# Holy Bible

## Aionian Edition®

मराठी समकालीन स्वतंत्र संस्करण

Marathi Contemporary Bible

AionianBible.org

जगातील पहिला पवित्र बायबल अनुवादित केलेला नाही

कॉपी आणि मुद्रित करण्यासाठी 100% विनामूल्य

त्याला असे सुद्धा म्हणतात “ जांभळा बायबल ”

*Holy Bible Aionian Edition* ®

मराठी समकालीन स्वतंत्र संस्करण

Marathi Contemporary Bible

Creative Commons Attribution ShareAlike 4.0 International, 2018-2025
Source text: eBible.org
Source version: 5/12/2025
Source copyright: Creative Commons Attribution ShareAlike 4.0
Biblica, Inc., 1978, 1982, 2008, 2022, 2024

Formatted by Speedata Publisher 5.1.7 (Pro) on 6/1/2025
100% Free to Copy and Print
TOR Anonymously
https://AionianBible.org

Published by Nainoia Inc, https://Nainoia-Inc.signedon.net
All profits are given to https://CoolCup.org

We pray for a modern Creative Commons translation in every language
Translator resources at https://AionianBible.org/Third-Party-Publisher-Resources
Report content and format concerns to Nainoia Inc
Volunteer help is welcome and appreciated!

*Celebrate Jesus Christ's victory of grace!*

# प्रस्तावना

मराठी at AionianBible.org/Preface

The *Holy Bible Aionian Edition* ® is the world's first Bible *un-translation*! What is an *un-translation*? Bibles are translated into each of our languages from the original Hebrew, Aramaic, and Koine Greek. Occasionally, the best word translation cannot be found and these words are transliterated letter by letter. Four well known transliterations are *Christ*, *baptism*, *angel*, and *apostle*. The meaning is then preserved more accurately through context and a dictionary. The Aionian Bible un-translates and instead transliterates eleven additional Aionian Glossary words to help us better understand God's love for individuals and all mankind, and the nature of afterlife destinies.

The first three words are *aiōn*, *aiōnios*, and *aïdios*, typically translated as *eternal* and also *world* or *eon*. The Aionian Bible is named after an alternative spelling of *aiōnios*. Consider that researchers question if *aiōn* and *aiōnios* actually mean *eternal*. Translating *aiōn* as *eternal* in Matthew 28:20 makes no sense, as all agree. The Greek word for *eternal* is *aïdios*, used in Romans 1:20 about God and in Jude 6 about demon imprisonment. Yet what about *aiōnios* in John 3:16? Certainly we do not question whether salvation is eternal! However, *aiōnios* means something much more wonderful than infinite time! Ancient Greeks used *aiōn* to mean *eon* or *age*. They also used the adjective *aiōnios* to mean *entirety*, such as *complete* or even *consummate*, but never infinite time. Read Dr. Heleen Keizer and Ramelli and Konstan for proofs. So *aiōnios* is the perfect description of God's Word which has *everything* we need for life and godliness! And the *aiōnios* life promised in John 3:16 is not simply a ticket to eternal life in the future, but the invitation through faith to the *consummate* life beginning now!

The next seven words are *Sheol*, *Hadēs*, *Geenna*, *Tartaroō*, *Abyssos*, and *Limnē Pyr*. These words are often translated as *Hell*, the place of eternal punishment. However, *Hell* is ill-defined when compared with the Hebrew and Greek. For example, *Sheol* is the abode of deceased believers and unbelievers and should never be translated as *Hell*. *Hadēs* is a temporary place of punishment, Revelation 20:13-14. *Geenna* is the Valley of Hinnom, Jerusalem's refuse dump, a temporal judgment for sin. *Tartaroō* is a prison for demons, mentioned once in 2 Peter 2:4. *Abyssos* is a temporary prison for the Beast and Satan. Translators are also inconsistent because *Hell* is used by the King James Version 54 times, the New International Version 14 times, and the World English Bible zero times. Finally, *Limnē Pyr* is the Lake of Fire, yet Matthew 25:41 explains that these fires are prepared for the Devil and his angels. So there is reason to review our conclusions about the destinies of redeemed mankind and fallen angels.

The eleventh word, *eleēsē*, reveals the grand conclusion of grace in Romans 11:32. Please understand these eleven words. The original translation is unaltered and a highlighted note is added to 64 Old Testament and 200 New Testament verses. To help parallel study and Strong's Concordance use, apocryphal text is removed and most variant verse numbering is mapped to the English standard. We thank our sources at eBible.org, Crosswire.org, unbound.Biola.edu, Bible4u.net, and NHEB.net. The Aionian Bible is copyrighted with creativecommons.org/licenses/by/4.0, allowing 100% freedom to copy and print, if respecting source copyrights. Check the Reader's Guide and read at AionianBible.org, with Android, and with TOR network. Why purple? King Jesus' Word is royal and purple is the color of royalty! All profits are given to CoolCup.org.

# History

मराठी at AionianBible.org/History

06/21/75 - Two boys, P. and J., wonder if Jesus saves all and pray.
04/15/85 - Aionian Bible conceived as B. and J. pray.
12/18/13 - Aionian Bible announced as J. and J. pray.
06/21/15 - Aionian Bible birthed as G. and J. pray.
01/11/16 - AionianBible.org domain registered.
06/21/16 - 30 translations available in 12 languages.
12/07/16 - Nainoia Inc established as non-profit corporation.
01/01/17 - Creative Commons Attribution No Derivatives 4.0 license added.
01/16/17 - Aionian Bible Google Play Store App published.
07/01/17 - 'The Purple Bible' nickname begins.
07/30/17 - 42 translations now available in 22 languages.
02/01/18 - Holy Bible Aionian Edition® trademark registered.
03/06/18 - Aionian Bibles available in print at Amazon.com.
09/15/18 - Aionian Bible dedicated as J. and J. pray again.
10/20/18 - 70 translations now available in 33 languages.
11/17/18 - 104 translations now available in 57 languages.
03/24/19 - 135 translations now available in 67 languages.
10/28/19 - Aionian Bible nursed as another J. and J. pray.
10/31/19 - 174 translations now available in 74 languages.
02/22/20 - Aionian Bibles available in print at Lulu.com.
05/25/20 - Illustrations by Gustave Doré, La Grande Bible de Tours, Felix Just.
08/29/20 - Aionian Bibles now available in ePub format.
12/01/20 - Right to left and Hindic languages now available in PDF format.
03/31/21 - 214 translations now available in 99 languages.
11/17/21 - Aionian Bible Branded Leather Bible Covers now available.
12/20/21 - Social media presence on Facebook, Twitter, LinkedIn, YouTube, etc.
01/01/22 - 216 translations now available in 99 languages.
01/09/22 - StudyPack resources for Bible translation study.
01/23/22 - Volunteers celebrate with pie and prayer.
02/14/22 - Strong's Concordance from Open Scriptures and STEPBible.
02/14/23 - Aionian Bible published on the TOR Network.
12/04/23 - Eleēsē added to the Aionian Glossary.
02/04/24 - 352 translations now available in 142 languages.
05/01/24 - 370 translations now available in 164 languages.
08/05/24 - 378 translations now available in 165 languages.
08/18/24 - Creative Commons Attribution 4.0 International, if source allows.
10/20/24 - Gospel Primer handout format.
11/24/24 - Progressive Web Application off-line format.
01/28/25 - All profits are given to CoolCup.org.
03/12/25 - 382 translations now available in 166 languages.
05/04/25 - 393 translations now available in 175 languages.
05/27/25 - 462 translations now available in 229 languages.

# अनुक्रमणिका

**जुना करार**


उत्पत्ती ....11
निर्गम ....49
लेवीय ....78
गणना ....100
अनुवाद ....129
यहोशुआ ....157
शास्ते ....175
रूथ ....193
1 शमुवेल ....196
2 शमुवेल ....220
1 राजे ....241
2 राजे ....264
1 इतिहास ....287
2 इतिहास ....307
एज्रा ....333
नहेम्याह ....340
एस्तेर ....351
इय्योब ....357
स्तोत्रसंहिता ....377
नीतिसूत्रे ....426
उपदेशक ....443
गीतरत्न ....449
यशायाह ....452
यिर्मयाह ....491
विलापगीत ....533
यहेज्केल ....537
दानीएल ....573
होशेय ....585
योएल ....591
आमोस ....594
ओबद्याह ....599
योनाह ....600
मीखाह ....602
नहूम ....606
हबक्कूक ....608
सफन्याह ....610
हाग्गय ....612
जखऱ्याह ....614
मलाखी ....620



**नवा करार**


मत्तय ....625
मार्क ....650
लूक ....666
योहान ....693
प्रेषित ....713
रोमकरांस ....740
1 करिंथकरांस ....751
2 करिंथकरांस ....762
गलातीकरांस ....770
इफिसकरांस ....774
फिलिप्पैकरांस ....778
कलस्सैकरांस ....781
1 थेस्सलनीकाकरांस ....784
2 थेस्सलनीकाकरांस ....787
1 तीमथ्य ....789
2 तीमथ्य ....792
तीता ....794
फिलेमोन ....796
इब्री ....797
याकोब ....805
1 पेत्र ....808
2 पेत्र ....811
1 योहान ....813
2 योहान ....816
3 योहान ....817
यहूदा ....818
प्रकटीकरण ....819


**परिशिष्ट**


वाचकांसाठी मार्गदर्शक
शब्दकोष
नकाशे
नशीब
चित्रे, Doré

# जुना करार




अशा रीतीने त्यांनी मनुष्याला एदेन बागेच्या बाहेर घालवून दिले आणि जीवनवृक्षाकडे कोणीही जाऊ नये यासाठी एदेन बागेच्या पूर्वेस करूबीम आणि प्रत्येक दिशेकडे फिरणारी एक ज्वालामय तलवार ठेवली.

उत्पत्ती 3:24

# उत्पत्ती

**1** परमेश्वराने प्रथम आकाश व पृथ्वी निर्माण केली. 2 आता पृथ्वी
निराकार आणि रिकामी होती, खोलवर अंधार पसरला होता आणि
परमेश्वराचा आत्मा पाण्यावर पाखर घालीत होता. 3 नंतर परमेश्वराने
म्हटले: “प्रकाश होवो” आणि प्रकाश झाला. 4 परमेश्वराने पाहिले की,
प्रकाश चांगला आहे आणि त्यांनी अंधारापासून प्रकाश वेगळा केला. 5
परमेश्वराने प्रकाशाला “दिवस” आणि अंधाराला “रात्र” असे नाव दिले
आणि संध्याकाळ झाली व सकाळ झाली; हा पहिला दिवस. 6 पुन्हा
परमेश्वराने म्हटले, “जलाशयाच्या मध्यभागी अंतराळ होवो आणि ते
जलापासून जलांची विभागणी करो.” 7 परमेश्वराने अंतराळ निर्माण
केले व अंतराळाच्या वरचे जल आणि खालचे जल अशी विभागणी केली
आणि तसे घडून आले. 8 परमेश्वराने अंतराळास “आकाश” असे नाव
दिले आणि संध्याकाळ झाली व सकाळ झाली; हा दुसरा दिवस. 9 नंतर
परमेश्वराने म्हटले: “अंतराळाखालील जले एकत्र येवो व कोरडी जमीन
दृष्टीस पडो” आणि तसे घडून आले. 10 परमेश्वराने कोरड्या जमिनीस
“भूमी” व जलांच्या संचयास “सागर” अशी नावे दिली. परमेश्वराने
पाहिले की, हे चांगले आहे. 11 मग परमेश्वराने म्हटले, “भूमीतून
वनस्पतीचा उपज होवो: निरनिराळी रोपे व झाडे, फळे देणारी व त्या
फळातच स्वजातीचे बीज असणाऱ्या फळझाडांचा भूमीतून उपज होवो”
आणि तसे घडून आले. 12 भूमीने वनस्पतीचा उपज केला: फळे देणारी
व त्या फळातच स्वजातीचे बीज असणारी फळझाडे भूमीने उपजविली.
परमेश्वराने पाहिले की हे चांगले आहे. 13 आणि संध्याकाळ झाली
व सकाळ झाली; हा तिसरा दिवस. 14 त्यानंतर परमेश्वराने म्हटले:
“दिवस आणि रात्र वेगळी करण्यासाठी आकाशात ज्योती होवोत व त्या
ऋतू, दिवस आणि वर्षे दाखविणारी चिन्हे होवोत. 15 पृथ्वीला प्रकाश
देण्यासाठी त्या ज्योती आकाशमंडळात दीप होवोत” आणि तसे घडून
आले. 16 परमेश्वराने दोन मोठ्या ज्योती निर्माण केल्या—दिवसावर
प्रभुत्व चालविण्यासाठी प्रखर आणि रात्रीवर प्रभुत्व चालविण्यासाठी
सौम्य प्रकाश. त्यांनी तारेही निर्माण केले. 17 परमेश्वराने त्या ज्योती
पृथ्वीवर प्रकाश पाडण्यासाठी आकाशमंडळात ठेवल्या, 18 दिवसावर
व रात्रीवर प्रभुत्व चालविण्यासाठी आणि प्रकाश व अंधार वेगळे
करण्यासाठी या ज्योती त्यांनी निर्माण केल्या. परमेश्वराने पाहिले की
हे चांगले आहे. 19 आणि संध्याकाळ झाली व सकाळ झाली; हा
चौथा दिवस. 20 आणि परमेश्वराने म्हटले, “जलांमध्ये विपुल प्रमाणात
जीवजंतू उत्पन्न होवोत आणि पक्षी पृथ्वीवर आकाशमंडळात विहार
करोत.” 21 सागरांमधील महाकाय प्राणी, तसेच जलांमध्ये संचार
करणारे व सर्व जातीचे प्राणी त्यांनी उत्पन्न केले. तसेच पंख असलेले
सर्व जातीचे पक्षीही त्यांनी उत्पन्न केले. परमेश्वराने पाहिले की हे
चांगले आहे. 22 परमेश्वराने त्यांना आशीर्वाद दिला आणि ते म्हणाले,
“फलद्रूप व्हा, बहुगुणित व्हा, समुद्रातील जले भरून टाका आणि
पृथ्वीवर पक्ष्यांची वृद्धी होवो.” 23 आणि संध्याकाळ झाली व सकाळ
झाली; हा पाचवा दिवस. 24 मग परमेश्वराने म्हटले, “प्रत्येक जातीच्या
जिवंत प्राण्याची निर्मिती होवो: गुरे, जमिनीवरील सरपटणारे प्राणी,
वनपशू यांच्या सर्व जाती पृथ्वीवर अस्तित्वात येवोत” आणि तसे घडून
आले. 25 परमेश्वराने वन्यप्राणी, पाळीव जनावरे, जमिनीवर सरपटत
जाणारे सर्व प्राणी, त्यांच्या जाती प्रमाणे त्यांनी निर्माण केले आणि
परमेश्वराने पाहिले की ते चांगले आहे. 26 मग परमेश्वराने म्हटले:
“आपल्यासारखी, आपल्या प्रतिरूपाची मानवजात आपण निर्माण करू
या. समुद्रातील मासे आणि आकाशातील पक्षी, गुरे, सर्व वनपशू आणि
जमिनीवर सरपटणाऱ्या प्रत्येक प्राण्यांवर त्यांनी सत्ता चालवावी.” 27
याप्रमाणे परमेश्वराने आपल्या प्रतिरूपाची मानवजात निर्माण केली.
त्यांनी आपल्या प्रतिरूपातच त्यांना निर्माण केले. पुरुष व स्त्री असे
त्यांनी निर्माण केले. 28 मग परमेश्वराने त्यांना आशीर्वाद दिला आणि ते
त्यांना म्हणाले, “फलद्रूप व्हा, बहुगुणित व्हा आणि पृथ्वी व्यापून टाका;
ती आपल्या सत्तेखाली आणा. समुद्रातील मासे, आकाशातील पक्षी
आणि पृथ्वीवर संचार करणाऱ्या प्रत्येक सजीव प्राण्यावर अधिकार
गाजवा.” 29 मग परमेश्वर म्हणाले, “पाहा, भूतलावर बीज देणारी प्रत्येक
वनस्पती आणि फळांमध्येच वृक्ष निर्माण करणारे बीज असलेले प्रत्येक
फळझाड मी तुम्हाला दिले आहे. ती तुमचे अन्न होतील. 30 त्याप्रमाणे
पृथ्वीतलावरील सर्व पशू, आकाशातील प्रत्येक पक्षी, तसेच जमिनीवर
सरपटत जाणारा, जीवनाचा श्वास असलेला प्रत्येक प्राणी—यांना
अन्न म्हणून मी हिरवी वनस्पती देत आहे” आणि तसे घडून आले.
31 परमेश्वराने आपण निर्माण केलेली प्रत्येक गोष्ट पाहिली आणि ती
अतिशय चांगली होती आणि संध्याकाळ झाली व सकाळ झाली; हा
सहावा दिवस.

**2** अशा रीतीने आकाश, पृथ्वी व त्यातील सर्वांची निर्मिती पूर्ण झाली.
2 परमेश्वराने सातव्या दिवसापर्यंत त्यांचे काम संपविले, म्हणून
सातव्या दिवशी त्यांच्या सर्व कामापासून त्यांनी विश्रांती घेतली. 3
सातव्या दिवसाला आशीर्वाद देऊन परमेश्वराने तो पवित्र केला; कारण
निर्मितीचे संपूर्ण कार्य संपवून त्यांनी सातव्या दिवशी विश्रांती घेतली. 4
याहवेह परमेश्वराने आकाश व पृथ्वी निर्माण केली, त्याचा हा वृतांत
आहे: जेव्हा याहवेह परमेश्वराने पृथ्वी व आकाशाची निर्मिती केली. 5
जमिनीवर अद्याप वनस्पती उगवली नव्हती, कारण याहवेह परमेश्वराने
अजून पाऊस पाडला नव्हता आणि जमिनीची मशागत करण्यासाठी
कोणी मनुष्य नव्हता. 6 मात्र जमिनीवरून धुके वर जात असे आणि
त्याने जमिनीच्या सर्व पृष्ठभागाचे सिंचन होत असे. 7 मग याहवेह
परमेश्वराने जमिनीवरील धूळ घेऊन तिचा मनुष्य घडविला व त्याच्या
नाकपुड्यांत त्यांनी जीवन देणारा श्वास फुंकला; तेव्हा मनुष्य सजीव
प्राणी झाला. 8 नंतर याहवेह परमेश्वराने पूर्वेकडे, एदेनमध्ये एक बाग
लावली आणि त्या बागेत आपण घडविलेल्या मनुष्याला ठेवले. 9
याहवेह परमेश्वराने सर्व प्रकारची झाडे जमिनीतून उगवली—डोळयांना
आनंद देणारे व खाण्यास उत्तम असलेले जीवनवृक्ष आणि बऱ्यावाईटाचे
ज्ञान करून देणारा वृक्ष हे देखील बागेच्या मध्यभागी लावले. 10 बागेला

पाणी देण्यासाठी एदेनात एक नदी उगम पावली व वाहू लागली आणि
ती विभागून तिच्या चार नद्या झाल्या 11 पहिल्या नदीचे नाव पीशोन
असून ती सोने असलेल्या हवीला प्रदेशाला वेढा घालून वाहते. 12
त्या प्रदेशातील सोने उत्तम प्रतीचे असून तिथे मोती व गोमेद रत्नेही
सापडतात. 13 दुसऱ्या नदीचे नाव गीहोन असून ती कूशच्या सर्व
प्रदेशाभोवती वाहत जाते. 14 तिसऱ्या नदीचे नाव हिद्दकेल असून ती
अश्शूरच्या पूर्वेस वाहत जाते; आणि चौथ्या नदीचे नाव फरात असे आहे.
15 याहवेह परमेश्वराने मनुष्याला एदेन बागेत नेऊन तिची मशागत व
राखण करण्यास ठेवले. 16 याहवेह परमेश्वराने मनुष्याला आज्ञा केली,
“बागेतील वाटेल त्या झाडाचे फळ तू खुशाल खा; 17 परंतु बऱ्यावाईटाचे
ज्ञान करून देणाऱ्या वृक्षाचे फळ मात्र तू खाऊ नकोस, कारण ज्या
दिवशी तू ते फळ खाशील त्या दिवशी तू निश्चित मरशील.” 18 याहवेह
परमेश्वर म्हणाले, “मनुष्याने एकटे असावे हे बरे नाही; मी त्याच्यासाठी
एक योग्य मदतनीस निर्माण करेन.” 19 याहवेह परमेश्वराने भूमीपासून
प्रत्येक जातीचे वन्यपशू, आकाशातील सर्व पक्षी निर्माण केले. त्यांना
मानव कोणती नावे देतो हे पाहण्याकरिता त्याच्याकडे आणले; आणि
त्याने जी नावे दिली तीच त्यांची नावे पडली. 20 याप्रकारे मानवाने
सर्व पाळीव प्राण्यांना, आकाशातील पक्ष्यांना आणि जमिनीवरील सर्व
पशूंना नावे दिली. परंतु आदामाला योग्य असा मदतनीस त्यांच्यामध्ये
नव्हता. 21 नंतर याहवेह परमेश्वराने मानवाला गाढ निद्रा आणली आणि
तो झोपेत असताना याहवेह परमेश्वराने त्याची एक फासळी काढली
आणि ती जागा त्यांनी मांसाने भरून काढली. 22 याहवेह परमेश्वराने
मानवाची जी फासळी काढली, त्याची त्यांनी एक स्त्री निर्माण केली
आणि तिला त्यांनी मानवाकडे आणले. 23 तेव्हा मानव म्हणाला, “ही
माझ्या हाडाचे हाड आणि मांसाचे मांस आहे; हिला नारी असे म्हणतील,
कारण ती नरापासून बनविली आहे.” 24 या कारणासाठी पुरुष आपल्या
आईवडिलांना सोडून आपल्या पत्नीशी जडून राहील आणि ती एकदेह
होतील. 25 आदाम आणि त्याची पत्नी हे दोघेही नग्न होती, परंतु त्यांना
लज्जा वाटत नव्हती.

**3** आता याहवेह परमेश्वराने निर्माण केलेल्या सर्व वन्यप्राण्यांमध्ये सर्प
सर्वात धूर्त होता. त्याने स्त्रीला म्हटले, “बागेतील कोणत्याही झाडाचे
फळ तुम्ही खाऊ नये असे परमेश्वराने खरोखरच म्हटले आहे काय?” 2
स्त्री सर्पाला म्हणाली, “आम्हाला बागेतील झाडांची फळे खाण्याची
मुभा आहे. 3 पण परमेश्वर म्हणाले, ‘बागेच्या मध्यभागी असलेल्या
झाडाचे फळ खाऊ नका आणि त्याला स्पर्शही करू नका, असे केल्यास
तू मरशील.’” 4 पण सर्प त्या स्त्रीला म्हणाला, “तुम्ही निश्चितच मरणार
नाही, 5 कारण परमेश्वराला हे माहीत आहे की ज्या दिवशी ते फळ
तुम्ही खाल, त्या दिवशी तुमचे डोळे उघडतील आणि चांगले व वाईट
यातील फरक तुम्हाला समजेल आणि तुम्ही परमेश्वरासारखे व्हाल.” 6
जेव्हा स्त्रीने पाहिले की खाण्यास योग्य, दिसण्यास सुंदर आणि सुज्ञ
करणारे ते झाड आहे, तेव्हा तिने त्याच्या फळातील काही तोडून घेतले
आणि खाल्ले आणि आपला पती, जो तिच्यासोबत होता, त्यालाही दिले
आणि त्याने ते खाल्ले. 7 पण मग त्यांचे डोळे उघडले आणि आपण
नग्न असल्याचे त्यांना समजले; नंतर त्यांनी स्वत:साठी अंजिराच्या
पानांची कटिवेष्टने केली. 8 सायंकाळी याहवेह परमेश्वर बागेतून फिरत
असल्याचा आवाज त्यांनी ऐकला आणि आदाम व त्याची पत्नी, याहवेह
परमेश्वरापासून बागेतील झाडामागे लपली. 9 परंतु याहवेह परमेश्वराने
आदामाला हाक मारून म्हटले, “तू कुठे आहेस?” 10 आदाम म्हणाला,
“बागेत मी तुमचा आवाज ऐकला आणि मला भीती वाटली, कारण मी
नग्न होतो; त्यामुळे लपून बसलो.” 11 याहवेह म्हणाले, “तू नग्न आहेस
हे तुला कोणी सांगितले? ज्या झाडाचे फळ खाऊ नकोस, अशी मी तुला
आज्ञा केली होती, त्या झाडाचे फळ तू खाल्लेस काय?” 12 त्यावर
आदाम म्हणाला, “जी स्त्री तुम्ही माझ्या सोबतीला दिली; तिने मला त्या
झाडाची फळे दिली आणि मी ती खाल्ली.” 13 तेव्हा याहवेह परमेश्वर
त्या स्त्रीला म्हणाले, “तू हे काय केलेस?” त्यावर ती स्त्री म्हणाली,
“सर्पाने मला भुरळ पाडली आणि मी ते फळ खाल्ले.” 14 याहवेह
परमेश्वर सर्पाला म्हणाले, “कारण तू हे केलेस म्हणून, “तू सर्व पाळीव
प्राण्यांहून, आणि सर्व वन्यपशूहून अधिक शापित आहेस! तू तुझ्या
पोटावर सरपटशील आणि तुझ्या आयुष्याचे सर्व दिवस माती खाशील.
15 तू आणि स्त्री, तुझी संतती आणि तिची संतती यामध्ये मी शत्रुत्व
निर्माण करेन; तिचे संतान तुझे मस्तक चिरडेल आणि तू त्याची टाच
फोडशील.” 16 नंतर परमेश्वर स्त्रीला म्हणाले, “तुझ्या प्रसूतिकाळात
मी तुझे क्लेश अत्यंत वाढवेन; वेदनांनी तू तुझ्या संतानास जन्म देशील,
तुझ्या पतीकडे तुझी ओढ राहील, आणि तो तुजवर सत्ता गाजवील.”
17 नंतर ते आदामाला म्हणाले, “तू तुझ्या पत्नीचे ऐकलेस आणि ज्या
झाडाचे फळ तू खाऊ नकोस, अशी मी तुला आज्ञा केली होती, ते
खाल्लेस म्हणून आता, “तुझ्यामुळे भूमी शापित झाली आहे; तू तुझ्या
आयुष्याचे सर्व दिवस अत्यंत क्लेशमय कष्ट करून तिचा उपज खाशील.
18 भूमी तुझ्यासाठी काटे आणि कुसळे उगवील, आणि तू शेतातील
पीक खाशील. 19 ज्यामधून तू घडविला गेलास त्या मातीत परत जाऊन
मिळेपर्यंत तू घाम गाळून अन्न खाशील, कारण तू माती आहेस आणि तू
मातीतच परत जाऊन मिळशील.” 20 आदामाने आपल्या पत्नीचे नाव
हव्वा असे ठेवले, कारण ती सर्व सजिवांची माता होती. 21 याहवेह
परमेश्वराने आदामासाठी आणि त्याच्या पत्नीसाठी चर्मवस्त्रे केली आणि
त्यांना ती घातली. 22 नंतर याहवेह परमेश्वर म्हणाले, “पाहा, मानव
आपल्यापैकी एक आणि आपल्यासारखा झाला आहे; तो बरे आणि
वाईट यातील फरक समजू लागला आहे. परंतु आता जीवनवृक्षाचे
फळ त्याच्या हाती लागून त्याने ते तोडून खाऊ नये, कारण मग तो
सदासर्वकाळ जिवंत राहील.” 23 म्हणून याहवेह परमेश्वराने मनुष्याला
ज्या भूमीतून निर्माण केले होते तिची मशागत करण्यासाठी त्या एदेन
बागेतून घालवून दिले. 24 अशा रीतीने त्यांनी मनुष्याला एदेन बागेच्या
बाहेर घालवून दिले आणि जीवनवृक्षाकडे कोणीही जाऊ नये यासाठी
एदेन बागेच्या पूर्वेस करूबीम आणि प्रत्येक दिशेकडे फिरणारी एक
ज्वालामय तलवार ठेवली.

4 मग आदामाने आपली पत्नी हव्वा हिच्याशी प्रीती संबंध केला,
तेव्हा ती गर्भवती झाली आणि तिने काईन नावाच्या मुलाला जन्म
दिला. ती म्हणाली, “याहवेहच्या साहाय्याने मी एका पुरुषाला प्राप्त
केले आहे.” 2 नंतर तिने त्याचा भाऊ हाबेलास जन्म दिला. हाबेल
मेंढपाळ होता आणि काईन शेतीकाम करीत होता. 3 हंगामाचे वेळी
काईनाने याहवेहला दान देण्यासाठी आपल्या जमिनीतील काही उत्पन्न
आणले. 4 हाबेलानेही आपल्या मेंढरातील प्रथम जन्मलेली धष्टपुष्ट
मेंढरे आणून परमेश्वराला अर्पण केली. याहवेहने हाबेलाच्या अर्पणास
प्रीतीने ग्रहण केले, 5 पण काईनाच्या अर्पणास प्रीतीने ग्रहण केले नाही,
म्हणून त्याला खूप राग आला आणि त्याचा चेहरा उतरला. 6 याहवेहने
काईनला विचारले, “तू का संतापलास? तुझ्या चेहर्‍यावर निराशा का
दिसते? 7 तू योग्य ते केलेस तर तुझाही स्वीकार केला जाणार नाही
काय? पण तू योग्य ते करण्याचे नाकारशील तर सावध राहा, तुझा
सर्वनाश करावा म्हणून पाप तुझ्या दारावर हल्ला करण्यास टपून बसले
आहे; पण त्यावर तू विजय मिळव.” 8 एके दिवशी काईन आपला भाऊ
हाबेलास म्हणाला, “चल, आपण शेतात जाऊ.” त्याप्रमाणे शेतात
गेल्यावर काईनाने आपल्या भावावर हल्ला करून त्याचा वध केला. 9
मग याहवेहने काईनाला विचारले, “तुझा भाऊ हाबेल कुठे आहे?”
“मला माहीत नाही.” त्याने प्रत्युत्तर दिले. “मी काय माझ्या भावाचा
राखणदार आहे?” 10 याहवेह त्याला म्हणाले, “तू हे काय केलेस?
आता ऐक, तुझ्या भावाचे रक्त मला जमिनीतून हाक मारीत आहे. 11
ज्या भूमीने तुझ्या भावाचे रक्त स्वीकारण्यास आपले मुख उघडले आहे,
त्या भूमीतून तुला हद्दपार करण्यात आले आहे आणि तू शापित आहेस.
12 त्या भूमीवर तू कष्ट केलेस तरी ती तुला उपज देणार नाही. तू बेचैन
असा पृथ्वीवर भटकशील.” 13 काईन याहवेहला म्हणाला, “मला
मिळालेली शिक्षा माझ्या सहनशक्तीच्या पलीकडे आहे. 14 कारण तुम्ही
मला माझ्या शेतातून हद्दपार केले आहे आणि तुमच्या सानिध्यापासून
दूर केले आहे; मी पृथ्वीवर बेचैन असा भटकणारा होईन, जो कोणी
मला पाहील, तो मला ठार करेल.” 15 यावर याहवेहने त्याला उत्तर
दिले, “असे होणार नाही, जर कोणी काईनाचा जीव घेईल, तर त्याला
मी तुला दिलेल्या शिक्षेपेक्षा सातपट शिक्षा देईन” आणि मग त्याचा वध
कोणीही करू नये, असा इशारा देणारी एक खूण याहवेहने काईनावर
केली. 16 मग काईन याहवेहच्या समक्षतेतून निघून गेला आणि एदेन
बागेच्या पूर्वेस असलेल्या नोद नावाच्या देशात वस्ती करून राहिला. 17
पुढे काईनाने त्याच्या पत्नीशी वैवाहिक प्रीती संबंधात प्रवेश केला आणि
ती गर्भवती झाली. तिने हनोख नावाच्या पुत्राला जन्म दिला. त्यावेळी
काईन एक नगर बांधत होता, त्याने आपल्या पुत्राचे, हनोख हे नाव त्या
नगराला दिले. 18 हनोखपासून ईराद झाला आणि ईराद हा महूयाएलचा
पिता, महूयाएल हा मथुशाएलचा पिता, मथुशाएल हा लामेखाचा पिता
होता. 19 लामेखाने आदाह व सिल्ला या दोन स्त्रियांशी लग्न केले.
20 आदाह हिला याबाल नावाचा पुत्र झाला. तो गुरे पाळणार्‍या व
तंबू ठोकून राहणार्‍या लोकांचा मूळ पुरुष झाला. 21 त्याच्या भावाचे
नाव युबाल असे होते. तो पहिला संगीतकार असून वीणा व बासरी
ही वाद्ये वाजविणार्‍यांचा मूळ पुरुष झाला. 22 लामेखाची दुसरी स्त्री
सिल्ला हिला तुबल-काईन झाला. तो कास्य व लोखंड यांची हत्यारे
बनविणार्‍यांचा मूळ पुरुष झाला. तुबल—काईनास नामाह नावाची
बहीण होती. 23 एके दिवशी लामेख आपल्या पत्नींना म्हणाला, आदाह
व सिल्ला माझे ऐका, “लामेखाच्या पत्नींनो, माझे बोलणे ऐका. एका
तरुणाने माझ्यावर हल्ला करून मला जखमी केले. पण त्या तरुणाला
मी ठार मारले आहे. 24 जर काईनाबद्दल सातपट तर लामेखाबद्दल
सत्याहत्तरपट सूड घेतला जाईल.” 25 आदामाने हव्वेशी पुन्हा प्रीती
संबंध केला आणि हव्वेने पुत्राला जन्म दिला. तिने त्याचे नाव शेथ असे
ठेवले, कारण ती म्हणाली, “काईनाने ठार केलेल्या हाबेल या माझ्या
पुत्राच्या जागी परमेश्वराने मला दुसरा पुत्र दिला आहे.” 26 शेथ मोठा
झाल्यावर त्यालाही एक पुत्र झाला, त्याचे नाव अनोश असे ठेवले.
त्याच्या हयातीत लोकांनी याहवेहच्या नावाने आराधना करण्यास प्रारंभ
केला.

5 ही आदामाची लिखित वंशावळी आहे. जेव्हा परमेश्वराने मानवजातीला
निर्माण केले, त्यांनी त्याला आपल्या प्रतिरूपात घडविले. 2
परमेश्वराने त्यांना पुरुष व स्त्री असे निर्माण केले. त्यांनी त्यांना आशीर्वाद
दिला आणि त्यांना “मानवजात” असे नाव दिले. 3 आदाम 130 वर्षाचा
झाला तेव्हा त्याला त्याच्या स्वतःच्या प्रतिरूपात, त्याच्या स्वतःच्या
प्रतिमेत एक मुलगा झाला; त्याने त्याचे नाव शेथ ठेवले. 4 शेथच्या
जन्मानंतर आदाम आणखी आठशे वर्षे जगला. याकाळात त्याला
आणखी पुत्र व कन्या झाल्या. 5 आदाम एकंदर 930 वर्षे जगला आणि
नंतर त्याचा मृत्यू झाला. 6 शेथ 105 वर्षाचा झाला, तेव्हा त्याला
अनोश झाला. 7 अनोशचा पिता झाल्यावर शेथ 807 वर्षे जगला आणि
त्याला आणखी पुत्र व कन्या झाल्या. 8 शेथ एकंदर 912 वर्षे जगला
आणि नंतर त्याचा मृत्यू झाला. 9 अनोश नव्वद वर्षाचा झाला तेव्हा
त्याला केनान झाला. 10 केनानचा पिता झाल्यावर अनोश 815 वर्षे
जगला आणि त्याला आणखी पुत्र व कन्या झाल्या. 11 अनोश एकंदर
905 वर्षे जगला आणि नंतर त्याचा मृत्यू झाला. 12 केनान सत्तर
वर्षाचा झाला तेव्हा तो महलालेलाचा पिता झाला. 13 महलालेलाचा
पिता झाल्यावर केनान 840 वर्षे जगला आणि त्याला आणखी पुत्र व
कन्या झाल्या. 14 केनान एकंदर 910 वर्षे जगला आणि नंतर त्याचा
मृत्यू झाला. 15 महलालेल 65 वर्षाचा झाला तेव्हा तो यारेदाचा पिता
झाला. 16 यारेदाचा पिता झाल्यावर महलालेल 830 वर्षे जगला आणि
त्याला आणखी पुत्र व कन्या झाल्या. 17 महलालेल एकंदर 895 वर्षे
जगला आणि नंतर त्याचा मृत्यू झाला. 18 यारेद 162 वर्षाचा झाला
तेव्हा तो हनोखाचा पिता झाला. 19 हनोखाचा पिता झाल्यावर यारेद
800 वर्षे जगला आणि त्याला आणखी पुत्र व कन्या झाल्या. 20 यारेद
एकंदर 962 वर्षे जगला आणि नंतर त्याचा मृत्यू झाला. 21 हनोख
65 वर्षाचा झाला तेव्हा तो मथुशेलहाचा पिता झाला. 22 मथुशेलहाचा
पिता झाल्यावर हनोख परमेश्वरासोबत विश्वासूपणे 300 वर्षे चालला

आणि त्याला आणखी पुत्र व कन्या झाल्या. 23 हनोख एकंदर 365
वर्षे जगला. 24 हनोख परमेश्वरासोबत विश्वासूपणे चालत असताना
तो अदृश्य झाला, कारण परमेश्वराने त्याला नेले. 25 मथुशेलह 187
वर्षांचा झाला तेव्हा तो लामेखाचा पिता झाला. 26 लामेखाचा पिता
झाल्यानंतर मथुशेलह 782 वर्षे जगला आणि त्याला आणखी पुत्र
व कन्या झाल्या. 27 मथुशेलह एकंदर 969 वर्षे जगला आणि नंतर
त्याचा मृत्यू झाला. 28 लामेख 182 वर्षांचा झाल्यावर त्याला पुत्र
झाला. 29 त्याने त्याचे नाव नोआह असे ठेवले, कारण तो म्हणाला,
“शाप दिलेली भूमी कसण्याच्या अवघड कामापासून याहवेह आम्हाला
विसावा देतील.” 30 नोआहच्या जन्मानंतर लामेख 595 वर्षे जगला
आणि त्याला आणखी पुत्र व कन्या झाल्या. 31 लामेख एकंदर 777
वर्षे जगला आणि नंतर त्याचा मृत्यू झाला. 32 नोआह 500 वर्षांचा
झाला तेव्हा तो शेम, हाम व याफेथ यांचा पिता झाला.

**6** पृथ्वीवर मानवाची संख्या खूप वाढू लागली आणि त्यांना कन्या
झाल्या. 2 परमेश्वराच्या पुत्रांनी बघितले की मानवाच्या कन्या सुंदर
आहेत; आणि आपल्या आवडीप्रमाणे त्यांनी त्यांच्याशी विवाह केला. 3
तेव्हा याहवेह म्हणाले, “माझा आत्मा मानवासोबत वादविवाद करीत
राहणार नाही, कारण ते दैहिक आहेत आणि त्यांचा जीवनकाल एकशेवीस
वर्षे असेल.” 4 त्या दिवसात—आणि नंतरच्या काळातही—महाबलाढ्य
मानव पृथ्वीवर वास करीत होते, जेव्हा परमेश्वराच्या पुत्रांनी मानवकन्यांशी
विवाह केला, त्यांना संतती झाली. तेच जुन्या काळातील समर्थ आणि
प्रसिद्ध मानव झाले. 5 पृथ्वीवर मानवामध्ये दुष्टाई खूप वाढलेली आहे
आणि त्यांचे विचार आणि कल्पना या सतत दुष्टाईच्याच असतात हे
याहवेहने पाहिले. 6 आपण मनुष्य निर्माण केल्याचा याहवेहला पश्चात्ताप
झाला आणि त्यांच्या हृदयाला अतोनात वेदना झाल्या. 7 म्हणून याहवेह
म्हणाले, “मी निर्माण केलेल्या मानवजातीला पृथ्वीतलावरून नष्ट
करेन—त्यांच्यासह पशू, सरपटणारे प्राणी, आकाशातील पक्षी यांनाही
नष्ट करेन—कारण त्यांना निर्माण केल्याचा मला पश्चात्ताप होत आहे.”
8 परंतु नोआहवर याहवेहची कृपादृष्टी झाली. 9 नोआह आणि त्याच्या
कुटुंबाचा वृतांत असा. नोआह आपल्या काळाच्या पिढीत एक नीतिमान
आणि निर्दोष मनुष्य होता आणि तो परमेश्वरासोबत विश्वासूपणे चालला.
10 नोआहला शेम, हाम व याफेथ हे तीन पुत्र झाले. 11 परमेश्वराच्या
दृष्टीने पृथ्वी पापाने भ्रष्ट झालेली आणि हिंसाचाराने पूर्णपणे भरलेली
होती. 12 जग किती पातकी झाले आहे आणि समस्त मानवजात किती
भ्रष्ट झाली आहे हे परमेश्वराने पाहिले. 13 तेव्हा परमेश्वर नोआहला
म्हणाले, “मी सर्व मनुष्यांचा नाश करेन, कारण त्यांच्यामुळे पृथ्वी
हिंसाचाराने भरून गेली आहे. मी निश्चितपणे त्यांचा आणि पृथ्वीचा
नाश करणार आहे. 14 तू आपल्याकरिता गोफेर लाकडाचे एक तारू
तयार कर; त्यात कोठड्या बनव आणि त्याला आतून व बाहेरून डांबर
लाव. 15 ते अशा प्रकारे तयार कर: तारू तीनशे हात लांब, पन्नास
हात रुंद आणि तीस हात उंच असावे. 16 त्याकरिता छत तयार कर,
तारवाला वरच्या बाजूला एक खिडकी कर. ही खिडकी छतापासून
खाली सभोवती एक हात उंच असावी. तसेच तारवाला वरचा, मधला
आणि खालचा असे तीन मजले बांध आणि तारवाच्या एका बाजूला दार
कर. 17 मी पृथ्वी महापुराने भरून टाकणार आहे आणि आकाशाखाली
ज्यामध्ये जीवनाचा श्वास आहे, अशा प्रत्येक सजीव प्राण्याचा मी नाश
करणार आहे. पृथ्वीवर जे काही आहे त्याचा नाश होईल. 18 परंतु मी
तुझ्यासोबत करार स्थापित करेन—तू आणि तुझे पुत्र आणि तुझी पत्नी
व तुझ्या पुत्रांच्या पत्नी हे तारवात प्रवेश करतील. 19 तू प्रत्येक जातीचे
दोन-दोन पशू, एक नर व एक मादी, अशा जोड्या जिवंत राखण्यासाठी
आपल्याबरोबर तारवात घेऊन ये. 20 प्रत्येक प्रकारचे पक्षी, प्रत्येक
प्रकारचे प्राणी आणि जमिनीवर सरपटणारे प्रत्येकी दोन-दोन प्राणी
जिवंत राहण्यासाठी तुझ्याकडे येतील. 21 आणि खावयाचे सर्वप्रकारचे
अन्न घे आणि ते स्वत:साठी आणि त्यांच्यासाठी साठवून ठेव.” 22
परमेश्वराने आज्ञा दिल्याप्रमाणेच नोआहने सर्वकाही केले.

**7** याहवेह नोआहला म्हणाले, “तू आणि तुझे पूर्ण कुटुंब तारवात जा,
कारण या पिढीत तूच नीतिमान असल्याचे मला आढळले आहे. 2
तुझ्याबरोबर शुद्ध अशा प्राण्यांच्या प्रत्येक जातीच्या नर व मादी अशा
सात जोड्या आणि अशुद्ध प्राण्यांच्या प्रत्येक जातीची नर व मादी
अशी एकच जोडी ने, 3 आणि प्रत्येक जातीच्या पक्ष्याच्या नरमादीच्या
सात जोड्या, म्हणजे पृथ्वीवर त्यांचे विविध प्रकार जिवंत राहतील. 4
आजपासून बरोबर सात दिवसानंतर मी पृथ्वीवर चाळीस दिवस आणि
चाळीस रात्र पाऊस पाडेन आणि मी निर्माण केलेल्या सर्व जिवंत
प्राण्यांना पृथ्वीवरून नष्ट करून टाकेन.” 5 याहवेहने दिलेल्या आज्ञेप्रमाणे
नोआहने सर्वकाही केले. 6 जलप्रलय आला, तेव्हा नोआह सहाशे
वर्षांचा होता. 7 जलप्रलयापासून वाचण्यासाठी नोआह आणि त्याचे पुत्र
आणि त्याची पत्नी, व पुत्रांच्या पत्नी यांनी तारवात प्रवेश केला. 8
तारवात त्याच्याबरोबर शुद्ध आणि अशुद्ध पशू, पक्षी व सरपटणारे प्राणी
होते. 9 परमेश्वराने नोआहला आज्ञा दिल्याप्रमाणे ते सर्व प्राणी नर व
मादी अशा जोडीने तारवात आले. 10 आणि सात दिवसानंतर पृथ्वीवर
जलप्रलय आला. 11 नोआहच्या आयुष्याच्या सहाशेव्या वर्षात, दुसऱ्या
महिन्याच्या सतराव्या दिवशी—त्याच दिवशी पृथ्वीच्या पोटातील सर्व
झऱ्यातील पाणीही उफाळून वर आले आणि आकाशाची दारे उघडली.
12 आणि पृथ्वीवर आकाशातून चाळीस दिवस आणि चाळीस रात्र
पाऊस पडला. 13 त्याच दिवशी नोआह आणि त्याचे पुत्र शेम, हाम
व याफेथ, त्यांच्यासोबत त्याची पत्नी आणि त्याच्या मुलांच्या पत्नी
तारवात गेले. 14 त्यांच्याबरोबर प्रत्येक वन्यजातीचे प्राणी, सर्वप्रकारचे
पाळीव पशू, जमिनीवर सरपटणारे प्राणी आणि प्रत्येक जातीचे, पंख
असलेले सर्व पक्षी तारवात गेले. 15 ज्यांच्यामध्ये जीवनाचा श्वास
आहे, अशा प्रत्येक जातीच्या प्राण्यांची एकएक जोडी नोआहकडे आली
आणि त्यांनी नोआहसोबत तारूत प्रवेश केला. 16 नर व मादी असे
ते परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे जोडीजोडीने आले. मग याहवेहने त्यांना
आत ठेवून तारवाचे दार बंद केले. 17 जलप्रलय चाळीस दिवस चालू
होता. यामुळे सर्व पृथ्वी पाण्याने व्यापून गेली आणि तारू पृथ्वीच्यावर

पाण्यात तरंगू लागले. 18 पाणी जमिनीवर वाढू लागले आणि तारू
पाण्याच्या पृष्ठभागावर तरंगू लागले. 19 शेवटी पाणी इतके वाढले की,
आकाशाखाली असलेले सर्व उंच पर्वतदेखील बुडून गेले. 20 पाणी वाढले
आणि पर्वतांना पंधरा हातापेक्षा जास्त खोलीपर्यंत झाकले. 21 पृथ्वीवर
जिवंत असलेले सर्व प्राणी नष्ट झाले—त्यात आकाशातील पक्षी,
पाळीव जनावरे, वन्यपशू, सरपटणारे प्राणी आणि अखिल मानवजात
या सर्वांचा समावेश होता. 22 कोरड्या जमिनीवर राहणारा, श्वास घेणारा
प्रत्येक प्राणी मरण पावला. 23 पृथ्वीवर असलेल्या प्रत्येक सजिवांचा
नाश झाला; मानव आणि प्राणी आणि सरपटणारे प्राणी आणि पक्षी
पृथ्वीवरून नाहीसे झाले. फक्त नोआह आणि त्याच्यासोबत तारवात
असलेलेच वाचले. 24 पृथ्वी पाण्याच्या पुराखाली दीडशे दिवस राहिली.

**8** परमेश्वराने नोआह आणि तारवातील सर्व पाळीव व वन्यप्राण्यांचे
स्मरण केले. त्यांनी पृथ्वीवरून वाहण्यासाठी वारा पाठविला आणि
पुराचे पाणी ओसरू लागले. 2 पृथ्वीतलातील पाण्याचे झरे उफाळण्याचे
थांबले आणि आकाशातील जलप्रलयाची दारे बंद झाली, आकाशातून
पडणारा पाऊसही थांबला. 3 पृथ्वीवरून पाणी सतत कमी होत
गेले. दीडशे दिवस उलटल्यानंतर पाणी ओसरले. 4 आणि सातव्या
महिन्याच्या सतराव्या दिवशी तारू अरारात पर्वतावर स्थिरावले. 5 पाणी
ओसरू लागले व दहाव्या महिन्यापर्यंत पाणी सतत ओसरत होते आणि
दहाव्या महिन्याच्या पहिल्या दिवशी पर्वतांची शिखरे दिसू लागली. 6
आणखी चाळीस दिवसानंतर नोआहने तारवात बनविलेली खिडकी
उघडली 7 आणि त्याने एक कावळा बाहेर सोडला. तो पृथ्वीवरील सर्व
पाणी ओसरेपर्यंत तारवातून येणे जाणे करीत होता. 8 दरम्यान नोआहने
एका कबुतराला, पृथ्वीवरील पाणी ओसरले की नाही हे पाहण्यासाठी
बाहेर सोडले. 9 परंतु ते कबुतर त्याच्याकडे परत आले, कारण अजूनही
पाणी पृथ्वीवर बरेच वर असल्यामुळे त्याला उतरावयाला कुठेही जागा
मिळाली नाही. म्हणून नोआहने आपला हात बाहेर काढून कबुतराला
परत तारवात घेतले. 10 आणखी सात दिवस थांबून नोआहने तारवातून
ते कबुतर पुन्हा बाहेर सोडले. 11 संध्याकाळी कबुतर जेव्हा त्याच्याकडे
परत आले, तेव्हा त्याच्या चोचीत एक ताजे जैतुनाचे पान होते! मग
नोआहला समजले की पृथ्वीवरून पाणी ओसरले आहे. 12 मग आणखी
सात दिवस थांबून त्याने ते कबुतर पुन्हा बाहेर सोडले, परंतु यावेळी ते
परत आले नाही. 13 नोआहच्या सहाशे एकाव्या वर्षी, पहिल्या वर्षाच्या,
पहिल्या महिन्याच्या पहिल्या दिवशी, पृथ्वीवरील पाणी वाळले. मग
नोआहने तारवाचे दार उघडून बाहेर पाहिले, तेव्हा पृथ्वी कोरडी झाल्याचे
त्याला दिसून आले. 14 दुसऱ्या महिन्याच्या सत्ताविसाव्या दिवसापर्यंत
पृथ्वी पूर्णपणे कोरडी झाली. 15 मग परमेश्वराने नोआहला सांगितले, 16
"तू आणि तुझी पत्नी, तुझे पुत्र व त्यांच्या पत्नी असे सर्वांनी तारवाच्या
बाहेर यावे. 17 प्रत्येक प्रकारचा सजीव प्राणी—पक्षी, पशू, सरपटणारे
सर्व प्राणी—यांनाही बाहेर आणावे, म्हणजे त्यांची भरभराट होईल
आणि ते फलद्रूप होऊन पृथ्वीवर बहुगुणित होतील." 18 मग नोआह,
त्याचे पुत्र व त्याची पत्नी आणि पुत्रांच्या पत्नी हे तारूच्या बाहेर आले.
19 यांच्याबरोबर पशू, सरपटणारे प्राणी व पक्षी—भूमीवर वावरणारे
सर्वप्रकारचे प्राणी तारवातून उतरले. 20 मग नोआहने याहवेहसाठी एक
वेदी बांधली आणि त्याने शुद्ध पक्ष्यांतून काही आणि शुद्ध पशूतून काही
घेतले आणि त्यांचे वेदीवर होमार्पण केले. 21 तेव्हा याहवेह अर्पणाच्या
सुगंधाने संतुष्ट झाले आणि आपल्या अंत:करणात म्हणाले: "जरी
लहानपणापासून मानवी हृदयाची प्रत्येक प्रवृत्ती वाईट आहे तरी मी
मनुष्यामुळे जमिनीला पुन्हा कधी शाप देणार नाही आणि जसा मी केला
आहे, तसा सर्व जिवंत प्राण्यांचा नाश यापुढे कधीही करणार नाही. 22
"पृथ्वी अस्तित्वात आहे, तोपर्यंत वसंतऋतू व हंगामाचा काळ, थंडी
व उष्णता, हिवाळा व उन्हाळा, दिवस व रात्र ही व्हावयाची थांबणार
नाहीत."

**9** परमेश्वराने नोआहला व त्याच्या पुत्रांना आशीर्वाद देऊन सांगितले,
"फलद्रूप व्हा, बहुगुणित व्हा आणि पृथ्वी व्यापून टाका. 2 पृथ्वीवरील
प्रत्येक प्राणी आणि आकाशातील प्रत्येक पक्षी, जमिनीवर सरपटणारे
प्रत्येक प्राणी आणि समुद्रातील सर्व मासे यांना तुमचे भय व दहशत
वाटेल, कारण मी त्यांना तुमच्या ताब्यात दिले आहे; 3 जे काही सजीव
आहे आणि पृथ्वीवर वावरते ते तुमचे अन्न असेल. धान्य व वनस्पती
याबरोबरच आता ते सर्व मी तुमच्या स्वाधीन करतो. 4 "परंतु ज्या
मांसामध्ये जीवनदायी रक्त आहे, असे मांस तू खाऊ नकोस 5 आणि मी
तुझ्या जीवनदायी रक्ताचा जाब निश्चितच मागेन. जो कोणी एखाद्या
मनुष्याचा वध करेल, त्या प्रत्येक पशूकडून मी जीवनाचा जाब घेणार.
प्रत्येक मनुष्याकडून दुसऱ्या मनुष्याच्या वधाचा मी जाब घेणार. 6 "जो
कोणी मनुष्याचे रक्त वाहील, मनुष्याद्वारेच त्याचा रक्तपात करण्यात
येईल; कारण परमेश्वराने आपल्या प्रतिरूपात मानवाला निर्माण केले
आहे. 7 तुम्ही तर फलद्रूप व्हा, बहुगुणित व्हा आणि पृथ्वी व्यापून टाका
आणि तिच्यावर संपन्न व्हा." 8 मग परमेश्वर नोआहला व त्याच्या पुत्रांना
म्हणाले: 9 "आता मी तुझ्याशी व तुझ्या वंशजांशी करार स्थापित
करतो. 10 तुम्ही तुमच्याबरोबर तारवातून आणलेल्या—पक्षी, गुरे आणि
वन्यपशू—अशा सर्वप्रकारच्या सजीव प्राण्यांशी करार करतो. 11 यापुढे
सर्व सजिवांचा जलप्रलयाद्वारे मी कधीही नाश करणार नाही; पृथ्वीचा
नाश करण्याकरिता मी दुसरा जलप्रलय केव्हाही पाठविणार नाही,
असा मी तुझ्याशी करार करतो." 12 आणि परमेश्वर म्हणाले, "माझ्या
आणि तुझ्यामध्ये व तुमच्याबरोबर जे सर्व जिवंत आहेत त्यांच्यामध्ये
सर्वकाळाच्या पिढ्यांपर्यंत जो करार मी करतो त्याची खूण हीच आहे:
13 पृथ्वी व माझ्यामध्ये केलेल्या कराराचे चिन्ह म्हणून माझे मेघधनुष्य
मी मेघात ठेवले आहे 14 ज्यावेळी मी पृथ्वीवर मेघ आणेन, त्यावेळी हे
धनुष्य मेघांत प्रगट होईल. 15 आणि पृथ्वीवर पुन्हा जलप्रलय येणार
नाही आणि सर्व प्राणिमात्रांचा नाश होणार नाही, तुमच्याशी आणि
प्रत्येक प्राण्याशी केलेल्या या कराराची मला आठवण होईल. 16 जेव्हा
मी ते धनुष्य मेघांमध्ये पाहीन, तेव्हा परमेश्वर आणि पृथ्वीवरील प्रत्येक
प्राणिमात्राशी केलेल्या सार्वकालिक कराराची मला आठवण होईल."
17 परमेश्वर नोआहस म्हणाले, "पृथ्वीवरील सर्व सजीव व माझ्याबरोबर

स्थापित झालेल्या कराराचे हे चिन्ह असेल.” 18 नोआहबरोबर तारूमधून
बाहेर आलेल्या पुत्रांची नावे शेम, हाम व याफेथ ही होती. (हाम हा
कनानाचा पिता होता.) 19 हे नोआहचे तीन पुत्र होते आणि यांच्याद्वारे
पृथ्वीवर मानवजात पसरली. 20 नोआह शेतकरी झाला व त्याने एक
द्राक्षमळा लावला. 21 एके दिवशी तो द्राक्षारस प्याला आणि द्राक्षारसाने
धुंद होऊन आपल्या तंबूत उघडानागडा पडला. 22 कनानचा पिता हाम
याने आपल्या पित्याची नग्नता पाहिली आणि बाहेर जाऊन त्याने ही
गोष्ट आपल्या दोन्ही भावांना सांगितली. 23 हे ऐकून शेम व याफेथ
यांनी एक झगा घेतला; आपल्या खांद्यांपर्यंत तो उंच धरून ते आपल्या
पित्याची नग्नता झाकली जावी म्हणून उलट्या पावली चालत जाऊन,
विरुद्ध दिशेला पाहत त्यांनी तो झगा त्याच्या अंगावर टाकला. 24 नोआह
नशेतून शुद्धीवर आला आणि आपला धाकट्या पुत्राने काय केले हे
त्याला समजले, 25 तो म्हणाला, “कनान शापित असो! तो आपल्या
भावांच्या गुलामातील सर्वात कनिष्ठ गुलाम होवो.” 26 मग नोआह
असेही म्हणाला, “शेमचे परमेश्वर याहवेह यांची स्तुती असो! कनान
शेमचा गुलाम होवो. 27 परमेश्वर याफेथच्या प्रदेशाचा विस्तार करोत;
याफेथ शेमच्या तंबूत राहो, आणि कनान त्याचाही गुलाम होवो.” 28
जलप्रलयानंतर नोआह साडेतीनशे वर्षे जगला. 29 950 वर्षाचा होऊन
नोआह मृत्यू पावला.

**10** नोआहचे पुत्र शेम, हाम व याफेथ यांची वंशावळ अशी: त्यांना
जलप्रलयानंतर पुत्र झाले. 2 याफेथाचे पुत्र: गोमेर, मागोग,
मादय, यावान, तूबाल, मेशेख व तीरास. 3 गोमेरचे पुत्र: आष्कनाज,
रीपाथ व तोगर्माह. 4 यावानाचे पुत्र: एलिशाह, तार्शीश, कित्तीम व
दोदानीम. 5 या वंशांचे लोक निरनिराळ्या देशांत समुद्र किनाऱ्याजवळील
वस्ती करणारी राष्ट्रे बनली. प्रत्येक भाषेनुसार, कुळानुसार ते राष्ट्रांमध्ये
पसरले. 6 हामाचे पुत्र: कूश, इजिप्त, पूट व कनान. 7 कूशाचे पुत्र:
सबा, हवीला, साब्ता, रामाह व साब्तेका. रामाहचे पुत्र: शबा व ददान. 8
कूशचा पुत्र निम्रोद होता, जो पृथ्वीवरील एक वीर व्यक्ती झाला. 9 तो
याहवेहसमोर एक बलवान शिकारी होता; “याहवेहसमोर निम्रोदासारखा
पराक्रमी शिकारी.” असा उल्लेख करण्याची प्रथा पडली होती. 10
शिनार प्रांतातील बाबिलोन, एरक, अक्काद व कालनेह ही त्याच्या
राज्यातील प्रमुख शहरे होती. 11 शिनारपासून त्याने आपल्या राज्याचा
विस्तार अश्शूरपर्यंत केला. त्याने निनवेह, रेहोबोथ ईर व कालह 12 व
रेसन शहर, जे निनवेह व कालह यांच्या दरम्यान होते, ते वसविले. रेसन
हे त्याच्या राज्यातील एक प्रमुख शहर होते. 13 इजिप्तचे पुत्र: लूदीम,
अनामीम, लहाबीम, नाप्तुहीम, 14 पात्रुसीम, कास्लूहीम (ज्यापासून
पलिष्टी लोक आले) आणि कफतोरीम. 15 कनान यांचा पिता होता:
प्रथमपुत्र सीदोन आणि हेथ, 16 यबूसी, अमोरी, गिर्गाशी, 17 हिव्वी,
आर्की, सीनी 18 अर्वादी, समारी व हमाथी. (नंतर कनानी वंशज विखुरले
19 आणि सीदोनापासून गरारपासून गाझाच्या पट्ट्यातील, सदोम, गमोरा,
अदमाह व लेशाजवळील सबोईम येथवर कनानाची सीमा पसरली.) 20
वंश, भाषा, प्रदेश आणि राष्ट्रांनुसार हे हामाचे गोत्र आहेत. 21 याफेथचा
धाकटा भाऊ शेम यालाही पुत्र झाले, शेम एबरच्या सर्व संतानांचा
पूर्वज होता. 22 शेमचे पुत्र: एलाम, अश्शूर, अर्पक्षद, लूद व अराम.
23 अरामाचे पुत्र: ऊस, हूल, गेतेर व मेशेख. 24 अर्पक्षद हा शेलाहचा
पिता झाला व शेलाह एबरचा पिता झाला. 25 एबरला दोन पुत्र झाले:
एकाचे नाव पेलेग ठेवले, कारण याच्या हयातीत पृथ्वीची विभागणी
झाली; त्याच्या भावाचे नाव योक्तान होते. 26 योक्तानचे पुत्र: अलमोदाद,
शेलेफ, हसर्मावेथ, येरह, 27 हदोराम, ऊजाल, दिक्लाह, 28 ओबाल,
अबीमाएल, शबा, 29 ओफीर, हवीला व योबाब. हे सर्व योक्तानचे पुत्र
होते. 30 (ते मेशापासून सफार या पूर्वेकडील डोंगरापर्यंतच्या भागात
राहत होते.) 31 कुळे, भाषा, देश आणि राष्ट्रे अशाप्रकारे गोत्रानुसार
विभागणी केलेले शेमचे हे वंशज होते. 32 वर दिलेल्या यादीत नमूद
केलेले सर्व लोक नोआहच्या अनेक पिढ्यांतील गोत्र होते. त्यांनी
निरनिराळ्या राष्ट्रांत वस्ती केली. ही सर्व राष्ट्रे जलप्रलयानंतर पसरली.

**11** त्याकाळी पृथ्वीवरील सर्व मानवांची एकच भाषा आणि एकच
बोली होती. 2 पुढे ते पूर्वेकडे जात असता, त्या लोकांना शिनार
प्रांतात एक मैदान लागले आणि त्यांनी तिथे वस्ती केली. 3 ते एकमेकास
म्हणाले, “चला आपण विटा तयार करून त्याला पक्क्या भाजू या.”
त्याप्रमाणे त्यांनी दगडाऐवजी विटा तयार केल्या आणि चुना म्हणून
डांबर वापरले. 4 मग ते म्हणाले, “आपण स्वत:साठी एक मोठे शहर
आणि आकाशाला भिडणारा अतिउंच बुरूज बांधू म्हणजे आपण प्रसिद्ध
होऊ; नाहीतर पृथ्वीतलावर आपली पांगापांग होईल.” 5 परंतु जेव्हा
मानव बांधत असलेले शहर आणि बुरूज पाहण्यास याहवेह खाली आले,
6 तेव्हा याहवेह म्हणाले, “हे सर्व एक असून त्यांची भाषा ही एकच आहे,
जर ही योजना साध्य झाली तर मानवांना असाध्य असे काहीही राहणार
नाही. 7 चला, आपण खाली जाऊ आणि त्यांच्या भाषेत वेगवेगळ्या
भाषांची सरमिसळ करू, म्हणजे त्यांना एकमेकांचे बोलणे समजणार
नाही.” 8 अशा रीतीने याहवेहने सर्व पृथ्वीभर मानवांची पांगापांग केली
आणि त्यांचे शहर बांधण्याचे काम थांबले. 9 म्हणून त्या शहराला
बाबिलोन म्हणतात, कारण याहवेहने मानवांना गोंधळात पाडून अनेक
भाषा दिल्या आणि सर्व पृथ्वीभर त्यांची पांगापांग केली. 10 शेमाची
वंशावळी: अर्पक्षद याचा जन्म जलप्रलयानंतर दोन वर्षांनी झाला,
त्यावेळी शेम 100 वर्षांचा होता. 11 अर्पक्षदाचा पिता झाल्यानंतर
शेम आणखी 500 वर्षे जगला आणि त्याला इतरही पुत्र व कन्या
झाल्या. 12 अर्पक्षद 35 वर्षांचा असताना तो शेलाहचा पिता झाला. 13
शेलाहच्या जन्मानंतर अर्पक्षद आणखी 403 वर्षे जगला. त्या काळात
त्याला इतरही पुत्र व कन्या झाल्या. 14 जेव्हा शेलाह 30 वर्षांचा झाला
तेव्हा तो एबरचा पिता झाला. 15 आणि एबरचा पिता झाल्यावर शेलाह
आणखी 403 वर्षे जगला आणि त्याला इतरही पुत्र व कन्या झाल्या.
16 एबरचा पुत्र पेलेग जन्मला तेव्हा एबर 34 वर्षांचा होता. 17 पेलेग
जन्मल्यानंतर एबर 430 वर्षे जगला आणि त्याला इतरही पुत्र व कन्या
झाल्या. 18 पेलेगचा पुत्र रऊ जन्मला तेव्हा पेलेग 30 वर्षांचा होता.
19 रऊच्या जन्मानंतर पेलेग आणखी 209 वर्षे जगला आणि त्याला

इतरही पुत्र व कन्या झाल्या. 20 रऊचा पुत्र सरूग जन्मला तेव्हा रऊ 32
वर्षांचा होता. 21 सरूगच्या जन्मानंतर रऊ आणखी 207 वर्षे जगला
आणि त्याला इतरही पुत्र व कन्या झाल्या. 22 सरूगचा पुत्र नाहोर
जन्मला तेव्हा तो 30 वर्षांचा होता. 23 नाहोरच्या जन्मानंतर सरूग
आणखी 200 वर्षे जगला, आणि त्याला इतरही पुत्र व कन्या झाल्या.
24 नाहोर 29 वर्षांचा होता तेव्हा त्याला तेरह झाला. 25 तेरहचा पिता
झाल्यावर नाहोर पुढे आणखी 119 वर्षे जगला आणि त्याला इतरही
पुत्र व कन्या झाल्या. 26 तेरह 70 वर्षांचा होईपर्यंत त्याला अब्राम,
नाहोर व हारान हे तीन पुत्र झाले. 27 तेरहाच्या वंशजाचा तपशील:
तेरहास अब्राम, नाहोर व हारान हे पुत्र होते. हारानाला लोट नावाचा पुत्र
झाला. 28 पण हारान त्याच्या पिता तेरह जिवंत असताना, आपल्या
जन्मस्थानी, खाल्डियनांच्या ऊर गावी मरण पावला. 29 अब्राम व नाहोर
यांनी विवाह केले. अब्रामाच्या पत्नीचे नाव साराय होते व नाहोराच्या
पत्नीचे नाव मिल्का होते; मिल्का ही हारानाची कन्या होती आणि हारान
हा मिल्का व इस्काह यांचा पिता होता. 30 सारायला मूलबाळ नव्हते
कारण ती वांझ होती. 31 मग आपला पुत्र अब्राम, आपला नातू म्हणजे
हारानाचा पुत्र लोट आणि आपली सून साराय, यांना बरोबर घेऊन
कनान देशात जाण्यासाठी तेरहाने खाल्डियनांचे ऊर गाव सोडले; पण
कनान देशात जाण्याऐवजी ते हारान शहरीच स्थायिक झाले. 32 तेरहाचे
वय 205 वर्षांचे होऊन, हारान येथे तो मरण पावला.

**12** यहवेहने अब्रामाला सांगितले होते, “तू आपला देश, आपले
लोक व आपल्या पित्याचे घर सोड आणि मी दाखवेन त्या देशात
जा. 2 “मी तुला एक मोठे राष्ट्र करेन, मी तुला आशीर्वाद देईन; आणि
तुझे नाव महान करेन आणि तू एक आशीर्वाद असा होशील. 3 जे तुला
आशीर्वाद देतील, त्यांना मी आशीर्वाद देईन, आणि जे तुला शाप देतील,
त्यांना मी शाप देईन; आणि तुझ्याद्वारे पृथ्वीवरील सर्व कुळे आशीर्वादित
होतील.” 4 याहवेहने सूचना केल्याप्रमाणे अब्राम निघाला; आणि लोटही
त्याच्याबरोबर गेला. अब्राम हारान येथून निघाला त्यावेळी तो पंचाहत्तर
वर्षांचा होता. 5 अब्राम आपल्याबरोबर आपली पत्नी साराय, त्याचा
पुतण्या लोट, तसेच आपली धनदौलत म्हणजे हारानात मिळालेली गुरे
व लोक घेऊन निघाला आणि कनान देशात पोहोचला. 6 अब्राम त्या
प्रदेशातून प्रवास करीत शेखेम येथील मोरेहच्या मोठ्या एला वृक्षापर्यंत
गेला. त्यावेळी कनानी लोक या देशात राहत होते. 7 मग याहवेहने
अब्रामाला दर्शन देऊन म्हटले, “हा देश मी तुझ्या संतानाला देणार
आहे.” तेव्हा जे अब्रामाला प्रकट झाले त्या याहवेहसाठी त्याने एक वेदी
बांधली. 8 तिथून तो बेथेलाच्या पूर्वेकडे डोंगराकडे गेला आणि जिथे
पश्चिमेकडे बेथेल व पूर्वेकडे आय हे शहर होते, तिथे त्याने आपला तळ
दिला. तिथेच त्याने याहवेहसाठी एक वेदी बांधली आणि याहवेहच्या
नावाने उपासना केली. 9 मग अब्राम निघाला आणि दक्षिणेच्या दिशेने
चालू लागला. 10 त्यावेळी त्या देशात मोठा दुष्काळ पडला होता
म्हणून अब्राम इजिप्तमध्ये राहण्यास गेला, कारण दुष्काळ फारच
भयंकर होता. 11 परंतु इजिप्तच्या सीमेवर आल्यानंतर तो आपली
पत्नी साराय हिला म्हणाला, “तू फार सुंदर आहेस, 12 आणि इजिप्तचे
लोक तुला पाहतील व म्हणतील, ‘ही याची पत्नी आहे.’ मग ते मला
मारून टाकतील आणि तुला जगू देतील. 13 तू माझी बहीण आहेस असे
सांग, म्हणजे तुझ्यामुळे मला ते चांगले वागवतील आणि तुझ्यामुळे
माझा जीव वाचेल.” 14 अब्राम इजिप्तमध्ये आला तेव्हा इजिप्तच्या
लोकांनी पाहिले की साराय ही अतिशय सुंदर स्त्री आहे. 15 जेव्हा
फारोह राजाच्या सरदारांनी तिला पाहिले तेव्हा त्यांनी फारोहजवळ तिची
प्रशंसा केली; आणि तिला राजवाड्यात नेण्यात आले. 16 मग फारोहने
तिच्यामुळे अब्रामाला मेंढरे, बैल, गाढवे, उंट तसेच गुलाम स्त्री व पुरुष
अशा पुष्कळ देणग्या दिल्या. 17 परंतु याहवेहने अब्रामाची पत्नी साराय
तिथे असल्यामुळे फारोहच्या घरावर भयंकर पीडा पाठविली. 18 तेव्हा
फारोहने अब्रामाला बोलाविले आणि म्हटले, “तू माझ्याशी हे काय केले
आहेस? ती तुझी पत्नी आहे हे तू मला आधी का सांगितले नाहीस? 19
‘ती माझी बहीण आहे,’ असे तू का सांगितलेस? म्हणूनच तिला माझी
पत्नी करण्यास मी तयार झालो होतो. ही तुझी पत्नी घे आणि येथून
निघून जा!” 20 आणि फारोहने आपल्या अधिकाऱ्यांना आदेश देऊन
अब्रामाची पत्नी, कुटुंबीय मंडळी व मालमत्ता यासह त्याची देशाबाहेर
रवानगी केली.

**13** अशा रीतीने अब्रामाने आपली पत्नी, सर्व संपत्ती आणि लोटाला
घेऊन इजिप्त देश सोडला आणि ते नेगेव, म्हणजे दक्षिण, येथे
पोहोचले. 2 अब्राम जनावरांचे मोठे कळप, सोने व चांदी यांनी खूप
श्रीमंत झाला होता. 3 नंतर ते नेगेवहून बेथेलच्या रोखाने उत्तरेकडे गेले.
बेथेल व आय यांच्यामध्ये त्यांनी पूर्वी तळ दिला होता 4 व वेदी बांधली
होती, तिथे पोहोचल्यावर अब्रामाने पुन्हा एकदा याहवेहची उपासना
केली. 5 आता लोट, जो अब्रामासह फिरत होता, त्याच्याजवळही मेंढरे,
गुरे आणि डेरे होते. 6 परंतु ते एकत्र राहत असताना ती जमीन त्यांना
पुरेशी होऊ शकत नव्हती, कारण त्यांची संपत्ती इतकी मोठी होती की ते
एकत्र राहू शकत नव्हते. 7 कनानी व परिज्जी हे लोक देखील तिथे राहत
होते. अब्राम व लोट यांच्या गुराख्यामध्ये भांडणे होऊ लागली. 8 तेव्हा
अब्राम लोटाला म्हणाला, “तुझ्यामध्ये व माझ्यामध्ये, किंवा माझे गुराखी
व तुझे गुराखी यांच्यात भांडणे नसावी. कारण आपण जवळचे भाऊबंद
आहोत. 9 तुझ्यापुढे संपूर्ण देश नाही काय? आपण विभक्त होऊ या.
जर तू डावीकडे गेला तर मी उजवीकडे जाईन आणि जर तू उजवीकडे
गेला तर मी डावीकडे जाईन.” 10 तेव्हा लोटाने आपली नजर सभोवार
फिरविली आणि यार्देन नदीकडील सोअरकडे पाहिले की भरपूर पाणी
असलेले, याहवेहच्या बागेसारखे आणि इजिप्त देशासारखे ठिकाण
होते. (ही घटना याहवेहने सदोम आणि गमोराचा नाश करण्याआधीची
आहे.) 11 मग लोटाने यार्देनेची सगळी तळवट निवडली आणि तो
पूर्वेकडे निघाला. अशा रीतीने लोट व अब्राम विभक्त झाले. 12 अब्राम
कनान देशात राहिला आणि लोटाने यार्देनेच्या पूर्वतीरावरील तळवटीतील
शहरांमध्ये मुक्काम करीत सदोम शहरापाशी तळ दिला. 13 सदोम
शहरातील लोक दुष्ट होते आणि याहवेहच्या विरुद्ध महापातक करणारे

होते. 14 लोट अब्रामापासून विभक्त झाल्यानंतर याहवेह अब्रामाला
म्हणाले, “तू जिथे आहेस तिथून उत्तर, नेगेव दक्षिण आणि पूर्व, पश्चिम
अशी चहूकडे आपली नजर टाक. 15 जो सर्व देश तू पाहतोस तो मी
तुला आणि तुझ्या वंशजांना देईन. 16 मी तुझी संतती पृथ्वीवरील
धुळीच्या कणांइतकी करेन, जर कोणाला धुळीच्या कणांची गणती
करता आली, तर तुझ्या संततीचीही गणना होईल. 17 आणि मी जो
देश तुला देणार आहे, त्याच्या लांबी व रुंदीपर्यंत चालत जा.” 18 मग
अब्रामाने हेब्रोनजवळ असलेल्या मम्रेच्या महान एलावृक्षाजवळ जाऊन
तळ दिला आणि तिथे त्याने याहवेहसाठी एक वेदी बांधली.

**14** त्या काळात जेव्हा शिनारचा राजा अम्राफेल, एल्लासाराचा राजा
अर्योक, एलामाचा राजा केदोरलाओमेर व गोयीमाचा राजा तिदाल
यांनी, 2 सदोमाचा राजा बेरा, गमोराचा राजा बिर्शा, अदमाहचा राजा
शिनाब, सबोईमाचा राजा शमेबर आणि बेलाचा म्हणजे सोअराचा
राजा यांच्याशी युद्ध केले. 3 दुसऱ्या गटाचे सर्व राजे सिद्दिमाच्या
म्हणजे (मृत समुद्राच्या खोऱ्यात) एकत्र जमले. 4 बारा वर्षापर्यंत ते
केदोरलाओमेर या राजाची सेवा करणारी प्रजा होते, परंतु तेराव्या वर्षी
त्यांनी त्याच्याविरुद्ध बंड पुकारले. 5 चौदाव्या वर्षी, केदोरलाओमेर
व त्याचे मित्रराजे यांनी अष्टरोथ-कर्णईम येथील रेफाईम लोकांचा व
हाम येथील जूजीम लोकांच्या टोळीचा व शावेह किर्याथाईम येथे एमी
लोकांचा पराभव केला 6 आणि होरी लोकांच्या टोळीला सेईर डोंगरात
मार देऊन रानाच्या हद्दीवर असलेल्या एल-पारान येथपर्यंत पिटाळून
लावले. 7 पुढे ज्याला कादेश असे नाव मिळाले, त्या एन मिशपात
(अर्थात् कादेश) आणि अमालेकी लोकांचा, संपूर्ण प्रदेश व हससोन-
तामार येथे राहणाऱ्या अमोरी यांचाही त्यांनी पराभव केला. 8 पण आता
सदोमाचा राजा, गमोराचा राजा, अदमाहचा राजा, सबोईमचा राजा
आणि बेला म्हणजे सोअराचा राजा यांनी सिद्दीमच्या खोऱ्यात हल्ला
करण्याची तयारी केली. 9 ते एलामाचा राजा केदोरलाओमेर, गोयीमाचा
राजा तिदाल, शिनाराचा राजा अम्राफेल आणि एल्लासाराचा राजा
अर्योक यांच्याविरुद्ध लढले. ते पाच राजे विरुद्ध चार राजे असे लढले. 10
सिद्दीमच्या खोऱ्यात डांबराच्या अनेक खाणी होत्या. सदोम आणि गमोरा
येथील राजांच्या सैन्याने पळ काढला, तेव्हा काहीजण त्या खाणीत
पडले, पण बाकीचे सैन्य डोंगरावर पळून गेले. 11 चार राजांनी सदोम
आणि गमोरा येथील मालमत्ता व अन्नसामुग्री लुटली आणि ते निघून
गेले. 12 सदोम येथे राहणारा अब्रामाचा पुतण्या लोट यालाही त्याच्या
मालकीच्या सर्व वस्तूंसह ते घेऊन गेले. 13 या लढाईत वाचलेला एक
मनुष्य इब्री अब्रामाकडे पळून आला व त्याने ही बातमी त्याला सांगितली.
त्यावेळी अब्राम, अमोरी मम्रे याच्या एला राईत तळ देऊन राहिला होता.
अष्कोल व आनेर हे दोघे मम्रेचे भाऊ होते व त्यांनी अब्रामासोबत करार
केला होता. 14 लोटाला कैद करून नेल्याचे अब्रामाला समजल्याबरोबर
त्याने आपल्या कुटुंबात जन्मलेल्या तीनशेअठरा प्रशिक्षित पुरुषांना
बरोबर घेतले आणि घरी परतणाऱ्या विजयी सैन्याचा थेट दानपर्यंत
पाठलाग केला. 15 रात्रीच्या वेळी अब्रामाने युद्ध करण्यासाठी आपले
सैन्य विभागले आणि त्याने या सैन्यावर यशस्वी हल्ला केला आणि
त्याच्यापुढून पळून जाणाऱ्या सैन्याचा त्याने दिमिष्काच्या उत्तरेकडे
असलेल्या होबाह या शहरापर्यंत पाठलाग केला. 16 त्याने सर्व मालमत्ता
तसेच आपला पुतण्या लोट, याची मालमत्ता, स्त्रिया आणि कैद करून
पळविलेले लोटचे इतर लोकही परत मिळविले. 17 केदोरलाओमेर व
त्याचे मित्र असलेल्या इतर राजांचा पराभव करून अब्राम परत चालला
असताना सदोमचा राजा शावेहच्या खोऱ्यात (या खोऱ्यास पुढे राजांचे
खोरे असे नाव पडले) त्याला भेटावयास आला. 18 शालेमचा राजा
मलकीसदेक जो परात्पर परमेश्वराचा याजक होता, तो अब्रामाला भाकर
व द्राक्षारस घेऊन आला. 19 आणि त्याने अब्रामाला आशीर्वाद देऊन
म्हटले, “आकाश व पृथ्वी यांचा निर्माणकर्ते परात्पर परमेश्वराद्वारे अब्राम
आशीर्वादित असो. 20 ज्या सर्वसमर्थ परमेश्वराने तुझे शत्रू तुझ्या हाती
दिले ते परमेश्वर धन्यवादित असो.” मग अब्रामाने मलकीसदेकाला
सर्वांचा दहावा भाग दिला. 21 सदोमच्या राजाने अब्रामाला म्हटले,
“लोक मला द्या आणि मालमत्ता तुम्ही ठेवा.” 22 यावर अब्रामाने
सदोमाच्या राजाला उत्तर दिले, “आकाश व पृथ्वी यांना निर्माण करणारा
परात्पर याहवेह परमेश्वर यांना मी हात उंच करून वचन दिले आहे, 23
‘मी अब्रामाला श्रीमंत बनविले आहे,’ असे तुला कधीही म्हणता येऊ
नये म्हणून मी तुझ्यापासून सुतळीचा एक दोरा किंवा जोड्याचा बंदही
घेणार नाही. 24 माझ्या या तरुण माणसांनी जेवढे अन्न खाल्ले आहे
तेवढ्यांचाच मी स्वीकार करेन, मात्र माझे मित्र आनेर, अष्कोल आणि
मम्रे यांना त्यांचा वाटा मिळो.”

**15** या गोष्टीं घडल्यानंतर अब्रामाला दृष्टान्तात याहवेहकडून हा संदेश
मिळाला: “अब्रामा, भिऊ नको; मीच तुझी ढाल, तुझे अत्यंत
महान प्रतिफळ आहे.” 2 यावर अब्राम म्हणाला, “हे सार्वभौम याहवेह,
तुम्ही मला काय देऊ शकणार, मला पुत्र नसल्यामुळे माझ्या सर्व
मालमत्तेचा वारस तर दिमिष्काचा एलिएजर होईल ना?” 3 अब्रामाने
असेही म्हटले, “तुम्ही मला पुत्र दिलेला नाही; म्हणून माझा सेवकच
माझा वारस होईल.” 4 तेव्हा त्याच्याकडे याहवेहचे वचन आले, “तुझ्या
मालमत्तेचा वारसदार हा मनुष्य होणार नाही, परंतु तुझे मांस व तुझे रक्त
असलेला तुझा पुत्र तुझा वारस होईल.” 5 मग त्यांनी त्याला बाहेर
आणले आणि म्हटले, “वर आकाशात पाहा आणि तुला मोजता आले
तर आकाशातील तारे मोज.” नंतर ते त्याला म्हणाले, “त्याचप्रमाणे
तुझी संततीही होईल.” 6 अब्रामाने याहवेहवर विश्वास ठेवला आणि
ते त्याला नीतिमत्व असे गणण्यात आले. 7 त्यांनी त्याला सांगितले,
“मी याहवेह आहे. मी ही भूमी कायमची वतन करून देण्यासाठी तुला
खास्द्यांच्या ऊर या शहरातून येथे आणले आहे.” 8 पण अब्रामाने
विचारले, “सार्वभौम याहवेह, मला हे वतन मिळेल ते मी कसे समजू?”
9 मग याहवेह त्याला म्हणाले, “तू तीन वर्षांची एक कालवड, तीन वर्षांची
एक शेळी, तीन वर्षांचा एक एडका, तसेच एक होला आणि पारव्याचे
एक पिल्लू घेऊन ये.” 10 अब्रामाने हे सर्व आणले आणि त्या प्राण्यांचा
वध करून ते त्याने मधोमध कापले; व त्यांचे दोन्ही भाग समोरासमोर

ठेवले; पण पक्षी मात्र विभागले नाही. 11 त्या प्राण्यांच्या मृतशरीरांवर
गिधाडांनी झडप घातली, तेव्हा अब्रामाने गिधाडांना हुसकावून लावले.
12 सूर्यास्ताच्या वेळी अब्रामाला गाढ निद्रा लागली आणि त्याच्यावर दाट
आणि भयानक गडद अंधार पडला. 13 मग याहवेहने अब्रामाला म्हटले,
“हे निश्चितपणे जाणून घे की, तुझे वंशज, जो देश त्यांचा स्वतःचा
नाही अशा देशात परके गुलाम म्हणून राहतील व त्यांना चारशे वर्षे
बंदिस्त करून अन्यायाने वागविले जाईल. 14 परंतु ज्या राष्ट्रात त्यांनी
गुलाम म्हणून सेवा केली त्याला मी शिक्षा करेन. त्यानंतर तुझे वंशज
त्या देशातून पुष्कळ धन घेऊन बाहेर पडतील. 15 पण तू चांगला
म्हातारा होऊन मरण पावशील व शांतीने तुझ्या पूर्वजांबरोबर पुरला
जाशील. 16 चार पिढ्यानंतर तुझे वंशज या भूमीत परत येतील, कारण
अमोऱ्यांचा अपराध अजून पूर्ण झालेला नाही.” 17 नंतर सूर्य मावळला
आणि अंधार पडला तेव्हा अब्रामाने त्या प्राण्यांच्या मृतशरीराच्या दोन
ढिगांमधून धुमसते अग्निपात्र आणि पेटलेली मशाल जाताना पाहिली.
18 त्या दिवशी याहवेहने अब्रामाशी करार केला; त्यांनी म्हटले, “मी
तुझ्या वंशजांना इजिप्त देशाच्या नदीपासून फरात नदीपर्यंतचा जो सर्व
प्रदेश— 19 केनी, कनिज्जी, कदमोनी, 20 हिथी, परिज्जी, रेफाईम, 21
अमोरी, कनानी, गिर्गाशी व यबूसी या लोकांचा देश देत आहे.”

## 16

अब्रामाला साराय आपली पत्नी हिच्यापासून मूलबाळ नव्हते. पण
सारायला हागार नावाची इजिप्तची एक दासी होती; 2 सारायने
अब्रामाला म्हटले, “याहवेहने मला मूलबाळ दिले नाही, म्हणून तू माझ्या
दासीचा स्वीकार कर; म्हणजे तिच्यापासून माझी मुले होतील.” आणि
अब्रामाने तिचा शब्द मानला. 3 अब्राम कनान देशात राहून दहा वर्षे
झाली होती. अब्रामाची पत्नी साराय हिने आपली इजिप्तची दासी
हागार हिला अब्रामाची पत्नी होण्यासाठी त्याच्याकडे सोपविले. 4 तो
हागारसोबत निजला आणि ती गर्भवती झाली. जेव्हा तिला आपण
गर्भवती झाल्याचे लक्षात आले, तेव्हा ती तिच्या मालकिणीचा तिरस्कार
करू लागली. 5 मग साराय अब्रामाला म्हणाली, “माझ्याशी होत
असलेल्या अन्यायास तुम्ही जबाबदार आहात. वास्तविक, मी तिला
तुमच्या हातात दिले आणि आता जेव्हा तिला कळले की ती गर्भवती
आहे, ती मला तुच्छ मानू लागली आहे. याहवेह माझ्या व तुमच्यामध्ये
न्याय करो.” 6 यावर अब्रामाने सारायला उत्तर दिले, “तुझ्या दासीवर
तुझा पूर्ण अधिकार आहे. तुला जे योग्य वाटेल ते तिच्याशी कर.” तेव्हा
सारायने हागारची छळणूक केली; आणि हागार तिच्यापासून पळून
गेली. 7 शूर गावाच्या वाटेवर रानातील एका झऱ्याजवळ ती याहवेहच्या
एका दूताला आढळली. 8 तो तिला म्हणाला, “अगे हागारे, सारायची
दासी, तू कुठून आलीस आणि कुठे चाललीस?” हागारेने उत्तर दिले,
“मी माझी मालकीण साराय हिच्यापासून पळून जात आहे.” 9 तेव्हा
याहवेहचा दूत तिला म्हणाला, “तू तुझ्या मालकिणीकडे परत जा आणि
तिच्या अधीनतेत राहा.” 10 दूत पुढे म्हणाला, “मी तुझा वंश इतका
वाढवेन की त्यांची मोजणी करता येणार नाही.” 11 याहवेहच्या दूताने
तिला आणखी म्हटले, “आता तू गर्भवती आहेस आणि तुला एक पुत्र
होईल. तू त्याचे नाव इश्माएल असे ठेव, कारण याहवेहने तुझे दुःख
ऐकले आहे. 12 तो रानगाढवासारखा एक मनुष्य होईल; त्याचा हात
प्रत्येकाच्या विरुद्ध असेल व प्रत्येकाचा हात त्याच्याविरुद्ध होईल; आणि
तो आपल्या सर्व भाऊबंदांमध्ये शत्रुतापूर्ण वातावरणात वस्ती करून
राहील.” 13 तिच्याशी बोलणाऱ्या याहवेहला तिने हे नाव दिले: “मला
पाहणारे परमेश्वर तुम्हीच आहात,” कारण ती म्हणाली, “जे मला पाहात
आहेत, त्यांना मी आता पाहिले आहे.” 14 म्हणूनच त्या विहिरीला बएर-
लहाई-रोई असे नाव पडले. जी कादेश व बेरेद यांच्या दरम्यान आहे. 15
मग अब्रामाला हागारेपासून एक पुत्र झाला आणि तिच्यापासून झालेल्या
पुत्राचे नाव अब्रामाने इश्माएल असे ठेवले. 16 हागारेला अब्रामापासून
इश्माएल झाला त्यावेळी अब्राम शहाऐंशी वर्षांचा होता.

## 17

अब्राम नव्याण्णव वर्षांचा झाला तेव्हा याहवेहने त्याला दर्शन देऊन
म्हटले, “मी सर्वसमर्थ परमेश्वर आहे. माझ्यापुढे विश्वासयोग्य
आणि निर्दोष राहा. 2 मग मी माझ्या व तुझ्यामध्ये एक करार करेन
आणि तुला बहुगुणित करेन.” 3 अब्रामाने भूमीपर्यंत लवून नमस्कार
केला आणि परमेश्वर त्याला म्हणाले, 4 “मी तुझ्याशी हा करार करतो:
तू अनेक राष्ट्रांचा पिता होशील. 5 आता येथून पुढे तुझे नाव अब्राम
असे राहणार नाही, तर ते अब्राहाम असे होईल. कारण मी तुला अनेक
राष्ट्रांचा पिता केले आहे. 6 मी तुला फलद्रूप करेन; मी तुझ्यापासून राष्ट्रे
उदयास आणेल आणि तुझ्या संततीमधून राजे उत्पन्न होतील. 7 तुझ्या
व तुझ्या येणाऱ्या पिढीबरोबर मी असा शाश्वत करार स्थापित करेन
की, तुझा व तुझ्यानंतर तुझ्या संतानांचा मी परमेश्वर होईन. 8 ज्या
देशात आज तू परका आहेस, तो संपूर्ण कनान देश मी तुला आणि
तुझ्यानंतर तुझ्या वंशजांना कायमचे वतन म्हणून देईन; आणि मी त्यांचा
परमेश्वर होईन.” 9 मग परमेश्वराने अब्राहामाला सांगितले, “माझ्याशी
केलेल्या कराराचे तू आणि तुझ्या येणाऱ्या वंशजांनी पिढ्यान् पिढ्या
पर्यंत पालन करावे. 10 तू आणि तुझ्या वंशजांशी हा माझा करार
म्हणजे: तुमच्यातील प्रत्येक पुरुषाची तुम्ही सुंता केली पाहिजे. 11 ही
सुंता, तुझ्या आणि माझ्यामध्ये केलेल्या कराराचे चिन्ह होईल. 12 पुत्र
जन्मल्यानंतर आठव्या दिवशी त्याची सुंता केली पाहिजे. सुंतेची ही
अट तू पैसे देऊन विकत घेतलेल्या परदेशीय गुलामांना आणि तुझ्या
घराण्यात जन्मलेल्या प्रत्येकाला, जी तुझी संतती नाही त्यांनाही लागू
आहे. 13 तुझ्या घराण्यात जन्मलेल्या किंवा तू पैसे देऊन विकत
घेतलेल्या प्रत्येक पुरुषाची सुंता केली जावो. तुझ्या शरीराशी केलेला हा
करार सदासर्वकाळचा आहे. 14 सुंता न केलेल्या प्रत्येक पुरुषाला त्या
समाजातून बेदखल करण्यात येईल कारण त्याने माझा करार मोडला
आहे.” 15 मग परमेश्वराने अब्राहामालाही म्हटले, “तुझी पत्नी साराय
हिचे नाव आता साराय राहणार नाही, तर तिचे नाव साराह असे होईल.
16 मी तिला आशीर्वाद देईन आणि तिच्यापासून तुला निश्चितच एक
पुत्र देईन. मी तिला आशीर्वादित करेन आणि तिला अनेक राष्ट्रांची
माता करेन; तिच्यातून लोकांचे राजे उत्पन्न होतील.” 17 अब्राहामाने
लवून नमस्कार केला; आणि तो हसला व स्वतःशी म्हणाला, “शंभर

वर्षांच्या माणसालाही मुले होतील का? नव्वद वर्षांच्या साराहच्या पोटी
बाळ जन्माला येऊ शकेल काय?" 18 तेव्हा अब्राहामाने परमेश्वराला
म्हटले, "केवळ इश्माएल तुमच्या आशीर्वादाखाली राहिला तरी पुरे!"
19 परमेश्वराने उत्तर दिले, "होय, परंतु तुझी पत्नी साराह हिच्यापासून
तुला एक पुत्र होईल आणि तू त्याचे नाव इसहाक असे ठेवावेस. मी
त्याच्याबरोबर आणि त्याच्यानंतर त्याच्या वंशजांबरोबरही अनंतकाळचा
करार स्थापित करेन. 20 इश्माएलाविषयी मी तुझी विनंती ऐकली
आहे: मी त्याला निश्चितच आशीर्वाद देईन; त्याला फलद्रूप करेन व
बहुगुणित करेन. तो बारा शासकांचा पिता होईल व मी त्याला एक महान
राष्ट्र बनवेन. 21 पण माझा करार मी इसहाकाबरोबर स्थापित करेन.
ज्याला पुढील वर्षी याच सुमारास साराह तुझ्यासाठी प्रसवेल." 22
जेव्हा त्याने अब्राहामाशी बोलणे संपविले तेव्हा परमेश्वर अंतर्धान पावले.
23 त्याच दिवशी अब्राहामाने आपला पुत्र इश्माएल आणि आपल्या घरात
जन्मलेले किंवा पैसे देऊन विकत घेतलेले सर्व पुरुष यांची परमेश्वराने
सांगितल्याप्रमाणे सुंता केली. 24 अब्राहामाची सुंता झाली त्यावेळी तो
नव्याण्णव वर्षांचा होता, 25 आणि त्याचा पुत्र इश्माएल तेरा वर्षांचा
होता जेव्हा त्याची सुंता झाली. 26 अब्राहाम व त्याचा पुत्र इश्माएल या
दोघांचीही सुंता एकाच दिवशी झाली. 27 अब्राहामाच्या घरातील सर्व
पुरुष, त्याच्या घरात जन्मलेले व पैसे देऊन परदेशी व्यक्तीकडून खरेदी
केली गुलाम यांचीही त्याच्याबरोबर सुंता झाली.

**18** अब्राहाम मम्रेच्या महान एलावृक्षाजवळ राहत असताना,
मध्यान्हाच्या उन्हात आपल्या तंबूच्या दारापुढे बसला होता, तेव्हा
याहवेहने त्याला दर्शन दिले. 2 अब्राहामाने आपली नजर वर करून
पाहिले की तीन पुरुष जवळपास उभे आहेत, तो घाईने आपल्या तंबूच्या
दाराकडून त्यांना भेटण्यास गेला व त्यांना भूमीपर्यंत लवून नमन केले.
3 तो त्यांना म्हणाला, "माझ्या स्वामी, माझ्यावर आपली कृपा झाली
असल्यास, माझ्या घरी न येता पुढे जाऊ नका. 4 मी थोडे पाणी आणतो
आणि तुम्ही आपले पाय धुऊन या झाडाखाली विसावा घ्या. 5 तुम्हाला
ताजेपणा यावा म्हणून थोडे अन्नही आणतो मग तुम्ही पुढील प्रवासास
निघा; तुम्ही तुमच्या या सेवकाकडे आला आहात." "ठीक आहे. तू
म्हणतोस त्याप्रमाणे कर." त्यांनी उत्तर दिले. 6 मग अब्राहाम धावत
आपल्या तंबूत येऊन साराहला म्हणाला, "लवकर तीन सिआ सपीठ
घेऊन ते मळ आणि भाकरी कर." 7 नंतर अब्राहाम आपल्या गुरांच्या
कळपाकडे गेला, त्यातील एक कोवळे व उत्तम वासरू त्याने निवडले
आणि ते लवकर बनवावे म्हणून एका नोकराकडे दिले. 8 मग त्याने
दूध, दही आणि वासराचे मांस घेतले, जे त्याने बनविले होते आणि ते
त्यांच्यासमोर ठेवले; आणि ते जेवत असता तो त्यांच्याजवळ झाडाखाली
उभा राहिला. 9 त्यांनी विचारले, "तुझी पत्नी, साराह कुठे आहे?"
अब्राहामाने उत्तर दिले, "ती तंबूत आहे." 10 मग त्यापैकी एकजण
म्हणाला, "पुढील वर्षी मी तुझ्याकडे निश्चित वेळेत परत येईन, तेव्हा
तुझी पत्नी साराहला एक पुत्र होईल." त्याच्यामागे, तंबूच्या दारातून
साराह हे ऐकत होती. 11 आता अब्राहाम व साराह दोघेही खूप वृद्ध झाली
होती. साराहला मुले होण्याचा काळ केव्हाच निघून गेला होता; 12
म्हणून साराह स्वत:शीच हसली व विचार करू लागली, "मी झिजून गेले
आहे आणि माझा स्वामीही वृद्ध असताना, आता मला हा आनंद मिळेल
काय?" 13 तेवढ्यात याहवेहने अब्राहामाला विचारले, "'माझ्यासारख्या
वृद्धेला खरेच मूल होईल काय?' असे म्हणत साराह का हसली? 14
याहवेहला कोणतीही गोष्ट असाध्य आहे काय? मी सांगितल्याप्रमाणे
पुढील वर्षी निश्चित वेळेत परत येईल आणि साराहला एक पुत्र होईल."
15 साराह घाबरली, म्हणून ती खोटे बोलत म्हणाली, "मी हसले नाही."
परंतु ते म्हणाले, "होय, तू हसलीस." 16 जेव्हा ते पुरुष पुढील प्रवासास
जाण्यास उठले आणि त्यांनी खाली सदोमाच्या दिशेने पाहिले. अब्राहाम
त्यांना निरोप देण्यासाठी त्यांच्याबरोबर थोडी वाट चालून गेला. 17 मग
याहवेह म्हणाले, "अब्राहामापासून मी माझा संकल्प गुप्त ठेवावा काय?
18 कारण खात्रीने अब्राहाम एक महान व बलाढ्य राष्ट्र होईल आणि
त्याच्याद्वारे पृथ्वीवरील सर्व राष्ट्रे आशीर्वादित होतील. 19 कारण मी
त्याला निवडले आहे अशासाठी की त्याने त्याच्यानंतर त्याच्या लेकरांना
व त्याच्या घराण्याला याहवेहच्या मार्गात जे योग्य व न्यायी आहे, त्यात
चालवावे, त्यामुळे अब्राहामाला दिलेले अभिवचन याहवेह पूर्ण करतील."
20 मग याहवेहने म्हटले, "सदोम आणि गमोरा विरुद्ध आक्रोश खूप
वाढला आहे आणि त्यांचे पाप गंभीर आहे. 21 मी खाली जाऊन बघेन,
मग त्यांनी जे केले आहे ते माझ्यापर्यंत पोहोचलेल्या आक्रोशाएवढे
वाईट आहे की नाही हे मला समजेल." 22 त्याच्याबरोबर असलेले
पुरुष सदोमाच्या दिशेने गेले, पण अब्राहाम याहवेहपुढे उभा राहिला.
23 अब्राहाम त्यांच्याजवळ गेला आणि विचारले: "तुम्ही दुष्टांबरोबर
नीतिमानांचा सुद्धा नाश करणार काय? 24 जर त्या शहरात पन्नास
नीतिमान लोक आढळले तरी त्यांचा तुम्ही नाश करणार आणि त्यात
असलेल्या नीतिमान लोकांसाठी तुम्ही त्यांची गय करणार नाही काय?
25 ही गोष्ट तुमच्यापासून दूर असो—की तुम्ही दुष्टांच्या बरोबर नीतिमान
लोकांनाही मारून टाकावे, नीतिमान आणि दुष्टांना सारखेच लेखावे हे
तुमच्यापासून दूर असो! सर्व पृथ्वीचे न्यायाधीश, जे योग्य ते करणार
नाहीत का?" 26 याहवेहने उत्तर दिले, "त्या सदोम शहरात मला जर
पन्नास नीतिमान लोक आढळले, तर त्यांच्यासाठी मी त्या सर्व शहराची
गय करेन." 27 मग अब्राहाम पुन्हा म्हणाला, "मी धूळ आणि राख
असून, मी प्रभूशी बोलण्याचे धैर्य केले आहे, 28 जर नीतिमानांची संख्या
पाच कमी पन्नास असली तर काय? पाच लोक कमी आहेत म्हणून
तुम्ही त्या संपूर्ण शहराचा नाश करणार काय?" याहवेहने उत्तर दिले
"मला तिथे पंचेचाळीस भेटले, तरी मी त्याचा नाश करणार नाही." 29
अब्राहाम पुन्हा याहवेहला म्हणाला, "तिथे फक्त चाळीस असले तर
काय?" याहवेहने उत्तर दिले, "त्या चाळिसांसाठी, मी नाश करणार
नाही." 30 मग तो म्हणाला, "प्रभूला राग येऊ नये, पण मला बोलू द्यावे.
फक्त तीसच मिळाले तर?" याहवेहने उत्तर दिले, "तिथे तीस सापडले,
तरी मी नाश करणार नाही." 31 मग अब्राहाम म्हणाला, "मी प्रभूशी
बोलण्याचे खूप धैर्य केले आहे, तिथे जर वीसच नीतिमान लोक असले

तर?” त्यांनी म्हटले, “त्या विसांसाठी मी त्यांचा नाश करणार नाही.”
32 मग तो म्हणाला, “प्रभूला राग न येवो, पण मला एकदाच बोलू द्यावे.
तिथे फक्त दहाच सापडले तर?” याहवेहने उत्तर दिले, “त्या दहांच्यासाठी
मी त्याचा नाश करणार नाही.” 33 जेव्हा याहवेहने अब्राहामाशी आपले
बोलणे संपविले, ते निघून गेले आणि अब्राहाम घरी परतला.

**19** त्याच संध्याकाळी ते दोन दूत सदोमास पोहोचले. लोट नगराच्या
वेशीत बसला होता. त्यांना पाहिल्याबरोबर त्यांना भेटण्यासाठी
तो उठून उभा राहिला आणि आपले डोके भूमीकडे लववून त्याने दंडवत
घातले. 2 लोट त्यांना म्हणाला, “स्वामींनो, कृपा करून आज रात्री तुम्ही
आपल्या सेवकाच्या घरी या. आपण आपले पाय धुवावे आणि रात्री इथे
मुक्काम करावा, मग पहाटे तुमच्या पुढील प्रवासास निघा.” ते म्हणाले,
“नको, आम्ही चौकातच रात्र घालवू.” 3 पण लोटाने फारच आग्रह
केल्यामुळे ते त्याच्याबरोबर त्याच्या घरात गेले. त्याने त्यांच्यासाठी
बेखमीर भाकरीचे भोजन तयार केले, आणि ते जेवले. 4 ते झोपण्याच्या
आधी, सदोम शहराच्या प्रत्येक भागातील सर्व पुरुषांनी—तरुणांपासून
वृद्धांपर्यंत—लोटाच्या घराला वेढा घातला. 5 लोटाला ते ओरडून
म्हणाले, “जे पुरुष तुझ्याकडे आज रात्री आले ते कुठे आहेत? त्यांना
आमच्याकडे बाहेर आण म्हणजे आम्ही त्यांच्याशी समागम करू.” 6
लोट त्यांच्याबरोबर बोलण्यास बाहेर गेला आणि आपल्यामागे दार लावून
घेतले. 7 “आणि म्हणाला, नाही माझ्या मित्रांनो, असे भयंकर दुष्कर्म
करू नका. 8 पाहा, मला दोन कन्या आहेत ज्या अजून कुमारिका आहेत.
त्यांना मी तुमच्या स्वाधीन करतो; त्यांच्याशी तुम्हाला पाहिजे तसे वागा,
पण या दोन माणसांच्या वाटेला जाऊ नका, कारण ते माझ्या आश्रयाला
आले आहेत.” 9 “आमच्या मार्गातून दूर जा,” ते म्हणाले. “हा मनुष्य
इथे परदेशी म्हणून आला होता आणि आता त्याला न्यायाधीशाची
भूमिका करावयाची आहे! आम्ही तुम्हाला त्याच्यापेक्षा वाईट वागवू.” ते
लोटावर दबाव टाकत राहिले आणि दार तोडण्यासाठी पुढे गेले. 10
पण आतील त्या पुरुषांनी लोटाला घरात ओढून घेतले आणि दार बंद
केले. 11 मग तरुण आणि वृद्ध पुरुष जे घराच्या दरवाजात होते, त्यांना
त्यांनी अंधत्वाचा असा फटका दिला की त्यांना दरवाजा सापडेना. 12 ते
दोन पुरुष लोटाला म्हणाले, “या ठिकाणी तुझे जावई, मुले किंवा मुली
किंवा अजून कोणी या शहरात जे तुझे आपले असे आहे काय? त्यांना
येथून बाहेर काढ, 13 कारण आम्ही या शहराचा नाश करणार आहोत.
याहवेहपर्यंत या लोकांविरुद्ध आलेला आक्रोश इतका मोठा आहे की
त्यांनी आम्हाला त्याचा नाश करण्यासाठी पाठविले आहे.” 14 तेव्हा
लोट आपल्या जावयांकडे गेला, जे त्याच्या मुलींशी विवाह करण्यास
वचनबद्ध होते. तो म्हणाला, “घाई करा आणि या ठिकाणातून बाहेर
चला, कारण याहवेह या शहराचा नाश करणार आहेत!” पण त्याच्या
जावयांना वाटले की, तो विनोद करीत आहे. 15 पहाट होताच, दूत
लोटाला आग्रह करीत म्हणाले, “त्वरा कर! तुझी पत्नी व तुझ्या दोन
कन्या ज्या इथे आहेत त्यांना घेऊन नीघ, नाहीतर या नगराचा नाश होत
असताना तुझाही नाश होईल.” 16 पण लोट आढेवेढे घेऊ लागला,
तेव्हा दूतांनी त्याचा, त्याच्या पत्नीचा आणि त्याच्या दोन्ही कन्यांचे
हात धरून त्यांना नगराबाहेर एका सुरक्षित ठिकाणी आणून सोडले,
कारण त्या कुटुंबावर याहवेहची कृपा होती. 17 दूतांनी त्यांना ताकीद
दिली, “आता जीव घेऊन पळा! पाठीमागे अजिबात वळून पाहू नका,
सपाट भूमीवर रेंगाळत राहू नका! थेट डोंगरावर जा, नाहीतर तुम्हीही
त्याच्या आवाक्यात याल!” 18 यावर लोट विनवणी करीत म्हणाला,
“स्वामींनो, कृपा करून असे करू नका! 19 तुम्ही तुमच्या सेवकाशी
इतके दयाळूपणाने वागला आहात व तुम्ही माझा जीव वाचविला आहे.
परंतु मला डोंगरावर पाठवू नका; तिथे कदाचित माझ्यावर काही अरिष्ट
येईल आणि मी मरेन. 20 पाहा, तिथे जवळच एक गाव आहे आणि ते
लहानही आहे. तिथे पळून जाण्याची परवानगी द्या—हे अगदी लहानसे
आहे, नाही का? म्हणजे माझा जीव वाचेल.” 21 तो त्याला म्हणाला,
“ठीक आहे, मी तुझी विनंती मान्य करतो; तू म्हणतोस त्या गावाचा मी
नाश करणार नाही. 22 पण त्वरा कर आणि तिथे जा, कारण तू तिथे
पोहोचेपर्यंत मला काहीच हालचाल करता येत नाही.” (त्या वेळेपासून
त्या गावाचे नाव सोअर नगरी असे पडले.) 23 सूर्योदयाच्या सुमारास
लोट सोअर गावात जाऊन पोहोचला. 24 मग याहवेहने सदोम आणि
गमोरा या नगरांवर स्वर्गातून—याहवेहकडूनच—ज्वलंत गंधकाचा वर्षाव
केला; 25 आणि त्या दोन नगरांबरोबर आसपासची इतर गावे, तसेच
सर्व वनस्पतीचा संपूर्ण नाश केला. 26 परंतु लोटाच्या पत्नीने मागे वळून
पाहिले, ती मिठाचा खांब झाली. 27 दुसऱ्या दिवशी अब्राहाम पहाटेच
उठला आणि ज्या ठिकाणी तो याहवेहसमोर उभा राहिला होता त्या
ठिकाणी आला. 28 त्याने मैदानापलीकडे असलेल्या सदोम आणि
गमोरा याकडे नजर टाकली, भट्टीतून निघाल्यासारखे धुरांचे लोटच्या
लोट त्या नगरातून उसळून वर येत आहेत, असे त्याला दिसले. 29 मग
जेव्हा परमेश्वराने त्या नगरांचा नाश केला, त्यांना अब्राहामाची आठवण
आली आणि त्यांनी ज्या नगरास मृत्यूने विळखा घातला होता त्या लोट
राहात असलेल्या नगरातून त्याला सोडविले. 30 पुढे लोटाने सोअरमधील
लोकांच्या भीतीमुळे ते गाव सोडले व तो आपल्या दोन मुलींना घेऊन
डोंगरातील एक गुहेमध्ये जाऊन राहिला. 31 एके दिवशी थोरली मुलगी
धाकट्या बहिणीला म्हणाली, “आपले वडील म्हातारे झाले आहेत आणि
आजूबाजूला एकही पुरुष नाही की जो आपल्याला मूल देईल—जशी
पृथ्वीवरील प्रथा आहे. 32 तेव्हा चल, आपण त्यांना खूप द्राक्षमद्य पाजू
आणि मग त्यांच्याबरोबर शय्या करू म्हणजे आपला वंश आपल्या
वडिलांद्वारे कायम राहील.” 33 त्या रात्री त्यांनी लोटाला भरपूर मद्य
पाजले. मग थोरली आत गेली आणि तिने आपल्या वडिलांबरोबर शय्या
केली; ती केव्हा निजली व केव्हा उठली याचे त्याला भानच नव्हते! 34
दुसऱ्या दिवशी सकाळी थोरली मुलगी आपल्या धाकट्या बहिणीस
म्हणाली, “काल रात्री मी आपल्या वडिलांबरोबर शय्या केली, आज
रात्रीही आपण त्यांना भरपूर मद्य पाजू आणि मग तू त्यांच्याशी शय्या
कर म्हणजे अशा रीतीने आपला वंश आपल्या वडिलांद्वारे पुढे चालेल.”
35 त्याप्रमाणे त्या रात्री त्यांनी आपल्या वडिलांना पुन्हा भरपूर मद्य

पाजले. मग धाकटी मुलगी आत गेली आणि त्याच्यासोबत शय्या केली.
ती केव्हा निजली व केव्हा उठली याचे त्याला भानच नव्हते! 36 अशा
रीतीने लोटाच्या दोन्ही मुली आपल्या वडिलांपासून गर्भवती झाल्या. 37
थोरल्या मुलीला पुत्र झाला, तिने त्याचे नाव मोआब असे ठेवले व तो
मोआबी राष्ट्राचा मूळ पुरुष झाला. 38 धाकट्या मुलीलासुद्धा पुत्र झाला
आणि तिने त्याचे नाव बेनअम्मी असे ठेवले, तो अम्मोनी राष्ट्राचा मूळ
पुरुष झाला.

**20** आता अब्राहाम तिथून दक्षिणेस नेगेव प्रांताकडे गेला आणि
त्याने कादेश आणि शूर यांच्या दरम्यान वस्ती केली. काही
काळासाठी तो गरार नगरात राहिला, 2 सारा आपली बहीण असल्याचे
अब्राहामाने सांगितले, तेव्हा गरारचा राजा अबीमेलेख याने माणसे
पाठवून सारेला आपल्याकडे आणले. 3 पण एका रात्री परमेश्वर
स्वप्नात अबीमेलेखकडे आले आणि त्याला म्हणाले, “आता तुझा अंत
झाल्यासारखाच आहे, कारण जी स्त्री तू आणली आहेस, ती विवाहित
आहे.” 4 पण अबीमेलेखाने तिला अद्याप स्पर्श केला नव्हता, म्हणून
तो म्हणाला, “प्रभू, तुम्ही एक निरपराधी राष्ट्राचा अंत कराल काय?
5 खुद्द अब्राहामानेच मला सांगितले नव्हते का की ती माझी बहीण
आहे? आणि तिनेही सांगितले नव्हते का तो माझा भाऊ आहे? मी
हे शुद्ध हृदयाने आणि शुद्ध हातांनी केले आहे.” 6 परमेश्वराने त्याला
स्वप्नात म्हणाले, “होय, ते मला माहीत आहे; ते तू शुद्ध हृदयाने केले
आहे आणि म्हणूनच मी तुला पाप करण्यापासून रोखून धरले आणि
तिला स्पर्शही करू दिला नाही. 7 आता तू तिला आपल्या पतीकडे
परत पाठवून दे. तिचा पती माझा संदेष्टा आहे. तो तुझ्यासाठी प्रार्थना
करेल, म्हणजे तू जिवंत राहशील; पण जर तू तिला परत पाठविले
नाहीस, तर तू आणि तुझे सर्व लोक खात्रीने मरतील.” 8 दुसऱ्या दिवशी
सकाळीच अबीमेलेखाने आपल्या सर्व अधिकाऱ्यांना बोलाविले आणि
काय घडले हे त्याने सांगितले, तेव्हा सर्व लोक फार घाबरले. 9 मग
अबीमेलेखाने अब्राहामास बोलावून विचारणा केली, “हे तू आमच्याशी
काय केलेस? मी असे काय अपराध केले की, मला तुझ्याकडून अशी
वागणूक मिळावी आणि त्यामुळे माझ्यावर आणि माझ्या राज्यावर घोर
पातक आणले? जे कृत्य कधीही करू नये ते तू माझ्याशी केले आहेस.”
10 मग अबीमेलेखाने अब्राहामास विचारले, “तू हे असे करण्याचे काय
कारण आहे?” 11 अब्राहाम म्हणाला, “मी मनात विचार केला, ‘या
शहरात कोणीही परमेश्वराला भीत नाही आणि माझ्या पत्नीमुळे ते
माझा वध करतील.’ 12 असे असूनही, ती माझी बहीण आहे, माझ्या
वडिलांची मुलगी आहे, परंतु माझ्या आईची मुलगी नाही; आणि ती
माझी पत्नी झाली. 13 परमेश्वराने माझ्या वडिलांचे घर सोडून मला
प्रवासास पाठविले, तेव्हा मी तिला म्हटले की, ‘जिथेही आपण जाऊ
तिथे मी तुझा भाऊ आहे असे सांगून तू माझ्यावरील तुझी प्रीती मला
दाखव.’” 14 मग अबीमेलेखाने अब्राहामाला मेंढरे, बैल आणि स्त्री व
पुरुष गुलाम दिले आणि त्याची पत्नी साराहदेखील त्याला परत केली.
15 आणि अबीमेलेख म्हणाला, “माझा देश तुमच्यासमोर आहे. तुम्हाला
आवडेल तिथे राहा.” 16 मग साराहला तो म्हणाला, “तुझ्या भावाला मी
चांदीचे एक हजार शेकेल देत आहे. मी तुझ्यावर केलेल्या गुन्ह्याबद्दल
तुझ्याबरोबरच्या लोकांसमोर ही भरपाई आहे; तू पूर्णपणे निर्दोष आहे.”
17 यानंतर अब्राहामाने परमेश्वराजवळ प्रार्थना केली आणि परमेश्वराने
अबीमेलेख राजा, राणी व त्याच्या दासी यांना आरोग्य दिले आणि त्यांना
परत मुले होऊ लागली. 18 कारण अब्राहामाची पत्नी साराह हिच्यामुळे
याहवेहनी अबीमेलेखाच्या घराण्यातील सर्व स्त्रियांची गर्भधारणा बंद
केली होती.

**21** यानंतर याहवेहने आपल्या म्हणण्याप्रमाणे साराहवर अनुग्रह
केला आणि तिला दिलेले वचन पूर्ण केले. 2 साराह गर्भवती
झाली आणि परमेश्वराने नियुक्त केलेल्या वेळी अब्राहामाला त्याच्या
वृद्धापकाळात तिच्यापासून एक पुत्र झाला. 3 अब्राहामाने साराहपासून
जन्मलेल्या पुत्राचे नाव इसहाक असे ठेवले. 4 इसहाक जन्मल्यानंतर
आठ दिवसांनी, परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे, अब्राहामाने त्याची सुंता केली.
5 जेव्हा इसहाकाचा जन्म झाला, त्यावेळी अब्राहाम शंभर वर्षांचा होता.
6 साराह म्हणाली, “परमेश्वराने मला हसविले आहे आणि जे याबद्दल
ऐकतील, ते माझ्याबरोबर आनंद करतील.” 7 आणि ती अजून म्हणाली,
“अब्राहामाला कोणी सांगितले असते काय की साराह तिच्या बाळाला
स्तनपान करेल? तरीही मी अब्राहामाला त्याच्या म्हातारपणी एक
अपत्य दिले आहे.” 8 ते बाळ वाढू लागले आणि ज्या दिवशी इसहाकाचे
दूध तोडण्यात आले, त्या दिवशी अब्राहामाने एक मोठी मेजवानी दिली.
9 परंतु अब्राहामाला इजिप्त देशाची स्त्री हागार, हिच्यापासून झालेला
पुत्र, इसहाकाला चिडवीत असताना साराहने पाहिले. 10 तेव्हा ती
अब्राहामाला म्हणाली, “दासी व तिचा पुत्र यांना घालवून द्या; कारण
त्या स्त्रीचा पुत्र कधीही माझा पुत्र इसहाक याच्याबरोबर वारसा वाटून
घेणार नाही.” 11 ही बाब अब्राहामाला खूप त्रास देत होती कारण ती
त्याच्या मुलाची होती. 12 तरी परमेश्वराने अब्राहामाला सांगितले, “तुझी
स्त्री गुलाम आणि तिचा पुत्र यांच्यामुळे तू मनस्ताप करून घेऊ नकोस.
साराहच्या म्हणण्याप्रमाणे कर, कारण इसहाकाद्वारेच तुझी संतती
वाढेल. 13 त्या दासीपुत्रापासूनही मी एक राष्ट्र निर्माण करेन, कारण
तोही तुझा पुत्र आहे.” 14 दुसऱ्या दिवशी अब्राहाम सकाळीच उठला,
त्याने प्रवासासाठी भोजन आणि पाण्याची कातडी पिशवी हागारेला
दिली. ती तिच्या खांद्यावर अडकवून मुलासह तिची रवानगी केली. ती
तिथून निघाली व बेअर-शेबाच्या अरण्यात भटकू लागली. 15 जवळचे
पाणी संपल्यावर तिने आपल्या पुत्राला एका झुडूपाखाली ठेवले, 16
आणि ती त्याच्यापासून सुमारे बाणाच्या टप्प्याइतकी दूर जाऊन बसली,
“माझ्या बाळाचा मृत्यू मला पाहावयाला नको आहे,” असे म्हणून ती
हुंदके देऊन रडू लागली. 17 मग परमेश्वराने त्या मुलाच्या रडणे ऐकले
आणि परमेश्वराचा दूत आकाशातून हागारेला हाक मारून म्हणाला,
“हागारे, तुला काय झाले आहे? भिऊ नकोस; कारण परमेश्वराने
मुलाचे रडणे ऐकले आहे. 18 ऊठ, त्याला उचलून घे, कारण मी
त्याच्यापासून एक मोठे राष्ट्र निर्माण करेन.” 19 मग परमेश्वराने तिचे

डोळे उघडले आणि तिला एक पाण्याची विहीर दिसली. तेव्हा तिने
आपली पाण्याची मसक भरून घेतली आणि त्या मुलाला पाणी पाजले.
20 परमेश्वर त्या मुलासोबत होते. तो पारानच्या रानात लहानाचा मोठा
होऊन एक तरबेज तिरंदाज झाला; 21 पुढे तो पारानच्या रानात राहत
असताना त्याच्या आईने त्याचा इजिप्त देशातील एका मुलीसह विवाह
करून दिला. 22 याच सुमारास अबीमेलेख राजा व त्याचा सेनापती
पीकोल. हे अब्राहामाकडे आले, ते त्याला म्हणाले, “तू जे काही करतोस
त्यात परमेश्वर तुला साहाय्य करतात. 23 तर परमेश्वराच्या नावाने तू
मला असे वचन दे की, तू माझ्याशी, माझ्या मुलांशी किंवा वंशजांशी
कपटनीतीने वागणार नाहीस. ज्याप्रमाणे मी तुझ्याशी मित्रत्वाने वागलो
आहे, त्याप्रमाणेच तूही माझ्या देशाशी मित्रत्वानेच वागशील.” 24
अब्राहाम म्हणाला, “ठीक आहे, मी तुला शपथ देतो.” 25 “पण तुझ्या
सेवकांनी माझ्या नोकरांपासून जबरदस्तीने एक विहीर हिरावून घेतली
आहे त्याचे काय?” अब्राहामाने अबीमेलेखकडे तक्रार केली. 26 “हे
तर मी पहिल्यांदाच ऐकत आहे,” अबीमेलेख राजाने उद्गार काढले,
“आणि याला कोण जबाबदार आहे याची मला काहीच कल्पना नाही.
हे तू मला आधी का सांगितले नाहीस?” 27 मग अब्राहामाने मेंढरे
आणि बैल घेतले आणि अबीमेलेखाला दिले आणि त्या दोघांनी करार
केला. 28 पण अब्राहामाने सात मेंढ्या बाजूला काढून ठेवल्या, 29
तेव्हा अबीमेलेखाने अब्राहामाला विचारले, “तू असे का करीत आहेस?
त्या मेंढ्या बाजूला का काढीत आहेस?” 30 यावर अब्राहामाने उत्तर
दिले, “ही विहीर मीच खोदली आहे, याचे जाहीर प्रमाण म्हणून या
मेंढ्या मी तुला देणगीदाखल देत आहे.” 31 म्हणून त्या वेळेपासून
त्या विहिरीचे नाव बेअर-शेबा पडले. कारण दोघांनी त्याच ठिकाणी
शपथ घेऊन करार केला होता. 32 बेअर-शेबा येथे करार केल्यानंतर
अबीमेलेख आणि त्याचा सेनापती पीकोल पलिष्ट्यांच्या देशात परतले.
33 अब्राहामाने बेअर-शेबा येथे टमरिस्क म्हणजे एशेल नावाचे झाड
लावले आणि सनातन परमेश्वर याहवेहची आराधना केली. 34 आणि
अब्राहाम पलिष्ट्यांच्या देशात दीर्घकाल राहिला.

**22** काही वेळेनंतर परमेश्वराने अब्राहामाची परीक्षा घेतली. परमेश्वराने
त्यास म्हटले, “अब्राहामा!” “हा, मी इथे आहे,” तो उत्तरला.
2 मग परमेश्वर म्हणाले, “तुझा पुत्र, ज्याच्यावर तू प्रीती करतोस तो
तुझा एकुलता एक पुत्र इसहाकाला बरोबर घे आणि मोरिया प्रदेशात
जा आणि त्या ठिकाणी मी तुला जो डोंगर दाखवेन त्या डोंगरावर
त्याचे होमार्पण कर.” 3 अब्राहामाने दुसऱ्या दिवशी पहाटेस उठून
गाढवावर खोगीर लादले आणि आपला पुत्र इसहाक व दोन सेवकांना व
होमार्पणासाठी पुरेशी लाकडे बरोबर घेऊन तो परमेश्वराने सांगितलेल्या
ठिकाणी जावयास निघाला. 4 तिसऱ्या दिवशी अब्राहामाने आपली दृष्टी
वर करून ते ठिकाण दुरून पाहिले. 5 तेव्हा अब्राहाम सेवकांना म्हणाला,
“तुम्ही येथे गाढवाजवळ थांबा, मी आणि माझा पुत्र पलीकडे जातो.
परमेश्वराची उपासना करून तुमच्याकडे परत येतो.” 6 अब्राहामाने
होमार्पणासाठी घेतलेले लाकूड इसहाकाच्या खांद्यावर ठेवले आणि
स्वतः सुरा व विस्तव घेतला. जसे ते चालत पुढे गेले, 7 इसहाकाने
अब्राहामाला विचारले, “बाबा?” “काय माझ्या मुला?” अब्राहामाने
उत्तर दिले. “आपण लाकडे व विस्तव घेतले,” इसहाक म्हणाला,
“पण होमार्पणासाठी कोकरू कुठे आहे?” 8 अब्राहामाने उत्तर दिले,
“परमेश्वर होमार्पणासाठी कोकरू पुरवतील, माझ्या मुला.” आणि ते
दोघे एकत्र पुढे गेले. 9 परमेश्वराने ज्या ठिकाणी जाण्यास सांगितले
होते त्या जागी आल्यावर अब्राहामाने एक वेदी बांधली आणि त्यावर
त्याने लाकडे रचून ठेवली. त्याने आपला पुत्र इसहाकाला बांधले आणि
वेदीवरील लाकडांवर ठेवले; 10 मग अब्राहामाने आपल्या मुलाचा बळी
देण्याकरिता आपल्या हातातील सुरा उंचाविला. 11 त्याच क्षणाला
याहवेहचा दूत स्वर्गातून ओरडून म्हणाला, “अब्राहामा, अब्राहामा!” “हा
मी इथे आहे,” तो उत्तरला. 12 “मुलावर आपला हात उगारू नको.” तो
म्हणाला, “त्याला काहीही करू नकोस. तुला परमेश्वराचे भय आहे हे
मला समजले आहे, कारण तुझा पुत्र, एकुलता एक पुत्र मला अर्पिण्याचे
तू नाकारले नाहीस.” 13 अब्राहामाची नजर झुडूपात शिंगे अडकलेल्या
एका एडक्याकडे गेली. त्याने तो एडका धरला आणि आपल्या पुत्राच्या
जागी त्याने त्या एडक्याचा होमार्पण म्हणून बळी दिला. 14 म्हणून
अब्राहामाने त्या जागेचे नाव “याहवेह यिरेह” आजपर्यंत “याहवेहच्या
डोंगरावर पुरवठा केला जाईल,” असे बोलले जाते. 15 नंतर याहवेहच्या
दूताने अब्राहामाला स्वर्गातून दुसऱ्यांदा हाक मारली. 16 ते म्हणाले,
“मी याहवेह, स्वतःचीच शपथ घेऊन तुला सांगतो की, कारण तू हे
केलेस आणि स्वतःच्या पुत्राला, एकुलत्या एक पुत्राला अर्पण करण्यास
तू नाकारले नाहीस, 17 म्हणून मी तुला निश्चितच आशीर्वादित करेन
आणि वृद्धिंगत करून तुझी संतती आकाशातील ताऱ्यांइतकी आणि
समुद्रतीरावरील वाळू इतकी करेन. तुझी संतती आपल्या सर्व शत्रूंची
शहरे हस्तगत करेल, 18 आणि तू माझ्या आज्ञा पाळल्या आहेस, म्हणून
पृथ्वीवरील सर्व राष्ट्रे तुझ्या वंशजापासून आशीर्वादित होतील.” 19
यानंतर अब्राहाम आपल्या सेवकांकडे परत आला आणि ते सर्वजण
बेअर-शेबा येथे आपल्या घरी परतले आणि अब्राहाम बेअर-शेबा येथे
राहिला. 20 काही वेळेनंतर अब्राहामाला सांगण्यात आले, “त्याचा भाऊ
नाहोर याची पत्नी मिल्का हिलाही मुले झाली आहेत: 21 ऊस हा त्याचा
प्रथमपुत्र, त्याचा भाऊ बूज व कमुवेल (अरामचा पिता) 22 आणि
केसद, हजो, पिलदाश, यिदलाप व बेथुएल.” 23 बेथुएल रिबेकाहचा
पिता झाला. 24 नाहोराची उपपत्नी रेऊमा हिलाही पुत्र झाले: तेबाह,
गहाम, तहश व माकाह.

**23** साराह एकशे सत्तावीस वर्षे जगली. 2 साराह ही कनान देशातील
किर्याथ-अर्बा (म्हणजे हेब्रोन) येथे मरण पावली. अब्राहाम
तिच्यासाठी शोक व विलाप करण्यास गेला. 3 आणि साराहच्या
मृतदेहाजवळ उभे राहून अब्राहाम हेथीच्या लोकांना म्हणाला, 4 “या
देशात मी एक परकीय व अनोळखी आहे. कृपया मला माझ्या मृतास
पुरण्याकरिता जमिनीचा एक भाग विकत द्या.” 5 हेथी लोकांनी
अब्राहामाला उत्तर दिले, 6 “महाराज, आमचे ऐका. आमच्यामध्ये आपण

एक पराक्रमी राजपुत्र आहात. तुम्ही आपल्या मृतांसाठी स्वत:च कबर
निवडून त्यांना मूठमाती द्या. आपली खाजगी कबर तुम्हाला देण्यास
आमच्यातील कोणीही नकार देणार नाही.” 7 हे ऐकून अब्राहामाने त्या
हेथी लोकांसमोर लवून मुजरा केला आणि तो म्हणाला, 8 “मी आपल्या
मयतास पुरावे अशी तुमची इच्छा असेल तर माझे ऐका, जोहराचा पुत्र
एफ्रोन, 9 याला त्याच्या शेताच्या टोकाला असलेली मकपेला नावाची
गुहा मला विकत देण्यास माझ्यावतीने विनंती करा. तिची पूर्ण किंमत मी
देईन आणि ती माझ्या कुटुंबीयांसाठी स्मशानभूमी होईल.” 10 एफ्रोन
हेथी हा हेथी लोकांसह बसलेला होता, त्या नगरचौकात असलेल्या
सर्व हेथी लोकांसमक्ष तो अब्राहामाला म्हणाला, 11 “नाही, महाराज,
माझे ऐका; ती गुहा आणि ते शेत मी तुम्हाला देईन, माझ्या लोकांच्या
देखत मी तुम्हाला ती देत आहे. तिथे तुम्ही तुमच्या मृतास मूठमाती
द्या.” 12 अब्राहामाने त्या देशातील लोकांना पुन्हा लवून मुजरा केला 13
आणि त्या देशाच्या लोकांसमक्ष तो एफ्रोनास म्हणाला, “माझे ऐका,
मला ती जागा तुझ्याकडून विकत घेऊ दे; त्या शेताची सर्व किंमत
मी तुला देईन. मग मी माझ्या मृताला तिथे मूठमाती देईन.” 14 हे
ऐकून एफ्रोन अब्राहामाला म्हणाला, 15 “महाराज, त्या जागेची किंमत
केवळ चांदीची चारशे शेकेल आहे; पण तुमच्या आणि माझ्यामध्ये
त्याचे काय? तिथे आपल्या मृताला मूठमाती द्या.” 16 तेव्हा अब्राहामाने
कबूल केल्याप्रमाणे एफ्रोनाने हेथी लोकांच्या समक्ष सांगितलेली किंमत,
म्हणजे चारशे शेकेल चांदी, त्या काळातील व्यापाऱ्यांच्या परिमाणानुसार
अब्राहामाने त्याला दिली. 17 अशाप्रकारे मम्रेजवळील मकपेला येथे
असलेले एफ्रोनाचे शेत आणि शेताच्या शेवटच्या टोकाला असलेली गुहा
आणि त्याच्या चतु:सीमातील प्रत्येक झाड अब्राहामाने विकत घेण्याचा
करार केला. 18 हा करार शहराच्या वेशीसमोर सर्व हेथी लोकांच्या
समक्ष झाला, ते सर्व अब्राहामाच्या कायमच्या मालकीचे झाले. 19
त्यानंतर अब्राहामाने आपली पत्नी साराह हिला कनान देशात मम्रे
(म्हणजे हेब्रोन) जवळ असलेल्या मकपेलाच्या शेतातील गुहेत पुरले.
20 याप्रमाणे, हेथी लोकांनी स्मशानभूमी म्हणून शेत व त्यातील गुहा
अब्राहामाच्या मालकीची झाल्याचा करार केला.

**24** अब्राहाम आता खूप वृद्ध झाला होता. याहवेहने त्याला सर्व
बाबतीत आशीर्वादित केले होते. 2 अब्राहाम आपल्या घरादाराचा
कारभार पाहणाऱ्या सर्वात जुन्या सेवकाला म्हणाला, “तू आपला हात
माझ्या मांडीखाली ठेव. 3 स्वर्ग व पृथ्वीचे परमेश्वर याहवेह यांच्या नावाने
मला वचन दे की, माझ्या मुलाचा मी राहत असलेल्या स्थानिक कनानी
मुलीबरोबर विवाह करून देणार नाहीस, 4 याऐवजी तू माझ्या मायदेशात
माझ्या नातेवाईकांकडे जाशील आणि माझा पुत्र इसहाकासाठी एक वधू
शोधून आणशील.” 5 सेवकाने अब्राहामाला विचारले, “पण समजा,
आपले घर सोडून इतक्या दूर येण्यास ती स्त्री तयार नसेल तर मी
इसहाकाला जो देश तुम्ही सोडून आला त्या देशात घेऊन जावे काय?”
6 “माझ्या मुलाला तिकडे कधीही नेऊ नको,” अब्राहाम त्याला म्हणाला.
7 “कारण याहवेह जे स्वर्गाचे परमेश्वर आहेत, त्यांनी माझ्या पित्याच्या
घरातून व माझ्या जन्मभूमीतून काढून मला आणि माझ्या मुलाबाळांना
हा देश देण्याचे वचन दिले आहे, तेच परमेश्वर तुझ्यापुढे आपला दूत
पाठवतील आणि माझ्या मुलासाठी योग्य वधू तुला मिळेल. 8 पण स्त्री
येथे येण्यास तयार झाली नाही, तर तू आपल्या वचनातून मुक्त होशील.
फक्त माझ्या मुलाला तिकडे नेऊ नकोस.” 9 तेव्हा सेवकाने त्याचा धनी
अब्राहामाच्या मांडीखाली हात ठेऊन ही बाब शपथपूर्वक मान्य केली.
10 मग त्या सेवकाने अब्राहामाचे दहा उंट घेऊन, आपल्या धन्याच्या
मालमत्तेतील उत्तमोत्तम वस्तू निवडून त्या सर्व उंटांवर लादल्या. मग तो
प्रवास करीत अराम-नहराईम मधील नाहोराच्या नगरास गेला. 11 तिथे
नगराच्या बाहेर त्याने विहिरीजवळ उंटांना बसविले; ती संध्याकाळची
वेळ होती. स्त्रिया विहिरीतून पाणी नेण्यासाठी तिथे येत होत्या. 12
त्यावेळी त्या सेवकाने प्रार्थना केली, “हे याहवेह, माझ्या धन्याच्या
परमेश्वरा, माझा धनी अब्राहाम याच्यावर दया करा आणि ज्या उद्देशाने
मी हा प्रवास केला तो सफल करा. 13 पाहा, मी येथे विहिरीजवळ
उभा आहे व पाणी नेण्याकरिता नगरातील कन्या येत आहेत. 14
माझी तुम्हाला अशी विनंती आहे की, त्या तरुणींपैकी एकीला ‘तुझी
पाण्याची घागर वाकवून मला प्यायला पाणी दे’ असा ज्यावेळी मी
म्हणेन त्यावेळी, ‘होय निश्चितच, मी तुझ्या उंटांनाही पाणी पाजते’ असे
जी म्हणेल तीच इसहाकासाठी तुम्ही निवडलेली वधू आहे, यावरून
मला समजेल की तुम्ही माझ्या धन्याला कृपा दाखविली आहे.” 15
त्याची प्रार्थना समाप्त होण्यापूर्वी रिबेकाह खांद्यावर घागर घेऊन तिथे
आली. ती नाहोर आणि मिल्का यांचा पुत्र बेथुएल याची कन्या होती.
नाहोर हा अब्राहामाचा भाऊ होता. 16 ती अतिशय देखणी असून
कुमारिका होती; आतापर्यंत कोणत्याही पुरुषाने तिला स्पर्श केला
नव्हता. तिने खाली जाऊन विहिरीच्या पाण्याने घागर भरली आणि ती
वर आली. 17 अब्राहामाचा सेवक तिच्याकडे धावत गेला आणि तो
तिला म्हणाला, “कृपया मला तुझ्या घागरीतील थोडे पाणी दे.” 18
“प्या, माझ्या स्वामी,” असे म्हणून तिने लगेच आपली घागर वाकवून
त्याला प्यायला पाणी दिले. 19 त्यास पुरेसे पाणी पाजल्यानंतर ती
त्याला म्हणाली, “मी तुमच्या उंटांसाठीही त्यांना पुरेल इतके पाणी
काढते.” 20 तिने आपल्या घागरीतील पाणी कुंडात ओतले आणि ती
पुन्हा पाणी काढण्याकरिता विहिरीकडे धावत गेली आणि त्याच्या सर्व
उंटांना पुरेल इतके पाणी तिने काढले. 21 ती पाणी काढीत असताना,
तो सेवक एक शब्दही न बोलता, तिचे बारकाईने निरीक्षण करीत होता
की याहवेहने त्याचा प्रवास सफल केला की नाही. 22 शेवटी उंटांचे
पाणी पिणे संपल्यावर, त्याने तिला एक बेका वजनाची सोन्याची नथ
आणि दहा शेकेल वजनाच्या दोन सोन्याच्या बांगड्या दिल्या. 23 नंतर
त्याने तिला विचारले, “तू कोणाची कन्या आहेस? कृपया मला सांग की
रात्री मुक्काम करण्यासाठी आम्हाला तुझ्या वडिलांच्या घरी जागा मिळू
शकेल काय?” 24 तिने उत्तर दिले, “मी नाहोर व मिल्का, यांचा पुत्र
बेथुएल यांची कन्या आहे.” 25 आणि ती पुढे हे म्हणाली, “आमच्या
घरी रात्री मुक्काम करण्यासाठी खोली आणि उंटांसाठीही भरपूर गवत

व चारा आहे.” 26 तेव्हा त्या मनुष्याने आपले डोके लवविले आणि
याहवेहची आराधना केली. 27 तो म्हणाला, “माझा धनी अब्राहामाचे
परमेश्वर याहवेहची स्तुती असो, माझ्या धन्याबरोबर तुम्ही इतक्या
प्रेमाने आणि विश्वासूपणाने वागता म्हणून मी तुमचे आभार मानतो.
माझ्या धन्याच्या नातेवाईकांच्या कुटुंबात तुम्ही मला सरळ घेऊन आला
म्हणूनही मी तुमचे आभार मानतो.” 28 तेव्हा ती मुलगी आपल्या
आईच्या कुटुंबातील लोकांना ही बातमी सांगण्यासाठी धावतच घरी
गेली. 29 रिबेकाहला एक भाऊ होता, त्याचे नाव लाबान होते. तो
धावतच त्या मनुष्याला भेटण्यासाठी विहिरीकडे गेला; 30 त्याने तिची
नथ व तिच्या हातातील बांगड्या पाहिल्या आणि रिबेकाहच्या तोंडची
हकिकत ऐकली, तेव्हा तो विहिरीकडे गेला आणि पाहिले की तो मनुष्य
अद्यापही आपल्या उंटांपाशी विहिरीजवळच उभा आहे. 31 त्याने म्हटले,
“या, तुम्ही जे याहवेहद्वारे आशीर्वादित आहात, बाहेर का उभे आहात?
तुम्हाला राहण्यास खोली आणि उंटांकरिता मी जागा तयार केली आहे.”
32 मग तो मनुष्य त्यांच्या घरी गेला. उंटांवरून सामान उतरून त्यांना
गवत आणि खाण्याकरिता चाराही देण्यात आला. त्यास व त्याच्या
बरोबरीच्या लोकांस पाय धुण्याकरिता त्याने पाणीही दिले. 33 यानंतर
भोजन वाढण्यात आले; परंतु तो म्हणाला, “मला जे काही सांगायचे ते
सांगेपर्यंत मी भोजन करणार नाही.” लाबान म्हणाला, “ठीक आहे,
आम्हाला सांग.” 34 तेव्हा तो म्हणाला, “मी अब्राहामाचा सेवक आहे.
35 याहवेहने माझ्या धन्याला फार आशीर्वाद दिले आहेत आणि तो थोर
पुरुष झाला आहे. त्यांनी त्याला मेंढरांचे कळप, गुरांची खिल्लारे, सोने
चांदी, पुष्कळ दास आणि दासी, उंट आणि गाढवे दिली आहेत. 36
माझ्या धन्याला त्याची पत्नी साराह हिच्यापासून वृद्धापकाळात एक
पुत्र झाला. माझ्या धन्याने त्याचे सर्वस्व त्याला दिले आहे. 37 त्या
पुत्रासाठी, मी जिथे राहत आहे तेथील स्थानिक कनानी मुलींमधून पत्नी
निवडू नये, असे वचन माझ्या धन्याने माझ्यापासून घेतले आहे. 38
माझ्या वडिलांच्या कुटुंबात जावे आणि माझ्या स्वतःच्या घराण्यातील
लोकांकडे जाऊन माझ्या मुलासाठी येथील मुलगी निवडून मी आणावी,
असे त्याने मला बजावले आहे. 39 “मग मी माझ्या धन्यास विचारले, ती
मुलगी माझ्याबरोबर परत आली नाही तर? 40 “यावर त्याने उत्तर दिले,
‘ती खात्रीने येईल, कारण ज्या याहवेहच्या समक्षतेत मी चालतो ते
त्यांचा दूत तुझ्याबरोबर पाठवतील आणि तुझी यात्रा सिद्धीस नेतील.
माझ्या नातेवाईकांकडे जाऊन माझ्या वडिलाच्या घराण्यातील एक
मुलगी शोधून आण. 41 याप्रमाणे करण्यास तू वचनबद्ध आहेस. जेव्हा तू
माझ्या घराण्याकडे जाशील आणि त्यांनी मुलगी पाठविण्याचे नाकारले,
तर तू तुझ्या शपथेतून मुक्त होशील.’ 42 “आज मी विहिरीजवळ आलो
तेव्हा मी अशी प्रार्थना केली की, माझा धनी अब्राहामाचे परमेश्वर
याहवेह, कृपया माझी यात्रा तुम्ही यशस्वी करा. 43 पाहा, मी येथे या
विहिरीजवळ उभा असताना पाणी भरण्यास आलेल्या एखाद्या मुलीला
म्हणेन, ‘तुझ्या घागरीतील थोडे पाणी मला प्यावयास दे,’ 44 आणि
यावर ती मला म्हणेल, ‘अवश्य महाराज, आणि मी तुम्हाला आणि
तुमच्या उंटांनाही पाणी पाजीन,’ तीच मुलगी माझ्या धन्याच्या पुत्राची
पत्नी होण्यासाठी याहवेहने निवडलेली आहे असे होऊ द्या. 45 “माझ्या
मनातल्या मनात माझे हे बोलणे संपले नाही तोच रिबेकाह आपल्या
खांद्यावर घागर घेऊन पाणी भरण्यास आली आणि तिने विहिरीत उतरून
पाणी भरले. मग मी तिला म्हणालो, ‘मला थोडे पाणी प्यावयाला दे.’
46 “मला पाणी पिता यावे म्हणून तिने आपल्या खांद्यावरील घागर
झटकन खाली उतरविली आणि ती मला म्हणाली, ‘अवश्य महाराज, मी
तुम्हाला आणि तुमच्या उंटांनाही पाणी पाजते.’ मग मी प्यालो आणि
तिने उंटांनाही पाणी पाजले. 47 “मी तिला विचारले, ‘तू कोणाची मुलगी
आहेस?’ “ती म्हणाली, ‘मी नाहोराचे पुत्र बेथुएलाची, ज्यांची माता
मिल्का आहे, त्यांची कन्या आहे.’ “हे ऐकून मी तिच्या नाकात नथ
आणि हातात पाटल्या घातल्या. 48 माझ्या धन्याच्या भावाची नात
शोधून काढण्यास मला योग्य मार्गदर्शन केल्याबद्दल मी माझे मस्तक
लवविले आणि माझा धनी अब्राहामाचे परमेश्वर याहवेहचे मी स्तवन
केले. 49 तर आता माझ्या धन्यावर दया आणि विश्वासूपणा दाखवून जे
योग्य ते करण्याची तुमची तयारी आहे की नाही हे मला नक्की सांगा,
म्हणजे पुढे काय करावयाचे ते मला ठरविता येईल.” 50 यावर लाबान
आणि बेथुएल यांनी उत्तर दिले, “हे याहवेहकडूनच आहे; हे अगदी
उघड आहे. तेव्हा आम्ही तुम्हास बरे किंवा वाईट कसे काय बोलावे?
51 ही रिबेकाह तुमच्यापुढे आहे, तिला घेऊन जा. याहवेह परमेश्वराने
मार्गदर्शन केल्याप्रमाणे तिला तुमच्या धन्याच्या पुत्राची पत्नी होऊ द्या.”
52 जेव्हा अब्राहामाच्या सेवकाने हे ऐकले, त्याने याहवेहपुढे गुडघे टेकले.
53 मग त्या सेवकाने रिबेकाहला सोने आणि चांदीचे दागिने आणि
कपडे दिले; तसेच त्याने तिच्या आईसाठी आणि भावासाठीही पुष्कळ
मौल्यवान वस्तू दिल्या. 54 यानंतर त्यांनी संध्याकाळचे भोजन केले
आणि तो सेवक व त्याच्या बरोबरच्या माणसांनी खाणेपिणे करून रात्री
तिथेच मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यानंतर तो म्हणाला,
“माझ्या धन्याकडे परत जाण्यास मला निरोप द्या.” 55 परंतु तिची आई
व भाऊही म्हणाला, “मुलीने आमच्याजवळ कमीतकमी दहा दिवस
राहावे अशी आमची इच्छा आहे; नंतर तुम्ही जावे.” 56 पण विनंती करीत
तो म्हणाला, “कृपा करून माझ्या परतण्यात अडथळा आणू नका.
कारण याहवेहने माझी यात्रा यशस्वी केली आहे; मला माझ्या मार्गावर
पाठवा म्हणजे मी माझ्या धन्याकडे परत जाईन.” 57 तेव्हा ते म्हणाले,
“आम्ही मुलीला बोलावून विचारतो” 58 त्याप्रमाणे त्यांनी रिबेकाहला
बोलावून विचारले, “तू या मनुष्यासोबत जाशील का?” तिने उत्तर दिले,
“होय, मी जाईन.” 59 तेव्हा त्यांनी तिला निरोप दिला. म्हणून त्यांनी
आपली बहीण रिबेकाह हिला, तिची दाई, अब्राहामाचा सेवक व त्याची
माणसे यांच्यासह तिची रवानगी केली. 60 एकमेकांपासून दूर होण्यापूर्वी
त्यांनी रिबेकाहला आशीर्वाद दिला: “आमच्या भगिनी, तू लक्षावधींची
माता हो; तुझी संतती त्यांच्या शत्रूंच्या शहरांचा ताबा घेवोत.” 61 नंतर
रिबेकाह व तिच्या दासी तयार होऊन उंटावर आरूढ झाल्या आणि त्या
मनुष्याबरोबर गेल्या, त्या सेवकाने रिबेकाहला घेतले आणि निघाला. 62

दरम्यानच्या काळात इसहाक नेगेव-दक्षिण-प्रांतातील आपल्या घरून
बएर-लहाई-रोई येथे आला होता. 63 एके दिवशी संध्याकाळी तो मनन
करीत शेतातून फिरावयास निघाला असताना, त्याने नजर वर करून
पाहिले, तो त्याला काही उंट येताना दिसले. 64 रिबेकाहने दृष्टी वर
करून इसहाकाला पाहिले, तेव्हा ती उंटावरून खाली उतरली 65 आणि
सेवकाला विचारले, “शेतातून आपल्याला भेटावयास येत असलेला तो
पुरुष कोण आहे?” “ते माझे स्वामी आहेत.” सेवकाने उत्तर दिले. तेव्हा
तिने आपले मुख बुरख्याने झाकून घेतले. 66 आपण काय काय केले
याचा सर्व वृतांत सेवकाने इसहाकाला सांगितला. 67 मग इसहाकाने
रिबेकाहला आपली आई साराहच्या तंबूमध्ये आणले. त्याने रिबेकाहशी
विवाह केला आणि ती त्याची पत्नी झाली. त्याचे तिच्यावर प्रेम बसले;
आणि आपल्या आईच्या मृत्यूनंतर तिच्यामुळे त्याला सांत्वन मिळाले.

**25** अब्राहामाने दुसरी पत्नी केली होती, तिचे नाव केटूराह होते. 2
तिच्यापासून त्याला जिम्रान, योक्षान, मदान, मिद्यान, इश्बाक व
शूआह पुत्र झाले. 3 योक्षान हा शबा आणि ददान यांचा पिता; अश्शूरी,
लटूशी आणि लऊमी हे ददानाचे गोत्र होते. 4 एफाह, एफेर, हनोख,
अबीदा आणि एल्दाह हे मिद्यानाचे पुत्र होते. हे सर्व केटूराहचे वंशज
होते. 5 अब्राहामाने आपली सर्व मालमत्ता इसहाकाच्या नावावर केली.
6 परंतु अब्राहाम जिवंत असताना त्याने आपल्या दासीपुत्रांनाही देणग्या
दिल्या आणि त्याने त्यांना इसहाकापासून दूर, पूर्वेकडे पाठवून दिले.
7 अब्राहाम एकशे पंचाहत्तर वर्षे जगला. 8 मग अब्राहामाने अखेरचा
श्वास घेतला आणि एका वृद्धावस्थेत, परिपूर्ण वयाचा होऊन मरण
पावला; आणि मग तो त्याच्या लोकांना जाऊन मिळाला. 9 त्याची
मुले इसहाक आणि इश्माएल यांनी त्याला मम्रेजवळील मकपेलाच्या
गुहेत, जोहर हिथीचा मुलगा एफ्रोनच्या शेतात पुरले, 10 हे अब्राहामाने
हेथच्या लोकांकडून विकत घेतलेले शेत. तिथे अब्राहामाला त्याची
पत्नी साराहजवळ मूठमाती देण्यात आली. 11 अब्राहामाच्या मृत्यूनंतर
परमेश्वराने इसहाकाला आशीर्वाद दिला, जो नंतर बएर-लहाई-रोई या
ठिकाणी राहवयास गेला. 12 ही अब्राहामाचा पुत्र इश्माएलची वंशावळ
आहे, जो साराहची इजिप्तमधील दासी हागारेपासून जन्मला. 13 ही
इश्माएलाच्या पुत्रांची त्यांच्या जन्मानुसार यादी: इश्माएलाचा प्रथमपुत्र
नबायोथ, नंतर केदार, अदबील, मिबसाम, 14 मिश्मा, दूमाह, मस्सा,
15 हदद, तेमा, यतूर, नापीश आणि केदमाह. 16 हे इश्माएलाचे पुत्र
होते आणि त्यांच्या गावांवरून आणि छावण्यांनुसार हे बारा वंशाचे
प्रधान झाले. 17 इश्माएल एकशे सदतीस वर्षे जगला. त्याने आपला
शेवटचा श्वास घेतला आणि मरण पावला आणि तो आपल्या पूर्वजास
जाऊन मिळाला. 18 त्याचे वंशज हवीलापासून शूर देशापर्यंत वस्ती
करून राहिले. हा देश इजिप्त देशाच्या सीमेवर अश्शूरच्या बाजूला
आहे. ते एकमेकांशी वैराभावाने राहत होते. 19 अब्राहामाचा मुलगा
इसहाक याची वंशावळ अशी आहे: अब्राहाम हा इसहाकाचा पिता
झाला, 20 जेव्हा इसहाकाने रिबेकाहशी विवाह केला तेव्हा तो चाळीस
वर्षांचा होता. रिबेकाह पद्दन-अराम येथील अरामी बेथुएलाची कन्या
आणि लाबानाची बहीण होती. 21 इसहाकाने याहवेहची प्रार्थना करून
रिबेकाहला मूल देण्याची विनंती केली, कारण तिला मूल नव्हते.
याहवेहने त्याची विनवणी ऐकली आणि त्याची पत्नी रिबेकाह गर्भवती
झाली. 22 तिच्या उदरात मुले एकमेकांशी भांडू लागली. तेव्हा ती
म्हणाली, “मला हे काय होत आहे?” आणि याबाबत तिने याहवेहकडे
विचारणा केली. 23 याहवेहने तिला सांगितले, “तुझ्या उदरात दोन राष्ट्रे
आहेत, तुझ्या उदरातील हे दोन वंश वेगळे होतील; एकजण दुसऱ्यापेक्षा
बलवान होईल, मोठा लहान्याची सेवा करेल.” 24 तिचे दिवस भरून
प्रसूतिसमय आला तेव्हा पाहा, तिला जुळे पुत्र झाले. 25 पहिल्यांदा
जन्मलेला तांबूस रंगाच्या केसांनी इतका व्यापलेला होता की, त्याने
केसांचा झगाच घातला आहे असे वाटत होते; म्हणून त्यांनी त्याचे नाव
एसाव असे ठेवले. 26 मग जुळ्यातील दुसरा पुत्र जन्मला. त्याचा हात
एसावाच्या टाचेवर होता म्हणून त्यांनी त्याचे नाव याकोब असे ठेवले.
जेव्हा रिबेकाहने यांना जन्म दिला, तेव्हा इसहाक साठ वर्षांचा होता. 27
हळूहळू ती मुले वाढली. एसाव एक तरबेज शिकारी झाला, खुल्या
मैदानातील फिरणारा मनुष्य होता, पण याकोब तसा शांत स्वभावाचा
असून त्याला तंबूतच राहण्यास आवडे. 28 इसहाकास वन्यप्राण्यांचे
मांस खाण्याची आवड होती, एसाव त्याचा आवडता होता, तर याकोब
रिबेकाहचा आवडता होता. 29 एकदा याकोब वरण शिजवित असताना
एसाव शिकारीहून खूप थकूनभागून आला. 30 तो याकोबाला म्हणाला,
“लवकर, मला तो तांबडा पदार्थ घेऊ दे! मला भयंकर भूक लागली
आहे!” (म्हणूनच त्याला एदोम असेही म्हणतात.) 31 याकोबाने उत्तर
दिले, “प्रथम तुझा ज्येष्ठत्वाचा हक्क मला दे.” 32 एसाव म्हणाला,
“एखादा मनुष्य भुकेने मरत असताना त्याला त्याच्या ज्येष्ठत्वाच्या
हक्काचा काय उपयोग?” 33 परंतु याकोब म्हणाला, “आधी शपथ
घे.” म्हणून त्याने शपथ घेतली आणि आपला ज्येष्ठ पुत्रत्वाचा हक्क
याकोबाला मोबदला म्हणून दिला. 34 तेव्हा याकोबाने एसावाला भाकर
व मसुरीच्या डाळीचे वरण दिले; एसावाने ते खाल्ले आणि निघून गेला.
अशा रीतीने एसावाने आपला ज्येष्ठत्वाचा हक्क तुच्छ मानला.

**26** त्या देशात दुष्काळ पडला—अब्राहामाच्या काळात पडला त्या
खेरीज हा दुसरा दुष्काळ होता—म्हणून इसहाक गरार या
शहरात पलिष्ट्यांचा राजा अबीमेलेख याजकडे गेला. 2 याहवेहने तिथे
इसहाकाला दर्शन देऊन म्हटले, “खाली इजिप्त देशात जाऊ नकोस; मी
तुला सांगतो त्या देशात राहा. 3 या प्रांतात काही काळ राहा आणि मी
तुझ्यासह असेन व तुला आशीर्वादित करेन. तुझा पिता अब्राहाम याला
मी दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी हा सर्व प्रदेश तुला आणि तुझ्या
वंशजाला देईन. 4 मी तुझ्या वंशजांची संख्या असंख्य ताऱ्यांसारखी
करेन. मी हा सर्व प्रदेश तुझ्या वंशजांना देईन आणि पृथ्वीवरील
सर्व राष्ट्रे तुझ्या संततीद्वारे आशीर्वादित होतील. 5 कारण अब्राहामाने
माझे आज्ञापालन केले आणि मी सांगितलेला प्रत्येक नियम, विधी व
प्रत्येक सूचनेचे पालन केले.” 6 म्हणून इसहाक गरारातच राहिला. 7
जेव्हा तेथील लोकांनी त्याला त्याच्या पत्नीबद्दल विचारले, तेव्हा तो

म्हणाला, “ती माझी बहीण आहे.” कारण “ती माझी पत्नी आहे” असे
सांगण्याची त्याला भीती वाटली; त्याने विचार केला, “या ठिकाणचे
लोक रिबेकाहमुळे कदाचित मला मारून टाकतील, कारण ती फार सुंदर
आहे.” 8 तो तिथे बराच काळ राहिल्यानंतर एके दिवशी पलिष्ट्यांचा
राजा अबीमेलेख याने खिडकीतून बाहेर पाहिले की तो इसहाक आपली
पत्नी रिबेकाह हिच्याशी प्रेम करीत आहे. 9 अबीमेलेखाने इसहाकाला
बोलाविणे पाठविले आणि त्याला म्हणाला, “निश्चितच ही तुझी पत्नी
आहे, ‘तर ती माझी बहीण आहे’ असे तू का सांगितलेस?” इसहाकाने
उत्तर दिले, “तिच्यामुळे माझा कोणी वध करेल अशी मला भीती
वाटली.” 10 अबीमेलेखाने उद्गार काढले, “तू आमच्यासोबत असे
का केले? माझ्या लोकांपैकी कोणीही तिच्यासोबत निजला असता
आणि तू आमच्यावर दोष आणला असतास.” 11 यानंतर अबीमेलेखाने
जाहीर फर्मान काढले: “या मनुष्याला किंवा याच्या पत्नीला कोणी
त्रास दिल्यास त्याला मृत्यूची शिक्षा दिली जाईल.” 12 इसहाकाने
त्या देशात धान्य पेरले व त्याच वर्षी त्याला शंभरपट पीक मिळाले,
कारण याहवेहने इसहाकाला आशीर्वादित केले. 13 तो श्रीमंत होत
गेला आणि त्याचे धन असे वाढत गेले की पुढे तो खूप धनाढ्य झाला.
14 त्याच्याकडे इतके मेंढ्या, गुरे आणि नोकर होते की पलिष्ट्यांनी
त्याचा हेवा केला. 15 म्हणून ज्या विहिरी त्याचा पिता अब्राहाम याच्या
नोकरांनी खणल्या होत्या त्या सर्व पलिष्ट्यांनी मातीने बुजवून टाकल्या.
16 तेव्हा अबीमेलेखाने इसहाकाला म्हटले, “तू आमच्यापासून दूर निघून
जा; तू आमच्यापेक्षा अधिक शक्तिशाली झाला आहेस.” 17 तेव्हा
इसहाकाने ते ठिकाण सोडले आणि गरारच्या खोर्‍यात तळ देऊन राहू
लागला. 18 इसहाकाने आपला पिता अब्राहाम याने खणलेल्या आणि
अब्राहामाच्या मृत्यूनंतर पलिष्टी लोकांनी बुजवून टाकलेल्या सर्व विहिरी
पुन्हा खणल्या. अब्राहामाने विहिरींना जी नावे दिली होती तीच नावे
त्याने पुन: दिली. 19 इसहाकाच्या नोकरांनी खोर्‍यात एक नवी विहीर
खणली आणि तिथे त्यांना गोड पाण्याचा एक झरा सापडला. 20 मग
गरारचे गुराखी इसहाकाच्या गुराख्यांशी भांडले आणि म्हणाले, “हे पाणी
आमचे आहे!” म्हणून त्याने विहिरीला एसेक असे नाव दिले; कारण
त्यांचे त्याच्याशी भांडण झाले. 21 मग त्यांनी दुसरी एक विहीर खणली;
पण तिच्यावरूनही पुन्हा भांडणे झाली, म्हणून तिचे नाव सितनाह असे
ठेवले. 22 यानंतर इसहाकाने आणखी एक विहीर खणली, पण त्यावेळी
कोणाशीही भांडण झाले नाही. म्हणून त्याने त्या विहिरीचे नाव रेहोबोथ
असे ठेवले. तो म्हणाला, “आता तरी याहवेहने आम्हाला जागा दिली
आहे. आता आमची या देशात भरभराट होईल.” 23 पुढे इसहाक
तिथून बेअर-शेबाला गेला; 24 त्याच रात्री याहवेहने त्याला दर्शन देऊन
म्हटले, “मी तुझा पिता अब्राहामाचा परमेश्वर आहे; भिऊ नकोस, कारण
मी तुझ्याबरोबर आहे; मी आपला सेवक अब्राहाम याच्यासाठी तुला
आशीर्वादित करेन आणि तुझा वंश वाढवेन.” 25 मग इसहाकाने तिथे
एक वेदी बांधली आणि याहवेहची उपासना केली. त्याने तिथे वस्ती
केली आणि तिथे त्यांच्या नोकरांनी एक विहीर खणली. 26 एके दिवशी
त्याला भेटण्यासाठी गरारहून अबीमेलेख, त्याचा सल्लागार अहुज्जाथ
आणि त्याचा सेनापती पीकोल हे आले. 27 “तुम्ही येथे का आला?”
इसहाकाने त्यांना विचारले, “कारण तुम्ही मला द्वेषाने वागवून हाकलून
दिले होते.” 28 यावर ते म्हणाले, “आम्हाला हे स्पष्टपणे दिसत आहे
की, याहवेह तुला आशीर्वादित करीत आहेत; तुझ्याशी—तुझ्या आणि
आमच्यामध्ये एक करार करावा असे आम्हाला वाटले. म्हणून आम्हाला
तुमच्याबरोबर करार करू द्यावा. 29 आम्ही जसा तुला कसलाही उपद्रव
दिला नाही, तसा तू आम्हाला कसलाही उपद्रव देणार नाहीस, असे
वचन दे. उलट आम्ही तुझे भलेच केले आणि तुला शांतीने जाऊ दिले;
आणि आता तू याहवेहद्वारे आशीर्वादित झाला आहे.” 30 इसहाकाने
त्यांच्यासाठी एक मोठी मेजवानी दिली आणि त्यांनी खाणेपिणे केले. 31
पहाटेस उठल्याबरोबर त्यांनी एकमेकांशी करार केला. नंतर इसहाकाने
त्यांना निरोप दिला व ते शांतीने परतले. 32 त्या दिवशी इसहाकाचे
नोकर त्याच्याकडे येऊन त्याला सांगू लागले. “आम्ही खणीत असलेल्या
विहिरीला पाणी लागले आहे!” 33 त्याने तिला शिबाह म्हटले, आणि
आजपर्यंत या नगराचे नाव बेअर-शेबा असे आहे. 34 एसावाने त्याच्या
चाळिसाव्या वर्षी यहूदीथ नावाच्या बवरी हिथीच्या मुलीसोबत आणि
एलोन हिथी याची कन्या बासमाथ हिच्याबरोबरही विवाह केला. 35 त्या
इसहाक आणि रिबेकाहसाठी दु:खाचे स्रोत होत्या.

**27** इसहाक वृद्ध झाला, त्याची दृष्टी मंद होऊन त्याला दिसेनासे
झाले, तेव्हा एके दिवशी त्याने आपला ज्येष्ठपुत्र एसाव याला
हाक मारली व म्हटले, “माझ्या मुला.” “बाबा, काय आज्ञा,” तो
उत्तरला. 2 तेव्हा इसहाक त्याला म्हणाला, “मी आता वृद्ध झालो आहे,
आणि माझ्या मृत्यूचा दिवस मला माहीत नाही. 3 तर तुझे शस्त्र घेऊन
ये—धनुष्य व बाण घे—आणि खुल्या मैदानात जाऊन एखाद्या वनपशूची
शिकार करून आण. 4 मग माझ्या आवडीचे रुचकर भोजन तयार कर
आणि मला खाण्यासाठी ते इकडे घेऊ ये, म्हणजे मरण्यापूर्वी मी माझा
आशीर्वाद तुला देईन.” 5 इसहाक आपला पुत्र एसावसोबत बोलत आहे
हे रिबेकाह ऐकत होती. एसाव रानात शिकार करून मांस आणण्यास
गेला, 6 रिबेकाहने आपला पुत्र याकोब याला बोलाविले आणि ती त्याला
म्हणाली “हे बघ, तुझे वडील तुझा भाऊ एसावाला म्हणाले, 7 एखाद्या
वनपशूची शिकार करून आण, मग माझ्या आवडीचे रुचकर भोजन
तयार कर, म्हणजे मरण्यापूर्वी याहवेहच्या सानिध्यात जो आशीर्वाद
आहे, तो मी तुला देईन, हे सांगताना मी ऐकले.” 8 ती म्हणाली, “आता
माझ्या मुला, नीट लक्ष देऊन ऐक व मी सांगते तसेच कर: 9 बाहेर
कळपात जा आणि दोन चांगली करडे घेऊ ये. मी त्या करडांचे तुझ्या
वडिलांच्या आवडीप्रमाणे रुचकर भोजन तयार करेन, 10 मग ते तू
आपल्या वडिलांकडे घेऊन जा. म्हणजे मृत्यूपूर्वी ते तुला आशीर्वाद
देतील.” 11 याकोब त्याची आई रिबेकाहला म्हणाला, “पण माझा भाऊ
एसाव तर केसाळ आहे आणि माझी कातडी अगदी केसरहित आहे. 12
वडिलांनी मला चाचपून पाहिले तर? त्यांना वाटेल मी त्यांना फसवीत
आहे आणि मग आशीर्वादाऐवजी मी स्वत:वर शाप ओढवून घेईन.” 13

तेव्हा रिबेकाह म्हणाली, “माझ्या बाळा, ते शाप माझ्यावर पडोत. मी
सांगते त्याप्रमाणे तू कर, बाहेर जा आणि करडे घेऊन ये.” 14 तेव्हा
याकोबाने करडे कापून, स्वच्छ करून आपल्या आईकडे आणली, आणि
तिने त्याच्या वडिलांना आवडणारे रुचकर भोजन तयार केले. 15 मग
रिबेकाहने घरात असलेले एसावाचे उत्तम कपडे घेतले आणि आपला
धाकटा मुलगा याकोबाला ते घालण्यास सांगितले. 16 तिने त्याचा
हात आणि मानेवरचा गुळगुळीत भाग करडांच्या कातड्याने झाकला.
17 नंतर तिने रुचकर भोजन व भाकर आपला मुलगा याकोबाजवळ
दिली. 18 आपल्या वडिलाजवळ जाऊन याकोब म्हणाला, “बाबा.” तो
म्हणाला, “काय माझ्या बाळा? तू कोण आहेस?” 19 तेव्हा याकोबाने
उत्तर दिले, “मी एसाव, तुमचा ज्येष्ठपुत्र आहे. तुम्ही सांगितल्याप्रमाणे
मी केले आहे. कृपया उठून बसा आणि तुमच्यासाठी शिकार करून
आणलेले भोजन खा, म्हणजे तुम्ही मला तुमचे आशीर्वाद द्या.” 20
त्यावर इसहाक म्हणाला, “माझ्या मुला, इतक्या लवकर तुला शिकार
कशी मिळाली?” तेव्हा तो म्हणाला, “तुमचे परमेश्वर याहवेह यांनी
मला यश दिले.” 21 मग इसहाक याकोबास म्हणाला, “माझ्या मुला,
जरा माझ्याजवळ ये. तू खरोखरच एसाव आहेस की नाही ते मला
चाचपून पाहू दे.” 22 तेव्हा याकोब आपला पिता इसहाकाजवळ गेला
व त्यांनी त्याला चाचपून म्हटले, “वाणी तर याकोबाची आहे, पण
हात एसावाचे आहेत.” 23 त्याने त्याला ओळखले नाही, कारण त्याचे
हात एसावाच्या हातांसारखे केसाळ होते. तो याकोबाला आशीर्वाद
देण्यासाठी तयार झाला, 24 त्याने विचारले, “तू खरोखर माझा पुत्र
एसावच आहेस काय?” तो म्हणाला “होय, मीच आहे.” 25 मग
इसहाक त्यास म्हणाला, “त्या शिकारीचे भोजन इकडे आण. मी ते
खाईन आणि माझे आशीर्वाद तुला देईन.” तेव्हा याकोबाने जेवणाचे ताट
आणले, तो जेवला आणि मग द्राक्षारस त्याच्याकडे आणले, तेही तो
प्याला. 26 मग इसहाक त्याला म्हणाला, “माझ्या मुला इकडे ये आणि
माझे चुंबन घे.” 27 तो आपल्या पित्याजवळ गेला आणि त्याने त्याचे
चुंबन घेतले. जेव्हा इसहाकाला त्याच्या वस्त्रांचा वास आला, तेव्हा
त्याला आशीर्वाद देत तो म्हणाला, “अहा, माझ्या पुत्राचा सुगंध, जसा
याहवेहने आशीर्वादित केलेल्या शेताचा. 28 परमेश्वर तुला आकाशातील
दव आणि पृथ्वीची समृद्धी देतील, भरपूर धान्य आणि नवीन द्राक्षारस
देतील. 29 राष्ट्रे तुझी सेवा करोत, आणि लोक तुझ्यापुढे नमोत. तू
तुझ्या भाऊबंदाचा धनी हो. तुझ्या आईची मुले तुझ्यापुढे लवून तुला
मुजरा करोत. जे तुला शाप देतात ते सर्व शापित होवोत, आणि जे
तुला आशीर्वाद देतात ते सर्व आशीर्वादित होवोत.” 30 इसहाकाने
त्याला आशीर्वाद देण्याचे पूर्ण केले आणि याकोब आपल्या वडिलांच्या
उपस्थितीतून पडतो न पडतो तोच एसाव शिकारीहून परतला 31 त्यानेही
आपल्या पित्यासाठी रुचकर भोजन तयार केले आणि त्याच्याकडे
ते घेऊन आला व म्हणाला, “बाबा, हे पाहा मी शिकार घेऊन आलो
आहे. उठून बसा आणि हे खा म्हणजे मला तुम्ही तुमचे आशीर्वाद
देऊ शकाल.” 32 हे ऐकून त्याचा पिता इसहाक त्यास म्हणाला, “तू
कोण आहेस?” त्याने उत्तर दिले, “मी एसाव तुमचा ज्येष्ठपुत्र आहे.”
33 त्याचवेळी इसहाकाच्या शरीराला भयंकर कंप सुटला आणि तो
म्हणाला, “तर मग आताच शिकार घेऊन माझ्याकडे आला होता तो
कोण होता? तू येण्यापूर्वी मी तर ते खाल्ले आणि माझे आशीर्वादही
त्याला दिले. होय, त्याला ते आशीर्वाद आता मिळणारच.” 34 जेव्हा
एसावाने आपल्या पित्याचे हे शब्द ऐकले, तेव्हा तो अतिदु:खाने हंबरडा
फोडून आपल्या पित्यास म्हणाला, “बाबा, बाबा, मलाही आशीर्वाद
द्या.” 35 परंतु तो म्हणाला, “तुझा भाऊ कपटाने आला होता आणि तुझे
आशीर्वाद तो घेऊन गेला.” 36 यावर एसावाने म्हटले, “त्याचे नाव
याकोब योग्यच नाही काय? त्याने दुसऱ्यांदा मला फसविले आहे. त्याने
माझा जन्मसिध्द हक्क घेतला आणि आता माझा आशीर्वादही चोरला
आहे.” नंतर त्याने विचारले, “माझ्यासाठी तुम्ही एकही आशीर्वाद राखून
ठेवला नाही काय?” 37 परंतु इसहाकाने एसावास उत्तर दिले, “मी
त्याला तुझा धनी आणि तुझ्या सर्व नातेवाईकांना त्याचे नोकर करून
ठेवले आहे. मी त्याला भरपूर धान्य आणि द्राक्षारस यांची हमी दिली
आहे. आता देण्याचे काय शिल्लक राहिले आहे, माझ्या मुला?” 38
एसाव आपल्या वडिलांना म्हणाला, “तुमच्याकडे एकच आशीर्वाद आहे
काय? अहो बाबा, मलाही आशीर्वाद द्या!” मग एसाव मोठ्याने रडू
लागला. 39 त्याचे वडील इसहाक त्याला उत्तर देत म्हणाले, “तुझे
वास्तव्य सुपीक प्रदेशापासून दूर आकाशातील दहिवर पडते तिथून
दूर असेल. 40 तलवारीच्या जोरावर तू जगशील तू आपल्या भावाची
सेवा करशील, परंतु जेव्हा अस्वस्थ होशील, तेव्हा तुझ्यावर असलेले
त्याचे जू तू तुझ्यावरून झुगारून देशील.” 41 एसाव याकोबाचा त्याच्या
पित्याने आशीर्वाद दिल्यामुळे द्वेष करू लागला. तो स्वत:शीच म्हणाला,
“माझ्या वडिलांसाठी शोक करण्याचे दिवस जवळ आले आहे; मग मी
माझा भाऊ याकोबाचा वध करेन.” 42 परंतु एसावाचा बेत कोणीतरी
रिबेकाहच्या कानावर घातला. रिबेकाहने याकोबाला बोलाविले आणि
त्याला सांगितले, “एसावाने तुझा जीव घेऊन, सूड घेण्याची धमकी
दिली आहे. 43 तर आता माझ्या मुला, मी म्हणते तसे कर आणि माझा
भाऊ लाबानकडे हारानला पळून जा. 44 तुझ्या भावाचा राग शमेपर्यंत
काही काळ तिथेच राहा. 45 तू जे काही केलेस याचा त्याला विसर
पडेपर्यंत तू तिथेच राहा. मग मी तुला बोलाविणे पाठवेन. एकाच दिवशी
मी तुम्हा दोघांनाही का मुकावे?” 46 नंतर रिबेकाह इसहाकास म्हणाली,
“या हेथी मुलींमुळे माझा जीव मला नकोसा झाला आहे. याकोबानेही
त्यांच्यापैकीच एकीशी लग्न केले तर माझ्या जगण्याचा काही उपयोग
नसेल.”

**28** तेव्हा इसहाकाने याकोबाला बोलावून आशीर्वाद दिला आणि
नंतर त्याला आज्ञा दिली, “कनानी मुलीशी तू लग्न करू नकोस.
2 तू त्वरित पद्दन-अराम येथे तुझा आईचा पिता बेथुएल याच्या घरी
जा, आणि तुझ्या आईचा भाऊ लाबान याच्या मुलींपैकी पत्नी कर.
3 सर्वसमर्थ परमेश्वर तुला आशीर्वाद देवो. तुला पुष्कळ संतती देवो
आणि तुझ्यापासून अनेक वंशाचे एक मोठे राष्ट्र निर्माण करो. 4

अब्राहामाला जे आशीर्वाद परमेश्वराने दिले, ते तुझ्या वंशजाला लाभोत,
ज्या भूमीवर तू आता परदेशी म्हणून राहत आहेस, ती भूमी तुझ्या
मालकीची होवो, कारण परमेश्वराने ती अब्राहामाला दिलेली आहे.” 5
अशा रीतीने इसहाकाने याकोबाला पद्दन-अराम येथे अरामी बेथुएलाचा
पुत्र आणि याकोब व एसाव यांची आई रिबेकाहचा भाऊ, लाबान
याच्याकडे पाठविले. 6 एसावाला समजले की इसहाकाने याकोबाला
आशीर्वाद देऊन पद्दन-अराम येथे पत्नी करण्यासाठी पाठविले आहे,
आणि जेव्हा त्याने त्याला आशीर्वाद दिला, तेव्हा त्याला आज्ञा दिली
की तू कनानी मुलीशी विवाह करू नको, 7 आणि याकोब आपल्या
पित्याची व आईची आज्ञा पाळून पद्दन-अराम येथे गेला. 8 तेव्हा
एसावाला समजले की, त्याचे वडील इसहाकाला कनानी मुली अजिबात
आवडत नाहीत. 9 म्हणून एसाव अब्राहामाचा पुत्र इश्माएलच्या घरी
गेला आणि तिथे त्याने त्याची कन्या, नबायोथाची बहीण माहलथशी
विवाह केला आणि माहलथ त्याच्या पूर्वीच्या पत्नींमध्ये सामील झाली.
10 याकोब बेअर-शेबा सोडून हारानास जाण्यास निघाला. 11 त्या रात्री
सूर्य मावळल्यावर तो मुक्कामास एके ठिकाणी थांबला असताना,
त्याने एक धोंडा उशासाठी घेतला आणि तो त्या ठिकाणी झोपी गेला.
12 तेव्हा त्याला एक स्वप्न पडले. त्यात त्याने पृथ्वीवर उभी केलेली
व तिचे वरचे टोक स्वर्गाला टेकलेले आहे अशी एक शिडी पाहिली.
परमेश्वराचे दूत त्या शिडीवरून वर जाताना व खाली उतरतांना त्याने
पाहिले. 13 शिडीच्या वरच्या टोकाला याहवेह उभे राहून त्यास म्हणाले,
“मी याहवेह, तुझा पिता अब्राहाम व इसहाक यांचा परमेश्वर आहे.
ज्या भूमीवर तू झोपला आहेस ती मी तुला आणि तुझ्या वंशजांना
देईन. 14 तुझे गोत्र धुळीच्या कणांइतके वाढतील. ते नेगेव पासून
पूर्वेपर्यंत आणि उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत विस्तार करतील. तुझ्या व
तुझ्या संततीच्या द्वारे पृथ्वीवरील सर्व लोक आशीर्वादित होतील. 15
पाहा, मी तुझ्याबरोबर आहे आणि ज्या ठिकाणी तू जाशील, त्या सर्व
ठिकाणी मी तुझे संरक्षण करेन आणि याच भूमीवर तुला सुखरुपपणे
परत आणेन. तुला दिलेले अभिवचन पूर्ण होईपर्यंत मी तुझ्याबरोबर
सतत राहीन.” 16 मग याकोब झोपेतून जागा झाला, त्याने विचार
केला, “निश्चितच याहवेहची उपस्थिती या ठिकाणी आहे, पण मला हे
माहीत नव्हते. 17 तो भयभीत झाला आणि म्हणाला, हे किती अद्भुत
स्थळ आहे! हे परमेश्वराच्या भवनाशिवाय दुसरे काहीही असू शकत
नाही; हे स्वर्गाचे द्वार आहे.” 18 दुसऱ्या दिवशी याकोब अगदी पहाटेस
उठला आणि जो धोंडा त्याने उशाशी घेतला होता, तो त्याने स्तंभ
म्हणून उभा केला आणि त्यावर जैतुनाचे तेल ओतले. 19 त्याने त्या
जागेचे नाव बेथेल असे ठेवले, जरी त्या नगराचे नाव लूज असे होते. 20
नंतर याकोबाने नवस केला, “जर परमेश्वर माझ्यासोबत असतील, या
प्रवासात माझे रक्षण करतील, मला अन्नपाणी, वस्त्र देतील, 21 व मला
आपल्या पित्याच्या घरी सुखरुपपणे परत आणतील, तर याहवेह माझे
परमेश्वर होतील 22 आणि हा जो धोंडा मी स्तंभ म्हणून उभा केला आहे
ते परमेश्वराचे भवन होईल आणि जे सर्वकाही ते मला देतील, त्यातील
प्रत्येकाचा दशांश मी त्यांना अर्पण करेन.”

**29** प्रवास करीत याकोब पूर्वेकडील लोकांच्या प्रदेशात आला. 2
त्याला समोरच्या मैदानात मेंढरांचे तीन कळप, एका विहिरीजवळ
पाणी पिण्यासाठी बसलेले दिसले, परंतु एका मोठ्या दगडाने विहिरीचे
तोंड झाकून ठेवलेले होते. 3 सर्व कळप विहिरीजवळ जमल्यानंतर
मेंढपाळ तो दगड लोटत असत आणि सर्व कळपांना पाणी पाजून मग
तो दगड विहिरीच्या तोंडावर पुन्हा ठेवीत असत. 4 याकोब मेंढपाळांकडे
गेला, आणि त्याने त्यांना विचारले, “माझ्या भावांनो, तुम्ही कुठून
आहात?” ते म्हणाले, “आम्ही हारानाहून आलो आहोत.” 5 तेव्हा त्याने
त्यांना विचारले, “नाहोराचा नातू लाबान याला तुम्ही ओळखता काय?”
“हो, आम्ही ओळखतो,” त्यांनी उत्तर दिले. 6 यावर याकोबाने त्यांना
विचारले, “ते बरे आहेत काय?” “तो बरा आहे, ती पाहा, त्याची कन्या
राहेल मेंढरांचा कळप घेऊन इकडेच येत आहे.” ते म्हणाले. 7 याकोबाने
म्हटले, “पाहा सूर्य अजून मावळला नाही; कळपांना एकत्र करण्याची
अजून वेळ झालेली नाही. त्यांना पाणी पाजून पुन्हा चरावयास घेऊन
जा.” 8 आम्ही तसे करू शकत नाही, त्यांनी उत्तर दिले, “सगळे कळप
येथे जमल्यानंतर आम्ही विहिरीवरील दगड बाजूला काढतो आणि
कळपांना पाणी पाजतो.” 9 त्यांचे संभाषण चालू असताना राहेल
आपल्या पित्याची मेंढरे घेऊन तिथे आली, कारण ती मेंढपाळ होती. 10
जेव्हा याकोबाने त्याचा मामा लाबानची मुलगी राहेल आणि लाबानाची
मेंढरे पाहिली, तेव्हा त्याने विहिरीच्या तोंडावरील दगड बाजूला केला
आणि आपल्या मामाच्या मेंढरांना पाणी पाजले. 11 नंतर याकोबाने
राहेलचे चुंबन घेतले आणि तो मोठ्याने रडू लागला. 12 याकोबाने
राहेलला सांगितले की तो तिच्या पित्याच्या नात्यातील आहे आणि
रिबेकाह हिचा मुलगा आहे. तेव्हा राहेल धावतच गेली आणि आपल्या
पित्याला ही बातमी सांगितली. 13 लाबानाला आपल्या बहिणीचा
मुलगा याकोबाची बातमी कळताच तो त्याला लगबगीने भेटावयाला
आला. त्याने त्याला मिठी मारली आणि त्याचे चुंबन घेतले आणि
त्याला आपल्या घरी आणले आणि तिथे याकोबाने त्याला सर्व गोष्टी
सांगितल्या. 14 तेव्हा लाबान त्याला म्हणाला, “तू माझे स्वतःचे मांस व
रक्त आहेस.” याकोबाला तिथे राहून सुमारे एक महिना झाल्यानंतर, 15
लाबान त्याला म्हणाला, “आपण एकमेकांचे नातेवाईक असलो तरी
त्यामुळे तू माझ्यासाठी फुकट काम करावे हे योग्य नाही. तू वेतन म्हणून
काय घेशील?” 16 लाबानाला दोन कन्या होत्या. वडील कन्येचे नाव
लेआ व धाकटीचे नाव राहेल. 17 लेआचे डोळे निस्तेज होते पण राहेल
बांधेसूद व दिसायला सुंदर होती. 18 याकोबाचे राहेलवर प्रेम बसले
होते, म्हणून तो म्हणाला, “मला तुमची धाकटी मुलगी राहेल पत्नी
म्हणून द्याल, तर मी तुमच्यासाठी सात वर्षे काम करेन.” 19 लाबान
म्हणाला, “परकीय मनुष्याला तिला देण्यापेक्षा ती तुला देणेच उत्तम
आहे. माझ्यासोबत इथे राहा.” 20 याप्रमाणे याकोबाने राहेलकरिता
पुढील सात वर्षे काम केले. परंतु त्याचे तिच्यावर इतके प्रेम होते की, ही

वर्षे त्याला काही दिवसांप्रमाणे भासली. 21 तेव्हा याकोब लाबानाला
म्हणाला, “माझी पत्नी मला द्या. माझी मुदत संपली आहे, आता मला
तिचा स्वीकार करता येईल.” 22 तेव्हा लाबानाने वस्तीतील सर्व लोकांना
बोलाविले आणि मेजवानी दिली. 23 परंतु संध्याकाळी लाबानाने आपली
कन्या लेआला याकोबाकडे पाठविले आणि याकोबाने तिच्याबरोबर
रात्र घालविली. 24 आणि लाबानाने आपली दासी जिल्पा, त्याची
कन्या लेआ हिला दासी म्हणून दिली. 25 पण याकोब सकाळी उठून
पाहतो, तर ती लेआ होती! याकोब लाबानाला म्हणाला, “हे तुम्ही काय
केले? मी राहेलसाठी सात वर्षे काम केले आणि तुम्ही माझी अशी
फसवणूक का केली?” 26 लाबानाने उत्तर दिले, “मोठ्या बहिणीचे लग्न
झाल्याशिवाय धाकट्या बहिणीचे लग्न करून देण्याची आमच्यात प्रथा
नाही. 27 लग्नाचा सप्ताह पूर्ण होऊ दे, मग माझ्यासाठी आणखी सात
वर्षे काम करण्याचे तू वचन देत असशील तर राहेलही तुला मिळेल.”
28 याकोबाने त्याप्रमाणे केले. त्याने लेआसोबत संपूर्ण एक आठवडा
घालविला, मग लाबानाने त्याला त्याची कन्या राहेल ही पत्नी म्हणून
दिली. 29 लाबानाने आपली दासी बिल्हा, त्याची कन्या राहेलला दासी
म्हणून दिली. 30 मग याकोबाने राहेलचाही पत्नी म्हणून स्वीकार केला.
तो तिच्यावर लेआपेक्षा अधिक प्रेम करी आणि तिच्यासाठी आणखी
सात वर्षे तिथे राहून त्याने काम केले. 31 याकोब लेआला कमी प्रीती
करीत आहे, म्हणून याहवेहने तिला गर्भधारणा करण्याचे सामर्थ्य दिले,
पण राहेल वांझच राहिली. 32 लेआ गर्भवती झाली व तिला एक पुत्र
झाला आणि तिने त्याचे नाव रऊबेन असे ठेवले. कारण लेआ म्हणाली,
“याहवेहने माझे दुःख पाहिले आहे. आता माझे पती माझ्यावर प्रेम
करतील.” 33 लवकरच ती पुन्हा गर्भवती झाली आणि तिला दुसरा
पुत्र झाला. तिने त्याचे नाव शिमओन असे ठेवले, कारण ती म्हणाली,
“याहवेहने माझे ऐकले आहे, मी नावडती आहे म्हणून त्यांनी मला
आणखी एक पुत्र दिला.” 34 मग ती पुन्हा गर्भवती झाली आणि तिला
पुत्र झाला; आणि ती म्हणाली, “यावेळी माझे पती माझ्याशी पुन्हा
जोडले जातील, कारण मी त्यांना तीन पुत्र दिले.” म्हणून त्याचे नाव
लेवी असे ठेवण्यात आले. 35 ती पुन्हा एकदा गर्भवती झाली आणि
तिला आणखी एक पुत्र झाला तिने त्याचे नाव यहूदाह असे ठेवले,
कारण ती म्हणाली, “आता मी याहवेहची स्तुती करेन.” यानंतर तिला
मूल होण्याचे थांबले.

**30** राहेलने पाहिले की याकोबाला तिच्यापासून मूल होत नाही,
तेव्हा ती आपल्या बहिणीचा मत्सर करू लागली. “मला मूल द्या,
नाहीतर मी मरून जाईन,” ती याकोबास म्हणाली. 2 त्यामुळे याकोब
संतापून राहेलला म्हणाला, “मी काय परमेश्वराच्या ठिकाणी आहे,
ज्यांनी तुला मूल होण्यापासून रोखले आहे?” 3 मग ती म्हणाली, “तुम्ही
माझी दासी बिल्हा हिचा स्वीकार करा. जेणेकरून ती माझ्यासाठी
मुलांना जन्म देईल आणि मीही तिच्याद्वारे कुटुंब तयार करू शकेन.” 4
याप्रमाणे तिने आपली दासी बिल्हा, त्याला पत्नी म्हणून दिली, आणि
याकोबाने तिचा स्वीकार केला, 5 आणि बिल्हा गर्भवती झाली व
याकोबाच्या पुत्राला जन्म दिला, 6 राहेलने त्याचे नाव दान असे ठेवले,
कारण ती म्हणाली, “परमेश्वराने मला न्याय दिला आहे; त्यांनी माझी
विनंती मान्य केली आणि मला एक पुत्र दिला आहे.” 7 राहेलची दासी
बिल्हा ही पुन्हा गर्भवती झाली आणि तिने याकोबाच्या अजून एका
पुत्राला जन्म दिला. 8 राहेलने त्याचे नाव नफताली असे ठेवले. कारण
ती म्हणाली, “मी माझ्या बहिणीशी जोरदार संघर्ष करून विजयी झाले
आहे.” 9 आपण पुन्हा गर्भवती होत नाही, हे लक्षात घेऊन लेआने
आपली दासी जिल्पा याकोबाला पत्नी म्हणून दिली. 10 याकोबापासून
लेआची दासी जिल्पाने एका पुत्राला जन्म दिला. 11 लेआ म्हणाली,
“हा किती आशीर्वाद आहे!” म्हणून तिने त्याचे नाव गाद असे ठेवले. 12
लेआची दासी जिल्पाला याकोबापासून दुसरा पुत्र झाला. 13 लेआने
त्याचे नाव आशेर ठेवले. कारण ती म्हणाली. “मी किती आनंदी आहे!
स्त्रिया मला धन्य म्हणतील.” 14 गव्हाच्या हंगामात रऊबेन शेतात
काम करताना एके दिवशी त्याला पुत्रदात्रीची फळे सापडली. त्याने ती
आपली आई लेआ हिला नेऊन दिली. तेव्हा राहेलने लेआजवळ विनंती
केली, “तुझ्या मुलाने पुत्रदात्रीची फळे आणली आहेत, त्यातील काही
मला दे.” 15 पण लेआ तिला म्हणाली, “माझा पती घेतलास तेवढे
पुरे झाले नाही काय? आता माझ्या मुलाची पुत्रदात्रीची फळे देखील
तू घेशील काय?” राहेल म्हणाली, “ठीक आहे. तुझ्या पुत्रदात्रीच्या
फळांच्या मोबदल्यात, याकोब आज रात्री तुझ्याकडे येईल.” 16 जेव्हा
संध्याकाळी याकोब शेतातून आला, लेआ त्याला भेटण्यासाठी बाहेर
गेली. ती म्हणाली, “आज तुम्ही माझ्याबरोबर निजावे, कारण माझ्या
मुलाची पुत्रदात्रीची फळे देऊन मी तुम्हाला त्या मोबदल्यात घेतले
आहे.” त्याप्रमाणे त्या रात्री तो तिच्यासोबत निजला. 17 परमेश्वराने
लेआचे ऐकले आणि ती पुन्हा गर्भवती होऊन तिने याकोबाच्या पाचव्या
पुत्राला जन्म दिला. 18 तिने त्याचे नाव इस्साखार असे ठेवले. कारण
लेआ म्हणाली, “माझ्या पतीला मी माझी दासी दिल्यामुळे परमेश्वराने
मला हे प्रतिफळ म्हणून दिले आहे.” 19 नंतर लेआ याकोबापासून
पुन्हा गर्भवती झाली आणि तिला सहावा पुत्र झाला. 20 तिने त्याचे
नाव जबुलून असे ठेवले. कारण लेआ म्हणाली, “परमेश्वराने माझ्या
पतीसाठी मला चांगल्या देणग्या दिल्या आहेत. कारण मी त्याच्या सहा
पुत्रांना जन्म दिला आहे, आता ते मला माझा आदर करतील.” 21
काही वेळेनंतर तिने एका कन्येला जन्म दिला आणि तिचे नाव दीना
असे ठेवले. 22 तेव्हा परमेश्वराला राहेलची आठवण झाली; त्यांनी तिचे
ऐकले आणि तिला गर्भधारण करण्यास सक्षम केले. 23 ती गर्भवती
झाली आणि तिने एका पुत्राला जन्म दिला ती म्हणाली, “परमेश्वराने
माझा काळिमा दूर केला आहे.” 24 तिने त्याचे नाव योसेफ असे ठेवले,
आणि म्हणाली, “याहवेहने मला आणखी एक पुत्र द्यावा.” 25 राहेलने
योसेफास जन्म दिल्यानंतर याकोब लाबानास म्हणाला, “माझी रवानगी
करा म्हणजे मी माझ्या देशाला जाईन. 26 माझ्या स्त्रिया व मुले यासह
मला जाऊ द्या. त्यांच्यासाठी मी तुमची किती सेवा केली आहे, हे तुम्हाला
ठाऊक आहे.” 27 पण लाबान त्याला म्हणाला, “माझ्यावर तुझी

कृपादृष्टी असेल तर कृपया थांब. तुझ्यामुळे याहवेहने मला आशीर्वाद
दिला आहे हे मला भविष्यकथनाने कळले आहे. 28 तुला किती वेतन हवे
ते मला सांग म्हणजे मी तुला तेवढे देईन.” 29 याकोब त्याला म्हणाला,
“मी तुमची चाकरी कशी केली आणि तुमची गुरे माझ्या देखरेखीखाली
कशी राहिली हे तुम्हाला माहीत आहे. 30 मी येण्यापूर्वी तुमच्याकडे जे
होते ते खूप वाढले आहे आणि मी जिथे होतो तिथे याहवेहने तुम्हाला
आशीर्वाद दिला आहे. पण माझ्या स्वतःच्या कुटुंबीयांकडे मी केव्हा लक्ष
देणार?” 31 “मी तुला काय देऊ?” त्याने विचारले. “मला काहीही देऊ
नका,” याकोबने उत्तर दिले. “पण जर तुम्ही माझ्यासाठी हे केले तर
मी तुमच्या कळपांचे पालन करेन आणि त्यांचा सांभाळ करेन: 32
आज मला तुमचे सर्व कळप बघून घेऊ द्या म्हणजे मी त्यातून डाग
व ठिपके असलेली मेंढरे व बोकडे आणि गडद रंगाची मेंढरे वेगळी
करेन व तेच माझे वेतन होईल. 33 आणि जेव्हा तुम्ही मला दिलेले
वेतन तपासाल तेव्हा भविष्यात माझा प्रामाणिकपणा माझ्यासाठी
साक्ष देईल. म्हणजे माझ्या कळपात तुम्हाला एखादा डाग व ठिपके
नसलेला बोकड किंवा मेंढा आढळला, तर मी तो तुमच्या कळपातून
चोरून घेतला आहे, हे तुम्हाला समजेल.” 34 लाबान म्हणाला, “ठीक
आहे, तू म्हणतोस तसे होऊ दे.” 35 त्याच दिवशी लाबान आपल्या
कळपात गेला आणि त्याने पट्टेदार आणि ठिपके असलेली बोकडे व
डाग आणि ठिपके असलेल्या शेळया (ज्यांच्यावर पांढरा डाग होता)
आणि गडद रंगांची मेंढरे वेगळी करून आपल्या पुत्रांच्या स्वाधीन केली.
36 नंतर त्याने त्यांच्यामध्ये आणि याकोबामध्ये तीन दिवसांच्या यात्रेचे
अंतर ठेवले आणि याकोब लाबानाचे उर्वरित कळप राखू लागला. 37
मग याकोबाने चिनार, बदाम व अर्मोन वृक्षांच्या कोवळया फांद्या घेतल्या
व त्यांची पांढरी अंतर्साल दिसेपर्यंत त्या सोलल्या. 38 त्या काठ्या
त्याने कळपाच्या पाणी पिण्याच्या पन्हाळयात ठेवल्या, जेणेकरून जेव्हा
ते पाणी पिण्याकरिता येतील तेव्हा ते थेट कळपांसमोर असतील. 39
त्या काठ्यांच्या समोर शेळयामेंढ्या फळत तेव्हा त्यांना पट्टेदार किंवा
डाग असलेली किंवा ठिपकेदार करडे होत. 40 मग याकोबाने तरुण
कळप बाजूला केला, परंतु लाबानाच्या कळपामधील पट्टेदार आणि गडद
रंगाच्या मेंढ्यांकडे कळपांची तोंडे केली. अशा प्रकारे त्याने स्वतःसाठी
वेगळे कळप बनविले आणि त्यांना लाबानाच्या प्राण्यांबरोबर ठेवले नाही.
41 जेव्हा तो मेंढरांशी आपल्या कळपातील धष्टपुष्ट माद्यांचा संबंध घडवून
आणत असे, त्यावेळी सोललेल्या काठ्या याकोब त्यांच्यापुढे ठेवी. 42
पण जेव्हा दुबळया मेंढ्या फळत तेव्हा त्या काठ्या तो त्यांच्यापुढे ठेवीत
नसे. त्यामुळे दुबळी मेंढरे लाबानाची व धष्टपुष्ट मेंढरे याकोबाची होत.
43 याचा परिणाम असा झाला की, याकोब खूप श्रीमंत झाला आणि
पुष्कळ शेरडे, मेंढरे, दास, दासी, उंट आणि गाढवे त्याच्या मालकीची
झाली.

**31** याकोबाने लाबानाच्या पुत्रांचे म्हणणे ऐकले, “आमच्या वडिलांचे
जे सर्वकाही होते ते याकोबाने घेतले आहे आणि ही सर्व संपत्ती
त्याला जी मिळाली आहे ती आमच्या वडिलांची होती.” 2 आणि
याकोबाला दिसून आले की लाबानची त्याच्याबद्दलची वृत्ती आता
पूर्वीसारखी राहिली नाही. 3 तेव्हा याहवेह याकोबाशी बोलले आणि
म्हणाले, “तू आता आपल्या वडिलांच्या व नातलगांच्या देशात परत जा
आणि मी तुझ्याबरोबर असेन.” 4 तेव्हा याकोबाने राहेल व लेआ यांना
ज्या शेतात तो कळप राखीत होता तिथे बोलावून घेतले. 5 तो त्यांना
म्हणाला, “मी पाहतो की तुमच्या वडिलांची वृत्ती माझ्याशी पूर्वीसारखी
राहिलेली नाही, पण माझ्या वडिलांचे परमेश्वर माझ्याबरोबर आहेत. 6
मी तुमच्या वडिलांची आपल्या सर्व शक्तिनिशी सेवा केली हे तुम्हाला
माहीत आहे; 7 तरीपण तुमच्या वडिलांनी माझ्या वेतनाबाबत केलेला
करार दहा वेळा बदलून मला फसविले आहे, तरी परमेश्वराने त्यांना माझे
काही वाईट करू दिले नाही. 8 कारण ज्यावेळी त्यांनी म्हटले की, डाग
असलेल्या शेळयामेंढ्या तुझ्या, त्यावेळी सर्व कळपांना डाग असलेली
करडे होत. जेव्हा ते आपले मन बदलून म्हणत, पट्टेदार शेळयामेंढ्या
तुझ्या, तेव्हा त्यांना सर्व पट्टेदार करडे होत. 9 अशा रीतीने तुमच्या
वडिलांच्या शेळयामेंढ्या त्यांच्यापासून काढून परमेश्वराने ती मला दिली
आहेत. 10 “कळप फळावयाच्या ॠतूत मला स्वप्नात दिसले की,
कळप फळविणारे बोकड पट्टेदार, डाग असलेले व ठिपकेदार आहेत. 11
मग स्वप्नामध्ये परमेश्वराच्या दूताने मला बोलावून म्हटले, ‘याकोबा,’ मी
उत्तर दिले, ‘हा मी इथे आहे.’ 12 आणि त्यांनी मला सांगितले, ‘तुझी
नजर वर कर आणि पाहा की, फळविणारे बोकड पट्टेदार, डाग असलेले
व ठिपकेदार आहेत. कारण लाबानाने तुझ्याशी कसा व्यवहार केला
हे सर्व मी पाहिले आहे. 13 मीच तुला बेथेलमध्ये भेटलेला परमेश्वर
आहे. त्या ठिकाणी तू स्तंभाला तैलाभ्यंग करून शपथ वाहिली होती.
आता तू हा देश सोडून आपल्या मायदेशी परत जा.’” 14 तेव्हा राहेल
आणि लेआ यांनी उत्तर दिले, “आता आमच्या वडिलांच्या संपत्तीत
आमचा काही वाटा राहिला आहे काय? 15 ते आम्हाला परकियांसारखी
वागणूक देत नाहीत काय? त्यांनी आम्हाला केवळ विकलेच नाही, तर
आमच्याबद्दल मिळालेला सर्व मोबदला वापरून संपविला आहे. 16
आमच्या वडिलांकडून परमेश्वराने हे धन काढून घेतले आहे, ते निश्चितच
आमचे आणि आमच्या मुलाबाळांचे धन आहे. म्हणून परमेश्वराने तुम्हाला
सांगितले आहे तसे करा.” 17 मग याकोबाने आपल्या पत्नी व मुलांना
उंटांवर बसविले 18 आणि त्याने आपल्यापुढे कळप हाकीत, पद्दन-
अराम येथे मिळालेली सर्व मालमत्ता घेऊन त्याचे वडील इसहाक
याचा देश कनान इथे जाण्यास निघाला. 19 जेव्हा लाबान आपल्या
मेंढरांची लोकर कातरण्यास गेला असताना, राहेलने आपल्या वडिलांच्या
कुलदैवतांच्या मूर्ती चोरल्या. 20 याकोब अरामी लाबानाला काहीही न
सांगता त्याला फसवून पळाला. 21 अशा रीतीने आपली सर्व चीजवस्तू
घेऊन, फरात नदी ओलांडून ते सर्वजण गिलआद डोंगराळ प्रदेशाच्या
वाटेला लागले. 22 याकोब पळून गेला आहे, हे लाबानाला तिसऱ्या
दिवशी सांगण्यात आले. 23 तेव्हा आपले नातलग बरोबर घेऊन त्याने
त्यांचा पाठलाग केला आणि त्यांना सातव्या दिवशी गिलआद डोंगरावर
गाठले. 24 पण रात्रीच्या स्वप्नात परमेश्वर अरामी लाबानकडे आले

आणि म्हणाले, “सावध राहा, तू याकोबाला चांगले किंवा वाईट असे
काहीही म्हणू नकोस.” 25 लाबानाने याकोबास गाठले तेव्हा याकोब
गिलआद डोंगरमाथ्यावर तळ देऊन राहिला होता. मध्यंतरीच्या काळात
लाबानानेदेखील आपला तळ डोंगराच्या पायथ्याशी दिला. 26 लाबानाने
याकोबाला विचारले, “हे तू काय केलेस? तू मला फसविले आणि
माझ्या मुली युद्धबंदिसारख्या पळवून नेत आहेस? 27 असे गुप्तपणे
पळून तू मला का फसविले? तू मला का सांगितले नाही, जेणेकरून झांज
व वीणेचे गायन-वादन करून समारंभाने आनंदाने निरोप देण्याची मला
संधी मिळाली असती? 28 माझ्या नातवंडाचा निरोप घेण्यापूर्वी, तू मला
त्यांची चुंबने देखील घेऊ दिली नाहीस. ही मूर्खपणाची वागणूक आहे.
29 मी तुझे नुकसान करू शकलो असतो, पण तुझ्या पूर्वजांचे परमेश्वर
काल रात्री मला म्हणाले, ‘सावध राहा, तू याकोबला चांगले किंवा वाईट
असे काहीही म्हणू नकोस.’ 30 आता तुला जावेसे वाटते कारण तुझ्या
नातलगांमध्ये परतण्याची तुला आतुरता आहे. पण तू माझी कुलदैवते
का चोरलीस?” 31 याकोबाने लाबानास उत्तर दिले, “मला भीती वाटत
होती की तुम्ही आपल्या मुली माझ्यापासून बळजबरीने काढून घ्याल.
32 पण ज्याच्याकडून तुम्हाला तुमची कुलदैवते मिळतील, तो जिवंत
राहणार नाही. आपल्या नातेवाईकांच्या उपस्थितीत, माझ्याबरोबर येथे
तुमचे काही आहे की नाही ते स्वतःच पाहा; आणि असल्यास, ते
घ्या.” राहेलने त्या मूर्ती चोरल्या होत्या हे याकोबाला माहीत नव्हते.
33 लाबान याकोबाच्या तंबूमध्ये गेला. लेआच्या तंबूमध्ये आणि मग
दोन दासींच्या तंबूंमध्ये गेला, पण त्याला काही सापडले नाही. नंतर तो
लेआच्या तंबूमधून निघून राहेलच्या तंबूमध्ये गेला. 34 आता राहेलने त्या
कुलदैवतांच्या मूर्ती चोरून आपल्या उंटाच्या खोगिरामध्ये लपवून ठेवल्या
होत्या आणि ती त्या खोगिरावर बसली होती. लाबानाने तिच्या तंबूमध्ये
कसून शोध केला तरी त्याला त्या सापडल्या नाहीत. 35 राहेल त्याला
म्हणाली, “बाबा मी तुमच्यापुढे उभी राहू शकत नाही कारण मी ऋतुमती
आहे.” अशाप्रकारे त्याने शोध केला, परंतु त्याला कुलदैवतांच्या मूर्ती
आढळल्या नाही. 36 तेव्हा याकोबाला लाबानाचा खूप संताप आला.
त्याने रागाने विचारणा केली, “माझा काय अपराध आहे? मी कोणता
गुन्हा केला आहे, की तुम्ही माझा पाठलाग करीत आहात? 37 माझ्या
सर्व सामानाची झडती घेतलीत. आता मी तुमचे जे काही चोरले असेल,
ते तुमच्या आणि माझ्या लोकांच्या पुढे ठेवा. त्यांनाच ते पाहू द्या आणि
ते कोणाचे आहे हे ठरवू द्या. 38 “वीस वर्षे मी तुमच्याबरोबर राहिलो.
त्या काळात तुमच्या मेंढ्या व शेळ्या यांचा कधीही गर्भपात झाला
नाही किंवा मी तुमच्या कळपातील एकाही एडक्याला खाल्ले नाही. 39
मी तुमच्याकडे वनपशूंनी फाडलेले प्राणी आणले नाहीत; मी स्वतः
नुकसान सहन केले आणि दिवसा किंवा रात्री जे काही चोरीला गेले
त्याबद्दल तुम्ही माझ्याकडून भरून घेतले. 40 माझी परिस्थिती अशी
होती: दिवसभर उन्हाचा आणि रात्री थंडीच्या कहराचा त्रास होत असे
आणि झोप माझ्या डोळ्यावरून उडून जात असे. 41 अशा स्थितीत मी
वीस वर्षे काढली. चौदा वर्षे तुमच्या दोन मुली मिळविण्याकरिता आणि
सहा वर्षे कळप मिळविण्याकरिता आणि तेवढ्या काळात तुम्ही दहा
वेळेस माझ्या वेतनात फेरबदल केला. 42 जर माझे पिता इसहाकाचे
परमेश्वर, अब्राहामाचे परमेश्वर आणि इसहाकास ज्यांचे भय वाटते, ते
माझ्यासह नसते, तर तुम्ही मला रिकामी हाताने पाठवून दिले असते.
पण परमेश्वराने माझे परिश्रम व माझ्या हातांनी केलेले कष्ट पाहिले
आणि म्हणूनच त्यांनी तुम्हाला काल रात्री दर्शन देऊन धमकाविले.” 43
यावर लाबानाने याकोबास उत्तर दिले, “या स्त्रिया माझ्या मुली आहेत;
ही मुलेबाळेही माझी आहेत; हे कळप व तुझे जे आहे ते सर्व माझेच
आहे. तेव्हा माझ्या कन्या व त्यांची संतती यांचे मी आता करू? 44
तर चल, आपण दोघे म्हणजे तू आणि मी शांतीचा करार करू आणि
तो तुझ्या माझ्यामध्ये साक्ष होवो.” 45 तेव्हा याकोबाने स्तंभ म्हणून
एक धोंडा उभा केला; 46 आणि याकोबाने आपल्या नातेवाईकांना
म्हटले, “काही दगड गोळा करा.” त्यांनी त्यांची रास केली, मग त्या
सर्वांनी दगडाच्या राशी जवळ बसून एकत्र भोजन केले. 47 मग त्या
राशीला लाबानाच्या भाषेत यगर-सहदूथा आणि याकोबाच्या भाषेत
गलेद असे नाव दिले. 48 लाबान म्हणाला, “आपल्या दोघांपैकी कोणीही
एकमेकांविरुद्ध अतिक्रमण केले, तर ही दगडांची रास त्याला साक्षी
राहील.” याकारणास्तव या जागेला गलेद म्हणतात. 49 यावरून तिला
मिस्पाह असेही नाव देण्यात आले; कारण लाबान म्हणाला, “आपण
एकमेकांपासून दूर जाऊ तेव्हा आपण आपला करार पाळू, याहवेह
आपल्यावर लक्ष ठेवो.” 50 तू माझ्या मुलींना निर्दयतेने वागविलेस
किंवा अन्य स्त्रिया केल्यास, “जरी आपल्यासोबत कोणीही नसेल,
तरीपण परमेश्वर तुझ्यात व माझ्यात साक्षी आहेत.” 51 लाबान आणखी
याकोबास म्हणाला, “ही रास आणि हा स्तंभ तुझ्या व माझ्या दरम्यान
ठेवला आहे. 52 हे ओलांडून मी तुझ्यावर हल्ला करणार नाही किंवा तू
देखील ही रास व हा स्तंभ ओलांडून माझ्यावर हल्ला करणार नाही. ही
रास व स्तंभ याची साक्ष आहे. 53 अब्राहामाचे परमेश्वर आणि नाहोराचे
परमेश्वर आणि त्याच्या पित्याचे परमेश्वर, आमच्यामध्ये न्याय करोत.”
मग याकोबाने त्याचे वडील इसहाकाला ज्यांचे भय होते त्यांच्या नावाने
शपथ घेतली. 54 नंतर याकोबाने डोंगराच्या माथ्यावर परमेश्वराला एक
अर्पण वाहिले. त्याने आपल्या सर्व नातलगांना मेजवानीस बोलाविले
आणि त्यांनी भोजन करून ती सर्व रात्र त्या डोंगरावर घालविली. 55
लाबान दुसऱ्या दिवशी सकाळीच उठला व त्याने आपल्या कन्यांची व
नातवंडांची चुंबने घेतली, त्यांना आशीर्वाद दिला आणि मग तो घरी परत
गेला.

**32** याकोब आपल्या वाटेने जात असता परमेश्वराचा दूत त्यास भेटले.
2 जेव्हा याकोबाने त्यांना पाहिले, तो म्हणाला, “या ठिकाणी
परमेश्वराचे सैन्यतळ आहे!” म्हणून त्याने त्या ठिकाणाचे नाव महनाईम
असे ठेवले. 3 याकोबाने आता एदोम प्रांतातील सेईर प्रदेशात राहणारा
आपला भाऊ एसाव, याच्याकडे आपले दूत पाठविले; 4 आणि त्याने
दूतांना आज्ञा दिली की, तुम्ही माझा धनी एसाव याला जाऊन सांगा:
“तुमचा सेवक याकोब म्हणतो, मी आतापर्यंत आपले मामा लाबान

यांच्याकडे राहत होतो. 5 आता मी गुरे, गाढवे, मेंढरे, पुष्कळ स्त्रीपुरुष
चाकर यांचा धनी झालो आहे. मी हा निरोप तुमच्याकडे पाठवित आहे
कि तुमची कृपादृष्टी माझ्यावर होऊ द्यावी.” 6 निरोप्यांनी परत येऊन
याकोबास सांगितले की, “आपला भाऊ एसाव चारशे लोक बरोबर
घेऊन तुम्हाला भेटण्यासाठी येत आहे.” 7 हे ऐकताच याकोबाने भीतीने
व व्याकूळ होऊन आपले कुटुंबीय, गुरे, शेरडेमेंढरे आणि उंट यांची दोन
गटांमध्ये विभागणी केली. 8 त्याने विचार केला, “एसावाने एका गटावर
हल्ला केला तर दुसऱ्या गटाला कदाचित निसटून जाता येईल.” 9
मग याकोबाने प्रार्थना केली, “हे याहवेह, माझे पिता अब्राहाम, आणि
माझे पिता इसहाक यांच्या परमेश्वरा, तुम्ही मला माझ्या देशात आणि
नातलगात परत येण्यास सांगितले व मला समृद्ध करण्याचे वचन
दिले आहे. 10 तुम्ही मला वचन दिल्याप्रमाणे जी वात्सल्य आणि
विश्वसनीयता वारंवार दाखविलीस तिला वास्तविक मी पात्र नाही; मी
यार्देनेच्या पलीकडे गेलो तेव्हा माझ्याजवळ एका काठीशिवाय दुसरे
काहीही नव्हते आणि आता माझे दोन गट झाले आहेत. 11 तुम्ही
माझी विनंती ऐकून, माझा भाऊ एसावच्या हातून मला वाचवा, मला
त्याची भीती वाटते की तो येऊन मला आणि त्यांच्या आईसह मुलांनाही
मारून टाकेल. 12 परंतु तुम्ही मला समृद्ध करण्याचे आणि माझे वंशज
समुद्रातील वाळूप्रमाणे अगणित करण्याचे वचन दिले आहे.” 13 त्या
रात्री याकोब तिथेच राहिला आणि आपल्याजवळ होते त्यातून त्याने
आपला भाऊ एसाव याच्यासाठी एक भेट तयार केली: 14 त्यासाठी
त्याने दोनशे शेळया, वीस बोकड, दोनशे मेंढ्या व वीस एडके, 15
तीस दुभत्या मादी उंट व त्यांची बछडी, चाळीस गाई, दहा बैल, वीस
गाढवी, दहा शिंगरे, एवढी जनावरे बाजूला काढली. 16 प्रत्येक जातीच्या
जनावरांचे वेगवेगळे कळप करून त्यांना नोकरांकडे सुपूर्द करून सूचना
दिली, “माझ्यापुढे चला आणि प्रत्येक कळपामध्ये काही अंतर ठेवा.”
17 पहिला कळप नेणाऱ्या नोकराला त्याने सांगितले: “जेव्हा माझा
भाऊ एसाव तुम्हाला भेटेल आणि त्याने विचारले, ‘तुम्ही कोणाचे चाकर
आहात, तुम्ही कुठे चालला आहात, ही जनावरे जी तुझ्यापुढे आहे ती
कोणाची आहेत?’ 18 त्याला उत्तर द्या, ‘ही जनावरे तुमचा सेवक याकोब
याची आहेत. ही त्याने आपला धनी एसावच्या भेटीदाखल पाठविली
आहेत. तो स्वतः आमच्या पाठोपाठ येत आहे.’” 19 याकोबाने दुसऱ्या,
तिसऱ्या आणि इतर कळप हाकणाऱ्याला सूचना दिली: “एसाव जेव्हा
तुम्हाला भेटेल तेव्हा तुम्हीही हाच निरोप दिला पाहिजे. 20 हे निश्चित
बोला, ‘आपला दास याकोब आमच्या मागून येत आहे.’” कारण त्याने
विचार केला, “मी एसावाला समोरासमोर भेटण्यापूर्वी त्याला भेटी
देऊन संतुष्ट करेन; मग तो जेव्हा मला भेटेल, तेव्हा तो माझा स्वीकार
करेल.” 21 म्हणूनच आपल्यापुढे भेटी पाठवली आणि याकोबाने ती
रात्र तळावरच घालविली. 22 परंतु त्या रात्रीच याकोब उठला आणि
त्याने त्याच्या दोन्ही पत्नी व उपपत्नी आणि अकरा मुले यांना जागे
केले आणि यार्देन नदीच्या किनाऱ्याने त्यांना यब्बोक नदीच्या उताराने
पार नेले 23 त्याने त्यांना नदीच्या पलीकडे पाठविल्यावर त्याची सर्व
संपत्तीही त्यांच्या पाठोपाठ पलीकडे पाठविली. 24 तिथे याकोब एकटाच
होता. त्याचवेळी कोणा पुरुषाने सूर्योदय होईपर्यंत त्याच्याशी झोंबी
केली. 25 याकोबावर जय मिळणे शक्य नाही, असे पाहून त्या पुरुषाने
याकोबाच्या जांघेवर प्रहार केला आणि तो सांधा त्याने उखडून टाकला.
26 मग तो याकोबाला म्हणाला, “मला आता जाऊ दे, कारण पहाट
होत आहे.” पण याकोब म्हणाला, “तू मला आशीर्वाद दिल्यावाचून
मी तुला जाऊ देणार नाही.” 27 मग त्याने याकोबास विचारले, “तुझे
नाव काय आहे?” तेव्हा त्याने उत्तर दिले, “याकोब.” 28 यावर तो
मनुष्य म्हणाला, “आता तुझे नाव याकोब राहणार नाही, तर ‘इस्राएल’
असे पडेल; कारण तू परमेश्वराशी व मनुष्याशीही संघर्ष करून यशस्वी
झाला.” 29 मग याकोबाने त्याला विचारले, “कृपया आपले नाव मला
सांगा.” तेव्हा तो म्हणाला, “तू मला माझे नाव का विचारतोस?” मग
त्याने याकोबाला आशीर्वाद दिला. 30 मग याकोबाने त्या ठिकाणाचे
नाव पनीएल असे ठेवले, कारण तो म्हणाला, “मी परमेश्वराचे मुख
पाहिले आणि तरीही मी जिवंत राहिलो.” 31 जेव्हा याकोब पेनुएल
मधून निघाला त्यावेळी सूर्य उगवला होता आणि त्याच्या जांघेचा सांधा
उखडल्यामुळे तो लंगडत होता. 32 याच कारणास्तव इस्राएलचे लोक
अजूनही जनावरांच्या जांघेतील धोंडशिरा खात नाहीत, कारण त्याने
याकोबाच्या जांघेच्या स्नायुला स्पर्श केला होता.

**33** नंतर दूर अंतरावरून एसाव आपल्या चारशे माणसांबरोबर येत
आहे असे याकोबाने पाहिले, तेव्हा त्याने लेआ व राहेल व दोघी
दासी यांच्याजवळ मुले वाटून दिली. 2 सर्वात पुढे त्याने आपल्या दासी
आणि त्यांची मुले; त्यांच्यामागे लेआ व तिची मुले आणि त्यांच्यानंतर
राहेल व योसेफ अशा रीतीने त्यांना ठेवले. 3 तो स्वतः सर्वांच्या
पुढे चालला आणि आपल्या भावाजवळ जाऊन पोहोचेपर्यंत त्याने
त्याला भूमीपर्यंत लवून सात वेळा मुजरा केला. 4 एसाव हा याकोबास
भेटण्यास धावत आला; त्याने त्याला आलिंगन दिले; त्याला कवेत
घेऊन त्याचे चुंबन घेतले आणि ते दोघे रडले. 5 एसावाने दृष्टी वर करून
त्या स्त्रिया व मुलांकडे पाहिले तेव्हा त्याने विचारले, “तुजबरोबर हे
लोक कोण आहेत?” याकोब म्हणाला, “परमेश्वराने कृपा करून तुमच्या
दासाला दिलेली ही माझी मुले आहेत.” 6 तेव्हा याकोबाच्या दासी आणि
त्यांची मुले पुढे आली आणि त्यांनीही त्याला लवून नमस्कार केला. 7
त्यानंतर लेआ व तिची मुले आली, शेवटी राहेल आणि योसेफ पुढे
आली. त्यांनीही त्याला लवून नमस्कार केला. 8 एसावाने विचारले, “जी
गुरे व कळप मला भेटले त्याचा उद्देश काय आहे?” याकोब म्हणाला,
“माझ्या धन्या, तुझ्या दृष्टीत मी कृपा पावावे म्हणून.” 9 यावर एसाव
म्हणाला, “भाऊ, माझ्याजवळ भरपूर आहे; तुझे आहे ते तुलाच राहू दे.”
10 “नाही, नाही!” याकोब म्हणाला, “जर तुमची माझ्यावर कृपा झाली
असल्यास या भेटींचा तुम्ही स्वीकार करा. कारण तुम्ही आता मला
स्वीकारले आहे म्हणून तुमचे मुख बघून परमेश्वराचे मुख बघितल्यासारखे
वाटते. 11 माझ्या देणग्यांचा कृपया स्वीकार करा, कारण परमेश्वराने
माझ्यावर दया केली आहे आणि त्यांनी मला सर्वकाही भरपूर दिले

आहे.” याकोबाने फारच आग्रह केल्यामुळे एसावाने शेवटी त्या भेटींचा स्वीकार केला. 12 मग एसाव त्याला म्हणाला, “चला, आता आपण वाटेस लागून पुढे जाऊ या. मी तुझ्यासोबत चालतो.” 13 पण याकोब त्यास म्हणाला, “काही मुले फार लहान आहेत हे माझ्या स्वामीला दिसतच आहे आणि दूध पाजणाऱ्या शेळया, मेंढ्या व गाई यांचेही मला पाहिले पाहिजे. त्यांना मी दिवसभर असेच हाकीत नेले तर ती जनावरे मरून जातील. 14 म्हणून मी माझ्या स्वामींना विनंती करतो की, आपण आपल्या सेवकापुढे जावे. आम्ही त्यांच्यामागे त्यांना चालवेल तसे हळूहळू चालत येऊन सेईर येथे तुम्हाला भेटू.” 15 मग एसाव म्हणाला, “माझी काही माणसे तुमच्याबरोबर ठेवू द्या.” “पण हे का करावे?” याकोब म्हणाला, “माझ्या स्वामींची कृपादृष्टी मजवर असली म्हणजे पुरे.” 16 तेव्हा एसाव त्याच दिवशी सेईरला परत जाण्यास निघाला. 17 दरम्यान याकोब सुक्कोथ येथे गेला. तिथे त्याने स्वतःसाठी तंबू आणि आपल्या गुरांसाठी निवारा बांधला. म्हणूनच त्या ठिकाणाला सुक्कोथ असे नाव पडले. 18 यानंतर याकोब पद्दन-अरामचा प्रवास पूर्ण करून कनान देशातील शेखेम नावाच्या शहरात सुखरुपपणे पोहोचला आणि शहराच्या बाहेर त्याने आपला तळ दिला. 19 जिथे त्याने तळ दिला होता तेथील जमिनीचा काही भाग त्याने शेखेमचा पिता हमोर याच्याकडून शंभर चांदीची नाणी देऊन विकत घेतला. 20 मग तिथे त्याने एक वेदी बांधून तिचे नाव त्याने एल एलोहे इस्राएल असे ठेवले.

**34** एके दिवशी याकोबापासून झालेली लेआची कन्या दीना त्या देशातील मुलींना भेटावयास गेली. 2 तेव्हा त्या देशाचा अधिपती हमोर नावाचा हिव्वी याचा पुत्र शेखेम, याने तिला पाहिले, तेव्हा तो तिला घेऊन गेला आणि तिच्यावर बलात्कार करून त्याने तिला भ्रष्ट केले. 3 याकोबाची मुलगी दीना हिच्यावर त्याचे हृदय आकर्षित झाले; त्याने त्या तरुण स्त्रीवर प्रेम केले आणि तो कोमलतेने तिच्याशी बोलला. 4 मग शेखेमने आपले वडील हमोर यांना म्हणाला, “ही मुलगी मला पत्नी करून द्या.” 5 आपली कन्या दीना हिला शेखेमने भ्रष्ट केले आहे हे याकोबाने ऐकले त्यावेळी त्याचे पुत्र रानात गुरांबरोबर होते; म्हणून ते घरी परत येईपर्यंत त्याने त्याबाबत काहीही केले नाही. 6 मग जेव्हा शेखेमचा बाप हमोर याकोबाकडे आपल्या मुलाच्या विवाहासंबंधी बोलणी करावयास आला. 7 तेवढ्यात याकोबाचे पुत्रही रानातून घरी आले. शेखेमने इस्राएलात अशी भयानक गोष्ट करून याकोबाच्या कन्येला भ्रष्ट केल्याचे वृत ऐकून त्यांना मोठा धक्का बसला आणि ते संतप्त झाले कारण ही अपमानजनक गोष्ट घडणे अत्यंत घृणास्पद होते. 8 हमोर त्यांना म्हणाला, “माझा मुलगा शेखेम याचे हृदय तुमच्या मुलीकडे आकर्षित झाले आहे, म्हणून तिला त्याची पत्नी म्हणून द्या. 9 आमच्याशी सोयरीक करा; आम्हाला तुमच्या मुली द्या आणि आमच्या मुली तुमच्यासाठी घ्या. 10 आमच्याबरोबर राहा; हा देश तुमच्यासमोर मोकळा आहे, त्यात राहा आणि व्यापार करा आणि मालमत्ता प्राप्त करा.” 11 मग शेखेम, दीनाचे वडील व भाऊ यांना उद्देशून म्हणाला, “माझ्यावर एवढी कृपादृष्टी करा, तुम्ही जे मागाल ते मी देईन. 12 तुम्ही वधूबद्दल वाटेल तितका हुंडा आणि भेट मागा, मी ती तुम्हाला देईन, पण ती मुलगी मला पत्नी म्हणून द्या.” 13 आपली बहीण दीना हिला शेखेमने भ्रष्ट केले म्हणून याकोबाच्या पुत्रांनी शेखेम आणि त्याचा पिता हमोर यांच्याशी मनात कपट धरून बोलणी केली. 14 ते म्हणाले, “आमची बहीण शेखेमाला देणे आम्हाला जमणार नाही, कारण तुमची सुंता झालेली नाही. अशा बेसुंती मनुष्याबरोबर विवाह केल्यास आमचा अपमान होईल. 15 आता आपण एक करार करू: जर तुमच्या देशातील प्रत्येक पुरुष आपली सुंता करून घेईल, 16 तर तुमच्या मुली आम्ही करू व आमच्या मुली तुम्हाला देऊ व आम्ही तुमच्यामध्ये स्थायिक होऊ आणि तुमच्याबरोबर एक लोक होऊ. 17 जर तुम्ही सुंता करण्यास तयार होणार नाही तर आम्ही तिला आमच्याबरोबर घेऊन आमची वाट धरू.” 18 त्यांचा प्रस्ताव हमोर आणि त्याचा मुलगा शेखेम यांना चांगला वाटला. 19 तो तरुण, जो त्याच्या वडिलांच्या घराण्यात सर्वात आदरणीय होता, त्याने जे सांगितले ते करण्यात वेळ घालविला नाही, कारण याकोबाच्या मुलीवर त्याचे खूप मन बसले होते. 20 म्हणून हमोर आणि शेखेम यांनी त्या शहरातील वेशीकडे जाऊन लोकांपुढे सुंतेची ही सूचना मांडली. 21 ते म्हणाले, “हे लोक आपले मित्र आहेत. त्यांना आपण आपल्यात राहण्याचे आमंत्रण देऊ आणि व्यापार करण्यास परवानगी देऊ; कारण आपला देश त्यांनाही पुरेल इतका मोठा असून त्यांना येथे सहज राहता येईल आणि त्यांच्या मुली आपण स्त्रिया करून घेऊ आणि आपण आपल्या मुली त्यांना देऊ. 22 परंतु ते लोक आपल्यात राहून राष्ट्राशी एकरूप होण्यास एकाच अटीवर तयार आहेत. ती अट म्हणजे आपल्यातील प्रत्येक पुरुषाने त्यांच्याप्रमाणेच स्वतःची सुंता करून घेतली पाहिजे. 23 तेव्हा त्यांची ही अट आपण मान्य करू या, म्हणजे ते आपल्यामध्ये वस्ती करतील. आपण हे केले तर त्यांची शेरडेमेंढरे, गुरे व मालमत्ता ते सर्व आपले होणार नाही का?” 24 हमोर आणि शेखेम यांच्या या गोष्टीला सर्व पुरुषांनी मान्यता दिली. ते त्या नगराच्या वेशीबाहेर आले आणि त्या सर्वांची सुंता करण्यात आली. 25 परंतु तीन दिवसानंतर, त्यांच्या जखमांमुळे ते वेदनेत असताना, याकोबाच्या पुत्रांपैकी दीनाचे दोन भाऊ शिमओन व लेवी, यांनी आपल्या हाती तलवारी घेतल्या, ते बेसावध असलेल्या शहरात शिरले आणि त्यांनी तेथील प्रत्येक पुरुषाची कत्तल केली. 26 हमोर आणि शेखेम यांचीही त्यांनी तलवारीने कत्तल केली. त्यांनी दीनाची शेखेमाच्या घरातून सुटका केली आणि तिला घेऊन ते परत आले. 27 यानंतर याकोबाचे सर्व पुत्र शहरात गेले आणि त्यांनी ते संपूर्ण शहर लुटले, जिथे त्यांच्या बहिणीला भ्रष्ट केले होते. 28 त्यांनी त्यांचे कळप, गुरे, गाढवे आणि त्यांच्या नगरात व शेतात असलेले सर्वकाही त्यांनी नेले. 29 तसेच त्यांच्या घरातील सर्व संपत्ती आणि त्यांच्या सर्व स्त्रिया व लेकरे, त्यांना जे काही घरात सापडले ते सर्व त्यांनी लुटले. 30 तेव्हा याकोब, शिमओन व लेवी यांना म्हणाला, “या भूमीतील सर्व कनानी व परिज्जी लोकांना माझी किळस येईल असे वर्तन तुम्ही केले आहे. आपण अगदी थोडके आहोत; ते आपल्यावर चालून येतील आणि आपल्याला चिरडून टाकतील व

आपण सर्वजण मारले जाऊ.” 31 यावर त्यांनी प्रत्युत्तर केले, “त्याने
आमच्या बहिणीशी एखाद्या वेश्येप्रमाणे व्यवहार करावा काय?”

**35** मग परमेश्वराने याकोबाला म्हटले, “ऊठ आणि बेथेलला जाऊन
तिथेच स्थायिक हो. तुझा भाऊ एसाव, याच्यापासून तू पळून जात
असता, ज्या परमेश्वराने तुला दर्शन दिले होते, तिथे त्याच परमेश्वरासाठी
एक वेदी बांध.” 2 म्हणून याकोब आपल्या सर्व कुटुंबीयांना व बरोबरच्या
सर्वांना म्हणाला, “तुम्ही बरोबर आणलेल्या परक्या दैवतांचा नाश करा,
शुद्ध व्हा, आपली वस्त्रे बदला. 3 चला आपण आता वर बेथेलला जाऊ
या. ज्या परमेश्वराने माझ्या संकटसमयी माझ्या प्रार्थनेचे उत्तर दिले आणि
मी जिथे कुठे गेलो तिथे माझ्याबरोबर राहिले, त्या परमेश्वरासाठी मी
तिथे एक वेदी बांधणार आहे.” 4 तेव्हा त्या सर्वांनी आपल्याकडील इतर
दैवताच्या मूर्ती व कर्णफुले याकोबाला दिली व त्याने ती शेखेमजवळ
असलेल्या एका एला वृक्षाखाली पुरून टाकली. 5 मग ते पुन्हा पुढे
निघाले आणि त्यांच्याभोवती असलेल्या सर्व नगरांवर परमेश्वराचे भय
पडले, त्यामुळे त्यांनी याकोबाचा पाठलाग केला नाही. 6 शेवटी याकोब
आणि त्याच्यासोबतचे सर्व लोक कनान देशातील लूज (याला बेथेल
असेही नाव होते) येथे येऊन पोहोचले. 7 त्या ठिकाणी याकोबाने एक
वेदी उभारली व त्या वेदीचे नाव त्याने एल बेथेल असे ठेवले; कारण तो
एसावापासून पळून जात असता परमेश्वराने येथेच त्याला दर्शन दिले
होते. 8 यानंतर लवकरच रिबेकाहची वृद्ध दाई दबोरा, ही मरण पावली
आणि बेथेलच्या खोऱ्यात एका एला वृक्षाखाली तिला मूठमाती देण्यात
आली. तेव्हापासून त्या वृक्षाला अल्लोन-बकूथ असे नाव पडले. 9
याकोब पद्दन-अराम वरून बेथेल येथे आला तेव्हा परमेश्वराने त्याला
पुन्हा एकदा दर्शन देऊन आशीर्वाद दिला. 10 परमेश्वर त्याला म्हणाले,
“तुझे नाव याकोब आहे, पण आता येथून पुढे, तुला याकोब म्हणजे
‘ठक’ असे म्हणणार नाहीत, तर इस्राएल असे म्हणतील.” याप्रकारे
त्याला इस्राएल हे नाव देण्यात आले. 11 परमेश्वर त्याला म्हणाले, “मी
सर्वसमर्थ परमेश्वर आहे; फलद्रूप हो आणि तुझी संख्या अनेक पटीने
वाढो. तुझे एक मोठे राष्ट्र निर्माण व्हावे म्हणून मी तुझी वृद्धी करेन.
पुष्कळ राजे तुझ्या वंशजातून उदय पावतील. 12 अब्राहाम व इसहाक
यांना जो देश मी दिला तो मी तुला व तुझ्यानंतर तुझ्या वंशजांना देईन.”
13 ज्या ठिकाणी परमेश्वराने त्याच्याशी बोलणे केले, त्या ठिकाणाहून
परमेश्वर वर निघून गेले. 14 नंतर याकोबाने ज्या ठिकाणी परमेश्वराने
त्याच्याशी बोलणे केले, त्या ठिकाणी एक पाषाणस्तंभ उभा केला
आणि त्यावर परमेश्वराला पेयार्पण ओतले आणि त्या स्तंभावर तैलाभ्यंग
केला. 15 ज्या स्थानी परमेश्वर त्याच्याशी बोलले होते. त्या स्थानाचे नाव
याकोबाने बेथेल असे ठेवले. 16 मग ते बेथेलमधून पुढे निघाले. तरी
एफ्राथाहपासून काही अंतरावर असतानाच राहेलला प्रसूती वेदना सुरू
झाल्या व तिला अतिशय कष्ट झाले. 17 अतिशय त्रासदायक प्रसूती
होताना सुईण तिला म्हणाली, “भिऊ नकोस; कारण तुला आणखी एक
पुत्र झाला आहे.” 18 तिने अखेरचा श्वास घेतला—कारण ती मृतवत
झाली होती—तिने तिच्या मुलाचे नाव बेन-ओनी ठेवले पण त्याच्या
वडिलांनी त्याचे नाव बिन्यामीन ठेवले. 19 अशाप्रकारे राहेल मरण
पावली आणि एफ्राथच्या (म्हणजे बेथलेहेमकडे) जाणाऱ्या वाटेवर तिला
मूठमाती देण्यात आली. 20 मग याकोबाने तिच्या कबरेवर एक दगडी
स्मारक उभारले, ते स्मारक आजही राहेलच्या कबरेचे खूण म्हणून तिथे
उभे आहे. 21 मग इस्राएल पुढे प्रवास करीत निघाला आणि त्याने
एदेरच्या बुरुजापलीकडे आपला तळ दिला. 22 तो त्या प्रदेशात राहत
असताना रऊबेन हा आपल्या पित्याची उपपत्नी बिल्हा हिच्याजवळ
जाऊन निजला, हे वृत्त इस्राएलला सांगण्यात आले. 23 लेआचे पुत्र:
याकोबाचा ज्येष्ठपुत्र रऊबेन, मग शिमओन, लेवी, यहूदाह, इस्साखार व
जबुलून. 24 राहेलचे पुत्र: योसेफ व बिन्यामीन हे होते. 25 राहेलची दासी
बिल्हा हिचे पुत्र: दान व नफताली हे होते. 26 लेआची दासी जिल्पा हिचे
पुत्र: गाद व आशेर हे होते. 27 अशा रीतीने शेवटी याकोब किर्याथ-अर्बा
म्हणजे हेब्रोन येथील मम्रे या ठिकाणी आपला पिता इसहाक याच्याकडे
येऊन पोहोचला. याच ठिकाणी अब्राहामही राहिला होता. 28 इसहाक
एकशेऐंशी वर्षे जगला. 29 तो परिपक्व वयाचा वयोवृद्ध होऊन मरण
पावला आणि त्याचे पुत्र एसाव व याकोब यांनी त्याला मूठमाती दिली.

**36** एसाव म्हणजे एदोम याची वंशावळ ही: 2 एसावाने कनान
देशातील स्थानिक मुलींशी विवाह केले होते: एलोन हिथी याची
कन्या आदाह, अनाहची कन्या व सिबोन हिव्वी याची नात ओहोलीबामाह
3 आणि इश्माएलाची कन्या व नबायोथाची बहीण बासमाथ. 4
एसावापासून आदाहला एलीफाज नावाचा पुत्र झाला, बासमाथला
रऊएल नावाचा पुत्र झाला. 5 एसावापासून ओहोलीबामाहला यऊश,
यालाम व कोरह या नावांचे पुत्र झाले. एसावाला हे सर्व पुत्र कनान
देशात झाले. 6 मग एसाव आपल्या स्त्रिया, मुलेबाळे, आपल्या घरची
सर्व नोकरमंडळी, आपली गुरे व इतर जनावरे आणि कनान देशात
त्याने मिळविलेली धनसंपत्ती घेऊन याकोबापासून दूर निघून तिथे
वस्ती करून राहिला. 7 कारण त्या दोघांकडे इतकी अधिक धनसंपत्ती
होती की त्यांच्या गुरांना पुरतील इतकी कुरणे तिथे नव्हती. 8 म्हणून
एसावाने सेईरच्या (जे एदोम आहे) डोंगराळ प्रदेशात वस्ती केली. 9
सेईरच्या डोंगराळ प्रदेशातील एदोमी लोकांचा मूळ पुरुष एसावच्या
वंशजांची नावे अशी. 10 एसावाच्या पुत्रांची नावे: एसावची पत्नी
आदाहपासून झालेला पुत्र एलीफाज आणि एसावची पत्नी बासमाथ
हिच्यापासून झालेला रऊएल. 11 एलीफाजचे पुत्र: तेमान, ओमर, सेपो,
गाताम व केनाज होते. 12 एसावाचा पुत्र एलीफाजला तिम्ना नावाची
उपपत्नी होती जिच्यापासून त्याला अमालेक हा पुत्र झाला. ही एसावची
पत्नी आदाह हिची नातवंडे होती. 13 रऊएलाचे पुत्र: नहाथ, जेरह,
शम्माह व मिज्जा. ही एसावाची पत्नी बासमाथ हिची नातवंडे होती. 14
एसावाला ओहोलीबामाह नावाची आणखी एक पत्नी होती. ती अनाहची
कन्या असून सिबोनाची नात होती. ओहोलीबामाहच्या पोटी एसावाला,
यऊश, यालाम व कोरह हे पुत्र झाले. 15 एसावाची नातवंडे त्यांच्या
नावांनी ओळखल्या जाणाऱ्या कुळांचे प्रमुख झाले: एसावाचा प्रथमपुत्र
एलीफाजचे पुत्र: त्यांची नावे ही: तेमान, ओमर, सेपो, केनाज, 16

कोरह, गाताम व अमालेक. हे सर्व एदोमातील एलीफाजचे प्रमुख वंशज
होते; ते आदाहचे पौत्र होते. 17 एसावाचा पुत्र रऊएलचे वंशज: नहाथ,
जेरह, शम्माह व मिज्जा. ही कुळे एदोम देशात रऊएलापासून झाले;
एसाव व त्याची पत्नी बासमाथची ही नातवंडे. 18 एसावाला त्याची
पत्नी ओहोलीबामाह हिच्याकडून: यऊश, यालाम व कोरह हे पुत्र झाले.
हे पुढारी एसावाला, अनाह याची कन्या ओहोलीबामाह हिच्यापासून
झाले. 19 हे एसावाचे (अर्थात् एदोमाचे) पुत्र, जे त्यांच्या कुळाचे पुढारी
होते. 20 एदोम देशातील रहिवासी, सेईर होरी याच्या पुत्रांची नावे ही:
लोटान, शोबाल, सिबोन, अनाह, 21 दिशोन, एसर व दीशान. हे एदोम
देशातील सेईराचे पुत्र होरी वंशातील कुळांचे सरदार झाले. 22 लोटानाचे
पुत्र: होरी व होमाम. तिम्ना लोटानाची बहीण होती. 23 शोबालाचे
पुत्र: अलवान, मानहथ, एबाल, शेफो व ओनाम. 24 सिबोनाचे पुत्र:
अय्याह व अनाह. (आपल्या पित्याची गाढवे ओसाड प्रदेशात चारीत
असताना ज्याने गरम पाण्याचे झरे शोधून काढले तोच हा अनाह होय.)
25 अनाहचा पुत्र: दिशोन असून त्याची कन्या ओहोलीबामाह ही होती.
26 दिशोनाचे पुत्र: हेमदान, एश्बान, इथरान व करान. 27 एसराचे पुत्र:
बिल्हान, जावान व आकान. 28 दिशोनाचे पुत्र: ऊस व अरान. 29 होरी
लोकांमधून प्रमुख झालेल्यांची नावे ही: लोटान, शोबाल, सिबोन, अना,
30 दिशोन, एसर व दीशान. 31 इस्राएली लोकांवर कोणत्याही राजाने
राज्य करण्यापूर्वी एदोम देशावर ज्या राजांनी राज्य केले ते: 32 बौराचा
पुत्र बेला एदोमचा राजा झाला. त्याच्या शहराला दिन्हाबाह हे नाव दिले
होते. 33 बेला मृत्यू पावल्यावर बस्रा येथला जेरहाचा पुत्र योबाब हा
त्याच्या जागी राजा झाला. 34 योबाब मरण पावल्यावर तेमानी देशातील
हुशाम त्याच्या जागी राजा झाला. 35 हुशाम मेल्यावर बदादाचा पुत्र
हदाद त्याच्या जागी राजा झाला. यानेच मोआब मैदानात मिद्यानांना
पराभूत केले; त्या नगराचे नाव अवीत होते. 36 हदाद मेल्यावर मास्रेका
येथील सामलाह त्याच्या जागी राजा झाला. 37 सामलाह मेल्यावर
फरात नदीच्या तीरावरील रेहोबोथ नावाच्या शहरातील शौल त्याच्या
जागी राजा झाला. 38 शौलाच्या मृत्यूनंतर अकबोराचा पुत्र बआल-
हानान त्याच्या जागी राजा झाला. 39 अकबोराचा पुत्र बआल-हानान हा
मेल्यावर हदाद त्याच्या जागी राजा झाला. त्याच्या नगराचे नाव पाऊ
होते, आणि त्याच्या पत्नीचे नाव महेटाबेल असून ती मेजाहाबाची कन्या
मात्रेद हिची कन्या होती. 40 एसाव हा एदोम वंशातील प्रमुखांचा मूळ
पुरुष होता: तिम्ना, आल्वा, यतेथ, 41 ओहोलीबामाह, एलाह, पीनोन,
42 केनाज, तेमान, मिब्सार, 43 मग्दीएल व ईराम.

**37** कनान देशात ज्या ठिकाणी आपला पिता वस्ती करून राहिला
होता, त्या ठिकाणी याकोब जाऊन स्थायिक झाला. 2 याकोबाच्या
कुटुंबाचा वृतांत असा आहे: योसेफ सतरा वर्षांचा तरुण असताना
आपल्या भावांबरोबर, त्याच्या वडिलांच्या पत्नी बिल्हा व जिल्पा यांच्या
पुत्रांबरोबर कळप चारीत असे, तेव्हा योसेफाने, त्यांच्या दुर्वर्तनाबद्दल
तक्रारी वडिलांकडे आणल्या. 3 इस्राएल योसेफावर आपल्या इतर
मुलांपेक्षा अधिक प्रीती करीत असे, कारण त्याला तो म्हातारपणी
झाला होता; म्हणून याकोबाने त्याच्यासाठी एक आकर्षक रंगाचा
अंगरखा तयार केला. 4 जेव्हा त्याच्या भावांनी पाहिले की त्यांचे वडील
त्यांच्यापेक्षा योसेफावर अधिक प्रीती करतात, तेव्हा ते योसेफाचा द्वेष
करू लागले आणि त्याच्याशी सलोख्याचा एकही शब्द बोलू शकत
नव्हते. 5 एके रात्री योसेफाला एक स्वप्न पडले आणि त्याने ते
आपल्या भावांना सांगितले. ते ऐकून तर ते त्याचा अधिकच द्वेष करू
लागले. 6 योसेफ आपल्या भावांना म्हणाला, “माझे स्वप्न ऐका: 7
आपण शेतात पेंढ्या बांधत होतो, तेवढ्यात माझी पेंढी उठून उभी
राहिली आणि तुमच्या सर्वांच्या पेंढ्या माझ्या पेंढीभोवती गोळा होऊन
उभ्या राहिल्या व त्यांनी माझ्या पेंढीला नमन केले.” 8 तेव्हा त्याच्या
भावांनी त्याची हेटाळणी करून त्याला म्हटले. “काय! तू आमचा राजा
होणार? तू आम्हावर सत्ता चालविणार?” आणि त्याच्या स्वप्नामुळे
व त्याने त्याचे कथन केल्यामुळे ते त्याचा अधिक द्वेष करू लागले.
9 पुढे त्याला आणखी एक स्वप्न पडले. तो त्यांना म्हणाला, “पाहा,
मला आणखी एक स्वप्न पडले. सूर्य, चंद्र आणि अकरा तारे यांनी
मला खाली लवून नमन केले.” 10 त्याने आपले स्वप्न आपल्या
भावांबरोबर आपल्या वडिलांनाही सांगितले, तेव्हा त्याच्या वडिलांनी
त्याला धमकावून विचारले, “हे काय बोलतोस? मी, तुझी आई आणि
तुझे भाऊ तुझ्याकडे येऊन तुला भूमीपर्यंत लवून नमन करणार आहोत
काय?” 11 या कारणामुळे त्याच्या भावांचा द्वेष अधिक तीव्र झाला;
परंतु त्याच्या वडिलांनी ही बाब आपल्या मनात ठेवली. 12 योसेफाचे
भाऊ आपल्या वडिलांची मेंढरे शेखेम येथे चारावयास घेऊन गेले होते.
13 इस्राएलने योसेफाला म्हटले, “तुझे भाऊ शेखेम येथे मेंढरे चारावयास
गेले आहेत; मी तुला त्यांच्याकडे पाठवित आहे.” योसेफ म्हणाला,
“ठीक आहे.” 14 याकोबाने योसेफास म्हटले, “तू शेखेमला जा आणि
तुझ्या भावांचे सर्वकाही ठीक आहे का व कळपांची स्थिती कशी आहे,
हे पाहून मला येऊन सांग.” नंतर याकोबाने त्याला हेब्रोन खोऱ्यातून
पाठवले. आणि तो शेखेमास पोहोचला. 15 तो शेतातून फिरत असता
त्याला एका मनुष्याने पाहिले आणि त्याने योसेफाला विचारले, “तू
काय शोधीत आहेस?” 16 योसेफाने उत्तर दिले, “मी माझ्या भावांना
शोधीत आहे. ते कुठे कळप चारीत आहे, हे मला सांगाल का?” 17
तेव्हा तो मनुष्य म्हणाला, “होय, पण आता ते येथे नाहीत, ‘आपण
दोथानला जाऊ’ तुझ्या भावांना असे बोलताना मी ऐकले.” तेव्हा योसेफ
भावांच्या मागे दोथानला गेला आणि ते त्याला तिथे आढळले. 18
त्याच्या भावांनी त्याला दुरून येताना पाहिले आणि तो पोहोचण्या
आधी त्याला जिवे मारण्याचा कट रचला. 19 ते एकमेकांना म्हणाले,
“अरे हा स्वप्नदर्शी येत आहे. 20 चला आपण याला ठार करू. त्याला
एखाद्या विहिरीत फेकून देऊ आणि आपल्या वडिलांना सांगू की त्याला
हिंस्र पशूने खाऊन टाकले आहे; मग त्याच्या स्वप्नांचे काय होते ते
आपण पाहू.” 21 जेव्हा रऊबेनने हे ऐकले तेव्हा त्याने योसेफाचा
जीव वाचविण्याचा प्रयत्न केला; तो म्हणाला, “आपण त्याला जिवे
मारणार नाही; 22 आपण रक्तपात करणार नाही; तर आपण त्याला या

रानातल्या विहिरीत फेकून देऊ; परंतु त्याला हात लावू नका.” रऊबेनने
असा बेत केला होता की नंतर योसेफाला विहिरीतून काढावे आणि
आपल्या वडिलांकडे परत पाठवून द्यावे. 23 योसेफ त्यांच्याजवळ आला
तेव्हा त्यांनी त्याचा झगा—जो गडद रंगाचा, सुशोभित होता—ओढून
काढला, 24 आणि त्याला एका कोरड्या विहिरीत फेकून दिले, ती विहीर
रिकामी होती, तिच्यात पाणी नव्हते. 25 मग ते भोजन करण्यास बसले
असता त्यांना दूर अंतरावरून उंटांचा एक काफिला त्यांच्याकडे येताना
दिसला. ते इश्माएली व्यापारी असून गिलआदहून इजिप्तला डिंक,
मसाले व गंधरस घेऊन चालले होते. 26 तेव्हा यहूदाह आपल्या भावांना
म्हणाला, “आपल्या भावाला मारून त्याचा रक्तपात झाकून आपल्याला
काय फायदा? 27 चला आपण योसेफाला इश्माएली लोकांना विकून
टाकू या, त्याला हात लावू नका, तो आपला भाऊच आहे, आपल्याच
रक्तमांसाचा आहे.” त्या सर्व भावांना त्याचे म्हणणे पटले. 28 मिद्यानी
व्यापाऱ्यांचा काफिला म्हणजे इश्माएली लोक जवळ आले, तेव्हा
त्यांनी योसेफाला त्या विहिरीतून बाहेर काढले आणि वीस शेकेल चांदी
घेऊन भावांनी योसेफाला विकून टाकले; आणि व्यापाऱ्यांनी योसेफाला
आपल्याबरोबर इजिप्त देशाला नेले. 29 जेव्हा रऊबेन त्या विहिरीजवळ
परत आला आणि योसेफ विहिरीत नाही हे पाहून त्याने आपली वस्त्रे
फाडली. 30 तो रडत आपल्या भावांना म्हणाला, “मुलगा विहिरीत
नाही; आता मी कुठे जाऊ?” 31 मग त्यांनी योसेफाचा झगा घेतला,
एक बोकड मारला आणि त्याच्या रक्तात तो झगा बुडवला. 32 तो
झगा त्यांनी आपल्या वडिलांकडे आणून म्हटले, “हा झगा आम्हास
सापडला आहे; हा तुमच्या मुलाचा झगा आहे की नाही ते पाहा!” 33
त्याने तो झगा ओळखला आणि म्हणाला, “होय, हा माझ्या मुलाचाच
झगा आहे; त्याला वनपशूने खाऊन टाकले असावे. योसेफाचे त्याने
फाडून तुकडे केले आहे यात शंका नाही.” 34 यानंतर याकोबाने आपली
वस्त्रे फाडली आणि गोणपाट नेसून त्याने मुलासाठी पुष्कळ दिवस
शोक केला. 35 त्याचे सर्व पुत्र आणि कन्या आले आणि त्याचे सांत्वन
करण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा काही उपयोग झाला नाही. तो
म्हणत असे, “मी पुत्र शोकानेच मरेन आणि अधोलोकी आपल्या
मुलाकडे जाईन.” अशा रीतीने तो त्याच्यासाठी दु:खाने रडत असे.
(Sheol h7585) 36 दरम्यान, मिद्यानी लोकांनी योसेफाला इजिप्तमधील
पोटीफर, फारोहच्या सरदारांपैकी एका सुरक्षादलाच्या प्रमुखास विकले.

**38** याच सुमारास यहूदाह आपल्या भावांना सोडून अदुल्लाम येथे
आला आणि हीरा नावाच्या एका मनुष्याबरोबर राहू लागला. 2
तिथे शूवा नावाच्या एका कनानी मनुष्याची कन्या यहूदाहच्या दृष्टीस
पडली आणि तिच्याशी विवाह करून त्याने तिचा स्वीकार केला; 3 ती
गर्भवती झाली, तिला पुत्र झाला. त्याचे नाव एर ठेवण्यात आले. 4 ती
पुन्हा गर्भवती झाली, तिला पुत्र झाला, त्याचे नाव ओनान ठेवण्यात
आले. 5 तिने आणखी एका पुत्राला जन्म दिला व त्याचे नाव शेलाह
ठेवले, ते कजीब येथे राहत असताना तिने त्याला जन्म दिला. 6 यहूदाहने
आपला ज्येष्ठपुत्र एर याचा विवाह तामार नावाच्या एका स्त्रीशी करून
दिला. 7 परंतु यहूदाहचा ज्येष्ठपुत्र एर, याहवेहच्या नजरेत एक दुष्ट
मनुष्य होता म्हणून याहवेहने त्याला ठार मारले. 8 तेव्हा यहूदाह ओनान
यास म्हणाला, “तू तिचा दीर असल्याची जबाबदारी पूर्ण करण्यासाठी
तामारेशी विवाह केला पाहिजे, म्हणजे तुझ्यापासून तिला तुझ्या भावाचे
संतान होतील.” 9 ओनानला हे ठाऊक होते की संतती झाली तर
ती आपली होणार नाही म्हणून ज्यावेळी तो तिच्याशी समागम करी,
त्यावेळी तो आपले वीर्य जमिनीवर पाडी, यासाठी की त्याच्यापासून
भावाला संतती होऊ नये. 10 हे त्याचे कृत्य याहवेहच्या दृष्टीने एक फार
मोठे पाप होते; म्हणून याहवेहने त्यालाही मारून टाकले. 11 यहूदाह
आपली सून तामारला म्हणाला, “माझा पुत्र शेलाहचे विवाहाचे वय
होईपर्यंत तू तुझ्या वडिलांच्या घरात विधवा म्हणून राहा.” यहूदाहला
भीती वाटत होती की हा मुलगाही आपल्या भावांप्रमाणे मरेल. मग
तामार तिच्या वडिलांच्या घरी गेली. 12 कालांतराने यहूदाहची पत्नी
जी शूवाची मुलगी होती ती मरण पावली. शोक करण्याचे दिवस
संपल्यावर यहूदाह, आपला मित्र अदुल्लाम येथील हीरा, याच्याबरोबर
आपल्या मेंढरांची लोकर कातरणाऱ्यांकडे तिम्ना येथे गेला. 13 “तुझा
सासरा तिम्ना येथे मेंढरांची लोकर कातरण्यासाठी गेला आहे,” असे
कोणीतरी तामारेला सांगितले. 14 तिने आपले वैधव्यदशेत वापरण्याचे
कपडे बाजूला ठेवून दिले आणि आपल्याला कोणी ओळखू नये म्हणून
तिने अंगावर बुरखा घेतला. मग तिम्नाच्या वाटेवर असलेल्या एनाईम
गावाच्या प्रवेशद्वाराजवळ ती जाऊन बसली. कारण तिने पाहिले की,
शेलाह आता मोठा झाला असला तरी तिला त्याची पत्नी म्हणून दिले
गेले नाही. 15 तिथून जाताना यहूदाहने तिला पाहिले आणि तिच्या
तोंडावर बुरखा असल्यामुळे त्याला वाटले की ती एक वेश्या आहे,
16 म्हणून तो तिच्याजवळ जाऊन थांबला आणि त्याने तिला म्हटले,
“तुझ्याशी रत होण्याची माझी इच्छा आहे.” अर्थात् ती आपली सून
आहे, हे त्याला माहीत नव्हते. यावर तिने विचारले, “याबद्दल तुम्ही
मला काय द्याल?” 17 त्याने म्हटले, “मी तुला माझ्या कळपातून एक
कोवळी शेळी पाठवून देईन.” तेव्हा तिने विचारले, “ती पाठवेपर्यंत तुम्ही
माझ्याकडे कोणते तारण ठेवणार आहात?” 18 “तुला काय तारण हवे
आहे?” त्याने तिला विचारले. तिने उत्तर दिले, “तुमची मुद्रिका, गोफ
आणि हातातील काठी.” याप्रमाणे त्याने या वस्तू तिला दिल्या आणि
तिने त्याला आपल्याशी रत होऊ दिले, परिणामी ती गर्भवती झाली. 19
यानंतर तिने वैधव्यदशेतील आपले कपडे पुन्हा धारण केले. 20 यहूदाहने
आपला अदुल्लामी मित्र हीरा, याला तिच्याकडे कोवळी शेळी घेऊन
जाण्यास आणि तिला दिलेल्या गहाण वस्तू परत आणण्यात सांगितले;
पण हीराला ती सापडली नाही. 21 म्हणून त्याने एनाईम गावातील काही
लोकांना विचारले, “गावाच्या प्रवेशद्वाराजवळील रस्त्यावर बसलेली
देवदासी कुठे राहते?” “आमच्या गावात तर कोणी देवदासी राहत
नाही,” त्यांनी त्याला उत्तर दिले. 22 तेव्हा तो यहूदाहकडे परत गेला
आणि त्याने त्याला सांगितले, “मला ती कुठेच सापडली नाही, तसेच
तेथील लोकांनी सांगितले की आमच्या गावात कोणी देवदासी राहत

नाही.” 23 यावर यहूदाह म्हणाला, “मग त्या वस्तू तिच्याकडेच राहू दे. नाहीतर तेथील लोकांसाठी आपण उपहासाचा विषय होऊ. मी तर तुझ्यामार्फत तिच्यासाठी ही कोवळी शेळी पाठविली होती, पण ती तुला आढळली नाही.” 24 सुमारे तीन महिन्यानंतर, “तुझी सून तामार ही वेश्याकर्मामुळे गर्भवती झाली आहे,” अशी बातमी यहूदाहच्या कानावर गेली. यहूदाह म्हणाला, “तिला बाहेर काढा आणि जाळून टाका!” 25 त्याप्रमाणे ते तिला जाळून टाकण्यासाठी बाहेर घेऊन जात असताना तिने आपल्या सासऱ्याला निरोप पाठविला, “ही मुद्रिका, हा गोफ आणि ही काठी ज्याची आहे, त्याच्यापासून मला गर्भ राहिलेला आहे. तुम्ही या वस्तू ओळखता काय?” 26 यहूदाहने त्या वस्तूंना ओळखले आणि म्हटले, “माझ्यापेक्षा ती अधिक नीतिमान आहे, कारण माझा पुत्र शेलाह तिला पती म्हणून दिला नाही.” यानंतर त्याने कधीही तिच्याशी शरीरसंबंध ठेवला नाही. 27 योग्य वेळी तामारेचे दिवस भरले आणि तिला जुळे पुत्र झाले. 28 त्यांचा जन्म होत असताना, एका मुलाने प्रथम हात बाहेर काढला, त्याच्या मनगटावर सुइणीने शेंदरी रंगाचा दोरा बांधला व ती म्हणाली, “हा प्रथम जन्माला आला.” 29 परंतु त्याने त्याचा हात मागे ओढून घेतला आणि त्याचा भाऊ बाहेर आला, ती म्हणाली, “तर अशाप्रकारे तू वाट काढली!” आणि त्याचे नाव पेरेस ठेवले. 30 यानंतर लवकरच मनगटावर शेंदरी दोरा असलेले मूल जन्मले आणि त्याचे नावे जेरह असे ठेवण्यात आले.

**39** इकडे योसेफाला इजिप्तमध्ये आणले. फारोह अंमलदार व अंगरक्षकांचा प्रमुख पोटीफराने इश्माएली लोकांपासून योसेफास विकत घेतले. 2 याहवेह योसेफाबरोबर होते, म्हणून तो सफल व्यक्ती बनला आणि तो इजिप्तच्या धन्याच्या घरी राहत असे. 3 पोटीफराने पाहिले की याहवेह योसेफाबरोबर आहेत आणि जे काही तो करतो त्यामध्ये याहवेह त्याला यश देतात, 4 त्यामुळे साहजिकच योसेफ त्याचा आवडता झाला व त्याचा व्यक्तिगत सेवक बनला. लवकरच पोटीफराच्या घराची व्यवस्था व त्याचे सर्व व्यवहार त्याच्या ताब्यात देण्यात आले. 5 जेव्हापासून त्याने योसेफाला त्याच्या घरावर, व त्याचे जे काहीही होते त्या सर्वांवर अधिकारी म्हणून नेमले, तेव्हापासून योसेफामुळे याहवेहने त्या इजिप्तच्या धन्याला आशीर्वादित केले; पोटीफराचे जे काही होते, त्याचे कुटुंब व शेती यावर याहवेहचा आशीर्वाद होता. 6 म्हणून पोटीफराने आपले सर्वकाही योसेफाला सोपवून दिले. आपण काय खावे यापलीकडे त्याने कशाचीच काळजी केली नाही. योसेफ हा बांधेसूद व देखणा होता. 7 काही वेळेनंतर योसेफ पोटीफराच्या पत्नीच्या डोळ्यात भरला व ती त्याला म्हणाली, “माझ्याशी समागम कर!” 8 योसेफाने तिला नाकारले. तो तिला म्हणाला. “हे पाहा, मी कारभारी असताना माझे धनी या घरातील कोणत्याही गोष्टीची काळजी करीत नाही, त्यांच्या मालकीचे सर्वकाही त्यांनी माझ्या हाती सोपविले आहे. 9 या घरामधे मला सर्वांपेक्षा अधिक अधिकार आहेत. तुम्ही त्यांची पत्नी आहात, तुम्हाला वगळून इतर प्रत्येक गोष्ट त्यांनी माझ्या हाती दिली आहे. तेव्हा असे दुष्कर्म मला कसे करता येईल? ते परमेश्वराविरुद्ध एक घोर पातक ठरेल.” 10 ती दिवसेंदिवस योसेफाला आग्रह करीत असली तरी त्याने तिच्यासोबत निजण्यास किंवा तिच्या सहवासात असण्याचे नाकारले. 11 एके दिवशी असे घडून आले की, तो कामानिमित्त घराच्या आत आला असताना, घरात दुसरे कोणतेही सेवक नव्हते; 12 तिने त्याच्या झग्याला पकडले आणि म्हणाली, “माझ्याबरोबर नीज!” पण त्याने त्याचा झगा तिच्या हातातच सोडला आणि घराबाहेर पळाला. 13 त्याचा झगा आपल्याच हातात आहे आणि तो पळून गेला आहे हे तिच्या लक्षात आले, 14 तेव्हा तिने घरातील सेवकांना बोलाविले. ती म्हणाली, “आमच्या घराचा उपमर्द करण्यासाठीच हा इब्री गुलाम घरात आणला आहे! त्याने माझ्यासोबत निजण्याचा प्रयत्न केला, पण मी किंचाळले. 15 जसे त्याने माझे किंचाळणे ऐकले तसे तो स्वतःचा झगा माझ्याजवळ टाकून घराबाहेर पळून गेला.” 16 तिने तिचा धनी घरी येईपर्यंत तो झगा आपल्याजवळच ठेवला. 17 नंतर तिने त्याला आपली कथा सांगितली: “जो इब्री गुलाम तुम्ही इकडे आणला आहे, त्याने माझ्यावर बळजबरी करण्याचा प्रयत्न केला. 18 पण जसे मी मदतीसाठी किंचाळले, त्याचा झगा माझ्याजवळ टाकून घराबाहेर पळून गेला.” 19 “तुमचा गुलाम माझ्याशी असा वागला.” असे म्हणून पत्नीने सांगितलेला वृतांत ऐकताच त्याचा धनी रागाने बेभान झाला. 20 योसेफाच्या धन्याने त्याला धरले आणि राजाच्या कैद्यांना ज्या तुरुंगात ठेवीत, तिथे त्याने योसेफाला ठेवले, परंतु जेव्हा योसेफ तुरुंगात होता, 21 याहवेह योसेफाबरोबर होते आणि तुरुंगाच्या अधिकाऱ्याची कृपादृष्टी त्याच्यावर बसेल असे त्यांनी केले. 22 तुरुंगाच्या अधिकाऱ्याने तुरुंगाचा सर्व कारभार योसेफाच्या हाती दिला आणि सर्व कैदीही योसेफाच्या ताब्यात दिले. 23 त्यानंतर तुरुंगाच्या अधिकाऱ्याला कसलीच काळजी उरली नाही, कारण याहवेह योसेफाबरोबर होते आणि तो जे काही करत असे त्यामध्ये ते त्याला यश देत.

**40** काही काळानंतर असे झाले की, इजिप्तच्या राजाचा रोटी भाजणारा व प्यालेबरदार यांनी त्यांच्या धन्याच्या, म्हणजे इजिप्तच्या राजाविरुद्ध अपराध केला. 2 फारोह आपला रोटी भाजणारा प्रमुख व प्यालेबरदारचा प्रमुख या दोन्ही सरदारांवर रागावला 3 आणि त्याने त्या दोघांना सुरक्षादलाचा प्रमुख, याच्या वाड्यात म्हणजे जिथे योसेफ होता, त्याच वाड्यातील तुरुंगात टाकले. 4 तुरुंगाच्या अधिकाऱ्याने योसेफाला त्यांच्याकडे लक्ष देण्यास सांगितले आणि त्याने त्यांची देखरेख केली, काही काळ ते तुरुंगात राहिल्यानंतर, 5 एके रात्री दोघांनाही—इजिप्तच्या राजाचा रोटी भाजणारा व प्यालेबरदार, ज्यांना तुरुंगात टाकण्यात आले होते—स्वप्ने पडली आणि प्रत्येकाच्या स्वप्नाचा विशिष्ट अर्थ होता. 6 दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा योसेफ त्यांना भेटला, तेव्हा ते दोघेही खिन्न असल्याचे त्याच्या लक्षात आले. 7 योसेफाने त्याच्यासोबत त्याच्या धन्याच्या वाड्यात तुरुंगात असलेल्या त्या फारोहच्या अधिकाऱ्यांना विचारले, “आज तुम्ही इतके खिन्न का आहात?” 8 त्यांनी उत्तर दिले, “काल रात्री आम्हा दोघांनाही स्वप्न पडले, पण आम्हाला त्यांचा अर्थ सांगणारा येथे कोणीच नाही.” यावर

योसेफ म्हणाला, “स्वप्नांचा उलगडा करून सांगणे हे परमेश्वराकडूनच
असते ना? स्वप्नात तुम्ही काय पाहिले ते सांगा.” 9 मुख्य प्यालेबरदारने
आपले स्वप्न योसेफाला सांगितले. तो म्हणाला, “स्वप्नात मी एक
द्राक्षवेल पाहिली. 10 तिला तीन फांद्या होत्या. त्यांना कळया व फुले
आली आणि लवकरच त्याला पिकलेल्या द्राक्षांचे घोसही लागले. 11
माझ्या हातात फारोहचा प्याला होता, त्यात ती द्राक्षे पिळून मी रस
काढला आणि तो प्याला फारोह राजाला प्यावयास दिला.” 12 तेव्हा
योसेफ म्हणाला, “या स्वप्नाचा अर्थ असा: तीन फांद्या म्हणजे तीन
दिवस. 13 या तीन दिवसात फारोह तुला तुरुंगातून सोडून देईल आणि
तू स्वत: परत राजाच्या हाती प्याला देशील, जसा तू आधी प्यालेबरदार
म्हणून देत होता. 14 पण जेव्हा तुझ्याबरोबर सर्वकाही ठीक होईल,
तेव्हा माझी आठवण ठेव आणि माझ्यावर कृपा दाखव, फारोहजवळ
माझा उल्लेख कर आणि मला या तुरुंगातून बाहेर काढ. 15 कारण
मला इब्री लोकांच्या देशातून येथे पळवून आणण्यात आले आणि
अंधारकोठडीची शिक्षा मला मिळावी, असे मी काही केले नाही.” 16
त्याच्या स्वप्नाचे उत्तर चांगले निघाले आहे हे पाहून, रोटी भाजणारा
प्रमुख योसेफाला म्हणाला, “मला देखील एक स्वप्न पडले आहे:
मला माझ्या डोक्यावर रोट्यांच्या तीन टोपल्या दिसल्या. 17 सर्वात
वरच्या टोपलीमध्ये फारोहसाठी भटारखान्यातील सर्वप्रकारचे उत्कृष्ट
प्रतीचे खाद्यपदार्थ होते; परंतु पक्षी येऊन माझ्या डोक्यावरील टोपलीतून
ते पदार्थ खाऊ लागले.” 18 योसेफाने अर्थ सांगताना म्हटले, “या
तीन टोपल्या म्हणजे तीन दिवस होत. 19 आजपासून तीन दिवसांनी
फारोह तुझा शिरच्छेद करेल व तुझा मृतदेह सुळावर ठेवेल आणि
पक्षी येऊन तुझे मांस टोचून खातील.” 20 आता तिसऱ्या दिवशी
फारोहचा वाढदिवस होता आणि त्याने आपल्या सर्व सरदारांसाठी
मेजवानी दिली. त्याने आपल्या सरदारांसमोर मुख्य प्यालेबरदार आणि
प्रमुख रोटी भाजणारा यांचे मस्तक उंचावले: 21 यावेळी त्याने मुख्य
प्यालेबरदारला त्याच्या कामावर पुन्हा नेमले, तो फारोहच्या हाती पुन्हा
प्याला देऊ लागला— 22 परंतु प्रमुख रोटी भाजणाऱ्याला योसेफाने
भाकीत केल्याप्रमाणे सुळावर चढविण्याची शिक्षा दिली. 23 मुख्य
प्यालेबरदाराला योसेफाचे स्मरण राहिले नाही; त्याला तो विसरला.

**41** दोन वर्षे पूर्ण झाल्यानंतर, एके रात्री फारोहला स्वप्न पडले.
तो नाईल नदीच्या काठावर उभा होता. 2 तेवढ्यात एकाएकी
नाईल नदीतून चांगल्या धष्टपुष्ट दिसणाऱ्या सात गाई वर आल्या आणि
लव्हाळयात चरू लागल्या. 3 नंतर नाईलमधून दुसऱ्या सात गाई आल्या;
त्या अगदी कुरूप व दुबळया होत्या आणि नदीकाठी असलेल्या गाईंच्या
शेजारी येऊन उभ्या राहिल्या. 4 मग त्या सात दुबळया गाईंनी त्या
धष्टपुष्ट गाईंना खाऊन टाकले. यावर फारोहची झोपमोड झाली. 5
यानंतर तो पुन्हा झोपी गेला आणि त्याला पुन्हा दुसरे स्वप्न पडले:
एकाच ताटाला टपोऱ्या दाण्यांची भरदार सात कणसे त्याने पाहिली.
6 मग आणखी सात कणसे उगवली, पण ही वाळून गेलेली आणि
पूर्वेच्या वाऱ्याने कोमेजून गेलेली होती. 7 या सात अशक्त कणसांनी
टपोऱ्या दाण्यांची ती भरदार कणसे गिळून टाकली. नंतर फारोह जागा
झाला आणि हे सर्व स्वप्न होते हे त्याला समजले. 8 दुसऱ्या दिवशी
सकाळी, स्वप्नांचा विचार करता फारोह चिंताक्रांत झाला. मग त्याने
इजिप्तमधील सर्व ज्योतिष्यांना व ज्ञानी पुरुषांना बोलाविले आणि
त्यांना आपले स्वप्न सांगितले. परंतु त्यापैकी एकालाही त्या स्वप्नाचा
अर्थ काय असेल हे सांगता येईना. 9 मुख्य प्यालेबरदार फारोहला
म्हणाला, “आज मला माझ्या चुकीची आठवण होत आहे. 10 काही
काळापूर्वी फारोह माझ्यावर आणि प्रमुख रोटी भाजणाऱ्यावर रागावून
त्यांनी आम्हाला सुरक्षादलाच्या अधिकाऱ्याच्या घरातील बंदिवासात
ठेवले होते. 11 त्यावेळी प्रमुख रोटी भाजणाऱ्याला आणि मला एकाच
रात्री स्वप्ने पडली, दोन्ही स्वप्नांचा अर्थ वेगळा होता. 12 त्या ठिकाणी
एक इब्री तरुण होता; तो सुरक्षादलाच्या अधिकाऱ्याचा गुलाम होता.
त्याला आम्ही आमची स्वप्ने सांगितली आणि त्याने आम्हाला आमच्या
स्वप्नांचा अर्थ सांगितला, त्याने प्रत्येकाच्या स्वप्नानुसार त्याच्या अर्थ
सांगितला. 13 आणि त्याने सांगितल्याप्रमाणे प्रत्येक गोष्ट घडली:
प्यालेबरदाराच्या जागी माझी पुन्हा नेमणूक झाली आणि प्रमुख रोटी
भाजणाऱ्याला फाशी देण्यात आली.” 14 तेव्हा फारोहने योसेफाला
बोलाविणे पाठविले. योसेफाला लगेच तुरुंगाच्या कोठडीतून बाहेर
आणण्यात आले आणि योसेफ मुंडण करून व कपडे बदलून फारोहपुढे
दाखल झाला. 15 फारोह योसेफास म्हणाला, “मला एक स्वप्न पडले,
पण येथे असलेल्या कोणाही मनुष्याला त्याचा अर्थ काय असेल हे
सांगता येत नाही. पण मी असे ऐकले आहे की तू स्वप्न ऐकताच,
तुला स्वप्नांचा अर्थ सांगता येतो.” 16 योसेफाने उत्तर दिले, “मला
स्वत:च्या बुद्धीने स्वप्नांचा अर्थ सांगता येत नाही, परंतु परमेश्वर फारोहला
हितकारक उत्तर देतील.” 17 तेव्हा फारोहने योसेफाला सांगितले, “मी
स्वप्नात नाईल नदीच्या काठावर उभा होतो; 18 तेवढ्यात एकाएकी
नाईल नदीतून चांगल्या धष्टपुष्ट दिसणाऱ्या सात गाई वर आल्या आणि
लव्हाळयात चरू लागल्या. 19 नंतर दुसऱ्या सात गाई वर आल्या; त्या
अगदी कुरूप व दुबळया होत्या. सर्व इजिप्त देशात अशा अशक्त गाई मी
कधीही पाहिल्या नाहीत. 20 या कुरूप व दुबळया गाईंनी त्या पहिल्या
सात धष्टपुष्ट गाईंना खाऊन टाकले. 21 असे असूनही त्यांनी त्या सात
धष्टपुष्ट गाई कशा खाल्ल्या हे समजू शकले नाही; पण धष्टपुष्ट गाईंना
खाऊन टाकल्यानंतरही त्या अशक्त गाई अशक्तच राहिल्या आणि मग
मी जागा झालो. 22 “मग मला परत स्वप्नात, एकाच ताटाला टपोऱ्या
दाण्यांची भरदार सात कणसे दिसली. 23 मग त्याच ताटातून सात
वाळलेली आणि पूर्वेच्या वाऱ्याने कोमेजून गेलेली कणसे निघाली. 24
या अशक्त कणसांनी ती भरदार कणसे गिळून टाकली. मी हे सर्व माझ्या
ज्योतिष्यांना सांगितले, परंतु त्यातील एकालाही स्वप्नांचा अर्थ सांगता
आला नाही.” 25 स्वप्ने ऐकून योसेफ फारोहला म्हणाला, “फारोहला
पडलेल्या या दोन्हीही स्वप्नांचा अर्थ एकच आहे. परमेश्वर काय करणार
आहेत, हे त्यांनी तुम्हाला प्रगट केले आहे. 26 या दोन्हीचा अर्थ एकच
आहे, सात लठ्ठ गाई म्हणजे सात वर्षांचा काळ आणि सात भरदार

कणसे यांचाही अर्थ पुढील सात वर्षांचा काळ; जो अतिशय समृद्धीचा
असेल. 27 त्या सात अशक्त गाई म्हणजे या सात वर्षानंतर येणारी
सात वर्षे आणि पूर्वेच्या वाऱ्याने कोमेजून गेलेली सात सुकलेली कणसे
दुष्काळाची सात वर्षे दर्शवितात. 28 “मी फारोहला जे सांगितले आहे ते
असे असेल: परमेश्वर लवकरच काय करणार आहेत, हे त्यांनी तुम्हाला
प्रकट केले आहे. 29 पुढील सात वर्षांचा काळ संपूर्ण इजिप्त देशासाठी
अतिशय समृद्धीचा काळ असेल. 30 पण त्यानंतरच्या सात वर्षांच्या
काळात इजिप्त देशामध्ये इतका मोठा दुष्काळ पडेल की, आधीच्या
सात वर्षांतील सर्व समृद्धी आणि भरभराट विसरली जाईल. दुष्काळ
देशाचा विध्वंस करेल. 31 तो इतका भयानक असेल की, आधीच्या
समृद्धीची वर्षे आठवणार देखील नाहीत. 32 आता हे स्वप्न फारोहला
दोन स्वरुपात पडले, याचा अर्थ असा की परमेश्वराने दुष्काळाची
बाब निश्चित केली आहे आणि परमेश्वर त्याप्रमाणे लवकरच घडवून
आणतील. 33 “म्हणून आता फारोहने एक सुज्ञ आणि शहाणा मनुष्य
शोधला पाहिजे आणि त्याला इजिप्त देशावर अधिकारी केले पाहिजे.
34 फारोह राजाने इजिप्त देशावर अधिकाऱ्यांची नेमणूक करून सात
वर्षांच्या समृद्धीच्या काळात सर्व वरकड धान्याचा पाचवा भाग गोळा
करावा. 35 समृद्धीच्या वर्षात अन्नसामुग्री एकत्र करून सर्व शहरात
फारोहच्या अधिकारातील धान्य कोठारात साठविण्याचे व्यवस्थापन
करावे. 36 ही सर्व अन्नसामुग्री राखीव म्हणून संपूर्ण देशाकरिता साठवून
ठेवल्यास नंतर दुष्काळाची सात वर्षे इजिप्त देशावर आली म्हणजे
खाण्यासाठी पुरेसे अन्नधान्य राहील, म्हणजे दुष्काळाने देशाचा नाश
होणार नाही.” 37 तेव्हा फारोह व त्याच्या अधिकाऱ्यांना ही योजना
योग्य वाटली. 38 फारोहने त्यांना विचारले, “परमेश्वराच्या आत्म्याने
भरलेला या माणसासारखा दुसरा कोणी सापडेल का?” 39 मग फारोह
योसेफाला म्हणाला, “ज्याअर्थी परमेश्वराने तुला या स्वप्नांचा अर्थ
प्रगट केला आहे, त्याअर्थी देशामध्ये तुझ्यासारखा चतुर आणि सुज्ञ
मनुष्य कोणीच नाही. 40 म्हणून तू माझ्या महालाचा अधिकारी होशील
आणि माझे सर्व लोक तुझ्या अधीन होतील. केवळ सिंहासनासाठीच मी
तुझ्यापेक्षा मोठा असेन.” 41 मग फारोह योसेफाला म्हणाला, “पाहा,
मी तुला संपूर्ण इजिप्त देशाचा प्रमुख केले आहे.” 42 फारोहने आपली
स्वतःची राजमुद्रा योसेफाच्या बोटात घातली. त्याला रेशमी तागाची
वस्त्रे घातली आणि त्याच्या गळयात सोन्याची साखळी घातली. 43
फारोहने योसेफाला आपल्या खालोखालच्या पदाचा रथही दिला आणि
योसेफ जिकडे जाई तिकडे ललकारी उठे, “गुडघे टेका.” अशाप्रकारे
फारोहने योसेफाला संपूर्ण इजिप्त देशाचा प्रमुख केले. 44 फारोहने
योसेफास म्हटले, “मी इजिप्त देशाचा राजा फारोह आहे, पण संपूर्ण
इजिप्त देशभर तुझ्या परवानगीशिवाय कोणीही त्याचा हात किंवा पाय
उचलणार नाही.” 45 फारोहने त्याला सापनाथ-पानेह हे नाव दिले,
आणि त्याला ओन येथील पोटीफेरा याजकाची कन्या आसनथ ही पत्नी
करून दिली. योसेफ संपूर्ण इजिप्त देशभर फिरला. 46 योसेफाने फारोह
राजाच्या सेवेत प्रवेश केला, तेव्हा तो तीस वर्षाचा होता. नंतर राजधानी
सोडून तो इजिप्त देशभर प्रवास करू लागला. 47 पुढील समृद्धीच्या
सात वर्षात देशात चहूकडे भरघोस पीक आले. 48 या समृद्धीच्या सात
वर्षांच्या काळात योसेफाने इजिप्तमध्ये प्रत्येक शहराच्या भोवताली
असलेल्या शेतात जे अन्नधान्य पिकले ते सर्व त्याने त्या भागाच्या जवळ
असलेल्या शहरात साठवून ठेवले. 49 योसेफाने समुद्राच्या वाळूप्रमाणे
धान्याचा मोठा साठा केला; ते इतके होते की त्याने नोंदी ठेवणे बंद
केले, कारण ते मोजण्यापलीकडे होते. 50 याकाळात, दुष्काळाची वर्षे
येण्यापूर्वी योसेफाला ओन येथील याजक पोटीफेराची कन्या आसनथ
हिच्या पोटी दोन पुत्र झाले. 51 योसेफाने त्याच्या ज्येष्ठ पुत्राचे नाव
मनश्शेह असे ठेवले आणि तो म्हणाला, परमेश्वराने माझ्या सर्व यातना
आणि आपल्या वडिलांच्या घराला मुकण्याचे दुःख, यांचा विसर पाडला
आहे. 52 त्याच्या दुसऱ्या पुत्राचे नाव एफ्राईम असे ठेवले आले. कारण
योसेफ म्हणाला, “परमेश्वराने माझ्या यातनेच्या या देशामध्ये मला
फलद्रूप केले आहे.” 53 इजिप्त देशातील समृद्धीची सात वर्षे संपत
आली. 54 मग योसेफाने भाकीत केल्याप्रमाणे दुष्काळाची सात वर्षे
सुरू झाली. इजिप्त देशाच्या सभोवती असलेल्या सर्व देशांमध्ये सुद्धा
दुष्काळ पडला; परंतु इजिप्तमध्ये अन्न होते. 55 इजिप्ती लोकांची
उपासमार होऊ लागली, तेव्हा लोक फारोहजवळ अन्न मागू लागले
आणि फारोहने त्यांना योसेफाकडे पाठविले व त्यांना सांगितले, “योसेफ
सांगेल त्याप्रमाणे करा.” 56 तेव्हा आता सर्व देशभर दुष्काळ पसरला
असताना योसेफाने धान्याची कोठारे उघडली आणि तो इजिप्त देशाच्या
लोकांना धान्य विकू लागला, कारण इजिप्तचा दुष्काळ अत्यंत भयानक
होता. 57 जगभर दुष्काळ पडल्यामुळे संपूर्ण जगातील लोक इजिप्तमध्ये
येऊन योसेफाकडून धान्य विकत घेऊ लागले.

**42** इजिप्त देशामध्ये धान्य मिळते, हे जेव्हा याकोबाच्या कानी गेले,
तेव्हा तो आपल्या पुत्रांना म्हणाला, “एकमेकांच्या तोंडाकडे नुसते
पाहत का उभे राहिलात?” 2 मग त्याने पुढे म्हटले, “इजिप्तमध्ये धान्य
मिळत आहे, असे मी ऐकले आहे. तुम्ही तिथे जा आणि आपल्यासाठी
थोडे धान्य विकत घेऊन या, म्हणजे आपण जगू, मरणार नाही.” 3 मग
योसेफाचे दहा भाऊ, धान्य विकत घेण्यासाठी इजिप्तमध्ये गेले. 4 परंतु
याकोबाने योसेफाचा भाऊ बिन्यामीन याला, त्यांच्याबरोबर पाठविले
नाही, कारण त्याला काही अपाय होईल अशी त्याला भीती वाटत
होती. 5 अशा रीतीने इस्राएलचे पुत्र इतर लोकांबरोबर इजिप्तमध्ये
धान्य खरेदीसाठी आले, कारण दुष्काळ कनान देशातही पडला होता.
6 योसेफ हा इजिप्त देशाचा अधिकारी असल्यामुळे तो सर्व लोकांना
धान्यविक्री करीत असे. जेव्हा त्याचे भाऊ तिथे आले, त्यांनी त्याच्यापुढे
जमिनीपर्यंत लवून त्याला मुजरा केला. 7 योसेफाने त्यांना बघताच
ओळखले तरी अपरिचितासारखे वागून दरडावून विचारले, “तुम्ही कुठून
आला आहात?” त्यांनी त्याला उत्तर दिले, “कनान देशाहून आम्ही
धान्य विकत घेण्यासाठी आलो आहोत.” 8 योसेफाने तर त्याच्या
भावांना ओळखले, पण त्या भावांनी त्याला ओळखले नाही. 9 यावेळी
योसेफाला आपल्याला पूर्वी पडलेल्या स्वप्नांची आठवण झाली, आणि

त्यांना म्हणाला, “तुम्ही हेर आहात! आणि आमचा देश कुठे असुरक्षित
आहे हे पाहण्यासाठी आला आहात.” 10 ते म्हणाले, “नाही, नाही
महाराज, आपले सेवक फक्त धान्य खरेदीसाठी आले आहेत. 11 आम्ही
भाऊ एकाच पित्याचे पुत्र आहोत, तुमचे सेवक प्रामाणिक पुरुष आहेत,
आम्ही हेर नाही.” 12 “नाही,” तो त्यांना म्हणाला, “आमचा देश कुठे
असुरक्षित आहे हे पाहण्यासाठीच तुम्ही आला आहात.” 13 परंतु
ते म्हणाले, “महाराज, आपले हे सेवक बारा भाऊ आहेत; एकाच
पित्याचे पुत्र आहोत, जे कनान देशात आहेत; आमचा धाकटा भाऊ
आमच्या पित्यासोबत आहे आणि आमचा एक भाऊ आता जीवित
नाही.” 14 योसेफ म्हणाला, “म्हणूनच मी म्हणतो: तुम्ही हेर आहात!
15 आणि अशा प्रकारे तुम्हाला पडताळून पाहू: फारोहच्या जिवाची
शपथ, तुमचा धाकटा भाऊ इकडे येईपर्यंत तुम्हाला येथून जाता येणार
नाही. 16 तुमच्यापैकी एकाला भावास आणण्यास पाठवा; तोपर्यंत
बाकीच्यांना तुरुंगात ठेवण्यात येईल, म्हणजे तुम्ही सत्य बोललात ते
कळून येईल. जर नाही तर फारोहची शपथ तुम्ही हेर आहात!” 17
आणि त्याने त्या सर्वांना तीन दिवस तुरुंगात ठेवले. 18 तिसऱ्या दिवशी
योसेफ त्यांना म्हणाला, “जर जीवित राहवयाचे असेल तर तुम्ही हे
करा, कारण मी परमेश्वराचे भय धरणारा आहे. 19 तुम्ही प्रामाणिक
लोक आहात तर तुमच्या एका भावाला तुरुंगात राहू द्या, बाकीच्यांना
कुटुंबीयांची उपासमार निवारण्यासाठी धान्य घेऊन जाऊ द्या. 20 परंतु
तुम्ही तुमच्या धाकट्या भावाला माझ्याकडे घेऊन या. अशा रीतीने
तुमचे शब्द खरे होतील आणि तुमचा मृत्यू टळेल.” मग त्यांनी तेच केले.
21 ते एकमेकांना म्हणाले, “आम्ही आमच्या भावाविषयी दोषी आहोत.
जेव्हा त्याने आपल्या जिवाची विनवणी केली तेव्हा तो किती व्यथित
होता हे आम्ही पाहिले, पण आम्ही ऐकले नाही; त्यामुळेच हे संकट
आमच्यावर आले आहे.” 22 रऊबेन म्हणाला, “त्या मुलाविरुद्ध असे
पाप करू नका, हे मी तुम्हाला सांगत नव्हतो का? पण तुम्ही माझे
ऐकले नाही! आम्हाला त्याच्या रक्तपाताचा हिशोब द्यावा लागेल.” 23
योसेफाला आपले बोलणे समजत असेल असे त्यांना वाटले नाही,
कारण तो दुभाषी वापरत होता. 24 तो तिथून बाहेर पडला व रडू लागला,
थोड्या वेळाने तो परत आला आणि त्याने शिमओनाची निवड करून
त्याला त्यांच्या डोळ्यांसमक्ष बांधून घेतले. 25 नंतर योसेफाने आपल्या
नोकरांना त्यांची पोती धान्याने भरण्यास सांगितले; पण त्याचवेळी
त्याने प्रत्येक भावाने दिलेले पैसे ज्याच्या त्याच्या पोत्यात ठेवून द्यावे
अशी सूचना दिली. त्याने आपल्या भावांना प्रवासासाठी अन्नसामुग्री
देण्याचा आदेश दिला. 26 शेवटी त्यांनी धान्याची पोती गाढवांवर लादली
आणि ते घरी जाण्यास निघाले. 27 परंतु ते रात्रीच्या मुक्कामासाठी
थांबले असताना त्यांच्यापैकी एकाने गाढवांना देण्यासाठी थोडे धान्य
काढले. धान्य काढीत असताना आपले पैसे पोत्याच्या तोंडाशी असलेले
त्याला दिसले. 28 तो आपल्या भावांना म्हणाला, “अरे हे काय? माझे
पैसे माझ्या पोत्यातच आहेत!” ते सर्वजण भयभीत झाले. भयाने थरथर
कापत ते एकमेकास म्हणाले, “परमेश्वराने आपल्याशी हे काय केले?”
29 कनान देशात ते आपले पिता याकोबाकडे आले आणि इजिप्तमध्ये
जे काही घडले त्याची सर्व हकिकत त्यांनी त्याला सांगितली. 30 ते
म्हणाले, “त्या देशाचा अधिकारी आमच्याशी अत्यंत कठोरतेने बोलला,
त्याने आम्हाला हेर असल्यासारखे वागविले.” 31 आम्ही त्याला म्हटले,
“आम्ही हेर नाहीत; आम्ही प्रामाणिक माणसे आहोत. 32 आम्ही
बारा भाऊ असून एकाच पित्याचे पुत्र आहोत. आमचा एक भाऊ
मरण पावला आहे, आणि धाकटा भाऊ कनान देशामध्ये आमच्याच
पित्याजवळ राहिला आहे.” 33 तेव्हा त्या देशाचा अधिपती आम्हाला
म्हणाला, “तुमच्या म्हणण्याप्रमाणे तुम्ही प्रामाणिक माणसे आहात की
नाही, याची खात्री करून घेण्यासाठी मी असे ठरविले आहे: तुमच्यापैकी
एका भावाला येथे तुरुंगात ठेवावे; बाकीच्यांनी तुमच्या कुटुंबीयांसाठी
धान्य घेऊन घरी जावे. 34 पण तुमच्या धाकट्या भावाला माझ्याकडे
घेऊन या; मगच तुम्ही हेर नाहीत, तर प्रामाणिक माणसे आहात हे मला
समजेल. तर मी तुमचा भाऊ तुम्हाला परत देईन व तुम्ही या देशात
व्यापार करू शकाल.” 35 त्यांनी त्यांची धान्याची पोती रिकामी केली
तो, प्रत्येकाच्या पोत्याच्या तोंडाशी त्यांनी दिलेले पैसे होते असे त्यांना
दिसून आले! भयाने त्यांचा व त्यांच्या वडिलांचाही थरकाप उडाला.
36 मग याकोब त्यांना म्हणाला, “तुम्ही माझ्या मुलांना हिरावून घेतले
आहे. योसेफ राहिला नाही, शिमओन गेला; आता तुम्ही बिन्यामीनालाही
नेणार; सर्वकाही माझ्या विरुद्धच घडत आहे.” 37 तेव्हा रऊबेन आपल्या
वडिलांस म्हणाला, “मी बिन्यामीनाला तुमच्याकडे परत आणले नाही
तर तुम्ही माझ्या दोन मुलांना मारून टाका; बिन्यामीनाला माझ्या हवाली
करा, मी त्याला परत तुमच्याकडे आणेन.” 38 पण याकोबाने उत्तर
दिले, “माझा मुलगा तुमच्याबरोबर तिथे जाणार नाही; त्याचा भाऊ
योसेफ मरण पावला आणि आता तो एकटाच राहिला आहे; त्याला काही
कमीजास्त झाले तर या म्हातारपणात दुःखाने माझा प्राण जाईल!”
**(Sheol h7585)**

**43** परंतु देशात दुष्काळ तीव्र होता. 2 इजिप्तमधून त्यांनी आणलेले
धान्य संपले तेव्हा त्यांचे वडील त्यांना म्हणाले, “इजिप्तमध्ये
पुनः जाऊन आपल्यासाठी थोडे धान्य विकत आणा.” 3 तेव्हा यहूदाह
त्यास म्हणाला, “त्या मनुष्याने आम्हाला चेतावणी दिली होती की,
‘तुमच्या भावास सोबत आणल्याशिवाय तुम्ही माझे मुख पाहणार
नाही.’ 4 जर तुम्ही आमच्या भावाला आमच्याबरोबर पाठवाल तरच
आम्ही जाऊन धान्य विकत घेऊ. 5 जर तुम्ही त्याला पाठवित नसाल
तर आम्ही जाणार नाही, कारण त्या मनुष्याने आम्हाला म्हटले, ‘जर
तुम्ही तुमच्या भावास सोबत आणले नाही तर तुम्ही माझे मुख पाहणार
नाही.’” 6 इस्राएल म्हणाला, “तुम्हाला आणखी एक भाऊ आहे असे
तुम्ही त्याला सांगून माझ्यावर हे अनर्थ का आणले?” 7 यावर ते
म्हणाले, “पण त्या मनुष्याने आपल्याबद्दल आणि आपल्या कुटुंबाची
खोल चौकशी केली. त्याने आम्हाला विचारले, ‘तुमचे वडील अजून
जिवंत आहेत काय? तुम्हाला आणखी एखादा भाऊ आहे काय?’ आम्ही
सहजपणे त्याच्या प्रश्नांची उत्तरे दिली. ‘तुमच्या भावाला घेऊन या’ असे

तो म्हणेल, असे आम्हाला कसे ठाऊक असणार?” 8 तेव्हा यहूदाह
आपला पिता इस्राएलला म्हणाला, “मुलाला माझ्याबरोबर पाठवा,
आम्ही लगेच जाऊ, म्हणजे तुम्ही, आम्ही व आमची मुले जगणार
आणि मरणार नाही. 9 त्याच्या सुरक्षिततेची हमी मी घेतो. जर मी
त्याला परत आणले नाही व तुमच्या स्वाधीन केले नाही, तर त्याचा दोष
माझ्या माथ्यावर कायमचा राहील. 10 जर आम्ही उशीर केला नसता तर
इतक्या दिवसात आम्ही तिकडे दोनदा जाऊन आलो असतो.” 11 नंतर
त्यांचे वडील इस्राएल त्यांना म्हणाले, “जर असेच असेल तर मग हे
करा: या देशात उत्पादन होणारे सर्वोत्तम पदार्थ—थोडे औषधी बलसान,
थोडे मध, मसाले, गंधरस, पिस्ते व बदाम आपल्या गोण्यात घ्या आणि
या वस्तू त्या मनुष्याला देणगी म्हणून घेऊन जा. 12 दुप्पट चांदी सोबत
घेऊन जा म्हणजे तुमच्या पोत्याच्या तोंडाशी असलेला चांदीचा पैसाही
तुम्हाला परत करता येईल. कदाचित काही तरी चूक झाली असेल.
13 तुमच्या भावाला बरोबर घेऊन त्या मनुष्याकडे लगेच जा. 14 त्या
माणसापुढे, सर्वसमर्थ परमेश्वराने तुमच्यावर कृपा करावी म्हणजे तो
दुसऱ्या भावाला आणि बिन्यामीनालाही तुमच्यासोबत परत पाठवेल.
पण जर मी माझ्या पुत्रांना मुकलो तर मुकलो.” 15 मग त्यांनी भेट व
दुप्पट चांदी आणि बिन्यामीनाला सोबत घेतले आणि खाली इजिप्तला
गेले आणि योसेफापुढे उपस्थित झाले. 16 बिन्यामीन त्यांच्याबरोबर आहे
हे योसेफाने पाहिले, तेव्हा तो आपल्या घराच्या कारभाऱ्याला म्हणाला,
“या माणसांना माझ्या घरी घेऊन जा, पशू मार आणि भोजन तयार कर;
ते दुपारी माझ्याबरोबर भोजन करतील.” 17 त्या मनुष्याने योसेफाच्या
सांगितल्याप्रमाणे केले आणि त्याने माणसांना योसेफाच्या घरी नेले. 18
त्यांना योसेफाच्या घरी नेल्यावर त्यांची भीतीने गाळण उडाली. त्यांनी
विचार केला आणि म्हणाले, “पहिल्यांदा आपल्या पोत्यात जी चांदी
टाकण्यात आली होती त्यासाठी आपल्याला इथे आणण्यात आले आहे.
आपल्यावर हल्ला करून आपल्यावर विजय मिळवून आपल्याला गुलाम
करावे व आपल्या गाढवांना हस्तगत करावे असा त्याचा बेत असावा.”
19 घराच्या दाराशी आल्यानंतर ते योसेफाच्या घरकारभाऱ्याकडे गेले;
20 आणि त्याला म्हणाले, “महाराज, पहिल्या फेरीत आम्ही इथे धान्य
खरेदीसाठी आलो होतो. 21 तेव्हा परत घरी जाताना आम्ही रात्री
जिथे थांबलो आणि आमची पोती उघडली तेव्हा आम्हा प्रत्येकाचा
पोत्यात त्याची चांदी—अचूक वजनाची—पोत्याच्या तोंडाशी सापडली.
आम्ही ती परत देण्यासाठी बरोबर आणली आहे. 22 या रकमेबरोबरच
धान्य विकत घेण्यासाठी आम्ही वेगळी चांदी आणली आहे. आमच्या
पोत्यांमध्ये आमची चांदी कोणी ठेवली हे आम्हाला माहीत नाही.”
23 “ते सर्व ठीक आहे,” तो म्हणाला, “घाबरू नका. तुमचा परमेश्वर,
तुमच्या पित्याचा परमेश्वर यांनीच तुमच्या पोत्यात ते धन दिले आहे;
तुमची चांदी मला मिळाली आहे.” मग त्याने शिमओनाला बाहेर काढून
त्यांच्याकडे आणले. 24 नंतर घरकारभाऱ्याने त्यांना योसेफाच्या घरात
नेले, त्यांचे पाय धुण्यासाठी पाणी दिले आणि त्यांच्या गाढवांना चाराही
दिला. 25 योसेफ दुपारी येणार त्यावेळी त्याला देण्यासाठी त्यांनी
आपली भेट तयार करून ठेवली, कारण त्यांना तिथेच भोजन करावयाचे
आहे असे सांगण्यात आले होते. 26 योसेफ घरी आला तेव्हा त्यांनी
त्याला जमिनीपर्यंत लवून मुजरा केला आणि त्याला देणग्या दिल्या ज्या
त्यांनी घरात आणल्या होत्या. 27 त्याने त्यांना अभिवादन केले, मग
त्याने विचारले, “त्या वृद्ध माणसाविषयी तुम्ही बोलला, ते तुमचे वडील
कसे आहेत? ते अजून जिवंत आहेत काय?” 28 “होय” ते म्हणाले,
“तुमचा सेवक, आमचे वडील जिवंत असून सुखरुप आहेत,” आणि
त्यांनी त्याला पुन्हा लवून मुजरा केला. 29 त्याने आपली नजर वर करून
आपल्या आईचा मुलगा, आपला सख्खा भाऊ, बिन्यामीनाकडे पाहून
त्याने विचारले, “हाच का तुमचा धाकटा भाऊ, याच्याचविषयी तुम्ही
मला सांगत होता ना?” आणि तो म्हणाला, “माझ्या मुला, परमेश्वर
तुजवर कृपा करो.” 30 नंतर योसेफ घाईघाईने बाहेर जाऊन रडण्यासाठी
जागा शोधत होता, कारण आपल्या भावाबद्दलच्या प्रेमाने त्याचा ऊर
भरून आला होता, तो आपल्या स्वतःच्या खोलीत जाऊन रडला. 31 मग
तो आपले तोंड धुऊन बाहेर आला आणि स्वतःवर ताबा ठेवून म्हणाला,
“भोजन वाढा.” 32 योसेफ एकटाच जेवला; आणि त्याच्या भावांना
वेगळ्या पंक्तीत बसविले; त्याचप्रमाणे इजिप्त लोकांचीही वेगळीच
पंगत होती, कारण इजिप्तचे लोक इब्री लोकांना तुच्छ लेखीत आणि
त्यांच्या पंक्तीला बसून कधीही भोजन करीत नसत. 33 प्रत्येकाने कुठे
बसावे हे त्याने सांगितले आणि त्यांना ज्येष्ठापासून कनिष्ठापर्यंत त्यांच्या
वयाप्रमाणे बसविले, यावर फार आश्चर्यचकित होऊन ते एकमेकांकडे
पाहू लागले. 34 योसेफ, जी पक्वान्ने खात होता, तीच पक्वान्ने त्यांनाही
वाढण्यात आली. पण बिन्यामीनाला इतर भावांपेक्षा पाचपट अधिक
वाढण्यात आले. ते सर्व त्याच्यासोबत भरपूर जेवले व मनमुरादपणे
पिऊन तृप्त झाले.

**44** आता योसेफाने आपल्या घरकारभाऱ्यास आदेश दिला:
“माणसांच्या पोत्यात त्यांना वाहून नेण्याइतके अन्न भरावे आणि
प्रत्येक माणसाच्या पोत्याच्या तोंडाशी त्यांची चांदी ठेवावी. 2 याखेरीज
धाकट्याच्या पोत्यामध्ये धान्याच्या पैशाबरोबरच माझा चांदीचा प्यालाही
ठेवा.” असे सांगितले आणि घरकारभाऱ्याने योसेफाच्या आदेशाप्रमाणे
केले. 3 पहाट होताच त्या माणसांना त्यांच्या गाढवांसोबत मार्गस्थ
करण्यात आले. 4 पण ते शहराच्या बाहेर पडतात न पडतात तोच
योसेफ त्याच्या कारभाऱ्यास म्हणाला, “त्यांचा पाठलाग करा आणि
त्यांना थांबवून विचारा, ‘तुम्ही चांगल्याची फेड वाईटाने का केली? 5
हाच तो चांदीचा प्याला नाही का जो माझे स्वामी स्वतः पिण्याकरिता
वापरतात आणि ज्याच्यामधून ते शकुनही पाहत असतात? हे तुमचे
कृत्य किती वाईट आहे!’” 6 त्याप्रमाणे त्याने त्यांना गाठले आणि
सांगितल्याप्रमाणे तो त्यांना बोलला. 7 पण ते त्याला म्हणाले, “महाराज
असे का बोलतात? तुमच्या सेवकांपासून असे काही करणे दूरच
असो! 8 मागीलवेळी आमच्या पोत्यांच्या तोंडाशी असलेला पैसा
आम्ही कनानहून परत आणला नाही काय? तर आता तुमच्या धन्याच्या
घरून चांदी किंवा सोने चोरण्याची आम्हाला काय गरज होती? 9

आमच्यापैकी कोणाच्याही जवळ जर तो प्याला सापडला तर त्याला
मृत्यू येवो; आणि आम्ही सर्वजण तुझ्या धन्याचे गुलाम होऊ.” 10 त्या
मनुष्याने उत्तर दिले, “ठीक आहे, तुम्ही जे म्हणता त्याप्रमाणे होईल;
परंतु ज्याच्याजवळ तो प्याला सापडेल तोच माझ्या धन्याचा गुलाम
होईल; बाकीचे दोषापासून मुक्त होतील.” 11 आपल्या पोती त्यांनी
लगबगीने खाली जमिनीवर ठेऊन ती उघडली; 12 त्या कारभाऱ्याने
वडील भावापासून आरंभ करून धाकट्या भावाच्या पोत्यापर्यंत शोध
केला; आणि तो प्याला बिन्यामीनच्या पोत्यामध्ये सापडला. 13 हताश
होऊन त्यांनी आपले कपडे फाडले, आपल्या गाढवांवर पोती लादली
आणि ते पुन्हा शहरात परतले. 14 यहूदाह आणि त्याचे भाऊ आले,
त्यावेळी योसेफ घरीच होता आणि त्यांनी त्याच्यापुढे लोटांगण घातले.
15 योसेफाने विचारले, “तुम्ही हे काय केले? माझ्यासारखा मनुष्य शकुन
पाहून या गोष्टी जाणून घेऊ शकतो हे तुम्हाला माहिती नव्हते का?” 16
यहूदाहने उत्तर दिले, “आमच्या स्वामीपुढे आम्ही काय बोलावे? आमची
निर्दोषता आम्ही कशी सिद्ध करावी? परमेश्वराने तुमच्या दासांचे अपराध
उघडे केले आहे. महाराज, आम्ही सर्वजण आणि ज्याच्या पोत्यात
प्याला सापडला तो देखील तुमचे गुलाम आहोत.” 17 योसेफ म्हणाला,
“अशी गोष्ट माझ्याकडून कधीही न होवो! ज्या मनुष्याकडे माझा प्याला
मिळाला, तोच माझा गुलाम होईल बाकीचे तुम्ही तुमच्या वडिलांकडे
शांतीने परत जा.” 18 तेव्हा यहूदाह पुढे सरसावून म्हणाला, “महाराज,
तुमच्या सेवकाला क्षमा करा, मला एक शब्द बोलू द्या, क्षणभर माझे
ऐकून घ्या. कृपया, आपल्या सेवकावर रागावू नका, कारण तुम्ही
प्रत्यक्ष फारोहसमान आहात. 19 महाराज, तुमच्या सेवकांना तुम्ही
विचारले होते की, तुम्हाला वडील आहेत का? तुम्हाला आणखी एखादा
भाऊ आहे का? 20 आणि आम्ही आमच्या प्रभूला उत्तर दिले की,
‘आम्हाला वृद्ध वडील आहेत आणि अशा वृद्धापकाळातच त्यांना एक पुत्र
झाला. त्याचा भाऊ मरण पावला आहे आणि त्याच्या आईला झालेल्या
पुत्रांपैकी तो एकटाच उरलेला आहे आणि त्याचे वडील त्याच्यावर खूप
प्रीती करतात.’ 21 “तेव्हा तुम्ही तुमच्या सेवकांना म्हणाले, ‘त्याला
माझ्याकडे घेऊन या, म्हणजे मी त्याला पाहू शकेन.’ 22 आणि आम्ही
आमच्या महाराजास म्हणालो, ‘तो मुलगा आपल्या वडिलांना सोडू
शकत नाही; जर त्याने वडिलांना सोडले तर त्याचे वडील मरतील.’ 23
पण तुम्ही आपल्या सेवकांना सांगितले की, ‘जर तुमचा धाकटा भाऊ
तुमच्यासोबत आला नाही तर तुम्ही माझे मुख पाहू शकणार नाही.’ 24
जेव्हा आम्ही परत तुमचा सेवक आमच्या पित्याकडे जाऊन पोहोचलो,
आम्ही त्यांना महाराज काय म्हणाले ते सांगितले. 25 “आमच्या
वडिलांनी म्हटले, ‘परत जा आणि थोडे धान्य विकत घेऊन या.’ 26 परंतु
आम्ही म्हणालो, ‘आम्ही खाली जाऊ शकत नाही, जर आमचा धाकटा
भाऊ आमच्याबरोबर असला तरच आम्ही जाणार. आमचा धाकटा भाऊ
आमच्याबरोबर असल्याशिवाय आम्ही त्या मनुष्याचे मुख पाहू शकणार
नाही.’ 27 “मग तुमचे सेवक, आमचे वडील आम्हाला म्हणाले, ‘माझ्या
पत्नीने माझ्या दोन पुत्रांना जन्म दिला. 28 त्यापैकी एक माझ्यापासून
दूर गेला तेव्हा मी म्हणालो, “त्याला एखाद्या श्वापदाने फाडून त्याचे
तुकडे केले असावेत,” त्यानंतर मी त्याला पहिले नाही. 29 जर यालाही
तुम्ही माझ्यापासून घेऊन जाल आणि त्याच्यावरही संकट आले तर
तुम्ही माझ्या पिकलेल्या केसाला दुःखाने कबरेत लोटण्यास कारणीभूत
व्हाल.’ (Sheol h7585) 30 “आमच्या वडिलांचा जीव मुलाच्या जिवाशी
इतका निगडीत आहे की, आता जेव्हा मी तुमचा सेवक, आम्ही या
मुलाशिवाय परतलो, 31 आणि मुलगा आमच्याबरोबर नाही असे जर
त्यांनी पाहिले तर ते प्राण सोडतील आणि त्यांच्या पिकलेल्या केसांना
दुःखात व कबरेत लोटण्यास आम्ही कारणीभूत होऊ. (Sheol h7585) 32
तुमच्या सेवकाने आमच्या वडिलांना अभिवचन दिले आहे की, मुलाची
मी काळजी घेईन. मी त्यांना सांगितले की, ‘मी जर त्याला परत आणले
नाही तर त्याचा दोष माझ्या जीवनात सदैव माझ्या माथ्यावर राहील!’
33 “म्हणून महाराज, कृपा करा आणि त्या मुलाऐवजी मलाच येथे तुमचा
गुलाम म्हणून राहू द्या आणि मुलाला त्याच्या भावांबरोबर परत जाऊ द्या.
34 कारण मुलगा माझ्याबरोबर नसला तर मी माझ्या वडिलांकडे कसे
जाऊ शकतो? माझ्या वडिलांना होणारे दुःख मला पाहवणार नाही.”

**45** आता मात्र आपल्या सेवकांसमोर योसेफाचा भावनावेग अनावर
झाला आणि तो मोठ्याने ओरडला, “सगळ्यांनी माझ्या
समक्षतेतून बाहेर जावे!” योसेफाने तिथे कोणी नसताना स्वतःला
आपल्या भावांसमोर प्रगट केले. 2 मग तो इतक्या मोठमोठ्याने रडू
लागला की, ते इजिप्तच्या लोकांनी ऐकले आणि फारोहच्या घराण्यातील
लोकांनीही ते ऐकले. 3 तेव्हा योसेफ आपल्या भावांना म्हणाला,
“मी योसेफ आहे! माझे वडील अद्याप जिवंत आहेत काय?” परंतु
त्याचे भाऊ इतके घाबरले होते की त्यांच्या मुखातून एकही शब्द बाहेर
पडेना. 4 तेव्हा योसेफाने आपल्या भावांना म्हटले, “माझ्याजवळ
या!” ते जवळ आल्यावर तो त्यांना म्हणाला, “ज्या भावाला विकून
तुम्ही इजिप्त देशात पाठवून दिले होते, तो मी तुमचा भाऊ योसेफ
आहे! 5 तुम्ही मला अशा रीतीने वागविले म्हणून वाईट वाटून घेऊ
नका व त्रागा करून घेऊ नका, कारण तुमचे जीव वाचविण्याकरिता
परमेश्वरानेच मला तुमच्यापुढे इकडे पाठविले. 6 दुष्काळ पडून आता
दोनच वर्षे झाली आणि अद्यापही पाच वर्षे आहेत. त्या काळात नांगरणी
व कापणी अजिबात होणार नाही. 7 परंतु पृथ्वीवर जे उरले आहेत, त्या
तुम्हाला वाचवण्यासाठी आणि मोठ्या मुक्तिद्वारे तुमचे जीवन सुरक्षित
करण्यासाठी परमेश्वराने मला तुमच्या आधी इथे पाठवले आहे. 8
“म्हणजे आता तुम्ही नव्हे तर खुद्द परमेश्वरानेच मला इकडे पाठविले.
त्यांनीच मला फारोहचा सल्लागार, त्याच्या घराण्याचा व्यवस्थापक
आणि संपूर्ण इजिप्त देशाचा अधिपती केले आहे. 9 आता त्वरा करा
आणि माझ्या वडिलांकडे जाऊन त्यांना सांगा की, तुमचा पुत्र योसेफ
असे म्हणतो: ‘परमेश्वराने मला संपूर्ण इजिप्त देशाचा प्रमुख केले आहे,
म्हणून आता क्षणाचाही विलंब न लावता माझ्याकडे येथे या. 10 म्हणजे
तुम्ही, तुमची मुले व तुमची नातवंडे, गुरे, शेरडेमेंढरे आणि जे सर्वकाही
तुमचे आहे, त्यासह तुम्हाला येथे गोशेन प्रांतात राहता येईल. 11 मी

तुमची या ठिकाणी काळजी घेईन, कारण आपल्यापुढे दुष्काळाची
अजून पाच वर्षे आहेत आणि तुम्ही इकडे आला नाही तर, तुम्ही तुमच्या
सर्व कुटुंबासह निराधार व्हाल.’ 12 “तुम्ही हे स्वत: बघत आहात व माझा
भाऊ बिन्यामीनही बघत आहे, की खरोखर मीच तुमच्याशी बोलत आहे.
13 आपल्या वडिलांना इजिप्तमध्ये मला देण्यात आलेला आदर आणि
जे सर्वकाही तुम्ही पाहिले ते सांगा आणि त्यांना माझ्याकडे तत्परतेने
घेऊन या.” 14 मग आनंदाने रडू येत असतानाच, त्याने बिन्यामीनाला
मिठी मारली आणि बिन्यामीनही रडू लागला. 15 मग त्याने आपल्या
प्रत्येक भावाला मिठी मारली व त्यांच्यासह रडला आणि नंतर त्याचे
भाऊ त्याच्याशी बोलू लागले. 16 योसेफाचे भाऊ आले आहेत ही
बातमी फारोहपर्यंत पोहोचली, तेव्हा ती ऐकून फारोहला आणि त्याच्या
अधिकाऱ्यांना अतिशय आनंद झाला. 17 फारोह योसेफाला म्हणाला,
“तुझ्या भावांना सांग, ‘आपली जनावरे लादा आणि झटपट कनान
देशातील आपल्या घरी जा, 18 आणि तुमचे वडील व सर्व कुटुंबीय
मंडळी यांना इजिप्तमध्येच राहण्यासाठी घेऊन या. त्यांना सांगा, फारोह
तुम्हाला इजिप्त देशातील सर्वात सुपीक प्रदेश बहाल करेल म्हणजे
या देशातील उत्तम पदार्थ तुम्हाला खावयास मिळतील.’ 19 “आणि
तुझ्या भावांना असेही सांग, ‘तुमच्या स्त्रिया, मुले आणि तुमचे वडील
यांना घेऊन येण्यासाठी इजिप्तमधून गाड्या घेऊन जा. 20 तुमच्या
मालमत्तेची काळजी करू नका, कारण इजिप्त देशात जे काही उत्कृष्ट
आहे ते तुमचेच होईल.’” 21 इस्राएलच्या पुत्रांनी तसेच केले. फारोहच्या
आज्ञेप्रमाणे योसेफाने त्यांना सामान आणण्यासाठी गाड्या दिल्या;
तसेच प्रवासासाठी अन्नधान्यही दिले. 22 त्याने त्या प्रत्येकाला नवीन
पोशाख दिला, परंतु बिन्यामीनाला त्याने पाच नवीन पोशाख आणि
तीनशे शेकेल चांदी दिली. 23 त्याने आपल्या वडिलांसाठी इजिप्तमधील
सर्वोत्तम वस्तूंनी लादलेली दहा गाढवे पाठवली. प्रवासासाठी धान्य
व खाद्यपदार्थ यांनी लादलेल्या दहा गाढवीही रवाना केल्या. 24 अशा
रीतीने त्याने त्याच्या भावांची रवानगी केली. त्यांना प्रत्यक्ष निरोप देताना
तो त्यांना म्हणाला, “रस्त्याने जाताना भांडू नका!” 25 निरोप घेऊन ते
इजिप्तमधून निघाले व कनान देशात आपले वडील याकोब याच्याकडे
आले. 26 ते त्यांना म्हणाले, “योसेफ अजून जिवंत आहे! तो इजिप्त
देशाचा अधिपती झाला आहे.” हे ऐकून याकोब अवाक झाला; त्याचा
त्याच्या पुत्रांच्या बातमीवर विश्वास बसेना. 27 परंतु जेव्हा त्यांनी त्याला
योसेफाचा निरोप सांगितला आणि योसेफाने पाठविलेल्या धान्याच्या
गाड्या त्याने पाहिल्या, तेव्हा त्यांचा पिता याकोब याच्या आत्म्याला
नवचैतन्य प्राप्त झाले. 28 आणि इस्राएलने म्हटले, “माझी खात्री झाली
आहे! माझा पुत्र योसेफ जिवंत आहे, आता मृत्यूपूर्वी मी स्वत: त्याला
जाऊन भेटेन.”

**46** अशा रीतीने इस्राएल आपले सर्वस्व घेऊन निघाला आणि बेअर-
शेबा येथे पोहोचल्यावर त्याने आपला पिता इसहाक याच्या
परमेश्वराला अर्पणे वाहिली. 2 त्या रात्री परमेश्वराने इस्राएलला स्वप्नात
दर्शन दिले व त्याला म्हटले, “याकोबा! याकोबा!” याकोब म्हणाला,
“काय आज्ञा?” 3 परमेश्वराने म्हटले, “मी परमेश्वर, मी तुझ्या पित्याचा
परमेश्वर आहे; खाली इजिप्त देशात जाण्यास भिऊ नको, कारण तिथे
मी तुझे एक मोठे राष्ट्र करेन. 4 मी स्वत: तुझ्याबरोबर खाली इजिप्तला
जाईन, आणि तुला तिथून निश्चितच परत आणेन. योसेफाचे हात तुझे
डोळे बंद करतील.” 5 तेव्हा याकोब बेअर-शेबाहून निघाला; त्याला
नेण्यासाठी फारोहने पाठविलेल्या गाड्यांमधून इस्राएलाच्या पुत्रांनी,
त्याला व आपल्या पत्नींना आणि मुलांबाळांना इजिप्तमध्ये आणले. 6
मग याकोब त्याची सर्व संतती आणि आपली गुरे व कनान देशामध्ये
मिळविलेली संपत्ती घेऊन इजिप्तला गेला. 7 याप्रमाणे याकोबाने
त्याचे पुत्र, नातवंडे आणि त्याच्या मुली आणि नातवंडांना—त्याची सर्व
संतती इजिप्तमध्ये आणली. 8 इजिप्तला गेलेल्या इस्राएलाच्या पुत्रांची
(याकोब आणि त्याचे वंशज) ही नावे आहेत: रऊबेन हा याकोबाचा
प्रथम जन्मलेला. 9 रऊबेनाचे पुत्र: हनोख, पल्लू, हेस्रोन व कर्मी. 10
शिमओनाचे पुत्र: यमुवेल, यामीन, ओहाद, याखीन, जोहर आणि कनानी
स्त्रीपासून झालेला मुलगा शौल. 11 लेवीचे पुत्र: गेर्षोन, कोहाथ व
मरारी. 12 यहूदाहचे पुत्र: एर, ओनान, शेलाह, पेरेस व जेरह (परंतु एर
आणि ओनान हे कनान देशातच मरण पावले होते). परेसाचे पुत्र: हेस्रोन
आणि हामूल. 13 इस्साखारचे पुत्र: तोला, पुवाह, योब व शिम्रोन. 14
जबुलूनाचे पुत्र: सेरेद, एलोन व याहलेल हे होते. 15 म्हणजे याकोब
आणि लेआ यांची सर्व संतती मिळून तेहतीस होती. यातच त्यांना पद्दन-
अराम येथे झालेली कन्या दीना हिचाही समावेश आहे. 16 गादाचे पुत्र:
सिफयोन, हग्गी, शूनी, एसबोन, एरी, अरोदी व अरेली. 17 आशेराचे
पुत्र: इम्नाह, इश्वा, इश्वी व बरीयाह; त्यांची बहीण सेराह. बरीयाहचे पुत्र:
हेबेर व मालकीएल. 18 हे सोळाजण लाबानाने लेआला दासी म्हणून
दिलेल्या जिल्पेपासून याकोबाला झाले. 19 याकोबाची पत्नी राहेल हिचे
पुत्र: योसेफ व बिन्यामीन. 20 योसेफाचे पुत्र मनश्शेह व एफ्राईम हे
इजिप्तमध्ये ओन नगरचा याजक पोटीफेरा याची कन्या आसनथपासून
जन्मले. 21 बिन्यामीनचे पुत्र: बेला, बेकेर, आशबेल, गेरा, नामान, एही,
रोष, मुप्पीम, हुप्पीम व आर्द हे होते. 22 हे चौदाजण म्हणजे याकोब व
राहेल यांची संतती होती. 23 दानचा पुत्र: हुशीम. 24 नफतालीचे पुत्र:
याहसेल, गूनी, येसेर आणि शिल्लेम. 25 लाबानाने आपली कन्या राहेल
हिला दासी म्हणून दिलेली स्त्री बिल्हा हिच्यापासून याकोबाला सात
पुत्र झाले. 26 याप्रमाणे याकोबाच्या पुत्राच्या स्त्रियांच्या व्यतिरिक्त
इजिप्तमध्ये गेलेल्या त्याच्या संतानात एकूण सहासष्ट व्यक्ती होत्या. 27
योसेफाला इजिप्तमध्ये झालेल्या दोन पुत्रांचा यामध्ये समावेश केला
तर इजिप्तमध्ये आलेल्या याकोबाच्या कुटुंबाचे एकूण सत्तरजण होते.
28 याकोबाने गोशेनला जाण्याचा मार्ग विचारण्याकरिता यहूदाहला
त्यांच्या पुढे योसेफाकडे पाठविले. मग जेव्हा ते गोशेन प्रांतात पोहोचले,
29 योसेफाने आपला रथ तयार केला आणि आपला पिता इस्राएल
यांना भेटण्याकरिता गोशेन प्रांतात गेला. भेट होताच त्यांनी एकमेकांना
मिठी मारली आणि ते बराच वेळ रडले. 30 मग इस्राएल योसेफाला
म्हणाला, “आता मला खुशाल मरण येवो, कारण तू जिवंत आहेस हे मी

स्वत: पाहिले आहे.” 31 योसेफ आपल्या भावांना आणि पित्याच्या
कुटुंबातील सर्वांना म्हणाला, “मी वर जाऊन फारोहला सांगेन की, ‘माझे
भाऊ व माझ्या पित्याचे संपूर्ण कुटुंब कनान देशातून मजकडे आले
आहेत. 32 मी त्याला सांगेन, हे मेंढपाळ आहेत; त्यांनी त्यांच्याबरोबर
आपली शेरडेमेंढरे, गुरे व त्यांचे सर्वस्व आणले आहे.’ 33 म्हणून फारोह
जेव्हा तुम्हाला बोलावून विचारेल, ‘तुमचा व्यवसाय काय आहे?’ 34
तेव्हा तुम्ही असे उत्तर द्यावे, ‘आमच्या वडीलांप्रमाणे तुझ्या सेवकांनी
लहानपणापासून गुरे पाळली आहेत.’ म्हणजे तो तुम्हाला येथेच गोशेन
प्रांतात राहू देईल, कारण इजिप्तमध्ये मेंढपाळांना तुच्छ मानले जाते.”

**47** योसेफाने जाऊन फारोहला सांगितले, “माझे वडील आणि
माझे भाऊ कनान देशातून आपली सर्व गुरे, शेरडेमेंढरे आणि
सर्व संपत्ती घेऊन इकडे आले आहेत आणि आता ते गोशेन प्रांतात
आहेत.” 2 त्याने आपल्या भावांपैकी पाच जणांना निवडले आणि
फारोहपुढे उपस्थित केले. 3 फारोहने त्यांना विचारले, “तुमचा व्यवसाय
कोणता आहे?” त्यांनी फारोहला उत्तर दिले, “तुमचे सेवक आमच्या
पूर्वजांप्रमाणेच मेंढपाळ आहोत.” 4 ते फारोहला आणखी म्हणाले,
“आम्ही इथे काही काळ राहण्यास आलो आहोत, कारण कनान देशात
अतितीव्र दुष्काळ पडला आहे आणि तुमच्या सेवकांच्या गुरांसाठी तिथे
चारा नाही. तुम्ही आम्हाला गोशेन प्रांतात राहू द्यावे अशी विनंती आम्ही
करीत आहोत.” 5 फारोह योसेफाला म्हणाला, “तुझे वडील व भाऊ
तुझ्याकडे आले आहेत, 6 आणि संपूर्ण इजिप्त देश तुझ्यासमोर आहे;
या देशातील उत्तम भागात तुझ्या पित्याला आणि भावांना राहण्यास
दे. त्यांना गोशेन येथे राहू दे. आणि त्यांच्यापैकी कोणी विशेष क्षमता
असणारे असतील तर त्यांच्यावर माझ्याही गुरांची जबाबदारी सोपवून
दे.” 7 मग योसेफाने आपला पिता याकोब याला फारोहकडे उपस्थित
केले आणि याकोबाने फारोहला आशीर्वाद दिला. 8 फारोहने त्याला
विचारले, “तुमचे किती वय आहे?” 9 आणि याकोबाने फारोहला उत्तर
दिले, “माझी जीवनयात्रा एकशे तीस वर्षांची आहे. माझी ही वर्षे अत्यंत
कष्टाची आणि दु:खाची अशी होती; तरीपण माझ्या पूर्वजांइतके माझे
वय अजून झालेले नाही.” 10 नंतर याकोबाने फारोहला आशीर्वाद
दिला आणि त्याच्या उपस्थितीतून निघाला. 11 याप्रमाणे योसेफाने
आपले वडील आणि भाऊ यांना फारोहच्या आज्ञेप्रमाणे इजिप्तमधील
रामसेस नगरामधील सर्वोत्तम जागा वतन म्हणून दिली. 12 योसेफाने
आपला पिता, आपले भाऊ आणि आपल्या पित्याच्या कुटुंबातील
प्रत्येकाला त्यांच्या मुलाबाळांच्या संख्येनुसार अन्नधान्य पुरविले. 13
मात्र, दुष्काळ उग्र असल्याने संपूर्ण प्रदेशात अन्न नव्हते; दुष्काळामुळे
इजिप्त आणि कनान दोन्ही देश कष्टमय झाले. 14 योसेफाने धान्य
विकून इजिप्त आणि कनानमधील सर्व पैसा गोळा केला आणि त्याने
तो पैसा फारोहच्या महालात आणला. 15 जेव्हा इजिप्त आणि कनानी
लोकांजवळचा सर्व पैसा संपला तेव्हा इजिप्तमधील लोक योसेफाकडे
आले आणि म्हणाले, “आमचा सर्व पैसा संपला आहे तरी आम्हाला
अन्न द्या. आम्ही तुमच्या नजरेसमोर अन्नावाचून मरावे का?” 16 यावर
योसेफाने उत्तर दिले, “तुमचे पैसे संपले आहेत, तर मग तुमची गुरे
मला द्या आणि त्यांच्या मोबदल्यात मी तुम्हाला अन्नधान्य देतो.” 17
त्याप्रमाणे अन्नधान्यासाठी लोकांनी आपले सर्व घोडे, गुरे, शेरडेमेंढरे
आणि गाढवे योसेफाकडे आणली आणि त्याने त्याच्या मोबदल्यात
त्यांना वर्षभर पुरेल इतके धान्य दिले. 18 ते वर्ष संपल्यावर, पुढच्या वर्षी
ते त्याच्याकडे आले आणि म्हणाले, “आम्ही धन्यापासून हे सत्य लपवू
शकत नाही की आमचा पैसा संपला आणि आमची गुरे तुमची झाली
आहेत आणि आता आमच्याजवळ आमच्या धन्यासाठी फक्त आमची
शरीरे व आमच्या जमिनी राहिल्या आहेत. 19 आम्ही तुमच्या नजरेसमोर
अन्नावाचून मरावे का? आता आम्हाला आमच्या जमिनीसह विकत घ्या
म्हणजे आम्ही फारोहचे गुलाम होऊ. अन्नासाठी आम्ही स्वत:चा विक्रय
केला तरच आम्ही जगू आणि जमिनीही मोकळया राहणार नाहीत.” 20
याप्रमाणे योसेफाने इजिप्त देशातील सर्व जमीन फारोहसाठी विकत
घेतली. दुष्काळ महाभयंकर असल्यामुळे सर्व इजिप्त देशातील लोकांनी
त्याला आपआपली शेते विकली आणि इजिप्त देशातील सर्व जमीन
फारोहची झाली, 21 तसेच योसेफाने इजिप्त देशातील एका टोकापासून
दुसऱ्या टोकापर्यंतच्या शहरातील सर्व लोकांना गुलाम बनविले. 22
याजकांच्या जमिनी मात्र योसेफाने विकत घेतल्या नाहीत, कारण
फारोहकडून त्यांना निर्धारित अन्नधान्य पुरविले जात असे आणि
त्यामुळे त्यांनी जमिनी विकल्या नाही. 23 मग योसेफ लोकांना म्हणाला,
“पाहा, मी फारोहसाठी तुम्हाला तुमच्या जमिनींसह विकत घेतले आहे.
आता हे बियाणे घ्या आणि जमिनीत पेरा. 24 ज्यावेळी तुम्ही कापणी
कराल. त्यावेळी तुमच्या उत्पन्नाचा पाचवा हिस्सा फारोहला द्यावा.
राहिलेले चार हिस्से पुढील वर्षाच्या बियाण्यांसाठी आणि तुम्हासाठी,
तुमचे कुटुंब व मुलाबाळांच्या खाण्यासाठी ठेवा.” 25 लोक म्हणाले,
“तुम्ही आमचे प्राण वाचविले आहेत, आमच्या धन्याच्या दृष्टीत आम्हाला
दया प्राप्त होवो; आम्ही फारोहच्या गुलामगिरीत राहू.” 26 म्हणून
योसेफाने याजकांच्या मालकीच्या जमिनी शिवाय इतर सर्व जमिनीतील
पिकांचा पाचवा हिस्सा फारोहला देण्यात यावा, असा इजिप्त देशभर
कायदा केला. हा कायदा आजवर चालू आहे. 27 अशा रीतीने इस्राएली
इजिप्तच्या गोशेन प्रांतात राहू लागले, आणि त्यांनी तिथे जमीनजुमला
संपादन केला व ते फलद्रूप होऊन संख्येने खूप वाढले. 28 इजिप्त
देशात याकोब सतरा वर्षे जगला आणि त्याच्या जीवनाची वर्षे एकशे
सत्तेचाळीस होती. 29 इस्राएलाची मृत्युघटका भरत आली त्यावेळी
त्याने आपला पुत्र योसेफ याला बोलाविले आणि म्हटले, “जर तुझी
माझ्यावर कृपादृष्टी असेल तर माझ्या मांडीखाली हात ठेऊन अशी शपथ
घे की तू मला करुणेने व विश्वासाने वागवशील. इजिप्त देशात मला
मूठमाती देऊ नकोस, 30 परंतु जेव्हा मी माझ्या पूर्वजांसोबत झोपी
जाईन, मला इजिप्तमधून बाहेर ने आणि त्यांना जिथे पुरले आहे, तिथे
मला मूठमाती दे.” त्याने म्हटले, “तुम्ही जसे सांगितले आहे तसेच मी
करेन.” 31 “मला शपथ दे.” त्याने म्हटले, मग योसेफाने त्याला शपथ

दिली आणि मग इस्राएलने आपल्या काठीच्या टोकावर टेकून उपासना केली.

**48** काही दिवसानंतर योसेफाला कळविण्यात आले, “तुझे वडील आजारी आहेत.” तेव्हा तो मनश्शेह व एफ्राईम या आपल्या दोन पुत्रांना आपल्यासोबत घेऊन निघाला. 2 जेव्हा याकोबाला सांगण्यात आले, “तुझा पुत्र योसेफ तुझ्याकडे आला आहे,” तेव्हा इस्राएल आपली सर्व शक्ती एकवटून उठून बिछान्यावर बसला. 3 याकोब हा योसेफाला म्हणाला, “सर्वसमर्थ परमेश्वराने मला कनान देशात लूज येथे दर्शन देऊन आशीर्वाद दिला 4 आणि मला म्हणाले, ‘मी तुला फलद्रूप करेन आणि तुझी संख्या वाढवेन. मी तुला लोकांचा समुदाय करेन आणि तुझ्यानंतर हा देश तुझ्या वंशजांना कायमचे वतन म्हणून देईन.’ 5 “आता मी इजिप्तमध्ये तुझ्याकडे येण्यापूर्वी तुला इजिप्तमध्ये झालेले दोन पुत्र माझेच गणले जातील; जसे रऊबेन व शिमओन तसेच एफ्राईम व मनश्शेह हेदेखील माझेच आहे. 6 परंतु यानंतर तुला जी मुलेबाळे होतील ती तुझी होतील. त्यांचे वतन त्यांच्या भावांच्या नावाने चालेल. 7 मी पद्दन-अराम येथून परत येत होतो आणि कनान देशात एफ्राथपासून थोड्याच अंतरावर होतो, तेव्हा राहेलच्या मृत्यूचे दुःख माझ्यावर पडले आणि मी तिला एफ्राथ गावाच्या थोड्या अंतरावर पुरले” (म्हणजे बेथलेहेम). 8 जेव्हा इस्राएलने योसेफाच्या पुत्रांना पाहिले, त्याने विचारले, “ही कोण आहेत?” 9 योसेफाने त्याच्या पित्याला म्हटले, “परमेश्वराने मला इथे दिलेले हे माझे पुत्र आहेत.” इस्राएल त्याला म्हणाला, “त्यांना माझ्याजवळ आण आणि म्हणजे मी त्यांना आशीर्वाद देईन.” 10 इस्राएलाची दृष्टी म्हातारपणामुळे अशक्त झाली होती, त्यामुळे तो नीट पाहू शकत नव्हता, म्हणून योसेफाने त्यांना त्याच्याजवळ आणले आणि त्याच्या पित्याने त्यांचे चुंबन घेतले व त्यांना कवटाळले. 11 इस्राएल योसेफाला म्हणाला, “मी तुला परत पाहीन असे मला कधीच वाटले नव्हते, पण परमेश्वराने मला तुझे पुत्रही पाहू दिलेत.” 12 नंतर योसेफाने त्यांना इस्राएलाच्या मांडीवरून बाजूला केले आणि जमिनीपर्यंत लवून मुजरा केला. 13 मग योसेफाने दोघांना घेतले आणि एफ्राईमला योसेफाच्या उजव्या व इस्राएलाच्या डाव्या हातास आणि मनश्शेहला योसेफाच्या डाव्या आणि इस्राएलाच्या उजव्या हातास असे त्याच्याजवळ नेले. 14 परंतु इस्राएलने त्याचा उजवा हात पुढे केला आणि तो एफ्राईमच्या डोक्यावर ठेवला, जरी तो धाकटा होता आणि हात ओलांडून त्याने आपला डावा हात मनश्शेहच्या डोक्यावर ठेवला, जरी मनश्शेह प्रथम जन्मलेला होता. 15 नंतर त्याने योसेफाला आशीर्वाद देऊन म्हटले, “ज्या परमेश्वरापुढे माझे पूर्वज अब्राहाम आणि इसहाक विश्वासाने चालले, तेच परमेश्वर आजपर्यंत माझ्या जीवनाचे मेंढपाळ राहिले आहे, 16 ज्या परमेश्वराच्या दूताने मला सर्व घातपातापासून सुरक्षित ठेवले, ते या मुलांना आशीर्वादित करोत. माझे आणि माझे पूर्वज अब्राहाम आणि इसहाक यांचे नाव या मुलांच्या द्वारे पुढे चालू राहो, त्यांना पुष्कळ मुलेबाळे व गोत्र लाभोत.” 17 त्याच्या पित्याने आपला उजवा हात एफ्राईमाच्या डोक्यावर ठेवलेला पाहून योसेफ नाराज झाला आणि त्याने एफ्राईमच्या डोक्यावरील हात मनश्शेहच्या डोक्यावर ठेवावा म्हणून त्याने त्याच्या पित्याचा हात उचलला. 18 योसेफ त्याला म्हणाला, “नाही बाबा, हा प्रथम जन्मलेला आहे; तुमचा उजवा हात त्याच्या डोक्यावर ठेवा.” 19 परंतु त्याच्या वडिलांनी ते नाकारले आणि ते म्हणाले, “मला माहीत आहे, माझ्या मुला, मला माहीत आहे. त्याचीही कुळे होतील आणि तो देखील महान होईल, परंतु त्याचा धाकटा भाऊ त्याच्याहीपेक्षा थोर होईल आणि त्याचे लोक राष्ट्रांचे समुदाय बनतील.” 20 त्याने त्या दिवशी त्यांना आशीर्वाद दिला आणि म्हणाला, “इस्राएली लोक एकमेकांना आशीर्वाद देताना तुझे नाव घेऊन म्हणोत: ‘एफ्राईम व मनश्शेह यांच्याप्रमाणे परमेश्वर तुझे कल्याण करो.’” अशाप्रकारे याकोबाने एफ्राईमाला मनश्शेहपेक्षा श्रेष्ठ ठरविले. 21 नंतर इस्राएल योसेफाला म्हणाला, “आता लवकरच माझा अंत होईल; परंतु परमेश्वर तुझ्याबरोबर राहतील आणि तुला तुझ्या वाडवडीलांच्या देशामध्ये परत नेतील. 22 आणि मी तुझ्या भावांपेक्षा तुला जमिनीचा एक भाग अधिक देतो, तो मी, माझी तलवार आणि माझे धनुष्य यांच्या बळावर, अमोरी लोकांपासून जिंकून घेतला होता.”

**49** नंतर याकोबाने आपल्या सर्व मुलांना बोलावून म्हटले: “असे माझ्याभोवती गोळा व्हा, म्हणजे पुढे भविष्यकाळात तुमचे काय होणार आहे ते मी तुम्हाला सांगेन. 2 “एकत्र व्हा आणि माझे ऐका, अहो याकोबाच्या पुत्रांनो; तुमचा पिता इस्राएल याचे ऐका. 3 “रऊबेना, तू माझा प्रथमपुत्र आहेस, माझे बळ, पौरुषाचे प्रथमफळ असा आहेस. प्रतिष्ठा आणि शक्तीत उत्कृष्ट असा तू आहेस. 4 तू अशांत पाण्यासारखा उग्र आहे, तू अजून उत्कृष्ट होणार नाही, कारण तू तुझ्या वडिलांच्या खाटेवर, माझ्या खाटेवर चढला आणि ते अशुद्ध केले. 5 “शिमओन व लेवी हे दोघे भाऊ आहेत, त्यांची तलवार ही अत्याचाराचे साधन आहे. 6 मी त्यांच्या सभेमध्ये जाऊ नये, त्यांच्या मंडळीमध्ये मी सामील होऊ नये, कारण रागाच्या भरात त्यांनी माणसांचा वध केला, आणि वाटेल तसे बैलांची धोंडशीर तोडली. 7 त्यांचा क्रोध शापित असो, आणि त्यांचा संताप, किती क्रूर आहे! मी त्यांची याकोबामध्ये पांगापांग करेन, आणि त्यांना इस्राएलभर पांगवून टाकेन. 8 “हे यहूदाह, तुझे भाऊ तुझी प्रशंसा करतील; तुझा हात तुझ्या शत्रूंच्या मानेवर राहील; तुझ्या पित्याचे पुत्र तुला नमन करतील. 9 यहूदाह, तू सिंहाचा छावा आहेस. माझ्या मुला, तू तुझ्या शिकारीहून परत येतो. सिंहासारखा दबा धरून बसतो व विसावा घेतो, सिंहिणीप्रमाणे आहेस—त्याला कोण छेडणार? 10 यहूदाहपासून राजदंड कधीही वेगळा होणार नाही, किंवा अधिकाराची काठी त्याच्या पायामधून निघून जाणार नाही, ज्याचे जे आहे तो येईपर्यंत, राष्ट्रे त्याची आज्ञा पाळतील. 11 तो आपले गाढव द्राक्षवेलीला, गाढवीचे शिंगरू उत्कृष्ट द्राक्षवेलीला बांधून ठेवणार आहे; आपला झगा द्राक्षारसात, आपली वस्त्रे द्राक्षाच्या रक्तात धुणार आहे. 12 त्याचे नेत्र द्राक्षारसापेक्षा गर्द होतील, त्याचे दात दुधापेक्षाही पांढरे होतील. 13 “जबुलून समुद्रकिनारी राहील आणि तो जहाजांचे बंदर होईल. त्याची सीमा सीदोनपर्यंत पसरेल. 14 “इस्साखार बळकट गाढव आहे. तो

मेंढवाड्यांमध्ये दबून बसला आहे. 15 त्याची विश्रांतीची जागा किती
रम्य आहे आणि तिकडचा प्रदेश किती आल्हाददायक आहे, हे पाहून तो
आपल्या खांद्याला भार वाहण्यासाठी वाकवेल आणि मजुरीचा दास
होऊन जाईल. 16 “दान आपल्या लोकांना न्यायदान करेल, इस्राएलाच्या
एका गोत्राप्रमाणे तो हे करेल. 17 दान हा रस्त्याच्या कडावरील सर्प
बनेल, तो वाटेवरील विषारी सर्प बनेल, जो घोड्याच्या टापांचा चावा
घेईल व घोडेस्वार खाली कोसळेल. 18 “हे याहवेह, मी तुमच्या तारणाची
वाट पाहत आहे. 19 “एक लुटारूची टोळी गादवर हल्ला करेल, पण गाद
त्यांच्या टाचेवर तडाखा देईल. 20 “आशेरला पौष्टिक अन्न मिळेल;
आणि तो राजास योग्य अशी मिष्टान्ने पुरवेल. 21 “नफताली स्वैर
हरिणीप्रमाणे आहे, त्याला सुंदर पाडसे होतील. 22 “योसेफ हा फलवंत
वेल आहे, पाण्याच्या झऱ्याजवळ लावलेली फलवंत वेल आहे, तिच्या
फांद्या भिंतीवर पसरल्या आहेत. 23 कटुतेने तिरंदाजांनी त्याच्यावर हल्ला
केला; त्यांनी त्याच्यावर वैराने बाण सोडले. 24 परंतु त्याचे धनुष्य स्थिर
राहिले, त्याचे बाहू मजबूत राहिले, याचे कारण याकोबाचे सर्वसमर्थ
परमेश्वर, ते मेंढपाळ आणि इस्राएलचे खडक आहेत. 25 कारण तुझ्या
पित्याचे परमेश्वर, तुझे सहायक आहेत, कारण सर्वसमर्थ, जे तुला
आशीर्वादित करतात, वरून स्वर्गातील आशीर्वाद, खोलातील डोहातून
निघणाऱ्या झऱ्यातील आशीर्वाद, स्तने आणि गर्भांच्या आशीर्वादांचा
वर्षाव करो. 26 तुझ्या पित्याचे आशीर्वाद पूर्वजांच्या पर्वतापेक्षा श्रेष्ठ
आशीर्वाद आहेत, ते सर्वकालीन पर्वतांच्या संपन्नतेपेक्षा श्रेष्ठ आहेत. हे
आशीर्वाद योसेफाच्या मस्तकी, जो आपल्या भावामधील राजपुत्र आहे,
त्याच्या मस्तकी येवोत. 27 “बिन्यामीन, हा भुकेला लांडगा आहे; तो
सकाळच्या प्रहरी शिकार करतो, आणि संध्याकाळी लूट वाटतो.” 28 हे
सर्व इस्राएलचे बारा गोत्र आहेत आणि मुलांना आशीर्वाद देण्याकरिता
त्यांचा पिता असा बोलला, प्रत्येकाला त्याने यथायोग्य आशीर्वाद दिला.
29 नंतर त्याने आपल्या पुत्रांस या सूचना दिल्या: “आता लवकरच
माझा अंत होईल, तेव्हा एफ्रोन हेथीपासून विकत घेतलेल्या गुहेमध्ये
माझ्या वाडवडिलांच्या सोबत मला मूठमाती द्या. 30 कनान देशात
अब्राहामाने एफ्रोन हेथीपासून विकत घेतलेली स्मशानभूमी मम्रेसमोरील
मकपेला नावाच्या शेतातील गुहेमध्ये आहे. 31 तिथेच त्यांनी अब्राहाम
आणि त्याची पत्नी साराहला मूठमाती दिली; तिथेच त्यांनी इसहाक
आणि त्याची पत्नी रिबेकाहला मूठमाती दिली आणि तिथेच मी लेआला
मूठमाती दिली. 32 ते शेत आणि ती गुहा हेथीच्या लोकांपासून विकत
घेतली होती.” 33 आपल्या पुत्रांसंबंधीची भविष्यवाणी संपविल्यावर
याकोबाने आपले पाय बिछान्यावर उचलून घेतले व त्याने अखेरचा श्वास
घेऊन प्राण सोडला आणि तो त्याच्या पूर्वजास जाऊन मिळाला.

**50** योसेफ आपल्या पित्याल्या आलिंगन देऊन खूप रडला आणि
त्याने त्याचे चुंबन घेतले. 2 नंतर योसेफाने वैद्यास त्याचा पिता
इस्राएल याच्या मृतदेहात मसाला भरण्याची आज्ञा दिली. मग वैद्यांनी
मृतदेहात सुगंधी द्रव्याचा मसाला भरला. 3 मसाला भरण्याच्या क्रियेला
चाळीस दिवस लागले, मृतदेहात मसाला भरण्यास इतके दिवस लागत
असत. इजिप्तच्या लोकांनी त्याच्यासाठी सत्तर दिवस शोक केला.
4 शोक करण्याचे दिवस संपल्यानंतर योसेफ फारोहच्या राजदरबारी
गेला आणि म्हणाला, “जर माझ्यावर तुमची कृपादृष्टी असेल तर तुम्ही
माझ्यावतीने फारोहशी बोलावे” अशी त्याने त्यांना विनंती केली. 5
“माझ्या वडिलांनी मला शपथ घ्यायला लावली आणि म्हणाले, मी
मरणार आहे; कनान देशात मी स्वत:साठी खोदलेल्या थडग्यात मला
मूठमाती दे. आता मला वर जाऊन माझ्या वडिलांना मूठमाती देऊ दे. मग
मी परत येईन.” 6 फारोहने म्हटले, “तू वर जा आणि शपथ दिल्याप्रमाणे
आपल्या वडिलांना मूठमाती दे.” 7 मग योसेफ आपल्या पित्याला
पुरण्यास निघाला. फारोहचे सर्व अधिकारी त्याच्याबरोबर होते—त्याचे
मान्यवर आणि इजिप्तचे सर्व प्रतिष्ठित— 8 तसेच योसेफाचे पूर्ण
कुटुंब म्हणजे त्याचे भाऊ आणि त्यांचे कुटुंब, या सर्वांसह गेला. परंतु
त्यांनी त्यांची मुलेबाळे, गुरे, शेरडेमेंढरे गोशेन प्रांतातच मागे ठेवली.
9 अशाप्रकारे योसेफाबरोबर रथ, घोडेस्वार गेले. तो मोठा समुदाय
होता. 10 जेव्हा ते यार्देन नदीच्या पश्चिम तीरावर यरीहोजवळ अटाद या
ठिकाणी आले; तेव्हा त्यांनी तिथे फार आकांत करून मोठा विलाप
केला; योसेफाच्या वडिलांसाठी त्यांनी सात दिवस तिथे शोक केला.
11 जेव्हा तिथे राहणाऱ्या कनानी लोकांनी अटादच्या खळयावर शोक
करताना पाहिले, यार्देनजवळच्या त्या जागेला आबेल-मिस्राईम असे
नाव ठेवले. कारण ते म्हणाले, “इजिप्तच्या लोकांची ही मोठा शोक
करण्याची जागा आहे.” 12 इस्राएलने आज्ञा केल्याप्रमाणे त्याच्या
पुत्रांनी सर्वकाही केले: 13 त्याचा मृतदेह कनान देशामध्ये आणला
आणि अब्राहामाने एफ्रोन हिथी याच्यापासून मम्रेजवळील मकपेला
नावाच्या शेतातील गुहेत त्यांनी त्याला मूठमाती दिली. 14 आपल्या
वडिलांना मूठमाती दिल्यानंतर, योसेफ आपले भाऊ आणि आपल्या
वडिलांच्या मूठमातीसाठी त्याच्याबरोबर गेलेले लोक यासह इजिप्त
देशास परत आला. 15 जेव्हा योसेफाच्या भावांनी पाहिले की त्यांचे
वडील मरण पावले, ते म्हणाले, “आपण योसेफाला जी वाईट वागणूक
दिली होती, त्याची जर त्याने वाईटाने आपल्याला परतफेड केली तर?”
16 म्हणून त्यांनी योसेफाला निरोप पाठविला, “मरण्यापूर्वी तुझ्या
वडिलांनी अशी सूचना दिली होती: 17 ‘तुम्हाला हे योसेफाला बोलायचे
आहे: आम्ही तुझ्याशी जे अतिदुष्टाईचे वर्तन केले त्याबद्दल आम्ही तुझी
क्षमा मागावी.’ त्याप्रमाणे आम्ही तुझ्या पित्याच्या परमेश्वराचे सेवक
तुझी क्षमा मागत आहोत.” जेव्हा हा संदेश योसेफाकडे आला, तेव्हा
योसेफ रडला. 18 नंतर त्याचे भाऊ त्याच्याकडे आले आणि त्याच्यापुढे
पालथे पडून त्याला म्हणाले, “आम्ही तुझे गुलाम आहोत.” 19 पण
योसेफ त्यांना म्हणाला, “भीती बाळगू नका. मी काय परमेश्वराच्या
ठिकाणी आहे? 20 तुम्ही जे वाईट योजिले होते, त्यातून परमेश्वराने
चांगलेच निर्माण केले; कारण आज मला त्याने या पदावर यासाठी
आणले की, मला पुष्कळ लोकांचे प्राण वाचविता यावेत. 21 म्हणून
तुम्ही घाबरू नका; मी स्वत: तुमचा आणि तुमच्या मुलाबाळांचा पुरवठा
करेन.” अशाप्रकारे त्यांच्याशी अतिशय ममतेने बोलून त्याने त्यांचे

समाधान केले. 22 योसेफ, इजिप्त देशात आपल्या पित्याच्या संपूर्ण
कुटुंबासोबत राहिला. तो एकशे दहा वर्ष जगला 23 आणि योसेफाने
त्याचा पुत्र एफ्राईमच्या मुलांची तिसरी पिढी पाहिली. तसेच मनश्शेहचा
पुत्र माखीरला जन्मतः त्याच्या मांडीवर ठेवण्यात आले. 24 नंतर योसेफ
आपल्या भावांस म्हणाला, “लवकरच माझा अंत होईल, पण खात्रीने
परमेश्वर तुमची भेट घेतील आणि तुम्हाला इजिप्त देशाबाहेर अब्राहाम,
इसहाक आणि याकोब यांना वचन दिलेल्या देशात घेऊन जातील,” 25
नंतर योसेफाने इस्राएली लोकांना शपथ देऊन म्हटले, “परमेश्वर तुमच्या
मदतीला येतील आणि मग तुम्ही निश्चितच माझ्या अस्थी या जागेवरून
घेऊन जाल.” 26 अशा रीतीने योसेफ एकशे दहा वर्षांचा होऊन मृत्यू
पावला. मग त्याच्या प्रेतात मसाला भरण्यात आला आणि ते एका
शवपेटीत घालून इजिप्तमध्ये ठेवण्यात आले.

# निर्गम

1 याकोबाबरोबर इजिप्तला गेलेल्या इस्राएलचे पुत्र, जे आपल्या
कुटुंबासह गेले, त्यांची नावे ही आहेत: 2 रऊबेन, शिमओन, लेवी
आणि यहूदाह; 3 इस्साखार, जबुलून आणि बिन्यामीन; 4 दान आणि
नफताली; गाद व आशेर. 5 याकोबाचे एकूण सत्तर वंशज होते; योसेफ
तर आधीच इजिप्तमध्ये गेला होता. 6 आता योसेफ आणि त्याचे सर्व
भाऊ व ती सर्व पिढी मरण पावली. 7 परंतु इस्राएली लोक अत्यंत
फलद्रूप झाले; ते बहुगुणित होऊन त्यांना पुष्कळ संतती झाली आणि
त्यांची संख्या वाढून, लवकरच ते इतके असंख्य झाले की संपूर्ण देश
त्यांनी व्यापून टाकला. 8 नंतर एक नवीन राजा इजिप्तच्या गादीवर
आला, त्याच्या दृष्टीने योसेफ कोणीही नव्हता. 9 त्याने आपल्या
लोकांना सांगितले, “पाहा, इस्राएली लोक संख्येने आपल्यापेक्षा जास्त
आहेत. 10 चला त्यांच्याशी चातुर्याने वागू या, नाहीतर त्यांची संख्या
अजून वाढेल, आणि लढाई झाली तर ते आपल्या शत्रूंशी एक होतील
आणि देश सोडून जातील.” 11 म्हणून त्यांनी इस्राएली लोकांवर गुलाम
मुकादम ठेवले व त्यांच्याकडून जुलमाने फारोहसाठी पीथोम व रामसेस
ही भंडारांची नगरे बांधून घेतली. 12 परंतु जेवढा त्यांच्यावर अत्याचार
केला गेला, तेवढे ते जास्त बहुगुणित झाले आणि पसरले; म्हणून
इजिप्तच्या लोकांना इस्राएली लोकांचे भय वाटू लागले. 13 इजिप्तचे
लोक इस्राएली लोकांकडून कठोरपणे कष्ट करून घेऊ लागले. 14 विटा
व चुन्यातील कष्टाच्या कामाने त्यांचे जीवन कठीण केले आणि शेतातील
प्रत्येक प्रकारच्या कष्टाच्या कामात त्यांच्याशी इजिप्तचे लोक कठोरतेने
वागले. 15 इजिप्तच्या राजाने शिफ्राह व पुआह नावाच्या दोन इब्री
सुइणींना अशी सूचना दिली की, 16 “इब्री स्त्रियांची प्रसूतीच्या तिवईवर
मदत करीत असताना जर मुलगा जन्मला तर त्याला मारून टाका, परंतु
मुलगी असली तर तिला जगू द्या.” 17 पण त्या सुइणी परमेश्वराचे भय
धरणाऱ्या होत्या, म्हणून त्यांनी इजिप्तच्या राजाने सांगितल्याप्रमाणे
केले नाही; तर मुलांनाही जिवंत राहू दिले. 18 तेव्हा इजिप्तच्या राजाने
त्या सुइणींना बोलावून विचारले, “तुम्ही असे का केले? तुम्ही मुलांना
का जिवंत राहू दिले?” 19 सुइणींनी फारोह राजाला उत्तर दिले, “इब्री
स्त्रिया इजिप्तच्या स्त्रियांप्रमाणे नाहीत; त्या सशक्त आहेत आणि
आम्ही तिथे पोहचण्या आधीच बाळंत होतात.” 20 म्हणून परमेश्वराने
त्या सुइणींना आशीर्वाद दिला आणि इस्राएली लोक बहुगुणित झाले व
संख्येने फार अधिक झाले. 21 या सुइणींनी परमेश्वराचे भय धरल्यामुळे
परमेश्वराने त्यांची कुटुंबे स्थापित केली. 22 मग फारोहने आपल्या सर्व
लोकांना हुकूम दिला, “इब्र्यांना होईल तो प्रत्येक मुलगा नाईल नदीत
फेकून द्यावा, परंतु प्रत्येक मुलीला जिवंत राहू द्यावे.”

2 लेवी वंशातील एका पुरुषाने लेवी तरुणीशी विवाह केला. 2 आणि
ती गरोदर राहिली आणि तिने मुलाला जन्म दिला. त्या बाळाचे रूप
पाहून त्याच्या आईने त्याला तीन महिने लपवून ठेवले. 3 पण त्यानंतर
त्याला ती लपवू शकत नव्हती, तेव्हा तिने त्याच्यासाठी लव्हाळ्याची
एक टोपली घेतली, व तिला डांबर आणि चुन्याचा लेप लावला. मग
तिने आपल्या बाळाला त्या टोपलीत ठेवले व ती टोपली तिने नाईल
नदीच्या काठी लव्हाळ्यात नेऊन ठेवली. 4 बाळाचे पुढे काय होते हे
पाहण्यासाठी त्याची बहीण दुरून त्याच्यावर नजर ठेऊन उभी राहिली.
5 फारोहची कन्या नाईल नदीवर स्नान करण्यासाठी गेली व तिच्या
दासी नदीच्या कडेने चालत होत्या. तिने लव्हाळ्याजवळ एक टोपली
पाहिली; तेव्हा ती टोपली आणण्यासाठी तिने आपल्या एका दासीला
पाठविले. 6 तिने ती टोपली उघडली आणि त्यात एक बाळ रडत
असल्याचे तिला दिसून आले. तिला त्याचा कळवळा आला. “हे बालक
इब्री आहे,” ती म्हणाली. 7 तेवढ्यात त्या बाळाची बहीण फारोहच्या
राजकन्येला म्हणाली, “या बाळाला दूध पाजण्यासाठी एखादी इब्री
दाई मी तुमच्यासाठी शोधून आणू का?” 8 “होय, जा,” फारोहची
कन्या तिला म्हणाली. त्या मुलीने जाऊन बाळाच्या आईला आणले.
9 फारोहची कन्या तिला म्हणाली, “या बाळाला घेऊन जा आणि
माझ्यासाठी त्याला दूध पाज; याचे वेतन मी तुला देईन.” ती बाई त्या
बाळाला आपल्या घरी घेऊन गेली व तिने त्याचे संगोपन केले. 10 पुढे
बाळ मोठा झाल्यावर तिने त्याला फारोहच्या कन्येकडे आणले आणि तो
तिचा पुत्र झाला. तिने त्याचे नाव मोशे असे ठेवले, कारण ती म्हणाली,
“मी त्याला पाण्यातून बाहेर काढले.” 11 मोशे तरुण झाल्यानंतर, एक
दिवस तो आपल्या लोकांना भेटायला गेला असताना त्याने त्यांना कष्टाने
राबत असताना बघितले. इजिप्तचा एक मनुष्य त्याच्या इब्री बांधवाला
मारहाण करीत असल्याचे मोशेने पाहिले. 12 आपल्याला कोणीही पाहत
नाही, हे बघून त्याने त्या इजिप्ती मनुष्याला ठार केले आणि त्याला
वाळूत लपवून टाकले. 13 दुसऱ्या दिवशी तो बाहेर गेला आणि त्याला
दोन इब्री पुरुष मारामारी करताना दिसले. तेव्हा ज्याची चूक होती त्याला
तो म्हणाला, “तू आपल्या इब्री सोबत्याला का मारत आहेस?” 14 तो
मनुष्य त्याला म्हणाला, “तुला आमच्यावर अधिकारी व न्यायाधीश
असे कोणी नेमले? तू इजिप्त देशाच्या मनुष्याला जसे मारून टाकलेस,
तसे मलाही मारून टाकायचा तुझा विचार आहे काय?” तेव्हा मोशे
घाबरला आणि त्याला वाटले, “मी जे काही केले ते सर्वांना माहीत झाले
असणार.” 15 जेव्हा फारोहने हे ऐकले, त्याने मोशेला मारून टाकण्याचा
प्रयत्न केला, परंतु मोशे फारोहपासून पळून मिद्यानास राहवयाला गेला,
तिथे जाऊन तो एका विहिरीजवळ बसला. 16 तिथे एका मिद्यानी
याजकाच्या सात मुली होत्या, त्या आपल्या पित्याच्या कळपाला पाणी
पाजण्यासाठी, व कुंडे भरून घेण्यासाठी विहिरीवर आल्या. 17 पण तिथे
काही धनगर आले आणि त्यांनी मुलींना तिथून हाकलून लावले. पण
मोशे उठला व मुलींच्या मदतीस आला आणि त्यांच्या मेंढरांना पाणी
पाजले. 18 जेव्हा मुली आपले वडील रऊएल याकडे परत गेल्या, त्याने
त्यांना विचारले, “आज इतक्या लवकर कशा आल्या?” 19 त्यांनी उत्तर
दिले, “एका इजिप्ती व्यक्तीने आम्हाला मेंढपाळांपासून सोडविले; त्याने
आमच्यासाठी विहिरीतून पाणी सुद्धा काढले आणि मेंढरांना पाजले.”
20 “तो कुठे आहे?” रऊएलाने आपल्या मुलींना विचारले, “त्याला

तुम्ही का सोडून आला? काहीतरी खावे म्हणून त्याला आमंत्रण द्या.”
21 मोशेने त्या मनुष्यासह राहण्यास स्वीकारले. त्याने आपली मुलगी
सिप्पोराह हिला मोशेची पत्नी म्हणून दिली. 22 सिप्पोराने एका मुलाला
जन्म दिला आणि मोशेने त्याचे नाव गेर्षोम ठेवले, कारण मोशे म्हणाला,
“मी विदेशात एक परदेशी झालो आहे.” 23 बराच काळ लोटल्यानंतर
इजिप्तचा राजा मरण पावला. इस्राएली लोक क्लेशाने विव्हळत होते
व आपल्या गुलामगिरीत रडून परमेश्वराचा धावा करीत होते; आणि
त्यांच्या कष्टप्रद गुलामगिरीतील त्यांचा धावा परमेश्वराकडे पोहोचला.
24 परमेश्वराने त्यांचे रडणे ऐकले आणि अब्राहाम, इसहाक व याकोब
यांच्याशी त्यांनी केलेल्या कराराचे त्यांना स्मरण झाले. 25 परमेश्वराने
इस्राएली लोकांना पाहिले आणि त्यांना त्यांची आस्था वाटली.

**3** मोशे आपला सासरा, मिद्यानी याजक इथ्रो याची मेंढरे चारीत होता.
तो ती मेंढरे घेऊन रानात, परमेश्वराचा डोंगर होरेबच्या मागच्या
बाजूला गेला. 2 तिथे त्याला एका झुडूपात अग्निज्वालेमधून याहवेहचा
दूत प्रकट झाला. झुडूप तर पेटले आहे, पण ते जळत नाही असे जेव्हा
मोशेने पाहिले, 3 तेव्हा मोशेने विचार केला “ते झुडूप का जळत नाही, हे
विचित्र दृश्य मी त्याजवळ जाऊन बघेन.” 4 मोशे ते झुडूप पाहण्यासाठी
गेला हे याहवेहने पाहिले, तेव्हा परमेश्वराने त्याला झुडूपातून आवाज
दिला, “मोशे, मोशे!” मोशे म्हणाला, “हा मी येथे आहे.” 5 परमेश्वर
त्याला म्हणाले, “आणखी जवळ येऊ नकोस. आपली पायतणे काढ,
कारण ज्या भूमीवर तू उभा आहेस ती पवित्र भूमी आहे.” 6 मग ते
म्हणाले, “मी तुझ्या पूर्वजांचा परमेश्वर आहे, म्हणजे मी अब्राहामाचा
परमेश्वर, इसहाकाचा परमेश्वर आणि याकोबाचा परमेश्वर आहे.” तेव्हा
मोशेने आपला चेहरा झाकला, कारण परमेश्वराकडे पाहण्यास तो
घाबरला. 7 नंतर याहवेहने त्याला सांगितले, “इजिप्त देशातील माझ्या
लोकांचे हाल मी बघितले आहे. त्यांच्या मुकादमांच्या त्रासामुळे त्यांचे
रडणे मी ऐकले आहे आणि त्यांच्या दुःखाविषयी मला चिंता आहे. 8
त्यांना इजिप्तच्या गुलामगिरीतून सोडवून चांगल्या व विस्तीर्ण देशात,
दूध व मध वाहत्या देशात घेऊन जाण्यासाठी मी खाली आलो आहे. त्या
देशात कनानी, हिथी, अमोरी, परिज्जी, हिव्वी व यबूसी हे लोक राहतात.
9 आणि आता इस्राएली लोकांचे रडणे माझ्यापर्यंत पोहोचले आहे आणि
इजिप्तचे लोक त्यांच्यावर कसा अत्याचार करीत आहेत हे मी पाहिले
आहे. 10 तर आता जा, माझ्या इस्राएलच्या लोकांना इजिप्तमधून बाहेर
काढून आणावे म्हणून मी तुला फारोहकडे पाठवित आहे.” 11 पण
मोशे परमेश्वराला म्हणाला, “मी कोण आहे की मी फारोहकडे जावे
आणि इस्राएली लोकांना इजिप्तमधून बाहेर आणावे?” 12 परमेश्वराने
म्हटले, “मी तुझ्याबरोबर असेन आणि मी तुला पाठविले आहे याचे
चिन्ह हेच असणार: जेव्हा तू इस्राएली लोकांना इजिप्त देशातून बाहेर
आणशील, तेव्हा याच डोंगरावर तुम्ही परमेश्वराची उपासना कराल.” 13
परंतु मोशेने परमेश्वराला विचारले, “जर मी इस्राएली लोकांकडे गेलो
आणि त्यांना सांगितले, तुमच्या पूर्वजांच्या परमेश्वराने मला पाठविले
आहे, तर ते मला विचारतील, त्यांचे नाव काय आहे? तर मी त्यांना
काय सांगू?” 14 परमेश्वर मोशेला म्हणाले, “जो मी आहे तो मी आहे.
इस्राएली लोकांना सांग: ‘मी आहे’ यांनी मला पाठवले आहे.” 15
परमेश्वर मोशेला आणखी म्हणाले, “इस्राएलास सांग, ‘अब्राहामाचा
परमेश्वर, इसहाकाचा परमेश्वर आणि याकोबाचा परमेश्वर या तुमच्या
पूर्वजांचा परमेश्वर याहवेहने मला तुमच्याकडे पाठविले आहे.’ “हेच माझे
सनातन नाव आहे, आणि सर्व पिढ्यांपर्यंत याच नावाने तुम्ही मला हाक
मारणार. 16 “जा आणि इस्राएलांच्या सर्व वडीलजनांना एकत्र बोलव
आणि त्यांना सांग, तुमचे पूर्वज अब्राहाम, इसहाक व याकोब यांचे
परमेश्वर याहवेह हे मला प्रकट झाले आणि म्हणाले, मी तुमच्याकडे लक्ष
दिले आहे आणि इजिप्तमध्ये तुमच्याबाबतीत जे काही घडत आहे ते मी
पाहिले आहे. 17 आणि इजिप्तमधील तुमच्या या दुःखातून तुम्हाला
बाहेर काढून कनानी, हिथी, अमोरी, परिज्जी, हिव्वी व यबूसी लोक
राहत असलेल्या दूध व मध वाहत्या देशात तुम्हाला घेऊन जाण्याचे
मी वचन दिलेले आहे. 18 “इस्राएलचे वडीलजन तुझा शब्द मानतील.
मग तू आणि वडीलजन इजिप्तच्या राजाकडे जाऊन त्याला सांगा,
याहवेह, इब्रींचे परमेश्वर, यांनी आम्हाला दर्शन देऊन सांगितले आहे
की आम्ही तीन दिवसांच्या प्रवासाच्या अंतरावर रानात जाऊन याहवेह
आमचे परमेश्वर यास यज्ञ अर्पण करावा म्हणून तू आम्हाला जाऊ दे.
19 पण मला माहीत आहे की, बलवान हाताने दबाव आणल्याशिवाय
इजिप्तचा राजा तुम्हाला जाऊ देणार नाही. 20 म्हणून मी आपला हात
लांब करेन व माझ्या चमत्कारांनी इजिप्तवर प्रहार करेन. मग शेवटी
तो तुम्हाला जाऊ देईल. 21 “आणि या लोकांवर इजिप्तच्या लोकांची
कृपादृष्टी होईल असे मी करेन म्हणजे तुम्ही रिक्तहस्ते बाहेर पडणार
नाही. 22 इजिप्त देशातील स्त्रियांकडून व तुमच्या शेजारणीकडून
प्रत्येक इस्राएली स्त्रीने सोन्याचे व चांदीचे दागिने व उत्तमोत्तम वस्त्रे
मागून घ्यावीत व तुम्ही ते आपल्या मुलांवर व मुलींवर चढवावे, याप्रकारे
तुम्ही इजिप्त देशातील लोकांना लुटाल.”

**4** मोशेने उत्तर दिले, “जर त्यांनी माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवला
नाही किंवा माझे ऐकले नाही आणि म्हणाले, ‘याहवेह तुला प्रकट
झालेच नाही’ तर मी काय करावे?” 2 याहवेहने त्याला विचारले, “तुझ्या
हातात काय आहे?” त्याने उत्तर दिले, “एक काठी!” 3 याहवेह त्याला
म्हणाले, “ती जमिनीवर टाक.” मोशेने ती जमिनीवर टाकली आणि
तिचा साप झाला आणि मोशे भिऊन त्यापासून दूर पळाला. 4 मग
याहवेहने त्याला सांगितले, “हात लांब करून सापाचे शेपूट धर.” तेव्हा
मोशेने त्या सापाला धरले आणि तो पुन्हा त्याच्या हातातील काठी
झाला. 5 याहवेहने मोशेला सांगितले “हे अशासाठी की याहवेह त्यांच्या
पूर्वजांचे परमेश्वर—अब्राहामाचे परमेश्वर, इसहाकाचे परमेश्वर आणि
याकोबाचे परमेश्वर—यांचे तुला निश्चितच दर्शन झाले आहे.” 6 मग
याहवेह त्याला म्हणाले, “तुझा हात तुझ्या झग्याच्या आत घाल.” मग
मोशेने आपला हात आपल्या झग्याच्या आत घातला आणि जेव्हा त्याने
हात बाहेर काढला, त्याची कातडी कोडाने भरली; तो हिमासारखा
पांढरा झाला होता. 7 “आता परत आपला हात झग्याच्या आत घाल,”

याहवेह म्हणाले आणि मोशेने परत आपला हात झग्याच्या आत घातला,
आणि जेव्हा तो बाहेर काढला, तो पूर्ववत त्याच्या शरीराच्या बाकीच्या
कातडीप्रमाणे झाला. 8 तेव्हा याहवेह म्हणाले, “पहिले चिन्ह पाहून
जर त्यांनी विश्वास ठेवला नाही, तर दुसरे चिन्ह पाहून कदाचित ते
विश्वास ठेवतील. 9 पण या दोन्ही चिन्हांवर त्यांनी विश्वास ठेवला नाही
तर तू नाईल नदीचे पाणी घेऊन ते कोरड्या जमिनीवर ओत म्हणजे
नदीतून घेतलेल्या पाण्याचे जमिनीवर रक्त होईल.” 10 मोशे याहवेहला
म्हणाला, “आपल्या सेवकास क्षमा करावी, प्रभू मी चांगला वक्ता नाही,
कधीही नव्हतो आणि आपण माझ्याबरोबर प्रत्यक्ष बोलत होता तेव्हाही
नाही. मी मुखदुर्बल व जिभेचा जड आहे.” 11 याहवेह त्याला म्हणाले,
“मनुष्यांना मुख कोणी दिले? त्यांना बहिरा किंवा मुका कोण करतो?
त्याला कोण दृष्टी देतो? किंवा कोण आंधळे करतो? तो मी याहवेह
नाही का? 12 आता जा; मी तुला बोलण्यास मदत करेन आणि काय
बोलावे ते तुला शिकवेन.” 13 पण मोशे म्हणाला, “तुमच्या सेवकास
क्षमा करावी, प्रभू. कृपा करून दुसऱ्या कोणाला पाठवा.” 14 तेव्हा
मोशेविरुद्ध याहवेहचा राग भडकला, ते म्हणाले, “लेवी अहरोन, तुझा
भाऊ, याच्याविषयी काय? मला ठाऊक आहे की तो चांगले बोलू
शकतो. तो तुला भेटावे म्हणून मार्गावर आहे, तुला पाहून त्याला फार
आनंद होईल. 15 तू त्याच्याशी बोलून त्याच्या मुखात शब्द घाल; मी
तुम्हा दोघांना बोलण्यास मदत करेन, आणि काय करावे हे शिकवेन.
16 तो तुझ्या वतीने लोकांबरोबर बोलेल, जसे तो तुझेच मुख आहे व
तू त्याला परमेश्वरासारखा होशील असे मी करेन. 17 परंतु ही काठी
आपल्या हातात घे, म्हणजे तिच्यायोगे तुला चिन्हे करता येतील.” 18
मग मोशे आपला सासरा इथ्रोकडे गेला आणि त्याला म्हणाला, “इजिप्त
देशात असलेल्या माझ्या स्वकियांकडे परत जाऊन त्यातील कोणी
जिवंत आहेत की नाही ते मला पाहू दे.” इथ्रोने उत्तर दिले, “जा. तुझे
भले होवो.” 19 मिद्यानात याहवेहने मोशेला म्हटले, “इजिप्त देशास जा,
कारण तुला ठार करावयास जे टपलेले होते, ते सर्व आता मरण पावले
आहेत.” 20 तेव्हा मोशे आपली पत्नी व मुले यांना गाढवावर बसवून
इजिप्तला परतला. त्याने आपल्या हाती परमेश्वराची काठी घेतली. 21
याहवेह मोशेला म्हणाले, “इजिप्त देशात पोहोचल्यावर फारोहसमोर
जाऊन, मी जे चमत्कार करण्याचे सामर्थ्य तुला दिले आहे, ते त्याच्यापुढे
सादर कर. पण मी फारोहचे हृदय कठीण करेन आणि तो लोकांना जाऊ
देणार नाही. 22 मग तू फारोहला सांग, ‘याहवेह असे म्हणतात: इस्राएल
माझा ज्येष्ठपुत्र आहे, 23 आणि मी तुला सांगितल्याप्रमाणे, माझ्या
पुत्राला माझी आराधना करण्यासाठी तू जाऊ द्यावेस. पण तू त्यांना
पाठविण्यास नकार दिला; तर मी तुझा ज्येष्ठपुत्र मारून टाकीन.’”
24 मोशे आपल्या मार्गात एके ठिकाणी मुक्कामास असताना, जसे
याहवेह त्याला मारणारच असे गाठले. 25 सिप्पोराहने एक धारदार
गारेचा तुकडा घेऊन, आपल्या मुलाची अग्रत्वचा कापून त्याची सुंता
केली व त्या अग्रत्वचेने तिने मोशेच्या पायांस स्पर्श केला आणि ती
त्याला म्हणाली, “खरोखर तुम्ही माझे रक्ताचे वर आहात.” 26 नंतर
याहवेहने त्याला सोडले. (“रक्ताचा वर” असे तिने सुंतेच्या बाबतीत
म्हटले.) 27 आता याहवेहने अहरोनाला म्हटले, “मोशेला भेटण्यासाठी
रानात जा.” तेव्हा अहरोन मोशेला परमेश्वराच्या पर्वतावर भेटला आणि
त्याचे चुंबन घेतले. 28 तेव्हा याहवेहने जे काही सांगावयास त्याला
पाठविले होते ते सर्व मोशेने अहरोनाला सांगितले आणि जी चिन्हे
करावयास सांगितली आहेत, त्याविषयी सुद्धा त्याला सांगितले. 29 मग
मोशे व अहरोन यांनी इस्राएलांच्या सर्व वडिलांना एकत्र बोलाविले, 30
आणि याहवेहने मोशेला जे सांगितले होते ते सर्वकाही अहरोनाने त्यांना
सांगितले. मोशेने लोकांच्या देखत चिन्हे करून दाखविली. 31 तेव्हा
या गोष्टीवर त्यांनी विश्वास केला. आणि जेव्हा त्यांनी हे ऐकले की
याहवेहने इस्राएली लोकांची भेट घेऊन त्यांचे दुःख पाहिले आहे, तेव्हा
सर्वांनी नमन करून उपासना केली.

**5** नंतर मोशे व अहरोन फारोहकडे जाऊन त्याला म्हणाले, “याहवेह
इस्राएलचे परमेश्वर असे म्हणतात: ‘माझ्या लोकांना जाऊ दे,
यासाठी की रानात जाऊन त्यांनी माझा उत्सव साजरा करावा.’” 2
यावर फारोह म्हणाला, “हा याहवेह कोण आहे, की मी त्याचे ऐकावे
व इस्राएली लोकांना जाऊ द्यावे? मी याहवेहला ओळखत नाही. मी
इस्राएलला जाऊ देणार नाही.” 3 तेव्हा ते फारोहला म्हणाले, “इब्री
लोकांच्या परमेश्वराने आम्हाला दर्शन दिले. आता आम्ही याहवेह,
आमच्या परमेश्वराला यज्ञ करावा म्हणून आम्हाला तीन दिवसांचा
प्रवास करून रानात जाऊ दे. नाही तर परमेश्वर आम्हाला पीडांनी
किंवा तलवारीने मारून टाकेल.” 4 यावर इजिप्तचा राजा म्हणाला,
“अहो मोशे व अहरोन, तुम्ही लोकांना त्यांच्या कामापासून का दूर नेत
आहात? आपल्या कामास परत जा!” 5 मग फारोह म्हणाला, “पाहा,
देशाच्या लोकांची संख्या पुष्कळपटीने वाढली आहे आणि तुम्ही त्यांच्या
कामात अडथळा आणत आहात.” 6 त्याच दिवशी फारोहने इस्राएलावर
नेमलेल्या मुकादमांना व अधिकाऱ्यांना हुकूम दिला: 7 “यापुढे लोकांना
विटा तयार करण्यासाठी गवत देऊ नका; आपल्यासाठी गवत त्यांनी
स्वतःच गोळा करावे. 8 तरीही पूर्वी ते जितक्या विटा तयार करीत
होते तितक्या त्यांनी केल्याच पाहिजे; त्यात घट होऊ नये. ते आळशी
आहेत; म्हणूनच, ‘आम्हाला रानात जाऊन आमच्या परमेश्वराला यज्ञ
करू दे,’ अशी ओरड करीत आहेत. 9 त्यांच्यासाठी काम अजून कठीण
करा, म्हणजे ते काम करत राहतील व खोट्या गोष्टींकडे ते लक्ष देणार
नाहीत.” 10 तेव्हा मुकादम व पुढारी यांनी इस्राएली लोकांना सांगितले,
“फारोहने असे सांगितले आहे की मी तुम्हाला यापुढे गवत देणार नाही.
11 तर जाऊन मिळेल तिथून आपल्यासाठी गवत शोधून आणा, मात्र
तुमचे काम मुळीच कमी करण्यात येणार नाही.” 12 तेव्हा लोक गवत
गोळा करून आणण्यासाठी इजिप्तभर पांगले. 13 मुकादम त्यांना जोर
देऊन म्हणत होते, “गवत असताना जेवढे काम करीत होते तितकेच
नेमून दिलेले काम रोज झाले पाहिजे.” 14 फारोहच्या मुकादमांनी
इस्राएली गटांवर नेमलेल्या पुढाऱ्यांना मार देऊन विचारले, “पूर्वीप्रमाणे,
काल व आज तुम्हाला नेमून दिलेले विटा तयार करण्याचे काम तुम्ही

का पूर्ण केले नाही?” 15 तेव्हा इस्राएलांचे पुढारी फारोहकडे जाऊन
त्याला विनवून म्हणाले, “तुम्ही आपल्या सेवकांशी असे निष्ठुरपणे का
वागता? 16 तुमच्या दासांना गवत नाही, तरीही ‘विटा तयार करा!’
असे सांगितले जाते, तुमच्या सेवकांना मारहाण करण्यात येते, परंतु
सगळा दोष तुमच्याच लोकांचा आहे.” 17 फारोहने उत्तर दिले, “तुम्ही
आळशी लोक आहात—आळशी! म्हणून तुम्ही म्हणता, ‘आम्हाला
याहवेहपुढे यज्ञ करावयास जाऊ द्यावे.’ 18 आता आपले काम करा.
तुम्हाला गवत पुरविले जाणार नाही, तरी नेमल्याप्रमाणेच विटा तयार
करून द्याव्या लागतील.” 19 “तुम्हाला नेमून दिल्याप्रमाणे रोजचे विटा
बनविण्याचे काम कमी केले जाणार नाही,” असे ऐकल्यावर आपण
अडचणीत सापडलो आहोत, असे इस्राएली पुढाऱ्यांच्या लक्षात आले.
20 फारोहकडून आल्यावर, अहरोन व मोशे आपल्याशी बोलण्यास
वाट पाहत आहेत असे त्यांनी पाहिले, 21 ते त्यांना म्हणाले, “याहवेह
तुम्हाकडे पाहो व तुमचा न्याय करो! तुम्ही दोघांनी फारोह व त्याच्या
अधिकाऱ्यांसमोर आम्हाला किळसवाणे असे केले आहे आणि आम्हाला
मारून टाकण्यासाठी त्यांच्या हाती तलवार दिली आहे.” 22 मोशे
याहवेहकडे जाऊन म्हणाला, “हे प्रभू, या लोकांवर तुम्ही अरिष्ट का
आणले? यासाठीच तुम्ही मला पाठवले आहे का? 23 मी तुमच्या नावाने
फारोहला बोललो, तेव्हापासून त्याने त्यांच्यावर त्रास आणला आहे
आणि तुम्ही आपल्या लोकांना सोडविले नाही.”

**6** तेव्हा याहवेह मोशेला म्हणाले, “आता मी फारोहला काय करतो,
ते तू पाहशील: कारण माझ्या पराक्रमी हातामुळे तो लोकांना जाऊ
देईल; कारण माझ्या बलवान हातामुळे तो त्यांना आपल्या देशाबाहेर
घालवून देईल.” 2 परमेश्वर मोशेला म्हणाले, मी याहवेह आहे. 3 मी
सर्वसमर्थ परमेश्वर म्हणून अब्राहाम, इसहाक व याकोब यांना प्रकट
झालो होतो, परंतु माझ्या याहवेह या नावाने मी स्वतःची त्यांना ओळख
करून दिली नव्हती. 4 ज्या कनान देशात ते पूर्वी परदेशी म्हणून राहत
होते, तो देश मी त्यांना देईन, असा मी त्यांच्याशी करार स्थापित
केला. 5 आता इस्राएली लोकांचे इजिप्तच्या दास्यातील विव्हळणे मी
ऐकले आणि माझ्या कराराची मला आठवण झाली आहे. 6 म्हणून
इस्राएली लोकांना सांग, “मी याहवेह आहे आणि मी तुम्हाला इजिप्तच्या
लोकांच्या ओझ्याखालून बाहेर आणेन, त्यांच्या कष्टप्रद गुलामगिरीतून
मी तुम्हाला मुक्त करेन आणि माझ्या लांब केलेल्या बाहूने व न्यायाच्या
महान कृत्यांनी तुमची सुटका करेन. 7 मी तुम्हाला माझे लोक म्हणून
स्वीकारेन आणि मी तुमचा परमेश्वर होईन, मग तुम्हाला कळून येईल
की, तुम्हाला इजिप्तच्या ओझ्याखालून सोडविणारा परमेश्वर याहवेह
मीच आहे. 8 आणि जो देश अब्राहाम, इसहाक व याकोब यांना देण्यास
मी हात उंच करून शपथ वाहिली, त्यात मी तुम्हाला आणेन आणि तो
तुम्हाला वतन म्हणून देईन. मीच याहवेह आहे.” 9 तेव्हा मोशेने हे सर्व
इस्राएली लोकांना सांगितले, परंतु त्यांची निराशा व कठोर परिश्रम
यामुळे त्यांनी त्याचे ऐकले नाही. 10 तेव्हा याहवेह मोशेला म्हणाले, 11
“जा, इजिप्तचा राजा फारोह याला सांग की, इस्राएल लोकांस त्याच्या
देशातून त्याने जाऊ द्यावे.” 12 परंतु मोशे याहवेहला म्हणाला, “मी
बोबड्या ओठांचा आहे म्हणून जर इस्राएल लोकच माझे ऐकत नाहीत,
तर फारोह माझे का ऐकेल?” 13 आता याहवेह मोशे व अहरोनाशी
इस्राएली लोक व इजिप्तचा राजा फारोह याविषयी बोलले आणि
इस्राएली लोकांना इजिप्तमधून बाहेर आणावे याविषयी आज्ञा केली. 14
त्यांच्या कुटुंब प्रमुखांची नावे ही: इस्राएलाचा प्रथमपुत्र रऊबेन याचे पुत्र:
हनोख व पल्लू, हेस्रोन व कर्मी. 15 शिमओनाचे पुत्र हे: यमुवेल, यामीन,
ओहाद, याखीन, जोहर आणि कनानी स्त्रीचा पुत्र शौल. 16 लेवीच्या
पुत्रांची ही क्रमानुसार नावे: गेर्षोन, कोहाथ व मरारी. 17 गेर्षोनाच्या
पुत्रांची त्यांच्या कुळांनुसार नावे ही: लिब्नी व शिमी. 18 कोहाथाच्या
पुत्रांची नावे: अम्राम, इसहार, हेब्रोन व उज्जीएल. (कोहाथ एकशे
तेहतीस वर्षे जगला.) 19 मरारीच्या पुत्रांची नावे: महली व मूशी. 20
अम्रामाने आपल्या वडिलांची बहीण योखबेद हिच्याबरोबर विवाह केला
आणि तिच्यापासून त्याला अहरोन व मोशे हे झाले. 21 इसहाराच्या
पुत्रांची नावे: कोरह, नेफेग व जिक्री. 22 उज्जीएलाच्या पुत्रांची नावे:
मिशाएल, एलसाफान व सिथ्री. 23 अहरोनाने अम्मीनादाबाची कन्या,
नहशोनाची बहीण एलीशेबा हिच्याबरोबर विवाह केला. तिच्यापासून
त्याला नादाब व अबीहू, एलअज़ार व इथामार झाले. 24 कोरहाच्या
पुत्रांची नावे: अस्सीर, एलकानाह व अबीयासाफ. 25 अहरोनाचा पुत्र
एलअज़ार याने पुटिएलाच्या कन्यांपैकी एकीबरोबर विवाह केला, आणि
तिच्यापासून त्याला फिनहास झाला. 26 ज्या अहरोन व मोशे यांना
याहवेहने सांगितले होते, “इजिप्तच्या भूमीतून सर्व इस्राएलच्या लोकांना
त्यांच्या तुकडीनुसार बाहेर आणा.” 27 हे तेच मोशे व अहरोन आहेत जे
इस्राएल लोकांना इजिप्तमधून बाहेर आणण्यासंबंधी इजिप्तचा राजा
फारोहबरोबर बोलले. 28 जेव्हा मोशे इजिप्तमध्ये होता तेव्हा याहवेह
त्याच्याशी बोलले, 29 याहवेह मोशेला म्हणाले, “मी याहवेह आहे. जा व
मी तुला जे काही सांगतो ते इजिप्तचा राजा फारोह याला सांग.” 30
परंतु मोशे याहवेहला म्हणाला, “कारण मी बोबड्या ओठांचा आहे,
फारोह माझे कसे ऐकणार?”

**7** मग याहवेह मोशेला म्हणाले, “पाहा, मी तुला फारोहसाठी
परमेश्वरासारखे केले आहे आणि तुझा भाऊ अहरोन तुझा संदेष्टा
असेल. 2 तुला जे काही मी आज्ञापिणार आहे ते सर्व तू बोलावयचे आणि
तुझा भाऊ अहरोन याने इस्राएली लोकांना त्याच्या देशातून जाऊ द्यावे
असे फारोहला सांगावयाचे आहे. 3 पण मी फारोहचे हृदय कठीण करेन
आणि इजिप्तमध्ये जरी मी माझी चिन्हे व चमत्कार बहुगुणित करेन, 4
तरीही फारोह तुझे ऐकणार नाही. मग मी इजिप्तवर माझा हात उगारेन
आणि मोठ्या पराक्रमी कृत्यांच्या न्यायाने मी माझे सैन्य, माझे इस्राएली
लोक यांना बाहेर काढेन. 5 आणि जेव्हा मी माझा हात इजिप्तविरुद्ध
उगारेन आणि इस्राएलास बाहेर आणेन, तेव्हा इजिप्तच्या लोकांना
समजेल की मीच याहवेह आहे.” 6 मग मोशे व अहरोन यांनी याहवेहच्या
आज्ञेप्रमाणे केले. 7 जेव्हा ते फारोहपुढे जाऊन बोलले तेव्हा मोशे ऐंशी
वर्षांचा व अहरोन त्र्याऐंशी वर्षांचा होता. 8 मग याहवेह मोशे व अहरोन

यास म्हणाले, 9 “जेव्हा फारोह तुम्हाला म्हणेल, ‘चमत्कार करून
दाखवा,’ तेव्हा अहरोनास सांग, ‘तुझी काठी घे आणि फारोहसमोर
खाली टाक,’ आणि तिचा साप होईल.” 10 मग मोशे व अहरोन
फारोहकडे गेले व याहवेहने त्यांना सांगितल्याप्रमाणेच केले. अहरोनाने
आपली काठी फारोहसमोर व त्याच्या सेवकांसमोर खाली जमिनीवर
टाकली आणि तिचा साप झाला. 11 तेव्हा फारोहने इजिप्तच्या ज्ञानी व
मांत्रिकांना बोलाविले. त्यांनीही आपल्या गुप्त ज्ञानानुसार तसेच केले:
12 प्रत्येकाने आपआपली काठी खाली टाकली आणि त्यांचा साप झाला.
पण अहरोनाच्या काठीने त्यांच्या काठ्या गिळून टाकल्या. 13 तरी
देखील याहवेहने सांगितल्याप्रमाणे फारोहचे हृदय कठीण झाले आणि
त्याने त्यांचे ऐकले नाही. 14 तेव्हा याहवेह मोशेला म्हणाले, “फारोहचे
हृदय कठीण आहे आणि तो इस्राएली लोकांना जाऊ देण्यास नाकारतो.
15 फारोह सकाळी बाहेर नदीकडे जात असताना त्याच्याकडे जा. नाईल
नदीच्या काठावर जाऊन त्याची भेट घे आणि ज्या काठीचा साप झाला
होता, ती काठी आपल्या हातात घे. 16 मग त्याला सांग, ‘याहवेह, इब्रींचे
परमेश्वर यांनी मला हे सांगण्यासाठी तुझ्याकडे पाठविले आहे: माझ्या
लोकांना जाऊ दे, यासाठी की त्यांनी रानात जाऊन माझी उपासना
करावी, पण अजूनही तू ऐकले नाहीस. 17 याहवेह असे म्हणतात:
यावरून मी याहवेह आहे हे तुला कळेल: माझ्या हातात जी काठी आहे,
ती मी नाईल नदीच्या पाण्यावर मारीन, आणि तिचे रक्त होईल. 18 मग
नाईल नदीतील मासे मरतील आणि नदीला दुर्गंध सुटेल; इजिप्तचे लोक
ते पाणी पिऊ शकणार नाहीत.’” 19 मग याहवेह मोशेला म्हणाले,
“अहरोनाला सांग, ‘आपली काठी घेऊन, इजिप्तचे पाणी म्हणजेच
नद्या, नाले, तलाव व सर्व तळे यावर आपला हात लांब कर; आणि त्याचे
रक्त होईल’ इजिप्तमध्ये सर्वत्र, लाकडी भांड्यात व दगडी पात्रात सुद्धा
रक्त असेल.” 20 मोशे व अहरोन यांनी याहवेहच्या आज्ञेप्रमाणे केले.
अहरोनाने आपल्या हातातील काठी, फारोहच्या व त्याच्या सेवकांच्या
समक्ष उंच केली आणि नाईल नदीच्या पाण्यावर मारली आणि नदीतील
सर्व पाण्याचे रक्तात रूपांतर झाले. 21 नाईल नदीतील सर्व मासे मेले, व
त्यामुळे पाण्याला इतकी दुर्गंधी सुटली की इजिप्तच्या लोकांना ते पाणी
पीता येईना, इजिप्त देशात सर्वत्र रक्त झाले होते. 22 पण इजिप्तच्या
जादूगारांनीही आपल्या गुप्तज्ञानाने पाण्याचे रक्त केले. फारोहचे मन
पुन्हा कठीण झाले व याहवेहने सांगितल्याप्रमाणे त्याने मोशे व अहरोन
यांचे ऐकले नाही. 23 आणि फारोहने हे मनावर न घेता, तो आपल्या
राजवाड्यात परतला. 24 आणि इजिप्तच्या लोकांनी नाईल नदीच्या
किनाऱ्यावर खणले, कारण नदीचे पाणी ते पिऊ शकत नव्हते. 25
याहवेहने नाईलवर प्रहार करून सात दिवस लोटले.

**8** मग याहवेह मोशेला म्हणाले, “फारोहकडे जा आणि त्याला सांग,
याहवेह असे म्हणतात, माझ्या लोकांना जाऊ दे, अशासाठी की
त्यांनी माझी उपासना करावी. 2 तू जर त्यांना जाऊ देण्याचे नाकारलेस,
तर तुझ्या संपूर्ण देशात मी बेडकांची पीडा पाठवेन. 3 नाईल नदी
बेडकांनी भरून जाईल. ते तुझ्या महालात व तुझ्या शयनगृहात, तुझ्या
अंथरुणात येतील, तुझ्या अधिकाऱ्यांच्या घरात आणि तुझ्या लोकांवर,
तुझ्या भट्ट्या व तुझ्या परातीत ते येतील. 4 बेडूक तुझ्यावर आणि
तुझ्या लोकांवर आणि तुझ्या सर्व अधिकाऱ्यांवर येतील.” 5 यानंतर
याहवेह मोशेला म्हणाले, “अहरोनाला सांग, त्याने त्याच्या हातात काठी
घेऊन आपला हात इजिप्तमधील सर्व ओढे, कालव्याच्या व तलावाच्या
दिशेला लांब करावा म्हणजे इजिप्त देशाच्या भूमीवर बेडूक येतील.” 6
त्याप्रमाणे अहरोनाने इजिप्तच्या पाण्यावर आपला हात लांब केला
आणि संपूर्ण देश बेडकांनी व्यापून गेला. 7 पण जादूगारांनीही आपल्या
गुप्तज्ञानाने तसेच केले व इजिप्त देशात बेडूक आणले. 8 मग फारोहने
मोशे व अहरोन यांना बोलावून सांगितले, “याहवेहकडे प्रार्थना करा की
त्यांनी माझ्यापासून व माझ्या लोकांपासून बेडूक दूर करावेत, मग मी
तुझ्या लोकांनी याहवेहला यज्ञ करावा म्हणून त्यांना जाऊ देईन.” 9
मोशे फारोहला म्हणाला, “हा सन्मान मी तुला देतो, की मी तुझ्यासाठी,
तुझ्या अधिकाऱ्यांसाठी व लोकांसाठी विनंती करावी अशी वेळ तू नेमून
ठेवावी, म्हणजे तुमच्यातून बेडूक नाहीसे होतील, नाईल नदीतील बेडके
मात्र राहतील.” 10 फारोह मोशेला म्हणाला, “उद्या.” मोशेने उत्तर दिले,
“तुझ्या सांगण्याप्रमाणे होईल, अशासाठी की तू जाणावे की याहवेह
आमचे परमेश्वर यासारखे इतर कोणीही नाही. 11 नाईल नदीतील
बेडूक सोडून बाकीचे सर्व बेडूक तू, तुझे घर, तुझे सेवक व तुझ्या
लोकांपासून निघून जातील.” 12 मग मोशे व अहरोन फारोहला सोडून
गेल्यानंतर, जी बेडके याहवेहने फारोहवर आणली होती, त्याविषयी
मोशेने याहवेहला विनंती केली. 13 मोशेने मागितल्याप्रमाणे याहवेहने
केले; आणि घरातील, अंगणातील व शेतातील सर्व बेडूक मरून गेले.
14 त्यांचे ढीग जमा झाले, व देशात त्यांची दुर्गंधी पसरली. 15 पण
सगळे व्यवस्थित झाले असे पाहून फारोहने आपले मन कठीण केले व
याहवेहने सांगितल्याप्रमाणे मोशे व अहरोनाचे त्याने ऐकले नाही. 16 मग
याहवेह मोशेला म्हणाले, “अहरोनाला सांग, ‘आपली काठी लांब कर व
भूमीच्या धुळीवर आपट,’ आणि संपूर्ण इजिप्तभर या धुळीची चिलटे
होतील.” 17 त्यांनी तसे केले, आणि जेव्हा अहरोनाने काठी घेऊन
आपला हात लांब केला आणि भूमीच्या धुळीवर मारली, तेव्हा मनुष्य व
जनावरे यावर चिलटे आली. इजिप्त देशभरातील सगळी धूळ चिलटे
अशी झाली. 18 परंतु जेव्हा जादूगारांनी आपल्या गुप्तज्ञानाने तसेच
करण्याचा प्रयत्न केला, ते करू शकले नाही. कारण सगळीकडे लोकांवर
व जनावरांवर चिलटे आली होती, 19 तेव्हा ते जादूगार फारोहला म्हणाले,
“ही परमेश्वराची अंगुली आहे.” पण याहवेहने सांगितल्याप्रमाणे फारोहचे
हृदय कठीण होते आणि त्याने त्यांचे ऐकले नाही. 20 यानंतर याहवेह
मोशेला म्हणाले, “पहाटे ऊठ व फारोह नदीवर जात असता त्याची भेट
घे आणि त्याला सांग याहवेह असे म्हणतात: माझ्या लोकांना जाऊ दे,
यासाठी की त्यांनी माझी उपासना करावी. 21 जर तू माझ्या लोकांना
जाऊ दिले नाहीस तर मी तुझ्यावर आणि तुझ्या सेवकांवर व तुझ्या
लोकांवर व तुमच्या घरांमध्ये गोमाश्यांचे थवे पाठवेन. इजिप्त लोकांची
घरे गोमाश्यांनी भरून जातील; व जमीन सुद्धा गोमाश्यांनी झाकली

जाईल. 22 “पण त्या दिवशी माझे लोक राहतात त्या गोशेन प्रांताशी मी
वेगळा वागेन; त्या ठिकाणी मात्र गोमाश्यांचे थवे नसतील, यावरून तुला
समजावे की, मी याहवेह या भूमीवर आहे. 23 माझे लोक व तुझे लोक
यांच्यामध्ये मी फरक करेन. हे चिन्ह उद्याच घडेल.” 24 आणि याहवेहने
तसेच केले. आणि पाहा, फारोहचा राजवाडा, त्याच्या अधिकाऱ्यांची
घरे व इजिप्तच्या लोकांची सर्व घरे गोमाश्यांच्या दाट थव्यांनी भरून
गेली; आणि गोमाश्यांनी देशाची नासाडी केली. 25 मग फारोहने मोशे व
अहरोन यांना बोलावून म्हटले, “जा, याच देशात तुमच्या परमेश्वराला
यज्ञ करा.” 26 पण मोशे म्हणाला, “तसे करणे बरे नाही. याहवेह
आमच्या परमेश्वराला जो यज्ञ आम्ही करतो तो इजिप्तच्या लोकांना
किळसवाणा वाटेल. आणि असा यज्ञ ज्याची ते किळस करतात तो जर
आम्ही केला, तर ते आम्हाला धोंडमार करणार नाही काय? 27 म्हणून
आम्ही तीन दिवसांचा प्रवास करून रानात जाऊन आमचे परमेश्वर
याहवेह आज्ञा देईल त्याप्रमाणे आम्ही बळी अर्पण करू.” 28 फारोहने
म्हटले, “तुमचा परमेश्वर याहवेह यास रानात जाऊन यज्ञ करावा म्हणून
मी तुम्हाला जाऊ देतो, परंतु फार दूर जाऊ नका. आता माझ्यासाठी
विनंती करा.” 29 मोशे त्याला म्हणाला, “मी तुला सोडून गेल्याबरोबर
याहवेहकडे तुझ्यासाठी विनंती करेन, आणि उद्या गोमाशा फारोहस
व त्याच्या अधिकाऱ्यांस व त्याच्या लोकास सोडून जातील. लोकांनी
याहवेहला यज्ञ करण्यास जाऊ नये म्हणून फारोहने पुन्हा फसवणूक
करू नये याची त्याने दक्षता घ्यावी.” 30 मग मोशे फारोह पुढून निघून
गेला व याहवेहकडे विनंती केली, 31 व मोशेने जे याहवेहपाशी मागितले
त्याप्रमाणे याहवेहने केले. फारोह, त्याचे सेवक व त्याच्या लोकांपासून
गोमाशा निघून गेल्या; एक सुद्धा गोमाशी बाकी राहिली नाही. 32
परंतु यावेळी सुद्धा फारोहने आपले हृदय कठीण केले आणि इस्राएली
लोकांना जाऊ दिले नाही.

**9** तेव्हा याहवेह मोशेला म्हणाले, “फारोहकडे जा व त्याला सांग,
‘इब्री लोकांचे परमेश्वर याहवेह असे म्हणतात, “माझ्या लोकांना
जाऊ दे, अशासाठी की त्यांनी माझी उपासना करावी.” 2 जर तू त्यांना
जाण्यास नकार दिला आणि त्यांना धरून ठेवलेस, 3 तर शेतातील
तुमची जनावरे—घोडे, गाढवे, उंट व शेळयामेंढ्यांचे कळप यांच्यावर
याहवेहचा हात भयानक पीडा आणेल. 4 परंतु याहवेह इस्राएलची
जनावरे व इजिप्तची जनावरे यात फरक करतील, असा की इस्राएली
लोकांची जनावरे मरणार नाहीत.’” 5 याहवेहने समय नेमून ठेवला व
म्हणाले, “याहवेह हे उद्या देशभर घडवून आणतील.” 6 आणि दुसऱ्या
दिवशी याहवेहने तसेच केले: इजिप्त लोकांची सर्व गुरे मरून गेली, परंतु
इस्राएल लोकांच्या कळपातील एकही जनावर मेले नाही. 7 फारोहने
शोध घेतला व जाणून घेतले की इस्राएलातील एकही जनावर मेले नाही,
तरीसुद्धा फारोहचे मन बदलले नाही व त्याने इस्राएली लोकांना जाऊ
दिले नाही. 8 नंतर याहवेह मोशे व अहरोन यांना म्हणाले, “भट्टीतून
मूठभर राख घेऊन मोशेने ती फारोहच्या देखत हवेत उधळावी. 9 व
संपूर्ण इजिप्त देशभर तिचा धुरळा होईल व त्यामुळे देशातील प्रत्येक
मनुष्य व पशू यांच्यावर गळवे फुटतील.” 10 तेव्हा त्यांनी भट्टीतील
राख घेतली व फारोहसमोर उभे राहून मोशेने ती राख हवेत उधळली,
तेव्हा मनुष्यांवर व सर्व जनावरांवर गळवे फुटली. 11 मांत्रिक मोशेसमोर
उभे राहू शकले नाहीत, कारण त्यांच्याही अंगावर व सर्व इजिप्तच्या
लोकांवर गळवे फुटली होती. 12 पण याहवेहने फारोहचे मन कठीण
केले व याहवेहने सांगितल्याप्रमाणे फारोहने मोशे व अहरोन यांचे ऐकले
नाही. 13 मग याहवेह मोशेला म्हणाले, “अगदी पहाटेच ऊठ, फारोहची
भेट घे आणि त्याला सांग, इब्री लोकांचे परमेश्वर याहवेह असे म्हणतात:
माझी उपासना करण्यासाठी माझ्या लोकांना जाऊ दे. 14 नाहीतर
यावेळी मी तुम्हा सर्वांवर म्हणजेच तू व तुझे अधिकारी व तुझे लोक या
सर्वांवर भयानक पीडा पाठवेन, ज्यामुळे तुझी खात्री होईल की, सर्व
पृथ्वीवर माझ्यासारखा इतर कोणी नाही. 15 वास्तविक मी आतापर्यंत
माझा हात लांब करून तुला व तुझ्या लोकांना अशा पीडेने मारून
या पृथ्वीतून तुम्हाला नष्ट केले असते. 16 परंतु मी तुला याच एका
उद्देशाने राखून ठेवले की, मी तुला माझे सामर्थ्य दाखवावे आणि माझे
नाव अखिल पृथ्वीवर जाहीर व्हावे. 17 तू अजूनही माझ्या लोकांच्या
विरोधात राहून त्यांना जाऊ देत नाहीस. 18 म्हणून उद्या याच वेळेला,
इजिप्तची स्थापना झाली तेव्हापासून कधी झाला नाही अशा भयानक
गारांचा वर्षाव मी करेन. 19 म्हणून आपआपली जनावरे आणि तुमचे
जे काही रानात आहे ते आत आश्रयास आणायला सांग, कारण जे
मनुष्य व जनावरे आत आली नाहीत, त्या सर्वांवर गारा पडतील व ते
मरतील.” 20 फारोहच्या ज्या अधिकाऱ्यांना याहवेहच्या शब्दाचे भय
वाटले, त्यांनी आपले चाकर व गुरे लगबगीने आत आणली. 21 पण
ज्यांनी याहवेहच्या शब्दाकडे दुर्लक्ष केले, त्यांनी आपले दास व पशू
यांना रानातच सोडले. 22 मग याहवेहने मोशेला सांगितले, “तू आपला
हात आकाशाकडे उंच कर म्हणजे संपूर्ण इजिप्त देशावर—मनुष्य,
जनावरे व शेतात जे काही आहे त्यावर—गारा पडतील.” 23 जेव्हा
मोशेने आपली काठी आकाशाकडे लांब केली, तेव्हा याहवेहने ढगांच्या
गडगडाटांसह गारा पाठविल्या व विजा भूमीवर पडल्या. अशाप्रकारे
याहवेहने इजिप्तवर गारांची वृष्टी केली. 24 गारा पडून चहूकडे विजा
लखलखत होत्या, इजिप्त देशाची स्थापना झाली तेव्हापासून कधी
झाले नाही असे भयंकर वादळ उठले. 25 गारांनी इजिप्त देशाच्या
शेतातील सर्वकाही; मनुष्य असो वा जनावरे यांचा नाश केला; शेतात
पिकत असलेले पीक व रानातील प्रत्येक झाड नाहीसे केले. 26 फक्त
एकच असे ठिकाण होते जिथे गारा पडल्या नाही; तो गोशेन प्रांत,
ज्या ठिकाणी इस्राएली लोक राहत होते. 27 मग फारोहने मोशे व
अहरोन यांना बोलावून घेतले, व तो त्यांना म्हणाला, “यावेळी मी पाप
केले आहे, याहवेह न्यायी आहेत, परंतु मी व माझे लोक चुकलो. 28
याहवेहला विनंती करा, कारण मेघांचा हा गडगडाट व गारा आता असह्य
झाले आहे. मी तुम्हाला जाऊ देईन व तुम्हाला इथे राहण्याची गरज
नाही.” 29 मोशे म्हणाला, “शहराबाहेर जाताच प्रार्थनेत याहवेहकडे मी
माझे हात पसरेन. मग गडगडाट थांबेल व गारांचा वर्षावही होणार नाही.

यावरून तुला कळेल की, पृथ्वी याहवेहची आहे. 30 पण मला माहीत आहे की, तू व तुझे सेवक अजूनही याहवेह परमेश्वराचे भय बाळगत नाहीत.” 31 (आता जवस व सातू या पिकांचा पूर्णपणे नाश झाला होता, कारण सातू कापणीला आला होता व जवसाला फुले आली होती. 32 पण गहू व खपल्याचा गहू यांचा नाश झाला नाही, कारण ते अजून पिकले नव्हते.) 33 मग मोशे फारोहपासून निघून शहराबाहेर गेला व त्याने आपले हात याहवेहकडे पसरले; मेघगर्जना व गारांचा वर्षाव थांबला व संपूर्ण देशावर पडणारा पाऊस बंद झाला. 34 पण फारोहने जेव्हा पाहिले की मेघगर्जना, गारा व पाऊस हे थांबले आहे, त्याने पुन्हा पाप केले: त्याने व त्याच्या सरदारांनी आपले हृदय कठीण केले. 35 याहवेहने मोशेला सांगितल्याप्रमाणे फारोहने इस्राएली लोकांना जाऊ देण्याचे नाकारले, कारण त्याचे हृदय कठीण झाले होते.

**10** मग याहवेह मोशेला म्हणाले, “फारोहकडे जा, कारण मी त्याचे व त्याच्या अधिकाऱ्यांची मने कठीण केली आहेत, अशासाठी की मी त्यांच्यामध्ये माझे चमत्कार करावे 2 व तुम्हीही आपल्या लेकरांस व नातवंडास मी इजिप्तच्या लोकांशी कसे कठोरपणे वागलो व त्यांच्यामध्ये माझे चमत्कार कसे केले ते सांगावे आणि तुम्हाला समजावे की मी याहवेह आहे.” 3 मग मोशे व अहरोन फारोहकडे गेले व त्याला म्हणाले, “इब्री लोकांचे परमेश्वर याहवेह असे म्हणतात, ‘अजून किती काळ माझ्यासमोर नम्र होण्यास तू नाकारशील? माझ्या लोकांना जाऊ दे, म्हणजे ते माझी उपासना करतील. 4 तू जर त्यांना जाऊ दिले नाहीस, तर उद्या मी तुझ्या संपूर्ण देशावर टोळ आणेन. 5 ते तुझी भूमी आच्छादून टाकतील की, जमीन मुळीच दिसणार नाही, शेतात असलेल्या झाडांसह, गारांच्या व पावसाच्या मारातून जे पीक वाचले आहे त्याचा ते नाश करतील, एवढेच नव्हे तर वनात वाढणारी झाडेही ते खाऊन टाकतील. 6 ते तुझी घरे व तुझ्या अधिकाऱ्यांची व सर्व इजिप्तच्या लोकांची घरे भरून टाकतील; इजिप्तच्या इतिहासात तुझे वडील व तुझे पूर्वज या देशाचे रहिवासी झाले तेव्हापासून आजपर्यंत असे झालेले त्यांनी कधी पाहिले नाही.’” मग मोशे वळून फारोहपासून निघून गेला. 7 फारोहचे अधिकारी त्याला म्हणाले, “किती काळ हा मनुष्य आम्हाला पाश म्हणून असणार? याहवेह त्यांचा परमेश्वर यांची उपासना करावी म्हणून या लोकांना जाऊ द्या. इजिप्तचा नाश झाला आहे याची तुम्हाला जाणीव नाही काय?” 8 मग मोशे व अहरोन यांना फारोहकडे पुन्हा बोलाविण्यात आले. फारोह त्यांना म्हणाला, “याहवेह तुमचा परमेश्वर याची उपासना करावी म्हणून तुम्ही जा, पण कोण कोण जाणार हे मला सांग.” 9 मोशेने उत्तर दिले “आम्ही आमचे तरुण व वृद्ध, आमचे पुत्र व कन्या आणि आमची शेरडेमेंढरे व गुरे या सर्वांसह जाणार. कारण आम्ही सर्वांनीच याहवेहचा सण साजरा करणे आवश्यक आहे.” 10 तेव्हा फारोह त्यांना म्हणाला, “मी तुमच्या मुलाबाळांस व स्त्रियांना जाऊ दिले तर याहवेह तुम्हाबरोबर असो! खचितच तुम्ही दुष्टता योजली आहे. 11 नाही! याहवेहची उपासना करण्यासाठी फक्त पुरुषांनीच जावे, कारण तशीच मागणी तुम्ही करत होता.” मग मोशे व अहरोनास फारोहच्या पुढून हाकलून देण्यात आले. 12 मग याहवेह मोशेला म्हणाले, “तू आपला हात इजिप्त देशावर लांब कर म्हणजे टोळधाड येईल व गारांच्या वर्षावातून वाचलेली वनस्पती जी भूमीवर वाढत आहे त्या सर्वांचा ती नाश करेल.” 13 तेव्हा मोशेने आपली काठी इजिप्त देशावर उगारली, आणि याहवेहने तो संपूर्ण दिवस व ती संपूर्ण रात्र पूर्वेचा वारा देशावर वाहविला. सकाळपर्यंत वाऱ्याने टोळ आणले. 14 त्यांनी संपूर्ण इजिप्त देश व्यापून टाकला व ते मोठ्या संख्येने देशाच्या प्रत्येक भागात जाऊन राहिले. इतिहासात अशी भयंकर टोळांची पीडा ना कधी आली होती ना पुढे कधी येणार. 15 कारण टोळांनी जमिनीचा पृष्ठभाग अगदी काळा होईपर्यंत झाकून टाकला व गारातून जे वाचले होते ते सर्वकाही—शेतातील सर्व पीक व झाडावरील प्रत्येक फळ त्यांनी फस्त केले. संपूर्ण इजिप्त देशात ना झाडे ना वनस्पती, काहीही हिरवे असे राहिले नाही. 16 मग फारोहने मोशे व अहरोन यांना त्वरेने बोलावून घेतले आणि म्हटले, “मी तुमच्या याहवेह परमेश्वराविरुद्ध व तुमच्याविरुद्ध पाप केले आहे. 17 परत एकदा माझ्या पापाची मला क्षमा करा आणि तुमच्या याहवेह परमेश्वराने ही पीडा माझ्यापासून दूर करावी म्हणून त्यांच्याकडे विनंती करा.” 18 मग मोशे फारोह पुढून निघून गेला व त्याने याहवेहकडे प्रार्थना केली; 19 आणि याहवेहने पश्चिमेच्या दिशेने वाऱ्याची दिशा बदलली व त्या वाऱ्याने टोळांना एकवटून तांबड्या समुद्रात टाकले. इजिप्तमध्ये एकही टोळ शिल्लक राहिला नाही. 20 पण याहवेहने फारोहचे हृदय कठीण केले व त्याने इस्राएली लोकांना जाऊ दिले नाही. 21 नंतर याहवेहने मोशेला म्हटले, “तू आपला हात वर आकाशाकडे लांब कर, म्हणजे इजिप्त देशावर अंधार पडेल—इतका अंधार की त्याला लोक चाचपडतील.” 22 तेव्हा मोशेने आपला हात आकाशाकडे लांब केला, आणि तीन दिवसांसाठी निबिड अंधकाराने संपूर्ण इजिप्त देश व्यापून टाकला. 23 कोणी कोणाला पाहू शकत नव्हते व तीन दिवस कोणी आपल्या ठिकाणाहून हलला नाही, परंतु जिथे इस्राएली लोक राहत होते तिथे मात्र प्रकाश होता. 24 तेव्हा फारोहने मोशेला बोलावून घेतले. तो म्हणाला, “जा, आणि याहवेहची उपासना करा. तुमच्या स्त्रिया व लेकरे सुद्धा तुमच्याबरोबर जाऊ शकतात; तुमची जनावरे व शेरडेमेंढरे मात्र सोडून जा.” 25 परंतु मोशे म्हणाला, “याहवेह, आमचा परमेश्वर यास आम्ही यज्ञ व होमबली अर्पण करावे म्हणून जाऊ दे. 26 आमची जनावरे सुद्धा आमच्याबरोबर गेली पाहिजेत; एक खूर देखील आम्ही मागे ठेवणार नाही. आम्हाला त्यांच्यापैकी काहींचा याहवेह आमचे परमेश्वर यांची उपासना करण्यास वापर करावयाचा आहे, आणि त्यात आम्ही काय वापरावे हे आम्ही त्या ठिकाणी पोहोचेपर्यंत आम्हाला समजणार नाही.” 27 पण याहवेहने फारोहचे हृदय कठीण केले, व तो त्यांना जाऊ देण्यास मान्यता देईना. 28 फारोह मोशेला म्हणाला, “माझ्यासमोरून चालता हो! आपले तोंडसुध्दा मला पुन्हा दाखवू नकोस! ज्या दिवशी तू माझे तोंड पाहशील त्या दिवशी तू मरशील.” 29 “तू म्हणालास तसेच होईल,” मोशे म्हणाला. “मी पुन्हा तुझ्यासमोर उभा राहणार नाही.”

11 मग याहवेह मोशेला म्हणाले, “मी फारोह व इजिप्तवर आणखी
एक पीडा आणेन. त्यानंतर तो तुम्हाला या ठिकाणाहून जाऊ देईल
आणि जेव्हा तो हे करेल तेव्हा तो तुम्हाला अक्षरशः देशातून घालवून
देईल. 2 सर्व इस्राएली लोकांना सांग, की स्त्री व पुरुषांनी आपआपल्या
शेजाऱ्यांकडून चांदीचे व सोन्याचे दागिने मागून घ्यावेत.” 3 (आता
याहवेहने इजिप्तमधील लोकांची मने इस्राएलांना अनुकूल होतील असे
केले, मोशे स्वतः इजिप्तमध्ये फारोहच्या सेवकांच्या व इजिप्तच्या
लोकांच्या दृष्टीत फार थोर झाला होता.) 4 मग मोशे म्हणाला, “याहवेह
असे म्हणतात: ‘मध्यरात्रीच्या सुमारास मी इजिप्तमधून फिरेन. 5
इजिप्त देशातील प्रत्येक प्रथम जन्मलेला पुत्र मरण पावेल, फारोह
जो राजासनावर बसतो त्याच्या प्रथम पुत्रापासून त्याच्या जात्यावर
दळत बसणाऱ्या गुलाम स्त्रीच्या प्रथम पुत्रापर्यंत आणि जनावरातील
प्रथम जन्मलेले प्रत्येक वत्स मरेल. 6 संपूर्ण इजिप्त देशभर पूर्वी कधी
झाला नाही व पुढे कधी होणार नाही असा आकांत होईल. 7 परंतु
इस्राएली व्यक्तीवर किंवा पशूंवर कुत्रेदेखील भुंकणार नाही.’ यावरून मी
याहवेह इजिप्त व इस्राएल यांच्यामध्ये कसा भेद करतो, हे तुम्हाला
समजेल. 8 तुझे हे सर्व सेवक माझ्याकडे येतील व माझ्या पाया पडून
मला म्हणतील, ‘तू व तुझे अनुसरण करणारे सर्व लोक निघून जा!’
त्यानंतर मी निघून जाईन.” मग मोशे रागाने संतापून फारोहसमोरून
निघून गेला. 9 याहवेहने मोशेला आधीच सांगितले होते, “इजिप्त
देशात मी पुष्कळ चमत्कार करावे म्हणून फारोह तुमचे ऐकण्यास
नाकारेल.” 10 मोशे व अहरोन यांनी फारोहसमक्ष हे सर्व चमत्कार केले,
पण याहवेहने फारोहचे हृदय कठीण केले व त्याने इस्राएली लोकांना
देशाबाहेर जाण्यास परवानगी दिली नाही.

12 मग इजिप्तमध्ये याहवेह मोशे व अहरोन यांच्याशी बोलले, 2 “हा
महिना तुमच्यासाठी पहिला महिना, वर्षाचा पहिला महिना असेल.
3 तू इस्राएलाच्या सर्व समुदायाला जाहीर कर की, या महिन्याच्या
दहाव्या दिवशी, प्रत्येकाने आपल्या कुटुंबासाठी एक कोकरू घ्यावे,
प्रत्येक घराण्यासाठी एक कोकरू. 4 जर एखादे कुटुंब एका कोकराच्या
मानाने लहान असले तर शेजारच्या कुटुंबाबरोबर, त्यांच्यातील लोकांची
संख्या लक्षात घेऊन प्रत्येक व्यक्ती किती खाईल यानुसार अंदाज
घेऊन, किती कोकरे लागतील हे ठरवावे. 5 एक वर्षाचे निर्दोष नर
कोकरू असावे, आणि तुम्ही ते मेंढरांतून अथवा शेळयांतून घ्यावे. 6
या महिन्याच्या चौदाव्या दिवसापर्यंत त्यांची काळजी घ्यावी आणि
इस्राएली लोकातील सर्वांनी सायंकाळी ते कापावेत. 7 ज्या घरांमध्ये ते
खातील त्या घराच्या दोन्ही दारपट्ट्यांना व कपाळपट्टीला त्या कोकराचे
रक्त घेऊन ते लावावे. 8 त्या रात्री प्रत्येकाने त्या कोकऱ्याचे विस्तवावर
भाजलेले मांस, बेखमीर भाकर व कडू भाजी यांच्याबरोबर खावे. 9 मांस
कच्चे किंवा पाण्यात उकळून खाऊ नये, तर विस्तवावर भाजून, त्याचे
डोके, पाय व आतड्यांसह खावे. 10 त्यातील काहीही सकाळपर्यंत
राहू देऊ नये; जर काही सकाळपर्यंत उरले तर ते जाळून टाकावे. 11
तुम्ही ते असे खावे: तुमच्या कंबरा बांधलेल्या, तुमची पायतणे पायात
घातलेली व हातात काठी घेऊन ते घाईघाईने खावे. हा याहवेहचा
वल्हांडण आहे. 12 “कारण त्याच रात्री मी संपूर्ण इजिप्त देशामधून
संचार करेन व सर्व मनुष्यांचे व जनावरांचे प्रथमवत्स मारून टाकेन
आणि त्यांच्या सर्व दैवतांवर न्याय आणेन; मी याहवेह आहे. 13 तुम्ही
राहत असलेल्या घरांच्या दारांवर असलेले रक्त हे तुमच्याकरिता चिन्ह
असेल, जेव्हा मी ते रक्त पाहीन, तेव्हा मी तुम्हाला ओलांडून पुढे
जाईन. जेव्हा मी इजिप्तला तडाखा देईन, तेव्हा कोणतीही विनाशी
पीडा तुम्हाला स्पर्श करणार नाही. 14 “हा दिवस तुम्ही याहवेहचा सण
म्हणून पिढ्यान् पिढ्यांपर्यंत सर्वकाळच्या नियमाने पाळावा. 15 सात
दिवस तुम्ही खमीर नसलेली भाकर खावी. पहिल्या दिवशी आपल्या
घरातून खमीर काढून टाकावे, कारण जे कोणी या सात दिवसात
खमीर घातलेल्या वस्तू खाईल, त्याला इस्राएलातून बेदखल करण्यात
यावे. 16 पहिल्या दिवशी एक पवित्र सभा भरवावी आणि सातव्या
दिवशी दुसरी सभा. या दिवसात प्रत्येकाने खाण्यासाठी अन्न तयार
करण्याशिवाय इतर कोणतेही काम करू नये. 17 “बेखमीर भाकरीचा
सण पाळावा, कारण याच दिवशी मी तुमच्या सैन्यांना इजिप्तमधून बाहेर
आणले. पिढ्यान् पिढ्यांपर्यंत सर्वकाळच्या नियमाने तो पाळावा. 18
पहिल्या महिन्यात चौदाव्या दिवसाच्या संध्याकाळपासून एकविसाव्या
दिवसाच्या संध्याकाळपर्यंत तुम्ही खमीर नसलेली भाकर खावी. 19 या
सात दिवसात तुमच्या घरात खमीर सापडू नये. आणि कोणीही, तो
परदेशी असो वा देशात जन्मलेला असो, जो खमीर घातलेले पदार्थ
खाईल तर त्याला इस्राएलाच्या समाजातून वाळीत टाकले जावे. 20
खमीर घातलेले काहीही खाऊ नये. तुम्ही कुठेही राहत असला तरी तुम्ही
बेखमीर भाकरीच खावी.” 21 मग मोशेने इस्राएलातील वडीलजनांना
बोलाविले व म्हटले, “तुम्ही लगेच जा व आपआपल्या कुटुंबाप्रमाणे
कोकरू निवडून घ्या व वल्हांडणाच्या कोकराचा वध करा. 22 एजोबाची
जुडी घेऊन ती पात्रात घेतलेल्या रक्तात बुडवा व त्याने ते रक्त घराच्या
दरवाजाच्या बाजूंवर व कपाळपट्टीवर लावा. तुम्हापैकी कोणीही सकाळ
होईपर्यंत आपल्या घराबाहेर पडू नये. 23 कारण याहवेह या देशात संचार
करतील व इजिप्तवासियांचा संहार करतील. पण ज्या दरवाजाच्या
बाजूंवर व कपाळपट्टीवर रक्त दिसेल, याहवेह त्या घराला ओलांडून पुढे
जातील व विनाशकाला तुम्हाला मारण्यास तुमच्या घरात येऊ देणार
नाहीत. 24 “तुमच्यासाठी व तुमच्या वंशजांसाठी हा सर्वकाळचा नियम
असावा. 25 वचन दिल्याप्रमाणे जो देश याहवेह तुम्हाला देणार आहेत,
त्या देशात तुम्ही जाल, तिथेही हा विधी पाळावा. 26 जेव्हा तुमची लेकरे
तुम्हाला विचारतील, ‘या विधीचा अर्थ काय आहे?’ 27 तेव्हा त्यांना
सांगा, ‘हा याहवेहसाठी वल्हांडणाचा यज्ञ आहे, ज्यांनी इजिप्तच्या
लोकांचा संहार करून त्यांचा नाश केला, आणि इस्राएली लोकांची घरे
ओलांडून गेले आणि आम्हाला वाचविले.’” तेव्हा लोकांनी आपली
मस्तके नमवून त्यांना नमन केले व त्यांची आराधना केली. 28 मग
याहवेहने मोशे व अहरोन यांना आज्ञा दिल्याप्रमाणे इस्राएली लोकांनी
केले. 29 मध्यरात्रीत याहवेहने इजिप्त देशातील प्रथम जन्मलेले सर्व

मारून टाकले. सिंहासनावर बसणाऱ्या फारोहच्या प्रथम पुत्रापासून
तुरुंगात असलेल्या कैद्याच्या प्रथम जन्मलेल्या पुत्रापर्यंत, जनावरांचे
प्रथम जन्मलेले वत्स देखील मारून टाकले. 30 तेव्हा फारोह, त्याचे
अधिकारी व सर्व इजिप्तचे लोक रात्री जागे झाले आणि इजिप्तमध्ये
मोठा आकांत झाला, कारण ज्या घरात मृत्यू झाला नाही, असे एकही
घर नव्हते. 31 तेव्हा फारोहने मोशे व अहरोन यांना रात्री बोलावून म्हटले,
“उठा! तुम्ही व इस्राएली लोक माझ्या लोकांना सोडून जा! जा, आणि
तुम्ही मागितल्याप्रमाणे याहवेहची उपासना करा. 32 तुमची शेरडेमेंढरे
आणि गुरे घ्या आणि निघून जा आणि मलाही आशीर्वाद द्या.” 33
इस्राएली लोक देशाबाहेर त्वरेने जावे म्हणून इजिप्तच्या लोकांनी त्यांना
विनंती केली. कारण ते म्हणाले, “नाहीतर आम्ही सर्व मरून जाऊ!” 34
मग इस्राएली लोकांनी खमीर घालण्यापूर्वी कणीक परातीसह कापडात
बांधून खांद्यावर टाकली. 35 मोशेने सांगितल्याप्रमाणे इस्राएल लोकांनी
इजिप्तच्या लोकांकडून चांदीचे व सोन्याचे दागिने व कपडे मागून
घेतले. 36 इजिप्तचे लोक इस्राएली लोकांवर कृपादृष्टी करतील असे
याहवेहने केले आणि जे काही त्यांनी मागितले ते सर्व त्यांनी त्यांना दिले;
अशाप्रकारे त्यांनी इजिप्तच्या लोकांना लुटले. 37 इस्राएल लोकांनी
रामसेस पासून ते सुक्कोथ पर्यंत प्रवास केला. स्त्रिया व लेकरे या
खेरीज सुमारे सहा लाख पुरुष पायी चालणारे होते. 38 इतर पुष्कळ
लोकसुद्धा त्यांच्याबरोबर निघाले होते, त्याचप्रमाणे शेरडेमेंढरांचे कळप
व जनावरेही होती. 39 जी कणीक इस्राएल लोकांनी इजिप्तमधून बरोबर
आणली होती, त्याच्या त्यांनी भाकरी भाजल्या. ते कणीक बेखमीर
होते, कारण जेव्हा त्यांना इजिप्तमधून घालवून दिले, स्वतःसाठी अन्न
तयार करावयाला वेळ नव्हता. 40 इस्राएली लोक इजिप्तमध्ये राहिले
तो कालावधी चारशेतीस वर्षांचा होता. 41 चारशेतिसाव्या वर्षाच्या
शेवटच्या दिवशी याहवेहच्या सैन्यांनी इजिप्त देश सोडला. 42 ही रात्र
याहवेहने इस्राएली लोकांना इजिप्त देशातून बाहेर आणण्यासाठी वेगळी
करून ठेवली, ही रात्र इस्राएल लोकांनी पिढ्यान् पिढ्या याहवेहला
सन्मान म्हणून पाळावी. 43 नंतर याहवेह मोशे व अहरोन यांना म्हणाले,
“वल्हांडणाच्या भोजनाचे हे नियम आहेत: “कोणत्याही विदेशी व्यक्तीने
ते खाऊ नये. 44 पण तू मोल देऊन विकत घेतलेला गुलाम व ज्याची
सुंता तू करून घेतली आहे त्याने ते खावे. 45 पण तात्पुरता रहिवासी
किंवा मोलकरी यांनी ते खाऊ नये. 46 “ते घरातच खावयाचे आहे;
त्यातील मांस घराबाहेर घेऊन जाऊ नये. त्यातील एकही हाड मोडू नये.
47 इस्राएलाच्या सर्व समुदायाने हा सण पाळावा. 48 “तुमच्याबरोबर
राहणाऱ्या विदेशी व्यक्तीला याहवेहचा हा वल्हांडणाचा सण पाळावयाचा
असेल, तर त्यांच्यातील सर्व पुरुषांनी सुंता करवून घ्यावी; मगच ते या
देशात जन्मलेल्याप्रमाणे हा सण पाळू शकतील. कोणत्याही बेसुंती
पुरुषाने ते खाऊ नये. 49 तुमच्यामध्ये असलेले स्वदेशी असो वा
तुमच्यामध्ये असलेले विदेशी असो, दोघांनाही एकच नियम असावा.”
50 तेव्हा याहवेहने मोशे व अहरोन यांना सूचना दिल्याप्रमाणे इस्राएली
लोकांनी केले. 51 याच दिवशी याहवेहने वंशानुसार इस्राएली लोकांना
इजिप्त देशातून बाहेर आणले.

**13** याहवेहने मोशेला सांगितले, 2 “इस्राएली लोकांचे प्रथम जन्मलेले
प्रत्येक नर मला समर्पित कर. उदरातून आलेले इस्राएलातील
प्रत्येक प्रथम संतान माझ्या मालकीचे आहे, ते मनुष्याचे असो किंवा
पशूंचे.” 3 तेव्हा मोशे लोकांना म्हणाला, हा दिवस स्मरणात ठेवा,
याच दिवशी याहवेहने आपल्या पराक्रमी हाताने इजिप्त देशातून,
गुलामगिरीतून तुम्हाला बाहेर आणले. खमीर असलेले तुम्ही काहीही
खाऊ नये. 4 आज, अवीव महिन्यात तुम्ही निघालात. 5 जेव्हा तुम्हाला
कनानी, हिथी, अमोरी, यबूसी आणि हिव्वी यांचा देश, ज्यात दूध व मध
वाहतो, ते तुम्हाला देतील अशी तुमच्या पूर्वजांशी शपथ वाहिली, त्यात
याहवेह तुम्हाला नेतील; तेव्हा या महिन्यात हा विधी तुम्ही पाळावा. 6
सात दिवस तुम्ही बेखमीर भाकर खावी आणि सातव्या दिवशी याहवेहचा
उत्सव साजरा करावा. 7 या सात दिवसात बेखमीर भाकर खावी;
खमीर असलेले काहीही तुमच्यात आढळू नये किंवा तुमच्या सीमेत
कुठेही खमीर दृष्टीस पडू नये. 8 त्या दिवशी आपल्या लेकरांना सांगा,
जेव्हा आम्ही इजिप्तमधून बाहेर आलो तेव्हा याहवेहने आमच्यासाठी
जे केले, त्याचे चिन्ह म्हणून आम्ही हे करतो. 9 हे तुम्हाला तुमच्या
हातावरील खूण व कपाळावर स्मरणचिन्हासारखे असणार. याहवेहचा
हा नियम तुमच्या मुखात असावा. कारण याहवेहने आपल्या पराक्रमी
हाताने तुम्हाला इजिप्त देशातून बाहेर आणले. 10 दरवर्षी हा सण तुम्ही
ठराविक वेळी पाळावा. 11 “तुम्हाला व तुमच्या पूर्वजांना दिलेल्या
शपथेनुसार याहवेह तुम्हाला कनानी लोकांच्या देशात घेऊन जातील व
तो देश तुम्हाला देतील, 12 तेव्हा प्रत्येक उदराचे पहिले संतान तुम्ही
याहवेहला द्यावे. तुमच्या पशूंचे प्रथम जन्मलेले नर याहवेहचे आहेत. 13
गाढवाच्या प्रथम जन्मलेल्या शिंगरूला कोकरू खंडणी म्हणून भरून
सोडव, पण खंडणी भरून ते तू सोडविले नाहीस, तर त्याची मान मोड.
मनुष्याच्या प्रत्येक नराला खंडणी भरून सोडव. 14 “भविष्यकाळात
तुमची मुले तुम्हाला विचारतील, ‘याचा अर्थ काय आहे?’ तेव्हा त्यांना
सांगा, ‘याहवेहने आपल्या पराक्रमी हाताने आम्हाला इजिप्तमधून,
त्यांच्या गुलामगिरीतून बाहेर आणले. 15 जेव्हा फारोह हट्टाने आम्हाला
जाऊ देत नव्हता, तेव्हा याहवेहने संपूर्ण इजिप्त देशातील लोकांचे व
जनावरांचे प्रथम जन्मलेले मारून टाकले. म्हणून प्रत्येक उदरातून प्रथम
जन्मलेला नर आम्ही याहवेहला समर्पित करतो आणि ते आम्ही खंडणी
भरून सोडवितो.’ 16 आणि हे तुमच्या हातावर खूण व कपाळावर
चिन्ह असे असावे, की याहवेहने आपल्या बलवान हाताने आम्हाला
इजिप्त देशातून बाहेर आणले.” 17 शेवटी फारोहने जेव्हा लोकांस
जाऊ दिले, तेव्हा परमेश्वराने त्यांना पलिष्ट्यांच्या देशातून जवळचा
मार्ग असूनही तिथून चालविले नाही. कारण परमेश्वर म्हणाले, “जर
युद्धाला सामोरे जावे लागले तर त्यांचे मन बदलेल व ते पुन्हा इजिप्तकडे
जातील.” 18 म्हणून परमेश्वराने त्यांना तांबड्या समुद्राकडून रानाच्या
मार्गाने नेले. इस्राएली लोक लढाईसाठी सज्ज होऊन इजिप्तमधून

बाहेर पडले. 19 मोशेने योसेफाची हाडे आपल्याबरोबर घेतली. कारण,
योसेफाने इस्राएली लोकांकडून शपथ घेतली होती. तो म्हणाला होता,
“परमेश्वर खरोखर तुमच्या मदतीला येईल, तेव्हा तुमच्याबरोबर माझी
हाडे या ठिकाणातून घेऊन जा.” 20 सुक्कोथ शहर सोडल्यावर त्यांनी
वाळवंटाच्या सीमेवर एथाम येथे तळ दिला. 21 दिवस व रात्र ते प्रवास
करू शकतील, म्हणून दिवसा मेघस्तंभातून त्यांचे मार्गदर्शन करीत
व रात्री अग्निस्तंभातून प्रकाश देत याहवेह त्यांच्या पुढे चालले. 22
दिवसाचा मेघस्तंभ व रात्रीचा अग्निस्तंभ यांनी लोकांसमोरून आपले
स्थान सोडले नाही.

**14** मग याहवेह मोशेला म्हणाले, 2 “इस्राएली लोकांस सांग मागे
फिरा आणि पी-हाहीरोथ जवळ, मिग्दोल व समुद्र यांच्यामध्ये,
समुद्राजवळ तळ द्या, जो थेट बआल-सफोनासमोर आहे. 3 यामुळे
फारोहला वाटेल की, इस्राएली लोक देशाभोवती गोंधळून भटकत
आहेत, वाळवंटात अडकले आहेत. 4 मी फारोहचे मन कठीण करेन,
म्हणजे तो त्यांचा पाठलाग करेल. पण फारोह व त्याच्या सैन्याकडून मी
माझे गौरव करून घेईन आणि इजिप्तच्या प्रजेला समजेल की, मी याहवेह
आहे.” मग इस्राएली लोकांनी तसे केले. 5 जेव्हा इजिप्तच्या राजाला
सांगितले गेले की ते लोक पळून गेले, फारोहने व त्याच्या अधिकाऱ्यांनी
त्यांच्याविषयी आपले मन बदलले व ते म्हणाले, “आपण हे काय केले?
आपण इस्राएली लोकांना जाऊ दिले व त्यांची सेवा गमावली!” 6 मग
त्याने ताबडतोब आपला रथ जोडून आपले सैन्य सोबत घेतले. 7 सहाशे
सर्वात उत्तम असे रथ व त्याबरोबर इजिप्तचे बाकी सर्व रथ व त्यावरील
अधिकारी त्याने घेतले. 8 याहवेहने इजिप्तचा राजा फारोह याचे हृदय
कठीण केले म्हणून इस्राएली लोक जे मोठ्या धैर्याने इजिप्तमधून जात
होते, त्यांचा त्याने पाठलाग केला. 9 इजिप्तच्या लोकांनी—फारोहचे
सर्व घोडे व रथ, घोडेस्वार व सैन्य यांच्यासह—इस्राएली लोकांचा
पाठलाग केला आणि बआल-सफोनासमोर असलेल्या पी-हाहीरोथ,
जिथे ते तळ देऊन होते तिथे त्यांना गाठले. 10 फारोह जसा जवळ
आला, इस्राएली लोकांनी पाहिले की इजिप्तचे सैन्य त्यांच्यावर चालून
येत आहे. ते फार घाबरले व मोठ्याने याहवेहकडे आरोळी मारली. 11 ते
मोशेला म्हणाले, “इजिप्त देशात कबरा नव्हत्या म्हणून तू आम्हाला या
रानात मरायला आणले काय? इजिप्तमधून आम्हास बाहेर आणून तू हे
काय केले? 12 आम्हाला असेच राहू दे; आम्हाला इजिप्त लोकांची
सेवा करू दे, असे आम्ही तुला इजिप्तमध्ये असताना म्हणालो नव्हतो
काय? या रानात मरण्याऐवजी इजिप्त लोकांची गुलामी करणे आम्हाला
बरे होते!” 13 मोशे लोकांना म्हणाला, “घाबरू नका. स्तब्ध राहा व
आज याहवेह तुम्हाला अद्भुतरित्या कसे सोडविणार आहे ते पाहा. हे
इजिप्तचे लोक जे तुम्हाला आज दिसतात ते पुन्हा दिसणार नाहीत.
14 याहवेह तुमच्यासाठी लढतील; तुम्ही केवळ स्तब्ध राहा.” 15 मग
याहवेह मोशेला म्हणाले, “माझ्याकडे का रडतोस? इस्राएली लोकांना
पुढे जायला सांग. 16 समुद्रातील पाणी दुभागावे म्हणून तुझ्या हातातील
काठी समुद्रावर उगार म्हणजे इस्राएली लोक समुद्रामधून कोरड्या
जमिनीवरून जातील. 17 मी इजिप्तच्या लोकांची मने कठीण करेन
आणि ते त्यांच्यामागे समुद्राच्या आत येतील. मग फारोह, त्याचे सर्व
सैनिक, रथ व घोडेस्वार यांच्याकडून मी माझे गौरव करून घेईन. 18
आणि जेव्हा फारोह, त्याचे रथ व त्याचे घोडेस्वार यांच्याकडून मला गौरव
मिळेल, तेव्हा इजिप्तचे लोक जाणतील की मी याहवेह आहे.” 19 मग
परमेश्वराचा दूत, जो इस्राएलांपुढे प्रवास करीत होता, तो आता त्यांच्या
मागच्या बाजूला गेला. मेघस्तंभ देखील त्यांच्यापुढून निघून त्यांच्यामागे
गेला, 20 आणि इजिप्तचे सैन्य व इस्राएली लोक यांच्यामध्ये आला.
त्या रात्रभर मेघांनी एका बाजूने प्रकाश तर दुसऱ्या बाजूने अंधकार
आणला; म्हणून रात्रभर एक दल दुसऱ्यापर्यंत पोहोचला नाही. 21 मग
मोशेने आपला हात समुद्रावर उगारला आणि याहवेहने रात्रभर पूर्वेचा
वारा वाहवून समुद्राचे पाणी मागे हटवून ती कोरडी जमीन केली व पाणी
दुभागले. 22 तेव्हा इस्राएली लोक, त्यांच्या उजवी व डावीकडे पाण्याची
भिंत उभी असताना, समुद्रामधून कोरड्या भूमीवरून चालत गेले. 23
इजिप्तच्या लोकांनी इस्राएली लोकांचा पाठलाग केला आणि फारोहचे
घोडे, रथ व स्वार त्यांच्यामागे समुद्राच्या मध्ये गेले. 24 पण पहाटेच्या
वेळी अग्निस्तंभामधून व मेघस्तंभामधून याहवेहने इजिप्तच्या सेनेकडे
पाहिले आणि त्यांचा गोंधळ उडविला. 25 त्यांच्या रथांची चाके गच्च
केली की त्यांना पुढे जाणे कठीण होऊ लागले. तेव्हा इजिप्तची लोक
म्हणू लागले, “इस्राएलच्या लोकांपासून आपण दूर जाऊ या! कारण
याहवेह त्यांच्यावतीने इजिप्तविरुद्ध लढत आहेत.” 26 मग याहवेह
मोशेला म्हणाले, “आपला हात समुद्रावर लांब कर म्हणजे समुद्राचे
पाणी पूर्ववत होऊन इजिप्तचे सर्व सैन्य, त्यांचे रथ व घोडेस्वार यांच्यावर
येईल.” 27 मोशेने आपला हात समुद्रावर लांब केला आणि पहाटेच्या
वेळी समुद्र त्याच्या ठिकाणी परत गेला. इजिप्तचे लोक त्याच्याकडे
धावत असताना याहवेहने त्यांना समुद्रात बुडवून टाकले. 28 पाणी
परत वाहू लागले व फारोहचे सर्व सैन्य, घोडेस्वार व रथ—फारोहचे
संपूर्ण सैन्य, ज्यांनी इस्राएली लोकांचा समुद्रामध्ये पाठलाग केला ते
पाण्याखाली गेले. त्यांच्यातील एकही जिवंत राहिला नाही. 29 पण
इस्राएली लोक कोरड्या जमिनीवरून समुद्र पार करून गेले आणि
त्यांच्या उजवीकडे व डावीकडे पाणी भिंतीप्रमाणे उभे राहिले. 30 त्या
दिवशी याहवेहने इस्राएलला इजिप्तच्या हातातून सोडविले, इस्राएली
लोकांनी इजिप्तचे मेलेले लोक समुद्रकिनाऱ्यावर पडलेले पाहिले. 31
जेव्हा इस्राएली लोकांनी इजिप्तच्या लोकांविरुद्ध आलेला याहवेहचा
पराक्रमी हात बघितला, त्यावेळी त्यांना याहवेहचे भय वाटले आणि
त्यांनी याहवेह व त्यांचा सेवक मोशे यांच्यावर विश्वास ठेवला.

**15** नंतर मोशे व इस्राएली लोकांनी याहवेहप्रीत्यर्थ हे गीत गाईले:
“मी याहवेहला गीत गाईन, कारण ते अत्युच्च आहेत. घोडे व
त्यांचे स्वार त्यांनी समुद्रात फेकले आहेत. 2 “याहवेह माझे सामर्थ्य
व माझे संरक्षण आहेत; याहवेह माझे तारण झाले आहेत. तेच माझा
परमेश्वर आहेत आणि मी त्यांची स्तुती करेन, माझ्या पूर्वजांचे परमेश्वर,
मी त्यांचा महिमा वर्णीन. 3 याहवेह योद्धा आहेत; याहवेह त्यांचे नाव

आहे. 4 फारोहचे रथ व सैन्य त्यांनी समुद्रात उलथून टाकले. फारोहचे
सर्वोत्तम अधिकारी तांबड्या समुद्रात बुडून गेले. 5 खोल पाण्याने
त्यांना झाकून टाकले; दगडाप्रमाणे ते खोल तळाशी बुडून गेले. 6
हे याहवेह, तुमचा उजवा हात, सामर्थ्याने ऐश्वर्यमान आहे. हे याहवेह
तुमच्या उजव्या हाताने, शत्रूला हादरून टाकले. 7 “तुमच्या ऐश्वर्याच्या
महानतेने तुमच्या विरोधकांना तुम्ही खाली पाडले. स्वैर सोडलेल्या
तुमच्या क्रोधाने; भुशाप्रमाणे त्यांना भस्म केले. 8 तुमच्या नाकपुड्यांच्या
श्वासाने जले एकत्र आली. पाण्याचे प्रवाह भिंतीप्रमाणे उभे राहिले;
डोहातील पाणी समुद्राच्या मध्यभागी गोळा झाले. 9 शत्रूने फुशारकी
मारीत म्हटले, ‘मी पाठलाग करून त्यांच्यावर मात करेन. मी लूट वाटून
घेईन; त्यांच्या जिवावर मी तृप्त होईन. मी माझी तलवार उपसेन आणि
माझ्या हाताने त्यांचा नाश होईल.’ 10 पण तुम्ही आपला श्वास फुंकला,
आणि समुद्राने त्यांना झाकून टाकले. ते शीसाप्रमाणे महाजलात बुडून
गेले. 11 सर्व दैवतांमध्ये हे याहवेह तुमच्यासारखे कोण आहे? पवित्रतेत
ऐश्वर्यमान; वैभवात अद्वितीय, आश्चर्यकर्मे करणारे, असे तुमच्यासारखे
कोण आहे?” 12 तुम्ही आपला उजवा हात उगारला, आणि पृथ्वीने
तुमच्या शत्रूंना गिळून टाकले. 13 तुम्ही उद्धारलेल्या लोकांना आपल्या
प्रेमदयेने चालविणार. आपल्या सामर्थ्याने तुम्ही त्यांना तुमच्या पवित्र
निवासस्थानाकडे घेऊन जाणार. 14 राष्ट्रे हे ऐकून थरथर कापतील;
पलिष्टी भीतीने ग्रासून जातील. 15 एदोमाचे अधिकारी घाबरून जातील,
मोआबाचे पुढारी थरथर कापू लागतील, कनानातील लोक वितळून
जातील; 16 तुमच्या बाहूच्या पराक्रमामुळे भीती व दहशत त्यांच्यावर
येऊन पडेल. तुमचे लोक पार करेपर्यंत, हे याहवेह, जे लोक तुम्ही खंडून
घेतले आहेत, ते पार होईपर्यंत ते दगडाप्रमाणे स्तब्ध राहतील. 17 तुम्ही
त्यांना आत, तुमच्या वतनाच्या पर्वतावर आणून रोपणार; तेच ठिकाण
याहवेह, जे तुम्ही आपल्या निवासासाठी तयार केले, ते पवित्रस्थान जे,
हे प्रभू, तुमच्या हातांनी प्रस्थापित केले. 18 याहवेह सदासर्वकाळ राज्य
करतील. 19 जेव्हा फारोहचे घोडे, रथ आणि घोडेस्वार समुद्रामध्ये गेले,
तेव्हा याहवेहने समुद्राचे पाणी परत त्यांच्यावर आणले; परंतु इस्राएली
लोक समुद्रामधून कोरड्या वाटेवरून चालले. 20 तेव्हा अहरोनाची
बहीण, मिर्याम संदेष्टी, हिने हातात डफ घेतला आणि सर्व स्त्रिया
तिच्यामागे हातात डफ घेऊन नाचू लागल्या. 21 मिर्यामने त्यांच्यासाठी
गाईले: “याहवेहप्रीत्यर्थ गीत गा, कारण ते अत्युच्च आहेत. घोडे व त्यांचे
स्वार त्यांनी समुद्रात बुडवून टाकले आहेत.” 22 मग मोशेने इस्राएली
लोकांस तांबड्या समुद्रापासून पुढे शूर नावाच्या रानात आणले. तीन
दिवसांच्या रानातील त्यांच्या प्रवासात त्यांना पाणी मिळाले नाही. 23
मग ते माराह येथे आले, त्याचे पाणी ते पिऊ शकले नाहीत, कारण ते
कडू होते. (म्हणूनच त्या ठिकाणाला मारा, म्हणजे कडू असे म्हणतात.)
24 “आम्ही काय प्यावे?” असे म्हणत लोकांनी मोशेविरुद्ध कुरकुर
केली. 25 तेव्हा मोशेने याहवेहचा धावा केला आणि याहवेहने त्याला
लाकडाचा एक तुकडा दाखविला. त्याने तो पाण्यात टाकला आणि पाणी
पिण्यास योग्य झाले. त्या ठिकाणी याहवेहने त्यांना पारखण्यासाठी
नियम व सूचना दिल्या. 26 ते म्हणाले, “जर तुम्ही याहवेह, तुमच्या
परमेश्वराचा शब्द काळजीपूर्वक ऐकाल व त्यांच्या नजरेत जे योग्य ते
कराल, जर त्यांच्या आज्ञांकडे लक्ष देऊन त्यांचे सर्व नियम पाळाल, तर
मी इजिप्तवर ज्या पीडा आणल्या होत्या, त्या तुमच्यावर आणणार
नाही, कारण मी याहवेह, तुम्हाला आरोग्य देणारा आहे.” 27 मग ते
एलीम येथे आले. जिथे बारा झरे व सत्तर खजुरीची झाडे होती. त्या
पाण्याजवळ त्यांनी तळ दिला.

**16** इजिप्त देशातून बाहेर आल्यावर, दुसऱ्या महिन्याच्या पंधराव्या
दिवशी इस्राएलचा समुदाय एलीम येथून निघून एलीम व
सीनायच्या मध्ये जे सीन रान आहे त्याकडे आला. 2 त्या रानात
सर्व इस्राएली लोकांनी मोशे व अहरोन यांच्याविरुद्ध कुरकुर केली. 3
इस्राएली लोक त्यांना म्हणाले, “इजिप्तमध्ये असतानाच याहवेहच्या
हाताने आम्ही मेलो असतो तर किती बरे असते! तिथे आम्ही मांसाच्या
भांड्याभोवती बसून हवे ते अन्न खाल्ले, पण तू हा सर्व समाज मरावा
म्हणून आम्हाला या अरण्यात आणले आहे.” 4 मग याहवेहने मोशेला
म्हटले, “मी तुमच्यासाठी स्वर्गातून भाकरीची वृष्टी करेन. लोकांनी
दररोज बाहेर जाऊन त्या दिवसासाठी पुरेलसे गोळा करावे. म्हणजे ते
माझ्या सूचनेप्रमाणे वागतात की नाहीत याची मला परीक्षा करता येईल.
5 सहाव्या दिवशी ते जे काही आत आणतील ते त्यांनी तयार करावे
आणि दररोज ते जेवढे गोळा करतात त्यापेक्षा दुप्पट असावे.” 6 मग
मोशे व अहरोन यांनी सर्व इस्राएली लोकांना सांगितले, “संध्याकाळच्या
वेळी तुम्हाला समजेल की याहवेहनेच तुम्हाला इजिप्त देशातून बाहेर
आणले. 7 आणि सकाळी तुम्ही याहवेहचे गौरव बघाल, कारण
तुम्ही याहवेहविरुद्ध केलेली कुरकुर त्यांनी ऐकली आहे. आम्ही कोण
आहोत की तुम्ही आमच्याविरुद्ध कुरकुर करावी?” 8 मोशे म्हणाला,
“संध्याकाळी जेव्हा याहवेह तुम्हाला मांस आणि सकाळी जी भाकर
तुम्हाला पाहिजे ती खायला देतील, कारण त्यांनी त्यांच्याविरुद्ध केलेली
तुमची कुरकुर ऐकली आहे. आम्ही कोण आहोत? तुम्ही आमच्याविरुद्ध
नाही, तर याहवेहच्या विरुद्ध कुरकुर करीत आहात.” 9 मग मोशे
अहरोनाला म्हणाला, “संपूर्ण इस्राएली समुदायाला सांग, ‘याहवेहच्या
समोर या, कारण त्यांनी तुमची कुरकुर ऐकली आहे.’” 10 अहरोन सर्व
इस्राएली लोकांशी बोलत असताना, त्यांनी रानाकडे पाहिले आणि
त्यांना याहवेहचे गौरव ढगात प्रकट होत असलेले दिसले. 11 याहवेह
मोशेला म्हणाले, 12 “मी इस्राएली लोकांची कुरकुर ऐकली आहे. त्यांना
सांग, ‘सायंकाळी तुम्ही मांस खाल, व सकाळी तुम्ही भाकरीने तृप्त
व्हाल. मग तुम्हाला समजेल की, मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे.’” 13
त्या संध्याकाळी लावे पक्षी त्यांच्या वस्तीवर येऊन उतरले व त्यामुळे
छावणी व सभोवतालची सर्व जमीन झाकली गेली आणि सकाळी
छावणी सभोवती दवबिंदूंचा थर जमला होता. 14 जेव्हा दवबिंदू नाहीसे
झाले, तेव्हा रानातील भूमीवर हिमकणांएवढे खवल्यांसारखे बारीक
तुकडे पसरलेले दिसू लागले. 15 जेव्हा इस्राएली लोकांनी ते पाहिले,
ते एकमेकास म्हणू लागले, “हे काय आहे?” कारण ते काय होते ते

त्यांना ठाऊक नव्हते. मोशे त्यांना म्हणाला, “हीच ती भाकर आहे
जी याहवेहने तुम्हाला खाण्यासाठी दिली आहे. 16 याहवेहने दिलेली
आज्ञा ही: ‘प्रत्येकाने त्यांना लागते तेवढे गोळा करावे. तुमच्या तंबूत
असलेल्या प्रत्येक व्यक्तीसाठी एक ओमेर एवढे घ्यावे.’” 17 इस्राएली
लोकांनी जसे त्यांना सांगितले होते तसे केले; काहींनी अधिक तर
काहींनी थोडे गोळा केले. 18 आणि जेव्हा त्यांनी ते ओमेरच्या मापाने
मोजले, ज्याने खूप गोळा केले, त्याला अधिक झाले नाही आणि ज्याने
थोडे गोळा केले त्याला थोडे झाले नाही. प्रत्येकाने त्यांना जितके लागत
होते तितकेच गोळा केले होते. 19 मग मोशे त्यांना म्हणाला, “यातील
काहीही सकाळपर्यंत शिल्लक ठेवू नये,” 20 तरीही काहींनी मोशेच्या
शब्दाकडे लक्ष दिले नाही; व त्याचा काही भाग सकाळपर्यंत ठेवला,
पण त्यात किडे पडून त्याला दुर्गंधी सुटली होती, तेव्हा मोशे त्यांच्यावर
रागावला. 21 मग रोज सकाळी प्रत्येकाला लागते तेवढेच ते गोळा करीत
असत आणि जेव्हा सूर्य प्रखर होई, तेव्हा ते वितळून जात असे. 22
आठवड्याच्या सहाव्या दिवशी ते रोजच्यापेक्षा दुप्पट—प्रत्येकी दोन
ओमेर अन्न गोळा करीत—आणि सर्व इस्राएली वडीलमंडळींनी येऊन
मोशेला याबद्दल हवाला दिला. 23 मोशेने त्यांना सांगितले, “याहवेहची
आज्ञा हीच आहे: ‘उद्या विसाव्याचा दिवस, याहवेहचा पवित्र शब्बाथ
आहे. तर तुम्हाला जे काही शिजवायचे आहे ते शिजवा व जे उकळावयाचे
असेल ते उकळून घ्या. जे उरेल ते सकाळपर्यंत ठेवा.’” 24 म्हणून
त्यांनी मोशेने आज्ञापिल्याप्रमाणे ते सकाळपर्यंत ठेवले तेव्हा त्याला ना
दुर्गंधी आली ना त्यात किडे पडले. 25 मोशे म्हणाला, “आज हे खा,
कारण आज याहवेहचा शब्बाथ आहे. म्हणून तुम्हाला आज त्यातील
काही जमिनीवर मिळणार नाही. 26 सहा दिवस तुम्ही ते गोळा करावे,
पण सातव्या दिवशी शब्बाथ आहे. या दिवशी ते मिळणार नाही.” 27
पण काही लोक सातव्या दिवशी सुद्धा ते गोळा करावयाला बाहेर गेले.
पण त्यांना काहीही सापडले नाही. 28 मग याहवेहने मोशेला म्हटले,
“किती काळ तुम्ही माझे नियम व माझ्या आज्ञा पाळण्याचे नाकारणार?
29 हे लक्षात घ्या की याहवेहने तुम्हाला हा शब्बाथ दिलेला आहे; म्हणून
सहाव्या दिवशी ते तुम्हाला दोन दिवसासाठी भाकर देतात. सातव्या
दिवशी प्रत्येकाने ते जिथे आहेत तिथेच थांबावे; कोणीही बाहेर जाऊ
नये.” 30 म्हणून लोकांनी सातव्या दिवशी विसावा घेतला. 31 इस्राएली
लोकांनी त्या भाकरीला मान्ना असे नाव दिले. ते धण्याच्या बीजाप्रमाणे
पांढरे असून त्याची चव मध घालून केलेल्या पापडीप्रमाणे होती. 32
मोशे म्हणाला, “याहवेहने अशी आज्ञा दिली आहे: ‘एक ओमेर मान्ना
घेऊन तो येणाऱ्या पिढ्यांसाठी ठेवा, की तुम्हाला इजिप्त देशातून बाहेर
आणल्यावर रानामध्ये मी तुम्हाला खायला दिलेली भाकरी ते पाहू
शकतील.’” 33 मोशेने अहरोनाला सांगितले, “एक पात्र घे व त्यात
एक ओमेर मान्ना घाल. मग तो पुढे येणाऱ्या पिढ्यांसाठी याहवेहसमोर
ठेव.” 34 याहवेहने मोशेला आज्ञापिल्याप्रमाणे, अहरोनाने तो मान्ना
कराराच्या पाट्यांबरोबर ठेवला, अशासाठी की तो राखून ठेवला जाईल.
35 इस्राएली लोक स्थायिक असलेल्या भूमीवर येईपर्यंत, त्यांनी चाळीस
वर्षे मान्ना खाल्ला; ते कनान देशाच्या सीमेवर पोहोचेपर्यंत त्यांनी मान्ना
खाल्ला. 36 (एक ओमेर हा एका एफाचा दहावा भाग आहे.)

**17** सर्व इस्राएलाचा समाज सीन रानातून निघून, याहवेहच्या
आज्ञेनुसार एका ठिकाणाहून दुसरीकडे प्रवास करीत गेले. मग
त्यांनी रफीदीम येथे तळ दिला, पण तिथे लोकांना प्यावयास पाणी
नव्हते. 2 तेव्हा लोक मोशेशी भांडण करीत म्हणाले, “आम्हाला
प्यावयास पाणी दे.” मोशे त्यांना म्हणाला, “तुम्ही माझ्याशी का
भांडता? तुम्ही याहवेहची परीक्षा का पाहता?” 3 पण तिथे लोकांना
फारच तहान लागली होती आणि ते मोशेविरुद्ध कुरकुर करीत म्हणाले,
“आम्ही व आमची मुलेबाळे व पशू तहानेने मरून जावे म्हणून तू
आम्हाला इजिप्त देशाबाहेर आणलेस का?” 4 मग मोशेने याहवेहकडे
आरोळी मारली, “मी या लोकांचे काय करू? ते तर मला धोंडमार
करण्याच्या तयारीत आहेत.” 5 मग याहवेहने मोशेला सांगितले,
“लोकांच्या समोर जा. काही इस्राएली वडिलजनांना आपल्याबरोबर घे
आणि नाईल नदीवर ज्या काठीने मारले ती आपल्या हाती घे आणि
नीघ. 6 होरेबातील खडकाकडे मी तुझ्यापुढे उभा राहीन. त्या खडकाला
काठीने मार आणि त्यातून लोकांना प्यावयास पाणी येईल.” मग मोशेने
इस्राएलाच्या वडिलांदेखत तसे केले. 7 मोशेने त्या ठिकाणाचे नाव
मस्सा व मरीबाह असे ठेवले; कारण इस्राएली लोकांनी भांडण केले
आणि याहवेह आमच्यामध्ये आहेत की नाहीत? असे म्हणून याहवेहची
परीक्षा घेतली. 8 नंतर अमालेकी आले व त्यांनी इस्राएली लोकांवर
रफीदीम येथे हल्ला केला. 9 मोशे यहोशुआला म्हणाला, “आपल्यातून
काही माणसे निवड आणि बाहेर जाऊन अमालेक्यांशी युद्ध करा. उद्या
मी परमेश्वराची काठी माझ्या हातात घेऊन डोंगराच्या शिखरावर उभा
राहीन.” 10 मग मोशेने सांगितल्याप्रमाणे यहोशुआ अमालेकी सैन्याशी
लढला आणि मोशे, अहरोन व हूर हे डोंगराच्या शिखरावर गेले. 11
जोपर्यंत मोशे आपले हात वर करीत असे, इस्राएली लोकांचा विजय
होत असे, पण जेव्हा ते खाली करी, अमालेक्यांचा विजय होत असे. 12
जेव्हा मोशेचे हात थकून गेले, त्यांनी एक दगड घेतला व मोशे त्यावर
बसला. अहरोन एका बाजूने व हूर दुसऱ्या बाजूने असे त्यांनी त्याचे
हात वर धरून ठेवले; व सूर्यास्तापर्यंत त्याचे हात स्थिर राहिले. 13
आणि यहोशुआने अमालेकी सैन्याला तलवारीने ठार केले. 14 मग
याहवेह मोशेला म्हणाले, “या घटनेची आठवण रहावी म्हणून तू ती
ग्रंथात लिहून ठेव आणि ते यहोशुआच्या कानी पडेल याची खात्री कर,
कारण मी पृथ्वीवरून अमालेकांचा संपूर्णपणे नाश करणार.” 15 मोशेने
त्या ठिकाणी एक वेदी बांधली व त्या ठिकाणाचे नाव याहवेह निस्सी
असे ठेवले. 16 तो म्हणाला, “कारण याहवेहच्या राजासनाविरुद्ध हात
उगारले गेले, म्हणून याहवेह पिढ्यान् पिढ्या पर्यंत अमालेक्यांशी युद्ध
करतील.”

**18** आता परमेश्वराने मोशे व त्यांच्या इस्राएली लोकांसाठी काय केले
आणि याहवेहने इस्राएली लोकांना कशाप्रकारे इजिप्तमधून बाहेर

आणले, याविषयी सर्वकाही मिद्यानी याजक व मोशेचा सासरा इथ्रो याने
ऐकले. 2 मोशेने आपली पत्नी सिप्पोराहला व त्याच्या दोन मुलांना
आपला सासरा इथ्रो याच्याकडे सोडले होते, 3 मोशेच्या एका मुलाचे
नाव गेर्षोम असे होते; कारण मोशे म्हणाला, “मी परक्या देशात विदेशी
झालो आहे.” 4 दुसऱ्या मुलाचे नाव एलिएजर असे ठेवले होते. कारण
मोशे म्हणाला, “माझ्या वडिलांचे परमेश्वर माझे साहाय्य झाले; व त्यांनी
मला फारोहच्या तलवारीपासून सोडविले.” 5 इथ्रो, मोशेचा सासरा,
मोशेची पत्नी व मुलांसोबत, परमेश्वराच्या डोंगराजवळ रानात जिथे त्यांनी
तळ दिला होता तिथे आला. 6 इथ्रोने मोशेला निरोप पाठविला, “मी
तुझा सासरा इथ्रो, तुझी पत्नी व दोन मुले घेऊन तुझ्याकडे येत आहे.”
7 तेव्हा मोशे त्याच्या सासऱ्याला भेटायला बाहेर आला आणि नमन
करून त्याचे चुंबन घेतले. ते एकमेकांना अभिवादन करून तंबूत गेले. 8
मोशेने आपल्या सासऱ्याला सर्वकाही सांगितले जे इस्राएली लोकांसाठी
याहवेहने फारोह व इजिप्तच्या लोकांबरोबर केले आणि वाटेत ज्या
अडचणी त्यांना आल्या आणि कशाप्रकारे याहवेहने त्यांची सुटका
केली. 9 इजिप्तच्या लोकांच्या हातातून इस्राएलची सुटका करण्यासाठी
याहवेहने जी चांगली कृत्ये केली, ती ऐकून इथ्रोला फार आनंद झाला.
10 इथ्रो म्हणाला, “याहवेहचे नाव धन्यवादित असो, ज्यांनी तुला इजिप्त
व फारोहच्या तावडीतून सोडविले आणि ज्यांनी लोकांना इजिप्तच्या
लोकांच्या हातातून सोडविले. 11 आता मला समजले की, याहवेह
सर्व दैवतांपेक्षा श्रेष्ठ आहे, कारण ज्यांनी इस्राएली लोकांना क्रूरतेने
वागविले होते त्यांचा त्यांनी नाश केला आहे.” 12 मग मोशेचा सासरा
इथ्रोने परमेश्वरासाठी होमार्पण व इतर अर्पणे आणली आणि अहरोन व
इस्राएली लोकांचे सर्व वडील मोशेच्या सासऱ्याबरोबर भोजन करावयास
परमेश्वराच्या समक्षतेत आले. 13 दुसऱ्या दिवशी मोशे इस्राएली लोकांचा
न्याय करावयाला त्याच्या आसनावर बसला आणि लोक सकाळपासून
संध्याकाळपर्यंत त्याच्याभोवती उभे राहिले. 14 जेव्हा मोशे लोकांसाठी
जे सर्व करीत होता ते त्याच्या सासऱ्याने पाहिले, तो म्हणाला, “हे
तू लोकांसाठी काय करीत आहेस? तू एकटाच न्यायाधीश म्हणून
का बसतोस व ते सर्व लोक दिवसभर तुझ्याभोवती उभे असतात?”
15 मोशे त्याला म्हणाला, “कारण लोक परमेश्वराची इच्छा जाणावी
म्हणून माझ्याकडे येतात. 16 जेव्हा त्यांच्यात वाद होतात, ते माझ्याकडे
आणतात आणि मी त्यांचा निर्णय करतो आणि त्यांना परमेश्वराचे विधी
व नियम याबद्दल सांगतो.” 17 मोशेच्या सासऱ्याने उत्तर दिले, “तू
जे करतोस ते बरोबर नाही. 18 तू व हे लोक जे तुझ्याकडे येतात,
सर्वजण थकून जाल. हे काम तुझ्यासाठी खूप जड आहे; तू एकट्यानेच
ते करणे तुला जमणार नाही. 19 तर आता तू माझे ऐक आणि मी तुला
सल्ला देतो आणि परमेश्वर तुझ्याबरोबर असो. तू परमेश्वरासमोर या
लोकांचा प्रतिनिधी म्हणून राहा आणि त्यांचे वाद परमेश्वरासमोर आण.
20 परमेश्वराचे विधी व नियम त्यांना शिकव आणि ज्या मार्गाने त्यांनी
चालावे आणि त्यांचे वर्तन कसे असावे हे त्यांना दाखव. 21 पण या
सर्व लोकांमधून सक्षम असे लोक—जे परमेश्वराचे भय बाळगणारे,
विश्वसनीय, व अन्यायाच्या लाभाचा द्वेष करणारे असतील—ते निवडून
घे; त्यांची हजारांवर, शंभरांवर, पन्नासांवर आणि दहांवर अधिकारी
म्हणून नेमणूक कर. 22 त्यांनी सर्व समयी लोकांचे न्यायाधीश म्हणून
असावे, परंतु प्रत्येक अवघड वाद तुझ्याकडे आणावा; आणि सोपे वाद
त्यांच्या अधिकाऱ्यांनी सोडवावेत. त्यामुळे तुझे ओझे हलके होईल,
कारण ते तुझ्याबरोबर तुझा भार वाहतील. 23 जर तू असे केले आणि
परमेश्वराने तुला आज्ञा केली, तर तुला सोपे जाईल आणि हे लोकसुद्धा
समाधानी होऊन घरी जातील.” 24 मोशेने आपल्या सासऱ्याचे ऐकून
सर्वकाही त्याने सांगितल्याप्रमाणे केले. 25 मोशेने संपूर्ण इस्राएलातून
सक्षम अशी माणसे निवडली व त्यांना हजारांवर, शंभरांवर, पन्नासांवर
व दहांवर प्रमुख व अधिकारी म्हणून नेमले. 26 त्यांनी सर्व समयी
लोकांचे न्यायाधीश म्हणून सेवा केली. अवघड वाद त्यांनी मोशेकडे
आणले, परंतु साधेसरळ वाद त्यांनीच सोडविले. 27 मग मोशेने आपल्या
सासऱ्याचा निरोप घेतला आणि इथ्रो त्याच्या देशास परत निघून गेला.

**19** इस्राएली लोक इजिप्त देशातून बाहेर आल्यावर तिसऱ्या
महिन्याच्या पहिल्या दिवशी; याच दिवशी ते सीनायच्या रानात
आले. 2 रफीदीम येथून निघाल्यावर, त्यांनी सीनायच्या रानात प्रवेश
केला आणि इस्राएल त्या ठिकाणी रानात पर्वतापुढे तळ देऊन राहिले. 3
नंतर मोशे परमेश्वराकडे गेला आणि याहवेहने पर्वतावरून त्याला आवाज
देऊन म्हटले, “याकोबाच्या वंशजांना, म्हणजेच इस्राएली लोकांना तू हे
सांगावे: 4 ‘मी इजिप्तच्या लोकांचे काय केले आणि तुम्हाला गरुडाच्या
पंखावर माझ्याकडे कसे वाहून आणले, ते तुम्ही स्वतःच पाहिले आहे. 5
आता जर तुम्ही पूर्णपणे माझे आज्ञापालन केले आणि माझा करार
पाळला, तर सर्व राष्ट्रात तुम्ही माझे मोलवान धन व्हाल. जरी सर्व पृथ्वी
माझी आहे, 6 तरी तुम्हीच मला याजकीय राज्य; पवित्र राष्ट्र असे
व्हाल.’ तू इस्राएली लोकांना सांगावयाच्या याच गोष्टी आहेत.” 7 तेव्हा
मोशेने इस्राएली पुढाऱ्यांना बोलावून ज्यागोष्टी याहवेहने सांगाव्या म्हणून
आज्ञापिल्या होत्या, त्या त्यांना सांगितल्या. 8 तेव्हा सर्व लोक एकत्र
प्रतिसाद देत म्हणाले, “जे काही याहवेहने सांगितले, ते सर्व आम्ही
करू.” मग मोशेने जाऊन लोकांचे म्हणणे याहवेहला कळविले. 9
मग याहवेहने मोशेला म्हटले, “मी घनदाट मेघातून तुझ्याकडे येईन,
अशासाठी की मी तुझ्याशी बोलत असताना लोक ऐकतील आणि
तुझ्यावर विश्वास ठेवतील.” मग मोशेने लोक काय म्हणाले ते याहवेहला
सांगितले. 10 आणि याहवेह मोशेला म्हणाले, “लोकांकडे जा आणि
त्यांना आज व उद्या पवित्र कर. त्यांनी आपले कपडे स्वच्छ धुवावे, 11
आणि तिसऱ्या दिवशी तयार असावे, कारण त्या दिवशी याहवेह सर्व
लोकांसमक्ष सीनाय पर्वतावर उतरून येतील. 12 लोकांसाठी पर्वताच्या
सभोवती सीमारेषा आख आणि त्यांना सांग, ‘कोणीही पर्वताकडे जाऊ
नये किंवा त्याच्या पायथ्यालाही कोणी स्पर्श करणार नाही, याची
काळजी घ्यावी. जे कोणी पर्वताला हात लावतील त्यांना मारून टाकावे.’
13 त्यांना मरेपर्यंत धोंडमार करावी किंवा धनुष्यबाणाने मारावे; कोणीही
त्यांना स्पर्श करू नये. ते मनुष्य असो वा प्राणी, त्यांना जिवंत राहू

देऊ नये. जेव्हा एडक्याच्या शिंगाचा दीर्घ नाद कानी पडेल तेव्हाच
त्यांनी पर्वताजवळ यावे.” 14 मग मोशे पर्वतावरून खाली उतरून
लोकांकडे गेला, त्याने त्यांना शुद्ध केले व लोकांनी आपले कपडे धुतले.
15 मग तो लोकांना म्हणाला, “तिसऱ्या दिवसासाठी आपली तयारी
करा, लैंगिक संभोगापासून दूर राहा.” 16 तिसऱ्या दिवसाच्या सकाळी
ढगांचा गडगडाट होऊन विजा चमकू लागल्या व पर्वतावर दाट ढग जमा
झाले आणि तुतारीचा फार मोठा नाद झाला. छावणीतील सर्वजण
भीतीने कापू लागले. 17 मग मोशेने लोकांना परमेश्वराला भेटण्यासाठी
छावणीच्या बाहेर आणले आणि ते पर्वताच्या पायथ्याशी उभे राहिले.
18 सीनाय पर्वत धुराने झाकून गेला होता, कारण याहवेह अग्निरुपात
पर्वतावर उतरले होते. भट्टीतून निघावा तसा धूर उठला होता आणि
सगळा पर्वत जोरात थरथरत होता. 19 कर्ण्याचा आवाज जसा मोठा
होत गेला, तसा मोशे बोलत होता आणि परमेश्वर त्याला उत्तर देत होते.
20 याहवेह सीनाय पर्वतावर उतरले व मोशेला पर्वतावर बोलाविले.
मग मोशे वर गेला, 21 आणि याहवेह मोशेला म्हणाले. “खाली जा
व लोकांना सांग की याहवेहला पाहण्यासाठी त्यांनी सीमा ओलांडू
नये आणि पुष्कळांचा नाश होऊ नये. 22 याहवेहची सेवा करावयास
जे याजक जवळ येतात त्यांनी सुद्धा स्वतःला पवित्र करावे, नाहीतर
याहवेह त्यांच्याविरुद्ध भडकतील.” 23 तेव्हा मोशे याहवेहला म्हणाला,
“लोक सीनाय पर्वताजवळ येऊ शकत नाहीत, कारण तुम्ही स्वतःच
आम्हाला ताकीद दिली आहे, ‘पर्वताभोवती सीमा आखून आम्ही त्याला
पवित्र ठेवावे.’” 24 याहवेहने उत्तर दिले, “खाली जा आणि अहरोनाला
तुझ्याबरोबर घेऊन ये. परंतु याजकांनी व लोकांनी याहवेहकडे सीमा
ओलांडून येऊ नये, नाहीतर याहवेह त्यांच्याविरुद्ध भडकतील.” 25 मग
मोशे खाली लोकांकडे गेला व त्यांना हे सर्व सांगितले.

**20** आणि परमेश्वर ही सर्व वचने बोलले: 2 “ज्याने तुम्हाला इजिप्त
देशातून व दास्यातून बाहेर आणले, तो मीच याहवेह, तुमचा
परमेश्वर आहे. 3 “माझ्यासमोर तुम्हाला इतर कोणतेही देव नसावेत.”
4 तुम्ही स्वतःसाठी वर आकाशातील, पृथ्वीवरील व पृथ्वीच्या खाली
जलातील कशाचीही प्रतिमा करू नका. 5 तुम्ही त्यांना नमन करू नये
किंवा त्यांची उपासना करू नये; कारण मी, याहवेह तुमचा परमेश्वर,
ईर्ष्यावान परमेश्वर आहे. जे माझा द्वेष करतात त्यांच्या लेकरांना तिसऱ्या
व चौथ्या पिढीपर्यंत त्यांच्या आईवडिलांच्या पापांचे शासन करतो. 6
परंतु जे माझ्यावर प्रीती करतात आणि माझ्या आज्ञा पाळतात अशांच्या
हजारो पिढ्यांपर्यंत प्रीती करतो. 7 याहवेह तुमच्या परमेश्वराचे नाव तुम्ही
व्यर्थ घेऊ नका, कारण जे त्यांचे नाव व्यर्थ घेतात, त्यांना याहवेह शिक्षा
दिल्यावाचून राहणार नाहीत. 8 शब्बाथ दिवस पवित्रपणे पाळून त्याची
आठवण ठेवा. 9 सहा दिवस तुम्ही परिश्रम करावेत आणि आपली
सर्व कामे करावी. 10 परंतु सातवा दिवस याहवेह तुमचे परमेश्वर यांचा
शब्बाथ आहे. त्या दिवशी तुम्ही कोणतेही काम करू नये, तुम्ही किंवा
तुमचा पुत्र किंवा कन्या, तुमचा दास किंवा दासी, तुमचे पशू किंवा
तुमच्या नगरात राहणारा परदेशी यांनी देखील कोणतेही काम करू
नये. 11 कारण सहा दिवसात याहवेहने आकाश व पृथ्वी, सागर आणि
त्यातील सर्वकाही निर्माण केले, परंतु सातव्या दिवशी त्यांनी विश्रांती
घेतली, म्हणून याहवेहने शब्बाथ दिवस आशीर्वादित करून तो पवित्र
केला. 12 आपल्या वडिलांचा व आपल्या आईचा सन्मान करा, म्हणजे
जो देश याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला देत आहे, त्यात तुम्ही दीर्घकाळ
राहाल. 13 तुम्ही खून करू नका. 14 तुम्ही व्यभिचार करू नका. 15
तुम्ही चोरी करू नका. 16 तुमच्या शेजाऱ्याविरुद्ध खोटी साक्ष देऊ नका.
17 तुमच्या शेजाऱ्याच्या घराचा लोभ धरू नका. तुमच्या शेजाऱ्याच्या
पत्नीची अभिलाषा धरू नका किंवा त्याच्या दासाचा किंवा दासीचा,
किंवा त्याच्या बैलाचा किंवा त्याच्या गाढवाचा, किंवा त्याच्या मालकीचे
जे काही असेल त्या कशाचाही लोभ धरू नका. 18 जेव्हा लोकांनी
विजा पाहिल्या आणि गडगडाट व तुतारीचा आवाज ऐकला आणि
धुराने भरलेला पर्वत पाहिला, ते भीतीने कंपित झाले व दूर उभे राहिले
19 आणि ते मोशेला म्हणाले, “तुम्ही स्वतः आमच्याशी बोला आणि
आम्ही ऐकू. पण परमेश्वराला मात्र आमच्याशी बोलू देऊ नका, नाहीतर
आम्ही मरून जाऊ.” 20 मोशे लोकांना म्हणाला, “घाबरू नका. तुमची
परीक्षा पाहावी म्हणून परमेश्वर आले आहेत, अशासाठी की परमेश्वराचे
भय तुम्हाला पापापासून दूर ठेवण्याकरिता तुमच्याबरोबर असावे.”
21 परमेश्वर होते तिथे मोशे दाट अंधकारात गेला असताना, लोक दूर
अंतरावर उभे राहिले. 22 मग याहवेह मोशेला म्हणाले, “इस्राएली
लोकांस हे सांग: ‘मी तुमच्याशी स्वर्गातून बोललो हे तुम्ही स्वतः पाहिले
आहे: 23 माझ्या खेरीज इतर कोणतेही देव बनवू नका; तुमच्यासाठी
चांदीच्या किंवा सोन्याच्या मूर्त्या बनवू नका. 24 “‘माझ्यासाठी मातीची
वेदी तयार करा व त्यावर तुमची मेंढरे, बोकडे व तुमचे गुरे चढवून
आपली होमार्पणे व शांत्यर्पणे ही अर्पण करा. जिथे कुठे माझ्या नावाचे
गौरव व्हावा असे मी ठरवेन, तिथे मी तुमच्याजवळ येऊन तुम्हाला
आशीर्वाद देईन. 25 तुम्ही माझ्यासाठी जर दगडाची वेदी बांधली, तर
त्यासाठी घडविलेले दगड वापरू नयेत. त्यावर कोणतेही हत्यार वापरले
तर तुम्ही त्यास विटाळून टाकाल. 26 आपली नग्नता उघडी पडू नये
म्हणून माझ्या वेदीवर पायऱ्या चढून जाऊ नका.’

**21** “तू त्यांच्यासमोर मांडावयाचे नियम हे आहेत: 2 “तुम्ही जर
एखादा इब्री गुलाम विकत घेतला, तर त्याने तुमची सहा वर्षे सेवा
करावी. परंतु सातव्या वर्षी तो काहीही भरपाई न घेता स्वतंत्र होईल. 3
जर तो एकटाच आला, तर तो एकटाच स्वतंत्र जाईल; परंतु तो आपल्या
पत्नीसोबत आला तर तीसुद्धा त्याच्याबरोबर जाईल. 4 जर गुलाम
असताना त्याच्या मालकाने त्याचे लग्न करून दिले आणि त्याला मुले व
मुली झाले, तर ती स्त्री व तिची लेकरे त्या मालकाच्या हक्काची राहतील
आणि तो मनुष्य एकटाच स्वतंत्र केला जाईल. 5 “पण जर तो गुलाम
जाहीर करतो की, मी माझ्या मालकावर, माझ्या पत्नीवर व माझ्या
लेकरांवर प्रीती करतो आणि तुम्हाला सोडून जाण्याची माझी इच्छा
नाही, 6 तर त्याच्या मालकाने त्याला न्यायाधीशांसमोर आणावे. मग
त्याने त्याला दरवाजाकडे किंवा दरवाजाच्या चौकटीजवळ आणावे व

आरीने त्याचा कान टोचावा. यानंतर तो त्याचा जीवनभर गुलाम म्हणून
राहील. 7 "एखाद्या मनुष्याने आपली मुलगी गुलाम म्हणून विकली, तर
पुरुष केले जातात त्याप्रमाणे ती स्वतंत्र केली जाणार नाही. 8 ज्याने
तिला आपल्यासाठी निवडून घेतले होते, त्या आपल्या मालकाला जर
ती संतुष्ट करीत नाही, तर त्याने तिची खंडणी भरून तिला जाऊ द्यावे;
तिला परक्याला विकण्याचा त्याला अधिकार नाही, कारण त्याने तिचा
विश्वास तोडला आहे. 9 पण आपल्या मुलासाठी जर तो तिची निवड
करतो, तर त्याने आपल्या मुलीचे हक्क तिला द्यावे. 10 जर तो दुसऱ्या
स्त्रीशी विवाह करतो, तर त्याने पहिल्या पत्नीला अन्न, वस्त्र, आणि
वैवाहिक हक्क यापासून वंचित ठेऊ नये. 11 जर तो या तीन गोष्टी
तिला पुरवित नाही तर ती पैसे न देताच मोकळी जाऊ शकते. 12 "जर
कोणी एखाद्यावर प्राणघातक हल्ला केला तर त्याला मृत्युदंड द्यावा. 13
जरी ते मुद्दाम केलेले नाही, पण परमेश्वरानेच ते घडवून आणले, तर
मी नेमलेल्या ठिकाणी त्यांनी पळून जावे. 14 पण कोणी जर कपटाने
एखाद्याचा वध केला, तर त्याला माझ्या वेदीकडे नेऊन मृत्युदंड द्यावा. 15
"जे कोणी आपला पिता किंवा आईला जिवे मारतात त्यांना जिवे मारावे.
16 "जो कोणी एखाद्याचे अपहरण करतो त्याला जिवे मारावे, पीडित
व्यक्ती त्याच्या ताब्यात असो किंवा कोणाला विकलेली असो. 17 "जो
कोणी आपल्या आई किंवा वडिलास शाप देईल त्यास जिवे मारावे. 18
"जर लोक आपसात भांडत असताना एकाने दुसऱ्याला दगडाने किंवा
बुक्कीने मारले आणि पीडित व्यक्ती मेली नाही, परंतु आपले अंथरूण
धरून राहिली, 19 आणि जर उठून काठीच्या आधाराने बाहेर चालू शकेल
तर ज्याने मारले तो दंडास पात्र नसून निर्दोष असेल; मात्र दोषी व्यक्तीने
इजा झालेल्या व्यक्तीला नुकसान भरपाई व तो व्यक्ती बरा होईपर्यंत सर्व
खर्च द्यावा. 20 "जो कोणी आपल्या गुलाम स्त्री किंवा पुरुषाला काठीने
मारेल व त्यामुळे गुलाम मरण पावला, तर त्या धन्याला शिक्षा व्हावी.
21 पण जर गुलाम एक किंवा दोन दिवसात बरा झाला तर त्यांना पैशाची
शिक्षा होणार नाही, कारण गुलाम त्यांच्या मालकीचा आहे. 22 "कोणी
मारामारी करीत असताना एखाद्या गरोदर स्त्रीला धक्का लागला व
त्यामुळे तिचा गर्भपात झाला, पण तिला गंभीर इजा झाली नाही, तर
तिचा पती मागेल व न्यायाधीश मान्य करेल तितकी रक्कम अपराध्याने
द्यावी. 23 परंतु इजा जर गंभीर आहे, तर तुम्ही जिवाबद्दल जीव, 24
डोळ्याबद्दल डोळा, दाताबद्दल दात, हाताबद्दल हात, पायाबद्दल पाय,
25 चटक्याबद्दल चटका, जखमेबद्दल जखम किंवा इजेबद्दल इजा द्यावी.
26 "एखाद्या धन्याने आपल्या गुलाम स्त्री किंवा पुरुषाच्या डोळ्यांवर
मारून तो फोडला तर डोळ्याची भरपाई म्हणून त्याने त्यांना स्वतंत्र
करावे. 27 एखादा धनी जो आपल्या गुलाम पुरुष किंवा स्त्रीचा दात
पाडतो, तर दाताची भरपाई म्हणून त्याने त्यांना स्वतंत्र करावे. 28
"एखाद्या बैलाने एखाद्या पुरुष किंवा स्त्रीस हुंदडून जिवे मारले, तर त्या
बैलास धोंडमार करून ठार मारावे व त्याचे मांस खाऊ नये. परंतु बैलाचा
मालक निर्दोष असून जबाबदार असणार नाही. 29 पण बैल मारका आहे
याबद्दल त्याच्या मालकाला सूचना देऊनही त्याने त्या बैलाला बांधून
ठेवले नाही व तो एखाद्या पुरुषाला किंवा स्त्रीला मारून टाकतो, तर त्या
बैलाला धोंडमार करावी व त्याच्या मालकास सुद्धा जिवे मारावे. 30 परंतु
जर त्याच्याकडून खंडणी मागितली असेल, तर जेवढी रक्कम मागितली
ती देऊन तो मालक आपला जीव वाचवू शकतो. 31 एखाद्याच्या पुत्राला
किंवा कन्येला बैलाने हुंदडून मारले, तरी हाच नियम लागू व्हावा. 32
पण बैलाने जर एखाद्या स्त्री किंवा पुरुष गुलामाला हुंदडून मारले,
तर त्या गुलामाच्या मालकाला बैलाच्या मालकाने तीस चांदीची नाणी
द्यावीत व बैलाला धोंडमार करावी. 33 "जर कोणी एखादा खड्डा उघडला
किंवा खणला व तो झाकला नाही आणि त्यात बैल किंवा गाढव पडले,
34 तर ज्याने तो खड्डा उघडला त्याने जनावराच्या मालकाला त्याची
किंमत मोजून द्यावी व त्याबदल्यात ते मेलेले जनावर घ्यावे. 35 "जर
कोणाच्या बैलाने दुसऱ्याच्या बैलाला हुंदडून मारले, तर त्या दोघांनी
जिवंत असलेला बैल विकून आलेली रक्कम व मेलेला बैल यांचा सारखा
वाटा करून घ्यावा. 36 पण आपला बैल मारका आहे हे त्या बैलाच्या
मालकाला माहिती असूनही, त्याने त्या बैलाला बांधले नाही, तर त्याच्या
धन्याने जनावराबद्दल भरपाई करावी व मेलेले जनावर घ्यावे.

**22** "जर एखाद्याने बैल किंवा मेंढरू चोरले व ते कापले किंवा विकले
तर त्याने एका बैलाबद्दल पाच बैल व एका मेंढराबद्दल चार मेंढरे
परत करावीत. 2 "एखादा चोर घरफोडी करताना सापडला व त्याला
मारत असताना तो मेला, तर मारणारा रक्तदोषी राहणार नाही. 3 पण ते
जर सूर्योदय झाल्यावर घडले, तर मारणारा रक्तदोषी ठरेल. "ज्याने चोरी
केली त्याने खचितच भरपाई करून द्यावी, पण त्याच्याकडे काहीही
नसले, तर त्याला चोरीची भरपाई म्हणून विकून टाकावे. 4 त्याने
चोरलेले बैल, गाढव किंवा मेंढरू त्याच्याजवळ जिवंत सापडले; तर त्याने
त्याची दुपटीने भरपाई करावी. 5 "जर कोणी व्यक्ती आपली जनावरे
दुसऱ्याच्या शेतात किंवा द्राक्षमळयात चरण्यासाठी मोकळी सोडतो, तर
त्याने आपल्या स्वतःच्या शेतातील व द्राक्षमळयातील सर्वोत्तम पीक
देऊन भरपाई करावी. 6 "कोणी जर विस्तव पेटविले आणि चुकून तो
काट्यांच्या झुडूपात पसरून दुसऱ्याच्या धान्याची कोठारे किंवा उभे पीक
किंवा संपूर्ण शेत जळून जाते, तर ज्याने विस्तव पेटविले त्याने नुकसान
भरपाई करून द्यावी. 7 "जर कोणी चांदी किंवा सामान सुरक्षित राहावे
म्हणून आपल्या शेजाऱ्याकडे ठेवले आणि त्याची चोरी झाली, जर
चोराला पकडले तर त्या चोराने त्या सामानाची दुप्पट भरपाई करून
द्यावी. 8 पण जर चोर सापडला नाही तर घरमालकाने न्यायाधीशासमोर
हजर व्हावे आणि शेजाऱ्याच्या सामानावर त्याने हात टाकला नाही हे
सिद्ध करावे. 9 एखादे बैल, गाढव, मेंढरू, वस्त्र किंवा एखादी हरवलेली
वस्तू असे काहीही असो, ज्याबद्दल कोणी कलहाने बेकायदेशीरपणे
म्हणतो की, 'हे माझे आहे,' तर त्या दोघांचाही वाद न्यायाधीशासमोर
आणावा. ज्या कोणाला न्यायाधीश दोषी ठरवेल त्याने दुसऱ्याला दुपटीने
परत करावे. 10 "जर कोणी आपले गाढव, बैल, मेंढरू किंवा कोणतेही
जनावर आपल्या शेजाऱ्याकडे सुरक्षित राहावे म्हणून ठेवले आणि ते
मेले किंवा त्याला काही इजा झाली किंवा त्याच्यावर नजर नसताना

त्याला कोणी घेऊन गेले, 11 तर शेजाऱ्याने दुसऱ्याच्या जनावरावर हात टाकला नाही हे सिद्ध करण्यासाठी त्याने याहवेहसमोर शपथ घ्यावी. मालकाला यावर विश्वास ठेवावा लागणार आणि त्यासाठी कोणतीही रक्कम भरून द्यायची गरज नाही. 12 पण ते जनावर जर शेजाऱ्याकडून चोरीला गेले, तर त्याने मालकाला भरपाई करून द्यावे. 13 जर एखाद्या जंगली श्वापदाने ते जनावर फाडून टाकले, तर त्या शेजाऱ्याने त्या जनावराचे पार्श्वशरीर पुरावा म्हणून समोर आणावे आणि त्या फाडलेल्या जनावराची फेड करून देऊ नये. 14 “जर कोणी आपल्या शेजाऱ्याकडून जनावर उसने घेतो व जनावराचा मालक तिथे नसताना ते जनावर जखमी झाले किंवा मेले, तर त्याने त्याची भरपाई त्याला द्यावी. 15 पण मालक जनावराबरोबर असला, तर भाडेकरूने त्याची भरपाई करू नये. जर त्याने ते भाड्याने घेतले असेल, तर त्याचे नुकसान भाड्यातच आलेले असते. 16 “जर एखादा मनुष्य मागणी न झालेल्या कुमारीला भुलवितो आणि तिचा विनयभंग करतो, तर त्याने वधूकिंमत द्यावी आणि ती त्याची पत्नी होईल. 17 पण जर तिच्या वडिलांनी ती त्याला देण्यास नाकारले, तरीही त्याने कुमारिकेची वधूकिंमत द्यावी. 18 “चेटकिणीला मुळीच जिवंत राहू देऊ नये. 19 “पशुशी लैंगिक संबंध करणाऱ्याला अवश्य जिवे मारावे. 20 “याहवेह परमेश्वराशिवाय इतर दैवतांना अर्पणे करणाऱ्यांचा नाश करून टाकावा. 21 “परदेशी व्यक्तीशी गैरवर्तणूक किंवा त्याला जाच करू नका, कारण तुम्हीही इजिप्त देशात परदेशी होता. 22 “विधवा किंवा अनाथाचा गैरफायदा घेऊ नये. 23 तुम्ही जर तसे केले आणि त्यांनी माझा धावा केला, तर मी खचितच त्यांचे रडणे ऐकेन. 24 मग माझा क्रोध पेटेल आणि मी तुम्हाला तलवारीने मारून टाकीन; आणि तुमची पत्नी विधवा व तुमची लेकरे अनाथ होतील. 25 “तुमच्यामध्ये असलेल्या माझ्या गरजवंत लोकांना जर तुम्ही उसने पैसे दिले, तर त्यांच्याशी सावकारी व्यवहार करू नका; व व्याज लावू नका. 26 तुम्ही आपल्या शेजाऱ्याचे पांघरूण मागून घेतले, तर सूर्यास्तापूर्वी ते परत करा, 27 कारण तुमच्या शेजाऱ्याजवळ पांघरावयाला तेवढेच असेल, तर ते रात्री काय घेऊन झोपतील? आणि जेव्हा ते माझ्याकडे धावा करतील, तेव्हा मी त्यांचे ऐकेन, कारण मी दयाळू आहे. 28 “तुम्ही परमेश्वराची निंदा करू नये किंवा तुमच्या लोकांच्या पुढाऱ्यांपैकी कोणाला शाप देऊ नये. 29 “आपल्या धान्यातून किंवा आपल्या फळातून द्यावयाचे दान देण्यास विलंब करू नये. “आपला प्रथम जन्मलेला पुत्र तुम्ही मला समर्पण करावा. 30 बैल व मेंढे यांच्याविषयी सुद्धा असेच करावे. त्यांना सात दिवस त्यांच्या आईजवळ राहू द्यावे, परंतु आठव्या दिवशी ते मला द्यावे. 31 “तुम्ही माझे पवित्र लोक असावे. यास्तव हिंस्र श्वापदाने मारून टाकलेल्या प्राण्याचे मांस खाऊ नये; ते तुम्ही कुत्र्यांना घालावे.

**23** “तुम्ही खोट्या अफवा पसरवू नयेत. अन्यायाने साक्षीदार होऊन दोषी व्यक्तीला मदत करू नये. 2 “दुष्कृत्य करण्याकरिता जमावाला अनुसरू नका आणि त्या जमावाशी एक होऊन न्यायवादात आपली साक्ष फिरवू नका, 3 आणि गरिबाच्या न्यायवादात तो दोषी असता, त्यावर दया दाखवू नये. 4 “तुमच्या वैऱ्याचा बैल किंवा गाढव भटकलेला असा तुमच्या नजरेस पडला, तर ते तुम्ही अवश्य माघारी आणून परत करावे. 5 जे तुमचा द्वेष करतात त्यांचे गाढव ओझ्याखाली पडलेले तुम्हाला दिसले, ते तसेच सोडू नये; त्यांना अवश्य मदत करावी. 6 “तुमच्यातील गरिबांच्या न्यायवादात त्यांचा न्याय नाकारला जाऊ नये. 7 खोट्या आरोपांपासून स्वतःला दूर ठेवावे आणि निरपराधी किंवा प्रामाणिक व्यक्तीला मरणदंड देऊ नये, कारण मी दोषी व्यक्तीला सोडणार नाही. 8 “तुम्ही लाच घेऊ नये, कारण लाच डोळस व्यक्तीस आंधळे करते व निरपराध्याचे शब्द विपरीत करते. 9 “परदेशी व्यक्तीस जाचू नका; परदेशी असणे काय आहे हे तुम्ही समजता, कारण तुम्हीही इजिप्त देशात परदेशी होता. 10 “सहा वर्षे आपल्या भूमीत तुम्ही पेरणी करावी आणि पीक गोळा करावे, 11 परंतु सातव्या वर्षी जमीन नांगरू नये आणि न वापरता तशीच पडीक राहू द्यावी. मग तुमच्यातील गरीब लोकांना त्यातील अन्न मिळेल आणि त्यातूनही उरलेले वनपशू खातील. तुमचे द्राक्षमळे व जैतुनाच्या बागांविषयी सुद्धा असेच करावे. 12 “सहा दिवस आपले काम करावे, पण सातव्या दिवशी काम करू नये, अशासाठी की तुमच्या बैलांना व गाढवांना विसावा मिळावा, तसेच तुमच्या घरात जन्मलेले गुलाम आणि तुमच्यामध्ये राहणारा परदेशी सुद्धा ताजेतवाने होऊ शकेल. 13 “जे काही मी तुम्हाला सांगितले आहे ते काळजीपूर्वक पाळावे. इतर दैवतांचा धावा करू नये; तुमच्या मुखांनी त्यांचे नावही घेऊ नये. 14 “वर्षातून तीन वेळा तुम्ही माझ्यासाठी सण पाळावेत. 15 “बेखमीर भाकरीचा सण पाळावा; मी तुम्हाला आज्ञापिल्याप्रमाणे, सात दिवस बेखमीर भाकर खा. अवीव महिन्यात नेमलेल्या वेळेत असे करावे, कारण त्या महिन्यात तुम्ही इजिप्त देशातून बाहेर आला. “माझ्यासमोर कोणीही रिकाम्या हाताने येऊ नये. 16 “जेव्हा तुम्ही तुमच्या शेतात पेरलेल्या पिकाचा हंगाम करता, तेव्हा त्याच्या प्रथमफळाने हंगामाचा सण पाळावा. “वर्षाच्या शेवटी आपल्या शेतातून तुम्ही हंगाम गोळा करता, तेव्हा संग्रहाचा सण पाळावा. 17 “वर्षातून तीन वेळा तुमच्या सर्व पुरुषांनी सार्वभौम याहवेह यांच्यासमोर हजर व्हावे. 18 “अर्पणातील रक्त खमिराबरोबर मला अर्पण करू नये. “मला अर्पण केलेल्या यज्ञपशूंची चरबी सकाळपर्यंत राहू देऊ नये. 19 “तुमच्या भूमीच्या प्रथम उत्पन्नातील सर्वोत्तम भाग तुमचे परमेश्वर याहवेह यांच्या भवनात आणावा. “करडू त्याच्या आईच्या दुधात शिजवू नये. 20 “पाहा, मार्गात तुझे रक्षण करावे व जो देश मी तुमच्यासाठी तयार करून ठेवला आहे, त्यात तुम्हाला घेऊन यावे म्हणून तुमच्यापुढे मी एक दूत पाठवित आहे. 21 त्याच्यापुढे सावध असा आणि तो जे काही सांगेल ते ऐका. त्याच्याविरुद्ध बंड करू नका; तो तुझ्या अपराधांची क्षमा करणार नाही, कारण माझे नाव त्याच्यामध्ये आहे. 22 जर तुम्ही काळजीपूर्वक त्याचे ऐकाल आणि मी जे सांगतो ते कराल, तर मी तुमच्या शत्रूंचा शत्रू होईन आणि जे तुमचा विरोध करतात, त्यांचा मी विरोधक होईन. 23 माझा दूत तुमच्यापुढे जाईल आणि तुम्हाला अमोरी, हिथी, परिज्जी, कनानी, हिव्वी व यबूसी यांच्या देशात पोहचवेल आणि मी त्या सर्वांचा नाश करेन. 24 त्यांच्या दैवतांना नमन करू नये किंवा

त्यांची उपासना करू नये किंवा त्यांच्या चालीरीतींचे अनुसरण करू
नये. तुम्ही त्या मोडून टाकाव्यात आणि त्यांच्या पवित्र दगडांचा चुरा
करावा. 25 तुमचे परमेश्वर याहवेह यांची सेवा करा, म्हणजे तुमच्या
अन्नावर व पाण्यावर त्यांचा आशीर्वाद राहील. तुमच्यातून मी आजार
नाहीसे करेन, 26 तुमच्या देशात कोणाचा गर्भपात होणार नाही, ना
कोणी वांझ राहणार. तुमचा जीवनकाळ मी पूर्ण करेन. 27 “तुम्ही
जो देश जिंकून घ्याल त्यात मी आपले भय पाठवेन व त्यात गोंधळ
निर्माण करेन. तुमचे शत्रू पाठ दाखवून पळ काढतील असे मी करेन.
28 हिव्वी, कनानी, हिथी या लोकांनी तुमच्या मार्गातून बाजूला व्हावे
म्हणून मी तुमच्यापुढे गांधीलमाशा पाठवेन. 29 पण एका वर्षातच मी
त्यांना घालवून देणार नाही, कारण देश ओसाड होईल आणि वनपशू
तुमच्यासाठी पुष्कळ होतील. 30 तुमची संख्या वाढून तुम्ही त्या देशाचा
ताबा घेईपर्यंत थोडेथोडे असे मी त्यांना तुमच्यापुढून घालवून देईन. 31
“तांबड्या समुद्रापासून पलिष्ट्यांच्या समुद्रापर्यंत व वाळवंटापासून
फरात नदीपर्यंत मी तुमची सीमा स्थापित करेन. त्या देशात राहणारे
लोक मी तुमच्या हाती देईन आणि तुम्ही त्यांना आपल्या पुढून घालवून
टाकाल. 32 त्यांच्याशी किंवा त्यांच्या दैवतांशी करार करू नये. 33
त्यांना तुमच्या देशात राहू देऊ नये, नाहीतर ते तुम्हाला माझ्याविरुद्ध
पाप करण्यास प्रवृत्त करतील, कारण त्यांच्या दैवतांची उपासना करणे
तुमच्यासाठी खचितच पाश असे होईल.”

**24** मग याहवेहने मोशेला म्हटले, “तू आणि अहरोन, नादाब आणि
अबीहू व इस्राएलींचे सत्तर वडील याहवेहकडे वर या. तुम्ही
दुरूनच उपासना करावी, 2 परंतु मोशेने एकटेच याहवेहजवळ यावे;
इतरांनी जवळ येऊ नये. लोकांनी त्यांच्याबरोबर वर येऊ नये.” 3
मग मोशेने जाऊन याहवेहचे शब्द व नियम लोकांना सांगितले, त्यांनी
एका आवाजात प्रतिसाद देत म्हटले, “याहवेहने जे सर्वकाही सांगितले
त्याप्रमाणे आम्ही करू.” 4 मग याहवेहने मोशेला जे काही सांगितले होते
ते सर्व त्याने लिहून ठेवले. दुसऱ्या दिवशी अगदी सकाळी मोशेने उठून
पर्वताच्या पायथ्याशी एक वेदी बांधली व इस्राएलाच्या बारा गोत्रानुसार
बारा खांब उभे केले. 5 मग त्याने इस्राएलचे तरुण पुरुष पाठविले व
त्यांनी याहवेहला होमार्पणे व गोऱ्हे अर्पून शांत्यर्पण केले. 6 मोशेने
त्यातील अर्धे रक्त वाटीत घेतले व अर्धे वेदीवर शिंपडले. 7 मग मोशेने
कराराचा ग्रंथ घेऊन लोकांपुढे वाचला. त्यांनी प्रतिसाद दिला, “याहवेहने
सांगितले ते सर्वकाही आम्ही करू; आम्ही आज्ञापालन करू.” 8 मग
मोशेने रक्त घेतले, लोकांवर शिंपडले आणि म्हणाला, “हे कराराचे रक्त
आहे, जो याहवेहने त्यांच्या वचनानुसार तुमच्याबरोबर केला आहे.” 9
मग मोशे व अहरोन, नादाब व अबीहू व इस्राएलचे सत्तर वडील वर गेले.
10 आणि त्यांनी इस्राएलाच्या परमेश्वराला पाहिले. त्यांच्या पायाखाली
नीलकांत पाषाणाच्या चिरेबंदी कामासारखे अगदी निरभ्र आकाशासारखे
होते. 11 परंतु त्या इस्राएलाच्या वडिलांविरुद्ध परमेश्वराने आपला हात
उगारला नाही; त्यांनी परमेश्वराला पाहिले आणि त्यांनी खाणेपिणे केले.
12 मग याहवेह मोशेला म्हणाले, “तू पर्वतावर माझ्याकडे ये आणि येथेच
राहा आणि लोकांसाठी सूचना म्हणून नियम आणि आज्ञा ज्या मी दगडी
पाट्यांवर लिहिल्या आहेत त्या मी तुला देईन.” 13 मग मोशे व त्याचा
मदतनीस यहोशुआ उठले आणि मोशे पर्वतावर परमेश्वराकडे गेला. 14
तो वडीलजनांना म्हणाला, “आम्ही तुमच्याकडे परत येईपर्यंत येथेच
थांबा, जर कोणाचा काही वाद असला तर त्यांनी अहरोन आणि हूर
तुमच्याबरोबर आहेत, त्यांच्याकडे जावे.” 15 जेव्हा मोशे पर्वतावर गेला,
मेघांनी पर्वत झाकून गेले, 16 आणि याहवेहचे वैभव सीनाय पर्वतावर
येऊन राहिले. सहा दिवस मेघांनी सीनाय पर्वत झाकलेला होता आणि
सातव्या दिवशी परमेश्वराने मेघांतून मोशेला आवाज दिला. 17 इस्राएली
लोकांना पर्वतावरील याहवेहचे वैभव भस्म करणाऱ्या अग्नीप्रमाणे
दिसले. 18 मग मोशेने मेघांमधून पर्वतावर प्रवेश केला आणि तो तिथे
चाळीस दिवस व चाळीस रात्री राहिला.

**25** मग याहवेह मोशेला म्हणाले, 2 “इस्राएली लोकांना सांग की,
त्यांनी मला अर्पण आणावे. ज्यांना मनापासून देण्याची इच्छा
आहे त्यांच्याकडून ते तू माझ्यावतीने स्वीकारावे. 3 “त्यांच्यापासून तू जी
अर्पणे स्वीकारावी ती ही आहेत: “सोने, चांदी आणि कास्य; 4 निळ्या,
जांभळ्या व किरमिजी रंगाचे सूत आणि रेशमी ताग, बोकडाचे केस;
5 लाल रंगाने रंगविलेली मेंढ्याची कातडी व टिकाऊ चर्म; बाभळीचे
लाकूड; 6 दिव्यासाठी जैतुनाचे तेल; अभिषेकाचे तेल व सुगंधी धूप
यासाठी सुवासिक मसाले; 7 एफोदाच्या ऊरस्त्राणावर चढविण्यासाठी
गोमेद खडे व इतर रत्ने. 8 “मग मी त्यांच्यामध्ये वस्ती करावी, म्हणून
त्यांनी माझ्यासाठी एक पवित्रस्थान बनवावे. 9 हा निवासमंडप आणि
त्याची रचना मी दाखवेन त्याप्रमाणेच असावी. 10 “त्यांनी बाभळीच्या
लाकडाचा एक कोश तयार करावा—अडीच हात लांब व दीड हात
रुंद, दीड हात उंच. 11 त्याला आतून व बाहेरून शुद्ध सोन्याचे आवरण
द्यावे व त्याच्याभोवती सोन्याचा काठ करावा. 12 त्यासाठी सोन्याच्या
चार कड्या बनवून कोशाच्या चार पायांना, दोन कड्या एका बाजूला व
दोन कड्या दुसऱ्या बाजूला अशा त्या बसवाव्यात. 13 मग बाभळीच्या
लाकडाचे दांडे बनवून त्यांना सोन्याचे आवरण द्यावे. 14 कोश वाहून
नेण्यासाठी ते दांडे दोन्ही बाजूंच्या कड्यात घालाव्या. 15 या दांड्या
कोशाच्या कड्यातच असाव्यात; त्या काढू नये. 16 मग कराराच्या
नियमाच्या पाट्या ज्या मी तुला देणार, त्या तू कोशाच्या आत ठेवाव्यात.
17 “प्रायश्चिताचे झाकण शुद्ध सोन्याचे बनवावे—ते अडीच हात लांब व
दीड हात रुंद असावे. 18 मग झाकणाच्या टोकांना घडवून घेतलेल्या
सोन्याचे दोन करूब करून ठेवावेत. 19 एका बाजूस एक करूब आणि
दुसऱ्या बाजूस दुसरे करूब असावे; ते करूब झाकणास दोन्ही बाजूंनी
अखंड जोडून घ्यावे. 20 या करुबांची पंखे वरच्या बाजूने पसरून
प्रायश्चिताच्या झाकणावर आच्छादले जावे. करुबाचे मुख समोरासमोर
असून, त्यांची दृष्टी प्रायश्चिताच्या झाकणाकडे असावी. 21 हे प्रायश्चिताचे
झाकण कोशाच्या वर ठेवावे आणि कराराच्या नियमाच्या पाट्या ज्या
मी तुला देणार त्या कोशाच्या आत ठेवाव्यात. 22 तिथे, प्रायश्चिताच्या
झाकणावर दोन करूब जे कोशावर ठेवलेले आहेत, त्यांच्यामध्ये मी तुला

भेटेन आणि इस्राएल लोकांसाठी द्यावयाच्या सर्व आज्ञा मी तुला देईन.
23 “बाभळीच्या लाकडाचा एक मेज बनवा; जो दोन हात लांब, एक
हात रुंद व दीड हात उंच असावा. 24 त्याला शुद्ध सोन्याचे आवरण
द्यावे आणि त्याभोवती सोन्याचा काठ करावा. 25 मेजाच्या सभोवती
चार बोटे रुंदीएवढी पट्टी बनवून त्यावर सोन्याचा काठ करावा. 26
मेजाकरिता सोन्याच्या चार कड्या कराव्यात आणि त्या चार पायांच्या
चार कोपऱ्यांवर लावाव्या. 27 मेज वाहून नेण्याच्या दांड्या धरण्यासाठी
कड्या पट्टीच्या जवळ असाव्यात. 28 दांडे बाभळीच्या लाकडाचे
असावेत, त्यांना सोन्याचे आवरण द्यावे आणि मेज वाहून नेण्यासाठी
त्यांचा उपयोग करावा. 29 आणि अर्पणे ओतण्याकरिता मेजावरील
ताटे, पात्रे, तसेच त्याचे कलश व वाट्या हे शुद्ध सोन्याचे असावे. 30 त्या
मेजावर माझ्यासमोर समक्षतेची भाकर नेहमी ठेवलेली असावी. 31
“शुद्ध सोन्याचा एक दीपस्तंभ बनवा. त्याची बैठक, त्याचा दांडा घडून
कराव्या आणि त्याच्या फुलाच्या आकाराची फुलपात्रे, त्याच्यावरील
कळ्या व फुले ही सर्व त्याबरोबर अखंड असावीत. 32 दीपस्तंभाच्या
बाजूंनी सहा फांद्या निघाव्या; तीन एका बाजूला व तीन दुसऱ्या बाजूला.
33 एका फांदीवर बदामाच्या फुलांप्रमाणे कळ्या आणि फुले असलेल्या
तीन वाट्या, पुढच्या फांदीवर तीन वाट्या आणि दीपस्तंभापासून
पसरलेल्या सर्व सहा फांद्यांसाठी समान असावे. 34 आणि दीपस्तंभावर
वाटीच्या आकाराची चार बदामाची फुले त्याच्या कळ्या व फुले बनवावे.
35 दीपस्तंभाच्या बाजूने निघालेल्या पहिल्या दोन फांद्यांच्या खालच्या
बाजूस एक कळी असावी, दुसरी कळी दुसऱ्या दोन फांद्यांच्या खालच्या
बाजूस, आणि तिसरी कळी तिसऱ्या फांदीच्या जोडीखाली असावी; सर्व
मिळून सहा फांद्या असाव्या. 36 या सर्व कळ्या व फांद्या शुद्ध सोन्याच्या
असून दीपस्तंभाला घडीव शुद्ध सोन्याच्या एकाच अखंड तुकड्यापासून
असाव्या. 37 “मग त्याचे सात दिवे तयार करून ते दीपस्तंभावर असे
ठेवावे की त्यांचा प्रकाश त्यांच्यासमोर पडेल. 38 त्यांच्या वातीचे चिमटे
व ते ठेवण्याची तबके शुद्ध सोन्याची असावी. 39 दीपस्तंभ व इतर
उपकरणांसाठी एक तालांत शुद्ध सोन्याचा उपयोग करावा. 40 मी
तुला पर्वतावर दाखविलेल्या नमुन्याप्रमाणेच ते सर्व काळजीपूर्वकपणे
बनवावे.”

26
“निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगांच्या तागाच्या व रेशमी
तागाच्या दहा पडद्यांनी निवासमंडप तयार करावा, त्यावर कुशल
कारागिरांकडून करूब विणून घ्यावे. 2 सर्व पडद्यांची लांबी अठ्ठावीस हात
व रुंदी चार हात असावी. 3 पाच पडदे एकमेकांना जोडलेले असावेत व
इतर पाच पडद्यांचेही तसेच करावे. 4 जोडलेल्या पडद्यापैकी शेवटच्या
पडद्यांच्या किनारीवर निळ्या रंगाच्या कापडाचे फासे बनवावे आणि
दुसऱ्या पडद्यांच्या शेवटच्या पडद्यालाही तसेच करावे. 5 एका पडद्याच्या
किनारीला पन्नास फासे व दुसऱ्या पडद्याच्या किनारीपर्यंत पन्नास फासे
करावे, हे फासे समोरासमोर असावेत. 6 मग सोन्याचे पन्नास आकडे
तयार करावेत आणि त्याचा उपयोग पडद्यांना एकत्र जोडण्यासाठी
करावा की निवासमंडप अखंड होईल. 7 “निवासमंडपावर आच्छादन
करण्यासाठी बोकडाच्या केसाचे पडदे तयार करावेत; ते अकरा पडदे
असावेत. 8 सर्व अकरा पडदे एकाच मापाचे, म्हणजे लांबी तीस हात व
रुंदी चार हात. असावी. 9 पाच पडदे एकत्र व इतर सहा पडदे एकत्र
असे जोडावेत. सहावा पडदा मंडपाच्या पुढील बाजूस दुमडावा. 10
जोडलेल्या पडद्यांपैकी शेवटच्या पडद्याच्या किनारीवर शेवटपर्यंत पन्नास
फासे करून तो एकजोड करावा आणि दुसऱ्या पडद्यापैकी किनारीवर
देखील पन्नास फासे करून एकजोड करावा. 11 मग कास्याचे पन्नास
आकडे करावेत आणि ते फासात घालून असे जोडावे की तंबू एकजोड
होईल. 12 तंबूच्या पडद्याचा उरलेला भाग, म्हणजे जो अर्धा पडदा उरतो,
तो निवासमंडपाच्या मागच्या बाजूस टांगलेला असू द्यावा. 13 तंबूचे
पडदे दोन्ही बाजूंनी एकएक हात अधिक लांब असावे; उरलेला पडदा
निवासमंडपाला झाकेल असा लोंबत ठेवावा. 14 तंबूसाठी तांबडा रंग
दिलेल्या मेंढ्याच्या कातड्याचे आच्छादन करावे आणि त्यावर टिकाऊ
चर्माचे आच्छादन करावे. 15 “निवासमंडपासाठी बाभळीच्या लाकडाच्या
उभ्या फळ्या तयार कराव्यात. 16 प्रत्येक फळी दहा हात लांब व दीड
हात रुंद असावी. 17 एक फळी दुसऱ्या फळीला जोडण्यासाठी त्यांच्या
समोरासमोर दोन कुसे असावी. निवासमंडपाच्या प्रत्येक फळीला
अशाप्रकारे कुसे बनवावी. 18 निवासमंडपाच्या दक्षिणेस वीस फळ्या
बसवाव्यात. 19 आणि त्या फळ्यांखाली ठेवण्यासाठी चांदीच्या चाळीस
बैठका कराव्यात—प्रत्येक फळीसाठी दोन बैठका, प्रत्येक कुसाखाली
एक. 20 निवासमंडपाच्या दुसऱ्या बाजूला, म्हणजे उत्तरेला वीस फळ्या
बनवाव्या 21 आणि प्रत्येक फळीखाली दोन अशा चांदीच्या चाळीस
बैठका कराव्या. 22 निवासमंडपाच्या शेवटच्या बाजूसाठी, म्हणजे
पश्चिम बाजूस सहा फळ्या तयार कराव्या, 23 आणि निवासमंडपाच्या
मागच्या बाजूच्या कोपऱ्यांसाठी दोन फळ्या तयार कराव्या. 24 या दोन
कोपऱ्यातील फळ्या खालपासून वरपर्यंत दुहेरी जोडीने एकाच कडीत
जोडाव्यात; दोन्ही कोपऱ्यांच्या फळ्या एकसारख्याच असाव्यात. 25
एका फळीखाली दोन; अशा प्रकारे एकूण आठ फळ्या आणि चांदीच्या
सोळा बैठका असतील. 26 “बाभळीच्या लाकडाचे अडसर तयार करा:
निवासमंडपाच्या एका बाजूच्या फळ्यांसाठी पाच अडसर असावे,
27 निवासमंडपाच्या दुसऱ्या बाजूला पाच आणि पश्चिमेच्या बाजूच्या
म्हणजेच शेवटच्या बाजूच्या फळ्यांसाठी पाच अडसर असावे. 28
मध्यभागी लावण्याचे अडसर फळ्यांच्या मधून एका टोकापासून दुसऱ्या
टोकापर्यंत पोहोचतील असे असावे. 29 फळ्यांना सोन्याचे आवरण
लावावे आणि आडव्या खांबांना अडकविण्यासाठी सोन्याच्या कड्या
बनवाव्या. आडव्या खांबांना सुद्धा सोन्याचे आवरण द्यावे. 30 “मी तुला
पर्वतावर दाखविल्याप्रमाणे नमुन्याप्रमाणे निवासमंडप तयार करावा. 31
“निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगांच्या कातलेल्या रेशमी तागाचा
पडदा करून त्यावर कुशल कारागिरांकडून करूब विणून घ्यावेत. 32 हा
पडदा, बाभळीच्या लाकडाचे बनविलेले सोन्याचे आवरण देऊन चांदीच्या
बैठकावर उभ्या असलेल्या चार खांबावर चार सोन्याच्या बैठकावर
टांगावा. 33 पडदा आकड्यांवर टांगावा आणि कराराचा कोश पडद्यामागे

ठेवावा. हा पडदा पवित्रस्थान व परमपवित्रस्थानाची साक्ष वेगळी करेल.
34 प्रायश्चिताचे झाकण परमपवित्रस्थानात कराराच्या कोशावर ठेवावे.
35 निवासमंडपाच्या पडद्याच्या बाहेर उत्तर दिशेला मेज ठेवावा आणि
त्यासमोर दक्षिण दिशेला दीपस्तंभ ठेवावा. 36 “निवासमंडपाच्या
प्रवेशद्वारासाठी निळया, जांभळया व किरमिजी रंगांच्या रेशमी तागाचा
नक्षीदार पडदा बनवावा. 37 या पडद्यासाठी सोन्याचे आकडे आणि
सोन्याचे आवरण दिलेले बाभळीच्या लाकडाचे पाच खांब तयार करावेत
आणि त्यांच्यासाठी कास्याच्या पाच बैठका तयार कराव्यात.”

27 “बाभळीच्या लाकडाची वेदी तयार करावी, ती तीन हात उंच, पाच
हात लांब व पाच हात रुंद असून ती चौकोनी असावी. 2 तिच्या
चार कोपऱ्यांना प्रत्येकी एक शिंग बनवावे, शिंगे व वेदी अखंड असावी.
वेदीला कास्याचे आवरण द्यावे. 3 वेदीवरील सर्व पात्रे, म्हणजेच राख
उचलून नेण्याची भांडे, फावडे, शिंपडण्याचे भांडे, मांसाचे काटे आणि
अग्निपात्रे कास्याचे असावीत. 4 तिच्यासाठी कास्याची जाळी तयार
करावी आणि जाळीच्या चारही बाजूला कास्याच्या चार कड्या तयार
कराव्या. 5 वेदीच्या काठाखाली ती अशाप्रकारे ठेवावी की ती वेदीच्या
अर्ध्या उंचीपर्यंत यावी. 6 वेदीसाठी बाभळीच्या लाकडाचे दांडे तयार
करून त्यांना कास्याचे आवरण द्यावे. 7 दांडे कड्यात असे घालावेत की,
वेदी वाहून नेताना ते तिच्या दोन बाजूंनी असतील. 8 फळया लावून
वेदी आतून पोकळ बनवावी. ती तुला पर्वतावर दाखविल्याप्रमाणेच
बनवावी.” 9 “निवासमंडपासाठी अंगण बनवावे. त्याची दक्षिणेकडील
बाजू शंभर हात लांब असावी व त्यास कातलेल्या रेशमी तागाचे पडदे
असावेत, 10 आणि वीस खांब व वीस कास्याच्या बैठका बनवाव्या,
खांबावर चांदीच्या कड्या व पट्ट्या असाव्या. 11 उत्तरेकडील बाजू सुद्धा
शंभर हात लांब असून तिलाही पडदे आणि वीस खांब व कास्याच्या
वीस बैठका बनवाव्या, खांबाच्या कड्या व पट्ट्या चांदीच्या असाव्या. 12
“अंगणाच्या पश्चिमेकडील बाजू पन्नास हात रुंदीची असावी व त्यासाठी
पडदे, व दहा खांब व दहा बैठका असाव्या. 13 सूर्योदयाकडील पूर्वेकडील
अंगण सुद्धा पन्नास हात रुंद असावे. 14 प्रवेशद्वाराच्या एका बाजूस
पंधरा हात लांबीचा पडदा आणि तीन खांब व तीन बैठका असाव्या.
15 आणि दुसऱ्या बाजूला पंधरा हात लांबीचे पडदे, तीन खांब व तीन
बैठका असाव्या. 16 “अंगणाच्या प्रवेशद्वारासाठी, निळया जांभळया व
किरमिजी रंगाच्या सुताचे व रेशमी तागाचा, वीस हात लांबीचा पडदा
असावा; त्यावर भरतकाम केलेले असावे; त्यात चार खांब व चार
बैठका असाव्या. 17 अंगणाच्या सभोवती असलेल्या सर्व खांबांना
चांदीच्या पट्ट्या, कड्या व कास्याच्या बैठकी असाव्या. 18 अंगणाची
लांबी शंभर हात, रुंदी पन्नास हात असावी व त्यास कातलेल्या रेशमी
तागाचे पाच हात उंचीचे पडदे आणि कास्याच्या बैठकी असाव्या. 19
निवासमंडपातील सेवेसाठी लागणारी सर्व पात्रे व उपकरणे, त्यांच्या
मेखा व अंगणाच्या सर्व मेखा कास्याच्या असाव्यात.” 20 “इस्राएली
लोकांना आज्ञा दे की दिवे अखंड पेटत राहावे म्हणून त्यांनी कुटून
काढलेले जैतुनाचे शुद्ध तेल तुझ्याकडे आणावे. 21 सभामंडपातील
जे पडदे कराराच्या कोशाला झाकतात त्याच्याबाहेर, अहरोन आणि
त्याच्या पुत्रांनी याहवेहसमोर संध्याकाळपासून सकाळपर्यंत दिवे पेटत
ठेवावे. इस्राएलात हा विधी पिढ्यान् पिढ्या असावा.”

28 “तुझा भाऊ अहरोन व त्याचे पुत्र, नादाब, अबीहू, एलअज़ार
व इथामार यांनी याजक म्हणून माझी सेवा करावी, यासाठी
त्यांना इस्राएली लोकांमधून तुझ्याकडे आणावे. 2 अहरोन तुझा भाऊ
याला सन्मान आणि गौरव मिळावा म्हणून त्याच्यासाठी पवित्र वस्त्रे
तयार करावी. 3 ज्यांना अशा बाबतीत मी ज्ञान दिले आहे, त्या सर्व
कुशल कारागिरांना सांग की अहरोनाच्या पवित्रीकरणासाठी त्यांनी
वस्त्रे बनवावी, यासाठी की त्याने याजक म्हणून माझी सेवा करावी. 4
त्यांनी जी वस्त्रे बनवावी ती ही: ऊरपट, एफोद, एक झगा, भरतकाम
केलेला अंगरखा, फेटा व कमरबंद. त्यांनी ही पवित्र वस्त्रे तुझा भाऊ
अहरोन व त्याच्या पुत्रांसाठी बनवावी, यासाठी की याजक म्हणून त्यांनी
माझी सेवा करावी. 5 त्यांनी सोन्याचा आणि निळया, जांभळया व
किरमिजी रंगांच्या सुताचा व रेशमी तागाचा वापर करावा. 6 “एफोद
सोन्याचा, निळया, जांभळया व किरमिजी रंगाच्या सुताचा आणि बारीक
कातलेल्या रेशमी तागाचा, कुशल कारागिराच्या हातांनी बनवा. 7
त्याच्या दोन कोपऱ्यांना दोन खांदेपट्ट्या जोडलेल्या असाव्या, म्हणजे
ते बांधता येईल. 8 कुशलतेने विणलेला कमरबंद त्याच्यासारखाच
असावा; एफोदाशी अखंड असा तो सोन्याचा, निळया, जांभळया
व किरमिजी रंगाच्या सुताचा व कातलेल्या रेशमी तागाचा असावा.
9 “दोन गोमेद रत्ने घेऊन त्यावर इस्राएलाच्या पुत्रांची नावे कोरून
घ्यावीत. 10 एका रत्नावर सहा व दुसऱ्यावर सहा अशी त्यांच्या
जन्माच्या क्रमानुसार ती असावी. 11 मोलवान रत्ने कोरणारे मुद्रेची
कोरणी करतात त्याप्रमाणे तू त्या दोन रत्नांवर इस्राएलांच्या पुत्रांची
नावे कोरून घ्यावी व ती दोन्ही रत्ने सोन्याच्या जाळीदार साच्यात
बसवावी. 12 आणि ते एफोदाच्या दोन खांदेपट्ट्यांवर इस्राएलच्या पुत्रांचे
स्मारक म्हणून रत्ने लावावी. याहवेहसमोर स्मारक म्हणून अहरोनाने
ही नावे आपल्या खांद्यांवर वागवावी. 13 सोन्याचे खाचे बनव 14
आणि पीळ घातलेल्या दोरीसारख्या शुद्ध सोन्याच्या दोन साखळया
तयार करून खांदेपट्ट्यांवरील आकड्यात अडकवाव्या.” 15 “मग
निर्णय घेण्यासाठी कुशल कारागिरांकडून ऊरपट तयार करून घ्यावा.
एफोदाप्रमाणे सोन्याची जर असलेला, निळया, जांभळया व किरमिजी
रंगांचे सूत व कातलेल्या रेशमी तागाचा असावा. 16 तो चौकोनी असून
दुहेरी दुमडलेला असावा व त्याची लांबी एक वीत व रुंदी एक वीत
असावा. 17 मग त्यात चार रांगेत मोलवान रत्ने लावावी. पहिल्या
रांगेत लाल, पुष्कराज व माणिक ही रत्ने असावी; 18 दुसऱ्या रांगेत
पाचू, नीलमणी व हिरे असावे; 19 तिसऱ्या रांगेत तृणमणी, सूर्यकांत
व पद्मराग ही असावीत; 20 चौथ्या रांगेत लसणा, गोमेद व यास्फे
असावीत. ही सर्व रत्ने सोन्याच्या कोंदणात बसवावीत. 21 इस्राएलाच्या
पुत्रातील प्रत्येकाच्या नावाने एक अशी बारा रत्ने असावीत, प्रत्येक
रत्नावर इस्राएलाच्या बारापैकी एका गोत्राचे नाव मुद्रेप्रमाणे कोरले जावे.

22 “ऊरपटासाठी पीळ घातलेल्या दोरीप्रमाणे शुद्ध सोन्याच्या साखळ्या
कराव्या. 23 ऊरपटाच्या दोन्ही टोकास लावण्यासाठी सोन्याच्या दोन
कड्या बनवाव्या. 24 त्या सोन्याच्या दोन साखळ्या ऊरपटाच्या टोकाला
असलेल्या कड्यांमध्ये घालाव्या, 25 आणि साखळीची दुसरी दोन टोके
साच्यात घालून एफोदाच्या समोरील बाजूने त्याच्या खांदेपट्टीला जोडून
घ्याव्या. 26 सोन्याच्या दोन कड्या तयार कर व त्या ऊरपटाच्या दुसऱ्या
दोन कोपऱ्यांना म्हणजे एफोदा जवळील आतील बाजूच्या काठाला
जोडाव्या. 27 सोन्याच्या आणखी दोन कड्या करून त्या त्या एफोदाच्या
खांदेपट्टीच्या खालच्या बाजूने समोरून, एफोदाच्या कमरबंदाच्या अगदी
वर असलेल्या काठाला जोडाव्या. 28 ऊरपटाच्या कड्या एफोदाच्या
कड्यांना निळ्या दोरीने, कमरबंदाला जोडतील अशा बांधाव्या, म्हणजे
ऊरपट एफोदावरून सरकणार नाही. 29 “अहरोन जेव्हा पवित्रस्थानात
जाईल, तेव्हा इस्राएलच्या पुत्रांची नावे असलेला निर्णयाचा ऊरपट एक
नित्य स्मरण म्हणून आपल्या हृदयावर याहवेहसमोर घेऊन जाईल.
30 जेव्हा तो याहवेहच्या उपस्थितीत जाईल, तेव्हा अहरोनाने उरीम
व थुम्मीम सुद्धा ऊरपटात, आपल्या हृदयावर ठेवून जावे. अशाप्रकारे
अहरोनाने नित्यनेमाने इस्राएली लोकांसाठी निर्णय घेणाऱ्या वस्तू
आपल्या हृदयावर वाहत याहवेहसमोर यावे.” 31 “एफोदाचा झगा
संपूर्ण निळ्या कापडाने बनवावा. 32 डोके जाईल असे त्याला मधोमध
उघडे ठेवावे. तो फाटू नये म्हणून त्याच्या तोंडाला गळपट्टीप्रमाणे
विणलेला गोट असावा. 33 त्या झग्याच्या खालच्या घेऱ्यावर निळ्या,
जांभळ्या व किरमिजी रंगाच्या सुताची डाळिंबे व त्यामध्ये सोन्याच्या
घंट्या बनवाव्या. 34 सोन्याच्या घंट्या व डाळिंबे एक सोडून एक असे
आळीपाळीने झग्याच्या घेराला लावावे. 35 अहरोनाने तो झगा सेवा
करीत असताना घालावा. जेव्हा तो याहवेहसमोर पवित्रस्थानात जातो व
बाहेर येतो त्यावेळी घंट्यांचा आवाज ऐकू येईल, म्हणजे तो मरणार
नाही. 36 “शुद्ध सोन्याची एक पाटी तयार करावी आणि तिच्यावर मुद्रा
कोरावी तशी ही अक्षरे कोरावीत: याहवेहसाठी पवित्र. 37 आणि ती
जोडता यावी म्हणून ती फेट्याला निळ्या दोरीने बांध. 38 ती पाटी
अहरोनाच्या फेट्यासमोर कपाळावर राहील आणि तो इस्राएलांच्या
पवित्र भेटीसंबंधीचे दोष वाहील, त्यांच्या कोणत्याही भेटी असो. ती पाटी
नित्य अहरोनाच्या कपाळावर असावी, अशासाठी की लोकांच्या भेटी
याहवेहला मान्य होतील.” 39 “तलम तागाचा झगा विणून घ्यावा आणि
रेशमी तागाचा फेटा तयार करावा. कमरबंद भरतकाम केलेला असावा.
40 अहरोनाच्या पुत्रांचा मान व आदर राखला जावा, म्हणून त्यांच्यासाठी
झगे, कमरबंद व टोप्या बनवाव्या. 41 तुझा भाऊ अहरोन व त्याचे पुत्र
यांच्या अंगावर ही वस्त्रे घातल्यावर, त्यांचा अभिषेक आणि समर्पण
कर. त्यांनी याजक म्हणून माझी सेवा करावी म्हणून त्यांना पवित्र कर.
42 “शरीराला झाकावे म्हणून तागाच्या कापडाचे, कंबरेपासून मांडीपर्यंत
पोहोचेल अशी अंतर्वस्त्रे तयार करावी. 43 अहरोन व त्याचे पुत्र ज्यावेळी
सभामंडपात येतील किंवा सेवेसाठी वेदीकडे पवित्रस्थानात जातील,
त्यावेळी त्यांनी ती वस्त्रे घालावी, म्हणजे ते दोषी ठरून मरणार नाहीत.
“अहरोन व त्याच्या वंशजांसाठी हा सर्वकाळचा नियम असावा.”

**29** “त्यांनी याजक या नात्याने माझी सेवा करावी म्हणून त्यांना
पवित्र करण्यासाठी असेच करावे: एक निर्दोष गोऱ्हा व दोन
मेंढे घ्यावेत. 2 आणि उत्तम गव्हाच्या पिठाच्या दोन बेखमीर गोल
भाकरी कराव्या, त्या बेखमीर भाकरी आणि जैतुनाचे तेल मिसळून
केलेल्या असाव्यात आणि बेखमीर पिठाच्या व जैतुनाचे तेल लावलेल्या
पातळ भाकरी कराव्या. 3 त्यांना एका टोपलीत घालून, गोऱ्हा आणि
दोन मेंढ्यांबरोबर सादर कराव्या. 4 मग अहरोन व त्याच्या पुत्रांना
सभामंडपाच्या प्रवेशद्वाराशी आणून त्यांना पाण्याने धुवावे; 5 वस्त्रे
घ्या आणि अहरोनास अंगरखा व त्याबरोबर एफोदाचा झगा, एफोद,
ऊरपट हे परिधान करावे. त्यावर कुशलतेने विणलेल्या कमरपट्ट्याने
एफोद बांधावा; 6 त्याच्या डोक्यावर फेटा घालावा व त्यास पवित्र मुद्रा
जोडून घ्यावी. 7 मग अभिषेकाचे तेल घे व त्याच्या डोक्यावर ओतून
त्याला अभिषेक करावा. 8 त्याच्या पुत्रांनाही झगे घालावे. 9 त्यांना फेटे
बांधावे. मग अहरोनास व त्याच्या पुत्रांना कमरपट्टे बांधावे. याप्रमाणे
याजकत्व कायमचे त्यांचेच असणार. “मग तू अहरोन व त्याच्या मुलांना
अभिषेक करावा. 10 “मग सभामंडपाच्या समोर गोऱ्हा आणावा व
त्याच्या डोक्यावर अहरोन व त्याच्या पुत्रांनी आपले हात ठेवावेत. 11
सभामंडपाच्या प्रवेशद्वारात, याहवेहच्या समक्षतेत तो गोऱ्हा वधावा. 12
गोऱ्ह्याचे थोडे रक्त घेऊन ते तू आपल्या बोटांनी वेदीच्या शिंगांवर लावावे
व शिल्लक राहिलेले रक्त वेदीच्या पायथ्याशी ओतावे. 13 मग त्याच्या
आतड्यांवरील सर्व चरबी, काळजावरील लांब पाळ आणि त्यांच्या
चरबीसह दोन्ही गुरदे घेऊन ती वेदीवर जाळावी. 14 परंतु गोऱ्ह्याचे मांस
व त्याची विष्ठा व त्याची आतडी छावणीबाहेर नेऊन जाळून टाकाव्या.
ते पापार्पण आहे. 15 “मग त्यातील एक मेंढा घ्यावा व अहरोन व
त्याच्या पुत्रांनी त्याच्या डोक्यावर आपले हात ठेवावे. 16 मेंढ्याचा
वध करावा व त्याचे रक्त वेदीभोवती शिंपडावे. 17 मेंढा कापून तुकडे
करावेत आणि त्याचे आतील अवयव व पाय धुऊन त्याचे तुकडे व डोके
इतर भागांबरोबर ठेवावे. 18 मग संपूर्ण मेंढ्याचे वेदीवर होम कर. तो
याहवेहसाठी होमार्पण आहे, ते सुवासिक असे, याहवेहसाठी सादर
केलेले अन्नार्पण आहे. 19 “मग दुसरा मेंढा घ्यावा व अहरोन व त्याच्या
पुत्रांनी त्याच्या डोक्यावर आपले हात ठेवावेत. 20 मेंढ्याचा वध करून,
त्याचे थोडे रक्त घेऊन अहरोन व त्याच्या पुत्रांच्या उजव्या कानाच्या
पाळीला, उजव्या हाताच्या अंगठ्यांना, व उजव्या पायाच्या अंगठ्यांना
लावावे, मग रक्त वेदीच्या सभोवती शिंपडावे. 21 आणि वेदीवरील काही
रक्त व अभिषेकाचे तेल घे व ते अहरोन व त्याच्या वस्त्रांवर व त्याचे पुत्र
व त्यांच्या वस्त्रांवर शिंपडावे. मग तो व त्याचे पुत्र आणि त्यांची वस्त्रे
पवित्र होतील. 22 “मग त्या मेंढ्याची चरबी, त्याचे जाड शेपूट, त्याच्या
आतड्यांवरील चरबी, काळजाची लांब पाळ, दोन्ही गुरदे व त्यावरील
चरबी व उजवी मांडी घ्यावी; हा समर्पणाचा मेंढा आहे. 23 बेखमीर
भाकरीची टोपली, जी याहवेहसमोर आहे, त्यातून एक गोल भाकर घे,

जैतुनाच्या तेलात मळलेली एक जाड भाकर आणि एक पातळ भाकर
घे. 24 हे सर्व अहरोन व त्याच्या पुत्रांच्या हातांवर ठेवावे आणि त्यांनी
ते याहवेहसमोर हेलावणीचे अर्पण घेऊन त्याची ओवाळणी करावी.
25 मग ते त्यांच्या हातातून घेऊन होमार्पणाबरोबर वेदीवर जाळावे,
याहवेहला सुवास म्हणून अर्पिलेले अन्नार्पण असे सादर करावे. 26
मग अहरोनाच्या समर्पणाकरिता मेंढ्याच्या उराचा भाग घेऊन त्याला
ओवाळणीचे अर्पण घेऊन याहवेहसमोर त्याची ओवाळणी कर आणि
तो तुझा वाटा राहील. 27 “समर्पणाच्या मेंढ्याचे ते भाग म्हणजेच,
त्याचे ऊर ज्याची ओवाळणी केली होते व मांडीचा भाग जो सादर केला
होता तो अहरोन आणि त्याच्या पुत्रांच्या मालकीचे आहे, ते भाग पवित्र
कर. 28 हा नेहमीच इस्राएली लोकांकडून अहरोन व त्याच्या पुत्रांसाठी
शाश्वत हिस्सा असावा. हे इस्राएली लोकांकडून शांत्यर्पणातून याहवेहस
दिलेली वर्गणी असावी. 29 “अहरोनाची पवित्र वस्त्रे त्याच्यानंतर
त्याच्या वंशजांची व्हावीत अशासाठी की त्यामध्ये त्यांचा अभिषेक व
समर्पण व्हावे. 30 त्याचा पुत्र जो याजक म्हणून त्याचा वारस होईल
आणि सभामंडपात सेवा करण्यासाठी पवित्रस्थानात येईल त्याने ती
वस्त्रे सात दिवस अंगात घालावी. 31 “समर्पणासाठी असलेला मेंढा
घेऊन पवित्र जागी त्याचे मांस शिजवावे. 32 मग अहरोन व त्याच्या
पुत्रांनी सभामंडपाच्या प्रवेशद्वारात ते मेंढ्याचे मांस टोपलीतील समर्पित
भाकरीसह खावी. 33 त्यांचे समर्पण आणि पवित्रीकरण करण्यासाठी
प्रायश्चित्त केलेले अर्पण त्यांनी खावे. परंतु कोणी परक्याने ते खाऊ
नये, कारण ते पवित्र आहे. 34 आणि समर्पणाच्या मेंढ्याचे मांस व
भाकरीतील काही सकाळपर्यंत उरले तर ते जाळून टाकावे. ते खाऊ
नये, कारण ते पवित्र आहे. 35 “मी तुला आज्ञा दिल्याप्रमाणे अहरोन व
त्याच्या पुत्रांसाठी तू करावे, त्यांच्या समर्पणास सात दिवस घ्यावे. 36
पापार्पण म्हणून दररोज तू एक गोऱ्हा प्रायश्चित्तासाठी अर्पण करावा.
वेदीसाठी प्रायश्चित्त करून ती शुद्ध करावी व ती पवित्र करण्यासाठी तिला
अभिषेक करावा. 37 सात दिवस वेदीसाठी प्रायश्चित करून ती पवित्र
करावी. मग वेदी परमपवित्र होईल व ज्या कशाचा वेदीला स्पर्श होईल
ते पवित्र होईल. 38 “दररोज तू वेदीवर जे अर्पण करावयाचे आहे ते हे:
एक वर्षाची दोन कोकरे. 39 एक कोकरू सकाळी व दुसरे संध्याकाळी
अर्पण करावे. 40 पहिल्या कोकराबरोबर कुटून काढलेल्या जैतुनाच्या
एक पाव हीन तेलात मळलेल्या पिठाचा एक एफाचा दहावा भाग आणि
पेयार्पण म्हणून एक पाव हीन द्राक्षारस अर्पण करावे. 41 संध्याकाळी
दुसरे कोकरू सकाळच्या अर्पणाप्रमाणे धान्यार्पण व पेयार्पण यासहित
अर्पण करावे. हे अन्नार्पण याहवेहसाठी सुवासिक अर्पण आहे. 42 “हे
होमार्पण येणाऱ्या पिढ्यान् पिढ्या पर्यंत, याहवेहसाठी सभामंडपाच्या
प्रवेशद्वारात नित्य करावे. तिथे मी तुला भेटेन व तुझ्याशी बोलेन. 43
तिथे मी इस्राएली लोकांना देखील भेटेन आणि ते ठिकाण माझ्या तेजाने
पवित्र होईल. 44 “तर मी सभामंडप व वेदी पवित्र करेन आणि अहरोन
व त्याचे पुत्र यांना याजक म्हणून माझी सेवा करावी यासाठी पवित्र
करेन. 45 मग मी इस्राएली लोकात राहीन आणि त्यांचा परमेश्वर होईन.
46 त्यांना समजेल की, ज्याने त्यांना इजिप्त देशातून बाहेर आणले तो
मी याहवेह त्यांचा परमेश्वर आहे, यासाठी की, मी त्यांच्यामध्ये वस्ती
करावी. मी याहवेह त्यांचा परमेश्वर आहे.”

**30** “धूप जाळण्यासाठी बाभळीच्या लाकडाची एक वेदी तयार
करावी. 2 ती चौरस असावी आणि तिची लांबी एक हात, रुंदी
एक हात व उंची दोन हात असावी. तिची शिंगे तिच्याशी अखंड असावी.
3 तिचा वरचा भाग, तिच्या सर्व बाजू व शिंगे यांना शुद्ध सोन्याचे
आवरण द्यावे व त्याभोवती सोन्याचा काठ करावा. 4 वेदीच्या खालच्या
काठाला सोन्याच्या दोन कड्या कराव्या; वेदी वाहून नेण्यासाठी
दांडे घालता येतील अशा समोरासमोर प्रत्येक बाजूला दोन कड्या
असाव्या. 5 दांडे बाभळीच्या लाकडाचे करून त्याला सोन्याचे आवरण
द्यावे. 6 कराराच्या कोशासमोर लावलेल्या पडद्याच्या बाहेरच्या बाजूस,
प्रायश्चिताचे झाकण जे कराराच्या नियमाच्या पाटींवर आहे; तिथे वेदी
ठेवावी; तिथेच मी तुला भेटत जाईन. 7 “रोज सकाळी जेव्हा अहरोन
दिव्याची तयारी करेल, त्यावेळी त्याने वेदीवर सुगंधी धूप जाळावा. 8
पुन्हा सायंकाळी दिवे लावायला तो येईल तेव्हा त्याने धूप जाळावा
म्हणजे याहवेहसमोर नित्याने येणाऱ्या पिढ्यांपर्यंत धूप जळत असावा.
9 या वेदीवर इतर कोणताही धूप, होमार्पण, अन्नार्पण किंवा पेयार्पण
करू नये. 10 अहरोनाने वर्षातून एकदा वेदीच्या शिंगांवर प्रायश्चित करावे.
हे वार्षिक प्रायश्चित येणाऱ्या पिढ्यांपर्यंत पापार्पणाच्या रक्ताने करावे. हे
याहवेहसाठी परमपवित्र आहे.” 11 मग याहवेह मोशेला म्हणाले, 12
“तू इस्राएली लोकांना मोजण्यासाठी त्यांची जनगणना करशील, तेव्हा
प्रत्येकाने आपली मोजणी झाल्यावर आपल्या जिवासाठी याहवेहस
खंडणी द्यावी, म्हणजे तू त्यांची मोजणी करीत असताना त्यांच्यावर
कोणतीही पीडा येणार नाही. 13 प्रत्येकजण ज्यांची मोजणी होईल,
त्यांनी पवित्रस्थानाच्या शेकेलानुसार अर्धा शेकेल द्यावा, ज्याचे मोल
वीस गेरे आहे. हा अर्धा शेकेल याहवेहसाठी अर्पण आहे. 14 जे वीस
वर्षांचे व त्याहून अधिक वयाचे आहेत त्या सर्वांनी याहवेहसाठी हे अर्पण
द्यावे. 15 जेव्हा आपल्या जिवासाठी खंडणी म्हणून तुम्ही याहवेहस
अर्पण देता, तेव्हा श्रीमंताने अर्ध्या शेकेलापेक्षा अधिक देऊ नये व
गरिबानेही कमी देऊ नये. 16 इस्राएली लोकांकडून प्रायश्चिताचा पैसा
घेऊन तो सभामंडपाच्या सेवेकरिता लावावा. तुमच्या जिवासाठी केलेले
प्रायश्चित इस्राएली लोकांसाठी याहवेहसमोर स्मारक म्हणून राहील.” 17
मग याहवेह मोशेला म्हणाले, 18 “तू कास्याचे गंगाळ व त्याची कास्याची
बैठक तयार करावी. ते सभामंडप व वेदीच्या मध्ये ठेवून त्यात पाणी
भरावे 19 अहरोन व त्याच्या पुत्रांनी त्यातील पाण्याने आपले हात व पाय
धुवावे. 20 जेव्हा ते सभामंडपात प्रवेश करतात, तेव्हा प्रत्येक वेळी त्यांनी
आपले हात व पाय पाण्याने धुवावे म्हणजे ते मरणार नाहीत आणि जेव्हा
ते याहवेहला अन्नार्पण करण्याची सेवा करण्यासाठी वेदीजवळ जातात,
21 त्यांनी आपले हात व पाय धुवावे म्हणजे ते मरणार नाहीत. हा नियम
अहरोन व त्याच्या येणाऱ्या वंशाच्या प्रत्येक पिढीसाठी असावा.” 22 मग
याहवेह मोशेला म्हणाले, 23 “पवित्रस्थानाच्या शेकेलानुसार हे उत्तम

मसाले घे: पाचशे शेकेल गंधरस, त्याच्या अर्धे म्हणजे दोनशे पन्नास
शेकेल सुगंधी दालचिनी, दोनशे पन्नास शेकेल सुगंधी वेखंड, 24 पाचशे
शेकेल गोलाकार दालचिनी, सर्व पवित्रस्थानाच्या शेकेलानुसार, व एक
हीन भरून जैतुनाचे तेल. 25 यातून पवित्र अभिषेकाचे तेल, सुगंधी द्रव्ये
तयार करणाऱ्याच्या कुशलतेप्रमाणे तयार करावे. ते पवित्र अभिषेकाचे
तेल असेल. 26 त्या तेलाचा उपयोग सभामंडप, कराराच्या नियमाचा
कोश, 27 मेज व त्याचे सामान, दीपस्तंभ व त्याची उपकरणे, धूपवेदी,
28 होमार्पणाची वेदी, तिची सर्व पात्रे, बैठकासह गंगाळ यांचा अभिषेक
करण्यासाठी करावा. 29 ते तू पवित्र करावे म्हणजे ते परमपवित्र होतील
आणि ज्याला त्यांचा स्पर्श होईल ते पवित्र होईल. 30 “याजक म्हणून
माझी सेवा करावी म्हणून अहरोन व त्याच्या पुत्रांना अभिषेक करून
त्यांना पवित्र कर. 31 इस्राएली लोकांना सांग, ‘येणाऱ्या पिढ्यांपर्यंत हे
माझे पवित्र अभिषेकाचे तेल असावे. 32 इतर कोणत्याही मनुष्याच्या
शरीरावर ते ओतू नये आणि या मिश्रणाचा वापर करून दुसरे तेल बनवू
नये. ते पवित्र आहे आणि तुम्ही त्याला पवित्र मानावे. 33 जे कोणी
याप्रकारे तेल तयार करेल आणि याजका व्यतिरिक्त इतर कोणाला
लावेल, ते आपल्या लोकांतून काढून टाकले जातील.’” 34 मग याहवेह
मोशेला म्हणाले, “गंधरस, जटामांसी व गंधाबिरुजा व शुद्ध ऊद हे
सुगंधी मसाले घे, हे सर्व समान प्रमाणात असावे, 35 सुगंधी द्रव्ये तयार
करणाऱ्याच्या कुशलतेप्रमाणे सुगंधी धूप बनव. तो मीठ घातलेला, शुद्ध
आणि पवित्र असावा. 36 त्यातील काही कुटून त्याची बारीक भुकटी
करावी व ती सभामंडपातील कराराच्या नियमाच्या कोशापुढे ठेवावी,
जिथे मी तुला भेटत जाईन. ती तुमच्यासाठी परमपवित्र असावी. 37 या
मिश्रणाचा वापर करून स्वत:साठी धूप तयार करू नये; याहवेहसाठी तो
पवित्र मानला जावा. 38 त्या सुगंधाचा आनंद घेण्यासाठी जो कोणी
याप्रकारचा धूप बनवेल, त्याला आपल्या लोकांतून काढून टाकले
जावे.”

**31** मग याहवेह मोशेला म्हणाले, 2 “पाहा, मी यहूदाहच्या गोत्रातील,
हूराचा पुत्र उरी याचा पुत्र बसालेल याला निवडले आहे. 3 व
मी त्याला परमेश्वराचा आत्मा, ज्ञान, समज, बुद्धी आणि सर्वप्रकारच्या
कुशलतेने भरले आहे— 4 सोने, चांदी आणि कास्याचे कलाकौशल्य
करण्यासाठी; 5 आणि पाषाण फोडून रत्ने घडवावी, लाकडाचे काम
आणि सर्वप्रकारचे कलात्मक कारागिरीचे काम करण्यासाठी. 6
त्याचप्रमाणे, त्याला मदत करण्यासाठी दान गोत्रातील अहीसामाक
याचा पुत्र ओहोलियाब याला मी नेमले आहे. 7 “जसे सभामंडप,
कराराच्या नियमाचा कोश व त्यावरील प्रायश्चिताचे झाकण, आणि
तंबूचे इतर सर्व साहित्य: 8 मेज व त्यावरील सर्व सामान, शुद्ध सोन्याचा
दीपस्तंभ व त्याची सर्व उपकरणे, व धूपवेदी, 9 होमार्पणाची वेदी व
तिची सर्व पात्रे, गंगाळ व त्याची बैठक. 10 तसेच विणलेली वस्त्रे,
अहरोन याजकासाठी पवित्र वस्त्रे, व याजक म्हणून सेवा करतात तेव्हा
त्याच्या पुत्रांसाठी वस्त्रे, 11 अभिषेकाचे तेल व पवित्रस्थानासाठी
सुगंधी धूप. 12 मग याहवेह मोशेला म्हणाले, 13 “इस्राएली लोकांना
सांग, ‘तुम्ही माझे शब्बाथ अवश्य पाळावेत. येणाऱ्या पिढ्यांपर्यंत हे
माझ्या व तुमच्यामध्ये चिन्ह राहील, यासाठी की तुम्ही जाणावे की
जो तुम्हाला पवित्र करतो, तो मीच याहवेह आहे. 14 “‘शब्बाथ दिवस
पाळावा, कारण तो तुम्हासाठी पवित्र आहे; जो कोणी तो अपवित्र
करेल त्याला जिवे मारावे; जे कोणी त्या दिवशी काम करतील, त्यांना
त्यांच्या लोकांतून काढून टाकले जावे. 15 सहा दिवस काम करावे,
परंतु सातवा दिवस हा विसाव्याचा शब्बाथ आणि याहवेहसाठी पवित्र
आहे; शब्बाथ दिवशी जो काम करेल त्याला जिवे मारावे. 16 इस्राएली
लोकांनी निरंतरचा करार म्हणून पिढ्यान् पिढ्या शब्बाथ पाळावा. 17 तो
माझ्यामध्ये व इस्राएली लोकांमध्ये सदासर्वकाळचे चिन्ह असेल, कारण
याहवेहने सहा दिवसात आकाश व पृथ्वी निर्माण केली आणि सातव्या
दिवशी त्यांनी स्वस्थ राहून विसावा घेतला.’” 18 जेव्हा याहवेहने सीनाय
पर्वतावर मोशेबरोबर आपले बोलणे संपविले, तेव्हा त्यांनी मोशेला
कराराच्या नियमाच्या दोन दगडी पाट्या दिल्या, ज्या परमेश्वराच्या बोटाने
कोरलेल्या होत्या.

**32** मोशेला पर्वतावरून खाली येण्यास उशीर होत आहे असे लोकांनी
पाहिले, तेव्हा ते अहरोना सभोवती गोळा झाले व म्हणाले, “ये,
आमच्यापुढे जातील अशी दैवते आमच्यासाठी बनव. हा मनुष्य ज्याने
आम्हाला इजिप्तच्या बाहेर आणले, त्या मोशेचे काय झाले हे आम्हाला
माहीत नाही.” 2 अहरोनाने त्यांना उत्तर दिले, “तुमच्या स्त्रिया, तुमचे
पुत्र व तुमच्या कन्यांनी घातलेले कानातील सोन्याचे डूल काढून, ते
माझ्याकडे आणा.” 3 म्हणून सर्व लोकांनी ते कानातील सोन्याचे
डूल काढून ते अहरोनाकडे आणले. 4 लोकांनी जे अहरोनाच्या हातात
दिले, ते घेऊन त्याने हत्याराने कोरून, वासराची ओतीव मूर्ती बनविली.
मग ते म्हणाले, “हे इस्राएला, ही तुमचे दैवते आहेत, ज्यांनी तुम्हाला
इजिप्तमधून बाहेर आणले.” 5 अहरोनाने जेव्हा हे पाहिले, तेव्हा त्याने
त्या वासरासमोर एक वेदी बांधली व जाहीर केले, “उद्या याहवेहसाठी
एक उत्सव करावयाचा आहे.” 6 म्हणून दुसऱ्या दिवशी लोक लवकर
उठले आणि होमार्पणाचा यज्ञ केला व शांत्यर्पणे आणले. त्यानंतर
त्यांनी बसून खाणेपिणे केले व उठून चैनबाजीची मजा घेऊ लागले. 7
मग याहवेह मोशेला म्हणाले, “खाली जा, कारण तुझे लोक, ज्यांना तू
इजिप्तमधून बाहेर आणलेस, ते भ्रष्ट झाले आहेत. 8 मी त्यांना दिलेल्या
आज्ञांपासून ते फार लवकरच फिरले आहेत आणि आपल्यासाठी
वासराची ओतीव मूर्ती तयार केली आहे. त्यांनी त्याच्यासमोर नमन
केले आहे आणि यज्ञ करून म्हटले आहे, ‘हे इस्राएला, ही तुमची दैवते
आहेत, ज्यांनी तुम्हाला इजिप्तमधून बाहेर काढले आहे!’” 9 याहवेह
मोशेला पुन्हा म्हणाले, “मी या लोकांना पाहिले आहे, ते ताठ मानेचे
लोक आहेत. 10 तर आता माझ्या आड येऊ नकोस. माझा राग मी
त्यांच्याविरुद्ध भडकवीन आणि मी त्यांचा नाश करेन. मग मी तुला एक
मोठे राष्ट्र बनवीन.” 11 पण याहवेह त्याचे परमेश्वर यांची कृपादृष्टी व्हावी
म्हणून विनंती करत मोशे म्हणाला, “याहवेह, तुमचे लोक ज्यांना तुम्ही
महान सामर्थ्याने आणि बलवान हाताने इजिप्तमधून बाहेर आणले,

त्यांच्याविरुद्ध तुमचा राग का पेटावा? 12 इजिप्तच्या लोकांनी असे का
म्हणावे की, याहवेहने त्यांना डोंगरात मारून टाकावे व या पृथ्वीतून
नाहीसे करावे अशा दुष्ट हेतूने बाहेर काढले? आपल्या तीव्र कोपापासून
माघार घ्या; सौम्य व्हा आणि आपल्या लोकांवर आपत्ती आणू नका.
13 आपले सेवक अब्राहाम, इसहाक व इस्राएल यांची आठवण करा,
ज्यांच्याशी आपण स्वतःच्या नावाने शपथ घेतली: 'मी तुझे वंशज
आकाशातील ताऱ्यांइतके करेन, आणि त्यांना अभिवचन दिल्याप्रमाणे
हा सर्व देश मी त्यांच्या वंशजांना देईन, आणि तो सदासर्वकाळासाठी
त्यांचे वतन राहील.'" 14 तेव्हा याहवेहने त्याविषयी अनुताप केला व जी
विपत्ती आपल्या लोकांवर आणण्याचे म्हटले होते ती आणली नाही.
15 मग मोशे आपल्या हातात कराराच्या नियमाच्या दोन पाट्या घेऊन
पर्वतावरून खाली उतरला. त्या पाट्यांवर दोन्ही बाजूंनी, मागे व पुढे
लेख कोरलेले होते. 16 त्या पाट्या परमेश्वराची कृती होती; तो लेख
परमेश्वराची लेखणी होती, जी पाट्यांवर कोरलेली होती. 17 जेव्हा
यहोशुआने लोकांचा ओरडण्याचा आवाज ऐकला, तो मोशेला म्हणाला,
"छावणीत युद्धाचा आवाज आहे." 18 मोशेने उत्तर दिले: "हा आवाज
विजयाचा नाही, तो आवाज पराजयाचाही नाही; मला गाण्याचा आवाज
ऐकू येत आहे." 19 जेव्हा मोशे छावणीजवळ आला आणि वासरू
व नृत्य पाहिले, तेव्हा त्याचा राग पेटला आणि आपल्या हातातील
पाट्या फेकून, डोंगराच्या पायथ्याशी फोडून त्यांचा चुराडा केला. 20
आणि त्याने ते वासरू घेतले जे लोकांनी घडविले होते व ते अग्नीत
जाळून टाकले; मग त्याने त्याची कुटून बारीक पूड केली, ती पाण्यात
विरघळून इस्राएलच्या लोकांना प्यायला दिली. 21 मग मोशे अहरोनाला
म्हणाला, "या लोकांनी तुला काय केले, म्हणून तू त्यांना एवढ्या
मोठ्या पापात आणले?" 22 अहरोन म्हणाला, "माझ्या स्वामी, क्रोधित
होऊ नको, तुला माहीत आहे की हे लोक कसे दुष्टतेकडे प्रवृत्त होतात.
23 ते मला म्हणाले, 'आमच्यापुढे जातील अशी दैवते आमच्यासाठी
बनव. हा मनुष्य ज्याने आम्हाला इजिप्तच्या बाहेर आणले, त्या मोशेचे
काय झाले हे आम्हाला माहीत नाही.' 24 म्हणून मी त्यांना म्हणालो,
'ज्यांच्याकडे सोन्याचे दागिने आहेत ते त्यांनी काढावे.' मग त्यांनी ते
सोने मला दिले, आणि मी ते अग्नीत टाकले, आणि त्यातून हे वासरू
बाहेर आले." 25 मोशेने पाहिले की, लोक मोकाट सुटले आहेत आणि
त्यांच्या शत्रूंसमोर एक चेष्टेचे कारण बनावे असे अहरोनाने त्यांना मोकळे
सोडले आहे. 26 म्हणून मोशे छावणीच्या प्रवेशद्वाराजवळ उभा राहिला
व म्हणाला, "जे कोणी याहवेहच्या पक्षाचे आहे, त्यांनी माझ्याकडे
यावे." तेव्हा लेवीचे सर्व लोक त्याच्याकडे आले. 27 मग मोशे त्यांना
म्हणाला, "याहवेह इस्राएलांचे परमेश्वर असे म्हणतात: 'प्रत्येकाने
आपली तलवार कंबरेस बांधावी. छावणीतून एका टोकापासून दुसऱ्या
टोकापर्यंत फिरत, प्रत्येकाने आपला भाऊ आणि मित्र व शेजारी यांना
जिवे मारून टाकावे.'" 28 मोशेने आज्ञापिल्याप्रमाणे लेवीच्या लोकांनी
केले आणि त्या दिवशी अंदाजे तीन हजार लोक मरण पावले. 29 तेव्हा
मोशे म्हणाला, "आज तुम्ही याहवेहसाठी वेगळे केले गेले आहात आणि
याहवेहने आज तुम्हाला आशीर्वाद दिला आहे, कारण तुम्ही आपले
पुत्र, भाऊ यांच्याविरुद्ध गेलात." 30 मग दुसऱ्या दिवशी मोशे लोकांना
म्हणाला, "तुम्ही मोठे पाप केले आहे, पण आता मी वर याहवेहकडे
जाईन; कदाचित मी तुमच्या पापासाठी प्रायश्चित करू शकेन." 31 मग
मोशे याहवेहकडे परत गेला आणि म्हणाला, "अरेरे, या लोकांनी केवढे
मोठे पाप केले आहे! त्यांनी आपल्या स्वतःसाठी सोन्याचे दैवत केले
आहेत. 32 परंतु आता कृपा करून त्यांच्या पापांची क्षमा करा—नाहीतर
जे पुस्तक तुम्ही लिहिले आहे, त्यातून माझे नाव मिटवून टाका." 33
तेव्हा याहवेहने मोशेला उत्तर दिले, "ज्यांनी माझ्याविरुद्ध पाप केले
आहे, त्यांचीच नावे मी माझ्या पुस्तकातून मिटवून टाकीन. 34 आता
जा आणि ज्या ठिकाणाविषयी मी बोललो त्याकडे लोकांना चालव
आणि माझा दूत तुमच्यापुढे जाईल. तथापि, जेव्हा शिक्षा करण्याची
वेळ येईल, तेव्हा मी त्यांना त्यांच्या पापाची शिक्षा देईन." 35 अहरोनाने
केलेल्या वासराशी लोकांनी जे केले होते त्यासाठी याहवेहने त्यांच्यावर
पीडा आणून त्यांना शासन केले.

**33** नंतर याहवेह मोशेला म्हणाले, "तू आणि ज्या लोकांना तू
इजिप्तमधून बाहेर आणले त्यांना घेऊन या ठिकाणातून नीघ
आणि मी अब्राहाम, इसहाक आणि याकोब यांना शपथ घेऊन अभिवचन
दिले, 'हा देश मी तुझ्या वंशजांना देईन' त्या देशाकडे घेऊन जा. 2 मी
तुमच्यापुढे एक दूत पाठवून कनानी, अमोरी, हिथी, परिज्जी, हिव्वी
आणि यबूसी या लोकांना बाहेर हाकलून देईन. 3 दूध व मध वाहत
असलेल्या देशाकडे जा. परंतु मी तुमच्याबरोबर येणार नाही, कारण
तुम्ही ताठ मानेचे लोक आहात आणि कदाचित वाटेत मी तुमचा नाश
करेन." 4 जेव्हा लोकांनी हे निराशाजनक शब्द ऐकले, तेव्हा ते शोक
करू लागले आणि कोणीही कोणत्याही प्रकारचे दागिने घातले नाही. 5
कारण याहवेहने मोशेला सांगितले होते, "इस्राएलच्या लोकांना सांग,
तुम्ही ताठ मानेचे लोक आहात. मी एक क्षणभरही तुमच्याबरोबर गेलो
तर कदाचित मी तुमचा नाश करेन. आता तुमचे दागिने काढा आणि
तुमचे काय करावे हे मी ठरवेन." 6 म्हणून इस्राएल लोकांनी होरेब
पर्वताजवळ आपले दागिने काढून टाकले. 7 आता छावणीबाहेर थोड्या
दूर अंतरावर मोशे एक तंबू उभारीत असे, त्याला तो "सभामंडप असे
म्हणे." ज्याला याहवेहशी बोलायचे असेल तो छावणीबाहेर असलेल्या
त्या सभामंडपाकडे जात असे. 8 आणि जेव्हा मोशे बाहेर मंडपाकडे
जाई, तेव्हा सर्व लोक आपआपल्या तंबूच्या दाराशी उठून उभे राहून
मोशे मंडपामध्ये जाईपर्यंत त्याला पाहत असत. 9 आणि जेव्हा मोशे
मंडपामध्ये प्रवेश करी, तेव्हा याहवेह मोशेशी बोलेपर्यंत, मेघस्तंभ
खाली उतरून मंडपाच्या दाराशी थांबत असे. 10 जेव्हा लोक मेघस्तंभ
मंडपाच्या दाराशी थांबलेला पाहत, ते सर्व आपआपल्या तंबूच्या दाराशी
उभे राहून उपासना करीत असत. 11 जसा एखादा व्यक्ती आपल्या
मित्राशी बोलतो तसे याहवेह मोशेशी समोरासमोर बोलत असत. मग
मोशे छावणीकडे परत जात असे, परंतु त्याचा तरुण सहकारी, नूनाचा
पुत्र यहोशुआ हा मंडप सोडून जात नसे. 12 मग मोशे याहवेहशी बोलला,

“तुम्ही मला सांगत आला, ‘या लोकांना चालव,’ परंतु माझ्याबरोबर तुम्ही कोणाला पाठविणार हे तुम्ही मला सांगितले नाही. तुम्ही म्हणाला, ‘मी तुला नावाने ओळखतो आणि तू माझ्या दृष्टीने कृपा पावला आहेस.’ 13 जर तुम्ही माझ्यावर संतुष्ट असाल, तर मला तुमचे मार्ग शिकवा, यासाठी की मी तुम्हाला जाणून तुमच्या दृष्टीत कृपा पावावी. हे स्मरणात असू द्या की हे राष्ट्र तुमचे लोक आहेत.” 14 यावर याहवेहने उत्तर दिले, “माझी समक्षता तुझ्याबरोबर जाईल आणि मी तुला विसावा देईन.” 15 मग मोशे याहवेहला म्हणाला, “जर तुमची समक्षता आमच्याबरोबर गेली नाही, तर आम्हाला येथून पुढे पाठवू नका. 16 तुम्ही आम्हाबरोबर आला नाही, तर माझ्यावर आणि आपल्या लोकांवर तुमची कृपादृष्टी झाली आहे की नाही हे कसे कळणार? मी व तुमचे लोक पृथ्वीवरील इतर सर्व लोकांपासून वेगळे आहोत हे कसे समजणार?” 17 यावर याहवेहने मोशेला म्हटले, “जी गोष्ट तू माझ्याकडे मागितली आहे तीच मी करेन, कारण तुझ्यावर मी संतुष्ट आहे आणि मी तुला नावाने ओळखतो.” 18 तेव्हा मोशेने विनंती केली, “आता मला तुमचे गौरव दाखवा.” 19 आणि याहवेह म्हणाले, “मी माझे सर्व चांगुलपण तुझ्यापुढून चालवेन आणि याहवेह म्हणून माझ्या नावाची घोषणा मी तुझ्यासमक्ष करेन. ज्याच्यावर मला कृपा करावयाची त्याच्यावर मी कृपा करेन आणि ज्याच्यावर मला दया करावयाची त्याच्यावर मी दया करेन.” 20 याहवेह म्हणाले, “पण तू माझा चेहरा पाहू शकणार नाहीस, कारण मला पाहिल्यानंतर कोणीही मनुष्य जगत नाही.” 21 मग याहवेह म्हणाले, “माझ्याजवळ एक जागा आहे, जिथे एका खडकावर तू उभा राहा. 22 माझे गौरव जवळून जात असता, मी तुला खडकाच्या कपारीत ठेवेन आणि मी पार होईपर्यंत मी तुला माझ्या हाताने झाकीन. 23 मग मी माझा हात काढून घेईन आणि तू माझी पाठ पाहशील; पण माझा चेहरा तुला दिसणार नाही.”

**34** मग याहवेह मोशेला म्हणाले, “पहिल्या पाट्यांसारख्याच दोन दगडी पाट्या तू घडव, मग तू फोडून टाकलेल्या पहिल्या पाट्यांवर जी वचने होते ते मी त्यावर लिहेन. 2 तू सकाळी तयार राहा आणि मग सीनाय पर्वतावर ये. तिथे डोंगरमाथ्यावर माझ्यासमोर स्वतःला सादर कर. 3 तुझ्याबरोबर कोणीही येऊ नये किंवा डोंगरावर कुठेही इतर कोणी दृष्टीस पडू नये; गुरे आणि शेरडेमेंढरे यांनी सुद्धा डोंगरासमोर चरू नये.” 4 मग मोशेने पहिल्यासारख्या दोन दगडी पाट्या घडवून घेतल्या आणि त्या दोन दगडी पाट्या आपल्या हातात घेऊन याहवेहने आज्ञा दिल्याप्रमाणे मोठ्या पहाटे सीनाय पर्वतावर गेला. 5 मग याहवेह ढगामध्ये खाली उतरले आणि तिथे मोशेसमोर उभे राहिले. तिथे त्यांनी याहवेह या आपल्या नावाची घोषणा केली. 6 आणि याहवेह मोशे समोरून जाताना घोषणा केली, “याहवेह, याहवेह, दयाळू व कृपाळू परमेश्वर, मंदक्रोध, प्रीती व विश्वासूपण यात उदंड, 7 हजारांवर प्रीती करणारे, दुष्टता, अपराध व पाप यांची क्षमा करणारे; तरीही याहवेह दोषीला निर्दोष असे सोडत नाहीत; तर आईवडिलांच्या पापाचे शासन त्यांच्या संततीवर, व त्यांच्या संततीच्या तिसऱ्या व चौथ्या पिढीपर्यंत देणारे आहे.” 8 तेव्हा मोशेने भूमीस लवून उपासना केली. 9 तो म्हणाला, “हे प्रभू, तुमच्या दृष्टीने मी जर कृपा पावलो असलो, तर प्रभूने आमच्याबरोबर जावे. जरी हे लोक ताठ मानेचे आहेत, तरी आमच्या दुष्टाईची व आमच्या पापाची क्षमा करून आपले वतन म्हणून आमचा स्वीकार करा.” 10 तेव्हा याहवेहने उत्तर दिले: “मी तुझ्याशी एक करार करीत आहे. तुझ्या लोकांसमोर मी असे चमत्कार करेन की जे संपूर्ण पृथ्वीवर कोणत्याही राष्ट्रात करण्यात आले नाहीत. ज्या लोकांमध्ये तू राहतो ते पाहतील की मी, याहवेहने तुझ्यासाठी केलेली कृत्ये किती भयावह आहेत. 11 मी तुला आज जे आज्ञापितो ते तू पाळावे. मी तुमच्यापुढून अमोरी, कनानी, हिथी, परिज्जी, हिव्वी आणि यबूसी यांना घालवून देईन. 12 ज्या देशात तुम्ही जात आहात त्यात राहत असलेल्या लोकांशी करार करू नये याविषयी सावध असा, नाहीतर ते तुमच्यासाठी पाश असे होतील. 13 त्यांच्या वेद्या मोडून टाका, त्यांच्या पवित्र पाषाणांचा चुरा करा आणि अशेराचे स्तंभ तोडून टाका. 14 इतर कोणत्याही दैवतांची उपासना करू नका, कारण याहवेह, ज्यांचे नाव ईर्ष्यावान आहे, ते ईर्ष्यावान परमेश्वर आहेत. 15 “त्या देशात राहत असलेल्या लोकांशी करार करू नये याविषयी सावध असा; कारण ते जेव्हा त्यांच्या दैवतांशी व्यभिचार करतात आणि त्यांना यज्ञ करतात, ते तुम्हाला आमंत्रित करतील आणि तुम्ही त्यांच्या यज्ञार्पणातील अन्न खाल. 16 आणि जेव्हा तुम्ही त्यांच्यातील काही कन्या तुमच्या पुत्रांसाठी पत्नी म्हणून निवडाल आणि त्या कन्या त्यांच्या दैवतांशी व्यभिचार करतील, त्या तुमच्या मुलांनाही तसेच करण्यासाठी प्रवृत्त करतील. 17 “तुम्ही आपल्यासाठी कोणतीही मूर्ती करू नका. 18 “बेखमीर भाकरीचा सण पाळा. मी तुम्हाला आज्ञापिल्याप्रमाणे, सात दिवस बेखमीर भाकर खा. अबीब महिन्यात नेमीत वेळी ते करावे, कारण त्या महिन्यात तुम्ही इजिप्तमधून बाहेर निघाला होता. 19 “प्रत्येक उदरातील प्रथम जन्मलेला, तुमच्या गुरातील सर्व प्रथम जन्मलेले नर, मग ते खिल्लारातील असो किंवा मेंढरांतील असो माझे आहेत. 20 गाढवाचे प्रथमवत्स कोकरू देऊन खंडणी भरून सोडवून घ्यावा, परंतु तो जर तुम्ही खंडणी भरून सोडविला नाही तर, त्याची मान मोडावी. तुमच्या सर्व प्रथम पुत्रांना खंडणी भरून सोडवावे. “कोणीही माझ्यासमोर रिकाम्या हाताने येऊ नये. 21 “सहा दिवस तुम्ही काम करावे, परंतु सातव्या दिवशी तुम्ही विसावा घ्यावा; नांगरणीच्या व कापणीच्या हंगामात सुद्धा तुम्ही विसावा घ्यावा. 22 “गव्हाच्या कापणीच्या वेळी प्रथम पिकाने सप्ताहाचा उत्सव साजरा करावा आणि वर्षाच्या शेवटी हंगामाचा सण पाळावा. 23 वर्षातून तीन वेळा तुमच्या सर्व पुरुषांनी सार्वभौम याहवेह, इस्राएलचे परमेश्वर यांच्यासमोर हजर व्हावे. 24 मी सर्व राष्ट्रांना तुमच्यापुढून घालवून टाकीन आणि तुमची सीमा वाढवेन आणि जेव्हा तुम्ही याहवेह तुमचे परमेश्वर यांच्यासमोर हजर होण्यासाठी जाल, त्यावेळी इतर कोणीही तुमच्या देशाचा लोभ धरणार नाही. 25 “अर्पणातील रक्त खमिराबरोबर मला अर्पण करू नये. आणि वल्हांडण सणाच्या यज्ञातील काहीही सकाळपर्यंत राहू देऊ नये. 26 “तुमच्या भूमीच्या प्रथम उत्पन्नातील सर्वोत्तम भाग तुमचे परमेश्वर याहवेह यांच्या भवनात आणावा. “करडू

त्याच्या आईच्या दुधात शिजवू नये.” 27 मग याहवेह मोशेला म्हणाले,
“हे शब्द लिही, कारण या शब्दांनुसार मी तुझ्याशी व इस्राएलाशी करार
केला आहे.” 28 मोशे त्या ठिकाणी भाकरी न खाता किंवा पाणी न
पिता चाळीस दिवस व चाळीस रात्र याहवेहबरोबर राहिला आणि त्याने
पाट्यांवर कराराचे शब्द, म्हणजेच दहा आज्ञा लिहिल्या. 29 जेव्हा मोशे
आपल्या हातात कराराच्या नियमाच्या दोन दगडी पाट्या घेऊन सीनाय
पर्वतावरून खाली उतरून आला, तेव्हा याहवेहबरोबर बोलल्यामुळे
त्याचा चेहरा तेजस्वी झाला होता, हे त्याच्या लक्षात आले नाही. 30
जेव्हा अहरोन व सर्व इस्राएल लोकांनी मोशेला पाहिले, त्याचा चेहरा
तेजस्वी होता आणि ते त्याच्याजवळ येण्यास घाबरत होते. 31 पण
मोशेने त्यांना बोलाविले; म्हणून अहरोन व समुदायाचे वडीलजन परत
त्याच्याजवळ गेले व तो त्यांच्याबरोबर बोलला. 32 यानंतर सर्व इस्राएली
लोक त्याच्याजवळ आले आणि मोशेने त्यांना त्या सर्व आज्ञा दिल्या,
ज्या याहवेहने सीनाय पर्वतावर त्याला दिल्या होत्या. 33 मोशेने लोकांशी
आपले संभाषण संपविले व आपल्या चेहऱ्यावर पडदा घातला. 34 पण
जेव्हा मोशे याहवेहबरोबर बोलण्यासाठी त्यांच्या समक्षतेत जात असे,
बाहेर जाईपर्यंत तो पडदा काढत असे. जेव्हा तो बाहेर येई व त्याला जे
काही आज्ञापिले गेले आहे ते तो इस्राएली लोकांना सांगत असे, 35
इस्राएली लोकांनी पाहिले की मोशेचा चेहरा तेजस्वी होता. मग मोशे
याहवेहबरोबर बोलावयास जाईपर्यंत आपल्या चेहऱ्यावर पडदा परत
घालत असे.

**35** मग मोशेने इस्राएली लोकांच्या संपूर्ण समुदायाला बोलाविले
व त्यांना म्हटले, “ज्यागोष्टी तुम्ही कराव्या अशी याहवेहनी आज्ञा
दिली आहे, त्या या आहेत: 2 सहा दिवस तुम्ही काम करावे, परंतु सातवा
दिवस तुमचा पवित्र दिवस असेल, हा याहवेहप्रीत्यर्थ शब्बाथ विसाव्याचा
दिवस असावा. जो कोणी या दिवशी काम करेल, त्याला जिवे मारावे. 3
शब्बाथ दिवशी तुमच्या कोणत्याही घरामध्ये विस्तव पेटवू नये.” 4 मोशे
सर्व इस्राएल समुदायाला म्हणाला, “याहवेहने जे आज्ञापिले आहे ते
हे: 5 तुमच्याजवळ जे काही आहे, त्यातून याहवेहसाठी अर्पण घ्या.
ज्या कोणास याहवेहसाठी अर्पण आणावे अशी इच्छा आहे, त्यांनी
हे अर्पण आणावे: “सोने चांदी आणि कास्य, 6 निळ्या, जांभळ्या
व किरमिजी रंगाचे सूत आणि रेशमी ताग; बोकडाचे केस; 7 लाल
रंगाने रंगविलेली मेंढ्याची कातडी व टिकाऊ चर्म; बाभळीचे लाकूड;
8 दिव्यासाठी जैतुनाचे तेल; अभिषेकाचे तेल व सुगंधी धूप यासाठी
सुवासिक मसाले; 9 एफोदाच्या ऊरस्त्राणावर चढविण्यासाठी गोमेद
खडे व इतर रत्ने. 10 “तुमच्यामध्ये जे सर्व कुशल कारागीर आहेत,
त्यांनी येऊन जे सर्वकाही याहवेहने आज्ञापिले आहे ते तयार करावे: 11
“निवासमंडप, त्याचा तंबू आणि त्याचे आच्छादन, आकडे, फळ्या,
अडसर, खांब व बैठका; 12 कोश व त्याचे दांडे आणि प्रायश्चिताचे
झाकण व त्याचा पडदा; 13 मेज व त्याचे दांडे आणि त्याचे सर्व सामान
आणि समक्षतेची भाकर; 14 प्रकाशासाठी दीपस्तंभ व त्याची सर्व
उपकरणे, दिवे आणि प्रकाशासाठी तेल; 15 धूपवेदी व तिचे दांडे,
अभिषेकाचे तेल व सुगंधी धूप; निवासमंडपाच्या प्रवेशद्वारासाठी पडदा;
16 होमार्पणाची वेदी, तिची कास्याची जाळी, तिचे दांडे व तिचे सर्व
साहित्य; कास्याचे गंगाळ व त्याची बैठक; 17 अंगणाचे पडदे, त्यांच्या
खुंट्या व बैठका आणि अंगणाच्या दाराचा पडदा; 18 निवासमंडप,
त्याचे अंगण व त्यांच्या मेखा व त्यांच्या दोऱ्या; 19 पवित्रस्थानात
सेवा करताना घालावयाची विणलेली वस्त्रे; आणि याजक म्हणून
घालावयाची अहरोन याजकासाठी पवित्र वस्त्रे व त्याच्या पुत्रांची वस्त्रे.”
20 मग इस्राएलचा सर्व समुदाय मोशेच्या समक्षतेतून निघून गेला, 21
आणि ज्यांची इच्छा असेल व ज्यांच्या हृदयाला स्फूर्ती मिळाली त्यांनी
सभामंडपाच्या कामासाठी व त्याच्या सेवेसाठी आणि पवित्र वस्त्रांची
अर्पणे याहवेहसाठी आणली. 22 ज्या कोणाला इच्छा झाली, त्या स्त्री
आणि पुरुषांनी येऊन सर्वप्रकारचे सोन्याचे दागिने, रत्नखचित पीना,
कानातील डूल, अंगठ्या आणि दागिने आणले. त्या सर्वांनी आपले
सोने याहवेहसाठी ओवाळणीचे अर्पण म्हणून दिले. 23 ज्यांच्याकडे
निळे, जांभळे किंवा किरमिजी कापड किंवा रेशमी तागाचे होते किंवा
बोकडाचे केस, लाल रंगविलेली मेंढ्याची कातडी किंवा टिकाऊ चर्म
होते ते आणले. 24 चांदी किंवा कास्याची अर्पणे आणणाऱ्यांनी ती
याहवेहसाठी आणली आणि ज्या कोणाकडे बाभळीचे लाकूड होते, ते
त्यांनी बांधकामाच्या कोणत्याही भागात उपयोगी पडेल असे म्हणून
आणले. 25 प्रत्येक कुशल स्त्रीने निळे, जांभळे आणि किरमिजी सूत
व रेशमी ताग जे तिने आपल्या हाताने विणले होते ते आणले. 26
आणि ज्या सर्व स्त्रियांना इच्छा झाली आणि ज्या सूतकताईत कुशल
होत्या त्यांनी बोकडाचे केस कातले. 27 पुढाऱ्यांनी एफोद व ऊरपट
यावर लावण्यासाठी गोमेद व इतर रत्ने आणली. 28 त्याचप्रमाणे त्यांनी
दिव्यासाठी आणि अभिषेकासाठी आणि सुवासिक धुपासाठी जैतुनाचे
तेल व सुगंधी मसाले आणले. 29 याहवेहने मोशेद्वारे जे काम आज्ञापिले
होते त्यासाठी इस्राएली लोकांमधील सर्व इच्छुक पुरुष व स्त्रियांनी
याहवेहकरिता स्वखुशीने अर्पणे आणली. 30 मग मोशे इस्राएली लोकांना
म्हणाला, “पाहा, याहवेहने यहूदाहच्या गोत्रातील, हूराचा पुत्र, उरी
याचा पुत्र बसालेल याला निवडले आहे, 31 आणि याहवेहने त्याला
परमेश्वराचा आत्मा, ज्ञान, समज, बुद्धी आणि सर्वप्रकारच्या कुशलतेने
भरले आहे— 32 सोने, चांदी आणि कास्याचे कलाकौशल्य करावे, 33
आणि पाषाण फोडून रत्ने घडवावी, लाकडाचे काम आणि सर्वप्रकारचे
कलात्मक कारागिरीचे काम करावे. 34 आणि याहवेहने त्याला व दान
गोत्रातील अहीसामाक याचा पुत्र ओहोलियाब या दोघांना इतरांनाही
शिकविण्याची क्षमता दिली आहे. 35 याहवेहने त्यांना सर्वप्रकारचे कोरीव
काम, कारागिरीचे काम, निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगाचे सुती व
रेशमी तागावर भरतकाम, विणकाम; अशा सर्वप्रकारच्या विणकरांना
कारागिरीचे—कौशल्याचे—काम करण्याच्या दानांनी भरले आहे.

**36** मग बसालेल, ओहोलियाब आणि सर्व निपुण व्यक्ती, ज्यांना
याहवेहने कुशलता व पवित्रस्थानाचे बांधकाम करण्याचे कौशल्य
आणि क्षमता दिली आहे, त्यांनी याहवेहने आज्ञापिल्याप्रमाणेच काम

करावे.” 2 मग बसालेल व ओहोलियाब व ज्यांना याहवेहने क्षमता
दिली होती आणि ज्यांना येऊन काम करण्याची इच्छा होती त्यांना
मोशेने बोलाविले. 3 पवित्रस्थानाच्या बांधकामासाठी इस्राएल लोकांनी
आणलेली अर्पणे मोशेकडून त्यांनी घेतली. लोक दररोज सकाळी
स्वैच्छिक अर्पणे आणत राहिले. 4 मग सर्व कुशल कारागीर जे
पवित्रस्थानाचे काम करीत होते, त्यांनी ते पूर्वी करीत असलेले काम
सोडले, 5 व मोशेला म्हणाले, “याहवेहने आज्ञापिलेल्या कामासाठी
आवश्यक आहे त्यापेक्षा अधिक सामुग्री लोक आणत आहेत.” 6
तेव्हा मोशेने आज्ञा दिली आणि सर्व छावणीत कळविण्यात आले:
“कोणी पुरुषाने किंवा स्त्रीने पवित्रस्थानासाठी कोणतेही अर्पण करू
नये.” अशाप्रकारे अधिक सामुग्री आणण्यापासून लोकांना थांबविण्यात
आले, 7 कारण जी सामुग्री त्यांच्याजवळ होती, ती सर्व कामाच्या
आवश्यकतेपेक्षा अधिक होती. 8 सर्व कुशल कारागिरांनी निळ्या,
जांभळ्या व किरमिजी रंगांच्या तागाच्या व रेशमी तागाच्या दहा पडद्यांनी
निवासमंडप तयार केला व त्यावर कुशल कारागिरांकडून करूब विणून
घेतले. 9 सर्व पडद्यांची लांबी अठ्ठावीस हात व रुंदी चार हात होती.
10 त्यांनी पाच पडदे एकमेकांना जोडले व इतर पाच पडद्यांचेही तसेच
केले. 11 जोडलेल्या पडद्यापैकी शेवटच्या पडद्यांच्या किनारीवर त्यांनी
निळ्या रंगाच्या कापडाचे फासे बनविले आणि दुसऱ्या पडद्यांच्या
शेवटच्या पडद्यालाही तसेच केले. 12 तसेच त्यांनी एका पडद्याच्या
किनारीला पन्नास फासे व दुसऱ्या पडद्याच्या किनारीपर्यंत तसेच
पन्नास फासे केले, हे फासे समोरासमोर होते. 13 मग त्यांनी सोन्याचे
पन्नास आकडे तयार केले आणि त्याचा उपयोग पडद्याच्या दोन जोड्या
एकत्र बांधण्यासाठी केला, यासाठी की निवासमंडप अखंड होईल.
14 निवासमंडपावर आच्छादन करण्यासाठी त्यांनी बोकडाच्या केसाचे
पडदे तयार केले; ते अकरा पडदे होते. 15 सर्व अकरा पडदे एकाच
मापाचे, म्हणजे लांबी तीस हात व रुंदी चार हात होती. 16 त्यांनी
पाच पडदे एकत्र जोडले आणि इतर सहा पडदे एकत्र जोडले. 17
जोडलेल्या पडद्यांपैकी शेवटच्या पडद्याच्या किनारीवर पन्नास फासे
करून तो एकजोड केला आणि दुसऱ्या पडद्याच्या किनारीवर देखील
पन्नास फासे करून एकजोड केला. 18 मग त्यांनी कास्याचे पन्नास
आकडे तयार केले आणि ते फासात घालून तंबू एकजोड केला.
19 मग त्यांनी तंबूसाठी तांबडा रंग दिलेल्या मेंढ्याच्या कातड्याचे
आच्छादन केले आणि त्यावर टिकाऊ चर्माचे आच्छादन केले. 20
त्यांनी निवासमंडपासाठी बाभळीच्या लाकडाच्या उभ्या फळ्या तयार
केल्या. 21 प्रत्येक फळी दहा हात लांब व दीड हात रुंद होती. 22
एक फळी दुसऱ्या फळीला जोडण्यासाठी त्यांच्या समोरासमोर दोन
कुसे केली. निवासमंडपाच्या प्रत्येक फळीला त्यांनी अशाप्रकारे कुसे
केली. 23 निवासमंडपाच्या दक्षिणेस त्यांनी वीस फळ्या तयार केल्या
24 आणि त्या फळ्यांखाली ठेवण्यासाठी चांदीच्या चाळीस बैठका
केल्या—प्रत्येक फळीसाठी दोन बैठका, प्रत्येक कुसाखाली एक. 25
निवासमंडपाच्या दुसऱ्या बाजूला, म्हणजे उत्तरेला त्यांनी वीस फळ्या
तयार केल्या 26 आणि प्रत्येक फळीखाली दोन, अशा चांदीच्या चाळीस
बैठका केल्या. 27 निवासमंडपाच्या शेवटच्या बाजूसाठी, म्हणजे पश्चिम
बाजूस त्यांनी सहा फळ्या तयार केल्या. 28 आणि निवासमंडपाच्या
मागच्या बाजूच्या कोपऱ्यांसाठी त्यांनी दोन फळ्या तयार केल्या. 29
या दोन कोपऱ्यातील फळ्या खालपासून वरपर्यंत दुहेरी असून एकाच
कडीत जोडल्या होत्या; दोन्ही कोपऱ्यांच्या फळ्या एकसारख्याच होत्या.
30 एका फळीखाली दोन; अशा प्रकारे एकूण आठ फळ्या आणि
चांदीच्या सोळा बैठका होत्या. 31 त्याचप्रमाणे त्यांनी निवासमंडपाच्या
एका बाजूच्या फळ्यांसाठी बाभळीच्या लाकडाचे पाच अडसर तयार
केले, 32 निवासमंडपाच्या दुसऱ्या बाजूला पाच आणि पश्चिमेच्या
बाजूच्या म्हणजेच शेवटच्या बाजूच्या फळ्यांसाठी पाच अडसर होते. 33
मध्यभागी लावण्याचे अडसर फळ्यांच्या मधून एका टोकापासून दुसऱ्या
टोकापर्यंत पोहोचतील असे तयार केले. 34 त्यांनी फळ्यांना सोन्याचे
आवरण लावले आणि आडव्या खांबांना अडकविण्यासाठी सोन्याच्या
कड्या केल्या. त्यांनी आडव्या खांबांना सुद्धा सोन्याचे आवरण दिले.
35 मग त्यांनी निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगांच्या तागाच्या व
रेशमी तागाचे पडदे बनविले व त्यावर कुशल कारागिरांकडून करूब
विणून घेतले. 36 त्यासाठी त्यांनी बाभळीच्या लाकडाचे चार खांब
केले व त्यावर सोन्याचे आवरण घातले. त्यासाठी त्यांनी सोन्याच्या
कड्या व चांदीच्या चार बैठका बनविल्या. 37 त्यांनी निवासमंडपाच्या
प्रवेशद्वारासाठी निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगाच्या रेशमी तागाचा
नक्षीदार पडदा तयार केला. 38 मग त्यांनी पाच खांब व त्यांच्या कड्या
बनविल्या. त्या खांबांचा वरचा भाग व बांधे यांना सोन्याचे आवरण
घातले आणि त्यांच्या कास्याच्या पाच बैठका बनविल्या.

**37** मग बसालेलाने बाभळीच्या लाकडाचा कोश तयार केला—अडीच
हात लांब व दीड हात रुंद, दीड हात उंच होता. 2 त्यावर त्याने
आतून व बाहेरून शुद्ध सोन्याचे आवरण घातले आणि त्याच्याभोवती
सोन्याचा काठ केला. 3 त्याने त्यासाठी सोन्याच्या चार कड्या केल्या
आणि त्याच्या चार पायांना दोन कड्या एका बाजूला व दोन कड्या
दुसऱ्या बाजूला लावल्या. 4 मग त्याने बाभळीच्या लाकडाचे दांडे
बनवून त्यांना सोन्याचे आवरण घातले. 5 आणि ते दांडे कोश वाहून
नेण्यासाठी कोशाच्या दोन्ही बाजूंच्या कड्यात घातले. 6 नंतर त्याने
शुद्ध सोन्याचे प्रायश्चिताचे झाकण बनविले; जे अडीच हात लांब व दीड
हात रुंद होते. 7 झाकणाच्या टोकांना त्याने घडवून घेतलेल्या सोन्याचे
दोन करूब बनविले. 8 एका बाजूस एक करूब आणि दुसऱ्या बाजूस
दुसरे करूब बनविले; झाकणास दोन्ही बाजूंनी अखंड जोडून घेतले.
9 या करुबांची पंखे वरच्या बाजूने पसरून प्रायश्चिताच्या झाकणावर
आच्छादन करीत होते. करुबांची मुखे समोरासमोर असून त्यांची दृष्टी
प्रायश्चिताच्या झाकणाकडे होती. 10 मग त्यांनी बाभळीच्या लाकडाचा
एक मेज बनविला; जो दोन हात लांब, एक हात रुंद व दीड हात
उंच होता. 11 मग त्यांनी त्याला शुद्ध सोन्याचे आवरण घातले आणि
त्याभोवती सोन्याचा काठ बनविला. 12 मग त्यांनी त्याच्याभोवती चार

बोटे रुंदीएवढी पट्टी बनवून, त्यावर सोन्याचा काठ तयार केला. 13 मग
त्यांनी मेजाकरिता सोन्याच्या चार कड्या तयार करून त्या चार पायांच्या
चार कोपऱ्यांवर बसविल्या. 14 मेज वाहून नेण्याच्या दांड्या धरण्यासाठी
कड्या पट्टीच्या जवळ लावल्या. 15 मेज वाहून नेण्यासाठी असलेले
दांडे बाभळीच्या लाकडाचे बनविले होते व त्यांना सोन्याचे आवरण
घातले होते. 16 आणि अर्पणे ओतण्याकरिता मेजावरील उपकरणे
म्हणजे ताटे, पात्रे व वाट्या व त्याचे कलश हे त्यांनी शुद्ध सोन्याचे
बनविले. 17 मग त्यांनी शुद्ध सोन्याचा दीपस्तंभ बनविला. त्याची
बैठक, त्याचा दांडा घडून आणि त्याच्या फुलाच्या आकाराची फुलपात्रे,
त्याच्यावरील कळ्या व फुले ही सर्व त्याबरोबर अखंड असा तयार
केला. 18 दीपस्तंभाच्या बाजूंनी सहा फांद्या निघाल्या होत्या; तीन एका
बाजूला व तीन दुसऱ्या बाजूला. 19 एका फांदीवर बदामाच्या फुलांप्रमाणे
कळ्या आणि फुले असलेल्या तीन वाट्या, पुढच्या फांदीवर तीन वाट्या
आणि दीपस्तंभापासून पसरलेल्या सर्व सहा फांद्यांसाठी समान असावे.
20 आणि दीपस्तंभावर वाटीच्या आकाराची चार बदामाची फुले व
त्याच्या कळ्या व फुले होती. 21 दीपस्तंभाच्या बाजूने निघालेल्या
पहिल्या दोन फांद्यांच्या खालच्या बाजूस एक कळी होती, दुसरी कळी
दुसऱ्या दोन फांद्यांच्या खालच्या बाजूस आणि तिसरी कळी तिसऱ्या
फांदीच्या जोडीखाली होती; सर्व मिळून सहा फांद्या होत्या. 22 या सर्व
कळ्या व फांद्या असून दीपस्तंभाला घडीव शुद्ध सोन्याच्या एकाच
अखंड तुकड्यापासून घडविल्या होत्या. 23 मग त्यांनी त्याचे सात दिवे
बनविले व शुद्ध सोन्याचे वातीचे चिमटे आणि तबके सुद्धा बनविली.
24 त्यांनी दीपस्तंभ व त्याची सर्व उपकरणे एक तालांत शुद्ध सोन्याने
तयार केली. 25 मग त्यांनी बाभळीच्या लाकडाची एक वेदी तयार
केली. ती चौरस होती. तिची लांबी एक हात, रुंदी एक हात व उंची
दोन हात होती व तिची शिंगे तिच्याशी अखंड अशी होती. 26 त्यांनी
वेदीचा वरचा भाग, तिच्या सर्व बाजू व शिंगे यांना शुद्ध सोन्याचे आवरण
घातले व त्याभोवती सोन्याचा काठ केला. 27 त्यांनी वेदीच्या खालच्या
काठाला सोन्याच्या दोन कड्या बनविल्या; वेदी वाहून नेण्यासाठी दांडे
घालता येतील अशा समोरासमोर प्रत्येक बाजूला दोन कड्या केल्या. 28
त्यांनी ते दांडे बाभळीच्या लाकडाचे बनविले व त्यांना सोन्याचे आवरण
घातले. 29 त्यांनी सुगंधी द्रव्ये तयार करणाऱ्याच्या कुशलतेप्रमाणे पवित्र
अभिषेकाचे तेल व शुद्ध, सुगंधी धूप बनविले.

**38** त्यांनी बाभळीच्या लाकडाची होमार्पणाची वेदी तयार केली. ती
तीन हात उंच, पाच हात लांब, पाच हात रुंद असून चौकोनी होती.
2 मग त्यांनी वेदीच्या चार कोपऱ्यांना प्रत्येकी एक शिंग बनविले, शिंगे व
वेदी अखंड बनविली व वेदीला कास्याचे आवरण घातले. 3 वेदीची
सर्व पात्रे, म्हणजे त्याचे भांडे, फावडे, शिंपडण्याचे भांडे, मांसाचे काटे
आणि अग्निपात्रे कास्याचे बनविले. 4 त्यांनी वेदीसाठी कास्याच्या
जाळीची चाळण तयार केली, जी वेदीच्या काठाखाली वेदीच्या अर्ध्या
उंचीपर्यंत होती. 5 त्यांनी कास्याच्या चाळणीच्या चार कोपऱ्यांना दांडे
अडकविण्यासाठी ओतीव कास्याच्या कड्या तयार केल्या. 6 त्यांनी
बाभळीच्या लाकडाचे दांडे तयार करून त्यांना कास्याचे आवरण घातले.
7 त्यांनी ते दांडे कड्यात अडकविले, म्हणजे वेदी वाहून नेताना दांडे
वेदीच्या दोन बाजूंनी असतील. वेदी लाकडाची असून ती आतून पोकळ
बनविली. 8 मग त्यांनी कास्याचे गंगाळ व त्याची बैठक सुद्धा कास्याची
बनविली. सभामंडपाच्या दाराशी सेवा करणाऱ्या स्त्रियांच्या आरशांचे
ते बैठक होते. 9 मग त्यांनी अंगण तयार केले. त्याची दक्षिणेकडील
बाजू शंभर हात लांब होती व त्यास कातलेल्या रेशमी तागाचे पडदे
होते. 10 आणि वीस खांब व वीस कास्याच्या बैठका होत्या, खांबावर
चांदीच्या कड्या व पट्ट्या होत्या. 11 उत्तरेकडील बाजू सुद्धा शंभर
हात लांब होती आणि वीस खांब व कास्याच्या वीस बैठका होत्या व
खांबाच्या कड्या व पट्ट्या चांदीच्या होत्या. 12 पश्चिमेकडील शेवटची
बाजू पन्नास हात रुंदीची होती आणि त्याला पडदे लावलेले होते, त्याला
दहा खांब व दहा बैठका असून खांबांना चांदीच्या कड्या व पट्ट्या
होत्या. 13 सूर्योदयाकडील पूर्वेकडील बाजू पन्नास हात रुंद होती.
14 प्रवेशद्वाराच्या एका बाजूस पंधरा हात लांबीचा पडदा होता. त्यास
तीन खांब व तीन बैठका होत्या, 15 आणि अंगणाच्या प्रवेशद्वाराच्या
दुसऱ्या बाजूला पंधरा हात लांबीचे पडदे होते, त्यास तीन खांब व तीन
बैठका होत्या. 16 अंगणाच्या सर्व बाजूचे पडदे कातलेल्या रेशमी तागाचे
होते. 17 खांबांच्या बैठका कास्याच्या होत्या. खांबाच्या कड्या व पट्ट्या
चांदीच्या होत्या आणि त्यांच्या वरच्या भागाला चांदीचे आवरण दिले
होते; अशाप्रकारे अंगणाच्या प्रत्येक खांबाला चांदीच्या पट्ट्या होत्या.
18 अंगणाच्या प्रवेशद्वाराचा पडदा निळ्या, जांभळ्या व किरमिजी
रंगाच्या सुताचे व रेशमी तागाचा होता व त्यावर भरतकाम केले होते. ते
अंगणाच्या पडद्यासारखे वीस हात लांब होते आणि पाच हात उंच होते.
19 त्याला चार खांब व कास्याच्या चार बैठका होत्या. त्यांच्या कड्या व
पट्ट्या चांदीच्या होत्या आणि त्याच्या वरच्या भागाला चांदीचे आवरण
दिले होते. 20 निवासमंडप व अंगणाच्या सभोवती वापरलेल्या सर्व
मेखा कास्याच्या होत्या. 21 मोशेच्या आज्ञेनुसार बनविलेले कराराच्या
नियमाचे निवासमंडप यासाठी जी सामुग्री वापरली गेली, त्यांची मोजणी,
अहरोन याजक याचा पुत्र इथामार याच्या नेतृत्वाखाली लेव्यांच्या द्वारे
केली गेली, ती अशी: 22 याहवेहने मोशेला जे सर्व आज्ञापिले होते ते
यहूदाह वंशातील हूराचा पुत्र उरी याचा पुत्र बसालेल याने तयार केले; 23
त्याच्याबरोबर दान वंशातील अहीसामाक याचा पुत्र ओहोलियाब होता;
हा शिल्पकार व कुशल कारागीर, निळे, जांभळे आणि किरमिजी रंगाचे
रेशमी ताग यावर भरतकाम करणारा होता. 24 हेलावणीच्या अर्पणातून
पवित्रस्थानाच्या सर्व कामासाठी वापरलेले सोने हे पवित्रस्थानाच्या
वजनानुसार एकोणतीस तालांत व सातशे तीस शेकेल असे होते.
25 इस्राएली समुदायातील जनगणना झालेल्या लोकांपासून आलेली
चांदी पवित्रस्थानाच्या वजनानुसार शंभर तालांत आणि एक हजार
सातशे पंचाहत्तर शेकेल होती. 26 जनगणना झालेले वीस वर्ष व त्याहून
अधिक वयाचे सहा लक्ष तीन हजार पाचशे पन्नास पुरुष होते—त्याचा
प्रत्येक पुरुषाकरिता एक बेका, म्हणजेच पवित्रस्थानाच्या वजनानुसार

अर्धा शेकेल मिळाला होता. 27 शंभर तालांत चांदी पवित्रस्थानाच्या व
पडद्याच्या ओतीव बैठका तयार करण्यासाठी वापरली; शंभर बैठकांसाठी
शंभर तालांत, प्रत्येकी एका बैठकीसाठी एक तालांत वापरला. 28
खाबांच्या कड्यांसाठी, खांबांच्या वरील भागास आवरण देण्यासाठी
व त्यांच्या पट्ट्या बनविण्यासाठी एक हजार सातशे पंचाहत्तर शेकेल
वापरण्यात आले. 29 हेलावणीच्या अर्पणात सत्तर तालांत आणि दोन
हजार चारशे शेकेल कास्य होते. 30 त्याचा वापर त्यांनी सभामंडपाच्या
प्रवेशद्वाराच्या बैठका, कास्याची वेदी व त्याची कास्याची चाळणी
व वेदीवरील उपकरणे बनविण्यासाठी केला, 31 निवासमंडपाच्या
अंगणाभोवती व त्याच्या प्रवेशद्वारासाठी बैठका आणि निवासमंडपाच्या
व अंगणाच्या सभोवती मेखा करण्यासाठी त्याचा वापर केला.

**39** पवित्रस्थानातील सेवेसाठी त्यांनी निळे, जांभळे व किरमिजी
रंगाच्या सुताची विणलेली वस्त्रे बनविली. याहवेहने मोशेला
आज्ञापिल्याप्रमाणे अहरोनासाठी सुद्धा त्यांनी पवित्र वस्त्रे बनविली. 2
मग त्यांनी एफोद सोन्याचा, निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगाच्या
सुताचा आणि बारीक कातलेल्या रेशमी तागाचा वापर करून बनविला.
3 त्यांनी सोने ठोकून त्याचे पातळ पत्रे बनविले आणि निळ्या, जांभळ्या
आणि किरमिजी रंगाच्या धाग्यात आणि रेशमी ताग कातून—कुशल
कारागिराच्या हातांनी बनविले. 4 एफोदासाठी त्यांनी दोन खांदेपट्ट्या
बनविल्या, ज्या त्याच्या दोन कोपऱ्यांना बांधता येतील अशा जोडल्या.
5 कुशलतेने विणलेला कमरबंद त्याच्यासारखाच होता; एफोदाशी अखंड
असा तो सोन्याचा, निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगाच्या सुताचा
व कातलेल्या रेशमी तागाचा, याहवेहने मोशेला आज्ञापिल्याप्रमाणे
तो बनविला होता. 6 त्यांनी गोमेद रत्ने सोन्याच्या कोंदणात बसविले
आणि त्यावर मुद्रा कोरावी अशी इस्राएलाच्या पुत्रांची नावे कोरली. 7
मग त्यांनी इस्राएलच्या पुत्रांचे स्मारक म्हणून ती रत्ने एफोदाच्या दोन
खांदेपट्ट्यांवर लावली, याहवेहने मोशेला आज्ञापिल्याप्रमाणे त्यांनी हे
केले. 8 कुशल कारागिरांच्या हस्तकृतीने त्यांनी ऊरपट बनविला. त्यांनी
तो एफोदाप्रमाणे: सोन्याच्या जरीचा, निळ्या, जांभळ्या व किरमिजी
रंगांचे सूत व कातलेल्या रेशमी तागाचा बनविला. 9 तो चौकोनी असून
दुहेरी दुमडलेला होता व त्याची लांबी एक वीत व रुंदी एक वीत होती.
10 मग त्यांनी त्यात चार रांगेत मोलवान रत्ने लावली. पहिल्या रांगेत
लाल, पुष्कराज, व माणिक 11 दुसऱ्या रांगेत पाचू, नीलमणी व हिरे, 12
तिसऱ्या रांगेत तृणमणी, सूर्यकांत व पद्मराग; 13 आणि चौथ्या रांगेत
लसणा, गोमेद व यास्फे. त्यांना नक्षीकाम केलेल्या सोन्याच्या कोंदणात
लावले होते. 14 इस्राएलाच्या पुत्रातील प्रत्येकाच्या नावाने एक अशी
बारा रत्ने होती. प्रत्येक रत्नावर इस्राएलाच्या बारापैकी एका गोत्राचे नाव
मुद्रेप्रमाणे कोरले. 15 त्यांनी ऊरपटासाठी पीळ घातलेल्या दोरीप्रमाणे
शुद्ध सोन्याच्या साखळ्या तयार केल्या. 16 त्यांनी सोन्याची दोन कोंदणे
व सोन्याच्या दोन कड्या बनविल्या, त्या दोन कोंदणांमध्ये घालून
ऊरपटाच्या दोन्ही टोकास बसविल्या. 17 त्यांनी त्या सोन्याच्या दोन
साखळ्या ऊरपटाच्या टोकाला असलेल्या कड्यांमध्ये बसविल्या, 18
आणि साखळीची दुसरी दोन टोके साच्यात घालून एफोदाच्या समोरील
बाजूने त्याच्या खांदेपट्टीला जोडले. 19 त्यांनी सोन्याच्या दोन कड्या
तयार केल्या व त्या ऊरपटाच्या दुसऱ्या दोन कोपऱ्यांना म्हणजे एफोदा
जवळील आतील बाजूच्या काठाला जोडल्या. 20 मग त्यांनी सोन्याच्या
आणखी दोन कड्या बनविल्या व त्या एफोदाच्या खांदेपट्टीच्या खालच्या
बाजूने समोरून जोडल्या, एफोदाच्या कमरबंदाच्या अगदी वर असलेल्या
काठाला जोडल्या. 21 त्यांनी त्या ऊरपटाच्या कड्या एफोदाच्या कड्यांना
निळ्या दोरीने कमरबंदाला अशा बांधाव्या की ऊरपट एफोदावरून
सरकणार नाही; हे त्यांनी याहवेहने मोशेला आज्ञापिल्याप्रमाणे केले. 22
त्यांनी एफोदाचा झगा संपूर्ण निळ्या कापडाने बनविला—विणकाम
करणाऱ्याच्या कामाप्रमाणे विणला. 23 त्याच्या मधोमध चिलखताच्या
गळ्याप्रमाणे त्या झग्याचे तोंड होते. तो फाटू नये म्हणून त्याच्या तोंडाला
गळपट्टीप्रमाणे गोट होता. 24 त्यांनी त्या झग्याच्या खालच्या घेऱ्यावर
निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगाच्या सुताची व कातलेल्या सुताची
डाळिंबे बनविली. 25 डाळिंबांच्या मध्ये झग्याच्या घेरावर शुद्ध सोन्याच्या
घंट्या बनवून लावल्या. 26 याहवेहने मोशेला आज्ञापिल्याप्रमाणे सेवा
करण्यासाठी घालावयाच्या झग्याच्या घेराच्या काठावर घंट्या व डाळिंबे
एक सोडून एक असे आळीपाळीने लावले. 27 यानंतर त्यांनी अहरोन व
त्याचे पुत्र यांच्यासाठी रेशमी तागाचे विणलेले अंगरखे तयार केले.
28 आणि रेशमी तागाचा फेटा व रेशमी तागाची टोपी आणि रेशमी
तागाची अंतर्वस्त्रे केली. 29 कातलेल्या रेशमी तागाचा आणि निळ्या,
जांभळ्या व किरमिजी रंगाचे भरतकाम केलेला कमरबंद होता; जसे
याहवेहने मोशेला आज्ञापिले होते. 30 त्यांनी शुद्ध सोन्याची पवित्र
मुद्रेची पाटी बनविली आणि तिच्यावर मुद्रा कोरावी तसे हे कोरले:
याहवेहसाठी पवित्र. 31 ती जोडता यावी म्हणून त्यांनी ती निळ्या
फेट्याला दोरीने बांधली, जसे याहवेहने मोशेला आज्ञापिले होते. 32
याप्रकारे निवासमंडप व सभामंडप यांचे काम समाप्त झाले. इस्राएली
लोकांनी जे काही याहवेहने मोशेला आज्ञापिले होते त्याप्रमाणेच केले.
33 मग त्यांनी निवासमंडप मोशेकडे आणला: तंबू व त्याचे सर्व सामान,
त्याचे आकडे, फळ्या, अडसर, खांब व बैठका; 34 मेंढ्याच्या लाल
रंगवलेल्या कातड्यांचे आच्छादन आणि इतर प्रकारचे टिकाऊ चर्म,
झाकण व त्याचा पडदा; 35 कराराच्या नियमाचा कोश, त्याचे दांडे आणि
प्रायश्चिताचे झाकण; 36 मेज व त्याचे सर्व सामान आणि समक्षतेची
भाकर; 37 शुद्ध सोन्याचे दीपस्तंभ व त्याच्या दिव्यांची रांग व त्याची
सर्व उपकरणे आणि प्रकाशासाठी जैतुनाचे तेल; 38 सोन्याची धूपवेदी,
अभिषेकाचे तेल, सुगंधी धूप व तंबूच्या प्रवेशद्वारासाठी पडदा; 39
कास्याची वेदी व तिची कास्याची जाळी, तिचे दांडे व तिचे सर्व साहित्य;
गंगाळ व त्याची बैठक; 40 अंगणाचे पडदे, खुंट्या व त्यांच्या बैठका
आणि अंगणाच्या प्रवेशद्वारासाठी पडदे; दोऱ्या व अंगणासाठी तंबूच्या
मेखा; निवासमंडप व सभामंडपा साठी लागणारे सर्व साहित्य; 41
पवित्रस्थानात सेवा करताना घालावयाची विणलेली वस्त्रे आणि याजक
म्हणून घालावयाची अहरोन याजकासाठी पवित्र वस्त्रे व त्याच्या पुत्रांची

वस्त्रे. 42 याहवेहने मोशेला आज्ञापिल्याप्रमाणेच इस्राएल लोकांनी सर्व
कामे केली होती. 43 मोशेने कामाचे परीक्षण केले व पाहिले की त्यांनी
याहवेहने आज्ञापिल्याप्रमाणेच केले होते. म्हणून मोशेने त्यांना आशीर्वाद
दिला.

**40** मग याहवेह मोशेला म्हणाले: 2 “पहिल्या महिन्याच्या पहिल्या
दिवशी निवासमंडप, सभामंडप उभा करावा. 3 त्यामध्ये कराराच्या
नियमाचा कोश ठेवावा आणि कोश पडद्याने झाकावा. 4 मेज आत
आणून त्यावरचे सामान व्यवस्थित लावावे. मग दीपस्तंभ आत आणावा
व त्याचे दिवे लावावे. 5 कराराच्या नियमाच्या कोशापुढे सोन्याची
धूपवेदी ठेवावी आणि निवासमंडपाच्या प्रवेशद्वाराचा पडदा लावावा.
6 “निवासमंडपाच्या प्रवेशद्वारापुढे, सभामंडपापुढे होमार्पणाची वेदी
ठेवावी. 7 सभामंडप व वेदी यांच्यामध्ये गंगाळ ठेवून त्यात पाणी भरावे.
8 त्याभोवती अंगण करावे आणि त्या अंगणाच्या प्रवेशद्वारास पडदा
लावावा. 9 “अभिषेकाचे तेल घेऊन निवासमंडप व त्यातील प्रत्येक
वस्तूवर अभिषेक करावा, ते व त्यातील सर्व सामान वेगळे करावे
म्हणजे ते पवित्र होईल. 10 मग होमार्पणाची वेदी व तिची सर्व पात्रे
यांचा अभिषेक करावा; वेदीला पवित्र करावे म्हणजे ती वेदी परमपवित्र
होईल. 11 मग गंगाळ व त्याच्या बैठकीस अभिषेक कर व ते समर्पित
कर. 12 “अहरोन व त्याचे पुत्र यांना सभामंडपाच्या प्रवेशद्वाराशी
आणावे व त्यांना पाण्याने धुवावे. 13 मग अहरोनाला पवित्र वस्त्रे
घालावीत. त्याने याजक म्हणून माझी सेवा करावी, यासाठी त्याला
अभिषेक करून पवित्र करावे. 14 त्याच्या पुत्रांना आणून त्यांना झगे
घालावे. 15 जसा त्यांच्या पित्याला अभिषेक केला, तसाच त्यांनाही
अभिषेक करावा, म्हणजे याजक म्हणून ते माझी सेवा करतील. त्यांचा
हा याजकपणाचा अभिषेक पिढ्यान् पिढ्या चालू राहील.” 16 जसे
याहवेहने आज्ञापिले होते, मोशेने सर्वकाही तसेच केले. 17 दुसऱ्या
वर्षाच्या पहिल्या महिन्याच्या पहिल्या दिवशी निवासमंडपाची उभारणी
करण्यात आली. 18 जेव्हा मोशेने निवासमंडपाची उभारणी केली, त्याने
बैठका जागेवर लावल्या, फळया उभ्या केल्या, त्यात अडसर टाकले व
खांब उभे केले. 19 मग मोशेने निवासमंडपावरून तंबू पसरला आणि
तंबूवर आच्छादन टाकले, जसे याहवेहने त्याला आज्ञापिले होते. 20 मग
त्याने कराराच्या नियमाच्या पाट्या घेतल्या व त्या कोशामध्ये ठेवल्या,
कोशाचे दांडे जोडले व त्यावर प्रायश्चिताचे झाकण लावले. 21 मग
मोशेने कोश निवासमंडपात आणला आणि पडदे अडकविले आणि
याहवेहने त्याला आज्ञापिल्याप्रमाणे कराराच्या नियमाचा कोश झाकून
घेतला. 22 मोशेने सभामंडपामध्ये, निवासमंडपाच्या उत्तर दिशेला
पडद्याच्या बाहेर मेज ठेवला 23 व मोशेने त्यावर याहवेहसमोर भाकर
ठेवली, जसे याहवेहने त्याला आज्ञापिले होते. 24 त्याने सभामंडपामध्ये
मेजासमोर, निवासमंडपाच्या दक्षिण दिशेला दीपस्तंभ ठेवला 25 आणि
याहवेहने मोशेला आज्ञापिल्याप्रमाणे याहवेहसमोर दिवे लावले. 26
मग मोशेने सभामंडपात, पडद्याच्या समोर सोन्याची वेदी ठेवली 27 व
याहवेहने मोशेला आज्ञापिल्याप्रमाणे वेदीवर सुगंधी धूप जाळला. 28
मग त्याने निवासमंडपाच्या प्रवेशद्वाराला पडदे लावले. 29 मग मोशेने
निवासमंडपाच्या, सभामंडपाच्या प्रवेशद्वाराजवळ होमार्पणाची वेदी
ठेवली व त्यावर होमार्पण व अन्नार्पण केले, जसे याहवेहने त्याला
आज्ञापिले होते. 30 नंतर मोशेने सभामंडप व वेदी यांच्यामध्ये गंगाळ
ठेवले व धुण्यासाठी त्यात पाणी भरून ठेवले, 31 आणि मोशे आणि
अहरोन व अहरोनाचे पुत्र यांनी आपले हात व पाय धुण्यासाठी त्या
पाण्याचा वापर केला. 32 जेव्हा ते सभामंडपात प्रवेश करीत किंवा
वेदीजवळ जात, तेव्हा ते आपले हात व पाय धूत असत, जसे याहवेहने
मोशेला आज्ञापिले होते. 33 मग मोशेने निवासमंडप व वेदी यांच्याभोवती
अंगण केले आणि अंगणाच्या प्रवेशद्वारात पडदे लावले. अशाप्रकारे
मोशेने सर्व काम पूर्ण केले. 34 मग मेघाने सभामंडप झाकले आणि
याहवेहच्या तेजाने निवासमंडप भरून गेला. 35 मोशे सभामंडपात प्रवेश
करू शकत नव्हता कारण त्यावर मेघ होता आणि याहवेहच्या तेजाने
निवासमंडप भरून गेला होता. 36 इस्राएली लोकांच्या सर्व प्रवासात,
जेव्हा निवासमंडपावरून मेघ वर जाई तेव्हा ते पुढची वाटचाल करीत
असत; 37 पण मेघ वर गेला नाही, तर तो वर जाईल त्या दिवसापर्यंत ते
पुढे जात नसत. 38 त्यांच्या संपूर्ण प्रवासात निवासमंडपावर दिवसा
याहवेहचा मेघ, तर रात्री त्या मेघात अग्नी, असे इस्राएलने पाहिले.

# लेवीय

1 याहवेहनी मोशेला बोलाविले आणि सभामंडपातून त्याच्याशी बोलणे
केले. ते म्हणाले, 2 “इस्राएली लोकांशी बोल आणि त्यांना सांग:
‘जेव्हा तुमच्यामधील कोणी याहवेहसाठी अर्पण आणतील, तेव्हा
तुमच्या गुरांमधील किंवा कळपातील प्राण्यांचे अर्पण आणावे. 3 “‘जर
हे होमार्पण गुरांमधून करावयाचे असेल, तर निर्दोष असलेला नरगोर्‍हा
तुम्ही अर्पण करावा. तुम्ही ते सभामंडपाच्या प्रवेशद्वाराजवळ आणावे,
म्हणजे ते याहवेहद्वारे मान्य केले जाईल. 4 तुम्ही तुमचे हात त्या
होमार्पणाच्या मस्तकावर ठेवावे आणि प्रायश्चित्त म्हणून तुमच्याऐवजी ते
तुमच्यासाठी स्वीकारले जाईल. 5 तुम्ही याहवेहसमोर त्या गोर्‍ह्याचा
वध करावा आणि नंतर अहरोनाचे जे पुत्र याजक आहेत, ते त्याचे रक्त
आणतील आणि सभामंडपाच्या प्रवेशद्वाराजवळ असलेल्या वेदीभोवती
शिंपडतील. 6 तुम्ही यज्ञपशूची कातडी काढावी आणि पशूचे कापून
तुकडे करावे. 7 अहरोनाचे जे पुत्र याजक आहेत, त्यांनी वेदीवर अग्नी
ठेवावा आणि अग्नीवर लाकडांची रचना करावी. 8 नंतर अहरोनाचे पुत्र
जे याजक आहेत त्यांनी वेदीवर जळत असलेल्या लाकडांवर त्या पशूचे
तुकडे, शिर व चरबी यासह व्यवस्थित रचून ठेवावी. 9 पाय व आतडी
पाण्याने धुऊन याजकाने त्या सगळ्यांचे वेदीवर होम करावे. हे होमार्पण
आहे, हे अन्नार्पण आहे. याहवेहला प्रसन्न करणारा सुगंध आहे. 10
“‘जर हे होमार्पण कळपातून आणलेले, मेंढी किंवा शेळी असेल तर
तुम्ही दोष नसलेल्या नराचे अर्पण करावे. 11 तुम्ही याहवेहसमोर
वेदीच्या उत्तर दिशेला त्या प्राण्याचा वध करावा आणि अहरोनाचे पुत्र
जे याजक आहेत त्यांनी त्याचे रक्त वेदीभोवती शिंपडावे. 12 मग त्या
पशूचे कापून तुकडे करावेत आणि याजकाने शिर व चरबी यासह ते
तुकडे वेदीवरील लाकडांवर ठेवावे. 13 त्याची आतडी आणि पाय तुम्ही
पाण्याने धुऊन घ्यावीत आणि याजकाने हे सर्व घेऊन यावे आणि त्यांचा
वेदीवर होम करावा. हे होमार्पण आहे, हे अन्नार्पण आहे, हा याहवेहला
प्रसन्न करणारा सुगंध आहे. 14 “‘जर याहवेहसाठी पक्ष्यांचे होमार्पण
म्हणून अर्पण असेल तर त्याने पारवा किंवा कबुतराची पिल्ले अर्पण
करावी. 15 याजकाने तो पक्षी वेदीजवळ आणावा, त्याचे मुंडके मुरगळून
काढावे आणि त्याचे वेदीवर होम करावे; त्याचे रक्त वेदीच्या बाजूला
वाहू द्यावे. 16 त्याने त्या पक्ष्याची चुनाळ व पिसे काढून वेदीच्या पूर्वेस
राख टाकावयाच्या जागी फेकून द्यावी. 17 तो त्याला पंखांच्या मधोमध
फाडेल, त्याचे पूर्णपणे तुकडे करणार नाही आणि नंतर याजक त्याचे
वेदीवरील जळत्या लाकडांवर होमार्पण करेल. हे होमार्पण आहे, हे
अन्नार्पण आहे, हा याहवेहला प्रसन्न करणारा सुगंध आहे.

2 “‘जेव्हा कोणी याहवेहला धान्यार्पण आणत असेल, तर त्यांची
अर्पणे उत्तम पिठाची असावीत. त्यांनी त्यावर जैतुनाचे तेल ओतावे व
त्यावर धूप ठेवावा. 2 आणि अहरोनाचे पुत्र जे याजक आहेत त्यांच्याकडे
ते आणावे. याजक मूठभर पीठ आणि तेल घेतील, त्याचबरोबर सर्व
धूप स्मरणाचा भाग म्हणून वेदीवर एकत्र जाळतील, हे अन्नार्पण, हा
याहवेहला प्रसन्न करणारा सुगंध आहे. 3 अन्नार्पणातून राहिलेले धान्य
अहरोन आणि त्याच्या पुत्रांचे असावे; याहवेहला दिलेल्या अन्नार्पणाचा
हा परमपवित्र भाग आहे. 4 “‘जर तुम्ही भट्टीत भाजलेले अन्नार्पण
आणता, तर ते उत्तम पिठाचे असावे: बेखमीर जाड भाकरी आणि
जैतुनाच्या तेलात मळलेल्या किंवा पातळ बेखमीर भाकरी आणि वर
जैतुनाचे तेल लावलेले असे असावे. 5 जर तुमचे अन्नार्पण तव्यावर
भाजलेले असेल तर ते उत्तम पिठापासून तयार केलेले तेलात मिसळलेले
आणि बेखमीर असे असावे. 6 तिचा भुगा करावा आणि त्यावर तेल
ओतावे; हे धान्यार्पण आहे. 7 जर तुमचे धान्यार्पण भांड्यात शिजविलेले
असेल, तर ते उत्तम पिठाचे आणि थोडेसे जैतुनाचे तेल वापरून तयार
केलेले असावे. 8 याहवेहला अर्पण करण्याचे अशा प्रकारच्या वस्तूंनी
बनविलेले धान्यार्पण तुम्ही याजकास आणून द्यावे व त्याने ते वेदीवर
ठेवावे. 9 स्मरणभाग म्हणून याजक ते अन्नार्पणातून काढून ठेवेल आणि
याहवेहला प्रसन्न करणारे सुवासिक अन्नार्पण म्हणून वेदीवर त्याचे हवन
करेल. 10 अन्नार्पणातून राहिलेले धान्य अहरोन आणि त्याच्या पुत्रांचे
असावे; याहवेहला दिलेल्या अन्नार्पणाचा हा परमपवित्र भाग आहे. 11
“‘याहवेहसाठी आणले जाणारे प्रत्येक अन्नार्पण हे खमीर न घालता
तयार करावे, तुम्ही याहवेहसाठी आणलेल्या अन्नार्पणात खमीर किंवा
मध जाळू नये. 12 तुम्ही त्यांना प्रथमफळाचे अर्पण म्हणून याहवेहकडे
आणू शकता, परंतु ते वेदीवर प्रसन्न करणारे सुवासिक अर्पण म्हणून
करू नये. 13 प्रत्येक अर्पण मीठ घालून रुचकर करावे, कारण तुमच्या
परमेश्वराबरोबर झालेल्या कराराचे मीठ तुमच्या अन्नार्पणात असलेच
पाहिजे. 14 “‘जर तुम्ही याहवेहसाठी प्रथम पिकाचे धान्यार्पण आणले,
तर नवीन कणसाला चिरडून भाजलेल्या दाण्याचे अर्पण करावे. 15
त्यावर जैतुनाचे तेल व धूप ठेवावे; ते धान्यार्पण आहे. 16 याजकाने त्या
चिरडलेल्या धान्याचा आणि तेलाचा स्मरणभाग, सर्व धूपांबरोबर एकत्र
जाळावा, याहवेहसाठी अर्पण असे हे एक अन्नार्पण असावे.

3 “‘जर तुमचे अर्पण हे शांत्यर्पण असेल आणि तुम्ही कळपातील
नर किंवा मादी प्राण्याचे अर्पण करीत असाल, तुम्ही निर्दोष असा
प्राणी याहवेहसमोर आणावा. 2 तुम्ही तुमचा हात त्या अर्पणाच्या
डोक्यावर ठेवावा आणि सभामंडपाच्या प्रवेशद्वारात त्याचा वध करावा.
नंतर अहरोनाचे पुत्र जे याजक आहेत, त्यांनी वेदीच्या भोवती त्याचे
रक्त शिंपडावे. 3 शांत्यर्पणातून तुम्ही याहवेहसाठी अन्नार्पण आणावे:
अंतर्गत अवयव आणि त्यांना जोडून असलेली सर्व चरबी, 4 कंबरेजवळ
असलेल्या चरबीसह दोन्ही गुरदे, काळजाला जोडलेले भाग जे तुम्ही
गुरद्यासह काढून टाकाल. 5 नंतर अहरोनाच्या पुत्रांनी जळत्या लाकडावर
असलेल्या होमार्पणावरील वेदीवर त्याचे हवन करावे. हे अन्नार्पण
आहे, हा याहवेहला प्रसन्न करणारा सुगंध आहे. 6 “‘परंतु शांत्यर्पणाचे
अर्पण म्हणून शेरडामेंढरांतील नर किंवा मादी यांचे याहवेहला अर्पण
करावयाचे असेल तर तो पशू निर्दोष असावा. 7 जर तुम्ही कोकर्‍याचे
अर्पण करीत असाल तर तुम्ही ते याहवेहसमोर आणावे, 8 तुमचा हात
त्याच्या डोक्यावर ठेवावा आणि सभामंडपाच्या प्रवेशद्वाराजवळ त्याचा

वध करावा. नंतर अहरोनाचे पुत्र त्याचे रक्त अर्पण म्हणून वेदीच्या
भोवती शिंपडतील. 9 शांत्यर्पणातून जे अन्नार्पण तुम्ही याहवेहसाठी
आणावयाचे ते हे: त्याची चरबी, पाठीच्या हाडाजवळून कापलेली संपूर्ण
चरबीदार शेपटी, आतील अवयव आणि त्याला जोडून असलेली सर्व
चरबी, 10 कंबरेजवळ असलेले चरबीसह दोन्ही गुरदे आणि जो तुम्ही
गुरद्यासह काढून टाकाल तो काळजाचा मोठा भाग. 11 याहवेहसाठी
अन्नार्पण म्हणून याजक या सर्वाचे वेदीवर हवन करेल. 12 “‘जर तुमचे
अर्पण बोकड असेल, तर तुम्ही ते याहवेहसमोर आणावे, 13 तुमचा हात
त्याच्या डोक्यावर ठेवावा आणि सभामंडपाच्या प्रवेशद्वाराजवळ त्याचा
वध करावा. नंतर अहरोनाचे पुत्र त्याचे रक्त वेदीच्या भोवती शिंपडतील.
14 जे काही अर्पण तुम्ही याहवेहसाठी अन्नार्पण म्हणून आणता ते
अशाप्रकारे असावे: आतील अवयव आणि आतड्यांवरील सर्व चरबी,
15 कंबरेजवळ असलेले चरबीसह दोन्ही गुरदे आणि जो तुम्ही गुरद्यासह
काढून टाकाल तो काळजाचा मोठा भाग. 16 याजक त्यांचे अन्नार्पण
म्हणून वेदीवर हवन करतील, हा याहवेहला प्रसन्न करणारा सुगंध
आहे. सर्व चरबी याहवेहसाठी आहे. 17 “‘भावी पिढीसाठी हे विधी
सर्वकाळासाठी आहेत, जिथे कुठे तुम्ही राहाल: तुम्ही कोणतीही चरबी
किंवा कोणतेही रक्त सेवन करू नये.’”

**4** याहवेह मोशेला म्हणाले: 2 “इस्राएली लोकांस सांग की जो कोणी
अजाणतेने पाप करून याहवेहच्या नियमानुसार निषिद्ध कृत्ये करत
असेल, तर त्याच्यासाठी हे नियम आहेत.” 3 एखाद्या अभिषिक्त
याजकाकडून अजाणतेने घडलेल्या पापामुळे लोकांवर दोष आला, तर
पापार्पण म्हणून याहवेहला त्याने एक निर्दोष गोऱ्हा अर्पण करावा.
4 त्याने तो गोऱ्हा सभामंडपाच्या दाराशी आणून त्याच्या मस्तकावर
आपला हात ठेवावा व याहवेहसमोर त्याचा वध करावा. 5 मग अभिषिक्त
याजकाने त्या गोऱ्ह्याचे थोडे रक्त सभामंडपामध्ये नेऊन त्यात आपली
बोटे बुडवून 6 याजकाने पवित्रस्थान वेगळे करणाऱ्या पडद्यासमोर
याहवेहपुढे सात वेळा शिंपडावे. 7 नंतर याजकाने त्यातील काही रक्त
घेऊन याहवेहसमोर सभामंडपातील धूपवेदीच्या शिंगांना लावावे व
गोऱ्ह्याचे उरलेले सर्व रक्त त्याने सभामंडपातील दाराशी असलेल्या
होमार्पणाच्या वेदीच्या पायथ्याजवळ ओतावे. 8 नंतर पापार्पणाच्या
गोऱ्ह्याची सर्व चरबी, म्हणजे आतड्यांवरील चरबी, त्यास लागून
असलेली सर्व चरबी, 9 दोन गुरदे व त्यावरील कंबरेजवळची चरबी व
काळीज काढून त्यांचे वेदीवर होमार्पण करावे. 10 शांत्यर्पणाच्या यज्ञात
जसे गोऱ्ह्याचे भाग काढून घेतात तसे ते वेगळे काढून याजकाने त्यांचे
होमवेदीवर होम करावे. 11 परंतु त्या गोऱ्ह्याची कातडी आणि त्याचे सर्व
मांस तसेच डोके आणि पाय, आतील अवयव आणि आतडी, 12 त्या
गोऱ्ह्याचे राहिलेले सर्व भाग, छावणीबाहेरील विधिपूर्वक स्वच्छ केलेल्या
ठिकाणी, राख टाकण्याच्या जागेवर नेऊन लाकडांच्या विस्तवावर जाळून
टाकावेत. 13 जर संपूर्ण इस्राएली लोकांकडून अजाणतेने पाप घडले,
आणि याहवेहनी निषिद्ध केलेल्यापैकी एखादी गोष्ट केली, ते केलेले
जरी समुदायाला माहीत नसेल, पण जेव्हा त्यांना त्यांची चूक समजून
येईल, 14 आणि त्यांनी केलेले पाप सर्वांना माहीत होईल, तेव्हा त्या
समुदायाने पापार्पण म्हणून एक गोऱ्हा आणावा आणि सभामंडपासमोर
अर्पण करावा. 15 तिथे इस्राएली समुदायातील पुढाऱ्यांनी याहवेहसमोर
त्यांचे हात त्या गोऱ्ह्याच्या मस्तकावर ठेवावेत, व याहवेहसमोर त्या
गोऱ्ह्याचा वध करावा. 16 नंतर अभिषिक्त याजकाने त्या गोऱ्ह्याचे काही
रक्त सभामंडपात घेऊन जावे. 17 याजकाने त्याची बोटे त्यात बुडवून
याहवेहसमोर पडद्यापुढे ते सात वेळा शिंपडावे. 18 त्यातील काही रक्त
घेऊन ते याहवेहपुढे सभामंडपातील वेदीच्या शिंगांना लावावे व राहिलेले
सर्व रक्त सभामंडपाच्या प्रवेशद्वाराकडे असलेल्या होमार्पणाच्या वेदीच्या
पायथ्याशी ओतावे. 19 त्याने त्यावरील सर्व चरबी काढावी आणि तिचे
वेदीवर होम करावे. 20 पापार्पणाच्या गोऱ्ह्यासंबंधीच्या विधीप्रमाणेच
त्याने या गोऱ्ह्याचेही करावे. अशा प्रकारे याजकाने संपूर्ण समुदायासाठी
प्रायश्चित्त करावे, म्हणजे त्यांची क्षमा होईल. 21 नंतर तो गोऱ्हा
वस्तीबाहेर काढून, जसा पहिला गोऱ्हा त्याने जाळून टाकला तसाच हा
गोऱ्हा जाळून टाकावा. समुदायासाठी हे पापार्पण आहे. 22 जेव्हा एखादा
पुढारी अजाणतेने याहवेह, त्याच्या परमेश्वराच्या आज्ञेचा भंग करून पाप
करतो व दोषी ठरतो, 23 ज्यावेळी त्याला हे पाप कळून येईल तेव्हा
त्याने एका निर्दोष बोकडाचे अर्पण आणावे. 24 त्याने त्या बोकडाच्या
मस्तकावर आपला हात ठेवावा व होमार्पणाच्या स्थळी त्याचा वध करून
तो याहवेहला अर्पावा. हे त्याचे पापार्पण होय. 25 मग याजकाने त्या
पापार्पणातील काही रक्त घेऊन आपल्या बोटाने होमार्पणाच्या वेदीच्या
शिंगांना ते लावावे व राहिलेले रक्त होमार्पणाच्या वेदीच्या पायथ्याशी
ओतून द्यावे. 26 शांत्यर्पणाच्या अर्पणाच्या यज्ञपशूच्या चरबीप्रमाणे या
सर्व चरबीचा वेदीवर होम करावा. अशाप्रकारे पुढाऱ्याच्या पापाबद्दल,
याजक प्रायश्चित करेल आणि त्याची क्षमा होईल. 27 समुदायातील
सामान्य मनुष्याने चुकून पाप केले व याहवेहने निषिद्ध केलेले एखादे
कृत्य केल्यामुळे ते दोषी ठरले, 28 पण जेव्हा ते त्यांच्या लक्षात येईल,
तेव्हा त्यांनी आपल्या पापाबद्दल प्रायश्चिताचे अर्पण म्हणून एक निर्दोष
शेळी आणावी. 29 त्या व्यक्तीने त्याचे हात पापार्पणाच्या मस्तकावर
ठेवावे आणि होमार्पणाच्या स्थळी तिचा वध करावा. 30 याजकाने
आपल्या बोटांनी काही रक्त घेऊन ते होमार्पणाच्या वेदीच्या शिंगांना
लावावे व राहिलेले सर्व रक्त त्याने वेदीच्या पायथ्याशी ओतावे. 31 मग
सर्व चरबी काढून शांत्यर्पणाच्या यज्ञपशूच्या चरबीप्रमाणे याजकाने तिचा
याहवेहसाठी सुवासिक हव्य म्हणून वेदीवर होम करावा. अशाप्रकारे
याजकाने त्या व्यक्तीसाठी प्रायश्चित्त करावे म्हणजे त्याची क्षमा होईल.
32 जर कोणी पापार्पणासाठी अर्पण म्हणून एखादे कोकरू घेऊन येतो,
तर ती एक निर्दोष मादी असावी. 33 होमार्पणाच्या पशूंचा वध करतात
तिथे तिला आणावे, तिच्या मस्तकावर हात ठेवावा आणि पापार्पण
म्हणून तिचा वध करावा. 34 “नंतर याजकाने पापार्पणाच्या रक्तातील
काही रक्त बोटांनी घेऊन ते होमार्पणाच्या वेदीच्या शिंगांना लावावे, व
राहिलेले सर्व रक्त वेदीच्या पायथ्याशी ओतून द्यावे.” 35 शांत्यर्पणाच्या
कोकराच्या चरबीचा उपयोग करतात, तसा या चरबीचा उपयोग करावा.

याजकाने सर्व चरबी काढून तिचे वेदीवर याहवेहसमोर होम करावे.
अशाप्रकारे याजक त्या व्यक्तींसाठी प्रायश्चित करेल, म्हणजे त्यांच्या
पापांची क्षमा होईल.

**5** जर पाहिलेल्या किंवा माहीत झालेल्या गोष्टींबद्दल साक्ष देण्यासाठी
सार्वजनिकरित्या केलेला आरोप जे ऐकतात पण काही बोलत
नाहीत, तर ते पाप करतात, त्यांना जबाबदार धरले जाईल. 2 एखादी
व्यक्ती अजाणतेने विधिनियमानुसार अशुद्ध ठरविलेल्या वस्तूला म्हणजेच
खाण्यास निषिद्ध असलेल्या ग्रामपशूच्या किंवा वनपशूच्या मृत शरीराला,
किंवा सरपटणाऱ्या अशुद्ध प्राण्याच्या मृत शरीराला स्पर्श करेल, तर ती
व्यक्ती अशुद्ध झाली. निषिद्ध असलेल्या मृत शरीराचा स्पर्श झाला, हे
त्या व्यक्तीच्या लक्षात आले, तर ती व्यक्ती दोषी आहे. 3 कोणत्याही
प्रकारच्या मानवी अशुद्धतेस कोणतीही व्यक्ती अजाणतेने स्पर्श करेल
आणि ते अशुद्ध झाले आहेत हे त्यांना समजणार नाही, परंतु नंतर त्यांना
त्यांचा दोष समजून आल्यास; 4 किंवा जर कोणता व्यक्ती अविचाराने
शपथ घेतो, मग ती शपथ चांगली असो वा वाईट असो, नंतर आपण ती
शपथ अज्ञानाने घेतली हे त्याला कळून आले, तेव्हा तो दोषी ठरेल. 5
जर कोणाला याची जाणीव होते की ते यापैकी कोणत्याही बाबतीत
दोषी आहेत, तर त्याने जे पातक केले ते पातक कबूल करावे, 6 आणि
त्यांनी केलेल्या पापांचा दंड म्हणून कळपातील एक मादी कोकरू
किंवा शेळी याहवेहला पापार्पण अशी करावी; आणि याजकाने त्यांच्या
पापाबद्दल प्रायश्चित करावे. 7 परंतु एखाद्याला याहवेहला कोकरू देणे
शक्य नसेल, तर त्याने आपल्या पापांबद्दल दोषार्पण म्हणून दोन होले
किंवा पारव्याची दोन पिल्ले, एक पापार्पणासाठी व एक होमार्पणासाठी
आणावी. 8 त्याने ती याजकाकडे आणावी आणि याजकाने प्रथम
पापार्पणाचा यज्ञ करावा. त्याने त्या पक्ष्याची मान मुरगळावी, परंतु डोके
मानेपासून वेगळे करू नये. 9 नंतर पापार्पणाचे काही रक्त वेदीभोवती
शिंपडावे. बाकीचे रक्त वेदीच्या पायथ्याशी ओतावे; हे पापार्पण होय.
10 दुसरा पक्षी त्याने विधिपूर्वक होमार्पण म्हणून अर्पावा. अशाप्रकारे
याजकाने त्यांच्यासाठी त्यांच्या पापाचे प्रायश्चित्त करावे, म्हणजे त्यांची
क्षमा होईल. 11 "जर होले किंवा पारव्याची पिल्ले आणण्याइतकीही
त्याची ऐपत नसेल, तर त्याने एफाचा दहावा भाग उत्तम पीठ आणावे. ते
पापार्पण असल्यामुळे त्याने ते जैतुनाच्या तेलात मिश्रित करू नये किंवा
त्यावर धूपही ठेवू नये. 12 त्याने ते याजकाकडे आणावे आणि याजकाने
त्यातील मूठभर पीठ घेऊन संपूर्ण पापार्पणाचे अंशात्मक प्रतीक म्हणून
याहवेहला इतर अर्पणांचा होम करतात तसे त्याचे वेदीवर होम करावे.
हे त्याच्यावतीने पापार्पण होय. 13 अशारितीने याजकाने त्यांच्या
अशा प्रकारच्या कोणत्याही पापांबद्दल प्रायश्चित्त करावे म्हणजे त्यांची
क्षमा होईल. अन्नार्पणासंबंधी सांगितल्याप्रमाणे, पापार्पणाचे उरलेले
पीठ याजकाचे होईल." 14 याहवेह मोशेला म्हणाले: 15 "याहवेहशी
अविश्वासूपणा करून त्यांची कोणतीही पवित्र वस्तू चुकून दूषित करून
कोणी पापी ठरला, तर त्याने दोषार्पण म्हणून, तू ठरवशील तितक्या
निवासमंडपातील चांदीच्या शेकेलांच्या ठरलेल्या किमतीचा एक निर्दोष
मेंढा आणावा. 16 पवित्र वस्तू दूषित करून त्यांनी जे पाप केले त्याची
ते भरपाई करतील. त्यांनी भरपाईची रक्कम देऊन वर वीस टक्के
अधिक दंड द्यावा. त्यांनी दोषार्पणाचा एक मेंढा याजकाकडे आणावा
आणि याजक त्यांच्यासाठी तो मेंढा अर्पून प्रायश्चित्त करेल व त्यांची
क्षमा होईल. 17 "अजाणतेने याहवेहने निषिद्ध ठरवलेले एखादे कृत्य
केल्याचे पाप कोणाकडून घडले, तरी ते दोषी ठरतील आणि त्याकरिता
ते जबाबदार असतील. 18 त्यांनी निर्दोष मेंढा याजकाकडे न्यावा, तू
ठरवशील तेवढ्या किमतीचा तो असावा, म्हणजे याजक तो मेंढा अर्पून
त्यांच्यासाठी प्रायश्चित्त करेल, आणि अजाणतेने घडलेल्या पापाबद्दल
त्यांची क्षमा होईल. 19 हे दोषार्पण आहे, याहवेहविरुद्ध चुकीची गोष्ट
केल्याने ते दोषी ठरले आहेत."

**6** याहवेह मोशेला म्हणाले: 2 "जर कोणी त्याच्या शेजारच्या मनुष्यावर
त्याने सोपविलेल्या काही गोष्टीबाबत फसवणूक करून किंवा त्याची
काळजी न घेता किंवा काहीतरी चोरी करून किंवा त्यांच्या शेजाऱ्याला
फसवून याहवेहविरुद्ध विश्वासघात केला असेल, तर तो पाप करतो 3
किंवा जर कोणाला हरवलेली वस्तू सापडली आणि त्याबद्दल ते खोटे
बोलतील आणि तिच्याविषयी खोटी शपथ वाहतील किंवा जर लोकांनी
केलेल्या अशा पापाबद्दल ते खोटे बोलतील, 4 अशा कोणत्याही प्रकारे
जर ते पाप करतील आणि त्यांच्या पापांची त्यांना जाणीव होईल, तेव्हा
त्यांनी ती चोरलेली वस्तू किंवा बळजबरीने जे घेतले असेल ते किंवा जे
काही त्यांच्यावर सोपविलेले असेल किंवा हरवलेली संपत्ती सापडल्यास
ती परत करावी— 5 किंवा अशा कोणत्याही गोष्टीबद्दल त्यांनी खोटी
शपथ घेतली असेल तर, ज्या दिवशी दोषार्पण आणतील, त्याच दिवशी
त्यांनी त्यांच्या गुन्ह्याबद्दल वीस टक्के अधिक दंड म्हणून त्या वस्तूच्या
मालकाला द्यावा. 6 आणि दंड म्हणून त्यांनी याजकाकडे, म्हणजेच
याहवेहसाठी, कळपातून एक निर्दोष व योग्य किमतीचा एक मेंढा
दोषार्पण म्हणून आणावा. 7 याप्रकारे त्यांच्यासाठी याजक याहवेहसमोर
प्रायश्चित करेल आणि ज्या गोष्टींमुळे ते दोषी झाले असतील, त्याबद्दल
त्यांना क्षमा केली जाईल." 8 याहवेह मोशेला म्हणाले, 9 "अहरोन आणि
त्याच्या पुत्रांना अशी आज्ञा कर, होमार्पणासाठी पाळावयाचे नियम हे
आहेत: होमार्पण रात्रभर वेदीवर ठेवून ते सकाळपर्यंत राहू द्यावे आणि
त्या वेदीवरील अग्नी जळत ठेवावा. 10 नंतर याजकाने त्याची तागमिश्रित
वस्त्रे, त्याचबरोबर त्याची अंतर्वस्त्रे अंगावर घालावी आणि वेदीवरील
अग्नीत भस्म झालेली होमार्पणाची राख काढावी आणि ती वेदीच्या
बाजूला ठेवावी. 11 मग त्याने आपली वस्त्रे बदलून, दुसरी वस्त्रे घालावी
आणि ती राख छावणीबाहेरील विधिपूर्वक स्वच्छ केलेल्या ठिकाणी
न्यावी. 12 वेदीवरील अग्नी सतत पेटलेला ठेवावा, तो विझू देऊ नये. तो
पेटलेला ठेवण्यासाठी याजकाने रोज सकाळी वेदीवर लाकडे ठेवावी व
त्यावर होमबली रचून शांत्यर्पणाच्या अर्पणाच्या चरबीचे हवन करावे. 13
वेदीवरील अग्नी सतत पेटलेला ठेवावा; तो कधीही विझू देऊ नये. 14
"अन्नार्पणासंबंधी नियम आहेत ते हे: अहरोनाच्या पुत्रांनी याहवेहसमोर
वेदीपुढे अर्पण करावे. 15 मग याजकांनी सुगंधी मसाले व जैतुनाचे

तेल व धूप घ्यावा आणि मळलेला अन्नार्पणातील मूठभर सपीठ घ्यावे
व संपूर्ण अर्पणाचा स्मरणभाग म्हणून वेदीवर त्याचे हवन करावे. हा
याहवेहला प्रसन्न करणारा सुगंध असेल. 16 उर्वरित भाग अहरोन आणि
त्याचे पुत्र खातील, परंतु त्यांनी ते खमीर न घालता पवित्रस्थानात खावे;
त्यांनी ते सभामंडपाच्या अंगणात खावे. 17 तो खमिरासह भाजू नये.
मला अर्पिलेल्या होमार्पणाचा हा भाग मी माझ्या अर्पणातून याजकांना
त्यांचा वाटा म्हणून दिला आहे. दोषार्पण व पापार्पण त्याप्रमाणेच हे
देखील परमपवित्र आहे. 18 अहरोनाच्या संतानांतील फक्त पुरुषांनी ते
खावे आणि याहवेहला अर्पिलेला अन्नार्पणाचा हा भाग त्यांच्यासाठी
पिढ्यान् पिढ्या कायमचा वाटा राहावा. जे कोणी यास स्पर्श करतील, ते
पवित्र गणले जातील.” 19 याहवेह मोशेला हे देखील म्हणाले, 20 “ज्या
दिवशी अहरोन व त्याच्या पुत्रांचा याजकीय सेवेसाठी अभिषेक होईल,
त्या दिवशी त्यांनी एफाचा दहावा हिस्सा उत्तम सपीठ, अर्धे सकाळी
व अर्धे सायंकाळी, अन्नार्पण म्हणून नेमाने याहवेहला अर्पावे. 21 ते
अन्नार्पण तव्यावर तेलात चांगले परतावे आणि मग याहवेहला अर्पण
म्हणून आणावे, कारण हा याहवेहला प्रसन्न करणारा सुगंध असे अर्पण
आहे. 22 त्याच्या पुत्रांपैकी जो पुत्र त्याच्या जागी अभिषिक्त याजक
म्हणून नियुक्त होईल तो ते तयार करेल. याहवेहचा हा वाटा सर्वकाळचा
आहे आणि तो पूर्णपणे जाळून टाकावा. 23 याजकाचे प्रत्येक धान्यार्पण
पूर्णपणे जाळून टाकले जाईल; ते खाऊ नये.” 24 याहवेह मोशेला
म्हणाले, 25 “अहरोन व त्याच्या पुत्रांना सांग, पापार्पणासंबंधी नियम हे
आहेत: ज्या स्थळी होमार्पणाच्या पशूंचा वध करतात त्याच स्थळी या
पापार्पणाच्या पशूचाही याहवेहसमोर वध करावा. हे परमपवित्र आहे.
26 ज्या याजकाने हा पापार्पणविधी केला असेल, त्याने सभामंडपाच्या
अंगणात पवित्रस्थानात ते खावे. 27 जे काही या मांसाला स्पर्श करेल ते
पवित्र होईल आणि जर काही रक्त वस्त्रावर उडाले असेल, तर ते तुम्ही
पवित्रस्थानी धुवावे. 28 ज्या मातीच्या पात्रात मांस शिजविले असेल, ते
पात्र फोडून टाकावे पण तांब्याच्या पात्रात शिजविले असेल; तर ते पात्र
घासून पाण्याने धुवावे. 29 याजकीय घराण्यातील कोणीही पुरुष ते
खाऊ शकतात; ते परमपवित्र आहे. 30 परंतु कोणतेही पापार्पण, ज्याचे
रक्त पवित्रस्थानात प्रायश्चित्त करण्यासाठी सभामंडपात आणले जाते ते
खाऊ नये; ते जाळून टाकावे.”

**7** “दोषार्पण जे परमपवित्र आहे त्यासंबंधी जे नियम आहेत ते
हे: 2 ज्या स्थळी होमार्पणाचे यज्ञपशू मारले जातात, त्याच
निर्धारित स्थळी दोषार्पणाच्या यज्ञपशूचा वध करावा आणि त्याचे रक्त
वेदीभोवती शिंपडावे. 3 मग याजकाने त्याची सर्व चरबी: चरबीदार
शेपूट, आतड्यावरील चरबी, 4 कंबरेजवळील चरबीसह दोन्ही गुरदे,
काळजाला जोडलेले भाग तुम्ही गुरद्यासह काढून टाकावे. 5 आणि
याजकाने या सर्वांचे याहवेहला अन्नार्पण म्हणून वेदीवर हवन करावे. हे
दोषार्पण होय. 6 याजकवर्गातील प्रत्येक पुरुषाला हा बली खाण्याचा
अधिकार असून त्यांनी तो बली पवित्रस्थानातच बसून खावा; कारण हे
परमपवित्र आहे. 7 “पापार्पणासारखेच दोषार्पण आहे; त्या दोघांचे
नियम सारखेच आहेत. अर्पिलेला हा बली प्रायश्चित्तविधी करणाऱ्या
याजकाच्याच अधिकाराचा होईल. 8 जो याजक एखाद्या मनुष्याच्या
वतीने होमार्पण करेल, त्या अर्पण पशूच्या कातडीवर त्या याजकाचाच
हक्क असेल. 9 भाजलेल्या किंवा शिजविलेल्या किंवा तळलेल्या
प्रत्येक अन्नधान्याचे अर्पण, विधी करणाऱ्या याजकाचे होईल, 10
अन्नधान्याचे प्रत्येक अर्पण, जैतुनाच्या तेलात मिश्रण केलेली किंवा
कोरडी, अहरोनाच्या सर्व पुत्रांच्या सामूहिक मालकीची आहेत.” 11
“याहवेहसाठी कोणाला शांत्यर्पणाचा यज्ञ करावयाचा असेल तर त्याचा
विधी असा: 12 “उपकारस्तुती म्हणून केलेल्या शांत्यर्पणात तेल
लावलेल्या बेखमीर जाड भाकरी, बेखमीर व वरून तेल लावलेल्या
पातळ पापड्या, नीट मळलेल्या व तेल मिसळलेल्या उत्तम पिठाच्या
जाड भाकरी असाव्यात. 13 उपकारस्तुतीच्या या शांत्यर्पणासह खमीर
घालून केलेल्या जाड भाकरींचेही अर्पण करावे. 14 या अर्पणातील
काही भाग संपूर्ण अर्पणाचे अंशात्मक प्रतीक म्हणून प्रत्येक प्रकारची
भाकर वेदीपुढे याहवेहला अर्पण करावी, म्हणजे याजक जो वेदीवर
शांत्यर्पणाचे रक्त शिंपडतो त्या याजकाचाच त्यावर हक्क असेल.
15 उपकारस्तुती करिता अर्पिलेल्या शांत्यर्पणातील यज्ञबलीचे मांस
अर्पण केल्या दिवशीच खावे; सकाळपर्यंत त्यातील काही शिल्लक ठेऊ
नये. 16 “परंतु यज्ञबलीचे अर्पण नवसाचे अथवा स्वैच्छिक असेल,
तर अर्पणातील भाग त्या दिवशीच खावे, पण उरलेले भाग दुसऱ्या
दिवशी खाण्यास हरकत नाही. 17 अर्पणातील काही मांस तिसऱ्या
दिवसापर्यंत शिल्लक राहिले असेल तर ते अग्नीत जाळून टाकावे. 18
शांत्यर्पणाच्या मांसापैकी काही मांस तिसऱ्या दिवशी खाल्ले, तर ज्याने
ते अर्पण केले असेल त्याला स्वीकारले जाणार नाही. त्याचे त्यांना
काहीच श्रेय मिळणार नाही, कारण ते अशुद्ध झाले आहे; त्यापैकी
काहीही खाणारा व्यक्ती जबाबदार धरला जाईल. 19 “‘ज्या मांसाचा
स्पर्श एखाद्या विधिनियमानुसार अपवित्र वस्तूला झाल्यास ते खाऊ
नये; ते जाळून टाकावे. दुसरे मांस जो कोणी विधिपूर्वक शुद्ध आहे, तो ते
खाऊ शकतो. 20 परंतु जर कोणी विधिनियमानुसार अशुद्ध असताना
शांत्यर्पणातील कोणतेही मांस जे याहवेहचे आहे ते खाईल, तर त्यांना
त्यांच्या लोकांमधून काढून टाकावे. 21 जर कोणी विधिनियमांनुसार
अशुद्ध वस्तूला स्पर्श करेल—मानवासंबंधीची अशुद्धता किंवा अशुद्ध
पशू वा सरपटणाऱ्या अशुद्ध पशूला स्पर्श करेल व नंतर याहवेहस
अर्पित शांत्यर्पणाचे सेवन करेल, त्याचा लोकातून उच्छेद व्हावा.’” 22
याहवेह मोशेला म्हणाले, 23 “इस्राएली लोकांस सांग: तुम्ही बैलांची,
मेंढरांची किंवा शेळ्यांची चरबी खाऊ नये. 24 मेलेल्या प्राण्याची
चरबी किंवा हिंस्त्र श्वापदाने फाडलेल्या प्राण्याची चरबी सापडली तर
ती इतर कामासाठी वापरता येईल, परंतु तुम्ही ती खाऊ नये. 25
याहवेहला केलेल्या होमार्पणातील चरबी जो कोणी खाईल, त्याचा
त्यांच्या लोकातून उच्छेद व्हावा. 26 जिथे कुठे तुम्ही राहाल, पशूचे किंवा
पक्ष्याच्या रक्ताचे केव्हाही सेवन करू नये. 27 जो कोणी ते खाईल,
त्याचा त्यांच्या लोकातून उच्छेद व्हावा.” 28 याहवेह मोशेला म्हणाले,

29 इस्राएली लोकांस सांग: जो कोणी याहवेहसाठी शांत्यर्पण आणेल,
त्याने त्याचा काही भाग याहवेहला अर्पणासाठी वेगळा आणावा. 30
त्याने तो स्वहस्ते याहवेहस अर्पण करावा. चरबी व ऊर यांचे अर्पण
आणून वेदीसमोर ओवाळले जाऊन ते याहवेहला ओवाळणीचे अर्पण
करावे. 31 मग याजक चरबीचे वेदीवर हवन करेल, पण ऊर अहरोन व
त्याच्या पुत्रांचे होईल. 32 तू त्याची उजवी मांडी शांत्यर्पणाचा भाग
म्हणून याजकास द्यावी. 33 अहरोनाच्या पुत्रांपैकी जो शांत्यर्पणातील
रक्त व चरबी अर्पण करेल, त्याला त्याचा वाटा म्हणून उजवी मांडी
देण्यात यावी. 34 कारण ओवाळणीचा ऊर आणि समर्पणाची मांडी
ही इस्राएली लोकांतर्फे याजक अहरोन आणि त्याच्या पुत्रांना दिली
आहेत. शांत्यर्पणाचा हा भाग त्यांचा सर्वकाळचा वाटा म्हणून देण्यात
यावा. 35 होमार्पणातील हा भाग याहवेहची सेवा करण्यासाठी नेमलेल्या
सर्व याजकांना, म्हणजेच अहरोन व त्याच्या पुत्रांना दिला पाहिजे. 36
कारण याहवेहनी त्यांचा अभिषेक केला, त्याच दिवशी त्यांनी इस्राएली
लोकांना आज्ञा दिली की, त्यांनी हा सर्वकाळचा वाटा त्या वंशाला
पिढ्यान् पिढ्या द्यावा. 37 होमार्पण, अन्नार्पण, पापार्पण, दोषार्पण,
याजकांच्या अभिषेकाचे अर्पण व शांत्यर्पण यांच्या विधीसंबंधीचे हे
नियम आहेत. 38 याहवेहनी हे नियम सीनाय पर्वतावर मोशेला दिले.
सीनायच्या रानात इस्राएली लोकांना याहवेहप्रीत्यर्थ कोणती अर्पणे
आणावी म्हणून मोशेला हे नियम देण्यात आले.

**8** याहवेह मोशेला म्हणाले, 2 “अहरोन आणि त्याच्या पुत्रांना,
त्यांची वस्त्रे, अभिषेकाचे तेल, पापार्पणासाठी एक गोऱ्हा, दोन
मेंढे आणि टोपलीभर बेखमीर भाकरी घेऊन ये, 3 आणि सर्व
लोकांना सभामंडपाच्या प्रवेशद्वाराजवळ एकत्र कर.” 4 याहवेहने
आज्ञा दिल्याप्रमाणे मोशेने केले आणि सर्व लोक सभामंडपाच्या
प्रवेशद्वाराजवळ एकत्र जमले. 5 तेव्हा मोशेने सर्व लोकांना म्हटले,
“याहवेहने जे करण्यास आज्ञा दिली आहे, ते हेच आहे.” 6 नंतर मोशेने
अहरोन आणि त्याच्या पुत्रांना पुढे आणले आणि त्यांना पाण्याने आंघोळ
घातली. 7 त्याने अहरोनास अंगरखा घातला, कंबरपट्टा कसला, झगा
घातला, झग्यावर एफोद घातले, एफोदावर सुशोभित केलेला कमरबंद
त्याच्या सभोवती बांधला. 8 नंतर त्याने अहरोनाला ऊरस्त्राण घातले व
त्यात उरीम व थुम्मीम ठेवले. 9 नंतर त्याच्या डोक्यावर फेटा बांधला.
त्या फेट्याच्या पुढील भागी सोन्याची एक पट्टी म्हणजे पवित्र मुद्रा
जोडली, याहवेहने मोशेला आज्ञा दिल्यानुसार त्याने हे केले. 10 मग
मोशेने अभिषेकाचे तेल घेऊन, निवासमंडप व त्यातील जे सर्वकाही होते,
त्यांना अभिषेक करून ती पवित्र केली. 11 काही तेल त्याने वेदीवर सात
वेळा शिंपडले; वेदी आणि त्यावरील सर्व उपकरणे, हात धुण्याचे भांडे व
त्याची बैठक पवित्र करण्यासाठी त्याने ते तेल त्यांच्यावरही शिंपडले.
12 मग त्याने अभिषेकाचे थोडे तेल अहरोनाच्या डोक्यावर ओतून त्याला
पवित्र केले. 13 मग मोशेने अहरोनाच्या पुत्रांना पुढे आणले, त्यांना
झगे घातले, कमरपट्टे कसले व फेटे बांधले, याहवेहने मोशेला आज्ञा
दिल्यानुसार त्याने हे केले. 14 मग मोशेने पापार्पणाच्या यज्ञबलीसाठी
एक गोऱ्हा आणला आणि अहरोन व त्याच्या पुत्रांनी त्या गोऱ्ह्याच्या
डोक्यावर आपले हात ठेवले. 15 मग मोशेने त्या गोऱ्ह्याचा वध केला
आणि वेदी पवित्र करण्यासाठी त्या गोऱ्ह्याचे रक्त वेदी व तिची चारही
शिंगे यांना आपल्या बोटांनी लावले. शिल्लक राहिलेले रक्त वेदीच्या
पायथ्याशी ओतले. अशाप्रकारे वेदीसाठी प्रायश्चित्त करून त्याने वेदी
पवित्र केली. 16 मोशेने आतड्यांवरील सर्व चरबी, काळजावरील लांब
पाळ, दोन्ही गुरदे काढून घेऊन तिचे वेदीवर हवन केले. 17 याहवेहने
आज्ञा दिल्याप्रमाणे मोशेने गोऱ्हा, त्याची कातडी, त्याचे मांस आणि
आतडी छावणीबाहेर नेऊन जाळून टाकले. 18 नंतर त्याने होमार्पणासाठी
एक मेंढा घेतला आणि अहरोन व त्याच्या पुत्रांनी त्याच्या डोक्यावर
आपले हात ठेवले. 19 नंतर मोशेने त्याचा वध केला आणि त्या मेंढ्याचे
रक्त वेदीभोवती शिंपडले. 20 मग मोशेने तो मेंढा कापून त्याचे तुकडे
केले आणि त्या तुकड्यांसह डोके व चरबी यांचा होम केला. 21 त्याची
आतडी व खूर पाण्याने धुऊन त्याने संपूर्ण मेंढ्याचे वेदीवर होम केले. हे
होमार्पण आहे. ते सुवासिक असे, याहवेहसाठी सादर केलेले अन्नार्पण
आहे, जसे याहवेहने मोशेला आज्ञा केली होती. 22 मग मोशेने दुसरा
मेंढा, अर्थात् समर्पणाचा मेंढा घेतला व अहरोन व त्याच्या पुत्रांनी
मेंढ्याच्या डोक्यावर आपले हात ठेवले. 23 मग मोशेने त्याचा वध केला
व त्याचे काही रक्त घेऊन ते अहरोनाच्या उजव्या कानाच्या पाळीला व
उजव्या हाताच्या व उजव्या पायाच्या अंगठ्यांना लावले. 24 नंतर मोशेने
काही रक्त अहरोनाच्या पुत्रांच्या उजव्या कानाच्या पाळयांना व उजव्या
हाताच्या आणि उजव्या पायाच्या अंगठ्यांना लावले. उर्वरित सर्व रक्त
त्याने वेदीभोवती शिंपडले. 25 मग त्याने सर्व चरबी आणि चरबीदार
शेपूट, आतड्यांवरील चरबी, चरबीसह दोन्ही गुरदे, काळजाची लांब
पाळ व उजवी मांडी ही घेतली. 26 आणि बेखमीर भाकरीची टोपली, जी
याहवेहसमोर होती त्यातून त्याने एक जाड भाकर, जैतुनाच्या तेलात
मळलेली एक जाड भाकर आणि एक पातळ भाकर घेतली, आणि
त्याने ते सर्व चरबीच्या भागावर आणि उजव्या मांडीवर ठेवले. 27
त्याने हे सर्व अहरोन व त्याच्या पुत्रांच्या हातांवर ठेवले आणि त्यांनी ते
याहवेहसमोर हेलावणीचे अर्पण घेऊन त्याची ओवाळणी केली. 28 नंतर
मोशेने ते सर्व त्यांच्या हातातून घेतले आणि ते वेदीवर होमार्पणासहित
समर्पणाचे अर्पण म्हणून सादर केले, हा याहवेहला सुवास म्हणून
अर्पिलेले अन्नार्पण होते. 29 मग मोशेने मेंढ्याच्या उराचा भाग घेतला, हा
समर्पणाच्या गोऱ्ह्याचा त्याचा स्वत:चा वाटा होता, तो त्याने ओवाळणीचे
अर्पण म्हणून याहवेहसमोर ओवाळले. याहवेहने दिलेल्या आज्ञेप्रमाणे
मोशेने हे केले. 30 नंतर मोशेने अभिषेकाचे थोडे तेल व वेदीवरील
थोडे रक्त घेऊन अहरोन व त्याच्या वस्त्रावर आणि त्याच्या पुत्रांवर
व त्यांच्या वस्त्रांवर शिंपडले. अशारितीने मोशेने अहरोन व त्याचे
पुत्र यांना याहवेहच्या सेवेसाठी पवित्र केले. 31 मग मोशे, अहरोन व
त्याच्या पुत्रांना म्हणाला, “मी तुम्हाला आज्ञा दिली होती त्याप्रमाणे,
सभामंडपाच्या प्रवेशद्वारात मांस शिजवा व ते मांस टोपलीतील समर्पित
भाकरीसह खावे. 32 उरलेले मांस व भाकरी मात्र अग्नीत जाळून टाका.

33 मग सात दिवस पूर्ण होईपर्यंत तुम्ही सभामंडपाच्या द्वाराबाहेर जाऊ
नका, कारण तुमचा समर्पणविधी सात दिवसाचा आहे. 34 आज जो
विधी करण्यात आला तो तुमच्या प्रायश्चित्तासाठी याहवेहने दिलेल्या
आज्ञेप्रमाणे करण्यात आला. 35 शिवाय, सात दिवस सभामंडपाच्या
प्रवेशद्वाराजवळ रात्रंदिवस राहून, याहवेहने दिलेल्या आज्ञेचे पालन
केल्याने तुम्ही मरणार नाही, कारण मला अशी आज्ञा देण्यात आली
आहे.” 36 तेव्हा अहरोन आणि त्याच्या पुत्रांनी ते सर्वकाही केले जे
करण्याची आज्ञा याहवेहनी मोशेद्वारे त्यांना दिली होती.

9 आठव्या दिवशी मोशेने अहरोन आणि त्याचे पुत्र व इस्राएलच्या
पुढाऱ्यांना बोलाविले. 2 तो अहरोनाला म्हणाला, “तुझ्या
पापार्पणासाठी व्यंग नसलेला एक गोऱ्हा व होमार्पणासाठी व्यंग नसलेला
एक मेंढा घेऊन याहवेहसमोर अर्पण कर. 3 मग इस्राएली लोकांना सांग:
तुम्ही तुमच्या पापार्पणासाठी एक बोकड व होमार्पणासाठी एक गोऱ्हा व
एक कोकरू निवडून घ्यावे. ही दोन्ही एका वर्षाची असून व्यंग नसलेली
असावीत, 4 आणि याहवेहसमोर शांत्यर्पणाचे बली म्हणून एक गोऱ्हा
आणि एक मेंढा व अन्नार्पणासाठी तेल मिसळलेले अन्नबली आणावे.
कारण याहवेह आज तुम्हाला दर्शन देणार आहेत.” 5 म्हणून मोशेने
दिलेल्या आज्ञेप्रमाणे लोकांनी सभामंडपापुढे सर्वकाही आणले आणि
संपूर्ण मंडळी याहवेहसमोर येऊन उभी राहिली. 6 तेव्हा मोशे म्हणाला,
“हे करण्याची आज्ञा तुम्हाला याहवेहनी दिली आहे, जेणेकरून याहवेहचे
गौरव तुम्हाला प्रकट व्हावे.” 7 मोशेने अहरोनाला सांगितले, “वेदीजवळ
ये आणि तुझे पापार्पण आणि तुझे होमार्पण यांचे अर्पण कर आणि
स्वतःसाठी आणि लोकांसाठी प्रायश्चित्त कर; लोकांसाठी बलीचे अर्पण
कर आणि त्यांच्यासाठी प्रायश्चित्त कर, याहवेहने आज्ञा दिली त्याप्रमाणे
ते कर.” 8 तेव्हा अहरोन वेदीजवळ गेला आणि त्याने स्वतःच्या
पापासाठी गोऱ्ह्याचा वध केला. 9 मग अहरोनाचे पुत्र त्या गोऱ्ह्याचे रक्त
घेऊन त्याच्याकडे आले आणि अहरोनाने आपले बोट रक्तात बुडवून ते
वेदीच्या शिंगांना लावले; उर्वरित रक्त त्याने वेदीच्या पायथ्याशी ओतून
दिले. 10 याहवेहनी मोशेला आज्ञा दिल्याप्रमाणे अहरोनाने पापार्पणाची
चरबी, गुरदे व काळजावरील चरबीचा पडदा यांचा वेदीवर होम केला.
11 कातडे व मांस मात्र त्याने वस्तीबाहेर नेऊन अग्नीत जाळले. 12
मग अहरोनाने स्वतःच्या होमबलीचा वध केला आणि त्या बलीचे रक्त
त्याच्या पुत्रांनी त्याला सोपवून दिले व त्याने ते वेदीभोवती शिंपडले. 13
मग त्यांनी त्या होमबलीचे तुकडे केले व ते तुकडे शिरासह अहरोनाकडे
दिले आणि अहरोनाने त्या प्रत्येक भागाचा वेदीवर होम केला. 14 त्याने
आतडी व पाय धुऊन वेदीवरील होमार्पणासह त्यांचा होम केला. 15
मग लोकांनी आणलेली अर्पणे अहरोनाने अर्पण केली. लोकांसाठी
पापार्पण म्हणून आणलेल्या पापबलीच्या बोकडाचा जसा वध केला,
तसाच या बोकडाचाही वध केला. 16 नंतर त्याने होमार्पण आणले
आणि सूचना दिल्याप्रमाणे त्याचे अर्पण केले. 17 मग त्याने सकाळच्या
होमार्पणाबरोबर अन्नार्पणही सादर केले व त्यातील मूठभर धान्य वेदीवर
जाळून टाकले. 18 यानंतर अहरोनाने लोकांच्या शांत्यर्पणाच्या गोऱ्ह्याचा
आणि मेंढ्यांचा वध केला आणि त्याच्या पुत्रांनी त्याला रक्त सोपविले
आणि त्याने ते वेदीच्या सभोवार शिंपडले. 19 परंतु त्याने गोऱ्ह्याची व
मेंढ्याची चरबी, म्हणजे चरबीदार शेपूट, आतड्यांवरील चरबी, गुरदे
आणि काळजावरील चरबीचा पडदा 20 त्या बलींच्या उरांवर ठेवली,
मग अहरोनाने त्या सर्वांचा वेदीवर होम केला. 21 मोशेच्या आज्ञेप्रमाणे
अहरोनाने ऊर व उजवी मांडी यांचे याहवेहसमोर ओवाळणीचे अर्पण
केले. 22 मग अहरोनाने आपले हात लोकांकडे उभारून त्यांना आशीर्वाद
दिला आणि जिथे त्याने पापार्पण, होमार्पण व शांत्यर्पण वाहिले होते
तिथून उतरून तो खाली आला. 23 नंतर मोशे व अहरोन सभामंडपात
गेले. ते परत बाहेर आले, तेव्हा त्यांनी लोकांना आशीर्वाद दिला आणि
याहवेहचे वैभव सर्वांना प्रकट झाले. 24 याहवेहपासून अग्नी येऊन त्याने
वेदीवरील होमार्पण व चरबीही भस्म केली. जेव्हा लोकांनी ते पाहिले
तेव्हा त्यांनी मोठ्या आवाजाने जयजयकार केला आणि जमिनीवर
लोटांगण घातले.

10 अहरोनाचे पुत्र नादाब व अबीहू यांनी आपआपल्या धुपाटण्यात
अग्नी भरून, त्यावर धूप ठेवून तो अनाधिकृत अग्नी याहवेहसमोर
नेला, जे याहवेहच्या आज्ञेविरुद्ध होते. 2 म्हणून याहवेहकडून अग्नी
निघाला आणि त्याने त्यांना भस्म केले आणि ते याहवेहसमोर मरण
पावले. 3 तेव्हा मोशे अहरोनास म्हणाला, “याहवेहने जे सांगितले ते
असे: “‘जे माझ्याजवळ येतात त्यांना मी दाखवेन की मी पवित्र आहे;
सर्व लोकांसमक्ष माझे गौरव होईल.’” यावर अहरोन शांत राहिला. 4
मग मोशेने अहरोनाचा चुलता उज्जीएलाचे पुत्र मिशाएल व एलसाफान
यांना बोलावून सांगितले, “तुम्ही इकडे या आणि पवित्र स्थानासमोरील
तुमच्या भावांची शरीरे उचलून छावणीबाहेर न्या.” 5 तेव्हा मोशेने आज्ञा
केल्याप्रमाणे त्यांनी जाऊन ती उचलली आणि त्यांच्या अंगरख्यांसह ती
बाहेर नेली. 6 मग मोशे अहरोन व त्याचे पुत्र एलअज़ार व इथामार
यांना म्हणाला, “तुमचे केस न विंचरलेले असे मोकळे सोडू नका व
तुमची वस्त्रे कधी फाडू नका, नाहीतर तुम्ही मराल आणि याहवेह तुम्हा
सर्व समुदायावर रागावतील. परंतु तुमचे नातेवाईक, सर्व इस्राएली
लोक याहवेहनी अग्नीने नाश केलेल्या लोकांबद्दल शोक करतील.
7 सभामंडपाचे प्रवेशद्वार सोडू नका, नाही तर तुम्ही मराल, कारण
याहवेहच्या अभिषेकाचे तेल तुम्हावर आहे.” तेव्हा त्यांनी मोशेच्या
आज्ञेप्रमाणे केले. 8 मग याहवेहने अहरोनाला आज्ञा दिली, 9 “तू
सभामंडपात जाशील तेव्हा द्राक्षारस किंवा कोणतेही आंबवलेले पेय
पिऊन तिथे जाऊ नकोस, नाहीतर तू मरशील. हा नियम तुझ्या पुत्रांना व
त्यांच्या पुत्र पौत्रांना पिढ्यान् पिढ्या लागू आहे, 10 यासाठी की पवित्र
व अपवित्र, शुद्ध व अशुद्ध यातील भेद तुला कळेल. 11 आणि याहवेहने
मोशेद्वारे दिलेल्या आज्ञांचे शिक्षण इस्राएली लोकांना देणे हे तुमचे कर्तव्य
राहील.” 12 अहरोन आणि त्याचे जिवंत राहिलेले पुत्र एलअज़ार आणि
इथामारला मोशे म्हणाला, “खमिराशिवाय तयार केलेल्या अन्नार्पणातून
उरलेले धान्यार्पण घेऊन याहवेहला अर्पण करा आणि ते तुम्ही वेदीजवळ
बसून खावे, कारण ते परमपवित्र आहे. 13 ते तुम्ही पवित्रस्थानी बसून

खावे, कारण याहवेहला अर्पण केलेल्या यज्ञपशूचा तो भाग तुमच्यासाठी
व तुमच्या मुलांसाठी ठरलेला वाटा आहे; कारण मला तशी आज्ञा
देण्यात आली आहे. 14 परंतु अर्पण केलेला ऊर व समर्पित केलेली
मांडी मात्र तुम्ही कोणत्याही विधिनियमानुसार शुद्ध केलेल्या जागी बसून
खावी. इस्राएली लोकांनी अर्पिलेल्या शांत्यर्पणाचा हा भाग तुमचे पुत्र व
कन्या यांच्यासाठी आहे. 15 मग मोशे पुढे म्हणाला, मांडी व ऊर दोन्ही
चरबीसह याहवेहसमोर आणावी व ती झोके देऊन परमेश्वराला अर्पण
करावी. याहवेहनी आज्ञा दिल्याप्रमाणे हे सर्व भाग सर्वकाळ तुमच्या
व तुमच्या मुलांचा वाटा समजावे.” 16 जेव्हा मोशेने पापार्पणाच्या
बोकडाचा शोध घेतला, तेव्हा त्याला समजले की तो जाळून टाकण्यात
आला आहे. तेव्हा अहरोनाचे बाकी असलेले पुत्र एलअज़ार व इथामार
यांच्यावर तो संतापला. 17 “तुम्ही पापबली पवित्रस्थानात का खाल्ला
नाही? ते परमपवित्र आहे; आणि समुदायाची पापे दूर करण्यासाठी
आणि याहवेहसमोर त्यांच्याकरिता प्रायश्चित्त करण्यासाठी याहवेहने
ते तुम्हाला दिले आहे. 18 पाहा, त्याचे रक्त पवित्रस्थानात आणले
नव्हते, म्हणून माझ्या आज्ञेप्रमाणे तुम्ही तो पवित्रस्थानात खावयाचा
होता.” 19 तेव्हा अहरोन मोशेला म्हणाला, “पाहा त्यांनी आजच त्यांचे
पापार्पण व होमार्पण परमेश्वराला अर्पण केले, म्हणून मजवर अशा
आपत्ती ओढविल्या. तेव्हा आज मी माझ्या दुःखाच्या दिवसात तो
पापबली खाल्ला असता, तर ते याहवेहला आवडले असते काय?” 20
हे ऐकल्यावर मोशेचे समाधान झाले.

**11** याहवेह मोशे व अहरोन यांना म्हणाले, 2 “इस्राएली लोकांना
सांग: पृथ्वीवर राहणाऱ्या सर्व प्राण्यांपैकी हे प्राणी तुम्ही खाऊ
शकता. 3 ज्यांचे खूर दुभागलेले आहेत आणि जे प्राणी रवंथ करतात
असे कोणतेही प्राणी तुम्ही खाऊ शकता. 4 “जे प्राणी फक्त रवंथ
करतात किंवा त्यांचे फक्त खूर दुभागलेले आहेत, ते तुम्ही खाऊ नयेत.
उंट जरी रवंथ करतात तरी त्यांचे खूर दुभागलेले नसतात; ते तुमच्यासाठी
अशुद्ध आहेत. 5 रानससा जरी रवंथ करतो तरी त्याचे खूर दुभागलेले
नसतात. तो तुमच्यासाठी अशुद्ध आहे. 6 ससा जरी रवंथ करतो, तरी
त्याचे खूर दुभागलेले नसतात; तो तुमच्यासाठी अशुद्ध आहे. 7 डुकरे
देखील अशुद्ध आहेत; जरी त्यांचे दुभागलेले खूर आहेत, तरी ते रवंथ
करीत नाहीत. 8 त्यांचे मांस तुम्ही खाऊ नये किंवा त्यांच्या मृतशरीरांना
स्पर्श करू नये; ते तुमच्यासाठी अशुद्ध आहेत. 9 “समुद्राच्या आणि
नद्यांच्या पाण्यात राहणाऱ्या सर्व प्राण्यांपैकी तुम्ही कल्ले आणि खवले
असलेले कोणतेही प्राणी खाऊ शकता. 10 पण ज्यांना कल्ले व खवले
नाहीत—मग ते समुद्रात राहणारे वा इतर जलचर असोत—असे सर्व
मासे तुम्हाला निर्विवाद अशुद्ध असून निषिद्ध आहेत. 11 तुम्ही ते अशुद्ध
समजावे व ते खाऊ नयेत किंवा त्यांच्या मृतशरीरांना स्पर्शही करू
नये. 12 ज्यांना कल्ले व खवले नाहीत असा प्रत्येक जलचर प्राणी
तुम्हाला निषिद्ध आहे. 13 “जे पक्षी तुम्ही अशुद्ध समजावेत आणि
ते तुम्ही खाऊ नयेत कारण ते अशुद्ध आहेत ते हे: गरुड, गिधाड,
काळे गिधाड, 14 लाल पतंग, कोणत्याही जातीचे काळे पतंग, 15
कोणत्याही जातीचे कावळे, 16 शिंग असलेले घुबड, किंचाळणारे घुबड,
समुद्रपक्षी, सर्व जातीचे बहिरी ससाणे, 17 लहान घुबड, करढोक, मोठे
घुबड, 18 पांढरे घुबड, वाळवंटी घुबड, कुरर, 19 करकोचा, कोणत्याही
प्रकारचे बगळे, टिटवी आणि वटवाघूळ.” 20 चार पाय असलेले उडणारे
कीटक तुम्ही खाऊ नये, ते तुमच्यासाठी अशुद्ध समजले जातात.
21 तरीसुद्धा उडणारे कीटक, जे त्यांच्या चारही पायांवर चालतात:
जमिनीवर उड्या मारण्याकरिता ज्यांच्या पायांवर एकजोड असतो,
ते तुम्ही खाऊ शकता. 22 उड्या मारीत चालणारे सर्व जातींचे टोळ,
नाकतोडे, खरपुडे व गवतेटोळ तुम्ही खावेत. 23 मात्र चार पाय असून जे
उडतात ते सर्व कीटक तुम्हाला निषिद्ध आहेत. 24 वर उल्लेखलेल्या
प्राण्यांमुळे तुम्ही अशुद्ध व्हाल, जो कोणी त्यांच्या मृतशरीराना स्पर्श
करेल तो संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहील. 25 जे कोणी त्यांचे मृतदेह
उचलतील त्यांनी त्यांची वस्त्रे धुवावीत आणि ते संध्याकाळपर्यंत अशुद्ध
राहतील. 26 ज्या प्राण्यांचे खूर अर्धवट दुभागलेले आहेत किंवा जे
प्राणी रवंथ करीत नाहीत, अशा प्राण्यांच्या मृतशरीरांना तुम्ही स्पर्श
केलात, तर तुम्ही अशुद्ध व्हाल. 27 पंजांवर चालणारा प्रत्येक प्राणी
खाण्यास तुम्हाला मनाई आहे. अशा प्राण्याच्या मृत शरीराला जो स्पर्श
करेल त्याने संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे. 28 जो कोणी त्याचे मृतदेह
उचलून नेईल त्याने संध्याकाळपर्यंत अशुची राहावे. तो प्राणी तुम्ही
अशुद्ध समजावा. 29 जमिनीवर सरपटणाऱ्या प्राण्यांपैकी तुम्ही अशुद्ध
समजावे ते हे: मुंगूस, उंदीर, सरडे, 30 घोरपड, घुशी, पाल, मगर,
गोगलगाय व गुहिऱ्या सरडा. 31 जमिनीवर सरपटणाऱ्यापैकी ही सर्व
तुम्हाला निषिद्ध होत; जो कोणी त्यांच्या मृत शरीराला स्पर्श करेल,
त्याने संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे. 32 त्यांच्यापैकी कोणी मरून
एखाद्या वस्तूवर पडले तर ती वस्तूही अशुद्ध समजावी; काष्ठपात्रे, वस्त्रे,
कातडे, गोणपाट किंवा कोणत्याही कामाचे हत्यार असो, ते पाण्यात
टाकावे व संध्याकाळपर्यंत अशुद्ध समजावे; नंतर ते शुद्ध होईल. 33
त्यापैकी एखादा प्राणी मातीच्या पात्रात पडला, तर त्या पात्रात जे काही
असेल ते अशुद्ध समजावे व ते पात्र फोडून टाकावे. 34 अशाप्रकारे
अशुद्ध झालेली वस्तू धुण्यासाठी वापरलेल्या पाण्याचा जर एखाद्या
पदार्थाला स्पर्श झाला, तर ते सर्व अशुद्ध समजावे. अशुद्ध भांड्यातील
कोणतेही पेय अशुद्ध आहे. 35 अशा प्राण्यांच्या मृत शरीराचा स्पर्श
चुलीला किंवा एखाद्या भांड्याला झाला तर ते अशुद्ध होय. अशा अशुद्ध
चुलीचा व भांड्याचा नाश करावा. 36 जर एखाद्या प्राण्याचे मृतदेह
पाणी असलेल्या एखाद्या झऱ्यात किंवा हौदात पडले, तरी ते पाणी
शुद्धच राहते. तरीपण जो त्या मृत शरीराला स्पर्श करेल त्याला अशुद्ध
समजावे. 37 जर शेतात पेरण्याच्या बियाण्यांना त्यांच्या मृत शरीराचा
स्पर्श झाला तर ते शुद्धच राहते; 38 पण ओल्या बियाण्यावर मृतदेह
पडले तर ते बियाणे तुमच्यासाठी अशुद्ध आहेत. 39 तुम्हाला खाण्यास
मोकळीक असलेला प्राणी आजारी पडून मेला, तर अशा प्राण्याच्या मृत
शरीराला जो कोणी स्पर्श करेल तो संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहील. 40
त्याचप्रमाणे जो कोणी त्या प्राण्याचे मांस खाईल किंवा त्याचे मृतदेह

वाहून नेईल, त्याने आपली वस्त्रे धुवावीत; तो संध्याकाळपर्यंत अशुद्ध
राहील. 41 जमिनीवर सरपटत जाणारे सर्व प्राणी अशुद्ध आहेत. ते खाऊ
नयेत. 42 जे पोटावर सरपटतात, चार पायांवर खुरडत चालतात वा
ज्यांना अनेक पाय असतात असे प्राणी तुम्ही खाऊ नयेत, कारण ते
अशुद्ध आहेत. 43 झुंडीने राहणाऱ्या अशा कोणत्याही प्राण्यांना स्पर्श
करून तुम्ही अशुद्ध होऊ नये. त्यांच्याद्वारे किंवा त्यांच्यामुळे स्वतःला
अशुद्ध करू नका. 44 मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे; म्हणून तुम्ही
स्वतःस पवित्र ठेवावे. मी पवित्र आहे, म्हणून तुम्हीही पवित्र राहावे.
म्हणून तुम्ही जमिनीवर सरपटणाऱ्या कोणत्याही प्राण्याला स्पर्श करून
स्वतःस विटाळवून घेऊ नये. 45 मी याहवेह आहे, ज्याने तुम्हाला इजिप्त
देशातून बाहेर आणले यासाठी की मी तुमचा परमेश्वर असावा; म्हणून
पवित्र व्हा, कारण मी पवित्र आहे. 46 “पशू, पक्षी, प्रत्येक जलचर
आणि प्रत्येक प्राणी जे जमिनीवर सरपटणारे आहेत त्यांच्यासंबंधी हे
नियम आहेत. 47 शुद्ध व अशुद्ध प्राणी तुम्ही खावे वा खाऊ नये यामधील
फरक दाखविण्यासाठी हे नियम आहेत.”

**12** याहवेह मोशेला म्हणाले, 2 “इस्राएली लोकांना सांग: एखादी
स्त्री गरोदर राहिली आणि तिला पुत्र झाल्यास, ती आई
विधीनियमाप्रमाणे सात दिवस अशुद्ध राहील. मासिक पाळीच्या वेळी
जशी ती असते, तशीच ती अशुद्ध समजावी. 3 आठव्या दिवशी तिच्या
पुत्राची सुंता करावी. 4 नंतर पुढील तेहतीस दिवस संपेपर्यंत ती
बाळंतपणात होणाऱ्या आपल्या रक्तस्त्रावाच्या अशुद्धतेपासून शुद्ध
होत असताना, तिने कोणत्याही पवित्र वस्तूला स्पर्श करू नये अथवा
पवित्रस्थानात जाऊ नये. 5 जर ती कन्येला जन्म देईल, तर ती स्त्री जशी
तिच्या मासिक पाळीच्या वेळेस अशुद्ध राहते तशी ती चौदा दिवस अशुद्ध
राहील. नंतर रक्तस्त्रावापासून शुद्ध होण्यासाठी तिने सहासष्ट दिवस वाट
पाहावी.” 6 हे शुद्ध होण्याचे दिवस संपल्यानंतर तिला पुत्र झालेला असो
की कन्या, तिला पुढील नियम लागू आहेत: तिने होमार्पणासाठी एक
वर्षाचे कोकरू आणावे व पापार्पणासाठी होला किंवा पारव्याचे पिलू
सभामंडपाच्या दाराशी याजकाकडे घेऊन जावे. 7 याजक याहवेहला ते
अर्पण करून तिच्यासाठी प्रायश्चित्त करेल म्हणजे बाळंतपणात होणाऱ्या
रक्तस्त्रावापासून ती विधिपूर्वक शुद्ध होईल. पुत्र किंवा कन्या झालेल्या
स्त्री विषयी हा विधिनियम आहे. 8 जर कोकरू आणण्याइतकी तिची
ऐपत नसेल, तर तिने एक होमार्पणासाठी व दुसरे पापार्पणासाठी दोन
कबुतरे किंवा पारव्याची दोन पिल्ले आणावी. त्याचे अर्पण करून याजक
तिच्यासाठी प्रायश्चित्त करेल, म्हणजे ती पुन्हा विधिपूर्वक शुद्ध होईल.

**13** याहवेह मोशे व अहरोन यांना म्हणाले, 2 “जेव्हा एखाद्या
मनुष्याच्या त्वचेवर सूज, पुरळ किंवा पुटकुळी आली आणि
त्यामुळे त्याची त्वचा पांढरी झाली असली, तो कुष्ठरोगाचा चट्टा असेल,
त्याला अहरोन याजकाकडे किंवा याजक असलेले त्याचे पुत्र यापैकी
एकाकडे आणावे. 3 याजकाने त्या व्यक्तीच्या त्वचेवरील चट्टा तपासावा
आणि चट्ट्यावरील केस पांढरे झाले असतील व तो त्वचेपेक्षा खोल
गेलेला असेल, तर हा कुष्ठरोग समजावा; आणि याजकाने त्या व्यक्तीचा
तपासणी केल्यावर, त्याला विधिनियमानुसार अशुद्ध म्हणून जाहीर
करावे. 4 जर त्वचेवरील चट्टा पांढरा असेल, परंतु तो चट्टा त्वचेपेक्षा
खोल गेलेला नसेल व त्यावरील केस पांढरे झाले नसतील, तर याजकाने
चट्टा पडलेल्या व्यक्तीला सात दिवस वेगळे ठेवावे. 5 सातव्या दिवशी,
याजकाने त्याची तपासणी करावी आणि त्वचेवरील चट्टा अधिक
पसरलेला नसेल, तर याजकाने त्याला आणखी सात दिवस वेगळे
ठेवावे. 6 सातव्या दिवशी, याजकाने त्याची पुन्हा तपासणी करावी
आणि चट्टा बुजत चालला आहे व तो त्वचेवर पसरला नसेल, तर तो
शुद्ध झाला आहे, असे याजकाने जाहीर करावे; कारण तो साधारण
खवंद होय. त्या मनुष्याने आपले कपडे धुवावेत आणि पूर्ववत शुद्ध
व्हावे. 7 परंतु याजकापुढे शुद्ध सिद्ध झाल्यावर, तो चट्टा त्वचेवर पसरू
लागला, तर त्या व्यक्तीने स्वतःला पुन्हा याजकासमोर हजर करावे. 8
याजकाने त्या व्यक्तीची तपासणी करावी आणि खवंद त्वचेवर पसरलेला
दिसून आल्यास, त्याला अशुद्ध असे जाहीर करावे; तो कुष्ठरोग आहे. 9
“एखाद्या मनुष्याला कुष्ठरोग झाला असेल, तर त्याला याजकाकडे न्यावे.
10 याजकाने त्याची तपासणी करावी आणि त्वचेवर पांढरी सूज येऊन
आणि तेथील केस पांढरे झाले असतील आणि सूजेवर उघडी जखम
आढळल्यास, 11 तर हा जुना कुष्ठरोग असून याजकाने त्या व्यक्तीला
अशुद्ध म्हणून जाहीर करावे, यापुढे त्याला अधिक तपासणीसाठी वेगळे
ठेवू नये; कारण तो अशुद्धच आहे.” 12 जर कुष्ठरोग सर्व त्वचेवर
पसरलेला असेल आणि याजक जितके पाहू शकतो तितके म्हणजे
डोक्यापासून पायापर्यंत पसरलेला असेल तर, 13 याजकाने त्याची
तपासणी करावी आणि ते कोड संपूर्ण शरीरावर पसरलेले असेल तर
त्याने त्याला शुद्ध म्हणून जाहीर करावे. कुष्ठरोगापासून बरा झाला आहे,
असे जाहीर करावे; कारण तो संपूर्ण शुभ्र झाला आहे, म्हणजेच तो
शुद्ध होय. 14 परंतु त्यांच्यावर उघडी जखम आढळल्यास, ते अशुद्ध
समजावे. 15 याजकाने त्वचेवरील जखम पाहून त्या व्यक्तीला अशुद्ध
जाहीर करावे; त्वचा नसलेले मांस अशुद्ध असून ते कुष्ठरोग आहे; हा
गंभीर आजार आहे. 16 परंतु उघडी जखम फिरून पांढरी पडली तर त्या
कुष्ठरोग्याने याजकाकडे यावे. 17 याजकाने त्यांना तपासावे, जर तो
भाग खरोखर पूर्णपणे पांढरा झालेला असेल, तर तो मनुष्य शुद्ध झाला
आहे, असे याजकाने जाहीर करावे. 18 ज्या माणसाच्या त्वचेवर फोड
येऊन पुढे तो फोड बरा झाला 19 व फोडाच्या जागी तांबूस पांढरा चट्टा
राहिला, तर त्याने याजकाकडे तपासणीसाठी गेले पाहिजे. 20 याजकाने
त्याची तपासणी करावी आणि जर तो चट्टा त्वचेखाली खोलवर गेला
असेल आणि त्याच्यावरील केस पांढरे झाले असतील, तर याजकाने
त्याला अशुद्ध म्हणून जाहीर करावे; कारण फोडामधून कुष्ठरोग निर्माण
झाला आहे. 21 पण तपासणीनंतर त्या चट्ट्यामध्ये पांढरे केस नाहीत
आणि चट्टा त्वचेत खोल गेला नाही व त्याचा रंग करडा आहे, असे
याजकाला दिसून आले असेल, तर याजकाने त्याला सात दिवस वेगळे
ठेवावे. 22 त्या कालावधीत तो चट्टा पसरत गेला आहे असे दिसले,

तर याजकाने त्यास अशुद्ध ठरवावे; तो गंभीर आजार आहे. 23 पण
पांढरा चट्टा वाढला नाही किंवा पसरला नाही. तर तो केवळ फोडाचा
व्रण आहे; म्हणून याजकाने तो मनुष्य शुद्ध आहे असे जाहीर करावे. 24
एखादा काही कारणाने भाजला व जळालेली जागा लालसर पांढरी
किंवा नुसती पांढरी झाली असे दिसून आले, 25 तर याजकाने तो चट्टा
अवश्य तपासावा. जर चट्ट्यावरील केस पांढरे झाले असतील, आणि तो
त्वचेपेक्षा खोल गेला आहे असे दिसून आले, तर त्या जळालेल्या भागी
कुष्ठरोग फुटला असे समजावे; याजकाने त्यास अशुद्ध जाहीर करावे; तो
मनुष्य कुष्ठरोगी आहे. 26 पण तपासणीनंतर त्या पांढऱ्या चट्ट्यावरील
केस पांढरे झालेले नाहीत, आणि पांढरेपणा त्वचेच्या खोलवर गेलेला
नाही व तो हळूहळू कमी होत आहे, असे जर याजकाला दिसून आले,
तर याजकाने त्याला सात दिवसापर्यंत वेगळे ठेवावे; 27 सातव्या दिवशी
याजकाने त्याची तपासणी करावी आणि जर चट्टा त्वचेवर पसरत गेला
असेल, तर याजकाने त्यास अशुद्ध म्हणून जाहीर करावे; तो कुष्ठरोग
आहे. 28 पण पांढरा चट्टा त्वचेवर पांगून परसला नाही आणि तो हळूहळू
कमी होत आहे, असे दिसून आले, तर याजकाने त्याला शुद्ध जाहीर
करावे; तो जळालेल्या जागेत केवळ व्रण आहे आणि त्याला कुष्ठरोग
नाही. 29 एखाद्या पुरुषाच्या किंवा स्त्रीच्या डोक्यावर अथवा हनुवटीवर
चट्टा असेल 30 तर याजकाने त्याची तपासणी करावी. चट्टा त्वचेखाली
खोलवर आहे असे वाटत असेल आणि चट्ट्यावर पिवळे केस सापडले
असतील, तर याजकाने त्यास अशुद्ध असे जाहीर करावे; हा डोक्याचा
अथवा हनुवटीचा कुष्ठरोग आहे. 31 पण तो चट्टा त्वचेपेक्षा खोल गेलेला
नाही आणि त्यामध्ये काळे केस नाहीत, असे याजकाच्या तपासणीत
दिसून आले तर याजकाने त्या व्यक्तीला सात दिवस वेगळे ठेवावे. 32
सातव्या दिवशी याजकाने तपासणी करावी आणि चट्टा जर पसरला
नसेल आणि संसर्ग त्वचेमध्ये खोलवर गेला नसेल किंवा पिवळसर
केस दिसून येत नसतील, 33 तर व्रणाभोवतीचे केस काढून टाकावे;
व्रणावरचे केस मात्र काढू नयेत. मग याजकाने त्या व्यक्तीला आणखी
सात दिवस वेगळे ठेवावे. 34 मग याजकाने सातव्या दिवशी तपासणी
करावी, आणि व्रण त्वचेवर पसरला नसेल आणि संसर्ग त्वचेखाली
खोलवर गेला नसेल, तर याजकाने त्या व्यक्तीला शुद्ध म्हणून जाहीर
करावे आणि ती व्यक्ती कपडे धुतल्यानंतर शुद्ध व्हावी. 35 पण तो शुद्ध
जाहीर केल्यानंतर तो चट्टा पसरू लागला, 36 तर याजकाने तपासणी
करावी आणि चट्ट्याभोवतालचे केस पिवळे होतात की नाही याची वाट
न पाहता, ती व्यक्ती अशुद्ध असे जाहीर करावे. 37 पण चट्टा पसरण्याची
क्रिया थांबली असून तिच्यावर काळे केस सापडले, तर ती व्यक्ती बरी
झाली असून शुद्ध आहे आणि याजकाने त्याला शुद्ध असे जाहीर करावे.
38 एखाद्या पुरुषाच्या किंवा स्त्रीच्या त्वचेवर पांढरे चट्टे असतील, 39 तर
याजक तपासणी करेल आणि त्वचेवरील चट्ट्याचा रंग पांढरट असेल,
तर इसब हा चर्मरोग झाला आहे, असे जाहीर करेल; ती व्यक्ती शुद्ध
आहे. 40 कोणा माणसाच्या डोक्यावरील केस गळून टक्कल झाले
असेल तर तो शुद्ध आहे. 41 जर त्याच्या मस्तकाच्या पुढच्या भागावरील
केस गळून पडले असतील, तर ते केवळ साधे टक्कल आहे, तो शुद्ध
होय. 42 तरी टक्कलावर तांबूस पांढरा डाग असेल तर तो त्या टक्कल
पडलेल्या डोक्यावर किंवा कपाळावर कुष्ठरोग असण्याचा संभव आहे.
43 याबाबतीत याजक त्याची तपासणी करेल आणि डोक्याच्या टक्कल
पडलेल्या भागावर अंगावरील त्वचेवर कुष्ठरोगासारखा दिसणारा तांबूस
पांढरा चट्टा असेल, 44 तर त्या व्यक्तीच्या डोक्यावर पडलेला चट्टा
कुष्ठरोगाचा आहे; ती व्यक्ती अशुद्ध आहे; याजकाने त्यास अशुद्ध असे
जाहीर करावे. 45 असा कुष्ठरोग झालेल्या व्यक्तीने फाटलेले कपडे
घालावेत, त्यांच्या केसात फणी न फिरविता ते तसेच वाढू द्यावेत; त्यांनी
तोंडाखालील भाग झाकून घ्यावा आणि अशुद्ध! अशुद्ध! असे ओरडावे.
46 जोपर्यंत कुष्ठरोग टिकून आहे, तोपर्यंत तो मनुष्य अशुद्ध असून
त्याने छावणीबाहेर एकटे राहावे. 47 एखाद्या लोकरीच्या वा तागमिश्रित
सुताच्या वस्त्राला किंवा कापडाच्या ताग्याला रोगाचा संसर्ग झाला
आहे, 48 सुताच्या, लोकरीच्या ताण्याने विणलेले वस्त्र वा तागमिश्रित
चामड्याला किंवा चामड्याच्या वस्तूला कुष्ठरोग झाला आहे, असा
संशय आला 49 आणि जर ते चामड्याच्या, विणलेल्या वस्त्रावर, अथवा
चामड्याच्या वस्तूवर हिरवट किंवा तांबूस चट्टा असला, तर तो कुष्ठरोगच
आहे, म्हणून तपासणीसाठी ती वस्तू याजकाकडे अवश्य घेऊन जावी.
50 याजक ती वस्तू सात दिवसापर्यंत वेगळी ठेवील व सातव्या दिवशी
त्या चट्ट्याची पुन्हा तपासणी करेल. तो चट्टा पसरला असेल, तर त्या
विणलेल्या किंवा चामड्याच्या वस्त्राला वा वस्तूला संसर्गजन्य कुष्ठरोग
झाला आहे असे समजावे; ती वस्तू अशुद्ध होय. 52 तेव्हा याजकाने ती
वस्त्रे, ते कापड किंवा ती विणलेली लोकरीची वा चामड्याची वस्तू
संसर्गजन्य आहे असे म्हणून अग्नीत जाळून टाकावी. 53 पण सातव्या
दिवशी ते विणलेले वस्त्र किंवा चामड्याची वस्तू तपासली असता तो
चट्टा पसरला नाही, असे याजकाला दिसून आले, तर त्याने कुष्ठरोगाची
शंका असलेली वस्तू धुऊन टाकण्याचा आदेश द्यावा व नंतर आणखी
सात दिवस ती वेगळी ठेवावी. 55 मग ती वस्तू धुतल्यावर याजकाने
तपासावी आणि त्या चट्ट्याचा रंग बदलला नसून तो पसरला नाही.
तरी तो अशुद्ध आहे असे समजावे; ती वस्तू जाळून टाकावी कारण
तिला आतून, बाहेरून, सगळीकडून कुष्ठरोगाचा संसर्ग पोहोचला आहे
असे समजावे. 56 पण धुतल्यानंतर चट्ट्याचा रंग फिकट झाला आहे,
असे याजकाला दिसून आले, तर त्याने चट्टा असलेल्या विणलेल्या
कापडाच्या वा चामड्याच्या वस्तूचा तेवढाच भाग कापून टाकावा. 57
इतके करूनही जर तो चट्टा या विणलेल्या वस्त्रावर किंवा चामड्याच्या
वस्तूवर पुन्हा फुलून निघाला, तर याजकाने ती वस्तू अवश्य जाळून
टाकावी, कारण तिला कुष्ठरोग आहे. 58 पण ती विणलेल्या कापडाची
किंवा चामड्याची वस्तू धुतल्यानंतर तिच्यावरील चट्टा नाहीसा झाला,
तर ती वस्तू पुन्हा एकदा धुवावी, म्हणजे ती शुद्ध होईल. 59 लोकरीच्या
व तागमिश्रित सुताच्या विणलेल्या वस्त्राला किंवा कापडाच्या ताग्याला,
चामड्याला किंवा चामड्याच्या वस्तूला कुष्ठरोगाचा चट्टा दिसून आला
तर ती शुद्ध किंवा अशुद्ध ठरविण्याचे हे नियम आहे.

**14** याहवेह मोशेला म्हणाले, 2 कोणत्याही रोगग्रस्त व्यक्तीला
त्यांच्या शुद्धीकरणाच्या विधीसमयी, जेव्हा त्यांना याजकाकडे
आणले जाते तेव्हा हे नियम आहेत: 3 याजकाने छावणीबाहेर जाऊन बरे
झालेल्या कुष्ठरोग्यांस तपासून पाहावे. जर ते कुष्ठरोगी बरे झाले आहेत
असे दिसून आले, 4 याजक आज्ञा करतील की दोन जिवंत शुद्ध पक्षी
आणि काही गंधसरूचे लाकूड, किरमिजी रंगाची दोरी आणि एजोब त्या
व्यक्तीच्या शुद्धीकरणासाठी आणाव्यात. 5 मग याजकाने आज्ञा करावी
की, वाहत्या पाण्यावर धरलेल्या मातीच्या पात्रात त्यापैकी एक पक्षी
मारावा; 6 गंधसरूचे लाकूड, किरमिजी रंगाची दोरी व एजोब घेऊन
दुसर्‍या जिवंत पक्ष्यासह वाहत्या पाण्यावर मारलेल्या पक्ष्याच्या रक्तात
या सर्व वस्तू बुडवाव्यात. 7 मग याजकाने ते रक्त कुष्ठरोगातून मुक्त
झालेल्या व्यक्तीवर सात वेळा शिंपडावे व तो शुद्ध झाला आहे, असे
जाहीर करून त्या जिवंत पक्ष्याला उघड्या शेतात सोडून द्यावे. 8 मग शुद्ध
करण्यात येणार्‍या मनुष्याने आपले कपडे धुवावेत, आपले मुंडण करावे
व स्नान करावे; म्हणजे तो विधिनियमानुसार शुद्ध होईल. त्यानंतर त्याने
छावणीत राहण्यासाठी परत यावे. तरी सात दिवसापर्यंत त्याने आपल्या
तंबूबाहेरच राहावे. 9 सातव्या दिवशी त्याने आपले डोके, दाढी, भुवया व
अंगावरील एकंदर सर्व केस मुंडवावे, आपले कपडे धुवावे व पाण्याने
स्नान करावे. मग तो शुद्ध होईल. 10 आठव्या दिवशी त्यांनी दोन निर्दोष
कोकरे, एक वर्षाची निर्दोष मेंढी, अन्नार्पणासाठी तेलात मळलेला
एक एफाचा एकतृतीयांश भाग सपीठ आणि एक लोगभर तेल घेऊन
यावे. 11 मग शुद्ध जाहीर करणार्‍या याजकाने शुद्ध होणार्‍या मनुष्यास
सभामंडपाच्या दाराशी याहवेहसमोर उभे करावे. 12 नंतर याजकाने एक
कोकरू व एकतृतीयांश लीटर जैतुनाचे तेल दोषार्पण म्हणून वेदीपुढे
ओवाळणीचे अर्पण म्हणून याहवेहसमोर ओवाळावे. 13 पवित्रस्थानात
ज्या ठिकाणी पापार्पणाच्या व होमार्पणाच्या बलींचा वध करतात, त्या
ठिकाणी याजकाने कोकराला ठार मारावे. पापार्पणातील बलीप्रमाणेच
या दोषार्पणातील बली याजकाच्या हक्काचा आहे. हे परमपवित्र होय.
14 मग याजकाने या दोषबलीचे काही रक्त घ्यावे आणि शुद्ध होणार्‍या
माणसाच्या उजव्या कानाच्या पाळीला, उजव्या हाताच्या व उजव्या
पायाच्या अंगठ्याला लावावे. 15 मग याजकाने तेलाचा काही भाग
घ्यावा आणि ते आपल्या डाव्या हाताच्या तळहातावर ओतावे, 16 व
याजकाने त्यात आपल्या उजव्या हाताची बोटे बुडवून ते याहवेहपुढे सात
वेळा शिंपडावे. 17 यानंतर तळहातावर शिल्लक राहिलेले तेल याजकाने
शुद्ध होणार्‍या माणसाच्या उजव्या कानाच्या पाळीला, उजव्या पायाच्या
व उजव्या हाताच्या अंगठ्यावरील दोषबलीच्या रक्तावर लावावे. 18
याजकाच्या तळहातावर शिल्लक राहिलेले सर्व तेल शुद्ध ठरविण्याच्या
माणसाच्या मस्तकास लावावे. अशाप्रकारे याजकाने त्या माणसासाठी
याहवेहपुढे प्रायश्चित्त करावे. 19 नंतर अशुद्धतेपासून शुद्ध झालेल्या
माणसासाठी याजकाने पापबली अर्पावा व त्याच्यासाठी प्रायश्चित्ताचा
विधी करावा; आणि यानंतर याजकाने होमबलीचा वध करावा, 20 मग
याजकाने अन्नार्पणासह, होमबली वेदीवर अर्पावा व त्या माणसासाठी
प्रायश्चित्त करावे, म्हणजे तो मनुष्य शुद्ध ठरेल. 21 जर तो गरीब
असेल आणि इतके आणण्याची त्याची ऐपत नसेल तर त्याने आपल्या
प्रायश्चित्तासाठी ओवाळणीचे एक कोकरू दोषार्पण म्हणून आणावे.
अन्नार्पणासाठी जैतुनाच्या तेलात मळलेल्या सपिठाच्या एक एफाचा
दहावा भाग आणावा, 22 आणि ऐपतीप्रमाणे त्याने पारव्याची दोन पिल्ले
किंवा दोन होले आणावे; त्यातील एक पापबली व दुसरा होमबली म्हणून
अर्पण करावा. 23 “प्रायश्चित्तविधीसाठी त्याने आपल्या शुद्धीकरणासाठी
आठव्या दिवशी ते पक्षी याहवेहसमोर सभामंडपाच्या दाराशी याजकाकडे
आणावेत. 24 मग याजकाने दोषार्पणाचे कोकरू व अर्धा लीटर तेल
घेऊन वेदीपुढे ओवाळणीचे अर्पण म्हणून याहवेहसाठी ओवाळावे. 25
त्यानंतर दोषार्पणाच्या कोकराचा वध करावा आणि याजकाने त्याचे
काही रक्त घेऊन शुद्ध होणार्‍या माणसाच्या उजव्या कानाच्या पाळीला
आणि उजव्या हाताच्या व उजव्या पायाच्या अंगठ्याला लावावे. 26 मग
याजकाने आपल्या डाव्या तळहातावर तेलातील काही तेल ओतावे,
27 आणि याजकाने आपल्या उजव्या हाताच्या बोटांनी सात वेळा ते
याहवेहपुढे शिंपडावे. 28 मग याजकाने आपल्या तळहातावरील काही
तेल घेऊन ते शुद्ध होणार्‍या माणसाच्या उजव्या कानाच्या पाळीला आणि
उजव्या हाताच्या व उजव्या पायाच्या अंगठ्याला दोषबलीचे रक्त लावले
त्या जागी लावावे. 29 याजकाने त्याच्या तळहातावर उरलेले तेल त्या
शुद्ध होणार्‍या माणसाच्या प्रायश्चित्तासाठी याहवेहपुढे त्याच्या डोक्यास
लावावे. 30 मग त्या व्यक्तीला परवडेल त्याप्रमाणे त्याने पारव्याच्या
किंवा होल्याच्या पिल्लाचे अर्पण करावे. 31 एक पक्ष्याचे पापार्पण
म्हणून व दुसर्‍या पक्ष्याचे अन्नार्पणासह होमार्पण म्हणून अर्पणे करावी.
अशाप्रकारे याजकाने शुद्ध होणार्‍या माणसासाठी याहवेहपुढे प्रायश्चित्त
करावे.” 32 हे नियम सर्वसाधारणपणे शुद्धीकरणासाठी लागणारे अर्पण
आणण्याची ऐपत नसलेल्या कुष्ठरोग्यांसाठी आहेत. 33 याहवेह मोशे व
अहरोन यांना म्हणाले, 34 “जेव्हा तुम्ही कनान देशात प्रवेश कराल, जो
मी तुम्हाला वतन म्हणून दिला आहे, आणि मी तेथील एखाद्या घराला
कुष्ठरोगाचा चट्टा देईन, 35 तेव्हा त्या घराच्या मालकाने याजकाकडे
येऊन त्याला सांगावे, ‘आमच्या घरात चट्ट्यासारखे काहीतरी दिसत
आहे.’ 36 याजकाने घरामध्ये जाऊन चिन्हाचे परीक्षण करण्यापूर्वी,
त्याने घर रिकामे करण्याचा आदेश दिला पाहिजे, अन्यथा त्या घरातील
सर्व वस्तू अशुद्ध होऊ शकतील. त्यानंतर याजकाने त्या घरात प्रवेश
करून त्याची तपासणी करावी. 37 त्याने घराच्या भिंतींची तपासणी
करून त्यावरील चट्टा भिंतींपेक्षा खोलवर हिरवट किंवा लालसर आहे,
असे याजकाला आढळले, 38 तर याजकाने घराबाहेर दाराजवळ यावे
आणि ते घर सात दिवस बंद ठेवावे. 39 मग सातव्या दिवशी याजकाने
पुन्हा जाऊन ते घर तपासावे आणि तो चट्टा भिंतीवर पसरला असेल, 40
तर याजकाने चट्टा असलेला भाग काढून तो नगराबाहेर अशुद्ध ठिकाणी
फेकून देण्याची आज्ञा द्यावी. 41 नंतर भिंतीचा आतील भाग पूर्णपणे
खरवडून त्याची दगड व माती नगराबाहेर अशुद्ध ठिकाणी फेकून देण्याची
आज्ञा द्यावी. 42 मग त्या जागी बसविण्यासाठी दुसरे दगड आणावेत

व नव्या चुन्याचा गिलावा करावा.” 43 दगड काढल्यावर आणि घर
खरवडून नवीन गिलावा केल्यावर तो चट्टा पुन्हा आला, 44 तर याजकाने
आत येऊन तो तपासावा, आणि जर चट्टा पसरला आहे असे त्याला
दिसून आले, तर तो न निघणारा कुष्ठरोग असून ते घर अशुद्ध झाले आहे.
45 मग ते घर पाडून टाकण्यात यावे व त्या घराचे दगड, चुना, लाकूड
नगराबाहेर नेऊन अशुद्ध ठिकाणी फेकून द्यावे. 46 असे घर बंद असता
जो कोणी त्या घरात शिरेल, तो संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहील, 47 जर
कोणी अशा घरात झोपेल किंवा जेवेल, तर त्याने आपली वस्त्रे धुवावी.
48 याजकाने आत जाऊन घर पुन्हा तपासावे आणि गिलाव्यावर चट्टे
पुन: दिसले नाहीत, तर ते घर शुद्ध झाले असून तेथील कुष्ठरोग नाहीसा
झाला आहे असे त्याने जाहीर करावे. 49 मग त्याने दोन पक्षी, गंधसरूचे
लाकूड, किरमिजी रंगाची दोरी व एजोब घेऊन शुद्धीकरणाचा विधी
करावा. 50 त्याने वाहत्या पाण्याच्या वर मातीचे पात्र धरून त्याच्यात
एक पक्षी मारावे, 51 व वाहत्या पाण्यावर धरलेल्या मातीच्या पात्रात
मारलेल्या पक्ष्याच्या रक्तात, तसेच वाहत्या पाण्यात, गंधसरूचे लाकूड,
किरमिजी रंगाची दोरी, एजोब त्याचप्रमाणे दुसरा जिवंत पक्षी बुडवावा,
आणि ते रक्त सात वेळा त्या घरावर शिंपडावे. अशाप्रकारे याजक ते घर
शुद्ध करेल. 53 मग त्याने तो जिवंत पक्षी शहराबाहेर मोकळ्या जागी
सोडून द्यावा. अशाप्रकारे त्याने घराकरिता प्रायश्चित्त करावे म्हणजे ते
शुद्ध होईल. 54 सर्व प्रकाराचा कुष्ठरोग, चाई, 55 वस्त्रावरील आणि
घरावरील कुष्ठरोग, 56 सूज, खवंद, पांढरा चट्टा या सर्वांसंबंधीचा हा
नियम आहे. 57 अशाप्रकारे हा खरोखरच शुद्ध किंवा अशुद्ध आहे हे
तुम्हाला समजेल. कुष्ठरोग आणि बुरशी यासाठी हे नियम दिलेले आहेत.

**15** याहवेह मोशे व अहरोन यांना म्हणाले, 2 इस्राएली लोकांबरोबर
बोल आणि त्यांना सांग: जेव्हा कोणाही माणसाच्या शरीरातून
स्राव होत असेल, तर अशा प्रकारचा स्त्राव हा अशुद्ध आहे. 3 त्याचे
शरीर सतत स्राव बाहेर टाकीत असले किंवा अडवून ठेवीत असले, तरी
तो मनुष्य अशुद्ध आहे. या स्रावामुळे तो मनुष्य अशुद्ध होतो: 4 ज्या
बिछान्यावर तो झोपेल आणि ज्या बैठकीवर तो बसेल ती अशुद्ध होईल.
5 जे कोणी अशा माणसाच्या अंथरुणाला स्पर्श करतील त्यांनी त्यांची
वस्त्रे धुवावीत आणि स्नान करावे आणि संध्याकाळपर्यंत ते अशुद्ध
राहतील. 6 स्रावामुळे अशुद्ध झालेला मनुष्य ज्या बैठकीवर बसला
असेल त्या बैठकीवर जो कोणी बसेल, तो संध्याकाळपर्यंत अशुद्ध
राहील. त्याने आपली वस्त्रे धुवावीत व स्नान करावे. 7 जो कोणी अशा
मनुष्याला स्पर्श करेल त्याने स्वतःचे शरीर व वस्त्र पाण्याने स्वच्छ
धुवावे, तो संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहील. 8 ज्या कोणा शुद्ध व्यक्तीवर
असा मनुष्य थुंकेल, त्याने स्वतःचे शरीर व वस्त्र पाण्याने स्वच्छ धुवावे,
तो संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहील. 9 ज्या वाहनांचा तो स्त्राव होणारा
मनुष्य उपयोग करेल ते वाहन अशुद्ध होय, 10 आणि जो कोणी अशा
माणसाच्या अंगाखालील वस्तूला स्पर्श करेल किंवा ती उचलेल त्याने
स्वतःचे शरीर व वस्त्र पाण्याने स्वच्छ धुवावे, तो संध्याकाळपर्यंत अशुद्ध
राहील. 11 हात धुतल्याशिवाय स्त्राव होणारा मनुष्य जर कोणाला स्पर्श
करेल, तर स्पर्श झालेल्या त्या मनुष्याने अवश्य आपली वस्त्रे धुवावीत
आणि पाण्याने स्नान करावे, तो संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहील. 12
“असा मनुष्य ज्या मातीच्या पात्राला स्पर्श करेल ते अवश्य फोडून
टाकावे आणि कोणत्याही लाकडाच्या भांड्याला त्याचा स्पर्श झाल्यास
ते पाण्याने धुऊन घ्यावे. 13 “स्राव थांबल्यावर त्याने आपली वस्त्रे
धुऊन, सात दिवसांच्या शुद्ध होण्याच्या विधीची सुरुवात करावी. त्याने
आपली वस्त्रे धुवावी आणि वाहत्या पाण्यात स्नान करून शुद्ध व्हावे. 14
आठव्या दिवशी त्याने दोन होले किंवा पारव्याची दोन पिल्ले घ्यावीत
व सभामंडपाच्या दाराशी याहवेहसमोर येऊन याजकाला ती द्यावीत.
15 याजकाने त्यातील एका पक्ष्याचे पापार्पण व दुसऱ्याचे होमार्पण
करावे. अशाप्रकारे याजकाने त्याच्या स्त्रावासाठी याहवेहसमोर प्रायश्चित
करावे. 16 “जर एखाद्या मनुष्याला वीर्यपात झाला, तर त्याने संपूर्ण
शरीर पाण्याने धुवावे, तो संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहील. 17 ज्या
वस्त्रांवर वा चामड्यावर वीर्य लागले असेल, ते अवश्य धुऊन टाकावे व
सायंकाळपर्यंत ते अशुद्ध समजावे. 18 जर एखाद्या पुरुषाने स्त्रीशी
शारीरिक संबंध ठेवले आणि या प्रक्रियेत त्याचे वीर्यस्खलन झाले,
तर दोघांनीही पाण्याने स्नान केले पाहिजे. ते संध्याकाळपर्यंत अशुद्ध
राहतील. 19 “स्त्री ॠतुमती होते, तेव्हा तिने विधिनियमानुसार सात
दिवस अशुद्ध राहावे. त्या काळात जो कोणी तिला स्पर्श करेल, तो
संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहील. 20 “याकाळात ती ज्या अंथरुणावर
झोपेल किंवा बैठकीवर बसेल, ती सर्व अशुद्ध होतील 21 जो कोणी
तिच्या अंथरुणाला स्पर्श करेल त्या व्यक्तीने आपली वस्त्रे धुवावीत,
स्नान करावे व तो सायंकाळपर्यंत अशुद्ध राहील. 22 जो कोणी तिच्या
बैठकीला स्पर्श करेल त्या व्यक्तीने आपली वस्त्रे धुवावीत, स्नान करावे
व तो सायंकाळपर्यंत अशुद्ध राहील. 23 जो कोणी तिच्या अंथरुणाला
किंवा बैठकीला स्पर्श करेल तो व्यक्ती सायंकाळपर्यंत अशुद्ध राहील.
24 “याकाळात तिच्याशी शारीरिक संबंध ठेवणारा पुरुष सात दिवस
अशुद्ध राहील आणि ज्या बिछान्यावर तो झोपेल तो अशुद्ध समजावा. 25
“महिन्यात अनियमित वेळा किंवा मासिक पाळीच्या दिवसानंतरही जर
ॠतुस्राव चालू राहिला, तर त्यामुळे मासिक पाळीच्या अशुद्धतेप्रमाणे ती
या अशुद्ध स्त्रावात अशुद्धच राहील. 26 म्हणजे, नियमित मासिक पाळी
चालू असलेल्या ॠतुस्रावाच्या काळात ती ज्या अंथरुणावर झोपेल
ते अशुद्ध होईल; आणि ज्या बैठकीवर बसेल ती ही अशुद्ध होईल.
27 जी व्यक्ती तिच्या अंथरुणाला वा बैठकीला स्पर्श करेल ती अशुद्ध
होईल. त्या व्यक्तीने आपली वस्त्रे धुवावीत व स्नान करावे आणि तो
सायंकाळपर्यंत अशुद्ध राहील. 28 “जेव्हा ती स्त्री तिच्या स्त्रावातून
शुद्ध होईल, तेव्हा तिने शुद्ध होण्यासाठी सात दिवस मोजावे, त्यानंतर
ती शुद्ध होईल. 29 आठव्या दिवशी तिने दोन होले किंवा पारव्याची
दोन पिल्ले सभामंडपाच्या दाराशी याजकाकडे आणावी; 30 याजकाने
एकाचे पापार्पण व दुसऱ्याचे होमार्पण म्हणून याहवेहपुढे अर्पून तिच्या
स्त्रावाच्या अशुद्धतेकरिता प्रायश्चित्त करावे. 31 “अशाप्रकारे इस्राएली
लोकांना तू अशुद्धतेपासून दूर ठेवावे. आपल्यावर मरणाचा प्रसंग ओढवू

नये म्हणून त्यांनी आपल्या अशुद्धतेमुळे त्यांच्यामध्ये ज्या निवासमंडपात
मी राहतो तो अशुद्ध करू नये." 32 स्राव किंवा वीर्यपात होऊन जो पुरुष
अशुद्ध होतो, त्याच्यासाठी हे नियम आहेत. 33 जी स्त्री ऋतुमती होते
आणि जो कोणी अशा ऋतुमती असलेल्या स्त्रीशी शारीरिक संबंध ठेवून
विधिनियमानुसार अशुद्ध होतो, यासंबंधीचे हे नियम आहेत.

16 अहरोनाचे दोन पुत्र याहवेहच्या समक्षतेत गेल्यामुळे मरण
पावल्यानंतर याहवेह मोशेबरोबर बोलले. 2 याहवेह मोशेला
म्हणाले, "तुझा भाऊ अहरोन याला सांग की कोश व प्रायश्चिताचे
झाकण असलेल्या पडद्यामागील परमपवित्रस्थानात त्याची इच्छा होईल
तेव्हा येऊ नये, नाही तर त्याला मरण येईल. कारण दयासनावरील
ढगात मी प्रकट होत राहीन. 3 "अहरोन पवित्रस्थानात अशाप्रकारे प्रवेश
करेल: त्याने पापार्पणासाठी एक गोऱ्हा व होमार्पणासाठी एक मेंढा
अवश्य आणावा. 4 त्याने तागाचा पवित्र झगा घातला पाहिजे आणि
त्याच्या शरीराभोवती तागाचे अंतर्वस्त्र घालावे; तागाच्या वस्त्राने आपली
कंबर कसावी आणि तागाचा फेटा बांधावा. ही पवित्र वस्त्रे आहेत;
म्हणून ती अंगावर घालण्यापूर्वी त्याने पाण्याने स्नान करावे. 5 मग
इस्राएली समुदायाकडून पापार्पणासाठी दोन बोकडे व होमार्पणासाठी
एक मेंढा घ्यावा. 6 "अहरोनाने स्वतःच्या पापार्पणाचा गोऱ्हा परमेश्वराला
पहिल्याने अर्पण करून स्वतःसाठी व स्वतःच्या कुटुंबासाठी प्रायश्चित्त
करावे. 7 मग त्याने सभामंडपाच्या दाराशी याहवेहपुढे ती दोन बोकडे
आणावी. 8 दोन बोकडांवर अहरोनाने चिठ्ठ्या टाकाव्या—याहवेहसाठी
एक बोकड आणि पाप वाहून नेण्यासाठी दुसरा बोकड. 9 नंतर
याहवेहसाठी चिठ्ठी पडलेल्या बोकडाला अहरोनाने घेऊन यावे आणि
पापार्पणाचा बळी म्हणून त्याचा यज्ञ करावा. 10 परंतु चिठ्ठी टाकून जो
दुसरा बोकड आला तो पाप वाहून नेण्यासाठीचा बोकड जिवंत ठेवून
याहवेहसमोर आणावा आणि त्याच्यावर प्रायश्चित्ताचा विधी करून, पाप
वाहून नेण्यासाठी तो रानात सोडून द्यावा. 11 "अहरोनाने स्वतःसाठी व
आपल्या कुटुंबीयांसाठी पापार्पणाच्या गोऱ्ह्याचा वध करून प्रायश्चित्त
करावे. 12 याहवेहच्या वेदीसमोरील धुपाटण्यात जळते निखारे भरून
घ्यावेत व कुटून बारीक केलेला व दोन मुठीत भरेल एवढा सुगंधी धूप
अंतरपटाच्या आत आणावा. 13 तो धूप त्याने याहवेहसमोर निखाऱ्यांवर
असा टाकावा की, धूपाच्या धुराने दहा आज्ञांच्या दगडी पाट्या ठेवलेला
कोश व त्यावरील दयासन व्यापून जाईल; म्हणजे तो मरणार नाही. 14
मग त्याने गोऱ्ह्याचे काही रक्त घेऊन ते आपल्या बोटांनी दयासनाच्या
पूर्वेस शिंपडावे आणि काही रक्त दयासनासमोर सात वेळा शिंपडावे.
15 "नंतर त्याने बाहेर जाऊन लोकांसाठी आणलेल्या पापार्पणाच्या
बोकडाचा वध करावा; बोकडाचे रक्त अंतरपटाच्या आत घेऊन जावे
आणि गोऱ्ह्याचे रक्त त्याने ज्या ठिकाणी शिंपडले, त्याच ठिकाणी
म्हणजे दयासनावर व दयासनासमोर ते शिंपडावे. 16 कारण इस्राएली
लोकांची अशुद्धता आणि बंडखोरी, त्यांची पापे कोणतीही असोत,
अशाप्रकारे त्याने परमपवित्रस्थानासाठी प्रायश्चित्त करावे. त्याचप्रमाणे
त्याने सभामंडपासाठीही असेच करावे, कारण तो त्यांच्यामध्ये उभारला
असून त्यांच्या अशुद्धतेने वेढला गेला आहे. 17 अहरोन प्रायश्चित्त
करण्यासाठी परमपवित्रस्थानात जाईल, तेव्हापासून तो परत येईपर्यंत,
तो स्वतःसाठी, स्वतःच्या कुटुंबीयांसाठी व सर्व इस्राएली लोकांसाठी
प्रायश्चित्त करेपर्यंत कोणीही सभामंडपात जाऊ नये. 18 "मग त्याने
तिथून निघून याहवेहसमोरील वेदीजवळ जाऊन तिच्यासाठी प्रायश्चित्त
करावे. त्याने गोऱ्ह्याचे व बोकडाचे रक्त घेऊन ते वेदीच्या चारही बाजूच्या
शिंगांना लावावे. 19 काही रक्त घेऊन वेदीवर आपल्या बोटांनी सात
वेळा शिंपडावे. अशाप्रकारे इस्राएलांच्या अशुद्धतेपासून वेदी शुद्ध व
पवित्र करावी. 20 "परमपवित्रस्थान, सभामंडप व वेदी यांच्यासाठी
प्रायश्चित्तविधी पूर्ण केल्यानंतर अहरोनाने जिवंत बोकड आणावा. 21 मग
अहरोन आपले दोन्ही हात बोकडाच्या डोक्यावर ठेवून इस्राएली लोकांचे
सर्व अन्याय, बंडखोरी—त्यांची सर्व पापे—त्या बोकडाच्या मस्तकावर
ठेवावी व नेमलेल्या माणसाद्वारे त्या बोकडाला रानात पाठवून द्यावे. 22
जिथे कोणी राहत नाही अशा प्रदेशात तो बोकड लोकांच्या पापाचा
भार वाहून नेईल, नंतर त्या मनुष्याने त्या बोकडाला रानात सोडून
द्यावे. 23 "मग अहरोनाने सभामंडपात पुन्हा यावे व परमपवित्रस्थानात
प्रवेश करण्यापूर्वी घातलेली तागमिश्रित वस्त्रे काढावीत आणि तिथेच
ठेवावीत. 24 नंतर त्याने पवित्रस्थानी पाण्याने स्नान करावे, आपली
नियमित वस्त्रे घालावी. मग त्याने बाहेर यावे व स्वतःसाठी व लोकांसाठी
प्रायश्चित्ताचे होमार्पण करावे म्हणून स्वतःसाठी होमार्पण व लोकांसाठीही
होमार्पण करावे. 25 त्याने पापार्पणासाठी ठेवलेल्या चरबीचा वेदीवर
होम करावा. 26 "ज्या मनुष्याने पाप वाहून नेण्यासाठी निवडलेला
बोकड अरण्यात सोडून दिला, त्याने आपली वस्त्रे धुवावी, पाण्याने
स्नान करावे आणि त्यानंतर छावणीत परत यावे. 27 पापार्पणाच्या
ज्या गोऱ्ह्याचे व बोकडाचे रक्त अहरोनाने प्रायश्चित्तासाठी पवित्रस्थानात
नेले होते, त्यांचे मृतदेह, कातडी व आतडी छावणीबाहेर नेऊन अग्नीने
जाळण्यात यावीत." 28 ज्या मनुष्याने ते जाळून टाकले, त्याने आपली
वस्त्रे धुवावीत, स्नान करावे; त्यानंतर छावणीत परत यावे. 29 तुम्ही जो
नियम सर्वकाळ पाळला पाहिजे तो हा: सातव्या महिन्याच्या दहाव्या
दिवशी तुम्ही स्वतःला नाकारले पाहिजे आणि—तुमच्यामध्ये जन्मलेले
स्वदेशी किंवा तुमच्यामध्ये राहणारे परदेशी—कोणतेही कार्य करू
नये 30 कारण या दिवशी तुम्हाला शुद्ध करण्यासाठी तुमच्यासाठी
प्रायश्चित्त केले जाईल, तुम्ही याहवेहसमोर तुमच्या सर्व पापांपासून
शुद्ध व्हाल. 31 तुमच्यासाठी हा विसाव्याचा शब्बाथ होय आणि तुम्ही
स्वतःला नाकारले पाहिजे; हा कायमचा नियम होय. 32 अभिषिक्त
म्हणून आपल्या वडिलांच्या नंतर नियुक्त केलेल्या याजकाने प्रायश्चित्त
करावे. त्याने पवित्र तागाची वस्त्रे घालावीत 33 त्याने परमपवित्रस्थान,
सभामंडप, वेदी, याजकवर्ग व इस्राएली लोक यांच्यासाठी प्रायश्चित्त
करावे. 34 "तुझ्यासाठी हा नेहमीचा नियम असेल: इस्राएली लोकांच्या
सर्व पापांसाठी वर्षातून एकदा प्रायश्चित्त करावे." याहवेहने मोशेला
दिलेल्या आज्ञेप्रमाणे हे करण्यात आले.

**17** याहवेह मोशेला म्हणाले, 2 “अहरोन, त्याचे पुत्र आणि सर्व इस्राएली लोकांसाठी याहवेहने ज्या आज्ञा दिल्या त्या या आहेत: 3 इस्राएलाच्या घराण्यातील कोणत्याही मनुष्याने बैल, कोकरू किंवा शेळी यांचा छावणीत किंवा छावणीबाहेर वध केला, 4 परंतु याहवेहच्या निवासमंडपासमोर आणि तो प्राणी सभामंडपाच्या दाराशी याहवेहला अर्पण करण्याकरिता आणला नाही, तर त्या मनुष्याला रक्तपाताचा दोष लागेल; त्याने रक्त सांडले आहे, म्हणून त्याला आपल्या लोकातून बहिष्कृत करावे. 5 या आज्ञेचा उद्देश असा आहे की, इस्राएली लोक जे उघड्या मैदानात यज्ञपशू मारीत होते, ते त्यांनी सभामंडपाच्या दाराशी याजकाकडे याहवेहपुढे आणावे आणि शांत्यर्पणाचे यज्ञ म्हणून याहवेहला अर्पण करावे. 6 याजकाने सभामंडपाच्या दाराशी असलेल्या याहवेहच्या वेदीवर रक्त शिंपडून याहवेहला सुवास म्हणून त्यांच्या चरबीचा होम करावा. 7 यापुढे ज्यांच्याबरोबर ते स्वतःच व्यभिचार करतात, त्या बोकडाच्या मूर्तींना, त्यांचे कोणतेही अर्पण करू नये. हा नियम त्यांच्यासाठी आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी लागू आहे.” 8 तू त्यांना सांग: इस्राएली किंवा तुमच्यामध्ये राहणारा कोणताही विदेशी यांनी होमार्पण किंवा यज्ञार्पण केले, 9 आणि याहवेहसाठी सभामंडपाच्या दाराशी तो प्राणी अर्पण करण्यास आणला नाही, तर त्याला आपल्या लोकांमधून बहिष्कृत करावे. 10 इस्राएलांच्या घराण्यातील कोणीही किंवा त्यांच्यामध्ये राहणारा कोणताही विदेशी, जो रक्त खातो त्या माणसाविरुद्ध मी माझे मुख फिरवेन आणि मी त्यांना लोकांमधून बहिष्कृत करेन. 11 कारण शरीराचे जीवन रक्तात असते आणि तुमच्या प्रायश्चित्तासाठी मी तुम्हाला वेदीवर शिंपडण्यासाठी ते दिले आहे; रक्तात जीवन असल्यामुळे प्रायश्चित्त होते. 12 म्हणून मी इस्राएली लोकांना सांगितले आहे, “तुमच्यामधील कोणीही किंवा तुमच्यामध्ये राहणारा विदेशी यापैकी कोणीही रक्ताचे सेवन करू नये.” 13 “‘इस्राएली किंवा तुमच्यामध्ये असलेला कोणीही विदेशी शिकारीला गेला असता, त्याने खाण्यास योग्य असलेला पशू किंवा पक्षी यांची शिकार केली, तर त्याचे रक्त जमिनीवरच ओतून मातीने झाकून टाकावे, 14 कारण रक्त हे प्रत्येक प्राण्याचे जीवन आहे. म्हणून इस्राएली लोकांना सांगितले आहे, “तुम्ही कोणत्याही प्राण्याचे रक्त खाऊ नका, कारण प्रत्येक प्राण्याचे जीवन हे त्याचे रक्त आहे; जो कोणी रक्ताचे सेवन करेल त्याला बहिष्कृत केलेच पाहिजे.” 15 “‘जर कोणत्या व्यक्तीने, मग तो देशात जन्मलेला किंवा विदेशी असो, यापैकी जो कोणी मेलेल्या किंवा जंगली जनावराने फाडलेल्या मृत प्राण्याचे मांस खाईल, त्याने आपली वस्त्रे धुवावी व पाण्याने स्नान करावे आणि तो संध्याकाळपर्यंत विधिनियमानुसार अशुद्ध राहील आणि त्यानंतर तो शुद्ध होईल. 16 पण जर त्याने आपली वस्त्रे धुतली नाहीत व स्नान केले नाही, तर तो दोषीच राहील.’”

**18** याहवेह मोशेला म्हणाले, 2 “इस्राएली लोकांबरोबर बोल आणि त्यांना सांग: ‘मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे. 3 तुम्ही ज्या इजिप्त देशात राहिलात त्यांच्यासारखे वागू नका आणि मी तुम्हाला जिथे नेत आहे, त्या कनान देशाचे लोक जे करतात ते करू नका. त्यांच्या रीतिरिवाजाचे पालन करू नका. 4 तुम्ही माझ्या नियमांचे पालन केलेच पाहिजे आणि काळजीपूर्वक माझ्या आज्ञांप्रमाणे वागले पाहिजे. मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे. 5 तुम्ही माझ्या आज्ञा आणि नियमांचे पालन करा, कारण जो व्यक्ती त्यांचे पालन करतो, तो त्यामुळे जिवंत राहील. मी याहवेह आहे. 6 “‘तुमच्यापैकी कोणीही आपल्या जवळच्या नातलगाशी शारीरिक संबंध ठेऊ नये; मी याहवेह आहे. 7 “‘तुझ्या आईबरोबर शारीरिक संबंध ठेवून वडिलांचा अनादर करू नकोस. ती तुझी आई आहे; तिच्याशी संबंध ठेवू नकोस. 8 “‘तुझ्या वडिलांच्या पत्नीशी शारीरिक संबंध ठेवू नकोस; जे तुझ्या वडिलांचा अपमान करेल. 9 “‘तुझ्या बहिणीशी शारीरिक संबंध तू ठेवू नकोस, तुझ्या वडिलांची कन्या असो किंवा तुझ्या आईची कन्या, मग ती एकाच घरात जन्मली असेल किंवा इतरत्र. 10 “‘तू तुझ्या पुत्राच्या कन्येशी किंवा तुझ्या कन्येच्या कन्येशी शारीरिक संबंध ठेवू नकोस; त्यामुळे तुझा अपमान होईल. 11 “‘तुझ्या पित्याच्या पत्नीच्या कन्येशी शारीरिक संबंध ठेवू नकोस; ती तुझी बहीण आहे. 12 “‘तू तुझ्या पित्याच्या बहिणीशी शारीरिक संबंध ठेवू नकोस; ती तुझ्या पित्याची जवळची नातेवाईक आहे. 13 “‘तुझ्या मातेच्या बहिणीशी शारीरिक संबंध ठेवू नकोस, कारण ती तुझ्या आईची जवळची नातेवाईक आहे. 14 “‘आपल्या पित्याच्या भावाचा त्याच्या पत्नीसोबत शारीरिक संबंध ठेवून त्याचा अपमान करू नका; ती तुझी चुलती आहे. 15 “‘तू तुझ्या सूनेशी शारीरिक संबंध ठेवू नकोस. ती तुझ्या पुत्राची पत्नी होय; तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवू नकोस. 16 “‘तुझ्या भावाच्या पत्नीशी शारीरिक संबंध ठेऊ नकोस; हा तुझ्या भावाचा अपमान आहे. 17 “‘तू एखाद्या स्त्रीसोबत आणि तिच्या कन्येसोबत शारीरिक संबंध ठेऊ नकोस. तिच्या पुत्राच्या किंवा कन्येच्या कन्येशी तू शारीरिक संबंध ठेऊ नकोस, कारण ते तिचे जवळचे नातेवाईक आहेत; आणि असे करणे भयंकर पाप आहे. 18 “‘तुझी पत्नी जिवंत असताना तिची वैरीण म्हणून तिच्या बहिणीशी विवाह करू नकोस आणि तिच्याशी शारीरिक संबंध ठेवू नका. 19 “‘स्त्री ऋतुमती असताना तिच्या अशुद्धतेत तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवायला जाऊ नको. 20 “‘तू आपल्या शेजाऱ्याच्या पत्नीशी शारीरिक संबंध ठेऊ नकोस आणि स्वतःला भ्रष्ट करू नकोस. 21 “‘तू आपल्या संतानांपैकी कोणालाही मोलख दैवतासाठी यज्ञबली म्हणून अर्पण करू नये, कारण असा यज्ञ केल्याने तुझ्या परमेश्वराच्या नावाचा अनादर होतो. मी याहवेह आहे. 22 “‘स्त्रीप्रमाणे पुरुषाने पुरुषाशी शारीरिक संबंध ठेऊ नये. ते ओंगळ कृत्य आहे. 23 “‘प्राण्याशी लैंगिक संबंध ठेवू नकोस आणि त्याद्वारे स्वतःला अशुद्ध करू नको. स्त्रीने प्राण्याशी लैंगिक संबंध ठेवण्यासाठी स्वतःला सादर करू नये; ती एक विकृती आहे. 24 “‘अशा प्रकारच्या कोणत्याही अमंगळ गोष्टी करून तुम्ही स्वतःला अपवित्र करून घेऊ नये, कारण ज्या राष्ट्रात मी तुम्हाला पाठवित आहे, ती राष्ट्रे या गोष्टींनी भ्रष्ट झाली आहेत. 25 भूमीसुद्धा भ्रष्ट झाली होती; म्हणून तिच्या पापाबद्दल मी तिला शिक्षा केली आहे, भूमीने तेथील रहिवाशांना देशाबाहेर ओकारीसारखे फेकून दिले आहे. 26 म्हणून तुम्ही माझे नियम

व विधी पाळा आणि वर उल्लेख केलेल्या कोणत्याही ओंगळ गोष्टी करू
नका. हे नियम इस्राएली लोकांना व तुमच्यात राहत असलेल्या विदेशी
लोकांनाही लागू आहेत, 27 ज्या देशात मी तुम्हाला घेऊन जात आहे,
त्या देशातील रहिवाशांनी अशा ओंगळ गोष्टी सतत केल्या म्हणून तो
देश भ्रष्ट झाला. 28 जर तुम्ही ही भूमी भ्रष्ट कराल, तर ती तुम्हाला
ओकून टाकेल, जसे तुमच्या पूर्वी असलेल्या राष्ट्रांना तिने ओकून टाकले
होते. 29 “‘या ओंगळ कृत्यांपैकी एकदेखील कृत्य जो करेल, त्याला या
राष्ट्रातून बहिष्कृत केले जाईल. 30 म्हणून तुम्ही जात आहात, तेथील
लोकांच्या ओंगळ कृत्यांचे अनुकरण करून तुम्ही स्वतःस भ्रष्ट करून
घेऊ नये; मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे.’”

**19** याहवेह मोशेला म्हणाले, 2 “सर्व इस्राएली लोकांस सांग: ‘तुम्ही
पवित्र असावे, कारण मी, याहवेह तुमचा परमेश्वर, पवित्र आहे. 3
“‘तुमच्यातील प्रत्येकाने आपल्या आईवडिलांचा आदर केला पाहिजे
आणि माझा शब्बाथ पाळलाच पाहिजे. मी याहवेह तुमचा परमेश्वर
आहे. 4 “‘मूर्तीकडे वळू नका आणि आपल्यासाठी ओतीव देव करू
नका. मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे. 5 “‘जेव्हा तुम्ही याहवेहला
शांत्यर्पणे करता, तेव्हा ती अशा प्रकारे अर्पण करा की तुमच्यावतीने
मान्य करण्यात येतील. 6 तुम्ही अर्पिलेला यज्ञपशू त्याच दिवशी किंवा
दुसऱ्या दिवशी खावा; पण तिसऱ्या दिवशी उरलेले जाळूनच टाकले
पाहिजे. 7 जर कोणी तिसऱ्या दिवशी त्यातील काही खाल्ले तर ते
अशुद्ध आहे आणि ते स्वीकारले जाणार नाही. 8 जो कोणी ते खाईल तो
दोषी ठरेल, कारण ज्यागोष्टी याहवेहला पवित्र आहेत, त्याला त्यांनी
अपवित्र केले आहे. अशा व्यक्तीला त्यांच्या लोकांमधून बहिष्कृत करावे.
9 “‘तुम्ही पिकांची कापणी कराल, तेव्हा शेताच्या कानाकोपऱ्यातील
पिकांची कापणी करू नये आणि शेतात हंगामानंतर राहिलेला सरवा
गोळा करू नये. 10 तुमच्या द्राक्षमळयावर दुसऱ्यांदा जाऊ नका अथवा
पडलेली द्राक्षे गोळा करू नका. गोरगरिबांसाठी आणि परदेशीयांसाठी
ती तिथेच राहू द्यावी. मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे. 11 “‘तुम्ही चोरी
करू नये. “‘खोटे बोलू नये. “‘एकमेकांना फसवू नये. 12 “‘तुम्ही
माझ्या नावाने खोटी शपथ वाहू नये आणि तुमच्या परमेश्वराचे नाव
अपवित्र करू नये. मी याहवेह आहे. 13 “‘तुम्ही कोणाला फसवू नये
किंवा तुमच्या शेजाऱ्याला लुबाडू नये. “‘मजुरांची मजुरी रात्रभर दिवस
उजाडेपर्यंत आपल्याजवळ ठेवू नये. 14 “‘तुम्ही बहिऱ्यांना शाप देऊ नये
किंवा आंधळयाच्या समोर अडखळण ठेवू नये, परंतु तुमच्या परमेश्वराची
भीती बाळगावी. मी याहवेह आहे. 15 “‘न्याय देताना अन्याय करू
नका; तुम्ही गरिबांमध्ये भेदभाव करू नये, उच्च लोकांच्या आदराचा
तुमच्या निर्णयावर परिणाम होऊ नये, तर तुम्ही तुमच्या शेजाऱ्याचा
योग्य न्याय करावा. 16 “‘तुमच्या लोकांमध्ये निंदा करीत फिरू नये.
“‘तुमच्या शेजाऱ्याचा जीव धोक्यात येईल असे काहीही करू नका.
मी याहवेह आहे. 17 “‘तुमच्याबरोबर असलेल्या इस्राएली मनुष्याचा
तुमच्या अंतःकरणात द्वेष करू नये. तुमच्या शेजाऱ्याला उघडपणे ताकीद
द्यावी म्हणजे तुम्ही त्यांच्या पापाचे सहभागी होणार नाही. 18 “‘सूड
उगवू नका किंवा तुमच्या लोकांमध्ये कोणाचाही द्वेष करू नका, तर जशी
तुम्ही स्वतःवर तशी तुमच्या शेजाऱ्यावर प्रीती करावी. मी याहवेह आहे.
19 “‘माझ्या आज्ञा पाळा. “‘तुम्ही आपल्या पशूंना भिन्न जातीच्या
जनावरांशी संग करू देऊ नये. “‘तुमच्या शेतात दोन प्रकारच्या बियांची
पेरणी करू नका. “‘दोन प्रकारच्या कापडांपासून विणलेली वस्त्रे वापरू
नयेत. 20 “‘एखादा मनुष्य एखाद्या गुलाम स्त्रीसोबत झोपेल जी एखाद्या
पुरुषाशी वाग्दत्त झाली असेल, परंतु ज्याला खंडणी दिली गेली नाही
किंवा तिला स्वातंत्र्य दिले गेले नाही, तर त्याला योग्य शिक्षा झाली
पाहिजे. तरीही त्यांना मृत्युदंड दिला जाऊ नये, कारण तिला मुक्त
केले गेले नाही. 21 त्या मनुष्याने याहवेहसाठी सभामंडपाच्या दाराशी
आपले दोषार्पण म्हणून एक मेंढा आणलाच पाहिजे. 22 त्या मनुष्याने
केलेल्या पापाबद्दल याजकाने त्या मेंढ्याद्वारे याहवेहसमोर प्रायश्चित्त
करावे, म्हणजे त्याने केलेल्या पापाची त्याला क्षमा होईल. 23 “‘तुम्ही
आपल्या देशात प्रवेश कराल व तिथे सर्व प्रकारची फळझाडे लावाल.
तेव्हा पहिली तीन वर्षे त्या झाडांची फळे खाऊ नका, कारण ती बेसुंती
समजावी व तुम्हाला निषिद्ध आहेत, 24 चौथ्या वर्षी त्याची सर्व फळे
पवित्र होतील, याहवेहच्या स्तुतीप्रीत्यर्थ ते द्यावे. 25 परंतु पाचव्या वर्षी
ती फळे तुम्ही खावी. अशा प्रकारे तुमचे पीक वाढेल. मी याहवेह तुमचा
परमेश्वर आहे. 26 “‘तुम्ही कोणतेही मांस रक्तासह खाऊ नये. “‘तुम्ही
जादूटोणा करू नये किंवा शकुन पाहू नये. 27 “‘तुम्ही आपले केस
कापतांना बाजूचे केस कापून गोलाकार देऊ नये किंवा आपल्या दाढीचे
टोक कापू नये. 28 “‘मृत्यू पावलेल्यासाठी तुम्ही आपल्या शरीरावर
जखमा करून घेऊ नये किंवा शरीर गोंदून घेऊ नये. मी याहवेह आहे. 29
“‘तुम्ही आपल्या कन्यांना वेश्याकर्माला लावून त्यांना भ्रष्ट करू नये,
नाहीतर देश व्यभिचारी होऊन दुष्टाईने भरून जाईल. 30 “‘तुम्ही माझे
शब्बाथ पाळावे आणि माझ्या पवित्र स्थानाविषयी आदर बाळगावा;
मी याहवेह आहे. 31 “‘तुम्ही शकुनविद्या, ज्योतिष किंवा चेटक्यांची
सल्लामसलत घेऊन स्वतःला भ्रष्ट करून घेऊ नये; मी याहवेह तुमचा
परमेश्वर आहे. 32 “‘परमेश्वराची भीती बाळगून आपल्यापेक्षा वडील
माणसांपुढे उभे राहून त्यांना मान द्या. त्यांना आदर दाखवा, मी याहवेह
आहे. 33 “‘तुम्ही तुमच्या देशात असलेल्या परदेश्यांचा गैरफायदा घेऊ
नये. त्यांच्याशी वाईट वागू नये. 34 जे परदेशी तुमच्यामध्ये राहत आहेत
ते तुमच्या स्वदेशीय सारखेच आहेत, असे समजून तुम्ही त्यांना वागवावे.
जशी स्वतःवर तशी त्यांच्यावर प्रीती करावी, कारण तुम्हीही इजिप्त
देशात विदेशी होता. मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे. 35 “‘लांबी, वजन
किंवा प्रमाण मापण्यात अप्रामाणिक मापे वापरू नका. 36 तोलण्यात
खरे तराजू आणि वजन उपयोगात आणावे आणि मापण्यात तुम्ही खरे
एफा आणि हीन उपयोगात आणावे; कारण ज्याने तुम्हाला इजिप्त
देशातून बाहेर आणले तो याहवेह मी तुमचा परमेश्वर आहे. 37 “‘माझे
सर्व विधी आणि माझे सर्व नियम याकडे तुम्ही लक्ष द्यावे आणि त्यांचे
पालन करावे. मी याहवेह आहे.’”

**20** याहवेह मोशेला म्हणाले, 2 “इस्राएली लोकांना सांग: इस्राएली
लोकांपैकी कोणीही किंवा तुमच्यात राहणाऱ्या कोणत्याही
परदेश्याने त्याच्या मुलाचे अर्पण मोलख दैवतासाठी केले, तर
समुदायातील सभासदांनी त्याला दगडमार करावा. 3 मी स्वतः त्या
मनुष्याच्या विरुद्ध माझे मुख फिरवेन व लोकातून त्याच्या उच्छेद
करेन; कारण त्याने आपले मूल मोलख दैवताला बळी देऊन व माझे
पवित्रस्थान भ्रष्ट करून माझ्या पवित्र नावाचा अपमान केला आहे.
4 पण जर त्या मनुष्याने आपले मूल मोलखला बळी दिले हे माहीत
असूनही त्या समुदायाच्या लोकांनी त्याकडे डोळेझाक केली व बळी
देणाऱ्याला मारून टाकण्याचे नाकारले, 5 मी स्वतः त्याच्याविरुद्ध व
त्याच्या घराण्याविरुद्ध मुख फिरवेन आणि मोलखबरोबर व्यभिचार
करून त्याचे अनुकरण करणाऱ्या सर्वांचा त्यांच्या लोकांतून नाश करेन.
6 “‘शकुनविद्या आणि चेटक्यांची अनुसरण करून स्वतःला वेश्या
करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांकडून मी माझे मुख फिरवेन आणि मी त्याचा
त्याच्या लोकांमधून उच्छेद करेन. 7 “‘तुम्ही स्वतःस शुद्ध राखून पवित्र
राहावे, कारण मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे. 8 तुम्ही माझे नियम
पाळा आणि त्याचे पालन करा. मी याहवेह आहे, जो तुम्हाला पवित्र
करतो. 9 “‘जो कोणी आपल्या वडिलांना किंवा आईला शाप देतो,
त्याला अवश्य जिवे मारावे, कारण त्याने स्वतःच्या आईवडिलांना शाप
दिला आहे, त्याच्या रक्ताचा दोष त्याच्याच माथी राहील. 10 “‘जर कोणी
व्यक्ती दुसऱ्याच्या पत्नीबरोबर व्यभिचार करतो—आपल्या शेजाऱ्याच्या
पत्नीबरोबर व्यभिचार करतो—त्या व्यभिचारी आणि व्यभिचारिणी
दोघांनाही जिवे मारावे. 11 “‘जो व्यक्ती आपल्या पित्याच्या पत्नीशी
शारीरिक संबंध ठेवतो, तो आपल्या पित्याचा अपमान करतो. त्या
व्यक्तीला व त्या स्त्रीला अवश्य जिवे मारावे; त्यांच्या रक्ताचा दोष
त्यांच्याच माथी राहील. 12 “‘एखाद्या व्यक्तीने आपल्या सुनेबरोबर
शारीरिक संबंध ठेवले, तर त्या दोघांनाही अवश्य जिवे मारावे; त्यांनी जे
केले ते विकृत आहे; त्यांच्या रक्ताचा दोष त्यांच्याच मस्तकी राहील.
13 “‘जर एखादा पुरुष जसे एखाद्या स्त्रीसोबत तसे दुसऱ्या पुरुषाशी
शारीरिक संबंध ठेवतो, तर त्या दोघांनीही घृणास्पद कृत्य केले आहे. त्या
दोघांनाही अवश्य जिवे मारावे; त्यांच्या रक्ताचा दोष त्यांच्याच मस्तकी
राहील. 14 “‘एखाद्या व्यक्तीने एखाद्या स्त्रीबरोबर विवाह करून तिच्या
आईबरोबरही विवाह केला, तर ती भयंकर दुष्टता आहे. तुमच्यातील
ही दुष्टता निपटून काढण्यासाठी त्या पुरुषाला व त्या दोन्ही स्त्रियांना
अग्नीत जाळून टाकावे. 15 “‘एखाद्या व्यक्तीने प्राण्यासोबत शारीरिक
संबंध ठेवले, तर त्या व्यक्तीला जिवे मारावे; त्या पशूलाही ठार करावे.
16 “‘जर एखादी स्त्री एखाद्या प्राण्याशी शारीरिक संबंध ठेवण्यासाठी
गेली तर ती स्त्री आणि तो प्राणी दोघांनाही मारून टाका. त्या दोघांनाही
अवश्य जिवे मारावे; त्यांच्या रक्ताचा दोष त्यांच्याच मस्तकी राहील. 17
“‘एखाद्या व्यक्तीने आपल्या बहिणीबरोबर मग ती त्याच्या पित्याची
किंवा आईची कन्या असो, विवाह केला आणि त्यांनी शारीरिक संबंध
ठेवले, तर ते अपमानास्पद आहे. त्यांना जाहीरपणे लोकांमधून काढून
टाकावे. कारण त्याने आपल्या बहिणीचा अपमान केला आहे आणि
त्यासाठी तोच जबाबदार राहील. 18 “‘एखादी स्त्री ऋतुमती असताना
तिच्याबरोबर एखाद्या व्यक्तीने शारीरिक संबंध ठेवले, तर त्याने तिच्या
प्रवाहाचा स्त्रोत उघड केला आहे आणि तिने देखील ते उघड केले
आहे. तर दोघांनाही समुदायामधून बहिष्कृत करावे. 19 “‘आईच्या
किंवा वडिलांच्या बहिणीशी शारीरिक संबंध ठेवू नका, कारण त्यामुळे
जवळच्या नातेवाईकाचा अपमान होईल; त्यांना आपल्या पापाचा भार
वाहावा लागेल. 20 “‘एखाद्या व्यक्तीने आपल्या वडिलांच्या भावाच्या
पत्नीसोबत शारीरिक संबंध ठेवले, तर त्याने त्याच्या वडिलांच्या भावाचा
अपमान केला आहे. त्यांना जबाबदार धरले जाईल; ते निःसंतान मरतील.
21 “‘एखाद्या व्यक्तीने आपल्या भावाच्या पत्नीसोबत विवाह केला, तर
ते अशुद्धपणाचे कृत्य होय; त्याने आपल्या भावाचा अपमान केला
आहे. ते निःसंतान राहतील. 22 “‘तुम्ही माझे विधी व नियम पाळले तर
मी वस्ती करून राहण्यासाठी ज्या देशात तुम्हाला नेत आहे, ती भूमी
तुम्हाला बाहेर ओकून देणार नाही. 23 ज्या राष्ट्रांना मी तुमच्यापुढून
घालवून देत आहे, त्या राष्ट्रांचे रीतिरिवाज तुम्ही पाळू नयेत, कारण
त्यांनी ही दुष्कर्मे केली म्हणून मला त्यांचा तिरस्कार आहे. 24 परंतु मी
तुम्हाला म्हणालो, “तुम्ही त्यांच्या देशाचे मालक व्हाल; मी तुम्हाला
तो वारसाप्राप्त संपत्ती असे देईन, दुधामधाचे प्रवाह वाहणारा असा
तो देश आहे.” तुम्हाला इतर राष्ट्रांपासून वेगळे राखणारा, मी याहवेह
तुमचा परमेश्वर आहे. 25 “‘तुम्हाला शुद्ध आणि अशुद्ध प्राणी, शुद्ध
आणि अशुद्ध पक्षी यांच्यात स्पष्ट फरक करावा लागेल; कोणत्याही
पशू, पक्षी किंवा जमिनीवर सरपटणाऱ्या प्राण्यामुळे स्वतःला अशुद्ध
करू नका, ज्यांना मी तुमच्यासाठी अशुद्ध म्हणून वेगळे केले आहे. 26
तुम्ही माझ्यासाठी पवित्र असावे, कारण मी याहवेह पवित्र आहे आणि
तुम्ही माझे व्हावे म्हणून मी तुम्हाला इतर सर्व राष्ट्रांपासून वेगळे केले
आहे. 27 “‘शकुनविद्या वा चेटूक करणारा पुरुष किंवा स्त्री यांना अवश्य
जिवे मारावे. त्यांना दगडमार करावा. त्यांच्या रक्ताचा दोष त्यांच्याच
मस्तकी राहील.’ ”

**21** याहवेह मोशेला म्हणाले, “याजकांना म्हणजे अहरोनाच्या पुत्रांना
सांग की: तुमच्या लोकांपैकी कोणाचाही मृत्यू झाल्यावर कोणीही
स्वतःला विधिनियमानुसार अशुद्ध करू नये, 2 आपले जवळचे नातलग
म्हणजे त्याची आई किंवा वडील, पुत्र किंवा कन्या, त्याचा भाऊ 3 किंवा
अविवाहित बहीण, जी त्याच्यावर अवलंबून आहे कारण तिला पती
नाही—यांच्यासाठी तो स्वतःला अशुद्ध करू शकतो. 4 याजक लोकांचा
प्रमुख असल्यामुळे, त्याच्या विवाहाच्या द्वारे संबंधित लोकांसाठी त्याने
स्वतःला अपवित्र करून अशुद्ध करू नये. 5 “‘याजकाने मुंडण करू नये
किंवा दाढीची टोके छाटू नयेत किंवा शरीराला जखमा करून घेऊ नयेत.
6 त्यांनी त्यांच्या परमेश्वरासाठी पवित्र राहावे आणि त्यांच्या परमेश्वराच्या
नावाला काळिमा लावू नये. ते याहवेहला अन्नार्पण म्हणजे त्यांच्या
परमेश्वराचे अन्न अर्पितात, म्हणून त्यांनी पवित्र राहावे. 7 “‘त्यांनी
वेश्यावृत्तीने भ्रष्ट झालेल्या किंवा त्यांच्या पतीला घटस्फोट दिलेल्या

स्त्रियांबरोबर विवाह करू नये; कारण याजक त्यांच्या परमेश्वरासाठी
पवित्र आहेत. 8 त्यांना पवित्र मानावे, कारण ते तुमच्या परमेश्वराला
अन्न अर्पण करतात. त्यांना पवित्र समजावे, कारण मी याहवेह पवित्र
आहे—मीच आहे जो तुम्हाला पवित्र करतो. 9 "'एखाद्या याजकाची
कन्या वेश्याकर्म करून स्वतःला भ्रष्ट करते तर ती आपल्या पित्याला
अशुद्ध करते, म्हणून तिला अग्नीत जाळून टाकावे. 10 "'प्रमुख याजक,
म्हणजे ज्याच्या मस्तकावर अभिषेकाचे तेल ओतण्यात आले आहे व
जो याजकीय वस्त्रे घालण्यास पवित्र करण्यात आला आहे, त्याने शोक
व्यक्त करण्याकरिता आपले केस मोकळे सोडू नयेत किंवा आपली वस्त्रे
फाडू नये. 11 ज्या ठिकाणी मृतदेह असेल अशा ठिकाणी त्याने प्रवेश
करू नये. मग तो त्याच्या वडिलांचा असो किंवा आईचा, त्याने स्वतःला
अशुद्ध करू नये. 12 त्याच्या परमेश्वराचे पवित्रस्थान सोडू नये किंवा
ते अपवित्र करू नये, कारण तो त्याच्या परमेश्वराच्या अभिषेकाच्या
तेलाद्वारे समर्पित करण्यात आलेला आहे. मी याहवेह आहे. 13 "'त्याने
कुमारिकेबरोबरच विवाह करावा. 14 त्याने विधवा, घटस्फोटित किंवा
वेश्यावृत्तीने भ्रष्ट झालेल्या स्त्रीसह विवाह करू नये, परंतु त्याने त्याच्या
स्वतःच्याच वंशातील कुमारिकेशी विवाह करावा, 15 त्यामुळे तो त्याच्या
लोकांमध्ये त्याचे वंशज अशुद्ध करणार नाही. मी याहवेह आहे, जो
त्याला पवित्र करतो.'" 16 याहवेह मोशेला म्हणाले, 17 "अहरोनास
सांग, 'पिढ्यान् पिढ्या त्याच्या कुळातील शरीराने अपंग असलेल्या
कोणीही अन्नार्पण करण्यासाठी परमेश्वराजवळ येऊ नये. 18 एखादा
मनुष्य आंधळा, लंगडा, चपट्या नाकाचा, हातापायांना अधिक बोटे
असलेला; 19 ज्याचा पाय किंवा हात तुटलेला आहे, 20 कुबडा, ठेंगणा,
डोळ्यात कमतरता असलेला, त्वचेचे रोग असलेला व भग्नांड असून 21
तो अहरोन याजकाचा वंशज असला, तरी शारीरिक व्यंग असल्यामुळे
त्याने याहवेहला अन्न अर्पिण्यास जाऊ नये; त्याच्यात कमतरता आहे;
त्याने त्याच्या परमेश्वराजवळ अन्नार्पण करण्यासाठी जाऊ नये. 22
तरी त्याच्या परमेश्वराचे परमपवित्र अन्न व पवित्र अन्न तो खाऊ
शकतो; 23 पण त्याला शारीरिक व्यंग असल्यामुळे त्याने पडद्यामागील
परमपवित्रस्थानात किंवा वेदीजवळही जाऊ नये, त्याने तसे केल्यास,
माझे पवित्रस्थान भ्रष्ट होईल, कारण त्यांना पवित्र करणारा मीच याहवेह
आहे.'" 24 अहरोन, त्याचे पुत्र आणि सर्व इस्राएली लोकांना मोशेने हे
सांगितले.

**22** याहवेह मोशेला म्हणाले, 2 "अहरोन व त्याच्या पुत्रांना सांग
की, इस्राएलच्या लोकांनी आणलेल्या पवित्र अर्पणांचा आदर
करावा, म्हणजे ते माझ्या पवित्र नावाला अपवित्र करणार नाही. मी
याहवेह आहे. 3 "त्यांना सांग: 'आतापासून पुढे पिढ्यान् पिढ्या जो
कोणी विधिनियमानुसार अशुद्ध असताना इस्राएल लोकांनी याहवेहसाठी
आणलेल्या पवित्र अर्पणांना स्पर्श करेल, त्याचा माझ्या समक्षतेपासून
उच्छेद करावा; मी याहवेह आहे. 4 "'जर अहरोनाच्या वंशापैकी कोणास
कुष्ठरोग असेल किंवा शरीरातून स्राव होत असेल, तर त्याने शुद्ध
होईपर्यंत, पवित्र अर्पणे खाऊ नयेत. प्रेताला स्पर्श केल्यामुळे किंवा
वीर्यपात झालेल्या व्यक्तीला स्पर्श केला तर तो देखील अशुद्ध होईल,
5 किंवा जमिनीवर सरपटणाऱ्या कोणत्याही अशुद्ध प्राण्याला स्पर्श
केल्यामुळे किंवा कोणत्याही प्रकारची अशुद्ध असलेल्या कोणत्याही
व्यक्तीला स्पर्श केला तर तो अशुद्ध होईल. 6 अशा कोणालाही त्या
व्यक्तीने स्पर्श केला तर तो सायंकाळपर्यंत अशुद्ध राहील आणि
पाण्याने स्नान केल्याशिवाय पवित्र अर्पणांतील अन्न खाऊ नये. 7
सूर्य मावळल्यानंतर तो पुन्हा शुद्ध ठरेल व तेव्हाच त्याने पवित्र अन्न
खावे, कारण तेच त्याचे अन्न आहे. 8 मृत पावलेले किंवा जंगली
प्राण्याने मारलेल्या जनावराचे मांस त्याने खाऊन अशुद्ध होऊ नये. मी
याहवेह आहे. 9 "'याजकांनी माझी सेवा काळजीपूर्वक करावी, नाहीतर
माझी सेवा निंदापूर्वक केल्याने त्यांना दोषी ठरवून मरणदंड भोगावा
लागेल. त्यांना पवित्र करणारा मी याहवेह आहे. 10 "'याजकाच्या कुटुंबा
बाहेरील इतर कोणीही, त्याच्याकडे आलेले पाहुणे किंवा त्याच्याकडे
काम करणारे मजूर यांनी पवित्र अर्पणांतील कोणताही पदार्थ खाऊ नये.
11 पण याजकाने स्वतःच्या पैशाने गुलाम विकत घेतला असेल किंवा
जर त्या गुलामांनी याजकाच्या घरात जन्म घेतला असेल, ते त्याचे अन्न
खाऊ शकतील. 12 जर याजकाच्या कन्येचा विवाह याजकासोबत झाला
नसून, दुसऱ्यासोबत झाला असेल तर तिने पवित्र अर्पणांतील पदार्थ
खाऊ नयेत. 13 पण जर याजकाची मुलगी विधवा किंवा पतीने सोडलेली
असून तिला पुत्र नसेल आणि ती तरुणपणी पुन्हा आपल्या पित्याच्या
घरात येऊन राहत असेल, तर मात्र तिने आपल्या पित्याच्या घरातील
अन्न खावे. तथापि, कोणत्याही अनधिकृत व्यक्तीने हे अन्न खाऊ नये.
14 "'एखाद्याने चुकून पवित्र अर्पणांतील काही पदार्थ खाल्ले, तर त्याने
जितके पदार्थ खाल्ले असतील तितके सर्व आणि पाचव्या हिश्शाइतका
पदार्थाचा भाग याजकाला द्यावा. 15 इस्राएली लोकांनी याहवेहला
अर्पिलेली पवित्र अर्पणे, याजकाने भ्रष्ट करू नयेत, 16 ती पवित्र अर्पणे
खाण्यास मनाई न केल्यास पापदंड भरण्याची शिक्षा त्यांच्यावर ते
ओढवून घेतील; मी याहवेह आहे, जो त्यांना पवित्र करतो.'" 17 याहवेह
मोशेला म्हणाले, 18 "अहरोन, त्याचे पुत्र व इस्राएली लोकांना सांग,
'जर तुमच्यापैकी—इस्राएली लोकांपैकी किंवा इस्राएलात राहणारे
विदेशी यापैकी कोणीही—याहवेहला वचनपूर्तीचे किंवा स्वैच्छिक
होमार्पण आणले, 19 तर ते तुमच्यावतीने मान्य होण्यासाठी निर्दोष
गोऱ्हा, मेंढा किंवा बोकड यांचेच असावे. 20 दोष असलेला कोणताही
प्राणी अर्पण करू नये, कारण ते तुमच्यावतीने मान्य केले जाणार
नाहीत. 21 याहवेहसाठी कोणी स्वतःच्या गुरांतून किंवा शेरडामेंढरांतून
शपथपूर्तीचे किंवा स्वखुशीचे शांत्यर्पण करेल, तर ते मान्य होण्यासाठी
ते निर्दोष प्राण्याचेच असावे. 22 याहवेहला आंधळा, हाड तुटलेला,
लुळा किंवा अंगावर मस, इसब अथवा खरूज असलेला असा कोणताही
प्राणी अर्पण करू नका. यापैकी काहीही वेदीवर याहवेहला हवन म्हणून
अर्पण ठेऊ नका. 23 तुम्ही एखाद्या गोऱ्ह्याला किंवा मेंढ्याला, एखादा
अवयव जास्त वा कमी असेल, तर तो प्राणी स्वखुशीचे अर्पण म्हणून
चालेल, पण शपथपूर्तीचे अर्पण म्हणून तो अर्पण करता येणार नाही. 24

ज्या प्राण्याचे अंडकोश ठेचलेले किंवा चिरडलेले किंवा फाटलेले किंवा
कापलेले असेल, त्याचे अर्पण याहवेहला कधीही करू नये. तुमच्या
स्वतःच्या देशात असे करू नका. 25 आणि तुम्ही अशा प्रकारचे प्राणी
परराष्ट्रीयांकडून घेऊ नयेत आणि तुमच्या परमेश्वरासाठी अन्नार्पण करू
नये. ते तुमच्यावतीने स्वीकारले जाणार नाहीत, कारण ते विकृत आहेत
आणि त्यांच्यात दोष आहेत.’” 26 याहवेह मोशेला म्हणाले, 27 “वासरू,
कोकरू वा करडू जन्मले असताना ते सात दिवस त्याच्या आईजवळ राहू
द्यावे; आठव्या दिवसापासून याहवेहला अन्नार्पण करण्यास योग्य ठरेल.
28 गाई व तिचे वासरू किंवा मेंढी व तिचे करडू यांचा एकाच दिवशी वध
करू नये. 29 “ज्यावेळी तुम्ही याहवेहला उपकारस्तुतीच्या बलीचा यज्ञ
करता तेव्हा अशा प्रकारे करावा की तो तुमच्यावतीने मान्य व्हावा. 30
त्याच दिवशी ते खाऊन टाकावे; त्यातील काहीही सकाळपर्यंत ठेवू
नये. मी याहवेह आहे. 31 “तुम्ही माझ्या सर्व आज्ञा पाळाव्यात; मी
याहवेह आहे. 32 माझ्या पवित्र नावाला अपवित्र करू नका, कारण
मला इस्राएली लोकांनी पवित्र म्हणून ओळखावे. मी याहवेह आहे,
ज्याने तुम्हाला पवित्र केले 33 आणि ज्याने तुमचा परमेश्वर होण्यासाठी
तुम्हाला इजिप्तमधून बाहेर आणले. मी याहवेह आहे.”

**23** याहवेह मोशेला म्हणाले, 2 “इस्राएली लोकांबरोबर बोल आणि
त्यांना सांग: ‘हे मी नेमून दिलेले सण आहेत, याहवेहचे नेमून दिलेले
सण, जे तुम्ही पवित्र मेळावे असे जाहीर करावे. 3 “‘आठवड्यातील
सहा दिवस त्यांनी कामकाज करावे, परंतु सातवा दिवस हा शब्बाथ,
विश्रांतीचा दिवस आहे. पवित्र मेळाव्याचा दिवस. तुम्ही कोणतेही काम
करू नये; तुम्ही कुठेही राहत असाल तरी याहवेहसाठी हा शब्बाथ आहे.
4 “‘याहवेहने नेमून दिलेले हे पवित्र सण आहेत, पवित्र मेळाव्यांची
घोषणा तुम्ही त्यांच्या ठरवून दिलेल्या वेळांमध्ये करावी: 5 याहवेहच्या
वल्हांडण सणाची सुरुवात पहिल्या महिन्याच्या चौदाव्या दिवसाच्या
संध्याकाळपासून होते. 6 त्या महिन्याच्या पंधराव्या दिवशी याहवेहचा
बेखमीर भाकरीचा सण सुरू होतो; सात दिवस खमीर नसलेली भाकर
खावी. 7 पहिल्या दिवशी एक पवित्र सभा भरवावी व कोणतीही
नियमित कामे करू नये. 8 सात दिवस याहवेहसाठी अन्नार्पण द्यावे.
सातव्या दिवशी पवित्र सभा भरवावी आणि नियमित कामे करू नये.’”
9 याहवेह मोशेला म्हणाले, 10 “इस्राएली लोकांबरोबर बोल आणि
त्यांना सांग: ‘मी जो देश तुम्हाला देणार आहे, जेव्हा तुम्ही तिथे
प्रवेश कराल आणि पिकांची कापणी कराल, तेव्हा तुम्ही कापणी
केलेल्या पहिल्या धान्याची एक पेंढी याजकाकडे आणावी. 11 त्याने
याहवेहसमोर पेंढी ओवाळावी, जेणेकरून ते तुमच्यावतीने मान्य केले
जाईल; शब्बाथाच्या दुसऱ्या दिवशी याजकाने ते ओवाळावे. 12 आता
ज्या दिवशी तुम्ही पेंढी ओवाळाल, त्याच दिवशी तुम्ही याहवेहला एक
वर्षाच्या निर्दोष कोकऱ्याचे होमार्पण करावे. 13 त्याच्या धान्यासोबत,
जैतुनाच्या तेलात मळलेल्या सपिठाच्या एक एफाचा दहावा भाग
जैतुनाच्या तेलात मळून अर्पावा; हा याहवेहला प्रसन्न करणारा सुगंध
आहे. त्यासोबत पावशेर हीन द्राक्षारसही याहवेहला अर्पण करावा. 14
तुम्ही आपल्या परमेश्वराला हे सर्व अर्पण आणल्याशिवाय पिकातील
कोणताही भाग म्हणजे कोवळी कणसे, त्या धान्याच्या भाकरी किंवा
भाजलेले दाणे यापैकी काहीही खाऊ नये. तुम्ही कुठेही राहिले तरी
येणाऱ्या पिढ्यांसाठी हा कायमचा नियम आहे. 15 “‘शब्बाथाच्या
दुसऱ्या दिवशी, तुम्ही ओवाळणीची पेंढी आणाल त्या दिवसापासून पुढे
पूर्ण सात आठवडे मोजावे. 16 पन्नासाव्या दिवशी म्हणजे सात शब्बाथ
संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी याहवेहला पुन्हा एकदा नवे अन्नार्पण
करावे. 17 तुम्ही कुठेही राहत असाल तरी अर्पण म्हणून दोन भाकरी
आणाव्यात. एका एफाच्या दहा भागातील दोन भाग सपिठाच्या खमीर
घालून भाजलेल्या असाव्यात, पहिल्या उत्पन्नातून ओवाळणीचे अर्पण
म्हणून याहवेहसाठी असे अर्पण आणावे. 18 या भाकरीबरोबर तुम्ही
एक वर्षाची सात निर्दोष नरकोकरे, एक गोऱ्हा व दोन मेंढे अर्पावे, ते
पेयार्पण व अन्नार्पणासह याहवेहला एक होमार्पण असतील, याहवेहला
प्रसन्न करणारा एक सुगंध होमार्पण. 19 मग याजकाने पापार्पणासाठी
एक बोकड व शांत्यर्पणासाठी एक वर्षांचे दोन मेंढे अर्पण करावे. 20
याजक ती प्रथम उपजाची भाकर घेऊन तिला ओवाळणी देईल व
दोन मेंढ्यांबरोबर ती याहवेहला अर्पण करेल. हे सर्व याहवेहसाठी
पवित्र ठरेल व ते याजकासाठी भाग म्हणून असेल. 21 त्याच दिवशी
तुम्ही एक पवित्र सभा भरवा आणि नियमित कामे करू नका. तुम्ही
कुठेही राहिले तरी तुमच्या सर्व भावी पिढ्यांसाठी हा कायमचा नियम
आहे. 22 “‘तुम्ही आपल्या जमिनीतील पिकांची कापणी कराल, तेव्हा
शेताच्या कानाकोपऱ्यातील पिकांची कापणी करू नये किंवा खाली
पडलेले धान्य गोळा करू नये. हे गरिबांसाठी व तुम्हामध्ये राहणाऱ्या
परदेशीयांसाठी ते तसेच राहू द्यावे. मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे.’”
23 याहवेह मोशेला म्हणाले, 24 “इस्राएली लोकास सांग: ‘सातव्या
महिन्याचा पहिला दिवस तुम्ही शब्बाथ विश्रांतीसाठी ठेवावा, या दिवशी
पवित्र मेळावा करून स्मृतिदिन म्हणून कर्णे फुंकावेत. 25 या दिवशी
कोणतीही कष्टाची कामे करू नये, परंतु याहवेहला अन्नार्पण म्हणून हवन
करावे.’” 26 नंतर याहवेह मोशेला म्हणाले, 27 “सातव्या महिन्याचा
दहावा दिवस प्रायश्चिताचा दिवस आहे. एक पवित्र मेळावा भरवावा
आणि स्वतःचा नकार करावा आणि याहवेहला अन्नार्पण करावे. 28 या
दिवशी तुम्ही कोणतेही कामकाज करू नये, कारण हा दिवस याहवेह
तुमच्या परमेश्वरापुढे तुम्हाप्रीत्यर्थ प्रायश्चित्त करण्यात येईल. 29 जे
कोणी स्वतःचा नकार करणार नाहीत, त्यांचा त्यांच्या लोकांतून समूळ
नाश करण्यात येईल. 30 जो कोणी त्या दिवशी कोणतेही काम करेल
त्याचा मी त्यांच्या लोकांमधून नाश करेन. 31 कोणीही या दिवशी
कोणतेही कामकाज करू नये, तुम्ही कुठेही राहाल, इस्राएलाच्या पिढ्यान्
पिढ्यांसाठी हा कायमचा नियम आहे. 32 तो दिवस तुमच्यासाठी
शब्बाथ, विश्रांतीचा दिवस आहे आणि तुम्ही स्वतःला नाकारले पाहिजे.
महिन्याच्या नवव्या दिवसाच्या संध्याकाळपासून पुढील संध्याकाळपर्यंत
तुम्ही तुमचा शब्बाथ पाळावा.” 33 याहवेह मोशेला म्हणाले, 34
“इस्राएली लोकांना सांग: ‘सातव्या महिन्याच्या पंधराव्या दिवसापासून

याहवेहकरिता मंडपाचा सण सात दिवस पाळावा. 35 पहिला दिवस हा
पवित्र मेळावा आहे. कोणतेही नियमित काम या दिवशी करू नये. 36
सात दिवस याहवेहला अन्नार्पण करा आणि आठव्या दिवशी पवित्र
मेळावा भरवून याहवेहला अन्नार्पण करा. हा मेळाव्याचा समारोप आहे;
कोणतेही नियमित काम करू नका. 37 (“‘हे याहवेहने स्थापित केलेले
सण आहेत, जे तुम्ही याहवेहला अन्नार्पण करण्यासाठी पवित्र मेळावे
घोषित करावे; होमार्पण, धान्यार्पण, शांत्यर्पण व पेयार्पण आवश्यक
त्या दिवशी अर्पणे करावी. 38 ही अर्पणे याहवेहच्या शब्बाथांच्या
व्यतिरिक्त आहेत आणि हे यज्ञ तुम्ही परमेश्वराला अर्पण करता त्या
तुमच्या देणग्या आणि नवस फेडावयाची अर्पणे आणि स्वैच्छिक अर्पणे
त्या व्यतिरिक्त आहेत.) 39 “‘सातव्या महिन्याच्या पंधराव्या दिवशी,
जेव्हा तुम्ही जमिनीचे पीक गोळा कराल, तेव्हा सात दिवस याहवेहपुढे
सण पाळावा. पहिला दिवस हा शब्बाथ, विश्रामदिन आणि आठवा
दिवसही शब्बाथाचा विश्रामदिन असेल. 40 पहिल्या दिवशी तुम्ही दाट
पाने असलेल्या झाडांच्या फांद्या—खजुरीच्या झावळया, वाळुंजे, आणि
भरपूर पाने असलेली इतर झाडांच्या फांद्या—घेऊन याहवेह तुमच्या
परमेश्वरापुढे सात दिवस आनंदोत्सव करावा. 41 हा सात दिवसांचा
वार्षिक सण तुम्ही याहवेहसाठी प्रत्येक वर्षी पाळावा. हा सर्वकाळचा
नियम येणाऱ्या पिढ्यांसाठी आहे; सातव्या महिन्यात हा सण साजरा
करावा. 42 या सात दिवसात इस्राएली वंशातील सर्वांनी डहाळ्याच्या
मंडपात राहावे 43 यासाठी की, तुमच्या भावी पिढीला हे कळावे की,
जेव्हा मी इस्राएलच्या घराण्याला इजिप्तमधून बाहेर काढले तेव्हा मी
त्यांना मंडपात राहायला लावले. मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे.’” 44
अशाप्रकारे याहवेहनी नेमून दिलेले हे वार्षिक सण मोशेने इस्राएली
लोकांना जाहीर केले.

**24** याहवेह मोशेला म्हणाले, 2 “इस्राएली लोकांना आज्ञा दे की दिवे
अखंड पेटत राहावे म्हणून त्यांनी कुटून काढलेले जैतुनाचे शुद्ध
तेल तुझ्याकडे आणावे. 3 सभामंडपातील जे पडदे कराराच्या कोशाला
झाकतात, त्याच्याबाहेर अहरोनाने संध्याकाळपासून सकाळपर्यंत
याहवेहसमोर दिवे सतत पेटत ठेवावेत, हा नियम पिढ्यान् पिढ्या
असावा. 4 याहवेहसमोर असलेल्या शुद्ध सोन्याच्या दीपस्तंभावरील
दिव्यांची नियमितपणे व्यवस्था करावी. 5 “सपीठ घ्यावे आणि त्याच्या
बारा भाकरी तयार कराव्या, प्रत्येक भाकरीसाठी दोन दशांश एफा
वापरावा. 6 त्यांच्या दोन रांगा आणि प्रत्येक रांगेत सहा भाकरी शुद्ध
सोन्याच्या मेजावर मांडून याहवेहसमोर ठेवाव्यात. 7 प्रत्येक रांगेभोवती
स्मरणभाग म्हणून शुद्ध धूप टाकावा, याचे प्रतीक म्हणून भाकर आणि
अन्नार्पण हे याहवेहसाठी अर्पण करावी. 8 ही भाकर याहवेहसमोर
नियमितपणे मांडून ठेवावी, शब्बाथानंतर शब्बाथ, इस्राएली लोकांसाठी
हा शाश्वत करार आहे. 9 या भाकरी अहरोन व त्याच्या पुत्रांचा वाटा
होय, ज्या त्यांनी पवित्रस्थानात बसून खाव्यात; कारण याहवेहला
अर्पण केल्या जाणाऱ्या यज्ञातील हा परमपवित्र भाग आहे. त्याचा
त्यावर कायमचा अधिकार आहे.” 10 एकदा एका इस्राएली स्त्रीचा
मुलगा, ज्याचे वडील इजिप्तचे होते, इस्राएली छावणीत गेला. तिथे
छावणीत त्याचे आणि एका इस्राएली मनुष्याचे भांडण झाले. 11
इस्राएली स्त्रीच्या मुलाने परमेश्वराच्या नावाची निंदा केली आणि तो
शिव्याशाप देऊ लागला; तेव्हा त्याला मोशेकडे आणले. (त्याच्या आईचे
नाव शेलोमीथ होते, ती दान वंशातील दिब्रीची कन्या होती.) 12 तेव्हा
याहवेहची इच्छा त्यांना स्पष्ट समजून येईपर्यंत त्यांनी त्याला अटकेत
ठेवले. 13 मग याहवेहनी मोशेला सांगितले: 14 “परमेश्वराच्या नावाची
निंदा करणाऱ्याला छावणीच्या बाहेर घेऊन जा. ज्यांनी हे बोलताना
ऐकले आहे, त्यांनी त्याच्या डोक्यावर आपले हात ठेवावेत आणि
संपूर्ण मंडळीने त्याच्यावर दगडमार करावा. 15 इस्राएली लोकांना
सांग: ‘जो कोणी आपल्या परमेश्वराला शिव्याशाप देईल त्याने आपल्या
पापाची शिक्षा भोगावी; 16 याहवेहच्या नावाची जो कोणी निंदा
करेल त्याला निश्चित जिवे मारावे. संपूर्ण मंडळीने त्याच्यावर दगडमार
करावा. परदेशीय असो किंवा देशात जन्मलेला, जेव्हा ते परमेश्वराच्या
नावाची निंदा करतात त्यांना निश्चित जिवे मारावे. 17 “‘जो कोणी
एखाद्या मनुष्याचा जीव घेईल त्याला निश्चित जिवे मारावे. 18 जो
कोणी एखाद्या मनुष्याच्या प्राण्याची हत्या करतो, तर त्याने निश्चित
त्याची परतफेड करावी—जीवनासाठी जीवन. 19 जो कोणी आपल्या
शेजाऱ्याला दुखापत करतो, त्याला त्याच प्रकारे दुखापत केली पाहिजे:
20 हाड मोडल्याबद्दल हाड मोडणे, डोळ्याबद्दल डोळा, दाताबद्दल दात.
ज्याप्रमाणे त्याने एखाद्या व्यक्तीला दुखापत केली आहे, त्यालाही निश्चित
तीच दुखापत झाली पाहिजे. 21 जो कोणी प्राण्याची हत्या करतो,
त्याने निश्चित त्याची परतफेड करावी, परंतु जो कोणी मनुष्याची हत्या
करतो त्याला जिवे मारावे. 22 परदेशीय किंवा देशात जन्मलेल्यासाठी
सारखाच नियम असावा. मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे.’” 23 मग
मोशे इस्राएली लोकांसोबत बोलला आणि त्यांनी त्या निंदा करणाऱ्याला
छावणीबाहेर नेले आणि त्याच्यावर दगडमार केला. याहवेहने मोशेला
आज्ञापिल्यानुसार इस्राएली लोकांनी केले.

**25** सीनाय पर्वतावर याहवेहनी मोशेला सांगितले, 2 “इस्राएली
लोकांशी बोल आणि त्यांना सांग: ‘मी तुम्हाला देत असलेल्या
देशात तुम्ही पोहोचाल, तेव्हा त्या भूमीने याहवेहसाठी शब्बाथ पाळावा.
3 सहा वर्षे तुम्ही आपल्या शेतात पेरणी करावी, द्राक्षमळयांची छाटणी
करावी आणि त्यांचे पीक जमा करावे. 4 पण सातव्या वर्षी जमिनीला
शब्बाथ विश्रांती राहील; जो याहवेहसाठी शब्बाथ आहे. तुम्ही तुमच्या
शेतात बी पेरू नका आणि तुमच्या द्राक्षमळयांची छाटणी करू नका.
5 आपोआप उगविलेल्या पिकांची कापणी करू नये किंवा छाटणी
न झालेल्या द्राक्षवेलीची द्राक्षे गोळा करू नये. कारण जमिनीला हे
विश्रांतीचे वर्ष राहील. 6 त्या शब्बाथाच्या वर्षी जमीन जे काही पीक
येईल ते सर्वांना म्हणजेच तुम्ही, तुमचे नोकरचाकर, तुमच्याकडे असलेले
गुलाम आणि तुमच्यात राहणारा कोणीही परदेशीय यांना खाण्याची
मोकळीक आहे. 7 तसेच जनावरे, वनपशू या दोघांनाही तिथे चरावयाची
मोकळीक आहे. 8 “‘तुम्ही सात शब्बाथ वर्षे मोजावे; म्हणजेच सात

वेळा सात वर्षे; म्हणजे सात शब्बाथ वर्षांचा काळ एकोणपन्नास वर्षे
होईल. 9 मग सातव्या महिन्याच्या दहाव्या दिवशी म्हणजे प्रायश्चित्ताच्या
दिवशी तुम्ही सर्वत्र कर्णे फुंकावे. प्रायश्चित्ताच्या दिवशी संपूर्ण देशात
तुम्ही मोठ्या आवाजाचे कर्णे दीर्घकाल वाजवावे. 10 पन्नासावे वर्ष
पवित्र मानावे आणि संपूर्ण देशातील सर्व लोकांना मुक्ततेची घोषणा
करावी. तुमच्यासाठी हा महोत्सव असेल; तुमच्यातील प्रत्येकाने तुमच्या
कौटुंबिक मालमत्तेकडे आणि तुमच्या स्वतःच्या कुळाकडे परत जावे.
11 पन्नासावे वर्ष हे योबेल वर्ष असेल; आपोआप उगविलेल्या पिकांची
कापणी करू नये किंवा छाटणी न झालेल्या द्राक्षवेलीची द्राक्षे गोळा
करू नये. 12 कारण हे योबेल वर्ष असेल आणि हे तुमच्याकरिता
पवित्र असेल; शेतात आपोआप उगविलेले पीक तुम्ही खावे. 13 “‘या
योबेल वर्षी तुम्ही सर्वांनी आपल्या स्वतःच्या वतनात परत जावे. 14
“‘यासाठी की तुम्ही जेव्हा आपल्या लोकांना जमीन विकाल किंवा
त्याच्याकडून विकत घ्याल, तेव्हा तुमच्याकडून अन्यायाचा व्यवहार
होऊ नये. 15 योबेल वर्षानंतरच्या वर्षांच्या संख्येच्या आधारावर तुम्ही
तुमच्या लोकांकडून विकत घ्यावयाची आणि पीक कापणीसाठी किती
वर्षे शिल्लक आहेत या आधारावर त्याची तुम्हाला विक्री करावयाची
आहे. 16 जर वर्षे अनेक असतील तर जमिनीची किंमत त्या मानाने
जास्त असेल, परंतु ही वर्षे थोडी असल्यास तिची किंमत त्या मानाने
कमी असेल; कारण खरोखर विक्री जमिनीची होत नाही, तर ती जमीन
किती वेळा पिके देऊ शकेल यावर तिची किंमत अवलंबून राहील. 17
एकमेकांचा गैरफायदा घेऊ नका, तर तुमच्या परमेश्वराचे भय बाळगा.
मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे. 18 “‘माझ्या आज्ञांचे पालन करा
आणि माझे विधीचे पालन करण्याची काळजी घ्या, म्हणजे तुम्ही देशात
सुरक्षितपणे राहाल. 19 भूमी भरपूर पीक देईल आणि तुम्ही भरपूर
खाल आणि सुरक्षित राहाल. 20 तुम्ही असे विचाराल, “जर आम्ही झाडे
लावली नाही किंवा आमच्या पिकांची कापणी केली नाही, तर आम्ही
सातव्या वर्षी काय खावे?” 21 मी तुम्हाला असे आशीर्वादित करेन
की जमीन सहाव्या वर्षी तीन वर्षापर्यंत पर्याप्त असे पीक देईल. 22
आठव्या वर्षी जेव्हा तुम्ही बी पेराल, तेव्हा तुम्ही मागच्या वर्षात गोळा
केलेले पीक खात राहाल आणि नवव्या वर्षाचे पीक येईपर्यंत तुम्ही ते
खाऊ शकाल. 23 “‘तुम्ही जमीन कायमचीच विकू नये. कारण जमीन
माझी आहे आणि तुम्ही माझ्या भूमीवर परदेशी आणि परके म्हणून
राहत आहात. 24 तुमच्या ताब्यात असलेली संपूर्ण जमीन, तुम्ही त्या
जमिनीला सोडविण्याची तरतूद केली पाहिजे. 25 “‘तुमचा इस्राएली
सहकारी गरीब झाला आणि त्याने त्यांची काही मालमत्ता विकली,
तर त्यांच्या जवळच्या नातलगाने ती खंडणी भरून सोडवून घ्यावी.
26 जर सोडवून घेणारा त्याला कोणी नातलग नसला आणि त्याला
स्वतःलाच ती खंडणी भरून सोडवून घेण्याची ऐपत वाढली, 27 तर
योबेल वर्षापर्यंत जमीन आणखी किती वर्षे पीक देऊ शकेल हे पाहून
त्या प्रमाणात तिची किंमत भरावी. जमिनीच्या सध्याच्या मालकाने
तितके पैसे घेऊन तिच्या मूळ मालकाला ती परत करावी. 28 पण मूळ
मालक ती सोडवून घ्यावयाला समर्थ नसेल तर योबेल वर्षापर्यंत ती
हल्लीच्या मालकाकडेच रहावी. पण योबेल वर्षी ती मूळ मालकाला
परत केलीच पाहिजे. 29 “‘एखाद्याने तटबंदीच्या शहरातील आपले घर
विकले असेल, तर त्याला एक वर्षाच्या काळात खंडणी भरून ते परत
सोडवून घेता येईल. ते सोडविण्याचा हक्क त्याला पूर्ण एक वर्ष राहील.
30 नगर तटबंदीच्या आत असलेले घर जर त्याने ते एक वर्षाच्या आत
खंडणी भरून सोडवून घेतले नाही, तर ते नव्या मालकाच्या कायमचेच
मालकीचे होईल. योबेल वर्षीही ते त्याच्या मूळ मालकाला परत करावे
लागणार नाही. 31 पण गावातील घर म्हणजे ज्या वस्तीला तटबंदी
नाही अशा मोकळया वस्तीत असलेले घर मात्र केव्हाही खंडणी भरून
सोडविता येईल आणि योबेल वर्षी ते घर मालकाला परत केलेच पाहिजे.
32 “‘लेवी वंशातील मनुष्याचे घर तटबंदी असलेल्या शहरात असले
तरी ते त्याला केव्हाही खंडणी भरून सोडवून घेता येईल. 33 म्हणून
लेव्यांच्या मालकीचे जे काही आहे ते सोडविता येईल, आणि शहरातील
त्यांच्या मालमत्तेतून विकले गेलेले घर योबेल वर्षात सोडविले जाईल,
कारण लेवींच्या नगरातील घरेही इस्राएलच्या घराण्यात त्यांची मालमत्ता
आहे. 34 लेव्यांना त्यांच्या शहराभोवती असलेली कुरणे विकण्यास
परवानगी नाही, कारण ती त्यांची कायमचीच मालमत्ता आहे. 35 “‘जर
तुमच्या कोणी इस्राएल बंधूला दारिद्र्य आले आणि ते तुमच्यामध्ये
स्वतःचे पालनपोषण करू शकत नसतील, तर जसे तुम्ही परदेशी आणि
परक्यांना मदत कराल तशी त्यांना करा, जेणेकरून ते तुमच्यामध्ये
राहतील. 36 परमेश्वराची भीती बाळगावी आणि तुमच्या बंधूला तुमच्या
घरात राहू द्यावे. त्याला उसने म्हणून दिलेल्या पैशावर तुम्ही व्याज घेऊ
नये. 37 तुम्ही त्यांना व्याजाने पैसे देऊ नयेत किंवा जे खाद्यपदार्थ तुम्ही
त्यांना विकाल त्यावर नफा घेऊ नये. 38 ज्याने तुम्हाला कनान देश
देण्यासाठी आणि तुमचा परमेश्वर होण्यासाठी इजिप्त देशातून बाहेर
आणले, तो मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे. 39 “‘जर तुमच्यापैकी
कोणी इस्राएली गरीब झाला असेल आणि त्याने स्वतःला तुम्हाला
विकले असेल, तर तुम्ही त्यांना गुलामासारखे कामे करावयास लावू नये.
40 तर रोजदारीवर ठेवलेल्या नोकराप्रमाणे किंवा तुमच्या आश्रिताप्रमाणे
तुम्ही त्याला वागणूक द्यावी आणि योबेल वर्षापर्यंत तो तुमची सेवा
करेल. 41 त्यानंतर त्यांना आणि त्यांच्या मुलाबाळांना सोडण्यात येईल
आणि ते आपल्या कुटुंबातील पूर्वजांच्या वतनात परत जाऊ शकतील.
42 कारण इस्राएली तर माझे सेवक आहेत, मी त्याला इजिप्त देशातून
बाहेर आणले आहे. म्हणून त्याची सर्वसाधारण गुलामाप्रमाणे विक्री
केली जाऊ नये. 43 त्यांना जुलमाने वागविले जाऊ नये, परंतु तुमच्या
परमेश्वराचे भय बाळगावे. 44 “‘तुमचे पुरुष आणि स्त्री गुलाम तुमच्या
सभोवतालच्या राष्ट्रांमधून यावेत; तुम्ही त्यांच्याकडून गुलाम विकत घेऊ
शकता. 45 तुम्ही तुमच्यामध्ये राहणारे काही तात्पुरते रहिवासी आणि
तुमच्या देशात जन्मलेल्या त्यांच्या कुळातील सदस्यांना देखील विकत
घेऊ शकता आणि ते तुमची मालमत्ता बनतील. 46 तुम्ही ते तुमच्या
मुलांना वारसाहक्कात देऊ शकता आणि त्यांना आयुष्यभर गुलाम

बनवू शकता, पण तुमच्या इस्राएली बांधवांना अशा प्रकारची कठोर
वागणूक तुम्ही देऊ नये. 47 "'तुमच्यात राहणारा एखादा परदेशी श्रीमंत
झाला व इस्राएली वंशातील कोणी आपल्या दारिद्र्यामुळे स्वत:ला
त्या परदेश्याला वा परदेशी कुटुंबाला विकून टाकले, 48 तर त्याची
विक्री झाल्यावरही त्याच्या घराण्यापैकी कोणालाही: 49 त्याचा चुलता,
पुतण्या किंवा त्याच्या जवळचा कोणीही खंडणी भरून त्याला सोडवून
घेऊ शकेल, त्याला स्वत:लाच पैसा मिळाला तर खंडणी भरून तो
स्वत:ची सुटका करून घेऊ शकेल. 50 त्याने स्वत:ला विकले त्या
वर्षापासून योबेल वर्षापर्यंत जितकी वर्षे राहिली असतील तितकी
मोजून याकाळात एका मजुराला जितकी मजुरी द्यावी लागेल तितका
पैसा भरून त्याची सुटका करावी. 51 जर त्याला पुष्कळ वर्षे लागत
असतील, तर त्यांनी त्यांच्या सुटकेसाठी दिलेल्या किमतीचा मोठा भाग
त्यांच्यासाठी द्यावा. 52 जर योबेल वर्षाला थोडीच वर्षे राहिली असतील
तर त्यांनी हिशोब करावा आणि त्यांच्या सुटकेसाठी नियमाप्रमाणे
किंमत द्यावी. 53 तो दरवर्षी मजुराच्या हिशोबाप्रमाणे त्याच्याबरोबर
वागणूक करेल आणि ज्यांच्याकडून सेवा करून घेतात त्यांना कठोर
वागणूक देऊ नये. 54 "'योबेल वर्षापर्यंतही तो मुक्त झाला नसेल, तर
तो व त्याची मुलेबाळे योबेल वर्षी मुक्त होतील, 55 कारण इस्राएली
लोक माझेच सेवक आहेत; मीच त्यांना इजिप्त देशातून बाहेर आणले;
मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे.

**26** "'तुम्ही आपणासाठी घडीव मूर्ती किंवा कोरीव मूर्ती किंवा
मूर्तिस्तंभ यांची स्थापना करू नये, अथवा आपल्या देशात
नतमस्तक होण्यासाठी कोरीव दगड ठेवू नये. मी याहवेह तुमचा परमेश्वर
आहे. 2 "'तुम्ही माझे शब्बाथ पाळावे आणि माझ्या पवित्र स्थानाविषयी
आदर बाळगावा, मी याहवेह आहे. 3 "'माझ्या विधीनुसार तुम्ही
चालाल आणि काळजीपूर्वक माझ्या आज्ञा पाळाल, 4 तर मी हंगामात
तुमच्यासाठी पाऊस पाठवेन आणि जमीन पीक देईल आणि झाडे फळ
देतील. 5 द्राक्षमळ्याची कापणी होईपर्यंत तुझी मळणी सुरूच राहील
आणि द्राक्षांची कापणी पेरणी होईपर्यंत चालू राहील आणि पोटभर
अन्न खाऊन तुम्ही तृप्त व्हाल आणि देशात सुरक्षित राहाल. 6 "'मी
तुम्हाला शांती देईन म्हणजे तुम्ही निर्धास्तपणे झोप घ्याल. उपद्रव
देणारे पशू मी हाकलून देईन आणि तुमच्या देशावर तलवार चालणार
नाही. 7 तुम्ही तुमच्या शत्रूंचा पाठलाग कराल आणि तुमच्यासमोर
ते तलवारीने पडतील. 8 तुम्हातील पाचजण शंभरांचा व शंभर दहा
हजारांचा पाठलाग करून सर्व शत्रूंचा पराजय करतील आणि तुमचे शत्रू
तलवारीने तुमच्यासमोर पडतील. 9 "'मी तुमच्यावर कृपादृष्टी करेन,
तुम्हाला बहुगुणित करेन व तुमच्याशी केलेला माझा करार दृढ करेन.
10 तुम्ही अजूनही मागील कापणी खात राहाल, तुमच्या शेतात इतके
भरपूर पीक येईल की, ते साठविण्यासाठी तुम्हाला जुने धान्य बाहेर
काढावे लागेल. 11 मी तुमच्यामध्ये वस्ती करेन व मला तुमचा तिटकारा
वाटणार नाही. 12 मी तुमच्यामध्ये चालेन; मी तुमचा परमेश्वर होईन व
तुम्ही माझे लोक व्हाल. 13 इजिप्तच्या लोकांचे तुम्ही गुलाम राहू नये
म्हणून ज्याने तुम्हाला इजिप्त देशामधून बाहेर आणले; तो मी याहवेह
तुमचा परमेश्वर आहे. मी तुमच्या बेड्या तोडून टाकल्या आणि तुम्ही
ताठ मानेने चालाल असे मी केले आहे. 14 "'पण तुम्ही माझे ऐकले
नाही आणि या सर्व आज्ञा पाळल्या नाही, 15 आणि माझे विधी तुम्ही
स्वीकारले नाही आणि माझे नियम तुच्छ लेखून माझ्या आज्ञा पाळण्यात
कसूर केली आणि माझ्या कराराचा भंग केला, 16 तर मी तुमच्यासोबत
हे करेन: तुम्हाला एकाएकी भयंकर भीतीने ग्रासून टाकेन, तुम्हाला
क्षयरोग होईल व असे भयंकर ज्वर तुम्हाला पछाडतील की त्यामुळे
तुमचे नेत्र अंधुक होतील आणि तुमची शक्ती कोमेजून जाईल. तुम्ही
केलेली धान्याची पेरणी व्यर्थ जाईल, कारण तुमचे पीक तुमचे शत्रू
खाऊन टाकतील. 17 मी तुम्हापासून आपले मुख फिरवेन आणि तुमच्या
शत्रूंपुढे तुमचा पराभव होईल. ज्यांचा तुम्ही द्वेष करता तेच तुमच्यावर
सत्ता गाजवतील आणि कोणी पाठलाग करीत नसतानाही तुम्ही पळाल.
18 "'इतके झाल्यानंतरही तुम्ही माझे ऐकले नाही, तर तुमच्या पापांबद्दल
मी तुम्हाला सातपट शिक्षा करेन. 19 मी तुमच्या सामर्थ्याचा गर्व नाहीसा
करेन आणि तुमचे आकाश लोखंडासारखे व पृथ्वी कास्यासारखी करून
टाकेन. 20 तुमची मेहनत व्यर्थ गोष्टींमुळे नाश पावेल, कारण तुमची
जमीन पिके देणार नाही व तुझ्या देशातील झाडांना फळे येणार नाहीत.
21 "'इतके झाल्यानंतरही तुम्ही माझ्याविरुद्ध वागाल व माझे ऐकले
नाही, तर मी तुमच्या पापांच्या मानाने तुमच्यावर सातपट पीडा आणेन.
22 मी तुमच्यावर जंगली श्वापदे पाठवेन आणि ती तुमच्या लेकरांना
उचलून नेतील, गुरांचा नायनाट करतील आणि तुमची संख्या कमी
करतील; आणि त्यामुळे तुमचे रस्ते ओसाड होतील. 23 "'एवढे करून
सुद्धा तुमच्यात सुधारणा झाली नाही आणि माझ्याविरुद्ध तुम्ही वागत
राहिलात, 24 तर मी तुमच्याविरुद्ध होईन आणि तुमच्या पापाबद्दल सात
वेळा तुम्हाला ताडण करेन. 25 माझा करार मोडल्याबद्दल तुमच्यावर
तलवार आणेन. तुम्ही आपआपल्या शहरांत एकत्र व्हाल, तेव्हा तिथे मी
तुमच्यामध्ये प्राणघातक रोग पाठवेन आणि तुम्हाला तुमच्या शत्रूच्या
हाती देण्यात येईल. 26 मी तुमच्या भाकरीचा पुरवठा बंद करेन, तेव्हा
दहा स्त्रिया एकाच चुलीवर भाकर भाजू शकतील आणि त्या भाकरीचे
वजन करून देतील. तुम्ही खाल परंतु तृप्त होणार नाहीत. 27 "'एवढे
सर्व करूनही तुम्ही माझे ऐकणार नाही आणि माझ्याविरुद्ध वागाल,
28 तर मी क्रोधायमान होऊन तुमच्याविरुद्ध चालेन आणि तुमच्या
पातकांबद्दल तुम्हाला सातपट शिक्षा करेन. 29 तुम्ही तुमच्या पुत्रांचे व
तुमच्या कन्यांचे मांस खाल. 30 तुमच्या उच्च स्थानांचा मी नाश करेन;
तुमच्या धूपवेद्या मी मोडून टाकीन; तुमची प्रेते कुजण्यासाठी मी ती
मूर्तींच्या समवेतच राहू देईन आणि मी तुमचा तिरस्कार करेन. 31 तसेच
मी तुमची शहरे उजाड करेन, तुमची पवित्रस्थाने ओसाड करेन आणि
तुमच्या सुगंधी द्रव्यांचा सुवास घेणार नाही. 32 मी देश ओसाड करेन,
म्हणजे तुमचे शत्रू जे त्यात राहतील ते त्यामुळे गांगरून जातील. 33 मी
तुमची राष्ट्रांमध्ये पांगापांग करेन आणि मी माझी तलवार उगारून तुमच्या
पाठीस लागेन. तुमचा देश उजाड होईल आणि तुमच्या शहरांचा नाश

होईल. 34 जेव्हा तुम्ही शत्रूंच्या देशात असाल, तुमचा देश उजाड होईल;
तेव्हा भूमीला विश्रांती मिळेल व भूमी तिच्या शब्बाथ वर्षांचा संपूर्ण वेळ
आनंद करेल. 35 अनेक वर्षे ती उजाड होती, तुम्ही तिथे राहत असताना
शब्बाथाच्या काळामध्ये तिला विश्रांती मिळाली नाही म्हणून ती आता
विश्रांती घेईल. 36 "'तुमच्यातील जे उर्वरित राहतील, त्यांच्या शत्रूंच्या
देशात मी त्यांची अंतःकरणे इतकी भयभीत करेन, की वाऱ्याने उडून
जाणाऱ्या पानांचा आवाजसुद्धा त्यांना असा पळ काढावयास लावील की
जणू एखादा तलवार घेऊन त्यांच्या पाठीशी लागला आहे आणि कोणीही
त्यांचा पाठलाग करत नसले तरी ते पडतील. 37 कोणी पाठलाग करीत
नसतानाही तलवार पाठीस लागल्याप्रमाणे अडखळून एकमेकांवर
पडतील. त्यामुळे तुम्ही तुमच्या शत्रूंसमोर उभे राहू शकणार नाही. 38
तुम्ही राष्ट्रांत पांगून नाश पावाल; तुमच्या शत्रूंचा देश तुम्हाला गिळून
टाकील. 39 तुमच्यापैकी जे शिल्लक राहतील ते तुमच्या शत्रूंच्या देशात
त्यांच्या पापांमुळे नष्ट होतील; आणि ते त्यांच्या पूर्वजांच्या पापांमुळे नष्ट
होतील. 40 "'परंतु जर ते आपल्या पापांची व आपल्या वाडवडिलांच्या
पापांची—त्यांच्या अविश्वासूपणाची आणि माझ्याविरुद्ध चालण्याची
कबुली देतील, 41 ज्यामुळे मी त्यांचा शत्रू झालो व त्यांना शत्रूच्या
भूमीत घेऊन गेलो—नंतर जेव्हा त्यांची सुंता न झालेली हट्टी अंतःकरणे
नम्र होतील आणि त्यांच्या पापाची शिक्षा ते भोगतील, 42 तेव्हा मी
अब्राहाम, इसहाक व याकोब यांच्याबरोबर केलेल्या कराराचे स्मरण
करेन आणि त्या भूमीचे स्मरण करेन. 43 कारण ती भूमी ओसाड
पडल्यामुळेच शब्बाथांचा आनंद उपभोगू शकत आहे. ते त्यांच्या पापांची
परतफेड करतील कारण त्यांनी माझे नियम नाकारले आणि माझ्या
विधींचा तिरस्कार केला. 44 त्यांनी इतके केले असतानाही जेव्हा ते
शत्रूंच्या देशात असतील, मी त्यांचा नकार करणार नाही किंवा नाश
करणार नाही किंवा त्यांच्याशी केलेला करार मोडणार नाही. कारण मी
याहवेह त्यांचा परमेश्वर आहे. 45 परंतु त्यांचा परमेश्वर होण्याचा, त्यांच्या
पूर्वजांबरोबर केलेला करार मी आठवेन. सर्व राष्ट्रे पाहत असताना मी
त्यांच्या वाडवडिलांना इजिप्त देशाबाहेर घेऊन आलो होतो. मी याहवेह
आहे.'" 46 हे ते नियम, विधी व सूचना आहेत, ज्या याहवेहने आपल्यात
व इस्राएली लोकांमध्ये मोशेद्वारे सीनाय पर्वतावर स्थापित केल्या.

**27** याहवेह मोशेला म्हणाले, 2 "इस्राएली लोकांबरोबर बोल आणि
त्यांना सांग: 'जेव्हा एखादा मनुष्य याहवेहला समर्पणाचे विशेष
नवस करेल, तेव्हा त्या व्यक्तीचे मूल्य पुढीलप्रमाणे ठरवावे. 3 वीस ते
साठ वर्षे वयाच्या पुरुषाचे मूल्य पवित्रस्थानाच्या वजनानुसार चांदीचे
पन्नास शेकेल असावे, 4 स्त्रीसाठी तिचे मूल्य चांदीचे तीस शेकेल
असावे; 5 पाच ते वीस वर्षे वयोगटातील व्यक्तीसाठी, पुरुषाचे मूल्य
वीस शेकेल असावे आणि स्त्रीसाठी दहा शेकेल असावे; 6 एक महिना
ते पाच वर्षे वयाच्या पुरुषाला चांदीचे पाच शेकेल आणि स्त्रीसाठी
चांदीचे तीन शेकेल असावे; 7 साठ वर्ष आणि अधिक वर्षाच्या पुरुषाचे
मूल्य चांदीचे पंधरा शेकेल असावे आणि स्त्रीसाठी दहा चांदीचे शेकेल
असावे. 8 फारच गरिबीमुळे नवस फेडण्यासाठी मनुष्याला इतके शेकेल
भरणे शक्य नसेल, तर ज्याचे समर्पण होत आहे त्याला याजकापुढे उभे
करावे. मग नवस फेडण्यासाठी याजक ठरवेल तितके शेकेल त्याने
द्यावे. 9 "'जर त्याने एखादा पशू याहवेहला अर्पण करण्याचा नवस
केला असेल, तर हे अर्पण याहवेहला पवित्र असे होईल. 10 त्यांनी
त्याची अदलाबदल करू नये किंवा वाईटाच्या बदल्यात चांगला किंवा
चांगल्याच्या बदल्यात वाईट असे करू नये; जर ते एका पशूबद्दल दुसरा
पशू अशी अदलाबदल करतील, तर दोन्ही पशू आणि बदललेला पशू
पवित्र होतील. 11 जर नवस दिलेला पशू विधिनियमानुसार अशुद्ध
असेल—जे याहवेहला अर्पण करण्यास योग्य नाही—तर त्या पशूला
याजकाकडे घेऊन यावे. 12 तो त्याचा दर्जा चांगला किंवा वाईट हे
ठरवेल. मग याजक त्याचे जे काही मूल्य ठरवेल, तेवढेच त्याचे मूल्य
असेल. 13 परंतु जर त्या मालकाला तो पशू सोडवून घ्यावयाचा असेल,
तर त्याच्या किमतीचा पाचवा भाग अधिक द्यावा. 14 "'जर एखाद्याने
याहवेहला आपले घर पवित्र म्हणून समर्पित केले आणि नंतर त्याची
इच्छा असेल की, ते सोडवून घ्यावे, तर याजक त्या घराची चांगलीवाईट
स्थिती पाहून त्याचे मूल्य ठरवेल, आणि घरमालक याजकाने ठरविलेली
किंमत अधिक वीस टक्के भरून ते घर आपल्या ताब्यात घेईल. 16
"'जर कोणी त्यांच्या वतनाच्या शेताचा काही भाग याहवेहला समर्पित
करीत असतील तर त्या शेतामध्ये किती बी पेरले जाऊ शकेल त्याप्रमाणे
त्या शेताची किंमत ठरविली जाईल, एक होमेर जव पेरता येईल तेवढ्या
भागाचे मूल्य चांदीचे पन्नास शेकेल होतील. 17 जर योबेल वर्षापासून
त्याने आपले शेत समर्पित केले तर त्याची ठरविलेली किंमत तितकीच
राहील. 18 तरी, त्याने योबेल वर्षानंतर जर आपले शेत अर्पण केले
असेल, तर दुसऱ्या योबेल वर्षाला जितकी वर्षे असतील त्या मानाने
याजकाने त्या शेताचे मोल कमी करून मूल्य ठरवावे. 19 जर शेत
समर्पित करणाऱ्याला ते सोडवून घ्यावयाचे असेल तर त्यांनी त्याच्या
मूल्यात पाचवा भाग जोडला पाहिजे आणि ते शेत पुन्हा त्यांचे होईल.
20 तथापि, जर त्यांनी ते शेत परत सोडवून न घेता, किंवा त्यांनी ते इतर
कोणाला विकले असेल, तर ते कधीही सोडविले जाऊ शकत नाही.
21 जर ते शेत योबेल वर्षी सोडविले जाते तर ते याहवेहसाठी समर्पित
पवित्र शेत मानले जाईल; ते याजकाचे वतन होईल. 22 "'एखाद्याने
स्वतःचे वतन नसलेले, पण दुसऱ्याकडून विकत घेतलेले शेत याहवेहला
समर्पित केले, जी त्याच्या कुटुंबाची संपत्ती नसेल, 23 तर याजक योबेल
वर्षापर्यंतची त्या शेताची किंमत ठरवेल, आणि त्याने त्याच दिवशी
याजकाने ठरविलेले मूल्य याहवेहसाठी पवित्र समजून द्यावे. 24 योबेल
वर्षी, ज्याच्याकडून शेत विकत घेतले आहे त्या व्यक्तीकडे, म्हणजेच
त्या शेताचे खरे वतन असलेल्या व्यक्तीच्या ताब्यात परत जावे. 25 तुम्ही
विकता त्या प्रत्येकाचे मूल्य पवित्रस्थानाच्या शेकेलनुसार असावे आणि
एक शेकेल म्हणजे वीस गेरा. 26 "'तथापि, कोणीही प्राण्याचे प्रथम
जन्मलेले समर्पित करू शकत नाही, कारण प्रथम जन्मलेले मुळातच
याहवेहचे आहेत; बैल असो वा मेंढरे, ते याहवेहचेच आहे. 27 जर ते
अशुद्ध पशूंपैकी असेल, तर त्याची ठरवून दिलेले मूल्य द्यावे व त्या शिवाय

ठरविलेल्या किमतीचा पाचवा भाग अधिक किंमत भरावी. जर तो पशू
सोडवून घेतला जात नसेल, तर तो त्याच्या ठरविलेल्या किमतीत विकता
येईल. 28 "'एखादा मनुष्य आपल्याजवळ असलेले काहीही याहवेहला
समर्पित करेल—मग ते एखादी व्यक्ती असो, पशू असो वा वतनाची
जमीन असो—ते विकू नये किंवा खंडणी भरून सोडवूनही घेऊ नये;
कारण समर्पित ते सर्व याहवेहसाठी परमपवित्र आहे. 29 "'मरणदंडाची
शिक्षा झालेल्या मनुष्याला खंडणी भरून सोडविता येणार नाही. त्याचा
अवश्य वध करावा. 30 "'भूमीचा दशांश, मग ते शेतातील उत्पादन असो
किंवा झाडांची फळे, याहवेहचे आहेत; ते याहवेहसाठी पवित्र आहेत.
31 ज्या कोणाला त्यांचा कोणताही दशांश भाग सोडावयाचा असेल
त्यांनी त्या वस्तूंच्या किमतीचा पाचवा भाग अधिक रक्कम भरावी. 32
गुरे आणि शेरडेमेंढरांचा प्रत्येक दशांश—मेंढपाळाच्या काठीखालून
जाणारा प्रत्येक दहावा प्राणी—याहवेहसाठी पवित्र असेल. 33 कोणीही
वाईटामधून चांगल्याची निवड करू नये किंवा अदलाबदल करू नये;
तशी अदलाबदल केल्यास दोन्हीही प्राणी आणि बदली केलेला पवित्र
होतील आणि त्यांना खंडणी भरून सोडवू शकणार नाहीत.'" 34 या
आज्ञा सीनाय पर्वतावर याहवेहने इस्राएली लोकांसाठी मोशेला दिल्या.

# गणना

1 इस्राएली लोक इजिप्तमधून बाहेर आल्यावर, दुसऱ्या वर्षाच्या
दुसऱ्या महिन्याच्या पहिल्या दिवशी सीनाय रानात सभामंडपामध्ये
याहवेह मोशेशी बोलले. ते म्हणाले: 2 “संपूर्ण इस्राएली समुदायाची
त्यांचे कूळ आणि कुटुंब यानुसार, प्रत्येक पुरुषाच्या नावाने एकएक
करून जनगणना करा. 3 तू आणि अहरोनाने त्यांच्या विभागानुसार जे
वीस वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या आणि सैन्यात सेवा करण्यास
सक्षम असलेल्या सर्व इस्राएली पुरुषांची गणना करावी. 4 प्रत्येक कुळा
मधून जो मनुष्य कुटुंबप्रमुख आहे त्याने तुला मदत करावी. 5 “तुम्हाला
मदत करणाऱ्या पुरुषांची नावे ही आहेत: “रऊबेन वंशातील शदेयुराचा
पुत्र एलीसूर; 6 शिमओन वंशातील, सुरीशादैचा पुत्र शेलुमीएल; 7
यहूदाह वंशातील अम्मीनादाबाचा पुत्र नहशोन; 8 इस्साखार वंशातील
सूवाराचा पुत्र नथानेल; 9 जबुलून वंशातील हेलोनाचा पुत्र एलियाब; 10
योसेफाचे पुत्र: एफ्राईम वंशातील अम्मीहूदाचा पुत्र एलीशामा; मनश्शेह
वंशातील पदहसूरचा पुत्र गमलीएल; 11 बिन्यामीन वंशातील गिदोनाचा
पुत्र अबीदान; 12 दान वंशातील अम्मीशद्दायचा पुत्र अहीएजर; 13
आशेर वंशातील आक्रानाचा पुत्र पगीयेल; 14 गाद वंशातील देउएलाचा
पुत्र एलीआसाफ; 15 नफतालीचा वंशातील एनानाचा पुत्र अहीरा.”
16 हे सर्व वंशांतून निवडलेले पुरुष त्यांच्या पूर्वजांच्या वंशांचे सरदार
आहेत. ते इस्राएली गोत्रप्रमुख होते. 17 मोशे आणि अहरोनाने नावे
नमूद केलेल्यांना घेतले, 18 आणि दुसऱ्या महिन्याच्या पहिल्या दिवशी
सर्व समुदायाला एकत्र बोलाविले. लोकांनी आपआपल्या पूर्वजांची
नावे, आपले कूळ व घराणे यानुसार नोंदणी केली आणि वीस वर्षे
किंवा त्याहून अधिक वयाच्या पुरुषांच्या नावांची एकामागून एक यादी
केली. 19 याहवेहने मोशेला आज्ञा केल्याप्रमाणेच सीनायच्या रानात
त्याने त्यांची गणती केली: 20 इस्राएलचा पहिला पुत्र रऊबेनच्या
वंशजातून: वीस वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे, सैन्यात सेवा करण्यास
सक्षम असणाऱ्या सर्व पुरुषांची नावे, त्यांचे कूळ आणि कुटुंब यानुसार
नोंदण्यात आली. 21 रऊबेनाच्या गोत्रांची संख्या 46,500 होती. 22
शिमओनाच्या वंशजातून: वीस वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे सर्व
पुरुष व जे सैन्यात सेवा करण्यास सक्षम होते अशांची नावे त्यांचे कूळ
आणि कुटुंबानुसार नोंदण्यात आली. 23 शिमओनाच्या गोत्रांची संख्या
59,300 होती. 24 गादच्या वंशजातून: वीस वर्षे किंवा त्याहून अधिक
वयाचे सर्व पुरुष जे सैन्यात सेवा करण्यास सक्षम होते, अशांची नावे
त्यांचे कूळ आणि कुटुंब यानुसार नोंदण्यात आली. 25 गाद गोत्रांची
संख्या 45,650 होती. 26 यहूदाहच्या वंशजातून: वीस वर्षे किंवा
त्याहून अधिक वयाचे सर्व पुरुष जे सैन्यात सेवा करण्यास सक्षम
होते, अशांची नावे त्यांचे कूळ आणि कुटुंब यानुसार नोंदण्यात आली.
27 यहूदाहच्या गोत्रांची संख्या 74,600 होती. 28 इस्साखारच्या
वंशजातून: वीस वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे सर्व पुरुष जे सैन्यात
सेवा करण्यास सक्षम होते, अशांची नावे त्यांचे कूळ आणि कुटुंब
यानुसार नोंदण्यात आली. 29 इस्साखार गोत्रांची संख्या 54,400.
30 जबुलूनच्या वंशजातून: वीस वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे सर्व
पुरुष जे सैन्यात सेवा करण्यास सक्षम होते, अशांची नावे त्यांचे कूळ
आणि कुटुंब यानुसार नोंदण्यात आली. 31 जबुलून गोत्रांची संख्या
57,400. 32 योसेफाच्या पुत्रांमधून: एफ्राईमच्या वंशजातून: वीस
वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे सर्व पुरुष जे सैन्यात सेवा करण्यास
सक्षम होते, अशांची नावे त्यांचे कूळ आणि कुटुंब यानुसार नोंदण्यात
आली. 33 एफ्राईमच्या गोत्रांची संख्या 40,500. 34 मनश्शेहच्या
वंशजातून: वीस वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे सर्व पुरुष जे सैन्यात
सेवा करण्यास सक्षम होते, अशांची नावे त्यांचे कूळ आणि कुटुंब
यानुसार नोंदण्यात आली. 35 मनश्शेहच्या गोत्रांची संख्या 32,200
होती. 36 बिन्यामीनच्या वंशजातून: वीस वर्षे किंवा त्याहून अधिक
वयाचे सर्व पुरुष जे सैन्यात सेवा करण्यास सक्षम होते, अशांची नावे
त्यांचे कूळ आणि कुटुंब यानुसार नोंदण्यात आली. 37 बिन्यामीन
गोत्रांची संख्या 35,400 होती. 38 दानच्या वंशजातून: वीस वर्षे किंवा
त्याहून अधिक वयाचे सर्व पुरुष जे सैन्यात सेवा करण्यास सक्षम होते,
अशांची नावे त्यांचे कूळ आणि कुटुंब यानुसार नोंदण्यात आली. 39
दान गोत्रांची संख्या 62,700 होती. 40 आशेरच्या वंशजातून: वीस
वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे सर्व पुरुष जे सैन्यात सेवा करण्यास
सक्षम होते, अशांची नावे त्यांचे कूळ आणि कुटुंब यानुसार नोंदण्यात
आली. 41 आशेर गोत्रांची संख्या 41,500 होती. 42 नफतालीच्या
वंशजातून: वीस वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे सर्व पुरुष जे सैन्यात
सेवा करण्यास सक्षम होते, अशांची नावे त्यांचे कूळ आणि कुटुंब
यानुसार नोंदण्यात आली. 43 नफताली गोत्रांची संख्या 53,400
होती. 44 मोशे आणि अहरोन आणि इस्राएलच्या प्रत्येक घराण्याच्या
बारा पुढाऱ्यांनी मोजलेले पुरुष ते हेच. 45 सर्व इस्राएलातील वीस वर्षे
किंवा त्याहून अधिक वयाचे सर्व पुरुष जे सैन्यात सेवा करण्यास सक्षम
होते, अशांची नावे त्यांच्या कुटुंबानुसार नोंदण्यात आली. 46 एकूण
संख्या 6,03,550 होती. 47 परंतु लेवी पूर्वजांच्या गोत्रांची गणना मात्र
इतरांबरोबर करण्यात आली नाही. 48 याहवेहने मोशेला सांगितले होते:
49 “लेवी गोत्राची गणती करू नये किंवा इस्राएलच्या जनगणनेमध्ये
त्यांचा समावेश करू नये. 50 परंतु कराराच्या नियमाचा निवासमंडप;
त्यातील सामुग्री व त्यासंबंधाचे जे काही आहे त्यावर लेवींची प्रमुख
म्हणून नेमणूक कर. त्यांनी निवासमंडप व त्यातील सामुग्री वाहून न्यावी;
त्यांनी त्याची काळजी घ्यावी व त्याभोवती आपला डेरा उभारावा. 51
ज्यावेळी निवासमंडप पुढे जायचा असेल, त्यावेळी लेव्यांनीच तो खाली
काढावा आणि ज्यावेळी निवासमंडप उभारावयाचा असेल त्यावेळी
लेव्यांनीच तो उभारावा. इतर कोणी निवासमंडपाच्या जवळ गेल्यास
त्याला जिवे मारावे. 52 इस्राएली लोकांनी आपआपल्या दलानुसार,
प्रत्येकाने आपआपल्या छावणीत, आपआपल्या झेंड्याखाली आपले डेरे
द्यावे. 53 परंतु लेव्यांनी आपले डेरे कराराच्या निवासमंडपाच्या सभोवती
उभारावे, म्हणजे इस्राएली समुदायाविरुद्ध माझा क्रोध पेटणार नाही.

लेव्यांनी कराराच्या नियमाच्या निवासमंडपाची जबाबदारी घेऊन त्याची काळजी घ्यावी.” 54 याहवेहने मोशेला जसे आज्ञापिले होते, त्याप्रमाणे इस्राएली लोकांनी सर्वकाही केले.

**2** याहवेहने मोशे आणि अहरोनाला म्हटले: 2 “इस्राएली लोकांनी सभामंडपाच्या सभोवती, त्यापासून थोडे अंतरावर आपआपले डेरे उभारावे, प्रत्येकाने ते आपआपल्या झेंड्याजवळ व आपल्या घराण्याच्या निशाणाजवळ ते उभारावे.” 3 पूर्वेकडे, सूर्योदयाच्या दिशेने: यहूदाहच्या छावणीच्या दलांनी त्यांच्या झेंड्याखाली आपला डेरा द्यावा. यहूदाहच्या लोकांचा पुढारी अम्मीनादाबाचा मुलगा नहशोन असावा. 4 त्यांच्या दलातील लोकांची संख्या 74,600 होती. 5 इस्साखारचे गोत्र त्यांच्या शेजारी डेरा देणार. इस्साखारच्या लोकांचा पुढारी सूवाराचा मुलगा नथानेल असावा. 6 त्यांच्या दलातील लोकांची संख्या 54,400 होती. 7 त्यानंतर जबुलूनचे गोत्र असणार. हेलोनचा पुत्र एलियाब हा जबुलूनच्या लोकांचा पुढारी आहे. 8 त्यांच्या दलातील लोकांची संख्या 57,400 होती. 9 यहूदाहच्या छावणीत नेमलेले सर्व पुरुष, त्यांच्या दलानुसार, संख्येने 1,86,400 होते. त्यांनी सर्वप्रथम निघावे. 10 दक्षिणेच्या बाजूस: रऊबेनच्या छावणीच्या दलाने त्यांच्या झेंड्याखाली आपला डेरा द्यावा असावा. रऊबेनच्या लोकांचा पुढारी शेदेऊरचा पुत्र एलीसूर आहे. 11 त्यांच्या दलातील लोकांची संख्या 46,500 होती. 12 शिमओनचे गोत्र त्यांच्या शेजारी डेरा देईल. शिमओनच्या लोकांचा पुढारी सुरीशादैचा पुत्र शेलुमीएल आहे. 13 त्यांच्या दलातील लोकांची संख्या 59,300 होती. 14 त्यानंतर गाद गोत्र असेल. गादच्या लोकांचा पुढारी रऊएलाचा पुत्र एलीआसाफ आहे. 15 त्यांच्या दलातील लोकांची संख्या 45,650 होती. 16 रऊबेनच्या छावणीत नेमलेले सर्व पुरुष, त्यांच्या दलानुसार संख्येने 1,51,450 होते. ते दुसऱ्या रांगेत निघतील. 17 मग सभामंडप व लेव्यांची छावणी सर्व छावण्यांच्या मध्यभागी असणार. ज्या क्रमाने ते डेरा देऊन राहतात त्याच क्रमाने, आपल्या झेंड्याखाली आपआपल्या जागेवर त्यांनी निघावे. 18 पश्चिमेच्या बाजूस: एफ्राईमच्या दलाने आपल्या झेंड्याखाली आपला डेरा द्यावा. एफ्राईमच्या लोकांचा पुढारी अम्मीहूदाचा पुत्र एलीशामा आहे. 19 त्यांच्या दलातील लोकांची संख्या 40,500 होती. 20 मनश्शेहचे गोत्र त्यांच्यानंतर असेल. मनश्शेहच्या लोकांचा पुढारी पदहसूरचा पुत्र गमलीएल आहे. 21 त्यांच्या दलातील लोकांची संख्या 32,200 होती. 22 त्यानंतर बिन्यामीनचे गोत्र असणार. बिन्यामीन लोकांचा पुढारी गिदयोनीचा पुत्र अबीदान आहे. 23 त्यांच्या दलातील लोकांची संख्या 35,400 होती. 24 एफ्राईमच्या छावणीत नेमलेले सर्व पुरुष, त्यांच्या दलानुसार संख्येने 1,08,100 होते. ते तिसऱ्या रांगेत निघतील. 25 उत्तरेच्या बाजूस: दानच्या दलाने आपल्या झेंड्याखाली त्यांचा डेरा द्यावा. दान लोकांचा पुढारी अम्मीशद्दायचा पुत्र अहीएजर आहे. 26 त्यांच्या दलातील लोकांची संख्या 62,700 होती. 27 आशेर गोत्र त्यांच्या शेजारी डेरा देईल. आशेर लोकांचा पुढारी ओक्रानचा पुत्र पगीयेल आहे. 28 त्यांच्या दलातील लोकांची संख्या 41,500 होती. 29 नफताली गोत्र त्यांच्या शेजारी असणार. नफताली लोकांचा पुढारी एनानाचा पुत्र अहीरा आहे. 30 त्यांच्या दलातील लोकांची संख्या 53,400 होती. 31 दानच्या छावणीत नेमलेले सर्व पुरुष, त्यांच्या दलानुसार संख्येने 1,57,600 होते. त्यांच्या झेंड्याखाली ते सर्वांच्या शेवटी निघतील. 32 आपआपल्या घराण्यानुसार मोजलेले इस्राएली लोक हे आहेत. छावणीतील सर्व पुरुषांची संख्या 6,03,550 होती. 33 याहवेहने मोशेला दिलेल्या आज्ञेप्रमाणे इतर इस्राएल लोकांबरोबर लेव्यांची मोजणी केली नव्हती. 34 अशा रीतीने याहवेहने मोशेला आज्ञापिल्याप्रमाणे इस्राएली लोकांनी प्रत्येक गोष्ट केली, ते असे की, आपआपल्या झेंड्याजवळ ते डेरे देत असत आणि आपले कूळ व घराणे यानुसार पुढे चालत असत.

**3** सीनाय डोंगरावर याहवेह मोशेबरोबर बोलले, त्यावेळी अहरोन व मोशे यांची वंशावळी ही होती. 2 अहरोनाच्या पुत्रांची नावे: प्रथम जन्मलेला नादाब, मग अबीहू, एलअज़ार व इथामार. 3 अहरोनाच्या ज्या पुत्रांचा याजक म्हणून अभिषेक करण्यात आला आणि निवासमंडपात सेवा करण्यासाठी समर्पित करण्यात आले, त्यांची ही वरील नावे होती. 4 नादाब व अबीहूनी सीनायच्या रानात अनाधिकृत अग्नी वापरल्यामुळे ते याहवेहसमोर मरण पावले, त्यांना पुत्र नसल्यामुळे एलअज़ार व इथामारनी त्यांचे वडील अहरोनाच्या जीवनकाळात याजक म्हणून सेवा केली. 5 याहवेह मोशेला म्हणाले, 6 “लेवीच्या गोत्राने अहरोन याजकाला मदत करावी म्हणून तू त्यांना त्याच्यासमोर सादर कर. 7 त्यांनी सभामंडपात त्याच्यासाठी आणि संपूर्ण समुदायासाठी निवासमंडपाचे काम करून कर्तव्ये पार पाडावीत. 8 सभामंडपाच्या सर्व सामानाची त्यांनी काळजी घ्यावी, निवासमंडपाचे काम करून इस्राएली लोकांची कर्तव्ये पूर्ण करावी. 9 वास्तव लेव्यांना अहरोन आणि त्याच्या पुत्रांच्या हाती द्यावे; संपूर्ण इस्राएली लोकांमधून ते अहरोनाला पूर्णपणे देण्यात आलेले आहेत. 10 याजकाची सेवा करण्यासाठी अहरोन व त्याच्या पुत्रांची नेमणूक करावी. इतर दुसरे कोणी पवित्रस्थानाच्या जवळ आले, तर त्यास जिवे मारावे.” 11 आणि याहवेह मोशेला म्हणाले, 12 “इस्राएली लोकांतील प्रत्येक स्त्रीच्या पोटी प्रथम जन्मलेल्या पुत्रांच्या ऐवजी मी लेव्यांना घेतले आहे. लेवी लोक माझे आहेत, 13 कारण सर्व प्रथम जन्मलेले माझे आहेत. ज्या दिवशी इजिप्तमध्ये मी सर्व प्रथम जन्मलेले मारून टाकले, त्या दिवशी इस्राएलातील प्रत्येक प्रथम जन्मलेले मी माझ्यासाठी समर्पित करून घेतले, ते मनुष्य असो किंवा पशू, ते माझे आहेत, मीच याहवेह आहे.” 14 याहवेहने पुन्हा मोशेला सीनाय रानात सांगितले, 15 “आता तू लेवींची त्यांच्या घराण्यानुसार व कुळानुसार गणती करावी. एक महिन्याच्या व त्यापेक्षा जास्त वयाच्या प्रत्येक पुरुषाची गणती करावी.” 16 याहवेहच्या आज्ञेनुसार मोशेने लेव्यांची गणती केली. 17 लेवीच्या पुत्रांची नावे ही: गेर्षोन, कोहाथ आणि मरारी. 18 गेर्षोनाच्या कुळांची नावे ही होती: लिब्नी आणि शिमी. 19 कोहाथाची कुळे: अम्राम, इसहार, हेब्रोन आणि उज्जीएल. 20 मरारीची कुळे: महली आणि मूशी. 21 लिब्नी व शिमी ही कुळे गेर्षोनापासून होती; ही गेर्षोनी कुळे होती. 22 एक महिना किंवा त्याहून अधिक वयाच्या सर्व

पुरुषांची संख्या 7,500 होती. 23 गेर्षोनी कुळांनी निवासमंडपाच्या मागे पश्चिमेकडे डेरा द्यावा. 24 गेर्षोनी घराण्याचा प्रमुख लाएलचा पुत्र एलीआसाफ होता. 25 सभामंडपात गेर्षोनी लोकांची जबाबदारी ही होती की, त्यांनी निवासमंडप व तंबू, त्याचे आच्छादन, सभामंडपाच्या प्रवेशद्वाराचा पडदा, 26 आणि अंगणाचे पडदे, निवासमंडप आणि वेदीच्या सभोवतालच्या अंगणाच्या प्रवेशद्वाराचा पडदा आणि दोऱ्या व त्याच्या वापराशी संबंधित जे सर्वकाही आहे यांची काळजी घ्यावी. 27 अम्रामी, इसहारी, हेब्रोनी आणि उज्जीएली हे कोहाथी कुळाचे होते; ही कोहाथची कुळे होती. 28 एक महिना किंवा त्याहून अधिक वयाच्या सर्व पुरुषांची संख्या 8,600 होती. पवित्रस्थानाची काळजी घेण्याची जबाबदारी कोहाथी लोकांकडे होती. 29 कोहाथी कुळांनी निवासमंडपाच्या दक्षिणेकडे डेरे द्यायचे होते. 30 उज्जीएलचा पुत्र एलीजाफान हा कोहाथी कुळांचा पुढारी होता. 31 कोश, मेज, दीपस्तंभ, वेद्या, पवित्रस्थानाच्या सेवेत वापरली जाणारी उपकरणे, पडदा आणि त्यांच्या वापराशी संबंधित सर्व गोष्टींची काळजी घेण्यास ते जबाबदार होते. 32 अहरोन याजकाचा पुत्र एलअज़ार हा लेवींचा प्रमुख पुढारी होता. पवित्रस्थानाची काळजी घेण्याची जबाबदारी असलेल्यांवर त्याची नेमणूक करण्यात आली होती. 33 महली व मूशी हे कुळे मरारीपासून होते. ही मरारी कुळे होती. 34 एक महिना किंवा त्याहून अधिक वयाच्या सर्व पुरुषांची संख्या सहा हजार दोनशे होती. 35 अबीहाईलाचा पुत्र जूरीएल हा मरारी घराण्यांच्या कुळांचा पुढारी होता. त्यांनी निवासमंडपाच्या उत्तरेला डेरे द्यायचे होते. 36 मरारी लोकांची नेमणूक निवासमंडपाच्या फळया, अडसर, खांब, बैठका, त्याची सर्व उपकरणे आणि त्यांच्या वापरा संबंधित सर्व गोष्टींची काळजी घेण्यासाठी, 37 तसेच अंगणाच्या आजूबाजूच्या बैठका, तंबूच्या मेखा आणि दोऱ्या यावर करण्यात आली होती. 38 मोशे आणि अहरोन आणि त्याच्या पुत्रांनी निवासमंडपाच्या पूर्वेला, सूर्योदयाच्या दिशेने, सभामंडपासमोर डेरा द्यायचा होता. इस्राएली लोकांच्या वतीने पवित्रस्थानाची काळजी घेण्याची जबाबदारी त्यांच्याकडे होती. इतर कोणीही पवित्रस्थानाजवळ आले तर त्याला जिवे मारले जावे. 39 याहवेहच्या आज्ञेप्रमाणे मोशे व अहरोन यांनी लेवी लोकांची त्यांच्या कुळानुसार एक महिन्याचे व अधिक वयाचे पुरुष यांची गणती केली, ते एकूण 22,000 होते. 40 मग याहवेह मोशेला म्हणाले, “इस्राएली लोकांतील एक महिन्याच्या व त्याहून अधिक वयाच्या प्रथम जन्मलेल्या सर्व पुरुषांची गणती करून त्यांच्या नावांची यादी करावी. 41 आणि इस्राएली लोकांच्या सर्व प्रथम जन्मलेल्यांच्या ऐवजी लेव्यांना माझ्यासाठी घ्यावे आणि इस्राएली लोकांच्या पशूतील सर्व प्रथम जन्मलेल्या वत्सांऐवजी, लेव्याच्या पशूंना माझ्यासाठी घ्यावे. मीच याहवेह आहे.” 42 याहवेहच्या आज्ञेप्रमाणे मोशेने इस्राएल लोकांच्या प्रथम जन्मलेल्या सर्वांची गणती केली. 43 एक महिना व त्याहून अधिक वयाच्या प्रथम जन्मलेल्या पुरुषांची एकूण संख्या 22,273 होती. 44 याहवेह मोशेला आणखी म्हणाले, 45 “इस्राएली लोकांच्या सर्व प्रथम जन्मलेल्यांच्या ऐवजी लेवी लोकांना घे आणि त्यांच्या पशूंच्या ऐवजी लेव्यांचे पशू घ्यावे. लेवी लोक माझे असावेत. मीच याहवेह आहे. 46 273 इस्राएली लोकांचे प्रथम जन्मलेले जे लेव्यांपेक्षा अधिक आहेत त्यांची खंडणी भरण्यासाठी, 47 प्रत्येकामागे पवित्रस्थानाच्या शेकेलाप्रमाणे पाच शेकेल घे; म्हणजेच वीस गेरा. 48 आणि इस्राएली लोकांतील जे अधिक होते त्यांच्या खंडणीचे पैसे अहरोन आणि त्याच्या पुत्रांना द्यावे.” 49 मोशेने लेव्यांपेक्षा जे अधिक होते त्यांच्याकडून त्यांच्या खंडणीचे पैसे गोळा केले. 50 इस्राएली लोकांच्या प्रथम जन्मलेल्यांकडून त्याने पवित्रस्थानाच्या शेकेलनुसार 1,365 गोळा केले. 51 याहवेहच्या वचनाप्रमाणे झालेल्या आज्ञेनुसार मोशेने ते खंडणीचे पैसे अहरोन व त्याच्या पुत्रांना दिले.

**4** याहवेह मोशेला आणि अहरोनाला म्हणाले: 2 “लेवींच्या शाखेतील कोहाथी लोकांची त्यांच्या कुळांनुसार व घराण्यानुसार जनगणना करा. 3 म्हणजे सभामंडपाच्या कामाची सेवा करण्यास जे सर्व तीस ते पन्नास वर्षे वयाचे पुरुष आहेत, त्यांची गणती करावी. 4 “सभामंडपातील परमपवित्र वस्तूंची काळजी घेण्याचे काम कोहाथी लोकांचे आहे. 5 ज्यावेळी छावणी पुढे चालण्यास निघेल, त्यावेळी अहरोन आणि त्याच्या पुत्रांनी आत जाऊन आडपडदा खाली काढून तो कराराच्या नियमाच्या कोशावर ठेवावा. 6 मग त्यांनी तो पडदा टिकाऊ चर्माने झाकावा व त्यावर निळया रंगाचे कापड पसरावे आणि कोशाचे दांडे त्याच्या जागी बसवावे. 7 “समक्षतेच्या मेजावर त्यांनी निळया रंगाचे कापड पसरावे आणि त्यावर बशा, ताट, वाट्या आणि पेयार्पणासाठी कलश ठेवावे; आणि निरंतरची अर्पणाची भाकर त्यावर असावी. 8 त्यांनी त्यावर किरमिजी रंगाचे एक कापड पसरावे आणि त्यावर टिकाऊ चर्माचे आच्छादन घालावे व मेजाचे दांडे त्यांच्या जागी बसवावेत. 9 “यानंतर त्यांनी प्रकाश देणारा दीपस्तंभ व त्यावरील दिवे, वातीचे चिमटे व त्यांची तबके आणि जैतुनाच्या तेलाचे वाटप करण्यासाठी त्याचे सर्व कलश हे सर्व निळया कापडाने झाकावे. 10 मग त्यांनी ती सगळी उपकरणे टिकाऊ चर्माच्या आच्छादनात गुंडाळून ते वाहून नेण्याच्या फळीवर ठेवावे. 11 “मग त्यांनी सोन्याच्या वेदीवर निळे कापड पसरावे व ते टिकाऊ चर्माने झाकावे आणि वेदीचे दांडे त्यांच्या जागी बसवावेत. 12 “पवित्रस्थानाच्या सेवेसाठी वापरात आणली जाणारी सर्व पात्रे निळया कापडात गुंडाळावीत व त्यावर टिकाऊ चर्माचे आच्छादन घालावे आणि ती वाहून नेण्याच्या फळीवर ठेवावी. 13 “कास्य वेदीवरील सर्व राख काढावी आणि वेदी जांभळया रंगाच्या कापडाने झाकावी. 14 मग वेदीच्या सेवेसाठी वापरात येणारी सर्व पात्रे म्हणजे अग्निपात्रे, मांसाचे काटे, फावडी आणि शिंपडण्याचे कटोरे त्यावर ठेवावे. मग त्यावर टिकाऊ चर्माचे आच्छादन घालावे आणि त्याचे दांडे त्यांच्या जागी बसवावेत. 15 “नंतर अहरोन आणि त्याच्या पुत्रांनी सर्व पवित्र साहित्य व पवित्र उपकरणे यावर आच्छादन घालण्याचे काम संपविल्यावर, जेव्हा छावणी पुढे जाण्यास सज्ज होईल, त्याचवेळी कोहाथी कुळाने ते वाहून नेण्यास पुढे यावे. परंतु त्यांनी पवित्र वस्तूंना स्पर्श करू नये, नाहीतर ते मरतील. कोहाथी लोकांनी सभामंडपातील

वस्तू वाहून न्यावयाच्या आहेत. 16 “दिव्याचे तेल, सुगंधी धूप, रोजचे
अन्नार्पण व अभिषेकाचे तेल, संपूर्ण निवासमंडप आणि त्यातील सर्व
साहित्य, त्याचे पवित्र साहित्य व उपकरणे यांची जबाबदारी अहरोन
याजकाचा पुत्र एलअज़ारकडे असावी.” 17 याहवेहने मोशे व अहरोन
यांना म्हटले, 18 “कोहाथी गोत्राच्या कुळाचा लेव्यांमधून नाश होऊ
नये, 19 आणि ते जेव्हा परमपवित्र वस्तूंच्या जवळ येतात तेव्हा त्यांनी
मरू नये पण जगावे म्हणून त्यांच्यासाठी असे करावे: अहरोन आणि
त्याच्या पुत्रांनी पवित्रस्थानात जावे आणि प्रत्येकाने काय वाहून न्यावे हे
त्यांना दाखवावे. 20 परंतु कोहाथी लोकांनी पवित्र वस्तू पाहण्यासाठी
एक क्षणभरही आत जाऊ नये. नाहीतर ते मरण पावतील.” 21
याहवेह मोशेला म्हणाले, 22 गेर्षोनी लोकांची त्यांचे घराणे व कूळ
यानुसार जनगणना करावी. 23 म्हणजे सभामंडपाच्या कामाची सेवा
करण्यास तीस ते पन्नास वर्षे वयाच्या सर्व पुरुषांची गणती करावी.
24 “वाहून नेणे व त्यांची इतर कामे करणे, ही गेर्षोनी कुळांची सेवा
आहे: 25 त्यांनी निवासमंडपाचे पडदे, सभामंडप व त्याचे आच्छादन व
त्याचे टिकाऊ चर्माचे बाहेरील आच्छादन, सभामंडपाच्या प्रवेशद्वाराचा
पडदा वाहून न्यावा. 26 निवासमंडप आणि वेदीच्या सभोवतालच्या
अंगणाचे पडदे, अंगणाच्या प्रवेशद्वाराचा पडदा, दोर्‍या आणि मंडपातील
सेवा करण्यासाठी वापरलेली सर्व उपकरणे. या संबंधीच्या ज्यागोष्टी
करण्याची गरज आहे, त्या गेर्षोनी लोकांनी कराव्यात. 27 गेर्षोनी
लोकांनी सर्व सेवा, वाहून नेण्यासंबंधी असो किंवा इतर कामे असो, ती
अहरोन आणि त्याच्या पुत्रांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडावी. त्यांनी जे
काही वाहून न्यायचे आहे ते त्यांना त्यांची जबाबदारी म्हणून तू नेमून
द्यावे. 28 सभामंडपात गेर्षोनी कुळांनी करावयाची सेवा ती हीच आहे.
त्यांची कर्तव्ये अहरोन याजकाचा मुलगा इथामार याच्या मार्गदर्शनाखाली
असावीत. 29 “मरारी लोकांची त्यांचे कूळ व घराणे यानुसार गणती
करावी. 30 म्हणजे सभामंडपाच्या कामाची सेवा करण्यास सर्व तीस ते
पन्नास वर्षे वयाच्या पुरुषांची गणती करावी. 31 सभामंडपातील त्यांच्या
सेवेचा भाग म्हणून, त्यांनी निवासमंडपाच्या फळया, त्याची अडसरे,
खांब आणि बैठका वाहून न्याव्या, 32 त्याचप्रमाणे सभोवतालच्या
अंगणाचे खांब, त्यांच्या बैठका, मेखा, दोर्‍या, त्याची सर्व उपकरणे
आणि त्याच्या वापरासंबंधीचे सर्व साहित्य न्यावे. ज्या पुरुषाने जी
ठराविक वस्तू वाहून न्यावयाची आहे ती त्याला नेमून द्यावी. 33 अहरोन
याजकाचा पुत्र इथामार याच्या मार्गदर्शनाखाली राहून सभामंडपात जी
सेवा मरारी कुळांनी करावयाची आहे ती हीच आहे.” 34 मोशे, अहरोन
आणि समुदायाच्या पुढाऱ्यांनी कोहाथी लोकांची, त्यांचे कूळ व घराणे
यानुसार गणती केली. 35 सभामंडपाच्या कामाची सेवा करण्यास जे
सर्व तीस ते पन्नास वर्षे वयाचे पुरुष आले होते, 36 त्यांची संख्या
कुळांनुसार 2,750 होती. 37 सभामंडपात सेवा करणाऱ्या सर्व कोहाथी
कुळाची ही एकूण संख्या होती. मोशेद्वारे याहवेहने आज्ञा दिल्यानुसार
मोशे आणि अहरोनाने त्यांची गणती केली. 38 गेर्षोनी लोकांची त्यांचे
कूळ व घराणे यानुसार गणती केली. 39 सभामंडपाच्या कामाची सेवा
करण्यास सर्व तीस ते पन्नास वर्षे वयाचे पुरुष आले होते, 40 त्यांचे
कूळ व घराणे यानुसार ते 2,630 होते. 41 सभामंडपात सेवा करणाऱ्या
सर्व गेर्षोनी कुळाची ही एकूण संख्या होती. मोशेद्वारे याहवेहने आज्ञा
दिल्यानुसार मोशे आणि अहरोनाने त्यांची गणती केली. 42 मरारी
लोकांची त्यांचे कूळ व घराणे यानुसार गणती केली. 43 सभामंडपाच्या
कामाची सेवा करण्यास जे सर्व तीस ते पन्नास वर्षे वयाचे पुरुष आले
होते, 44 त्यांच्या कुळानुसार ते 3,200 गणले गेले. 45 सभामंडपात
सेवा करणाऱ्या सर्व मरारी कुळाची ही एकूण संख्या होती. मोशेद्वारे
याहवेहने आज्ञा दिल्यानुसार मोशे आणि अहरोनाने त्यांची गणती केली.
46 मोशे, अहरोन आणि इस्राएलच्या पुढाऱ्यांनी सर्व लेवींची, त्यांचे
कूळ व घराणे यानुसार गणती केली. 47 सभामंडपाच्या कामाची सेवा
करण्यास सर्व तीस ते पन्नास वर्षे वयाचे पुरुष आले होते, 48 त्यांची
संख्या 8,580 भरली. 49 याहवेहने मोशेद्वारे आज्ञा दिल्याप्रमाणे
प्रत्येकाला आपले काम व त्यांनी काय वाहून न्यावे हे नेमून देण्यात
आले. अशाप्रकारे याहवेहने दिलेल्या आज्ञेप्रमाणे प्रत्येकाची गणती
करण्यात आली.

**5** याहवेहने मोशेला म्हटले, 2 इस्राएली लोकांना आज्ञा दे की, ज्यांना
चर्मरोग आहे किंवा कोणत्याही प्रकारचा स्राव आहे किंवा जो
मृतदेहाच्या विधीमुळे अशुद्ध झाला आहे, त्यांना छावणीबाहेर पाठवून
द्यावे. 3 मग ते स्त्री असो किंवा पुरुष; त्यांना बाहेर पाठवावे. ज्या
छावणीत मी तुमच्यामध्ये राहतो, ती त्यांच्यामुळे भ्रष्ट होऊ नये, म्हणून
त्यांना बाहेर पाठवावे. 4 त्याप्रमाणे इस्राएली लोकांनी केले; त्यांनी
त्यांना छावणीबाहेर पाठविले. याहवेहने मोशेला सूचना दिली होती
तसेच त्यांनी केले. 5 याहवेह मोशेला म्हणाले, 6 “इस्राएली लोकांस
सांग, ‘जेव्हा कोणी पुरुष किंवा स्त्री एखाद्याविरुद्ध कोणताही अपराध
करेल, तो याहवेहच्या विरुद्ध विश्वासघात असून तो दोषी आहे. 7 त्यांनी
केलेले पाप कबूल करावे. त्यांनी केलेल्या पापाची पूर्ण भरपाई करून
द्यावी, त्यात त्याचा पाचवा भाग मिळवून ज्या व्यक्तीविरुद्ध पाप केला
आहे त्याला द्यावा. 8 परंतु पापाची भरपाई करण्यासाठी त्या व्यक्तीचा
कोणीही जवळचा नातेवाईक नसेल तर ती भरपाई याहवेहची असावी
आणि पापासाठी प्रायश्चित करण्याच्या मेंढ्यासह ती याजकाकडे द्यावी.
9 सर्व पवित्र भेटी, ज्या इस्राएली लोक याजकाकडे आणतात त्या
याजकाच्या व्हाव्या. 10 पवित्र वस्तू त्यांच्या मालकाच्या आहेत, परंतु ते
जे याजकाला देतात, ते याजकाच्या मालकीचे होईल.’” 11 मग याहवेह
मोशेला म्हणाले, 12 “इस्राएली लोकांशी बोल आणि त्यांना सांग: जर
एखाद्या मनुष्याच्या पत्नीचे वाकडे पाऊल पडले आणि ती त्याच्याशी
अविश्वासूपणे वागली, 13 जेणेकरून दुसऱ्या पुरुषाचे तिच्याशी लैंगिक
संबंध असले आणि हे तिच्या पतीपासून गुपित असेल आणि तिची
अशुद्धता उघडकीस आली नाही (कारण तिच्याविरुद्ध कोणीही साक्षीदार
नाही आणि ती त्या कृत्यात पकडली गेली नाही), 14 आणि जर तिच्या
पतीला मत्सराची भावना झाली आणि तो आपल्या पत्नीवर संशय घेतो
की ती अशुद्ध आहे—किंवा त्याच्या मनात मत्सराची भावना निर्माण

झाली आणि ती जरी अशुद्ध नसली तरीही तो संशय घेतो— 15 तर
त्याने आपल्या पत्नीला याजकाकडे न्यावे. त्याने तिच्या वतीने सोबत
एक एफाचा दहावा भाग जवाचे पीठ आणावे. त्याने त्यावर जैतुनाचे
तेल ओतू नये किंवा त्यावर धूप ठेवू नये, कारण हे मत्सरासाठी केलेले
अन्नार्पण आहे, अपराधाची आठवण देणारे स्मरणाचे अर्पण आहे.
16 "'याजकाने त्या स्त्रीला आणावे आणि तिला याहवेहसमोर उभे
करावे. 17 मग याजकाने मातीच्या पात्रात पवित्र पाणी घ्यावे आणि
निवासमंडपाच्या भूमीवरील थोडी धूळ घेऊन त्या पाण्यात टाकावी.
18 नंतर याजकाने तिला याहवेहपुढे उभे केल्यानंतर, त्याने तिचे केस
मोकळे सोडावे आणि तिच्या स्मरणाचे अर्पण, मत्सरासाठी केलेले
अन्नार्पण तिच्या हातावर ठेवावे व त्याने शाप आणणारे कडू पाणी
आपल्या हाती घ्यावे. 19 मग याजकाने त्या स्त्रीला शपथ घालून म्हणावे,
"जर कोणी पुरुषाने तुझ्याशी लैंगिक संबंध ठेवलेले नाहीत आणि तू
आपल्या पतीशी विवाहित असताना निर्दोष असून वाकडे पाऊल टाकले
नाही, तर या कडू पाण्यापासून मिळणारा शाप तुला अपाय न करो. 20
परंतु जर तू तुझ्या पतीशी विवाहित असतानाही वाकडे पाऊल टाकले
आहे आणि आपल्या पती व्यतिरिक्त इतर पुरुषाशी लैंगिक संबंध ठेवून
स्वतःला भ्रष्ट केले आहेस— 21 यावेळी याजकाने त्या स्त्रीस शपथ
देऊन या शापाखाली आणावे—जेव्हा याहवेह तुझ्या उदराचा गर्भपात
करेल आणि तुझे पोट फुगेल, तेव्हा याहवेह तुला तुझ्या लोकांमध्ये
शापित करो. 22 शाप देणारे हे पाणी तुझ्या शरीरात जावो, म्हणजे तुझे
पोट फुगेल किंवा तुझा गर्भपात होईल." "'मग त्या स्त्रीने म्हणावे,
"आमेन. असेच होवो." 23 "'तेव्हा याजकाने हे शापाचे शब्द एका
गुंडाळीवर लिहून ते शब्द त्या कडू पाण्यात धुवावे. 24 ज्या पाण्यापासून
शाप येईल ते कडू पाणी त्याने तिला प्यायला द्यावे आणि हे पाणी जे
शाप व कडवट कष्ट आणते ते तिच्यात प्रवेश करेल. 25 याजकाने ते
मत्सराचे अन्नार्पण त्या स्त्रीच्या हातातून घ्यावे व याहवेहस ओवाळत ते
वेदीकडे आणावे. 26 त्या अन्नार्पणाचे प्रतीक म्हणून याजकाने त्या
अर्पणातील मूठभर अन्न घेऊन ते वेदीवर जाळावे; व त्यानंतर त्याने ते
पाणी त्या स्त्रीला प्यायला द्यावे. 27 जर ती आपल्या पतीशी अविश्वासू
राहून तिने स्वतःला भ्रष्ट केले असेल, तर त्याचा परिणाम असा असेल:
जेव्हा तिला ते शाप आणि कडवट कष्ट आणणारे पाणी पाजले जाईल,
ते तिच्या शरीरात जाईल, तिचे पोट फुगेल आणि तिचे उदर गर्भपात
करेल आणि ती शापित होईल. 28 पण त्या स्त्रीने जर स्वतःला भ्रष्ट
केलेले नाही आणि ती शुद्ध असेल, तर ती निर्दोष ठरविली जाईल आणि
तिला मुलेबाळे होतील. 29 "'जेव्हा एखादी स्त्री तिच्या पतीशी विवाहित
असतानाही स्वतःला भ्रष्ट करते तेव्हा हा मत्सराचा नियम असावा, 30
किंवा जेव्हा एखाद्या पुरुषाच्या मनात मत्सराची भावना येते, कारण तो
आपल्या पत्नीवर संशय घेतो, याजकाने तिला याहवेहसमोर उभे करावे
आणि हा संपूर्ण नियम तिला लागू करावा. 31 तिचा पती कोणत्याही
अन्यायापासून निर्दोष असेल, परंतु ती स्त्री आपल्या पापाचे परिणाम
भोगेल.'"

**6** मग याहवेह मोशेला म्हणाले, 2 "इस्राएली लोकांशी बोल व त्यांना
सांग: एखादा पुरुष किंवा स्त्री याहवेहला समर्पित नाजीर होण्याचा
एक विशेष नवस करू इच्छितात, 3 तर त्या नाजीरांनी द्राक्षारस व
इतर आंबलेले पेय वर्ज्य करावे आणि त्यांनी द्राक्षारसाचा शिरका किंवा
इतर आंबलेले पेय पिऊ नये. त्यांनी द्राक्षाचा रस पिऊ नये किंवा द्राक्षे
किंवा मनुकेही खाऊ नयेत. 4 जोपर्यंत ते नाजीराच्या नवसाखाली
असतील, तोपर्यंत त्यांनी द्राक्षवेलीचा कोणताही उपज, साल व बीज
सुद्धा खाऊ नये. 5 "'नाजीरपणाच्या संपूर्ण काळात त्यांच्या डोक्यावर
वस्तरा फिरवू नये. त्यांनी याहवेहला समर्पित केलेला नवसाच्या काळ
संपेपर्यंत त्यांनी पवित्र असावे; त्यांनी आपले केस लांब वाढू द्यावेत. 6
"'याहवेहला समर्पित केलेल्या त्यांच्या संपूर्ण कालावधीत, नाजीराने
मृतदेहाजवळ जाऊ नये. 7 त्यांचे स्वतःचे वडील किंवा आई किंवा भाऊ
किंवा बहीण जरी मरण पावले, तरीही त्यांच्यामुळे त्यांनी स्वतःला
विधिपूर्वक अशुद्ध करू नये, कारण परमेश्वराला समर्पित केल्याचे प्रतीक
त्यांच्या डोक्यावर आहे. 8 समर्पित केलेल्या त्यांच्या संपूर्ण कालावधीत
ते याहवेहसाठी पवित्र आहेत. 9 "'जर नाजीराच्या समक्षतेत कोणी
अचानक मरण पावला, तर त्यांच्या डोक्यावरील केस, समर्पणाचे
प्रतीक विटाळले जाते, त्यावेळी सातव्या दिवशी; शुद्धीकरणाच्या दिवशी
त्यांनी आपले मुंडण करावे. 10 मग आठव्या दिवशी त्यांनी दोन
कबुतरे किंवा पारव्यांची दोन पिल्ले सभामंडपाच्या दाराशी याजकाकडे
आणावी. 11 मग नाजीरासाठी याजकाने त्यापैकी एक पापार्पण व
दुसरा होमार्पणाचे प्रायश्चित म्हणून अर्पण करावा, कारण मृतदेहाच्या
समक्षतेत राहून त्यांनी पाप केले. त्याच दिवशी त्यांनी पुन्हा आपले
डोके पवित्र करावे. 12 आणि त्यांनी आपला नाजीरपणाचा काळ
याहवेहसाठी पुनर्समर्पित करावा आणि दोषार्पण म्हणून एक वर्षाचा
कोकरा आणावा. आधीचे दिवस मोजले जाणार नाही, कारण त्यांच्या
समर्पित असलेल्या काळात ते विटाळले गेले. 13 "'आणि त्यांचा
समर्पणाचा काळ संपल्यानंतर नाजीरांसाठी हा नियम असावा. त्यांना
सभामंडपाच्या दाराशी आणावे, 14 त्या ठिकाणी त्यांनी याहवेहसाठी ही
अर्पणे सादर करावी: होमार्पणासाठी एक वर्षाचा निर्दोष कोकरा व
पापार्पणासाठी मेंढी आणावी व शांत्यर्पणाच्या अर्पणासाठी निर्दोष
गोऱ्हा आणावा. 15 त्याबरोबर त्यांचे अन्नार्पण व पेयार्पण आणि
एक टोपलीभर सपिठाची आणि बेखमीर भाकरी—जैतुनाच्या तेलात
मळलेल्या जाड भाकरी व जैतुनाचे तेल लावलेल्या पातळ भाकरी
आणाव्या. 16 "'याजकाने ही अर्पणे याहवेहसमोर सादर करून पापार्पण
व होमार्पण करावे. 17 याजकाने बेखमीर भाकरीची टोपली सादर
करावी व अन्नार्पण व पेयार्पण याबरोबर याहवेहसाठी शांत्यर्पण म्हणून
गोऱ्हाचा यज्ञ करावा. 18 "'मग नाजीराने आपल्या डोक्यावरील केस जे
त्यांच्या समर्पणाचे प्रतीक आहे, ते सभामंडपाच्या दारात मुंडवावे. मग
ते केस घेऊन त्यांनी शांत्यर्पणाखाली असलेल्या अग्नीत टाकावे. 19
"'नाजीराने आपल्या डोक्यावरील केस जे त्यांच्या समर्पणाचे प्रतीक
आहे ते मुंडण केल्यानंतर, याजकाने त्यांच्या हातात गोऱ्हाचा उकळलेला

खांद्याचा भाग व खमीर न घालता बनविलेल्या दोन्ही, एक जाड व
एक पातळ भाकर ठेवावी. 20 नंतर याजकाने ते हेलावणीचे अर्पण
म्हणून याहवेहपुढे ओवाळावे; ते पवित्र आहे; त्याचबरोबर ओवाळलेला
उराचा भाग आणि सादर केलेला मांडीचा भाग याजकासाठी असावा.
यानंतर नाजीर द्राक्षारस पिऊ शकतो. 21 "'हा नाजीराचा नियम आहे,
जे आपल्या समर्पणानुसार याहवेहला अर्पण करण्याचा नवस करतात,
त्या खेरीज त्यांना परवडेल त्यानुसार आणावे. नाजीराच्या नियमानुसार
केलेले नवस त्यांनी पूर्ण केले पाहिजे.'" 22 याहवेह मोशेला म्हणाले, 23
अहरोन आणि त्याच्या पुत्रांना सांग, "तुम्ही इस्राएली लोकांस आशीर्वाद
देतांना असे म्हणावे: 24 "'"याहवेह तुम्हाला आशीर्वाद देवो आणि
तुमचे संरक्षण करो; 25 याहवेह आपला मुखप्रकाश तुमच्यावर पाडो
आणि तुमच्यावर कृपा करो; 26 याहवेह आपले मुख तुमच्याकडे लावो,
आणि तुम्हाला शांती देवो."' 27 "अशा रीतीने ते माझे नाव इस्राएली
लोकांना ठेवतील आणि मी त्यांना आशीर्वादित करेन."

**7** जेव्हा मोशेने निवासमंडप उभारण्याचे काम संपविले, तेव्हा त्याने
निवासमंडप व त्यातील सामानावर अभिषेक केला व ते पवित्र
केले. त्याने वेदी व त्याची सर्व पात्रे सुद्धा अभिषिक्त करून ती पवित्र
केली. 2 मग इस्राएलचे पुढारी, घराण्यांचे प्रमुख जे त्यांच्या गोत्राचे
पुढारी होते, ज्यांची मोजणी करण्यात आली होती, त्यांच्यावर जे
देखरेख करणारे होते, त्यांनी अर्पणे आणली. 3 त्यांनी याहवेहपुढे भेटी
म्हणून आणले ते हे—आच्छादन असलेल्या सहा गाड्या व बारा बैल;
प्रत्येक पुढाऱ्यामागे एक बैल आणि दोन पुढाऱ्यांमागे एक गाडी. हे
सर्व त्यांनी निवासमंडपासमोर सादर केले. 4 याहवेहने मोशेला म्हटले,
5 "तू त्यांच्याकडून ते स्वीकार आणि त्यांचा उपयोग सभामंडपाच्या
कामासाठी करावा. जसे प्रत्येक व्यक्तीच्या कामास लागेल तसे ते
लेव्यांच्या हाती दे." 6 तेव्हा मोशेने त्या गाड्या आणि ते बैल घेतले
व लेव्यांना दिले. 7 गेर्षोन कुळाला त्यांच्या कामाच्या गरजेनुसार
त्याने दोन गाड्या व चार बैल दिले. 8 आणि त्याने मरारी कुळाला
त्यांच्या कामाच्या गरजेनुसार चार गाड्या व आठ बैल दिले. ते सर्व
अहरोन याजकाचा पुत्र इथामार याच्या नेतृत्वाखाली होते. 9 कोहाथी
कुळाला मात्र मोशेने काहीही दिले नाही, कारण पवित्र वस्तू आपल्या
खांद्यांवर वाहून नेण्याच्या सेवेसाठी ते जबाबदार होते. 10 जेव्हा वेदीचा
अभिषेक करण्यात आला, पुढाऱ्यांनीही तिच्या समर्पणाची अर्पणे
आणली व ती वेदीपुढे सादर केली. 11 कारण याहवेहने मोशेला
सांगितले होते, "प्रत्येक दिवशी एका पुढाऱ्याने वेदीच्या समर्पणासाठी
अर्पणे आणावी." 12 पहिल्या दिवशी ज्याने अर्पणे आणली तो यहूदाह
गोत्रातील अम्मीनादाबाचा पुत्र नहशोन होता. 13 त्याचे अर्पण हे:
पवित्रस्थानाच्या शेकेलानुसार एकशे तीस शेकेल वजनाचे एक चांदीचे
ताट आणि सत्तर शेकेल वजनाचे शिंपडण्याचे चांदीचे भांडे, ही दोन्ही
अन्नार्पण म्हणून जैतुनाच्या तेलात मळलेल्या सपिठाने भरली होती;
14 दहा शेकेल वजनाचे धूपाने भरलेले एक सोन्याचे धूपपात्र. 15
होमार्पणासाठी एक तरुण बैल, एक गोऱ्हा आणि एक वर्षांचा कोकरा;
16 पापार्पणासाठी एक बोकड; 17 आणि शांत्यर्पणासाठी दोन बैल,
पाच गोऱ्हे, पाच बोकडे आणि एक वर्षाची पाच नरकोकरे. 18 दुसऱ्या
दिवशी इस्साखार वंशाचा प्रमुख सूवाराचा पुत्र नथानेलाने आपली अर्पणे
आणली. 19 त्याचे अर्पण हे: पवित्रस्थानाच्या शेकेलानुसार एकशे
तीस शेकेल वजनाचे एक चांदीचे ताट आणि सत्तर शेकेल वजनाचे
शिंपडण्याचे चांदीचे भांडे, ही दोन्ही अन्नार्पण म्हणून जैतुनाच्या तेलात
मळलेल्या सपिठाने भरली होती; 20 दहा शेकेल वजनाचे धूपाने भरलेले
एक सोन्याचे धूपपात्र; 21 होमार्पणासाठी एक तरुण बैल, एक गोऱ्हा
आणि एक वर्षाचा कोकरा; 22 पापार्पणासाठी एक बोकड; 23 आणि
शांत्यर्पणासाठी दोन बैल, पाच गोऱ्हे, पाच बोकडे आणि एक वर्षाची
पाच नरकोकरे. 24 तिसऱ्या दिवशी जबुलून वंशाचा प्रमुख, हेलोनाचा पुत्र
एलियाबाने आपले अर्पणे आणले. 25 त्याचे अर्पण हे: पवित्रस्थानाच्या
शेकेलानुसार एकशे तीस शेकेल वजनाचे एक चांदीचे ताट आणि सत्तर
शेकेल वजनाचे शिंपडण्याचे चांदीचे भांडे. ही दोन्ही अन्नार्पण म्हणून
जैतुनाच्या तेलात मळलेल्या सपिठाने भरली होती; 26 दहा शेकेल
वजनाचे धूपाने भरलेले एक सोन्याचे धूपपात्र; 27 होमार्पणासाठी एक
तरुण बैल, एक गोऱ्हा आणि एक वर्षाचा कोकरा; 28 पापार्पणासाठी
एक बोकड; 29 आणि शांत्यर्पणासाठी दोन बैल, पाच गोऱ्हे, पाच
बोकडे आणि एक वर्षाची पाच नरकोकरे. 30 चौथ्या दिवशी रऊबेन
वंशाचा प्रमुख शदेयुराचा पुत्र एलीसूराने आपले अर्पण आणले. 31 त्याचे
अर्पण हे: पवित्रस्थानाच्या शेकेलानुसार एकशे तीस शेकेल वजनाचे
एक चांदीचे ताट आणि सत्तर शेकेल वजनाचे शिंपडण्याचे चांदीचे भांडे,
ही दोन्ही अन्नार्पण म्हणून जैतुनाच्या तेलात मळलेल्या सपिठाने भरली
होती; 32 दहा शेकेल वजनाचे धूपाने भरलेले एक सोन्याचे धूपपात्र; 33
होमार्पणासाठी एक तरुण बैल, एक गोऱ्हा आणि एक वर्षाचा कोकरा;
34 पापार्पणासाठी एक बोकड; 35 आणि शांत्यर्पणासाठी दोन बैल,
पाच गोऱ्हे, पाच बोकडे आणि एक वर्षाची पाच नरकोकरे. 36 पाचव्या
दिवशी शिमओन वंशाचा प्रमुख सुरीशादैचा पुत्र शेलुमीएलाने आपले
अर्पण आणले. 37 त्याचे अर्पण हे: पवित्रस्थानाच्या शेकेलानुसार
एकशे तीस शेकेल वजनाचे एक चांदीचे ताट आणि सत्तर शेकेल
वजनाचे शिंपडण्याचे चांदीचे भांडे, ही दोन्ही अन्नार्पण म्हणून जैतुनाच्या
तेलात मळलेल्या सपिठाने भरली होती; 38 दहा शेकेल वजनाचे धूपाने
भरलेले एक सोन्याचे धूपपात्र; 39 होमार्पणासाठी एक तरुण बैल,
एक गोऱ्हा आणि एक वर्षाचा कोकरा; 40 पापार्पणासाठी एक बोकड;
41 आणि शांत्यर्पणासाठी दोन बैल, पाच गोऱ्हे, पाच बोकडे आणि
एक वर्षाची पाच नरकोकरे. 42 सहाव्या दिवशी, गादच्या लोकांचा
पुढारी देउएलाचा पुत्र एलीआसाफाने आपले अर्पण आणले. 43 त्याचे
अर्पण हे: पवित्रस्थानाच्या शेकेलानुसार एकशे तीस शेकेल वजनाचे
एक चांदीचे ताट आणि सत्तर शेकेल वजनाचे शिंपडण्याचे चांदीचे भांडे,
ही दोन्ही अन्नार्पण म्हणून जैतुनाच्या तेलात मळलेल्या सपिठाने भरली
होती; 44 दहा शेकेल वजनाचे धूपाने भरलेले एक सोन्याचे धूपपात्र; 45
होमार्पणासाठी एक तरुण बैल, एक गोऱ्हा आणि एक वर्षाचा कोकरा;

46 पापार्पणासाठी एक बोकड; 47 आणि शांत्यर्पणासाठी दोन बैल,
पाच गोऱ्हे, पाच बोकडे आणि एक वर्षाची पाच नरकोकरे. 48 सातव्या
दिवशी एफ्राईम वंशाचा प्रमुख अम्मीहूदाचा पुत्र एलीशामाने आपले
अर्पण आणले. 49 त्याचे अर्पण हे: पवित्रस्थानाच्या शेकेलानुसार
एकशे तीस शेकेल वजनाचे एक चांदीचे ताट आणि सत्तर शेकेल
वजनाचे शिंपडण्याचे चांदीचे भांडे, ही दोन्ही अन्नार्पण म्हणून जैतुनाच्या
तेलात मळलेल्या सपिठाने भरली होती; 50 दहा शेकेल वजनाचे धूपाने
भरलेले एक सोन्याचे धूपपात्र; 51 होमार्पणासाठी एक तरुण बैल, एक
गोऱ्हा आणि एक वर्षाचा कोकरा; 52 पापार्पणासाठी एक बोकड; 53
आणि शांत्यर्पणासाठी दोन बैल, पाच गोऱ्हे, पाच बोकडे आणि एक
वर्षाची पाच नरकोकरे. 54 आठव्या दिवशी मनश्शेह वंशाचा प्रमुख
पदहसूरचा पुत्र गमलीएल याने आपले अर्पण आणले. 55 त्याचे अर्पण
हे: पवित्रस्थानाच्या शेकेलानुसार एकशे तीस शेकेल वजनाचे एक
चांदीचे ताट आणि सत्तर शेकेल वजनाचे शिंपडण्याचे चांदीचे भांडे, ही
दोन्ही अन्नार्पण म्हणून जैतुनाच्या तेलात मळलेल्या सपिठाने भरली
होती; 56 दहा शेकेल वजनाचे धूपाने भरलेले एक सोन्याचे धूपपात्र; 57
होमार्पणासाठी एक तरुण बैल, एक गोऱ्हा आणि एक वर्षाचा कोकरा;
58 पापार्पणासाठी एक बोकड; 59 आणि शांत्यर्पणासाठी दोन बैल,
पाच गोऱ्हे, पाच बोकडे आणि एक वर्षाची नर पाच कोकरे. 60 नवव्या
दिवशी बिन्यामीन वंशाचा प्रमुख गिदोनीचा पुत्र अबीदान याने आपले
अर्पण आणले. 61 त्याचे अर्पण हे: पवित्रस्थानाच्या शेकेलानुसार
एकशे तीस शेकेल वजनाचे एक चांदीचे ताट आणि सत्तर शेकेल
वजनाचे शिंपडण्याचे चांदीचे भांडे, ही दोन्ही अन्नार्पण म्हणून जैतुनाच्या
तेलात मळलेल्या सपिठाने भरली होती; 62 दहा शेकेल वजनाचे धूपाने
भरलेले एक सोन्याचे धूपपात्र; 63 होमार्पणासाठी एक तरुण बैल,
एक गोऱ्हा आणि एक वर्षाचा कोकरा; 64 पापार्पणासाठी एक बोकड;
65 आणि शांत्यर्पणासाठी दोन बैल, पाच गोऱ्हे, पाच बोकडे आणि
एक वर्षाची पाच नरकोकरे. 66 दहाव्या दिवशी दान वंशाचा प्रमुख
अम्मीशद्दायचा पुत्र अहीएजर याने आपले अर्पण आणले. 67 त्याचे
अर्पण हे: पवित्रस्थानाच्या शेकेलानुसार एकशे तीस शेकेल वजनाचे
एक चांदीचे ताट आणि सत्तर शेकेल वजनाचे शिंपडण्याचे चांदीचे भांडे,
ही दोन्ही अन्नार्पण म्हणून जैतुनाच्या तेलात मळलेल्या सपिठाने भरली
होती; 68 दहा शेकेल वजनाचे धूपाने भरलेले एक सोन्याचे धूपपात्र; 69
होमार्पणासाठी एक तरुण बैल, एक गोऱ्हा आणि एक वर्षाचा कोकरा;
70 पापार्पणासाठी एक बोकड; 71 आणि शांत्यर्पणासाठी दोन बैल, पाच
गोऱ्हे, पाच बोकडे आणि एक वर्षाची पाच नरकोकरे. 72 अकराव्या
दिवशी आशेर वंशाचा प्रमुख ओक्रानाचा पुत्र पगीयेल याने आपले
अर्पण आणले. 73 त्याचे अर्पण हे: पवित्रस्थानाच्या शेकेलानुसार एकशे
तीस शेकेल वजनाचे एक चांदीचे ताट आणि सत्तर शेकेल वजनाचे
शिंपडण्याचे चांदीचे भांडे, ही दोन्ही अन्नार्पण म्हणून जैतुनाच्या तेलात
मळलेल्या सपिठाने भरली होती; 74 दहा शेकेल वजनाचे धूपाने भरलेले
एक सोन्याचे धूपपात्र; 75 होमार्पणासाठी एक तरुण बैल, एक गोऱ्हा
आणि एक वर्षाचा कोकरा; 76 पापार्पणासाठी एक बोकड; 77 आणि
शांत्यर्पणासाठी दोन बैल, पाच गोऱ्हे, पाच बोकडे आणि एक वर्षाची
पाच नरकोकरे. 78 बाराव्या दिवशी नफताली वंशाचा प्रमुख एनानाचा
पुत्र अहीराने आपले अर्पण आणले. 79 त्याचे अर्पण हे: पवित्रस्थानाच्या
शेकेलानुसार एकशे तीस शेकेल वजनाचे एक चांदीचे ताट आणि सत्तर
शेकेल वजनाचे शिंपडण्याचे चांदीचे भांडे, ही दोन्ही अन्नार्पण म्हणून
जैतुनाच्या तेलात मळलेल्या सपिठाने भरली होती; 80 दहा शेकेल
वजनाचे धूपाने भरलेले एक सोन्याचे धूपपात्र; 81 होमार्पणासाठी एक
तरुण बैल, एक गोऱ्हा आणि एक वर्षाचा कोकरा; 82 पापार्पणासाठी
एक बोकड; 83 आणि शांत्यर्पणासाठी दोन बैल, पाच गोऱ्हे, पाच बोकडे
आणि एक वर्षाची पाच नरकोकरे. 84 जेव्हा वेदीचा अभिषेक झाला
तेव्हा इस्राएलच्या पुढाऱ्यांकडून तिच्या समर्पणाची अर्पणे ही होती: बारा
चांदीची ताटे, बारा शिंपडण्याचे भांडे आणि बारा सोन्याची पात्रे होती. 85
चांदीचे प्रत्येक ताट एकशे तीस शेकेल वजनाचे होते आणि शिंपडण्याचे
प्रत्येक भांडे सत्तर शेकेल वजनाचे होते. ते सर्व मिळून, चांदीची भांडी
पवित्रस्थानाच्या शेकेलानुसार दोन हजार चारशे शेकेल वजनाची होती.
86 धूपाने भरलेली सोन्याची बारा धूपपात्रे, प्रत्येकी दहा शेकेल वजनाची
होती. पवित्रस्थानाच्या शेकेलानुसार ते सोन्याचे पात्र एकशेवीस शेकेल
वजनाचे होते. 87 होमार्पण व त्याबरोबर अन्नार्पणासाठी एकूण बारा
तरुण बैल, बारा गोऱ्हे, एक वर्षाची बारा नरकोकरे होती. बारा बोकडे
पापार्पणांसाठी वापरण्यात आली. 88 शांत्यर्पणासाठी एकूण चोवीस
बैल, साठ गोऱ्हे, साठ बोकडे व एक वर्षांची साठ नरकोकरे आणली
होती. 89 जेव्हा मोशे याहवेहशी बोलण्यासाठी सभामंडपात गेला, तेव्हा
कराराच्या नियमाच्या कोशावर असलेल्या प्रायश्चिताच्या झाकणावरून,
दोन करुबांमधून त्याच्याशी बोलत असलेली वाणी त्याने ऐकली.
अशाप्रकारे याहवेह त्याच्याशी बोलले.

**8** मग याहवेह मोशेला म्हणाले, 2 “अहरोनाशी बोल व त्याला सांग,
जेव्हा तू दिवे लावशील, तेव्हा सातही दिव्यांचा प्रकाश दीपस्तंभाच्या
पुढील बाजूस पडावा.” 3 याहवेहने मोशेला आज्ञापिले होते त्याप्रमाणेच
अहरोनाने केले; त्याने दीपस्तंभाच्या समोरील बाजूस दिवे लावले.
4 दीपस्तंभ अशाप्रकारे घडविला गेला होता: जसे याहवेहने मोशेला
दाखविले होते त्या नमुन्याप्रमाणेच तो त्याच्या बैठकीपासून त्याच्या
फुलांपर्यंत सोन्याने घडविला होता. 5 याहवेह मोशेला म्हणाले, 6
“लेव्यांना सर्व इस्राएली लोकांमधून घेऊन त्यांना विधीनुसार शुद्ध कर.
7 त्यांना शुद्ध करण्यासाठी तू असे कर: त्यांच्यावर शुद्धीकरणाचे पाणी
शिंपडावे; मग त्यांनी आपल्या संपूर्ण अंगावरून वस्तरा फिरवावा व
आपले कपडे धुवावे. अशाप्रकारे ते स्वतःला शुद्ध करतील. 8 मग त्यांनी
एक गोऱ्हा घ्यावा व त्याबरोबरचे अन्नार्पण जे जैतुनाच्या तेलात मळलेले
सपीठ आणावे; आणि पापार्पणासाठी आणखी एक गोऱ्हा आणावा. 9
लेव्यांना सभामंडपाच्या समोर घेऊन यावे व सर्व इस्राएल समुदायाला
एकत्र करावे. 10 लेव्यांना याहवेहपुढे सादर करावे व इस्राएली लोकांनी
आपले हात त्यांच्यावर ठेवावेत. 11 अहरोनाने इस्राएली लोकांच्या

वतीने हेलावणीचे अर्पण म्हणून लेव्यांना याहवेहसमोर सादर करावे,
म्हणजे ते याहवेहची सेवा करण्याकरिता तयार होतील.” 12 मग
लेव्यांनी गोऱ्ह्यांच्या डोक्यावर आपले हात ठेवावेत, त्यातील एक गोऱ्हा
याहवेहला पापार्पण म्हणून अर्पण करावा आणि दुसरा लेव्यांसाठी
प्रायश्चित म्हणून होमार्पण करावा. 13 मग तू लेव्यांना अहरोन आणि
त्याच्या पुत्रांसमोर उभे करावे आणि त्यांना हेलावणीचे अर्पण म्हणून
याहवेहला सादर करावे. 14 अशाप्रकारे तू लेवी लोकांना माझ्यासाठी
इतर इस्राएली लोकांपासून वेगळे करावेस म्हणजे लेवी माझे होतील. 15
तू लेवींना शुद्ध करून हेलावणीचे अर्पण म्हणून मला सादर केल्यानंतर,
त्यांनी आपले काम करण्याकरिता सभामंडपात यावे. 16 इस्राएली
लोकांमधून ते सर्वस्वी मला समर्पित आहेत. प्रत्येक इस्राएली स्त्रीच्या
प्रथम जन्मलेल्या पुरुषाऐवजी, मी त्यांना आपलेसे करून घेतले आहे.
17 इस्राएली लोकांतील प्रथम जन्मलेला प्रत्येक नर, तो मनुष्याचा असो
किंवा पशूंचा, तो माझा आहे. जेव्हा मी इजिप्तचे सर्व प्रथम जन्मलेले
मारून टाकले, तेव्हा मी त्यांना माझ्यासाठी पवित्र केले आहे. 18 आणि
मी इस्राएली लोकांतील प्रथम जन्मलेल्यांच्या ऐवजी लेवींना घेतले आहे.
19 मी लेव्यांना सर्व इस्राएली लोकांमधून अहरोन व त्याच्या पुत्रांना
भेट म्हणून दिले आहे, यासाठी की इस्राएली लोकांच्या वतीने त्यांनी
सभामंडपात सेवा करावी व त्यांच्यासाठी प्रायश्चित करावे, म्हणजे
इस्राएली लोक पवित्रस्थानाकडे जातील, तेव्हा कोणतीही पीडा त्यांचा
नाश करणार नाही. 20 मोशे, अहरोन आणि सर्व इस्राएली समुदायांनी
याहवेहने मोशेला आज्ञापिले होते त्याच प्रकारे लेव्यांना केले. 21 लेवी
लोकांनी स्वतःला शुद्ध केले आणि आपली वस्त्रे धुतली. मग अहरोनाने
त्यांना हेलावणीचे अर्पण म्हणून याहवेहसमोर सादर केले व त्यांच्या
शुद्धीकरणासाठी प्रायश्चित्त केले. 22 नंतर लेवी लोक अहरोन व त्याच्या
पुत्रांच्या देखरेखीखाली सेवा करण्यासाठी सभामंडपात आले. लेव्यांच्या
संबंधी याहवेहने मोशेला आज्ञापिले होते त्याचप्रमाणे त्यांनी केले. 23
याहवेह मोशेला म्हणाले, 24 “लेव्यांच्या संबंधी हा नियम लागू असावा:
पंचवीस वर्षे व त्याहून अधिक वय असलेल्या पुरुषांनी सभामंडपामध्ये
कार्यरत होण्यासाठी यावे. 25 पन्नासाव्या वर्षी त्यांनी त्यांच्या रोजच्या
सेवेतून निवृत्त व्हावे व त्यानंतर काम करू नये. 26 त्यांनी सभामंडपात
आपल्या बांधवांना त्यांच्या कार्यात मदत करावी; परंतु त्यांनी स्वतः
काम करू नये. याप्रकारे तू लेवी लोकांची कामे नेमून द्यावी.”

**9** इजिप्त देशातून निघाल्यानंतर दुसऱ्या वर्षाच्या पहिल्या महिन्यात
ते सीनाय रानात असताना याहवेह मोशेशी बोलले. ते म्हणाले, 2
“इस्राएली लोकांनी नेमलेल्या वेळेस वल्हांडण सण पाळावा. 3 नेमलेल्या
वेळेस, म्हणजेच या महिन्याच्या चौदाव्या दिवसाच्या संध्याकाळी,
त्यासंबंधी असलेल्या सर्व विधी नियमानुसार तो सण पाळावा.” 4 तेव्हा
मोशेने इस्राएली लोकांना वल्हांडणाचा सण पाळावयास सांगितले. 5
त्याप्रमाणे सीनायच्या रानात, पहिल्या महिन्याच्या चौदाव्या दिवसाच्या
संध्याकाळी त्यांनी वल्हांडणाचा सण पाळला. जसे याहवेहने मोशेला
आज्ञापिले होते त्याचप्रमाणे इस्राएली लोकांनी केले. 6 परंतु त्यांच्यापैकी
काही व्यक्ती असे होते ज्यांना वल्हांडण सण पाळता आला नाही, कारण
ते विधीनुसार मृत देहामुळे अशुद्ध झाले होते. म्हणून त्याच दिवशी ते मोशे
व अहरोनकडे आले. 7 आणि मोशेला म्हणाले, “आम्ही मृत देहामुळे
अशुद्ध झालो आहोत, परंतु इस्राएली लोकांबरोबर नेमलेल्या वेळी
याहवेहला अर्पण सादर करण्यापासून आम्हाला का वंचित ठेवावे?” 8
मोशे त्यांना म्हणाला, “तुमच्याविषयी याहवेह काय आज्ञा देतील ते मी
जाणून घेईपर्यंत तुम्ही थांबा.” 9 मग याहवेहने मोशेला म्हटले, 10
“इस्राएली लोकांना सांग: ‘जर तुमच्यातील किंवा तुमच्या गोत्रातील
कोणी मृत देहामुळे अशुद्ध झाला किंवा दूर प्रवासात असला, त्यांनी
तरीही याहवेहसाठी वल्हांडण सण पाळावा, 11 परंतु त्यांनी तो दुसऱ्या
महिन्याच्या चौदाव्या दिवसाच्या संध्याकाळी पाळावा. त्यांनी बेखमीर
भाकर व कडू पाल्याबरोबर वल्हांडणाचे कोकरू खावे. 12 त्यांनी दुसऱ्या
दिवसाच्या सकाळपर्यंत त्यातील काहीही शिल्लक ठेवू नये किंवा त्याचे
एकही हाड मोडू नये. जेव्हा ते वल्हांडण पाळतात, तेव्हा त्यांनी सर्व
नियम पाळावेत. 13 पण जो कोणी विधीनुसार शुद्ध असला आणि
प्रवासात नसला, तरीही वल्हांडण पाळीत नाही तर त्यांना आपल्या
लोकांतून काढून टाकले जावे, कारण त्यांनी नेमलेल्या वेळेस याहवेहला
अर्पण सादर केले नाही. त्यांच्या पापाचा परिणाम त्यांना भोगावा लागेल.
14 “‘तुमच्यामध्ये राहत असणाऱ्या परदेशी व्यक्तीनेही विधी नियमानुसार
याहवेहचा वल्हांडण पाळावा. परदेशी व स्वदेशी व्यक्तीसाठी सारखाच
नियम असावा.’” 15 ज्या दिवशी निवासमंडप, कराराच्या नियमाचा
मंडप उभारण्यात आला, त्या दिवशी मेघाने त्याला झाकून टाकले.
संध्याकाळपासून सकाळपर्यंत निवासमंडपावरील मेघ अग्नीसारखे
दिसू लागले. 16 आणि ते तसेच चालू राहिले; मेघांनी त्याला झाकले
आणि रात्री ते अग्नीसारखे दिसू लागले. 17 जेव्हा मंडपावरून मेघ वर
जाई, तेव्हा ते पुढची वाटचाल करीत असत; आणि जेव्हा मेघ थांबत
असे, तिथे इस्राएली लोक तळ देत असत. 18 याहवेहच्या आज्ञेनुसार
इस्राएली लोक प्रवासास निघत असत आणि याहवेहच्या आज्ञेनुसार
ते तळ देत. जोपर्यंत निवासमंडपावर मेघ थांबत असे तोपर्यंत ते तळ
देऊन राहत असत. 19 जेव्हा मेघ दीर्घकाळ निवासमंडपावर थांबून
राहिला, तेव्हा इस्राएली लोक याहवेहची आज्ञा पाळीत व पुढे जात
नसत. 20 कधीकधी मेघ काहीच दिवस निवासमंडपावर थांबत असे,
तेव्हा याहवेहच्या आज्ञेनुसार ते तळ देऊन राहत आणि याहवेहच्या
आज्ञेनुसार ते पुढे जात. 21 कधीकधी मेघ केवळ संध्याकाळपासून
सकाळपर्यंत राहत असे आणि सकाळी जेव्हा तो वरती घेतला जाई,
लोक पुढे जात. तो दिवस असो किंवा रात्र, जेव्हा मेघ वरती घेतला जात
असे, ते पुढे निघत असत. 22 निवासमंडपावर मेघ दोन दिवस थांबून
राहो किंवा एक महिना किंवा एक वर्ष राहो, इस्राएली लोक आपल्या
छावणीत राहत आणि पुढे जात नसत; परंतु जेव्हा मेघ वर घेतला जाई,
ते पुढे जात. 23 याहवेहच्या आज्ञेनुसार ते तळ देत आणि याहवेहच्या
आज्ञेनुसार ते पुढे जात. मोशेद्वारे याहवेहने दिलेल्या आज्ञेचे त्यांनी पालन
केले.

10 याहवेह मोशेला म्हणाले: 2 “तू घडीव चांदीचे दोन कर्णे घडवून
घे आणि समुदायाला एकत्र जमविण्यासाठी आणि छावण्या पुढे
प्रवासास निघण्यासाठी त्यांचा उपयोग कर. 3 दोन्ही कर्णे वाजविले
म्हणजे सर्व समुदायाने सभामंडपाच्या प्रवेशव्दाराजवळ तुझ्यापुढे एकत्र
जमावे. 4 जर एकच कर्णा वाजविला, तर इस्राएली कुलप्रमुखांनी
तुझ्यापुढे जमावे. 5 जेव्हा कर्ण्याचा मोठा गजर केला म्हणजे पूर्वेकडे तळ
दिलेल्या वंशानी पुढे निघावे. 6 दुसरा गजर केला म्हणजे दक्षिणेकडील
वंशानी निघावे. तो गजर पुढे निघण्यासाठी संकेत असा राहील 7
जेव्हा समुदाय जमा करावयाचा असेल तेव्हा कर्णा वाजवा, परंतु
पुढे जाण्याच्या संकेताने नव्हे. 8 “अहरोनाचे पुत्र जे याजक आहेत
त्यांनीच कर्णे वाजवावे. हा तुम्हाला व येणाऱ्या तुमच्या पिढ्यांसाठी
सर्वकाळचा नियम असावा. 9 जेव्हा तुम्ही तुमच्याच देशात तुमच्यावर
जुलूम करणाऱ्या तुमच्या शत्रूविरुद्ध युद्ध करण्यास जाता, तेव्हा तुम्ही
कर्ण्याचा गजर करा. तेव्हा याहवेह तुमचे परमेश्वर तुमचे स्मरण करतील
व तुमच्या शत्रूपासून तुम्हाला सोडविले जाईल. 10 तुमच्या आनंदाच्या
प्रसंगी; तुमचे नेमलेले सण व महिन्याच्या आरंभीची मेजवानी, जेव्हा
तुम्ही आपली होमार्पणे व शांत्यर्पणे आणता, त्यावेळी सुद्धा तुम्ही कर्णे
वाजवा आणि ते याहवेहसमोर तुमच्यासाठी स्मरणार्थ असेल. मीच
याहवेह तुमचा परमेश्वर आहे.” 11 दुसऱ्या वर्षाच्या दुसऱ्या महिन्याच्या
विसाव्या दिवशी कराराच्या नियमाच्या निवासमंडपावरून मेघ वरती
घेतला गेला. 12 तेव्हा इस्राएली लोक सीनायच्या रानातून निघाले
आणि पारानाच्या रानात मेघ स्थिर होईपर्यंत एका ठिकाणातून दुसऱ्या
ठिकाणी प्रवास करीत राहिले. 13 याहवेहने मोशेद्वारे दिलेल्या आज्ञेनुसार
ते पहिल्या प्रवासास निघाले. 14 यहूदाह वंशाच्या छावणीचा दल
आपल्या झेंड्याखाली प्रथम निघाला. अम्मीनादाबाचा पुत्र नहशोन
त्यांचा सेनापती होता. 15 सूवाराचा पुत्र नथानेल हा इस्साखार वंशाच्या
दलावर होता, 16 आणि हेलोनाचा पुत्र एलियाब जबुलून वंशाच्या
दलावर होता. 17 मग निवासमंडप खाली उतरविला गेला आणि गेर्षोनी
व मरारींनी निवासमंडप वाहून ते पुढे निघाले. 18 त्यानंतर रऊबेन
वंशाच्या छावणीचा दल आपल्या झेंड्याखाली पुढे निघाला. शदेयुराचा
पुत्र एलीसूर त्यांचा सेनापती होता. 19 सुरीशादैचा पुत्र शेलुमीएल हा
शिमओन वंशाच्या दलावर होता. 20 आणि देउएलाचा पुत्र एलीआसाफ
हा गाद वंशाच्या दलावर होता. 21 मग पवित्र वस्तू घेऊन कोहाथी लोक
निघाले. म्हणजे ते पोहोचण्यापूर्वी निवासमंडप उभारला जावा. 22
एफ्राईम वंशाच्या छावणीचा दल आपल्या झेंड्याखाली पुढे निघाला.
अम्मीहूदाचा पुत्र एलीशामा त्यांचा सेनापती होता. 23 पदहसूरचा पुत्र
गमलीएल हा मनश्शेह वंशाच्या दलावर होता, 24 आणि गिदोनाचा पुत्र
अबीदान हा बिन्यामीन वंशाच्या दलावर होता. 25 शेवटी सर्व तुकड्यांच्या
मागून रक्षक म्हणून, दान वंशाच्या छावणीचा दल आपल्या झेंड्याखाली
निघाला. अम्मीशद्दायचा पुत्र अहीएजर त्यांच्या दलावर सेनापती होता.
26 ओक्रानाचा पुत्र पगीयेल हा आशेर वंशाच्या दलावर होता, 27 आणि
एनानाचा पुत्र अहीरा हा नफताली वंशाच्या दलावर होता. 28 पुढे
निघताना इस्राएली दलांच्या प्रवासाचा हा क्रम होता. 29 आणि मोशेचा
सासरा मिद्यानी रऊएलचा पुत्र होबाबला मोशे म्हणाला, “आम्ही त्या
ठिकाणाकडे जात आहोत, ज्याविषयी याहवेहने सांगितले की, ‘मी ते
तुम्हाला देईन.’ तू आमच्याबरोबर ये आणि आम्ही तुला चांगली वागणूक
देऊ, कारण याहवेहने इस्राएली लोकांना उत्तम गोष्टींविषयी अभिवचन
दिले आहे.” 30 तो त्याला म्हणाला, “नाही, मी येणार नाही; मी माझा
देश आणि माझ्या लोकांकडे जात आहे.” 31 पण मोशे म्हणाला, “कृपा
करून आम्हाला सोडू नकोस. रानात आम्ही कुठे तळ द्यावा याविषयी
तुला माहिती आहे, आम्ही तुझ्या नजरेने पाहू. 32 तू जर आमच्याबरोबर
आलास, तर याहवेह आम्हाला ज्या चांगल्या गोष्टी देतील, त्यात तुलाही
वाटा मिळेल.” 33 मग ते याहवेहचे पर्वत म्हणजेच सीनाय पर्वतापासून
निघाले व तीन दिवसांचा प्रवास करीत गेले. याहवेहच्या कराराचा कोश
त्यांच्या विसाव्याचे ठिकाण पाहण्यासाठी त्या तीन दिवसांचा प्रवास
करीत त्यांच्यापुढे गेला. 34 ते छावणीतून निघाले तेव्हा दिवसा याहवेहचा
मेघ त्यांच्यावर होता. 35 जेव्हा कोश पुढे जात असे तेव्हा मोशे म्हणे,
“हे याहवेह, सक्रिय व्हा! तुमच्या शत्रूंची पांगापांग होवो; तुमचे वैरी
तुमच्यापुढून पळून जावोत.” 36 जेव्हा कोश थांबत असे, तो म्हणे, “हे
याहवेह, परत या, इस्राएलाच्या हजारो असंख्याकडे पुन्हा या.”

11 मग असे झाले की लोक याहवेहसमोर असताना त्यांच्या कष्टांबद्दल
तक्रार करू लागले. जेव्हा याहवेहने ते ऐकले तेव्हा त्यांचा राग
भडकला आणि त्यांच्यामध्ये याहवेहचा अग्नी पेटला आणि छावणीच्या
बाहेरील काही भाग भस्म झाला. 2 जेव्हा लोकांनी मोशेकडे धावा केला
व त्याने याहवेहकडे विनंती केली आणि अग्नी विझला. 3 म्हणून त्या
जागेचे नाव तबेरा असे पडले, कारण याहवेहचा अग्नी त्यांच्यामध्ये
पेटला होता. 4 नंतर त्यांच्याबरोबर असलेले निम्नस्तरातील मिश्र लोक
अन्य भोजनाची लालसा धरू लागले आणि इस्राएली लोकही पुन्हा
रडत म्हणू लागले, “आम्हाला खायला मांस असते तर किती बरे! 5
इजिप्त देशात आम्ही फुकट मासे खाल्ले; आणि काकड्या, खरबुजे,
कंदभाजी, कांदे आणि लसूण यांची सुद्धा आम्हाला आठवण येते. 6
परंतु आता आमची भूक नाहीशी झाली आहे; कारण या मान्न्याशिवाय
आम्हाला दुसरे काहीच दिसत नाही!” 7 मान्ना आकाराने धण्यासारखा
असून रंगाने मोत्यासारखा होता. 8 लोक चोहीकडे जाऊन तो गोळा
करीत असत आणि मग जात्यात दळीत किंवा उखळात कुटत असत.
मग ते भांड्यात शिजवित किंवा त्याच्या भाकरी बनवित असत. त्याची
चव जैतुनाच्या तेलात बनलेल्या भाकरीप्रमाणे असे. 9 रात्री जेव्हा
छावणीवर दहिवर जमा होत असे तेव्हा मान्ना सुद्धा पडत असे. 10
प्रत्येक घराण्यातील लोक आपआपल्या तंबूच्या दाराशी उभे राहून रडत
होते आणि याहवेहचा त्यांच्यावर अतिशय क्रोध आला होता त्यामुळे
मोशे अस्वस्थ झाला. 11 मोशेने याहवेहला विचारले, “तुमच्या सेवकावर
हे कष्ट तुम्ही का आणले? तुम्ही असंतुष्ट व्हावे असे मी काय केले की
तुम्ही या सर्व लोकांचे ओझे माझ्यावर लादावे? 12 मी या सर्व लोकांचे
गर्भधारण केले काय? त्यांना मी जन्म दिला काय? आई आपल्या तान्ह्या

बाळाला घेते तसे मी यांना माझ्या उराशी घेऊन तुम्ही त्यांच्या पूर्वजांना
शपथ घेऊन वचन दिलेल्या देशात मी घेऊन जावे असे तुम्ही मला का
सांगता? 13 या सर्व लोकांसाठी मी मांस कुठून आणावे? ते रडत
माझ्याजवळ मागतात ‘आम्हाला खायला मांस दे!’ 14 मला एकट्याला
या राष्ट्राला घेऊन जाता येत नाही! हे ओझे मला खूप जड आहे. 15
तुम्ही मला असेच वागविणार असाल आणि तुमच्या दृष्टीत मी जर कृपा
पावलो असलो तर मला मारून टाका. मी माझाच नाश पाहावा असे
होऊ देऊ नये.” 16 याहवेह मोशेला म्हणाले: “इस्राएली लोकांमधील
सत्तर वडील ज्यांना तू पुढारी आणि अधिकारी म्हणून ओळखतो, त्यांना
माझ्यासमोर आण. त्यांनी सभामंडपात यावे व तुझ्याबरोबर उभे राहावे.
17 मी खाली येऊन तिथे तुझ्याशी बोलेन आणि जो आत्मा तुझ्यावर
आहे, त्याचे काही सामर्थ्य मी घेऊन त्यांच्यावर ठेवेन. ते तुझ्याबरोबर
लोकांचा भार वाहतील म्हणजे तुला एकट्याला तो वाहावा लागणार
नाही. 18 “लोकांना सांग: ‘उद्याच्या तयारीकरिता स्वतःला पवित्र करा,
कारण उद्या त्यांना मांस खायला मिळेल. “आम्हाला मांस खायला
मिळाले तर किती बरे! आम्ही इजिप्तमध्ये चांगले होतो!” हे तुमचे
रडणे याहवेहने ऐकले आहे, आता याहवेह तुम्हाला मांस देणार आहेत
आणि ते तुम्ही खाल. 19 तुम्ही ते केवळ एक दिवस किंवा दोन दिवस,
किंवा पाच दिवस, दहा, किंवा वीस दिवस, 20 परंतु संपूर्ण एक महिना;
ते तुमच्या नाकपुड्यातून बाहेर येईपर्यंत आणि ते तुम्हाला नकोसे
वाटेपर्यंत ते तुम्ही खाल; कारण तुम्ही याहवेह जे तुमच्यामध्ये राहतात
त्यांना नाकारले आहे, त्यांच्यासमोर रडत म्हणाला, “आम्ही इजिप्त का
सोडले?”’” 21 पण मोशे म्हणाला, “इथे ज्या लोकांमध्ये मी आहे ते
सहा लाख पुरुष पायदळ आहेत आणि तुम्ही म्हणता, ‘मी त्यांना एक
महिनाभर मांस खायला देणार!’ 22 गुरे व शेरडेमेंढरे कापली तरी ते
त्यांच्यासाठी पुरेसे होईल काय? समुद्रातील सर्व मासे पकडले तरी ते
त्यांना पुरतील काय?” 23 याहवेहने मोशेला उत्तर दिले, “याहवेहचा हात
इतका आखूड आहे काय? माझे शब्द घडून येतात की नाही हे तू आता
पाहशील.” 24 मग मोशे निवासमंडपातून बाहेर आला आणि याहवेह जे
काही बोलले ते त्याने लोकांना सांगितले. आणि त्याने सत्तर वडिलांना
एकत्र करून तंबूच्या सभोवती उभे केले. 25 मग याहवेह मेघातून खाली
उतरले व मोशेशी बोलले आणि याहवेहने मोशेवर असलेल्या आत्म्याचे
काही सामर्थ्य घेऊन त्या सत्तर वडिलांवर ठेवले. ज्यावेळी आत्मा
त्यांच्यावर स्थिर झाला, त्यावेळी त्यांनी भविष्यवाणी केली—परंतु
पुन्हा असे केले नाही. 26 पण दोघे पुरुष ज्यांची नावे एलदाद व मेदाद
छावणीतच राहिले होते. वडिलांच्या यादीत त्यांची नावे होती, परंतु ते
बाहेर तंबूकडे गेले नाही. तरी त्यांच्यावरही आत्मा उतरला आणि त्यांनी
छावणीतच भविष्यवाणी केली. 27 एका तरुण पुरुषाने धावत जाऊन
मोशेला सांगितले, “एलदाद व मेदाद छावणीत भविष्यवाणी करीत
आहेत.” 28 नूनाचा पुत्र यहोशुआ, जो तारुण्यापासून मोशेचा मदतनीस
होता, तो म्हणाला, “मोशे, माझ्या स्वामी, त्यांना थांबवा!” 29 पण
मोशे म्हणाला, “माझ्यासाठी तू त्यांचा हेवा करतोस काय? माझी तर
इच्छा आहे की, याहवेहचे सर्व लोक संदेष्टे असावेत आणि याहवेहने
सर्व लोकांवर आपला आत्मा ठेवावा!” 30 नंतर मोशे व इस्राएलांचे
वडीलजन छावणीकडे परतले. 31 मग याहवेहकडून वारा वाहिला आणि
समुद्रावरून लावे पक्षी आणले. आणि छावणीच्या सभोवती, एकंदर
एकएक दिवसाच्या वाटेपर्यंत सर्व दिशेने सुमारे दोन हात उंचीचा थर
पसरला. 32 त्या दिवशी लोकांनी बाहेर जाऊन तो संपूर्ण दिवस आणि
रात्र आणि संपूर्ण दुसरा दिवस लावे पक्षी गोळा केले. कोणीही दहा होमेर
वजनापेक्षा कमी गोळा केले नाही, मग त्यांनी ते छावणीत सर्वत्र पसरून
ठेवले. 33 परंतु ते मांस त्यांच्या मुखातच होते आणि ते खाण्याच्या
आधी याहवेहचा क्रोध लोकांविरुद्ध भडकला आणि याहवेहने त्यांना
भयंकर पीडेने मारले. 34 म्हणून त्या ठिकाणाचे नाव किब्रोथ-हत्ताव्वा
असे पडले, कारण ज्यांनी इतर भोजनाची लालसा धरली त्या लोकांना
त्या ठिकाणी पुरले. 35 किब्रोथ-हत्ताव्वा येथून लोकांनी हसेरोथकडे
प्रवास केला आणि तिथे राहिले.

**12** मोशेच्या कूशी पत्नीमुळे मिर्याम आणि अहरोन मोशेच्या विरुद्ध
बोलू लागले, कारण त्याने कूशी देशातील एका स्त्रीशी विवाह
केला होता. 2 त्यांनी विचारले, “याहवेह मोशेद्वारेच बोलले आहेत काय?
याहवेह आमच्याद्वारे सुद्धा बोलले नाहीत काय?” आणि याहवेहने हे
ऐकले. 3 (मोशे तर अतिशय नम्र मनुष्य होता, भूतलावरील इतर
लोकांपेक्षा अधिक नम्र होता.) 4 याहवेह लगेचच मोशे, अहरोन आणि
मिर्यामला म्हणाले, “तुम्ही तिघेही सभामंडपाकडे बाहेर या.” तेव्हा
ते तिघे बाहेर गेले. 5 मग याहवेह मेघस्तंभातून खाली आले; आणि
निवासमंडपाच्या दाराशी उभे राहून अहरोन व मिर्याम यांना बोलाविले.
जेव्हा ते पुढे गेले, 6 याहवेह त्यांना म्हणाले, “माझे शब्द ऐका: “जेव्हा
तुमच्यामध्ये एखादा संदेष्टा आहे, मी याहवेह, त्यांना दृष्टान्ताद्वारे स्वतःला
प्रकट करतो, स्वप्नाद्वारे मी त्यांच्याशी बोलतो. 7 परंतु माझा सेवक
मोशे याच्या बाबतीत तसे नाही; तो माझ्या सर्व घराण्यात विश्वासू आहे.
8 मी त्याच्याशी कोड्यात नाही, तर समोरासमोर स्पष्टपणे बोलतो;
तो याहवेहचे रूप पाहतो. माझा सेवक मोशे याच्याविरुद्ध बोलण्यास
तुम्हाला भीती का वाटली नाही?” 9 मग याहवेहचा क्रोध त्यांच्याविरुद्ध
भडकला आणि याहवेह त्यांना सोडून निघून गेले. 10 जेव्हा मंडपावरून
मेघ वरती घेतला गेला, तेव्हा मिर्यामची त्वचा रोगाने भरली होती;
ती बर्फासारखी पांढरी झाली. अहरोनाने तिच्याकडे वळून बघितले
तेव्हा त्याने पाहिले की तिच्या त्वचेवर कोड फुटले होते, 11 तेव्हा तो
मोशेला म्हणाला, “माझे स्वामी, मी तुला विनंती करतो, कृपया, आम्ही
मूर्खपणाने केलेले पाप आमच्याविरुद्ध मोजू नको. 12 जसे एक तान्हे मृत
बाळ आपल्या आईच्या उदरातून जन्माला येताच त्याचे अर्धे शरीर नष्ट
झालेले असते, असे तिला राहू देऊ नको.” 13 तेव्हा मोशेने याहवेहचा
धावा केला, “हे याहवेह कृपा करून तिला बरे करा!” 14 तेव्हा याहवेहने
मोशेला उत्तर दिले, “जर तिचा पिता तिच्या तोंडावर थुंकला असता, तर
तिला सात दिवस लाजेने घालवावे लागले असते की नाही? तिला सात
दिवस छावणीच्या बाहेर वेगळे राहू दे, त्यानंतर तिला परत आणावे.” 15

मग मिर्यामला सात दिवस छावणीबाहेर वेगळे ठेवण्यात आले आणि
तिला पुन्हा छावणीत आणेपर्यंत लोक पुढच्या प्रवासास गेले नाही. 16
यानंतर त्यांनी हसेरोथ सोडले आणि पारान नावाच्या रानात तळ दिला.

**13** याहवेह मोशेला म्हणाले, 2 “मी जो कनान देश इस्राएली लोकांना
देत आहे, तो देश हेरावा म्हणून पूर्वजांच्या प्रत्येक कुळातील
एका पुढाऱ्याला पाठव.” 3 म्हणून याहवेहच्या आज्ञेनुसार मोशेने
ज्यांना पारानच्या रानातून बाहेर पाठवले, ते सर्व इस्राएली लोकांचे
पुढारी होते. 4 त्यांची नावे ही आहेत: रऊबेन गोत्रातील जक्कूरचा
पुत्र शम्मुवा; 5 शिमओन गोत्रातील होरीचा पुत्र शाफाट; 6 यहूदाह
गोत्रातील यफुन्नेहचा पुत्र कालेब; 7 इस्साखार गोत्रातील योसेफाचा
पुत्र इगाल; 8 एफ्राईमच्या गोत्रातील नूनाचा पुत्र होशा; 9 बिन्यामीन
गोत्रातील राफूचा पुत्र पालती; 10 जबुलून गोत्रातील सोदीचा पुत्र
गाद्दीयेल; 11 मनश्शेहच्या गोत्रातील (योसेफाचे गोत्र) सुसीचा पुत्र
गाद्दी; 12 दान गोत्रातील गमल्लीचा पुत्र अम्मीएल; 13 आशेर गोत्रातील
मिखाएलचा पुत्र सेथूर; 14 नफताली गोत्रातील वोफसीचा पुत्र नाहबी;
15 गाद गोत्रातील माकीचा पुत्र गऊवेल. 16 देश हेरावयाला जे पुरुष
मोशेने पाठवले त्यांची ही नावे होती. (मोशेने नूनाचा पुत्र होशाचे नाव
बदलून त्याला यहोशुआ हे नाव दिले.) 17 जेव्हा मोशे त्यांना कनान
देश हेरायाला पाठवित होता तेव्हा तो म्हणाला, “नेगेव-दक्षिण-मधून
वर डोंगराळ प्रदेशात जा. 18 आणि तो देश कसा आहे, तिथे जे लोक
राहतात ते बलवान आहेत की दुर्बल आहेत, ते थोडे आहेत की पुष्कळ हे
पाहा. 19 ते राहतात तो देश कसा आहे? तो चांगला आहे की वाईट
आहे? कोणत्या प्रकारच्या नगरांमध्ये त्यांची वस्ती आहे? ते उजाड
आहेत की तटबंदीची आहेत? 20 तेथील जमीन कशी आहे? ती सुपीक
आहे की नापीक? त्यात झाडे आहेत की नाही? तुम्ही परत येताना त्या
देशातील काही फळे तुमच्याबरोबर घेऊन येण्याचा कसोशीने प्रयत्न
करा.” (तो प्रथमपक्व द्राक्षाच्या फळांचा हंगाम होता.) 21 मग ते
गेले आणि सीन रानापासून हमाथाच्या जवळील रहोबा पर्यंतचा देश
त्यांनी हेरला. 22 ते वरती नेगेवमधून गेले आणि हेब्रोनात आले, जिथे
अहीमान, शेशय आणि तलमय हे अनाकाचे वंशज राहत होते. (हेब्रोन हे
इजिप्त देशातील सोअन शहराच्या सात वर्षे आधी बांधले गेले होते.) 23
ते जेव्हा अष्कोल खोऱ्याजवळ आले. तिथे त्यांनी एक द्राक्षांचा घड
असलेली फांदी कापून घेतली. दोन माणसांनी त्यांच्यामध्ये तो एका
काठीवर घालून वाहून नेला. त्याचबरोबर त्यांनी काही डाळिंबे आणि
अंजिरेही घेतली. 24 त्या खोऱ्याचे नाव अष्कोल असे ठेवले कारण
इस्राएली लोकांनी तिथून द्राक्षाचा घड कापून घेतला होता. 25 देश
हेरून चाळीस दिवसानंतर ते परत आले. 26 पारान रानातील कादेश
येथे मोशे आणि अहरोन व सर्व इस्राएली लोकांकडे ते परत आले.
तिथे त्यांनी त्यांना व सर्व समुदायाला अहवाल दिला व त्या देशाची
फळे दाखविली. 27 त्यांनी मोशेला अहवाल दिला तो असा: “जो देश
हेरण्यास तुम्ही आम्हाला पाठविले तिथे आम्ही गेलो, त्यात खरोखरच
दूध व मध वाहतात! ही पाहा तेथील फळे. 28 परंतु तिथे राहत असलेले
लोक बलवान आहेत, त्यांची शहरे तटबंदीची व पुष्कळ मोठी आहेत.
आम्ही त्या ठिकाणी अनाकाचे वंशजही पाहिले. 29 नेगेवमध्ये अमालेकी
लोक राहतात. डोंगराळ प्रदेशात हिथी, यबूसी आणि अमोरी लोक
राहतात. समुद्राच्या किनाऱ्यावर आणि यार्देन नदीच्या खोऱ्यात कनानी
लोक राहतात.” 30 तेव्हा मोशेसमोर कालेबाने लोकांना शांत केले व
म्हणाला, “आपण वर जाऊन तो देश ताब्यात घेतला पाहिजे, कारण
आपण खचितच ते करू शकतो.” 31 परंतु जे पुरुष त्याच्याबरोबर वर
गेले होते ते म्हणाले, “त्या लोकांवर आपण हल्ला करू शकत नाही; ते
आपल्यापेक्षा बलवान आहेत.” 32 आणि जो देश ते हेरण्यास गेले
होते त्याबद्दल त्यांनी इस्राएली लोकांमध्ये वाईट अहवाल पसरविला. ते
म्हणाले, “जो देश आम्ही हेरला तो देश त्यांच्या रहिवाशांना खाऊन
टाकणारा आहे. जे लोक आम्ही पाहिले ते धिप्पाड आहेत. 33 तिथे
आम्ही नेफिलीम (अनाकाचे महाबलाढ्य वंशज नेफिलीम पासून आहेत)
लोकांना बघितले. आमच्याच दृष्टीत आम्ही नाकतोड्याप्रमाणे होतो
आणि त्यांनाही आम्ही तसेच भासलो.”

**14** रात्रीच्या वेळी लोकसमुदायाचे सर्व सभासद आपला आवाज
उंच करून मोठ्याने रडू लागले. 2 सर्व इस्राएली लोकांनी मोशे व
अहरोन यांच्याविरुद्ध कुरकुर केली आणि सर्व समुदाय त्यांना म्हणाला,
“आम्ही इजिप्त देशात किंवा या रानातच मेलो असतो तर किती बरे
असते! 3 आम्ही तलवारीने पडावे म्हणूनच या देशात याहवेह आम्हाला
आणत आहेत काय? आमच्या स्त्रिया आणि लेकरांना गुलाम म्हणून
नेण्यात येईल. आम्ही इजिप्तकडे परत जावे हे आमच्यासाठी बरे नाही
काय?” 4 आणि ते एकमेकांना म्हणाले, “आपण एखाद्या पुढाऱ्याची
निवड करू आणि इजिप्त देशास परत जाऊ.” 5 तेव्हा सर्व इस्राएली
समुदाय जो तिथे एकत्र जमला होता, त्यांच्यासमोर मोशे आणि अहरोन
पालथे पडले. 6 नूनाचा पुत्र यहोशुआ आणि यफुन्नेहचा पुत्र कालेब, जे
त्यापैकीच देश हेरून आले होते तेही होते, त्यांनी आपली वस्त्रे फाडली 7
आणि सर्व इस्राएली समुदायाला म्हणाले, “आम्ही ज्या देशातून फिरून
आलो तो देश अतिशय चांगला आहे. 8 याहवेह जर आमच्याविषयी
संतुष्ट असले तर त्या दूध व मध वाहत्या देशात ते आपल्याला घेऊन
जातील आणि तो देश आम्हाला देतील. 9 मात्र याहवेहविरुद्ध बंड करू
नका. आणि तेथील लोकांचे भय बाळगू नका, कारण आम्ही त्यांना नष्ट
करणार. त्यांचे संरक्षण नाहीसे झाले आहे, परंतु याहवेह आमच्याबरोबर
आहेत. त्यांचे भय बाळगू नका.” 10 परंतु सर्व समुदाय त्यांना धोंडमार
करण्याविषयी बोलू लागले. तेव्हा सभामंडपावर सर्व इस्राएली लोकांना
याहवेहचे तेज प्रकट झाले, 11 याहवेह मोशेला म्हणाले, “हे लोक
कुठवर माझा तिरस्कार करणार? त्यांच्यामध्ये मी केलेले सर्व चमत्कार
पाहूनही कुठवर माझ्यावर विश्वास ठेवण्यास ते नकार देतील? 12
मी त्यांच्यावर पीडा आणून त्यांचा नाश करेन, परंतु मी तुझ्यापासून
त्यांच्याहून मोठे व बलवान राष्ट्र करेन.” 13 मोशे याहवेहला म्हणाला,
“मग इजिप्तचे लोक याविषयी ऐकतील! तुम्ही आपल्या सामर्थ्याने या
लोकांना त्यांच्यामधून काढून बाहेर आणले आहे. 14 आणि ते त्या

देशात राहणाऱ्यांना याविषयी सांगतील. त्यांनी तर आधी तुमच्याविषयी
ऐकले आहे की, तुम्ही याहवेह या लोकांबरोबर आहात, तुमचा मेघस्तंभ
त्यांच्यावर असतो आणि याहवेह तुम्ही त्यांना समोरासमोर दिसता आणि
तुम्ही दिवसा मेघस्तंभात व रात्री अग्निस्तंभात त्यांच्यापुढे असता. 15
जर तुम्ही या लोकांपैकी कोणालाही जिवंत न ठेवता मारून टाकले, तर
ज्या राष्ट्रांनी तुमच्याविषयी ऐकले आहे ते म्हणतील, 16 ‘याहवेहने या
लोकांना शपथ देऊन जो देश देऊ केला होता, त्यात त्यांना नेण्यास
याहवेह असमर्थ होते म्हणून त्यांनी लोकांना रानातच मारून टाकले.’
17 “आता प्रभूचे सामर्थ्य तुम्ही घोषित केल्याप्रमाणेच प्रकट होवो:
18 ‘याहवेह मंदक्रोध, अत्यंत प्रीती करणारे, अन्याय व पापाची क्षमा
करणारे आहेत. तरीही ते दोषीला निर्दोष सोडत नाहीत; तर तिसऱ्या
व चौथ्या पिढीपर्यंत आईवडिलांच्या पापाचे शासन त्यांच्या संततींना
देतात.’ 19 आपल्या महान प्रीतीनुसार, जसे इजिप्त सोडले तेव्हापासून
आतापर्यंत क्षमा केली, तसेच आताही त्यांच्या पापाची त्यांना क्षमा
करावी.” 20 मग याहवेहने उत्तर दिले, “तुझ्या म्हणण्याप्रमाणे मी
त्यांना क्षमा केली आहे. 21 परंतु खचितच मी जिवंत आहे आणि
खचितच संपूर्ण पृथ्वी याहवेहच्या वैभवाने भरलेली आहे. 22 ज्यांनी
माझे वैभव आणि मी इजिप्तमध्ये व रानात केलेले चमत्कार पाहिले
आहेत आणि तरीही माझा आज्ञाभंग केला व दहा वेळा माझी परीक्षा
पाहिली; 23 त्यांच्यातील एकही व्यक्ती, जो देश मी त्यांच्या पूर्वजांना
शपथपूर्वक देऊ केला आहे तो पाहणार नाही. ज्यांनी मला तुच्छ लेखले
आहे त्यातील कोणीही तो देश पाहणार नाही. 24 परंतु माझा सेवक
कालेब याच्यावर वेगळा आत्मा आहे आणि तो संपूर्ण हृदयाने माझे
अनुसरण करतो, म्हणून तो ज्या देशात गेला होता तिथे मी त्याला नेईन
व त्याचे वंशज त्या देशाचे वतन पावतील. 25 अमालेकी व कनानी लोक
खोऱ्यामध्ये राहतात म्हणून, उद्या तुम्ही माघारी फिरा आणि तांबड्या
समुद्राच्या वाटेने जा.” 26 याहवेह मोशे व अहरोन यांना म्हणाले: 27
“कुठपर्यंत हा दुष्ट समुदाय माझ्याविरुद्ध कुरकुर करीत राहणार? या
कुरकुर करणाऱ्या इस्राएली लोकांच्या तक्रारी मी ऐकल्या आहे. 28
म्हणून त्यांना सांगा, याहवेह म्हणतात, खचितच मी जिवंत आहे, जे
काही तुम्ही बोलला आहात तेच मी तुम्हास करेन: 29 याच रानात
तुम्ही सर्व मरण पावाल—तुमच्यापैकी प्रत्येक जे वीस वर्षे व त्याहून
अधिक वयाचे आहेत, ज्यांची जनगणनेमध्ये गणती झाली आणि ज्यांनी
माझ्याविरुद्ध कुरकुर केली. 30 ज्या देशाविषयी मी हात उंच करून
म्हटले की त्यात मी तुम्हाला वसवेन, त्या देशात तुमच्यापैकी यफुन्नेहचा
पुत्र कालेब आणि नूनाचा पुत्र यहोशुआ यांच्याशिवाय कोणीही जाणार
नाही. 31 ज्या तुमच्या लेकरांविषयी तुम्ही म्हणाला होता की, त्या
देशात ते लूट असे होतील, त्यात मी त्यांना आणेन, अशासाठी की
ज्या देशाचा तुम्ही धिक्कार केला त्याचा त्यांनी आनंद भोगावा. 32
परंतु तुमच्याविषयी तर असे की, तुमचे देह याच रानात पडतील. 33
तुमच्यापैकी अगदी शेवटचा देह या रानात पडेपर्यंत तुमची लेकरे तुमच्या
अविश्वासूपणाचे परिणाम भोगत चाळीस वर्षे मेंढपाळ म्हणून राहतील.
34 चाळीस दिवस तुम्ही देश हेरला त्याप्रमाणे प्रत्येक दिवसाला एक
वर्ष अशी चाळीस वर्षे तुम्ही आपल्या पापाचे परिणाम भोगाल आणि
माझ्या विरोधात जाणे कसे असते हे तुम्ही जाणाल. 35 मी याहवेह हे
बोललो आहे आणि जे माझ्या विरोधात एकत्र आले आहेत त्या संपूर्ण
दुष्ट समाजाला मी असे निश्चितच करेन. त्यांचा शेवट ते या रानातच
पाहतील; ते येथेच मरण पावतील.” 36 म्हणून मोशेने ज्या पुरुषांना
देश हेरण्यास पाठवले होते, ज्यांनी माघारी येऊन त्या देशाविषयी
वाईट अहवाल पसरविला होता, संपूर्ण समाजाला मोशेविरुद्ध कुरकुर
करण्यास भाग पाडले होते— 37 हे पुरुष जे त्या देशाबद्दल वाईट
अहवाल पसरविण्यास जबाबदार होते, त्यांच्यावर पीडा आली व ते
याहवेहसमोर मरण पावले. 38 देश हेरायला गेलेल्या पुरुषांपैकी फक्त
नूनाचा पुत्र यहोशुआ आणि यफुन्नेहचा पुत्र कालेब हे वाचले. 39 जेव्हा
मोशेने हे सर्व इस्राएली लोकांना सांगितले, त्यांनी मोठा शोक केला. 40
दुसऱ्या दिवशी पहाटेच ते डोंगराळ प्रदेशाकडे डोंगराच्या शिखराकडे
असे म्हणत निघाले, “याहवेहने वचन दिलेल्या देशाकडे वर जाण्यास
आम्ही तयार आहोत. खरोखरच आम्ही पाप केले आहे!” 41 परंतु मोशे
म्हणाला, “तुम्ही याहवेहचा आज्ञाभंग का करता? यात तुम्हाला यश
मिळणार नाही! 42 वर जाऊ नका, कारण याहवेह तुमच्यासोबत नाहीत.
तुमचा तुमच्या शत्रूकडून पराभव होईल, 43 कारण अमालेकी व कनानी
लोक तिथे तुम्हाला सामोरे येतील. कारण तुम्ही याहवेहपासून मागे
फिरला आहात, ते तुमच्याबरोबर नाहीत आणि तुम्ही तलवारीने मरून
पडाल.” 44 जरी त्यांनी डोंगराळ प्रदेशाच्या उंच शिखरापर्यंत जाण्याची
धिटाई केली, तरी मोशे किंवा याहवेहच्या कराराचा कोश छावणीतून
हलले नाहीत. 45 मग त्या डोंगराळ देशात राहणारे अमालेकी व कनानी
लोक खाली आले व त्यांनी त्यांच्यावर हल्ला केला आणि होरमाहपर्यंत
त्यांना मारत आले.

**15** याहवेह मोशेला म्हणाले, 2 “इस्राएली लोकांशी बोल व त्यांना
सांग: जो देश मी तुम्हाला तुमच्या वस्तीसाठी देत आहे त्यात तुम्ही
प्रवेश कराल 3 आणि याहवेहसाठी सुवास म्हणून आपली खिल्लारे व गुरे
यातून तुम्ही याहवेहसाठी अन्नार्पण कराल, मग ते होमार्पण किंवा यज्ञ
असो, विशेष नवस असो किंवा स्वखुशीचे अर्पण किंवा सणाचे अर्पण
असो. 4 अर्पण आणणाऱ्याने याहवेहसमोर एक पाव हीन जैतुनाच्या
तेलात मळलेल्या बारीक सपिठाचा एका एफाचा दहावा भाग सादर
करावा. 5 होमार्पण किंवा यज्ञासाठी एका कोकराबरोबर, पेयार्पण म्हणून
एक पाव हीन द्राक्षारस तयार करावा. 6 “‘मेंढ्याबरोबर एक एफाचे दोन
भाग बारीक सपीठ, एकतृतीयांश हीन जैतुनाच्या तेलात मळून अन्नार्पण
तयार करावे, 7 आणि अन्नार्पण म्हणून एकतृतीयांश हीन द्राक्षारस, हे
सर्व याहवेहला सुवास म्हणून अर्पण करावे. 8 “‘जेव्हा तुम्ही होमार्पण
किंवा यज्ञ म्हणून, याहवेहला विशेष नवस किंवा शांत्यर्पण म्हणून
एक तरुण बैल तयार करता, 9 बैलाबरोबर एफाचे तीन दशांश बारीक
सपीठ, अर्धा हीन जैतुनाच्या तेलात मळलेले असे अन्नार्पण आणावे.
10 आणि पेयार्पण म्हणून अर्धा हीन द्राक्षारस आणावा. हे याहवेहसाठी

सुवासिक असे अन्नार्पण आहे. 11 प्रत्येक बैल किंवा मेंढा, प्रत्येक
कोकरू किंवा तरुण बोकड अशा प्रकारे तयार करावे. 12 जितक्यांदा
तुम्ही हे तयार करता, प्रत्येकासाठी असेच करावे. 13 "'देशाच्या प्रत्येक
रहिवासीने याहवेहला सुवासिक अन्नार्पण सादर करताना या गोष्टी
अशाच पद्धतीने कराव्या. 14 जेव्हा कोणी परदेशी किंवा तुमच्यामधील
कोणीही इतर रहिवासी याहवेहला सुवासिक अन्नार्पण सादर करतात,
त्यांनीही तुम्ही ज्याप्रकारे करतात, त्याच पद्धतीने करावे, हे पुढील
सर्व पिढ्यांपर्यंत असावे. 15 समुदायाने स्वतःसाठी व तुमच्यामध्ये
असलेल्या परदेशीयांसाठी सारखेच नियम पाळावे. येणाऱ्या पिढ्यांसाठी
हा सर्वकाळचा नियम असावा. तुम्ही व परदेशी याहवेहसमोर सारखेच
आहात. 16 तुमच्यासाठी व तुमच्यामध्ये असलेल्या परदेशीयांसाठी
एकच नियम व कायदे असावेत.'" 17 याहवेह मोशेला म्हणाले, 18
"इस्राएली लोकांशी बोल व त्यांना सांग: ज्या देशात मी तुम्हाला घेऊन
जात आहे त्यात तुम्ही जेव्हा जाल 19 आणि त्या भूमीचे फळ खाल,
तेव्हा त्याचा एक भाग याहवेहसमोर सादर करावा. 20 तुमच्या मळलेल्या
पिठाची पहिली भाकर सादर करावी आणि ती खळयातील अर्पण
म्हणून सादर करावी. 21 तुमच्या मळलेल्या पिठाच्या पहिल्या भागाचे हे
अर्पण तुम्ही याहवेहला तुमच्या भावी पिढ्यांपर्यंत करावे. 22 "'आता
जर तुम्ही एक समुदाय म्हणून याहवेहने मोशेला दिलेल्या या आज्ञांपैकी
कोणतीही आज्ञा पाळण्यास नकळतपणे अपयशी ठरला— 23 ज्या
आज्ञा याहवेहने मोशेद्वारे तुम्हाला दिलेल्या आहेत, ज्या दिवशी त्या
दिल्या तेव्हापासून भविष्यातही येणाऱ्या पिढ्यांसाठी त्या असतील—
24 आणि जर समुदाय जागृत नसताना हे नकळत घडले असेल, तर
संपूर्ण समुदायाने एका तरुण गोऱ्ह्याचे याहवेहला सुवासिक होमार्पण
करावे आणि त्याबरोबरचे अन्नार्पण व पेयार्पण आणि पापार्पणासाठी
एक बोकड अर्पावा. 25 याजकाने सर्व इस्राएली समुदायासाठी प्रायश्चित्त
करावे, म्हणजे त्यांची क्षमा होईल; कारण त्यांनी मुद्दाम पाप केले नव्हते
आणि त्यांनी याहवेहला आपल्या पापाबद्दल अन्नार्पण व पापार्पण
सादर केले आहेत. 26 सर्व इस्राएली समुदाय व त्यामध्ये राहणारे
परदेश्यांची क्षमा केली जाईल, कारण सर्वांनी जे पाप केले ते नकळत
झाले होते. 27 "'परंतु जर केवळ एकाच व्यक्तीने नकळत पाप केले
असेल, तर त्या व्यक्तीने पापार्पणासाठी एक वर्षाची शेळी आणावी.
28 ज्या व्यक्तीने नकळत पाप केले आहे त्या व्यक्तीसाठी याजकाने
याहवेहसमोर प्रायश्चित्त करावे आणि जेव्हा प्रायश्चित केले जाईल,
तेव्हा त्या व्यक्तीला क्षमा करण्यात येईल. 29 जे कोणी नकळत पाप
करतील त्यांच्यासाठी हाच एक नियम लागू असावा, ती व्यक्ती जन्मतः
इस्राएली असो किंवा तुमच्यामध्ये राहणारा परदेशी असो. 30 "'परंतु
जे कोणीही मुद्दाम पाप करतात, ते स्वदेशी असो किंवा परदेशी, ते
याहवेहविषयी दुर्भाषण करतात, त्यांचे इस्राएली लोकांतून उच्छेदन
करावे. 31 कारण त्यांनी याहवेहच्या शब्दाला तुच्छ मानले आहे आणि
याहवेहच्या आज्ञा मोडल्या आहेत, त्यांचे खचितच उच्छेदन करावे;
त्यांचा दोष त्यांच्यावर राहील.'" 32 इस्राएली लोक रानात असताना,
एक मनुष्य शब्बाथ दिवशी लाकडे गोळा करीत असताना सापडला.
33 तेव्हा ज्यांनी त्याला लाकडे गोळा करताना पकडले, त्यांनी त्याला
मोशे, अहरोन व सर्व मंडळीसमोर आणले, 34 आणि त्यांनी त्याला
ताब्यात ठेवले, कारण त्याचे काय करावे याविषयी त्यांना काही स्पष्ट
माहीत नव्हते. 35 मग याहवेह मोशेला म्हणाले, "त्या मनुष्याने मरावे.
सर्व मंडळीने त्याला छावणीबाहेर धोंडमार करावा." 36 मग मोशेला
याहवेहने दिलेल्या आज्ञेप्रमाणे मंडळीने त्याला छावणीबाहेर नेऊन तो
मरेपर्यंत धोंडमार केली. 37 याहवेह मोशेला म्हणाले, 38 "इस्राएली
लोकांशी बोल व त्यांना सांग: येणाऱ्या सर्व पिढ्यांपर्यंत तुम्ही आपल्या
वस्त्राच्या काठांना गोंडे लावावे, प्रत्येक गोंड्यावर निळा दोरा असावा.
39 ते यासाठी की तुम्ही त्यांच्याकडे पाहावे व याहवेहच्या सर्व आज्ञांचे
तुम्हाला स्मरण व्हावे, म्हणजे तुम्ही त्यांचे पालन करावे आणि आपल्या
अंतःकरणाच्या व डोळयांच्या वासनांच्या मागे लागून व्यभिचार करू
नये. 40 मग तुम्हाला माझ्या सर्व आज्ञांचे पालन करण्याची आठवण
राहील आणि तुम्ही तुमच्या परमेश्वरासाठी पवित्र राहाल. 41 तुमचा
परमेश्वर व्हावे म्हणून ज्याने तुम्हाला इजिप्तमधून बाहेर आणले तो मीच
याहवेह आहे. मीच याहवेह तुमचा परमेश्वर आहे."

**16** लेवीचा पुत्र कोहाथ, त्याचा पुत्र इसहार, त्याचा पुत्र कोरह, आणि
रऊबेन गोत्रातील काही लोक म्हणजे एलियाबाचे पुत्र दाथान व
अबीराम व पेलेथाचा पुत्र ओन हे उन्मत्त झाले 2 आणि मोशेविरुद्ध उठले.
त्यांच्याबरोबर समाजाचे सुपरिचित व मंडळीचे नेमलेले पुढारी असे
दोनशे पन्नास इस्राएली पुरुष होते. 3 ते एकजूट होऊन मोशे व अहरोन
यांच्याकडे आले व त्यांना म्हणाले, "तुमचे आता फार झाले आहे! सर्व
समुदाय व त्यातील प्रत्येकजण पवित्र आहे आणि याहवेह त्यांच्याबरोबर
आहेत. मग तुम्ही स्वतःला याहवेहच्या मंडळीपेक्षा उच्च का मानता?"
4 जेव्हा मोशेने हे ऐकले, तेव्हा तो पालथा पडला. 5 मग तो कोरह
आणि त्याच्या अनुयायांना म्हणाला, "सकाळी याहवेह त्यांचे लोक
कोण आहेत आणि कोण पवित्र आहेत हे दाखवतील आणि याहवेह त्या
व्यक्तीला आपल्याजवळ आणतील. ज्या पुरुषाला याहवेह निवडतील
त्याला याहवेह आपल्याजवळ आणतील. 6 तर कोरहा, तू आणि तुझ्या
सर्व अनुयायांनी असे करावे: धुपाटणे घ्या 7 आणि उद्या त्यात जळते
निखारे व धूप टाकून ती याहवेहपुढे ठेवा. ज्याला याहवेह निवडतील तोच
पुरुष पवित्र ठरेल. लेवींच्या वंशजांनो, तुमचे आता फार झाले आहे!" 8
मोशे कोरहाला हे सुद्धा म्हणाला, "लेवीच्या वंशजांनो आता ऐका! 9
तुम्ही याहवेहच्या निवासमंडपाची सेवा करावी, मंडळीपुढे राहून तिची
सेवा करावी म्हणून इस्राएली लोकांच्या परमेश्वराने तुम्हाला इस्राएलच्या
इतर लोकांमधून वेगळे केले आहे आणि आपल्याजवळ घेतले ते
तुम्हाला पुरेसे नाही काय? 10 त्यांनी तुला व तुझ्याच लेवी घराण्यातील
भाऊबंदांना आपल्याजवळ घेतले, परंतु तुम्ही आता याजकपद सुद्धा घेऊ
इच्छिता. 11 तू व तुझे सर्व अनुयायी असे एकत्र आला ते याहवेहच्या
विरोधात आहे. अहरोन कोण आहे की तुम्ही त्याच्या विरोधात कुरकुर
करावी?" 12 मग मोशेने एलियाबाचे पुत्र दाथान व अबीराम यांना

बोलाविले. परंतु त्यांनी म्हटले, “आम्ही येणार नाही! 13 दूध व मध
वाहत असलेल्या देशातून तू आम्हाला या रानात मारण्यास आणले ते
पुरे नाही काय? आणि आता तुला आमच्यावर प्रभुत्व करावयाचे आहे!
14 त्या शिवाय, तू आम्हाला दूध व मध वाहणाऱ्या देशात आणले नाहीस
किंवा आम्हाला शेतीचे व द्राक्षमळ्यांचे वतन दिले नाहीस. या पुरुषांना
तू गुलाम समजतोस काय? नाही, आम्ही येणार नाही!” 15 मग मोशे
खूप संतापला आणि याहवेहला म्हणाला, “त्यांच्या अर्पणांचा स्वीकार
करू नका. त्यांच्या एका गाढवाची देखील मी चोरी केली नाही आणि
त्यांच्यातील एकालाही दुखविले नाही.” 16 पुढे मोशे कोरहाला म्हणाला,
“उद्या तुला अनुसरणाऱ्या सर्वांना घेऊन तू येथे याहवेहसमोर ये. तू
आणि ते व अहरोनही त्यावेळी हजर असेल. 17 प्रत्येकाने असे सर्व
मिळून आपआपल्या दोनशे पन्नास धुपाटण्या धुपासह याहवेहसमक्ष
घेऊन यावे. अहरोन त्याचे आणि तू तुझे धुपाटणे घेऊन हजर व्हावे.”
18 याप्रमाणे प्रत्येकाने आपले धुपाटणे घेतले, त्यात जळते निखारे व
धूप टाकला आणि ते मोशे आणि अहरोन यांच्याबरोबर सभामंडपाच्या
प्रवेशद्वाराजवळ येऊन थांबले. 19 जेव्हा कोरहाने त्यांच्याविरुद्ध असून
त्याला अनुसरणाऱ्या सर्वांना सभामंडपाच्या प्रवेशद्वाराजवळ जमविले,
याहवेहचे वैभव संपूर्ण समुदायासमक्ष प्रगट झाले. 20 याहवेह, मोशे व
अहरोन यांना म्हणाले, 21 “तुम्ही या लोकांच्या समुदायापासून दूर व्हा
म्हणजे मी क्षणार्धात त्यांचा नाश करेन.” 22 पण मोशे आणि अहरोन
याहवेहपुढे जमिनीवर पालथे पडले व विनंती करून म्हणाले “हे परमेश्वरा,
सर्व जीवधाऱ्यांना जीवनाचा श्वास प्रदान करणाऱ्या परमेश्वरा, एकाच
मनुष्याने पाप केले तरी तुम्ही सर्व लोकांवर रागावणार काय?” 23 नंतर
याहवेह मोशेला म्हणाले, 24 “कोरह, दाथान आणि अबीराम यांच्या
तंबूपासून सर्व समुदायाला दूर व्हावयाला सांग.” 25 तेव्हा मोशे दाथान
व अबीराम यांच्या तंबूकडे धावत गेला. त्याच्यामागे इस्राएली पुढारीही
गेले. 26 त्वरा करा, मोशे समुदायाला म्हणाला, “या दुष्ट माणसांच्या
तंबूंपासून दूर व्हा. त्यांच्या मालकीच्या कोणत्याही वस्तूला स्पर्श करू
नका. नाहीतर त्यांच्या पापामुळे त्यांच्याबरोबर तुमचाही नाश होईल.”
27 मग कोरह, दाथान व अबीराम यांच्या तंबूंपासून ते दूर गेले. दाथान व
अबीराम हे आपल्या पत्नी, मुले व तान्ही बाळे यांच्यासह आपआपल्या
तंबूंच्या दारांशी येऊन उभे राहिले. 28 त्यावर मोशे म्हणाला, “ज्यागोष्टी
मी करतो त्या करण्यास मला याहवेहने पाठविले आहे. हे माझ्या मनाचे
विचार नाहीत, हे तुम्हाला यावरून समजेल: 29 जर हे लोक नैसर्गिक
कारणाने अपघाताने मरण पावले, तर याहवेहने मला पाठविले नाही. 30
परंतु याहवेहने चमत्कार केला आणि या भूमीने आपले तोंड उघडून
या लोकांना त्यांच्या सर्व मालमत्तेसह जिवंतपणे अधोलोकात गिळून
टाकले, तर या लोकांनी याहवेहला तुच्छ मानले आहे, हे तुम्हाला समजून
येईल.” (Sheol h7585) 31 त्याचे हे बोलणे संपताच, त्या लोकांच्या
पायाखालची जमीन एकदम दुभागली 32 आणि कोरह व त्याचे तंबू
त्यांची कुटुंबे आणि त्यांच्याजवळ उभे असलेले त्यांचे मित्र व त्यांच्या
सर्व मालमत्तेसह पृथ्वीने गिळून टाकले. 33 ते जिवंतपणीच अधोलोकात
गेले आणि त्यांचा व त्यांच्या मालकीचे जे होते त्यांचा नाश झाला; मग
जमीन पूर्ववत झाली, त्यांचा नाश होऊन ते सर्वजण समुदायातून नाहीसे
झाले. (Sheol h7585) 34 त्यांच्या आक्रोशामुळे, “पृथ्वी आपल्यालाही
गिळून टाकील!” असे म्हणत इस्राएली लोक भीतीने ओरडत पळत
सुटले. 35 नंतर याहवेहपासून अग्नी निघाला आणि त्याने धूपाचे अर्पण
करणाऱ्या त्या दोनशे पन्नास पुरुषांना भस्म केले. 36 याहवेह मोशेला
म्हणाले, 37 “अहरोन याजकाचा पुत्र एलअज़ारला अग्नीमधून सर्व
धुपाटणी ओढून घेण्यास सांगावे. कारण ती पवित्र असून याहवेहला
समर्पित केलेली आहेत. त्याचप्रमाणे त्याने तो जळका धूपही थोड्या
अंतरावर विखरून टाकावा. 38 ज्या लोकांनी आपला जीव धोक्यात
घालून पाप केले होते, त्या लोकांच्या धुपाटण्यांतील हा धूप विखरून
टाकावा. नंतर वेदीला आच्छादन म्हणून त्या धुपाटण्याचे रुंद पत्रे तयार
करावेत, कारण ती धुपाटणी याहवेहपुढे वापरली असल्यामुळे पवित्र
आहेत. वेदीवरील हा पत्रा इस्राएली लोकांना या प्रसंगाचे चिन्ह म्हणून
राहील.” 39 त्याप्रमाणे एलअज़ार याजकाने ती दोनशे पन्नास कास्याची
धुपाटणी घेतली आणि ती ठोकून वेदीला आच्छादन करण्याकरिता
त्यांचा पत्रा तयार केला. 40 कोरह आणि त्याचे सोबत्यांची जी दशा
झाली, तशी वेदीपुढे अनाधिकृतपणे धूप जाळणाऱ्या म्हणजे अहरोनाचा
वंशज नसलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीची होऊ नये, याची आठवण
इस्राएली लोकांना देण्याकरिता ते वेदीवरील आच्छादन होते. याप्रमाणे
याहवेहने मोशेला दिलेल्या आज्ञा पाळण्यात आल्या. 41 पण दुसऱ्याच
दिवशी सकाळी सर्व इस्राएली लोक मोशे आणि अहरोन यांच्याविरुद्ध
पुन्हा कुरकुर करू लागले. ते त्यांना म्हणाले, “तुम्हीच याहवेहच्या
लोकांना मारून टाकले.” 42 लवकरच तिथे मोशे व अहरोनाच्या विरुद्ध
समुदाय जमला. तेवढ्यात एकाएकी सभामंडपावर मेघ उतरून याहवेहचे
गौरव पसरल्याचे त्यांना दिसले. 43 मोशे आणि अहरोन सभामंडपाच्या
दाराशी येऊन उभे राहिले; 44 आणि याहवेह मोशेला म्हणाले, 45
“या लोकांपासून दूर व्हा म्हणजे मला त्यांचा क्षणात नाश करता
येईल.” आणि ते जमिनीवर पालथे पडले. 46 नंतर मोशे अहरोनाला
म्हणाला, “त्वरा कर. एक धुपाटणे घे. वेदीवरील अग्नी त्यावर ठेव.
त्यावर धूप टाक आणि लोकांसाठी प्रायश्चित्त कर. कारण याहवेहचा
कोप त्यांच्यावर भडकला आहे आणि पीडा सुरू झाली आहे.” 47 मोशेने
सांगितल्याप्रमाणे अहरोनाने केले. तो लोकांमध्ये पळत गेला, कारण
पीडा त्यांच्यामध्ये सुरू झाली होती. त्याने धूप जाळले आणि लोकांसाठी
प्रायश्चित्त केले. 48 मग तो मृतांच्या आणि जिवंतांच्यामध्ये उभा राहिला
आणि पीडा थांबली. 49 परंतु त्याअगोदरच 14,700 लोक मरण
पावले होते. आदल्याच दिवशी कोरहाबरोबर मेलेल्या लोकांव्यतिरिक्त
हे आणखी लोक मरण पावले होते. 50 यानंतर अहरोन मोशेकडे
सभामंडपाच्या दाराशी परत आला, कारण पीडा थांबली होती.

**17** याहवेह मोशेला म्हणाले, 2 “इस्राएली लोकांशी बोल व
त्यांच्याकडून त्यांच्या पूर्वजांच्या गोत्रांप्रमाणे प्रत्येक पुढाऱ्याकडून
एक काठी अशा बारा काठ्या घे. प्रत्येक पुरुषाचे नाव त्याच्या काठीवर

लिही. 3 लेवी वंशाच्या काठीवर अहरोनाचे नाव लिही, कारण प्रत्येक पूर्वजांच्या गोत्राच्या पुढाऱ्याची एक काठी असावी. 4 सभामंडपात जिथे मी तुझी भेट घेत असतो, तिथे कराराच्या नियमाच्या कोशापुढे त्या काठ्या ठेवाव्या. 5 ज्या पुरुषाची मी निवड करेन त्याच्या काठीला अंकुर फुटेल आणि इस्राएली लोक तुमच्याविरुद्ध सातत्याने जी कुरकुर करतात त्यापासून मी स्वतःची सुटका करेन.” 6 म्हणून मोशे इस्राएली लोकांशी बोलला आणि त्यांच्या पुढाऱ्यांनी त्याला बारा काठ्या दिल्या, त्यांच्या पूर्वजांच्या गोत्रांप्रमाणे प्रत्येक पुढाऱ्याकडून एक काठी आणि त्यांच्यामध्ये एक अहरोनाची काठी होती. 7 मोशेने त्या काठ्या कराराच्या नियमाच्या मंडपात याहवेहसमोर ठेवल्या. 8 दुसऱ्या दिवशी मोशे मंडपात गेला आणि अहरोनाची काठी जी लेवी वंशाच्या वतीने ठेवली होती, ती केवळ अंकुरितच नव्हे तर त्याला कळी आली असून तिच्यावर बदाम पिकलेले दिसले. 9 मग मोशेने त्या सर्व काठ्या याहवेहच्या समक्षतेतून इस्राएली लोकांकडे आणल्या. त्यांनी त्या पाहिल्या आणि प्रत्येक पुढाऱ्याने आपआपली काठी घेतली. 10 तेव्हा याहवेह मोशेला म्हणाले, “अहरोनाची काठी कराराच्या नियमाच्या कोशापुढे परत ठेव, बंड करणाऱ्यांना चिन्ह म्हणून ती तिथे ठेवावी. अशाने माझ्याविरुद्ध करीत असलेल्या त्यांच्या कुरकुरीचा शेवट होईल, म्हणजे ते मरणार नाहीत.” 11 याहवेहने आज्ञा केल्याप्रमाणेच मोशेने केले. 12 इस्राएली लोक मोशेला म्हणाले, “आम्ही मरून जाऊ! आम्ही हरलो आहोत, आम्ही सर्व हरलो आहोत! 13 जो कोणी याहवेहच्या निवास मंडपाजवळ जरी येईल तरी त्याचा नाश होईल. आम्ही सर्व मरणार आहोत का?”

**18** याहवेह अहरोनाला म्हणाले, “पवित्रस्थानासंबंधी झालेल्या अन्यायास तू, तुझे पुत्र आणि तुझे घराणे जबाबदार असणार व याजकपणासंबंधीच्या अपराधासही तू व तुझे पुत्र जबाबदार असणार. 2 तू व तुझे पुत्र कराराच्या नियमाच्या कोशापुढे जेव्हा सेवा करतात तेव्हा तुझ्याशी जडून व तुला मदत करण्यासाठी लेवी वंशातील, तुझ्या पूर्वजांच्या गोत्रातील तुझ्या बांधवांना आपल्यासोबत आण. 3 ते तुला जबाबदार असणार व त्यांनी मंडपातील सर्व कर्तव्ये पार पाडावीत, परंतु त्यांनी पवित्रस्थानाच्या पात्रांजवळ किंवा वेदीजवळ जाऊ नये. नाहीतर ते व तुम्हीही मृत व्हाल. 4 त्यांनी तुझ्याशी जडून सभामंडपाच्या सेवेसंबंधी—म्हणजेच मंडपातील सर्व कामासंबंधी जबाबदार असावे—आणि जिथे तू असणार तिथे इतर कोणीही जवळ येऊ नये. 5 “पवित्रस्थान व वेदीच्या सेवेसंबंधी तू जबाबदार असावे, यासाठी की इस्राएली लोकांवर माझा क्रोध पुन्हा भडकू नये. 6 इस्राएली लोकांतून सभामंडपातील सेवाकार्य करण्यासाठी, याहवेहसाठी समर्पित म्हणून लेवी वंशातील तुझे सोबती तुझ्यासाठी भेट म्हणून निवडले आहेत. 7 परंतु वेदी व आतील पडद्यासंबंधी केवळ तू व तुझ्या पुत्रांनीच याजक म्हणून पवित्रस्थानातील पडद्यामागील आणि वेदीवरील पवित्र सेवा करावी. याजकपणाची सेवा मी तुला भेट म्हणून देत आहे. इतर कोणीही जे पवित्रस्थानाच्या जवळ येतील त्यांना जिवे मारावे.” 8 याहवेह अहरोनाला म्हणाले, मला सादर केलेल्या अर्पणांवर मी स्वतः तुला प्रभारी नेमले आहे; सर्व पवित्र अर्पणे जी इस्राएली लोक मला देतात ती मी तुला व तुझ्या पुत्रांना तुमचा वाटा, तुमचा शाश्वत भाग म्हणून देत आहे. 9 जो अग्नीपासून राखला जातो तो अर्पणातील परमपवित्र भाग तुझा व्हावा. परमपवित्र अर्पणे म्हणून ते माझ्यासाठी जे आणतात त्या सर्वांतून, ती अन्नार्पणे किंवा पापार्पणे किंवा दोषार्पणे असो, तो वाटा तुझा व तुझ्या पुत्रांचा आहे. 10 जसे परमपवित्र वस्तूतील, तसे ते खावे; प्रत्येक पुरुषाने ते खावे, ते तुम्ही पवित्र मानावे. 11 हे देखील तुझे असावे: इस्राएली लोकांच्या हेलावणीच्या अर्पणातील ज्या भेटी बाजूला काढून ठेवल्या जातात, त्या मी तुला व तुझ्या पुत्रांना व तुझ्या कन्यांना तुमचा शाश्वत वाटा म्हणून देतो. तुझ्या घरातील जे कोणी विधीनुसार शुद्ध असतील त्या प्रत्येकाने ते खावे. 12 जैतुनाचे सर्वोत्तम तेल आणि सगळा उत्तम नवा द्राक्षारस आणि धान्याच्या हंगामाचे प्रथमफळ म्हणून याहवेहला लोक देतात ते मी तुला देत आहे. 13 आपल्या भूमीचे सर्व प्रथमफळ लोक याहवेहकडे आणतात ते तुझे होईल. तुझ्या घरातील जे कोणी विधीनुसार शुद्ध आहेत त्या प्रत्येकाने ते खावे. 14 इस्राएलात याहवेहला समर्पित केलेली प्रत्येक वस्तू तुझी होईल. 15 उदरातून जन्मलेले प्रत्येक प्रथम जन्मलेले संतान, जे याहवेहला अर्पिलेले आहेत, मग ते मनुष्याचे असो किंवा जनावरांचे, ते तुझे होतील. परंतु प्रत्येक प्रथम जन्मलेल्या पुत्राला व प्रत्येक अशुद्ध जनावराच्या नर वत्साला तू खंडणी भरून सोडवावे. 16 ते एक महिन्याचे झाल्यावर, पवित्रस्थानाच्या शेकेलानुसार ठरवलेली खंडणीची किंमत जी पाच चांदीचे शेकेल, म्हणजेच वीस गेरा भरून त्यांची खंडणी भरावी. 17 गाईचे, मेंढीचे व शेळीचे प्रथमवत्स यांची तू खंडणी भरू नये; ते पवित्र आहे. त्यांचे रक्त वेदीवर शिंपडावे आणि त्यांची चरबी अन्नार्पण म्हणून जाळावी. हा याहवेहला संतोषविणारा सुगंध आहे. 18 जसे ओवाळणीचा छातीचा भाग व उजवी मांडी तुझे आहेत, त्याचप्रमाणे त्यांचे मांस सुद्धा तुझ्या वाट्याचे होईल. 19 इस्राएली लोक याहवेहसाठी जी पवित्र अर्पणे आणतात, त्यातील जे काही बाजूला काढून ठेवले जाते, ते मी तुला आणि तुझ्या पुत्रांना व तुझ्या कन्यांना शाश्वत वाटा म्हणून देत आहे. हा याहवेहसमोर तुझ्यासाठी व तुझ्या संतानांसाठी सर्वकाळचा मिठाच्या करार आहे. 20 याहवेहने अहरोनाला म्हटले, “त्यांच्या देशात तुला वतन असणार नाही किंवा तुला त्यांच्यात कोणताही वाटा असणार नाही; इस्राएलमध्ये मी तुझा वाटा व तुझे वतन आहे.” 21 लेवी वंश सभामंडपाची सेवा करताना जी कामे करतात त्याचा मोबदला म्हणून इस्राएलातून येणारा सर्व दशांश मी त्यांना त्यांचे वतन असे देत आहे. 22 येथून पुढे इस्राएली लोकांनी सभामंडपाजवळ जाऊ नये, नाहीतर त्यांच्या पापाचा परिणाम त्यांना भोगावा लागेल व ते मरतील. 23 लेवी लोक सभामंडपामध्ये सेवा करतील आणि त्याविरोधात केलेल्या अपराधाची जबाबदारी ते स्वतः वाहतील. येणाऱ्या पिढ्यांपर्यंत हा सर्वकाळचा नियम असेल. इस्राएलमध्ये त्यांना वतन मिळणार नाही. 24 त्याऐवजी इस्राएली लोक जो दशांश अर्पण म्हणून याहवेहला सादर करतात तो मी लेवींना वतन म्हणून देत आहे. म्हणूनच त्यांच्याबद्दल

मी म्हटले: “त्यांना इस्राएलमध्ये वतन नसणार.” 25 याहवेह मोशेला म्हणाले, 26 “लेवी लोकांशी बोल व त्यांना सांग: ‘इस्राएलातून जो दशांश मी तुम्हाला तुमचे वतन म्हणून देतो, जेव्हा तो तुम्हाला मिळतो, त्या दशमांशातील दहावा हिस्सा याहवेहचे अर्पण म्हणून सादर करावा. 27 तुमचे अर्पण खळ्यातील धान्य किंवा द्राक्षकुंडातील रसाप्रमाणे तुमच्यासाठी गणले जाईल. 28 याप्रकारे इस्राएलातून जो दशांश तुम्हाला मिळतो त्यातून तुम्ही सुद्धा आपले अर्पण याहवेहला सादर करावे. या दशमांशातील जो याहवेहचा वाटा तो तुम्ही अहरोन याजकाला द्यावा. 29 तुम्हाला दिलेल्या प्रत्येक वस्तूतील सर्वोत्तम आणि अतिपवित्र भाग याहवेहचा भाग म्हणून तुम्ही सादर करावा.’ 30 “लेव्यांना सांग: ‘जेव्हा तुम्ही सर्वोत्तम भाग सादर करतात, ते तुमच्यासाठी खळ्यातील किंवा द्राक्षकुंडातील उत्पन्न गणले जाईल. 31 बाकीच्या अर्पणातून तू व तुझ्या घराण्याने कोणत्याही ठिकाणी खावे, कारण सभामंडपातील तुमच्या सेवेसाठी असलेले ते तुमचे वेतन आहे. 32 सर्वोत्तम भाग सादर केल्यामुळे तुम्ही याबाबतीत दोषी ठरणार नाही; मग तुम्ही इस्राएली लोकांची अर्पणे विटाळविणार नाही व तुम्ही मरणार नाही.’”

**19** याहवेह मोशे आणि अहरोनला म्हणाले: 2 “याहवेहने आज्ञापिलेल्या कराराचा हा एक नियम आहे: इस्राएली लोकांस सांग की, जी अव्यंग किंवा निर्दोष आणि जिच्यावर कधीही जू घातले नाही अशी तांबड्या रंगाची कालवड त्यांनी तुमच्याकडे आणावी. 3 ती एलअज़ार याजकाकडे द्यावी; तिला छावणीबाहेर न्यावे व त्याच्यासमोर कालवडीचा वध करावा. 4 त्यानंतर एलअज़ार याजकाने तिचे थोडे रक्त आपल्या बोटावर घ्यावे व सभामंडपाच्या समोरील बाजूस सात वेळा ते शिंपडावे. 5 एलअज़ार याजकादेखत ती कालवड; तिचे कातडे, मांस, रक्त व आतडे यासह जाळण्यात यावी. 6 याजकाने गंधसरूचे लाकूड, एजोब आणि किरमिजी लोकरीचा दोरा घेऊन त्या जळत्या कालवडीवर टाकावा. 7 त्यानंतर याजकाने आपली वस्त्रे धुवावी व पाण्याने आंघोळ करावी. मग त्याने छावणीत यावे, परंतु विधीनुसार संध्याकाळपर्यंत त्याने अशुद्ध राहावे. 8 जो पुरुष ती कालवड जाळतो त्यानेही आपली वस्त्रे धुवावी व पाण्याने आंघोळ करावी आणि त्यानेही संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे. 9 “शुद्ध असलेल्या एका पुरुषाने कालवडीची राख गोळा करावी व छावणीबाहेर विधीनुसार शुद्ध असलेल्या ठिकाणी ठेवावी. ही राख इस्राएली समाजाने शुद्धीकरणाच्या पाण्यामध्ये वापरावी; ते पापक्षालनासाठी आहे. 10 जो मनुष्य कालवडीची राख गोळा करतो त्यानेही आपली वस्त्रे धुवावी व त्यानेही संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे. इस्राएली लोक आणि त्यांच्यामध्ये राहणारे परदेशीय लोक यांच्यासाठी हा सर्वकाळचा नियम असावा. 11 “जो कोणी मानवी मृतदेहाला स्पर्श करतो, त्यांनी सात दिवस अशुद्ध राहावे. 12 त्यांनी तिसऱ्या दिवशी व सातव्या दिवशी स्वतःला पाण्याने शुद्ध करावे; मग ते शुद्ध होतील. पण तिसऱ्या दिवशी व सातव्या दिवशी त्यांनी स्वतःला शुद्ध केले नाही, तर ते अशुद्धच असतील. 13 मानवी मृतदेहाला स्पर्श केल्यानंतरही जर त्यांनी स्वतःला शुद्ध केले नाही, तर ते याहवेहचा निवासमंडप विटाळवितात. इस्राएली लोकांमधून त्यांना काढून टाकले जावे. कारण शुद्ध करणारे पाणी त्याच्यावर शिंपडले गेले नाही, ते अशुद्ध आहेत; त्यांचा अशुध्दपणा त्यांच्यावर तसाच राहतो. 14 “एखादा मनुष्य जेव्हा तंबूमध्ये मरण पावतो त्यावेळी पाळावयाचा नियम हा: जो कोणी त्या तंबूमध्ये प्रवेश करतो आणि जो कोणी तंबूत आहे त्यांनी सात दिवस अशुद्ध राहावे, 15 आणि दोरीने झाकण न बांधलेले प्रत्येक उघडे पात्र अशुद्ध असावे. 16 “जो कोणी मोकळ्या मैदानात तलवारीने मारलेल्या व्यक्तीच्या शवाला स्पर्श करतो किंवा कोणी नैसर्गिकरित्या मरण पावलेल्याला किंवा कोणी मानवी हाडाला किंवा कबरेला स्पर्श करतो, त्याने सात दिवस अशुद्ध राहावे. 17 “अशुद्ध व्यक्तीसाठी, जाळलेल्या शुद्धतेच्या अर्पणातून थोडी राख घेऊन ती एका पात्रात घेऊन त्यांच्यावर स्वच्छ पाणी ओतावे. 18 आणि जो मनुष्य विधीनुसार शुद्ध आहे, त्याने एजोबाची फांदी घेऊन ती पाण्यात बुचकळावी व ते तंबू व त्याची पात्रे आणि तिथे उपस्थित असलेल्या लोकांवर शिंपडावे. त्याचप्रमाणे ज्यांनी मानवी हाड किंवा कबर किंवा ज्याचा वध झाला किंवा नैसर्गिकरित्या मरण पावलेल्याला स्पर्श केला त्यांच्यावरही ते पाणी शिंपडावे. 19 जो मनुष्य शुद्ध आहे, त्याने अशुद्ध झालेल्या व्यक्तींवर तिसऱ्या व सातव्या दिवशी हे पाणी शिंपडावे आणि सातव्या दिवशी त्याने त्यांना शुद्ध करावे. ज्यांचे शुद्धीकरण होत आहे त्यांनी आपली वस्त्रे धुवावी व पाण्याने आंघोळ करावी आणि त्या संध्याकाळी ते शुद्ध होतील. 20 पण जे अशुद्ध आहेत आणि स्वतःला शुद्ध करीत नाहीत, त्यांना समाजातून काढून टाकले जावे, कारण त्यांनी याहवेहचे पवित्रस्थान विटाळविले आहे. शुद्धतेचे पाणी त्यांच्यावर शिंपडले गेले नाही आणि ते अशुद्ध आहेत. 21 हा त्यांच्यासाठी कायमचा नियम आहे. “जो मनुष्य शुद्धतेचे पाणी शिंपडतो त्यानेही आपली वस्त्रे धुवावीत आणि जो कोणी शुद्धतेच्या पाण्याला स्पर्श करतो तो संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहील. 22 अशुद्ध व्यक्ती ज्या वस्तूला स्पर्श करेल ती अशुद्ध होईल आणि जो कोणी त्या वस्तूला स्पर्श करेल त्यानेही संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे.”

**20** पहिल्या महिन्यात सर्व इस्राएली लोकांचा समुदाय सीन अरण्यात आला आणि त्यांनी कादेश येथे तळ दिला. तिथे मिर्याम मरण पावली व तिला तिथेच पुरण्यात आले. 2 त्या ठिकाणी समुदायासाठी पाणी नव्हते आणि लोक मोशे आणि अहरोन यांच्याविरुद्ध एकत्र आले. 3 लोक मोशेशी भांडण करीत म्हणाले, “याहवेहसमोर आमचे भाऊबंद जेव्हा मरून पडले, तेव्हाच आम्हीही मेलो असतो तर बरे होते! 4 याहवेहच्या समुदायाला तुम्ही या अरण्यात का आणले, आम्ही व आमच्या जनावरांनी मरावे म्हणून आणले काय? 5 इजिप्त देशाबाहेर या भयंकर ठिकाणी तुम्ही आम्हाला का आणले? या ठिकाणी ना धान्य किंवा अंजीर ना द्राक्षवेल किंवा डाळिंबे आहेत आणि प्यायला पाणीही नाही!” 6 मग मोशे व अहरोन मंडळीपुढून निघून सभामंडपाच्या दाराशी गेले व पालथे पडले आणि याहवेहचे तेज त्यांना प्रकट झाले. 7 मग याहवेह मोशेला म्हणाले, 8 “आपली काठी घे आणि तू व तुझा भाऊ अहरोन मंडळीला एकत्र करा. त्यांच्यासमोर खडकाशी बोल आणि

त्यातून पाणी निघेल. तू त्या खडकातून समुदायासाठी पाणी काढशील म्हणजे ते व त्यांचे कळप पाणी पितील.” 9 मोशेने आपली काठी याहवेहच्या उपस्थितीपुढून घेतली आणि जसे आज्ञापिले त्याप्रमाणेच त्याने केले. 10 मोशे आणि अहरोन यांनी मंडळीला खडकासमोर एकत्र केले व मोशे त्यांना म्हणाला, “अहो, बंडखोरांनो, तुम्ही ऐका, या खडकातून आम्ही तुमच्यासाठी पाणी काढावे काय?” 11 मग मोशेने आपला हात उगारला व आपल्या काठीने खडकावर दोनदा वार केला. तेव्हा पाण्याचा मोठा प्रवाह वाहू लागला व समुदायाने आणि त्यांच्या कळपाने पाणी प्याले. 12 परंतु याहवेह मोशे आणि अहरोन यांना म्हणाले, “कारण इस्राएली लोकांच्या दृष्टीत मी पवित्र असावे इतका सन्मान करण्याइतपत तुम्ही माझ्यावर पुरेसा विश्वास ठेवला नाही, मी जो देश त्यांना देऊ करीत आहे त्यात या समुदायाला तुम्ही आणणार नाही.” 13 हे मरीबाहचे पाणी होते, जिथे इस्राएली लोक याहवेहशी भांडले आणि जिथे याहवेह त्यांच्यामध्ये पवित्र असे सिद्ध केले गेले.
14 मोशेने कादेशमधून एदोमाच्या राजाकडे निरोप्यांच्या द्वारे हा संदेश पाठविला: “तुझा भाऊ इस्राएल असे म्हणतो: आमच्यावर आलेल्या सर्व कष्टांविषयी तुला ठाऊक आहे. 15 आमचे पूर्वज खाली इजिप्तमध्ये गेले आणि पुष्कळ वर्षे आम्ही तिथे राहिलो. इजिप्तच्या लोकांनी आम्हाला व आमच्या पूर्वजांना अयोग्य वागणूक दिली, 16 पण आम्ही जेव्हा याहवेहचा धावा केला, तेव्हा याहवेहने आमचे रडणे ऐकले, त्यांनी एक दूत पाठवून आम्हाला इजिप्त देशातून बाहेर आणले. “आता आम्ही इथे तुझ्या सीमेवरील टोकावर, कादेश नगरात आहोत. 17 कृपा करून आम्हाला तुझ्या देशातून जाऊ दे. आम्ही कोणत्याही शेतातून किंवा द्राक्षमळ्यातून जाणार नाही किंवा कोणत्याही विहिरीचे पाणी पिणार नाही. तुझी सीमा ओलांडून जाईपर्यंत आम्ही राजमार्गावरच प्रवास करू.” 18 पण एदोम म्हणाला: “तुम्ही इथून पार जाऊ शकत नाही; जर तुम्ही प्रयत्न केला, तर आम्ही चाल करून तुमच्यावर तलवारीने हल्ला करू.” 19 इस्राएली लोकांनी उत्तर दिले: “आम्ही महामार्गानेच जाऊ आणि जर आम्ही किंवा आमचे कळप तुमचे पाणी प्यालो, तर आम्ही त्याची किंमत भरू. आम्हाला केवळ पायी जायचे आहे; दुसरे काही नाही.” 20 त्यांनी पुन्हा उत्तर दिले: “तुम्ही जाऊ शकत नाही.” तेव्हा एदोम मोठे व सामर्थ्यवान सैन्य घेऊन त्यांच्याविरुद्ध बाहेर आला. 21 एदोमाने त्यांना हद्दीतून पार जाण्यास मनाई केली त्यामुळे इस्राएली त्यांच्यापासून वळून माघारी गेले. 22 संपूर्ण इस्राएली समुदाय कादेशहून निघून होर पर्वतावर आला. 23 एदोमच्या सीमेवर, होर पर्वतावर याहवेह मोशे व अहरोनला म्हणाले, 24 “अहरोन आपल्या लोकांशी जाऊन मिळेल. इस्राएली लोकांना मी जो देश देत आहे त्यात तो प्रवेश करणार नाही, कारण मरीबाहच्या पाण्याकडे तुम्ही दोघांनी माझ्या आज्ञेविरुद्ध बंड केले. 25 अहरोन व त्याचा पुत्र एलअज़ार यांना घेऊन होर पर्वतावर जा. 26 अहरोनाची वस्त्रे काढून ती त्याचा पुत्र एलअज़ारला घाल, कारण तो त्याच्या लोकांशी जाऊन मिळेल; तो तिथे मरण पावेल.” 27 जसे याहवेहने आज्ञापिले त्यानुसार मोशेने केले: सर्व समुदायादेखत ते होर पर्वतावर गेले. 28 मोशेने अहरोनाची वस्त्रे उतरविली आणि एलअज़ारावर चढविली आणि अहरोन त्या डोंगराच्या शिखरावर मरण पावला. नंतर मोशे आणि एलअज़ार डोंगरावरून खाली आले, 29 आणि अहरोन मरण पावला असे जेव्हा समुदायाला समजले, तेव्हा सर्व इस्राएलने तीस दिवस शोक केला.

**21** इस्राएली लोक अथारीमच्या वाटेने येत आहेत असे नेगेवमध्ये राहत असलेला कनानी राजा अरादने जेव्हा ऐकले, तेव्हा त्याने इस्राएली लोकांवर हल्ला केला व काहींना कैद केले. 2 तेव्हा इस्राएलने याहवेहपुढे ही शपथ घेतली: “जर तुम्ही या लोकांना आमच्या हाती दिले तर आम्ही त्यांची शहरे पूर्णपणे नाश करू.” 3 याहवेहने इस्राएली लोकांची विनंती ऐकली आणि कनानी लोकांना त्यांच्या हाती दिले. त्यांनी त्यांचा व त्यांच्या नगरांचा पूर्णपणे नाश केला; म्हणून त्या ठिकाणाचे नाव होरमाह असे पडले. 4 नंतर इस्राएली लोक होर पर्वताकडून प्रवास करीत एदोमाला वळसा घालून तांबड्या समुद्राच्या वाटेने प्रवास करीत निघाले; परंतु लोक वाटेतच अधीर झाले; 5 ते परमेश्वराविरुद्ध व मोशेविरुद्ध कुरकुर करीत बोलू लागले व म्हणाले, “तुम्ही आम्हाला या रानात मरावे म्हणून इजिप्तमधून का आणले? येथे भाकर नाही! पाणी नाही! आणि हे बेचव अन्न आम्हाला नकोसे झाले आहे.” 6 तेव्हा याहवेहने त्यांच्यामध्ये विषारी साप पाठविले; ते लोकांना चावले आणि पुष्कळ इस्राएली लोक मरण पावले. 7 लोक मोशेकडे आले व म्हणाले, “याहवेहविरुद्ध व तुझ्याविरुद्ध बोलून आम्ही पाप केले आहे. याहवेहने हे साप आमच्यापासून दूर घालवून द्यावे म्हणून प्रार्थना कर.” तेव्हा मोशेने लोकांसाठी प्रार्थना केली. 8 तेव्हा याहवेहने मोशेला म्हटले, “सापाची एक प्रतिमा तयार कर आणि ती एका खांबावर टांग; ज्याला साप चावेल त्या व्यक्तीने खांबावर टांगलेल्या सापाकडे पाहिल्यास तो जगेल.” 9 तेव्हा मोशेने कास्याचा साप तयार केला व तो खांबावर टांगला, तेव्हा ज्या कोणाला साप चावला व त्यांनी त्या कास्याच्या सापाकडे पाहिले म्हणजे ते जगत असत. 10 इस्राएली लोक प्रवास करीत पुढे निघाले आणि ओबोथ येथे तिथे त्यांनी तळ दिला. 11 नंतर ते ओबोथहून निघाले व पूर्वेकडे मोआबासमोर ईये-अबारीम रानात त्यांनी तळ दिला. 12 तिथून निघून त्यांनी जेरेद खोर्‍यात तळ दिला. 13 नंतर तिथून निघून, अमोर्‍यांच्या रानातील सीमेतून निघणार्‍या आर्णोन नदीजवळ त्यांनी तळ दिला. आर्णोन नदी मोआबाची सीमा आहे, जी मोआब आणि अमोरी यांच्यामध्ये आहे. 14 यावरून याहवेहच्या युद्धाच्या पुस्तकात म्हटले आहे: “…सूफाहतील वाहेब व आर्णोनाचे ओहोळ 15 आणि ओहोळांचा जो ओघ आर येथील वस्तीकडे वाहतो आणि मोआब प्रदेशालगत आहे.” 16 तिथून ते बैर म्हणजे विहीर या ठिकाणाकडे निघाले. ज्या ठिकाणी याहवेह मोशेला म्हणाले होते, “लोकांना बोलव म्हणजे मी त्यांना पाणी देईन.” 17 मग इस्राएलने हे गीत गाईले: “हे विहिरी, उफाळून ये! त्याविषयी गा, 18 जी विहीर राजपुत्रांनी खोदली, की ज्यामध्ये लोकांचे सरदार— आपल्या राजदंड आणि काठीसह बुडले.” मग ते त्या रानातून मत्तानाहला गेले,

19 मत्तानाहहून नाहालीयेल, नाहालीयेलपासून बामोथास, 20 आणि
बामोथपासून मोआबामधील खोऱ्यापर्यंत जिथे पिसगाच्या शिखरावर
ओसाड जमीन दिसते. 21 इस्राएलने अमोऱ्यांचा राजा सीहोनकडे दूत
पाठवून म्हटले: 22 “आम्हाला तुझ्या देशामधून जाऊ दे. आम्ही शेताकडे
किंवा द्राक्षमळ्याकडे वळणार नाही किंवा विहिरीतील पाणी पिणार
नाही. तुमची सीमा पार करेपर्यंत आम्ही केवळ राजमार्गानेच प्रवास
करू.” 23 परंतु सीहोन राजाने इस्राएलास त्याच्या सीमेमधून जाण्यास
परवानगी दिली नाही. त्याने आपल्या संपूर्ण सैन्याला जमा केले व
इस्राएला विरुद्ध बाहेर रानात गेला आणि याहस येथे पोहोचल्यावर तो
इस्राएलाशी लढला. 24 परंतु इस्राएलने त्याला तलवारीवर धरले आणि
आर्णोन नदीपासून यब्बोक नदीपर्यंत, अम्मोनी लोक राहतात तिथपर्यंत
त्यांच्या देशावर कब्जा केला, कारण त्यांची सीमा तटबंदची होती. 25
याप्रकारे इस्राएलने हेशबोन व आसपासच्या नगरांसह अमोऱ्यांची सर्व
नगरे ताब्यात घेतली व त्यात वस्ती केली. 26 हेशबोन हे अमोऱ्यांचा
राजा सीहोनचे शहर होते, ज्याने मोआबाच्या पूर्वीच्या राजाशी युद्ध
केले होते आणि आर्णोन पर्यंतचा सर्व प्रदेश त्याच्याकडून घेतला होता.
27 म्हणूनच कवी म्हणतात: “हेशबोनला या आणि ते पुन्हा बांधू द्या;
सीहोनाच्या शहराची पुनर्स्थापना होऊ द्या. 28 “हेशबोनमधून अग्नी
निघाला, सीहोनाच्या शहरातून ज्वाला निघाली. त्याने मोआबचे आर या
आर्णोनाच्या उंच प्रदेशातील नागरिकांना भस्म केले आहे. 29 हे मोआबा,
तुझा धिक्कार असो! कमोशाच्या लोकांनो, तुम्ही नष्ट झाला आहात!
त्याने आपल्या मुलांना निर्वासित केले व अमोऱ्यांचा राजा सीहोनच्या
हाती आपल्या मुलींना बंदी म्हणून दिले. 30 “पण आम्ही त्यांना पराजित
केले आहे; दिबोनपर्यंत हेशबोनचे वर्चस्व नष्ट झाले आहे. मेदबापर्यंत
पसरलेल्या नोफाहपर्यंत, आम्ही त्यांचा नाश केला आहे.” 31 याप्रमाणे
इस्राएली अमोरी लोकांच्या देशात स्थायिक झाले. 32 मोशेने याजेर
नगराकडे हेर पाठवल्यानंतर, इस्राएली लोकांनी तेथील आसपासच्या
वसाहती हस्तगत केल्या आणि तिथे असलेल्या अमोरी लोकांना बाहेर
घालवून दिले. 33 नंतर तिथून वळून ते बाशानाच्या वाटेने वर गेले आणि
बाशानचा राजा ओग आणि त्याचे सर्व सैन्य जमवून त्यांच्याशी युद्ध
करण्यासाठी एद्रेई येथे गेले. 34 याहवेहने मोशेला म्हटले, “त्याला भिऊ
नकोस, कारण मी त्याला व त्याच्या सर्व सैन्याला तुझ्या हाती दिले
आहे. अमोऱ्यांचा राजा सीहोन जो हेशबोनात राज्य करीत होता, याचे तू
जसे केले तसेच याला कर.” 35 तेव्हा इस्राएली लोकांनी त्याला, त्याची
मुले व सर्व सैन्यासह नष्ट करून टाकले, त्यांच्यातील कोणीही वाचला
नाही आणि इस्राएली लोकांनी त्याचा देश ताब्यात घेतला.

**22** नंतर इस्राएली लोक प्रवास करीत मोआबाच्या मैदानात आले, जे
यार्देनच्या पलीकडे यरीहोच्या समोर आहे. 2 इस्राएली लोकांनी
अमोरी लोकांचे काय केले हे सर्व सिप्पोरचा पुत्र बालाकाने पाहिले.
3 इस्राएली लोक पुष्कळ आहेत हे पाहून मोआब फार घाबरला.
इस्राएलमुळे मोआब हादरून गेला. 4 मोआबी लोकांनी मिद्यान्यांच्या
वडील लोकांना म्हटले, “जसा बैल शेतातील गवत चाटून फस्त करतो,
त्याप्रमाणे हा मोठा जमाव आमच्या सभोवती असलेले सर्वकाही चाटून
घेईल.” तेव्हा सिप्पोरचा पुत्र बालाक, जो त्यावेळी मोआबाचा राजा
होता, 5 त्याने बौराचा पुत्र बलामला बोलवायला दूत पाठवले. तो
त्यावेळी फरात नदीजवळ त्याच्या मातृभूमीत असलेल्या पथोर येथे
होता. त्याला बालाक म्हणाला: “इजिप्तमधून काही लोक बाहेर आले
आहेत; व त्यांनी पृथ्वी व्यापून टाकली आहे आणि आता माझ्यासमोर
वसले आहेत. 6 तर आता ये आणि या लोकांना शाप दे, कारण ते
माझ्यासाठी खूप प्रबळ आहेत. मग कदाचित मी त्यांचा पराभव करून
त्यांना देशातून हाकलून देऊ शकेन. कारण मला माहीत आहे की
ज्या कोणाला तू आशीर्वाद देतोस ते आशीर्वादित होतात आणि ज्या
कोणाला तू शाप देतोस ते शापित होतात.” 7 मोआबी व मिद्यानी
वडील, शकुन पाहण्यासाठी मोबदला घेऊन निघाले. जेव्हा ते बलामाकडे
आले, तेव्हा बालाक जे काही म्हणाला ते त्याला सांगितले. 8 बलाम
त्यांना म्हणाला, “आज रात्री येथे मुक्काम करा आणि याहवेह मला
जे काही सांगतील ते मी तुम्हाला कळवेन.” म्हणून मोआबी सरदार
त्याच्याकडे राहिले. 9 परमेश्वराने बलामाकडे येऊन त्याला विचारले,
“तुझ्याबरोबर हे पुरुष कोण आहेत?” 10 बलाम परमेश्वराला म्हणाला,
“सिप्पोरचा पुत्र बालाक, मोआबाच्या राजाने मला हा संदेश पाठवला
आहे: 11 ‘इजिप्तमधून काही लोक बाहेर आले आहेत; व त्यांनी पृथ्वी
व्यापून टाकली आहे. तर आता ये आणि माझ्यासाठी त्यांना शाप
दे. कदाचित मी त्यांचा पराभव करून त्यांना देशातून हाकलून देऊ
शकेल.’” 12 परंतु परमेश्वर बलामाला म्हणाले, “त्यांच्याबरोबर जाऊ
नकोस. त्या लोकांना तू शाप देऊ नकोस, कारण ते आशीर्वादित लोक
आहेत.” 13 सकाळी उठून बलामाने बालाकाच्या सरदारांना सांगितले,
“तुमच्या आपल्या देशाला परत जा, कारण मी तुमच्याबरोबर जाण्यास
याहवेहने नाकारले आहे.” 14 तेव्हा मोआबी सरदार बालाकाकडे परत
गेले व म्हणाले, “बलामाने आमच्याबरोबर येण्यास नाकारले.” 15 नंतर
बालाकाने दुसरे सरदार पाठवले, जे पहिल्यापेक्षा अधिक व आणखी
प्रतिष्ठित होते. 16 ते बलामाकडे आले आणि म्हणाले: सिप्पोरचा
पुत्र बालाक असे म्हणतो: “माझ्याकडे येण्यासाठी तुला कोणतीही
अडचण असू नये, 17 कारण मी तुला चांगले प्रतिफळ देईन आणि तू
जे सांगशील ते करेन. तर आता ये आणि माझ्यासाठी या लोकांना
शाप दे.” 18 परंतु बलामाने त्यांना उत्तर दिले, “बालाकाने जरी मला
त्याच्या राजवाड्यातील सर्व चांदी आणि सोने दिले, तरीही याहवेह
माझ्या परमेश्वराच्या आज्ञेपलीकडे मी काहीही कमी किंवा जास्त करू
शकत नाही. 19 तरी आजची रात्र येथे राहा, म्हणजे याहवेह मला अजून
काय सांगतात ते मला कळेल.” 20 त्या रात्री परमेश्वर बलामाकडे
येऊन म्हणाले, “कारण हे लोक तुला बोलवायला आले आहेत, तू
त्यांच्याबरोबर जा, परंतु केवळ मी तुला जे सांगेन तेच कर.” 21 बलाम
सकाळी उठला आणि आपल्या गाढवीवर खोगीर घातले आणि मोआबी
सरदारांबरोबर निघाला. 22 परंतु तो निघाला त्यावेळी परमेश्वराचा राग
पेटला आणि त्याला अडविण्यासाठी याहवेहचा दूत वाटेत उभा राहिला.

बलाम आपल्या गाढवीवर स्वार होता व त्याचे दोन सेवक त्याच्याबरोबर
होते. 23 जेव्हा याहवेहचा दूत उपसलेली तलवार हातात घेऊन वाटेत
उभा आहे असे गाढवीने पाहिले, तेव्हा ती वाटेतून वळून शेतात गेली.
बलामाने तिला मारून पुन्हा वाटेवर आणले. 24 नंतर याहवेहचा दूत
द्राक्षमळ्यांच्या मधील अरुंद वाटेवर उभा राहिला, त्याच्या दोन्ही बाजूंना
भिंती होत्या. 25 जेव्हा गाढवीने याहवेहच्या दूताला पाहिले, ती भिंतीला
घसटली व बलामाचा पाय भिंतीशी चेंगरला. म्हणून त्याने गाढवीला
पुन्हा मारले. 26 नंतर याहवेहचा दूत पुढे जाऊन जिथे उजवीकडे किंवा
डावीकडे वळायला जागा नव्हती अशा अरुंद ठिकाणी उभा राहिला. 27
जेव्हा गाढवीने याहवेहच्या दूताला पाहिले, बलाम तिच्यावर बसलेला
असतानाच ती त्याच्यासहच खाली बसली आणि तो रागावला व तिला
काठीने मारले. 28 तेव्हा याहवेहने त्या गाढवीचे मुख उघडले, व ती
बलामाला म्हणाली, “तू मला तीन वेळा मारावेस असे मी काय केले
आहे?” 29 बलाम गाढवीला म्हणाला, “तू मला मूर्ख बनविले! माझ्या
हातात तलवार असती, तर मी आता तुला मारून टाकले असते.” 30
गाढवीने बलामाला म्हटले, “मी तुझी ती गाढवी नाही काय जिच्यावर तू
आजपर्यंत बसत आलास? मी तुझ्याशी कधी अशी वागणूक केली
काय?” तो म्हणाला, “नाही.” 31 तेव्हा याहवेहने बलामाचे डोळे उघडले
आणि त्याने रस्त्यावर तलवार उपसून उभे असलेल्या याहवेहच्या दूताला
पाहिले आणि तो नमन करून पालथा पडला. 32 याहवेहच्या दूताने
बलामाला विचारले, “तू तुझ्या गाढवीला असे तीन वेळा का मारलेस?
मी तुला अडविण्यास आलो कारण माझ्यासमोर तुझा मार्ग विपरीत
आहे. 33 गाढवीने मला पाहिले व तीन वेळा माझ्यापासून ती वळली. ती
जर वळली नसती, तर आतापर्यंत मी तुला जिवे मारले असते, परंतु त्या
गाढवीला वाचविले असते.” 34 बलाम याहवेहच्या दूताला म्हणाला,
“मी पाप केले आहे. मला अडवावे म्हणून तुम्ही वाटेत उभे आहात
हे मला समजले नाही. मग आता जर हे तुम्हाला आवडले नाही, तर
मी माघारी जाईन.” 35 याहवेहच्या दूताने बलामाला म्हटले, “त्या
पुरुषांबरोबर जा, परंतु जे मी तुला सांगेन तेच तू बोलावे.” म्हणून बलाम
बालाकाच्या त्या सरदारांबरोबर गेला. 36 बलाम येत आहे, हे जेव्हा
बालाकाने ऐकले, तेव्हा तो त्याला भेटण्याकरिता आर्णोनाच्या तीरावर,
त्याच्या देशाच्या सीमेवर असलेल्या मोआबाच्या नगराकडे गेला. 37
बालाकाने बलामाला विचारले, “मी तुला तातडीचे बोलाविणे पाठवले
नव्हते काय? तू माझ्याकडे का आला नाहीस? तुला बक्षीस देण्यास मी
खरोखर समर्थ नाही काय?” 38 बलामाने बालाकाला उत्तर दिले, “पाहा
आता मी तुझ्याकडे आलो आहे, परंतु मला वाटेल ते मी बोलू शकत
नाही, परमेश्वर माझ्या मुखात जे शब्द घालतील तेच मी बोलेन.” 39 मग
बलाम बालाकाबरोबर किर्याथ-हुसोथ येथे गेला. 40 तिथे बालाकाने
गुरे व मेंढरे यांचे यज्ञ केले आणि त्यातील काही बलाम व जे सरदार
त्याच्याबरोबर होते त्यांना दिले. 41 सकाळी बालाकाने बलामास वर
बामोथ-बआल या ठिकाणी नेले आणि तिथून तो इस्राएली लोकांच्या
छावणीचा शेवटचा भाग पाहू शकत होता.

**23** बलाम बालाकाला म्हणाला, “या ठिकाणी माझ्यासाठी सात
वेद्या बांध आणि माझ्यासाठी सात गोर्‍हे व सात मेंढे तयार ठेव.”
2 बलामाने सांगितले त्याप्रमाणे बालाकाने केले आणि दोघांनी प्रत्येक
वेदीवर गोर्‍हा व मेंढा यांचे अर्पण केले. 3 मग बलाम बालाकाला
म्हणाला, “तू या तुझ्या होमार्पणाजवळ थांब आणि मी जरा बाजूला
जातो. कदाचित याहवेह मला भेटायला येतील. ते जे काही मला
प्रकट करतील ते मी तुला सांगेन.” मग तो एका उंच ओसाड ठिकाणी
गेला. 4 परमेश्वर त्याला भेटले आणि बलाम म्हणाला, “मी सात
वेद्या बांधून प्रत्येक वेदीवर एक गोर्‍हा आणि एक मेंढा अर्पण केला
आहे.” 5 तेव्हा याहवेहने बलामाच्या मुखात शब्द घातले व म्हटले, “जा
आणि बालाकाला हे वचन सांग.” 6 म्हणून बलाम परत बालाकाकडे
आला. तेव्हा तो त्याच्या मोआबी सरदारांसह होमार्पणाजवळ उभा
होता असे त्याने पाहिले. 7 तेव्हा बलामाने आपला संदेश सांगितला:
“बालाकाने मला अरामाहून आणले, मोआबाच्या राजाने पूर्वेकडील
डोंगरातून मला आणले. तो म्हणाला, ‘ये, माझ्यासाठी याकोबाला शाप
दे; ये, इस्राएलाचा धिक्कार कर.’ 8 ज्यांना परमेश्वराने शाप दिला नाही,
त्यांना मी शाप कसा देऊ? ज्यांचा तिरस्कार याहवेहने केला नाही;
त्यांचा तिरस्कार मी कसा करू? 9 खडकाच्या शिखरांवरून मी त्यांना
पाहतो, उंच ठिकाणावरून मला ते दिसतात. वेगळे राहत असलेले लोक
मी पाहतो राष्ट्रांबरोबर ते स्वतःला गणत नाहीत. 10 याकोबाची धूळ
कोण मोजू शकेल, किंवा इस्राएलच्या चौथ्या भागाची तरी मोजणी
कोण करणार? मला नीतिमानाचे मरण मरू दे, आणि माझा शेवट
त्यांच्याप्रमाणे असो!” 11 बालाक बलामाला म्हणाला, “तू मला हे काय
केलेस? माझ्या शत्रूंना शाप देण्यासाठी मी तुला आणले, पण तू तर
आशीर्वाद दिल्याशिवाय काही केले नाहीस!” 12 बलामाने म्हटले, “जे
शब्द याहवेह माझ्या मुखात घालतील तेच मी बोलू नये काय?” 13 तेव्हा
बालाक त्याला म्हणाला, “माझ्याबरोबर दुसर्‍या ठिकाणी चल जिथून तू
त्यांना पाहू शकशील; तुला ते सर्व दिसणार नाहीत तर केवळ त्यांच्या
छावणीचा शेवटचा भाग मात्र दिसेल. तिथून त्यांना माझ्यासाठी शाप
दे.” 14 त्याने बलामाला सोफिमाच्या मैदानाच्या पिसगाच्या डोंगरावर
नेले, तिथे त्याने सात वेद्या बांधल्या आणि प्रत्येक वेदीवर एक गोर्‍हा व
एक मेंढा अर्पण केला. 15 बलाम बालाकाला म्हणाला, “तू इथे तुझ्या
होमार्पणाजवळ थांब, मी तिथे जाऊन याहवेहशी भेट घेतो.” 16 याहवेह
बलामाला भेटले व त्याच्या मुखात आपला शब्द घातला व म्हटले,
“बालाकाकडे परत जा आणि त्याला हे संदेश दे.” 17 जेव्हा तो परत
आला तेव्हा तो आपल्या मोआबी सरदारांबरोबर त्याच्या होमार्पणाजवळ
उभा असलेला त्याला दिसला. बालाकाने त्याला विचारले, “याहवेह काय
म्हणाले?” 18 नंतर त्याने हा संदेश सांगितला: “बालाका, ऊठ आणि
ऐक; सिप्पोरच्या पुत्रा, माझे ऐक. 19 परमेश्वर मनुष्य नाहीत की त्यांनी
लबाडी करावी, ते मानव नाहीत, की त्यांनी आपले मन बदलावे. याहवेह
बोलणार आणि त्यानुसार करणार नाहीत काय? त्यांनी अभिवचन दिले
आणि ते पूर्ण करणार नाहीत काय? 20 आशीर्वाद देण्याची आज्ञा

मला मिळाली आहे; याहवेहने आशीर्वाद दिला आहे आणि मी तो बदलू
शकत नाही. 21 “याकोबात विपत्ती सापडली नाही, इस्राएलात क्लेश
दिसत नाहीत. त्यांचे परमेश्वर याहवेह त्यांच्याबरोबर आहेत; राजाचा
जयघोष त्यांच्यामध्ये आहे. 22 परमेश्वराने त्यांना इजिप्तच्या बाहेर
आणले. रानबैलासारखे त्यांचे बळ आहे. 23 याकोबाविरुद्ध मंत्रतंत्र
नाही, इस्राएलविरुद्ध अपशकुन नाही. याकोबाविषयी व इस्राएलाविषयी
असे म्हटले जाईल, परमेश्वराने काय केले आहे ते पाहा! 24 लोक
सिंहिणीप्रमाणे उठतात; ते सिंहासारखे उभे राहतात जे त्याची शिकार
खाईपर्यंत व वधलेल्यांचे रक्त पिईपर्यंत विसावा घेत नाहीत.” 25 मग
बालाक बलामाला म्हणाला, “त्यांना अजिबात शापही देऊ नकोस
किंवा आशीर्वादही देऊ नकोस.” 26 बलामाने बालाकाला उत्तर दिले,
“याहवेह जे सांगतील त्याचप्रमाणे मी केले पाहिजे असे मी तुला
सांगितले नव्हते काय?” 27 नंतर बालाक बलामाला म्हणाला, “चल,
मी तुला आणखी एका ठिकाणी नेतो. कदाचित त्या ठिकाणाहून तू
माझ्यासाठी त्यांना शाप द्यावा हे परमेश्वराला बरे वाटेल.” 28 आणि
बालाकाने बलामाला पेओर डोंगराच्या शिखराकडे ओसाड जागेसमोर
नेले. 29 बलाम बालाकाला म्हणाला, “माझ्यासाठी येथे सात वेद्या बांध
आणि सात गोर्‍हे व सात मेंढे माझ्यासाठी तयार ठेव.” 30 बलामाने
सांगितल्याप्रमाणे बालाकाने केले आणि प्रत्येक वेदीवर एकएक गोर्‍हा
व मेंढा अर्पण केला.

**24** आता जेव्हा बलामाने पाहिले की इस्राएलास आशीर्वाद देण्यास
याहवेहला बरे वाटले, तेव्हा तो पूर्वीप्रमाणे मंत्रतंत्र करावयाला
गेला नाही, तर त्याने रानाकडे आपले तोंड वळविले. 2 जेव्हा बलामाने
दृष्टी वर करून पाहिले की इस्राएली लोक आपआपल्या गोत्राप्रमाणे
छावणी देऊन राहत होते, परमेश्वराचा आत्मा त्याच्यावर आला 3 आणि
त्याने आपला संदेश सांगितला: “बौराचा पुत्र बलामाची भविष्यवाणी,
ज्याच्या डोळ्याला स्पष्ट दिसते त्याची भविष्यवाणी, 4 जो याहवेहचा
शब्द ऐकतो त्याची भविष्यवाणी, जो सर्वसमर्थाकडून दृष्टान्त पाहतो, जो
दंडवत घालतो आणि ज्याचे डोळे उघडले आहेत: 5 “हे याकोबा, तुझे
तंबू, हे इस्राएला, तुझी राहण्याची ठिकाणे किती सुंदर आहेत! 6 “ते
खोर्‍याप्रमाणे पसरतात, नदीकिनारी असलेल्या बागेप्रमाणे, याहवेहने
रोपलेल्या जटामांसीसारखे, पाण्याजवळच्या गंधसरूंसारखे ते आहेत.
7 त्यांच्या पोहर्‍यातून पाणी वाहेल; त्यांच्या बिजांना भरपूर पाणी
मिळेल. “त्यांचा राजा अगाग राजापेक्षा महान असेल; त्यांचे राज्य
गौरवित केले जाईल. 8 “परमेश्वराने त्यांना इजिप्तमधून बाहेर आणले;
रानबैलासारखे त्यांचे बळ आहे. त्यांच्या विरोधात असलेल्या राष्ट्रांचा
ते नाश करतात आणि त्यांच्या हाडांचे ते तुकडे करतात; ते आपल्या
बाणांनी त्यांना भोसकतात. 9 सिंहाप्रमाणे ते दबा धरून निपचित पडून
राहतात, सिंहिणीप्रमाणे ते पडून राहतात—त्यांना उठविण्याचे धाडस
कोण करणार? “जे तुम्हाला आशीर्वाद देतात ते आशीर्वादित होतील
आणि जे तुम्हाला शाप देतात ते शापित असो!” 10 तेव्हा बलामाविरुद्ध
बालाकाचा राग पेटला. त्याने आपले हात एकत्र आपटले व त्याला
म्हणाला, “माझ्या शत्रूंना शाप द्यावा म्हणून मी तुला बोलाविले, पण
या तीन वेळा तू त्यांना आशीर्वादच दिलास. 11 आता येथून चालता
हो! आणि आपल्या घरी जा. मी तुझा मोठा सन्मान करेन असे मी
म्हटले होते, परंतु याहवेहने तुला सन्मानापासून वंचित केले आहे.” 12
बलामाने बालाकाला उत्तर दिले, “तू ज्या दूतांना माझ्याकडे पाठवले
त्यांना मी सांगितले नव्हते काय, 13 ‘बालाकाने जरी मला त्याच्या
राजवाड्यातील सर्व चांदी आणि सोने दिले, तरीही मला वाटेल ते मी
करू शकत नाही, याहवेहच्या आज्ञेपलीकडे मी काहीही कमी किंवा
जास्त करू शकत नाही; आणि याहवेह सांगतील तेच मी बोलणार’? 14
आता मी माझ्या लोकांकडे परत जात आहे, पण ये, हे इस्राएली लोक
येणार्‍या दिवसात तुझ्या लोकांचे काय करणार त्याविषयी मी तुला
चेतावणी देतो.” 15 मग त्याने हा संदेश दिला: “बौराचा पुत्र बलामाची
भविष्यवाणी, ज्याच्या नजरेस स्पष्ट दिसते त्याची भविष्यवाणी, 16
जो परमेश्वराचे शब्द ऐकतो त्याची भविष्यवाणी, ज्याला परात्पराचे
ज्ञान आहे, ज्याला सर्वसमर्थाकडून दर्शन घडते, जो दंडवत घालतो
आणि ज्याचे डोळे उघडले आहेत: 17 “मी त्याला पाहतो, पण आता
नाही; मी त्याला न्याहाळतो, पण जवळ नाही. याकोबातून एक तारा
उदयास येईल; इस्राएलातून एक राजदंड निघेल. तो मोआबाचे डोके व
शेथाच्या सर्व लोकांच्या कवट्या चिरडून टाकेल. 18 एदोम जिंकला
जाईल; इस्राएलचा शत्रू सेईर सुद्धा जिंकला जाईल, पण इस्राएल
बलवान होईल. 19 याकोबातून एक अधिकारी येईल आणि नगरातील
उरलेल्यांचा नाश करेल.” 20 नंतर बलामाने अमालेकाला पाहिले व
आपला संदेश दिला: “अमालेक सर्व राष्ट्रांमध्ये प्रथम राष्ट्र होते, परंतु
त्यांचा शेवट संपूर्ण विनाशात होईल.” 21 यानंतर त्याने केनी लोकांना
पाहिले व आपला संदेश दिला: “तुझे वसतिस्थान सुरक्षित आहे, तुझे
घरटे खडकात स्थिर आहे; 22 तरीही हे केनी, जेव्हा अश्शूर तुला कैद
करून घेतील तेव्हा तुझा नाश होईल.” 23 त्यानंतर त्याने हा संदेश
दिला: “हाय हाय! परमेश्वर हे करीत असताना कोण जगू शकेल? 24
कित्तीमाच्या किनार्‍यावरून जहाजे येतील; ते अश्शूर व एबर यांच्यावर
जुलूम करतील, परंतु त्यांचाही नाश होईल.” 25 त्यानंतर बलाम उठून
आपल्या घरी परतला व बालाकही आपल्या मार्गाने गेला.

**25** इस्राएली लोक शिट्टीम येथे राहत असताना, त्यांचे पुरुष तेथील
मोआबी कन्यांशी व्यभिचार करू लागले, 2 त्या कन्यांनी इस्राएली
पुरुषांना त्यांच्या दैवतांच्या यज्ञास बोलाविले. लोकांनी त्या यज्ञांचे भोजन
खाल्ले आणि त्या दैवतांना नमन केले. 3 अशा प्रकारे इस्राएली लोक
बआल-पौराशी जडले आणि याहवेहचा कोप त्यांच्याविरुद्ध भडकला.
4 याहवेहने मोशेला म्हटले, “या लोकांच्या सर्व पुढार्‍यांना घे, त्यांना
फासावर टांग व त्यांना दिवसाच्या प्रकाशात याहवेहसमोर उघडे कर,
म्हणजे इस्राएलवर पेटलेला याहवेहचा क्रोध शांत होईल.” 5 तेव्हा मोशे
इस्राएलच्या न्यायाधीशांनी म्हणाला, “तुम्ही स्वतःला बआल-पौराशी
जोडले आहे, तुम्हा प्रत्येकाला जिवे मारावे.” 6 त्यावेळी ते सभामंडपाच्या
दारात रडत असताना, एका इस्राएली पुरुषाने मोशे व संपूर्ण इस्राएली

मंडळीसमोर एक मिद्यानी स्त्री आणली. 7 जेव्हा अहरोन याजकाचा पुत्र
एलअज़ारचा पुत्र फिनहासने हे पाहिले, तेव्हा तो समुदायातून उठला व
त्याने आपल्या हाती एक भाला घेतला 8 आणि त्यांच्यामागे तंबूत गेला
व त्या दोघांच्या म्हणजेच तो इस्राएली पुरुष व ती स्त्री यांच्या पोटात तो
भाला भोसकला, तेव्हा इस्राएलच्या लोकांमधून पीडा थांबली; 9 परंतु
त्या पीडेत ज्यांचा मृत्यू झाला त्यांची संख्या चोवीस हजार होती. 10 मग
याहवेह मोशेला म्हणाले, 11 “अहरोन याजकाचा पुत्र एलअज़ारचा
पुत्र फिनहासने इस्राएलवरील माझा क्रोध शांत केला आहे. कारण
लोकांमधील माझ्या सन्मानाविषयी मी जितका ईर्ष्यावान आहे तितकाच
तो सुद्धा होता म्हणून मी माझ्या ईर्षेने त्यांचा नाश केला नाही. 12 म्हणून
त्याला सांग मी त्याच्याशी शांतीचा करार करीत आहे. 13 तो व त्याच्या
वंशजासाठी हा सर्वकाळच्या याजकपणाचा करार असणार, कारण तो
त्याच्या परमेश्वराच्या सन्मानासंबंधी ईर्ष्यावान होता आणि इस्राएली
लोकांसाठी त्याने प्रायश्चित केले.” 14 मिद्यानी स्त्रीबरोबर ज्या इस्राएली
पुरुषाला जिवे मारण्यात आले, त्याचे नाव जिम्री होते, जो शिमओनी
घराण्याचा पुढारी सालूचा पुत्र होता. 15 आणि ज्या मिद्यानी स्त्रीला जिवे
मारण्यात आले होते तिचे नाव कजबी होते, जी मिद्यानी घराण्याच्या
कुळाचा पुढारी सूरची कन्या होती. 16 याहवेह मोशेला म्हणाले, 17
“मिद्यानी लोकांना शत्रू समजून त्यांना जिवे मारा. 18 कारण त्यांनी
तुम्हाला शत्रू मानले, जेव्हा पेओरच्या घटनेत तुम्हाला फसविण्यासाठी
आपली बहीण, मिद्यानी पुढाऱ्याची मुलगी कजबी हिचा त्यांनी उपयोग
केला व त्या घटनेमुळे पीडा आली, तेव्हा तिला जिवे मारण्यात आले.”

**26** पीडेनंतर याहवेहने मोशे व अहरोन याजकाचा पुत्र एलअज़ारला
म्हटले, 2 “इस्राएली लोकांच्या संपूर्ण समाजाची त्यांच्या
घराण्यानुसार—जे सर्व वीस किंवा अधिक वयाचे असून इस्राएलच्या
सैन्यात सेवा करण्यास सक्षम आहेत, त्यांची जनगणना कर.” 3 म्हणून
मोशे व एलअज़ार याजक मोआबाच्या मैदानात यरीहोजवळ यार्देन
नदीच्या काठावर इस्राएली लोकांशी बोलले आणि म्हणाले, 4 “याहवेहने
मोशेला आज्ञापिल्याप्रमाणे जे पुरुष वीस किंवा त्याहून अधिक वयाचे
आहेत त्यांची मोजणी करा.” 5 रऊबेन, इस्राएलच्या प्रथम जन्मलेल्या
पुत्राचे वंशज हे: हनोखपासून हनोखी कूळ; पल्लूपासून पल्लूवी कूळ;
6 हेस्रोनपासून हेस्रोनी कूळ; कर्मीपासून कर्मी कूळ. 7 ही रऊबेनची कुळे
होती; मोजलेल्यांची संख्या 43,730 भरली. 8 पल्लूचा पुत्र एलियाब
होता, 9 आणि एलियाबाचे पुत्र नेमूएल, दाथान आणि अबीराम होते. तेच
दाथान आणि अबीराम जे समाजाचे अधिकारी होते, ज्यांनी मोशे आणि
अहरोन विरुद्ध बंड केले आणि जेव्हा त्यांनी याहवेहविरुद्ध बंड केले
तेव्हा ते कोरहाच्या अनुयायांपैकी होते. 10 ज्यावेळी पृथ्वीने आपले तोंड
उघडले आणि कोरह व त्याच्या अनुयायांना गिळून टाकले व त्यांच्यातील
दोनशे पन्नास पुरुषांना अग्नीने भस्म करून टाकले. ते लोकांसाठी एक
चेतावणीचे चिन्ह होते. 11 तरीही कोरहाचे सर्वच वंशज मेले नाही. 12
शिमओनचे वंशज त्यांच्या कुळानुसार हे होते: नेमूएलपासून नेमूएली
कूळ; यामीनपासून यामीनी कूळ; याकीनपासून याखीनी कूळ; 13
जेरहपासून जेरही कूळ; शाऊलपासून शाऊली कूळ. 14 ही शिमओनी
कुळे होती; जे मोजले त्यांची संख्या 22,200 भरली. 15 गादचे वंशज
त्यांच्या कुळानुसार हे होते: जेफोनपासून जेफोनी कूळ; हग्गीपासून हग्गी
कूळ; शूनीपासून शूनी कूळ; 16 ओजनीपासून ओजनी कूळ; एरीपासून
एरी कूळ; 17 अरोदपासून अरोदी कूळ; अरेलीपासून अरेली कूळ. 18 ही
गादची कुळे होती; जे मोजले त्यांची संख्या 40,500 भरली. 19 एर
आणि ओनान हे यहूदाहचे पुत्र होते, परंतु ते कनान देशात मरण पावले.
20 यहूदाहचे वंशज त्यांच्या कुळानुसार हे होते: शेलाहपासून शेलानी
कूळ; पेरेसापासून पेरेसी कूळ; जेरहपासून जेरही कूळ. 21 पेरेसचे
वंशज हे होते: हेस्रोनपासून हेस्रोनी कूळ; हामूलपासून हामूली कूळ. 22
ही यहूदाहची कुळे होती; जे मोजले त्यांची संख्या 76,500 भरली. 23
इस्साखारचे वंशज त्यांच्या कुळानुसार हे होते: तोलापासून तोलाई कूळ;
पुवाहपासून पुनी कूळ; 24 याशूबपासून याशूबी कूळ; शिम्रोनपासून
शिम्रोनी कूळ. 25 ही इस्साखारची कुळे होती; जे मोजले त्यांची संख्या
64,300 भरली. 26 जबुलूनचे वंशज त्यांच्या कुळानुसार हे होते:
सेरेदपासून सेरेदी कूळ; एलोनपासून एलोनी कूळ; याहलीलपासून
याहलेली कूळ. 27 ही जबुलूनची कुळे होती; जे मोजले त्यांची संख्या
60,500 भरली. 28 योसेफाचे कूळ त्याचे वंशज मनश्शेह व एफ्राईमचे
कूळ हे होते: 29 मनश्शेहचे वंशज: माखीरपासून माखीरी कूळ (माखीर
गिलआदाचा पिता होता); गिलआदापासून गिलआदी कूळ. 30 हे
गिलआदाचे वंशज होते: इएजेरपासून इएजेरी कूळ; हेलेकपासून हेलेकी
कूळ; 31 अस्रिएलपासून अस्रिएली कूळ; शेखेमपासून शेखेमी कूळ;
32 शेमीदापासून शेमीदाई कूळ; हेफेरपासून हेफेरी कूळ. 33 (हेफेरचा
पुत्र सलाफहादला पुत्र नव्हते; त्याला फक्त कन्या होत्या, त्यांची नावे
महलाह, नोआह, होगलाह, मिल्काह आणि तिरजाह होती.) 34 ही
मनश्शेहची कुळे होती; जे मोजले त्यांची संख्या 52,700 भरली. 35
एफ्राईमचे वंशज त्यांच्या कुळानुसार हे होते: शुथेलहपासून शूथेलाही
कूळ; बेकेरपासून बेकेरी कूळ; तहनपासून तहनी कूळ. 36 शुथेलहाचे
वंशज हे होते: एरानपासून एरानी कूळ. 37 हे एफ्राईमचे कूळ होते; जे
मोजले त्यांची संख्या 32,500 भरली. 38 बिन्यामीनचे वंशज त्यांच्या
कुळानुसार हे होते: बेलापासून बेलाई कूळ; आशबेलपासून अशबेली
कूळ; अहीरामपासून अहीरामी कूळ; 39 शफूफामपासून शूफामी कूळ;
हूफामपासून हूफामी कूळ. 40 आर्द आणि नामान यांच्याद्वारे बेलाचे
वंशज हे होते: आर्दाचे आर्दी कूळ; नामान द्वारे नामीनी कूळ. 41 ही
बिन्यामीनची कुळे होती; जे मोजले त्यांची संख्या 45,600 भरली. 42
दानचे वंशज त्यांच्या कुळानुसार हे होते: शूहामपासून शूहामी कूळ. 43
ती सर्व शूहामी कुळे होती; आणि जे मोजले त्यांची संख्या 64,400
भरली. 44 आशेरचे वंशज त्यांच्या कुळानुसार हे होते: इम्नाहपासून इम्नी
कूळ; इश्वीपासून इश्वी कूळ; बरीयाहपासून बरीयाह कूळ; 45 आणि
बरीयाहच्या वंशजांपासून: हेबेरपासून हेबेरी कूळ; मालकीएलपासून
मालकीएली कूळ. 46 आशेरला सेराह नावाची कन्या होती. 47 ही
आशेरची कुळे होती; जे मोजले त्यांची संख्या 53,400 भरली. 48

नफतालीचे वंशज त्यांच्या कुळानुसार हे होते: याहसेलपासून याहसेली
कूळ; गूनीपासून गूनी कूळ; 49 येसेरपासून येसेरी कूळ; शिल्लेमपासून
शिल्लेमी कूळ. 50 ही नफतालीची कुळे होती; जे मोजले त्यांची संख्या
45,400 भरली. 51 इस्राएली लोकांची एकूण संख्या 6,01,730
भरली. 52 याहवेहने मोशेला म्हटले, 53 “त्यांना नावाच्या संख्येनुसार
देश वतन म्हणून द्यावा. 54 मोठ्या गटाला मोठा वारसा द्यावा आणि
लहान गटाला लहान वारसा द्या; ज्यांची नावे यादीत आहेत त्यानुसार
प्रत्येकाला संख्येनुसार त्यांचा वारसा मिळावा. 55 जमिनीची वाटणी
चिठ्ठ्या टाकून होईल याची खात्री करावी. त्यांच्या पूर्वजांच्या गोत्राच्या
नावानुसार प्रत्येक गटाला वारसा मिळावा. 56 प्रत्येक वारसा मोठ्या
आणि लहान गटांमध्ये चिठ्ठ्याद्वारे वाटप केला जावा.” 57 ज्या लेवी
लोकांची त्यांच्या कुळानुसार मोजणी झाली ते हे: गेर्षोनापासून गेर्षोनी
कूळ; कोहाथापासून कोहाथी कूळ; मरारीपासून मरारी कूळ. 58 ही
देखील लेवी लोकांची कुळे होती: लिब्नी कूळ, हेब्रोनी कूळ, महली
कूळ, मूशी कूळ, कोरही कूळ. कोहाथ हा अम्रामाचा पूर्वज होता; 59
अम्रामाच्या पत्नीचे नाव योखबेद होते, ती लेवी वंशातील होती, जी
लेवीच्या घराण्यात इजिप्तमध्ये असताना जन्मली होती. अम्रामापासून
तिने अहरोन, मोशे व त्यांची बहीण मिर्यामला जन्म दिला. 60 अहरोन
नादाब व अबीहू, एलअज़ार व इथामार यांचा पिता होता. 61 परंतु नादाब
आणि अबीहूने याहवेहसमोर अनाधिकृत अग्नीद्वारे अर्पण केल्यामुळे ते
मरण पावले. 62 एक महिन्यापेक्षा अधिक वयाच्या लेवी पुरुषांची संख्या
23,000 भरली. इस्राएलच्या इतर लोकांमध्ये त्यांची मोजणी झाली
नाही, कारण त्यांना त्यांच्यामध्ये वाटा मिळाला नाही. 63 मोआबाच्या
मैदानात यरीहोजवळ यार्देन नदीतीरी मोशे व एलअज़ार याजकाने वरील
इस्राएली लोकांची मोजणी केली. 64 सीनाय रानात मोशे आणि अहरोन
याजकाने इस्राएली लोकांची जी मोजणी केली होती, त्यांच्यापैकी
एकही या गणतीत नव्हता. 65 कारण याहवेहने त्या इस्राएली लोकांना
सांगितले होते की ते खचितच रानात मरतील आणि यफुन्नेहचा मुलगा
कालेब आणि नूनाचा मुलगा यहोशुआ यांच्याशिवाय एकही उरले नाही.

**27** योसेफाचा पुत्र मनश्शेहच्या कुळातील माखीरचा पुत्र गिलआदचा
पुत्र हेफेरचा पुत्र सलाफहादच्या कन्या, ज्यांची नावे महलाह,
नोआह, होगलाह, मिल्काह व तिरजाह होती, त्या पुढे आल्या 2
आणि त्या मोशे, एलअज़ार याजक, पुढारी व सर्व मंडळीसमोर
सभामंडपाच्या प्रवेशद्वाराशी उभ्या राहिल्या व म्हणाल्या, 3 “आमचे
पिता रानात मरण पावले. ते कोरहाच्या अनुयायांपैकी नव्हते, ज्यांनी
एकत्र येऊन याहवेहविरुद्ध बंड केले, परंतु ते आपल्याच पापामुळे
मरण पावले आणि त्यांना पुत्र नव्हते. 4 त्यांना पुत्र नव्हते म्हणून
आमच्या पित्याचे नाव त्यांच्या कुळातून का नाहीसे व्हावे? आमच्या
पित्याच्या नातेवाईकांबरोबर आम्हालाही वतन द्यावे.” 5 तेव्हा मोशेने
त्यांचा वाद याहवेहपुढे आणला, 6 आणि याहवेह मोशेला म्हणाले,
7 “सलाफहादाच्या कन्या जे म्हणतात ते बरोबर आहे. तू खचितच
त्यांना त्यांच्या पित्याच्या नातेवाईकामध्ये त्यांचा वाटा म्हणून द्यावे
आणि त्यांच्या पित्याचे वतन त्यांना दे. 8 “इस्राएली लोकांना सांग,
एखादा मनुष्य मरण पावला व त्यांच्यामागे त्याला पुत्र नाही, तर त्याचे
वतन त्याच्या मुलीला द्यावे. 9 आणि जर त्याला कन्या नसली, तर
त्याचे वतन त्याच्या भावांना द्यावे. 10 आणि त्याला भाऊ नसला,
तर त्याचे वतन त्याच्या पित्याच्या भावांना द्यावे. 11 जर त्याच्या
पित्याला भाऊ नसले, तर त्याचे वतन त्याच्या कुळातील जवळच्या
नातेवाईकाला द्यावे, म्हणजे ते त्याचे वतन होईल. याहवेहने मोशेला
आज्ञापिल्याप्रमाणे इस्राएली लोकांस हा न्यायाचा नियम असावा.” 12
नंतर याहवेह मोशेला म्हणाले, “या अबारीम डोंगरावर जा आणि जो
देश मी इस्राएली लोकांना दिला आहे तो पाहा. 13 तो पाहिल्यानंतर,
जसा तुझा भाऊ अहरोन आपल्या लोकांत जाऊन मिळाला, त्याप्रमाणे
तू सुद्धा आपल्या लोकांना जाऊन मिळशील. 14 कारण सीन रानात
पाण्याजवळ जेव्हा इस्राएली लोकांनी बंड केले, त्यावेळी त्यांच्या
नजरेपुढे मला पवित्र म्हणून मानण्यास नाकारून तुम्ही दोघांनी माझ्या
आज्ञेचा भंग केला.” (हेच सीन रानातील, कादेश येथील मरीबाहचे
पाणी.) 15 मोशे याहवेहला म्हणाला, 16 “याहवेह परमेश्वर, जे सर्व
जीवधाऱ्यांना श्वास देतात, त्यांनी या समाजावर कोणा एकाची नेमणूक
करावी 17 की त्याने त्यांच्यापुढे बाहेर जावे व आत यावे, जो त्यांना बाहेर
नेईल व आत आणेल, जेणेकरून याहवेहचे लोक मेंढपाळ नसलेल्या
मेंढरांप्रमाणे होणार नाहीत.” 18 तेव्हा याहवेह मोशेला म्हणाले, “नूनाचा
पुत्र यहोशुआ, ज्या पुरुषामध्ये पुढारीपणाचा आत्मा वसतो, त्याला घे व
त्याच्यावर आपला हात ठेव. 19 एलअज़ार याजक व संपूर्ण मंडळीसमोर
त्याला उभे करून त्यांच्या समक्षतेत त्याची नेमणूक कर. 20 तुझे काही
अधिकार त्याला दे म्हणजे सर्व इस्राएली समाज त्याचे आज्ञापालन
करतील. 21 त्याने एलअज़ार याजकापुढे उभे राहावे, जो याहवेहसमोर
उरीमविषयी विचारेल. त्याच्या आज्ञेनुसार तो व सर्व इस्राएली समाज
बाहेर जाईल व त्याच्या आज्ञेनुसार आत येतील.” 22 याहवेहने त्याला
आज्ञापिल्याप्रमाणे मोशेने केले. त्याने यहोशुआला एलअज़ार याजक व
सर्व समाजापुढे उभे केले. 23 आणि याहवेहने सूचना दिल्याप्रमाणे
मोशेने आपले हात यहोशुआवर ठेवून त्याची नेमणूक केली.

**28** याहवेहने मोशेला म्हटले, 2 “इस्राएली लोकांना ही आज्ञा दे
व त्यांना सांग: ‘तुम्ही मला नेमलेल्या वेळी मला आवडेल
असे सुवासिक अन्नार्पण मला निश्चितपणे सादर करावे.’ 3 त्यांना
सांग: ‘जे अन्नार्पण तुम्ही याहवेहला सादर करावे ते हे: एक वर्षाची
दोन निर्दोष कोकरे, जी दररोज नियमितपणे होमार्पण म्हणून अर्पण
करावी. 4 एक कोकरू सकाळी व दुसरे संध्याकाळी अर्पण करावे. 5
त्याबरोबर धान्यार्पणासाठी एक एफाचा दहावा भाग बारीक पीठ, कुटून
काढलेल्या एक पाव हीन जैतुनाच्या तेलात मळून अर्पण करावे. 6
सीनाय पर्वतावर स्थापित केलेले हे नियमितपणाचे होमार्पण याहवेहला
आवडणारे सुवासिक अन्नार्पण आहे. 7 त्याबरोबरचे पेयार्पण, एका
कोकऱ्याबरोबर एक पाव आंबवलेले पेय असावे. हे पेयार्पण याहवेहसाठी
पवित्रस्थानी ओतावे. 8 दुसरे कोकरू संध्याकाळी अर्पावे, सकाळच्या

अर्पणाप्रमाणे धान्यार्पण व पेयार्पण यासहित अर्पण करावे. हे अन्नार्पण
याहवेहसाठी सुवासिक अर्पण आहे.’” 9 “शब्बाथ दिवशी एक वर्षाची
दोन निर्दोष कोकरे, व त्याबरोबर पेयार्पण व जैतुनाच्या तेलात मळलेले
एका एफाचे दोन दशांश बारीक पीठ धान्यार्पण असे अर्पण करावे.
10 नियमित होमार्पण व त्याचे पेयार्पण याशिवाय प्रत्येक शब्बाथ
दिवसाचे हे होमार्पण आहे. 11 “प्रत्येक महिन्याच्या पहिल्या दिवशी
दोन तरुण गोर्‍हे, एक मेंढा आणि एक वर्षाची सात कोकरे होमार्पण
म्हणून याहवेहसाठी अर्पण करावे, हे सर्व निर्दोष असावेत. 12 प्रत्येक
गोर्‍ह्याबरोबर धान्यार्पण म्हणून तेलात मळलेले एका एफाचे तीन
दशांश बारीक पीठ; आणि एका मेंढ्याबरोबर धान्यार्पण म्हणून तेलात
मळलेले दोन दशांश बारीक पीठ; 13 आणि प्रत्येक कोकर्‍याबरोबर
धान्यार्पण म्हणून तेलात मळलेले एक दशांश बारीक पीठ अर्पण करावे.
हे होमार्पण सुवासिक अर्पण, अन्नार्पण म्हणून याहवेहसाठी सादर
करावे. 14 प्रत्येक गोर्‍ह्याबरोबर अर्धा हीन पेयार्पण; आणि प्रत्येक
मेंढ्याबरोबर एकतृतीयांश हीन, व प्रत्येक कोकर्‍याबरोबर एक पाव हीन
द्राक्षारस आणावा. वर्षभरातील प्रत्येक पोर्णिमेच्या दिवशी करावयाचे
हे मासिक होमार्पण आहे. 15 नियमित होमार्पण व त्याचे पेयार्पण
याशिवाय एक बोकड पापार्पण म्हणून याहवेहला सादर करावा. 16
“‘पहिल्या महिन्याच्या चौदाव्या दिवशी तुम्ही याहवेहचा वल्हांडण
पाळावा. 17 या महिन्याच्या पंधराव्या दिवशीही सण पाळावा; सात
दिवस खमीर न घातलेली भाकर खावी. 18 पहिल्या दिवशी एक पवित्र
सभा भरवावी व कोणतेही नियमित कामे करू नये. 19 याहवेहसाठी
अन्नार्पण सादर करा, म्हणजेच दोन तरुण गोर्‍हे, एक मेंढा व एक वर्षाची
सात कोकरे यांचे होमार्पण करा, हे सर्व निर्दोष असावे. 20 प्रत्येक
गोर्‍ह्याबरोबर तेलात मळलेले एका एफाचे तीन दशांश बारीक पीठ व
मेंढ्याबरोबर दोन दशांश असे धान्यार्पण करावे. 21 व सात कोकर्‍यातील
प्रत्येकासाठी, एफाचा एक दशांश अर्पावा. 22 आणि तुमच्यासाठी
प्रायश्चित व्हावे म्हणून एक बोकड पापार्पण म्हणून अर्पावा. 23 ही
अर्पणे सकाळच्या नियमित होमार्पणाखेरीज असावीत. 24 अशाप्रकारे
सात दिवस दररोज याहवेहसाठी सुवास म्हणून हे अन्नार्पण करावे;
नियमित होमार्पण व त्याचे पेयार्पण याबरोबरच ही अर्पणे अर्पावीत.
25 सातव्या दिवशी पवित्र सभा भरवावी आणि नियमित कामे करू
नये. 26 “‘प्रथमफळांच्या दिवशी, जेव्हा तुम्ही आठवड्याच्या सणाच्या
वेळी याहवेहला नवीन धान्याचे अर्पण करता, तेव्हा पवित्र सभा बोलवा
आणि नियमित कामे करू नका. 27 याहवेहला सुवासिक होमार्पण
म्हणून दोन तरुण गोर्‍हे, एक मेंढा व एक वर्षाची सात नरकोकरे अर्पण
करा. 28 प्रत्येक गोर्‍ह्याबरोबर तेलात मळलेले एका एफाचे तीन दशांश
बारीक पीठ यांचे धान्यार्पण करावे; गोर्‍ह्याबरोबर दोन दशांश; 29 आणि
सात कोकर्‍यांकरिता प्रत्येकी एक दशांश बारीक पीठ अर्पावे. 30
तुमच्यासाठी प्रायश्चित व्हावे म्हणून एक बोकड अर्पावा. 31 नियमित
होमार्पण व त्याचे धान्यार्पण याबरोबरच ही अर्पणे त्यांच्या पेयार्पणासह
अर्पावीत. गुरे निर्दोष असतील याची खात्री करावी.

**29** “‘सातव्या महिन्याच्या पहिल्या दिवशी पवित्र सभा भरवा व
नियमित कामे करू नये. तो तुमच्यासाठी कर्णे वाजविण्याचा
दिवस आहे. 2 याहवेहस आवडणारा सुवास म्हणून एक तरुण गोर्‍हा,
एक मेंढा व एक वर्षाची सात कोकरे यांचे होमार्पण करा, हे सर्व निर्दोष
असावेत. 3 गोर्‍ह्याबरोबर जैतुनाच्या तेलात मळलेले एका एफाचे तीन
दशांश बारीक पिठाचे धान्यार्पण अर्पावे; व मेंढ्याबरोबर दोन दशांश;
4 आणि सात कोकर्‍यातील प्रत्येकासाठी एफाचा एक दशांश. 5
तुमच्यासाठी प्रायश्चित व्हावे म्हणून पापार्पणाकरिता एक बोकड अर्पावा.
6 मासिक व रोजचे होमार्पण व त्यांचे नेमलेले धान्यार्पण व पेयार्पण
याबरोबरच ही अर्पणे करावी. ही याहवेहस आवडणारी सुवासिक
अन्नार्पणे आहेत. 7 “‘याच सातव्या महिन्याच्या दहाव्या दिवशी एक
पवित्र सभा भरवा. तुम्ही स्वसुखाचा त्याग करावा व कोणतेही नियमित
काम करू नये. 8 याहवेहला सुवास म्हणून एक तरुण गोर्‍हा, एक मेंढा
आणि एक वर्षाची सात कोकरे यांचे होमार्पण सादर करा, ते सर्व निर्दोष
असावेत; 9 गोर्‍ह्याकरिता तेलात मळलेले एका एफाचे तीन दशांश
बारीक पीठ; आणि मेंढ्याकरिता दोन दशांश असे धान्यार्पण करावे; 10
आणि सात कोकर्‍यातील प्रत्येकी एक दशांश बारीक पीठ अर्पावे. 11
प्रायश्चित्ताचे पापार्पण, नियमित होमार्पण व त्याचे धान्यार्पण व त्याचे
पेयार्पण, याबरोबरच पापार्पणासाठी एक बोकड अर्पण करावा. 12
“‘सातव्या महिन्याच्या पंधराव्या दिवशी पवित्र सभा बोलवा आणि त्या
दिवशी कोणतीही नियमित कामे करू नये. हा सण तुम्ही याहवेहसाठी
सात दिवस पाळावा. 13 आणि तुम्ही याहवेहला सुवासिक होमार्पण
म्हणून तेरा गोर्‍हे, दोन मेंढे आणि एक वर्षाची चौदा कोकरे अर्पण
करावी, हे सर्व निर्दोष असावेत. 14 या प्रत्येकी तेरा गोर्‍ह्यांबरोबर
धान्यार्पण म्हणून तेलात मळलेले एक एफाचे तीन दशांश बारीक पीठ;
व दोन मेंढ्यांबरोबर प्रत्येकी दोन दशांश; 15 आणि चौदा कोकर्‍यांबरोबर
प्रत्येकी एक दशांश बारीक पीठ अर्पावे. 16 नियमित होमार्पण व
त्याबरोबरचे धान्यार्पण आणि पेयार्पण याशिवाय पापार्पणासाठी एक
बोकड अर्पावा. 17 “‘दुसर्‍या दिवशी, बारा तरुण गोर्‍हे, दोन मेंढे आणि
एक वर्षाची चौदा कोकरे अर्पण करावे व हे सर्व निर्दोष असावेत. 18
गोर्‍हे, मेंढे व कोकरे याबरोबर त्यांच्या संख्येनुसार नेमल्याप्रमाणे त्यांचे
धान्यार्पण व पेयार्पण अर्पावे. 19 नियमित होमार्पण व त्याबरोबरचे
धान्यार्पण आणि पेयार्पण याशिवाय पापार्पणासाठी एक बोकड अर्पावा.
20 “‘तिसर्‍या दिवशी अकरा गोर्‍हे, दोन मेंढे, व एक वर्षाची चौदा
कोकरे अर्पण करावी. हे सर्व निर्दोष असावेत. 21 गोर्‍हे, मेंढे व कोकरे
याबरोबर त्यांच्या संख्येनुसार नेमल्याप्रमाणे त्यांचे धान्यार्पण व पेयार्पण
अर्पावे. 22 नियमित होमार्पण व त्याबरोबरचे धान्यार्पण आणि पेयार्पण
याशिवाय पापार्पणासाठी एक बोकड अर्पावा. 23 “‘चौथ्या दिवशी
दहा गोर्‍हे, दोन मेंढे, एक वर्षाची चौदा कोकरे अर्पण करावी, हे सर्व
निर्दोष असावेत. 24 गोर्‍हे, मेंढे व कोकरे याबरोबर त्यांच्या संख्येनुसार
नेमल्याप्रमाणे त्यांचे धान्यार्पण व पेयार्पण अर्पावे. 25 नियमित होमार्पण
व त्याबरोबरचे धान्यार्पण आणि पेयार्पण याशिवाय पापार्पणासाठी

एक बोकड अर्पावा. 26 “‘पाचव्या दिवशी नऊ गोऱ्हे, दोन मेंढे व एक
वर्षाची चौदा कोकरे अर्पावी. हे सर्व निर्दोष असावेत. 27 गोऱ्हे, मेंढे
व कोकरे याबरोबर त्यांच्या संख्येनुसार नेमल्याप्रमाणे धान्यार्पण व
पेयार्पण अर्पावे. 28 नियमित होमार्पण व त्याबरोबरचे धान्यार्पण आणि
पेयार्पण याशिवाय पापार्पणासाठी एक बोकड अर्पावा. 29 “‘सहाव्या
दिवशी आठ गोऱ्हे, दोन मेंढे, एक वर्षाची चौदा कोकरे अर्पावी. हे सर्व
निर्दोष असावेत. 30 गोऱ्हे, मेंढे व कोकरे याबरोबर त्यांच्या संख्येनुसार
नेमल्याप्रमाणे धान्यार्पण व पेयार्पण अर्पावे. 31 नियमित होमार्पण व
त्याबरोबरचे धान्यार्पण आणि पेयार्पण याशिवाय पापार्पणासाठी एक
बोकड अर्पावा. 32 “‘सातव्या दिवशी सात गोऱ्हे, दोन मेंढे आणि एक
वर्षाची चौदा कोकरे अर्पावी. हे सर्व निर्दोष असावेत. 33 गोऱ्हे, मेंढे व
कोकरे याबरोबर त्यांच्या संख्येनुसार नेमल्याप्रमाणे त्यांचे धान्यार्पण व
पेयार्पण अर्पावे. 34 नियमित होमार्पण व त्याबरोबरचे धान्यार्पण आणि
पेयार्पण याशिवाय पापार्पणासाठी एक बोकड अर्पावा. 35 “‘आठव्या
दिवशी विशेष समारोप सभा बोलवावी व कोणतीही नियमित कामे
करू नये. 36 याहवेहसाठी एक गोऱ्हा, एक मेंढा व एक वर्षाची सात
कोकरे यांचे सुवासिक अन्नार्पण म्हणजेच होमार्पण अर्पावे. हे सर्व
निर्दोष असावेत. 37 गोऱ्हा, मेंढा व कोकरे याबरोबर त्यांच्या संख्येनुसार
नेमल्याप्रमाणे धान्यार्पण व पेयार्पण अर्पावे. 38 नियमित होमार्पण
व त्याबरोबरचे धान्यार्पण आणि पेयार्पण याशिवाय पापार्पणासाठी
एक बोकड अर्पावा. 39 “‘तुमचे नवस व तुमची स्वखुशीची अर्पणे
याबरोबरच तुमची होमार्पणे, धान्यार्पणे, पेयार्पणे व शांत्यर्पणे तुमच्या
नेमलेल्या सणाच्या वेळी याहवेहस अर्पण करावे.’” 40 याहवेहने
आज्ञापिल्याप्रमाणे मोशेने सर्वकाही इस्राएली लोकांना सांगितले.

**30** मोशे इस्राएली लोकांच्या गोत्रांच्या पुढाऱ्यांशी बोलला: “याहवेहने
जे आज्ञापिले ते हे: 2 जेव्हा एखादा पुरुष याहवेहला नवस करतो
किंवा शपथ घेऊन स्वतःला बांधील करण्याचे वचन देतो, तेव्हा त्याने
त्याचा शब्द मोडू नये व बोलल्याप्रमाणे त्याने ते करावे. 3 “एखादी स्त्री
अजूनही आपल्या पित्याच्या घरात राहून याहवेहस नवस करते किंवा
वचन देऊन स्वतःला बांधील करते 4 आणि तिचा नवस किंवा शपथ
याविषयी तिच्या पित्याने ऐकले आणि तिला काही बोलला नाही, तर
ते वचन तिच्यावर कायम राहील. 5 परंतु ते ऐकून त्याने तिला मना
केले तर तिचे नवस व शपथ यापैकी कोणतेही कायम राहणार नाही;
कारण तिच्या पित्याने तिला मनाई केली, म्हणून याहवेह तिला क्षमा
करतील. 6 “तिने नवस केल्यावर किंवा तिच्या ओठांनी अविचाराने
शपथ उच्चारली व स्वतःला बांधील केल्यानंतर जर तिने विवाह केला 7
आणि तिच्या पतीने त्याविषयी ऐकले आणि तिला काही बोलला नाही,
तर तिचे नवस किंवा शपथ ज्याने तिने स्वतःला बांधील केले ते तिच्यावर
कायम राहील. 8 पण त्याविषयी ऐकून जर तिच्या पतीने तिला मनाई
केली, तर ज्या नवसाने व शपथेने तिने स्वतःला बांधील करून घेतले
आहे, ते तो रद्द करतो व याहवेह तिला क्षमा करतील. 9 “विधवा किंवा
घटस्फोट झालेली स्त्री शपथेने किंवा नवसाने स्वतःला बांधील करून
घेते, तर ते तिच्यावर कायम राहील. 10 “आपल्या पतीबरोबर राहून
एखादी स्त्री जर नवस करते किंवा स्वतःला बांधील करून शपथ घेते 11
आणि तिचा पती त्याविषयी ऐकून तिला काही बोलत नाही किंवा तिला
मनाई करीत नाही, तर ज्या नवसांनी व शपथांनी तिने स्वतःला बांधील
करून घेतले आहे ते कायम राहतील. 12 पण त्याविषयी ऐकून जर त्याने
ते रद्द केले, तर तिच्या मुखातून आलेले कोणतेही नवस किंवा शपथ
कायम राहणार नाहीत. तिच्या पतीने ते रद्द केले आहेत आणि याहवेह
तिला क्षमा करतील. 13 तिचा पती तिने केलेला नवस किंवा स्वतःचा
त्याग करण्यासाठी घेतलेली शपथ कायम करेल किंवा रद्द करेल. 14
पण रोजच्यारोज जर तिचा पती त्याविषयी तिला काहीही बोलत नाही,
तर तिने केलेले सर्व नवस व शपथ ज्यांनी तिने स्वतःला बद्ध करून
घेतले आहे ते तो कायम करतो. तो काहीही बोलला नाही म्हणून तिने
केलेले नवस तो कायम करतो. 15 पण ते ऐकल्यानंतर काही काळाने
जर त्याने ते रद्द केले, तर तिचा दोष त्याला भोगावा लागेल.” 16 पुरुष
व त्याची पत्नी, यांच्यामधील नाते व पिता व त्याची तरुण मुलगी जी
अजूनही त्याच्या घरात राहते यांच्यामधील नाते याविषयी याहवेहने
मोशेला दिलेले नियम ते हे आहेत.

**31** मग याहवेह मोशेला म्हणाले, 2 “इस्राएली लोकांसाठी मिद्यानी
लोकांचा सूड घे. त्यानंतर तू तुझ्या लोकांत मिळविला जाशील.”
3 तेव्हा मोशे लोकांना म्हणाला, “मिद्यानी लोकांशी युद्ध करावे म्हणून
तुम्ही आपल्यातील काही पुरुषांना सिद्ध करा, म्हणजे ते याहवेहच्या
वतीने त्यांचा सूड घेतील. 4 इस्राएलच्या प्रत्येक गोत्रातून एक
हजार पुरुषांना युद्धासाठी पाठवा.” 5 तेव्हा युद्धासाठी बारा हजार
पुरुष सशस्त्र झाले, प्रत्येक गोत्रातून एक हजार असे इस्राएलच्या
कुळातून ते पुरविण्यात आले. 6 एलअज़ार याजकाचा पुत्र फिनहासाने
आपल्याबरोबर पवित्रस्थानातील साहित्य व इशारा देण्यासाठी कर्णे
घेतले होते, त्याच्यासह मोशेने प्रत्येक गोत्रातील एक हजार पुरुषांना
युद्धात पाठवले. 7 याहवेहने मोशेला आज्ञापिल्याप्रमाणे ते मिद्यानी
लोकांशी लढले व त्यांनी प्रत्येक पुरुषाला जिवे मारले. 8 ज्या लोकांचा
त्यांनी वध केला ते मिद्यानांचे पाच राजे म्हणजे एवी, रेकेम, सूर, हूर
आणि रेबा हे होते. त्यांनी बौराचा पुत्र बलाम यालाही तलवारीने जिवे
मारले. 9 इस्राएली लोकांनी मिद्यानी स्त्रिया व लेकरे यांना कैद केले
आणि मिद्यानी गुरे व शेरडेमेंढरे व मालमत्ता लूट म्हणून घेतले. 10 मिद्यानी
लोक ज्या नगरांमध्ये स्थायिक होते त्यांच्या सर्व छावण्या त्यांनी जाळून
टाकल्या. 11 त्यांनी सर्व लोक व जनावरे यासह सर्व लूट व मालमत्ता
घेतली, 12 आणि कैदी, लूट, जनावरे यांना मोआबाच्या मैदानात
यरीहोजवळ यार्देनेकडील छावणीत मोशे, एलअज़ार याजक आणि
इतर इस्राएलच्या मंडळीसमोर आणले. 13 मोशे, एलअज़ार याजक
आणि समाजाचे सर्व पुढारी त्यांना भेटण्यास छावणीबाहेर गेले. 14 पण
सेनाधिकारी जे हजारांवरचे सरदार व शंभरांवरचे सरदार—जे युद्धावरून
परतले त्यांच्यावर मोशे रागावला. 15 मोशेने त्यांना विचारले, “तुम्ही सर्व
स्त्रियांना जिवंत राहू दिले काय? 16 त्यांनीच बलामाच्या सल्ल्यानुसार

पेओरच्या प्रकरणात इस्राएली लोकांना याहवेहशी अविश्वासूपणा
करण्यास भाग पाडले आणि याहवेहच्या लोकांना पीडेने मारले. 17
तर आता सर्व मुलांस जिवे मारा व पुरुषाशी संग ठेवलेल्या प्रत्येक
स्त्रीला मारून टाका, 18 परंतु जिचा कधीही पुरुषाशी संग झाला
नाही ती प्रत्येक मुलगी तुमच्यासाठी राखून ठेवा. 19 "जर कोणी
एखाद्याला जिवे मारले किंवा जो जिवे मारला गेला त्याला स्पर्श केला
त्यांनी सात दिवस छावणीबाहेर राहावे. तिसऱ्या दिवशी व सातव्या
दिवशी तुम्ही स्वतःस व आपल्या बंदिवानांना शुद्ध करावे. 20 चामडे,
बोकडाचे केस किंवा लाकूड या सर्व वस्तूंसह प्रत्येक वस्त्र शुद्ध करावे."
21 यानंतर एलअज़ार याजक युद्धास गेलेल्या सैनिकांना म्हणाला,
"याहवेहने मोशेला दिलेल्या नियमानुसार ही आज्ञा आहे: 22 सोने,
चांदी, तांबे लोखंड, कथील, शिसे 23 आणि त्या प्रत्येक वस्तू ज्या
अग्नीत टिकतात त्या अग्नीत टाकाव्या, मग त्या शुद्ध होतील. परंतु
त्या शुद्धीकरणाच्या पाण्यानेही शुद्ध कराव्या. ज्या वस्तू अग्नीत टिकत
नाहीत, त्या शुद्धीकरणाच्या पाण्यात घालून काढाव्या. 24 सातव्या
दिवशी तुम्ही आपली वस्त्रे धुवावीत म्हणजे तुम्ही शुद्ध व्हाल, मग तुम्ही
छावणीत परत यावे." 25 मग याहवेह मोशेला म्हणाले, 26 "तू आणि
एलअज़ार याजक व समाजाच्या कुटुंब प्रमुखांनी कैद केलेले सर्व लोक व
जनावरे यांची मोजणी करावी. 27 लुटीचे दोन समान भाग करावेत. एक
भाग लढाईवर गेलेल्या सैनिकांना व दुसरा भाग समाजातील इतरांना
द्यावा. 28 युद्धास गेलेल्या सैनिकांच्या हिश्श्यातून, मनुष्य असो किंवा
गुरे, गाढवे किंवा मेंढरे यापैकी याहवेहसाठी खंडणी म्हणून पाचशेमागे
एक याप्रमाणे ते वेगळे कर. 29 त्यांच्या अर्ध्या हिश्श्यातून ते घे व
याहवेहचा वाटा म्हणून तो एलअज़ार याजक याला दे. 30 इस्राएली
लोकांच्या अर्ध्या हिश्श्यातून माणसे असो किंवा गुरे, गाढवे, मेंढरे किंवा
इतर जनावरे यापैकी याहवेहसाठी खंडणी म्हणून पन्नासापैकी एक
याप्रमाणे ते वेगळे कर. व लेवी लोक, जे याहवेहच्या निवासमंडपाच्या
देखरेखीसाठी जबाबदार आहेत त्यांना द्यावे." 31 म्हणून याहवेहने
मोशेला आज्ञापिल्याप्रमाणे मोशे व एलअज़ार याजकाने केले. 32
युद्धात सैन्याने घेतलेल्या लुटीतून राहिलेली लूट 6,75,000 मेंढरे,
33 72,000 गुरे, 34 61,000 गाढवे 35 आणि 32,000 स्त्रिया
ज्यांनी कधीही पुरुषांबरोबर संग केला नव्हता. 36 युद्धात लढलेल्यांना
मिळालेला अर्धा भाग हा होता: 3,37,500 मेंढरे, 37 ज्यापैकी
याहवेहची खंडणी 675 मेंढरे होती; 38 36,000 गुरे, ज्यापैकी 72
याहवेहची खंडणी होती; 39 30,500 गाढवे, ज्यापैकी याहवेहची
खंडणी 61 होती; 40 16,000 लोक, ज्यापैकी याहवेहची खंडणी
32 होती. 41 याहवेहने मोशेला आज्ञापिल्याप्रमाणे मोशेने याहवेहचा
हिस्सा म्हणून एलअज़ार याजकाला खंडणी दिली. 42 युद्धास गेलेल्या
सैनिकांशिवाय इस्राएली लोकांना जो वाटा मोशेने वेगळा केला— 43
इस्राएल समाजाला मिळालेला अर्धा वाटा याप्रमाणे होता—3,37,500
मेंढरे, 44 36,000 गुरे, 45 30,500 गाढवे 46 आणि 16,000 लोक.
47 याहवेहने मोशेला आज्ञापिल्याप्रमाणे इस्राएली लोकांच्या वाट्यातील
पन्नासापैकी एक, लोक आणि जनावरे असे मोशेने निवडून ते लेवी
लोकांना दिले, जे याहवेहच्या निवासमंडपाच्या देखरेखीसाठी जबाबदार
होते. 48 नंतर सेनेच्या तुकड्यांवर जे अधिकारी होते—जे हजारांचे व
शंभरांचे सेनापती होते ते मोशेकडे गेले 49 आणि मोशेला म्हणाले,
"तुझ्या सेवकांनी आमच्या हाताखाली असलेल्या सैनिकांची मोजणी
केली आणि त्यातून एकही व्यक्ती कमी झालेला नाही. 50 म्हणून आम्ही
आम्हाला लुटीतून जे सोन्याचे दागिने मिळाले त्यातून तोडे, कड्या,
अंगठ्या, कुंडले व माळा; आमच्यासाठी प्रायश्चिताचे अर्पण म्हणून
याहवेहसमोर आणले आहेत." 51 मोशे व एलअज़ार याजक यांनी ते
सोने; घडीव दागिने त्यांच्यापासून स्वीकारले. 52 हजारांचे सरदार व
शंभरांचे सरदार यांच्याकडून स्वीकारलेले सोने जे मोशे व एलअज़ार
याजकाने याहवेहला भेट म्हणून सादर केले, त्याचे वजन 16,750
शेकेल इतके भरले. 53 प्रत्येक सैनिकाने स्वतःसाठी लूट घेतली होती.
54 मोशे आणि एलअज़ार याजकाने हजारांच्या व शंभरांच्या सरदारांकडून
जे सोने स्वीकारले, ते त्यांनी इस्राएली लोकांसाठी याहवेहसमोर स्मारक
म्हणून सभामंडपात आणले.

**32** रऊबेन गोत्राचे लोक व गाद गोत्राच्या लोकांकडे मोठी खिल्लारे
व कळपे होती. त्यांनी पाहिले की याजेर आणि गिलआद हे प्रांत
कळपासाठी उत्तम आहेत. 2 म्हणून गाद गोत्राचे व रऊबेन गोत्राचे
लोक मोशे, एलअज़ार याजक व समाजाच्या पुढाऱ्यांकडे आले आणि
म्हणाले, 3 "अतारोथ, दिबोन, याजेर, निमराह, हेशबोन, एलिआलेह,
सेबाम, नबो व बेओन; 4 हा प्रांत जो याहवेहने इस्राएली लोकांपुढे
कब्जा केला आहे, तो गुरांसाठी उत्तम आहे आणि तुझ्या सेवकांजवळ
गुरे आहेत." 5 ते म्हणाले, "जर आम्ही तुझ्या दृष्टीत कृपा पावलो
असलो तर हा प्रदेश तुझ्या सेवकांना आमचे वतन असा दिला जावा.
आम्हाला यार्देनच्या पलीकडे नेऊ नकोस." 6 मोशे गाद गोत्राच्या व
रऊबेन गोत्राच्या लोकांना म्हणाला, "इस्राएलमधील तुमचे इतर भाऊ
युद्धाला जातील तेव्हा तुम्ही इथे बसून राहावे काय? 7 याहवेहने जो देश
त्यांना देऊ केला आहे, त्यात जाण्यासाठी तुम्ही इस्राएली लोकांना
का निराश करता? 8 मी तुमच्या पूर्वजांना कादेश-बरनेआपासून देश
हेरायला पाठवले तेव्हाही त्यांनी असेच केले होते. 9 अष्कोलच्या
खोऱ्यापर्यंत गेल्यानंतर त्यांनी देश पाहिला व जो देश याहवेहने त्यांना
दिला होता त्यात जाण्यापासून त्यांनी इस्राएली लोकांना निराश केले.
10 त्या दिवशी याहवेहचा क्रोध भडकला आणि त्यांनी ही शपथ वाहिली:
11 'कारण त्यांनी पूर्ण अंतःकरणाने मला अनुसरले नाही, म्हणून
इजिप्तमधून बाहेर येताना ज्यांचे वय वीस वर्षे व त्याहून अधिक होते
त्यातील एकही, जो देश मी अब्राहाम, इसहाक व याकोबाला शपथ
घेऊन देऊ केला तो पाहणार नाही; 12 कनिज्जी यफुन्नेहचा पुत्र कालेब
आणि नूनाचा पुत्र यहोशुआ मात्र तो पाहतील, कारण त्यांनी याहवेहला
पूर्ण हृदयाने अनुसरले.' 13 याहवेहचा क्रोध इस्राएलवर भडकला व ज्या
पिढीने याहवेहच्या दृष्टीने दुष्टाई केली होती त्या सर्वांचा नाश होईपर्यंत
याहवेहने इस्राएली लोकांना चाळीस वर्षे रानात भटकण्यास लावले.

14 “आणि पाहा, पातक्यांच्या पिल्लांनो, इस्राएलावर याहवेहचा राग
आणखी वाढविण्यासाठी तुम्ही तुमच्या पित्याच्या जागी उभे राहिला
आहात. 15 जर तुम्ही याहवेहच्या मागे चालण्यापासून दूर फिराल, तर
याहवेह या इस्राएली लोकांना पुन्हा रानात सोडून देतील व तुम्ही त्यांच्या
नाशास कारणीभूत ठराल.” 16 नंतर ते मोशेकडे येऊन त्याला म्हणाले,
“येथे आम्ही आमच्या गुरामेंढरांसाठी मेंढवाडे व आमच्या स्त्रिया व
लेकरांसाठी नगरे बांधू. 17 परंतु आम्ही स्वतःला युद्धासाठी सशस्त्र
करू व इस्राएली लोकांना त्यांच्या ठिकाणी पोहचवेपर्यंत त्यांच्यापुढे
जाऊ. तोपर्यंत आमच्या स्त्रिया व लेकरे देशातील रहिवाशांपासून
तटबंदीच्या नगरात सुरक्षित राहतील. 18 प्रत्येक इस्राएली व्यक्तीला
आपले वतन मिळेपर्यंत आम्ही आमच्या घरी परत जाणार नाही. 19
यार्देन नदीच्या पलीकडे त्यांच्याबरोबर आम्ही कोणतेही वतन घेणार
नाही, कारण आमचे वतन आम्हाला यार्देनेच्या पूर्वेस मिळाले आहे.”
20 तेव्हा मोशे त्यांना म्हणाला, “जर तुम्ही हे कराल, म्हणजे जर
तुम्ही याहवेहसमोर युद्धासाठी स्वतःला हत्यारबंद कराल 21 आणि
याहवेह आपल्या शत्रूंना आपल्यासमोरून घालवून देईपर्यंत तुम्ही सर्व जे
हत्यारबंद झालेले आहात, ते याहवेहच्या पुढे यार्देन पार कराल; 22
तर जेव्हा याहवेहपुढे देश ताब्यात घेतला जाईल, तेव्हा तुम्ही परत जा
व याहवेहच्या व इस्राएलच्या कर्तव्यातून तुम्ही मुक्त व्हाल आणि हा
देश याहवेहसमोर तुमचे वतन होईल. 23 “परंतु तुम्ही असे करण्यास
चुकला, तर तुम्ही याहवेहविरुद्ध पाप कराल; आणि खचितच तुमचे पाप
तुम्हाला शोधणार. 24 तुमच्या स्त्रिया व लेकरांकरिता नगरे व तुमच्या
गुरामेंढरांकरिता वाडे बांधा, परंतु तुम्ही वचन दिल्याप्रमाणे करा.” 25
गाद आणि रऊबेन गोत्राच्या लोकांनी मोशेला म्हटले, “आम्ही तुझे
सेवक, आमच्या प्रभूच्या आज्ञेप्रमाणे करू. 26 आमची लेकरे, स्त्रिया,
आमचे कळप आणि गुरे या ठिकाणी गिलआदाच्या शहरांमध्ये राहतील.
27 पण तुझे सेवक, म्हणजे युद्धासाठी हत्यारबंद झालेला प्रत्येक पुरुष,
जसे आमचे प्रभू सांगतात त्याप्रमाणेच युद्धासाठी याहवेहपुढे पार
जातील.” 28 नंतर मोशेने एलअज़ार याजकाला व नूनाचा पुत्र यहोशुआ
आणि इस्राएली गोत्राच्या कुटुंबप्रमुखांना आज्ञा दिली. 29 मोशे त्यांना
म्हणाला, “जर गाद आणि रऊबेन गोत्राचे लोक, त्यांच्यातील प्रत्येक
पुरुष जो युद्धासाठी हत्यारबंद झालेला, याहवेहसमोर तुमच्याबरोबर
यार्देन पार करतील, जेव्हा तुमच्यापुढे देश ताब्यात घेतला जाईल, तेव्हा
तुम्ही गिलआदाचा प्रांत त्यांना त्यांचे वतन म्हणून द्यावा. 30 पण ते
जर तुमच्याबरोबर हत्यारबंद होऊन पार गेले नाहीत, तर त्यांनी कनान
देशात तुमच्याबरोबर वतन स्वीकारावे.” 31 गाद आणि रऊबेन गोत्राच्या
लोकांनी उत्तर दिले, “तुझे सेवक तेच करतील जे याहवेहने सांगितले
आहे. 32 आम्ही हत्यारबंद होऊन याहवेहपुढे कनान देशात पार जाऊ,
परंतु आमचे वतन यार्देनेच्या अलीकडे असणार.” 33 तेव्हा मोशेने गाद
गोत्राचे लोक, रऊबेन गोत्राचे लोक आणि योसेफाचा पुत्र मनश्शेहचे
अर्ध्या गोत्रांना अमोऱ्यांचा राजा सीहोनाचे राज्य आणि बाशानचा राजा
ओगच्या राज्याचा सर्व प्रदेश, शहरे व चहूकडील नगरे दिली. 34 गाद
गोत्राच्या लोकांनी दिबोन, अतारोथ, अरोएर, 35 अटरोथ-शोफान,
याजेर, योगबेहाह, 36 बेथ-निमराह व बेथ-हारान ही सर्व तटबंदीची नगरे
बांधली व त्यांच्या कळपासाठी मेंढवाडे सुद्धा बांधले. 37 रऊबेन गोत्राच्या
लोकांनी हेशबोन, एलिआलेह, आणि किर्याथाईमची पुनर्बांधणी केली,
38 याशिवाय नबो, बआल-मेओन (यांची नावे बदलली गेली) व सिबमाह
हे देखील. ज्या नगरांची त्यांनी पुनर्बांधणी केली त्या नगरांना त्यांनीच
नावे दिली. 39 मनश्शेहचा पुत्र माखीरचे वंशज गिलआद प्रांताकडे गेले,
त्यावर ताबा करून तिथे असलेल्या अमोरी लोकांना तिथून घालवून
दिले. 40 म्हणून मोशेने मनश्शेहचे वंशज माखीरी लोकांना गिलआद
प्रांत देऊ केला आणि ते तिथे स्थायिक झाले. 41 मनश्शेहचे वंशज
याईरी लोकांनी एका नगराला ताब्यात घेतले व त्याचे नाव हव्वोथ-
याईर असे ठेवले. 42 आणि नोबाहने केनाथ आणि त्याच्या परिसरातील
वस्त्या ताब्यात घेतल्या व त्याला नोबाह असे आपलेच नाव दिले.

**33** मोशे आणि अहरोन यांच्या नेतृत्वाखाली इस्राएली लोक आपल्या
तुकडीनुसार इजिप्तमधून बाहेर पडल्यानंतर त्यांच्या प्रवासाचे
टप्पे असे होते. 2 याहवेहच्या आज्ञेनुसार मोशेने त्यांच्या प्रवासाच्या
टप्प्यांची नोंद केली. टप्प्यानुसार त्यांचा प्रवास असा होता: 3 पहिल्या
महिन्याच्या पंधराव्या दिवशी, वल्हांडणाच्या दुसऱ्या दिवशी इस्राएली
लोक रामसेस येथून निघाले. सर्व इजिप्ती लोकांदेखत ते मोठ्या धैर्याने
चालत बाहेर पडले, 4 त्यावेळी इजिप्तचे लोक आपल्या सर्व प्रथम
जन्मलेल्या मुलांना ज्यांना याहवेहने जिवे मारले होते त्यांना दफन करीत
होते; कारण याहवेहने त्यांच्या दैवतांवरही न्याय आणला होता. 5
इस्राएली लोकांनी रामसेस सोडले व सुक्कोथ येथे तळ दिला. 6 त्यांनी
सुक्कोथ सोडले आणि वाळवंटाच्या काठावरील एथाम येथे तळ दिला.
7 त्यांनी एथाम सोडले व बआल-सफोनच्या पूर्वेकडे पी-हाहीरोथ कडे
वळले आणि मिग्दोलकडे तळ दिला. 8 त्यांनी पी-हाहीरोथ सोडले व
समुद्र पार रानात गेले आणि एथाम रानातील तीन दिवसांचा प्रवास
केल्यानंतर माराह येथे त्यांनी तळ दिला. 9 त्यांनी माराह सोडले व
एलीम येथे गेले, त्या ठिकाणी पाण्याचे बारा झरे व खजुरीची सत्तर
झाडे होती. तिथे त्यांनी तळ दिला. 10 त्यांनी एलीम सोडले व तांबड्या
समुद्राजवळ तळ दिला. 11 त्यांनी तांबडा समुद्र सोडून सीनच्या रानात
तळ दिला. 12 सीनचे रान सोडून त्यांनी दोफकाह येथे तळ दिला. 13
त्यांनी दोफकाह सोडले व अलूश येथे तळ दिला. 14 नंतर त्यांनी अलूश
सोडले व रफीदीम येथे तळ दिला. या ठिकाणी लोकांना पिण्यासाठी
पाणी नव्हते. 15 रफीदीम सोडल्यावर त्यांनी सीनायच्या रानात तळ
दिला. 16 मग सीनायच्या रानातून निघून त्यांनी किब्रोथ-हत्ताव्वा येथे
तळ दिला. 17 नंतर त्यांनी किब्रोथ-हत्ताव्वा सोडले आणि हसेरोथ येथे
तळ दिला. 18 त्यांनी हसेरोथ सोडले आणि रिथमाह येथे तळ दिला. 19
मग त्यांनी रिथमाह सोडल्यावर रिम्मोन-पेरेस येथे तळ दिला. 20 त्यांनी
रिम्मोन-पेरेस सोडले व लिब्नाह येथे तळ दिला. 21 मग त्यांनी लिब्नाह
सोडले व रिस्साह येथे तळ दिला. 22 त्यांनी रिस्साह सोडले आणि
केहेलाथाह येथे तळ दिला. 23 त्यांनी केहेलाथाह सोडले आणि शेफर

पर्वतावर तळ दिला. 24 नंतर त्यांनी शेफर पर्वत सोडला आणि हारादाह येथे तळ दिला. 25 त्यांनी हारादाह सोडले आणि माखेलोथ येथे तळ दिला. 26 माखेलोथ सोडल्यावर त्यांनी तहथ येथे तळ दिला. 27 तहथ सोडून त्यांनी तेराह येथे तळ दिला. 28 नंतर त्यांनी तेराह सोडले व मितखाह येथे तळ दिला. 29 त्यांनी मग मितखाह सोडले व हशमोनाह येथे तळ दिला. 30 त्यांनी हशमोनाह सोडले आणि मोसेरोथ येथे तळ दिला. 31 त्यांनी मोसेरोथ सोडले आणि बेने-याकन येथे तळ दिला. 32 त्यांनी बेने-याकन सोडले आणि होर-हग्गीदगाद येथे तळ दिला. 33 त्यांनी होर-हग्गीदगाद सोडले आणि याटबाथह येथे तळ दिला. 34 त्यांनी याटबाथह सोडले आणि आबरोनाह येथे तळ दिला. 35 नंतर त्यांनी आबरोनाह सोडले आणि एजिओन-गेबेर येथे तळ दिला. 36 त्यांनी एजिओन-गेबेर सोडले आणि सीनच्या वाळवंटातील कादेश येथे तळ दिला. 37 त्यांनी कादेश सोडले आणि एदोमच्या सीमेवरील होर पर्वतावर तळ दिला. 38 याहवेहच्या आज्ञेनुसार अहरोन याजक होर पर्वतावर गेला आणि इस्राएली लोक इजिप्तमधून बाहेर आल्यानंतर चाळिसाव्या वर्षाच्या पाचव्या महिन्याच्या पहिल्या दिवशी तो तिथे मरण पावला. 39 अहरोन होर पर्वतावर मरण पावला तेव्हा तो एकशे तेवीस वर्षांचा होता. 40 कनानी अरादचा राजा कनानाच्या नेगेव येथे राहत होता, त्याने इस्राएली लोक आपल्या देशाकडे येत आहेत असे ऐकले. 41 मग त्यांनी होर डोंगर सोडून जालमोनाह येथे तळ दिला. 42 नंतर त्यांनी जालमोनाह सोडले व पूनोन येथे तळ दिला. 43 पूनोन सोडल्यानंतर त्यांनी ओबोथ येथे तळ दिला. 44 त्यांनी ओबोथ सोडले व मोआबच्या सीमेवरील ईये-अबारीम येथे तळ दिला. 45 नंतर ईये-अबारीम सोडून त्यांनी दिबोन-गाद येथे तळ दिला. 46 दिबोन-गाद सोडल्यावर त्यांनी आलमोन-दिबलाथाइम येथे तळ दिला. 47 त्यांनी आलमोन-दिबलाथाइम सोडले व नबोजवळ अबारीम डोंगराजवळ तळ दिला. 48 मग त्यांनी अबारीम डोंगर सोडून मोआबाच्या मैदानात यार्देन नदीजवळ यरीहो समोर तळ दिला. 49 तिथे मोआबाच्या मैदानात यार्देनजवळ बेथ-यशिमोथापासून आबेल-शित्तीमपर्यंत तळ दिला. 50 मोआबाच्या मैदानात यार्देनजवळ यरीहोजवळ याहवेह मोशेला म्हणाले, 51 “इस्राएली लोकांशी बोल व त्यांना सांग: ‘यार्देन पार करून तुम्ही जेव्हा कनान देशात जाल, 52 तेव्हा तिथे राहणाऱ्या लोकांना तुमच्यापुढून घालवून द्या, त्यांच्या सर्व कोरीव आकृत्या व ओतीव मूर्त्यांचा नाश करा व त्यांची सर्व उच्च स्थाने नष्ट करा. 53 देशाचा ताबा घ्या व त्यात वस्ती करा, कारण तुम्ही त्यात वस्ती करावी म्हणून हा देश मी तुम्हाला दिला आहे. 54 तुमच्या कुळानुसार चिठ्ठ्या टाकून जमीन वाटप करावी. संख्येने मोठ्या असलेल्या गटाला मोठे वतन व लहान गटाला लहान वतन. चिठ्ठीद्वारे जे निघेल ते त्यांचे वतन होईल. तुमच्या पूर्वजांच्या गोत्रानुसार त्याची वाटणी करावी. 55 “‘पण त्या ठिकाणच्या रहिवाशांना तुम्ही जर घालवले नाही, व त्यांना तुम्ही तिथेच राहू दिले, तर ते तुमच्या डोळ्यांना कुसळांसारखे आणि तुमच्या कूशीला काट्यांसारखे होतील. ज्या देशात तुम्ही राहाल त्यामध्ये ते तुम्हाला त्रास देतील. 56 आणि मग जसे मी त्यांचे करण्याचे योजले आहे, तसे तुमचे करेन.’”

**34** याहवेह मोशेला म्हणाले, 2 “इस्राएली लोकांस आज्ञा देऊन सांग: ‘जो देश तुम्हाला तुमचे वतन म्हणून दिला जाणार आहे त्या कनान देशात जेव्हा तुम्ही प्रवेश कराल तेव्हा त्याच्या सीमा अशाप्रकारे असाव्यात: 3 “‘तुमच्या दक्षिणेचा विभाग सीन रानाच्या काही भागापासून एदोमाच्या सीमेपर्यंत असावा. तुमची दक्षिणेची सीमा मृत समुद्राच्या पूर्वेच्या टोकाकडून असावी, 4 तिथून तुमची सीमा अक्राब्बीमच्या चढावाच्या दक्षिणेस पोचून तिथून ती पुढे सीन पर्यंत जाऊन कादेश-बरनेआच्या दक्षिणेपर्यंत आणि हाजार अद्दारपर्यंत जाऊन आजमोनास पोचावी. 5 आजमोनाहून ती सीमा वळून इजिप्त देशाच्या ओहोळाला जाऊन मिळेल व भूमध्य समुद्राकडे संपेल. 6 तुमची पश्चिमेकडील सीमा भूमध्य समुद्राचा किनारा असेल. ही तुमची पश्चिम सीमा असावी. 7 तुमच्या उत्तरेकडील सीमेसाठी भूमध्य समुद्रापासून होर पर्वतापर्यंत रेखा आखावी. 8 आणि होर पर्वतापासून लेबो हमाथपर्यंत व तिथून ती सीमा जेदादपर्यंत न्यावी. 9 जिफरोनपर्यंत जाऊन तिचा शेवट हाजार-एनान येथे संपेल. ही तुमची उत्तरेकडील सीमा असेल. 10 तुमच्या पूर्वेकडील सीमेसाठी हाजार-एनानपासून शेफम पर्यंत रेखा आखावी. 11 तिथून ती सीमा शेफमपासून खाली रिब्लाह जे एईनच्या पूर्वेकडे आहे तिथपर्यंत जाईल आणि उताराला पुढे पूर्वेच्या बाजूने किन्नेरेथ समुद्रापर्यंत पोहोचेल. 12 नंतर ती सीमा यार्देन नदीच्या कडेने जाऊन मृत समुद्राकडे तिचा शेवट होईल.’ 13 मोशेने इस्राएली लोकांना ही आज्ञा दिली: “हा देश तुम्ही चिठ्ठ्या टाकून वतन म्हणून वाटप करावा. याहवेहने आज्ञा केली आहे की हा देश साडेनऊ गोत्रांना दिला जावा, 14 कारण रऊबेनचे गोत्र, गादचे गोत्र आणि मनश्शेहच्या अर्ध्या गोत्राच्या कुटुंबांना त्यांचे वतन मिळाले आहे. 15 या अडीच गोत्रांना त्यांचे वतन यरीहोजवळ, यार्देनच्या अलीकडे पूर्वेच्या बाजूला मिळाले आहे.” 16 याहवेह मोशेला म्हणाले, 17 “ज्या पुरुषांनी देश वतन म्हणून तुम्हाला वाटप करून द्यावा ते हे आहेत: एलअज़ार याजक आणि नूनाचा पुत्र यहोशुआ. 18 आणि देश वाटणीच्या मदतीसाठी प्रत्येक गोत्रातून एक पुढारी नेमावा. 19 “ही त्यांची नावे आहेत: “यहूदाहच्या गोत्रातून, यफुन्नेहचा पुत्र कालेब; 20 शिमओनच्या गोत्रातून, अम्मीहूदाचा पुत्र शमुवेल; 21 बिन्यामीनच्या गोत्रातून, किसलोनचा पुत्र एलीदाद; 22 दानच्या गोत्रातून, योगलीचा पुत्र बुक्की हा पुढारी होता. 23 योसेफाचा पुत्र मनश्शेह याच्या गोत्रातून, एफोदचा पुत्र हन्नीऐल हा पुढारी होता. 24 योसेफाचा पुत्र एफ्राईम याच्या गोत्रातून, शिफतनचा पुत्र कमुवेल हा पुढारी होता. 25 जबुलूनच्या गोत्रातून, परनाखचा पुत्र एलीजाफान हा पुढारी होता. 26 इस्साखारच्या गोत्रातून, अज्जानचा पुत्र पलतीएल हा पुढारी होता. 27 आशेरच्या गोत्रातून, शलोमीचा पुत्र अहिहूद हा पुढारी होता. 28 नफताली गोत्रातून, अम्मीहूदाचा पुत्र पेदेहेल हा पुढारी होता.” 29 इस्राएली लोकांना कनान देशात वतन वाटून देण्यासाठी याहवेहने ज्या पुरुषांना आज्ञा दिली ते हे आहेत.

**35** यरीहो समोर मोआबाच्या मैदानात यार्देनजवळ याहवेह मोशेला
म्हणाले, 2 “इस्राएली लोकांना आज्ञा दे की त्यांना मिळालेल्या
वतनातून लेवी लोकांना राहण्यासाठी त्यांनी नगरे आणि नगराभोवतालची
कुरणेही द्यावीत. 3 म्हणजे त्यांना राहण्यासाठी नगरे व त्यांच्या मालकीची
असणारी त्यांची गुरे मेंढरे व सर्व इतर जनावरांसाठी कुरणे असावीत. 4
“नगराभोवतालची जी कुरणे तुम्ही लेवी लोकांना देणार ती नगराच्या
कुसापासून एक हजार हात असावी. 5 नगराबाहेर पूर्वेच्या दिशेने दोन
हजार हात, दक्षिणेच्या दिशेने दोन हजार हात, पश्चिमेकडे दोन हजार हात
व दोन हजार हात उत्तरेकडे मोजावे आणि नगर मध्यभागी असावे. हाच
भाग त्यांच्या नगरांसाठी कुरण म्हणून असावा.” 6 “लेवी लोकांना जी
शहरे तुम्ही द्याल, त्यापैकी सहा शहरे आश्रयाची शहरे म्हणून असावीत,
जर एखाद्या व्यक्तीने कोणाला जिवे मारले तर त्याने त्यात पळून जावे.
त्याचबरोबर इतर बेचाळीस नगरे लेवी लोकांना द्यावीत. 7 अशी लेवी
लोकांना त्यांच्या कुरणांसह एकंदर अठ्ठेचाळीस नगरे द्यावीत. 8 लेवी
लोकांना जी नगरे तुम्ही द्याल ती इस्राएली लोकांच्या प्रत्येक गोत्राला
मिळालेल्या वतनाच्या प्रमाणात: म्हणजे ज्यांना पुष्कळ नगरे मिळाली
त्यांच्याकडून पुष्कळ, परंतु ज्यांना थोडी नगरे मिळाली त्यांच्याकडून
थोडी नगरे घेऊन द्यावीत.” 9 नंतर याहवेह मोशेला म्हणाले: 10
“इस्राएली लोकांशी बोल आणि त्यांना सांग: जेव्हा तुम्ही यार्देन पार
करून कनानमध्ये जाल, 11 तुमच्यासाठी आश्रयनगरे व्हावी म्हणून
तुम्ही काही शहरे निवडून ठेवा, म्हणजे कोणी एखाद्याला चुकून जिवे
मारले तर त्याने तिथे पळून जावे. 12 सूड घेणाऱ्यापासून आश्रय म्हणून
ही नगरे तुमच्यासाठी असावीत, अशासाठी की खुनी असल्याचा दोष
असणारा, मंडळीसमोर खटला होण्यापूर्वीच मारला जाऊ नये. 13
ही जी सहा नगरे तुम्ही द्याल ती तुमच्यासाठी आश्रयाची नगरे म्हणून
असतील. 14 या आश्रयाच्या नगरांपैकी तीन नगरे यार्देनेच्या अलीकडे
व तीन कनानमध्ये असावीत. 15 ही सहा नगरे इस्राएली लोकांसाठी
व त्यांच्यामध्ये रहिवासी असलेल्या परदेशीयांसाठी सुद्धा आश्रयाचे
ठिकाण असे असावे, अशासाठी की कोणी एखाद्याला चुकीने जिवे
मारले असता त्याने त्या ठिकाणी पळून जावे. 16 “‘जर कोणा व्यक्तीने
लोखंडी वस्तूने एखाद्यावर घातक हल्ला केला, तर तो व्यक्ती खुनी
आहे; खुनी मनुष्याला अवश्य जिवे मारावे. 17 किंवा कोणी दगड घेऊन
एखाद्यावर घातक हल्ला करतो, तो व्यक्ती खुनी आहे; खुनी मनुष्याला
अवश्य जिवे मारावे. 18 किंवा कोणी लाकडी वस्तू घेऊन एखाद्यावर
घातक हल्ला करतो, तो व्यक्ती खुनी आहे; त्या खुनी मनुष्याला अवश्य
जिवे मारावे. 19 रक्ताचा सूड घेणाऱ्याने त्या खुनी मनुष्याला जिवे
मारावे; जेव्हा सूड घेणाऱ्याला खुनी मनुष्य सापडेल; सूड घेणाऱ्याने
खुनी मनुष्याला जिवे मारावे. 20 जर कोणी एखाद्याला द्वेषभावनेने
लोटून दिले किंवा त्याने मरावे अशा हेतूने काही फेकून मारले 21 किंवा
जर वैरभावाने एखाद्याला बुक्की मारली व तो मेला, तर त्या व्यक्तीला
मारून टाकले जावे; कारण तो खुनी आहे. रक्ताचा सूड घेणारा जेव्हा त्या
खुनी व्यक्तीला भेटेल तेव्हा त्याने त्याला अवश्य जिवे मारावे. 22 “‘पण
काही शत्रुत्व नसताना अचानक कोणी एखाद्याला ढकलतो किंवा चुकीने
त्यांच्यावर एखादी वस्तू फेकतो 23 किंवा न पाहताच त्यांना मारून
टाकू शकेल असा जड दगड त्यांच्यावर टाकेल, व तो व्यक्ती जर मेला,
परंतु ज्याने मारले तो त्याचा शत्रू नव्हता व त्याने ती हानी मुद्दाम केली
नाही, 24 म्हणून मंडळीने या नियमानुसार आरोपी आणि रक्ताचा सूड
घेणारा यांच्यात न्याय करावा. 25 खुनाचा आरोप असलेल्या व्यक्तीला
मंडळीने रक्ताचा सूड घेणाऱ्यापासून वाचवावे व तो ज्या आश्रयाच्या
नगराकडे पळून गेला होता त्याकडे त्याला पाठवावे. पवित्र तेलाने
अभिषेक झालेल्या मुख्य याजकाचा मृत्यू होईपर्यंत आरोपी मनुष्याने
तिथेच राहावे. 26 “‘परंतु आरोपी ज्या आश्रय नगरात पळून गेला आहे
त्याच्या सीमेबाहेर गेला 27 आणि रक्ताचा सूड घेणाऱ्याला तो शहराच्या
बाहेर सापडला आणि रक्ताचा सूड घेणाऱ्याने त्याला जिवे मारले तर त्या
खुनासाठी तो दोषी ठरणार नाही. 28 कारण आरोपीने त्या आश्रयाच्या
नगरात महायाजकाचा मृत्यू होईपर्यंत राहिले पाहिजे; महायाजकाच्या
मृत्यूनंतर त्याने आपल्या स्वतःच्या घरी जावे. 29 “‘हे सर्व तुमच्या
येणाऱ्या पिढ्यांसाठी तुम्ही जिथे वस्ती कराल तिथे तुमच्या न्यायाचे
नियम म्हणून असावे. 30 “‘जो कोणी एखाद्याचा खून करतो त्याला
केवळ साक्षीदाराच्या साक्षीनुसारच जिवे मारावे. परंतु केवळ एकाच
साक्षीच्या आधारावर कोणाला जिवे मारू नये. 31 “‘खुनी व्यक्तीच्या
जिवासाठी खंडणी स्वीकारू नये, जो दोषी मरणास पात्र आहे त्याला
अवश्य जिवे मारावे. 32 “‘जो आश्रयाच्या नगरात पळून गेला आहे,
त्याने महायाजकाच्या मृत्यूच्या आधी आपल्या स्वतःच्या घरी जाऊन
राहावे म्हणून त्याच्या जिवासाठी खंडणी स्वीकारू नये. 33 “‘तुम्ही
राहत असलेला देश भ्रष्ट करू नका. रक्तपाताने देश भ्रष्ट होतो आणि
ज्या देशात रक्तपात होतो त्याच्यासाठी ज्याने रक्तपात केला त्याच्या
रक्ताशिवाय प्रायश्चित होऊ शकत नाही. 34 ज्या देशात तुम्ही राहता व
जिथे मी निवास करतो तो तुम्ही अशुद्ध करू नये, कारण मी याहवेह
इस्राएली लोकांमध्ये निवास करतो.’”

**36** योसेफाच्या वंशाच्या कुळातील, मनश्शेहचा पुत्र माखीरचा पुत्र
गिलआदच्या कुटुंबाचे कुलप्रमुख मोशे व पुढारी, म्हणजे इस्राएली
कुटुंबाच्या पुढाऱ्यांपुढे येऊन बोलले. 2 ते म्हणाले, “माझ्या प्रभूला
याहवेहने आज्ञा दिली की इस्राएली लोकांना हा देश चिठ्ठ्या टाकून वतन
म्हणून द्यावा, याहवेहने तुला आज्ञा दिली की आमचा भाऊ सलाफहादचे
वतन त्याच्या मुलींना द्यावे. 3 परंतु त्यांनी जर इस्राएलातील इतर
गोत्रातील पुरुषांशी लग्न केले, तर त्यांचे वतन आमच्या पूर्वजांच्या
वतनातून काढून ज्या गोत्रात त्या लग्न करून जातील त्यांच्यात जोडले
जाईल. म्हणजे आम्हाला मिळालेल्या वतनाचा भाग काढून घेतला
जाईल. 4 आणि जेव्हा इस्राएल लोकांचे योबेल वर्ष येईल, तेव्हा
त्यांचे वतन ज्या गोत्रात ते लग्न करून जातील त्यांच्यात जोडले
जाईल आणि त्यांचे वतन आमच्या पूर्वजांच्या गोत्रातून काढून घेतले
जाईल.” 5 नंतर याहवेहच्या आज्ञेनुसार मोशेने इस्राएली लोकांना हा
हुकूम दिला: “योसेफाच्या गोत्राचे वंशज जे म्हणत आहेत ते बरोबर

आहे. 6 सलाफहादच्या कन्यांसंबंधी याहवेह अशी आज्ञा देतात:
त्यांना आवडेल त्या व्यक्तीशी त्यांनी विवाह करावा, परंतु आपल्याच
पित्याच्या गोत्राच्या कुळात त्यांनी विवाह करावा. 7 इस्राएलचे वतन
एका गोत्रातून दुसर्‍या गोत्रात जाऊ नये, तर प्रत्येक इस्राएली व्यक्तीने
आपल्या पूर्वजांच्या गोत्राच्या वतनाला जपावे. 8 इस्राएली लोकांतील
कोणत्याही गोत्रातील ज्या प्रत्येक मुलीला वतन मिळाले असेल, तिने
आपल्या पित्याच्या गोत्राच्या कुळातील एखाद्या व्यक्तीशी विवाह करावा,
यासाठी की प्रत्येक इस्राएली व्यक्तीला आपल्या पूर्वजांचे वतन मिळेल.
9 कोणतेही वतन एका गोत्रातून दुसर्‍या गोत्रात जाणार नाही, तर
इस्राएली लोकांच्या प्रत्येक गोत्राने आपल्या वतनाला जपावे.” 10
याहवेहने मोशेला दिलेल्या आज्ञेनुसार सलाफहादच्या कन्यांनी केले. 11
सलाफहादच्या कन्या म्हणजे महलाह, तिरजाह, होगलाह, मिल्काह व
नोआहने त्यांच्या पित्याच्या चुलत भावांशी विवाह केला. 12 त्यांनी
योसेफाचा पुत्र मनश्शेहच्या गोत्राच्या कुळातच विवाह केला व त्यांचे
वतन त्यांच्या पित्याच्या गोत्रात व कुळातच राहिले. 13 मोआबाच्या
मैदानात यरीहोजवळ यार्देनकडे मोशेद्वारे याहवेहने इस्राएली लोकांसाठी
ज्या आज्ञा व नियम लावून दिले ते हेच आहेत.

# अनुवाद

**1** इस्राएली लोक यार्देन नदीच्या पूर्वेस असणाऱ्या रानातील अराबा
नावाच्या दरीमध्ये तळ देऊन राहिले होते, त्यावेळी मोशे जे बोलला
त्या सर्व गोष्टींची नोंद या पुस्तकात केलेली आहे. या प्रदेशात सूफ,
पारान, तोफेल, लाबान, हसेरोथ व दीजाहाब इत्यादी शहरांचा समावेश
होतो. 2 (सेईर डोंगरमार्गे होरेब ते कादेश-बरनेआपर्यंतचा प्रवास अकरा
दिवसाचा होता.) 3 चाळिसाव्या वर्षाच्या, अकराव्या महिन्याच्या
पहिल्या दिवशी, याहवेहने आज्ञा केल्याप्रमाणे मोशेने इस्राएली लोकांना
हे सर्व सांगितले. 4 हे मोशेने जाहीर करण्यापूर्वीच अमोऱ्यांचा राजा
सीहोनाचा हेशबोन येथे पराभव करण्यात आला होता व एद्रेई जवळील
अष्टारोथ येथे बाशानचा राजा ओगचाही पराभव करण्यात आला
होता. 5 यार्देनच्या पूर्वेकडील मोआब प्रदेशात मोशे इस्राएली लोकांशी
नियमांसंबंधी बोलला. तो म्हणाला: 6 आपल्या याहवेह परमेश्वरांनी
चाळीस वर्षांपूर्वी होरेब येथे आपल्याला सांगितले होते, “तुम्ही या
पर्वताजवळ खूप दिवस राहिलात; 7 आता तुम्ही येथून जा व अमोऱ्यांचा
डोंगराळ प्रदेश, अराबाची दरी, नेगेव, कनान व लबानोन आणि भूमध्य
समुद्रकिनाऱ्यापासून ते फरात नदीच्या काठापर्यंत पसरलेल्या संपूर्ण
प्रदेशात जाऊन वस्ती करा. 8 पाहा, मी हा सर्व प्रदेश तुम्हाला देत
आहे. तुम्ही जा व तो प्रदेश हस्तगत करा. कारण याहवेहने तो प्रदेश
अब्राहाम, इसहाक व याकोब या तुमच्या पूर्वजास व त्यांच्या वंशजास
दिलेला वचनदत्त देश आहे.” 9 त्यावेळी मी तुम्हाला सांगितले होते,
“माझ्या शक्तीपलीकडे असलेले मी एकट्यानेच वाहून नेणारे तुमचे
मोठे ओझे माझ्यावर पडले आहे. 10 कारण याहवेह तुमच्या परमेश्वराने
तुमची संख्या आकाशातील ताऱ्यांप्रमाणे अगणित केली आहे, 11
याहवेह तुमच्या पूर्वजांच्या परमेश्वरांनी जे तुम्हाला अभिवचन दिले होते,
त्यानुसार तुमची संख्या हजारपटीने वाढवो आणि तुम्हाला आशीर्वाद
देवो! 12 तुमच्या समस्या, तुमचे ओझे व तुमची भांडणे माझ्यासारखा
एकटा मनुष्य कसा सोडवू शकेल? 13 तेव्हा तुम्हीच प्रत्येक गोत्रांमधून
सुज्ञ, समजूतदार व प्रतिष्ठित अशी काही माणसे निवडा, म्हणजे मी
त्यांना तुमचे पुढारी नेमीन.” 14 तुम्ही मला उत्तर देऊन म्हणाला, “तुम्ही
जे करण्याचा प्रस्ताव दिला ते उत्तम आहे.” 15 म्हणून मी तुमच्या
प्रत्येक गोत्रांतून प्रमुख, ज्ञानी आणि आदरणीय पुरुष घेतले आणि
त्यांना हजारांवर, शंभरांवर, पन्नासांवर व दहांवर प्रमुख व अधिकारी
म्हणून नेमले. 16 आणि त्यावेळी मी तुमच्या न्यायाधीशांना आज्ञा
केली, “तुमच्या लोकांचा वाद ऐकून त्यावर न्याय करावा, मग तो दोन
इस्राएली लोकांमधील असो किंवा इस्राएली आणि तुमच्यामध्ये राहणारे
परदेशी यांच्यातील असो. 17 न्याय करताना पक्षपातीपणा दाखवू नका;
लहान व मोठे यांचे म्हणणे समानतेत ऐकून घ्या. कोणालाही घाबरू
नका; कारण न्याय हा परमेश्वराकडूनच असतो. ज्या तक्रारी तुम्हाला
सोडविण्यास कठीण वाटतील, त्या माझ्याकडे आणा आणि मी ऐकेन.”
18 आणि त्यावेळी मी तुम्हाला जे काही करावयाचे आहे ते सर्व सांगितले
होते. 19 नंतर आम्ही होरेब येथून प्रस्थान केले व जो तुम्ही पाहिला
होता अशा अफाट आणि भयानक अशा अरण्यातून प्रवास करीत,
याहवेह आमच्या परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे शेवटी अमोऱ्यांच्या डोंगराळ
प्रदेशात पोहोचलो आणि आम्ही कादेश-बरनेआस आलो. 20 तेव्हा मी
तुम्हाला सांगितले, “आता तुम्ही अमोऱ्यांच्या डोंगराळ प्रदेशात येऊन
पोहोचला आहात, जो याहवेह आमचे परमेश्वर आम्हाला देणार आहेत.
21 पाहा, याहवेह तुमच्या परमेश्वराने हा देश तुम्हाला दिला आहे. तुमच्या
पूर्वजांचे देव परमेश्वरांनी सांगितल्याप्रमाणे वर जा आणि तो आपल्या
ताब्यात घ्या. घाबरू नका; निराश होऊ नका.” 22 तेव्हा तुम्ही सर्व
लोक माझ्याकडे आले आणि म्हणाले, “आधी आपण आपले हेर पाठवू
म्हणजे कुठल्या मार्गाने त्या देशात प्रवेश करावा व त्यांची कोणती शहरे
लागतील हे शोधून काढणे सोपे होईल.” 23 ही गोष्ट मला चांगली
वाटली; म्हणून मी प्रत्येक गोत्रातून एक असे बारा हेर निवडले. 24
तिथून निघून ते डोंगराळ प्रदेशात पोहोचले आणि ते अष्कोल दरीपर्यंत
आले व त्यांनी त्या प्रदेशाची पाहणी केली. 25 तिथून परत येताना त्यांनी
त्या ठिकाणची फळे आपल्याबरोबर आणली व असा अहवाल दिला:
“जो देश याहवेह आमचे परमेश्वर आम्हाला देत आहेत तो खरोखरच
चांगला आहे.” 26 परंतु तुम्ही वर जाण्यास नाकारले व याहवेह तुमच्या
परमेश्वराच्या आज्ञेविरुद्ध बंड केले. 27 आपल्या तंबूत बसून तुम्ही
कुरकुर केली आणि म्हटले, “याहवेह आमचा द्वेष करीत आहेत, म्हणून
अमोऱ्यांच्या हातून आमचा नाश व्हावा यासाठी त्यांनी आम्हाला इजिप्त
देशातून इकडे आणले आहे. 28 आम्ही आता कुठे जावे? आमच्या
हेरबंधूंच्या वार्तेमुळे आम्ही भयभीत झालो आहोत. ते म्हणतात की, ‘त्या
देशातील लोक आपल्यापेक्षा धिप्पाड आणि बलवान आहेत. त्यांची
नगरे खूप मोठी असून नगरतट तर इतके उंच आहेत की ते जणू काही
आकाशाला भिडले आहेत. आम्ही तिथे अनाकाचे वंशज देखील पाहिले
आहेत.’” 29 तेव्हा मी त्यांना म्हणालो, “असे भयभीत होऊ नका,
त्यांना घाबरू नका. 30 कारण याहवेह तुमचे परमेश्वर तुमच्यापुढे जात
आहेत, ते तुमच्यावतीने त्यांच्याशी लढतील, जसे तुमच्या डोळ्यादेखत
त्यांनी इजिप्त देशात आणि अरण्यात असताना केले. ज्याप्रमाणे पिता
आपल्या मुलांची सर्वतोपरी काळजी घेतो, त्याप्रमाणे याहवेह परमेश्वराने
इथे पोहोचेपर्यंत तुमची सतत काळजी घेतली.” 32 पण तरीही तुम्ही
याहवेह तुमच्या परमेश्वरावर विश्वास ठेवण्याचे नाकारले. 33 ज्यांनी
प्रवासात तुमच्यापुढे राहून रात्री अग्नीने आणि दिवसा मेघांनी तुमचे
मार्गदर्शन केले, वाटेत विश्रांतीसाठी उत्तमोत्तम जागा निवडल्या, ते रात्री
अग्नीने आणि दिवसा मेघांनी तुमचे मार्गदर्शन करीत. 34 तुम्ही जे म्हटले
ते याहवेहनी ऐकले आणि ते रागावले व त्यांनी शपथपूर्वक म्हटले:
35 “या पिढीतील एकाच्याही दृष्टीस मी त्यांच्या पूर्वजांना वचनदत्त
केलेली उत्तम भूमी पडू देणार नाही. 36 परंतु यफुन्नेहचा पुत्र कालेब,
जो मला पूर्णपणे अनुसरून चालला, त्याचे पाय ज्या भूमीला लागतील
ती भूमी मी त्याच्या वंशजांना देईन, कारण तो याहवेहच्या मागे पूर्ण
अंत:करणाने चालला.” 37 तुमच्यामुळे याहवेह माझ्यावरही रागावले व

म्हणाले, “तू या वचनदत्त देशात प्रवेश करणार नाहीस. 38 पण तुझा
मदतनीस, नूनाचा पुत्र यहोशुआ प्रवेश करेल. तू त्याला प्रोत्साहन दे,
कारण तो या वतनाचा ताबा घेण्यासाठी इस्राएली लोकांचे मार्गदर्शन
करेल. 39 जी बालके पारतंत्र्यात जातील असे तुम्ही म्हणता, ज्यांना
त्यांचे बरेवाईटही कळत नाही, त्यांना मी तो देश बहाल करेन आणि ते
त्याला आपल्या ताब्यात घेतील. 40 परंतु तुम्ही मागे वळून वाळवंटातून
तांबड्या समुद्राच्या वाटेने कूच करावे.” 41 तेव्हा लोकांनी कबुली दिली,
“आम्ही याहवेहविरुद्ध पाप केले आहे; आम्ही आमच्या वचनदत्त देशात
जाऊ व तो मिळविण्यासाठी याहवेह परमेश्वराच्या आज्ञेनुसार आम्ही वर
जाऊन लढाई करू.” असे म्हणून त्यांना आपली शस्त्रे सरसावली.
त्यांना वाटले की हा सर्व डोंगराळ प्रदेश आपण सहज जिंकून घेऊ. 42
परंतु याहवेह मला म्हणाले, “त्यांना सांग, ‘लढाई करण्यास वर जाऊ
नका, कारण मी तुमच्याबरोबर राहणार नाही. तुमचा तुमच्या शत्रूकडून
पराभव होईल.’” 43 तुम्हाला मी तसे सांगितले, पण तुम्ही माझे
ऐकले नाही. उलट पुन्हा याहवेहच्या आज्ञेविरुद्ध बंड केले आणि धिटाई
करून त्या डोंगराळ देशात शत्रूवर चाल करून गेले. 44 तिथे डोंगराळ
देशात राहणाऱ्या अमोऱ्यांनी तुमच्यावर चाल करून मधमाश्यांप्रमाणे
सेईरपासून होरमाहपर्यंत तुमचा पाठलाग केला व तुम्हाला मार दिला.
45 यानंतर तुम्ही परत येऊन याहवेहसमोर शोक करू लागलात, परंतु
त्यांनी तुमच्या रडण्याकडे लक्ष दिले नाही. 46 म्हणून तुम्ही कादेश
येथेच दीर्घकाल राहिला, असे तुम्ही तिथे दिवस घालविले.

2 नंतर आम्ही मागे वळून अरण्यामधून तांबड्या समुद्राकडे निघालो,
कारण याहवेहनी मला तशी आज्ञा दिली होती आणि अनेक वर्षे
आम्ही सेईर पर्वताच्या सभोवतालच्या प्रदेशात भ्रमण करीत राहिलो. 2
मग याहवेह मला म्हणाले, 3 “तुम्ही या पर्वताच्या सभोवती दीर्घकाल
राहिला आहात, तर आता उत्तरेकडे वळा. 4 लोकांना आदेश दे:
‘सेईर येथे राहणाऱ्या एसावाच्या वंशजाच्या, म्हणजे त्यांच्या एदोमी
भाऊबंदांच्या देशातून ते पुढे जाणार आहेत. तुमची त्यांना भीती वाटेल,
म्हणून तुम्ही खबरदारी घ्या. 5 त्यांना लढाईला प्रवृत्त करू नका,
कारण त्यांची भूमी मी तुम्हाला देणार नाही, मी तुम्हाला तिथे पाऊल
ठेवण्यासही जागा देणार नाही. मी सेईर पर्वताचा मुलूख एसावाला
दिला आहे. 6 तुम्ही तिथे जे काही अन्न खाल व पाणी प्याल त्याच्या
मोबदल्यात त्यांना चांदी द्या.’” 7 याहवेह तुमच्या परमेश्वराने तुमच्या
हाताच्या प्रत्येक कार्याला आशीर्वादित केले आहे. या विशाल अरण्यात
तुमचे भटकणे त्यांनी पाहिले आहे, चाळीस वर्षे याहवेह तुमचे परमेश्वर
तुमच्याबरोबर आहेत व तुम्हाला कशाचेही उणे पडले नाही. 8 म्हणून
आम्ही सेईर येथे राहणाऱ्या एसावाच्या वंशातील भाऊबंदांच्या देशाला
वळसा घालून दक्षिणेकडे एलाथ व एजिओन-गेबेरकडे जाणारा अराबाचा
रस्ता पार करून उत्तरेकडे प्रवास करीत मोआब वाळवंटाकडे निघालो.
9 तेव्हा याहवेह आम्हाला म्हणाले, “मोआबी लोकांना उपद्रव किंवा
लढाईसाठी प्रवृत करू नका, कारण मी त्यांच्या देशाचा कोणताही
भाग वतन म्हणून तुम्हाला देणार नाही. मी लोटाच्या वंशजांना आर
प्रदेश वतन म्हणून दिला आहे.” 10 (एमी लोक त्या भागात राहात
होते—बलवान व बहुसंख्य आणि अनाकी लोकांसारखे उंच असे होते.
11 एमी व अनाकी या दोन्हीही जमातीस पुष्कळदा रेफाईम असेही
म्हणत, पण मोआबी मात्र त्यांना एमीच म्हणत. 12 पूर्वीच्या काळी होरी
लोक सेईरमध्ये राहत असत, परंतु एसावाचे वंशज एदोमींनी त्यांना
तिथून घालवून दिले व तिथे वस्ती केली. याहवेहने वतन दिलेल्या
प्रदेशातून ज्याप्रमाणे इस्राएली लोकांनी तेथील लोकांना घालवून दिले
होते त्याचप्रमाणे.) 13 आणि याहवेह म्हणाले, “आता उठा आणि
जेरेद ओहोळ पार करून जा.” तेव्हा आम्ही ओहोळ पार केला. 14 पण
कादेश-बरनेआहून निघून जेरेद ओहोळ ओलांडून जाण्यास आम्हाला
तब्बल अडतीस वर्षे लागली, कारण याहवेहने घेतलेल्या शपथेमुळे
लढाऊ पुरुषांची संपूर्ण पिढी छावणीतून नष्ट झाली होती. 15 त्या सर्वांचा
नाश होईपर्यंत छावणीतून त्यांचा संहार करावा म्हणून याहवेहचा हात
त्यांच्यावर उगारलेला होता. 16 आता जेव्हा या लोकांमधील शेवटचा
योद्धा मरण पावला, 17 याहवेह मला म्हणाले, 18 “आज तुम्हाला
आर येथे मोआबाची सीमा ओलांडून जायचे आहे. 19 जेव्हा तुम्ही
अम्मोनी लोकांच्या भूमीत प्रवेश कराल, अम्मोनी लोकांना त्रास देऊ
नका, कारण मी त्यांचा कोणताही प्रदेश तुम्हाला देणार नाही, तो सर्व
मी लोटाच्या वंशजांना वतनादाखल दिला आहे.” 20 (तो देश तिथे
राहाणाऱ्या रेफाईम लोकांचा देखील मानला जात होता; परंतु अम्मोनी
लोक त्यांना जमजुम्मी म्हणत. 21 त्यांच्या वंशातील लोक धिप्पाड
आणि संख्येने पुष्कळ होते. ते अनाकी लोकांइतके उंच होते, परंतु
अम्मोनी लोकांपुढून त्यांना याहवेहने घालवून दिले व त्यांच्या नाश
केला. त्यांच्या जागी अम्मोन्यांनी त्या देशात वस्ती केली. 22 जेव्हा
तिथे राहणाऱ्या होरी लोकांना त्यांनी घालवून लावले व त्यांचा नाश
केला. त्यांनी त्यांना हुसकावून लावले आणि आजपर्यंत त्यांच्या जागी ते
वस्ती करून राहत आहेत, त्याचप्रमाणे सेईर येथे राहाणाऱ्या एसावाच्या
वंशजांसाठीही याहवेहने असेच केले. 23 गाझा शहरापर्यंत विखुरलेल्या
गावातून वस्ती करून राहिलेल्या अव्वी लोकांवर कफतोरहून आलेल्या
कफतोरी लोकांनी हल्ला चढवून त्यांचा संहार केला व त्या ठिकाणी
वस्ती केली.) 24 “आता उठा आणि आर्णोन नदी ओलांडून जा. पाहा,
हेशबोनचा राजा अमोरी सीहोन आणि त्याचा देश मी तुमच्या हाती
दिला आहे. तो देश ताब्यात घेण्यास सुरुवात करा व त्याच्याशी युद्ध
करा. 25 आजपासून पुढे मी असे करेन की अखिल पृथ्वीतलावरील
लोक तुमच्यापुढे भीतीने थरथर कापतील व तुमच्या आगमनाची चाहूल
लागताच दहशत घेतील.” 26 नंतर शांततेची बोलणी करण्याकरिता मी
केदेमोथच्या रानातून हेशबोनचा राजा सीहोनकडे दूत पाठवून म्हटले, 27
“आम्हाला तुझ्या देशामधून जाऊ दे. आम्ही मुख्य रस्त्यावरच राहू;
उजवीकडे वा डावीकडे वळणारही नाही. 28 आम्ही वाटेने जात असताना
तुमचे अन्न व पाणी तुमच्याकडून चांदीच्या किमतीत विकत घेऊ.
तुमच्या देशातून पायी चालत जाण्याची फक्त आम्हाला परवानगी द्या—
29 सेईरमध्ये राहणारे एसावाचे वंशज आणि आरवासी मोआबी यांनी

आमच्यासाठी केले—आम्ही यार्देन ओलांडून याहवेह आमचे परमेश्वर आम्हाला देत असलेल्या देशात जाईपर्यंत तुम्ही आमच्यासोबत करा." 30 परंतु हेशबोनाच्या सीहोन राजाने आम्हाला जाण्यास परवानगी दिली नाही. याहवेह तुमच्या परमेश्वराने त्याला तुमच्या हातात देण्यासाठी त्याचा आत्मा हट्टी आणि त्याचे हृदय कठीण केले होते. 31 मग याहवेह म्हणाले, "सीहोन राजाचा देश तुम्हाला देण्यास मी आता सुरुवात केली आहे. जेव्हा तुम्ही तो देश ताब्यात घ्याल, तेव्हा तो कायमचा तुमच्या मालकीचा होईल." 32 सीहोन आणि त्याची सर्व सेना आमच्यासोबत युद्ध करण्यास याहस येथे एकत्रित झाली, 33 परंतु याहवेह आमच्या परमेश्वराने त्याला आमच्या अधीन केले, आम्ही त्याला, त्याच्या पुत्रांसह संपूर्ण सेनेला चिरडून टाकले. 34 त्यावेळी आम्ही त्याची सर्व नगरे घेतली. त्यांच्या सर्वांचा नाश केला—पुरुष, स्त्रिया आणि मुले. आम्ही कोणालाही जिवंत सोडले नाही. 35 फक्त त्यांची गुरे जिवंत ठेवली. त्यांची नगरे काबीज करून ती सर्व संपत्ती आम्ही घेतली. 36 आर्णोन खोऱ्याच्या कडेला असलेल्या अरोएर शहरापासून खोऱ्यातील शहरापर्यंत व त्या शहरापासून गिलआदापर्यंत एकही दुर्गम शहर राहिले नाही. याहवेह आमच्या परमेश्वराने हे सर्व आमच्या अधीन करून दिले. 37 मात्र याहवेह आमच्या परमेश्वराच्या आज्ञेनुसार अम्मोनी लोकांच्या प्रदेशापासून आम्ही दूरच राहिलो. तसेच यब्बोक नदी व त्या डोंगराळ प्रदेशात वसलेल्या शहरापासूनही आम्ही दूर राहिलो.

**3** मग आम्ही वळलो आणि बाशानाच्या वाटेने वर गेलो आणि बाशानचा राजा ओग आपले सर्व सैन्य जमवून आमच्याशी युद्ध करण्यासाठी एद्रेई येथे आला. 2 याहवेहने मला म्हटले, "त्याला भिऊ नकोस; कारण मी त्याला व त्याच्या सर्व सैन्याला तुझ्या हाती दिले आहे. अमोऱ्यांचा राजा सीहोन जो हेशबोनात राज्य करीत होता त्याचे तू जसे केले तसेच याचे कर." 3 याप्रमाणे याहवेह आमच्या परमेश्वराने बाशानचा ओग राजा त्याच्या सर्व सैन्यासह आमच्या अधीन झाला. आम्ही त्यांचा असा संहार केला की त्यांच्यातील कोणीही मागे जिवंत राहिला नाही. 4 त्याची सगळी शहरे आम्ही त्यावेळी घेतली होती. अर्गोबचा संपूर्ण प्रदेश आणि बाशानमधील ओगचे राज्य, साठ नगरातील असे एकही शहर राहिले नाही जे आम्ही त्यांच्याकडून घेतले नाही. 5 या सर्व शहरांच्या तटबंदी उंच व दरवाजे लोखंडी गजांचे होते. शिवाय बरीच तटबंदी नसलेली गावेही होती. 6 ज्याप्रकारे आपण सीहोन राज्याचा हेशबोन येथे नाश केला, त्याच प्रकारे आपण बाशानच्या राज्यातील संपूर्ण शहरांचा—पुरुष, स्त्रिया व मुले यासहित समूळ नायनाट केला. 7 पण त्यांची सर्व गुरे व शहरातून मिळालेली लूट आपण आपल्यासाठी नेली. 8 म्हणून आपल्या ताब्यात दोन्हीही राजांचे सर्व प्रदेश, म्हणजे यार्देनेच्या पूर्वेकडे आर्णोन खिंडीपर्यंत असलेला हर्मोन पर्वतापर्यंतचा अमोऱ्यांचा सर्व प्रदेश आपल्या ताब्यात आला. 9 (सीदोनी लोक हर्मोन पर्वतास सिर्योन असेही म्हणत, पण अमोरी लोक त्याला सनीर म्हणत असत.) 10 आतापर्यंत आपण पठारावरील सर्व शहरे, संपूर्ण गिलआद आणि बाशान, सलेकाह व एद्रेई, ओग या शहरांपर्यंतची सर्व शहरे काबीज केली. 11 (रेफाईम लोकांपैकी बाशानचा राजा ओग हा शेवटचा होता. त्याचा पलंग लोखंडाने सजविला होता आणि तो चार हात लांब आणि दोन हात रुंद होता. तो अजूनही अम्मोनी लोकांच्या राब्बाहमध्ये आहे.) 12 त्यावेळी आपण काबीज केलेला प्रदेश मी रऊबेन व गाद यांच्या वंशास दिला. रऊबेन व गादच्या वंशांना मी आर्णोन नदीवरील अरोएरापासून गिलआद पर्वताचा अर्धा भाग त्यातील शहरांसह दिला. 13 गिलआद पर्वताचा उरलेला अर्धा भाग आणि ओग राजाचे पूर्वीचे राज्य म्हणजे अर्गोब विभाग हा मनश्शेहच्या अर्ध्या गोत्रास दिला. (बाशानच्या अर्गोब प्रदेशाला रेफाईमचा देश असेही म्हणत. 14 मनश्शेहच्या वंशातील याईराच्या कुळाने गशूरी व माकाथी लोकांच्या सीमेपर्यंतचा अर्गोबचा संपूर्ण प्रदेश आपल्या ताब्यात घेतला; त्याच्या नावावरून त्या प्रदेशाचे नाव पडले, त्यामुळे आजपर्यंत बाशानाला हव्योथ याईर म्हणतात.) 15 आणि मी गिलआद देश माखीरला दिला. 16 रऊबेन आणि गाद यांना मात्र गिलआद देशातील यब्बोक नदीपासून ते आर्णोन नदीच्या खोऱ्याच्या मध्यापर्यंतचा सर्व भाग मिळाला. गिलआद ही अम्मोन लोकांची सीमा होती. 17 तसेच किन्नेरेथाच्या समुद्रापासून अराबाचा समुद्र (म्हणजे मृत समुद्र) आणि पिसगाच्या उतरणी खालील अराबा व यार्देनेच्या पश्चिमेकडील सर्व प्रदेशही त्यांनाच मिळाला. 18 त्यावेळी मी तुम्हाला आज्ञा दिली: "याहवेह तुमच्या परमेश्वराने हा प्रदेश तुम्हाला वतन म्हणून दिलेला आहे, परंतु तुम्ही त्यात वस्ती करण्यापूर्वी तुमच्या सक्षम योद्ध्यांना शस्त्रे धारण करून यार्देन ओलांडून इतर इस्राएलाच्या पुढे पाठवावे. 19 तुमच्या स्त्रिया, मुले आणि तुमची जनावरे (मला माहीत आहे तुमच्याकडे विपुल गुरे आहेत) यांना मी तुम्हाला दिलेल्या शहरात राहता येईल, 20 यार्देनेच्या पश्चिमेला याहवेह देत असलेल्या देशात तुमचे इस्राएली बांधव वस्ती करेपर्यंत आणि याहवेह तुमच्या परमेश्वराने ज्याप्रमाणे तुम्हाला विसावा दिला आहे, त्याप्रमाणे त्यांनाही विसावा मिळेपर्यंत, तुमच्या बांधवांना मदत करा. त्यानंतर जो प्रदेश मी तुम्हाला दिला आहे येथे तुम्ही आपल्या वतनावर परत यावे." 21 नंतर मी यहोशुआस म्हणालो: "याहवेह तुझ्या परमेश्वराने सीहोन व ओग या दोन राजांचे काय केले हे तू आपल्या डोळ्याने पाहिले आहेस. तुम्ही जिथे जात आहात तेथील सर्व राज्यांचेही याहवेह असेच करतील. 22 त्यांना तू भिऊ नको; कारण याहवेह तुझे परमेश्वर स्वतः तुझ्यासाठी त्यांच्याशी लढतील." 23 त्यावेळी मी याहवेहला विनवणी केली: 24 "हे सार्वभौम याहवेह, तुमची महानता आणि तुमचा बलवान हात तुमच्या दासाला दाखविण्यास तुम्ही आरंभ केला आहे. स्वर्गात किंवा पृथ्वीवर असे कोणते दैवत आहे की, ज्याला तुमच्यासारखी थोर व महान कृत्ये करता येतील? 25 हे प्रभो, मला जाऊ द्या आणि यार्देनच्या पलीकडील उत्तम जमीन पाहू द्या—तो उत्तम डोंगराळ प्रदेश आणि लबानोन." 26 पण तुमच्यामुळे याहवेह माझ्यावर रागावले आणि त्यांनी त्या वचनदत्त देशात मला जाऊ दिले नाही. ते मला म्हणाले, "पुरे कर. ही गोष्ट पुन्हा माझ्याजवळ काढू नकोस. 27 पिसगा पर्वताच्या शिखरावर जा आणि तिथून पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण दिशांना पाहा. तिथून दूरवर तुला तो

देश दिसेल, कारण तुला यार्देन ओलांडून जाता येणार नाही. 28 पण
तुझ्या जागी यहोशुआची नेमणूक कर. त्याला उत्तेजन दे, धैर्य दे, कारण
तोच आपल्या लोकांना पलीकडे घेऊन जाईल आणि जो प्रदेश तुझ्या
दृष्टीस पडेल तो त्यांना वतन करून देईल.” 29 म्हणून आम्ही बेथ-
पौरातील खोऱ्यातच मुक्काम केला.

**4** आता, अहो इस्राएली लोकहो, मी जे विधी व नियम तुम्हाला
शिकवणार आहे ते ऐका. त्यांचे पालन करा म्हणजे जिवंत राहाल
आणि याहवेह तुमच्या पूर्वजांचे परमेश्वर तुम्हाला देत आहेत, तो देश
ताब्यात घ्या. 2 याहवेह तुमच्या परमेश्वराच्या आज्ञा मी तुम्हाला देत
आहे त्यांचे तुम्ही फक्त पालन करा, त्यात काही भर घालू नका आणि
काही कमी करू नका. 3 बआल—पौर येथे याहवेहने काय केले हे तुम्ही
आपल्या डोळ्याने पाहिले आहे. याहवेह तुमच्या परमेश्वराने बआल-
पौराच्या मागे चालणाऱ्या सर्वांचा नाश केला, 4 पण याहवेह तुमच्या
परमेश्वराशी एकनिष्ठ राहिलेले तुम्ही सर्वजण आजही जिवंत आहात.
5 पाहा, मी तुम्हाला याहवेह माझ्या परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे दिलेले
विधी व नियम यासाठी शिकविले की जो देश तुम्ही ताब्यात घेणार
आहात, त्या देशात तुमचा प्रवेश होईल, त्यावेळी ते तुम्ही पाळावे. 6
तुम्ही जर ते पाळले तर तुम्ही सुज्ञ व समंजस आहात अशी तुमची किर्ती
होईल. जेव्हा सभोवतालची राष्ट्रे या नियमांविषयी ऐकतील तेव्हा ती
म्हणतील, “इस्राएली राष्ट्रातील लोक निश्चितच बुद्धिमान व समंजस
आहेत.” 7 याहवेह आपले परमेश्वर जसे आपण त्यांना प्रार्थना करतो
तेव्हा ते आपल्या समीप असतात त्याप्रमाणे दुसरे कोणते महान राष्ट्र
आहे ज्याचे देव त्यांच्या समीप असतात? 8 आणि एवढे महान राष्ट्र
कोणते आहे, ज्याचे विधी आणि नियम या नियमशास्त्रासारखे न्याय्य
आहेत, जे मी आज तुमच्यासमोर मांडणार आहे? 9 तुम्ही स्वतःबद्दल
जागरूक असणे आणि स्वतःची काळजी घेणे खूप आवश्यक आहे,
जेणेकरून तुम्ही स्वतःच्या डोळयांनी पाहिलेल्या गोष्टी विसरून जाऊ
नये आणि आयुष्यभर त्या तुमच्या स्मरणातून निघून जाऊ नये. तुम्ही ते
तुमच्या पुत्रांना आणि त्यांच्यानंतर त्यांच्या पुत्रांना शिकवा. 10 ज्या
दिवशी तुम्ही होरेब पर्वताजवळ याहवेह तुमच्या परमेश्वरासमोर उभे
होता, त्या दिवसाविषयी त्यांना सांगा. त्या दिवशी याहवेहनी मला
म्हणाले होते, “माझ्यासमोर सर्व लोकांना माझे शब्द ऐकण्यासाठी
एकत्र कर, म्हणजे ते पृथ्वीवर जिवंत असेपर्यंत माझा आदर करतील
आणि आपल्या मुलाबाळांना माझे शब्द शिकवतील.” 11 मग तुम्ही
जवळ येऊन त्या पर्वताच्या पायथ्याशी जाऊन उभे राहिलात आणि
पर्वत अग्नीने पेटला होता, त्याची ज्वाला आकाशापर्यंत पोहोचली होती,
सर्वत्र अंधार, ढग आणि घनदाट अंधकार पसरला होता. 12 मग याहवेह
तुमच्याशी अग्नीतून बोलले, तुम्ही त्यांचे शब्द ऐकले, परंतु त्यांची
आकृती तुम्हाला दिसली नाही; फक्त वाणी ऐकली. 13 त्यांनी आपला
करार तुम्हाला घोषित केला, दहा आज्ञा, ज्या पालन करण्याची त्यांनी
आज्ञा दिली आणि त्यांनी त्या दोन दगडी पाट्यांवर लिहिल्या. 14 आणि
त्यावेळी याहवेहने मला आज्ञा केली की तुम्ही यार्देन ओलांडून जो देश
ताब्यात घेणार आहात तिथे तुम्हाला जे विधी व नियम पाळायचे आहेत
ते शिकवावे. 15 याकरिता सावधगिरी बाळगा, कारण याहवेह तुमच्याशी
होरेब पर्वतावर अग्नीमधून बोलले, त्यावेळी त्यांची काहीही आकृती
तुमच्या दृष्टीस पडली नाही; 16 म्हणून कोणत्याही पुरुष अथवा स्त्रीच्या
आकाराची कोरीव मूर्ती करून तुम्ही स्वतःला भ्रष्ट करू नये, 17 किंवा
पृथ्वीवरील एखाद्या पशूची किंवा आकाशात उडणाऱ्या कोणत्याही
पक्ष्याची, 18 अथवा जमिनीवर रांगणाऱ्या कोणत्याही प्राण्याची किंवा
पृथ्वीच्या खाली जलामध्ये असणाऱ्या कोणत्याही मत्स्याची तुम्ही
प्रतिमा करू नये. 19 जेव्हा तुम्ही वर आकाशाकडे बघाल आणि तुम्हाला
सूर्य, चंद्र व तारे—आकाशातील सर्व नक्षत्र—दिसतील, तेव्हा त्यांची
उपासना करण्याच्या आणि त्यांना दंडवत घालण्याच्या मोहात पडू नका.
याहवेह तुमच्या परमेश्वराने आकाशाखाली असलेल्या पृथ्वीतलावरील
इतर राष्ट्रांना ते वाटून दिले आहेत. 20 परंतु याहवेहने तुम्हाला इजिप्तच्या
तप्त लोखंडी भट्टीतून यासाठी सोडवून आणले की, तुम्ही त्यांचे खास
निवडलेले लोक, त्यांचे वारसदार व्हावे, जसे तुम्ही आज आहात. 21 पण
तुमच्यामुळेच याहवेह माझ्यावर रागावले होते. त्यांनी मला शपथपूर्वक
सांगितले आणि याहवेह तुमच्या परमेश्वरांनी वतनादाखल दिलेल्या त्या
उत्तम देशात यार्देन ओलांडून तुला जाता येणार नाही. 22 तुला याच
देशात मरावे लागणार; मी यार्देन पार करू शकणार नाही; परंतु तुम्ही
मात्र पार करून तो उत्तम प्रदेश वतन म्हणून ताब्यात घ्याल. 23 तेव्हा
सावधगिरी बाळगा, नाहीतर याहवेह तुमच्या परमेश्वराने मनाई केलेल्या
वस्तूंची तुम्ही स्वतःसाठी कोरीव प्रतिमा कराल आणि याहवेह तुमच्या
परमेश्वराच्या कराराचे तुम्हाला विस्मरण होईल. 24 कारण याहवेह तुमचे
परमेश्वर भस्म करणारे अग्नी व ईर्ष्यावान असे परमेश्वर आहेत. 25
तुम्हाला जेव्हा मुले आणि नातवंडे होतील आणि त्या देशात तुम्ही बराच
काळ वास्तव्य केल्यावर तुम्ही मूर्तिपूजा करून स्वतःला भ्रष्ट केले,
तर याहवेह तुमचे परमेश्वर तुमच्यावर अतिशय कोपायमान होतील,
26 तर मी सांगतो की तुमच्याविरुद्ध स्वर्ग व पृथ्वी ही दोन्हीही साक्षी
असतील, मग तुम्ही यार्देन पार करून जो देश ताब्यात घ्याल, त्या देशात
तुमचा लवकरच नाश होईल. तुमचे तेथील वास्तव्य अगदी अल्पकाळ
असेल व तुमचा संपूर्णपणे नायनाट होईल. 27 याहवेह, तुमची इतर
राष्ट्रांमध्ये पांगापांग करतील आणि ज्या राष्ट्रांमध्ये याहवेह तुम्हाला घेऊन
जातील त्यांच्यापैकी फक्त काही लोकच मागे उरतील. 28 तिथे तुम्ही
लाकूड आणि दगडाच्या मानवनिर्मित दैवतांची सेवा कराल, जे पाहू
शकत नाहीत, ऐकू शकत नाहीत, खाऊ शकत नाहीत किंवा वासही
घेऊ शकत नाहीत. 29 परंतु तिथे असताना जर तुम्ही याहवेह तुमच्या
परमेश्वराचा शोध घ्याल आणि संपूर्ण मनाने व जिवाने त्यांना शोधाल,
तर ते तुम्हाला सापडतील. 30 तुमच्यावर यातना व अनेक दुःखाचे प्रसंग
येतील, तेव्हा तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वराकडे परत याल आणि त्यांचे
आज्ञापालन कराल. 31 कारण याहवेह तुमचे परमेश्वर हे कनवाळू आहेत.
ते तुम्हाला सोडणार वा टाकणार नाहीत किंवा त्यांनी तुमच्या पूर्वजांशी
केलेला शपथपूर्वक करार ते विसरणार नाहीत. 32 परमेश्वराने पृथ्वीवर

मानवाला निर्माण केले त्या दिवसापासून आतापर्यंत तुमच्या आधी होऊन
गेलेल्या दिवसांना विचारा आणि आकाशाच्या एका टोकापासून दुसऱ्या
टोकापर्यंत विचारा की, अशा प्रकारची महान गोष्ट पूर्वी कधी घडली होती
का किंवा अशी गोष्ट कुठे घडल्याचे कोणी कधी ऐकले आहे का? 33
अग्नीमधून बोलताना परमेश्वराची वाणी कोणी कधी ऐकली, ज्याप्रकारे
तुम्ही ऐकली आणि जिवंत राहिले आहेत काय? 34 कोणत्या दैवताने
एका राष्ट्रातून दुसऱ्या राष्ट्राला गुलामगिरीतून बाहेर काढण्याकरिता
भयानक पीडा पाठविल्या, चिन्हे, चमत्कार केले, युद्ध व अद्भुत कृत्ये
केली, जसे इजिप्त देशातून तुम्हाला बाहेर काढण्यासाठी याहवेह तुमच्या
परमेश्वराने पराक्रमी बाहू आणि उगारलेल्या हाताने चमत्कार केले, असे
एक तरी उदाहरण इतरत्र तुम्हाला सापडेल का? 35 त्यांनी या गोष्टी
अशासाठी केल्या की, याहवेहच परमेश्वर आहेत हे तुम्हाला कळून यावे;
त्यांच्यासारखा अन्य कोणीही नाही हे देखील समजावे. 36 तुम्हाला बोध
करण्यासाठी स्वर्गातून आज्ञा देण्यास त्यांनी तुम्हाला आपली वाणी
ऐकविली, तसेच त्यांचा महान अग्निस्तंभही तुम्हाला या पृथ्वीतलावर
दाखविला; आणि तुम्ही त्या अग्नीमधून येणारे त्यांचे शब्दही ऐकले. 37
तुमच्या पूर्वजांवर त्यांची प्रीती होती आणि त्यांनी त्यांच्या वंशजांना
आशीर्वाद देण्यासाठी निवडले आणि म्हणूनच त्यांनी तुम्हाला आपल्या
उपस्थितीने आणि महान सामर्थ्याने इजिप्त देशामधून बाहेर आणले,
38 त्यांनी तुमच्यापेक्षाही महान आणि सामर्थ्यवान राष्ट्रांना घालवून
दिले व त्यांची भूमी तुम्हाला वतनादाखल दिली, ती आजही तशीच
आहे. 39 वर स्वर्गात आणि खाली पृथ्वीवर याहवेहच परमेश्वर आहेत, हे
आजच स्वीकारा आणि तुमच्या अंतःकरणात ठेवा. त्यांच्याशिवाय दुसरा
कोणी नाही. 40 आज जे विधी व आज्ञा मी तुम्हाला सांगणार आहे,
यांचे तुम्ही पालन केले, तर तुमचे व तुमच्या वंशजांचे कल्याण होईल
आणि याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला देत असलेल्या या देशामध्ये तुम्ही
चिरकाल वस्ती कराल. 41 नंतर मोशेने यार्देनेच्या पूर्वेस तीन शहरे
नेमली; 42 ती यासाठी की, जर कोणी चुकून एखाद्या व्यक्तीची हत्या
केली, त्याने पूर्व कल्पना नसताना एखाद्या शेजाऱ्याला अनावधानाने
मारले तर त्याला सुरक्षिततेसाठी त्या शहरात पळून जाता येईल. तो
यापैकी एका शहरात पळून जाऊन आपला जीव वाचवू शकतो. 43 ती
शहरे ही होती: रऊबेनाच्या वंशजासाठी रानातील पठारावरील बेसेर,
गाद वंशजांसाठी गिलआदातील रामोथ आणि मनश्शेहच्या वंशजांसाठी
बाशानातले गोलान. 44 मोशेने इस्राएली लोकांना दिलेले नियमशास्त्र
हे आहे. 45 ज्यावेळी इस्राएली लोकांनी इजिप्त देश सोडला, त्यांना
मोशेने या अटी, विधी व नियम दिले 46 आणि तेव्हा ते यार्देनेच्या
पूर्वेकडे बेथ-पौर शहराजवळ तळ देऊन राहिलेले होते, हीच भूमी
पूर्वी अमोऱ्यांनी आपला राजा सीहोनच्या अधिपत्याखाली व्यापली
होती आणि त्याची राजधानी हेशबोन होती; मोशे व इस्राएली लोकांनी
इजिप्त देशातून बाहेर आल्यानंतर सीहोन राजा आणि त्याच्या लोकांचा
पराभव केला. 47 इस्राएली लोकांनी त्यांची भूमी आणि बाशानचा
राजा ओगचीही भूमी जिंकून ताब्यात घेतली. यार्देनेच्या पूर्वेस असणारे
हेच दोघे अमोरी राजे होते. 48 आर्णोन नदीच्या खोऱ्याच्या टोकाशी
वसलेल्या अरोएर शहरापासून सिर्योन पर्वतापर्यंत, ज्याला हर्मोन पर्वत
असेही म्हणतात, 49 आणि तसेच यार्देनच्या पूर्वेस असलेल्या अराबाच्या
संपूर्ण प्रदेशापासून पिसगा पर्वताच्या उताराखाली असलेल्या खाऱ्या
समुद्रापर्यंतचा सर्व भूभाग इस्राएली लोकांनी जिंकून घेतला.

**5** मोशेने सर्व इस्राएली लोकांना बोलाविले आणि म्हटले: इस्राएली
लोकांनो, ज्या विधी व नियमांची आज मी घोषणा करीत आहे व
तुम्हाला ऐकवीत आहे, ते शिका आणि निश्चितपणे त्याचे पालन करा.
2 याहवेह आपल्या परमेश्वराने होरेब पर्वतावर तुमच्याशी एक करार
केला होता. 3 याहवेहने हा करार आपल्या पूर्वजांशी नव्हे तर आज येथे
जिवंत असलेल्या आपल्या सर्वांशी केला आहे. 4 याहवेह पर्वतावर
अग्नीमधून तुमच्याशी समोरासमोर बोलले. 5 (त्यावेळी मी तुमच्या
आणि याहवेहमध्ये उभा राहिलो आणि तुम्हाला याहवेहच्या वचनाची
घोषणा केली, कारण तुम्हाला अग्नीची भीती वाटत असल्यामुळे तुम्ही
पर्वतावर चढून त्यांच्यापर्यंत गेला नाही.) आणि ते म्हणाले: 6 “ज्याने
तुम्हाला इजिप्त देशातून व दास्यातून बाहेर आणले तो मी याहवेह
तुमचा परमेश्वर आहे. 7 “माझ्यासमोर तुम्हाला इतर कोणतेही देव
नसावेत. 8 तुम्ही स्वतःसाठी वर आकाशातील, पृथ्वीवरील व पृथ्वीच्या
खाली जलातील कशाचीही प्रतिमा करू नका. 9 तुम्ही त्यांना नमन
करू नये किंवा त्यांची उपासना करू नये; कारण मी याहवेह तुमचा
परमेश्वर ईर्ष्यावान परमेश्वर आहे. जे माझा द्वेष करतात त्यांच्या लेकरांना
तिसऱ्या व चौथ्या पिढीपर्यंत त्यांच्या आईवडिलांच्या पापांचे शासन
करतो, 10 परंतु जे माझ्यावर प्रीती करतात आणि माझ्या आज्ञा
पाळतात अशांच्या हजारो पिढ्यांपर्यंत प्रीती करतो. 11 याहवेह तुमच्या
परमेश्वराचे नाव तुम्ही व्यर्थ घेऊ नका, कारण जे त्यांचे नाव व्यर्थ घेतात,
त्यांना याहवेह शिक्षा दिल्यावाचून राहणार नाहीत. 12 याहवेह तुमच्या
परमेश्वराच्या आज्ञेनुसार शब्बाथ दिवस पवित्रपणे पाळावा. 13 सहा
दिवस तुम्ही परिश्रम करावेत आणि आपली सर्व कामे करावी, 14
परंतु सातवा दिवस याहवेह तुमच्या परमेश्वराचा शब्बाथ आहे. त्या
दिवशी तुम्ही कोणतेही काम करू नये. तुम्ही किंवा तुमचा पुत्र किंवा
कन्या, तुमचा दास किंवा दासी, तुमचे बैल, गाढव, तुमचे पशू किंवा
तुमच्या नगरात राहणारा परदेशी, तुमचा दास आणि दासी यांनी देखील
तुमच्यासह त्या दिवशी विश्रांती घ्यावी. 15 तुम्ही इजिप्त देशात गुलाम
होता याचे स्मरण करा. याहवेह तुमच्या परमेश्वराच्या सामर्थ्यवान व
विस्तारित हातांनी तुम्हाला तिथून बाहेर काढले. यास्तव याहवेह तुमच्या
परमेश्वराने शब्बाथ दिवस पाळण्याची आज्ञा केली आहे. 16 याहवेह
तुमच्या परमेश्वराने आज्ञा दिल्याप्रमाणे आपल्या वडिलांचा व आपल्या
आईचा सन्मान करा, म्हणजे जो देश याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला
देत आहे, त्यात तुम्ही दीर्घकाळ राहाल व तुमचे कल्याण होईल. 17
तुम्ही खून करू नका. 18 तुम्ही व्यभिचार करू नका. 19 तुम्ही चोरी
करू नका. 20 तुमच्या शेजाऱ्याविरुद्ध खोटी साक्ष देऊ नका. 21
तुमच्या शेजाऱ्याच्या पत्नीची अभिलाषा धरू नका. त्याच्या घराचा

किंवा भूमीचा, त्याच्या दासाचा किंवा दासीचा, त्याच्या बैलाचा किंवा
गाढवाचा किंवा शेजाऱ्याच्या मालकीच्या कशाचाही लोभ करू नका."
22 याहवेहने या आज्ञा तुमच्यातील प्रत्येकाला अग्नी, मेघ व निबिड
अंधकार यांनी वेष्टिलेल्या पर्वतावरून उंच आवाजात उच्चारून दिल्या; व
त्यात अधिक काहीही जोडले नाही. त्यांनी त्या दोन दगडी पाट्यांवर
लिहून माझ्याजवळ दिल्या. 23 पण ज्यावेळी तुम्ही अंधारातून येणारा
आवाज ऐकला आणि डोंगर माथ्यावरील त्या भयानक ज्वाला पाहिल्या,
तेव्हा तुमचे सर्व गोत्रप्रमुख व वडील माझ्याकडे आले. 24 आणि मला
म्हणाले, "याहवेह आमच्या परमेश्वराने आज आम्हाला त्यांचे गौरव व
थोरवी दाखविली आहे आणि अग्नीमधून येणारा त्यांचा आवाजसुद्धा
आम्ही ऐकला. आम्ही आज पाहिले आहे की, परमेश्वर मानवाशी बोलले
तरी मानव जिवंत राहणे शक्य आहे. 25 परंतु आम्ही का मरावे? त्या
भयानक ज्वाला आम्हाला भस्म करून टाकतील आणि याहवेह आमच्या
परमेश्वराची वाणी आम्ही ऐकत राहू, तर खात्रीने मरून जाऊ. 26 कारण
जिवंत परमेश्वर अग्नीतून बोलत असताना त्यांची वाणी ऐकून जिवंत
राहिला आहे, असा सर्व नश्वर मानवात आमच्याशिवाय कोण आहे? 27
तेव्हा तुम्ही याहवेह आमच्या परमेश्वराजवळ जा आणि ते जे सांगतील ते
सर्व ऐका. मग याहवेह आमच्या परमेश्वराने तुम्हाला जे काही सांगितले
आहे ते आम्हाला सांगा. आम्ही ऐकू आणि त्याचे पालन करू." 28
तुम्हाला माझ्याशी बोलताना याहवेहनी ऐकले आणि याहवेह मला
म्हणाले, "हे लोक जे काही तुझ्याशी बोलले ते मी ऐकले आहे. त्यांनी जे
सर्वकाही बोलले ते चांगले आहे. 29 त्यांचे अंतःकरण मजविषयी नेहमीच
असे राहिले आणि माझ्या आज्ञा पाळण्याचे भय त्यांच्याठायी नेहमीच
राहिले तर किती बरे होईल! असे झाल्यास त्यांचे व त्यांच्या मुलाबाळांचे
सदासर्वकाळ कल्याण होईल! 30 "जा आणि त्यांना त्यांच्या तंबूमध्ये
परत जाण्यास सांग. 31 पण तू माझ्याबरोबर इथेच थांब, म्हणजे मी
तुला माझ्या सर्व आज्ञा, विधी व नियम देईन आणि ते त्यांना शिकव
म्हणजे जो देश मी त्यांना वतन म्हणून देणार आहे तिथे त्यांचे पालन
करावे." 32 याहवेह तुमच्या परमेश्वराच्या आज्ञा पाळण्याची तुम्ही
खबरदारी घ्या; उजवीकडे किंवा डावीकडे वळू नका. 33 याहवेह तुमच्या
परमेश्वराने ज्या मार्गावर चालण्यास आज्ञा केली आहे, त्यावर तुम्ही
चला, म्हणजे तुम्ही जिवंत राहाल आणि ज्या देशाचा तुम्ही ताबा घेणार
आहात, त्या देशात तुम्ही दीर्घकाल समृद्धीचे जीवन जगू शकाल.

**6** यार्देन ओलांडून त्या वचनदत्त देश ताब्यात घ्यायचा आहे, त्या देशात
तुम्हाला पाळावयास शिकविण्यासाठी याहवेह तुमच्या परमेश्वराने
मला सांगितलेल्या आज्ञा, विधी व नियम हे आहेत, 2 यासाठी की
तुम्ही, तुमचे पुत्र, पौत्रे यांनी याहवेह तुमच्या परमेश्वराचे भय बाळगावे.
मी तुम्हाला दिलेले सर्व नियम व आज्ञा तुम्ही पाळत राहाल तर तुम्ही
दीर्घायुष्याचा आनंद घ्याल. 3 म्हणून इस्राएली लोकहो ऐका आणि
काळजीपूर्वक आज्ञा पाळा म्हणजे तुमचे भले होईल आणि याहवेह
तुमच्या पूर्वजांच्या परमेश्वरांनी तुम्हाला दिलेल्या वचनाप्रमाणे दूध व मध
वाहणाऱ्या देशात तुम्ही बहुगुणित व्हाल. 4 हे इस्राएला ऐक: याहवेह
आपले परमेश्वर एकच याहवेह आहेत. 5 याहवेह तुमच्या परमेश्वरावर
तुमच्या पूर्ण हृदयाने, तुमच्या पूर्ण जिवाने आणि तुमच्या पूर्णशक्तीने
प्रीती करा. 6 या ज्या आज्ञा मी आज तुम्हाला देणार आहे, त्या तुमच्या
अंतःकरणात सदैव असाव्या. 7 त्या तुमच्या मुलांवर बिंबवा. घरी बसले
असताना, वाटेवर चालत असताना, झोपण्याच्या वेळी व झोपेतून
उठल्यानंतर त्याबद्दल बोलत राहा. 8 त्या तुम्ही आपल्या हातावर चिन्ह
म्हणून बांधून ठेवा आणि आपल्या कपाळपट्टीवर बांधा. 9 त्या तुमच्या
घरातील दाराच्या चौकटीवर व तुमच्या फाटकांवर लिहा. 10 जो देश
देण्याचे वचन याहवेह तुमच्या परमेश्वराने तुमचे पूर्वज अब्राहाम, इसहाक
व याकोबाला दिले होते, त्या देशात जेव्हा ते तुम्हाला घेऊन जातील व
जी तुम्ही स्वतः वसविलेली नाहीत—अशी मोठी व सुंदर शहरे तुम्हाला
देतील, 11 तुम्ही स्वतः भरले नाहीत अशा सर्व चांगल्या वस्तूंनी भरलेली
घरे, तुम्ही स्वतः खोदल्या नाहीत अशा विहिरी आणि तुम्ही स्वतः लावले
नाहीत असे द्राक्षमळे व जैतुनाचे वृक्ष—तुम्ही ते सर्व खाल आणि तृप्त
व्हाल, 12 ज्या याहवेहने तुम्हाला इजिप्त देशातून, दास्यगृहातून बाहेर
आणले त्यांना तुम्ही विसरू नये याची खबरदारी घ्या. 13 तुम्ही याहवेह
आपल्या परमेश्वराचे भय बाळगावे, फक्त त्यांचीच सेवा करावी आणि
त्यांच्याच नावाने शपथ वाहवी. 14 इतर दैवतांच्या, तुमच्या सभोवती
असलेल्या राष्ट्रांच्या दैवतांच्या मागे लागू नका; 15 कारण याहवेह तुमचे
परमेश्वर, जे तुम्हामध्ये आहेत, ते ईर्ष्यावान परमेश्वर आहेत, यामुळे
त्यांचा राग भडकेल व ते तुम्हाला या पृथ्वीवरून नष्ट करून टाकतील.
16 मस्सा येथे पाहिली तशी तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वराची परीक्षा
पाहू नका. 17 याहवेह तुमच्या परमेश्वराच्या आज्ञा तुम्ही काळजीपूर्वक
पाळाव्या आणि त्यांची बोधवचने व नियमांचेही जपून पालन करावे.
18 याहवेहच्या दृष्टीने जे योग्य व चांगले आहे तेच करा, तर तुमचे सर्व
बाबतीत कल्याण होईल आणि याहवेहने तुमच्या पूर्वजांना शपथपूर्वक
देऊ केलेल्या देशात तुम्ही जाल व तो देश तुम्ही ताब्यात घ्याल. 19
याहवेहने सांगितल्याप्रमाणे तुमच्या सर्व शत्रूंना तुमच्यापुढून घालवून
द्या. 20 भविष्यात जेव्हा तुमचा पुत्र तुम्हाला विचारेल, "याहवेह आपल्या
परमेश्वराने या आज्ञा, ही बोधवचने, विधी व नियम तुम्हाला दिले आहेत,
त्यांचा अर्थ काय?" 21 तेव्हा तुम्ही त्यांना सांगा: "आम्ही इजिप्त
देशात फारोहचे गुलाम होतो, परंतु याहवेहने आपल्या पराक्रमी हाताने
आम्हाला इजिप्तमधून बाहेर आणले. 22 आमच्या नजरेसमोर याहवेहने
इजिप्त देश, फारोह राजा आणि त्याच्या संपूर्ण कुटुंबाविरुद्ध—महान
व भयावह—चिन्हे दाखविली व चमत्कार केले. 23 त्यांनी आम्हाला
इजिप्तमधून यासाठी बाहेर आणले की, आमच्या पूर्वजांना जो देश
देण्याचे त्यांनी शपथपूर्वक वचन दिले होते, त्या देशात आम्हाला आणावे.
24 याहवेहने आम्हाला सर्व नियम पाळण्याची आज्ञा दिली आणि याहवेह
आपल्या परमेश्वराचे भय बाळगावे, जेणेकरून आपले निरंतर कल्याण
व्हावे आणि स्वतःस जिवंत राखावे, जसे आजवर आहोत. 25 आणि जर
आपण याहवेह आपल्या परमेश्वरासमोर दिलेल्या आज्ञेप्रमाणे या सर्व
नियमांचे काळजीपूर्वक पालन केले, तर ते आपले नीतिमत्व असेल."

**7** जेव्हा याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला त्या देशात घेऊन जातील, ज्याचा
ताबा मिळविण्यासाठी तुम्ही जात आहात आणि तुमच्यापुढून—हिथी,
गिर्गाशी, अमोरी, कनानी, परिज्जी, हिव्वी आणि यबूसी या तुमच्यापेक्षा
मोठ्या आणि बलाढ्य सात राष्ट्रांना हाकलून देतील— 2 आणि जेव्हा
याहवेह तुमचे परमेश्वर त्यांना तुमच्या हाती देतील आणि तुम्ही त्यांचा
पराभव कराल, तेव्हा तुम्ही त्यांचा समूळ नायनाट करा. त्यांच्याशी
कुठलाही करार करू नका किंवा त्यांना दया दाखवू नका. 3 तुम्ही
त्यांच्याशी आंतरविवाह करू नका, तुमच्या कन्या त्यांच्या पुत्रांसाठी
देऊ नका किंवा त्यांच्या कन्या तुमच्या पुत्रांसाठी घेऊ नका, 4 कारण
ते तुमच्या मुलांना माझे अनुसरण करण्यापासून परावृत्त करून इतर
दैवतांची उपासना करण्यासाठी प्रवृत्त करतील आणि याहवेहचा क्रोध
तुम्हावर भडकेल आणि ते लगेच तुमचा नाश करतील. 5 तुम्ही त्यांच्या
बाबतीत हे करा: त्यांच्या वेद्या मोडून टाका, त्यांच्या पवित्र पाषाणांचा
चुरा करा, त्यांचे अशेराचे स्तंभ तोडून टाका आणि त्यांच्या मूर्ती अग्नीत
जाळून टाका. 6 कारण तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वराचे पवित्रजन
आहात. संपूर्ण पृथ्वीवरील सर्व लोकातून याहवेह तुमच्या परमेश्वराने
तुम्हाला अशासाठी निवडले आहे की, तुम्ही त्यांचा खूप मोलाचा
ठेवा असावा. 7 तुम्ही संख्येने अधिक होता म्हणून याहवेहने तुमची
निवड केली नाही व तुमच्यावर प्रीती केली नाही, कारण तुम्ही तर सर्व
राष्ट्रांमध्ये संख्येने अतिशय अल्प होता. 8 पण याहवेहची तुमच्यावर प्रीती
असल्यामुळे आणि त्यांनी तुमच्या पूर्वजांना दिलेली शपथ पाळावयाची
होती, म्हणून त्यांनी तुम्हाला सामर्थ्यशाली हाताने बाहेर काढले आणि
इजिप्तचा राजा फारोहच्या दास्यगृहातून तुम्हाला सोडविले. 9 म्हणून हे
जाणून घ्या की, याहवेहच तुमचे परमेश्वर आहेत; ते विश्वासू परमेश्वर
आहेत, जे त्यांच्यावर प्रीती करतात आणि त्यांच्या आज्ञा पाळतात,
अशांच्या हजारो पिढ्यांपर्यंत ते आपल्या प्रीतीचा करार पाळतात. 10
परंतु जे त्यांचा द्वेष करतात, त्यांना ते नष्ट करण्यास संकोच करणार
नाहीत; जे त्यांची घृणा करतात, त्यांची ते परतफेड करण्यास विलंब
लावणार नाही. 11 यास्तव, मी आज तुम्हाला देत आहे त्या सर्व आज्ञा,
विधी व नियम पाळण्याची तुम्ही खबरदारी घ्या. 12 तुम्ही या आज्ञा
ऐकून त्या प्रामाणिकपणे पाळल्या, तर याहवेह तुमचे परमेश्वर तुमच्या
पूर्वजांना दिलेल्या अभिवचनाप्रमाणे हा प्रीतीचा करार पुढेही पाळीत
राहतील. 13 ते तुम्हावर प्रीती करतील, तुम्हाला आशीर्वाद देतील आणि
तुम्हाला बहुगुणित करतील. तुमच्या पूर्वजांना देऊ केलेल्या वचनदत्त
देशात ते तुमच्या पोटच्या फळाला, तुमच्या जमिनीतील पीक—तुमच्या
धान्याला, नव्या द्राक्षारसाला, जैतुनाच्या तेलाला—तुमच्या गुरांची वासरे
आणि तुमच्या कळपातील कोकरे यांनाही ते आशीर्वाद देतील. 14
तुम्ही इतर लोकांपेक्षा अधिक आशीर्वादित व्हाल; तुमच्यापैकी कोणीही
पुरुष वा स्त्री नि:संतान राहणार नाही किंवा तुमच्या पशूंपैकी कोणीही
वांझ राहणार नाही. 15 याहवेह तुमच्यातील सर्व रोग दूर करतील.
इजिप्तमधील तुम्हाला माहीत असलेले भयंकर रोग ते तुमच्यावर
आणणार नाहीत, तर तुमचा द्वेष करणाऱ्या सर्वांवर ते रोग आणतील.
16 याहवेह तुमचे परमेश्वर जे सर्व देश तुमच्या हाती देतील, त्यांचा तुम्ही
पूर्णपणे संहार करावा. त्यांना दयामाया दाखवू नका व त्यांच्या दैवतांची
सेवा करू नका. कराल, तर ते तुमच्यासाठी सापळा असे होईल. 17
तुम्ही स्वत:शी म्हणाल, “ही राष्ट्रे आमच्यापेक्षा कितीतरी सामर्थ्यवान
आहेत. आम्ही त्यांना कसे काय घालवून देऊ?” 18 परंतु त्यांना भिऊ
नका; याहवेह तुमच्या परमेश्वराने फारोहचे आणि संपूर्ण इजिप्त देशाचे
काय केले याचे चांगले स्मरण ठेवा. 19 याहवेह तुमच्या परमेश्वराने
तुम्हाला इजिप्तमधून बाहेर काढून आणण्यासाठी सामर्थ्यशाली हाताने
व पसरलेल्या भुजांनी जी भयंकर संकटे, महान चमत्कार व चिन्हे
केली, ते सर्व तुम्ही प्रत्यक्ष पाहिले होते. तुम्हाला ज्या लोकांचे भय
वाटते त्यासर्वांच्या सोबत याहवेह तुमचे परमेश्वर हेच करतील. 20
शिवाय याहवेह तुमचे परमेश्वर त्यांना घालवून देण्यासाठी गांधीलमाशा
पाठवतील, तुमच्यापासून लपून बसलेले देखील नाश पावतील. 21 तुम्ही
त्यांना भिऊ नका, कारण महान व भयावह असे याहवेह तुमचे परमेश्वर
तुम्हाबरोबर आहेत. 22 याहवेह तुमचे परमेश्वर त्या राष्ट्रांना हळूहळू
घालवून देतील; कारण त्यांना एकदम घालवून दिल्यास हिंस्र पशूंची
संख्या वेगाने वाढेल आणि त्यांच्याकडून तुम्हाला धोका निर्माण होईल.
23 परंतु त्यांच्यात खूप गोंधळ निर्माण करून त्यांचा नाश होईपर्यंत
याहवेह तुमचे परमेश्वर त्यांना तुमच्या हातात देतील. 24 ते त्यांच्या
राजांना तुमच्या हाती देतील आणि तुम्ही त्यांची नावे या पृथ्वीतलावरून
पुसून टाकाल. मग कोणीही तुमच्याविरुद्ध उभा राहणार नाही; तुम्ही
त्यांचा नाश कराल. 25 त्यांच्या दैवतांच्या मूर्ती तुम्ही जाळून टाका;
त्यांच्या सोन्यारुप्याच्या लोभ धरू नका आणि ते स्वत:करिता घेऊ नका,
नाहीतर तुम्ही त्याद्वारे सापळ्यात अडकाल, कारण याहवेह तुमच्या
परमेश्वराला याचा वीट आहे. 26 नाशाचे कारण असलेली कोणतीही
किळसवाणी वस्तू घरात आणू नका, तसे केल्यास तुमचा खात्रीने नाश
होईल. ती घृणास्पद समजून तिचा अगदी वीट माना, कारण ती शापित
आहे.

**8** आज मी तुम्हाला देत असलेल्या आज्ञांचे तुम्ही काळजीपूर्वक पालन
करावे. जेणेकरून तुम्ही जिवंत राहाल व बहुगुणित व्हाल आणि
याहवेहने तुमच्या पूर्वजांना शपथ दिलेल्या देशात जाऊन तो ताब्यात
घ्याल. 2 याहवेह तुमच्या परमेश्वराने तुम्हाला रानात चाळीस वर्षात कसे
चालविले, त्यांनी तुम्हाला कसे नम्र केले व तुमची परीक्षा कशी पाहिली,
याची तुम्ही आठवण करा. तुमच्या अंत:करणात काय होते, तुम्ही
त्यांच्या आज्ञा पाळणार की नाही, हे पाहण्यासाठी त्यांनी असे केले.
3 तुमची उपासमार करून तुम्हाला नम्र केले व नंतर तुम्हाला आणि
तुमच्या पूर्वजांनाही पूर्वी कधीही माहिती नसलेला मान्ना खावयास देऊन
तुम्हाला शिकविले की, मनुष्य केवळ भाकरीने नव्हे, तर याहवेहच्या
मुखातून निघणाऱ्या प्रत्येक वचनाने जगेल. 4 या चाळीस वर्षात तुमचे
कपडे कधी जीर्ण झाले नाहीत, की तुमच्या पायांना सूज आली नाही.
5 तेव्हा तुम्हाला हे समजावे की, जसा पिता आपल्या पुत्राला शिस्त
लावतो तसे याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला शिस्त लावतात. 6 याहवेह

तुमच्या परमेश्वराच्या आज्ञांचे पालन करा, त्यांच्या आज्ञेत राहा आणि
त्यांचा आदर करा. 7 कारण याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला उत्तम अशा
देशात नेणार आहेत—त्यात नद्या, झरे व ओहोळ हे डोंगरात उगम पावून
खोऱ्यांमधून वाहत आहेत; 8 गहू व जव, द्राक्षमळे, अंजिरे व डाळिंबे,
जैतुनाचे तेल व मध यांचा तो देश आहे; 9 या देशात भाकरीची उणीव
भासणार नाही आणि कशाचीही कमतरता राहणार नाही; तेथील दगड
लोहयुक्त आहेत व डोंगरांमधून तांबे खणून काढता येईल. 10 जेव्हा
तुम्ही खाल आणि तृप्त व्हाल, याहवेह तुमच्या परमेश्वराने तुम्हाला
उत्तम देश दिल्याबद्दल त्यांचा धन्यवाद करा. 11 परंतु याच वेळी तुम्ही
सावधगिरी बाळगली पाहिजे, नाहीतर तुम्ही आपल्या समृद्धीत याहवेह
तुमच्या परमेश्वराला विसराल व त्यांच्या ज्या आज्ञा, नियम व विधी
मी तुम्हाला आज देत आहे, त्या पाळण्याचे सोडून द्याल. 12 कारण
जेव्हा तुम्ही खाल आणि तृप्त व्हाल, जेव्हा सुंदर घरे बांधाल आणि
त्यात वस्ती कराल, 13 आणि जेव्हा तुमची शेरडेमेंढरे व गुरे यांची
वृद्धी झालेली असेल आणि तुमचे चांदी आणि सोने व तुमची मालमत्ता
वाढलेली असेल, 14 तेव्हा तुमचे अंतःकरण उन्मत्त होईल आणि ज्यांनी
तुम्हाला इजिप्त देशाच्या गुलामगिरीतून काढून बाहेर आणले, त्या
याहवेह तुमच्या परमेश्वराला तुम्ही विसरून जाल. 15 विषारी सापाचा
आणि विंचवांचा धोका असलेल्या अफाट व भयानक रानातून व उष्ण
आणि कोरड्या भूमीतून त्यांनी तुम्हाला आणले. शुष्क भूमीत खडक
फोडून तुम्हाला पाणी दिले. 16 त्यांनी तुम्हाला रानात खावयास मान्ना
दिला, जो तुमच्या पूर्वजांना कधीच माहीत नव्हता, यासाठी की त्यांनी
तुम्हाला नम्र करावे आणि तुमची परीक्षा घ्यावी, जेणेकरून शेवटी तुमचे
भले व्हावे. 17 तुम्ही आपल्या मनात म्हणाल, "माझ्या शक्तीने व माझ्या
हाताच्या बळाने मी हे धन मिळविले आहे." 18 परंतु याहवेह तुमच्या
परमेश्वराचे स्मरण ठेवा, कारण संपत्ती निर्माण करण्याचे सामर्थ्य केवळ
तेच तुम्हाला पुरवितात, आणि आजच्या प्रमाणेच ते तुमच्या पूर्वजांशी
शपथपूर्वक केलेल्या कराराची पुष्टी करतात. 19 परंतु जर तुम्ही याहवेह
तुमच्या परमेश्वराला विसराल, त्यांना सोडून इतर दैवतांच्या मागे लागाल
आणि त्यांची उपासना कराल व त्यांना नमन कराल, तर आज मी
तुमच्याविरुद्ध साक्ष देतो की, तुम्ही खात्रीने नाश पावाल. 20 याहवेहने
इतर राष्ट्रांचा तुमच्यापुढे जसा नाश केला, तसाच याहवेह तुमच्या
परमेश्वराच्या आज्ञांचे पालन केले नाही तर तुमचाही नाश होईल.

**9** हे इस्राएला, ऐक: तुम्ही आता यार्देन पार करून पलीकडे आत
जाणार आहात आणि ज्यांच्या शहरांची तटबंदी आकाशापर्यंत
आहेत, अशा तुमच्यापेक्षा महान आणि अधिक बलवान लोकांना हाकलून
देणार आहात. 2 तेथील लोक धिप्पाड व उंच आहेत—अनाकी वंशज!
तुम्हाला त्यांच्याबद्दल माहीत आहे आणि तुम्ही हे ऐकले आहे: "अनाकी
लोकांविरुद्ध कोण उभे राहू शकेल?" 3 पण तुमची खात्री असू द्या की,
याहवेह तुमचे परमेश्वर भस्म करणाऱ्या अग्निरुपाने तुमच्यापुढे जातील.
ते त्यांचा नाश करतील; त्यांना तुमच्यापुढे नमवतील आणि तुमच्यासमोर
त्यांचा नायनाट करतील, मग याहवेहने दिलेल्या अभिवचनानुसार तुम्ही
त्यांना लगेच संपूर्ण नष्ट कराल आणि त्यांना तिथून घालवून द्याल. 4
याहवेह तुमच्या परमेश्वराने त्यांना तुमच्यापुढून घालवून दिल्यानंतर
स्वतःशी म्हणू नका, "मी नीतिमान आहे, म्हणूनच याहवेहने हा देश
वतन म्हणून घेण्यास मला मदत केली." नाही! तसे मुळीच नाही, तर
या राष्ट्रांच्या दुष्टपणामुळेच याहवेह त्यांना तुमच्यापुढून घालवून देत
आहेत. 5 तुम्ही नीतिमान आणि सरळ मनाचे लोक आहात म्हणून
याहवेह तुम्हाला त्यांचा देश ताब्यात देतील असे मुळीच नाही; मी पुन्हा
सांगतो की याहवेह तुमचे परमेश्वर हे केवळ त्या राष्ट्रांच्या दुष्टपणामुळेच
व त्यांनी तुमचे पूर्वज अब्राहाम, इसहाक व याकोब यांना जी शपथ
दिली होती, ती पूर्ण करण्यासाठीच ते त्या राष्ट्रांना तुमच्यापुढून घालवून
देतील. 6 आणि हे जाणून घ्या, याहवेह तुमचे परमेश्वर, तुम्ही नीतिमान
आहात म्हणून हा उत्तम देश तुम्हाला वतन म्हणून देत नाहीत, खरेतर
तुम्ही ताठ मानेचे लोक आहात. 7 तुम्ही त्या रानात याहवेह तुमच्या
परमेश्वराला राग येईल असे वागलात, हे तुम्ही विसरू नका आणि
याची नेहमी आठवण ठेवा. ज्या दिवशी तुम्ही इजिप्त देश सोडला त्या
दिवसापासून या ठिकाणी येईपर्यंत, तुम्ही याहवेहविरुद्ध सतत बंड केले.
8 होरेब पर्वतावर तुम्ही त्यांना इतके संतप्त केले की याहवेह तुमचा नाश
करणारच होते. 9 याहवेहने तुमच्याशी केलेल्या कराराच्या दगडी पाट्या
स्वीकारण्यासाठी मी त्या पर्वतावर चढून गेलो होतो. तिथे मी चाळीस
दिवस व चाळीस रात्री होतो; त्या काळात मी भाकर खाल्ली नाही आणि
पाणीदेखील प्यालो नाही. 10 याहवेहने दोन दगडी पाट्या मला दिल्या,
ज्यावर परमेश्वराच्या बोटाने लिहिलेले होते. तुम्ही पर्वताच्या पायथ्याशी
गोळा झालेले होता, त्यावेळी याहवेहने तुमच्याशी बोलताना पर्वतावर
अग्नीतून सांगितलेल्या सर्व आज्ञा त्यावर होत्या. 11 चाळीस दिवस व
चाळीस रात्री लोटल्यानंतर, याहवेहने कराराच्या दोन दगडी पाट्या मला
दिल्या. 12 मग याहवेह मला म्हणाले, "ताबडतोब येथून उतरून खाली
जा, कारण तुझे लोक, ज्यांना तू इजिप्त देशातून बाहेर काढून आणले,
ते भ्रष्ट झाले आहेत. मी त्यांना जे करण्याची आज्ञा दिलेली होती,
त्यापासून बहकून त्यांनी स्वतःसाठी ओतीव मूर्ती तयार केली आहे."
13 याहवेह मला म्हणाले, "मी या लोकांना ओळखतो, हे ताठ मानेचे
लोक आहेत. 14 तू माझ्या आड येऊ नकोस, मी या लोकांचा नाश करेन
आणि त्यांचे नाव पृथ्वीवरून पुसून टाकेन आणि त्यांच्याहीपेक्षा अधिक
बलवान व बहुगुणित असे राष्ट्र मी तुझ्यापासून बनवीन." 15 नंतर मी
मागे वळलो आणि पर्वतावरून खाली उतरत असताना पर्वत अग्नीने
जळत होता आणि त्या कराराच्या दोन पाट्या माझ्या हातात होत्या. 16
जेव्हा मी पाहिले की, याहवेह तुमच्या परमेश्वराविरुद्ध तुम्ही पाप केले
आहे; तुम्ही तुमच्यासाठी वासराची ओतीव मूर्ती घडविली, असे माझ्या
दृष्टीस पडले. याहवेहनी दिलेल्या आज्ञा पाळण्याचे सोडून तुम्ही किती
लवकर पथभ्रष्ट झालात. 17 तेव्हा मी त्या दोन दगडी पाट्या घेतल्या
आणि माझ्या हातांतून फेकून, तुमच्या डोळयादेखत त्यांचा चुराडा
केला. 18 नंतर आणखी चाळीस दिवस व चाळीस रात्री मी याहवेहपुढे
पालथा पडून राहिलो; मी भाकर खाल्ली नाही आणि पाणीदेखील

प्यालो नाही, कारण याहवेहच्या दृष्टीने वाईट आहे, तेच पाप तुम्ही करून त्यांचा क्रोध भडकाविला होता. 19 मला याहवेहच्या रागाची आणि क्रोधाची भीती वाटली, कारण ते तुमचा नाश करण्याइतके रागावले होते. परंतु त्यावेळी सुद्धा याहवेहने माझे ऐकले. 20 आणि याहवेह अहरोनवर अत्यंत संतप्त झाले व त्याचा नाश करणार होते, परंतु मी त्याच्यासाठी देखील प्रार्थना केली. 21 मी तुमचे पापकृत्य, म्हणजे जे वासरू तुम्ही बनविले होते ते घेतले आणि अग्नीत जाळून त्याची कुटून धुळीसारखी बारीक पूड केली आणि ती धूळ डोंगरातून वाहणाऱ्या ओहोळात फेकून दिली. 22 पुन्हा तबेरा येथे, मस्सा येथे आणि किब्रोथ-हत्ताव्वा येथेही तुम्ही याहवेहला संतप्त केले. 23 आणि जेव्हा याहवेहने तुम्हाला कादेश-बरनेआ येथून पाठविले, तेव्हा ते म्हणाले, “वर जा आणि जो देश मी तुम्हाला दिला आहे त्याचा ताबा घ्या.” पण तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वराच्या आज्ञेविरुद्ध बंड केले. त्यांच्यावर भरवसा ठेवला नाही व त्यांची आज्ञा पाळली नाही. 24 मी तुम्हाला ओळखतो, त्या दिवसापासून तुम्ही याहवेहविरुद्ध बंड करीत आहात. 25 म्हणूनच मी याहवेहपुढे चाळीस दिवस व चाळीस रात्र पालथा पडून राहिलो, कारण याहवेह म्हणाले होते की, ते तुमचा नाश करतील. 26 मी याहवेहला प्रार्थना केली आणि म्हणालो, “हे सार्वभौम याहवेह, तुमच्या प्रचंड शक्तीने व तुमच्या बलाढ्य हाताने इजिप्त देशातून वाचविलेल्या तुमच्या लोकांचा, तुमच्या वारसांचा संहार करू नका. 27 तुमचे सेवक अब्राहाम, इसहाक व याकोब यांची आठवण करा. या लोकांचा हट्टीपणा, त्यांच्या दुष्टपणाकडे व त्यांच्या पापाकडे लक्ष देऊ नका. 28 कारण जर तुम्ही यांचा नाश केला, तर ज्या देशामधून तुम्ही आम्हाला बाहेर आणले ते लोक म्हणतील, ‘वचनदत्त देशात त्यांना नेण्यास त्यांचा याहवेह असमर्थ होता आणि तो त्यांचा द्वेष करीत होता म्हणून त्याने त्यांचा नाश केला व त्यांना ठार मारण्यासाठीच त्याने त्यांना रानात नेले.’ 29 पण हे तुमचे लोक, तुमचे वारसदार आहेत. तुम्हीच त्यांना तुमच्या महान सामर्थ्याने आणि पसरलेल्या बाहूने इजिप्तमधून बाहेर आणले.”

**10** त्यावेळी याहवेहने मला सांगितले, “पहिल्या पाट्यांसारख्याच आणखी दोन दगडी पाट्या तू घडव आणि त्या घेऊन पर्वतावर माझ्याकडे ये. एक लाकडी कोशही तयार कर. 2 तू फोडून टाकलेल्या पहिल्या पाट्यांवर जी वचने होती, ती मी त्यावर लिहेन. मग त्या पाट्या तू कोशात ठेव.” 3 म्हणून मी बाभळीच्या लाकडाचा एक कोश तयार केला, आणि पहिल्यासारख्या दोन दगडी पाट्या घडविल्या व त्या पाट्या माझ्या हातात घेऊन मी पर्वतावर गेलो. 4 याहवेहने या पाट्यांवर जे आधी लिहिले होते तेच लिहिले, ज्या दहा आज्ञा त्यांनी पर्वतावर अग्नीमधून संपूर्ण मंडळीला घोषित केल्या होत्या, त्या पुन्हा लिहिल्या आणि मला सोपवून दिल्या. 5 नंतर मी पर्वतावरून खाली उतरलो आणि याहवेहने मला आज्ञा दिल्याप्रमाणे त्या पाट्या मी बनविलेल्या लाकडी कोशात ठेवून दिल्या; आजपर्यंत त्या तिथेच आहेत. 6 (मग इस्राएली लोक बेने याकानच्या विहिरी सोडून प्रवास करीत मोसेरापर्यंत आले. तिथे अहरोन मरण पावला व त्याला मूठमाती देण्यात आली, आणि त्याचा पुत्र एलअज़ार त्याच्यानंतर याजक झाला. 7 नंतर ते प्रवास करीत गुदगोदाह येथे आले व तिथून पुढे याटबाथह येथे आले, ही झऱ्यांची भूमी होती. 8 याच ठिकाणी याहवेहने लेवीच्या गोत्रास याहवेहच्या कराराचा कोश वाहून नेण्यासाठी, त्याचप्रमाणे याहवेहच्या समोर उभे राहून त्यांची सेवा करण्यास व त्यांच्या नावाने आशीर्वाद देण्यास नेमले, जसे आजपर्यंत चालत आले आहे. 9 म्हणून लेवी वंशजांना वचनदत्त देशात त्यांच्या बंधुवंशजांप्रमाणे वाटा किंवा वतन मिळालेले नाही, कारण याहेवह तुमच्या परमेश्वराने सांगितल्याप्रमाणे याहवेह स्वतःच त्यांचे वतन आहेत.) 10 त्या पर्वतावर पहिल्या वेळी राहिलो होतो, त्याप्रमाणे चाळीस दिवस व चाळीस रात्र राहिलो आणि या वेळीही याहवेहने माझी विनंती मान्य केली. तुमचा नाश करण्याची त्यांची इच्छा नव्हती. 11 याहवेह मला म्हणाले, “जा आणि सर्व लोकांना मी त्यांच्या पूर्वजांना वचनपूर्वक देऊ केलेल्या देशाकडे जाण्यास मार्गदर्शन कर, म्हणजे ते त्या देशात प्रवेश करून तो ताब्यात घेतील.” 12 आता हे इस्राएली लोकहो, याहवेह तुमचे परमेश्वर तुमच्याजवळ मागतात ते एवढेच की तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वराचे भय धरावे, त्यांच्या आज्ञा पाळाव्या, त्यांच्यावर प्रीती करावी आणि पूर्ण मनाने व पूर्ण जिवाने याहवेह तुमच्या परमेश्वराची सेवा करावी, 13 आणि याहवेहच्या ज्या आज्ञा व नियम आज मी तुम्हाला देत आहे, त्या तुमच्या भल्यासाठीच आहेत, त्या तुम्ही पाळाव्या. 14 आकाश, सर्वोच्च आकाश, पृथ्वी व तिच्यावरील सर्वकाही याहवेह तुमच्या परमेश्वराचे आहे. 15 असे असूनही याहवेहने तुमच्या पूर्वजांवर वात्सल्यमय प्रीती केली व त्यांच्यानंतर तुम्ही इतर सर्व राष्ट्रांहून श्रेष्ठ व्हावे म्हणून त्यांच्या वंशजांची म्हणजे तुमची निवड केली—जसे आजही आहे. 16 म्हणून तुम्ही तुमच्या अंतःकरणाची सुंता करा आणि आता ताठ मानेचे राहू नका. 17 याहवेह तुमचे परमेश्वर, हे देवाधिदेव, प्रभूंचे प्रभू, महान परमेश्वर, पराक्रमी आणि भयावह आहेत, जे पक्षपात करीत नाहीत व लाच घेत नाहीत. 18 ते अनाथांचा व विधवांचा न्याय करतात, जे परदेशीय तुम्हामध्ये राहतात त्यांच्यावर प्रीती करून त्यांना अन्न व वस्त्रे देतात. 19 तुम्हीदेखील परदेशीयांवर प्रीती केली पाहिजे, कारण तुम्ही स्वतः इजिप्त देशामध्ये परदेशी होता. 20 याहवेह तुमच्या परमेश्वराचे तुम्ही भय बाळगा, त्यांची सेवा करा, त्यांना बिलगून राहा आणि त्यांच्याच नावाने शपथ घ्या. 21 तेच तुमच्या स्तुतीचा विषय आहे; तेच तुमचे परमेश्वर आहेत, त्यांनी केलेले महान व भयावह चमत्कार तुम्ही स्वतःच्या डोळ्याने पाहिले आहेत. 22 ज्यावेळी तुमचे पूर्वज इजिप्तमध्ये गेले, त्यावेळी ते केवळ सत्तर जणच होते आणि आता याहवेह तुमच्या परमेश्वराने तुम्हाला आकाशातील ताऱ्यांइतके अगणित केले आहे.

**11** याहवेह तुमच्या परमेश्वरावर प्रीती करावी आणि नेहमी त्यांचे विधी, त्यांचे नियम आणि त्यांच्या आज्ञा पाळाव्यात. 2 तुम्ही आज हे स्मरणात ठेवा, तुमच्या मुलांनी याहवेह तुमच्या परमेश्वराचे अनुशासन पाहिले नाही आणि त्याचा अनुभव केला नाही—त्यांचे गौरव, सामर्थ्यशाली हात व पसरलेल्या भुजांचा; 3 इजिप्तचा राजा फारोह व

त्यांच्या सर्व देशाच्या समक्षतेत याहवेहने केलेली चिन्हे आणि केलेल्या गोष्टी; 4 इजिप्तचे सैन्य, त्यांचे रथ आणि घोडे जेव्हा तुमचा पाठलाग करीत आले, तेव्हा याहवेहने त्या सैन्याला तांबड्या समुद्रामध्ये कसे बुडवून टाकले व त्यांची कशी दुर्दशा केली. 5 तुम्ही या ठिकाणी येईपर्यंत त्यांनी तुमच्यासाठी रानात काय केले, 6 रऊबेनाचा वंशज एलियाब, याचे पुत्र दाथान व अबीराम यांचे त्यांनी काय केले, जेव्हा पृथ्वीने सर्व इस्राएली छावणीच्या मध्यभागी आपले तोंड उघडले आणि तिने त्यांना, त्यांच्या घरादारांना, त्यांच्या डेर्‍यांना आणि त्यांच्या सर्व मालकीचे सर्व जिवंत प्राणी कसे गिळून टाकले हे तुमच्या मुलांनी पाहिले नाही. 7 परंतु याहवेहने केलेले हे सर्व महान कार्य तुम्ही स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले आहे. 8 म्हणून मी तुम्हाला आज देत असलेल्या सर्व आज्ञा पाळाव्या, म्हणजे यार्देन ओलांडून ज्या देशात तुम्ही प्रवेश करणार आहात, तो हस्तगत करण्यास तुम्हाला सामर्थ्य मिळेल. 9 म्हणजे जो देश त्यांना व त्यांच्या वंशजांना देण्याविषयी याहवेहने तुमच्या पूर्वजांना वचन दिले होते, त्या दुधामधाच्या सुंदर देशात तुम्ही चिरकाल राहाल. 10 कारण ज्या देशात तुम्ही प्रवेश करणार आहात व तो ताब्यात घेणार आहात, तो देश तुम्ही सोडून आलेल्या इजिप्त देशातील भूमीसारखा नाही. तिथे तुम्ही पेरणी केली व भाज्यांचे मळे लावण्यासाठी जलसिंचन केले. 11 परंतु यार्देन ओलांडून जो देश ताब्यात घेण्यासाठी तुम्ही जात आहात, तो देश डोंगराचा व दर्‍याखोर्‍यांचा आहे, जो आकाशातून पडणारा पाऊस पितो. 12 याहवेह तुमचे परमेश्वर स्वतः त्या भूमीची काळजी घेतात; वर्षाच्या आरंभापासून अखेरपर्यंत याहवेह तुमच्या परमेश्वराची नजर सतत त्या देशावर असते. 13 आज मी तुम्हाला देत असलेल्या या सर्व आज्ञा जर तुम्ही अगदी विश्वासूपणे पाळाल—तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वरावर पूर्ण अंतःकरणाने व पूर्ण जिवाने प्रीती कराल व त्यांची सेवा कराल— 14 तर मी आगोठीचा आणि वळवाचा पाऊस योग्य समयी पाठवेन, म्हणजे तुम्हाला धान्य, नवीन द्राक्षे व तेलासाठी जैतुनाच्या तेलाचा साठा करता येईल. 15 मी तुमच्या गुरांसाठी हिरवीगार कुरणे देईन आणि तुम्हीही खाल आणि तृप्त व्हाल. 16 पण सावध असावे, तुम्ही इतर दैवतांची उपासना व त्यांना नमन करण्याकडे बहकून जाऊ नये. 17 तसे केल्यास याहवेहचा क्रोध तुम्हावर भडकेल आणि ते आकाशकपाटे बंद करतील, मग पाऊस पडणार नाही, भूमी आपला हंगामही देणार नाही आणि याहवेहने तुम्हाला दिलेल्या या उत्तम देशातून तुम्ही त्वरित नाश पावाल. 18 यास्तव माझ्या या आज्ञा काळजीपूर्वक आपल्या मनात आणि अंतःकरणात साठवून ठेवा; त्या तुम्ही आपल्या हातावर चिन्ह म्हणून बांधून ठेवा आणि आपल्या कपाळपट्टीवर बांधा. 19 त्या आपल्या मुलांना शिकवा. घरी बसलेले असताना, वाटेवर चालत असताना, झोपण्याच्या वेळी व झोपेतून उठल्यानंतर त्याबद्दल बोलत राहा. 20 त्या तुमच्या घरातील दाराच्या चौकटीवर व तुमच्या फाटकांवर लिहाव्या, 21 म्हणजे जितके दिवस पृथ्वीवर आकाश स्थित आहे, तितके तुमच्या पूर्वजांना याहवेहने देऊ केलेल्या वचनदत्त देशात तुमचे आणि तुमच्या मुलाबाळांचे दिवस असतील. 22 मी तुम्हाला देत असलेल्या या सर्व आज्ञा तुम्ही काळजीपूर्वक पाळाल—याहवेह तुमच्या परमेश्वरावर प्रीती कराल, आज्ञाधारकपणे त्यांच्या मार्गावर चालत राहाल आणि त्यांना बिलगून राहाल— 23 तर याहवेह या सर्व राष्ट्रांना तुमच्यापुढून घालवून देतील आणि तुमच्यापेक्षा कितीही मोठी आणि बलवान राष्ट्र असोत, तुम्ही त्यांना आपल्या ताब्यात घ्याल. 24 तुम्ही जिथे पाऊल ठेवाल, ती प्रत्येक भूमी तुमची होईल: तुमच्या देशाची सीमा दक्षिणेकडील नेगेव प्रांतापासून लबानोन देशापर्यंत व फरात नदीपासून भूमध्य समुद्रापर्यंत पसरेल. 25 तुमच्याविरुद्ध कोणीही उभे राहू शकणार नाही. कारण याहवेह तुमच्या परमेश्वराने वचन दिल्याप्रमाणे, तुम्ही जाल त्या ठिकाणी तुम्हाविषयी तेथील लोकात ते भय आणि दहशत निर्माण करतील. 26 पाहा, मी आज तुमच्यापुढे आशीर्वाद व शाप ठेवीत आहे— 27 याहवेह तुमच्या परमेश्वराच्या ज्या आज्ञा आज मी तुम्हाला देणार आहे, त्या जर तुम्ही पाळल्या, तर तुम्हाला आशीर्वाद मिळेल; 28 आणि याहवेह तुमच्या परमेश्वराच्या आज्ञा न मानल्यास, आज मी तुम्हाला ज्या मार्गाने जाण्याची आज्ञा देत आहे त्यापासून भटकून जाल आणि जी दैवते तुम्हाला माहीत नाहीत अशांचे अनुसरण करण्यास सुरुवात कराल, तर तुम्हाला शाप मिळेल. 29 याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला जेव्हा या देशाचा ताबा घेण्यासाठी आणतील, तेव्हा तुम्ही गरिज्जीम डोंगरावरून आशीर्वाद आणि एबाल डोंगरावरून शाप उच्चारावा. 30 तुम्ही जाणता, हे डोंगर यार्देन नदीच्या पश्चिमेला असलेल्या कनानी लोकांच्या देशात आहेत. कनानी लोक जे अराबात गिलगाल या शहराजवळ असलेल्या ओसाड भागात राहतात. हे ठिकाण मोरेहच्या जवळील एला वृक्षांच्या राईपासून दूर नाही. 31 तुम्ही यार्देन नदी ओलांडून याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला देत असलेला देश काबीज करण्यास जात आहात. तुम्ही तो ताब्यात घ्याल आणि तिथे वस्ती कराल, 32 पण मी आज तुमच्यासमोर ठेवत असलेल्या सर्व विधी व नियम पाळण्याची खबरदारी तुम्ही घेतली पाहिजे.

**12** याहवेह तुमच्या पूर्वजांच्या परमेश्वराने जो देश तुम्हाला ताब्यात घ्यावयास दिला आहे—तिथे तुम्ही या पृथ्वीवर जिवंत असेपर्यंत हे विधी व नियम काळजीपूर्वकपणे पाळावेत. 2 ज्या राष्ट्रांना तुम्ही ताब्यात घेणार आहात तेथील उंच पर्वतांवर, टेकड्यांवरील आणि प्रत्येक घनदाट पसरलेल्या झाडाखाली जे त्या दैवतांची उपासना करतात ती सर्व ठिकाणे पूर्णपणे नष्ट करा. 3 तुम्ही त्यांच्या वेद्या पाडून टाकाव्या, त्यांचे पवित्र दगड फोडून टाकावे, त्यांचे अशेरास्तंभ अग्नीत जाळून टाकावे, त्यांच्या दैवतांच्या कोरीव मूर्ती फोडून टाकाव्या आणि त्या ठिकाणातून त्यांची नावे पुसून टाकावी. 4 याहवेह तुमच्या परमेश्वराची उपासना त्यांच्या पद्धतीने करू नका. 5 उलट, तुमच्या सर्व गोत्रांच्या जागेतून याहवेह तुमचे परमेश्वर निवडील व त्या जागेला ते स्वतःचे नाव देतील, त्या ठिकाणी तुम्ही जावे; 6 तिथेच तुम्ही आपली होमार्पणे, यज्ञार्पणे, तुमचे दशांश व विशेष भेटी, नवस फेडण्यासाठी आणलेली अर्पणे आणि तुमची स्वेच्छार्पणे आणि तुमच्या गुरांची व शेरडामेंढरांची प्रथम वत्सांची अर्पणे आणावीत. 7 त्या ठिकाणी याहवेह तुमच्या परमेश्वराच्या

सान्निध्यात तुम्ही आणि तुमच्या कुटुंबाने भोजन करावे आणि तुम्ही
हातात घेतलेल्या प्रत्येक गोष्टीत आनंद कराल, कारण याहवेह तुमच्या
परमेश्वराने तुम्हाला आशीर्वादित केले आहे. 8 आजपर्यंत तुम्ही तुमच्या
मनाला योग्य वाटेल त्याप्रमाणे वागत आला आहात, पण आता तसे
करता येणार नाही, 9 कारण याहवेह तुमच्या परमेश्वरांनी दिलेल्या
विश्रामस्थानी आणि वचनदत्त ठिकाणी अजून तुम्ही पोहोचला नाही. 10
पण तुम्ही यार्देन नदी पार करून याहवेह तुमच्या परमेश्वराने दिलेल्या
वचनदत्त देशात राहू लागाल तेव्हा ते तुमच्या सभोवती असलेल्या सर्व
शत्रूपासून सुरक्षित ठेवून तुम्हाला विश्रांती देतील. 11 तेव्हाच तुम्ही तुमची
सर्व होमार्पणे, यज्ञार्पणे, दशांश, नवसाची अर्पणे व स्वेच्छार्पणे—याहवेह
तुमचे परमेश्वर स्वतःच्या नावाचे निवासस्थान म्हणून ज्या ठिकाणाची
निवड करतील तिथे आणावीत. 12 आणि त्या ठिकाणी तुम्ही, तुमचे
पुत्र आणि कन्या, तुमचे दास व दासी आणि तुमच्या नगरातील लेवी,
ज्यांना स्वतःचा कोणताही वाटा किंवा वतन नाही, या सर्वांसह—याहवेह
तुमच्या परमेश्वरासमोर आनंदोत्सव करावा. 13 तुमची होमार्पणे तुम्ही
इतर कुठेही अर्पण करणार नाही याची खबरदारी घ्या. 14 तुमच्या एका
गोत्रातील याहवेहने नेमून दिलेल्या ठिकाणीच तुमचे होमबली अर्पावेत
आणि मी तुम्हाला जे आज्ञापिले ते सर्वकाही करावे. 15 तरीसुद्धा,
याहवेह तुमचे परमेश्वर देत असलेल्या आशीर्वादाप्रमाणे तुम्ही तुमच्या
नगरात तुमचे पशू ज्याप्रमाणे सांबर व हरिण मारून खाता त्याप्रमाणे
पाहिजे तेवढे खा. विधिनियमानुसार अशुद्ध आणि शुद्ध असे दोघेही ते
खाऊ शकतात. 16 पण तुम्ही रक्ताचे सेवन कधीही करू नये; तर ते
जमिनीवर पाण्यासारखे ओतून द्यावे. 17 धान्य, द्राक्षारस व तेलाचे
दशांश, गुरांचे प्रथमवत्स, नवसफेडीच्या वस्तू, स्वेच्छार्पणे व इतर
अर्पणे या परमेश्वराला वाहिलेल्या अर्पणातून काहीही आपल्या नगरात
खाऊ नये. 18 पण ही सर्व अर्पणे याहवेह तुमचे परमेश्वर निवडील त्या
ठिकाणी तुमचे पुत्र, कन्या, तुमचे दास व दासी व तुमच्या शहरात
राहणारे लेवी, या सर्वांसह तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वरासमोर खावीत.
तुम्ही जे करता त्या प्रत्येक सेवेबद्दल परमेश्वरापुढे आनंद करावा. 19
जेव्हापर्यंत तुमचे या भूमीवर वास्तव्य असेल तेव्हापर्यंत लेवी वंशजांकडे
दुर्लक्ष न करण्याची काळजी घ्यावी. 20 याहवेह तुमच्या परमेश्वराने
आपल्या वचनाप्रमाणे तुमच्या देशाची सीमा वाढविल्यावर, तुम्हाला
मांस खाण्याची इच्छा झाल्यास तुम्ही म्हणाल, “मला मांस खावयाचे
आहे,” तेव्हा तुम्ही मनसोक्त मांस खावे. 21 याहवेह तुमच्या परमेश्वराने
आपल्या नावासाठी निवडलेले स्थान तुमच्या घरापासून खूप दूर असेल,
तर तुम्हाला जेव्हा इच्छा होईल, तेव्हा याहवेहने तुम्हाला दिलेल्या
पशूंमधून किंवा मेंढरांमधून तुम्ही काहीही मारून खावे. मी तुम्हाला
सांगितल्याप्रमाणे ते मांस तुम्ही तुमच्या शहरात तुम्हाला हवे तेवढे खावे.
22 जो कोणी विधिनियमानुसार शुद्ध किंवा अशुद्ध असेल त्यानेही हे
मांस, हरणाचे किंवा सांबराचे मांस खातात, त्याप्रमाणे खावे. 23 परंतु
रक्त सेवन न करण्याची तुम्ही खबरदारी घ्यावी, कारण रक्त हे जीवन
आहे, म्हणून तुम्ही मांसाबरोबर जीवन सेवन करू नये. 24 तुम्ही रक्ताचे
सेवन करू नये; त्याऐवजी ते पाण्याप्रमाणे जमिनीवर ओतून टाकावे.
25 त्याचे सेवन करू नये, तर त्याने तुमचे आणि तुमच्यानंतर तुमच्या
संततीचे सर्व बाबतींत कल्याण होईल, कारण याहवेहच्या दृष्टीने योग्य
वाटणाऱ्या गोष्टीच तुम्ही कराल. 26 परंतु जी पवित्र अर्पणे करावयाची
असतील व नवसाची दाने द्यावयाची असतील, ती घेऊन तुम्ही याहवेह
जे स्थान निवडील, त्या स्थानी जावे. 27 तिथे आपल्या होमबलीचे
मांस व रक्त याहवेह तुमच्या परमेश्वराच्या वेदीवर अर्पण करावे. तुमच्या
यज्ञपशूंचे रक्त याहेवह तुमच्या परमेश्वराच्या वेदीवर ओतावे आणि मांस
खावे. 28 या सर्व आज्ञा पाळण्याची तुम्ही खबरदारी घ्यावी. याहवेह
तुमच्या परमेश्वराच्या दृष्टीने जे उत्तम आणि योग्य ते तुम्ही केले, तर
तुमचे आणि तुमच्या मुलाबाळांचे निरंतर कल्याण होईल. 29 ज्या
भूमीत तुम्ही राहणार आहात तेथील राष्ट्रांचा याहवेह तुमचे परमेश्वर नाश
करतील. मग त्यांना तिथून घालवून दिल्यानंतर तुम्ही त्या ठिकाणी
वस्ती करावी, 30 आणि तुमच्यासमोर ते नष्ट झाल्यानंतर, तुम्ही त्यांच्या
दैवतांची चौकशी कराल “ही राष्ट्रे त्यांच्या दैवतांची उपासना कशी
करीत होती? आपणही तसेच करावे,” तसे करण्याचा तुम्हाला मोह
होईल, तेव्हा त्यांच्या दैवतांच्या मोहात अडकू नये याची खबरदारी घ्या.
31 त्यांच्या पद्धतीप्रमाणे तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वराची उपासना
कदापि करू नये, कारण त्यांच्या दैवतांच्या उपासनेमध्ये ते अशी घृणित
कृत्ये करतात, ज्यांचा याहवेह तिरस्कार करतात. ते आपल्या पुत्रांना
जाळतात आणि कन्यांचा त्यांच्या दैवतांना होम करतात. 32 मी देत
असलेल्या सर्व आज्ञांचे तुम्ही पालन करावे; त्यात काहीही भर घालू नये
किंवा त्यातून काही कमी करू नये.

**13** जर तुम्हामध्ये कोणी ज्योतिषी किंवा स्वप्नांच्या आधाराने भविष्य
सांगणारा असेल व त्याने दैवी चिन्ह आणि चमत्कारांची घोषणा
केली, 2 आणि जर त्याची चिन्हे आणि भविष्ये खरी ठरली आणि तो
ज्योतिषी म्हणेल, “चला, आपण इतर दैवतांचे अनुसरण करू आणि
त्यांची उपासना करू.” (अशी दैवते ज्यांची तुम्हाला ओळख नसेल) 3
तर तुम्ही त्या ज्योतिष्याचे किंवा स्वप्नदर्शीचे शब्द ऐकू नका. कारण
तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वरावर मनापासून प्रीती करता की नाही, हे
पाहण्यासाठी परमेश्वर तुमची परीक्षा घेत आहेत. 4 याहवेह तुमच्या
परमेश्वराचेच तुम्ही अनुसरण करावे व त्यांचेच भय बाळगावे. त्यांच्या
आज्ञा पाळाव्यात, त्यांची वाणी ऐकावी; त्यांची सेवा करावी व त्यांनाच
बिलगून राहावे. 5 जो संदेष्टा किंवा स्वप्नदर्शी तुम्हाला बहकवील
त्याला अवश्य जिवे मारावे, कारण ज्या याहवेह तुमच्या परमेश्वराने
तुम्हाला इजिप्त देशातील गुलामगिरीतून बाहेर काढले, त्यांच्याविरुद्ध
बंड करण्यास त्याने तुम्हाला प्रवृत्त केले. तुम्ही स्वतःला या दुष्टाईपासून
मुक्त केले पाहिजे. 6 जर तुमचा स्वतःचा बंधू किंवा तुमचे पुत्र किंवा
कन्या किंवा तुमची प्रिय पत्नी किंवा जिवलग मित्र तुम्हाला गुप्तपणे
भुरळ पाडेल व म्हणेल, “चल, आपण जाऊ आणि इतर दैवतांची
उपासना करू” (ज्यांना तुम्ही वा तुमचे पूर्वज ओळखत नाहीत, 7 जे
तुमच्या शेजाऱ्यांचे देव आहेत, ते जवळ असो वा दूर, त्या भूमीच्या एका

टोकापासून असो वा दुसऱ्या टोकापर्यंत), 8 तर त्यांना संमती देऊ
नका किंवा त्यांचे ऐकू नका. त्यांची गयही करू नका. त्यांना वाचवू
नका किंवा संरक्षण देऊ नका. 9 तर त्यांना अवश्य जिवे मारावे. त्यांना
मृत्युदंड देत असताना, त्यांच्यावर तुमचा हात सर्वप्रथम पडला पाहिजे
आणि त्यानंतर इतर लोकांचे हात पडावेत. 10 त्यांना मरेपर्यंत धोंडमार
करावी, कारण ज्यांनी तुम्हाला इजिप्त देशाच्या गुलामगिरीतून बाहेर
काढले, त्या याहवेह तुमच्या परमेश्वरापासून तुम्हाला फूस लावून दूर
नेण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. 11 तेव्हा संपूर्ण इस्राएल ऐकेल व
भयभीत होईल आणि तुमच्यामध्ये असा दुष्टपणा करण्यास कोणी
धजणार नाही. 12 याहवेह तुमचे परमेश्वर वस्ती करण्यास देत असलेल्या
एखाद्या शहरातून तुमच्या कानावर आले की, 13 तुमच्यापैकी काही
अधम पुरुष निघाले आहेत आणि त्यांनी त्यांच्या नगरातील लोकांना हे
बोलून बहकविले, “चला आपण जाऊ आणि इतर दैवतांची उपासना
करू” (अशी दैवते ज्यांना तुम्ही ओळखत नाहीत), 14 तर तुम्ही त्याची
चौकशी करावी, शोध करावा आणि सखोल तपासणी करावी आणि
जर हे सत्य असेल की तुमच्यामध्ये असे घृणित कृत्य घडले आहे, 15
तर तुम्ही त्या नगरातील लोकांना तलवारीने निश्चित मारून टाकावे.
त्यातील सर्व रहिवाशांचा आणि गुरांचा समूळ नाश करावा. 16 त्यानंतर
युद्धात मिळालेल्या लुटीचा नगरातील रस्त्याच्या मधोमध ढीग करून
त्याला आग लावावी आणि ते संपूर्ण नगर होमार्पण म्हणून याहवेह
तुमच्या परमेश्वराला अर्पण करावे. हे नगर म्हणजे एक उजाड ठिकाण
म्हणून कायम राहील. ते पुन्हा कधीही बांधले जाणार नाही, 17 आणि
निषिद्ध वस्तूंपैकी ज्या विनाशासाठी ठरविलेल्या आहेत त्यातील काहीही
तुमच्या हातात राहू नये. मग याहवेहचा तीव्र क्रोध शमेल, ते तुमच्यावर
दया करतील आणि तुम्हावर करुणा करतील. तुमच्या पूर्वजांना वचन
दिल्याप्रमाणे ते तुम्हाला बहुगुणित करतील— 18 कारण तुम्ही याहवेह
तुमच्या परमेश्वराची वाणी ऐकून, आज मी तुम्हाला ज्या आज्ञा देत आहे
त्या पाळल्या आणि त्यांच्या दृष्टीने जे योग्य तेच केले आहे.

## 14

याहवेह तुमच्या परमेश्वराची तुम्ही संतती आहात. मृतांसाठी
स्वत:ला जखमा करून घेऊ नका किंवा डोक्याचे मुंडण करून
घेऊ नका, 2 कारण तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वराचे पवित्रजन आहात.
पृथ्वीवरील इतर सर्व राष्ट्रांमधून तुम्हीच त्यांचा मौल्यवान ठेवा असावे
म्हणूनच याहवेहने तुम्हाला निवडले आहे. 3 कोणतेही निषिद्ध ठरविण्यात
आलेले अन्न तुम्ही खाऊ नये. 4 तुम्ही हे प्राणी खाऊ शकता: बैल,
मेंढरे व शेरडे, 5 सांबर, हरिण, भेकर, रानबोकड, रोही, गवा व डोंगरी
मेंढा. 6 ज्यांचे खूर दुभागलेले आहेत आणि जे प्राणी रवंथ करतात असे
कोणतेही प्राणी तुम्ही खाऊ शकता. 7 तरी, जे प्राणी फक्त रवंथ करतात
अथवा ज्यांचे फक्त खूर दुभागलेले असतात, हे प्राणी तुम्ही खाऊ नयेत:
उंट, ससा आणि रानससा; कारण हे प्राणी रवंथ करतात, परंतु त्यांचे
खूर दुभागलेले नसतात; ते प्राणी तुमच्यासाठी विधिनियमानुसार अशुद्ध
आहेत. 8 डुकरे देखील अशुद्ध आहेत; त्यांचे खूर जरी दुभागलेले आहेत,
तरी ते रवंथ करीत नाहीत, त्यांचे मांस तुम्ही खाऊ नये किंवा त्यांच्या
मृतशरीरांना स्पर्श करू नये. 9 पाण्यात राहणाऱ्या सर्व प्राण्यांपैकी
ज्यांना कल्ले व खवले आहेत, त्यांना तुम्ही खाऊ शकता. 10 परंतु
ज्यांना कल्ले व खवले नाहीत ते तुम्ही खाऊ नये; तुमच्यासाठी ते अशुद्ध
आहे. 11 कोणतेही शुद्ध पक्षी खाण्यास योग्य आहेत. 12 परंतु हे पक्षी
तुम्ही खाऊ नये: गरुड, गिधाड, काळे गिधाड, 13 लाल पतंग, काळे
पतंग, निरनिराळ्या जातीच्या घारी, 14 कोणत्याही जातीचे कावळे, 15
शिंग असलेले घुबड, किंचाळणारे घुबड, समुद्रपक्षी, सर्व जातीचे बहिरी
ससाणे, 16 लहान घुबड, पिंगळा, मोठे घुबड, पांढरे घुबड, 17 वाळवंटी
घुबड, कुरर, करढोक, 18 करकोचा, कोणत्याही प्रकारचे बगळे, टिटवी
आणि वटवाघूळ. 19 सर्वप्रकारचे उडणारे कीटक तुमच्यासाठी अशुद्ध
आहेत; ते तुम्ही खाऊ नये. 20 पण पंख असलेले कोणतेही पक्षी जे
शुद्ध आहेत ते तुम्ही खाऊ शकता. 21 आधीच मृत्यू पावलेले असे
काहीही तुम्ही खाऊ नये. तुमच्या नगरात राहणाऱ्या एखाद्या परकियाने
ते खाण्यास हरकत नाही. किंवा परकियाला विकत द्यावा, परंतु तुम्ही
याहवेह तुमच्या परमेश्वराचे पवित्रजन आहात. त्याच्या आईच्या दुधात
करडाला कधीही शिजवू नये. 22 तुमच्या शेतात प्रत्येक वर्षी होणाऱ्या
उत्पन्नाचा दशांश भाग वेगळा ठेवण्याची खात्री करा. 23 धान्याचा,
नवीन द्राक्षारसाचा व जैतुनाच्या तेलाचा दशांश आणि तुमच्या गुरांच्या
व शेरडामेंढरांच्या प्रथम वत्सांनाही याहवेह तुमच्या परमेश्वरासमोर
त्यांच्या नावाप्रित्यर्थ खाण्यासाठी, ते जे पवित्रस्थान निवडतील त्या
ठिकाणी खा, म्हणजे तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वराचे नेहमीच आदर
करण्याचे शिकाल. 24 परंतु जर ते ठिकाण खूप दूर असेल आणि
तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वराद्वारे आशीर्वादित झाला असाल आणि
तुमचा दशांश घेऊन जाणे गैरसोईचे असेल (कारण जे ठिकाण याहवेह
त्यांच्या नावाच्या स्थापनेसाठी निवडतील ते खूप दूर आहे), 25 तर
मग तुमचे दशांश चांदीच्या मोबदल्यात घ्या, ही चांदी तुमच्याबरोबर
घ्या आणि याहवेह तुमचे परमेश्वर निवडतील त्या ठिकाणी जा. 26 त्या
चांदीने तुम्हाला आवडेल ते विकत घ्या: गाई, बैल, मेंढी, थोडा द्राक्षारस
अथवा आंबलेले पेय आणि तुम्हाला हवे असलेले काहीही. त्या ठिकाणी
याहवेह तुमच्या परमेश्वरासमोर तुम्ही आणि तुमच्या कुटुंबासह खाऊन
पिऊन आनंद करावा. 27 आणि तुमच्या नगरात राहत असलेल्या लेवी
वंशजांकडे तुम्ही कधीही दुर्लक्ष करू नये; कारण त्यांना तुमच्यासारखा
वाटा अथवा वतन नाही. 28 प्रत्येक तिसऱ्या वर्षाच्या शेवटी संपूर्ण
उत्पन्नाचा दशांश आणावा आणि तुमच्या नगरात एकत्र साठवून ठेवावा,
29 म्हणजे लेवी वंशजांना (ज्यांना स्वत:चा वाटा अथवा वतन नाही) तो
दशांश द्यावा किंवा परकियांना द्यावा अथवा तुमच्या नगरात असणाऱ्या
विधवांना आणि अनाथांना द्यावा. म्हणजे ते खाऊन तृप्त होतील आणि
मग याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला आणि तुमच्या हाताच्या कार्याला
आशीर्वादित करतील.

## 15

प्रत्येक सातव्या वर्षाच्या शेवटी सर्व कर्ज माफ करावे.
2 कर्जमाफीची प्रक्रिया अशी असावी: प्रत्येक सावकाराने
आपल्याजवळ असलेल्या कोणाही इस्राएली बंधूचे कर्ज माफ करावे.

त्यांना स्वतःच्या लोकांपैकी कोणाकडूनही पैसे घ्यावे लागणार नाहीत,
कारण कर्जाची फेड करण्याची वेळ याहवेहने घोषित केली आहे. 3
परदेशी पासून असलेले कर्ज तुम्हाला वसूल करता येईल, परंतु तुमच्याच
बांधवांची देणी तुम्ही मुळीच वसूल करू नयेत. 4 तरीसुद्धा तुमच्यात
कोणीही दरिद्री असा राहू नये, कारण याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला
वतनादाखल देऊ केलेल्या या देशात भरपूर आशीर्वाद देतील, 5 जर
तुम्ही पूर्णपणे याहवेह तुमच्या परमेश्वराच्या आज्ञेत राहाल आणि आज
मी तुम्हाला देत असलेल्या या सर्व आज्ञा काळजीपूर्वक पाळाल तरच.
6 कारण याहवेह तुमच्या परमेश्वराने अभिवचन दिल्याप्रमाणे ते तुम्हाला
आशीर्वाद देतील आणि तुम्ही अनेक राष्ट्रांना कर्ज द्याल पण तुम्ही मात्र
कर्ज घेणार नाही. तसेच तुम्ही अनेक राष्ट्रांवर राज्य कराल, पण ती राष्ट्रे
तुम्हावर राज्य करणार नाहीत. 7 परंतु याहवेह तुमचे परमेश्वर जो देश
तुम्हाला देत आहेत, त्यातील कोणत्याही नगरात कोणी इस्राएली बांधव
गरीब असेल, तर त्यांच्याकरिता तुमचे हृदय कठोर करू नका किंवा
तुमची मूठ बांधून ठेऊ नका. 8 त्यांना गरज लागेल तितके तुम्ही त्यांना
उदारमनाने व निर्व्याज उसने द्यावे. 9 हा दुष्ट विचार मनात न आणण्याची
खबरदारी घ्या: “कर्जमाफी करण्याचे सातवे वर्ष जवळ आले आहे.”
म्हणून तुम्ही एखाद्या इस्राएली बांधवाबद्दल वाईट इच्छा दाखवू नका
आणि मदत नाकारू नका. जर तो याहवेहकडे आपले गाऱ्हाणे घेऊन
गेला, तर ते तुमच्याविरुद्ध पाप असे मोजण्यात येईल. 10 तुम्ही त्यांना
उदारपणे दिले पाहिजे आणि त्याबद्दल तुम्ही अंतःकरणात कुरकुर करू
नये; मग तुम्ही जे काही कराल आणि जे कार्य हातात घ्याल त्यात
याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला आशीर्वादित करतील. 11 देशात नेहमीच
गरीब असतील. म्हणून मी तुम्हाला आज्ञा देत आहे की तुमच्या देशातील
इस्राएली बांधव जे गरीब आणि गरजवंत आहेत, त्यांना उदारहस्ते मदत
करावी. 12 जर तुमच्यापैकी कोणी—इब्री पुरुष किंवा इब्री स्त्री—दास
म्हणून स्वतःला विकले आणि सहा वर्षे त्यांनी तुमची सेवा केल्यानंतर
सातव्या वर्षी त्यांना मुक्त करावे. 13 आणि ज्यावेळी तुम्ही त्यांना मुक्त
कराल, त्यावेळी त्यांना रिकाम्या हाताने जाऊ देऊ नका. 14 तर तुम्ही
तुमच्या गुरांच्या कळपातून, तुमच्या खळ्यातून, तुमच्या द्राक्षारसाच्या
कुंडातून उदारहस्ते द्यावे. ज्याप्रकारे याहवेह तुमच्या परमेश्वराने तुम्हाला
आशीर्वादित केले आहे त्याप्रकारे त्यांना द्या. 15 स्मरण ठेवा, तुम्हीही
इजिप्त देशामध्ये गुलाम होता आणि याहवेह तुमच्या परमेश्वराने तुमची
सुटका केली. म्हणूनच मी आज तुम्हाला ही आज्ञा देत आहे. 16 परंतु
तुमच्या दासाची तुमच्यावर आणि तुमच्या कुटुंबावर प्रीती असेल आणि
त्याला तुमच्या घरी राहण्यात आनंद वाटत असेल आणि तो तुम्हाला
म्हणेल की “तुम्हाला सोडून जाण्याची माझी इच्छा नाही,” 17 तर आरी
घेऊन, त्याचा कान दरवाजावर धरून, तो आरपार टोचावा. मग तो तुमचा
कायमचाच दास होईल. तुमच्या दासीचेही असेच करावे. 18 पण जेव्हा
तुम्ही तुमच्या दासदासींना दास्यातून मुक्त कराल, तेव्हा वाईट वाटून
घेऊ नये; कारण लक्षात ठेवा की, सहा वर्षात एखाद्या मोलकऱ्यासाठी
जितका खर्च तुम्हाला आला असता, त्याच्या निम्म्याहूनही कमी खर्चात
त्यांनी तुमचे काम केले आहे आणि त्यांना मुक्त करण्यासाठी तुम्ही जे
काही कराल, त्याबद्दल याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला आशीर्वादित
करतील. 19 तुमच्या गुरांचे आणि शेरडामेंढरांचे प्रथम जन्मलेले नर,
याहवेह तुमच्या परमेश्वरासाठी तुम्ही पवित्र म्हणून वेगळे ठेवावेत.
तुमच्या गुरांचे प्रथमवत्स तुम्ही शेतीच्या कामासाठी वापरू नयेत आणि
तुमच्या मेंढरांच्या प्रथम वत्साची लोकर कातरू नये. 20 प्रत्येक वर्षी
तुम्ही आणि तुमच्या कुटुंबाने याहवेह तुमच्या परमेश्वरासमोर, ते जे
स्थान निवडतील त्या ठिकाणी त्यांचे मांस खावे. 21 तरी, त्या प्राण्यात
काही दोष आढळल्यास, म्हणजे तो लंगडा किंवा आंधळा असेल किंवा
त्यामध्ये कोणतेही व्यंग असले तर याहवेह तुमच्या परमेश्वराला त्याचे
अर्पण करू नये. 22 ते तुम्ही आपल्याच नगरात खावे. हरिण किंवा सांबर
खातात त्याप्रमाणेच, विधीनुसार अशुद्ध व शुद्ध यांनी ते खावे; 23 परंतु
तुम्ही त्याच्या रक्ताचे सेवन करू नये; तर ते पाण्यासारखे जमिनीवर
ओतून द्यावे.

**16** अवीव हा महिना पाळावा आणि याहवेह तुमच्या परमेश्वरासाठी
वल्हांडण सण साजरा करावा, कारण त्यांनी अवीव महिन्यात
तुम्हाला इजिप्त देशामधून रात्रीच्या वेळी बाहेर काढले. 2 याहवेह
तुमच्या परमेश्वराला तुमचे वल्हांडण सणाचे अर्पण म्हणजे शेरडेमेंढरे
किंवा गाईबैल असावे आणि याहवेह त्यांच्या नावाच्या स्थापनेसाठी
जे स्थान निवडतील तिथे त्याचे अर्पण करावे. 3 ते खमीर असलेल्या
भाकरीबरोबर खाऊ नये, परंतु सात दिवस तुम्ही बेखमीर भाकर
खावी, ही तुमच्या क्लेशाची भाकर होय, कारण इजिप्त देश घाईघाईने
सोडताना तुम्हाला खावी लागली होती—इजिप्तमधून तुमची सुटका
झाली त्या वेळेची आठवण तुम्हाला आयुष्यभर राहील. 4 सात
दिवसापर्यंत तुमच्या संपूर्ण देशात खमीर अजिबात दृष्टीस पडू नये.
बली देण्यात आलेले मांस दुसऱ्या दिवसाच्या सकाळपर्यंत राहू देऊ
नये. 5 याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला देत असलेल्या शहरांपैकी
कोणत्याही शहरात तुम्ही वल्हांडणाच्या यज्ञपशूचे अर्पण करावयाचे
नाही, 6 तर ते आपल्या नावाच्या स्थापनेसाठी जे स्थान निवडतील
तिथेच वल्हांडणाचा यज्ञपशू तुम्ही सूर्यास्ताच्या वेळी अर्पावा, कारण
त्याच वेळेला तुम्ही इजिप्त देशामधून बाहेर पडला होता. 7 याहवेह तुमचे
परमेश्वर निवडतील त्या स्थानी ते भाजावे आणि खावे. मग दुसऱ्या
दिवशी सकाळी आपल्या तंबूत परतावे. 8 तुम्ही सहा दिवस बेखमीर
भाकर खावी आणि सातव्या दिवशी याहवेह तुमच्या परमेश्वरासाठी
सभा भरवावी आणि कोणतेही काम करू नये. 9 उभ्या पिकाला
विळा लावल्यापासून तुम्ही सात आठवडे मोजावे. 10 मग याहवेह
तुमच्या परमेश्वरासमोर तुम्ही सप्ताहांचा उत्सव साजरा करावा. यावेळी
तुम्ही तुम्हाला मिळालेल्या आशीर्वादांच्या प्रमाणात याहवेह तुमच्या
परमेश्वराला स्वेच्छार्पणे वाहावीत. 11 याहवेह तुमच्या परमेश्वरासमोर
त्यांनी आपल्या नावासाठी निवडलेल्या पवित्रस्थानी—तुम्ही, तुमचे
पुत्र व कन्या, तुमचे दास व दासी, तुमच्या नगरातील लेवी आणि
परदेशी, तुमच्यामध्ये राहणारे अनाथ आणि विधवा यांनाही उत्सवात

सामील करून घ्यावे. 12 तुम्ही इजिप्त देशामध्ये गुलाम होता, याचे तुम्हाला स्मरण राहावे आणि म्हणून या विधीचे तुम्ही काळजीपूर्वक पालन करावे. 13 तुमच्या खळ्यातील आणि द्राक्षकुंडातील उत्पादन तुम्ही गोळा केल्यानंतर सात दिवस मंडपाचा सण साजरा करा. 14 आनंदोत्सव साजरा करण्यास—तुम्ही, तुमचे पुत्र व कन्या, तुमचे दास व दासी, तुमच्या नगरातील लेवी, परदेशी, तुमच्यामध्ये राहणारे अनाथ आणि विधवा यांनाही उत्सवात सामील करून घ्यावे. 15 हा सण सात दिवस याहवेह तुमचे परमेश्वर जे स्थान निवडतील तिथे साजरा करावा. कारण याहवेह तुमच्या परमेश्वराने तुम्हाला तुमच्या सर्व उत्पन्नात आणि हाती घेतलेल्या तुमच्या कामात आशीर्वादित केले यास्तव तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा. 16 वर्षातून तीन वेळा तुमच्या सर्व पुरुषांनी याहवेह तुमच्या परमेश्वरासमोर हजर व्हावे: बेखमीर भाकरीचा सण, सप्ताहांचा सण व मंडपांचा सण. या प्रत्येक प्रसंगी याहवेहसमोर रिक्तहस्ते येऊ नये: 17 याहवेह तुमच्या परमेश्वराने तुम्हाला ज्याप्रकारे आशीर्वादित केले आहे, त्या प्रमाणात तुम्ही प्रत्येकाने भेटवस्तू आणावी. 18 याहवेह तुमचे परमेश्वर जी सर्व शहरे तुमच्या प्रत्येक गोत्राला देणार आहेत, त्या सर्व शहरांमध्ये न्यायाधीश आणि शास्ते यांची तुम्ही नेमणूक करावी व त्यांनी लोकांचा न्याय नीतीने करावा. 19 भेदभाव किंवा विपरीत असा न्याय कधीही करू नये. लाच घेऊ नये, कारण लाच ही शहाण्या माणसांना आंधळे करते आणि निरपराध्याचे शब्द विपरीत करते. 20 न्याय आणि केवळ न्यायाचीच कास तुम्ही धरावी, जेणेकरून याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला देणार असलेल्या देशाचा ताबा घेऊन तुम्ही तिथे वस्ती करू शकाल. 21 याहवेह तुमच्या परमेश्वराच्या वेदीशेजारी तुम्ही अशेरा मूर्तीचे लाकडी स्तंभ उभारू नका, 22 आणि पूजास्तंभ उभारू नयेत, कारण याहवेह तुमच्या परमेश्वराला त्यांचा अत्यंत तिटकारा आहे.

**17** तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वराला दोष अथवा व्यंग असलेला बैल किंवा मेंढरू यांचे अर्पण कदापि करू नये; कारण त्याचा त्यांना वीट आहे. 2 समजा याहवेहने तुम्हाला दिलेल्या देशातील एखाद्या नगरात तुमच्यातील कोणी पुरुष अथवा स्त्री याहवेह तुमच्या परमेश्वराच्या कराराविरुद्ध त्यांच्या दृष्टीने पातक करेल, 3 आणि त्यांनी माझ्या आज्ञेच्या विरुद्ध अन्य दैवतांची उपासना केली, त्यांना किंवा सूर्य किंवा चंद्र किंवा आकाशातील तारे यांना नमन केले, 4 आणि हे तुमच्या कानी आले, तर ही गोष्ट खरी आहे की नाही याची तुम्ही प्रथम काळजीपूर्वक खात्री करून घ्यावी. इस्राएलात ही घृणास्पद गोष्ट घडली आहे व हे सत्य आहे असे निश्चित झाल्यावर, 5 ही घृणास्पद गोष्ट करणाऱ्या त्या पुरुषाला अथवा स्त्रीला नगराच्या वेशीजवळ घेऊन जावे आणि त्या व्यक्तीला मरेपर्यंत धोंडमार करावा. 6 दोन किंवा तीन साक्षीदारांच्या साक्षीवर एखाद्याला मृत्यू दंड द्यावे लागते, परंतु केवळ एका साक्षीदाराच्या साक्षीवर कोणालाही मृत्यू दंड देऊ नये. 7 ही धोंडमार करण्यासाठी जे साक्षीदार आहेत, त्यांनी प्रथम त्या मनुष्याला दगडमार करावा आणि नंतर इतरांनी त्यात सहभागी व्हावे. अशा रीतीने तुमच्यामधून दुष्टाई घालवून तुम्ही स्वतःला शुद्ध करून घ्यावे. 8 तुमच्या न्यायालयात खटले येतात, ज्यांचा निवाडा करण्याचे काम तुमच्या आवाक्याबाहेरचे असेल—मग ते रक्तपात असो, फिर्याद अथवा मारामारी असोत—याहवेह तुमच्या परमेश्वराने निवडलेल्या स्थानी तुम्ही तो वाद न्यावा. 9 त्याकाळी जे लेवी याजक किंवा न्यायाधीश आपल्या पदावर असतील, त्यांच्याशी तुम्ही मसलत करावी आणि ते त्या वादाचा निर्णय तुम्हाला देतील. 10 ते आपला निर्णय देतील आणि ते सांगतील त्याप्रमाणे अगदी तंतोतंत तुम्ही करावे. याहवेहने निवडलेल्या स्थानी त्यांनी दिलेला निर्णय तुम्ही अगदी तंतोतंत पाळावा. त्यांनी तुम्हाला जे काही करण्यास सांगितले आहे ते सर्व करण्याची काळजी घ्या. 11 ते तुम्हाला जे काही शिकवतील व जो निर्णय ते देतील, त्याच्या उजवीकडे वा डावीकडे न वळता, तो अंमलात आणावा. 12 याहवेह तुमच्या परमेश्वराने निवडलेला, त्यावेळी पदावर असलेल्या न्यायाधीशाचा अथवा याजकांचा निर्णय न पाळण्याचे धाडस जो कोणी करेल, त्याला मृत्यूची शिक्षा दिली जावी. अशा रीतीने इस्राएलातून तुम्हाला ही दुष्टाई काढून टाकता येईल. 13 हे सर्व लोक ऐकतील व भयभीत होतील आणि पुढे ते उन्मत्तपणा करणार नाहीत. 14 याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला देणार असलेल्या देशात तुम्ही याल व तो ताब्यात घ्याल आणि स्वतःशी म्हणाल, “इतर राष्ट्रांना जसा राजा आहे तसा आपल्यालाही असावा,” 15 तर ज्या माणसाची याहवेह तुमचे परमेश्वर निवड करतील, त्यालाच तुम्ही राजा म्हणून नेमावे. तो तुमच्या भाऊबंदांपैकी असावा; परदेशीयाला म्हणजे इस्राएली पैकी नसलेल्यास तुम्ही राजा म्हणून नेमू नये. 16 राजाने स्वतःसाठी घोड्यांचा मोठा संग्रह करू नये किंवा त्याने आपल्यासाठी अधिक घोडे आणण्यासाठी आपली माणसे इजिप्त देशात पाठवू नये, कारण “तुम्ही त्या मार्गाने परत जाऊ नये,” असे याहवेहने तुम्हाला सांगितले आहे. 17 तुमच्या राजाने अनेक स्त्रिया करू नयेत, जेणेकरून त्याचे अंतःकरण बहकून जाईल. त्याने आपल्यासाठी चांदी व सोन्याचा मोठा संग्रह करू नये. 18 जेव्हा तो आपल्या राजासनावर बसेल, तेव्हा त्याने लेवी याजकांच्या जवळ असणाऱ्या नियमशास्त्रामधून हे सर्व नियम व आज्ञा स्वतः लिहून काढाव्यात. 19 ती प्रत नेहमीच त्याच्याजवळ असेल. त्याने त्या नियमांचे दररोज वाचन करावे म्हणजे तो याहवेह त्याच्या परमेश्वराचा आदर करण्यास शिकेल आणि या नियमाचे आणि विधीचे सर्व शब्द काळजीपूर्वक पाळेल 20 व त्याने स्वतःला आपल्या इस्राएली बांधवांपेक्षा अधिक श्रेष्ठ समजू नये आणि नियमांपासून उजवीकडे किंवा डावीकडे वळू नये. मग तो आणि त्याचे वंशज अनेक पिढ्या इस्राएलावर दीर्घकाळ राज्य करतील.

**18** लेवी याजकांना—अर्थात् संपूर्ण लेवी गोत्राला—इतर गोत्रांप्रमाणे इस्राएलात वाटा किंवा वतन नाही. ते याहवेहला केलेल्या होमार्पणावर जगतील, कारण हेच त्यांचे वतन आहे. 2 त्यांच्या इस्राएली भाऊबंदांप्रमाणे त्यांना वतन नसेल; कारण याहवेहच त्यांचे वतन आहेत, जसे त्यांनी त्यांना अभिवचन दिले होते. 3 बैलाचे किंवा मेंढराचे अर्पण करणाऱ्या लोकांकडून मिळणारा याजकांचा हा वाटा आहे:

खांदा, अंतर्गत अवयव आणि डोक्याचे मांस. 4 याशिवाय धान्य,
नवा द्राक्षारस व जैतुनाचे तेल यांच्या उत्पन्नाचे प्रथम भाग आणि
मेंढरांची प्रथम कातरलेली लोकर त्यांना दिली जावी, 5 कारण याहवेह
तुमच्या परमेश्वराने त्यांना आणि त्यांच्या वंशजांना सर्व गोत्रातून पिढ्यान्
पिढ्या निरंतर उभे राहून आणि याहवेहच्या नावाची सेवा करण्यासाठी
निवडले आहे. 6 जर एखाद्या लेवीची इस्राएली राष्ट्राच्या एका नगरातून
दुसऱ्या नगरात जाऊन राहण्याची कळकळीची इच्छा असल्यास आणि
तो याहवेहने निवडलेल्या पवित्रस्थानी येऊन राहिल्यास, 7 याहवेह
त्याच्या परमेश्वराच्या नावाने इस्राएली भूमीत इतर लेवी बांधवांप्रमाणे
याहवेहच्या उपस्थितीत त्याने सेवा करावी. 8 वारसाहक्काने मिळालेली
संपत्ती विकून आलेले पैसे त्याच्याकडे असतील तरी देखील त्याला
इतरांप्रमाणेच सारखा वाटा मिळावा. 9 जेव्हा तुम्ही याहवेह तुमच्या
परमेश्वराने दिलेल्या वचनदत्त देशात याल, तेव्हा त्या देशात राहणाऱ्या
राष्ट्रांच्या अमंगळ चालीरीती शिकू नका. 10 तुमच्यामध्ये आपल्या
पुत्राचा किंवा कन्येचा होम करणारा, शकुनमुहूर्त पाहणारा किंवा चेटके
करणारा, दुष्ट आत्म्यांची मदत घेऊन भविष्य सांगणारा, जादूटोणा
करणारा, 11 अथवा वशीकरण करणारा, अथवा कोणी मध्यस्थ
अथवा मृतात्म्यांना बोलावून त्यांच्याशी मसलत करणारा असू नये.
12 जो कोणी अशी कृत्ये करतो त्याचा याहवेहला तिरस्कार आहे;
आणि त्यांच्या या अमंगळ कृत्यांमुळेच त्या राष्ट्रांना याहवेह तुमचे
परमेश्वर तुमच्यापुढून घालवून देणार आहेत. 13 तुम्ही याहवेह तुमच्या
परमेश्वरापुढे निर्दोषपणे चालावे. 14 जी सर्व राष्ट्रे शकुनमुहूर्त पाहणाऱ्यांचे
व दैवज्ञांची भाकिते ऐकतात त्या राष्ट्रांचा ताबा तुम्ही घेणार आहात,
त्यामधून त्यांना हुसकावून लावा. परंतु याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला
अशा गोष्टी करण्याची परवानगी देत नाहीत. 15 याहवेह तुमचे परमेश्वर
इस्राएलातून तुमच्यासाठी माझ्यासारखा एक संदेष्टा उभा करतील.
तुम्ही त्याचे ऐकावे. 16 कारण होरेबाच्या पर्वताजवळ हीच विनंती तुम्ही
स्वतः याहवेह तुमच्या परमेश्वराजवळ केली होती, जेव्हा तुम्ही विनविले,
“याहवेह आमच्या परमेश्वराचा भयावह आवाज पुन्हा ऐकण्याचा अथवा
त्या पर्वतावर तो भयावह अग्नी पुनरपि पाहण्याचा प्रसंग आम्हावर येऊ
नये, नाहीतर आम्हाला मृत्यू येईल.” 17 तेव्हा याहवेह मला म्हणाले:
“ते जे म्हणतात ते योग्य आहे. 18 त्यांच्या भाऊबंदांतून मी त्यांच्यासाठी
तुझ्यासारखा एक संदेष्टा उभा करेन आणि मी माझी वचने त्याच्या
मुखात घालेन. मी त्याला ज्याकाही आज्ञा देईन त्या सर्व तो त्यांना
सांगेल. 19 तो संदेष्टा जे काही माझ्या नावाने बोलेल आणि जो कोणी
माझे शब्द ऐकणार नाही, त्याची मी स्वतः झडती घेईन. 20 पण जो
संदेष्टा माझ्या नावाने असे काही बोलतो ज्याची मी आज्ञा दिली नाही
किंवा जो संदेष्टा इतर दैवतांच्या नावाने बोलतो त्याला जिवे मारावे.” 21
तुम्ही स्वतःशी म्हणू शकता, “हा संदेश याहवेह बोलले नाहीत, हे आम्ही
कसे ओळखावे?” 22 तर एखाद्या संदेष्ट्याने याहवेहच्या नावाने ज्या
गोष्टीची घोषणा केलेली असेल, ती गोष्ट जर घडून आली नाही किंवा
खरेच तसे होत नसेल तर तो संदेश याहवेहने दिलेला नाही. तो संदेष्टा
उन्मत्तपणे बोलला आहे, तुम्ही त्याचे भय बाळगू नये.

**19** याहवेह तुमचे परमेश्वर जी भूमी तुम्हाला देणार आहेत, तेथील
राष्ट्रांचा ते नाश करतील व जेव्हा तुम्ही त्यांना त्या भूमीतून
घालवून द्याल आणि त्यांच्या शहरात व घरात वस्ती कराल, 2 त्यावेळी
याहवेह तुमचे परमेश्वर जी भूमी तुम्हाला वतन म्हणून देत आहेत,
त्यामधील तीन शहरे तुम्ही वेगळी करून ठेवावी. 3 यातील अंतर
निश्चित करा आणि याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला वतन म्हणून देत
असलेल्या भूमीचे तीन भाग करा, म्हणजे एखाद्याने कोणाची हत्या
केली, तर त्याला स्वतःच्या संरक्षणासाठी त्या नगरात पळून जाता
येईल. 4 जो कोणी एखाद्या व्यक्तीची हत्या करतो आणि आश्रयाच्या
नगरात पळून जातो, त्याच्यासाठी हे नियम असावे: एखाद्या मनुष्याने
मनात काहीही द्वेष नसताना व हेतुपुरस्सर नव्हे, पण चुकून त्याच्या
शेजाऱ्याचा वध केला. 5 एखादा मनुष्य लाकडे तोडण्यासाठी आपल्या
शेजाऱ्याबरोबर अरण्यात गेला आणि झाड तोडत असता त्याने कुऱ्हाड
चालविली व ती दांड्यातून निसटून उडाली व त्याच्या शेजाऱ्याला ती
लागली आणि तो मरण पावला, तर त्या मनुष्याने पळून जाऊन या
तीन शहरांपैकी एका शहराचा आश्रय घेऊन सुरक्षित राहावे. 6 नाही
तर, अशा रक्तपाताबद्दल सूड घेणारा संतापाने त्याचा पाठलाग करेल
व मार्ग लांब असल्याने त्याला वाटेत गाठून ठार मारेल. त्याला मृत
व्यक्तीबद्दल द्वेष नव्हता व त्याने पूर्वनियोजित केल्याशिवाय आपल्या
शेजाऱ्याशी हे कृत्य केले, तो प्राणदंडाच्या शिक्षेस पात्र नव्हता. 7 म्हणून
मी तुम्हाला आज्ञा देतो की तीन शहरे निवडून ती वेगळी करून ठेवावी. 8
याहवेह तुमच्या परमेश्वराने तुमच्या पूर्वजांना वचन दिल्याप्रमाणे तुमच्या
देशाच्या सीमांचा विस्तार करून संपूर्ण देश तुम्हाला दिला, 9 कारण मी
आज तुम्हाला देत असलेल्या या सर्व आज्ञांचे काळजीपूर्वक पालन
केले—तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वरावर प्रीती केली व त्यांच्या मार्गात
आज्ञाधारकपणे चाललात—तर तुम्ही आणखी तीन शहरे निवडावीत.
10 हे करावे, अशा रीतीने याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला वतनादाखल देत
असलेल्या भूमीवर निरपराधी माणसांचे रक्त सांडल्याचा दोष तुमच्यावर
येणार नाही. 11 परंतु कोणी द्वेषाने दबा धरून राहील व आपल्या
शेजाऱ्यावर अचानक प्राणघातक हल्ला करून त्याला ठार करेल आणि
मग यापैकी एखाद्या शहरात पळून जाईल, 12 तर त्या गावाच्या वडील
मंडळीने माणसे पाठवून त्याला धरून आणावे व त्याला वध झालेल्या
माणसाच्या रक्तपाताचा सूड घेणाऱ्याच्या स्वाधीन करावे. 13 त्याला
दया दाखवू नये. इस्राएलास निरपराधी माणसांचे रक्त सांडल्याच्या
दोषापासून शुद्ध करावे, म्हणजे तुमचे सर्व बाबतीत कल्याण होईल. 14
याहवेह तुमचे परमेश्वर जो देश तुम्हाला वतनात देत आहेत, तो ताब्यात
घेतल्यावर, आधीच्या माणसांनी ठेवलेल्या शेजाऱ्याच्या जमीन हद्दीच्या
खुणा कदापि बदलू नये. 15 केवळ एकाच साक्षीदाराच्या साक्षीवर तुम्ही
कोणालाही त्याच्या गुन्ह्याबद्दल किंवा अपराधाबद्दल कदापि दोषी ठरवू
नये. दोन किंवा तीन साक्षीदारांच्या संमतीने प्रकरण स्थापित केले

पाहिजे. 16 एखाद्याने मत्सराने खोटी साक्ष देऊन कोणावर चुकीचा आरोप लावल्यास, 17 त्या दोन्हीही इसमांना याहवेहसमोर, त्यावेळी जबाबदार असलेल्या याजकांपुढे आणि न्यायाधीशांपुढे आणावे. 18 न्यायाधीशांनी त्यांची बारकाईने चौकशी करावी आणि साक्षीदार खोटे बोलत असल्याचे सिद्ध झाले व तो दुसऱ्या इस्राएली बांधवावर खोटा आरोप करीत असेल, 19 तर त्याच्या बांधवाचे जे करण्याचे त्याने मनात योजिले होते, तेच त्याचे करण्यात यावे. अशा रीतीने तुमच्यातील दुष्टाई तुम्ही घालवून टाकावी. 20 इतर लोक हे ऐकतील व भयभीत होतील आणि तुम्हामध्ये अशी दुष्टाई पुन्हा कधीही घडणार नाही. 21 खोट्या साक्षीदाराला तुम्ही दया दाखवू नये: जिवाबद्दल जीव, डोळ्याबद्दल डोळा, दाताबद्दल दात, हाताबद्दल हात, पायाबद्दल पाय.

**20** जेव्हा तुम्ही तुमच्या शत्रूशी युद्ध करण्यास जाल आणि तुमच्यासमोर घोडे व रथ आणि तुमच्या सैन्यापेक्षा फारच मोठे शत्रुसैन्य पाहाल, तेव्हा त्यांना घाबरू नका. कारण ज्यांनी तुम्हाला इजिप्त देशातून सुखरुपपणे बाहेर आणले, ते याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाबरोबर असतील. 2 तुम्ही युद्धाला सुरुवात करण्यापूर्वी, याजकाने पुढे यावे आणि सैन्याला सांगावे. 3 त्याने म्हणावे: “हे इस्राएली लोकहो, ऐका: जेव्हा आज तुम्ही लढण्यासाठी तुमच्या शत्रूविरुद्ध पुढे जात आहात; मन कचरू देऊ नका वा भयभीत होऊ नका; त्यांना घाबरू वा भिऊ नका. 4 कारण याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाबरोबर जात आहेत. ते तुमच्यासाठी तुमच्या शत्रूविरुद्ध लढतील आणि तुम्हाला विजय प्राप्त करून देतील.” 5 नंतर सेनाधिकारी आपल्या सैनिकांना म्हणतील: “तुम्हामध्ये असा कोणी आहे का, की ज्याने नुकतेच नवीन घर बांधले असून, तो अद्याप त्या घरात राहिला नाही? तर त्याने घरी जावे, कारण या युद्धात तो कदाचित मारला गेला तर दुसरा कोणीतरी त्या घरात राहू लागेल. 6 तुम्हापैकी असा कोणी आहे, ज्याने द्राक्षमळा लावला, पण त्याचे फळ अद्याप खाल्लेले नाही? तर त्याने घरी जावे. कदाचित युद्धात तो मारला जाईल आणि दुसरा कोणी त्याचा आनंद घेईन. 7 तुमच्यापैकी कोणाचा वाङ्‌निश्चय झालेला असून त्याचा अद्याप विवाह झाला नाही असा आहे का? त्याने घरी जावे आणि विवाह करावा. कदाचित युद्धात तो मारला जाईल आणि दुसरा कोणी तिच्याशी विवाह करेल.” 8 मग सेनाधिकारी पुढे म्हणेल, “तुम्हापैकी कोणी भेकड वा भित्रा आहे का? जर असेल, तर इतर सैनिकांना घाबरवून टाकण्यापूर्वी त्याने घरी निघून जावे.” 9 जेव्हा सेनाधिकारी आपले बोलणे संपवतील, ते सैनिकांवर सेनापती नियुक्त करतील. 10 युद्ध करण्याकरिता तुम्ही एखाद्या शहरावर हल्ला करण्यास पोहोचला, तर प्रथम तेथील लोकांना शांतीचा प्रस्ताव द्या. 11 जर त्यांनी तो मान्य केला आणि शहराच्या वेशी तुमच्यासाठी उघडल्या, तर त्या शहरातील सर्व रहिवासी तुमचे दास बनतील आणि तुमची सेवा करतील. 12 परंतु त्यांनी तह करण्याचे नाकारले व तुमच्याशी युद्ध करण्याची तयारी केली तर त्या शहराला तुम्ही वेढा घालावा. 13 जेव्हा याहवेह तुमचे परमेश्वर ते शहर तुमच्या ताब्यात देतील, तेव्हा त्यातील सर्व पुरुषांना तुम्ही तलवारीने ठार मारावे. 14 पण त्या शहरातील सर्व स्त्रिया, मुले, गुरे व सर्व संपत्ती तुम्ही स्वतःकरिता ठेवावी. ही संपत्ती जी याहवेह तुमचे परमेश्वर तुमच्या शत्रूकडून तुम्हाला देतील तिचा तुम्ही स्वतःसाठी उपयोग करावा. 15 तुमच्यापासून दूर असलेल्या व निकटवर्ती नसलेल्या राष्ट्राच्या सर्व शहरांच्याबाबतीत तुम्ही असेच वागावे. 16 कारण याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला देत असलेल्या वचनदत्त देशात असणाऱ्या शहरातील कोणालाही तुम्ही जिवंत ठेऊ नये. 17 हिथी, अमोरी, कनानी, परिज्जी, हिव्वी आणि यबूसी—यांचा समूळ नायनाट करावा—ही आज्ञा याहवेह तुमच्या परमेश्वराने तुम्हाला दिली आहे. 18 नाहीतर ते त्यांच्या दैवतांची उपासना करताना ज्या किळसवाण्या चालीरीती करतात त्या तुम्हाला शिकवतील व तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वराविरुद्ध पाप कराल. 19 तुम्ही एखाद्या शहराला बरेच दिवस वेढा द्याल आणि ते हस्तगत करण्यासाठी त्याच्याविरुद्ध युद्ध कराल, तेव्हा तेथील झाडांचा कुऱ्हाड चालवून त्यांचा नाश करू नये. झाडांवरील पाहिजे तेवढी फळे तुम्ही खावी; पण झाडे मात्र तोडू नयेत. झाडे मनुष्य आहेत का त्यांना तुम्ही वेढा घालावा? 20 परंतु जी झाडे फळे न देणारी आहेत हे तुम्ही जाणता, त्यांचा वापर तुमच्याशी युद्ध सुरू असलेले शहर पडेपर्यंत वेढा बांधण्यासाठी करू शकता.

**21** याहवेह तुमच्या परमेश्वराने वतन म्हणून दिलेल्या देशात तुम्ही आल्यावर एखाद्या शेतामध्ये वध झालेला मनुष्यदेह तुम्हाला आढळला व त्याला कोणी मारले हे समजले नाही, 2 तर वडीलजनांनी आणि न्यायाधीशांनी तिथे जाऊन त्या मृतदेहापासून आजूबाजूच्या प्रत्येक नगरापर्यंत अंतर मोजावे. 3 नंतर मृतदेहाच्या सर्वात जवळ असलेल्या नगरातील वडीलजनांनी, कधीही कामास न लावलेली आणि पूर्वी कधीही जू न ठेवलेली अशी एक कालवड घ्यावी 4 आणि तिला वडिलांनी ज्या भूमीची कधी नांगरणी अथवा पेरणी केलेली नाही, अशा सतत पाणी वाहत असलेल्या खोऱ्यात नेऊन तिथे कालवडीची मान मोडावी. 5 यानंतर लेवी वंशातील याजक जवळ येतील, कारण याहवेह तुमच्या परमेश्वराने त्यांना आपल्यासमोर सेवा करण्यासाठी याहवेहच्या नावाने आशीर्वाद देण्यासाठी व वाद आणि हल्ला यांचे निर्णय घेण्यासाठी निवडलेले आहे. 6 मग मृत माणसाच्या देहाच्या सर्वात जवळ असलेल्या नगरातील सगळे वडीलजन आपले हात खोऱ्यात मान मोडून टाकलेल्या त्या कालवडीवर धुतील, 7 आणि त्यांनी हे घोषित करावे, “आमच्या हातांनी हा रक्तपात केलेला नाही किंवा आमच्या डोळ्यांनी तो पाहिलेला नाही. 8 हे याहवेह, ज्या तुमच्या इस्राएली लोकांना तुम्ही सोडविले आहे, त्या लोकांना तुम्ही क्षमा करा व निरपराधी माणसाच्या हत्येचा आरोप त्यांच्यावर ठेवू नका.” मग या रक्तपाताचे प्रायश्चित्त होईल, 9 आणि तुम्ही तुमच्यावरील निरपराधी माणसाच्या रक्तपाताचा दोष घालवून टाकाल, कारण याहवेहच्या दृष्टीने योग्य ते केले आहे. 10 जेव्हा तुम्ही तुमच्या शत्रूविरुद्ध युद्ध करण्यास जाल आणि याहवेह तुमचे परमेश्वर तुमच्या शत्रूंना तुमच्या स्वाधीन करतील आणि त्यांना तुम्ही बंदिवान कराल, 11 आणि त्या बंदिवानात तुम्हाला जर एखादी देखणी तरुणी आढळली आणि तुम्ही तिच्याकडे आकर्षित झालात

तर तिचा तुम्ही तुमची पत्नी म्हणून स्वीकार करावा. 12 तिला तुम्ही तुमच्या घरी न्यावे आणि तिच्या डोक्यावरील केसांचे मुंडण करावे, तिची नखे कापावीत 13 आणि तिने बंदिवासाची सर्व वस्त्रे बाजूला ठेवून द्यावीत आणि नंतर तिने तुमच्या घरी तिच्या आईवडिलांसाठी संपूर्ण महिनाभर शोक करावा. त्यानंतर तुम्ही तिच्याशी संबंध ठेऊ शकता, तुम्ही तिचे पती व ती तुमची पत्नी होईल. 14 जर तुम्हाला ती आवडेनाशी झाली, तर तिला मुक्त करावे व तिला हवे तिथे जाऊ द्यावे, तुम्ही तिला किंमत घेऊन विकू नये, अथवा तिला गुलामासारखे वागवू नये कारण तुम्ही तिची अवहेलना केली आहे. 15 एखाद्या मनुष्याला दोन पत्नी असतील व तो एकीवर प्रीती करीत असेल व दुसरीवर करीत नसेल आणि त्या दोघींनाही त्याच्यापासून पुत्र झाले असतील आणि जी त्याला प्रिय नाही तिचा पुत्र ज्येष्ठ असेल, 16 तर जेव्हा तो आपल्या पुत्रांना आपली संपत्ती त्याचे वतन म्हणून वाटून देईल, तेव्हा जो खरा ज्येष्ठपुत्र असून नावडत्या पत्नीचा पुत्र आहे, त्याला डावलून, धाकट्या पुत्राला, जो त्याच्या आवडत्या पत्नीचा आहे, त्याला आपल्या प्रथम पुत्राचा अधिकार देऊ नये. 17 आपल्या परंपरेप्रमाणे त्याने आपल्या सर्वात ज्येष्ठ पुत्राला दुप्पट वाटा द्यावा, कारण तो त्याच्या पौरुषाचे प्रथमफळ आहे. तो जरी नावडत्या पत्नीचा पुत्र असला, तरीही ज्येष्ठ पुत्राचा हक्क त्याचाच आहे. 18 जर एखाद्या मनुष्याला हट्टी व बंडखोर पुत्र असेल, जो आपल्या आईवडिलांची आज्ञा पाळत नसेल आणि त्यांनी शिस्त लावण्याचा प्रयत्न केला तरी तो त्यांचे ऐकत नसेल, 19 तर त्याच्या आईवडिलांनी त्याला धरून नगराच्या वेशीवर वडील मंडळीपुढे घेऊन जावे. 20 त्यांनी वडील मंडळीपुढे सांगावे, “हा आमचा पुत्र हट्टी आणि बंडखोर आहे. तो आमच्या आज्ञा पाळत नसून आमचे ऐकत नाही. तो खादाड व मद्यपी आहे.” 21 मग त्या नगरातील सर्व लोकांनी त्याला धोंडमार करून ठार मारावे. अशा रीतीने तुमच्यामधील दोष तुम्ही घालवून टाकावे म्हणजे सर्व इस्राएली लोक हे ऐकतील आणि घाबरतील. 22 जर एखाद्या मनुष्याने असा काही गंभीर स्वरुपाचा गुन्हा केला ज्याची शिक्षा मृत्युदंड आहे व त्याला मृत्युदंड देण्यात आला आणि त्याला झाडावर टांगण्यात आले असेल, 23 तर त्याचा मृतदेह रात्रभर तिथे ठेवू नये, तर त्याच दिवशी त्याचे दफन करावे; कारण जो कोणी खांबावर टांगलेला असेल, त्याच्यावर परमेश्वराचा शाप असतो. म्हणून याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला जो देश वतन म्हणून देत आहे, तो तुम्ही भ्रष्ट करू नये.

**22** आपल्यापैकी एखाद्या इस्राएली मनुष्याचा बैल अथवा मेंढरू दूरवर भटकलेला तुम्ही पाहिला, तर त्याच्याकडे दुर्लक्ष करू नये; त्याला त्याच्या मालकाकडे घेऊन जावे. 2 जर मालक तुमच्याजवळ राहत नसतील किंवा तो कोण आहे हे तुम्हाला ठाऊक नसेल, तर तो तुम्ही तुमच्या घरी न्यावा व त्याचा मालक त्याला शोधीत तिथे येईपर्यंत त्याला ठेवावे. मग त्याच्या मालकाला तो परत करावा. 3 जर तुम्हाला त्यांचे गाढव किंवा झगा किंवा त्यांनी हरवलेले इतर काही सापडले तर असेच करा. त्याकडे दुर्लक्ष करू नका. 4 जर तुमच्या इस्राएली बांधवाचे गाढव किंवा बैल मार्गात घसरून पडलेले दिसले तर त्याच्याकडे दुर्लक्ष करू नये. त्याला आपल्या पायांवर उभे करण्यास त्याच्या मालकाला मदत करावी. 5 कोणत्याही स्त्रीने पुरुषाचा पोशाख घालू नये किंवा कोणत्याही पुरुषाने स्त्रीचा पोशाख घालू नये, कारण याहवेह तुमच्या परमेश्वराच्या दृष्टीने असे करणे घृणित आहे. 6 जर तुम्हाला मार्गाच्या कडेला किंवा झाडावर किंवा जमिनीवर पक्ष्याचे घरटे आढळले आणि त्यात मादी पिलांवर किंवा अंड्यांवर बसलेली असेल, तर त्या मादीला पिलांसोबत धरू नये. 7 तुम्हाला हवी असतील तर तुम्ही तिची पिल्ले घेऊ शकता, त्यांच्या आईस मात्र तुम्ही अवश्य जाऊ द्यावे; म्हणजे तुमचे कल्याण होईल व तुम्हाला दीर्घायुष्य लाभेल. 8 जेव्हा तुम्ही नवीन घर बांधाल तेव्हा धाब्याला कठडा बांधवा, म्हणजे कोणीही धाब्यावरून पडल्यास मनुष्य हत्येचा दोष तुमच्या घरावर येऊ नये. 9 तुमच्या द्राक्षमळयात तुम्ही दोन प्रकारचे बी पेरू नये; तसे केल्यास, दोन्हीही पिकेच नव्हे तर दोन्ही बीजे देखील दूषित समजल्या जातील. 10 एकाच नांगराला बैल व गाढव यांना एकत्र जुंपून नांगरणी करू नये. 11 लोकर व ताग यांचे मिश्रण असलेली वस्त्रे घालू नका. 12 आपल्या अंगरख्याच्या चारही कोपऱ्यांना गोंडे लावावीत. 13 एखाद्या पुरुषाने पत्नी केली आणि तिच्याशी समागम केल्यानंतर ती त्याला आवडेनाशी झाली 14 आणि तिची निंदा केली आणि तिच्या नावाची बदनामी करून म्हटले, “मी या स्त्रीसोबत लग्न केले, पण जेव्हा मी तिच्याजवळ गेलो तेव्हा तिच्यात मला कौमार्याबद्दलचा पुरावा आढळला नाही,” 15 तर मुलीच्या आईवडिलांनी तिच्या कौमार्याबद्दलचा पुरावा, त्या नगराच्या वेशीत वडील मंडळीपुढे साजरा करावा. 16 तिच्या वडिलांनी त्यांना असे सांगावे, “मी माझी कन्या या मनुष्याला त्याची पत्नी व्हावी म्हणून दिली, परंतु आता ती त्याला आवडत नाही. 17 आता त्याने तिची निंदा केली आणि म्हणाला, ‘मला तुमच्या कन्येमध्ये कौमार्याबद्दलचे पुरावे आढळले नाही.’ पण हे पाहा आमच्या कन्येच्या कौमार्याबद्दलचा पुरावा.” मग तिच्या आईवडिलांनी ते वस्त्र नगराच्या वडीलांपुढे सादर करावे, 18 आणि मग नगरातील वडील मंडळीने त्या पुरुषाला घ्यावे आणि त्याला शिक्षा द्यावी. 19 शंभर चांदीची नाणी दंडादाखल त्याच्याकडून वसूल करावी आणि मुलीच्या वडिलांना द्यावीत, कारण त्या तरुणाने एका इस्राएली कुमारिकेची बदनामी केली. ती त्याची पत्नी म्हणून राहील; तो जिवंत असेपर्यंत त्याने तिला कदापि घटस्फोट देऊ नये. 20 परंतु आरोप सत्य असल्यास आणि तिच्या कौमार्याबद्दलचा पुरावा आढळला नाही, 21 तर मात्र नगराच्या वडिलांनी त्या कन्येला तिच्या वडिलांच्या घराच्या दारापर्यंत न्यावे व तिथे नगरातील लोकांनी तिला मरेपर्यंत धोंडमार करावी. आपल्या आईवडिलांच्या घरात राहत असताना, व्यभिचारिणी होऊन तिने इस्राएलात घृणास्पद कृत्य केले आहे. अशा रीतीने तुमच्यामधील दोष काढून टाकण्यात यावे. 22 एखादा पुरुष दुसऱ्या पुरुषाच्या स्त्रीबरोबर व्यभिचार करीत असताना आढळला, तर तिच्यासोबत झोपलेला पुरुष आणि स्त्री दोघांनाही जिवे मारावे. अशा रीतीने इस्राएलमधून कलंक दूर करून शुद्ध करावे. 23 ज्या कुमारिकेचा

वाङ्‌निश्चय झालेला आहे, अशा कुमारिकेला जर एखाद्या नगरात एखाद्या
पुरुषाने भ्रष्ट केले, 24 तर त्या दोघांनाही नगराच्या वेशीच्या बाहेर घेऊन
जावे आणि मरेपर्यंत धोंडमार करावा—त्या कुमारिकेला अशासाठी की
नगरात असताना तिने मदतीसाठी आरडाओरडा केला नाही आणि त्या
पुरुषाला अशासाठी की त्याने दुसऱ्या पुरुषाच्या स्त्रीला भ्रष्ट केले. अशा
रीतीने तुमच्यामधून कलंक दूर करून शुद्ध करावे. 25 परंतु एखाद्या
पुरुषाने वाङ्‌निश्चय झालेल्या कुमारिकेला बाहेर शेतात गाठून तिच्यावर
बलात्कार केला, तर असे करणाऱ्या पुरुषाला ठार मारावे. 26 त्या
कुमारिकेला काही करू नये; तिला मरणदंड मिळावा असे पाप तिने केले
नाही. एखाद्याने आपल्या शेजाऱ्यावर हल्ला करून त्याला ठार मारावे
त्याप्रमाणे हे आहे, 27 कारण त्या पुरुषाने त्या एकट्या कुमारिकेला
शेतात शोधून काढली आणि मदतीसाठी ती ओरडलीच असेल, परंतु ते
ऐकण्यासाठी आणि तिची सुटका करण्यासाठी त्या ठिकाणी कोणीही
नव्हते. 28 जर एखाद्या पुरुषाने जिचा वाङ्‌निश्चय झालेला नसेल, अशा
कुमरिकेवर बलात्कार केला आणि ते करीत असताना तो आढळला, 29
तर त्याने मुलीच्या वडिलांना पन्नास चांदीची नाणी दंड म्हणून दिली
पाहिजेत आणि त्या कुमारिकेशी विवाह केला पाहिजे, कारण त्याने
तिला भ्रष्ट केले. तो जिवंत असेपर्यंत तिला घटस्फोट देऊ शकत नाही.
30 कोणाही पुरुषाने आपल्या पित्याच्या पत्नीशी विवाह करू नये; त्याने
आपल्या पित्याच्या अंथरुणास भ्रष्ट करू नये.

**23** जो भग्नांड आहे किंवा ज्याच्या लिंगाचा छेद झाला आहे त्याने
याहवेहच्या सभेत प्रवेश करू नये. 2 निषिद्ध विवाहबंधनापासून
जन्मलेला अथवा त्यांच्या वंशातल्या अगदी दहाव्या पिढीपर्यंत कोणीही
याहवेहच्या सभेत प्रवेश करू नये. 3 तसेच दहाव्या पिढीनंतर कोणाही
अम्मोनी अथवा मोआब्याने याहवेहच्या सभेत कधीही प्रवेश करू
नये. 4 कारण जेव्हा तुम्ही इजिप्त देशातून बाहेर आला, तेव्हा हे
मार्गात अन्न व पाणी घेऊन तुम्हाला भेटण्यास आले नाहीत, एवढेच
नव्हे तर अराम-नहराईम येथील पथोर नगरात राहणारा बौराचा पुत्र
बलामास द्रव्य देऊन तुम्हाला शाप देण्यासाठी आणले. 5 तरीही
याहवेह तुमच्या परमेश्वराने बलामाचे ऐकले नाही, परंतु त्यांनी त्याच्या
शापाचे तुमच्यासाठी आशीर्वादात रूपांतर केले, कारण याहवेह तुमचे
परमेश्वर तुम्हावर प्रीती करतात. 6 म्हणून तुम्ही जिवंत असेपर्यंत
त्यांच्याशी तहाची मैत्री करण्याचा कधीही प्रयत्न करू नये. 7 परंतु
एदोमी लोकांना तुच्छ लेखू नका, कारण एदोमी तुमचे भाऊबंद आहेत.
इजिप्तच्या लोकांचा तिरस्कार करू नका कारण त्यांच्या देशात तुम्ही
परदेशी म्हणून राहिला होता. 8 त्यांच्यात जन्मलेल्या तिसऱ्या पिढीच्या
संततीस याहवेहच्या सभेत प्रवेश करण्यास हरकत नाही. 9 जेव्हा
तुम्ही तुमच्या शत्रूविरुद्ध तळ ठोकाल, तेव्हा सर्व अशुद्ध गोष्टींपासून
दूर राहावे. 10 एखादा पुरुष स्वप्नावस्थेमुळे रात्रीतून अशुद्ध झाला
असेल, तर त्याने छावणीबाहेर जावे आणि बाहेरच राहावे. 11 पण जशी
संध्याकाळ होईल तसे त्याने स्नान करावे व सूर्यास्तानंतर छावणीत
परत यावे. 12 नैसर्गिक विधी करण्यासाठी लागणारी जागा छावणीच्या
बाहेर असावी. 13 तुमच्या हत्यारांमध्ये कुदळ अवश्य असावी आणि
बहिर्दिशेच्या वेळी आपल्या मलमूत्रासाठी त्याने खड्डा खोदावा व नंतर
झाकून टाकण्यासाठी तिचा वापर करावा. 14 तुमचे रक्षण करण्यासाठी
आणि तुमच्यापुढे तुमच्या शत्रूंना तुमच्या हाती देण्यासाठी, याहवेह तुमचे
परमेश्वर तुमच्या छावणीमध्ये फिरत असतात. तुमची छावणी पवित्र
असली पाहिजे, यासाठी की त्यांच्या दृष्टीस अमंगळता पडल्यास ते
तुमच्यापासून दूर निघून जातील. 15 एखादा गुलाम आपल्या धन्यापासून
पळून तुमच्याकडे आला असेल, तर तुम्ही त्याला त्याच्या धन्याच्या
स्वाधीन करू नका. 16 त्यांना जे गाव आवडेल, त्या गावात तुमच्यामध्ये
त्यांना राहू द्यावे. तुम्ही त्यांना छळू नये. 17 इस्राएलातील कन्या वा
पुत्रांनी मंदिरातील देवदासी बनू नये. 18 वेश्येच्या कमाईचा अथवा
पुमैथुन करणाऱ्याच्या मिळकतीचा पैसा याहवेह तुमच्या परमेश्वराच्या
मंदिरात नवस फेडण्यासाठी कोणीही आणू नये; कारण हे दान व दान
देणारी व्यक्ती या दोन्हीही गोष्टी याहवेह तुमच्या परमेश्वराच्या दृष्टीने
ओंगळ होत. 19 तुमच्या इस्राएली बंधूला दिलेल्या कर्जावर व्याज
मागू नका, मग ते कर्ज पैशाच्या, अन्नाच्या अथवा दुसऱ्या कशाच्याही
रूपाने दिलेले असो, त्याच्यावर व्याज मागू नका. 20 तुम्ही एखाद्या
परदेशीकडून व्याज घेऊ शकता, पण कोणाही इस्राएली बांधवाकडून
घेऊ नका, म्हणजे याहवेह तुमचे परमेश्वर जेव्हा तुम्हाला वतन म्हणून
ज्या देशात आणतील, तेव्हा तुम्ही केलेल्या प्रत्येक कार्याला आशीर्वाद
देतील. 21 तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वराला एखादा नवस करता, तेव्हा
तो फेडण्यास विलंब लावू नये, कारण नवसांची फेड तत्परतेने करावी,
अशी याहवेह तुमच्या परमेश्वराची अपेक्षा आहे. तसे न केल्याने तुम्ही
पापाचे दोषी ठराल. 22 परंतु तुम्ही नवस केला नसेल, तर ते मात्र पाप
नाही. 23 तुमच्या ओठांनी तुम्ही जे काही वचन दिले असेल, त्याप्रमाणे
तुम्ही अवश्य केले पाहिजे; कारण तो नवस तुम्ही मुखाने, स्वखुशीने
याहवेह तुमच्या परमेश्वराला केला होता. 24 तुम्ही तुमच्या शेजाऱ्याच्या
द्राक्षमळ्यात गेलात, तर हवी तितकी द्राक्षे तुम्ही खावी, परंतु टोपलीत
घालून तुम्ही काहीही नेऊ नये. 25 आपल्या शेजाऱ्याच्या उभ्या पिकात
तुम्ही गेलात, तर हवी तेवढी कणसे तुम्ही हाताने मोडून खावी, पण
त्याच्या उभ्या पिकास मात्र विळा लावू नये.

**24** कोणा पुरुषाने एखाद्या स्त्रीसोबत विवाह केला, परंतु नंतर तो
तिच्यासोबत संतुष्ट होत नाही आणि त्याला तिच्यात काही दोष
आढळला, तर त्याने सूटपत्र लिहून तिच्या हाती द्यावे आणि तिला
आपल्या घरातून घालवून द्यावे, 2 आणि त्याचे घर सोडल्यानंतर ती
दुसऱ्या पुरुषाची पत्नी होते, 3 आणि तिच्या दुसऱ्या पतीलाही ती
आवडली नाही व त्यानेही तिच्या हाती सूटपत्रे देऊन तिला घालवून दिले
किंवा तो मरण पावला, 4 तर तिच्या पहिल्या पतीने तिला पत्नी म्हणून
पुन्हा स्वीकारू नये, कारण ती भ्रष्ट झालेली आहे. अशा स्त्रीशी विवाह
करणे ही गोष्ट याहवेहच्या दृष्टीने अमंगळ अशी आहे. याहवेह तुमचे
परमेश्वर तुम्हाला वतन म्हणून देत असलेल्या देशावर पाप आणू नका.
5 नुकतेच विवाह झालेल्या पुरुषाला सैन्याबरोबर मोहिमेवर पाठवू नये

किंवा त्याच्यावर इतर कुठलीही जबाबदारी टाकू नये. त्याला वर्षभर
घरी राहण्याची मोकळीक असावी आणि त्याने घरी राहून आपल्या
विवाहित पत्नीला आनंदित करावे. 6 तुम्ही एखाद्या मनुष्याला काही
उसने देता—तेव्हा जाते किंवा जात्याची तळी गहाण म्हणून ठेवून घेऊ
नये—कारण अशी वस्तू गहाण ठेवणे म्हणजे त्या मनुष्याचे जीवितच
गहाण ठेवणे होय. 7 जर एखाद्याने आपल्याच इस्राएली बांधवाचे
अपहरण केले आणि त्याला एखाद्या गुलामाप्रमाणे वागविले किंवा तो
विकून टाकताना त्याला धरण्यात आले, तर अपहरण करणाऱ्याला
अवश्य जिवे मारावे. अशा रीतीने तुमच्यातील दुष्कर्म तुम्ही दूर करावे.
8 कुष्ठरोगाच्या बाबतीत लेवी याजकाने तुम्हाला सांगितल्याप्रमाणे
वागण्याची काळजी घ्या. मी त्यांना दिलेल्या आज्ञा तुम्ही काळजीपूर्वक
पाळा. 9 इजिप्तमधून येताना याहवेह तुमच्या परमेश्वराने मिर्यामचे
काय केले, याची तुम्ही आठवण ठेवावी. 10 जेव्हा तुम्ही आपल्या
शेजाऱ्याला काही उसने देता, तर तारण घेण्यासाठी तुम्ही त्याच्या
घरात शिरू नये, 11 तुम्ही बाहेर उभे राहावे आणि ज्या शेजाऱ्याला
तुम्ही कर्ज देत आहात त्याने तुम्हाला बाहेर तारण आणून द्यावे. 12 जर
शेजारी गरीब असेल, तर तुम्ही त्याने तारण म्हणून दिलेले पांघरूण
अंगावर घेऊन झोपू नका. 13 गहाणादाखल त्याने आपले पांघरूण
दिले असेल व तर सूर्यास्तसमयी ते त्याला परत करावे म्हणजे ते
पांघरूण अंगावर घेऊन तो झोपेल. तो तुमचे आभार मानेल आणि
याहवेह तुमच्या परमेश्वराच्या दृष्टीने तुमचे हे कृत्य नीतिमत्व असे ठरेल.
14 गरीब व गरजवंत मजुराचा तुम्ही गैरफायदा घेऊ नये, मग तो तुमचा
इस्राएली बांधव असो किंवा तुमच्या गावात राहणारा परदेशी असो.
15 त्यांना दररोज सूर्य मावळण्यापूर्वीच त्यांची मजुरी द्यावी, कारण
ते गरीब आहेत आणि ते त्या मजुरीवर अवलंबून आहेत. नाहीतर ते
तुमच्याविरुद्ध याहवेहकडे गाऱ्हाणे करतील व मग ते तुमच्याविरुद्ध पाप
असे मोजण्यात येईल. 16 आईवडिलांना त्यांच्या मुलांच्या कारणामुळे
जिवे मारू नये, तसेच आईवडिलांच्या कारणामुळे त्यांच्या मुलांना जिवे
मारू नये. प्रत्येकजण स्वतःच्या पापासाठी मरतील. 17 परदेशी आणि
अनाथांना यथायोग्य न्याय दिला पाहिजे, किंवा विधवेची वस्त्रे गहाण
म्हणून कधीही घेतली जाऊ नये. 18 तुम्ही इजिप्त देशात गुलाम होता
आणि याहवेह तुमच्या परमेश्वराने त्यातून तुमची सुटका केली, याची
तुम्ही सतत आठवण ठेवावी. म्हणूनच मी तुम्हाला हे करण्याची आज्ञा
देत आहे. 19 पिकांची कापणी करीत असताना तुम्ही बांधून ठेवलेली
एखादी पेंढी शेतातून आणावयाचे विसरलात, तर ती आणण्यासाठी
तुम्ही माघारी जाऊ नये, तर परदेशी, अनाथ व विधवा यांच्यासाठी ती
तिथेच राहू द्यावी, म्हणजे याहवेह तुमचे परमेश्वर तुमच्या हाताच्या सर्व
कार्यात आशीर्वाद देतील. 20 तुम्ही तुमच्या जैतून वृक्षांवरील फळे
काढण्याकरिता झोडपणी कराल, तेव्हा तुम्ही एकाच फांदीवर दोनदा
प्रहार करू नये. त्या फांदीवर जी काही फळे राहतील ती परदेशी, अनाथ
व विधवा यांच्यासाठी राहू द्यावी. 21 जेव्हा तुम्ही तुमच्या द्राक्षमळयातील
द्राक्षे काढता तेव्हा परत वेलींवर जाऊ नका. तर राहिलेली द्राक्षे परदेशी,
अनाथ व विधवा यांच्यासाठी तशीच राहू द्यावीत. 22 इजिप्त देशामध्ये
तुम्ही गुलाम होता याची आठवण ठेवावी म्हणून मी तुम्हाला हे करण्याची
आज्ञा देत आहे.

**25** लोकांमध्ये वाद उपस्थिती झाला आणि न्याय मागण्यासाठी
त्यांनी न्यायालयात जावे व न्यायाधीशाने त्यांचा निवाडा करावा.
जो निर्दोष असेल त्याला निर्दोषी ठरवावे व जो दोषी असेल त्याला
दोषी ठरवावे. 2 दोषी मनुष्य जर फटक्यांच्या शिक्षेस पात्र ठरला,
तर न्यायाधीशाने त्याला पालथे पाडावे आणि आपल्यादेखत त्याच्या
अपराधाप्रमाणे मोजून फटके मारावेत, 3 परंतु न्यायाधीशाने त्याला
चाळीस पर्यंतच फटके मारावेत, अधिक फटके मारू नयेत. नाहीतर,
अधिक फटके मारल्यास, तुमच्या बंधूंची तुमच्यादेखत अप्रतिष्ठा होईल.
4 बैल धान्याची मळणी करीत असताना त्याला मुसके बांधू नको. 5
भाऊ एकत्र राहत असतील व त्यातील एकजण निपुत्र मरण पावला, तर
त्याच्या विधवेने कुटुंबाबाहेर परक्याशी विवाह करू नये. तिच्या पतीच्या
भावाने तिच्याशी विवाह करावा आणि तिचा स्वीकार करावा आणि
तिच्याप्रती दिराचे कर्तव्य पूर्ण करावे. 6 तिला जन्मलेल्या पहिल्या
पुत्राला मृत भावाचे नाव द्यावे, जेणेकरून त्याचे नाव इस्राएलमधून
पुसले जाणार नाही. 7 परंतु याबाबतीत मृत माणसाच्या भावाने त्याच्या
मृत भावाच्या विधवेशी विवाह करण्यास नकार दिला, तर तिने त्या
नगराच्या वेशीवर वडीलजनांकडे जाऊन त्यांना म्हणावे, “माझ्या पतीचा
भाऊ आपल्या भावाचे नाव इस्राएलात पुढे चालविण्यास तयार नाही.
माझ्याप्रति तो आपले दिराचे कर्तव्य पार पाडणार नाही.” 8 तेव्हा
त्याच्या नगरातील वडीलजनांनी त्याला बोलावून घ्यावे आणि त्याच्याशी
बोलणी करावी. “मला त्या बाईशी लग्न करावयाचे नाही,” असे जर
तो हट्टीपणाने म्हणाला. 9 तर त्या विधवेने सर्व वडीलजनासमोर
त्याच्याकडे जावे, त्याच्या पायातील पायतण काढून घ्यावे आणि त्याच्या
तोंडावर थुंकून म्हणावे, “जो मनुष्य आपल्या भावाचे घर चालविण्यास
नकार देतो, त्याची अशीच गत होते.” 10 त्याच्या घराण्याचा उल्लेख
इस्राएलातील पायतण काढलेल्या पुरुषाचे घराणे असा केला जाईल. 11
समजा दोन पुरुष एकमेकात मारामारी करीत असताना त्या दोघांपैकी
एकाची पत्नी आपल्या पतीला मदत करण्यासाठी येते आणि दुसऱ्या
मनुष्याचे वृषण पकडते, 12 तर काहीही दयामाया न दाखविता तुम्ही
तिचा हात कापून टाकावा. 13 तुमच्या झोळीत तुम्ही वेगवेगळी वजने
ठेऊ नये—एक जड व एक हलके. 14 तुमच्या घरात दोन वेगवेगळी मापे
वापरू नये—एक मोठे व एक लहान. 15 तुम्ही तुमच्याजवळ तंतोतंत
आणि प्रामाणिक वजने आणि मापे बाळगावी, म्हणजे याहवेह तुमचे
परमेश्वर जो देश तुम्हाला देणार आहे, त्या देशात तुम्हाला दीर्घायुष्य
लाभेल. 16 कारण याहवेह तुमचे परमेश्वर या गोष्टी अप्रामाणिकपणे
करणाऱ्यांचा तिरस्कार करतात. 17 तुम्ही इजिप्त देशातून बाहेर
आल्यानंतर अमालेक लोक तुमच्याशी कसे वागले, हे स्मरण ठेवा. 18
जेव्हा तुम्ही दुर्बल व थकलेले होता, तेव्हा त्यांनी तुम्हाला मार्गात गाठले
आणि मागे राहिलेल्यांवर हल्ला केला; त्यांना परमेश्वराचे भय नव्हते. 19

जेव्हा वतन म्हणून देणाऱ्या देशातील तुमच्या सर्व शत्रूपासून याहवेह
तुमचे परमेश्वर तुम्हाला विश्रांती देतील, तेव्हा तुम्ही या अमालेक लोकांचे
नाव पृथ्वीवरून पूर्णपणे नामशेष केले पाहिजे. हे तुम्ही कधीही विसरू
नये!

**26** जेव्हा तुम्ही याहवेह तुमचे परमेश्वराने वतन दिलेल्या देशात प्रवेश
कराल, तो जिंकून त्याचा ताबा घ्याल आणि तिथे वस्ती कराल,
2 तेव्हा याहवेह तुमच्या परमेश्वराने दिलेल्या भूमीतील प्रत्येक पिकाचे
प्रथम उत्पन्न एका टोपलीत आणावे. नंतर याहवेह तुमचे परमेश्वर
आपल्या नावासाठी जे वसतिस्थान निवडून देतील त्या ठिकाणी तुम्ही
जावे 3 आणि त्यावेळी सेवा करीत असलेल्या याजकास म्हणा, "याहवेह
तुमच्या परमेश्वराला आज मी जाहीर करतो, की आमच्या पूर्वजांना
वचन देऊ केलेल्या देशात मी आलो आहे." 4 मग याजक ती टोपली
तुमच्या हातून घेऊन याहवेह तुमच्या परमेश्वराच्या वेदीपुढे ठेवेल. 5 नंतर
तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वरासमोर म्हणावे: "आमचे पूर्वज अरामी, हे
निर्वासित होऊन आश्रयासाठी इजिप्त देशास गेले. ते संख्येने अगदी
थोडे होते, पण इजिप्त देशात ते एक विशाल, बलाढ्य आणि थोर राष्ट्र
बनले. 6 इजिप्त देशातील लोकांनी आम्हाला वाईट रीतीने वागविले,
आमच्यावर जुलूम केला व कठोर परिश्रम लादले 7 तेव्हा आम्ही
याहवेहचा, आमच्या पूर्वजांच्या परमेश्वराचा धावा केला आणि याहवेहने
आमचे गाऱ्हाणे ऐकले, आमच्या अडचणी जाणल्या आणि आमच्यावर
होत असलेला जुलूम व अत्याचार त्यांनी पाहिला. 8 मग याहवेहने
महान चमत्कारांनी, सामर्थ्यशाली बाहुबलाने व पसरलेल्या हातांनी
आणि भयावह चिन्ह व चमत्कार करून आम्हाला इजिप्त देशातून बाहेर
आणले. 9 त्यांनी आम्हाला या ठिकाणी आणले आणि दुधामधाचे प्रवाह
वाहत असलेला हा देश आम्हाला दिला; 10 आता, हे याहवेह परमेश्वरा,
तुम्ही जी भूमी आम्हाला दिली आहे, त्यात उगविलेल्या धान्याचे प्रथम
उत्पन्न आम्ही आणले आहे." नंतर ते अर्पण तुम्ही याहवेह तुमच्या
परमेश्वरापुढे ठेवावे व त्यांची उपासना करावी. 11 त्यानंतर याहवेह
तुमच्या परमेश्वराने ज्या सर्व चांगल्या गोष्टी तुम्हाला दिल्या, त्याबद्दल
तुम्ही, लेवी व परदेशी लोक या सर्वांनी मिळून आनंदोत्सव साजरा
करावा. 12 तुम्ही तुमच्या सर्व उत्पन्नाचा दशांश तिसऱ्या वर्षी, म्हणजे
दशांशाच्या वर्षी लेवी वंशजांना, परदेशी लोकांना, अनाथांना आणि
विधवांना द्यावा, म्हणजे तुमच्या नगरात ते खाऊन तृप्त होतील. 13 मग
तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वरासमोर सांगावे, "मी माझ्या घरातून पवित्र
हिस्सा काढला आहे. लेवी वंशजांना, परदेशीयांना, अनाथांना आणि
विधवांना तुमच्या आज्ञेप्रमाणे दिला आहे. मी कोणतीही आज्ञा मोडली
नाही किंवा तुमचा कोणताही नियम विसरलो नाही. 14 मी विलाप
करीत असताना त्या पवित्र वाट्यातील काहीही खाल्ले नाही, धार्मिक
संस्कारांच्या दृष्टीने अशुद्ध असताना ते घराच्या बाहेर नेले नाही किंवा
एखाद्या मृत व्यक्तीला अर्पण केले नाही. हे माझ्या याहवेह परमेश्वरा,
मी तुमचे आज्ञापालन केले आहे. तुम्ही सांगितलेले सर्वकाही मी केले
आहे. 15 म्हणून हे परमेश्वरा, स्वर्गातील तुमच्या पवित्र निवासस्थानातून
तुम्ही खाली पाहा आणि आमच्या पूर्वजांना वचन दिल्याप्रमाणे जो
दुधामधाचे प्रवाह वाहणारा असा देश तुम्ही आम्हाला दिला आहे त्याला
व आम्हा इस्राएली लोकांना आशीर्वादित करा." 16 आज याहवेह तुमचे
परमेश्वर तुम्हाला ज्या आज्ञा आणि विधी देत आहेत, त्या आज्ञा व
विधी यांचे तुम्ही पूर्ण मनाने व पूर्ण जिवाने पालन करावे; 17 कारण
ते याहवेह तुमचे परमेश्वर आहेत, असे तुम्ही आज जाहीरपणे मान्य
केले आहे; त्यांचे नियम आणि विधी पाळण्याचे आणि ते जे काही
सांगतील ते करण्याचे तुम्ही वचन दिले आहे. 18 आणि याहवेहनेही
वचन दिल्याप्रमाणे स्वतःचे लोक व त्यांचा मोलवान ठेवा म्हणून त्यांनी
आज तुमचा स्वीकार केला आहे व तुम्ही त्यांच्या सर्व आज्ञा अवश्य
पाळाव्या. 19 ते तुम्हाला इतर कोणत्याही राष्ट्रापेक्षा थोर करतील आणि
तुम्हाला प्रशंसा, किर्ती व सन्मान प्राप्त होतील आणि त्यांनी वचन
दिल्यानुसार तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वराचे पवित्र लोक व्हाल.

**27** नंतर मोशे व इस्राएलांच्या वडीलजनांनी लोकांना आज्ञापिले:
"ज्या आज्ञा आज मी तुम्हाला सांगत आहे त्या तुम्ही पाळाव्या.
2 जेव्हा तुम्ही यार्देन नदी पार करून याहवेह तुमच्या परमेश्वराने दिलेल्या
वचनदत्त देशात जाल, तेव्हा काही मोठे धोंडे घेऊन त्यावर चुन्याचा लेप
लावून स्थापित करावे. 3 त्यावर या नियमशास्त्राचे सर्व शब्द लिहून
काढावे जेव्हा तुम्ही यार्देन नदी पार करून याहवेह तुमचे परमेश्वर देत
असलेल्या वचनदत्त देशात जाल म्हणजे दुधामधाचे प्रवाह वाहणाऱ्या
अशा देशात जाल, जसे याहवेह तुमच्या पूर्वजांच्या परमेश्वराने तुम्हाला
वचन दिले होते. 4 आणि जेव्हा तुम्ही यार्देन नदी पार करून याहवेह
तुमच्या परमेश्वराने दिलेल्या वचनदत्त देशात जाल, तेव्हा हे धोंडे एबाल
डोंगरावर स्थापित करावे, जसे मी आज तुम्हाला आज्ञा करीत आहे
आणि त्यावर चुन्याचा लेप लावावा. 5 याहवेह तुमच्या परमेश्वरासाठी
तुम्ही तिथे एक वेदी बांधावी, धोंड्यांची वेदी बांधावी. त्यावर कोणतेही
लोखंडी अवजार वापरू नये. 6 याहवेह तुमच्या परमेश्वरासाठी तुम्ही तिथे
न घडविलेल्या धोंड्यांची एक वेदी बांधावी आणि मग त्या वेदीवर याहवेह
तुमच्या परमेश्वराला होमार्पणे अर्पावी. 7 तसेच शांत्यर्पणही त्याच वेदीवर
करून याहवेह तुमच्या परमेश्वरासमोर मोठ्या आनंदाने भोजन करावे. 8
या धोंड्यावर नियमशास्त्राचा प्रत्येक शब्द स्पष्टपणे लिहून काढावा." 9
नंतर मोशे व लेवीय याजकांनी सर्व इस्राएली लोकांना म्हटले, "अहो
इस्राएली लोकांनो, शांत व्हा व ऐका! आता तुम्ही याहवेह तुमच्या
परमेश्वराचे लोक झाला आहात. 10 याहवेह तुमच्या परमेश्वराच्या आज्ञेचे
पालन करा आणि त्यांच्या ज्या आज्ञा आणि विधी आज मी तुम्हाला
देत आहे, ते सर्व तुम्ही पाळावे." 11 त्याच दिवशी मोशेने लोकांना
आज्ञापिले: 12 तुम्ही यार्देन नदी पार करून जाल, तेव्हा शिमओन,
लेवी, यहूदाह, इस्साखार, योसेफ व बिन्यामीनच्या गोत्रांनी लोकांना
आशीर्वाद देण्यासाठी गरिज्जीम पर्वतावर उभे राहावे. 13 आणि रऊबेन,
गाद, आशेर, जबुलून, दान आणि नफताली यांच्या गोत्रांनी शापवचने
उच्चारण्यासाठी एबाल डोंगरावर उभे राहावे. 14 तेव्हा लेव्यांनी सर्व
इस्राएली लोकांना पुढीलप्रमाणे मोठ्याने म्हणावे: 15 "जो याहवेहला

घृणास्पद अशी मूर्ती कुशल कारागिरांच्या हातांनी घडवितो आणि ती
गुप्तपणे ठेवतो तो शापित आहे.” तेव्हा सर्व लोकांनी “आमेन!” म्हणावे.
16 “जो कोणी आपल्या पित्याचा अथवा मातेचा अनादर करतो, तो
शापित होय.” तेव्हा सर्व लोकांनी “आमेन!” म्हणावे. 17 “जो कोणी
आपल्या शेजाऱ्याच्या सीमेची धोंड बदलतो, तो शापित होय.” तेव्हा सर्व
लोकांनी “आमेन!” म्हणावे. 18 “जो कोणी आंधळ्याची वाट चुकवितो
तो शापित होय!” तेव्हा सर्व लोकांनी “आमेन!” म्हणावे. 19 “जो कोणी
परदेशी, अनाथ आणि विधवा यांचा न्याय विपरीत करतो तो शापित
होय.” तेव्हा सर्व लोकांनी “आमेन!” म्हणावे. 20 “जो कोणी आपल्या
पित्याच्या पत्नीबरोबर समागम करतो, तो शापित होय, कारण त्याने
त्याच्या पित्याचे अंथरूण अपमानित केले आहे.” तेव्हा सर्व लोकांनी
“आमेन!” म्हणावे. 21 “जो कोणी एखाद्या पशूबरोबर समागम करतो,
तो शापित होय.” तेव्हा सर्व लोकांनी “आमेन!” म्हणावे. 22 “जो
कोणी आपल्या बहिणीबरोबर, त्याच्या पित्याच्या कन्येबरोबर किंवा
आपल्या मातेच्या कन्येबरोबर समागम करतो, तो शापित होय.” तेव्हा
सर्व लोकांनी “आमेन!” म्हणावे. 23 “जो कोणी आपल्या सासूबरोबर
समागम करतो, तो शापित होय.” तेव्हा सर्व लोकांनी “आमेन!”
म्हणावे. 24 “जो कोणी आपल्या शेजाऱ्याला गुप्तपणे ठार मारतो,
तो शापित होय.” तेव्हा सर्व लोकांनी “आमेन!” म्हणावे. 25 “जो
कोणी एखाद्या निरपराधी मनुष्याला जिवे मारण्यासाठी लाच घेतो, तो
शापित होय.” तेव्हा सर्व लोकांनी “आमेन!” म्हणावे. 26 “जो कोणी
या नियमशास्त्राचे शब्द अमान्य करून ते आचरणात आणत नाही, तो
शापित होय.” तेव्हा सर्व लोकांनी “आमेन!” म्हणावे.

**28** याहवेह तुमच्या परमेश्वराच्या ज्या सर्व आज्ञा आज मी तुम्हाला
देत आहे, त्या सर्व तुम्ही पाळल्या, तर याहवेह तुमचे परमेश्वर
तुम्हाला पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांपेक्षा श्रेष्ठ असे राष्ट्र करतील. 2 जर
तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वराच्या आज्ञा पाळाल तर हे सर्व आशीर्वाद
तुम्हावर येतील व तुमच्यासह असतील: 3 तुम्ही नगरात आणि शेतात
आशीर्वादित व्हाल. 4 तुमची संतती, तुमच्या भूमीतील पिके आणि
तुमच्या गुरांचे वत्स, तुमच्या कळपातील वासरे व कोकरे आशीर्वादित
होतील. 5 तुमच्या टोपल्या व तुमची पीठ मळण्याची परात आशीर्वादित
होतील. 6 तुम्ही बाहेर जाल तेव्हा व तुम्ही आत याल तेव्हा आशीर्वादित
व्हाल. 7 तुमचे शत्रू जेव्हा तुम्हावर हल्ला करतील, तेव्हा याहवेह
त्यांचा तुमच्यासमोर पराजय करतील. ते एका दिशेकडून तुमच्यावर
चालून येतील, परंतु सात दिशांना पळून जातील. 8 याहवेह तुमच्या
धान्याची कोठारे आणि जे काही तुम्ही हाती घ्याल त्यास आशीर्वादित
करतील, याहवेह तुमचे परमेश्वर देत असलेल्या देशात तुम्ही जाल तिथे
ते तुमची भरभराट करतील. 9 तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वराच्या आज्ञा
पाळल्या व त्यांच्या मार्गात चालला तर ते तुम्हाला त्यांच्या शपथेनुसार,
त्यांचे पवित्र लोक म्हणून प्रतिष्ठित करतील. 10 मग पृथ्वीवरील सर्व
लोक पाहतील की तुम्हाला याहवेहच्या नावाने संबोधित करण्यात
येते, ती तुम्हाला भिऊ लागतील. 11 याहवेह तुम्हाला अत्यंत संपन्न
करतील—तुमची संतती, तुमच्या गुरांची पिल्ले आणि तुमच्या भूमीतील
उपज—जसे त्यांनी तुमच्या पूर्वजांना वचन दिले होते. 12 प्रत्येक ऋतूत
उत्तम पिके मिळावीत यासाठी याहवेह त्यांच्या आकाशातील अद्भुत असे
पावसाचे भांडार तुम्हासाठी उघडतील व तुम्ही हाती घ्याल ती प्रत्येक
गोष्ट ते आशीर्वादित करतील. अनेक राष्ट्रांना तुम्ही उसने द्याल, पण
तुम्हाला उसने कधीही घ्यावे लागणार नाही. 13 याहवेह तुम्हाला मस्तक
करतील, शेपूट नव्हे. मी तुम्हाला आज देत असलेल्या याहवेह तुमच्या
परमेश्वराच्या सर्व आज्ञा जर तुम्ही प्रामाणिकपणे पाळल्या, तर तुम्ही
सतत उच्चस्थानी राहाल व कधीही खाली राहणार नाही. 14 आज मी
देत असलेल्या आज्ञांपासून तुम्ही परावृत्त होऊ नका, उजवीकडे किंवा
डावीकडे वळू नका, इतर दैवतांचे अनुसरण करू नका आणि त्यांची
उपासनाही करू नका. 15 परंतु याहवेह तुमच्या परमेश्वराचे तुम्ही ऐकले
नाही व त्यांच्या सर्व आज्ञा व विधी ज्या मी तुम्हाला आज देत आहे
त्यांचे तुम्ही काळजीपूर्वक पालन केले नाही, तर हे सर्व शाप तुम्हावर
येतील आणि तुम्हाला येऊन गाठतील: 16 तुम्ही नगरात शापित व्हाल
व शेतात शापित व्हाल. 17 तुमच्या टोपल्या व तुमचे पीठ मळण्याचे
परात शापित होईल. 18 तुमच्या पोटचे फळ आणि तुमच्या भूमीतील
पिके आणि तुमच्या गुरांचे वत्स आणि तुमच्या कळपातील वासरे
शापित होतील. 19 तुम्ही आत याल तेव्हा शापित व्हाल आणि तुम्ही
बाहेर जाल तेव्हा शापित व्हाल. 20 जर तुम्ही याहवेहचा त्याग करून
दुष्कर्मे करीत राहिलात तर तुम्ही ज्या कार्यात हात घालाल त्या प्रत्येक
गोष्टीत याहवेह शाप, गोंधळ आणि संकटे आणतील व सरतेशेवटी
तुमचा अचानक आणि संपूर्णपणे नाश करतील. 21 जो देश तुम्ही
प्रवेश करून ताब्यात घेणार आहात, त्या देशातून तुम्ही समूळ नष्ट
होईपर्यंत, याहवेह तुम्हावर मरी पाठवतील. 22 याहवेह तुम्हावर क्षयरोग,
ज्वर, दाह, साथीचे रोग व अवर्षण, तांबेरा व बुरशी पाठवतील, तुमचा
संपूर्ण नाश होईपर्यंत या पीडा तुमचा पिच्छा पुरवतील. 23 तुमच्या
डोक्यावरील आकाश कास्यासारखे होऊन तुमच्या पावला खालील
भूमी लोखंडासारखी होईल. 24 पावसाच्या ऐवजी याहवेह तुमच्यावर,
तुमचा नाश होईपर्यंत, धुळीच्या व वाळूच्या वादळांचा आकाशातून
वर्षाव करतील. 25 तुमच्या शत्रूंपुढे तुमचा पराभव व्हावा, असे याहवेह
करतील. तुम्ही त्यांच्यावर एका दिशेने चाल करून जाल, पण सात
दिशांनी गोंधळून पळ काढाल आणि पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांकरिता तुम्ही
भयानक विनाशाचे उदाहरण व्हाल. 26 तुमची प्रेते पक्ष्यांचे आणि
वन्यपशूंचे भक्ष्य होतील आणि त्यांना दूर हाकलून देण्यास तिथे कोणीही
नसेल. 27 याहवेह तुम्हावर इजिप्त देशातील गळवे, मूळव्याध, खवडे व
खरूजाच्या अशा पीडा आणतील की ज्यातून तुम्ही कधीच बरे होणार
नाही. 28 याहवेह तुम्हाला वेडे व आंधळे करतील आणि तुमची मने
गोंधळून जातील. 29 ज्याप्रमाणे एखादा आंधळा मनुष्य चाचपडतो
तसे, तुम्ही प्रखर सूर्यप्रकाशात चाचपडाल. जे काही तुम्ही हाती घ्याल,
त्यात तुम्हाला यश मिळणार नाही; तुमच्यावर सतत जुलूम होत राहील
आणि तुम्ही सतत लुबाडले जाल, यातून कोणीही तुम्हाला सोडविणारा

राहणार नाही. 30 तुमच्या वाग्दत्त वधूला दुसराच कोणी नेईल व तिचे शीलभंग करेल. तुम्ही घर बांधाल, पण त्यामध्ये तुम्ही राहणार नाही. तुम्ही द्राक्षमळा लावाल, पण त्या फळांचा उपभोग तुम्ही करू शकणार नाही. 31 तुमच्या डोळ्यादेखतच तुमच्या बैलांची कत्तल करण्यात येईल, पण त्यांचे मांस तुम्हाला खायला मिळणार नाही. तुमच्यासमक्ष तुमची गाढवे जबरदस्तीने हाकलून नेण्यात येतील, पण ती तुम्हाला परत देणार नाहीत. तुमची मेंढरे तुमच्या शत्रूंना देण्यात येतील आणि त्यांना कोणीही सोडविणार नाही. 32 तुमच्या पुत्र व कन्यांना दुसऱ्या देशात देण्यात येईल आणि तुमचे डोळे त्यांना पाहण्याच्या उत्कट इच्छेने क्षीण होतील आणि तुम्ही तुमचे हातही वर उचलण्यास असमर्थ व्हाल. 33 तुम्ही कष्ट करून वाढविलेली पिके एखादे परकीय राष्ट्र, ज्याचे नावही तुम्ही कधी ऐकले नाही, ते खातील. तुमची नेहमीच छळवणूक होईल व तुम्ही नेहमीच चिरडले जाल. 34 तुमच्यासमोर जे येईल ते पाहून तुम्हाला वेड लागेल. 35 याहवेह तुमच्या गुडघ्या व पायावर कधीही बरी होणार नाही अशी वेदना देणारी फोडी येऊ देतील, जे अगदी तुमच्या डोक्यापासून पायाच्या तळव्यापर्यंत भरून जातील. 36 तुम्हाला किंवा तुमच्या पूर्वजांना कधीही माहीत नसलेल्या राष्ट्रांमध्ये याहवेह तुम्हाला आणि तुम्ही स्वतःवर नेमलेल्या राजाला हद्दपार करतील. तिथे तुम्ही इतर दैवतांची उपासना कराल, जे लाकडाचे आणि दगडाचे दैवत असेल. 37 याहवेह तुम्हाला अशा सर्व राष्ट्रांमध्ये ओढून नेतील, जिथे तुम्ही भयाचा, म्हणीचा आणि उपहासाचा विषय बनाल. 38 तुम्ही पुष्कळ बी पेराल, पण थोडक्याच पिकांची कापणी कराल, कारण टोळ ते खाऊन टाकतील. 39 तुम्ही द्राक्षमळे लावून त्यांची निगा राखाल; पण तुम्हाला द्राक्षे खावयाला मिळणार नाहीत किंवा द्राक्षारस प्यावयास मिळणार नाही. कारण कीड त्यांना खाऊन टाकेल. 40 तुमच्या सर्व देशात जैतुनाची झाडे वाढतील, पण तुम्ही तेलाचा उपयोग करू शकणार नाही. तुम्हाला तेल लावण्यासाठी पुरेसे जैतून तेल मिळणार नाही, कारण त्यांची फळे गळून जातील. 41 तुम्हाला पुत्र व कन्या होतील, पण त्यांना तुम्ही ठेऊ शकणार नाही, कारण ते गुलामगिरीत जातील. 42 टोळधाड येऊन तुमच्या भूमीवरील वृक्षांचा आणि पिकांचा नाश करतील. 43 तुम्हामध्ये राहणारे परदेशी लोक तुमच्यावर अधिकाधिक वरचढ होत जातील, पण तुमची अधिकाधिक अधोगती होत जाईल. 44 ते तुम्हाला उसने देतील, पण तुम्ही त्यांना उसने देऊ शकणार नाही. ते मस्तक होतील आणि तुम्ही शेपूट व्हाल. 45 हे सर्व शाप तुमच्यावर येतील. ते तुमचा नाश होईपर्यंत पाठपुरावा करतील आणि तुम्हाला गाठतील, कारण तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वराच्या आज्ञेचे पालन केले नाही व ज्या आज्ञा आणि विधी त्यांनी तुम्हाला दिले त्याचे पालन करण्याचे नाकारले. 46 ही अरिष्टे सदैव तुमच्यावर व तुमच्या संततीवर चिन्ह आणि चमत्कार असे होतील. 47 कारण तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वराची समृद्धीच्या काळात आनंदाने आणि हर्षाने सेवा केली नाही, 48 म्हणून तुम्ही याहवेहने पाठविलेल्या तुमच्या शत्रूंचे गुलाम व्हाल आणि तुम्ही भुकेले, तहानलेले, नग्न आणि अत्यंत गरीब असे व्हाल आणि ते तुमचा नाश करेपर्यंत तुमच्या मानेवर लोखंडी जू ठेवण्यात येईल. 49 याहवेह तुमच्यावर दुरून, पृथ्वीच्या सीमेवरून एक राष्ट्र पाठवतील, ते गरुडाप्रमाणे झेप घेऊन तुमच्यावर तुटून पडतील, ते असे राष्ट्र असेल ज्यांची भाषा तुम्हाला समजणार नाही, 50 ते क्रूर चेहऱ्याचे राष्ट्र असेल, जे तुमच्यातील वृद्धांना आदर देणार नाहीत किंवा तरुणांना दयामाया दाखविणार नाहीत. 51 तुमचा नाश होईपर्यंत ते तुमच्या गुराचे वत्स व तुमच्या भूमीचा उपज खाऊन टाकतील. तुमचे धान्य, नवीन द्राक्षारस, जैतुनाचे तेल, वासरे आणि कोकरे ही सर्व नाहीशी करून तुमचा पूर्णपणे नाश करतील. 52 ते राष्ट्र तुमच्या नगरांना वेढा घालेल आणि तुमचे सर्व उंच व मजबूत तट, ज्यावर तुमची भिस्त आहे, ते पाडून टाकतील. याहवेह तुमच्या परमेश्वराने तुम्हाला दिलेल्या देशातील सर्व शहरांना ते वेढा घालतील. 53 तुमच्या शत्रूंनी वेढा दिल्यामुळे आणि त्यांच्या छळामुळे, तुम्ही तुमच्या पोटचे फळ म्हणजे तुमचे पुत्र व कन्या देखील तुम्ही खाऊन टाकाल, जे याहवेह तुमच्या परमेश्वराने तुम्हाला दिले आहे. 54 तुमच्यातील अत्यंत कोमलहृदयी व सुसंस्कृत पुरुषाला देखील आपला भाऊ, आपली प्राणप्रिय पत्नी आणि जगून वाचून राहिलेल्या मुलांवरही दयामाया येणार नाही, 55 आणि तो त्याच्या मुलांचे जे मांस खाईल त्याचे मांस तो त्यापैकी कोणालाही देणार नाही. कारण तुमच्या शहरांना वेढा पडल्यामुळे त्याच्याजवळ काहीच शिल्लक राहणार नाही. 56 ऐश्वर्यसंपन्न असल्यामुळे जिने आपला तळवाही कधी जमिनीला लावला नाही अशी घरंदाज व कोमलहृदयी पत्नी इतकी कठोरहृदयी बनेल की आपला प्राणप्रिय पती, पुत्र किंवा कन्या यांना ती आपल्या अन्नाचे वाटेकरी होऊ देणार नाही, 57 आपल्याच पोटचा गर्भ व आपल्याच पोटची मुले स्वतःलाच गुप्तपणे खाता यावी म्हणून ती लपवून ठेवील. अशाप्रकारे या वेढ्याच्या काळातील भूक खूप भयानक असेल आणि तुमच्या शत्रूकडून तुम्हाला तुमच्याच वेशींच्या आत भयंकर संकट व यातना भोगाव्या लागतील. 58 या पुस्तकात नमूद केलेली नियमशास्त्राची वचने तुम्ही प्रामाणिकपणे आचरणात आणली नाही आणि याहवेह तुमच्या परमेश्वराच्या अद्भुत आणि भयावह नावाचा मान तुम्ही राखला नाही, 59 तर याहवेह तुमच्यावर व तुमच्या वंशजांवर असाध्य रोग आणि कधीही न थांबणारे भयंकर साथीचे रोग पाठवतील. 60 ज्या रोगांना तुम्ही भिता, असे इजिप्तमधील सर्व रोग तुमच्यावर आणतील आणि ती तुम्हाला लागून राहतील. 61 तुमचा नाश होईपर्यंत याहवेह तुम्हावर प्रत्येक आजार आणि सर्व साथींचे रोग आणि या नियमशास्त्र ग्रंथात ज्यांचा उल्लेख नाही, असे सर्व रोग तुम्हावर आणतील. 62 तुम्ही आकाशातील ताऱ्यांप्रमाणे अगणित असला, तरी अगदीच थोडके उराल, कारण तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वराचे आज्ञापालन केले नाही. 63 तुमची भरभराट करण्यात व तुम्हाला बहुगुणित करण्यात जसा याहवेहला आनंद वाटला, तसाच आनंद त्यांना तुमचा नाश व नायनाट करण्यातही वाटेल. जो देश तुम्ही ताब्यात घेण्यास जात आहात, त्या देशातून तुमचे उच्चाटन करण्यात येईल. 64 पृथ्वीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत असलेल्या

निरनिराळया राष्ट्रांमध्ये याहवेह तुमची पांगापांग करतील. तिथे तुम्ही
किंवा तुमच्या पूर्वजांनी ज्यांची कधीही उपासना केली नाही—अशा
लाकडाच्या आणि दगडाच्या दैवतांची तुम्ही उपासना कराल. 65 त्या
राष्ट्रांमध्ये तुम्हाला स्वास्थ्य मिळणार नाही, तुमच्या पायांना विसावा
मिळणार नाही, तिथे तुमची हृदये थरथर कापत राहतील, तुमचे डोळे
म्लान होतील व तुमचा जीव झुरणीस लागेल, असे याहवेह करतील. 66
तुम्ही सदैव संशयात जगाल, रात्रंदिवस तुम्ही भीतीने ग्रस्त राहाल,
तुमच्या जीवनाची काहीच खात्री राहणार नाही. 67 तुमची अंतःकरणे
भयग्रस्त झाल्यामुळे सारखी धडधडत राहतील, त्यामुळे सकाळी तुम्ही
म्हणाल, "अहा, आता रात्र असती, तर किती बरे झाले असते!" आणि
संध्याकाळी तुम्ही म्हणाल, "अहा, आता सकाळ असती तर किती बरे
झाले असते!" 68 जो प्रवास तुम्ही कधीही करणार नाही असे याहवेह
म्हणाले होते, तोच प्रवास याहवेह तुम्हाला करावयाला लावतील आणि
जहाजातून मी तुम्हाला पुन्हा इजिप्त देशामध्ये पाठवेन. मग तिथे तुमच्या
शत्रूंनी तुम्हाला पुरुष व स्त्री गुलाम म्हणून विकत घ्यावे यासाठी तुम्ही
स्वतःला देऊ कराल, परंतु तुम्हाला कोणाही विकत घेणार नाही.

**29**
याहवेहने मोआब देशात इस्राएली लोकांबरोबर जो करार
करण्याची मोशेला आज्ञा दिली होती त्याच्या या अटी आहेत,
त्यांनी होरेब पर्वतावर जो करार केला होता तो विस्तारित असा आहे.
2 मोशेने सर्व इस्राएली लोकांना बोलाविले आणि सांगितले: इजिप्त
देशात फारोह, त्याच्या अधिकाऱ्यांशी आणि त्याच्या देशात याहवेहने
जे काही केले ते तुम्ही तुमच्या डोळयांनी पाहिले आहे. 3 तिथे ज्या
महान पीडा आणि ते चिन्ह आणि जे महान चमत्कार केले, ते सर्व तुम्ही
स्वतःच्या डोळयांनी पाहिले आहेत. 4 पण याहवेहने आजपर्यंत तुम्हाला
समजणारी अंतःकरणे किंवा पाहू शकणारे डोळे किंवा ऐकू शकणारे
कान दिलेले नाहीत. 5 तरी देखील याहवेह म्हणतात, "चाळीस वर्षे
तुम्हाला त्या रानात चालविले, तरी तुमचे कपडे जीर्ण झाले नाहीत
ना तुमची पायतणे झिजली. 6 खाण्यासाठी तुमच्याजवळ भाकर
नव्हती अथवा पिण्यासाठी तुमच्याजवळ द्राक्षारस किंवा मद्य नव्हते.
हे मी यासाठी केले की मीच याहवेह तुमचा परमेश्वर आहे, हे तुम्ही
ओळखावे." 7 जेव्हा तुम्ही येथे आला, तेव्हा हेशबोनचा राजा सीहोन व
बाशानचा राजा ओग लढाई करण्यासाठी आपल्यावर चालून आले,
पण आपण त्यांचा पराभव केला. 8 त्यांचा प्रदेश जिंकून आपण तो
रऊबेन आणि गाद यांच्या गोत्रांना आणि मनश्शेहच्या अर्ध्या गोत्राला
वतन म्हणून दिला. 9 म्हणून या कराराच्या अटींचे काळजीपूर्वक पालन
करा, म्हणजे तुम्ही जे सर्वकाही कराल त्यात तुम्ही समृद्ध व्हाल. 10
आज तुम्ही सर्वजण याहवेह तुमच्या परमेश्वराच्या उपस्थितीत उभे
आहात—म्हणजे तुमचे पुढारी व तुमचे गोत्र, तुमचे वडील आणि
अधिकारी आणि इस्राएलमधील इतर सर्व पुरुष, 11 तुमचे लेकरे आणि
तुमच्या स्त्रिया व मुलेबाळे आणि तुमच्या छावणीमध्ये राहणारे परदेशी,
जे तुमच्यासाठी लाकूड तोडतात आणि तुमच्यासाठी पाणी भरतात. 12
याहवेह तुमच्या परमेश्वराशी करार करण्यासाठी येथे तुम्ही उभे आहात,
तो करार याहवेह आज तुमच्यासोबत करीत आहेत आणि शपथपूर्वक
त्यावर अशी मोहोर लावत आहेत की, 13 तुम्ही त्यांचे लोक आहात
आणि तुमचे पूर्वज अब्राहाम, इसहाक व याकोब यांना प्रतिज्ञापूर्वक
वचन दिल्याप्रमाणे याहवेहच तुमचे परमेश्वर आहेत याची आज तुम्हाला
खात्री करून द्यावयाची आहे. 14 हा करार मी शपथपूर्वक करीत आहे,
केवळ तुमच्याशीच नव्हे, 15 तर आज याहवेह तुमच्या परमेश्वरासमोर
जे इस्राएली उभे आहेत व जे आज येथे नाहीत त्यांच्यासोबत देखील
ते आहेत. 16 तुम्हाला माहीत आहे की, आपण इजिप्त देशामध्ये
कसे राहिलो आणि आपण इतर देशातून प्रवास करीत येथपर्यंत कसे
आलो. 17 तुम्ही त्यांच्यामध्ये घृणास्पद वस्तू आणि लाकडाच्या आणि
दगडाच्या, चांदीच्या आणि सोन्याच्या अमंगळ मूर्ती पाहिल्या आहेत.
18 आज येथे उभा असणारा तुमच्यातील कोणताही पुरुष किंवा स्त्री,
कूळ किंवा गोत्राचे हृदय याहवेह तुमच्या परमेश्वराला सोडून इतर
राष्ट्रांच्या दैवतांची उपासना करण्यासाठी त्यांच्याकडे वळणार नाही
याबद्दल खबरदारी घ्या; हे कडू विषारी फळ आणि कडू दवणा देणाऱ्या
रोपट्याचे मूळ तुम्हामध्ये उगविणार नाही याबद्दल खबरदारी घ्या. 19
जो कोणी अशी महत्त्वाची आणि गंभीर स्वरुपाची शपथ आपल्या
कानांनी ऐकतो आणि स्वतःला आशीर्वाद देऊन म्हणतो, "माझ्या
स्वतःच्याच इच्छेने मी चाललो तरी माझे काही बिघडणार नाही, मी
सुरक्षित राहीन;" असे म्हणणारी माणसे सिंचित भूमी आणि कोरड्या
भूमीवर नाश ओढवून घेतील. 20 याहवेह अशा लोकांना क्षमा करण्यास
कधीही तयार होणार नाहीत; त्यांचा कोप व क्रोधाग्नी त्यांच्याविरुद्ध
भडकेल. या ग्रंथात लिहिलेले सर्व शाप त्यांच्यावर कोसळतील आणि
याहवेह त्यांचे नाव देखील या आकाशाच्या खालून नामशेष करून
टाकतील. 21 याहवेह या मनुष्याला सर्व इस्राएली गोत्रातून वेगळे
काढतील आणि कराराच्या या नियमशास्त्राच्या ग्रंथात नमूद केलेले सर्व
शाप त्याच्यावर कोसळतील. 22 मग तुमची भावी पिढी, तुमची मुलेबाळे
आणि दूरदेशातील परदेशी लोक, तुमच्या देशावर याहवेहने पाठविलेली
पीडा आणि रोगराई पाहतील. 23 तुमचा संपूर्ण देश गंधक आणि
क्षारयुक्त होऊन—पूर्णपणे जळून गेल्यामुळे ती एक निरुपयोगी भूमी
झाली आहे असे त्यांना आढळून येईल आणि याहवेहने क्रोधाविष्ट होऊन
त्याचा सदोम, गमोरा, अदमाह व सबोईम या देशांसारखाच नाश केला
आहे हे त्यांना दिसेल. 24 सर्व राष्ट्रे विचारतील: "याहवेहने या देशाचे
असे का केले? हा एवढा कोप व क्रोधाग्नी कशाला?" 25 आणि त्याचे
उत्तर असेल: "ज्यावेळी याहवेह त्यांच्या पूर्वजांच्या परमेश्वराने इस्राएली
लोकांना इजिप्त देशातून बाहेर आणले होते, त्यावेळी त्यांच्याशी जो
करार केला होता तो या लोकांनी मोडला म्हणून असे झाले. 26 सक्त
मनाई असतानाही, ते ओळखत नसलेली दैवते, जी त्यांना देण्यात आली
नाहीत, त्या दैवतांची त्यांनी उपासना केली आणि त्यांना नमन केले.
27 म्हणूनच याहवेहचा क्रोध या देशाविरुद्ध इतका भडकला की, या
पुस्तकात नमूद केलेले सर्व शाप त्यांनी त्यांच्यावर आणले. 28 तेव्हा
याहवेहने रागाने आणि मोठ्या क्रोधाने त्यांचे या देशातून उच्चाटन केले

आणि त्यांना दूरच्या देशात घालवून दिले, जिथे ते आज देखील राहत
आहेत.” 29 रहस्यमय बाबी याहवेह आमच्या परमेश्वराच्या आहेत; परंतु
त्यांनी ज्यागोष्टी उघड रीतीने सांगितल्या, त्या आपल्यासाठी आणि
आपल्या लेकरांसाठी आहेत, यासाठी की आपण या नियमशास्त्राच्या
सर्व शब्दांचे पालन करावे.

**30** मी तुमच्यापुढे ठेवलेले हे सर्व आशीर्वाद आणि शाप तुम्हावर
येतील, तेव्हा याहवेह तुमच्या परमेश्वराने तुम्हाला घालवून दिलेल्या
देशात राहत असताना तुम्ही या गोष्टी आपल्या अंतःकरणात ठेवाव्या, 2
आणि त्यावेळी जर तुम्ही व तुमची मुले याहवेह तुमच्या परमेश्वराकडे
परत याल आणि संपूर्ण मनाने व संपूर्ण जिवाने आज मी तुम्हाला देत
आहे त्या त्यांच्या आज्ञा पाळाल, 3 तर याहवेह तुमचे परमेश्वर तुमची
बंदिवासातून सुटका करतील आणि ते तुमच्यावर दया करतील आणि
ज्या देशात त्यांनी तुम्हाला पांगवून टाकले असेल, त्या देशातून तुम्हाला
एकत्र करतील. 4 तुम्ही पृथ्वीच्या अगदी दिगंतापर्यंत विखुरलेले असला,
तरी याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला तिथून पुन्हा परत आणतील. 5
याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला तुमच्या पूर्वजांच्या देशात परत आणतील
आणि तुम्ही तो ताब्यात घ्याल. ते तुमचे कल्याण करतील आणि
तुमच्या पूर्वजांपेक्षा तुम्हाला अधिक संपन्न आणि बहुगुणित करतील.
6 याहवेह तुमचे परमेश्वर तुमच्या व तुमच्या वंशजांच्या अंतःकरणाची
सुंता करतील, तुम्ही त्यांच्यावर पूर्ण मनाने व आत्म्याने प्रीती कराल,
मग याद्वारे तुम्ही जिवंत राहू शकाल. 7 याहवेह तुमचे परमेश्वर हे सर्व
शाप तुमच्या शत्रूंवर, म्हणजे जे तुमचा द्वेष करतात व तुमचा छळ
करतात, त्यांच्यावर आणतील. 8 तुम्ही परत याहवेहच्या आज्ञा पाळाल
आणि मी आज तुम्हाला देत असलेल्या त्यांच्या सर्व आज्ञेचे तुम्ही पालन
कराल. 9 तेव्हा याहवेह तुमचे परमेश्वर तुमच्या हाताच्या प्रत्येक कार्यात
तुम्हाला समृद्धी प्रदान करतील. ते तुम्हाला विपुल संतती, पुष्कळ गुरे
आणि तुमच्या भूमीला अमाप पीक देतील. याहवेह तुमच्या पूर्वजांवर
जसे प्रसन्न होते, तसेच तुमच्या कल्याणासाठी तुम्हावरही परत प्रसन्न
होतील, 10 जर तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वराच्या आज्ञा पाळाल
आणि नियमशास्त्राच्या या ग्रंथात याहवेह तुमच्या परमेश्वराने जे नियम
व विधी दिले आहेत, त्या तुम्ही पाळाल व पूर्ण मनाने व आत्म्याने
याहवेह तुमच्या परमेश्वराकडे माघारी वळाल, तर हे होईल. 11 आता
मी ज्या आज्ञा आज तुम्हाला देत आहे, त्या अतिशय अवघड किंवा
तुमच्या आवाक्याबाहेरच्या नाहीत. 12 कारण त्या काही वर स्वर्गात
नाहीत, की तुम्ही विचाराल, “आम्ही त्या पाळाव्या म्हणून आमच्यापर्यंत
आणण्यासाठी आणि जाहीर करण्यासाठी स्वर्गात कोण चढेल?”
13 तसेच त्या महासागरा पलीकडेही नाहीत, की तुम्ही विचाराल,
“आम्ही त्या पाळाव्या म्हणून आमच्यापर्यंत आणण्यासाठी आणि
जाहीर करण्यासाठी महासागर ओलांडून कोण जाईल?” 14 नाही,
वचन अगदी तुमच्याजवळ आहे; तुम्हाला त्यांचे पालन करता यावे
म्हणून ते तुमच्या मुखात आहेत; ते तुमच्या अंतःकरणात आहे. 15 पाहा
मी आज तुमच्यापुढे जीवन व समृद्धी, मृत्यू व नाश ठेवले आहे. 16
आज मी तुम्हाला आज्ञा देत आहे की तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वरावर
प्रीती करावी, आज्ञापूर्वक त्यांच्या मार्गात चालावे, आणि त्यांच्या आज्ञा,
विधी व नियम पाळावे; म्हणजे तुम्ही जिवंत राहाल व तुमची वृद्धी होईल
आणि जी भूमी तुम्ही ताब्यात घेण्यासाठी जात आहात, तिथे याहवेह
तुमचे परमेश्वर तुम्हाला आशीर्वादित करतील. 17 परंतु तुमचे अंतःकरण
फिरले आणि तुम्ही आज्ञा न पाळणारे झालात आणि जर तुम्ही इतर
दैवतांकडे बहकून जाऊन त्यांना नमन कराल आणि त्यांची उपासना
कराल, 18 तर मी आज तुम्हाला जाहीरपणे सांगतो की, तुम्ही निश्चितच
नष्ट व्हाल. यार्देन ओलांडून ज्या भूमीत प्रवेश करण्यास आणि ताब्यात
घेण्यासाठी तुम्ही जात आहात, त्यात तुम्हाला दीर्घायुष्य लाभणार नाही.
19 आकाश आणि पृथ्वी यांना तुमच्याविरुद्ध साक्षीला ठेवून आज मी
तुमच्यापुढे जीवन आणि मृत्यू, आशीर्वाद आणि शाप, ही ठेवली आहेत.
म्हणून तुम्ही जीवन निवडून घ्यावे म्हणजे तुम्ही आणि तुमची मुले जिवंत
राहतील, 20 आणि तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वरावर प्रीती करावी,
त्यांची वाणी ऐकावी आणि त्यांना बिलगून राहावे. कारण याहवेहच
तुमचे जीवन आहेत आणि अब्राहाम, इसहाक आणि याकोब या तुमच्या
पूर्वजांना वचन दिलेल्या देशात तेच तुम्हाला दीर्घायुष्य देतील.

**31** मोशेने या गोष्टी सर्व इस्राएली लोकांना जाऊन सांगितल्या: 2
“मी आता एकशेवीस वर्षांचा झालो आहे आणि मी येथून पुढे
तुमचे नेतृत्व करू शकणार नाही. कारण ‘तू यार्देन नदी ओलांडू नये,’
असे याहवेहने मला सांगितले आहे. 3 परंतु याहवेह तुमचे परमेश्वर
स्वतःच तुमच्या आधी यार्देन नदी ओलांडतील. ते या राष्ट्रांचा तुमच्यापुढे
नाश करतील आणि तुम्ही त्यांच्या भूमीचा ताबा घ्याल. याहवेहने
म्हटल्याप्रमाणे यहोशुआ देखील यार्देन नदी ओलांडून तुमच्यापुढे जाईल.
4 आणि ज्याप्रमाणे याहवेहने अमोर्‍यांचे राजे सीहोन आणि ओगचा नाश
केला, त्याचप्रमाणे या देशातील राष्ट्रांचा ते नाश करतील. 5 याहवेह
त्यांना तुमच्या स्वाधीन करतील आणि त्यांच्याशी ते सर्व करावे ज्याची
आज्ञा मी तुम्हाला दिलेली आहे. 6 खंबीर व्हा आणि हिंमत धरा. त्यांना
भिऊ नका वा घाबरू नका, कारण याहवेह तुमचे परमेश्वर तुमच्याबरोबर
जातील; ते तुम्हाला कधीही सोडणार नाही किंवा त्यागणार नाही.” 7
मग मोशेने यहोशुआला बोलाविले आणि सर्व इस्राएली लोकांसमक्ष
त्याला सांगितले, “खंबीर हो आणि हिंमत धर, कारण या लोकांच्या
पूर्वजांना याहवेहने वचनपूर्वक देऊ केलेल्या देशात तू त्यांच्यासह जावे
आणि ती भूमी त्यांचे वतन म्हणून त्यांना विभागून द्यावी. 8 याहवेह
स्वतः तुझ्यापुढे चालतील आणि तुझ्याबरोबर राहतील; ते तुला कधीही
सोडणार नाही किंवा त्यागणार नाहीत. भिऊ नकोस; निरुत्साही होऊ
नकोस.” 9 नंतर मोशेने हे संपूर्ण नियमशास्त्र लिहिले आणि याहवेहच्या
कराराचे कोश वाहणार्‍या लेवीय याजकांना आणि इस्राएली लोकांच्या
वडीलजनांना दिले. 10 मग मोशेने त्यांना आज्ञा दिली: “प्रत्येक सातव्या
वर्षाच्या शेवटी, कर्ज माफीच्या वर्षी, मंडपांच्या उत्सवात, 11 याहवेह
तुमच्या परमेश्वराने निवडलेल्या ठिकाणी जेव्हा सर्व इस्राएली लोक
उपस्थित होतील, तेव्हा हे नियमशास्त्र त्यांना ऐकू जाईल असे वाचावे.

12 लोकांना एकत्र करा—पुरुष, स्त्रिया आणि मुले आणि तुमच्या नगरात
राहत असलेले परदेशी—म्हणजे ते ऐकतील आणि याहवेह तुमच्या
परमेश्वराचे भय बाळगण्यास शिकतील व या नियमशास्त्रामधील सर्व
वचने काळजीपूर्वक पाळतील. 13 त्यांची बालके, ज्यांना हे नियमशास्त्र
ठाऊक नाही, त्यांनीही यार्देन नदी ओलांडून, त्या वचनदत्त देशात, जी
भूमी ताब्यात घेण्यास तुम्ही जात आहात तिथे जोपर्यंत राहाल, तोपर्यंत
हे ऐकावे आणि याहवेह तुमच्या परमेश्वराचे भय बाळगण्यास शिकावे.”
14 मग याहवेह मोशेला म्हणाले, “तुझ्या मृत्यूचा दिवस जवळ आला
आहे. यहोशुआला बोलव आणि तुम्ही दोघे सभामंडपात हजर व्हा
म्हणजे मी तिथे त्याला नियुक्त करेन.” मग मोशे आणि यहोशुआ आले
आणि सभामंडपात हजर झाले. 15 तेव्हा याहवेह मंडपाच्या प्रवेशद्वाराशी
मेघस्तंभाच्या रूपाने त्यांना प्रगट झाले आणि मेघस्तंभ द्वाराशी स्थिर
राहिले. 16 आणि याहवेह मोशेला म्हणाले: “तू आपल्या पूर्वजांसोबत
विसावा घ्यावयास जाणार आहे आणि हे लोक ज्या देशात प्रवेश करणार
आहेत, तिथे लवकरच परकीय दैवतांच्या समोर व्यभिचार करतील. ते
माझा त्याग करतील आणि मी त्यांच्याबरोबर केलेला करार मोडतील.
17 आणि म्हणून त्या दिवशी माझा क्रोध त्यांच्याविरुद्ध भडकेल आणि
मी त्यांचा त्याग करेन; माझे मुख त्यांच्यापासून लपवेन आणि त्यांचा
नाश होईल. त्यांच्यावर भयंकर संकटे व अरिष्ट येतील आणि त्या दिवशी
ते म्हणतील, ‘आमचे परमेश्वर आता आम्हामध्ये नाहीत म्हणून ही संकटे
आम्हावर आली आहेत का?’ 18 आणि निश्चितच इतर दैवतांची उपासना
करण्याच्या त्यांच्या पातकांमुळे मी माझे मुख त्यांच्यापासून लपवेन.
19 “म्हणून आता हे गीत तुम्ही लिहून घ्या आणि ते इस्राएलाच्या सर्व
लोकांना शिकव व त्यांना गावयास सांग, म्हणजे हे गीत त्यांच्याविरुद्ध
माझ्याकरिता साक्ष असेल. 20 जो देश मी त्यांच्या पूर्वजांना शपथ
वाहून देऊ केला आहे, त्या दुधामधाचा प्रवाह वाहणाऱ्या देशात, मी
त्यांना आणेन आणि ते खाऊन पिऊन तृप्त व संपन्न होतील, तेव्हा ते
इतर दैवतांकडे वळतील आणि त्यांची उपासना करू लागतील, माझी
उपेक्षा करतील आणि माझा करार मोडतील. 21 आणि जेव्हा त्यांच्यावर
अनेक संकटे व अरिष्टे येतील, तेव्हा हे गीत त्यांच्याविरुद्ध साक्ष असे
ठरेल, कारण त्यांचे वंशज हे गीत विसरू शकणार नाही. या वचनदत्त
देशात प्रवेश करण्यापूर्वीच या लोकांची प्रवृत्ती कशी आहे हे मला माहीत
आहे.” 22 तेव्हा त्याच दिवशी मोशेने त्या गीताचे शब्द लिहून काढले
आणि सर्व इस्राएली लोकांना ते शिकविले. 23 नंतर याहवेहने नूनाचा
पुत्र यहोशुआला ही आज्ञा दिली: “खंबीर हो व हिंमत धर, कारण तू सर्व
इस्राएली लोकांना मी त्यांना देऊ केलेल्या वचनदत्त देशात आणशील
आणि मी स्वतः तुझ्याबरोबर असेन.” 24 त्या पुस्तकात नमूद केलेल्या
नियमशास्त्राच्या सर्व शब्दांना प्रारंभापासून शेवटपर्यंत मोशेने लिहून
पूर्ण केल्यानंतर, 25 त्याने जे याहवेहच्या कराराचा कोश वाहतात त्या
लेव्यांना आज्ञा केली: 26 “तुम्ही नियमशास्त्राचा हा ग्रंथ घ्या आणि
याहवेह तुमच्या परमेश्वराच्या कराराच्या कोशाजवळ नेऊन ठेवा. तिथे हा
तुमच्याविरुद्ध साक्ष म्हणून राहील. 27 कारण तुम्ही किती बंडखोर आणि
ताठ मानेचे आहात हे मला माहीत आहे. मी तुम्हाबरोबर असताना,
तुम्ही जर याहवेहविरुद्ध बंडखोरी करीत आहात, तर माझ्या मृत्यूनंतर
तुम्ही किती अधिक बंडखोरी कराल! 28 आता तुमच्या गोत्रांच्या सर्व
वडीलजनास आणि अधिकाऱ्यांस माझ्यासमोर एकत्र करा, म्हणजे मी
हे वचने त्यांच्या कानावर पडतील असे बोलेन व आकाश आणि पृथ्वी
यांना त्यांच्याविरुद्ध साक्ष बनवेल. 29 कारण मला माहीत आहे की,
माझ्या मृत्यूनंतर तुम्ही स्वतःला पूर्णपणे भ्रष्ट कराल आणि मी दिलेल्या
आज्ञांपासून बहकून दूर जाल. भविष्यकाळात तुमच्यावर संकटे येतील,
कारण याहवेहच्या दृष्टीने वाईट ते कराल व तुमच्या हस्तकृतीने त्यांना
अतिशय संतप्त कराल.” 30 आणि मोशेने या गीताचे शब्द प्रारंभापासून
तर शेवटपर्यंत जमलेल्या इस्राएली लोकांच्या सर्व मंडळीच्या कानी
पडतील असे सांगितले.

**32** अहो आकाशमंडळांनो, ऐका आणि मी बोलेन; हे पृथ्वी, माझ्या
मुखातील शब्दांकडे लक्ष दे. 2 माझे शिक्षण तुमच्या कानावर
पावसाच्या सरीप्रमाणे पडो, माझ्या शब्दांची दवाप्रमाणे पखरण होवो,
नव्या गवतावर पडणाऱ्या पावसाप्रमाणे, कोवळया रोपांवर पावसाच्या
सरींप्रमाणे वृष्टी करोत. 3 मी याहवेहचे नाव जाहीर करेन. आपल्या
परमेश्वराच्या महानतेची स्तुती गा! 4 तेच आमचे खडक आहेत, त्यांचे
कार्य परिपूर्ण आहे. आणि त्यांचे सर्व मार्ग न्याय्य असतात. विश्वासयोग्य
परमेश्वर, जे कधीच चूक करीत नाही, ते न्यायी आणि सत्यनिष्ठ आहेत.
5 ती आता त्यांची लेकरे राहिली नाहीत, कारण ती भ्रष्ट झाली आहेत;
त्यांना लाज वाटेल की ते एक विकृत आणि कुटिल पिढी आहेत. 6
अहो मूर्ख आणि मतिमंद लोकांनो, याहवेहची परतफेड करण्याची ही
रीत आहे काय? ते तुमचे जनक, तुमचे पिता नाहीत काय? त्यांनीच
तुम्हाला बनविले व घडविले नाही काय? 7 पूर्वीच्या काळातील दिवस
आठवा; तुमच्या गत पिढ्यांची वर्षे स्मरणात आणा. तुमच्या वडिलांना
विचारा व ते तुम्हाला सांगतील. तुमच्या वडीलजनांकडे विचारणा करा,
ते याचा खुलासा करतील. 8 जेव्हा सर्वोच्चांनी पृथ्वीवरील राष्ट्रांना
त्यांचे वतन दिले, तेव्हा त्यांनी सर्व मानवजातीची विभागणी केली,
इस्राएलाच्या पुत्रांच्या संख्येनुसार त्यांच्या सीमारेषा आखून दिल्या. 9
कारण याहवेहची प्रजाच त्यांची संपत्ती होती, याकोब हे त्यांचे वैयक्तिक
वतन आहे. 10 एका मरुभूमीत त्यांना ते भेटले ते घोर व भयाण
अरण्य होते. त्यांनी त्याचे जतन व संरक्षण केले; त्यांच्या डोळ्यातील
बाहुलीसारखे त्याचे रक्षण केले, 11 गरुडपक्षीण आपले घरटे हालविते
आणि पिलांवर घिरट्या घालते, आपले पंख पसरून, आपल्या पिलांना
आपल्या पंखावर सुरक्षित वाहून नेते. 12 तसे फक्त याहवेहच याकोबाला
चालवित होते; इतर कोणतेही परदेशी दैवत त्याच्यासोबत नव्हते. 13
याहवेहने त्याला देशातील उंचीवर स्वार केले, आणि शेतातील फळे
खायला दिली. खडकातून पाझरणारा मध, आणि डोंगर कपारीतून
तेलाचा पौष्टिक आहार पुरविला, 14 त्यांनी त्याला कळपातील गाईंचे
दही-दूध, पुष्ट शेळया आणि मेंढरे, आणि बाशानाचे अस्सल मेंढे,
आणि सर्वोत्तम गहू पुरविला, तुम्ही गडद लाल फेसाळणारा द्राक्षारसही

प्यालात. 15 लवकरच यशुरून स्वस्थ झाला आणि लाथा झाडू लागला;
खाऊन पिऊन धष्टपुष्ट व आकर्षक झाला. उन्मत्त होऊन त्याने त्याच्या
निर्माणकर्त्या परमेश्वराचा तिरस्कार केला, आणि आपल्या तारणदुर्गाचा
त्याग केला. 16 त्यांनी परदेशी दैवतांच्या नादी लागून याहवेहला ईर्षेस
पेटविले आणि घृणित मूर्तींमुळे अतिशय संतप्त केले. 17 जे परमेश्वर
नाहीत अशा खोट्या दैवतांना अर्पणे वाहिली— जी दैवते अनोळखी
होती, जी दैवते नवीनच अस्तित्वात आली होती, ज्या दैवतांचे तुमच्या
पूर्वजांना कधीच भय वाटले नाही. 18 ज्या खडकाने तुम्हाला जन्म
दिला, त्याचाच तुम्ही त्याग केला; ज्या परमेश्वराने तुम्हाला निर्माण केले,
त्यांनाच तुम्ही विसरला. 19 हे याहवेहने बघितले आणि त्यांनी त्यांना
नाकारले कारण त्यांच्या पुत्र व कन्यांच्या द्वारे ते संतप्त झाले. 20 तेव्हा
ते म्हणाले, “मी त्यांच्यापासून माझे मुख लपवेन, आणि मग त्यांचा
कसा अंत होतो ते पाहीन; कारण ही विकृत पिढी आहे, जी विश्वासयोग्य
संतती नाही. 21 जे देव नाहीत त्याद्वारे त्यांनी मला ईर्षेस पेटविले
आहे आणि त्यांच्या तुच्छ मूर्तींनी मला संताप आणला आहे. जे लोक
नाहीत त्यांच्याद्वारे मी त्यांना ईर्षेस आणेन; ज्या राष्ट्राला समज नाही
त्याद्वारे मी त्यांना क्रोधास आणेन; 22 कारण माझा क्रोधाग्नी प्रदीप्त
होत आहे, तो थेट अधोलोकापर्यंत खोलवर पेटणार आहे. तो पृथ्वी व
तिच्यावरील सर्व पिके जाळून टाकील, आणि तिच्या पर्वतांच्या पायांना
अग्नी लावील. (Sheol h7585) 23 “मी त्यांच्यावर संकटांची रास रचेन,
माझ्या बाणांनी त्यांच्यावर प्रहार करेन. 24 मी पाठविलेल्या दुष्काळाने
ते दुर्बल होतील, महामारी व घातक रोग त्यांच्यावर येतील; आपल्या
दातांनी त्यांना फाडून खाणारी हिंस्त्र श्वापदे मी त्यांच्यावर पाठवेन,
मातीत सरपटणारे विषारी सर्पही त्यांच्यावर पाठवेन. 25 घराबाहेर
शत्रूंची तलवार त्यांना निर्वंश करेल; आणि घराच्या आत ते भयाक्रान्त
होतील. तरुण पुरुष व तरुण स्त्रिया, वृद्ध आणि बालके नाश पावतील.
26 मी असे म्हटले असते, मी त्यांना दूरच्या देशात पांगविणार आणि
त्यांची आठवणसुद्धा मानवी स्मरणातून पुसली जाईल, 27 पण मला
शत्रूच्या फुशारक्यांची धास्ती वाटली, ते कदाचित गैरसमज करतील,
आणि म्हणतील, ‘आम्ही आमच्या बाहुबलानेच विजय मिळविला आहे;
याहवेहने यातील काहीही केले नाही.’” 28 ते एक असमंजस राष्ट्र आहे,
त्यांच्यात काही विवेक नाही. 29 हे लोक सुज्ञ असते आणि जर त्यांना
हे कळले असते तर किती बरे झाले असते, आणि त्यांचा अंत कसा
होणार हे त्यांना समजले असते! 30 हे कसे शक्य आहे, केवळ एक
मनुष्य हजार लोकांचा, किंवा दोन लोक दहा हजार लोकांचा पाठलाग
करू शकतात, जर इस्राएलांच्या खडकाने त्यांना विकून टाकले नसते,
जर याहवेहने त्यांना टाकले नसते, तरच असे होऊ शकले असते? 31
कारण त्यांचा खडक आमच्या खडकासारखा नाही, आमचे शत्रू देखील
हे मान्य करतात. 32 त्यांची द्राक्षलता सदोमाच्या द्राक्षलतेमधून येते,
आणि गमोराच्या मळयातून येते. त्यांचे द्राक्ष विषाने भरलेले आहेत,
आणि द्राक्षाचे घड कडू चवीचे आहेत. 33 त्यांचे द्राक्षारस सर्पाचे विष, ते
नागांचे घातक विष आहे. 34 “यांना मी राखून ठेवलेले नाही काय,
आणि यांना माझ्या तिजोरीत सुरक्षित ठेवले नाही काय? 35 सूड घेणे
मजकडे आहे; मी परतफेड करेन. ठरल्या वेळेवर त्यांचे पाय घसरतील;
त्यांच्या नाशाचा दिवस जवळ आलेला आहे, आणि त्यांचा सर्वनाश
वेगाने त्यांच्या दिशेने सरसावत आहे.” 36 याहवेह आपल्या लोकांचा
न्याय करतील, आणि त्यांच्या सेवकांसाठी त्यांच्या मनाला पाझर फुटेल
जेव्हा त्यांच्यातील सर्व शक्ती संपून जाईल, आणि दास किंवा स्वतंत्र
असे कोणीही उरणार नाहीत. 37 मग ते विचारतील: “आता त्यांची
दैवते कुठे आहेत, त्यांचे आश्रयाचे खडक कुठे आहेत? 38 ज्या दैवतांनी
त्यांच्या यज्ञातील चरबीचे सेवन केले आणि त्यांच्या द्राक्षारसाचे रसपान
केले, ती दैवते आता कुठे आहेत? त्या दैवतांनी तुमच्या मदतीसाठी
आता जागे व्हावे! त्यांनी त्यांचे आश्रयस्थान व्हावे! 39 “आता पाहा मीच
एकमेव आहे तो आहे! माझ्याशिवाय इतर कोणताही ईश्वर नाही. माझ्या
आदेशानेच मृत्यू येतो आणि जीवनही मीच प्रदान करतो. मी जखम
केली आणि मी ती बरीही करेन, माझ्या हातून सोडविणारा कोणीही
नाही. 40 मी माझा हात स्वर्गाकडे उंचावतो आणि म्हणतो: शपथ माझ्या
जीवनाची, 41 जेव्हा मी माझी लखलखणारी तलवार पाजळेन आणि
न्याय देण्यासाठी ती माझ्या हातात घेईन, मी माझ्या शत्रूचा सूड घेईन,
आणि जे माझा तिरस्कार करतात त्यांची परतफेड करेन. 42 वधलेल्या
व कैद केलेल्यांच्या रक्ताने, शत्रूंच्या सरदारांच्या मस्तकाच्या रक्ताने मी
माझे बाण मदमस्त करेन, आणि माझी तलवार मांस गिळून टाकेल.”
43 अहो राष्ट्रांनो, त्यांच्या लोकांबरोबर जयजयकार करा, कारण आपल्या
सेवकांच्या रक्तपाताचा ते सूड उगवतील; आणि शत्रूंचा प्रतिशोध घेतील,
आणि आपला देश आणि आपले लोक यांच्याकरिता प्रायश्चित करतील.
44 मोशे नूनाचा पुत्र होशा सोबत आला आणि या गीताचे सर्व शब्द
लोकांना ऐकू जातील असे म्हणून दाखविले. 45 जेव्हा मोशेने गीताचे
हे सर्व शब्द सर्व इस्राएलींसमोर बोलून संपविले, 46 तेव्हा तो त्यांना
म्हणाला: “आज मी ज्या नियमशास्त्रामधील आज्ञा तुमच्यापुढे जाहीर
केल्या आहेत, त्याला हृदयात साठवून ठेवा आणि तुमच्या मुलाबाळांना
काळजीपूर्वक रीतीने त्यांचे पालन करण्यास शिकवा. 47 कारण हे
केवळ पोकळ शब्द नाहीत—तर ते तुमचे जीवन आहे. त्याद्वारे यार्देनेच्या
पलीकडे असलेला जो देश तुम्ही ताब्यात घेणार आहात, त्या देशात
तुम्ही दीर्घकाल जगाल.” 48 त्याच दिवशी याहवेह मोशेला म्हणाले,
49 “तू मोआब देशात यरीहो पलीकडे असलेल्या अबारीम पर्वतातील
नबो शिखराकडे जा, त्याच्यावर चढून समोर पसरलेला जो देश मी
इस्राएली लोकांना त्यांचे स्वतःचे वतन म्हणून देणार आहे, त्या कनान
देशाकडे नजर टाक. 50 तुझा भाऊ अहरोन होर पर्वतावर मरण पावला व
आपल्या पूर्वजास जाऊन मिळाला, तसा तू देखील नबो पर्वतावर चढून
गेल्यावर व कनान देश पाहिल्यावर मरशील आणि आपल्या पूर्वजास
जाऊन मिळशील. 51 कारण सीनच्या अरण्यात कादेशच्या मरीबाह
नावाच्या झऱ्याजवळ इस्राएली लोकांसमक्ष तू आणि अहरोनाने माझा
विश्वासघात करून माझ्या पवित्रतेला आदर दिला नाही. 52 तर तो देश

तू दुरून पाहशील; पण मी जो देश इस्राएली लोकांना देणार आहे, त्यात
तू प्रवेश करणार नाहीस.”

**33** परमेश्वराचा मनुष्य मोशेने आपल्या मरणापूर्वी इस्राएली लोकांना
आशीर्वाद जाहीर केले. 2 तो म्हणाला: “याहवेह सीनाय
पर्वतावरून आले आणि सेईरावर ते सूर्याप्रमाणे उदय पावले; पारान
पर्वतावरून ते प्रकाशले. असंख्य पवित्र जनांचा समुदाय त्यांच्याबरोबर
होता. दक्षिण दिशेने, त्यांच्या पर्वत उतरणीवरून ते खाली आले. 3
निश्चित तुम्हीच आपल्या लोकांवर प्रीती करता; सर्व पवित्रजन तुमच्या
अधीन आहेत. ते तुमच्या चरणाशी नमन करतात, आणि तुमच्याकडून
ते आज्ञा स्वीकारतात, 4 मोशेने आम्हाला जे नियम दिले, ते नियम
याकोबाच्या सभेचे अमोल वतन आहे. 5 इस्राएलच्या गोत्रांबरोबर
जेव्हा इस्राएलच्या लोकांचे पुढारी एकत्र जमले, तेव्हा याहवेह यशुरून
लोकांचे राज्यकर्ता झाले. 6 “रऊबेन जिवंत राहो व त्यास मृत्यू न
येवो, त्याची माणसे कमी न होवोत.” 7 आणि तो यहूदाहबद्दल असे
म्हणाला: “हे याहवेह, यहूदाहचा धावा ऐका; आणि त्याला आपल्या
लोकांजवळ आणा. स्वतःच्या हाताने ते त्याचे संरक्षण करतात, तुम्हीच
त्याच्यासाठी त्याच्या शत्रूविरुद्ध साहाय्य व्हा!” 8 मग तो लेवी विषयी
म्हणाला: “तुमचे उरीम व थुम्मीम, तुमच्या विश्वसनीय लोकांच्या
अधिकारात कायम राहोत. ज्यांची तुम्ही मस्सा येथे परीक्षा घेतली;
आणि मरीबाहच्या झऱ्याजवळ तुम्ही त्यांच्याशी झुंज दिली. 9 आपले
आई आणि वडील यांच्याबद्दल त्याने म्हटले, ‘ते माझे कोणीही नाहीत.’
त्याने आपल्या बांधवांना ओळखले नाही, किंवा आपल्या संततीस
ओळखले नाही, परंतु त्याने तुमच्या आज्ञांचे पालन केले, आणि तुमच्या
कराराशी ते प्रामाणिक राहिले. 10 ते तुमचे विधी याकोबाला, आणि
तुमचे नियमशास्त्र इस्राएली लोकांना शिकवतील. धूपाच्या वेदीवर ते धूप
जाळतील, व तुमच्या वेदीवर संपूर्ण होमबली अर्पितील. 11 हे याहवेह,
त्यांचे सर्व कौशल्य आशीर्वादित करा, आणि त्यांची हस्तकृती तुम्हाला
प्रसन्न करो. त्यांच्याविरुद्ध जे उठतात त्यांना चिरडून टाका, आणि ते
पुन्हा उठणार नाहीत, असे करा.” 12 मोशे बिन्यामीनाबद्दल म्हणाला:
“याहवेहचा लाडका त्यांच्याजवळ सुरक्षित राहो, कारण दिवसभर
याहवेह त्याची ढाल होऊन त्याला आपली सुरक्षा प्रदान करतात, आणि
जो याहवेहला प्रिय आहे तो त्यांच्या दोन्ही खांद्यामध्ये सुरक्षित आहे.” 13
तो योसेफाबद्दल म्हणाला: “याहवेह स्वर्गातील मौल्यवान दवाने, आणि
पृथ्वीच्या खोलात असलेल्या जलाने त्याच्या भूमीला आशीर्वादित करोत;
14 सूर्यप्रकाशाने मिळणारे उत्तम उत्पादन, आणि चंद्राच्या प्रभावाने
मिळणाऱ्या उत्तम गोष्टी त्याला प्राप्त होवो; 15 प्राचीन पर्वतामधून
प्राप्त होणाऱ्या सर्वोत्तम वस्तूंनी आणि सनातन डोंगरातून मिळणाऱ्या
निवडक फळांनी भरून जावो; 16 जी पृथ्वीच्या विपुलतेची सर्वोत्तम भेट,
आणि जळत्या झुडूपातून बोलणाऱ्या त्या प्रभूच्या कृपादृष्टीने तो समृद्ध
होवो. योसेफाच्या व त्याच्या वंशजाच्या मस्तकावर हे सर्व आशीर्वाद
येवोत, जो आपल्या भाऊबंदांत प्रमुख होता. 17 प्रथम जन्मलेल्या
बैलासारखे त्याचे वैभव आहे; त्याची शिंगे रानबैलाची शिंगे आहेत, त्या
शिंगानी तो राष्ट्रांना, पृथ्वीच्या दिगंती असलेल्यांना देखील भोसकतो.
एफ्राईमाचे लाखो वंशज आणि मनश्शेहचे हजारो वंशज असे आहेत.”
18 जबुलूनाविषयी तो म्हणाला: “जबुलूना, तुझा प्रवास तुझ्यासाठी
आनंदाचा होवो आणि तू इस्साखारा, आपल्या डेऱ्यात उल्हास करो.
19 ते लोकांना डोंगरावर बोलवतील व तिथे न्याययुक्त अशी यज्ञार्पणे
वाहतील; समुद्रातून मिळविलेल्या उत्पन्नाचे ते स्वामी होतील, वाळूतून
आपले गुप्तधन काढतील.” 20 गादाविषयी तो म्हणाला: “धन्य आहे
गादाचा विस्तार! गाद सिंहासारखा जीवन जगतो, झडप घालून तो भुजा
आणि डोके फोडतो. 21 त्याने स्वतःसाठी सर्वोत्तम अशी भूमी निवडली
आहे; पुढाऱ्यासाठी राखून ठेवलेली जमीन त्याला मिळाली आहे.
वंशपित्यांच्या सभेत त्याने इस्राएलाकरिता याहवेहच्या नीतिपर इच्छेचे
आणि याहवेहच्या न्यायाचे पालन केले.” 22 दानाविषयी तो म्हणाला:
“दान हा सिंहाच्या छाव्यासारखा आहे, बाशानातून तो सिंहासारखी
झेप घेतो.” 23 नफताली विषयी तो म्हणाला: “नफताली याहवेहच्या
सर्व आशीर्वादांनी तृप्त आहे आणि त्यांच्या कृपेत परिपूर्ण आहे; तो
सागरापर्यंतचा दक्षिण भाग वतन करून घेईल.” 24 आशेराविषयी
तो म्हणाला: “आशेर हा पुत्रांपैकी सर्वात धन्य आहे; त्याला सर्व
भावांची कृपादृष्टी प्राप्त होवो आणि त्याचे पाय तेलाने धुतले जावोत.
25 लोखंड आणि काशांच्या अडसरांनी त्याच्या शहराचे रक्षण होवो,
आणि तुझे सामर्थ्य तुझ्या जीवनमानाइतके असो. 26 “यशुरूनच्या
परमेश्वरासमान कोणी नाही, ते आपल्या वैभवाच्या मेघावर आरूढ
होऊन, आकाशमंडळातून तुझ्या साहाय्यार्थ धावून येतात. 27 सनातन
परमेश्वर तुमचा आश्रय आहे, आणि सनातन बाहू तुझ्याखाली आहेत.
तुझ्या शत्रूंना ते तुझ्यापुढून घालवून देतात, ‘त्यांचा नाश करा!’ असा
ते आदेश देतात. 28 म्हणून इस्राएल सुरक्षितेत जगेल; याकोबास
संरक्षण प्राप्त होईल, धान्य आणि नव्या द्राक्षारसाने समृद्ध असलेल्या
आणि आकाशातील जलांच्या दवबिंदूंनी सिंचित होणाऱ्या भूमीत तो
सुरक्षित राहील. 29 इस्राएला, तू आशीर्वादित आहेस! इतर कोणत्या
लोकांना याहवेहने वाचविले आहे काय? तेच तुझी ढाल व तुझे साहाय्य
आहेत आणि तुझ्या वैभवाची तलवार आहेत. तुझे शत्रू तुझ्यापुढे थरथर
कापतील, आणि तू त्यांची उच्च स्थाने पायाखाली तुडवशील!”

**34** नंतर मोशे मोआबाच्या सपाट मैदानातून यरीहोच्या समोरील
नबो पर्वताच्या पिसगा नामक शिखरावर चढून गेला. तिथून
सभोवार—गिलआदापासून दानपर्यंतचा—सर्व प्रदेश याहवेहने त्याला
दाखविला, 2 नफतालीचा संपूर्ण प्रदेश, एफ्राईम आणि मनश्शेह यांचे
प्रदेश, त्यांच्या पलीकडे भूमध्य समुद्रापर्यंत पसरलेला तो यहूदीयाचा
सर्व प्रदेश, 3 नेगेव प्रांत व यार्देनेचे खोरे! आणि खजुरीच्या झाडांचे
यरीहो शहर, सोअर प्रांतापर्यंत. 4 मग याहवेह त्याला म्हणाले, “हाच
तो वचनदत्त देश होय, ज्याचे मी अब्राहाम, इसहाक व याकोब यांना
शपथपूर्वक वचन देऊन मी म्हटले होते, ‘मी हा देश त्यांच्या वंशजांना
देईन.’ आता त्याला तू स्वतःच्या डोळयांनी पाहिले आहेस, परंतु तू
त्यात प्रवेश करणार नाहीस.” 5 आणि याहवेहने सांगितल्याप्रमाणे,

याहवेहचा सेवक मोशे मोआब देशात मरण पावला. 6 याहवेहने त्याला
मोआब देशातील बेथ-पौरजवळील खोऱ्यात पुरले, पण आजपर्यंत
त्याला पुरले ते ठिकाण नक्की कुठे आहे हे कोणालाही ठाऊक नाही. 7
मृत्युसमयी मोशे एकशेवीस वर्षांचा होता तरीही त्याची दृष्टी कमी झाली
नव्हती, की त्याची शक्ती कमी झाली नव्हती. 8 इस्राएली लोकांनी
मोआबाच्या मैदानात मोशेसाठी विलाप करण्याचे तीस दिवस पूर्ण
होईपर्यंत शोक केला. 9 नूनाचा पुत्र यहोशुआ हा ज्ञानाच्या आत्म्याने
परिपूर्ण होता, कारण मोशेने त्याजवर आपले हात ठेवले होते. म्हणून
इस्राएली लोकांनी त्याचे ऐकले आणि याहवेहने मोशेला दिलेल्या आज्ञा
ते पाळीत असत. 10 मोशेसारखा संदेष्टा इस्राएलात पूर्वी झाला नाही,
कारण याहवेह त्याच्याशी समोरासमोर बोलत असत, 11 याहवेहच्या
आज्ञेवरून त्याने इजिप्तमध्ये फारोह—त्याच्या दरबारातील लोक व
संपूर्ण देशात आश्चर्यकारक चमत्कार केले. 12 मोशेने इस्राएलसमोर जे
महान सामर्थ्यशाली किंवा भयावह चमत्कार केले ते चमत्कार इतर
कोणीही केले नाही.

# यहोशुआ

**1** याहवेहचा सेवक मोशेच्या मृत्यूनंतर, मोशेचा मदतनीस, नूनाचा पुत्र
यहोशुआला याहवेह म्हणाले: 2 “माझा सेवक मोशे मरण पावला
आहे, तर आता तू आणि हे सर्व लोक यार्देन नदी ओलांडून त्या देशात
जाण्यास तयार व्हा, जो मी त्यांना, म्हणजे इस्राएली लोकांना देत आहे.
3 मी मोशेला दिलेल्या वचनानुसार जिथे तुम्ही तुमचे पाऊल ठेवाल
ते प्रत्येक ठिकाण मी तुम्हाला देईन. 4 तुमची सीमा वाळवंटापासून
लबानोन पर्यंत आणि महान नदी फरातपासून, सर्व हिथी देश, ते
पश्चिमेकडे भूमध्य समुद्रापर्यंत असेल. 5 तुमच्या आयुष्यातील सर्व
दिवस तुम्हाला कोणीही विरोध करू शकणार नाही, कारण मी जसा
मोशेबरोबर होतो तसाच तुझ्याबरोबरही असेन; मी तुला कधीही सोडणार
नाही किंवा टाकणार नाही. 6 खंबीर हो आणि हिंमत धर, कारण जो
देश या लोकांच्या पूर्वजांना वारसा म्हणून देण्याची मी शपथ वाहिली
त्या देशात नेण्यासाठी तू त्यांचे नेतृत्व करशील. 7 “मात्र तू खंबीर हो
आणि फार धैर्यवान हो. माझा सेवक मोशेने तुम्हाला दिलेले सर्व नियम
पाळण्याची काळजी घे; त्यापासून उजवीकडे किंवा डावीकडे वळू नको,
म्हणजे जिथे तू जाशील तिथे तू यशस्वी होशील. 8 शास्त्रग्रंथातील हे
नियम नेहमी तुझ्या मुखात असू दे; दिवसा आणि रात्री त्यांचे मनन कर,
त्यात लिहिलेल्या सर्व गोष्टींचे काळजीपूर्वक पालन करशील, तर तुझी
भरभराट होईल आणि तू यशस्वी होशील. 9 मी तुला आज्ञापिले नाही
का? खंबीर हो आणि धैर्यवान हो. भिऊ नको; निराश होऊ नको, कारण
तू जिथे जाशील तिथे याहवेह तुझे परमेश्वर तुझ्याबरोबर असतील.”
10 तेव्हा यहोशुआने तेथील लोकांच्या अधिकाऱ्यांना हुकूम दिला: 11
“छावणीमधून जा आणि लोकांना सांगा, ‘तुमची अन्नसामुग्री तयार
ठेवा. आतापासून तीन दिवसात तुम्ही येथून यार्देन नदी पार करून जाल
आणि याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला जो देश देत आहेत, त्याचा ताबा
घ्याल.’” 12 परंतु रऊबेन आणि गाद आणि मनश्शेहच्या अर्ध्या गोत्राला
यहोशुआ म्हणाला, 13 “याहवेहचा सेवक मोशेने दिलेल्या आज्ञेची
आठवण ठेवा, नंतर तो म्हणाला, ‘तुम्हाला विश्रांती मिळावी म्हणून
याहवेह तुमचे परमेश्वर हा प्रदेश तुम्हाला देतील.’ 14 तुमच्या स्त्रिया,
तुमची लेकरे आणि गुरे मोशेने तुम्हाला यार्देनेच्या पूर्वेकडे दिलेल्या
प्रदेशात राहू शकतील, परंतु युद्धासाठी तयार असलेले तुमचे सर्व योद्धे
इस्राएली लोकांच्या पुढे नदी पार करून जातील. तुम्ही त्यांना मदत
करावी. 15 याहवेहने जशी तुम्हाला विश्रांती दिली आहे तशीच त्यांनाही
देईपर्यंत आणि याहवेह तुमचे परमेश्वर त्यांना जो प्रदेश देत आहेत, त्याचा
ताबा घेईपर्यंत तुम्ही त्यांची मदत करावी. त्यानंतर तुम्ही परत जाऊ
शकता आणि जो यार्देनेच्या पूर्वेकडील प्रदेश याहवेहचा सेवक मोशेने
तुम्हास दिला आहे, त्या स्वतःच्या प्रदेशात तुम्ही वास्तव्य करू शकता.”
16 तेव्हा ते यहोशुआला म्हणाले, “जी आज्ञा तू आम्हाला दिली आहेस
त्याप्रमाणे आम्ही करू आणि जिथे कुठे तू आम्हाला पाठवशील तिथे
आम्ही जाऊ. 17 जसे आम्ही मोशेच्या आज्ञांचे पूर्णपणे पालन केले,
तसेच आम्ही तुझ्या आज्ञांचे पालन करू. फक्त एवढेच की तुझे परमेश्वर
याहवेह तुझ्याबरोबर असावे जसे ते मोशेबरोबर होते. 18 जो कोणी
तुझ्या शब्दाविरुद्ध बंड करेल आणि त्याचे पालन करणार नाही, त्याला
मरणदंड दिला जाईल. फक्त खंबीर हो आणि धैर्यवान हो!”

**2** त्यानंतर नूनाचा पुत्र यहोशुआने गुप्तपणे शिट्टीम येथून दोन हेर
पाठविले. तो म्हणाला, “जा, देशाचे अवलोकन करा, विशेषकरून
यरीहोचे.” तेव्हा ते गेले आणि राहाब नावाच्या वेश्येच्या घरी गेले आणि
तिथे राहिले. 2 तेव्हा यरीहोच्या राजाला बातमी दिली गेली, “पहा, काही
इस्राएली लोक हेरगिरी करण्यासाठी आज रात्री येथे आले आहेत.” 3
तेव्हा यरीहोच्या राजाने राहाबकडे निरोप पाठविला: “जे लोक तुझ्याकडे
आले आणि तुझ्या घरी उतरले आहेत त्यांना बाहेर काढ, कारण ते
संपूर्ण देशात हेरगिरी करण्यासाठी आले आहेत.” 4 परंतु त्या स्त्रीने
त्या दोन्ही पुरुषांना लपवून ठेवले होते. ती म्हणाली, “होय, ते पुरुष
माझ्याकडे आले होते, परंतु मला माहीत नव्हते की ते कुठून आले होते.
5 संध्याकाळी शहराच्या वेशी बंद होण्याच्या सुमारास ते निघून गेले.
मला माहीत नाही ते कोणत्या मार्गाने गेले. लवकर त्यांच्यामागे जा.
तुम्ही त्यांना पकडू शकाल.” 6 परंतु तिने त्यांना घराच्या धाब्यावर
वाळत ठेवलेल्या जवसाच्या ताटांच्या ढिगाऱ्याखाली लपविले होते. 7
तेव्हा ते पुरुष जो रस्ता यार्देन नदी ओलांडण्यासाठी जातो त्या रस्त्यावर
हेरांचा शोध करीत गेले. शोध घेणारे बाहेर पडताच वेशी बंद करण्यात
आल्या. 8 रात्री ते हेर झोपी जाण्यापूर्वी ती घराच्या धाब्यावर गेली 9
आणि त्यांना म्हणाली, “मला माहीत आहे की, हा देश याहवेहने तुम्हाला
दिलेला आहे आणि तुमच्या भीतीमुळे आम्ही धास्तावून गेलो आहोत,
म्हणून या देशात राहणारे सर्व लोक तुमच्या भीतीने थरथरत आहेत. 10
कारण जेव्हा तुम्ही इजिप्त देशातून बाहेर पडला त्यावेळेस तुमच्यासाठी
तांबड्या समुद्रातून याहवेहने मार्ग कसा तयार केला, याबद्दल आम्ही
ऐकले आहे आणि यार्देनेच्या पूर्वेस असणाऱ्या सीहोन व ओग या दोन
अमोऱ्यांच्या राजांचा तुम्ही कसा संपूर्ण नाश केला, याबद्दल आम्ही
ऐकले आहे. 11 जेव्हा आम्ही या गोष्टी ऐकल्या, तेव्हा आमची अंतःकरणे
भीतीने थरारून गेली आणि प्रत्येकाचे धैर्य थंड पडले, कारण याहवेह जे
तुमचे परमेश्वर वर स्वर्गात आहेत ते परमेश्वर पृथ्वीवर सुद्धा आहेत. 12
“तर आता मला याहवेहकडून वचन द्या की तुम्ही माझ्या कुटुंबावर दया
दाखवाल, कारण मी तुमच्यावर दया दाखविली आहे. मला खात्रीने
एक चिन्ह द्या, 13 की माझे आई आणि वडील, माझे भाऊ आणि
बहिणी आणि त्यांच्या कुटुंबातील सर्वांचे प्राण वाचवाल आणि आम्हाला
मृत्यूपासून सोडवाल.” 14 “आम्ही तुमच्या जिवास जीव देऊ!” त्या
पुरुषांनी तिला खात्री दिली. “आम्ही जे काही करीत आहोत ते जर तू
सांगणार नाहीस, तर जेव्हा याहवेह हा प्रदेश आमच्या हाती देतील,
आम्ही तुला दयेने वागवू आणि तुझ्याबरोबर विश्वासू राहू.” 15 तेव्हा
तिने खिडकीतून दोरी टाकून त्यांना खाली उतरविले कारण तिचे घर
गावकुसावर होते. 16 ती त्यांना म्हणाली, “तुम्ही डोंगराकडे पळून जा
म्हणजे तुमचा शोध घेणाऱ्यांना तुम्ही सापडणार नाही. जोपर्यंत ते परत

येत नाहीत, तोपर्यंत तीन दिवस तिथेच लपून राहा आणि नंतर तुम्ही
तुमच्या मार्गाने परत जा.” 17 आता ते पुरुष तिला म्हणाले, “जेव्हा
आम्ही या प्रदेशात प्रवेश करू त्यावेळेस किरमिजी रंगाचा हा दोर, ज्याने
तू आम्हाला खाली सोडलेस तो तुझ्या खिडकीतून लोंबताना आम्हाला
दिसला नाही आणि तुझे वडील आणि आई, तुझे भाऊ आणि तुझ्या सर्व
कुटुंबाला तुझ्या घरात आणले नाहीस तर, तू जे वचन आमच्याकडून
शपथ घालून घेतले आहेस, ते आमच्यावर बंधनकारक राहणार नाही.
19 जर त्यांच्यापैकी कोणीही घराबाहेर रस्त्यावर जातील तर त्यांचे
रक्त त्यांच्याच माथ्यावर राहेल, आम्ही त्याला जबाबदार नसणार. जे
तुझ्या घरात तुझ्याबरोबर आहेत जर त्यांना काही झाले तर त्यांचे रक्त
आमच्या माथ्यावर असेल. 20 परंतु जर तू आम्ही काय करीत आहोत हे
कोणाला सांगितलेस तर, ही शपथ जी तू आमच्याकडून वाहून घेतली
आहेस त्यातून आम्ही मुक्त होऊ.” 21 “मला मान्य आहे,” ती म्हणाली.
“तुमच्या म्हणण्याप्रमाणे होवो.” तेव्हा तिने त्यांना पाठवून दिले आणि
ते निघून गेले आणि तिने किरमिजी रंगाचा दोर तिच्या खिडकीला
बांधला. 22 जेव्हा ते डोंगराळ भागाकडे निघून गेले आणि तीन दिवस
तिथे राहिले, तोपर्यंत शोध करणाऱ्यांनी सर्व रस्त्यांवर त्यांचा शोध
घेतला आणि काही न सापडता ते परत आले. 23 नंतर ते दोन पुरुष
परत मागे निघाले. डोंगर उतरले आणि नदी पार करून नूनाचा पुत्र
यहोशुआकडे आले आणि त्यांच्या बाबतीत घडलेल्या सर्व गोष्टी त्याला
सांगितल्या. 24 ते यहोशुआला म्हणाले, “याहवेहने तो संपूर्ण प्रदेश
निश्चितच आपल्या हाती दिला आहे; तेथील सर्व लोक आपल्यामुळे
भयभीत झालेले आहेत.”

3 दुसऱ्या दिवशी पहाटेच यहोशुआ आणि सर्व इस्राएली लोकांनी
शिट्टीम सोडले आणि ते यार्देन नदी पार करण्यापूर्वी त्यांनी काही
दिवस तिथेच तळ दिला. 2 मग तीन दिवसानंतर अधिकाऱ्यांनी छावणीत
फिरून लोकांना या सूचना दिल्या: 3 “तुम्ही जेव्हा याहवेह तुमचे
परमेश्वराच्या कराराचा कोश व तो वाहत असणाऱ्या लेवी याजकांना
पाहाल, तेव्हा तुमच्या ठिकाणातून निघून त्यांच्या पाठोपाठ जा. 4 तेव्हा
कोणत्या मार्गाने जावे हे तुम्हाला समजेल, कारण तुम्ही या मार्गाने पूर्वी
कधी गेला नाही. परंतु तुमच्यात व कोशात अंदाजे वीस हजार हाताचे
अंतर असावे; तुम्ही त्याजवळ जाऊ नये.” 5 मग यहोशुआने लोकांना
सांगितले, “तुम्ही शुद्ध व्हा, कारण उद्या तुम्हामध्ये याहवेह एक महान
चमत्कार करणार आहेत.” 6 यहोशुआने याजकांस म्हटले, “कराराचा
कोश उचलून घ्या आणि लोकांच्या पुढे चला.” तेव्हा त्यांनी कोश घेतला
व लोकांच्या पुढे निघाले. 7 मग याहवेह यहोशुआस म्हणाले, “आज मी
तुला मोठा सन्मान बहाल करणार आहे, म्हणजे सर्व इस्राएली लोकांना
कळून येईल की, मी जसा मोशेबरोबर होतो, अगदी तसाच तुझ्याबरोबर
देखील आहे. 8 कराराचा कोश वाहून नेणाऱ्या याजकांना सांग, ‘जेव्हा
तुम्ही यार्देन नदीच्या पाण्याच्या काठावर पोहोचाल तेव्हा जा व नदीत
उभे राहा.’” 9 मग यहोशुआने इस्राएली लोकांस म्हटले, “इकडे या
व याहवेह तुमच्या परमेश्वराचे शब्द ऐका. 10 यहोशुआ म्हणाला,
अशाप्रकारे तुम्हाला कळेल की जिवंत परमेश्वर तुमच्यामध्ये आहेत व
कनानी, हिथी, हिव्वी, परिज्जी, गिर्गाशी, अमोरी व यबूसींना ते खचितच
तुमच्या समोरून घालवून देतील. 11 पाहा, अखिल पृथ्वीच्या प्रभूच्या
कराराचा कोश तुमच्यापुढे यार्देन नदीत प्रवेश करेल. 12 तर आता
इस्राएलच्या प्रत्येक गोत्रातून एक असे बारा पुरुष निवडा. 13 याहवेह
अखिल पृथ्वीच्या प्रभूच्या कराराचा कोश वाहून नेणाऱ्या याजकांचे
पाय यार्देनला लागताच, वरून वाहत येणारे पाणी थांबेल व त्याची रास
उभी राहील.” 14 जेव्हा यार्देन नदी पार करण्यासाठी लोकांनी आपली
छावणी उठविली, तेव्हा कराराचा कोश वाहून नेणारे याजक त्यांच्या
पुढे निघाले. 15 तो हंगामाचा काळ होता व त्या संपूर्ण काळात यार्देन
नदीला पूर आलेला असतो. तरीही कोश वाहणारे याजक यार्देनपर्यंत
पोहोचताच व त्यांचे पाय पाण्याला स्पर्श करताच, 16 वरून वाहत येणारे
पाण्याचे प्रवाह थांबले. सारेथान जवळील आदाम नावाच्या गावात
खूप अंतरावर पाण्याची एक रास झाली, तर अराबाच्या समुद्राकडे
(म्हणजे मृत समुद्रात) वाहणारे पाणी पूर्णपणे कापले गेले. तेव्हा लोक
यरीहो समोर नदीपलीकडे गेले. 17 सर्व इस्राएली लोकांच्या संपूर्ण
राष्ट्राने कोरड्या जमिनीवरून पलीकडे जाईपर्यंत, याहवेहचा कराराचा
कोश वाहून नेणारे याजक यार्देनेच्या मध्यभागी थांबले आणि कोरड्या
जमिनीवर उभे राहिले.

4 जेव्हा सर्व लोकांनी यार्देन नदी ओलांडली, तेव्हा याहवेह यहोशुआला
म्हणाले, 2 “लोकातील प्रत्येक गोत्रातून एक अशा बारा पुरुषांची
निवड कर, 3 आणि त्यांना सांग की त्यांनी यार्देनेच्या मध्यभागातून,
म्हणजे जिथे याजक उभे आहेत, तिथून बारा धोंडे उचलून घ्यावे आणि ते
तुमच्याबरोबर घेऊन आज रात्री ज्या ठिकाणी तुम्ही राहणार आहात त्या
ठिकाणी ठेवावे.” 4 तेव्हा यहोशुआने इस्राएलच्या प्रत्येक गोत्रातून एक
अशा बारा पुरुषास निवडले व त्यांना बोलाविले, 5 आणि यहोशुआ त्यांना
म्हणाला, “यार्देनेच्या मध्यभागी जिथे याहवेह तुमच्या परमेश्वराचा कोश
आहे त्याच्यापुढे जा. तिथून तुमच्यातील प्रत्येकाने एक धोंडा खांद्यावर
वाहून आणावा. इस्राएलच्या बारा गोत्रातील प्रत्येक गोत्रामागे एक,
असे एकूण बारा धोंडे तुम्ही बारा जणांनी आणावे. 6 ते आपल्यासाठी
एक चिन्ह असेल, यासाठी की जेव्हा भावी काळात तुमची मुलेबाळे
तुम्हाला विचारतील, ‘या धोंड्यांचा अर्थ काय आहे?’ 7 तेव्हा तुम्हाला
त्यांना सांगता येईल, याहवेहच्या कराराच्या कोशासमोर यार्देन नदीचा
वाहता प्रवाह थांबला होता. जेव्हा त्यांनी यार्देन पार केली, तेव्हा यार्देन
नदीच्या पाण्याचा प्रवाह दुभागला होता. हे धोंडे इस्राएली लोकांसाठी
कायमचे स्मारक चिन्ह असावे.” 8 तेव्हा इस्राएली लोकांनी यहोशुआने
सांगितल्याप्रमाणे केले. याहवेहने यहोशुआला आज्ञापिल्यानुसार प्रत्येक
गोत्रामागे एक याप्रमाणे बारा धोंडे त्यांनी यार्देन नदीच्या मध्यभागातून
उचलले व ज्या ठिकाणी त्यांनी छावणी दिली, त्या ठिकाणी ते धोंडे
ठेवले. 9 यहोशुआने यार्देन नदीच्या मध्यभागी असलेले बारा धोंडे जिथे
कराराचा कोश वाहून नेणारे याजक उभे होते तिथे उभे केले आणि
आजपर्यंत ते तिथेच आहेत. 10 मोशेने यहोशुआला सुचविल्याप्रमाणे,

याहवेहने यहोशुआला ज्या आज्ञा होत्या, त्या पूर्ण होईपर्यंत कोश
वाहणारे याजक यार्देन नदीच्या मध्यभागी उभे राहिले, तेव्हा लोकांनी
घाईने नदी ओलांडली. 11 त्या सर्वांनी नदी पार करणे संपविताच
याहवेहचा कोश व याजक सर्व लोकांच्या देखत पलीकडे गेले. 12 मग
मोशेने त्यांना सांगितल्याप्रमाणे रऊबेन, गाद आणि मनश्शेहचे अर्धे गोत्र
इस्राएली लोकांपुढे युद्धासाठी सुसज्ज होऊन पुढे निघाले. 13 युद्धासाठी
सुसज्ज झालेले सुमारे चाळीस हजार पुरुष याहवेहसमोर यरीहोच्या
मैदानात पलीकडे गेले. 14 त्या दिवशी याहवेहने यहोशुआला सर्व
इस्राएली लोकांच्या दृष्टीत सन्मानित केले आणि जसे त्यांनी मोशेच्या
संपूर्ण आयुष्यभर त्याचा आदर केला, तसाच त्यांनी यहोशुआचाही
केला. 15 नंतर याहवेह यहोशुआला म्हणाले, 16 “याजकांना आज्ञा
दे, कराराच्या नियमांचा कोश घेऊन यार्देन नदीतून वर या.” 17 तेव्हा
यहोशुआने याजकांना आज्ञा दिली, “यार्देन नदीतून वर या.” 18 आणि
याजक याहवेहच्या कराराचा कोश घेऊन यार्देन नदीच्या पात्रातून वर
आले. त्यांनी त्यांचे पाय कोरड्या जमिनीवर ठेवताच, नदीचे पाणी परत
मूळ ठिकाणी आले आणि पूर्वीप्रमाणे ते भरून वाहू लागले. 19 पहिल्या
महिन्याच्या दहाव्या दिवशी ते यार्देनेतून वर आले आणि यरीहोच्या पूर्व
सीमेवरील गिलगाल येथे त्यांनी छावणी घातली. 20 आणि यहोशुआने
गिलगाल येथे यार्देनेतून बाहेर काढलेल्या बारा धोंड्यांची रचना केली.
21 तो इस्राएली लोकांना म्हणाला, “भविष्यकाळात तुमचे वंशज त्यांच्या
वडिलांना विचारतील, ‘या धोंड्यांचा अर्थ काय आहे?’ 22 त्यांना सांग,
‘इस्राएली लोक यार्देन नदीतून कोरड्या जमिनीवरून पलीकडे आले.’
23 कारण याहवेह तुमच्या परमेश्वरांनी तुम्ही यार्देन नदी पार करेपर्यंत
तुमच्यासमोर नदीचे पात्र कोरडे ठेवले. याहवेह तुमच्या परमेश्वरांनी
यार्देन नदीचे जसे केले तसेच त्यांनी आम्ही लाल समुद्र पार करेपर्यंत तो
कोरडा केला होता. 24 हे त्यांनी यासाठी केले की, पृथ्वीवरील सर्व
राष्ट्रांना कळावे की याहवेह सामर्थ्यशाली आहेत आणि म्हणून तुम्ही
सदैव याहवेह तुमच्या परमेश्वराचे भय बाळगावे.”

**5** आता जेव्हा यार्देनेच्या पश्चिमेकडील सर्व अमोरी राजांनी आणि
किनाऱ्यावरील सर्व कनानी राजांनी ऐकले की, याहवेहनी कशाप्रकारे
इस्राएली लोकांसमोर ते पार करून जाईपर्यंत यार्देन नदी कोरडी करून
दिली, त्यांची अंतःकरणे भीतीने गळून गेली आणि पुन्हा इस्राएली
लोकांना सामोरे जाण्यास त्यांना धैर्य राहिले नाही. 2 त्यावेळेस याहवेहनी
यहोशुआस सांगितले, “गारगोटीच्या सुऱ्या तयार कर आणि ज्या
इस्राएली लोकांची रानात सुंता झाली नव्हती त्यांची सुंता कर.” 3
तेव्हा यहोशुआने गारगोटीच्या सुऱ्या तयार केल्या आणि गिबियाथ
हारालोथ या ठिकाणी इस्राएली लोकांची सुंता केली. 4 यहोशुआने सुंता
यासाठी केली की: इजिप्त देश सोडून जे सर्व बाहेर आले—युद्धाचे
वय असलेले सर्व पुरुष—इजिप्त सोडून येत असताना रानामध्ये मरण
पावले. 5 बाहेर पडलेल्या सर्व पुरुषांची सुंता झाली होती, परंतु इजिप्त
सोडल्यानंतरच्या प्रवासाच्या काळात जे सर्व पुरुष जन्मले त्यांची सुंता
झाली नव्हती. 6 इस्राएली लोक चाळीस वर्षे संपेपर्यंत रानात भ्रमण
करीत राहिले होते. इजिप्त सोडताना जे पुरुष युद्ध करण्याच्या वयाचे
होते, ते सर्वजण याकाळात मरण पावले होते, कारण त्यांनी याहवेहची
आज्ञा पाळली नव्हती. याहवेहनी त्यांना शपथपूर्वक सांगितले होते की,
जो देश इस्राएलला देण्याचे वचन मी त्यांच्या पूर्वजास दिलेले होते त्या
“दुधामधाचे प्रवाह वाहणाऱ्या” देशात, मी त्यांना प्रवेश करू देणार
नाही. 7 म्हणून जी मुले आपल्या वडिलांची जागा घेण्यायोग्य झाली
होती, यहोशुआने त्यांची सुंता केली. ते अजूनही बेसुंती होते कारण
वाटेत त्यांची सुंता झाली नव्हती 8 सुंतेच्या विधीनंतर जखमा बऱ्या
होईपर्यंत संपूर्ण इस्राएली राष्ट्राने छावणीत विश्रांती घेतली. 9 मग याहवेह
यहोशुआस म्हणाले, “आज मी तुमच्यापासून इजिप्तचा कलंक दूर
लोटून दिला आहे,” यास्तव त्या ठिकाणाला गिलगाल असे नाव देण्यात
आले आणि आज देखील ते ठिकाण त्याच नावाने ओळखले जाते.
10 यरीहोच्या मैदानावर गिलगाल येथे इस्राएली लोकांनी तळ दिलेला
असताना, त्या महिन्याच्या चौदाव्या दिवशी सायंकाळी त्यांनी वल्हांडण
सण साजरा केला. 11 वल्हांडणाच्या दुसऱ्या दिवशी, त्याच दिवशी त्यांनी
त्या जमिनीतील काही उपज खाल्ले: बेखमीर भाकरी आणि भाजलेले
धान्य. 12 त्यांनी त्या जमिनीतून उगविलेले धान्य खाल्ले त्याच्या दुसऱ्या
दिवसापासून मान्ना मिळण्याचे थांबले; तिथून पुढे इस्राएली लोकांना
कोणताही मान्ना मिळाला नाही, परंतु त्या वर्षी त्यांनी कनानमधील
उपज खाल्ला. 13 आता यहोशुआ जेव्हा यरीहोजवळ होता, त्याने वर
पाहिले आणि त्याला दिसले की त्याच्यासमोर एक पुरुष तलवार हातात
घेऊन त्याच्यासमोर उभा आहे. यहोशुआ त्याच्याजवळ गेला आणि
त्याला विचारले, “तू आमच्या बाजूने आहेस की आमच्या शत्रूच्या
बाजूने आहेस?” 14 “कोणाच्याही बाजूचा नाही,” त्याने उत्तर दिले,
“परंतु याहवेहचा सेनानायक म्हणून मी आलो आहे.” तेव्हा यहोशुआने
आदराने त्याच्यासमोर लोटांगण घातले आणि त्याला विचारले, “माझ्या
प्रभूकडून त्याच्या सेवकासाठी काय आदेश आहे?” 15 याहवेहच्या
सेनानायकाने उत्तर दिले, “तुझ्या पायातील पायतण काढ, कारण ज्या
भूमीवर तू उभा आहेस ती पवित्र आहे.” तेव्हा यहोशुआने त्याप्रमाणे
केले.

**6** इस्राएली लोकांमुळे यरीहोच्या वेशी आता कडक बंदोबस्ताने बंद
करून टाकल्या होत्या. कोणी बाहेर गेला नाही आणि कोणीही आत
आला नाही. 2 तेव्हा याहवेह यहोशुआला म्हणाले, “पाहा, मी यरीहो
शहर, त्याचबरोबर त्यांचा राजा आणि त्यांचे योद्धे पुरुष देखील तुझ्या
हाती दिले आहे. 3 सर्व सशस्त्र माणसांना घेऊन शहराभोवती एक
प्रदक्षिणा घाला. सहा दिवस असेच करा. 4 मेंढ्याच्या शिंगापासून
केलेली रणशिंगे घेऊन सात याजक कोशाच्या पुढे ठेवा. सातव्या दिवशी
याजक रणशिंगे वाजवित शहराभोवती सात वेळेस प्रदक्षिणा घालतील.
5 जेव्हा त्यांच्या रणशिंगाचा मोठा व दीर्घ आवाज तुम्ही ऐकाल, त्यावेळी
संपूर्ण सैन्याने मोठा जयघोष करावा. तेव्हा शहराचा तट कोसळेल आणि
सैन्य पुढे जाईल, नंतर प्रत्येकजण सरळ आत प्रवेश करेल.” 6 तेव्हा
नूनाचा पुत्र यहोशुआने याजकांना बोलाविले आणि त्यांना सांगितले,

“याहवेहच्या कराराचा कोश घ्या आणि त्यासमोर सात याजक रणशिंगे
घेऊन जातील.” 7 त्याने सैनिकांना हुकूम दिला, “पुढे चला! सशस्त्र
सुरक्षा सैनिकांना याहवेहच्या कोशापुढे ठेऊन शहराच्या सर्व बाजूने
प्रदक्षिणा घाला.” 8 जेव्हा यहोशुआने लोकांबरोबर बोलणे केले,
तेव्हा सात याजक याहवेहच्या पुढे त्यांची सात रणशिंगे वाजवित पुढे
निघाले आणि याहवेहच्या कराराचा कोश त्यांच्यामागे गेला. 9 सशस्त्र
शिपाई रणशिंगे वाजविणाऱ्या याजकांच्या पुढे चालू लागले आणि
मागून येणारे शिपाई कोशाच्या मागे चालत राहिले. या सर्व वेळेपर्यंत
रणशिंगे वाजविली जात होती. 10 परंतु यहोशुआने सैन्याला आज्ञा दिली
होती, “युद्धाची घोषणा करू नका, तुम्ही मोठ्याने जयघोष करू नका,
तुमचा आवाज उंचावू नका, जयघोष करा असे मी तुम्हाला सांगेन त्या
दिवसापर्यंत एकही शब्द बोलू नका.” 11 तेव्हा त्यांनी याहवेहचा कोश
घेऊन शहराभोवती एक प्रदक्षिणा घातली. त्यानंतर सैन्य परत छावणीत
आले आणि तिथे त्यांनी रात्री मुक्काम केला. 12 दुसऱ्या दिवशी
सकाळीच यहोशुआ उठला आणि याजकांनी याहवेहचा कोश उचलून
घेतला. 13 सात याजक सात रणशिंगे फुंकत याहवेहच्या कोशाच्या
पुढे निघाले. सशस्त्र सैनिक त्यांच्या पुढे गेले आणि रणशिंगे फुंकली
जात असताना मागे जाणारे सुरक्षा सैनिक याहवेहच्या कोशाच्या मागे
गेले. 14 तेव्हा दुसऱ्या दिवशी त्यांनी शहराभोवती एक वेळेस प्रदक्षिणा
घातली आणि ते छावणीकडे परत आले. सहा दिवस त्यांनी असेच केले.
15 सातव्या दिवशी ते पहाटेच उठले आणि त्यांनी नेहमीप्रमाणे त्या
शहराला प्रदक्षिणा घातल्या, फक्त त्या दिवशी त्यांनी सात प्रदक्षिणा
घातल्या. 16 सातव्या प्रदक्षिणेच्या वेळी जेव्हा याजकांनी रणशिंगांचा
दीर्घ निनाद केला, तेव्हा यहोशुआने सैन्याला आज्ञा केली, “जयघोष
करा! कारण याहवेहनी हे शहर तुम्हाला दिले आहे! 17 हे शहर आणि
त्यातील सर्वकाही याहवेहला समर्पित करावे. राहाब वेश्या आणि जी
कोणी माणसे तिच्या घरात असतील त्यांना वाचविले जावे, कारण
आपण पाठविलेल्या हेरांना तिने लपवून ठेवले होते. 18 परंतु अर्पण
केलेल्या सर्व वस्तूंपासून दूर राहा, म्हणजे त्यातील काहीही घेतल्याने
तुम्ही स्वतःवर नाश ओढवून घेणार नाही. नाहीतर तुम्ही इस्राएलच्या
छावणीच्या नाशासाठी जबाबदार ठराल आणि तिच्यावर संकट आणाल.
प्रत्येक वस्तूचा तुम्ही नाश केला नाही, तर संपूर्ण इस्राएली राष्ट्रावर अनर्थ
कोसळेल. 19 सर्व चांदी आणि सोने, तसेच मिश्र धातूची वेगवेगळी पात्रे
आणि लोखंडाची पात्रे याहवेहला समर्पित आहेत आणि ती त्यांच्या
भांडारात आणली पाहिजे.” 20 जेव्हा रणशिंगांनी निनाद केला, तेव्हा
सैन्याने मोठा जयघोष केला आणि रणशिंगाच्या आवाजामुळे जेव्हा
पुरुषांनी मोठ्याने आवाज केला, तेव्हा तेथील भिंत कोसळून पडली;
तेव्हा प्रत्येकजण सहजपणे आत गेला आणि त्यांनी ते शहर हस्तगत
केले. 21 त्यांनी ते शहर याहवेहला समर्पित केले आणि त्या शहरात
जिवंत असलेल्या प्रत्येकाचा संहार केला: पुरुष, स्त्रिया, तरुण आणि
वृद्ध, बैल, मेंढरे आणि गाढवे या सर्वांचा नाश केला. 22 ज्यांनी तो देश
हेरला होता त्या दोन हेरांना यहोशुआ म्हणाला, “त्या वेश्येच्या घरी
जा आणि तिला व तिच्याबरोबर असलेल्या तिच्या नातेवाईकांना तुम्ही
वचन दिल्याप्रमाणे बाहेर काढा.” 23 तेव्हा ज्या तरुण पुरुषांनी तो
देश हेरला होता, ते आत गेले आणि त्यांनी राहाब, तिचे वडील आणि
आई, तिचे भाऊ आणि बहिणी आणि तिच्याबरोबर असलेल्या तिच्या
सर्व नातेवाईकांना बाहेर काढले. त्यांनी तिच्या संपूर्ण कुटुंबाला बाहेर
काढले आणि इस्राएलच्या छावणीबाहेरील जागेत त्यांच्या राहण्याची
व्यवस्था केली. 24 इस्राएली लोकांनी ते शहर व त्यातील प्रत्येक
गोष्ट जाळून टाकली. फक्त चांदी व सोने, कास्य व लोखंडाची पात्रे
याहवेहच्या भांडारासाठी राखून ठेवण्यात आली. 25 परंतु यहोशुआने
राहाब वेश्येस आणि तिच्याबरोबर असलेल्या तिच्या सर्व नातेवाईकांना
वाचविले, कारण यहोशुआने यरीहोत पाठविलेल्या हेरांना तिने लपवून
ठेवले होते आणि इस्राएली लोकांमध्ये ते आजपर्यंत राहत आहेत. 26
तेव्हा यहोशुआने गंभीरपणाने शपथ घेतली: “जो कोणी यरीहो शहर
पुन्हा बांधण्याचा प्रयत्न करेल, तो याहवेहसमोर शापित ठरेल: “जो
कोणी या शहराचा पाया घालेल; त्याचा प्रथमपुत्र मरण पावेल, आणि
जो कोणी या शहराच्या वेशी उभारेल, त्याचा धाकटा पुत्र मरण पावेल.”
27 याप्रमाणे याहवेह यहोशुआबरोबर होते आणि त्याच्या नावाची सर्वत्र
किर्ती पसरली.

7 परंतु इस्राएली लोक समर्पित केलेल्या वस्तूंबाबतीत अविश्वासू होते;
यहूदाह गोत्रातील जेरहाचा पुत्र जब्दी याचा पुत्र कर्मी, याचा पुत्र
आखानाने त्यातील काही वस्तू घेतल्यामुळे याहवेहचा क्रोध इस्राएल
राष्ट्राविरुद्ध भडकला. 2 यहोशुआने काही माणसे यरीहोकडून आयकडे
पाठविली, जे बेथेलच्या पूर्वेकडे बेथ-आवेनजवळ आहे आणि त्यांना
म्हणाला, “जा आणि त्या प्रदेशाला हेरा.” तेव्हा ती माणसे निघाली
आणि त्यांनी आय शहर हेरले. 3 जेव्हा ते यहोशुआकडे परत आले,
त्यांनी सांगितले, “संपूर्ण सैन्याला आय विरुद्ध लढाई करण्यासाठी
जावे लागणार नाही. ते जिंकण्यासाठी दोन ते तीन हजार माणसे
पाठवा आणि संपूर्ण सैन्याला थकवू नका, कारण फक्त थोडेच लोक
तिथे राहतात.” 4 तेव्हा सुमारे तीन हजार हल्ला करून गेले; परंतु
आयच्या लोकांनी त्यांचा पराभव केला. 5 आयच्या लोकांनी त्यांच्यातील
छत्तीसजणांना मारून टाकले. त्यांनी इस्राएली सैनिकांचा वेशीपुढे
शबारीमपर्यंत पाठलाग केला; यामुळे लोकांची अंतःकरणे भीतीने
वितळून पाण्यासारखी झाली. 6 तेव्हा यहोशुआने त्याची वस्त्रे फाडली
आणि तो संध्याकाळपर्यंत याहवेहच्या कोशासमोर जमिनीवर तसाच
पालथा पडून राहिला. इस्राएलच्या वडीलजनांनी तसेच केले आणि
त्यांनी त्यांच्या डोक्यावर राख शिंपडली. 7 आणि यहोशुआ म्हणाला,
“हाय, सार्वभौम याहवेह, तुम्ही आम्हाला अमोऱ्यांच्या हातून ठार
करणार होता, तर आम्हाला यार्देन नदी पार करून का आणले? आम्ही
यार्देन पलीकडे आमच्याजवळ होते त्यातच आम्ही समाधानी होतो! 8 हे
प्रभू तुमच्या सेवकाला क्षमा करा. आता इस्राएलचा त्यांच्या शत्रूकडून
पराभव झालेला आहे तर मी काय बोलू? 9 कारण कनानी लोक
आणि आसपासची राष्ट्रे याबद्दल ऐकतील, तेव्हा ते आम्हाला सभोवार

घेरतील, आमच्यावर हल्ला करतील आणि आम्हाला नामशेष करून
टाकतील. मग तुमच्या महान नावाच्या थोरवीचे काय होईल?” 10
याहवेह यहोशुआस म्हणाले, “ऊठ! तू असा पालथा का पडला आहेस?
11 इस्राएलने पाप केले आहे; त्यांनी माझा करार भंग केला आहे,
ज्याचे पालन करण्यास मी त्यांना सांगितले होते. समर्पित केलेल्या
वस्तू ते घेऊन आले आहेत; त्यांनी चोरी केली आहे, त्यांनी लबाडी
केली आहे, त्यांनी त्या वस्तू स्वतःच्या मालकीच्या केल्या आहेत.
12 यामुळे इस्राएल त्यांच्या शत्रूपुढे उभे राहू शकत नाहीत; ते पाठ
फिरवून पळून जात आहेत, कारण त्यांच्या नाशासाठी तेच जबाबदार
आहेत. तुमच्यामधून नाशासाठी समर्पित असलेल्या वस्तूंचा तुम्ही
नाश करेपर्यंत मी तुम्हाबरोबर असणार नाही. 13 “तर ऊठ, लोकांना
शुद्ध कर, त्यांना सांग, तुमच्यापैकी प्रत्येकाने उद्यासाठी स्वतःला शुद्ध
करून घ्या, कारण याहवेह इस्राएलचे परमेश्वर असे म्हणतात: अहो
इस्राएली लोकहो, तुमच्यामध्ये समर्पित केलेल्या वस्तू आहेत. त्या
वस्तू काढून टाकेपर्यंत तुम्ही तुमच्या शत्रूपुढे उभे राहू शकणार नाही.
14 “सकाळी तुम्ही तुमच्या गोत्राप्रमाणे याहवेहसमोर उपस्थित व्हावे.
जे गोत्र याहवेह निवडतील त्यांनी त्यांच्या कुळाप्रमाणे पुढे यावे; ज्या
कुळाची याहवेह निवड करतील, त्यांनी त्यांच्या कुटुंबाप्रमाणे पुढे यावे;
आणि ज्या कुटुंबाची याहवेह निवड करतील त्यातील प्रत्येक पुरुषाने
पुढे यावे. 15 जो कोणी समर्पित केलेल्या वस्तूसह सापडेल त्याला,
त्याच्याकडे असलेल्या सर्व वस्तूसह जाळून टाकावे. त्याने याहवेहचा
करार मोडला आहे आणि इस्राएलमध्ये घृणास्पद कृत्य केले आहे.” 16
दुसऱ्या दिवशी सकाळ होताच यहोशुआने इस्राएली लोकांना त्यांच्या
गोत्रानुसार पुढे बोलाविले आणि यहूदाहचे गोत्र निवडण्यात आले. 17
यहूदाहचे गोत्र पुढे आले आणि जेरहाचे कूळ निवडण्यात आले. त्याच्या
कुळातील प्रत्येक कुटुंब पुढे आले आणि जब्दीचे घराणे निवडले गेले.
18 मग जब्दीच्या घराण्यातील एकाएका पुरुषाला समोर आणण्यात
आले आणि यहूदाहच्या वंशातील जेरहाचा पुत्र जब्दीचा पुत्र कर्मीचा
पुत्र आखान निवडला गेला. 19 तेव्हा यहोशुआ आखानास म्हणाला,
“माझ्या मुला, याहवेह इस्राएलच्या परमेश्वराचे गौरव कर आणि आपले
पाप कबूल कर. तू काय केलेस ते मला सांग; माझ्यापासून काहीही
लपवू नकोस.” 20 तेव्हा आखानाने यहोशुआला उत्तर दिले, “खचितच
मी याहवेह इस्राएलच्या परमेश्वराविरुद्ध पाप केले आहे. मी जे केले
ते हे: 21 लुटीमध्ये मी एक सुंदर शिनारी झगा आणि दोनशे शेकेल
चांदी, पन्नास शेकेल सोन्याची लगड या वस्तू पाहिल्या, तेव्हा त्या
मला इतक्या हव्याशा वाटल्या की, मी त्या घेतल्या आणि त्या वस्तू
माझ्या डेऱ्यात खाली जमिनीत पुरून ठेवलेल्या आहेत. झगा आणि
सोने यांच्याहून चांदी सर्वात खाली पुरलेली आहे.” 22 तेव्हा यहोशुआने
संदेशवाहकांना पाठविले, त्यांनी तंबूकडे धाव घेतली आणि तिथे तंबूत
खाली चांदीबरोबर ते सर्वकाही लपविले होते. 23 त्यांनी तंबूतून त्या
सर्व वस्तू घेतल्या व यहोशुआ व सर्व इस्राएली लोकांकडे आणल्या
आणि याहवेहसमोर पसरवून ठेवल्या. 24 मग यहोशुआ आणि सर्व
इस्राएली लोकांनी जेरहाचा पुत्र आखान व त्याच्याबरोबर, ती चांदी, तो
झगा, ती सोन्याची लगड, त्याचे पुत्र, त्याच्या कन्या, त्याचे बैल, गाढवे,
मेंढरे, त्याचा तंबू आणि त्याचे जे काही होते ते सर्व अखोरच्या खोऱ्यात
नेले. 25 मग यहोशुआ आखानाला म्हणाला, “तू आमच्यावर अरिष्ट का
आणलेस? आता याहवेह तुझ्यावर अरिष्ट आणतील.” मग इस्राएल
लोकांनी त्याला धोंडमार केली व त्याच्या बरोबरच्या इतरांनाही धोंडमार
केल्यावर त्यांनी त्यांना जाळून टाकले. 26 आणि आखानावर दगडांची
एक मोठी रास केली, जी आज देखील तिथे आहे. तेव्हा याहवेहचा
कोप शांत झाला आणि तेव्हापासून त्या ठिकाणाला अखोरचे खोरे असे
म्हटले जाते.

**8** तेव्हा याहवेह यहोशुआला म्हणाले, “भिऊ नकोस किंवा निराश
होऊ नकोस; सर्व सैन्य बरोबर घे आणि आय शहरावर हल्ला कर,
कारण जिंकून घेण्यासाठी मी आय शहराचा राजा, त्याचे लोक, त्याचे
नगर व त्याची भूमी तुझ्या हाती दिली आहे. 2 यरीहो शहर आणि
त्याच्या राजाचे तू केलेस तसेच आय शहर आणि त्याच्या राजाचे कर;
परंतु यावेळी हाती लागेल ती लूट व गुरे तुम्ही स्वतःसाठी ठेवू शकाल.
शहराच्या मागील बाजूस तुझ्या लोकांना दबा धरून बसव.” 3 तेव्हा
यहोशुआ आणि सर्व सैन्य आय नगरावर हल्ला करण्यासाठी बाहेर
पडले. त्याने सर्वोत्कृष्ट तीस हजार योद्धे निवडले आणि त्यांना रात्री
पाठवून दिले, 4 त्यांना आज्ञा दिली: “लक्षपूर्वक ऐका. शहराच्या मागील
बाजूस तुम्ही दबा धरून बसावे. त्या ठिकाणापासून फार दूर जाऊ नका.
तुम्ही सर्वजण सावध असा. 5 मी आणि माझ्याबरोबर असलेले सर्वजण
या नगरावर हल्ला करतील आणि जेव्हा त्यांनी आधी केल्याप्रमाणे ती
माणसे बाहेर आमच्यावर चालून येतील तेव्हा आम्ही त्यांच्यापासून
पळून जाऊ. 6 जोपर्यंत आम्ही त्यांना फसवून शहरापासून दूर घेऊन
जाऊ, ते आमचा पाठलाग करतील. कारण ते म्हणतील, ‘आधी केले
तसेच ते आमच्यापासून पळून जात आहेत.’ जेव्हा आम्ही त्यांच्यापासून
पळून जाऊ, 7 तेव्हा तुम्ही दबा धरून बसलेले ठिकाण सोडून आय
शहराचा ताबा घ्यावा. याहवेह तुमचे परमेश्वर ते शहर तुमच्या हाती
देतील. 8 जेव्हा ते शहर तुम्ही हाती घ्याल, तेव्हा याहवेहने आज्ञा
केल्याप्रमाणे तुम्ही त्या शहरास आग लावून द्यावी. लक्षात घ्या; तुम्हाला
मी आज्ञा दिलेल्या आहेत.” 9 नंतर यहोशुआने त्यांना पाठवून दिले
आणि ते आयच्या पश्चिमेकडे बेथेल आणि आयच्यामध्ये दबा धरून
बसण्याच्या ठिकाणाकडे गेले आणि वाट पहात राहिले; परंतु यहोशुआने
ती रात्र लोकांबरोबर घालविली. 10 दुसऱ्या दिवशी पहाटेच यहोशुआने
त्याच्या सैन्याला जमविले आणि तो आणि इस्राएलचे पुढारी त्यांच्यापुढे
आयच्या दिशेने चालत निघाले. 11 संपूर्ण सैन्यदल जे त्याच्याबरोबर
होते ते निघाले आणि शहरापर्यंत पोहोचले आणि त्या शहरासमोर आले.
त्यांनी आयच्या उत्तरेकडे छावणी उभी केली त्यांच्यामध्ये आणि आय
शहराच्यामध्ये खोरे होते. 12 यहोशुआने त्याच्याबरोबर सुमारे पाच हजार
पुरुष घेतले आणि त्यांना बेथेल आणि आय शहराच्यामध्ये पश्चिमेकडे
दबा धरून बसविले होते. 13 मुख्य छावणी शहराच्या उत्तरेकडे व दबा

धरून बसलेले पश्चिमेकडे, याप्रमाणे सैन्याने आपआपले स्थान घेतले.
त्या रात्री यहोशुआ खोऱ्यात गेला. 14 जेव्हा आय शहराच्या राजाने हे
पाहिले, तेव्हा तो आणि त्या शहराचे सर्व पुरुष पहाटेस घाई करून
अराबासमोर एका विशिष्ट ठिकाणी इस्राएलशी युद्ध करण्यास निघाले.
परंतु त्याला माहीत नव्हते की शहराच्या मागील बाजूस शत्रुसैन्य दबा
धरून बसले आहे. 15 नंतर यहोशुआ आणि सर्व इस्राएली सैन्याने त्यांना
मागे येऊ दिले आणि त्यांच्यापुढे ते रानाच्या दिशेने पळाले. 16 आय
शहरातील सर्व पुरुषांना त्यांचा पाठलाग करण्यासाठी बोलाविण्यात
आले. ते यहोशुआचा पाठलाग करीत शहरापासून लांब गेले. 17 इस्राएली
लोकांच्या मागे गेला नाही असा एकही पुरुष आय शहरात किंवा बेथेल
येथे मागे राहिला नाही. त्यांनी आय शहराच्या वेशी उघड्याच टाकल्या
आणि इस्राएलचा पाठलाग करण्यास गेले. 18 तेव्हा याहवेह यहोशुआला
म्हणाले, “तुझा भाला आय शहराकडे उंच कर कारण ते शहर मी तुझ्या
हाती देणार आहे.” तेव्हा यहोशुआने त्याच्या हातात असलेला भाला त्या
शहराच्या दिशेने उंच केला. 19 त्याने तसे केले त्याच क्षणाला दबा धरून
बसलेले पुरुष त्यांच्या जागेतून बाहेर आले आणि पुढे पळत निघाले.
त्यांनी त्या शहरात प्रवेश केला आणि ते ताब्यात घेतले आणि लगेच
ते शहर पेटवून दिले. 20 आयच्या पुरुषांनी मागे वळून पाहिले तेव्हा
त्यांना दिसले की त्यांच्या शहरातून धूर निघून वर आकाशात जात
आहे, परंतु आता कोणत्याही दिशेकडे पळून जाणे त्यांना शक्य नव्हते;
जे इस्राएली लोक रानाकडे पळत चालले होते ते आता मागे वळून
त्यांचा पाठलाग करणाऱ्यांवर चालून आले. 21 कारण जेव्हा यहोशुआ
आणि सर्व इस्राएली लोकांनी पाहिले की दबा धरून बसलेल्या सैन्याने
शहराचा ताबा घेतला आहे आणि तिथून धूर निघून वर जात आहे तेव्हा
ते मागे फिरले आणि त्यांनी आयच्या पुरुषांवर हल्ला केला. 22 दबा
धरून बसलेले सैन्यसुद्धा शहरातून बाहेर पडून त्यांच्या विरोधात आले
तेव्हा ते दोन्ही बाजूंनी इस्राएली लोकांमध्ये सापडले. इस्राएली लोकांनी
त्या सर्वांना मारून टाकले, त्यातील कोणीही जिवंत ठेवला नाही किंवा
निसटूनही गेला नाही. 23 परंतु त्यांनी आय शहराच्या राजाला जिवंत
ताब्यात घेतले आणि त्याला यहोशुआकडे आणले. 24 आय नगरात
राहणारे जे मैदानात आणि रानात त्यांचा पाठलाग करीत आले होते
त्यांच्यातील प्रत्येकाला इस्राएलने तलवारीने मारून संपविल्यानंतर सर्व
इस्राएली लोक आय शहराकडे परत आले आणि तिथे असलेल्या सर्व
लोकांना त्यांनी मारून टाकले. 25 आय शहराचे सर्व रहिवासी; जे पुरुष
आणि स्त्रिया त्या दिवशी मारले गेले, त्यांची संख्या बारा हजार होती.
26 कारण यहोशुआने आपल्या भाल्याचे टोक आय शहरातील सर्व
लोकांचा नाश होईपर्यंत, मागे घेतले नाही. 27 परंतु याहवेहने यहोशुआला
सूचना दिली त्याप्रमाणे इस्राएली लोकांनी त्यांच्यासाठी शहराची गुरे
आणि लूट जिंकून आणली. 28 अशा रीतीने यहोशुआने आय शहर
जाळून टाकले आणि ते नाश झालेल्या अवशेषांचा ढिगारा असे केले,
आजपर्यंत ते ठिकाण असेच ओसाड पडलेले आहे. 29 यहोशुआने आय
शहराच्या राजाचे शव एका झाडाला टांगून ठेवले आणि संध्याकाळपर्यंत
ते तसेच सोडून दिले. सूर्यास्ताच्या वेळेस यहोशुआने त्यांना हुकूम
केला की, त्याचे शरीर झाडावरून काढा आणि ते खाली नगरवेशीच्या
प्रवेशमार्गात फेकून द्यावे. नंतर त्यांनी त्याच्यावर धोंड्यांची एक मोठी
रास रचून ठेवली, ती आजपर्यंत राहिली आहे. 30 मग यहोशुआने
याहवेह इस्राएलच्या परमेश्वरासाठी एबाल पर्वतावर वेदी बांधली, 31 जी
आज्ञा याहवेहचा सेवक मोशेने इस्राएली लोकांना दिली होती. मोशेच्या
नियमशास्त्रात जसे लिहिले होते त्याप्रमाणे ज्या दगडांवर कोणतेही
लोखंडी अवजार वापरलेले नाही, अशा न घडविलेल्या दगडांची त्याने
वेदी बांधली. त्या वेदीवर त्यांनी याहवेहसाठी होमार्पणे व शांत्यर्पणे
केली. 32 तिथेच इस्राएली लोकांच्या उपस्थितीत यहोशुआने मोशेच्या
नियमशास्त्राची एक प्रत दगडांवर लिहिली. 33 सर्व इस्राएली लोक,
त्यांच्या वडीलजनांसह, अधिकारी आणि न्यायाधीश हे सर्व याहवेहच्या
कराराच्या कोशाच्या दोन्ही बाजूंना उभे होते, ज्या लेवीय याजकांनी तो
वाहून आणला त्यांच्यासमोर ते होते. त्यांच्यामध्ये राहणारे परदेशी आणि
तिथे जन्मलेले लोक तिथे होते. जशी आज्ञा याहवेहचा सेवक मोशेने
पूर्वी दिली होती, त्याप्रमाणे अर्धे लोक गरिज्जीम पर्वतासमोर आणि
अर्धे लोक एबाल पर्वतासमोर उभे राहिले, इस्राएली लोकांना आशीर्वाद
देण्यासाठी त्याने या सूचना दिल्या होत्या. 34 मग यहोशुआने त्या
सर्व लोकांस नियमशास्त्राच्या पुस्तकात जशी लिहिलेली होती तशीच
आशीर्वादांची आणि शापांची वचने वाचून दाखविली. 35 यहोशुआने
संपूर्ण इस्राएली मंडळी, स्त्रिया आणि मुलेबाळे आणि जे परदेशीय
त्यांच्यामध्ये राहत होते यांना, मोशेने दिलेल्या सर्व आज्ञातील वाचून
दाखविण्यात आल्या, एकही शब्द न वाचता सोडला नाही.

**9** यार्देनेच्या पश्चिमेकडील सर्व राजांनी—डोंगराळ प्रदेशाच्या राजांनी,
पश्चिमी पर्वत पायथ्यावरील राजांनी आणि लबानोन पर्यंत असलेल्या
भूमध्य समुद्रकिनाऱ्यांवरील सर्व राजांनी (हिथी, अमोरी, कनानी,
परिज्जी, हिव्वी आणि यबूसी राजांनी) या गोष्टींबद्दल ऐकले 2 तेव्हा ते
एकमताने यहोशुआ आणि इस्राएलविरुद्ध युद्ध करण्यास एकत्र आले. 3
तरीपण जेव्हा गिबोनाच्या लोकांनी ऐकले की यहोशुआने यरीहो आणि
आय या शहरांचे काय केले, 4 तेव्हा त्यांनी एका युक्तीचे अवलंबन
केले: ते यहोशुआकडे प्रतिनिधी म्हणून गेले, गाढवांवर जुनी गोणपाटे
आणि झिजलेले, फाटलेले, ठिगळे लावलेले द्राक्षारसाचे बुधले लादले. 5
त्यांनी अंगात जीर्ण झालेले कपडे व पायात झिजलेले व ठिगळांचे जोडे
घातले आणि त्यांच्या शिदोऱ्यांत शिळया वाळलेल्या व बुरशी लागलेल्या
भाकरी होत्या. 6 ते गिलगाल येथील छावणीत यहोशुआकडे आले. ते
यहोशुआला आणि इस्राएली लोकांना म्हणाले, “आम्ही दूरच्या देशातून
आलो आहोत; तुम्ही आमच्याबरोबर शांतीचा करार करा.” 7 तेव्हा
इस्राएली लोकांनी या हिव्वी लोकांस उत्तर दिले, “परंतु कदाचित तुम्ही
आमच्या जवळपास राहत असाल, तेव्हा आम्ही तुमच्याशी शांतीचा
करार कसा करू शकतो?” 8 ते यहोशुआला म्हणाले, “आम्ही तुमचे
दास आहोत.” परंतु यहोशुआने विचारले, “परंतु तुम्ही आहात तरी
कोण आणि कुठून आला आहात?” 9 त्यांनी उत्तर दिले, “तुमचे दास

एका अतिशय दूर देशाहून आले आहेत, कारण आम्ही याहवेह तुमच्या
परमेश्वराची किर्ती आणि इजिप्तमध्ये त्यांनी तुमच्यासाठी जे सर्व केले
त्याबद्दल ऐकले आहे. 10 त्याचप्रमाणे तुम्ही यार्देनच्या पूर्वेकडील
अमोऱ्यांच्या दोन राजांचे—हेशबोनचा राजा सीहोन व अष्टारोथातील
बाशानचा राजा ओगचे काय केले त्यासंबंधी देखील ऐकले आहे. 11
म्हणून आमचे वडीलजन आणि आमच्या लोकांनी आम्हाला सूचना
केली, 'लांबच्या प्रवासाची तयारी करा: वाटेसाठी शिदोरी घ्या आणि
इस्राएली लोकांकडे जा. आपली राष्ट्रे त्यांचे दास आहेत असे त्यांना
जाहीर करा आणि शांतीच्या करारासाठी त्यांना विनंती करा.' 12
आम्ही तुमच्याकडे येण्यास आमचे ठिकाण सोडले, तेव्हा या भाकरी
गरम होत्या, परंतु आता तुम्ही पाहता की त्या वाळून त्यांना बुरशी
लागली आहे. 13 हे द्राक्षारसाचे बुधले अगदी नवीन होते, परंतु आता
ते जुने झालेले आहेत व त्यांना भेगा पडलेल्या आहेत. आमचे कपडे
व आमचे जोडे लांबच्या खडतर प्रवासाने जीर्ण झालेले आहेत." 14
इस्राएली लोकांनी त्यांच्या अन्नसामुग्रींचा नमुना पाहिला, परंतु त्यांनी
याबाबतीत याहवेहला विचारले नाही. 15 नंतर यहोशुआने त्यांनी जगावे
यासाठी त्यांच्याबरोबर शांतीचा करार केला आणि मंडळीच्या पुढाऱ्यांनी
शपथेच्याद्वारे या गोष्टीला संमती दिली. 16 त्यांनी गिबोनी लोकांबरोबर
करार केल्याच्या तीन दिवसानंतर, इस्राएली लोकांनी जेव्हा ऐकले की ते
त्यांचे शेजारी होते, त्यांच्या जवळच राहत होते. 17 तेव्हा इस्राएली लोक
बाहेर पडले आणि तिसऱ्या दिवशी ते त्यांच्या शहरांकडे आले: गिबोन,
कफीराह, बैरोथ आणि किर्याथ-यआरीम ही त्या शहरांची नावे. 18
परंतु इस्राएली लोकांनी त्यांच्यावर हल्ला केला नाही, कारण मंडळीच्या
पुढाऱ्यांनी याहवेह इस्राएलच्या परमेश्वराच्या नावाने त्यांना तशी शपथ
दिली होती. संपूर्ण सभेने पुढाऱ्यांविरुद्ध कुरकुर केली, 19 परंतु सर्व
पुढाऱ्यांनी उत्तर दिले, "आपण याहवेह इस्राएलच्या परमेश्वराद्वारे त्यांना
शपथ दिली आहे आणि आता आपण त्यांना स्पर्श करू शकत नाही.
20 आपण त्यांच्यासाठी असे करू या: आपण त्यांना जिवंत राहू देऊ,
म्हणजे आपण त्यांना दिलेली शपथ मोडल्याबद्दल परमेश्वराचा क्रोध
आपल्यावर येणार नाही." 21 ते पुढे म्हणाले, "त्यांना जगू द्या, परंतु
त्यांनी संपूर्ण मंडळीच्या सेवेसाठी लाकूड तोडणारे आणि पाणी वाहणारे
म्हणून राहावे." अशाप्रकारे पुढाऱ्यांनी त्यांना दिलेल्या वचनाचे पालन
केले. 22 नंतर यहोशुआने गिबोनी लोकांना बोलावून घेतले आणि
त्यांना विचारले, "आम्ही दूरच्या देशात राहतो असे सांगून तुम्ही आमची
फसवणूक का केली? खरे पाहिले तर तुम्ही आमच्या जवळच राहता. 23
तुमच्यावर आता शाप आला आहे: तुम्हाला आता माझ्या परमेश्वराच्या
घरासाठी लाकडे तोडणारे आणि पाणी वाहणारे या सेवेतून कधीही
सोडविले जाणार नाही." 24 तेव्हा त्यांनी यहोशुआला उत्तर दिले,
"कारण आम्हाला असे सांगण्यात आले होते की, याहवेह तुमच्या
परमेश्वरांनी आपला सेवक मोशेला हा संपूर्ण प्रदेश जिंकून घेण्याची
आणि त्यात राहणाऱ्या सर्व लोकांना नष्ट करण्याची आज्ञा दिली होती.
म्हणून तुमच्यामुळे आम्हाला आमच्या जिवाबद्दल भीती वाटू लागली;
म्हणूनच आम्ही हे केले. 25 आता आम्ही सर्वस्वी तुमच्या हाती आहोत.
तुम्हाला चांगले व योग्य वाटेल त्याप्रमाणे आमचे करा." 26 तेव्हा
यहोशुआने त्यांना इस्राएली लोकांपासून वाचविले व त्यांना जिवे मारू
दिले नाही. 27 यहोशुआने त्या दिवशी इस्राएली लोकांच्या सभेकरिता
आणि याहवेह निवडतील त्या ठिकाणच्या वेदीसाठी त्यांना लाकूडतोडे
व पाणके म्हणून नेमले. हीच व्यवस्था आजपर्यंत आहे.

**10** यरीहो येथे यहोशुआने जे केले, तसेच आय शहरात करून त्याने
ते कसे हस्तगत केले, त्याचा कसा नाश केला, त्याच्या राजांचा
कसा वध केला, गिबोनाच्या लोकांनी इस्राएली लोकांशी शांतीचा करार
कसा केला आणि आता ते इस्राएलचे मित्र राष्ट्र म्हणून कसे बनून
राहिले, या सर्व गोष्टी यरुशलेमचा राजा अदोनी-सेदेक याने ऐकल्या, 2
तेव्हा तो व त्याचे लोक अतिशय घाबरून गेले. कारण गिबोन हे एका
राजेशाही शहराप्रमाणे प्रतिष्ठित शहर होते; ते आय नगरापेक्षा मोठे होते
व त्यातील पुरुष उत्तम योद्धे होते. 3 म्हणून यरुशलेमचा राजा अदोनी-
सेदेकाने हेब्रोनाचा राजा होहाम, यर्मूथचा राजा पिराम, लाखीशचा राजा
याफीय आणि एग्लोनाचा राजा दबीरकडे आपले निवेदन पाठवले.
4 तो म्हणाला, "या आणि गिबोनावर हल्ला करण्यास मला मदत
करा, कारण त्यांनी यहोशुआशी व इस्राएल लोकांशी शांतीचा करार
केला आहे." 5 तेव्हा अमोऱ्यांचे पाच राजे—यरुशलेम, हेब्रोन, यर्मूथ,
लाखीश व एग्लोन या नगरांचे राजे एकत्र आले व आपले सैन्य एकजूट
करून गिबोन विरुद्ध त्यांनी आपले स्थान घेतले व त्यांच्यावर हल्ला
केला. 6 तेव्हा यहोशुआ जो गिलगालच्या छावणीत होता, त्याच्याकडे
गिबोनाच्या लोकांनी निरोप पाठवून म्हटले: "आमचा त्याग करू नका.
आमच्याकडे लवकर येऊन आम्हाला वाचवा! आमची मदत करा, कारण
डोंगरवटीच्या सर्व अमोरी राजांनी आमच्याविरुद्ध आपले सैन्य उभारले
आहे." 7 लगेच यहोशुआ आपल्या सर्वोत्तम योद्ध्यांसह सर्व सैन्य
घेऊन गिलगालहून निघाला. 8 तेव्हा याहवेह यहोशुआला म्हणाले,
"त्यांना भिऊ नकोस; मी त्यांना तुझ्या हाती दिलेले आहे. त्यांच्यातील
कोणीही तुझ्यापुढे टिकाव धरू शकणार नाही." 9 गिलगालहून रात्रभर
प्रवास केल्यानंतर, यहोशुआने त्यांच्यावर अचानक हल्ला केला. 10
मग याहवेहने इस्राएली समोर शत्रू सैन्यांमध्ये गोंधळ निर्माण केला
आणि यहोशुआ व इस्राएलांच्या सैन्याने गिबोनाजवळ पूर्णपणे त्यांचा
पराभव केला. इस्राएली लोकांनी वर बेथ-होरोनकडे जाणाऱ्या वाटेपर्यंत
त्यांचा पाठलाग केला व अजेकाह व मक्केदापर्यंत त्यांना मारत आले.
11 ते इस्राएल पुढून बेथ-होरोन पासून अजेकाहच्या वाटेवरून पळून
जात असताना, याहवेहने त्यांच्यावर गारांच्या प्रचंड वर्षाव केला आणि
इस्राएली लोकांच्या तलवारीपेक्षा गारांनीच अधिक लोक मारले गेले. 12
ज्या दिवशी याहवेहने अमोरी लोकांना इस्राएली लोकांच्या हाती दिले,
तेव्हा इस्राएली लोकांच्या उपस्थितीत यहोशुआ याहवेहना म्हणाला:
"सूर्या, गिबोनावर स्थिर उभा हो, आणि हे चंद्रा, तू अय्यालोनच्या
खोऱ्यावर स्तब्ध राहा" 13 तेव्हा इस्राएली राष्ट्राने आपल्या शत्रूंचा
सूड घेईपर्यंत सूर्य स्थिर उभा राहिला, आणि चंद्र स्तब्ध झाला. जसे

याशारच्या ग्रंथात लिहिलेले आहे. सूर्य संपूर्ण दिवसभर आकाशात
मध्यभागी स्थिर राहिला आणि त्याने अस्त होण्यास विलंब केला. 14
असा दिवस यापूर्वी कधीही आला नव्हता आणि त्यानंतरही कधी आला
नाही. त्या दिवशी, याहवेहने एका मनुष्याचा शब्द ऐकला. कारण याहवेह
निश्चितच इस्राएलसाठी लढत होते! 15 त्यानंतर यहोशुआ सर्व इस्राएली
लोकांसोबत गिलगाल येथील छावणीकडे परतला. 16 तेव्हा ते पाच राजे
पळून गेले व मक्केदा येथे गुहेत लपून बसले. 17 ते पाच राजे मक्केदा
येथील एका गुहेत लपलेले आहेत हे जेव्हा यहोशुआला कळविण्यात
आले, 18 तेव्हा यहोशुआ म्हणाला, “मोठे धोंडे गुहेच्या तोंडावर लोटा
आणि त्याचे राखण करावयाला काही माणसांना तिथे बसवा. 19 पण
थांबू नका; शत्रूचा पाठलाग चालू ठेवा! त्यांच्यावर मागून हल्ला करा
आणि त्यांना त्यांच्या शहरांकडे जाऊ देऊ नका, कारण याहवेह तुमच्या
परमेश्वरांनी त्यांना तुमच्या हातात दिले आहे.” 20 तेव्हा यहोशुआ आणि
इस्राएली सैन्याने त्यांचा पूर्ण पराभव केला, परंतु त्यातून काही लोक
वाचले व त्यांच्या तटबंदीच्या शहरात गेले. 21 मग संपूर्ण इस्राएली
सैन्य मक्केदाच्या छावणीत यहोशुआकडे सुरक्षित परतले. त्यानंतर
इस्राएलविरुद्ध कोणीही एकही शब्द उच्चारला नाही. 22 यहोशुआने
म्हटले, “गुहेचे तोंड उघडून त्या पाच राजांना माझ्याकडे बाहेर आणा.”
23 मग त्या गुहेतून पाच राजे—यरुशलेम, हेब्रोन, यर्मूथ, लाखीश आणि
एग्लोन या नगरांच्या राजांना बाहेर काढण्यात आले. 24 जेव्हा त्या पाच
राजांना बाहेर काढून यहोशुआ पुढे हजर करण्यात आले, तेव्हा त्याने
सर्व इस्राएली पुरुषांना बोलाविले. मग त्याच्यासोबत आलेल्या सेनेच्या
अधिकाऱ्यांना तो म्हणाला, “इकडे या व आपले पाय या राजांच्या
मानेवर ठेवा.” तेव्हा ते पुढे आले आणि त्यांनी आपले पाय या राजांच्या
मानेवर ठेवले. 25 तेव्हा यहोशुआ त्यांना म्हणाला, “भिऊ नका; निराश
होऊ नका. खंबीर आणि धैर्यवान व्हा, कारण याहवेह तुमच्या सर्व
शत्रूंच्या बाबतीत हेच करणार आहेत.” 26 नंतर यहोशुआने त्या राजांचा
वध केला आणि त्यांची मृत शरीरे पाच झाडांवर संध्याकाळपर्यंत तशीच
टांगून ठेवली. 27 सूर्य मावळू लागला, तेव्हा यहोशुआने आज्ञा दिली
की त्या राजांचे मृतदेह झाडांवरून खाली काढा आणि ते ज्या गुहेमध्ये
लपून राहिले होते त्या गुहेत ती फेकून द्या. हे केल्यावर गुहेच्या तोंडावर
त्यांनी मोठमोठ्या खडकांची रास रचून ठेवली. आजपर्यंत ती रास
तिथेच आहे. 28 त्याच दिवशी यहोशुआने मक्केदा या शहराचा नाश
केला आणि त्या शहराचा राजा व त्यातील प्रत्येकाचा तलवारीने संहार
केला. एकही व्यक्ती जिवंत ठेवण्यात आली नाही. त्याने यरीहोच्या
राजाचे केले तसेच मक्केदाच्या राजाचेही केले. 29 नंतर यहोशुआ व
त्याच्याबरोबर सर्व इस्राएली लोक मक्केदाहून लिब्नाह शहरावर चालून
गेले आणि त्याच्यावर हल्ला केला. 30 याहवेहने ते शहर आणि त्याच्या
राजालाही इस्राएलच्या हाती दिले. ते शहर आणि त्यातील प्रत्येकाचा
यहोशुआने तलवारीने नाश केला. त्याने कोणालाही जिवंत सोडले नाही
आणि यरीहोच्या राजाचे जसे केले तसे त्याने तेथील राजांचे केले. 31
मग यहोशुआसह संपूर्ण इस्राएल लिब्नाहहून लाखीशला गेले; ते त्या
शहराशी युद्ध करण्यासाठी सज्ज झाले व त्यांच्यावर हल्ला केला. 32
याहवेहने लाखीश शहर इस्राएलच्या हाती दिले आणि यहोशुआने दुसऱ्या
दिवशी त्यांच्यावर ताबा मिळविला. लिब्नाहचा केला तसाच लाखीश
शहर व त्यात असलेल्या सर्वांचा त्यांनी तलवारीने नाश केला. 33
लाखीशवर हल्ला होत असताना, गेजेरचा राजा होराम लाखीश शहरास
मदत करण्यास आला. परंतु यहोशुआने त्याचा व त्याच्या सैनिकांचा
पराजय केला; त्यांच्यातील एकही जण वाचला नाही. 34 मग यहोशुआ
व त्याच्यासह संपूर्ण इस्राएलने लाखीश सोडल्यावर ते एग्लोनला आले;
त्यांनी त्यांच्यावर हल्ल्याची तयारी केली व त्यांच्याशी लढले. 35 त्यांनी
ते शहर त्याच दिवशी हस्तगत केले आणि तेथील प्रत्येकाचा लाखीश
येथे केल्याप्रमाणे तलवारीने नाश केला. एकही व्यक्ती जिवंत राहिली
नाही. 36 मग यहोशुआ आणि त्याच्यासह संपूर्ण इस्राएलने एग्लोन
सोडल्यावर ते हेब्रोनला आले आणि त्यावर हल्ला केला. 37 त्यांनी ते
शहर हस्तगत केले आणि एग्लोन येथे केल्याप्रमाणे हेब्रोनच्या राजासह
प्रत्येकाचा तलवारीने नाश केला. एकही व्यक्ती जिवंत राहू दिली नाही.
38 मग यहोशुआ व त्याच्यासह संपूर्ण इस्राएली मागे वळून दबीरवर
चालून गेले व त्यांच्याशी लढले. 39 त्यांनी ते शहर, त्याचा राजा व
त्यातील गावे हस्तगत केली व त्यांना तलवारीने मारून टाकले. त्यातील
प्रत्येकाचा समूळ नाश केला. त्यांनी एकही व्यक्ती जिवंत सोडली नाही.
आणि लिब्नाह व त्याच्या राजाला व हेब्रोनला केले तसे त्यांनी दबीर व
त्याच्या राजालाही केले. 40 अशा रीतीने यहोशुआने सर्व देश, म्हणजे
डोंगराळ प्रदेश, नेगेव प्रांत, पश्चिमी तळवट, डोंगराची उतरण, तेथील
राजांसह हस्तगत केला. एकही व्यक्ती जिवंत सोडली नाही. याहवेह
इस्राएलच्या परमेश्वरांनी आज्ञापिल्याप्रमाणे प्रत्येक जीवधारी प्राण्यांचा
नाश केला. 41 कादेश-बरनेआपासून गाझापर्यंत आणि गोशेनपासून
गिबोनापर्यंतचे प्रदेश यहोशुआने हस्तगत केले. 42 यहोशुआने हे सर्व
राजे व त्यांची भूमी एकाच मोहिमेत जिंकले, कारण याहवेह इस्राएलचे
परमेश्वर इस्राएलसाठी लढले. 43 मग यहोशुआ सर्व इस्राएली लोकांसह
गिलगालच्या छावणीकडे परतला.

**11** हासोराचा राजा याबीनने या घडलेल्या घटनांबद्दल ऐकले, तेव्हा
त्याने मादोनाचा राजा योबाब, शिम्रोनाचे व अक्षाफाचे राजे, 2 व
उत्तरेकडील डोंगराळ प्रदेशांचे सर्व राजे; किन्नेरेथाच्या दक्षिणेकडील
अराबात असलेले राजे; तळवटीत असलेले राजे, पश्चिमेकडील नाफथ
दोराच्या प्रदेशातील राजे; 3 पूर्वेकडील व पश्चिमेकडील कनानी; अमोरी,
हिथी, परिज्जी आणि डोंगराळ प्रदेशातील यबूसी लोकांना; आणि
मिस्पाहच्या हर्मोन डोंगराच्या तळाशी राहणारे हिव्वी या सर्व लोकांना
निरोप पाठवला. 4 ते त्यांचे सैनिक, मोठ्या संख्येने घोडे आणि रथ
घेऊन समुद्र किनाऱ्यावरील वाळूप्रमाणे एक मोठे सैन्य घेऊन बाहेर
आले. 5 हे सर्व राजे इस्राएलाशी लढण्यासाठी एकत्र आले व मेरोम
सरोवरापाशी त्यांनी आपला तळ दिला. 6 परंतु याहवेह यहोशुआला
म्हणाले, “तू त्यांना भिऊ नकोस, कारण उद्या यावेळेस मी त्यांना मृत
झालेले इस्राएलच्या हाती देईन. त्यांच्या घोड्यांच्या धोंडशिरा तोडून

टाक व त्यांचे रथ जाळून टाक.” 7 तेव्हा यहोशुआ आणि त्याचे सैन्य
अकस्मात मेरोम सरोवराजवळ दाखल झाले आणि त्यांनी हल्ला केला.
8 याहवेहने त्यांना इस्राएली लोकांच्या हाती दिले व त्यांनी शत्रूंचा
सीदोन महानगरीपर्यंत व मिसरेफोत-मयिम या ठिकाणापर्यंत आणि
पूर्वेस मिस्पेह खोऱ्यापर्यंत पाठलाग केला; अशा रीतीने या लढाईत
शत्रूंचा एकही व्यक्ती जिवंत राहिला नाही. 9 मग याहवेहने सूचना
दिल्याप्रमाणे यहोशुआने त्यांच्या घोड्यांच्या धोंडशिरा तोडून टाकल्या
आणि त्यांचे सर्व रथ जाळून टाकले. 10 परत येताना यहोशुआने हासोर
शहर हस्तगत केले आणि तेथील राजाला तलवारीने ठार मारले. (हासोर
शहर त्या सर्व संयुक्त राज्यांची राजधानी होती.) 11 त्या शहरातील
प्रत्येकाचा तलवारीने संहार करण्यात आला. त्यांनी तिथे असलेल्या
प्रत्येक जिवंत व्यक्तीचा नाश केला आणि हासोर शहर जाळून टाकले.
12 मग यहोशुआने ही सर्व राजकीय शहरे व त्यांच्या राजांवर हल्ले करून
त्यांचा नाश केला. याहवेहचा सेवक मोशेने आज्ञापिल्याप्रमाणे सर्व
लोकांची तलवारीने कत्तल करण्यात आली. 13 इस्राएलने टेकड्यांवर
वसलेल्या शहरांपैकी कोणतेही शहर जाळून टाकले नाही—फक्त हासोर,
जे यहोशुआने जाळले. 14 उद्ध्वस्त केलेल्या सर्व शहरातील लूट व
गुरे इस्राएली लोकांनी स्वतःसाठी घेतली; परंतु सर्व लोकांचा नाश
होईपर्यंत त्यांना तलवारीने मारले. त्यांनी कोणालाही जिवंत ठेवले नाही.
15 कारण याहवेहने आपला सेवक मोशेला अशीच आज्ञा दिली होती;
आणि मोशेने ही आज्ञा यहोशुआला दिली व यहोशुआने जसे सांगण्यात
आले होते, त्याप्रमाणे केले; याहवेहने मोशेला दिलेल्या सर्व आज्ञांचे
त्याने काळजीपूर्वक पालन केले. 16 अशा रीतीने यहोशुआने हे सर्व
देश जिंकून घेतले, म्हणजे डोंगराळ प्रदेश, नेगेव प्रांत, गोशेनचा सर्व
प्रांत, पश्चिमी तळवट, अराबा आणि इस्राएलचा डोंगराळ प्रदेश व त्याची
तळवट, 17 सेईरच्या वाटेवरील हालाक डोंगरापासून हर्मोन पर्वताच्या
पायथ्याशी लबानोनाच्या खोऱ्यात असलेल्या बआल-गादपर्यंतचा सर्व
प्रदेश. त्यांच्या सर्व राजांना त्याने हस्तगत केले व त्यांना जिवे मारले.
18 या सर्व राजांशी यहोशुआने दीर्घकाळ युद्ध केले. 19 गिबोनातील
हिव्वी लोकांशिवाय कोणत्याही शहराने इस्राएली लोकांशी शांतीचा
करार केला नाही; इस्राएली लोकांनी बाकीच्या सर्वांना लढाईत जिंकून
घेतले. 20 कारण याहवेहनेच इस्राएली लोकांशी युद्ध करण्यासाठी या
राजांचे हृदय कठोर केले होते, अशासाठी की याहवेहने त्यांना काहीही
दयामाया न दाखविता त्यांचा समूळ नाश करावा असे मोशेला आज्ञापिले
होते. याहवेहने मोशेला आज्ञा दिल्याप्रमाणे काही दयामाया न दाखविता
त्यांचा वध करण्यात आला. 21 या काळामध्ये हेब्रोन, दबीर व अनाब
येथील आणि यहूदीया व इस्राएलच्या सर्व डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्या
अनाकाच्या सर्व वंशजांचा यहोशुआने सर्वस्वी नायनाट केला आणि
त्यांची शहरे संपूर्णपणे ओसाड केली. 22 इस्राएली लोकांच्या देशात
एकही अनाकी जिवंत उरला नाही, मात्र गाझा, गथ व अश्दोद येथे काही
उरले. 23 याहवेहने मोशेला आज्ञा दिल्याप्रमाणे यहोशुआने संपूर्ण प्रदेश
घेतला; आणि इस्राएलाच्या गोत्रांच्या अनुसार विभागणी करून, त्यांचे
वतन म्हणून तो इस्राएली लोकांस दिला. अशा रीतीने शेवटी देशास
युद्धापासून विसावा मिळाला.

**12** यार्देन नदीच्या पूर्वेकडे आर्णोन खोऱ्यापासून हर्मोन पर्वतापर्यंत
व पूर्वेकडील सर्व अराबासह ज्या राजांना इस्राएली लोकांनी
पराभूत करून ज्यांच्या सीमा हस्तगत केल्या ते हे: 2 हेशबोन येथे राज्य
करणारा अमोऱ्यांचा राजा सीहोन. त्याच्या राज्याचा विस्तार आर्णोन
खोऱ्याच्या कडेवरील अरोएर शहरापासून आणि आर्णोन खोऱ्याच्या
मध्यभागापासून अम्मोनी लोकांच्या सीमेवरील यब्बोक नदीपर्यंत होता.
यामध्ये अर्ध्या गिलआदाचा समावेश होता. 3 अराबाच्या पूर्वेकडील
भागावर सुद्धा त्याने राज्य केले, तसेच किन्नेरेथ समुद्रापासून अराबाचा
समुद्र (म्हणजे मृत समुद्र), बेथ-यशिमोथपर्यंत आणि दक्षिणेकडे पिसगा
पर्वताच्या उतरणीपर्यंत राज्य केले. 4 बाशानचा राजा ओग, जो रेफाईम
लोकांपैकी शेवटचा होता, त्याने अष्टारोथ व एद्रेई येथे राज्य केले. 5 त्याचे
राज्य हर्मोन पर्वत, सलेकाह, संपूर्ण बाशानपासून गशूरी आणि माकाथी
लोकांच्या सीमेपर्यंत, अर्ध्या गिलआद पासून हेशबोनचा राजा सीहोन
याच्या सीमेपर्यंत विस्तृत होते. 6 याहवेहचा सेवक मोशे व इस्राएलच्या
लोकांनी या लोकांवर विजय मिळविला आणि याहवेहचा सेवक मोशेने
त्यांचा देश रऊबेन, गाद व मनश्शेहच्या अर्ध्या गोत्रांना त्यांचे वतन म्हणून
दिला होता. 7 यार्देनेच्या पश्चिमेस असलेल्या लबानोन खोऱ्यातील
बआल-गादपासून व सेईरास जाणाऱ्या हालाक डोंगरापर्यंतच्या ज्या
देशांच्या राजांवर यहोशुआ व इस्राएली लोकांनी विजय मिळविला ते हे
आहेत. यहोशुआने त्यांचे प्रदेश इस्राएलांच्या गोत्रांना त्या गोत्रांच्या
वाट्याप्रमाणे वतन म्हणून दिला. 8 यात डोंगराळ प्रदेश, पश्चिमेकडील
तळवट, अराबा, डोंगराचा उतार, अरण्याचा भाग आणि नेगेव प्रांतांचा
समावेश होता. हे सर्व प्रदेश हिथी, अमोरी, कनानी, परिज्जी, हिव्वी
आणि यबूसीचे होते. 9 यरीहोचा राजा-एक, बेथेल जवळील आय
शहराचा राजा-एक, 10 यरुशलेमचा राजा-एक, हेब्रोनचा राजा-एक, 11
यर्मूथचा राजा-एक, लाखीशचा राजा-एक, 12 एग्लोनाचा राजा-एक,
गेजेरचा राजा-एक, 13 दबीरचा राजा-एक, बेथ-गादेरचा राजा-एक, 14
होरमाहचा राजा-एक, अरादचा राजा-एक, 15 लिब्नाहचा राजा-एक,
अदुल्लामचा राजा-एक, 16 मक्केदाचा राजा-एक, बेथेलचा राजा-एक,
17 तप्पूआहचा राजा-एक, हेफेराचा राजा-एक, 18 अफेकाचा राजा-एक,
शारोनचा राजा-एक, 19 मादोनाचा राजा-एक, हासोरचा राजा-एक,
20 शिम्रोन-मरोनाचा राजा-एक, अक्षाफाचा राजा-एक, 21 तानखाचा
राजा-एक, मगिद्दोचा राजा-एक, 22 केदेशचा राजा-एक, कर्मेलातील
योकनामाचा राजा-एक, 23 नाफथ दोरचा राजा-एक, गिलगालातील
गोईमाचा राजा-एक, 24 तिरजाहचा राजा-एक,

**13** जेव्हा यहोशुआ उतार वयाचा झाला, तेव्हा याहवेह त्याला म्हणाले,
“तू आता खूप वयस्कर झाला आहेस आणि देशाचा बराच भाग
ताब्यात घ्यावयाचा राहिला आहे.” 2 जे प्रदेश अजूनही बाकी होते ते हे:
पलिष्टी आणि गशूरींचा सर्व प्रदेश; 3 पूर्व इजिप्तच्या शिहोर नदीपासून

उत्तरेकडे असलेल्या एक्रोनच्या सीमेपर्यंत सर्व मिळून कनानी लोकांचा
प्रदेश समजला जात असे, जरी इथे गाझा, अश्दोद, अष्कलोन, गथ
आणि एक्रोन असे पाच पलिष्टी शासक होते; अव्वी लोकांचा प्रदेश: 4
दक्षिणेकडे कनानी लोकांचा सर्व प्रदेश; सीदोनी लोकांचा माराह, अफेक
आणि अमोऱ्यांची सीमा इथपर्यंत आहे; 5 गिबली लोकांचा प्रदेश;
बआल-गादपासून खाली हर्मोन पर्वत ते लेबो हमाथपर्यंत पूर्वेकडील
सर्व लबानोन. 6 “लबानोनपासून मिसरेफोत-मयिम डोंगराळ प्रदेशात
राहणारे सर्व रहिवासी, म्हणजे सर्व सीदोन्यांना मी स्वत: इस्राएली
लोकांपुढून घालवून देईन. मी तुला सूचना दिल्याप्रमाणे इस्राएली
लोकांना हा देश त्यांचे वतन म्हणून विभागून देण्यात येईल याची खात्री
कर. 7 इस्राएलचे नऊ गोत्र आणि मनश्शेहच्या अर्ध्या गोत्राला तो
वतन म्हणून तू विभागणी करून दे.” 8 मनश्शेहचे बाकीचे अर्धे गोत्र,
रऊबेन आणि गाद यांच्या गोत्रांना यार्देनेच्या पूर्वेकडे आपले वतन
मिळाले होते, याहवेहचा सेवक मोशेने त्यांच्याशी ठरविल्याप्रमाणे तो
प्रदेश त्यांना वाटून दिला होता. 9 आर्णोन नदीच्या खोऱ्याच्या सीमेवर
असलेले अरोएर व खोऱ्यांमधील शहरापासून दिबोनपर्यंतचा मेदबाचा
सर्व पठाराचा प्रदेश, 10 अम्मोन्यांच्या सीमेपर्यंतची हेशबोनात राज्य
करणारा अमोऱ्यांचा राजा सीहोन याची सर्व नगरे. 11 आणि गिलआद
देश, गशूरी व माकाथी या लोकांचा सर्व प्रदेश; सर्व हर्मोन पर्वत;
सलेकाहपर्यंत सर्व बाशान; 12 म्हणजे अष्टारोथ व एद्रेईवर ज्याने राज्य
केले त्या ओग राजाचे बाशानातील संपूर्ण राज्य. (रेफाईम लोकांपैकी
तो शेवटचा होता.) मोशेने त्यांच्यावर विजय मिळवून त्यांना वतनातून
बाहेर घालवून दिले. 13 परंतु इस्राएली लोकांनी गशूरी व माकाथी
लोकांना घालवून दिले नव्हते, म्हणून आज देखील ते लोक इस्राएली
लोकात राहत आहेत. 14 परंतु लेवीच्या गोत्रास त्याने कोणतेही वतन
दिले नाही, कारण याहवेहने त्यांना अभिवचन दिल्याप्रमाणे, इस्राएलचे
परमेश्वर याहवेहना वाहिलेली अन्नार्पणे हे त्यांचे वतनभाग आहेत. 15
रऊबेन गोत्राला त्यांच्या कुळाप्रमाणे मोशेने त्यांना जी भूमी दिली ती
ही: 16 आर्णोन खोऱ्यांच्या सीमेवर असलेले अरोएर शहर व खोऱ्यांच्या
मध्यभागी असलेल्या नगरापासून मेदबा पलीकडील पठार, 17 हेशबोन
व दिबोन, बामोथ-बआल, बेथ-बआल-मेओनसह पठारावरील त्याची सर्व
इतर नगरे, 18 याहसाह, केदेमोथ, मेफाथ, 19 किर्याथाईम, सिबमाह,
खोऱ्यातील टेकडीवरील जेरेथ-नगर. 20 बेथ-पौर, पिसगाची उतरण व
बेथ-यशिमोथ. 21 पठारावरील सर्व शहरांचा आणि अमोऱ्यांचा राजा
सीहोन, ज्याने हेशबोनात राज्य केले होते, याचे सर्व राज्य. मोशेने त्याचा
आणि मिद्यानी सरदारांचा, एवी, रेकेम, सूर, हूर आणि रेबा, त्या देशात
राहत असलेले व सीहोनाबरोबर मिळालेल्या राजपुत्रांचा पराभव केला.
22 या लोकांची त्यांनी युद्धात कत्तल केली होते, त्याचबरोबर इस्राएली
लोकांनी शकुन पाहणारा बौराचा पुत्र बलामाला देखील तलवारीने मारून
टाकले होते. 23 यार्देनच्या किनाऱ्यापर्यंत रऊबेन गोत्राची सीमा होती. ही
नगरे व त्यातील गावे रऊबेनी गोत्राचे त्यांच्या कुळानुसार वतन होते. 24
मोशेने गाद गोत्रास त्यांच्या कुळानुसार हे वतन दिले: 25 गिलआदातील
सर्व नगरे आणि राब्बाह जवळील अरोएरापर्यंतचा अम्मोन्यांचा अर्धा
देश, ही याजेरची सीमा होती. 26 आणि हेशबोनापासून रामाथ मिस्पेह
व बेटोनीमपर्यंत आणि महनाईमपासून दबीरच्या सीमेपर्यंत; 27
व खोऱ्यातील बेथ-हाराम, बेथ-निमराह, सुक्कोथ, साफोन म्हणजे
हेशबोनचा राजा सीहोनच्या राज्याचे हे उरलेले राज्य होते (यार्देन नदीच्या
पूर्वबाजूपासून किन्नेरेथ समुद्रापर्यंत त्यांची सीमा होती). 28 ही नगरे व
गावे गादच्या गोत्राला त्यांच्या कुळानुसार वतन म्हणून दिली होती. 29
मोशेने मनश्शेहच्या अर्ध्या गोत्राला, म्हणजेच मनश्शेहच्या कुटुंबाच्या
अर्ध्या वंशजांना त्यांच्या कुळानुसार हे प्रदेश दिले: 30 त्यांचा प्रदेश
महनाईमपासून सर्व बाशान, जे बाशानचा राजा ओगच्या सर्व राज्यासह;
बाशानातील याईर येथील साठ नगरे, 31 अर्धा गिलआद आणि अष्टारोथ
आणि एद्रेई (बाशानातील ओग राजाची राजकीय शहरे). 32 यरीहोजवळ
यार्देनेच्या पूर्वेस मोआबाच्या मैदानात मोशेने वरील वतने दिली. 33 परंतु
लेवी गोत्राला मोशेने कोणतेही वतन दिले नाही, कारण त्यांना अभिवचन
दिल्याप्रमाणे, याहवेह इस्राएलचे परमेश्वरच त्यांचे वतन आहेत.

**14** एलअज़ार याजक, नूनाचा पुत्र यहोशुआ आणि इस्राएलच्या
गोत्राच्या कुलप्रमुखांनी इस्राएली लोकांना कनान देशातील हे भाग
वतन म्हणून दिले. 2 याहवेहने मोशेद्वारे दिलेल्या आज्ञेनुसार साडेनऊ
गोत्रांना चिठ्ठ्या टाकून वतन वाटण्यात आले होते. 3 अडीच गोत्रांना
मोशेने यार्देनच्या पूर्वेकडे वतन दिलेले होते. परंतु लेव्यांना इतर गोत्रांमध्ये
वतन देण्यात आले नव्हते. 4 योसेफाचे वंशज मनश्शेह व एफ्राईम अशा
दोन गोत्रांमध्ये वेगळे झाले होते. लेव्यांना कोणताही वाटा मिळाला
नाही, मात्र राहण्यास नगरे आणि त्यांच्या गुरांसाठी सभोवतालची
कुरणे दिली होती. 5 याहवेहने मोशेला आज्ञापिल्याप्रमाणेच इस्राएली
लोकांनी देशाची वाटणी केली. 6 यहूदाह वंशाचे लोक गिलगाल येथे
यहोशुआकडे आले. आणि कनिज्जी यफुन्नेहचा पुत्र कालेब त्याला
म्हणाला, “कादेश-बरनेआमध्ये याहवेहने परमेश्वराचा सेवक मोशेला
तुझ्या व माझ्याविषयी काय सांगितले हे तुला माहीत आहे. 7 जेव्हा
याहवेहचा सेवक मोशेने मला कादेश-बरनेआवरून हा देश हेरण्यासाठी
पाठविले होते तेव्हा मी चाळीस वर्षांचा होतो. आणि मला मनापासून
जे वाटले त्याप्रमाणे मी त्याला वर्तमान दिले, 8 परंतु माझ्याबरोबर
गेलेल्या माझ्या इस्राएली बांधवांनी लोकांचे अंत:करण भयभीत केले.
तरीही मी, याहवेह माझ्या परमेश्वराचे पूर्ण हृदयाने अनुसरण केले,
9 म्हणून त्या दिवशी मोशेने मला शपथ घेऊन सांगितले, ‘देशाच्या
ज्या भागात तुझे पाऊल पडेल तो भाग तुझा आणि तुझ्या वंशजांचे
निरंतरचे वतन होईल, कारण तू याहवेह माझ्या परमेश्वराचे पूर्ण हृदयाने
अनुसरण केले आहे.’ 10 “इस्राएली लोक रानात फिरत असता याहवेहने
मोशेला हे सांगितले तेव्हापासून आजपर्यंत पंचेचाळीस वर्षे याहवेहने
मला जिवंत ठेवले आहे आणि आज मी पंचाऐंशी वर्षांचा आहे! 11
मोशेने मला पाठविले होते, त्या दिवशी मी जेवढा बलवान होतो तेवढाच
आज देखील आहे आणि तेव्हा युद्धावर जाण्यास मी जसा आवेशी
होतो तसाच आज देखील आहे. 12 म्हणून त्या दिवशी याहवेहने हा

डोंगराळ प्रदेश मला देण्याचे अभिवचन दिले होते, तो तू मला दे. तुला
तर माहीतच आहे की, तिथे अनाकी लोक राहतात आणि त्यांची शहरे
मोठी व तटबंदीची आहेत, परंतु याहवेह जर माझ्याबरोबर असतील, तर
मी त्या लोकांना घालवून देईन.” 13 तेव्हा यहोशुआने यफुन्नेहचा पुत्र
कालेबाला आशीर्वाद दिला आणि त्याला हेब्रोन त्याचे वतन म्हणून दिले.
14 म्हणून तेव्हापासून हेब्रोन हे कनिज्जी यफुन्नेहचा पुत्र कालेबच्या
मालकीचे वतन झाले, कारण त्याने याहवेह इस्राएलच्या परमेश्वराचे पूर्ण
हृदयाने अनुसरण केले. 15 (त्यापूर्वी हेब्रोनचे नाव किर्याथ-अर्बा असे
होते, कारण अर्बा अनाकी लोकातील सर्वात महान व्यक्ती होता.) मग
सर्व देशास युद्धापासून विसावा मिळाला.

**15** यहूदाह गोत्रास त्यांच्या कुटुंबानुसार चिठ्ठ्या टाकून देण्यात
आलेला प्रदेश एदोमाच्या सीमेपर्यंत आणि सीनच्या वाळवंटातील
दक्षिणेच्या सीमेपर्यंत पसरला होता. 2 त्यांची दक्षिण सीमा मृत
समुद्राच्या दक्षिणेस असलेल्या शेवटच्या खाडीपासून सुरू झाली, 3
अक्राब्बीमच्या चढावाच्या दक्षिणेस असलेल्या मार्गाने सीन रानाच्या
कडेने जाऊन दक्षिणेस कादेश-बरनेआपर्यंत. नंतर ती हेस्रोनच्या पुढे
अद्दारपर्यंत आणि कारकाला वळण घेते. 4 नंतर पुढे जाऊन ती
आजमोनच्या बाजूने इजिप्तच्या ओढ्यापर्यंत जाऊन, त्या ओढ्याच्या
कडेने ती भूमध्य समुद्रापर्यंत गेली होती. ही त्यांची दक्षिणी सीमा
आहे. 5 त्यांची पूर्वेकडील सीमा यार्देन नदीच्या मुखाकडे असलेल्या
मृत समुद्रापर्यंत होती. त्यांच्या उत्तरेकडील सीमेची सुरुवात यार्देनेच्या
मुखाशी असलेल्या खाडीपासून झाली, 6 व पुढे बेथ-होगलाहपर्यंत
चढून बेथ-अराबाहच्या उत्तरेकडे रऊबेनाचा पुत्र बोहनच्या खडकापर्यंत
गेली. 7 तिथून ती सीमा आखोर खोऱ्यापासून दबीरपर्यंत जाऊन
गिलगालच्या उत्तरेकडे वळली. हे गिलगाल खोऱ्याच्या दक्षिण बाजूस
असलेल्या अदुमिम्माच्या चढावांच्या समोरील बाजूस आहे. तिथून त्या
सीमेचा विस्तार एन-शेमेशच्या झऱ्यांपासून एन-रोगेलपर्यंत होता. 8
त्यानंतर ती सीमा हिन्नोमाच्या खोऱ्यातून जाऊन यबूसी नगराच्या
(म्हणजे यरुशलेम) दक्षिणेकडील बाजूने गेली. पुढे ती सीमा पश्चिमेकडे
हिन्नोमाच्या खोऱ्यासमोर आणि रेफाईम खोऱ्याच्या उत्तरेकडील टोकास
असलेल्या पर्वताच्या माथ्यावर जाऊन पोहोचली. 9 तिथून ती सीमा त्या
डोंगराच्या माथ्यापासून नेफतोआहच्या झऱ्यापर्यंत आणि तिथून एफ्रोन
डोंगरातील नगरांवरून निघून बालाह म्हणजेच किर्याथ-यआरीमपर्यंत
पोहोचते. 10 तिथून ती बालाहाच्या पश्चिमेस वळसा घेऊन सेईर पर्वताकडे
गेली आणि यआरीम म्हणजेच कसालोन डोंगराच्या उत्तरेस जाऊन बेथ-
शेमेश इथे उतरून तिम्नाहास जाऊन पोहोचते. 11 तिथून ती एक्रोनच्या
उत्तरेकडून शिक्रोनपर्यंत गेली व बालाह पर्वतावरून यबनेलास जाऊन
पोहोचली. सीमेचा शेवट भूमध्य समुद्राजवळ झाला. 12 भूमध्य समुद्राचा
किनारा ही पश्चिमेची सीमा होती. 13 आणि यहोशुआने याहवेहच्या
आज्ञेप्रमाणे यफुन्नेहचा पुत्र कालेबाला यहूदाहच्या कुळाबरोबर जो वाटा
दिला तो हा: किर्याथ-अर्बा म्हणजेच हेब्रोन. (अर्बा हा अनाकांचा पूर्वज
होता.) 14 अनाकाचे पुत्र शेशय, अहीमान व तलमय या अनाकांच्या
वंशजांना कालेबाने बाहेर घालवून दिले. 15 तिथून त्यांनी दबीरमध्ये
(पूर्वी दबीरचे नाव किर्याथ-सेफर होते) राहणाऱ्या लोकांवर हल्ला केला.
16 आणि कालेब म्हणाला, “जो पुरुष किर्याथ-सेफरवर स्वारी करून
ते हस्तगत करेल, त्याला मी आपली कन्या अक्साह ही पत्नी म्हणून
देईन.” 17 कालेबाचा भाऊ केनाजचा पुत्र ओथनिएलाने ते जिंकून
घेतले, म्हणून कालेबाने आपली कन्या अक्साह त्याला पत्नी म्हणून
दिली. 18 एक दिवस जेव्हा ती ओथनिएलकडे आली, तेव्हा तिने तिच्या
वडिलांना एक शेत देण्याची त्याला विनंती केली. जेव्हा ती गाढवावरून
उतरली, तेव्हा कालेबाने तिला विचारले, “मी तुझ्यासाठी काय करावे?”
19 तिने उत्तर दिले, “माझ्यावर विशेष कृपा करा. तुम्ही मला नेगेव प्रांतात
जमीन दिलेली आहेच, मला पाण्याचे झरेही द्या.” म्हणून कालेबाने तिला
वरचे आणि खालचे झरे दिले. 20 यहूदाह गोत्रास त्यांच्या कुळानुसार
आलेले वतन हे होते: 21 दक्षिण भागाची नगरे यहूदाह गोत्राची जी
नेगेव प्रांताकडे एदोमाच्या सीमेजवळ होती: कबसेल, एदर, यागूर, 22
कीनाह, दीमोनाह, अदआदाह, 23 केदेश, हासोर, इथनान, 24 जीफ,
तेलेम, बालोथ, 25 हासोर-हदत्ताह, करीयोथ हेस्रोन (हेच हासोर), 26
अमाम, शमा, मोलादाह, 27 हसर-गदाह, हेशमोन, बेथ-पेलेट, 28 हसर-
शुआल, बेअर-शेबा, बिजोथा, 29 बालाह, ईयीम, असेम, 30 एलतोलाद,
कसील, होरमाह, 31 सिकलाग, मदमन्नाह, सनसन्नाह, 32 लबाओथ,
शिलहीम, एईन व रिम्मोन. ही सर्व मिळून एकोणतीस नगरे आणि
त्यांची गावे होती. 33 पश्चिम तळवटीत वसलेली नगरे ही: एष्टाओल,
सोराह, अशनाह, 34 जानोहा, एन-गन्नीम, तप्पूआह, एनाम, 35 यर्मूथ,
अदुल्लाम, सोकोह, अजेकाह, 36 शाराईम, अदीथयिम, व गेदेराह ही
एकूण चौदा नगरे व त्यांची गावे होती. 37 सेनान, हदाशाह, मिगदल-गाद,
38 दिलआन, मिस्पेह, योकथएल, 39 लाखीश, बसकाथ, एग्लोन, 40
कब्बोन, लहमास, किथलीश, 41 गदेरोथ, बेथ-दागोन, नामाह व मक्केदा
अशी सोळा नगरे आणि त्यांची गावे. 42 लिब्नाह, एथेर, आशान, 43
इफ्ताह, अशनाह, नेजीब, 44 कईलाह, अकजीब, आणि मारेशाह अशी
नऊ नगरे आणि त्यांची गावे. 45 एक्रोन व सभोवतालच्या वस्त्या व
गावे. 46 एक्रोनच्या पश्चिमेपासून अश्दोदच्या परिसरात असलेल्या
गावांसहीत सर्वकाही; 47 अश्दोद व त्याच्या सभोवतालच्या वस्त्या व
गावे, गाझा, त्याच्या वस्त्या व गावे, इजिप्तच्या नाल्यापर्यंतची गावे
व भूमध्य समुद्राच्या काठापर्यंत. 48 डोंगराळ प्रदेशातील: शामीर,
यत्तीर सोकोह, 49 दन्नाह किर्याथ-सन्नाह; म्हणजेच दबीर, 50 अनाब,
एष्तमोह, अनीम, 51 गोशेन, होलोन, आणि गिलोह अशी अकरा
नगरे आणि त्यांची गावे. 52 अरब, दूमाह, एशआन, 53 यानीम, बेथ-
तप्पूआह, अफेकाह, 54 हुमताह, किर्याथ-अर्बा; म्हणजेच हेब्रोन आणि
सियोर अशी नऊ नगरे आणि त्यांची गावे. 55 माओन, कर्मेल, जीफ,
युत्ताह, 56 येज्रील, योकदेआम, जानोहा, 57 काईन, गिबियाह, तिम्नाह
अशी दहा नगरे आणि त्यांची गावे. 58 हल्हूल, बेथ-सूर, गदोर, 59
माराथ, बेथ-अनोथ व एलतेकोन अशी सहा नगरे आणि त्यांची गावे. 60
किर्याथ-बआल (म्हणजेच किर्याथ-यआरीम व राब्बाह) अशी दोन नगरे

आणि त्यांची गावे. 61 अरण्यातील नगरे ही: बेथ-अराबाह, मिद्दीन,
सकाकाह, 62 मिठाचे नगर निबशान आणि एन-गेदी अशी सहा नगरे
आणि त्यांची गावे. 63 परंतु यरुशलेम शहरात राहणाऱ्या यबूसी लोकांना
यहूदाह वंशातील लोक घालवून देऊ शकले नाहीत; आजही यबूसी लोक
यरुशलेममध्ये यहूदीयाच्या लोकांमध्ये राहात आहेत.

16 योसेफाच्या गोत्राला मिळालेल्या भागाची सुरुवात यार्देनेकडून
होते, यरीहोच्या पूर्वेकडील झऱ्यापासून रानातून बेथेलच्या
डोंगराळ प्रदेशापर्यंत जाते. 2 पुढे ती बेथेल (म्हणजे लूज) पासून अर्की
लोकांची सीमा पार करून अटारोथपर्यंत गेली, 3 पुढे ती पश्चिमेकडे
यफलेटीच्या सीमेवरून खालच्या बेथ-होरोन व पुढे गेजेरपर्यंत उतरून
भूमध्य समुद्रापर्यंत संपते. 4 याप्रमाणे योसेफाचे वंशज मनश्शेह आणि
एफ्राईम यांना वतन मिळाले. 5 एफ्राईमच्या गोत्राची त्यांच्या कुळानुसार
ही सीमा होती: त्यांच्या वतनाची सीमा पूर्वेतील अटारोथ-अद्दार येथून
बेथ-होरोनचा वरील भाग 6 आणि पुढे भूमध्य समुद्रापर्यंत गेलेली होती.
उत्तरेकडील मिकमथाथवरून वळून पुढे तानथ-शिलोहवरून पूर्वेकडे
यानोहा येथवर गेलेली होती. 7 नंतर पुढे ती सीमा यानोहापासून खाली
वळून अटारोथ व नाराह येथवर जाऊन यरीहोस पोहोचून यार्देनातून आली
होती. 8 तप्पूआहपासून ही सीमा पश्चिम दिशेस कानाहा ओहोळावरून
जाऊन भूमध्य समुद्रापर्यंत संपते. एफ्राईम गोत्रास त्यांच्या कुळानुसार
मिळालेले वतन हे होते. 9 मनश्शेहच्या वतनातील काही नगरे आणि
त्यांची गावे सुद्धा एफ्राईमचे वतन म्हणून वेगळी करून ठेवण्यात आली
होती. 10 त्यांनी गेजेरात राहणाऱ्या कनानी लोकांना घालवून दिले नाही;
आजपर्यंत कनानी लोक एफ्राईम लोकांमध्ये राहत आहेत. परंतु लादून
दिलेली मजुरीची कामे त्यांना करावी लागतात.

17 योसेफाचा प्रथमपुत्र म्हणून मनश्शेहच्या गोत्राला देण्यात
आलेला वाटा हा होता. गिलआदाचा पूर्वज माखीर, मनश्शेहच्या
प्रथमपुत्राला गिलआद व बाशान हे मिळाले कारण माखीरी लोक महान
योद्धे होते. 2 हा वाटा मनश्शेहच्या बाकीच्या लोकांसाठी; अबिएजेर,
हेलेक अस्रिएल, शेखेम, हेफेर व शेमीदा यांच्या कुळांसाठी होता.
योसेफाचा पुत्र मनश्शेहच्या कुळातील हे इतर पुरुष वंशज आहेत. 3
मनश्शेहचा पुत्र माखीर, याचा पुत्र गिलआद, याचा पुत्र हेफेर, याचा
पुत्र सलाफहाद याला पुत्र नव्हते, परंतु फक्त कन्याच होत्या, त्यांची
नावे महलाह, नोआह, होगलाह, मिल्काह व तिरजाह ही होती. 4 त्या
एलअज़ार याजक, नूनाचा पुत्र यहोशुआ आणि पुढाऱ्यांकडे गेल्या
आणि म्हणाल्या, “याहवेहने मोशेला आज्ञा दिली होती की आमच्या
कुटुंबामध्ये आम्हाला वतन दिले जावे.” तेव्हा यहोशुआने याहवेहच्या
आज्ञेप्रमाणे त्यांच्या वडिलांच्या भावांबरोबर त्यांना वतन दिले. 5
यार्देनेच्या पूर्वेकडे गिलआद व बाशान याशिवाय मनश्शेहच्या वाट्याला
भूमीचे दहा भाग आले, 6 कारण मनश्शेहच्या गोत्रातील कन्यांना
पुत्रांमध्ये वतन मिळाले. गिलआदाचा प्रदेश मनश्शेहच्या बाकीच्या
वंशजाचा झाला होता. 7 मनश्शेहच्या गोत्राची सीमा आशेरापासून
शेखेमाच्या पूर्वेस मिकमथाथपर्यंत जाते. तिथून ही सीमा दक्षिणेला एन-
तप्पूआहच्या लोकांच्या वस्तीपर्यंत जाऊन पोहोचते. 8 (मनश्शेहकडे
तप्पूआहचा प्रांत होता, परंतु मनश्शेहच्या प्रदेशाच्या सीमेवरील तप्पूआह
एफ्राईमकडे होते.) 9 ती सीमा पुढे दक्षिणेकडील कानाहा ओढ्याकडे
जाते. एफ्राईमच्या मालकीची नगरे मनश्शेहच्या नगरांमध्ये होती, परंतु
मनश्शेहच्या प्रदेशाची सीमा ओढ्याच्या उत्तरेकडे होती आणि भूमध्य
समुद्राकडे संपते. 10 दक्षिणेकडील प्रदेश एफ्राईमच्या मालकीचा होता
व उत्तरेकडे असलेली शहरे मनश्शेहची होती. मनश्शेहची सीमा भूमध्य
समुद्रापर्यंत होती आणि त्याच्या उत्तरेकडे आशेर व पूर्वेकडे इस्साखार
आहेत. 11 इस्साखार आणि आशेरच्या प्रदेशात बेथ-शान, इब्लाम आणि
दोर येथील लोक, एनदोर, तानख, आणि मगिद्दो त्यांच्या जवळच्या
वसाहतीसह मनश्शेहचे होते (यादीतील तिसरे नगर नाफोथ होते). 12
तरीही मनश्शेहचे वंशज त्या नगरांमध्ये राहू शकत नव्हते, कारण कनानी
लोकांनी त्यात राहण्याचा अट्टाहास केला होता. 13 परंतु जेव्हा इस्राएली
लोक समर्थ झाले, तेव्हा त्यांनी कनानी लोकांना आपले गुलाम बनविले
पण त्यांना देशातून पूर्णपणे बाहेर घालवून दिले नाही. 14 योसेफाचे
लोक यहोशुआला म्हणाले, “वतन म्हणून तू आम्हाला एकच वाटा
आणि एकच भाग का दिला आहेस? आम्ही संख्येने पुष्कळ लोक
आहोत आणि याहवेहने आम्हाला पुष्कळ आशीर्वादित केले आहे.”
15 तेव्हा यहोशुआने उत्तर दिले, “जर तुम्ही संख्येने पुष्कळ आहात
आणि एफ्राईमचा डोंगराळ प्रदेश तुमच्यासाठी खूप लहान आहे, तर
परिज्जी व रेफाईम लोक राहतात तो रानाचा प्रदेश तुमच्यासाठी मोकळा
करून घ्या.” 16 योसेफाच्या लोकांनी म्हटले, “डोंगराळ प्रदेश आम्हाला
पुरेसा नाही आणि बेथ-शान व सभोवतालच्या वस्तीत राहणारे व
येज्रील खोऱ्यात राहणाऱ्या कनानी लोकांजवळ लोखंडी रथ आहेत.”
17 परंतु यहोशुआ योसेफाच्या गोत्राचे एफ्राईम आणि मनश्शेहला
म्हणाला; “तुम्ही संख्येने पुष्कळ आणि बलवान आहात. तुम्हाला केवळ
एकच भाग नसावा 18 परंतु अरण्यातील डोंगराळ भाग व त्याच्या
टोकापर्यंतच्या हद्दी तुमच्या होतील; जरी कनानी लोकांजवळ लोखंडी
रथ आहेत आणि ते फार शक्तिशाली आहेत, तरीही तुम्ही त्यांना घालवून
देऊ शकाल.”

18 संपूर्ण इस्राएली लोकांचा समुदाय शिलोह येथे एकत्र जमला
आणि तिथे त्यांनी सभामंडप उभारला. देश त्यांच्या ताब्यात
आला होता. 2 परंतु अजूनही सात इस्राएली गोत्र होते ज्यांना त्यांचे
वतन मिळाले नव्हते. 3 तेव्हा यहोशुआ इस्राएली लोकांना म्हणाला,
“याहवेह तुमच्या पूर्वजांच्या परमेश्वरांनी तुम्हाला दिलेला प्रदेश ताब्यात
घेण्यास तुम्ही किती वेळ वाट पाहणार आहात? 4 प्रत्येक गोत्रातून तीन
पुरुषांची नेमणूक करा. आपआपल्या वतनानुसार देशाचे सर्वेक्षण करावे
व त्याचे वर्णन लिहावे म्हणून मी त्यांना पाठवेन. मग त्यांनी माझ्याकडे
परत यावे. 5 तुम्ही ती भूमी त्यांना सात विभागांमध्ये विभागून द्यावी,
यहूदाहच्या गोत्राने त्यांच्या दक्षिणेकडील सीमेत आणि योसेफाच्या
गोत्राने त्यांच्या उत्तरेकडील सीमेतच राहावे. 6 त्या सात प्रदेशांचे

वर्णन लिहिल्यावर ते तुम्ही माझ्याकडे आणावे, मग याहवेह आपल्या
परमेश्वरासमोर मी तुमच्यासाठी चिठ्ठ्या टाकीन. 7 तथापि लेवी वंशास
तुमच्यामध्ये भाग मिळणार नाही, कारण याहवेहची याजकीय सेवा हेच
त्यांचे वतन आहे. गाद, रऊबेन आणि मनश्शेहच्या अर्ध्या गोत्राला आधी
त्यांचे वतन यार्देनेच्या पूर्वेकडे मिळाले आहे. याहवेहचे सेवक मोशेने ते
त्यांना दिले आहे.” 8 जेव्हा ते पुरुष प्रदेशाची मोजणी करण्यासाठी
निघाले, तेव्हा यहोशुआने त्यांना सूचना दिली, “जा आणि त्या प्रदेशाचे
सर्वेक्षण करा आणि त्याचे वर्णन लिहा आणि परत माझ्याकडे या, मग
मी येथे शिलोहमध्ये याहवेहसमोर तुमच्यासाठी चिठ्ठ्या टाकेन.” 9 तेव्हा
ते पुरुष निघाले आणि त्या प्रदेशातून फिरले व प्रत्येक नगरांप्रमाणे
सात भागात त्याचे वर्णन एका चर्मपत्राच्या गुंडाळीवर लिहिले आणि
शिलोह येथील छावणीत यहोशुआकडे परत आले. 10 तेव्हा शिलोह
येथे याहवेहसमोर यहोशुआने त्यांच्यासाठी चिठ्ठ्या टाकल्या व तिथे
त्याने इस्राएली लोकांच्या गोत्राच्या भागानुसार प्रदेशाची वाटणी करून
दिली. 11 बिन्यामीन गोत्राच्या कुळानुसार पहिली चिठ्ठी निघाली. त्यांच्या
वाट्याला आलेला भाग यहूदाह आणि योसेफाच्या गोत्रातील प्रांतांच्या
दरम्यान होता. 12 उत्तरेकडील सीमा यार्देन नदीजवळ सुरू होऊन
ती यरीहोच्या उत्तरेच्या उतरणीस जाऊन नंतर पश्चिमेकडील डोंगराळ
प्रदेशातून व बेथ-आवेनच्या रानातून गेलेली होती. 13 तिथून ती सीमा
ज्याला बेथेल देखील म्हणत, त्या लूज शहराच्या दक्षिणेकडे जाऊन
पुढे खालच्या बेथ-होरोनाच्या दक्षिणेस असलेल्या डोंगराळ प्रदेशातील
अटारोथ-अद्दार पर्यंत गेली. 14 तिथून ती सीमा दक्षिणेकडे वळून बेथ-
होरोनजवळील डोंगरावरून किर्याथ-बआल (म्हणजे किर्याथ-यआरीम)
मध्ये येते. यहूदीयाच्या लोकांच्या नगरांपैकी ते एक होते. ही पश्चिमी
सीमा होती. 15 दक्षिणेकडील सीमा किर्याथ-बआल (म्हणजे किर्याथ-
यआरीम) नगराच्या बाहेरील बाजूपासून सुरू झाली व ती नेफतोआहच्या
झर्‍याकडे पोहोचली. 16 तिथून ती खाली रेफाईम खोर्‍याच्या उत्तरेस
असलेल्या हिन्नोम खोर्‍याच्या जवळील डोंगराच्या पायथ्याशी जाऊन
पुढे हिन्नोम खोरे ओलांडून यबूसी लोक राहत त्या यरुशलेम शहराच्या
दक्षिण बाजूने एन-रोगेल येथे गेली. 17 मग ती सीमा उत्तरेस वळून एन-
शेमेशकडे जाऊन पुढे गलीलोथ जे अदुमिम्माच्या उतरणीच्या समोर होते
तिथे गेली. नंतर तिथून ती खाली रऊबेनाचा पुत्र बोहन याच्या खडकाकडे
जाते. 18 ती सीमा पुढे बेथ-अराबाहच्या उत्तरेकडील उताराकडून खाली
अराबाकडे गेली होती. 19 पुढे ती सीमा बेथ-होगलाहच्या उत्तरेकडील
उताराला जाऊन मृत समुद्राच्या उत्तरेच्या खाडीजवळ येते. ही यार्देन
नदीच्या मुखाजवळील दक्षिण सीमा आहे. 20 पूर्वेकडील सीमा यार्देन
नदी होती. 21 बिन्यामीन गोत्राच्या कुळानुसार मिळालेली नगरे ही होती:
यरीहो, बेथ-होगलाह, एमेक-केझीज, 22 बेथ-अराबाह, सेमाराईम,
बेथेल, 23 अव्वीम, पाराह, ओफराह, 24 कफर-अम्मोनी, ओफनी आणि
गेबा; ही बारा नगरे आणि त्यांची गावे. 25 गिबोन, रामाह, बैरोथ, 26
मिस्पेह, कफीराह, मोजाह, 27 रेकेम, यिरपएल, तरलाह, 28 सेला
हाएलेफ, यबूसी शहर (म्हणजेच यरुशलेम), गिबियाह आणि किर्याथ;
ही चौदा नगरे आणि त्यांची गावे.

**19** दुसरी चिठ्ठी शिमओन गोत्राच्या कुळानुसार निघाली. त्यांचे वतन
यहूदीयाच्या सीमेमध्ये होते. 2 त्यांना मिळालेल्या वतनातील
नगरे याप्रमाणे: बेअर-शेबा (किंवा शेबा), मोलादाह, 3 हसर-शुआल,
बालाह, असेम, 4 एलतोलाद, बेथूल, होरमाह, 5 सिकलाग, बेथ-
मर्काबोथ, हाझर-सूसाह, 6 बेथ-लेबाओथ, आणि शारूहेन; ही तेरा
नगरे आणि त्यांची गावे; 7 एईन, रिम्मोन, एथेर व आशान; ही चार
नगरे आणि त्यांची गावे; 8 आणि बालथ-बीर (नेगेवमधील रामोथ)
पर्यंत असलेली सर्व नगरे व सभोवतालची गावे. 9 शिमओन गोत्राच्या
वतनाचा हिस्सा यहूदीयाच्या वतनातून घेतला होता, कारण यहूदाहचा
भाग त्यांच्या गरजेपेक्षा मोठा होता. त्यामुळे शिमओन वंशाला त्यांचे
वतन यहूदाह वंशाच्या सीमेमध्ये मिळाले. 10 तिसरी चिठ्ठी जबुलून
गोत्राच्या कुळांनुसार निघाली: त्यांच्या वतनभागाची सीमा सारीदपर्यंत
गेली होती. 11 तिथून पुढे ती पश्चिमेकडे मरलापर्यंत व दब्बेशेथला जोडून
पुढे योकनामच्या ओहोळास जाऊन पोहोचली. 12 ती सारीदपासून
वळून पूर्वेकडे उगवतीला किसलोथ-ताबोर याच्या सीमेपर्यंत जाऊन पुढे
दाबरथ आणि याफीयापर्यंत गेली. 13 तिथून पूर्व दिशेकडे गथ-हेफेर
आणि एथ-काझीनपर्यंत येते; व तिथून रिम्मोनकडे येऊन नेआहकडे
वळते. 14 तेथील सीमा उत्तरेच्या बाजूंनी हन्नाथोनकडे जाते आणि
इफ्ताह-एल खोर्‍यापर्यंत जाऊन संपते. 15 त्यात कट्टाथ, नहलाल,
शिम्रोन, इदलाह आणि बेथलेहेम यांचा समावेश होता. ती बारा नगरे
आणि त्यांची गावे होती. 16 ही नगरे व त्यातील गावे जबुलून गोत्राच्या
कुळानुसार वतन होती. 17 चौथी चिठ्ठी इस्साखार गोत्राच्या कुळांनुसार
निघाली. 18 त्यांच्या सीमेमध्ये या नगरांचा समावेश होता: येज्रील,
कसुल्लोथ, शूनेम, 19 हफाराईम, शियोन, अनाहराथ, 20 रब्बीथ,
किशोन, एबेज, 21 रेमेथ, एन-गन्नीम, एन-हद्दाह आणि बेथ-पसेस. 22
ही सीमा ताबोर, शहसुमा आणि बेथ-शेमेश यांना लागून पुढे जाऊन
यार्देनकडे समाप्त होते. ही सोळा नगरे आणि त्यांची गावे होती. 23 ही
नगरे आणि त्यातील गावे इस्साखार गोत्राच्या कुळांनुसार वतनभाग
होती. 24 पाचवी चिठ्ठी आशेर गोत्राच्या कुळांनुसार निघाली. 25
त्यांच्या सीमेमध्ये समाविष्ट असलेली ही नगरे: हेलकथ, हली, बेटेन,
अक्षाफ, 26 अल्लामेलेख, अमआद आणि मिशाल. पश्चिमेकडे ती सीमा
कर्मेल आणि शिहोर-लिबनाथजवळून जाते. 27 तिथून ती पूर्वेकडे बेथ-
दागोनकडे वळून जबुलून आणि इफ्ताह-एल खोर्‍याजवळ जाते आणि
उत्तरेकडे बेथ-एमेक आणि नेईएल तसेच डाव्या बाजूने काबूलकडे
जाते. 28 ती पुढे अब्दोन, रहोब, हम्मोन आणि कानाहाकडून मोठ्या
सीदोनपर्यंत जाते. 29 नंतर ती सीमा रामाहकडे वळसा घेते आणि
तटबंदीचे शहर सोरकडे जाते, तिथून होसाहकडे वळून अकजीबकडून
भूमध्य समुद्राजवळ निघते, 30 उम्माह, अफेक आणि रहोब यासहित.
यामध्ये बावीस नगरे आणि त्यांच्या गावांचा समावेश होता: 31 ही नगरे
आणि त्यातील गावे आशेरच्या गोत्राच्या कुळांनुसार वतनभाग होती. 32

सहावी चिठ्ठी त्यांच्या कुळांनुसार नफताली गोत्राची निघाली. 33 ही
सीमा हेलेफ आणि साननीमातील मोठ्या एलावृक्षापासून पुढे अदामी-
नेकेब आणि यबनेल ते लक्कूम आणि यार्देनपर्यंत समाप्त होते. 34
पुढे पश्चिमेकडे अझनोथ ताबोरमधून जाते आणि हुक्कोक येथे निघते.
दक्षिणेकडून ती जबुलूनजवळ, पश्चिमेकडून आशेरजवळ आणि पूर्वेकडून
यार्देनच्या यहूदीया वतनभागाला जाऊन मिळते. 35 तटबंदीची नगरे
सिद्दीम, सेर, हम्मथ, रक्कथ, किन्नेरेथ, 36 अदमाह, रामाह, हासोर, 37
केदेश, एद्रेई, एन-हासोर, 38 इरोन, मिगदल-एल, होरेम, बेथ-अनाथ,
व बेथ-शेमेश ही होती. ही सर्व एकोणवीस नगरे आणि त्यांची गावे
होती. 39 ही नगरे आणि त्यातील गावे नफताली गोत्राच्या कुळाप्रमाणे
वतनभाग होती. 40 सातवी चिठ्ठी दान गोत्राच्या कुळांनुसार निघाली. 41
त्यांच्या वतनभागाची सीमा ही होती: सोराह, एष्टाओल, ईर-शमेश,
42 शालब्बीन, अय्यालोन, इथलाह, 43 एलोन, तिम्नाह, एक्रोन, 44
एल्तेकेह, गिब्बथोन, बालाथ, 45 येहूद, बने-बराक, गथ-रिम्मोन, 46 मे-
यरकोन आणि रक्कोन, याबरोबरच याफोसमोर असलेला प्रदेश. 47
(जेव्हा दानच्या गोत्राची सीमा त्यांनी गमावली, तेव्हा त्यांनी जाऊन
लेशेम शहरावर हल्ला करून ते हस्तगत केले, तलवारीने त्यांचा नाश
केला व तिथे वस्ती केली. लेशेममध्ये ते स्थायिक झाले व त्या शहराला
त्यांचा पूर्वज दानचे नाव दिले.) 48 ही नगरे आणि त्यातील गावे दानच्या
गोत्राच्या कुळांनुसार त्यांचे वतन म्हणून मिळाले. 49 जेव्हा त्यांनी
त्यांना दिलेल्या भागाची वाटणी करण्याचे संपविले, तेव्हा इस्राएली
लोकांनी नूनाचा पुत्र यहोशुआला आपल्या वतनामध्ये वाटा दिला, 50
याहवेहच्या आज्ञेप्रमाणे त्यांनी एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशातील तिम्नाथ-
सेरह नगर जे यहोशुआने मागितले होते ते त्याला दिले आणि त्याने ते
नगर बांधून त्यात वस्ती केली. 51 या वतनसीमा एलअज़ार याजक,
नूनाचा पुत्र यहोशुआ आणि इस्राएली गोत्राच्या कुळांच्या पुढाऱ्यांनी
शिलोह येथे सभामंडपाच्या प्रवेशद्वारात याहवेहच्या उपस्थितीत नेमून
दिली. अशाप्रकारे त्यांनी देशाची वाटणी करण्याचे काम संपविले.

**20** तेव्हा याहवेह यहोशुआला म्हणाले: 2 “इस्राएली लोकांना सांग,
मोशेद्वारे तुम्हाला सुचविल्यानुसार आश्रयाची शहरे नेमून द्यावीत.
3 यासाठी की जर एखाद्याने अकस्मात् आणि अजाणतेने एखाद्या
व्यक्तीची हत्या केली, तर त्याने तिथे पळून जावे आणि रक्ताचा सूड
घेणाऱ्यापासून आश्रय घेऊन सुरक्षित राहावे. 4 जेव्हा ते या शहरांपैकी
एका शहराकडे पळून जातील, तेव्हा त्यांनी त्या शहराच्या वेशीवर उभे
राहावे आणि आपली हकिकत त्या शहराच्या वडीलजनांना सांगावी.
आणि त्या वडिलांनी त्या पळून आलेल्या व्यक्तीला त्यांच्या शहरात घ्यावे
आणि त्यांच्यामध्ये राहण्यासाठी त्याला जागा द्यावी. 5 जर रक्ताचा सूड
घेणारा शोध करीत आला तर, वडिलांनी त्या पळून आलेल्या व्यक्तीला
त्याच्याकडे स्वाधीन करू नये, कारण त्याने आपल्या शेजाऱ्याचा काही
दुष्ट उद्देश नसताना वध केला आहे आणि त्याच्या मनात कोणतीही
द्वेषभावना नव्हती. 6 जोपर्यंत तो सभेसमोर खटल्यासाठी उभा राहत
नाही आणि त्यावेळेस तिथे सेवा करीत असलेला महायाजकास
मृत्यू येईपर्यंत त्याने त्या शहरात राहावे. त्यानंतर तो व्यक्ती जिथून
पळून आला, त्या नगरात स्वतःच्या घरी परत जावे.” 7 तेव्हा त्यांनी
नफतालीच्या डोंगराळ प्रदेशातील गालीलातील केदेश; एफ्राईमच्या
डोंगराळ प्रदेशातील शेखेम; आणि यहूदीयाच्या डोंगराळ प्रदेशातील
किर्याथ-अर्बा (म्हणजे हेब्रोन) ही वेगळी केली. 8 यार्देनेच्या पूर्वेकडे
(यरीहोच्या पलीकडे) त्यांनी रऊबेन गोत्राच्या पठारावरील रानात
असलेले बेसेर, गाद गोत्राच्या प्रदेशातील गिलआदातील रामोथ; आणि
मनश्शेहच्या गोत्राच्या प्रदेशातील बाशानातील गोलान ही आश्रयस्थाने
म्हणून वेगळी केली. 9 त्यांच्यामध्ये राहणारा कोणा इस्राएली किंवा
परदेशीयाने नकळतपणे कोणाची हत्या केली असेल, तर त्याने या नेमून
दिलेल्या शहरांकडे पळून जावे, यासाठी की मंडळीसमोर खटल्यासाठी
उभे राहण्याआधी रक्ताचा सूड घेणाऱ्याकडून तो मारला जाऊ नये.

**21** आता लेवीचे कुटुंबप्रमुख कनानातील शिलोहमध्ये असताना
एलअज़ार याजक, नूनाचा पुत्र यहोशुआ आणि इस्राएलच्या
इतर गोत्राच्या कुटुंब प्रमुखांकडे आले 2 आणि कनानातील शिलोह
येथे त्यांना म्हणाले, “याहवेहने मोशेद्वारे आज्ञा दिली होती की तुम्ही
आम्हाला राहण्यासाठी नगरे व आमच्या गुरांसाठी कुरणे द्यावीत.”
3 तेव्हा याहवेहने दिलेल्या आज्ञेप्रमाणे, इस्राएली लोकांनी स्वतःच्या
वतनभागातून लेवी लोकांना नगरे आणि कुरणे दिली, ती ही: 4 पहिली
चिठ्ठी कोहाथी लोकांच्या कुळांप्रमाणे निघाली. लेवी जे अहरोन याजकाचे
वंशज होते त्यांना यहूदाह, शिमओन आणि बिन्यामीन गोत्रांच्या वतनातून
तेरा नगरे दिली गेली. 5 बाकीच्या कोहाथी वंशजांना एफ्राईम, दान व
मनश्शेहचा अर्धा वंश या गोत्रांच्या प्रदेशातील दहा नगरे चिठ्ठ्या टाकून
देण्यात आली. 6 गेर्षोनाच्या वंशजांना इस्साखार, आशेर, नफताली व
बाशानातील मनश्शेहच्या अर्धा वंशाच्या गोत्रातील कुळांच्या वतनातून
तेरा नगरे देण्यात आली. 7 मरारीच्या वंशजांना त्यांच्या कुळांनुसार
रऊबेन, गाद आणि जबुलून गोत्रातून बारा नगरे मिळाली. 8 याहवेहने
मोशेद्वारे जसे आज्ञापिले होते, त्याप्रमाणे इस्राएली लोकांनी चिठ्ठ्या
टाकून लेवी लोकांना नगरे व त्यांची कुरणे नेमून दिली. 9 त्यांनी
यहूदाह आणि शिमओनच्या गोत्रांना त्यांच्या नावानुसार नगरे दिली. 10
अहरोनाचे वंशज जे लेवीच्या गोत्रातील कोहाथी कुळाचे होते, त्यांची
चिठ्ठी पहिली निघाली होती. त्यांना जी नगरे मिळाली ती ही: 11 त्यांना
यहूदीयाच्या डोंगराळ प्रदेशातील किर्याथ-अर्बा (म्हणजे हेब्रोन) व त्याची
सभोवतालची कुरणे दिली. (अर्बा हा अनाकाचा पूर्वज होता.) 12 परंतु
त्या शहराच्या सभोवतालची शेती आणि गावे यफुन्नेहचा पुत्र कालेबाला
त्याचे वतन म्हणून देण्यात आले होते. 13 म्हणून अहरोन याजकाच्या
वंशजांना त्यांनी हेब्रोन (हत्या केलेल्या व्यक्तीसाठी एक आश्रयाचे
शहर), लिब्नाह, 14 यत्तीर, एशतमोआ, 15 होलोन, दबीर, 16 एईन,
युत्ताह आणि बेथ-शेमेश व त्यांची कुरणे, ही एकूण नऊ नगरे या दोन
गोत्रांकडून दिली. 17 बिन्यामीनच्या गोत्राकडून त्यांना: गिबोन, गेबा, 18
अनाथोथ आणि अलमोन अशी त्यांच्या कुरणांसह चार नगरे दिली. 19
अहरोन याजकाच्या वंशजांना त्यांच्या कुरणासहित मिळालेल्या नगरांची

एकूण संख्या तेरा झाली. 20 कोहाथाच्या कुळांतील राहिलेल्या लेव्यांना
एफ्राईम गोत्राच्या वतनातून नगरे देण्यात आली: 21 एफ्राईमच्या डोंगराळ
प्रदेशात त्यांना दिलेली नगरे ही: शेखेम (हत्येचा आरोप असलेल्या
व्यक्तीसाठी आश्रय शहर) आणि गेजेर, 22 किबसाईम आणि बेथ-
होरोन ही त्यांच्या कुरणांसह एकूण चार नगरे. 23 दानच्या गोत्राकडून
त्यांना मिळालेली नगरे ही: एल्तेकेह, गिब्बथोन, 24 अय्यालोन व गथ-
रिम्मोन; त्यांच्या कुरणासह ही चार नगरे होती. 25 मनश्शेहच्या अर्ध्या
गोत्राकडून: तानख व गथ-रिम्मोन त्यांच्या कुरणासह ही दोन नगरे. 26
ही सर्व एकूण दहा नगरे व त्यांची कुरणे राहिलेल्या कोहाथी कुळाला
मिळाली. 27 लेवी कुळातील गेर्षोनाच्या गोत्राला: मनश्शेहच्या अर्ध्या
गोत्राकडून: बाशानातील गोलान (हत्येचा आरोप असलेल्या व्यक्तीसाठी
आश्रय शहर) व बीशतेराह त्यांच्या कुरणासह ही दोन नगरे देण्यात
आली. 28 इस्साखारच्या गोत्राकडून: किशोन, दाबरथ, 29 यर्मूथ व एन-
गन्नीम व त्यांच्या कुरणासह चार नगरे देण्यात आली. 30 आशेरच्या
गोत्राकडून: मिशाल, अब्दोन, 31 हेलकथ व रहोब ही चार नगरे व त्यांची
कुरणे देण्यात आली; 32 नफतालीच्या गोत्राकडून: गालीलातील केदेश
(हत्येचा आरोप असलेल्या व्यक्तीसाठी आश्रय शहर), हम्मोथ-दोर व
करतान ही तीन नगरे त्यांच्या कुरणासह देण्यात आली. 33 गेर्षोन
कुळाच्या वाट्याला तेरा नगरे व त्यांची कुरणे आली. 34 मरारी कुळास
(बाकीच्या लेवी गोत्राला): जबुलूनच्या गोत्राकडून: योकनाम, करताह,
35 दिमनाह व नहलाल ही चार नगरे त्यांच्या कुरणांसह देण्यात आली.
36 रऊबेनच्या गोत्राकडून: बेसेर, याहसाह, 37 केदेमोथ व मेफाथ ही चार
नगरे व त्यांची कुरणे देण्यात आली. 38 गादच्या गोत्राकडून: गिलआद
मधील रामोथ (हत्येचा आरोप असलेल्या व्यक्तीसाठी आश्रय शहर),
महनाईम, 39 हेशबोन व याजेर ही चार नगरे त्यांच्या कुरणांसह देण्यात
आली. 40 लेवीच्या उर्वरित कुळांना, म्हणजे मरारी कुळास एकूण बारा
नगरे चिठ्ठ्या टाकून देण्यात आली. 41 इस्राएली लोकांच्या हद्दीत लेवी
लोकांची सर्व मिळून अठ्ठेचाळीस नगरे व त्यांची कुरणे होती. 42 यातील
प्रत्येक नगराच्या सभोवती कुरणे होती. असेच सर्व नगरांचे होते. 43
याप्रमाणे याहवेहने इस्राएलाच्या पूर्वजांना जो देश देण्याची शपथ घेतली
होती, तो सर्व त्यांना दिला आणि त्यांनी त्याचा ताबा घेऊन त्यात वस्ती
केली. 44 याहवेहने त्यांच्या पूर्वजांना शपथ दिल्याप्रमाणे त्यांना सर्वस्वी
विसावा दिला. त्यांचा एकही शत्रू त्यांच्यासमोर उभा राहू शकला नाही;
याहवेहने इस्राएली लोकांच्या प्रत्येक शत्रूला त्यांच्या हाती दिले. 45
याहवेहने इस्राएली लोकांना दिलेली जी चांगली अभिवचने होती त्यातील
एकही निष्फळ झाले नाही; त्यातील प्रत्येक अभिवचन पूर्ण झाले.

**22** नंतर यहोशुआने रऊबेन, गाद व मनश्शेहचे अर्धे गोत्र यांना
बोलाविले 2 आणि त्यांना म्हटले, “याहवेहचा सेवक मोशेने
आज्ञापिल्याप्रमाणे तुम्ही सर्वकाही केले आहे आणि मी दिलेली प्रत्येक
आज्ञा तुम्ही पाळली आहे. 3 कारण पुष्कळ काळापासून—आजच्या
दिवसापर्यंत—तुम्ही तुमच्या इस्राएली बांधवांना सोडले नाही, परंतु
याहवेह तुमच्या परमेश्वरांनी तुम्हाला दिलेले विशिष्ट कार्य तुम्ही पार
पाडले आहे. 4 आता याहवेह तुमच्या परमेश्वरांनी अभिवचन दिल्याप्रमाणे
त्यांना विसावा दिला आहे. तर आता यार्देनेच्या पलीकडे याहवेहचा
सेवक मोशेने तुम्हाला दिलेल्या प्रदेशातील तुमच्या घरी तुम्ही परत जा.
5 परंतु याहवेहचा सेवक मोशेने तुम्हाला दिलेल्या आज्ञा आणि नियमांचे
काळजीपूर्वक पालन करा: याहवेह तुमच्या परमेश्वरावर प्रीती करा,
त्यांच्या आज्ञेप्रमाणे वागा आणि त्यांच्या नियमानुसार चला, याहवेहला
धरून राहा व तुमच्या सर्व अंतःकरणाने आणि तुमच्या संपूर्ण जिवाने
त्यांची सेवा करा.” 6 तेव्हा यहोशुआने त्यांना आशीर्वाद दिला आणि ते
त्यांच्या घरी रवाना झाले. 7 (मनश्शेहच्या अर्ध्या गोत्राला मोशेने बाशान
प्रदेशात वतन दिले होते, तर यहोशुआने त्यांच्या दुसऱ्या अर्ध्या गोत्राला
त्यांच्या सहइस्राएली लोकांबरोबर यार्देनेच्या पश्चिमेस वतन दिले होते.)
जेव्हा यहोशुआने त्यांना घरी पाठवले, तेव्हा त्याने त्यांना आशीर्वाद दिला
आणि तो म्हणाला, 8 “तुमची मोठी संपत्ती घेऊन घरी जा—गुरांचा मोठा
कळप, चांदी, सोने, कास्य आणि लोखंड आणि पुष्कळ वस्त्रे आणि
तुमच्या शत्रूपासून मिळालेली लूट आपल्या इस्राएली बांधवांसह वाटून
घ्या.” 9 तेव्हा रऊबेनचे गोत्र, गादचे गोत्र आणि मनश्शेहच्या अर्ध्या
गोत्रांनी गिलआद, जो प्रदेश त्यांना याहवेहच्या आज्ञेनुसार मोशेकडून
मिळाला होता, त्याकडे परत जाताना कनानातील शिलोह येथे इस्राएली
लोकांचा निरोप घेतला. 10 जेव्हा ते कनान देशातील यार्देन जवळील
गलीलोथ येथे आले तेव्हा रऊबेन, गाद आणि मनश्शेहच्या अर्ध्या गोत्रांनी
यार्देनजवळ एक खूप मोठी वेदी बांधली. 11 आणि त्यांनी कनान देशाच्या
सीमेवर यार्देन नदीजवळ जी इस्राएली लोकांची बाजू होती त्या गलीलोथ
येथे रऊबेन, गाद आणि मनश्शेहच्या अर्ध्या गोत्रांनी मोठी वेदी बांधली
आहे असे जेव्हा इस्राएली लोकांनी ऐकले, 12 तेव्हा सर्व इस्राएली
मंडळी त्यांच्याशी युद्ध करावयाला शिलोह येथे एकत्र जमले. 13 म्हणून
इस्राएली लोकांनी एलअज़ार याजकाचा पुत्र फिनहासला गिलआदाच्या
प्रदेशाकडे रऊबेन, गाद व मनश्शेहच्या अर्ध्या गोत्राकडे पाठविले. 14
त्याच्याबरोबर त्यांनी इस्राएलाच्या प्रत्येक गोत्रातून एक, जे इस्राएलच्या
कुळांपैकी आपआपल्या पूर्वजांच्या दहा कुटुंबप्रमुख पुरुषांना पाठविले.
15 जेव्हा ते गिलआद येथे रऊबेन, गाद, आणि मनश्शेहच्या अर्ध्या
गोत्राकडे गेले; आणि त्यांना म्हणाले: 16 “याहवेहची सर्व मंडळी असे
म्हणते: ‘इस्राएलच्या परमेश्वराचा विश्वासघात तुम्ही कसा करू शकता?
याहवेहविरुद्ध बंड करून तुम्ही स्वतःच वेदी बांधून त्यांच्यापासून दूर कसे
जाऊ शकता? 17 पेओराचे पाप आमच्यासाठी पुरेसे नव्हते काय?
याहवेहच्या समाजावर मरी पडली त्या पातकापासून आजपर्यंत आम्ही
शुद्ध झालेलो नाही. 18 आणि आता तुम्ही याहवेहपासून दूर जात आहात
काय? “‘जर तुम्ही आज याहवेहविरुद्ध बंड केले तर उद्या संपूर्ण इस्राएली
समाजाविरुद्ध याहवेहचा राग पेटेल. 19 जर तुमच्या मालकीची जमीन
अशुद्ध असेल, तर याहवेहच्या भूमीकडे या, ज्या ठिकाणी याहवेहचा
निवासमंडप उभा आहे आणि ती भूमी आमच्याबरोबर वाटून घ्या. परंतु
याहवेह आपल्या परमेश्वराच्या वेदीखेरीज आपल्यासाठी वेदी बांधून
याहवेहविरुद्ध किंवा आमच्याविरुद्ध बंड करू नका. 20 जेरहाचा पुत्र

आखान समर्पित वस्तूसंबंधी अविश्वासू राहिला, तेव्हा संपूर्ण इस्राएली
लोकांवर क्रोध आला नाही काय? त्याच्या पातकामुळे मरण पावणारा
तो केवळ एकटाच नव्हता.'" 21 तेव्हा रऊबेन, गाद व मनश्शेहच्या
अर्ध्या गोत्रांनी इस्राएलच्या कुटुंबप्रमुखांना उत्तर दिले: 22 "याहवेह
जे सामर्थ्यशाली परमेश्वर आहेत! याहवेह जे सामर्थ्यशाली परमेश्वर
आहेत! त्यांना माहीत आहे! आणि हे सर्व इस्राएलच्या लोकांना माहीत
व्हावे! जर हे, याहवेहविरुद्ध बंड करण्यासाठी किंवा आज्ञाभंग असे
असेल तर आज आम्हाला जिवंत सोडू नका. 23 जर याहवेहपासून
दूर जाण्यासाठी, आणि होमार्पण आणि अन्नार्पण किंवा शांत्यर्पण
त्यावर करावे म्हणून आम्ही आमची स्वतःची वेदी बांधली असेल तर
याहवेह स्वतः त्याचा हिशोब आमच्याकडून घेवो. 24 "नाही! आम्ही
या भयाने हे केले की जर कधी तुमच्या वंशजांनी आमच्या वंशजांना
विचारले, 'याहवेह इस्राएलच्या परमेश्वराशी तुमचा काय संबंध आहे?
25 आमच्या आणि तुमच्यामध्ये याहवेहने यार्देन नदीची सीमा ठेवली
आहे. तुम्ही रऊबेनी आणि गाद लोकांनो! याहवेहमध्ये तुम्हाला वाटा
नाही.' तेव्हा तुमचे वंशज आमच्या वंशजांना याहवेहचे भय बाळगण्यास
थांबवतील. 26 "म्हणूनच आम्ही म्हणालो, 'चला आपण तयार होऊन
वेदी बांधू या, परंतु होमार्पणासाठी किंवा यज्ञासाठी नाही.' 27 तर
ती आमच्या आणि तुमच्या आणि पुढच्या पिढ्यांमध्ये साक्ष असावी,
यासाठी की आम्ही होमार्पण, यज्ञे व शांत्यर्पणे करून याहवेहच्या
पवित्रस्थानी सेवा करावी, म्हणजे 'याहवेहमध्ये तुम्हाला वाटा नाही'
असे भविष्यात तुमचे वंशज आमच्या वंशजांना म्हणू शकणार नाहीत.
28 "आणि आम्ही म्हणालो, 'जर ते आम्हाला किंवा आमच्या वंशजांना
असे म्हणतील तर आम्ही उत्तर देऊ: आमच्या पूर्वजांनी बांधलेल्या
याहवेहच्या वेदीचा हा नमुना पाहा, होमार्पणे किंवा यज्ञांसाठी नाही, परंतु
आमच्या आणि तुमच्यामध्ये ही साक्ष म्हणून असावी.' 29 "याहवेहच्या
विरुद्ध बंड करणे आणि त्यांच्या निवासमंडपासमोर उभ्या असलेल्या
याहवेह आपल्या परमेश्वराची होमवेदी सोडून धान्यार्पण आणि यज्ञांसाठी
दुसरी वेदी बांधून त्यांच्यापासून दूर जाणे हे आमच्याकडून कधी ना
होवो." 30 जेव्हा फिनहास याजक आणि समाजाचे पुढारी; इस्राएलच्या
कुळांच्या कुटुंबप्रमुखांनी रऊबेन, गाद व मनश्शेहच्या अर्ध्या गोत्रांना जे
म्हणायचे होते ते ऐकले, तेव्हा त्यांचे समाधान झाले. 31 मग एलअज़ार
याजकाचा पुत्र फिनहासने रऊबेन, गाद आणि मनश्शेहला उत्तर दिले,
"आज आमची खात्री झाली आहे की, याहवेह आमच्याबरोबर आहेत,
कारण तुम्ही वेदी बांधण्याबाबतीत याहवेहशी अविश्वासू राहिला नाहीत.
तुम्ही इस्राएली लोकांना याहवेहच्या हातातून वाचविले आहे." 32 मग
एलअज़ार याजकाचा पुत्र फिनहास आणि पुढाऱ्यांचे रऊबेनी व गाद
लोकांशी गिलआद येथे बोलणे झाल्यावर ते कनानाकडे परतले व
इस्राएली लोकांना वृत्तांत सांगितला. 33 तेव्हा वृत्तांत ऐकून इस्राएली
लोक आनंदित झाले व परमेश्वराची स्तुती केली आणि रऊबेनी व गाद
लोकांशी लढण्याची किंवा ते राहतात त्या देशाचा नाश करण्याविषयी ते
पुन्हा बोलले नाही. 34 रऊबेन आणि गाद वंशांच्या लोकांनी याहवेह हेच
परमेश्वर आहे याची साक्ष म्हणून त्या वेदीला एद म्हणजे साक्ष असे नाव
ठेवले.

**23** पुष्कळ काळ होऊन गेला होता आणि याहवेहने इस्राएली लोकास
सभोवतालच्या सर्व शत्रूपासून विश्रांती दिली, तोपर्यंत यहोशुआ
अतिशय वयस्कर झाला होता, 2 यहोशुआने सर्व इस्राएली लोकास,
त्यांच्या वडीलजनास, पुढाऱ्यांना, न्यायाधीशांना आणि अधिकाऱ्यांना
बोलाविले; आणि त्यांना म्हटले, "मी फार वृद्ध झालो आहे. 3 याहवेह,
तुमचे परमेश्वरांनी तुमच्यासाठी या सर्व राष्ट्रांचे जे काही केले, ते
सर्वकाही तुम्ही स्वतःच पाहिले आहे. ते याहवेहच तुमचे परमेश्वर होते
जे तुमच्यासाठी लढले. 4 आठवण करा, कशाप्रकारे यार्देनपासून
पश्चिमेकडे भूमध्य समुद्रापर्यंत या उर्वरित राष्ट्रांना मी जिंकले व ती
तुमच्या गोत्रांना तुमचे वतन म्हणून वाटून दिले. 5 याहवेह तुमचे परमेश्वर
स्वतः त्यांना तुमच्यासाठी बाहेर हाकलून देतील. तुमच्यासमोर ते त्यांना
बाहेर काढतील आणि याहवेह तुमच्या परमेश्वरांनी तुम्हाला अभिवचन
दिल्यानुसार तुम्ही त्यांच्या देशाचा ताबा घ्याल. 6 "अत्यंत बलवान व्हा;
मोशेच्या नियमशास्त्रात जे सर्व लिहिले आहे, त्याचे काळजीपूर्वक पालन
करा, त्याच्या उजवीकडे किंवा डावीकडे वळू नका. 7 तुमच्यामध्ये जी
उर्वरित राष्ट्रे आहेत त्यांच्याशी संगती करू नका; त्यांच्या दैवतांची नावे
घेऊ नका किंवा त्यांची शपथही घेऊ नका. तुम्ही त्यांची सेवा करू नये
किंवा त्यांना नमन करू नये 8 परंतु आतापर्यंत जसे तुम्ही याहवेह तुमचे
परमेश्वर यांना धरून राहिलात तसेच राहा. 9 "याहवेहने तुमच्यापुढून
महान आणि शक्तिशाली राष्ट्रे घालवून दिली आहेत, कोणतेही राष्ट्र
आजपर्यंत तुमच्यापुढे टिकू शकले नाही. 10 तुमच्यातील एकजण
हजारांना पळवून लावतो, कारण याहवेह तुमच्या परमेश्वरांनी तुम्हाला
दिलेल्या अभिवचनाप्रमाणे, याहवेह तुमच्यासाठी लढतात, 11 म्हणून
याहवेह तुमच्या परमेश्वरावर प्रीती करण्याबाबत फार सावध असा. 12
"परंतु जर तुम्ही मागे फिराल आणि या राष्ट्रांतील उर्वरित जे लोक
तुमच्यामध्ये राहतात त्यांच्याबरोबर स्वतःला जोडाल, त्यांच्याबरोबर
सोयरीक कराल आणि त्यांची संगत धराल 13 तर खचित हे जाणून घ्या
की, याहवेह तुमचे परमेश्वर या राष्ट्रांना तुमच्या समोरून आणखी घालवून
देणार नाही. परंतु हा चांगला देश, जो याहवेह तुमच्या परमेश्वरांनी
तुम्हाला दिला आहे, त्यातून तुमचा नाश होईपर्यंत, ती राष्ट्रे तुमच्यासाठी
पाश व सापळा अशी होतील, तुमच्या पाठीवर चाबूक आणि तुमच्या
डोळ्यात काटे असतील. 14 "आता मी लवकरच सर्व जग जाते त्या
वाटेने जाणार आहे. तुम्हाला तुमच्या सर्व हृदयाने व जिवाने माहीत
आहे की, याहवेह तुमच्या परमेश्वरांनी तुम्हाला दिलेल्या सर्व चांगल्या
अभिवचनातील एकही निष्फळ झाले नाही. प्रत्येक अभिवचन पूर्ण झाले
आहे; एकही निष्फळ झाले नाही. 15 तर याहवेह तुमच्या परमेश्वरांनी
तुम्हाला अभिवचन दिल्याप्रमाणे सर्व चांगल्या गोष्टी दिल्या आहेत,
त्याच प्रकारे याहवेह तुमच्या परमेश्वरांनी तुम्हाला चेतावणी दिल्याप्रमाणे
तुम्हाला दिलेल्या या चांगल्या देशातून तुमचा समूळ नाश होईपर्यंत
प्रत्येक वाईट गोष्ट याहवेह तुमच्यावर आणतील. 16 याहवेह तुमच्या

परमेश्वरांनी जो करार तुम्हास आज्ञापिला आहे त्याचे जर तुम्ही उल्लंघन
केले, आणि जाऊन इतर दैवतांची सेवा केली आणि त्यांना नमन केले,
तर याहवेहचा क्रोध तुमच्याविरुद्ध भडकेल आणि या चांगल्या प्रदेशातून
जो त्यांनी तुम्हाला दिला आहे त्यातून तुमचा लवकरच नाश होईल.”

**24** नंतर यहोशुआने इस्राएलांच्या सर्व गोत्रांना शेखेम येथे एकत्र
केले. त्याने इस्राएलचे वडीलजन, पुढारी, न्यायाधीश व सर्व
अधिकाऱ्यांना बोलाविले आणि त्या सर्वांनी स्वतःस परमेश्वरासमोर सादर
केले. 2 यहोशुआ सर्व लोकांना म्हणाला, “याहवेह इस्राएलचे परमेश्वर
असे म्हणतात: ‘फार पूर्वी तुमचे पूर्वज, अब्राहाम व नाहोराचा पिता
तेरह, फरात नदीच्या पलीकडे राहत होते आणि ते इतर दैवतांची भक्ती
करीत होते. 3 परंतु तुमचा पिता अब्राहामाला मी फरात नदीपलीकडील
देशातून आणले व कनान देशात सर्वत्र फिरविले व त्याला अनेक वंशज
दिले, मी त्याला इसहाक दिला, 4 आणि इसहाकाला याकोब आणि
एसाव हे दिले. एसावाला मी सेईरचा डोंगराळ प्रदेश वतन करून दिला,
परंतु याकोब आणि त्याचे कुटुंब इजिप्त देशास गेले. 5 “‘नंतर मी मोशे
आणि अहरोनला पाठविले आणि मी तिथे जे केले त्यामुळे इजिप्तच्या
लोकांवर पीडा आल्या आणि मी तुम्हाला बाहेर आणले. 6 जेव्हा मी
तुमच्या लोकांना इजिप्त देशातून बाहेर आणले, तेव्हा तुम्ही समुद्राजवळ
आला आणि इजिप्तच्या लोकांनी रथ आणि घोडेस्वार घेऊन तांबड्या
समुद्रापर्यंत तुमचा पाठलाग केला. 7 त्यांनी साहाय्यासाठी याहवेहचा
(म्हणजे माझा) धावा केला आणि मी तुमच्या व इजिप्तच्या लोकांमध्ये
अंधार केला, समुद्र इजिप्तच्या लोकांवर आणला आणि त्यात त्यांना
बुडवून टाकले. मी इजिप्तच्या लोकांचे काय केले ते तुम्ही आपल्या
डोळयांनी पाहिले आहे. त्यानंतर तुम्ही पुष्कळ काळ अरण्यात राहिला.
8 “‘यार्देनेच्या पूर्वेकडे राहणाऱ्या अमोऱ्यांच्या देशात मी तुम्हाला आणले.
ते तुमच्याविरुद्ध लढले, परंतु मी त्यांना तुमच्या हाती दिले. तुमच्यापुढे
त्यांचा नाश केला आणि तुम्ही त्यांच्या देशाचा ताबा घेतला. 9 जेव्हा
सिप्पोरचा पुत्र, मोआबाचा राजा बालाकाने इस्राएलविरुद्ध युद्धाची
तयारी केली आणि तुम्हाला शाप देण्यासाठी बौराचा पुत्र बलामाला
पाठविले. 10 परंतु मी बलामाचे ऐकले नाही आणि त्याने तुम्हाला
पुन्हा आणि पुन्हा आशीर्वाद दिला आणि मी तुम्हाला त्याच्या हातातून
सोडविले. 11 “‘नंतर तुम्ही यार्देन नदी ओलांडून यरीहोकडे आला.
यरीहोचे रहिवासी तुमच्याविरुद्ध लढले, तसेच अमोरी, परिज्जी, कनानी,
हिथी, गिर्गाशी, हिव्वी आणि यबूसी हे सुद्धा लढले, परंतु मी त्यांना
तुमच्या हाती दिले. 12 मी तुमच्यापुढे गांधीलमाशा पाठविल्या व त्यांनी
त्यांना व दोन अमोरी राजांना तुमच्यापुढून घालवून दिले. हे तुमच्या
तलवारीने आणि धनुष्य बाणांनी केले नाही. 13 म्हणून ज्या भूमीवर
तुम्ही कष्ट केले नाहीत अशी भूमी आणि जी शहरे तुम्ही बांधली नाहीत
ती मी तुम्हाला दिली; आणि तुम्ही त्यात राहता आणि जे तुम्ही लावले
नाही त्या द्राक्षमळयातून व जैतुनाच्या बागेतून फळे खाता.’ 14 “तर
आता याहवेहचे भय धरा आणि संपूर्ण विश्वासूपणाने त्यांची सेवा करा.
तुमचे पूर्वज फरात नदीच्या पलीकडे आणि इजिप्तमध्ये राहत असताना
ज्या देवतांची उपासना करीत होते, त्या टाकून द्या आणि याहवेहची सेवा
करा. 15 परंतु याहवेहची सेवा करणे तुम्हाला अप्रिय वाटत असेल,
तर तुम्ही कोणाची सेवा करणार ते आजच ठरवा, फरात नदीच्या
पलीकडे तुमच्या पूर्वजांनी ज्या दैवतांची सेवा केली ती की ज्या अमोरी
लोकांच्या देशात तुम्ही राहता त्यांच्या दैवतांची? परंतु मी आणि माझे
घराणे, आम्ही याहवेहची सेवा करणार.” 16 तेव्हा लोकांनी उत्तर दिले,
“आम्ही आमच्या याहवेहचा त्याग करून इतर दैवतांची सेवा करणे असे
आमच्या हातून कधी न घडो! 17 याहवेह आमच्या परमेश्वरांनी आम्हाला
व आमच्या पूर्वजांना इजिप्तमधून, त्या गुलामगिरीच्या देशातून बाहेर
काढले आणि आमच्या डोळयांपुढे ते महान चमत्कार केले. आमच्या
संपूर्ण प्रवासात आणि ज्या प्रदेशातून आम्ही प्रवास केला त्या सर्व
प्रवासात आमचे संरक्षण केले. 18 आणि याहवेहने जे अमोरी लोक त्या
देशात राहत होते त्यांच्यासहित सर्व राष्ट्रांना आमच्या समोरून बाहेर
घालवून दिले. आम्हीही याहवेहचीच सेवा करणार, कारण ते आमचे
परमेश्वर आहेत.” 19 यहोशुआ लोकांना म्हणाला, “तुमच्याने याहवेहची
सेवा करविणार नाही. ते पवित्र परमेश्वर आहे; ते ईर्ष्यावान परमेश्वर
आहेत. ते तुमच्या बंडाची आणि तुमच्या पातकांची क्षमा करणार नाही.
20 जर तुम्ही याहवेहचा त्याग कराल आणि परदेशी दैवताची सेवा
कराल, जरी इतका काळ ते तुमच्याबरोबर चांगले राहिले आहेत, तरी ते
उलटून तुमच्यावर संकट आणून तुमचा अंत करतील.” 21 परंतु लोक
यहोशुआला म्हणाले, “नाही! आम्ही याहवेहचीच सेवा करणार.” 22
तेव्हा यहोशुआ लोकांस म्हणाला, “तुम्ही याहवेहची सेवा करण्याचे
निवडले आहे, याला तुम्ही स्वतःच साक्षीदार आहात.” त्यांनी उत्तर
दिले. “होय, आम्ही साक्षीदार आहोत.” 23 तेव्हा यहोशुआ म्हणाला,
“तर आता तुमच्यामध्ये जे परदेशी दैवते आहेत ती टाकून द्या आणि
तुमची अंतःकरणे याहवेह इस्राएलच्या परमेश्वराकडे लावा.” 24 लोकांनी
यहोशुआला उत्तर दिले, “आम्ही याहवेह आमचे परमेश्वर यांचीच सेवा
करू आणि त्यांच्याच आज्ञा पाळू.” 25 त्या दिवशी यहोशुआने इस्राएली
लोकांशी एक करार केला, आणि शेखेम येथे त्याने त्यांच्यासाठी नियम
आणि आज्ञा पुन्हा निश्चित करून घेतल्या. 26 तेव्हा यहोशुआने या
सर्व गोष्टींची नोंद परमेश्वराच्या नियमशास्त्राच्या ग्रंथात केली. नंतर
त्याने एक मोठी धोंड घेतली आणि याहवेहच्या पवित्रस्थानाजवळ एला
वृक्षाखाली ठेवली. 27 नंतर यहोशुआ सर्व लोकांस म्हणाला, “पाहा,
ही धोंड आपल्याविरुद्ध साक्ष असेल. याहवेह जे आपल्याशी बोलले
तो प्रत्येक शब्द तिने ऐकला आहे. जर तुम्ही तुमच्या परमेश्वराबरोबर
खरेपणाने राहिला नाहीत तर ती तुमच्याविरुद्ध साक्ष देईल.” 28 नंतर
यहोशुआने त्या लोकांना आपआपल्या वतनास पाठवून दिले. 29 या
गोष्टीनंतर, याहवेहचा सेवक नूनाचा पुत्र यहोशुआ वयाच्या एकशे दहाव्या
वर्षी मरण पावला. 30 आणि त्यांनी त्याला गाश पर्वतांच्या उत्तरेला
असलेल्या एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशातील तिम्नाथ-सेरह येथे त्याच्याच
वतनभागात पुरले. 31 इस्राएली लोकांनी यहोशुआच्या सर्व आयुष्यात
आणि त्याच्या मृत्यूनंतरही जे वडीलजन जिवंत राहिले आणि याहवेहने

इस्राएलसाठी केलेल्या प्रत्येक गोष्टीचा ज्यांनी अनुभव घेतला, त्यांनी
याहवेहची सेवा केली.
32 योसेफाच्या ज्या अस्थी इस्राएली लोकांनी
इजिप्त येथून आणल्या होत्या, त्या शेखेम येथे जी जागा याकोबाने
हमोराच्या पुत्रांकडून चांदीच्या शंभर नाण्यांस विकत घेतलेली होती
तिथे पुरल्या. हे योसेफाच्या वंशजांचे वतन झाले.
33 अहरोनाचा पुत्र
एलअज़ार मरण पावला आणि त्याला एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशातील
गिबियाह येथे पुरण्यात आले. जे त्याचा पुत्र फिनहासला वतन म्हणून
देण्यात आले होते.

# शास्ते

1 यहोशुआच्या मृत्यूनंतर इस्राएली लोकांनी याहवेहला विचारले,
“कनानी लोकांविरुद्ध युद्ध करण्यासाठी आमच्यापैकी प्रथम कोणी
जावे?” 2 याहवेहने उत्तर दिले, “यहूदाहने पुढे जावे; ही भूमी मी
त्यांच्या हातात दिली आहे.” 3 मग यहूदीयाच्या पुरुषांनी इस्राएली
बांधव शिमओनीना म्हणाले, “कनानविरुद्ध लढण्यासाठी आमच्यासोबत
मिळालेल्या वतनात वर चला. तुमच्या वतनात आम्ही तुमच्यासोबत
येऊ.” तेव्हा शिमओनी त्यांच्याबरोबर गेले. 4 जेव्हा यहूदाहने आक्रमण
केले, याहवेहने कनानी आणि परिज्जी लोकांना त्यांच्या हातात दिले
आणि त्यांनी बेजेक इथे दहा हजार लोकांचा वध केला. 5 बेजेक इथे
त्यांना अदोनी-बेजेक सापडला आणि त्यांनी त्याच्याविरुद्ध युद्ध करून
कनानी आणि परिज्जी लोकांचा नायनाट केला. 6 अदोनी-बेजेक पळून
गेला, परंतु त्यांनी त्याचा पाठलाग केला, त्याला पकडले आणि त्याच्या
हातांचे आणि पायांचे आंगठे कापले. 7 त्यानंतर अदोनी-बेजेक म्हणाला,
“ज्या सत्तर राजांच्या हातापायांचे आंगठे कापून टाकले आणि ते माझ्या
मेजाखालचे तुकडे उचलतात. आता परमेश्वराने मला त्याची परतफेड
दिली आहे.” त्यांनी त्याला यरुशलेमला आणले आणि तिथे तो मरण
पावला. 8 यहूदाह गोत्राच्या लोकांनी यरुशलेमवर हल्ला केला आणि ते
देखील जिंकून घेतले. तेथील लोकांची तलवारीने कत्तल केली आणि
त्या शहराला आग लावून दिली. 9 त्यानंतर यहूदाह डोंगराळ प्रदेशात,
नेगेव आणि पश्चिमेकडील पायथ्याशी राहणाऱ्या कनानी लोकांशी युद्ध
करण्यास उतरले. 10 मग त्या हेब्रोनात (ज्याला पूर्वी किर्याथ-अर्बा
म्हणत) राहणाऱ्या कनान्यांवर यहूदाहने हल्ला केला आणि त्यांनी शेशय,
अहीमान, व तलमय यांचा पराभव केला. 11 तिथून त्यांनी दबीरमध्ये
(पूर्वी दबीरचे नाव किर्याथ-सेफर होते) राहणाऱ्या लोकांवर हल्ला केला.
12 कालेब म्हणाला, “जो पुरुष किर्याथ-सेफरवर स्वारी करून ते हस्तगत
करेल, त्याला मी आपली कन्या अक्साह ही पत्नी म्हणून देईन.” 13
कालेबाचा लहान भाऊ केनाजचा पुत्र ओथनिएलाने ते जिंकून घेतले;
म्हणून कालेबाने आपली कन्या अक्साह पत्नी म्हणून त्याला दिली. 14
एक दिवस जेव्हा ती ओथनिएलकडे आली, तेव्हा तिने तिच्या वडिलांना
शेत देण्याची त्याला विनंती केली. जेव्हा ती गाढवावरून उतरली, तेव्हा
कालेबाने तिला विचारले, “मी तुझ्यासाठी काय करावे?” 15 तिने उत्तर
दिले, “माझ्यावर विशेष कृपा करा. तुम्ही मला नेगेव प्रांतात जमीन
दिलेली आहेच, मला पाण्याचे झरेही द्या.” म्हणून कालेबाने तिला वरचे
आणि खालचे झरे दिले. 16 मोशेच्या सासऱ्याचे वंशज, केनी वंशातले
लोक यहूदाहच्या वंशाबरोबर खजुरीच्या शहरातून अरादजवळील नेगेव
येथे यहूदीयाच्या रानातील लोकांमध्ये जाऊन राहिले. 17 नंतर यहूदाहचे
लोक शिमओनी लोकांबरोबर त्यांच्या सोबतच्या इस्राएली लोकांबरोबर
गेले आणि त्यांनी जेफथ येथे राहणाऱ्या कनानी लोकांवर आक्रमण
केले आणि त्या शहराचा संपूर्ण नाश केला. म्हणून त्याला होरमाह असे
म्हणतात. 18 यहूदाहने गाझा, अष्कलोन आणि एक्रोन ही—शहरे व
त्यांच्या सभोवतालचा प्रदेशही जिंकून घेतला. 19 याहवेह यहूदाहच्या
लोकांसह होते. त्यांनी डोंगराळ प्रदेशातील देशांचा पूर्णपणे ताबा घेतला,
परंतु खोऱ्यात राहणाऱ्या लोकांजवळ लोखंडी रथ असल्याने त्यांना ते
हाकलू शकले नाहीत. 20 मोशेने अभिवचन दिल्याप्रमाणे कालेबला
हेब्रोन देण्यात आले, ज्याने अनाकाच्या तीन पुत्रांना हाकलून लावले. 21
तथापि, बिन्यामीनने यरुशलेममध्ये राहणाऱ्या यबूसी लोकांना हाकलून
दिले नाही; आजही यबूसी लोक बिन्यामीन लोकांसोबत राहत आहेत.
22 योसेफाच्या गोत्रांच्या लोकांनी बेथेलवर स्वारी केली आणि याहवेह
त्यांच्याबरोबर होते. 23 जेव्हा योसेफाच्या घराण्याने बेथेल नगरीची
(ज्याला पूर्वी लूज असे म्हणत) हेरगिरी करण्यासाठी पुरुष पाठविले,
24 एका मनुष्याला शहरातून बाहेर येताना हेरांनी पाहिले आणि ते त्याला
म्हणाले, “नगरात कसे जायचे ते आम्हाला दाखव आणि आम्ही पाहू की
तुझ्याशी चांगले वागले जाईल.” 25 म्हणून त्याने त्यांना दाखविले आणि
त्यांनी तलवारीच्या बळावर पूर्ण शहर नष्ट केले, परंतु त्या मनुष्याला
आणि त्याच्या संपूर्ण कुटुंबाला वाचविले. 26 त्यानंतर तो हिथी लोकांच्या
देशात गेला, तिथे त्याने एक शहर निर्माण केले आणि त्याचे नाव
लूज ठेवले, जे नाव आजपर्यंत आहे. 27 परंतु मनश्शेहने बेथ-शान,
तानख, दोर, इब्लाम किंवा मगिद्दो आणि त्यांच्या आसपासच्या लोकांना
घालविले नाही, कारण कनानी लोकांनी त्या देशात राहण्याचा निश्चय
केला होता. 28 जेव्हा इस्राएली प्रबळ झाले, त्यांनी कनानी लोकांना
गुलाम म्हणून काम करण्यास लावले, परंतु त्यांना कधीही पूर्णपणे
हाकलून दिले नाही. 29 तसेच एफ्राईमने गेजेर येथे राहणाऱ्या कनानी
लोकांना हाकलून दिले नाही, परंतु कनानी लोक त्यांच्यामध्येच राहिले.
30 जबुलूनने कित्रोन किंवा नहलोल येथे राहणाऱ्या कनानी लोकांना
हाकलून लावले नाही, म्हणून हे कनानी त्यांच्यामध्ये राहत होते, पण
जबुलूनने त्यांना जबरीने मजूरकामाच्या अधीन केले. 31 आशेराने
अक्को, सीदोन, अहलाब, अकजीब, हेल्बा, अफीक व रहोबातील
रहिवाशांस हाकलून दिले नाही. 32 आशेरी लोक त्या देशात राहणाऱ्या
कनानी लोकांमध्ये राहत होते, कारण त्यांनी त्यांना हाकलून दिले
नाही. 33 नफतालीने बेथ-शेमेश किंवा बेथ-अनाथ येथे राहणाऱ्यांना
हाकलून दिले नाही; पण नफताली लोकही त्या देशात राहणाऱ्या कनानी
लोकांमध्ये राहत होते आणि बेथ-शेमेश व बेथ-अनोथ येथे राहणारे लोक
त्यांच्यासाठी मजूर बनले. 34 अमोरी लोकांनी दान गोत्राच्या लोकांना
डोंगराळ प्रदेशात पळवून लावले, त्यांना खाली खोऱ्यात येऊ दिले
नाही. 35 आणि अमोरी लोकांनी हेरेस, अय्यालोन आणि शालब्बीम
पर्वतावर देखील थांबण्याचा निर्धार केला होता, परंतु जेव्हा योसेफाच्या
गोत्रांचे लोक सामर्थ्यवान झाले तेव्हा त्यांच्यावर देखील जबरदस्तीने
मजुरकामासाठी दबाव टाकण्यात आला. 36 अमोरी लोकांची सीमा
अक्राब्बीमच्या चढावापासून सेला आणि त्यापलीकडे होती.

2 याहवेहचा दूत गिलगालहून वर बोखीम येथे गेला आणि म्हणाला,
“मी तुम्हाला इजिप्त देशातून काढून तुमच्या पूर्वजास शपथपूर्वक
देऊ केलेल्या देशात आणले. मी म्हणालो, ‘तुमच्याशी केलेला करार मी

कधी मोडणार नाही, 2 आणि तुम्ही या देशातील लोकांशी कोणतेही
करार करू नका, परंतु तुम्ही त्यांच्या वेद्या मोडून टाका.’ तरी तुम्ही माझी
आज्ञा पाळली नाही. तुम्ही हे का केले? 3 आणि मी हे देखील म्हणालो,
‘मी त्यांना तुमच्यापुढून घालवून देणार नाही; ते तुम्हाला काट्यांसारखे
होतील आणि त्यांची दैवते तुम्हाला सापळे होतील.’” 4 जेव्हा याहवेहचा
दूत या गोष्टी सर्व इस्राएली लोकांना म्हणाला, ते लोक मोठ्याने रडू
लागले, 5 आणि म्हणून त्या ठिकाणाचे नाव “बोखीम” असे ठेवले. तिथे
त्यांनी याहवेहला यज्ञ अर्पण केले. 6 नंतर यहोशुआने इस्राएली लोकांना
निरोप दिला, ते देशाचा ताबा घेण्यास गेले, आपापल्या वतनावर गेले.
7 लोकांनी यहोशुआच्या सर्व आयुष्यात आणि त्याच्या मृत्यूनंतरही
जे वडीलजन जिवंत राहिले आणि याहवेहने इस्राएलसाठी केलेली
महान कृत्ये ज्यांनी पाहिली त्यांनी याहवेहची सेवा केली. 8 नूनाचा
पुत्र यहोशुआ, याहवेहचा सेवक, वयाच्या एकशे दहाव्या वर्षी मरण
पावला. 9 आणि गाश पर्वताच्या उत्तरेस एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशातील
तिम्नाथ-हेरेस येथे त्याच्या वतनाच्या प्रदेशात त्यांनी त्याचे दफन केले.
10 नंतर ती संपूर्ण पिढी त्यांच्या पूर्वजांना मिळाल्यानंतर, दुसरी पिढी
उदयास आली, ज्यांना याहवेहबद्धल किंवा त्यांनी इस्राएलसाठी काय
केले हे माहीत नव्हते. 11 तेव्हा इस्राएली लोकांनी याहवेहच्या दृष्टीने
वाईट कृत्य केले आणि बआल देवतांची सेवा केली. 12 त्यांच्या
पूर्वजांच्या ज्या याहवेह परमेश्वराने त्यांना इजिप्तमधून बाहेर आणले
होते, त्यांनी त्यांचा त्याग केला. त्यांच्या सभोवतालच्या लोकांच्या अन्य
दैवतांचे अनुसरण केले आणि त्यांची उपासना केली. त्यांनी याहवेहचा
क्रोध भडकाविला 13 कारण त्यांनी याहवेहला सोडून बआल आणि
अष्टारोथची उपासना केली. 14 याहवेहचा राग इस्राएलावर भडकला,
त्यांनी त्यांना लुटारूंच्या हाती दिले, ज्यांनी त्यांना लुटले. ज्यांचा ते
सामना करू शकत नव्हते अशा त्यांच्या सभोवतालच्या सर्व शत्रूंच्या
हाती विकले. 15 जेव्हा इस्राएली राष्ट्र त्यांच्या शत्रूविरुद्ध लढण्यास जात
असे, तेव्हा याहवेहचा हात त्यांच्याविरुद्ध असून त्यांचा पराभव होत
असे, जसे याहवेहने त्यांना वचन दिले होते. ते भयंकर संकटात होते. 16
तेव्हा याहवेहने त्यांना लुटारूंच्या हातून वाचविण्यासाठी शास्ते उभे केले.
17 तरी देखील त्यांनी आपल्या शास्त्यांचे ऐकले नाही, परंतु व्यभिचारी
मनाने इतर दैवतांच्या मागे लागले आणि त्यांची उपासना करू लागले.
त्वरेने ते आपल्या पूर्वजांच्या मार्गापासून बहकले, ज्यांनी याहवेहच्या
आज्ञांचे पालन केले होते. 18 जेव्हा याहवेहने त्यांच्यासाठी शास्ते उभे
केले होते, ते शास्त्यांबरोबर होते आणि शास्तेच्या जीवनभर ते त्यांच्या
सर्व शत्रूंच्या हातातून त्यांना सोडवित होते; कारण जुलूम व त्रास
देणाऱ्यांमुळे इस्राएली लोक विव्हळत असल्यामुळे याहवेहला त्यांची
दया येऊ लागली होती. 19 परंतु शास्ते मरण पावले की लोक योग्य ते
करण्याचे सोडून त्यांचे पूर्वज करीत त्यापेक्षा अधिक वाईट आचरण करू
लागले. ते इतर दैवतांची उपासना करीत व त्यांच्या पापी चालीरीतींकडे
हट्टाने पुन्हा वळत. 20 यासाठी याहवेहचा क्रोध इस्राएलविरुद्ध भडकला
आणि त्यांनी जाहीर केले, “कारण या इस्राएली राष्ट्राने त्यांच्या पूर्वजांशी
मी केलेल्या कराराचे उल्लंघन केले आहे आणि माझे ऐकले नाही, 21
यहोशुआ मरण पावल्यावर, यापुढे मी घालविलेल्या राष्ट्रांपैकी कोणतेही
राष्ट्र त्यांच्यापुढून घालविणार नाही. 22 इस्राएली लोकांची मी परीक्षा
घेईन आणि त्यांच्या पूर्वजांप्रमाणे याहवेहच्या आज्ञेचे पालन ते करतात
की नाही हे पाहण्यासाठी या राष्ट्रांचा मी उपयोग करेन.” 23 याहवेहने
त्या राष्ट्रांना तिथेच राहू दिले; यहोशुआच्या हातात देऊनही त्यांना एकदम
घालवून दिले नाही.

**3** कनानमधील युद्धांमध्ये भाग न घेतलेल्या इस्राएली लोकांची परीक्षा
घेण्यासाठी याहवेहने या राष्ट्रांना त्या देशात राहण्याची परवानगी
दिली 2 (हे केवळ यासाठी की ज्यांना युद्धाचा पूर्वी कोणताही अनुभव
नव्हता, त्या इस्राएली लोकांच्या वंशजांना हा अनुभव यावा): 3 ते
लोक हे होते, पलिष्टांचे पाच शासक, कनानी, सीदोनी, व बआल-हर्मोन
डोंगरापासून हमाथाच्या घाटापर्यंत लबानोन डोंगरात राहणारे हिव्वी. 4
याहवेहने मोशेद्वारे त्यांच्या पूर्वजांना दिलेल्या आज्ञांचे पालन ते करतील
की नाही याबाबत परीक्षा पाहण्यासाठी इस्राएली लोकांना मागे राहू
दिले होते. 5 इस्राएली लोक कनानी, हिथी, अमोरी, परिज्जी, हिव्वी,
आणि यबूसींमध्ये राहू लागले. 6 इस्राएली लोकांनी विवाहात त्यांच्या
कन्या घेतल्या आणि आपल्या कन्या त्यांच्या पुत्रांना दिल्या आणि
त्यांच्या दैवतांची उपासना करू लागले. 7 इस्राएली लोकांनी याहवेहच्या
दृष्टीने वाईट कृत्य केले; ते याहवेह त्यांच्या परमेश्वराला विसरले आणि
बआल व अशेरा या दैवतांची उपासना करू लागले. 8 याहवेहचा क्रोध
इस्राएलावर भडकला म्हणून त्यांनी, जिथे इस्राएली लोक आठ वर्षे
गुलामगिरीत होते त्या अराम-नहराईम राजा कुशन-रिशाथईमच्या हाती
त्यांना विकले. 9 परंतु जेव्हा इस्राएली लोकांनी याहवेहचा धावा केला,
तेव्हा त्यांनी त्यांना सोडविण्यासाठी कालेबाचा धाकटा भाऊ केनाजचा
पुत्र ओथनिएलला सुटका करणारा म्हणून उभे केले आणि त्याने त्यांची
सुटका केली. 10 याहवेहचा आत्मा त्याच्यावर उतरला, जेणेकरून
तो इस्राएलाचा शास्ता झाला आणि युद्धासाठी निघाला. याहवेहने
अरामचा राजा कुशन-रिशाथईमला अथनिएलाच्या हाती दिले, ज्याने
त्याच्यावर ताबा घेतला. 11 त्यामुळे केनाजचा पुत्र ओथनिएल मरेपर्यंत
देशात चाळीस वर्षे शांतता होती. 12 एकदा पुन्हा इस्राएली लोकांनी
याहवेहच्या दृष्टीने वाईट कृत्य केले आणि म्हणून याहवेहने मोआबाचा
राजा एग्लोनला इस्राएलावर वर्चस्व करण्यास दिले. 13 एग्लोन अम्मोनी
व अमालेकींना सोबत घेऊन आला आणि त्याने इस्राएली लोकांवर
हल्ला केला आणि त्यांनी खजुरीच्या झाडांचे शहर ताब्यात घेतले.
14 इस्राएली लोक अठरा वर्षे मोआबचा राजा एग्लोनचे गुलाम होते.
15 इस्राएलांनी पुन्हा याहवेहचा धावा केला आणि त्यांनी त्यांना एक
सोडविणारा—बिन्यामीन गेराचा पुत्र एहूद दिला, जो डाव्या हाताचा
मनुष्य होता. इस्राएली लोकांनी त्याला मोआबाचा राजा एग्लोनकडे
नजराणा देऊन पाठविले. 16 आता एहूदाने दुधारी तलवार बनविली, जी
अर्धा मीटर लांब होती, ती त्याने त्याच्या झग्याखाली उजव्या मांडीवर
बांधली. 17 त्याने मोआबच्या राजा एग्लोनाच्या समोर रसद सादर

केली, जो खूप गलेलठ्ठ मनुष्य होता. 18 एहूदाने रसद सादर केल्यानंतर,
ज्यांनी ते वाहून नेले होते त्यांना त्यांच्या मार्गावर परत पाठविले. 19 परंतु
गिलगालजवळील दगडी मूर्तीजवळ पोहोचल्यावर तो स्वत: एग्लोनकडे
परत गेला आणि म्हणाला, “महाराज, माझ्याकडे तुमच्यासाठी एक
गुप्त संदेश आहे.” राजा आपल्या सेवकांना म्हणाला, “आम्हाला एकटे
सोडा!” आणि ते सर्व निघून गेले. 20 मग त्याच्या राजवाड्याच्या वरच्या
खोलीत तो एकटाच बसला असताना एहूद त्याच्याजवळ आला आणि
म्हणाला, “तुमच्यासाठी माझ्याकडे परमेश्वराचा संदेश आहे.” राजा
आसनावरून उठताच, 21 एहूदाने आपला डावा हात पुढे झग्याखाली
करून उजव्या मांडीवर बांधलेली तलवार उपसली आणि राजाच्या
पोटात खोल खुपसली. 22 पात्याबरोबर मूठही आत गेली आणि आतडी
बाहेर पडली, एहूदाने ती तलवार बाहेर काढली नाही, तलवारीवर चरबी
गोळा झाली होती. 23 मग एहूद बाहेर ओसरीत गेला; त्याने त्याच्यामागे
वरच्या खोलीचे दरवाजे बंद केले आणि त्यांना कुलूप लावले. 24 तो
गेल्यानंतर सेवक आले आणि त्यांना वरच्या खोलीचे दरवाजे कुलूप
लावून बंद असल्याचे दिसले. ते म्हणाले, “महाराज राजवाड्याच्या
आतील खोलीत आराम करण्यास गेले असावे.” 25 ते लाजिरवाणे
वाटेपर्यंत थांबले, परंतु जेव्हा त्यांनी खोलीचे दार उघडले नाही, तेव्हा
त्यांनी किल्ली घेतली आणि दार उघडले. तिथे त्यांना आपला स्वामी
जमिनीवर मरून पडलेला दिसला. 26 ते तिथे वाट पाहत असता, एहूद
पळून गेला. दगडी मूर्तीपलीकडे सेईराह येथे जाऊन पोहोचला. 27 तो
तिथे गेल्यावर त्याने एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशात रणशिंग फुंकले
आणि इस्राएली लोक त्याच्यासोबत डोंगराळ प्रदेशातून उतरले आणि
त्याने त्यांचे नेतृत्व केले. 28 त्याने आदेश दिला, “माझ्यामागे या, कारण
याहवेहने तुमचे शत्रू मोआबी लोक तुमच्या हाती दिले आहेत.” मग ते
त्याच्या पाठोपाठ खाली गेले आणि त्यांनी मोआब देशाजवळचे यार्देनेचे
उतार रोखून धरले आणि कोणासही पलीकडे जाऊ दिले नाही. 29
त्यावेळी त्यांनी सुमारे दहा हजार मोआबी लोक मारले. हे सर्व धिप्पाड
आणि बलवान पुरुष होते; त्यापैकी एकही सुटू शकला नाही. 30 त्या
दिवशी मोआबी लोक इस्राएली लोकांच्या अधीन आले आणि त्यानंतर
देशाला ऐंशी वर्षे शांतता लाभली. 31 एहूदनंतर अनथाचा पुत्र शमगार
आला, त्याने बैलाच्या अंकुशाने सहाशे पलिष्ट्यांना मारले. त्यानेही
इस्राएलला वाचविले.

**4** एहूदच्या मृत्यूनंतर इस्राएली लोकांनी याहवेहच्या दृष्टीने पुन्हा वाईट
कृत्य केले. 2 म्हणून याहवेहने त्यांना कनानातील हासोर येथील
राजा याबीनच्या हाती दिले. त्याच्या सैन्याचा सेनापती सिसेरा हा
हरोशेथ-हग्गोईम येथे राहणारा होता. 3 त्याच्याजवळ नऊशे लोखंडी
रथ होते आणि त्याने क्रूरतेने वीस वर्षे इस्राएली लोकांचा छळ केला,
त्यांनी मदतीसाठी याहवेहचा धावा केला. 4 त्या समयी लप्पिदोथाची
पत्नी दबोरा एक संदेष्टी होती आणि ती इस्राएलचे नेतृत्व करत होती. 5
तिने एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशात रामा आणि बेथेलमध्ये दबोराच्या
खजूराच्या झाडाखाली न्यायसभा चालविली आणि इस्राएली लोक
त्यांच्यातील वादाचा निर्णय घेण्यासाठी तिच्याकडे येत असत. 6
तिने नफतालीच्या प्रदेशातील केदेश येथे राहणारा अबीनोअमाचा
पुत्र बाराकास बोलावून आणले आणि ती त्याला म्हणाली, “याहवेह
इस्राएलाचे परमेश्वर तुला आज्ञा देतात: ‘जा आणि तुझ्यासोबत नफताली
आणि जबुलून वंशातील दहा हजार पुरुषांना सोबत घेऊन ताबोर
पर्वताकडे कूच करून जा. 7 मी याबीनाच्या सैन्याचा सेनापती सिसेराला
त्याच्या रथांसह आणि त्याच्या सैन्यासह किशोन नदीकडे नेईन
आणि त्याला तुझ्या हाती देईन.’” 8 बाराक तिला म्हणाला, “जर तू
माझ्यासोबत येशील तर मी जाईन; परंतु तू माझ्याबरोबर येत नसशील,
तर मी जाणार नाही.” 9 दबोराने उत्तर दिले, “मी तुजबरोबर अवश्य येईन,
परंतु जो मार्ग तू घेत आहेस त्यामध्ये तुझा सन्मान होणार नाही, कारण
याहवेह सिसेराला एका स्त्रीच्या हातात देतील.” मग ती बाराकासोबत
केदेश येथे गेली. 10 बाराकाने जबुलूनी आणि नफतालीच्या लोकांना
बोलाविले आणि तेव्हा दहा हजार पुरुष त्याच्यामागे निघाले. दबोराही
त्याच्यासह केदेशला गेली. 11 आता हेबेर केनीने मोशेचा मेहुणा होबाबचे
गोत्र व इतर केनी लोकांना सोडले आणि केदेशजवळ साननीम येथील
मोठ्या एलावृक्षाजवळ आपला तंबू ठोकला. 12 जेव्हा त्यांनी सिसेराला
सांगितले की अबीनोअमाचा मुलगा बाराक ताबोर पर्वतावर गेला आहे,
13 तेव्हा सिसेराने आपले सर्व लोक आणि आपले नऊशे लोखंडी रथ
सज्ज करून, हरोशेथ-हग्गोईम येथून किशोन नदीकडे कूच केले. 14
तेव्हा दबोरा बाराकास म्हणाली, “जा! आज तो दिवस आहे, याहवेहने
सिसेराला तुझ्या हाती दिलेले आहे. याहवेह तुझ्यापुढे निघाले आहेत
ना?” तेव्हा बाराक दहा हजार लोकांसह ताबोर पर्वतावरून उतरला. 15
जसा बाराक पुढे गेला, याहवेहने सिसेरा आणि त्याचे सर्व रथ आणि
त्याच्या सैनिकांचा तलवारीने धुव्वा उडविला, सिसेरा तर आपल्या
रथातून उतरला आणि पायी पळून गेला. 16 बाराकाने रथांचा आणि
सैन्याचा हरोशेथ-हग्गोईमपर्यंत पाठलाग केला आणि सिसेराचे संपूर्ण
सैन्य तलवारीने पडले; एकही पुरुष जिवंत राहिला नाही. 17 सिसेरा
तर केनी हेबेराची पत्नी याएलच्या डेर्‍याकडे पायी पळून गेला, कारण
हासोरचा राजा याबीन आणि केनी हेबेरच्या घराण्यात सलोखा होता. 18
याएल सिसेराला भेटण्यास बाहेर आली आणि त्याला म्हणाली, “या,
महाराज, आत या. भिऊ नका.” म्हणून तो तिच्या डेर्‍यात गेला आणि
तिने त्याला कांबळीखाली झाकले. 19 “मला तहान लागली आहे,” तो
तिला म्हणाला. “कृपा करून मला थोडेसे पाणी दे.” तेव्हा तिने त्याला
दुधाची बुधली उघडून त्यातून त्याला थोडे दूध दिले आणि त्याला झाकून
टाकले. 20 तो तिला म्हणाला, “डेर्‍याच्या दाराशी उभी राहा. जर कोणी
येईल आणि तुला विचारेल, ‘आत कोणी आहे का?’ तर ‘नाही’ असे
सांग.” 21 सिसेरा थकून झोपलेला होता, परंतु हेबेराची पत्नी याएलने
डेर्‍याची मेख आणि हातोडा घेतला आणि हळूच त्याच्याजवळ जाऊन
त्याच्या कानशिलात तिने मेख ठोकली व ती आरपार जाऊन जमिनीत
रुतून बसली आणि तो मरण पावला. 22 बाराक सिसेराचा शोध करीत
आला, तेव्हा याएल त्याला सामोरी गेली व म्हणाली, “या, ज्या पुरुषाचा

तुम्ही शोध करीत आहात, तो मी तुम्हाला दाखविते.” तो तिच्याबरोबर
आत गेला, तेव्हा तिथे डेऱ्याची मेख कपाळातून आरपार जाऊन सिसेरा
मरून पडलेला त्याला दिसला. 23 त्या दिवशी परमेश्वराने कनानाचा
राजा याबीनास इस्राएलसमोर पराजित केले. 24 इस्राएली लोकांचे
वर्चस्व अधिकाधिक प्रबळ होत गेले आणि शेवटी त्यांनी कनानाचा राजा
याबीनचा नाश केला.

**5** त्या दिवशी दबोरा आणि अबीनोअमाचा पुत्र बाराकाने हे गीत
गाईले: 2 “जेव्हा इस्राएलचे राजकुमार पुढे चालतात, जेव्हा लोक
स्वेच्छेने स्वत:ला सादर करतात— याहवेहची स्तुती करा! 3 “अहो
राजांनो हे ऐका! अधिपतींनो कान द्या! मी स्वतः याहवेहची स्तुती
करेन; मी याहवेह इस्राएलच्या परमेश्वराची स्तुती गाईन. 4 “जेव्हा
याहवेह तुम्ही सेईरातून बाहेर निघाले, जेव्हा तुम्ही एदोमाच्या भूमीतून
चालत गेले, पृथ्वी थरारली, आकाशाने जल ओतले, ढगांनी जलबिंदू
खाली ओतले. 5 याहवेहसमोर पर्वत थरथरला, याहवेह इस्राएलच्या
परमेश्वरासमोर सीनाय थरकापला. 6 “अनथाचा पुत्र शमगारच्या
दिवसामध्ये, याएलच्या काळी राजमार्ग सुने पडले; प्रवाशांनी वळणाचा
मार्ग वापरला. 7 इस्राएलमधील ग्रामीण लढणार नाहीत; मी, दबोरा
उठेपर्यंत ते थांबले, मी, इस्राएलमधील एक माता उठेपर्यंत ते थांबले.
8 परमेश्वराने नवीन पुढारी निवडले जेव्हा युद्ध शहराच्या वेशीजवळ
आले होते, परंतु इस्राएलाच्या चाळीस हजारांमध्ये एकही ढाल किंवा
भाला दिसला नाही. 9 माझे हृदय इस्राएलच्या राजपुत्रांसह आहे,
लोकांमध्ये स्वेच्छेने काम करणाऱ्यांबरोबर आहे. याहवेहची स्तुती
हो! 10 “तुम्ही जे शुभ्र गाढवांवर स्वार होता, गालिचांच्या खोगिरावर
बसता, आणि तुम्ही त्या मार्गाने पायी चालणारे, विचार करा, 11
गायकांचा आवाज पाणवठ्याच्या ठिकाणी. ते याहवेहचे विजयगीत
गातात, इस्राएलच्या गावकऱ्यांच्या विजयाचे स्मरण करतात. “नंतर
याहवेहचे लोक शहराच्या द्वाराजवळ गेले. 12 ‘दबोरा जागी हो, जागी हो!
जागी हो, जागी हो, तुझ्या मुखातून गीत भरभरून वाहो! ऊठ, हे बाराका!
हे अबीनोअमाच्या पुत्रा, तू बंधनात टाकलेल्या बंदिवानांना घेऊन जा.’
13 “राहिलेले सरदार खाली आले; याहवेहचे लोक बलवान लोकांविरुद्ध
माझ्याकडे आले. 14 ज्यांचे मूळ अमालेकामध्ये होते, ते काही लोक
एफ्राईमामधून आले; बिन्यामीन तुम्हाला अनुसरण करणाऱ्या लोकांसह
होते. माखीराचे सरदारही आले, जबुलूनाचे दंडधारी सेनापतिसुद्धा
आले. 15 इस्साखारचे राजपुत्र दबोरा सोबत होते; होय, इस्साखार
बाराक सोबत, रऊबेनच्या जिल्ह्यांमध्ये त्याच्या नेतृत्वाखाली खोऱ्यामध्ये
पाठविले अंत:करणाचा बारकाईने शोध घेतला गेला. 16 मेंढ्यांच्या
कळपांची शिट्टी ऐकण्यासाठी तू मेंढवाड्यात का राहिलास? रऊबेनच्या
जिल्ह्यांमध्ये अंत:करणाचा बारकाईने शोध घेतला गेला. 17 गिलआद
यार्देनेपलीकडे राहिला, पण दान आपल्या जहाजांपाशीच का राहिला?
आशेर सागरकिनारीच राहिला आणि खाडीतील त्याच्या सुरक्षित स्थळी
राहिला. 18 जबुलूनच्या लोकांनी आपल्या जीव धोक्यात घातला;
तसेच नफतालीच्या लोकांनी रणभूमीवर मरणाचा धोका पत्करला. 19
“राजे आले, ते लढले, कनानाचे राजे लढले, मगिद्दोच्या झऱ्याजवळ
तानख येथे लढले, त्यांनी चांदीची लूट घेतली नाही. 20 आकाशातून तारे
लढले, त्यांच्या मार्गावरून ते सिसेराशी लढले. 21 किशोन नदीने त्यांना
वाहून नेले, पुरातन नदी, किशोन नदी. कूच कर, माझ्या आत्म्या; समर्थ
होऊन पुढे जा! 22 घोड्यांच्या टापांचा गडगडाट झाला— घोडे चौखूर
उधळले, त्याचे सशक्त घोडे चौखूर उधळले! 23 याहवेहच्या दूताने आदेश
दिला, ‘मेरोजला शाप द्या. त्याच्या लोकांना कडवटपणे शाप द्या, कारण
ते याहवेहला मदत करावयाला आले नाहीत, पराक्रमी लोकांविरुद्ध
याहवेहला मदत करावयाला आले नाहीत.’ 24 “स्त्रियांमध्ये सर्वाधिक
आशीर्वादित याएल, केनी हेबेरची पत्नी, तंबूत राहणाऱ्या स्त्रियांमध्ये
सर्वात धन्य. 25 त्याने पाणी मागितले आणि तिने त्याला दूध दिले;
आणि सरदाराला साजेल अशा वाटीत त्याला दही दिले. 26 तिचा हात
तंबूच्या खुंटीकडे गेला, उजवा हात कामगाराच्या हातोडीसाठी. तिने
सिसेराला मारले, तिने त्याचे डोके चिरडले. तिने त्याच्या कपाळाचे
भोसकून तुकडे केले. 27 तिच्या पायाशी तो खचला, तो पडला, जिथे तो
पडला; तिथेच तो पडून राहिला. तिच्या पायाशी तो खचला, तो पडला;
जिथे तो खचला, तिथे तो पडला व मेला. 28 “खिडकीतून सिसेराच्या
आईने डोकावले; जाळीच्या मागे ती ओरडली, ‘त्याचा रथ येण्यास
इतका वेळ का लागला आहे? त्याच्या रथांचा कल्लोळ ऐकू येण्यास
का उशीर होत आहे?’ 29 तिच्यातील हुशार स्त्रिया तिला उत्तर देतात;
खरंच, ती स्वत:शीच म्हणते, 30 ‘ते लूट शोधून वाटून तर घेत नाहीत
ना: प्रत्येक पुरुषासाठी एक किंवा दोन स्त्रिया, सिसेरासाठी लूट म्हणून
रंगीबेरंगी वस्त्रे, रंगीबेरंगी नक्षीदार वस्त्रे, माझ्या गळयात भरतकाम
केलेली वस्त्रे— ही सर्व लूट म्हणून आहेत काय?’ 31 “याहवेह याप्रकारे
तुमच्या सर्व शत्रूंचा नाश होवो! जसा सूर्य आपल्या सामर्थ्याने उगवतो
तसे, जे लोक तुमच्यावर प्रीती करतात ते सर्व त्या सूर्याप्रमाणे होवोत.”
त्यानंतर देशात चाळीस वर्षे देशात शांतता होती.

**6** इस्राएली लोकांनी पुन्हा याहवेहच्या दृष्टीने वाईट कृत्य केले, म्हणून
त्यांनी त्यांना सात वर्षे मिद्यानी लोकांच्या हाती दिले. 2 कारण
मिद्यानाचे सामर्थ्य अत्यंत जुलमी असल्यामुळे, इस्राएली लोकांनी
डोंगरातील फटी, गुहा आणि किल्ल्यांमध्ये स्वत:साठी आश्रयस्थान
तयार केले. 3 जेव्हा कधी इस्राएली लोक आपल्या पिकांची पेरणी
करीत, तेव्हा मिद्यानी, अमालेकी आणि इतर पूर्वेकडील लोक देशावर
आक्रमण करत असत. 4 त्यांनी तेथील जमिनीवर तळ ठोकला आणि
गाझापर्यंत पिकांची नासाडी केली आणि इस्राएलसाठी मेंढ्या, गुरे,
गाढवेही त्यांनी जिवंत ठेवली नाहीत. 5 ते टोळांच्या समुहासारखे त्यांचे
तंबू आणि त्यांचे पशुधन घेऊन आले. त्यांना किंवा त्यांचे उंट मोजणे
शक्य नव्हते; त्यांनी ती भूमी उद्ध्वस्त करण्यासाठी आक्रमण केले. 6
अशा रीतीने या मिद्यानी लोकांमुळे इस्राएलाची अवस्था इतकी निकृष्ट
व कंगाल झाली, की ते मदतीसाठी याहवेहचा धावा करू लागले. 7
मिद्यान्यांमुळे जेव्हा इस्राएली लोक मदतीसाठी याहवेहचा धावा करू
लागले, 8 त्यांनी एक संदेष्टा पाठवला, तो म्हणाला, “याहवेह इस्राएलचे

परमेश्वर म्हणतात, मी तुम्हाला इजिप्तमधून, गुलामगिरीच्या देशातून
बाहेर काढले. 9 मी तुम्हाला इजिप्तमधील लोकांच्या हातातून सोडविले
आणि जे तुमच्याशी क्रूरपणे वागत, त्या सर्व लोकांच्या हातून सोडविले
आणि तुमच्या शत्रूंना तुमच्यापुढून घालवून त्यांचा देश तुम्हाला दिला.
10 मी तुम्हाला म्हटले, मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे; ज्या अमोरी
लोकांच्या देशात तुम्ही राहता, त्यांच्या दैवतांची उपासना करू नका. परंतु
तुम्ही माझे ऐकले नाही.” 11 याहवेहचा दूत आला आणि ओफराह येथील
एला वृक्षाखाली बसला. तो वृक्ष अबियेजरी योआशच्या मालकीचा
होता, जिथे त्याचा पुत्र गिदोन मिद्यानी लोकांपासून वाचविण्यासाठी
द्राक्षकुंडात गहू मळत होता. 12 जेव्हा याहवेहचा दूत गिदोनाच्या पुढे
प्रगट झाला आणि त्यास म्हणाला, “हे बलवान सैनिका, याहवेह
तुझ्याबरोबर आहेत.” 13 गिदोन त्यास म्हणाला, “महाराज, मला माफ
करा, परंतु जर याहवेह आमच्यासह असते तर हे सर्व आमच्यासोबत
का घडले? आमच्या पूर्वजांनी सांगितलेले त्यांचे सर्व चमत्कार कुठे
आहेत, जेव्हा ते म्हणाले, ‘परमेश्वराने आम्हाला इजिप्तमधून बाहेर
काढले नाही का?’ पण आता याहवेहने आम्हाला सोडून दिले आहे
आणि आम्हाला मिद्यानच्या हाती दिले आहे.” 14 याहवेह त्याच्याकडे
वळून म्हणाले, “आपल्या बळाचा उपयोग कर आणि जा इस्राएलला
मिद्यान्यांच्या हातून सोडव. मी तुला पाठवित नाही का?” 15 गिदोनाने
उत्तर दिले, “महाराज, मला माफ करा, मी इस्राएली लोकांना कसा
काय सोडविणार? माझे कुटुंब संपूर्ण मनश्शेह गोत्रातील अत्यंत दुर्बल
असे कुटुंब आहे आणि माझ्या पूर्ण कुटुंबात मला अत्यंत कनिष्ठ समजले
जाते.” 16 याहवेहने उत्तर दिले, “मी तुझ्याबरोबर असेन आणि तू सर्व
मिद्यान्यांचा असा नायनाट करशील की त्यांच्यापैकी कोणीही जिवंत
राहणार नाही.” 17 गिदोनाने प्रत्युत्तर दिले, “जर तुम्ही माझ्यावर संतुष्ट
झाले असाल तर ते सिद्ध करण्यासाठी मला एखादे चिन्ह दाखवा. 18
मी परत येऊन माझे अर्पण तुमच्यापुढे ठेवीपर्यंत कृपा करून जाऊ
नका.” आणि याहवेह म्हणाले, “तू परत येईपर्यंत मी वाट पाहीन.” 19
गिदोन आत गेला, त्याने एक करडू कापून कालवण तयार केले आणि
पिठाच्या एक एफापासून खमीर नसलेली भाकर केली. टोपलीत मांस
आणि त्याचा रस्सा एका भांड्यात ठेवून त्याने ते बाहेर आणले आणि
एलाच्या वृक्षाखाली त्याला अर्पण केले. 20 परमेश्वराचा दूत त्याला
म्हणाला, “मांस व बेखमीर भाकरी त्या तिथे असलेल्या खडकावर
ठेव आणि रस्सा त्यावर ओत.” गिदोनाने सूचनांप्रमाणे केले, 21
तेव्हा याहवेहच्या दूताने आपल्या हातातील काठीने त्या मांसास व
बेखमीर भाकरीस स्पर्श केला, त्याबरोबर खडकातून अग्नी निघाला
व त्या अग्नीने ते मांस व त्या भाकरी भस्म करून टाकल्या. आणि
याहवेहचा तो दूत एकाएकी अंतर्धान पावला. 22 जेव्हा गिदोनाच्या
लक्षात आले की तो खरोखर याहवेहचा दूत होता, तेव्हा तो मोठ्याने
म्हणाला, “अरेरे, अहो सार्वभौम याहवेह! मी तर मरणार, कारण मी
याहवेहच्या दूताला समोरासमोर पाहिले आहे!” 23 परंतु याहवेहने
त्याला उत्तर दिले, “शांती असो! भिऊ नकोस. तू मरणार नाहीस.”
24 म्हणून गिदोनाने तिथे याहवेहसाठी एक वेदी बांधली आणि तिला
याहवेह शालोम, याहवेह शांती देतात असे नाव दिले. ही वेदी अद्यापही
अबियेजरीकरांच्या मुलुखातील ओफराह या गावी आहे. 25 त्याच रात्री
याहवेहने त्याला म्हटले, “वडिलांच्या कळपातील उत्तम सात वर्षांचा
दुसरा गोऱ्हा घे. तुझ्या पित्याची बआल दैवताची वेदी पाडून टाक आणि
तिच्याजवळ असणाऱ्या अशेरा देवीचा खांब तोडून टाक. 26 नंतर या
उंचवट्यावर याहवेह तुमच्या परमेश्वरासाठी योग्य प्रकारची वेदी बांधा. तू
तोडलेल्या अशेरा खांबाच्या लाकडाचा वापर करून, होमार्पण म्हणून
दुसरा गोऱ्हा अर्पण कर.” 27 यास्तव गिदोनाने आपल्या नोकरांपैकी
दहा नोकर बरोबर घेतले आणि याहवेहने आज्ञा केल्याप्रमाणे सर्वकाही
केले. परंतु आपल्या पित्याच्या परिवारातील माणसांच्या व गावातील
लोकांच्या भीतीने त्याने ते हवन दिवसाच्या ऐवजी रात्री केले. 28
दुसऱ्या दिवशी पहाटेस गाव जागे होऊ लागले, तेव्हा बआल दैवताची
वेदी मोडून पडलेली, तिच्याजवळच असलेला अशेराचा खांब नाहीसा
झालेला, नवीन वेदी बांधलेली व तिच्यावर दुसऱ्या गोऱ्ह्याचे होमार्पण
झालेले दृष्टीस पडले! 29 ते एकमेकांना विचारू लागले, “हे कोणी
केले असावे?” शोध घेतल्यावर त्यांना सांगण्यात आले, “योआशाचा
पुत्र गिदोनाने ते केले होते.” 30 योआशाला नगरवासी मोठमोठ्याने
ओरडून म्हणू लागले, “तुझ्या पुत्राला बाहेर आण; बआल दैवताच्या
वेदीचा अपमान केल्याबद्दल व तिच्याजवळील अशेरामूर्ती फोडल्याबद्दल
त्याने मेलेच पाहिजे.” 31 परंतु योआशाने त्याच्या आजूबाजूच्या विरोधी
जमावाला उत्तर दिले, “तुम्ही बआलची बाजू मांडणार आहात का? तुम्ही
त्याला वाचविण्याचा प्रयत्न करत आहात का? जो कोणी त्याच्यासाठी
लढेल त्याला सकाळपर्यंत जिवे मारावे! जर बआल खरोखरच देव
असता तर, जेव्हा कोणी त्याची वेदी तोडतो तेव्हा तो स्वतःचा बचाव
करू शकला असता.” 32 म्हणून गिदोनाने बआल दैवताची वेदी विध्वंस
केली, त्या दिवशी त्यांनी त्याला “यरूब्बआल” असे नाव दिले, त्याचा
अर्थ, “बआल दैवतानेच त्याचा विरोध करावा,” असा होता. 33 त्यानंतर
लवकरच मिद्यानी, अमालेकी आणि इतर पूर्वेकडील शेजारी राष्ट्रांची
सैन्ये एकत्रित झाली. त्यांनी यार्देन पार केली व येज्रीलच्या खोऱ्यात तळ
दिला. 34 तेव्हा याहवेहचा आत्मा गिदोनावर आला आणि त्याने रणशिंग
फुंकले; अबिएजेरी लोक त्याच्याकडे आले. 35 त्याने मनश्शेह, आशेर,
जबुलून आणि नफतालीकडे दूत पाठवून त्यांच्या सैन्यांना येण्याचे
आव्हान केले व त्या सर्वांनी त्याला साथ दिली. 36 गिदोन परमेश्वराला
म्हणाला, “जर तुम्ही इस्राएलला दिलेल्या अभिवचनाप्रमाणे माझ्या
हातांनी वाचवाल— 37 पाहा, तर आज रात्री खळ्यात मी लोकर ठेवेन
आणि सकाळी लोकर तेवढी दवाने ओली असावी, परंतु सभोवतालची
जमीन कोरडी असे आढळून आले, तर मी समजेन की तुम्ही इस्राएलला
वाचविण्यासाठी मला मदत कराल.” 38 आणि अगदी तसेच घडून
आले. दुसऱ्या दिवशी सकाळी गिदोन उठला; त्याने ती लोकर दाबली
आणि तिच्यातील दहिवर पिळले—एक वाटीभर पाणी काढले. 39 नंतर
गिदोन परमेश्वराला म्हणाला, “कृपा करून माझ्यावर रागावू नका. मला

पुन्हा आणखी एक वेळ विनंती करू द्या. मला पुन्हा एकदा परीक्षा घेऊ द्या, परंतु यावेळी ती लोकर कोरडी असू द्या आणि पूर्ण भूमी दवबिंदूने झाकून टाका.” 40 त्या रात्री परमेश्वराने तसेच केले. त्या रात्री लोकर कोरडी राहिली, परंतु जमीन दहिवराने आच्छादून गेली.

**7** अगदी पहाटेस यरूब्बआल (म्हणजे गिदोन) आणि त्याचे सर्व लोक हरोदाच्या झऱ्यापर्यंत गेले. मिद्यान्यांचा तळ त्यांच्या उत्तरेस मोरेह डोंगराजवळ खोऱ्यात होता. 2 याहवेह गिदोनाला म्हणाले, “तुझ्याकडे खूप जास्त लोक आहेत. मी मिद्यानी लोकांना तुमच्या हातात देणार नाही; नाहीतर इस्राएलचे लोक माझ्यासमोर गर्व करून म्हणतील की, ‘आमच्याच बळाने आम्ही स्वतःला वाचविले आहे.’ 3 आता सैन्यांना सूचना दे, ‘जर कोणी घाबरत असतील, तर त्यांनी गिलआद डोंगरावरून माघारी जावे.’” त्यामधून बावीस हजार लोक परत गेले व दहा हजार राहिले. 4 परंतु याहवेह गिदोनास म्हणाले, “अजूनही पुष्कळ लोक आहेत. त्यांना पाण्याजवळ घेऊन चल आणि तिथे मी त्यांना पारखून त्यांची संख्या तुझ्यासाठी कमी करेन. जर मी म्हणालो, ‘हा तुझ्याबरोबर जाईल,’ तो तुझ्याबरोबर जाईल; पण जर मी म्हणालो, ‘हा तुझ्याबरोबर जाऊ नये,’ तर त्याने तुझ्याबरोबर जाऊ नये.” 5 म्हणून गिदोनाने त्या माणसांना पाण्याजवळ नेले. तिथे याहवेहने त्याला सांगितले, “जे कुत्र्याप्रमाणे पाणी जिभेने पितात त्यांना जे गुडघे टेकून पाणी पितात त्यांच्यापासून वेगळे करा.” 6 त्यांच्यापैकी तीनशे जण होते जे पाणी आपल्या तोंडाजवळ घेऊन, कुत्र्यांसारखे चाटून पाणी प्याले. बाकी सर्व गुडघे टेकून पाणी प्याले. 7 याहवेहने गिदोनाला सांगितले, “जे चाटून पाणी प्याले, त्या तीनशे लोकांच्या साहाय्यानेच मी तुम्हाला सोडवेन आणि मिद्यानी लोकांना तुमच्या हाती देईन. बाकी सर्वांना तू घरी पाठवून दे.” 8 गिदोनाने बाकीच्या इस्राएली लोकांना घरी पाठवून दिले, परंतु त्याच्याजवळ फक्त तीनशे लोकच ठेवले, ज्यांनी इतरांकडून अन्नसामुग्री व रणशिंगे घेतली. त्याच्या खाली खोऱ्यात मिद्यानी लोक आपल्या छावणीत होते. 9 त्या रात्री, याहवेह गिदोनास म्हणाले, “ऊठ, खाली छावणीवर चाल कर, कारण मी त्यांना तुझ्या हातात देणार आहे. 10 परंतु तुला हल्ला करण्यास भीती वाटत असेल, तर तुझा सेवक पुराहला आपल्याबरोबर घे 11 आणि ते काय बोलत आहे ते ऐक. त्यानंतर तू हल्ला करण्यास उत्साहित होशील.” तेव्हा तो आणि त्याचा सेवक पुराह छावणीच्या सीमेपर्यंत खाली उतरले. 12 मिद्यानी, अमालेकी आणि पूर्वेकडील इतर देशांचे लोक टोळांप्रमाणे त्या खोऱ्यात दाटीने पसरले होते. त्यांचे उंट समुद्र किनाऱ्यावरील वाळूप्रमाणे इतके अधिक होते की, त्यांची गणती करणे शक्य नव्हते. 13 गिदोन तिथे पोहोचला तेव्हा एक मनुष्य आपल्या सोबत्याला स्वप्न सांगत होता. तो म्हणत होता, “मला एक स्वप्न पडले, एक जवाची गोल भाकर घरंगळत मिद्यानी छावणीत आली. तिने आपल्या तंबूला असा जोराचा धक्का दिला की तो तंबू उलटला आणि जमिनीवर भुईसपाट झाला.” 14 त्याच्या सोबत्याने उत्तर दिले, “हे इस्राएलातील योआशाचा पुत्र गिदोनाच्या तलवारीशिवाय दुसरे काही नाही. परमेश्वराने मिद्यानी व त्यांची संपूर्ण छावणी त्याच्या हाती दिली आहे.” 15 जेव्हा गिदोनाने स्वप्न व त्याचा अर्थ ऐकला, तेव्हा तिथे त्याने दंडवत घातले आणि उपासना केली. तो इस्राएली लोकांच्या छावणीत लोकांकडे परतला आणि म्हणाला, “उठा! कारण मिद्यानी लोकांची छावणी याहवेहने तुमच्या हातात दिली आहे.” 16 मग गिदोनाने आपल्या तीनशे सैनिकांच्या तीन तुकड्या केल्या आणि प्रत्येकाला एक रणशिंग व मातीचे एक रिकामे मडके दिले, त्या मडक्यात एकेक मशाल होती. 17 तो त्यांना म्हणाला, “माझ्याकडे पाहत राहा आणि जसे मी करतो तसे करा. मी छावणीच्या सीमेवरील टोकावर पोहोचल्यावर जसे मी करतो तसेच करा. 18 मी व माझ्यासोबत असलेल्या सर्वांनी आमची रणशिंगे फुंकल्यानंतर तुम्हीही छावणीच्या सर्व बाजूंना तुमची रणशिंगे फुंका आणि मोठ्याने ओरडून म्हणा, ‘याहवेहसाठी व गिदोनासाठी.’” 19 गिदोन आणि त्याच्या बरोबरची शंभर माणसे मध्य पहाटेच्या सुरुवातीला पहारा बदलल्यानंतर छावणीच्या टोकाला पोहोचले. त्यांनी रणशिंग फुंकले आणि त्यांच्या हातातील मडके फोडले. 20 तीनही दलांनी रणशिंग फुंकले आणि मडके फोडले. आपल्या डाव्या हातात मशाली धरून आणि उजव्या हातात रणशिंगे धरून जे फुंकणार होते, ते ओरडले, “याहवेहसाठी आणि गिदोनासाठी तलवार!” 21 प्रत्येक व्यक्ती छावणीच्या सभोवताली आपल्या स्थानी उभे राहिले, सर्व मिद्यानी लोक पळू लागले, ते पळत असता मोठ्याने ओरडत पळाले. 22 जेव्हा तीनशे रणशिंगे फुंकली, याहवेहने छावणीतील संपूर्ण पुरुषांची तलवार त्यांच्याच साथीदारावर चालविली. सैन्य सरेराहनजीकच्या बेथ-शिट्टाहपर्यंत व टब्बाथा नजीकच्या आबेल-महोलाहच्या सीमेपर्यंत पळून गेले. 23 तेव्हा नफताली, आशेर व मनश्शेहमधील इस्राएली लोकांना बोलाविले गेले आणि त्यांनी मिद्यान्यांचा पाठलाग केला. 24 गिदोनाने एफ्राईमच्या सर्व डोंगराळ प्रदेशात आपले दूत पाठवून हा संदेश दिला, “खाली येऊन मिद्यानाशी लढून बेथ-बाराहपर्यंत यार्देन नदीचे उतार रोखून धरा.” म्हणून एफ्राईमच्या सर्व लोकांना बोलाविण्यात आले आणि त्यांनी बेथ बारापर्यंत यार्देन नदीचा उतार रोखून धरला. 25 त्यांनी ओरेब व जेब नावांच्या दोन मिद्यानी पुढाऱ्यांनाही पकडले. त्यांनी ओरेबाला ओरेबाच्या खडकावर मारले आणि जेबाला जेबाच्या द्राक्षकुंडाजवळ मारले. मग इस्राएली लोकांनी मिद्यानांचा पाठलाग केला आणि ओरेब व जेब यांची शिरे यार्देनेपलीकडे गिदोनाकडे आणली.

**8** आता एफ्राईमचे लोक गिदोनाला म्हणाले, “तू आमच्याशी असा का वागला? जेव्हा तू मिद्यानी लोकांशी युद्ध करावयास गेला तर आम्हाला का बोलाविले नाही?” आणि त्यांनी रागात गिदोनासह वाद घातला. 2 परंतु त्याने त्यांना उत्तर दिले, “तुमच्या तुलनेत मी काय साध्य केले आहे? एफ्राईमच्या द्राक्षांचा सरवा हा अबिएजेराच्या द्राक्षाच्या पूर्ण कापणीपेक्षा चांगला नाही काय? 3 परमेश्वराने ओरेब व जेब मिद्यानी पुढारी तुमच्या हातात दिले. तुमच्या तुलनेने मी काय केले आहे?” असे बोलल्यानंतर त्यांचा त्याच्यावरचा राग शांत झाला. 4 मग गिदोन आणि त्याचे तीनशे लोक थकून गेलेले होते तरीही ते त्यांचा पाठलाग करीत यार्देन किनारी आले आणि पलीकडे गेले. 5 तो सुक्कोथ येथील लोकांना

म्हणाला, “मी तुम्हाला विनंती करतो की, माझ्याबरोबरच्या लोकांना
काही भाकरी द्या; कारण ते फार थकले आहेत आणि मी मिद्यानी
लोकांचे राजे जेबह व सलमुन्नाचा आताही पाठलाग करीत आहे.” 6
परंतु सुक्कोथाचे अधिकारी म्हणाले, “आता तुझ्या हातात जेबह व
सलमुन्नाचे हात आहेत का? मग आम्ही तुझ्या सैन्याला भाकरी का
द्यावी?” 7 त्यावर गिदोन म्हणाला, “याहवेह जेव्हा जेबह व सलमुन्नाला
माझ्या हाती देतील, तेव्हा मी रानातील काटे व काटेरी झुडपांनी तुमच्या
शरीराचे मांस फाडेन.” 8 मग तो तिथून पेनुएल येथे गेला आणि
तिथेही त्याने तीच विनंती केली, पण त्यांनी देखील सुक्कोथ येथील
लोकांप्रमाणे उत्तर दिले. 9 म्हणून तो पेनुएलच्या लोकांना म्हणाला, “मी
सुरक्षित परत येईन, तेव्हा हा बुरूज पाडून टाकेन.” 10 आता जेबह राजा
व सलमुन्ना राजा आपल्या उरलेल्या पंधरा हजार सैनिकांसह कर्कोर
येथे पोहोचले होते, पूर्वेकडील देशांच्या मित्र सेनांपैकी तेवढेच सैनिक
उरले होते; कारण त्यांचे एक लाख वीस हजार सैनिक आधीच ठार
झालेले होते. 11 मग गिदोनाने नोबाह व योगबेहाहच्या पूर्वेस राहुट्यात
राहणाऱ्या लोकांच्या वाटेने वर जाऊन बेसावध सेनेवर अचानक हल्ला
चढविला. 12 जेबह व सलमुन्ना हे दोन मिद्यानी राजे पळाले, परंतु त्याने
त्यांचा पाठलाग केला व त्यांना पकडले आणि त्यांच्या सर्व सैन्याची
दाणादाण केली. 13 योआशाचा पुत्र गिदोन युद्धावरून हेरेसच्या खिंडीतून
परत आला. 14 तिथे त्याने सुक्कोथातील एका तरुणास पकडले व
त्याला विचारले आणि त्या तरुणाने सुक्कोथ येथील सर्व सत्याहत्तर
अधिकारी आणि वडीलजनांची नावे लिहून दिली. 15 मग गिदोन आला
आणि सुक्कोथ येथील लोकांना म्हणाला, “यांना पाहा हे जेबह राजा व
सलमुन्ना यांच्याविषयी तुम्ही मला टोमणा मारत म्हटले होते, ‘आता
तुझ्या हातात ओरेब व जेबाचे हात आहेत काय? मग आम्ही तुझ्या
थकलेल्या सैन्याला भाकरी का द्यावी?’” 16 मग त्याने त्या शहरातील
वडिलांना पकडले आणि सुक्कोथ येथील लोकांना रानातील काटे आणि
काटेरी झुडपांची शिक्षा देऊन धडा शिकविला. 17 त्याने पेनुएल येथील
बुरूज मोडून टाकला व त्या शहरातील पुरुषांचा संहार केला. 18 मग
गिदोनाने जेबह राजा व सलमुन्ना राजाला विचारले, “तुम्ही ताबोर
येथे ज्या पुरुषांना ठार केले ते कसे होते?” त्यांनी उत्तर दिले, “ते
तुझ्यासारखेच, प्रत्येकजण राजपुत्राप्रमाणे दिसत होते.” 19 गिदोनाने
म्हटले, “ते माझे भाऊ होते, माझ्याच आईचे पुत्र. जीवित याहवेहची
शपथ घेऊन सांगतो की त्यांना तुम्ही ठार केले नसते, तर मी तुमचा
वध केला नसता.” 20 मग आपल्या ज्येष्ठपुत्र येथेर याच्याकडे वळून
त्याला म्हणाला, “त्यांना ठार कर!” परंतु येथेर याने आपली तलवार
उपसली नाही, कारण तो कोवळा मुलगा होता आणि भयभीत झाला.
21 जेबह व सलमुन्ना म्हणाले, “तूच ते कर. ‘कारण जसा पुरुष, तसे
त्याचे बल.’” तेव्हा गिदोन पुढे आला आणि त्यांना ठार केले व त्यांच्या
उंटांच्या गळ्यांतील अलंकार काढून घेतले. 22 आता इस्राएलचे लोक
गिदोनास म्हणू लागले, “तू आमच्यावर राज्य कर; तू आणि तुझे पुत्र
आणि तुझे नातूही; कारण मिद्यानी लोकांच्या हातातून तू आम्हाला
सोडविले आहे.” 23 परंतु गिदोनाने त्यांना म्हटले, “मी तुमच्यावर राज्य
करणार नाही किंवा माझा पुत्रही तुमच्यावर राज्य करणार नाही. याहवेह
तुमच्यावर राज्य करतील.” 24 आणि गिदोन म्हणाला, “माझी एक
विनंती आहे, तुमच्यापैकी प्रत्येकाने आपल्या लुटीतील एक कुंडले
मला द्यावे.” (सोन्याची कुंडले घालण्याची इश्माएली लोकांची प्रथा
होती.) 25 त्यांनी उत्तर दिले, “आम्हाला ते देण्यास आनंद होईल.”
म्हणून त्यांनी एक वस्त्रे पसरले आणि त्यांच्यातील प्रत्येकाने आपल्या
लुटीतील एकेक कुंडले तिथे टाकली. 26 त्याने मागितलेल्या कुंडलांचे
वजन एक हजार सातशे शेकेल, याखेरीज त्याला चंद्रकोरी, लोलक,
मिद्यानी राजांची जांभळी वस्त्रे व उंटांच्या गळ्यातील साखळयाही
मिळाल्या. 27 गिदोनाने त्या सोन्याचे एक एफोद करून आपले नगर
ओफराह येथे ठेवले. सर्व इस्राएली लोकांनी त्याची उपासना करून
व्यभिचार केला आणि ते गिदोन आणि त्याच्या कुटुंबासाठी पाश असे
झाले. 28 अशा प्रकारे इस्राएली लोकांपुढे मिद्यानी वश झाले आणि
त्यांनी आपले डोके पुन्हा कधीही वर काढले नाही. आणि गिदोनाच्या
सर्व हयातीत चाळीस वर्षे देशाला शांतता लाभली. 29 योआशचा पुत्र
यरूब्बआल राहण्यासाठी घरी परतला. 30 गिदोनाला एकूण सत्तर पुत्र
झाले, कारण त्याला अनेक पत्नी होत्या. 31 शेखेमातही त्याला एक
उपपत्नी होती. तिने त्याला एक पुत्र दिला. त्याचे नाव अबीमेलेख असे
होते. 32 योआशचा पुत्र गिदोन पूर्ण वयातीत होऊन मरण पावला व
त्याला अबियेजऱ्यांच्या ओफराह येथे त्याचा पिता योआशच्या कबरेत
पुरण्यात आले. 33 गिदोन मरण पावल्याबरोबर, इस्राएली लोकांनी
बआल दैवताच्या मागे लागून पुन्हा व्यभिचार केला. त्यांनी बआल-
बरीथची दैवत म्हणून स्थापना केली 34 आणि ज्या याहवेह इस्राएलच्या
परमेश्वराने, त्यांच्या चहूकडील शत्रूंच्या हातातून सोडविले होते, त्यांचे
स्मरण ठेवले नाही. 35 तसेच इस्राएलसाठी सगळया चांगल्या गोष्टी
करूनही त्यांनी यरूब्बआल (म्हणजे गिदोन) च्या घराण्यावर काहीही
निष्ठा दाखविली नाही.

**9** यरूब्बआलचा पुत्र अबीमेलेख हा आपल्या आईच्या भावांना
भेटण्यासाठी शेखेम येथे गेला आणि त्यांना व आपल्या आईच्या सर्व
घराण्याला तो बोलला, 2 “तुम्ही शेखेमातील सर्व नागरिकांना विचारा,
‘तुमच्यासाठी काय उत्तम आहे: यरूब्बआलच्या सर्व सत्तर पुत्रांनी
किंवा एक व्यक्तीने तुमच्यावर राज्य करावे?’ स्मरण ठेवा मी तुमच्या
रक्तामांसाचा आहे.” 3 जेव्हा बंधूंनी हे सर्व शेखेमातील नागरिकांना
सांगितले, त्यांनी अबीमेलेखाचे अनुसरण करण्याचे ठरविले, कारण ते
म्हणाले, “तो आमचा नातेवाईक आहे.” 4 त्यांनी त्याला बआल-बरीथ
मंदिरातील सत्तर शेकेल चांदी दिली आणि अबीमेलेखाने ती अविचारी
व लुच्ची माणसे त्याच्यामागे चालण्यासाठी उपयोगी आणली. 5 तो
ओफराह येथील आपल्या पित्याच्या घरी गेला व तिथे एका दगडावर
त्याने आपल्या सत्तर भावांचा म्हणजे यरूब्बआलाच्या पुत्रांचा वध
केला. परंतु यरूब्बआलाचा धाकटा पुत्र योथाम लपून निसटून गेला. 6
तेव्हा शेखेमातील आणि बेथमिल्लोतील सर्व नागरिकांनी एक सभा

बोलावली आणि शेखेमातील स्तंभाजवळील मोठ्या एलावृक्षाजवळ
त्यांनी अबीमेलेखाचा राजा म्हणून राज्याभिषेक केला. 7 जेव्हा
योथामाला हे सांगण्यात आले, तेव्हा तो गरिज्जीम डोंगराच्या शिखरावर
उभा राहिला व त्यांना उंच वाणीने ओरडून म्हणाला, “शेखेमातील
नागरिकांनो माझे ऐका, म्हणजे परमेश्वर तुमचे ऐकतील. 8 एकदा
वृक्षांनी त्यांच्यासाठी राजाला अभिषिक्त करण्यास गेले. ते जैतून वृक्षाला
म्हणाले, ‘तू आमचा राजा हो!’ 9 “परंतु जैतून वृक्षाने उत्तर दिले, ‘ज्याद्वारे
दैवत आणि मनुष्य या दोघांचा सन्मान होतो ते माझे तेल देणे मी सोडून
इतर वृक्षांवर हलतडुलत राहावे काय?’ 10 “नंतर ते वृक्ष अंजिराच्या
वृक्षास म्हणाले, ‘ये आणि तू आमचा राजा हो!’ 11 “परंतु अंजिराच्या
वृक्षाने उत्तर दिले, ‘केवळ इतर वृक्षांवर हलतडुलत राहण्यासाठी मी माझे
माधुर्य आणि चांगली फळे देण्याचे सोडून द्यावे का?’ 12 “मग ते वृक्ष
द्राक्षवेलास म्हणाले, ‘ये आणि आमचा राजा हो.’ 13 “परंतु द्राक्षवेलाने
उत्तर दिले, ‘केवळ इतर वृक्षांवर हलतडुलत राहण्यासाठी दैवत व
मनुष्यांना आनंदित करणारा द्राक्षारस देण्याचे मी सोडून द्यावे का?’ 14
“अखेरीस सर्व वृक्ष काटेरी झुडूपाला म्हणाले, ‘ये आणि तू आमचा राजा
हो.’ 15 “ते काटेरी झुडूप त्या वृक्षांना म्हणाला, ‘तुमचा राजा म्हणून
माझा अभिषेक व्हावा अशी तुमची इच्छा आहे, हे जर सत्य असेल तर
या आणि माझ्या सावलीचा आश्रय घ्या; पण जर तसे नसेल तर काटेरी
झुडूपातून अग्नी निघो व तो लबानोनाचे गंधसरू भस्म करून टाको!’ 16
“तुम्ही अबीमेलेखाचा तुमचा राजा करून सन्मानाने आणि चांगल्या
विश्वासाने वागलात काय? यरूब्बआल आणि त्याचा कुटुंबासाठी योग्य ते
केले आहे का? ज्या योग्यतेचा तो आहे, त्याप्रमाणे त्याच्याशी वागलात
का? 17 आठवण ठेवा की माझा पिता तुमच्यासाठी लढला व तुम्हाला
मिद्यानी लोकांच्या तावडीतून सोडविण्यासाठी त्याने आपला जीव
धोक्यात घातला. 18 परंतु आज तुम्ही माझ्या पित्याच्या कुटुंबाविरुद्ध
बंड केले व तुम्ही त्याच्या सत्तर पुत्रांचा एका दगडावर वध केला
आणि आता अबीमेलेख जो एक दासीचा पुत्र आहे, त्याला शेखेमातील
नागरिकांवर राजा केले आहे, कारण तो तुमचा नातेवाईक आहे. 19
आज तुम्ही यरूब्बआल आणि त्याच्या कुटुंबासोबत सन्मानाने आणि
सदिच्छेने वागलात काय? तर मग अबीमेलेख तुमचा आनंद होवो आणि
तुम्ही त्याचा आनंद होवो! 20 परंतु जर तसे नाही, तर अबीमेलेखातून
अग्नी निघून तुम्हाला, शेखेमाच्या आणि बेथमिल्लोच्या नागरिकांना
भस्म करो आणि शेखेमाच्या आणि बेथमिल्लोच्या नागरिकातून अग्नी
निघून अबीमेलेखाला भस्म करो!” 21 मग योथाम निसटून गेला व
आपला भाऊ अबीमेलेखाच्या भीतीमुळे बैर येथे जाऊन राहिला. 22
अबीमेलेखाने इस्राएलावर तीन वर्षे राज्य केल्यानंतर, 23 परमेश्वराने
अबीमेलेख व शेखेमाच्या नागरिकांमध्ये वैर निर्माण केले, ज्यामुळे त्यांनी
अबीमेलेखाचा विश्वासघात केला. 24 यरूब्बआलाच्या सत्तर पुत्रांचा
विरोधात केलेल्या अपराधाचा, त्यांचा रक्तपात करण्याचा, त्यांचा भाऊ
अबीमेलेख आणि शेखेमाच्या नागरिकांवर ज्यांनी अबीमेलेखाचा त्याच्या
बंधूंची हत्या करण्यास साहाय्य केले होते, त्यांचा सूड घेण्यास परमेश्वराने
असे केले. 25 शेखेमाच्या नागरिकांनी त्याच्याविरुद्ध डोंगराच्या माथ्यावर
वाटेवर दबा धरण्यास लोक ठेवले आणि त्या वाटेने जाणाऱ्या येणाऱ्या
प्रत्येकाला ते लुबाडू लागले आणि हे कोणीतरी अबीमेलेखाचा सांगितले.
26 मग एबेदचा पुत्र गाल आपल्या भावांबरोबर शेखेमास आला आणि
तेथील नागरिकांनी त्याच्यावर भरवसा ठेवला. 27 नंतर ते शेतात गेले
आणि द्राक्षे गोळा केली आणि ती तुडविली व त्यांच्या दैवताच्या मंदिरात
उत्सव केला. ते खातपीत असताना त्यांनी अबीमेलेखाला शाप दिला.
28 नंतर एबेदचा पुत्र गाल म्हणाला, “अबीमेलेख कोण आहे आणि
आम्ही शेखेमी लोकांनी त्याची चाकरी का करावी? तो यरूब्बआलाचा
पुत्र नाही का आणि त्याचा कारभारी जबुल नाही का? शेखेमचा पिता
हमोरच्या कुटुंबाची तुम्ही सेवा करा! अबीमेलेखाच्या कुटुंबाची आम्ही
सेवा का करावी? 29 जर हे लोक माझ्या अधिकारात असते तर किती
बरे झाले असते! तेव्हाच मी अबीमेलेखाला काढून टाकले असते. मी
अबीमेलेखाला म्हणेन, ‘तुझे संपूर्ण सैन्य घेऊन बाहेर पड आणि लढाई
कर!’” 30 परंतु नगराधिपती जबुलाने एबेदचा पुत्र गालचे बोलणे ऐकले
तेव्हा तो भयंकर संतापला. 31 त्याने अबीमेलेखकडे दूत पाठवून त्याला
कळविले, “एबेदचा पुत्र गाल व त्याचे भाऊबंद शेखेमात आले आहेत
आणि आता ते या शहराला तुझ्याविरुद्ध चिथावीत आहेत. 32 म्हणून
आता तू आणि तुझे लोक रात्री या आणि शेतांमध्ये दबा धरून बसा. 33
सकाळी अगदी सूर्योदय झाल्याबरोबर शहरावर स्वारी कर. जेव्हा गाल
आणि त्याचे लोक तुझ्याविरुद्ध लढण्यास बाहेर येतील, तेव्हा त्यांच्यावर
हल्ला करण्याची संधी पाहा.” 34 तेव्हा अबीमेलेख आणि त्याच्या
सर्व सैन्याने रात्रीच कूच केले आणि शेखेमजवळ त्यांनी आपल्या चार
टोळ्या केल्या व शहराच्या सभोवती ते दबा धरून बसले. 35 आता
एबेदचा पुत्र गाल बाहेर आला आणि शहराच्या वेशीजवळ उभा राहिला,
अबीमेलेख आणि त्याचे सैन्य जे दबा धरून बसले होते तेही बाहेर आले.
36 जेव्हा गालने त्यांना पाहिले, तेव्हा तो जबुलास म्हणाला, “पाहा,
डोंगराच्या शिखरांवरून लोक उतरत आहेत!” जबुल त्याला म्हणाला,
“नाही, ती केवळ डोंगराची सावली आहे जी तुला माणसांसारखी दिसत
आहे.” 37 परंतु गाल परत म्हणाला: “पाहा, मध्य उंचवट्यापासून लोक
खाली येत आहेत आणि दैवप्रश्न करणाऱ्यांच्या एला वृक्षाच्या मागील
वाटेने टोळी येत आहे.” 38 तेव्हा जबुल त्याला म्हणाला, “आता तुझे ते
मोठेपणाचे बोलणे कुठे आहे, तू जे बोलला होता, ‘अबीमेलेख कोण आहे
की त्याची चाकरी करावी?’ हीच माणसे आहेत ना ज्यांची तू थट्टा केली
होती? तर बाहेर जा आणि त्यांच्याशी लढ!” 39 तेव्हा गालने शेखेमाच्या
नागरिकांना लढण्यासाठी नेले व अबीमेलेखाशी तो लढला. 40 नंतर
अबीमेलेखाने त्याचा वेशीच्या प्रवेश दारापर्यंत पाठलाग केला आणि
पळून जात असता अनेक मृत्युमुखी पडले. 41 मग अबीमेलेख अरुमा
येथे राहिला आणि जबुलाने गाल आणि त्याच्या भाऊबंदांना शेखेमातून
घालवून दिले. 42 दुसऱ्या दिवशी शेखेमातील लोक बाहेर शेतात गेले
आणि अबीमेलेखाला ही बातमी देण्यात आली. 43 म्हणून त्याने लोक
घेतले, त्यांना तीन तुकड्या मध्ये विभाजित केले व ते शेतांमध्ये दबा

धरून बसले. जेव्हा त्याने पहिले की लोक शहरातून बाहेर येत आहेत, तेव्हा त्याने उठून त्यांच्यावर हल्ला केला. 44 अबीमेलेख आणि त्याच्या तुकडीने शहराच्या वेशीजवळ पुढे धावत येऊन ती रोखून धरली. त्याच्या इतर दोन तुकड्यांनी जे शेतात होते त्यांच्यावर हल्ला केला आणि त्यांचा शेतांमध्ये संहार केला. 45 संपूर्ण दिवसभर अबीमेलेख शहर काबीज करेपर्यंत शहरावर हल्ला करीत राहिला आणि त्याने त्यातील लोकांचा संहार केला. नंतर त्याने शहराचा नाश केला आणि त्यावर मीठ पेरले. 46 हे ऐकून शेखेमाचे नागरिक जे बुरुजात होते त्यांनी बआल-बरीथच्या मंदिराशेजारी असलेल्या किल्ल्यामध्ये आश्रय घेतला 47 जेव्हा अबीमेलेखाने हे ऐकले की नागरिक शेखेमाच्या बुरुजात एकत्र झाले आहेत, 48 अबीमेलेख आणि त्याची सर्व माणसे सलमोन डोंगराकडे गेले. त्याने कुऱ्हाड घेतली आणि झाडांच्या फांद्या तोडून, त्या आपल्या खांद्यावर उचलून ठेवल्या. त्याने आपल्या लोकांना आदेश दिला, “त्वरा करा! तुम्ही मला जे करताना पाहिले तसेच करा!” 49 म्हणून सर्व माणसांनी फांद्या तोडल्या आणि अबीमेलेखाच्या मागे चालले. त्यांनी फांद्यांची रास बुरुजाच्या चहूबाजूंनी लावली आणि लोक आत असता त्याला आग लावली. अशा रीतीने शेखेमाच्या बुरुजामध्ये असलेले सुमारे एक हजार स्त्रीपुरुष मरण पावले. 50 त्यानंतर अबीमेलेख तेबेस येथे गेला आणि त्याला वेढा दिला आणि ते हस्तगत केले. 51 त्या शहरात एक मजबूत बुरूज होता, ज्यामध्ये सर्व पुरुष आणि सर्व स्त्रिया—शहरातील सर्व लोक—बुरुजाकडे पळाले. त्यांनी स्वत:ला आतमध्ये बंद करून घेतले आणि बुरुजाच्या छतावर चढले. 52 अबीमेलेख बुरुजाकडे गेला आणि त्याने त्यावर हल्ला केला. पण बुरुजाला आग लावण्यासाठी तो प्रवेशद्वाराजवळ गेला असताना, 53 एका स्त्रीने जात्याची वरची तळी खाली सरळ अबीमेलेखाच्या डोक्यावर टाकली आणि त्याच्या कवटीचा चुराडा केला. 54 त्याने घाईने आपल्या शस्त्रवाहकास बोलावून आदेश दिला, “तुझी तलवार काढ आणि मला ठार कर, ‘एका स्त्रीने त्याला ठार केले, असे कोणीही म्हणू शकणार नाही.’” तेव्हा त्या तरुणाने त्याला आपल्या तलवारीने भोसकले आणि तो मरण पावला. 55 जेव्हा इस्राएली लोकांनी अबीमेलेख मृत झाल्याचे पाहिले, तेव्हा ते आपापल्या घरी परतले. 56 अबीमेलेखाने आपल्या सत्तर भावांचे वध करून आपल्या वडिलांविरुद्ध जी दुष्टाई केली होती, तिची परतफेड परमेश्वराने अशा रीतीने केली. 57 शेखेमातील लोकांच्या सर्व दुष्टाईबद्दल परमेश्वराने त्यांना शिक्षा दिली. यरुब्बआलाचा पुत्र योथामचा शापही त्यांच्यावर आला.

**10** अबीमेलेखाच्या काळानंतर इस्साखार गोत्राताल एक पुरुष, तोला जो पुआहचा पुत्र व दोदोचा नातू इस्राएलाच्या सुटकेसाठी उभा राहिला. तो एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशातील शामीर नगरात राहत असे. 2 तेवीस वर्षे त्याने इस्राएलचे नेतृत्व केले; नंतर त्याचा मृत्यू झाला आणि त्याला शामीर येथे मूठमाती देण्यात आली. 3 त्याच्यानंतर याईर गिलआदीचा उदय झाला. त्याने बावीस वर्षे इस्राएलचे नेतृत्व केले. 4 त्याचे तीस पुत्र होते, जे तीस गाढवांवर स्वार होत असत. गिलआद येथील तीस नगरे त्यांच्या अधिकारात होती. ती आज देखील हव्वोथ-याईर म्हणून संबोधली जातात. 5 याईर मरण पावल्यावर त्याला कामोन येथे मूठमाती देण्यात आली. 6 इस्राएली लोकांनी याहवेहच्या दृष्टीने पुन्हा वाईट कृत्य केले. ते बआल व अष्टारोथ या दैवतांच्या मूर्तींची आणि अरामाचे दैवत, सीदोनाचे दैवत, मोआबाचे दैवत, अम्मोनाचे दैवत व पलिष्टीच्या दैवतांची उपासना व सेवा करू लागले. इस्राएली लोक याहवेहला विसरले आणि त्यांची सेवा करणे सोडले. 7 यास्तव याहवेहचा राग इस्राएलवर भडकला. त्यांनी त्यांना पलिष्टी आणि अम्मोनी लोकांच्या हाती विकले. 8 ज्यांनी त्या वर्षी त्यांची दाणादाण केली आणि त्यांना चिरडून टाकले. अठरा वर्षे त्यांनी अमोऱ्यांचा देश असलेल्या गिलआदामध्ये यार्देन नदीच्या पूर्वेकडील सर्व इस्राएली लोकांवर अत्याचार केला. 9 तसेच यहूदाह घराणे, बिन्यामीन घराणे व एफ्राईम घराण्यांविरुद्ध युद्ध करण्यास अम्मोनी वंशजांनी यार्देन नदी पार केली; यामुळे इस्राएली फार संकटात होते. 10 तेव्हा इस्राएली लोकांनी याहवेहला आरोळी मारली, “आम्ही आमच्या परमेश्वराचा त्याग केला आणि बआलची सेवा करून तुमच्याविरुद्ध पाप केले आहे.” 11 याहवेहने इस्राएली लोकांना उत्तर दिले, “जेव्हा इजिप्ती, अमोरी, अम्मोनी, पलिष्टी, 12 सीदोनी, अमालेकी व माओनी या सर्वांनी तुमच्यावर अत्याचार केला आणि तुम्ही माझ्या मदतीसाठी धावा केला आणि मी तुम्हाला सोडविले नाही काय? 13 परंतु तुम्ही माझा त्याग केला आणि इतर दैवतांची सेवा करू लागले, म्हणून यापुढे मी तुम्हाला सोडविणार नाही. 14 जा आणि तुम्ही निवडलेल्या नवीन दैवतांचा धावा करा. तुमच्या आपत्काली त्यांनीच तुम्हाला सोडवावे!” 15 परंतु इस्राएली लोकांनी याहवेहला म्हटले, “आम्ही पाप केले आहे. तुम्हाला जे योग्य वाटेल ते तुम्ही करा, पण आता आम्हाला सोडवा.” 16 नंतर त्यांनी त्यांच्याजवळ असलेली परदेशी दैवते दूर टाकली आणि याहवेहची सेवा केली. याहवेहना इस्राएलची दैन्यावस्था सहन झाली नाही. 17 जेव्हा अम्मोनी लोकांना युद्धासाठी एकत्र करण्यात आले आणि त्यांनी गिलआदामध्ये तळ ठोकला, तेव्हा इस्राएली लोक एकत्र आले आणि त्यांनी मिस्पाह येथे तळ दिला. 18 गिलआदाच्या लोकांचे पुढारी एकमेकांना म्हणाले, “जो कोणी अम्मोनी लोकांवर हल्ला करण्यास पुढाकार घेईल तो गिलआदामध्ये राहणाऱ्या सर्वांचा प्रमुख होईल.”

**11** गिलआदी इफ्ताह हा एक महान योद्धा होता. त्याच्या पित्याचे नाव गिलआद; त्याची आई एक वेश्या होती. 2 गिलआदाच्या पत्नीने सुद्धा त्याच्या पुत्रांना जन्म दिला आणि जेव्हा ते मोठे झाले, तेव्हा त्यांनी इफ्ताहाला हाकलून दिले. ते त्याला म्हणाले, “आमच्या पित्याच्या वतनातून तुला काहीही मिळावयाचे नाही, कारण तू दुसऱ्या स्त्रीचा पुत्र आहेस.” 3 म्हणून इफ्ताह आपल्या भावांपासून पळून गेला आणि तोब या देशात जाऊन राहिला. लवकरच त्याने गुंड लोकांची टोळी जमविली. त्या टोळीतले लोक त्याचे अनुयायी बनले व त्याच्याबरोबर राहू लागले. 4 काही वेळानंतर, अम्मोनी लोक इस्राएली लोकांविरुद्ध युद्ध करू लागले. 5 जेव्हा अम्मोनी इस्राएल लोकांशी लढत होते, तेव्हा

गिलआदाचे वडीलजन इफ्ताहाला आणण्यास तोब येथे गेले. 6 त्यांनी
इफ्ताहाला म्हटले, “ये आणि आमचा सेनापती हो, म्हणजे आपण
अम्मोनी लोकांविरुद्ध युद्ध करू.” 7 गिलआदाच्या वडीलजनांना इफ्ताह
म्हणाला, “तुम्ही माझा द्वेष केला नाही का आणि मला माझ्या वडिलांच्या
घरातून हाकलून लावले होते ना? जेव्हा तुम्ही संकटात आहात तेव्हा
आता तुम्ही मजकडे का आलात?” 8 गिलआदाच्या वडीलजनांनी
इफ्ताहाला म्हटले, “आम्ही तुझ्याकडे यासाठी आलो आहेत की; तू
आमच्यासोबत अम्मोनी लोकांविरुद्ध युद्ध करण्यास ये आणि गिलआद
मधील रहिवाशांचा प्रमुख हो.” 9 गिलआदाच्या वडीलजनांना इफ्ताहाने
उत्तर दिले, “समजा तुम्ही मला अम्मोनी लोकांशी लढण्यासाठी परत
नेले आणि याहवेहने ते मला दिले तर मी खरोखर तुमचा प्रमुख होईन
काय?” 10 गिलआदाच्या वडिलांनी इफ्ताहाला उत्तर दिले, “याहवेह
आमचे साक्षी आहेत; तुम्ही सांगाल तसे आम्ही नक्कीच करू.” 11 तेव्हा
इफ्ताह गिलआदाच्या वडिलांसोबत गेला आणि लोकांनी त्याला त्यांचा
प्रमुख व सेनापती केले. आणि त्याने मिस्पाह येथे याहवेहसमोर आपले
सर्व शब्द पुन्हा सांगितले. 12 नंतर इफ्ताहाने अम्मोनी राजाकडे दूत
पाठवून प्रश्न केला: “तुला माझ्याविरुद्ध काय तक्रार आहे की तू माझ्या
देशावर हल्ला केला?” 13 अम्मोन्यांच्या राजाने इफ्ताहाच्या दूतांना
उत्तर दिले, “जेव्हा इस्राएली लोक इजिप्त देशामधून बाहेर आले, तेव्हा
आर्णोन नदीपासून यब्बोक आणि यार्देन या नद्यांपर्यंतचा सर्व मुलूख
त्यांनी हिरावून घेतला होता. आता तो शांततेने परत केला जावा.” 14
इफ्ताहाने अम्मोनी राजाकडे दूतांना परत पाठवले 15 म्हणाला: “इफ्ताह
असे म्हणतो: इस्राएलने मोआब किंवा अम्मोनी लोकांची भूमी घेतली
नाही. 16 परंतु जेव्हा इस्राएली लोक इजिप्तमधून बाहेर आले, त्यांनी
तांबडा समुद्र ओलांडला आणि कादेश या ठिकाणी आले. 17 तेव्हा
इस्राएली लोकांनी एदोमाच्या राजाकडे दूतांना पाठवून म्हटले, ‘आम्हाला
तुमच्या देशातून जाण्याची परवानगी द्या,’ परंतु एदोमाच्या राजाने ऐकले
नाही. तसाच त्यांनी मोआबाच्या राजाकडे निरोप पाठविला आणि
त्यानेही नकार दिला. म्हणून इस्राएली लोक कादेश येथेच राहिले. 18
“नंतर त्यांनी एदोम आणि मोआब या देशांना वेढा घालून रानातून आणि
पूर्वेकडील सीमेने प्रवास करीत मोआबाच्या सीमेच्या पलीकडे आर्णोन
नदीजवळ तळ दिला. परंतु त्यांनी मोआबाच्या सीमेत प्रवेश केला
नाही, कारण आर्णोन ही मोआबाची सीमा होती. 19 “नंतर इस्राएलने
अमोर्‍यांचा राजा सीहोनकडे दूतांना पाठविले. जो त्यावेळी हेशबोन येथे
राज्य करीत होता आणि त्याला म्हटले, ‘आम्हाला आमच्या स्वस्थानी
जाण्यासाठी तुमच्या देशातून जाण्याची परवानगी द्या.’ 20 त्यांना त्याच्या
सीमेतून जाऊ द्यावे असा विश्वास सीहोन राजाने इस्राएलवर ठेवला नाही.
त्याने आपले सर्व सैन्य गोळा केले आणि याहसाह येथे तळ दिला आणि
इस्राएलाशी युद्ध केले. 21 “नंतर याहवेह इस्राएलच्या परमेश्वराने सीहोन
व त्याचे सर्व सैन्य इस्राएलाच्या हाती दिले आणि त्यांनी त्यांचा पराभव
केला. त्या देशात राहणार्‍या अमोरी लोकांचा सर्व देश इस्राएलने घेतला,
22 आर्णोन ते यब्बोकपर्यंत आणि वाळवंटापासून यार्देनपर्यंत अमोर्‍यांचा
सर्व प्रदेश काबीज केला. 23 “याहवेह इस्राएलांच्या परमेश्वराने आपल्या
इस्राएली लोकांपुढून अमोर्‍यांना घालवून टाकले, तर ते परत मागण्याचा
तुला कोणता अधिकार आहे? 24 तुझे दैवत कमोशने तुला काही वतन
दिले, तर ते तू आपल्या ताब्यात ठेवणार नाहीस का? तसेच याहवेह
आमचे परमेश्वर आम्हाला जे वतन म्हणून देत आहे, ते आम्ही आमच्याच
ताब्यात ठेवू. 25 सिप्पोरचा पुत्र मोआबाचा राजा बालाकहून आपण श्रेष्ठ
आहोत, असे तुला वाटते काय? त्याने इस्राएलशी कधी भांडण केले
का किंवा त्यांच्याशी त्याने युद्ध केले काय? 26 तीनशे वर्षे इस्राएलने
हेशबोन, अरोएर, आजूबाजूच्या वसाहती आणि आर्णोनच्या बाजूची सर्व
नगरे ताब्यात घेतली. त्या काळात तुम्ही त्यांना पुन्हा का घेतले नाही?
27 मी तुझ्याविरुद्ध काही अपराध केलेला नाही, उलट तूच माझ्याशी
लढण्यासाठी येऊन माझ्यावर अन्याय करीत आहेस. याहवेह जे न्यायी
आहेत, ते इस्राएली लोक व अम्मोनी लोक यांच्यामध्ये आज न्याय
करोत.” 28 अम्मोन्यांच्या राजाने इफ्ताहाने पाठविलेल्या संदेशाकडे
अजिबात लक्ष दिले नाही. 29 मग याहवेहचा आत्मा इफ्ताहावर आला.
तो गिलआद व मनश्शेह पार करून गिलआदाच्या मिस्पेह येथे गेला
आणि तिथून त्याने अम्मोनी लोकांवर आक्रमण केले. 30 इफ्ताहाने
याहवेहला नवस केला: “जर तुम्ही अम्मोनी लोकांना माझ्या हाती द्याल,
31 आणि जेव्हा मी अम्मोन्यांकडून सुरक्षित परत येईन, तेव्हा माझ्या
घराच्या दारातून जे काही मला भेटायला येईल ते याहवेहचे असेल
आणि मी त्याचा होमार्पण म्हणून यज्ञ करेन.” 32 नंतर इफ्ताहाने
अम्मोन्यांवर आक्रमण केले आणि याहवेहने त्यांना त्याच्या हाती दिले.
33 अरोएरापासून ते मिन्नीथापर्यंतच्या वाटेवरील सर्व वीस नगरांमध्ये
आणि दूर आबेल-करामीमपर्यंत त्याने अम्मोन्यांची भयंकर कत्तल केली.
अशाप्रकारे इस्राएली लोकांनी अम्मोनी लोकांस जेरीस आणले. 34
जेव्हा इफ्ताह मिस्पाह येथे आपल्या घरी परतला, त्याची कन्या डफ
वाजवित व आनंदाने नृत्य करीत त्याला भेटण्यास बाहेर आली! ती
त्याची एकुलती एक कन्या होती, तिच्याशिवाय त्याला पुत्र किंवा कन्या
नव्हती. 35 जेव्हा त्यांना तिला पाहिले, त्याने आपली वस्त्रे फाडली
आणि तो आकांत केला, “हाय, हाय, माझ्या कन्ये! तू मला मातीत
मिळविले आहेस आणि तू माझ्या शोकाचे कारण झाली आहेस! कारण
मी याहवेहला नवस केला आहे, जो आता मला मागे घेता येत नाही.”
36 “माझ्या पित्या,” तिने म्हटले, “याहवेहला तुम्ही आपले वचन दिलेले
आहे. तुम्ही दिलेल्या वचनानुसार माझ्यासोबत करा, कारण याहवेहने
तुमचे शत्रू अम्मोनी लोकांवर तुम्हाला विजय दिलेला आहे. 37 परंतु
माझी एक विनंती मान्य करा,” ती म्हणाली. “मला माझ्या सख्यांबरोबर
दोन महिने डोंगरावर फिरू द्या आणि माझा विवाह कदापि होणार नाही,
याबद्दल शोक करू द्या.” 38 त्यावर तो म्हणाला, “ठीक आहे, तू जाऊ
शकते.” त्याने तिला दोन महिन्यांसाठी जाऊ दिले. ती आणि तिच्या
सख्या डोंगरावर गेल्या आणि तिचा विवाह कदापि होणार नाही, याबद्दल
शोक केला. 39 दोन महिन्यानंतर ती आपल्या पित्याकडे परत आली
आणि त्याने नवस केल्याप्रमाणे तिच्यासोबत केले आणि ती कुमारिका

होती. त्यानंतर इस्राएली लोकांमध्ये प्रथा पडली, 40 की प्रत्येक वर्षी इस्राएली कुमारिकांनी चार दिवस डोंगरांवर जावे आणि गिलआदी इफ्ताहाच्या कन्येच्या स्मरणात शोक करावा.

**12** मग एफ्राईमच्या लोकांनी आपले सैन्य एकवटले आणि ते पार होऊन साफोन येथे आले. ते इफ्ताहाला म्हणाले, “आम्हाला सोबत न घेता तू अम्मोन्यांशी लढावयास का गेलास? आता आम्ही तुझ्यासह तुझे घर जाळून टाकणार आहोत.” 2 इफ्ताहाने प्रत्युत्तर दिले, “मी आणि माझ्या लोकांचे अम्मोन्यांशी फार मोठे भांडण झाले आणि मी तुम्हाला बोलाविले देखील होते, पण तुम्ही मला त्यांच्या हातातून सोडविले नाही. 3 जेव्हा मी हे पहिले तुम्ही मदतीला येत नाही, तेव्हा मी माझ्या जिवावर उदार होऊन अम्मोनी लोकांवर चालून गेलो आणि याहवेहने मला त्यांच्यावर विजय दिला. मग आज तुम्ही आमच्याविरुद्ध लढावयास का आलात?” 4 मग इफ्ताहाने गिलआदाच्या माणसांना एकत्र बोलाविले आणि एफ्राईमच्या विरुद्ध युद्ध केले. गिलआदाच्या माणसांनी एफ्राईमच्या लोकांना मारले, कारण ते म्हणाले होते, “तुम्ही गिलआदाचे लोक एफ्राईमातून व मनश्शेहतून पळपुटे आहात.” 5 गिलआदांनी एफ्राईमकडे जाणारे यार्देनेचे खोरे काबीज केले आणि जेव्हा एफ्राईममधील कोणी वाचला व म्हणाला, “मला ओलांडू दे,” तेव्हा गिलआदाचे लोक त्याला विचारीत, “तू एफ्राईमी आहेस का?” जर तो म्हणाला, “नाही,” 6 ते म्हणत, “ठीक आहे मग ‘शिब्बोलेथ म्हण.’” जर तो “सीब्बोलेथ,” म्हणाला, कारण तो ते शब्द नीट उच्चारू शकला नाही, तर ते त्याला धरत आणि त्याला यार्देनेच्या उतारावर ठार करीत. त्यावेळी एफ्राईमचे बेचाळीस हजार लोक ठार झाले. 7 इफ्ताहाने सहा वर्षे इस्राएलचे नेतृत्व केले. मग गिलआदी इफ्ताह मरण पावला आणि त्याला गिलआदाच्या एका गावात पुरण्यात आले. 8 त्याच्यानंतर बेथलेहेमच्या इब्झानने इस्राएलचे नेतृत्व केले. 9 त्याला तीस पुत्र आणि तीस कन्या होत्या. त्याने आपल्या कन्यांचा विवाह परकीय कुळात केला आणि आपल्या पुत्रांसाठी त्याने तीस तरुण स्त्रिया परकीय कुळांतून आणल्या. इब्झानने इस्राएलचे नेतृत्व सात वर्षे केले. 10 नंतर इब्झान मरण पावला आणि त्याला बेथलेहेमात मूठमाती देण्यात आली. 11 त्याच्यानंतर एलोन जबुलूनने दहा वर्षे इस्राएलचे नेतृत्व केले. 12 मग एलोन मरण पावला आणि त्याला जबुलून देशातील अय्यालोनमध्ये पुरण्यात आले. 13 त्याच्यानंतर पिराथोन येथील हिल्लेलचा मुलगा अब्दोनाने इस्राएलचे नेतृत्व केले. 14 त्याला चाळीस पुत्र आणि तीस नातू होते, ते सत्तर गाढवांवर स्वार होते. त्याने आठ वर्षे इस्राएलचे नेतृत्व केले. 15 मग हिल्लेलचा पुत्र अब्दोन मरण पावला आणि त्याला अमालेक्यांच्या डोंगराळ प्रदेशात एफ्राईममधील पिराथोन येथे पुरण्यात आले.

**13** पुन्हा इस्राएली लोकांनी याहवेहच्या दृष्टीने वाईट ते केले, म्हणून याहवेहने त्यांना चाळीस वर्षे पलिष्टी लोकांच्या अंमलाखाली ठेवले. 2 दान कुळातील सोराह येथील एक मनुष्य होता, ज्याचे नाव मानोहा होते, त्याची पत्नी होती, जी वांझ असून ती लेकरांना जन्म देऊ शकत नव्हती. 3 याहवेहच्या दूताने तिला दर्शन दिले आणि म्हणाला, “तू वांझ आहे आणि तुला मूल नाही, तरीपण तू गर्भवती होशील आणि एका पुत्राला जन्म देशील. 4 तू द्राक्षारस किंवा मद्य घेऊ नकोस आणि अशुद्ध असलेले काहीही सेवन करू नकोस. 5 कारण तू गर्भवती होशील आणि पुत्राला जन्म देशील, गर्भावस्थेपासूनच तो परमेश्वराला समर्पित नाजीर होईल म्हणून त्याच्या केसाला वस्तऱ्याचा स्पर्श करू नकोस, कारण इस्राएलला पलिष्ट्यांच्या हातून सोडविण्यास तोच नेतृत्व करेल.” 6 तेव्हा ती स्त्री आपल्या पतीकडे गेली आणि त्याला सांगितले, “परमेश्वराचा एक पुरुष माझ्याकडे आला. तो परमेश्वराच्या दूतासारखा दिसत होता, अतिशय अद्भुत. तो कुठून आला होता हे मी त्याला विचारले नाही आणि त्याने आपले नावही मला सांगितले नाही. 7 परंतु त्याने मला सांगितले, ‘तू गर्भवती होशील आणि एक पुत्रास जन्म देशील. आतापासून द्राक्षारस किंवा मद्य घेऊ नको, अशुद्ध असे काहीही खाऊ नको, कारण ते बाळ, तो पुत्र गर्भावस्थेपासून त्याच्या मृत्यूपर्यंत परमेश्वराचा नाजीर होईल.’” 8 तेव्हा मानोहाने याहवेहला प्रार्थना केली: “हे प्रभू, तुमच्या सेवकाला क्षमा करा. परमेश्वराचा दूत पुन्हा आमच्याकडे येईल असे करा म्हणजे जे बाळ जन्मास येणार आहे त्याचे संगोपन कसे करावे तो आम्हास शिकवेल.” 9 परमेश्वराने मानोहानाच्या प्रार्थनेचे उत्तर दिले आणि परमेश्वराचा दूत परत त्या स्त्रीकडे आला, जेव्हा ती शेतात बसलेली होती; परंतु तिचा पती मानोहा तिच्याबरोबर नव्हता 10 म्हणून ती स्त्री लगबगीने आपल्या पतीस सांगण्यास गेली, “जो पुरुष त्या दिवशी माझ्या दृष्टीस पडला होता तो इथे आहे!” 11 मानोहा उठला आणि आपल्या पत्नीसह त्या ठिकाणी गेला, तो त्या पुरुषाजवळ गेला व त्याला विचारले, “त्या दिवशी माझ्या पत्नीशी बोलणारे आपणच आहात का?” त्याने उत्तर केले, “मीच आहे.” 12 “तेव्हा मानोहाने त्याला विचारले, जेव्हा तुमचे शब्द पूर्ण होतील तेव्हा त्या बाळाच्या कार्यासाठी व जीवनासाठी कोणते नियम असावे?” 13 याहवेहच्या दूताने मानोहाला उत्तर दिले, “मी तुझ्या पत्नीला जे सांगितले आहे ते सर्व तिने करावे. 14 तिने द्राक्षाच्या वेलीतून आलेले कोणतेही उपज खाऊ नये, द्राक्षारस किंवा मद्य पिऊ नये किंवा जे अशुद्ध आहे असे काहीही खाऊ नये. ज्या सर्व आज्ञा तिला दिल्या आहेत त्या तिने पाळाव्या.” 15 मानोहा याहवेहच्या दूतास म्हणाला, “आम्ही आपणासाठी करडू तयार करेपर्यंत आपण येथेच थांबावे.” 16 याहवेहच्या दूताने उत्तर दिले, “तुम्ही मला रोखून धरले तरी मी तुमचे भोजन खाणार नाही. पण जर तुम्ही होमार्पण तयार केले तर ते याहवेहला अर्पण करा.” (हा याहवेहचा दूत आहे, हे अद्यापही मानोहाला समजले नव्हते.) 17 नंतर मानोहाने याहवेहच्या दूताला विचारले, “आपले नाव काय? म्हणजे तुमचे शब्द खरे ठरल्यानंतर आम्ही तुमचा सत्कार करू.” 18 याहवेहच्या दूताने उत्तर दिले, “तू माझे नाव का विचारतो? हे समजण्यापलीकडे आहे.” 19 मग मानोहाने एक तरुण करडू घेतले आणि ते अन्नबलीसह याहवेहला एका खडकावर अर्पिले आणि जेव्हा मानोहा आणि त्याची पत्नी हे पाहत

असताना याहवेहने आश्चर्यकारक कृत्ये केली: 20 मानोहा व त्याची पत्नी
पाहत असताना वेदीवरून आकाशाकडे उफाळून वर जाणाऱ्या अग्नीच्या
ज्वालेवर याहवेहच्या दूताने आरोहण केले. ते पाहून मानोहा आणि
त्याची पत्नी यांनी दंडवत घातले. 21 जेव्हा याहवेहचा दूत मानोहा आणि
त्याच्या पत्नीला परत प्रकट झाला नाही, तेव्हा मानोहाला हे कळले
की तो याहवेहचा दूत होता. 22 “आता आपला मृत्यू निश्चित आहे!”
मानोहा त्याच्या पत्नीला म्हणाला. “आम्ही परमेश्वराला पाहिले आहे!”
23 परंतु त्याची पत्नीने उत्तर दिले, “जर याहवेहला आपल्याला मारून
टाकावयाचे असते, तर त्यांनी आपल्या हातांनी होमबली व अन्नार्पण
स्वीकारले नसते, आपल्याला या सर्व अद्भुत गोष्ट प्रकट केली नसती वा
आपल्याला सांगितलीही नसती.” 24 मग त्या स्त्रीने एका मुलाला जन्म
दिला आणि त्याचे नाव शमशोन ठेवले. तो वाढत गेला आणि याहवेहने
त्याला आशीर्वाद दिला, 25 सोराह आणि एष्टाओल यांच्यामध्ये महनेह
दान येथे असताना याहवेहचा आत्मा त्याला प्रवृत्त करू लागला.

**14** शमशोन खाली तिम्नाह येथे गेला आणि तिथे त्याने एक तरुण
पलिष्टी स्त्री पाहिली. 2 तिथून परत आल्यावर, तो आपल्या
आईवडिलांना म्हणाला, “मी तिम्नाह इथे एक पलिष्टी स्त्री पाहिली
आहे; मला ती माझी पत्नी करून द्या.” 3 त्याच्या आईवडिलांनी
प्रत्युत्तर दिले, “तुझ्या नातेवाईकांमध्ये किंवा आपल्या सर्व लोकांमध्ये
स्वीकार करण्यायोग्य स्त्री नाही काय? सुंता न झालेल्या पलिष्टी
लोकांकडे पत्नी मिळविण्यासाठी का जावे?” परंतु शमशोनाने आपल्या
वडिलांना म्हटले, “मला तीच हवी आहे. ती माझ्यासाठी योग्य आहे.”
4 (त्याच्या आईवडिलांना कळले नाही की हे याहवेहकडून आहे, जे
पलिष्ट्यांना विरोध करण्याच्या संधीची वाट पाहत होते; कारण त्यावेळी
ते इस्राएलावर राज्य करीत होते.) 5 शमशोन त्यांच्या आईवडिलांसोबत
खाली तिम्नाह येथे गेला. ते तिम्नाह येथील द्राक्षांच्या मळयांजवळ
पोहोचले असता, अचानक एक तरुण सिंह गर्जना करीत त्याच्या
अंगावर आला. 6 याहवेहचा आत्मा मोठ्या सामर्थ्याने त्याच्यावर आला
जेणेकरून त्याने आपल्या हाताने एखादी शेळी फाडावे त्याप्रमाणे त्याने
त्या सिंहाचे जबडे फाडले. परंतु त्याबद्दल आपल्या वडिलांना किंवा
आईला काहीही सांगितले नाही. 7 नंतर शमशोन खाली गेला आणि त्या
स्त्रीसह बोलला आणि ती त्याला प्रिय वाटली. 8 कालांतराने, जेव्हा
तो तिच्यासोबत विवाह करण्यासाठी परत आला, आडवाट करून तो
सिंहाचे कलेवर पाहण्यास गेला आणि त्यामध्ये त्याने मधमाश्यांचा थवा
आणि काही मध पाहिला. 9 त्याने आपल्या हाताने तो मध घेतला आणि
वाटेने मध खात खात तो पुढे गेला. जेव्हा तो आपल्या आईवडिलांजवळ
पोहोचला तेव्हा त्यांनाही काही मध दिला आणि त्यांनीही तो खाल्ला.
परंतु तो सिंहाच्या कलेवरातून आणला आहे, हे त्याने त्यांना सांगितले
नाही. 10 आता त्याचे वडील त्या स्त्रीला बघायला खाली गेले. आणि
तिथे शमशोनाने तरुणांच्या प्रथेप्रमाणे मेजवानी दिली. 11 जेव्हा लोकांनी
त्याला पाहिले, तेव्हा त्यांनी तीस लोकांना त्याचे साथीदार म्हणून
निवडले. 12 शमशोन त्यांना म्हणाला, “मी तुम्हाला एक कोडे सांगतो,
तुम्ही मला सणाच्या सात दिवसांत उत्तर देऊ शकलात तर मी तुम्हाला
तीस तागाची वस्त्रे आणि तीस जोडी कपडे देईन. 13 जर तुम्ही मला
उत्तर सांगू शकत नसाल, तर तुम्ही मला तीस तागाची वस्त्रे आणि तीस
जोडी कपडे द्याल.” “तुझे कोडे आम्हाला सांग,” ते म्हणाले. “चला
ऐकू या.” 14 त्याचे कोडे असे होते “खाणाऱ्यातून अन्न; प्रबळातून
माधुर्य ते काय?” तीन दिवसापर्यंत ते उत्तर देऊ शकले नाही. 15
चौथ्या दिवशी ते शमशोनाच्या पत्नीस म्हणाले, “तुझ्या पतीला फूस
लावून या कोड्याचा अर्थ काढून घे नाहीतर किंवा तुझ्यासह आम्ही
तुझ्या वडिलांचे घर तुम्ही मरेपर्यंत जाळून टाकू. आमची मालमत्ता
चोरण्यासाठी आम्हाला या मेजवानीला बोलाविले होते का?” 16 तेव्हा
शमशोनाची पत्नी त्याच्यापुढे अश्रू गाळीत म्हणाली, “तुम्ही माझा
द्वेष करता! तुम्ही माझ्यावर प्रीती करीत नाही. कारण तुम्ही माझ्या
लोकांना कोडे घातले आहे, परंतु तुम्ही मला उत्तर दिले नाही.” तो
तिला म्हणाला, “मी माझ्या वडिलांना किंवा आईला देखील कोड्याचे
उत्तर सांगितले नाही, तर मग मी तुला ते का सांगावे?” 17 मेजवानीचे
संपूर्ण सात दिवस ती रडली. त्यामुळे सातव्या दिवशी शेवटी त्याने
तिला सांगितले, कारण ती त्याच्यावर फार दबाव टाकत होती. तिने
जाऊन आपल्या लोकांना कोडे समजावून सांगितले. 18 सातव्या दिवशी
सूर्यास्त होण्यापूर्वी नगरातील लोक त्याला म्हणाले, “मधापेक्षा गोड
काय आहे? सिंहापेक्षा बलवान काय आहे?” शमशोन त्यांना म्हणाला,
“तुम्ही माझ्या कालवडीने नांगरणी केली नसती, तर तुम्ही माझे कोडे
सोडविले नसते.” 19 नंतर याहवेहचा आत्मा सामर्थ्याने त्याच्यावर
आला. तो खाली अष्कलोनला गेला, त्यांच्यापैकी तीस लोकांना मारले,
त्यांच्याकडून सर्वकाही काढून टाकले आणि ज्यांनी कोडे समजावून
सांगितले त्यांना त्यांचे कपडे दिले. रागाने पेटून तो आपल्या वडिलांच्या
घरी परतला. 20 आणि शमशोनची पत्नी त्याच्या मेजवानीला उपस्थित
असलेल्या त्याच्या एका सोबत्याला देण्यात आली.

**15** काही दिवसानंतर गहू कापण्याच्या हंगामात, शमशोनाने एक
शेळी घेतली आणि आपल्या पत्नीला भेटायला गेला. तो म्हणाला,
“मी माझ्या पत्नीच्या खोलीत जात आहे.” पण तिचे वडील त्याला आत
जाऊ देईना. 2 “मला खात्री होती की तू तिचा तिरस्कार करतोस,”
तो म्हणाला, “मी तिला तुझ्या सोबत्याला दिले. तिची धाकटी बहीण
अधिक आकर्षक नाही का? तिच्याऐवजी हिला घेऊन जा.” 3 शमशोन
त्यांना म्हणाला, “यावेळी मला पलिष्ट्यांवर चालून जाण्याचा अधिकार
आहे; मी त्यांना शिक्षा करेन.” 4 म्हणून शमशोन बाहेर पडला आणि
त्याने तीनशे कोल्हे पकडले आणि जोडीजोडीने त्यांच्या शेपट्या एकत्र
बांधल्या. प्रत्येक दोन शेपट्यांच्या जोडीमध्ये त्याने एकएक मशाल
बांधली, 5 मशाली पेटविल्या आणि कोल्ह्यांना पलिष्ट्यांच्या उभ्या
पिकात मोकळे सोडले. त्यांनी द्राक्षमळे आणि जैतुनाचे मळे आणि धान्य
जाळून टाकले. 6 तेव्हा पलिष्ट्यांनी विचारले, “हे कोणी केले?” त्यांना
सांगण्यात आले, “हे तिम्नाहचा जावई शमशोनाने केले, कारण त्याची
पत्नी त्याच्या सोबत्याला देण्यात आली आहे.” तेव्हा पलिष्टी लोक आले

व त्यांनी तिला व तिच्या पित्याला जाळून टाकले. 7 शमशोन त्यांना
म्हणाला, “आता तुम्ही याप्रकारे वागला आहात म्हणून, मी अशी शपथ
घेतो की तुमच्यावर सूड घेतल्याशिवाय मी शांत बसणार नाही.” 8
तेव्हा अतिशय क्रूरतेने त्याने त्यांच्यावर हल्ला केला आणि त्यांच्यापैकी
अनेकांना ठार केले. त्यानंतर तो खाली गेला आणि एटाम खडकातील
गुहेत राहू लागला. 9 इकडे पलिष्टी लोक वर गेले आणि त्यांनी यहूदीयात
तळ ठोकला व लेहीवर हल्ला केला. 10 तेव्हा यहूदीयाच्या लोकांनी
विचारले, “तुम्ही आमच्यासोबत युद्ध करण्यास का आलात?” त्यांनी
उत्तर दिले, “आम्ही शमशोनाला कैदी करून घेऊन जाण्यास आलो
आहोत, कारण जसे त्याने आमचे केले तसे आम्ही त्याचे करणार
आहोत.” 11 तेव्हा यहूदाहचे तीन हजार लोक खाली एटाम खडकातील
गुहेकडे गेले आणि ते शमशोनाला म्हणाले, “पलिष्टी लोक आपल्यावर
राज्य करतात हे तुला माहीत नाही काय? तू आमच्यासोबत हे काय
केले?” त्याने उत्तर दिले, “ज्याप्रकारे त्यांनी माझ्याशी वर्तन केले
तसेच मीही त्यांच्याशी केले.” 12 ते त्याला म्हणाले, “आम्ही तुला
बांधण्यासाठी आणि तुला पलिष्टी लोकांच्या हवाली करण्यासाठी आलो
आहोत.” शमशोन म्हणाला, “तुम्ही मला ठार मारणार नाही, अशी
शपथ माझ्याजवळ घ्या.” 13 “आम्ही सहमत आहोत,” त्यांनी उत्तर
दिले. “आम्ही फक्त तुला बांधणार आणि तुला त्यांच्या हवाली करणार.
आम्ही तुला मारणार नाही.” तेव्हा त्यांनी त्याला दोन नव्या दोरांनी
बांधले आणि खडकाच्या कपारीतून बाहेर आणून वर नेले. 14 जेव्हा तो
लेहीला पोहोचला, तेव्हा पलिष्टी लोक ओरडत पुढे आले. याहवेहचा
आत्मा मोठ्या सामर्थ्याने त्याच्यावर उतरला. ज्या दोरांनी त्याच्या दंडांना
बांधले होते ते दोर अग्नीत जळून गेलेल्या तागासारखे झाले आणि
त्याच्या हातांवरून गळून पडले. 15 मग तिथे त्याला गाढवाचे ताजे
जाभाड सापडले, त्याने ते उचलले आणि एक हजार पलिष्ट्यांस ठार
केले. 16 मग शमशोन म्हणाला, “गाढवाच्या जाभाडाने मी राशींवर
राशी पाडल्या. केवळ गाढवाच्या जाभाडाने मी हजार माणसे वधली.”
17 आपले बोलणे संपविल्यावर त्याने आपल्या हातातील ते जाभाड
फेकून दिले; आणि त्या ठिकाणाचे नाव त्याने रामाथ-लेही असे ठेवले.
18 त्याला अतिशय तहान लागली होती, तेव्हा त्याने याहवेहचा धावा
केला, “तुम्ही आपल्या सेवकाला हा मोठा विजय दिला आहे. आता मी
तहानेने मरावे काय आणि बेसुंती लोकांच्या हाती पडावे काय?” 19
तेव्हा परमेश्वराने लेहीतील खोलगट जागा दुभंगली आणि त्यातून पाणी
बाहेर आले. जेव्हा शमशोन ते पाणी प्याला, तेव्हा त्याची शक्ती परत
आली आणि तो ताजातवाना झाला. मग त्याने त्या ठिकाणाचे नाव
एन-हक्कोरे असे ठेवले. आज देखील तो झरा लेही येथे आढळतो. 20
पलिष्टी लोकांच्या काळात शमशोनाने वीस वर्षे इस्राएलचे नेतृत्व केले.

**16** एके दिवशी शमशोन गाझा येथे गेला, जिथे त्याने एका वेश्येला
पाहिले. तिच्यासोबत रात्र घालविण्यास तो आत गेला. 2 गाझा
येथील लोकांना सांगण्यात आले, “शमशोन येथे आला आहे!” म्हणून
त्यांनी त्या जागेला वेढा घातला आणि त्याची वाट पाहत शहराच्या
वेशीत रात्रभर दबा धरून बसले. त्यांनी रात्रभर कोणतीही हालचाल
केली नाही, ते म्हणाले, “पहाटेस आपण त्याला ठार मारू.” 3 परंतु
मध्यरात्री पर्यंत शमशोन तिथे झोपला. मग तो उठला आणि त्याने
शहराच्या वेशीची दारे, दोन्ही खांब व अडसरासह जमिनीतून उखडून
काढली व आपल्या खांद्यांवर ठेवून हेब्रोनासमोरील डोंगरमाथ्यावर नेली.
4 काही काळानंतर सोरेक खोऱ्यातील दलीला नावाच्या एका स्त्रीवर
त्याचे प्रेम बसले. 5 पलिष्ट्यांचे अधिकारी तिच्याकडे गेले व म्हणाले,
“काहीतरी युक्ती कर आणि त्याच्या बळाचे रहस्य काय आहे आणि
त्याच्यावर प्रबल होऊन, त्याला बांधून आपल्याला वश कसे करावे
हे विचार. आम्ही प्रत्येकजण तुला चांदीची अकराशे शेकेल देऊ.” 6
दलीला शमशोनास म्हणाली, “मला सांगा, तुमच्या प्रचंड सामर्थ्याचे
रहस्य काय आहे आणि तुम्हाला कशाने बांधावे आणि तुम्ही शक्तिहीन
व्हाल.” 7 शमशोनाने तिला उत्तर दिले, “जर मला कोणी धनुष्याच्या न
सुकलेल्या ताज्या सात दोऱ्यांनी बांधले, तर मी दुसऱ्या कोणत्याही
मनुष्यासारखा बलहीन होईन.” 8 तेव्हा पलिष्टी अधिकाऱ्यांनी तिला
धनुष्याच्या न सुकलेल्या सात ताज्या दोऱ्या आणून दिल्या आणि तिने
त्याला बांधून टाकले. 9 काही लोक खोलीत लपून होते, तिने त्याला
म्हटले, “शमशोन, पलिष्टी तुमच्यावर चालून आलेले आहेत!” परंतु
अग्नीजवळ जाताच सुताचा धागा जसा सहज तुटून जातो त्याप्रमाणे
शमशोनाने त्या धनुष्याच्या दोऱ्या तोडून टाकल्या जणू आणि त्याच्या
बळाचे रहस्य उघडकीस आले नाही. 10 त्यानंतर दलीला शमशोनास
म्हणाली, “तुम्ही मला मूर्ख बनविले आहे; तुम्ही मला खोटे सांगितले. तर
आता, मला सांगा तुम्हाला कशाने बांधावे.” 11 तो म्हणाला, “ज्यांचा
कधीही वापर केला नाही अशा अगदी नव्या कोऱ्या दोरांनी जर मला
कोणी बांधून टाकले, तर मी इतर मनुष्यासारखा बलहीन होईन.” 12
तेव्हा दलीलाने नवीन दोर घेतले आणि त्यांनी त्याला बांधून टाकले.
नंतर लोक खोलीत लपून बसलेले होते, ती त्याला म्हणाली, “शमशोन
पलिष्टी लोक तुमच्यावर चालून आले आहेत!” परंतु शमशोनाने दंडाला
बांधलेले दोर, सुताचा धागा तोडावा त्याप्रमाणे तोडून टाकले! 13 तेव्हा
दलीलाने शमशोनास म्हटले, “आतापर्यंत तुम्ही मला मूर्ख बनविले
आणि आणि मला खोटे सांगितले. मला सांगा तुम्हाला कशाने बांधावे.”
तो तिला म्हणाला, “पाहा, माझ्या डोक्याच्या केसांच्या सात बटा मागात
गुंफल्या आणि त्या फणीने घट्ट केल्या तर मी इतर माणसांसारखा
बलहीन होईन.” मग तो झोपला असताना, दलीलाने त्याच्या डोक्याच्या
केसांच्या सात बटा मागात गुंफल्या 14 आणि ते फणीने घट्ट केल्या.
परत ती त्याला म्हणाली, “शमशोन, पलिष्टी तुमच्यावर चालून आले
आहेत!” तो आपल्या झोपेतून जागा झाला व त्याने विणकराची फणी
व मागसुद्धा उखडून काढला. 15 नंतर ती त्याला म्हणाली, “जेव्हा
तुमचे हृदय माझ्यावर नाही, तेव्हा तुम्हाला कसे म्हणता येईल, ‘मी
तुझ्यावर प्रेम करतो?’ ही तिसरी वेळ आहे जेव्हा तुम्ही मला मूर्ख
बनविले आहे आणि तुमच्या प्रचंड सामर्थ्याचे रहस्य सांगितले नाही.”
16 दररोज बोलून बोलून तिने त्याला भांडावून सोडले; त्याला जीव

नकोसा झाला. 17 म्हणून त्याने तिला सर्वकाही सांगितले, "माझ्या
डोक्यावर कधीही वस्तरा वापरला नाही," तो म्हणाला, "कारण मी
माझ्या आईच्या उदरात होतो तेव्हापासून मी परमेश्वराला समर्पित एक
नाजीर आहे. जर माझे केस कापले गेले, तर माझी शक्ती मला सोडून
जाईल आणि मी दुसऱ्या कोणत्याही मनुष्यासारखा बलहीन बनेन." 18
जेव्हा दलीलाने पाहिले की त्याने तिला सर्वकाही सांगितले आहे, तेव्हा
तिने पलिष्ट्यांच्या अधिकाऱ्यांना निरोप पाठविला, "एकदा अजून या;
त्याने मला सर्वकाही सांगितले आहे." तेव्हा पलिष्ट्यांचे अधिकारी
त्यांच्या हातात चांदी घेऊन परत आले. 19 त्याला आपल्या मांडीवर
झोपविल्यानंतर, तिने कोणाला तरी बोलावून त्याच्या डोक्याच्या सात
बटांचे मुंडण करून घेतले आणि तिने त्याला वश करण्यास प्रारंभ केला
आणि त्याचे सामर्थ्य त्याला सोडून गेले. 20 मग ती म्हणाली, "शमशोन,
तुमच्यावर पलिष्टी चालून आले आहेत!" तो आपल्या झोपेतून जागा
झाला आणि त्याला वाटले, "मी पूर्वीप्रमाणेच बाहेर जाईन आणि
झटका मारून स्वतःस मोकळे करेन." परंतु याहवेहने त्याला सोडले
आहे, हे त्याला कळले नाही. 21 तेव्हा पलिष्टी लोकांनी त्याला पकडून
त्याचे डोळे फोडून टाकले. नंतर खाली गाझा येथे घेऊन गेले. त्याला
कास्याच्या साखळ्यांनी जखडून कारागृहात त्याला धान्य दळावयाला
लावले. 22 परंतु त्याच्या डोक्यावरील केस मुंडण झाल्यानंतर पुन्हा वाढू
लागले. 23 आता पलिष्ट्यांचे अधिकारी त्यांचे दैवत दागोनला यज्ञ
अर्पण करून उत्सव करण्यास एकत्र आले आणि म्हणाले, "आमच्या
दैवताने आमचा शत्रू शमशोनला आमच्या हाती दिले आहे." 24 जेव्हा
त्यांनी शमशोनला पाहिले तेव्हा त्यांनी आपल्या दैवताची स्तुती करीत
ते म्हणाले, "आमच्या दैवताने आमच्या शत्रूला आमच्या हाती दिले
आहे, जो आमच्या देशाची गांजणूक करणारा व आमच्या लोकांतील
अनेकांचा संहार करणारा होता." 25 जेव्हा ते मोठ्या आनंदात होते,
ते ओरडून म्हणाले, "शमशोनाला आमची करमणूक करण्यास बाहेर
आणा." म्हणून त्यांनी शमशोनाला तुरुंगातून बाहेर आणले आणि
त्याने त्यांची करमणूक केली. जेव्हा त्यांनी त्याला दोन खांबाच्या
मध्ये उभे केले, 26 तेव्हा ज्या सेवकाने त्याचा हात धरला होता त्यास
शमशोन म्हणाला, "मला अशा ठिकाणी ठेव जेणेकरून ज्या खांबांवर
हे मंदिर आधारलेले आहे ते मी चाचपडू शकेन, म्हणजे मी त्याचावर
टेकेन." 27 आता ते मंदिर पूर्णपणे पुरुषांनी व स्त्रियांनी भरलेले होते;
पलिष्ट्यांचे सर्व अधिकारी तिथे होते आणि गच्चीवर सुमारे तीन हजार
पुरुष आणि स्त्रिया शमशोन करीत असलेली करमणूक पाहत होते. 28
मग शमशोनाने याहवेहला प्रार्थना केली, अहो, सार्वभौम याहवेह माझी
आठवण करा. परमेश्वरा कृपा करून आणखी एकदाच मला बळ द्या
आणि म्हणजे या पलिष्ट्यांचा मी माझ्या दोन्ही डोळ्यांबद्दल सूड घेऊ
शकेन. 29 मग ज्या मधल्या दोन खांबांवर मंदिर आधारलेले होते, त्यास
शमशोनाने एका बाजूला त्याच्या उजव्या हाताने, आणि दुसऱ्या बाजूला
डाव्या हाताने धरले, 30 शमशोन म्हणाला, "या पलिष्ट्यांबरोबर मलाही
मृत्यू येवो!" नंतर त्याने आपल्या पूर्ण सामर्थ्याने ढकलले आणि ते
मंदिर अधिकारी आणि सर्व लोकांवर कोसळले. त्याच्या मृत्यूच्या क्षणी
त्याने जेवढे लोक ठार केले त्यांची संख्या, त्याने आपल्या सर्व हयातीत
मारलेल्या संख्येहून अधिक होती. 31 नंतर त्याचा मृतदेह नेण्यासाठी
त्याचे भाऊबंद आणि पित्याच्या घरचे सर्व कुटुंब खाली आले. त्यांनी
त्याला परत आणले व सोराह आणि एष्टाओल यांच्या दरम्यान त्याचा
पिता मानोहाला मूठमाती दिली होती, तिथेच त्यालाही मूठमाती दिली.
त्याने वीस वर्षे इस्राएलचे नेतृत्व केले.

**17** एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशात मीखाह नावाचा एक मनुष्य होता,
2 तो आपल्या आईला म्हणाला, "तुझी अकराशे शेकेल चांदीची
नाणी कोणीतरी चोरली असे तुला वाटत होते त्याबद्दल तू चोराला शाप
देत होतीस ती चांदीची नाणी मीच चोरली होती." तेव्हा त्याची आई
म्हणाली, "माझ्या मुला, याहवेह तुला आशीर्वाद देवो!" 3 जेव्हा त्याने
ती अकराशे चांदीची नाणी त्याच्या आईला परत दिली, ती म्हणाली,
"माझ्या मुलाने चांदीने मढविलेली प्रतिमा बनवण्यासाठी मी माझी
चांदी याहवेहला समर्पित करते. मी ते तुला परत देईन." 4 जेव्हा त्याने
चांदी त्याच्या आईला परत केली, तिने दोनशे शेकेल चांदी घेतली
आणि रौप्यकाराला दिली, जो त्याद्वारे मूर्ती बनवित असे आणि ती
मीखाहच्या घरात ठेवण्यात आली. 5 आता मीखाहचे एक देवघर होते
आणि त्याच्याजवळ एक एफोद आणि काही कुलदेवता होत्या आणि
आपल्या पुत्रांपैकी एकाची त्याने पुरोहित म्हणून नेमणूक केली. 6
त्या दिवसांमध्ये इस्राएलला कोणी राजा नव्हता; प्रत्येकजण त्याला
योग्य वाटेल ते करत असे. 7 एक तरुण लेवी जो यहूदाह कुळातील
यहूदीयातील बेथलेहेम नगरात राहत होता, 8 यहूदीयातील बेथलेहेम नगर
सोडून राहण्यासाठी तो चांगलेसे ठिकाण शोधीत होता. प्रवास करत तो
डोंगराळ भागात एफ्राईम देशातील मीखाहच्या घराजवळ आला. 9
मीखाहने त्याला विचारले, "तू कुठून आलास?" तो म्हणाला, "मी
यहूदीयातील बेथलेहेम येथील एक लेवी आहे आणि मी राहण्यासाठी
एक ठिकाण शोधत आहे." 10 त्यावर मीखाह लेवीला म्हणाला, "तू
माझ्यासोबत राहा आणि माझ्या पित्याचे आणि पुरोहिताचे कर्तव्य पार
पाड. आणि मी तुला वर्षाचे दहा शेकेल चांदीचे नाणे, एकजोड कपडे
आणि अन्न देईल." 11 तो लेवी त्याच्यासोबत राहण्यास तयार झाला
आणि त्याच्या पुत्रांपैकी एक असा तो राहू लागला. 12 तेव्हा मीखाहने
लेवीला शुद्ध केले आणि तो तरुण त्याचा पुरोहित झाला आणि त्याच्या
घरात राहू लागला. 13 आणि मीखाहने म्हटले, "मला माहीत आहे की
याहवेह माझे कल्याण करतील, कारण हा लेवी माझा पुरोहित झाला
आहे."

**18** त्या दिवसामध्ये इस्राएलावर कोणी राजा नव्हता. आणि त्या
दिवसामध्ये दान गोत्राचे लोक स्वतः स्थायिक होण्यासाठी जागा
शोधण्याचा प्रयत्न करीत होते, कारण आतापर्यंत त्यांना इस्राएलच्या
गोत्रांमध्ये त्यांचे वतन मिळाले नव्हते. 2 म्हणून दानच्या लोकांनी
आपल्या गोत्रातून सोराह व एष्टाओल येथील पाच प्रमुख व्यक्तींना

देश हेरायला व भेद घेण्यास पाठविले. हे लोक सर्व दानी लोकांचे
प्रतिनिधित्व करीत होते. त्यांनी त्यांना म्हटले, “जा आणि देशाचा
भेद घेऊन या!” मग त्यांनी एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशात प्रवेश केला
आणि ते मीखाहच्या घरी आले, जिथे त्यांनी रात्र घालविली. 3 जेव्हा
ते मीखाहच्या घराजवळ पोहोचले, त्यांनी त्या तरुण लेवीचा आवाज
ओळखला. त्यांनी त्याला बाजूला घेतले आणि विचारले, “तुला इथे
कोणी आणले? या ठिकाणी तू काय करीत आहेस? तू येथे का
आलास?” 4 त्याने त्यांना सांगितले की मीखाहने त्याच्यासाठी काय
केले आणि त्याने म्हटले, “त्यांनी मला कामावर ठेवले आहे आणि मी
त्यांचा पुरोहित आहे.” 5 तेव्हा ते त्याला म्हणाले, “आमचा प्रवास
यशस्वी होईल की नाही, हे कृपया परमेश्वराला विचार.” 6 पुरोहिताने
त्यांना उत्तर दिले, “शांतीने जा. तुमच्या प्रवासाला याहवेहची मंजुरी
आहे.” 7 म्हणून ते पाच माणसे निघून लईश येथे आले, तिथे त्यांनी
पाहिले की सर्व लोक सुरक्षितपणे राहत होते, ते सीदोनी लोकांप्रमाणे
शांततेत व सुरक्षित राहत आहेत. आणि त्यांच्या जमिनीत कशाचीही
कमतरता नसल्यामुळे ते समृद्ध होते. तसेच, ते सीदोनी लोकांपासून
लांब राहत होते आणि इतर कोणाशीही त्यांचा संबंध नव्हता. 8 जेव्हा ते
हेर सोराह व एष्टाओल येथे परतले, त्यांच्या दान भाऊबंदांनी त्यांना
विचारले, “तुम्ही काय माहिती आणली आहे?” 9 त्यांनी उत्तर दिले,
“चला, आपण त्यांच्यावर हल्ला करू! आम्ही तो देश पाहिला आहे
आणि तो खूप चांगला आहे. तुम्ही काही करणार नाही का? तिथे
जाऊन ते ताब्यात घेण्यास अजिबात संकोच करू नका. 10 जेव्हा तुम्ही
तिथे पोहोचाल, तेव्हा तुम्हाला एक संशयहीन लोक आणि परमेश्वराने
तुमच्या हातात दिलेली सुरक्षित प्रशस्त भूमी सापडेल, अशी भूमी जिथे
कशाचीही कमतरता नाही.” 11 तेव्हा दान गोत्राचे सहाशे सैनिक सोराह
व एष्टाओल येथून निघाले. 12 त्यांनी जाताना यहूदीयातील किर्याथ-
यआरीम जवळ तळ दिला, यामुळे या ठिकाणाला आज देखील “महाने-
दान” असेच म्हणतात. 13 तिथून ते एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशात गेले
आणि मीखाहच्या घरी आले. 14 नंतर पाच व्यक्ती जे लईश हेरायला
आले होते ते आपल्या दान भाऊबंदांना म्हणाले, “तुम्हाला माहीत
आहे का या घरातील एका घरात एक एफोद, काही कुलदेवता आणि
अनेक रुप्याचा मुलामा दिलेल्या मूर्ती आहेत? आता काय करावयाचे हे
तुम्हाला माहीत आहे.” 15 म्हणून ते तिथे वळले आणि मीखाहकडील
त्या तरुण लेवीच्या घरी जाऊन त्याला अभिवादन केले. 16 युद्धासाठी
सज्ज असलेले दानी गोत्राचे सहाशे सैनिक प्रवेशद्वाराजवळ उभे होते.
17 मग ते पाच पुरुष, जे तो देश हेरायला गेले होते, ते आत गेले आणि
त्यांनी तेथील मूर्ती, एफोद, आणि कुलदेवता घेतली, जेव्हा पुरोहित
आणि सहाशे सैनिक बाहेर प्रवेशद्वाराजवळ उभे होते. 18 जेव्हा ते पाच
पुरुष मीखाहच्या घरी गेले आणि त्यांनी मूर्ती, एफोद, आणि कुलदेवता
उचलत असता, पुरोहित त्यांना म्हणाला, “तुम्ही हे काय करत आहे?”
19 त्यांनी त्याला उत्तर दिले, “शांत राहा! एक शब्द सुद्धा बोलू नकोस.
आमच्याबरोबर ये आणि आमचा पिता आणि पुरोहित हो. केवळ एका
मनुष्याचा पुरोहित होऊन राहण्यापेक्षा, इस्राएलातील एक संपूर्ण गोत्र
आणि वंशाचा पुरोहित होऊन राहणे अधिक चांगले नाही का?” 20
तेव्हा त्या पुरोहिताला अतिशय आनंद झाला. त्याने एफोद, कुलदेवता
आणि मूर्ती घेतली आणि तो त्या लोकांबरोबर गेला. 21 मग ते फिरले
आणि कूच करीत असताना ते आपली लहान मुले, गुरे आणि सामान
अग्रभागी घेऊन चालले. 22 जेव्हा ते मीखाहच्या घरापासून काही दूर गेले
असता, मीखाहचे शेजारी एकत्र आले आणि त्यांनी दानच्या लोकांना
गाठले. 23 जेव्हा त्यांनी दानच्या लोकांना हाक मारली तेव्हा ते वळले
आणि मीखाहला विचारले, “तुला काय झाले आहे की तू आपल्या
लोकांना युद्ध करण्यास घेऊन आला आहेस?” 24 मीखाहने प्रत्युत्तर
दिले, “जे दैवत मी तयार केले त्यांना आणि माझ्या पुरोहिताला तुम्ही
घेऊन जात आहात आणि उलट तुम्हीच मला विचारता? मला काय
हवे आहे. ‘आता माझ्याजवळ काहीही राहिलेले नाही?’” 25 त्यावर
दानच्या लोकांनी उत्तर दिले, “आमच्यासोबत वाद घालू नकोस, नाहीतर
काही माणसांना राग येईल आणि ते तुझ्यावर हल्ला करतील आणि
तुला आणि तुझ्या कुटुंबीयांना आपला जीव गमवावा लागेल.” 26 मग
दानचे लोक आपल्या मार्गाने गेले आणि मीखाहने पाहिले ते लोक फार
शक्तिशाली आहेत, तेव्हा तो माघारी फिरला आणि आपल्या घरी गेला.
27 मग मीखाहने जे बनविले होते आणि त्याच्या पुरोहितासह दानचे लोक
लईश या शहरात येऊन दाखल झाले. तेथील लोक शांत आणि सुरक्षित
होते. त्यांनी त्यांच्यावर तलवारीने हल्ला केला आणि त्यांचे शहर जाळून
टाकले. 28 त्यांना वाचविणारा कोणी नव्हता, कारण ते सीदोनापासून
दूर राहत होते आणि त्यांचा इतर लोकांशी कसलाही व्यवहार नव्हता. हे
शहर बेथ-रहोब शेजारी असलेल्या खोऱ्यात होते. मग दानच्या लोकांनी
ते शहर पुन्हा बांधले आणि ते तिथे राहू लागले. 29 त्यांनी त्या शहरास
आपला पूर्वज, इस्राएलचा एक पुत्र दान त्याचे नाव दिले—त्या शहराचे
मूळ नाव लईश होते. 30 मग दानच्या लोकांनी आपणासाठी मूर्तीची
स्थापना केली व गेर्षोमाचा पुत्र, मोशेचा नातू योनाथान आणि त्याच्या
पुत्रास, त्या देशाचा त्याच्या शत्रूकडून पाडाव होईपर्यंत दानच्या गोत्राचे
पुरोहित म्हणून नेमले. 31 अशा रीतीने जोपर्यंत परमेश्वराचे निवासस्थान
शिलोह येथे होते, तोपर्यंत मीखाहने तयार केलेली मूर्तीची उपासना
दानच्या लोकांकडून केली जात होती.

**19** त्या दिवसामध्ये इस्राएलावर कोणी राजा नव्हता. लेवी वंशातील
कोण एक मनुष्य एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशातील दुर्गम भागात
राहत होता. त्याने यहूदीयातील बेथलेहेम मधील एक स्त्री आपली
उपपत्नी करून घेतली. 2 परंतु ती उपपत्नी त्याच्यासोबत विश्वासू
राहिली नाही. तिने त्याला सोडले आणि यहूदीयातील बेथलेहेमातील
आपल्या पित्याच्या घरी परतली. तिथे चार महिने राहिल्यानंतर, 3 तिचा
पती तिला परत आणावे म्हणून तिच्याकडे गेला. त्याच्याबरोबर त्याने
एक सेवक आणि दोन गाढवे घेतली. तिने त्याला पित्याच्या घरी नेले
आणि जेव्हा तिच्या पित्याने त्याला पाहिले, तेव्हा त्याने त्याचे आनंदाने
स्वागत केले. 4 त्याच्या सासऱ्याने म्हणजे स्त्रीच्या पित्याने त्याला

थोडे दिवस राहण्याचा आग्रह केला; आणि म्हणून तो त्याच्यासोबत
खातपीत आणि विश्राम करीत तिथे तीन दिवस राहिला. 5 चौथ्या
दिवशी ते पहाटेच उठले आणि त्या मनुष्याने निघण्याची तयारी केली,
परंतु स्त्रीच्या पित्याने आपल्या जावयाला म्हटले, “काहीतरी खाऊन
तुम्ही स्वतःला ताजेतवाने करा; नंतर तुम्ही जाऊ शकता.” 6 मग त्या
दोघांनी एकत्र बसून खाणेपिणे केले. त्यानंतर स्त्रीचा पिता म्हणाला,
“कृपया आजची रात्र थांबा आणि आनंद करा.” 7 आणि जेव्हा तो
पुरुष जाण्यास उठला तेव्हा त्याच्या सासऱ्याने त्याला आग्रह केला,
म्हणून त्या रात्री तो तिथे राहिला. 8 पाचव्या दिवसाच्या सकाळी,
जेव्हा तो जाण्यास उठला, स्त्रीच्या पित्याने म्हटले, “तुम्ही स्वतःला
ताजेतवाने करा. मग दुपारपर्यंत थांबा!” मग ते दोघे एकत्र जेवले. 9 मग
जेव्हा तो पुरुष, त्याची उपपत्नी आणि त्याचा सेवक जाण्यास उठले,
तेव्हा त्याचा सासरा, त्या स्त्रीचा पिता म्हणाला, “पाहा, आता तर
संध्याकाळ झालीच आहे. रात्र इथेच घालवा. दिवस संपत आला आहे.
थांबा आणि आनंद करा. उद्या सकाळी लवकर उठा आणि आपल्या
घरासाठी मार्गस्थ व्हा.” 10 परंतु आणखी एक रात्र थांबण्यास तयार
झाला नाही, तो पुरुष निघाला आणि आपली उपपत्नी व त्याचे खोगीर
घातलेले दोन गाढव घेऊन यबूस (म्हणजे यरुशलेम आहे) येथे निघाले.
11 जेव्हा ते यबूस जवळ होते आणि दिवस उतरला होता, तेव्हा तो
सेवक आपल्या धन्यास म्हणाला, “चला आपण या यबूसी लोकांच्या
शहरात थांबू आणि रात्र घालवू.” 12 त्याच्या धनी म्हणाला, “नाही,
आपण अशा कोणत्याही शहरात जाणार नाही जेथील लोक इस्राएली
नाहीत. आपण गिबियाहपर्यंत जाऊ.” 13 तो आणखी म्हणाला, “चला
आपण गिबियाह किंवा रामाहपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करू आणि
यापैकी एका ठिकाणी मुक्काम करू.” 14 तेव्हा ते प्रवास करीत पुढे
निघाले आणि सूर्य मावळत असता ते बिन्यामीनच्या गिबियाहजवळ
पोहोचले. 15 तिथे रात्र घालविण्यासाठी ते गिबियाहात थांबले. ते
शहराच्या चौकात बसले, परंतु कोणीही त्यांना आपल्या घरी घेतले नाही.
16 त्या संध्याकाळी एक म्हातारा आपले शेतातले काम आटोपून येत
होता. तो एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशातील गिबियाहचा (तिथे बिन्यामीन
लोक राहत होते) रहिवासी होता. 17 त्याने शहराच्या चौकात तळ
दिलेल्या प्रवाशांना पाहिले, आणि विचारले, “तुम्ही कुठे जात आहात?
तुम्ही कुठून आला?” 18 त्याने उत्तर दिले. “यहूदीयातील बेथलेहेमातून
एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशाच्या दूरच्या ठिकाणी जिथे राहतो तिथे जात
आहोत. मी यहूदीयातील बेथलेहेम नगरात गेलो होतो आणि आता मी
याहवेहच्या भवनात जात आहे. परंतु कोणीही मला रात्र घालविण्यासाठी
आपल्या घरात घेतलेले नाही. 19 आमच्याजवळ आमच्या गाढवांसाठी
दाणा आणि वैरण आहे आणि आमच्या सेवकांसाठी भाकरी आणि
द्राक्षारस भरपूर आहे—मी, तुमची सेविका आणि आमच्यासोबतचा
तरुण. आम्हाला कशाचीही उणीव नाही.” 20 “तुमचे कल्याण असो,”
तो म्हातारा गृहस्थ म्हणाला. “तुम्हाला जे काही लागेल ते मला पुरवू द्या.
फक्त रात्र चौकात घालवू नका.” 21 तेव्हा त्याने त्यांना आपल्याबरोबर
घरी नेले. ते विश्रांती घेत असताना आणि त्यांच्या गाढवांना वैरण दिली.
त्यांनी आपले पाय धुतले, त्यांनी काही खाणेपिणे केले. 22 ते आनंदात
असताना, गावातील काही अधम लोकांचे टोळके घराभोवती जमा झाले
आणि दार जोरजोराने ठोकून त्या म्हाताऱ्या मनुष्यास जो घराचा स्वामी
होता त्यास ओरडून म्हणू लागले, “जो पुरुष तुझ्या घरी आला आहे
त्यास बाहेर काढ म्हणजे आम्ही त्याच्याबरोबर शारीरिक संबंध करू.”
23 तेव्हा घराचा स्वामी बाहेर गेला आणि त्यांना म्हणाला, “नाही, माझ्या
बंधुजनांनो, असले नीच कृत्य करू नका, कारण तो पुरुष माझा पाहुणा
आहे, तुम्ही हे घृणास्पद कृत्य करू नका. 24 पाहा, इथे माझी कुमारी
कन्या आणि त्याची उपपत्नी आहे. मी त्या दोघींना तुमच्याकडे बाहेर
आणतो आणि त्यांच्याशी तुम्हाला वाटेल ते करा, परंतु त्या पुरुषाशी
असले घृणास्पद कृत्य करू नका.” 25 परंतु ती माणसे त्याचे ऐकेनात.
मग त्या पुरुषाने आपल्या उपपत्नीला घेतले आणि तिला त्यांच्याकडे
बाहेर पाठविले, आणि त्यांनी तिच्यावर बलात्कार केला आणि रात्रभर
तिच्याशी कुकर्म केले व पहाटेस त्यांनी तिला जाऊ दिले. 26 पहाटेस
ती स्त्री आपला स्वामी राहत असलेल्या घरी परतली आणि घराच्या
दाराशी खाली पडली आणि उजाडेपर्यंत ती तशीच पडून राहिली. 27
सकाळी जेव्हा तिचा स्वामी उठला व घराचे दार उघडले आणि आपल्या
प्रवासाला निघण्यासाठी बाहेर आला, तेव्हा त्याने त्याच्या उपपत्नीला
घराच्या दारासमोर खाली पडलेली आणि तिचे हात उंबरठ्यावर असलेले
त्याच्या दृष्टीस पडले. 28 तो तिला म्हणाला, “चल ऊठ, आपण निघू
या.” परंतु काहीही उत्तर आले नाही. नंतर त्या मनुष्याने तिला गाढवाच्या
पाठीवर घातले व तो आपल्या घरी गेला. 29 जेव्हा तो घरी पोहोचला,
तेव्हा त्याने एक सुरी घेतली आणि त्याच्या उपपत्नीचे एकएक भाग
कापून बारा भाग केले आणि इस्राएलांच्या सर्व प्रदेशात पाठवून दिले.
30 ज्या प्रत्येकाने ते पाहिले, त्यांनी एक दुसऱ्यांना म्हटले, “इस्राएली
लोक इजिप्तमधून आले, तेव्हापासून आजवर अशी घटना पाहिली नाही
किंवा केली नाही. आपण काहीतरी केलेच पाहिजे! चला बोलू या!”

**20** तेव्हा दानपासून ते बेअर-शेबापर्यंतचे आणि गिलआदाच्या
प्रदेशातून सर्व इस्राएली एकत्र आले आणि मिस्पाह येथे
याहवेहसमोर जमा झाले. 2 इस्राएलाच्या सर्व गोत्रप्रमुखांनी परमेश्वराच्या
लोकांच्या सभेत आपले स्थान घेतले, जे तलवारीने सज्ज असलेले चार
लाख लोक होते. 3 (बिन्यामीन लोकांनी ऐकले की इस्राएली लोक वर
मिस्पाह येथे गेले आहेत.) जेव्हा इस्राएली लोकांनी म्हटले, “आम्हाला
सांग हे दुष्कर्म कसे घडले.” 4 तेव्हा तो लेवी, ज्या स्त्रीची हत्या
करण्यात आली होती तिचा पती म्हणाला, “मी आणि माझी उपपत्नी
बिन्यामीनच्या गिबियाह येथे रात्र घालविण्यास आलो. 5 रात्रीच्या वेळेस
गिबियाहतील लोक माझ्यामागे आले आणि घरास वेढा घातला व माझा
घात करण्याचा त्यांचा बेत होता. त्यांनी माझ्या उपपत्नीवर बलात्कार
केला आणि ती मरण पावली. 6 तेव्हा मी उपपत्नीला घेतले आणि
तिच्या शरीराचे कापून बारा तुकडे केले व ते इस्राएलांच्या वारसांच्या
सर्व प्रांतात पाठवून दिले, कारण इस्राएलात त्यांनी हे अपवित्र आणि

घृणास्पद कृत्य केले. 7 तर आता इस्राएलांच्या सर्व लोकांनो, बोला
आणि तुम्ही कोणता निर्णय घेतला ते मला सांगा." 8 सर्व पुरुष
एकत्र उठून एकमुखाने म्हणाले, "आपल्यापैकी कोणीही घरी परतणार
नाही. नाही, आपल्यापैकी कोणीही त्याच्या घरी परतणार नाही. 9
पण आता आम्ही हे गिबियाहविषयी करणार: आपण चिठ्ठ्या टाकून
त्याच्या क्रमानुसार त्यांच्या विरोधात जाऊ. 10 आपण इस्राएलाच्या सर्व
गोत्रांतून शंभरातून दहा आणि हजारातून शंभर आणि दहा हजारातून
एक हजार पुरुष निवडू आणि हे सैन्याकरिता भोजनसामुग्री आणतील.
जेव्हा ते सैन्य बिन्यामीनच्या गेबा येथे पोहोचेल, तेव्हा इस्राएलात त्यांनी
केलेल्या भयंकर घृणास्पद कृत्याबद्दल शिक्षा करेल." 11 अशा रीतीने
सर्व इस्राएली लोक एकत्र आले आणि त्यांनी शहराविरुद्ध एकजूट केली.
12 मग इस्राएली गोत्रांनी, सर्व बिन्यामीन गोत्राकडे दूत पाठवून विचारले,
"तुमच्यामध्ये ही भयंकर गोष्ट झाली आहे ती काय आहे? 13 गिबियाह
नगरातील या दुष्कर्म्यांना आमच्या स्वाधीन करा म्हणजे आम्ही त्यांना
ठार मारू आणि इस्राएलातील दुष्टता काढून टाकू." परंतु बिन्यामीन
लोक आपल्या इस्राएली भाऊबंदाचे ऐकेनात. 14 बिन्यामीन वंशज
आपल्या नगरातून येऊन ते गिबियाह येथे इस्राएली लोकांविरुद्ध युद्ध
करण्यास एकत्र झाले. 15 बिन्यामीन लोकांनी ताबडतोब आपआपल्या
नगरांतून सव्वीस हजार तलवार चालविण्यास निपुण अशी माणसे आणि
गिबियाह येथील स्थानिक सातशे कुशल तरुण जमविले. 16 या सर्व
सैनिकांमध्ये सातशे निवडक पुरुष डावखुरे होते. ते एवढे नेमबाज होते
की त्यांच्या गोफणीचा नेम केसभरदेखील चुकत नसे. 17 बिन्यामीन
गोत्राला सोडून इस्राएलांच्या सेनेतील तलवार चालविण्यास निपुण
पुरुषांची संख्या चार लाख होती, ते सर्व योद्धे होते. 18 इस्राएली लोक वर
बेथेल येथे गेले आणि परमेश्वराशी मसलत केली. ते म्हणाले, "बिन्यामीन
लोकांशी लढण्यासाठी आमच्यातील कोण प्रथम वर जाईल?" याहवेहने
उत्तर दिले, "यहूदाहने प्रथम जावे." 19 इस्राएली लोक दुसऱ्या दिवशी
उठले आणि त्यांनी गिबियाहजवळ तळ दिला. 20 मग इस्राएली लोक
बिन्यामीन लोकांशी लढण्यासाठी गेले आणि त्यांनी गिबियाह येथे
त्यांच्याविरुद्ध युद्धाची व्यूहरचना केली. 21 बिन्यामीन लोक गिबियाहतून
बाहेर आले आणि त्यांनी त्या दिवशी युद्धभूमीवर इस्राएली लोकांचे
बावीस हजार पुरुष ठार केले. 22 परंतु इस्राएली लोकांनी एकमेकांना
प्रोत्साहन दिले आणि पहिल्या दिवशी ज्या ठिकाणी मोर्चा दिला होता,
दुसऱ्या दिवशी त्याच ठिकाणी पुन्हा मोर्चा दिला. 23 इस्राएली लोक वर
गेले आणि याहवेहपुढे संध्याकाळपर्यंत रडले आणि त्यांनी याहवेहला
विचारले. ते म्हणाले, "आमचे बिन्यामीन भाऊबंद यांच्याविरुद्ध युद्ध
करण्यास आम्ही परत वर जावे का?" याहवेहने उत्तर दिले, "वर जाऊन
हल्ला करा." 24 दुसऱ्या दिवशी इस्राएली लोकांनी बिन्यामीन लोकांवर
हल्ला केला. 25 या वेळेस जेव्हा बिन्यामीन लोक त्यांच्या विरोध
करण्यास गिबियाहतून बाहेर आले, तेव्हा त्यांनी इस्राएली लोकांचे
आणखी अठरा हजार पुरुष ठार केले, जे सर्व तलवारीने सशस्त्र होते.
26 मग संपूर्ण इस्राएली लोक, संपूर्ण सेना वर बेथेल येथे गेली आणि
तिथे ते याहवेहसमोर रडत बसले. त्या दिवशी त्यांनी संध्याकाळपर्यंत
उपवास केला आणि याहवेहला होमबली व शांत्यर्पणे अर्पिली. 27
आणि इस्राएली लोकांनी याहवेहला विचारले. (त्या समयी परमेश्वराचा
कराराचा कोश तिथे होता, 28 एलअज़ाराचा पुत्र व अहरोनाचा नातू
फिनहास हा तिथे कोशापुढे सेवा करीत होता.) त्यांनी विचारले, "आम्ही
पुन्हा जाऊन आमचा इस्राएली भाऊबंद बिन्यामीन याविरुद्ध लढावे
किंवा नाही?" याहवेहने उत्तर दिले, "जा, कारण उद्या मी त्यांना तुमच्या
हातात देणार आहे." 29 तेव्हा इस्राएलने गिबियाहच्या सभोवती दबा
धरणारे बसविले. 30 तिसऱ्या दिवशी इस्राएली लोकांनी बिन्यामीनच्या
लोकांविरुद्ध युद्ध केले आणि पूर्वीप्रमाणे त्यांनी गिबियाहजवळ व्यूहरचना
केली. 31 बिन्यामीन लोक त्यांच्यावर हल्ला करण्यास बाहेर आले आणि
माघार घेत असलेल्या इस्राएली लोकांनी त्यांना शहरापासून दूर नेले.
पूर्वी केले त्याप्रमाणे बिन्यामीन पुरुषांनी इस्राएली पुरुषांना बेथेल आणि
गिबियाह यांच्यामधील मार्गावर ठार करण्यास सुरुवात केली. तेव्हा
इस्राएलांपैकी सुमारे तीस माणसे ठार झाली. 32 मग बिन्यामीन लोक
बोलू लागले, "आपण पहिल्याप्रमाणेच त्यांचा पराभव करीत आहोत!"
परंतु इस्राएली लोक म्हणाले, "चला आपण पळण्यास सुरू करू आणि
त्यांना शहरापासून दूर मार्गावर घेऊन येऊ." 33 सर्व इस्राएली लोक
आपल्या ठिकाणाहून उठले आणि बआल-तामार येथे युद्धाची व्यूहरचना
केली आणि इस्राएली लोक गेबाच्या पश्चिमेला दबा धरून बसले होते.
34 मग इस्राएलातील निवडलेले दहा हजार तरुण पुरुषांनी गिबियाहवर
हल्ला केला. युद्ध एवढे भयंकर झाले की आपल्यावर मोठा अनर्थ
येऊन ठेपला आहे, याची बिन्यामीन लोकांना काही कल्पना नव्हती.
35 तेव्हा याहवेहने बिन्यामीनांचा इस्राएलपुढे पराभव केला आणि त्या
दिवशी इस्राएली लोकांनी बिन्यामीनातील पंचवीस हजार शंभर लोक
ठार केले, हे सर्व तलवारीने सशस्त्र होते. 36 तेव्हा बिन्यामीन लोकांनी
पाहिले की त्यांच्या पराभव झाला आहे. इस्राएली लोक हे बिन्यामीन
लोकांपुढून बाजूला झाले, कारण त्यांचा गिबियाहजवळ दबा धरून
बसलेल्या लोकांवर भरवसा होता. 37 जे दबा धरून बसलेले होते त्यांनी
अचानक गिबियाहवर हल्ला केला आणि ते शहरात पसरले आणि
पूर्ण शहराचा तलवारीने नाश केला. 38 इस्राएली लोक आणि दबा
धरून बसलेले यांच्यात अशी सांकेतिक खूण ठरली होती की शहरातून
धुराचा मोठा लोट वर चढेल असे करावे, 39 आणि मग इस्राएली लोक
पलटवार करतील. बिन्यामीन लोकांनी इस्राएली पुरुष (सुमारे तीस)
ठार केले आणि ते म्हणाले, "आपण त्यांचा पहिल्या युद्धाप्रमाणेच
पराभव करीत आहोत." 40 परंतु जेव्हा शहरातून धुराचा लोट वर चढू
लागला, तेव्हा बिन्यामीन लोकांनी मागे वळून पाहिले आणि संपूर्ण
शहरातून धुराचा लोट वर आकाशात चढत असल्याचे त्यांना दिसले.
41 नंतर इस्राएली लोकांनी पलटवार केला आणि बिन्यामीन लोक
घाबरून गेले आणि त्यांना कळून आले की त्यांच्यावर भयंकर संकट
आले आहे. 42 म्हणून ते इस्राएली लोकांपुढून रानाकडे पळू लागले,
परंतु युद्धापासून वाचू शकले नाही. आणि इस्राएली लोकांनी ते ज्या

नगरातून निघाले होते त्यांना तिथेच ठार मारले. 43 त्यांनी बिन्यामीन
लोकांचा पाठलाग करीत गिबियाहच्या पूर्वेस त्यांना वेढले आणि त्यांना
सहज तुडविले. 44 बिन्यामीन लोकांचे अठरा हजार लोक ठार झाले, ते
सर्व वीर योद्धे होते. 45 जसे ते मागे वळले आणि रानात रिम्मोनाच्या
खडकाकडे पळाले, परंतु इस्राएली लोकांनी वाटेतच त्यांच्यापैकी पाच
हजार पुरुषांना ठार केले आणि पुढे बिन्यामीन लोकांचा गिदोमापर्यंत
पाठलाग करून त्यांचे आणखी पुरुष दोन हजार पुरुष मारून टाकले. 46
त्या दिवशी बिन्यामीनचे पंचवीस हजार तलवारधारक मारले गेले, जे
सर्व वीर योद्धे होते. 47 पण त्यापैकी सहाशे पुरुष वळले आणि रानात
रिम्मोन खडकावर पळून गेले आणि तिथे ते चार महिने राहिले. 48 मग
इस्राएली पुरुष परत बिन्यामीन लोकांकडे गेले आणि त्यांनी संपूर्ण नगर
व पशू आणि त्यांना जे मिळाले त्या सर्वांना तलवारीने मारले. जी नगरे
त्यांना आढळली त्या सर्वांना त्यांनी जाळून भस्मसात केले.

**21** इस्राएलांच्या पुरुषांनी मिस्पाह येथे प्रतिज्ञा केलेली होती:
“आपल्यापैकी कोणीही आपल्या कन्यांना बिन्यामीन गोत्रांना
विवाहात देणार नाही.” 2 ते बेथेल येथे गेले, जिथे संध्याकाळपर्यंत
परमेश्वरासमोर बसून त्यांनी उच्चस्वरात शोक केला. 3 “याहवेह
इस्राएलांचे परमेश्वर,” ते आक्रंदून म्हणाले, “इस्राएल सोबत असे
का घडले? आज इस्राएलातील एक गोत्र का कमी झाले?” 4 मग
दुसऱ्या दिवशी पहाटेस उठून, त्यांनी तिथे वेदी बांधली आणि तिच्यावर
होमार्पण व शांत्यर्पणे अर्पिली. 5 नंतर इस्राएली लोकांनी हे विचारले, ते
एकमेकास विचारू लागले, “इस्राएलाच्या सर्व गोत्रांमधून असा कोणी
आहे, जो या सभेत याहवेहसमोर आला नाही?” कारण त्यांनी गंभीरतेने
शपथ घेतली होती की, जो कोणी मिस्पाह येथे याहवेहसमोर उपस्थित
राहणार नाही, त्याला अवश्य जिवे मारावे. 6 सर्व इस्राएली लोक त्यांचा
बंधू बिन्यामीन गोत्राबद्दल दुःखी झाले. ते म्हणाले, “आज इस्राएलांच्या
एका गोत्राचा उच्छेद झाला आहे. 7 आता जे उरले आहेत त्यांच्यासाठी
पत्नी मिळवून देण्यास काय करावे? कारण आपण तर याहवेहची शपथ
घेऊन म्हटले आहे की विवाहात त्यांना आपण आपल्या कन्या देणार
नाही.” 8 नंतर त्यांनी विचारले “मिस्पाह येथे याहवेहसमोर इस्राएलचा
कोणता गोत्र आला नव्हता?” तेव्हा त्यांना कळून आले की, याबेश
गिलआदातील लोकांपैकी कोणीही हजर नव्हते. 9 कारण जेव्हा त्यांनी
लोकांची मोजणी केली, त्यांना आढळून आले की याबेश गिलआदातील
लोकांपैकी कोणीही तिथे नव्हते. 10 म्हणून सभेने बारा हजार योद्ध्यांना
सूचना देऊन याबेश-गिलआद येथे पाठविले आणि त्यांनी जाऊन तिथे
राहणाऱ्यांचा, स्त्रियांचा आणि लेकरांचा तलवारीने संहार करावा. 11
तुम्हाला हे करावयाचे आहे ते म्हणाले, “सर्व पुरुष आणि स्त्रिया ज्या
कुमारिका नाहीत त्या सर्वांना तुम्ही मारावे.” 12 त्यांना याबेश-गिलआद
येथे राहणाऱ्या लोकांमध्ये चारशे तरुण स्त्रिया आढळल्या ज्या कधीही
पुरुषांसोबत निजल्या नव्हत्या आणि त्यांनी त्यांना कनान देशातील
शिलोह येथील छावणीत आणले. 13 मग संपूर्ण सभेने बिन्यामीन
गोत्राकडे जे रिम्मोन खडकावर राहत होते, निरोप पाठवून त्यांच्याकडे
शांतीची बोलणी केली. 14 बिन्यामीन लोक त्यावेळेस परत आले आणि
याबेश-गिलआद येथील उर्वरित स्त्रिया त्यांना पत्नी म्हणून देण्यात
आल्या आणि मग ते आपापल्या घरी परतले. परंतु त्या त्यांना पुरेसा
नव्हत्या. 15 बिन्यामीन गोत्रासाठी लोकांनी दुःख केले, कारण याहवेहने
इस्राएलांच्या गोत्रांमध्ये दरी निर्माण केली. 16 आणि सभेतील वडिलांनी
म्हटले, “बिन्यामीन स्त्रियांचा संहार केल्यामुळे जे पुरुष उरले आहेत
त्यांना पत्नी कशी मिळवून द्यावी? 17 उरलेल्या बिन्यामीन लोकांना
वारस मिळालेच पाहिजे, म्हणजे इस्राएलच्या एका गोत्राचा नाश होणार
नाही. 18 आपण आपल्या कन्या त्यांना देऊ शकत नाही. कारण आपण
इस्राएली लोकांनी अशी प्रतिज्ञा केलेली आहे: ‘जो कोणी बिन्यामीनास
पत्नी करून देईल, तो शापित होईल.’ 19 आणि मग ते म्हणाले, पाहा,
शिलोह येथे याहवेहचा उत्सव दरवर्षी असतो, तो बेथेलाच्या उत्तरेस
आहे, जो रस्ता बेथेलापासून वर शेखेमास जातो त्याच्या पूर्वेकडे आणि
लबोनाहच्या दक्षिणेस आहे.” 20 म्हणून त्यांनी बिन्यामीन लोकांना
अशी सूचना दिली, “जा आणि द्राक्षमळयात लपून बसा 21 आणि लक्ष
ठेवा. तुम्ही तिथे जा आणि शिलोहतील कन्या त्यांचे नृत्य करण्यासाठी
बाहेर येतील, तेव्हा तुम्ही द्राक्षमळयातून धावत बाहेर निघा आणि तुम्ही
प्रत्येकाने एकएका तरुणीला धरून आपली पत्नी करून घ्यावी. नंतर
बिन्यामीनच्या भूमीत परत यावे. 22 आणि जेव्हा त्यांचे वडील आणि
भाऊ गाऱ्हाणे घेऊन आमच्याकडे येतील, तेव्हा आम्ही त्यांना म्हणू,
‘आमच्यासाठी तुम्ही त्यांच्यावर कृपा करावी, कारण युद्धात आम्हाला
त्यांच्यासाठी पत्नी मिळाली नाही. तुम्ही तुमची शपथ मोडल्याबद्दल
दोषी ठरणार नाही, कारण तुम्ही तुमच्या कन्या त्यांना दिल्या नाहीत.’”
23 यासाठी बिन्यामीन लोकांनी हे केले. जेव्हा तरुण स्त्रिया नाचत
होत्या, तेव्हा प्रत्येक पुरुषाने एकी एकीला धरले आणि तिला आपली
पत्नी म्हणून घेऊन गेले. ते परत आपल्या वतनात आले आणि त्यांनी
नगरे परत बांधली आणि ते त्यात राहू लागले. 24 मग त्यावेळी इस्राएली
लोकांनी ते स्थान सोडले आणि आपआपले गोत्र आणि कुळाप्रमाणे
असलेल्या वतनात आपल्या घरी परतले. 25 त्या दिवसांमध्ये इस्राएलला
कोणी राजा नव्हता; प्रत्येकजण आपल्याला योग्य वाटेल ते करी.

# रूथ

**1** त्या दिवसांमध्ये जेव्हा शास्ते शासन करीत होते तेव्हा त्या प्रदेशात
दुष्काळ पडला. म्हणून एक मनुष्य यहूदीयाच्या बेथलेहेम येथून
त्याची पत्नी आणि दोन मुले यांच्यासह थोड्या काळासाठी मोआब
देशात राहवयास गेला. 2 त्या मनुष्याचे नाव एलीमेलेख, त्याच्या
पत्नीचे नाव नाओमी आणि त्याच्या दोन मुलांची नावे महलोन आणि
किलिओन. ते यहूदीयाच्या बेथलेहेम येथील एफ्राथी वंशाचे होते. ते
मोआब देशात गेले आणि तिथेच राहिले. 3 आता नाओमीचा पती
एलीमेलेख मरण पावला आणि ती तिच्या दोन पुत्रांसह एकटी राहिली.
4 त्यांनी मोआबी स्त्रियांशी विवाह केला, एकीचे नाव ओफराह आणि
दुसरीचे रूथ. दहा वर्षे ते तिथे राहिल्यानंतर, 5 महलोन आणि किलिओन
हे दोघेही मरण पावले आणि आता नाओमी तिचे दोन पुत्र आणि
तिचा पती यांच्याशिवाय राहू लागली. 6 जेव्हा नाओमीने मोआब येथे
ऐकले की, याहवेह त्यांच्या लोकांच्या मदतीला आले आहेत आणि
त्यांनी त्यांच्यासाठी अन्नाचा पुरवठा केला आहे, तेव्हा तिने आणि
तिच्या सुनांनी त्यांच्या घराकडे परत जाण्याची तयारी केली. 7 ती
ज्या ठिकाणी राहत होती ते तिने सोडले आणि तिच्या दोन सुनांना
घेऊन ती त्या मार्गाने निघाली जो त्यांना परत यहूदीया देशाकडे नेत
होता. 8 नंतर नाओमी तिच्या दोन्ही सुनांना म्हणाली, “तुम्ही दोघीही
तुमच्या आईच्या घरी परत जा. जशी तुम्ही तुमच्या मृत पतींवर आणि
माझ्यावर दया दाखविली तशीच याहवेह तुमच्यावर दया करो. 9 याहवेह
तुम्हा प्रत्येकीला तुमच्या दुसऱ्या पतींच्या घरी विश्रांती देवो.” नंतर तिने
त्यांचे चुंबन घेतले आणि त्या मोठ्याने रडू लागल्या 10 आणि तिला
म्हणाल्या, “आम्हीही तुमच्याबरोबर तुमच्या लोकांकडे परत जाऊ.” 11
परंतु नाओमी म्हणाली, “माझ्या मुलींनो, तुम्ही घरी परत जा. तुम्ही
माझ्याबरोबर का यावे? मला आणखी पुत्र होणार आहेत काय, की ते
तुमचे पती होऊ शकतील? 12 माझ्या मुलींनो, तुमच्या घरी परत जा; मी
इतकी वृद्ध झाले आहे की मी दुसरा पती करू शकत नाही. समजा,
मी तसा विचार केला तरी माझ्यासाठी आशा होती—जरी आज रात्री
माझा नवरा असता आणि नंतर मी पुत्रांना जन्म दिला असता— 13
तरी ते मोठे होईपर्यंत तुम्ही वाट पाहत राहणार काय? नाही, माझ्या
मुलींनो, तुमच्यापेक्षा मला हे फारच मोठे दुःख आहे, कारण याहवेहचा
हात माझ्याविरुद्ध झाला आहे!” 14 त्या पुन्हा आणखीच मोठ्याने
रडू लागल्या. नंतर ओफराहने तिच्या सासूचे चुंबन घेऊन तिचा निरोप
घेतला, परंतु रूथ तिला बिलगून राहिली. 15 तेव्हा नाओमी म्हणाली,
“पाहा, तुझी जाऊ तिच्या लोकांकडे आणि तिच्या दैवतांकडे परत
जात आहे. तू तिच्याबरोबर परत जा.” 16 परंतु रूथने उत्तर दिले,
“तुम्हाला सोडून जाण्याचा किंवा तुमच्यापासून परत जाण्याचा आग्रह
मला करू नका. कारण तुम्ही जिकडे जाल, तिकडे मी येईन आणि
तुम्ही जिथे राहाल, तिथे मी राहीन. तुमचे लोक हे माझे लोक होतील
आणि तुमचे परमेश्वर हे माझे परमेश्वर होतील. 17 तुम्ही मराल तिथे मी
मरेन आणि तिथेच मला मूठमाती देण्यात यावी. मरणाशिवाय तुम्हाला
आणि मला वेगळे केले तर याहवेह माझा अधिक कठोरपणे न्याय
करो.” 18 जेव्हा नाओमीने हे पाहिले की, रूथने तिच्याबरोबर जाण्याचा
ठाम निर्णय घेतला आहे, तेव्हा तिने तिला आग्रह करण्याचे थांबविले.
19 त्या दोन्ही स्त्रिया बेथलेहेम येईपर्यंत चालत राहिल्या. जेव्हा त्या
बेथलेहेम येथे पोहोचल्या, तेव्हा त्यांच्यामुळे ते संपूर्ण नगर गोंधळून
गेले आणि स्त्रियांनी आश्चर्याने उद्गार काढले, “ही खरोखरच नाओमी
आहे काय?” 20 नाओमीने त्यांना म्हटले, “मला नाओमी म्हणू नका,
मला मारा असे म्हणा, कारण सर्वसमर्थांनी माझे जीवन फार कडवट
केले आहे 21 मी भरलेली गेले होते, परंतु याहवेहने मला रिकामे परत
आणले आहे. मला नाओमी असे का म्हणता? याहवेहने मला दुःख दिले
आहे; सर्वसमर्थांनी माझ्यावर हे दुर्भाग्य आणले आहे.” 22 अशाप्रकारे
नाओमी, तिची मोआबी सून रूथबरोबर मोआब देशातून परत आली, त्या
दोघी बेथलेहेमात पोहोचल्या, त्यावेळी सातूचा हंगाम सुरू झाला होता.

**2** नाओमीच्या पतीचा एक नातेवाईक होता, तो मनुष्य एलीमेलेखच्या
कुळातील असून, त्याचे नावे बवाज होते. 2 आणि मोआबी रूथ
नाओमीला म्हणाली, “ज्याची कृपादृष्टी माझ्यावर होईल अशा मनुष्याच्या
शेतामध्ये जाऊन त्याच्यामागे राहिलेले धान्य वेचण्यासाठी मला जाऊ
दे.” नाओमी म्हणाली, “ठीक आहे, माझ्या मुली, तू जा.” 3 तेव्हा
ती गेली, तिने एका शेतात प्रवेश केला आणि कापणी करणाऱ्यांच्या
मागे राहिलेले धान्य जमा करू लागली, संयोगाने ते शेत बवाजच्या
मालकीचे होते, जो एलीमेलेखच्या कुळातील होता. 4 त्याचवेळेस बवाज
बेथलेहेमातून आला आणि कापणी करणाऱ्यांचे क्षेमकुशल विचारले, तो
म्हणाला, “याहवेह तुम्हाबरोबर असो!” त्यांनी प्रत्युत्तर दिले, “याहवेह
तुम्हाला आशीर्वाद देवो!” 5 बवाजाने त्याच्या कापणी करणाऱ्यांच्या
मुकादमास विचारले, “ती तरुण स्त्री कोणाची आहे?” 6 त्या मुकादमाने
उत्तर दिले, “ती मोआबी आहे, ती मोआब देशातून नाओमी बरोबर आली
आहे. 7 ती मला म्हणाली, ‘कृपा करून कापणी करणाऱ्यांच्यामागे
पेंढ्यांमधून राहिलेले धान्य जमा करून गोळा करू द्या.’ ती सकाळीच
शेतामध्ये आली आणि थोडाच वेळ छताखाली विश्रांती घेऊन आतापर्यंत
येथेच आहे.” 8 तेव्हा बवाज रूथला म्हणाला, “माझ्या मुली, माझे ऐक.
धान्य वेचण्यासाठी दुसऱ्याच्या शेतात जाऊ नकोस आणि येथून दूर
जाऊ नकोस. माझ्यासाठी काम करणाऱ्या स्त्रियांबरोबर इथेच राहा. 9
ज्या शेतात माणसे कापणीचे काम करीत आहेत तिकडे लक्ष ठेव आणि
या स्त्रियांच्या बरोबरीने त्यांच्यामागे जात राहा. तुला त्रास न देण्याबद्दल
मी माणसांना सांगून ठेवले आहे. जेव्हा तुला तहान लागेल, तेव्हा तू
जाऊन माणसांनी भरून ठेवलेल्या या रांजणातील पाणी पीत जा.” 10
त्यावर तिने तिचे मुख जमिनीकडे खाली लवून ते मान्य केले. ती त्याला
म्हणाली, “मी एक परदेशी असूनही तुम्ही माझ्यावर एवढी कृपादृष्टी
का बरे दाखवित आहात?” 11 बवाज म्हणाला, “तुझ्या पतीच्या
निधनानंतर तू तुझ्या सासूसाठी जे काही केले ते सर्व मला सांगण्यात
आलेले आहे—कशाप्रकारे तू तुझ्या वडिलांकडे आणि आईकडे आणि

तुझ्या गावाकडे जाण्याचे मान्य केले नाहीस आणि अशा लोकांबरोबर
राहण्यास आली आहेस की, ज्यांना तू ओळखत नाही. 12 तू जे काही
केले आहेस त्याचे फळ याहवेह तुला देतील. याहवेह इस्राएलांचे परमेश्वर
ज्यांच्या पंखाखाली आश्रय घेण्यास तू आली आहेस, त्यांच्याद्वारे तुला
भरपूर मजुरी मिळो.” 13 तेव्हा ती म्हणाली, “हे स्वामी, तुमच्याकडून
माझ्यावर सतत कृपा होत रहावी, जरी मी तुमच्या एखाद्या नोकरांपैकी
नाही तरी तुमच्या या दासीबरोबर दयाळूपणाने बोलण्याने मला समाधान
झाले आहे.” 14 भोजनाच्या वेळी बवाज तिला म्हणाला, “इकडे ये.
थोडी भाकरी घे आणि द्राक्षाच्या सिरक्यामध्ये बुडवून खा.” जेव्हा ती
कापणी करणाऱ्याबरोबर खाली बसली, तेव्हा त्याने तिला थोडे भाजलेले
धान्य दिले. तिने तिला हवे तेवढे खाल्ले आणि थोडेसे राहिले होते. 15
जेव्हा ती उरलेले धान्य जमा करण्यास उठली, तेव्हा बवाजाने त्याच्या
माणसांना आज्ञा दिल्या, “तिला पेंढ्यांमधून राहिलेले धान्य गोळा करू
द्या आणि तिला मनाई करू नका. 16 उलट पेंढ्यांतून काही ताटे ओढून
तिला वेचण्यासाठी पडू द्या, आणि तिला धमकावू नका.” 17 अशाप्रकारे
रूथने शेतात संध्याकाळपर्यंत धान्य वेचले. नंतर तिने गोळा केलेल्या
जवाची झोडपणी केली आणि ते एकूण एक एफा भरले. 18 ते घेऊन ती
नगरात गेली आणि तिच्या सासूने पाहिले की तिने किती गोळा केले
आहे. रूथने खाऊन राहिलेले अन्नसुद्धा आणले आणि ते तिला दिले. 19
तिच्या सासूने तिला विचारले, “धान्य गोळा करण्यासाठी आज तू कुठे
गेली होतीस? तू कुठे काम केलेस? ज्याने तुझी एवढी काळजी घेतली,
तो मनुष्य आशीर्वादित असो!” तेव्हा रूथने तिच्या सासूला त्याच्याबद्दल
सांगितले ज्याच्या ठिकाणी ती काम करीत होती. ती म्हणाली, “ज्या
माणसाबरोबर मी आज काम केले त्याचे नाव बवाज आहे,” 20 नाओमी
तिच्या सुनेला म्हणाली, “याहवेह त्याला आशीर्वादित करो! त्यांनी
जिवंतांना आणि मृतांना त्यांचा चांगुलपणा दाखविणे थांबविले नाही.”
ती पुढे म्हणाली, “तो मनुष्य आपला जवळचा नातेवाईक आहे; तो
आम्हाला सोडविणाऱ्यांपैकी एक आहे.” 21 तेव्हा मोआबी रूथ म्हणाली,
“तो मला असेही म्हणाला की, ‘जोपर्यंत ते माझ्या संपूर्ण धान्याची
कापणी करीत आहेत, तोपर्यंत माझ्या कामकऱ्यांबरोबर राहा.’” 22
नाओमी तिची सून रूथला म्हणाली, “माझ्या मुली, त्याच्यासाठी काम
करणाऱ्या स्त्रियांबरोबर जाणे हे तुझ्यासाठी हिताचे होईल, कारण
दुसऱ्या कोणाच्याही शेतात तुझ्यावर अत्याचार होण्याची शक्यता आहे.”
23 म्हणून जव आणि गव्हाची कापणी संपेपर्यंत रूथ जव गोळा करीत
बवाजच्या स्त्रियांच्या जवळच राहिली. ती तिच्या सासूसह राहिली.

**3** एके दिवशी रूथची सासू नाओमी तिला म्हणाली, “माझ्या मुली,
जिथे तुझी चांगल्या प्रकारे काळजी घेतली जाईल असे घर मला
तुझ्यासाठी शोधलेच पाहिजे. 2 ज्याच्या स्त्रियांबरोबर तू काम केले
आहेस तो बवाज आपला नातेवाईकच आहे. आज रात्री तो झोडपणी
करण्याच्या जागेवर जव पाखडण्याचे काम करेल. 3 आंघोळ कर, सुगंधी
अत्तर लाव आणि तुझी उत्तम वस्त्रे घाल. नंतर खाली खळयात जा,
परंतु त्याचे खाणे आणि पिणे होईपर्यंत त्याला माहीत होऊ देऊ नकोस
की, तू तिथे आहेस. 4 जेव्हा विश्रांती घेतो तेव्हा तो कुठे झोपत आहे, हे
पाहून ठेव. नंतर जा आणि त्याच्या पायांवरील पांघरूण काढ आणि
तिथेच पडून राहा. काय करावयाचे तोच तुला सांगेल.” 5 रूथने उत्तर
दिले, “तुम्ही जे काही सांगता ते मी करेन.” 6 तेव्हा ती खाली खळयात
गेली आणि तिच्या सासूने जे सर्वकाही तिला करावयास सांगितले
होते तसे तिने केले. 7 जेव्हा बवाजने खाणे आणि पिणे संपविले
आणि तो आनंदात होता, मग तो झोपण्यासाठी धान्य रचून ठेवलेल्या
ढिगाऱ्यांच्या शेवटी गेला. रूथ शांतपणे त्याच्याजवळ गेली आणि त्याच्या
पायांवरचे पांघरूण काढले आणि तिथेच पडून राहिली. 8 मध्यरात्री त्या
मनुष्याला कशाचातरी धक्का लागला; त्याने वळून पाहिले—आणि
त्याच्या पायाजवळ एक स्त्री निजली होती! 9 त्याने विचारले, “तू कोण
आहेस?” “मी तुमची दासी रूथ आहे. तुमच्या वस्त्राचा कोपरा माझ्यावर
पसरून टाका, कारण तुम्ही आमच्या कुटुंबाला सोडविणाऱ्यांपैकी एक
आहात.” 10 “माझ्या मुली, याहवेह तुला आशीर्वाद देवो,” त्याने उत्तर
दिले. “जो दयाळूपणा तू आता दाखविला, तो पूर्वी दाखविला त्यापेक्षा
अधिक आहे: गरीब असो वा श्रीमंत, पण तू अशा तरुण पुरुषांच्या मागे
गेली नाहीस. 11 आणि आता, माझ्या मुली, घाबरू नकोस. तू जे काही
मागशील ते मी सर्व तुझ्यासाठी करेन. माझ्या नगरातील सर्व लोकांना
माहीत आहे की, तू एक नीतिमान चरित्र असलेली स्त्री आहेस. 12
ही गोष्ट खरी आहे की, मी आपल्या कुटुंबाचा सोडविणारा नातेवाईक
आहे, परंतु माझ्याहीपेक्षा अधिक जवळचा संबंध असलेला असा दुसरा
एकजण आणखी आहे. 13 आज रात्री येथेच राहा आणि सकाळी जर
त्याला तुमच्या कुटुंबाची जबाबदारी घेऊन सोडविणारा म्हणून त्याचे
कर्तव्य करावयाचे असेल, तर चांगलेच आहे; त्याला तुम्हाला सोडवू द्या.
परंतु जर त्याची तशी इच्छा नसेल, तर याहवेहची शपथ, मी ते करेन.
सकाळ होईपर्यंत येथेच पडून राहा.” 14 म्हणून ती सकाळपर्यंत त्याच्या
पायाजवळ पडून राहिली, परंतु इतर कोणालाही कळण्याआधी ती उठून
बसली, तेव्हा तो म्हणाला, “हे कोणालाही कळू देऊ नको की एक
स्त्री या खळयात आली होती.” 15 तो असेही म्हणाला, “तू घातलेली
ओढणी माझ्याकडे आण आणि ती उघडून धरून ठेव.” जेव्हा तिने तसे
केले तेव्हा त्याने सहा मापे भरून जव त्यावर ओतले आणि ते गाठोडे
बांधून तिच्या खांद्यावर दिले. नंतर तो परत नगराकडे निघून गेला. 16
जेव्हा ती घरी तिच्या सासूकडे आली, तेव्हा नाओमीने तिला विचारले,
“माझ्या मुली, कसे काय झाले?” तेव्हा बवाजने तिच्यासाठी जे केले, ते
तिने तिला सर्वकाही सांगितले, 17 आणि ती पुढे म्हणाली, “त्याने मला
ही सहा मापे जव दिले व म्हणाला, ‘तुझ्या सासूकडे रिकामी हाताने
परत जाऊ नकोस.’” 18 तेव्हा नाओमी म्हणाली, “माझ्या मुली, काय
घडते हे समजेपर्यंत वाट पाहा, कारण तो मनुष्य या गोष्टीचा निकाल
लागेपर्यंत स्वस्थ राहणार नाही.”

**4** त्या दरम्यान बवाज नगराच्या वेशीकडे गेला आणि तो तिथे बसला
असताना तो सोडवणूक करणारा, ज्याच्याबद्दल त्याने सांगितले
होते, तो मनुष्य पुढे आला. तेव्हा बवाज त्याला म्हणाला, “माझ्या

मित्रा, इकडे ये आणि इथे बस.” तेव्हा तो तिकडे गेला आणि बसला.
2 नंतर बवाजने नगरातील दहा वडीलजनांना बोलावून घेतले आणि
त्यांना म्हणाला, “येथे बसा,” आणि ते बसले. 3 तेव्हा तो जबाबदारी
घेऊन सोडवणूक करणाऱ्या मनुष्यास म्हणाला, “नाओमी मोआब
देशातून परत आली आहे. ती आता ज्या जमिनीचा भाग विकत आहे,
ती आपला नातेवाईक एलीमेलेखच्या मालकीची आहे. 4 मला असे
वाटले की, ही गोष्ट तुझ्या लक्षात आणून द्यावी आणि मी असे सुचवितो
की, येथे बसलेल्या लोकांच्या उपस्थितीत आणि माझ्या वडीलजनांच्या
उपस्थितीत तू ती विकत घे. जर तू ती सोडवशील, तर तसे कर.
परंतु जर तू तसे करणार नाहीस, मला सांग, म्हणजे मला ते कळेल.
कारण तुझ्याशिवाय तसे करण्याचा अधिकार कोणालाही नाही आणि
तुझ्यानंतर मला तो अधिकार आहे.” तो म्हणाला, “मी तो सोडवून
घेईन,” 5 तेव्हा बवाज म्हणाला, “ज्या दिवशी तू नाओमीकडून ही
जमीन विकत घेशील तेव्हा त्याच्या कुटुंबाचे नाव त्याची मालमत्ता
चालू ठेवण्यासाठी त्या मृत माणसाची विधवा मोआबी रूथसुद्धा तुला
स्वीकारावी लागेल.” 6 यावरून तो जबाबदारी घेऊन सोडविणारा
मनुष्य म्हणाला, “असे असेल, तर मग मी ती सोडवू शकत नाही.
कारण त्यामुळे माझी स्वतःची मालमत्ता धोक्यात येईल. तू स्वतःच
ती सोडवून घे. मी हे करू शकत नाही.” 7 (इस्राएलमध्ये पूर्वीच्या
काळात, मालमत्तेची सोडवणूक करणे आणि तिचे हस्तांतरण पक्के
होण्यासाठी, एका पक्षाने त्याची चप्पल काढून ती दुसऱ्याला देणे ही
इस्राएलमधील व्यवहार कायदेशीर करण्याची पद्धत होती.) 8 म्हणून तो
जबाबदारी घेऊन सोडविणारा मनुष्य बवाजला म्हणाला, “तू स्वतःच
ती विकत घे.” आणि त्यावेळी त्याने त्याची चप्पल काढली. 9 तेव्हा
बवाजने वडीलजनांना आणि सर्व लोकांना जाहीरपणे सांगितले, “आज
तुम्ही साक्षीदार आहात की मी एलीमेलेख, किलिओन आणि महलोन
यांची सर्व मालमत्ता नाओमीकडून विकत घेतली आहे. 10 मोआबी
रूथ, म्हणजे महलोनची विधवा हिलासुद्धा माझी पत्नी म्हणून, त्या
मनुष्याचे नाव त्याच्या मालमत्तेसहित चालवावे यासाठी माझ्या ताब्यात
घेत आहे, म्हणजे त्याच्या कुटुंबातून किंवा त्याच्या गावातून त्याचे नाव
पुसले जाणार नाही. याविषयी तुम्ही आज साक्षी आहात!” 11 तेव्हा
वडीलजन आणि वेशीत आलेले सर्व लोक म्हणाले, “होय, आम्ही
साक्षीदार आहोत. राहेल आणि लेआ, ज्यांनी एकत्र मिळून इस्राएलचे
कुटुंब तयार केले, त्याप्रमाणेच याहवेह आता तुझ्या घरात येत असलेल्या
या स्त्रीचे करो. तुला एफ्राथामध्ये स्थान मिळो आणि तू बेथलेहेमात
प्रसिद्ध व्हावेस. 12 या तरुण स्त्रीपासून याहवेह तुला संतती देवो,
तुझे कुटुंब तामार आणि यहूदाहचा पुत्र पेरेससारखे होवो.” 13 तेव्हा
बवाजने रूथला स्वीकारले आणि ती त्याची पत्नी झाली. जेव्हा त्याने
तिच्याशी प्रीतिसंबंध केले, तेव्हा याहवेहनी तिला गर्भ राहण्यासाठी
समर्थ केले, आणि तिने मुलाला जन्म दिला. 14 तेव्हा स्त्रिया नाओमीला
म्हणाल्या: “याहवेहची स्तुती असो, ज्यांनी या दिवशी तुझी जबाबदारी
घेऊन सोडविणाऱ्याशिवाय तुला सोडले नाही. तो संपूर्ण इस्राएलमध्ये
प्रसिद्ध होवो! 15 तो तुला नवजीवन देऊन तुझ्या वृद्धापकाळात तुला
आधार देईल. कारण तुझी सून, जी तुझ्यावर प्रीती करते आणि जी सात
मुलांपेक्षा अधिक उत्तम आहे, तिनेच त्याला जन्म दिला आहे.” 16
तेव्हा नाओमीने ते बाळ उचलून उराशी धरले आणि त्याची काळजी घेऊ
लागली. 17 तिथे राहणाऱ्या स्त्रिया म्हणाल्या, “आता नाओमीला मुलगा
आहे!” आणि त्यांनी त्याचे नाव ओबेद ठेवले. जो इशायाचा पिता,
जो दावीद राजाचा पिता होता. 18 पेरेसाची वंशावळ अशी: पेरेस हा
हेस्रोनचा पिता होता, 19 हेस्रोन हा रामचा पिता, राम हा अम्मीनादाबचा
पिता, 20 अम्मीनादाब हा नहशोनचा पिता, नहशोन हा सल्मोन चा
पिता, 21 सल्मोन हा बवाजचा पिता, बवाज हा ओबेदचा पिता, 22
ओबेद हा इशायचा पिता, आणि इशाय हा दावीदाचा पिता.

# 1 शमुवेल

**1** एफ्राईम येथील डोंगराळ भागात रामाथाईम-सोफीम या गावात
एलकानाह नामक एक मनुष्य राहत होता, जो यरोहामचा पुत्र होता,
तो एलीहूचा पुत्र, तो तोहूचा पुत्र, तो सूफाचा पुत्र, तो एफ्राईम गोत्रातील
होता. 2 त्याला दोन पत्नी होत्या; एकीचे नाव हन्नाह आणि दुसरीचे
नाव पनिन्नाह असे होते. पनिन्नाहला मुलेबाळे होती, परंतु हन्नेहला
एकही मूल नव्हते. 3 दरवर्षी हा मनुष्य त्याच्या नगरापासून शिलोह
येथे सर्वसमर्थ याहवेहची उपासना आणि यज्ञ करण्यासाठी जात असे,
जिथे एलीचे दोन पुत्र होफनी आणि फिनहास हे याहवेहचे याजक
होते. 4 यज्ञ करण्यासाठी जेव्हा एलकानाहचा दिवस येत असे, तेव्हा
तो आपली पत्नी पनिन्नाह आणि तिच्या सर्व मुलांना आणि मुलींना
मांसाचा वाटा देत असे. 5 परंतु हन्नेहला तो दुप्पट वाटा देई, कारण
त्याची तिच्यावर प्रीती होती, आणि याहवेहने तिचे उदर बंद केले होते.
6 कारण याहवेहने हन्नाहचे उदर बंद केले होते, यामुळे तिची सवत
तिला चिडवून त्रास देत असे. 7 वर्षानुवर्षे हे असेच चालू होते. जेव्हा
हन्नाह याहवेहच्या मंदिरात जात असे, तेव्हा तिची सवत पनिन्नाह, ती
रडेपर्यंत चिडवीत असे आणि मग ती काही खात नसे. 8 तिचा पती
एलकानाह तिला म्हणत असे, “हन्नाह तू का रडत आहेस? तू काही का
खात नाहीस? मी तुला दहा पुत्रांपेक्षा अधिक नाही काय?” 9 एकदा,
शिलोह येथे त्यांनी खाणेपिणे संपविल्यानंतर हन्नाह उठली. तेव्हा एली
याजक याहवेहच्या मंदिराच्या दारात त्याच्या खुर्चीवर बसलेला होता.
10 तीव्र वेदनेने हन्नेहने याहवेहकडे प्रार्थना केली, मोठ्या दुःखाने ती
रडली. 11 आणि तिने एक शपथ घेतली, ती म्हणाली, “हे सर्वसमर्थ
याहवेह, जर तुम्ही तुमच्या दासीच्या दुर्दशेकडे लक्ष द्याल आणि माझी
आठवण कराल आणि तुमच्या दासीला विसरणार नाही परंतु तिला एक
पुत्र द्याल, तर मी त्याला त्याच्या आयुष्याचे सर्व दिवस याहवेहसाठी
देईन आणि त्याच्या डोक्यावर कधीही वस्तरा फिरणार नाही.” 12 ती
याहवेहकडे प्रार्थना करीत असता, एली तिच्या मुखाकडे पाहत होता. 13
हन्नाह तिच्या मनात प्रार्थना करीत होती, आणि तिचे ओठ हालत होते,
परंतु तिचा आवाज मात्र ऐकू येत नव्हता. एलीला वाटले की ती नशेत
आहे 14 आणि एली तिला म्हणाला, “किती वेळ तू नशेत राहशील?
मद्यपान सोडून दे.” 15 “तसे नाही, माझ्या स्वामी,” हन्नाहने उत्तर दिले,
“मी फार त्रस्त झालेली स्त्री आहे. मी द्राक्षारस किंवा मद्य घेतले नाही;
मी माझे हृदय याहवेहकडे मोकळे करीत होते. 16 तुमच्या दासीला
दुष्ट स्त्री असे समजू नका; मी या ठिकाणी वेदना आणि तीव्र दुःखाने
प्रार्थना करीत आहे.” 17 तेव्हा एलीने उत्तर दिले, “शांतीने जा, आणि तू
जे काही मागितले आहेस, ते इस्राएलचे परमेश्वर तुला देवो.” 18 ती
म्हणाली, “तुमची दासी तुमच्या दृष्टीत कृपा पावो.” नंतर ती आपल्या
मार्गाने निघून गेली आणि तिने अन्न सेवन केले आणि त्यानंतर तिचा
चेहरा उदास राहिला नाही. 19 दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांनी उठून
याहवेहची उपासना केली आणि परत रामाह येथे आपल्या घरी परतले.
एलकानाहने आपली पत्नी हन्नाह हिच्याशी प्रीतिसंबंध केला आणि
याहवेहने तिची आठवण केली. 20 तेव्हा नेमलेल्या काळात हन्नाह
गर्भवती झाली आणि एका पुत्राला जन्म दिला. तिने त्याचे नाव शमुवेल
असे ठेवले, ती म्हणाली, “कारण याहवेहकडे मी याला मागितले होते,”
21 जेव्हा तिचा पती एलकानाह त्याच्या सर्व कुटुंबाबरोबर याहवेहसाठी
वार्षिक यज्ञ अर्पण करण्यासाठी आणि त्याचा नवस पूर्ण करण्यासाठी
गेला, 22 तेव्हा हन्नाह गेली नाही. ती तिच्या पतीला म्हणाली, “मुलाचे
दूध तोडल्यानंतर, मी त्याला घेऊन जाईन आणि त्याला याहवेहसमोर
सादर करेन आणि तो सदैव तिथेच राहील.” 23 “तुला जे उत्तम वाटते ते
तू कर,” तिचा पती एलकानाह तिला म्हणाला. “त्याचे दूध तुटेपर्यंत तू
येथेच राहा; याहवेह त्यांच्या वचनाप्रमाणे करो.” म्हणून ती स्त्री घरीच
राहिली आणि मुलाचे दूध तोडेपर्यंत तिने त्याचे पालनपोषण केले. 24
त्याचे दूध तोडल्यानंतर तिने बालकास लहान असतानाच तिच्याबरोबर
घेतले, तसेच तीन वर्षाचा बैल, एक एफा सपीठ आणि द्राक्षारसाचा
बुधला घेतला आणि त्याला शिलोह येथे याहवेहच्या मंदिरात आणले.
25 बैलाचा यज्ञ केल्यानंतर, त्यांनी त्या मुलाला एलीकडे आणले, 26
आणि हन्ना त्याला म्हणाली, “माझ्या स्वामी, मला क्षमा करा. तुमच्या
जीविताची शपथ, मी तीच स्त्री आहे जी येथे तुमच्या बाजूला उभी राहून
याहवेहकडे प्रार्थना करीत होती. 27 या बाळासाठी मी प्रार्थना केली,
आणि याहवेहकडे मी जे मागितले त्यांनी ते मला दिले आहे. 28 तर मी
आता त्याला याहवेहला समर्पित करीत आहे. त्याचे संपूर्ण जीवनभर
तो याहवेहसाठी दिलेला आहे.” आणि त्याने तिथे याहवेहची उपासना
केली.

**2** तेव्हा हन्नाहने प्रार्थना केली आणि म्हणाली: “माझे हृदय याहवेहमध्ये
आनंद करीत आहे; याहवेहमध्ये माझे शिंग उंच केलेले आहे. माझे
मुख माझ्या शत्रूंपुढे बढाई मारते, कारण याहवेहने दिलेल्या उद्धारात मी
आनंद करते. 2 “याहवेहसारखे कोणीही पवित्र नाही; तुमच्याशिवाय
दुसरे कोणीही नाही; आमच्या परमेश्वरासारखा दुसरा कोणताही खडक
नाही. 3 “फार गर्वाने बोलत राहू नका, किंवा तुमच्या मुखाला उद्धट
बोलणे करू देऊ नका, कारण ते याहवेह परमेश्वर आहेत जे सर्वज्ञानी
आहेत, आणि त्यांच्याद्वारे कृत्ये तोलली जातात. 4 “योद्ध्यांचे धनुष्य
तुटलेले आहेत, परंतु जे अडखळले, ते शक्तीने सज्ज झाले आहेत.
5 ज्यांच्याकडे भरपूर होते ते आता अन्नासाठी मजुरी करीत आहेत,
परंतु जे भुकेले होते ते आता भुकेले नाहीत. जी अपत्यहीन होती तिने
सात लेकरांना जन्म दिला आहे, परंतु जिला अनेक मुले होती ती क्षीण
झाली आहे. 6 “याहवेह मृत्यू आणतात आणि जिवंतही करतात; ते
कबरेत घेऊन जातात आणि तिथून वरही काढतात. (Sheol h7585) 7
गरिबी आणि संपत्ती याहवेह पाठवितात; ते नम्र करतात आणि उंचही
तेच करतात. 8 ते दीनांस धुळीतून वर काढतात, आणि गरजवंतास
राखेच्या ढिगाऱ्यातून वर उचलून घेतात; ते त्यांना राजपुत्रांबरोबर
बसवितात, आणि त्यांना वतन म्हणून सन्मानाचे आसन प्राप्त होते.
“कारण पृथ्वीचा पाया याहवेहचा आहे; त्यावरच त्यांनी जग स्थापले

आहे. 9 ते आपल्या प्रामाणिक सेवकांची पावले सांभाळतील, परंतु
दुष्ट अंधकारमय ठिकाणी शांत केले जातील. “कोणीही बळाने विजय
पावत नाही; 10 जे याहवेहचा विरोध करतात त्यांचा चुराडा होईल.
सर्वश्रेष्ठ याहवेह स्वर्गातून गर्जना करतील; पृथ्वीच्या शेवटचा न्याय
याहवेह करतील. “ते आपल्या राजाला सामर्थ्य देतील, आणि आपल्या
अभिषिक्ताचे शिंग उंच करतील.” 11 नंतर एलकानाह रामाह येथे
त्याच्या घरी गेला, परंतु तो मुलगा शमुवेल एली याजकाच्या हाताखाली
याहवेहसमोर सेवा करू लागला. 12 एलीचे पुत्र अतिशय नीच होते;
ते याहवेहचा आदर करीत नसत. 13 याजकांची अशी रीत होती की,
ज्यावेळेस लोकांमधील कोणी यज्ञार्पण केले व जेव्हा ते मांस शिजविले
जात असे, तेव्हा याजकांचा सेवक तीन टोके असलेला काटा घेऊन येत
असे 14 आणि परातीत किंवा पातेल्यात किंवा कढईत किंवा गंगाळात
तो काटा टाकून जितके मांस त्या काट्याने वरती येईल याजक ते
आपल्या स्वतःसाठी घेत असे, शिलोह येथे आलेल्या सर्व इस्राएल
लोकांशी ते असाच व्यवहार करीत असत. 15 परंतु चरबी जळण्याच्या
आधी, याजकाचा सेवक येऊन यज्ञ करीत असलेल्या व्यक्तीला म्हणत
असे, “भाजून घेण्यासाठी याजकाला थोडे मांस दे; तो तुझ्याकडून
शिजविलेले मांस स्वीकारणार नाही, तर कच्चेच मांस घेईल.” 16 जर
तो व्यक्ती त्याला म्हणाला, “प्रथम चरबी जळू दे, त्यानंतर तुला हवे ते तू
घे,” तो सेवक उत्तर देत असे, “नाही, ते आताच दे; जर तू दिले नाही,
तर मी ते सक्तीने घेईन.” 17 या तरुणांचे हे पाप याहवेहच्या दृष्टीने फार
मोठे होते, कारण लोकांना याहवेहच्या अर्पणाचा तिरस्कार येऊ लागला
होता. 18 परंतु शमुवेल बालक तागाचे एफोद घालून याहवेहसमोर
सेवा करीत होता. 19 प्रत्येक वर्षी जेव्हा त्याची आई तिच्या पतीबरोबर
वार्षिक यज्ञ करण्यासाठी जात, तेव्हा त्याच्यासाठी एक लहान झगा
बनवून ती त्याला देत असे. 20 एलकानाह आणि त्याची पत्नी यांना
एली आशीर्वाद देताना म्हणे, “या स्त्रीने ज्याच्यासाठी प्रार्थना केली
आणि याहवेहला दिले त्याच्या बदल्यात या स्त्रीपासून याहवेह तुला
लेकरे देवो.” त्यानंतर ते त्यांच्या घरी जात असत. 21 आणि हन्नाहवर
याहवेहची कृपा होती; तिने तीन मुलांना आणि दोन मुलींना जन्म
दिला. याकाळात शमुवेल बाळ याहवेहच्या उपस्थितीत वाढत गेला.
22 आता एली, जो फार वृद्ध झाला होता, त्याची मुले सर्व इस्राएली
लोकांशी कसा व्यवहार करीत होते आणि ज्या स्त्रिया सभामंडपाच्या
प्रवेशद्वारात सेवा करीत होत्या त्यांच्याबरोबर त्यांनी जे कुकर्म केले त्या
सर्वांविषयी त्याने ऐकले. 23 तेव्हा तो त्यांना म्हणाला, “तुम्ही अशी
कर्मे का करता? तुमच्या दुष्ट कृत्यांबद्दल सर्व लोकांकडून मी ऐकत
आहे. 24 नाही, माझ्या मुलांनो; याहवेहच्या लोकांमध्ये पसरत असलेला
अहवाल जो मी ऐकत आहे तो चांगला नाही. 25 जर एक व्यक्ती
दुसऱ्याविरुद्ध पाप करते, तर परमेश्वर त्या अपराध्यासाठी मध्यस्थी
करतील; परंतु जर कोणी याहवेहविरुद्ध पाप केले तर त्यांच्यासाठी
कोण मध्यस्थी करेल?” तरीही त्याच्या मुलांनी त्यांच्या वडिलांच्या
निषेधाकडे लक्ष दिले नाही, कारण त्यांना जिवे मारावे अशी याहवेहची
इच्छा होती. 26 आणि शमुवेल बाळ याहवेहच्या आणि लोकांच्या कृपेत
वाढत गेला. 27 परमेश्वराचा एक मनुष्य एलीकडे आला आणि त्याला
म्हणाला, “याहवेह असे म्हणतात: ‘तुझे पूर्वज इजिप्तमध्ये फारोहच्या
दास्यात असताना मी त्यांना स्पष्टपणे प्रगट झालो नाही काय? 28 माझे
याजक व्हावे, धूप जाळावे, माझ्या वेदीकडे जावे व माझ्या समक्षतेत
एफोद घालावा म्हणून इस्राएलच्या सर्व गोत्रांतून मी तुझ्या पूर्वजांना
निवडले. त्याचप्रमाणे इस्राएली लोकांनी दिलेले सर्व अन्नार्पण मी
तुझ्या पूर्वजांच्या कुटुंबांला दिले. 29 माझे जे यज्ञ व अर्पणे मी माझ्या
मंदिरासाठी नेमून दिली आहेत त्याचा तुम्ही अवमान का करता? माझ्या
इस्राएली लोकांनी केलेल्या अर्पणातून सर्वोत्तम भाग खाऊन तू स्वतःला
पुष्ट करून माझ्यापेक्षा तुझ्या पुत्रांचा जास्त सन्मान का करतो?’ 30
“म्हणून याहवेह इस्राएलचे परमेश्वर, असे जाहीर करतात: ‘मी वचन
दिले होते की, तुझ्या कुटुंबातील सदस्य सर्वकाळ माझ्यासमोर सेवा
करतील.’ परंतु आता याहवेह असे जाहीर करतात: ‘ते माझ्यापासून दूर
असो! जे माझा सन्मान करतात त्यांचा मी सन्मान करेन, परंतु जे माझा
अवमान करतात त्यांचा अवमान होईल.’ 31 अशी वेळ येत आहे की,
मी तुझी आणि तुझ्या याजकीय घराण्याची शक्ती कमी करेन, म्हणजे
त्यातील कोणीही वृद्धापकाळापर्यंत जगणार नाही, 32 आणि माझ्या
वस्तीत तू मोठे दुःख पाहशील. जरी इस्राएली लोकांचे भले केले जाईल
तरी तुझ्या घराण्यातील कोणीही वृद्धापकाळापर्यंत जगणार नाहीत. 33
तुमच्यापैकी ज्यांना मी माझ्या वेदीवरील सेवा करण्यापासून दूर करणार
नाही, त्यांच्यापैकी तुझी मात्र नजर मी क्षीण करेन व तुझ्या शक्तीचा
नाश करेन आणि तुझे सर्व वंशज भर तारुण्यात मरतील. 34 “‘आणि
तुझे दोन पुत्र, होफनी आणि फिनहास यांच्यावर जे येईल, ते तुला एक
चिन्ह असे असतील—ते दोघेही एकाच दिवशी मरण पावतील. 35 मी
माझ्यासाठी एक विश्वासू याजक पुढे आणेन, जो माझ्या अंतःकरणात
आणि माझ्या मनात जे आहे त्यानुसार करेल. मी त्याचे याजकीय घराणे
स्थिर स्थापित करेन आणि ते निरंतर माझ्या अभिषिक्तासमोर सेवा
करतील. 36 नंतर तुझ्या घराण्यातील राहिलेला प्रत्येकजण येईल आणि
चांदीच्या तुकड्यासाठी आणि भाकरीच्या तुकड्यासाठी त्याच्यासमोर
वाकतील आणि विनंती करतील, “मला खाण्यासाठी अन्न असावे
म्हणून माझ्यासाठी काही याजकीय पद द्या.”’”

**3** शमुवेल बाळ एलीच्या हाताखाली याहवेहची सेवा करीत होता. त्या
दिवसात याहवेहचे वचन दुर्मिळ होते; दृष्टान्तही फारसे मिळत नसत.
2 एका रात्री एलीची दृष्टी मंद झाल्यामुळे त्याला फारसे दिसत नव्हते, तो
त्याच्या नेहमीच्या जागी पडून होता. 3 परमेश्वराचा दीप अजूनही विझला
नव्हता आणि शमुवेल याहवेहच्या घरात परमेश्वराचा कोश होता त्या
ठिकाणी निजला होता. 4 तेव्हा याहवेहने शमुवेलाला हाक मारली.
शमुवेलाने उत्तर दिले, “मी येथे आहे.” 5 आणि तो धावत एलीकडे गेला
आणि म्हणाला, “मी येथे आहे; तुम्ही मला बोलाविले.” परंतु एली
म्हणाला, “मी बोलाविले नाही; परत जा आणि झोप.” तेव्हा तो गेला
आणि झोपला. 6 याहवेहने पुन्हा, “शमुवेल!” अशी हाक मारली आणि

शमुवेल उठला आणि एलीकडे गेला आणि म्हणाला, “मी येथे आहे;
तुम्ही मला बोलाविले.” एली म्हणाला, “माझ्या मुला, मी बोलाविले
नाही; परत जा आणि झोप.” 7 शमुवेलने तर अजूनही याहवेहला
ओळखले नव्हते: याहवेहचे वचन आतापर्यंत त्याला प्रकट झाले नव्हते.
8 याहवेहने तिसऱ्यांदा हाक मारली, “शमुवेल!” आणि शमुवेल उठला
आणि एलीकडे गेला आणि म्हणाला, “मी येथे आहे; तुम्ही मला
बोलाविले.” तेव्हा एलीला समजले की, याहवेह त्या बालकाला बोलावित
होते. 9 म्हणून एलीने शमुवेलास सांगितले, “जा आणि झोप आणि जर
त्यांनी पुन्हा तुला हाक मारली, तर म्हण, ‘याहवेह, बोला, कारण, तुमचा
सेवक ऐकत आहे.’” तेव्हा शमुवेल गेला आणि त्याच्या जागेवर झोपला.
10 याहवेह आले आणि तिथे उभे राहिले आणि इतर वेळेप्रमाणे हाक
मारली, “शमुवेल! शमुवेल!” तेव्हा शमुवेल म्हणाला, “बोला, तुमचा
सेवक ऐकत आहे.” 11 आणि याहवेह शमुवेलास म्हणाले: “पाहा, मी
इस्राएलमध्ये असे काहीतरी करणार आहे, जे ऐकून प्रत्येकाचे कान
भणभणतील. 12 एलीच्या घराण्याविषयी मी जे काही बोललो होतो ते;
सुरुवातीपासून शेवटपर्यंत मी करेन. 13 कारण मी त्याला सांगितले की,
जे पाप त्याला माहीत होते त्यासाठी मी सर्वकाळ त्याच्या कुटुंबाचा
न्याय करेन; त्याच्या पुत्रांनी परमेश्वराची निंदा केली आणि एली त्यांना
आवरू शकला नाही. 14 म्हणून मी एलीच्या घराण्यासाठी अशी शपथ
घेतली, ‘एलीच्या घराण्याच्या पापाचे प्रायश्चित यज्ञ किंवा अर्पणाने
कधीही होणार नाही.’” 15 सकाळ होईपर्यंत शमुवेल झोपला आणि
नंतर याहवेहच्या मंदिराची दारे उघडली. एलीला दृष्टान्त सांगण्यासाठी
त्याला भीती वाटत होती, 16 परंतु एलीने त्याला बोलाविले आणि
म्हटले, “शमुवेल, माझ्या मुला.” शमुवेलाने उत्तर दिले, “मी येथे आहे.”
17 “याहवेह तुला काय म्हणाले?” एलीने विचारले. “माझ्यापासून ते
लपवू नकोस. ज्यागोष्टी त्यांनी तुला सांगितल्या त्या जर तू माझ्यापासून
लपवून ठेवल्या तर परमेश्वर तुला फार कठीण शिक्षा देवो.” 18 तेव्हा
शमुवेलाने त्याला सर्वकाही सांगितले, त्याच्यापासून काहीही लपवून
ठेवले नाही. तेव्हा एली म्हणाला, “ते याहवेह आहेत; त्यांच्या दृष्टीने
जे बरे ते करो.” 19 शमुवेल वाढत असता याहवेह त्याच्याबरोबर होते
आणि त्यांनी शमुवेलाचे कोणतेही शब्द वाया जाऊ दिले नाही. 20 आणि
दानपासून बेअर-शेबापर्यंत सर्व इस्राएली लोकांनी ओळखले की शमुवेल
याहवेहचा संदेष्टा होण्यास प्रमाणित केलेला आहे. 21 याहवेहचे शिलोह
येथे दर्शन होत राहिले आणि तिथे त्यांच्या वचनाद्वारे त्यांनी स्वतःला
शमुवेलास प्रकट केले.

**4** आणि शमुवेलाचा शब्द सर्व इस्राएलात पोहोचला. यावेळेस इस्राएली
लोक पलिष्ट्यांशी युद्ध करण्यासाठी निघाले. इस्राएली लोकांनी
एबेन-एजर येथे व पलिष्ट्यांनी अफेक येथे तळ दिला. 2 पलिष्ट्यांनी
इस्राएलशी युद्ध करण्यासाठी त्यांचे सैन्य तैनात केले आणि जसे युद्ध
वाढत गेले तसा पलिष्ट्यांद्वारे इस्राएलचा पराभव झाला, त्यांच्यापैकी
सुमारे चार हजार लोकांना युद्धभूमीवर मारले गेले. 3 जेव्हा सैनिक
छावणीकडे परत आले तेव्हा इस्राएलच्या वडीलजनांनी विचारले,
“याहवेहने आज पलिष्ट्यांसमोर आमचा पराभव का होऊ दिला?
आपण शिलोह येथून याहवेहच्या कराराचा कोश घेऊन येऊ, यासाठी
की ते आपल्याबरोबर जाऊन आपल्या शत्रूच्या हातातून आपल्याला
वाचवतील.” 4 म्हणून लोकांनी शिलोह येथे माणसे पाठविली आणि
त्यांनी सर्वसमर्थ याहवेह, जे करुबांच्या मध्ये आरूढ आहेत, त्यांच्या
कराराचा कोश परत आणला. आणि एलीचे दोन पुत्र होफनी आणि
फिनहास हे परमेश्वराच्या कराराच्या कोशाबरोबर होते. 5 जेव्हा
याहवेहच्या कराराचा कोश छावणीमध्ये आला, तेव्हा सर्व इस्राएली
लोकांनी इतका मोठा जयघोष केला की, जमीन हादरली. 6 तो मोठा
जयघोष ऐकून पलिष्ट्यांनी विचारले “इब्री लोकांच्या छावणीमध्ये हा
कसला जयघोष होत आहे?” जेव्हा त्यांना कळले की, याहवेहचा कोश
छावणीमध्ये आला आहे, 7 तेव्हा पलिष्टी लोक घाबरून गेले. “देव
छावणीत आले आहेत,” ते म्हणाले, “अरेरे! असे अद्याप कधीच घडले
नव्हते. 8 आम्हास हाय हाय! या शक्तिमान देवाच्या हातून आम्हास
कोण सोडवेल? ते तेच देव आहेत ज्यांनी रानात इजिप्तच्या लोकांवर
प्रत्येक प्रकारच्या पीडा आणून त्यांचा नाश केला. 9 पलिष्टी लोकांनो,
शक्तिशाली व्हा! खंबीर पुरुषांसारखे व्हा, नाहीतर जसे ते तुमचे गुलाम
होत आले तसे तुम्ही इब्री लोकांचे गुलाम व्हाल. खंबीर व्हा आणि युद्ध
करा!” 10 तेव्हा पलिष्टी लढले आणि इस्राएली लोकांचा पराभव झाला
आणि प्रत्येक पुरुष आपआपल्या छावणीकडे पळून गेला. आघात खूप
मोठा होता; इस्राएलने तीस हजार पायदळ गमावले. 11 परमेश्वराचा
कोश हस्तगत करण्यात आला आणि एलीचे दोन्ही पुत्र होफनी आणि
फिनहास मारले गेले. 12 त्याच दिवशी बिन्यामीन वंशातील एक मनुष्य,
फाटलेले कपडे आणि डोक्यावर धूळ घातलेला असा युद्धभूमीतून
निघून पळत शिलोह येथे गेला. 13 जेव्हा तो तिथे पोहोचला, तेव्हा
एली रस्त्याच्या कडेला त्याच्या आसनावर बसून पाहत होता, कारण
परमेश्वराच्या कोशासाठी त्याचे हृदय कापत होते. जेव्हा तो मनुष्य
नगरात आला आणि जे घडले ते सांगितले तेव्हा संपूर्ण नगरात मोठ्याने
आकांत सुरू झाला. 14 एलीने हे रडणे ऐकून विचारले, “हा मोठ्याने
रडण्याचा आवाज कशाचा आहे?” तो मनुष्य घाईने एलीकडे गेला, 15
एली अठ्याण्णव वर्षाचा होता आणि त्याची दृष्टी मंद असल्याने त्याला
दिसत नव्हते. 16 त्याने एलीला सांगितले, “मी आताच युद्धभूमीवरून
आलो आहे; मी आजच तिथून पळून आलो आहे.” एलीने विचारले,
“माझ्या मुला, काय घडले आहे?” 17 ज्या मनुष्याने बातमी आणली
होती त्याने उत्तर दिले, “इस्राएलने पलिष्ट्यांपुढून पळ काढला आणि
सैन्याचा मोठा वध झाला. तुझे दोघे पुत्र होफनी आणि फिनहास सुद्धा
मारले गेले आहेत आणि परमेश्वराचा कोश हस्तगत करण्यात आला
आहे.” 18 जेव्हा त्याने परमेश्वराच्या कोशाचा उल्लेख केला, एली
वेशीजवळच्या आसनावरून मागे खाली पडला. त्याची मान मोडली
आणि तो मरण पावला, कारण तो वृद्ध आणि जड अंगाचा मनुष्य होता.
त्याने चाळीस वर्षे इस्राएली लोकांचे पुढारीत्व केले होते. 19 त्याची
सून फिनहासाची पत्नी, तेव्हा गरोदर असून तिचा प्रसूतिकाळ जवळ

आला होता. जेव्हा तिने ऐकले की, परमेश्वराचा कोश हस्तगत केला
गेला आहे आणि तिचा सासरा आणि तिचा पती मरण पावले आहेत,
तेव्हा तिला प्रसूती वेदना सुरू झाल्या व ती प्रसूत झाली, परंतु तिच्या
प्रसूती वेदनांनी तिच्यावर मात केली. 20 तिच्या मरणाच्या वेळी, तिच्या
सभोवताली ज्या स्त्रिया होत्या, त्या म्हणाल्या, “भिऊ नकोस; तू एका
मुलाला जन्म दिलेला आहेस.” परंतु तिने काही उत्तर दिले नाही किंवा
लक्षही दिले नाही. 21 त्या मुलाचे नाव ईखाबोद असे ठेवत ती म्हणाली,
“इस्राएलचे वैभव निघून गेले आहे,” कारण परमेश्वराचा कोश हस्तगत
करण्यात आला आहे आणि तिच्या सासऱ्याचा आणि तिच्या पतीचा
मृत्यू झाला आहे. 22 ती म्हणाली, “इस्राएलमधून वैभव निघून गेले
आहे, परमेश्वराचा कोश हस्तगत करण्यात आला आहे.”

**5** परमेश्वराचा कोश पलिष्टी सैन्याने हस्तगत केल्यानंतर त्यांनी तो
एबेन-एजर येथून अश्दोदकडे नेला. 2 नंतर पलिष्ट्यांनी परमेश्वराचा
कोश दागोनच्या मंदिरात नेला आणि दागोनच्या मूर्तीच्या बाजूला ठेवला.
3 जेव्हा अश्दोदचे लोक दुसऱ्या दिवशी पहाटे उठले, तेव्हा याहवेहच्या
कोशासमोर दागोन जमिनीवर पालथा पडलेला होता! त्यांनी दागोनला
उचलले आणि पुन्हा त्याच्या जागेवर ठेवले. 4 परंतु दुसऱ्या दिवशी पहाटे
जेव्हा ते उठले तेव्हा याहवेहच्या कोशासमोर दागोन जमिनीवर पालथा
पडलेला होता! त्याचे डोके आणि हात तुटून ते दाराच्या उंबरठ्यावर
पडलेले होते; फक्त त्याचे शरीर तसेच होते. 5 त्यामुळेच आजपर्यंत
दागोनचे पुजारी किंवा जे अश्दोद येथे दागोनच्या मंदिरात जातात ते
उंबरठ्यावर पाय ठेवीत नाहीत. 6 याहवेहचा हात अश्दोद व त्याच्या
जवळच्या भागातील लोकांवर भारी होता; याहवेहने त्यांच्यावर विध्वंस
आणला आणि त्यांना पीडेच्या गाठींनी पीडले. 7 जे घडत होते ते
अश्दोदच्या लोकांनी पाहिले, तेव्हा ते म्हणाले, “इस्राएलच्या परमेश्वराचा
कोश येथे आमच्यामध्ये असू नये, कारण त्यांचा हात आमच्यावर
आणि आमचा देव दागोन याच्यावर भारी आहे.” 8 तेव्हा त्यांनी
पलिष्ट्यांच्या सर्व अधिकाऱ्यांना एकत्र बोलाविले आणि त्यांना विचारले,
“इस्राएलच्या परमेश्वराच्या कोशाचे आम्ही काय करावे?” त्यांनी उत्तर
दिले, “इस्राएलच्या परमेश्वराचा कोश गथकडे घेऊन जा.” तेव्हा त्यांनी
इस्राएलच्या परमेश्वराचा कोश तिथून हालविला. 9 परंतु त्यांनी कोश
हालविल्यानंतर, याहवेहचा हात त्या शहराच्या विरुद्ध उठला आणि ते
फार घाबरून गेले. परमेश्वराने त्या शहरातील लहान मोठ्यांना पीडेच्या
गाठींनी पीडले. 10 म्हणून त्यांनी परमेश्वराचा कोश एक्रोन येथे पाठविला.
परमेश्वराचा कोश एक्रोनमध्ये प्रवेश करताच एक्रोनचे लोक मोठ्याने
ओरडून म्हणाले, “आम्हाला आणि आमच्या लोकांनी मारावे म्हणून
त्यांनी इस्राएलच्या परमेश्वराचा कोश आमच्याकडे आणला आहे.” 11
तेव्हा त्यांनी पलिष्ट्यांच्या सर्व अधिकाऱ्यांना एकत्र बोलाविले आणि
म्हटले, “इस्राएलच्या परमेश्वराचा कोश दूर पाठवून द्या; त्याच्या मूळ
ठिकाणी त्याला जाऊ द्या, नाहीतर तो आम्हाला आणि आमच्या लोकांना
जिवे मारेल.” कारण शहरात मृत्यूमुळे भय पसरले होते; परमेश्वराचा
हात त्यावर फार भारी होता. 12 जे मरण पावले नाही ते पीडेच्या गाठींनी
पीडित झाले होते व त्या शहराचा आक्रोश स्वर्गापर्यंत जाऊन पोहोचला.

**6** याहवेहचा कोश सात महिने पलिष्टी देशात होता, 2 तेव्हा पलिष्ट्यांनी
याजकांस आणि दैवप्रश्न पाहणाऱ्यांस बोलाविले आणि विचारले,
“आम्ही याहवेहच्या कोशाचे काय करावे? त्याच्या मूळ ठिकाणी आम्ही
तो कसा पाठवावा.” 3 ते म्हणाले, “जर तुम्ही इस्राएलच्या परमेश्वराचा
कोश परत पाठवित आहात, तर तो त्यांच्याकडे भेटीशिवाय पाठवू
नये! दोषार्पण तर अवश्य पाठवा. म्हणजे तुम्ही बरे व्हाल आणि
त्यांचा हात तुमच्यापासून का दूर होत नाही हे तुम्हाला समजेल.” 4
पलिष्ट्यांनी विचारले, “जे दोषार्पण आम्ही त्यांच्याकडे पाठवावे ते
काय असावे?” त्यांनी उत्तर दिले, “पलिष्टी अधिकाऱ्यांच्या संख्येप्रमाणे
पीडेच्या गाठींच्या पाच व उंदरांच्या पाच सोन्याच्या प्रतिमा; कारण
तुम्हाला व तुमच्या अधिकाऱ्यांना त्याच पीडांनी पीडले आहे. 5 ज्यामुळे
देशाचा नाश होत आहे त्या पीडेच्या गाठींच्या आणि उंदरांच्या प्रतिमा
तयार करा आणि इस्राएलच्या देवाला गौरव द्या. कदाचित तुमच्यावरून
आणि तुमच्या दैवतावरून आणि तुमच्या देशावरून ते त्यांचा हात काढून
घेतील. 6 फारोह व इजिप्तच्या लोकांनी केली तशी तुम्ही तुमची हृदये
कठीण का करता? इस्राएलच्या याहवेहने त्यांना कठोरपणाने वागविले
होते, म्हणून इस्राएली लोकांना त्यांनी जाऊ दिले नव्हते का? 7 “तर
आता एक नवीन गाडी तयार करा व दोन दुभत्या गाई ज्यांच्या मानेवर
कधीही जू ठेवलेले नाही घेऊन त्यांना त्यास जुंपा, परंतु त्यांची वासरे
त्यांच्यापासून काढून त्यांना गोठ्यात ठेवा. 8 याहवेहचा कोश घ्या
आणि तो त्या गाडीवर ठेवा आणि दोषार्पण म्हणून ज्या सोन्याच्या वस्तू
तुम्ही पाठवित आहात त्या एका पेटीत ठेवून त्या कोशाजवळ ठेवा व
त्या गाडीला पाठवून द्या, 9 परंतु त्याच्यावर लक्ष ठेवा. जर ते आपली
सीमा बेथ-शेमेशपर्यंत गेले तर याहवेहने हे मोठे संकट आपल्यावर
आणले आहे. परंतु जर ते तसे गेले नाहीत, तर याहवेहच्या हाताने
आम्हाला मारले नाही परंतु ते योगायोगाने घडून आले आहे.” 10 तेव्हा
त्यांनी हे केले. त्यांनी तशा दोन दुभत्या गाई घेतल्या आणि त्यांना
गाडीला जुंपले आणि त्यांच्या वासरांना गोठ्यामध्ये ठेवले. 11 त्यांनी
याहवेहचा कोश गाडीवर ठेवला आणि त्याबरोबरच्या पेटीत सोन्याचे
उंदीर आणि पीडेच्या गाठींच्या सोन्याच्या प्रतिमा ठेवल्या. 12 तेव्हा
त्या गाई सरळ बेथ-शेमेशच्या रस्त्याने निघाल्या आणि जाताना संपूर्ण
रस्त्यावर त्या हंबरत गेल्या; त्या उजवीकडे किंवा डावीकडे वळल्या
नाहीत. पलिष्टी लोकांचे पुढारी त्यांच्यामागे बेथ-शेमेशच्या सीमेपर्यंत
गेले. 13 यावेळेस बेथ-शेमेशचे लोक खोऱ्यात त्यांच्या गव्हाची कापणी
करीत होते आणि जेव्हा त्यांनी आपली नजर वर केली आणि कोश
पाहिला, तेव्हा तो पाहताच त्यांना आनंद झाला. 14 ती गाडी बेथ-
शेमेश येथील यहोशुआच्या शेतात आली आणि तिथे ती एका मोठ्या
खडकाजवळ जाऊन थांबली. लोकांनी त्या गाडीच्या लाकडाचे तुकडे
केले आणि याहवेहसाठी होमार्पण म्हणून त्या गाईंचा यज्ञ केला. 15
लेवी लोकांनी याहवेहचा कोश व त्याबरोबरच्या त्या सोन्याच्या वस्तू

ठेवलेली पेटी खाली उतरवून घेतल्या व त्यांनी त्या मोठ्या खडकावर ठेवल्या. त्या दिवशी बेथ-शेमेशच्या लोकांनी याहवेहसाठी होमार्पणे आणि यज्ञ केले. 16 पलिष्टी लोकांच्या त्या पाच पुढाऱ्यांनी हे सर्व पाहिले आणि त्याच दिवशी ते एक्रोनकडे परतले. 17 पलिष्ट्यांनी याहवेहला दोषार्पण म्हणून ज्या गाठीच्या सोन्याच्या प्रतिमा पाठविल्या त्या या: अश्दोद, गाझा, अष्कलोन, गथ आणि एक्रोन यांच्याकरिता प्रत्येकी एक अशा होत्या. 18 आणि सोन्याच्या उंदरांच्या प्रतिमांची संख्या त्या पाच पुढाऱ्यांच्या मालकीचे असलेले पलिष्टी नगरे; तटबंदीची नगरे व त्यांच्या गावांच्या संख्येनुसार होती. बेथ-शेमेशमधील यहोशुआच्या शेतात ज्या मोठ्या खडकावर लेवी लोकांनी याहवेहचा कोश ठेवला तो आजपर्यंत साक्ष म्हणून आहे. 19 परंतु परमेश्वराने बेथ-शेमेशमधील काही रहिवाशांवर प्रहार केला व सत्तर लोकांना मारून टाकले, कारण त्यांनी याहवेहच्या कोशात डोकावून पाहिले. आणि याहवेहने त्यांना मोठ्या दंडाने मारले म्हणून लोकांनी शोक केला. 20 आणि बेथ-शेमेश येथील लोकांनी विचारले, “याहवेहच्या उपस्थितीत, या पवित्र परमेश्वरासमोर कोणी उभे राहावे? येथून हा कोश पुढे कोणाकडे जाईल?” 21 तेव्हा त्यांनी किर्याथ-यआरीमच्या लोकांकडे हा संदेश देत दूत पाठविले, “पलिष्ट्यांनी याहवेहचा कोश परत केला आहे. इकडे या आणि तो तुमच्या नगराकडे घेऊन जा.”

**7** म्हणून किर्याथ-यआरीमचे लोक आले आणि त्यांनी याहवेहचा कोश घेऊन टेकडीवर अबीनादाबाच्या घरी नेऊन ठेवला व कोशाचे राखण करण्यासाठी अबीनादाबाचा पुत्र एलअज़ार याला पवित्र केले. 2 कोश किर्याथ-यआरीम येथे पुष्कळ काळ—म्हणजेच वीस वर्षे राहिला. तेव्हा सर्व इस्राएली लोक याहवेहकडे परत फिरले. 3 आणि शमुवेल सर्व इस्राएली लोकांना म्हणाला, “जर तुम्ही तुमच्या संपूर्ण हृदयाने याहवेहकडे परत वळत आहात, तर तुम्ही अन्य दैवते व अष्टारोथचा त्याग करा; आणि याहवेहकडे चित्त लावून केवळ त्यांचीच सेवा करा; म्हणजे याहवेह तुम्हाला पलिष्ट्यांच्या हातातून सोडवतील.” 4 त्याप्रमाणे इस्राएली लोकांनी त्यांच्या अष्टारोथ व बआलांच्या मूर्ती टाकून दिल्या आणि केवळ याहवेहची सेवा केली. 5 तेव्हा शमुवेल म्हणाला, “सर्व इस्राएली लोकांना मिस्पाह येथे जमा करा, म्हणजे मी याहवेहकडे तुमच्यासाठी मध्यस्थी करेन.” 6 जेव्हा ते मिस्पाह येथे एकत्र जमले, तेव्हा त्यांनी पाणी काढले व ते याहवेहसमोर ओतले. त्या दिवशी त्यांनी उपास करून कबुली दिली, “आम्ही याहवेहविरुद्ध पाप केले आहे.” त्यावेळी शमुवेल मिस्पाहमध्ये इस्राएलचा पुढारी म्हणून सेवा करीत होता. 7 इस्राएली लोक मिस्पाह येथे जमले आहेत, हे जेव्हा पलिष्ट्यांनी ऐकले, तेव्हा पलिष्टी लोकांचे पुढारी त्यांच्यावर हल्ला करण्यासाठी आले. हे जेव्हा इस्राएली लोकांनी ऐकले, तेव्हा ते पलिष्ट्यांना घाबरले. 8 इस्राएली लोक शमुवेलाला म्हणाले, “याहवेह आमच्या परमेश्वरांनी आम्हाला पलिष्ट्यांच्या हातातून वाचवावे म्हणून आमच्यासाठी मध्यस्थी करावयाचे थांबवू नको.” 9 मग शमुवेलाने एक दूधपिते कोकरू घेतले व त्याचा याहवेहला संपूर्ण होमार्पण म्हणून यज्ञ करून, इस्राएलच्या वतीने याहवेहकडे विनंती केली आणि याहवेहने ती ऐकली. 10 शमुवेल होमार्पण करत असताना, पलिष्टी लोक इस्राएली लोकांशी युद्ध करावयाला जवळ आले. तेव्हा याहवेहने प्रचंड गडगडाटाने गर्जना करून पलिष्ट्यांना असे भयभीत केले की, इस्राएली लोकांपुढे त्यांचा बीमोड झाला. 11 तेव्हा इस्राएली लोक मिस्पाहातून पलिष्ट्यांचा पाठलाग करीत बाहेर आले आणि बेथ-कार पर्यंत त्यांना जिवे मारीत गेले. 12 नंतर शमुवेलाने एक दगड घेतला आणि तो मिस्पाह आणि शेन यांच्यामध्ये उभारला. “येथपर्यंत याहवेहने आमचे साहाय्य केले आहे” असे म्हणत त्याने त्याला एबेन-एजर असे नाव दिले. 13 अशाप्रकारे पलिष्टी लोक पराभूत झाले आणि त्यांनी इस्राएलच्या सीमेवर पुन्हा हल्ला केला नाही आणि शमुवेलच्या सर्व जीवनकाळात याहवेहचा हात पलिष्ट्यांविरुद्ध होता. 14 एक्रोनपासून गथपर्यंत पलिष्ट्यांनी जी नगरे इस्राएलपासून ताब्यात घेतली होती ती इस्राएली लोकांस परत मिळाली आणि इस्राएली लोकांनी आसपासच्या प्रदेश सोडवून घेतला. व इस्राएली व अमोरी लोकात शांतता होती. 15 शमुवेल आपल्या आयुष्याच्या सर्व दिवसांत इस्राएलचा शास्ता होऊन न्याय करीत होता. 16 प्रतिवर्षी तो बेथेल, गिलगाल, मिस्पाह येथे अनुक्रमाने इस्राएलचा न्याय करीत फिरत असे. 17 पण तो रामाह येथे, जिथे तो राहत होता तिथे परत जात असे आणि तिथेही तो इस्राएलचा न्याय करीत असे. आणि त्याने तिथे याहवेहसाठी एक वेदी बांधली होती.

**8** जेव्हा शमुवेल उतार वयाचा झाला, तेव्हा त्याने त्याच्या मुलांना इस्राएलचे पुढारी म्हणून नेमले. 2 त्याच्या प्रथमपुत्राचे नाव योएल आणि दुसऱ्याचे नाव अबीयाह असे होते आणि त्यांनी बेअर-शेबा येथे सेवा केली. 3 परंतु त्याच्या पुत्रांनी त्याचे अनुकरण केले नाही. ते अप्रामाणिकपणे लाभ मिळविण्याच्या मागे लागले आणि लाच स्वीकारून विपरीत न्याय करत. 4 म्हणून इस्राएलचे सर्व पुढारी एकत्र झाले आणि रामाह येथे शमुवेलकडे आले. 5 ते शमुवेलला म्हणाले, “तुम्ही वृद्ध झाला आहात आणि तुमचे पुत्र तुमच्या मार्गाने चालत नाहीत; तर आता जसे इतर राष्ट्रांना आहे त्याप्रमाणे आमचेही नेतृत्व करण्यासाठी एक राजा नेमून द्यावा.” 6 परंतु जेव्हा ते म्हणाले, “आमचे नेतृत्व करण्यासाठी आम्हाला एक राजा नेमून द्या,” त्यामुळे शमुवेल दुःखी झाला; आणि त्याने याहवेहकडे प्रार्थना केली. 7 तेव्हा याहवेहने शमुवेलला सांगितले: “लोक तुला जे सांगत आहेत ते सगळे ऐक; त्यांनी तुझा नकार नाही तर त्यांचा राजा म्हणून त्यांनी माझा नकार केला आहे. 8 मी त्यांना इजिप्त देशातून बाहेर आणले त्या दिवसापासून आजपर्यंत त्यांनी असेच केले आहे, त्यांनी माझा त्याग करून इतर दैवतांची सेवा केली, तसेच ते तुझ्याशीही करीत आहेत. 9 आता त्यांचे ऐकून घे; परंतु त्यांना गंभीरपणे चेतावणी दे, जो राजा त्यांच्यावर राज्य करेल तो त्यांच्याकडून त्याला हवे ते हक्काने मागेल हे त्यांना माहीत होऊ दे.” 10 शमुवेलाने याहवेहचे सर्व शब्द त्या लोकांना सांगितले जे त्यांच्याकडे राजा मागत होते. 11 शमुवेल म्हणाला, “जो राजा तुमच्यावर राज्य करेल तो या गोष्टी तुमच्याकडून हक्काने मागेल: तो

तुमचे पुत्र घेईल आणि त्यांना त्याचे रथ आणि घोडे यांच्याबरोबर सेवा
करावयास लावील आणि ते त्याच्या रथांच्या पुढे धावतील. 12 त्यातील
काहींना हजारांवर तर काहींना पन्नासांवर तो सरदार म्हणून नेमील,
आणि इतरांना जमीन नांगरण्याचे आणि पिकांची कापणी करण्यास व
काहींना युद्धाची शस्त्रे आणि त्याच्या रथांसाठी हत्यारे तयार करण्यास
लावील. 13 तो तुमच्या कन्यांना अत्तरे तयार करणाऱ्या, स्वयंपाकिणी
व भटारणी असे करेल. 14 तो तुमची उत्तम शेती, द्राक्षमळे व जैतुनाचे
मळे घेईल आणि त्याच्या सेवकांस देईल. 15 तो तुमच्या धान्यातील
व द्राक्षमळे यांचा दहावा हिस्सा घेऊन त्याच्या अधिकाऱ्यांना आणि
सेवकांना देईल. 16 तुमचे दास व दासी आणि तुमचे उत्तम पशू व गाढवे
तो स्वतःच्या उपयोगासाठी घेईल. 17 तो तुमच्या कळपांचा दहावा
हिस्सा घेईल आणि तुम्ही त्याचे गुलाम व्हाल. 18 जेव्हा तो दिवस येईल,
तेव्हा तुम्ही निवडून घेतलेल्या राजापासून सुटका मिळावी म्हणून तुम्ही
रडाल, परंतु याहवेह त्या दिवशी तुमचे ऐकणार नाही.” 19 परंतु लोकांनी
शमुवेलाचे ऐकण्यास नकार दिला. “नाही!” ते म्हणाले, “आम्हाला
आमच्यावर राजा पाहिजेच. 20 म्हणजे आम्ही इतर सर्व राष्ट्रांसारखे होऊ,
आमचा राजा आमचे नेतृत्व करेल आणि आमच्यासाठी युद्ध करण्यास
आमच्यापुढे जाईल.” 21 लोक जे म्हणाले ते सर्व शमुवेलाने ऐकले व
तेच त्याने याहवेहला सांगितले. 22 याहवेहने उत्तर दिले, “त्यांचे ऐकून
घे आणि त्यांना एक राजा नेमून दे.” नंतर शमुवेल इस्राएल लोकांना
म्हणाले, “तुम्ही प्रत्येकजण आपआपल्या नगराकडे परत जा.”

**9** बिन्यामीन वंशातील एक मनुष्य होता, त्याचे नाव कीश होते, तो
अबीएलचा पुत्र होता, तो सरोराचा पुत्र, तो बेकोराथचा पुत्र, तो
अफियाचा पुत्र होता. तो बिन्यामीन घराण्यातील असून सन्माननीय
मनुष्य होता. 2 कीशला शौल नावाचा एक पुत्र होता, त्याच्यासारखा
देखणा तरुण पुरुष इस्राएलमध्ये कोणीही नव्हता आणि तो सर्वांपेक्षा
उंच होता. 3 शौलाचा पिता कीशची गाढवे हरवली होती आणि कीश
त्याचा पुत्र शौलास म्हणाला, “सेवकांपैकी एकाला तुझ्याबरोबर घेऊन
जा आणि गाढवांचा शोध कर.” 4 तेव्हा तो एफ्राईमच्या संपूर्ण डोंगराळ
प्रदेशात आणि शलीशाह भागाच्या सभोवती फिरला, परंतु त्यांना ते
सापडले नाहीत. ते तसेच पुढे शालीम प्रांतात गेले, परंतु गाढवे तिथेही
नव्हती. नंतर तो बिन्यामीनच्या हद्दीतून फिरला परंतु त्यांना ते सापडले
नाहीत. 5 जेव्हा ते सूफ प्रांतात पोहोचले, तेव्हा शौल त्याच्याबरोबर
असलेल्या सेवकाला म्हणाला, “चल, आपण परत जाऊ या, नाहीतर
माझा पिता गाढवांचा विचार करण्याचे सोडून आपलीच काळजी करू
लागेल.” 6 परंतु सेवक म्हणाला, “पाहा, या शहरात परमेश्वराचा एक
मनुष्य आहे; तो फार सन्माननीय आहे आणि जे काही तो सांगतो ते
खरे होते. तर चल, आपण तिकडे जाऊ. कदाचित आपण कोणत्या
मार्गाने जावे ते तो आपल्याला सांगेल.” 7 शौल त्याच्या सेवकाला
म्हणाला, “जर आपण जात आहोत, तर आपण त्याला काय द्यावे?
आपल्या पिशवीतील खाद्य तर संपले आहे. परमेश्वराच्या मनुष्याला
देण्यासाठी आपल्याकडे काही बक्षीस नाही. आपल्याकडे काय आहे?”
8 तो सेवक पुन्हा शौलाला म्हणाला, “पाहा, माझ्याजवळ पाव शेकेल
चांदी आहे. मी ते परमेश्वराच्या मनुष्याला देईन म्हणजे आपण कोणत्या
मार्गाने जावे हे तो आपल्याला सांगेल.” 9 त्याकाळी इस्राएलमध्ये जर
कोणी परमेश्वराविषयी चौकशी करण्यास गेला तर ते म्हणत असत,
“चला, आपण पाहणाऱ्याकडे जाऊ,” कारण आज ज्याला संदेष्टा
म्हणतात त्याला पाहणारा असे संबोधले जाई. 10 “ठीक आहे,” शौल
त्याच्या सेवकाला म्हणाला, “चल, जाऊ या.” असे म्हणत ज्या नगरात
परमेश्वराचा मनुष्य राहत होता त्याकडे ते निघाले. 11 जसे ते डोंगर
चढून त्या गावाकडे जात होते, त्यांना काही तरुणी भेटल्या ज्या पाणी
काढण्यासाठी बाहेर पडल्या होत्या आणि त्यांनी त्यांना विचारले, “येथे
कोणी संदेष्टा आहे काय?” 12 “होय तो आहे,” त्यांनी उत्तर दिले. “तो
तुमच्यापुढेच जात आहे. आता घाई करा; तो आजच आमच्या गावात
आला आहे, कारण लोक उच्च स्थानावर यज्ञ करणार आहेत. 13 तुम्ही
शहरामध्ये प्रवेश करताच उंच टेकड्यावर भोजन करण्यास जाण्याआधी
तो तुम्हाला सापडेल. तो येईपर्यंत लोक भोजन करीत नाहीत, कारण
त्याने यज्ञाला आशीर्वाद दिल्यानंतरच, ज्यांना आमंत्रित केले आहे ते
भोजन करतील. आता वर जा; आताच तो तुम्हाला सापडेल.” 14
ते वर नगरापर्यंत गेले आणि जसे ते त्यात प्रवेश करीत होते, तिथे
शमुवेल होता, तो उंच टेकड्यावर जात असताना ते शौलाच्या दिशेने
येत होते. 15 शौल येण्याच्या एक दिवस आधी याहवेहने शमुवेलला हे
प्रकट केले होते: 16 “याच वेळेस उद्या मी तुझ्याकडे बिन्यामीनच्या
प्रदेशातील एक मनुष्य पाठवेन. माझ्या इस्राएली लोकांवर शासनकर्ता
म्हणून त्याचा अभिषेक कर; तो माझ्या लोकांना पलिष्ट्यांच्या हातून
सोडवेल. मी माझ्या लोकांकडे पाहिले आहे, कारण त्यांचा आकांत
माझ्यापर्यंत पोहोचला आहे.” 17 जेव्हा शौल शमुवेलाच्या दृष्टीस पडला,
याहवेह त्याला म्हणाले, “हाच मनुष्य आहे, ज्याच्या विषयी मी तुला
सांगितले होते; तो माझ्या लोकांवर शासन करेल.” 18 शौलाने नगराच्या
प्रवेशद्वारातच शमुवेलकडे जाऊन विचारले, “संदेष्ट्याचे घर कुठे आहे
हे मला कृपा करून सांगाल काय?” 19 “मीच पाहाणारा आहे,”
शमुवेलने शौलास उत्तर दिले. “माझ्यापुढे वर उंचस्थानी जा, कारण
आज तुला माझ्याबरोबर भोजन करावयाचे आहे आणि सकाळी मी
तुला तुझ्या मार्गाने पाठवून देईन आणि जे तुझ्या अंतःकरणात आहे ते
मी तुला सांगेन. 20 आणि तुझी जी गाढवे तीन दिवसांपूर्वी हरवली
होती, त्यांची काळजी करू नकोस; ती सापडली आहेत. इस्राएलची सर्व
इच्छा कोणाकडे वळली आहे, तुझ्याकडे व तुझ्या संपूर्ण कुटुंबाकडे
ती वळली नाही काय?” 21 शौलाने उत्तर दिले, “परंतु मी बिन्यामीन
गोत्र जे इस्राएलचे सर्वात लहान, त्यातील नाही काय आणि माझे
कूळ बिन्यामीनच्या गोत्रातील सर्वात लहान कूळ नाही काय? तर मग
तुम्ही मला असे का बोलत आहात?” 22 नंतर शमुवेलने शौल आणि
त्याच्या सेवकास भोजनगृहात आणले आणि जिथे आमंत्रित केलेले
सुमारे तीस लोक होते तिथे प्रमुखस्थानी त्यांना बसविले. 23 शमुवेल
आचाऱ्याला म्हणाला, “मांसाचा जो तुकडा तुला देऊन मी बाजूला

ठेवायला सांगितला होता, तो घेऊन ये.” 24 तेव्हा आचाऱ्याने मांडीचा
भाग आणि त्याच्याबरोबर जे होते ते उचलून शौलासमोर मांडले. शमुवेल
म्हणाला, “हे तुझ्यासाठी राखून ठेवलेले आहे. हे खा, कारण मी जेव्हा
म्हणालो, ‘मी पाहुण्यांना आमंत्रित केले आहे,’ तेव्हापासून हे तुझ्यासाठी
या प्रसंगासाठी बाजूला राखून ठेवण्यात आले होते.” त्या दिवशी शौलाने
शमुवेलबरोबर भोजन केले. 25 उच्च स्थानावरून खाली नगराकडे
आल्यानंतर, शमुवेल त्याच्या घराच्या धाब्यावर शौलाबरोबर बोलला. 26
पहाटेच ते उठले आणि शमुवेलने शौलाला धाब्यावर बोलाविले, “तयार
हो, म्हणजे मी तुला तुझ्या मार्गाने पाठवेन.” जेव्हा शौल तयार झाला, तो
आणि शमुवेल एकत्र बाहेर पडले. 27 नगराच्या कडेने चालत असताना,
शमुवेल शौलास म्हणाला, “सेवकाला सांग, की त्याने आपल्यापुढे
चालावे.” आणि सेवकाने त्याप्रमाणे केले; “परंतु तू थोडा वेळ येथेच
राहा म्हणजे मी परमेश्वराचा संदेश तुला देईन.”

**10** नंतर शमुवेलने जैतून तेलाची एक कुपी घेतली आणि शौलाच्या
डोक्यावर ओतली, त्याचे चुंबन घेत म्हणाला, “याहवेहने तुला
त्यांच्या वतनावर अधिकारी म्हणून अभिषेक केला नाही काय? 2 आज
तू माझ्याकडून गेल्यावर, बिन्यामीन प्रदेशाच्या सीमेवर सेल्सेह येथे
राहेलच्या कबरेजवळ तुला दोन माणसे भेटतील. ते तुला सांगतील,
‘ज्या गाढवांच्या शोधात तू बाहेर पडला होता ती सापडली आहेत आणि
आता तुझ्या वडिलांनी त्यांच्याबद्दलचा विचार करण्याचे थांबविले आहे
आणि तुझ्याबद्दल काळजी करीत आहेत. ते म्हणत आहेत मी, “माझ्या
मुलाविषयी काय करावे?”’ 3 “नंतर तिथून पुढे जात तू ताबोराच्या
मोठ्या एलावृक्षाजवळ पोहोचशील. तिथे तुला बेथेलकडे परमेश्वराची
आराधना करण्यासाठी निघालेली तीन माणसे भेटतील. एकजण तीन
लहान करडे, दुसरा तीन भाकरी आणि तिसरा द्राक्षारसाची एक बुधली
घेऊन जात असेल. 4 ते तुला अभिवादन करतील आणि तुला दोन
भाकरी देतील, त्या तू त्यांच्याकडून स्वीकारशील. 5 “त्यानंतर तू
परमेश्वराच्या गिबियाकडे, जिथे पलिष्ट्यांची चौकी आहे तिथे जाशील.
त्या नगरात जाताच, संदेष्ट्यांची एक मिरवणूक सतार, डफ, सनई
आणि वीणा ही वाद्ये वाजवित उच्च स्थानावरून खाली उतरत असताना
आणि भविष्यवाणी करत असताना तुला आढळतील. 6 याहवेहचा
आत्मा सामर्थ्याने तुझ्यावर येईल आणि तू त्यांच्याबरोबर भविष्यवाणी
करशील; आणि तुझ्यात बदल होऊन तू निराळा व्यक्ती होशील. 7 ही
चिन्हे पूर्ण होतील तेव्हा जे काही तुझ्या हाती येईल ते तू कर, कारण
परमेश्वर तुझ्याबरोबर आहे. 8 “माझ्यापुढे तू गिलगाल येथे जा. होमार्पणे
आणि शांत्यर्पणे करण्यासाठी मी खचित खाली तुझ्याकडे येईल, परंतु
मी तुझ्याकडे येऊन तू काय करावे ते मी तुला सांगेपर्यंत सात दिवस तू
माझी वाट पाहा.” 9 शमुवेलपासून निघून जाण्यासाठी शौल वळताच,
परमेश्वराने शौलाचे हृदय बदलले आणि त्याच दिवशी ही सर्व चिन्हे
पूर्ण झाली. 10 जेव्हा शौल आणि त्याचा सेवक गिबियाहकडे आले
तेव्हा संदेष्ट्यांची मिरवणूक त्याला भेटली; तेव्हा परमेश्वराचा आत्मा
सामर्थ्याने त्याच्यावर उतरला आणि तो त्यांच्याबरोबर भविष्यवाणी
करू लागला. 11 सर्व लोक जे शौलाला पूर्वीपासून ओळखीत होते,
जेव्हा त्यांनी त्याला संदेष्ट्यांबरोबर भविष्यवाणी करताना पाहिले, तेव्हा
ते आपसात म्हणू लागले, “कीशच्या मुलाला हे काय झाले आहे?
शौलसुद्धा संदेष्ट्यांपैकी एक आहे काय?” 12 तिथे राहत असलेल्या
एका मनुष्याने उत्तर दिले, “त्यांचा पिता कोण आहे?” यावरून अशी
म्हण पडली: “शौलसुद्धा संदेष्ट्यांपैकी आहे काय?” 13 शौलाने
भविष्यवाणी करण्याचे थांबविल्यानंतर तो उच्चस्थानी गेला. 14 तेव्हा
शौलाच्या काकाने त्याला आणि त्याच्या सेवकाला विचारले, “तुम्ही कुठे
गेला होता?” तो म्हणाला, “गाढवांना शोधण्यासाठी गेलो होतो, परंतु
ती आम्हाला सापडत नाहीत असे पाहून, आम्ही शमुवेलकडे गेलो.” 15
शौलाचे काका म्हणाले, “शमुवेल तुला काय म्हणाले ते मला सांग.” 16
शौलाने उत्तर दिले, “गाढवे सापडली आहेत याची त्यांनी आम्हाला खात्री
दिली.” परंतु राजपदाबद्दल शमुवेलने जे सांगितले होते ते त्याने त्याच्या
काकांना सांगितले नाही. 17 शमुवेलने इस्राएली लोकांना याहवेहकडे
मिस्पाह येथे बोलाविले 18 आणि त्यांना म्हटले, “याहवेह, इस्राएलचे
परमेश्वर, असे म्हणतात: ‘मी इस्राएलास इजिप्तमधून बाहेर आणले
आणि तुम्हाला इजिप्तच्या सत्तेपासून आणि ज्या सर्व राष्ट्रांनी तुम्हाला
अन्यायाने वागवले, त्यांच्यापासून मी तुम्हाला सोडविले.’ 19 परंतु
तुम्ही आता तुमच्या परमेश्वराला नाकारले आहे, जे तुम्हाला तुमच्या सर्व
अरिष्टांपासून आणि संकटांपासून वाचवितात. आणि तुम्ही म्हणाला,
‘नको, आता आमच्यावर एक राजा नेम.’ तर आता तुमच्या गोत्रानुसार व
कुळांनुसार याहवेहसमोर हजर व्हा.” 20 जेव्हा शमुवेलने सर्व इस्राएलला
त्यांच्या गोत्राप्रमाणे पुढे आणले, बिन्यामीन गोत्राची चिठ्ठी निघाली. 21
नंतर त्याने बिन्यामीन गोत्राला कुळानुसार पुढे आणले आणि मात्रीच्या
कुळाची चिठ्ठी निघाली. शेवटी कीशाचा पुत्र शौल याची निवड झाली.
परंतु जेव्हा त्यांनी त्याचा शोध केला, तेव्हा तो कुठेच सापडला नाही. 22
तेव्हा त्यांनी याहवेहला विचारले, “तो मनुष्य येथे आला आहे काय?”
आणि याहवेह म्हणाले, “होय, त्याने स्वत:ला सामानामध्ये लपविले
आहे.” 23 तेव्हा त्यांनी पळत जाऊन त्याला बाहेर आणले आणि
तो लोकांमध्ये उभा राहिला, तेव्हा सर्व लोक त्याच्या खांद्यापर्यंतच
होते. 24 शमुवेल सर्व लोकांस म्हणाला, “याहवेहने निवडलेल्या या
मनुष्याला तुम्ही पाहत आहात काय? सर्व लोकांमध्ये त्याच्यासारखा
कोणीही नाही.” तेव्हा लोकांनी मोठ्याने घोषणा दिली, “राजा चिरायू
होवो!” 25 शमुवेलने राजपदाचे हक्क आणि कर्तव्ये लोकांना समजावून
सांगितली. त्याने ती एका चर्मपत्राच्या गुंडाळीवर लिहून ठेवली आणि
ती याहवेहसमोर ठेवली. नंतर शमुवेलने लोकांना आपआपल्या घरी
पाठवून दिले. 26 शौलसुद्धा ज्यांच्या हृदयास परमेश्वराने स्पर्श केला
होता अशा शूर पुरुषांबरोबर गिबियाह येथे आपल्या घरी गेला. 27 परंतु
काही अधर्मी लोक म्हणाले, “हा मनुष्य आमचा काय उद्धार करणार?”
त्यांनी त्याला तुच्छ मानले आणि त्याच्यासाठी भेटी आणल्या नाहीत.
परंतु शौल शांत राहिला.

**11** अम्मोनी नाहाशने जाऊन याबेश-गिलआदला वेढा घातला.
याबेशचे सर्व पुरुष त्याला म्हणाले, “आमच्यासह एक करार कर,
म्हणजे आम्ही प्रजा होऊन तुमची सेवा करू.” 2 परंतु अम्मोनी नाहाश
म्हणाला, “मी एकाच अटीवर तुमच्याशी करार करेन की मी तुम्हा
प्रत्येकाचा उजवा डोळा फोडून संपूर्ण इस्राएलवर अप्रतिष्ठा आणेन.” 3
याबेशचे वडीलजन त्याला म्हणाले, “आम्हाला सात दिवसांचा अवकाश
दे म्हणजे आम्ही संपूर्ण इस्राएलमध्ये निरोप पाठवू; जर आमची सुटका
करण्यासाठी कोणी आला नाही तर आम्ही तुला स्वाधीन होऊ.” 4 जेव्हा
निरोप्यांनी शौलाच्या गिबियाह येथे जाऊन तेथील लोकांस हे वर्तमान
दिले, तेव्हा त्या सर्वांनी मोठ्याने आकांत केला. 5 त्याचवेळेस शौल
त्याच्या बैलांमागून शेतातून परत येत होता, त्याने विचारले, “प्रत्येकाला
काय झाले आहे? ते का रडत आहेत?” तेव्हा याबेशाच्या लोकांनी जे
काही सांगितले होते ते त्यांनी त्याला सांगितले. 6 जेव्हा शौलाने त्यांचे
शब्द ऐकले, तेव्हा परमेश्वराचा आत्मा त्याच्यावर सामर्थ्याने आला आणि
तो क्रोधाने पेटला. 7 त्याने बैलाची एक जोडी कापून त्यांचे तुकडे केले
आणि निरोप्यांच्या हाती ते तुकडे सर्व इस्राएलमध्ये पाठविले आणि
जाहीर केले, “जे कोणी शौल आणि शमुवेल यांचे अनुसरण करणार
नाही, त्यांच्या बैलांचे असेच केले जाईल.” तेव्हा लोकांना याहवेहचे
भय वाटू लागले आणि ते एकजूट होऊन बाहेर आले. 8 बेजेक येथे
शौलाने त्यांची मोजणी केली, तेव्हा ते तीन लाख इस्राएली पुरुष होते
आणि यहूदाहचे तीस हजार पुरुष होते. 9 जे निरोप घेऊन आले होते
त्यांना त्यांनी सांगितले, “याबेश-गिलआदच्या पुरुषांना सांगा, ‘उद्या सूर्य
तापलेला असेल, त्या वेळेपर्यंत तुमची सुटका केली जाईल.’” जेव्हा
निरोप्यांनी जाऊन हे वर्तमान याबेशच्या लोकांना सांगितले तेव्हा ते
आनंदित झाले. 10 याबेशवासी अम्मोनी लोकांना म्हणाले, “उद्या आम्ही
स्वतःला तुमच्या स्वाधीन करू आणि तुम्हाला आवडेल तसे तुम्ही आमचे
करा.” 11 दुसऱ्या दिवशी शौलाने आपल्या लोकांना तीन भागांमध्ये
विभागले; रात्रीच्या शेवटच्या प्रहरी ते अम्मोन्यांच्या छावणीत घुसले
आणि सूर्य तापेपर्यंत त्यांना मारून टाकले. जे वाचले त्यातील दोन
व्यक्तीही एकत्र येणार नाही असे विखरून गेले. 12 तेव्हा लोक शमुवेलास
म्हणाले, “ते कोण होते ज्यांनी विचारले होते, ‘शौल आमच्यावर राज्य
करेल काय?’ त्या माणसांना आमच्याकडे आणा, म्हणजे आम्ही त्यांना
जिवे मारू.” 13 परंतु शौल म्हणाला, “आज कोणालाही जिवे मारले
जाणार नाही, कारण आज याहवेहने इस्राएलची सुटका केली आहे.” 14
नंतर शमुवेल लोकांना म्हणाला, “चला आपण गिलगालास जाऊ आणि
तिथे राजपदाची पुनर्स्थापना करू.” 15 तेव्हा सर्व लोक गिलगालास गेले
आणि त्यांनी याहवेहच्या उपस्थितीत शौलाला राजा केले. तिथे त्यांनी
याहवेहसमोर शांत्यर्पणाचे यज्ञ केले आणि शौलाने आणि सर्व इस्राएली
लोकांनी मोठा उत्सव साजरा केला.

**12** शमुवेल सर्व इस्राएली लोकांना म्हणाला, “तुम्ही मला जे काही
सांगितले ते ऐकून मी तुमच्यावर राजा नेमून दिला आहे. 2 आता
तुमचा पुढारी म्हणून तुमच्याकडे राजा आहे. मी तर उतार वयाचा होऊन
माझे केस पांढरे झाले आहेत, आणि माझी मुले येथे तुमच्याबरोबर
आहेत. माझ्या तरुणपणाच्या दिवसापासून आजपर्यंत मी तुमचा पुढारी
आहे. 3 मी येथे तुमच्यापुढे उभा आहे. याहवेहच्या आणि त्याच्या
अभिषिक्ताच्या उपस्थितीत माझ्याविरुद्ध साक्ष द्या. मी कोणाचा बैल
घेतला आहे? मी कोणाचा गाढव घेतला आहे? मी कोणाला फसविले
आहे? मी कोणावर अत्याचार केला आहे? न्याय विपरीत करण्यासाठी
मी कोणाच्या हातून लाच घेतली आहे? यापैकी कोणतीही गोष्ट जर मी
केली असेल तर त्याची मी भरपाई करेन.” 4 त्यांनी उत्तर दिले, “तुम्ही
आम्हाला कधीही फसविले नाही किंवा आमच्यावर अत्याचार केला
नाही, कोणाच्याही हातून तुम्ही काहीही घेतलेले नाही.” 5 शमुवेल त्यांना
म्हणाला, “याहवेह तुमच्याविरुद्ध साक्षी आहेत आणि आज याहवेहचा
अभिषिक्त सुद्धा साक्षी आहे की, माझ्यामध्ये तुम्हाला कोणताही
दोष सापडला नाही.” ते म्हणाले, “होय, याहवेह साक्षी आहेत.” 6
तेव्हा शमुवेल लोकांना म्हणाला, “ज्यांनी मोशे आणि अहरोन यांना
नेमले, आणि तुमच्या पूर्वजांना इजिप्तमधून बाहेर काढले ते याहवेहच
होते. 7 तर आता येथे उभे राहा, कारण याहवेहने तुमच्यासाठी आणि
तुमच्या पूर्वजांसाठी केलेल्या सर्व नीतिमान कृत्यांविषयी मी तुम्हाला
याहवेहसमोर बोध करतो.” 8 याकोबाने इजिप्तमध्ये प्रवेश केल्यानंतर
साहाय्यासाठी ते याहवेहकडे रडले आणि याहवेहने मोशे आणि अहरोन
यांना पाठविले, त्यांनी तुमच्या पूर्वजांना इजिप्तमधून बाहेर आणले
आणि त्यांना या ठिकाणी वसविले. 9 “परंतु याहवेह त्यांच्या परमेश्वरांना
ते विसरले; म्हणून याहवेहने त्यांना हासोरचा सेनापती सिसेराच्या हाती
आणि पलिष्ट्यांच्या हाती आणि मोआबच्या राजाच्या हाती विकून
टाकले आणि ते त्यांच्याशी लढले. 10 तेव्हा त्यांनी रडून याहवेहचा
धावा करीत ते म्हणाले, ‘आम्ही पाप केले आहे, आम्ही याहवेहचा त्याग
केला आहे आणि बआल व अष्टारोथ यांची सेवा केली आहे. परंतु आता
आमच्या शत्रूंच्या हातातून आमची सुटका करा आणि आम्ही तुमची
सेवा करू,’ 11 तेव्हा याहवेहनी यरूब्बआल, बाराक, इफ्ताह आणि
शमुवेल यांना पाठविले आणि त्यांनी सभोवतालच्या तुमच्या शत्रूपासून
तुमची सुटका केली, त्यामुळे तुम्ही सुरक्षित राहिला. 12 “परंतु जेव्हा
तुम्ही पाहिले की, अम्मोन्यांचा राजा नाहाश तुमच्यावर आक्रमण करत
आहे, तेव्हा याहवेह तुमचे परमेश्वर तुमचा राजा असतानाही, तुम्ही
मला म्हणाला, ‘नाही, आमच्यावर राज्य करण्यासाठी आम्हाला राजा
पाहिजे.’ 13 तर आता तुम्ही निवडून घेतलेला राजा येथे आहे, जो तुम्ही
मागून घेतला आहे; पाहा, याहवेहने तुमच्यावर राजा नेमला आहे. 14 जर
तुम्ही याहवेहचे भय धरून त्यांची सेवा कराल, त्यांचे आज्ञापालन कराल
आणि त्यांच्या आदेशांविरुद्ध बंड करणार नाही आणि तुमच्यावर राज्य
करतो तो तुमचा राजा व तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वराचे अनुसरण
कराल, तर बरे! 15 परंतु जर तुम्ही याहवेहचे ऐकणार नाही, आणि
त्यांच्या आदेशांविरुद्ध बंड कराल, तर याहवेहचा हात जसा तुमच्या
पूर्वजांच्या विरुद्ध होता, तसाच तुमच्याही विरोधात जाईल. 16 “तर
आता, शांत उभे राहा आणि याहवेह तुमच्या नजरेसमोर जे महान कृत्य

करणार आहेत ते पाहा! 17 हा गव्हाचा हंगाम नाही काय? मी आता याहवेहकडे मेघगर्जना आणि पाऊस पाठवावा म्हणून प्रार्थना करेन. आणि तुम्हाला समजून येईल की, तुम्ही आपणासाठी राजा मागून याहवेहच्या दृष्टीने किती वाईट गोष्ट केली आहे." 18 तेव्हा शमुवेलने याहवेहकडे प्रार्थना केली आणि त्याच दिवशी याहवेहने मेघगर्जना व पाऊस पाठवला. तेव्हा सर्व लोकांनी याहवेहचे आणि शमुवेलचे भय धरले. 19 सर्व लोक शमुवेलला म्हणाले, "याहवेह तुमचे परमेश्वर यांच्याकडे तुमच्या सेवकांसाठी प्रार्थना करा म्हणजे आम्ही मरणार नाही, कारण राजाची मागणी करून आम्ही आमच्या इतर सर्व पापांमध्ये भर घातली आहे." 20 "भिऊ नका," शमुवेलने उत्तर दिले. "तुम्ही हे सर्व वाईट केले आहे; तरी आता याहवेहपासून दूर वळू नका, परंतु तुमच्या सर्व हृदयाने याहवेहची सेवा करा. 21 निरुपयोगी मूर्तींच्या मागे लागू नका. ते तुमचे काहीही भले करू शकत नाहीत किंवा ते तुम्हाला वाचवूही शकत नाहीत, कारण त्या निरुपयोगी आहेत. 22 आपल्या महान नामाकरिता याहवेह आपल्या लोकांचा धिक्कार करणार नाहीत, कारण तुम्हाला स्वतःचे लोक बनविणे हे याहवेहला बरे वाटले. 23 माझ्याविषयी म्हणाल, तर मी तुम्हासाठी प्रार्थना करण्याचे सोडून देण्याने मी याहवेहविरुद्ध पाप करावे हे माझ्यापासून दूरच असो. आणि मी तुम्हाला चांगला व खरा मार्ग शिकवेन. 24 परंतु याहवेहचे भय धरून प्रामाणिकपणे तुमच्या सर्व हृदयाने त्यांची सेवा करण्याविषयी खात्री बाळगा; त्यांनी तुम्हासाठी जी महान कृत्ये केली आहेत ती लक्षात ठेवा. 25 परंतु तुम्ही पाप करीत राहाल, तर तुम्ही आणि तुमचा राजा नाश पावाल."

**13** शौल राजा झाला तेव्हा तो तीस वर्षांचा होता आणि त्याने बेचाळीस वर्षे इस्राएलवर राज्य केले. 2 शौलाने इस्राएलमधून तीन हजार पुरुष निवडले. दोन हजार त्याच्याजवळ मिकमाश येथे आणि बेथेलच्या डोंगराळ प्रदेशामध्ये होते आणि एक हजार बिन्यामीन प्रांतात गिबियाह येथे योनाथान बरोबर होते. बाकीच्या पुरुषांना त्याने आपआपल्या घरी पाठवून दिले. 3 गेबा येथील पलिष्ट्यांच्या ठाण्यावर योनाथानने हल्ला केला आणि पलिष्ट्यांनी याविषयी ऐकले. तेव्हा शौलाने संपूर्ण प्रदेशामधून रणशिंग वाजवित म्हटले, "इब्री लोकांनो, ऐका!" 4 तेव्हा इस्राएली लोकांनी ही बातमी ऐकली: "शौलाने पलिष्ट्यांच्या ठाण्यावर हल्ला केला आहे आणि पलिष्ट्यांसमोर इस्राएली लोक घृणित ठरले." म्हणून लोकांना गिलगाल येथे शौलाबरोबर येण्यासाठी बोलाविण्यात आले. 5 तीन हजार रथ, सहा हजार रथस्वार आणि समुद्र किनाऱ्यावरील वाळूइतके असंख्य सैनिक बरोबर घेऊन पलिष्टी लोक इस्राएलशी युद्ध करण्यास एकत्र आले. त्यांनी मिकमाश येथे बेथ-आवेनच्या पूर्वेकडे आपला तळ दिला. 6 आपण पेचात पडलो आहोत आणि आपले सैन्य दबावात आहे असे जेव्हा इस्राएली लोकांनी पाहिले, तेव्हा ते गुहा आणि झुडूपे, खडक आणि कडे व विवरे यामध्ये लपले. 7 काही इब्री लोक तर यार्देनपासून गाद आणि गिलआदापलिकडे गेले. परंतु शौल गिलगालातच राहिला आणि जे लोक त्याच्याबरोबर होते ते भीतीने कंपित झाले होते. 8 शमुवेलने वेळ ठरविल्याप्रमाणे शौलाने सात दिवस वाट पाहिली; परंतु शमुवेल गिलगालास आला नाही आणि शौलाची माणसे विखरू लागली. 9 तेव्हा तो म्हणाला, "होमार्पण आणि शांत्यर्पणे माझ्याकडे आणा." आणि शौलाने होमार्पण केले. 10 त्याने होमार्पणाची समाप्ती करताच शमुवेल आला आणि शौल त्याला अभिवादन करण्यास बाहेर गेला. 11 तेव्हा शमुवेलने विचारले, "तू हे काय केले आहेस?" शौलाने उत्तर दिले, "जेव्हा मी पाहिले की, लोक निघून जात आहेत आणि ठरविलेल्या वेळात तुम्ही आला नाहीत आणि पलिष्टी लोक मिकमाश येथे जमत होते, 12 मला वाटले, 'आता पलिष्टी लोक गिलगाल येथे माझ्याविरुद्ध चाल करून येतील आणि मी अजूनही याहवेहकडून साहाय्यासाठी विनंती केली नाही.' म्हणून होमार्पण करणे मला भाग पडले." 13 शमुवेल शौलास म्हणाला, "तू मूर्खपणा केला आहे, याहवेह तुझ्या परमेश्वरांनी दिलेल्या आज्ञेचे पालन तू केले नाही; जर पालन केले असते तर इस्राएलवरील तुझे राज्य याहवेहने सर्वकाळासाठी स्थापले असते. 14 परंतु आता तुझे राज्य टिकणार नाही; याहवेहने आपल्या मनासारखा मनुष्य शोधला आहे आणि आपल्या लोकांचा अधिकारी म्हणून त्याला नेमले आहे. कारण तू याहवेहची आज्ञा पाळली नाही." 15 नंतर शमुवेलने गिलगाल सोडले व बिन्यामीन प्रांतात गिबियाह येथे गेला, आणि शौलाने त्याच्याबरोबर असलेल्या पुरुषांची मोजणी केली. त्यांची संख्या सुमारे सहाशे होती. 16 शौल आणि त्याचा पुत्र योनाथान आणि त्यांच्याबरोबर असलेले पुरुष बिन्यामीन प्रांतामध्ये गेबा येथे राहिले. आणि पलिष्टी लोकांनी मिकमाश येथे तळ दिला. 17 छापा टाकलेल्या टोळया पलिष्ट्यांच्या छावणीतून तीन तुकड्यांमध्ये बाहेर पडल्या. एक शूआल भागात ओफराहकडे गेली, 18 दुसरी बेथ-होरोनकडे आणि तिसरी रानासमोर असलेले सेबोईम खोऱ्याच्या सीमेकडे गेली. 19 त्या दिवसांत संपूर्ण इस्राएली देशात लोहार सापडत नव्हते, कारण पलिष्टी लोक म्हणाले होते, "कदाचित इब्री लोक तलवारी किंवा भाले तयार करतील!" 20 म्हणून सर्व इस्राएली लोक त्यांचे फाळ, कुदळी, कुऱ्हाडी किंवा विळे यांना धार लावण्यासाठी खाली पलिष्ट्यांकडे जात असत. 21 नांगराचा फाळ व कुदळी यांना धार लावण्यासाठी दोन तृतीयांश शेकेल, व कुऱ्हाड, विळा आणि पराणीसाठी एकतृतीयांश शेकेल असा दर होता. 22 म्हणून लढाईच्या दिवशी शौल आणि योनाथान यांच्याबरोबर असलेल्या कोणाही सैनिकांच्या हाती तलवार किंवा भाला नव्हता; केवळ शौल आणि त्याचा पुत्र योनाथान यांच्याकडेच हत्यारे होती. 23 तेव्हा पलिष्टी सैन्यांची एक तुकडी मिकमाशाच्या घाटाकडे गेली होती.

**14** एके दिवशी शौलाचा पुत्र योनाथान आपल्या तरुण शस्त्रवाहकाला म्हणाला, "चल, आपण पलिष्ट्यांच्या चौकीच्या पलीकडील बाजूला जाऊ." परंतु त्याने त्याच्या वडिलांना हे सांगितले नाही. 2 शौल गिबियाहच्या बाहेरील हद्दीवर मिग्रोन येथे डाळिंबांच्या झाडाखाली राहत होता. त्याच्याबरोबर सहाशे लोक होते. 3 त्यापैकी एक एफोद घातलेला अहीयाह होता. तो शिलोहमध्ये जो याहवेहचा याजक होता

त्या एलीचा पुत्र फिनहास, याचा पुत्र ईखाबोद, याचा भाऊ अहीतूब
याचा पुत्र होता. योनाथान गेला आहे, हे कोणालाही माहीत नव्हते. 4
ज्या घाटांनी योनाथानने पलिष्ट्यांच्या चौकीवर जाण्याची योजना केली
होती त्याच्या दोन्ही बाजूंनी शिखरे होती; एका शिखराचे नाव बोसेस
व दुसऱ्याचे नाव सेनेह होते. 5 एक शिखर उत्तरेकडे मिकमाशासमोर
आणि दुसरे दक्षिणेकडे गेबासमोर होते. 6 योनाथान त्याच्या तरुण
शस्त्रवाहकाला म्हणाला, “चल, आपण त्या बेसुंती लोकांच्या चौकीकडे
जाऊ या. कदाचित याहवेह आपल्या बाजूने कार्य करतील, कारण
याहवेहने आमचे तारण करू नये म्हणून त्यांना कोण अडखळविणार?
मग ते पुष्कळांद्वारे असो किंवा थोडक्यांद्वारे.” 7 त्याचा शस्त्रवाहक
म्हणाला, “तुझ्या मनामध्ये जे आहे ते कर, पुढे जा; मी माझ्या पूर्ण
मनाने व जिवाने तुझ्याबरोबर आहे.” 8 योनाथान म्हणाला, “चल,
आपण त्यांच्याकडे जाऊ आणि त्यांच्या दृष्टीस पडू. 9 जर ते आपल्याला
म्हणतील, ‘आम्ही तुमच्याकडे येईपर्यंत तिथेच थांबा,’ तर आपण जिथे
आहोत तिथेच थांबू आणि त्यांच्यापर्यंत जाणार नाही. 10 परंतु जर ते
म्हणाले, ‘आमच्याकडे वर या,’ तर आपण चढून जाऊ, कारण याहवेहने
त्यांना आपल्या हाती दिले आहे याचे ते चिन्ह असेल.” 11 जेव्हा ते
दोघेजण पलिष्ट्यांच्या चौकीवर त्यांच्या दृष्टीस पडले. तेव्हा पलिष्टी
लोक म्हणाले, “पाहा, इब्री लोक ज्या बिळांमध्ये लपले होते त्यातून
आता बाहेर येत आहेत.” 12 चौकीवरील लोक योनाथान व त्याच्या
शस्त्रवाहकाला ओरडून म्हणाले, “इकडे आमच्याकडे वर या, म्हणजे
आम्ही तुम्हाला धडा शिकवू.” तेव्हा योनाथान शस्त्रवाहकाला म्हणाला,
“चल, माझ्यामागे वर ये; कारण याहवेहने त्यांना इस्राएलच्या हाती दिले
आहे.” 13 योनाथान आपल्या हातापायांचा वापर करीत वर चढला,
त्याच्यामागे त्याचा शस्त्रवाहक चढत गेला. पलिष्टी लोक योनाथानसमोर
पडले व त्याचा शस्त्रवाहक त्याच्यामागे पलिष्ट्यांना मारत त्यांच्यामागे
गेला. 14 त्या पहिल्या हल्ल्यात योनाथान व त्याच्या शस्त्रवाहकाने
सुमारे अर्ध्या एकर जमिनीवर वीस माणसे मारली. 15 छावणीत व
शेतात, चौकीवर व छापा टाकणारे अशा संपूर्ण सैन्यामध्ये भय निर्माण
झाले; आणि भूमी हादरली, ते परमेश्वराकडून पाठविलेले भयंकर भय
होते. 16 इकडे बिन्यामीनच्या गिबियाहतील शौलाच्या पहारेकऱ्यांनी
पाहिले की सैन्य विखरून सर्व दिशेने धावत जात आहे. 17 तेव्हा
शौलाने आपल्याबरोबर असलेल्या लोकांना म्हटले, “आपल्या लोकांची
हजेरी घ्या आणि आम्हाला कोण सोडून गेला आहे ते पाहा.” त्यांनी
हजेरी घेतली तेव्हा योनाथान व त्याचा शस्त्रवाहक तिथे नव्हते. 18
शौल अहीयाहला म्हणाला, “परमेश्वराचा एफोद इकडे आण,” (कारण
त्यावेळी तो इस्राएली लोकांसोबत होता.) 19 शौल याजकांबरोबर बोलत
असताना, पलिष्ट्यांच्या छावणीतील गोंधळ अधिकच वाढत गेला. तेव्हा
शौल याजकाला म्हणाला, “थांब!” 20 तेव्हा शौल व त्याचे लोक एकत्र
जमा होऊन युद्धास निघाले. त्यांना पलिष्टी लोक मोठ्या गोंधळात,
त्यांच्याच तलवारीने एकमेकास मारत असलेले दिसले. 21 जे इब्री
लोक आधी पलिष्ट्यांबरोबर होते व त्यांच्याबरोबर त्यांच्या छावणीत
गेले होते, ते आता जे इस्राएली लोक शौल व योनाथान बरोबर होते
त्यांच्याकडे गेले. 22 एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशात जे इस्राएली लोक
लपून राहिले होते त्यांनी जेव्हा ऐकले की पलिष्ट्यांनी पळ काढला
आहे त्यांनीही त्याच ईर्षेने युद्धात भाग घेतला. 23 अशाप्रकारे त्या
दिवशी याहवेहने इस्राएलची सुटका केली आणि युद्ध बेथ-आवेनच्या
पलीकडे गेले. 24 त्या दिवशी इस्राएल कष्टात होते, कारण शौलाने
लोकांना असे म्हणत शपथबद्ध केले होते, “दिवस मावळण्यापूर्वी व
मी माझ्या शत्रूंवर सूड घेईपर्यंत, जो कोणी भोजन करेल तो शापित
होईल!” त्यामुळे सैन्यातील कोणीही अन्न चाखले नाही. 25 सर्व सैन्य
जेव्हा रानात गेले, त्यावेळी जमिनीवर मध पडलेले होते. 26 जेव्हा ते
आत जंगलात गेले, तेव्हा त्यांनी मध वाहत असलेले पाहिले; परंतु
कोणीही आपला हात तोंडाला लावला नाही, कारण त्यांना शपथेचे भय
होते. 27 परंतु आपल्या पित्याने लोकांना शपथबद्ध केले आहे याविषयी
योनाथानला माहीत नव्हते, म्हणून त्याने त्याच्या हातात असलेल्या
काठीचे टोक मधाच्या पोळयात घातले व ते खाल्ले आणि त्याचे डोळे
टवटवीत झाले. 28 नंतर त्याला एका सैनिकाने सांगितले, “तुझ्या
पित्याने सैन्याला सक्त शपथेने बद्ध केले की ‘आज जो कोणी भोजन
करेल तो शापित होईल!’ म्हणूनच लोक खूप थकून गेले आहेत.” 29
योनाथान म्हणाला, “माझ्या पित्याने देशावर कष्ट आणले आहे. हे थोडे
मध चाखून माझे डोळे पाहा किती टवटवीत झाले आहेत. 30 आपल्या
शत्रूकडून मिळालेल्या लुटीतील लोकांनी काही खाल्ले तर किती बरे
असते. पलिष्ट्यांचा संहार केल्याचा आनंद यापेक्षा मोठा असता काय?”
31 त्या दिवशी मिकमाशपासून अय्यालोन पर्यंत पलिष्ट्यांना त्यांनी
मारले होते, त्यामुळे ते अतिशय थकले होते. 32 तेव्हा ते लुटीवर
तुटून पडले, त्यांनी मेंढरे, गुरे व वासरे घेऊन त्यांना जमिनीवर कापले
आणि ते रक्तासहित खाल्ले. 33 मग कोणी शौलाला सांगितले, “पाहा,
रक्तासहित मांस खाऊन लोक याहवेहविरुद्ध पाप करीत आहेत.” “तुम्ही
विश्वासघात केला आहे,” तो म्हणाला, “एक मोठा दगड इकडे लवकर
लोटत आणा.” 34 तेव्हा शौल म्हणाला, “लोकांमध्ये जा आणि त्यांना
सांग, ‘तुमच्यातील प्रत्येकाने तुमचे गुरे व मेंढरे माझ्याकडे आणा आणि
त्यांना या ठिकाणी कापून खा. रक्तासहित मांस खाऊन याहवेहविरुद्ध
पाप करू नका.’” तेव्हा सर्वांनी आपआपले बैल आणून त्या रात्री तिथे
ते कापले. 35 नंतर शौलाने याहवेहसाठी एक वेदी बांधली. शौलाने
बांधलेली ही पहिलीच वेदी होती. 36 शौल म्हणाला, “चला, आपण रात्री
खाली जाऊन पलिष्ट्यांचा पहाटेपर्यंत पाठलाग करू आणि त्यांच्यातील
एकालाही जिवंत सोडू नये.” लोक म्हणाले, “तुला जे उत्तम वाटेल ते
कर.” परंतु याजकाने म्हटले, “याबाबत आपण परमेश्वराला विचारू.”
37 तेव्हा शौलाने परमेश्वराला विचारले, “मी खाली जाऊन पलिष्ट्यांचा
पाठलाग करावा काय? त्यांना तुम्ही इस्राएलच्या हाती देणार काय?”
परंतु परमेश्वराने त्या दिवशी त्याला उत्तर दिले नाही. 38 तेव्हा शौल
म्हणाला, “जे सेनानायक आहात ते तुम्ही माझ्याकडे या आणि आज
कोणते पाप घडले हे आपण शोधू. 39 इस्राएलचा उद्धार करणारा

याहवेह यांची शपथ, पापाचा दोष जरी माझा पुत्र योनाथान याच्यावर
असला, तरी त्याने मरावे.” परंतु कोणीही काही बोलले नाही. 40 तेव्हा
शौल सर्व इस्राएली लोकांना म्हणाला, “तुम्ही एका बाजूला उभे राहा;
मी व माझा पुत्र योनाथान या बाजूला उभे राहतो.” लोक म्हणाले, “तुला
जे उत्तम वाटेल ते कर.” 41 शौलाने याहवेह इस्राएलाच्या परमेश्वराकडे
प्रार्थना केली, “तुम्ही आपल्या सेवकाला आज उत्तर का दिले नाही? जर
मी किंवा माझा पुत्र योनाथान दोषी आहे तर उरीमद्वारे ते दाखवावे,
परंतु जर इस्राएलचे लोक दोषी आहेत, तर थुम्मीमद्वारे ते दाखवावे.”
योनाथान व शौलाची चिठ्ठी निघाली आणि लोक त्यातून सुटले. 42 शौल
म्हणाला, “आता माझ्या व माझा पुत्र योनाथानवर चिठ्ठ्या टाका,”
तेव्हा योनाथानची चिठ्ठी निघाली. 43 शौलाने योनाथानला विचारले, “तू
काय केलेस ते मला सांग.” योनाथानने उत्तर दिले, “माझ्या काठीच्या
टोकावर घेऊन मी थोडा मध खाल्ला; परंतु आता मला मरणे भाग
आहे.” 44 शौल म्हणाला, “योनाथान, जर मी तुला मृत्युदंड दिला
नाही, तर परमेश्वर माझ्याशी कठोरपणे वागो.” 45 परंतु सैनिकांनी
शौलाला म्हटले, “ज्याने इस्राएली लोकांस हा मोठा उद्धार आणला
आहे, तो योनाथान मरावा काय? कदापि नाही! जिवंत याहवेहची शपथ,
त्याच्या डोक्यावरील एक केसही खाली पडणार नाही, कारण त्याने
आज जे केले ते परमेश्वराच्या साहाय्याने केले आहे.” याप्रकारे लोकांनी
योनाथानला सोडविले आणि त्याला मृत्युदंड दिला नाही. 46 यानंतर
शौलाने पलिष्ट्यांचा पाठलाग करणे थांबविले आणि ते आपापल्या
ठिकाणी परतले. 47 इस्राएलवर आपले राज्य स्थापित केल्यावर,
चहूकडील असलेले त्यांचे शत्रू: मोआब, अम्मोनी, एदोम, सोबाहचे राजे
व पलिष्टी यांच्याशी शौल लढला. जिथे कुठे तो जाई, तिथे तो विजयी
होई. 48 तो शौर्याने लढला आणि त्याने अमालेक्यांचा पराभव केला
आणि ज्यांनी इस्राएलला लुटले होते त्यांच्या हातूनही त्यांची सुटका
केली. 49 शौलाचे पुत्र योनाथान, अबीनादाब इश्वी व मलकी-शुआ हे
होते. त्याच्या थोरल्या मुलीचे नाव मेरब व धाकटीचे नाव मीखल होते.
50 त्याच्या पत्नीचे नाव अहीनोअम होते, ती अहीमाजची कन्या होती.
शौलाचा सेनापती, नेरचा पुत्र अबनेर होता आणि नेर शौलाचा काका
होता. 51 शौलाचा पिता कीश व अबनेरचा पिता नेर अबीएलचे पुत्र होते.
52 शौलाच्या सर्व कारकिर्दीत इस्राएल व पलिष्ट्यांमध्ये घनघोर युद्ध
होते, आणि जेव्हा शौलाला एखादा पराक्रमी किंवा शूर पुरुष आढळला
तर तो त्याला आपल्या सेवेत सामील करीत असे.

**15** शमुवेल शौलास म्हणाला, “इस्राएल लोकांवर राजा म्हणून तुझा
अभिषेक करण्यास याहवेहने मलाच पाठवले होते; तर आता
याहवेहचा संदेश ऐक. 2 सर्वशक्तिमान याहवेह असे म्हणतात: ‘इस्राएली
लोक इजिप्तमधून बाहेर आले त्यावेळी अमालेकी लोकांनी त्यांना
रस्त्यात कसे अडविले, त्यासाठी मी त्यांना शिक्षा करणार. 3 तर आता
तू जा, अमालेक्यांवर हल्ला कर आणि त्यांचे जे काही आहे त्या सर्वांचा
सर्वस्वी नाश कर. त्यांची गय करू नको; त्यांचे पुरुष व स्त्रिया, लेकरे व
तान्ही बाळे, गुरे व मेंढरे, उंट व गाढवे हे सर्व मारून टाक.’” 4 तेव्हा
शौलाने आपले सैन्य बोलाविले व तेलाईम येथे त्यांची मोजणी केली;
ते दोन लक्ष पायदळ व यहूदीयातील दहा हजार सैनिक होते. 5 शौल
अमालेक्यांच्या शहरात जाऊन तिथे खोऱ्यात दबा धरून राहिला. 6
मग शौल केनी लोकांना म्हणाला, “तुम्ही निघून जा, अमालेक्यांना
सोडून जा, यासाठी की त्यांच्याबरोबर मी तुमचा नाश करू नये; कारण
इस्राएली लोक इजिप्तमधून बाहेर आले त्यावेळी तुम्ही त्यांच्याशी दयेने
वागला.” तेव्हा केनी लोक अमालेक्यांमधून निघून गेले. 7 तेव्हा शौलाने
हवीलापासून इजिप्तच्या पूर्वेकडील सीमेवरील शूरपर्यंत अमालेक्यांना
मारले. 8 त्याने अमालेक्यांचा राजा अगाग याला जिवंत पकडले, आणि
त्याच्या लोकांचा तलवारीने सर्वनाश केला. 9 परंतु शौलाने व त्याच्या
सैन्याने अगाग राजाला जिवंत ठेवले, तसेच उत्तम मेंढरे, गुरे, पुष्ट वासरे
व कोकरे; व सर्वकाही जे चांगले होते त्यांचा नाश करावा असे त्यांना
वाटले नाही, म्हणून त्यांनी ते राखून ठेवले. मात्र जे टाकाऊ व कुचकामी
होते त्यांचा त्यांनी नाश केला. 10 तेव्हा याहवेहचे वचन शमुवेलकडे
आले: 11 “मी शौलास राजा केले याबद्दल मला पश्चाताप होत आहे,
कारण तो माझ्यापासून फिरला आहे आणि त्याने माझ्या आज्ञांचे पालन
केले नाही.” शमुवेल फार संतापला आणि रात्रभर याहवेहकडे रडला.
12 सकाळी, अगदी पहाटे उठून शमुवेल शौलाला भेटायला निघाला,
पण त्याला कोणी सांगितले, “शौल कर्मेलास गेला आहे. तिथे त्याने
आपल्या स्वतःच्या आदरार्थ एक स्तंभ उभारला आहे आणि तिथून पुढे
तो खाली गिलगालास गेला आहे.” 13 जेव्हा शमुवेलने शौलाला गाठले,
शौल म्हणाला, “याहवेह तुम्हाला आशीर्वादित करो! मी याहवेहच्या
सूचना पार पाडल्या आहेत.” 14 परंतु शमुवेलने म्हटले, “तर मग
मेंढरांचे बेंबावणे व बैलांचे हंबरणे मी ऐकतो ते काय आहे?” 15 शौलाने
उत्तर दिले, “सैन्याच्या लोकांनी ती अमालेक्यांपासून आणली आहेत;
त्यांनी उत्तम मेंढरे व गुरे याहवेह तुमचा परमेश्वर यांच्या यज्ञासाठी राखून
ठेवले आहेत, परंतु बाकीच्या सर्वांचा आम्ही पूर्णपणे नाश केला आहे.”
16 तेव्हा शमुवेल शौलास म्हणाले, “पुरे! काल रात्री याहवेहने मला
काय सांगितले ते मी तुला सांगतो.” “सांगा,” शौल म्हणाला. 17
शमुवेल म्हणाले, “एकेकाळी तू आपल्याच दृष्टीने लहान होतास, तरी
इस्राएलच्या गोत्रांचा पुढारी तू झाला नाहीस काय? याहवेहने तुला
इस्राएलचा राजा म्हणून अभिषेक केला. 18 आणि याहवेहने तुला एका
कामगिरीवर पाठवित म्हटले, ‘जा आणि त्या दुष्ट अमालेक्यांचा पूर्णपणे
नाश कर, ते नाहीसे होईपर्यंत त्यांच्याविरुद्ध युद्ध कर.’ 19 तू याहवेहच्या
आज्ञेचे पालन का केले नाहीस? लुटीवर झडप घालून तू याहवेहच्या
दृष्टीने जे वाईट ते का केलेस?” 20 शौल शमुवेलला म्हणाला, “पण
मी याहवेहचे आज्ञापालन केले, याहवेहने मला दिलेल्या कामगिरीवर
मी गेलो, अमालेक्यांचा मी पूर्णपणे नाश केला आणि अगाग त्यांचा
राजा याला मी घेऊन आलो. 21 सैनिकांनी त्या लुटीतील मेंढरे व
गुरे घेतली व त्यातील जे उत्तम ते गिलगालात याहवेह तुमचे परमेश्वर
यांच्यासाठी यज्ञ करावे म्हणून राखून ठेवली आहेत.” 22 परंतु शमुवेलने
उत्तर दिले: “त्यांच्या आज्ञा पाळल्याने याहवेहला जितका होतो तितका

आनंद होमार्पणे व यज्ञांनी होईल काय? यज्ञापेक्षा आज्ञापालन चांगले,
आणि एडक्याच्या चरबीपेक्षा वचन ऐकणे बरे. 23 कारण बंडखोरी ही
शकुनविद्येच्या पापासारखी आहे, आणि हट्टीपणा मूर्तिपूजेसारखा वाईट
आहे. तू याहवेहचे वचन धिक्कारले यामुळे, त्यांनी तुला राजा म्हणून
धिक्कारले आहे.” 24 शौल शमुवेलास म्हणाला, “मी पाप केले आहे, मी
याहवेहच्या आज्ञेचा व तुमच्या सूचनांचा भंग केला आहे; मला लोकांचे
भय वाटले, म्हणून मी त्यांचे म्हणणे ऐकले. 25 आता मी तुम्हाला
विनंती करतो, माझ्या पापाची क्षमा करा आणि मी याहवेहची उपासना
करावी म्हणून परत माझ्याबरोबर या.” 26 परंतु शमुवेल शौलाला
म्हणाला, “मी तुझ्याबरोबर परत जाणार नाही. तू याहवेहच्या वचनाचा
धिक्कार केला आहे आणि याहवेहनेही तुला इस्राएलचा राजा म्हणून
धिक्कारले आहे.” 27 आणि शमुवेल जाण्यास वळला, तेव्हा शौलाने
त्यांच्या झग्याचा काठ धरला व तो फाटला. 28 तेव्हा शमुवेल त्याला
म्हणाला, “याहवेहने आज इस्राएलचे राज्य तुझ्यापासून फाडून घेऊन ते
तुझ्यापेक्षा उत्तम असलेल्या तुझ्या एका शेजाऱ्याला दिले आहे. 29 जे
परमेश्वर इस्राएलचे वैभव आहेत, ते असत्य बोलत नाहीत किंवा आपले
मन बदलत नाही; कारण आपले मन बदलण्यास ते मानव नाहीत.”
30 शौलाने उत्तर दिले, “मी पाप केले आहे, तरीही माझ्या लोकांच्या
वडीलजनांसमोर व इस्राएलसमोर माझा मान राखा; माझ्याबरोबर परत
या, म्हणजे मी याहवेह तुमच्या परमेश्वराची उपासना करेन.” 31 तेव्हा
शमुवेल शौलाबरोबर परत गेले आणि शौलाने याहवेहची उपासना केली.
32 नंतर शमुवेल म्हणाला, “अमालेक्यांचा राजा अगाग याला माझ्याकडे
घेऊन या.” अगाग साखळयांनी बांधलेला असा शमुवेलकडे आला
आणि त्याला वाटले, “मरणाचे संकट खात्रीने टळले आहे.” 33 परंतु
शमुवेलने म्हटले, “जसे तुझ्या तलवारीने अनेक स्त्रियांना अपत्यहीन
केले, तसेच तुझी आई स्त्रियांमध्ये अपत्यहीन होईल.” आणि शमुवेलने
याहवेहसमोर गिलगालात अगागाला मारून टाकले. 34 नंतर शमुवेल
रामाह येथे गेला आणि शौल आपल्या घरी शौलाच्या गिबियाहकडे
परतला. 35 शमुवेल आपल्या मरण्याच्या दिवसापर्यंत शौलाला भेटायला
गेला नाही, परंतु शमुवेलने त्याच्यासाठी शोक केला. आणि आपण
शौलाला इस्राएलवर राजा केले म्हणून याहवेहला पश्चाताप झाला.

**16** याहवेह शमुवेलला म्हणाले, “मी शौलाला इस्राएलाचा राजा
म्हणून नाकारले आहे, तर तू कुठवर त्याच्यासाठी शोक करीत
राहणार? तुझे शिंग तेलाने भर आणि चल; मी तुला बेथलेहेमकर इशाय
याच्याकडे पाठवित आहे. मी त्याच्या एका पुत्राला राजा म्हणून निवडले
आहे.” 2 परंतु शमुवेल म्हणाला, “मी कसे जाऊ? जर शौलाने याविषयी
ऐकले, तर तो मला जिवे मारेल.” याहवेह म्हणाले, “तुझ्यासोबत
एक कालवड घे आणि सांग, ‘मी याहवेहला यज्ञ करण्यासाठी आलो
आहे.’ 3 इशायला यज्ञासाठी आमंत्रित कर आणि तू काय करावे
ते मी तुला दाखवेन. ज्याला मी सूचित करेन त्याला तू माझ्यासाठी
अभिषिक्त कर.” 4 याहवेहने सांगितल्याप्रमाणे शमुवेलने केले. जेव्हा
शमुवेल बेथलेहेमला पोहोचला, तेव्हा त्या नगराचे वडीलजन थरथर
कापत त्याला भेटले. त्यांनी विचारले, “आपण शांतीने आला आहात
काय?” 5 शमुवेलने उत्तर दिले, “होय, मी शांतीने आलो आहे; मी
याहवेहला यज्ञ करण्यासाठी आलो आहे. आपणास शुद्ध करा आणि
माझ्याबरोबर यज्ञाला या.” मग शमुवेलने इशाय व त्याच्या पुत्रांना
शुद्ध केले आणि त्यांना यज्ञासाठी आमंत्रण दिले. 6 ते आल्यानंतर
एलियाबाला पाहून शमुवेलला वाटले, “निश्चितच याहवेहचा अभिषिक्त
येथे याहवेहसमोर उभा आहे.” 7 परंतु याहवेह शमुवेलला म्हणाले,
“त्याचे रूप किंवा त्याची उंची यानुसार जाऊ नकोस, कारण मी
त्याला नाकारले आहे. मनुष्य पाहतात त्याप्रमाणे याहवेह पाहत नाहीत.
मनुष्य बाहेरील रूप पाहतात, परंतु याहवेह हृदय पारखतात.” 8
नंतर इशायाने अबीनादाबाला शमुवेलसमोर चालविले. परंतु शमुवेलने
म्हटले, “याहवेहने यालाही निवडले नाही.” 9 नंतर इशायाने शम्माहला
चालविले, परंतु शमुवेल म्हणाला, “हा सुद्धा याहवेहने निवडलेला नाही.”
10 इशायाने त्याचे सात पुत्र शमुवेलसमोर चालविले, परंतु शमुवेल
त्याला म्हणाला, “याहवेहने यांना निवडले नाही.” 11 तेव्हा त्यांनी
इशायला विचारले, “तुझे पुत्र येण्याचे पूर्ण झाले काय?” इशायाने
उत्तर दिले, “अजून एक जो सर्वात लहान आहे, तो रानात मेंढरे राखीत
आहे.” शमुवेल म्हणाले, “त्याला बोलाविणे पाठव; कारण तो येईपर्यंत
आम्ही बसणार नाही.” 12 तेव्हा इशायाने त्याला बोलावून आणले. तो
तांबूस रंगाचा, सुंदर डोळयांचा, दिसायला देखणा होता. तेव्हा याहवेह
म्हणाले, “ऊठ आणि त्याला अभिषिक्त कर, हाच तो आहे.” 13 तेव्हा
शमुवेलने तेलाचे शिंग घेतले व त्याच्या भावांदेखत दावीदाचा अभिषेक
केला आणि त्या दिवसापासून याहवेहचा आत्मा सामर्थ्याने दावीदावर
आला. नंतर शमुवेल रामाह येथे परत गेला. 14 आता याहवेहचा आत्मा
शौलापासून निघून गेला होता आणि याहवेहकडून पाठविलेला एक
दुष्ट आत्मा त्याला बाधा करू लागला. 15 शौलाच्या सेवकांनी त्याला
म्हटले, “पाहा, परमेश्वराकडून पाठविलेला हा दुष्ट आत्मा तुम्हाला बाधा
करीत आहे. 16 आमच्या धन्याने त्याच्या या सेवकांना आज्ञा द्यावी की
एक उत्कृष्ट वीणावादकाचा शोध करावा, म्हणजे जेव्हा परमेश्वराकडून
येणारा दुष्ट आत्मा तुमच्यावर येईल, तेव्हा तो वीणा वाजवेल, आणि
तुम्हाला बरे वाटेल.” 17 तेव्हा शौल आपल्या सेवकांना म्हणाला, “एक
चांगला वीणावादक शोधून त्याला माझ्याकडे आणा.” 18 त्यापैकी
एका सेवकाने उत्तर दिले, “मी बेथलेहेमकर इशायाचा पुत्र पाहिला
आहे, तो वीणा वादनात निपुण आहे. तो शूर व योद्धा आहे, तो उत्तम
वक्ता व रूपवान आहे; व याहवेह त्याच्याबरोबर आहेत.” 19 तेव्हा
शौलाने इशायाकडे निरोप पाठवून म्हटले, “तुझा पुत्र दावीद जो मेंढरे
राखीत आहे त्याला माझ्याकडे पाठव.” 20 तेव्हा इशायाने आपला पुत्र
दावीदाबरोबर भाकरी, द्राक्षारसाचा एक बुधला व एक करडू लादलेले
एक गाढव शौलाकडे पाठविले. 21 दावीद शौलाकडे आला व त्याच्या
सेवेस हजर झाला. शौलाला तो अतिशय आवडला व दावीद त्याचा एक
शस्त्रवाहक झाला. 22 नंतर शौलाने इशायला संदेश पाठवून सांगितले,
“दावीदाला माझ्या सेवेत असू दे. कारण मी त्याच्यावर प्रसन्न आहे.”

23 ज्या ज्यावेळी परमेश्वराकडून पाठविलेला दुष्ट आत्मा शौलावर येई,
त्यावेळी दावीद आपली वीणा घेऊन वाजवित असे, तेव्हा शौलाला बरे
वाटत असे, आणि दुष्ट आत्मा शौलाला सोडून जात असे.

17 पलिष्ट्यांनी युद्धासाठी आपले सैन्य गोळा केले आणि ते
यहूदीयातील सोकोह येथे जमले. त्यांनी सोकोह आणि अजेकाह
यांच्यामध्ये एफेस-दम्मिम येथे छावणी दिली. 2 शौल आणि इस्राएली
लोक जमले आणि त्यांनी एलाहच्या खोऱ्यात छावणी दिली आणि
पलिष्ट्यांशी युद्ध करण्यासाठी सेनेचे नियोजन केले. 3 पलिष्टी लोक
एका टेकडीवर सज्ज झाले आणि दुसऱ्यावर इस्राएली लोक सज्ज
झाले; व त्यांच्यामध्ये खोरे होते. 4 तेव्हा गथ येथील, गल्याथ नामक
एक महाशूरवीर, पलिष्ट्यांच्या छावणीतून बाहेर आला, त्याची उंची सहा
हात आणि एक वीत. 5 त्याच्या डोक्यावर कास्याचा टोप होता, त्याने
खवल्यासारखे कास्याचे चिलखत घातले होते; ज्याचे वजन पाच हजार
शेकेल होते; 6 त्याच्या पायात त्याने कास्याचे संरक्षण कवच घातले
होते व कंबरेला कास्याची बरची लटकलेली होती. 7 विणकऱ्याच्या
काठीसारखा त्याचा भाला होता आणि त्याच्या लोखंडी पात्याचे वजन
सहाशे शेकेल होते. त्याचा ढाल वाहक त्याच्यापुढे चालत गेला. 8
गल्याथ उभा राहिला आणि इस्राएली सैन्याला ओरडून म्हणाला, "तुम्ही
युद्ध रचण्यासाठी बाहेर येऊन का उभे आहात? मी पलिष्टी नाही काय
आणि तुम्ही शौलाचे चाकर नाहीत काय? तुमच्यातील एक मनुष्य
निवडा आणि त्याने माझ्याकडे यावे. 9 जर तो माझ्याशी लढून मला
मारू शकेल तर आम्ही तुमची प्रजा होऊ; परंतु जर मी त्याच्यावर
मात केली आणि त्याला मारले, तर तुम्ही आमची प्रजा होऊन आमची
सेवा कराल." 10 तो पलिष्टी म्हणाला, "आज मी इस्राएली सैन्याला
चेतावणी देतो! माझ्याकडे एक मनुष्य पाठवा म्हणजे आम्ही एकमेकांशी
लढू." 11 पलिष्ट्याचे हे शब्द ऐकून शौल आणि सर्व इस्राएली लोक
घाबरून गेले. 12 दावीद यहूदीयातील बेथलेहेम येथील एफ्राथी गोत्रातील
इशायाचा पुत्र होता. इशायला आठ पुत्र होते आणि शौल राजाच्या
कारकिर्दीत तो खूप वृद्ध झाला होता. 13 इशायाचे तीन थोरले पुत्र;
प्रथमपुत्र एलियाब, दुसरा अबीनादाब आणि तिसरा शम्माह हे युद्धासाठी
शौलाच्या सेवेत गेले होते. 14 दावीद सर्वांहून धाकटा होता. थोरले तीन
शौलाबरोबर गेले, 15 परंतु दावीद बेथलेहेमात आपल्या वडिलांची मेंढरे
चारण्यासाठी शौलाकडून जात येत असे. 16 तो पलिष्टी मनुष्य चाळीस
दिवस दररोज सकाळी व संध्याकाळी समोर येऊन उभा राहत असे.
17 एके दिवशी इशाय त्याचा पुत्र दावीदाला म्हणाला, "एक एफाभर
भाजलेले हे धान्य आणि या दहा भाकरी तुझ्या भावांसाठी लवकर
छावणीत घेऊन जा. 18 त्याचबरोबर खव्याचे हे दहा लाडू त्यांच्या
तुकडीच्या सेनापतीसाठी घे, तुझे भाऊ कसे आहेत ते पाहा आणि परत
येताना त्यांच्याकडून काही शांतीची बातमी घेऊन ये. 19 ते शौल आणि
सर्व इस्राएली लोकांबरोबर एलाहच्या खोऱ्यामध्ये पलिष्ट्यांविरुद्ध युद्ध
करीत आहेत." 20 सकाळी लवकरच दावीदाने आपली मेंढरे एका
राखणदाऱ्याच्या हाती सोडली, इशायाने सांगितल्याप्रमाणे सर्वकाही
घेऊन निघाला. तो छावणीजवळ पोहोचला, तेव्हा सैन्य युद्धाच्या
घोषणा देत त्यांच्या लढाईचे स्थानग्रहण करत होते. 21 इस्राएली
आणि पलिष्टी सेना समोरासमोर उभ्या राहिल्या. 22 दावीदाने आपल्या
वस्तू सामान राखणाऱ्याच्या स्वाधीन केल्या व युद्धभुमीकडे धावत
जाऊन त्याच्या भावांना अभिवादन केले. 23 तो त्यांच्याबरोबर बोलत
असता, गथ येथील पलिष्टी महाशूरवीर गल्याथ त्याच्या जागेतून बाहेर
येऊन नेहमीप्रमाणे ओरडून बोलला, आणि दावीदाने ते ऐकले. 24 त्या
मनुष्याला पाहताच इस्राएली लोक मोठ्या भयाने पळून जात असत.
25 इस्राएली लोक म्हणत होते, "तुम्ही हा मनुष्य बाहेर येताना पाहता
ना? तो इस्राएली लोकांना चेतावणी देण्यासाठी बाहेर येतो. जो कोणी
त्याला ठार मारेल त्याला राजा मोठी संपत्ती देईल, तो त्याला त्याची
कन्या देईल व इस्राएलात त्याचे कुटुंब करमुक्त होईल." 26 दावीदाने
त्याच्या बाजूला उभे असलेल्या पुरुषांना विचारले, "जो या पलिष्टी
मनुष्याला मारेल आणि इस्राएलची ही अप्रतिष्ठा काढून टाकेल, त्याला
काय करण्यात येईल? हा बेसुंती पलिष्टी मनुष्य कोण आहे की त्याने
जिवंत परमेश्वराच्या सैन्याला चेतावणी द्यावी?" 27 ते जे काही म्हणत
आले होते ते त्यांनी त्याला पुन्हा सांगितले आणि म्हणाले, "जो मनुष्य
त्याला ठार मारेल त्याचे असे करण्यात येईल." 28 जेव्हा दावीदाचा
थोरला भाऊ एलियाब याने दावीदाला या लोकांबरोबर बोलतांना पाहिले,
तेव्हा तो त्याच्यावर रागाने भडकला आणि त्याला विचारले, "तू येथे
का आलास? आणि ती थोडीशी मेंढरे रानात तू कोणाबरोबर सोडली
आहेत? तू किती गर्विष्ठ आहेस आणि तुझे हृदय किती दुष्ट आहे हे मी
जाणतो; तू येथे खाली केवळ युद्ध पाहायला आला आहेस." 29 दावीद
म्हणाला, "मी काय केले आहे? मी बोलूपण नये काय?" 30 नंतर तो
दुसऱ्या कोणाकडे वळला आणि तोच विषय पुढे नेला आणि त्यांनीही
आधीप्रमाणेच उत्तर दिले. 31 दावीद जे बोलला ते कोणी ऐकले व ते
शौलाला कळविले, तेव्हा शौलाने त्याला बोलावून घेतले. 32 दावीद
शौलाला म्हणाला, "या पलिष्ट्यामुळे कोणी मनुष्याने खचून जाऊ नये;
तुमचा सेवक पुढे जाऊन त्याच्याशी लढेल." 33 शौलाने दावीदाला
उत्तर दिले, "या पलिष्ट्यांविरुद्ध लढण्यास तू सक्षम नाहीस; तू केवळ
कोवळा तरुण आहेस आणि तो त्याच्या तारुण्यापासून योद्धा आहे."
34 परंतु दावीद शौलाला म्हणाला, "तुमचा सेवक त्याच्या वडिलांची
मेंढरे राखीत असताना, एकदा एक सिंह व एकदा एक अस्वल येऊन
त्याने कळपातील मेंढरू उचलून घेतले, 35 मी त्याच्यामागे गेलो, त्याला
मारले व त्याच्या जबड्यातून मेंढरू बाहेर काढले. जेव्हा त्याने माझ्यावर
झडप घातली, मी त्याचे केस धरून त्याला ठार मारले. 36 आपल्या
दासाने सिंह व अस्वल हे दोन्ही मारले; हा बेसुंती पलिष्टीही त्यापैकी
एकासारखा असेल, कारण त्याने जिवंत परमेश्वराच्या सेनेचा उपहास
केला आहे. 37 ज्या याहवेहने मला सिंहाच्या व अस्वलाच्या पंजांतून
सोडविले, तेच याहवेह मला या पलिष्ट्यांपासूनही सोडवेल." शौल
दावीदाला म्हणाला, "जा, याहवेह तुझ्याबरोबर असो." 38 शौलाने
आपली वस्त्रे दावीदाच्या अंगावर चढविली, त्याच्यावर चिलखत चढविले

आणि त्याच्या डोक्यावर कास्य टोप घातला. 39 दावीदाने त्याच्या
चिलखतावर तलवार बांधली, त्याला याचा आधी सराव नसल्यामुळे,
त्याने चालण्याचा प्रयत्न केला. तो शौलाला म्हणाला, “मी यामध्ये चालू
शकत नाही, मला याचा सराव नाही.” म्हणून दावीदाने तो पोशाख
उतरविला. 40 नंतर त्याने आपली काठी हातात घेतली, ओहोळातून
पाच गुळगुळीत गोटे घेतले व ते आपल्या धनगरी बटव्यात ठेवले व
आपली गोफण हाती घेऊन त्या पलिष्ट्याकडे गेला. 41 त्या दरम्यान
पलिष्टी गल्याथही दावीदाच्या जवळ येऊ लागला; त्याचा शस्त्रवाहक
त्याच्यापुढे चालत होता. 42 पलिष्ट्याने दावीदाकडे नजर टाकून पाहिले
की तो केवळ एक तरुण, तांबूस रंगाचा, सुंदर डोळयांचा, दिसायला
रूपवान होता, आणि त्याने दावीदाला तुच्छ मानले. 43 तो दावीदाला
म्हणाला, “माझ्यावर काठी घेऊन चालून येण्यास, मी कुत्रा आहे
काय?” आणि त्या पलिष्ट्याने आपल्या दैवतांची नावे घेऊन दावीदाला
शाप दिला. 44 तो पलिष्टी दावीदाला म्हणाला, “इकडे ये, म्हणजे
मी तुझे मांस पक्ष्यांना व जंगली जनावरांना देईल.” 45 दावीद त्या
पलिष्ट्याला म्हणाला, “तू तलवार, भाला व बरची घेऊन माझ्याविरुद्ध
आलास, परंतु ज्या इस्राएली सैन्याच्या परमेश्वराला तू तुच्छ लेखले;
त्या याहवेह, सेनाधीश परमेश्वराच्या नावाने मी तुझ्याविरुद्ध येतो. 46
आज याहवेह तुला माझ्या हाती देईल, मी तुला मारून टाकीन व तुझा
शिरच्छेद करेन. या आजच्या दिवशी मी पलिष्टी सैन्याची शरीरे पक्ष्यांना
व जंगली जनावरांना देईन आणि सर्व जगाला समजेल की परमेश्वर
इस्राएलात आहेत. 47 येथे जमलेल्या प्रत्येकाने जाणावे की तलवार
किंवा भाल्याने याहवेह आम्हाला सोडवित नाही; कारण युद्ध याहवेहचे
आहे आणि तुम्हा सर्वांना याहवेह आमच्या हाती देतील.” 48 पलिष्टी
गल्याथ जसा दावीदावर हल्ला करण्यासाठी पुढे येऊ लागला, तसा
दावीद त्याचा सामना करण्यास त्याच्या दिशेने धावत गेला. 49 दावीदाने
आपल्या बटव्यातील एक दगड घेऊन, तो गोफणीत घातला व तो त्या
पलिष्ट्याच्या कपाळावर मारला. तो दगड त्याच्या कपाळात शिरला
आणि गल्याथ जमिनीवर पालथा पडला. 50 अशाप्रकारे, दावीदाने
त्या पलिष्ट्यावर गोफण व गोट्याद्वारे विजय मिळविला; त्याच्या हाती
तलवार नसताना त्याने त्या पलिष्ट्याला मारून टाकले. 51 दावीद धावत
जाऊन त्याच्यावर उभा राहिला, त्याने त्या पलिष्ट्याच्या म्यानातून
तलवार काढून त्या तलवारीनेच त्याचे डोके कापले. जेव्हा पलिष्ट्यांनी
पाहिले की त्यांचा नायक मरण पावला त्यांनी तिथून पळ काढला. 52
तेव्हा इस्राएली व यहूदीयाच्या सैनिकांनी उठून आरोळी केली, त्यांनी
गथ व एक्रोनच्या वेशींपर्यंत पलिष्ट्यांचा पाठलाग केला. मरण पावलेले
पलिष्टी शाराईमाच्या वाटेवर गथ व एक्रोन येथवर पडलेले होते. 53
इस्राएली लोक पलिष्ट्यांचा पाठलाग करण्याचे सोडून परत आले
व त्यांची छावणी लुटली. 54 दावीदाने त्या पलिष्ट्याचे शिर घेऊन
यरुशलेमास आणले; पण त्या पलिष्ट्याची शस्त्रे आपल्या तंबूत ठेवली.
55 शौलाने दावीदाला पलिष्ट्याशी युद्ध करण्यास जाताना पाहिले, तेव्हा
त्याने सेनापती अबनेर याला विचारले, “हा तरुण कोणाचा पुत्र आहे?”
अबनेरने उत्तर दिले, “महाराज चिरायू होवो, मला माहीत नाही.” 56
राजा म्हणाला, “हा तरुण कोणाचा पुत्र आहे त्याचा तपास कर.” 57
दावीदाने त्या पलिष्ट्याला मारल्यावर परत येताच, अबनेरने त्याला
शौलाकडे आणले, त्या पलिष्ट्याचे शिर अजूनही दावीदाच्या हातात
होते. 58 शौलाने दावीदाला विचारले, “हे तरुणा, तू कोणाचा पुत्र
आहेस?” दावीद म्हणाला, “आपला सेवक इशाय बेथलेहेमकर याचा
मी पुत्र आहे.”

**18** दावीदाने शौलाशी आपले संभाषण संपविले, तेव्हा योनाथानचा
जीव दावीदाशी जडला आणि जशी स्वत:वर तशी प्रीती त्याने
दावीदावर केली. 2 त्या दिवसापासून शौलाने दावीदाला आपल्याजवळ
ठेवले व त्याला त्याच्या पित्याच्या घरी जाऊ दिले नाही. 3 आणि
योनाथानने दावीदाशी करार केला, कारण त्याने जशी आपल्या स्वत:च्या
जिवावर तशी दावीदावर प्रीती केली. 4 योनाथानने आपल्या अंगातील
झगा काढून तो दावीदाला दिला. आपला अंगरखा, तलवार, धनुष्य
व कंबरपट्टा सुद्धा दावीदाला दिले. 5 शौलाने दावीदाला कोणत्याही
कामगिरीवर पाठविले तरी त्यात दावीद यशस्वी होत असे, म्हणून
शौलाने त्याला आपल्या सैन्यात उच्च हुद्दा दिला. ते सर्व सैनिकांना व
शौलाच्या अधिकाऱ्यांनाही आवडले. 6 दावीदाने पलिष्टी गल्याथाला ठार
मारल्यानंतर ज्यावेळी लोक परत घरी येत होते, त्यावेळी इस्राएलच्या
सर्व नगरांतून प्रत्येक गावातून स्त्रिया गात व नाचत आणि हर्षाने डफ व
झांजा वाजवित शौल राजाला भेटायला आल्या. 7 नाचत असताना
त्यांनी गीत गाईले: “शौलाने त्याच्या हजारास वधले, दावीदाने त्याचे दहा
हजार वधले.” 8 यामुळे शौल अतिशय रागावला; गीतांच्या या ओळींनी
तो असंतुष्ट झाला. तो म्हणाला, “त्यांनी दावीदाला दहा हजारांचे श्रेय
दिले आणि मला केवळ हजारांचे. राज्यावाचून त्याला आणखी काय
मिळायचे राहिले?” 9 आणि तेव्हापासून शौलाने दावीदावर पाळत
ठेवली. 10 दुसऱ्या दिवशी परमेश्वराकडून पाठविलेला एक दुष्ट आत्मा
शौलावर जोराने उतरला, तेव्हा तो आपल्या घरात भविष्यवाणी करू
लागला. दावीद रोजच्याप्रमाणे आपली वीणा वाजवित होता व शौलाच्या
हाती भाला होता 11 “मी दावीदाला भिंतीशी खिळून टाकीन” असे
म्हणत शौलाने भाला फेकला, परंतु दावीदाने त्याला दोनदा चुकविले.
12 शौलाला दावीदाची भीती वाटत होती, कारण याहवेह त्याच्याबरोबर
होते परंतु शौलाला याहवेहने सोडले होते. 13 तेव्हा शौलाने दावीदाला
आपल्या पुढून घालवून दिले व हजारांचा सेनापती म्हणून नेमले आणि
दावीदाने त्या सैनिकांचे युद्धात नेतृत्व केले. 14 प्रत्येक कामात दावीद
यशस्वी होत असे, कारण याहवेह त्याच्याबरोबर होते. 15 दावीद किती
यशस्वी होतो हे जेव्हा शौलाने पाहिले, तेव्हा त्याला दावीदाची अधिक
भीती वाटू लागले. 16 परंतु सर्व इस्राएली व यहूदीयाचे लोक दावीदावर
प्रीती करीत होते. कारण तो त्यांचे युद्धात नेतृत्व करीत असे. 17 एके
दिवशी शौल दावीदास म्हणाला, “माझी थोरली कन्या मेरब तुला मी
पत्नी म्हणून देईन, केवळ शौर्याने माझी सेवा कर व याहवेहच्या लढाया
लढ.” कारण शौल स्वत:शी म्हणाला, “मी दावीदावर हात टाकणार

नाही, पलिष्ट्यांनी ते करावे.” 18 परंतु दावीद शौलाला म्हणाला,
“राजाचा जावई व्हावे असा मी कोण आहे, माझे कुटुंब काय आहे किंवा
इस्राएलातील माझे कूळ काय आहे?” 19 तरीही जेव्हा शौलाची कन्या
मेरबचा विवाह दावीदाशी होण्याची प्रत्यक्ष वेळ आली, तेव्हा तिचा
विवाह महोलाथी अद्रीएल याच्याबरोबर झाला. 20 या दरम्यान शौलाची
कन्या मीखल हिचे दावीदावर प्रेम जडले, हे ऐकून शौलाला आनंद
झाला. 21 त्याने विचार केला, “मी तिला दावीदाला देईन, अशासाठी
की ती त्याला पाश अशी होईल व पलिष्ट्यांचा हात त्याच्याविरुद्ध
येईल.” तेव्हा शौल दावीदाला म्हणाला, “माझा जावई होण्यासाठी तुला
अजून एक संधी आहे.” 22 तेव्हा शौलाने आपल्या सेवकांना आज्ञा
दिली: “दावीदाशी गुप्तपणे बोलून सांगा की राजाला तू आवडतोस
आणि त्याच्या सर्व सेवकांची तुझ्यावर प्रीती आहे; म्हणून राजाचा
जावई हो.” 23 हे शब्द शौलाच्या सेवकांनी दावीदाला सांगितले. परंतु
दावीद म्हणाला, “मी केवळ एक गरीब व अप्रसिद्ध मनुष्य आहे, राजाचा
जावई होणे तुम्हाला फार हलकी गोष्ट वाटते काय?” 24 दावीद जे
काही म्हणाला ते शौलाच्या सेवकांनी जेव्हा शौलाला कळविले, 25
शौलाने उत्तर दिले, “दावीदाला सांगा राजाला हुंडा म्हणून काही नको,
मात्र राजाच्या शत्रूंचा सूड घ्यावा म्हणून शंभर पलिष्ट्यांची अग्रत्वचा
पाहिजे.” दावीद पलिष्ट्यांच्या हाती मरून जावा यासाठी ही शौलाची
योजना होती. 26 सेवकांनी ज्यावेळी या गोष्टी दावीदाला सांगितल्या, तो
राजाचा जावई होण्यास आनंदाने तयार झाला, ठरविलेल्या वेळे आधी
27 दावीदाने आपली माणसे आपल्याबरोबर घेतली व जाऊन दोनशे
पलिष्ट्यांना मारले आणि त्यांच्या अग्रत्वचा आणल्या, दावीद राजाचा
जावई व्हावा म्हणून त्यांनी त्या मोजल्या. मग शौलाने आपली कन्या
मीखल दावीदाला त्याची पत्नी म्हणून दिली. 28 जेव्हा शौलाला लक्षात
आले की याहवेह दावीदाबरोबर होते आणि त्याची कन्या मीखल हिची
दावीदावर प्रीती होती, 29 तेव्हा शौलाला दावीदाचे अधिकच भय वाटू
लागले व तो त्याच्या आयुष्यभर दावीदाचा वैरी म्हणून राहिला. 30
पलिष्ट्यांच्या सरदारांनी बाहेर जाऊन युद्ध सुरूच ठेवले आणि जेव्हा ते
असे करीत, त्या त्यावेळी शौलाच्या बाकीच्या सैन्यापेक्षा दावीदाला
अधिक यश मिळे, आणि तो प्रसिद्ध होत गेला.

**19** शौलाने त्याचा पुत्र योनाथान आणि सर्व सेवकांना सांगितले की
त्यांनी दावीदाला मारून टाकावे. परंतु योनाथानला दावीद फार
आवडत असे 2 म्हणून त्याने दावीदाला सावध केले, “माझा पिता शौल
तुला मारण्याची संधी शोधत आहे. तर उद्या सकाळपर्यंत तू सावध राहा;
गुप्त ठिकाणी जा व तिथेच लपून राहा. 3 तू जिथे आहेस तिथे बाहेर
मैदानात माझ्या पित्याबरोबर मी उभा राहीन; त्याच्याशी मी तुझ्याविषयी
बोलेन आणि जे मला समजेल ते मी तुला कळवेन.” 4 योनाथान त्याचा
पिता शौल याच्याशी दावीदाबद्दल चांगले बोलत म्हणाला, “राजाने
त्यांचा सेवक दावीद याचे काही वाईट करू नये; त्याने तुमचे काही वाईट
केले नाही आणि त्याने जे काही केले त्यामुळे तुम्हाला मोठा फायदा
झाला आहे. 5 त्याने त्याचा प्राण पणाला लावून त्या पलिष्ट्याला मारले.
याहवेहने सर्व इस्राएलसाठी मोठा विजय मिळवून दिला आणि तुम्हाला
ते पाहून आनंद झाला होता. तर मग दावीदासारख्या निर्दोष व्यक्तीला
विनाकारण मारून तुम्ही पाप का करावे?” 6 शौलाने योनाथानचे
बोलणे ऐकले आणि शपथ घेतली: “खचितच जिवंत याहवेहची शपथ,
दावीदाला जिवे मारले जाणार नाही.” 7 तेव्हा योनाथानने दावीदाला
बोलाविले आणि झालेले सर्व संभाषण त्याला सांगितले. त्याने त्याला
शौलाकडे नेले आणि नेहमीप्रमाणे दावीद शौलापुढे राहिला. 8 त्यानंतर
पुन्हा एकदा युद्ध सुरू झाले आणि दावीद जाऊन पलिष्ट्यांशी लढला,
त्याने त्यांना असे मारले की ते त्याच्यापुढून पळून गेले. 9 परंतु शौल
आपल्या घरी हातात भाला घेऊन बसला असता दावीद त्याच्यापुढे वीणा
वाजवित होता, तेव्हा याहवेहकडून पाठविलेला एक दुष्ट आत्मा शौलावर
आला, 10 शौलाने दावीदाला आपल्या भाल्याने भिंतीशी खिळण्याचा
प्रयत्न केला, परंतु दावीद तिथून निसटला आणि भाला भिंतीत शिरला.
त्या रात्री दावीद निसटला. 11 शौलाने दावीदाच्या घरावर पहारा ठेवून
सकाळी त्याला मारावे म्हणून माणसे पाठवली. परंतु दावीदाची पत्नी
मीखल हिने त्याला सावध केले, “जर आज रात्री तू आपला जीव
वाचवण्यासाठी पळ काढला नाही तर उद्या सकाळी तू मारला जाशील.”
12 तेव्हा मीखलने दावीदाला खिडकीतून खाली उतरविले आणि तो
पळून गेला. 13 मीखलने एक मूर्ती घेऊन ती पलंगावर ठेवली, उशाकडे
शेळीचे केस लावून ते एका वस्त्राने झाकले. 14 जेव्हा शौलाने दावीदाला
पकडण्यासाठी माणसे पाठवली, तेव्हा मीखल म्हणाली, “तो आजारी
आहे.” 15 तेव्हा शौलाने दावीदाला पाहण्यासाठी माणसे परत पाठवली
आणि त्यांना सांगितले, “त्याच्या पलंगासहित त्याला घेऊन या म्हणजे
मी त्याला ठार मारेन.” 16 परंतु जेव्हा माणसे आत गेली, त्यांना दिसले
की पलंगावर मूर्ती होती आणि उशाशी शेळीचे केस. 17 शौल मीखलला
म्हणाला, “तू मला असे का फसविलेस आणि त्याने पळून जावे म्हणून
तू माझ्या शत्रूला का जाऊ दिलेस?” मीखल त्याला म्हणाली, “मला तो
म्हणाला, ‘मला जाऊ दे, मी तुला का मारावे?’” 18 जेव्हा दावीद निसटून
पळाला तेव्हा तो रामाह येथे शमुवेलकडे गेला आणि शौलाने त्याच्याशी
केले ते सर्वकाही त्यांना सांगितले. मग तो व शमुवेल नायोथ येथे
जाऊन राहिले. 19 दावीद रामाहतील नायोथ येथे असल्याचे शौलाला
कळले; 20 तेव्हा त्याने दावीदाला पकडण्यासाठी माणसे पाठवली, परंतु
जेव्हा त्यांनी संदेष्ट्यांचा घोळका भविष्यवाणी करीत आणि शमुवेल
त्यांचा पुढारी म्हणून तिथे उभा आहे असे पाहिले, तेव्हा परमेश्वराचा
आत्मा शौलाच्या माणसांवर आला आणि ते सुद्धा भविष्यवाणी करू
लागले. 21 जे झाले याविषयी शौलाला सांगण्यात आले, तेव्हा त्याने
अजून माणसे पाठवली आणि त्यांनी सुद्धा भविष्यवाणी केली. शौलाने
तिसऱ्यांदा माणसे पाठवली आणि त्यांनी सुद्धा भविष्यवाणी केली. 22
शेवटी, शौल स्वतः रामाहास निघाला व सेखू येथील मोठ्या विहिरीपर्यंत
पोहोचल्यावर, त्याने विचारले, “दावीद व शमुवेल कुठे आहेत?” ते
म्हणाले, “रामाहतील नायोथ येथे ते गेले आहेत.” 23 शौल रामाहतील
नाइयोथकडे निघाला. परंतु परमेश्वराचा आत्मा त्याच्यावरही आला आणि

नायोथपर्यंत पोहोचेपर्यंत भविष्यवाणी करीत चालत गेला. 24 त्याने
आपली वस्त्रे काढली आणि शमुवेलपुढे भविष्यवाणी करू लागला. तो
संपूर्ण दिवस व ती रात्र शौल विवस्त्र पडून राहिला. त्यावरूनच लोक
म्हणतात, “शौलसुद्धा संदेष्ट्यांपैकी एक आहे काय?”

**20** नंतर दावीद रामाहतील नायोथ येथून पळून गेला आणि
योनाथानकडे जाऊन त्याने विचारले, “मी काय केले आहे? माझा
अपराध काय आहे? तुझ्या पित्याशी मी काय चुकीचे वागलो आहे की, ते
मला मारण्याचा प्रयत्न करीत आहेत?” 2 “कधीच नाही!” योनाथानने
उत्तर दिले. “तू मरणार नाहीस! माझा पिता कोणतेही काम; लहान किंवा
मोठे, ते मला सांगितल्याशिवाय करीत नाही. तर ते माझ्यापासून ही गोष्ट
का लपवून ठेवतील? हे खरे आहे ना!” 3 परंतु दावीदाने शपथ घेतली
आणि म्हणाला, “तुझ्या पित्याला चांगलेच माहीत आहे की, मी तुझ्या
दृष्टीत कृपा पावलो आहे आणि ते स्वतःशी म्हणाले आहेत, ‘योनाथानला
हे माहीत होऊ नये नाहीतर तो दुःखी होईल.’ तरीपण जिवंत याहवेहची व
तुझ्या जिवाची शपथ की, माझ्यामध्ये व मृत्यूमध्ये फक्त एका पावलाचे
अंतर आहे.” 4 योनाथान दावीदाला म्हणाला, “तुला वाटेल, ते मी
तुझ्यासाठी करेन.” 5 तेव्हा दावीद म्हणाला, “पाहा उद्या चंद्रदर्शन आहे
आणि मला राजाबरोबर चंद्रदर्शनाचे भोजन करावयाचे आहे; पण मला
जाऊ दे म्हणजे मी परवाच्या संध्याकाळपर्यंत शेतात लपून राहीन. 6
जर माझी अनुपस्थिती तुझ्या पित्याला जाणवली, तर त्यांना सांग,
‘दावीदाला त्याच्या गावाकडे, बेथलेहेमकडे तातडीने जायचे होते, कारण
त्याच्या संपूर्ण कुळासाठी वार्षिक यज्ञ आहे.’ 7 जर ते म्हणाले, ‘ठीक
आहे,’ तर तुझा सेवक सुरक्षित आहे. परंतु जर त्यांचा संयम सुटला तर
खात्री करून घे की, मला इजा करण्याचा त्यांचा हेतू आहे. 8 तर, तुझ्या
सेवकावर दया दाखव, कारण तू त्याला याहवेहसमोर तुझ्याशी करार
करून घेतले आहेस. जर मी दोषी आहे, तर तू स्वतःच मला मार! तुझ्या
पित्याच्या हाती मला का स्वाधीन करावे?” 9 “कधीच नाही!” योनाथान
म्हणाला. “जर मला थोडीतरी कल्पना असती की, माझ्या पित्याने तुला
इजा करावयाचे योजले आहे, तर मी तुला सांगणार नाही काय?” 10
दावीदाने योनाथानाला विचारले, “जर तुझ्या पित्याने तुला कठोर उत्तर
दिले तर मला कोण सांगणार?” 11 योनाथान दावीदाला म्हणाला,
“चल, आपण बाहेर मैदानात जाऊ.” तेव्हा ते मिळून तिकडे गेले. 12
नंतर योनाथान दावीदाला म्हणाला, “याहवेह इस्राएलचे परमेश्वर यांची
मी शपथ घेतो की, परवा या सुमाराला मी खात्रीने माझ्या पित्याचे
मनोगत समजून घेईन, जर तुझ्या हिताचे काही असले तर ते मी तुला
कळविणार नाही काय? 13 परंतु जर तुला इजा करावी असा माझ्या
पित्याचा हेतू असला आणि जर त्याविषयी मी तुला कळवले नाही आणि
तुला शांतीने पाठवले नाही, तर याहवेह योनाथानशी असेच किंवा त्याहून
अधिक कठोरपणे वागो. याहवेह जसे माझ्या पित्याबरोबर आहेत तसेच
तुझ्याबरोबरही असोत. 14 आणि जशी याहवेहची अटळ दया तशी मी
जिवंत असेपर्यंत माझ्यावर असू दे, म्हणजे मी मरणार नाही, 15 एवढेच
नाही तर, याहवेहने दावीदाच्या प्रत्येक शत्रूंना पृथ्वीच्या पाठीवरून
काढून टाकले तरीसुद्धा माझ्या कुटुंबावरील तुझी दया कधीही काढू
नकोस.” 16 तेव्हा योनाथानने दावीदाच्या घराण्याबरोबर एक करार
केला, तो म्हणाला, “आता याहवेह दावीदाच्या शत्रूंची झडती घेवो.” 17
आणि योनाथानने दावीदाकडून त्याच्या आपल्या प्रीतिकरिता त्याच्या
शपथेची पुष्टी केली, कारण आपल्या जिवासारखीच त्याने त्याच्यावर
प्रीती केली. 18 नंतर योनाथान दावीदाला म्हणाला, “उद्या चंद्रदर्शन
आहे. तुझी अनुपस्थिती जाणवेल, कारण तुझे आसन रिकामे असणार.
19 परवाच्या दिवशी संध्याकाळपर्यंत तू त्या ठिकाणी जाऊन लप, जिथे
आधी हा त्रास सुरू झाला तेव्हा लपला होता आणि एझेल दगडाकडे
वाट पाहा. 20 मी निशाणा साधित आहे असे दाखवित त्या दगडाच्या
दिशेने तीन बाण मारेन. 21 नंतर मी एका मुलाला पाठवेन आणि सांगेन,
‘जा, बाणांचा शोध कर.’ जर मी त्याला म्हटले, ‘पाहा, बाण तुझ्या
अलीकडच्या बाजूला आहेत; ते इकडे घेऊन ये,’ तेव्हा तू ये, कारण
खचितच जिवंत याहवेहची शपथ, तू सुरक्षित आहेस; तुला धोका नाही.”
22 पण जर मी त्या मुलाला म्हटले, “पाहा, बाण तुझ्या पलीकडे आहेत,
तेव्हा तू निघून जा, कारण याहवेह तुला दूर पाठवित आहेत. 23 आणि
ज्या विषयाबद्दल तू आणि मी चर्चा केली आहे, ते लक्षात ठेव, तुझ्या
आणि माझ्यामध्ये याहवेह सर्वकाळ साक्षी आहे.” 24 तेव्हा दावीद
शेतात जाऊन लपला आणि चंद्रदर्शनाच्या दिवशी राजा भोजनास बसले.
25 राजा नेहमीप्रमाणे आसनावर योनाथानच्या समोरच्या भिंतीजवळ
बसला होता आणि अबनेर शौलाच्या बाजूला बसला, परंतु दावीदाचे
आसन रिकामेच होते. 26 शौल त्या दिवशी काही बोलला नाही, कारण
त्याला वाटले, “दावीदाला काहीतरी झाल्यामुळे तो विधीनुसार अशुद्ध
झाला असेल; खात्रीनेच तो अशुद्ध आहे.” 27 परंतु दुसऱ्या दिवशी,
त्या महिन्याच्या दुसऱ्या दिवशी दावीदाचे स्थान पुन्हा रिकामे होते.
तेव्हा शौलाने त्यांचा पुत्र योनाथान याला विचारले, “इशायाचा पुत्र
काल आणि आजही भोजनास का आला नाही?” 28 योनाथानने
शौलास उत्तर दिले, “दावीदाने बेथलेहेमला जाण्यासाठी मला आग्रहाने
परवानगी मागितली. 29 तो म्हणाला, ‘मला जाऊ दे, कारण माझे
घराणे नगरामध्ये यज्ञ करीत आहेत आणि मी तिथे असावे असा माझ्या
भावाने हुकूम केला आहे. जर तुझी माझ्यावर कृपादृष्टी असली, तर मला
माझ्या भावांना भेटण्यासाठी जाऊ दे.’ त्यामुळे तो राजाच्या मेजवानीस
आला नाही.” 30 शौलाचा राग योनाथानवर भडकला आणि तो त्याला
म्हणाला, “भ्रष्ट आणि फितुरी स्त्रीच्या मुला! तू तुझ्या स्वतःची व जिने
तुला जन्म दिला त्या तुझ्या आईची बेअब्रू करून त्या इशायच्या पुत्राच्या
बाजूने आहेस हे मला माहीत नाही काय? 31 जोपर्यंत इशायाचा पुत्र या
पृथ्वीवर जिवंत आहे, तोपर्यंत तू किंवा तुझे राज्य स्थापित होणार नाही.
आताच कोणाला तरी त्याच्याकडे पाठवून त्याला माझ्याकडे घेऊन
ये, कारण त्याने अवश्य मरावे!” 32 योनाथानने आपला पिता शौल
याला विचारले, “त्याला मारून टाकावे असे त्याने काय केले आहे?”
33 परंतु शौलाने योनाथानला मारण्यासाठी त्याच्यावर भाला फेकला.
तेव्हा योनाथानला समजले की दावीदाला मारावे असा संकल्प त्याच्या

पित्याने केला आहे. 34 योनाथान रागाने संतप्त होऊन मेजावरून
उठला; चंद्रदर्शन सणाच्या दुसऱ्या दिवशी त्याने भोजन केले नाही;
कारण दावीदाप्रित्यर्थ आपल्या पित्याची लज्जास्पद वागणूक पाहून
त्याला फार वाईट वाटले. 35 सकाळी योनाथान एका लहान मुलाला
घेऊन दावीदाची भेट घेण्यासाठी शेतात गेला. 36 आणि तो त्या मुलाला
म्हणाला, “मी बाण मारतो, तू पळत जाऊन ते बाण शोध.” तो मुलगा
पळू लागला, तेव्हा योनाथानने त्याच्या पलीकडे बाण मारला. 37 जेव्हा
तो मुलगा योनाथानचा बाण ज्या ठिकाणी पडला होता तिथे आला,
तेव्हा योनाथान त्याला ओरडून म्हणाला, “बाण तुझ्या पलीकडे नाही
काय?” 38 तेव्हा योनाथान ओरडला, “घाई कर. लवकर जा! थांबू
नकोस!” त्या मुलाने बाण उचलला आणि त्याच्या धन्याकडे परतला.
39 (त्या मुलाला या सर्व गोष्टीबद्दल काही माहीत नव्हते; फक्त योनाथान
आणि दावीद यांनाच ते माहीत होते.) 40 नंतर योनाथानने आपली
शस्त्रे त्या मुलाकडे देत म्हटले, “जा, हे घेऊन परत नगराकडे जा.”
41 तो मुलगा निघून गेल्यानंतर, दावीद त्या दगडाच्या दक्षिण बाजूने
उठला आणि योनाथानसमोर भूमीवर उपडे पडून तीन वेळेस नमन केले.
नंतर त्या दोघांनी एकमेकांचे चुंबन घेतले आणि एकत्र रडले—परंतु
दावीद अधिक रडला. 42 योनाथान दावीदाला म्हणाला, “शांतीने जा,
कारण याहवेहच्या नावाने आपण एकमेकांशी मैत्रीची शपथ घेतली
आहे, आपण असे म्हटले आहे, ‘तुझ्या आणि माझ्यामध्ये आणि तुझे
वंशज आणि माझे वंशज यामध्ये याहवेह साक्षी आहेत.’” तेव्हा दावीद
तिथून निघाला आणि योनाथान नगराकडे परत गेला.

**21** दावीद नोब येथे अहीमेलेख याजकाकडे गेला. अहीमेलेख भीतीने
कापत दावीदाला भेटला आणि विचारले, “तू एकटाच का आहेस?
तुझ्याबरोबर कोणीच का नाही?” 2 दावीदाने अहीमेलेख याजकाला
उत्तर दिले, “राजाने मला एका कामगिरीवर पाठवले आहे आणि मला
सांगितले, ‘ज्या कामगिरीवर मी तुला पाठवित आहे त्याबद्दल कोणालाही
माहीत होऊ नये.’ आणि माझ्या माणसांनी मला मी एका ठराविक
ठिकाणी भेटावे असे मी त्यांना सांगितले आहे. 3 तर आता, तुझ्याजवळ
काय आहे? मला पाच भाकरी दे किंवा तुझ्याजवळ जे काही असेल ते
दे.” 4 परंतु याजकाने दावीदाला उत्तर दिले, “माझ्याजवळ कोणती
साधारण भाकर नाही, तरीही काही पवित्र भाकर येथे आहे, जी माणसे
तुझ्याबरोबर आहेत ती मात्र स्त्रियांपासून दूर राहिली पाहिजेत.” 5
दावीदाने याजकाला उत्तर दिले, “नक्कीच, नेहमीप्रमाणे मी जेव्हा
बाहेर पडतो तेव्हा स्त्रियांना आमच्यापासून दूर ठेवतो. कामगिरी पवित्र
नसताना सुद्धा माणसांची शरीरे पवित्र असतात. तर आज किती अधिक
पवित्र असतील!” 6 तेव्हा याजकाने त्याला समर्पित समक्षतेची भाकर
दिली, कारण समर्पित भाकरीशिवाय दुसरी भाकर तिथे नव्हती. जेव्हा
ताजी भाकरी याहवेहच्या समक्षतेत ठेवली जात असे तेव्हा शिळी
भाकर काढून टाकली जात असे. 7 त्या दिवशी शौलाचा एक सेवक
तिथे होता, ज्याला याहवेहसमोर थांबवून ठेवले गेले होते; तो शौलाचा
मुख्य मेंढपाळ दवेग, एदोमी प्रांतातील होता. 8 दावीदाने अहीमेलेखास
विचारले, “येथे तुझ्याकडे एखादा भाला किंवा तलवार आहे काय?
कारण राजाची कामगिरी इतकी तातडीची होती, मी माझी तलवार किंवा
दुसरे कोणतेही शस्त्र आणलेले नाही.” 9 याजकाने उत्तर दिले, “ज्या
पलिष्टी गल्याथाला तू एलाहच्या खोऱ्यात ठार मारलेस त्याची तलवार
येथे आहे; ती कापडात गुंडाळून एफोदाच्या मागे ठेवलेली आहे. तुला
पाहिजे तर ती तू घे; त्या शिवाय दुसरी तलवार येथे नाही.” दावीद
म्हणाला, “तिच्यासारखी दुसरी तलवार नाही; ती मला दे.” 10 त्या
दिवशी दावीद शौलापासून पळाला आणि गथचा राजा आखीशकडे
गेला. 11 परंतु आखीशाचे सेवक त्याला म्हणाले, “हा दावीद, या देशाचा
राजा नाही काय? ज्याच्याविषयी त्यांनी असे म्हणून गाईले व नाचले
तो हाच नाही काय: “शौलाने हजारांना वधले, आणि दावीदाने दहा
हजार वधले?” 12 हे शब्द दावीदाच्या अंतःकरणाला लागले व त्याला
गथचा राजा आखीशची भीती वाटली. 13 म्हणून त्याने त्यांच्यासमोर
मनोविकृत असल्याचे सोंग घेतले; व तो त्यांच्याबरोबर होता तेव्हा तो
वेड्यासारखे वागू लागला, फाटकाच्या दारांवर ओरडू लागला आणि
आपल्या दाढीवरून लाळ गाळू लागला. 14 आखीश राजा त्याच्या
सेवकांना म्हणाला, “पाहा तो मनुष्य वेडा आहे! त्याला माझ्याकडे का
आणले? 15 माझ्याकडे वेडी माणसे कमी आहेत का की हे वेडेचाळे
करावयाला या व्यक्तीला तुम्ही माझ्यासमोर आणले आहे? या मनुष्याने
माझ्या घरात यावे काय?”

**22** दावीदाने गथ सोडले आणि पळून जाऊन अदुल्लाम येथील
गुहेकडे गेला. जेव्हा त्याच्या भावांनी आणि त्याच्या पित्याच्या
घराण्यातील लोकांनी याबद्दल ऐकले तेव्हा ते त्याच्याकडे गेले. 2 जे
सर्व निराशेत किंवा कर्जात किंवा असमाधानी होते ते त्याच्याभोवती
गोळा झाले आणि दावीद त्यांचा सेनापती झाला. सुमारे चारशे लोक
त्याच्याबरोबर होते. 3 तिथून निघून दावीद मोआबातील मिस्पाह येथे
गेला आणि मोआबच्या राजाला म्हणाला, “परमेश्वर माझ्यासाठी काय
करेल, हे मला समजेपर्यंत माझ्या आईवडिलांना तुमच्याजवळ राहू
द्याल काय?” 4 तेव्हा त्याने त्यांना मोआबच्या राजाकडे सोडले आणि
जोपर्यंत दावीद गडांमध्ये होता तोपर्यंत ते राजाकडे राहिले. 5 परंतु
गाद संदेष्टा दावीदाला म्हणाला, “गडांमध्ये राहू नकोस; यहूदीयाच्या
प्रदेशामध्ये जा.” तेव्हा दावीद तिथून निघाला आणि हेरेथ नावाच्या
जंगलात गेला. 6 आता शौलाने ऐकले की, दावीद आणि त्याच्या
माणसांचा शोध लागला आहे. तेव्हा शौल हातात भाला घेऊन, गिबियाह
येथील टेकडीवर चिंचेच्या झाडाखाली बसला, त्याचे सर्व अधिकारी
त्याच्या सभोवती उभे राहिले. 7 शौल त्यांना म्हणाला, “बिन्यामीन
पुरुषांनो, ऐका! इशायाचा पुत्र तुम्हा सर्वांना शेते आणि द्राक्षमळे देणार
काय? तो तुम्हाला हजारांचे किंवा शंभरांचे सेनापती करणार काय? 8
याच कारणामुळे तुम्ही सर्वांनी माझ्याविरुद्ध कट केला आहे काय?
माझ्या पुत्राने इशायच्या पुत्राबरोबर करार केला तेव्हा कोणीही मला
सांगितले नाही. तुमच्यापैकी कोणालाही माझी काळजी नाही किंवा जसे
आज केले तसे माझ्याच मुलाने माझ्या सेवकाला माझ्यासाठी दबा धरून

बसविले आहे याविषयी कोणी मला सांगितले नाही." 9 परंतु शौलाच्या
अधिकाऱ्यांबरोबर उभा असलेला दवेग एदोमी म्हणाला, "मी नोब येथे
इशायच्या पुत्राला अहीतूब याचा पुत्र अहीमेलेख याच्याकडे येताना
पाहिले. 10 अहीमेलेखने त्याच्यासाठी याहवेहकडे चौकशी केली; त्याने
त्याला काही अन्नसामुग्री व पलिष्टी गल्याथाची तलवार सुद्धा दिली."
11 तेव्हा राजाने अहीतूबचा पुत्र अहीमेलेख याजक आणि त्याच्या
कुटुंबातील सर्व पुरुष, जे नोब येथे याजक होते यांना बोलाविणे पाठविले
आणि ते सर्व राजाकडे आले. 12 शौल म्हणाला, "अहीतूबच्या पुत्रा,
ऐक." तो उत्तरला, "होय, माझ्या धन्या." 13 शौल त्याला म्हणाला,
"तू माझ्याविरुद्ध कट का केलास, तू इशायच्या पुत्राला भाकर आणि
तलवार देऊन त्याच्यासाठी परमेश्वराकडे चौकशी केली, ज्यामुळे त्याने
माझ्याविरुद्ध बंड केले आहे आणि तो आज माझ्यासाठी दबा धरून
बसला आहे?" 14 अहीमेलेखाने राजाला उत्तर दिले, "तुमच्या सर्व
सेवकांपैकी राजाचा जावई दावीद याच्याइतका विश्वासू असा दुसरा
कोण आहे जो तुमच्या अंगरक्षकांचा प्रमुख आणि तुमच्या घराण्यात
सर्वाधिक आदरणीय आहे? 15 केवळ त्याच दिवशी मी त्याच्यासाठी
परमेश्वराकडे चौकशी केली काय? नक्कीच नाही! राजाने आपल्या
सेवकावर किंवा त्याच्या पित्याच्या घराण्यातील कोणावरही आरोप
करू नये, कारण आपल्या सेवकाला या सर्व प्रकरणाबद्दल काहीच
माहीत नाही." 16 परंतु राजा म्हणाला, "अहीमेलेख, तू आणि तुझे
संपूर्ण कुटुंब, तुम्ही खात्रीने मराल." 17 नंतर राजाने त्याच्या बाजूला
असलेल्या अंगरक्षकांना हुकूम दिला: "पुढे येऊन याहवेहच्या याजकांना
जिवे मारा, कारण ते सुद्धा दावीदाच्या बाजूने आहेत. दावीद माझ्यापासून
पळून चालला होता, हे त्यांना माहीत होते, तरी त्यांनी मला सांगितले
नाही." परंतु याहवेहच्या याजकांवर हात उगारण्यास अंगरक्षकांची इच्छा
नव्हती. 18 तेव्हा राजाने दवेगला आज्ञा केली, "तू मागे वळ आणि
याजकांना मारून टाक." तेव्हा एदोमी दोएग फिरला आणि त्यांना मारून
टाकले. त्या दिवशी तागाचे एफोद वस्त्र घातलेल्या पंचाऐंशी पुरुषांना
त्याने मारून टाकले. 19 त्याने याजकांचे शहर नोब, यातील पुरुष आणि
स्त्रिया, लेकरे आणि तान्ही बालके, आणि तेथील गुरे, गाढवे आणि मेंढरे
सुद्धा तलवारीने मारून टाकले. 20 परंतु अहीतूबचा पुत्र अहीमेलेख याचा
एक पुत्र अबीयाथार निसटून दावीदाकडे पळून गेला. 21 अबीयाथारने
दावीदाला सांगितले की, शौलाने याहवेहच्या याजकांना मारून टाकले
आहे. 22 तेव्हा दावीद अबीयाथारला म्हणाला, "त्या दिवशी, एदोमी
दवेग तिथे होता, मला माहीत होते की, तो नक्कीच शौलाला सांगेल.
तुझ्या सर्व घराण्याच्या मृत्यूस मी जबाबदार आहे. 23 माझ्याबरोबर
राहा; घाबरू नकोस. जो मनुष्य तुला मारण्याचा प्रयत्न करत आहे,
तो मला सुद्धा मारण्याचा प्रयत्न करत आहे. तू माझ्याबरोबर सुरक्षित
राहशील."

**23** जेव्हा दावीदाला कळविण्यात आले, "पाहा, पलिष्टी लोक
कईलाहच्या विरुद्ध लढाई करीत आहेत आणि धान्याची खळी
लुटत आहेत." 2 तेव्हा त्याने याहवेहला विचारले, "मी तिकडे जाऊन
पलिष्ट्यांवर हल्ला करू काय?" याहवेहने दावीदाला उत्तर दिले, "जा,
पलिष्ट्यांवर हल्ला कर आणि कईलाहला वाचव." 3 परंतु दावीदाची
माणसे त्याला म्हणाली, "येथे यहूदीयाच्या प्रदेशामध्ये असतानाच
आम्हाला भीती वाटते, जर कईलाहकडे जाऊन आम्ही पलिष्ट्यांच्या
सैन्याविरुद्ध गेलो तर किती अधिक धोका असेल!" 4 दावीदाने
पुन्हा एकदा याहवेहला विचारले आणि याहवेहने त्याला उत्तर दिले,
"कईलाहकडे जा, कारण पलिष्ट्यांना मी तुझ्या हाती देणार आहे."
5 तेव्हा दावीद आणि त्याची माणसे कईलाहकडे गेली, पलिष्ट्यांशी
लढले आणि त्यांची गुरे नेली. त्याने पलिष्टी लोकांचे मोठे नुकसान केले
आणि कईलाहच्या लोकांना वाचविले. 6 (आता अहीमेलेखचा पुत्र
अबीयाथार दावीदाकडे कईलाह येथे पळून येताना त्याने आपल्याबरोबर
एफोद आणला होता.) 7 शौलाला कोणी सांगितले की, दावीद कईलाह
येथे गेला आहे आणि तो म्हणाला, "परमेश्वराने त्याला माझ्या हाती
दिले आहे, कारण ज्या नगरास वेशी व भिंती आहेत त्यात जाऊन
दावीदाने स्वतःला कैद करून घेतले आहे." 8 तेव्हा कईलाहास जाऊन
दावीदाला व त्याच्या माणसांना वेढावे म्हणून शौलाने त्याच्या संपूर्ण
सैन्याला युद्धासाठी बोलाविले. 9 जेव्हा दावीदाला समजले की, शौल
त्याच्याविरुद्ध कट करीत आहे, तेव्हा तो अबीयाथार याजकाला म्हणाला,
"एफोद इकडे आणा." 10 दावीद म्हणाला, "याहवेह, इस्राएलच्या
परमेश्वरा, शौल माझ्यामुळे या कईलाह नगराचा नाश करण्यास पाहत
आहे, असे तुमच्या दासाने नक्की ऐकले आहे. 11 कईलाहचे लोक मला
त्याच्या स्वाधीन करतील काय? तुमच्या सेवकाने ऐकल्याप्रमाणे शौल
इकडे येईल काय? याहवेह, इस्राएलच्या परमेश्वरा, मी विनंती करतो,
तुमच्या सेवकाला हे सांगा." आणि याहवेहने उत्तर दिले, "तो येईल." 12
पुन्हा दावीदाने विचारले, "कईलाहचे लोक मला आणि माझ्या माणसांना
शौलाच्या स्वाधीन करतील काय?" आणि याहवेह म्हणाले, "होय, ते
करतील." 13 तेव्हा दावीद आणि त्याची सुमारे सहाशे माणसे यांनी
कईलाह सोडले आणि ते ठिकठिकाणी फिरत राहिले. जेव्हा शौलाला
सांगण्यात आले की, दावीद कईलाहतून निसटून गेला आहे, तो तिकडे
गेला नाही. 14 दावीद अरण्यातील गडांमध्ये आणि जीफच्या डोंगराळ
प्रदेशातील रानामध्ये राहू लागला. दिवसेंदिवस शौल त्याचा शोध घेत
होता, परंतु परमेश्वराने दावीदाला त्याच्या हाती दिले नाही. 15 दावीद
जीफच्या वाळवंटातील होरेश येथे असताना त्याला कळले की, शौल
त्याचा प्राण घेण्यासाठी बाहेर पडला आहे. 16 आणि शौलाचा पुत्र
योनाथान होरेश येथे दावीदाकडे गेला आणि त्याने दावीदाला मदत केली
व परमेश्वराठायी सबळ केले. 17 तो म्हणाला, "भिऊ नकोस, माझा
पिता शौल तुझ्यावर हात टाकणार नाही. तू इस्राएलचा राजा होशील
आणि मी तुझा दुय्यम होईन, हे माझा पिता शौलसुद्धा जाणून आहे."
18 तेव्हा त्या दोघांनी याहवेहसमोर एक करार केला. नंतर योनाथान
घरी गेला, परंतु दावीद होरेश येथेच राहिला. 19 जिफी लोक गिबियाह
येथे शौलाकडे गेले आणि म्हणाले, "होरेशच्या गडांमध्ये, हकीलाहच्या
डोंगरात, यशीमोनच्या दक्षिणेकडे दावीद आमच्यामध्ये लपून राहत नाही

काय? 20 तर आता, महाराज, जेव्हा तुमची इच्छा होईल तेव्हा खाली या आणि त्याला तुमच्या हाती देण्याची जबाबदारी आमची असेल.” 21 शौलाने उत्तर दिले, “तुम्ही माझ्यावर जी दया दाखविली त्यामुळे याहवेह तुमचे कल्याण करो. 22 जा आणि अधिक माहिती मिळवा. दावीद नेहमी कुठे जातो आणि त्याला तिकडे कोणी पाहिले, याचा शोध करा. मला समजले की तो फारच धूर्त आहे. 23 लपण्यासाठी ज्या ठिकाणांचा तो उपयोग करतो त्यांचा शोध करा आणि निश्चित माहिती घेऊन माझ्याकडे परत या. मग मी तुमच्याबरोबर जाईन; जर तो त्याच भागात असेल, तर यहूदाहच्या सर्व कुळांमधून मी त्याला शोधून काढेन.” 24 तेव्हा ते बाहेर पडले आणि शौलाच्यापुढे जीफकडे गेले. आता दावीद आणि त्याची माणसे यशीमोनच्या दक्षिणेकडील अराबाह येथे माओनच्या वाळवंटात होती. 25 शौल आणि त्याच्या माणसांनी शोध सुरू केला आणि जेव्हा दावीदाला याबद्दल सांगण्यात आले तेव्हा तो खाली खडकाकडे गेला आणि माओनच्या वाळवंटात राहिला. जेव्हा शौलाने हे ऐकले तेव्हा तो दावीदाचा पाठलाग करीत माओनच्या वाळवंटात गेला. 26 शौल डोंगराच्या एका बाजूने जात होता तर दावीद आणि त्याची माणसे दुसऱ्या बाजूला होती, शौलापासून दूर जाण्याची ते घाई करत होते. कारण शौल आणि त्याचे सैनिक दावीद व त्याच्या माणसांना पकडण्यास जवळ येत होते, 27 एक संदेशवाहक शौलाकडे आला, व म्हणाला, “लवकर या! पलिष्ट्यांनी देशावर हल्ला केला आहे.” 28 तेव्हा शौलाने दावीदाचा पाठलाग करण्याचे सोडून दिले आणि तो पलिष्ट्यांशी लढण्यास गेला. याच कारणामुळे या ठिकाणाला सेला-हम्माहलेकोथ असे म्हटले जाते. 29 नंतर दावीद तिथून पुढे गेला आणि एन-गेदीच्या गडांमध्ये राहिला.

**24** पलिष्ट्यांचा पाठलाग करून परत आल्यानंतर शौलाला सांगण्यात आले, “दावीद एन-गेदीच्या वाळवंटात आहे.” 2 तेव्हा शौलाने सर्व इस्राएलमधून सक्षम असलेले तीन हजार तरुण पुरुष घेतले आणि ते दावीदाचा व त्याच्या माणसांचा शोध करण्यासाठी रानबकऱ्यांच्या खडकाळ भागात गेले. 3 रस्त्याने फिरत तो मेंढवाड्याच्या जवळ आला. तिथे एक गुहा होती. शौल तिथे बहिर्दिशेस गेला, दावीद आणि त्याची माणसेही त्या गुहेत अगदी लांब आतील बाजूस होती. 4 दावीदाची माणसे म्हणाली, “हाच तो दिवस आहे, ज्याविषयी याहवेहने तुम्हाला सांगितले होते, ‘मी तुझ्या शत्रूला तुझ्या हाती देईन तेव्हा तुला वाटेल तसे तू त्याचे कर.’” तेव्हा दावीदाने हळूवारपणे सरकत जाऊन शौलाच्या झग्याचा काठ कापून घेतला. 5 त्यानंतर शौलाच्या झग्याचा काठ आपण कापला म्हणून दावीदाचे मन त्याला टोचू लागले. 6 तो त्याच्या माणसांना म्हणाला, “मी माझ्या धन्यावर, याहवेहच्या अभिषिक्तावर हात टाकावा अशी गोष्ट याहवेह माझ्या हातून न घडवो; कारण ते याहवेहचे अभिषिक्त आहेत.” 7 या शब्दांनी दावीदाने त्याच्या माणसांचा कडकपणे निषेध केला आणि शौलावर हल्ला करण्यास आवरले. तेव्हा शौल गुहेतून बाहेर निघून आपल्या मार्गाने गेला. 8 नंतर दावीद गुहेच्या बाहेर आला आणि शौलाला हाक मारली, “महाराज, माझ्या धन्या!” जेव्हा शौलाने मागे पाहिले, तेव्हा दावीदाने भूमीकडे आपले तोंड करून दंडवत घातले. 9 तो शौलाला म्हणाला, “तुम्ही लोकांचे का ऐकता, जेव्हा ते म्हणतात, ‘दावीद तुला इजा करण्यास पाहत आहे’? 10 आज तुम्ही स्वतः तुमच्या डोळ्यांनी पाहिले आहे की, कशाप्रकारे याहवेहने गुहेमध्ये तुम्हाला माझ्या हाती दिले होते. तुम्हाला मारून टाकावे असे काहीजण म्हणाले, परंतु मी तुम्हाला सोडले; मी म्हणालो, ‘मी माझ्या धन्यावर हात टाकणार नाही, कारण ते याहवेहचे अभिषिक्त आहेत.’ 11 पाहा, माझ्या पित्या, तुमच्या झग्याचा तुकडा माझ्या हातात आहे तो पाहा! मी तुमच्या झग्याचा काठ कापून घेतला परंतु तुम्हाला मारून टाकले नाही. यावरून माझ्याकडे दुष्ट किंवा फितुरी असल्याचा दोष नाही. मी तुमच्याशी चुकीचे वागलो नाही, तरीही तुम्ही माझ्या जिवाची शिकार करण्यास टपला आहात. 12 याहवेह तुमच्या आणि माझ्यामध्ये न्याय करो. तुम्ही माझ्याबरोबर जे चुकीचे केले आहे त्याचा बदला याहवेहच घेवो, परंतु मी तुम्हाला हात लावणार नाही. 13 जशी प्राचीन काळाची म्हण ‘दुष्टापासून दुष्टाई येते,’ म्हणून माझा हात तुम्हाला स्पर्श करणार नाही. 14 “इस्राएलचा राजा कोणाविरुद्ध बाहेर आला आहे? तुम्ही कोणाचा पाठलाग करीत आहात? एका मेलेल्या कुत्र्याचा? एखाद्या पिसवाचा? 15 याहवेहनेच आपला न्यायाधीश होऊन आपल्यामध्ये निवाडा करावा. त्यांनी माझा वाद लक्षात घेऊन माझा कैवार घ्यावा; व मला तुमच्या हातून सोडवून माझी सुटका करावी.” 16 जेव्हा दावीदाने त्याचे हे बोलणे संपविले तेव्हा शौलाने विचारले, “दावीदा, माझ्या पुत्रा, हा तुझाच आवाज आहे काय?” आणि शौल मोठ्याने रडला, 17 तो दावीदाला म्हणाला, “तू माझ्यापेक्षा अधिक नीतिमान आहेस, तू माझ्याशी सदाचाराने वागलास, परंतु मी तुझ्याशी वाईट वागलो. 18 तू माझ्याशी चांगले वागतोस ते तू आताच मला दाखवून दिले आहेस; याहवेहने मला तुझ्या हाती दिले होते, परंतु तू मला मारून टाकले नाहीस. 19 कोणा मनुष्याला त्याचा शत्रू सापडला तेव्हा त्याला इजा केल्याशिवाय जाऊ देईल काय? ज्याप्रकारे तू आज माझ्याशी वागलास त्याचे चांगले प्रतिफळ याहवेह तुला देवो. 20 मला माहीत आहे की, तू खरोखर राजा होशील आणि इस्राएलचे राज्य तुझ्या हातात स्थापित होईल. 21 तेव्हा आता मला याहवेहची शपथ घेऊन सांग की, माझ्या वंशजांचा तू नाश करणार नाहीस किंवा माझ्या पित्याच्या घराण्यातून माझे नाव पुसून टाकणार नाहीस.” 22 तेव्हा दावीदाने शौलास शपथेने वचन दिले; नंतर शौल घरी गेला, परंतु दावीद आणि त्याची माणसे गडाकडे गेली.

**25** शमुवेल मरण पावला, तेव्हा सर्व इस्राएली लोक एकत्र जमले आणि त्याच्यासाठी शोक केला; आणि त्यांनी त्याला रामाह येथील त्याच्या घरी पुरले. नंतर दावीद खाली पारानच्या वाळवंटात गेला. 2 माओन येथे एक श्रीमंत मनुष्य होता, ज्याची कर्मेलमध्ये मालमत्ता होती, त्याच्याकडे एक हजार बोकडे आणि तीन हजार मेंढरे होते आणि तो कर्मेलमध्ये लोकर कातरत होता. 3 त्याचे नाव नाबाल आणि त्याच्या पत्नीचे नाव अबीगईल होते. ती बुद्धिमान व सुंदर स्त्री

होती, परंतु तिचा पती कालेबच्या वंशाचा असून कठोर व दुष्ट वृत्तीचा
होता. 4 आणि नाबाल मेंढरांची कातरणी करीत आहे असे दावीदाने
रानात ऐकले. 5 तेव्हा दावीदाने दहा तरुण पुरुष पाठवित म्हटले,
“कर्मेल येथे नाबालकडे जा आणि माझ्या नावाने त्याला अभिवादन
करा. 6 त्याला म्हणा, ‘चिरकाळ जग! तुला, तुझ्या घराण्याला व सर्व जे
तुझे आहे त्यांना चांगली स्वस्थता लाभो! 7 “‘मी ऐकत आहे की, ही
मेंढरे कातरण्याची वेळ आहे. जेव्हा तुझे मेंढपाळ आमच्याबरोबर होते,
आम्ही त्यांच्याशी वाईट वागलो नाही आणि जितका काळ ते कर्मेल
येथे होते त्यांचे काहीही हरवले नाही. 8 आपल्या चाकरांना ते विचार
आणि ते तुला सांगतील. म्हणून आता माझ्या माणसांवर कृपादृष्टी कर,
कारण आम्ही सणाच्या वेळेस आलो आहोत, तर कृपा करून जे काही
तुझ्या हाती येईल ते तुझ्या सेवकांना आणि तुझा पुत्र दावीद यांना दे.’”
9 जेव्हा दावीदाची माणसे तिथे आली, त्यांनी दावीदाच्या नावाने हा
निरोप नाबालास दिला व ते वाट पाहत राहिले. 10 नाबालने दावीदाच्या
सेवकांना उत्तर दिले, “कोण हा दावीद? कोण हा इशायाचा पुत्र?
आजकाल पुष्कळ सेवक त्यांच्या मालकांपासून पळून जात आहेत. 11
जी भाकर व जे पाणी आणि जे मांस मी माझी मेंढरे कातरणाऱ्यांसाठी
कापून ठेवले आहे ते, जी माणसे कुठून आली हे मला माहीत नाही
अशांना द्यावे काय?” 12 तेव्हा दावीदाची माणसे परत त्यांच्या वाटेने
गेली. आणि पोहोचल्यावर प्रत्येक शब्दाचा अहवाल दावीदाला दिला.
13 तेव्हा दावीद त्याच्या माणसांना म्हणाला, “प्रत्येकाने आपली तलवार
कंबरेस बांधा,” आणि त्यांनी तसे केले आणि दावीदानेसुद्धा त्याची
तलवार कंबरेस बांधली. सुमारे चारशे पुरुष दावीदाबरोबर गेले आणि
दोनशे पुरुष सामानाजवळ राहिले. 14 चाकरांपैकी एकाने नाबालाची
पत्नी अबीगईल हिला सांगितले, “दावीदाने रानातून आपल्या धन्याला
अभिवादन देण्यासाठी निरोप्यांना पाठविले, परंतु त्यांनी त्यांचा अपमान
केला. 15 तरीही ही माणसे आमच्याबरोबर चांगलीच होती. ते आमच्याशी
वाईट वागले नाहीत आणि संपूर्ण वेळ आम्ही शेतामध्ये त्यांच्याजवळ
होतो तेव्हा आमचे काहीही हरवले नाही. 16 जेव्हा आम्ही आमची मेंढरे
त्यांच्याबरोबर राखीत होतो, तेव्हा रात्रंदिवस ते भिंतीसारखे आमच्या
सभोवती होते. 17 आता काय करावे याचा तुम्ही विचार करा, कारण
आमच्या मालकावर आणि त्यांच्या संपूर्ण घराण्यावर संकट येत आहे.
ते इतके दुष्ट मनुष्य आहेत की, त्यांच्याबरोबर बोलण्यास कोणी धजत
नाही.” 18 तेव्हा अबीगईलने घाई केली. तिने दोनशे भाकरी, दोन बुधले
द्राक्षारस, पाच मेंढरांचे शिजविलेले मांस, पाच सिआह भाजलेले धान्य,
मनुक्यांच्या शंभर व अंजिराच्या दोनशे ढेपा घेऊन ते सर्व गाढवांवर
लादले. 19 आणि ती आपल्या सेवकांना म्हणाली, “तुम्ही पुढे जा; मी
तुमच्यामागे येते.” परंतु तिने तिचा पती नाबाल याला काहीही सांगितले
नाही. 20 ती गाढवावर बसून डोंगराच्या ओढ्याकडून जात असताना,
तिथे दावीद आणि त्याची माणसे तिच्या समोरून येत होती व ती त्यांना
भेटली. 21 दावीद नुकताच म्हणाला होता, “त्याचे काही हरवू नये
म्हणून मी रानात या लोकांच्या मालमत्तेवर पहारा ठेवला, ते व्यर्थच गेले.
त्याने मला चांगल्याची फेड वाईटाने केली आहे. 22 उद्या सकाळपर्यंत
त्याच्या लोकांपैकी मी एकही पुरुष जिवंत ठेवला तर परमेश्वर दावीदाचे
तसेच किंवा त्यापेक्षा अधिक वाईट करो!” 23 जेव्हा अबीगईलने
दावीदाला पाहिले, तेव्हा ती घाईने गाढवावरून उतरली आणि तिने
दावीदासमोर तोंड जमिनीकडे करून अभिवादन केले. 24 ती त्याच्या
पायावर पडली आणि म्हणाली, “माझ्या धन्या, आपल्या सेवकाच्या
अपराधांची क्षमा करा, आणि मला तुमच्याशी बोलू द्या; तुमच्या दासीचे
बोलणे ऐकून घ्या. 25 माझ्या धन्या, तो दुष्ट मनुष्य नाबाल याच्याकडे
लक्ष देऊ नका. तो त्याच्या नावाप्रमाणेच आहे, त्याच्या नावाचा अर्थ
मूर्ख आहे आणि त्याच्या ठायी मूर्खपणा आहे. परंतु ज्या पुरुषांना
माझ्या धन्याने पाठवले त्यांना मी पाहिले नाही.” 26 तर आता, माझ्या
धन्या, याहवेह तुमच्या जिवंत परमेश्वराची व तुमची शपथ, याहवेहने
तुम्हाला रक्तपातापासून आणि तुमच्या हातांना सूड घेण्यापासून आवरले
आहे, तुमचे सर्व शत्रू आणि जे माझ्या धन्याला इजा आणू पाहतात
ते नाबालाप्रमाणे होवो. 27 आणि ही भेट, जी तुमच्या दासीने माझ्या
धन्यासाठी आणली आहे ती तुमच्या बरोबरच्या माणसांना दिली जावो.
28 “तुमच्या दासीच्या उद्धटपणाची कृपा करून क्षमा करा. याहवेह तुमचा
परमेश्वर खचितच माझ्या धन्याचे राजघराणे कायमचे स्थापित करेल,
कारण आपण याहवेहतर्फे युद्ध करत आहात आणि तुम्ही जिवंत आहात
तोपर्यंत तुमच्या ठायी दुष्टता आढळणार नाही. 29 जरी कोणा मनुष्याने
तुमचा जीव घेण्यासाठी तुमचा पाठलाग केला, तरी माझ्या धन्याचा
जीव याहवेह तुमचा परमेश्वर यांच्याजवळ जिवंतांच्या गाठोड्यामध्ये
सुरक्षित राहील, परंतु जसे गोफणीच्या झोळीतून फेकावे तसे याहवेह
तुमच्या शत्रूंचे प्राण भिरकावून देतील. 30 याहवेहने माझ्या धन्यासाठी
जी चांगली अभिवचने दिली आहेत, ती प्रत्येक गोष्ट पूर्णतेस नेऊन
आपणास इस्राएलवर अधिकारी म्हणून नेमल्यावर, 31 माझ्या धन्याने
विनाकारण रक्तपात केल्याविषयी किंवा सूड घेतल्याविषयी तुमच्या
मनाला टोचणी लागणार नाही किंवा लटपटणारे ओझे असणार नाही.
आणि जेव्हा याहवेह तुमचे परमेश्वर तुम्हाला यश मिळवून देतील तेव्हा
आपल्या दासीची आठवण करा.” 32 दावीद अबीगईलला म्हणाला,
“ज्यांनी तुला आज माझी भेट घेण्यासाठी पाठवले, ते याहवेह इस्राएलचे
परमेश्वर धन्यवादित असोत. 33 तुझ्या उत्तम निर्णयामुळे व तू मला आज
रक्तपातापासून आणि माझ्या हाताने सूड घेण्यापासून दूर ठेवले त्यामुळे
तू आशीर्वादित असो. 34 नाहीतर जिवंत याहवेह इस्राएलचे परमेश्वर
ज्यांनी मला तुझा नाश करण्यापासून आवरले त्यांची शपथ, जर तू त्वरा
करून माझी भेट घेण्यास आली नसतीस तर पहाटेपर्यंत नाबालाचा
एकही पुरुष जिवंत राहिला नसता.” 35 नंतर तिने जे काही त्याच्यासाठी
आणले होते ते तिच्या हातून दावीदाने स्वीकारले आणि म्हणाला,
“शांतीने घरी जा. मी तुझे म्हणणे ऐकले आहे आणि तुझी विनंती मान्य
केली आहे.” 36 जेव्हा अबीगईल नाबालाकडे गेली तेव्हा तो घरात होता,
त्याने एका राजासारखी मेजवानी आयोजित केली होती. आणि मद्यपान
करून तो फार नशेत होता, म्हणून सकाळ होईपर्यंत तिने त्याला काहीही

सांगितले नाही. 37 नंतर सकाळी नाबालाची नशा उतरल्यावर, त्याच्या
पत्नीने त्याला घडलेल्या गोष्टी सांगितल्या, ते सर्व नाबालाला सांगितले.
तेव्हा त्याच्या हृदयाला धक्का बसला आणि तो दगडासारखा झाला. 38
सुमारे दहा दिवसानंतर नाबालाला याहवेहने फटका मारला आणि तो
मरण पावला. 39 जेव्हा दावीदाला कळले की, नाबाल मरण पावला
आहे, तेव्हा तो म्हणाला, “ज्यांनी माझ्या अपमानाचा सूड नाबालावर
उगवला आहे आणि ज्यांनी आपल्या सेवकाला वाईट करण्यापासून
आवरले आहे त्या याहवेहची स्तुती असो. याहवेहने नाबालाची दुष्टाई
त्याच्याच मस्तकावर आणली आहे.” नंतर अबीगईलने त्याची पत्नी
व्हावे म्हणून दावीदाने तिच्याकडे संदेश पाठवला. 40 त्याचे सेवक कर्मेल
येथे जाऊन अबीगईलला म्हणाले, “दावीदाने आम्हाला तुमच्याकडे
पाठविले आहे यासाठी की, तुम्हाला त्यांची पत्नी होण्यास आम्ही घेऊन
जावे.” 41 तिने तिचे मस्तक जमिनीपर्यंत लवून म्हणाली, “मी तुमची
दासी आहे. मी तुमची सेवा करण्यास व माझ्या धन्याच्या सेवकांचे पाय
धुण्यास तयार आहे.” 42 अबीगईल त्वरित गाढवावर बसली आणि
तिच्या पाच दासी घेऊन दावीदाच्या निरोप्यांबरोबर गेली आणि त्याची
पत्नी झाली. 43 दावीदाने येज्रीलची अहीनोअम हिच्याशीही विवाह केला
होता आणि त्या दोघी त्याच्या पत्नी होत्या. 44 परंतु शौलाने त्याची
कन्या मीखल, जी दावीदाची पत्नी होती तिला लईशाचा पुत्र पालती
याला दिले होते, जो गल्लीम येथील होता.

**26** जिफी लोक गिबियाह येथे शौलाकडे गेले आणि म्हणाले,
“जेशीमोनच्या समोर असलेल्या हकीलाहच्या डोंगरावर दावीद
लपून राहत नाही काय?” 2 तेव्हा शौल त्याच्या निवडलेल्या तीन हजार
इस्राएली सैनिकांना बरोबर घेऊन दावीदाचा शोध घेण्यासाठी जीफच्या
वाळवंटाकडे निघाला. 3 शौलाने जेशीमोन समोर हकीलाहच्या डोंगरावर
जाण्याच्या रस्त्याच्या बाजूला छावणी घातली आणि दावीद रानातच
राहिला. परंतु शौल आपल्यामागे आला आहे हे समजून, 4 दावीदाने
आपले दोन सैनिक पाठवून शौल खरोखरच तिथे आला काय याची
माहिती काढून घेतली. 5 नंतर दावीद बाहेर पडला आणि ज्या ठिकाणी
शौलाने छावणी टाकली होती तिथे गेला. त्याने पाहिले शौल, नेराचा
पुत्र अबनेर, सैन्याचा सेनापती झोपले होते. शौल छावणीच्या आतील
बाजूस झोपला होता, त्याच्याभोवती सैन्याचा पहारा होता. 6 तेव्हा
दावीदाने हिथी अहीमेलेख आणि जेरुइयाहचा पुत्र अबीशाई, योआबाचा
भाऊ यांना विचारले, “छावणीच्या आत शौलाकडे माझ्याबरोबर कोण
जाईल?” अबीशाई म्हणाला, “मी तुझ्याबरोबर जाईन.” 7 तेव्हा
दावीद आणि अबीशाई रात्रीच्या वेळेस सैन्याकडे गेले आणि शौल
तिथे छावणीच्या आतमध्ये झोपलेला होता, त्याच्या उशाशी त्याचा
भाला जमिनीमध्ये रोवलेला होता. अबनेर आणि सैनिक त्याच्याभोवती
झोपलेले होते. 8 अबीशाई दावीदाला म्हणाला, “परमेश्वराने तुझ्या
शत्रूला आज तुझ्या हाती दिले आहे. तर आता मला भाल्याने त्याच्यावर
एकच वार करून त्याला जमिनीत खुपसून टाकू द्या; दुसऱ्यांदा वार
करावा लागणार नाही.” 9 परंतु दावीद अबीशाईला म्हणाला, “त्याचा
वध करू नको! याहवेहच्या अभिषिक्तावर हात टाकून कोण निर्दोष राहू
शकेल?” 10 दावीद म्हणाला, “जिवंत याहवेहची शपथ, याहवेह स्वतः
त्याला मारतील, किंवा त्याची वेळ येईल आणि त्याचा मृत्यू होईल, किंवा
तो युद्धात जाईल आणि त्याचा नाश होईल. 11 परंतु मी याहवेहच्या
अभिषिक्तावर हात टाकावा असे याहवेह माझ्या हातून घडवून न आणो.
तर आता त्याच्या उशाशी असलेला भाला आणि पाण्याचा चंबू घे, मग
आपण जाऊ या.” 12 तेव्हा दावीदाने शौलाच्या उशाशी असलेला भाला
आणि पाण्याचा चंबू घेतला आणि ते निघून गेले. कोणीही ते पाहिले
नाही किंवा कोणाला ते कळले नाही, किंवा कोणी उठले नाही. ते सर्व
झोपी गेले होते, कारण याहवेहकडून त्यांना गाढ निद्रा लागली होती. 13
नंतर दावीद पलीकडे गेला आणि डोंगराच्या उंच टोकावर अंतरावर उभा
राहिला; त्यांच्यामध्ये बरेच अंतर होते. 14 दावीदाने सैन्याला आणि
नेरचा पुत्र अबनेर यांना मोठ्याने विचारले, “अबनेर, तू मला उत्तर
देणार नाहीस काय?” अबनेरने उत्तर दिले, “तू कोण आहेस, राजाला
कोण हाक मारत आहे?” 15 दावीद अबनेरास म्हणाला, “तू एक पुरुष
आहेस, नाही का? आणि इस्राएलमध्ये तुझ्यासारखा कोण आहे? तू
तुझा धनी, म्हणजेच राजाचे रक्षण का केले नाहीस? कोणीतरी तुझ्या
धनी राजाचा वध करण्यास आला होता. 16 तू जे केलेस ते चांगले
नाही. जिवंत याहवेहची शपथ, तू आणि तुझी माणसे मेलीच पाहिजेत,
कारण तू तुझ्या मालकाचे, याहवेहच्या अभिषिक्ताचे रक्षण केले नाहीस.
तुझ्या सभोवती पाहा. राजाचा भाला आणि पाण्याचा चंबू जे त्यांच्या
उशाशी होते ते कुठे आहेत?” 17 शौलाने दावीदाचा आवाज ओळखला
आणि म्हणाला, “दावीदा माझ्या मुला, हा तुझाच आवाज आहे काय?”
दावीदाने उत्तर दिले, “होय, माझे धनी, माझ्या राजा, हा माझाच आवाज
आहे.” 18 आणि तो पुढे म्हणाला, “माझा धनी आपल्या सेवकाचा
पाठलाग का करीत आहे? मी काय केले आहे आणि कोणत्या बाबतीत
दोषी आहे? 19 तर आता माझ्या धन्याने, राजाने आपल्या सेवकाचे
म्हणणे ऐकावे. जर याहवेहने तुम्हाला माझ्याविरुद्ध चेताविले आहे,
तर आपण अर्पण स्वीकारावे. परंतु जर लोकांनी हे केले आहे, तर
ते याहवेहसमोर शापित केले जावोत! कारण मला आज याहवेहच्या
वतनाचा वाटा मिळू नये म्हणून त्यांनी मला बाहेर घालवून म्हटले, ‘जा,
इतर दैवतांची सेवा कर.’ 20 आता याहवेहच्या समक्षतेपासून दूर माझे
रक्त भूमीवर पडू नये. जसे कोणी डोंगरामध्ये तीतराची शिकार करावी,
तसा इस्राएलचा राजा पिसवा शोधायला बाहेर आला आहे.” 21 तेव्हा
शौल म्हणाला, “मी पाप केले आहे. दावीदा, माझ्या पुत्रा, परत ये.
कारण आज तू माझ्या जिवास मौल्यवान समजलेस, मी पुन्हा तुला
इजा करणार नाही. खरोखरच मी मूर्खासारखा वागलो आणि फार
चुकीचे वागलो.” 22 दावीदाने उत्तर दिले, “हा पाहा, राजाचा भाला,
तुमच्या तरुण पुरुषांपैकी एकाने इकडे येऊन तो घेऊन जा. 23 याहवेह
प्रत्येकाला आपआपल्या नीतिमत्तेचे व विश्वासूपणाचे प्रतिफळ देवो.
याहवेहने आज तुम्हाला माझ्या हाती दिले होते, परंतु मी याहवेहच्या
अभिषिक्तावर हात टाकणार नाही. 24 जसा आज तुमचा जीव मला

मोलाचा वाटला, तसेच याहवेहला माझाही जीव मोलाचा वाटो आणि ते
सर्व संकटांपासून मला वाचवो.” 25 तेव्हा शौल दावीदास म्हणाला,
“दावीदा, माझ्या मुला, तू आशीर्वादित होशील; तू महान गोष्टी करशील
आणि खात्रीने विजयी होशील.” तेव्हा दावीद त्याच्या मार्गाने निघून गेला
आणि शौल घरी परतला.

**27** परंतु दावीदाने आपल्या मनात म्हटले, “कधी तरी मी शौलाच्या
हातून मरणारच आहे. पलिष्ट्यांच्या देशात पळून जाणे उत्तम
आहे. मग शौल इस्राएलमध्ये माझा शोध करण्याचे सोडून देईल आणि मी
त्याच्या हातातून निसटून जाईन.” 2 तेव्हा दावीद आणि त्याच्याबरोबरची
सहाशे माणसे गथ नगराचा राजा माओकचा पुत्र आखीशकडे गेले.
3 दावीद आणि त्याची माणसे आखीश बरोबर गथ येथे राहू लागले.
प्रत्येकाबरोबर त्यांचे कुटुंब होते आणि दावीदाच्या दोन पत्नी; येज्रीली
अहीनोअम आणि कर्मेली नाबालाची विधवा अबीगईल होत्या. 4 जेव्हा
शौलाला कळले की, दावीद गथकडे पळून गेला आहे, त्यानंतर त्याने
त्याचा शोध केला नाही. 5 नंतर दावीद आखीश राजास म्हणाला, “जर
आपल्या दृष्टीत मी कृपा पावत असलो तर, मला देशातील एका गावात
जागा द्या म्हणजे मी तिथे राहीन. आपल्या सेवकाने या राजकीय शहरात
तुमच्याबरोबर का राहावे?” 6 म्हणून आखीशने त्या दिवशी त्याला
सिकलाग हे शहर दिले. आणि तेव्हापासून ते यहूदीयाच्या राजांचे आहे.
7 दावीद पलिष्ट्यांच्या हद्दीमध्ये एक वर्ष चार महिने राहिला. 8 नंतर
दावीद आणि त्याच्या माणसांनी गशूरी, गिरजी आणि अमालेकी या
लोकांवर छापा टाकला. (पुरातन काळापासून हे लोक शूर शहरापासून
इजिप्तपर्यंत वाढत गेलेल्या प्रदेशात राहत होते.) 9 जेव्हा दावीद
कोणत्याही प्रांतावर हल्ला करीत असे तो एकही पुरुष किंवा स्त्री जिवंत
सोडत नसे, परंतु तेथील मेंढरे, गुरे, गाढवे व उंट आणि वस्त्रे यांची
लूट घेत असे. नंतर तो आखीशकडे परत आला. 10 जेव्हा आखीशने
विचारले, “आज तुम्ही कोणत्या प्रांतावर स्वारी केली?” दावीद त्याला
उत्तर देत असे, “यहूदीयाच्या नेगेव विरुद्ध” किंवा “यरहमेल्यांच्या
नेगेव विरुद्ध” किंवा “केनीयांच्या नेगेव विरुद्ध.” 11 त्याने गथ येथे
आणण्यासाठी एकही पुरुष किंवा स्त्री जिवंत ठेवले नव्हते, कारण
त्याला वाटले, “ते आमच्याबद्दल सांगतील आणि म्हणतील, ‘दावीदाने
असे केले आहे.’” आणि जोपर्यंत तो पलिष्ट्यांच्या सीमेत राहिला
तोपर्यंत तो असेच करीत असे. 12 आखीशने दावीदावर भरवसा ठेवला
आणि स्वत:शीच म्हणाला, “तो आपल्या इस्राएली लोकांच्या दृष्टीत
इतका घृणास्पद झाला आहे की, तो आयुष्यभर माझा सेवक म्हणून
राहील.”

**28** त्या दिवसांमध्ये इस्राएलविरुद्ध युद्ध करावे म्हणून पलिष्ट्यांनी
त्यांचे सैन्य एकत्र केले. आखीश दावीदाला म्हणाला, “तू हे
खचित समज की, तू आणि तुझी माणसे माझ्याबरोबर सैन्यात येतील.”
2 दावीद म्हणाला, “तर आपला दास काय करू शकतो, हे आपण
पाहाल.” आखीशने उत्तर दिले, “फार चांगले, मी तुला आयुष्यभर माझा
अंगरक्षक करेन.” 3 शमुवेल तर मरण पावला होता आणि सर्व इस्राएली
लोकांनी त्याच्यासाठी शोक केला होता आणि त्याला त्याच्याच रामाह
नगरात पुरले होते. शौलाने मृतात्म्यांशी संपर्क साधणारे आणि तंत्रमंत्र
करणारे यांना देशातून घालवून दिले होते. 4 पलिष्टी एकत्र आले आणि
त्यांनी शूनेम येथे छावणी दिली, तर शौलाने सर्व इस्राएली सैन्याला
एकत्र करून गिलबोआ येथे छावणी दिली. 5 जेव्हा शौलाने पलिष्ट्यांचे
सैन्य पाहिले, तेव्हा तो घाबरला; त्याचे हृदय भीतीने भरून गेले. 6
शौलाने याहवेहला विचारले, परंतु याहवेहने त्याला स्वप्ने किंवा उरीम
किंवा संदेष्टे या कोणत्याही द्वारे उत्तर दिले नाही. 7 तेव्हा शौल त्याच्या
सेवकांना म्हणाला, “माझ्यासाठी एक भूतविद्या जाणकार स्त्रीला शोधा
की, जी मृतात्म्यांशी संपर्क करते, म्हणजे मी जाऊन तिला विचारेन.”
ते म्हणाले, “एक स्त्री एनदोर येथे आहे.” 8 तेव्हा शौलाने आपला
वेश बदलून वेगळे कपडे घातले आणि दोन माणसे घेऊन रात्रीच्या
वेळेस त्या स्त्रीकडे गेला. आणि म्हणाला, “माझ्यासाठी एक आत्म्याला
विचार आणि मी ज्याचे नाव सांगतो त्याला माझ्यासाठी वर आण.” 9
परंतु ती स्त्री त्याला म्हणाली, “तुला नक्कीच माहीत आहे की, शौलाने
काय केले आहे. चेटकीण आणि तंत्रमंत्र करणाऱ्यांना त्याने या देशातून
घालवून टाकले आहे. मी मरावे म्हणून माझ्या जिवासाठी तू सापळा
का टाकतोस?” 10 शौलाने तिला याहवेहची शपथ घातली, “जिवंत
याहवेहची शपथ, यासाठी तुला शिक्षा होणार नाही.” 11 तेव्हा त्या
स्त्रीने विचारले, “मी तुझ्यासाठी कोणाला वर आणू?” तो म्हणाला,
“शमुवेलला वर आण.” 12 जेव्हा त्या स्त्रीने शमुवेलला पाहिले,
तेव्हा ती मोठ्याने ओरडली आणि शौलाला म्हणाली, “तुम्ही मला का
फसविले आहे? तुम्ही शौल आहात!” 13 शौल राजाने तिला म्हटले,
“भिऊ नकोस, तुला काय दिसते?” ती स्त्री म्हणाली, “जमिनीतून एक
भुतासारखी आकृती वर येताना दिसत आहे.” 14 “तो कसा दिसतो?”
त्याने विचारले. “झगा घातलेला एक वृद्ध पुरुष वर येत आहे,” ती
म्हणाली. तेव्हा शौलाने ओळखले की तो शमुवेल होता आणि त्याने
स्वत: त्याचे तोंड खाली जमिनीकडे करून दंडवत घातले. 15 शमुवेल
शौलास म्हणाला, “मला वर आणून तू मला का त्रास दिला आहेस?”
शौलाने उत्तर दिले, “मी फार मोठ्या संकटात आहे, पलिष्टी माझ्याविरुद्ध
लढाई करत आहेत आणि परमेश्वराने मला सोडून दिले आहे. परमेश्वर
मला संदेष्ट्यांच्या अथवा स्वप्नां द्वारे उत्तर देत नाही. यामुळेच मी काय
करावे हे तुम्ही मला सांगावे म्हणून मी तुम्हाला बोलाविले आहे.” 16
शमुवेल म्हणाला, “याहवेहने तुला सोडले आहे आणि ते तुझे शत्रू झाले
आहेत, तर तू माझा सल्ला का घ्यावा? 17 याहवेहने माझ्याद्वारे जे
भविष्य सांगितले होते, ते त्यांनी केले आहे. याहवेहने तुझ्या हातून राज्य
फाडून टाकले आहे आणि ते तुझ्या शेजाऱ्यांपैकी एकाला म्हणजेच
दावीदाला दिले आहे. 18 कारण तू याहवेहची आज्ञा पाळली नाही
किंवा अमालेकी लोकांविरुद्ध याहवेहचा क्रोध उगारला नाही, म्हणून
याहवेहने आज हे तुझ्यासाठी केले आहे. 19 याहवेह इस्राएली लोकांना
आणि तुला पलिष्ट्यांच्या हाती देणार आहे आणि उद्या तू आणि

तुझी मुले माझ्याबरोबर असतील. आणि याहवेह इस्राएलच्या सैन्याला
पलिष्ट्यांच्या देईल.” 20 शौल लगेच तसाच जमिनीवर पडला, शमुवेलने
सांगितलेल्या शब्दांमुळे तो फार भयभीत झाला. त्याच्यात काही शक्ती
राहिली नाही, कारण त्याने दिवसभर आणि रात्रभर काहीही खाल्ले
नव्हते. 21 जेव्हा ती स्त्री शौलाकडे आली आणि तिने पाहिले की तो
फारच हादरून गेला होता, ती म्हणाली, “पाहा, तुझ्या दासीने तुमचा
शब्द मानला आणि माझा जीव मुठीत घेऊन तुम्ही सांगितल्याप्रमाणे
केले. 22 तर आता माझा शब्द माना, मी तुम्हाला थोडे अन्न वाढते ते
खा म्हणजे आपल्या वाटेने जाण्यास तुम्हाला शक्ती असावी.” 23 तो
ते नाकारत म्हणाला, “मी खाणार नाही.” परंतु त्याच्या माणसांनीही
त्या स्त्रीबरोबर त्याला आग्रह केला, तेव्हा त्याने त्यांचे म्हणणे मानले.
तो जमिनीवरून उठून पलंगावर बसला. 24 त्या स्त्रीच्या घरी एक पुष्ट
वासरू होते, ते तिने लवकर कापले. तिने थोडेसे पीठ घेतले, ते मळले
आणि खमीर न घालता भाकरी भाजल्या. 25 नंतर तिने शौल आणि
त्याची माणसे यांच्यासमोर ते वाढले आणि त्यांनी ते खाल्ले. नंतर त्याच
रात्री ते तिथून निघून गेले.

**29** पलिष्ट्यांनी त्यांचे सर्व सैन्य अफेक येथे जमविले आणि इस्राएली
सैन्याने त्यांची छावणी येज्रीलच्या झर्‍याजवळ दिली. 2 पलिष्टी
सरदार आपआपल्या शंभराच्या आणि हजारांच्या तुकड्यांबरोबर निघाले
आणि त्यांच्यामागे दावीद आणि त्याची माणसे आखीश बरोबर चालू
लागले. 3 तेव्हा पलिष्ट्यांच्या सेनाधिकार्‍यांनी विचारले, “या इब्री
लोकांचे येथे काय काम?” आखीशने उत्तर दिले, “हा दावीद नाही
काय, जो इस्राएलचा राजा शौल याच्याकडे अधिकारी होता? तो आता
एक वर्षाहून अधिक काळ माझ्याबरोबर आहे, आणि त्याने शौलाला
सोडले तेव्हापासून आजपर्यंत, मला त्याच्यामध्ये काही दोष सापडला
नाही.” 4 परंतु पलिष्ट्यांचे सेनापती आखीशवर रागावले होते आणि ते
म्हणाले, “त्या मनुष्याला परत पाठवून दे, म्हणजे जे ठिकाण तू त्याला
दिले आहेस तिथे त्याने परत जावे. त्याने आपल्याबरोबर लढाईमध्ये
जाऊ नये, नाहीतर लढाई होत असताना तो आपल्याविरुद्ध लढेल.
आपल्याच लोकांचे डोके कापण्यापेक्षा, त्याच्या धन्याची कृपा मिळविणे
हे किती चांगले असेल? 5 हाच तो दावीद नाही काय, ज्याच्याविषयी
नृत्य करताना त्यांनी गाईले: “‘शौलाने त्याच्या हजारांना मारले, आणि
दावीदाने त्याच्या दहा हजारांना मारले?’” 6 तेव्हा आखीशने दावीदाला
बोलावून म्हटले, “जिवंत याहवेहची शपथ, तू विश्वसनीय आहेस आणि
सैन्यामध्ये तू माझ्याबरोबर सेवा करावी यात मला आनंद आहे. ज्या
दिवशी तू माझ्याकडे आलास तेव्हापासून आजपर्यंत मला तुझ्यामध्ये
काही दोष सापडला नाही, परंतु सरदार तुला अनुमती देत नाहीत. 7
आता तू मागे वळ आणि शांतीने जा; पलिष्टी सरदारांना असंतुष्ट वाटेल
असे काहीही करू नकोस.” 8 दावीदाने आखीशला विचारले, “परंतु
मी काय केले आहे? मी आपल्याकडे आलो तेव्हापासून आतापर्यंत
आपल्या दासामध्ये काही दोष आढळला आहे काय? माझ्या राजाच्या,
मी जाऊन स्वामीच्या शत्रूशी का लढू नये?” 9 आखीशने दावीदाला
उत्तर दिले, “मला माहीत आहे तू माझ्या दृष्टीने परमेश्वराच्या दूतासारखा
आहेस; परंतु पलिष्टी सेनापती म्हणतात, ‘त्याने आमच्याबरोबर युद्धास
जाऊ नये.’ 10 तर सकाळी लवकर ऊठ आणि तुझ्या धन्याचे जे चाकर
तुझ्याबरोबर आले आहेत, त्यांच्याबरोबर पहाट होताच निघून जा.” 11
तेव्हा दावीद आणि त्याची माणसे पहाटेच उठून पलिष्ट्यांच्या प्रदेशाकडे
जाण्यासाठी निघाली आणि पलिष्टी सैन्य येज्रीलपर्यंत गेले.

**30** तिसर्‍या दिवशी दावीद आणि त्याची माणसे सिकलाग येथे
पोहोचली. त्या दरम्यान अमालेक्यांनी नेगेव आणि सिकलाग या
शहरांवर छापा टाकला होता. त्यांनी सिकलाग शहरावर हल्ला करून
ते जाळून टाकले होते, 2 आणि तेथील स्त्रिया व तिथे असलेल्या
प्रत्येक तरुण आणि वृद्धाला त्यांनी कैद करून नेले होते. त्यांच्यातील
कोणालाही त्यांनी मारून टाकले नाही, परंतु त्यांना आपल्याबरोबर नेले
होते. 3 जेव्हा दावीद आणि त्याची माणसे सिकलाग येथे पोहोचली तेव्हा
त्यांना दिसून आले की, त्या शहराचा अग्नीने नाश झालेला आहे आणि
त्यांच्या पत्नी आणि त्यांची मुले व मुली कैद करून नेलेली आहेत. 4
तेव्हा दावीद आणि त्याची माणसे इतकी मोठ्याने रडली की, आणखी
रडण्यास त्यांना शक्ती राहिली नाही. 5 दावीदाच्या दोन्ही पत्नी, येज्रीली
अहीनोअम आणि कर्मेल येथील नाबालाची विधवा अबीगईलला कैद
करून नेले होते. 6 दावीद फार संकटात पडला कारण त्याला धोंडमार
करावी असे तेथील माणसे बोलत होती; आपआपली मुले व मुली
यांच्यासाठी प्रत्येकजण आपल्या हृदयात अतिशय कटुत्वाने भरले होते,
परंतु दावीदाला याहवेह त्याचा परमेश्वर यांच्यामध्ये शक्ती प्राप्त झाली.
7 तेव्हा दावीद अहीमेलेखचा पुत्र अबीयाथार याजकाला म्हणाला,
“एफोद माझ्याकडे आणा.” तेव्हा अबीयाथारने ते त्याच्याकडे आणले,
8 आणि दावीदाने याहवेहला विचारले, “छापा टाकलेल्या या लोकांचा
मी पाठलाग करू काय? ते माझ्या हाती लागतील काय?” याहवेहने
उत्तर दिले, “त्यांचा पाठलाग कर, ते खात्रीने तुझ्या हाती लागतील
आणि त्यांची सुटका करण्यात यश पावशील.” 9 तेव्हा दावीद आणि
त्याच्याबरोबरची सहाशे पुरुष बेसोर खोर्‍याकडे आले, व काहीजण
तिथेच मागे राहिले. 10 त्यांच्यापैकी दोनशे माणसे खूप थकून गेली होती
की, त्यांना ते बेसोर खोरे पार करता येईना, परंतु दावीद आणि इतर
चारशे पुरुषांनी पाठलाग चालू ठेवला. 11 रस्त्याने जाता जाता, त्यांना
एका शेतात इजिप्त देशाचा एक पुरुष भेटला. त्याला त्यांनी दावीदाकडे
आणले. त्याला त्यांनी प्यायला पाणी व खायला भाकर दिली; 12 त्यांनी
त्याला अंजिरांच्या ढेपेचा एक तुकडा व खिसमिसचे दोन घड दिले. ते
खाऊन तो ताजातवाना झाला. कारण त्याने तीन दिवस व तीन रात्र
काहीही खाल्ले नव्हते किंवा पाणी प्याले नव्हते. 13 दावीदाने त्याला
विचारले, “तू कोणाचा आहेस? तू कुठून आलास?” त्याने उत्तर दिले,
“मी इजिप्त देशाचा असून अमालेक्यांचा गुलाम आहे. तीन दिवसांपासून
मी आजारी असल्यामुळे माझ्या धन्याने मला सोडून दिले. 14 आम्ही
नेगेवातील करेथी प्रांत, यहूदीयाचा काही प्रांत आणि कालेबाचा नेगेव
यावर छापा टाकला आणि सिकलाग जाळून टाकले.” 15 दावीदाने

विचारले, “छापा टाकलेल्या त्या टोळीकडे मला नेशील काय?” तो
म्हणाला, “तुम्ही मला मारून टाकणार नाही किंवा मला माझ्या धन्याच्या
स्वाधीन करणार नाही, अशी परमेश्वरापुढे शपथ घ्या, मग मी तुम्हाला
त्यांच्याकडे घेऊन जाईन.” 16 मग त्याने दावीदाला तिथे नेले, तेव्हा
पाहा, ते त्या भागात सर्वत्र पसरले होते. खात, पीत व मौजमजा करीत
होते, कारण त्यांनी पलिष्ट्यांच्या व यहूदीयाच्या देशातून मोठी लूट
आणली होती. 17 दावीद त्यांच्याशी त्या संध्याकाळपासून दुसऱ्या
दिवसाच्या संध्याकाळपर्यंत लढला आणि त्यांच्यातील जे चारशे तरुण
पुरुष उंटांवर स्वार होऊन पळाले त्यांच्याशिवाय एकही सुटला नाही.
18 दावीदाने आपल्या दोन स्त्रिया व अमालेकी लोकांनी जे सर्व लुटून
नेले होते ते परत मिळविले. 19 लहान किंवा मोठा, मुले किंवा मुली,
लूट किंवा जे काही त्यांनी नेले त्यातील काहीही गहाळ राहिले नाही.
दावीदाने सर्वकाही परत आणले. 20 त्याने सर्व मेंढरे व गुरे घेतली,
आणि त्याच्या माणसांनी ती इतर पशूंच्या पुढे हाकीत नेत म्हटले, “ही
दावीदाची लूट आहे.” 21 नंतर जी दोनशे माणसे अतिशय थकल्यामुळे
त्याच्याबरोबर जाऊ शकली नव्हती, आणि जे बेसोर खोऱ्याजवळ राहिले
होते, त्यांच्याजळ दावीद आला. आणि ते दावीदाला व त्याच्याबरोबर
असलेल्या माणसांना भेटायला बाहेर आले. दावीद व त्याची माणसे
जवळ जाताच दावीदाने त्यांना अभिवादन केले. 22 परंतु दावीदाचे
काही दुष्ट व त्रासदायक अनुयायी म्हणाले, “हे लोक आपल्याबरोबर
आले नाही, म्हणून आपण सोडवून आणलेल्या लुटीतील वाटा त्यांना
आम्ही देणार नाही. तथापि, त्यांनी त्यांच्या स्त्रिया व लेकरे घेऊन निघून
जावे.” 23 तेव्हा दावीद म्हणाला, “नाही, माझ्या बंधूंनो! याहवेहने
आपणास जे काही दिले आहे त्याचे आम्ही असे करू नये. याहवेहने
आम्हाला सुरक्षित ठेवले आहे आणि छापा टाकलेली टोळी, आमचे शत्रू
जे आमच्या विरोधात उठले त्यांना याहवेहने आमच्या हाती दिले. 24
याबाबत तुमचे कोण ऐकणार? जो मनुष्य सामानाजवळ राहतो त्याचा
वाटा तेवढाच असणार जेवढा लढाईवर गेलेल्या व्यक्तीचा असणार.
सर्वांना सारखाच वाटा मिळणार.” 25 तेव्हापासून आजपर्यंत दावीदाने
हा नियम व विधी सर्व इस्राएली लोकांस लावून दिला. 26 दावीद जेव्हा
सिकलाग येथे पोहोचला, तेव्हा त्याने लुटीतील काही भाग यहूदीयातील
वडीलजनांस पाठवला आणि म्हटले, “याहवेहच्या शत्रूंच्या लुटीतून
तुमच्यासाठी भेट म्हणून पाठवित आहे.” 27 बेथेल, नेगेवमधील रामोथ
व यत्तीर येथील लोकांना; 28 आणि अरोएर, सिपमोथ, एशतमोआ
येथील लोकांना 29 व राकाल, यरहमेल व केनी नगरातील लोकांना; 30
होरमाह, बोर-आशान, अथाक येथील लोकांना 31 आणि हेब्रोन व इतर
ठिकाणी जिथे तो व त्याची माणसे फिरत असे तेथील लोकांना दावीदाने
त्या भेटी पाठविल्या.

**31** पलिष्ट्यांनी इस्राएलविरुद्ध युद्ध केले; इस्राएली लोक त्यांच्यापुढून
पळून गेले आणि गिलबोआ डोंगरावर पुष्कळजण मारले गेले. 2
पलिष्ट्यांनी शौल आणि त्याच्या पुत्रांचा जोरात पाठलाग केला आणि
त्यांनी त्याचे पुत्र योनाथान, अबीनादाब आणि मलकी-शुआ यांना ठार
मारले. 3 शौलाच्या सर्व बाजूंनी युद्ध भयंकर वाढत गेले आणि जेव्हा
धनुर्धरांनी त्याला गाठले व गंभीररित्या जखमी केले. 4 तेव्हा शौल
त्याच्या शस्त्रवाहकाला म्हणाला, “तुझी तलवार उपस आणि मला
आरपार भोसक, नाहीतर हे बेसुंती लोक येऊन मला भोसकतील व माझी
विटंबना करतील.” परंतु त्याचा शस्त्रवाहक घाबरून गेला होता आणि
तो तसे करेना; तेव्हा शौलाने स्वतःची तलवार घेतली आणि तिच्यावर
तो पडला. 5 जेव्हा शस्त्रवाहकाने पाहिले की शौल मरण पावला
आहे, तेव्हा तो सुद्धा आपल्या तलवारीवर पडला आणि त्याच्याबरोबर
मरण पावला. 6 अशाप्रकारे शौल आणि त्याचे तीन पुत्र आणि त्याचा
शस्त्रवाहक आणि त्याची सर्व माणसे त्याच दिवशी एकत्र मरण पावले.
7 जेव्हा खोऱ्याच्या बाजूने आणि यार्देनेच्या पलीकडे असलेल्या इस्राएली
लोकांनी पाहिले की, इस्राएली सैन्याने पळ काढला आहे आणि शौल
आणि त्याचे पुत्र मरण पावले आहेत, तेव्हा त्यांनी त्यांची नगरे सोडली
आणि तिथून पळून गेले. आणि पलिष्ट्यांनी येऊन तिथे वस्ती केली. 8
दुसऱ्या दिवशी जेव्हा पलिष्टी लोक मेलेल्या लोकांच्या वस्तू लुटण्यासाठी
आले, तेव्हा त्यांना गिलबोआ डोंगरावर शौल आणि त्याचे तीन पुत्र
पडलेले सापडले. 9 त्यांनी शौलाचे शिर छेदले आणि त्याचे शस्त्र काढून
घेतले आणि त्यांनी ही बातमी पलिष्ट्यांच्या संपूर्ण देशामध्ये आणि
त्यांच्या मूर्तींच्या मंदिरात आणि त्यांच्या लोकांमध्ये जाहीर करण्यास
संदेशवाहक पाठवले. 10 त्यांनी त्याची शस्त्रे अष्टारोथच्या मंदिरात
ठेवली आणि त्याचे शरीर बेथ-शान नगराच्या भिंतीवर टांगले. 11 पलिष्टी
लोकांनी शौलाचे काय केले हे जेव्हा याबेश-गिलआदच्या लोकांनी
ऐकले, 12 तेव्हा त्यांचे सर्व शूरवीर रात्रभर चालून बेथ-शान येथे गेले.
त्यांनी शौल आणि त्याच्या पुत्रांचे मृतदेह बेथ-शानच्या भिंतीवरून खाली
उतरविले आणि याबेश येथे आणले व तिथे त्यांनी ते जाळून टाकले. 13
त्यानंतर त्यांनी त्यांच्या अस्थी याबेश येथे चिंचेच्या झाडाखाली पुरल्या
आणि सात दिवस उपास केला.

# 2 शमुवेल

**1** शौलाच्या मृत्यूनंतर, अमालेक्यांची कत्तल करून दावीद परत आला
आणि सिकलाग येथे दोन दिवस राहिला. 2 तिसऱ्या दिवशी
शौलाच्या छावणीतून एक मनुष्य आला, त्याचे कपडे फाटलेले होते
आणि डोक्यावर धूळ घातलेली होती. तेव्हा तो दावीदाकडे आला
आणि जमिनीवर पालथा पडून दंडवत घातले. 3 “तू कुठून आला
आहेस?” दावीदाने त्याला विचारले. त्याने उत्तर दिले, “मी इस्राएलच्या
छावणीतून निसटून पळून आलो आहे.” 4 दावीदाने विचारले, “काय
झाले आहे, ते मला सांग.” त्याने उत्तर दिले, “सैनिक युद्धातून पळून
गेले, पुष्कळजण पडले आणि मरण पावले. शौल आणि त्याचा पुत्र
योनाथान हे सुद्धा मरण पावले आहेत.” 5 तेव्हा ज्या तरुणाने निरोप
आणला होता त्याला दावीदाने विचारले, “शौल आणि त्याचा पुत्र
योनाथान हे मरण पावले हे तुला कसे समजले?” 6 तो तरुण मनुष्य
म्हणाला, “मी सहज गिलबोआच्या डोंगरावर होतो आणि तिथे शौल
त्याच्या भाल्यावर टेकलेला आणि रथाचा सारथी आणि त्यांचे स्वार
जोरात त्याचा पाठलाग करीत होते असे मला दिसले. 7 जेव्हा तो
मागे वळला आणि त्याने मला पाहिले व मला बोलाविले आणि मी
म्हणालो, ‘मी काय करू शकतो?’ 8 “त्याने मला विचारले, ‘तू कोण
आहेस?’ “‘मी अमालेकी आहे.’ मी उत्तर दिले. 9 “तेव्हा तो मला
म्हणाला, ‘येथे माझ्या बाजूला उभा राहा आणि मला मारून टाक! मी
मृत्यूच्या यातनेत आहे, परंतु अजूनही मी जिवंतच आहे.’ 10 “तेव्हा मी
त्याच्या बाजूला उभा राहिलो आणि त्याला मारून टाकले, कारण मला
माहीत होते की, भाल्यावर पडल्याने तो जगू शकला नसता. आणि
जो राजमुकुट त्याच्या डोक्यावर होता आणि त्याच्या बाहुंवरचा कडा
मी येथे माझ्या धन्याजवळ आणले आहेत.” 11 तेव्हा दावीदाने आणि
त्याच्या बरोबरच्या माणसांनी आपली वस्त्रे धरली व फाडली. 12 शौल
आणि त्याचा पुत्र योनाथान आणि याहवेहचे सैन्य आणि इस्राएली राष्ट्र
यांच्यासाठी त्यांनी शोक केला आणि ते रडले आणि संध्याकाळपर्यंत
उपास केला कारण ते तलवारीने मारले गेले होते. 13 नंतर दावीदाने
बातमी घेऊन आलेल्या मनुष्याला विचारले, “तू कुठला आहेस?”
त्याने उत्तर दिले, “मी एका परदेशी मनुष्याचा पुत्र, एक अमालेकी
आहे.” 14 दावीदाने त्याला विचारले, “याहवेहच्या अभिषिक्ताचा नाश
करण्यासाठी तुझा हात उचलताना तुला भीती कशी वाटली नाही?” 15
तेव्हा दावीदाने त्याच्या माणसांतील एकाला बोलाविले आणि म्हटले,
“जा, त्याला मारून टाक!” तेव्हा त्याने त्याच्यावर वार केला आणि तो
मनुष्य मरण पावला. 16 कारण दावीद त्याला म्हणाला होता, “तुझ्या
रक्ताचा दोष तुझ्याच डोक्यावर असो. जेव्हा तू असे म्हणालास की, ‘मी
याहवेहच्या अभिषिक्ताला ठार मारले आहे,’ तुझ्या स्वतःच्या तोंडाने
स्वतःविरुद्ध साक्ष दिली आहे.” 17 शौल आणि त्याचा पुत्र योनाथान
यांच्याविषयी दावीदाने हे विलापगीत रचले, 18 आणि यहूदीयाच्या
लोकांना हे धनुष्याचे विलापगीत शिकविले जावे असा आदेश दिला (ते
याशेरच्या पुस्तकात लिहिलेले आहे): 19 “हे इस्राएला, तुझ्या डोंगरांवर
जसे एक चपळ हरिण मरून पडते, तसे शूरवीर पडले आहेत! 20
“गथमध्ये हे सांगू नका, अष्कलोनच्या रस्त्यांवर याची घोषणा करू नका,
नाहीतर पलिष्ट्यांच्या कन्या हर्ष पावतील, बेसुंत्यांच्या कन्या आनंद
करतील. 21 “गिलबोआच्या डोंगरांनो, तुम्हावर दव किंवा पाऊस न
येवो; तुमच्या उतरणीच्या शेतांवर पावसाच्या सरी न पडोत. कारण तिथे
शूरवीराची ढाल तिरस्कृत झाली, शौलाची ढाल—यापुढे तेलाने पुसली
जाणार नाही. 22 “वध केलेल्यांच्या रक्तापासून शूरवीरांच्या मांसापासून
योनाथानचा बाण मागे फिरला नाही, शौलाची तलवार असमाधानाने
परत आली नाही. 23 शौल आणि योनाथान, जिवंत असता प्रिय व
आवडते होते, मृत्यूमध्येही त्यांचा वियोग झाला नाही. ते गरुडांपेक्षा
वेगवान होते, सिंहांपेक्षा बलवान असे होते. 24 “अहो, इस्राएलच्या
कन्यांनो, शौलासाठी रुदन करा, ज्यांनी तुम्हाला किरमिजी रंगाची आणि
भरजरीत कपडे घातली, ज्यांनी तुमची वस्त्रे सोन्याच्या अलंकारांनी
सुशोभित केली. 25 “हे बलवान युद्धात कसे पडले! योनाथान तुमच्या
डोंगरावर मारला गेला आहे. 26 योनाथान माझ्या भावा, मी तुझ्यासाठी
शोक करतो; तू मला फार प्रिय होतास. माझ्यावरील तुझे प्रेम अद्भुत
असे होते, स्त्रीच्या प्रेमापेक्षा ते अधिक अद्भुत होते! 27 “पाहा, बलवान
कसे पडले आहेत! युद्धाची शस्त्रे नष्ट झाली आहेत!”

**2** त्या दरम्यान, दावीदाने याहवेहला विचारले, “यहूदीयाच्या एखाद्या
गावात मी जाऊ काय?” तेव्हा याहवेह म्हणाले, “जा.” दावीदाने
विचारले, “मी कुठे जावे?” याहवेहने उत्तर दिले, “हेब्रोनास जा.” 2
तेव्हा दावीद त्याच्या दोन पत्नी म्हणजे येज्रीली अहीनोअम आणि
कर्मेलच्या नाबालाची विधवा अबीगईल यांच्याबरोबर तिथे गेला. 3
दावीद त्याच्या बरोबरच्या प्रत्येक माणसांना त्यांच्या कुटुंबासह घेऊन
गेला आणि त्यांनी हेब्रोन व तेथील गावांमध्ये वस्ती केली. 4 तेव्हा
यहूदीयातील माणसे हेब्रोनास आली व तिथे त्यांनी दावीदाचा यहूदाहच्या
गोत्राचा राजा म्हणून अभिषेक केला. जेव्हा दावीदाला सांगण्यात आले
की, ज्या लोकांनी शौलाला पुरले ते याबेश-गिलआदचे लोक होते, 5
तेव्हा दावीदाने याबेश-गिलआदवासियांकडे दूत पाठवून म्हटले, “याहवेह
तुम्हाला आशीर्वादित करो, कारण तुम्ही आपला धनी शौल यांना पुरून
त्यांच्याप्रित्यर्थ दया दाखविली आहे. 6 तर आता याहवेह आपली दया व
विश्वासूपणा तुम्हाला प्रगट करो आणि तुम्ही हे केले आहे म्हणून मी
सुद्धा अशीच कृपा तुम्हावर करेन. 7 तर आता हिंमत ठेवा आणि धैर्य
धरा, कारण शौल तुमचा धनी मरण पावला आहे आणि यहूदीयाच्या
लोकांनी त्यांचा राजा म्हणून माझा अभिषेक केला आहे.” 8 त्या
दरम्यान, शौलाचा सेनापती नेरचा पुत्र अबनेरने शौलाचा पुत्र इश-
बोशेथला महनाईम येथे आणले. 9 त्याने गिलआद, अशुरी, येज्रील
आणि एफ्राईम, बिन्यामीन व सर्व इस्राएलवर त्याला राजा नेमले. 10
शौलाचा पुत्र इश-बोशेथ इस्राएल देशाचा राजा झाला तेव्हा तो चाळीस
वर्षांचा होता आणि त्याने दोन वर्षे राज्य केले. मात्र यहूदाहचे गोत्र
दावीदाशी एकनिष्ठ राहिले. 11 हेब्रोनात यहूदीयावर दावीदाने राज्य केले

त्याचा कालावधी सात वर्षे व सहा महिने होता. 12 नेरचा पुत्र अबनेर
शौलाचा पुत्र इश-बोशेथच्या माणसांबरोबर एकत्र येऊन महनाईम सोडून
गिबोनकडे गेले. 13 जेरुइयाहचा पुत्र योआब आणि दावीदाची माणसे
बाहेर पडली आणि गिबोनाच्या तळ्याकडे भेटली. एक गट तळ्याच्या
एका बाजूला खाली बसला आणि दुसरा गट तळ्याच्या दुसऱ्या बाजूला
बसला. 14 तेव्हा अबनेर योआबाला म्हणाला, “काही तरुण पुरुषांनी
उठून आमच्यापुढे समोरासमोर लढाई होऊ करावी.” “ठीक आहे, त्यांनी
तसे करावे,” योआब म्हणाला. 15 म्हणून ते उभे राहिले आणि त्यांची
मोजणी करण्यात आली; बिन्यामीन आणि शौलाचा पुत्र इश-बोशेथ
यांच्यातील बारा माणसे आणि बारा माणसे दावीदासाठी पुढे आले.
16 नंतर प्रत्येकाने त्याच्या विरोधकाचे डोके पकडले आणि आपला
सुरा विरोधकाच्या कुशीत खुपसला आणि ते मिळून पडले. म्हणून
गिबोनातील त्या जागेला हेलकाथ-हज्जूरीम हे नाव पडले. 17 त्या
दिवशी तीव्र युद्ध झाले आणि अबनेर व इस्राएली सैन्य यांचा दावीदाच्या
माणसांनी पराभव केला. 18 जेरुइयाहचे हे तीन पुत्र: योआब, अबीशाई
आणि असाहेल तिथे होते. असाहेल हरिणीसारखा चपळ पायाचा होता.
19 असाहेलने अबनेरचा पाठलाग केला, त्याचा पाठलाग करताना तो
उजवीकडे किंवा डावीकडे वळला नाही. 20 अबनेरने मागे वळून पाहिले
आणि विचारले, “तू असाहेल आहेस काय?” “होय, मी आहे,” त्याने
उत्तर दिले. 21 तेव्हा अबनेर त्याला म्हणाला, “उजवीकडे किंवा डावीकडे
वळ; एखाद्या तरुण पुरुषाला पकड आणि त्याची शस्त्रे काढून घे.”
परंतु असाहेल त्याचा पाठलाग करण्याचे थांबवेना. 22 अबनेरने पुन्हा
असाहेलला चेतावणी दिली, “माझा पाठलाग करण्याचे थांबव! मी
तुला का मारून टाकावे? तुझा भाऊ योआब याला मी आपले तोंड
कसे दाखवू?” 23 परंतु असाहेलने पाठलाग करण्याचे थांबविण्यास
नाकारले; तेव्हा अबनेरने त्याच्या भाल्याचा दांडा असाहेलच्या पोटात
खुपसला आणि तो भाला त्याच्या पोटातून जाऊन पाठीतून बाहेर आला.
तो पडला आणि तिथेच मरण पावला. आणि प्रत्येकजण जे तिथून येत
होते, ते असाहेल पडून मेला होता, तिथे थांबले. 24 परंतु आता योआब
आणि अबीशाई यांनी अबनेरचा पाठलाग केला, ते गिहाजवळच्या
गिबोनच्या वाळवंटाकडे जाणाऱ्या मार्गावर असलेल्या अम्माहच्या
डोंगरावर येऊन पोहोचले तेव्हा सूर्यास्त होत होता. 25 तेव्हा बिन्यामीनचे
लोक अबनेरच्या मागे गेले. त्यांनी आपला एक गट तयार केला आणि
एका टेकडीच्या शिखरावर उभे राहिले. 26 अबनेरने योआबाला हाक
मारत म्हटले, “तलवारीने सर्वकाळ नाश करावा काय? तुला समजत
नाही काय की याचा शेवट कटुत्वात होणार? आपल्या सोबतीच्या
इस्राएली लोकांचा पाठलाग करण्याचे थांबविण्यास तुझ्या लोकांस
तू आज्ञा कधी देणार?” 27 योआबने उत्तर दिले, “जिवंत परमेश्वराची
शपथ, तू जर बोलला नसतास, तर माणसे सकाळपर्यंत त्यांचा पाठलाग
करीत राहिली असती.” 28 तेव्हा योआबने कर्णा वाजविला आणि
सर्व सैन्य थांबले; त्यांनी पुढे इस्राएलचा पाठलाग केला नाही किंवा ते
त्यांच्याशी पुन्हा लढलेही नाही. 29 अबनेर आणि त्याची माणसे रात्रभर
अराबाहमधून चालत गेली. त्यांनी यार्देन नदी पार केली, सकाळपर्यंत
तसेच पुढे चालत राहिले आणि महनाईम येथे येऊन पोहोचले. 30 नंतर
योआबने अबनेरचा पाठलाग करण्याचे थांबविले आणि संपूर्ण सैन्याला
एकत्र जमविले. असाहेल शिवाय दावीदाची एकोणवीस माणसे गहाळ
होती. 31 परंतु दावीदाच्या माणसांनी अबनेर बरोबर असलेल्या तीनशे
साठ बिन्यामीन लोकांना मारले होते. 32 त्यांनी असाहेलला घेतले आणि
बेथलेहेम येथे त्याच्या वडिलांच्या कबरेत पुरले. नंतर योआब आणि
त्याच्या माणसांनी रात्रभर प्रवास केला आणि पहाटेस हेब्रोनास येऊन
पोहोचले.

**3** शौलाचे घराणे आणि दावीदाचे घराणे यांच्यामधील युद्ध फार काळ
चालू होते. दावीदाचे घराणे अधिक अधिक बलवान होत गेले आणि
शौलाचे घराणे अधिक अधिक दुर्बल होत गेले. 2 हेब्रोन येथे दावीदाचे
जे पुत्र जन्मले ते हे: त्याचा ज्येष्ठपुत्र अम्नोन हा येज्रीली अहीनोअम
हिच्यापासून झाला होता; 3 त्याचा दुसरा पुत्र किलियाब, हा त्याला
कर्मेलच्या नाबालाची विधवा अबीगईल हिच्यापासून झाला; तिसरा पुत्र
अबशालोम हा गशूरचा राजा तलमय याची कन्या माकाह हिच्यापासून
झाला; 4 चौथा पुत्र अदोनियाह हा हग्गीथपासून जन्मला; पाचवा पुत्र
शफाट्याह हा अबीटालपासून झाला; 5 आणि सहावा पुत्र इथ्रियाम
हा दावीदाची पत्नी एग्लाहपासून झाला. 6 दावीद व शौल यांच्या
घराण्यांमधील लढाईच्या काळात, अबनेर शौलाच्या घराण्यात आपले
स्थान मजबूत करीत होता. 7 रिजपाह नावाची शौलाची एक उपपत्नी
होती, जी अय्याहची कन्या होती. इश-बोशेथ अबनेरला म्हणाला,
“तू माझ्या बापाच्या उपपत्नीबरोबर शरीरसंबंध का केला?” 8 तेव्हा
इश-बोशेथचे बोलणे ऐकल्याने अबनेर फार संतापला. त्याने उत्तर
दिले, “मी यहूदीयाच्या कुत्र्याचे डोके आहे काय? आजही मी तुझा
पिता शौल याच्या घराण्याशी आणि त्याच्या कुटुंबाशी आणि त्याच्या
मित्रांशी एकनिष्ठ आहे. मी तुला दावीदाच्या हातून शासन केले नाही.
तरीही या स्त्रीला मध्ये आणून माझ्यावर अपराधाचा आरोप करीत
आहे! 9 याहवेहने शपथ घेऊन दावीदाला जे म्हटले आहे त्याप्रमाणे
मी जर केले नाही तर परमेश्वर अबनेराला तसे किंवा त्यापेक्षा अधिक
शासन करोत. 10 आणि शौलाच्या घराण्याकडून राज्य हस्तांतरीत
करून इस्राएल आणि यहूदीयावर दानपासून बेअर-शेबापर्यंत दावीदाचे
सिंहासन स्थापित केले नाही तर परमेश्वर अबनेरशी अधिक कठोरपणे
वागो.” 11 इश-बोशेथ अबनेरला आणखी एकही शब्द बोलण्यास
धजला नाही, कारण तो अबनेरला घाबरत होता. 12 नंतर अबनेरने
आपल्या निरोप्यांना दावीदाकडे असे म्हणत पाठवले, “हा प्रदेश कोणाचा
आहे? माझ्याबरोबर एक करार कर आणि मी सर्व इस्राएली लोकांना
तुझ्याकडे आणण्यास मदत करेन.” 13 दावीद म्हणाला, “ठीक आहे,
मी तुझ्याबरोबर एक करार करेन. परंतु मी तुझ्याकडून एका गोष्टीची
मागणी करतो: जेव्हा तू मला भेटायला येशील तेव्हा शौलाची कन्या
मीखल हिला घेऊन आल्याशिवाय माझ्यासमोर येऊ नकोस.” 14 नंतर
दावीदाने शौलाचा पुत्र इश-बोशेथ याच्याकडे दूत पाठवून सांगितले,

“माझी पत्नी मीखल मला दे, जिला मी शंभर पलिष्ट्यांच्या अग्रत्वचा
किंमत देऊन वाग्दत्त करून घेतली.” 15 तेव्हा इश-बोशेथने हुकूम करून
मीखलला तिचा पती, लईशचा पुत्र पलतीएलपासून आणले. 16 तरीही
तिचा पती रडत तिच्यामागे बहूरीमपर्यंत गेला. तेव्हा अबनेर त्याला
म्हणाला, “परत घरी जा!” तेव्हा तो परत गेला. 17 अबनेरने इस्राएलच्या
पुढाऱ्यांबरोबर विचारविनिमय केला आणि म्हणाला, “दावीद तुमचा
राजा व्हावा अशी काही काळापासून तुमची इच्छा होती. 18 आता
तसे करा! कारण याहवेहने दावीदाला अभिवचन दिले आहे, ‘माझा
सेवक दावीद याच्याद्वारे माझ्या इस्राएली लोकांना मी पलिष्ट्यांच्या
आणि त्यांच्या सर्व शत्रूंच्या हातातून सोडवेन.’” 19 अबनेर बिन्यामीन
लोकांबरोबरही प्रत्यक्ष बोलला. नंतर तो हेब्रोनास दावीदाकडे गेला व
इस्राएली आणि संपूर्ण बिन्यामीन गोत्राला जे करण्याची इच्छा होती ते
दावीदाला सांगितले. 20 जेव्हा अबनेर त्याच्या बरोबरच्या वीस माणसांना
घेऊन दावीदाकडे हेब्रोनास आला, तेव्हा दावीदाने त्याच्यासाठी आणि
त्याच्या माणसांसाठी मेजवानी तयार केली. 21 तेव्हा अबनेर दावीदाला
म्हणाला, “मी जाऊन माझ्या धनीराजासाठी सर्व इस्राएली लोकांना
एकत्र करेन, यासाठी की त्यांनी तुमच्याबरोबर एक करार करावा, मग
आपल्या मनास येईल त्यांच्यावर आपण राज्य करावे” तेव्हा दावीदाने
अबनेरला रवाना केले आणि तो शांतीने गेला. 22 त्याचवेळेस दावीदाची
माणसे आणि योआब छापा घालून परतले आणि आपल्याबरोबर मोठी
लूट आणली. परंतु अबनेर दावीदाबरोबर हेब्रोनमध्ये नव्हता, कारण
दावीदाने त्याला रवाना केले होते आणि तो शांतीने गेला होता. 23
जेव्हा योआब आणि त्याच्या बरोबरचे सर्व सैनिक आले तेव्हा त्याला
सांगितले गेले की, नेराचा पुत्र अबनेर राजाकडे आला होता आणि राजाने
त्याला परत पाठवून दिले आणि तो शांतीने गेला होता. 24 तेव्हा योआब
राजाकडे गेला आणि म्हणाला, “आपण हे काय केले? पाहा, अबनेर
आपणाकडे आला होता. आपण त्याला का जाऊ दिले? आता तो गेला
आहे! 25 आपणास नेराचा पुत्र अबनेर कसा आहे हे माहीत आहे; तो
आपणास फसवायला आणि आपल्या हालचाली पाहण्यासाठी आणि
आपण जे करता त्याचा अंदाज घेण्यासाठी आला होता.” 26 नंतर
योआब दावीदाकडून निघाला आणि त्याने अबनेरच्या मागे निरोप्यांना
पाठवले आणि त्यांनी त्याला सिराहच्या विहिरीपासून परत आणले.
परंतु दावीदाला हे माहीत नव्हते. 27 जेव्हा अबनेर हेब्रोनास परत आला,
तेव्हा योआबाने त्याला आतील खोलीत बाजूला नेले जसे की, त्याला
त्याच्याबरोबर काही खाजगी बोलावयाचे आहे. आणि तिथे त्याचा भाऊ
असाहेल याच्या रक्ताचा सूड घ्यावा म्हणून योआबने त्याच्या पोटावर
वार केला आणि तो मरण पावला. 28 नंतर जेव्हा दावीदाने याबद्दल
ऐकले, तो म्हणाला, “मी आणि माझे राज्य नेराचा पुत्र अबनेर याच्या
रक्ताबाबतीत याहवेहसमोर निर्दोष आहोत. 29 त्याचे रक्तदोष योआब
आणि त्याच्या संपूर्ण कुटुंबावर असो! योआबच्या कुटुंबात स्रावी,
महारोगी, कुबडीवर टेकलेला, तलवारीने पडणारा, अन्नावाचून राहणारा
असा कोणी ना कोणी असल्याशिवाय राहणार नाही.” 30 योआब व
त्याचा भाऊ अबीशाई यांनी अबनेरला मारून टाकले, कारण त्याने
गिबोनच्या लढाईत त्यांचा भाऊ असाहेलला मारले होते. 31 नंतर दावीद
योआबाला आणि त्याच्याबरोबर असलेल्या सर्व लोकांना म्हणाला,
“तुमची वस्त्रे फाडा आणि गोणपाट नेसून अबनेरसमोर शोक करत
चला.” दावीद राजा स्वत: तिरडीमागे चालला. 32 त्यांनी अबनेरास
हेब्रोनमध्ये पुरले आणि राजाने अबनेरच्या कबरेजवळ मोठ्याने आकांत
केला. सर्व लोकसुद्धा रडले. 33 राजाने अबनेरसाठी हे विलापगीत
गाईले: “मूर्खाने मरावे तसे अबनेरने मरावे काय? 34 तुझे हात बांधलेले
नव्हते, तुझ्या पायसुद्धा बेड्यांमध्ये नव्हते. दुष्टासमोर एखादा पडावा
तसा तू पडला.” आणि सर्व लोक त्याच्यासाठी पुन्हा रडले. 35 नंतर
त्या सर्वांनी येऊन दावीदाने दिवस असताच काही खावे अशी विनंती
केली; पण दावीद शपथ घेत म्हणाला, “सूर्यास्ताच्या आधी मी भाकर
किंवा काहीही सेवन केले, तर परमेश्वर मला कठोर शासन करोत!” 36
सर्व लोकांनी हे लक्षात घेतले आणि त्यांना समाधान वाटले; राजाने
जे सर्वकाही केले त्यात ते खचितच समाधानी झाले. 37 त्या दिवशी
तिथे असलेल्या सर्व लोकांना आणि सर्व इस्राएलला लक्षात आले की,
नेराचा पुत्र अबनेर याला ठार मारण्यात राजाचा काही भाग नव्हता. 38
नंतर राजा आपल्या माणसांना म्हणाला, “तुम्हाला लक्षात येत नाही
काय की आज इस्राएलमध्ये एक सेनापती, एक महान पुरुष पडला
आहे? 39 आणि आज, मी अभिषिक्त राजा असूनही, निर्बल आहे आणि
जेरुइयाहचे हे पुत्र माझ्यासाठी फारच शक्तिमान आहेत. याहवेह वाईट
कृत्य करणाऱ्यास त्याच्या दुष्कृत्यांप्रमाणे प्रतिफळ देवो!”

4 जेव्हा शौलाचा पुत्र इश-बोशेथ याने ऐकले की, अबनेर हेब्रोन येथे
मरण पावला आहे, तेव्हा त्याचे धैर्य सुटले आणि सर्व इस्राएली
सावध झाले. 2 इकडे शौलाच्या पुत्राकडे दोन माणसे होती, ते छापा
घालणाऱ्या तुकड्यांचे पुढारी होते. एकाचे नाव बाअनाह आणि दुसऱ्याचे
रेखाब असे होते; ते बिन्यामीन गोत्रातील, बैरोथ वंशाच्या रिम्मोनचे
पुत्र होते, बैरोथ हा बिन्यामीनचा भाग समजला जातो, 3 कारण बैरोथ
येथील लोक गित्ताइमला पळून गेले आणि आजपर्यंत परदेशी म्हणून
तिथेच निवासी झाले आहेत. 4 (शौलाचा पुत्र योनाथानचा एक पुत्र
होता तो दोन्ही पायांनी अधू होता. येज्रील येथून शौल आणि योनाथान
यांच्याविषयी वर्तमान आले, तेव्हा तो पाच वर्षाचा होता. त्याची दाई
त्याला घेऊन पळाली, परंतु ती निघण्याच्या घाईत असताना तो पडला
आणि अपंग झाला. त्याचे नाव मेफीबोशेथ असे होते.) 5 आता बैरोथ
येथील रिम्मोनचे पुत्र रेखाब आणि बाअनाह हे प्रवासाला निघाले आणि
इश-बोशेथ मध्यानाच्या वेळी, दुपारची विश्रांती घेत होता, तेव्हा हे
त्याच्या घरी आले. 6 गहू घेत आहेत असे दाखवित ते घराच्या आतील
भागात गेले आणि त्यांनी त्याच्या पोटावर वार केला. नंतर रेखाब आणि
त्याचा भाऊ बाअनाह तिथून निसटून गेले. 7 ते जेव्हा घरामध्ये गेले
होते त्यावेळेस तो त्याच्या झोपण्याच्या खोलीत पलंगावर विश्रांती घेत
होता. तेव्हा त्यांनी त्याच्यावर वार करून त्याला जिवे मारले, त्यांनी
त्याचे डोके कापले व ते घेऊन रात्रभर अराबाहच्या मार्गाने प्रवास करीत

गेले. 8 त्यांनी इश-बोशेथचे डोके हेब्रोनात दावीदाकडे आणले आणि
राजाला म्हणाले, “हे पाहा, तुमचा शत्रू शौल ज्याने तुम्हाला जिवे
मारावयास पाहिले, त्याचा पुत्र इश-बोशेथ याचे शिर. आज याहवेहने
माझ्या धनीराजाच्या विरुद्ध शौल आणि त्याच्या संतानाचा सूड घेतला
आहे.” 9 दावीदाने रिम्मोन बैरोथ याचे पुत्र रेखाब आणि बाअनाह
यांना उत्तर दिले, “ज्यांनी मला प्रत्येक संकटातून सोडविले आहे, त्या
याहवेहची शपथ, 10 आपण चांगले वर्तमान आणले आहे हे समजून मला
एका व्यक्तीने सांगितले, ‘शौल मेला आहे’ तेव्हा मी त्याला सिकलाग
येथे धरून मारून टाकले. त्याने आणलेल्या वर्तमानासाठी त्याला मी हे
प्रतिफळ दिले! 11 तर आता दुष्ट पुरुषांनी एका निर्दोष व्यक्तीला त्याच्या
घरात, त्याच्याच पलंगावर जिवे मारले आहे; मी किती विशेषकरून
तुमच्या हातून त्याच्या रक्ताचा जाब घ्यावा आणि तुम्हाला या पृथ्वीतून
नष्ट करावे!” 12 तेव्हा दावीदाने त्याच्या माणसांना आज्ञा दिली आणि
त्यांनी त्यांना जिवे मारले. त्यांनी त्यांचे हात आणि पाय तोडून टाकले
आणि त्यांची शरीरे हेब्रोन येथील तळयाजवळ टांगली. परंतु त्यांनी इश-
बोशेथचे डोके घेतले आणि ते हेब्रोन येथे अबनेरच्या कबरेत पुरले.

**5** इस्राएलच्या सर्व गोत्रांचे लोक हेब्रोन येथे दावीदाकडे आले आणि
म्हणाले, “आम्ही तर तुमचेच मांस आणि रक्त आहोत. 2 मागील
काळात, जेव्हा शौल आमचा राजा होता, तेव्हा इस्राएलला त्यांच्या
युद्धात चालविणारे तुम्हीच तर होता. आणि याहवेहने तुम्हाला म्हटले,
‘माझ्या इस्राएल लोकांचा मेंढपाळ व त्यांचा अधिकारी तू होशील.’”
3 जेव्हा इस्राएलचे सर्व वडील लोक हेब्रोनात दावीद राजाकडे आले,
तेव्हा राजाने त्यांच्याशी याहवेहसमोर हेब्रोन येथे एक करार केला आणि
त्यांनी दावीदाला इस्राएलचा राजा म्हणून अभिषेक केला. 4 दावीद तीस
वर्षाचा असताना राजा झाला आणि त्याने चाळीस वर्षे राज्य केले. 5
त्याने हेब्रोन येथून यहूदीयावर सात वर्षे आणि सहा महिने राज्य केले
आणि सर्व इस्राएल व यहूदाह यांच्यावर यरुशलेमात तेहतीस वर्षे राज्य
केले. 6 राजा आणि त्यांची माणसे यरुशलेममध्ये राहत असलेल्या
यबूसी लोकांवर हल्ला करण्यासाठी निघाले. यबूसी लोक दावीदाला
म्हणाले, “तू या शहरात प्रवेश करू शकणार नाही; येथील आंधळे आणि
लंगडेही तुम्हाला बाहेर हाकलून लावतील.” त्यांना वाटले, “दावीद येथे
आत येऊ शकणार नाही.” 7 तरीही, दावीदाने सीयोन गड हस्तगत
केला; हेच दावीदाचे शहर आहे. 8 त्या दिवशी दावीदाने म्हटले होते, “जो
कोणी यबूसी लोकांवर विजय मिळवील त्याने पाण्याच्या झोताकडून
जाऊन ‘आंधळे व लंगडे’ अशा दावीदाच्या शत्रूंवर हल्ला करावा म्हणूनच
असे म्हटले जाते, ‘आंधळे आणि लंगडे’ राजवाड्यात प्रवेश करणार
नाहीत.” 9 दावीदाने त्या गडामध्ये आपला निवास केला आणि त्याला
दावीदाचे शहर असे म्हटले. त्याने बुरुजापासून आतील भागापर्यंत तट
बांधले. 10 आणि दावीद अधिकाधिक शक्तिशाली बनत गेला, कारण
याहवेह सर्वसमर्थ परमेश्वर त्याच्याबरोबर होते. 11 आता सोरचा राजा
हीरामाने दावीदाकडे दूत पाठविले, त्यांच्याबरोबर देवदारू लाकडे व
सुतार आणि गवंडी पाठवले आणि त्यांनी दावीदासाठी एक राजवाडा
बांधला. 12 तेव्हा दावीदाने जाणले की, याहवेहने आपल्याला इस्राएलवर
राजा म्हणून स्थापित केले आहे आणि आपल्या इस्राएली लोकांसाठी
त्याचे राज्य उंच केले आहे. 13 दावीदाने हेब्रोन सोडल्यानंतर यरुशलेमात
आणखी उपपत्नी आणि पत्नी केल्या आणि त्याला आणखी पुत्र आणि
कन्या झाल्या. 14 यरुशलेममध्ये जन्मलेल्या त्याच्या मुलांची नावे
ही: शम्मुआ, शोबाब, नाथान, शलोमोन, 15 इभार, एलीशुआ, नेफेग,
याफीय, 16 एलीशामा, एलयादा व एलिफेलेत. 17 इस्राएलवर राजा
म्हणून दावीदाचा अभिषेक झाला आहे असे पलिष्ट्यांनी जेव्हा ऐकले,
तेव्हा ते त्याला शोधण्यासाठी आपले सर्व सैन्य घेऊन निघाले, परंतु
दावीदाने याबद्दल ऐकले तेव्हा तो खाली गडाकडे गेला. 18 इकडे पलिष्टी
लोक येऊन रेफाईमच्या खोर्‍यात पसरले. 19 तेव्हा दावीदाने याहवेहला
विचारले, “मी जाऊन पलिष्ट्यांवर हल्ला करू काय? आपण त्यांना
माझ्या हाती देणार काय?” याहवेहने त्याला उत्तर दिले, “जा, कारण मी
नक्कीच पलिष्ट्यांना तुझ्या हातात देईन.” 20 तेव्हा दावीद बआल-
पेरासीम येथे गेला आणि तिथे त्याने त्यांचा पराभव केला. दावीद
म्हणाला, “पाण्याच्या लोंढ्याप्रमाणे याहवेह माझ्या शत्रूंवर माझ्यासमोर
तुटून पडले.” म्हणून त्या ठिकाणाला बआल-पेरासीम हे नाव पडले.
21 पलिष्टी लोकांनी त्यांच्या मूर्त्या तिथेच टाकून दिल्या आणि दावीद
आणि त्याच्या माणसांनी त्या आपल्याबरोबर नेल्या. 22 पुन्हा एकदा
पलिष्टी लोक आले आणि रेफाईमच्या खोर्‍यात पसरले. 23 तेव्हा
दावीदाने याहवेहला विचारले आणि त्यांनी उत्तर दिले, “सरळ वरती
जाऊ नको, परंतु त्यांच्यामागून वळसा घे आणि तुतीच्या झाडांसमोरून
त्यांच्यावर हल्ला कर. 24 तुतीच्या झाडांच्या शेंड्यांमधून सैन्य चालत
येण्याचा आवाज येताच, त्वरित पुढे निघा, त्यावरून पलिष्टी सैन्याचा
नाश करण्यासाठी याहवेह तुमच्यापुढे गेले आहेत असे समज.” 25 तेव्हा
दावीदाने याहवेहच्या आज्ञेप्रमाणे केले आणि गिबोनापासून गेजेरपर्यंत
त्याने पलिष्टी सैन्याला मारून टाकले.

**6** दावीदाने पुन्हा इस्राएलातील सर्व सक्षम तरुण माणसांना एकत्र
आणले, ते तीस हजार होते. 2 दावीद व त्याची सर्व माणसे,
यहूदीयातील बालाह येथून सर्वसमर्थ याहवेह परमेश्वराचा कोश, जे
करुबांमध्ये आरूढ आहेत त्यांच्या नावाने ओळखला जात असे, तो कोश
आणण्यासाठी निघाले. 3 त्यांनी परमेश्वराचा कोश एका नवीन गाडीत
ठेवला व तो डोंगरावर असलेल्या अबीनादाबाच्या घरातून बाहेर आणला.
अबीनादाबाचे पुत्र उज्जा आणि अहियो नवीन गाडी चालवित होते 4
अबीनादाबाच्या डोंगरावरील घरातून परमेश्वराचा कोश त्या गाडीवर
ठेवून, अहियो त्यापुढे चालत होता. 5 दावीद आणि इस्राएलचे सर्व लोक
त्यांच्या सर्व शक्तीने याहवेहसमोर चिपळया, सनोवर लाकडापासून
बनविलेले वीणा, सारंगी, डफ, डमरू, झांजा वाजवित आनंद करीत
होते. 6 जेव्हा ते नाकोनच्या खळयाजवळ आले तेव्हा बैल अडखळले
आणि परमेश्वराचा कोश धरण्यासाठी उज्जाहने आपला हात पुढे केला.
7 त्याच्या या आदरहीन कृत्यामुळे याहवेहचा कोप उज्जाहविरुद्ध पेटला;
म्हणून परमेश्वराने त्याला मारून टाकले आणि तो तिथे परमेश्वराच्या

कोशाच्या बाजूला मरण पावला. 8 तेव्हा दावीदाला राग आला कारण
याहवेहचा क्रोध उज्जाहवर भडकला होता आणि आजपर्यंत त्या
ठिकाणाला पेरेस-उज्जाह असे म्हणतात. 9 त्या दिवशी दावीदाला
याहवेहचे भय वाटले आणि तो म्हणाला, “आता याहवेहचा कोश
माझ्याकडे कसा येणार?” 10 याहवेहचा कोश त्याच्याबरोबर दावीदाच्या
नगरात घेऊन जाण्यास त्याची इच्छा नव्हती. त्याऐवजी, त्याने तो
गित्ती ओबेद-एदोम याच्या घरी नेला. 11 याहवेहचा कोश गित्ती ओबेद-
एदोम याच्या घरात तीन महिने राहिला आणि याहवेहने त्याला आणि
त्याच्या संपूर्ण घराण्यास आशीर्वाद दिला. 12 दावीद राजाला असे
सांगण्यात आले की, “याहवेहने ओबेद-एदोमच्या घराण्यास व त्याचे जे
काही आहे त्यास, परमेश्वराच्या कोशामुळे आशीर्वादित केले आहे,”
तेव्हा परमेश्वराचा कोश ओबेद-एदोमच्या घरापासून दावीदाच्या नगरात
आणावा म्हणून दावीद आनंद करीत गेला. 13 याहवेहचा कोश वाहून
नेणारे जेव्हा सहा पावले पुढे गेले, तेव्हा त्याने एक बैल आणि एक
पुष्ट वासरू यांचा यज्ञ केला. 14 तागाचे एफोद परिधान करून दावीद
त्याच्या सर्व शक्तीने याहवेहसमोर नाचत होता, 15 दावीद आणि सर्व
इस्राएली लोक आनंदाचा जयघोष करीत आणि रणशिंगांचा नाद करीत
याहवेहचा कोश आणत होते. 16 याहवेहचा कोश दावीदाच्या नगरात
प्रवेश करीत असताना, शौलाची कन्या मीखल हिने खिडकीतून पाहिले.
आणि जेव्हा तिने दावीद राजाला याहवेहसमोर उड्या मारत आणि नाचत
असता पाहिले, तेव्हा तिने तिच्या अंतःकरणात त्याचा तिरस्कार केला.
17 त्यांनी याहवेहचा कोश आणला आणि दावीदाने त्यासाठी जो तंबू
तयार केला होता त्या ठिकाणी तो ठेवला, आणि दावीदाने याहवेहसमोर
होमार्पणे व शांत्यर्पणे सादर केली. 18 होमार्पणे व शांत्यर्पणे सादर
केल्यानंतर, दावीदाने लोकांना सर्वसमर्थ याहवेहच्या नावाने आशीर्वाद
दिला. 19 नंतर त्याने तिथे जमलेल्या इस्राएली लोकांच्या समुदायातील
प्रत्येक स्त्री व पुरुषास एक भाकर, खजुराची एक ढेप, मनुक्याची एक
वडी दिली, मग सर्व लोक आपआपल्या घरी गेले. 20 दावीद जेव्हा
आपल्या घराण्याला आशीर्वाद देण्यासाठी घरी परतला, तेव्हा शौलाची
मुलगी मीखल त्याला भेटण्यास बाहेर आली आणि म्हणाली, “आज
इस्राएलाच्या राजाने एखाद्या असभ्य माणसाप्रमाणे आपल्या चाकरांच्या
कन्यांसमोर अर्धनग्न अवस्थेत फिरून स्वतःस किती प्रतिष्ठित केले
आहे!” 21 दावीद मीखलला म्हणाला, “ते याहवेहच्या समोर झाले,
ज्यांनी तुझ्या पित्याच्या किंवा त्याच्या घराण्यातील इतर कोणाच्या
ऐवजी माझी निवड करून याहवेहच्या इस्राएली लोकांवर मला राज्यकर्ता
म्हणून नेमले; तर मी याहवेहसमोर आनंद साजरा करेन. 22 मी यापेक्षाही
अधिक अप्रतिष्ठित होईन आणि मी माझ्या स्वतःच्या दृष्टीने अपमानित
होईन. परंतु या गुलाम मुलींद्वारे ज्यांच्याबद्दल तू बोललीस, त्या माझा
सन्मान करतील.” 23 आणि शौलाची मुलगी मीखल हिला तिच्या
मृत्यूच्या दिवसापर्यंत संतती झाली नाही.

**7** राजा आपल्या राजवाड्यात राहत असताना व याहवेहने त्याला
त्याच्या चहूकडील सर्व शत्रूंपासून विसावा दिल्यानंतर, 2 राजाने
नाथान संदेष्ट्याला म्हटले, “पाहा, मी येथे गंधसरूच्या भवनात राहतो
आणि परमेश्वराचा कोश एका तंबूत आहे!” 3 नाथानाने राजाला उत्तर
दिले, “तुमच्या मनात जे काही आहे, त्यानुसार करा, कारण याहवेह
तुम्हाबरोबर आहेत.” 4 परंतु त्याच रात्री याहवेहचे वचन नाथानाकडे
आले, ते असे: 5 “जा आणि माझा सेवक दावीदाला सांग, ‘याहवेह असे
म्हणतात: मी निवास करावा म्हणून माझ्यासाठी तू घर बांधणार काय?
6 इस्राएली लोकांना इजिप्त देशातून मी बाहेर आणले तेव्हापासून
आजपर्यंत मी घरात राहिलो नाही. मी एका ठिकाणाहून दुसरीकडे,
माझे निवासस्थान म्हणून डेऱ्यातूनच फिरत आलो आहे. 7 जिथे कुठे
मी इस्राएली लोकांबरोबर फिरत आलो, तेव्हा त्यांच्यातील ज्यांना मी
माझ्या इस्राएली लोकांची मेंढपाळाप्रमाणे काळजी घेण्यास आज्ञा
दिली त्यातील कोणत्याही अधिकाऱ्यांना, “तुम्ही माझ्यासाठी गंधसरूचे
घर का बांधले नाही” असे कधी म्हटले काय?’ 8 “तर आता माझा
सेवक दावीदाला सांग, ‘सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: मी तुला
कुरणातून, कळप राखीत असताना आणले आणि माझ्या इस्राएली
लोकांवर अधिपती म्हणून नेमले. 9 जिथे कुठे तू गेलास तिथे मी
तुझ्याबरोबर राहिलो आणि तुझ्या सर्व शत्रूंना तुझ्यापुढून छेदून टाकले.
आता मी पृथ्वीवरील सर्वश्रेष्ठ पुरुषांच्या नावांप्रमाणे तुझे नाव महान
करेन. 10 आणि मी माझ्या इस्राएली लोकांसाठी एक ठिकाण नेमून
देईन आणि त्यांना त्या ठिकाणी स्थापित करेन, यासाठी की त्यांना
स्वतःचे घर असावे आणि त्यांना पुन्हा त्रास होऊ नये. आणि पूर्वीप्रमाणे
दुष्ट लोकांनी त्यांचा छळ करू नये. 11 मी माझ्या इस्राएली लोकांवर
पुढारी नेमले तेव्हापासून त्यांनी तसेच केले आहे. मी तुलासुद्धा तुझ्या
सर्व शत्रूंपासून विसावा देईन. “‘याहवेह असे जाहीर करतात, की याहवेह
स्वतः तुझ्यासाठी घर स्थापित करतील: 12 जेव्हा तुझे दिवस भरतील
आणि तू आपल्या पूर्वजांबरोबर निजशील, तेव्हा मी तुझे संतान म्हणजे
तुझ्या पोटचा वंश उभा करून त्याला तुझा उत्तराधिकारी बनवीन, मी
त्याचे राज्य प्रस्थापित करेन. 13 तोच माझ्या नावाकरिता घर बांधेल
आणि मी त्याचे राजासन सर्वकाळासाठी स्थापित करेन. 14 मी त्याचा
पिता होईन आणि तो माझा पुत्र होईल. तो जेव्हा चूक करेल, तेव्हा मी
त्याला मनुष्याच्या काठीने, मानवांच्या फटक्यांनी शिक्षा करेन. 15 परंतु
तुझ्यासमोरून काढून टाकलेल्या शौलावरची प्रीती मी जशी दूर केली,
तशी तुझ्या संतानावरची माझी प्रीती काढून टाकली जाणार नाही.
16 तुझे घराणे आणि तुझे राज्य माझ्यासमोर सर्वकाळ टिकून राहेल;
तुझे राजासन सर्वकाळासाठी स्थापित केले जाईल.’” 17 या संपूर्ण
प्रकटीकरणातील प्रत्येक शब्द नाथानाने दावीदाला सांगितला. 18 नंतर
दावीद राजा आत जाऊन याहवेहसमोर बसला आणि म्हणाले: “हे
सार्वभौम याहवेह, मी कोण आहे आणि माझे कुटुंब काय आहे की तुम्ही
मला येथवर आणावे? 19 आणि हे सार्वभौम याहवेह, जणू हे आपल्या
दृष्टीने पुरेसे नव्हते म्हणून आपण आपल्या सेवकाच्या घराण्याच्या
भविष्याबद्दलही अभिवचन दिले आहे आणि हे याहवेह परमेश्वरा हा करार
केवळ एका मनुष्यासाठी आहे! 20 “दावीद तुमच्यापुढे आणखी काय

बोलू शकतो? कारण हे सार्वभौम याहवेह, आपल्या सेवकाला तुम्ही
ओळखता. 21 आपल्या वचनासाठी आणि तुमच्या इच्छेप्रमाणे तुम्ही हे
महान कार्य केले आहे व आपल्या सेवकाला ते कळविले आहे. 22 “हे
सार्वभौम याहवेह, तुम्ही किती थोर आहात! तुमच्यासारखा कोणीही
नाही, जे आम्ही आमच्या कानांनी ऐकले आहे त्यानुसार, तुमच्याशिवाय
दुसरे कोणी परमेश्वर नाही. 23 आपल्या इस्राएली लोकांसारखे कोण
आहेत—पृथ्वीवरील असे एक राष्ट्र ज्यांनी आपले लोक व्हावे म्हणून
परमेश्वर त्यांना खंडून घेण्यास व आपले नाव प्रसिद्ध करण्यासाठी गेले;
आणि ज्या तुमच्या लोकांना तुम्ही इजिप्त देशातून, म्हणजे राष्ट्रे व
त्यांची दैवते यांच्यामधून सोडविले व त्यांच्यादेखत आपल्या लोकांसाठी
महान व अद्भुत कार्य केले? 24 तुम्ही आपल्या इस्राएली लोकांना
स्वतःचे खास लोक म्हणून सर्वकाळासाठी स्थापित केले आहे आणि हे
याहवेह, तुम्ही त्यांचे परमेश्वर झाला आहात. 25 “तर आता, हे याहवेह
परमेश्वरा, आपला सेवक व त्याच्या घराण्याविषयी जे अभिवचन तुम्ही
दिले आहे, ते आपण सर्वकाळपर्यंत पूर्ण करावे, आपण म्हटल्याप्रमाणे
आपण करावे, 26 यासाठी की तुमचे नाव सर्वकाळ महान होईल. तेव्हा
लोक म्हणतील, ‘सर्वसमर्थ याहवेह हे इस्राएलचे परमेश्वर आहेत!’
आणि आपला सेवक दावीदाचे घराणे तुमच्या दृष्टीत स्थापित व्हावे. 27
“सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलच्या परमेश्वरा, तुम्ही आपल्या सेवकाला हे
प्रकट केले आहे की, ‘मी तुझे घर बांधीन.’ त्यामुळे आपल्या सेवकाला
तुमच्याकडे ही प्रार्थना करण्याचे धैर्य आले आहे. 28 सार्वभौम याहवेह,
तुम्ही परमेश्वर आहात! तुमचा करार विश्वासयोग्य आहे आणि तुम्ही
आपल्या सेवकासाठी उत्तम गोष्टींचे अभिवचन दिले आहे. 29 तर आता
प्रसन्न होऊन आपल्या सेवकाच्या घराण्याला आशीर्वाद द्या, म्हणजे
त्यांनी तुमच्या दृष्टीपुढे सदैव राहावे; कारण, सार्वभौम याहवेह, तुम्ही हे
बोलला आहात आणि आपल्या आशीर्वादाने तुमच्या सेवकाचे घराणे
सदैव आशीर्वादित व्हावे.”

**8** काही काळानंतर, दावीदाने पलिष्ट्यांचा पराभव केला आणि
त्यांच्यावर कब्जा केला आणि त्याने मेथेग-अम्माह पलिष्ट्यांच्या
ताब्यातून काढून घेतले. 2 दावीदाने मोआबी लोकांचा सुद्धा पराभव
केला. त्याने त्यांना जमिनीवर झोपविले आणि दोरीच्या अंतराने त्यांचे
मोजमाप केले. जे दोन दोऱ्या भरले त्यांना मारून टाकले आणि जे एक
दोरी भरले त्यांना जिवंत सोडले. याप्रकारे मोआबी लोक दावीदाच्या
अधीन झाले आणि त्याला कर देऊ लागले. 3 याशिवाय दावीद त्याच्या
स्मारकाची पुनर्स्थापना करण्यास फरात नदीकडे गेला असता, त्याने
सोबाहचा राजा, रहोबाचा पुत्र हादादेजरचा पराभव केला. 4 दावीदाने
त्याचे एक हजार रथ, सात हजार रथस्वार आणि वीस हजार पायदळ
ताब्यात घेतले. परंतु रथाच्या घोड्यांपैकी शंभर घोडे सोडून बाकी
घोड्यांच्या नसा कापून टाकल्या. 5 जेव्हा दिमिष्कातील अरामी लोक
सोबाहचा राजा हादादेजरच्या मदतीला आले तेव्हा दावीदाने त्यांच्यातील
बावीस हजार जणांना मारून टाकले. 6 नंतर त्याने दिमिष्कातील
अरामी राज्यात ठाणे बसविले आणि अरामी लोक त्याच्या अधीन
झाले आणि त्याला कर देऊ लागले. दावीद जिथे कुठे गेला, तिथे
तिथे याहवेहने त्याला विजय दिला. 7 हादादेजरच्या अधिकाऱ्यांच्या
सोन्याच्या ढाली दावीदाने घेतल्या आणि त्या यरुशलेमात आणल्या. 8
हादादेजरच्या मालकीची नगरे तिबहाथ आणि बीरोथाई येथून दावीद
राजाने पुष्कळ कास्य आणले. 9 हमाथाचा राजा तोई याने जेव्हा ऐकले
की, दावीदाने हादादेजरच्या संपूर्ण सैन्याचा पराभव केला आहे, 10
तेव्हा त्याने आपला पुत्र योरामला दावीदाला आशीर्वाद देऊन अभिनंदन
करण्यासाठी दावीद राजाकडे पाठवले, कारण दावीदाने हादादेजरशी
युद्ध करून त्याच्यावर विजय मिळविला होता. कारण हादादेजर आणि
तोई यांच्यातही युद्ध होते. योरामने त्याच्याबरोबर चांदी, सोने आणि
कास्याच्या वस्तू आणल्या. 11 दावीद राजाने या वस्तू, सर्व राष्ट्रांतून लुटून
आणलेल्या चांदी सोन्याबरोबर याहवेहला समर्पित केल्या, दावीदाने
ताब्यात घेतलेली राष्ट्रे ही: 12 अराम व मोआब, अम्मोनी आणि पलिष्टी
आणि अमालेकी. सोबाहचा राजा, रहोबाचा पुत्र हादादेजर याच्याकडून
आणलेली लूट सुद्धा दावीद राजाने याहवेहला समर्पित केली. 13 क्षार
खोऱ्यातील अठरा हजार अरामी लोकांना मारून परत आल्यावर दावीदाचे
नाव प्रसिद्ध झाले. 14 त्याने एदोमात सर्वठिकाणी ठाणे बसविले आणि
सर्व एदोमी लोक दावीदाच्या अधीन झाले. दावीद जिथे कुठे गेला
तिथे याहवेहने त्याला विजय दिला. 15 दावीदाने संपूर्ण इस्राएलवर
राज्य केले व त्याच्या लोकांशी तो न्यायाने व सत्याने वागत असे. 16
जेरुइयाहचा पुत्र योआब सर्व सैन्याचा सेनापती होता; आणि अहीलुदचा
पुत्र यहोशाफाट हा नोंदणी करणारा होता. 17 अहीतूबचा पुत्र सादोक
आणि अबीयाथारचा पुत्र अहीमेलेख हे याजक होते; आणि सेरायाह हा
चिटणीस होता; 18 यहोयादाचा पुत्र बेनाइयाह हा करेथी आणि पेलेथी
लोकांवर अधिकारी होता; आणि दावीदाचे पुत्र शासकीय सल्लागार
होते.

**9** दावीदाने विचारले, “योनाथानप्रीत्यर्थ ज्याच्यावर मी कृपा करावी
असा शौलाच्या घराण्यातील कोणी अजून राहिला आहे काय?” 2
शौलाच्या घराण्यातील सीबा नावाचा एक सेवक होता. दावीदासमोर
येण्यासाठी त्यांनी त्याला बोलावून घेतले आणि राजा त्याला म्हणाला,
“तू सीबा आहेस काय?” त्याने उत्तर दिले, “मी तुमच्या सेवेस हजर
आहे,” 3 राजाने विचारले, “मी परमेश्वराची कृपा दाखवावी असा
शौलाच्या घराण्यातील कोणीही जिवंत नाही काय?” सीबाने राजाला
उत्तर दिले, “योनाथानचा एक पुत्र अजूनही जिवंत आहे; तो दोन्ही
पायांनी अधू आहे.” 4 “तो कुठे आहे?” राजाने विचारले. सीबाने
उत्तर दिले, “तो लो-देबार येथे अम्मीएलचा पुत्र माखीर याच्या घरी
आहे.” 5 तेव्हा दावीद राजाने त्याला लो-देबार येथून अम्मीएलाचा पुत्र
माखीरच्या घरून बोलावून आणले. 6 जेव्हा शौलाचा पुत्र योनाथानचा
पुत्र मेफीबोशेथ दावीदाकडे आला व त्याच्या आदरार्थ त्याने खाली वाकून
दंडवत घातले. दावीद म्हणाला, “मेफीबोशेथ!” “मी तुमच्या सेवेस हजर
आहे,” त्याने उत्तर दिले. 7 दावीद त्याला म्हणाला, “भिऊ नकोस!
कारण तुझा पिता योनाथान याच्याप्रीत्यर्थ मी तुझ्यावर अवश्य दया

करेन. तुझे आजोबा शौल यांच्या मालकीची सर्व जमीन मी तुला परत
देईन आणि तू नेहमी माझ्या मेजावर भोजन करशील.” 8 मेफीबोशेथ
दंडवत घालीत म्हणाला, “तुमचा सेवक कोण आहे की, माझ्यासारख्या
मेलेल्या कुत्र्याची तुम्ही नोंद घ्यावी?” 9 नंतर राजाने शौलाचा सेवक
सीबा याला बोलावून घेतले आणि त्याला म्हणाला, “शौलाचे व त्याच्या
घराण्याचे जे काही होते ते सर्व मी तुझ्या धन्याच्या नातवाला दिले आहे.
10 तू, तुझे पुत्र आणि तुझे चाकर यांनी त्याच्यासाठी त्या जमिनीची
मशागत करावी आणि तुझ्या धन्याच्या नातवाला पुरवठा असावा म्हणून
ते पीक आणावे. आणि मेफीबोशेथ, तुझ्या धन्याचा नातू, नेहमीच
माझ्या मेजावर भोजन करेल.” (सीबाची पंधरा मुले आणि वीस चाकर
होते.) 11 तेव्हा सीबा राजाला म्हणाला, “माझ्या धनीराजाने आपल्या
सेवकाला दिलेल्या आज्ञेनुसार आपला सेवक करेल.” याप्रमाणे राजाच्या
पुत्रांसारखा मेफीबोशेथ दावीदाच्या मेजावर भोजन करीत असे. 12
मेफीबोशेथला मीखा नावाचा एक लहान पुत्र होता आणि सीबाच्या
घरातील प्रत्येकजण मेफीबोशेथचे चाकर होते. 13 आणि मेफीबोशेथ
यरुशलेम येथे राहिला कारण तो नेहमी राजाच्या मेजावर भोजन करीत
असे; तो दोन्ही पायांनी अधू होता.

**10** कालांतराने, अम्मोन्यांचा राजा मरण पावल्यानंतर, त्याचा पुत्र
हानून राजा झाला. 2 तेव्हा दावीदाने विचार केला, “जशी त्याचा
पिता नाहाशने माझ्यावर दया दाखविली होती, तशी दया मी त्याचा पुत्र
हानूनवर दाखवेन.” म्हणून दावीदाने हानूनच्या पित्याविषयी आपली
सहानुभूती व्यक्त करण्यासाठी राजदूत पाठवले. जेव्हा दावीदाची माणसे
अम्मोनी लोकांच्या प्रदेशात आले, 3 तेव्हा अम्मोनी अधिकाऱ्यांनी त्यांचा
धनी हानून याला विचारले, “दावीदाने सहानुभूती व्यक्त करण्यासाठी
राजदूत पाठवून आपल्या पित्याचा आदर केला आहे असे आपणास
वाटते काय? दावीदाने त्यांना आपणाकडे केवळ शहराची पहाणी
करण्यास, ते हेरण्यास व ते उद्ध्वस्त करण्यास पाठवले नाही काय?”
4 तेव्हा हानूनने दावीदाच्या राजदूतांना ताब्यात घेऊन, प्रत्येक मनुष्याच्या
अर्ध्या दाढीचे मुंडण केले व त्यांची वस्त्रे मधोमध नितंबापर्यंत फाडून
त्यांना परत पाठवून दिले. 5 जेव्हा दावीदाला याबाबतीत सांगितले गेले,
तेव्हा दावीदाने त्या माणसांची भेट घेण्यासाठी माणसे पाठवली, कारण
त्यांचा मोठा अपमान झाला होता. राजाने म्हटले, “तुमची दाढी वाढेपर्यंत
यरीहोतच राहा, मग परत या.” 6 जेव्हा अम्मोनी लोकांना समजून आले
की, दावीदाला आपण घृणास्पद झालो आहोत, तेव्हा त्यांनी बेथ-रहोब
व अराम-झोबाह येथून वीस हजार अरामी पायदळ, तसेच माकाहच्या
राजाबरोबर एक हजार लोक आणि तोब कडून बारा हजार माणसे
भाड्याने आणली. 7 हे ऐकून, दावीदाने युद्ध करणाऱ्या माणसांच्या
संपूर्ण सैन्यासह योआबाला पाठवले. 8 तेव्हा अम्मोन्यांचे सैन्य बाहेर
आले आणि युद्धाच्या तयारीने त्यांच्या नगरवेशीच्या दरवाजाजवळ येऊन
थांबले आणि अराम-झोबाह आणि रहोबचे अरामी आणि तोब आणि
माकाहची माणसे मोकळया प्रदेशात एकटीच होती. 9 शत्रूचे सैन्य
आपल्यापुढे व मागे आहे हे योआबाला समजले; तेव्हा त्याने इस्राएली
सैन्यातून उत्तम योद्धे निवडले व त्यांना अरामी सैन्याशी लढण्यास
पाठविले. 10 बाकीचे सैन्य त्याने आपला भाऊ अबीशाई याच्या हाती
दिले आणि त्यांना अम्मोनी लोकांविरुद्ध लढण्यास पाठवले. 11 योआब
म्हणाला, “जर अरामी सैन्य माझ्यावर भारी झाले तर तुम्ही माझी
सुटका करण्यास यावे; परंतु जर अम्मोनी सैन्य तुझ्यावर भारी झाले
तर मी तुला सोडविण्यास येईन. 12 खंबीर व्हा, आपल्या लोकांसाठी
आणि आपल्या परमेश्वराच्या शहरांसाठी आपण धैर्याने लढू. याहवेहच्या
दृष्टीने जे बरे ते याहवेह करतील.” 13 तेव्हा योआब आणि त्याच्या
बरोबरचे सैन्य अराम्यांशी लढण्यास पुढे गेले पण ते त्याच्यापुढून पळून
गेले. 14 जेव्हा अम्मोनी सैन्याला समजले की, अरामी सैन्याने पळ
काढला आहे, तेव्हा ते अबीशाईपुढून पळून शहरात गेले. तेव्हा योआब
अम्मोनी सैन्याबरोबर युद्ध करून यरुशलेमास आला. 15 नंतर अरामी
लोकांनी पाहिले इस्राएलकडून त्यांचा पराभव झाला आहे, तेव्हा ते पुन्हा
एकत्र झाले. 16 हादादेजरने फरात नदीपलीकडून अरामी सैन्य आणले;
हादादेजरच्या सैन्याचा सेनापती शोबाक याच्या नेतृत्वाखाली ते हेलाम
येथे गेले. 17 याविषयी जेव्हा दावीदाला सांगण्यात आले, तेव्हा त्याने
सर्व इस्राएली सैन्य एकत्र केले, यार्देन नदी पार करून ते हेलामकडे
गेले. अरामी सैन्याने दावीदाला भेटण्यासाठी त्यांच्या युद्धाच्या रांगा
तयार केल्या आणि त्याच्याविरुद्ध युद्ध केले. 18 परंतु अरामी इस्राएली
समोरून पळून गेले आणि दावीदाने त्यांच्यातील सातशे रथस्वारांना व
चाळीस हजार पायदळांना ठार मारले. त्याने त्यांचा सेनापती शोबाक
याला सुद्धा मारले आणि तो तिथेच मरण पावला. 19 जे सर्व राजे
हादादेजरचे जहागीरदार होते, यांनी इस्राएलपुढे झालेला आपला पराभव
पाहून, इस्राएलशी करार केला व त्यांच्या अधीन झाले. त्यानंतर पुढे
अरामी लोक अम्मोनी लोकांना मदत करण्यास घाबरले.

**11** त्याकाळी वसंतऋतूमध्ये राजे लोक युद्धावर जात असत, तेव्हा
दावीदाने राजाची माणसे आणि संपूर्ण इस्राएली सैन्याबरोबर
योआबाला पाठवले. त्यांनी अम्मोनी सैन्याचा नाश केला आणि राब्बाह
शहराला वेढा घातला. परंतु दावीद यरुशलेमात राहिला. 2 एके
संध्याकाळी दावीद त्याच्या बिछान्यावरून उठला आणि आपल्या
राजवाड्याच्या गच्चीवर फिरू लागला. गच्चीवरून त्याने एका स्त्रीला
स्नान करताना पाहिले. ती स्त्री फार सुंदर होती, 3 दावीदाने तिच्याबद्दल
चौकशी करण्यासाठी कोणा एकाला पाठवले. तो मनुष्य म्हणाला,
“ती एलीयामची कन्या, हिथी उरीयाहची पत्नी, बथशेबा आहे.” 4
तेव्हा दावीदाने दूत पाठवून तिला बोलावून घेतले. ती त्याच्याकडे आली
आणि त्याने तिच्याशी शरीरसंबंध केला. (यावेळी ती तिच्या मासिक
अशुद्धतेपासून शुद्ध होत होती.) नंतर ती परत तिच्या घरी गेली. 5 ती
स्त्री गर्भवती झाली आणि तिने दावीदाकडे निरोप पाठवित म्हटले, “मी
गर्भवती आहे.” 6 मग दावीदाने योआबाला निरोप पाठवला: “उरीयाह
हिथी याला माझ्याकडे पाठव.” आणि योआबाने त्याला दावीदाकडे
पाठवले. 7 जेव्हा उरीयाह त्याच्याकडे आला, तेव्हा दावीदाने त्याची
विचारपूस करत विचारले योआब कसा आहे, शिपाई कसे आहेत आणि

युद्ध कसे चालले आहे. 8 नंतर दावीद उरीयाहला म्हणाला, “तुझ्या घरी
जा आणि आपले पाय धू.” तेव्हा उरीयाह राजवाड्यातून निघाला आणि
त्याच्यामागोमाग राजाकडून एक बक्षीस पाठवले गेले. 9 परंतु उरीयाह
राजवाड्याच्या प्रवेशद्वारातच त्याच्या धन्याच्या सेवकांबरोबर झोपला,
तो त्याच्या घरी गेला नाही. 10 दावीदाला कोणी सांगितले, “उरीयाह घरी
गेला नाही.” तेव्हा त्याने उरीयाहाला विचारले, “तू आताच लष्कराच्या
मोहिमेवरून आलास नाही काय? तू घरी का गेला नाहीस?” 11 उरीयाह
दावीदाला म्हणाला, “कोश आणि इस्राएल आणि यहूदीया हे तंबूत राहत
आहेत आणि माझा सेनापती योआब आणि माझ्या धन्याची माणसे
उघड्या मैदानात तळ देऊन आहेत. तर मी माझ्या घरी जाऊन खाणेपिणे
आणि माझ्या पत्नीशी प्रेम कसे करू शकतो? तुमच्या जिवाची शपथ, मी
अशी गोष्ट करणार नाही!” 12 तेव्हा दावीद त्याला म्हणाला, “आणखी
एक दिवस येथेच राहा, उद्या मी तुला परत पाठवेन.” त्याप्रमाणे उरीयाह
तो दिवस आणि दुसरा दिवस यरुशलेममध्ये राहिला. 13 दावीदाने त्याला
आमंत्रण दिल्यावरून त्याने त्याच्याबरोबर खाणेपिणे केले आणि तो
मस्त होईपर्यंत दावीदाने त्याला मद्य पाजले. परंतु संध्याकाळी उरीयाह
त्याच्या धन्याच्या सेवकांमध्ये त्याच्या चटईवर झोपण्यासाठी गेला;
तो घरी गेला नाही. 14 सकाळी दावीदाने योआबाला एक पत्र लिहिले
आणि ते उरीयाहच्या हाती पाठवले. 15 त्यात त्याने असे लिहिले,
“तुंबळ युद्धाच्या तोंडी उरीयाहला ठेवा; आणि त्याच्यापासून मागे या
म्हणजे त्याच्यावर वार होईल व तो मरण पावेल.” 16 म्हणून जिथे
योआबने शहराला वेढा घातला होता, तेव्हा त्याला माहीत होते की,
शूर योद्धे कुठे असतील तिथे त्याने उरीयाहला ठेवले. 17 जेव्हा त्या
शहराची माणसे बाहेर आली आणि त्यांनी योआबाविरुद्ध लढाई केली,
तेव्हा दावीदाच्या सैन्यातील काही माणसे युद्धात पडली; व उरीयाह
हिथी सुद्धा मारला गेला. 18 योआबने दावीदाकडे लढाईचा संपूर्ण
वृतांत पाठवला. 19 त्याने संदेशवाहकाला सूचना दिली: “राजाला या
लढाईचा वृत्तांत दिल्यानंतर, 20 राजाचा राग भडकेल आणि ते तुला
विचारतील, ‘लढण्यासाठी तुम्ही त्या शहराच्या इतक्या जवळ का गेला?
ते नगराच्या तटावरून बाण सोडतील याची कल्पना तुम्हाला नव्हती
काय? 21 यरुब्बशेथचा पुत्र अबीमेलेख याला कोणी मारले? एका
स्त्रीने जात्याची तळी भिंतीवरून टाकून तेबेस येथे त्याला मारले नाही
काय? तुम्ही त्या भिंतीच्या इतक्या जवळ का गेला?’ जर राजा तुला
असे विचारतील, तेव्हा त्यांना सांग, ‘तुमचा सेवक उरीयाह हिथी हा
सुद्धा मरण पावला आहे.’” 22 त्याप्रमाणे संदेशवाहक निघाला आणि
पोहोचल्यानंतर त्याने दावीदाला ते सर्वकाही सांगितले जे सांगण्यासाठी
योआबने त्याला पाठवले होते. 23 संदेशवाहक दावीदाला म्हणाला,
“ती माणसे आमच्यावर प्रबळ झाली आणि मोकळया मैदानात त्यांनी
आमच्यावर हल्ला केला, परंतु आम्ही त्यांना शहराच्या प्रवेशद्वाराकडे
परत लावून दिले. 24 तेव्हा तिरंदाजांनी वेशीच्या तटांवरून तुमच्या
सेवकांवर बाणांनी हल्ला केला आणि राजाची काही माणसे मारली
गेली. याशिवाय, आपला सेवक उरीयाह हिथी हा सुद्धा मरण पावला
आहे.” 25 दावीदाने त्या संदेशवाहकाला म्हटले, “योआबाला सांग,
‘यामुळे तू निराश होऊ नकोस, कारण तलवार जसे एकाचा तसेच
दुसऱ्याचाही नाश करते. त्या नगराविरुद्ध अधिक नेटाने हल्ला करा
आणि त्याचा नाश करा.’ योआबाला उत्तेजित करण्यासाठी हे तू त्याला
सांग.” 26 जेव्हा उरीयाहच्या पत्नीने ऐकले की, तिचा पती मारला गेला,
तिने त्याच्यासाठी शोक केला. 27 शोककाळ संपल्यानंतर दावीदाने
तिला आपल्या घरी बोलावून घेतले आणि ती त्याची पत्नी झाली आणि
तिने त्याच्या पुत्राला जन्म दिला. परंतु दावीदाने जे केले होते त्यामुळे
याहवेह असंतुष्ट झाले होते.

**12** नंतर याहवेहनी नाथानला दावीदाकडे पाठवले. जेव्हा नाथान
त्याच्याकडे आला, तो म्हणाला, “एका शहरात दोन माणसे
राहत होती, एक श्रीमंत होता तर दुसरा गरीब. 2 श्रीमंत माणसाजवळ
पुष्कळ मेंढरे व गुरे होती, 3 परंतु गरीब मनुष्याकडे त्याने विकत
घेतलेल्या एका लहान मेंढीशिवाय काहीच नव्हते. त्याने ती वाढवली,
ती त्याच्याबरोबर आणि त्याच्या लेकरांबरोबर वाढली. तिने त्याच्या
अन्नामधून खाल्ले, त्याच्या प्याल्यातून पाणी प्याले आणि त्याच्या
बाहूंमध्येच ती झोपी जात असे. त्याला ती आपल्या मुलीप्रमाणेच
होती. 4 “त्या श्रीमंत मनुष्याकडे एक पाहुणा आला. परंतु त्या श्रीमंत
मनुष्याने त्या पाहुण्यासाठी भोजन बनवावे म्हणून त्याच्याकडील
असलेल्या मेंढरे किंवा गुरातून घेतले नाही, त्याऐवजी त्याने त्या गरीब
माणसाची ती लहान मेंढी घेऊन त्याच्याकडे आलेल्या पाहुण्यासाठी
भोजन तयार केले.” 5 हे ऐकून दावीद त्या माणसावर रागाने भडकला
आणि नाथानला म्हणाला, “जिवंत याहवेहची शपथ, ज्या मनुष्याने असे
केले आहे तो मेलाच पाहिजे! 6 त्याने त्या मेंढीसाठी चारपट किंमत
मोजावी, कारण त्याने दया न करता असे कृत्य केले आहे.” 7 तेव्हा
नाथान दावीदाला म्हणाला, “तो मनुष्य तूच आहेस! याहवेह, इस्राएलचे
परमेश्वर असे म्हणतात: ‘मी तुझा इस्राएलचा राजा म्हणून अभिषेक
केला आणि तुला शौलाच्या हातातून सोडविले. 8 तुझ्या धन्याचे घर मी
तुला दिले आणि तुझ्या धन्याच्या स्त्रिया तुझ्या बाहूंमध्ये दिल्या. मी
तुला संपूर्ण इस्राएल आणि यहूदीया दिले. आणि हे सर्व फार थोडेच होते
तर, मी तुला अधिक दिले असते. 9 याहवेहच्या दृष्टीने जे वाईट ते करून
तू याहवेहचा शब्द का अवमानीत केला आहेस? उरीयाह हिथी याला
तू तलवारीने मारून टाकलेस आणि त्याची पत्नी तू आपली स्वत:ची
पत्नी म्हणून घेतली आहेस. तू त्याला अम्मोन्यांच्या तलवारीने ठार
मारलेस. 10 तर आता, तलवार तुझ्या घराण्याला कधीही सोडणार नाही,
कारण तू मला तुच्छ लेखले आणि उरीयाह हिथीची पत्नी तू स्वत:ची
पत्नी म्हणून घेतली आहेस.’ 11 “याहवेह असे म्हणतात: ‘तुझ्याच
घराण्यातून मी तुझ्यावर अरिष्ट आणणार आहे. तुझ्या डोळ्यांसमोर
मी तुझ्या स्त्रिया घेऊन तुझ्या जिवलगाला देईन आणि तो दिवसाच्या
प्रकाशात तुझ्या स्त्रियांशी संबंध ठेवील. 12 तू हे गुप्तपणे केलेस, परंतु
मी हे दिवसाच्या प्रकाशात सर्व इस्राएलसमोर करेन.’” 13 नंतर दावीद
नाथानाला म्हणाला, “मी याहवेहविरुद्ध पाप केले आहे.” नाथानाने

उत्तर दिले, “याहवेहने तुझे पाप दूर केले आहे. तू मरणार नाहीस. 14
परंतु हे कृत्य करून तू याहवेहचा भयंकर अनादर केला आहेस, या
कारणाने तुझ्यापासून जन्मलेला मुलगा मरण पावेल.” 15 नाथान
घरी निघून गेल्यानंतर, उरीयाहच्या पत्नीपासून दावीदाला झालेल्या
मुलावर याहवेहने वार केला आणि तो आजारी पडला. 16 दावीदाने
मुलासाठी परमेश्वराकडे याचना केली. त्याने उपास केला व गोणपाट
घालून रात्रभर जमिनीवर पडून राहिला. 17 त्याच्या घरातील वडील
लोक त्याला जमिनीवरून उठविण्यासाठी त्याच्या बाजूला उभे राहिले,
परंतु त्याने नकार दिला आणि त्याने त्यांच्याबरोबर काहीही अन्न खाल्ले
नाही. 18 सातव्या दिवशी ते मूल मरण पावले. मूल मरण पावले आहे
हे दावीदाला सांगण्यासाठी त्याचे सेवक घाबरत होते, कारण त्यांना
वाटले, “मूल जिवंत असताना आम्ही त्याला समजाविले पण तो आमचे
ऐकत नव्हता. तर आता आम्ही त्याला कसे सांगावे की, मूल मरण
पावले आहे? तो स्वतःला काही अपाय करून घेईल.” 19 आपले सेवक
एकमेकात कुजबुज करीत आहेत असे दावीदाच्या लक्षात आले, आणि
त्याला समजले की मूल मरण पावले आहे. त्याने विचारले, “मूल मरण
पावले आहे काय?” “होय, तो मरण पावला आहे.” त्यांनी उत्तर दिले.
20 तेव्हा दावीद जमिनीवरून उठला, त्याचे स्नान झाल्यानंतर, तैलाभ्यंग
करून आपले कपडे बदलले व याहवेहच्या घरात जाऊन त्याने आराधना
केली, मग तो आपल्या स्वतःच्या घरात गेला व त्याने मागितल्यानुसार
त्यांनी त्याच्यापुढे अन्न वाढले, आणि त्याने ते खाल्ले. 21 त्याच्या
सेवकांनी त्याला विचारले, “तुम्ही हे असे का वागत आहात? मूल जेव्हा
जिवंत होते, तेव्हा तुम्ही उपास केला आणि रडलात, परंतु आता मुलाचा
मृत्यू झाला आहे आणि तुम्ही उठून भोजन करीत आहात.” 22 त्याने
उत्तर दिले, “मूल अजून जिवंत होते तेव्हा मी उपास केला आणि रडलो,
मला वाटले, ‘न जाणो याहवेहची कृपा कदाचित माझ्यावर होईल आणि
ते मुलाला वाचवतील.’ 23 परंतु आता तो मरण पावला आहे, तर मी
उपास का करावा? मी त्याला पुन्हा परत आणू शकणार आहे काय? मी
त्याच्याकडे जाईन, परंतु तो माझ्याकडे परत येणार नाही.” 24 नंतर
दावीदाने आपली पत्नी बथशेबा हिचे सांत्वन केले आणि तो तिच्याकडे
गेला आणि त्याने तिच्याशी प्रीतिसंबंध केला. तिने एका पुत्राला जन्म
दिला आणि त्यांनी त्याचे नाव शलोमोन असे ठेवले. याहवेहने त्याच्यावर
प्रीती केली; 25 कारण याहवेहने त्याच्यावर प्रीती केली, म्हणून याहवेहने
नाथान संदेष्ट्याद्वारे निरोप पाठवून त्याचे नाव यदीदियाह असे ठेवले.
26 त्या कालांतरात योआबाने अम्मोन्यांच्या राब्बाह नगराविरुद्ध लढाई
केली आणि राजदूर्ग ताब्यात घेतले. 27 नंतर योआबाने संदेशवाहकांना
दावीदाकडे निरोप पाठवित सांगितले, “मी राब्बाहशी युद्ध केले आणि
राजदूर्ग ताब्यात घेऊन त्या शहराचा पाणी पुरवठा हस्तगत केला आहे.
28 तर आता उरलेले सैन्य गोळा करा आणि शहराला वेढा घाला आणि
ते ताब्यात घ्या. नाहीतर मी ते शहर घेईन आणि ते माझ्या नावावर
होईल.” 29 त्याप्रमाणे दावीदाने संपूर्ण सैन्य एकत्रित केले आणि तो
राब्बाह शहराकडे गेला आणि त्यावर हल्ला करून ते ताब्यात घेतले. 30
दावीदाने त्यांच्या राजाच्या डोक्यावरून मुकुट काढून घेतला आणि तो
स्वतःच्या डोक्यावर ठेवला. त्याचे वजन सोन्याचा एक तालांत होते व
त्यावर मोलवान रत्ने जडविलेली होती. दावीदाने त्या शहरातून मोठ्या
प्रमाणात लूट घेतली 31 आणि त्या शहरातील लोक जे तिथे होते
त्यांना त्याने बाहेर आणले, व त्यांना करवती, लोखंडी कुदळ आणि
कुऱ्हाडीच्या साहाय्याने मजुरी करण्यास लावले आणि त्याने त्यांना
वीटभट्टीवर काम करावयास लावले. दावीदाने अम्मोन्यांच्या नगरांचे
असे केले. नंतर तो व त्याचे सर्व सैन्य यरुशलेमास परतले.

**13** काही काळानंतर, दावीदाचा पुत्र अम्नोन हा तामार, जी दावीदाचा
पुत्र अबशालोमची सुंदर बहीण होती, तिच्या प्रेमात पडला. 2
अम्नोन त्याच्या बहिणीच्या प्रेमात इतका वेडा झाला की, तो आजारी
पडला. तामार कुमारी होती आणि तिच्याशी काही करणे हे त्याला
अशक्य होते. 3 दावीदाचा भाऊ शिमिआहचा पुत्र योनादाब अम्नोनाचा
सल्लागार असून अतिशय धूर्त होता. 4 त्याने अम्नोनास विचारले,
“तू जो राजाचा पुत्र असून दिवसेंदिवस असा क्षीण का दिसतोस? तू
मला सांगणार नाहीस काय?” तेव्हा अम्नोन त्याला म्हणाला, “माझा
भाऊ अबशालोम याची बहीण तामारवर मी प्रेम करतो.” 5 यहोनादाब
म्हणाला, “तुझ्या पलंगावर जा आणि आजारी असल्याचे ढोंग कर,
जेव्हा तुझे वडील तुला पाहायला येतील, तेव्हा त्यांना सांग, ‘माझी
बहीण तामारने माझ्याकडे येऊन मला काहीतरी खावयास द्यावे. तिने ते
भोजन माझ्या दृष्टीसमोर तयार करावे म्हणजे मी तिला पाहीन आणि
नंतर ते तिच्या हातून खाईन.’” 6 तेव्हा अम्नोन पडून राहिला आणि
आजारी असल्याचे ढोंग केले. जेव्हा राजा त्याच्या भेटीस आला, तेव्हा
अम्नोन त्याला म्हणाला, “माझी बहीण तामार हिने येऊन माझ्या
दृष्टीसमोर विशेष भाकरी बनविल्या तर मला आवडेल, म्हणजे त्या
मी तिच्या हातून खाईन.” 7 दावीदाने राजवाड्यात तामारकडे निरोप
पाठवला: “तुझा भाऊ अम्नोन याच्या घरी जा आणि त्याच्यासाठी
भोजन तयार कर.” 8 तेव्हा तामार तिचा भाऊ अम्नोनच्या घरी गेली, तो
तर बिछान्यावर पडून होता. तिने थोडे पीठ घेतले, ते मळले, आणि
त्याच्या दृष्टीसमोर भाकरी तयार केल्या आणि त्या भाजल्या. 9 नंतर
तिने ताट घेतले आणि त्याला भाकर वाढली परंतु त्याने खाण्यास
नकार दिला. अम्नोन म्हणाला, “प्रत्येकाला येथून बाहेर घालवून द्या.”
तेव्हा प्रत्येकजण त्याच्यापासून निघून गेले. 10 नंतर अम्नोन तामारला
म्हणाला, “भाकरी माझ्या झोपण्याच्या खोलीकडे घेऊन ये म्हणजे मी
तुझ्या हाताने ती खाईन.” तेव्हा तिने बनविलेल्या भाकरी घेऊन तामार
आपला भाऊ अम्नोनच्या खोलीकडे आली. 11 परंतु त्याने भाकरी
खाव्या म्हणून जेव्हा ती भाकरी घेऊन त्याच्याजवळ गेली, तेव्हा त्याने
तिला पकडले आणि म्हटले, “माझ्या बहिणी, माझ्याबरोबर पलंगावर
ये.” 12 ती त्याला म्हणाली, “नाही, माझ्या भावा! माझ्यावर जबरदस्ती
करू नकोस! इस्राएलमध्ये अशी गोष्ट होऊ नये! अशी घृणास्पद गोष्ट
करू नकोस. 13 माझ्याबद्दल विचार कर, मी या बेअब्रू पासून कशी
वाचेन? आणि तुझ्याबद्दल काय? इस्राएलमधील मूर्ख व दुष्टासारखा तू

होशील? म्हणून कृपा करून राजाकडे बोलणे कर; ते मला तुझ्याशी
लग्न करण्यापासून थांबविणार नाहीत.” 14 परंतु त्याने तिचे ऐकण्यास
नकार दिला आणि तो तिच्यापेक्षा बलवान असल्यामुळे त्याने तिच्यावर
बलात्कार केला. 15 नंतर अम्नोनाला तिचा तीव्र तिरस्कार वाटू लागला.
वास्तविकता त्याने तिच्यावर जितके प्रेम केले होते, त्यापेक्षाही त्याला
अधिक तिचा तिरस्कार वाटला. नंतर अम्नोन तिला म्हणाला, “ऊठ
आणि चालती हो!” 16 “नाही!” ती त्याला म्हणाली, “तू मला पाठवून
देणे हे, जे वाईट कृत्य तू आधी केले आहे त्यापेक्षाही भयंकर आहे.”
परंतु तो तिचे ऐकेना. 17 त्याने त्याच्या खासगी सेवकाला बोलावून
सांगितले, “या स्त्रीला माझ्या नजरेपासून बाहेर काढ आणि तिच्यामागे
दाराला कडी लाव.” 18 तेव्हा त्याच्या सेवकाने तिला बाहेर काढले
आणि तिच्यामागे दार बंद केले. राजाच्या कुमारी कन्या घालत असत
त्याप्रकारचा पायघोळ झगा तिने घातला होता. 19 तामारने तिच्या
डोक्यावर राख घातली आणि जो पायघोळ झगा तिने घातला होता तो
तिने फाडला. तिने तिचे हात आपल्या डोक्यावर ठेवले आणि मोठ्याने
रडत ती निघून गेली. 20 तिचा भाऊ अबशालोम तिला म्हणाला, “तुझा
भाऊ अम्नोन तुझ्याबरोबर होता काय? तर आता माझ्या बहिणी, शांत
हो, तो तुझा भाऊ आहे. ही गोष्ट मनाला लावून घेऊ नकोस.” आणि
तामार तिचा भाऊ अबशालोमच्या घरात एकाकी अशी राहू लागली. 21
जेव्हा दावीद राजाने हे सर्व ऐकले, तेव्हा त्याला संताप आला. 22 आणि
अबशालोम अम्नोनास चांगले किंवा वाईट काहीही बोलला नाही; त्याने
अम्नोनाचा तिरस्कार केला कारण त्याने त्याची बहीण तामारला बेअब्रू
केले होते. 23 दोन वर्षानंतर, जेव्हा एफ्राईमच्या सीमेवर बआल-हासोर
येथे अबशालोमच्या मेंढरांची लोकर कातरणी होती, तेव्हा त्याने राजांच्या
सर्व पुत्रांना तिथे येण्यास आमंत्रण दिले. 24 अबशालोम राजाकडे गेला
आणि म्हणाला, “तुमच्या सेवकाकडे मेंढ्यांची लोकर कातरणी आहे,
राजा आणि त्याचे सेवक कृपा करून माझ्या सहभागी होतील काय?”
25 राजाने उत्तर दिले, “नाही, माझ्या पुत्रा, आम्ही सर्वांनीच जाऊ नये;
आम्ही तुझ्यासाठी केवळ भार होऊ.” जरी अबशालोमाने त्याला आग्रह
केला, तरीही राजाने जाण्यास नकार दिला परंतु त्याने त्याला आशीर्वाद
दिला. 26 तेव्हा अबशालोम म्हणाला, “आपण येत नाही, तर माझा
भाऊ अम्नोन याला आमच्याबरोबर येऊ द्या.” राजाने त्याला विचारले,
“त्याने तुमच्याबरोबर का जावे?” 27 परंतु अबशालोमाने त्याला विनंती
केली, म्हणून त्याने त्याच्याबरोबर अम्नोन व बाकीच्या राजपुत्रांना
पाठवले. 28 अबशालोमाने त्याच्या माणसांना आज्ञा केली, “ऐका!
जेव्हा अम्नोन द्राक्षारस पिऊन मस्त झालेला असेल आणि मी तुम्हाला
सांगेन, ‘अम्नोनावर वार करा,’ तेव्हा त्याला ठार मारा. घाबरू नका. ही
आज्ञा मी तुम्हाला केली नाही काय? खंबीर व्हा आणि धैर्य धरा.” 29
तेव्हा अबशालोमने सांगितल्याप्रमाणे त्याच्या माणसांनी अम्नोनाचे केले.
तेव्हा राजाचे सर्व पुत्र उठले, आपआपल्या खेचरावर बसून पळून गेले.
30 ते त्यांच्या मार्गावर असता, दावीदाकडे निरोप आला: “अबशालोमने
राजाच्या सर्व पुत्रांना मारून टाकले आहे; त्यांच्यातील एकही जिवंत
राहिलेले नाही.” 31 तेव्हा राजा उभा राहिला, आपली वस्त्रे फाडली
आणि जमिनीवर पडून राहिला; आणि त्याचे सर्व सेवक त्यांची वस्त्रे
फाडून राजाच्या बाजूला उभे राहिले. 32 परंतु दावीदाचा भाऊ शिमिआह
याचा पुत्र योनादाब म्हणाला “सर्वच राजपुत्रांना मारून टाकले आहे
असा माझ्या धन्याने विचार करू नये; केवळ अम्नोन मरण पावला आहे.
कारण अम्नोनाने त्याची बहीण तामार हिच्यावर बलात्कार केला होता,
तेव्हापासून अबशालोमाने हा निश्चय केला होता. 33 माझ्या धनीराजाने
या वृत्तांताबाबतीत काळजी करू नये की, राजाची सर्व मुले मरण पावली
आहेत. केवळ अम्नोन मरण पावला आहे.” 34 तोपर्यंत अबशालोम
पळून गेला होता. पहाऱ्यावर असलेल्या मनुष्याने वर दृष्टी करून पाहिले
आणि त्याला रस्त्याच्या पश्चिमेकडून डोंगरावरून खाली पुष्कळ लोक
येताना दिसले. पहारेकऱ्याने जाऊन राजाला सांगितले, “होरोनाइमच्या
दिशेकडे डोंगराच्या वरील बाजूला मला लोक दिसत आहेत.” 35
योनादाब राजाला म्हणाला, “पाहा, राजपुत्र आले आहेत; तुमचा सेवक
जसे म्हणाला तसेच घडले आहे.” 36 त्याचे बोलणे संपताच, राजाचे
पुत्र मोठ्याने आक्रोश करीत आत आले. राजा आणि त्याचे सर्व सेवक
मोठ्या दुःखाने रडले. 37 अबशालोम तिथून पळाला आणि अम्मीहूदाचा
पुत्र, गशूरचा राजा तलमय याच्याकडे गेला. परंतु दावीद राजाने आपल्या
पुत्रासाठी पुष्कळ दिवस शोक केला. 38 अबशालोम तिथून पळून
गशूरकडे गेला व तिथे तीन वर्ष राहिला. 39 आणि दावीद राजाला
अबशालोमकडे जाण्याची इच्छा झाली, कारण अम्नोनाच्या मृत्यूबद्दल
त्याचे सांत्वन झाले होते.

**14** जेरुइयाहचा पुत्र योआब याला माहीत होते की, अबशालोमला
भेटावे असे राजाला मनापासून वाटते. 2 तेव्हा योआबाने कोणा
एकाला तकोवा येथे पाठवले आणि तिथून एका शहाण्या स्त्रीला
बोलावून आणले. तो तिला म्हणाला, “तू शोक करीत असल्याचे ढोंग
कर. शोकवस्त्रे परिधान कर, आणि सुवासिक तेल अंगाला लावू नकोस.
आणि पुष्कळ दिवसांपासून मृत व्यक्तीसाठी शोक करीत असल्याचे
ढोंग कर. 3 मग राजाकडे जा आणि असे बोल.” आणि काय बोलावे ते
योआबाने तिला सांगितले. 4 जेव्हा तकोवा येथून आलेली स्त्री राजाकडे
गेली, राजाला सन्मान देण्यासाठी तिने तोंड भूमीकडे लवून दंडवत
केले, आणि म्हणाली, “महाराज, माझी मदत करा!” 5 राजाने तिला
विचारले, “तुला काय त्रास आहे?” ती म्हणाली, “मी विधवा आहे;
माझा पती मरण पावला आहे. 6 आपल्या सेविकेला दोन मुले होती.
शेतामध्ये ती दोघे भांडू लागली आणि ते भांडण मिटविण्यास तिथे कोणी
नव्हते. एकाने दुसऱ्यावर वार केला आणि त्याला जिवे मारले. 7 आता
संपूर्ण कुटुंब आपल्या सेविकेविरुद्ध उठले आहे; ते म्हणतात, ‘ज्याने
त्याच्या भावाला मारले त्याला आमच्या हाती सोपवून दे, म्हणजे त्याच्या
भावाच्या जिवाबद्दल ज्याला त्याने मारून टाकले त्याचा आम्ही नाश
करू; म्हणजे जो वारस राहिला आहे त्याच्यापासूनसुद्धा आमची सुटका
होईल.’ याप्रकारे जो माझा एकमात्र निखारा राहिलेला आहे, तो सुद्धा ते
विझवतील, व या भूतलावर माझ्या पतीचे ना नाव ना वारस राहील.” 8

राजा त्या स्त्रीला म्हणाला, “घरी जा, आणि मी तुझ्याबाजूने आदेश
देईन.” 9 परंतु तकोवाची ती स्त्री राजाला म्हणाली, “माझ्या धनीराजाने
मला आणि माझ्या कुटुंबाला क्षमा करावी, आणि राजा आणि त्याचे
सिंहासन निर्दोष असो.” 10 राजाने उत्तर दिले, “तुला जर कोणी काही
म्हटले, तर त्यांना माझ्याकडे घेऊन ये, आणि ते पुन्हा तुला त्रास देणार
नाहीत.” 11 ती म्हणाली, “तर मग राजाने याहवेह आपल्या परमेश्वराला
विनंती करावी, म्हणजे रक्ताचा सूड घेणाऱ्याला हानी करण्यापासून
प्रतिबंध करावा, म्हणजे माझ्या मुलाचा नाश होणार नाही.” तो म्हणाला,
“जिवंत याहवेहची शपथ, तुझ्या मुलाच्या डोक्यावरील एक केसही
जमिनीवर पडणार नाही.” 12 तेव्हा ती स्त्री म्हणाली, “आपल्या
सेविकेला माझ्या धनीराजाशी एक शब्द बोलू द्यावा.” राजाने म्हटले,
“बोल,” 13 ती स्त्री म्हणाली, “तर मग परमेश्वराच्या लोकांविरुद्ध
आपण अशी योजना का केली? जेव्हा राजा असे म्हणतो, कारण राजाने
स्वतः घालवून दिलेल्या आपल्याच मुलाला परत आणले नाही, तेव्हा
तो स्वत:लाच दोषी ठरवीत नाही का? 14 जसे जमिनीवर सांडलेले
पाणी पुन्हा गोळा करता येत नाही, तसेच आपणही मेले पाहिजे. परंतु
परमेश्वराची तशी इच्छा नाही; तर घालवून दिलेला व्यक्ती कायमचा
त्यांच्यापासून घालवून दिला जाऊ नये अशी योजना परमेश्वर करतात.
15 “आणि आता मी माझ्या धनीराजाला हे सांगण्यासाठी आले आहे,
कारण लोकांनी मला भयभीत केले आहे. आपल्या सेविकेने विचार
केला, ‘मी राजाशी बोलेन; कदाचित ते आपल्या सेविकेची विनंती मान्य
करतील. 16 कदाचित, राजा त्यांच्या सेविकेला त्या माणसाच्या हातून
सोडविण्यास मान्य होतील, जो मला आणि माझ्या मुलाला परमेश्वराच्या
वतनापासून वंचित ठेवेल.’ 17 “आणि आता आपली सेविका म्हणते की,
‘माझ्या राजाचा, स्वामीचा शब्द माझे वतन सुरक्षित ठेवो, कारण माझ्या
धनीराजाला परमेश्वराच्या दूतासारखी चांगले आणि वाईट याची ओळख
आहे. याहवेह आपला परमेश्वर आपल्याबरोबर असो.’” 18 तेव्हा राजा
त्या स्त्रीला म्हणाला, “तुला मी जे काही विचारणार आहे, त्याचे उत्तर
माझ्यापासून लपवू नकोस.” ती स्त्री म्हणाली, “माझ्या धनीराजाने
बोलावे.” 19 राजाने विचारले, “या सर्व गोष्टींमध्ये योआबाचा हात
नाही काय?” त्या स्त्रीने उत्तर दिले, “माझ्या धनीराजाच्या जीविताची
शपथ, माझे धनीराजा जे सांगतात त्यापासून कोणीही उजवी किंवा
डावीकडे वळू शकत नाही. होय, तो आपला सेवक योआब होता ज्याने
मला हे करण्यास सुचविले व आपल्या सेविकेच्या मुखात शब्द घातले.
20 आपला सेवक योआब याने सध्याची परिस्थिती बदलावी म्हणून
असे केले. माझ्या धनीराजाला परमेश्वराच्या दूताप्रमाणे ज्ञान आहे;
देशात जे काही घडते ते सर्व आपणास ठाऊक आहे.” 21 तेव्हा राजाने
योआबाला म्हटले, “ठीक आहे, मी त्याप्रमाणे करेन, जा आणि त्या
तरुण अबशालोमास परत घेऊन ये.” 22 योआबाने राजाला सन्मान
व आशीर्वाद देण्यासाठी भूमीकडे तोंड करून दंडवत घातले. योआब
म्हणाला, “आज आपल्या सेवकास समजले की त्याच्या धनीराजाच्या
नजरेत तो कृपा पावला आहे, कारण राजाने आपल्या सेवकाची विनंती
मान्य केली आहे.” 23 मग योआबाने गशूरला जाऊन अबशालोमला
यरुशलेमास परत आणले. 24 तेव्हा राजाने म्हटले, “त्याने आपल्या
स्वतःच्या घरी जावे, त्याने माझे मुख पाहू नये.” म्हणून अबशालोम
आपल्या स्वतःच्या घरी जाऊन राहिला व त्याने राजाचे मुख पाहिले नाही.
25 सर्व इस्राएलात सुंदरतेविषयी प्रशंसनीय असा अबशालोमसारखा
कोणी नव्हता. डोक्याच्या माथ्यापासून तळपायापर्यंत त्याच्या ठायी
काही दोष नव्हता. 26 वर्षातून एकदा तो आपल्या डोक्यावरील केस
कापत असे कारण ते त्याच्यासाठी फार भारी होत असत. जेव्हा तो केस
कापीत असे; त्याचे वजन केले जात असे, आणि राजकीय मापानुसार
त्याचे वजन दोनशे शेकेल इतके भरत असे. 27 अबशालोमास तीन
पुत्र व एक कन्या झाली. त्याच्या कन्येचे नाव तामार होते. ती फार
सुंदर होती. 28 अबशालोम यरुशलेमात राजाचे मुख न पाहता दोन वर्षे
राहिला. 29 तेव्हा योआबाला राजाकडे पाठवावे म्हणून अबशालोमाने
योआबाला बोलाविणे पाठवले, परंतु योआबाने त्याच्याकडे येण्यास
नकार दिला. त्याने दुसऱ्यांदा बोलाविणे पाठवले, परंतु पुन्हा योआबाने
येण्यास नकार दिला. 30 तेव्हा अबशालोम आपल्या सेवकांस म्हणाला,
“पाहा, योआबाचे शेत माझ्या शेताला लागून आहे, त्यात त्याने जव
लावले आहे. जा आणि त्याला आग लावा.” त्याप्रमाणे अबशालोमच्या
सेवकांनी शेताला आग लावली. 31 नंतर योआब अबशालोमच्या
घरी गेला, आणि त्याला म्हणाला, “तुझ्या सेवकांनी माझ्या शेताला
का आग लावली?” 32 अबशालोम योआबाला म्हणाला, “पाहा, मी
तुला बोलाविणे पाठवित म्हटले, ‘येथे ये म्हणजे मी तुला राजाकडे हे
विचारण्यास पाठवेन, “गशूरहून मी का आलो? मी अजूनही तिथेच
असतो तर ते माझ्यासाठी बरे झाले असते!”’ तर आता मला राजाला
भेटावयाचे आहे, जर माझ्याठायी काही दोष असेल, तर त्यांनी मला
जिवे मारावे.” 33 तेव्हा योआबाने राजाकडे जाऊन हे सर्व सांगितले.
मग राजाने अबशालोमला बोलावून घेतले आणि तो आला व राजापुढे
भूमीकडे लवून दंडवत घातले आणि राजाने अबशालोमचे चुंबन घेतले.

**15** त्यानंतरच्या काळात, अबशालोमने स्वत:साठी एक रथ आणि
घोडे आणि त्याच्यापुढे धावण्यासाठी पन्नास माणसे ठेवली. 2
तो सकाळी लवकर उठत असे आणि शहराच्या वेशीकडे जाणाऱ्या
रस्त्याच्या बाजूला थांबत असे. जेव्हा कोणी राजाकडे तक्रार आणत असे
तेव्हा अबशालोम त्याला बोलावून विचारत असे, “तू कोणत्या नगराचा
आहेस?” तो उत्तर देत असे, “आपला सेवक इस्राएलातील गोत्रांपैकी
एका गोत्राचा आहे.” 3 तेव्हा अबशालोम त्याला म्हणत असे, “पाहा,
तुझे दावे कायदेशीर आणि यथायोग्य आहेत, परंतु तुझे ऐकण्यासाठी
राजाचा कोणीही प्रतिनिधी तिथे नाही.” 4 अबशालोम आणखी असेही
म्हणे, “जर या देशात न्यायाधीश म्हणून माझी नेमणूक झाली! तर
प्रत्येकजण ज्याची काही तक्रार किंवा खटला आहे तो माझ्याकडे आला
असता व मी त्यांना न्याय मिळवून दिला असता.” 5 जेव्हा कोणी खाली
लवून मुजरा करावयाला जवळ आला, तेव्हा अबशालोम पुढे जाऊन
त्याचा हात पकडून त्याचे चुंबन घेत असे. 6 जे कोणी राजाकडे न्याय

मागण्यासाठी येत असत त्या सर्वांशी अबशालोम असा वागत असे,
अशा प्रकारे त्याने इस्राएली लोकांची मने जिंकून घेतली. 7 चार वर्षे पूर्ण
झाल्यावर, अबशालोम राजाला म्हणाला, “मला हेब्रोन येथे जाऊ द्यावे
म्हणजे मी याहवेहला केलेला आपला नवस फेडीन. 8 आपला सेवक
अराम येथील गशूर या ठिकाणी राहत असताना मी हा नवस केला
होता: ‘जर याहवेह मला परत यरुशलेमास घेऊन जातील, तर मी हेब्रोन
येथे याहवेहची उपासना करेन.’” 9 राजा त्याला म्हणाला, “शांतीने
जा.” तेव्हा तो हेब्रोनकडे गेला. 10 नंतर अबशालोमने इस्राएलच्या
सर्व गोत्रांकडे गुप्त संदेशवाहक असे सांगत पाठवले, “रणशिंगांचा
आवाज ऐकताच तुम्ही म्हणा, ‘हेब्रोनमध्ये अबशालोम राजा आहे.’”
11 यरुशलेममधून दोनशे लोक अबशालोमबरोबर आले होते. त्यांना
पाहुणे म्हणून आमंत्रित केले गेले होते आणि ते अगदी निरागसपणे
गेले, त्यांना याबाबतीत काहीही माहीत नव्हते. 12 अबशालोम यज्ञार्पण
करीत असताना, त्याने दावीदाचा सल्लागार गिलोनी अहीथोफेल याला
सुद्धा त्याचे नगर गिलोह येथून बोलाविले. त्यामुळे कटकारस्थानाला
अधिक बळ मिळत गेले व अबशालोमच्या मागे जाणाऱ्यांची संख्या
वाढत गेली. 13 तेव्हा एका संदेशवाहकाने येऊन दावीदाला सांगितले,
“इस्राएलच्या लोकांची मने अबशालोमशी जडली आहेत.” 14 तेव्हा
दावीद त्याच्याबरोबर यरुशलेमात असलेल्या आपल्या सर्व अधिकाऱ्यांना
म्हणाला, “चला! आपण पळून जाऊ या, नाहीतर आपल्यातील कोणीही
अबशालोमच्या हातून वाचणार नाही. आपण लवकर निघाले पाहिजे,
नाहीतर तो त्वरेने आपल्याला गाठून आपल्यावर अरिष्ट आणेल व
तलवारीने शहराचा नाश करेल.” 15 राजाच्या अधिकाऱ्यांनी उत्तर दिले,
“आमचे स्वामी जे काही ठरवतील ते करण्यास आम्ही तयार आहोत.”
16 राजा आपल्या घरातील सर्व लोकांबरोबर बाहेर पडला; परंतु त्याने
त्याच्या दहा उपपत्नींना राजवाड्याची देखरेख करण्यास मागे सोडले.
17 अशा प्रकारे राजा बाहेर पडला व सर्व लोक त्याच्यामागे निघाले
आणि ते शहराच्या सीमेवर थांबले. 18 त्याची सर्व माणसे करेथी आणि
पलेथी व सर्व सहाशे गित्ती लोक जे दावीदाबरोबर गथवरून आले होते
ते त्यांच्याबरोबर राजापुढे चालत होते. 19 राजा गित्ती इत्तय याला
म्हणाला, “तू आमच्याबरोबर का येत आहे? परत जा आणि अबशालोम
राजाबरोबर राहा. तू तर परदेशीय, तुझ्या जन्मभूमीतून बाहेर आलेला
आहेस. 20 तू कालचा आलेला मनुष्य, मी कुठे जातो ते मला स्वतःला
माहीत नाही, तेव्हा मी तुला आमच्याबरोबर इकडे तिकडे का फिरवू?
परत जा आणि आपले लोक सोबत घेऊन जा. याहवेह तुला दया व
विश्वासूपण दाखवो.” 21 परंतु इत्तयने उत्तर दिले, “जिवंत याहवेहची
आणि माझ्या राजाच्या जीविताची शपथ, माझे स्वामी कुठेही असतील,
मग ते जीवन किंवा मरण असले तरी तिथे आपला सेवक असणार.” 22
दावीद इत्तयला म्हणाला, “पुढे जा, चालत राहा.” तेव्हा गित्ती इत्तय
पुढे चालत गेला. त्याची सर्व माणसे व त्याचे घराणे त्याच्याबरोबर
होते. 23 जेव्हा लोक देश पार करीत होते, तेव्हा सर्व देशवासी मोठ्याने
रडू लागले. राजाने सुद्धा किद्रोनचे खोरे पार केली आणि सर्व लोक
अरण्याच्या वाटेने पुढे गेले. 24 सादोक सुद्धा तिथे होता आणि सर्व
लेवी लोक जे त्याच्याबरोबर होते ते परमेश्वराच्या कराराचा कोश वाहून
नेत होते. त्यांनी परमेश्वराचा कोश खाली ठेवला आणि सर्व लोकांनी
शहर सोडण्याचे पूर्ण होईपर्यंत अबीयाथारने यज्ञार्पणे केली. 25 नंतर
दावीद राजाने सादोकाला म्हटले, “परमेश्वराचा कोश परत शहरात
घेऊन जा. जर याहवेहच्या दृष्टीत मी कृपा पावलो असलो तर याहवेह
मला परत आणतील यासाठी की मी कोश व याहवेहचे निवासस्थान
पुन्हा पाहू शकेल. 26 परंतु जर याहवेहने म्हटले, ‘मी तुझ्यावर प्रसन्न
नाही,’ तर मी तयार आहे; त्यांना जे बरे वाटते तसे याहवेह माझे करो.”
27 राजाने सादोक याजकाला आणखी पुढे म्हटले, “तुला कळते की
नाही? माझ्या आशीर्वादासह नगरात परत जा. तुझा पुत्र अहीमाज
आणि अबीयाथारचा पुत्र योनाथान यांना सोबत घेऊन जा. तू आणि
अबीयाथार तुमच्या दोन्ही पुत्रांसह परत या. 28 मला कळविण्यासाठी
तुझा संदेश येईपर्यंत मी रानाकडील मैदानात वाट पाहीन.” 29 त्याप्रमाणे
सादोक व अबीयाथार यांनी परमेश्वराचा कोश परत यरुशलेमास नेला व
ते तिथेच राहिले. 30 परंतु दावीद जैतुनाच्या डोंगराकडे रडत रडतच
चालत चढत होता; त्याने आपले मस्तक झाकून घेतले होते व अनवाणी
चालत होता. त्याच्याबरोबर असलेल्या सर्व लोकांनीसुद्धा आपले मस्तक
झाकून ते रडत रडत वर चढले. 31 “अहीथोफेल अबशालोमबरोबर
कट रचणाऱ्यांपैकी एक आहे” असे कोणी दावीदाला सांगितले, तेव्हा
दावीदाने प्रार्थना केली, “हे याहवेह, अहीथोफेलचा सल्ला मूर्खपणा
असे होऊ द्या.” 32 दावीद जेव्हा डोंगराच्या माथ्यावर जिथे लोक
परमेश्वराची उपासना करीत असत तिथे जाऊन पोहोचला, तेव्हा अर्कीचा
हूशाई त्याची वस्त्रे फाटलेली व डोक्यात धूळ घातलेला असा दावीदास
भेटण्यास तिथे होता. 33 दावीद त्याला म्हणाला, “तू जर माझ्याबरोबर
आलास, तर तू मला भार मात्र होशील. 34 तर तू परत शहराकडे जा
आणि अबशालोमास म्हण, ‘महाराज, मी आपला सेवक होईन; आधी मी
तुमच्या पित्याचा सेवक होतो, परंतु आता मी तुमचा सेवक होईन,’ असे
केल्यास अहीथोफेलचा सल्ला निष्फळ करून तू मला मदत करशील.
35 सादोक याजक व अबीयाथार हे तिथे तुझ्याबरोबर असणार नाहीत
काय? तू जे काही राजाच्या राजवाड्यात ऐकशील ते जाऊन त्यांना
सांग. 36 त्यांचे दोन पुत्र, सादोकचा पुत्र अहीमाज व अबीयाथारचा पुत्र
योनाथान त्यांच्याबरोबर आहेत. जे काही तू ऐकशील ते मला सांगण्यास
त्यांना माझ्याकडे पाठव.” 37 तेव्हा अबशालोम शहरात प्रवेश करीत
असताना, दावीदाचा मित्र हूशाई यरुशलेमात पोहोचला.

16 जेव्हा दावीद डोंगराच्या माथ्यावर काही अंतरावर गेला, तिथे
मेफीबोशेथचा कारभारी सीबा त्याला भेटण्यासाठी तिथे वाट पाहत
होता. त्याच्याकडे खोगीर घातलेली गाढवे व त्यांच्यावर दोनशे भाकरी,
मनुक्यांच्या शंभर ढेपा, अंजिराच्या शंभर ढेपा आणि द्राक्षारसाचा एक
बुधला होता. 2 राजाने सीबाला विचारले, “हे तू का आणले आहेस?”
सीबाने उत्तर दिले, “गाढवे राजघराण्यातील लोकांना बसण्यासाठी,
भाकरी आणि फळे लोकांना खाण्यासाठी आणि हा द्राक्षारस रानातून

जाताना जे कोणी थकून जातात त्यांना ताजेतवाने करण्यासाठी.”
3 तेव्हा राजाने विचारले, “तुझ्या धन्याचा नातू कुठे आहे?” सीबा
त्याला म्हणाला, “तो यरुशलेमात राहत आहे, कारण त्याला असे
वाटते, ‘इस्राएलचे लोक मला माझ्या आजोबांचे राज्य आज परत
मिळवून देतील.’” 4 तेव्हा राजा सीबाला म्हणाला, “मेफीबोशेथच्या
मालकीचे जे सर्व आहे ते आता तुझे आहे.” सीबा म्हणाला, “मी विनम्र
अभिवादन करतो, माझ्या स्वामीची माझ्यावर कृपादृष्टी असो.” 5 दावीद
राजा बहूरीमजवळ पोहोचताच, एक मनुष्य बाहेर आला, जो शौलाच्या
घराण्यातील एका कुळातील होता. त्याचे नाव शिमी होते, तो गेराचा पुत्र
होता, तो बाहेर येताच शाप देऊ लागला. 6 त्याने दावीद व राजाच्या
सर्व अधिकाऱ्यांवर धोंडमार केली, सर्व सैन्यदल व विशेष अंगरक्षक
दावीदाच्या उजव्या व डाव्या बाजूंना होते. 7 शाप देत शिमी म्हणाला,
“निघून जा, अरे तू खुनी, हलकट मनुष्या, चालता हो! 8 ज्याच्या जागी
तू राज्य केलेस त्या शौलाच्या घराण्याचा जो रक्तपात तू केला त्याचा
मोबदला याहवेह तुला देत आहेत. आता याहवेहने ते राज्य तुझा पुत्र
अबशालोम याच्या हाती दिले आहे. तू खुनी आहेस म्हणून तू नाशास
येऊन ठेपला आहेस!” 9 तेव्हा जेरुइयाहचा पुत्र अबीशाई राजाला
म्हणाला, “या मेलेल्या कुत्र्याने माझ्या स्वामीला का शाप द्यावा? मला
त्याच्याकडे जाऊन त्याचा शिरच्छेद करू द्या.” 10 परंतु राजा म्हणाला,
“अहो जेरुइयाहच्या पुत्रांनो, तुम्हाला याचे काय? याहवेहनेच जर त्याला
सांगितले असले, ‘दावीदाला शाप दे,’ तर ‘तू असे का करतोस,’ असे
त्याला कोणी विचारावे?” 11 तेव्हा दावीद अबीशाई व त्याच्या सर्व
अधिकाऱ्यांना म्हणाला, “माझा पुत्र, माझे स्वतःचे रक्त-मांस मला
मारून टाकण्याचा प्रयत्न करीत आहे, तर हा बिन्यामीन किती अधिक
करेल! त्याला जाऊ द्या; व शाप देऊ द्या, कारण याहवेहने त्याला तसे
करण्यास सांगितले आहे. 12 मला होत असलेल्या त्रासाकडे कदाचित
याहवेह पाहतील आणि या शापाऐवजी मी गमावलेला त्यांच्या कराराचा
आशीर्वाद मला मिळवून देतील.” 13 दावीद आणि त्याची माणसे त्यांच्या
वाटेने पुढे जात राहिले आणि शिमी त्यांच्या समोरच्या टेकडीकडून,
दावीदाला शाप देत, त्याच्यावर दगडफेक करीत व त्याच्यावर धूळ
उधळत चालत होता. 14 राजा व त्याच्या बरोबरचे सर्व लोक थकलेले
त्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचले आणि तिथे त्याने विसावा
घेतला. 15 त्या दरम्यान अबशालोम व इस्राएलचे सर्व लोक यरुशलेमास
आले आणि अहीथोफेल त्याच्याबरोबर होता. 16 तेव्हा दावीदाचा मित्र
हूशाई अर्की अबशालोमकडे गेला व त्याला म्हणाला, “राजा चिरायू
होवो! राजा चिरायू होवो!” 17 अबशालोमने हूशाईला विचारले, “तुझ्या
मित्रावर तू अशीच प्रीती दाखवितोस काय? तो जर तुझा मित्र आहे,
तर तू त्याच्याबरोबर का गेला नाहीस?” 18 हूशाई अबशालोमला
म्हणाला, “नाही, याहवेहने आणि या लोकांनी, आणि सर्व इस्राएलच्या
लोकांनी ज्याला निवडले आहे; मी त्याचा आहे आणि मी त्याच्याबरोबर
राहणार. 19 आणि मी कोणाची सेवा करावी? जशी मी आपल्या
पित्याची सेवा केली तशीच मी त्यांच्या पुत्राची करू नये काय? म्हणून
मी तुमची सेवा करणार.” 20 अबशालोम अहीथोफेलला म्हणाला,
“आम्हाला तुझा सल्ला दे, आम्ही काय करावे?” 21 अहीथोफेलने
अबशालोमास सल्ला दिला, “तुझ्या पित्याच्या उपपत्नी, ज्यांना तो
राजवाड्याच्या देखरेखीसाठी सोडून गेला त्यांच्यापाशी जाऊन नीज.
तेव्हा सर्व इस्राएलास समजेल की तू तुझ्या पित्याची किती घृणा करतो
आणि तुझ्याबरोबर काम करीत असलेल्या प्रत्येकाचा हात बळकट
होईल.” 22 तेव्हा त्यांनी अबशालोमसाठी छतावर एक तंबू उभारला
आणि तो सर्व इस्राएलच्या लोकांच्या नजरेपुढे त्याच्या पित्याच्या
उपपत्नींपाशी जाऊन निजला. 23 त्या दिवसांमध्ये अहीथोफेलने दिलेला
कोणताही सल्ला जणू काय परमेश्वराकडे विचारल्याप्रमाणे होता. व
त्याप्रमाणेच दावीद व अबशालोम त्याचा सल्ला मानीत असत.

**17** अहीथोफेल अबशालोमला म्हणाला, “आज रात्री दावीदाचा
पाठलाग करण्यासाठी मला बारा हजार माणसे निवडून घेऊ दे.
2 जेव्हा तो थकलेला आणि दुर्बल असेल तेव्हा मी त्याच्यावर हल्ला
करेन. मी त्याला भीतीचा धक्का देईन आणि त्याच्याबरोबर असलेले
सर्व लोक पळून जातील. मी केवळ राजावरच वार करेन 3 आणि
सर्व लोकांना तुझ्याकडे परत आणेन. ज्या मनुष्याचे मरण तू इच्छितो,
तो मेला म्हणजे सर्व लोक सुरक्षित परत येतील; कोणालाही हानी
होणार नाही.” 4 अबशालोमला आणि इस्राएलच्या सर्व वडिलांना
ही योजना चांगली वाटली. 5 परंतु अबशालोम म्हणाला, “हूशाई
अर्कीलासुद्धा बोलावून घ्या, म्हणजे त्याचे म्हणणे काय आहे ते आम्ही
पाहू.” 6 जेव्हा हूशाई त्याच्याकडे आला, तेव्हा अबशालोम म्हणाला,
“अहीथोफेलने हा सल्ला दिला आहे. तो जे म्हणतो ते आपण करावे
काय? नाहीतर तुझा सल्ला आम्हाला दे.” 7 हूशाईने अबशालोमला
उत्तर दिले, “अहीथोफेलने जो सल्ला दिला आहे, तो यावेळेसाठी बरा
नाही. 8 हूशाईने पुढे म्हटले, तुझे वडील आणि त्याची माणसे यांना तू
चांगले ओळखतोस; ते योद्धे आहेत, रानटी अस्वलाची पिल्ले कोणी
नेली तेव्हा ती कशी चवताळते त्यासारखे ते आहेत, तुझे वडील अनुभवी
योद्धा आहेत; आणि तो सैन्याबरोबर रात्र घालविणार नाही. 9 यावेळेस
सुद्धा ते गुहेत किंवा कुठे दुसऱ्या ठिकाणी लपले असतील. जर त्यांनी
तुझ्या सैन्यावर प्रथम हल्ला केला, तर कोणीही त्याबद्दल ऐकून म्हणेल,
‘अबशालोमच्या मागे जाणाऱ्यांचीच हत्या होत आहे.’ 10 तेव्हा सर्वात
धैर्यशाली शिपाई, ज्याचे हृदय एखाद्या सिंहासारखे आहे तो भीतीने
गळून जाईल, कारण सर्व इस्राएली लोकांना माहीत आहे की, तुझा
पिता योद्धा आहे आणि त्याच्याबरोबर असणारे सर्व शूर आहेत. 11
“म्हणून मी तुला सल्ला देतो: दानपासून बेअर-शेबापर्यंत असलेल्या सर्व
असंख्य इस्राएली लोकांना समुद्रकिनाऱ्यावरील वाळूप्रमाणे तुझ्याकडे
गोळा कर, आणि तू स्वतः युद्धाचे नेतृत्व कर. 12 मग तो सापडेल तिथे
आपण त्याच्यावर हल्ला करू, आणि जसे जमिनीवर दव येऊन पडते
तसे आपण त्याच्यावर पडू. मग तो किंवा त्याच्या माणसांपैकी कोणीही
जिवंत सोडला जाणार नाहीत. 13 जर तो शहरात निघून गेला, तर सर्व
इस्राएली लोक त्या शहराकडे दोऱ्या आणतील आणि तिथे एकही खडा

राहणार नाही तोपर्यंत आम्ही ते खाली दरीत ओढून नेऊ.” 14 तेव्हा
अबशालोम आणि सर्व इस्राएली लोक म्हणाले, “हूशाई अर्कीचा सल्ला
अहीथोफेलच्या सल्ल्यापेक्षा अधिक बरा आहे.” कारण अबशालोमवर
अरिष्ट आणावे म्हणून अहीथोफेलचा चांगला सल्ला विफल करण्याची
याहवेहने योजना केली होती. 15 हूशाईने सादोक आणि अबीयाथार
याजकांना सांगितले, “अहीथोफेलने अबशालोम आणि इस्राएलच्या
वडीलजनास अमुक करण्याचा सल्ला दिला होता, परंतु मी त्यांना असे
करण्याचा सल्ला दिला आहे. 16 आता लवकर निरोप पाठवा आणि
दावीदाला सांगा, ‘आजची रात्र रानाच्या उतारावर घालवू नको; तर
लवकर पलीकडे जा, नाहीतर राजा आणि त्याच्याबरोबर असलेले सर्व
लोक नष्ट केले जातील.’” 17 आपण शहरात जाताना कोणी पाहून
धोका देऊ नये, म्हणून योनाथान आणि अहीमाज एन-रोगेल येथे राहत
होते. त्यांनी ही सूचना दावीद राजाला द्यावी म्हणून त्यांच्याकडे एक
दासी पाठवली. 18 परंतु एका तरुण मनुष्याने त्यांना पाहिले आणि
त्याने जाऊन अबशालोमला सांगितले. तेव्हा दोघेजण त्वरित बहूरीम
येथे एका माणसाच्या घरी गेले. त्याच्या घराच्या अंगणात एक विहीर
होती, तिच्यात ते उतरले. 19 त्याच्या पत्नीने विहिरीच्या तोंडावर एक
झाकण टाकले व त्यावर धान्य पसरले. त्याबद्दल कोणालाही काहीही
कळले नाही. 20 अबशालोमाच्या माणसांनी जेव्हा त्या बाईच्या घरी
येऊन विचारपूस केली, “अहीमाज व योनाथान कुठे आहेत?” तिने उत्तर
दिले, “ते ओढ्यापलीकडे गेले आहेत.” त्या माणसांनी शोध केला,
पण त्यांना ते सापडले नाही. म्हणून ते यरुशलेमास परत गेले. 21 ते
तिथून निघून गेल्यानंतर, दोघेजण विहिरीतून बाहेर आले आणि दावीद
राजाला जाऊन सांगितले, ते त्याला म्हणाले, “लवकर निघा आणि
नदी पार करा; अहीथोफेलने तुमच्याविरुद्ध अमुक सल्ला दिला आहे.”
22 तेव्हा दावीद आणि त्याच्या बरोबरच्या सर्व लोकांनी यार्देन नदी
पार केली. दिवस उजाडेपर्यंत यार्देन पार केली नाही असा कोणीही
मागे राहिला नाही. 23 इकडे अबशालोमने आपल्या सल्ल्यानुसार केले
नाही असे अहीथोफेलने पाहिले, तेव्हा त्याने आपल्या गाढवावर खोगीर
घातले आणि आपल्या जन्मगावी, आपल्या घराकडे निघून गेला. त्याने
आपले घर नीटनेटके करून फाशी घेतली. तो मरण पावला आणि त्याला
त्याच्या पित्याच्या कबरेत पुरले. 24 नंतर दावीद महनाईम येथे गेला
आणि अबशालोम सर्व इस्राएली सैन्यासह यार्देन पार करून गेला. 25
अबशालोमने योआबाच्या जागी अमासाची सेनापती म्हणून नेमणूक
केली. अमासा हा इथ्रा इश्माएली याचा पुत्र असून, नाहाशाची कन्या,
जेरुइयाहची बहीण योआबाची आई अबीगईलशी त्याचा विवाह झाला
होता. 26 अबशालोम व इस्राएली सैन्याने गिलआद देशात तळ दिला.
27 दावीद जेव्हा महनाईम येथे पोहोचला, तेव्हा अम्मोन्यांच्या राब्बाह
येथील नाहाशाचा पुत्र शोबाई आणि लो-देबार येथील अम्मीएलाचा
पुत्र माखीर आणि रोगलीम येथील गिलआदी बारजिल्लई यांनी 28
दावीद आणि त्याच्या लोकांसाठी बिछाने आणि पात्रे, मातीची भांडी
आणली. त्यांना खाण्यासाठी गहू व जव, पीठ आणि भाजलेली धान्ये,
शेंगा व डाळी, 29 मध व दही, मेंढरे आणि गाईच्या दुधाचा खवा, हे सुद्धा
आणले. कारण ते म्हणाले, “रानात दावीद आणि त्याचे लोक थकलेले,
भुकेले व तहानलेले झाले असतील.”

**18** दावीदाने आपल्याबरोबर असलेल्या लोकांना एकत्र करून त्यांची
मोजणी केली आणि त्यांच्या हजारांवर सेनापती आणि शंभरांवर
सेनापती नेमले. 2 दावीदाने एकतृतीयांश लोक योआबाच्या हाताखाली,
एकतृतीयांश सैन्य योआबाचा भाऊ, जेरुइयाहचा पुत्र अबीशाईच्या
हाताखाली आणि एकतृतीयांश इत्तय गित्तीच्या हाताखाली असे आपले
सैन्य पाठवले. राजाने सैन्यास सांगितले, “मी स्वतः अवश्य तुम्हाबरोबर
चालत जाईन.” 3 परंतु लोकांनी म्हटले, “तुम्ही बाहेर जाऊ नये; जर
आम्हाला पळून जावे लागले, तरी त्यांना आमचे काही वाटणार नाही.
जरी आमच्यातील अर्धे लोक मरण पावले, त्याचीही त्यांना काळजी
वाटणार नाही; परंतु तुमचे मोल आमच्यातील दहा हजारांप्रमाणे आहे.
तुम्ही आम्हाला शहरात राहूनच पाठिंबा दिला तर ते उत्तम होईल.” 4
राजाने उत्तर दिले, “तुम्हाला जे योग्य वाटते तेच मी करेन.” म्हणून
राजा वेशीजवळ उभे राहिला आणि त्यांचे सर्व सैनिक शंभराच्या व
हजारांच्या टोळीने बाहेर पडले. 5 राजाने योआब, अबीशाई व इत्तय
यांना आज्ञा दिली, “माझ्यासाठी त्या तरुण अबशालोमशी सौम्यतेने
वागा.” राजाने अबशालोमविषयी प्रत्येक सेनापतीला दिलेली ही आज्ञा
सर्व सैनिकांनी ऐकली. 6 दावीदाचे सैनिक इस्राएलशी युद्ध करण्यास
शहराच्या बाहेर पडले आणि एफ्राईमच्या जंगलात युद्धास सुरुवात
झाली. 7 दावीदाच्या सैन्यापुढे इस्राएली सैन्याचा मोड झाला आणि त्या
दिवशी वीस हजार लोक मरण पावले. 8 संपूर्ण देशभर युद्ध पसरले, त्या
दिवशी तलवारीपेक्षा घनदाट जंगलामुळे अधिक लोकांचा मृत्यू झाला. 9
यावेळी अचानक अबशालोमची दावीदाच्या माणसांशी गाठ पडली. तो
त्याच्या खेचरावर बसून जात असता, खेचर एका मोठ्या एला झाडाच्या
दाट फांद्यांखालून गेले आणि अबशालोमचे केस त्यात अडकले. तो हवेत
लटकत राहिला आणि त्याचे खेचर ज्यावर तो बसला होता ते पुढे चालत
राहिले. 10 जेव्हा दावीदाच्या एका मनुष्याने जे झाले ते पाहिले व त्याने
ते योआबाला सांगितले, “अबशालोमला एलाच्या झाडाला लटकत
असलेले मी पाहिले.” 11 ज्या मनुष्याने त्याला हे सांगितले, त्याला
योआब म्हणाला, “काय! तू त्याला पाहिले? तू त्याला तिथेच मारून
जमिनीवर का पाडले नाही? मी तुला चांदीची दहा शेकेल आणि योद्ध्याचा
कंबरपट्टा दिला असता.” 12 पण त्या मनुष्याने योआबाला उत्तर दिले,
“जरी माझ्या हातावर चांदीची हजार शेकेल वजन करून ठेवली, तरी
मी राजपुत्रावर हात टाकणार नाही. कारण राजाने तुला, अबीशाईला
व इत्तयला आज्ञा देताना आम्ही असे ऐकले की, ‘माझ्यासाठी तरुण
अबशालोमचे रक्षण करा.’ 13 आणि असे करून जरी मी माझा जीव
धोक्यात घातला असता; तरी राजापासून काही गुप्त राहत नाही; आणि
तू सुद्धा माझ्यापासून दूर राहिला असता.” 14 योआब म्हणाला, “मी
असा तुझ्यासाठी थांबणार नाही.” असे म्हणत त्याने आपल्या हाती तीन
भाले घेतले आणि अबशालोम एलाच्या झाडाला अजूनही जिवंत असा

लटकलेला असताना त्याने त्याच्या छातीत ते भोसकले. 15 त्यानंतर
योआबाचे दहा शस्त्रवाहक अबशालोमच्या सभोवती जमले, त्याच्यावर
वार केला आणि त्याला मारून टाकले. 16 नंतर योआबाने रणशिंग
फुंकले, तेव्हा सैनिकांनी इस्राएलचा पाठलाग करण्याचे थांबविले,
कारण योआबाने त्यांना थांबविले. 17 त्यांनी अबशालोमला घेऊन,
जंगलात एका खड्ड्यात फेकले आणि त्याच्यावर धोंड्यांची मोठी रास
केली, त्या दरम्यान सर्व इस्राएली लोक आपआपल्या घरी पळून गेले.
18 अबशालोमने आपल्या कारकिर्दीत राजाच्या खोऱ्यात स्वतःच्या
स्मरणार्थ एक स्तंभ उभारला. कारण तो स्वतःशी म्हणाला, “माझे
नाव पुढे चालविण्यासाठी मला पुत्र नाही.” म्हणून त्याने त्या स्तंभाला
अबशालोमचे स्मारक असे नाव दिले होते. आजही ते त्याच नावाने
ओळखले जाते. 19 तेव्हा सादोकाचा पुत्र अहीमाज म्हणाला, “मी धावत
जाऊन राजाला ही बातमी द्यावी, की याहवेहने राजाला त्यांच्या शत्रूच्या
हातून सोडवून मुक्ती दिली आहे.” 20 पण योआब त्याला म्हणाला, “तू
आज ही बातमी घेऊन जाणार नाहीस, तू ही बातमी दुसऱ्या एखाद्या
दिवशी घेऊन जा, परंतु आज ती तू नेऊ नये, कारण राजाचा पुत्र
मेला आहे.” 21 नंतर योआब एका कूशी मनुष्याला म्हणाला, “तू जे
पाहिलेस ते जाऊन राजाला सांग.” त्या कूशी मनुष्याने योआबाला
लवून मुजरा केला व धावत निघाला. 22 सादोकाचा पुत्र अहीमाज
योआबाला म्हणाला, “जे होईल ते होवो, मला कूशी मनुष्याच्या मागे
धावू दे.” योआबाने उत्तर दिले, “माझ्या मुला, तुला का जायचे आहे?
तुला बक्षीस मिळवून देईल अशी बातमी तुझ्याजवळ नाही.” 23 तो
म्हणाला, “जे होईल ते होवो, मला धावायचे आहे,” तेव्हा योआब
म्हणाला, “धाव!” तेव्हा अहीमाज मैदानाच्या मार्गाने धावू लागला आणि
कूशी माणसाच्या पुढे गेला. 24 दावीद शहराच्या आतील व बाहेरील
वेशीच्या मध्ये बसलेला असता. पहारेकरी भिंतीवरून वेशीच्या छपरावर
चढून गेला, तेव्हा त्याने पाहिले की एक मनुष्य एकटाच धावत येत आहे.
25 पहारेकऱ्याने राजाला आवाज देऊन ते सांगितले. राजाने म्हटले, “जर
तो एकटाच आहे म्हणजे त्याच्याकडे चांगली बातमी असणार.” तो
मनुष्य धावत जवळ जवळ येत होता. 26 तेव्हा पहारेकऱ्याने अजून एक
मनुष्य धावत येताना पाहिला आणि त्याने द्वारपालाला आवाज दिला,
“पाहा, आणखी एक मनुष्य एकटाच धावत येत आहे.” राजाने म्हटले,
“तो देखील चांगली बातमी आणत असणार.” 27 पहारेकरी म्हणाला,
“पहिला मनुष्य सादोकाचा पुत्र अहीमाज, याच्यासारखा धावत आहे
असे मला वाटते,” राजाने म्हटले, “तो चांगला मनुष्य आहे. तो चांगलीच
बातमी घेऊन येत असणार.” 28 तेव्हा अहीमाजने राजाला आवाज देत
म्हटले, “सर्वकाही ठीक आहे!” त्याने आपले मुख जमिनीपर्यंत खाली
लववून म्हटले, “याहवेह, आपला परमेश्वर धन्यवादित असो! माझ्या
धनीराजाविरुद्ध हात उचलणाऱ्यांना याहवेहने आपल्या हाती घेतले
आहे.” 29 राजाने विचारले, “तरुण अबशालोम सुरक्षित आहे काय?”
अहीमाज म्हणाला, “योआब जेव्हा राजाचा सेवक व आपला सेवक
म्हणजेच मला पाठवित होता त्यावेळी फार गोंधळ मी पाहिला, परंतु ते
काय होते ते मला कळले नाही.” 30 राजाने म्हटले, “येथे बाजूला वाट
पाहत उभा राहा,” तेव्हा तो बाजूला सरकून उभा राहिला. 31 नंतर कूशी
मनुष्य येऊन पोहोचला आणि म्हणाला, “माझे राजा, माझे स्वामी,
चांगली बातमी ऐका! आपल्याविरुद्ध उठलेल्या लोकांच्या हातातून
याहवेहने तुम्हाला सोडवून तुमची सुटका केली आहे.” 32 राजाने
कूशी मनुष्याला विचारले, “तरुण अबशालोम सुरक्षित आहे का?” त्या
कूशी मनुष्याने उत्तर दिले, “माझ्या धनीराजाला जे सर्व इजा करण्यास
आपणाविरुद्ध उठतात त्या आपल्या सर्व शत्रूंचे त्या तरुणाप्रमाणेच
होवो.” 33 तेव्हा राजा हादरून गेला. तो वरती दरवाज्यावरील खोलीत
गेला आणि रडला! “माझ्या मुला, माझ्या मुला अबशालोमा! तुझ्या
ऐवजी मी मेलो असतो—अरे माझ्या पुत्रा अबशालोमा, माझ्या पुत्रा!”

**19** “अबशालोमसाठी राजा रडत आहे आणि शोक करीत आहे
हे योआबाला सांगण्यात आले.” 2 आणि त्या दिवशी संपूर्ण
सैन्याचा विजय, शोकात बदलला, कारण त्या दिवशी त्या सैन्याने
ऐकले, “राजा आपल्या पुत्रासाठी शोक करीत आहे.” 3 युद्ध सोडून
पळून जाणारी माणसे जशी लज्जित होऊन चोरपावलांनी परत येतात
तशी ती माणसे लपतच शहरात गेली. 4 तेव्हा राजाने आपला चेहरा
झाकला आणि मोठ्याने रडला, “हे माझ्या पुत्रा, अबशालोमा! हे
अबशालोमा माझ्या पुत्रा! माझ्या पुत्रा!” 5 नंतर योआब घरात राजाकडे
गेला आणि म्हणाला, “आज तुम्ही तुमच्या सर्व सैन्याला अपमानित
केले आहे, ज्यांनी तुमचा जीव वाचविला आणि तुमची मुले, मुली,
तुमच्या पत्नी व उपपत्नींना वाचविले आहेत. 6 तुमचा द्वेष करणाऱ्यांवर
तुम्ही प्रेम करता आणि तुमच्यावर प्रेम करणाऱ्यांचा तुम्ही द्वेष करता.
आज तुम्ही हे स्पष्ट केले आहे की, सेनापती आणि त्यांची माणसे यांचे
तुम्हाला काही वाटत नाही. मला तर असे वाटते की आज जर आम्ही
सर्व मेलो असतो आणि अबशालोम जिवंत असता तर तुम्हाला आनंद
झाला असता. 7 तर आता बाहेर जा आणि तुमच्या माणसांना उत्तेजित
करा. मी जिवंत याहवेहची शपथ घेऊन सांगतो की, तुम्ही बाहेर गेला
नाही, तर आज रात्र येईपर्यंत तुमच्याजवळ एकही मनुष्य असणार
नाही. तुमच्या तारुण्यापासून आजपर्यंत जी सर्व अरिष्टे तुमच्यावर
आली त्यापेक्षा हे तुमच्यासाठी अधिक वाईट असे होईल.” 8 तेव्हा
राजा उठला आणि शहराच्या वेशीकडे आपल्या स्थानी जाऊन बसला.
जेव्हा माणसांना सांगण्यात आले, “राजा वेशीकडे बसला आहे,” तेव्हा
ते सर्वजण त्याच्यासमोर आले. या दरम्यान इस्राएली लोक त्यांच्या
घरांकडे पळून गेले. 9 इस्राएलच्या सर्व गोत्रातील लोकांचा आपसात
वाद चालू होता, ते म्हणत होते, “राजाने आम्हाला आमच्या शत्रूंच्या
हातातून सोडविले आहे; तोच आहे ज्याने पलिष्ट्यांच्या हातातून आमची
सुटका केली. परंतु आता अबशालोममुळे तो देशातून पळून गेला आहे;
10 आणि अबशालोम ज्याला आम्ही आमच्यावर राज्य करण्यासाठी
अभिषेक केला, तो युद्धात मारला गेला आहे. तेव्हा राजाला परत
आणण्याविषयी तुम्ही काहीच का बोलत नाही?” 11 दावीद राजाने
सादोक आणि अबीयाथार याजकांना निरोप पाठवला: “यहूदीयाच्या

वडीलजनांना विचारा, ‘जे सर्व इस्राएलात बोलले जात आहे ते राजाच्या
कानी आले आहे, तर राजाला त्याच्या राजवाड्यात आणण्यास तुम्ही
सर्वात शेवटचे का आहात? 12 तुम्ही माझे नातेवाईक आहात, माझ्या
हाडामांसाचे आहात. तेव्हा राजाला परत आणण्यास तुम्ही मागे का
असावे?’ 13 आणि अमासाला असे म्हणा, ‘तू माझ्या हाडामांसाचा
नाहीस काय? योआबाच्या जागी तू माझ्या सैन्याचा सेनापती झाला
नाहीस तर परमेश्वर मला अधिक कठोर शिक्षा करो.’” 14 अशाप्रकारे
दावीदाने यहूदाह गोत्राच्या लोकांची मने जिंकून त्यांना एकमत केले.
त्यांनी राजाकडे निरोप पाठवला, “तुम्ही आणि तुमची सर्व माणसे,
परत या.” 15 नंतर राजा परतला आणि यार्देनपर्यंत गेला. यहूदाहचे
लोक गिलगाल येथे राजाला भेटण्यास आणि त्यांना यार्देनेच्या पार
नेण्यास आले. 16 यहूदीयाच्या लोकांबरोबर बहूरीम येथील बिन्यामीन
गोत्रातील, गेराचा पुत्र शिमी हा सुद्धा घाईने दावीद राजाला भेटण्यासाठी
गेला. 17 त्याच्याबरोबर बिन्यामीन कुळातील एक हजार माणसे होती,
त्याचप्रमाणे शौलाच्या घराचा कारभारी सीबा आणि त्याचे पंधरा पुत्र
आणि वीस सेवक हे त्याच्याबरोबर होते. यार्देनेकडे जिथे राजा होता तिथे
ते घाईने गेले. 18 राजाच्या घराण्याला घेण्यासाठी आणि राजाला हवे
त्याप्रमाणे करण्यास, ते नदीचे पात्र पार करून आले. जेव्हा गेराचा पुत्र
शिमी यार्देन पार करून आला, तेव्हा त्याने राजासमोर दंडवत घातले. 19
आणि तो राजाला म्हणाला, “माझ्या स्वामीने माझा दोष मोजू नये.
माझ्या स्वामीने ज्या दिवशी यरुशलेम सोडले, तेव्हा आपल्या दासाने
केलेल्या वाईट कृत्याचे आपण स्मरण करू नये. राजाने ते आपल्या
मनातून काढून टाकावे. 20 कारण आपल्या सेवकाला (म्हणजे मला)
माहीत आहे की, मी पाप केले आहे, परंतु आज योसेफाच्या गोत्रातील मी
पहिलाच माझ्या स्वामीस भेटावयास आलो आहे.” 21 तेव्हा जेरुइयाहचा
पुत्र अबीशाई म्हणाला, “शिमीने याहवेहच्या अभिषिक्ताला शाप दिला
यामुळे शिमीला जिवे मारावे की नाही?” 22 तेव्हा दावीद म्हणाला,
“जेरुइयाहच्या पुत्रांनो, तुम्हाला त्याचे काय? तुम्हाला लुडबुड करण्याचा
अधिकार कोणी दिला? इस्राएलमध्ये आज कोणाचा मृत्यू व्हावा काय?
आज मी इस्राएलचा राजा आहे हे मला समजत नाही काय?” 23 तेव्हा
राजाने शिमीला म्हटले, “तू मरणार नाहीस.” आणि राजाने त्याला
शपथ घेऊन अभिवचन दिले. 24 शौलाचा नातू, मेफीबोशेथ सुद्धा
राजाला भेटण्यास गेला. राजा यरुशलेम सोडून गेल्यापासून सुरक्षित
परत येईपर्यंत त्याने आपल्या पायांची काळजी घेतली नव्हती, किंवा
दाढी केली नव्हती किंवा कपडे धुतले नव्हते. 25 जेव्हा तो यरुशलेमातून
राजाला भेटायला आला, त्याला राजाने विचारले, “मेफीबोशेथ, तू
माझ्याबरोबर का आला नाहीस?” 26 तो म्हणाला, “माझ्या स्वामी, मी
आपला सेवक अपंग आहे, मी म्हणालो, ‘मी माझ्या गाढवावर खोगीर
घालून त्यावर बसून माझ्या राजाबरोबर जाईन.’ परंतु माझा सेवक सीबा
याने मला फसविले. 27 परंतु त्याने आपल्या सेवकाविषयी माझ्या
स्वामीला खोटे सांगितले. माझे स्वामी तर परमेश्वराच्या दूताप्रमाणे
आहेत; म्हणून आपणास जे योग्य वाटेल ते आपण करावे. 28 माझ्या
आजोबांचे सर्व वारसदार माझ्या स्वामीकडून मरणास पात्र होते, परंतु
आपण आपल्या सेवकाला आपल्या मेजावर बसणाऱ्यांसह पंक्तीस
बसविले. त्यामुळे राजासमोर आणखी काही विनंती करण्याचा मला
काय अधिकार आहे?” 29 राजाने त्याला म्हटले, “आणखी काही का
बोलावे? माझी आज्ञा आहे की तू व सीबाने जमीन वाटून घ्यावी.” 30
मेफीबोशेथ राजाला म्हणाला, “ती सर्व जमीन सीबालाच देऊन टाका,
आता माझे स्वामी सुखरुप आले आहे.” 31 बारजिल्लई गिलआदी हा
सुद्धा रोगलीम येथून दावीद राजाबरोबर यार्देन पार करून देण्यास आणि
तिथून त्यांना त्यांच्या मार्गी लावण्यास आला होता. 32 बारजिल्लई
फार उतार वयाचा झाला होता, तो ऐंशी वर्षाचा होता. महनाईम येथे
असताना त्याने राजाला सामुग्री पुरविली होती, कारण तो फार धनवान
मनुष्य होता. 33 राजाने बारजिल्लईस म्हटले, “माझ्याबरोबर पार चल
आणि यरुशलेममध्ये माझ्याजवळ राहा आणि मी तुझे पालनपोषण
करेन.” 34 पण बारजिल्लईने राजाला उत्तर दिले, “मी अजून किती
वर्षे जगणार, की मी राजाबरोबर यरुशलेमास जावे? 35 मी ऐंशी
वर्षाचा आहे. कोणत्या गोष्टी मला आनंद देतील आणि कोणत्या नाही
यातील फरक मला सांगता येईल काय? आपला सेवक जे काही खातो
किंवा पितो याची चव तरी त्याला कळते काय? गाणारे पुरुष किंवा
स्त्रियांचा आवाज मला अजूनही ऐकायला येतो काय? माझ्या स्वामीला
त्यांचा सेवक एक ओझे म्हणून का असावा? 36 आपला सेवक काही
अंतरापर्यंत आपणाबरोबर यार्देन नदी पार करेल, पण राजाने मला
त्याचा मोबदला याप्रकारे का द्यावा? 37 आपल्या सेवकाला परत जाऊ
द्या, की मी माझ्या नगरात, माझ्या पित्याच्या व आईच्या कबरेजवळ
पुरला जाईन. परंतु आपला सेवक किमहाम येथे आहे. त्याला माझ्या
स्वामीबरोबर पार जाऊ द्यावे, व आपणास जे योग्य वाटेल ते आपण
त्याचे करावे.” 38 राजाने म्हटले, “किमहाम माझ्याबरोबर पार जाईल
आणि तुझ्या इच्छेनुसार मी त्याचे करेन. आणि जे मी तुला करावे असे
तुला वाटते ते मी तुझ्यासाठी करेन.” 39 तेव्हा सर्व लोकांनी यार्देन
पार केली आणि मग राजाने पार केली. राजाने बारजिल्लईचे चुंबन
घेऊन त्याला आशीर्वाद दिला आणि बारजिल्लई आपल्या घरी परत
गेला. 40 जेव्हा राजा यार्देन पार करून गिलगालकडे गेला, किमहाम
सुद्धा त्यांच्याबरोबर गेला. यहूदाहचे सर्व सैन्य आणि इस्राएलच्या अर्ध्या
सैन्यांनी दावीदाला पार नेले. 41 लवकरच सर्व इस्राएली लोक दावीद
राजाकडे येऊन त्यांना म्हणू लागले, “आमचे भाऊबंद, यहूदीयाच्या
लोकांनी राजाला का चोरून नेले आणि त्यांना व त्यांच्या घराण्याला,
त्यांच्या सैन्यासह यार्देन पार करून नेले?” 42 यहूदीयाच्या सर्व लोकांनी
इस्राएली लोकांना उत्तर दिले, “आम्ही असे केले, कारण राजा आमचा
जवळचा नातेवाईक आहे. तुम्हाला त्याविषयी का राग यावा? राजाच्या
सामुग्रीतील आम्ही काही खाल्ले आहे काय? आमच्यासाठी आम्ही
काही घेतले आहे काय?” 43 यावर इस्राएली लोकांनी यहूदीयाच्या
लोकांना उत्तर दिले, “राजामध्ये आम्हाला दहा हिस्से आहेत; म्हणून
दावीदावर तुमच्यापेक्षा आमचा हक्क मोठा आहे. मग तुम्ही आम्हाला

का तुच्छ लेखता? आमच्या राजाला परत आणण्याविषयी प्रथम आम्ही
बोलणे केले नाही काय?” परंतु यहूदीयाच्या माणसांनी इस्राएलच्या
लोकांपेक्षा अधिक जोराने दावा केला.

**20** बिन्यामीन गोत्रातील बिकरीचा पुत्र शबा जो फार त्रासदायक
होता, तो तिथे आला. त्याने रणशिंग फुंकले आणि ओरडून
म्हणाला, “आम्हाला दावीदाबरोबर वाटा नाही, इशायच्या पुत्रामध्ये
काही भाग नाही! इस्राएलातील प्रत्येकाने आपल्या तंबूत जावे!” 2 तेव्हा
बिकरीचा पुत्र शबाच्या मागे जाण्यासाठी इस्राएलच्या सर्व पुरुषांनी
दावीदाला सोडून दिले. परंतु यार्देनपासून यरुशलेमपर्यंतचे यहूदाह गोत्राचे
लोक त्यांच्या राजाबरोबर राहिले. 3 दावीद जेव्हा यरुशलेमात त्याच्या
राजवाड्यात परतला, तेव्हा त्याने राजवाड्याची व्यवस्था पाहण्यासाठी
मागे ठेवलेल्या त्याच्या दहा उपपत्नींना घेऊन एका घरात देखरेखीत
ठेवले आणि त्यांना सामुग्री पुरविली परंतु त्यांच्याशी लैंगिक संबंध ठेवले
नाही. त्यांच्या मरणाच्या दिवसापर्यंत, विधवांप्रमाणे बंदिवासात ठेवले.
4 नंतर राजाने अमासाला म्हटले, “तीन दिवसात यहूदीयाच्या लोकांना
माझ्याकडे जमा कर आणि तू स्वतः देखील हजर हो.” 5 परंतु जेव्हा
अमासा यहूदीयाच्या लोकांना जमा करण्यास गेला, तेव्हा राजाने त्याला
ठरवून दिलेल्या वेळेपेक्षा जास्त वेळ त्याने घेतला. 6 तेव्हा दावीदाने
अबीशाईला म्हटले, “अबशालोमाने केलेल्या हानीपेक्षा बिकरीचा पुत्र
शबा आपले अधिक नुकसान करेल. तू तुझ्या स्वामीच्या माणसांना घे
आणि त्याचा पाठलाग कर, नाहीतर त्याला तटबंदीची शहरे सापडतील
आणि तो आपल्यापासून निसटून जाईल.” 7 मग योआबाची माणसे
आणि करेथी व पेलेथी आणि सर्व शूर योद्धे अबीशाईच्या नेतृत्वाखाली
बाहेर निघाले. बिकरीचा पुत्र शबा याचा पाठलाग करण्यासाठी ते
यरुशलेमातून बाहेर पडले. 8 ते गिबोनातील मोठ्या खडकाजवळ
आले, तेव्हा अमासा त्यांना भेटण्यास आला. योआबाने त्याचा लष्करी
अंगरखा घातला होता आणि वरून कंबरपट्टा व म्यानात खंजीर होता.
जसा तो पुढे गेला, त्याच्या म्यानातून खंजीर बाहेर पडला. 9 योआब
अमासाला अभिवादन करीत म्हणाला, “माझ्या भावा तू कसा आहेस?”
असे म्हणत त्याने अमासाची दाढी उजव्या हाताने पकडून त्याचे चुंबन
घेतले. 10 अमासा योआबाच्या हातातील खंजिराविषयी सावध नव्हता
आणि योआबाने तो त्याच्या पोटात खुपसला आणि त्याच्या आतड्या
जमिनीवर पडल्या. पुन्हा वार न करताच अमास मरण पावला. नंतर
योआब आणि त्याचा भाऊ अबीशाई यांनी बिकरीचा पुत्र शबाचा
पाठलाग केला. 11 तेव्हा योआबाच्या पुरुषांपैकी एकजण अमासाच्या
बाजूला उभा राहिला आणि म्हणाला, “जो कोणी योआबाचे समर्थन
करतो आणि जो कोणी दावीदाच्या बाजूने आहे, त्याने योआबाच्या
मागे यावे!” 12 अमासा भर रस्त्यात रक्ताच्या थारोळ्यात लोळत
होता आणि त्या मनुष्याने पाहिले की, सर्व सैन्य स्तब्ध उभे होते.
जेव्हा त्याला समजले की, प्रत्येकजण अमासापर्यंत येऊन थांबत होते,
तेव्हा त्याने त्याला रस्त्यावरून ओढून शेतात नेले आणि त्याच्यावर
एक वस्त्र टाकले. 13 अमासाला रस्त्यावरून बाजूला काढल्यानंतर,
सर्वजण योआबाबरोबर बिकरीचा पुत्र शबा याचा पाठलाग करण्यासाठी
निघाले. 14 शबा इस्राएलच्या सर्व गोत्रांमधून आबेल बेथ-माकाहपर्यंत व
बेऱ्याच्या प्रदेशातून गेला आणि ते एकत्र येऊन त्याच्यामागे गेले. 15
योआबाबरोबरच्या सर्व सैन्याने येऊन शबाला आबेल-बेथ-माकाह येथे
वेढा दिला. त्यांनी शहरापर्यंत जोडणाऱ्या उतरणीपर्यंत मोर्चा लावला
आणि तो बाहेरील तटबंदीच्या समोर होता. तट पाडण्यासाठी ते त्यावर
वार करीत होते, 16 नगरातून एका शहाण्या स्त्रीने आवाज दिला,
“ऐका! ऐका! योआबाला इकडे येण्यास सांगा म्हणजे मी त्याच्याशी
बोलेन.” 17 तेव्हा तो तिच्याकडे गेला, आणि तिने विचारले, “तू योआब
आहेस काय?” तो उत्तरला, “होय, मीच आहे.” ती म्हणाली, “तुझ्या
दासीला जे सांगायचे आहे ते ऐक.” “मी ऐकत आहे,” तो म्हणाला. 18
ती पुढे म्हणाली, “प्राचीन काळी असे म्हटले जात असे की, ‘आबेलातून
सल्ला घ्यावा,’ आणि समस्या पूर्णपणे सोडविली जात असे. 19 आम्ही
शांतताप्रिय आणि इस्राएलचे विश्वासू लोक आहोत. तुम्ही इस्राएलातील
मातृनगराचा नाश करण्याचा प्रयत्न का करीत आहात? याहवेहच्या
वतनाचा तुम्ही का नाश करावा?” 20 यावर योआबाने उत्तर दिले,
“मी त्याचा नाश किंवा त्याचा विध्वंस करावा हे माझ्यापासून अगदी
दूर असो. 21 पण तसे काही नाही. एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशातील
एक मनुष्य, जो बिकरीचा पुत्र शबा याने दावीद राजाविरुद्ध आपला
हात उगारला आहे. हा मनुष्य माझ्या स्वाधीन कर, म्हणजे मी शहर
सोडून जाईन.” ती स्त्री योआबाला म्हणाली, “त्याचे शिर तुझ्याकडे
तटावरून टाकले जाईल.” 22 ती स्त्री आपल्या शहाणपणाचा हा सल्ला
घेऊन सर्व लोकांकडे गेली आणि त्यांनी बिकरीचा पुत्र शबा याचे शिर
कापून योआबाकडे फेकून दिले. तेव्हा योआबाने रणशिंग फुंकले आणि
त्याचे लोक शहर सोडून आपआपल्या घरी निघून गेले. आणि योआब
यरुशलेमास राजाकडे परत गेला. 23 योआब इस्राएलच्या सर्व सैन्याचा
सेनापती होता; यहोयादाचा पुत्र बेनाइयाह करेथी व पेलेथी यांचा प्रमुख
होता; 24 अदोनिराम वेठबिगारी करणाऱ्यांचा अधिकारी होता; आणि
अहीलुदचा पुत्र यहोशाफाट हा नोंदणी करणारा होता; 25 शेवा सचिव
होता; सादोक व अबीयाथार याजक होते; 26 आणि याईरचा वंशज ईरा
दावीदाचा याजक होता.

**21** दावीदाच्या कारकिर्दीत लागोपाठ तीन वर्षे दुष्काळ पडला होता;
म्हणून दावीद याहवेहसमोर गेला. याहवेह म्हणाले, “हे शौल
आणि त्याच्या रक्तदोषी घराण्यामुळे आहे; कारण त्याने गिबोनी लोकांना
मारले होते.” 2 तेव्हा राजाने गिबोनी लोकांस बोलावून घेतले आणि
त्यांना म्हटले. (गिबोनी लोक इस्राएलचा भाग नव्हते, परंतु अमोरी
लोकांतून उरलेले लोक होते; त्यांना जिवंत ठेवावे अशी इस्राएली
लोकांनी शपथ घेतली होती, परंतु इस्राएल आणि यहूदाह यांच्याबद्दल
असलेल्या त्याच्या आवेशामुळे शौलाने त्यांना नष्ट करण्याचा प्रयत्न
केला होता.) 3 दावीदाने गिबोनी लोकांना विचारले, “मी तुमच्यासाठी
काय करावे? कशाप्रकारे मी प्रायश्चित करावे की तुम्ही याहवेहच्या
वतनाला आशीर्वाद द्याल?” 4 गिबोनी लोकांनी राजाला उत्तर दिले,

“शौल आणि त्याच्या घराण्याकडून आम्ही चांदी किंवा सोन्याची मागणी
करावी असा अधिकार आम्हाला नाही, किंवा इस्राएलातील कोणालाही
जिवे मारण्याचा अधिकार आम्हाला नाही.” दावीदाने विचारले, “मग
तुमच्यासाठी मी काय करावे अशी तुमची इच्छा आहे?” 5 त्यांनी
राजाला उत्तर दिले, “ज्या मनुष्याने आमचा नाश केला आणि आमची
संख्या कमी व्हावी आणि इस्राएलमध्ये कुठेही आम्हाला स्थान नसावे
म्हणून आमच्याविरुद्ध योजना केली, 6 तर आता त्याच्या वंशातील
सात पुरुषांना आमच्याकडे द्यावे म्हणजे शौल जो याहवेहद्वारे निवडला
गेला होता, त्याच्या गिबियाहमध्ये आम्ही त्यांना मारून टाकून त्यांची
शरीर तिथे उघडे टाकू.” तेव्हा राजा म्हणाला, “मी त्यांना तुमच्या हाती
देईन.” 7 शौलाचा पुत्र योनाथान व दावीदामध्ये याहवेहसमोर झालेल्या
शपथेमुळे राजाने शौलाचा पुत्र योनाथान याचा पुत्र मेफीबोशेथ याची गय
केली. 8 परंतु अय्याहची कन्या रिजपाह हिचे दोन पुत्र अरमोनी आणि
मेफीबोशेथ जे तिला शौलापासून झाले होते, त्याबरोबर शौलाची कन्या
मीखल हिचे पाच पुत्र जे तिला महोलाथी बारजिल्लईचा पुत्र अद्रीएल
याच्यापासून झाले होते यांना राजाने घेतले. 9 त्याने त्यांना गिबोनी
लोकांच्या हाती सोपवून दिले, ज्यांनी त्यांना मारून टाकले आणि त्यांची
शरीरे डोंगरावर याहवेहसमोर प्रदर्शित केली. ते सातही जण एकत्र मरण
पावले; हंगामाच्या सुरवातीच्या दिवसांमध्ये त्यांना मारण्यात आले होते,
जेव्हा जवाच्या हंगामाची सुरुवात झाली होती. 10 तेव्हा अय्याहची मुलगी
रिजपाह हिने गोणपाट घेतले, आणि ते स्वत:साठी खडकावर पसरविले.
हंगामाच्या सुरुवातीपासून त्या शरीरावर आकाशातून पाऊस पडेपर्यंत,
तिने दिवसा पक्ष्यांना आणि रात्री जंगली प्राण्यांना त्या शवांना स्पर्श करू
दिला नाही. 11 अय्याहची कन्या रिजपाह, जी शौलाची उपपत्नी होती
तिने जे केले ते दावीदाला कळले, 12 दावीद गेला आणि याबेश-गिलआद
येथील नागरिकांकडून शौल आणि त्याचा पुत्र योनाथान यांच्या अस्थी
घेतल्या. (त्यांनी त्यांची शरीरे बेथ-शान नगराच्या चौकातून चोरली होती,
जिथे पलिष्ट्यांनी शौलाला गिलबोआत मारून टाकल्यानंतर त्यांना तिथे
टांगले होते.) 13 तेव्हा दावीदाने शौल आणि त्याचा पुत्र योनाथान यांच्या
अस्थी तिथून आणल्या आणि ज्यांना मारून टाकून डोंगरावर प्रदर्शित
केले होते त्यांच्या अस्थी सुद्धा गोळा केल्या. 14 त्यांनी बिन्यामीन
प्रांतातील सेला येथे शौल व त्याचा पुत्र योनाथान यांच्या अस्थी, शौलाचा
पिता कीश याच्या कबरेत पुरल्या आणि राजाने आज्ञापिल्याप्रमाणे
सर्वकाही केले, त्यानंतर देशाच्या वतीने केलेल्या प्रार्थनेचे परमेश्वराने
उत्तर दिले. 15 पुन्हा एकदा पलिष्टी आणि इस्राएल यांच्यामध्ये युद्ध
झाले. दावीद आपल्या सैन्याला घेऊन पलिष्ट्यांशी लढण्यास गेला
आणि तो थकून गेला. 16 इशबी-बेनोब नावाचा राफाह वंशातील एक
पुरुष, ज्याचा कास्याचा भाला तीनशे शेकेल वजनाचा होता आणि तो
नवीन तलवार घेऊन सज्ज होत म्हणाला, की तो दावीदाला जिवे मारेल.
17 परंतु जेरुइयाहचा पुत्र अबीशाई दावीदाचा बचाव करण्यासाठी आला;
त्याने त्या पलिष्ट्यावर हल्ला केला आणि त्याला ठार मारले. तेव्हा
दावीदाच्या लोकांनी दावीदाला शपथ घेत सांगितले, “येथून पुढे पुन्हा
आपण आमच्याबरोबर युद्धासाठी येणार नाही, म्हणजे इस्राएलचा दिवा
विझणार नाही.” 18 कालांतराने पलिष्ट्यांबरोबर गोब येथे पुन्हा दुसरे
युद्ध झाले. त्यावेळेस हुशाथी सिब्बखय याने राफाह वंशातील साफ
याला ठार मारले. 19 गोब येथे पलिष्ट्यांबरोबर झालेल्या आणखी
एका युद्धामध्ये बेथलेहेम येथील याईरचा पुत्र एलहानान याने गित्ती
गल्याथाच्या भावाला ठार मारले ज्याच्या भाल्याची काठी विणकऱ्याच्या
काठीसारखी होती. 20 आणखी दुसऱ्या एका युद्धात, जे गथ येथे झाले,
त्यामध्ये प्रत्येक हाताला सहा बोटे आणि पायाला सहा बोटे; असे एकंदर
चोवीस बोटे असलेला एक धिप्पाड मनुष्य होता. तो सुद्धा राफाहच्या
वंशातील होता. 21 जेव्हा त्याने इस्राएलची अवहेलना केली तेव्हा
दावीदाचा भाऊ शिमिआहचा पुत्र योनाथानने त्याला मारून टाकले. 22
हे चार पुरुष गथ येथील राफाहच्या वंशातील होते आणि ते दावीदाच्या
आणि त्याच्या सैनिकांच्या हातून मारले गेले.

**22** जेव्हा याहवेहने दावीदाला त्याच्या सर्व शत्रूंच्या हातातून
आणि शौलाच्या हातातून सोडविले, तेव्हा दावीदाने या शब्दात
याहवेहसाठी गीत गाईले. 2 तो म्हणाला: “याहवेह माझे खडक, माझे
दुर्ग आणि मला सोडविणारे आहेत; 3 माझे परमेश्वर माझे खडक आहेत,
ज्यांच्या ठायी मी आश्रय घेतो, तेच माझी ढाल आणि माझ्या तारणाचे
शिंग आहे. ते माझे गड, माझे शरणस्थान आणि माझे तारणारे आहेत;
हिंसक लोकांपासून याहवेह, तुम्ही मला वाचवितात. 4 “स्तुतीस योग्य
याहवेहचा, मी धावा केला, आणि माझ्या शत्रूपासून माझी सुटका झाली.
5 मृत्यूच्या लाटांनी मला घेरले; नाशाच्या प्रवाहांनी मला बुडवून टाकले.
6 मृतलोकाच्या दोऱ्यांनी मला सभोवती घेरले; मृत्यूचे भय मला सामोरे
आले, (Sheol h7585) 7 “मी आपल्या संकटात याहवेहचा धावा केला;
मी माझ्या परमेश्वराचा धावा केला. आणि त्यांनी आपल्या मंदिरातून
माझी आरोळी ऐकली; माझा धावा त्यांच्या कानी पडला. 8 तेव्हा
पृथ्वी हादरली व कंपित झाली, आकाशाचे पाये हादरले; याहवेहच्या
क्रोधामुळे ते भयभीत झाले. 9 त्यांच्या नाकपुड्यातून धूर निघाला;
भस्म करणारा अग्नी त्यांच्या मुखातून निघाला, जळते निखारे त्यातून
निघाले. 10 आकाशाला विभागून याहवेह खाली आले; घनदाट ढग
त्यांच्या पायाखाली होते. 11 करुबावर आरूढ होऊन ते उडून गेले;
वाऱ्याच्या पंखांवर त्यांनी भरारी मारली. 12 अंधकार, व आकाशातील
काळे मेघ; यांचा त्यांनी आपल्या सभोवती मंडप केला आहे. 13
त्यांच्या तेजस्वी समक्षतेतून विजा लखलखल्या. 14 याहवेहने स्वर्गातून
गर्जना केली; परात्पराच्या वाणीचा नाद झाला. 15 त्यांनी आपले बाण
सोडले आणि शत्रूंची दाणादाण केली, मोठ्या विजेच्या कडकडाटांनी
त्यांना पळवून टाकले. 16 याहवेहच्या धमकीने त्यांच्या नाकपुड्यातील
श्वासाच्या फुंकराने समुद्राचे तळ उघडकीस आले आणि पृथ्वीचे पाये
उघडे पडले. 17 “वरून त्यांनी आपला हात लांब करून मला धरले; खोल
जलांमधून त्यांनी मला बाहेर काढले. 18 माझ्या बलवान शत्रूपासून
माझे शत्रू जे माझ्यासाठी फार शक्तिमान होते, त्यांच्यापासून मला
सोडविले. 19 माझ्या विपत्कालच्या दिवसात ते माझ्यावर चालून आले,

परंतु याहवेह माझे आधार होते. 20 त्यांनी मला प्रशस्त ठिकाणी
आणले; त्यांनी मला सोडविले कारण त्यांना माझ्याठायी हर्ष होता.
21 “याहवेहने माझ्या नीतिमत्तेनुसार माझ्याशी व्यवहार केला आहे;
माझ्या हाताच्या शुद्धतेनुसार त्यांनी मला प्रतिफळ दिले आहे. 22 कारण
याहवेहचे मार्ग मी पाळले आहेत; माझ्या परमेश्वरापासून दूर गेल्याचा
दोष माझ्यावर नाही. 23 त्यांचे सर्व नियम माझ्यासमोर आहेत; मी
त्यांच्या आज्ञेपासून दूर वळलो नाही. 24 मी त्यांच्यापुढे निर्दोष आहे
आणि मी स्वत:ला पापापासून दूर ठेवले आहे. 25 याहवेहने माझ्या
नीतिमत्तेनुसार, त्यांच्या दृष्टीसमोर माझ्या शुद्धतेनुसार मला प्रतिफळ
दिले आहे. 26 “विश्वासणाऱ्यांशी तुम्ही विश्वासू आहात, व निर्दोषांशी
तुम्ही निर्दोषतेने वागता, 27 शुद्धजनांशी तुम्ही शुद्धतेने वागता, परंतु
कुटिलांशी तुम्ही चतुरतेने वागता. 28 नम्रजनांचा तुम्ही उद्धार करता,
परंतु उन्मत्त लोकांवर नजर ठेवून तुम्ही त्यांचा अध:पात करतात. 29
हे याहवेह, तुम्ही माझे दीप आहात; याहवेह माझ्या अंधाराचा प्रकाश
करतात. 30 तुमच्याच साहाय्याने मी सैन्यावर मात करू शकतो; माझ्या
परमेश्वरामुळे मी गड चढू शकतो. 31 “परमेश्वराविषयी म्हणाल, तर
त्यांचा मार्ग परिपूर्ण आहे. याहवेहचे वचन दोषरहित आहे; जे याहवेहच्या
ठायी आश्रय घेतात त्यांची ते ढाल आहेत. 32 याहवेहखेरीज दुसरा कोण
परमेश्वर आहे? आणि आमच्या परमेश्वराशिवाय कोण खडक आहे? 33
परमेश्वरच मला सामर्थ्य पुरवितात, आणि माझे मार्ग सरळ ठेवतात. 34
तेच माझे पाय हरिणींच्या पायांसारखे करतात; कड्यांच्या माथ्यांवरून
तेच मला सुखरुपपणे नेतात. 35 ते माझ्या हातांना युद्धासाठी प्रशिक्षित
करतात; माझे हात कास्य धनुष्य वाकवितात. 36 माझी ढाल म्हणून
तुम्ही मला तारण दिले आहे; तुमच्या साहाय्याने मला थोर केले आहे.
37 माझी पावले घसरू नयेत, म्हणून माझ्या पावलांसाठी तुम्ही विस्तृत
मार्ग केला आहे. 38 “मी माझ्या शत्रूंचा पाठलाग केला आणि त्यांचा
नाश केला; त्यांचा नाश होईपर्यंत मी परतलो नाही. 39 मी त्यांना
पूर्णपणे तुडविले आणि ते उठू शकले नाही; ते माझ्या पायाखाली पडले.
40 तुमच्या शक्तीने मला युद्धासाठी सुसज्ज केले; माझ्या शत्रूंना तुम्ही
माझ्यासमोर लीन केले. 41 तुम्ही माझ्या वैऱ्यांना पाठ दाखविण्यास
भाग पाडले, आणि मी माझ्या शत्रूंचा नाश केला. 42 त्यांनी साहाय्याची
आरोळी केली, पण त्यांना वाचविण्यास कोणी नव्हते; त्यांनी याहवेहचा
धावा केला, परंतु त्यांनी उत्तर दिले नाही. 43 पृथ्वीच्या धुळीप्रमाणे मी
त्यांचा भुगा केला; रस्त्यावरील चिखलाप्रमाणे त्यांना मी कुटून आणि
तुडवून टाकले. 44 “लोकांच्या हल्ल्यापासून तुम्ही माझी सुटका केली;
राष्ट्रांचा प्रमुख म्हणून तुम्ही मला राखून ठेवले. ज्या लोकांची मला
ओळख नव्हती ते आता माझी सेवा करतात, 45 परदेशी माझ्यासमोर
भीतीने वाकतात; माझे नाव ऐकताच ते माझी आज्ञा पाळतात. 46 त्या
सर्वांचे धैर्य खचून गेले, ते त्यांच्या गडातून थरथर कापत बाहेर येतात.
47 “याहवेह जिवंत आहे! माझ्या खडकाची स्तुती असो! माझे परमेश्वर,
खडक, माझे तारणकर्ता सर्वोच्च असोत! 48 परमेश्वरच आहेत, जे
माझ्यासाठी सूड घेतात, ते राष्ट्रांना माझ्या अधीन करतात, 49 ते मला
माझ्या वैऱ्यांपासून मुक्त करतात. तुम्ही मला माझ्या वैऱ्यांपेक्षा उंचावले
आहे; हिंसक मनुष्यापासून तुम्ही मला सोडविले. 50 म्हणून हे याहवेह,
राष्ट्रांमध्ये मी तुमची थोरवी गाईन; मी तुमच्या नावाची स्तुती गाईन. 51
“ते आपल्या राजाला महान विजय देतात; ते आपल्या अभिषिक्तावर,
दावीदावर आणि त्याच्या वंशजांवरही सर्वदा कृपा करतात.”

23 दावीदाचे शेवटचे शब्द हे आहेत: “इशायाचा पुत्र दावीदाचे प्रेरित
शब्द, परात्पराने ज्याला उंच केले त्याचे हे शब्द, याकोबाच्या
परमेश्वराद्वारे ज्याचा अभिषेक झाला, जो इस्राएलच्या गीतांचा नायक:
2 “याहवेहचा आत्मा माझ्याद्वारे बोलला आहे; त्यांचे वचन माझ्या
जिभेवर होते. 3 इस्राएलचे परमेश्वर बोलले, इस्राएलच्या खडकाने मला
म्हटले: ‘जेव्हा एखादा मनुष्य न्यायाने लोकांवर राज्य करतो, जेव्हा तो
परमेश्वराचे भय बाळगून राज्य करतो, 4 तो सूर्योदयाच्या प्रकाशासारखा
निरभ्र पहाटेच्या प्रभेसारखा, पाऊसानंतरच्या तेजाप्रमाणे जे भूमीतून
गवत उगवते त्याप्रमाणे आहे.’ 5 “जर माझे घराणे परमेश्वराशी सरळ
नसते, तर खचितच त्यांनी माझ्याशी सर्वकाळचा करार, सर्वप्रकारे
सुव्यवस्थित व निश्चित केला नसता, खचितच त्यांनी माझे तारण सफल
करून माझी प्रत्येक आकांक्षा पूर्ण केली नसती. 6 परंतु सर्व दुष्ट लोक
काट्यांसारखे फेकले जातील, जे हाताने गोळा करता येत नाहीत. 7
जे कोणी काट्यांना गोळा करतात ते लोखंडी साधन किंवा भाल्याचा
दांडा वापरतात; ते जागीच भस्म केले जातात.” 8 दावीदाच्या पराक्रमी
योद्ध्यांची नावे ही: तहकेमोनचा योशेब-बश्शेबेथ तीन सेनापतींचा प्रमुख
होता; त्याने भाला उगारून एका हल्ल्यात आठशे लोकांचा वध केला. 9
त्याच्यानंतर अहोहचा रहिवासी दोदोचा पुत्र एलअज़ार होता. तो तीन
पराक्रमी योद्ध्यांपैकी एक होता. पस-दम्मीम येथे युद्धासाठी एकत्र
आलेल्या पलिष्ट्यांना टोमणे मारत जो दावीदाबरोबर होता. तेव्हा
इस्राएल लोक माघारी गेले होते, 10 परंतु एलअज़ार युद्धभूमीवर राहून,
त्याचा हात थकेपर्यंत व तलवारीला त्याचा हात चिकटून जाईपर्यंत
त्याने पलिष्ट्यांना ठार मारले होते. त्या दिवशी याहवेहने त्यांना मोठा
विजय प्राप्त करून दिला. सैन्य पुन्हा एलअज़ारकडे आले ते केवळ
मेलेल्यांना लुटायला. 11 त्याच्यानंतर अगी हरारी याचा पुत्र शम्माह
होता. मसूरांनी भरलेले शेत असलेल्या एका ठिकाणी पलिष्टी एकत्र
जमले तेव्हा इस्राएली सैन्याने पलिष्ट्यांपुढून पळ काढला होता. 12
परंतु शम्माह त्या शेताच्या मध्यभागी उभा राहिला, त्याचा बचाव त्यांनी
केला आणि पलिष्ट्यांना मारून टाकले आणि याहवेहने त्या दिवशी
मोठा विजय मिळवून दिला. 13 हंगामाच्या वेळी, जेव्हा पलिष्ट्यांच्या
टोळीने रेफाईमच्या खोऱ्यात छावणी दिली होती, तेव्हा तीस मुख्य
सेनापती योद्ध्यांपैकी तिघे जण दावीदाकडे अदुल्लाम गुहेकडे आले.
14 त्यावेळी दावीद गडावर होता आणि पलिष्टी सेना बेथलेहेम नगरात
होती. 15 दावीदाला पाणी पिण्याची उत्कट इच्छा झाली व म्हणाला,
“बेथलेहेमच्या वेशीजवळच्या विहिरीचे पाणी मला कोणी आणून दिले
तर किती बरे असते!” 16 तेव्हा या तीन पराक्रमी योद्ध्यांनी पलिष्ट्यांच्या
छावणीमधून घुसून, बेथलेहेमच्या वेशीजवळच्या विहिरीचे पाणी काढून

दावीदाकडे आणले. परंतु दावीदाने ते पिण्याचे नाकारले; आणि ते
याहवेहसमोर ओतले. 17 दावीद म्हणाला, “मी असे करणे माझ्यापासून
दूर असो, हे याहवेह! ज्या पुरुषांनी आपला जीव धोक्यात घालून
आणले, त्यांचे ते रक्त नाही काय?” म्हणून दावीद ते पाणी प्याला
नाही. अशी साहसी कामे त्या तीन पराक्रमी योद्ध्यांनी केली होती. 18
जेरुइयाहचा पुत्र योआबचा भाऊ अबीशाई हा तिघांचा प्रमुख होता.
त्याने आपला भाला तीनशे लोकांवर उगारून त्यांना मारून टाकले होते,
म्हणून तो या तिघांप्रमाणेच प्रसिद्ध झाला होता. 19 या तिघांपेक्षा त्याला
मोठा सन्मान दिला नाही काय? तो त्या तिघांचाही सेनापती झाला,
जरी त्या तिघांमध्ये त्याची गणती झाली नाही. 20 कबसेल येथील
यहोयादाचा पुत्र बेनाइयाह एक शूर मनुष्य होता. त्याने मोआबाच्या
सर्वात पराक्रमी योद्ध्यांना ठार मारले होते. त्याचप्रमाणे हिमवर्षावाच्या
दिवसात खाली गुहेत जाऊन एका सिंहाला ठार मारले. 21 त्याने
एका बलाढ्य इजिप्ती मनुष्याला सुद्धा जिवे मारले होते. जरी त्या
इजिप्ती माणसाच्या हातात भाला होता, बेनाइयाह केवळ आपली काठी
हातात घेऊन त्याच्याशी लढण्यास गेला. त्याने त्याचा भाला हिसकावून
घेतला व त्याच्याच भाल्याने त्याला मारून टाकले. 22 यहोयादाचा पुत्र
बेनाइयाहची ही साहसी कामे होती; त्या तीन पराक्रमी योद्ध्यांप्रमाणे
त्याने देखील किर्ती मिळविली होती. 23 इतर तीस जणांपेक्षा त्याला
मोठा सन्मान दिला गेला, परंतु तिघांमध्ये त्याची गणती झाली नाही.
आणि दावीदाने त्याला आपल्या अंगरक्षकांचा अधिकारी म्हणून नेमले.
24 तीस जण येणेप्रमाणे होते: योआबाचा भाऊ असाहेल, बेथलेहेमकर
दोदोचा पुत्र एलहानान, 25 हरोदी शम्माह, हरोदी एलीका, 26 पालती
हेलेस, तकोवा येथील इक्केशाचा पुत्र ईरा, 27 अनाथोथचा अबिएजेर,
हुशाथचा सिब्बखय, 28 अहोह येथील सलमोन, नटोफाथी माहाराई, 29
नटोफाथी बाअनाहचा पुत्र हेलेब, गिबियाहतील बिन्यामीन गोत्रातील
रीबाईचा पुत्र इत्तई, 30 पिराथोनचा बेनाइयाह, गाशाच्या ओढ्याजवळचा
हिद्दै, 31 अर्बाथचा अबी-अल्बोन, बहरहूमचा अजमावेथ, 32 शालबोनचा
एलीहबा, याशेनाचे पुत्र, योनाथान 33 हरार येथील शम्माहचा पुत्र, हरार
येथील शारारचा पुत्र अहीयाम, 34 माकाथी अहसबैचा पुत्र एलिफेलेत,
गिलोनी अहीथोफेलचा पुत्र एलीयाम, 35 कर्मेलचा हेस्रो, अर्बी येथील
पारई, 36 सोबाह येथील हागरीचा पुत्र, नाथानचा पुत्र इगाल, गादी
बानी; 37 अम्मोनी सेलेक, बैरोथचा नाहाराई, जो जेरुइयाहचा पुत्र
योआब याचा शस्त्रवाहक होता, 38 इथ्री येथील ईरा, इथ्री येथील गारेब
39 आणि उरीयाह हिथी.

**24** इस्राएली लोकांविरुद्ध याहवेहचा कोप पुन्हा भडकला आणि
त्यांनी दावीदाला चिथविले, “जा आणि इस्राएल व यहूदीयाची
शिरगणती कर.” 2 म्हणून राजाने योआब व त्याच्या बरोबरच्या
सेनापतींना सांगितले, “दानपासून बेअर-शेबापर्यंत इस्राएलच्या सर्व
गोत्रांमधून फिरून, लढाऊ पुरुषांची नोंदणी करा, म्हणजे ते किती आहेत
ते मला कळेल.” 3 परंतु योआबाने राजाला उत्तर दिले, “याहवेह आपले
परमेश्वर आपल्या सैन्यातील संख्या शंभरपटीने वाढवो आणि माझे
स्वामी ते आपल्या डोळ्यांनी पाहो. परंतु गणती करावी अशी इच्छा राजा
का बाळगतात?” 4 तथापि, राजाच्या शब्दापुढे योआब व सेनापतींचे
म्हणणे सफल झाले नाही; तेव्हा ते इस्राएलच्या लढाऊ पुरुषांची गणती
करण्यासाठी राजापुढून निघून गेले. 5 यार्देन पार केल्यावर, त्यांनी
अरोएर नगराच्या दक्षिणेकडील खोऱ्यात डेरा दिला, नंतर ते गादमधून
जाऊन याजेरकडे गेले. 6 नंतर ते गिलआद व तहतीम होदशी या प्रांतात
गेले व तिथून दान यअनकडून वळसा घेऊन सीदोनकडे गेले. 7 नंतर ते
सोरच्या किल्ल्याकडे आणि हिव्वी व कनानी यांच्या सर्व नगरांकडे व
शेवटी ते यहूदीयाच्या नेगेवप्रांतातील बेअर-शेबापर्यंत गेले. 8 नऊ महिने
वीस दिवस संपूर्ण देशात फिरल्यानंतर, ते यरुशलेमात परत आले. 9
योआबाने राजाला योद्धे पुरुषांच्या संख्येचा अहवाल दिला: इस्राएलमध्ये
धनुर्धारी आठ लाख व यहूदीयामध्ये पाच लाख पुरुष होते. 10 योद्धे
पुरुषांची गणती केल्यानंतर दावीदाचे मन त्याला टोचू लागले आणि
त्याने याहवेहला म्हटले, “मी जे केले ते करून मी पाप केले आहे. तर
आता हे याहवेह, मी आपणास विनंती करतो की आपल्या सेवकाचा
दोष दूर करा; मी मूर्खपणा केला आहे.” 11 दुसऱ्या दिवशी सकाळी
दावीद उठण्यापूर्वी, दावीदाचा द्रष्टा, गाद संदेष्टा, याच्याकडे याहवेहचे
वचन आले: 12 “जाऊन दावीदाला सांग, ‘याहवेह असे म्हणतात: मी
तुझ्यापुढे तीन पर्याय ठेवतो. त्यापैकी तू एकाची निवड कर, जो मी
तुझ्याविरुद्ध वापरावा.’ ” 13 तेव्हा गाद दावीदाकडे गेला व त्याला म्हटले,
“तुमच्यासमोर देशभर तीन वर्षांचा दुष्काळ असावा? किंवा शत्रूकडून
तुमचा पाठलाग होत असताना तीन महिने तुम्ही त्यांच्यापासून पळ
काढावा? किंवा तुमच्या देशात तीन दिवस पीडा यावी? तर आता यावर
विचार करून ज्यांनी मला पाठविले आहे त्यांना काय उत्तर द्यावे ते तुम्ही
ठरवून मला सांगा.” 14 दावीदाने गादला म्हटले, “मी मोठ्या पेचात
आहे. आपण याहवेहच्या हाती पडू, कारण त्यांची कृपा अपार आहे;
परंतु मला मनुष्याच्या हातात पडू देऊ नको.” 15 तेव्हा याहवेहने इस्राएल
देशात त्या सकाळपासून नेमलेल्या वेळेपर्यंत मरी पाठवली आणि
दानपासून बेअर-शेबापर्यंत सत्तर हजार लोक मरण पावले. 16 जेव्हा
यरुशलेमचा नाश करण्यासाठी दूताने आपला हात लांब केला, तेव्हा
याहवेहला अरिष्टाविषयी वाईट वाटले आणि लोकांचा नाश करणाऱ्या
दूताला याहवेहने म्हटले, “पुरे! आपला हात आवर.” त्यावेळी याहवेहचा
दूत यबूसी अरवनाहच्या खळ्याजवळ होता. 17 दावीदाने जेव्हा लोकांचा
नाश करणाऱ्या दूताला पाहिले, तो याहवेहला म्हणाला, “मी पाप केले
आहे; जो मी मेंढपाळ, तो मी चुकीचे वागलो. ही तर केवळ मेंढरे आहेत.
त्यांनी काय केले आहे? आपला हात माझ्यावर व माझ्या घराण्यावर
पडो.” 18 त्या दिवशी गाद दावीदाकडे आला आणि त्याला म्हणाला,
“जा आणि यबूसी अरवनाहच्या खळ्यात याहवेहप्रीत्यर्थ वेदी बांध.”
19 तेव्हा गादद्वारे याहवेहने दिलेल्या आज्ञेनुसार दावीद वर गेला. 20
राजा व त्याची माणसे आपल्याकडे येत आहेत असे जेव्हा अरवनाहने
पाहिले, तेव्हा त्याने राजासमोर जाऊन भूमीकडे तोंड करून दंडवत
घातले. 21 अरवनाहने विचारले, “माझे स्वामी आपल्या सेवकाकडे का

आले आहेत?” दावीदाने उत्तर दिले, “मी तुझे खळे विकत घेण्यासाठी
आलो आहे, लोकांवर आलेली मरी थांबावी म्हणून याहवेहसाठी मी
इथे वेदी बांधेन.” 22 अरवनाह दावीदाला म्हणाला, “माझ्या स्वामींना
मनास येईल ते त्यांनी घ्यावे व अर्पण करावे. हे पाहा होमार्पणासाठी
बैल इकडे आहेत आणि लाकडासाठी मळणीची आऊते व बैलाचे जू येथे
आहे. 23 महाराज, अरवनाह हे सर्व राजाला देत आहे.” त्याचप्रमाणे
अरवनाह हे सुद्धा म्हणाला, “याहवेह आपले परमेश्वर आपला स्वीकार
करो.” 24 परंतु राजा अरवनाहला म्हणाला, “नाही, मी त्याबद्दल
तुला किंमत मोजून देणार. फुकट मिळालेले होमार्पण याहवेह माझ्या
परमेश्वराला मी अर्पिणार नाही.” म्हणून दावीदाने जात्याचे खळे आणि
बैल चांदीचे पन्नास शेकेल देऊन विकत घेतले. 25 नंतर दावीदाने तिथे
याहवेहप्रीत्यर्थ एक वेदी बांधली व होमार्पणे व शांत्यर्पणे अर्पिली.
तेव्हा दावीदाने देशाच्या वतीने केलेली प्रार्थना याहवेहने ऐकली आणि
इस्राएलातील पीडा नाहीशी झाली.

# 1 राजे

1 जेव्हा दावीद राजा फार वृद्ध झाला, तेव्हा त्याच्यावर कितीही
पांघरुणे घातली तरी त्याला ऊब येत नसे. 2 म्हणून त्याचे सेवक
त्याला म्हणाले, “राजाची सेवा करण्यासाठी आणि त्यांची काळजी
घेण्यासाठी आपण एक तरुण कुमारी शोधू या. तिने त्यांच्याजवळ
झोपावे म्हणजे आमच्या स्वामींना ऊब येईल.” 3 नंतर त्यांनी सर्व
इस्राएली देशात एका सुंदर तरुण कुमारीचा शोध केला आणि त्यांना
शूनेमकरीण अबीशग आढळली, त्यांनी तिला राजाकडे आणले. 4 ती
स्त्री खूप सुंदर होती; तिने राजाची काळजी घेतली आणि त्यांची सेवा
केली, पण राजाने तिच्याशी लैंगिक संबंध ठेवले नाहीत. 5 त्यावेळी
अदोनियाह, ज्याच्या आईचे नाव हग्गीथ होते, त्याने स्वत:ला पुढे
करीत म्हटले, “मी राजा होणार.” म्हणून त्याने रथ आणि घोडे तयार
केले आणि त्याच्यापुढे धावण्यासाठी पन्नास माणसे घेतली. 6 (“तू
जे काही करतोस ते का करतोस?” असे त्याच्या वडिलांनी त्याला
कधीही खडसावून विचारले नाही. तो सुद्धा फार रूपवान होता आणि
अबशालोमच्या नंतर तो जन्मला होता.) 7 जेरुइयाहचा पुत्र योआब
आणि अबीयाथार याजक यांच्याशी अदोनियाहने चर्चा केली आणि
त्यांनी त्याला पाठिंबा दिला. 8 परंतु सादोक याजक, यहोयादाचा पुत्र
बेनाइयाह, नाथान संदेष्टा, शिमी आणि रेई आणि दावीदाचा खास रक्षक
हे अदोनियाहला जाऊन मिळाले नाही. 9 अदोनियाहने एन-रोगेलजवळ
जोहेलेथच्या दगडावर मेंढरे, गुरे आणि पुष्ट वासरे यांचा यज्ञ केला.
त्याने आपले सर्व भाऊ, राजपुत्र आणि यहूदीयाच्या सर्व राजकीय
अधिकाऱ्यांना आमंत्रित केले, 10 परंतु त्याने नाथान संदेष्टा, बेनाइयाह,
खास रक्षक व त्याचा भाऊ शलोमोन यांना आमंत्रित केले नाही. 11
तेव्हा शलोमोनची आई बथशेबा हिला नाथानाने विचारले, “हग्गीथेचा
पुत्र अदोनियाह हा आता राजा झाला आहे, हे तू ऐकले नाही काय?
आणि दावीद आमचे धनी यांना याविषयी काहीच माहिती नाही? 12
तर आता, तू आपला स्वत:चा आणि तुझा पुत्र शलोमोन याचा जीव
कसा वाचवावा असा बोध मी तुला देतो. 13 दावीद राजाकडे जा आणि
त्यांना सांग, ‘माझ्या स्वामी, आपण आपल्या दासीशी शपथ घेतली
नव्हती काय, “खचितच माझ्यानंतर तुझा पुत्र शलोमोन राजा होईल
आणि तो माझ्या राजासनावर बसेल” तर मग अदोनियाह कसा राजा
झाला?’ 14 तू राजाबरोबर अजूनही बोलत असतानाच मी आत येईन
आणि तू जे सांगितले त्यामध्ये माझे शब्द घालेन.” 15 तेव्हा बथशेबा
वृद्ध राजाला भेटण्यास त्यांच्या खोलीत गेली, तिथे शूनेमकरीण अबीशग
त्यांची सेवा करीत होती. 16 बथशेबाने राजासमोर लवून दंडवत घातले.
राजाने विचारले, “तुला काय पाहिजे?” 17 ती त्यांना म्हणाली, “माझे
स्वामी, मी तुमची दासी, मला तुम्ही तुमच्या याहवेह परमेश्वराची शपथ
दिली होती की: ‘माझ्यानंतर तुझा पुत्र शलोमोन हाच राजा होईल,
आणि तो माझ्या राजासनावर बसेल.’ 18 परंतु आता अदोनियाह राजा
झाला आहे आणि माझ्या स्वामींना यातील काहीही माहीत नाही. 19
त्याने मोठ्या संख्येने पशू, पुष्ट वासरे आणि मेंढरे यांचा यज्ञ केला
आणि त्याने राजाच्या सर्व पुत्रांना, अबीयाथार याजक आणि सैन्याचा
सेनापती योआब यांना आमंत्रित केले, पण आपला सेवक शलोमोनला
त्याने बोलाविले नाही. 20 माझे स्वामी, सर्व इस्राएली लोकांचे डोळे
आपणाकडे लागले आहेत, की आपण हे घोषित कराल की माझ्या
स्वामीनंतर तुमच्या सिंहासनावर कोण बसणार. 21 नाहीतर, माझे
स्वामी त्यांच्या पूर्वजांबरोबर विसावा पावतील आणि मला आणि माझ्या
पुत्र शलोमोनला दोषी असल्याची वागणूक दिली जाईल.” 22 ती
राजाबरोबर बोलत असतानाच, नाथान संदेष्टा आला. 23 आणि राजाला
सांगण्यात आले, “नाथान संदेष्टा आले आहेत.” म्हणून तो राजासमोर
गेला आणि जमिनीपर्यंत लवून दंडवत केले. 24 नाथान संदेष्टा म्हणाला,
“माझ्या स्वामी, अदोनियाह तुमच्यानंतर राजा होणार आणि तो तुमच्या
राजासनावर बसणार अशी घोषणा तुम्ही केली आहे काय? 25 आज
त्याने खाली जाऊन पुष्कळ संख्येने गुरे, पुष्ट वासरे आणि मेंढरांचा यज्ञ
केला आहे. त्याने सर्व राजपुत्र, सैन्यांचे सेनापती आणि अबीयाथार
याजक यांना आमंत्रित केले आहे. सध्या यावेळी ते त्याच्यासोबत खात
व पीत आहेत आणि म्हणत आहेत, ‘राजा अदोनियाह चिरायू होवो!’ 26
परंतु मी आपला सेवक आणि सादोक याजक, आणि यहोयादाचा पुत्र
बेनाइयाह, आणि आपला पुत्र शलोमोन यांना त्याने आमंत्रित केले नाही.
27 हे सर्व माझ्या स्वामीने त्यांच्यानंतर राजासनावर कोणी बसावे हे
आपल्या सेवकाला न कळवताच केले आहे काय?” 28 मग दावीद राजा
म्हणाला, “बथशेबाला आत बोलवा,” तेव्हा ती राजाच्या उपस्थितीत
येऊन उभी राहिली. 29 तेव्हा राजाने शपथ वाहून म्हटले, “ज्यांनी मला
प्रत्येक संकटातून सोडविले, त्या जिवंत याहवेहची शपथ, 30 याहवेह
इस्राएलच्या परमेश्वराच्या नावाने जे मी तुला शपथ घेऊन म्हटले होते
की: तुझा पुत्र शलोमोन माझ्यानंतर राजा होईल आणि तोच माझ्या
जागेवर माझ्या राजासनावर बसेल, ते मी आज खचितच पूर्ण करेन.”
31 तेव्हा बथशेबाने भूमीकडे आपले मुख लवून राजासमोर दंडवत घातले
आणि म्हटले, “दावीद, माझे स्वामी सदा चिरायू होवोत!” 32 दावीद
राजाने म्हटले, “सादोक याजक, नाथान संदेष्टा आणि यहोयादाचा पुत्र
बेनाइयाह यांना आत बोलवा.” जेव्हा ते राजापुढे आले, 33 राजाने त्यांना
म्हटले: “आपल्या धन्याचे सेवक तुमच्यासोबत घ्या आणि माझा पुत्र
शलोमोन याला माझ्या खेचरावर बसवून त्याला गीहोन येथे घेऊन जा.
34 तिथे सादोक याजक आणि नाथान संदेष्टा यांनी त्याचा इस्राएलचा
राजा म्हणून अभिषेक करावा. कर्णे वाजवून घोषणा करावी, ‘शलोमोन
राजा चिरायू होवोत!’ 35 नंतर तुम्ही त्याच्यासोबत वर जावे आणि
त्याने येऊन माझ्या राजासनावर बसून माझ्या जागेवर राज्य करावे.
मी त्याला इस्राएलचा आणि यहूदीयाचा राज्यकर्ता नेमले आहे.” 36
यहोयादाचा पुत्र बेनाइयाहने राजाला उत्तर दिले, “आमेन! याहवेह,
माझ्या स्वामींचे परमेश्वर असेच घोषित करोत. 37 याहवेह जसे दावीद,
माझ्या स्वामींसोबत होते, तसेच याहवेह शलोमोनसोबतही असो, म्हणजे
त्याचे राजासन माझ्या स्वामींच्या राजासनापेक्षा अधिक महान करो.”

38 तेव्हा सादोक याजक, नाथान संदेष्टा, यहोयादाचा पुत्र बेनाइयाह,
करेथी व पलेथी हे खाली गेले आणि शलोमोनला दावीद राजाच्या
खेचरावर बसविले आणि त्याला गीहोन येथे नेले. 39 सादोक याजकाने
पवित्र मंडपातून तेलाचे शिंग घेतले आणि शलोमोनचा अभिषेक केला.
नंतर त्यांनी कर्णे वाजविले आणि “शलोमोन राजा चिरायू असो! असा
सर्व लोकांनी जयघोष केला.” 40 आणि सर्व लोक पावा वाजवित
आणि मोठा आनंदोत्सव करीत त्याच्यामागे गेले, त्यांच्या घोषणांनी
जमीन हादरली. 41 अदोनियाह आणि त्याच्याबरोबर असलेल्या सर्व
पाहुण्यांनी मेजवानी संपत असता हा आवाज ऐकला. कर्ण्यांचा आवाज
ऐकताच योआबाने विचारले, “शहरात हा सर्व आवाज का येत आहे?”
42 तो हे बोलत असताच, अबीयाथार याजकाचा पुत्र योनाथान आला.
अदोनियाह त्याला म्हणाला, “आत ये. तुझ्यासारख्या योग्य मनुष्याने
चांगलीच बातमी आणली असणार.” 43 योनाथानने अदोनियाहास
उत्तर दिले, “अजिबात नाही! दावीद आमच्या स्वामींनी शलोमोनास
राजा केले आहे. 44 राजाने त्याच्यासोबत सादोक याजक, नाथान
संदेष्टा, यहोयादाचा पुत्र बेनाइयाह, करेथी आणि पलेथी यांना पाठविले
आहे आणि त्यांनी त्याला राजाच्या खेचरावर बसविले आहे, 45 आणि
सादोक याजक आणि नाथान संदेष्टा यांनी त्याचा राजा म्हणून गीहोन
येथे अभिषेक केला आहे. तिथून ते मोठ्या आनंदाने वर गेले आणि
शहरात त्या आवाजाचा नाद होत आहे. तोच आवाज आपण ऐकत
आहात. 46 शिवाय, शलोमोनने राजासनावरील आपले स्थान घेतले
आहे. 47 तसेच, राजकीय अधिकारी येऊन दावीद आपल्या स्वामींना
असे म्हणत आशीर्वाद देत आहेत, ‘आपला परमेश्वर तुमच्या नावांपेक्षा
शलोमोनचे नाव अधिक प्रसिद्ध करो आणि त्याचे राजासन तुमच्या
राजासनापेक्षा मोठे करो!’ आणि राजाने आपल्या पलंगावरून नमन केले
48 आणि म्हटले, ‘याहवेह, इस्राएलचे परमेश्वर ज्यांनी मला आज माझ्या
राजासनावरचा माझा वारस मला पाहू दिला, त्यांचे नाव धन्यवादित
असो.’” 49 त्यावेळी, अदोनियाहचे सर्व पाहुणे घाबरून उठले आणि
पांगून गेले. 50 परंतु अदोनियाहने शलोमोनच्या भीतीने जाऊन वेदीवरील
शिंगे धरून ठेवली. 51 तेव्हा शलोमोनला सांगण्यात आले, “अदोनियाह
शलोमोन राजाला घाबरत आहे आणि वेदीच्या शिंगांना धरून ठेवले आहे.
तो म्हणतो की, ‘शलोमोन राजाने आज माझ्याशी शपथ घ्यावी की तो
त्याच्या सेवकाला तलवारीने मारणार नाही.’” 52 शलोमोनने उत्तर दिले,
“जर तो स्वतःस योग्य असा सिद्ध करेल, तर त्याच्या डोक्यावरील एक
केससुद्धा जमिनीवर पडणार नाही; पण त्याच्या ठायी दुष्टाई आढळली,
तर तो मरण पावेल.” 53 तेव्हा शलोमोन राजाने माणसे पाठवून त्याला
वेदीवरून खाली आणले आणि अदोनियाहने येऊन शलोमोन राजास
मुजरा केला आणि शलोमोन त्याला म्हणाला, “आपल्या घरी जा.”

**2** जेव्हा दावीदाचा शेवट जवळ आला, तेव्हा त्याने आपला पुत्र
शलोमोनाला आज्ञा दिल्या. 2 दावीदाने म्हटले, “जगाच्या प्रथेनुसार
आता माझी जाण्याची वेळ आली आहे, तर खंबीर हो आणि शुराप्रमाणे
वाग. 3 आणि याहवेह तुझे परमेश्वर काय म्हणतात त्याकडे लक्ष दे:
मोशेच्या नियमशास्त्रात लिहिल्याप्रमाणे याहवेहच्या आज्ञांचे पालन कर
आणि त्यांचे नियम आणि आज्ञा, त्यांचे निर्णय आणि निर्बंध पाळ.
असे केल्याने जे काही तू करशील आणि जिथे कुठे तू जाशील तिथे
तू यशस्वी होशील. 4 आणि मला दिलेले हे अभिवचन याहवेह पूर्ण
करतील: ‘जर तुझे वंशज आपले जीवन यथायोग्य ठेवतील आणि
त्यांच्या सर्व हृदयाने आणि जिवाने माझ्यासमोर विश्वासूपणे चालतील,
इस्राएलच्या राजासनावर बसण्यासाठी तुझा वंश खुंटणार नाही.’ 5 “तर
तू स्वतः समजून घे की जेरुइयाहचा पुत्र योआब माझ्याशी कसा वागला;
इस्राएलच्या सैन्याचे दोन सेनापती, नेरचा पुत्र अबनेर आणि येथेरचा
पुत्र अमासा यांना त्याने काय केले. त्याने त्यांना जसे युद्धकाळात मारावे
तसे शांतीच्या काळात जिवे मारले आणि त्या रक्ताने त्याचा कंबरपट्टा
आणि पायतणे डागाळली आहेत. 6 तुझ्या सुज्ञतेनुसार त्यांचे कर, परंतु
त्याचे पिकलेले डोके शांतीने कबरेत जाऊ देऊ नकोस. (Sheol h7585)
7 “परंतु गिलआदी बारजिल्लईच्या मुलांवर दया दाखव आणि त्यांना
तुमच्या मेजावर भोजन करणाऱ्यांपैकी असू दे. तुझा भाऊ अबशालोम
याच्यापासून मी पळून गेलो तेव्हा ते माझ्या पाठीशी उभे राहिले. 8
“आणि बहूरीम येथील बिन्यामीन गेराचा पुत्र शिमी तुमच्यात आहे हे
विसरू नकोस, मी महनाईमकडे जाताना त्या दिवशी ज्याने मला भयंकर
शाप दिला होता. पण जेव्हा तो मला यार्देनकडे भेटण्यास आला, तेव्हा
‘मी तुला तलवारीने ठार मारणार नाही’ अशी याहवेहच्या नावाने मी
त्याला शपथ दिली होती. 9 परंतु त्याला निर्दोष समजू नको. तू सुज्ञ
व्यक्ती आहेस; त्याचे काय करावे हे तुला कळेल. त्याचे पिकलेले डोके
रक्ताळलेले असे कबरेत पाठव.” (Sheol h7585) 10 यानंतर दावीद त्याच्या
पूर्वजांसोबत विसावला आणि दावीदाच्या नगरात त्याला पुरले गेले.
11 दावीदाने इस्राएलवर चाळीस वर्षे राज्य केले; सात वर्षे हेब्रोनमध्ये
आणि तेहतीस वर्षे यरुशलेमेत राज्य केले. 12 मग शलोमोन आपला
पिता दावीद याच्या राजासनावर बसला आणि त्याचे राज्य बळकट
असे स्थापित झाले. 13 हग्गीथेचा पुत्र अदोनियाह हा शलोमोनची आई
बथशेबाकडे आला. बथशेबाने त्याला विचारले, “तू शांतीने आला आहेस
काय?” त्याने उत्तर दिले “होय, मी शांतीने आलो आहे.” 14 नंतर तो
पुढे म्हणाला, “मला तुमच्याशी काही बोलायचे आहे.” ती म्हणाली,
“तू बोलू शकतो.” 15 तेव्हा तो म्हणाला, “तुम्हाला तर ठाऊकच आहे
की वास्तविकता राज्य माझे होते. त्यांचा राजा म्हणून सर्व इस्राएलची
नजर माझ्याकडे होती. परंतु ते पालटले आणि राज्य माझ्या भावाकडे
गेले आहे; कारण त्याला ते याहवेहकडून आले आहे. 16 तर आता
मला तुमच्याकडे एक विनंती करावयाची आहे. मना करू नका.” ती
म्हणाली, “बोल.” 17 तो पुढे म्हणाला, “शलोमोन राजा तुम्हाला मना
करणार नाही; कृपया त्यांना विचार की त्यांनी शूनेमकरीण अबीशग
ही मला पत्नी म्हणून द्यावी.” 18 बथशेबा म्हणाली, “ठीक आहे, मी
तुझ्या वतीने राजाशी बोलेन.” 19 जेव्हा बथशेबा शलोमोन राजाकडे
त्याच्याशी अदोनियाहसाठी बोलण्यास गेली, तिला पाहताच राजा
तिला भेटण्यास उभा राहिला, त्याने तिच्यापुढे डोके लवविले. राजाच्या

आईसाठी आसन मागविले आणि ती त्याच्या उजवीकडे बसली. 20 ती
म्हणाली, “मला तुझ्याकडे एक लहानशी विनंती करावयाची आहे, मला
मना करू नकोस.” राजाने म्हटले, “माझ्या माते, माग, मी तुला मना
करणार नाही.” 21 तेव्हा ती म्हणाली, “शूनेमकरीण अबीशग हिला
तुझा भाऊ अदोनियाह याला पत्नी म्हणून दे.” 22 शलोमोन राजाने
त्याच्या आईला उत्तर दिले, “तू अदोनियाहसाठी शूनेमकरीण अबीशग
हिची विनंती का करतेस? तू त्याच्यासाठी राज्य मागू शकतेस; शेवटी तो
माझा थोरला भाऊ आहे; होय, त्याच्यासाठी आणि अबीयाथार याजक
व जेरुइयाहचा पुत्र योआब यांच्यासाठी देखील मागू शकतेस!” 23
तेव्हा शलोमोन राजाने याहवेहची शपथ घेतली: “अदोनियाहने ही जी
विनंती केली आहे त्यासाठी त्याचा जीव देऊन त्याने किंमत मोजली
नाही तर, परमेश्वर माझे पाहो आणि माझ्याशी अधिक कठोरपणे
वागो! 24 तर आता, ज्यांनी मला माझे पिता दावीदाच्या राजासनावर
स्थापित केले आहे आणि त्यांनी वचन दिल्याप्रमाणे माझे घराणे
स्थापित केले आहे, ते याहवेह जिवंत आहेत; आज अदोनियाहला
जिवे मारले जाईल!” 25 म्हणून शलोमोन राजाने यहोयादाचा पुत्र
बेनाइयाह याला आज्ञा केली, आणि त्याने अदोनियाहवर वार केला
आणि तो मेला. 26 राजा अबीयाथार याजकाला म्हणाला, “तू अनाथोथ
येथे आपल्या शेताकडे परत जा. वास्तविक तू सुद्धा मरण्यास पात्र
आहे, परंतु मी तुला आता मारणार नाही, कारण माझे पिता दावीद
याच्यासमोर तू सार्वभौम याहवेहचा कोश वाहिला आणि माझे पिता
दावीदाच्या सर्व कष्टांमध्ये तू सहभागी होतास.” 27 म्हणून शलोमोनने
अबीयाथारला याहवेहच्या याजकपदावरून काढून टाकले, याप्रकारे
एलीच्या घराण्याबद्दल याहवेहने शिलोह येथे बोललेले शब्द पूर्णतेस
आले. 28 जेव्हा योआबाला ही बातमी कळली, तो याहवेहच्या मंडपाकडे
पळून गेला आणि वेदीवरील शिंगे धरून राहिला. अबशालोमसोबत तो
जरी मिळाला नव्हता तरीही अदोनियाहसोबत त्याने कट रचला होता.
29 शलोमोन राजाला सांगण्यात आले की योआब याहवेहच्या मंडपात
पळून जाऊन वेदीच्या बाजूला आहे. तेव्हा शलोमोनने यहोयादाचा पुत्र
बेनाइयाह याला हुकूम दिला, “जा, त्याच्यावर वार कर.” 30 तेव्हा
बेनाइयाह याहवेहच्या मंडपामध्ये गेला आणि योआबाला म्हणाला,
“राजा म्हणतो ‘बाहेर ये!’” परंतु त्याने उत्तर दिले, “नाही, मी येथेच
मरेन.” तेव्हा बेनाइयाहने राजाला कळवले, “योआबाने मला असे उत्तर
दिले.” 31 तेव्हा राजाने बेनाइयाहला आज्ञा केली, “तो म्हणतो तसे
कर. त्याला मारून त्याला गाडून टाक आणि योआबाने विनाकारण
रक्त सांडल्याच्या दोषातून मला व माझ्या सर्व कुटुंबाला मुक्त कर.
32 त्याने केलेल्या रक्तपाताबद्दल याहवेह त्याची परतफेड करतील,
कारण माझे पिता दावीदच्या नकळत त्याने दोन माणसांवर हल्ला केला
आणि त्यांना तलवारीने ठार केले. ते दोघेजण; इस्राएलच्या सैन्याचा
सेनापती नेरचा पुत्र अबनेर आणि यहूदीयाच्या सैन्याचा सेनापती
येथेरचा पुत्र अमासा; हे योआबापेक्षा अधिक चांगले आणि सरळ होते.
33 त्यांच्या रक्ताचा दोष योआबाच्या व त्याच्या वंशजांच्या माथ्यावर
सर्वकाळ असो. परंतु दावीद व त्याचे वंशज, त्याचे घराणे आणि त्याचे
राजासन यावर याहवेहची शांती सदा असो.” 34 तेव्हा यहोयादाचा पुत्र
बेनाइयाहने जाऊन योआबावर वार केला आणि त्याला मारून टाकले
आणि त्याला रानात त्याच्या घरी पुरले. 35 मग राजाने यहोयादाचा पुत्र
बेनाइयाह याला योआबाच्या जागी सैन्याचा अधिकारी म्हणून आणि
अबीयाथाराच्या जागी सादोकला याजक म्हणून नेमले. 36 नंतर राजाने
शिमीला बोलावून सांगितले, “तुझ्यासाठी यरुशलेमात घर बांध आणि
तिथे राहा, इतर कुठेही जाऊ नकोस. 37 ज्या दिवशी तू निघून किद्रोनचे
खोरे पार करशील, तेव्हा हे समज की तू खचितच मरशील; आणि
तुझे रक्त तुझ्याच माथ्यावर असणार.” 38 शिमीने राजाला उत्तर दिले,
“तुम्ही जे म्हणता ते योग्य आहे. माझे स्वामी जे म्हणतात त्याप्रमाणे
आपला सेवक करेल.” आणि शिमी बराच काळ यरुशलेमात राहिला.
39 परंतु तीन वर्षानंतर, शिमीचे दोन गुलाम, माकाहचा पुत्र आखीश,
गथच्या राजाकडे पळून गेले आणि शिमीला सांगण्यात आले, “तुझे
गुलाम गथमध्ये आहेत.” 40 हे ऐकताच, त्याने आपल्या गाढवावर
खोगीर घातले आणि त्याच्या गुलामांचा शोध करीत आखीशकडे गथ
येथे गेला. शिमीने जाऊन गथवरून आपल्या गुलामांना परत आणले. 41
जेव्हा शलोमोनला सांगण्यात आले की शिमी यरुशलेमहून गथला गेला
होता आणि परत आला आहे. 42 तेव्हा राजाने शिमीला बोलावून घेतले
आणि त्याला म्हटले, “याहवेहसमोर तुझ्याकडून शपथ घेऊन तुला मी
चेतावणी दिली नव्हती काय की, ‘तू यरुशलेम सोडून कुठेही जाशील
त्या दिवशी खचितच तू मरशील’? त्यावेळी तू मला म्हणालास, ‘तुम्ही जे
काही म्हणता ते बरे आहे, मी त्याप्रमाणे करेन.’ 43 तर मग तू याहवेहला
दिलेली शपथ आणि मी दिलेली आज्ञा का पाळली नाही?” 44 पुढे राजा
शिमीला म्हणाला, “माझे पिता दावीदाशी तू किती चुकीचा वागला हे
तुला तुझ्या मनात ठाऊक आहे. याहवेहच तुला तुझ्या चुकीचा मोबदला
देतील. 45 परंतु शलोमोन राजा आशीर्वादित राहील आणि दावीदाचे
राजासन याहवेहसमोर सदा सुरक्षित राहील.” 46 तेव्हा यहोयादाचा पुत्र
बेनाइयाह याला राजाने आज्ञा दिली आणि त्याने बाहेर जाऊन शिमीवर
वार केला आणि तो मेला. आता शलोमोनच्या हातात राज्य प्रस्थापित
झाले.

**3** शलोमोनने इजिप्तचा राजा फारोह याच्याशी सोयरीक केली व
त्याच्या कन्येशी विवाह केला. त्याने तिला दावीदाच्या शहरात आणले
आणि आपला राजवाडा, याहवेहचे मंदिर, यरुशलेमच्या सभोवतीचा
कोट बांधून होईपर्यंत त्याने तिला तिथेच ठेवले. 2 तथापि लोक अजूनही
उच्च स्थानावर आपली यज्ञार्पणे करीत असत. कारण याहवेहच्या नावाचे
मंदिर अजून बांधून झाले नव्हते. 3 उच्च स्थानावर जाऊन यज्ञार्पणे करणे
व धूप जाळणे, याशिवाय आपला पिता दावीदाने दिलेल्या सूचनांनुसार
शलोमोन चालला व त्याने याहवेहवरील त्याची प्रीती व्यक्त केली. 4
राजा गिबोन येथे यज्ञ करावयाला गेले, कारण ते सर्वात महत्त्वाचे उच्च
स्थान होते आणि शलोमोनने त्या वेदीवर एक हजार होमार्पणे सादर
केली. 5 गिबोन येथे त्या रात्री याहवेहने शलोमोनला स्वप्नात दर्शन दिले

आणि परमेश्वर म्हणाले, “मी तुला जे काही द्यावे असे तुला वाटते ते माग.” 6 शलोमोनने उत्तर दिले, “आपला सेवक, माझे पिता दावीदाला आपण अपार दया दाखविली होती, कारण ते आपल्याशी विश्वासू होते, व हृदयाने नीतिमान व सरळ होते. आपण त्यांच्यावरील ही अपार दया पुढे चालू ठेवून आज त्यांच्या राजासनावर बसण्यासाठी त्यांना एक पुत्र दिला. 7 “तर आता हे याहवेह, माझ्या परमेश्वरा, माझे पिता दावीदाच्या जागी आपण मला राजा केले आहे. परंतु मी एक लहान बालक आहे आणि माझ्या जबाबदाऱ्या मी कशा पार पाडाव्या हे मला कळत नाही. 8 आपला सेवक तर आपण निवडलेल्या लोकांमध्ये आहे, जे इतके मोठे व अगणित आहेत. 9 म्हणून आपल्या लोकांवर राज्य करण्यासाठी आणि बरे आणि वाईटाची पारख करण्यासाठी आपण आपल्या सेवकाला विवेकी हृदय द्यावे. कारण आपल्या या मोठ्या प्रजेवर कोण राज्य करू शकेल?” 10 शलोमोनाने हे मागितल्याने प्रभू परमेश्वर प्रसन्न झाले. 11 म्हणून परमेश्वराने त्याला म्हटले, “कारण तू तुझ्यासाठी दीर्घायुष्य किंवा संपत्ती किंवा तुझ्या शत्रूंचा नाश हे न मागता न्याय करण्यासाठी विवेक मागितला आहे, 12 त्यामुळे तू जे मागितले आहेस ते मी करेन. मी तुला ज्ञानी व विवेकी हृदय देईन, म्हणजे तुझ्यासारखा पूर्वी कधी कोणी नव्हता, ना कधी असेल. 13 याशिवाय, तू जे मागितले नाहीस ते म्हणजे संपत्ती आणि सन्मान हे देखील मी तुला देईन—आणि तुझ्या आयुष्याच्या दिवसांत राजांमध्ये तुझ्यासमान कोणीही नसेल. 14 आणि तुझा पिता दावीद करीत असे त्याचप्रमाणे जर तू माझ्या आज्ञेनुसार चालून माझे नियम आणि विधी पाळशील, तर मी तुला दीर्घायुष्य देईन.” 15 नंतर शलोमोन जागा झाला; आणि त्याला कळले की ते एक स्वप्न होते. तो यरुशलेमास गेला आणि प्रभू परमेश्वराच्या कराराच्या कोशापुढे उभे राहून होमार्पणे व शांत्यर्पणे अर्पण केली. नंतर त्याने आपल्या दरबारात मोठी मेजवानी दिली. 16 आता दोन वेश्या राजाकडे येऊन त्यांच्यासमोर उभ्या राहिल्या. 17 त्यांच्यापैकी एक म्हणाली, “माझे स्वामी, मला क्षमा करा. ही स्त्री आणि मी एकाच घरात राहतो आणि ती माझ्यासोबत असताना मला एक मूल झाले. 18 माझे मूल जन्मल्यानंतर तिसऱ्या दिवशी, या स्त्रीला सुद्धा एक मूल झाले. आम्ही एकट्याच होतो; घरात आम्हा दोघींशिवाय अन्य कोणी नव्हते. 19 “रात्रीच्या वेळी या स्त्रीचे मूल मरण पावले, कारण ती त्याच्या अंगावर झोपली. 20 तेव्हा ती मध्यरात्री उठली आणि मी आपली दासी झोपेतच असताना माझ्याजवळ झोपलेले माझे मूल तिने घेतले आणि तिने ते तिच्या उराशी ठेवले व तिचे मेलेले मूल माझ्या उराशी ठेवले. 21 सकाळी मी माझ्या मुलाला दूध पाजण्यासाठी उठले; आणि तो मेलेला होता! परंतु दिवसाच्या उजेडात जेव्हा मी त्याला निरखून पाहिले, तेव्हा मला समजले की मी ज्याला जन्म दिला तो हा नव्हे.” 22 दुसरी स्त्री म्हणाली, “जिवंत असलेला मुलगा माझा आहे; मेलेला तुझा आहे.” परंतु पहिलीने हट्ट केला, “नाही! मेलेला तुझा आहे; जिवंत माझा आहे.” असा त्यांनी राजासमोर वादविवाद केला. 23 राजाने म्हटले, “एक म्हणते, ‘माझा मुलगा जिवंत आहे आणि तुझा मुलगा मेला आहे,’ तर दुसरी म्हणते, ‘नाही! तुझा मुलगा मेला आहे आणि माझा जिवंत आहे.’” 24 तेव्हा राजाने म्हटले, “मला एक तलवार आणून द्या.” तेव्हा त्यांनी राजासाठी तलवार आणली. 25 नंतर राजाने आज्ञा केली: “जिवंत मुलाचे कापून दोन तुकडे करा आणि अर्धा भाग एकीला आणि अर्धा भाग दुसरीला द्यावा.” 26 ज्या स्त्रीचा जिवंत मुलगा होता तिचे हृदय तिच्या मुलासाठी ममतेने तुटले आणि ती राजाला म्हणाली, “माझे स्वामी, कृपा करून जिवंत मुलगा तिला द्या! त्याला मारू नका!” परंतु दुसरी म्हणाली, “तो ना तुला ना मला मिळणार. त्याचे दोन तुकडे करा!” 27 तेव्हा राजाने आपला न्याय दिला: “मूल पहिल्या स्त्रीला द्या. त्याला मारू नका; तीच त्याची आई आहे.” 28 राजाने दिलेला हा न्याय जेव्हा सर्व इस्राएलने ऐकला, तेव्हा त्यांना राजाचा आदर वाटू लागला, कारण त्यांनी पाहिले की न्याय देण्यासाठी राजाला परमेश्वराकडून ज्ञान प्राप्त झाले आहे.

**4** शलोमोन राजाने सर्व इस्राएलवर राज्य केले. 2 हे सर्व मुख्य अधिकारी होते: सादोकाचा पुत्र अजऱ्याह याजक; 3 शिशाचे पुत्र एलिहोरेफ आणि अहीयाह सचिव; अहीलुदचा पुत्र यहोशाफाट, नोंदणी करणारा; 4 यहोयादाचा पुत्र बेनाइयाह, मुख्य सेनापती होता; सादोक व अबीयाथार, हे याजक होते. 5 नाथानचा पुत्र अजऱ्याह, हा राज्याधिकाऱ्यांचा मुख्य होता. नाथानचा पुत्र जाबूद, राजाचा याजक व सल्लागार होता; 6 अहीशार, राजवाड्या संबंधीच्या कामकाजाचा व्यवस्थापक होता. अब्दाचा पुत्र अदोनिराम हा मजुरांवर अधिकारी होता. 7 शलोमोनने सर्व इस्राएलात बारा जिल्हाधिकारीही नेमले होते. ते राजाला आणि राजघराण्याला अन्नसामुग्री पुरवित असत. प्रत्येकाला वर्षातून एकदा, महिनाभर सामुग्री पुरवावी लागत असे. 8 त्यांची नावे ही होती: बेन-हूर हा एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशावर होता; 9 बेन-देकेर हा माकाज, शालब्बीम, बेथ-शेमेश आणि एलोन-बेथ-हानान या प्रदेशांवर होता. 10 बेन-हेसेद हा अरुब्बोथवर होता (सोकोह आणि हेफेरचा सर्व प्रदेश त्याच्याकडे होता); 11 बेन-अबीनादाब हा नाफोथ दोर यावर (शलोमोनची कन्या ताफाथ हिच्याशी त्याचा विवाह झाला होता); 12 अहीलुदचा पुत्र बाअनाकडे तानख व मगिद्दो आणि येज्रीलखाली असलेल्या सारेथान जवळील बेथ-शानपर्यंत सर्व प्रदेश, तसेच बेथ-शानपासून योकमेअम पर्यंतचा आबेल-महोलाहचा प्रदेश; 13 बेन-गेबेर हा रामोथ-गिलआदवर (मनश्शेहहचा पुत्र याईरची गावे, त्याचप्रमाणे बाशानातील अर्गोब व त्यातील तटबंदीची व कास्याच्या अडसरांची फाटके असलेली साठ मोठी नगरे याच्याकडे होती); 14 इद्दोचा पुत्र अहीनादाबकडे महनाईम. 15 अहीमाजकडे नफताली होते (त्याने शलोमोनची कन्या बासमाथ हिच्याशी विवाह केला होता); 16 हूशाईचा पुत्र बआना आशेर आणि बालोथवर; 17 पारुआहचा पुत्र यहोशाफाट हा इस्साखारमध्ये होता; 18 एलाचा पुत्र शिमी हा बिन्यामीन प्रांतावर. 19 उरीचा पुत्र गेबेर हा गिलआद प्रांतावर (अमोऱ्यांचा राजा सीहोन आणि बाशानचा राजा ओग यांचा प्रदेश). त्या जिल्ह्यावर तो एकटाच अधिकारी होता. 20 इस्राएली आणि यहूदीयाच्या लोकांची संख्या समुद्र किनाऱ्यावरील वाळू इतकी अगणित होती. ते खाऊन

पिऊन मजेत होते. 21 आणि फरात नदीपासून पलिष्ट्यांच्या देशापर्यंत आणि पुढे खाली इजिप्तच्या हद्दीपर्यंत या सर्व राज्यांवर शलोमोनचे राज्य होते. या सर्व राष्ट्रांनी शलोमोनला कर दिला व शलोमोनच्या सर्व आयुष्यभर ते त्याच्या अधीन राहिले. 22 शलोमोनचा रोजचा पुरवठा तीस कोर सपीठ व साठ कोर पीठ, 23 गोठ्यात चारलेले दहा बैल, कुरणात चरणारे वीस बैल आणि शंभर मेंढरे व बोकडे, याशिवाय हरिण, सांबरे, भेकरे आणि पुष्ट पक्षी. 24 कारण फरात नदीच्या पश्चिमेकडील तिफसाहपासून गाझापर्यंतच्या सर्व राज्यांवर शलोमोनचे राज्य होते आणि सर्व बाजूने शांती होती. 25 शलोमोनच्या जीवनभरात यहूदीया आणि इस्राएलचे लोक, दानपासून बेअर-शेबापर्यंत सुरक्षित होते, प्रत्येकजण आपआपल्या द्राक्षवेली व अंजिराच्या झाडाखाली होते. 26 शलोमोनकडे रथाच्या घोड्यांसाठी चार हजार तबेले आणि बारा हजार घोडे होते. 27 जिल्हाधिकारी आपआपल्या महिन्यात शलोमोन राजाला व त्यांच्या मेजावर भोजन करणाऱ्यांसाठी अन्नसामुग्रींचा पुरवठा करीत असत. कशाचीही वाण पडणार नाही याची ते दक्षता घेत असत. 28 त्याचप्रमाणे रथाच्या घोड्यांसाठी व इतर घोड्यांसाठी देखील जव व वैरण त्यांच्या नेमलेल्या ठिकाणी आणत असत. 29 परमेश्वराने शलोमोनला ज्ञान व समुद्रकाठच्या वाळूप्रमाणे मोजमाप काढता येत नाही इतके फार मोठे शहाणपण व अगाध समज दिली होती. 30 पूर्वेकडील देशातील सर्व लोकांपेक्षा किंवा इजिप्तमधील सर्व ज्ञानापेक्षा शलोमोनचे ज्ञान फार मोठे होते. 31 इतर मनुष्यांपेक्षा, म्हणजेच एज्रावासी एथान, माहोलचे पुत्र हेमान, कल्कोल व दारदापेक्षा शलोमोन ज्ञानी होता. आणि त्याची किर्ती आसपासच्या सर्व राष्ट्रांपर्यंत पसरली. 32 शलोमोनने तीन हजार नीतिसूत्रे आणि एक हजार पाच गीते रचली. 33 लबानोनातील गंधसरूपासून भिंतीतून उगविणाऱ्या एजोबापर्यंत वनस्पती जीवनाविषयी तो बोलला. पशू व पक्षी, सरपटणारे जंतू व मासे याबद्दलही त्याने वर्णन केले. 34 शलोमोनच्या ज्ञानाचे बोल ऐकायला सर्व राष्ट्रांतून लोक येत असत, ते जगातील सर्व राजे ज्यांनी शलोमोनच्या ज्ञानाविषयी ऐकले होते, त्यांच्याद्वारे पाठवले जात असत.

**5** त्याचे पिता दावीदाचा अभिषिक्त वारस म्हणून शलोमोनचा राज्याभिषेक झाला आहे असे जेव्हा सोरचा राजा हीरामाने ऐकले, तेव्हा त्याने शलोमोनकडे आपले राजदूत पाठवले, कारण दावीदाशी त्याचे नेहमीच मैत्रीचे संबंध होते. 2 शलोमोनने हीरामास परत निरोप पाठवला: 3 “आपणास तर माहीतच आहे की माझे पिता दावीदाला सर्व बाजूंनी युद्धाने घेरले होते आणि त्याच्या शत्रूंना याहवेहने त्याच्या पायाखाली देईपर्यंत याहवेह त्यांच्या परमेश्वराच्या नावासाठी त्यांना मंदिर बांधता आले नाही. 4 परंतु आता माझ्या याहवेह परमेश्वराने सर्व बाजूंनी मला स्वस्थता दिली आहे. कोणी शत्रू किंवा अरिष्ट नाही. 5 जसे याहवेहने माझे पिता दावीदाला सांगितले होते, ‘तुझा पुत्र, ज्याला मी तुझ्या जागी तुझ्या राजासनावर बसवेन तो माझ्या नावासाठी मंदिर बांधेल.’ म्हणून याहवेह माझ्या परमेश्वराच्या नावासाठी मी मंदिर बांधावे अशी मी इच्छा बाळगतो. 6 “तर आता लबानोनचे गंधसरू माझ्यासाठी कापले जावे अशी आज्ञा करा. माझी माणसे तुमच्या माणसांबरोबर काम करतील आणि तुमच्या माणसांसाठी तुम्ही जी मजुरी ठरवाल ती मी तुम्हाला देईन. तुम्हाला माहीतच आहे की लाकडाचे काम करण्यात जी निपुणता सीदोनी लोकांमध्ये आहे ती आमच्यात कोणामध्ये नाही.” 7 शलोमोनचा निरोप ऐकून हीरामाला अतिशय आनंद झाला व म्हणाला, “आज याहवेहची स्तुती असो, कारण या महान देशावर राज्य करण्यासाठी याहवेहने दावीदाला ज्ञानी पुत्र दिला आहे.” 8 तेव्हा हीरामाने शलोमोनला निरोप पाठवला: “आपण पाठविलेला निरोप मला मिळाला. देवदारू व गंधसरूच्या लाकडाचा पुरवठा आपल्या मागणीनुसार पुरविला जाईल. 9 माझी माणसे ती लबानोनपासून भूमध्य समुद्रापर्यंत ओढून नेतील, मी त्यांचे ताफे बनवून जे ठिकाण आपण मला सांगाल तिथपर्यंत पोचते करेन. तिथे मी ते वेगळे करेन आणि मग आपण ते घेऊन जाऊ शकता. आणि माझ्या राजकीय घराण्याला आपण अन्न पुरवावे ही माझी इच्छा आपण पूर्ण करावी.” 10 याप्रकारे हीरामाने शलोमोनला हवे तेवढ्या गंधसरू आणि देवदारू लाकडांचा पुरवठा केला. 11 आणि शलोमोनने हीरामाला त्याच्या घराण्यासाठी अन्न म्हणून वीस हजार कोर गहू, त्याचबरोबर वीस हजार कोर दाबून काढलेले जैतुनाचे तेल दिले. याप्रकारे शलोमोन वर्षानुवर्षे ते पाठवित राहिला. 12 अभिवचन दिल्याप्रमाणे याहवेहने शलोमोनला ज्ञान दिले. हीराम आणि शलोमोन यांच्यात शांतीचे संबंध होते आणि त्या दोघांनी शांतीचा करार केला. 13 शलोमोन राजाने सर्व इस्राएलातून तीस हजार पुरुष मजूर घेतले, 14 शलोमोन लबानोनला प्रत्येक महिन्याला दहा हजार पुरुष आळीपाळीने पाठवित असे, म्हणजे ते लबानोनमध्ये एक महिना व दोन महिने आपल्या घरी राहत असत. अदोनिराम बिगारी कामकऱ्यांवर अधिकारी होता. 15 डोंगराळ प्रदेशात शलोमोनचे सत्तर हजार ओझी वाहणारे आणि ऐंशी हजार दगड घडविणारे होते, 16 त्याचप्रमाणे शलोमोनचे तीन हजार तीनशे मुकादम होते, जे प्रकल्पाची देखरेख करून कामगारांचे मार्गदर्शन करीत असत. 17 राजाच्या आज्ञेनुसार त्यांनी मंदिराच्या पायासाठी खाणीतून उच्च दर्जाचे मोठे दगडे काढले. 18 शलोमोनचे आणि हीरामाचे कारागीर व गिबली येथील कामकऱ्यांनी मंदिर बांधण्यासाठी लाकूड व दगडे कापून तयार केली.

**6** इस्राएली लोक इजिप्त देशातून बाहेर पडल्यावर चारशे ऐंशी वर्षानंतर, इस्राएलवर शलोमोनच्या कारकिर्दीच्या चौथ्या वर्षात, दुसऱ्या महिन्यात; म्हणजेच सीव महिन्यात, शलोमोनने याहवेहचे मंदिर बांधण्यास सुरुवात केली. 2 शलोमोन राजाने याहवेहसाठी जे मंदिर बांधले, त्याची लांबी साठ हात, रुंदी वीस हात आणि उंची तीस हात होती. 3 मंदिराच्या मुख्य मंडपाच्या समोरच्या व्हरांड्याची रुंदी मंदिराच्या रुंदीएवढीच, म्हणजेच वीस हात होती, मंदिराच्या समोरील बाजूने त्याची रुंदी दहा हात होती. 4 त्यांनी मंदिराच्या वरील बाजूच्या भिंतींमध्ये अरुंद खिडक्या बनविल्या. 5 मुख्य खोली तसेच पवित्रस्थानाच्या आतील बाजूस त्याने मजले बांधले व त्यात खोल्या केल्या. 6 सर्वात खालचा मजला पाच हात रुंद, मधला मजला सहा हात आणि तिसरा मजला

सात हात. त्याने मंदिराच्या बाहेरील बाजूस तोडे ठेवले म्हणजे मंदिराच्या
भिंतींच्या पार काहीही घुसविले जावू नये. 7 मंदिराच्या बांधकामासाठी
खाणीतूनच तयार केलेले दगड वापरण्यात आले होते आणि मंदिर बांधले
जात असताना हातोडी, कुऱ्हाड किंवा इतर कोणत्याही लोखंडी हत्याराचा
आवाज मंदिराच्या परिसरात ऐकू आला नव्हता. 8 तळमजल्याचे
प्रवेशद्वार मंदिराच्या दक्षिणेस होते; तिथून मधल्या मजल्यापर्यंत आणि
तिथून पुढे तिसऱ्या मजल्यापर्यंत एक जिना होता. 9 त्याने गंधसरूच्या
लाकडाच्या तुळया टाकून छप्पर टाकून, मंदिराचे बांधकाम पूर्ण केले.
10 आणि त्याने मंदिराच्या सभोवतीच्या बाजूने पाच हात उंचीच्या
खोल्या बांधल्या व त्या प्रत्येक खोली गंधसरूच्या तुळयांनी मंदिराशी
जोडली. 11 तेव्हा याहवेहचे वचन शलोमोनकडे आले: 12 “तू बांधत
असलेले हे जे मंदिर आहे त्याबाबत, जर तू माझ्या विधींचे अनुसरण
केले, माझे नियम पाळले व माझ्या आज्ञा मानून त्यांचे पालन केले
तर, तुझा पिता दावीदाला दिलेल्या अभिवचनांची मी तुझ्याद्वारे पूर्तता
करेन. 13 आणि मी इस्राएली लोकांमध्ये राहीन आणि माझे लोक
इस्राएल यांना मी सोडणार नाही.” 14 शलोमोनने मंदिर बांधून पूर्ण
केले. 15 त्याने मंदिराच्या आतील भिंतींना, जमिनीपासून छप्परापर्यंत
गंधसरूच्या पट्ट्या लावल्या व जमिनीला गंधसरूच्या फळया केल्या. 16
मंदिरामध्येच पवित्रस्थान व परमपवित्रस्थान असावे म्हणून मंदिराच्या
मागील बाजूला जमिनीपासून छप्परापर्यंत देवदारूच्या फळया लावून
त्याने तो वेगळा केला. 17 या खोलीच्या समोरची मुख्य खोली चाळीस
हात लांब होती. 18 मंदिराचा आतील भाग गंधसरूचा होता व त्यावर
कळया व उमललेली फुले कोरली होती. दगड दृष्टीस पडू नये, म्हणून
सर्वकाही गंधसरूचे बनविले गेले होते. 19 याहवेहच्या कराराचा कोश
ठेवण्यासाठी त्याने मंदिराच्या आतील भागात पवित्रस्थान बनविले. 20
आतील पवित्रस्थान वीस हात लांब, वीस हात रुंद व वीस हात उंच होते.
त्याच्या आतील भागावर व गंधसरूच्या वेदीला त्याने शुद्ध सोन्याचे
आवरण दिले होते. 21 शलोमोनने मंदिराच्या आतील भागाला शुद्ध
सोन्याचे आच्छादन घातले, आणि पवित्रस्थानाच्या समोरून आतील
बाजूने सोन्याच्या साखळया आडव्या लावल्या, व त्यांना देखील सोन्याचे
आवरण दिले. 22 अशाप्रकारे त्याने संपूर्ण मंदिर सोन्याने मढविले.
आतील पवित्रस्थानातील वेदीला सुद्धा त्याने सोन्याचे आवरण दिले.
23 आतील पवित्रस्थानासाठी त्याने जैतून लाकडाचे दोन करूब तयार
केले. प्रत्येक दहा हात उंच होते. 24 पहिल्या करुबाचे एक पंख पाच
हात आणि दुसरे पंख पाच हात लांब होते; एका पंखाच्या टोकापासून
दुसऱ्या पंखाच्या टोकापर्यंत दहा हात अंतर होते. 25 दुसरा करूब
सुद्धा दहा हाताच्या मापाचा होता, कारण दोन्ही करूब एकसारख्याच
मापाचे व आकाराचे होते. 26 प्रत्येक करुबाची उंची दहा हात होती. 27
त्याने ते करूब, त्यांचे पंख पसरलेले असे मंदिराच्या अगदी आतील
खोलीत ठेवले. एका करुबाचे पंख एका भिंतीला स्पर्श करत होते, तर
दुसऱ्या करुबाचे पंख दुसऱ्या भिंतीला स्पर्श करत होते आणि त्यांचे पंख
खोलीच्या मध्यभागी एकमेकांना स्पर्श करत होते. 28 त्याने करुबांना
सोन्याचे आवरण दिले. 29 मंदिराच्या आतील व बाहेरील खोल्यांच्या
भिंतीवर सभोवार करूब, खजुरीची झाडे व उमललेली फुले कोरली
होती. 30 त्याने मंदिराच्या आतील व बाहेरील खोल्यांच्या जमिनीला
सुद्धा सोन्याचे आवरण दिले. 31 मंदिराच्या आतील प्रवेशद्वारासाठी त्याने
जैतून लाकडाचे दरवाजे बनविले, ज्यांची रुंदी पवित्रस्थानाच्या पाचव्या
भागाइतकी होती. 32 त्यातील जैतून लाकडाच्या दोन दारांवर सोन्याचे
ठोकलेले करूब, खजुरीची झाडे आणि उमललेली फुले कोरली. 33
त्याच प्रकारे, मुख्य खोलीच्या प्रवेशद्वारासाठी त्याने जैतून लाकडाच्या
कपाळपट्ट्या बनविल्या ज्यांची रुंदी भिंतीच्या चौथ्या भागाइतकी होती.
34 त्याने देवदारू लाकडाचे सुद्धा दोन दरवाजे बनविले, जे दोन्ही बाजूंनी
दुमडले जात होते. 35 त्यावरही त्याने एकसारखे ठोकलेल्या सोन्याचे
काम करून करूब, खजुरीची झाडे आणि उमललेली फुले कोरली. 36
आणि त्याने आतील अंगणात वळणदार दगडांच्या तीन रांगा आणि
छाटलेल्या गंधसरूच्या तुळयांची एक रांग बनविली. 37 चौथ्या वर्षी,
सीव महिन्यात याहवेहच्या मंदिराचा पाया घातला गेला. 38 अकराव्या
वर्षी, आठव्या महिन्यात; म्हणजे बूल महिन्यात, त्याच्या तपशील व
नमुन्याप्रमाणे मंदिराचे बांधकाम संपले. शलोमोनला मंदिर बांधण्यासाठी
सात वर्षे लागली.

7 शलोमोनच्या राजवाड्याचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी तेरा वर्षे
लागली. 2 त्याने लबानोनच्या वनात जो राजवाडा बांधला त्याची
लांबी शंभर हात, रुंदी पन्नास हात व उंची तीस हात होती, त्याला
गंधसरूच्या खांबांच्या चार रांगा होत्या व त्याला आधार देण्यासाठी
गंधसरूच्या छाटलेल्या तुळया होत्या. 3 त्या खांबांवर एका ओळीत
पंधरा तुळया; अशा पंचेचाळीस तुळया होत्या व त्यावर देवदारूच्या
फळयांचे छत होते. 4 त्याच्या खिडक्या उंचावर समोरासमोर तीन
अशा जोडीने बसविल्या होत्या. 5 सर्व दरवाजांना चौकट बाह्या होत्या;
त्या समोरच्या बाजूने समोरासमोर तीन अशा जोडीने होत्या. 6 त्याने
पन्नास हात लांब व तीस हात रुंद अशी खांबांची एक पंक्ती बनविली.
त्याच्यासमोर एक द्वारमंडप होता व त्यासमोर खांब व त्यावर छत
होते. 7 त्याने राजासनासाठी खोली बांधली, जी न्यायाची खोली,
जिथे बसून तो लोकांचा न्याय करणार, त्या खोलीला जमिनीपासून
छतापर्यंत गंधसरूच्या फळयांनी झाकले. 8 आणि ज्या राजवाड्यात
तो राहणार त्याची रचना याच खोलीप्रमाणे होती. फारोहच्या ज्या
कन्येशी त्याने विवाह केला होता तिच्यासाठी सुद्धा शलोमोनने याच
खोलीसारखा राजवाडा बनविला. 9 या सर्व इमारती, बाहेरच्या बाजूपासून
ते दरबारापर्यंत आणि त्यांच्या पायापासून छपराच्या वळचणीपर्यंत, उच्च
प्रतीचे दगड घेऊन त्यांना आकारात कापून आतील व बाहेरील बाजूने
त्यांना गुळगुळीत बनवून वापरले होते. 10 उत्तम दर्जाच्या मोठमोठ्या
दगडांनी त्यांचा पाया घातला गेला. काही दगड दहा हात तर काही आठ
हात लांबीचे होते. 11 त्याच्या वरच्या बाजूने योग्य आकारात कापलेले
उच्च दर्जाचे दगड आणि गंधसरूच्या तुळया होत्या. 12 मोठ्या अंगणाच्या
सभोवती घडलेल्या दगडांच्या तीन रांगा व छाटलेल्या गंधसरूच्या

तुळयांची एक रांग होती, याहवेहच्या मंदिराच्या आतील अंगणाला व
द्वारमंडपालाही तसेच होते. 13 शलोमोन राजाने सोर येथून हीरामला
बोलावून घेतले. 14 त्याची आई नफताली गोत्रातील एक विधवा होती
आणि त्याचा पिता सोरचा होता, तो कास्याचे काम करण्यात निपुण
कारागीर होता. हुराम सर्वप्रकारचे कास्याचे काम करण्यास ज्ञानाने,
शहाणपणाने व विद्येने भरलेला होता. तो शलोमोन राजाकडे आला व
त्याला नेमून दिलेली सर्व कामे केली. 15 त्याने कास्याचे दोन खांब
तयार केले, प्रत्येक खांबाची उंची अठरा हात आणि घेर बारा हात होती.
16 खांबांच्या शिखरांवर बसविण्यासाठी त्याने कास्याचे दोन ओतीव
कळस केले; प्रत्येकाची उंची पाच हात होती. 17 खांबांवर असलेल्या
प्रत्येक कळसांना सात साखळीच्या विणलेल्या जाळया बसविल्या
होत्या. 18 खांबांच्या वरच्या कळसांना सजविण्यासाठी त्याने प्रत्येक
जाळयाला गोलाकारात दोन रांगेत डाळिंबे बनविली. प्रत्येक कळस
त्याने असेच घडविले. 19 द्वारमंडपात असलेल्या खांबांवरील कळस
कमळांच्या फुलांच्या आकाराचे, चार हात उंच होते. 20 दोन्ही खांबांच्या
कळसांना लागून वाटीच्या आकाराच्या जाळीभोवती, दोनशे डाळिंबाच्या
रांगा केलेल्या होत्या. 21 त्याने हे खांब मंदिराच्या द्वारमंडपाकडे ठेवले.
दक्षिणेकडे ठेवलेल्या खांबाला त्याने याखीन आणि उत्तरेकडील खांबाला
बवाज असे नाव दिले. 22 खांबांवर असलेले कळस कमळांच्या आकाराचे
होते. याप्रकारे खांबांचे काम पूर्ण झाले. 23 त्याने ओतीव धातूचा
हौद तयार केला, तो गोलाकार असून त्याचा व्यास एका काठापासून
दुसऱ्या काठापर्यंत दहा हात होता व पाच हात उंच होता. त्याचे सभोवार
माप घेण्यास तीस हात दोरी लागत असे. 24 त्याच्या काठाखाली
सभोवार एकेका हाताच्या अंतरावर दहा काकड्या होत्या. या काकड्या
हौदाबरोबरच एकांगी अशा दोन रांगेत ओतीव केल्या होत्या. 25 हा
हौद बारा बैलांवर उभा होता, तीन बैल उत्तरेकडे, तीन पश्चिमेकडे, तीन
दक्षिणेकडे आणि तीन पूर्वेकडे तोंड करून होते आणि त्यांच्यावर हौद
विसावला होता आणि त्यांचे मागचे अंग आतील बाजूस होते. 26 त्याची
जाडी चार बोटे होते, आणि पेल्याचा घेर, कमळाच्या पाकळयांप्रमाणे
बाहेरच्या बाजूला वळलेला होता. त्यामध्ये तीन हजार बथ पाणी मावत
असे. 27 त्याने कास्याचे दहा चौरंग बनविले; प्रत्येकाची लांबी चार
हात, रुंदी चार हात आणि उंची तीन हात होती. 28 चौरंग याप्रकारे
बनविले होते: त्याला बाजूने लाकडाच्या फळया जोडल्या होत्या. 29
फळयांच्या मध्यभागी व तिवडीवरही सिंह, बैल आणि करूब यांच्या
आकृती कोरल्या होत्या आणि सिंहाच्या व बैलांच्या ठोकलेल्या लोंबत्या
झालरी होत्या. 30 प्रत्येक चौरंगाला चार कास्याची चाके व कास्याच्या
धुऱ्या होत्या आणि प्रत्येकाला गंगाळे होती, ज्याला आधार देण्यासाठी
ओतीव स्तंभ असून त्यांच्या बाजूंनी लोंबत्या माळा होत्या. 31 तिवडीच्या
आतील बाजूस त्याचे तोंड उघडे होते व त्याला एका हाताएवढी खोल
गोलाकार पट्टी होती. हा उघडा भाग गोल होता, आणि त्याच्या व्यासाचे
माप दीड हात होते. त्याच्या तोंडाभोवती कोरीव काम होते. तिवडीचे
खांब गोल नसून चौकोनी होते. 32 चार चाके खांबांच्या खाली होती
आणि चाकांच्या धुऱ्या तिवडीला जोडलेल्या होत्या. प्रत्येक चाकाचा
व्यास दीड हात होती. 33 ही चाके रथाच्या चाकांप्रमाणे बनविली होती;
धुऱ्या, कडा, आरे आणि तुंबे हे सर्व ओतीव काम होते. 34 प्रत्येक
तिवडीला, चारही कोपऱ्यांना चार दांडे होते, जे तिवडीला अखंड असे
होते. 35 तिवडीच्या वरच्या बाजूला अर्धा हात गोलाकाराची खोल पट्टी
होती. त्याचे आधारस्तंभ आणि खांब तिवडीच्या वरच्या बाजूने जोडलेले
होते. 36 आधारस्तंभाच्या आणि खांबांच्या पृष्ठभागावर करूब, सिंह
आणि खजुरीची झाडे कोरली होती आणि सभोवार लोंबत्या माळा
होत्या. 37 अशाप्रकारे त्याने या दहा तिवड्या तयार केल्या. त्या सर्व
एकाच साच्यात तयार केलेल्या असून ते सारख्याच मापाच्या आणि
आकाराच्या होत्या. 38 त्यानंतर त्याने कास्याची दहा गंगाळे बनविली,
प्रत्येकात चाळीस बथ पाणी मावत असे आणि त्याचा व्यास चार हात
होता, त्या दहा तिवडीतील प्रत्येकावर एकेक गंगाळ होते. 39 त्याने
पाच तिवड्या मंदिराच्या दक्षिणेकडे ठेवल्या आणि पाच उत्तरेकडे.
त्याने हौद मंदिराच्या दक्षिणेस; दक्षिणपूर्वेच्या कोपऱ्यात ठेवला. 40
त्याने मडके आणि फावडे आणि शिंपडण्याचे भांडेही बनविले. हीरामाने
याहवेहच्या मंदिरात शलोमोन राजासाठी हाती घेतलेले हे सर्व काम पूर्ण
केले: 41 दोन खांब; खांबांच्या वर दोन वाटीच्या आकाराचे कळस;
खांबांवर वाटीच्या आकाराच्या दोन कळसांना सजविणाऱ्या जाळयांचे
दोन संच; 42 त्या जाळयांच्या दोन संचासाठी चारशे डाळिंबे (खांबावरील
वाट्यांच्या आकाराचे कळस सजविणाऱ्या एका जाळीसाठी डाळिंबांच्या
दोन रांगा); 43 दहा तिवड्या व त्यांची दहा गंगाळे; 44 हौद आणि
त्याखालील बारा बैल; 45 भांडी, फावडे आणि शिंपडण्याच्या वाट्या.
शलोमोन राजासाठी हीरामाने याहवेहच्या मंदिरातील बनविलेल्या या
सर्व वस्तू उजळ कास्याच्या होत्या. 46 राजाने त्या वस्तू सुक्कोथ आणि
सारेथान प्रदेशामध्ये यार्देनेच्या पठारावर मातीच्या साच्यात घडवून
घेतल्या होत्या. 47 शलोमोनने या सर्व वस्तूंचे वजन केले नाही, कारण
ते पुष्कळ होते; कास्याचे वजन करणे शक्य नव्हते. 48 याहवेहच्या
मंदिरामध्ये असलेली उपकरणेसुद्धा शलोमोनाने तयार करून घेतली
होती: सोन्याची वेदी; मेजावर समक्षतेची भाकर ठेवली होती; 49
शुद्ध सोन्याचे दीपस्तंभ (आतील पवित्रस्थानासमोर पाच उजवीकडे व
पाच डावीकडे); सोन्याच्या फुलांची सजावट, दिवे आणि चिमटे; 50
शुद्ध सोन्याची गंगाळे, वाती कापण्याची कात्री, शिंपडण्याचे कटोरे,
पात्रे व धूपदाण्या; आतील खोलीच्या, म्हणजेच परमपवित्रस्थानाच्या
आणि मंदिराच्या मुख्य खोलीच्या दरवाजासाठी सोन्याच्या कड्या. 51
याहवेहच्या मंदिराचे सर्व काम शलोमोन राजाने पूर्ण केल्यानंतर, त्याने
आपला पिता दावीदाने समर्पित केलेल्या वस्तू मंदिरात आणल्या; चांदी,
सोने आणि पडदे; शलोमोनने त्या वस्तू याहवेहच्या मंदिराच्या भांडारात
ठेवल्या.

**8** तेव्हा शलोमोन राजाने दावीदाचे नगर सीयोन येथून याहवेहच्या
कराराचा कोश आणण्यासाठी इस्राएल लोकांच्या पुढाऱ्यांना, सर्व
गोत्रप्रमुखांना आणि इस्राएली कुटुंबाच्या सर्व प्रमुखांना त्याच्यापुढे

येण्यास यरुशलेमास बोलाविले. 2 इस्राएलचे सर्व लोक एथानीम
महिन्यात, म्हणजे सातव्या महिन्यातील सणाच्या काळात शलोमोन
राजाकडे एकत्र आले. 3 जेव्हा इस्राएलचे सर्व वडीलजन आले, तेव्हा
याजकांनी कोश उचलून घेतला, 4 आणि त्यांनी याहवेहचा कोश,
सभामंडप व त्यातील सर्व पवित्र पात्रे आणली. याजक व लेवींनी
ती वाहून आणली, 5 राजा शलोमोन आणि जमलेली इस्राएलची
संपूर्ण मंडळी कोशासमोर इतक्या मेंढरांचा आणि गुरांचा बळी दिले
की, त्यांची नोंद किंवा मोजणी करता येत नव्हती. 6 नंतर याजकांनी
याहवेहच्या कराराचा कोश मंदिराच्या आतील पवित्रस्थानी; म्हणजेच
परमपवित्रस्थानात आणून त्याच्या नियोजित ठिकाणी, अर्थात् करुबांच्या
पंखाखाली ठेवला. 7 करुबांचे पंख कोशावर असे पसरले होते की त्यांनी
कोश आणि तो वाहून नेण्याचे दांडे आच्छादले जात होते. 8 ते दांडे इतके
लांब होते की, त्यांची टोके आतील खोलीसमोरील पवित्रस्थानातून
दिसत असत, परंतु पवित्रस्थानाच्या बाहेरून ती दिसत नसे; आणि
ते आजही तिथेच आहेत. 9 इस्राएली लोक इजिप्त देशातून बाहेर
आल्यानंतर याहवेहने त्यांच्याशी करार केला तेव्हा होरेबमध्ये मोशेने
ठेवलेल्या दोन दगडी पाट्यांशिवाय त्या कोशात दुसरे काहीही नव्हते.
10 जेव्हा याजक पवित्रस्थानातून बाहेर आले, तेव्हा याहवेहचे मंदिर
मेघाने भरले. 11 आणि त्या मेघांमुळे याजकांना सेवा करता येईना,
कारण याहवेहच्या तेजाने याहवेहचे मंदिर भरले होते. 12 तेव्हा शलोमोन
म्हणाला, “याहवेहने म्हटले आहे की ते घनदाट मेघात राहतील; 13
खचितच मी आपणासाठी एक भव्य मंदिर बांधले आहे, की आपण
त्यात सर्वकाळ वस्ती करावी.” 14 इस्राएलची सर्व मंडळी तिथे उभी
असताना, राजाने मागे वळून त्यांना आशीर्वाद दिला. 15 तेव्हा राजाने
म्हटले: “याहवेह, इस्राएलचे परमेश्वर धन्यवादित असोत, कारण त्यांनी
माझे वडील दावीद, यांना स्वतःच्या मुखाने दिलेले वचन आज स्वहस्ते
पूर्ण केले आहे. कारण याहवेहने म्हटले होते की, 16 ‘मी माझ्या
इस्राएली लोकांना इजिप्तमधून बाहेर आणले, तेव्हापासून इस्राएलातील
कोणत्याही गोत्राचे शहर माझ्या नावाने मंदिर तिथे बांधावे म्हणून मी
निवडले नाही, परंतु माझ्या इस्राएली लोकांवर राज्य करावे म्हणून
मी दावीदाची निवड केली.’ 17 “याहवेह इस्राएलच्या परमेश्वराच्या
नावासाठी मंदिर बांधावे असे माझे वडील दावीद यांच्या मनात होते.
18 पण याहवेहने माझे पिता दावीदाला म्हटले, ‘माझ्या नावासाठी
मंदिर बांधावे अशी आपल्या हृदयात इच्छा बाळगून तू फार चांगले
केले. 19 तथापि, तू ते मंदिर बांधणार नाहीस, तर तुझा पुत्र, तुझ्या
स्वतःच्या हाडामांसाचा; तोच माझ्या नावासाठी मंदिर बांधील.’ 20
“याहवेहने दिलेले वचन पूर्ण केले आहे: माझे वडील दावीदाचा मी
वारस झालो आणि याहवेहने अभिवचन दिल्याप्रमाणे आता इस्राएलच्या
राजासनावर मी बसतो आणि याहवेह इस्राएलचे परमेश्वर यांच्यासाठी
मी हे मंदिर बांधले आहे. 21 आमच्या पूर्वजांना जेव्हा याहवेहने इजिप्त
देशातून बाहेर आणले तेव्हा त्यांच्याशी याहवेहने जो करार केला तो
ज्यात आहे त्या कोशासाठी मी एक स्थान तयार केले आहे.” 22
नंतर शलोमोनने इस्राएलच्या सर्व मंडळीदेखत याहवेहच्या वेदीसमोर
उभे राहून वर स्वर्गाकडे आपले हात पसरले 23 आणि म्हटले: “हे
याहवेह, इस्राएलच्या परमेश्वरा, वर स्वर्गात किंवा खाली पृथ्वीवर
तुमच्यासारखा परमेश्वर नाही; जे आपले सेवक सर्व हृदयाने आपल्या
मार्गात चालतात त्यांच्याशी आपण आपल्या प्रीतीच्या कराराची पूर्तता
करतात. 24 आपला सेवक, माझे पिता दावीदाला दिलेले अभिवचन
आपण पाळले आहे; आपण आपल्या मुखाने अभिवचन दिले आणि
स्वहस्ते ते आज पूर्ण केले आहे. 25 “आता हे याहवेह, इस्राएलच्या
परमेश्वरा, आपला सेवक माझे पिता दावीद यांना आपण जे वचन दिले
होते ते आपण पाळावे, आपण म्हटले होते, ‘जसा तू होतास तसेच
तुझे वंशज माझ्यासमोर विश्वासूपणे चालण्यास सावधान राहतील,
तर इस्राएलच्या राजासनावर बसण्यास तुझे वारस कधीही खुंटणार
नाही.’ 26 तर आता, हे इस्राएलच्या परमेश्वरा, आपला सेवक, माझे
पिता दावीद यांना जे अभिवचन आपण दिले होते ते प्रतितीस येऊ
द्यावे. 27 “पण परमेश्वर खचितच पृथ्वीवर राहतील काय? स्वर्ग, अगदी
सर्वोच्च स्वर्गात सुद्धा आपण मावणार नाहीत! मग हे जे मंदिर मी बांधले
आहे त्यात आपण कसे मावाल? 28 तरीही हे याहवेह, माझ्या परमेश्वरा,
आपल्या सेवकाच्या प्रार्थनेकडे व त्याच्या दयेच्या याचनेकडे लक्ष
द्यावे. आपला सेवक आपल्याकडे प्रार्थना व धावा करीत आहे त्याकडे
कान द्या. 29 ‘माझे नाव या ठिकाणी राहेल’ असे ज्या स्थळाविषयी
आपण म्हटले होते, त्या या मंदिराकडे दिवस व रात्र आपली दृष्टी असो;
यासाठी की या ठिकाणातून करत असलेली तुमच्या सेवकाची प्रार्थना
आपण ऐकावी. 30 आपला सेवक व आपले इस्राएली लोक जेव्हा या
ठिकाणातून विनंती करतील, तेव्हा त्यांच्या प्रार्थना ऐका. स्वर्गातून,
आपल्या निवासस्थानातून कान द्या, व ती ऐकून त्यांना क्षमा करा.
31 “जेव्हा कोणी आपल्या शेजाऱ्याचा अपराध करेल व त्यांना शपथ
घ्यावी लागली, तर ते आपल्या वेदीसमोर या मंदिरात शपथ घेतील,
32 तेव्हा स्वर्गातून ऐकून त्याप्रमाणे घडू द्या. आपल्या सेवकांचा न्याय
करून दोषी व्यक्तीने केलेल्या कृत्यांनुसार त्यांचे शिर खाली झुकवा व
निर्दोष्यास त्यांच्या निर्दोषतेनुसार वागणूक देऊन त्यांना न्याय द्यावा. 33
“आपल्याविरुद्ध पाप केल्यामुळे जेव्हा आपले इस्राएली लोक त्यांच्या
शत्रूद्वारे पराभूत केले जातात आणि जेव्हा ते आपल्याकडे पुन्हा वळतात
व आपल्या नावाची थोरवी गाऊन, या मंदिरात आपल्याकडे प्रार्थना व
विनंती करतात, 34 तेव्हा स्वर्गातून ऐकून आपल्या इस्राएली लोकांच्या
पापांची क्षमा करा व जो देश आपण त्यांच्या पूर्वजांना दिला त्यात
त्यांना परत आणावे. 35 “आपल्या लोकांनी आपल्याविरुद्ध केलेल्या
पापामुळे जेव्हा आकाश बंद होऊन पाऊस पडणार नाही आणि जेव्हा
ते या ठिकाणातून प्रार्थना करतील आणि आपल्या नावाची थोरवी
गातील आणि आपण त्यांच्यावर आणलेल्या क्लेशामुळे ते आपल्या
पापापासून वळतील, 36 तेव्हा त्यांची विनंती ऐकून आपले सेवक,
इस्राएली लोकांच्या पापांची क्षमा करा. जीवनाचा योग्य मार्ग त्यांना
शिकवा व जो देश आपण आपल्या लोकांना वतन म्हणून दिला त्यावर

पाऊस पाठवावा. 37 “जेव्हा देशावर दुष्काळ किंवा पीडा येते किंवा पिके
करपवून टाकणारा वारा किंवा भेरड, टोळ किंवा नाकतोडे आले किंवा
शत्रूने त्यांच्या एखाद्या शहराला वेढा घातला, असे कोणतेही अरिष्ट किंवा
रोग आला, 38 आणि आपल्या इस्राएली लोकांपैकी कोणी त्यांच्या
हृदयाला होत असलेले क्लेश जाणून प्रार्थना किंवा विनंती केली आणि
त्यांचे हात मंदिराकडे पसरतील; 39 तेव्हा स्वर्ग जे आपले निवासस्थान
आहे तिथून ऐकून त्यांना क्षमा करा व त्यानुसार त्यांना करा; प्रत्येकाच्या
सर्व कृत्यांनुसार त्यांच्याशी वागा, कारण आपणास त्यांच्या हृदयाची
पारख आहे (कारण केवळ आपणच प्रत्येक मानवाचे हृदय जाणणारे
आहात), 40 यासाठी की जो देश आपण आमच्या पूर्वजांना दिला,
त्यात जितका काळ ते राहतील त्यांनी तुमचे भय बाळगावे. 41 “असा
कोणी परदेशी जो आपल्या इस्राएली लोकांमधील नाही परंतु आपल्या
नावास्तव लांबच्या देशातून आला; 42 कारण त्यांनी आपले महान
नाव आणि आपला पराक्रमी हात व आपला लांबविलेला बाहू याबद्दल
ऐकले; व जेव्हा ते येऊन या मंदिराकडे वळून प्रार्थना करतील, 43 तेव्हा
स्वर्ग जे आपले निवासस्थान तिथून आपण त्यांची प्रार्थना ऐकावी. त्या
परदेशीयाने जे काही आपल्याकडे मागितले ते आपण त्यांना द्यावे,
अशासाठी की पृथ्वीवरील लोकांनी आपले नाव ओळखावे व आपल्या
इस्राएली लोकांप्रमाणे आपले भय धरावे व जाणावे की मी बांधलेल्या या
घरावर आपले नाव आहे. 44 “जेव्हा आपले लोक आपण जिथे पाठवाल
तिथे त्यांच्या शत्रूविरुद्ध युद्धास जातात आणि जेव्हा ते तुम्ही निवडलेल्या
नगराकडे आणि तुमच्या नावासाठी मी बांधलेल्या मंदिराकडे याहवेहची
प्रार्थना करतील, 45 तेव्हा स्वर्गातून त्यांची प्रार्थना व विनंती ऐकून
त्यांच्यावतीने न्याय करावा. 46 “जेव्हा ते आपणाविरुद्ध पाप करतील;
कारण पाप करीत नाही असा कोणी मनुष्य नाही आणि त्यामुळे रागावून
आपण त्यांना त्यांच्या शत्रूंच्या हाती दिले आणि त्यांनी त्यांना गुलाम
म्हणून त्यांच्या जवळच्या किंवा दूरच्या देशात कैद करून नेले; 47
आणि ते कैदेत असता त्यांच्या हृदयाचा पालट झाला व पश्चात्ताप करीत
कैद करून नेलेल्यांच्या देशात आपल्याकडे असे म्हणत विनंती केली,
‘आम्ही पाप केले आहे, आम्ही विपरीत वागलो आहोत, आम्ही दुष्टतेने
वागलो आहोत’; 48 आणि त्यांना कैद करून नेलेल्या त्यांच्या शत्रूंच्या
देशात ते जर त्यांच्या संपूर्ण हृदयाने व जिवाने आपणाकडे वळले,
आणि त्यांच्या पूर्वजांना दिलेल्या देशाकडे, जे शहर आपण निवडले
आणि मी आपल्या नावासाठी बांधलेल्या या मंदिराकडे वळून प्रार्थना
करतील, 49 तेव्हा स्वर्ग जे आपले निवासस्थान आहे तिथून त्यांची
प्रार्थना व विनंती ऐकून त्यांच्यावतीने न्याय करावा. 50 आणि ज्या
आपल्या लोकांनी आपणाविरुद्ध पाप केले आहे त्यांना क्षमा करावी.
त्यांनी आपणाविरुद्ध केलेल्या सर्व अपराधांची त्यांना क्षमा करा व
त्यांना कैद करून नेणाऱ्यांनी त्यांच्यावर दया दाखववावी असे आपण
करावे; 51 कारण ते तुमचे लोक आणि तुमचे वतन आहेत, ज्यांना
तुम्ही इजिप्त देशातून, त्या लोखंडाच्या भट्टीतून बाहेर काढले आहे.
52 “तुमचे कान आपल्या सेवकाच्या व आपल्या इस्राएली लोकांच्या
विनंतीकडे असावे आणि जेव्हा ते आपल्याकडे आरोळी करतील तेव्हा
त्यांचे ऐकावे. 53 कारण हे सार्वभौम याहवेह, आपण जेव्हा आमच्या
पूर्वजांना इजिप्त देशातून बाहेर काढले त्यावेळी तुमचा सेवक मोशेद्वारे
तुम्ही जसे जाहीर केले, त्यानुसार त्यांना आपले वतन व्हावे म्हणून
पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांतून तुम्ही त्यांना वेगळे केले आहे.” 54 शलोमोनने
वेदीसमोर गुडघे टेकून व स्वर्गाकडे हात पसरून याहवेहची प्रार्थना
करून संपविल्यावर तो याहवेहच्या वेदीपुढून उठला. 55 त्याने उभे
राहून सर्व इस्राएली मंडळीला उंच आवाजात असे म्हणत आशीर्वाद
दिला: 56 “याहवेह धन्यवादित असोत, त्यांनी आपल्या अभिवचनानुसार
त्यांच्या इस्राएली लोकांना विसावा दिला आहे. त्यांचा सेवक मोशेद्वारे
जी चांगली अभिवचने याहवेहने दिली त्यातील एकही निष्फळ झाले
नाही. 57 याहवेह आमचे परमेश्वर जसे आमच्या पूर्वजांसह होते तसेच ते
आम्हासोबतही असो; त्यांनी कधीही आमचा त्याग करू नये. 58 आम्ही
त्यांच्या मार्गात चालावे आणि आमच्या पूर्वजांना दिलेल्या आज्ञा व विधी
आम्ही पाळावे म्हणून त्यांनी आमची मने आपल्याकडे वळवावी. 59
आणि ज्या या शब्दांनी मी याहवेहसमोर प्रार्थना केली आहे त्या याहवेह
आमच्या परमेश्वरापुढे रात्रंदिवस असो, यासाठी की रोजच्या गरजेनुसार
ते आपल्या सेवकाला व आपल्या इस्राएली लोकांना साहाय्य करो. 60
म्हणजे पृथ्वीवरील सर्व लोकांनी ओळखावे की याहवेह हेच परमेश्वर
आहेत आणि दुसरा कोणीही नाही. 61 आणि आज आहे त्याप्रमाणे
तुम्ही याहवेहच्या विधीनुसार राहावे व त्यांच्या आज्ञा पाळाव्या म्हणून
तुमची मने याहवेह आमच्या परमेश्वराशी पूर्णपणे समर्पित असावी.”
62 नंतर राजा आणि त्याच्याबरोबर असलेल्या सर्व इस्राएली लोकांनी
याहवेहसमोर यज्ञे अर्पण केली. 63 शलोमोनने शांत्यर्पणासाठी जी
अर्पणे केली ती: बावीस हजार गुरे, एक लाख वीस हजार मेंढरे व बोकडे
होती. याप्रकारे राजाने व सर्व इस्राएली लोकांनी याहवेहच्या मंदिराची
प्रतिष्ठापना केली. 64 त्याच दिवशी राजाने याहवेहच्या मंदिरापुढच्या
द्वारमंडपाचा मधला भाग पवित्र केला आणि तिथे त्याने होमार्पणे,
धान्यार्पणे व शांत्यर्पणाची मांदे ही अर्पण केली, कारण याहवेहपुढे
जी कास्याची वेदी होती ती होमार्पणे, धान्यार्पणे व शांत्यर्पणाची मांदे
यासाठी फार लहान होती. 65 तेव्हा शलोमोन आणि सर्व इस्राएली
लोकांनी त्याच्याबरोबर त्यावेळी सण साजरा केला—एक मोठी मंडळी,
म्हणजे लेबो हमाथपासून इजिप्तच्या खाडीपर्यंतचे रहिवासी आले होते.
त्यांनी याहवेह आमच्या परमेश्वरापुढे सात दिवस व आणखी सात दिवस
असे मिळून चौदा दिवस उत्सव साजरा केला. 66 आठव्या दिवशी
त्याने लोकांना रवाना केले. तेव्हा त्यांनी राजाला आशीर्वाद दिला आणि
याहवेहने आपला सेवक दावीद व इस्राएलच्या लोकांसाठी जी सर्व
चांगली कृत्ये केली त्यासाठी त्यांच्या अंत:करणात हर्ष आणि आनंद
होता.

**9** शलोमोनने जेव्हा याहवेहचे मंदिर व राजमहाल बांधण्याचे काम
संपविले, आणि त्याला जे काही करावयाचे मनोरथ होते ते
साधल्यानंतर, 2 याहवेहने शलोमोनला जसे गिबोन येथे दर्शन दिले होते,

तसे त्याला दुसऱ्यांदा दर्शन दिले. 3 याहवेह शलोमोनला म्हणाले: “तू
माझ्यासमोर केलेली प्रार्थना व विनंती मी ऐकली आहे; हे जे मंदिर तू
बांधले आहे तिथे सर्वकाळासाठी माझे नाव देऊन मी ते पवित्र केले आहे.
त्यावर माझी दृष्टी व माझे हृदय सदा राहील. 4 “तुझ्या बाबतीत म्हणायचे
तर तू आपला पिता दावीद याच्याप्रमाणे माझ्यासमोर विश्वासूपणे
हृदयाच्या सरळतेने चालशील आणि सर्वकाही मी आज्ञापिल्याप्रमाणे
करशील व माझे विधी व नियम पाळशील, 5 तर इस्राएलवरचे तुझे
राजासन मी सर्वकाळासाठी प्रस्थापित करेन, तुझा पिता दावीद याला
मी अभिवचन देत म्हटले होते, ‘इस्राएलच्या राजासनावर तुझा वारस
कधीही खुंटणार नाही.’ 6 “पण जर तू किंवा तुझी संतती माझ्यापासून
दूर वळली आणि मी तुला दिलेल्या आज्ञा व विधी पाळले नाही आणि
जाऊन इतर दैवतांची सेवा करून त्यांची उपासना केली, 7 तर जो देश
मी त्यांना दिला आहे त्यातून मी इस्राएली लोकांना छेदून टाकीन आणि
हे मंदिर जे मी माझ्या नावासाठी पवित्र केले आहे त्याचा मी धिक्कार
करेन. मग इस्राएल सर्व लोकांमध्ये थट्टा व निंदेचा विषय होतील. 8
हे मंदिर ढेकळ्यांचा ढिगारा होईल. त्याच्या जवळून जाणारे सर्वजण
आश्चर्यचकित होऊन तुच्छतेने म्हणतील, ‘याहवेहने या देशाचे व या
मंदिराचे असे का केले आहे?’ 9 तेव्हा लोक उत्तर देतील, ‘याहवेह
त्यांचे परमेश्वर, ज्यांनी या लोकांच्या पूर्वजांना इजिप्त देशातून बाहेर
आणले त्या याहवेहला सोडून ते इतर दैवतांची उपासना व सेवा करू
लागले आहेत; म्हणून याहवेहने त्यांच्यावर हे अरिष्ट आणले आहे.’” 10
शेवटच्या वीस वर्षात शलोमोनने याहवेहचे मंदिर आणि राजमहाल या
दोन इमारतींचे बांधकाम केले. 11 शलोमोन राजाने सोरचा राजा हीराम
याला गालील प्रांतातील वीस नगरे दिली, कारण त्याने हवे असलेले
सर्व गंधसरू, देवदारू, आणि सोने शलोमोनला पुरविले होते. 12 परंतु
जेव्हा शलोमोनने त्याला दिलेली नगरे पाहण्यासाठी हीराम सोरवरून
गेला, ते पाहून त्याला समाधान झाले नाही. 13 तेव्हा तो म्हणाला,
“माझ्या भावा, ही कशी नगरे तू मला दिलीस?” आणि त्याने त्यास
काबूल प्रांत असे नाव दिले, ते नाव आजही प्रचलित आहे. 14 हीरामाने
राजाकडे एकशेवीस तालांत सोने पाठवले होते. 15 शलोमोन राजाने ज्या
मजुरांना याहवेहचे मंदिर, आपला स्वतःचा राजवाडा, स्तरीय बांधकाम,
यरुशलेमचा तट आणि हासोर, मगिद्दो व गेजेर नगर बांधण्यासाठी
कामावर लावले होते त्यांचा अहवाल अशाप्रकारे आहे. 16 (इजिप्तचा
राजा फारोहने गेजेरवर हल्ला करून ते ताब्यात घेतले होते. त्याने
त्याला आग लावली व त्यातील कनानी रहिवाशांना मारून टाकले व ते
नगर आपली कन्या, शलोमोनच्या पत्नीला तिच्या लग्नाची भेट म्हणून
दिले. 17 आणि शलोमोनने गेजेर नगराची पुनर्बांधणी केली.) त्याने
खालचे बेथ-होरोन बांधले, 18 वाळवंटातील देशाच्या हद्दीतील बालाथ
आणि तदमोर बांधली, 19 त्याचप्रमाणे शलोमोनचे रथ व त्याचे घोडे
यांच्यासाठी सर्व शहरे व नगरे; यरुशलेमात, लबानोनात आणि ज्या सर्व
प्रदेशात त्याचे राज्य होते त्या हद्दींमध्ये त्याच्या मनास येईल ते त्याने
बांधले. 20 अमोरी, हिथी, परिज्जी, हिव्वी व यबूसी यांच्यातील आणखी
काही लोक बाकी राहिले होते (हे लोक इस्राएली नव्हते). 21 या लोकांचे
वंशज जे देशात उरले होते त्यांनाही शलोमोनने सक्तीने गुलाम म्हणून
भरती केले; हे ते लोक होते ज्यांना इस्राएली लोक पूर्णपणे नष्ट करू
शकले नव्हते, आजवर हे तसेच आहेत. 22 परंतु इस्राएली लोकांपैकी
कोणावरही शलोमोनने गुलामी लादली नाही; ते त्याचे योद्धे, त्याचे
सरकारी अधिकारी, सरदार, सेनापती व त्याच्या रथांचे व रथस्वारांचे
अधिकारी होते. 23 शलोमोनच्या प्रकल्पांवर जे मुख्य अधिकारीसुद्धा
होते, ते पाचशे पन्नास जण होते, जे माणसांवर देखरेख ठेवणारे मुकादम
होते. 24 फारोहची कन्या दावीदाचे शहर सोडून शलोमोनने तिच्यासाठी
बांधलेल्या राजवाड्यात आली, मग त्याने स्तरीय बांधकाम केले. 25
याहवेहसाठी बांधलेल्या वेदीवर शलोमोन वर्षातून तीन वेळा होमार्पणे,
शांत्यर्पणे करून त्याबरोबर धूप जाळत असे, अशाप्रकारे त्याने मंदिराची
कर्तव्ये पूर्ण केली. 26 शलोमोन राजाने एदोम देशात तांबड्या समुद्रतीरी
एलोथजवळ एजिओन-गेबेर येथे सुद्धा गलबते बांधली. 27 आणि
हीरामाने त्याच्या अनुभवी खलाश्यांना शलोमोनच्या माणसांबरोबर सेवा
करण्यास पाठवले. 28 त्यांनी ओफीरपर्यंत प्रवास करून चारशे वीस
तालांत सोने परत आणले व ते शलोमोन राजाला दिले.

10 जेव्हा शबाच्या राणीने शलोमोनची किर्ती व याहवेहशी असलेले
त्याचे नाते याविषयी ऐकले, तेव्हा कठीण प्रश्न करून शलोमोनची
परीक्षा करावी म्हणून ती आली. 2 मोठा तांडा घेऊन; उंटांबरोबर सुगंधी
द्रव्ये, पुष्कळ सोने आणि मौल्यवान रत्ने घेऊन ती यरुशलेमास आली;
शलोमोनकडे येऊन जे काही तिच्या मनात होते त्याविषयी ती त्याच्याशी
बोलली. 3 शलोमोनने तिच्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली; तिला स्पष्ट
करू शकणार नाही असे काहीही राजासाठी कठीण नव्हते. 4 जेव्हा
शबाच्या राणीने शलोमोनचे ज्ञान व त्याने बांधलेला राजवाडा पाहिला, 5
त्याच्या मेजावरील भोजन, त्याच्या अधिकाऱ्यांची आसने, सेवा करणारे
सेवक व त्यांचे झगे, त्याचे प्यालेदार व याहवेहच्या मंदिरात त्याने केलेले
होमार्पणे हे सर्व पाहून ती चकित झाली. 6 ती राजाला म्हणाली, “तुमचे
ज्ञान व तुमची प्राप्ती याविषयी माझ्या देशात मी जो अहवाल ऐकला
तो सत्य आहे. 7 परंतु मी येथे येऊन या गोष्टी स्वतःच्या डोळ्यांनी
पाहीपर्यंत त्यावर मी विश्वास ठेवला नाही. खचितच तुमचे ज्ञान व संपत्ती
याबद्दल मला जे सांगितले गेले त्यापेक्षा ते कितीतरी अधिक आहे. 8
तुमचे लोक किती सुखी असतील! तुमचे अधिकारी जे तुमच्यासमोर
नित्याने उभे राहतात व तुमचे ज्ञान ऐकतात ते किती सुखी असतील! 9
याहवेह तुमचे परमेश्वर धन्य असो, ज्यांना तुमच्या ठायी संतोष वाटला व
तुम्हाला इस्राएलच्या राजासनावर ठेवले. इस्राएल प्रीत्यर्थ याहवेहच्या
सर्वकाळच्या प्रीतिकरिता न्याय व नीतिमत्व राखून ठेवण्यासाठी त्यांनी
तुम्हाला राजा केले आहे.” 10 आणि तिने राजाला एकशेवीस तालांत
सोने, पुष्कळ सुगंधी द्रव्ये व मौल्यवान रत्ने दिली. शबाच्या राणीने
शलोमोन राजाला इतकी सुगंधी द्रव्ये आणली की त्यानंतर तेवढी द्रव्ये
परत कोणी आणली नाहीत. 11 (त्याचप्रमाणे हीरामच्या गलबतांवर
ओफीर येथून सोने व मोठ्या प्रमाणात चंदनाचे लाकूड व मोलवान

रत्ने आणली. 12 शलोमोनने याहवेहच्या मंदिरात व राजवाड्यात कठडे
बनवण्यासाठी व वादकांसाठी वीणा व सतारी बनविण्यास चंदनाच्या
लाकडाचा उपयोग केला. तेव्हापासून आजपर्यंत हे चंदन ना कुठे आणले
गेले ना ते कोणाच्या दृष्टीस पडले.) 13 शबाच्या राणीने शलोमोन
राजाकडून ज्या गोष्टींची इच्छा केली व जे काही तिने मागितले ते सर्व
राजाने तिला दिल्या, त्या शिवाय राजाच्या खजिन्यातूनही राजाने तिला
भेटी दिल्या. मग ती तिच्या सेवकांसह आपल्या देशास परत गेली. 14
शलोमोनला मिळत जाणारे वार्षिक सोने सहाशे सहासष्ट तालांत होते,
15 याशिवाय व्यापारी आणि सावकार, अरब देशाचे राजे व देशाच्या
राज्यपालांपासून येणारी महसूल ती वेगळीच होती. 16 शलोमोन राजाने
ठोकलेल्या सोन्याच्या दोनशे मोठ्या ढाली बनविल्या. प्रत्येक ढालीस
सहाशे शेकेल ठोकलेले सोने लागले होते. 17 तसेच त्याने ठोकलेल्या
सोन्याच्या तीनशे लहान ढाली केल्या. प्रत्येक ढालीस तीन मीना सोने
लागले. राजाने त्या लबानोनच्या जंगलातील राजवाड्यात ठेवल्या. 18
नंतर राजाने हस्तिदंताने सजविलेले एक भव्य सिंहासन तयार करून
त्याला शुद्ध सोन्याचे आवरण दिले. 19 सिंहासनाला सहा पायऱ्या होत्या
आणि त्याच्या मागचा भाग गोलाकार होता. आसनाच्या दोन्ही बाजूंना
हात होते आणि दोन्ही हातांच्या बाजूंना दोन सिंह केलेले होते. 20 प्रत्येक
पायरीवर दोन याप्रमाणे बारा सिंह केलेले होते. याप्रकारचे सिंहासन
आणखी इतर राज्यांमध्ये कुठेही नव्हते. 21 शलोमोनचे सर्व प्याले
सोन्याचे होते. लबानोनच्या वाळवंटातील राजवाड्यात असलेली सर्व
पात्रे सुद्धा शुद्ध सोन्याची होती. चांदीचे काहीही बनविले नव्हते, कारण
शलोमोनच्या काळात चांदीचे मोल कमी मानले जात असे. 22 हीरामच्या
गलबतांबरोबर शलोमोन राजाचाही व्यापारी गलबतांचा समुद्रावर तांडा
होता. तीन वर्षातून एकदा ही गलबते सोने, चांदी, हस्तिदंत, वानरे
आणि मोर घेऊन परत येत असत. 23 संपत्ती व ज्ञानाने शलोमोन
राजा पृथ्वीवरील सर्व राजांपेक्षा अधिक महान होता. 24 परमेश्वराने
शलोमोनच्या ठायी दिलेले ज्ञान ऐकण्यास जगातील सर्व लोक येत
असत. 25 आणि जे लोक येत असत, ते वर्षानुवर्षे चांदी व सोन्याच्या
वस्तू, झगे, शस्त्रे व सुगंधी द्रव्ये व घोडे व खेचरे भेटी म्हणून आणत
असत. 26 शलोमोनजवळ रथ व घोडे यांचा साठा झाला; त्याच्याकडे
चौदाशे रथ आणि बारा हजार घोडे, जे त्याने रथांच्या शहरात व काही
यरुशलेमात राजाकडे ठेवली होती. 27 राजाने यरुशलेमात चांदीला
धोंड्याप्रमाणे व गंधसरू डोंगर तळवटीतील उंबराच्या झाडांप्रमाणे
सर्वसाधारण असे केले. 28 शलोमोनच्या घोड्यांची आयात इजिप्त
आणि कवे वरून होत असे; त्यावेळेच्या दरानुसार किंमत लावून राजाचे
व्यापारी ते कवेवरून विकत घेत असत. 29 त्यांनी सहाशे शेकेल चांदी
देऊन इजिप्तवरून रथ आयात करून आणले व एकेका घोड्याची किंमत
एकशे पन्नास शेकेल चांदी इतकी होती. हिथी व अरामी राजांना सुद्धा ते
पाठवित असत.

11 शलोमोन राजा, फारोहच्या कन्येशिवाय मोआबी, अम्मोनी,
एदोमी, सीदोनी व हिथी या परदेशीय स्त्रियांवर देखील प्रेम करत
होता. 2 हे ते राष्ट्र होते ज्याविषयी याहवेहने इस्राएल लोकांना सांगितले
होते, “तुम्ही त्यांच्याशी विवाह करू नये, कारण ते खचितच तुमची
मने त्यांच्या दैवतांकडे वळवतील.” तरीही, शलोमोन त्या स्त्रियांच्या
प्रेमात फार जडला होता. 3 त्याला राजकीय घराण्यातील सातशे पत्नी
आणि तीनशे उपपत्नी होत्या व त्याच्या पत्नींनी त्याला बहकविले. 4 तो
उतार वयाचा होईपर्यंत, त्याच्या पत्नींनी त्याचे हृदय इतर दैवतांकडे
वळविले आणि त्याचा पिता दावीदाप्रमाणे शलोमोनचे हृदय आता
संपूर्णपणे याहवेह त्याच्या परमेश्वरास समर्पित नव्हते. 5 शलोमोन
सीदोन लोकांची देवी अष्टारोथ आणि अम्मोनी लोकांचे अमंगळ दैवत
मोलेख याची उपासना करू लागला. 6 याप्रमाणे याहवेहच्या दृष्टीने जे
वाईट ते शलोमोनने केले; त्याचा पिता दावीदाने केले त्याप्रमाणे शलोमोन
याहवेहला पूर्णपणे अनुसरला नाही. 7 शलोमोनाने यरुशलेमच्या
पूर्वेकडील डोंगरावर मोआबाचे अमंगळ दैवत कमोश व अम्मोनी लोकांचे
अमंगळ दैवत मोलख यांच्यासाठी पूजास्थाने बांधली. 8 आपल्या
परदेशीय स्त्रिया, ज्या धूप जाळून आपआपल्या दैवतांना यज्ञ अर्पण
करीत होत्या, त्यांच्यासाठी सुद्धा त्याने तसेच केले. 9 शलोमोनचे
हृदय याहवेह इस्राएलचे परमेश्वर, ज्यांनी त्याला दोनदा दर्शन दिले होते
त्यांच्यापासून दूर वळले होते, म्हणून याहवेह शलोमोनवर रागावले.
10 जरी याहवेहने इतर देवांचे अनुसरण करण्यास मना केली होती,
तरी शलोमोनने याहवेहची आज्ञा मानली नाही. 11 म्हणून याहवेहने
शलोमोनला म्हटले, “तुझी ही वृत्ती आहे, आणि मी तुला लावून दिलेल्या
माझ्या कराराचे व विधींचे पालन तू केले नाही, मी खचितच तुझे राज्य
तुझ्यापासून हिसकावून घेईन व ते तुझ्या हाताखालच्या मनुष्याला देईन.
12 तथापि, तुझा पिता दावीद याच्याप्रीत्यर्थ, ते मी तुझ्या जीवनकाळात
करणार नाही. ते मी तुझ्या पुत्राच्या हातून हिसकावून घेईन. 13 तरीही,
संपूर्ण राज्यच मी त्याच्यापासून हिसकावून घेणार नाही, तर माझा सेवक
दावीद व यरुशलेम ज्यांना मी निवडले, याच्याप्रीत्यर्थ एक गोत्र मी
तुझ्या पुत्राच्या हाती देईन.” 14 नंतर याहवेहने एदोमी राजघराण्यातील
एदोम हदाद याला शलोमोनचा शत्रू म्हणून उभे केले. 15 काही वर्षापूर्वी
योआबाचा सेनापती एदोम, जो मृतांना पुरण्यास गेला होता, तेव्हा
दावीदाने त्याच्याशी युद्ध केले होते आणि एदोमातील सर्व पुरुषांना
मारून टाकले होते. 16 एदोमातील सर्व पुरुषांना मारेपर्यंत योआब व सर्व
इस्राएली लोक सहा महिने तिथेच राहिले. 17 परंतु हदाद, जो अजूनही
कोवळा मुलगा होता, काही एदोमी अधिकारी, ज्यांनी त्याच्या पित्याची
सेवा केली होती, त्यांच्याबरोबर इजिप्तमध्ये पळून गेला. 18 ते मिद्यान
येथून निघून पारानकडे आले. मग पारानातून त्यांच्याबरोबर लोकांना
घेऊन पुढे इजिप्तला, इजिप्तचा राजा फारोह याच्याकडे गेले, राजाने
हदादला घर व जमीन व अन्नपुरवठा केला. 19 फारोह हदादवर इतका
प्रसन्न झाला की त्याने आपली पत्नी, तहपनीस राणीची बहीण त्याला
पत्नी म्हणून दिली. 20 तहपनीसच्या बहिणीकडून त्याला गेनुबाथ
नावाचा एक पुत्र झाला, ज्याचे संगोपन तहपनीसने राजवाड्यात केले.
गेनुबाथ तिथे स्वत: फारोहच्या लेकरांबरोबर राहिला. 21 इजिप्तमध्ये

असताना हदादने ऐकले की दावीद आपल्या पूर्वजांबरोबर विसावा
पावला आहे आणि सैन्याचा अधिकारी योआब देखील मरण पावला
होता. तेव्हा हदाद फारोहला म्हणाला, “मी आपल्या स्वदेशास जावे
म्हणून मला जाऊ द्यावे.” 22 फारोहने त्याला विचारले, “येथे तुला
काय कमी आहे की तू आपल्या देशाला जाऊ इच्छितोस?” हदाद
म्हणाला, “काही कमी नाही, पण मला जाऊ द्यावे!” 23 परमेश्वराने
शलोमोनविरुद्ध आणखी एक शत्रू उभा केला, तो एलयादाचा पुत्र रेजोन
होता, जो त्याचा मालक सोबाहचा राजा हादादेजर याच्यापासून पळून
गेला होता. 24 जेव्हा दावीदाने जोबाहच्या सैन्याचा नाश केला, रेजोनने
त्याच्यासोबत काही लोक जमा केले व तो त्यांचा पुढारी झाला; ते
पुढे दिमिष्कास गेले, तिथे स्थायिक होऊन त्यांनी त्याचा ताबा घेतला.
25 शलोमोन जिवंत होता तोपर्यंत हदादने दिलेल्या त्रासात भर असे
रेजोनने देखील इस्राएलशी वैर केले. तेव्हा रेजोनने अरामात राज्य
केले व इस्राएलला विरोध केला. 26 जेरेदाह येथील एक एफ्राईमकर,
नेबाटाचा पुत्र यरोबोअमने सुद्धा शलोमोन राजाविरुद्ध बंड केले. त्याची
आई विधवा होती, तिचे नाव जेरुआह होते. 27 त्याने राजाविरुद्ध बंड
कसे केले त्याचा वृत्तांत असा: शलोमोनने स्तरीय बांधकाम व त्याचा
पिता दावीदाच्या शहराच्या भिंतीची खिंडारे दुरुस्त केली. 28 यरोबोअम
एक शूरवीर होता. या तरुणाने आपले काम किती उत्तम प्रकारे केले
आहे, हे शलोमोनने पाहिले, तेव्हा त्याने त्याला योसेफाच्या गोत्रातील
सर्व मजूर कामगारांवर मुख्य असे नेमले. 29 त्याच दरम्यान यरोबोअम
यरुशलेमातून बाहेर जात असताना, शिलोनी अहीयाह नावाचा संदेष्टा,
नवीन झगा घातलेला असा त्याला वाटेत भेटला. ते त्या मैदानात
दोघेच होते, 30 अहीयाहने घातलेला आपला नवीन झगा घेऊन तो
फाडून त्याचे बारा तुकडे केले. 31 आणि तो यरोबोअमास म्हणाला,
“तुझ्यासाठी दहा तुकडे उचलून घे, कारण याहवेह इस्राएलचे परमेश्वर
असे म्हणतात: ‘पाहा, मी शलोमोनच्या हातून राज्य हिसकावून घेईन
व दहा गोत्र मी तुझ्या हाती देईन. 32 पण माझा सेवक दावीद आणि
यरुशलेम शहर ज्याची मी इस्राएलच्या सर्व गोत्रांतून निवड केली
त्याच्याप्रित्यर्थ, शलोमोनच्या हातात एक गोत्र राहील. 33 मी असे केले
आहे कारण त्यांनी माझा त्याग केला आहे आणि सीदोन्यांची देवी
अष्टारोथ, मोआबाचे दैवत कमोश आणि अम्मोन्यांचे दैवत मिलकाम
यांची उपासना केली आणि ते माझ्या आज्ञेनुसार चालले नाहीत किंवा
माझ्या दृष्टीने जे बरे ते केले नाही किंवा शलोमोनचा पिता दावीदाने
केले तसे माझे विधी व नियम त्यांनी पाळले नाहीत. 34 “‘परंतु मी
शलोमोनच्या हातून आताच संपूर्ण राज्य हिसकावून घेणार नाही; माझा
सेवक दावीदाप्रीत्यर्थ मी त्याला त्याच्या जीवनभर अधिकारी असे
नेमले आहे, कारण मी दावीदाला निवडले व त्याने माझ्या आज्ञा व
विधींचे पालन केले. 35 परंतु मी शलोमोनच्या पुत्राच्या हातून राज्य
काढून दहा गोत्र तुला देईन. 36 मी शलोमोनच्या पुत्राला एक गोत्र
देईन, यासाठी की ज्या यरुशलेम नगरास मी माझ्या नावासाठी निवडले
आहे त्यात माझा सेवक दावीद याचा दीप सदा माझ्यासमोर पेटलेला
असेल. 37 आणि तुझ्याविषयी म्हटले तर, तुला मनास वाटेल त्यावर तू
राज्य करशील; इस्राएलवर तू राज्य करशील. 38 मी तुला दिलेल्या
आज्ञांनुसार जर तू करशील, माझा सेवक दावीदाने केले त्याप्रमाणे
माझ्या आज्ञेत चालशील व माझे विधी व आज्ञा पाळून माझ्या दृष्टीत
जे योग्य ते करशील, तर मी तुझ्याबरोबर राहीन. दावीदाचे जसे मी
कायमचे राज्य स्थापले आहे, तसेच तुझी व तुझ्या राज्याची स्थापना
मी करेन व इस्राएल तुझ्या हाती देईन. 39 असे करून मी दावीदाच्या
वंशजांना नम्र बनवीन, पण सर्वकाळासाठी नव्हे.’” 40 शलोमोनने
यरोबोअमला ठार मारण्याचा प्रयत्न केला, पण यरोबोअम इजिप्त
देशाचा राजा शिशाककडे पळून गेला आणि शलोमोनचा मृत्यू होईपर्यंत
तिथेच राहिला. 41 शलोमोनच्या राज्यकाळातील इतर घटना; त्याची
कृत्ये व त्याने दाखविलेले ज्ञान हे शलोमोनच्या पुस्तकात लिहिलेले
नाहीत का? 42 शलोमोनने यरुशलेमात संपूर्ण इस्राएलवर चाळीस वर्षे
राज्य केले. 43 नंतर शलोमोन त्याच्या पूर्वजांबरोबर विसावा पावला व
त्याला त्याचा पिता दावीदाच्या नगरात पुरले आणि रेहोबोअम राजा
म्हणून त्याचा वारस झाला.

**12** रेहोबोअम शेखेम येथे गेला, कारण इस्राएलचे सर्व लोक त्याला
राजा करावे म्हणून तिथे गेले. 2 जेव्हा नेबाटाचा पुत्र यरोबोअमने
हे ऐकले (तो शलोमोन राजापासून पळून अजूनही इजिप्त देशातच
होता). तो इजिप्तवरून परत आला. 3 तेव्हा त्यांनी यरोबोअमला
बोलावून घेतले, मग तो आणि इस्राएलची सर्व मंडळी रेहोबोअमकडे
गेले व त्याला म्हणाले: 4 “तुमच्या पित्याने आमच्यावर भारी जू
ठेवले, तर आता मजुरीचा हा कठीण भार व हे भारी जू आपण हलके
करावे, म्हणजे आम्ही आपली सेवा करू.” 5 रेहोबोअमने उत्तर दिले,
“तीन दिवसांसाठी माघारी जा आणि परत माझ्याकडे या.” तेव्हा
लोक माघारी गेले. 6 तेव्हा त्याचा पिता शलोमोनच्या जीवनकाळात
त्यांची सेवा केलेल्या वडीलजनांना रेहोबोअम राजाने विचारले, तो
म्हणाला, “या लोकांना मी काय उत्तर द्यावे असे तुम्हाला वाटते?” 7
त्यांनी उत्तर दिले, “आज जर तुम्ही त्यांचा सेवक होऊन त्यांची सेवा
केली व त्यांना अनुकूल उत्तर दिले, तर ते नेहमीच तुमचे सेवक म्हणून
राहतील.” 8 पण रेहोबोअमने वडीलजनांचा सल्ला नाकारला आणि
त्याच्याबरोबर वाढलेल्या व त्याच्या सेवेत असलेल्या तरुण पुरुषांचा
सल्ला घेतला. 9 त्याने त्यांना विचारले, “जे लोक मला म्हणतात,
‘तुझ्या पित्याने आमच्यावर घातलेले जू हलके करावे,’ त्यांना मी काय
उत्तर द्यावे?” 10 त्याच्याबरोबर वाढलेल्या तरुणांनी उत्तर दिले, “हे लोक
तुला म्हणाले आहेत की, ‘तुझ्या पित्याने आमच्यावर भारी जू ठेवले
होते, तर आता हे भारी जू आपण हलके करावे.’ आता त्यांना सांग,
‘माझी करंगळी माझ्या पित्याच्या कमरेपेक्षाही जाड आहे. 11 माझ्या
पित्याने तुमच्यावर भारी जू लादले; मी ते अजून भारी करेन. माझ्या
पित्याने तुम्हाला चाबकाने मारले; तर मी तुम्हाला विंचवांनी मारीन.’”
12 तीन दिवसानंतर यरोबोअम व सर्व लोक रेहोबोअमकडे आले, कारण
राजाने त्यांना सांगितले होते, “तीन दिवसांनी माझ्याकडे परत या.” 13

वडील लोकांनी दिलेल्या सल्ल्याला नाकारत राजाने लोकांना कठोरपणे
उत्तर दिले, 14 तरुणांच्या सल्ल्याचे अनुसरण करीत तो म्हणाला,
“माझ्या पित्याने तुमचे जू भारी केले; मी ते अजून भारी करेन. माझ्या
पित्याने तुम्हाला चाबकाने मारले; तर मी तुम्हाला विंचवांनी मारीन.” 15
अशाप्रकारे राजाने लोकांचे म्हणणे मानले नाही, कारण शिलोनी संदेष्टा
अहीयाहच्याद्वारे याहवेहने नेबाटाचा पुत्र यरोबोअमला सांगितलेल्या
वचनांची पूर्तता व्हावी म्हणून या घटना याहवेहकडून घडून आल्या
होत्या. 16 राजाने आपले म्हणणे ऐकले नाही असे जेव्हा इस्राएलच्या
सर्व लोकांनी पाहिले, तेव्हा त्यांनी राजाला उत्तर दिले: “आम्हाला
दावीदामध्ये, इशायच्या मुलाशी आमचा काय वाटा, इस्राएला, तुझ्या
डेर्‍यांपाशी जाऊन! दावीदा, आपल्या स्वतःचे घर सांभाळ!” असे म्हणत
इस्राएलचे लोक परत घरी गेले. 17 परंतु तरीही जे इस्राएली लोक
यहूदीयाच्या नगरांमध्ये राहत होते त्यांच्यावर रेहोबोअमने राज्य केले.
18 अदोनिराम जो मजुरी कामकर्‍यांचा प्रमुख होता त्याला रेहोबोअम
राजाने पाठवले, परंतु सर्व इस्राएलने त्याला धोंडमार करून मारून
टाकले. तरीही, रेहोबोअम राजा आपल्या रथात बसून यरुशलेमास
निसटून गेला. 19 याप्रकारे इस्राएली लोकांनी दावीदाच्या घराण्याविरुद्ध
बंड केले ते आजवर चालू आहे. 20 यरोबोअम इजिप्त देशातून परत
आला आहे हे सर्व इस्राएल लोकांनी ऐकले, तेव्हा त्यांनी त्याला
आपल्या मंडळीत बोलावून घेतले व त्याला सर्व इस्राएलवर राजा केले.
केवळ यहूदाहचे गोत्र दावीदाच्या घराण्याशी विश्वासू राहिले. 21 जेव्हा
रेहोबोअम यरुशलेमास आला, तेव्हा त्याने यहूदाह व बिन्यामीनच्या
गोत्रातील सर्व लोकांना जमा केले; इस्राएलशी युद्ध करून शलोमोनचा
पुत्र रेहोबोअमसाठी राज्य पुन्हा मिळवून देतील असे एक लाख ऐंशी
हजार सक्षम तरुण पुरुष होते. 22 परंतु परमेश्वराचा मनुष्य शमायाह
याच्याकडे परमेश्वराचे वचन आले: 23 “शलोमोनचा पुत्र यहूदीयाचा
राजा रेहोबोअम, यहूदाह आणि बिन्यामीन व बाकीच्या लोकांना सांग,
24 ‘याहवेह असे म्हणतात: इस्राएल जे तुमचे बांधव आहेत त्यांच्याविरुद्ध
लढाईस जाऊ नका. तुम्ही प्रत्येकजण आपआपल्या घरी जा, कारण
हे माझ्यापासून आहे.’” म्हणून त्यांनी याहवेहचा शब्द मानला आणि
याहवेहने दिलेल्या आदेशाप्रमाणे आपआपल्या घरी परत गेले. 25
तेव्हा यरोबोअमने एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशातील शेखेम शहर बांधले
व तिथे राहिला. तिथून पुढे त्याने पेनुएल बांधले. 26 यरोबोअमने
स्वतःशी विचार केला, “राज्य कदाचित दावीदाच्या घराण्याकडे परत
जाईल. 27 जर या लोकांनी यरुशलेमात जाऊन याहवेहच्या मंदिरात
यज्ञार्पणे केली व त्यांचा स्वामी यहूदीयाचा राजा रेहोबोअम याच्याप्रीत्यर्थ
आपली निष्ठा पुन्हा दाखविली, तर ते मला जिवे मारतील व त्यांचा
राजा रेहोबोअम याच्याकडे वळतील.” 28 आपल्याबरोबरच्या लोकांचा
सल्ला घेतल्यानंतर, राजाने दोन सोन्याची वासरे बनविली. तो लोकांना
म्हणाला, “तुम्ही वर यरुशलेमकडे जाणे तुम्हाला अतिशय कठीण आहे,
हे इस्राएला, ही पाहा तुमची दैवते, ज्यांनी तुम्हाला इजिप्तमधून बाहेर
आणले.” 29 एक वासरू त्याने बेथेलमध्ये व दुसरे दानमध्ये प्रतिष्ठापीत
केले. 30 आणि ही बाब पाप अशी झाली; एका वासराची उपासना
करण्यासाठी काही लोक बेथेलात येत होते आणि दुसर्‍या वासराची
उपासना करण्यासाठी काही दूर दानपर्यंत गेले. 31 यरोबोअमने उच्च
स्थानावर मंदिरे बांधली आणि जरी ते लेवी घराण्यातील नव्हते, प्रत्येक
प्रकारच्या लोकांमधून याजक नेमले. 32 आठव्या महिन्याच्या पंधराव्या
दिवशी, जसा यहूदीयामध्ये पाळला जात असे तसेच त्याने एका सणाची
स्थापना केली. आणि वेदीवर यज्ञार्पणे केली. बेथेलमध्ये बनविलेल्या
वासरांसाठी अर्पणे त्याने केली. बेथेलमध्ये यरोबोअमने बनविलेल्या
पूजास्थानांवर सुद्धा त्याने याजक नेमले. 33 आठव्या महिन्याच्या
पंधराव्या दिवशी, त्याने स्वतःच निवडलेल्या महिन्यात, त्याने बेथेलमध्ये
बांधलेल्या वेदीवर यज्ञार्पणे केली. त्याने इस्राएली लोकांसाठी सण
स्थापित करून वरती वेदीवर जाऊन अर्पणे सादर केली.

**13** याहवेहच्या वचनानुसार परमेश्वराचा एक मनुष्य यहूदीयावरून
बेथेलास आला, जेव्हा यरोबोअम अर्पण करण्यासाठी वेदीजवळ
उभा होता. 2 याहवेहच्या वचनानुसार तो वेदीविरुद्ध ओरडला: “वेदी, हे
वेदी! याहवेह असे म्हणतात: ‘दावीदाच्या घराण्यात योशीयाह नावाचा
पुत्र जन्माला येईल. जे याजक तुझ्यावर येथे यज्ञ करतात, त्यांचे यज्ञ
तो तुझ्यावर करेल, मनुष्यांची हाडे तुझ्यावर जाळली जातील.’” 3
त्याच दिवशी परमेश्वराच्या मनुष्याने एक चिन्ह दिले: “याहवेहने हेच
चिन्ह जाहीर केले आहे: वेदी दुभागली जाईल आणि त्यावरील राख
ओतली जाईल.” 4 जेव्हा यरोबोअम राजाने परमेश्वराच्या मनुष्याने
बेथेलात वेदीविरुद्ध जे काही सांगितले ते ऐकले, तेव्हा वेदीवरून आपला
हात पुढे करून तो म्हणाला, “त्याला पकडा!” परंतु जो हात त्याने
पुढे केला होता, तो वाळून गेला आणि त्याला तो मागे घेता येईना. 5
आणि याहवेहच्या वचनानुसार परमेश्वराच्या मनुष्याने जे चिन्ह दिले
त्यानुसार वेदी दुभागली व वेदीवरील राख ओतली गेली. 6 तेव्हा
राजाने परमेश्वराच्या मनुष्याला म्हटले, “याहवेह तुझ्या परमेश्वराकडे
माझ्यासाठी मध्यस्थी कर व माझा हात पूर्ववत व्हावा म्हणून प्रार्थना
कर.” तेव्हा परमेश्वराच्या मनुष्याने याहवेहकडे मध्यस्थी केली आणि
राजाचा हात बरा होऊन पूर्ववत झाला. 7 राजा त्या परमेश्वराच्या
मनुष्यास म्हणाला, “माझ्याबरोबर भोजन करण्यास घरी चल आणि मी
तुला एक भेट देईन.” 8 परंतु परमेश्वराच्या मनुष्याने राजाला उत्तर दिले,
“तू जरी मला तुझी अर्धी संपत्ती दिली, तरीही मी तुझ्याबरोबर जाणार
नाही, या ठिकाणी ना मी भाकर खाणार, ना पाणी पिणार. 9 कारण
याहवेहच्या वचनाने मला आज्ञा दिली आहे: ‘तू तिथे ना भाकरी खावी ना
पाणी प्यावे किंवा ज्या वाटेने तू जातोस त्या वाटेने परत येऊ नये.’” 10
म्हणून ज्या मार्गाने तो बेथेलास आला होता त्याने न जाता, दुसर्‍या
मार्गाने रवाना झाला. 11 तेव्हा बेथेलमध्ये एक वृद्ध संदेष्टा राहत होता,
त्याच्या मुलांनी येऊन त्याला परमेश्वराच्या मनुष्याने त्या दिवशी जे केले
ते सर्वकाही सांगितले. आणि तो राजाला जे काही बोलला ते देखील
सांगितले. 12 त्यांच्या पित्याने त्यांना विचारले, “तो कोणत्या मार्गाने
गेला?” आणि परमेश्वराचा मनुष्य जो यहूदीयातून आलेला होता तो ज्या

मार्गाने गेला होता तो त्यांनी त्याला सांगितला. 13 तेव्हा तो आपल्या
मुलांना म्हणाला, “माझ्यासाठी गाढवावर खोगीर घाला.” आणि त्यांनी
तसे केल्यानंतर तो गाढवावर बसला 14 आणि परमेश्वराच्या मनुष्याचा
पाठलाग करीत गेला. तो त्याला एका एलाच्या वृक्षाखाली बसलेला
दिसला. त्याने त्याला विचारले, “परमेश्वराचा मनुष्य जो यहूदीयातून
आला तो तूच आहेस काय?” तो म्हणाला, “होय, तो मीच आहे.” 15
त्या संदेष्ट्याने त्याला म्हटले, “माझ्याबरोबर घरी चल आणि भोजन
कर.” 16 परमेश्वराच्या मनुष्याने म्हटले, “मी मागे वळून तुझ्याबरोबर
जाऊ शकत नाही, ना मी तुझ्याबरोबर या ठिकाणी भाकर खाऊ शकत
ना पाणी पिऊ शकत. 17 याहवेहच्या वचनाद्वारे मला सांगितले गेले:
‘तू तिथे भाकर खाऊ नये किंवा पाणी पिऊ नये किंवा ज्या मार्गाने तू
आलास, त्याने परत जाऊ नये.’” 18 त्या वृद्ध संदेष्ट्याने उत्तर दिले,
“जसा तू तसाच मीही संदेष्टा आहे, आणि याहवेहच्या वचनाने दूत मला
म्हणाला: ‘त्याने भाकर खावी व पाणी प्यावे म्हणून त्याला परत तुझ्या
घरी घेऊन ये.’” (परंतु तो त्याच्याशी खोटे बोलत होता.) 19 म्हणून
परमेश्वराचा मनुष्य त्याच्याबरोबर माघारी गेला व त्याच्या घरी खाणेपिणे
केले. 20 ते मेजावर जेवायला बसले असताना, याहवेहचे वचन त्या
वृद्ध संदेष्ट्याकडे आले, ज्याने त्याला माघारी आणले होते. 21 तो
परमेश्वराचा मनुष्य जो यहूदीयातून आला होता त्याला ओरडून म्हणाला,
“याहवेह असे म्हणतात: ‘तू याहवेहच्या वचनाचा अवमान केला आहेस
आणि याहवेहने तुला दिलेल्या आज्ञेचे पालन तू केले नाही. 22 माघारी
येऊन, ज्या ठिकाणी तू भाकर खाऊ नये किंवा पाणी पिऊ नये असे
याहवेहने तुला सांगितले होते, तिथे तू खाणेपिणे केले. म्हणून तुझ्या
पूर्वजांच्या कबरेत तुझे शरीर पुरले जाणार नाही.’” 23 परमेश्वराच्या
मनुष्याचे खाणेपिणे झाल्यानंतर, ज्या संदेष्ट्याने त्याला माघारी आणले
होते त्याने त्याच्यासाठी गाढवावर खोगीर घातले. 24 त्याच्या वाटेने जात
असताना, त्याला वाटेत एका सिंहाने गाठले व त्याला मारून टाकले
आणि त्याचे शरीर रस्त्यावर पडून राहिले असून, त्याच्या एका बाजूला
सिंह व दुसऱ्या बाजूला गाढव उभे राहिले. 25 जे लोक त्या रस्त्याने
येणे जाणे करीत होते त्यांनी त्याच्या शरीराच्या बाजूला सिंह उभा आहे
असे पाहिले आणि त्यांनी शहरात जाऊन ज्या ठिकाणी वृद्ध संदेष्टा
राहत होता तिथे ही बातमी सांगितली. 26 त्याला त्याच्या प्रवासातून
माघारी आणलेल्या त्या संदेष्ट्याने त्याविषयी ऐकले, तेव्हा तो म्हणाला,
“परमेश्वराचा मनुष्य, ज्याने याहवेहच्या वचनाचा अवमान केला तो हाच.
याहवेहने त्याला सिंहाच्या स्वाधीन केले व त्याने त्याला फाडून मारून
टाकले, याहवेहने त्याला चेतवणी दिल्यानुसार ते घडले आहे.” 27
तेव्हा त्या संदेष्ट्याने त्याच्या मुलांना म्हटले, “माझ्यासाठी गाढवावर
खोगीर घाला,” त्यानुसार त्यांनी केले. 28 तेव्हा तो गेला आणि त्याचे
शरीर रस्त्यावर पडलेले व त्याच्या बाजूला गाढव व सिंह उभे असलेले
आढळले. सिंहाने ना त्याचे शरीर खाऊन टाकले होते ना त्या गाढवाला
फाडले होते. 29 मग त्या संदेष्ट्याने परमेश्वराच्या मनुष्याचे शरीर उचलून
गाढवावर ठेवले आणि त्याच्यासाठी शोक करावा व त्याला पुरावे म्हणून
आपल्या शहरात आणले. 30 मग त्याने त्याचे शरीर आपल्याच कबरेत
ठेवले व म्हणाला, “अरेरे, माझ्या भावा!” 31 त्याला पुरल्यानंतर,
संदेष्टा आपल्या मुलांना म्हणाला, “मी मेल्यावर, परमेश्वराच्या मनुष्याला
ज्या कबरेत पुरले आहे तिथेच मलाही ठेवा; त्याच्या हाडांजवळ माझी
हाडे असू द्या. 32 कारण बेथेलमधील वेदी व शोमरोन नगरातील उच्च
स्थानावरील मंदिरांविरुद्ध याहवेहच्या वचनानुसार त्याने जे काही जाहीर
केले ते निश्चितच घडून येणार.” 33 यानंतरही, यरोबोअमने त्याचे दुष्टमार्ग
सोडले नाही व पुन्हा प्रत्येक प्रकारच्या लोकांमधून पूजास्थानांसाठी
याजकांची नेमणूक केली. ज्या कोणाला याजक होण्यास इच्छा होईल
त्यांना त्याने पूजास्थानांसाठी वेगळे केले. 34 यरोबोअमचे घराण्याचे हे
पाप त्यांच्या पतनास व पृथ्वीवरून त्यांच्या नाशास कारण झाले.

**14** त्या काळात यरोबोअमचा पुत्र अबीयाह आजारी पडला, 2
आणि यरोबोअम आपल्या पत्नीस म्हणाला, “यरोबोअमची पत्नी
म्हणून तुला कोणी ओळखू नये म्हणून आपला वेष पालट. मग शिलोह
येथे जा. मी या लोकांचा राजा होईल असे ज्या व्यक्तीने मला सांगितले
असा अहीयाह नावाचा संदेष्टा तिथे आहे. 3 तुझ्याबरोबर दहा भाकरी,
काही वड्या आणि मधाची एक कुपी घेऊन त्याच्याकडे जा आणि
मुलाचे काय होईल ते तो तुला सांगेल.” 4 म्हणून यरोबोअमच्या पत्नीने
त्याने सांगितल्याप्रमाणे केले व शिलोह येथे अहीयाहच्या घरी गेली.
अहीयाह तर आता त्याच्या वयामुळे पाहू शकत नव्हता; त्याची दृष्टी मंद
झाली होती. 5 परंतु याहवेहने अहीयाहला आधी सांगून ठेवले होते,
“यरोबोअमची पत्नी तिच्या मुलाबद्दल तुला विचारण्यास येत आहे,
कारण तो आजारी आहे आणि तू तिला असे उत्तर द्यावे. जेव्हा ती
आत येईल तेव्हा ती कोणी दुसरीच स्त्री असल्याचे ढोंग करेल.” 6
जेव्हा अहीयाहने दाराजवळ तिच्या पावलांचा आवाज ऐकला, तेव्हा
तो म्हणाला, “यरोबोअमचे पत्नी, आत ये. हे सोंग तू का घ्यावे?
दुःखाची बातमी घेऊन मला तुझ्याकडे पाठविले गेले आहे. 7 जा,
यरोबोअमला सांग, याहवेह इस्राएलचे परमेश्वर असे म्हणतात: ‘मी
तुला लोकांमधून वर काढले आणि माझ्या इस्राएली लोकांवर त्यांचा
अधिकारी असे नेमले. 8 दावीदाच्या घराण्यापासून राज्य फाडून ते मी
तुला दिले, पण तू माझा सेवक दावीदाप्रमाणे नाहीस, त्याने माझ्या
आज्ञा पाळल्या व त्याच्या आयुष्यभर त्यांचे अनुसरण केले आणि केवळ
जे माझ्या दृष्टीने योग्य ते त्याने केले. 9 पण तुझ्यापूर्वी होऊन गेलेल्या
सर्वांपेक्षा तू अधिक दुष्कर्मे केली आहेस. तू आपल्यासाठी इतर दैवत
घडविलेस, धातूच्या मूर्ती बनविल्यास; तू माझा क्रोध पेटविला आहेस
आणि माझ्याकडे पाठ केली आहेस. 10 “‘यामुळे यरोबोअमच्या घरावर
मी अरिष्ट आणणार आहे. मी इस्राएलातून यरोबोअमच्या घराण्याचा
प्रत्येक शेवटचा पुरुष नष्ट करेन; मग तो गुलाम असो वा मोकळा असो.
यरोबोअमचे घराणे संपूर्णपणे नष्ट होईपर्यंत शेणाप्रमाणे जाळून टाकीन.
11 यरोबोअमच्या घराण्यातील जे कोणी शहरात मरण पावतील त्यांना
कुत्रे खातील आणि जे शहराच्या बाहेर मरतील त्यांना पक्षी खाऊन
टाकतील. याहवेहने हे म्हटले आहे!’ 12 “तर तू आता ऊठ, परत घरी

जा. शहरात तुझे पाऊल पडताच तुझा मुलगा मरण पावेल. 13 सर्व
इस्राएली त्याच्यासाठी शोक करून त्याला पुरतील. यरोबोअमच्या
घराण्यातील तो एकटाच आहे जो पुरला जाईल, कारण तो एकटाच
आहे ज्याच्या ठायी याहवेह इस्राएलच्या परमेश्वराला काहीतरी चांगले
आढळले आहे. 14 “याहवेह स्वत:च आपल्यासाठी इस्राएलवर असा
राजा उभा करतील जो यरोबोअमच्या कुटुंबाचा उच्छेद करेल. ते आताच
घडण्यास सुरुवात होत आहे. 15 याहवेह इस्राएलवर असा वार करतील
की ते वाहत्या पाण्यावरील बोरूप्रमाणे होतील. जी चांगली भूमी मी
त्यांच्या पूर्वजांना दिली, त्यातून मी त्यांना उपटून टाकीन व फरात
नदीपलीकडे त्यांना पांगून टाकीन, कारण त्यांनी अशेराची खांब तयार
करून याहवेहला क्रोधित केले आहे. 16 यरोबोअमने जी पापे केली व
इस्राएलला सुद्धा करण्यास भाग पाडले यामुळे याहवेह त्यांचा त्याग
करतील.” 17 तेव्हा यरोबोअमची पत्नी तिथून उठून तिरजाह येथे गेली.
तिने उंबरठ्यावर पाऊल टाकताच, तिचा मुलगा मेला. 18 अहीयाह
आपला सेवक जो संदेष्टा याच्याद्वारे याहवेहने जे सांगितले त्याप्रमाणे,
त्यांनी त्याला पुरले व सर्व इस्राएलने त्याच्यासाठी शोक केला. 19
यरोबोअमच्या कारकिर्दीतील इतर घटना, त्याने कसे राज्य केले व कशा
लढाया लढल्या हे सर्व इस्राएलच्या राजांच्या पुस्तकात लिहिले आहे.
20 यरोबोअमने बावीस वर्षे राज्य केले आणि तो त्याच्या पूर्वजांबरोबर
विसावा पावला. त्याचा पुत्र नादाब त्याचा वारस झाला. 21 त्यावेळी
शलोमोनचा पुत्र रेहोबोअम हा यहूदीयाचा राजा होता. तो राजा झाला
त्यावेळी तो एकेचाळीस वर्षांचा होता आणि आपले नाव द्यावे म्हणून
याहवेहने सर्व इस्राएलच्या गोत्रांतून ज्या शहराची निवड केली त्या
यरुशलेमात त्याने राज्य केले. त्याच्या आईचे नाव नामाह होते; ती
अम्मोनी होती. 22 याहवेहच्या दृष्टीत जे वाईट ते यहूदीयाच्या लोकांनी
केले. आणि जी पापे त्यांनी केली त्यामुळे त्यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या
लोकांपेक्षा त्यांनी याहवेहला अधिक क्रोधित केले. 23 प्रत्येक पसरलेल्या
झाडाखाली त्यांनी त्यांच्यासाठी पूजास्थाने, पवित्र धोंडे व अशेराची
खांब बनविली. 24 त्यावेळी देशात मंदिरामध्ये पुरुषगामीही होती;
जे सर्व याहवेहने इस्राएलातून काढून टाकले होते, त्या सर्वप्रकारच्या
अमंगळ कृत्यांमध्ये लोक भाग घेत होते. 25 रेहोबोअम राजाच्या
कारकिर्दीच्या पाचव्या वर्षी, इजिप्तचा राजा शिशाकने यरुशलेमवर
हल्ला केला. 26 त्याने याहवेहच्या मंदिरातील भांडारे व राजवाड्यातील
भांडारे लुटून नेली. शलोमोनने बनविलेल्या सोन्याच्या ढालींसहीत
त्याने सर्वकाही घेतले. 27 म्हणून रेहोबोअम राजाने त्या सोन्याच्या
ढालींच्या ऐवजी कास्याच्या ढाली तयार केल्या व राजवाड्यातील
पहारेकऱ्यांच्या कामगिरीवर असलेल्यांच्या हाती त्या स्वाधीन केल्या.
28 जेव्हा राजा याहवेहच्या मंदिरात जात असे, तेव्हा पहारेकरी त्या ढाली
घेऊन उभे राहत असत आणि नंतर त्या त्यांच्या चौकीत ठेवत असत.
29 रेहोबोअमच्या कारकिर्दीतील इतर घटना आणि त्याने केलेली कृत्ये
यहूदीयाच्या राजांच्या पुस्तकात लिहून ठेवल्या आहेत की नाही? 30
रेहोबोअम व यरोबोअम यांच्यामध्ये सतत युद्ध होत राहिले. 31 रेहोबोअम
त्याच्या पूर्वजांबरोबर विसावा पावला आणि त्याला दावीदाच्या शहरात
त्याच्या पूर्वजांजवळ पुरण्यात आले. त्याच्या आईचे नाव नामाह होते; ती
अम्मोनी होती. त्याचा पुत्र अबीयाह राजा म्हणून त्याचा वारस झाला.

**15** नेबाटाचा पुत्र यरोबोअमच्या कारकिर्दीच्या अठराव्या वर्षी अबीयाह
यहूदीयाचा राजा झाला, 2 त्याने यरुशलेमात तीन वर्षे राज्य
केले. त्याच्या आईचे नाव माकाह होते जी अबशालोमची कन्या होती.
3 त्याच्या वडिलांनी त्याच्यापूर्वी जी पापे केली होती ती सर्व पापे
त्याने केली; त्याचा पूर्वज दावीदाप्रमाणे त्याचे हृदय याहवेह त्याच्या
परमेश्वराशी पूर्णपणे समर्पित नव्हते. 4 तरीपण दावीदाप्रित्यर्थ याहवेह
त्याचे परमेश्वर यांनी त्याला त्याचा वारस म्हणून यरुशलेमात त्याला दीप
दिला व यरुशलेमास बलवान बनविले. 5 कारण दावीदाने याहवेहच्या
दृष्टीने जे योग्य ते केले होते आणि उरीयाह हिथीची घटना वगळता,
दावीद आपल्या आयुष्याच्या सर्व दिवसात याहवेहची कोणतीही आज्ञा
पाळण्यापासून मागे वळला नाही. 6 अबीयाहच्या जीवनभर यरोबोअम
आणि रेहोबोअम यांच्यामध्ये युद्ध होत राहिले. 7 अबीयाहच्या राज्याच्या
इतर घटना आणि त्याने जे काही केले ते सर्व यहूदीया देशाच्या राजांच्या
इतिहासाच्या पुस्तकात लिहिल्या नाहीत काय? अबीयाह व यरोबोअम
यांच्यातील युद्ध सुरूच होते. 8 मग अबीयाह त्याच्या पूर्वजांबरोबर
विसावा पावला आणि त्याला दावीदाच्या शहरात पुरले गेले. आणि
त्याचा पुत्र आसा राजा म्हणून त्याचा वारस झाला. 9 इस्राएलचा राजा
यरोबोअमच्या कारकिर्दीच्या विसाव्या वर्षी आसा यहूदीयाचा राजा
झाला, 10 आणि त्याने यरुशलेमात एकेचाळीस वर्षे राज्य केले. त्याच्या
आजीचे नाव माकाह होते ती अबशालोमची कन्या होती. 11 आसाने
आपला पूर्वज दावीदाप्रमाणे याहवेहच्या दृष्टीने जे योग्य ते केले. 12
त्याने मंदिरातून पुरुषगामी करणाऱ्यांना देशाबाहेर घालवून दिले आणि
त्याच्या पूर्वजांनी केलेल्या मूर्ती देखील काढून टाकल्या. 13 त्याने
आपली आजी माकाह हिला राजमातेच्या पदावरून काढून टाकले,
कारण तिने तिरस्करणीय अशी अशेराची उपासना करण्यासाठी एक
मूर्ती घडविली होती. आसाने ती तोडली व किद्रोनच्या खोऱ्याजवळ
जाळून टाकली, 14 जरी त्याने पूजास्थाने मोडून टाकली नाही, तरीही
आसाचे हृदय त्याच्या जीवनभरात याहवेहशी समर्पित होते. 15 त्याने
व त्याच्या पित्याने समर्पित केलेले चांदी व सोन्याचे सामान त्याने
याहवेहच्या मंदिरात आणले. 16 यहूदीयाचा राजा आसा व इस्राएलचा
राजा बाशा यांच्यात त्यांच्या आयुष्यभर युद्ध होत राहिले. 17 यहूदीयाचा
राजा आसा याच्या सीमेतून कोणी बाहेर जाऊ नये किंवा आत येऊ नये
म्हणून इस्राएलचा राजा बाशाने यहूदीयावर स्वारी केली आणि रामाह
शहराची तटे बांधली. 18 त्यानंतर आसाने याहवेहच्या मंदिरातील आणि
त्याच्या राजवाड्यातील भांडारात उरलेले सर्व चांदी व सोने काढून घेतले
व ते आपल्या सरदारांच्या हाती स्वाधीन करून त्यांना हेजीओनचा
पुत्र ताब्रिम्मनचा पुत्र बेन-हदाद, अरामचा राजा जो दिमिष्कात राज्य
करीत होता त्याच्याकडे पाठवले. 19 आणि म्हटले, “माझ्या व तुझ्या
वडिलांमध्ये होता तसा तुझ्या व माझ्यात एक करार असावा. पाहा, मी

तुला चांदी व सोन्याची भेट पाठवित आहे. तर आता इस्राएलचा राजा
बाशा याच्याशी असलेला तुझा करार मोड म्हणजे तो माझ्यापासून
निघून जाईल.” 20 बेन-हदद आसा राजाशी सहमत झाला व आपल्या
सैन्याच्या सेनापतींना इस्राएलच्या नगरांवर हल्ला करण्यास पाठविले.
त्याने इय्योन, दान, आबेल-बेथ-माकाह आणि नफतालीसहीत संपूर्ण
किन्नेरेथवर विजय मिळविला. 21 बाशाने जेव्हा हे ऐकले तेव्हा रामाह
बांधण्याचे थांबवून तिरजाह येथे राहिला. 22 मग आसा राजाने सर्व
यहूदीयात एक हुकूम जाहीर केला; त्यातून कोणीही वगळले नाही;
आणि जे दगड आणि लाकूड बाशा वापरत होता, ते त्यांनी रामाह
येथून नेऊन त्यांच्यापासून त्याने बिन्यामीनातील गेबा आणि मिस्पाह हे
बांधले. 23 आसाच्या कारकिर्दीच्या इतर घटना, त्याचे सर्व पराक्रम,
जे सर्वकाही त्याने केले व जी शहरे त्याने बांधली, ते यहूदीयाच्या
राजांच्या इतिहासाच्या पुस्तकात लिहिल्या नाहीत काय? पण त्याच्या
वृद्धापकाळात तो पायाच्या आजाराने त्रस्त झाला. 24 मग आसा
त्याच्या पूर्वजांबरोबर विसावा पावला आणि त्याचा पिता दावीदाच्या
शहरात पुरला गेला. आणि त्याचा पुत्र यहोशाफाट राजा म्हणून त्याचा
वारस झाला. 25 यहूदीयाचा राजा आसाच्या कारकिर्दीच्या दुसऱ्या
वर्षी यरोबोअमचा पुत्र नादाब इस्राएलचा राजा झाला आणि त्याने
दोन वर्षे राज्य केले. 26 याहवेहच्या दृष्टीने जे वाईट ते त्याने केले.
आपल्या पित्याचे अनुसरण करीत, त्याच्या पित्याने इस्राएली लोकांना
जी पापे करण्यास लावले होते, त्याच मार्गाला तो लागला. 27 इस्साखार
गोत्रातील अहीयाहचा पुत्र बाशाने नादाबाविरुद्ध कट केला, नादाब व
सर्व इस्राएली लोकांनी गिब्बथोनला वेढा घातला असता, त्याने त्याला
पलिष्ट्यांच्या गिब्बथोन नगरात मारून टाकले. 28 यहूदीयाचा राजा
आसाच्या कारकिर्दीच्या तिसऱ्या वर्षी बाशाने नादाबला ठार केले व तो
स्वतः त्याच्या जागी राजा झाला. 29 त्याच्या राज्याच्या सुरुवातीलाच,
त्याने यरोबोअमच्या संपूर्ण घराण्याला मारून टाकले, याहवेहचा सेवक
शिलोनी अहीयाहच्या वचनानुसार त्याने कोणालाही जिवंत सोडले नाही,
सर्वांचा नाश केला. 30 जी पापे यरोबोअमने केली आणि इस्राएली
लोकांना देखील करावयाला लावली आणि त्याने याहवेह इस्राएलच्या
परमेश्वराचा राग भडकाविला म्हणून हे सगळे घडले. 31 नादाबच्या
राज्याच्या इतर घटना, आणि जे सर्वकाही त्याने केले ते इस्राएलच्या
राजांच्या इतिहासाच्या पुस्तकात लिहिल्या गेल्या नाहीत काय? 32
यहूदीयाचा राजा आसा व इस्राएलचा राजा बाशा यांच्यात त्यांच्या
आयुष्यभर युद्ध होत राहिले. 33 यहूदीयाचा राजा आसाच्या कारकिर्दीच्या
तिसऱ्या वर्षी अहीयाहचा पुत्र बाशा हा तिरजाह येथे इस्राएलचा राजा
झाला. त्याने चोवीस वर्षे राज्य केले. 34 याहवेहच्या दृष्टीने जे वाईट ते
त्याने केले. त्याने यरोबोअमच्या मार्गाचे अनुसरण करून जी पापे त्याने
इस्राएलास करण्यास लावले, तीच पापे बाशानेही केली.

**16** हनानीचा पुत्र येहूकडे बाशासंबंधी याहवेहचे जे वचन आले ते हे:
2 “मी तुला धुळीतून उचलून माझ्या इस्राएली लोकांवर अधिकारी
नेमले, परंतु तू यरोबोअमचा मार्ग अनुसरला आहेस व माझ्या इस्राएली
लोकांना पाप करावयाला भाग पाडले आणि त्यांच्या पापामुळे माझा
क्रोध भडकविला आहे. 3 म्हणून मी बाशा व त्याच्या घराण्याला नाहीसे
करेन आणि मी तुझ्या घराण्याला नेबाटाचा पुत्र यरोबोअम याच्या
घराण्यासारखे करेन. 4 बाशाच्या मालकीचा जो कोणी शहरात मरेल
त्यांना कुत्रे खातील आणि जे शहराच्या बाहेर मरतील त्यांना पक्षी
खातील.” 5 बाशाच्या कारकिर्दीच्या इतर घटना, त्याने केलेली कृत्ये
व त्याची यशप्राप्ती, इस्राएलच्या राजांच्या इतिहासाच्या पुस्तकात
लिहिल्या आहेत की नाही? 6 बाशा त्याच्या पूर्वजांबरोबर विसावा पावला
आणि त्याला तिरजाह येथे पुरले गेले. त्याचा पुत्र एलाह त्याचा वारस
म्हणून राजा झाला. 7 त्याचप्रमाणे, हनानीचा पुत्र येहू संदेष्ट्याच्या
द्वारे याहवेहचे जे वचन बाशा व त्याच्या घराण्याकडे आले, कारण
त्याने याहवेहच्या दृष्टीत जे वाईट ते केले व त्याने केलेल्या कृत्यांमुळे
याहवेहचा क्रोध भडकविला, त्यामुळे यरोबोअमच्या घराण्यासारखे
त्याचे झाले; आणि त्याचा नाश झाला. 8 यहूदीयाचा राजा आसाच्या
कारकिर्दीच्या सव्विसाव्या वर्षी, बाशाचा पुत्र एलाह तिरजाह येथे
इस्राएलवर राज्य करू लागला आणि त्याने दोन वर्षे राज्य केले. 9
जिम्री, जो त्याच्या अधिकाऱ्यांपैकी एक होता, जो त्याच्या निम्म्या
रथांचा सेनापती होता, त्याने त्याच्याविरुद्ध कट रचला. एलाह त्यावेळी
तिरजाह येथे, राजवाड्याचा अधिकारी अरजाच्या तिरजाह येथील घरी
मद्यधुंद झाला होता. 10 तेव्हा जिम्री आत आला व त्याच्यावर वार करून
त्याला मारून टाकले आणि त्याचा उत्तराधिकारी म्हणून राजा झाला.
यहूदीयाचा राजा आसाच्या सत्ताविसाव्या वर्षी असे झाले. 11 तो राजा
झाला व राजासनावर बसताच, त्याने बाशाच्या संपूर्ण कुटुंबाला मारून
टाकले. कोणीही पुरुष, नातेवाईक किंवा मित्र त्याने जिवंत सोडला
नाही. 12 याप्रकारे बाशाविरुद्ध याहवेहचे जे वचन येहू संदेष्ट्याच्या
द्वारे सांगितले गेले होते त्यानुसार, जिम्रीने बाशाच्या संपूर्ण घराण्याचा
नाश केला; 13 कारण बाशाने व त्याचा पुत्र एलाहनी जी पापे केली
आणि इस्राएली लोकांना देखील ती पापे करावयाला भाग पाडले होते,
म्हणून त्यांनी त्यांच्या व्यर्थ मूर्तींमुळे याहवेह इस्राएलच्या परमेश्वराचा
क्रोध भडकविला होता. 14 एलाहच्या कारकिर्दीच्या इतर घटना आणि
त्याने जे काही केले, ते इस्राएलच्या राजांच्या इतिहासाच्या पुस्तकात
लिहिल्या नाहीत काय? 15 यहूदीयाचा राजा आसाच्या कारकिर्दीच्या
सत्ताविसाव्या वर्षी जिम्रीने तिरजाह येथे इस्राएलवर सात दिवस राज्य
केले. सैन्याने पलिष्ट्यांच्या हद्दीतील गिब्बथोन नगराजवळ छावणी
दिली होती. 16 जिम्रीने राजाविरुद्ध कट करून त्याला ठार मारले असे
जेव्हा छावणीतील इस्राएली सैन्याने ऐकले, तेव्हा त्यांनी त्याच दिवशी
सेनापती ओमरीला इस्राएलचा राजा म्हणून छावणीतच घोषित केले.
17 तेव्हा ओमरी व त्याच्या बरोबरच्या इस्राएली लोकांनी गिब्बथोन
सोडून तिरजाह नगराला वेढा दिला. 18 शहर हस्तगत झाले आहे असे
जेव्हा जिम्रीने पाहिले, तेव्हा तो राजवाड्याच्या किल्ल्यात गेला आणि
त्यात स्वतःभोवती आग लावली आणि तो मेला. 19 कारण याहवेहच्या
दृष्टीत जे वाईट ते करून त्याने पाप केले आणि यरोबोअमचे अनुसरण

करीत त्याने जी पापे केली, ती केली व इस्राएली लोकांना सुद्धा ती
पापे करावयाला भाग पाडले. 20 जिम्रीच्या कारकिर्दीच्या इतर घटना,
त्याने केलेली बंडखोरी, इस्राएलच्या राजांच्या इतिहासाच्या पुस्तकात
लिहिल्या आहेत की नाही? 21 आता इस्राएली लोक दोन भागात
विभागले गेले; अर्ध्या लोकांनी गीनाथचा पुत्र तिबनी याला पाठिंबा
दिला, तर अर्ध्यांनी ओमरीला राजा होण्यासाठी पाठिंबा दिला. 22 परंतु
गीनाथचा पुत्र तिबनी याच्या समर्थकांपेक्षा ओमरीचे समर्थक अधिक
प्रबळ झाले; म्हणून तिबनी मेला व ओमरी राजा झाला. 23 यहूदीयाचा
राजा आसाच्या कारकिर्दीच्या एकतिसाव्या वर्षी ओमरी इस्राएलवर
राज्य करू लागला आणि त्याने बारा वर्षे राज्य केले, त्यापैकी सहा वर्षे
तिरजाह येथे राज्य केले. 24 त्याने शेमेर नावाच्या व्यक्तीकडून शोमरोन
डोंगर चांदीचे दोन तालांत देऊन विकत घेतले आणि त्या डोंगरावर नगर
बांधले व त्या डोंगराचा आधीचा मालक शेमेर याच्या नावानुसार शोमरोन
असे नाव दिले. 25 पण ओमरीने सुद्धा याहवेहच्या दृष्टीत जे वाईट ते
केले आणि त्याच्यापूर्वी होऊन गेलेल्यांपेक्षा अधिक पाप केले. 26 त्याने
पूर्णपणे नेबाटाचा पुत्र यरोबोअमचे अनुसरण केले होते, यरोबोअमने
इस्राएली लोकांना जी पापे करावयाला भाग पाडले, ती त्याने केली
आणि त्यांनी त्यांच्या व्यर्थ मूर्तीमुळे याहवेह इस्राएलच्या परमेश्वराचा
क्रोध भडकविला. 27 ओमरीच्या कारकिर्दीच्या इतर घटना, त्याने
केलेल्या गोष्टी व त्याची यशप्राप्ती इस्राएलच्या राजांच्या इतिहासाच्या
पुस्तकात लिहिल्या आहेत की नाही? 28 ओमरी आपल्या पूर्वजांबरोबर
विसावा पावला आणि त्याला शोमरोनात पुरले गेले. आणि त्याचा पुत्र
अहाब त्याचा वारस म्हणून राजा झाला. 29 यहूदीयाचा राजा आसाच्या
कारकिर्दीच्या अडतिसाव्या वर्षी ओमरीचा पुत्र अहाब इस्राएलवर राज्य
करू लागला. त्याने शोमरोन येथे इस्राएलवर बावीस वर्षे राज्य केले. 30
ओमरीचा पुत्र अहाबाने त्याच्या आधी होऊन गेलेल्यांपेक्षा याहवेहच्या
दृष्टीने जे वाईट ते केले. 31 नेबाटाचा पुत्र यरोबोअमच्या पापांना क्षुल्लक
समजून त्याचे अनुसरण केले; इतकेच नाही, तर त्याने सीदोनी राजा
एथबालची कन्या ईजबेल हिच्याशी विवाह केला आणि बआलची
सेवा व उपासना करू लागला. 32 शोमरोनात त्याने बआलासाठी जे
मंदिर बांधले होते त्यात बआलासाठी एक वेदी उभारली. 33 अहाबाने
अशेरा देवीचे स्तंभही उभारले आणि असे करून त्याच्या आधी होऊन
गेलेल्या राजांपेक्षा याहवेह इस्राएलच्या परमेश्वराच्या क्रोधाला अधिक
भडकाविले. 34 अहाबाच्या काळात, बेथेलचा हिएल याने यरीहोची
पुनर्बांधणी केली. त्याने त्याचा पाया घातला, तेव्हा त्याचा प्रथमपुत्र
अबीराम मरण पावला आणि जेव्हा त्याची फाटके उभारली तेव्हा त्याचा
सर्वात धाकटा पुत्र सगूब मरण पावला; नूनाचा पुत्र यहोशुआच्या द्वारे
याहवेहने सांगितलेल्या वचनानुसार हे सर्व घडले.

**17** गिलआद येथील तिश्बे नगरातील उपरी म्हणून राहणाऱ्यापैकी
एलीयाह तिश्बे अहाबाला म्हणाला, “याहवेह, इस्राएलचे जिवंत
परमेश्वर ज्यांची मी सेवा करतो त्यांची शपथ, मी सांगितल्याशिवाय
येणाऱ्या काही वर्षांमध्ये दहिवर किंवा पाऊस पडणार नाही.” 2 तेव्हा
याहवेहचे वचन एलीयाहकडे आले: 3 “येथून निघून पूर्वेकडे जा आणि
यार्देनेच्या पूर्वेस केरीथ ओहळाकडे लपून राहा. 4 त्या ओहळाचे पाणी
तू पी आणि तुला अन्न पुरवावे म्हणून मी कावळ्यांना आज्ञा दिली
आहे.” 5 म्हणून याहवेहने त्याला जे सांगितले त्याप्रमाणे त्याने केले. तो
पूर्वेला यार्देनेच्या केरीथ ओहळाकडे जाऊन तिथे राहिला. 6 सकाळी
आणि संध्याकाळी कावळे त्याच्यासाठी भाकर आणि मांस आणून देत
असत आणि तो त्या ओहळाचे पाणी पीत असे. 7 काही काळानंतर
ओहोळ आटून गेला, कारण देशात पाऊस नव्हता. 8 मग याहवेहचे
वचन एलीयाहकडे आले: 9 “सीदोनजवळच्या सारेफथ नगराकडे जा
आणि तिथे राहा. तिथे मी एका विधवेला आज्ञा दिली आहे की तिने
तुला अन्नपुरवठा करावा.” 10 तेव्हा तो सारेफथला गेला. जेव्हा तो
नगराच्या वेशीजवळ आला, तेव्हा काटक्या गोळा करीत असलेली एक
विधवा तिथे होती. त्याने तिला बोलावून विचारले, “एका भांड्यात मला
पिण्यासाठी पाणी आणशील काय?” 11 ती पाणी आणायला जात
असताना, त्याने तिला आवाज देऊन म्हटले, “आणि कृपया येताना
माझ्यासाठी भाकरीचा एक तुकडा घेऊन ये.” 12 ती म्हणाली, “याहवेह
तुझ्या जिवंत परमेश्वराची शपथ, माझ्याकडे भाकर नाही; केवळ मूठभर
पीठ व कुपीत थोडे जैतुनाचे तेल आहे. मी काही काटक्या गोळा करीत
आहे, म्हणजे मी घरी जाऊन माझ्यासाठी व माझ्या मुलासाठी भोजन
बनवीन व आम्ही ते खाऊ व मरून जाऊ.” 13 एलीयाह तिला म्हणाला,
“भिऊ नकोस. घरी जा आणि तू म्हटल्याप्रमाणे कर. परंतु तुझ्याजवळ
जे आहे त्यातून प्रथम माझ्यासाठी एक लहान भाकर बनव आणि
माझ्याकडे आण आणि मग तुझ्यासाठी व तुझ्या मुलासाठी बनव. 14
कारण याहवेह, इस्राएलचे परमेश्वर असे म्हणतात: ‘याहवेह देशात
पाऊस पाठवेपर्यंत, तुझ्या भांड्यातील पीठ संपणार नाही आणि तुझी
तेलाची कुपी कोरडी होणार नाही.’” 15 ती गेली आणि एलीयाहने
तिला सांगितल्याप्रमाणे केले, म्हणून एलीयाह, आणि ती स्त्री व तिचे
कुटुंब यांच्यासाठी रोज भोजन मिळत असे. 16 एलीयाहद्वारे दिलेल्या
याहवेहच्या वचनानुसार भांड्यातील पीठ संपले नाही आणि तेलाची कुपी
कोरडी झाली नाही. 17 काही काळानंतर जी घर मालकीण स्त्री होती
तिचा मुलगा आजारी पडला. त्याचा आजार वाढतच गेला आणि त्याचा
श्वास थांबला. 18 ती एलीयाहला म्हणाली, “अहो परमेश्वराच्या मनुष्या,
तुम्ही माझ्याविरुद्ध आहात काय? माझ्या पापाची मला आठवण करून
द्यायला व माझ्या मुलाला मारून टाकण्यास आला आहात काय?” 19
एलीयाह म्हणाला, “तुझ्या मुलाला माझ्याकडे आण.” त्याने त्याला
तिच्या हातून घेतले आणि माडीवरील खोलीत जिथे तो राहत होता तिथे
नेऊन आपल्या बिछान्यावर ठेवले. 20 मग त्याने याहवेहचा धावा करीत
म्हटले, “याहवेह, माझ्या परमेश्वरा, मी या विधवेच्या घरात राहत आहे,
तिच्या मुलाला मारून आपण तिच्यावर अरिष्ट आणले काय?” 21 मग
त्याने तीन वेळा त्या मुलावर पाखर घातली आणि याहवेहकडे आरोळी
केली, “याहवेह, माझ्या परमेश्वरा, या मुलाचा जीव पुन्हा त्याच्यात येऊ
द्यावा!” 22 याहवेहने एलीयाहची प्रार्थना ऐकली, आणि त्या मुलाचा

जीव त्याच्यात परत आला आणि तो जिवंत झाला. 23 मग एलीयाहने
मुलाला उचलून त्या खोलीतून खाली आणले. त्याने त्याला त्याच्या
आईच्या हाती दिले आणि म्हटले, “पाहा, तुझा मुलगा जिवंत आहे!”
24 तेव्हा ती स्त्री एलीयाहला म्हणाली, “आता मला ठाऊक झाले की
आपण परमेश्वराचे मनुष्य आहात आणि आपल्या मुखातील याहवेहचे
वचन सत्य आहे.”

18 काही कालानंतर, म्हणजे तिसऱ्या वर्षी याहवेहचे वचन
एलीयाहकडे आले: “जा आणि अहाबाच्या समोर हजर हो,
आणि मी देशावर पाऊस पाठवेन.” 2 म्हणून एलीयाह अहाबासमोर
हजर झाला. याकाळात शोमरोनामध्ये अतिशय तीव्र दुष्काळ पडला
होता, 3 आणि अहाबाने आपल्या राजवाड्याचा कारभारी ओबद्याहला
बोलाविले. (ओबद्याह याहवेहचे फार भय बाळगणारा होता. 4 जेव्हा
ईजबेल याहवेहच्या संदेष्ट्यांना मारून टाकत होती, तेव्हा ओबद्याहने
शंभर संदेष्ट्यांना प्रत्येकी पन्नास असे दोन गुहांमध्ये लपविले होते,
आणि त्यांना अन्नपाणी पुरविले.) 5 अहाबाने ओबद्याहला म्हटले,
“देशातील सर्व झरे व ओढे शोध, घोडे व खेचरे जिवंत राहावे म्हणून
कदाचित आपल्याला थोडे गवत मिळेल म्हणजे आपल्याला त्यांना
मारून टाकावे लागणार नाही.” 6 मग ज्या प्रदेशात फिरायचे आहे त्या
भागाचे त्यांनी दोन भाग केले, अहाब एका दिशेने जाणार व ओबद्याह
दुसऱ्या बाजूने. 7 ओबद्याह वाटेने चालत असता, त्याला एलीयाह
भेटला. ओबद्याहने त्याला ओळखले व जमिनीकडे लवून त्याला दंडवत
घालत म्हटले, “माझे स्वामी, एलीयाह ते आपणच आहात काय?” 8
एलीयाह म्हणाला, “होय, जा, तुझ्या धन्याला सांग एलीयाह येथे आहे.”
9 तेव्हा ओबद्याहने विचारले, “माझ्याकडून अशी कोणती चूक झाली
आहे, की तुम्ही आपल्या सेवकाला मारून टाकावे म्हणून अहाबाच्या
स्वाधीन करीत आहात? 10 याहवेह, आपल्या जिवंत परमेश्वराची
शपथ, आपला शोध करण्यासाठी माझ्या धन्याने लोक पाठवले नाही
असा एकही देश किंवा राज्य नाही. आणि त्या देशात किंवा राज्यात
एलीयाह नाही असे कोणी सांगितले, तर एलीयाह त्यांना सापडला
नाही असे त्यांना शपथ घेऊन सांगावे लागत असे. 11 परंतु आता
आपण मला सांगता त्याला जाऊन सांग, ‘एलीयाह येथे आहे.’ 12
मी तुम्हाला सोडून गेल्यावर याहवेहचा आत्मा तुम्हाला कुठे घेऊन
जाईल हे मला ठाऊक नाही. पण जर मी जाऊन अहाबाला सांगितले
आणि त्याला तुम्ही सापडला नाही, तर तो मला मारून टाकील. मी
तर आपला सेवक, माझ्या बालपणापासून याहवेहची उपासना करीत
आलो आहे. 13 ईजबेल राणी प्रभूच्या संदेष्ट्यांना मारत होती तेव्हा
मी काय केले हे तुम्ही ऐकले नाही काय? एका गुहेत पन्नास असे
शंभर याहवेहच्या संदेष्ट्यांना मी दोन गुहांमध्ये लपविले आणि त्यांना
अन्नपाणी पुरविले. 14 आणि आता तुम्ही मला म्हणता, जाऊन माझ्या
धन्याला मी सांगावे, ‘एलीयाह येथे आहे,’ तो मला मारून टाकील!”
15 एलीयाह म्हणाला, “ज्या सर्वसमर्थ याहवेहची मी सेवा करतो त्या
जिवंत परमेश्वराची शपथ, आज मी खचितच अहाबासमोर हजर होईन.”
16 तेव्हा ओबद्याह अहाबाला भेटायला गेला आणि त्याला सांगितले
आणि अहाब एलीयाहला भेटायला गेला. 17 एलीयाहला पाहताच अहाब
म्हणाला, “इस्राएलची छळणूक करणारा तो तूच आहेस काय?” 18
एलीयाहने उत्तर दिले, “इस्राएलला छळणारा मी नाही, तर तू व तुझ्या
पित्याचे घराणे आहे. तुम्ही याहवेहच्या आज्ञा पाळण्याचे सोडून बआलाचे
अनुसरण केले आहे. 19 आता सर्व इस्राएली लोकांना माझ्यासमोर
कर्मेल डोंगरावर बोलावून घे. आणि जे ईजबेलच्या मेजावर भोजन
करतात असे बआलाचे चारशे पन्नास संदेष्टे व अशेराचे चारशे संदेष्टे,
त्यांनाही बोलावून घे.” 20 म्हणून अहाबाने सर्व इस्राएली लोकांना
बोलाविणे पाठवले आणि संदेष्ट्यांना कर्मेल डोंगरावर जमविले. 21
एलीयाह लोकांच्या समोर जाऊन म्हणाला, “दोन मतांमध्ये तुम्ही
कुठवर डगमगत राहणार? जर याहवेह हेच परमेश्वर आहे तर त्यांचे
अनुसरण करा; परंतु जर बआल परमेश्वर आहे तर त्याला अनुसरा.”
परंतु लोक काही बोलले नाही. 22 मग एलीयाह त्यांना म्हणाला,
“याहवेहचा संदेष्टा म्हणून मी एकटाच उरलो आहे, परंतु बआलाचे तर
चारशे पन्नास संदेष्टे आहेत. 23 आमच्यासाठी दोन बैल आणा. त्यातील
एक बआलच्या संदेष्ट्यांनी त्यांच्यासाठी निवडावा आणि त्याचे तुकडे
कापून ते लाकडांवर ठेवावे परंतु त्याला अग्नी लावू नये. मी दुसरा बैल
तयार करेन आणि लाकडांवर ठेवेन आणि ते पेटविणार नाही. 24 मग
तुम्ही तुमच्या देवाचा धावा करा, आणि मी माझ्या याहवेहचा धावा
करेन. मग जो देव अग्नीद्वारे उत्तर देईल; तोच खरा परमेश्वर.” मग
लोक म्हणाले, “तू जे बोलतो ते बरोबर आहे.” 25 एलीयाह बआलच्या
संदेष्ट्यांना म्हणाला, “प्रथम तुम्ही बैल निवडून घ्या आणि तो तयार
करा, कारण तुम्ही संख्येने अधिक आहात. तुमच्या देवाचा धावा करा,
परंतु अग्नी लावू नये.” 26 म्हणून त्यांना दिलेला बैल घेऊन त्यांनी
तयार केला. मग त्यांनी सकाळपासून मध्यान्हापर्यंत बआलच्या नावाचा
धावा केला. आणि ओरडत म्हणाले, “हे बआला, आम्हाला उत्तर दे!”
परंतु काही प्रत्युत्तर आले नाही; कोणीही उत्तर दिले नाही. आणि जी
वेदी त्यांनी केली होती त्याभोवती ते नाचत होते. 27 मध्यान्हाच्या वेळी
एलीयाह त्यांची थट्टा करीत म्हणू लागला, “अधिक मोठ्याने ओरडा,
खचित तो देव आहे! कदाचित तो विचारात गढून गेला असेल किंवा
व्यस्त किंवा प्रवास करीत असेल किंवा झोपला असेल आणि त्याला
जागे केले पाहिजे.” 28 म्हणून ते मोठ्याने ओरडू लागले आणि त्यांच्या
प्रथेप्रमाणे तलवारी व भाल्यांनी रक्तबंबाळ होईपर्यंत स्वतःला घाव करू
लागले. 29 दुपार सरून गेली आणि संध्याकाळच्या यज्ञाच्या वेळेपर्यंत ते
अजूनही वेड्यासारखे भविष्यवाणी करीत होते. परंतु काहीही प्रत्युत्तर
आले नाही, कोणी काही बोलले नाही, कोणी लक्ष दिले नाही. 30 तेव्हा
एलीयाह सर्व लोकांना म्हणाला, “माझ्याजवळ या.” ते त्याच्याकडे
आले आणि त्याने याहवेहची जी वेदी मोडून गेली होती ती दुरुस्त केली.
31 “तुझे नाव इस्राएल असणार” असे याहवेहने ज्या याकोबाला म्हटले
होते त्याच्या वंशजांच्या बारा गोत्रांइतके एलीयाहने बारा धोंडे घेतले. 32
त्या धोंड्यांनी त्याने याहवेहच्या नावाने वेदी बांधली आणि वेदीभोवती

दोन सिआह बीज मावेल इतकी मोठी खळगी खणली. 33 त्याने लाकडे
रचली, बैल कापून त्याचे तुकडे केले आणि त्या लाकडांवर रचले. मग
तो त्यांना म्हणाला, “चार मोठ्या घागरी पाण्याने भरा आणि ते यज्ञावर
व लाकडांवर ओता.” 34 तो म्हणाला, “पुन्हा असेच करा.” आणि
त्यांनी पुन्हा केले. त्याने आदेश दिला, “तिसऱ्यांदा असेच करा,” आणि
त्यांनी तिसऱ्यांदाही होमार्पणावर पाणी टाकले. 35 पाणी वेदीवरून
खाली वाहू लागले आणि खळगी सुद्धा पाण्याने भरली. 36 यज्ञाच्या
वेळी, एलीयाह संदेष्टा पुढे आला आणि त्याने प्रार्थना केली: “हे याहवेह,
अब्राहाम, इसहाक आणि इस्राएलच्या परमेश्वरा, आज हे जाहीर होवो
की इस्राएलमध्ये केवळ तुम्हीच परमेश्वर आहात आणि मी तुमचा सेवक
असून या सर्व गोष्टी मी आपल्या आज्ञेनुसार केल्या आहेत. 37 मला उत्तर
द्या, हे याहवेह, मला उत्तर द्या, म्हणजे या लोकांना समजेल, याहवेह,
तुम्हीच परमेश्वर आहे आणि आपणच त्यांची मने परत वळवित आहात.”
38 तेव्हा याहवेहचा अग्नी आला आणि होमार्पण, लाकडे, धोंडे आणि
माती भस्म करून टाकली आणि खळग्यातील पाणी चाटून टाकले. 39
जेव्हा सर्व लोकांनी हे पाहिले, तेव्हा ते पालथे पडून रडू लागले, “याहवेह
हेच परमेश्वर आहे! याहवेह हेच परमेश्वर आहे!” 40 मग एलीयाहने त्यांना
आज्ञा दिली, “बआलच्या संदेष्ट्यांना पकडा, कोणालाही जाऊ देऊ
नका!” तेव्हा त्यांनी पकडले आणि एलीयाहने त्यांना खाली किशोन
ओहळाकडे नेऊन त्यांचा वध केला. 41 आणि एलीयाहने अहाबास
म्हटले, “जा, खा व पी, कारण मला मुसळधार पावसाचा आवाज येत
आहे.” 42 म्हणून अहाब खाण्यापिण्यास गेला, परंतु एलीयाह कर्मेल
डोंगराच्या माथ्यावर गेला आणि त्याने जमिनीपर्यंत लवून आपले तोंड
आपल्या गुडघ्यांमध्ये घातले. 43 तो आपल्या सेवकास म्हणाला, “जा
आणि समुद्राकडे दृष्टी लाव.” तेव्हा तो गेला आणि त्याने पाहिले. तो
म्हणाला, “काही दिसत नाही.” सात वेळा एलीयाह म्हणाला, “परत
जा.” 44 सातव्या वेळेस सेवकाने सांगितले, “मनुष्याच्या हाताएवढा
लहानसा ढग समुद्रातून वर येत आहे.” एलीयाह म्हणाला, “जा आणि
अहाबाला सांग, ‘पावसाने तुला थांबविण्याआधी, रथ जुंपून खाली
जा.’” 45 थोड्याच वेळात, आकाश काळ्या ढगांनी भरले, वारा वाहू
लागला आणि मुसळधार पाऊस सुरू झाला आणि अहाब रथात बसून
येज्रील येथे निघाला. 46 याहवेहचे सामर्थ्य एलीयाहवर आले आणि तो
आपली कंबर बांधून अहाबापुढे येज्रीलपर्यंत धावत गेला.

**19** एलीयाहने जे काही केले आणि त्याने बआलाच्या सर्व संदेष्ट्यांना
तलवारीने कसे मारून टाकले ते अहाबाने ईजबेलला सांगितले.
2 तेव्हा ईजबेलने एलीयाहकडे असे म्हणत एक दूत पाठवला, “उद्या
या वेळेपर्यंत मी त्यांच्यातील एकाप्रमाणे तुझ्या जिवाचे केले नाही तर
देव माझे त्याहूनही अधिक वाईट करो.” 3 एलीयाह घाबरून आपला
जीव घेऊन पळून गेला. जेव्हा तो यहूदीया प्रांतातील बेअर-शेबा नगरात
आला, त्याने आपल्या सेवकाला तिथे सोडले, 4 तो स्वतः एक दिवसाचा
प्रवास करीत रानात गेला, तो रतामाच्या झुडूपाखाली आला आणि मरून
जावे म्हणून तिथे बसून प्रार्थना केली. “हे याहवेह आता पुरे आहे, माझा
प्राण घ्या, मी माझ्या पूर्वजांपेक्षा चांगला आहे असे नाही.” 5 नंतर तो
त्या रतामाच्या झुडूपाखाली पडून झोपी गेला. अचानक परमेश्वराच्या
दूताने येऊन त्याला स्पर्श करीत म्हटले, “ऊठ आणि खा.” 6 त्याने
सभोवती पाहिले, आणि त्याच्या उशाशी निखाऱ्यावर भाजलेल्या काही
भाकरी आणि पाण्याचे एक भांडे ठेवलेले होते. तो भाकर खाऊन
पाणी प्याला आणि पुन्हा झोपी गेला. 7 याहवेहचा दूत परत दुसऱ्यांदा
त्याच्याकडे आला आणि त्याला स्पर्श करून म्हणाला, “ऊठ आणि खा,
कारण तुला फार लांबचा प्रवास करावयाचा आहे.” 8 तेव्हा त्याने उठून
अन्नपाणी घेतले. त्या अन्नाच्या शक्तीवर चाळीस दिवस व चाळीस रात्री
प्रवास करीत होरेब, तो परमेश्वराच्या डोंगराकडे पोहोचला. 9 तिथे तो
गुहेत जाऊन रात्रभर तिथेच राहिला. आणि याहवेहचे वचन त्याच्याकडे
आले: “एलीयाह, तू येथे काय करीत आहेस?” 10 एलीयाह म्हणाला,
“सर्वसमर्थ याहवेह परमेश्वरासाठी मी फार ईर्ष्यावान आहे. इस्राएली
लोकांनी आपला करार नाकारला आहे, आपल्या वेद्या फोडल्या आहेत
आणि आपल्या संदेष्ट्यांना तलवारीने मारून टाकले आहे. मी एकटाच
उरलो आहे आणि आता ते मला सुद्धा मारण्याचा प्रयत्न करीत आहेत.”
11 याहवेहने त्याला म्हटले, “बाहेर जा आणि याहवेहच्या उपस्थितीत
डोंगरावर उभा राहा, कारण याहवेह तिथून जाणार आहेत.” तेव्हा मोठ्या
व शक्तिशाली वाऱ्याने डोंगर याहवेहसमोर दुभागले आणि खडक फोडले,
परंतु याहवेह त्या वाऱ्यात नव्हते. त्या वाऱ्यानंतर भूमिकंप झाला, परंतु
याहवेह त्या भूमिकंपात देखील नव्हते. 12 भूमिकंपानंतर अग्नी आला,
परंतु त्या अग्नीतही याहवेह नव्हते. आणि त्या अग्नीनंतर एक शांत
वाणी झाली. 13 जेव्हा एलीयाहने ही वाणी ऐकली, त्याने आपल्या
झग्याने आपला चेहरा झाकून घेतला आणि बाहेर जाऊन गुहेच्या
तोंडाशी जाऊन उभा राहिला. मग ती वाणी त्याला म्हणाली, “एलीयाह,
तू येथे काय करीत आहेस?” 14 एलीयाह म्हणाला, “सर्वसमर्थ याहवेह
परमेश्वरासाठी मी फार ईर्ष्यावान आहे. इस्राएली लोकांनी आपला
करार नाकारला आहे, आपल्या वेद्या फोडल्या आहेत आणि आपल्या
संदेष्ट्यांना तलवारीने मारून टाकले आहे. मी एकटाच उरलो आहे आणि
आता ते मलाही मारण्याचा प्रयत्न करीत आहेत.” 15 याहवेहने त्याला
म्हटले, “तू आलास त्या मार्गाने परत दिमिष्काच्या वाळवंटाकडे जा.
आणि तिथे जाशील तेव्हा हजाएलचा अरामचा राजा म्हणून अभिषेक
कर. 16 आणि निमशीचा पुत्र येहूचा सुद्धा इस्राएलचा राजा म्हणून
अभिषेक कर व आबेल-महोलाह येथील शाफाटचा पुत्र अलीशाचा
तुझा वारस म्हणून संदेष्टा होण्यास अभिषेक कर. 17 हजाएलच्या
तलवारीपासून जो कोणी निसटेल त्याला येहू मारून टाकेल आणि
जे येहूच्या तलवारीपासून निसटतील त्यांना अलीशा जिवे मारेल. 18
तथापि बआलच्या पुढे गुडघे टेकले नाहीत किंवा आपल्या मुखाने त्याचे
चुंबन घेतले नाही, असे सात हजार लोक मी इस्राएलात राखून ठेवले
आहेत.” 19 म्हणून एलीयाह तिथून निघाला आणि त्याला शाफाटचा
पुत्र अलीशा दिसला. नांगराला बारा बैल जुंपून तो नांगरणी करीत होता
आणि तो स्वतः बाराव्या बैलाच्या जोडीवर होता. एलीयाह त्याच्याकडे

गेला व आपला झगा त्याच्यावर टाकला. 20 तेव्हा अलीशाने आपले
बैल सोडले आणि एलीयाहच्या मागे धावून गेला. तो म्हणाला, “मला
माझ्या आईपित्याचे चुंबन घेऊ दे, मग मी आपल्याबरोबर येईन.”
एलीयाहने उत्तर दिले, “परत जा, मी तुला काय केले?” 21 तेव्हा
अलीशा त्याच्यापासून निघून परतला. त्याने आपल्या बैलाची एक
जोडी घेतली आणि ती कापली. त्याने नांगरणीची साधने पेटवून त्यावर
मांस शिजविले आणि लोकांना दिले आणि त्यांनी ते खाल्ले. मग तो
एलीयाहचा अनुयायी होण्यास निघाला आणि त्याचा सेवक झाला.

**20** अरामचा राजा बेन-हदादाने आपले सैन्य एकत्र केले. त्याच्याबरोबर
बत्तीस राजे आपआपले घोडे व रथ घेऊन त्यांनी शोमरोनला वेढा
घालून त्यावर हल्ला केला. 2 त्याने इस्राएलचा राजा अहाब याच्याकडे
शहरात असे सांगत दूत पाठवले, 3 “बेन-हदाद असे म्हणतो: ‘तुझे
चांदी व सोने माझे आहेत, तुझ्या उत्तम स्त्रिया आणि लेकरे ही सुद्धा
माझी आहेत.’” 4 इस्राएलच्या राजाने उत्तर दिले, “माझ्या स्वामी,
आपल्या म्हणण्याप्रमाणे मी व माझे जे काही आहे ते सर्व आपलेच
आहे.” 5 दूत पुन्हा येऊन म्हणाले, “बेन-हदाद असे म्हणतो: ‘तुझी
चांदी व सोने, तुझ्या स्त्रिया व लेकरे यांना माझ्या स्वाधीन करावे
म्हणून सांगितले होते. 6 परंतु उद्या याच वेळी तुझ्या राजवाड्यात व
तुझ्या अधिकाऱ्यांच्या घरात शोध करावा म्हणून मी माझे अधिकारी
पाठवेन. तुझे जे काही मौल्यवान आहे ते सर्व ते घेऊन जातील.’” 7
तेव्हा इस्राएलच्या राजाने देशातील वडील लोकांना बोलाविले व म्हटले,
“पाहा हा मनुष्य कसा त्रास देऊ इच्छित आहे! त्याने जेव्हा माझ्या
स्त्रिया आणि माझी लेकरे, माझी चांदी व सोने मागवून घेतली, मी
त्याला नकार दिला नाही.” 8 वडील आणि सर्व लोकांनी उत्तर दिले,
“आपण त्याचे ऐकू नये किंवा त्याच्या मागण्यांना सहमत होऊ नये.” 9
तेव्हा त्याने बेन-हदादच्या दूतांना उत्तर दिले, “माझ्या स्वामीला सांगा,
‘पहिल्याने आपण जी मागणी केली होती त्यानुसार आपला हा सेवक
करेल, परंतु ही मागणी मी पूर्ण करू शकत नाही.’” त्यांनी परत जाऊन
हा संदेश बेन-हदादकडे पोहोचविला. 10 तेव्हा बेन-हदादने अहाबास
आणखी एक संदेश पाठवला: “जर माझ्या माणसांसाठी शोमरोनात
मूठभर माती जरी पुरेशी पडली तरी देव माझे तसे किंवा त्यापेक्षा
अधिक वाईट करो.” 11 इस्राएलच्या राजाने उत्तर दिले, “त्याला सांगा:
‘युद्धासाठी शस्त्रधारण करणाऱ्याने शस्त्र उतरविणाऱ्याप्रमाणे फुशारकी
मारू नये.’” 12 बेन-हदाद आणि इतर राजे आपल्या तंबूमध्ये मद्य पीत
असताना त्याने ही बातमी ऐकली आणि त्याने त्याच्या माणसांना आज्ञा
दिली: “हल्ल्यासाठी तयारी करा.” म्हणून शहरावर हल्ला करण्यास
त्यांनी तयारी केली. 13 त्या दरम्यान इस्राएलचा राजा अहाबकडे एक
संदेष्टा आला व त्याने असे जाहीर केले, “याहवेह असे म्हणतात: ‘हे
मोठे सैन्य तू पाहतोस काय? आज ते मी तुझ्या हाती देईन, मग तू
जाणशील की मी याहवेह आहे.’” 14 “परंतु हे कोण करेल?” अहाबाने
विचारले. संदेष्ट्याने उत्तर दिले, “याहवेह असे म्हणतात: ‘राज्यपालांच्या
हाताखाली काम करणारे कनिष्ठ सैनिक हे करतील.’” अहाबाने विचारले,
“आणि युद्धाची सुरुवात कोण करणार?” संदेष्ट्याने म्हटले, “सुरुवात
तू करणार.” 15 तेव्हा अहाबाने राज्यपालांच्या हाताखाली असलेल्या
दोनशे बत्तीस कनिष्ठ सैन्यांना बोलावून घेतले. मग त्याने सर्व इस्राएली
लोकांना जमा केले, ते सर्व सात हजार होते. 16 मध्यान्हाच्या वेळी, बेन-
हदाद आणि त्याच्याबरोबर हात मिळविलेले बत्तीस राजे त्यांच्या तंबूंमध्ये
मद्यधुंद झालेले होते. 17 राज्यपालांच्या हाताखाली असलेले कनिष्ठ
सैनिक प्रथम बाहेर पडले. आता बेन-हदादने टेहळणीसाठी पाठविलेल्या
सैनिकांनी येऊन सांगितले, “शोमरोनातून माणसे निघाली आहेत.” 18
तेव्हा तो म्हणाला, “जर ते शांतीने येत आहेत तर त्यांना जिवंत पकडा;
जर ते युद्धासाठी येत आहेत तरीही त्यांना जिवंत पकडा.” 19 तेव्हा
राज्यपालांच्या हाताखाली असलेले कनिष्ठ सैनिक नगरातून बाहेर पडले
आणि त्यांच्यामागे सैन्य निघाले. 20 आणि त्या प्रत्येकाने आपआपल्या
विरोधकांना मारून टाकले; आणि अरामी लोकांनी पळ काढला आणि
इस्राएली लोकांनी त्यांचा पाठलाग केला. पण अरामचा राजा बेन-हदाद
आपल्या काही घोडेस्वारांबरोबर घोड्यावर स्वार होऊन निसटून गेला.
21 इस्राएलच्या राजाने जाऊन त्यांच्या घोड्यांना व रथांना गाठले आणि
अराम्यांचे मोठे नुकसान केले. 22 त्यानंतर, संदेष्ट्याने इस्राएलच्या
राजाकडे येऊन म्हटले, “आपणास बळकट करा आणि काय करावे हे
जपून पाहा, कारण पुढील वसंतऋतूमध्ये अरामचा राजा पुन्हा तुझ्यावर
हल्ला करेल.” 23 त्या दरम्यान, अरामाच्या राजाच्या अधिकाऱ्यांनी
त्याला सल्ला दिला, “त्यांची दैवते, डोंगरावरील दैवते आहेत. म्हणून
ते आपल्यासमोर अधिक प्रबळ ठरले. परंतु आपण त्यांच्याशी जर
मैदानावर लढलो, तर आपण त्यांच्यावर प्रबळ ठरू. 24 मात्र असे करा:
की राजांना बाजूला काढा व त्यांच्या जागी इतर राज्यपालांची नेमणूक
करा. 25 तुमचे जे सैन्य नष्ट झाले, त्यासारखे दुसरे सैन्य; घोड्यासाठी
घोडा व रथासाठी रथ तयार करा; म्हणजे आपण मैदानावर इस्राएलशी
लढू शकू आणि खचितच आपण त्यांच्यापेक्षा अधिक प्रबळ होऊ.”
त्यांच्याशी सहमत होऊन त्यानुसार त्याने केले. 26 पुढील वसंतऋतूत
बेन-हदादने अरामी लोकांना जमा केले आणि ते इस्राएलशी लढण्यास
अफेक येथे गेले. 27 जेव्हा इस्राएली लोकसुद्धा एकत्र होऊन आपला
अन्नसामुग्रींचा पुरवठा करून त्यांचा सामना करण्यास निघाले. इस्राएली
लोकांनी शेळयांच्या दोन लहान कळपांप्रमाणे त्यांच्यासमोर तळ दिला
आणि अरामी लोकांनी सर्व प्रदेशाला व्यापून टाकले होते. 28 परमेश्वराचा
एक मनुष्य आला आणि त्याने इस्राएलच्या राजाला सांगितले, “याहवेह
असे म्हणतात: ‘कारण अरामी लोकांना वाटते की याहवेह डोंगरावरील
दैवत आहे, तळवटीचा नाही, म्हणून मी हे मोठे सैन्य तुझ्या हाती देईन
आणि तुम्ही जाणाल की मीच याहवेह आहे.’” 29 सात दिवसापर्यंत
त्यांनी एकमेकांसमोर तळ दिला आणि सातव्या दिवशी लढाई सुरू
झाली. इस्राएली लोकांनी एका दिवसात एक लाख अरामी पायदळी
सैन्याला मारून टाकले. 30 बाकीचे लोक अफेक शहरात पळून गेले,
तिथे सत्तावीस हजार लोकांवर भिंत कोसळून पडली आणि बेन-हदाद
शहरात पळून जाऊन एका आतील खोलीत लपून राहिला. 31 त्याचे

अधिकारी त्याला म्हणाले, “पाहा, आम्ही असे ऐकले आहे की इस्राएली
राजे फार दयाळू असतात. तर आपण आपल्या कंबरेस गोणपाट नेसून
आणि आपल्या डोक्याला दोरी बांधून इस्राएलच्या राजाकडे जाऊ,
कदाचित तो तुझा जीव वाचवेल.” 32 तेव्हा आपल्या कंबरेला गोणपाट
नेसून व डोक्याला दोरी बांधून, ते इस्राएलच्या राजाकडे गेले व म्हणाले,
“आपला सेवक बेन-हदाद म्हणतो: ‘कृपया मला जीवनदान द्यावे.’”
राजाने म्हटले, “तो अजूनही जिवंत आहे काय? तो तर माझा भाऊ
आहे.” 33 त्या माणसांनी हे चांगले चिन्ह असे समजून अहाबाचा
शब्द चटकन पकडून ते म्हणाले, “होय, आपला भाऊ बेन-हदाद!”
राजाने म्हटले, “जा आणि त्याला घेऊन या,” जेव्हा बेन-हदाद बाहेर
आला, अहाबाने त्याला आपल्या रथात घेतले. 34 बेन-हदाद म्हणाला,
“माझ्या पित्याने जी शहरे आपल्या पित्याकडून घेतली ती सर्व मी
आपणास परत करेन. माझ्या पित्याने जशा शोमरोनात वसविल्या
तशाच बाजारपेठा आपण दिमिष्कात वसवा.” अहाब म्हणाला, “या
करारावर मी तुला मोकळे करतो.” म्हणून त्याने त्याच्याशी करार केला
व त्याला सोडून दिले. 35 याहवेहच्या शब्दानुसार संदेष्ट्यांच्या एका
मंडळीतील एक संदेष्टा आपल्या साथीदाराला म्हणाला, “आपल्या
शस्त्राने माझ्यावर वार कर,” परंतु त्याने नकार दिला. 36 तेव्हा संदेष्टा
म्हणाला, “कारण तू याहवेहचा शब्द मानला नाहीस, तू माझ्यापासून
जाताच एक सिंह तुला मारून टाकील.” आणि तो मनुष्य जाताच
सिंहाने त्याला गाठले व मारून टाकले. 37 मग संदेष्ट्याने आणखी एका
मनुष्याला म्हटले, “कृपया माझ्यावर वार कर.” तेव्हा त्या मनुष्याने
त्याच्यावर वार करून त्याला जखमी केले. 38 नंतर संदेष्टा जाऊन
राजाची वाट पाहत रस्त्याच्या कडेला उभा राहिला. त्याने आपल्या
पागोट्याने आपले डोळे झाकून घेऊन आपले रूप बदलले होते. 39 राजा
जवळून जात असता, संदेष्ट्याने त्याला हाक मारीत म्हटले, “आपला
सेवक युद्धभूमीवर गेला असता, एक मनुष्य एका कैद्याला माझ्याकडे
घेऊन आला व म्हणाला, ‘या माणसावर लक्ष ठेव, तो जर गायब झाला,
तर त्याच्या जिवासाठी तुला आपला जीव द्यावा लागेल, नाहीतर त्याचा
मोबदला म्हणून तुला चांदीचा एक तालांत भरावा लागेल.’ 40 आपला
सेवक इकडे तिकडे व्यस्त असताना, तो मनुष्य गायब झाला.” “आपली
शिक्षा हीच असणार,” इस्राएलचा राजा म्हणाला. “तू आपल्याच
मुखाने ती सांगितली आहे.” 41 तेव्हा संदेष्ट्याने चटकन आपल्या
डोळयांवरील पागोटाची पट्टी काढली, आणि तो संदेष्ट्यांपैकी एक
आहे असे इस्राएलच्या राजाने ओळखले. 42 संदेष्टा राजाला म्हणाला,
“याहवेह असे म्हणतात: ‘ज्या मनुष्याने मरावे असे मी योजले होते,
त्याला तू मोकळे सोडले आहे. त्यामुळे त्याच्या जिवाबद्दल तुझा जीव,
त्याच्या लोकांसाठी तुझे लोक जातील.’” 43 तेव्हा इस्राएलचा राजा
खिन्न व रागाने भरून शोमरोनातील आपल्या राजवाड्याकडे गेला.

**21** काही काळानंतर, येज्रीली नाबोथच्या द्राक्षमळयासंबंधी एक
घटना घडली, हा द्राक्षमळा अहाब राजाच्या शोमरोनातील
येज्रील राजवाड्याजवळ होता. 2 अहाब नाबोथला म्हणाला, “तुझ्या
द्राक्षमळयात मला भाजीपाल्याची बाग करू दे, कारण तो माझ्या
राजवाड्याजवळ आहे. त्याचा मोबदला म्हणून मी तुला त्याहून चांगला
द्राक्षमळा देईन किंवा तुझी इच्छा असली तर त्याचे योग्य मोल मी तुला
देईन.” 3 परंतु नाबोथने अहाबाला उत्तर दिले, “माझ्या पूर्वजांचे वतन
मी तुला द्यावे असे याहवेह माझ्या हातून कधी न घडवो.” 4 त्यामुळे
अहाब खिन्न व रागाने भरून आपल्या घरी गेला कारण येज्रीली नाबोथने
त्याला म्हटले, “माझ्या पूर्वजांचे वतन मी तुला देणार नाही.” अहाब
रुसून व अन्न खाण्यास नाकारीत आपल्या बिछान्यावर पडून राहिला. 5
तेव्हा त्याची पत्नी ईजबेल आत आली व त्याला विचारले, “तुम्ही इतके
खिन्न का आहात? तुम्ही अन्न का खात नाही?” 6 तो तिला म्हणाला,
“कारण येज्रीली नाबोथला मी म्हणालो, ‘तुझा द्राक्षमळा मला विकत दे;
नाहीतर तुझी इच्छा असली तर, त्याबदल्यात त्याच किमतीत मी तुला
दुसऱ्या ठिकाणी द्राक्षमळा देईन.’ परंतु तो म्हणाला, ‘मी तुला माझा
द्राक्षमळा देणार नाही.’” 7 त्याची पत्नी ईजबेल म्हणाली, “इस्राएलचा
राजा असताना तुमचे वर्तन असे असावे काय? उठा आणि भोजन करा!
आपले मन आनंदित करा. येज्रीली नाबोथचा द्राक्षमळा मी तुम्हाला
मिळवून देईन.” 8 मग तिने अहाबाच्या नावाने पत्रे लिहिली, त्यावर
त्याचा शिक्का मारला आणि नाबोथच्या शहरात त्याच्याबरोबर राहत
असलेले वडीलजन व प्रतिष्ठित लोकांकडे ती पाठवली. 9 त्या पत्रांमध्ये
तिने लिहिले: “शहरात उपास जाहीर करा आणि नाबोथला सर्वात
महत्त्वाच्या स्थळी बसवा. 10 परंतु त्याच्यासमोर दोन अधम व्यक्तींना
बसवावे आणि ज्या परमेश्वराने आशीर्वाद दिला त्यांना व राजाला शाप
दिल्याचा आरोप त्याच्यावर आणावा. मग त्याला बाहेर नेऊन तो मरेपर्यंत
धोंडमार करा.” 11 तेव्हा नाबोथच्या शहरात राहत असलेल्या वडीलजन
व प्रतिष्ठित लोकांनी ईजबेलने लिहिलेल्या पत्रांमध्ये सांगितल्याप्रमाणे
केले. 12 त्यांनी उपास जाहीर केला व लोकांमधील अगदी महत्त्वाच्या
स्थळी नाबोथला बसविले. 13 मग दोन अधम व्यक्ती त्याच्यासमोर येऊन
बसले आणि लोकांसमक्ष नाबोथविरुद्ध आरोप आणले. ते म्हणाले,
“नाबोथने परमेश्वराला व राजाला शाप दिला आहे.” म्हणून त्यांनी
त्याला शहराच्या बाहेर नेले आणि तो मरेपर्यंत त्याला धोंडमार केली. 14
नंतर त्यांनी ईजबेलला निरोप पाठवून म्हटले: “नाबोथला धोंडमार करून
जिवे मारले आहे.” 15 येज्रीली नाबोथला धोंडमार करून मारले आहे हे
ईजबेलने ऐकताच, ती अहाबाला म्हणाली, “उठा आणि ज्या येज्रीली
नाबोथने तुम्हाला आपला द्राक्षमळा पैसे घेऊन देण्यास नाकारले त्याचा
द्राक्षमळा ताब्यात घ्या. तो आता जिवंत नाही, तो मेला आहे.” 16
येज्रीली नाबोथ मेला आहे असे जेव्हा अहाबाने ऐकले, तेव्हा तो उठला व
नाबोथचा द्राक्षमळा ताब्यात घेण्यास निघाला. 17 त्यानंतर तिश्बीचा
एलीयाहकडे याहवेहचे वचन आले: 18 “खाली जाऊन इस्राएलचा
राजा अहाब, जो शोमरोनमध्ये राज्य करतो त्याला भेट, आता तो
नाबोथच्या द्राक्षमळयात आहे, तो आपल्या ताब्यात घ्यावा म्हणून तो
तिथे गेला आहे. 19 त्याला सांग, ‘याहवेह असे म्हणतात: तू एका
मनुष्याचा खून करून त्याची मालमत्ता ताब्यात घेतली नाही काय?’

तेव्हा त्याला सांग, ‘याहवेह असे म्हणतात: ज्या ठिकाणी कुत्र्यांनी
नाबोथचे रक्त चाटले, त्याच ठिकाणी कुत्रे तुझे रक्त; होय, तुझेच रक्त
चाटतील!’” 20 अहाब एलीयाहला म्हणाला, “हे माझ्या वैऱ्या, शेवटी तू
मला शोधलेच!” तो म्हणाला, “मी तुला शोधलेच, कारण याहवेहच्या
दृष्टीत जे वाईट ते करण्यास तू स्वतःस विकून टाकले आहेस. 21
याहवेह म्हणतात, ‘मी तुझ्यावर अरिष्ट आणणार आहे. मी तुझी संतती
नष्ट करून टाकीन व इस्राएलात अहाबाच्या कुटुंबातून प्रत्येक शेवटचा
पुरुष; तो गुलाम असो किंवा स्वतंत्र असो, तो मी उपटून टाकीन. 22
मी तुझ्या कुटुंबाचे नेबाटाचा पुत्र यरोबोअम व अहीयाहचा पुत्र बाशा
यांच्याप्रमाणे करेन, कारण तू माझा क्रोध भडकविला आहेस आणि
इस्राएलास पाप करण्यास भाग पाडले आहे.’ 23 “आणि ईजबेलविषयी
याहवेह म्हणतात: ‘येज्रीलच्या भिंतीजवळ ईजबेलला कुत्रे खातील.’ 24
“अहाबाच्या संबंधातील लोक जे शहरात मरतील त्यांना कुत्रे खातील,
आणि वेशीच्या बाहेर जे मरतील त्यांना आकाशातील पक्षी खातील.” 25
(अहाबासारखा कोणी कधीही झाला नाही, ज्याने आपली पत्नी ईजबेल
हिच्या सांगण्यानुसार, याहवेहच्या दृष्टीत जे वाईट ते करण्यास स्वतःला
विकून टाकले. 26 याहवेहने इस्राएली लोकांच्या पुढून घालवून दिलेल्या
अमोरी लोकांप्रमाणे त्याने मूर्तींच्या मागे लागून अमंगळ कृत्ये केली.) 27
अहाबाने जेव्हा हे शब्द ऐकले, त्याने आपली वस्त्रे फाडली व गोणपाट
नेसून उपास केला. तो गोणपाटात राहून दीनपणे जगू लागला. 28 नंतर
एलीयाह तिश्बीकडे याहवेहचे वचन आले: 29 “अहाब माझ्यासमोर
कसा नम्र झाला आहे हे तुला दिसते का? कारण त्याने स्वतःला नम्र
केले आहे, म्हणून हे अरिष्ट मी तो जिवंत असताना आणणार नाही, परंतु
ते मी त्याच्या घराण्यावर त्याच्या पुत्राच्या काळात आणेन.”

**22** पुढील तीन वर्षात अराम व इस्राएलमध्ये युद्ध झाले नाही. 2 पण
तिसऱ्या वर्षी यहूदीयाचा राजा यहोशाफाट इस्राएलच्या राजाला
भेटण्यास गेला. 3 इस्राएलचा राजा आपल्या अधिकाऱ्यांना म्हणाला,
“रामोथ गिलआद आपलेच आहे हे तुम्हाला ठाऊक नाही काय आणि
तरीही अरामाच्या राजाकडून ते परत घेण्यास आपण काहीही का करत
नाही?” 4 तेव्हा त्याने यहोशाफाटला विचारले, “तुम्ही माझ्याबरोबर
रामोथ गिलआदविरुद्ध युद्ध करण्यासाठी जाल का?” यहोशाफाटने
इस्राएलच्या राजाला उत्तर दिले, “तुम्ही जसे आहात तसाच मी आहे
आणि माझे लोक तुमचे लोक आहेत, जसे माझे घोडे तसेच ते तुमचेही
घोडे आहेत.” 5 परंतु यहोशाफाट इस्राएलच्या राजाला असे सुद्धा
म्हणाला, “प्रथम याहवेहचा सल्ला घ्या.” 6 तेव्हा इस्राएलच्या राजाने
सुमारे चारशे संदेष्ट्यांना एकत्र बोलाविले आणि त्यांना विचारले,
“मी रामोथ-गिलआदच्या विरुद्ध युद्धास जावे की नाही?” ते म्हणाले,
“जा, कारण प्रभू ते राजाच्या हाती देतील.” 7 परंतु यहोशाफाटने
विचारले, “आपण विचारावे असा याहवेहचा एकही संदेष्टा येथे नाही
काय?” 8 इस्राएलचा राजा यहोशाफाटला म्हणाला, “ज्याच्याद्वारे
आपण याहवेहचा सल्ला घेऊ शकतो असा एक संदेष्टा अजूनही आहे,
परंतु तो माझ्याविषयी कधीही चांगला संदेश देत नाही, नेहमीच वाईट
संदेश देतो, म्हणून मला त्याचा तिरस्कार वाटतो. तो इम्लाहचा पुत्र
मिखायाह आहे.” यहोशाफाटने उत्तर दिले, “राजाने असे बोलू नये.” 9
तेव्हा इस्राएलच्या राजाने आपल्या एका अधिकाऱ्याला बोलाविले व
म्हटले, “लवकर जाऊन इम्लाहचा पुत्र मिखायाह याला घेऊन ये.” 10
इस्राएलचा राजा आणि यहूदीयाचा राजा यहोशाफाट आपली राजवस्त्रे
परिधान करून शोमरोनाच्या प्रवेशद्वाराजवळील खळयाजवळ त्यांच्या
सिंहासनांवर बसले होते आणि संदेष्टे त्यांच्यासमोर संदेश देत होते. 11
तेव्हा केनानाहचा पुत्र सिद्कीयाह याने लोखंडाची शिंगे तयार केली
होती आणि त्याने जाहीर केले, “याहवेह असे म्हणतात: ‘या शिंगांनी तू
अरामी लोकांवर असा वार करशील की त्यांचा नाश होईल.’” 12 इतर
सर्व संदेष्टे सुद्धा तीच भविष्यवाणी करीत होते, ते म्हणाले, “रामोथ-
गिलआदवर हल्ला करून विजयी हो, कारण याहवेह ते राजाच्या हाती
देणार आहे.” 13 जो दूत मिखायाहला बोलविण्यास गेला होता तो त्याला
म्हणाला, “पाहा, सर्व संदेष्टे राजाच्या यशासंबंधी भविष्य सांगत आहेत,
तुझे शब्द सुद्धा त्यांच्याशी सहमत होऊ दे आणि राजाच्या बाजूने चांगले
बोल.” 14 पण मिखायाह म्हणाला, “जिवंत याहवेहची शपथ, याहवेह
मला जे काही सांगतील तेच मी त्याला सांगेन.” 15 तो जेव्हा आला,
तेव्हा राजाने त्याला विचारले, “मिखायाह, आम्ही रामोथ गिलआदविरुद्ध
युद्धास जावे किंवा नाही?” त्याने उत्तर दिले, “हल्ला करून विजयी
व्हा, कारण याहवेह ते राजाच्या हाती देईल.” 16 राजाने त्याला म्हटले,
“मी तुला किती वेळा शपथ देऊन सांगावे की याहवेहच्या नावाने तू
मला केवळ जे सत्य तेच सांगावे?” 17 तेव्हा मिखायाहने उत्तर दिले,
“सर्व इस्राएल लोक मेंढपाळ नसलेल्या मेंढरांसारखे पर्वतांवर पांगलेले
आहेत असे मला दिसले आणि याहवेह म्हणाले, ‘या लोकांना धनी
नाही. प्रत्येकाला शांतीने आपआपल्या घरी जाऊ दे.’” 18 इस्राएलच्या
राजाने यहोशाफाटला म्हटले, “हा माझ्याविषयी कधीही चांगला संदेश
देत नाही तर वाईटच संदेश देतो असे मी तुला सांगितले नव्हते काय?”
19 मिखायाह पुढे म्हणाला, “तर आता याहवेहचे वचन ऐका: याहवेह
आपल्या सिंहासनावर बसलेले आणि स्वर्गातील सर्व समुदाय त्यांच्या
सभोवती डावीकडे व उजवीकडे उभा असलेला मला दिसला. 20
आणि याहवेहने म्हटले, ‘अहाबाने जाऊन रामोथ-गिलआदावर हल्ला
करून तिथे मरून पडावे म्हणून त्याला कोण मोह घालेल?’ “तेव्हा
एकाने एक तर दुसऱ्याने दुसरी मसलत दिली. 21 तेव्हा एक आत्मा
पुढे आला आणि याहवेहपुढे उभा राहिला आणि म्हणाला, ‘मी त्याला
मोहात पाडेन.’ 22 “याहवेहने विचारले, ‘तू हे कसे करशील?’ “तो
म्हणाला, ‘मी जाऊन त्याच्या सर्व संदेष्ट्यांच्या मुखात फसविणारा
आत्मा होईन.’ “याहवेहने म्हटले, ‘तू त्याला मोहात पाडण्यास यशस्वी
होशील. जा आणि तसे कर.’ 23 “तर आता पाहा, याहवेहने तुझ्या
या सर्व संदेष्ट्यांच्या मुखात फसविणारा आत्मा घातला आहे. आणि
तुझ्यावर अरिष्ट यावे असे याहवेह बोलले आहेत.” 24 तेव्हा केनानाहचा
पुत्र सिद्कीयाह उठला व मिखायाहच्या गालावर चापट मारत विचारले,
“याहवेहचा आत्मा माझ्यामधून निघून तुझ्याशी बोलायला कोणत्या

मार्गाने गेला?” 25 मिखायाहने उत्तर दिले, “ज्या दिवशी तू घराच्या
आतील खोलीत जाऊन लपशील तेव्हा तुला ते समजेल.” 26 तेव्हा
इस्राएलच्या राजाने आज्ञा दिली, “मिखायाहला घ्या आणि शहराचा
अधिकारी आमोन व राजपुत्र योआश यांच्याकडे त्याला परत पाठवा 27
आणि त्यांना सांगा, ‘राजा असे म्हणतात: या मनुष्याला तुरुंगात टाका
आणि मी सुखरुप परत येईपर्यंत त्याला केवळ भाकर आणि पाणी
द्या.’” 28 तेव्हा मिखायाह म्हणाला, “तू जर सुखरुप परत आलास तर
याहवेह माझ्याद्वारे बोललेच नाही असे समजावे.” तो पुढे म्हणाला,
“लोकांनो, तुम्ही सर्वजण हे लक्षात ठेवा!” 29 यानंतर इस्राएलचा
राजा व यहूदीयाचा राजा यहोशाफाट हे रामोथ गिलआद येथे गेले.
30 इस्राएलचा राजा यहोशाफाटला म्हणाला, “मी वेश बदलून युद्धात
प्रवेश करेन, परंतु तुम्ही तुमची राजवस्त्रे घाला.” म्हणून इस्राएलच्या
राजा वेश बदलून युद्धात गेला. 31 आता अरामाच्या राजाने आपल्या
बत्तीस रथांच्या सरदारांना आज्ञा दिली होती, “इस्राएलच्या राजाशिवाय
कोणत्याही लहान थोरांशी लढू नका.” 32 रथांच्या सरदारांनी जेव्हा
यहोशाफाटला पाहिले, तेव्हा त्यांना वाटले, “हा खचितच इस्राएलचा
राजा आहे.” म्हणून ते त्याच्यावर हल्ला करण्यास वळले, पण जेव्हा
यहोशाफाट मोठ्याने रडला, 33 आणि रथांच्या सरदारांनी पाहिले की तो
इस्राएलचा राजा नाही तेव्हा त्यांनी त्याचा पाठलाग करण्याचे थांबविले.
34 पण कोणीतरी सहजच आपला बाण सोडला आणि तो जाऊन
इस्राएलच्या राजाच्या चिलखतामधून गेला. राजाने आपल्या रथस्वाराला
सांगितले, “रथ मागे फिरव आणि मला युद्धातून बाहेर काढ कारण
मी घायाळ झालो आहे.” 35 तो संपूर्ण दिवस युद्ध वाढत गेले आणि
अराम्यांचा सामना करीत राजा रथातच राहिला. त्याच्या जखमेतून
रक्त वाहत रथाच्या तळाशी साचले आणि त्या संध्याकाळी तो मरण
पावला. 36 सूर्य मावळत असताना, सैन्यात एकच घोषणा झाली:
“प्रत्येकाने आपआपल्या नगरात जावे, प्रत्येकाने आपआपल्या देशात
जावे!” 37 राजा मरण पावला आणि त्याला शोमरोनात आणले व तिथे
त्याला पुरण्यात आले. 38 शोमरोनाच्या तळयाकडे (जिथे वेश्या आंघोळ
करीत असत), आणि याहवेहच्या वचनानुसार कुत्र्यांनी त्याचे रक्त चाटून
घेतले. 39 अहाबाच्या राज्याच्या इतर घटना आणि त्याने जे काही केले,
हस्तिदंताने मढविलेला जो राजवाडा त्याने बांधला, व ज्या शहरांचे
तट त्याने बांधले ते सर्व इस्राएलच्या राजांच्या इतिहासाच्या पुस्तकात
लिहिल्या गेले नाही काय? 40 अहाब आपल्या पूर्वजांबरोबर विसावा
पावला आणि त्याचा पुत्र अहज्याह त्याचा वारस म्हणून राजा झाला.
41 इस्राएलचा राजा अहाबाच्या चौथ्या वर्षी आसाचा पुत्र यहोशाफाट
यहूदीयाचा राजा झाला. 42 यहोशाफाट राजा झाला तेव्हा तो पस्तीस
वर्षांचा होता आणि त्याने यरुशलेमात पंचवीस वर्षे राज्य केले. त्याच्या
आईचे नाव अजुबाह होते, जी शिल्हीची कन्या होती. 43 त्याने आपला
पिता आसाचे सर्व मार्गात अनुसरण केले आणि त्यापासून तो वळला
नाही; याहवेहच्या दृष्टीने जे योग्य ते त्याने केले. तरी त्याने डोंगरावरील
उच्चस्थळे नष्ट केली नव्हती आणि लोक तिथे जाऊन यज्ञ करीत व धूप
जाळीत असत. 44 यहोशाफाट व इस्राएलचा राजा यांच्यात शांती होती.
45 यहोशाफाटच्या राज्याच्या इतर घटना, त्याने हस्तगत केलेल्या गोष्टी,
त्याचे लष्करी कार्य या सर्वांचे वर्णन यहूदीयाच्या राजांच्या पुस्तकात
केलेले नाही काय? 46 त्याचा पिता आसाच्या कारकिर्दीच्या नंतरही
चालू असलेली मंदिरातील पुरुषगामी यातून त्याने देशाला मुक्त केले. 47
त्यानंतर एदोमात राजा नव्हता; प्रांताधिकारी तेथील कारभार चालवित
होता. 48 ओफीर शहरातून सोने आणता यावे म्हणून यहोशाफाटने
व्यापारी जहाजे बांधली होती. पण ती एजिओन-गेबेर येथे फुटली,
त्यामुळे ती समुद्राची वाटचाल करू शकली नाहीत. 49 तेव्हा अहाबाचा
पुत्र अहज्याह यहोशाफाटला म्हणाला, “माझ्या माणसांना आपल्या
माणसांबरोबर जाऊ द्या.” पण यहोशाफाटने त्यास नकार दिला. 50
त्यानंतर यहोशाफाट आपल्या पूर्वजांबरोबर विसावा पावला आणि
त्याला त्यांच्याबरोबर त्याचा पिता दावीदाच्या शहरात पुरले. आणि
त्याचा पुत्र यहोराम त्याचा वारस म्हणून राजा झाला. 51 यहूदीयाचा
राजा यहोशाफाटच्या राज्याच्या सतराव्या वर्षी अहाबाचा पुत्र अहज्याह
हा शोमरोनात इस्राएलचा राजा झाला आणि त्याने इस्राएलवर दोन
वर्षे राज्य केले. 52 याहवेहच्या दृष्टीने जे वाईट ते त्याने केले, कारण
त्याने ज्यांनी इस्राएलास पाप करावयाला भाग पाडले असा आपला
पिता, आई व नेबाटाचा पुत्र यरोबोअम त्यांचे अनुसरण केले. 53 त्याने
बआलची सेवा व उपासना केली आणि आपल्या पित्याप्रमाणे याहवेह
इस्राएलच्या परमेश्वराचा क्रोध भडकविला.

# 2 राजे

**1** अहाब राजा मरण पावल्यानंतर मोआबाने इस्राएलविरुद्ध बंड केले.
2 अहज्याह, शोमरोन येथील आपल्या राजवाड्याच्या गच्चीवरून
खाली पडून जखमी झाला होता. तेव्हा त्याने आपल्या दूतांना हे सांगून
पाठविले, “जा आणि एक्रोनचे दैवत बाल-जबूबला विचारा की मी या
दुखण्यातून बरा होईन की नाही.” 3 परंतु याहवेहच्या दूताने तिश्बी
एलीयाहला निरोप देऊन म्हटले, “वर जा आणि शोमरोनाच्या राजाच्या
दूतांना भेट आणि त्यांना विचार, ‘इस्राएलमध्ये परमेश्वर नाही की काय,
म्हणून तुम्ही एक्रोनचे दैवत बाल-जबूब याला विचारावयास निघाले
आहात?’ 4 म्हणून याहवेह हे म्हणतात की: ‘ज्या अंथरुणावर तू पडला
आहेस, त्यावरून तू उठणार नाही. तू खात्रीने मरशील!’” मग एलीयाह
निघून गेला. 5 जेव्हा दूत राजाकडे परत गेले, तो त्यांना म्हणाला, “तुम्ही
का परत आलात?” 6 त्यांनी उत्तर दिले, “वाटेत आम्हाला एक मनुष्य
भेटण्यास आला, तो म्हणाला, ‘ज्या राजाने तुम्हाला पाठविले आहे
त्याच्याकडे परत जा आणि त्याला सांगा, “याहवेहचा हा संदेश आहे:
इस्राएलात परमेश्वर नाही म्हणून, तू एक्रोनच्या बाल-जबूब दैवताला प्रश्न
विचारतोस? म्हणून तू ज्या अंथरुणावर पडून आहेस, त्या अंथरुणावरून
उठणार नाहीस. तू खात्रीने मरशील!”’” 7 राजाने त्यांना विचारले,
“कोणत्या प्रकारचा हा व्यक्ती होता जो तुम्हाला भेटण्यास आला
आणि हे तुम्हाला सांगितले?” 8 त्यांनी उत्तर दिले, “त्या मनुष्याने
केसाळ झगा घातला होता आणि चामड्याचा कंबरपट्टा बांधलेला होता.”
राजाने म्हटले, “मग तो एलीयाह तिश्बीच असला पाहिजे.” 9 नंतर
राजाने आपल्या एका सेनाधिकाऱ्याला पन्नास शिपायांसह एलीयाहकडे
पाठविले. सेनाधिकारी एलीयाहकडे गेला जो एका डोंगराच्या शिखरांवर
बसलेला होता आणि त्याला म्हणाला, “हे परमेश्वराच्या मनुष्या, राजाने
आदेश दिला आहे, ‘खाली या!’” 10 एलीयाहने सेनाधिकाऱ्याला म्हटले,
“जर मी खराच परमेश्वराचा मनुष्य असेन, तर स्वर्गातून अग्नी उतरो
आणि तुला व तुझ्या पन्नास शिपायांना भस्म करो!” तेव्हा स्वर्गातून
अग्नी उतरला आणि सेनाधिकाऱ्यास व त्याच्या सर्व शिपायांना भस्म
केले. 11 तेव्हा राजाने आणखी दुसऱ्या एका सेनाधिकाऱ्यास पन्नास
शिपायांसह एलीयाहकडे पाठविले. सेनाधिकारी त्याला म्हणाला, “हे
परमेश्वराच्या मनुष्या, राजाने आदेश दिला आहे, ‘लवकर खाली उतरून
या!’” 12 एलीयाहने उत्तर दिले, “मी परमेश्वराचा मनुष्य असेन,
तर स्वर्गातून अग्नी उतरो आणि तुला व तुझ्या पन्नास शिपायांना
भस्म करो.” मग परमेश्वराचा अग्नी स्वर्गातून उतरला आणि त्याला
व त्याच्या पन्नास माणसांना भस्म केले. 13 यानंतर राजाने तिसऱ्या
सेनाधिकाऱ्यास त्याच्या पन्नास लोकांसोबत पाठविले. हा सेनाधिकारी
वर गेला आणि एलीयाहपुढे गुडघे टेकून त्याला विनंती केली. “हे
परमेश्वराच्या मनुष्या, तुमच्या दृष्टीत माझा जीव आणि या पन्नास
माणसांचा, जे तुमचे सेवक आहेत त्यांचा जीव मोलवान असो! 14
पाहा, स्वर्गातून अग्नी येऊन पहिल्या दोन्ही सेनाधिकाऱ्यांना आणि
त्यांच्या सर्व माणसांना भस्म केले. परंतु आता तुमच्या दृष्टीत माझा जीव
मोलवान असो!” 15 याहवेहच्या दूताने एलीयाहला म्हटले, “त्याला
भिऊ नकोस, त्याच्यासोबत खाली जा.” तेव्हा एलीयाह उठला आणि
त्याच्यासोबत राजाकडे गेला. 16 एलीयाहने राजाला सांगितले, याहवेह
हे म्हणतात: “इस्राएलात परमेश्वर नाही म्हणून, तू एक्रोनच्या बाल-जबूब
दैवताला प्रश्न विचारण्यास दूत पाठविले होते काय? हे कृत्य केल्यामुळे
तू या दुखण्यातून उठणार नाहीस; यातच तुला खात्रीने मरण येईल.”
17 एलीयाहद्वारे याहवेहने भविष्य केल्याप्रमाणे अहज्याह मरण पावला.
अहज्याहला पुत्र नव्हता म्हणून त्याचा भाऊ योराम राजा झाला. ही
घटना यहूदीयाचा राजा यहोशाफाटचा पुत्र यहोरामच्या कारकिर्दीच्या
दुसऱ्या वर्षी घडली. 18 अहज्याहच्या कारकिर्दीतील इतर घटना आणि
जे काही त्याने केले ते इस्राएलांच्या राजांच्या इतिहासग्रंथात लिहून
ठेवलेले नाही का?

**2** जेव्हा याहवेहने एलीयाहला वावटळीद्वारे स्वर्गात घेऊन जाण्याचा
समय आला. तेव्हा एलीयाह आणि अलीशा गिलगालहून निघाले
होते. 2 एलीयाहने अलीशाला म्हटले, “इथे थांब; याहवेहने मला
बेथेलला पाठवले आहे.” परंतु अलीशा म्हणाला, “जिवंत याहवेहची
शपथ आणि तुमच्या जीविताची शपथ मी आपणास सोडणार नाही.”
तेव्हा ते दोघे खाली बेथेलला गेले. 3 तिथे बेथेलातील संदेष्ट्यांचा
एक समूह अलीशाकडे आला आणि विचारले, “आज याहवेह तुझ्या
स्वामीला तुझ्यापासून घेऊन जाणार आहेत हे तुला ठाऊक आहे काय?”
अलीशाने उत्तर दिले, “हो मला माहीत आहे, म्हणून शांत राहा.” 4 नंतर
एलीयाह त्याला म्हणाला, “अलीशा तू येथेच राहा; कारण याहवेह मला
यरीहोस पाठवित आहे.” आणि त्याने म्हटले, “मी याहवेहची आणि
आपल्या जीविताची शपथ घेऊन सांगतो, मी तुम्हाला सोडणार नाही.”
तेव्हा ते दोघेही यरीहोला गेले. 5 तिथे यरीहोच्या संदेष्ट्यांचा एक समूह
अलीशास म्हणाला, “आज तुझ्या स्वामीला याहवेह तुझ्यापासून घेऊन
जाणार आहेत हे तुला ठाऊक आहे काय?” त्याने उत्तर दिले, “हो मला
माहीत आहे, म्हणून शांत राहा.” 6 मग एलीयाह अलीशास म्हणाला,
“तू येथेच राहा; कारण याहवेह मला यार्देनला पाठवित आहेत.” आणि
त्याने उत्तर दिले, “मी याहवेहची आणि आपल्या जीविताची शपथ घेऊन
सांगतो की मी तुम्हाला सोडणार नाही.” मग ते दोघेही पुढे चालले.
7 संदेष्ट्यांच्या सभेतील पन्नास लोकांचा समूह त्यांच्याजवळ आला
आणि दूर थांबला व जिथे एलीयाह आणि अलीशा यार्देनजवळ थांबले
होते, त्या दिशेने तोंड करून उभा राहिला. 8 तिथे एलीयाहने आपल्या
झग्याची घडी केली आणि ती पाण्यावर मारली. तेव्हा पाणी उजवीकडे
आणि डावीकडे दुभंगले आणि ते दोघे कोरड्या भूमीवरून चालत
पैलतीराला गेले. 9 ते पार गेल्यावर एलीयाह अलीशाला म्हणाला,
“मला तुझ्यापासून घेतले जाण्यापूर्वी मी तुझ्यासाठी काय करावे ते
मला सांग?” “अलीशाने उत्तर दिले, तुमच्यामध्ये असलेल्या आत्म्याचा
दुप्पट वाटा मला मिळावा.” 10 एलीयाह म्हणाला, “तू एक कठीण
गोष्ट मागितली आहेस; तरी देखील जेव्हा तू मला तुझ्यापासून दूर जात

असताना पाहिलेस, तर ते तुझे होईल; अन्यथा ते होणार नाही.” 11
ते एकत्र असे बोलत चालत असताना, अचानक अग्नीचे रथ आणि
अग्नीचे घोडे प्रगट झाले आणि त्या दोघांना एकमेकांपासून वेगळे केले
आणि वावटळीद्वारे एलीयाह स्वर्गात वर घेतला गेला. 12 अलीशाने हे
पाहिले आणि आरोळी मारली, “हे माझ्या पित्या! माझ्या पित्या! अहो
इस्राएलांच्या रथांनो आणि इस्राएलांच्या सारथ्यांनो!” आणि अलीशा
त्याला पुन्हा पाहू शकला नाही. तेव्हा अलीशाने आपला झगा फाडला
आणि त्याचे दोन तुकडे केले. 13 तेव्हा अलीशाने एलीयाहच्या अंगावरून
पडलेला झगा उचलला आणि तो यार्देन काठी परत गेला आणि उभा
राहिला. 14 त्याने एलीयाहच्या अंगावरून पडलेला झगा घेतला आणि
पाण्यावर मारला. “एलीयाहचा याहवेह परमेश्वर कुठे आहेत?” जेव्हा
त्याने झग्याने पाण्यावर मारले तेव्हा पाणी हे उजवीकडे आणि डावीकडे
दुभंगले आणि अलीशा पैलतीरावर गेला. 15 यरीहोतील संदेष्ट्यांचा एक
समूह, जो हे पाहत होता म्हणाला, “एलीयाहचा आत्मा अलीशावर
उतरला आहे.” ते त्याला भेटण्यास गेले आणि भूमीपर्यंत लवून त्याला
नमन केले. 16 ते त्याला म्हणाले, “पाहा, तुमच्या सेवकांकडे पन्नास
बळकट पुरुष आहेत. त्यांना जाऊ द्या आणि तुमच्या स्वामीचा शोध
घेऊ द्या. याहवेहच्या आत्म्याने त्यांना एखाद्या पर्वतशिखरावर, नाहीतर
एखाद्या दरीत नेऊन टाकले असेल.” अलीशा म्हणाला, “नको, त्यांना
पाठवू नका.” 17 परंतु त्यांनी त्याला लाजिरवाणे वाटेपर्यंत आग्रह केला.
तेव्हा तो म्हणाला, “त्यांना पाठवा.” आणि त्यांनी पन्नास पुरुषांना
पाठविले, ज्यांनी त्याचा तीन दिवस शोध घेतला, परंतु ते त्याला शोधू
शकले नाही. 18 जेव्हा ते अलीशाकडे परत आले, तेव्हा अलीशा
यरीहोतच होता, तो त्यांना म्हणाला, “तुम्ही जाऊ नका असे मी तुम्हाला
सांगितले नव्हते काय?” 19 नगरातील लोक अलीशाला म्हणाले,
“आमच्या प्रभू, जसे तुम्ही पाहत आहात, नगर उत्तम वसलेले आहे,
परंतु पाणी वाईट आहे आणि भूमी नापीक आहे.” 20 तो म्हणाला,
“मला एका नव्या वाटीत मीठ भरून आणून द्या.” त्याप्रमाणे त्यांनी
ते त्याच्याकडे आणून दिले. 21 मग तो पाण्याच्या झऱ्याजवळ गेला
आणि ते मीठ पाण्यात टाकून म्हणाला, “याहवेह असे म्हणतात: ‘मी
या पाण्याला बरे केले आहे. येथून पुढे या पाण्यामुळे मृत्यू येणार नाही
किंवा भूमी नापीक राहणार नाही.’” 22 आणि अलीशाने म्हटल्याप्रमाणे
ते पाणी शुद्ध झाले आणि आजवरही तसेच आहे. 23 नंतर अलीशा वर
बेथेलला गेला. तो रस्त्याने जात असताना, त्याच्या टक्कल पडलेल्या
डोक्याकडे पाहून नगरातील काही मुले त्याची टिंगल करून त्याला “अरे
टकल्या, चालता हो! अरे टकल्या, चालता हो!” असे म्हणून चिडवू
लागली. 24 तेव्हा तो वळला आणि त्याने याहवेहच्या नावाने त्या मुलांना
शाप दिला. त्याबरोबर जंगलातून दोन अस्वली बाहेर आल्या आणि
त्यांनी त्या मुलांपैकी बेचाळीस मुलांना फाडून टाकले. 25 तो तिथून
निघून कर्मेल डोंगराकडे गेला आणि तिथून शोमरोनास माघारी गेला.

**3** यहूदीयाचा राजा यहोशाफाटच्या शासनकाळात अठराव्या वर्षी
अहाबाचा पुत्र यहोराम हा शोमरोनात इस्राएलावर राज्य करू लागला.
त्याने बारा वर्षे राज्य केले. 2 याहवेहच्या दृष्टीत त्याने जे वाईट ते केले,
परंतु त्याने आपल्या आई वडिलांसारखे केले नाही. त्याने त्याच्या पित्याने
उभारलेला बआलचा मूर्तिस्तंभ पाडून टाकला. 3 तरीपण, नेबाटाचा पुत्र
यरोबोअमने इस्राएली लोकांना जे पाप करावयाला लावले, त्या पापास
तो चिकटून राहिला; त्याने ती पापे सोडली नाही. 4 मोआबाचा राजा
मेशा हा मेंढरांचे कळप बाळगून होता आणि तो इस्राएली राजास कर
म्हणून दरवर्षी एक लाख मेंढरे आणि एक लाख मेंढ्याची लोकर देत
असे. 5 परंतु अहाबाच्या मृत्यूनंतर मोआबाच्या राजाने इस्राएलविरुद्ध
बंड पुकारले. 6 तेव्हा यहोराम राजा शोमरोनातून बाहेर निघाला आणि
सर्व इस्राएली लोकांना एकत्र केले. 7 यहूदीयाचा राजा यहोशाफाटला
हा निरोप पाठविला: “मोआबाच्या राजाने माझ्याविरुद्ध बंड पुकारले
आहे. तेव्हा त्याच्याविरुद्ध लढण्यास माझ्यासोबत येशील काय?”
यहोशाफाटने उत्तर दिले, “मी तुझ्यासोबत येईन. जसा तू तसा मी, जे
माझे लोक ते तुझे लोक, जे माझे घोडे ते तुझे घोडे.” 8 यहोशाफाटने
विचारले, “आपण कोणत्या मार्गाने हल्ला करावा?” योरामाने उत्तर
दिले, “एदोमाच्या वाळवंटाकडून.” 9 त्याप्रमाणे इस्राएलाचा राजा,
यहूदीयाचा राजा आणि एदोमाचा राजा यांच्यासोबत निघाला. सात
दिवसाच्या फेरीनंतर, सैनिकांजवळ त्यांच्यासाठी आणि त्यांच्यासोबत
असलेल्या प्राण्यांसाठी पाणी उरले नाही. 10 “हे काय!” इस्राएलाचा
राजा म्हणाला. “याहवेहने आम्हा तीन राजांना मोआबाच्या हातात
देण्यासाठी एकत्र केले आहे का?” 11 परंतु यहोशाफाटने विचारले,
“याहवेहचा एखादा संदेष्टा इथे नाही काय, म्हणजे आपण याहवेहला
विचारू शकू?” तेव्हा इस्राएलाच्या राजाच्या अधिकाऱ्याने उत्तर दिले,
“शाफाटाचा पुत्र अलीशा इथे आहे. जो एलीयाहच्या हातावर पाणी
घालत असे.” 12 यहोशाफाटने म्हटले, “याहवेहचे वचन त्याच्यासोबत
आहे.” मग इस्राएलाच्या राजा आणि यहोशाफाट व एदोम हे राजे
त्याला भेटण्यास गेले. 13 अलीशाने इस्राएलाच्या राजाला म्हटले,
“तुम्ही माझ्याकडे का आला? तुम्ही तुमच्या वडिलांच्या संदेष्ट्याकडे जा
आणि तुमच्या आईच्या संदेष्ट्याकडे जा.” तेव्हा इस्राएलाच्या राजाने
उत्तर दिले, “नाही! कारण याहवेहनेच आमचा पराभव मोआबाच्या
राजाच्या हातून व्हावा म्हणून आम्हा तीन राजांना इकडे आणले आहे.”
14 अलीशा म्हणाला, “जिवंत याहवेहची शपथ, ज्यांच्या सान्निध्यात
मी उभा राहतो, जर मला यहूदीयाचा राजा यहोशाफाट याच्याबद्दल
आदर नसता तर मी तुमच्याकडे लक्ष दिले नसते. 15 परंतु आता एका
वीणावादकाला मजकडे घेऊन या.” हा वादक वीणा वाजवित असताना
याहवेहचा हात अलीशावर आला 16 आणि तो म्हणाला, “याहवेह असे
म्हणतात: मी या दरीला पाण्याच्या तळ्यांनी भरून टाकीन. 17 कारण
याहवेह असे म्हणतात: तुम्हाला वारा किंवा पाऊस दिसणार नाही,
तरीही ही दरी पाण्याने भरून जाईल आणि तुम्ही, तुमचे गुरे आणि इतर
जनावरे ते पाणी पितील. 18 हे तर याहवेहच्या दृष्टीने फार सोपे आहे,
ते मोआबी लोकांना देखील तुमच्या हातात देतील. 19 तुम्ही त्यांची
सर्वोत्तम शहरे, तसेच तटबंदी असलेली शहरेही जिंकून घ्याल. प्रत्येक

उत्तम झाड तुम्ही कापाल, सर्व झऱ्यांचे पाणी तुम्ही अडवाल आणि दगड पसरून त्यांच्या सुपीक जमिनीची नासाडीही कराल." 20 दुसऱ्या दिवशी सकाळी यज्ञार्पणाच्या वेळी—पाण्याचा लोंढा एदोमाच्या दिशेने वाहत आला व संपूर्ण भूमी पाण्याने भरून गेली. 21 राजे त्यांच्याविरुद्ध युद्ध करण्यास येत आहेत हे मोआबातील लोकांना समजले, तेव्हा त्यांनी लगेच प्रत्येक तरुण व वयस्क पुरुषांनाही सैन्यात दाखल करून घेतले आणि सीमेवर आपली छावणी केली. 22 जेव्हा ते मोठ्या पहाटेस उठले तेव्हा सूर्य पाण्यावर तळपत होता. ते पाणी मोआबी लोकांना दुरून रक्तासारखे दिसू लागले. 23 ते म्हणाले, "हे रक्त आहे! त्या राजांनी एकमेकांसह युद्ध केले असेल आणि त्यांनी एकमेकांना ठार मारले असेल. तेव्हा आता, मोआब्यांनो चला, त्यांचे सर्वकाही लुटून आणू." 24 पण जेव्हा मोआबी लोक इस्राएलांच्या छावणीकडे आले न आले तोच इस्राएलचे सैन्य उठले आणि ते पळेपर्यंत त्यांच्याशी युद्ध केले आणि त्वेषाने तुटून पडले व त्यांचा संहार करू लागले; आणि मोआबाचे सैन्य इस्राएलांपासून पळू लागले. इस्राएलांनी त्यांच्या देशात प्रवेश केला आणि मोआबी लोकांची कत्तल करत गेले. 25 त्यांनी मोआबाची शहरे उद्ध्वस्त केली. सर्व सुपीक जमिनीत एकएकाने दगडधोंड फेकून ती भरून टाकली. पाण्याच्या विहिरीतील झरे बुजविले आणि सर्व उत्तम झाडे तोडून टाकली. फक्त कीर-हरेसेथ येथील दगड राहू दिले, परंतु गोफणदारांनी त्याला घेरले आणि त्याच्यावर हल्ला केला. 26 आपली सेना हरविली जात आहे हे मोआबाच्या राजाने पाहिले, तेव्हा त्याने अखेरचा प्रयत्न म्हणून आपल्या सातशे धनुर्धाऱ्यांसह शत्रूंची फळी फोडून एदोमाच्या राजाकडे निसटून जाण्याचा प्रयत्न केला; पण त्याचा हा प्रयत्न निष्फळ ठरला. 27 म्हणून त्याने आपला ज्येष्ठपुत्र, जो त्याच्यानंतर राजा होणार होता, त्याला धरून ठार मारले व शहराच्या तटावरच त्याचे होमार्पण केले. यावरून इस्राएली सैन्याविरुद्ध प्रकोप आला; व ते माघारी आपल्या देशाला परतले.

**4** संदेष्ट्यांच्या समुहातील एका मनुष्याची पत्नी रडून अलीशाला म्हणाली, "तुमचा सेवक माझा पती मरण पावला आहे आणि तुम्हाला माहीत आहे तो याहवेहचे भय बाळगणारा होता. पण आता त्याचा सावकार माझ्या दोन मुलांना त्याचे गुलाम व्हावे म्हणून घ्यायला येत आहे." 2 अलीशाने तिला विचारले, "मी तुला कशी मदत करू शकतो? तुझ्या घरात काय आहे ते मला सांग?" ती म्हणाली, "एका कुपीत थोड्याशा जैतुनाच्या तेलाशिवाय तुमच्या दासीजवळ काहीही नाही." 3 अलीशा म्हणाला, "आजूबाजूला जा आणि तुझ्या सर्व शेजाऱ्यांकडून रिकामी भांडी मागून घे. थोडकी मागू नको. 4 आपल्या मुलांना घेऊन तू घरात जा व दार लावून घे. नंतर जैतुनाचे तेल तू सर्व भांड्यात भर आणि ते भांडे भरले की एका बाजूला ठेव." 5 तिने त्याला सोडले आणि तिच्या आणि तिच्या मुलांच्या मागून दार बंद केले. त्यांनी भांडे तिच्याकडे आणले आणि ती ओतत राहिली. 6 जेव्हा प्रत्येक भांडे भरले गेले. ती तिच्या मुलाला म्हणाली, "आणखी काही भांडी माझ्याकडे आण." पण त्याने म्हटले, "आता एकही भांडे शिल्लक राहिले नाही." तेव्हा तेल वाहणे बंद झाले. 7 ती परमेश्वराच्या माणसाजवळ गेली आणि त्याला सांगितले, तो म्हणाला, "आता जा आणि तेल विकून आपले कर्ज फेड. जे शिल्लक राहिलेले आहे त्यावर तुझा आणि तुझ्या मुलांचा निर्वाह कर." 8 एके दिवशी अलीशा शूनेम येथे गेला आणि तिथे एक प्रतिष्ठित स्त्री राहत होती, तिने त्याला भोजनासाठी आग्रह केला. जेव्हा तो त्या मार्गाने जाई, तेव्हा तेव्हा तो तिच्या घरी भोजनासाठी उतरत असे. 9 ती आपल्या पतीला म्हणाली, "मला माहीत आहे की हा मनुष्य जो वरचेवर आपल्या मार्गाने येतो, तो परमेश्वराचा पवित्र मनुष्य आहे. 10 तेव्हा त्यांच्यासाठी आपण धाब्यावर एक लहानशी खोली तयार करू. तिथे त्यांच्यासाठी एक खाट, एक मेज, एक खुर्ची व एक दिवा ठेवू. म्हणजे जेव्हा ते येतील तेव्हा इथे राहू शकतील." 11 एके दिवशी अलीशा तिथे आला आणि त्याच्या खोलीत जाऊन विसावा घेतला. 12 त्याने आपला सेवक गेहजीला म्हटले, "शूनेमकरीच्या स्त्रीला बोलव." त्याने तिला बोलाविले आणि ती त्याच्यापुढे उभी राहिली. 13 अलीशा गेहजीला म्हणाला, "तिला सांग, 'तू आमच्यासाठी या सर्व त्रासातून गेली आहेस. आम्ही तुझ्यासाठी काय करू शकतो? राजापुढे किंवा सेनाधिकाऱ्यांपुढे तुझ्या वतीने बोलावे काय?'" तिने उत्तर दिले, "मी तर माझ्या लोकांमध्येच राहते." 14 अलीशाने गेहजीला विचारले, "आपण तिच्यासाठी काय करू शकतो?" गेहजी म्हणाला, "तिला मूल नाही व आता तिचा पती वृद्ध झाला आहे." 15 मग अलीशाने म्हटले, "तिला बोलावून आण." म्हणून त्याने तिला बोलाविले आणि ती दारातच उभी राहिली. 16 अलीशा तिला म्हणाला, "पुढील वर्षी यावेळेस तू आपल्या पुत्रास उराशी धरशील." ती म्हणाली, "माझ्या स्वामी, नाही, परमेश्वराच्या मनुष्या, कृपया तुम्ही मला अशी खोटी अाशा देऊ नका!" 17 पण अलीशाने तिला सांगितल्याप्रमाणे ती स्त्री गर्भवती झाली आणि पुढच्या वर्षी वसंतऋतूत तिने एका पुत्राला जन्म दिला. 18 पुत्र वाढत गेला आणि एके दिवशी आपल्या पित्याकडे गेला, जो कापणी करणाऱ्यांसोबत होता. 19 तो आपल्या पित्याला म्हणाला, "माझे डोके! माझे डोके!" त्याच्या पित्याने एका सेवकाला म्हटले, "याला त्याच्या आईकडे घेऊन जा." 20 सेवकाने त्याला उचलले आणि त्याच्या आईजवळ त्याला नेले. तो बालक दुपारपर्यंत त्याच्या आईच्या मांडीवर बसला आणि नंतर तो मरण पावला. 21 ती त्याला घेऊन वर गेली आणि परमेश्वराच्या माणसाच्या खाटेवर ठेवले आणि दार बंद करून ती बाहेर गेली. 22 तिने आपल्या पतीला हाक मारली आणि म्हटले, "एक सेवक व एक गाढव माझ्याकडे पाठवून द्या, कारण मला ताबडतोब परमेश्वराच्या मनुष्याकडे त्याची भेट घेऊन परत येते." 23 त्याने विचारले, "आजच त्याच्याकडे का जात आहे? आज काही चंद्रदर्शन किंवा शब्बाथ नाही." ती म्हणाली, "हा ठीक आहे." 24 मग तिने गाढवावर खोगीर घातले व तिच्या सेवकास म्हणाली, "चल, गाढव त्वरेने हाकलीत ने, मी सांगितल्याशिवाय वेग कमी करू नको." 25 ती निघाली आणि कर्मेल डोंगराजवळ परमेश्वराच्या मनुष्याकडे आली. जेव्हा त्याने तिला दुरून पहिले, तेव्हा परमेश्वराच्या मनुष्याने आपला

सेवक गेहजीला म्हटले, “बघ, ती शूनेमकरीण! 26 धावत पुढे जा आणि
तिला विचार, ‘तू ठीक आहे काय? तुझे पती ठीक आहेत काय? तुझे
लेकरू ठीक आहे काय?’” ती म्हणाली, “होय, सर्वकाही ठीक आहे.”
27 जेव्हा ती परमेश्वराच्या मनुष्याच्या डोंगरावर पोहोचली, तेव्हा तिने
त्याचे पाय धरले. जेव्हा गेहजी तिला दूर लोटू लागला, पण परमेश्वराच्या
मनुष्याने म्हटले, “तिला सोड! ती फार दु:खात आहे, पण याहवेहने
त्याचे कारण मला कळविले नाही आणि ते माझ्यापासून गुप्त ठेवले.”
28 ती म्हणाली, “माझ्या स्वामी, मी तुमच्याजवळ पुत्र मागितला होता
काय? आणि त्यावेळी मी तुम्हाला, ‘मला निरर्थक आशा देऊ नका, असे
म्हटले नव्हते का?’” 29 अलीशा गेहजीला म्हणाला, “कंबर बांध आणि
माझी काठी तुझ्या हातात घे आणि धाव. मार्गात तुला कोणी भेटला
तर अभिवादन करू नको आणि जर तुला कोणी अभिवादन केले तर
त्यांना उत्तर देऊ नकोस. माझी काठी मुलाच्या तोंडावर ठेव.” 30 परंतु
मुलाची आई म्हणाली, “याहवेहची आणि तुमच्या जीविताची शपथ, मी
तुम्हाला सोडणार नाही.” म्हणून तो उठला आणि तिच्यामागून निघाला.
31 गेहजी पुढे गेला आणि त्याने त्या मुलाच्या तोंडाला काठीचा स्पर्श
केला, पण कोणताच आवाज नाही वा प्रतिसाद मिळाला. म्हणून गेहजी
परत अलीशाला भेटण्यास गेला आणि त्याला सांगितले, “मुलगा जागा
झाला नाही.” 32 अलीशा घरात गेला, तो त्याला मुलगा मृत होऊन
त्याच्या खाटेवर पडला आहे असे दिसले, 33 तेव्हा अलीशा आत गेला,
त्याने दोघांच्या मागे दार बंद करून घेतले, आणि याहवेहची प्रार्थना
केली. 34 मग अलीशा मुलाच्या शरीरावर, तोंडावर तोंड, डोळ्यांवर
डोळे, हातांवर हात, अशाप्रकारे उपडा पडला. त्यामुळे मुलाच्या शरीरात
पुन्हा ऊब येऊ लागली. 35 मग अलीशा माडीवरून खाली आला व घरात
काही वेळ इकडे फेऱ्या मारून पुन्हा माडीवर जाऊन पूर्वीप्रमाणे मुलाच्या
शरीरावर उपडा पडला. तेव्हा मुलाने सात वेळा शिंका दिल्या व डोळे
उघडले. 36 मग अलीशाने गेहजीला बोलावून म्हटले, “शूनेमकरीणीला
बोलव.” त्याने तिला बोलविल्यावर, तो तिला म्हणाला, “हा घे, तुझ्या
पुत्र!” 37 ती आत आली, त्याच्या पायावर पडली आणि जमिनीपर्यंत
लवून तिने त्याला नमन केले. मग तिने आपल्या मुलाला घेतले आणि
ती बाहेर पडली. 38 अलीशा गिलगाल येथे परत आला आणि त्या
भागात दुष्काळ पडला होता. संदेष्ट्यांचा समूह त्याच्यापुढे बसलेला
होता, त्याने आपल्या सेवकास म्हटले, “चुलीवर मोठे भांडे ठेऊन या
संदेष्ट्यांसाठी शाकभाजी कर.” 39 त्यांच्यातील एकजण शाकभाजी
आणावयास एका शेतात गेला आणि त्याला रानटी द्राक्षे दिसली आणि
त्याने आपल्या कापडात जितकी फळे त्याला उचलता येतील तितकी
त्याने उचलली. जेव्हा तो परत आला तेव्हा त्याने त्याचे तुकडे करून
भांड्यात टाकले, परंतु ते काय आहे याची काहीच कल्पना कोणालाही
नव्हती. 40 शाकभाजी माणसांना वाढण्यात आली, पण जसे त्यांनी
खाण्यास सुरुवात केली, ते खाताच ओरडू लागले, “परमेश्वराच्या
मनुष्या, या भांड्यामध्ये मृत्यू आहे!” आणि ते भोजन करू शकले
नाही. 41 तेव्हा अलीशा म्हणाला, “थोडे पीठ आणा.” त्याने ते भांड्यात
टाकले आणि म्हणाला, “हे लोकांना खाण्यास वाढा.” आणि भांड्यात
काहीही अपायकारक राहिले नाही. 42 एके दिवशी बआल-शालीशाह
येथून एका मनुष्याने आपल्या प्रथम पिकातील काही धान्य आणि
जवाच्या वीस भाकरी एका पिशवीत घालून परमेश्वराच्या मनुष्याकडे
आणल्या. तेव्हा तो म्हणाला, “लोकांना खाण्यास दे.” 43 त्याच्या
सेवकाने म्हटले, “शंभर लोकांपुढे हे भोजन कसे ठेऊ?” परंतु अलीशाने
उत्तर दिले, “हे लोकांना खाण्यास दे. कारण याहवेह असे म्हणतात: ‘ते
खातील आणि काही शिल्लक राहील.’” 44 मग त्याने ते त्यांच्यासमोर
वाढले, आणि त्यांनी ते खाल्ले आणि याहवेहच्या वचनानुसार काही
शिल्लक देखील उरले.

**5** नामान हा अरामाच्या राजाच्या सैन्याचा सेनापती होता. तो त्याच्या
स्वामीच्या नजरेत एक थोर आणि अत्यंत आदरणीय होता, कारण
याहवेहने त्याच्याद्वारे अरामाला विजय मिळवून दिला होता. तो एक
पराक्रमी वीरपुरुष होता; परंतु त्याला कुष्ठरोग झाला होता. 2 आता
अरामातून टोळी बाहेर गेली आणि त्यांनी इस्राएलातील एका लहान
मुलीला गुलाम म्हणून नेले आणि ती नामानाच्या पत्नीची सेवा करू
लागली. 3 एके दिवशी ती मुलगी आपल्या धनिणीला म्हणाली,
“आपल्या स्वामींनी शोमरोनातील संदेष्ट्याची भेट घेतली असती तर
किती बरे झाले असते! तो त्यांचा कुष्ठरोग बरा करू शकला असता.” 4
ही इस्राएली मुलगी काय म्हणते हे नामानाने जाऊन राजाला सांगितले.
5 तेव्हा अरामचा राजा म्हणाला, “मग आता जा आणि मी इस्राएलाच्या
राजाला पत्र पाठवितो.” मग नामान आपल्याबरोबर चांदीचे दहा तालांत,
सोन्याची सहा हजार सोन्याची नाणी आणि उंची पोशाखांचे दहा जोड
घेऊन निघाला. 6 त्याने इस्राएलाच्या राजासाठी जे पत्र नेले, त्यामध्ये
असे लिहिले होते: “या पत्रासोबत मी माझा सेवक नामानला तुमच्याकडे
पाठवित आहे, तुम्ही त्याचे कुष्ठरोग बरे करावे.” 7 इस्राएलाच्या राजाने
ते पत्र वाचले. तेव्हा त्याने आपली वस्त्रे फाडली व म्हणाला, “मी
परमेश्वर आहे काय? मी कोणाला मारून त्याला पुन्हा जिवंत करू शकतो
काय? या व्यक्तीने कोणाला तरी माझ्याकडे कुष्ठरोग बरा होण्यासाठी
का पाठविले आहे? पाहा तो कसा माझ्यासोबत भांडण करण्याचे
काहीतरी निमित्त शोधीत आहे!” 8 इस्राएलाच्या राजाने आपली वस्त्रे
फाडली आहेत, असे जेव्हा परमेश्वरचा मनुष्य अलीशाने ऐकले, तेव्हा
त्याने राजाला हा निरोप पाठविला: “तुम्ही आपली वस्त्रे का फाडली?
त्या व्यक्तीला माझ्याकडे पाठवून द्या आणि त्याला समजून येईल की
इस्राएलमध्ये संदेष्टा आहे.” 9 तेव्हा नामानाने आपले घोडे आणि रथ
घेतले आणि अलीशाच्या दारात येऊन उभा राहिला. 10 अलीशाने एका
निरोप्याद्वारे त्याला संदेश पाठविला, “जा यार्देन नदीत जाऊन सात
वेळा स्वत:ला धुवून घे म्हणजे तुझे शरीर पूर्वीसारखे शुद्ध होईल.”
11 परंतु नामान रागात निघाला आणि म्हणाला, “पाहा, मला वाटले
की ते खात्रीने बाहेर माझ्याकडे येतील आणि उभे राहतील आणि
याहवेह त्यांच्या परमेश्वराच्या नावाचा धावा करतील, आपला हात
माझ्या आजारी देहावर फिरवतील आणि माझे कोड बरे करतील. 12

दिमिष्कमधील अमानाह व परपर या नद्या इस्राएलातील जलांपेक्षा उत्तम
नाहीत काय? त्यामध्ये स्नान करून मी स्वत:ला शुद्ध करू शकतो की
नाही?” मग तो मागे फिरला आणि क्रोधाने निघून केला. 13 नामानाचे
सेवक त्याच्याकडे गेले आणि म्हणाले, “माझ्या पित्या, संदेष्ट्याने
आपल्याला एखादी अवघड गोष्ट करावयास सांगितली असती, तर ती
तुम्ही केली नसती काय? त्यांनी तर आपल्याला एवढेच सांगितले,
जा स्नान कर आणि शुद्ध हो. तर मग तसे करावे की नाही?” 14 मग
तो खाली गेला आणि परमेश्वराच्या मनुष्याने सांगितल्याप्रमाणे यार्देन
नदीमध्ये सात वेळा बुड्या मारल्या आणि त्याचे शरीर पूर्ववत् होऊन
लहान मुलाच्या शरीरासारखे शुद्ध झाले. 15 नंतर नामान आणि त्याचे
सर्व लोक परमेश्वराच्या मनुष्याकडे परत गेले. तो त्याच्यासमोर उभा
राहिला आणि म्हणाला, “शेवटी इस्राएलशिवाय जगामध्ये इतरत्र कुठेही
परमेश्वर नाही, हे मला आता पूर्णपणे समजून चुकले आहे. तुमच्या
सेवकाद्वारे आणलेल्या नजराण्यांचा कृपया स्वीकार करा.” 16 तेव्हा
संदेष्ट्याने उत्तर दिले, “ज्यांची मी सेवा करतो त्या जिवंत याहवेहची
शपथ, मी काहीही स्वीकार करणार नाही.” आणि नामानाने त्याला फार
आग्रह केला, पण त्याने नकार दिला. 17 नामान म्हणाला, “तुम्हाला
नजराणे नको असतील तर घेऊ नका, पण निदान माझ्यावर थोडी कृपा
करा आणि बरोबर नेण्यासाठी मला दोन खेचरांवर लादून नेता येईल
एवढी येथील माती तरी द्या, कारण येथून पुढे याहवेहशिवाय मी इतर
कोणत्याही दैवताला कधीही होमार्पण किंवा यज्ञार्पण करणार नाही. 18
मात्र एक गोष्टींसाठी याहवेहने आपल्या सेवकाला क्षमा करावी: माझा
धनी, म्हणजे राजा, रिम्मोन मंदिरात नमन करण्यास जातात, त्यावेळी
त्यांना माझ्या हाताच्या आधाराची गरज पडते आणि त्याच्याबरोबर
मलाही नमन करावे लागते—जेव्हा मी रिम्मोन मंदिरात नमन करतो,
तेव्हा याहवेहने आपल्या सेवकाला क्षमा करावी.” 19 अलीशा म्हणाला,
“शांतीने जा.” मग नामान काही प्रवास केल्यानंतर, 20 इकडे परमेश्वराचा
मनुष्य अलीशाचा सेवक गेहजी स्वत:स म्हणाला, “माझ्या धन्याने
या अरामी नामानाकडून नजराणे न स्वीकारता त्याला असेच जाऊ
दिले. जिवंत याहवेहची शपथ, आता मी स्वत: त्याच्यामागे पळत जाईन
आणि त्याच्यापासून काहीतरी घेईन.” 21 गेहजी नामानाच्या मागे
धावला. नामानाने जेव्हा त्याला त्याच्याकडे धावत येताना पाहिले,
तो आपल्या रथातून खाली उतरून त्यास भेटण्यास गेला. नामानाने
विचारले, “सर्वकाही ठीक आहे ना?” 22 गेहजी म्हणाला, “सर्वकाही
ठीक आहे. माझ्या धन्याने मला तुमच्याकडे हे सांगण्यास पाठविले
आहे, ‘एफ्राईमच्या डोंगराळ भागातून संदेष्ट्यांच्या समुहातून दोन तरुण
संदेष्टे आताच आले आहेत. कृपया त्यांना देण्यासाठी चांदीची एक
तालांत व पोशाखांचे दोन जोड हवे आहेत.’” 23 नामान म्हणाला, “तू
आनंदाने दोन तालांत घेऊन जा.” त्याने ते स्वीकारण्याची त्याला विनंती
केली आणि मग ती चांदी आणि पोशाखांच्या दोन थैल्या बांधून दिल्या.
त्याने ते आपल्या दोन सेवकांना दिले आणि ते त्याच्यापुढे निघाले. 24
जेव्हा गेहजी डोंगराजवळ आला तेव्हा त्याने सेवकांकडून त्या थैल्या
घेतल्या आणि त्या आपल्या घरी ठेवून दिल्या. त्याने त्या माणसांना परत
पाठवून दिले आणि ते निघून गेले. 25 गेहजी आपल्या धन्याच्या पुढे
जाऊन उभा राहिला, तेव्हा अलीशाने त्याला विचारले, “गेहजी, तू कुठे
गेला होतास?” गेहजीने उत्तर दिले, “तुमचा सेवक कुठेच गेला नव्हता.”
26 परंतु अलीशा त्याला म्हणाला, “तो मनुष्य तुला भेटण्यास आपल्या
रथावरून उतरला, तेव्हा माझा आत्मा तुझ्याबरोबर नव्हता काय? पैसा
किंवा पोशाख, जैतुनाची शेते आणि द्राक्षमळे किंवा मेंढरे आणि गुरे
किंवा दास आणि दासी मागून घेण्याचा हा समय आहे काय? 27 तुला
व तुझ्या संतानाला नामानाचा कुष्ठरोग निरंतर लागून राहील.” तेव्हा
गेहजी अलीशाच्या सान्निध्यातून निघून गेला आणि त्याच्या त्वचेवर
कोड फुटले होते—आणि त्याची त्वचा हिमासारखी पांढरी झाली होती.

6 संदेष्ट्यांचा समूह अलीशाला म्हणाला, “पाहा, आम्ही ज्या ठिकाणी
तुम्हाला भेटतो ती जागा आमच्यासाठी फार लहान आहे. 2 चला
आपण यार्देन नदीवर जाऊ या, जिथे प्रत्येक आपल्यासाठी खांब घेईल;
आणि भेटण्यासाठी आपण एक स्थान तयार करू या.” आणि तो
म्हणाला, “जा.” 3 त्यापैकी एकाने म्हटले, “कृपया तुम्ही तुमच्या
सेवकासोबत येणार काय?” अलीशाने उत्तर दिले, “मी तुमच्याबरोबर
येतो.” 4 आणि तो त्यांच्यासोबत गेला. ते यार्देनकडे गेले आणि झाडे
तोडू लागले. 5 त्यापैकी एकजण झाडे तोडत असता, त्याच्या कुर्‍हाडीचे
पाते अचानक दांड्यातून निसटून नदीत पडले. तो ओरडून म्हणाला,
“अरे! अरे! स्वामी, मी ती कुर्‍हाड उसनी मागून आणली होती!” 6
परमेश्वराच्या मनुष्याने विचारले, “ते कुठे पडले?” तेव्हा त्या शिष्यांनी
ती जागा त्याला दाखविली. तेव्हा अलीशाने एक लाकूड तोडून त्या
जागेवर टाकले. आणि ते कुर्‍हाडीचे पाते येऊन पाण्यावर तरंगू लागले.
7 तो म्हणाला, “ती काढून घे.” मग त्याने हात लांब करून ती घेतली.
8 त्यावेळी अरामाच्या राजाने इस्राएलशी युद्ध केले असता, आपल्या
अधिकार्‍यांशी मसलत केली आणि तो म्हणाला, “मी अमुक ठिकाणी
माझा तळ देणार आहे.” 9 परमेश्वराच्या मनुष्याने इस्राएलाच्या राजाला
निरोप पाठविला: “सावध राहा, तुम्ही त्या ठिकाणी जाऊ नका, कारण
अरामी सैनिक त्या ठिकाणी दबा धरून बसले आहेत.” 10 परमेश्वराच्या
मनुष्याने सांगितलेले ठिकाण इस्राएलच्या राजाने पडताळून पाहिले.
अलीशाने राजाला वारंवार सावध केले, जेणेकरून तो अशा ठिकाणी
सावध राहिला. 11 तेव्हा अरामचा राजा संतप्त झाला. त्याने आपल्या
अधिकार्‍यांना बोलाविले आणि मागणी केली, “आपल्यापैकी कोण
इस्राएलाच्या राजाच्या बाजूने आहे?” 12 तेव्हा एका अधिकार्‍याने
म्हटले, “माझे स्वामी महाराज, आपल्यापैकी कोणीही नाही, परंतु
इस्राएलमधील अलीशा जो संदेष्टा, तो इस्राएलाच्या राजाला तुम्ही
तुमच्या विश्रांतिगृहात उच्चारलेले प्रत्येक शब्द कळवितो.” 13 राजाने
आदेश दिला, “तो कुठे आहे शोधून काढा, म्हणजे मी माणसे पाठवितो
आणि त्याला कैद करतो.” त्याच्याकडे बातमी परत आली: “तो दोथान
येथे आहे.” 14 मग त्याने तिथे घोडे आणि रथ व एक मोठे सैन्य पाठविले.
ते रात्री गेले आणि शहराला वेढा घातला. 15 दुसर्‍या दिवशी पहाटेच

परमेश्वराच्या मनुष्याचा सेवक उठून बाहेर आला, तेव्हा सैनिकांनी रथ
आणि घोडे यासह शहराला वेढा दिला आहे, हे त्याला दिसले. तेव्हा तो
ओरडला, “माझ्या स्वामी, आता आपण काय करावे?” 16 संदेष्ट्याने
उत्तर दिले, “भिऊ नकोस, कारण त्यांच्यासोबत जे आहेत, त्यांच्यापेक्षा
जे आपल्यासोबत आहेत ते अधिक आहेत.” 17 मग अलीशाने ही
प्रार्थना केली, “हे याहवेह, याचे डोळे उघडा, म्हणजे तो पाहू शकेल.”
तेव्हा याहवेहने त्या सेवकाचे डोळे उघडले, आणि त्याने दृष्टी वर केली
आणि पाहिले की, अलीशाच्या सभोवतालचा डोंगर अग्नीचे घोडे आणि
रथ यांनी भरलेला आहे. 18 जेव्हा शत्रू खाली त्याच्याकडे आले, तेव्हा
अलीशाने याहवेहकडे प्रार्थना केली, “कृपा करून या सर्व लोकांना
आंधळे करून टाका.” अलीशाने विनंती केल्याप्रमाणे त्यांनी त्यांना
आंधळे केले. 19 मग अलीशा त्यांना म्हणाला, “हा तो रस्ता नाही
आणि हे ते नगरही नाही. माझ्यामागे या म्हणजे जो मनुष्य तुम्हाला
पाहिजे आहे, त्याच्याकडे मी तुम्हाला घेऊन जाईन.” आणि त्याने त्यांना
शोमरोनात नेले. 20 शोमरोनात प्रवेश केल्यानंतर, अलीशाने प्रार्थना
केली, “हे याहवेह, आता या माणसांचे डोळे उघडा म्हणजे ते पाहू
शकतील.” तेव्हा याहवेहने त्यांचे डोळे उघडले, आणि त्यांनी पाहिले की
ते इस्राएलची राजधानी शोमरोनामध्ये आहेत. 21 जेव्हा इस्राएलाच्या
राजाने त्यांना पहिले, तेव्हा त्यांनी अलीशाला विचारले, “मी त्यांचा वध
करू काय, माझ्या पित्या, मी त्यांचा वध करू काय?” 22 अलीशाने
उत्तर दिले, “त्यांचा वध करू नको. तुम्ही आपल्या तलवारीने किंवा
धनुष्याने पकडलेल्यांना माराल का? त्यांच्यापुढे अन्न व पाणी ठेवा
म्हणजे ते खाऊन पिऊन तृप्त होतील आणि नंतर त्यांच्या स्वामीकडे
परत जातील.” 23 तेव्हा राजाने त्यांच्यासाठी एक मोठी मेजवानी
केली, आणि त्यांचे खाणेपिणे झाल्यानंतर त्यांना पाठवून दिले आणि ते
आपल्या स्वामीकडे परत आले. त्यानंतर अरामाच्या टोळ्यांनी इस्राएली
देशावर हल्ला करण्याचे थांबविले. 24 काही काळानंतर अरामचा बेन-
हदाद राजाने आपल्या सर्व सैन्याची जमवाजमव करून शोमरोनावर
स्वारी केली आणि त्याला वेढा दिला. 25 शोमरोन शहरात फार मोठा
दुष्काळ पडला; वेढा इतका काळ राहिला की गाढवाचे मुंडके चांदीच्या
ऐंशी शेकेलला आणि कबुतराची एक पावशेर विष्ठा पाच शेकेलला
विकली गेली. 26 एके दिवशी इस्राएलाचा राजा तटावरून फेऱ्या मारीत
असताना, एक स्त्री मोठ्याने ओरडून त्याला म्हणाली, “माझे स्वामी
महाराज, मला साहाय्य करा!” 27 राजाने उत्तर दिले, “खुद्द याहवेह तुला
साहाय्य करीत नाही, तर मी तुझी साहाय्यता कशी करू? खळयातून
की द्राक्षकुंडातून?” 28 मग राजाने तिला विचारले, “तुला काय झाले
आहे?” स्त्रीने उत्तर दिले, “या स्त्रीने मला म्हटले, ‘तू आपला मुलगा दे
म्हणजे आज आपण त्याला खाऊ आणि उद्या आपण माझ्या मुलाला
खाऊ.’ 29 तेव्हा आम्ही माझ्या मुलाला शिजवून खाल्ले. दुसऱ्या दिवशी
मी तिला म्हणाले, ‘आता तुझ्या मुलाला आण म्हणजे आपण त्याला
खाऊ,’ पण तिने त्याला कुठेतरी लपवून ठेवले.” 30 जेव्हा राजाने स्त्रीचे
शब्द ऐकले, तेव्हा त्याने आपला अंगरखा फाडला. त्याला तटावरून
फिरत असता लोकांनी पाहिले आणि त्यांच्या नजरेस आले की त्याच्या
अंगरख्या खाली त्याने गोणपाट गुंडाळलेले आहे. 31 तो म्हणाला, “मी
जर आज शाफाटाचा पुत्र अलीशाचे शिर उडविले नाही, तर परमेश्वर माझे
त्याहूनही अधिक वाईट करो.” 32 अलीशा आपल्या घरात बसलेला
होता आणि वडीलजन त्याच्यासोबत बसलेले होते. राजाने आपल्यापुढे
दूत पाठविला, पण तो येण्यापूर्वी अलीशा वडीलजनांना म्हणाला, “या
खुनी मनुष्याने माझा शिरच्छेद करण्यासाठी कोणाला तरी पाठविले
आहे, हे तुम्ही पाहिले काय? पाहा, जेव्हा दूत येईल तेव्हा दार बंद
करून त्याला बाहेरच ठेवा, कारण त्याच्या पाठोपाठ त्याच्या धन्याच्या
पावलांचा आवाज आहे की नाही?” 33 अलीशा हे सांगत असतानाच तो
दूत खाली त्याच्याजवळ आला. राजा म्हणाला, “हे अरिष्ट याहवेहकडून
आहे. तेव्हा मी याहवेहची अजून वाट का पाहावी?”

**7** अलीशाने उत्तर दिले, “याहवेहचे वचन ऐका. याहवेह असे म्हणतात:
उद्या याच सुमारास शोमरोनच्या वेशीत तुम्हाला एका शेकेलला
एक सिआ सपीठ आणि एका शेकेलला दोन सिआ सातू मिळेल.” 2
ज्या कारभाऱ्याच्या हातावर राजा टेकायचा तो परमेश्वराच्या मनुष्याला
म्हणाला, “याहवेहने आकाशाच्या खिडक्या उघडल्या, तरी असे घडणे
शक्य नाही.” अलीशाने त्याला उत्तर दिले, “तसे तू आपल्या डोळयांनी
पाहशील, पण त्यातील तू काहीही खाऊ शकणार नाही!” 3 त्यावेळी
शहराच्या वेशीजवळ चार कुष्ठरोगी बसले होते. त्यांनी एकमेकास म्हटले,
“आपण मरेपर्यंत इथे का राहावे? 4 जर आपण म्हणालो, ‘आपण
शहरात जाऊ,’ तर तिथे दुष्काळ आहे आणि आपण तर मरणारच.
येते बसून राहिलो तरीही आपण मरणारच आहोत. तर मग आपण
अरामी सैन्याच्या छावणीत जाऊ आणि शरण घेऊ. त्यांनी आपल्याला
जीवदान दिले, तर जिवंत राहू आणि मारून टाकले, तर आपण मरू,
तर त्यात काही हरकत नाही.” 5 संध्याकाळी ते उठले आणि अरामी
सैन्याच्या छावणीत गेले, पण जेव्हा ते छावणीच्या सीमेवर आले तेव्हा
तिथे एकही मनुष्य नव्हता, 6 कारण प्रभू परमेश्वराने अरामी सेनेला
रथांचा आणि घोड्यांचा आणि मोठ्या सैन्याचा आवाज ऐकविला होता.
तेव्हा ते एकमेकांना म्हणाले, “पाहा, आमच्यावर हल्ला चढविण्यासाठी
इस्राएलाच्या राजाने पैसे देऊन हिथी व इजिप्ती राजे बोलाविले आहे.”
7 तेव्हा ते उठले आणि संध्याकाळी पळून गेले. त्यांनी आपले तंबू, घोडे,
गाढवे यांचा त्याग केला. आपले तंबू तसेच सोडून प्राण वाचविण्यासाठी
त्यांनी पलायन केले. 8 जेव्हा हे कुष्ठरोगी अरामी छावणीच्या सीमेजवळ
आले, तेव्हा त्यांनी एका तंबूत घुसून खाणेपिणे केले. त्यांनी चांदी,
सोने आणि कपडे गोळा करून ते लपवून ठेवले. ते परत येऊन दुसऱ्या
तंबूत गेले आणि त्यातून काही वस्तू घेतल्या आणि त्यादेखील लपवून
ठेवल्या. 9 तेव्हा ते एकमेकास म्हणाले, “आपण जे करत आहोत ते
योग्य नाही. हा आनंदाच्या शुभवार्तेचा दिवस आहे आणि ती आपण
स्वत:जवळच ठेवीत आहोत. जर आपण सकाळ होईपर्यंत थांबून राहिलो
तर आपण दंडपात्र होऊ. तेव्हा चला, आपण राजवाड्यात जाऊन ही
बातमी सांगू.” 10 नंतर ते गेले आणि शहराच्या पहारेकऱ्यांना हाक मारून

सांगितले, “आम्ही अरामी छावणीत गेलो होतो आणि तिथे कोणीही
मनुष्य नव्हता—कोणाचाही शब्द नाही—तेथील घोडे व गाढवे बांधून
ठेवली आहेत आणि तंबूही जसेच्या तसे आहेत.” 11 तेव्हा पहारेकऱ्यांनी
ओरडून ही बातमी सांगितली आणि राजवाड्यात कळविली. 12 तेव्हा
राजा रात्री उठला आणि आपल्या सेवकांना म्हणाला, “मी तुम्हाला
सांगतो की अरामी लोकांनी आपल्यासोबत काय केले आहे. आपण
भुकेने मरत आहोत हे त्यांना माहीत आहे; म्हणून ते आपली छावणी
सोडून आजूबाजूला मैदानात दबा धरून बसले आहे. त्यांना वाटते की,
‘ते खात्रीने बाहेर पडतील आणि मग आपण त्यांना जिवंत पकडू आणि
त्यांच्या शहरात प्रवेश करू.’” 13 तेव्हा त्याच्या एका अधिकाऱ्याने उत्तर
दिले, “शहरात शिल्लक राहिलेले पाच घोडे घेण्यास काही माणसांना
सांगा. तसेही त्यांची अवस्था येथे उरलेल्या सर्व इस्राएली लोकांपेक्षा
काही वेगळी नाही—होय, ते केवळ ज्यांचा नाश झाला आहे, त्या सर्व
इस्राएली लोकांप्रमाणेच असतील. म्हणून काय झाले आहे हे पाहण्यास
काही लोकांना पाठवू द्या.” 14 म्हणून त्यांनी दोन रथ घोड्यांसहित
घेतले आणि राजाने त्यांना अरामी सैन्याच्या मागे पाठविले. त्याने त्यांना
आदेश दिला, “जा आणि काय झाले ते पाहून या.” 15 ते यार्देनपर्यंत
त्यांच्यामागे गेले आणि अरामी लोकांचे कपडे व सामान मार्गावर
पसरलेले त्यांना आढळले, जे अरामी लोकांनी पळून जात असता फेकून
दिले होते. दूत परत आले आणि राजाला हे वर्तमान कळवले. 16 मग
लोक बाहेर निघाले आणि अरामी लोकांची छावणी लुटली. याहवेहच्या
वचनानुसार एका शेकेलास एक सिआ सपीठ, आणि एका शेकेलास
सातूच्या दोन सेआ विकत मिळू लागले. 17 राजा ज्या अधिकाऱ्याच्या
दंडावर टेकीत होता त्याला वेशीवर नियुक्त केले होते आणि लोकांनी
त्याला वेशीवर तुडविले व तो मरण पावला, ज्याप्रमाणे परमेश्वराच्या
मनुष्याने सांगितले होते, जेव्हा राजा खाली त्याच्याकडे गेला होता. 18
परमेश्वराच्या मनुष्याने राजाला सांगितल्याप्रमाणे झाले: “शोमरोनच्या
वेशीजवळ एका शेकेलास एक सिआ सपीठ आणि एका शेकेलास दोन
सिआ सातू विकत मिळू लागेल.” 19 त्या अधिकाऱ्याने परमेश्वराच्या
मनुष्याला म्हटले होते, “याहवेहने आकाशाच्या खिडक्या उघडल्या,
तरी असे घडणे शक्य नाही.” परमेश्वराच्या मनुष्याने उत्तर दिले होते,
“तसे तू आपल्या डोळ्यांनी पाहशील, पण त्यातील तू काहीही खाऊ
शकणार नाही!” 20 त्याच्यासोबत असेच घडले, कारण लोकांनी त्याला
वेशीजवळ तुडविले आणि तो मरण पावला.

**8** अलीशाने ज्या स्त्रीच्या मुलास जिवंत केले होते, तिला म्हणाला,
“तुझ्या कुटुंबीयांनी घेऊन निघून जा आणि जिथे तुला राहता येईल
तिथे राहा, कारण याहवेह या भूमीवर मोठा दुष्काळ पाठविणार आहेत
आणि तो सात वर्षे टिकणार आहे.” 2 त्या स्त्रीने परमेश्वराच्या मनुष्याने
सांगितल्याप्रमाणे केले. ती आणि तिचे कुटुंब दूर निघून पलिष्ट्यांच्या
देशात जाऊन सात वर्षे राहिले. 3 सात वर्षाच्या शेवटी ती पलिष्टी
देशातून परत आली आणि आपले घर आणि जमीन परत मिळण्यासंबंधी
राजाला विनंती करण्यास गेली. 4 त्यावेळी राजा परमेश्वराचा मनुष्य
अलीशाचा सेवक गेहजीशी बोलत होता आणि तो म्हणाला, “अलीशाने
जी सर्व मोठी कृत्ये केली ती मला सांग.” 5 जेव्हा गेहजी राजाला
सांगत असता कसे अलीशाने मृताला जिवंत केले; ती स्त्री आपली
जमीन आणि घर परत मिळावे म्हणून विनंती करण्यास राजाकडे आली
होती. गेहजी म्हणाला, “माझे स्वामी, माझे महाराज, हीच ती स्त्री
आणि अलीशाने ज्या मुलाला जिवंत केले तोच हा पुत्र.” 6 राजाने
त्याबद्दल स्त्रीला विचारले आणि तिने त्याला सर्व सांगितले. मग त्याने
आपल्या एका अधिकाऱ्याला तिच्या मदतीसाठी नेमून दिले आणि
त्याला म्हटले, “तिचे जे काही होते, ते सर्व तिला परत द्या, तिने देश
सोडल्यापासून आजपर्यंत तिच्या मालकीचे सर्वकाही, अगदी तिच्या
जमिनीचे सर्व उत्पन्न तिला परत करा.” 7 अलीशा दिमिष्क येथे गेला
आणि अरामचा राजा बेन-हदाद आजारी होता. जेव्हा राजाला सांगण्यात
आले, “परमेश्वराचा मनुष्य येथे वर आलेला आहे,” 8 राजाने हजाएलला
म्हटले, “एखादी भेट घेऊन परमेश्वराच्या मनुष्याला भेटण्यास जा
आणि त्याच्याद्वारे याहवेहस विचार, ‘मी या आजारातून बरा होईन की
नाही?’” 9 हजाएल त्याच्यासोबत दिमिष्कच्या सर्व उत्तम भेटवस्तू
चाळीस उंटावर लादून अलीशाला भेटण्यासाठी गेला. तो गेला आणि
त्याच्यासमोर उभा राहिला आणि म्हटले, “तुमचा पुत्र, अरामचा राजा
बेन-हदाद, यांनी मला आपल्याकडे हे विचारण्यास पाठविले आहे की,
मी या आजारातून बरा होईन की नाही?” 10 अलीशाने उत्तर दिले, “जा
आणि त्याला सांग, ‘तू नक्कीच बरा होशील.’ परंतु याहवेहने मला स्पष्ट
दाखविले आहे की तो अवश्य मरेल.” 11 यानंतर अलीशाने हजाएलकडे
तो इतका लाजिरवाणा होईपर्यंत रोखून पाहिले की हजाएल भांबावून
गेला. त्यानंतर परमेश्वराचा मनुष्य रडू लागला. 12 हजाएलाने विचारले,
“माझे स्वामी का रडत आहेत?” अलीशाने उत्तर दिले, “कारण मला
माहीत आहे की तू इस्राएली लोकांचे वाईट करणार आहेस, तू त्यांच्या
तटबंदीच्या ठिकाणास आग लावशील, त्यांच्या तरुण पुरुषांना तलवारीने
ठार मारशील, त्यांच्या बालकांना आपटून मारशील आणि गर्भवती
स्त्रियांना चिरून टाकशील.” 13 हजाएल म्हणाला, “तुमचा सेवक मी
एक कुत्रा आहे, एवढी मोठी गोष्ट कशी करणार?” अलीशाने उत्तर दिले,
“याहवेहने मला दाखविले आहे, तू अरामचा राजा होणार,” 14 त्यानंतर
हजाएल अलीशाला सोडून गेला आणि आपल्या स्वामीकडे परत
आला. जेव्हा बेन-हदादने विचारले, “अलीशाने तुला काय सांगितले?”
हजाएलाने उत्तर दिले, “त्यांनी मला सांगितले की तुम्ही नक्कीच बरे
होणार.” 15 परंतु दुसऱ्या दिवशी त्याने एक रजई पाण्यात भिजविली
आणि ती राजाच्या तोंडावर पसरली, त्यामुळे राजा मरण पावला.
त्यानंतर हजाएल त्याच्या ठिकाणी राजा झाला. 16 अहाबाचा पुत्र,
इस्राएलाचा राजा योरामच्या कारकिर्दीच्या पाचव्या वर्षी, यहूदीयाचा
राजा यहोशाफाटचा पुत्र यहोराम राज्य करू लागला. 17 तो वयाच्या
बत्तीसाव्या वर्षी राजा झाला, त्याने यरुशलेमवर आठ वर्षे राज्य केले.
18 अहाबाच्या घराण्याने जसे केले होते त्याचप्रमाणे त्याने इस्राएलच्या
राजांच्या मार्गांचे अनुसरण केले, कारण त्याने अहाबाच्या मुलीबरोबर

विवाह केला होता. याहवेहच्या दृष्टीने जे वाईट ते त्याने केले. 19 तथापि आपला सेवक दावीदासाठी याहवेहने यहूदाहचा नाश केला नाही. कारण त्यांनी दावीदाच्या वंशजाचा दिवा कायम ठेवण्याचे अभिवचन दिले होते. 20 यहोरामाच्या काळात, एदोमाने यहूदीयाविरुद्ध बंड पुकारले आणि त्यांनी स्वत:साठी एक राजा निवडला. 21 मग यहोराम आपले रथ घेऊन साईर येथे गेला. ज्या एदोमी लोकांनी त्याला आणि त्याच्या रथाच्या नायकांना घेरले होते, रात्रीच्या वेळी उठून त्याने वेढा मोडून टाकला. आणि लोक आपल्या डेऱ्यांत पळून गेले. 22 तेव्हापासून आजपर्यंत एदोम यहूदीयाहविरुद्ध बंड करीत आहे. त्याचवेळेस लिब्नाहनेही बंड केले. 23 यहोरामाच्या बाकीच्या कामगिरीचा तपशील आणि त्याची सर्व कामे यहूदीयाच्या राजांच्या इतिहास या ग्रंथात केलेली नाही काय? 24 यहोराम त्याच्या पूर्वजांबरोबर विसावा पावला आणि तो त्यांच्याबरोबर दावीदाच्या नगरात पुरला गेला आणि वारस म्हणून त्याचा पुत्र अहज्याह राजा झाला. 25 इस्राएलाचा राजा अहाबाचा पुत्र योरामच्या बाराव्या वर्षी यहोरामाचा पुत्र अहज्याह यहूदीयाचा राजा म्हणून राज्य करू लागला. 26 वयाच्या बावीसाव्या वर्षी अहज्याह राजा झाला आणि त्याने यरुशलेमात एक वर्ष राज्य केले. त्याच्या आईचे नाव अथल्याह होते, ती इस्राएलाचा राजा ओमरीची नात होती. 27 तो अहाबाच्या घराण्याच्या मार्गाने चालला आणि अहाबाच्या घराण्याप्रमाणे याहवेहच्या दृष्टीने वाईट ते केले, कारण त्याचे अहाबाच्या घराण्याशी विवाहाद्वारे संबंध होते. 28 अरामचा राजा, हजाएलविरुद्ध रामोथ गिलआद येथे झालेल्या युद्धात अहज्याह इस्राएलचा राजा अहाबाचा पुत्र योरामच्या बाजूने लढला. या युद्धात योराम राजा जखमी झाला; 29 रामाह येथे अरामचा राजा हजाएलशी लढताना झालेल्या जखमांना मलम पट्टी करण्यासाठी योराम राजा येज्रीलला परतला. यहूदीयाचा राजा यहोरामचा पुत्र अहज्याह हा अहाबाचा पुत्र योरामची प्रकृती पाहण्यासाठी येज्रीलला गेला, कारण योराम जखमी झाला होता.

**9** इकडे अलीशा संदेष्ट्याने एका तरुण संदेष्ट्याला संदेष्ट्यांच्या समुहातून बोलाविले आणि त्याला म्हटले, “तू आपली कंबर बांध, जैतून तेलाची कुपी बरोबर घे आणि रामोथ गिलआद येथे जा. 2 जेव्हा तू तिथे पोहोचशील तेव्हा निमशी यहोशाफाटाचा पुत्र येहूचा शोध घे व त्याला त्याच्या मित्र मंडळीपासून दूर एका खाजगी खोलीत घेऊन जा, 3 मग कुपी घे आणि तेल त्याच्या मस्तकांवर ओत आणि जाहीर कर, ‘याहवेह असे म्हणतात: मी तुझा इस्राएलाचा राजा म्हणून अभिषेक करतो.’ नंतर दार उघड आणि पळ; उशीर करू नकोस!” 4 मग तो तरुण संदेष्टा रामोथ-गिलआद येथे गेला. 5 जेव्हा तो तिथे पोहोचला, तेव्हा त्याने पाहिले की सेना अधिकारी सोबत बसलेले आहेत. तो म्हणाला, “सेनापती महोदय, माझ्याजवळ तुमच्यासाठी एक संदेश आहे.” येहूने विचारले, “आमच्यापैकी कोणासाठी?” त्याने उत्तर दिले, “सेनापती महोदय तुमच्यासाठी.” 6 मग येहू उठला आणि तो आत घरात गेला. नंतर संदेष्ट्याने येहूच्या मस्तकांवर तेल ओतले आणि जाहीर केले, “याहवेह इस्राएलचे परमेश्वर म्हणतात: ‘मी तुझा याहवेहची प्रजा इस्राएलाचा राजा म्हणून अभिषेक करतो. 7 तुला आपला स्वामी अहाबाच्या घराण्याचा नाश करावयाचा आहे. ईजबेलने माझ्या संदेष्ट्यांना आणि याहवेहच्या इतर सेवकांना ठार मारलेल्यांचा सूड तुला उगवावयाचा आहे. 8 कारण अहाबाच्या संपूर्ण घराण्याचा नाश होईल. मी अहाबाच्या घराण्यातील प्रत्येक पुरुष इस्राएली राष्ट्रातून मिटवून टाकीन तो दास असो किंवा स्वतंत्र. 9 नेबाटाचा पुत्र यरोबोअम आणि अहीयाहचा पुत्र बाशा यांच्या घराण्यासारखे मी अहाबाच्या घराण्याचे करेन. 10 ईजबेलला येज्रीलच्या भूमीत कुत्री फाडून खातील आणि तिला कोणीही मूठमाती देणार नाही.’” मग त्या तरुणाने दार उघडले आणि पळाला. 11 येहू आपल्या सोबतच्या अधिकाऱ्यांकडे परत आला. त्यापैकी एकाने त्याला विचारले, “सर्वकाही ठीक आहे ना? हा वेडा तुझ्याकडे का आला होता?” येहूने उत्तर दिले, “तो कोण होता व त्याचे बोलणे हे तुम्हाला चांगलेच ठाऊक आहे.” 12 तेव्हा ते म्हणाले, “हे सत्य नाही, खरे काय आहे ते आम्हाला सांग.” येहूने म्हटले, “त्याने मला म्हटले: ‘याहवेह असे म्हणतात: मी तुझा इस्राएलाचा राजा होण्यासाठी अभिषेक करत आहे.’” 13 हे ऐकून त्यांनी ताबडतोब त्याच्यासमोर पायऱ्यांवर आपल्या अंगरख्याच्या पायघड्या घातल्या व कर्णा वाजवून ते ओरडून म्हणाले, “येहू राजा झाला आहे.” 14 निमशीचा पुत्र यहोशाफाटचा पुत्र येहूने योराम राजाविरुद्ध बंड पुकारले. (त्यावेळेस योराम राजा सर्व सैन्यानिशी रामोथ गिलआद येथे अरामचा राजा हजाएलविरुद्ध इस्राएलांच्या बाजूने लढत होता. 15 पण यहोराम राजा हा अरामचा राजा हजाएलशी लढताना ज्या जखमा अरामी लोकांनी दिल्या होत्या, त्या जखमा बऱ्या व्हाव्यात म्हणून तो येज्रीलला परतला होता.) येहू म्हणाला, “मी राजा व्हावे असे जर तुम्हाला वाटत असेल, तर आपण काय केले आहे हे कोणीही या नगरीतून निसटून ही बातमी येज्रीलमध्ये कोणालाही कळवू नये म्हणून खबरदारी घ्या.” 16 मग येहू रथात बसला आणि येज्रीलास गेला, कारण योराम तिथे विसावा घेत होता आणि यहूदीयाचा राजा अहज्याह त्याला भेटण्यास खाली गेला होता. 17 येज्रीलच्या बुरुजावर असलेला पहारेकरी येहू व त्याची टोळी येताना पाहून ओरडून म्हणाला, “मला एक टोळी येताना दिसत आहे.” यहोरामाने आदेश दिला, “एका घोडेस्वारास त्यांना भेटण्यास पाठवा, जो त्यांना विचारेल, शांतीने येत आहात ना?” 18 तेव्हा एक घोडेस्वार येहूला भेटण्यास गेला आणि म्हणाला, “राजाने असे म्हटले आहे: ‘तुम्ही शांतीने आला आहात का?’” येहूने उत्तर दिले, “तुला शांतीचे काय घेणे देणे? चल, माझ्यामागे हो!” तेव्हा पहारेकऱ्याने बातमी दिली, “आपला दूत तिथे पोहोचला, तो येणाऱ्यांना भेटला, पण तो परत येत नाही.” 19 मग राजाने दुसऱ्या घोडेस्वाराला पाठविले. तो त्याच्याजवळ गेला आणि म्हणाला, राजाने असे म्हटले आहे: तुम्ही शांतीने आला आहात का? येहूने उत्तर दिले, “तुला शांतीचे काय घेणे देणे? चल, माझ्यामागे हो!” 20 पहारेकऱ्याने बातमी दिली, “तो तिथे पोहोचला, पण तो ही परत येताना दिसत नाही. त्याचे घोडे हाकणे तर निमशीचा पुत्र येहूसारखे आहे—तो घाईने हाकीत आहे.” 21 यहोरामाने फर्मान दिला, “माझा

रथ तयार करा.” मग इस्राएलाचा राजा योराम आणि यहूदीयाचा राजा
अहज्याह आपआपल्या रथात बसून येहूला भेटावयास निघाले. ते येहूला
येज्रीली नाबोथच्या शेतात भेटले. 22 जेव्हा यहोरामाने येहूस पाहिले,
तेव्हा त्याने विचारले, “येहू, तुम्ही शांतीने आला आहात का?” येहूने
उत्तर दिले, “कशी राहील शांती, जेव्हा तुमची आई ईजबेलचे व्यभिचार
आणि चेटके एवढे अधिक आहेत तोपर्यंत कशी शांती असेल?” 23 ते
ऐकताच यहोराम मागे फिरला आणि अहज्याहला ओरडून म्हणाला,
“अहज्याह, विद्रोह, विद्रोह!” 24 येहूने आपला धनुष्य सर्व शक्तिनिशी
ओढला आणि यहोरामाच्या दोन्ही बाहूंच्यामध्ये मारला. बाण त्याच्या
हृदयात शिरला, आणि तो रथातच कोसळून पडला. 25 तेव्हा येहूने
आपला साथीदार बिदकर याला म्हटले, “त्याला उचल आणि येज्रीली
नाबोथच्या भूमीत फेकून दे, कारण स्मरण कर की मी आणि तू मिळून
त्याचा पिता अहाब याच्यामागून रथामधून चाललो असताना याहवेहने ही
भविष्यवाणी त्याच्या विरोधात केली होती: 26 याहवेह जाहीर करतात,
‘मी काल नाबोथचे रक्त आणि त्याच्या पुत्रांचे रक्त पाहिले आहे आणि
याच भूमीवर मी याची परतफेड करेन, असे याहवेह जाहीर करतात.
वध केल्याबद्दल मी त्याचा बदला अहाबाला या नाबोथच्याच भूमीवर
देईन.’ म्हणून आता याहवेहच्या वचनानुसार, त्याला उचल आणि त्याला
त्या भूमीवर फेकून दे.” 27 काय झाले ते पाहून, जेव्हा यहूदीयाचा
राजा अहज्याह बेथ-हागानकडे जाणाऱ्या मार्गाने पळाला. येहू त्याचा
पाठलाग करता करता ओरडून म्हणाला, “त्यालाही मारा!” मग त्यांनी
त्याला इब्लामजवळच्या गुर येथील चढणीवर रथातच घायाळ केले;
तो मगिद्दोपर्यंत पळाला आणि तिथे तो मरण पावला. 28 त्याच्या
सेवकांनी त्याला रथामधूनच यरुशलेमास नेले व दावीदनगरीत त्याच्या
पूर्वजांच्या थडग्यात त्याला मूठमाती दिली. 29 (अहाबाचा पुत्र योरामच्या
अकराव्या वर्षी अहज्याह यहूदीयाचा राजा झाला होता.) 30 नंतर येहू
येज्रीलास गेला. जेव्हा ईजबेलने हे ऐकले, तेव्हा तिने आपल्या पापण्या
रंगविल्या व केशभूषा करून ती खिडकीतून बाहेर पाहत बसली. 31
जसा येहू वेशीतून आत आला, तिने विचारले, “अरे आपल्या धन्याचा
वध करणाऱ्या जिम्रीच्या मुला, तू शांतीने आला आहेस का?” 32
त्याने वर खिडकीकडे पाहिले आणि मोठ्याने म्हणाला, “माझ्या बाजूचे
कोण आहेत? कोण?” तेव्हा दोघा तिघा खोजांनी त्याच्याकडे डोकावून
पाहिले. 33 येहूने म्हटले, “तिला खिडकीतून खाली ढकलून द्या.”
तेव्हा त्यांनी तिला खाली ढकलून दिले, आणि तिच्या रक्ताच्या काही
चिरकांड्या भिंतीवर आणि घोड्यांवर पडल्या आणि घोड्यांनी तिला
पायाखाली तुडविले. 34 येहू आत गेला आणि त्याने खाणेपिणे केले. तो
म्हणाला, “त्या शापित स्त्रीची काळजी घ्या आणि तिला मूठमाती द्या.
कारण ती एका राजकन्या होती.” 35 परंतु जेव्हा ते तिला मूठमाती
देण्यासाठी गेले, तेव्हा त्यांना तिची फक्त कवटी व हात आणि पायच
सापडले. 36 ते परत गेले आणि येहूला सांगितले, तेव्हा तो म्हणाला,
“याहवेहचे वचन जे त्यांनी आपला सेवक एलीयाह तिश्बी याच्यामार्फत
सांगितले होते ते हेच होते; येज्रीलच्या शेतात कुत्री ईजबेलचे मांस
खातील. 37 आणि ईजबेलचे शरीर येज्रीलातीतील शेतात खताप्रमाणे
विखुरले जाईल. हे कोणालाही सांगता येणार नाही की, ही ईजबेल
आहे.”

10 शोमरोनात अहाबाचे सत्तर पुत्र होते. येहूने येज्रीलच्या
अधिकाऱ्यांना, वडिलांना आणि अहाबाच्या पुत्रांच्या पालकांना:
जे शोमरोनात होते त्यांना एक पत्र लिहिले, ज्यामध्ये असे लिहिलेले
होते, 2 “तुमच्यासोबत तुमच्या धन्याचे पुत्र आहेत आणि तुमच्याजवळ
रथ आणि घोडे, तटबंदी असलेले शहर आणि हत्यारेही आहेत, जेव्हा
हे पत्र तुम्हाला मिळताच, 3 आपल्या धन्याच्या पुत्रांपैकी सर्वोत्तम
आणि सर्वात योग्य निवडा आणि त्याला त्याच्या पित्याच्या सिंहासनावर
बसवा. मग तुमच्या धन्याच्या घरासाठी लढा.” 4 परंतु ते घाबरले आणि
म्हणाले, “त्याला दोन राजे रोखू शकले नाहीत, तर आम्ही कसे करू
शकतो?” 5 मग राजवाड्याचा कारभारी, शहराचा कारभारी, वडील व
त्या पुत्रांचे पालक यांनी येहूला हा निरोप पाठविला: “आम्ही तुमचे सेवक
आहोत व तुम्ही जे काही सांगाल ते आम्ही करू. आम्ही कोणालाही राजा
म्हणून नियुक्त करणार नाही; तुम्हाला जे उत्तम वाटते, ते तुम्ही करा.” 6
मग येहूने दुसरे पत्र त्यांना लिहिले आणि त्यात असे लिहिलेले होते,
“जर तुम्ही माझ्या बाजूचे असाल आणि माझ्या आज्ञा पाळणार असाल,
तर उद्या याच वेळेला तुम्ही तुमच्या धन्याच्या पुत्रांची शिरे घेऊन मजकडे
येज्रीलमध्ये या.” आता सत्तर राजपुत्र शहराच्या प्रमुख व्यक्तीबरोबर
होते, जे त्यांचे संगोपन करत होते. 7 जेव्हा त्यांना हे पत्र मिळाले तेव्हा
त्यांनी राजपुत्रांना घेतले आणि सर्व सत्तर पुत्रांना ठार केले. त्यांनी त्यांची
शिरे टोपल्यांमध्ये भरून ती येहूला येज्रीलमध्ये पाठवून दिली. 8 जेव्हा
दूत त्याच्याकडे आला, त्याने येहूला सांगितले, “त्यांनी राजपुत्रांची शिरे
आणली आहेत.” तेव्हा येहूने आदेश दिला, “ती शिरे मुख्य वेशीजवळ,
त्यांचे दोन ढीग करून सकाळपर्यंत ठेवावी.” 9 दुसऱ्या दिवशी सकाळी
येहू बाहेर आला. तो सर्व लोकांसमोर उभा राहिला आणि म्हणाला,
“तुम्ही सर्व निर्दोष आहात. मी आपल्या धन्याच्या विरुद्ध षडयंत्र केले
आणि त्याला ठार मारले, पण या सर्वांना कोणी मारले? 10 तेव्हा
हे जाणून घ्या, अहाबाच्या घराण्याविरुद्ध याहवेहने म्हटलेला एकही
शब्द व्यर्थ जाणार नाही. याहवेहने ते पूर्ण केले जे त्यांनी त्यांचा सेवक
एलीयाहद्वारे प्रकट केले होते.” 11 असे येहूने येज्रीलमधील अहाबाच्या
घराण्यातील सर्वांना, त्याचे मुख्य लोक, त्याचे सर्व जवळचे मित्र आणि
त्याच्या याजकांना ठार मारले आणि कोणालाही जिवंत सोडले नाही.
12 यानंतर येहू निघून शोमरोनाला गेला. वाटेत मेंढपाळांच्या बेथ-एकेद
नावाच्या स्थानात गेला, 13 त्याची भेट यहूदीयाचा राजा अहज्याहच्या
काही नातेवाईकांसह झाली आणि येहूने त्यांना विचारले, “तुम्ही कोण
आहात?” ते म्हणाले, “आम्ही अहज्याहचे नातेवाईक आहोत आणि
आम्ही राजा आणि राजमातेच्या कुटुंबीयांनी अभिवादन करण्यासाठी
खाली आलो आहोत.” 14 तेव्हा येहूने आदेश दिला, “त्यांना जिवंत
पकडा!” तेव्हा त्यांनी त्यांना जिवंत पकडले आणि बेथ-एकेदच्या
विहिरीजवळ—त्या बेचाळीस लोकांचा वध करण्यात आला. त्याने

कोणालाही जिवंत सोडले नाही. 15 तो तिथून निघाला आणि त्याची भेट
रेखाबाचा पुत्र यहोनादाबासोबत झाली, जो त्यालाच भेटावयाला येत
होता. येहूने त्याला अभिवादन केले आणि म्हणाला, “जसा मी तुझ्या
सहमत आहे, तसा तूही माझ्याशी सहमत आहेस काय?” यहोनादाबाने
उत्तर दिले, “होय निश्चित!” तेव्हा येहू म्हणाला, “तर मग आपला
हात मला दे.” आणि त्याने तसेच केले, आणि येहूने त्याला आपल्या
रथामध्ये घेण्यास मदत केली. 16 येहूने म्हटले, “आता माझ्याबरोबर चल
आणि मी याहवेहविषयी किती उत्कट आस्था बाळगतो ते पाहा.” तेव्हा
यहोनादाब त्याच्याबरोबर रथात बसून गेला. 17 जेव्हा येहू शोमरोनात
आला, त्याने अहाबाच्या घराण्यातील उर्वरित लोकांना ठार मारले;
याहवेहने एलीयाहला सांगितलेल्या वचनाप्रमाणे येहूने त्यांचा सर्वनाश
केला. 18 नंतर येहूने सर्व लोकांना एकत्र केले आणि त्यांना म्हणाला,
“अहाबाने बआलची थोडी सेवा केली; येहू त्याच्याहून अधिक सेवा
करेल. 19 म्हणून बआल दैवताच्या सर्व संदेष्ट्यांना आणि सर्व सेवकांना
आणि सर्व याजकांना एकत्र बोलवा. कोणीही अनुपस्थित राहू नये याची
खबरदारी घ्या, कारण मी बआलसाठी मोठा यज्ञ करणार आहे. जो
कोणी येणार नाही त्याला ठार मारण्यात येईल.” परंतु बआलच्या सर्व
भक्तांचा संहार करण्याच्या हेतूनेच येहूने ही योजना आखली होती. 20
येहूने म्हटले, “बआलच्या आदरासाठी सभा बोलवा.” अशी त्यांनी
त्याची घोषणा केली. 21 नंतर येहूने सर्व इस्राएलात संदेश पाठविला
आणि बआलचे सर्व सेवक आले; कोणीही मागे राहिला नाही. ते
बआलचे मंदिर एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत भरेपर्यंत गर्दी करत
राहिले. 22 आणि येहूने वस्त्र भांडाराच्या प्रमुखाला म्हटले, “बआलच्या
सर्व सेवकांसाठी झगे घेऊन ये.” तेव्हा त्याने त्यांच्यासाठी झगे आणले.
23 यानंतर येहू आणि रेखाबाचा पुत्र यहोनादाब मंदिरात गेले. येहू
बआलच्या सेवकांना म्हणाला, “सभोवती दृष्टी टाका आणि पाहा की
याहवेहची सेवा करणारा कोणीही तुमच्याबरोबर नाही—फक्त बआलचे
सेवक आहेत.” 24 म्हणून ते यज्ञार्पण व होमार्पण करण्यास आत गेले.
आता येहूने ऐंशी माणसांना बाहेर ही ताकीद देऊन उभे केले होते:
“जी माणसे तुमच्या तावडीत दिलेली आहेत, त्यातून एकही निसटून
जायला नको, जर एकही तुमच्या तावडीतून निसटला, तर त्याबद्दल
तुम्हाला तुमच्या जिवाची किंमत मोजावी लागेल.” 25 येहूने होमार्पण
करण्याचे संपविले त्याने ताबडतोब आपल्या पहारेकरी व अधिकाऱ्यांना
आदेश दिला: “आता नगरात जा आणि त्यांना मारा; कोणीही निसटून
जाऊ नये.” मग त्यांनी त्या सर्वांना तलवारीने मारले. पहारेकरी व
अधिकाऱ्यांनी मृतदेह बाहेर फेकले आणि नंतर ते बआलच्या मंदिराच्या
गाभाऱ्यात गेले. 26 बआलच्या मंदिरातून पवित्र स्तंभ बाहेर काढला
आणि तो जाळून टाकला. 27 त्यांनी बआलचा पवित्र स्तंभ नष्ट केला
आणि बआलच्या मंदिराची मोडतोड केली आणि त्याचे सार्वजनिक
शौचालय असा लोक आजही उपयोग करतात. 28 याप्रमाणे येहूने
इस्राएलमधून बआलची उपासना नष्ट केली. 29 तरी देखील नेबाटाचा
पुत्र यरोबोअमने इस्राएलला करावयाला लावलेली पातके यापासून
येहू फिरला नाही—त्याने बेथेल व दान येथील वासरांच्या सोन्याच्या
मूर्तीची उपासना केली. 30 याहवेह येहूला म्हणाले, “माझ्या दृष्टीने तू जे
योग्य ते केले आहे आणि जे माझ्या मनात अहाबाचा घराण्याविषयी
होते ते तू सर्व केले, म्हणून चौथ्या पिढीपर्यंत तुझे वंशज इस्राएलच्या
राजासनावर बसतील.” 31 परंतु येहू याहवेह इस्राएलांच्या परमेश्वराचे
नियम आपल्या पूर्ण अंत:करणाने पाळण्यात काळजीपूर्वक राहिला
नाही. यरोबोअमने इस्राएलला करावयाला लावलेल्या पातकांपासून
तो मागे फिरला नाही. 32 त्या दिवसात याहवेह इस्राएलची घट करू
लागले. हजाएलने इस्राएलाच्या सर्व सीमांवर त्यांचा पराभव केला.
33 यार्देनच्या पूर्वेकडील भागापासून संपूर्ण गिलआद (गाद, रऊबेन
आणि मनश्शेहचा भाग), आर्णोन खोऱ्याच्या जवळील अरोएरापासून
गिलआद व बाशानपर्यंतचे सर्व प्रदेश जिंकले. 34 येहूच्या बाकीच्या
कारकिर्दीची नोंद इस्राएलाच्या राजाचा इतिहास या ग्रंथात नमूद केली
नाही काय? 35 येहू मरण पावल्यानंतर त्याला शोमरोन येथे मूठमाती
देण्यात आली. त्याच्यानंतर त्याचा पुत्र यहोआहाज राज्य करू लागला.
36 येहूने इस्राएलाचा राजा म्हणून शोमरोनात अठ्ठावीस वर्षे राज्य केले.

**11** जेव्हा अहज्याहची आई अथल्याहने पाहिले की तिचा पुत्र मरण
पावला आहे, तेव्हा ती राजघराण्याचा नाश करण्यास निघाली.
2 परंतु यहोराम राजाची कन्या आणि अहज्याहची बहीण यहोशेबाने
अहज्याहचा पुत्र योआशला घेतले आणि ज्या राजपुत्रांची कत्तल
करण्यात येणार होती त्यामधून त्याला चोरले. त्याला आणि त्याच्या
दाईला विश्रांतिगृहात अथल्याहपासून लपवून ठेवले; म्हणून त्याचा
वध झाला नाही. 3 अथल्याहने देशावर राज्य केले त्या सहा वर्षापर्यंत
तो व त्याच्या दाईस याहवेहच्या मंदिरात लपवून ठेवण्यात आले
होते. 4 सातव्या वर्षी यहोयादाने शंभर तुकड्यांचे सरदार, गारदी
आणि पहारेकरी यांना बोलावून घेतले आणि त्यांना आपल्यासोबत
याहवेहच्या मंदिरात नेले. याहवेहच्या मंदिरात त्यांच्याशी करार आणि
शपथ घेऊन त्यांना राजाचा पुत्र दाखविला. 5 त्यांना आदेश देत तो
म्हणाला, “तुम्ही असे करावे: शब्बाथ दिवशी तुमच्यापैकी जे पहाऱ्यावर
असतील त्यातील—एकतृतीयांश राजमहालावर पहारा देतील. 6 आणि
एकतृतीयांश सूर वेशीवर आणि एकतृतीयांश पहारेकऱ्यांच्या मागच्या
वेशीवर, जे वेळोवेळी मंदिराची रक्षा करीत होते— 7 आणि तुमच्या दोन
तुकड्या ज्या शब्बाथ दिवसात कार्यासाठी नियुक्त करण्यात आल्या
आहेत, त्यांनी राजाकरिता याहवेहच्या मंदिराचे रक्षक म्हणून उभे राहावे.
8 तुम्ही सर्व आपआपली शस्त्रे हातात घेऊन राजाभोवती उभे राहावे.
जो कोणी तुमच्या रांगेच्याजवळ येण्याचा प्रयत्न करेल त्याला जिवे
मारावे. राजा जिथे जाईल तिथे तुम्ही त्याच्याजवळ राहावे.” 9 यहोयादा
याजकाच्या आज्ञेप्रमाणे शताधिपतींनी केले. प्रत्येकाने आपआपली
माणसे घेतली—जे शब्बाथाच्या दिवशी सेवेला येणार होते आणि
जे सेवा संपवून जात होते—ते सर्व यहोयादा याजकाजवळ आले.
10 याहवेहच्या मंदिरामधील दावीद राजाचे जे भाले व ढाली होत्या,
त्या अधिकाऱ्यांच्या हाती दिल्या. 11 प्रत्येकाच्या हातात शस्त्र घेऊन

पहारेकरी राजाभोवती; मंदिराच्या दक्षिणेकडून उत्तरेच्या बाजूपर्यंत;
वेदीजवळ व मंदिराजवळ उभे राहिले. 12 मग यहोयादाने राजाच्या
पुत्राला बाहेर आणले, त्याच्या शिरावर राजमुकुट ठेवला; त्याच्या
हातामध्ये कराराची प्रत दिली आणि त्याला राजा म्हणून घोषित केले.
मग त्यांनी त्याला अभिषेक केला आणि लोकांनी टाळ्या वाजविल्या
व मोठ्याने जयघोष करून ते म्हणाले, “राजा चिरायू होवो!” 13
जेव्हा अथल्याहने पहारेकऱ्यांचा आणि लोकांचा आवाज ऐकला, तेव्हा
ती त्यांच्याकडे याहवेहच्या मंदिरात आली. 14 तिने बघितले की
रीतीनुसार राजा खांबाजवळ उभा आहे. अधिकारी आणि कर्णेवादक
हे राजाजवळ उभे होते आणि राष्ट्रातील सर्व लोक आनंद करीत कर्णे
वाजवित होते. तेव्हा अथल्याहने आपली वस्त्रे फाडली आणि ओरडून
म्हणाली, “फितुरी रे, फितुरी!” 15 यहोयादा याजकाने नेमणूक केलेल्या
शताधिपतीच्या सेनाधिकाऱ्यांना आदेश दिला: “सैन्याच्या रांगेतून तिला
बाहेर काढा आणि जो कोणी तिच्यामागे जाईल त्याला तलवारीने मारा.”
याजकाने म्हटले होते, “तिला याहवेहच्या मंदिरात जिवे मारले जाऊ
नये.” 16 म्हणून ती घोडे जिथून राजवाड्याच्या मैदानात प्रवेश करतात
तिथे पोहोचताच त्यांनी तिला ताब्यात घेतले आणि तिथे तिला जिवे
मारण्यात आले. 17 मग यहोयादाने याहवेह आणि राजा आणि प्रजा
यांच्यात एक करार केला की ते याहवेहची प्रजा असणार. त्याने राजा
आणि प्रजा यांच्यामध्येही एक करारही केला. 18 देशातील सर्व लोक
बआलच्या मंदिराकडे गेले आणि त्यांनी ते तोडून टाकले. त्यांनी वेद्या
आणि मूर्ती फोडून त्याचे तुकडे केले आणि बआलचा पुजारी मत्तानचा
वेदींसमोर वध केला. मग यहोयादा याजकाने याहवेहच्या मंदिरावर
पहारेकरी नेमले. 19 त्याने त्याच्याबरोबर शताधिपती, गारदी, पहारेकरी
आणि देशातील सर्व लोकांना घेतले आणि एकत्र जाऊन याहवेहच्या
मंदिरातून राजाला खाली आणले आणि पहारेकऱ्यांच्या द्वारातून प्रवेश
करीत राजवाड्यात गेले. मग राजाने राजासनावर आपले स्थान घेतले.
20 राष्ट्रातील प्रत्येकजण आनंद करीत होता आणि शहर शांत झाले,
कारण राजवाड्यात अथल्याहचा तलवारीने वध करण्यात आला होता.
21 वयाच्या सातव्या वर्षी यहोआश राज्य करू लागला.

**12** येहूच्या सातव्या वर्षी यहोआश राज्य करू लागला आणि त्याने
यरुशलेमात चाळीस वर्षे राज्य केले. त्याच्या आईचे नाव सिब्या
होते; ती बेअर-शेबा येथील होती. 2 याजक यहोयादाने जितकी वर्षे जे
मार्गदर्शन केले होते तितकी वर्षे याहवेहच्या दृष्टीने योग्य ते यहोआशाने
केले. 3 तरी त्याने डोंगरावरील उच्चस्थळे नष्ट केली नाहीत आणि लोक
तिथे जाऊन यज्ञ करीत व धूप जाळीत असत. 4 यहोआश याजकांना
म्हणाला, “याहवेहच्या मंदिरात पवित्र अर्पण म्हणून आणलेले सर्व
पैसे, शिरगणतीत जमा केलेले पैसे, वैयक्तिक नवसातून मिळालेले
पैसे आणि मंदिरात स्वेच्छेने आणलेले सर्व पैसे जमा करा. 5 प्रत्येक
याजकाने त्याच्या खजिनदारांपैकी एकाकडून पैसे घ्यावे आणि नंतर
मंदिरात जी काही मोडतोड झाली असेल ती दुरुस्त करावी.” 6 परंतु
यहोआश राजाच्या कारकिर्दीतील तेवीस वर्षापर्यंत याजकांनी मंदिराची
डागडुजी केली नव्हती. 7 तेव्हा यहोआश राजाने यहोयादा याजक व
इतर याजकांना बोलाविले आणि विचारले, “तुम्ही मंदिराची डागडुजी
अजूनही का केली नाही? तुमच्या खजिनदारांकडून आणखी पैसे घेऊ
नका, तर तो पैसा आता मंदिराच्या डागडुजीसाठी देण्यात यावा.” 8 मग
याजकांनी सहमती दर्शविली की ते लोकांकडून आता पैसा घेणार नाही
आणि तसेच ते मंदिराची डागडुजी देखील करणार नाही. 9 यहोयादा
याजकाने एक पेटी घेतली व तिच्या झाकणाला एक छिद्र पाडले. ती पेटी
त्याने याहवेहच्या मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ वेदीच्या उजव्या बाजूला
ठेवली. प्रवेशद्वाराचे पहारेकरी याजक याहवेहच्या मंदिरात आणलेले सर्व
पैसे पेटीत घालू लागले. 10 जेव्हाही ते पाहत की पेटीमध्ये अधिक
पैसा जमा झाला आहे, तेव्हा राजाचा चिटणीस आणि प्रमुख याजक
येत आणि याहवेहच्या मंदिरात आलेला पैसा मोजून पिशव्यांत भरून
ठेवीत असे. 11 रक्कम मोजून आणि तोलून झाल्यानंतर मंदिराच्या
कामावर देखरेख ठेवण्यासाठी नेमलेल्या माणसांना पैसे देण्यात येत
असत. त्याद्वारे त्यांनी याहवेहच्या मंदिरावर काम करणारे सुतार आणि
बांधकाम करणारे, 12 गवंडी आणि दगड फोडणारे यांना पैसे दिले.
त्यांनी याहवेहच्या मंदिराच्या दुरुस्तीसाठी लाकूड आणि दगड घडविणे
केले आणि मंदिराच्या दुरुस्तीचे इतर सर्व खर्च पूर्ण केले. 13 जो
पैसा मंदिरामध्ये आणत होते याच्यात याहवेहच्या मंदिरात वापरण्यात
येणारे चांदीचे पेले, कातऱ्या, वाट्या, कर्णे किंवा सोन्या-चांदीच्या इतर
साहित्य यावर खर्च करण्यात आला नाही; 14 तर हा पैसा कामगारांना
पुरविला जात होता जे याहवेहच्या मंदिराची डागडुजी करीत होते. 15
ज्याच्या स्वाधीन हा पैसा कामगारांना देण्यासाठी होता त्यांच्याकडून
पैशाचा हिशोब घेण्याची गरज नव्हती, कारण त्यांनी पूर्ण प्रामाणिकपणे
काम केले. 16 त्याचप्रमाणे दोषार्पणाचा आणि पापार्पणाचा पैसा
याहवेहच्या मंदिरात आणला नाही; तो याजकांचा होता. 17 या वेळेला
अरामचा राजा हजाएलाने गथ शहरावर स्वारी केली आणि ते काबीज
केले. मग यरुशलेमावर स्वारी करण्यासाठी त्याने कूच केले. 18
तेव्हा यहूदीयाचा राजा यहोआशने आपले पूर्वज म्हणजे—यहोशाफाट,
यहोराम, अहज्याह या यहूदीयाच्या राजांनी—आणि त्याने स्वत:
समर्पित केलेल्या भेटवस्तू आणि याहवेहच्या मंदिरातील राजवाड्याच्या
खजिन्यातील सर्व सोने त्याने अरामचा राजा हजाएलकडे पाठवून दिले.
मग तो यरुशलेममधून निघून गेला. 19 योआशाचा बाकीचा इतिहास,
यहूदीयाच्या राजांचा इतिहास या ग्रंथात नमूद केला नाही काय? 20
योआशाच्या अधिकाऱ्यांनीच त्याच्याविरुद्ध कट रचला आणि सिल्लाकडे
खाली जाणाऱ्या रस्त्यावर बेथ मिल्लो येथे त्याचा वध केला. 21 ज्या
अधिकाऱ्यांनी त्याचा वध केला ते शिमाथाचा पुत्र योजाखार व शोमेराचा
पुत्र यहोजाबाद हे होते. तो मरण पावला आणि त्याला दावीदनगरीत
पूर्वजांच्या सोबत मूठमाती देण्यात आली. त्याचा पुत्र अमस्याह हा
त्याच्या जागी राजा झाला.

**13** यहूदीयाचा राजा अहज्याहचा पुत्र योआशच्या कारकिर्दीच्या
तेविसाव्या वर्षी येहूचा पुत्र यहोआहाज शोमरोनमध्ये इस्राएलावर

राज्य करू लागला आणि त्याने सतरा वर्षे राज्य केले. 2 पण त्याने
याहवेहच्या दृष्टीने वाईट ते केले. नेबाटाचा पुत्र यरोबोअमने इस्राएलांकडून
जी पातके करविली ती त्याने अनुसरली आणि त्यापासून तो मागे
फिरला नाही. 3 त्याच्या पातकांमुळे याहवेहचा क्रोध इस्राएलावर
भडकला आणि त्यांनी त्याला अरामचा राजा हजाएल आणि त्याचा पुत्र
बेन-हदादच्या अधीनतेमध्ये बराच काळ ठेवले. 4 तेव्हा यहोआहाजाने
याहवेहकडे विनवणी केली आणि याहवेहने त्याचे ऐकले, कारण अरामचा
राजा इस्राएलाचा अत्यंत क्रूरपणे छळ करीत होता हे त्यांनी पाहिले.
5 याहवेहने इस्राएली लोकांना सोडविणारा पाठविला आणि त्यांची
अरामी लोकांपासून सुटका झाली. त्यानंतर इस्राएली लोक पूर्वीप्रमाणेच
आपआपल्या घरात राहू लागले. 6 परंतु ते यरोबोअमाच्या घराण्याने
इस्राएली लोकांना जी पातके करण्यास लावली होती, त्या पातकांपासून
मागे फिरले नाहीत. शोमरोनात अशेरा मूर्तीचे स्तंभ देखील उभे होते. 7
यहोआहाजाकडे पन्नास घोडेस्वार, दहा रथ आणि दहा हजार पायदळ
याशिवाय काही शिल्लक राहिले नाही, कारण अरामी राजाने त्याच्या
बाकीच्या सैन्याचा पायांखालील धुळीच्या कणांप्रमाणे संहार केला
होता. 8 यहोआहाजाच्या कारकिर्दीच्या इतर घटना, त्याने जे सर्व केले
आणि त्याचे पराक्रम इस्राएलच्या राजांच्या इतिहासाच्या पुस्तकात
नमूद केलेले नाहीत काय? 9 यहोआहाज आपल्या पूर्वजांना जाऊन
मिळाला आणि त्याला शोमरोनात मूठमाती देण्यात आली. त्याच्यानंतर
त्याचा पुत्र योआश त्याच्या जागी राज्य करू लागला. 10 यहूदीयाचा
राजा यहोआशच्या कारकिर्दीच्या सदतिसाव्या वर्षी यहोआहाजाचा
पुत्र योआश शोमरोनात इस्राएलावर राज्य करू लागला आणि त्याने
सोळा वर्षे राज्य केले. 11 त्याने याहवेहच्या दृष्टीने वाईट ते केले आणि
नेबाटाचा पुत्र यरोबोअमच्या पातकांपासून मागे फिरला नाही; जी पातके
त्याने इस्राएली लोकांना करण्यास लावली होती, ती तो करत राहिला.
12 योआशाच्या कारकिर्दीचा बाकीचा इतिहास आणि यहूदीयाचा राजा
अमस्याहबरोबर झालेले त्याचे युद्ध व त्याचे पराक्रम यांची नोंद इस्राएली
राजांचा इतिहास या ग्रंथात केला नाही काय? 13 योआश आपल्या
पूर्वजांना जाऊन मिळाला आणि यरोबोअम त्याच्या राजासनावर बसला.
योआशाला शोमरोनात इस्राएलांच्या राजांसोबत मूठमाती देण्यात आली.
14 आता अलीशा ज्या आजाराने मरणार होता त्या आजाराने तो ग्रस्त
झाला. इस्राएलाचा राजा योआश त्याला भेटावयाला खाली आला आणि
त्याच्यासाठी रडला. तो रडत म्हणाला, “माझ्या पित्या! माझ्या पित्या!
तुम्ही इस्राएलचे रथ आणि त्याचे स्वार!” 15 अलीशा म्हणाला, “एक
धनुष्य व काही बाण घे.” आणि त्याने तसेच केले. 16 “आपल्या हातात
धनुष्य घे,” तो इस्राएलाच्या राजाला म्हणाला. जेव्हा त्याने ते आपल्या
हातात घेतले, तेव्हा अलीशाने आपला हात राजाच्या हातावर ठेवला.
17 “पूर्वेकडील खिडकी उघड.” असे अलीशाने म्हटले आणि त्याने
ती उघडली. तेव्हा अलीशा म्हणाला, “बाण सोड!” आणि त्याने बाण
सोडला. तेव्हा अलीशाने जाहीर केले, “हा याहवेहचा विजयी बाण,
अरामावर विजय मिळवून देणारा बाण आहे. तू अफेक येथे अरामी
लोकांचा संपूर्ण नाश करशील.” 18 नंतर त्याने म्हटले, “बाण घे,”
आणि राजाने बाण घेतले. अलीशा इस्राएलच्या राजाला म्हणाला, “ते
बाण जमिनीवर मार.” त्याने ते बाण तीन वेळा जमिनीवर मारले आणि
थांबला. 19 परमेश्वराचा मनुष्य त्याच्यावर रागावला आणि म्हणाला,
“तू पाच किंवा सहा बाण जमिनीवर सोडावयास हवे होतेस; तेव्हा
तू अरामचा पराभव आणि पूर्ण नाश केला असतास. परंतु आता तू
फक्त तीन वेळाच त्यांचा पराभव करशील.” 20 अलीशा मरण पावला
व त्याला मूठमाती देण्यात आली. मोआबातील लुटारूंच्या टोळ्या
प्रत्येक वसंतऋतूत देशावर हल्ला करीत असत. 21 एके दिवशी काही
इस्राएली लोक एका व्यक्तीला मूठमाती देत असताना त्यांनी लुटारूंची
टोळी पाहिली; म्हणून त्यांनी त्या मनुष्याचा मृतदेह अलीशाच्या कबरेत
लोटून दिला. त्या मृत शरीराला अलीशाच्या अस्थींचा स्पर्श होताच,
तो मृत मनुष्य जिवंत झाला आणि आपल्या पायांवर उभा राहिला.
22 यहोआहाज राजाच्या संपूर्ण कारकिर्दीत अरामचा राजा हजाएल
इस्राएली लोकांचा छळ करीत राहिला. 23 परंतु याहवेहची कृपा इस्राएली
लोकांवर होती आणि अब्राहाम, इसहाक व याकोब यांच्याशी केलेल्या
करारामुळे त्यांनी त्यांच्यावर दया केली आणि त्यांची काळजी घेतली.
आजपर्यंत त्यांचा नाश करण्याची किंवा त्यांना त्यांच्या उपस्थितीतून
घालवून देण्याची त्यांची इच्छा नव्हती. 24 अरामचा राजा हजाएल
मरण पावला आणि त्याचा पुत्र बेन-हदाद त्याच्या जागी राज्य करू
लागला. 25 मग यहोआहाजचा पुत्र यहोआशने हजाएलचा पुत्र बेन-
हदादच्या हातून त्याचा पिता यहोआहाजशी केलेल्या युद्धात घेतलेली
नगरे परत हस्तगत केली. योआशाने त्याचा तीनदा पराभव केला आणि
इस्राएलाची नगरे परत घेतली.

**14** यहोआहाजचा पुत्र इस्राएलाचा राजा यहोआशच्या कारकिर्दीच्या
दुसऱ्या वर्षी यहूदीयाचा राजा योआशचा पुत्र अमस्याह राज्य करू
लागला. 2 वयाच्या पंचवीसाव्या वर्षी तो राजा झाला, त्याने यरुशलेमात
एकोणतीस वर्षे राज्य केले. त्याच्या आईचे नाव यहोअदान होते; ती
यरुशलेमची होती. 3 त्याने याहवेहच्या दृष्टीने योग्य ते केले, परंतु त्याचा
पिता दावीदासारखे नव्हे. त्याने प्रत्येक गोष्टीत त्याचा पिता योआशचे
अनुकरण केले. 4 तरी त्याने डोंगरावरील उच्चस्थळे नष्ट केली नाहीत
आणि लोक तिथे जाऊन यज्ञ करीत व धूप जाळीत असत. 5 राज्य
त्याच्या पूर्णपणे नियंत्रणात आल्यानंतर त्याने त्याचा पिता राजाचा वध
करणाऱ्या अधिकाऱ्यांना मृत्युदंड दिला. 6 परंतु त्याने त्यांच्या मुलांना
जिवे मारले नाही, कारण नियमशास्त्रात, मोशेच्या पुस्तकात याहवेहने
आज्ञा दिली होती: “आईवडिलांना त्यांच्या मुलांच्या कारणामुळे जिवे
मारू नये, तसेच आईवडिलांच्या कारणामुळे त्यांच्या मुलांना जिवे
मारू नये. प्रत्येकजण स्वतःच्या पापासाठी मरतील.” 7 त्याने क्षार
खोऱ्यात दहा हजार एदोमी लोकांना ठार केले. त्याने सेला नगरावर
हल्ला करून ते जिंकले व त्याचे नाव योकथएल असे ठेवले, आजही
ते याच नावाने ओळखले जाते. 8 मग अमस्याहने इस्राएलचा राजा,
येहूचा पुत्र यहोआहाजचा पुत्र यहोआशला दूतांच्या द्वारे संदेश पाठवून

असे आव्हान केले, “चल ये, युद्धात एकमेकांचा सामना करू.” 9 परंतु
इस्राएलचा राजा यहोआशने यहूदीयाचा राजा अमस्याहला उत्तर दिले:
“लबानोनमधील एका काटेरी झुडूपाने लबानोनमधील एका गंधसरूला
निरोप पाठवला की, ‘तुझ्या मुलीचा विवाह माझ्या मुलाशी करून दे.’
तेव्हा लबानोनमधून एका जंगली श्वापदाने येऊन त्या काटेरी झुडूपाला
पायाखाली तुडविले. 10 खचितच तू एदोमाचा पराभव केला आहेस
आणि त्यामुळे तू उन्मत्त झाला आहेस. त्याचे गौरव करीत तू घरीच
राहा! संकटांला आमंत्रण देऊन स्वतःचा आणि यहूदीयाचा नाश का
करावा?” 11 परंतु अमस्याहने ऐकले नाही, तेव्हा इस्राएलाचा राजा
यहोआशने हल्ला केला. त्याने आणि यहूदीयाच्या राजा अमस्याहने
यहूदीयातील बेथ-शेमेश येथे एकमेकांचा सामना केला. 12 इस्राएलने
यहूदाहचा पराभव केला आणि प्रत्येकजण आपआपल्या घरी पळून
गेले. 13 इस्राएलाचा राजा यहोआशने यहूदीयाचा राजा अहज्याहचा
पुत्र, योआशाचा पुत्र अमस्याहला बेथ-शेमेश येथे कैद केले. नंतर
योआश यरुशलेमास गेला आणि यरुशलेमची एफ्राईमच्या दरवाजापासून
कोपऱ्याच्या दरवाजापर्यंत भिंत त्याने पाडून टाकली; जी चारशे हात
लांब होती. 14 याहवेहच्या मंदिरातील आणि राजवाड्याच्या तिजोरीतून
सर्व सोने, चांदी व सापडतील ती पात्रे त्याने घेतली, त्याने कैद्यांना
सुद्धा घेतले आणि तो शोमरोनास परतला. 15 यहोआशाचा बाकीचा
इतिहास, त्याने काय केले आणि त्याचे पराक्रम, तसेच यहूदीयाच्या
अमस्याह राजाबरोबर झालेले त्याचे युद्ध यांची नोंद इस्राएली राजांचा
इतिहासग्रंथात नमूद केलेली नाही काय? 16 यहोआश आपल्या पूर्वजांना
जाऊन मिळाला आणि त्याला इस्राएली राजांसोबत शोमरोनात मूठमाती
देण्यात आली. आणि त्याच्यानंतर त्याचा पुत्र यरोबोअम हा त्याच्या
जागी राज्य करू लागला. 17 इस्राएलचा राजा यहोआहाजचा पुत्र
यहोआशच्या मृत्यूनंतर यहूदीयाचा राजा योआशचा पुत्र अमस्याह
पंधरा वर्षे जगला. 18 अमस्याहाच्या राज्यकाळातील इतर घटना,
यहूदीयाच्या राजांच्या इतिहासग्रंथात लिहिलेल्या नाहीत काय? 19
त्यांनी यरुशलेममध्ये त्याच्याविरुद्ध कट रचला आणि तो लाखीशकडे
पळून गेला, परंतु त्यांनी त्याच्यामागे लाखीशकडे माणसे पाठवून दिली
आणि त्याला तिथे मारले. 20 त्याला घोड्यावरून परत आणण्यात आले
आणि यरुशलेममध्ये दावीदाच्या शहरात त्याच्या पूर्वजांबरोबर पुरण्यात
आले. 21 मग यहूदीयाच्या सर्व लोकांनी अजऱ्याह ला घेतले, जो सोळा
वर्षांचा होता आणि त्याला त्याचा पिता अमस्याहच्या जागी राजा केले.
22 राजा अमस्याह आपल्या पूर्वजांना मिळाल्यानंतर अजऱ्याहाने एलाथ
नगर पुन्हा वसविले व ते यहूदीयाला जोडले. 23 यहूदीयाचा राजा
योआशाचा पुत्र अमस्याहच्या कारकिर्दीच्या पंधराव्या वर्षी इस्राएलाचा
राजा योआशचा पुत्र यरोबोअम शोमरोनात राज्य करू लागला आणि
त्याने एकेचाळीस वर्षे राज्य केले. 24 त्याने याहवेहच्या दृष्टीने वाईट ते
केले, नेबाटाचा पुत्र यरोबोअमाने जी पातके इस्राएलास करावयास
लावली तो त्या पातकांपासून मागे फिरला नाही. 25 त्याने इस्राएलाची
सीमा लेबो हमाथपासून अराबाच्या समुद्रापर्यंत पुन: स्थापित केली.
याहवेह इस्राएलांच्या परमेश्वराच्या वचनाप्रमाणे गथ-हेफेर येथील संदेष्टा
अमित्तयाचा पुत्र योनाहद्वारे हे भविष्य केले होते. 26 इस्राएलातील
प्रत्येकजण, मग तो गुलाम असो वा स्वतंत्र असो, त्यांचा फार छळ होत
आहे हे याहवेहने पाहिले; त्यांना साहाय्य करणारे कोणीही नव्हते. 27
आणि इस्राएलचे नाव पृथ्वीवरून पुसून टाकीन असे याहवेहने कधीच
म्हटले नाही, मग याहवेहने योआशाचा पुत्र यरोबोअमद्वारे त्यांची सुटका
केली. 28 यरोबोअमचे बाकीचे जीवनचरित्र, त्याने केलेली कृत्ये,
त्याचे थोर सामर्थ्य, त्याचे युद्ध आणि त्याने पूर्वी यहूदीयाने काबीज
केलेले दिमिष्क व हमाथ परत कसे मिळविले या सर्व हकिकतीचे
वर्णन, इस्राएली राजांच्या इतिहासग्रंथात लिहून ठेवले नाही काय? 29
यरोबोअम त्याचे पूर्वज इस्राएली राजांना मिळाला. आणि त्याच्यानंतर
त्याचा पुत्र जखऱ्याह त्याच्या जागी इस्राएलावर राज्य करू लागला.

**15** इस्राएलाचा राजा यरोबोअमच्या कारकिर्दीच्या सत्ताविसाव्या वर्षी
यहूदीयाचा राजा अमस्याहाचा पुत्र अजऱ्याह राज्य करू लागला.
2 तो वयाच्या सोळाव्या वर्षी राजा झाला आणि त्याने यरुशलेममध्ये
बावन्न वर्षे राज्य केले. त्याच्या आईचे नाव यकोल्याह. ती यरुशलेम
येथील होती. 3 त्याने त्याचा पिता अमस्याहप्रमाणे याहवेहच्या दृष्टीने
जे योग्य ते केले. 4 तरी त्याने डोंगरावरील उच्चस्थळे नष्ट केली
नाहीत आणि लोक तिथे जाऊन यज्ञ करीत व धूप जाळीत असत. 5
याहवेहने राजाला पीडले आणि तो मरेपर्यंत त्याला कुष्ठरोग होता. तो
वेगळ्या घरात राहिला. राजाचा पुत्र योथामाकडे राजवाड्याचा कारभार
होता आणि तो देशाच्या जनतेवर शासन करीत असे. 6 अजऱ्याहच्या
कारकिर्दीतील इतर घटना आणि त्याने जे काही केले ते यहूदीयाच्या
राजांच्या इतिहासाच्या पुस्तकात लिहिलेले नाही काय? 7 अजऱ्याह
आपल्या पूर्वजांबरोबर विसावा पावला आणि त्याला त्यांच्याजवळ
दावीदनगरीत पुरण्यात आले. आणि त्याचा वारस म्हणून त्याचा पुत्र
योथाम राजा झाला. 8 यहूदीयाचा राजा अजऱ्याहच्या अडतिसाव्या वर्षी
यरोबोअमाचा पुत्र जखऱ्याह शोमरोनात इस्राएलावर राजा झाला आणि
त्याने सहा महिने राज्य केले. 9 आपल्या पूर्वजांप्रमाणेच याहवेहच्या
दृष्टीने वाईट ते त्याने केले. नेबाटाचा पुत्र यरोबोअमाने जी पातके
इस्राएलास करावयास लावली तो त्या पातकांपासून मागे फिरला
नाही. 10 याबेशाचा पुत्र शल्लूमाने जखऱ्याहविरुद्ध कट रचला. त्याने
लोकांसमोर त्याच्यावर हल्ला करून ठार त्याला केले आणि तो त्याच्या
ठिकाणी राज्य करू लागला. 11 जखऱ्याहच्या कारकिर्दीतील इतर
घटना इस्राएली राजांच्या इतिहासग्रंथात लिहिलेल्या नाहीत काय? 12
याहवेहने येहूला दिलेले वचन पूर्ण झाले: “चौथ्या पिढीपर्यंत तुझे वंशज
इस्राएलच्या राजासनावर बसतील.” 13 यहूदीयाचा राजा उज्जीयाहच्या
एकोणचाळिसाव्या वर्षी याबेशाचा पुत्र शल्लूम इस्राएलवर राज्य करू
लागला आणि त्याने शोमरोनमध्ये एक महिना राज्य केले. 14 नंतर
गादीचा पुत्र मनाहेम हा तिरजाहवरून शोमरोनास गेला आणि त्याने
याबेशाचा पुत्र शल्लूमास ठार मारले आणि तो त्याच्या ठिकाणी राज्य
करू लागला. 15 शल्लूम राजाच्या इतर घटना आणि त्याने केलेला

कट यांची नोंद इस्राएली राजांचा इतिहासग्रंथात केलेली नाही काय?
16 त्यावेळी, तिरजाहपासून निघालेल्या मनाहेमाने तिफसाह आणि
शहरातील आणि सीमेच्या क्षेत्रातील सर्वांवर हल्ला केला, कारण
त्यांनी आपली वेस उघडण्यास नकार दिला. त्याने त्यांना मार दिला
आणि सर्व गरोदर महिलांना चिरून टाकले. 17 यहूदीयाचा राजा
अजऱ्याहच्या कारकिर्दीच्या एकोणचाळिसाव्या वर्षी गादीचा पुत्र मनाहेम
हा इस्राएलाचा राजा झाला, त्याने शोमरोनात दहा वर्षे राज्य केले. 18
याहवेहच्या दृष्टीने वाईट ते त्याने केले. आपल्या संपूर्ण कारकिर्दीत
नेबाटाचा पुत्र यरोबोअमाने जी पातके इस्राएलास करावयास लावली,
त्या पातकांपासून तो मागे फिरला नाही. 19 तेव्हा अश्शूरचा राजा
पूल ने देशावर हल्ला केला आणि मनाहेमने त्याचा पाठिंबा मिळावा
आणि आपले राज्य स्थिर व्हावे यासाठी त्याला चांदीचे हजार तालांत
दिले. 20 मनाहेमाने हा पैसा इस्राएलमधून वसूल केला. अश्शूरच्या
राजाला द्यायला प्रत्येक श्रीमंत व्यक्तीने पन्नास चांदीचे शेकेल द्यायचे
होते. मग अश्शूरचा राजा मागे फिरला आणि देशात राहिला नाही.
21 मनाहेमाच्या राजवटीतील इतर घटना आणि त्याने जे सर्व केले हे
इस्राएली राजांचा इतिहासाग्रंथात नमूद करून ठेवलेले नाही काय?
22 मनाहेम आपल्या पूर्वजांना जाऊन मिळाला. आणि त्याच्या जागी
त्याचा पुत्र पेकाहियाह हा राज्य करू लागला. 23 यहूदीयाचा राजा
अजऱ्याहाच्या कारकिर्दीच्या पन्नासाव्या वर्षी मनाहेमचा पुत्र पेकाहियाह
शोमरोनात इस्राएलवर राज्य करू लागला, त्याने दोन वर्षे राज्य केले. 24
पेकाहियाहने याहवेहच्या दृष्टीने वाईट ते केले. नेबाटाचा पुत्र यरोबोअमाने
जी पातके इस्राएलास करावयास लावली होती, तो त्या पातकांपासून
मागे फिरला नाही. 25 त्याचा एक मुख्य अधिकारी, रमाल्याहचा पुत्र
पेकहने त्याच्याविरुद्ध कट रचला. गिलआदी लोकांपैकी पन्नास लोकांना
बरोबर घेऊन त्याने पेकाहियाहला, अर्गोब आणि अरये यांच्यासह
शोमरोन येथील राजवाड्याच्या वाड्यात मारले. पेकहने पेकाहियाहयाचा
वध केला आणि त्याच्या जागी राजा झाला. 26 पेकाहियाह राजाच्या
राजवटीतील इतर घटना आणि त्याने जे काही केले ते इस्राएली
राजांचा इतिहासाग्रंथात लिहून ठेवलेले नाही काय? 27 यहूदीयाचा
राजा अजऱ्याहच्या बावन्नाव्या वर्षी रमाल्याहचा पुत्र पेकह शोमरोनात
इस्राएलावर राज्य करू लागला आणि त्याने वीस वर्ष राज्य केले. 28
त्याने याहवेहच्या दृष्टीने वाईट ते केले. नेबाटाचा पुत्र यरोबोअमाने
जी पातके इस्राएलास करावयास लावली तो त्या पातकांपासून मागे
फिरला नाही. 29 इस्राएलचा राजा पेकहच्या कारकिर्दीत अश्शूरचा राजा
तिग्लथ-पिलेसर याने इस्राएलवर स्वारी केली आणि इय्योन, आबेल-
बेथ-माकाह, यानोहा, केदेश, हासोर, गिलआद, गालील व नफतालीचा
सर्व भाग जिंकला आणि लोकांना कैद करून अश्शूरास नेले. 30 नंतर
एलाहचा पुत्र होशेने रमाल्याहचा पुत्र पेकहाच्या विरुद्ध कट रचला. त्याने
त्याच्यावर हल्ला केला आणि त्याला ठार केले व त्याच्या ठिकाणी राज्य
करू लागला. ही घटना उज्जीयाहचा पुत्र योथामाच्या कारकिर्दीच्या
विसाव्या वर्षी घडली. 31 पेकहच्या राजवटीतील इतर घटना आणि त्याने
जे सर्व केले ते इस्राएली राजांच्या इतिहासग्रंथात नमूद केलेले नाही
काय? 32 इस्राएलाचा राजा रमाल्याहचा पुत्र पेकह याच्या दुसऱ्या वर्षी
यहूदीयाचा राजा उज्जीयाह याचा पुत्र योथाम राज्य करू लागला. 33 तो
पंचवीस वर्षांचा होता तेव्हा तो राजा झाला आणि त्याने यरुशलेमात
सोळा वर्षे राज्य केले. त्याच्या आईचे नाव यरुशा, ती सादोकची
कन्या होती. 34 आपल्या पिता उज्जीयाह प्रमाणे त्यानेही याहवेहच्या
दृष्टीने जे योग्य ते केले, 35 तथापि उच्च स्थाने काढली गेली नव्हती;
लोकांनी त्यांची अर्पणे व धूप जाळणे सुरूच ठेवले. योथामाने याहवेहच्या
मंदिराचा वरील दरवाजा पुन्हा बांधला. 36 योथामाच्या राजवटीतील इतर
घटना आणि त्याने काय केले हे यहूदीयाच्या राजांच्या इतिहासग्रंथात
लिहिलेले नाही काय? 37 (त्या दिवसात याहवेहने अरामचा राजा रसीन
आणि रमाल्याहचा पुत्र पेकह यांना यहूदीयावर स्वारी करण्यास उद्युक्त
केले.) 38 योथाम त्याच्या पूर्वजांबरोबर विसावा पावला आणि त्याला
त्यांच्याजवळ, त्याचा पिता दावीदाच्या नगरात पुरण्यात आले. आणि
वारस म्हणून त्याचा पुत्र आहाज राजा झाला.

**16** इस्राएलाचा राजा रमाल्याहचा पुत्र पेकहच्या कारकिर्दीच्या
सतराव्या वर्षी यहूदीयाचा राजा योथामचा पुत्र आहाज राज्य
करू लागला. 2 वयाच्या विसाव्या वर्षी आहाज राजा झाला आणि
त्याने यरुशलेममध्ये सोळा वर्षे राज्य केले. त्याचे वडील दावीदाने
केले त्याप्रमाणे, याहवेह त्याच्या परमेश्वराच्या दृष्टीने जे योग्य ते त्याने
केले नाही. 3 त्याने इस्राएलच्या राजांच्या मार्गांचे अनुसरण केले
आणि आपल्या पुत्राचे अग्नीत अर्पण केले, राष्ट्रांच्या ज्या अमंगळ
प्रथा याहवेहने इस्राएल लोकांतून काढून टाकल्या होत्या त्यात तो
गुंतला. 4 त्याने डोंगरावर, टेकड्यांवर आणि प्रत्येक घनदाट वृक्षाखाली
यज्ञार्पणे केली आणि धूप जाळला. 5 मग अरामचा राजा रसीन आणि
इस्राएलाचा राजा रमाल्याहचा पुत्र पेकह यांनी यरुशलेमवर हल्ला
केला आणि आहाजाला वेढा दिला, परंतु ते त्याच्यावर विजय प्राप्त
करू शकले नाहीत. 6 त्यावेळी अरामचा राजा रसीनने एलाथ हे शहर
जिंकून घेतले आणि त्याने यहूद्यांना हुसकावून लावले. ते अरामात
सामील केले. त्या शहरातून व एदोमी लोकांनी येऊन एलाथ येथे
वस्ती केली आणि आजही अरामी लोक तिथे राहत आहेत. 7 आहाज
राजाने अश्शूरचा राजा तिग्लथ-पिलेसरकडे आपले दूत पाठवून त्याला
संदेश दिला, "मी तुमचा दास आणि पुत्र आहे. वर येऊन अरामी राजा
आणि इस्राएली राजा यांच्यापासून माझा बचाव करा, ज्यांनी माझ्यावर
आक्रमण केले आहे." 8 आणि आहाजाने याहवेहच्या मंदिरातील आणि
राजवाड्यातील भांडारांतील चांदी आणि सोने घेतले आणि अश्शूरच्या
राजाला भेट म्हणून दिल्या. 9 अश्शूरच्या राजाने त्याची मागणी ऐकली.
त्याने दिमिष्कावर हल्ला केला आणि त्याला ताब्यात घेतले. तेथील
लोकांना धरून कीर येथे नेले आणि रसीनलाही ठार मारले. 10 मग
आहाज राजा तिग्लथ-पिलेसर अश्शूरच्या राजाला भेटावयास दिमिष्क
येथे गेला. त्याने दिमिष्क येथे एक वेदी पाहिली आणि त्याने, तिचा
आकार व आराखडा तयार करून तो उरीयाह याजकाकडे पाठवून दिला.

11 आहाज राजाने दिमिष्क येथून पाठविलेल्या सर्व आराखड्यानुसार
उरीयाह याजकाने एक वेदी बांधली आणि राजा आहाज परत येण्यापूर्वी
ती पूर्ण केली. 12 जेव्हा राजा दिमिष्क येथून परत आला आणि
त्याने वेदी पाहिली, तो वेदीजवळ गेला आणि त्यावर त्याने अर्पण
सादर केले. 13 त्याने वेदीवर त्याचे होमार्पण आणि अन्नार्पण अर्पण
केले, त्याने आपले पेयार्पण अर्पण ओतले, आणि शांत्यर्पणाचे रक्त
वेदीवर शिंपडले. 14 मग त्याने कास्य वेदी जी याहवेहच्या समोर होती,
ती त्याने मंदिराच्या पुढून आणली—नवीन वेदी आणि याहवेहच्या
मंदिराच्या मधून आणली—आणि नवीन वेदीच्या उत्तरेस ठेवली. 15 मग
आहाज राजाने उरीयाह याजकाला हे आदेश दिले: “या नव्या मोठ्या
वेदीवर सकाळचे होमार्पण, संध्याकाळचे अन्नार्पण, राजाची होमार्पण,
अन्नार्पण आणि देशातील सर्व लोकांची होमार्पण, आणि त्यांची पेयार्पण
ही अर्पण करीत जा. होमार्पणाचे सर्व रक्त आणि यज्ञाचे सर्व रक्त या
वेदीवर शिंपडावे. कास्याची जुनी वेदी माझ्यासाठी शकुन पाहण्यासाठी
असावी.” 16 आहाज राजाने आदेश दिल्याप्रमाणे उरीयाह याजकाने
केले. 17 आहाज राजाने बैठकीवरचे नक्षीकाम काढून टाकले आणि
त्यावरील पाण्याची टाकी आणि त्यांचे आधार काढून टाकले. कास्याच्या
बैलांच्या पाठीवर बसविलेले हौदही त्याने काढले आणि ते दगडाच्या
ओट्यावर ठेवले. 18 अश्शूरच्या राजामुळे त्याने शब्बाथ दिवशी वापरल्या
जाणाऱ्या याहवेहच्या मंदिरातील द्वारमंडप आणि राजासाठी बाहेरचा
दरवाजा काढून टाकला. 19 आहाजाच्या कारकिर्दीतील इतर घटना
आणि त्याने काय केले हे यहूदीयाच्या राजांच्या इतिहासग्रंथात लिहिलेले
नाही काय? 20 आहाज आपल्या पूर्वजांबरोबर विसावा पावला आणि
त्याला त्यांच्याजवळ दावीदाच्या नगरात पुरण्यात आले. त्याचा पुत्र
हिज्कीयाह वारस म्हणून राजा झाला.

**17** यहूदीयाचा राजा आहाजच्या राजवटीच्या बाराव्या वर्षी एलाहचा
पुत्र होशे शोमरोनात इस्राएलावर राज्य करू लागला, त्याने
नऊ वर्षे राज्य केले. 2 त्याने याहवेहच्या दृष्टीत वाईट ते केले, परंतु
त्याच्यापूर्वी जे इस्राएलचे राजा होऊन गेले त्यांच्याइतके केले नाही. 3
अश्शूरचा राजा शल्मनेसरने होशेवर हल्ला करून, त्याला जहागीरदार
केले आणि त्याला कर द्यावा लागला. 4 परंतु अश्शूरच्या राजाला
होशे फितूर झाल्याचे कळले, कारण त्याने इजिप्त देशाचा राजा सो
याच्याकडे दूत पाठविले होते, आणि राजाला निरोप दिला आणि
त्याने अश्शूरच्या राजाला दरवर्षीप्रमाणे कर देण्याचे नाकारले. म्हणून
अश्शूरचा राजा शल्मनेसरने त्याला कैद केले आणि त्याला तुरुंगात
डांबले. 5 आता अश्शूरच्या राजाने संपूर्ण देशावर आक्रमण केले आणि
शोमरोनवर चालून गेला आणि तीन वर्षे त्याला वेढा घातला. 6 होशेच्या
कारकिर्दीच्या नवव्या वर्षी अश्शूरच्या राजाने शोमरोन ताब्यात घेतले
आणि इस्राएली लोकांना बंदिवान करून अश्शूरला नेले आणि तिथे हलह
आणि हाबोर नदीच्या काठावर वसलेल्या गोजान भागात तसेच मेदिया
प्रदेशातील नगरांमध्ये वसविले. 7 हे सर्व यासाठी घडले की इस्राएलने
याहवेह त्यांच्या परमेश्वराविरुद्ध पाप केले, ज्यांनी त्यांना इजिप्तचा
राजा फारोहच्या हातून इजिप्तच्या गुलामगिरीतून सोडवून बाहेर आणले
होते, त्यांनी इतर दैवतांची उपासना केली 8 आणि जी राष्ट्रे याहवेहने
त्यांच्यापुढून घालवून दिली होती, त्यांच्या चालीरीतींचे, त्याचप्रमाणे
इस्राएली राजांनी घातलेल्या चालीरीतींचे अनुसरण केले. 9 इस्राएली
लोकांनी त्यांचे याहवेह परमेश्वराविरुद्ध गुप्तपणे, जे अयोग्य होते ते
केले. त्यांनी स्वत:साठी सर्व नगरामध्ये पहारेकऱ्यांच्या बुरुजापासून तर
तटबंदीच्या सर्वठिकाणी उच्च स्थाने बांधली. 10 त्यांनी प्रत्येक डोंगरावर
आणि प्रत्येक घनदाट वृक्षाखाली मूर्ति स्थापिल्या आणि अशेरा मूर्तीचे
स्तंभ उभारले. 11 ज्या राष्ट्रांना याहवेहने त्यांच्यापुढून घालवून दिले
होते, त्यांच्याप्रमाणे त्यांनी प्रत्येक उंचस्थानी धूप जाळले. याहवेहला
क्रोध येईल अशी वाईट कृत्ये केली. 12 याहवेहने त्यांना सांगितले
होते, “तुम्ही असे करू नये” तरी त्यांनी मूर्तींची उपासना केली. 13
याहवेहने इस्राएल आणि यहूदीयाला सर्व संदेष्टे आणि द्रष्टे यांच्याद्वारे
चेतावणी दिली होती: “तुमच्या दुष्ट मार्गापासून परावृत्त व्हा. मी तुमच्या
पूर्वजांना आज्ञा दिलेल्या आणि माझ्या सेवक संदेष्ट्यांद्वारे तुमच्यापर्यंत
पाठविलेल्या संपूर्ण नियमानुसार माझ्या आज्ञा व विधीचे पालन करा.”
14 परंतु त्यांनी याहवेहचे ऐकले नाही आणि ज्यांनी याहवेह आपल्या
परमेश्वरावर विश्वास ठेवला नाही, अशा आपल्या पूर्वजांप्रमाणे ते ताठ
मानेचे राहिले, 15 त्यांनी याहवेहचे विधी आणि त्यांच्या पूर्वजांबरोबर
केलेला करार व त्यांचे नियम पाळण्याचा इशारा दिला होता तो त्यांनी
नाकारला. ते निरर्थक मूर्तींच्या मागे लागले आणि स्वत:ही निरर्थक
झाले. जरी परमेश्वराने त्यांना आदेश दिला होता, “ते जसे करतात तसे
करू नका,” तरी त्यांनी त्यांच्या सभोवतालच्या राष्ट्रांचे अनुकरण केले.
16 त्यांनी याहवेह त्यांच्या परमेश्वराच्या, सर्व आज्ञांचा त्याग केला आणि
स्वत:साठी दोन वासरांच्या मूर्ती घडविल्याआणि अशेरास्तंभ घडविले.
सर्व नक्षत्रगणांची आणि बआल दैवताची उपासना केली. 17 त्यांनी
आपल्या पुत्रकन्यांचे अग्नीत अर्पण केले. ज्योतिष्यांचा सल्ला घेतला.
शकुनविद्येचा उपयोग केला व याहवेहच्या दृष्टीने जे वाईट त्याकरिता
त्यांनी स्वत:ला विकून त्यांचा क्रोध आपल्यावर भडकविला. 18 म्हणून
याहवेह इस्राएलावर फार संतापले आणि त्यांना आपल्या उपस्थितीतून
घालवून दिले. फक्त यहूदाहचे गोत्र तेवढेच राहिले, 19 परंतु यहूदीयानेही
याहवेह त्यांच्या परमेश्वराच्या आज्ञा पाळल्या नाहीत. त्यांनी इस्राएलींनी
सुरू केलेल्या पद्धतींचे पालन केले. 20 यामुळे याहवेहने सर्व इस्राएली
लोकांचा त्याग केला; त्यांनी त्यांना पीडा देऊन लुटणाऱ्यांच्या हाती दिले
व आपल्या उपस्थितीतून काढून टाकले. 21 जेव्हा याहवेहने इस्राएल
दावीदाच्या घराण्यापासून फाडून काढला, तेव्हा इस्राएली लोकांनी
नेबाटाचा पुत्र यरोबोअमास आपला राजा केले. तेव्हा यरोबोअमाने
इस्राएली लोकांना याहवेहच्या मागे जाण्यापासून बहकविले आणि त्यांना
फार मोठे पाप करण्यास लावले. 22 इस्राएली लोक यरोबोअमच्या सर्व
पापांमध्ये टिकून राहिले आणि त्यांच्यापासून फिरले नाही, 23 जोपर्यंत
याहवेहने त्यांना आपल्या उपस्थितीतून घालवून दिले नाही. जी चेतावणी
त्यांनी आपल्या सर्व सेवक संदेष्ट्यांद्वारे दिली होती. म्हणून इस्राएली

लोकांना त्यांच्या देशातून बंदिवान म्हणून अश्शूरात नेण्यात आले व
आजपर्यंत ते तिथेच आहे. 24 मग अश्शूरच्या राजाने बाबेलच्या, कूथाह,
अव्वा, हमाथ व सफरवाईम येथील लोकांच्या वसाहती हालवून त्यांना
शोमरोनात इस्राएलांच्या जागी वसाहती करावयास लावल्या. त्यांनी
शोमरोन ताब्यात घेतला आणि त्या नगरात राहू लागले. 25 जेव्हा ते
तिथे राहू लागले, प्रारंभी त्यांनी याहवेहची उपासना केली नाही; म्हणून
त्यांनी सिंहांना त्यांच्यामध्ये पाठवून त्यांच्यापैकी काही जणांना ठार
केले. 26 अश्शूरच्या राजाकडे याचा निरोप सांगण्यात आला: “ज्या
लोकांना तुम्ही त्यांच्या देशातून हाकलून दिले आणि शोमरोनच्या नगरांत
स्थायिक केले त्यांना त्या देशाच्या देवाला काय हवे हे माहीत नाही.
त्यांनी त्यांच्यामध्ये सिंहांना पाठविले जे त्यांना ठार मारीत आहेत, कारण
देवाला काय हवे हे त्या लोकांना माहीत नाही.” 27 तेव्हा अश्शूरच्या
राजाने हे फर्मान काढले: “शोमरोनामधून बंदिवान करून आणलेल्या
याजकांपैकी एका याजकाला तिथे पाठवा, जेणेकरून तो तिथे राहील
आणि लोकांना त्या देशातील देवाला काय हवे ते शिकविल.” 28
म्हणून शोमरोनातून बंदिवासात पाठविलेला एक याजक बेथेल येथे
राहायला आला आणि त्याने त्यांना याहवेहची उपासना कशी करावी हे
शिकविले. 29 तरीसुद्धा, प्रत्येक राष्ट्रांतून आलेल्या लोकांनी आपआपले
दैवत बनविले, आणि शोमरोनी लोकांनी बांधलेल्या उच्चस्थानी त्यांची
स्थापना केली, प्रत्येक राष्ट्रांतून आलेल्या लोकांनी आपआपल्या नगरात
असेच केले. 30 बाबेलमधील लोकांनी सुक्कोथ-बनोथ मूर्ती केली.
कूथमधील लोकांनी नेरगल केला व हमाथातील लोकांनी अशीमा केली;
31 अव्वी लोकांनी निभज व तर्ताक केले आणि सफरवी लोकांनी तर
अद्राम्मेलेक व अनम्मेलेक या आपल्या दैवतांच्या वेद्यांवर आपल्या
मुलामुलींचे अग्नीत बळी दिले. 32 त्यांनी याहवेहची उपासना केली,
परंतु त्यांनी त्यांच्या लोकांची उच्च स्थानावरील मंदिरांमध्ये याजक
म्हणून नियुक्त केले. 33 ते याहवेहची उपासना करीत असले, तरी
ज्या देशातून ते आले होते, त्या देशाच्या चालीरीतींप्रमाणे ते आपल्या
स्वतःच्या दैवतांची उपासना करीत असत. 34 ते आजवर याहवेहची
उपासना करीत नाही किंवा याहवेहने ज्यांचे नाव इस्राएल असे ठेवले त्या
याकोबाच्या वंशजांना जे विधी आणि नियम, कायदे आणि आज्ञा दिल्या
त्याचे ते पालन करत नाहीत. 35 जेव्हा याहवेहने इस्राएली लोकांसोबत
करार केला, तेव्हा त्यांनी त्यांना आज्ञा केली: “इतर दैवतांची उपासना
करू नका किंवा त्यांना नमन करू नका, त्यांची सेवा करू नका किंवा
त्यांना यज्ञार्पणे करू नका. 36 परंतु ज्या याहवेहने आपल्या अलौकिक
सामर्थ्याने आणि वाढविलेल्या भुजांनी इजिप्तमधून त्यांना बाहेर आणले
होते केवळ त्याच याहवेहची तुम्ही उपासना करावी. त्यांनाच तुम्ही नमन
करावे आणि त्यांनाच यज्ञार्पणे अर्पण करावी. 37 त्यांनी लिहून दिलेल्या
विधी आणि नियम, कायदे आणि आज्ञा यांचे तुम्ही खात्रीने नेहमी
काळजीपूर्वक पालन करावे. इतर दैवतांची उपासना करू नका. 38 मी
तुमच्याशी केलेला करार विसरू नका आणि इतर दैवतांची उपासना करू
नका. 39 तुम्ही फक्त याहवेह तुमच्या परमेश्वराचीच उपासना करावी;
तेव्हा ते तुम्हाला तुमच्या सर्व शत्रूंच्या हातून सोडवितील.” 40 त्यांनी
याहवेहचे ऐकले नाही, परंतु त्यांच्या आधीच्या रीतींना ते चिकटून राहिले.
41 हे लोक याहवेहची उपासना करीत असतानाही ते त्यांच्या मूर्तींची
सेवा करीत होते. आजवर त्यांची मुले आणि नातवंडेही त्यांच्या पूर्वजांनी
केले तसेच करीत आहेत.

**18** इस्राएलचा राजा, एलाहचा पुत्र होशेच्या तिसर्‍या वर्षी, यहूदीयाचा
राजा आहाजाचा पुत्र हिज्कीयाह राज्य करू लागला. 2 हिज्कीयाह
पंचवीस वर्षांचा होता तेव्हा तो राजा झाला आणि त्याने यरुशलेममध्ये
एकोणतीस वर्षे राज्य केले. त्याच्या आईचे नाव अबीयाह, ती जखर्‍याहची
कन्या होती. 3 त्याने आपला पिता दावीदाप्रमाणे याहवेहच्या दृष्टीने
जे योग्य ते केले. 4 त्याने उच्च स्थाने काढून टाकली, पूजास्तंभ
फोडून टाकले, अशेराचे स्तंभ नष्ट करून टाकले. त्याने मोशेने तयार
केलेला कास्याच्या सापाचे तुकडे केले, कारण तोपर्यंत इस्राएली लोक
त्याच्यापुढे धूप जाळत होते. (त्याला नहुशतान असे म्हणत होते.) 5
हिज्कीयाहचा याहवेह इस्राएलांच्या परमेश्वरावर भरवसा होता. म्हणून
यहूदीयाच्या सर्व राजांमध्ये त्याच्यासारखा कोणीही त्याच्या आधी
किंवा त्याच्यानंतर झाला नाही. 6 तो याहवेहला धरून राहिला आणि
त्यांचे अनुसरण करण्यापासून मागे फिरला नाही; याहवेहने मोशेला
दिलेल्या सर्व आज्ञांचे तो पालन करीत राहिला. 7 आणि याहवेह
त्याच्याबरोबर होते; त्याने जे काही हाती घेतले त्यात तो यशस्वी झाला.
त्याने अश्शूरच्या राजाविरुद्ध बंड पुकारले आणि त्याची सेवा केली नाही.
8 त्याने गाझा आणि त्याच्या सीमेपर्यंत पलिष्ट्यांना पराभूत केले, त्याने
पहारेकर्‍यांच्या बुरुजापासून तटबंदीच्या नगरापर्यंत त्यांना मारले. 9
हिज्कीयाह राजाच्या कारकिर्दीच्या चवथ्या वर्षी, म्हणजे इस्राएलाचा
राजा एलाहचा पुत्र होशेच्या कारकिर्दीच्या सातव्या वर्षी, अश्शूरच्या
शल्मनेसर राजाने शोमरोनवर आक्रमण केले आणि त्याला वेढा घातला.
10 तिसर्‍या वर्षांच्या शेवटी अश्शूरच्या लोकांनी ते घेतले. शोमरोन हे
हिज्कीयाह राजाच्या कारकिर्दीच्या सहाव्या वर्षी आणि इस्राएलचा
राजा होशेच्या कारकिर्दीच्या नवव्या वर्षी ताब्यात घेण्यात आले. 11
मग अश्शूरच्या राजाने इस्राएली लोकांना अश्शूरमध्ये नेले व त्यांना
हलह येथे, गोजानातील हाबोर नदीकिनारी व मेदिया लोकांच्या नगरात
ठेवले. 12 हे अशासाठी झाले कारण त्यांनी याहवेह त्यांच्या परमेश्वराची
आज्ञा पाळली नाही व त्यांचा करार मोडला; याहवेहचा सेवक मोशेने जे
सर्व आज्ञापिले होते, ते त्यांनी ऐकले नाही किंवा त्याचे पालन केले
नाही. 13 हिज्कीयाह राजाच्या कारकिर्दीच्या चौदाव्या वर्षी, अश्शूरचा
राजा सन्हेरीबने यहूदीयाच्या सर्व तटबंदीच्या नगरांवर हल्ला केला
आणि ती ताब्यात घेतली 14 म्हणून यहूदीयाचा राजा हिज्कीयाहने
लाखीश येथे अश्शूरच्या राजाला हा संदेश पाठविला: “माझ्याकडून
चूक झाली आहे. माझ्यापासून परत जा, आणि तुम्ही जी काही खंडणी
मागाल ती मी देईल.” अश्शूरच्या राजाने तडजोडीसाठी यहूदीयाचा
राजा हिज्कीयाहकडून चांदीचे तीनशे तालांत आणि सोन्याचे तीस
तालांत यांची मागणी केली. 15 तेव्हा हिज्कीयाह राजाने याहवेहच्या

मंदिरातील आणि राजवाड्यातील तिजोरीत असलेली सर्व चांदी त्याला
दिली. 16 यावेळी यहूदीयाचा राजा हिज्कीयाहने याहवेहच्या मंदिराची
दारे व खांबावर मढविलेले सोने काढले व ते अश्शूरच्या राजाला दिले.
17 अश्शूरच्या राजाने आपला सेनाप्रमुख, त्याचा प्रमुख अधिकारी
आणि त्याचा सरसेनापतीसह मोठ्या सैन्यास लाखीशहून यरुशलेमला
हिज्कीयाह राजाकडे पाठविले. ते यरुशलेमजवळ आले आणि वरच्या
हौदाच्या पाटाजवळ परिटाच्या शेताच्या मार्गात उभे राहिले. 18 त्यांनी
राजाला बोलाविले; तेव्हा त्याच्या राजवाड्याचा कारभारी एल्याकीम
जो हिल्कियाहचा पुत्र, चिटणीस शेबना व इतिहासलेखक योवाह जो
आसाफाचा पुत्र होता हे त्याच्याकडे गेले. 19 तेव्हा सेनाप्रमुख त्यांना
म्हणाला, “हिज्कीयाहला सांगा: “‘महान राजा, अश्शूरचा राजा असे
म्हणतो: तुझा हा भरवसा तू कशावर ठेवला आहेस? 20 तू म्हणतोस की
तुझ्याजवळ युद्ध करण्याची युक्ती आणि सामर्थ्य आहे—परंतु तुम्ही फक्त
पोकळ शब्द बोलता. तू कोणावर अवलंबून आहेस की तू माझ्याविरुद्ध
बंड करतोस? 21 पाहा, मला माहीत आहे की तू इजिप्तवर अवलंबून
आहेस, पाहा, जी एक तुटलेली वेळूची काठी आहे, जो कोणी त्यावर
टिकेल ती त्याच्या हाताला टोचणार! इजिप्तचा राजा फारोह, त्याच्यावर
भरवसा ठेवणाऱ्या सर्वांसाठी असेच असल्याचे सिद्ध होते. 22 पण जर
तुम्ही मला म्हणाल, “आम्ही याहवेह आमच्या परमेश्वरावर अवलंबून
आहोत.” तर हिज्कीयाहने ज्याची उच्च स्थाने आणि वेद्या काढून घेतल्या
आणि यहूदाह आणि यरुशलेमला सांगितले, “तुम्ही यरुशलेममधील
याच वेदीवर उपासना करा, तो तोच नाही काय”? 23 “‘तेव्हा आता या
आणि आमचा स्वामी, अश्शूरच्या राजाशी करार करा: तुमच्याकडे दोन
हजार घोडेस्वार जरी असले तरी मी तुला दोन हजार घोडे देईन! 24
रथ आणि घोडेस्वारांसाठी तुम्ही इजिप्तवर अवलंबून असताना माझ्या
स्वामीच्या सर्वात कनिष्ठ अधिकाऱ्यांपैकी एका अधिकाऱ्याचा तुम्ही
कसा पराभव करणार? 25 शिवाय, मी याहवेहशिवाय या ठिकाणावर
हल्ला करण्यासाठी आणि नाश करण्यासाठी आलो आहे काय?
याहवेहने स्वतःच मला या देशावर हल्ला करण्यास आणि त्याचा नाश
करण्यास सांगितले आहे.’” 26 तेव्हा हिल्कियाहचा पुत्र एल्याकीम,
शेबना आणि योवाह हे सेनापतीला म्हणाले, “कृपया तुमच्या सेवकांशी
अरामी भाषेत बोला, कारण आम्हाला ती समजते. भिंतीवर असलेले
लोक ऐकत असताना आमच्याबरोबर यहूदीयाच्या हिब्रू भाषेत बोलू
नका.” 27 परंतु सेनापतीने उत्तर दिले, “माझ्या धन्याने मला या गोष्टी
सांगावयास पाठविले होते, ते काय फक्त तुमच्या धन्याला आणि तुम्हाला
सांगण्यासाठी आणि भिंतीवर बसलेल्या लोकांसाठी नाही काय; ज्यांना
तुमच्यासारखीच स्वतःचीच विष्ठा खावी लागेल आणि स्वतःचेच मूत्र
प्यावे लागेल?” 28 मग सेनाप्रमुख उभा राहिला आणि यहूदीयाच्या हिब्रू
भाषेत मोठ्याने ओरडून म्हणाला, “महान राजा, अश्शूरच्या राजाचे
ऐका! 29 राजा असे म्हणतात: हिज्कीयाहस तुम्हाला फसवू देऊ नका.
मूर्ख बनवू देऊ नका. तो तुम्हाला माझ्या हातून सोडवू शकणार नाही. 30
‘याहवेह आपल्याला नक्कीच सोडवतील; हे शहर अश्शूरच्या राजाच्या
ताब्यात जाणार नाही.’ असे म्हणून हिज्कीयाहला तुम्हाला याहवेहवर
भरवसा ठेवण्यास प्रवृत्त करू देऊ नका. 31 “हिज्कीयाहचे ऐकू नका.
अश्शूरचे राजा असे म्हणतात: माझ्यासोबत शांतता प्रस्थापित करा
आणि माझ्याकडे या. मग तुम्ही आपल्या प्रत्येक द्राक्षवेलीचे आणि
अंजिराचे फळ खाल आणि आपल्या विहिरीचे पाणी प्याल, 32 जोपर्यंत
मी येऊन तुम्हाला तुमच्या देशासारख्या देशात; म्हणजेच धान्य आणि
नवीन द्राक्षारसाचा देश, भाकरी आणि द्राक्षमळयांच्या, जैतून तेलाची
झाडे आणि मधाच्या देशात नेत नाही तोपर्यंत. जीवन निवडा, मृत्यू नव्हे!
“हिज्कीयाहचे ऐकू नका, कारण ‘याहवेह आम्हाला सोडवतील’ असे
सांगून तो तुमची दिशाभूल करीत आहे. 33 कोणत्याही राष्ट्रांच्या दैवतांनी
कधीही अश्शूरच्या राजाच्या हातून आपल्या राष्ट्रांची सुटका केली आहे
काय? 34 हमाथ आणि अर्पादची दैवते कुठे आहेत? सफरवाईम,
हेना व इव्वाहची दैवते कुठे आहेत? त्यांनी शोमरोनला माझ्या हातून
सोडविले आहे काय? 35 या देशातील सर्व दैवतांपैकी कोण त्याच्या
देशाला माझ्यापासून वाचवू शकले? तर मग याहवेह माझ्या हातातून
यरुशलेमची सुटका कशी करू शकतील?” 36 परंतु लोक गप्प राहिले
आणि उत्तर देण्यासाठी काहीच बोलले नाहीत, कारण राजाने आज्ञा
केली होती, “त्याला उत्तर देऊ नका.” 37 यानंतर हिल्कियाहचा पुत्र
राजवाड्याचा कारभारी एल्याकीम, चिटणीस शेबना आणि आसाफाचा
पुत्र इतिहासलेखक योवाह यांनी आपली वस्त्रे फाडली व हिज्कीयाहकडे
जाऊन सेनाप्रमुखाने जे काही सांगितले होते ते त्याला सांगितले.

**19** जेव्हा हिज्कीयाह राजाने हे ऐकले, तेव्हा त्याने आपली वस्त्रे
फाडली आणि तो गोणपाट नेसून याहवेहच्या मंदिरात गेला. 2
त्याने राजवाड्याचा कारभारी एल्याकीम, चिटणीस शेबना आणि वडील
याजक यांना गोणपाट नेसून आमोजाचा पुत्र यशायाह संदेष्ट्याकडे
पाठविले. 3 ते त्याला म्हणाले, “हिज्कीयाह असे म्हणतो: आजचा
दिवस क्लेश, शिक्षा व अपमानाचा दिवस आहे, कारण लेकरे होण्याची
वेळ आली परंतु ते प्रसवण्याची शक्ती नाही. 4 कदाचित याहवेह तुमचे
परमेश्वर सेनाप्रमुखाचे सर्व शब्द ऐकतील, त्याचा स्वामी अश्शूरच्या
राजाने आपल्या जिवंत परमेश्वराची निंदा करण्यास पाठविले आहे
आणि हे शब्द ऐकून याहवेह तुमचे परमेश्वर त्याचा निषेध करतील.
म्हणून जे थोडके उरलेले आहेत त्यांच्यासाठी प्रार्थना करा.” 5 जेव्हा
हिज्कीयाह राजाचे अधिकारी यशायाहकडे आले, 6 यशायाह त्यांना
म्हणाला, “तुमच्या धन्याला सांगा, ‘याहवेह असे म्हणतात: तुम्ही जे
ऐकले आहे त्यामुळे घाबरून जाऊ नका—त्या शब्दांनी अश्शूरच्या
राजाच्या सेवकांनी माझी निंदा केली आहे. 7 ऐका! जेव्हा तो एक
ठराविक अहवाल ऐकेल, तेव्हा मी त्याला त्याच्या स्वतःच्या देशात
परत जाण्याची इच्छा व्हावी असे करेन आणि तिथे तो तलवारीने वधला
जाईल असे मी करेन.’” 8 जेव्हा सेनाप्रमुखाने ऐकले की अश्शूरच्या
राजाने लाखीश सोडले आहे, तेव्हा त्याने आपला तळ उठविला आणि
राजा लिब्नाह येथे युद्ध करताना त्याला आढळला. 9 आता सन्हेरीबला
बातमी मिळाली की कूशाचा राजा तिऱ्हाकाह त्याच्याशी युद्ध करण्याच्या

तयारीत आहे. म्हणून त्याने पुन्हा हिज्कीयाहकडे असे सांगत दूत
पाठवले: 10 “यहूदीयाचा राजा हिज्कीयाहला हे सांगा: ‘अश्शूरच्या
राजाच्या हाती यरुशलेम दिले जाणार नाही’ असे म्हणून तुम्ही ज्या
देवावर अवलंबून आहात त्याला तुमची फसवणूक करू देऊ नका.
11 अश्शूरच्या राजाने सर्व राष्ट्रांचा नाश कसा केला, हे तुम्ही ऐकलेच
आहे. मग तुमची सुटका होईल काय? 12 माझ्या पूर्वीच्या राजांनी ज्या
राष्ट्रांचा; म्हणजे गोजान, हारान, रेसफ तलास्सारतील एदेन यांचा नाश
केला, त्यांना त्यांच्या दैवतांनी वाचविले होते काय? 13 हमाथ नगरीचा
राजा किंवा अर्पादचा राजा हे कुठे आहेत? सफरवाईम, हेना व इव्वाह
यांचे राजे कुठे आहेत?” 14 हिज्कीयाहला दूताद्वारे पत्र मिळाले आणि
त्याने ते वाचले. त्यानंतर त्याने जाऊन याहवेहच्या मंदिरात याहवेहसमोर
ते उघडून ठेवले. 15 आणि हिज्कीयाहने याहवेहला प्रार्थना केली:
“अहो याहवेह इस्राएलांचे परमेश्वर, करुबांच्या सिंहासनावर आरूढ
असलेल्या परमेश्वरा, पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांचे तुम्ही एकमेव परमेश्वर
आहात. स्वर्ग व पृथ्वी तुम्हीच उत्पन्न केली आहे. 16 हे याहवेह, आपले
कान लावा आणि ऐका; याहवेह, आपले डोळे उघडा आणि पाहा;
आणि जिवंत परमेश्वराचा उपहास करण्यास पाठविलेले सन्हेरीबचे
शब्द ऐका. 17 “हे याहवेह, हे खरे आहे की अश्शूरच्या राजांनी या
राष्ट्रांचा आणि त्यांच्या भूमीचा नाश केला आहे. 18 आणि त्यांनी
त्यांची दैवते अग्नीत फेकून दिली आहेत, कारण त्या मूर्ती परमेश्वर
नव्हत्या. ते तर मनुष्याने घडविलेले लाकूड आणि दगड होते. 19 आता हे
याहवेह, आमच्या परमेश्वरा, त्याच्या तावडीतून आम्हाला सोडवा, म्हणजे
याहवेह केवळ तुम्हीच परमेश्वर आहात, हे पृथ्वीवरील सर्व राज्यांना
कळेल.” 20 मग आमोजाचा पुत्र यशायाहने हिज्कीयाह राजाला हा
संदेश पाठविला: “इस्राएलचे परमेश्वर याहवेह म्हणतात: अश्शूरचा
राजा सन्हेरीबविषयीची तुझी प्रार्थना मी ऐकली आहे. 21 त्याच्याविरुद्ध
बोललेले याहवेहचे वचन हे आहे: “सीयोनाची कुमारी कन्या तुझा
उपहास आणि तिरस्कार करते. यरुशलेम कन्या तुझे पलायन बघून
आपले डोके हालविते. 22 तू कोणाचा उपहास व निंदा केलीस? तू
कोणाविरुद्ध उंच आवाजात बोललास व गर्विष्ठपणाने कोणाकडे नजर
उचलून बघितलेस? इस्राएलाच्या पवित्र परमेश्वराविरुद्ध तू हे केलेस! 23
तुझे दूत पाठवून तू प्रभूची चेष्टा केली. आणि तू म्हणतोस, ‘मी माझ्या
अनेक रथांनी उंचच उंच पर्वतावर चढून गेलो, लबानोनच्या सर्वात उंच
पर्वतावर गेलो. मी तिचे सर्वात उंच देवदारू तोडले, निवडक गंधसरू
तोडले. मी तिच्या दुर्गम भागात पोहोचलो तिच्या अत्यंत उत्तम जंगलात
गेलो. 24 अनेक परकीय देशात मी विहिरी खणल्या आणि तेथील
पाणी प्यालो. माझ्या पावलाच्या तळव्याने मी मिसरचे सर्व झरे आटवून
टाकले.’” 25 “‘हे तू ऐकले नव्हते काय? याचा निश्चय मी फार पूर्वीच
केलेला होता. या घटना मी प्राचीन काळातच योजून ठेवल्या होत्या;
आता मी त्या अंमलात आणल्या आहेत, जी तटबंदीची शहरे तू उद्ध्वस्त
करून त्यांचा दगडांचा ढिगारा केलास. 26 त्यांच्या लोकांची शक्ती कमी
होत गेली, ते निराश व लज्जित झालेले आहेत. ते शेतातील पिकासारखे,
कोवळी पाने आलेल्या रोपासारखे, छतावर उगविलेल्या गवतासारखे,
पूर्ण वाढण्याआधीच उन्हाने करपून गेलेले होते. 27 “‘परंतु मी जाणतो तू
कुठे आहेस तू कधी जातो व येतो आणि तू माझ्यावर कसा संतापतोस.
28 कारण तू माझ्यावर संतापतो व तुझा उन्मत्तपणा माझ्या कानावर
आल्यामुळे, मी तुझ्या नाकात वेसण अडकवेन व तुझ्या तोंडात लगाम
घालेन आणि मग तू आलास त्याच वाटेने तुझ्याच देशात तुला परत
नेईन.’ 29 “हिज्कीयाह, तुझ्यासाठी हे चिन्ह असेल: “या वर्षी तुम्ही
आपोआप उगविलेले धान्य खाल, तरी पुढील वर्षी त्यातूनच उगविलेले
खाल. परंतु तिसऱ्या वर्षी पेरणी व कापणी कराल, द्राक्षमळे लावाल व
त्याची फळे खाल. 30 पुन्हा एकदा यहूदीया राज्यातील अवशिष्ट लोक
जमिनीत रुजाल आणि फलद्रूप व्हाल. 31 यरुशलेममधून अवशिष्ट
लोक येतील, सीयोन पर्वतातून वाचलेल्याची टोळी येईल. सर्वसमर्थ
याहवेहच्या आवेशाने हे सर्व घडून येईल. 32 “म्हणून अश्शूरच्या
राजाविषयी याहवेह असे म्हणतात: “‘तो या शहरात प्रवेश करणार
नाही किंवा एखादा बाणही सोडणार नाही. तो या ठिकाणी ढाल घेऊन
येणार नाही किंवा तटबंदीबाहेर मोर्चे बांधणार नाही. 33 ज्या रस्त्याने तो
आला, त्याच रस्त्याने तो परत जाईल; तो या शहरात प्रवेश करणार
नाही, असे याहवेह घोषित करतात. 34 माझ्याकरिता आणि माझा
सेवक दावीदाच्या स्मरणार्थ, मी या यरुशलेम नगराचे रक्षण करेन!’”
35 त्या रात्री याहवेहच्या दूताने अश्शूर सैनिकांच्या छावणीत एक लक्ष
पंचाऐंशी हजार सैनिक ठार केले. दुसऱ्या दिवशी सकाळी लोक उठून
पाहतात—तर त्यांच्या सर्व बाजूला प्रेते पसरलेली होती. 36 म्हणून
अश्शूरचा राजा सन्हेरीबने छावणी उठविली व तो माघारी परतला. तो
निनवेहला परत गेला व तिथेच राहिला. 37 एके दिवशी, तो निस्रोख या
त्याच्या दैवताच्या मंदिरात पूजा करीत असताना, त्याचे पुत्र अद्राम्मेलेक
व शरेसर यांनी तलवारीने त्याचा वध केला व ते अरारात देशात पळून
गेले. नंतर त्याचा वारस म्हणून त्याचा पुत्र एसरहद्दोन राजा झाला.

**20** त्या दिवसांमध्ये हिज्कीयाह राजा आजारी पडला आणि
मरणपंथाला लागला. आमोजाचा पुत्र यशायाह संदेष्टा त्याच्याकडे
गेला आणि म्हणाला, “याहवेह असे म्हणतात: तुझ्या घराची आवराआवर
कर, कारण तू मरणार आहेस; तू बरा होणार नाहीस.” 2 हे ऐकताच
हिज्कीयाहने आपले तोंड भिंतीकडे वळविले आणि याहवेहकडे प्रार्थना
केली, 3 “हे याहवेह, मी तुमच्यापुढे कसा विश्वासूपणाने आणि पूर्ण
मनोभावे समर्पित होऊन चाललो व नेहमी तुमच्या दृष्टीने योग्य तेच
केले, याचे स्मरण करा.” आणि हिज्कीयाह अतिदुःखाने रडू लागला. 4
यशायाह नगरीच्या राजवाड्याच्या आवाराबाहेर जाण्यापूर्वीच याहवेहचे
वचन त्याच्याकडे आले: 5 “परत जा आणि माझ्या लोकांचा अधिपती
हिज्कीयाहला सांग, ‘तुझे पूर्वज दावीदाचे परमेश्वर, याहवेह असे
म्हणतात: मी तुझी प्रार्थना ऐकली आणि तुझे अश्रू पाहिले आहेत;
आजपासून तिसऱ्या दिवशी तू याहवेहच्या मंदिरात जाशील. मी तुझ्या
आयुष्यात पंधरा वर्षांची भर घालेन. 6 आणि मी तुला आणि या शहराला
अश्शूरच्या राजाच्या हातातून सोडवेन. माझ्या नावाच्या गौरवासाठी

व माझा सेवक दावीदासाठी मी या शहराचे रक्षण करेन.'" 7 तेव्हा
यशायाहने म्हटले, "अंजिराचा लेप तयार करा." त्यांनी तसे केले
आणि त्याच्या गळवावर लावला आणि तो बरा झाला. 8 हिज्कीयाहने
यशायाहास विचारले, "याहवेह मला बरे करतील व मी आजपासून
तीन दिवसांनी याहवेहच्या मंदिरात जाईन याचे चिन्ह काय असेल?" 9
यशायाहने उत्तर दिले, "याहवेहचे हे चिन्ह तुझ्यासाठी आहे, जे अभिवचन
याहवेहने दिले आहे त्याप्रमाणे ते करतील: तू सांग, सावली दहा पावले
पुढे जावी कि दहा पावले मागे जावी?" 10 हिज्कीयाह म्हणाला,
"सावली पुढेच जात असते ही साधारण गोष्ट आहे, तेव्हा ती मागे
जावी असे करा!" 11 मग यशायाह संदेष्ट्याने याहवेहला हाक मारली,
आणि याहवेहने आहाजाच्या सूर्य घड्याळावर सावली दहा पावले
मागे सरकविली. 12 त्यावेळी बाबेलचा राजा बलदानचा पुत्र मरोदख-
बलादाना ने हिज्कीयाहला पत्रे आणि भेटवस्तू पाठविल्या, कारण त्याने
त्याच्या आजाराबद्दल ऐकले होते. 13 हिज्कीयाहने राजदूतांचे स्वागत
केले आणि त्याच्या भांडारांमध्ये काय आहे ते सर्व दाखविले—चांदी,
सोने, मसाले, आणि उत्तम जैतुनाचे तेल—त्याचे संपूर्ण शस्त्रागार
आणि त्याच्या खजिन्यामध्ये असलेली सर्व संपत्ती. त्याच्या राजवाड्यात
किंवा त्याच्या संपूर्ण राज्यात हिज्कीयाहने त्यांना दाखविले नाही असे
काहीही नव्हते. 14 तेव्हा यशायाह संदेष्टा राजा हिज्कीयाहकडे गेला
आणि त्याने विचारले, "ती माणसे काय म्हणाली आणि ती कुठून
आली होती?" हिज्कीयाहने उत्तर दिले, "दूरवरील देशातून, ते बाबेलहून
आले आहेत." 15 संदेष्ट्याने विचारले, "त्यांनी तुझ्या राजवाड्यात
काय पाहिले?" हिज्कीयाह म्हणाला, "त्यांनी माझ्या राजवाड्यातील
सर्वकाही पाहिले. माझ्या खजिन्यांमध्ये असे काहीही राहिले नाही, जे मी
त्यांना दाखविले नाही." 16 तेव्हा यशायाह हिज्कीयाहला म्हणाला,
"याहवेहचे वचन ऐका: 17 अशी वेळ निश्चितच येईल जेव्हा तुमच्या
राजवाड्यामधील सर्वकाही आणि तुमच्या पूर्वजांनी आजपर्यंत जे काही
साठवून ठेवले आहे ते सर्व बाबेलला नेले जाईल. काहीही सोडले
जाणार नाही, असे याहवेह म्हणतात. 18 आणि तुमच्या वंशजांपैकी
काही, तुमच्या मांसाचे आणि तुमच्या रक्ताचे जे तुमच्यापासून जन्माला
येतील, ते नेले जातील आणि ते बाबेलच्या राजाच्या राजवाड्यात
खोजे करण्यात येतील." 19 हिज्कीयाहने यशायाहास उत्तर दिले,
"तुम्ही बोललेले याहवेह यांचे वचन चांगले आहे," कारण त्याने असा
विचार केला, "माझ्या आयुष्यभरात शांती आणि सुरक्षितता नसणार
काय?" 20 हिज्कीयाहच्या कारकिर्दीतील इतर सर्व घटना, त्याच्या
सर्व पराक्रमाबद्दल आणि त्याने तळी व पाट खणून शहरात पाणी कसे
आणले ते यहूदीयाच्या राजांच्या इतिहासाच्या पुस्तकात नमूद केल्या
नाहीत काय? 21 हिज्कीयाह आपल्या पूर्वजांबरोबर विसावा पावला.
आणि त्याचा वारस म्हणून त्याचा पुत्र मनश्शेह राजा झाला.

**21** वयाच्या बाराव्या वर्षी मनश्शेह राजा झाला आणि त्याने
यरुशलेमात पंचावन्न वर्षे राज्य केले. त्याच्या आईचे नाव
हेफसीबाह होते. 2 त्याने याहवेहच्या दृष्टीने वाईट ते केले, याहवेहने
इस्राएली लोकांतून काढून टाकलेल्या राष्ट्रांच्या अमंगळ प्रथांचे अनुसरण
त्याने केले. 3 त्याचे वडील हिज्कीयाहने नष्ट केलेली उच्च स्थाने
त्याने पुन्हा बांधली; इस्राएलचा राजा अहाबने केल्याप्रमाणे त्यानेही
बआल दैवतांसाठी वेद्या आणि अशेराचे स्तंभ तयार केले. त्याने सर्व
तारांगणांना लवून नमन केले आणि त्यांची उपासना केली. 4 त्याने
याहवेहच्या मंदिरात वेद्या बांधल्या, ज्याबद्धल याहवेहने म्हटले होते,
"मी यरुशलेमात माझे नाव ठेवेन." 5 याहवेहच्या मंदिराच्या दोन
अंगणात त्याने सर्व तारांगणासाठी वेद्या बांधल्या. 6 त्याने आपल्याच
पुत्राचे अग्नीत अर्पण केले, जादूटोणा केला, शुभशकुन शोधले आणि
भूतविद्यांचा सल्ला घेतला. याहवेहच्या दृष्टीने जे वाईट तसे पुष्कळ
काही करून याहवेहचा राग पेटविला. 7 त्याने घडविलेली कोरीव
अशेराची स्तंभे घेतली व मंदिरात ठेवली. या मंदिराविषयी याहवेह,
दावीद व त्याचा पुत्र शलोमोनला म्हणाले होते, "इस्राएलांच्या सर्व
गोत्रांतून मी निवडलेल्या यरुशलेम शहरात व या मंदिरात माझे नाव
मी सर्वकाळासाठी ठेवेन. 8 जर ते केवळ माझा सेवक मोशेने दिलेले
सर्व नियम, विधी आणि आज्ञांचे काळजीपूर्वक पालन करतील तर जी
भूमी मी त्यांच्या पूर्वजांस दिली आहे त्यातून इस्राएली लोकांचे पाय
भटकू देणार नाही." 9 परंतु लोकांनी ऐकले नाही. मनश्शेहने त्यांना
मार्गभ्रष्ट केले म्हणून त्यांनी ज्यांचा इस्राएली लोकांसमोर याहवेहने
नाश केला होता अशा राष्ट्रांपेक्षा अधिक दुष्टपणा केला. 10 त्यावेळी
याहवेहने आपले सेवक संदेष्ट्यांद्वारे म्हटले होते: 11 "यहूदीयाचा राजा
मनश्शेह यानेही अमंगळ कृत्ये केली आहेत. एवढेच नाही, त्याने त्याच्या
आधीच्या अमोरी लोकांपेक्षाही अधिक दुष्ट कर्मे केली आहेत आणि
त्याने यहूदी लोकांना आपल्या मूर्तींसाठी तेच पाप करण्यास लावले. 12
म्हणून याहवेह इस्राएलांचे परमेश्वर म्हणतात: पाहा, मी यरुशलेम व
यहूदीया यांच्यावर असे भयंकर संकट आणेन की, त्याबद्दल जे लोक
ऐकतील, त्यांचे कान भणभणतील. 13 मी यरुशलेमावर शोमरोनचे
मापनसूत्र आणि अहाबाच्या घराण्याला लावलेला ओळंबा ताणीन. जसा
कोणी भांडे पुसून पालथे करून ठेवतो तसेच मी यरुशलेमाचे करेन. 14
मी माझ्या वतनातील उर्वरित लोकांना नाकारीन आणि त्यांना शत्रूंच्या
हाती देईन. त्यांचे सर्व शत्रू त्यांना लुटतील आणि ते त्यांचे भक्ष्य असे
होतील; 15 त्यांचे पूर्वज इजिप्तमधून बाहेर आले तेव्हापासून आजपर्यंत
त्यांनी माझ्या दृष्टीने जे वाईट आहे ते केले आहे आणि माझा क्रोध
भडकविला आहे." 16 शिवाय, मनश्शेहने इतके निष्पाप रक्त सांडले की
यरुशलेम पूर्ण रक्ताने भरून गेले—त्याने यहूदाहला जे पाप करावयाला
लावले होते त्या शिवाय त्याने याहवेहच्या दृष्टीने वाईट ते केले. 17
मनश्शेहच्या कारकिर्दीतील इतर घटना आणि त्याने जे सर्व केले आणि
त्याने जे पाप केले ते यहूदीयाच्या राजांच्या इतिहासग्रंथात लिहिल्या
नाहीत काय? 18 मनश्शेह आपल्या पूर्वजांना जाऊन मिळाला आणि
त्याला त्याच्या राजवाड्याच्या बागेत, उज्जाच्या बागेत पुरण्यात आले
आणि त्याच्या ठिकाणी त्याच्या पुत्र आमोन राज्य करू लागला. 19
वयाच्या बावीसाव्या वर्षी आमोन राजा झाला आणि त्याने यरुशलेमात

दोन वर्षे राज्य केले. त्याच्या आईचे नाव मेशुल्लेमेथ असे होते, ती
यटबाह हारूसची कन्या होती. 20 त्याने आपला पिता मनश्शेहप्रमाणे
याहवेहच्या दृष्टीने जे वाईट ते केले. 21 त्याचा पिता ज्या मार्गात चालला
त्याचे त्याने पूर्णत: पालन केले, ज्या मूर्तीची उपासना त्याचा पिता करीत
असे, त्याच मूर्तीची त्यानेही उपासना केली आणि त्यांना नमन केले. 22
त्याने याहवेह आपल्या पूर्वजांच्या परमेश्वराला सोडले आणि त्यांच्या
मार्गात चालला नाही. 23 आमोनच्या अधिकाऱ्यांनी त्याच्याविरुद्ध कट
रचला आणि राजाची त्याच्या राजवाड्यात हत्या केली. 24 तेव्हा त्या
देशातील लोकांनी आमोन राजाविरुद्ध ज्यांनी कट रचला होता, त्या
सर्वांना ठार मारले आणि त्यांनी त्याचा पुत्र योशीयाहला त्याच्या जागेवर
राजा केले. 25 आमोनाच्या कारकिर्दीतील इतर घटना, आणि त्याने जे
सर्व केले, हे यहूदीयाच्या राजांचा इतिहासग्रंथात नमूद केलेले नाही
काय? 26 उज्जाच्या बागेत त्याला त्याच्याच कबरेत मूठमाती देण्यात
आली. आणि त्याच्या ठिकाणी त्याचा पुत्र योशीयाह राजा झाला.

**22** वयाच्या आठव्या वर्षी योशीयाह राजा झाला आणि त्याने
यरुशलेममध्ये एकतीस वर्षे राज्य केले. त्याच्या आईचे नाव
यदीदाह होते. ती बसकाथ येथील अदायाहची कन्या होती. 2 याहवेहच्या
दृष्टीने जे योग्य तेच त्याने केले आणि उजवीकडे किंवा डावीकडे न
वळता त्याचे पूर्वज दावीदच्या मार्गाचे पूर्णपणे पालन केले. 3 त्याच्या
कारकिर्दीच्या अठराव्या वर्षी योशीयाह राजाने मशुल्लामचा पुत्र,
अजल्याहचा पुत्र व त्याचा चिटणीस शाफानला याहवेहच्या मंदिरात
पाठवले. त्याने म्हटले: 4 "मुख्य याजक हिल्कियाहकडे जा व याहवेहच्या
मंदिरात आलेले पैसे, जे द्वारपालांनी गोळा केले होते ते याजकांनी तयार
ठेवावे. 5 त्यांनी ते मंदिरातील कामावर देखरेख ठेवण्यासाठी नेमलेल्या
पुरुषांकडे सोपवावे. आणि या लोकांनी याहवेहच्या मंदिराची दुरुस्ती
करणाऱ्या कामगारांना द्यावे— 6 सुतार, बांधकाम करणारे, गवंडी यांना
द्यावा आणि मंदिराच्या डागडुजीसाठी लागणारी लाकडे व घडीव दगड
विकत घेण्यात यावे. 7 परंतु ज्यांच्याजवळ पैसा देण्यात आलेला आहे
त्यांचा हिशोब ठेवण्याची गरज नव्हती, कारण ते विश्वासूपणे कार्य करीत
आहेत." 8 मुख्य याजक हिल्कियाहने शाफान चिटणीसाला म्हटले,
"मला याहवेहच्या मंदिरात नियमशास्त्राचा ग्रंथ सापडला आहे." त्याने
तो शाफानकडे दिला, ज्याने ते वाचले. 9 मग शाफान चिटणीस राजाकडे
गेला आणि त्याला अहवाल दिला: "तुझ्या सेवकांना जे पैसे याहवेहच्या
मंदिरासाठी मिळाले, त्यांनी ते मंदिराचे कामगार व कामाची देखरेख
करणाऱ्यांच्या हाती दिले आहेत." 10 मग शाफान चिटणीसाने राजाला
माहिती दिली, "हिल्कियाह याजकाने मला एक पुस्तक दिले आहे."
आणि शाफानाने राजाच्या उपस्थितीत त्यामधून वाचवून दाखविले.
11 जेव्हा राजाने नियमशास्त्रातील वचने ऐकली, तेव्हा त्याने दुःखाने
आपली वस्त्रे फाडली. 12 त्याने याजक हिल्कियाह, शाफानाचा पुत्र
अहीकाम आणि मिखायाहचा पुत्र अकबोर आणि शाफान चिटणीस
आणि राजाचा सेवक असायाह यांना हा आदेश दिला: 13 "जा आणि
माझ्यासाठी आणि लोकांसाठी आणि सर्व यहूदीयासाठी, त्यांच्याबद्दल
या पुस्तकात लिहिलेले जे काही सापडले आहे, त्याबद्दल याहवेहकडे
चौकशी करा. याहवेहचा फार मोठा क्रोध आपल्यावर पेटला आहे,
कारण आपल्या पूर्वजांनी याहवेहच्या वचनाचे पालन केले नाही; या
पुस्तकात जे सर्वकाही लिहिलेले आहे त्याप्रमाणे ते वागले नाहीत." 14
याजक हिल्कियाह, अहीकाम, अकबोर, शाफान आणि असायाह हे
हरहसाचा पुत्र, तिकवाहचा पुत्र शल्लूम जो पोशाख भांडाराचा अधिकारी
होता, याची पत्नी हुल्दाह जी संदेष्टी होती, तिच्याकडे बोलण्यास गेले.
ती यरुशलेमच्या नव्या पेठेत राहत होती. 15 ती त्यांना म्हणाली,
"याहवेह इस्राएलचे परमेश्वर असे म्हणतात: ज्या मनुष्याने तुम्हाला
माझ्याकडे पाठवले आहे, त्याला सांगा, 16 'याहवेह असे म्हणतात:
यहूदीयाच्या राजाने वाचलेल्या ग्रंथात जे सर्व लिहिले आहे त्यानुसार
मी या ठिकाणावर आणि येथील लोकांवर संकट आणेन. 17 कारण
त्यांनी माझा त्याग केला आहे आणि इतर दैवतांना धूप जाळले आहेत
आणि त्यांच्या हातांनी तयार केलेल्या सर्व मूर्तीमुळे त्याने माझा राग
पेटविला आहे आणि माझा राग या जागेवर ओतला जाईल आणि तो
शांत होणार नाही.' 18 ज्याने तुम्हाला याहवेहची चौकशी करण्यासाठी
पाठविले आहे त्या यहूदीयाच्या राजाला हे जाऊन सांगा, 'जे वचन तुम्ही
ऐकले त्याबद्दल याहवेह इस्राएलचे परमेश्वर असे म्हणतात: 19 कारण
तुझे अंतःकरण प्रतिसाद देणारे आहे आणि जेव्हा या ठिकाणाविषयी
आणि येथील लोकांविरुद्ध मी जे काही बोललो ते तू ऐकले; की ते
शापित होऊन ओसाड पडतील, तेव्हा तू स्वतःला नम्र केलेस आणि तू
माझ्यासमोर नम्र झालास आणि तुझी वस्त्रे फाडली आणि माझ्यासमोर
रडलास, म्हणून मी तुझे ऐकले आहे, असे याहवेह जाहीर करतात.
20 म्हणून मी तुला तुझ्या पूर्वजांबरोबर मिळवेन आणि तुला शांतीने
पुरले जाईल. या ठिकाणावर मी जे संकट आणणार आहे, ते तुझ्या
डोळ्यांना दिसणार नाही.'" तेव्हा त्यांनी परत जाऊन तिचे उत्तर राजाला
सांगितले.

**23** नंतर राजाने यहूदीया आणि यरुशलेममधील सर्व वडीलजनांना
एकत्र बोलाविले. 2 यहूदीयाचे लोक, यरुशलेम येथील रहिवासी,
याजक आणि संदेष्टे, लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्व लोकांबरोबर राजा
याहवेहच्या मंदिरात गेला. याहवेहच्या मंदिरात सापडलेल्या कराराच्या
ग्रंथातील सर्व शब्द त्याने त्यांना ऐकू जातील असे वाचून दाखविले. 3
राजा त्या स्तंभाजवळ उभा राहिला आणि त्याने याहवेहसमोर याहवेहचे
अनुसरण करणे आणि त्यांच्या आज्ञा, कायदा आणि नियमांचे पालन
करणे आणि या ग्रंथात लिहिलेल्या शब्दांचे त्याच्या संपूर्ण अंतःकरणाने
आणि संपूर्ण आत्म्याने पालन करण्याच्या कराराची पुष्टी केली. नंतर
सर्व लोकांनी आपणास त्या कराराशी वचनबद्ध केले. 4 राजाने मुख्य
याजक हिल्कियाह, इतर याजक आणि मंदिराचे द्वारपाल यांना सूचना
दिली की याहवेहच्या मंदिरातील, बआल व अशेरा, सूर्य, चंद्र आणि तारे
यांची उपासना करण्यासाठी उपयोगात येणाऱ्या सर्व वस्तू नष्ट कराव्या.
राजाने त्या सर्व वस्तू यरुशलेमा बाहेर किद्रोनच्या खोऱ्यातील एक
शेतात जाळून टाकल्या आणि त्यांची राख बेथेलास नेली. 5 यहूदीयाच्या

पूर्वीच्या राजांनी नेमलेल्या मूर्तिपूजक याजकांना त्याने ठार मारले.
कारण त्यांनी यहूदीया आणि यरुशलेमच्या नगरातील टेकड्यांवरील
मंदिरात धूप जाळलेला होता. त्यांनी बआल, सूर्य, चंद्र, तारे व ग्रह यांनाही
धूप जाळला होता. 6 त्याने याहवेहच्या मंदिरातून अमंगळ अशेरामूर्ती
काढून टाकली आणि ती यरुशलेमबाहेर किद्रोनच्या खोऱ्याजवळ नेली.
तिथे त्याने ती पूर्ण जाळली आणि तिची राख केली आणि ती राख
सामान्य लोकांच्या कबरांवर फेकून दिली. 7 याहवेहच्या मंदिरासभोवती
असलेल्या पुरुषगामींची घरेही त्याने पाडून टाकली. या घरातच स्त्रिया
अशेराच्या मूर्तीसाठी लागणारे झगे विणीत असत. 8 यहूदीयाच्या इतर
शहरांमध्ये राहणाऱ्या याजकांना योशीयाह राजाने यरुशलेमास परत
आणले. पर्वतांवरील सर्व मंदिरे तसेच गेबापासून बेअर-शेबा पर्यंतची सर्व
मंदिरे त्याने पाडून भ्रष्ट केली. यरुशलेम नगरवेशीजवळील डाव्या बाजूला
नगराध्यक्ष यहोशुआच्या वाड्याच्या प्रवेशद्वाराशी असलेली मंदिरेही
त्याने नष्ट केली. 9 जरी उच्च स्थानांच्या मंदिराचे याजक यरुशलेमातील
याहवेहच्या वेदीवर सेवा करीत नसत, तरीही ते इतर याजकांच्या बेखमीर
भाकरीचे भोजन करावयास बसत असत. 10 कोणीही आपला पुत्र
अथवा कन्या यांचा मोलख दैवताला अग्नीत होम करू नये म्हणून
राजाने बेन हिन्नोम खोऱ्यातील तोफेत अशुद्ध केले. 11 त्याने याहवेहच्या
मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ यहूदीयाच्या पूर्वीच्या राजांनी सूर्याला समर्पित
केलेल्या घोड्यांचे पुतळे पाडून टाकले. ते नाथान-मेलेक या खोजाच्या
कोठडीजवळ होते. योशीयाहने सूर्याला समर्पित रथही अग्नीने जाळून
टाकले. 12 यहूदीयाच्या राजांनी राजवाड्यात आहाज राजाच्या खोलीच्या
छतावर उभारलेल्या वेद्याही त्याने पाडून टाकल्या. याहवेहच्या मंदिराच्या
दोन्ही अंगणात मनश्शेहने बांधलेल्या वेद्या सुद्धा त्याने नष्ट केल्या.
त्यांचा चुराडा करून त्यांची धूळ त्याने किद्रोनच्या खोऱ्यात फेकून दिली.
13 पुढे शलोमोनाने यरुशलेमच्या पूर्वेकडील आणि विध्वंसगिरीच्या
दक्षिणेकडील टेकड्यांवरील मंदिरे काढून टाकली. ही मंदिरे इस्राएलचा
राजा शलोमोनाने सीदोन्यांच्या अष्टारोथ, मोआबाच्या कमोश आणि
अम्मोन्यांच्या मिलकाम या अमंगळ दैवतांसाठी बांधली होती. 14
योशीयाहने मूर्तिस्तंभ पाडले आणि अशेराच्या ओंगळ मूर्ती फोडल्या,
नंतर ते ठिकाण मानवांच्या हाडांनी भरून ठेवले. 15 बेथेल येथे उभारलेली
वेदी, टेकड्यांवरील मंदिरे, नेबाटाचा पुत्र यरोबोअमद्वारे तयार करण्यात
आलेली वेदी, ज्याद्वारे इस्राएली लोकांनी पाप केले होते ती आणि
टेकड्यांवरील मंदिरे पाडून टाकली. त्याने त्या मंदिराचे धोंडे जमीनदोस्त
करून त्याचा भुगा केला आणि अशेराची ओंगळ मूर्ती जाळून भस्म केली.
16 योशीयाहने चौफेर नजर फिरविली, तेव्हा त्याला डोंगराच्या बाजूला
कित्येक कबरा आढळल्या, त्याने आपल्या सेवकांना आज्ञा केली की
त्या कबरांमधील हाडे जमा करून ती बेथेलमधील वेदीवर जाळून ती वेदी
भ्रष्ट करावी. जेव्हा यरोबोअम सणाच्या वेळी वेदीजवळ उभा राहिला
होता तेव्हा परमेश्वराच्या मनुष्याने याहवेहच्या संदेशानुसार भविष्यवाणी
केली होती तसेच हे घडले. 17 राजाने विचारले, “पलीकडे जे कबरेचे
स्मारक दिसते ते कोणाचे आहे?” तेव्हा शहरातील लोकांनी त्याला
सांगितले, “हे परमेश्वराच्या संदेष्ट्याचे स्मारक आहे, जो यहूदीयातून
आला होता आणि बेथेलच्या वेदीची नुकतीच जी पाडापाड केली,
त्यासंबंधीचे भाकीत ज्या संदेष्ट्याने केले होते, त्याची ती कबर आहे.”
18 तेव्हा राजा म्हणाला, “त्याच्या स्मारकाला धक्का लावू नका.
त्याच्या हाडांना सुद्धा धक्का लावू नका.” राजाज्ञेवरून त्यांनी त्याच्या
आणि शोमरोनातील संदेष्ट्याच्या अस्थी जाळल्या नाहीत. 19 त्याने
योशीयाहने बेथेलप्रमाणेच शोमरोनाच्या नगराच्या टेकड्यांवरील सर्व
मंदिरे नष्ट केली. इस्राएलाच्या निरनिराळ्या राजांनी ती बांधली होती.
यामुळे याहवेहला या गोष्टीचा फार क्रोध आलेला होता. 20 योशीयाहने
जे याजक वेदीवर उच्चस्थानी होते त्यांना त्या वेद्यांवरच जिवे मारले.
नंतर त्या वेद्यांवर लोकांची हाडे जाळून त्याने त्या भ्रष्ट केल्या. मग तो
यरुशलेमात परतला. 21 राजाने सर्व लोकांना आदेश दिला: “कराराच्या
पुस्तकात नमूद केल्याप्रमाणे याहवेह तुमच्या परमेश्वराकरिता वल्हांडण
सण साजरा करा.” 22 इस्राएलच्या शास्त्यांच्या काळापासून आणि
इस्राएलचे राजे आणि यहूदीयातील राजांच्या दिवसात सुद्धा असा
वल्हांडण सण साजरा केला नव्हता. 23 हा वल्हांडण सण योशीयाह
राजाच्या अठराव्या वर्षी यरुशलेममध्ये याहवेहसाठी साजरा करण्यात
आला. 24 योशीयाहने यहूदीया व यरुशलेममधील प्रेत साधक, भूतविद्या
करणारे, कुलदैवते व मूर्ती, आणि सर्वप्रकारच्या घृणास्पद वस्तू काढून
टाकल्या. हिल्कियाह याजकाला याहवेहच्या मंदिरात आढळलेल्या
नियमांच्या पुस्तकात जे लिहिले होते ते पूर्ण करण्यासाठी त्याने असे
केले. 25 योशीयाह सारखा कोणीही राजा त्याच्या आधी व त्याच्यानंतर
झाला नाही ज्याने याहवेहकडे वळून मोशेचे नियमशास्त्र पूर्ण मनाने,
पूर्ण जिवाने आणि पूर्णशक्तीने पाळले. 26 इतके होऊनही यहूदीयाच्या
विरुद्ध आलेला याहवेहचा महाक्रोध कमी झाला नव्हता, मनश्शेह राजाने
जी दुष्टता केली होती त्यामुळे त्यांचा यहूदाहवरचा राग कमी झाला
नाही. 27 म्हणून याहवेहने म्हटले, “इस्राएलप्रमाणे मी यहूदीयालाही
माझ्या उपस्थितीतून काढून टाकेन आणि मी स्वत: ज्या नगरीला
निवडले होते त्या यरुशलेमचा आणि या मंदिराचाही ज्याबद्दल मी म्हटले
होते, ‘तिथे माझे नाव राहील’ त्यांचा त्याग करेन.” 28 योशीयाहच्या
कारकिर्दीतील इतर घटना, आणि त्याने जे सर्व केले, ते यहूदीयाच्या
राजांचा इतिहासग्रंथामध्ये नमूद केलेले नाही काय? 29 योशीयाह राजा
असताना, इजिप्तचा राजा फारोह नखो हा अश्शूरच्या राजाला मदत
करण्यासाठी फरात नदीजवळ गेला. योशीयाह राजा त्याचा सामना
करण्यासाठी युद्धास गेला, परंतु नखो राजाने त्याचा सामना केला आणि
मगिद्दो येथे त्याला मारून टाकले. 30 योशीयाहच्या सेवकांनी त्याचे
प्रेत रथात घालून मगिद्दोहून यरुशलेमास आणले आणि त्याला त्याच्या
कबरेत पुरण्यात आले. आणि त्या देशातील लोकांनी योशीयाहचा पुत्र
यहोआहाजचा अभिषेक करून त्याच्या पित्याच्या जागेवर राजा केले.
31 वयाच्या तेविसाव्या वर्षी यहोआहाज राजा झाला आणि त्याने तीन
महिने यरुशलेमात राज्य केले, त्याच्या आईचे नाव हमूटल असे होते; ती
लिब्नाह येथील यिर्मयाहची कन्या होती. 32 त्याने आपल्या पूर्वजांच्या

प्रमाणे याहवेहच्या दृष्टीने जे वाईट ते केले. 33 त्याने यरुशलेमात राज्य
करू नये म्हणून फारोह नखोने त्याला हमाथातील रिब्लाह येथे बेड्या
घालून ठेवले. फारोह नखोने यहूदीयावर शंभर तालांत चांदी आणि एक
तालांत सोने असा कर लादला. 34 फारोह नखोने योशीयाहचा पुत्र
एल्याकीमला त्याच्या पित्याच्या जागी राजा केले आणि एल्याकीमचे
नाव बदलून यहोयाकीम ठेवले. परंतु त्याने यहोआहाजाला इजिप्तमध्ये
नेले आणि तिथे तो मरण पावला. 35 यहोयाकीमने फारोह नखोने
मागितलेले सोने आणि चांदी दिली. असे करण्यासाठी त्याने जमिनीवर
कर लावला आणि तेथील लोकांकडून चांदी व सोने वसूल केले.
36 वयाच्या पंचविसाव्या वर्षी यहोयाकीम राजा झाला आणि त्याने
यरुशलेममध्ये अकरा वर्षे राज्य केले. त्याच्या आईचे नाव जबूदाह होते;
ती रुमाह येथील पदायाहची कन्या होती. 37 त्याच्या पूर्वजांच्या प्रमाणे
त्याने याहवेहच्या दृष्टीने जे वाईट ते केले.

**24** यहोयाकीमच्या कारकिर्दीत, बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरने
देशावर स्वारी केली, आणि यहोयाकीम तीन वर्षे त्याचा ताबेदार
राहिला. पण नंतर तो नबुखद्नेस्सरच्या विरोधात गेला आणि त्याने
बंड पुकारले. 2 याहवेहने यहूदाहचा नाश करण्यासाठी यहूदीयावर
खास्द्यांच्या, अरामी, मोआबी व अम्मोनी यांच्या टोळ्या पाठविल्या, असे
घडणार हे भविष्य याहवेहने आपल्या संदेष्ट्याद्वारे आधी केलेले होते. 3
निश्चितच याहवेहच्या आज्ञेनुसार त्यांनी त्यांना आपल्या उपस्थितीतून
घालून द्यावे म्हणून हे संकट यहूदीयावर आले, कारण मनश्शेहचे पाप
आणि त्याने जे सर्व केले, 4 त्यासोबत निर्दोषाचे रक्त सांडणे हे सम्मिलीत
होते. त्याने यरुशलेम निर्दोषांच्या रक्ताने भरून टाकले, त्यामुळे याहवेहने
त्यांना क्षमा करण्याचे नाकारले. 5 यहोयाकीमच्या कारकिर्दीतील इतर
घटना, आणि त्याने सर्व जे केले ते यहूदीयाच्या राजांच्या इतिहासग्रंथात
लिहिलेले नाही काय? 6 यहोयाकीम आपल्या पूर्वजांबरोबर विसावा
पावला. आणि त्याचा वारस त्याचा पुत्र यहोयाखीन राजा झाला. 7
इजिप्तचा राजा पुन्हा कधीही आपल्या देशातून बाहेर आला नाही, कारण
बाबेलच्या राजाने इजिप्तच्या ओहोळापासून फरात नदीपर्यंतचा त्याचा
सर्व प्रदेश आपल्या सत्तेखाली आणला होता. 8 वयाच्या अठराव्या
वर्षी यहोयाखीन राजा झाला, आणि त्याने यरुशलेमात तीन महिने
राज्य केले. त्याच्या आईचे नाव नेहूष्टा होते. ती एलनाथानची कन्या
असून यरुशलेमची होती. 9 त्याने त्याच्या पित्याप्रमाणेच याहवेहच्या
दृष्टीने जे वाईट ते केले. 10 त्याच्याच कारकिर्दीत बाबेलचा राजा
नबुखद्नेस्सरच्या सैन्याने यरुशलेमावर स्वारी करून शहरास वेढा दिला,
11 आणि त्याचे अधिकारी हा वेढा घालत असताना बाबेलचा राजा
नबुखद्नेस्सर स्वतः शहरात आला. 12 यहूदीयाचा राजा यहोयाखीन,
त्याची आई, त्याचे सेवक, त्याच्या राजघराण्यातील सेवक आणि त्याचे
अधिकारी हे सर्व त्याला शरण गेले. बाबेलचा राजाच्या कारकिर्दीच्या
आठव्या वर्षी, त्याने यहोयाखीनला कैदी बनविले. 13 याहवेहने घोषणा
केल्याप्रमाणे, नबुखद्नेस्सरने याहवेहच्या मंदिरातील व राजवाड्यातील
सर्व संपत्ती लुटून नेली आणि इस्राएलाच्या शलोमोन राजाने याहवेहच्या
मंदिरासाठी ठेवलेले सोन्याचे कटोरे तोडून त्यांचे तुकडे केले. 14
यरुशलेम येथील लोक त्याने बंदिवासात नेले: सर्व अधिकारी आणि
लढाऊ पुरुष आणि सर्व कुशल कामगार आणि कारागीर—एकूण
दहा हजार. देशात फक्त सर्वात गरीब लोक उरले. 15 नबुखद्नेस्सर
यहोयाखीनला बंदी करून बाबेलला घेऊन गेला. त्याने राजाची आई,
त्याच्या पत्नी, त्याचे अधिकारी आणि देशातील प्रतिष्ठित लोकांना
देखील यरुशलेमहून बाबेलला नेले. 16 बाबेलच्या राजाने युद्धासाठी
सक्षम आणि बलवान योद्धांचे संपूर्ण सात हजार सैन्य आणि एक हजार
कुशल कारागीर आणि लोहार बाबेलला नेले. 17 बाबेलच्या राजाने
यहोयाखीनचा काका मत्तन्याहला त्याच्या ठिकाणी राजा केले आणि
त्याने त्याचे नाव बदलून ते सिद्कीयाह असे ठेवले. 18 सिद्कीयाह
एकवीस वर्षाचा असताना राजा झाला आणि त्याने यरुशलेमात अकरा
वर्षे राज्य केले. त्याच्या आईचे नाव हमूटल असून ती लिब्नाह येथील
यिर्मयाहची कन्या होती. 19 यहोयाकीमप्रमाणेच त्याने याहवेहच्या दृष्टीने
जे वाईट ते केले. 20 यरुशलेम व यहूदीयामध्ये हे सर्व याहवेहच्या
क्रोधामुळे घडले आणि शेवटी त्यांनी या लोकांना स्वतःच्या समक्षतेतून
काढून टाकले. आता सिद्कीयाहने बाबेलच्या राजाविरुद्ध बंड केले.

**25** म्हणून सिद्कीयाह राजाच्या कारकिर्दीच्या नवव्या वर्षी, दहाव्या
महिन्याच्या दहाव्या दिवशी, बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरने
आपले सर्व सैन्य घेऊन यरुशलेमवर आक्रमण केले व त्याच्या
सभोवार वेढा घालून मोर्चे बांधले. 2 सिद्कीयाह राजाच्या कारकिर्दीच्या
अकराव्या वर्षापर्यंत शहराला वेढा दिलेला होता. 3 चौथ्या महिन्याच्या
नवव्या दिवशी, शहरातील दुष्काळ इतका भयंकर झाला की लोकांना
खाण्यासाठी अन्न राहिले नाही. 4 तेव्हा नगराचा तट तोडण्यात आला व
सर्व सैनिक पळून गेले. सभोवताली बाबिलोनी सैन्याचा वेढा असूनही
त्यांनी रात्रीच्या वेळी राजाच्या बागेजवळ दोन भिंतीमध्ये असलेल्या
वेशीतून अराबाहच्या दिशेने पळ काढला, 5 परंतु बाबेलच्या सैनिकांनी
त्यांचा पाठलाग केला आणि सिद्कीयाह राजाला यरीहोच्या मैदानात
पकडले, कारण त्याचे सर्व सैन्य त्याच्यापासून पांगून दूर गेले होते, 6
आणि तो पकडला गेला. त्याला बाबिलोनी राजासमोर हमाथ राज्यातील
रिब्लाह या शहरात आणण्यात आले. त्या ठिकाणी सिद्कीयाला शिक्षा
सुनाविण्यात आली. 7 त्यांनी सिद्कीयाहच्या डोळ्यादेखत त्याच्या
पुत्रांचा वध केला. मग त्यांनी त्याचे डोळे काढले व त्याला बाबेलास
बंदिवान म्हणून पाठविण्यासाठी कास्याच्या साखळयांनी बांधले. 8
बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरच्या कारकिर्दीच्या एकोणविसाव्या वर्षाच्या
पाचव्या महिन्याच्या सातव्या दिवशी बाबेलच्या राजाच्या रक्षक दलाचा
अधिकारी नबुजरदान यरुशलेमास आला. 9 त्याने याहवेहचे मंदिर,
राजवाडा व यरुशलेमातील सर्व घरे अग्नीने जाळून टाकली. प्रत्येक
महत्त्वाची इमारत जाळून भस्म केली. 10 रक्षक दलाच्या अधिकाराच्या
नेतृत्वाखाली खास्द्यांच्या सर्व सैनिकांनी यरुशलेमची तटबंदी पाडून
टाकली. 11 नंतर रक्षक दलाचा अधिकारी नबुजरदानने शहराच्या
विध्वंसातून वाचलेल्या आणि बाबेलच्या राजाला शरण गेलेल्या लोकांना

बंदिवासात नेले. 12 परंतु अधिकाऱ्याने देशातील काही अत्यंत गरीब
लोकांना द्राक्षमळ्याची व शेताची मशागत करण्यास मागे ठेवले. 13
बाबेलच्या लोकांनी याहवेहच्या मंदिरातील कास्याचे खांब, बैठकी
आणि कास्याची मोठी टाकी मोडली आणि ते कास्य बाबेलास घेऊन
गेले. 14 त्यांनी भांडी, फावडे, चिमटे आणि मंदिरात उपासनेसाठी
वापरण्यात येणारी कास्याची सर्व भांडी सोबत नेली. 15 रक्षक दलाच्या
अधिकाऱ्याने अग्निपात्रे आणि शिंपडण्याची भांडी—जे सर्व शुद्ध
सोन्याचे किंवा चांदीचे होते, काढून घेतली. 16 याहवेहच्या मंदिरासाठी
शलोमोन राजाने तयार केलेले दोन खांब, मोठी टाकी आणि बैठकी
यांचे वजन करणे कठीण होते. 17 प्रत्येक खांब अठरा हात उंच
होता. एका खांबावर कास्याचा कळस होता जो तीन हात उंच असून
त्यावर सभोवती कास्याच्या डाळिंबाचे नक्षीकाम होते. नक्षीसह दुसरा
खांबही तसाच होता. 18 रक्षक दलाच्या अधिकाऱ्याने प्रमुख याजक
सेरायाह, दुसरा याजक सफन्याह आणि तीन द्वारपालांना बंदिवान
म्हणून नेले. 19 जे अजूनही शहरात होते त्यांच्याकडून त्याने योद्ध्यांचा
एक अधिकारी आणि पाच राजकीय सल्लागार घेतले. लोकांची सैन्यात
भरती करण्यासाठी मुख्य अधिकारी असलेल्या सचिवाला आणि शहरात
सापडलेल्या साठ माणसांनाही त्याने नेले. 20 रक्षक दलाचा अधिकारी
नबुजरदानने सर्वांना घेतले आणि रिब्लाह येथे बाबेलच्या राजाकडे
आणले. 21 हमाथ देशातील रिब्लाह येथे बाबेलच्या राजाने त्यांचा वध
केला. याप्रकारे यहूदीयाचे लोक आपल्या देशापासून दूर बंदिवासात
गेले. 22 बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरने शाफानचा पुत्र अहीकामचा
पुत्र गदल्याहला, यहूदीयाहमध्ये उरलेल्या लोकांवर अधिकारी म्हणून
नियुक्त केले. 23 जेव्हा सर्व सेनेचे अधिकारी आणि त्यांच्या माणसांनी
ऐकले की बाबेलच्या राजाने गदल्याहची राज्यपाल म्हणून नेमणूक
केली आहे, तेव्हा ते म्हणजे नथन्याहचा पुत्र इश्माएल, कारेहचा पुत्र
योहानान, नटोफाथी तन्हुमेथचा पुत्र सेरायाह आणि माकाथीचा पुत्र
याजन्याह आणि त्यांचे लोक गदल्याहकडे मिस्पाह येथे आले. 24 त्यांना
व त्यांच्या लोकांना पुनः खात्री देण्यासाठी गदल्याहने शपथ घेतली.
तो म्हणाला, “खास्द्यांच्या अधिकाऱ्यांना भिऊ नका, देशात स्थायिक
व्हा आणि बाबेलच्या राजाची सेवा करा आणि तुमचे बरे होईल.” 25
परंतु सातव्या महिन्यात एलीशामाचा पुत्र नथन्याहचा पुत्र इश्माएल जो
राजघराण्यातील एक होता, आपल्याबरोबर दहा माणसे घेऊन आला
आणि त्याने गदल्याह व यहूदी लोकांना व बाबेलच्या लोकांना जे मिस्पाह
येथे होते त्यांना ठार मारले. 26 मग सेनाधिकाऱ्यांसह, लहानमोठे सर्व
लोक खास्द्यांच्या भीतीने इजिप्तला पळून गेले. 27 यहूदीयाचा राजा
यहोयाखीनच्या बंदिवासातील सदतिसाव्या वर्षी, एवील-मरोदख हा
बाबेलचा राजा झाला, तेव्हा त्याने यहूदीयाचा राजा यहोयाखीनची
बंदिवासातून सुटका केली. त्याने हे बाराव्या महिन्याच्या सत्ताविसाव्या
दिवशी केले. 28 तो त्याच्याशी कृपेने बोलला आणि त्याचे राजासन जे
राजे त्याच्यासोबत बाबेल येथे होते, त्यांच्या राजासनापेक्षा उंच केले.
29 यहोयाखीनने तुरुंगातील कपड्यांचा त्याग केला आणि आयुष्यभर
राजाच्या मेजावर भोजन केले. 30 यहोयाखीन जिवंत असेपर्यंत राजा
त्याला प्रती दिवस नियमित पुरवठा करीत असे.

# 1 इतिहास

1 आदाम, शेथ, अनोश, 2 केनान, महलालेल, यारेद, 3 हनोख,
मथुशेलह, लामेख, नोआह. 4 नोआहाचे पुत्र: शेम, हाम व याफेथ.
5 याफेथाचे पुत्र: गोमेर, मागोग, मादय, यावान, तूबाल, मेशेख व
तीरास. 6 गोमेरचे पुत्र: आष्कनाज, रीपाथ व तोगर्माह. 7 यावानाचे
पुत्र: एलिशाह, तार्शीश, कित्तीम व रोदानीम. 8 हामाचे पुत्र: कूश,
इजिप्त, पूट व कनान. 9 कूशाचे पुत्र: सबा, हवीला, साब्ता, रामाह व
साब्तेका. रामाहचे पुत्र: शबा व ददान. 10 कूश निम्रोदचा पिता होता, जो
पृथ्वीवरील एक वीर व्यक्ती झाला. 11 इजिप्तचे पुत्र: लूदीम, अनामीम,
लहाबीम, नाप्तुहीम, 12 पात्रुसीम, कास्लूहीम (ज्यापासून पलिष्टी लोक
आले) आणि कफतोरीम. 13 कनान यांचा पिता होता: प्रथमपुत्र सीदोन,
आणि हेथ, 14 यबूसी, अमोरी, गिर्गाशी, 15 हिव्वी, आर्की, सीनी, 16
अर्वादी, समारी व हमाथी. 17 शेमचे पुत्र: एलाम, अश्शूर, अर्पक्षद,
लूद व अराम. अरामाचे पुत्र: ऊस, हूल, गेतेर व मेशेख. 18 अर्पक्षद हा
शेलाहचा पिता झाला, व शेलाह एबरचा पिता झाला. 19 एबरला दोन
पुत्र झाले: एकाचे नाव पेलेग ठेवले, कारण याच्या हयातीत पृथ्वीची
विभागणी झाली. त्याच्या भावाचे नाव योक्तान होते. 20 योक्तानचे पुत्र:
अलमोदाद, शेलेफ, हसर्मावेथ, येरह, 21 हदोराम, ऊजाल, दिक्लाह,
22 ओबाल, अबीमाएल, शबा, 23 ओफीर, हवीला व योबाब. हे सर्व
योक्तानचे पुत्र होते. 24 शेम, अर्पक्षद, शेलाह, 25 एबर, पेलेग, रऊ, 26
सरूग, नाहोर, तेरह, 27 व अब्राम (अर्थात् अब्राहाम). 28 अब्राहामाचे
पुत्र: इसहाक व इश्माएल. 29 हे त्यांचे वंशज होते: इश्माएलाचा
प्रथमपुत्र नबायोथ, नंतर केदार, अदबील, मिबसाम, 30 मिश्मा, दूमाह,
मस्सा, हदद, तेमा, 31 यतूर, नापीश आणि केदमाह. 32 अब्राहामाची
उपपत्नी केटूराह हिला जन्मलेले पुत्र: जिम्रान, योक्षान, मदान, मिद्यान,
इश्बाक व शूआह. योक्षानचे पुत्र: शबा आणि ददान. 33 मिद्यानाचे पुत्र:
एफाह, एफेर, हनोख, अबीदा आणि एल्दाह. 34 अब्राहामास इसहाक
झाला. इसहाकाचे पुत्र: एसाव व इस्राएल. 35 एसावाचे पुत्र: एलीफाज,
रऊएल, यऊश, यालाम व कोरह. 36 एलीफाजचे पुत्र: तेमान, ओमर,
सेपो, गाताम व केनाज, तिम्नाद्वारे: अमालेक. 37 रऊएलाचे पुत्र:
नहाथ, जेरह, शम्माह व मिज्जा. 38 सेईराचे पुत्र: लोटान, शोबाल,
सिबोन, अनाह, दिशोन, एसर व दीशान. 39 लोटानाचे पुत्र: होरी व
होमाम. तिम्ना लोटानाची बहीण होती. 40 शोबालाचे पुत्र: अलवान,
मानहथ, एबाल, शेफी व ओनाम. सिबोनाचे पुत्र: अय्याह व अनाह. 41
अनाहचा पुत्र: दिशोन. दिशोनाचे पुत्र: हेमदान, एश्बान, इथरान व करान.
42 एसराचे पुत्र: बिल्हान, जावान व याकान. दिशोनाचे पुत्र: ऊस व
अरान. 43 इस्राएली लोकांवर कोणत्याही राजाने राज्य करण्यापूर्वी
एदोम देशावर ज्या राजांनी राज्य केले ते हे: बौराचा पुत्र बेला; त्याच्या
शहराला दिन्हाबाह हे नाव दिले होते. 44 बेला मृत्यू पावल्यावर बस्रा
येथला जेरहाचा पुत्र योबाब हा त्याच्या जागी राजा झाला. 45 योबाब
मरण पावल्यावर तेमानी देशातील हुशाम त्याच्या जागी राजा झाला. 46
हुशामच्या मृत्यूनंतर बदादाचा पुत्र हदाद त्याच्या जागी राजा झाला;
यानेच मोआब मैदानात मिद्यानांना पराभूत केले; त्या नगराचे नाव अवीत
होते. 47 मग हदाद मेल्यावर मास्रेका येथील सामलाह त्याच्या जागी
राजा झाला. 48 सामलाहच्या मृत्यूनंतर फरात नदीच्या तीरावरील
रेहोबोथ नावाच्या शहरातला शौल त्याच्या जागी राजा झाला. 49
शौलाच्या मृत्यूनंतर अकबोराचा पुत्र बआल-हानान त्याच्या जागी राजा
झाला. 50 बआल-हानानच्या मृत्यूनंतर हदाद त्याच्या जागी राजा झाला.
त्याच्या नगराचे नाव पाऊ होते आणि त्याच्या पत्नीचे नाव महेटाबेल
असून ती मेजाहाबाची कन्या मात्रेदची कन्या होती. 51 हदादही मरण
पावला. एदोमाचे मूळ पुरुष: तिम्ना, आल्वा, यतेथ, 52 ओहोलीबामाह,
एलाह, पीनोन, 53 केनाज, तेमान, मिब्सार, 54 मग्दीएल व ईराम.

2 इस्राएलचे पुत्र: रऊबेन, शिमओन, लेवी, यहूदाह, इस्साखार व
जबुलून, 2 दान, योसेफ, बिन्यामीन, नफताली, गाद व आशेर.
3 यहूदाहचे पुत्र: एर, ओनान व शेलाह. हे तिघे कनानी बथ-शूवा
हिच्या पोटी त्यास झाले. (यहूदाहचा ज्येष्ठपुत्र एर हा याहवेहच्या दृष्टीने
दुष्ट असल्यामुळे त्यास याहवेहनी जिवे मारले.) 4 यहूदाहची सून
तामारपासून त्याला पेरेस व जेरह हे पुत्र झाले; 5 पेरेसाचे पुत्र: हेस्रोन व
हामूल. 6 जेरहाचे पुत्र: जिम्री, एथान, हेमान, कल्कोल व दारा; असे
एकंदर पाच पुत्र होते. 7 कर्मीचा पुत्र: आखार, ज्याने अविश्वासूपणे
मूर्तीस समर्पित वस्तूंची चोरी करून आपल्या इस्राएली राष्ट्रास क्लेश
दिला. 8 एथानाचा पुत्र: अजर्‍याह. 9 हेस्रोनास झालेले पुत्र: यरहमेल,
राम व केलूबाइ. 10 रामास अम्मीनादाब झाला, आणि अम्मीनादाबास
यहूदाह वंशाचा सरदार नहशोन हा झाला. 11 नहशोनाला सल्मा व
सल्माला बवाज हा झाला; 12 बवाजाला ओबेद झाला व ओबेदाला
इशाय झाला. 13 इशायाचे पुत्र: ज्येष्ठपुत्र एलियाब, दुसरा अबीनादाब,
तिसरा शिमिआ, 14 चवथा नथानेल, पाचवा रद्दाय, 15 सहावा ओसेम,
व सातवा दावीद हे होते. 16 त्यांच्या बहिणी सरुवा व अबीगईल.
जेरुइयाहचे अबीशाई, योआब व असाहेल असे तिघे पुत्र होते. 17
अबीगईलला अमासा झाला, अमासाचा पिता इश्माएली येथेर होता. 18
हेस्रोनचा पुत्र कालेबास त्याच्या पत्नी अजूबा (व यरियोथ) यांच्यापासून
संतती झाली. अजुबाहचे पुत्र: येशेर, शोबाब व अर्दोन. 19 अजुबाहच्या
मृत्यूनंतर कालेबाने एफ्राथेशी विवाह केला. तिच्या पोटी त्यास हूर
झाला. 20 हूरास उरी झाला व उरीस बसालेल झाला. 21 नंतर हेस्रोन
साठ वर्षांचा असता त्याने गिलआदाचा पिता माखीरच्या कन्येशी विवाह
केला व तिच्याशी केलेल्या प्रीतीसंबंधाने त्यास सगूब हा झाला. 22
सगूबास याईर झाला, याईराने गिलआद प्रांतात तेवीस शहरांचे नियंत्रण
केले. 23 (पण गशूर व अराम यांनी हव्योथ याईर व केनाथ आणि
त्यांच्या आसपासची गावे अशी एकंदर साठ नगरे हस्तगत केली.) 24
हेस्रोन कालेब एफ्राथ येथे मृत्यू पावल्यावर त्याची पत्नी अबीयाहच्या
पोटी त्याला तकोवाचा पिता अश्हूर हा झाला. 25 हेस्रोनाचा ज्येष्ठपुत्र
यरहमेल याचे पुत्र: ज्येष्ठपुत्र राम, बुना, ओरेन ओसेम व अहीयाह. 26
यरहमेलाची अटाराह नावाची दुसरी एक पत्नी होती. ती ओनामची आई

होती. 27 यरहमेलाचा ज्येष्ठपुत्र रामचे पुत्र: मास, यामीन व एकर. 28
ओनामाचे पुत्र: शम्मय व यादा. शम्मयाचे पुत्र: नादाब व अबीशूर. 29
अबीशूराच्या पत्नीचे नाव अबीहाईल होते. तिच्या पोटी त्यास अहबान व
मोलीद हे झाले. 30 नादाबाचे पुत्र: सलेद व अप्पईम. सलेद हा पुत्रहीन
मेला. 31 अप्पईमचा पुत्र: इशी. इशीला शेशान हा झाला व शेशानाला
अहलाय झाला. 32 शम्मयाचा भाऊ यादायाचे पुत्र: येथेर व योनाथान.
येथेर हा पुत्रहीन मेला. 33 योनाथानचे पुत्र: पेलेथ व जाजा. 34 शेशानास
पुत्र नव्हते, मात्र कन्या होत्या. त्याचा यरहा नावाचा एक इजिप्त येथील
सेवक होता. 35 शेशानाने आपली कन्या, आपला सेवक यरहास दिली;
तिच्या पोटी त्यास अत्ताय झाला. 36 अत्तायास नाथान, नाथानास
जाबाद, 37 जाबादास एफलाल, एफलालास ओबेद, 38 ओबेदास येहू,
येहूस अजऱ्याह, 39 अजऱ्याहास हेलेस, हेलेसाला एलीयासाह, 40
एलीयासाहला सिस्माय, सिस्मायास शल्लूम, 41 शल्लूमास यकम्याह,
आणि यकम्याहास एलीशामा झाला. 42 यरहमेलाचा भाऊ कालेबचे
पुत्र: ज्येष्ठपुत्र मेशा जीफाचा पिता होता, मेशा जिफचा पिता होता आणि
त्याचा पुत्र मारेशाह हा हेब्रोनचा पिता होता. 43 हेब्रोनाचे पुत्र: कोरह,
तप्पूआह, रेकेम व शमा. 44 शमास रहम झाला. तो यर्कामाचा पिता
होता. रेकेमास शम्मय हा झाला. 45 शम्मयाचा पुत्र मावोन, माओन
हा बेथ-सूराचा पिता होता. 46 कालेबाची उपपत्नी एफाहला हारान,
मोसा व गाजेज झाले. हारानास गाजेज झाला. 47 यादायाचे पुत्र: रेगेम,
योथाम, गेशान, पेलेट, एफाह व शाफ. 48 कालेबाची उपपत्नी माकाहला
शेबेर व तिऱ्हना हे झाले. 49 याशिवाय तिला मदमन्नाहचा पिता शाफ,
आणि मखबेना व गिबियाह यांचा पिता शेवा हे झाले; कालेबाची कन्या
अक्साह होती. 50 ही कालेबाची संतती होय. एफ्राथेचा ज्येष्ठपुत्र हूरचे
पुत्र: शोबाल हा किर्याथ-यआरीमाचा पिता होता. 51 सल्मा बेथलेहेमाचा
पिता होता. हारेफ हा बेथ-गादेराचा पिता होता. 52 किर्याथ-यआरीमाच्या
पिता शोबालचे वंशज: हारोवेह व अर्धे मेनुहोथवासी. 53 किर्याथ-
यआरीम याची कुळे: इथ्री, पूथी, शुमाथी व मिश्राई. यांच्यापासून सोराथी
व एष्टाबुली ही कुळे निघाली. 54 सल्माचे वंशज: बेथलेहेम, नटोफाथी,
अटरोथ-बेथ-योआब आणि अर्धे मानाहथी, सोरी, 55 आणि याबेस येथे
राहणारी सोफारी कुळे: तिराथी, शिमाथी व सुकाथी. रेखाब घराण्याचा
मूळ पुरुष हम्मथच्या वंशातील ही केनी कुळे होती.

**3** हेब्रोन येथे जन्मलेले दावीदाचे पुत्र: दावीदाचा ज्येष्ठपुत्र अम्नोन.
दावीदाला तो येज्रीली अहीनोअमपासून झाला. दावीदाचा दुसरा
पुत्र दानीएल. त्याच्या आईचे नाव अबीगईल असे असून ती कर्मेलची
होती. 2 तिसरा पुत्र अबशालोम हा गशूरचा राजा तलमयची कन्या
माकाहपासून झाला. चौथा पुत्र अदोनियाह हग्गीथपासून जन्मला. 3
पाचवा पुत्र शफाट्याह अबीटालपासून झाला. सहावा पुत्र इथ्रियामची
पत्नी एग्लाहपासून झाला. 4 हेब्रोन येथे जन्मलेले दावीदाचे हे सहा पुत्र
होते; तिथे त्याने सात वर्षे सहा महिने राज्य केले. 5 यरुशलेममध्ये
त्याला जे पुत्र झाले ते हे: शम्मुआ, शोबाब, नाथान, शलोमोन हे
चार अम्मीएलाची कन्या बथशेबा हिच्यापासून झाले. 6 नंतर इभार,
एलीशुआ, एलिफेलेत. 7 नोगा, नेफेग, याफीय, 8 एलीशामा, एलयादा
व एलिफेलेत हे सुद्धा झाले; असे एकूण नऊ पुत्र होते. 9 या यादीमध्ये
त्याला त्याच्या उपपत्नींपासून झालेल्या पुत्रांचा समावेश केलेला
नाही. दावीदाला तामार नावाची एक कन्याही होती. 10 शलोमोनचा
पुत्र रेहोबोअम, त्याचा पुत्र अबीयाह, त्याचा पुत्र आसा, त्याचा पुत्र
यहोशाफाट, 11 त्याचा पुत्र यहोराम, त्याचा पुत्र अहज्याह, त्याचा पुत्र
योआश, 12 त्याचा पुत्र अमस्याह, त्याचा पुत्र अजऱ्याह, त्याचा पुत्र
योथाम, 13 त्याचा पुत्र आहाज, त्याचा पुत्र हिज्कीयाह, त्याचा पुत्र
मनश्शेह, 14 त्याचा पुत्र आमोन, त्याचा पुत्र योशीयाह. 15 योशीयाहचे
पुत्र: ज्येष्ठ योहानान, दुसरा यहोयाकीम, तिसरा सिद्कीयाह, व चौथा
शल्लूम. 16 यहोयाकीमाचे पुत्र: यकोन्याह, व सिद्कीयाह. 17 बंदी
झालेले यकोन्याहचे पुत्र: शल्तीएल, 18 मल्कीराम, पदायाह, शेनस्सर,
यकम्याह, होशामा व नेदब्याह. 19 पदायाहचे पुत्र: जरूब्बाबेल व शिमी.
जरूब्बाबेलाचे पुत्र: मशुल्लाम, हनन्याह. त्याच्या कन्येचे नाव शेलोमीथ.
20 त्या शिवाय आणखी पाच पुत्र होते: हशूबाह, ओहेल, बेरेख्याह,
हसद्याह व यूशाब-हेसेद. 21 हनन्याहचे पुत्र: पेलतियाह व यशायाह.
यशायाहचा पुत्र रफायाह. रफायाहचा पुत्र नाव अर्णान. अर्णानला
ओबद्याह हा झाला. ओबद्याहचा पुत्र शखन्याह. 22 शखन्याहचे वंशज:
शमायाह आणि त्याचे पुत्र: हट्टूश, इगाल, बारीहा, निरय्याह व शाफाट;
एकूण सहा पुत्र. 23 निरय्याहचे पुत्र: एलिओएनाइ, हिज्कीयाह व
अज्रीकाम, एकूण तीन पुत्र. 24 एलिओएनाइ याचे पुत्र: होदव्याह,
एल्याशीब, पेलतियाह, अक्कूब, योहानान, दलायाह व अनानी; एकूण
सात पुत्र.

**4** यहूदाहचे वंशज: पेरेस, हेस्रोन, कर्मी, हूर व शोबाल. 2 शोबालचा
पुत्र रेआयाहला यहथ, यहथाला अहूमय व लाहाद झाला, ही सोराथी
कुळे होत. 3 एटामाचे पुत्र: येज्रील, इश्मा, इद्बाश व त्यांची बहीण
हस्सलेलपोनी होती. 4 पेनुएल गदोरचा पिता होता, आणि एजेरला हूशा
झाला. हूरचे वंशज: ज्येष्ठपुत्र एफ्राथाह आणि तो बेथलेहेमाचा पिता
होता. 5 तकोवाचा पिता अश्हूरला हेला व नाराह अशा दोन पत्नी होत्या.
6 नाराहच्या पोटी त्याला अहुज्जाम, हेफेर, तेमानी व अहष्टारी झाले. ही
नाराहची संतती होती. 7 हेलाचे पुत्र: सेरथ, जोहर व एथ्नान 8 व कोस,
जो आनूब व हस्सोबेबाह यांचा पिता होता, तसेच त्याच्यापासून हारूमाचा
पुत्र अहरहेल याची कुळे निपजली. 9 याबेस आपल्या भावांपेक्षा अधिक
आदरणीय होता; “त्यास प्रसवताना मला फार क्लेश झाले” असे म्हणत
त्याच्या आईने त्याचे नाव याबेस ठेवले. 10 याबेसाने इस्राएलाच्या
परमेश्वराजवळ प्रार्थना केली, “तुम्ही मला आशीर्वादित करा, माझ्या
क्षेत्राचा विस्तार करा! माझ्यावर कोणतेही अरिष्ट येऊन, मला क्लेश
वाटू नये म्हणून तुमचा हात माझ्यावर राहो.” परमेश्वराने त्याची विनंती
मान्य केली. 11 शूहाहचा भाऊ कलूबला महीर झाला; हा एष्टोनाचा
पिता होता. 12 एष्टोनास बेथ-राफा, पासेआह आणि ईर-नाहाश चा पिता
तहिन्ना झाला. हे रेकाह नगरवासी होते. 13 केनाजचे पुत्र: ओथनिएल व
सेरायाह. ओथनिएलाचे पुत्र: हथथ आणि मेयोनोथाय. 14 मेयोनोथाय

ओफराहचा पिता होता. सेरायाह योआबाचा पिता होता, हा योआब
गे-हाराशीम चा पिता. हे यासाठी म्हटले कारण तेथील लोक निपुण
कारागीर होते. 15 यफुन्नेहचा पुत्र कालेबाचे पुत्र: इरु, एलाह व नाआम.
एलाहचा पुत्र: केनाज. 16 यहल्लेलेलचे पुत्र: जीफ, जीफा, तिऱ्या
व असरेल. 17 एज्राहचे पुत्र: येथेर, मेरेद, एफेर व यालोन. मेरेदची
एक पत्नी बिथ्याने मिर्याम, शम्मय व इश्बह यास जन्म दिला. इश्बह
एष्टमोवाचा पिता होता. 18 मेरेदने इजिप्तचा राजा फारोहची राजकन्या
बिथ्याशी विवाह केला होता. यहूदाह गोत्रातील त्याच्या पत्नीने गदोरचा
पिता येरेद, सोकोहचा पिता हेबेर आणि जानोहाचा पिता यकूथिएल
यांना जन्म दिला. 19 नहमाची बहीण, होदीयाहची पत्नी झाली; तिला:
गार्मी येथील कईलाहचा पिता व माकाथी येथील एष्टमोवा झाले. 20
शिमओनाचे पुत्र: अम्नोन, रिन्नाह, बेन-हानान व तिलोन. इशीचे वंशज:
जोहेथ व बेन-जोहेथ. 21 यहूदाहचा पुत्र शेलाहचे पुत्र: लेकाहचा पिता
एर, मारेशाहचा पिता लादाह आणि बेथ-अश्बे येथील तलम कापडाचे
विणकाम करणारी कुळे उत्पन्न झाली. 22 तसेच शेलापासून योकीम,
कोजेबा येथील लोक, योआश, मोआबावर सत्ता चालविणारे साराफ व
यशूबी-लेहेम हे निपजले. (हा वृतांत प्राचीन नोंदवहीतील आहे.) 23 हे
कुंभार असून नताईम व गेदेराह येथे राहत असत; ते राजाचे कामकाज
करून त्याच्याजवळ राहत असत. 24 शिमओनाचे वंशज: नेमूएल,
यामीन, यारीब, जेरह व शौल; 25 शौलाचा पुत्र शल्लूम, शल्लूमाचा पुत्र
मिबसाम आणि मिबसामचा पुत्र मिश्मा. 26 मिश्माचा वंशज: त्याचा पुत्र
हम्मूएल. हम्मूएलाचा पुत्र जक्कूरचा पुत्र शिमी. 27 शिमीस सोळा पुत्र
व सहा कन्या झाल्या; पण त्याच्या भावास फारशी संतती झाली नाही
आणि त्यांचा वंश यहूदाहच्या वंशाप्रमाणे वृद्धी पावला नाही. 28 त्यांनी
वस्ती केलेली गावे ही: बेअर-शेबा, मोलादाह, हसर-शुआल, 29 बिल्हा
असेम, तोलाद, 30 बेथुएल, होरमाह सिकलाग, 31 बेथ-मर्काबोथ,
हसर-सुसीम, बेथ-बिरी व शाराईम. दावीदाच्या कारकिर्दीपर्यंत ही त्यांची
शहरे होती. 32 त्यांचे वंशज एटाम, एईन, रिम्मोन, तोखेन आणि आशान
या पाच नगरात आणि 33 या नगरांच्या सभोवतीच्या गावात बआलपर्यंत
वस्ती करून होते. 34 मेशोबाब, यामलेख, अमस्याहाचा पुत्र योशाह, 35
योएल. येहू योशिब्याहचा पुत्र, जो सेरायाहचा पुत्र, जो असिएलाचा पुत्र
होता. 36 एलिओएनाइ, याकोबाह, येशोहाइयाह, असायाह, अदिएल,
यशीमिएल, बेनाइयाह. 37 जीजा हा शिफीचा पुत्र, जो अल्लोनचा पुत्र,
जो यदायाहचा पुत्र, जो शिम्रीचा पुत्र व जो शमायाहचा पुत्र होता. 38
नावाने वर सूचीबद्ध केलेले हे सर्व पुरुष कुलप्रमुख होते. या कुटुंबांचा
खूप विस्तार झाला. 39 ते आपल्या मेंढरांच्या कळपांसाठी कुरणाच्या
शोधार्थ पूर्वेकडे गदोरच्या खोऱ्यापर्यंत गेले. 40 तिथे त्यांना कसदार व
उत्तम चारा सापडला. तो देश विस्तीर्ण असून शांत व निवांत होता; तिथे
पूर्वी हामाचे वंशज राहत असत. 41 ज्यांच्या नावाची वर नोंद केली आहे,
त्यांनी यहूदीयाचा राजा हिज्कीयाहच्या कारकिर्दीत तिथे आक्रमण करून
हामच्या वंशजांना आणि तसेच मऊनीमींना त्यांच्या डेऱ्यांसह नष्ट करून
ते त्यांच्या ठिकाणी आजपर्यंत वसलेले आहेत; कारण त्या ठिकाणी
त्यांच्या शेरडामेंढरांसाठी चारा होता. 42 त्यापैकी म्हणजे शिमओनाच्या
गोत्रातील पाचशे पुरुषांनी इशीचे पुत्र पेलतियाह, निरय्याह, रफायाह व
उज्जीएल यांनी त्यांचे नेतृत्व केले आणि ते सेईर डोंगरावर गेले. 43 तिथे
जे पळून गेलेले अमालेकी उरले होते, त्यांचा संहार करून ते आजवर
तिथे राहतात.

**5** रऊबेन हा ज्येष्ठपुत्र होता खरा, पण त्याने आपल्या पित्याचा पलंग
भ्रष्ट केला म्हणून त्याचा ज्येष्ठत्वाचा हक्क इस्राएलपुत्र योसेफच्या
संततीस देण्यात आला, म्हणून वंशावळीत रऊबेनचे नाव ज्येष्ठत्वाच्या
हक्काप्रमाणे नमूद करण्यात आले नाही. 2 जरी यहूदाह त्याच्या बंधूतील
सर्वात शक्तिमान होता आणि यहूदाहच्या वंशातूनच एक राज्यकर्ता
उदयास आला, तरी योसेफाला ज्येष्ठत्वाचा हक्क मिळाला. 3 इस्राएलचा
ज्येष्ठपुत्र रऊबेनचे पुत्र: हनोख, पल्लू, हेस्रोन व कर्मी. 4 योएलाचे वंशज:
त्याचा पुत्र शमायाह, त्याचा पुत्र गोग, त्याचा पुत्र शिमी, 5 शिमीचा पुत्र
मीखाह, त्याचा पुत्र रेआयाह, त्याचा पुत्र बाल, 6 बालाचा पुत्र बैरा
रऊबेन वंशाचा सरदार असून त्याला अश्शूरचा राजा तिग्लथ-पिलेसर
ने कैद करून नेले. 7 त्याच्या भावांची वंशावळी त्यांच्या कुळांप्रमाणे
लिहिली ती अशी: प्रमुख ईयेल, जखऱ्याह, 8 बेलाचा पिता आजाजचा
पिता शमा व त्याचा पिता योएल. हा वंश नबो व बआल-मेओन येथपर्यंत
अरोएरात वस्ती करून राहिला. 9 पूर्वेकडे फरात नदीजवळील रानाच्या
सीमेपर्यंत त्यांनी वस्ती केली, कारण गिलआद देशात त्यांचे पशुधन
भरपूर वाढले होते. 10 शौलाच्या कारकिर्दीत त्यांनी हगरी लोकांशी
युद्ध करून त्यांचा संहार केला; व गिलआदाच्या पूर्वेकडे असलेल्या
सगळया हगरी प्रदेशातील त्या लोकांच्या डेऱ्यात ते वस्ती करू लागले.
11 गादाचे वंशज त्यांच्यासमोर सलेकाह येथवर बाशान प्रदेशात राहत
होते: 12 त्यात योएल प्रमुख होता व दुसरा शाफाम, याखेरीज यानय
व शाफाट हे बाशानात राहत होते. 13 त्यांच्या पितृकुळाप्रमाणे त्यांचे
बांधव: मिखाएल, मशुल्लाम, शबा, योरय, याकान, जीया व एबर; असे
सर्व मिळून सात. 14 अबीहाईल हूरीचा पुत्र, जो दूरीचा पुत्र, जो यारोहचा
पुत्र, जो गिलआदाचा पुत्र, जो मिखाएलचा पुत्र, जो यशीशायचा पुत्र, जो
यहदोचा पुत्र, जो बूजचा पुत्र. 15 अही जो अबदीएलचा पुत्र, जो गूनीचा
पुत्र हा त्यांच्या कुटुंबाचा प्रमुख होता. 16 गादचे लोक गिलआदात व
बाशानात व तेथील गावात आणि शारोनच्या शिवारात आपल्या सीमेत
वस्ती करून राहिले. 17 या सर्वांची वंशावळी यहूदीयाचा राजा योथाम
व इस्राएलचा राजा यरोबोअम यांच्या कारकिर्दीत संग्रहित करण्यात
आली होती. 18 रऊबेनी, गादी व मनश्शेहच्या अर्ध्या गोत्रात 44,760
पुरुष योद्धे होते—ढालधारी, तलवारबहादूर, धनुर्धारी व युध्दकलानिपुण
असे. 19 त्यांनी हगरी, यतूर, नापीश व नोदाब यांच्याशी युद्ध केले. 20
त्यांच्याशी लढण्यास त्यास साहाय्य मिळून परमेश्वराने हगरी आणि
त्यांच्यासोबत असणाऱ्या इतर लोकांना त्यांच्या हातात दिले, कारण
युध्दसमयी त्यांनी परमेश्वराचा धावा केला; त्यांनी त्यांच्यावर भरवसा
ठेवला म्हणून त्यांनी त्यांची प्रार्थना ऐकली. 21 त्यांनी त्यांची गुरे जप्त
केली—पन्नास हजार उंट, दोन लक्ष पन्नास हजार मेंढरे, दोन हजार

गाढवे व एक लक्ष पुरुष कैद करून नेले. 22 बऱ्याच लोकांचा संहार
झाला, कारण हे युद्ध परमेश्वराचे होते. ते लोक या प्रदेशात बंदिवासाच्या
समयापर्यंत वस्ती करून राहिले. 23 मनश्शेहच्या अर्ध्या वंशातील
लोक असंख्य होते. त्यांनी बाशानपासून बआल-हर्मोन, सनीरपर्यंत
(हर्मोन पर्वत) वस्ती केली. 24 त्यांच्या कुटुंबातील प्रमुख पुरुष: एफेर,
इशी, एलीएल, अज्रीएल, यिर्मयाह, होदव्याह व यहदीएल. हे महावीर
व नामांकित पुरुष असू कुलप्रमुख होते. 25 ते आपल्या पूर्वजांच्या
परमेश्वराशी अविश्वासू झाले आणि परमेश्वराने त्यांच्यापुढून ज्या लोकांचा
नाश केला होता, त्यांच्या दैवतांच्या नादी लागून ते व्यभिचारी बनले. 26
यास्तव इस्राएलाच्या परमेश्वराने अश्शूरचा राजा पूल (म्हणजे अश्शूरचा
राजा तिग्लथ-पिलेसर), यास तयार केले. त्याने रऊबेनी, गादी व
मनश्शेहच्या अर्ध्या वंशाच्या लोकांचा पाडाव करून त्यांना हलह, हाबोर,
हारा येथे व गोजान नदीपर्यंत नेऊन बंदिवासात ठेवले व तिथेच ते
आजवर वस्ती करून राहिले आहेत.

**6** लेवीचे पुत्र: गेर्षोन, कोहाथ व मरारी. 2 कोहाथाचे पुत्र: अम्राम,
इसहार, हेब्रोन व उज्जीएल. 3 अम्रामाची संतती: अहरोन, मोशे
व मिर्याम. अहरोनाचे पुत्र: नादाब, अबीहू, एलअज़ार व इथामार. 4
एलअज़ारास फिनहास, फिनहासास अबीशूवा, 5 अबीशूवास बुक्की,
बुक्कीस उज्जी, 6 उज्जीस जरह्याह, जरह्याहास मरायोथ, 7 मरायोथास
अमऱ्याह, अमऱ्याहास अहीतूब, 8 अहीतूबास सादोक, सादोकास
अहीमाज, 9 अहीमाजास अजऱ्याह, अजऱ्याहास योहानान, 10 योहानान
यास अजऱ्याह झाला. अजऱ्याह शलोमोनाने यरुशलेमात बांधलेल्या
मंदिरात याजक म्हणून सेवा करीत असे. 11 अजऱ्याहास अमऱ्याह,
अमऱ्याहास अहीतूब झाला, 12 अहीतूबास सादोक, सादोकास शल्लूम,
13 शल्लूमास हिल्कियाह, हिल्कियाहास अजऱ्याह, 14 अजऱ्याहास
सरायाह, सेरायाहास यहोसादाक झाला. 15 याहवेहने बाबेलचा राजा
नबुखद्नेस्सराच्या हस्ते यहूदीया व यरुशलेमचा पाडाव केला, तेव्हा
यहोसादाक बंदी झाला. 16 लेवीचे पुत्र: गेर्षोन, कोहाथ व मरारी.
17 ही गेर्षोनच्या पुत्रांची नावे: लिब्नी व शिमी. 18 कोहाथाचे पुत्र:
अम्राम, इसहार, हेब्रोन व उज्जीएल. 19 मरारीचे पुत्र: महली व मूशी.
20 गेर्षोमाच्या कुळातील: गेर्षोमचा पुत्र लिब्नी, लिब्नीचा पुत्र यहथ,
यहथाचा पुत्र जिम्माह, 21 जिम्माहाचा पुत्र योवाह, योवाहचा पुत्र इद्दो,
इद्दोचा पुत्र जेरह, जेरहचा पुत्र जेथेराय. 22 कोहाथाचे वंशज: कोहाथाचा
पुत्र अम्मीनादाब, अम्मीनादाबाचा पुत्र कोरह, कोरहाचा पुत्र अस्सीर, 23
अस्सीरचा पुत्र एलकानाह, एलकानाहचा पुत्र एब्यासाफ, एब्यासाफाचा
पुत्र अस्सीर, 24 अस्सीरचा पुत्र तहथ, तहथाचा पुत्र उरीएल, उरीएलाचा
पुत्र उज्जीयाह आणि त्याचा पुत्र शौल. 25 एलकानाहचे वंशज: अमासय
व अहीमोथ. 26 एलकानाहचा पुत्र सोफय, सोफयाचा पुत्र नहाथ,
नहाथाचा पुत्र एलियाब, 27 एलियाबाचा पुत्र, यरोहाम व त्याचा पुत्र
एलकानाह, एलकानाहचा पुत्र शमुवेल. 28 शमुवेलाचे पुत्र: ज्येष्ठ योएल
व दुसरा अबीयाह. 29 मरारीचे वंशज: महली, त्याचा पुत्र लिब्नी,
त्याचा पुत्र शिमी, त्याचा पुत्र उज्जाह, 30 त्याचा पुत्र शिमा, त्याचा पुत्र
हग्गीयाह व त्याचा पुत्र असायाह. 31 कोश स्थायिक झाल्यावर दावीदाने
याहवेहच्या मंदिरात गायकवृंदात जे पुरुष नेमले ते: 32 यरुशलेममध्ये
शलोमोन याहवेहचे मंदिर बांधेपर्यंत सभामंडपाच्या निवासमंडपासमोर
त्यांनी संगीताची सेवा केली. ते आपल्या कामावर क्रमानुसार हजर राहत
असत. 33 ज्या पुरुषांनी त्यांच्या पुत्रांसह मिळून सेवा केली त्यांची नावे:
कोहाथी पासून: गायक हेमान, जो योएलचा पुत्र, जो शमुवेलाचा पुत्र,
34 जो एलकानाहचा पुत्र, जो यरोहामाचा पुत्र, जो एलीएलचा पुत्र, जो
तोहाचा पुत्र, 35 जो सूफाचा पुत्र, जो एलकानाहचा पुत्र, जो महथचा
पुत्र, जो अमासयचा पुत्र, 36 जो एलकानाहचा पुत्र, जो योएलचा पुत्र,
जो अजऱ्याहाचा पुत्र, जो सफन्याहाचा पुत्र, 37 जो तहथाचा पुत्र,
जो अस्सीरचा पुत्र, जो एब्यासाफचा पुत्र, जो कोरहाचा पुत्र, 38 जो
इसहारचा पुत्र, जो कोहाथचा पुत्र, जो लेवीचा पुत्र, आणि जो इस्राएलचा
पुत्र. 39 हेमानाचा भाऊ आसाफ त्याच्या उजवीकडे उभा राहात असे:
आसाफ जो बेरेख्याहचा पुत्र, जो शिमाचा पुत्र, 40 जो मिखाएलचा पुत्र,
जो बासेयाहचा पुत्र, जो मल्कीयाहचा पुत्र, 41 जो एथनीचा पुत्र, जो
जेरहचा पुत्र, जो अदायाहचा पुत्र, 42 जो एथानचा पुत्र, जो जिम्माहचा
पुत्र, जो शिमीचा पुत्र, 43 जो यहथाचा पुत्र, जो गेर्षोमचा पुत्र, आणि जो
लेवीचा पुत्र, 44 आणि त्यांच्या डावीकडे, मरारी कुळातील सहायक:
एथान जो किशीचा पुत्र, जो अब्दीचा पुत्र, जो मल्लूखचा पुत्र, 45 जो
हशब्याहाचा पुत्र, जो अमस्याहाचा पुत्र, जो हिल्कियाहचा पुत्र, 46 जो
अमसीचा पुत्र, जो बानीचा पुत्र, जो शेमेरचा पुत्र, 47 जो महलीचा पुत्र,
जो मूशीचा पुत्र, जो मरारीचा पुत्र, आणि जो लेवीचा पुत्र. 48 त्यांच्या
लेवी भाऊबंदांना परमेश्वराच्या भवनाच्या निवासमंडपातील सर्व सेवेसाठी
समर्पित करण्यात आलेले होते. 49 अहरोन व त्याचे वंशज हे होमवेदीवर
व धूपवेदीवर अर्पणे करीत असत. परमपवित्र स्थानासंबंधीची सर्व कामे
ते करीत आणि इस्राएली लोकांसाठी प्रायश्चित करीत. परमेश्वराचा
सेवक मोशेने दिलेल्या आज्ञेप्रमाणे ते करीत असत. 50 अहरोनाचे वंशज:
अहरोनाचा पुत्र एलअज़ार, त्याचा पुत्र फिनहास, त्याचा पुत्र अबीशूवा,
51 त्याचा पुत्र बुक्की, त्याचा पुत्र उज्जी, त्याचा पुत्र जरह्याह, 52 त्याचा
पुत्र मरायोथ, त्याचा पुत्र अमऱ्याह, त्याचा पुत्र अहीतूब, 53 त्याचा
पुत्र सादोक व त्याचा पुत्र अहीमाज. 54 हा प्रदेश त्यांना वाटप म्हणून
देण्यात आला होता. ही त्यांच्या वसाहतींची ठिकाणे बनली. (हा प्रदेश
अहरोनाच्या वंशज कोहाथी कुळातील लोकांना देण्यात आला, कारण
पहिली चिठ्ठी त्यांच्यासाठी होती): 55 यहूदीयाच्या प्रदेशातील हेब्रोन
हे नगर त्याच्या शिवारांसहित दिले. 56 पण त्या नगराची शेते व गावे
यफुन्नेहचा पुत्र कालेब याला दिली. 57 अहरोनाच्या वंशजास पुढील
नगरे देण्यात आली: हेब्रोन (शरणपूर म्हणून), लिब्नाह व त्याचे शिवार,
यत्तीर, एशतमोआ, 58 हीलेन, दबीर, 59 आशान, युताह, बेथ-शेमेश सर्व
त्यांच्या शिवारासह. 60 बिन्यामीनच्या गोत्रास गिबोन, गेबा, आलेमेथ
आणि अनाथोथ ही सर्व त्यांच्या शिवारासह. 61 अवशिष्ट राहिलेल्या
कोहाथी वंशजास चिठ्ठ्या टाकून मनश्शेहच्या अर्ध्या वंशजाच्या प्रदेशातून
दहा नगरे दिली. 62 गेर्षोम वंशजास त्यांच्या पितृकुळाप्रमाणे इस्साखार,

आशेर, नफताली व बाशानात राहणाऱ्या मनश्शेह वंशाची तेरा नगरे
दिली. 63 मरारी वंशजास चिठ्ठ्या टाकून त्यांच्या पितृकुळाप्रमाणे रऊबेन,
गाद व जबुलून या गोत्रांच्या प्रदेशातून बारा नगरे दिली. 64 इस्राएली
लोकांनी लेवी वंशजास ही नगरे त्यांच्या शिवारांसहित दिली. 65 त्यांनी
यहूदाह, शिमओन व बिन्यामीन या वंशांमधून चिठ्ठ्या टाकून आधी
उल्लेख केलेली नगरे दिली. 66 एफ्राईम वंशजाने कोहाथ पितृकुळाला
जी नगरे त्यांच्या शिवारांसहित दिली ती ही: 67 एफ्राईमच्या डोंगराळ
प्रदेशातील नगर शेखेम (शरणपूर) व त्याचे शिवार, तसेच गेजेर व
त्याचे शिवार, 68 योकमेअम, बेथ-होरोन, 69 अय्यालोन, गथ-रिम्मोन
हे सर्व त्यांच्या शिवारासह. 70 तसेच मनश्शेहच्या अर्ध्या गोत्रातून
आनेर आणि बिलाम, त्यांच्या शिवारासह. ही कोहाथी पितृकुळातील
अवशिष्ट वंशजास दिली. 71 गेर्षोमाच्या वंशजास जी नगरे मिळाली
ती ही: मनश्शेहच्या अर्ध्या गोत्रातून बाशानातले गोलान व अष्टारोथ
त्यांच्या शिवारासह; 72 इस्साखारच्या गोत्रातून केदेश व दाबरथ, 73
रामोथ व त्याचे शिवार आणि आनेम व त्याचे शिवार ही दिली; 74
आशेरच्या गोत्रातून माशाल व त्याचे शिवार, अब्दोन व त्याचे शिवार, 75
हुक्कोक व त्याचे शिवार आणि रहोब व त्याचे शिवार ही दिली; 76
नफताली गोत्रातून गालीलातील केदेश व त्याचे शिवार, हम्मोन व त्याचे
शिवार आणि किर्याथाईम व त्याचे शिवार ही दिली. 77 लेवीच्या बाकी
लोकांना म्हणजे मरारी वंशजास जी शहरे दिली ती ही: जबुलूनाच्या
गोत्रातून रिम्मोनो आणि ताबोर त्यांच्या शिवारासह; 78 यार्देनेपलीकडे
यरीहोजवळ, यार्देनेच्या पूर्वथडीस रऊबेन गोत्रातून रानातले बेसेर व
त्याचे शिवार, याहसाह व त्याचे शिवार, 79 केदेमोथ व त्याचे शिवार
आणि मेफाथ व त्याचे शिवार ही दिली; 80 आणि गाद गोत्रातून
गिलआदी रामोथ व त्याचे शिवार, महनाईम व त्याचे शिवार, 81 हेशबोन
व त्याचे शिवार आणि याजेर व त्याचे शिवार ही दिली.

**7** इस्साखारचे पुत्र: तोला, पुआह, याशूब व शिम्रोन; एकूण चार
पुत्र. 2 तोलाचे पुत्र: उज्जी, रफायाह, यरीएल, यहमय, इबसाम व
शमुवेल हे—त्याचा पिता तोलाच्या घराण्याचे प्रमुख असून आपल्या
वंशातील योद्धे होते. त्यांची संख्या दावीदाच्या कारकिर्दीत 22,600
होती. 3 उज्जी पुत्र: इज्राह. इज्राहचा पुत्र: मिखाएल, ओबद्याह, योएल
व इश्शीयाह असे एकूण पाच प्रमुख पुरुष होते. 4 त्यांच्या कुटुंबाप्रमाणे
व पितृकुळाप्रमाणे लढाईच्या सैन्याच्या टोळ्यांत त्याचे 36,000 पुरुष
असत, कारण त्यांना पुष्कळ स्त्रिया व संतती होती. 5 इस्साखारच्या
सर्व कुळातील त्यांचे भाऊबंद योद्धे होते. वंशावळीत ते एकंदर 87,000
नमूद झाले. 6 बिन्यामीनचे तीन पुत्र: बेला, बेकेर व यदिएल. 7 बेलाचे
पुत्र: एसबोन, उज्जी, उज्जीएल, यरिमोथ व ईरी; असे पाच पुत्र होते. हे
आपल्या पितृकुळांचे प्रमुख असून 22,034 योद्धे होते. 8 बेकेराचे
पुत्र: जमीराह, योआश, एलिएजर, एलिओएनाइ, ओमरी, यरेमोथ,
अबीयाह, अनाथोथ व अलेमेथ. 9 ते आपआपल्या पितृकुळाचे प्रमुख
असून, वंशावळीत 20,200 योद्धे नमूद झाले होते. 10 यदिएलाचा
पुत्र: बिल्हान. बिल्हानाचे पुत्र: यऊश, बिन्यामीन, एहूद, केनानाह,
जेथान, तार्शीश व अहीशाहर. 11 हे सर्व यदिएलाचे वंशज होते. ते
आपल्या कुटुंबाचे प्रमुख असून युद्धासाठी जाण्यास योग्य 17,200
योद्धे होते. 12 ईराचे वंशज शुप्पीम व हुप्पीम आणि अहेराचा वंशज
हुशीम. 13 नफतालीचे पुत्र: यहसिएल, गूनी, येसेर व शल्लूम. ही
बिल्हाची संतती. 14 मनश्शेहचे वंशज: त्याच्या पत्नीपासून त्याला
अस्रिएल झाला. त्याच्या अरामी उपपत्नीपासून त्याला गिलआदाचा
पिता माखीर झाला. 15 माखीराने हुप्पीम व शुप्पीमची बहीण पत्नी
केली; तिचे नाव माकाह. त्याच्या दुसऱ्या पुत्राचे नाव सलाफहाद.
सलाफादाला फक्त कन्याच होत्या. 16 माखीराची पत्नी माकाहला पुत्र
झाला. त्याचे नाव तिने पेरेस ठेवले. त्याच्या भावाचे नाव शेरेष, त्याचे
पुत्र ऊलाम व रेकेम. 17 ऊलामाचा पुत्र: बदान. हे गिलआदाचे पुत्र
माखीराचे पुत्र व मनश्शेहचे पुत्र. 18 त्याची बहीण हम्मोलेखेथ हिला
इशहोद, अबिएजेर व महलाह झाली. 19 शेमीदाचे पुत्र: अह्यान, शेखेम,
लिखी व अनीयाम. 20 एफ्राईमचे वंशज: एफ्राईमचा पुत्र शुथेलह, त्याचा
पुत्र बेरेद, त्याचा पुत्र तहथ, त्याचा पुत्र एलिआदाह, त्याचा पुत्र तहथ,
21 त्याचा पुत्र जाबाद, त्याचा पुत्र शुथेलह. (आणि एजेर व एलद;
यास गथच्या मूळ रहिवाशांनी मारून टाकले, कारण त्यांची गुरे जप्त
करण्यास ते गेले होते. 22 यामुळे त्यांचा पिता एफ्राईमने पुष्कळ दिवस
शोक केला आणि त्याचे भाऊबंद त्याचे सांत्वन करण्यास आले. 23 तो
आपल्या पत्नीजवळ गेला आणि ती गर्भवती होऊन तिला एक पुत्र
झाला. त्याने त्याचे नाव बरीयाह असे ठेवले, कारण त्याच्या घराण्यावर
दुर्दैव ओढवले होते. 24 त्याची कन्या शेराह होती. तिने खालचे व वरचे
बेथ-होरोन व उज्जेन-शेराह ही वसविली.) 25 त्याचा पुत्र रेफह व त्याचा
पुत्र रेशेफ, रेशेफाचा पुत्र तेलह, तेलहाचा पुत्र तहन, 26 त्याचा पुत्र
लादान, त्याचा पुत्र अम्मीहूद, त्याचा पुत्र एलीशामा, 27 त्याचा पुत्र नून
व त्याचा पुत्र यहोशुआ. 28 त्यांच्या वस्त्या व नगरे बेथेल व त्याच्या
आसपासची गावे, पूर्वेस नारान, पश्चिमेस गेजेर व त्याची गावे, शेखेम
व त्याची गावे, गाझा व त्याची गावे आणि अय्याहपर्यंत त्याची वतने
होती. 29 त्याप्रमाणेच मनश्शेहच्या सीमेवरील बेथ-शान व त्याची गावे,
तानख व त्याची गावे, मगिद्दो व त्याची गावे, दोर व त्याची गावे होती.
यात इस्राएलचा पुत्र योसेफाचे वंशज राहात. 30 आशेराचे पुत्र: इम्नाह,
इश्वा, इश्वी व बरीयाह, त्यांची बहीण सेराह. 31 बरीयाहचे पुत्र: हेबेर व
मालकीएल, मालकीएल हा बिर्जाइथाचा पिता. 32 हेबेरास यफलेट,
शोमेर, होथाम व त्यांची बहीण शूवा झाली. 33 यफलेटाचे पुत्र: पासख,
बिम्हाल व अश्वाथ. 34 शोमेराचे पुत्र: अही, रोहगाह, येहूब्बाह व अराम.
35 शोमेराचा भाऊ हेलेम याचे पुत्र: सोफह, इम्ना, शेलेश व आमाल.
36 सोफहाचे पुत्र: सूहा, हर्नेफेर, शूआल, बेरी, इम्राह, 37 बेसेर, होद,
शाम्मा शिलशाह, इथरान व बैरा. 38 येथेराचे पुत्र: यफुन्नेह, पिस्पाह व
अरा. 39 उल्लाचे पुत्र: आरह, हन्निएल, रिस्याह. 40 आशेराचे हे सर्व
वंशज—आपल्या कुटुंबाचे प्रमुख होते. ते सर्व शूर योद्धे व प्रसिद्ध सरदार
होते. त्यांची अधिकृत मोजदाद केली तेव्हा ते 26,000 योद्धे भरले.

**8** बिन्यामीनच्या पुत्रांची नावे: ज्येष्ठपुत्र बेला, दुसरा आशबेल, तिसरा
अहरह, 2 चौथा नोआह व पाचवा राफा. 3 बेलाचे पुत्र: अद्दार,
गेरा, अबीहूद, 4 अबीशूवा, नामान, अहोआह, 5 गेरा, शेफूफान व
हुराम. 6 एहूदाचे पुत्र, जे गेबा येथील कुटुंबाचे प्रमुख होते, ज्यांचा पाडाव
करून त्यांना मानाहथ येथे नेले ते: 7 नामान, अहीयाह व गेरा यास कैद
करून पाठविण्यात आले. गेराचे पुत्र उज्जा व अहीहूद. 8 शहरयिमाने
आपल्या पत्नी हुशीम व बारा यांच्यापासून घटस्फोट घेतला व मोआब
देशामध्ये त्याला पुत्र झाले. 9 त्याची पत्नी होदेशच्या पोटी झालेले पुत्र:
योबाब, सिब्या, मेशा, मल्काम, 10 यऊस, शख्याह व मिर्माह. हे त्यांच्या
कुटुंबाचे प्रमुख होते. 11 हुशीमेपासून त्यास झालेले पुत्र अबीतूब व
एल्पाल. 12 एल्पालाचे पुत्र: एबर, मिशाम व शमेद (ज्याने ओनो व लोद
ही नगरे व त्यांच्या आसपासची गावे वसविली), 13 बरीयाह व शमा हे
अय्यालोन लोकांचे कुटुंबप्रमुख होते व त्यांनी गथकरास पळवून लावले.
14 अहियो, शशक, यरेमोथ, 15 जबद्याह, अराद, एदर, 16 मिखाएल,
इश्पाह व योहा हे बरीयाहचे पुत्र. 17 जबद्याह, मशुल्लाम, हिज्की, हेबेर,
18 इश्मरय, इज्लीयाह व योबाब हे एल्पालाचे पुत्र. 19 याकीम, जिक्री,
जब्दी, 20 अलीएनय, सिलथाई, एलीएल, 21 अदायाह, बरीयाह व
शिम्राथ हे शिमीचे पुत्र. 22 इश्पान, एबर, एलीएल, 23 अब्दोन, जिक्री,
हानान, 24 हनन्याह, एलाम, अनथोथीयाह, 25 इफदयाह व पेनुएल
हे शशकाचे पुत्र. 26 शमशेराय, शहऱ्याह, अथल्याह, 27 यारेश्याह,
एलीयाह व जिक्री हे यरोहामाचे पुत्र. 28 हे त्यांच्या पिढीतील कुटुंबप्रमुख
असून ते यरुशलेम येथे राहात असत. 29 गिबोनचा पिता ईयेल, गिबोन
येथे स्थायिक झाला. त्याच्या पत्नीचे नाव माकाह. 30 त्याच्या पुत्रांची
नावे: ज्येष्ठ अब्दोन, मग सूर, कीश, बाल, नेर, नादाब, 31 गदोर, अहियो,
जेखर 32 आणि मिकलोथ जो शिमिआचा पिता. त्यांनीही त्यांच्या
नातलगांजवळ यरुशलेम येथे वस्ती केली. 33 नेराला कीश झाला,
कीशाला शौल, शौलाला योनाथान, मलकीशुवा, अबीनादाब व एश-बाल
हे पुत्र झाले. 34 योनाथानाचा पुत्र: मरीब-बाल ला मीखाह झाला. 35
मीखाहचे पुत्र: पीथोन, मेलेख, तरेया व आहाज. 36 आहाजास यहोअद्दा,
यहोअद्दाहास आलेमेथ, अजमावेथ व जिम्री, जिम्रीस मोसा. 37 मोसाला
बिना, बिनाला राफाह, राफाहला एलीयासाह, व एलीयासाहला आजेल
झाले. 38 आजेलास सहा पुत्र होते. त्यांची नावे अशी: अज्रीकाम,
बोखेरू, इश्माएल, शिआरियाह, ओबद्याह व हानान. हे सर्व आजेलाचे
पुत्र. 39 त्याचा भाऊ एशेकाचे पुत्र: ज्येष्ठ ऊलाम, दुसरा यऊश व तिसरा
एलिफेलेत. 40 ऊलामाचे वंशज शूरवीर असून धनुर्धारी होते; त्यांचे पुत्र
पौत्रे एकूण 150 लोक. हे सर्व बिन्यामीनचे वंशज होते.

**9** याप्रकारे सर्व इस्राएली लोकांच्या वंशावळ्या इस्राएलच्या व
यहूदीयाच्या राजांच्या इतिहासग्रंथात नमूद केलेल्या आहेत; या
लोकांच्या अविश्वासूपणामुळे त्यांना बंदिवान करून बाबिलोन देशी नेले.
2 जे सर्वप्रथम स्वतःच्या वतनातील आपल्या नगरात राहण्यास आले,
त्यातील काही इस्राएली, याजक, लेवी व मंदिराचे सेवक होते. 3
यहूदाह, बिन्यामीन, एफ्राईम व मनश्शेह यांच्यापैकी जे यरुशलेममध्ये
राहण्यास आले: 4 ऊथय जो अम्मीहूदाचा पुत्र, जो ओमरीचा पुत्र,
जो इम्रीचा पुत्र व जो बानीचा पुत्र, हा यहूदाहचा पुत्र पेरेसचा वंशज
होता. 5 शिलोनी वंश: त्याचा ज्येष्ठपुत्र असायाह व त्याचे पुत्र. 6
जेरही वंश: यऊवेल. 7 बिन्यामीन वंशातून: सल्लू जो मशुल्लामाचा
पुत्र, जो होदव्याहचा पुत्र व जो हस्सनुआहाचा पुत्र; 8 इबनीयाह जो
यरोहामाचा पुत्र; एलाह जो उज्जी पुत्र, जो मिकरीचा पुत्र; मशुल्लाम
जो शफाट्याहचा पुत्र, जो रऊएलाचा पुत्र व जो इबनीयाहचा पुत्र; 9
वंशावळीत नोंद झालेल्या बिन्यामीन लोकांची एकूण संख्या 956 होती.
हे सर्व लोक कुटुंबप्रमुख होते. 10 याजकातील: यदायाह; यहोयारीब;
याखीन; 11 अजऱ्याह जो हिल्कियाहचा पुत्र, जो मशुल्लामाचा पुत्र,
जो सादोकाचा पुत्र, जो मरायोथाचा पुत्र व जो अहीतूबचा पुत्र, हा
परमेश्वराच्या मंदिराचा प्रमुख अधिकारी होता; 12 अदायाह याजकही
परतला. तो यरोहामाचा पुत्र जो पशहूराचा पुत्र, जो मल्कीयाहचा
पुत्र होता; मआसाई जो अदिएलाचा पुत्र, जो यहजेराचा पुत्र, जो
मशुल्लामाचा पुत्र, जो मेशिल्लेमीथाचा पुत्र, जो इम्मेराचा पुत्र. 13 जे
कुटुंबप्रमुख होते, त्या 1,760 याजकांची नोंद झाली. परमेश्वराच्या
मंदिराच्या सेवाकार्यास हे पुरुष जबाबदार होते. 14 लेवींमधून: शमायाह
जो हश्शूबचा पुत्र, जो अज्रीकामचा पुत्र, जो हशब्याहाचा पुत्र. हे मरारी
वंशाचे होते; 15 बकबक्कार, हेरेश, गालाल, आणि मत्तन्याह जो
मीखाहचा पुत्र, जो जिक्रीचा पुत्र, जो आसाफचा पुत्र; 16 ओबद्याह जो
शमायाहचा पुत्र, जो गालालचा पुत्र, जो यदूथूनचा पुत्र; जो बेरेख्याहचा
पुत्र, जो आसाचा पुत्र, जो एलकानाहचा पुत्र, जो नटोफाथीच्या वस्तीत
राहत असे. 17 द्वारपाल: शल्लूम, अक्कूब, तल्मोन, अहीमान व त्यांचे
लेवी भाऊबंद. शल्लूम त्यांचा प्रमुख होता; 18 आजवर ते राजाच्या
पूर्वेकडील प्रवेशद्वारावर कार्यरत आहेत; लेवींच्या छावणीचे द्वारपाल हेच
होते. 19 शल्लूम जो कोरेचा पुत्र, जो एब्यासाफचा पुत्र, जो कोरहचा पुत्र
आणि त्यांच्या कुटुंबातील त्याचे द्वारपाल भाऊबंद जे कोरही होते, त्यांची
उपासनेच्या कामावर नेमणूक केलेली असून, ते त्यांच्या पूर्वजांसारखे
याहवेहच्या भवनाच्या व्दाराची रखवाली करीत. 20 पूर्वीच्या काळी
एलअज़ारचा पुत्र फिनहास या सर्वांवर द्वारपालांचा अधिकृत अधिकारी
होता. याहवेहचे सानिध्य त्यांच्याबरोबर होते. 21 मशेलेम्याहचा पुत्र
जखऱ्याह सभामंडपाचा द्वारपाल होता. 22 द्वारपालांच्या कामासाठी
212 लोक निवडले होते. त्यांच्या गावी त्यांच्या वंशावळीत त्यांची नोंद
केलेली होती. विश्वासयोग्यता पाहून त्यास दावीद व शमुवेल संदेष्टा
यांनी त्या कामगिरीवर नेमले होते. 23 ते व त्यांचे वंशज याहवेहच्या
भवनाच्या म्हणजे सभामंडपाच्या द्वारपालाचे काम पाहत असत. 24
पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण अशा चारही दिशांना द्वारपाल ठेवण्यात
आले होते. 25 त्यांच्या गावात राहणारे त्यांचे भाऊबंद सात दिवसात
पाळीपाळीने कार्य करीत. 26 परंतु चारही मुख्य द्वारपाल विश्वासू लेवीय
असून त्यांच्याकडे परमेश्वराच्या भवनाच्या कोठड्या व भांडारे यांची
जबाबदारी सोपविली होती. 27 परमेश्वराच्या भवनाचे रक्षण त्यांच्याकडे
सोपविले असल्यामुळे रात्री ते मंदिराच्या आसपास राहत असत

आणि दररोज सकाळी परमेश्वराचे भवन उघडण्यासाठी चावी त्यांच्याच
ताब्यात असे. 28 सेवेसंबंधीची पात्रे त्यांच्यापैकी काहीजणांच्या ताब्यात
असत; ती पात्रे ते मोजून आत ठेवीत व मोजून बाहेर काढीत. 29
त्यांच्यापैकी काहीजणांकडे सामानसुमान, पवित्रस्थानातील सर्व पात्रे,
सपीठ, द्राक्षारस, तेल, ऊद व सुगंधी द्रव्ये यांची व्यवस्था असे. 30
याजकांपैकी काहीजण सुगंधी मसाले तयार करीत असत. 31 तव्यावर
विश्वासयोग्यतेने ज्या वस्तू भाजण्यात येत, त्यावर देखरेख करण्यासाठी
लेव्यांपैकी कोरही शल्लूमचा ज्येष्ठपुत्र मत्तिथ्याहला नेमले. 32 कोहाथी
कुळातील त्यांच्या काही लेवी भाऊबंदांची नेमणूक दर शब्बाथ दिवशी
समर्पित भाकरी तयार करण्याच्या कामावर झाली होती. 33 काही लेवी
कुटुंबप्रमुख जे मंदिरातील संगीतासाठी जबाबदार होते, ते मंदिराच्या
काही खोल्यात राहत असत आणि त्यांना संगीताशिवाय इतर कामे
नव्हती, कारण त्या कामाची त्यांना रात्रंदिवस जबाबदारी देण्यात आली
होती. 34 हे सर्व लेवी वंशातील कुटुंबप्रमुख असून त्यांची प्रमुख म्हणून
वंशावळीत नोंद झाली होती, ते यरुशलेमात राहात. 35 गिबोनचा पिता
ईयेल गिबोन येथे स्थायिक झाला. त्याच्या पत्नीचे नाव माकाह होते. 36
त्याच्या पुत्रांची नावे अशी: ज्येष्ठ अब्दोन, मग सूर, कीश, बाल, नेर,
नादाब, 37 गदोर, अहियो, जखऱ्याह आणि मिकलोथ. 38 मिकलोथ जो
शिमिआमचा पिता होता. या सर्वांनी त्यांच्या नातलगांजवळ यरुशलेमेत
वस्ती केली. 39 नेराला कीश झाला; कीशाला शौल, शौलाला योनाथान,
मलकीशुवा, अबीनादाब व एश-बाल हे पुत्र झाले. 40 योनाथानाचा
पुत्र: मरीब-बाल. मरीब-बाल याला मीखाह. 41 मीखाहचे पुत्र: पीथोन,
मेलेख, तहरेया व आहाज. 42 आहाजास येरह, यादाहास आलेमेथ,
अजमावेथ व जिम्री झाले, जिम्रीस मोसा. 43 मोसाला बिना, बिनाला
रफायाह, रफायाहला एलीयासाह, व एलीयासाहला आजेल झाले. 44
आजेलास सहा पुत्र होते. त्यांची नावे: अज्रीकाम, बोखेरू, इश्माएल,
शिआरियाह, ओबद्याह व हानान. हे सर्व आजेलाचे पुत्र होते.

**10** पलिष्ट्यांनी इस्राएलविरुद्ध युद्ध केले; इस्राएली लोक त्यांच्यापुढून
पळून गेले, आणि गिलबोआ डोंगरावर पुष्कळजण मारले गेले.
2 पलिष्ट्यांनी शौल आणि त्याच्या पुत्रांचा आवेशाने पाठलाग केला
आणि त्याचे पुत्र योनाथान, अबीनादाब आणि मलकी-शुआ यांना ठार
मारले. 3 शौलाच्या सर्व बाजूंनी युद्ध भयंकर वाढत गेले आणि जेव्हा
धनुर्धऱ्यांनी त्याला गाठले व त्याला जखमी केले. 4 तेव्हा शौल त्याच्या
शस्त्रवाहकाला म्हणाला, “तुझी तलवार उपस आणि मला आरपार
भोसक, नाहीतर हे बेसुंती लोक येऊन माझी विटंबना करतील.” परंतु
त्याचा शस्त्रवाहक घाबरून गेला होता आणि तो तसे करेना; तेव्हा
शौलाने त्याची स्वत:ची तलवार घेतली आणि तिच्यावर तो पडला. 5
जेव्हा शस्त्रवाहकाने पाहिले की शौल मरण पावला आहे, तेव्हा तो
सुद्धा आपल्या तलवारीवर पडला आणि मरण पावला. 6 अशाप्रकारे
शौल आणि त्याचे तीन पुत्र मरण पावले, त्याचे सर्व कुटुंब एकत्रच
मृत्यू पावले. 7 जेव्हा खोऱ्यात असलेल्या इस्राएली लोकांनी पाहिले
की सैन्याने पळ काढला आहे आणि शौल आणि त्याचे पुत्र मरण
पावले आहेत, तेव्हा त्यांनी त्यांची नगरे सोडली आणि तिथून पलायन
केले. पलिष्ट्यांनी येऊन तिथे वस्ती केली. 8 दुसऱ्या दिवशी जेव्हा
पलिष्टी लोक मेलेल्या लोकांच्या वस्तू लुटण्यासाठी आले, तेव्हा त्यांना
गिलबोआ डोंगरावर शौल आणि त्याचे पुत्र मृत होऊन पडलेले दिसले.
9 त्यांनी शौलास लुबाडून, त्याचे शिर व त्याचे शस्त्र काढून घेतले
आणि पलिष्ट्यांच्या संपूर्ण देशामध्ये आणि त्यांच्या मूर्तीमध्ये आणि
आणि त्यांच्या लोकांमध्ये जाहीर करण्यास संदेशवाहक पाठवले. 10
त्यांनी त्याची शस्त्रे त्यांच्या दैवतांच्या मंदिरात ठेवली आणि त्याचे
शिर दागोनाच्या मंदिरात टांगले. 11 पलिष्टी लोकांनी शौलाचे काय
केले हे जेव्हा याबेश-गिलआदच्या रहिवाशांनी ऐकले, 12 तेव्हा त्यांचे
सर्व शूर पुरुष रणांगणावर गेले व त्यांनी शौल आणि त्याच्या पुत्रांचे
मृतदेह याबेश येथे परत आणले. त्यांच्या अस्थी याबेश येथील एला
झाडाखाली पुरल्या आणि सात दिवस उपास केला. 13 याहवेहशी
अविश्वासू राहिल्यामुळे शौलाला मृत्यू आला; कारण त्याने याहवेहची
आज्ञा न पाळता, एका भूतविद्याप्रवीण स्त्रीचा सल्ला घेतला, 14 आणि
याहवेहचे मार्गदर्शन नाकारले, यामुळे याहवेहने त्याचा वध केला आणि
त्याचे राज्य इशायाचा पुत्र दावीदास सोपविले.

**11** मग इस्राएलचे पुढारी एकत्र आले व हेब्रोन येथे दावीदाकडे आले
आणि त्याला म्हणाले, “आम्ही तर तुमचेच मांस आणि रक्त
आहोत. 2 मागील काळात, जेव्हा शौल राजा होता, तेव्हा इस्राएलला
त्यांच्या युद्धात चालविणारे तुम्हीच तर होता. आणि याहवेह तुमच्या
परमेश्वराने तुम्हाला म्हटले, ‘माझ्या इस्राएली लोकांचा मेंढपाळ व
त्यांचा अधिकारी तू होशील.’” 3 जेव्हा इस्राएलचे सर्व वडील लोक
हेब्रोनात दावीद राजाकडे आले होते, तेव्हा त्याने याहवेहसमोर हेब्रोन
येथे त्यांच्याशी एक करार केला आणि त्यांनी दावीदाचा इस्राएलचा
राजा म्हणून अभिषेक केला, जसे याहवेहने शमुवेलद्वारे वचन दिले होते.
4 नंतर दावीद व इस्राएलचे सर्व लोक मिळून यरुशलेमला (म्हणजे
यबूसला) गेले. 5 तिथे राहणारे यबूसी लोक दावीदाला म्हणाले, “तू
या शहरात प्रवेश करू शकणार नाही.” तरीही, दावीदाने सीयोन गड
हस्तगत केला; हेच दावीदाचे शहर आहे. 6 दावीद म्हणाला, “जो कोणी
यबूसींवर हल्ला करण्यात पुढाकार घेईल तो सेनापती होईल.” मग
जेरुइयाहचा पुत्र योआबने पहिल्याने आक्रमण करण्यास गेल्यामुळे तो
दावीदाच्या सैन्याचा सेनापती झाला. 7 तेव्हा दावीदाने त्या गडामध्ये
आपला निवास केला, म्हणून त्याला दावीदाचे शहर असे नाव पडले. 8
दावीदाने मिल्लोपासून गडाभोवतालच्या शहराच्या भागाचा विस्तार
केला आणि योआबाने बाकी यरुशलेमची पुनर्बांधणी केली. 9 आणि
दावीद अधिकाधिक शक्तिशाली बनत गेला, कारण सर्वसमर्थ याहवेह
त्याच्याबरोबर होते. 10 दावीदाच्या काही अत्यंत शूर योद्ध्यांची नावे
पुढीलप्रमाणे आहेत—याहवेहच्या कराराप्रमाणे या योद्ध्यांनी इस्राएली
पुढाऱ्यांसह राज्याची वाढ करण्यासाठी त्याला मजबूत आधार दिला. 11
दावीदाच्या पराक्रमी योद्ध्यांची नावे: हखमोनी याशबआम हा दावीदाच्या
सैन्यातील पहिल्या श्रेणीच्या वीरांपैकी होता; त्याने भाला उगारून एका

हल्ल्यात तीनशे लोकांचा वध केला. 12 त्याच्यानंतर अहोहचा रहिवासी, दोदोचा पुत्र एलअज़ार होता, तो तीन पराक्रमी योद्ध्यांपैकी एक होता. 13 पस-दम्मीम येथे पलिष्ट्यांबरोबर केलेल्या लढाईत तो दावीदाबरोबर होता. तो जवाच्या शेतात असताना इस्राएली सैन्याने पलिष्ट्यांपुढून पळ काढला होता. 14 परंतु ते त्या शेताच्या मध्यभागी उभे राहिले, त्यांनी सामना केला आणि पलिष्ट्यांना मारून टाकले आणि याहवेहने त्या दिवशी मोठा विजय मिळवून दिला. 15 जेव्हा पलिष्ट्यांच्या टोळीने रेफाईमच्या खोऱ्यात छावणी दिली होती तेव्हा तीस मुख्य सेनापती योद्ध्यांपैकी तिघे जण दावीदाकडे अदुल्लाम गुहेतील खडकाकडे आले. 16 त्यावेळी दावीद गडावर होता आणि पलिष्टी सेना बेथलेहेम नगरात होती. 17 दावीदाला पाणी पिण्याची उत्कट इच्छा झाली व तो म्हणाला, "बेथलेहेमच्या वेशीजवळच्या विहिरीचे पाणी मला कोणी आणून दिले तर किती बरे झाले असते!" 18 तेव्हा या तीन पराक्रमी योद्ध्यांनी पलिष्ट्यांच्या छावणीमधून घुसून, बेथलेहेमच्या वेशीजवळच्या विहिरीचे पाणी काढून दावीदाकडे आणले. परंतु दावीदाने ते पिण्याचे नाकारले; आणि ते याहवेहसमोर ओतले. 19 त्याने म्हटले, "परमेश्वर न करो मला ते करावे लागेल. ज्या पुरुषांनी ते आपला जीव धोक्यात घालून आणले त्यांचे रक्त मी प्यावे काय?" कारण ते आणण्यासाठी त्यांनी त्यांचा जीव धोक्यात घातला होता. त्यामुळे दावीद ते पाणी प्याला नाही. अशी साहसी कामे त्या तीन पराक्रमी योद्ध्यांनी केली होती. 20 योआबाचा भाऊ अबीशाई हा तिघांचा प्रमुख होता. त्याने आपला भाला तीनशे लोकांविरुद्ध उगारून त्यांचा वध केला होता, म्हणून तो या तिघांप्रमाणेच प्रसिद्ध झाला होता. 21 या तिघांपेक्षा त्याला दुप्पट सन्मान दिला गेला आणि तो त्या तिघांचाही सेनापती झाला, जरी त्या तिघांमध्ये त्याची गणती केली नाही. 22 कबसेल येथील यहोयादाचा पुत्र बेनाइयाह एक शूर मनुष्य होता. त्याने मोआबाच्या सर्वात पराक्रमी योद्ध्यांना ठार मारले होते. त्याचप्रमाणे हिमवर्षावाच्या दिवसात खाली गुहेत जाऊन एका सिंहाला ठार मारले. 23 एकदा त्याने पाच हात उंचीच्या इजिप्ती मनुष्याला जिवे मारले होते. त्या इजिप्ती माणसाच्या हातात भाला होता, तरी बेनाइयाह केवळ आपली विणकऱ्याची काठी हातात घेऊन त्याच्याशी लढण्यास गेला. त्याने त्याचा भाला हिसकावून घेतला व त्याच्याच भाल्याने त्याला ठार मारले. 24 यहोयादाचा पुत्र बेनाइयाहची ही साहसी कामे होती; त्या तीन पराक्रमी योद्ध्यांप्रमाणे त्याने देखील किर्ती मिळविली होती. 25 इतर तीस जणांपेक्षा त्याला मोठा सन्मान दिला गेला, परंतु तिघांमध्ये त्याची गणती झाली नाही. आणि दावीदाने त्याला आपल्या अंगरक्षकांचा अधिकारी म्हणून नेमले. 26 दावीदाचे पराक्रमी योद्धे हे होते: योआबाचा भाऊ असाहेल, बेथलेहेमकर दोदोचा पुत्र एलहानान, 27 हरोरचा शम्मोथ, पलोनी हेलेस, 28 तकोवा येथील इक्केशाचा पुत्र ईरा, अनाथोथचा अबिएजेर, 29 हुशाथचा सिब्बखय, अहोहचा ईलाय, 30 नटोफाथी माहाराई, नटोफाथी बाअनाहचा पुत्र हेलेद, 31 गिबियाहतील बिन्यामीन गोत्रातील रीबाईचा पुत्र इत्तय, पिराथोनचा बेनाइयाह, 32 गाशाच्या ओढ्याजवळचा हूरय, अर्बाथचा अबीएल, 33 बहरूमचा अजमावेथ, शालबोनचा एलीहबा, 34 गिजोन येथील हाशेमचे पुत्र, हरार येथील शागे याचा पुत्र योनाथान, 35 हरार येथील साखार याचा पुत्र अहीयाम, ऊरचा पुत्र एलिफाल, 36 मकेराथी हेफेर, पलोनी अहीयाह, 37 कर्मेलचा हेस्रो, एजबयाचा पुत्र नाराय, 38 नाथानाचा भाऊ योएल, हागरीचा पुत्र मिभार, 39 अम्मोनी सेलेक, जेरुइयाहचा पुत्र योआब याचा शस्त्रवाहक बैरोथचा नाहाराई, 40 इथ्री येथील ईरा, इथ्री येथील गारेब, 41 उरीयाह हिथी, अहलायाचा पुत्र जाबाद, 42 शीझाचा पुत्र अदीना, तो रऊबेनच्या गोत्रातील एकतीस पुढाऱ्यांपैकी एक होता. 43 माकाहचा पुत्र हानान, मिथनी योशाफाट, 44 अष्टराथी उज्जिया, अरोएर येथील होथामाचे पुत्र शामा व ईयेल, 45 शिम्रीचा पुत्र यदिएल, व तीसा येथील त्याचा भाऊ योहा, 46 महवी येथील एलीएल, व एलानामाचे पुत्र यरीबय व योशव्याह, मोआबी इथ्माह, 47 मसोबी एलीएल, ओबेद आणि यासीएल.

**12** कीशाचा पुत्र शौलाच्या सानिध्यातून हद्दपार केलेले असताना दावीदाला सिकलाग येथे येऊन मिळालेले योद्धे (ज्यांनी त्याला युद्धात साहाय्य केले त्या योद्ध्यांपैकी असलेले; 2 हे सर्वच धनुर्धारी वीर असून आपल्या डाव्या आणि उजव्या अशा दोन्ही हातांनी गोफणगुंडे व धनुष्यबाण मारण्यात प्रवीण होते. ते सर्वच बिन्यामीन गोत्रातील आणि शौल राजाचे नातलग होते): 3 त्यातील प्रमुख शमाहाचे पुत्र अहीएजर व त्याचा भाऊ योआश, हे गिबियाहचे रहिवासी होते. अजमावेथचे पुत्र यजिएल व पेलेट, बेराखाह व अनाथोथचा रहिवासी येहू. 4 इश्मायाह हा गिबोनी होता. हा तीस वीरांतील अत्यंत शूरवीर असून त्या तिसांवरील मुख्य होता. यिर्मयाह, यहजिएल, योहानान, गदेराथी योजाबाद, 5 एलूजय, यरिमोथ, बाल्या, शमारियाह व हरूफी शफात्याह, 6 एलकानाह, इश्शीयाह, अजरएल, योबेजर व याशबआम हे सर्व कोरही वंशज होते. 7 योएलाह व जबद्याह हे गदोर येथील यरोहामाचे पुत्र होते. 8 गादचे महान शूर वीरसुध्दा फितूर होऊन दावीद अरण्यवासात असताना त्याच्याकडे गेले. ते ढाली व भाले वापरण्यात निष्णात होते. त्यांचे चेहरे सिंहाच्या मुखासारखे असून ते डोंगरावरील हरणांसारखे चपळ होते. 9 एजेर हा त्यांचा प्रमुख सेनाधिकारी होता. ओबद्याह त्यांचा उपप्रमुख, एलियाब तिसरा, 10 मिश्मन्नाह चौथा, यिर्मयाह पाचवा, 11 अत्तय सहावा, एलीएल सातवा, 12 योहानान आठवा, एलजाबाद नववा, 13 यिर्मयाह दहावा आणि मखबन्नय अकरावा. 14 हे गाद गोत्राचे असून सैन्यातील अधिकारी होते; त्यातील जो सर्वात कनिष्ठ होता, तो शंभरांच्या तोडीचा होता व सर्वात ज्येष्ठ हजाराच्या तोडीचा. 15 वर्षाच्या पहिल्या महिन्यात यार्देन नदी दुथडी भरून वाहत असताना त्यांनी ती ओलांडली आणि नदीच्या खोऱ्यांत राहणाऱ्या लोकांची त्यांनी पूर्वेकडे व पश्चिमेकडे दाणादाण उडविली. 16 बिन्यामीन व यहूदाह गोत्रातील दुसरे काहीजण दावीदाकडे गडावर आले. 17 दावीद त्यांच्या भेटीसाठी बाहेर आला आणि त्यांना म्हणाला, "तुम्ही मला मदत करावयास शांतीने आला असाल, तर तुम्हाला सहभागी करण्यास मी तयार आहे. पण मी निरपराध असताना मला शत्रूंच्या

हवाली करण्यासाठी, माझा विश्वासघात करावयास तुम्ही आला असाल,
तर आपल्या पूर्वजांचा परमेश्वर तुम्हाला पाहून घेईल व तुमचा न्याय
करेल." 18 तेव्हा त्या तिसांचा पुढारी अमासयवर पवित्र आत्मा आला
आणि अमासय म्हणाला: "दावीद महाराज, आम्ही तुमचे आहोत! अहो
इशायपुत्र, आम्ही तुमच्या बाजूचे आहोत! तुम्हाला शांती, कल्याण
लाभो, आणि जे तुम्हाला मदत करतील, त्या सर्वांना यश लाभो. कारण
तुमचे परमेश्वर तुम्हाला मदत करतील." मग दावीदाने त्यांचा स्वीकार
केला आणि त्यांना आपल्या गनिमी युद्धाच्या सेनेवर अधिकारी नेमले.
19 आणि दावीद पलिष्ट्यांशी शौलाच्या विरुद्ध लढायला गेला तेव्हा
मनश्शेह गोत्रातीलही काही लोक दावीदाकडे फितूर झाले. (तरीही
दावीद आणि त्याच्या माणसांनी पलिष्ट्यांची मदत केली नाही, कारण
सल्लामसलत करून त्यांच्या अधिकाऱ्यांनी त्याला पाठवून दिले. ते
म्हणाले, "जर आपला धनी शौल याकडे तो फितूर झाला तर आमची
शिरे धोक्यात जातील.") 20 दावीद सिकलाग येथे जात असताना
मनश्शेह गोत्रातील जे लोक दावीदाला येऊन मिळाले, त्यांची यादी पुढे
दिली आहे: अदनाह, योजाबाद, यदिएल, मिखाएल, यहोजाबाद, एलीहू
व सिलथाई. ते सर्वजण मनश्शेह गोत्रातील उच्च श्रेणीचे सहस्त्राधिपती
होते. 21 ते शूर योद्धे होते. त्यांनी पलिष्ट्यांच्या गनिमी युद्धाविरुद्ध
दावीदाला मदत केली आणि ते त्याच्या सैन्यात सेनाधिकारी होते.
22 दररोज लोक दावीदाला येऊन मिळत होते. शेवटी त्याच्याकडे
परमेश्वराच्या सेनेसारखी प्रचंड सेना जमा झाली. 23 दावीद हेब्रोन
येथे असताना, त्याला अनेक कसलेले योद्धे येऊन मिळाले. याहवेहने
वचन दिल्याप्रमाणे दावीदाला शौलाच्या जागी राजा होण्यास मदत
करावी या उद्देशाने ते आले होते. 24 यहूदाह गोत्रातील ढाल व भाला
धारण करणारे हत्यारबंद 6,800 योद्धे; 25 शिमओनी गोत्रातले शूर
व पराक्रमी योद्धे 7,100; 26 लेव्यातील 4,600, 27 याजकांपैकी
अहरोन घराण्याचा पुढारी यहोयादा होता. त्याच्याबरोबर 3,700 लोक
होते. 28 सादोक हा तरुण असून मोठा धैर्यवान लढवय्या होता आणि
त्याच्याबरोबर त्याच्या पित्याच्या घराण्यातील 22 सरदार होते; 29
बिन्यामीनच्या म्हणजे शौलाच्या गोत्रातील 3,000, यातील बहुतेक
या वेळेपर्यंत शौलाशा एकनिष्ठ राहिले होते; 30 एफ्राईमी, हे महान
योद्धे आपआपल्या कुळांमध्ये नामांकित असे पुरुष 20,800; 31
मनश्शेहच्या अर्ध्या गोत्रातले लोक दावीदाला राजा होण्यास मदत
करण्यासाठी तातडीने पाठविण्यात आलेल्या सैन्यात होते 18,000;
32 इस्साखार गोत्रातले 200 पुढारी आले, काळाची पावले ओळखून
इस्राएलने काय करावे हे त्यांना समजत होते. त्यांचे सर्व भाऊबंद
त्याच्या आज्ञेत होते; 33 जबुलून गोत्रातले निष्णात लढवय्ये 50,000,
ते शस्त्रांनी सुसज्ज व दावीदाला एकनिष्ठ होते; 34 नफतालीचे 1,000
अधिकारी आणि भाले व ढाली यांनी सुसज्ज असे 37,000 सैनिक;
35 दान गोत्राचे लढाईसाठी सुसज्ज सैनिक 28,600; 36 आशेर गोत्राचे
अनुभवी, सुसज्ज सैनिक 40,000; 37 यार्देन नदीच्या पूर्वेकडील
काठावर राहणारे रऊबेनी, गाद व मनश्शेहच्या अर्ध्या गोत्रातील सर्व
शस्त्रांनिशी सज्ज सैनिक 1,20,000. 38 हे सर्व योद्धे, जे सेनेत
त्यांच्या हृद्यानुसार सहभागी होण्यास स्वेच्छेने आले. ते हेब्रोनला आले
तेव्हा दावीदाला इस्राएलचा राजा करणे हा त्यांचा एकच उद्देश होता.
वास्तविक पाहता सर्व इस्राएलींनी या गोष्टीस मान्यता दिली होती. 39
त्यांनी तिथे तीन दिवस दावीदाबरोबर घालवून, खाणेपिणे केले, कारण
त्यांच्या कुटुंबाने त्यांचा तसा प्रबंध केला होता. 40 शेजारच्या लोकांनी
म्हणजे इस्साखार, जबुलून व नफताली प्रांतांपर्यंत जे राहत होते,
त्यांनी भाकरीचे पीठ, अंजिरांच्या ढेपा, खिसमिसांचे घड, द्राक्षारस,
तेल इत्यादी खाण्याच्या वस्तू गाढवे, उंट खेचरे व बैल यांच्यावर लादून
आणल्या होत्या. त्याचप्रमाणे असंख्य बैल व शेरडेमेंढरे पण आणली
होती. कारण इस्राएलात सर्वत्र आनंदोत्सव साजरा होत होता.

**13** दावीदाने आपल्या सेनाधिकाऱ्यांचा, म्हणजे प्रत्येक सहस्राधिपती,
शताधिपतीचा सल्ला घेतला. 2 जमलेल्या संपूर्ण इस्राएली
सभेपुढे दावीदाने असे भाषण केले, "जर तुम्हाला योग्य वाटते आणि
आपल्या याहवेह परमेश्वरानेही या गोष्टीला संमती दिली आहे, त्याअर्थी
आपल्यात सामील होण्यासाठी, आपण इस्राएलातील सर्व बंधूना,
तसेच याजक, लेवी, जे त्यांच्यासह नगरात व मळयात आहेत त्यांना
आमंत्रणाचा संदेश पाठवू या. 3 त्याचप्रमाणे आपण आपल्या परमेश्वराचा
कोश परत आणू या. कारण शौल राजाच्या कारकिर्दीत आपण त्याकडे
पूर्ण दुर्लक्ष केले होते." 4 तेव्हा संपूर्ण सभेने एकमताने होकार दिला व
सर्व लोकांना ते योग्य वाटले. 5 मग दावीदाने परमेश्वराचा कोश किर्याथ-
यआरीमहून आणण्याच्या वेळी इजिप्तच्या शिहोर नदीपासून ते लबो
हमाथपर्यंत सर्वत्र विखुरलेल्या इस्राएली लोकांना एकत्र केले. 6 दावीद
व इस्राएलचे सर्व लोक यहूदीयातील बालाह म्हणजे किर्याथ-यआरीम
येथे, जो त्या नावाने संबोधित केला जातो, सर्वसमर्थ याहवेह परमेश्वराचा
कोश, जे करुबांमध्ये आरूढ आहेत, तो आणण्यासाठी निघाले. 7 त्यांनी
परमेश्वराचा कोश अबीनादाबाच्या घरातून काढून एका नव्या गाडीवर
ठेवला. उज्जा आणि अहियो हे बैलगाडी चालवित होते. 8 दावीद आणि
इस्राएलचे सर्व लोक त्यांच्या सर्व शक्तीने परमेश्वरासमोर वीणा, सारंगी,
डफ, डमरू, झांजा व कर्णे वाजवित आनंद करीत होते. 9 जेव्हा ते
कीदोनाच्या खळयाजवळ आले, तेव्हा बैल अडखळले म्हणून कोश
धरण्यासाठी उज्जाहने आपला हात पुढे केला. 10 त्यामुळे याहवेहचा
कोप उज्जाहविरुद्ध पेटला आणि त्याने कोशाला हात लावला म्हणून
त्यांनी त्याला मारून टाकले. आणि तो परमेश्वरापुढे मरण पावला. 11
तेव्हा दावीदाला राग आला कारण याहवेहचा क्रोध उज्जाहवर भडकला
होता आणि आजपर्यंत त्या ठिकाणाला पेरेस-उज्जाह असे म्हणतात. 12
त्या दिवशी दावीदाला परमेश्वराचे भय वाटले, तो म्हणाला, "परमेश्वराचा
कोश मी आपल्याकडे कसा नेऊ?" 13 त्याने कोश त्याच्याबरोबर
दावीदाच्या नगरात नेला नाही. त्याऐवजी त्याने तो गित्ती ओबेद-एदोम
याच्या घरी नेला. 14 परमेश्वराचा कोश ओबेद-एदोम याच्या घरात तीन
महिने राहिला आणि याहवेहने त्याच्या घराण्यास व त्याचे जे काही होते
त्या सर्वास आशीर्वाद दिला.

**14** आता सोरचा राजा हीरामाने दावीदाकडे दूत पाठविले व
दावीदासाठी राजवाडा बांधावा म्हणून त्यांच्याबरोबर देवदारू
लाकडे, गवंडी व सुतार पाठवले. 2 आणि दावीदाने जाणले की
याहवेहने आपल्याला इस्राएलवर राजा म्हणून स्थापित केले आहे आणि
आपल्या इस्राएली लोकांसाठी त्याचे राज्य खूप उंचावले आहे. 3
यरुशलेमात दावीदाने अनेक पत्नी व उपपत्नी केल्या आणि त्याला
आणखी पुत्र आणि कन्या झाल्या. 4 यरुशलेममध्ये जन्मलेल्या
त्याच्या मुलांची नावे ही: शम्मुआ, शोबाब, नाथान, शलोमोन, 5 इभार,
एलीशुआ, एल्पलेट, 6 नोगा, नेफेग, याफीय, 7 एलीशामा, बिलिआदा
व एलिफेलेत. 8 इस्राएलवर राजा म्हणून दावीदाचा अभिषेक झाला
आहे असे पलिष्ट्यांनी जेव्हा ऐकले, तेव्हा ते त्याला शोधण्यासाठी
आपले सर्व सैन्य घेऊन निघाले, परंतु दावीदाने याबद्दल ऐकले तेव्हा तो
त्यांना भेटण्यास गेला. 9 इकडे पलिष्टी लोकांनी येऊन रेफाईमच्या
खोऱ्याला लुटले. 10 तेव्हा दावीदाने परमेश्वराला विचारले, “मी जाऊन
पलिष्ट्यांवर हल्ला करू काय? आपण त्यांना माझ्या हाती देणार
काय?” याहवेहने त्याला उत्तर दिले, “जा, मी त्यांना तुझ्या हातात
देईन.” 11 म्हणून दावीद व त्याचे सैन्य बआल-पेरासीम येथे गेले
आणि तिथे त्याने त्यांचा पराभव केला. दावीद म्हणाला, “पाण्याच्या
लोंढ्याप्रमाणे परमेश्वराने माझ्याद्वारे शत्रूंचा नाश केला आहे.” म्हणून
त्या ठिकाणाला बआल-पेरासीम, हे नाव पडले. 12 पलिष्टी लोकांनी
त्यांची दैवते टाकून दिली व दावीदाने ती अग्नीत जाळून टाकण्याची
आज्ञा केली. 13 पुन्हा एकदा पलिष्टी लोकांनी खोऱ्यात हल्ला केला. 14
तेव्हा दावीदाने पुन्हा परमेश्वराला विचारले, आणि परमेश्वराने त्याला उत्तर
दिले, “थेट त्यांच्यामागे जाऊ नकोस, पण त्यांच्या बाजूने वळसा देऊन,
तुतीच्या झाडांसमोरून त्यांच्यावर हल्ला कर. 15 तुतीच्या झाडांच्या
शेंड्यांमधून सैन्य चालत येण्याचा आवाज येताच, युद्धास पुढे निघा,
त्यावरून पलिष्टी सैन्याचा नाश करण्यासाठी परमेश्वर तुमच्यापुढे गेले
आहेत असे समज.” 16 तेव्हा दावीदाने परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे केले
आणि गिबोनापासून गेजेरपर्यंत त्यांनी पलिष्टी सैन्याला ठार केले. 17
दावीदाची किर्ती संपूर्ण प्रदेशात पसरत गेली. सर्व राष्ट्रांना त्याचे भय
वाटावे असे याहवेहने केले.

**15** आता दावीदाने स्वतःसाठी दावीद नगर यरुशलेममध्ये भवने
बांधली व त्याने परमेश्वराच्या कोशाकरिता एक स्थान सिद्ध करून
तिथे एक नवा तंबू ठोकला. 2 नंतर दावीदाने म्हटले, “लेव्यांशिवाय
इतर कोणीही परमेश्वराचे कोश वाहू नये, कारण याहवेहने त्यांना त्यांचे
कोश वाहण्यासाठी निवडले आहे, त्यांची सेवा निरंतर करण्यासाठी
निवडले आहे.” 3 नंतर याहवेहचा कोश नव्या तंबूत आणण्याच्या
समारंभासाठी दावीदाने इस्राएलाच्या सर्व लोकांना यरुशलेममध्ये
एकत्र केले. 4 दावीदाने अहरोनाच्या वंशजांना आणि लेवींना एकत्र
बोलाविले: 5 कोहाथी वंशातील, प्रमुख उरीएल व त्याचे 120 भाऊबंद;
6 मरारीच्या वंशातील, प्रमुख असायाह व त्याचे 220 भाऊबंद;
7 गेर्षोमाच्या वंशातील, प्रमुख योएल व त्याचे 130 भाऊबंद; 8
एलीजाफानच्या वंशातील, प्रमुख शमायाह व त्याचे 200 भाऊबंद;
9 हेब्रोनाच्या वंशातील, प्रमुख एलीएल व त्याचे 80 भाऊबंद; 10
उज्जीएलाच्या वंशातील, प्रमुख अम्मीनादाब व त्याचे 112 भाऊबंद.
11 नंतर दावीदाने सादोक व अबीयाथार या मुख्य याजकांना व उरीएल,
असायाह, योएल, शमायाह, एलीएल व अम्मीनादाब या लेवी पुढाऱ्यांना
बोलाविणे पाठविले. 12 तो त्यांना म्हणाला, “तुम्ही लेवी वंशातील
कुटुंबप्रमुख आहात; आता तुमच्या सर्व बांधवांसमवेत तुम्ही शुद्ध व्हा,
कारण इस्राएली लोकांच्या याहवेह परमेश्वराचा कोश मी तयार केलेल्या
जागेवरील नव्या तंबूत आणावयाचा आहे. 13 याहवेह आपले परमेश्वर
आपल्यावर पूर्वी क्रोधाविष्ट झाले, कारण तुम्ही लेवी लोकांनी तो उचलून
आणला नाही. नेमून दिलेल्या विधीनुसार आपण कोश कोणत्या पद्धतीने
उचलावयाचा यासंबंधी कधी चौकशी केली नाही.” 14 तेव्हा याजक
व लेवी यांनी इस्राएलच्या याहवेह परमेश्वराचा कोश आणण्यासाठी
स्वतःला विधिपूर्वक शुद्ध केले. 15 याहवेह परमेश्वराने मोशेला ज्या
सूचना दिल्या होत्या त्याबरहुकूम लेव्यांनी कोशाचे खांब खांद्यांवर घेऊन
तो वाहिला. 16 दावीदाने लेवी पुढाऱ्यांना गायकवर्ग व वाद्यवृंद तयार
ठेवण्यास सांगितले. या वाद्यवृंदाने: सतार, वीणा व झांजा उच्चस्वराने
आणि हर्षाने वाजविल्या. 17 लेवी लोकांनी योएलचा पुत्र हेमान,
बेरेख्याहचा पुत्र आसाफ व मरारी कुटुंबातील कुशायाहचा पुत्र एथान, हे
प्रमुख वादक नेमले. 18 पुढे नमूद केलेल्या कुटुंबातील लोक त्यांचे
सहायक म्हणून नेमले: जखऱ्याह, बेन, यजिएल, शमिरामोथ, यहीएल,
उन्नी, एलियाब, बेनाइयाह, मासेयाह, मत्तिथ्याह, एलीफलेहू, मिकनेयाह.
ओबेद-एदोम व ईयेल हे द्वारपाल होते. 19 संगीतकार हेमान, आसाफ
व एथान यांना कास्याच्या झांजा वाजविण्यासाठी नेमले होते. 20
जखऱ्याह, अजीएल, शमिरामोथ यहीएल, उन्नी, एलियाब, मासेयाह व
बेनाइयाह यांना अलामोथ या संगीत रागावर सारंगी वाजविण्यास नेमले.
21 मत्तिथ्याह, एलीफलेहू, मिकनेयाह, ओबेद-एदोम, ईयेल, व अजज्याह
यांना शमीनीथ सुरावर वीणा वाजविण्यास नेमले होते. 22 लेव्यांचा
प्रमुख कनन्याह गायनकर्त्यांना ती जबाबदारी देण्यात आली होती. तो
गायनकलेत निपुण होता. 23 बेरेख्याह व एलकानाह हे कोशाचे द्वारपाल
होते. 24 शबन्याह, योशाफाट, नथानेल, अमासय, जखऱ्याह, बेनाइयाह
व एलिएजर हे सर्व याजक परमेश्वराच्या कोशापुढे कर्णे वाजवित व
मिरवणुकीच्या वेळी अग्रभागी चालत. ओबेद-एदोम व यहीयाह हे
कोशाचे द्वारपाल होते. 25 म्हणून दावीद, इस्राएलचे वडीलजन, सैन्याचे
उच्चाधिकारी याहवेहच्या कराराचा कोश यरुशलेममध्ये आणण्यासाठी
मोठ्या हर्षाने ओबेद-एदोमच्या घरी गेले. 26 याहवेह परमेश्वराच्या
कराराचा कोश वाहून नेणाऱ्या लेव्यांची याहवेहने मदत केली म्हणून
सात बैल आणि सात गोऱ्हे अर्पण केले गेले. 27 दावीद, कोश वाहणारे
सर्व लेवी, सर्व गायक व गायकांचा मुख्य संगीतकार कनन्याह होता,
या सर्वांनी तलम तागाची वस्त्रे परिधान केली होती. दावीदाने तागाचे
एफोद घातले होते. 28 अशाप्रकारे इस्राएलाच्या सर्व लोकांनी हर्षाने
जयघोष करीत, रणशिंगे, कर्णे, झांजा, सतार व वीणा यांच्या मोठ्या

निनादात याहवेहचा कराराचा कोश आणला. 29 याहवेहच्या कराराचा कोश दावीदाच्या नगरात प्रवेश करीत असताना, शौलाची मुलगी मीखल हिने खिडकीतून पाहिले. आणि जेव्हा तिने दावीद राजाला याहवेहसमोर नाचत आणि हर्ष करीत असता पाहिले, तेव्हा तिने तिच्या अंत:करणात त्याचा तिरस्कार केला.

**16** त्यांनी देवाचा कोश आणला आणि दावीदाने त्यासाठी जो तंबू तयार केला होता त्या ठिकाणी तो ठेवला आणि परमेश्वरासमोर होमार्पणे व शांत्यर्पणे सादर केली. 2 होमार्पणे व शांत्यर्पणे सादर केल्यानंतर दावीदाने लोकांना याहवेहच्या नावाने आशीर्वाद दिला. 3 नंतर त्याने इस्राएल लोकांच्या प्रत्येक स्त्री व पुरुषास एक भाकर, खजुराची एक ढेप व मनुक्यांची एक वडी वाटप केली. 4 इस्राएलच्या याहवेह परमेश्वराचे गौरव, स्तुतिगान व त्यांचे उपकारस्मरण करण्याकरिता दावीदाने कोशापुढे सेवा करणाऱ्या काही लेवी लोकांची नेमणूक केली: 5 वादकांचा प्रमुख आसाफ, पुढच्या श्रेणीत जखऱ्याह, येइएल, शमिरामोथ, यहीएल, मत्तिथ्याह, एलियाब, बेनाइयाह, ओबेद-एदोम व ईयेल हे सतार व वीणा वाजवित, व आसाफ उंच स्वरात झांज वाजवित असे. 6 बेनाइयाह व यहजिएल हे याजक परमेश्वराच्या कराराच्या कोशापुढे नियमितपणे कर्णे वाजवित. 7 त्या दिवसापासून दावीदाने याहवेहची अशा प्रकारे उपकारस्तुती करण्यासाठी आसाफ व त्याचे सहायक नेमले: 8 याहवेहचे स्तवन करा, त्यांच्या नावाची घोषणा करा; त्यांनी केलेली अद्भुत कृत्ये सर्व राष्ट्रात जाहीर करा. 9 त्यांची स्तुतिस्तोत्रे गा आणि त्यांचे स्तवन करा; त्यांच्या सर्व अद्भुत कार्यांचे वर्णन करा. 10 त्यांच्या पवित्र नावाचा अभिमान बाळगा; जे याहवेहचा शोध करतात, त्यांचे हृदय हर्षित होवो. 11 याहवेह व त्यांच्या सामर्थ्याकडे पाहा; सतत त्यांचे मुख शोधा. 12 परमेश्वराने केलेली अद्भुत कार्ये, त्यांचे चमत्कार, आणि त्यांनी केलेले न्याय यांचे स्मरण करा. 13 अहो त्यांचे सेवक, इस्राएलच्या वंशजांनो, त्यांच्या निवडलेल्या लोकांनो, याकोबाच्या संतानांनो, तुम्ही या सर्वांचे स्मरण करा. 14 कारण याहवेह आमचे परमेश्वर आहेत. त्यांचे न्याय सर्व पृथ्वीवर आहेत. 15 ते आपला करार सर्वदा स्मरणात ठेवतात, ती अभिवचने त्यांनी हजारो पिढ्यांना दिली होती, 16 हा करार त्यांनी अब्राहामाशी केला, आणि इसहाकाशी शपथ वाहिली, 17 आणि त्यांनी याकोबासाठी नियम व इस्राएलसाठी सदासर्वकाळचा करार या रूपाने कायम केला: 18 "मी तुम्हाला कनान देश तुमचे वतन म्हणून देईन." 19 त्यावेळी इस्राएली लोक अगदी मोजके होते निश्चितच थोडे, वचनदत्त देशात ते परके होते. 20 ते एका देशातून दुसऱ्या देशात, एका राज्यातून दुसऱ्या राज्यात भटकत असताना, 21 याहवेहने कोणालाही त्यांच्यावर जुलूम करू दिला नाही; त्यांच्याकरिता त्यांनी राजांना दटाविले: 22 "माझ्या अभिषिक्तांना स्पर्श करू नका; माझ्या संदेष्ट्यांना इजा करू नका." 23 हे सर्व पृथ्वी, याहवेहस्तव स्तुतिस्तोत्रे गा, दररोज त्यांच्या तारणाची घोषणा करा. 24 सर्व राष्ट्रांमध्ये त्यांचे गौरव, सर्व लोकांमध्ये त्यांची अद्भुत कृत्ये जाहीर करा. 25 कारण याहवेह थोर आणि स्तुतीस पात्र आहेत; सर्व दैवतांपेक्षा त्यांचे भय बाळगणे यथायोग्य आहे. 26 इतर देशांची दैवते केवळ मूर्ती आहेत. परंतु याहवेहनी आकाशमंडलांची रचना केली आहे. 27 राजवैभव आणि ऐश्वर्य त्यांच्या पुढे चालतात. त्यांच्या उपस्थितीत सामर्थ्य आणि हर्ष असतो. 28 अहो राष्ट्रातील सर्व कुळांनो याहवेहला गौरव द्या, याहवेहला गौरव आणि सामर्थ्य द्या. 29 याहवेहच्या नावाला योग्य तो गौरव द्या; अर्पणे आणून त्यांच्या समक्षतेत या. त्यांच्या पवित्रतेच्या ऐश्वर्याने याहवेहची उपासना करा; 30 त्यांच्या उपस्थितीत हे पृथ्वी कंपित हो! सर्व सृष्टी दृढपणे स्थिर झालेली आहे; ती डळमळत नाही. 31 आकाशे हर्ष करोत, पृथ्वी उल्लास करो; त्यांनी राष्ट्रांना हे सांगावे, "याहवेह राज्य करतात!" 32 सागर व त्यातील सर्वकाही गर्जना करोत; शेते व त्यातील सर्वकाही हर्षित होवो! 33 वनातील सर्व झाडे गुणगान करो, आनंदाने याहवेहची स्तुती करा, कारण ते पृथ्वीचा न्याय करण्यास येत आहेत. 34 याहवेहचे उपकारस्मरण करा, कारण ते चांगले आहेत; त्यांची प्रीती अनंतकाळची आहे. 35 यांचा धावा करून म्हणा, हे आमच्या परमेश्वरा, आमचे तारण करा; परमेश्वरा, आम्हाला या देशातून सोडवून एकत्र करा, जेणेकरून आम्ही तुमचे पवित्र नाव धन्यवादित करून, तुमच्या स्तवनात गौरव मानावे. 36 इस्राएलचे परमेश्वर याहवेहची, अनादिकालापासून अनंतकालापर्यंत स्तुती होवो. मग सर्व लोकांनी म्हटले "आमेन! याहवेहची स्तुती होवो." 37 दररोज गरजेप्रमाणे आसाफ आणि त्याचे भाऊबंद यांची याहवेहच्या कोशाची नियमितपणे करारबद्ध सेवा करण्यासाठी दावीदाने नेमणूक केली. 38 तसेच ओबेद-एदोम आणि त्याचे अडुसष्ट नातलग आणि यदूथूनाचा पुत्र ओबेद-एदोम आणि होसाह यांचा द्वारपाल म्हणून समावेश केला. 39 दावीदाने गिबोन टेकडीवरील याहवेहच्या सभामंडपात सादोक याजक आणि त्याचे याजक भाऊबंद सेवा करण्यासाठी ठेवले. 40 ते दररोज, सकाळ व संध्याकाळ, याहवेहने इस्राएली लोकांना दिलेल्या आज्ञेनुसार होमवेदीवर नियमितपणे होमार्पणे करीत होते. 41 त्यांच्यासोबत हेमान, यदूथून आणि नावे घेऊन निवडलेल्या इतर अनेकांची नेमणूक केली. या सर्वांना "याहवेहची प्रीती सनातन आहे" अशी त्यांची उपकारस्तुती करण्यासाठी नेमण्यात आले होते. 42 त्यांच्याबरोबर हेमान आणि यदूथून यांना कर्णे, झांजा व इतर वाद्ये वाजवून परमेश्वराची स्तुती करण्याची जबाबदारी दिली. यदूथूनच्या पुत्रांची द्वारपाल म्हणून नेमणूक करण्यात आली. 43 नंतर सर्व लोक आपापल्या नगरास परत गेले आणि दावीदही आपल्या कुटुंबीयांना आशीर्वाद देण्यासाठी घरी परतला.

**17** जेव्हा दावीद आपल्या राजवाड्यात राहत असताना, त्याने नाथान संदेष्ट्यास म्हटले, "पाहा, येथे मी गंधसरूच्या भवनात राहतो, परंतु याहवेहच्या कराराचा कोश एका तंबूत आहे!" 2 नाथानाने दावीदाला उत्तर दिले, "आपल्या मनात जे काही आहे त्यानुसार करा, कारण परमेश्वर आपल्याबरोबर आहेत." 3 परंतु त्याच रात्री परमेश्वराचे वचन असे नाथानाकडे आले: 4 "जा आणि माझा सेवक दावीदला सांग, 'याहवेह असे म्हणतात: मी निवास करावा म्हणून माझ्यासाठी तू घर बांधणार नाहीस. 5 इस्राएली लोकांना इजिप्त देशातून मी

बाहेर आणले त्या दिवसापासून आजपर्यंत मी घरात राहिलो नाही,
तंबू एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणात, या निवासस्थानातून
त्या निवासस्थानात फिरत राहिलो आहे. 6 जिथे कुठे मी इस्राएली
लोकांबरोबर फिरत आलो, तेव्हा त्यांच्यातील ज्यांना मी माझ्या लोकांची
मेंढपाळाप्रमाणे काळजी घेण्यास आज्ञा दिली त्यातील कोणत्याही
पुढाऱ्यांना, “तुम्ही माझ्यासाठी गंधसरूचे भवन का बांधले नाही असे
कधी मी म्हटले काय?”’ 7 “तर आता माझा सेवक दावीद याला सांग,
‘सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: मी तुला कुरणातून, कळप राखीत
असताना आणले आणि माझ्या इस्राएली लोकांवर अधिपती म्हणून
नेमले. 8 जिथे कुठे तू गेलास तिथे मी तुझ्याबरोबर राहिलो आणि तुझ्या
सर्व शत्रूंना तुझ्यापुढून छेदून टाकले. आता मी, पृथ्वीवरील सर्वश्रेष्ठ
पुरुषांच्या नावांप्रमाणे तुझे नाव करेन. 9 आणि मी माझ्या इस्राएली
लोकांसाठी एक ठिकाण नेमून देईन आणि त्यांना त्या ठिकाणी स्थापित
करेन, यासाठी की त्यांना आपले स्वतःचे घर असावे आणि त्यांना पुन्हा
त्रास होऊ नये. आणि पूर्वीप्रमाणे दुष्ट लोकांनी त्यांचा छळ करू नये. 10
मी माझ्या इस्राएली लोकांवर पुढारी नेमले तेव्हापासून असेच घडले. मी
तुझ्या सर्व शत्रूंचा ताबा घेईन. “‘मी असे जाहीर करतो की याहवेह
तुझ्यासाठी एक घर बांधतील: 11 जेव्हा तुझे दिवस भरतील आणि
तू आपल्या पूर्वजांना जाऊन मिळशील, तेव्हा मी तुझे संतान, तुझ्या
पुत्रांपैकी एक उभा करून त्याला तुझा उत्तराधिकारी बनवीन, मी त्याचे
राज्य स्थापित करेन. 12 तोच माझ्यासाठी घर बांधेल आणि मी त्याचे
राजासन सर्वकाळासाठी स्थापित करेन. 13 मी त्याचा पिता होईन आणि
तो माझा पुत्र होईल; ज्याप्रकारे मी तुझ्या पूर्वजापासून काढून घेतले
होते तसे मी माझे प्रेम कधीही त्याच्यापासून काढून घेणार नाही. 14 मी
त्याला माझ्या मंदिरावर आणि माझ्या राज्यावर नेमीन; त्याचे राजासन
सर्वकाळासाठी स्थापित केले जाईल.’” 15 या संपूर्ण प्रकटीकरणातील
प्रत्येक शब्द नाथानाने दावीदाला सांगितला. 16 तेव्हा दावीद राजा आत
जाऊन याहवेहसमोर बसला आणि म्हणाला: “हे याहवेह परमेश्वरा,
मी कोण आहे आणि माझे कुटुंब काय आहे की, तुम्ही मला येथवर
आणावे? 17 माझ्या परमेश्वरा, तुमच्या दृष्टीने हे जणू पुरेसे नव्हते, तर
तुम्ही माझ्या कुटुंबाच्या भविष्याबद्दलही अभिवचन दिले आहे. याहवेह
परमेश्वरा, मी जणूकाही कोणीतरी फार श्रेष्ठ दर्जाचा आहे, अशा नजरेने
तुम्ही माझ्याकडे बघितले आहे. 18 “तुम्ही दावीद या आपल्या सेवकाला
मोठा सन्मान दिला आहे, तर मी पुढे काय बोलू? आपल्या सेवकाला
तुम्ही ओळखता. 19 हे याहवेह, तुम्ही आपल्या सेवकासाठी आणि
तुमच्या इच्छेप्रमाणे हे सर्व महान कार्य केले आहे आणि थोर अभिवचन
दिले आहे. 20 “हे याहवेह, तुमच्यासारखे कोणी परमेश्वर नाही. जे आम्ही
आमच्या कानांनी ऐकले आहे त्यानुसार तुमच्याशिवाय कोणीही परमेश्वर
नाही. 21 आपल्या इस्राएली लोकांसारखे कोण आहे; पृथ्वीवरील असे
एक राष्ट्र, ज्यांच्या परमेश्वरांनी बाहेर जाऊन स्वतःसाठी व तुमच्या
नावासाठी इजिप्तमधून त्यांना खंडून घेतले, म्हणजे राष्ट्रे व त्यांची दैवते
यांच्यामधून सोडविले व त्यांच्यादेखत आपल्या लोकांसाठी महान व
अद्भुत कार्य केले? 22 तुम्ही आपल्या इस्राएली लोकांना सर्वकाळासाठी
तुमचे स्वतःचे खास लोक बनविले आहे आणि हे याहवेह तुम्ही त्यांचे
परमेश्वर झाला आहात. 23 “तर आता, हे याहवेह, आपला सेवक
व त्याच्या घराण्याविषयी जे अभिवचन तुम्ही दिले आहे, ते आपण
सर्वकाळासाठी स्थापित करावे. आपण म्हटल्याप्रमाणे ते आपण करावे.
24 यासाठी की ते स्थापित व्हावे आणि तुमचे नाव सर्वकाळ महान
होईल. तेव्हा लोक म्हणतील, ‘सर्वसमर्थ याहवेह हे इस्राएलवर राज्य
करणारे इस्राएलचे परमेश्वर आहेत!’ आणि आपला सेवक दावीदाचे
घराणे तुमच्यासमोर स्थापित व्हावे. 25 “हे माझ्या परमेश्वरा, तुम्ही
तुमच्या सेवकास प्रकट केले आहे, की तुम्ही त्याच्यासाठी एक घर
बांधाल. त्यामुळे आपल्या सेवकाला तुमच्याकडे प्रार्थना करण्याचे
धैर्य आले आहे. 26 याहवेह, परमेश्वर तुम्हीच आहात! तुम्ही आपल्या
सेवकासाठी उत्तम गोष्टींचे अभिवचन दिले आहे. 27 आता आपल्या
सेवकाच्या घराण्याला आशीर्वाद देण्यास तुम्ही प्रसन्न आहात, म्हणजे
ते तुमच्या दृष्टीत सदैव राहावे; कारण हे याहवेह, तुम्ही ते आशीर्वादित
केले आहे, आणि ते सदैव आशीर्वादित व्हावे.”

**18** काही काळानंतर, दावीदाने पलिष्ट्यांचा पराभव केला आणि
त्यांच्यावर ताबा घेतला आणि गथ व त्याच्या सभोवतालची गावे
पलिष्ट्यांच्या ताब्यातून काढून घेतली. 2 दावीदाने मोआबी लोकांचा
सुद्धा पराभव केला आणि ते त्याच्या अधीन झाले आणि त्याला
कर देऊ लागले. 3 याशिवाय दावीद त्याच्या स्मारकाची उभारणी
करण्यास फरात नदीकडे गेला असता, त्याने सोबाहचा राजा हादादेजर
याचा हमाथाच्या परिसरात पराभव केला. 4 दावीदाने त्याचे एक
हजार रथ, सात हजार रथस्वार आणि वीस हजार पायदळ ताब्यात
घेतले. परंतु रथाच्या घोड्यांपैकी शंभर घोडे सोडून बाकी घोड्यांच्या
नसा कापून टाकल्या. 5 जेव्हा दिमिष्कातील अरामी लोक सोबाहचा
राजा हादादेजरच्या मदतीला आले तेव्हा दावीदाने त्यांच्यातील बावीस
हजार जणांना ठार केले. 6 नंतर त्याने दिमिष्कातील अरामी राज्यात
ठाणे बसविले आणि अरामी लोक त्याच्या अधीन झाले आणि त्याला
कर देऊ लागले. दावीद जिथेही गेला, तिथे याहवेहने त्याला विजय
दिला. 7 हादादेजरचे अधिकारी वाहत असलेल्या सोन्याच्या ढाली
दावीदाने घेतल्या आणि त्या यरुशलेमात आणल्या. 8 हादादेजरच्या
मालकीची नगरे तिबहाथ व कून येथून दावीद राजाने पुष्कळ कास्य
आणले. शलोमोनाने हे नंतर वितळविले व मंदिर बांधण्याच्या कामात
कास्याची मोठी टाकी, खांब आणि वेदीवरील यज्ञार्पणांसाठी लागणारी
उपकरणे बनविण्याच्या उपयोगात आणले. 9 हमाथाचा राजा तोऊ
याने जेव्हा ऐकले की, दावीदाने सोबाहचा राजा हादादेजरच्या संपूर्ण
सैन्याचा पराभव केला आहे, 10 तेव्हा त्याने आपला पुत्र हादोरामला
दावीदाला आशीर्वाद देऊन अभिनंदन करण्यासाठी दावीद राजाकडे
पाठवले, कारण दावीदाने हादादेजरशी युद्ध करून त्याच्यावर विजय
मिळविला होता. कारण हादादेजर आणि तोऊ यांच्यातही युद्ध होते.
हदोरामने त्याच्याबरोबर चांदी, सोने आणि कास्याच्या सर्वप्रकारच्या

वस्तू आणल्या. 11 दावीद राजाने या वस्तू, या सर्व राष्ट्रांतून लुटून
आणलेल्या चांदी सोन्याबरोबर याहवेहला समर्पित केल्या, दावीदाने
ताब्यात घेतलेली राष्ट्रे ही: एदोम आणि मोआब, अम्मोनी, पलिष्टी आणि
अमालेकी. 12 जेरुइयाहचा पुत्र अबीशाईने क्षार खोऱ्यात एदोमाचे अठरा
हजार लोक ठार मारले. 13 त्याने एदोमात ठाणे बसविले, आणि सर्व
एदोमी लोक दावीदाच्या अधीन झाले. दावीद जिथेही गेला तिथे याहवेहने
त्याला विजय दिला. 14 दावीदाने संपूर्ण इस्राएलवर राज्य केले व
त्याच्या लोकांशी तो न्यायाने व सत्याने वागत असे. 15 जेरुइयाहचा पुत्र
योआब सर्व सैन्याचा सेनापती होता; आणि अहीलुदचा पुत्र यहोशाफाट
नोंदणी करणारा. 16 अहीतूबचा पुत्र सादोक आणि अबीयाथारचा पुत्र
अहीमेलेख याजक; शावेशा राजाचा चिटणीस होता. 17 यहोयादाचा पुत्र
बेनाइयाह करेथी आणि पेलेथी लोकांवर अधिकारी होता. दावीदाचे पुत्र
राजाचे मुख्य मंत्री होते.

**19** कालांतराने, अम्मोन्यांचा राजा नाहाश मरण पावल्यानंतर त्याचा
पुत्र राजा झाला. 2 दावीदाने विचार केला, “हानूनचा पिता
नाहाशने माझ्यावर दया दाखविली होती, तशी दया मी हानूनवर
दाखवेन.” म्हणून दावीदाने हानूनच्या पित्याविषयी आपली सहानुभूती
व्यक्त करण्यासाठी राजदूत पाठवले. जेव्हा दावीदाचे राजदूत अम्मोनी
लोकांच्या प्रदेशात आले, 3 तेव्हा अम्मोनी अधिकाऱ्यांनी हानूनला
विचारले, “दावीदाने सहानुभूती व्यक्त करण्यासाठी तुमच्याकडे राजदूत
पाठवून तुमच्या पित्याचा आदर केला आहे असे आपणास वाटते
काय? दावीदाने त्यांना आपणाकडे केवळ देशाची पहाणी करण्यास, ते
हेरण्यास व ते उद्ध्वस्त करण्यास पाठवले नाही काय?” 4 तेव्हा हानूनने
दावीदाच्या राजदूतांना ताब्यात घेऊन, प्रत्येकाचे मुंडण केले व त्यांची
वस्त्रे मधोमध नितंबापर्यंत फाडून त्यांना परत पाठवून दिले. 5 जेव्हा
कोणी येऊन दावीदाला त्या माणसांबद्दल सांगितले, तेव्हा दावीदाने
त्यांची भेट घेण्यासाठी माणसे पाठवली, कारण त्यांचा मोठा अपमान
झाला होता. राजाने म्हटले, “तुमची दाढी वाढेपर्यंत यरीहोतच राहा, मग
परत या.” 6 जेव्हा अम्मोनी लोकांना समजून आले की, दावीदाला
आपण घृणास्पद झालो आहोत, तेव्हा हानून व अम्मोन्यांनी अराम-
नहराईम, अराम-माकाह व सोबाह येथून एक हजार तालांत चांदी देऊन
सैन्य, रथ व घोडदळ ही भाड्याने आणली. 7 त्याने भाड्याने बत्तीस
हजार रथ व सारथी आणले. तसेच माकाहचा राजा व त्याचे संपूर्ण सैन्य
बोलाविले. त्या सैन्याने मेदबा येथे तळ दिला. अम्मोन्यांनी आपल्या
नगरातून भरती केलेल्या सैन्यासह तिथे येऊन युद्धासाठी मोर्चा बांधला.
8 हे ऐकून, दावीदाने संपूर्ण लढाऊ सैन्यासह योआबाला पाठवले. 9
तेव्हा अम्मोन्यांचे सैन्य बाहेर आले आणि युद्धाच्या तयारीने त्यांच्या
नगराच्या दरवाजाजवळ येऊन थांबले, युद्ध करण्यासाठी आलेले राजे
एकीकडे मोकळ्या प्रदेशात एकटेच होते. 10 शत्रूचे सैन्य आपल्यापुढे व
मागे आहे हे योआबाला समजले; तेव्हा त्याने इस्राएली सैन्यातून उत्तम
योद्धे निवडले व त्यांना अरामी सैन्याशी लढण्यास पाठविले. 11 बाकीचे
सैन्य त्याने आपला भाऊ अबीशाई याच्या हाती दिले आणि त्यांना
अम्मोनी लोकांविरुद्ध लढण्यास पाठविले गेले. 12 योआब म्हणाला,
“जर अरामी सैन्य माझ्यावर भारी झाले तर तुम्ही माझी सुटका करावी;
परंतु जर अम्मोनी सैन्य तुझ्यावर भारी झाले तर मी तुला सोडविण्यास
येईन. 13 खंबीर व्हा, आपल्या लोकांसाठी आणि आपल्या परमेश्वराच्या
शहरांसाठी आपण धैर्याने लढू. याहवेहच्या दृष्टीने जे बरे ते याहवेह
करतील.” 14 तेव्हा योआब आणि त्याच्या बरोबरचे सैन्य अराम्यांशी
लढण्यास पुढे गेले आणि ते अरामी त्याच्यापुढून पळून गेले. 15 जेव्हा
अम्मोनी सैन्याला समजले की, अरामी सैन्याने पळ काढला आहे,
तेव्हा त्यांनी सुद्धा त्याचा भाऊ अबीशाई याच्यापुढून पळ काढून ते
शहरात गेले. तेव्हा योआब यरुशलेमास परत गेला. 16 नंतर अरामी
लोकांनी पाहिले इस्राएलकडून त्यांचा पराभव झाला आहे, तेव्हा त्यांनी
दूत पाठवून फरात नदीच्या पूर्वेकडून अधिक अरामी सैन्य बोलाविले.
हादादेजर राजाचा सेनापती शोफख या सेनेचे नेतृत्व करीत होता. 17
याविषयी जेव्हा दावीदाला सांगण्यात आले, तेव्हा त्याने सर्व इस्राएली
सैन्य एकत्र केले आणि यार्देन नदी पार करून शत्रुसैन्याशी युद्ध सुरू
केले. दावीदाने पुन्हा युद्धसीमेची खूण तयार केली व अराम्यांविरुद्ध
युद्ध केले. 18 परंतु अरामी सैन्यांनी इस्राएल समोरून पळ काढला
आणि दावीदाने त्यांच्यातील सात हजार रथस्वारांना व चाळीस हजार
पायदळांना ठार मारले. त्याने त्यांचा सेनापती शोफख यालाही ठार
केले. 19 जेव्हा हादादेजरच्या जहागीरदारांनी पाहिले की इस्राएलपुढे
त्यांचा पराभव झाला, त्यांनी दावीदाशी समेट केला व ते त्याच्या अधीन
झाले. यानंतर अरामी लोक पुन्हा कधीही अम्मोन्यांना त्याच्या युद्धामध्ये
मदत करण्यास तयार झाले नाही.

**20** त्याकाळी वसंतऋतूमध्ये, राजे लोक युद्धावर जात असे, योआबाने
इस्राएली सैन्याला युद्धासाठी नेले. त्याने अम्मोन्यांची भूमी
उद्ध्वस्त केली व राब्बाह शहराला वेढा घातला, परंतु दावीद यरुशलेमात
राहिला. योआबने राब्बाहवर हल्ला करून त्याचा नाश केला. 2 दावीद
तिथे पोहोचला, तेव्हा त्याने राब्बाहचा राजा मिलकोम च्या डोक्यावरील
मुकुट काढला—तो मुकुट सोन्याचा असून त्याचे वजन सोन्याचा एक
तालांत होते व त्यावर मोलवान रत्ने जडविलेली होती; तो दावीदाच्या
डोक्यावर ठेवण्यात आला. त्याने त्या शहरातून मोठ्या प्रमाणात लूट
घेतली. 3 आणि त्या शहरातील रहिवाशांना त्याने बाहेर आणले व
त्यांना करवती, लोखंडी कुदळ आणि कुऱ्हाडीच्या साहाय्याने मजुरी
करण्यास लावले आणि त्याने त्यांना वीटभट्टीवर काम करावयाला
लावले. दावीदाने अम्मोन्यांच्या सर्व नगरांचे असेच केले. नंतर दावीद व
त्याचे सर्व सैन्य यरुशलेमास परतले. 4 कालांतराने, पलिष्ट्यांबरोबर
गेजेर येथे युद्ध झाले, सिब्बखय नावाच्या हुशाथी मनुष्याने रेफाईमच्या
वंशातील सिप्पय नावाच्या एका मनुष्याला ठार मारले, तेव्हा पलिष्टी
शरण आले. 5 पलिष्ट्यांबरोबर झालेल्या आणखी एका युद्धात याईराचा
पुत्र एलहानानने लहमी या गित्ती गल्याथाच्या भावाला ठार मारले,
ज्याच्या भाल्याची काठी विणकऱ्याच्या काठीसारखी होती. 6 आणखी
गथ येथे झालेल्या दुसऱ्या एका युद्धात प्रत्येक हाताला सहा बोटे

आणि पायाला सहा बोटे; असे एकंदर चोवीस बोटे असलेला एक
धिप्पाड मनुष्य होता. तो सुद्धा राफाहच्या वंशातील होता. 7 जेव्हा त्याने
इस्राएलची अवहेलना केली, तेव्हा दावीदाचा भाऊ शिमिआचा पुत्र
योनाथानने त्याला ठार केले. 8 हे गथ येथील राफाहच्या वंशातील होते
आणि ते दावीद व त्याच्या सैनिकांच्या हातून मारले गेले.

**21** सैतानाने इस्राएलविरुद्ध आपत्ती आणली, त्याने दावीदाला
इस्राएली लोकांची शिरगणती करण्यास चिथाविले. 2 म्हणून
दावीदाने योआब आणि इतर मुख्य सेनापतींना सांगितले, “जा आणि
संपूर्ण इस्राएलींची बेअर-शेबापासून दानापर्यंत शिरगणती करा, म्हणजे
ते किती आहेत ते मला कळेल.” 3 परंतु योआबाने उत्तर दिले, “याहवेह
आपल्या सैन्याची शंभरपटीने वाढ करो. माझ्या धनीराजा, ती सर्व
आपलीच प्रजा नाही का? मग गणती करावी अशी इच्छा राजा का
बाळगतात? इस्राएलवर आपण दोष का आणावा?” 4 तथापि, राजाच्या
शब्दापुढे योआब व सेनापतींचे म्हणणे सफल झाले नाही; आणि
योआब सर्व इस्राएलभर प्रवास करून यरुशलेमास परतला. 5 योआबाने
दावीदाला योद्धे पुरुषांच्या संख्येचा अहवाल दिला: यहूदीयामधील चार
लक्ष सत्तर हजार मिळून सर्व इस्राएलमध्ये अकरा लाख धनुर्धारी पुरुष
होते. 6 या गणतीमध्ये त्याने लेवी व बिन्यामीन वंशजांचा समावेश
केला नाही, कारण राजाने सांगितलेल्या या कामाचा योआबाला वीट
आला होता. 7 परमेश्वराच्या दृष्टीमध्ये देखील ही शिरगणती वाईट
होती; म्हणून त्यांनी त्याबद्दल इस्राएलला शिक्षा केली. 8 तेव्हा दावीद
परमेश्वराला म्हणाला, “असे करून मी मोठे पाप केले आहे. आता मी
आपणास विनंती करतो, आपल्या सेवकाचा दोष दूर करा. मी मूर्खपण
केले आहे.” 9 याहवेहने दावीदाचा द्रष्टा गाद याला म्हटले, 10 “जाऊन
दावीदाला सांग, ‘याहवेह असे म्हणतात: मी तुझ्यापुढे तीन पर्याय
ठेवतो. त्यापैकी तू एकाची निवड कर जो मी तुझ्याविरुद्ध वापरावा.’ ”
11 तेव्हा गाद दावीदाकडे गेला व त्याला म्हटले, “याहवेह असे म्हणतात:
‘तू निवड कर: 12 तीन वर्षाचा दुष्काळ, तुझ्या शत्रूपासून तीन महिने
पलायन किंवा तीन दिवस याहवेहची तलवार; म्हणजे मरी देशात पसरून
याहवेहचा दूत सर्व इस्राएलच्या भागात नाश करेल.’ आता ज्यांनी मला
पाठविले आहे त्यांना काय उत्तर द्यावे ते तुम्ही ठरवून मला सांगा.”
13 दावीदाने गादला म्हटले, “मी मोठ्या पेचात पडलो आहे. मला
याहवेहच्या हाती पडू दे, कारण त्यांची कृपा अतिशय अपार आहे; परंतु
मला मनुष्याच्या हातात पडू देऊ नको.” 14 तेव्हा याहवेहने इस्राएल
देशात मरी पाठवली आणि तिच्यामुळे सत्तर हजार लोक मरण पावले.
15 आणि परमेश्वराने आपले दूत पाठवून यरुशलेमचा नाश केला. परंतु
दूत जे करणार होता तेव्हा ते पाहून याहवेहला अरिष्टाविषयी वाईट वाटले
आणि नाश करणाऱ्या दूताला याहवेहने म्हटले, “पुरे! आपला हात
आवर.” त्यावेळी याहवेहचा दूत यबूसी अरवनाहच्या खळयाजवळ उभा
होता. 16 दावीदाने वर दृष्टी केली आणि याहवेहच्या दूताला स्वर्गाच्या
आणि पृथ्वीच्या मध्ये यरुशलेमकडे तलवार उगारून उभे असलेले
पाहिले, तेव्हा दावीद आणि वडीलजनांनी अंगावर गोणपाटाची वस्त्रे
घालून दंडवत घातले. 17 दावीदाने परमेश्वराला म्हटले, “योद्ध्यांची
शिरगणती करण्यासाठी मीच आज्ञा केली होती ना? मी मेंढपाळ असून
पाप केले आहे आणि चुकीचे वागलो. ही तर केवळ मेंढरे आहेत. त्यांनी
काय केले आहे? हे याहवेह, माझ्या परमेश्वरा, आपला हात माझ्यावर व
माझ्या घराण्यावर पडो. परंतु तुमच्या या लोकांवर मरी राहू देऊ नका.”
18 तेव्हा याहवेहच्या दूताने गादला दावीदाला सूचना देण्यास सांगितले
की, जा आणि यबूसी अरवनाहच्या खळयात याहवेहप्रीत्यर्थ वेदी बांध.
19 मग याहवेहच्या नावाने गादने जे सांगितले होते त्यानुसार दावीद वर
गेला. 20 आर्णोन गव्हाची मळणी करीत होता, त्याने वळून पाहिले, तर
त्याच्या दृष्टीस एक दूत पडला. आर्णोनाचे चार पुत्र सोबत होते, तिथून ते
गेले व लपून राहिले. 21 जेव्हा दावीद जवळ गेला, आर्णोनाने त्याच्याकडे
पाहिले, तेव्हा त्याने खळयापासून निघून दावीदासमोर भूमीकडे तोंड
करून दंडवत घातले. 22 दावीद अरवनाहला म्हणाला, “मला तुझे हे
खळे दे, लोकांवर आलेली मरी थांबावी म्हणून याहवेहसाठी मी इथे
वेदी बांधेन. मला हे विकत दे, मी तुला त्याची संपूर्ण किंमत देईन.”
23 अरवनाह दावीदाला म्हणाला, “माझ्या धनीराजांना मनास येईल
ते त्यांनी करावे. पाहा, होमार्पणासाठी मी बैल देईन, लाकडासाठी
मळणीची आऊते व धान्यार्पणासाठी गहू, मी हे सर्व तुम्हाला देत आहे.”
24 परंतु दावीद राजाने अरवनाहला उत्तर दिले, “नाही, मी त्याबद्दल तुला
किंमत मोजून देणार. जे तुझे आहे, ते मी याहवेहसाठी तसेच घेणार
नाही. फुकट मिळालेले होमार्पण मी अर्पिणार नाही.” 25 मग दावीदाने
आर्णोनला जागेबद्दल सोन्याची सहाशे शेकेल दिली. 26 नंतर दावीदाने
तिथे याहवेहप्रीत्यर्थ एक वेदी बांधली व होमार्पणे व शांत्यर्पणे अर्पिली.
त्याने याहवेहचा धावा केला आणि याहवेहने स्वर्गातून होमार्पणाच्या
वेदीवर अग्नी पाठवून त्याला उत्तर दिले. 27 मग याहवेहने देवदूताला
आज्ञा दिली आणि त्याने आपली तलवार म्यानात परत ठेवली. 28
याहवेहने आपल्या प्रार्थनेचे उत्तर दिले, हे पाहून दावीदाने आर्णोन
यबूसीच्या खळयात अर्पणे वाहिली. 29 मोशेने रानात याहवेहसाठी
केलेला सभामंडप आणि होमबलीची वेदी या दोन्ही गिबोनच्या टेकडीवर
होती. 30 परंतु दावीद परमेश्वराला प्रश्न विचारावयास त्यांच्या पुढे
जाण्यास धजेना, कारण याहवेहच्या दूताच्या तलवारीने तो भयभीत
झाला होता.

**22** मग दावीद म्हणाला, “याहवेह परमेश्वराचे मंदिर व इस्राएलसाठी
होमबलीची वेदी याच ठिकाणी असली पाहिजे.” 2 दावीदाने
इस्राएलमध्ये राहणाऱ्या सर्व परकियांना एकत्र करून परमेश्वराच्या
मंदिरासाठी चिरे घडविण्याची आज्ञा दिली. 3 प्रवेशद्वारे आणि जोडपट्ट्या
यांना लागणारे खिळे तयार करण्यासाठी दावीदाने विपुल प्रमाणात
लोखंड, तसेच वजन करता येणार नाही इतका कास्य धातू पुरविला. 4
त्याने मोजता येणार नाहीत इतके गंधसरूचे ओंडके पुरविले, कारण
सीदोन व सोर येथील लोकांनी ते प्रचंड प्रमाणात दावीदाकडे आणले
होते. 5 दावीदाने विचार केला, “माझा पुत्र शलोमोन तरुण आणि
अननुभवी आहे. याहवेहसाठी जे मंदिर बांधावयाचे आहे, ते संपूर्ण

जगात अत्यंत भव्य, प्रसिद्ध व वैभवशाली झाले पाहिजे. म्हणून मी ते बांधण्याची पूर्वतयारी करेन.” त्याप्रमाणे आपल्या मृत्यूपूर्वी दावीदाने पुष्कळ तयारी केली. 6 नंतर त्याने त्याचा पुत्र शलोमोनला इस्राएलचे परमेश्वर याहवेहसाठी एक भवन बांधण्याची जबाबदारी दिली. 7 दावीद शलोमोनाला म्हणाला, “याहवेह परमेश्वराच्या नावाने मंदिर बांधावयाची माझी मनापासून इच्छा होती, 8 परंतु माझ्याकडे याहवेहचा हा संदेश आला, ‘तू अनेक युद्ध करून पुष्कळ रक्त वाहिले आहेस. तू माझ्या नावाचे मंदिर बांधू नकोस, कारण तू या पृथ्वीवर माझ्यासमोर पुष्कळ रक्त वाहिले आहे. 9 परंतु तुला एक पुत्र होईल, तो शांतताप्रिय व स्वस्थचित्त मनुष्य असेल. सभोवतालच्या सर्व प्रदेशातील शत्रूपासून मी त्याला विसावा देईन. त्याचे नाव शलोमोन असेल. त्याच्या कारकिर्दीत मी इस्राएलला शांती आणि स्वस्थता देईन. 10 तो माझ्या नावाचे एक मंदिर बांधील. तो माझा पुत्र होईल आणि मी त्याचा पिता होईन. मी इस्राएलावर त्याचे राजासन अनंतकालापर्यंत स्थापन करेन.’ 11 “आता माझ्या मुला, याहवेह तुझ्याबरोबर असो आणि तुला यश प्राप्त होवो आणि तू ते बांधशील असे त्यांनी सांगितल्याप्रमाणे याहवेह तुझ्या परमेश्वराचे भवन बांध. 12 तुझे याहवेह तुला सुबुद्धी आणि चातुर्य देवो आणि जेव्हा ते तुला इस्राएलवर अधिकार देतील, तुला त्यांच्या नियमशास्त्राचे पालन करण्याची बुद्धी देवो, म्हणजे तू याहवेह तुझ्या परमेश्वराच्या नियमशास्त्राचे पालन करशील. 13 याहवेहने इस्राएली लोकांना मोशेद्वारे दिलेल्या नियमांचे तू काळजीपूर्वक पालन करशील, तर तू यशस्वी होशील. बलवान हो, धैर्यवान हो. भयभीत आणि निराश होऊ नको. 14 “मी अत्यंत परिश्रम करून याहवेहच्या मंदिरासाठी एक लाख तालांत सोने, दहा लाख तालांत चांदी जमा केली आहे. कास्य आणि लोखंड अगणित प्रमाणात आहेत आणि लाकूड आणि दगडही आहेत. आणि तुलाही त्यात भर घालता येईल. 15 तुझ्याजवळ पुष्कळ कारागीर आहेत: दगड घडविणारे, गवंडी, सुतार आणि प्रत्येक प्रकारचे कामगार. 16 सोने आणि चांदी, कास्य आणि लोखंड—याचे अगणित कारागीर आहेत. आता काम करण्यास सुरू कर, याहवेह तुझ्याबरोबर असो.” 17 नंतर दावीदाने इस्राएलाच्या सर्व पुढाऱ्यांना आपला पुत्र शलोमोनला या कामी मदत करण्याची आज्ञा दिली. 18 तो त्यांना म्हणाला, “याहवेह तुमचे परमेश्वर तुमच्याबरोबर नाहीत का? त्यांनी सर्व क्षेत्रात तुम्हाला स्वस्थता दिली नाही का? कारण त्यांनी या प्रदेशाच्या लोकांना माझ्या अधीन केले व या भूमीवर याहवेहचा व त्यांच्या लोकांचा अधिकार आहे. 19 आता तुमच्या याहवेह परमेश्वराला शोधण्याकरिता तुम्ही आपले अंत:करण आणि आपला जीव लावा. आणि याहवेह परमेश्वराचे मंदिर बांधा म्हणजे याहवेहच्या नामाप्रीत्यर्थ जे मंदिर बांधण्यात येणार आहे, त्यात तुम्हाला याहवेहच्या कराराचा कोश आणि परमेश्वराची पवित्र पात्रे आणता येतील.”

**23** जेव्हा दावीद वृद्ध व वयातीत झाला, तेव्हा त्याने आपला पुत्र शलोमोनला इस्राएलचा राजा बनविले. 2 त्याने इस्राएलांच्या सर्व पुढाऱ्यांना आणि लेवी व याजकांना एकत्र केले. 3 तीस वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या लेव्यांची शिरगणती करण्यात आली. त्यांची संख्या अडतीस हजार भरली. 4 दावीद म्हणाला, “यापैकी चोवीस हजार लेव्यांनी याहवेहच्या मंदिराच्या कामावर मुकादम म्हणून देखरेख करावी, सहा हजार लोकांनी न्यायाधीशांची आणि अंमलदारांची कामे करावी. 5 चार हजार लोकांनी मंदिराच्या द्वारपालांचे काम करावे आणि चार हजार लोकांनी मी पुरवठा केलेली वाद्ये वाजवून याहवेहचे स्तुतिगान करावे.” 6 नंतर दावीदाने लेवींची विभागणी करून त्यांचे त्यांच्या संततीनुसार भाग पाडले: गेर्षोन, कोहाथ व मरारी. 7 गेर्षोनीचे विभाग: लादान व शिमी. 8 लादानाचे पुत्र: यात यहीएल हा ज्येष्ठ, जेथाम व योएल—सर्व मिळून तीन. 9 शिमीचे पुत्र: शेलोमीथ, हजिएल व हारान; सर्व मिळून तीन. (हे लादानाचे कुटुंबप्रमुख.) 10 शिमीचे पुत्र: यहथ, जीजा, यऊश आणि बरीयाह. हे शिमीचे पुत्र; सर्व मिळून चार. 11 (यहथ हा ज्येष्ठ होता, जीजाह हा दुसरा होता, परंतु यऊश आणि बरीयाह यांना पुष्कळ पुत्र नव्हते; म्हणून ते एकच कुटुंब म्हणून ओळखले जात.) 12 कोहाथाचे पुत्र: अम्राम, इसहार, हेब्रोन आणि उज्जीएल; सर्व मिळून चार पुत्र. 13 अम्रामचे पुत्र: अहरोन व मोशे. अहरोनाला आणि त्याच्या वंशाला सर्वकाळाकरिता वेगळे करण्यात आले, जेणेकरून त्यांनी याहवेहसाठी अतिपवित्र वस्तू अर्पण करण्यासाठी, त्यांची सेवा करण्यासाठी व त्यांच्या नावाने अनंतकालाकरिता आशीर्वाद द्यावे. 14 परमेश्वराचा मनुष्य मोशे याच्या पुत्रांचाही समावेश लेवीच्या गोत्रात केला होता. 15 मोशेचे पुत्र: गेर्षोम व एलिएजर. 16 गेर्षोमाचे वंशज: शबुएल प्रथमपुत्र होता. 17 एलिएजरचे वंशज: रहब्याह प्रथमपुत्र होता. (एलिएजरला दुसरा पुत्र नव्हता, परंतु रहब्याहाला पुष्कळ पुत्र झाले.) 18 इसहारचे पुत्र: शेलोमीथ प्रथमपुत्र होता. 19 हेब्रोनाचे पुत्र: यरीयाह हा प्रथमपुत्र होता, अमऱ्याह दुसरा, यहजिएल तिसरा आणि यकमाम चौथा. 20 उज्जीएलाचे पुत्र: मीखाह हा प्रथमपुत्र व इश्शीयाह दुसरा. 21 मरारीचे पुत्र: महली व मूशी. महलीचे पुत्र: एलअज़ार व कीश. 22 एलअज़ारला पुत्र नव्हता: त्याला फक्त कन्याच होत्या. त्यांचे चुलतभाऊ कीशपुत्र यांनी त्यांच्याशी विवाह केले. 23 मूशीचे पुत्र: महली, एदर व यरेमोथ; सर्व मिळून तीन. 24 लेव्याच्या शिरगणतीमधील सर्व लेवी पुरुष—ज्या कुटुंब प्रमुखांची नावे समाविष्ट केली व त्यांची नावनोंदणी झाली, जे वीस वर्षांचे व त्याहून अधिक वयाचे होते, त्या सर्वांना याहवेहच्या मंदिरात सेवाकार्य दिले गेले. 25 कारण दावीद म्हणाला होता, “इस्राएलाच्या याहवेह परमेश्वराने आम्हाला विश्रांती दिली आहे आणि यरुशलेमात निरंतर निवास करण्यास ते आले आहेत. 26 म्हणून लेव्यांना निवासमंडप व इतर सर्व सेवा साधने एका जागेवरून दुसऱ्या जागी नेण्याची गरज राहणार नाही.” 27 दावीदाच्या शेवटच्या सूचनेनुसार, वीस वर्षे व त्याहून अधिक वयाच्या लेवींची शिरगणती केली गेली. 28 लेव्यांचा कार्यभाग, अहरोनाच्या वंशजांना याहवेहच्या मंदिराच्या सेवेत याप्रमाणे मदत करावी: अंगणाची देखरेख, इतर खोल्यांची देखरेख, सर्व पवित्र वस्तूंचे शुद्धीकरण आणि परमेश्वराच्या भवनातील इतर कामे करणे. 29 त्यांना समक्षतेची भाकर टेबलावर ठेवणे, अन्नार्पणांसाठी लागणारे विशिष्ट

सपीठ ठेवणे, बेखमीर पापड्या तयार करणे, भाजणे व मिश्रण तयार
करणे व सर्व वजन आणि मापाचे प्रमाण बघणे या जबाबदाऱ्या होत्या.
30 दररोज सकाळी याहवेहसमोर उभे राहून ते उपकारस्तुतीचे स्तवनगान
करीत असत व संध्याकाळीही ते हीच कामे करीत. 31 शब्बाथ दिवशी,
चंद्रदर्शनाच्या दिवशी आणि इतर सणांमध्ये विशेष होमार्पणाच्या कामात
ते नित्यनेमाने याहवेहची सेवा त्यांना नेमून दिल्यानुसार करीत होते. 32
याप्रमाणे याहवेहच्या मंदिरात लेवी सभामंडपाची आणि पवित्रस्थानाची
काळजी घेत आपल्या जबाबदाऱ्या पार पाडीत असत आणि त्यांचे
नातलग अहरोनाचे वंशज यांच्या मदतनीसाचे काम करीत असत.

**24** अहरोनाच्या वंशजाची विभागणी: अहरोनाचे पुत्र नादाब, अबीहू,
एलअज़ार व इथामार. 2 नादाब व अबीहू हे अहरोनाचे पुत्र, ते
अहरोना आधीच मृत्यू पावले होते. त्यांना पुत्र नव्हते; म्हणून याजकाचे
कार्य एलअज़ार व इथामार हे करीत. 3 दावीदाने एलअज़ाराचे वंशज
सादोक व इथामाराचा वंशज अहीमेलेख यांच्या मदतीने अहरोनाच्या
वंशजांची विभागणी केली व त्यांची क्रमानुसार सेवेसाठी नेमणूक केली.
4 एलअज़ाराच्या वंशात इथामाराच्या वंशापेक्षा अधिक पुढारी होते आणि
त्यांची त्यानुसार विभागणी करण्यात आली: एलअज़ाराच्या वंशातून
सोळा कुटुंबप्रमुख आणि इथामाराच्या वंशातून आठ कुटुंबप्रमुख असे
विभागण्यात आले. 5 कोणताही भेदभाव न करता चिठ्ठ्या टाकून
विभागण्यात आले, कारण ते एलअज़ार व इथामार या दोन्ही वंशातून
घेतलेले मंदिराचे अधिकारी व परमेश्वराचे निवडलेले अधिकारी होते.
6 लेवी वंशातील नथानेलाचा पुत्र लेखनिक शमायाहने राजाच्या व
शासक—याजक सादोक, अबीयाथारचा पुत्र अहीमेलेख व याजक
आणि लेवीच्या कुटुंबप्रमुखांसमोर—नावनोंदणी केली. एलअज़ारच्या
वंशातील एक कुटुंब व इथामारच्या वंशातील एक कुटुंब घेण्यात
आले. 7 प्रथम चिठ्ठी यहोयारीबच्या नावे आली, दुसरी यदायाह, 8
तिसरी हारीम, चवथी सोरीम, 9 पाचवी मल्कीयाह, सहावी मियामीन,
10 सातवी हक्कोस, आठवी अबीयाह, 11 नववी येशूआ, दहावी
शखन्याह, 12 अकरावी एल्याशीब, बारावी याकीम, 13 तेरावी हुप्पाह,
चौदावी येशेबियाब, 14 पंधरावी बिल्गाह, सोळावी इम्मेरा, 15 सतरावी
हेजीरा, अठरावी हप्पिसेसा, 16 एकोणविसावी पथह्याह, विसावी
यहेज्केल, 17 एकविसावी याखीन, बाविसावी गामूल, 18 तेविसावी
दलायाह, चोविसावी माझियाह. 19 त्या सर्वांचा पूर्वज अहरोनला याहवेह
इस्राएलाच्या परमेश्वराने नेमून दिलेली सेवा विधीनुसार पार पाडण्याची
जशी आज्ञा होती, त्याप्रमाणे ते परमेश्वराच्या मंदिरात प्रवेश करीत.
20 लेवी वंशातील बाकीची संतती पुढीलप्रमाणे होती: अम्रामाचे पुत्र:
शूबाएल; शूबाएलाचे पुत्र: यहदायाह. 21 रहब्याहचे पुत्र: इश्शीयाह
प्रथमपुत्र. 22 इसहारचे पुत्र: शलोमोथ; शलोमोथाचे पुत्र: यहथ. 23
हेब्रोनाचे पुत्र: यरीयाह प्रथमपुत्र, अमऱ्याह दुसरा, यहजिएल तिसरा व
यकमाम चौथा. 24 उज्जीएलाचे पुत्र: मीखा; मीखाहच्या पुत्रांपैकी:
शामीर. 25 मीखाहचा भाऊ: इश्शीयाह; इश्शीयाचे पुत्र: जखऱ्याह.
26 मरारीचे पुत्र: महली व मूशी. याजीयाहचा पुत्र: बनो. 27 मरारीचे
पुत्र: याजीयाहकडून: बनो, शोहम, जक्कूर व इब्री. 28 महलीकडून:
एलअज़ार, त्याला पुत्र नव्हता. 29 कीशाकडून: कीशाचा पुत्र: यरहमेल.
30 मूशीचे पुत्र: महली, एदर व यरिमोथ. 31 अहरोनाच्या संततीप्रमाणे
दावीद राजा, सादोक, अहीमेलेख आणि याजकांचे व लेव्यांचे पुढारी या
सर्वांसमक्ष चिठ्ठ्या टाकून कामे वाटून देण्यात आली. सर्वात ज्येष्ठाच्या
कुटुंबास व सर्वात कनिष्ठाच्या कुटुंबास सारखीच वागणूक देण्यात
आली.

**25** दावीद व निवासमंडपाचे अधिकारी यांनी आसाफ, हेमान व
यदूथूनच्या काही पुत्रांना सतारी, वीणा व झांजा वाजवून संदेशाची
सेवा करण्यासाठी वेगळे केले. त्यांच्या सेवेनुसार त्यांची यादी अशी
आहे: 2 आसाफच्या पुत्रा मधून: जक्कूर, योसेफ, नथन्याह आणि
अशारेलाह. राजाच्या देखरेखीत आसाफ संदेश देत असे, त्याच्या
देखरेखीत त्याचे पुत्र कार्य करीत. 3 यदूथून व त्याचे पुत्र: गदल्याह,
सरी, यशायाह, शिमी, हशब्याह आणि मत्तिथ्याह, सर्व मिळून सहाजण,
संदेश देणारे त्यांचे पिता यदूथूनच्या नेतृत्वाखाली वीणा वाजवून
याहवेहचे उपकारस्मरण व स्तवन करीत असत. 4 हेमान व त्याचे पुत्र:
बुक्कीयाह, मत्तन्याह, उज्जीएल, शबुएल आणि यरिमोथ; हनन्याह,
हनानी, अलियाथाह, गिद्दल्ती, रोमामती-एजेर; योश्बेकाशाह, मल्लोथी,
होथीर आणि महजिओथ हे होते. 5 (हे सर्व राजाचा संदेष्टा हेमानचे पुत्र
होते. परमेश्वराने दिलेल्या अभिवचनानुसार त्याला हा कर्णा देण्यात
आला होता. परमेश्वराने हेमानाला चौदा पुत्र आणि तीन कन्या दिल्या.)
6 हे सर्वजण याहवेहच्या मंदिरात आपल्या पित्याच्या नेतृत्वाखाली
झांजा, सतारी व वीणा वाजवून परमेश्वराच्या भवनात सेवा करीत असत.
आसाफ, यदूथून व हेमान राजाच्या नेतृत्वाखाली कार्य करीत. 7 ते आणि
त्यांच्या घराण्यातील सर्वजण म्हणजे एकंदर 288 गायनकला शिकून
याहवेहसाठी संगीत देण्यात कुशल झाले होते. 8 तरुण वा वयस्कर,
तसेच शिक्षक वा शिष्य या सर्व गायकांची चिठ्ठ्या टाकून नेमणूक केली
जाई. 9 पहिली चिठ्ठी निघाली आसाफ, योसेफ, त्याचे पुत्र आणि
नातेवाईक 12, दुसरी गदल्याहची, त्याचे पुत्र आणि नातेवाईक 12,
10 तिसरी जक्कूरा, त्याचे पुत्र आणि नातेवाईक 12, 11 चौथी इज्री,
त्याचे पुत्र आणि नातेवाईक 12, 12 पाचवी नथन्याह, त्याचे पुत्र आणि
नातेवाईक 12, 13 सहावी बुक्कीयाह, त्याचे पुत्र आणि नातेवाईक 12,
14 सातवी यसारेलाह, त्याचे पुत्र आणि नातेवाईक 12, 15 आठवी
यशायाह, त्याचे पुत्र आणि नातेवाईक 12, 16 नववी मत्तन्याह, त्याचे
पुत्र आणि नातेवाईक 12, 17 दहावी शिमी, त्याचे पुत्र आणि नातेवाईक
12, 18 अकरावी अजरएल, त्याचे पुत्र आणि नातेवाईक 12, 19
बारावी हशब्याह, त्याचे पुत्र आणि नातेवाईक 12, 20 तेरावी शूबाएल,
त्याचे पुत्र आणि नातेवाईक 12, 21 चौदावी मत्तिथ्याह, त्याचे पुत्र
आणि नातेवाईक 12, 22 पंधरावी यरेमोथ, त्याचे पुत्र आणि नातेवाईक
12, 23 सोळावी हनन्याह, त्याचे पुत्र आणि नातेवाईक 12, 24 सतरावी
योश्बेकाशाह, त्याचे पुत्र आणि नातेवाईक 12, 25 अठरावी हनानी,
त्याचे पुत्र आणि नातेवाईक 12, 26 एकोणविसावी मल्लोथी, त्याचे

पुत्र आणि नातेवाईक 12, 27 विसावी एलियाथाह, त्याचे पुत्र आणि नातेवाईक 12, 28 एकविसावी होथीर, त्याचे पुत्र आणि नातेवाईक 12, 29 बाविसावी गिद्दल्ती, त्याचे पुत्र आणि नातेवाईक 12, 30 तेविसावी महजिओथ, त्याचे पुत्र आणि नातेवाईक 12, 31 चोविसावी रोमामती-एजेर, त्याचे पुत्र आणि नातेवाईक 12.

**26** द्वारपालांचे विभाजन: कोरहा पासून: कोरही पुत्र मशेलेम्याह, आसाफाचा एक पुत्र होता. 2 मशेलेम्याहचे पुत्र: जखऱ्याह प्रथमपुत्र, यदिएल दुसरा, जबद्याह तिसरा, यथनिएल चौथा, 3 एलाम पाचवा, यहोहानान सहावा व एलिओएनाइ सातवा. 4 ओबेद-एदोमासही पुत्र होते: शमायाह प्रथमपुत्र, यहोजाबाद दुसरा, योवाह तिसरा, साखार चवथा, नथानेल पाचवा, 5 अम्मीएल सहावा, इस्साखार सातवा व पउलथय आठवा. (कारण परमेश्वराने त्याला आशीर्वाद दिला.) 6 ओबेद-एदोमाचा पुत्र शमायाहला सुद्धा पुत्र झाले, ते आपल्या कुटुंबाचे प्रमुख होते, कारण ते सक्षम पुरुष होते. 7 शमायाहचे पुत्र: अथनी, रफाएल, ओबेद, एलजाबाद; आणि त्यांचे बंधू अलीहू आणि समख्याह हे सक्षम पुरुष होते. 8 हे सर्व ओबेद-एदोमाचे वंशज होते; ते आणि त्यांचे कुटुंब हे सर्वच सक्षम—काम करण्यास समर्थ पुरुष होते—ओबेद-एदोमाचे वंशज, सर्व मिळून 62. 9 मशेलेम्याहचे पुत्र व नातेवाईक सुद्धा शूर पुरुष होते—सर्व मिळून 18. 10 मरारी होसाहचे पुत्र: शिम्री पहिला (तो प्रथमपुत्र नसतानाही त्याच्या पित्याने त्याला पुढारी नेमले). 11 हिल्कियाह दुसरा, तबालियाह तिसरा, जखऱ्याह चौथा. 12 ज्याप्रकारे त्यांच्या कुटुंबीयांना देण्यात आली, त्याच प्रकारे सर्व विभाजित द्वारपालांना त्यांच्या पुढाऱ्यांव्दारे याहवेहच्या मंदिराची सेवा देण्यात आली. 13 प्रत्येक द्वारांसाठी, लहान थोर सारखेच समजून त्यांच्या कुटुंबानुसार चिठ्ठ्या टाकण्यात आल्या. 14 पूर्वेकडील द्वारासाठी शेलेम्याहच्या नावाची चिठ्ठी निघाली. उत्तरेकडील द्वाराची त्याचा पुत्र जखऱ्याहकडे गेली, जो एक बुद्धिमान सल्लागार होता. 15 दक्षिणेकडील द्वार ओबेद-एदोम आणि त्याच्या पुत्रांच्या ताब्यात कोठारे दिली गेली. 16 पश्चिमेकडील द्वाराची व शल्लेकेथ द्वाराशी चढून जाण्याच्या मार्गावर पहारा देण्याची जबाबदारी शुप्पीम व होसाह यांच्याकडे आली. 17 पूर्वेच्या द्वारासाठी रोज सहा लेवी, उत्तरेच्या द्वारासाठी चार रक्षक, दक्षिणेच्या द्वारासाठी चार रक्षक आणि भांडारावर एकाच वेळी प्रत्येकी दोन. 18 न्यायालयाच्या पश्चिमेकडील द्वारांसाठी मार्गावर चार व न्यायालयात दोन रक्षक. 19 हे द्वारपालांचे विभाजित वर्ग कोरही आणि मरारी वंशातील होते. 20 अहीयाह लेवीस परमेश्वरासाठी मंदिराचे खजिनदार आणि वाहिलेल्या अर्पणांची देखरेख करण्यासाठी नेमण्यात आले. 21 लादानाचे वंशज, जे लादान गेर्षोनी होते व जे गेर्षोनी लादानाचे यहीएली कुटुंबप्रमुखांचा समावेश होता. 22 यहीएलीचे पुत्र जेथाम आणि त्याचा भाऊ योएलना याहवेहच्या मंदिराच्या खजिन्यावर अधिकारी नेमले होते. 23 अम्रामी पासून इसहारी हेब्रोनी व उज्जीएली: 24 मोशेचा पुत्र गेर्षोमच्या वंशातील शबुएल खजिन्यावर प्रमुख अधिकारी होता. 25 एलिएजरपासून त्याचे नातेवाईक: त्याचा पुत्र रहब्याह, त्याचा पुत्र यशायाह, त्याचा पुत्र योराम, त्याचा पुत्र जिक्री, व त्याचा पुत्र शेलोमीथ. 26 (हा शेलोमीथ आणि त्याचे नातेवाईक दावीद राजाने, हजार सैनिकांचे, शताधिपतींच्या आणि इतर सैनिकांच्या सेनाधिकारींचे कुटुंबप्रमुख, या सर्वांनी अर्पण केलेल्या भांडार वस्तूंची काळजी घेत. 27 लढाईतील काही लूट याहवेहच्या मंदिराच्या दुरुस्तीच्या खर्चासाठी अर्पण करीत. 28 शमुवेल संदेष्टा, कीशाचा पुत्र शौल, नेराचा पुत्र अबनेर आणि जेरुइयाहचा पुत्र योआब यांनी अर्पण केलेले सर्वकाही आणि इतर अर्पणे सांभाळण्याची जबाबदारी शेलोमीथ आणि त्याच्या नातेवाईकांवर टाकण्यात आली.) 29 इसहाऱ्यांपैकी: कनन्याह आणि त्याचे पुत्र यांची नेमणूक मंदिरापासून दूर इस्राएली लोकांवर अधिकारी आणि न्यायाधीश म्हणून करण्यात आली. 30 हेब्रोन्यांपैकी: हशब्याह आणि त्याचे नातेवाईक 1,700 सक्षम पुरुष यार्देन नदीच्या पश्चिमेकडील इस्राएलाच्या प्रदेशाचे प्रमुख होते. याहवेहची आणि राजाची सेवा करण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. 31 हेब्रोन्यातील यरीयाह हा त्यांच्या वंशावळीच्या नोंदीनुसार त्यांचा कुटुंबप्रमुख होता. (दावीद राजाच्या शासनकाळात चाळिसाव्या वर्षी शिरगणतीत शोध घेण्यात आला. गिलआदामधील हिब्रोनी याजेरमध्ये सक्षम पुरुष आढळून आले. 32 येरीह कडे 2,700 कुटुंब होते, जे सक्षम असून कुटुंबप्रमुख होते. दावीद राजाने त्यांना रऊबेन, गाद आणि मनश्शेहचे अर्धे गोत्र यांच्या परमेश्वरा संबंधित धार्मिक व सामाजिक बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी नेमले.)

**27** इस्राएली लोकांची यादी—कुटुंबप्रमुख, हजार सैनिकांचा अधिकारी आणि शंभर सैनिकांचा अधिकारी आणि त्यांचे मुख्य अधिकारी, दरवर्षी प्रत्येक महिन्यात राजाच्या सर्व लष्करी सेवेसाठी या सैन्य विभागांना बोलाविले जात असे. प्रत्येक विभागात 24,000 पुरुष सैनिक असत. 2 पहिल्या विभागाचा, पहिल्या महिन्याचा सेनापती जब्दीएलाचा पुत्र याशबआमच्या विभागामध्ये 24,000 पुरुष होते. 3 तो पेरेसाच्या वंशातील होता आणि त्याच्या नेतृत्वाची सैन्य तुकडी पहिल्या महिन्यात कामावर असे. 4 अहोही दोदय हा दुसऱ्या महिन्याच्या विभागाचा सेनापती होता; मिकलोथ त्यांचा मुख्य अधिकारी होता. त्याच्या विभागात 24,000 पुरुष सैनिक होते. 5 तिसऱ्या महिन्याच्या सैन्य विभागाचा सेनापती, प्रमुख याजक यहोयादाचा पुत्र बेनाइयाह होता. त्याच्या विभागात 24,000 पुरुष सैनिक होते. 6 बेनाइयाह दावीदाच्या सैन्यातील पहिल्या तीस योद्ध्यापैकी एक व त्या तिसांचा अधिकारी होता. त्याचा पुत्र अम्मीजाबाद सैन्य तुकडीचा सेनापती होता. 7 चौथ्या महिन्याचा चवथा सेनापती योआबाचा भाऊ असाहेल होता; त्याच्यानंतर त्याचा पुत्र जबद्याह त्याच्या जागी आला. त्याच्या विभागात 24,000 पुरुष सैनिक होते. 8 पाचव्या महिन्याचा पाचवा सेनापती इज्राही शम्हूथ होता. त्याच्या विभागात 24,000 पुरुष सैनिक होते. 9 सहाव्या महिन्याचा सहावा सेनापती तकोवा येथील इक्केशाचा पुत्र ईरा होता. त्याच्या विभागात 24,000 पुरुष सैनिक होते. 10 सातव्या महिन्याचा सातवा सेनापती हेलेस होता, तो एफ्राईमी असून पलोन

येथील होता. त्याच्या विभागात 24,000 पुरुष सैनिक होते. 11 आठव्या
महिन्याचा आठवा सेनापती जेरह कुळातील हुशाथी सिब्बखय होता.
त्याच्या विभागात 24,000 पुरुष सैनिक होते. 12 नवव्या महिन्याचा
नववा सेनापती बिन्यामीन अनाथोथी अबिएजेर होता. त्याच्या विभागात
24,000 पुरुष सैनिक होते. 13 दहाव्या महिन्याचा दहावा सेनापती
माहाराई, नटोफाथी जेरही होता. त्याच्या विभागात 24,000 पुरुष
सैनिक होते. 14 अकराव्या महिन्याचा अकरावा सेनापती पिराथोनचा
एफ्राईमी बेनाइयाह होता. त्याच्या विभागात 24,000 पुरुष सैनिक
होते. 15 बाराव्या महिन्याचा बारावा सेनापती नटोफाथी हेल्दय असून
तो ओथनिएलाच्या कुटुंबातील होता. त्याच्या विभागात 24,000
पुरुष सैनिक होते. 16 इस्राएलांचे गोत्रप्रमुख हे होते: रऊबेन गोत्रावर:
जिख्रीचा पुत्र एलिएजर; शिमओनी गोत्रावर: माकाहचा पुत्र शफात्याह;
17 लेवी गोत्रावर: कमुवेलाचा पुत्र हशब्याह; अहरोन गोत्रावर: सादोक;
18 यहूदाह गोत्रावर: दावीद राजाचा बंधू अलीहू; इस्साखार गोत्रावर:
मिखाएलचा पुत्र ओमरी; 19 जबुलून गोत्रावर: ओबद्याहचा पुत्र इश्मायाह;
नफताली गोत्रावर: अज्रीएलचा पुत्र यरिमोथ; 20 एफ्राईमच्या गोत्रावर:
अजज्याहचा पुत्र होशेय; मनश्शेहच्या अर्ध्या गोत्रावर: पदायाहचा पुत्र
योएल; 21 गिलआदातील मनश्शेहच्या अर्ध्या गोत्रावर: जखऱ्याहचा पुत्र
इद्दो; बिन्यामीन गोत्रावर: अबनेरचा पुत्र यासीएल; 22 दान गोत्रावर:
यरोहामाचा पुत्र अजरएल. 23 दावीदाने शिरगणती केली, तेव्हा वीस
वर्षांच्या किंवा त्यापेक्षा कमी वयाच्या व्यक्तीचा त्या गणतीमध्ये समावेश
केला नव्हता, कारण याहवेहने इस्राएली लोकांची संख्या आकाशातील
ताऱ्यांसारखी अगणित करण्याचे वचन दिले होते. 24 जेरुइयाहचा
पुत्र योआबाने गणती सुरू केली, परंतु तो ती पूर्ण करू शकला नाही.
कारण इस्राएलावर परमेश्वराचा कोप भडकला आणि गणतीची पूर्ण
संख्या दावीद राजाच्या इतिहासात लिहिली गेली नाही. 25 अदिएलाचा
पुत्र अजमावेथ राजाचा भांडारपाल होता. उज्जीयाहचा पुत्र योनाथान
इस्राएलातील सर्व सीमापार नगरे, गावे आणि किल्ले यांचा विभागीय
भांडारपाल होता. 26 कलूबाचा पुत्र एज्री राजाच्या जमिनीची लागवड
करणाऱ्या कामकऱ्यांवर अधिकारी होता. 27 रामाही शिमी राजाच्या
द्राक्षमळ्यांवर देखरेख करणारा होता. जब्दी शिफमी द्राक्षारस बनविणे व
त्याचा साठा करणे यास जबाबदार होता. 28 गदेर येथील बआल-हानान
राज्याच्या पश्चिमी डोंगरपायथ्यातील जैतुनाच्या व उंबराच्या झाडांची
देखरेख करत असे. योआश जैतून तेलाच्या पुरवठ्याचा प्रमुख होता.
29 शारोनाच्या मैदानात चरणाऱ्या कळपांवर शारोनी शित्रेय देखरेख
करत असे. खोऱ्यातील कळपांवर अदलयचा पुत्र शाफाट हा देखरेख
करत असे. 30 इश्माएली प्रांतातला ओबील उंटांवर देखरेख करत असे.
गाढवांवर मेरोनोथी यहदायाह देखरेख करत असे. 31 मेंढरांवर हगरी
येथील याजीज देखरेख करत असे. 32 दावीदाचा चुलता योनाथान हा
सुशिक्षित असून उत्तम सल्लागार व लेखनिक होता. हखमोन्याचा पुत्र
यहीएल राजपुत्रांचा शिक्षक होता. 33 अहीथोफेल राजाचा सल्लागार
होता. हूशाई अर्की खाजगी सल्लागार होता. 34 बेनाइयाहचा पुत्र
यहोयादा आणि अबीयाथार नंतर अहीथोफेल त्यांच्या जागी आला.
योआब राजाच्या शाही सेनेचा सरसेनापती होता.

**28** दावीदाने इस्राएलच्या सर्व अधिकाऱ्यांना यरुशलेम येथे एकत्र
बोलाविले: त्यात गोत्रावरील अधिकारी, राजकीय सेवेतील
विभागीय अधिकारी, हजार सैन्याचे आणि शंभर सैन्याचे सैन्याधिकारी,
राजा आणि राजपुत्र यांच्या स्थावर मालमत्तेची आणि पशुधनाची
देखरेख करणारे अधिकारी, युद्ध सैनिक व सर्व वीर योद्धे यांचा समावेश
होता. 2 राजा दावीद उभा राहिला व म्हणाला: “माझ्या इस्राएली
बंधूंनो, माझ्या लोकांनो, माझे ऐका. याहवेहच्या पवित्र कराराच्या
कोशासाठी आणि परमेश्वराच्या पादास्थानासाठी एक भवन असावे
म्हणून मंदिर बांधण्याची माझी इच्छा होती. आणि मी मंदिर बांधावयास
योजना केली आहे. 3 परंतु परमेश्वराने मला सांगितले आहे, ‘तू माझ्या
नामासाठी भवन बांधणार नाही, कारण तू योद्धा आहेस आणि तू
रक्तपात केला आहेस.’ 4 “तरीपण याहवेह इस्राएलच्या परमेश्वराने
माझ्या सर्व घराण्यातून इस्राएलावर सदासर्वदा राज्य करण्यासाठी मला
राजा म्हणून निवडले आहे. त्यांनी प्रथम यहूदाहच्या गोत्राची आणि या
गोत्रातून माझ्या पित्याच्या घराण्याची आणि माझ्या पित्याच्या सर्व
पुत्रांमधून माझी निवड करून आनंद मानला असून मला इस्राएलावर
राजा केले आहे. 5 याहवेहने मला पुष्कळ पुत्र दिलेले आहेत—माझ्या
अनेक पुत्रांमधून—याहवेहने इस्राएलींच्या राजगादीवर बसण्यासाठी
माझा पुत्र शलोमोन याची निवड केली. 6 याहवेहने मला सांगितले:
‘तुझा पुत्र शलोमोन माझे मंदिर आणि अंगण बांधील, कारण मी त्याला
माझा पुत्र म्हणून निवडले आहे आणि मी त्याचा पिता होईन. 7 त्याने
माझ्या आज्ञा आणि सूचना आतापर्यंत पाळल्या, त्याप्रमाणे जर तो
यापुढेही काटेकोरपणाने पाळल्या, तर मी त्याचे राज्य सदासर्वकाळ
टिकवेन.’ 8 “म्हणून आता सर्व इस्राएलसमोर, याहवेहच्या लोकांसमोर
आणि आपल्या परमेश्वराच्या ऐकिवात: मी तुम्हाला सूचना देत आहे
की याहवेह परमेश्वराच्या प्रत्येक आज्ञेचे काळजीपूर्वक पालन करा,
म्हणजे तुम्ही ही उत्तम भूमी ताब्यात घेऊन, ती सदासर्वदा तुमच्या
वंशजांना वारसाहक्क म्हणून देता येईल. 9 “आणि तू, माझ्या पुत्रा
शलोमोना, आपल्या पित्याच्या परमेश्वराचा अंगीकार कर, त्यांची सेवा
पूर्ण अंतःकरणाने व स्वखुशीने कर, कारण याहवेह प्रत्येकाचे अंतःकरण
पाहतात आणि त्यातील प्रत्येक इच्छा व विचार त्यांना कळतो. जर
तू त्यांना शोधशील, तर ते तुला सापडतील; पण जर तू त्यांचा त्याग
करशील, तर ते तुझा कायमचा त्याग करतील. 10 म्हणून आता तू लक्ष
दे, याहवेहने त्यांचे पवित्र मंदिर बांधण्यासाठी तुझी निवड केली आहे.
शक्तिशाली हो आणि ते कार्य पूर्ण कर.” 11 नंतर दावीदाने मंदिराची
नियोजित जागा, तेथील भवने, भांडारगृहे, वरच्या खोल्या, आतील
खोल्या, तसेच प्रायश्चिताची जागा यांचा नकाशा शलोमोनाला दिला.
12 पवित्र आत्म्याने ज्या योजना त्याच्या मनात घातल्या होत्या त्या
याहवेहच्या मंदिराच्या अंगणाचा, सभोवतालच्या खोल्यांचा, परमेश्वराच्या
मंदिराच्या खजिन्यांचा व समर्पित वस्तूंच्या कोठारांचाही नकाशा त्याला

दिला. 13 याजक व लेवी यांच्या विभागांच्या कामकाजाच्या सूचनाही राजाने शलोमोनाला दिल्या, त्याचप्रमाणे याहवेहच्या मंदिरातील भक्ती व सेवेसाठी वापरण्यात येणाऱ्या प्रत्येक वस्तूचा तपशीलही त्याने त्याला दिला. 14 त्याने वजन करून निरनिराळ्या सेवेसाठी लागणाऱ्या सोन्याच्या पात्रांसाठी लागणारे पुरेसे सोने व निरनिराळ्या सेवेसाठी लागणाऱ्या चांदीच्या पात्रांसाठी लागणारी पुरेशी चांदी दिली. 15 दिव्यांना व दिवठणींना लागणारे ठराविक वजनाचे सोनेही त्याने दिले. त्याने चांदीच्या बैठकींसाठी व दिव्यांसाठी प्रत्येकाच्या कामाप्रमाणे पुरेल एवढी चांदी दिली. 16 त्याने समक्षतेच्या भाकरीच्या मेजासाठी व इतर सोन्याच्या मेजांसाठी सोने तोलून दिले. त्याने चांदीच्या मेजांसाठीसुध्दा चांदी तोलून दिली. 17 शुद्ध सोन्याचे काटेरी चमचे, शिंपडण्यासाठी लागणारे कटोरे आणि प्याले; सोन्याच्या प्रत्येक ताटासाठी सोने, त्याप्रमाणेच चांदीच्या प्रत्येक ताटासाठी चांदी तोलून दिली; 18 आणि त्याने धूपवेदीसाठी लागणारे शुद्ध सोने तोलून दिले. तसेच रथाचा नकाशा म्हणजे याहवेहच्या कराराच्या कोशावर आपले पंख पसरून त्याचे संरक्षण करणाऱ्या करुबांचा नकाशा त्याने त्याला दिला. 19 दावीद म्हणाला, “हा सगळा तपशील खुद्द याहवेहच्या सूचनांचा परिणाम आहे. आणि त्यांनीच मला या नकाशाचा सर्व तपशील समजण्याचे ज्ञान दिले.” 20 दावीद त्याचा पुत्र शलोमोनला हे देखील म्हणाला, “हिंमत बांध, धैर्य धर आणि कामास लाग, भिऊ नकोस किंवा खचू नकोस, कारण याहवेह परमेश्वर, माझे परमेश्वर तुझ्याबरोबर आहेत. याहवेहच्या मंदिराचे प्रत्येक कार्य योग्यप्रकारे सिद्धीस जाईपर्यंत ते तुझा त्याग करणार नाहीत किंवा तुला अपयश देणार नाहीत. 21 याजक आणि लेवी यांच्या विभागणी प्रमाणे परमेश्वराच्या मंदिरातील सर्व कामे करण्यास तयार आहेत आणि तसेच निरनिराळ्या कारागिरीमध्ये कुशल असलेला प्रत्येक उत्सुक मनुष्य तुला सर्व कामात मदत करण्यास तयार आहे. अधिकारी वर्ग आणि सामान्य लोक तुझ्या प्रत्येक आज्ञेप्रमाणे वागतील.”

**29** नंतर सर्व जमलेल्या सभेला दावीद राजा म्हणाला: “माझा पुत्र शलोमोन, ज्याची निवड परमेश्वराने केली आहे, तो अजून तरुण आणि अननुभवी आहे. आणि हे कार्य महान आहे, कारण हे भव्यदिव्य मंदिर मानवाकरिता नव्हे, तर खुद्द याहवेह परमेश्वरासाठी आहे. 2 माझ्या उपलब्धींचा उपयोग करून परमेश्वराच्या मंदिरासाठी जितक्या वस्तू गोळा करता येतील, तितक्या मी केल्या आहेत—सोन्याच्या कामासाठी सोने, चांदीच्या कामासाठी चांदी, कास्याच्या कामासाठी कास्य, लोखंडाच्या कामासाठी लोखंड, लाकडाच्या कामासाठी लाकूड, गोमेद आणि जडावाच्या कामासाठी रंगीबेरंगी पाचूरत्न, उत्तम रत्ने, संगमरवरी पाषाण—मी गोळा केले आहेत. 3 माझा भक्तिभाव माझ्या परमेश्वराच्या मंदिरावर आहे, म्हणून माझ्या व्यक्तिगत खजिन्यातून जो सोने आणि चांदीचा मी संग्रह केला आहे, तो मी परमेश्वराच्या मंदिरासाठी देतो. याव्यतिरिक्त या पवित्र मंदिरासाठी मी दिले आहे: 4 ओफीराचे तीन हजार तालांत सोने आणि मंदिराच्या भिंती मढविण्यासाठी सात हजार तालांत शुद्ध चांदी. 5 सर्व सोने आणि चांदीची कामे कारागिरांकडून करण्यात येतील. आता स्वेच्छेने याहवेहसाठी स्वतःचे पवित्रीकरण करण्यास कोण तयार आहे?” 6 मग कुटुंबप्रमुख, इस्राएल गोत्राचे अधिकारी, हजार सैनिकांचे अधिकारी, आणि शंभर सैनिकांचे अधिकारी, राजाचे शासकीय अधिकारी यांनी स्वेच्छेने दान दिले. 7 परमेश्वराच्या मंदिराच्या कामासाठी त्यांनी पाच हजार तालांत आणि दहा हजार दारिक सोने, दहा हजार तालांत चांदी, अठरा हजार तालांत कास्य आणि एक लाख तालांत लोखंड दिले. 8 ज्यांच्याकडे रत्ने होती ती त्यांनी खजिन्यामध्ये जमा करण्यासाठी याहवेहच्या मंदिरातील खजिनदार गेर्षोनी यहीएलकडे सोपविली. 9 पुढाऱ्यांच्या या स्वेच्छेने दिलेल्या प्रतिसादाने सर्व लोक आनंदित झाले, कारण त्यांनी स्वयंस्फुर्तीने व पूर्ण अंतःकरणाने, आनंदाने याहवेहच्या सेवेला दिले, दावीद राजालाही मोठा आनंद झाला.

10 दावीदाने सर्व सभेदेखत याहवेहची स्तुती केली, तो म्हणाला, “हे याहवेह परमेश्वरा, आमच्या इस्राएलच्या पित्याच्या परमेश्वरा, अनादि ते अनंतकालापर्यंत तुमची स्तुती असो. 11 याहवेह, तुमचे सामर्थ्य व महिमा महान आहे; गौरव, वैभव व ऐश्वर्य ही सदासर्वकाळ तुमचीच असो, पृथ्वीवरील व स्वर्गातील सर्वकाही तुमचेच आहे! याहवेह, हे सर्व तुमचेच राज्य आहे; तुमचे प्रभुत्व सर्वांवर आहे. 12 श्रीमंती व सन्मान तुमच्याकडूनच येतात; तुम्ही सर्व गोष्टींचे शासक आहात. सर्वांना मोठेपणा व सामर्थ्य देण्याकरिता केवळ तुमच्याच बाहूत सामर्थ्य आणि अधिकार आहे. 13 आता, हे आमच्या परमेश्वरा, आम्ही तुमचे उपकार मानतो, आणि तुमच्या वैभवी नावाची स्तुती करतो. 14 “परंतु मी कोण, माझी शक्ती आणि माझे लोक कोण, जे तुम्हाला इतक्या उदारतेने दान देऊ शकतील? आमच्याजवळचे सर्वकाही तुमच्याकडूनच मिळालेले आहे आणि तेच आम्ही तुम्हाला देत आहोत. 15 आम्ही तुमच्या दृष्टीने आमच्या पूर्वजांप्रमाणे परकीय व अगांतुक आहोत. आमचे पृथ्वीवरील दिवस एखाद्या सावलीप्रमाणे आहेत, काही आशा न ठेवता ते नाहीसे होतील. 16 हे आमच्या याहवेह परमेश्वरा, तुमच्या पवित्र नावासाठी, तुमचे मंदिर बांधण्यास जे प्रचंड साहित्य आम्ही गोळा केले आहे, ते सर्व तुमच्याकडून मिळाले आहे, हे सर्वकाही तुमचेच आहे. 17 माझ्या परमेश्वरा, मी जाणतो, तुम्ही हृदयाची परीक्षा घेता आणि खरेपणाने प्रसन्न होता. मी या सर्व वस्तू स्वखुशीने व प्रामाणिक हेतूने दिल्या आहेत. आणि आता हे बघून मला आनंद झाला की तुमच्या लोकांनीही किती आनंदाने स्वखुशीने या देणग्या दिल्या आहेत. 18 हे याहवेह, आमच्या पित्या अब्राहाम, इसहाक आणि इस्राएल यांच्या परमेश्वरा, तुमच्या लोकांच्या मनात या इच्छा कायम राखा आणि त्यांचे अंतःकरण तुमच्याशी एकनिष्ठ राहू द्या. 19 माझा पुत्र शलोमोनाने एकचित्त हृदयाने तुमच्या सर्व आज्ञा, आदेश व नियम पाळावे, व हे भव्यदिव्य बांधकाम पूर्ण करण्यास सर्वतोपरी प्रयत्न करावा, ज्याच्यासाठी मी संपूर्ण तयारी करून ठेवली आहे.” 20 नंतर दावीद सर्व मंडळीला म्हणाला, “तुमच्या याहवेह परमेश्वराची स्तुती करा.” म्हणून त्या सर्वांनी आपल्या पूर्वजांचे याहवेह परमेश्वराची मस्तके लववून, दंडवते घालून, त्यांचा राजा

याहवेहची स्तुती केली. 21 दुसऱ्या दिवशी त्यांनी याहवेहसाठी यज्ञ व
होमबली अर्पण केले: एक हजार गोऱ्हे, एक हजार मेंढे आणि एक हजार
कोकरे, सोबत पेयार्पणे, तसेच इस्राएलींच्या वतीने इतर विपुल अर्पणे
वाहिली. 22 त्यांनी त्या दिवशी याहवेहसमोर मोठ्या आनंदाने खाणेपिणे
केले. नंतर त्यांनी दावीद राजाचा पुत्र शलोमोनचा याहवेहसमोर आणि
सर्व पुढाऱ्यांसमोर पुन्हा राज्यकर्ता म्हणून राज्याभिषेक केला. आपला
याजक म्हणून त्यांनी सादोकाचाही याजक म्हणून अभिषेक केला.
23 अशा रीतीने शलोमोन त्याचा पिता दावीदानंतर राजा झाला आणि
याहवेहच्या सिंहासनावर बसला. त्याची भरभराट झाली व सर्व इस्राएली
लोक त्याच्या आज्ञेत राहिले. 24 सर्व अधिकारी आणि शूरवीर सैनिक,
दावीद राजांच्या पुत्रांनी राजा शलोमोनशी एकनिष्ठ राहण्याचे वचन
दिले. 25 याहवेहने शलोमोनाला इस्राएलीदेखत सर्वाधिक सन्मान दिला
आणि इस्राएलमध्ये कोणत्याही राजाला त्याच्यासारखे शाही ऐश्वर्य
दिले नव्हते. 26 अशाप्रकारे इशायाचा पुत्र दावीदाने सर्व इस्राएलावर
राज्य केले. 27 दावीदाने इस्राएलवर चाळीस वर्षे राज्य केले; सात वर्षे
हेब्रोनमध्ये आणि तेहतीस वर्षे यरुशलेममध्ये राज्य केले. 28 तो वयोवृद्ध
होऊन मरण पावला, त्याने दीर्घायुष्य घालविले, संपत्ती आणि मान
मिळविला. त्याच्या जागी त्याचा पुत्र शलोमोन राज्य करू लागला.
29 दावीद राजाच्या कारकिर्दीतील घटना, सुरुवातीपासून शेवटपर्यंत
द्रष्टा शमुवेल, संदेष्टा नाथान आणि द्रष्टा गाद यांच्या ग्रंथात लिहिल्या
आहेत. 30 त्याच्या राज्याचा सर्व वृत्तांत, त्याचे सामर्थ्य, त्याच्यावर
आणि इस्राएलावर आणि इतर शेजारील राष्ट्रांच्या राजांवर जे बरे वाईट
प्रसंग आले, ते सर्व या ग्रंथात नमूद केले आहेत.

# 2 इतिहास

1 दावीद राजाचा पुत्र शलोमोनाने स्वतःस इस्राएलच्या राज्यावर
भक्कमपणे स्थापित केले, कारण याहवेह त्याच्या परमेश्वराने
त्याला अत्यंत महान बनविले होते. 2 मग शलोमोन संपूर्ण
इस्राएलास म्हणाला—फौजेचे सहस्त्राधिपती व शताधिपती, न्यायाधीश,
इस्राएलातील सर्व पुढारी, कुटुंबप्रमुख— 3 शलोमोन व संपूर्ण सभा
गिबोनच्या उच्चस्थानी गेले, कारण याहवेहचा सेवक मोशेने अरण्यवासात
परमेश्वराचा सभामंडप उभारला होता. 4 दावीदाने किर्याथ-यआरीमहून
परमेश्वराचा कोश आणला, कारण त्याने त्याकरिता यरुशलेम येथे एक
मंडप उभारला होता. 5 परंतु हूरचा पुत्र, उरीचा पुत्र बसालेलाने गिबोनात
कास्याच्या धातूची वेदी याहवेहच्या कोशासमोर बनविली होती; आता
शलोमोन व सर्व लोक त्यांची इच्छा जाणून घेण्यास आले. 6 शलोमोन
याहवेहच्या समक्षतेत सभामंडपात गेला व त्याने कास्याच्या वेदीवर
एक हजार होमबली अर्पिले. 7 त्या रात्री परमेश्वर शलोमोनला दर्शन
देऊन म्हणाले, "मी तुला जे काही द्यावे असे तुला वाटते ते माग." 8
शलोमोनाने परमेश्वराला उत्तर दिले, "आपला सेवक माझे पिता दावीद
याला आपण अपार दया दाखविली आणि त्यांच्या जागी तुम्ही मला
राजा म्हणून नेमले. 9 आता याहवेह परमेश्वरा, माझे पिता दावीदाला
दिलेली वचने पूर्ण होऊ द्यावी, जमिनीवरील धूलिकणांप्रमाणे असंख्य
लोक असलेल्या राष्ट्राचा तुम्ही मला राजा बनविले. 10 या लोकांना
मार्गदर्शन करण्यास मला सुज्ञता व ज्ञान द्या, कारण आपल्या या मोठ्या
प्रजेवर कोण राज्य करू शकणार?" 11 तेव्हा परमेश्वर शलोमोनाला
म्हणाले, "जर हीच तुझ्या मनातील इच्छा आहे व तू धनदौलत, संपत्ती
किंवा मान सन्मान मागितला नाहीस. मी तुझ्या शत्रूंना मृत्यू द्यावा
अथवा स्वतःसाठी मोठे आयुष्यमान ही मागणी देखील केली नाहीस,
तर ज्या माझ्या लोकांवर मी तुला राजा बनविले त्यांच्यावर नीट शासन
करता यावे म्हणून तू सुज्ञता व ज्ञान मागितलेस, 12 तुला सुज्ञता
व ज्ञान देण्यात येईल. याशिवाय मी तुला इतकी धन, संपत्ती आणि
सन्मान देईन की, आतापर्यंत कोणत्याही राजाला कधीही प्राप्त झाले
नव्हते व कोणालाही होणार नाही." 13 नंतर शलोमोन गिबोनाच्या उच्च
स्थानावरील सभामंडपावरून निघून यरुशलेमास गेला आणि इस्राएलावर
राज्य करू लागला. 14 शलोमोनजवळ रथ व घोडे यांचा साठा झाला;
त्याच्याकडे चौदाशे रथ आणि बारा हजार घोडे, जे त्याने रथांच्या शहरात
व काही यरुशलेमात राजाकडे ठेवली होती. 15 राजाने यरुशलेमात
चांदी व सोने धोंड्याप्रमाणे व गंधसरू डोंगर तळवटीतील उंबराच्या
झाडांप्रमाणे सर्वसाधारण असे केले. 16 शलोमोनच्या घोड्यांची आयात
इजिप्त आणि कवे वरून होत असे; त्यावेळेच्या दरानुसार किंमत लावून
राजाचे व्यापारी ते कवेवरून विकत घेत असे. 17 त्यांनी सहाशे शेकेल
चांदी देऊन इजिप्तवरून रथ आयात करून आणले व एकेका घोड्याची
किंमत एकशे पन्नास शेकेल चांदी इतकी होती. हिथी व अरामी राजांना
सुद्धा ते निर्यात करीत असे.

2 शलोमोनाने याहवेहच्या नामाने मंदिर व स्वतःसाठी राजवाडा
बांधण्याची आज्ञा दिली. 2 या कामासाठी शलोमोनाने 70,000
मजूर, 80,000 पाथरवट व त्यांच्यावर देखरेखीसाठी 3,600 मुकादम
यांची भरती केली. 3 शलोमोनाने सोरचा राजा हीराम याच्याकडे हा
निरोप पाठविला: "माझे पिता दावीद यांना महाल बांधण्यासाठी पाठविले
त्याप्रमाणे मलाही गंधसरूचे लाकूड पाठवावे. 4 आता मी याहवेह माझे
परमेश्वराच्या नामाने मंदिर बांधण्याचे आणि ते त्यांना समर्पित करण्याचे
ठरविले आहे. त्यांच्या पुढे सुगंधी धूप जाळण्याचे, समर्पित भाकर तिथे
नित्यनेमाने ठेवण्याचे आणि प्रतिदिनी सकाळ व सायंकाळी, तसेच
शब्बाथ, चंद्रदर्शन उत्सव व याहवेह आमच्या परमेश्वरास होमार्पणे
सादर करण्याचे योजले आहे. कारण हे सर्वकाळासाठी इस्राएलास
नेमलेले नियम आहेत. 5 "मी जे मंदिर बांधणार आहे ते फारच भव्य
होईल, कारण आमचे परमेश्वर सर्व दैवतांपेक्षा महान आहेत. 6 परंतु
ज्यांना स्वर्ग, अगदी सर्वोच्च स्वर्ग सुद्धा अपुरा आहे, त्यांच्यासाठी मंदिर
बांधण्यास कोण समर्थ आहे? तर मग मंदिर बांधणारा मी कोण?
केवळ त्यांच्या पुढे अर्पणे करण्यासाठी स्थान मी बांधत आहे. 7
"म्हणून या कामासाठी सोने, चांदी, कास्य व लोखंड या कामात एक
कुशल व हुशार कारागीर, जांभळया, किरमिजी व निळया रंगांचे कापड
विणण्यात आणि उत्तम नक्षीचे कोरीव काम करण्यात तरबेज कारागीर
माझ्याकडे पाठवा. माझ्याजवळ यहूदीयात व यरुशलेममध्ये, माझे
पिता दावीदाने निवडलेले जे निपुण कारागीर आहेत, त्यांच्याबरोबर तो
काम करेल. 8 "याशिवाय लबानोनच्या जंगलातून गंधसरू, देवदारू व
रक्तचंदन यांची लाकडे माझ्याकडे पाठवा. लाकडे कापून पाठविण्याच्या
कामी तुमचे लोक निष्णात आहेत हे मी जाणतो. माझे कारागीर
तुमच्या कारागिरांसह काम करतील. 9 जे मंदिर मी बांधणार आहे ते
अत्यंत विशाल व भव्य असेल, म्हणून लाकडाचा फारच मोठा साठा
लागेल. 10 तुमच्या लाकूड तोडणाऱ्या सेवकांना मी वीस हजार कोर
झोडलेला गहू, वीस हजार कोर जव, द्राक्षारसाचे वीस हजार बथ व
वीस हजार जैतुनाच्या तेलाचे बथ देईन." 11 सोरचा राजा हीरामाने
शलोमोन राजाच्या पत्रास असे उत्तर पाठविले: "कारण याहवेह आपल्या
लोकांवर प्रेम करतात, त्यामुळेच त्यांनी तुम्हाला त्यांचा राजा केले
आहे." 12 हीराम पुढे हे देखील म्हणाला, "इस्राएलचे परमेश्वर याहवेह
धन्यवादित असो, ज्यांनी स्वर्ग आणि पृथ्वी उत्पन्न केली! त्यांनी दावीद
राजाला तुमच्यासारखा सुज्ञ, बुद्धिमान व समजूतदार पुत्र दिला, जो
याहवेहचे मंदिर व स्वतःसाठी राजवाडा बांधेल. 13 "माझ्याकडे असलेला
अत्यंत निष्णात असा हुराम-आबी हा कारागीर मी तुमच्याकडे पाठवित
आहे. 14 त्याची आई दान येथील एक इस्राएली स्त्री असून त्याचा
पिता सोरचा आहे. सोन्याचांदीच्या कामाची तसेच कास्य व लोखंडी,
दगडकाम, सुतारकी, जांभळा, निळा व किरमिजी रंगाच्या सुताचे व
तलम कापडाच्या विणकामाची त्याला संपूर्ण माहिती आहे. तो उत्तम
कोरीव काम जाणणारा असून त्याला देण्यात येणाऱ्या कोणत्याही
प्रकारचे नमुने तयार करण्यात निपुण आहे. तो तुमच्याकडील कामगार

आणत असे तुमचे पिता व माझा प्रभू दावीद राजे यांनी नेमणूक केलेल्या
तुमच्या कारागिरांबरोबर काम करेल. 15 “आता माझ्या स्वामींनी कबूल
केलेले गहू, जव, द्राक्षारस व जैतुनाचे तेल पाठवून द्या. 16 आम्ही
लबानोन डोंगरावरील सर्व लाकडे कापून ते ओंडके जलमार्गाने याफोला
पाठवू, तिथून ते तुम्ही यरुशलेममध्ये घेऊ शकाल.” 17 शलोमोनाने,
त्याचा पिता दावीदाने केल्यानंतर, इस्राएल देशातील सर्व परदेशी
लोकांची मोजणी केली; मोजणीत 1,53,600 परदेशी लोक आढळले.
18 त्यातून त्याने 70,000 कष्टकरी मजूर, डोंगरात 80,000 पाथरवट
व यांच्यावर देखरेख करण्यास 3,600 मुकादम यांची नियुक्ती केली.

**3** मग शलोमोनाने यरुशलेमच्या मोरिया डोंगरावर याहवेहच्या मंदिराचे
बांधकाम सुरू केले. याच ठिकाणी याहवेहने शलोमोनचे पिता
दावीदाला दर्शन दिले होते. ही आर्णोन यबूसी याच्या खळ्याची जागा
होती. मंदिरासाठी दावीदाने ही जागा पुरविली होती. 2 शलोमोन राजाने
आपल्या कारकिर्दीच्या चौथ्या वर्षात, दुसऱ्या महिन्याच्या दुसऱ्या
दिवशी बांधकामास सुरुवात केली. 3 परमेश्वराचे मंदिर बांधण्यासाठी
शलोमोनाने पाया घातला, त्याची लांबी साठ हात आणि रुंदी वीस हात
होती. 4 मंदिरापुढील द्वारमंडपाची लांबी मंदिराच्या रुंदीएवढीच म्हणजेच
वीस हात व उंचीही वीस हात होती. त्याच्या आतील भाग शुद्ध सोन्याने
मढविलेला होता. 5 मंदिराचा दिवाणखाना त्याने देवदारू लाकडाची
तक्तपोशी करून ती सोन्याने मढविली व तिच्यावर खजुरीचे वृक्ष व
साखळ्यांची नक्षीचे कोरीव काम केले होते. 6 मंदिर मोलवान रत्नांनी
सजविले होते. परवाईम नामक ठिकाणी मिळणारे सोने वापरण्यात
आले होते. 7 त्याने मंदिराच्या छताचे वासे, दारांच्या चौकटी, भिंती
आणि मंदिराचे दरवाजे सोन्याने मढविले, भिंतींवर करुबाची आकृती
कोरली. 8 त्याने परमपवित्रस्थान बांधले, त्याची लांबी मंदिराच्या
रुंदीएवढी, वीस हात लांब आणि वीस हात रुंद होती. त्याच्या आतील
भाग सहाशे तालांत शुद्ध सोन्याने मढविला. 9 त्यात पन्नास शेकेल
वजनाचे सोन्याचे खिळे वापरण्यात आले होते. वरचा भाग सुद्धा सोन्याने
मढविला होता. 10 मग मंदिराच्या परमपवित्रस्थानात शलोमोनाने दोन
कोरलेले करूब बसविले व त्यांनाही सोन्याने मढविले. 11 करुबांच्या
पंखांची एकूण लांबी वीस हात होती. पहिल्या करुबाचा एक पंख पाच
हात लांब होता आणि तो मंदिराच्या भिंतीला लागून होता, तर त्याचा
दुसरा पंख सुद्धा पाच हात लांब असून दुसऱ्या करुबाच्या पंखाला लागून
होता. 12 त्याचप्रमाणे दुसऱ्या करुबांचा एक पंख पाच हात लांब आणि
मंदिराच्या दुसऱ्या भिंतीला लागून होता आणि त्याचा दुसरा पंख सुद्धा
पाच हात लांब आणि पहिल्या करुबाच्या पंखाला लागून होता. 13 या
करुबांचे पंख वीस हात पसरलेले होते. मुख्य दिवानखाण्याकडे तोंड
करून ते त्यांच्या पायांवर उभे होते. 14 त्याने करुबांच्या आकाराची
कशिदा केलेले निळ्या, जांभळ्या व किरमिजी धाग्यांचे आणि तागाच्या
कापडाचे पडदे तयार केले. 15 मंदिराच्या समोरील भागासाठी त्याने दोन
आधारस्तंभ तयार केले जे एकत्र मिळून पस्तीस हात लांब होते, प्रत्येक
स्तंभावर पाच हात उंचीचा कळस होता. 16 त्याने एकमेकात गुंफून
विणलेल्या साखळया बनविल्या आणि त्या आधारस्तंभाच्या टोकांवर
ठेवल्या. त्याने शंभर डाळिंबेसुद्धा तयार केली आणि त्यांना साखळयांना
लागून जोडले. 17 त्याने मंदिराच्या समोर आधारस्तंभ बांधले, एक
दक्षिणेकडे आणि एक उत्तरेकडे असे ते उभारले. दक्षिणेकडील खांबाला
त्याने याखीन असे नाव दिले आणि उत्तरेकडील खांबाला बवाज असे
नाव दिले.

**4** त्याने वीस हात लांब आणि वीस हात रुंद आणि दहा हात उंच
अशी कास्याची एक वेदी तयार केली. 2 त्याने ओतीव धातूचा हौद
तयार केला, तो गोलाकार असून त्याचा व्यास एका काठापासून दुसऱ्या
काठापर्यंत दहा हात होता व पाच हात उंच होता. त्याचे सभोवार माप
घेण्यास तीस हात दोरी लागत असे. 3 त्याच्या काठाखाली सभोवार
एकेका हाताच्या अंतरावर बैलाच्या आकृती होत्या. हे बैल हौदाबरोबरच
एकांगी अशा दोन रांगेत ओतीव केल्या होत्या. 4 हा हौद बारा बैलांवर
उभा होता, तीन बैल उत्तरेकडे, तीन पश्चिमेकडे, तीन दक्षिणेकडे आणि
तीन पूर्वेकडे तोंड करून होते आणि त्यांच्यावर हौद विसावला होता
आणि त्यांचे मागचे अंग आतील बाजूस होते. 5 त्याची जाडी चार बोटे
होती आणि पेल्याचा घेर कमळाच्या पाकळ्यांप्रमाणे बाहेरच्या बाजूला
वळलेला होता. त्यामध्ये तीन हजार बथ पाणी मावत असे. 6 होमबलींची
अर्पणे धुण्यासाठी त्याने दहा गंगाळे तयार करून टाकीच्या उजवीकडे
पाच व डावीकडे पाच अशी ठेवली. फक्त याजकवर्गाला धुण्यासाठी
हौदाचे पाणी वापरता येत असे. 7 दिलेल्या वर्णनाप्रमाणे त्याने सोन्याच्या
दहा समया तयार केल्या आणि त्या मंदिरामध्ये पाच दक्षिण बाजूच्या
भागावर आणि पाच उत्तर बाजूच्या भागावर ठेवल्या. 8 त्याने दहा
मेज तयार केले आणि ते मंदिरात ठेवले, पाच दक्षिणेकडे आणि पाच
उत्तरेकडे. पाणी शिंपडणारे सोन्याचे शंभर कटोरे सुद्धा तयार केले. 9
नंतर त्याने याजकांसाठी एक अंगण व जनतेसाठी एक मोठे अंगण
तयार केले व त्यांचे दरवाजे कास्य धातूने मढविले. 10 त्याने पाण्याचा
हौद दक्षिण बाजूला, दक्षिणपूर्व दिशेच्या कोपऱ्यावर ठेवला. 11 आणि
हुरामने मडके आणि फावडे आणि शिंपडण्याचे भांडेही बनविले. हुरामने
परमेश्वराच्या मंदिरात शलोमोन राजासाठी हाती घेतलेले सर्व काम पूर्ण
केले: 12 दोन खांब; खांबांच्या वर दोन वाटीच्या आकाराचे कळस;
खांबांवर वाटीच्या आकाराच्या दोन कळसांना सजविणाऱ्या जाळयांचे
दोन संच; 13 त्या जाळयांच्या दोन संचासाठी चारशे डाळिंबे (खांबावरील
वाट्यांच्या आकाराचे कळस सजविणाऱ्या एका जाळीसाठी डाळिंबांच्या
दोन रांगा); 14 तिवड्या व त्यांची गंगाळे; 15 हौद आणि त्याखालील
बारा बैल; 16 भांडी, फावडे, मांस पकडण्याचे काटे, इत्यादी सर्व वस्तू.
शलोमोन राजासाठी हुराम-अबीने याहवेहच्या मंदिरातील बनविलेल्या
या सर्व वस्तू उजळ कास्याच्या होत्या. 17 राजाने त्या वस्तू सुक्कोथ
आणि सारेथान प्रदेशामध्ये यार्देनेच्या पठारावर मातीच्या साच्यात
घडवून घेतल्या होत्या. 18 या सर्व वस्तू शलोमोनाने इतक्या बनविल्या
होत्या की, कास्याचे वजन करणे शक्य नव्हते. 19 परमेश्वराच्या
मंदिरामध्ये असलेली उपकरणेसुद्धा शलोमोनाने तयार करून घेतली

होती: सोन्याची वेदी; मेज, ज्यांच्यावर समक्षतेची भाकर ठेवली होती;
20 नेमून दिल्याप्रमाणे आतील पवित्रस्थानासमोर जाळण्यासाठी शुद्ध
सोन्याचे दीपस्तंभ व त्यांचे दिवे; 21 सोन्याच्या फुलांची सजावट
आणि दिवे आणि चिमटे (ते शुद्ध सोन्याचे होते); 22 दिव्याच्या वाती
कापण्याची शुद्ध सोन्याची कात्री, शिंपडण्याचे कटोरे, पात्रे व धूपदाण्या;
मंदिराचा सोन्याचा प्रवेशभाग: मुख्य द्वार, परमपवित्रस्थानाची आतील
दारेसुध्दा सोन्याची होती.

5 याहवेहच्या मंदिराचे सर्व काम शलोमोन राजाने पूर्ण केल्यानंतर,
त्याने त्याचा पिता दावीदाने समर्पित केलेल्या वस्तू मंदिरात
आणल्या; चांदी, सोने आणि इतर सामान—शलोमोनाने त्या वस्तू
परमेश्वराच्या मंदिराच्या भांडाऱ्यात ठेवल्या. 2 तेव्हा शलोमोनाने दावीदाचे
नगर सीयोन येथून याहवेहच्या कराराचा कोश आणण्यासाठी इस्राएल
लोकांच्या पुढाऱ्यांना, सर्व गोत्रप्रमुखांना आणि इस्राएली कुटुंबाच्या
सर्व प्रमुखांना यरुशलेमास बोलाविले. 3 आणि इस्राएलचे सर्व लोक
सातव्या महिन्यातील सणाच्या काळात राजाकडे एकत्र आले. 4 जेव्हा
इस्राएलचे सर्व वडीलजन आले तेव्हा लेवी लोकांनी कोश उचलून घेतला,
5 आणि त्यांनी कोश, सभामंडप व त्यातील सर्व पवित्र पात्रे आणली.
याजकीय लेवींनी ती वाहून आणली, 6 राजा शलोमोन आणि जमलेली
इस्राएलची संपूर्ण मंडळी कोशासमोर इतक्या मेंढरांचे आणि गुरांचे बळी
देत होते की, त्यांची नोंद किंवा मोजणी करता येत नव्हती. 7 नंतर
याजकांनी याहवेहच्या कराराचा कोश मंदिराच्या आतील पवित्रस्थानी;
म्हणजेच परमपवित्रस्थानात आणून त्याच्या निर्धारित ठिकाणी, अर्थात्
करुबांच्या पंखाखाली ठेवला. 8 करुबांचे पंख कोशावर असे पसरले
होते की त्यांनी कोश आणि तो वाहून नेण्याचे दांडे झाकले जात होते. 9
ते दांडे इतके लांब होते की, त्यांची कोशालगत असलेली टोके आतील
खोलीसमोरील पवित्रस्थानातून दिसत असे, परंतु पवित्रस्थानाच्या
बाहेरून ते दिसत नसे; आणि ते आजही तिथेच आहेत. 10 इस्राएली
लोक इजिप्त देशातून बाहेर आल्यानंतर याहवेहने त्यांच्याशी करार केला
तेव्हा होरेबमध्ये मोशेने ठेवलेल्या दोन पाट्यांशिवाय त्या कोशात दुसरे
काहीही नव्हते. 11 त्यानंतर याजक पवित्रस्थानापासून मागे निघाले.
तिथे असलेल्या सर्व याजकांनी त्यांच्या वर्गाकडे लक्ष न देता स्वतःस
पवित्र करून घेतले होते. 12 सर्व लेवीय जे संगीतकार होते—आसाफ,
हेमान, यदूथून आणि त्यांचे पुत्र आणि नातेवाईक—वेदीच्या पूर्व
बाजूला उत्तम तागाची वस्त्रे घातलेले आणि झांजा, सारंग्या आणि
वीणा वाजवित एकशेवीस याजक उभे राहिले. 13 रणशिंग वाजविणारे
आणि संगीतकार याहवेहस्तव एकसुरात स्तुतिगान आणि आभारप्रदर्शन
करण्यासाठी सहभागी झाले. कर्णे, झांजा आणि इतर वाद्यांसहित
गायकांनी याहवेहची स्तुती करण्यासाठी त्यांचा आवाज उंचाविला व ते
गाईले: "ते चांगले आहेत; त्यांचे प्रेम सर्वकाळ टिकते." तेव्हा याहवेहचे
मंदिर मेघांनी भरून गेले, 14 आणि त्या मेघांमुळे याजकांना सेवा करता
येईना, कारण याहवेहच्या तेजाने परमेश्वराचे मंदिर भरले होते.

6 तेव्हा शलोमोन म्हणाला, "याहवेहने म्हटले आहे की ते घनदाट
मेघात राहतील; 2 मी आपणासाठी एक भव्य मंदिर बांधले आहे,
की आपण त्यात सर्वकाळ वस्ती करावी." 3 इस्राएलची सर्व मंडळी
तिथे उभी असताना राजाने मागे वळून त्यांना आशीर्वाद दिला. 4
मग राजा म्हणाला: "याहवेह इस्राएलचे परमेश्वर धन्यवादित असोत,
कारण त्यांनी माझे वडील दावीदाला आपल्या मुखाने दिलेले वचन आज
स्वहस्ते पूर्ण केले आहे. कारण याहवेहने म्हटले होते की, 5 'मी माझ्या
लोकांना इजिप्तमधून बाहेर आणले, त्या दिवसापासून इस्राएलातील
कोणत्याही गोत्राचे शहर माझ्या नावाने मंदिर तिथे बांधावे म्हणून मी
निवडले नाही, ज्यामुळे माझे नाव तिथे असावे किंवा माझ्या इस्राएली
लोकांवर राज्य करण्यासाठी मी कोणालाही राज्यकर्ता म्हणून निवडले
नाही. 6 परंतु आता येथे माझे नाव असावे म्हणून मी यरुशलेमला
निवडले आहे आणि माझ्या इस्राएल लोकांवर राज्य करण्यासाठी मी
दावीदाची निवड केली आहे.' 7 "याहवेह इस्राएलच्या परमेश्वराच्या
नावासाठी मंदिर बांधावे असे माझे वडील दावीद यांच्या मनात होते. 8
पण याहवेहने माझे पिता दावीदाला म्हटले, 'माझ्या नावासाठी मंदिर
बांधावे अशी आपल्या हृदयात इच्छा बाळगून तू फार चांगले केले. 9
तथापि, तू ते मंदिर बांधणार नाहीस, तर तुझा पुत्र, तुझ्या स्वतःच्या
हाडामांसाचा; तोच माझ्या नावासाठी मंदिर बांधील.' 10 "याहवेहने
दिलेले वचन पूर्ण केले आहे: माझे वडील दावीदाचा मी वारस झालो
आणि याहवेहने अभिवचन दिल्याप्रमाणे आता इस्राएलच्या राजासनावर
मी बसतो आणि याहवेह इस्राएलचे परमेश्वर यांच्यासाठी मी हे मंदिर
बांधले आहे. 11 तिथे कोशासाठी मी एक स्थान तयार केले आहे,
ज्यात इस्राएली लोकांबरोबर याहवेहने केलेला करार आहे." 12 नंतर
इस्राएलच्या सर्व मंडळीदेखत शलोमोन याहवेहच्या वेदीसमोर उभा
राहिला, आणि त्याने आपले हात पसरले 13 शलोमोनाने आता पाच
हात लांब आणि पाच हात रुंद आणि तीन हात उंच असा एक कास्याचा
मंच तयार केला होता आणि तो बाहेरील अंगणाच्या मध्यभागी ठेवण्यात
आलेला होता. तो त्या मंचावर उभा राहिला आणि त्याने इस्राएलच्या
सर्व मंडळीदेखत गुडघे टेकले आणि स्वर्गाकडे आपले हात पसरले. 14
तो म्हणाला: "याहवेह, इस्राएलच्या परमेश्वरा, स्वर्गात किंवा पृथ्वीवर
तुमच्यासारखा परमेश्वर नाही; जे आपले सेवक सर्व हृदयाने आपल्या
मार्गात चालतात त्यांच्याशी आपण आपल्या प्रीतीच्या कराराची पूर्तता
करतात. 15 आपला सेवक, माझे पिता दावीदाला दिलेले अभिवचन
आपण पाळले आहे; आपण आपल्या मुखाने अभिवचन दिले आणि
स्वहस्ते ते आज पूर्ण केले आहे. 16 "आता हे याहवेह, इस्राएलच्या
परमेश्वरा, आपला सेवक माझे पिता दावीदाला आपण जे वचन दिले
होते ते पाळावे. आपण म्हटले होते, 'जसा तू होतास तसेच तुझे वंशज
माझ्यासमोर माझ्या नियमानुसार चालण्यास सावधान राहतील, तर
इस्राएलच्या राजासनावर बसण्यास तुझे वारस कधीही कमी पडणार
नाही.' 17 तर आता, याहवेह हे इस्राएलच्या परमेश्वरा, आपला सेवक,
माझे पिता दावीदाला जे अभिवचन आपण दिले होते ते प्रतितीस येऊ

द्यावे. 18 “पण परमेश्वर खचितच मानवजातीबरोबर पृथ्वीवर राहतील
काय? स्वर्ग, अगदी सर्वोच्च स्वर्गात सुद्धा आपण मावणार नाहीत! मग
हे जे मंदिर मी बांधले आहे त्यात आपण कसे मावाल? 19 तरीही हे
याहवेह, माझ्या परमेश्वरा, आपल्या सेवकाच्या प्रार्थनेकडे व त्याच्या
दयेच्या याचनेकडे लक्ष द्यावे. आपला सेवक आपल्याकडे प्रार्थना व
धावा करीत आहे त्याकडे कान द्या. 20 आपण आपले नाव देणार असे
ज्या स्थळाविषयी आपण म्हटले होते, त्या या मंदिराकडे दिवस व
रात्र आपली दृष्टी असो; यासाठी की या ठिकाणातून करत असलेली
तुमच्या सेवकाची प्रार्थना आपण ऐकावी. 21 आपला सेवक व आपले
इस्राएली लोक जेव्हा या ठिकाणातून विनंत्या करतील, तेव्हा त्यांच्या
प्रार्थना ऐका. स्वर्गातून, आपल्या निवासस्थानातून कान द्या व ती ऐकून
त्यांना क्षमा करा. 22 “जेव्हा कोणी आपल्या शेजाऱ्याचा अपराध
करेल व त्यांना शपथ घ्यावी लागली आणि ते आपल्या वेदीसमोर या
मंदिरात शपथ घेतील, 23 तेव्हा स्वर्गातून ऐकून त्याप्रमाणे घडू द्या.
आपल्या सेवकांचा न्याय करून दोषी व्यक्तीने केलेल्या कृत्यांनुसार
त्यांचे शिर खाली झुकवा व निर्दोष्यास त्यांच्या निर्दोषतेनुसार वागणूक
देऊन त्यांना न्याय द्यावा. 24 “तुमच्याविरुद्ध पाप केल्यामुळे जेव्हा
तुमचे इस्राएली लोक त्यांच्या शत्रूद्वारे पराभूत केले जातील आणि जेव्हा
ते तुमच्याकडे पुन्हा वळतील व आपल्या नावाची थोरवी गाऊन या
मंदिरात तुमच्यापुढे प्रार्थना व विनंती करतील, 25 तेव्हा स्वर्गातून ऐकून
तुमच्या इस्राएली लोकांच्या पापांची क्षमा करा व जो देश तुम्ही त्यांना व
त्यांच्या पूर्वजांना दिला त्यात त्यांना परत आणावे. 26 “तुमच्या लोकांनी
तुमच्याविरुद्ध केलेल्या पापामुळे जेव्हा आकाश बंद होऊन पाऊस
पडणार नाही, आणि जेव्हा ते या ठिकाणातून प्रार्थना करतील, आणि
तुमच्या नावाची थोरवी गातील आणि आपण त्यांच्यावर आणलेल्या
क्लेशामुळे ते आपल्या पापापासून वळतील, 27 तेव्हा त्यांची विनंती
ऐकून तुमचे सेवक, इस्राएली लोकांच्या पापांची क्षमा करा. जीवनाचा
योग्य मार्ग त्यांना शिकवा, व जो देश तुम्ही तुमच्या लोकांना वतन
म्हणून दिला त्यावर पाऊस पाठवावा. 28 “जेव्हा देशावर दुष्काळ,
किंवा पीडा येते, किंवा पिके करपवून टाकणारा वारा किंवा भेरड,
टोळ किंवा नाकतोडे आले किंवा शत्रूंनी त्यांच्या एखाद्या शहराला वेढा
घातला, असे कोणतेही अरिष्ट किंवा रोग आला, 29 आणि तुमच्या
इस्राएली लोकांपैकी कोणी त्यांच्या हृदयाला होत असलेले क्लेश आणि
वेदना जाणून प्रार्थना किंवा विनंती करतील आणि त्यांचे हात मंदिराकडे
पसरतील; 30 तेव्हा स्वर्ग जे तुमचे निवासस्थान आहे तिथून ऐकून त्यांना
क्षमा करा व त्यानुसार घडवून आणा; प्रत्येकाच्या सर्व कृत्यांनुसार
त्यांच्याशी वागा, कारण तुम्हाला त्यांच्या हृदयाची पारख आहे (कारण
केवळ तुम्हीच मानवाचे हृदय जाणणारे आहात), 31 यासाठी की जो
देश तुम्ही आमच्या पूर्वजांना दिला त्यात जितका काळ ते राहतील,
त्यांनी तुमचे भय बाळगावे व तुमच्या आज्ञेत राहावे. 32 “असा कोणी
परदेशी, जो आपल्या इस्राएली लोकांमधील नाही, परंतु तुमचे महान
नाव आणि तुमची पराक्रमी भुजा आणि तुमचा लांबवलेला बाहू यामुळे
तिथे दूरवरील देशातून आले व त्यांनी मंदिराकडे वळून प्रार्थना केली, 33
तेव्हा स्वर्ग जे तुमचे निवासस्थान आहे, तिथून तुम्ही त्यांची प्रार्थना
ऐकावी. त्या परदेशीयाने जे काही तुमच्याकडे मागितले ते आपण
त्यांना द्यावे, अशासाठी की पृथ्वीवरील लोकांनी तुमचे नाव ओळखावे
व तुमच्या इस्राएली लोकांप्रमाणे तुमचे भय धरावे, व जाणावे की मी
बांधलेल्या या घरावर तुमचे नाव आहे. 34 “जेव्हा तुमचे लोक तुम्ही
जिथे पाठवाल तिथे त्यांच्या शत्रूविरुद्ध युद्धास जातात आणि जेव्हा ते
तुम्ही निवडलेल्या नगराकडे आणि तुमच्या नावासाठी मी बांधलेल्या
मंदिराकडे तुमची प्रार्थना करतात, 35 तेव्हा स्वर्गातून त्यांची प्रार्थना व
विनंती ऐकून त्यांच्यावतीने न्याय करावा. 36 “जेव्हा ते तुमच्याविरुद्ध
पाप करतील; कारण पाप करीत नाही असा कोणीही मनुष्य नाही आणि
त्यामुळे रागावून तुम्ही त्यांना त्यांच्या शत्रूच्या हाती दिले, आणि त्यांनी
त्यांना गुलाम म्हणून जवळच्या किंवा दूरच्या देशात कैद करून नेले;
37 आणि ते कैदेत असता त्यांच्या हृदयाचा पालट झाला व पश्चात्ताप
करीत कैद करून नेलेल्या देशात तुमच्याकडे असे म्हणत विनंती केली,
‘आम्ही पाप केले आहे, आम्ही विपरीत वागलो आहोत आणि आम्ही
दुष्टतेने वागलो आहोत,’ 38 आणि त्यांना कैद करून नेलेल्या देशात ते
जर त्यांच्या संपूर्ण हृदयाने व जिवाने तुमच्याकडे वळले आणि त्यांच्या
पूर्वजांना दिलेल्या देशाकडे, जे शहर तुम्ही निवडले आणि मी तुमच्या
नावासाठी बांधलेल्या या मंदिराकडे वळून प्रार्थना करतील, 39 तेव्हा
स्वर्ग जे तुमचे निवासस्थान आहे तिथून त्यांची प्रार्थना व विनंत्या ऐकून
त्यांच्यावतीने न्याय करावा. आणि ज्या तुमच्या लोकांनी तुमच्याविरुद्ध
पाप केले आहे त्यांना क्षमा करा. 40 “माझ्या परमेश्वरा, आता तुमचे
डोळे उघडे असावेत आणि तुमचे कान या ठिकाणी केल्या जाणाऱ्या
प्रार्थनांकडे लागावे. 41 “याहवेह परमेश्वरा उठा आणि तुम्ही तुमच्या
सामर्थ्याच्या कोशासह, 42 हे याहवेह परमेश्वरा, तुमच्या अभिषिक्ताचा
अव्हेर करू नका.

**7** शलोमोनाने जेव्हा प्रार्थना करण्याचे संपविले, तेव्हा आकाशातून
अग्नी खाली आला आणि त्याने होमार्पणे आणि बलिदाने भस्मसात
करून टाकली आणि याहवेहच्या गौरवाने मंदिर भरून गेले. 2 याजकगण
याहवेहच्या मंदिरात प्रवेश करू शकले नाहीत, कारण याहवेहच्या
गौरवाने ते मंदिर भरून गेले होते. 3 जेव्हा सर्व इस्राएली लोकांनी पाहिले
की, अग्नी खाली उतरत आहे आणि याहवेहचे गौरव मंदिराच्या वर
आहे तेव्हा त्यांनी पदपथावर गुडघे टेकून त्यांची मुखे जमिनीकडे केली
आणि आराधना केली आणि याहवेहना असे म्हणत धन्यवाद दिला, “ते
चांगले आहेत; त्यांची प्रीती सर्वकाळ टिकते.” 4 नंतर राजा आणि
सर्व लोकांनी याहवेहसमोर होमार्पणे केली. 5 शलोमोन राजाने बावीस
हजार गुरे, एक लाख वीस हजार मेंढरे व बोकडे अर्पण केली. याप्रकारे
राजाने व सर्व लोकांनी परमेश्वराच्या मंदिराची प्रतिष्ठापना केली. 6
याजकांनी आपआपले स्थान ग्रहण केले, दावीद राजाने याहवेहची स्तुती
करण्यासाठी व “त्यांची प्रीती सर्वकाळ टिकून राहते” असे म्हणत
आभार मानले होते, तेव्हा जशी संगीतवाद्यांची रचना केली होती आणि

त्यांचा उपयोग केला होता, तशाच प्रकारे लेवी लोकांनीही स्थान ग्रहण
केले. लेव्यांच्या समोरच्या बाजूला याजकगण त्यांचे रणशिंग वाजवित
होते आणि सर्व इस्राएली लोक उभे होते. 7 शलोमोनाने याहवेहच्या
मंदिरापुढच्या द्वारमंडपाचा मधील भाग पवित्र केला, आणि तिथे त्याने
होमार्पणे व शांत्यर्पणाचे मांदे ही अर्पण केली, कारण जी कास्याची
वेदी त्याने बनविली होती त्यात होमार्पणे, धान्यार्पणे व मांदे मावत
नव्हते. 8 तेव्हा शलोमोन आणि सर्व इस्राएली लोकांनी त्याच्याबरोबर
सात दिवस सण साजरा केला—एक मोठी मंडळी, म्हणजे लेबो
हमाथपासून इजिप्तच्या खाडीपर्यंतचे राहिवासी आले होते. 9 आठव्या
दिवशी त्यांनी सभा भरविली, कारण त्यांनी सात दिवस वेदीवर समर्पण
आणि आणखी सात दिवस उत्सव साजरा केला होता. 10 सातव्या
महिन्याच्या तेविसाव्या दिवशी त्याने लोकांना त्यांच्या घरी रवाना केले,
याहवेहने दावीद आणि शलोमोन आणि त्यांच्या इस्राएली लोकांसाठी
जी चांगली कृत्ये केली, त्यासाठी त्यांच्या अंतःकरणात हर्ष आणि
आनंद होता. 11 शलोमोनाने याहवेहचे मंदिर आणि राजमहालाचे काम
संपविले आणि याहवेहच्या मंदिरात व आपल्या राजवाड्यात जे काही
करावे असे त्याचे मनोरथ होते ते सर्व करण्यात तो यशस्वी झाला. 12
रात्रीच्या वेळेस याहवेहने शलोमोनला दर्शन दिले आणि म्हणाले: “मी
तुझी प्रार्थना ऐकली आहे आणि मी स्वतःकरिता हे ठिकाण यज्ञांसाठी
मंदिर म्हणून निवडले आहे. 13 “जेव्हा मी पाऊस पडू नये म्हणून
आकाश बंद करेन किंवा टोळांना भूमी फस्त करण्याची आज्ञा करेन
किंवा माझ्या लोकांमध्ये महामारी पाठवेन, 14 जर माझे लोक, ज्यांना
माझ्या नावाने ओळखले जाते, ते जर स्वतःला नम्र करतील आणि
प्रार्थना करतील, माझा शोध घेतील आणि त्यांच्या वाईट मार्गांपासून
फिरतील, तेव्हा मी स्वर्गातून ऐकेन आणि त्यांच्या पापांची क्षमा करेन
आणि त्यांच्या भूमीला आरोग्य देईन. 15 आता मी माझ्या डोळयांनी
पाहीन आणि माझे कान या ठिकाणी केल्या जाणाऱ्या प्रार्थनांकडे
लागलेले असतील. 16 मी या मंदिराची निवड करून ते पवित्र केले आहे,
जेणेकरून माझे नाव सर्वकाळासाठी तिथे असेल. त्यावर माझी दृष्टी व
माझे हृदय सदा राहील. 17 “तुझ्या बाबतीत म्हणायचे तर, तू आपला
पिता दावीदाप्रमाणे माझ्यासमोर विश्वासूपणे चालशील आणि सर्वकाही
मी आज्ञापिल्याप्रमाणे करशील व माझे विधी व नियम पाळशील, 18 तर
इस्राएलवरचे तुझे राजासन मी सर्वकाळासाठी प्रस्थापित करेन, तुझा
पिता दावीदाशी करार करीत म्हटले होते, ‘इस्राएलवर राज्य करण्यास
तुझा वारस कधीही खुंटणार नाही.’ 19 “परंतु जर तुम्ही दूर वळले आणि
मी तुला दिलेले विधी आणि आज्ञा पाळल्या नाही आणि जाऊन इतर
दैवतांची सेवा करून त्यांची उपासना केली, 20 तर मी माझ्या देशातून
जो मी त्यांना दिलेला आहे, तिथून मी इस्राएली लोकांना उपटून टाकीन
आणि या मंदिराचा, जे मी माझ्या नावासाठी पवित्र केले आहे त्याचा मी
धिक्कार करेन. सर्व लोकांमध्ये मी ते थट्टा व निंदेचा विषय करेन. 21
हे मंदिर ढेकळयांचा ढिगारा होईल. त्याच्या जवळून जाणारे सर्वजण
आश्चर्यचकित होऊन म्हणतील, ‘याहवेहने या देशाचे व या मंदिराचे असे
का केले आहे?’ 22 तेव्हा लोक उत्तर देतील, ‘याहवेह, त्यांच्या पूर्वजांचे
परमेश्वर ज्यांनी त्यांना इजिप्त देशातून बाहेर आणले त्या याहवेहला
सोडून ते इतर दैवतांची उपासना व सेवा करू लागले आहेत; म्हणून
त्यांनी त्यांच्यावर हे अरिष्ट आणले आहे.’”

**8** शेवटच्या वीस वर्षात शलोमोनने याहवेहचे मंदिर आणि आपला
राजमहाल या दोन इमारतींचे बांधकाम केले. 2 शलोमोनाने त्याला
हीरामकडून मिळालेली नगरे पुन्हा बांधली आणि त्यामध्ये इस्राएली
लोकांची वस्ती केली. 3 नंतर शलोमोन हमाथ-सोबाहकडे गेला आणि
ते ताब्यात घेतले 4 त्याने तदमोर शहरसुद्धा वाळवंटात बांधले आणि
भांडारे असलेली सर्व नगरे त्याने हमाथ येथे बांधली. 5 त्याने वरचे बेथ-
होरोन आणि खालचे बेथ-होरोन ही तटबंदीची शहरे, मोठ्या भिंती आणि
प्रवेशद्वारांची धातूंचे गज बसवून पुनर्बांधणी केली, 6 त्याचप्रमाणे बालाथ
आणि शलोमोनच्या भांडारांची सर्व शहरे त्याचप्रमाणे त्याचे रथ व त्याचे
घोडे यांच्यासाठी सर्व शहरे बांधली; यरुशलेमात, लबानोनात आणि ज्या
सर्व राज्यांत त्याचे राज्य होते त्या हद्दींमध्ये त्याच्या मनास येईल ते
त्याने बांधले. 7 हिथी, अमोरी, परिज्जी, हिव्वी आणि यबूसी (हे लोक
इस्राएली नव्हते) यांच्यातील आणखी काही लोक बाकी राहिले होते. 8
या लोकांचे वंशज जे देशात उरले होते त्यांचीही शलोमोनने सक्तीने गुलाम
म्हणून भरती केली; हे ते लोक होते ज्यांना इस्राएली लोकांनी पूर्णपणे
नष्ट केले नव्हते, आजवर हे तसेच आहे. 9 परंतु इस्राएली लोकांपैकी
कोणालाही शलोमोनने आपल्या कामासाठी गुलाम म्हणून लादले नाही;
ते त्याचे योद्धे, सेनापती व त्याच्या रथांचे व रथस्वारांचे अधिकारी
होते. 10 शलोमोन राजाचे ते मुख्य अधिकारीसुद्धा होते, माणसांवर
देखरेख ठेवणारे दोनशे पन्नास अधिकारी होते. 11 शलोमोनाने फारोच्या
मुलीला दावीदाच्या नगरातून तिच्यासाठी बांधलेल्या राजवाड्यात
आणले कारण तो म्हणाला, “माझ्या पत्नीने इस्राएलचा राजा दावीदच्या
राजवाड्यात राहू नये, कारण ज्या स्थानी याहवेहच्या कोशाचा प्रवेश
झाला आहे, ते पवित्र आहे.” 12 याहवेहची जी वेदी त्याने द्वारमंडपासमोर
बांधली होती, तिथे शलोमोनाने याहवेहसाठी होमार्पणाचे बलिदान
केले, 13 शब्बाथ, अमावस्या आणि वर्षातून तीन वेळा सण यासाठी
मोशेने दिलेल्या आज्ञेप्रमाणे अर्पणे करण्यासाठी रोजच्या गरजेनुसार
शलोमोनाने त्यावर याहवेहसाठी होमार्पणाचे बलिदान केले—बेखमीर
भाकरीचा सण, आठवड्यांचा सण आणि मंडपांचा सण असे ते तीन
सण. 14 त्याचा पिता दावीदच्या आदेशानुसार, याजकांची जबाबदारी
पार पाडण्यासाठी याजक, आराधनेत नेतृत्व करण्यासाठी व याजकांना
दररोजच्या कामात मदत करण्यासाठी लेव्यांचे गट बनविले. परमेश्वराचा
मनुष्य दावीदच्या आदेशानुसार विभागून आलेल्या भागातून त्याने
वेगवेगळया फाटकांसाठी द्वार रक्षकांचीसुद्धा नेमणूक केली. 15 राजाने
याजकांना किंवा लेवीय यांना दिलेल्या कोणत्याही आज्ञेपासून तसेच
भंडाराच्या अंतर्भूत विषयामधील आज्ञेपासून ते विचलित झाले नाहीत.
16 ज्या दिवसापासून याहवेहच्या मंदिराची पायाभरणी केली गेली,
त्या दिवसापासून ते होईपर्यंत शलोमोनचे सर्व कार्य पूर्ण झाले.

याहवेहचे मंदिरही पूर्ण झाले. 17 नंतर शलोमोन एदोम या बंदरावर
असलेल्या एजिओन-गेबेर आणि एलोथ येथे गेला. 18 आणि हीरामाने
त्याला आपल्या माणसांबरोबर म्हणजेच त्याच्या अनुभवी खलाश्यांनी
चालविलेली जहाजे पाठविली. त्यांनी शलोमोनच्या माणसांबरोबर
ओफीरपर्यंत प्रवास करून चारशे पन्नास तालांत सोने परत आणले व ते
शलोमोन राजाला दिले.

**9** जेव्हा शबाच्या राणीने शलोमोनच्या किर्तीविषयी ऐकले, तेव्हा कठीण
प्रश्न करून शलोमोनची परीक्षा करावी म्हणून ती यरुशलेमास
आली. मोठा तांडा घेऊन; उंटांबरोबर सुगंधी द्रव्ये, पुष्कळ सोने आणि
मौल्यवान रत्ने घेऊन ती यरुशलेमास आली; शलोमोनकडे येऊन जे
काही तिच्या मनात होते त्याविषयी ती त्याच्याशी बोलली. 2 शलोमोनने
तिच्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली; तिला स्पष्ट करू शकणार नाही असे
काहीही त्याच्यासाठी कठीण नव्हते. 3 जेव्हा शबाच्या राणीने शलोमोनचे
ज्ञान व त्याने बांधलेला राजवाडा पाहिला, 4 त्याच्या मेजावरील भोजन,
त्याच्या अधिकाऱ्यांची आसने, सेवा करणारे सेवक व त्यांचे अंगरखे,
प्यालेदार व याहवेहच्या मंदिरात त्याने केलेली होमार्पणे हे सर्व पाहून ती
चकित झाली. 5 ती राजाला म्हणाली, “तुमचे ज्ञान व तुमची प्राप्ती
याविषयी माझ्या देशात मी जो अहवाल ऐकला तो सत्य आहे. 6
परंतु त्यांनी मला जे सांगितले त्यावर मी येथे येऊन या गोष्टी आपल्या
स्वतःच्या डोळ्यांनी पाहीपर्यंत विश्वास केला नाही. खचितच तुमचे ज्ञान
व संपत्ती याबद्दल मला जे सांगितले गेले ते अर्धे देखील नाही; त्यापेक्षा
ते कितीतरी अधिक आहे. 7 आपले लोक किती सुखी असतील! तुमचे
अधिकारी जे तुमच्यासमोर नित्याने उभे राहतात व तुमचे ज्ञान ऐकतात
ते किती सुखी असतील! 8 याहवेह तुमचे परमेश्वर धन्य असो, ज्यांना
तुमच्या ठायी संतोष वाटला व तुम्हाला याहवेह तुमचे परमेश्वरासाठी
राजा म्हणून आपल्या राजासनावर अधिकार करण्यास ठेवले. कारण
तुमच्या परमेश्वराचे इस्राएलवर असलेले प्रेम आणि त्यांना सर्वकाळ
पाठिंबा द्यावा अशी त्यांची इच्छा, यासाठी त्यांनी तुम्हाला त्यांच्यावर
राजा केले, यासाठी की न्याय आणि धार्मिकता टिकवून धरावी.” 9 नंतर
तिने राजाला एकशेवीस तालांत सोने, पुष्कळ सुगंधी द्रव्ये व मौल्यवान
रत्ने दिली. शबाच्या राणीने शलोमोन राजाला जी सुगंधी द्रव्ये आणली
त्यासारखी त्यानंतर परत कधी नव्हती. 10 (हीरामच्या सेवकांनी आणि
शलोमोनच्या सेवकांनी ओफीर येथून सोने आणले; त्यांनी चंदन आणि
मोलवान रत्ने ही सुद्धा आणली. 11 शलोमोनने याहवेहच्या मंदिरात व
राजवाड्यात पायऱ्या बनवण्यासाठी व वादकांसाठी वीणा व सतारी
बनविण्यास चंदनाच्या लाकडाचा उपयोग केला. यहूदीयामध्ये त्यासारखे
कधीही पाहण्यात आले नव्हते.) 12 शबाच्या राणीने शलोमोन राजाकडून
ज्या गोष्टींची इच्छा केली व जे काही तिने मागितले ते सर्व राजाने तिला
दिल्या, तिने त्याच्यासाठी जितके आणले होते, त्यापेक्षा जास्त त्याने
तिला दिले. मग ती तिच्या सेवकांसह आपल्या देशास परत गेली. 13
शलोमोनला मिळत जाणारे वार्षिक सोने सहाशे सहासष्ट तालांत होते,
14 व्यापारी आणि सावकार यांच्यापासून येणारा महसूलचा यात समावेश
नाही. तसेच अरब देशाचे सर्व राजे आणि शासनाच्या अंतर्गत प्रदेशाचे
राज्यपाल शलोमोनासाठी सोने आणि चांदी आणत होते. 15 शलोमोन
राजाने ठोकलेल्या सोन्याच्या दोनशे फार मोठ्या ढाली बनविल्या.
प्रत्येक ढालीस सहाशे शेकेल ठोकलेले सोने लागले होते. 16 तसेच त्याने
ठोकलेल्या सोन्याच्या तीनशे लहान ढाली केल्या. प्रत्येक ढालीस तीनशे
शेकेल सोने लागले. राजाने त्या लबानोनच्या जंगलातील राजवाड्यात
ठेवल्या. 17 नंतर राजाने हस्तिदंताने सजविलेले एक भव्य सिंहासन
तयार करून त्याला शुद्ध सोन्याचे आवरण दिले. 18 त्या सिंहासनाला
सहा पायऱ्या होत्या आणि त्याला जोडूनच पाय ठेवण्यासाठी सोन्याचे
पायदान होते. आसनाच्या दोन्ही बाजूंना हात होते आणि दोन्ही हातांच्या
बाजूंना दोन सिंह उभे केले होते. 19 प्रत्येक पायरीवर दोन याप्रमाणे
बारा सिंह केलेले होते. याप्रकारचे सिंहासन आणखी इतर राज्यांमध्ये
कुठेही नव्हते. 20 शलोमोनचे सर्व प्याले सोन्याचे होते. लबानोनच्या
वाळवंटातील राजवाड्यात असलेली सर्व पात्रे सुद्धा शुद्ध सोन्याची होती.
चांदीचे काहीही बनविले नव्हते, कारण शलोमोनच्या काळात चांदीचे
मोल कमी मानले जात असे. 21 हीरामच्या सेवकांद्वारे चालविलेल्या
गलबतांबरोबर शलोमोन राजाचाही व्यापारी गलबतांचा तांडा होता. तीन
वर्षातून एकदा ही गलबते सोने, चांदी, हस्तिदंत, वानरे आणि मोर घेऊन
परत येत असत. 22 संपत्ती व ज्ञानाने शलोमोन राजा पृथ्वीवरील सर्व
राजांपेक्षा अधिक महान होता. 23 परमेश्वराने शलोमोनच्या ठायी दिलेले
ज्ञान ऐकण्यास जगातील सर्व राजे येत असत. 24 आणि जे लोक येत
असत ते वर्षानुवर्षे चांदी व सोन्याच्या वस्तू, झगे, शस्त्रे व सुगंधी द्रव्ये व
घोडे व खेचरे भेटी म्हणून आणत असत. 25 शलोमोनाकडे घोड्यांसाठी
आणि रथांसाठी चार हजार तबेले होते आणि बारा हजार घोडे होते,
जे त्याने रथाच्या नगरांमध्ये आणि यरुशलेममध्ये राजाने स्वतःजवळ
ठेवले होते. 26 फरात नदीपासून ते पलिष्टी लोकांच्या देशापर्यंत आणि
इजिप्तच्या सीमेपर्यंत असलेल्या सर्व राजांवर त्याने राज्य केले. 27
राजाने यरुशलेमात चांदीला धोंड्याप्रमाणे व गंधसरू डोंगर तळवटीतील
उंबराच्या झाडांप्रमाणे सर्वसाधारण असे केले. 28 शलोमोनच्या घोड्यांची
आयात इजिप्त आणि इतर सर्व देशातून केलेली होती. 29 शलोमोनच्या
राज्यकाळातील इतर घटनांबद्दल, सुरुवातीपासून शेवटपर्यंत, ते नाथान
संदेष्ट्याच्या नोंदीमध्ये, शिलोनी अहीयाहच्या भविष्यवाणीमध्ये आणि
नेबाटाचा पुत्र यरोबोअमविषयी इद्दो संदेष्ट्याच्या दृष्टान्तात लिहिलेल्या
नाहीत का? 30 शलोमोनने यरुशलेमात संपूर्ण इस्राएलवर चाळीस वर्षे
राज्य केले. 31 नंतर शलोमोन त्याच्या पूर्वजांबरोबर विसावा पावला व
त्याला त्याचा पिता दावीदाच्या नगरात पुरले गेले. आणि त्याचा वारस
रेहोबोअम राजा झाला.

**10** रेहोबोअम शेखेम येथे गेला, कारण इस्राएलचे सर्व लोक त्याला
राजा करावे म्हणून तिथे गेले होते. 2 जेव्हा नेबाटाचा पुत्र
यरोबोअमने हे ऐकले (तो अजूनही इजिप्त देशातच होता तिथे तो
शलोमोन राजापासून पळून गेला होता), तो इजिप्तवरून परत आला
होता. 3 तेव्हा त्यांनी यरोबोअमला बोलावून घेतले, मग तो आणि

संपूर्ण इस्राएल रेहोबोअमकडे गेले व त्याला म्हणाले: 4 “तुमच्या
पित्याने आमच्यावर भारी जू ठेवले होते, तर आता मजुरीचा हा कठीण
भार व हे भारी जू तुम्ही हलके करावे, म्हणजे आम्ही तुमची सेवा
करू.” 5 रेहोबोअमने उत्तर दिले, “माघारी जा आणि तीन दिवसांनी
परत माझ्याकडे या.” तेव्हा लोक माघारी गेले. 6 तेव्हा त्याचा पिता
शलोमोनच्या जीवनकाळात त्यांची सेवा केलेल्या वडीलजनांना रेहोबोअम
राजाने विचारले, तो म्हणाला, “या लोकांना मी काय उत्तर द्यावे असे
तुम्हाला वाटते?” 7 त्यांनी उत्तर दिले, “जर तुम्ही या लोकांना दया
दाखविली आणि त्यांना संतुष्ट केले व त्यांना अनुकूल उत्तर दिले, तर ते
नेहमीच तुमचे सेवक म्हणून राहतील.” 8 पण रेहोबोअमने वडीलजनांचा
सल्ला नाकारला आणि त्याच्याबरोबर वाढलेल्या व त्याच्या सेवेत
असलेल्या तरुण पुरुषांचा सल्ला घेतला. 9 त्याने त्यांना विचारले, “जे
लोक मला म्हणतात, ‘तुझ्या पित्याने आमच्यावर घातलेले जू हलके
करावे,’ त्यांना मी काय उत्तर द्यावे?” 10 त्याच्याबरोबर वाढलेल्या
तरुणांनी उत्तर दिले, “हे लोक तुम्हाला म्हणाले आहेत की, ‘तुमच्या
पित्याने आमच्यावर भारी जू ठेवले होते, तर आता हे भारी जू तुम्ही
हलके करावे.’ आता त्यांना सांग, ‘माझी करंगळी माझ्या पित्याच्या
कमरेपेक्षाही जाड आहे. 11 माझ्या पित्याने तुमच्यावर भारी जू लादले;
मी ते अजून भारी करेन. माझ्या पित्याने तुम्हाला चाबकाने मारले; तर
मी तुम्हाला विंचवांनी मारीन.’” 12 तीन दिवसानंतर यरोबोअम व सर्व
लोक रेहोबोअमकडे आले, कारण राजाने त्यांना सांगितले होते, “तीन
दिवसांनी माझ्याकडे परत या.” 13 वडील लोकांनी दिलेल्या सल्ल्याला
नाकारत रेहोबोअम राजाने त्यांना कठोरपणे उत्तर दिले, 14 तरुणांच्या
सल्ल्याचे अनुसरण करीत तो म्हणाला, “माझ्या पित्याने तुमचे जू भारी
केले; मी ते अजून भारी करेन. माझ्या पित्याने तुम्हाला चाबकाने मारले;
तर मी तुम्हाला विंचवांनी मारीन.” 15 अशाप्रकारे राजाने लोकांचे म्हणणे
मानले नाही, कारण शिलोनी संदेष्टा अहीयाहच्याद्वारे परमेश्वराने नेबाटाचा
पुत्र यरोबोअमला सांगितलेल्या वचनांची पूर्तता व्हावी म्हणून या घटना
याहवेहकडून घडून आल्या होत्या. 16 राजाने आपले म्हणणे ऐकले
नाही असे जेव्हा इस्राएलच्या सर्व लोकांनी पाहिले, तेव्हा त्यांनी राजाला
उत्तर दिले: “दावीदामध्ये आमचा काय वाटा, इशायच्या मुलाशी आमचा
काय भाग, इस्राएला, तुझ्या डेर्‍यांपाशी जाऊन! दावीदा, आपल्या
स्वतःचे घर सांभाळ!” असे म्हणत इस्राएलचे सर्व लोक परत घरी गेले.
17 परंतु तरीही जे इस्राएली लोक यहूदीयाच्या नगरांमध्ये राहत होते
त्यांच्यावर रेहोबोअमने राज्य केले. 18 हदोराम जो मजुरी कामकर्‍यांचा
प्रमुख होता त्याला रेहोबोअम राजाने पाठवले, परंतु इस्राएली लोकांनी
त्याला धोंडमार करून मारून टाकले. तरीही, रेहोबोअम राजा आपल्या
रथात बसून यरुशलेमास निसटून गेला. 19 याप्रकारे इस्राएल लोकांनी
दावीदाच्या घराण्याविरुद्ध बंड केले ते आजवर चालू आहे.

**11** जेव्हा रेहोबोअम यरुशलेमास आला, तेव्हा त्याने यहूदाह व
बिन्यामीनच्या गोत्रातील लोकांना जमा केले; इस्राएलशी युद्ध
करणारे आणि रेहोबोअमला राज्य पुन्हा मिळवून देतील असे एक लाख
ऐंशी हजार सक्षम तरुण पुरुष होते. 2 परंतु परमेश्वराचा मनुष्य शमायाह
याच्याकडे याहवेहचे वचन आले: 3 “शलोमोनचा पुत्र यहूदीयाचा
राजा रेहोबोअमला व यहूदीयातील सर्व इस्राएली व बिन्यामीनच्या
लोकांना सांग, 4 ‘याहवेह असे म्हणतात: इस्राएली जे तुमचे बांधव
आहेत, त्यांच्याविरुद्ध युद्ध करू नका. तुम्ही प्रत्येकजण आपआपल्या
घरी जा, कारण हे मी सांगत आहे.’” म्हणून त्यांनी याहवेहचा शब्द
मानला आणि आणि यरोबोअमच्या विरुद्ध युद्ध करण्यापासून माघार
घेतली. 5 रेहोबोअम यरुशलेममध्ये राहिला आणि यहूदीयामध्ये त्याने
संरक्षणासाठी या नगरांची बांधणी केली: 6 बेथलेहेम, एटाम, तकोवा, 7
बेथ-सूर, सोकोह, अदुल्लाम, 8 गथ, मारेशाह, जीफ, 9 अदोराईम,
लाखीश, अजेकाह, 10 सोराह, अय्यालोन आणि हेब्रोन. ही तटबंदीची
शहरे यहूदीया आणि बिन्यामीनमध्ये होती. 11 त्याने त्या नगरांची
संरक्षणव्यवस्था मजबूत केली आणि त्यांच्यामध्ये सेनापती ठेवले आणि
त्यांना अन्न, जैतुनाचे तेल आणि द्राक्षारसाचा पुरवठा केला. 12 त्याने
तेथील प्रत्येक नगरात ढाली आणि भाले ठेवले आणि त्यांना फारच
सामर्थ्यवान केले. म्हणून यहूदीया आणि बिन्यामीन त्याच्याकडेच राहिले.
13 संपूर्ण इस्राएलमधील सर्व जिल्ह्यातील याजक आणि लेवींनी त्याची
बाजू घेतली. 14 लेवीय लोकांनी त्यांची कुरणे आणि मालमत्तासुद्धा
सोडली आणि ते यहूदीया आणि यरुशलेमेत आले, कारण यरोबोअम
आणि त्याच्या मुलांनी त्यांना याहवेहचे याजक म्हणून नाकारले होते, 15
जेव्हा त्याने उच्चस्थानांसाठी आणि वासराच्या आणि बोकडाच्या मूर्ती
तयार करून त्यासाठी स्वतःचे याजक नेमले. 16 इस्रायलच्या प्रत्येक
वंशातील ज्या लोकांनी इस्राएलचे परमेश्वर याहवेहच्या शोधात त्यांचे
अंतःकरण लावले होते, ते लेवीय लोकांच्या मागे यरुशलेमकडे त्यांच्या
पूर्वजांचे परमेश्वर याहवेहसाठी यांच्या बलिदानांचे अर्पण करण्यासाठी
गेले. 17 त्यांनी यहूदीयाचे राष्ट्र बळकट केले आणि शलोमोनचे पुत्र
रेहोबोअमला तीन वर्षे पाठिंबा दिला, याकाळात त्यांनी दावीद आणि
शलोमोनच्या मार्गाचे अनुसरण केले. 18 रेहोबोअमने महालाथ बरोबर
विवाह केला, जी दावीदाचा पुत्र यरिमोथ आणि अबीहाईल, इशायाचा
पुत्र एलियाबची कन्या होती. 19 तिने त्याच्या या मुलांना जन्म दिला:
यऊश, शमरियाह आणि जाहम. 20 नंतर त्याने अबशालोमची कन्या
माकाह हिच्याशी विवाह केला, जिने अबीयाह, अत्तय, जीजा आणि
शेलोमीथ यांना जन्म दिला. 21 रेहोबोअमने त्याच्या इतर पत्नी आणि
उपपत्नींपेक्षा अबशालोमची कन्या माकाहवर जास्त प्रीती केली. त्याला
एकूण अठरा पत्नी आणि साठ उपपत्नी, अठ्ठावीस मुले आणि साठ
मुली होत्या. 22 रेहोबोअमने माकाहचा मुलगा अबीयाह याला राजा
करण्यासाठी त्याच्या सर्व भावांमध्ये राजपुत्र म्हणून त्याची नेमणूक
केली. 23 तो फार हुशारीने वागला आणि त्याच्या काही मुलांना यहूदीया
आणि बिन्यामीन प्रांतात आणि सर्व तटबंदीच्या शहरांमध्ये पांगविले.
त्याने त्यांना विपुल पुरवठा दिला आणि त्यांच्यासाठी अनेक पत्नी
केल्या.

**12** राजा म्हणून रेहोबोअमचे स्थान स्थापित झाल्यानंतर आणि तो
बलवान झाला, तेव्हा त्याने आणि त्याच्याबरोबर असलेल्या सर्व
इस्राएली लोकांनी याहवेह यांचे नियम सोडून दिले. 2 याहवेहबरोबर ते
अविश्वासू झाले, म्हणून इजिप्तचा राजा शिशाकने रेहोबोअम राजाच्या
कारकिर्दीच्या पाचव्या वर्षी यरुशलेमवर हल्ला केला. 3 बाराशे रथ
आणि साठ हजार घोडेस्वार आणि लिबिया, सुक्की आणि कूशी चे
असंख्य सैन्य इजिप्तमधून त्याच्याबरोबर आले. 4 त्याने यहूदीयाची
तटबंदी असलेली शहरे काबीज केली आणि ते यरुशलेमपर्यंत आले. 5
नंतर शमायाह संदेष्टा रेहोबोअम आणि शिशाकच्या भयाने यरुशलेममध्ये
जमलेल्या यहूदीयाच्या पुढाऱ्यांकडे आला आणि त्यांना म्हणाला,
"याहवेह असे म्हणतात, तुम्ही मला सोडून दिले आहे; त्यामुळेच मी
आता तुम्हाला शिशाककडे सोडून देतो." 6 तेव्हा इस्राएलचे पुढारी
आणि राजाने स्वतःला नम्र केले आणि ते म्हणाले, "याहवेह न्यायी
आहेत!" 7 जेव्हा याहवेहनी पाहिले की, त्यांनी स्वतःला नम्र केले
आहे, तेव्हा याहवेहचे हे शब्द शमायाहकडे आले: "त्यांनी स्वतःला
नम्र केले आहे, त्यामुळे मी त्यांचा नाश करणार नाही, परंतु लवकरच
त्यांची सुटका करेन. माझा क्रोध शिशाकद्वारे यरुशलेमवर ओतला
जाणार नाही. 8 तथापि, ते त्याच्या अधीन होतील, म्हणजे माझी सेवा
करणे आणि दुसऱ्या देशातील राजांची सेवा करणे यातील फरक त्यांना
समजून येईल." 9 इजिप्तचा राजा शिशाक याने जेव्हा यरुशलेमवर
हल्ला केला, त्याने याहवेहच्या मंदिरातील भांडारे व राजवाड्यातील
भांडारे लुटून नेली. शलोमोनने बनविलेल्या सोन्याच्या ढालींसहीत
त्याने सर्वकाही घेतले. 10 म्हणून रेहोबोअम राजाने त्या सोन्याच्या
ढालींच्या ऐवजी कास्याच्या ढाली तयार केल्या व राजवाड्यातील
पहारेकऱ्यांच्या कामगिरीवर असलेल्यांच्या हाती स्वाधीन केल्या. 11
जेव्हा राजा याहवेहच्या मंदिरात जात असे, तेव्हा पहारेकरी त्या ढाली
घेऊन त्याच्याबरोबर जात असत आणि नंतर त्या त्यांच्या चौकीत
ठेवत असत. 12 रेहोबोअमने स्वतःला नम्र केले त्यामुळे, याहवेहचा
राग त्याच्यापासून दूर वळला आणि तो पूर्णपणे नष्ट झाला नाही.
खरोखरच, यहूदीयामध्ये काही चांगलेही होते. 13 रेहोबोअम राजाने
स्वतःला यरुशलेममध्ये स्थिर केले आणि राजा म्हणून राहिला. त्यावेळी
तो एकेचाळीस वर्षांचा होता आणि आपले नाव द्यावे म्हणून याहवेहने
सर्व इस्राएलच्या गोत्रांतून ज्या शहराची निवड केली त्या यरुशलेमात
त्याने राज्य केले. त्याच्या आईचे नाव नामाह होते; ती अम्मोनी होती.
14 त्याने दुष्ट कृत्य केले, कारण याहवेहचा शोध घ्यावा याकडे त्याने
त्याचे अंतःकरण लावलेले नव्हते. 15 रेहोबोअमच्या कारकिर्दीतील
घटनांबद्दल, सुरुवातीपासून शेवटपर्यंत, शमायाह संदेष्टा आणि इद्दो
द्रष्टा यांनी तयार केलेल्या वंशावळीत त्या लिहिलेल्या नाहीत काय?
रेहोबोअम व यरोबोअम यांच्यामध्ये सतत युद्ध होत राहिले. 16 रेहोबोअम
त्याच्या पूर्वजांबरोबर विसावा पावला आणि त्याला दावीदाच्या नगरात
पुरण्यात आले. आणि त्याच्यानंतर त्याचा पुत्र अबीयाह त्याचा वारस
म्हणून राजा झाला.

**13** इस्राएलचा राजा यरोबोअमच्या कारकिर्दीच्या अठराव्या वर्षी
अबीयाह यहूदीयाचा राजा झाला. 2 त्याने यरुशलेमात तीन
वर्षे राज्य केले. त्याच्या आईचे नाव माकाह होते. ती गिबियाह येथील
उरीएल याची कन्या होती. अबीयाह व यरोबोअम यांच्यामध्ये युद्ध झाले.
3 अबीयाहने चार लाख सक्षम योद्धे घेतले, यरोबोअम आठ लाख संख्या
असलेले सक्षम सैन्य घेऊन त्याच्या विरोधात युद्धरेषेवर जाऊन थांबला.
4 अबीयाह एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशातील सेमाराईम पर्वतावर उभा
राहिला आणि म्हणाला, "यरोबोअम आणि सर्व इस्राएल लोकांनो, माझे
ऐका! 5 तुम्हाला माहीत नाही काय की, इस्राएलचे परमेश्वर याहवेह
यांनी मिठाच्या कराराद्वारे इस्राएलचे राज्यपद दावीद आणि त्याच्या
वंशजांना कायमचे दिले आहे? 6 तरीसुद्धा दावीदाचा पुत्र शलोमोनचा
अधिकारी, नेबाटाचा पुत्र यरोबोअमने त्याच्या धन्याच्या विरोधात बंड
केले. 7 कुचकामी गुंडांची टोळी त्याच्या सभोवती गोळा झाली व त्यांनी
शलोमोनचा पुत्र रेहोबोअमचा विरोध केला, जो तेव्हा बालक असून व
निर्णयक्षमता नसलेला होता व त्यांचा सामना करण्यास असमर्थ होता.
8 "आणि आता तुम्ही याहवेहच्या राज्याला, जे दावीदाच्या वंशजांच्या
हातात आहे, विरोध करण्याची योजना केली आहे. तुमचे खरोखरच
प्रचंड सैन्य आहे आणि तुमच्याकडे यरोबोअमने तुमची दैवते केलेली
सोन्याची वासरे आहेत. 9 तुम्ही याहवेहचे याजक अहरोनाचे पुत्र आणि
लेवी यांना हाकलून दिले आणि स्वतःचे याजक तयार केले, जसे इतर
देशातील लोक करत नाहीत का? जो कोणी एक तरुण बैल आणि
सात मेंढे घेऊन स्वतःला पवित्र करण्यासाठी येतो, तो जी दैवते नाहीत
अशांचा पुजारी होऊ शकतो. 10 "आमच्याविषयी म्हणाल, याहवेह हे
आमचे परमेश्वर आहेत आणि आम्ही त्यांना सोडले नाही. जे याजक
याहवेहची सेवा करीत आहेत ते अहरोनाचे पुत्र आहेत आणि लेवीय
त्यांना मदत करतात. 11 रोज सकाळी आणि संध्याकाळी ते याहवेह
यांना होमार्पणे आणि सुगंधी धूप अर्पण करतात. ते विधिपूर्वक स्वच्छ
केलेल्या टेबलावर भाकरी ठेवतात आणि दररोज संध्याकाळी सोन्याच्या
दीपमाळेवर दीप लावतात. आम्ही आमचे परमेश्वर याहवेहना हव्या
असणाऱ्या गोष्टींचे पालन करीत आहोत. परंतु तुम्ही त्यांना सोडून दिले
आहे. 12 परमेश्वर आम्हाबरोबर आहेत; ते आमचे नेतृत्व करतात. त्यांचे
याजक तुझ्याविरुद्ध युद्धाचे रणशिंग वाजवितील. इस्राएलच्या लोकांनो,
तुमच्या पूर्वजांचे परमेश्वर याहवेह, यांच्याविरुद्ध लढाई करू नका, कारण
तुम्ही यशस्वी होणार नाही." 13 यरोबोअमने पाठीमागील सर्व बाजूंनी
सैन्य पाठवले होते, म्हणजे तो यहूदीयाच्या पुढे असताना, ते त्यांच्यामागे
दबा धरून बसले होते. 14 यहूदीयांनी सभोवार पाहिले, तेव्हा आपण
मागे व पुढे वेढले गेलो आहोत असे त्यांना दिसून आले, तेव्हा त्यांनी
मदतीकरिता याहवेहचा धावा केला आणि याजक रणशिंग वाजवू लागले.
15 जेव्हा यहूदी लोकांनी रणगर्जना केली, तेव्हा परमेश्वराने यरोबोअम
आणि संपूर्ण इस्राएली सैन्याचा अबीयाह आणि यहूदीयासमोर नायनाट
केला. 16 इस्राएली लोक यहूदीयांसमोरून पळून गेले आणि परमेश्वराने
त्यांना त्यांच्या हाती दिले. 17 अबीयाह आणि त्याच्या सैन्याने त्यांचे

इतके मोठे नुकसान केले की, इस्राएलच्या सक्षम लोकांमधील पाच
लाख लोक मारले गेले. 18 त्या प्रसंगी इस्राएल लोकांचा पराभव झाला
आणि यहूदीयाचे लोक विजयी झाले, कारण ते याहवेह, त्यांच्या पूर्वजांचे
परमेश्वर यांच्यावर विसंबून राहिले होते. 19 अबीयाहने यरोबोअम याचा
पाठलाग केला आणि त्याच्याकडून बेथेल, यशनाह आणि एफ्रोन ही
नगरे आणि त्यांच्या आजूबाजूची गावे घेतली. 20 इस्राएलचा राजा
यरोबोअम अबीयाहच्या हयातीत परत सत्ता मिळवू शकला नाही.
शेवटी याहवेहने त्याला ताडण केले आणि तो मरण पावला. 21 इकडे
यहूदीयाचा राजा अबीयाह फारच बलशाली झाला. त्याला चौदा पत्नी,
बावीस पुत्र व सोळा कन्या होत्या. 22 अबीयाह याच्या शासनकाळातील
इतर घटना, त्याने काय केले आणि तो काय म्हणाला, हे सर्व इद्दो
संदेष्ट्याने लिहिलेल्या इतिहासात नमूद केलेले आहे.

**14** मग अबीयाह त्याच्या पूर्वजांबरोबर विसावा पावला आणि त्याला
दावीदाच्या नगरात पुरले गेले. आणि त्याचा पुत्र आसा त्याचा
वारस म्हणून राजा झाला. त्याच्या कारकिर्दीच्या दहा वर्षे राज्यात
शांतता होती. 2 आसाने याहवेह त्याच्या परमेश्वराच्या दृष्टीने जे चांगले
आणि योग्य होते ते केले. 3 उच्च स्थानावरील परदेशीय दैवतांच्या
वेदीचा त्याने नाश केला, पवित्र दगडांचे तुकडे केले आणि अशेरा
मूर्तिस्तंभ कापून टाकले. 4 त्याने यहूदीयाला त्यांच्या पूर्वजांचे परमेश्वर
याहवेहचा आश्रय घेण्याची आणि त्यांचे नियम आणि आज्ञा पाळण्याची
आज्ञा दिली. 5 त्याने यहूदीयाच्या प्रत्येक नगरातील उच्च स्थाने व धूप
जाळण्याची प्रत्येक वेदी उद्ध्वस्त केली आणि त्याच्या काळात राज्यास
शांतता लाभली. 6 त्याने यहूदीयाची तटबंदी असलेली नगरे बांधली,
कारण देशात शांतता होती. त्या वर्षांमध्ये त्याच्याबरोबर युद्ध करणारा
कोणी नव्हता, कारण याहवेहनी त्याला विश्रांती दिली होती. 7 तो
यहूदीयांना म्हणाला, “चला, आपण या गावांची बांधणी करू या आणि
त्यांच्याभोवती बुरूज, फाटके आणि गज लावूया. भूमी अजूनही आमची
आहे, कारण आम्ही आमचे परमेश्वर याहवेहचा आश्रय घेतला आहे;
आम्ही त्यांचा आश्रय घेतला आणि त्यांनी आम्हाला प्रत्येक बाजूंनी
विश्रांती दिली आहे.” म्हणून त्यांनी ते बांधले आणि समृद्ध झाले. 8
आसाकडे यहूदीयाचे तीन लाख योद्ध्यांचे सैन्य, मोठ्या ढाली आणि
भाले घेऊन सुसज्ज होते आणि बिन्यामीन येथील दोन लाख ऐंशी हजार
योद्ध्यांचे सैन्य, लहान ढाली आणि धनुष्य घेऊन सुसज्ज होते. हे सर्व
शूर लढवय्ये पुरुष होते. 9 जेरह कूशी याने हजारोंच्या हजार संख्येने
सैन्य आणि तीनशे रथ बरोबर घेऊन त्यांच्याविरुद्ध चढाई केली आणि तो
मारेशाहपर्यंत आला. 10 आसाने त्याचा सामना करण्यासाठी आगेकूच
केले आणि ते मारेशाहजवळ असलेल्या जेफथाह खोर्‍यात युद्धासाठी
स्थानबद्ध झाले. 11 तेव्हा आसाने त्याचे परमेश्वर याहवेहना हाक मारली
आणि म्हणाला, “याहवेह, दुर्बल लोकांना पराक्रमी लोकांविरुद्ध मदत
करणारे तुमच्यासारखे कोणी नाही. आमच्या परमेश्वरा, याहवेह आम्हाला
मदत करा, कारण आम्ही तुमच्यावर अवलंबून आहोत आणि तुमच्याच
नावामध्ये आम्ही या विशाल सैन्याविरुद्ध आलो आहोत. याहवेह, तुम्ही
आमचे परमेश्वर आहात; मर्त्य मानवांनी तुमच्यावर विजयी होऊ नये.”
12 तेव्हा याहवेहनी आसा आणि यहूदीया यांच्यासमोर कूशी लोकांना
तडाखा दिला. कूशी लोक पळून गेले, 13 आणि आसा आणि त्याच्या
सैन्याने गरारपर्यंत त्यांचा पाठलाग केला. एवढ्या मोठ्या संख्येने
कूशी पडले की ते परत स्वतःला उभारू शकले नाहीत; याहवेह आणि
त्यांच्या सैन्यासमोर त्यांचा चुराडा झाला. यहूदीयाच्या लोकांनी मोठ्या
प्रमाणावर लुटालूट करून नेली. 14 गरारच्या सभोवतालची सर्व गावे
त्यांनी उद्ध्वस्त केली, कारण याहवेहची दहशत त्यांच्यावर पसरली
होती. त्यांनी ही सर्व गावे लुटली, कारण तिथे लुटण्यासारखी पुष्कळ
सामुग्री होती. 15 त्यांनी गुरांच्या छावण्यांवरही हल्ला केला आणि
मेंढ्या, शेळया आणि उंटांचे कळप उचलून नेले. नंतर ते यरुशलेमकडे
परतले.

**15** नंतर परमेश्वराचा आत्मा ओदेदाचा पुत्र अजर्‍याहवर आला. 2
तो आसाला भेटण्यासाठी गेला आणि त्याला म्हणाला, “आसा
आणि सर्व यहूदाह व बिन्यामीन माझे ऐका, याहवेह तुमच्याबरोबर
आहेत, जेव्हा तुम्ही त्यांच्याबरोबर राहाल. जर तुम्ही त्यांचा शोध घ्याल,
तर ते तुम्हाला सापडतील, परंतु जर तुम्ही त्यांना सोडाल, तर ते तुम्हाला
सोडतील. 3 आता पुष्कळ काळपर्यंत इस्राएलमध्ये खरे परमेश्वर नव्हते,
शिकविण्यासाठी याजक आणि नियम नव्हते. 4 तरीपण संकटसमयी ते
इस्राएलचे परमेश्वर याहवेहकडे वळले व त्यांनी त्यांचा शोध केला, तेव्हा
त्यांनी त्यांची मदत केली. 5 त्या दिवसांमध्ये प्रवास करणे सुरक्षित
नव्हते, कारण तेथील सर्व रहिवाशांमध्ये मोठा गोंधळ माजला होता. 6
एक राष्ट्र दुसर्‍या राष्ट्राकडून आणि एक शहर दुसर्‍या शहराकडून चिरडले
जात होते, कारण परमेश्वर त्यांना सर्वप्रकारच्या संकटांनी त्रास देत
होते. 7 परंतु तुम्ही तर खंबीर व्हा आणि हार मानू नका, कारण तुम्हाला
तुमच्या कामाचे प्रतिफळ मिळेल.” 8 जेव्हा आसाने हे शब्द आणि ओदेद
संदेष्ट्याचा पुत्र अजर्‍याहची भविष्यवाणी ऐकली तेव्हा त्याला धीर
आला. त्याने यहूदाह आणि बिन्यामीनच्या संपूर्ण देशातील आणि त्याने
ताब्यात घेतलेल्या एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशातील गावांमधील अमंगळ
मूर्ती काढून टाकल्या. त्याने याहवेहच्या मंदिराच्या प्रवेशमंडपासमोर
याहवेहची जी वेदी होती, तिची दुरुस्ती केली. 9 नंतर त्याने सर्व यहूदीया
आणि बिन्यामीन आणि एफ्राईम, मनश्शेह आणि शिमओन येथील
लोकांना जमविले, जे त्यांच्यामध्ये स्थायिक झाले होते, कारण त्याचे
परमेश्वर याहवेह त्याच्याबरोबर आहेत हे पाहून इस्राएलमधून मोठ्या
संख्येने लोक त्याच्याकडे आले होते. 10 ते आसाच्या कारकिर्दीच्या
पंधराव्या वर्षी तिसर्‍या महिन्यात यरुशलेम येथे जमले. 11 त्यावेळेस
त्यांनी परत आणलेल्या लुटीतून याहवेहसाठी सातशे गुरे आणि सात
हजार मेंढ्या व शेळयांचे बलिदान केले. 12 त्यांनी त्यांच्या संपूर्ण
अंतःकरणाने आणि जिवाने त्यांच्या पूर्वजांचे परमेश्वर याहवेह यांचा
शोध घ्यावा, असा करार केला. 13 जे इस्राएलचे परमेश्वर याहवेह यांचा
शोध घेणार नाहीत, त्या सर्वांना, लहान किंवा मोठे, पुरुष किंवा स्त्रीस
जिवे मारण्यात येईल. 14 त्यांनी मोठ्याने गर्जना करून, कर्णे व शिंगे

वाजवून याहवेहची शपथ घेतली. 15 यहूदीया येथील सर्व लोकांनी या शपथेबद्दल आनंद केला, कारण त्यांनी संपूर्ण अंत:करणापासून ती शपथ घेतली होती. त्यांनी उत्सुकतेने परमेश्वराचा शोध घेतला आणि ते त्यांना सापडले. त्यामुळे याहवेहनी त्यांना सर्व बाजूंनी विश्रांती दिली. 16
आसा राजाने आपली आजी माकाह हिला राजमातेच्या पदावरून काढून टाकले, कारण तिने तिरस्करणीय अशी अशेराची उपासना करण्यासाठी एक मूर्ती घडविली होती. आसाने ती तोडून फोडली व किद्रोनच्या खोऱ्याजवळ जाळून टाकली. 17 जरी त्याने इस्राएलातील पूजास्थाने मोडून टाकली नाही, तरीही आसाचे हृदय त्याच्या जीवनभरात याहवेहशी समर्पित होते. 18 त्याने व त्याच्या पित्याने समर्पित केलेले चांदी व सोन्याचे सामान त्याने परमेश्वराच्या मंदिरात आणले. 19 आसा राजाच्या कारकिर्दीच्या पस्तिसाव्या वर्षापर्यंत लढाई झाली नाही.

**16** आसाच्या कारकिर्दीच्या छत्तिसाव्या वर्षी यहूदीयाचा राजा आसा याच्या सीमेतून कोणी बाहेर जाऊ नये किंवा आत येऊ नये म्हणून इस्राएलचा राजा बाशा याने यहूदीयावर स्वारी केली आणि रामाह शहराची तटे बांधली. 2 त्यानंतर आसाने याहवेहच्या मंदिरातील आणि त्याच्या राजवाड्यातील खजिन्यातून चांदी व सोने काढून घेतले व ते दिमिष्कात राज्य करणारा बेन-हदाद अरामच्या राजाकडे पाठवले. 3
आणि म्हटले, “माझ्या व तुझ्या वडिलांमध्ये होता तसा तुझ्या व माझ्यात एक करार असावा. पाहा, मी तुला चांदी व सोने पाठवित आहे. तर आता इस्राएलचा राजा बाशा याच्याशी असलेला तुझा करार मोड म्हणजे तो माझ्यापासून निघून जाईल.” 4 बेन-हदाद आसा राजाशी सहमत झाला व आपल्या सैन्याच्या सेनापतींना इस्राएलच्या नगरांवर हल्ला करण्यास पाठवले. त्यांनी इय्योन, दान, आबेल-माईम आणि नफतालीचे सर्व भांडारशहरे ही जिंकून घेतली. 5 बाशाने जेव्हा हे ऐकले तेव्हा रामाह बांधण्याचे थांबविले आणि ते अर्धवट टाकून दिले. 6 नंतर आसा राजाने यहूदीयातील सर्व पुरुषांना आणले आणि जे दगड आणि लाकूड बाशा वापरत होता, ते त्यांनी रामाह येथून नेऊन त्यांच्यापासून त्याने गेबा आणि मिस्पाह हे बांधले. 7 त्याचवेळेस हनानी हा संदेष्टा यहूदीयाचा राजा आसा याच्याकडे आला आणि त्याला म्हणाला, “तुम्ही अरामच्या राजावर भरवसा ठेवला आणि तुमचे परमेश्वर याहवेह यांच्यावर ठेवला नाही, या कारणाने अरामच्या राजाचे सैन्य तुमच्या हातून निसटले आहे. 8 कूशी लोक आणि लिबियाचे लोक हे मोठ्या संख्येने रथ आणि घोडेस्वार असलेले बलाढ्य सैन्य नव्हते का? तरीसुद्धा जेव्हा तुम्ही याहवेहवर भरवसा ठेवला, तेव्हा त्यांनी त्यांना तुमच्या हाती दिले.
9 कारण ज्यांची अंत:करणे याहवेह यांच्याबरोबर पूर्णपणे वचनबद्ध आहेत, त्यांना बळ देण्यासाठी त्यांची दृष्टी संपूर्ण पृथ्वीवर व्याप्त आहे. तुम्ही मूर्खपणा केला आहे आणि आतापासून तुम्ही युद्धात असाल.”
10 यामुळे आसा संदेष्ट्यावर रागावला; तो इतका संतापला की त्याने त्याला तुरुंगात टाकले. त्याचवेळेस आसाने काही लोकांवर क्रूरपणे अत्याचार केले. 11 आसाच्या कारकिर्दीच्या घटना, सुरुवातीपासून शेवटपर्यंत, यहूदीया आणि इस्राएलच्या राजांच्या पुस्तकात नमूद केल्या आहेत. 12 त्याच्या कारकिर्दीच्या एकोणचाळिसाव्या वर्षी आसा पायाच्या आजाराने त्रस्त झाला. त्याचा आजार गंभीर स्वरुपाचा होता, तरी त्या आजारपणातही त्याने याहवेहकडून मदत घेतली नाही, परंतु फक्त वैद्यांचीच मदत घेतली. 13 नंतर आसा त्याच्या कारकिर्दीच्या एकेचाळीसाव्या वर्षी मरण पावला आणि त्याच्या पूर्वजांबरोबर विसावा पावला. 14 त्यांनी त्याला दावीदाच्या नगरात, त्याने स्वत:साठी तयार केलेल्या कबरेत पुरले. त्यांनी त्याला मसाले आणि विविध मिश्रित अत्तरांनी झाकलेल्या शवपेटीत ठेवले आणि त्याच्या सन्मानार्थ प्रचंड अग्नी पेटविला.

**17** त्याच्यानंतर त्याचा पुत्र यहोशाफाट हा राजा झाला. त्याने इस्राएलविरुद्ध युद्ध करण्यासाठी स्वत:ला सशक्त केले. 2 त्याने यहूदीयाच्या सर्व तटबंदीच्या शहरांमध्ये सैन्याचा तळ दिला आणि त्याचा पिता आसाने काबीज केलेल्या यहूदीया आणि एफ्राईमच्या नगरांमध्ये सैन्यांच्या छावण्या टाकल्या. 3 याहवेह यहोशाफाटबरोबर होते, कारण त्याने त्यांच्यासमोर त्याचा पिता दावीदाच्या मार्गाचे अनुसरण केले. त्याने बआल दैवतांचा सल्ला घेतला नाही. 4 परंतु इस्राएलच्या रीतिरिवाजा ऐवजी, त्याच्या पित्याच्या परमेश्वराचा सल्ला घेतला आणि त्यांच्या आज्ञांचे पालन केले. 5 याहवेहनी त्याचे राज्य त्याच्या नियंत्रणाखाली स्थापन केले; आणि यहूदीयाच्या सर्व लोकांनी यहोशाफाटकडे भेटवस्तू आणल्या, त्यामुळे त्याला मोठी संपत्ती आणि सन्मान मिळाला. 6
त्याचे अंत:करण याहवेहच्या मार्गाकडे समर्पित होते; याशिवाय, त्याने यहूदीयामधून उच्च स्थाने आणि अशेरा खांब काढून टाकले. 7 त्याच्या कारकिर्दीच्या तिसऱ्या वर्षी त्याने त्याचे अधिकारी बेन-हेल, ओबद्याह, जखऱ्याह, नथानेल आणि मिखायाह यांना यहूदीयाच्या गावांमध्ये शिकविण्यासाठी पाठवले. 8 त्यांच्याबरोबर काही विशिष्ट लेवी; शमायाह, नथन्याह, जबद्याह, असाहेल, शमिरामोथ, योनाथान, अदोनियाह, तोबीयाह आणि तोब-अदोनियाह आणि एलीशामा व यहोराम हे याजक होते. 9 त्यांनी त्यांच्याबरोबर याहवेहच्या नियमशास्त्राचे पुस्तक घेतले आणि संपूर्ण यहूदीयामध्ये शिकविले. त्यांनी यहूदीयाच्या सर्व शहरांत जाऊन लोकांना शिक्षण दिले. 10 यहूदीयाच्या आजूबाजूच्या प्रदेशांच्या सर्व राज्यांवर याहवेहचे भय आले, म्हणून ते यहोशाफाटविरुद्ध युद्ध करण्यासाठी गेले नाहीत. 11 काही पलिष्ट्यांनी यहोशाफाट याला भेटवस्तू आणि खंडणी म्हणून चांदी आणली आणि अरब लोकांनी त्याच्यासाठी कळप आणले: सात हजार सातशे मेंढ्या आणि सात हजार सातशे शेळया. 12 यहोशाफाट अधिकाधिक शक्तिशाली होत गेला; त्याने यहूदीयामध्ये किल्ले आणि भांडाराची शहरे बांधली 13
आणि यहूदीयाच्या नगरांमध्ये मोठ्या प्रमाणात साहित्य साठविले. त्याने यरुशलेममध्ये अनुभवी योद्धेसुद्धा ठेवले. 14 कुटुंबाद्वारे त्यांची नावनोंदणी अशाप्रमाणे होती: यहूदीयाकडून, 1,000 पथकांचे सेनापती: अदनाह हा 3,00,000 लढवय्ये पुरुषांचा सेनापती; 15 त्यानंतर यहोहानान हा 2,80,000 सैनिकांवर सेनापती; 16 त्यानंतर, जिक्रीचा पुत्र अमस्याहने स्वत:ला स्वेच्छेने याहवेहच्या सेवेसाठी अर्पण केले होते,

त्याच्याबरोबर 2,00,000 लोक होते. 17 बिन्यामीनकडून: एलयादा,
हा शूर सैनिक, त्याच्याबरोबर धनुष्यबाण आणि ढाल घेऊन सज्ज
असलेले 2,00,000 पुरुष; 18 त्यानंतर यहोजाबाद, त्याच्याबरोबर
युद्धासाठी सज्ज असलेले 1,80,000 पुरुष. 19 या पुरुषांनी राजाची
सेवा केली, यांच्याशिवाय त्याने संपूर्ण यहूदीयामध्ये तटबंदी केलेल्या
नगरांमधील छावण्यामध्ये सैनिक तैनात केले.

**18** आता यहोशाफाटजवळ मोठी संपत्ती आणि सन्मान होता
आणि त्याने स्वत:ला अहाबाशी विवाहाद्वारे जोडून घेतले. 2
काही वर्षानंतर तो शोमरोनला अहाबाला भेटण्यास गेला. अहाबाने
त्याच्यासाठी व त्याजबरोबर आलेल्या लोकांसाठी अनेक मेंढरे व गुरे
कापली व त्याने रामोथ-गिलआदवर हल्ला करावा अशी त्याला विनंती
केली. 3 इस्राएलचा राजा अहाबाने यहूदीयाचा राजा यहोशाफाटला
विचारले, “तुम्ही माझ्याबरोबर रामोथ गिलआदविरुद्ध जाल का?”
यहोशाफाटने उत्तर दिले, “तुम्ही जसे आहात तसाच मी आहे आणि माझे
लोक तुमचे लोक आहेत; आम्ही तुमच्या युद्धात सहभागी होऊ.” 4 परंतु
यहोशाफाट इस्राएलच्या राजाला असे सुद्धा म्हणाला, “प्रथम याहवेहचा
सल्ला घ्या.” 5 तेव्हा इस्राएलच्या राजाने सुमारे चारशे संदेष्ट्यांना
एकत्र बोलाविले आणि त्यांना विचारले, “आम्ही रामोथ-गिलआदच्या
विरुद्ध युद्धास जावे की नाही?” त्यांनी उत्तर दिले, “जा, कारण परमेश्वर
ते राजाच्या हाती देईल.” 6 परंतु यहोशाफाटने विचारले, “आपण
विचारावे असा याहवेहचा एकही संदेष्टा येथे नाही काय?” 7 इस्राएलचा
राजा यहोशाफाटला म्हणाला, “ज्याच्याद्वारे आपण याहवेहचा सल्ला
घेऊ शकतो असा एक संदेष्टा अजूनही आहे, परंतु तो माझ्याविषयी
कधीही चांगला संदेश देत नाही, नेहमीच वाईट संदेश देतो, म्हणून
मला त्याचा तिरस्कार वाटतो. तो इम्लाहचा पुत्र मिखायाह आहे.”
यहोशाफाटने उत्तर दिले, “राजाने असे बोलू नये.” 8 तेव्हा इस्राएलच्या
राजाने आपल्या एका अधिकाऱ्याला बोलाविले व म्हटले, “लवकर
जाऊन इम्लाहचा पुत्र मिखायाह याला घेऊन ये.” 9 इस्राएलचा राजा
आणि यहूदीयाचा राजा यहोशाफाट आपली राजवस्त्रे परिधान करून
शोमरोनाच्या प्रवेशद्वाराजवळील खळयाजवळ त्यांच्या सिंहासनांवर
बसले होते, आणि संदेष्टे त्यांच्यासमोर संदेश देत होते. 10 तेव्हा
केनानाहचा पुत्र सिद्कीयाह याने लोखंडाची शिंगे तयार केली होती,
आणि त्याने जाहीर केले, “याहवेह असे म्हणतात: ‘या शिंगांनी तू अरामी
लोकांवर असा वार करशील की त्यांचा नाश होईल.’” 11 इतर सर्व संदेष्टे
सुद्धा तीच भविष्यवाणी करीत होते, ते म्हणाले, “रामोथ-गिलआदवर
हल्ला करून विजयी हो कारण याहवेह ते राजाच्या हाती देणार आहे.”
12 जो दूत मिखायाहला बोलविण्यास गेला होता तो त्याला म्हणाला,
“पाहा, सर्व संदेष्टे राजाच्या यशासंबंधी भविष्य सांगत आहेत, तुझे शब्द
सुद्धा त्यांच्याशी सहमत होऊ दे, आणि राजाच्या बाजूने चांगले बोल.”
13 पण मिखायाह म्हणाला, “जिवंत याहवेहची शपथ, माझे परमेश्वर
मला जे काही सांगतील तेच मी त्याला सांगेन.” 14 तो जेव्हा आला,
तेव्हा राजाने त्याला विचारले, “मिखायाह, आम्ही रामोथ गिलआदविरुद्ध
युद्धास जावे किंवा नाही?” त्याने उत्तर दिले, “हल्ला करून विजयी व्हा,
कारण त्यांना तुमच्या हाती दिले जाईल.” 15 राजाने त्याला म्हटले,
“मी तुला किती वेळा शपथ देऊन सांगावे की याहवेहच्या नावाने तू
मला केवळ जे सत्य तेच सांगावे?” 16 तेव्हा मिखायाहने उत्तर दिले,
“सर्व इस्राएल लोक मेंढपाळ नसलेल्या मेंढरांसारखे पर्वतांवर पांगलेले
आहेत असे मला दिसले आणि याहवेह म्हणाले, ‘या लोकांना धनी
नाही. प्रत्येकाला शांतीने आपआपल्या घरी जाऊ दे.’” 17 इस्राएलच्या
राजाने यहोशाफाटला म्हटले, “हा माझ्याविषयी कधीही चांगला संदेश
देत नाही तर वाईटच संदेश देतो असे मी तुला सांगितले नव्हते काय?”
18 मिखायाह पुढे म्हणाला, “तर आता याहवेहचे वचन ऐका: याहवेह
आपल्या सिंहासनावर बसलेले आणि स्वर्गातील सर्व समुदाय त्यांच्या
डावीकडे व उजवीकडे उभा असलेला मला दिसला. 19 आणि याहवेहने
म्हटले, ‘इस्राएलचा राजा अहाब याने जाऊन रामोथ-गिलआदावर हल्ला
करून तिथे मरून पडावे म्हणून त्याला कोण मोह घालेल?’ “तेव्हा
एकाने एक तर दुसऱ्याने दुसरी मसलत दिली. 20 तेव्हा एक आत्मा
पुढे आला, आणि याहवेहपुढे उभा राहिला आणि म्हणाला, ‘मी त्याला
मोह घालेन.’ “याहवेहने विचारले, ‘तू हे कसे करशील?’ 21 “तो
म्हणाला, ‘मी जाऊन त्याच्या सर्व संदेष्ट्यांच्या मुखात फसविणारा
आत्मा होईन.’ “याहवेहने म्हटले, ‘तू त्याला मोहात पाडण्यास यशस्वी
होशील, जा आणि तसे कर.’ 22 “तर आता पाहा, याहवेहने तुझ्या
या सर्व संदेष्ट्यांच्या मुखात फसविणारा आत्मा घातला आहे. आणि
तुझ्यावर अरिष्ट यावे असे याहवेह बोलले आहेत.” 23 तेव्हा केनानाहचा
पुत्र सिद्कीयाह उठला व मिखायाहच्या गालावर चापट मारत विचारले,
“याहवेहचा आत्मा माझ्यामधून निघून तुझ्याशी बोलायला कोणत्या
मार्गाने गेला?” 24 मिखायाहने उत्तर दिले, “ज्या दिवशी तू घराच्या
आतील खोलीत जाऊन लपशील तेव्हा तुला ते समजेल.” 25 तेव्हा
इस्राएलच्या राजाने आज्ञा दिली, “मिखायाहला घ्या आणि शहराचा
अधिकारी आमोन व राजपुत्र योआश यांच्याकडे त्याला परत पाठवा, 26
आणि त्यांना सांगा, ‘राजा असे म्हणतात: या मनुष्याला तुरुंगात टाका
आणि मी सुखरुप परत येईपर्यंत त्याला केवळ भाकर आणि पाणी
द्या.’” 27 तेव्हा मिखायाह म्हणाला, “तू जर सुखरुप परत आलास तर
याहवेह माझ्याद्वारे बोललेच नाही असे समजावे.” तो पुढे म्हणाला,
“लोकांनो, तुम्ही सर्वजण हे लक्षात ठेवा!” 28 यानंतर इस्राएलचा
राजा व यहूदीयाचा राजा यहोशाफाट हे रामोथ गिलआद येथे गेले. 29
इस्राएलचा राजा यहोशाफाटला म्हणाला, “मी वेश बदलून युद्धात प्रवेश
करेन, परंतु तुम्ही तुमची राजवस्त्रे घाला.” म्हणून इस्राएलच्या राजा वेश
बदलून युद्धात गेला. 30 आता अरामाच्या राजाने आपल्या रथांच्या
सरदारांना आज्ञा दिली होती, “इस्राएलच्या राजाशिवाय कोणत्याही
लहान थोरांशी लढू नका.” 31 रथांच्या सरदारांनी जेव्हा यहोशाफाटला
पाहिले, तेव्हा त्यांना वाटले, “हा इस्राएलचा राजा आहे.” म्हणून
ते त्याच्यावर हल्ला करण्यास वळले, पण यहोशाफाटने मोठ्याने
धावा केला, आणि याहवेहने त्याला मदत केली. परमेश्वराने त्यांना

त्याच्यापासून दूर नेले, 32 आणि रथांच्या सरदारांनी पाहिले की तो
इस्राएलचा राजा नाही तेव्हा त्यांनी त्याचा पाठलाग करण्याचे थांबविले.
33 पण कोणीतरी सहजच आपला बाण सोडला आणि तो जाऊन
इस्राएलच्या राजाच्या चिलखत आणि कमरेचा पट्टा यामधून गेला. राजाने
आपल्या रथस्वाराला सांगितले, “रथ मागे फिरव आणि मला युद्धातून
बाहेर काढ कारण मी घायाळ झालो आहे.” 34 तो संपूर्ण दिवस युद्ध
वाढत गेले आणि इस्राएलचा राजा संध्याकाळपर्यंत अराम्यांचा सामना
करीत रथातच राहिला, आणि सूर्यास्ताच्या वेळी तो मरण पावला.

**19** जेव्हा यहूदीयाचा राजा यहोशाफाट सुखरुपपणे त्याच्या
राजवाड्यात यरुशलेम येथे परत आला, 2 तेव्हा हनानीचा
पुत्र येहू संदेष्टा त्याला भेटण्यासाठी गेला आणि यहोशाफाट राजाला
म्हणाला, “तुम्ही दुष्टाला मदत करावी आणि जे याहवेहचा द्वेष करतात
त्यांच्यावर तुम्ही प्रेम करावे काय? याच कारणामुळे याहवेहचा क्रोध
तुमच्यावर आहे. 3 कसेही असले तरी, तुमच्यामध्येही काही चांगले
आहे, कारण तुम्ही अशेरा खांब देशातून काढून टाकले आहेत आणि
परमेश्वराचा शोध घेण्याकडे तुमचे अंतःकरण लावले आहे.” 4
यहोशाफाट यरुशलेममध्ये राहिला आणि तो पुन्हा बेअर-शेबा पासून
एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशातील लोकांमध्ये गेला आणि त्यांना त्यांच्या
याहवेह पूर्वजांच्या परमेश्वराकडे वळविले. 5 त्याने यहूदीयाच्या प्रत्येक
तटबंदीच्या शहरांमध्ये न्यायाधीशांची नेमणूक केली. 6 त्याने त्यांना
सांगितले, “तुम्ही काय करता ते नीट विचार करा, कारण तुम्ही केवळ
मर्त्यांसाठी न्याय करीत नाही, परंतु याहवेहसाठी निर्णय घेता. जेव्हा
तुम्ही जे काही करीत असता तेव्हा ते तुमच्याबरोबर आहेत. 7 आता
याहवेहचे भय तुम्हावर असू द्या, काळजीपूर्वक न्याय करा, कारण आमचे
परमेश्वर याहवेह यांच्याकडे अन्याय किंवा पक्षपात किंवा लाचलुचपत
असे काही चालत नाही.” 8 यरुशलेममध्येही, यहोशाफाटने काही लेवी,
याजक आणि इस्राएली कुटुंबप्रमुखांना याहवेहच्या नियमांचे पालन
करण्यासाठी आणि वाद मिटविण्यासाठी नियुक्त केले. ते यरुशलेममध्ये
राहत होते. 9 त्याने त्यांना असे आदेश दिले: “तुम्ही याहवेहचे भय
बाळगूनच विश्वासूपणाने आणि संपूर्ण अंतःकरणाने सेवा करावी. 10
शहरात राहणाऱ्या तुमच्या लोकांकडून तुमच्यासमोर येणाऱ्या प्रत्येक
बाबतीत—मग तो रक्तपात असो किंवा कायद्याच्या संबंधात, आज्ञा,
हुकूम किंवा नियम—तुम्ही याहवेहविरुद्ध पाप करू नका अशी ताकीद
तुम्ही त्यांना द्यावी; नाहीतर त्यांचा राग तुमच्यावर आणि तुमच्या
लोकांवर येईल. हे असे करा म्हणजे तुम्ही पातक करणार नाही. 11
“याहवेह संबंधित कोणतेही प्रकरण असेल तर मुख्य याजक अमऱ्याह
तुमच्यावर असेल आणि राजाच्या संबंधित कोणतेही प्रकरण असेल
तर यहूदीयाच्या वंशाचा प्रमुख इश्माएलचा मुलगा जबद्याह तुमच्यावर
असेल आणि लेवी तुमच्यापुढे अधिकारी म्हणून काम करतील. धैर्याने
वागा आणि जे चांगले काम करतात त्यांच्याबरोबर याहवेह असतील.”

**20** यानंतर, मोआबी आणि अम्मोनी सैन्य काही मऊनी लोकांना
बरोबर घेऊन यहोशाफाटविरुद्ध युद्ध करण्यासाठी आले. 2 काही
लोक आले आणि यहोशाफाटला म्हणाले, “मृत समुद्राच्या पलीकडे
असलेल्या अराम येथून एक प्रचंड सैन्य तुमच्याविरुद्ध येत आहे. ते
आधीच हससोन-तामार येथे आले आहे” (ते म्हणजे एन-गेदी). 3
धोक्याची सूचना मिळाल्याने यहोशाफाटने याहवेहकडे याची चौकशी
करण्याचा निश्चय केला आणि त्याने सर्व यहूदीयामध्ये उपवासाची
घोषणा केली. 4 त्याप्रमाणे यहूदीयाचे लोक याहवेहची मदत घेण्यास
एकत्र आले; निश्चितच, यहूदीयाच्या प्रत्येक शहरातील लोक त्यांच्या
साहाय्यासाठी आले. 5 नंतर यहोशाफाट याहवेहच्या मंदिराजवळ
नवीन अंगणासमोर यहूदीया आणि यरुशलेम यांच्या सभेमध्ये उभा
राहिला 6 आणि म्हणाला: “याहवेह, आमच्या पूर्वजांच्या परमेश्वरा,
तुम्ही स्वर्गातील परमेश्वर नाही का? तुम्ही राष्ट्रांच्या सर्व राज्यांवर राज्य
करता. सत्ता आणि सामर्थ्य तुमच्या हातात आहे, आणि कोणीही
तुमचा सामना करू शकत नाही. 7 आमच्या परमेश्वरा, या प्रदेशातील
रहिवाशांना तुम्ही तुमच्या इस्राएली लोकांपुढून घालवून दिले आणि
तो प्रदेश तुमचे मित्र अब्राहामच्या वंशजांना कायमचा दिला नाही
का? 8 त्यांनी या प्रदेशात वास्तव्य केले आहे आणि त्यामध्ये तुमच्या
नामासाठी पवित्रस्थान बांधले आहे, ते म्हणाले, 9 ‘जर आमच्यावर
संकटे आली, मग ती न्यायाची तलवार असो किंवा मरी असो किंवा
दुष्काळ, तर आम्ही तुमच्या उपस्थितीत तुमचे नाव धारण करणाऱ्या
या मंदिरापुढे उभे राहू आणि आमच्या संकटात तुमचा धावा करू
आणि तुम्ही आमचे ऐकाल आणि आम्हाला वाचवाल.’ 10 “परंतु
आता येथे अम्मोन, मोआब आणि सेईर पर्वताकडील लोक आहेत,
जेव्हा ते इजिप्तकडून आले तेव्हा तुम्ही इस्राएली लोकांना त्यांच्या
प्रदेशावर आक्रमण करू देत नव्हता; म्हणून ते त्यांच्यापासून दूर गेले
आणि त्यांचा नाश केला नाही. 11 आता पाहा, तुम्ही आम्हाला वारसा
म्हणून दिलेल्या वतनदत्त प्रदेशातून बाहेर काढायला येऊन ते आमची
कशी परतफेड करत आहेत. 12 आमच्या परमेश्वरा, तुम्ही त्यांचा न्याय
करणार नाही का? कारण आमच्यावर हल्ला करणाऱ्या या विशाल
सैन्याचा सामना करण्यासाठी आमच्याकडे शक्ती नाही. काय करावे हे
आम्हाला कळत नाही, परंतु आमची दृष्टी तुमच्याकडे लागली आहे.” 13
यहूदीयाचे सर्व पुरुष, त्यांच्या पत्नी, मुले आणि शिशू यांच्या समवेत
याहवेहसमोर उभे राहिले. 14 तेव्हा जखऱ्याहचा मुलगा यहजिएल, जो
बेनाइयाहचा पुत्र, जो ईयेलचा पुत्र, जो मत्तन्याहचा पुत्र, लेवी आणि
आसाफ याचा वंशज त्याच्यावर याहवेहचा आत्मा आला व तो सभेमध्ये
उभा राहिला. 15 तो म्हणाला, “ऐका, राजा यहोशाफाट आणि जे
यहूदीया आणि यरुशलेममध्ये राहतात ते सर्वजण! याहवेह तुम्हाला असे
म्हणतात: ‘या विशाल सैन्याला घाबरू नका किंवा निराश होऊ नका.
कारण युद्ध तुमचे नव्हे, तर परमेश्वराचे आहे. 16 उद्या त्यांच्या विरोधात
हल्ला करा. जीजच्या खिंडीने ते वर चढत असतील आणि यरुएलच्या
वाळवंटातील खिंडीच्या शेवटी तुम्हाला ते सापडतील. 17 तुम्हाला हे

युद्ध करावे लागणार नाही. तुम्ही तुमचे स्थान ग्रहण करा; खंबीरपणे
उभे राहा. यहूदीया आणि यरुशलेम पहा, याहवेह तुम्हाला सुटकारा
देतील. घाबरू नका; निराश होऊ नका. उद्या त्यांचा सामना करण्यासाठी
बाहेर पडा, आणि याहवेह तुमच्याबरोबर असतील.'" 18 यहोशाफाट
त्याचे मुख जमिनीकडे करून नतमस्तक झाला आणि यहूदीया आणि
यरुशलेमच्या सर्व लोकांनी याहवेहपुढे खाली पडून उपासना केली. 19
नंतर कोहाथी आणि कोरही लोकांमधील काही लेवी उभे राहिले आणि
त्यांनी उच्चस्वरात याहवेहची, इस्राएलच्या परमेश्वराची स्तुती केली.
20 पहाटे ते तकोवाच्या वाळवंटाकडे निघाले. ते बाहेर पडले असताना
यहोशाफाट उभा राहिला आणि म्हणाला, "यहूदीया आणि यरुशलेमच्या
लोकांनो, माझे ऐका! याहवेह तुमचे परमेश्वर यांच्यावर विश्वास ठेवा
आणि तुमचे समर्थन केले जाईल; त्याच्या संदेष्ट्यांवर विश्वास ठेवा
आणि तुम्ही यशस्वी व्हाल." 21 लोकांबरोबर सल्लामसलत केल्यावर,
यहोशाफाटने पुरुषांची नियुक्ती केली, याहवेहची स्तुती गाण्यासाठी
आणि त्यांच्या पवित्रतेच्या वैभवाबद्दल त्यांची स्तुती करण्यासाठी जेव्हा
ते सैन्याचे प्रमुख म्हणून निघाले तेव्हा ते म्हणाले: "याहवेहचे आभार
माना, कारण त्यांचे प्रेम अनंतकाळ टिकते." 22 जेव्हा त्यांनी गाणे
गाण्यास आणि स्तुती करण्यास सुरुवात केली लागले, तेव्हा याहवेहनी
यहूदीयावर आक्रमण करणारे अम्मोनी, मोआब आणि सेईर पर्वताच्या
लोकांवर दबा धरून हल्ला केला आणि शत्रूचा पराभव झाला. 23
अम्मोनी आणि मोआबी लोक सेईर पर्वतावरील लोकांवर त्यांचा नाश
करण्यासाठी आणि त्यांचा समूळ उच्छेद करण्यासाठी उठले. सेईर
येथील माणसांची कत्तल करून झाल्यावर त्यांनी एकमेकांचा नाश
करण्यास सुरुवात केली. 24 जेव्हा यहूदीयाचे लोक जिथून वाळवंटातील
दृश्य दिसत होते त्या ठिकाणी आले आणि त्यांनी प्रचंड सैन्याकडे
पाहिले, तेव्हा त्यांना जमिनीवर फक्त मृतदेह पडलेले दिसले; त्यातून
कोणीही सुटला नव्हता. 25 तेव्हा यहोशाफाट आणि त्याची माणसे
त्यांची लूट घ्यायला निघाले, त्यांना त्याच्यामध्ये बरीच उपकरणे, वस्त्रे
आणि मौल्यवान वस्तू सापडल्या—त्यांच्या अपेक्षेपेक्षा जास्त तिथे
होते. इतकी लूट होती की, ती गोळा करावयाला तीन दिवस लागले.
26 चौथ्या दिवशी ते बेराखाह खोऱ्यात एकत्र जमले, जिथे त्यांनी
याहवेहला धन्यवाद दिला. म्हणून आजही त्या ठिकाणाला बेराखाहचे
खोरे असे म्हणतात. 27 नंतर यहोशाफाटच्या नेतृत्वाखाली, यहूदीया
आणि यरुशलेम येथील सर्व पुरुष आनंदाने यरुशलेमकडे परतले,
कारण याहवेहनी त्यांना त्यांच्या शत्रूवर आनंद करण्याचे कारण दिले
होते. 28 त्यांनी यरुशलेममध्ये प्रवेश केला आणि वीणा आणि कर्णे
बरोबर घेऊन ते याहवेहच्या मंदिरात गेले. 29 इस्राएलच्या शत्रूविरुद्ध
याहवेहनी कसे युद्ध केले, हे ऐकून आजूबाजूच्या सर्व राज्यात परमेश्वराचे
भय निर्माण झाले. 30 आणि यहोशाफाटच्या राज्यात शांतता होती,
कारण त्याच्या परमेश्वराने त्याला सर्व बाजूंनी विसावा दिला होता. 31
तेव्हा यहोशाफाटने यहूदीयावर राज्य केले. यहूदीयाचा राजा झाला
तेव्हा तो पस्तीस वर्षांचा होता आणि त्याने यरुशलेमात पंचवीस वर्षे
राज्य केले. त्याच्या आईचे नाव अजुबाह होते, जी शिल्हीची कन्या
होती. 32 आपला पिता आसाचे सर्व मार्गात अनुसरण केले आणि
त्यापासून तो वळला नाही; याहवेहच्या दृष्टीने जे योग्य ते त्याने केले.
33 तरी, डोंगरावरील मंदिरे नष्ट केली नव्हती आणि लोकांनी अजूनही
त्यांची अंतःकरणे त्यांच्या पूर्वजांच्या परमेश्वराकडे लावली नव्हती. 34
यहोशाफाटच्या राज्याच्या इतर घटना सुरुवातीपासून ते शेवटपर्यंतच्या
घटना हनानीचा पुत्र येहू याच्या इतिहासात लिहिलेल्या आहेत, ज्याची
नोंद इस्राएलच्या राजांच्या पुस्तकात आहेत. 35 नंतर, यहूदीयाचा राजा
यहोशाफाटने इस्राएलचा राजा अहज्याह याच्याशी मैत्री केली, ज्याचे
मार्ग दुष्ट होते. 36 व्यापारी जहाजांच्या ताफ्यांची बांधणी करण्यासाठी
तो त्याच्याशी सहमत झाला. नंतर ती एजिओन-गेबेर येथे बांधली गेली,
37 मारेशाहवासी दोदावाहूचा पुत्र एलिएजर याने यहोशाफाटविरुद्ध
भविष्यवाणी केली, "तुम्ही अहज्याहशी युती केल्यामुळे, तुम्ही जे काय
केले आहे त्याचा याहवेह नाश करतील." ही जहाजे उद्ध्वस्त झाली
आणि व्यापाराच्या प्रवासाला तार्शीशला घेऊन जाण्यासाठी ती सक्षम
नव्हती.

**21** त्यानंतर यहोशाफाट आपल्या पूर्वजांबरोबर विसावा पावला
आणि त्याला त्यांच्याबरोबर दावीदाच्या शहरात पुरले. आणि
त्याचा पुत्र यहोराम त्याचा वारस म्हणून राजा झाला. 2 यहोरामचे भाऊ
अजऱ्याह, यहीएल, जखऱ्याह, अजऱ्याह, मिखाएल आणि शफात्याह
हे सर्व इस्राएलचा राजा यहोशाफाटचे पुत्र होते. 3 त्यांच्या वडिलांनी
त्यांना सोन्या-चांदीच्या अनेक भेटवस्तू आणि सोने, मौल्यवान वस्तू,
तसेच यहूदीयामधील तटबंदीची शहरे दिली होती, परंतु त्याने यहोरामला
राज्य दिले कारण तो त्याचा प्रथमपुत्र होता. 4 जेव्हा यहोरामने त्याच्या
वडिलांच्या राज्यावर स्वतःला ठामपणे प्रस्थापित केले, तेव्हा त्याने
इस्राएलच्या काही अधिकाऱ्यांसह त्याच्या सर्व भावांना तलवारीने मारले.
5 जेव्हा यहोराम राजा झाला, तेव्हा त्याचे वय बत्तीस वर्ष होते, त्याने
यरुशलेमवर आठ वर्षे राज्य केले. 6 अहाबाच्या घराण्याने जसे केले
होते त्याचप्रमाणे त्याने इस्राएलच्या राजांच्या मार्गांचे अनुसरण केले,
कारण त्याने अहाबाच्या मुलीबरोबर विवाह केला होता. याहवेहच्या
दृष्टीने जे वाईट ते त्याने केले. 7 तथापि आपला सेवक दावीदासाठी
याहवेहने दावीदाच्या घराण्याचा नाश केला नाही. कारण त्यांनी त्याच्या
वंशजाचा दिवा कायम ठेवण्याचे अभिवचन दिले होते. 8 यहोरामाच्या
काळात, एदोमाने यहूदीयाविरुद्ध बंड पुकारले आणि त्यांनी स्वतःसाठी
एक राजा निवडला. 9 मग यहोराम आपले अधिकारी व सर्व रथ घेऊन
साईर येथे गेला. रात्रीच्या वेळी त्याने उठून ज्या एदोमी लोकांनी त्याला
आणि त्याच्या रथाच्या नायकांना घेरले होते, परंतु रात्रीच्या वेळी उठून
त्याने वेढा मोडून टाकला. 10 आजपर्यंत एदोम यहूदीयाहविरुद्ध बंड
करीत आहे. त्याचवेळेस लिब्नाहने बंड केले, कारण यहोरामने त्याच्या
पूर्वजांचे परमेश्वर याहवेहचा त्याग केला होता. 11 त्याने यहूदीयाच्या
टेकड्यांवर उच्च स्थानेही बांधली आणि यरुशलेमच्या लोकांना व्यभिचार
करावयाला लावले होते आणि यहूदीयाला चुकीच्या मार्गाने नेले होते.

12 यहोरामला एलीयाह संदेष्ट्याकडून एक पत्र मिळाले, त्यामध्ये
लिहिले होते: “तुमचे पिता दावीदाचे परमेश्वर याहवेह असे म्हणतात:
तुम्ही तुमचे पिता यहोशाफाट किंवा यहूदीयाचा राजा आसा यांच्या
मार्गांचे अनुसरण केले नाही. 13 परंतु तुम्ही इस्राएलच्या राजांच्या
मार्गांचे अनुसरण केले आणि अहाबाच्या घराण्याने जसे केले त्याप्रमाणे
तुम्ही यहूदीया आणि यरुशलेमच्या लोकांना व्यभिचार करावयाला
लावले आहे. तुम्ही स्वतःच्या भावांची, स्वतःच्या कुटुंबातील लोकांची,
तुमच्यापेक्षा चांगले असलेल्या पुरुषांचीही हत्या केली आहे. 14 तर
आता याहवेह तुमच्या लोकांवर, तुमच्या मुलांवर, तुमच्या स्त्रियांवर
आणि तुमच्या सर्व गोष्टींवर जोरदार प्रहार करणार आहेत. 15 तुमची
आतडी बाहेर पडेपर्यंत तुम्ही आतड्यांसंबंधीच्या दीर्घकाळच्या आजाराने
खूप त्रस्त व्हाल.” 16 याहवेहनी यहोरामच्या विरुद्ध पलिष्टी लोकांचे
आणि कूशी लोकांच्या जवळ राहणाऱ्या अरब लोकांचे शत्रुत्व जागृत
केले. 17 त्यांनी यहूदीयावर हल्ला केला, त्यावर आक्रमण केले आणि
राजाच्या राजवाड्यात सापडलेली सर्व मालमत्ता, त्याची मुले आणि
स्त्रियांना घेऊन गेले. सर्वात धाकटा यहोआहाज याच्याशिवाय एकही
पुत्र त्याच्याकडे राहिला नव्हता. 18 हे सर्व झाल्यानंतर याहवेहनी
यहोरामला आतड्यांच्या असाध्य आजाराने त्रस्त केले. 19 याकाळाच्या
दरम्यान, दुसऱ्या वर्षाच्या शेवटी या रोगामुळे त्याची आतडी बाहेर आली
आणि तो अत्यंत वेदनांनी मरण पावला. त्याच्या लोकांनी त्याच्या
सन्मानार्थ अंत्यसंस्कार केले नाहीत, जसे त्याच्या पूर्वजांसाठी केले
होते. 20 यहोराम राजा झाला तेव्हा तो बत्तीस वर्षांचा होता आणि त्याने
यरुशलेममध्ये आठ वर्षे राज्य केले. तो मरण पावला याचे कोणालाही
दुःख वाटले नाही आणि त्याला दावीदाच्या नगरात पुरला गेला, परंतु
राजांच्या कबरेत पुरले नाही.

**22** यरुशलेमच्या लोकांनी यहोरामचा धाकटा मुलगा अहज्याहला
त्याच्या जागी राजा केले, कारण हल्ला करणारे जे लोक अरब
लोकांबरोबर छावणीमध्ये आले होते त्यांनी सर्व थोरल्या मुलांचा वध
केला होता, म्हणून यहूदीयाचा राजा यहोरामचा पुत्र अहज्याहने राज्य
करण्यास सुरुवात केली. 2 वयाच्या बावीसाव्या वर्षी अहज्याह राजा
झाला आणि त्याने यरुशलेमात एक वर्ष राज्य केले. त्याच्या आईचे
नाव अथल्याह होते, जी ओमरीची नात होती. 3 तो सुद्धा अहाबाच्या
घराण्याच्या मार्गाने चालला, कारण त्याच्या आईने त्याला दुष्टतेने
वागण्यास प्रोत्साहन दिले. 4 अहाबाच्या घराण्याप्रमाणे याहवेहच्या दृष्टीने
जे वाईट ते त्याने केले, कारण त्याच्या वडिलांच्या मृत्यूनंतर त्याच्या
अपयशाचे ते सल्लागार झाले. 5 त्याने त्यांच्या सल्ल्याप्रमाणेसुद्धा केले
जेव्हा तो अरामचा राजा हजाएलविरुद्ध रामोथ गिलआद येथे झालेल्या
युद्धात अहज्याह इस्राएलचा राजा अहाबाचा पुत्र यहोराम च्या बाजूने
लढला. या युद्धात योराम राजा जखमी झाला; 6 रामाह येथे अरामचा
राजा हजाएलशी लढताना झालेल्या जखमांना मलम पट्टी करण्यासाठी
योराम राजा येज्रीलला परतला. यहूदीयाचा राजा यहोरामचा पुत्र
अहज्याह अहाबाचा पुत्र योरामची प्रकृती पाहण्यासाठी येज्रीलला गेला,
कारण योराम जखमी झाला होता. 7 अहज्याहची यहोरामाशी भेट
यामधून परमेश्वराने अहज्याहचा नाश केला. जेव्हा अहज्याह तिथे आला
तेव्हा तो योरामबरोबर निमशीचा पुत्र येहूला भेटण्यासाठी गेला, ज्याला
अहाबाच्या घराण्याचा नाश करण्यासाठी याहवेह यांनी अभिषेक केला
होता. 8 येहू अहाबाच्या घराण्याचा न्यायनिवाडा करीत असताना,
त्याला यहूदाहचे अधिकारी आणि अहज्याहकडे सेवा करण्याकरिता
आलेले अहज्याहच्या नातेवाईकांची मुले भेटली तेव्हा त्याने त्यांना
ठार मारले. 9 त्यानंतर तो अहज्याहचा शोध घेत गेला आणि त्याच्या
माणसांनी त्याला पकडले तेव्हा तो शोमरोनमध्ये लपला होता, त्याला
येहूकडे आणण्यात आले आणि ठार मारण्यात आले. त्यांनी त्याला
पुरले, कारण ते म्हणाले, “तो यहोशाफाटचा पुत्र होता, ज्याने त्याच्या
संपूर्ण अंतःकरणापासून याहवेहचा सल्ला घेतला होता.” त्यामुळे
अहज्याहच्या घरात राज्य टिकवून ठेवण्याइतके सामर्थ्य कोणातही
नव्हते. 10 जेव्हा अहज्याहची आई अथल्याहने पाहिले की तिचा पुत्र
मरण पावला आहे, तेव्हा ती यहूदीयाच्या सर्व राजघराण्याचा नाश
करण्यास निघाली. 11 परंतु यहोशेबा, यहोराम राजाची कन्या हिने
अहज्याहचा पुत्र योआश याला घेतले आणि ज्या राजपुत्रांची कत्तल
करण्यात येणार होती त्यामधून त्याला चोरले. आणि त्याला आणि
त्याच्या दाईला एका विश्रांतिगृहात ठेवले. कारण यहोराम राजाची कन्या
आणि याजक यहोयादाची पत्नी, यहोशेबा ही अहज्याहची बहीण होती,
म्हणून तिने मुलाला अथल्याहपासून लपवून ठेवले. त्यामुळे ती त्याचा
वध करू शकली नाही. 12 अथल्याहने देशावर राज्य केले त्या सहा
वर्षापर्यंत त्याला परमेश्वराच्या मंदिरात लपवून ठेवण्यात आले होते.

**23** सातव्या वर्षी यहोयादाने त्याचे सामर्थ्य दाखविले. त्याने शंभर
तुकड्यांचे सरदार यांच्यासोबत करार केला: यरोहामचा पुत्र
अजऱ्याह, यहोहानानचा पुत्र इश्माएल, ओबेदचा पुत्र अजऱ्याह,
अदायाहचा पुत्र मासेयाह आणि जिक्रीचा पुत्र अलीशाफाट. 2
त्यांनी यहूदीयामध्ये सर्वत्र फिरून सर्व गावातून लेवी आणि इस्राएली
कुटुंबप्रमुखांना एकत्र केले. जेव्हा ते यरुशलेमकडे आले, 3 तेव्हा सर्व
मंडळीने परमेश्वराच्या मंदिरात राजाबरोबर एक करार केला. यहोयादा
त्यांना म्हणाला, “याहवेहनी दावीदाच्या वंशजांविषयी वचन दिल्याप्रमाणे
राजाचा पुत्र राज्य करेल. 4 आता तुम्ही असे करावे: तुमच्यापैकी
एकतृतीयांश याजक आणि लेवी जे शब्बाथ दिवशी कर्तव्य बजावत
आहेत, त्यांनी दारांवर पहारा ठेवावा, 5 तुमच्यापैकी एकतृतीयांश
राजवाड्यात आणि एकतृतीयांश लोकांनी पायाभरणीचे प्रवेशद्वार आणि
इतर सर्वांनी याहवेहच्या मंदिराच्या प्रांगणात असावे. 6 कार्यासाठी
नियुक्त केलेले याजक व लेवी हे शुद्ध केलेले आहेत म्हणून यांच्याशिवाय
याहवेहच्या मंदिरात कोणी प्रवेश करू नये; परंतु प्रवेश करू नये ही
याहवेहची आज्ञा इतर सर्वांनी पाळावी. 7 प्रत्येक लेवींनी हातात शस्त्र
घेऊन राजाभोवती उभे राहावे. जो कोणी मंदिरात प्रवेश करेल त्याला
जिवे मारावे. राजा जिथे जाईल तिथे तुम्ही त्याच्याजवळ राहावे.” 8
यहोयादा याजकाच्या आज्ञेप्रमाणे लेवी आणि यहूदीयाच्या सर्व पुरुषांनी

केले. प्रत्येकाने आपआपली माणसे घेतली; जे शब्बाथाच्या दिवशी
सेवेला येणार होते आणि जे सेवा संपवून जात होते—कारण यहोयादा
याजकाने कोणत्याही विभागांना सुट्टी दिली नव्हती. 9 यहोयादा
याजकाने परमेश्वराच्या मंदिरामधील दावीद राजाचे भाले व मोठ्या
आणि लहान ढाली होत्या, त्या शताधिपतींच्या हाती दिल्या. 10 त्याने
सर्व पुरुषांना प्रत्येकाच्या हातात शस्त्र घेऊन राजाभोवती; मंदिराच्या
दक्षिणेच्या बाजूकडून उत्तरेच्या बाजूपर्यंत; वेदीजवळ व मंदिराजवळ
उभे केले. 11 मग यहोयादाने व त्याच्या पुत्रांनी राजाच्या पुत्राला बाहेर
आणले, त्याच्या शिरावर राजमुकुट ठेवला; त्यांनी त्याच्या हातामध्ये
कराराची प्रत दिली आणि त्याला राजा म्हणून घोषित केले. मग त्यांनी
त्याला अभिषेक केला व मोठ्याने जयघोष करून ते म्हणाले, “राजा
चिरायू होवो!” 12 जेव्हा अथल्याहने लोकांच्या धावपळीचा आणि
राजाचा जयघोष करण्याचा आवाज ऐकला, तेव्हा ती त्यांच्याकडे
याहवेहच्या मंदिरात आली. 13 तिने बघितले राजा प्रवेशद्वाराच्या
खांबाजवळ उभा आहे. अधिकारी आणि कर्णेवादक हे राजाजवळ
उभे होते आणि राष्ट्रातील सर्व लोक हर्षोल्हास करीत कर्णे वाजवित
आणि वादक त्यांच्या वाद्यांसह स्तुती करीत होते. तेव्हा अथल्याहने
आपली वस्त्रे फाडली आणि ओरडून म्हणाली, “फितुरी, फितुरी!” 14
यहोयादा याजकाने नेमणूक केलेल्या शताधिपतीच्या सेनाधिकाऱ्यांना
बाहेर पाठवले, आणि त्यांना सांगितले: “सैन्याच्या रांगेतून तिला बाहेर
काढा आणि जो कोणी तिच्यामागे जाईल त्याला तलवारीने मारा.”
याजकाने म्हटले होते, “तिला याहवेहच्या मंदिरात जिवे मारू नये.” 15
म्हणून ती राजवाड्याच्या मैदानात, घोड्यांच्या प्रवेशद्वाराकडे पोहोचताच
त्यांनी तिला ताब्यात घेतले आणि तिथे त्यांनी तिला ठार मारले. 16
मग यहोयादाने एक करार केला की तो, लोक आणि राजा याहवेहची
प्रजा असणार. 17 सर्व लोक बआलच्या मंदिराकडे गेले आणि त्यांनी ते
तोडून टाकले. त्यांनी वेद्या आणि मूर्ती फोडून टाकल्या आणि बआलचा
याजक मत्तान याचा वेदीसमोर वध केला. 18 नंतर दावीदाने ज्यांची
मंदिरात होमार्पणे करण्यासाठी नेमणूक केली होती, त्या याजकीय
लेव्यांच्या हाती यहोयादाने याहवेहच्या मंदिराची देखरेख सोपविली.
मोशेच्या नियमशास्त्रात लिहिल्याप्रमाणे, दावीदाने सांगितल्याप्रमाणे
ते आनंद करीत होते आणि गाणी गात होते. 19 त्याने याहवेहच्या
मंदिराच्या वेशींवर द्वारपालसुद्धा नेमले, ज्यामुळे कोणत्याही प्रकाराने
अशुद्ध व्यक्तीने प्रवेश करू नये. 20 त्याने त्याच्याबरोबर शताधिपती,
लोकांचे राज्यकर्ते आणि देशातील सर्व लोकांना घेतले आणि याहवेहच्या
मंदिरातून राजाला खाली आणले. ते वरच्या दरवाज्याने राजवाड्यात गेले
आणि राजाला राजासनावर बसविले. 21 राष्ट्रातील प्रत्येकजण आनंद
करीत होता आणि शहर शांत झाले, कारण अथल्याहचा तलवारीने वध
करण्यात आला होता.

**24** जेव्हा योआश राजा झाला तेव्हा तो सात वर्षांचा होता. आणि
त्याने चाळीस वर्षे यरुशलेममध्ये राज्य केले. त्याच्या आईचे नाव
सिबियाह होते; ती बेअर-शेबा येथील होती. 2 यहोयादा याजकाच्या
सर्व वर्षांमध्ये योआशाने याहवेहच्या दृष्टीने जे योग्य होते तेच केले. 3
यहोयादाने त्याच्यासाठी दोन पत्नींची निवड केली आणि त्याला पुत्र
व कन्या झाल्या. 4 काही काळानंतर योआशाने याहवेहच्या मंदिराची
दुरुस्ती करण्याचे ठरविले. 5 त्याने याजकांना आणि लेवींना एकत्र
बोलाविले आणि त्यांना सांगितले, “यहूदीयाच्या गावांकडे जा आणि
तुमच्या परमेश्वराच्या मंदिराची दुरुस्ती करण्यासाठी सर्व इस्राएल
लोकांकडून वार्षिक देय रक्कम गोळा करा. आताच हे करा.” परंतु
लेवी लोकांनी त्यावर तत्काळ हालचाल केली नाही. 6 तेव्हा राजाने
मुख्य याजक यहोयादा याला बोलावून घेतले आणि त्याला म्हणाला,
“याहवेहचा सेवक मोशे आणि इस्राएलच्या सभेचे लोक यांनी लावलेला
करार नियमांच्या तंबूसाठी लावलेला कर यहूदीया आणि यरुशलेममधून
आणण्याची मागणी तुम्ही लेवींकडे का केली नाही?” 7 आता अथल्याह
या दुष्ट स्त्रीच्या मुलांनी परमेश्वराचे मंदिर तोडून त्यात प्रवेश केला
होता आणि याहवेहच्या घराच्या सर्व पवित्र वस्तूंचा सुद्धा बआल
दैवतांसाठी वापर केला होता. 8 राजाच्या आज्ञेनुसार, एक पेटी तयार
केली गेली आणि बाहेर याहवेहच्या मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ ठेवण्यात
आली. 9 तेव्हा यहूदीया आणि यरुशलेममध्ये अशी घोषणा देण्यात
आली की, परमेश्वराचा सेवक मोशे याने अरण्यात इस्राएलचा जो कर
मागितला होता तो त्यांनी याहवेहकडे आणावा. 10 सर्व अधिकारी
आणि सर्व लोकांनी आनंदाने त्यांची वर्गणी आणली आणि ती पेटी
पूर्ण भरेपर्यंत त्यात टाकत राहिले. 11 जेव्हाही लेवी लोकांद्वारे पेटी
राजाच्या अधिकाऱ्यांकडे आणली जात होती आणि त्यांनी पाहिले की,
त्यात मोठ्या प्रमाणात पैसे होते, तेव्हा राजेशाही सचिव आणि मुख्य
याजकाचा अधिकारी येत असत आणि पेटी रिकामी करीत आणि पुन्हा
ती पेटी घेऊन तिच्या जागेवर ठेवीत. त्यांनी हे नियमितपणे केले आणि
मोठ्या प्रमाणात पैसे गोळा केले. 12 राजा आणि यहोयादा यांनी ते
याहवेहच्या मंदिरासाठी आवश्यक ते काम करणाऱ्यांना दिले. त्यांनी
याहवेहच्या मंदिराच्या दुरुस्तीसाठी गवंडी आणि सुतार आणि लोखंडी
आणि कास्यकाम करणारे कामगार ठेवले. 13 कामाची जबाबदारी
सांभाळणारे लोक कष्टाळू होते आणि त्यांच्या हाताखाली दुरुस्तीचे
काम चालू होते. त्यांनी परमेश्वराचे मंदिर त्याच्या मूळ रचनेनुसार
पुन्हा बांधले आणि ते भरभक्कम केले. 14 जेव्हा त्यांनी ते काम
संपविले, त्यांनी उरलेले पैसे राजा आणि यहोयादा यांच्याकडे आणले
आणि त्यातून याहवेहच्या मंदिरासाठी वस्तू बनविल्या: विधीसाठी
आणि होमार्पणासाठी वस्तू, आणि ताटेसुद्धा व सोन्या-चांदीच्या इतर
वस्तू. जोपर्यंत यहोयादा जिवंत होता, तोपर्यंत याहवेहच्या मंदिरात
निरंतर होमार्पण केले जात होते. 15 यहोयादा आता पूर्ण वयस्कर
झाला होता आणि तो वयाच्या एकशे तिसाव्या वर्षी मरण पावला.
16 इस्राएलमध्ये परमेश्वरासाठी आणि त्यांच्या मंदिरासाठी केलेल्या
चांगल्या गोष्टींमुळे, त्याला दावीदाच्या नगरात राजांबरोबर पुरण्यात
आले. 17 यहोयादाच्या मृत्यूनंतर, यहूदीयाचे अधिकारी आले आणि
त्यांनी राजाला आदरयुक्त वंदन केले आणि त्याने त्यांचे ऐकले. 18

त्यांनी त्यांच्या पूर्वजांचे परमेश्वर याहवेह यांचे मंदिर सोडून दिले, आणि
अशेरा खांब आणि मूर्त्या यांची पूजा केली. त्यांच्या या अपराधामुळे
परमेश्वराचा क्रोध यहूदीया आणि यरुशलेम यांच्यावर आला. 19 जरी
याहवेहनी लोकांना त्यांच्याकडे परत आणण्यासाठी संदेष्टे पाठवले
आणि त्यांनी त्यांच्याविरुद्ध साक्ष दिली, तरी त्यांनी ऐकले नाही. 20 मग
यहोयादा याजकाचा मुलगा जखर्‍याह याच्यावर परमेश्वराचा आत्मा
आला. तो लोकांसमोर उभा राहिला आणि म्हणाला, “परमेश्वर, असे
म्हणतात, ‘तुम्ही याहवेहच्या आज्ञांचे पालन का करीत नाही? तुमची
भरभराट होणार नाही. कारण तुम्ही याहवेह यांना सोडले आहे, म्हणून
त्याने तुमचा त्याग केला आहे.’” 21 परंतु त्यांनी त्याच्याविरुद्ध कट
रचला आणि राजाच्या हुकुमावरून याहवेह यांच्या मंदिराच्या अंगणात
त्याला दगडमार करून ठार मारले. 22 जखर्‍याहचे वडील यहोयादा
याने त्याच्यावर जो दयाळूपणा केला होता त्याची राजा योआशाने
आठवण केली नाही, परंतु त्याने त्याच्या पुत्राला ठार मारले, जो त्याच्या
मरणाच्या अवस्थेत म्हणाला, “याहवेह हे पाहतील आणि तुला त्याचा
हिशोब मागतील.” 23 वर्षाच्या शेवटी, अरामच्या सैन्याने योआशविरुद्ध
युद्धासाठी कवायत केली; त्याने यहूदीया आणि यरुशलेमवर आक्रमण
केले आणि लोकांच्या सर्व नेत्यांना ठार केले. त्यांनी लूट केलेला सर्व
माल दिमिष्कातील त्यांच्या राजाकडे पाठवला. 24 जरी अरामी सैन्य
थोडीच माणसे बरोबर घेऊन आले होते, तरी याहवेहनी त्यांच्या हाती
पुष्कळ मोठे सैन्य दिले. कारण यहूदाहने त्यांच्या पूर्वजांचा परमेश्वर
याहवेह यांना सोडले होते, योआशवर न्यायदंडाची कारवाई करण्यात
आली. 25 जेव्हा अरामी लोक मागे फिरले, तेव्हा त्यांनी योआशला
गंभीर जखमी करून सोडले. यहोयादा या याजकाच्या मुलाचा खून
करण्यासाठी त्याच्या अधिकार्‍यांनी त्याच्याविरुद्ध कट रचला आणि
त्यांनी त्याला त्याच्या पलंगावर ठार मारले. म्हणून तो मरण पावला
आणि त्याला दावीदाच्या नगरात पुरण्यात आले, परंतु राजांच्या कबरेत
नव्हे. 26 ज्यांनी त्याच्याविरुद्ध कट रचला ते म्हणजे शिमाथ या अम्मोनी
स्त्रीचा पुत्र जाबाद आणि यहोजाबाद हा मोआबी स्त्री शिमरीथचा पुत्र.
27 त्याच्या पुत्राचा वृत्तांत, त्याच्याविषयीच्या पुष्कळ भविष्यवाण्या
आणि परमेश्वराच्या मंदिराच्या पुनर्स्थापनेची नोंद राजांच्या पुस्तकावरील
टिप्पणीत लिहिली आहे. त्याच्यानंतर त्याचा पुत्र अमस्याह हा राजा
झाला.

**25** वयाच्या पंचवीसाव्या वर्षी अमस्याह राजा झाला, त्याने
यरुशलेमात एकोणतीस वर्षे राज्य केले. त्याच्या आईचे नाव
यहोअदान होते; ती यरुशलेमची होती. 2 त्याने याहवेहच्या दृष्टीने
जे योग्य होते ते केले, परंतु संपूर्ण अंतःकरणापासून नाही. 3 राज्य
त्याच्या पूर्णपणे नियंत्रणात आल्यानंतर त्याने त्याचा पिता राजाचा वध
करणार्‍या अधिकार्‍यांना मृत्युदंड दिला. 4 परंतु त्याने त्यांच्या मुलांना
जिवे मारले नाही, तर नियमशास्त्रात, मोशेच्या पुस्तकात जे लिहिले
आहे, त्यानुसार वागले, याहवेहने आज्ञा दिली होती: “आईवडिलांना
त्यांच्या मुलांच्या कारणामुळे जिवे मारू नये, तसेच आईवडिलांच्या
कारणामुळे त्यांच्या मुलांना जिवे मारू नये. प्रत्येकजण स्वतःच्या
पापासाठी मरेल.” 5 अमस्याहने यहूदीयाच्या लोकांना एकत्र बोलाविले
आणि सर्व यहूदाह आणि बिन्यामीनसाठी त्यांच्या कुटुंबांप्रमाणे हजारोंचे
सेनापती आणि शंभराचे सेनापती नियुक्त केले. त्यानंतर त्याने वीस वर्षे
किंवा त्याहून अधिक वयाचे लोक एकत्र केले आणि त्याला असे दिसून
आले की लष्कराच्या सेवेसाठी योग्य असे तीन लाख पुरुष आहेत, भाला
आणि ढाल हाताळण्यास ते सक्षम आहेत. 6 त्याने शंभर तालांत चांदी
देऊन इस्राएलमधून एक लाख लढाऊ माणसेसुद्धा भाड्याने घेतली.
7 परंतु परमेश्वराचा एक मनुष्य त्याच्याकडे आला आणि म्हणाला,
“महाराज, इस्राएलकडून आलेल्या या सैन्याने तुमच्याबरोबर जाऊ
नये, कारण याहवेह इस्राएलबरोबर नाहीत; एफ्राईमच्या कोणत्याही
लोकांबरोबर नाहीत. 8 जरी तुम्ही जाल आणि धाडसाने युद्ध कराल, तरी
परमेश्वर तुम्हाला शत्रूसमोर उलथून पाडतील, कारण कोणाला मदत
करावी किंवा कोणाला उलथून पाडावे यासाठी परमेश्वर सामर्थ्यशाली
आहेत.” 9 अमस्याहने परमेश्वराच्या मनुष्याला विचारले, “परंतु मी या
इस्राएली सैन्यासाठी शंभर तालांत चांदी दिली आहेत त्याचे काय?”
परमेश्वराच्या मनुष्याने उत्तर दिले, “याहवेह, तुम्हाला त्याच्यापेक्षाही
अधिक देऊ शकतात.” 10 तेव्हा अमस्याहने एफ्राईमहून त्याच्याकडे जे
सैन्य आले होते त्यांना काढून त्यांच्या घरी परत पाठविले. ते यहूदीयावर
खूप रागावले आणि संतापाने घरी निघून गेले. 11 अमस्याहने नंतर
त्याचे सामर्थ्य वाढविले आणि त्याचे सैन्य क्षार खोर्‍यात नेले आणि तिथे
त्याने सेईरच्या दहा हजार लोकांना ठार केले. 12 यहूदीयाच्या सैन्याने
दहा हजार माणसांनासुद्धा जिवंत पकडले, त्यांना एका कड्याच्या
टोकावर नेले आणि तिथून खाली फेकले, त्या सर्वांचे तुकडे झाले. 13
दरम्यान, अमस्याहने ज्या सैन्याला परत पाठवले होते आणि युद्धात
भाग घेऊ दिला नव्हता, त्यांनी शोमरोनपासून बेथ-होरोनपर्यंत तेथील
यहूदीयाच्या नगरांवर हल्ला केला. त्यांनी तीन हजार लोकांना ठार
केले आणि मोठ्या प्रमाणात लूट घेऊन गेले. 14 अमस्याह जेव्हा
एदोमी लोकांचा वध करून परत आला, तेव्हा त्याने सेईरच्या लोकांची
दैवते सोबत आणली, त्यांच्यापुढे लवून नमन केले आणि त्यांच्यासाठी
होमार्पणे केली. 15 याहवेहचा राग अमस्याहवर भडकला आणि त्यांनी
त्याच्याकडे एका संदेष्ट्याला पाठविले, तो म्हणाला, “या लोकांच्या
दैवतांचा तू सल्ला का घेतोस, जे स्वतःच्या लोकांना तुझ्या हातातून
वाचवू शकले नाहीत?” 16 तो बोलत असतानाच राजा त्याला म्हणाला,
“आम्ही तुला राजाचा सल्लागार नेमला आहे का? थांब! का बरे तू
मारला जावास?” तेव्हा तो संदेष्टा थांबला व म्हणाला, “मला माहीत
आहे की परमेश्वराने तुझा नाश करण्याचे ठरविले आहे, कारण तू
असे केलेस आणि माझा सल्ला ऐकला नाहीस.” 17 यहूदीयाचा
राजा अमस्याहने त्याच्या सल्लागारांशी सल्लामसलत केली, त्याने हे
आव्हान इस्राएलचा राजा, येहूचा पुत्र यहोआहाज याचा पुत्र यहोआश
याच्याकडे पाठविले: “चल ये, युद्धात एकमेकांचा सामना करू.” 18
परंतु इस्राएलचा राजा योआश याने यहूदीयाचा राजा अमस्याह याला

उत्तर दिले: “लबानोनमधील एका काटेरी झुडूपाने लबानोनमधील
एका गंधसरूला निरोप पाठवला की, ‘तुझ्या मुलीचा विवाह माझ्या
मुलाशी करून दे.’ तेव्हा लबानोनमधून एका जंगली श्वापदाने येऊन त्या
काटेरी झुडूपाला पायाखाली तुडविले. 19 तू स्वत:ला म्हणतोस की, तू
एदोमाचा पराभव केला आहेस आणि आता तू उद्धट व गर्विष्ठ झाला
आहेस. परंतु घरीच राहा! संकटांला आमंत्रण देऊन स्वत:चा आणि
यहूदीयाचा नाश तू का करावा?” 20 परंतु अमस्याहने ऐकले नाही,
कारण परमेश्वराने तसेच केले की, ते त्याला यहोआशच्या हाती सोपवून
देणार होते, कारण त्यांनी एदोमाच्या दैवतांचा सल्ला घेतला होता. 21
तेव्हा इस्राएलाचा राजा यहोआशने हल्ला केला. तो आणि यहूदीयाचा
राजा अमस्याहने यहूदीयातील बेथ-शेमेश येथे एकमेकांचा सामना केला.
22 इस्राएलने यहूदीयाचा पराभव केला आणि प्रत्येकजण आपआपल्या
घरी पळून गेले. 23 इस्राएलाचा राजा यहोआशने यहोआहाजचा पुत्र,
योआशाचा पुत्र यहूदीयाचा राजा अमस्याहला बेथ-शेमेश येथे कैद
केले. नंतर योआशाने त्याला यरुशलेमास आणले आणि यरुशलेमची
एफ्राईमच्या दरवाजापासून कोपऱ्याच्या दरवाजापर्यंत भिंत त्याने पाडून
टाकली; जी चारशे हात लांब होती. 24 परमेश्वराच्या मंदिरातील सर्व
सोने, चांदी व सापडतील ती पात्रे त्याने घेतली, जी ओबेद-एदोमच्या
देखरेखीखाली होते. आणि राजवाड्याच्या तिजोरीसह कैद्यांना घेऊन तो
शोमरोनास परतला. 25 इस्राएलचा राजा यहोआहाजचा पुत्र योआश
याच्या मृत्यूनंतर यहूदीयाचा राजा अमस्याह पंधरा वर्षे जगला. 26
अमस्याहच्या राज्यकाळातील इतर घटना, सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत,
यहूदीयाच्या आणि इस्राएलच्या राजांच्या पुस्तकात लिहिलेल्या नाहीत
काय? 27 अमस्याह याहवेहचे अनुसरण करण्यापासून दूर गेला,
तेव्हापासून त्यांनी यरुशलेममध्ये त्याच्याविरुद्ध कट रचला आणि तो
लाखीशकडे पळून गेला, परंतु त्यांनी त्याच्यामागे लाखीशकडे माणसे
पाठवून दिली आणि त्याला तिथे मारले. 28 त्याला घोड्यावरून परत
आणण्यात आले आणि यहूदीयाच्या शहरात त्याच्या पूर्वजांबरोबर
पुरण्यात आले.

**26** तेव्हा यहूदीयाच्या सर्व लोकांनी उज्जीयाहला घेतले, जो सोळा
वर्षांचा होता, त्याला त्याचा पिता अमस्याहच्या जागी राजा
म्हणून निवडले. 2 अमस्याह राजाने त्याच्या पूर्वजांसोबत विश्रांती
घेतल्यानंतर एलोथची पुनर्बांधणी करणारा आणि ते यहूदीयाच्या
पूर्वस्थितीत आणणारा तोच होता. 3 उज्जीयाह राजा झाला तेव्हा तो
सोळा वर्षांचा होता आणि त्याने यरुशलेममध्ये बावन्न वर्षे राज्य केले.
त्याच्या आईचे नाव येकोल्याह. ती यरुशलेम येथील होती. 4 त्याने
आपला पिता अमस्याह याच्याप्रमाणे याहवेहच्या दृष्टीने जे योग्य ते केले.
5 जखऱ्याहच्या काळात त्याने परमेश्वराचा सल्ला घेतला, ज्यांनी त्याला
परमेश्वराच्या भयामध्ये राहणे शिकविले. जोपर्यंत त्याने याहवेहचा
सल्ला घेतला, परमेश्वराने त्याला यश दिले. 6 तो पलिष्ट्यांविरुद्ध
युद्ध करण्यास गेला आणि त्याने गथ, याबनेह आणि अश्दोद यांच्या
भिंती पाडल्या. त्यानंतर त्याने अश्दोदजवळ आणि पलिष्ट्यांमध्ये
इतर ठिकाणी शहरांची पुनर्बांधणी केली. 7 परमेश्वराने त्याला पलिष्टी
लोकांविरुद्ध आणि गुर-बाल येथे राहणाऱ्या अरब लोकांविरुद्ध आणि
मऊनीमी लोकांविरुद्ध लढण्यास मदत केली. 8 अम्मोनी लोकांनी
उज्जीयाहकडे खंडणी आणली आणि त्याची किर्ती इजिप्तच्या सीमेपर्यंत
पसरली, कारण तो खूप शक्तिशाली झाला होता. 9 उज्जीयाहने
यरुशलेममध्ये कोपऱ्याच्या फाटकाजवळ, खोऱ्यांच्या फाटकाजवळ
आणि दोन भिंतीच्या कोपऱ्याजवळ बुरूज बांधले आणि त्यांची तटबंदी
केली. 10 त्याने वाळवंटात बुरूजही बांधले आणि पुष्कळ पाण्याच्या
टाक्या बांधल्या, कारण त्याच्याकडे डोंगरपायथ्याजवळ आणि मैदानात
भरपूर गुरे होती. त्याच्या शेतामध्ये आणि डोंगरामधील द्राक्षमळयात
आणि उपज देणाऱ्या जमिनीवर काम करणारे लोक त्याच्याकडे
होते, कारण त्याला जमिनीची आवड होती. 11 उज्जीयाहकडे एक
प्रशिक्षित सैन्य होते, हनन्याह हा राजेशाही अधिकाऱ्यांपैकी एक होता,
याच्या मार्गदर्शनाखाली सचिव ईयेल आणि मासेयाह या अधिकाऱ्याने
जमविलेल्या संख्येनुसार विभाग करून ते युद्ध करण्यास सुसज्जित
होते. 12 योद्धे पुरुषांच्या कुटुंब प्रमुखांची एकूण संख्या 2,600 होती.
13 त्यांच्या नेतृत्वाखाली युद्धासाठी प्रशिक्षित झालेल्या पुरुषांचे सैन्य
3,07,500 होते, राजाला त्याच्या शत्रूविरुद्ध आधार देण्यासाठी
ते एक शक्तिशाली सैन्य होते. 14 उज्जीयाहने त्यांना ढाली, भाले,
शिरस्त्राण, चिलखते, धनुष्ये आणि गोफणी यांचा पुरवठा केला. 15
यरुशलेममध्ये त्याने बुरुजावर आणि कोपऱ्यांवरील संरक्षणांसाठी वापर
करण्यासाठी शोध लावलेली उपकरणे बनविली. ज्यामुळे सैनिक बाण
मारू शकतील आणि भिंतीवरून मोठे दगड फेकू शकतील. त्याची किर्ती
दूर पसरली, कारण तो सामर्थ्यशाली होईपर्यंत त्याला खूप मदत झाली
होती. 16 परंतु उज्जीयाह सामर्थ्यवान झाल्यावर त्याचा गर्विष्ठपणा
त्याला नाशाकडे घेऊन गेला. तो त्याचे परमेश्वर याहवेह यांच्याबरोबर
अविश्वासू झाला आणि त्याने धूपवेदीवर धूप जाळण्यासाठी याहवेहच्या
मंदिरात प्रवेश केला. 17 अजऱ्याह याजका बरोबर याहवेहचे इतर ऐंशी
धैर्यवान याजक त्याच्यामागे आले. 18 ते उज्जीयाह राजास भेटले आणि
म्हणाले, “उज्जीयाह, याहवेहसाठी धूप जाळणे तुला योग्य नाही. धूप
जाळण्यासाठी अहरोनाचे वंशज, याजकांचे शुद्धीकरण करण्यात आले
आहे. त्या पवित्रस्थानातून बाहेर पड, कारण तू विश्वासू राहिला नाहीस
आणि परमेश्वर याहवेह यांच्याकडून तुझा सन्मान केला जाणार नाही.”
19 उज्जीयाह धूप जाळण्यासाठी त्याच्या हातात धूपदान घेऊन तयार
होता, तो याजकांवर रागावला. याहवेहच्या मंदिरातील धूपवेदीसमोर
पुजाऱ्यांवर तो रागावत असताना त्याच्या कपाळावर कुष्ठरोग आला. 20
जेव्हा अजऱ्याह मुख्य याजक आणि इतर सर्व याजक यांनी त्याच्याकडे
पाहिले, तेव्हा त्यांना त्याच्या कपाळावर कुष्ठरोग झाल्याचे दिसले,
म्हणून त्यांनी त्याला त्वरित बाहेर काढले. निश्चितच, तो स्वत:हून तिथून
निघून जाण्यास तयार झाला होता, कारण याहवेहनी त्याला पीडले होते.
21 उज्जीयाह राजाला त्याच्या मृत्यूच्या दिवसापर्यंत कुष्ठरोग होता. एका
वेगळया घरात तो राहत होता—कुष्ठरोगी असल्याने याहवेहच्या मंदिरात

येण्यास त्याला बंदी होती. त्याचा पुत्र योथामकडे राजवाड्याचा कारभार होता आणि देशातील लोकांवर त्याने राज्य केले. **22** उज्जीयाहच्या कारकिर्दीतील इतर घटना सुरुवातीपासून शेवटपर्यंत, आमोजाचा पुत्र यशायाह संदेष्ट्याद्वारे लिहून ठेवल्या आहेत. **23** उज्जीयाह आपल्या पूर्वजांबरोबर विसावा पावला आणि राजांच्या मालकीच्या स्मशानभूमीत त्याला पुरण्यात आले, कारण लोक म्हणाले, “त्याला कुष्ठरोग झाला होता.” आणि त्याचा वारस त्याचा पुत्र योथाम राजा झाला.

**27** वयाच्या पंचवीसाव्या वर्षी योथाम राजा झाला आणि त्याने यरुशलेमात सोळा वर्षे राज्य केले. त्याच्या आईचे नाव यरुशा, ती सादोकची कन्या होती. **2** त्याचे पिता उज्जीयाहने जसे केले तसे त्यानेही याहवेहच्या दृष्टीने जे योग्य ते केले; परंतु त्याने याहवेहच्या मंदिरात प्रवेश केला नाही. तथापि लोकांनी त्यांचे भ्रष्ट व्यवहार सुरूच ठेवले. **3** योथामाने याहवेहच्या मंदिराचा वरील दरवाजा पुन्हा बांधला आणि ओफेलच्या डोंगरावरील भिंतीवर बरेच काम केले. **4** त्याने यहूदीयाच्या डोंगराळ प्रदेशात नगरे बांधली आणि जंगली भागात किल्ले आणि बुरूज बांधले. **5** योथामाने अम्मोन्यांच्या राजाशी युद्ध करून त्यांना जिंकले. त्या वर्षी अम्मोनी लोकांनी त्याला शंभर तालांत चांदी, दहा हजार कोर गहू आणि दहा हजार कोर जव दिले. अम्मोनी लोकांनी दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षी देखील त्याच प्रमाणात वस्तू आणल्या. **6** योथाम सामर्थ्याने वाढत गेला, कारण तो त्याचे परमेश्वर याहवेहसमोर स्थैर्याने चालला. **7** योथामच्या राज्यकाळातील इतर घटना, त्याने केलेली सर्व युद्धे आणि इतर गोष्टी इस्राएलचे राजे आणि यहूदीयाचे राजे यांच्या इतिहासात लिहिलेल्या आहेत. **8** वयाच्या पंचवीसाव्या वर्षी योथाम राजा झाला आणि त्याने यरुशलेमात सोळा वर्षे राज्य केले. **9** योथाम त्याच्या पूर्वजांबरोबर विसावा पावला आणि त्याला दावीदाच्या नगरात पुरण्यात आले. आणि त्याचा पुत्र आहाज त्याचा वारस म्हणून राजा झाला.

**28** वयाच्या वीसाव्या वर्षी आहाज राजा झाला आणि त्याने यरुशलेममध्ये सोळा वर्षे राज्य केले. त्याचे पिता दावीदाने केले त्याप्रमाणे, याहवेहच्या दृष्टीने जे योग्य ते त्याने केले नाही. **2** त्याने इस्राएलच्या राजांच्या मार्गांचे अनुसरण केले आणि पूजा करण्यासाठी बआल दैवतांच्या मूर्तीसुद्धा बनविल्या. **3** त्याने बेन हिन्नोमच्या खोऱ्यात बलिदानांचे यज्ञ केले आणि त्याच्या लेकरांचे अग्नीत अर्पण केले, राष्ट्रांच्या ज्या अमंगळ प्रथा याहवेहने इस्राएल लोकांतून काढून टाकल्या होत्या त्यात तो गुंतला. **4** त्याने डोंगरावर, टेकड्यांवर आणि प्रत्येक घनदाट वृक्षाखाली यज्ञार्पणे केली आणि धूप जाळला. **5** त्यामुळेच त्याचे परमेश्वर याहवेहनी त्याला अरामच्या राजाच्या हाती सोपविले. अरामी लोकांनी त्याचा पराभव केला आणि त्याच्या अनेक लोकांना कैद करून दिमिष्क येथे आणले. त्याला इस्राएलच्या राजाच्या हातीही सोपविले, ज्याने त्याला भारी हानी पोहोचविली. **6** रमाल्याह याचा पुत्र पेकहने एका दिवसात यहूदीयामधील एक लाख वीस हजार सैनिकांना ठार केले—कारण यहूदीयाच्या लोकांनी त्यांच्या पूर्वजांचे परमेश्वर याहवेहचा त्याग केला होता. **7** एफ्राईम येथील योद्धा जिक्रीने राजाचा पुत्र मासेयाह, राजवाड्याचा प्रभारी अधिकारी अज्रीकाम आणि राजाच्या नंतरचा सर्वात उच्चाधिकारी एलकानाह यांना ठार मारले. **8** इस्राएली लोकांनी यहूदीया येथून आलेल्या त्यांच्या बंधूइस्राएली लोकांमधून दोन लाख स्त्रिया, पुत्र आणि कन्यांना कैद केले. त्यांनी पुष्कळ लूट घेतली व ती शोमरोनला नेली. **9** परंतु ओदेद नावाचा याहवेह यांचा एक संदेष्टा तिथे होता आणि जेव्हा सैन्य शोमरोनकडे परत आले, तेव्हा तो त्यांची भेट घेण्यासाठी निघाला. तो त्यांना म्हणाला, “तुमच्या पूर्वजांचे परमेश्वर याहवेह यहूदीयावर रागावले होते म्हणून त्यांनी त्यांना तुमच्या हाती दिले. परंतु इतक्या क्रोधाने तुम्ही त्यांची कत्तल केली आहे की, त्याचे पडसाद स्वर्गापर्यंत पोहोचले. **10** आणि आता तुमचा असा उद्देश आहे की, यहूदीया आणि यरुशलेममधील स्त्री-पुरुषांना तुमचे गुलाम बनवावे. परंतु तुमचे परमेश्वर याहवेह यांच्याविरुद्ध केलेल्या पापाबद्दल तुम्हीदेखील दोषी नाहीत का? **11** आता माझे ऐका! तुम्ही कैदी म्हणून आणलेल्या तुमच्या सहइस्राएली लोकांना परत पाठवा, कारण याहवेहचा क्रोधाग्नी तुमच्यावर भडकलेला आहे.” **12** नंतर एफ्राईममधील काही पुढारी—यहोहानानचा पुत्र अजऱ्याह, मेशिल्लेमोथचा पुत्र बेरेख्याह, शल्लूमचा पुत्र यहिज्कीयाह आणि हदलैचा पुत्र अमासा—यांनी जे युद्धातून परत येत होते त्यांचा सामना केला. **13** ते म्हणाले, “तुम्ही त्या कैद्यांना इकडे आणू नये, नाहीतर याहवेहसमोर आपण दोषी ठरले जाऊ. आपल्या पापामध्ये आणि दोषामध्ये आणखी भर घालण्याचा तुमचा विचार आहे काय? कारण आधीच आमचे पाप मोठे आहे आणि त्यांचा क्रोधाग्नी आम्हा इस्राएलींवर भडकलेला आहे.” **14** त्यामुळे शिपायांनी अधिकारी आणि जमलेल्या सर्व मंडळीच्या उपस्थितीत लूट आणि कैदींना सोडून दिले. **15** ज्या माणसांची नेमणूक करण्यात आली होती, त्यांनी कैद्यांना घेतले आणि जे वस्त्रहीन होते त्या सर्वांना कपडे घातले. त्यांनी त्यांना कपडे आणि पायताणे, अन्न आणि पेय आणि बरे होण्यासाठी मलम हे सर्व दिले. जे अशक्त होते त्या सर्वांना त्यांनी गाढवावर बसविले. तेव्हा ते त्यांना त्यांच्या इस्राएली बांधवांकडे यरीहो, खजुरीचे नगर येथे घेऊन गेले आणि ते शोमरोनकडे परत आले. **16** त्यावेळेस आहाज राजाने अश्शूरच्या राजांकडे मदतीसाठी बोलाविणे पाठविले होते. **17** एदोमी लोक पुन्हा आले होते आणि त्यांनी यहूदीयावर हल्ला केला आणि कैद्यांना पळवून नेले. **18** त्यावेळेस पलिष्ट्यांनी डोंगर पायथ्याशी असलेल्या नगरांवर आणि यहूदीयाच्या नेगेवमधील गावांवर हल्ला केला. त्यांनी बेथ-शेमेश, अय्यालोन आणि गदेरोथ, तसेच सोकोह, तिम्नाह आणि गिम्झो आणि त्यांच्या आजूबाजूची गावे काबीज केली. **19** इस्राएलचा राजा आहाजमुळे याहवेहनी यहूदीयाला नम्र केले होते, कारण त्याने यहूदीयामध्ये दुष्टमार्गाला चालना दिली होती आणि तो याहवेहबरोबर अत्यंत अविश्वासू राहिला. **20** अश्शूरचा राजा तिग्लथ-पिलेसर त्याच्याकडे आला, परंतु त्याने त्याला मदत करण्याऐवजी त्याला त्रास दिला. **21** आहाज राजाने याहवेहच्या मंदिरातून आणि

राजवाड्यातून आणि अधिकाऱ्यांकडून काही वस्तू घेतल्या आणि
अश्शूरच्या राजाला भेट म्हणून दिल्या, परंतु त्याचा काही उपयोग झाला
नाही. 22 त्याच्या संकटकाळात राजा आहाज याहवेहबरोबर आणखीच
अविश्वासू झाला. 23 त्याने दिमिष्कच्या दैवतांना बलिदान केले, ज्यांनी
त्याचा पराभव केला होता; कारण त्याला वाटले, “अरामच्या राजांच्या
दैवतांनी त्यांना मदत केली म्हणून मी त्यांना बलिदान करेन म्हणजे
ते मला मदत करतील.” परंतु तेच त्याचे आणि सर्व इस्राएलचे पतन
होण्याचे कारण होते. 24 आहाजाने परमेश्वराच्या मंदिरातील इतर
वस्तू एकत्र केल्या आणि कापून त्याचे तुकडे केले. त्याने याहवेहच्या
मंदिराचे दरवाजे बंद केले आणि यरुशलेममधील प्रत्येक रस्त्याच्या
कोपऱ्यात वेद्या बसविल्या. 25 यहूदीयामधील प्रत्येक गावात त्याने इतर
दैवतांना बलिदाने अर्पिण्यासाठी उच्च स्थाने बांधली आणि याहवेहच्या,
त्याच्या पूर्वजांच्या परमेश्वराच्या रागाला चेतावणी दिली. 26 त्याच्या
राज्यकाळातील इतर घटना आणि त्याचे सर्व मार्ग, सुरुवातीपासून
शेवटपर्यंत, यहूदीया आणि इस्राएलच्या राजांच्या पुस्तकात लिहिलेल्या
आहेत. 27 आहाज आपल्या पूर्वजांबरोबर विसावा पावला आणि त्याला
यरुशलेम शहरात पुरण्यात आले, परंतु त्याला इस्राएलच्या राजांच्या
कबरेत ठेवण्यात आले नाही. त्याचा पुत्र हिज्कीयाह त्याचा वारस म्हणून
राजा झाला.

**29** वयाच्या पंचवीसाव्या वर्षी हिज्कीयाह राजा झाला आणि
त्याने यरुशलेममध्ये एकोणतीस वर्षे राज्य केले. त्याच्या
आईचे नाव अबीयाह, ती जखऱ्याहची कन्या होती. 2 त्याने आपला
पिता दावीदाप्रमाणे याहवेहच्या दृष्टीने जे योग्य ते केले. 3 त्याच्या
राज्यकाळाच्या पहिल्या वर्षाच्या पहिल्या महिन्यात, त्याने याहवेहच्या
मंदिराचे दरवाजे उघडले आणि त्यांची दुरुस्ती केली. 4 त्याने याजकांना
आणि लेवींना आणले आणि त्यांना पूर्व बाजूला असलेल्या चौकात एकत्र
जमविले. 5 आणि म्हणाला: “लेवींनो, माझे ऐका! आता तुम्ही स्वतःला
पवित्र करा आणि याहवेह तुमच्या पूर्वजांचे परमेश्वर यांचे मंदिर पवित्र
करा. सर्व अशुद्धता या पवित्रस्थानातून काढून टाका. 6 आमचे पालक
अविश्वासू होते; त्यांनी याहवेह आमच्या परमेश्वराच्या दृष्टीने जे वाईट ते
केले आणि त्यांचा त्याग केला. त्यांनी याहवेहच्या निवासस्थानापासून
त्यांचे मुख फिरविले आणि त्यांच्याकडे पाठ फिरविली. 7 त्यांनी अंगणाचे
दरवाजे बंद केले आणि दिवे विझविले. त्यांनी धूप जाळला नाही किंवा
त्या पवित्रस्थानात इस्राएलच्या परमेश्वराला कोणतेही होमार्पण दिले
नाही. 8 त्यामुळेच याहवेहचा क्रोध यहूदीया आणि यरुशलेम यांच्यावर
आला आहे; त्यांनी त्यांना भयप्रद व दहशत निर्माण करणारे आणि
तिरस्काराचा विषय असे केले आहे, जसे तुम्ही तुमच्या डोळ्यांनी पाहू
शकता. 9 याकारणामुळेच आपले पूर्वज तलवारीने मारले गेले आणि
आपले पुत्र आणि कन्या आणि आपल्या स्त्रिया बंदिवासात ठेवलेल्या
आहेत. 10 आता मी या उद्देशाने इस्राएलचे परमेश्वर याहवेह यांच्याशी
एक करार करतो की, जेणेकरून त्यांचा भयंकर क्रोध आपल्यापासून
दूर होईल. 11 माझ्या मुलांनो, आता निष्काळजी राहू नका, कारण
याहवेहनी तुम्हाला त्यांच्यासमोर उभे राहण्यासाठी आणि त्यांची सेवा
करण्यासाठी, त्यांचे सेवक होण्यासाठी आणि धूप जाळण्यासाठी
निवडले आहे.” 12 तेव्हा या लेवीय लोकांनी कामास सुरुवात केली:
कोहाथी वंशातील: अमासय याचा पुत्र महथ आणि अजऱ्याह याचा पुत्र
योएल; मरारी वंशातील: अब्दीचा पुत्र कीश आणि यहल्लेलेलाचा पुत्र
अजऱ्याह; गेर्षोनी वंशातील: जिम्माहचा पुत्र योवाह आणि यवाहाचा पुत्र
एदेन; 13 एलीजाफानच्या वंशातील: शिम्री आणि ईयेल; आसाफाच्या
वंशातील: जखऱ्याह आणि मत्तन्याह; 14 हेमानच्या वंशातील: यहीएल
आणि शिमी; यदूथूनच्या वंशातील: शमायाह आणि उज्जीएल. 15
जेव्हा त्यांनी त्यांच्याबरोबर असलेल्या लेवींना एकत्र जमविले आणि
त्यांनी स्वतःला पवित्र केले, तेव्हा ते याहवेहच्या वचनाचे पालन करून,
राजाज्ञेनुसार याहवेहच्या मंदिराचे शुद्धीकरण करण्यासाठी मंदिरात गेले.
16 याजक याहवेहच्या पवित्रस्थानात त्याचे शुद्धीकरण करण्यासाठी
आत गेले. त्यांना याहवेहच्या मंदिरात जे काही अशुद्ध सापडले ते सर्व
त्यांनी याहवेहच्या मंदिराच्या अंगणात आणले. लेव्यांनी ते घेतले आणि
किद्रोन खोऱ्याकडे नेऊन फेकले. 17 पहिल्या महिन्याच्या पहिल्या
दिवसापासून त्यांनी शुद्धीकरण सुरू केले आणि पहिल्या महिन्याच्या
आठव्या दिवशी ते याहवेहच्या मंदिराजवळ पोहोचले. आणखी आठ
दिवस त्यांनी पहिल्या महिन्याच्या सोळाव्या दिवशी काम पूर्ण करून
याहवेहचे मंदिर पवित्र केले. 18 मग ते हिज्कीयाह राजाकडे गेले आणि
त्यांनी अहवाल दिला: “आम्ही याहवेहचे संपूर्ण मंदिर, होमार्पणाची वेदी
आणि त्यातील सर्व भांडी आणि पवित्र भाकर ठेवण्यासाठी असलेला
मेज, त्याच्या सर्व वस्तू शुद्ध केल्या आहेत. 19 राजा आहाज राजा
असताना त्यांच्या अविश्वासूपणामध्ये त्यांनी काढून टाकलेल्या सर्व वस्तू
आम्ही तयार केल्या आहेत आणि पवित्र केल्या आहेत. त्या सर्व वस्तू
आता याहवेहच्या वेदीसमोर आहेत.” 20 दुसऱ्याच दिवशी पहाटेच्या
वेळेस राजा हिज्कीयाहने शहरातील अधिकाऱ्यांना एकत्र केले आणि तो
याहवेहच्या मंदिरात गेला. 21 त्यांनी सात गोऱ्हे, सात मेंढे, सात नरकोकरे
आणि सात बोकडे हे राष्ट्राच्या पापार्पणासाठी, पवित्रस्थानासाठी आणि
यहूदीयासाठी आणले. राजाने याजकांना, अहरोनाच्या वंशजांना हे सर्व
याहवेहच्या वेदीवर अर्पण करण्यास सांगितले. 22 तेव्हा त्यांनी गोऱ्ह्यांचा
वध केला आणि याजकांनी रक्त घेऊन वेदीवर शिंपडले; नंतर त्यांनी
मेंढ्यांची कत्तल केली आणि त्यांचे रक्त वेदीवर शिंपडले. त्यानंतर
त्यांनी कोकऱ्यांचा वध केला आणि त्यांचे रक्त वेदीवर शिंपडले. 23
पापार्पणासाठी असलेले बोकड राजा आणि जमलेल्या मंडळीसमोर
आणले आणि त्यांनी त्यांचे हात त्यांच्यावर ठेवले. 24 याजकांनी नंतर
बोकडांचा वध केला आणि त्यांचे रक्त सर्व इस्राएलसाठी प्रायश्चिताचे
पापार्पण म्हणून वेदीवर अर्पण केले, कारण राजाने सर्व इस्राएलसाठी
होमार्पण आणि पापार्पण करण्याची आज्ञा दिली होती. 25 दावीद राजा,
राजाचा संदेष्टा गाद आणि नाथान संदेष्ट्यांनी सांगितल्याप्रमाणे झांजा,
वीणा आणि तंतुवाद्ये घेऊन त्याने लेवींना याहवेहच्या मंदिरात ठेवले;
अशी आज्ञा याहवेहनी त्यांच्या संदेष्ट्यांद्वारे दिली होती. 26 म्हणून

लेवीय लोक दावीदाची वाद्ये आणि याजक तुतारी घेऊन तयार उभे
राहिले. 27 हिज्कीयाहने वेदीवर बलिदानांचे होमार्पण करण्याची आज्ञा
दिली. अर्पण सुरू झाले तेव्हाच इस्राएलचा राजा दावीदाची वाद्ये आणि
कर्ण्यांसह याहवेहसाठी गीते गाण्यास सुरुवात झाली. 28 जमलेल्या
संपूर्ण सभेतील लोकांनी वाकून आराधना केली, त्यावेळेस वादक
वाद्य आणि कर्णे वाजवित होते. बलिदानांचे होमार्पण पूर्ण होईपर्यंत हे
सर्व सुरू होते. 29 जेव्हा अर्पणे करण्याचे संपले, तेव्हा राजा आणि
त्याच्याबरोबर उपस्थित असलेल्या प्रत्येकजणांनी गुडघे टेकले आणि
आराधना केली. 30 राजा हिज्कीयाह आणि त्याच्या अधिकार्‍यांनी
लेवींना दावीद आणि संदेष्टा आसाफ यांच्या शब्दांमध्ये याहवेहची
स्तुती करण्याचा आदेश दिला. म्हणून त्यांनी आनंदाने स्तुतिगीते
गायली आणि खाली वाकून आराधना केली. 31 तेव्हा हिज्कीयाह
म्हणाला, “तुम्ही आता स्वतःला याहवेहना समर्पित केले आहे. या
आणि याहवेहच्या मंदिरात बलिदाने आणि उपकारस्तुतीची अर्पणे
आणा.” म्हणून जमलेल्या लोकांनी बलिदाने आणि उपकारस्तुतीची
अर्पणे आणली आणि ज्या सर्वांची अंतःकरणापासून इच्छा होती त्यांनी
होमार्पणे आणली. 32 तिथे जमलेल्या लोकांनी आणलेल्या होमार्पणांची
संख्या सत्तर गोर्‍हे, शंभर मेंढे आणि दोनशे नरकोकरे होती; हे सर्व
याहवेहसमोर होमार्पणासाठी आणले होते. 33 बलिदाने म्हणून शुद्ध
केलेल्या प्राण्यांमध्ये सहाशे गोर्‍हे, आणि तीन हजार मेंढ्या आणि बोकडे
होते. 34 तरीसुद्धा सर्व होमार्पणाची कातडी काढण्यासाठी याजक फारच
कमी होते. म्हणून त्यांचे नातेवाईक लेवी लोकांनी त्यांना दिलेले काम
पूर्ण होईपर्यंत आणि इतर याजकांचे शुद्धीकरण होईपर्यंत मदत केली,
कारण लेवी लोक स्वतःचे शुद्धीकरण करण्यामध्ये याजकांपेक्षा अधिक
प्रामाणिक होते. 35 शांत्यर्पणाची चरबी आणि पेयार्पणे यांच्याबरोबरच
होमार्पणे विपुल प्रमाणात होती. अशा रीतीने याहवेहच्या मंदिरातील
सेवा पुन्हा प्रस्थापित झाली. 36 परमेश्वराने त्यांच्या लोकांसाठी हे त्वरित
सिद्धीस नेले होते, म्हणून हिज्कीयाह आणि सर्व लोक आनंदित झाले.

**30** हिज्कीयाहने सर्व इस्राएल आणि यहूदीया या ठिकाणी संदेश
पाठविला आणि एफ्राईम व मनश्शेह यांनाही पत्र लिहून आमंत्रण
दिले की, त्यांनी यरुशलेममधील याहवेहच्या मंदिरात यावे आणि
इस्राएलचे परमेश्वर याहवेहसाठी वल्हांडण सण साजरा करावा. 2
राजा आणि त्याचे अधिकारी आणि यरुशलेममधील सर्व मंडळी यांनी
असे ठरविले की, दुसर्‍या महिन्यात वल्हांडण सण साजरा करावा. 3
नेहमीच्या वेळेप्रमाणे त्यांना तो सण साजरा करता आला नव्हता, कारण
स्वतःचे शुद्धीकरण केलेले असे पुरेसे याजक तिथे नव्हते आणि लोक
यरुशलेममध्ये एकत्र जमले नव्हते. 4 ही योजना योग्य आहे असे राजाला
आणि संपूर्ण मंडळीला वाटले. 5 त्यांनी ठरविले की, बेअर-शेबापासून
दानपर्यंत संपूर्ण इस्राएलमध्ये एक घोषणापत्र पाठवावे आणि इस्राएलचे
परमेश्वर याहवेह यांचा वल्हांडण सण साजरा करण्यासाठी लोकांना
यरुशलेमकडे बोलावून घ्यावे. जसे लिहिले गेले होते त्याप्रमाणे तो
मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आलेला नव्हता. 6 राजाज्ञेनुसार,
राजा आणि त्याच्या अधिकार्‍यांकडून पत्रे घेऊन संदेशवाहक संपूर्ण
इस्राएल आणि यहूदीयामध्ये गेले, ज्यात लिहिले होते: “अहो, इस्राएलचे
लोकहो, अब्राहाम, इसहाक आणि इस्राएलचे परमेश्वर याहवेहकडे परत
या, म्हणजे, अश्शूरी राजांच्या हातातून जे निसटले आहेत त्यांच्याकडे ते
परत येतील. 7 तुमच्या पालकांसारखे होऊ नका आणि तुमच्याबरोबर
असलेल्या इस्राएली लोकांसारखे होऊ नका, जे त्यांच्या पूर्वजांचे परमेश्वर
याहवेहबरोबर अविश्वासू राहिले, त्यामुळे त्यांनी त्यांना उपहासाचे पात्र
केले, जसे ते तुम्हाला दिसतात. 8 तुम्ही तुमच्या पूर्वजांसारखे ताठ
मानेचे होऊ नका. याहवेहना शरण जा. त्यांनी सनातनकाळासाठी पवित्र
केलेल्या त्यांच्या पवित्रस्थानात या. तुमचे परमेश्वर याहवेहची सेवा करा,
म्हणजे त्यांचा भयंकर क्रोध तुमच्यापासून दूर होईल. 9 जर तुम्ही
याहवेहकडे परत याल, तर तुमच्याबरोबर असणारे इस्राएली लोक
आणि तुमच्या मुलाबाळांवर त्यांना कैद करणार्‍यांकडून दया करण्यात
येईल आणि ते या देशात परत येतील, कारण तुमचे परमेश्वर याहवेह हे
कृपाळू आणि दयाळू आहेत. जर तुम्ही त्यांच्याकडे परत आलात तर ते
तुमच्यापासून मुख फिरविणार नाहीत.” 10 संदेशवाहक एफ्राईम आणि
मनश्शेह येथील गावोगाव तसेच जबुलूनपर्यंत गेले, परंतु लोकांनी त्यांचा
तिरस्कार केला आणि त्यांची थट्टा केली. 11 तरीसुद्धा आशेर, मनश्शेह
आणि जबुलून येथील काही लोकांनी स्वतःला नम्र केले आणि ते
यरुशलेमला गेले. 12 याहवेहच्या वचनास अनुसरून राजा आणि त्याच्या
अधिकार्‍यांनी जे आदेश दिले होते, ते एकमताने पूर्ण करण्यासाठी
यहूदीयामध्येही परमेश्वराचा हात लोकांवर होता. 13 दुसर्‍या महिन्यामध्ये
बेखमीर भाकरीचा सण साजरा करण्यासाठी यरुशलेममध्ये बरेच लोक
एकत्र आले. 14 त्यांनी यरुशलेममधील वेद्या काढून टाकल्या आणि
धूपाच्या वेद्यांची जागा मोकळी केली आणि त्या किद्रोन खोर्‍यात फेकून
दिल्या. 15 वल्हांडणाचा कोकरा त्यांनी दुसर्‍या महिन्याच्या चौदाव्या
दिवशी कापला. याजकांना आणि लेवीय लोकांना स्वतःची लाज वाटली
आणि त्यांनी स्वतःला पवित्र केले आणि याहवेहच्या मंदिरात होमार्पणे
आणली. 16 नंतर त्यांनी परमेश्वराचा मनुष्य मोशेच्या नियमशास्त्रात
सांगितल्याप्रमाणे त्यांची नियमित पदे स्वीकारली. लेव्यांनी त्यांच्या हाती
दिलेले रक्त याजकांनी वेदीवर शिंपडले. 17 जमलेल्या समुदायामधील
पुष्कळ लोकांनी स्वतःला पवित्र केलेले नसल्यामुळे जे विधिपूर्वक
शुद्ध झालेले नव्हते आणि त्यांना व त्यांच्या कोकर्‍यांना याहवेहसमक्ष
पवित्र करू शकले नव्हते, त्यामुळे लेवीय लोकांनी त्या सर्वांकरिता
वल्हांडणाच्या कोकरांचा वध केला. 18 एफ्राईम, मनश्शेह, इस्साखार
आणि जबुलून येथून आलेल्या पुष्कळ लोकांपैकी बहुतेक लोकांनी
स्वतःला शुद्ध केलेले नव्हते, तरीही जे लिहिलेले होते त्याविरुद्ध जाऊन
त्यांनी वल्हांडण सणाचे अन्न खाल्ले. परंतु हिज्कीयाहने त्यांच्यासाठी
प्रार्थना केली आणि म्हणाला, “याहवेह, जे चांगले आहेत, त्यांनी
प्रत्येकांना क्षमा करावी. 19 जरी ते पवित्रस्थानाच्या नियमानुसार शुद्ध
नसले तरीसुद्धा, ते त्यांचे अंतःकरण त्यांच्या पूर्वजांचे परमेश्वर याहवेह
यांच्याकडे लावतात.” 20 आणि याहवेहनी हिज्कीयाहचे ऐकले आणि

लोकांना बरे केले. 21 यरुशलेममध्ये जे इस्राएली लोक उपस्थित होते,
त्यांनी बेखमीर भाकरीचा सण सात दिवस मोठ्या आनंदात साजरा
केला, तर लेवीय लोकांनी आणि याजकांनी याहवेहना समर्पित केलेल्या
प्रतिध्वनीच्या वाद्यांसहित दररोज याहवेहची स्तुती केली. 22 ज्यांनी
याहवेहच्या सेवेसाठी योग्य समज दाखविला, त्या सर्व लेवीय लोकांना
हिज्कीयाहने प्रोत्साहित केले. सात दिवस त्यांना नेमून दिलेला त्यांचा
भाग त्यांनी खाल्ला आणि शांत्यर्पणाचे अर्पण केले आणि त्यांच्या
पूर्वजांच्या परमेश्वराची स्तुती केली. 23 तेव्हा संपूर्ण सभेने पुढे अधिक
सात दिवस हा सण साजरा करण्याचे मान्य केले; त्यामुळे आणखी सात
दिवस त्यांनी हा उत्सव आनंदाने साजरा केला. 24 यहूदीयाचा राजा
हिज्कीयाहने या सभेसाठी एक हजार बैल आणि सात हजार मेंढ्या
आणि शेळ्या दिल्या आणि अधिकाऱ्यांनी त्यांना एक हजार बैल आणि
दहा हजार मेंढ्या व शेळ्या दिल्या. तेव्हा मोठ्या संख्येने याजकांनी
स्वतःला पवित्र केले. 25 यहूदीयाच्या संपूर्ण सभेने याजक आणि लेवीय
आणि इस्राएलमधून जमलेले सर्व लोक, इस्राएलमधून आलेले परदेशी
आणि यहूदीयामधील रहिवाशांनी आनंद साजरा केला. 26 त्यावेळेस
तिथे यरुशलेममध्ये मोठा आनंद झाला होता, कारण इस्राएलचा राजा
दावीदाचा पुत्र शलोमोनच्या दिवसांपासून यरुशलेममध्ये यासारखे
काहीही घडले नव्हते. 27 याजक आणि लेवीय हे लोकांना आशीर्वाद
देण्यासाठी उभे राहिले आणि परमेश्वराने त्यांचे ऐकले, कारण त्यांची
प्रार्थना स्वर्गात, परमेश्वराच्या पवित्र निवासस्थानापर्यंत पोहोचली.

**31** जेव्हा हे सर्व समाप्त झाले, तेव्हा तिथे असलेले इस्राएली लोक
बाहेर पडून यहूदीयाच्या नगरांमध्ये गेले व त्यांनी पूजास्तंभ फोडून
टाकले, अशेराचे स्तंभ नष्ट करून टाकले. त्यांनी यहूदीया, बिन्यामीन
आणि एफ्राईम व मनश्शेह येथील उच्च स्थाने आणि वेद्या नष्ट केल्या.
त्यांनी ते सर्व नष्ट केल्यानंतर, इस्राएली लोक स्वतःच्या गावी आणि
स्वतःच्या वतनाकडे परत आले. 2 हिज्कीयाहने याजक आणि लेवी
यांची निरनिराळ्या विभागांवर—त्यांच्यातील प्रत्येकाने याजक किंवा
लेवी यांनी त्यांना दिलेल्या कार्यानुसार—होमार्पण आणि शांत्यर्पण
करण्यासाठी, सेवा करण्यासाठी आणि याहवेहच्या निवासस्थानाच्या
फाटकांजवळ उपकारस्तुती आणि स्तुतिगान करण्यासाठी नेमणूक केली.
3 राजाने सकाळ आणि संध्याकाळच्या होमार्पणासाठी आणि शब्बाथ,
नवचंद्र आणि याहवेहच्या नियमात लिहिल्याप्रमाणे ठरवून दिलेल्या
सणांसाठी स्वतःच्या मालमत्तेतून दान दिले. 4 त्याने यरुशलेममध्ये
राहणाऱ्या लोकांना याजक आणि लेवींना त्यांचा योग्य भाग देण्याची
आज्ञा केली, ज्यामुळे ते स्वतःला याहवेहच्या नियमशास्त्रासाठी समर्पित
करू शकतील. 5 आदेश बाहेर पडताक्षणीच इस्राएली लोकांनी उदारतेने
त्यांच्या धान्याचे, नवीन द्राक्षारसाचे, जैतून तेलाचे आणि मधाचे आणि
शेतात जे काही उत्पन्न आले त्याचे प्रथमफळ दिले. त्यांनी प्रत्येक
गोष्टीचा दशांश मिळून एक मोठा भाग आणला. 6 यहूदीयाच्या गावांमध्ये
राहणाऱ्या इस्राएली आणि यहूदीयाच्या लोकांनीसुद्धा त्यांची गुरे आणि
कळप यांचा दशांश आणि त्यांचा परमेश्वर याहवेहना समर्पित केलेल्या
पवित्र वस्तूंचा दशांश आणला आणि त्याचा ढीग रचला. 7 त्यांनी
तिसऱ्या महिन्यात या कामाची सुरुवात केली आणि सातव्या महिन्यात ते
पूर्ण केले. 8 जेव्हा हिज्कीयाह आणि त्याचे अधिकारी आले आणि त्यांनी
तो ढीग पाहिला, तेव्हा त्यांनी याहवेहची स्तुती केली आणि त्यांच्या
इस्राएली लोकांना आशीर्वाद दिला. 9 हिज्कीयाहने याजकांना आणि
लेवीय लोकांना ढिगाबद्दल विचारले; 10 आणि सादोकच्या घराण्यातील
अजऱ्याह या मुख्य याजकाने उत्तर दिले, “लोकांनी याहवेहच्या मंदिरात
त्यांची वर्गणी आणण्यास सुरुवात केली, तेव्हापासून आपल्याकडे
खाण्यास पुरेसे आणि भरपूर असे उरले आहे, कारण याहवेहनी त्यांच्या
लोकांना आशीर्वाद दिला आहे आणि हा मोठा भाग उरला आहे.” 11
हिज्कीयाहने याहवेहच्या मंदिरात भांडारगृहे तयार करण्याची आज्ञा
दिली आणि ते काम पूर्ण झाले. 12 नंतर त्यांनी विश्वासूपणाने वर्गणी,
दशांश आणि समर्पित भेटवस्तू आणल्या. कनन्याह नावाचा लेवी या
सर्व गोष्टींचा प्रभारी पर्यवेक्षक होता आणि त्याचा भाऊ शिमी त्याच्या
नंतरच्या श्रेणीतील अधिकारी होता. 13 यहीएल, अजज्याह, नहाथ,
असाहेल, यरिमोथ, योजाबाद, एलीएल, इस्माकियाह, महथ आणि
बेनाइयाह हे कनन्याह आणि त्याचा भाऊ शिमीचे सहायक होते. या
सर्वांना राजा हिज्कीयाहने नियुक्त केल्यामुळे त्यांनी सेवा केली आणि
अजऱ्याह परमेश्वराच्या मंदिराचा नियुक्त प्रभारी अधिकारी म्हणून सेवा
करीत होता. 14 इम्नाह लेवीचा पुत्र कोरे, पूर्वेकडील वेशीचा रखवालदार,
परमेश्वराला स्वैच्छिक अर्पणावरील याहवेहना मिळालेल्या वर्गणीचे
वाटप करणे आणि पवित्र भेटवस्तू यावरील अधिकारी होता. 15 एदेन,
मिन्यामीन, येशूआ, शमायाह, अमऱ्याह आणि शखन्याहनी त्याला
विश्वासयोग्यतेने याजकांच्या गावांमध्ये त्यांच्याबरोबर असलेल्या वृद्ध
आणि तरुण याजकांना त्यांच्या विभागानुसार वाटप करण्यासाठी मदत
केली. 16 त्या शिवाय त्यांनी तीन वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या
पुरुषांना ज्यांची नावे वंशावळीच्या नोंदींमध्ये होती त्यांना वाटप केले, जे
सर्व लोक त्यांच्या जबाबदाऱ्या आणि त्यांच्या विभागानुसार त्यांची
रोजची वेगवेगळी नेमून दिलेली सेवा पार पाडण्यासाठी याहवेहच्या
मंदिरात प्रवेश करतील. 17 आणि त्यांनी त्यांच्या घराण्यांनी नोंदविलेल्या
वंशावळीतील याजकांना आणि त्याचप्रमाणे वीस वर्षे किंवा त्याहून
अधिक वयाच्या लेवींना त्यांच्या जबाबदाऱ्या आणि विभागणी यानुसार
वाटून दिल्या. 18 त्यांनी सर्व लहान मुले, स्त्रिया आणि संपूर्ण
समाजातील पुत्र व कन्या यांचा या वंशावळीच्या नोंदीमध्ये समावेश
केला. कारण स्वतःला पवित्र करण्यामध्ये ते प्रामाणिक होते. 19
याजक, जे अहरोनाचे वंशज होते ते त्यांच्या गावांच्या आसपासच्या
शेतजमिनीवर किंवा इतर कोणत्याही नगरांमध्ये राहत होते, त्यांच्यातील
प्रत्येक पुरुषाला आणि लेव्यांच्या वंशावळीमध्ये ज्यांची नोंद झाली
होती, त्या सर्वांना भागांचे वाटप करण्यासाठी नावानुसार पुरुष नेमले
गेले. 20 हिज्कीयाहने संपूर्ण यहूदीयामध्ये जे चांगले आणि योग्य होते
तेच केले आणि त्याचे परमेश्वर याहवेहसमोर तो विश्वासू राहिला. 21
परमेश्वराच्या मंदिराचे जे काही सेवाकार्य त्याने हाती घेतले आणि नियम

व आज्ञाचे पालन करण्यामध्ये त्याने त्याच्या परमेश्वराचा सल्ला घेतला
आणि संपूर्ण अंत:करणापासून काम केले आणि त्यामुळे तो समृद्ध
झाला.

32 हिज्कीयाहने इतके सर्व विश्वासूपणाने केल्यानंतर, अश्शूरचा राजा
सन्हेरीबने यहूदीयावर आक्रमण केले. त्याने तटबंदीच्या शहरांना
वेढा घातला या विचाराने की, ती स्वत:साठी जिंकून घ्यावी. 2 जेव्हा
हिज्कीयाहने पाहिले की सन्हेरीब आला आहे आणि यरुशलेमविरुद्ध युद्ध
करण्याचा त्याचा उद्देश आहे, 3 तेव्हा त्याने त्याच्या अधिकाऱ्यांबरोबर
आणि सैन्यातील कर्मचाऱ्यांबरोबर शहरा बाहेरील झऱ्यांचे पाणी बंद
करण्याविषयी सल्ला घेतला आणि त्यांनी त्याला मदत केली. 4
त्यांनी लोकांचा एक मोठा गट जमविला, त्यांनी सर्व झरे आणि
जमिनीमधून वाहणारे बंद केले. ते म्हणाले “अश्शूरच्या राजाने यावे
आणि त्याने भरपूर पाणी का मिळवावे?” 5 नंतर त्याने भिंतीचे तुटलेले
सर्वभाग दुरुस्त करून त्यावर अत्यंत परिश्रमाने बुरूज बांधले. त्याने त्या
भिंतीबाहेर दुसरी भिंत बांधली आणि दावीद नगरीच्या एकमेकांना लागून
बांधलेल्या घरांची छते मजबूत केली. त्याने मोठ्या संख्येने शस्त्रे आणि
ढालीसुद्धा तयार केल्या. 6 त्याने लोकांवर सैन्य अधिकारी नेमले आणि
त्यांना शहराच्या वेशीवरील चौकामध्ये त्याच्यासमोर आणले आणि
त्यांना या शब्दांनी प्रोत्साहन दिले: 7 “बलवान आणि धैर्यशील असा.
अश्शूरचा राजा आणि त्याच्याबरोबर असलेले मोठे सैन्यामुळे तुम्ही
घाबरून जाऊ नका किंवा निराश होऊ नका, कारण त्याच्यापेक्षा मोठी
शक्ती आपल्यासह आहे. 8 त्यांच्याबरोबर फक्त शारीरिक शस्त्र आहेत,
परंतु आपल्याला मदत करण्यासाठी आणि आपले युद्ध करण्यासाठी
आपले परमेश्वर याहवेह आपल्याबरोबर आहेत.” आणि यहूदीयाचा राजा
हिज्कीयाह जे काही बोलला त्यावरून लोकांचा आत्मविश्वास वाढला.
9 नंतर, जेव्हा अश्शूरचा राजा सन्हेरीब आणि त्याच्या सर्व सैन्याने
लाखीशला वेढा घातला, तेव्हा त्याने यहूदीयाचा राजा हिज्कीयाह राजा
आणि यहूदीयाच्या सर्व लोकांसाठी हा संदेश त्याच्या अधिकाऱ्यांबरोबर
देऊन त्यांना यरुशलेमकडे पाठवले: 10 “अश्शूरचा राजा सन्हेरीब असे
म्हणतो: तुम्ही कशावर भरवसा टेकवून तुम्ही या वेढ्यात यरुशलेममध्ये
राहिला आहात? 11 जेव्हा हिज्कीयाह म्हणतो, ‘याहवेह आमचे परमेश्वर
हे आम्हाला अश्शूरच्या राजाच्या हातातून वाचवतील,’ तर तुम्ही भुकेले
आणि तहानलेले असे होऊन मरावे म्हणून तो तुमची दिशाभूल करत
आहे. 12 हिज्कीयाहने स्वत:च या दैवताची उच्च स्थाने आणि वेद्या
काढून टाकून यहूदीया आणि यरुशलेमला सांगितले नाही का की,
‘तुम्ही एकाच वेदीसमोर आराधना करावी आणि तिच्यावर होमार्पणे
करावी?’ 13 “तुम्हाला हे माहीत नाही का, की मी आणि माझ्या
आधीच्या लोकांनी इतर देशातील सर्व लोकांचे काय केले? त्या राष्ट्रांच्या
दैवतांनी कधीतरी माझ्या हातातून त्यांच्या राष्ट्रांची सुटका केली आहे
काय? 14 माझ्या आधी या जागेवर काम करणाऱ्यांनी ज्या राष्ट्रांचा नाश
केला त्यांच्या सर्व दैवतांपैकी कोणीतरी त्याच्या लोकांना माझ्यापासून
वाचवू शकले का? तर मग तुमचे दैवत तुम्हाला माझ्या हातून कसे
बरे सोडवेल? 15 तर आता हिज्कीयाहने तुमची फसवणूक करू नये
आणि तुमची अशाप्रकारे दिशाभूल करू नये. त्याच्यावर विश्वास ठेवू
नका, कारण कोणत्याही राष्ट्राचे किंवा राज्याचे कोणतेही दैवत त्याच्या
लोकांना माझ्या हातातून किंवा माझ्या पूर्वीच्या लोकांच्या हातातून
सोडवू शकले नाही. तुमचे दैवत तुम्हाला माझ्या हातून कसे सोडवेल!”
16 सन्हेरीबचे अधिकारी परमेश्वर याहवेहविरुद्ध आणि त्यांचा सेवक
हिज्कीयाहविरुद्ध पुढे बोलले. 17 राजाने इस्राएलचे परमेश्वर याहवेहची
थट्टा करणारी पत्रेही लिहिली आणि त्यांच्याविरुद्ध असे म्हटले: “जशी
इतर देशातील लोकांच्या दैवतांनी त्यांच्या लोकांची माझ्या हातून सुटका
केली नाही, त्याचप्रमाणे हिज्कीयाहचे दैवत त्याच्या लोकांना माझ्या
हातातून सोडविणार नाही.” 18 तेव्हा ते शहर जिंकण्यासाठी त्यांनी
तटबंदीवर असलेल्या यरुशलेमच्या लोकांना घाबरवून सोडण्यासाठी
आणि त्यांना भीती वाटावी यासाठी यहूदीयाच्या हिब्रू भाषेत मोठ्याने
ओरडले. 19 यरुशलेमच्या परमेश्वराविषयी ते बोलले, जसे जगातील इतर
लोकांची दैवते—म्हणजे मनुष्याची हस्तकृती—त्यांच्याबद्दल त्यांनी
तसेच केले होते. 20 राजा हिज्कीयाह आणि आमोजाचा पुत्र यशायाह
संदेष्टा यांनी याबद्दल रडून स्वर्गाकडे प्रार्थना केली. 21 आणि याहवेह
यांनी एक देवदूत पाठवला, त्याने अश्शूरच्या राजाच्या छावणीतील
सर्व लढवय्ये, सेनापती आणि अधिकारी यांचा नाश केला. त्यामुळे
तो अपमानित होऊन स्वत:च्या भूमीकडे मागे फिरला. आणि जेव्हा
तो त्याच्या दैवताच्या मंदिरात गेला तेव्हा त्याच्या काही मुलांनी, जे
त्याचे स्वत:चे रक्त आणि मांस होते, त्यांनी त्याला तलवारीने कापले.
22 अशाप्रकारे याहवेहनी हिज्कीयाह आणि यरुशलेमच्या लोकांना
अश्शूरचा राजा सन्हेरीबच्या हातातून आणि इतर सर्वांच्या हातातून
वाचविले. त्यांनी सर्वप्रकारे त्यांची काळजी घेऊन त्यांना विसावा दिला.
23 पुष्कळ जणांनी यरुशलेमकडे याहवेहसाठी अर्पणे आणली आणि
यहूदीयाचा राजा हिज्कीयाह याच्यासाठी मौल्यवान भेटवस्तू आणल्या.
तेव्हापासून तो सर्व राष्ट्रांद्वारे अत्यंत आदरणीय मानला गेला. 24
त्या दिवसांमध्ये हिज्कीयाह राजा आजारी पडला आणि मरणपंथाला
लागला. त्याने याहवेहकडे प्रार्थना केली ज्यांनी त्याला उत्तर दिले आणि
एक आश्चर्यकारक चिन्ह दिले. 25 परंतु हिज्कीयाहचे मन गर्विष्ठ होते
आणि त्याच्यावर दाखविलेल्या दयेला त्याने अनुकूल प्रतिसाद दिला
नाही. त्यामुळे त्याच्यावर आणि यहूदीया व यरुशलेमवर याहवेहचा कोप
आला होता. 26 तेव्हा हिज्कीयाहने त्याच्या अंत:करणातील गर्वाबद्दल
पश्चात्ताप केला; तसेच यरुशलेमच्या लोकांनीसुद्धा केले; त्यामुळेच
हिज्कीयाहच्या कार्यकालामध्ये याहवेहचा क्रोध त्यांच्यावर आला नाही.
27 हिज्कीयाहकडे फार मोठी संपत्ती आणि सन्मान होता आणि त्याने
त्याच्याकडे असलेले चांदी आणि सोने आणि मौल्यवान रत्ने, मसाले,
ढाली आणि सर्वप्रकारच्या मौल्यवान वस्तूंसाठी भांडारे तयार केली.
28 हंगामाचे धान्य, नवीन द्राक्षारस आणि जैतुनाचे तेल यांचा साठा
ठेवण्यासाठी त्याने इमारती बांधल्या; आणि त्याने वेगवेगळ्या प्रकारची
गुरे आणि कळपांसाठी गोठे, मेंढवाडे बांधले. 29 त्याने गावे विकसित

केली आणि अधिक संख्येने गुरे मिळविली, कारण परमेश्वराने त्याला खूप
मोठी संपत्ती दिली होती. 30 हिज्कीयाहनेच गीहोन झऱ्याचा वर जाणारा
मार्ग अडविला आणि पाण्याचा मार्ग दावीदाच्या नगरीच्या पश्चिमेकडे
नेला. त्याने हाती घेतलेल्या प्रत्येक गोष्टीत तो यशस्वी झाला. 31 परंतु
त्या देशात घडलेल्या चमत्कारिक चिन्हाबद्दल त्याला विचारण्यासाठी
बाबेलच्या राज्यकर्त्यांनी जेव्हा दूत पाठवले, तेव्हा परमेश्वराने त्याची
परीक्षा घेण्यासाठी आणि त्याच्या अंतःकरणातील सर्वकाही जाणून
घेण्यासाठी त्याला सोडून दिले. 32 हिज्कीयाहच्या कारकिर्दीतील इतर
सर्व घटना व त्याच्या श्रद्धेचे कार्य आमोजाचा पुत्र यशायाह संदेष्ट्याच्या
दर्शनात त्याने लिहिलेल्या यहूदीयाच्या व इस्राएलच्या राजांच्या पुस्तकात
नमूद केल्या आहेत. 33 हिज्कीयाह त्याच्या पूर्वजांबरोबर विसावा पावला
आणि त्याला दावीदाच्या वंशजांबरोबर डोंगरावरील कबरेत पुरण्यात
आले. तो मरण पावला तेव्हा सर्व यहूदीया व यरुशलेमच्या लोकांनी
त्याचा सन्मान केला. आणि वारस म्हणून त्याचा पुत्र मनश्शेह राजा
झाला.

**33** वयाच्या बाराव्या वर्षी मनश्शेह राजा झाला आणि त्याने
यरुशलेमात पंचावन्न वर्षे राज्य केले. 2 त्याने याहवेहच्या दृष्टीने
वाईट ते केले, याहवेहने इस्राएली लोकांतून काढून टाकलेल्या राष्ट्रांच्या
अमंगळ प्रथांचे अनुसरण त्याने केले. 3 त्याचे वडील हिज्कीयाहने पाडून
टाकलेली उच्च स्थाने त्याने पुन्हा बांधली; त्याने बआल दैवतांसाठी
वेद्या आणि अशेराचे स्तंभ तयार केले. त्याने सर्व तारांगणांना लवून
नमन केले आणि त्यांची उपासना केली. 4 त्याने याहवेहच्या मंदिरात
वेद्या बांधल्या, ज्यासाठी याहवेहने म्हटले होते, “यरुशलेमात माझे नाव
सर्वकाळासाठी राहील.” 5 याहवेहच्या मंदिराच्या दोन्ही अंगणात त्याने
सर्व तारांगणासाठी वेद्या बांधल्या. 6 बेन हिन्नोमच्या खोऱ्यात त्याने
आपल्या लेकरांचे अग्नीत अर्पण केले, ज्योतिष आणि जादूटोणा केला,
शुभशकुन शोधले आणि भूतविद्यांचा सल्ला घेतला. याहवेहच्या दृष्टीने
जे वाईट अशा अनेक गोष्टी करून याहवेहचा राग पेटविला. 7 जी कोरीव
मूर्ती त्याने घडविली होती, ती त्याने घेतली व परमेश्वराच्या मंदिरात
ठेवली. या मंदिराविषयी परमेश्वर, दावीद व त्याचा पुत्र शलोमोन यांना
म्हणाले होते, “इस्राएलांच्या सर्व गोत्रांतून मी निवडलेल्या यरुशलेम
शहरात व या मंदिरात माझे नाव मी सर्वकाळासाठी ठेवेन. 8 जर ते
फक्त मोशेद्वारे दिलेले सर्व नियम, विधी आणि आज्ञांचे काळजीपूर्वक
पालन करतील तर जी भूमी मी तुमच्या पूर्वजांस दिली आहे त्यातून
इस्राएली लोकांची पावले भटकू देणार नाही.” 9 परंतु मनश्शेहने
यहूदीया आणि यरुशलेमच्या लोकांना मार्गभ्रष्ट केले, ज्यांचा इस्राएली
लोकांसमोर याहवेहने नाश केला होता, त्या राष्ट्रांपेक्षा अधिक दुष्टपणा
केला. 10 याहवेह मनश्शेह आणि त्याच्या लोकांशी बोलले, परंतु त्यांनी
त्याकडे दुर्लक्ष केले. 11 तेव्हा याहवेहनी अश्शूर राजाच्या सेनापतींना
त्यांच्याविरुद्ध केले, त्यांनी मनश्शेहला कैद केले, त्याच्या नाकात
आकडा घातला, त्याला कास्य धातूच्या बेड्यांनी बांधले आणि बाबेलला
नेले. 12 त्याच्या संकटात त्याने त्याचे परमेश्वर याहवेह यांची कृपा
मिळविण्याचा प्रयत्न केला आणि त्याच्या पूर्वजांच्या परमेश्वरासमोर
स्वतःला अधिक नम्र केले. 13 आणि जेव्हा त्याने त्यांच्याकडे प्रार्थना
केली, तेव्हा याहवेहना त्याच्या कळकळीच्या विनंतीमुळे दया आली
आणि त्यांनी त्याची विनंती ऐकली; म्हणून त्यांनी त्याला यरुशलेम
आणि त्याच्या राज्यात परत आणले. तेव्हा मनश्शेहला उमजले की,
याहवेह हेच परमेश्वर आहेत. 14 नंतर त्याने दावीदाच्या नगराची
बाहेरील भिंत गीहोन झऱ्याच्या पश्चिमेकडील खोऱ्यात, मासे फाटकाच्या
प्रवेशद्वारापर्यंत आणि ओफेलच्या टेकडीला वेढा घालून ती पुन्हा बांधली;
त्याने त्या भिंती जास्त उंच केल्या. त्याने यहूदीयामधील सर्व तटबंदी
नगरांमध्ये सैन्याचे सेनापती नेमले. 15 त्याने परकीय दैवते टाकून दिली
आणि याहवेहच्या मंदिरातून मूर्ती काढून टाकली, तसेच मंदिराच्या
टेकडीवर आणि यरुशलेममध्ये ज्या वेद्या त्याने बांधल्या होत्या त्या
सर्व वेद्या काढल्या आणि त्या शहराबाहेर फेकून दिल्या. 16 नंतर
त्याने याहवेहची वेदी पुनर्स्थापित केली आणि त्यावर शांत्यर्पणे आणि
उपकारस्तुतीची अर्पणे केली आणि यहूदीयाला सांगितले की, त्यांनी
इस्राएलचे परमेश्वर याहवेहचीच यांचीच सेवा करावी. 17 तरीसुद्धा
लोकांनी उच्च स्थानावर जाऊन त्यांचे परमेश्वर याहवेह यांनाच अर्पणे
करण्याचे कायम ठेवले. 18 मनश्शेहच्या कारकिर्दीतील इतर घटना,
त्याने त्याच्या परमेश्वराकडे केलेली प्रार्थना आणि इस्राएलचे परमेश्वर
याहवेह यांच्या नावामध्ये संदेष्ट्यांनी सांगितलेली वचने ही इस्राएली
राजांच्या पुस्तकात लिहिल्या आहेत. 19 त्याची प्रार्थना आणि त्याच्या
कळकळीच्या विनवणीमुळे परमेश्वर दयेने कसे हेलावून गेले, तसेच
त्याची सर्व पापे आणि अविश्वासूपणा आणि जिथे घटनास्थळे आहेत,
तिथे त्याने उच्च स्थाने बांधली आणि अशेराचे स्तंभ आणि मूर्ती स्थापित
केल्या, स्वतःला नम्र करण्याआधी केलेल्या या सर्व गोष्टी संदेष्ट्यांच्या
घटनांची नोंद यामध्ये लिहिलेल्या आहेत. 20 मनश्शेह मरण पावला
आणि त्याच्या पूर्वजांना मिळाला आणि त्याला त्याच्या महालात दफन
केले. आणि त्याच्यानंतर त्याचा पुत्र आमोन राजा झाला. 21 वयाच्या
बावीसाव्या वर्षी आमोन राजा झाला आणि त्याने यरुशलेमात दोन वर्षे
राज्य केले. 22 त्याने आपला पिता मनश्शेह याच्याप्रमाणे याहवेहच्या
दृष्टीने जे वाईट ते केले. मनश्शेहने तयार केलेल्या त्या सर्व मूर्तींची
आमोनने पूजा केली आणि त्यांना बलिदाने अर्पण केली. 23 परंतु
त्याचे वडील मनश्शेह याच्या उलट, त्याने याहवेहपुढे स्वतःला नम्र केले
नाही; आमोनाने त्याचे अपराध वाढविले. 24 आमोनच्या अधिकाऱ्यांनी
त्याच्याविरुद्ध कट रचला आणि त्याच्या राजवाड्यात त्याची हत्या केली.
25 तेव्हा त्या देशातील लोकांनी आमोन राजाविरुद्ध ज्यांनी कट रचला
होता, त्या सर्वांना ठार मारले आणि त्यांनी त्याचा पुत्र योशीयाह याला
त्याच्या जागेवर राजा केले.

**34** वयाच्या आठव्या वर्षी योशीयाह राजा झाला आणि त्याने
यरुशलेममध्ये एकतीस वर्षे राज्य केले. 2 याहवेहच्या दृष्टीने
जे योग्य तेच त्याने केले आणि उजवीकडे किंवा डावीकडे न वळता
त्याचे पूर्वज दावीदाच्या मार्गांचे पालन केले. 3 त्याच्या राज्यकाळाच्या

आठव्या वर्षी, तो लहान असतानाच त्याचे पूर्वज दावीदाच्या परमेश्वराचा
त्याने शोध घेण्यास सुरुवात केली. त्याच्या कारकिर्दीच्या बाराव्या वर्षी
त्याने यहूदीया आणि यरुशलेम येथील उच्च स्थाने, अशेराचे स्तंभ
आणि तिथे असलेल्या मूर्ती काढून शुद्धीकरण करण्यास सुरुवात केली.
4 त्याच्या मार्गदर्शनाखाली बआल दैवतांच्या वेद्या पाडण्यात आल्या;
त्याने त्यावर ज्या धूपवेद्या होत्या, त्यांचे तुकडे केले आणि अशेराचे
स्तंभ आणि मूर्ती जमिनीवर पाडून फोडल्या. त्याचे बारीक तुकडे केले
आणि ज्यांनी त्यांना बलिदान केले होते, त्यांच्या कबरेवर ते विखरून
टाकले. 5 याजकांची हाडे त्यांच्या वेदींवर जाळली आणि अशाप्रकारे
त्याने यहूदीया आणि यरुशलेम यांचे शुद्धीकरण केले. 6 मनश्शेह,
एफ्राईम आणि शिमओन या गोत्रांच्या नगरांमध्ये, नफतालीपर्यंत
आणि त्यांच्या सभोवतालच्या भग्नावशेषांमध्ये, 7 वेद्या आणि अशेराचे
स्तंभ मोडून टाकले आणि मूर्तींचा चुरा करून पूड केली आणि संपूर्ण
इस्राएलमधून सर्व धूपवेद्यांचे तुकडे केले. नंतर तो यरुशलेमकडे परत
गेला. 8 योशीयाहच्या कारकिर्दीच्या अठराव्या वर्षी, भूमी आणि मंदिर
शुद्ध करण्यासाठी, त्याने अजल्याहचा पुत्र शाफान आणि त्या नगराचा
अधिपती मासेयाह यांना, नोंद करणारा यहोआहाजचा पुत्र योवाहला
त्याचे परमेश्वर याहवेहच्या मंदिराची दुरुस्ती करण्यासाठी पाठविले. 9
ते मुख्य याजक हिल्कियाहकडे गेले व परमेश्वराच्या मंदिरात आलेले
पैसे, जे लेव्यांनी व द्वारपालांनी मनश्शेह, एफ्राईम आणि इस्राएलच्या
अवशिष्ट लोकांकडून आणि यहूदाह व बिन्यामीनच्या लोकांकडून, तसेच
यरुशलेमच्या रहिवाशांकडून गोळा केले होते ते राजाला दिले. 10
नंतर त्यांनी ते याहवेहच्या मंदिराच्या कामावर देखरेख करण्यासाठी
नेमलेल्या माणसांच्या हाती सोपविले. या पुरुषांनी याहवेहच्या मंदिराची
दुरुस्ती आणि पुनर्बांधणी करणाऱ्या कामगारांना ते पैसे दिले. 11 ज्या
इमारती नाश होण्यासाठी यहूदीयाच्या राजांनी पडू दिल्या होत्या, त्यांचा
जीर्णोद्धार करण्यासाठी बांधकाम करणारे व सुतार यांना घडीव दगड
आणि इमारतीचे वासे व तुळईची लाकडे खरेदी करण्यासाठीसुद्धा
पैसे दिले. 12 कामगारांनी विश्वासयोग्यतेने काम केले. यहथ आणि
ओबद्याह, मरारी वंशजातून आलेले लेवी आणि कोहाथी वंशजातून
आलेले जखऱ्याह आणि मशुल्लाम हे त्यांचे मार्गदर्शन करण्यासाठी
तिथे नियुक्त केले होते. सर्व लेवीय लोकांना—कुशल वाद्य वादक—
13 त्यांच्याकडे मजुरांची जबाबदारी आणि प्रत्येक कामावरील सर्व
कामगारांवर मुकादम म्हणून देखरेख करण्याचे काम दिले होते. काही
लेवी लोकांना सचिव, शास्त्री आणि द्वारपाल असे काम दिले. 14
जेव्हा हिल्कियाह याजक याहवेहच्या मंदिरात नेण्यात आलेले पैसे बाहेर
काढत होता तेव्हा त्याला मोशेच्याद्वारे देण्यात आलेला याहवेहच्या
नियमशास्त्राचा ग्रंथ सापडला. 15 हिल्कियाह शाफान या सचिवाला
म्हणाला, “मला याहवेहच्या मंदिरात नियमशास्त्राचा ग्रंथ सापडला
आहे.” तो त्याने शाफानकडे दिला. 16 तेव्हा शाफान याने तो ग्रंथ
राजाकडे नेला आणि त्याला अहवाल दिला: “तुमचे अधिकारी ज्याकाही
गोष्टी करण्यास वचनबद्ध आहेत, त्या सर्व गोष्टी ते करीत आहेत.
17 त्यांना जो पैसा याहवेहच्या मंदिरात मिळाला, त्यांनी तो मंदिराचे
कामगार व कामाची देखरेख करणाऱ्यांच्या हाती दिला आहे.” 18
नंतर सचिव शाफान याने राजाला कळविले, “हिल्कियाह याजकाने
मला एक पुस्तक दिले आहे.” आणि शाफानाने त्यामधून राजाच्या
समोर वाचले. 19 जेव्हा राजाने नियमशास्त्राचे शब्द ऐकले तेव्हा त्याने
त्याची वस्त्रे फाडली. 20 त्याने हिल्कियाह, शाफानाचा पुत्र अहीकाम
आणि मीखाहचा पुत्र अब्दोन आणि शाफान चिटणीस आणि राजाचा
सेवक असायाह यांना हा आदेश दिला: 21 “जा आणि माझ्यासाठी
आणि इस्राएल आणि यहूदीयामध्ये जे लोक राहत आहेत, त्यांच्याबद्दल
या पुस्तकात लिहिलेले जे काही सापडले आहे, त्याबद्दल याहवेहकडे
चौकशी करा. याहवेहचा फार मोठा क्रोध आपल्यावर आला आहे,
कारण आपल्या पूर्वजांनी याहवेहच्या वचनाचे पालन केले नाही; या
पुस्तकात जे सर्वकाही लिहिलेले आहे त्याप्रमाणे ते वागले नाहीत.” 22
हिल्कियाह आणि त्याच्याबरोबर राजाने ज्यांना पाठवले होते, ते संदेष्टी
हुल्दाह हिच्याशी बोलण्यास गेले, ती पोशाख भांडाराचा अधिकारी
हसराहचा पुत्र तोखाथ चा पुत्र शल्लूमची पत्नी होती. ती यरुशलेमच्या
नव्या पेठेत राहत होती. 23 ती त्यांना म्हणाली, “याहवेह इस्राएलचे
परमेश्वर असे म्हणतात: ज्या मनुष्याने तुम्हाला माझ्याकडे पाठवले
आहे, त्याला सांगा, 24 ‘याहवेह असे म्हणतात: मी या ठिकाणावर
आणि येथील लोकांवर संकट आणेन आणि यहूदीयाच्या राजासमोर
वाचलेल्या ग्रंथात लिहिलेले सर्व शाप आणेन. 25 कारण त्यांनी माझा
त्याग केला आहे आणि इतर दैवतांना धूप जाळले आहेत आणि त्यांच्या
हस्तकृतींनी माझा राग पेटविला गेला आहे आणि माझा राग या
जागेवर ओतला जाईल आणि तो शांत होणार नाही.’ 26 यहूदीयाच्या
राजाला हे जाऊन सांगा, ज्याने तुम्हाला याहवेहची चौकशी करण्यासाठी
पाठविले होते, ‘जे वचन तू ऐकले होते त्याबद्दल याहवेह इस्राएलचे
परमेश्वर असे म्हणतात: 27 कारण तुझे अंत:करण प्रतिसाद देणारे
होते आणि जेव्हा या ठिकाणाविषयी आणि येथील लोकांविरुद्ध तो
जे काही बोलला ते तू ऐकले तेव्हा तू स्वत:ला परमेश्वरासमोर नम्र
केलेस आणि तू माझ्यासमोर नम्र झालास आणि तुझी वस्त्रे फाडली
आणि माझ्यासमोर रडलास, म्हणून मी तुझे ऐकले आहे, असे याहवेह
जाहीर करतात. 28 आता मी तुला तुझ्या पूर्वजांबरोबर मिळवेन आणि
तुला शांतीने पुरले जाईल. या ठिकाणावर आणि येथे राहणाऱ्यांवर
मी जे संकट आणणार आहे, ते तुझ्या डोळ्यांना दिसणार नाही.’”
तेव्हा त्यांनी तिचे उत्तर परत राजाला जाऊन सांगितले. 29 नंतर राजाने
यहूदीया आणि यरुशलेममधील सर्व वडीलजनांना एकत्र बोलाविले.
30 यहूदीयाचे लोक, यरुशलेम येथील रहिवासी, याजक आणि लेवी,
लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्व लोकांबरोबर राजा याहवेहच्या मंदिरात
गेला. याहवेहच्या मंदिरात सापडलेल्या कराराच्या ग्रंथातील सर्व शब्द
त्याने त्यांना ऐकू जातील असे वाचून दाखविले. 31 राजा त्याच्या
स्तंभाजवळ उभा राहिला आणि त्याने याहवेहसमोर याहवेहचे अनुसरण
करणे आणि त्यांच्या आज्ञा, कायदा आणि हुकूमनाम्याचे पालन करणे

आणि या ग्रंथात लिहिलेल्या शब्दांचे त्याच्या संपूर्ण अंत:करणाने आणि
संपूर्ण आत्म्याने पालन करण्याच्या कराराचे नवीनीकरण केले. 32 नंतर
त्याने यरुशलेममधील प्रत्येकाला आणि बिन्यामीन गोत्रांच्या लोकांना
तसे वचन देण्यास लावले; यरुशलेमच्या लोकांनी त्यांच्या पूर्वजांच्या
परमेश्वराबरोबर केलेल्या कराराप्रमाणे केले. 33 योशीयाहने इस्राएली
लोकांच्या सर्व प्रदेशामधून सर्व घृणास्पद मूर्ती काढून टाकल्या आणि
इस्राएलमध्ये उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे परमेश्वर याहवेहची सेवा
करावयास लावले. जोपर्यंत तो जिवंत होता, तोपर्यंत त्यांच्या पूर्वजांचे
परमेश्वर याहवेह यांचे अनुसरण करण्यास ते चुकले नाहीत.

**35** योशीयाहने यरुशलेममध्ये याहवेहसाठी वल्हांडण सण साजरा
केला आणि वल्हांडणाचे कोकरू पहिल्या महिन्याच्या चौदाव्या
दिवशी कापले गेले. 2 त्याने याजकांना त्यांना दिलेल्या कामासाठी
नियुक्त केले आणि याहवेहच्या मंदिराच्या सेवेसाठी त्यांना प्रोत्साहित
केले. 3 ज्यांनी सर्व इस्राएली लोकांना आज्ञा केली होती आणि
ज्यांना याहवेहसाठी पवित्र केले गेले होते, त्या लेवी लोकांना म्हणाला:
“इस्राएलचा राजा दावीदाचा पुत्र शलोमोनाने बांधलेल्या मंदिरात पवित्र
कोश ठेवा. ते तुमच्या खांद्यावर वाहून नेण्यासारखे नाही. आता तुमचे
परमेश्वर याहवेह आणि त्यांचे इस्राएली लोक यांची सेवा करा. 4
इस्राएलचा राजा दावीद आणि त्याचा पुत्र शलोमोनने लिहिलेल्या
सूचनेप्रमाणे तुमच्या विभागातील कुटुंबानुसार तुम्ही स्वत:ची तयारी
करा. 5 “तुमच्या बरोबरील प्रत्येक उपविभागासाठी लेव्यांच्या गटासह
सामान्य इस्राएली लोकांच्या कुटुंबाबरोबर पवित्र ठिकाणी उभे राहा.
6 वल्हांडणाच्या कोकऱ्यांचा वध करा, स्वत:ला पवित्र करा आणि
तुमच्या सहइस्राएली लोकांसाठी, मोशेद्वारे याहवेहने आज्ञा दिल्याप्रमाणे
कोकऱ्यांची तयारी करा.” 7 योशीयाहने तिथे असलेल्या सर्वसामान्य
लोकांसाठी वल्हांडणाचे अर्पण म्हणून तीस हजार कोकरे आणि बोकडे
आणि तीन हजार गुरे ही सुद्धा पुरविली, राजाच्या व्यक्तिगत मालमत्तेतून
हे सर्व दिले गेले. 8 त्याच्या अधिकाऱ्यांनीसुद्धा स्वेच्छेने लोकांना आणि
याजकांना आणि लेवीय यांना मदत केली. हिल्कियाह, जखऱ्याह आणि
यहीएल हे परमेश्वराच्या मंदिराच्या कारभाराचे अधिकारी होते, त्यांनी
याजकांना वल्हांडणाची दोन हजार सहाशे अर्पणे आणि तीनशे गुरे दिली.
9 तसेच कनन्याह बरोबर शमायाह आणि नथानेल, त्याचे भाऊ आणि
हशब्याह, ईयेल आणि योजाबाद हे लेवी लोकांचे पुढारी, यांनी लेवीय
लोकांसाठी पाच हजार वल्हांडणाची अर्पणे आणि पाचशे गुरे दिली. 10
सेवेची व्यवस्था करण्यात आली आणि राजाच्या आदेशानुसार याजकांनी
लेवीय लोकांबरोबर आपले स्थान ग्रहण केले. 11 वल्हांडणाची कोकरे
कापली गेली आणि याजकांनी त्यांच्या हाती दिलेले रक्त वेदीवर शिंपडले,
त्यावेळेस लेवीय लोकांनी प्राण्यांची कातडी काढली. 12 मोशेच्या
पुस्तकात लिहिल्याप्रमाणे याहवेहना अर्पण देण्यासाठी लोकांच्या
कुटुंबातील पोटविभागांनी याहवेहना अर्पण द्यावे यासाठी त्यांनी होमार्पण
बाजूला ठेवले. त्यांनी गुरांच्या बाबतीतही तसेच केले. 13 त्यांनी नेमून
दिल्याप्रमाणे वल्हांडण सणाच्या प्राण्यांना अग्नीवर भाजून घेतले आणि
पवित्र अर्पणे मडके, कढई आणि तव्यांत उकळले आणि ते सर्व लोकांना
लगेच वाढले. 14 यानंतर, त्यांनी स्वत:साठी आणि याजकांसाठी तयारी
केली, कारण याजक, अहरोनाचे वंशज हे रात्र होईपर्यंत होमार्पण
आणि चरबीचे भाग अर्पण करत होते. म्हणून लेवींनी स्वत:साठी आणि
अहरोन वंशज याजकांसाठी तयारी केली. 15 दावीद, आसाफ, हेमान
आणि राजाचा संदेष्टा यदूथून त्यांनी नेमून दिल्याप्रमाणे आसाफाचे
वंशज जे संगीतकार होते त्यांनी आपआपले स्थान ग्रहण केले. प्रत्येक
फाटकावरच्या द्वारपालांना त्यांचे काम सोडण्याची गरज नव्हती, कारण
त्यांचे सहकारी लेव्यांनी त्यांच्यासाठी तयारी केली होती. 16 त्यावेळेस
योशीयाह राजाच्या आदेशाप्रमाणे वल्हांडण सण साजरा करण्यासाठी
आणि याहवेहच्या वेदीवर होमबलींचे अर्पण करण्यासाठी याहवेहची
संपूर्ण सेवा पार पडली. 17 त्यावेळी जे इस्राएली लोक तिथे उपस्थित
होते त्यांनी वल्हांडण सण साजरा केला आणि बेखमीर भाकरीचा सण
सात दिवस पाळला. 18 शमुवेल संदेष्ट्याच्या काळापासून इस्राएलमध्ये
अशा प्रकारे वल्हांडण सण साजरा करण्यात आला नव्हता; आणि
योशीयाहने ज्याप्रकारे याजक, लेवी आणि सर्व यहूदीया आणि इस्राएली
लोक जे यरुशलेममध्ये होते, त्यांच्याबरोबर सण साजरा केला होता
तसा वल्हांडण इस्राएलच्या कोणत्याही राजांनी कधीही केला नव्हता.
19 हा वल्हांडण सण योशीयाह राजाच्या कारकिर्दीच्या अठराव्या वर्षी
साजरा करण्यात आला. 20 या सर्व गोष्टीनंतर, जेव्हा योशीयाहने
मंदिराची सेवा व्यवस्थित केल्यानंतर तेव्हा इजिप्तचा राजा नखो फरात
नदीवर असलेल्या कर्कमीश येथे त्याच्याशी लढण्यास गेला आणि
योशीयाह त्याचा सामना करण्यासाठी युद्धास गेला. 21 परंतु नखोने
त्याच्याकडे दूत पाठवून सांगितले, “यहूदीयाच्या राजा, तुझ्या आणि
माझ्यामध्ये काय भांडण आहे? यावेळेस मी तुमच्यावर नव्हे तर या
घराण्याबरोबर मी युद्ध करीत आहे, त्याच्यावर हल्ला करीत आहे.
परमेश्वराने मला घाई करण्यास सांगितले आहे; म्हणून परमेश्वराला
विरोध करणे थांबव, ते माझ्याबरोबर आहेत, नाहीतर ते तुझा नाश
करतील.” 22 तरीसुद्धा, योशीयाह त्याच्यापासून मागे फिरला नाही,
परंतु त्याला युद्धात गुंतवून ठेवण्यासाठी त्याने स्वत:चे वेषांतर केले.
परमेश्वराच्या आज्ञेनुसार नखोने जे सांगितले, ते त्याने ऐकले नाही, परंतु
तो मगिद्दोच्या मैदानावर त्याच्याबरोबर लढण्यासाठी गेला. 23 तेव्हा
धनुर्धऱ्यांनी योशीयाह राजाला बाण मारला, त्याने त्याच्या अधिकाऱ्यांना
सांगितले, “मला घेऊन जा; मी अत्यंत जखमी झालो आहे.” 24 तेव्हा
त्यांनी योशीयाहला त्याच्या रथातून बाहेर काढले, त्याला त्याच्या दुसऱ्या
रथात ठेवले आणि यरुशलेमास आणले, तिथेच त्याचा मृत्यू झाला.
त्याला त्याच्या पूर्वजांच्या कबरांमध्ये पुरण्यात आले आणि सर्व यहूदीया
आणि यरुशलेम येथील लोकांनी त्याच्यासाठी शोक केला. 25 यिर्मयाहने
योशीयासाठी विलापगीत लिहिले आणि आजपर्यंत सर्व स्त्री-पुरुष
गायक विलापामध्ये योशीयाहचे स्मरणोत्सव करतात. इस्राएलमध्ये
ही एक परंपरा झाली आहे आणि विलाप गीतांमध्ये त्या लिहिलेल्या
आहेत. 26 याहवेहच्या नियमशास्त्रात लिहिल्याप्रमाणे योशीयाहने

केलेली भक्तीची कृत्ये आणि त्याच्या राजवटीतील इतर घटना 27
सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत हे सर्व इस्राएलचे आणि यहूदीयाचे राजे या
पुस्तकामध्ये लिहिलेल्या आहेत.

**36** आणि त्या देशातील लोकांनी योशीयाहचा पुत्र यहोआहाजला
यरुशलेमात त्याच्या पित्याच्या जागेवर राजा केले. 2 वयाच्या
तेवीसाव्या वर्षी यहोआहाज राजा झाला आणि त्याने तीन महिने
यरुशलेमात राज्य केले. 3 इजिप्तच्या राजाने त्याला यरुशलेममध्ये
राज्यपदावरून खाली पाडले आणि यहूदीयावर शंभर तालांत चांदी आणि
एक तालांत सोने असा कर लादला. 4 इजिप्तच्या राजाने यहोआहाजचा
भाऊ एल्याकीम याला यहूदीया आणि यरुशलेमचा राजा केले आणि
एल्याकीमचे नाव बदलून यहोयाकीम ठेवले. परंतु नखोने एल्याकीमचा
भाऊ यहोआहाजाला घेऊन इजिप्तमध्ये नेले. 5 वयाच्या पंचवीसाव्या
वर्षी यहोयाकीम राजा झाला आणि त्याने यरुशलेममध्ये अकरा वर्षे
राज्य केले. त्याने याहवेह त्याच्या परमेश्वराच्या दृष्टीने जे वाईट ते
केले. 6 बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरने त्याच्यावर हल्ला केला आणि
त्याला बाबेलला घेऊन जाण्यासाठी त्याला कास्याच्या साखळदंडाने
बांधले. 7 नबुखद्नेस्सरने याहवेहच्या मंदिरातील वस्तूसुद्धा बाबेलमध्ये
नेल्या आणि त्या तिथे त्याच्या मंदिरात ठेवल्या. 8 यहोयाकीमच्या
कारकिर्दीतील इतर घटना, त्याने केलेल्या घृणास्पद गोष्टी आणि
त्याच्याविरुद्ध जे काही होते, ते सर्व इस्राएली आणि यहूदीयाच्या
राजांच्या पुस्तकात लिहिलेल्या आहेत. आणि त्याचा वारस म्हणून त्याचा
पुत्र यहोयाखीन राजा झाला. 9 वयाच्या अठराव्या वर्षी यहोयाखीन
राजा झाला आणि त्याने यरुशलेमात तीन महिने दहा दिवस राज्य
केले. त्याने याहवेहच्या दृष्टीने वाईट ते केले. 10 वसंतऋतूमध्ये राजा
नबुखद्नेस्सरने त्याला बोलाविणे पाठवले आणि त्याला बाबेलमध्ये
आणले, त्याचबरोबर याहवेहच्या मंदिरातील मौल्यवान वस्तू आणल्या
आणि त्याने यहोयाखीनचा काका सिद्कीयाहला यहूदीया आणि
यरुशलेमवर राजा केले. 11 सिद्कीयाह एकवीस वर्षाचा असताना राजा
झाला आणि त्याने यरुशलेमात अकरा वर्षे राज्य केले. 12 त्याने त्याचे
परमेश्वर याहवेह यांच्या दृष्टीने जे वाईट ते केले आणि यिर्मयाह संदेष्टाने
याहवेहचे वचन त्याला सांगितले, तरी त्यांच्यासमोर तो नम्र झाला नाही.
13 ज्याने त्याला परमेश्वराच्या नावाने शपथ घ्यायला लावली होती, त्या
बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरविरुद्धही त्याने बंड केले. तो ताठ मानेचा
झाला आणि त्याने त्याचे हृदय कठोर केले आणि याहवेह इस्राएलचे
परमेश्वर यांच्याकडे तो वळला नाही. 14 याव्यतिरिक्त याजकांचे सर्व
पुढारी आणि लोक अधिकच अविश्वासू झाले, त्यांनी इतर राष्ट्रांच्या सर्व
घृणास्पद प्रथांचे पालन केले आणि यरुशलेममध्ये पवित्र केलेले याहवेह
यांचे मंदिर त्यांनी अशुद्ध केले. 15 याहवेह, त्यांच्या पूर्वजांचे परमेश्वरानी
त्यांच्या संदेष्ट्यांच्याद्वारे त्यांना वारंवार संदेश पाठवले, कारण त्यांनी
त्यांच्या लोकांवर आणि त्यांच्या निवासस्थानावर दया केली होती. 16
परंतु त्यांनी तिथे परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाईपर्यंत परमेश्वराच्या
संदेष्ट्यांची चेष्टा केली, याहवेहचा राग त्यांच्या लोकांविरुद्ध चेतवेपर्यंत
त्यांच्या शब्दांचा तिरस्कार केला आणि त्यांच्या संदेष्ट्यांची थट्टा केली.
17 याहवेहनी खाल्डियन लोकांच्या राजाला त्यांच्याविरुद्ध आणले,
ज्यांनी त्यांच्या तरुण पुरुषांना मंदिरात तलवारीने मारले आणि तरुण
पुरुष किंवा तरुण स्त्रिया, वृद्ध किंवा जे अशक्त होते त्यांनाही सोडले
नाही. परमेश्वराने त्या सर्वांना नबुखद्नेस्सरच्या हाती दिले. 18 ज्याने
परमेश्वराच्या मंदिरातील मोठ्या आणि लहान सर्व मौल्यवान वस्तू आणि
याहवेहच्या मंदिरातील खजिने आणि राजा आणि त्याचे अधिकारी, यांचे
खजिने बाबेलला नेले. 19 त्यांनी परमेश्वराच्या मंदिराला आग लावली
आणि यरुशलेमचे तट पाडून टाकले; त्यांनी सर्व राजवाडे जाळले आणि
तेथील सर्व मौल्यवान वस्तूंचा नाश केला. 20 तलवारीच्या घातापासून
सुटलेल्या लोकांना तो बाबेलला बंदिवासात घेऊन गेला आणि पर्शियाचे
राज्य सत्तेवर येईपर्यंत ते त्याचे आणि त्याच्यानंतर येणाऱ्यांचे सेवक
झाले. 21 भूमीने शब्बाथाच्या विश्रांतीचा आनंद घेतला; यिर्मयाहने
सांगितलेल्या याहवेहच्या वचनाच्या पूर्णतेची सत्तर वर्षे होईपर्यंत त्या
भूमीने तिच्या उजाडपणाच्या सर्व वेळेत विसावा घेतला. 22 यिर्मयाहने
सांगितलेला याहवेहचा संकल्प पूर्ण व्हावा म्हणून पर्शियाचा राजा
कोरेशच्या कारकिर्दीच्या पहिल्याच वर्षी पुढील जाहीरनामा लिहून
आपल्या संपूर्ण साम्राज्यात पाठवावा अशी इच्छा याहवेहने राजाच्या
मनात निर्माण केली. 23 "पर्शियाचा राजा कोरेश, असे जाहीर करतो
की: "'याहवेह, जे स्वर्गाचे परमेश्वर आहेत, त्यांनी पृथ्वीवरील सर्व राज्ये
माझ्याकडे दिली आहेत आणि यहूदीयातील यरुशलेमात त्यांचे मंदिर
बांधण्यास माझी नियुक्ती केली आहे. तुमच्यातील जे याहवेहचे लोक
आहात तुम्ही तिथे वर जाऊ शकता आणि त्यांचे परमेश्वर त्यांच्याबरोबर
असोत.'"

# एज्रा

1 यिर्मयाहने सांगितलेला याहवेहचा संकल्प पूर्ण व्हावा म्हणून
पर्शियाचा राजा कोरेशच्या कारकिर्दीच्या पहिल्याच वर्षी पुढील
जाहीरनामा लिहून आपल्या संपूर्ण साम्राज्यात पाठवावा अशी इच्छा
याहवेहने राजाच्या मनात निर्माण केली. 2 “पर्शियाचा राजा कोरेश,
असे जाहीर करतो की: “‘याहवेह, जे स्वर्गाचे परमेश्वर आहेत, त्यांनी
पृथ्वीवरील सर्व राज्ये माझ्याकडे दिली आहेत आणि यहूदीयातील
यरुशलेमात त्यांचे मंदिर बांधण्यास माझी नियुक्ती केली आहे.
3 तुमच्यातील जे याहवेहचे लोक आहेत त्यांनी वर यहूदीयातील
यरुशलेमास जाऊन याहवेह इस्राएलचे परमेश्वर, परमेश्वर जे यरुशलेमात
आहेत त्यांचे मंदिर बांधावे आणि त्यांचे परमेश्वर त्यांच्याबरोबर असोत.
4 आणि उरलेले जे यहूदी लोक जिथे कुठे असतील त्यांनी यरुशलेमला
जाणाऱ्या यहूदी लोकांना सोने, चांदी, अन्य वस्तू आणि पशू, तसेच
यरुशलेमातील परमेश्वराच्या मंदिरासाठी स्वैच्छिक अर्पणेही पुरवावी.’”
5 नंतर परमेश्वराने यहूदाह व बिन्यामीन वंशांचे पुढारी आणि लेवी व
याजक यांच्या मनामध्ये याहवेहचे मंदिर पुन्हा बांधण्यासाठी यरुशलेमला
ताबडतोब जाण्याची उत्कट इच्छा निर्माण केली. 6 सर्व शेजाऱ्यांनी
दिलेल्या स्वेच्छेने दिलेल्या देणग्यांबरोबरच सोने, चांदी, गुरे याशिवाय
इतर मोलवान भेटवस्तूही देऊन त्यांची मदत केली. 7 त्या शिवाय
बाबेलच्या नबुखद्नेस्सर राजाने यरुशलेम येथील याहवेहच्या मंदिरातून
नेलेल्या ज्या वस्तू आपल्या दैवतांच्या मंदिरात ठेवल्या होत्या, त्या
कोरेश राजाने बाहेर काढल्या. 8 कोरेश राजाने पर्शियाचा खजिनदार
मिथ्रदाथला सूचना दिली की त्याने यहूदीयात परतणारा यहूद्यांचा पुढारी
शेशबस्सरला सर्व वस्तू मोजून द्याव्या. 9 यामध्ये पुढील वस्तूंचा समावेश
होता: सोन्याच्या पराती 30, चांदीच्या पराती 1,000, चांदीची पात्रे
29, 10 सोन्याचे कटोरे 30, चांदीचे कटोरे 410, इतर पात्रे 1,000.
11 अशा एकूण 5,400 सोने व चांदीच्या वस्तू होत्या. या सर्व वस्तू
बंदिवासातील लोकांसह शेशबस्सरने बाबेल देशातून यरुशलेमला परत
नेल्या.

2 आता बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरने जे लोक धरून बाबेलला नेले
होते, त्यातील जे बंदिवासातून प्रांतात परतले, त्यांच्या नावांची
ही यादी आहे (ते यरुशलेम व यहूदीया येथे येऊन आपआपल्या
गावी परतले. 2 जरुब्बाबेल, येशूआ, नहेम्याह, सेरायाह, रेएलायाह,
मर्दखय, बिलशान, मिस्पार, बिग्वई, रहूम व बाअनाह): 3 पारोशचे
वंशज 2,172, 4 शफाट्याहचे 372, 5 आरहचे 775, 6 पहथ-
मोआब (येशूआ व योआब यांच्या कुळातून) 2,812, 7 एलामचे
1,254, 8 जत्तूचे 945, 9 जक्काईचे 760, 10 बानीचे 642, 11
बेबाईचे 623, 12 अजगादचे 1,222, 13 अदोनिकामचे 666, 14
बिग्वईचे 2,056, 15 आदीनचे 454, 16 हिज्कीयाहच्या कुळातले
आतेरचे 98, 17 बेसाईचे 323, 18 योराहचे 112, 19 हाशूमचे
223, 20 गिब्बारचे 95, 21 बेथलेहेमचे 123, 22 नटोफाहचे 56,
23 अनाथोथचे 128, 24 अजमावेथचे 42, 25 किर्याथ-यआरीम,
कफीराह व बैरोथचे 743, 26 रामाह व गेबाचे 621, 27 मिकमाशचे
122, 28 बेथेल व आयचे 223, 29 नबोचे 52, 30 मग्बिशचे 156,
31 दुसऱ्या एलामचे 1,254, 32 हारीमचे 320, 33 लोद, हादीद व
ओनोचे 725, 34 यरीहोचे 345, 35 सनाहाचे 3,630, 36 याजकांचे
वंशज: यदायाहचे (येशूआच्या पितृकुळातील) 973, 37 इम्मेरचे
1,052, 38 पशहूरचे 1,247, 39 हारीमचे 1,017, 40 लेवीचे वंशज:
येशूआ व कदमीएलचे (होदव्याहचे कुटुंबाद्वारे) 74, 41 संगीतकार:
आसाफचे वंशज 128, 42 मंदिराचे द्वारपाल: खालील लोकांचे वंशज:
शल्लूमचे, आतेरचे, तल्मोनचे, अक्कूबचे, हतीताचे व शोबाईचे 139,
43 मंदिराचे सेवकांचे वंशज: झीहाचे, हसूफाचे, तब्बावोथचे, 44 केरोसचे,
सीआहाचे, पादोनचे, 45 लबानाहचे, हगाबाहचे, अक्कूबचे, 46 हागाबचे,
शलमाईचे, हानानचे, 47 गिद्देलचे, गहरचे, रेआयाहचे, 48 रसीनचे,
नकोदाचे, गज्जामचे, 49 उज्जाचे, पासेआहचे, बेसाईचे, 50 अस्नाहचे,
मऊनीमचे, नफूसीमचे, 51 बकबुकचे, हकूफाचे, हर्हूरचे, 52 बसलूथचे,
महीदाचे, हर्षाचे, 53 बर्कोसचे, सिसेराचे, तामहचे, 54 नसीयाहचे व
हतीफाचे. 55 शलोमोनच्या सेवकांचे वंशज: सोताईचे, हसोफरतचे,
परूदाचे, 56 यालाहचे, दर्कोनचे, गिद्देलचे, 57 शफाट्याहचे, हत्तीलचे,
पोखेरेथ-हज्ज़ेबाइमचे व आमीचे. 58 मंदिराचे सेवक व शलोमोनच्या
सेवकांचे वंशज एकूण 392. 59 पर्शियाचे तेल-मेलाह, तेल-हर्षा, करूब,
अद्दोन व इम्मेर या शहरातून पुढील लोक आले. पण त्यांच्या वंशावळी
हरवल्यामुळे ते इस्राएली वंशज असल्याचे सिद्ध करू शकले नाहीत.
60 यांचे वंशज: दलायाहचे, तोबीयाहचे व नकोदाचे 652. 61 आणि
याजक पितृकुळातील वंशज: हबयाहचे, हक्कोसचे व बारजिल्लईचे
(बारजिल्लईने गिलआदी बारजिल्लई याच्या कन्यांपैकी एकीशी विवाह
केला आणि त्याने तिच्या घराण्याचे नाव धारण केले होते.) 62 यांनी
आपल्या वंशावळींचा शोध घेतला, परंतु त्यांना ते सापडले नाही, म्हणून
त्यांना अशुद्ध म्हणून याजकपदातून वगळण्यात गेले. 63 राज्यपालांनी
उरीम व थुम्मीम यांचा उपयोग करताना इतर याजक असल्याशिवाय
त्यांना अर्पणांतील अन्नाचा याजकांचा वाटा घेण्यास परवानगी दिली
नाही. 64 सर्व सभेचे एकूण 42,360 लोक होते. 65 याशिवाय त्यांचे
7,337 दास व दासी व 200 गायक व गायिका होत्या. 66 त्यांनी
आपल्याबरोबर 736 घोडे, 245 खेचरे, 67 435 उंट आणि 6,720
गाढवे आणली होती. 68 जेव्हा ते यरुशलेमात याहवेहच्या मंदिरात
आले, काही कुलप्रमुखांनी परमेश्वराच्या भवनाची पुनर्बांधणी करण्यास
त्या जागीच स्वेच्छेने दाने दिली. 69 प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार
जितके देणे शक्य होते तितके दिले. या कामासाठी 61,000 दारिक
सोने, 5,000 मीना चांदी व 100 याजकीय झगे भांडारात आणले. 70
इतर काही लोक आणि बाकीचे इस्राएल लोक जे आपआपल्या शहरात
स्थायिक झाले होते त्यांच्याबरोबर याजक, लेवी, संगीतकार, द्वारपाल व
मंदिरसेवक हे सुद्धा आपआपल्या नगरांत स्थायिक झाले.

3 यहूदीयाला परतलेले सर्व इस्राएली लोक आपआपल्या शहरात
स्थायिक झाल्यावर ते सातव्या महिन्यात यरुशलेममध्ये एकत्र आले.
2 नंतर योसादाकाचा पुत्र येशूआने आपल्या बरोबरीच्या याजकांना
आणि शल्तीएलचा पुत्र जरूब्बाबेल व त्याच्या बंधूना बरोबर घेऊन
इस्राएलांच्या परमेश्वराची वेदी पुन्हा बांधली आणि परमेश्वराचा मनुष्य
मोशेच्या नियमशास्त्रात सांगितल्याप्रमाणे वेदीवर होमार्पणे वाहिली. 3
आसपासच्या राष्ट्रातील लोकांचे भय असून देखील ती वेदी आधीच्याच
पायावर परत बांधण्यात आली आणि याहवेहस सकाळ संध्याकाळच्या
होमार्पणांसाठी तिचा ताबडतोब उपयोग करण्यात आला. 4 मोशेच्या
नियमशास्त्रात सांगितल्याप्रमाणे त्यांनी मंडपांचा सण पाळला व
सणाच्या नियमानुसार प्रतिदिवसासाठी नेमलेले होमबली प्रत्येक दिवशी
अर्पिले. 5 याशिवाय नेहमीचे होमबली आणि चंद्रदर्शनाचे व सर्व
सणांचे बली, तसेच याहवेहच्या इतर वार्षिक उत्सवांचे बली व लोकांनी
याहवेहसाठी स्वखुशीने आणलेले बली त्यांनी अर्पण केले. 6 याहवेहच्या
मंदिराचा पाया अद्याप घातला गेला नव्हता, तरी सातव्या महिन्याच्या
पहिल्या दिवशी त्यांनी याहवेहला होमार्पणे करण्यास सुरुवात केली. 7
नंतर त्यांनी गवंडी व सुतार मोलमजुरीने लावले व सोर आणि सीदोन
येथील लोकांकडून गंधसरूचे ओंडके विकत घेतले आणि त्याबद्दल
त्यांनी त्यांना धान्य, द्राक्षारस व जैतुनाचे तेल दिले. हे ओंडके लबानोन
पर्वतावरून आणण्यात आले व भूमध्य समुद्राच्या किनाऱ्याने जलमार्गाने
त्यांना याफो येथे पोचते करण्यात आले. हे सर्व पर्शियाचा राजा
कोरेशच्या परवानगीने करण्यात आले. 8 इस्राएली लोक यरुशलेमला
परमेश्वराच्या भवनात आल्यानंतर दुसऱ्या वर्षाच्या दुसऱ्या महिन्यात
मंदिराच्या बांधकामास सुरुवात झाली. शल्तीएलचा पुत्र जरूब्बाबेल,
योसादाकाचा पुत्र येशूआ व त्यांच्याबरोबर त्यांचे याजकबंधू व लेवीबंधू
या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली बंदिवासाहून परत आलेले सर्वजण कामास
लागले. वीस वर्षे वा अधिक वयाच्या लेव्यांना याहवेहच्या मंदिराची
देखरेख करण्यासाठी नेमण्यात आले. 9 परमेश्वराच्या मंदिराच्या
बांधकामाची सर्व देखरेख येशूआ व त्याचे बंधू व पुत्र, तसेच (यहूदाहचे
वंशज) कदमीएल व त्याचे पुत्र, हेनादादचे पुत्र व नातेवाईक यांच्यावर
सोपविली होती. हे सर्वजण लेवी होते. 10 बांधकाम करणाऱ्यांनी
याहवेहच्या मंदिराच्या पायाचे बांधकाम पूर्ण केले, तेव्हा याजकांनी
आपले याजकीय पोशाख घातले व आपल्या तुताऱ्या वाजविल्या.
आसाफाच्या वंशातील लेव्यांनी आपल्या झांजा वाजविल्या. इस्राएलच्या
दावीद राजाने लावून दिलेल्या क्रमाप्रमाणे त्यांनी याहवेहची स्तुती केली.
11 त्यांनी स्तुतिगान गाईले व पुढील गीत गाऊन याहवेहची उपकारस्तुती
केली: "याहवेह चांगले आहेत. इस्राएलावरील त्यांची प्रीती व दया
सर्वकाळ टिकणारी आहेत." याहवेहच्या मंदिराचा पाया घातल्याबद्दल,
त्यांनी मोठ्याने जयघोष करीत याहवेहची स्तुती केली. 12 पण वयस्कर
याजक, लेवी, व इतर पुढारी यातील पुष्कळजण, ज्या लोकांनी पूर्वीचे
मंदिर बघितले होते ते शलोमोनाने बांधलेल्या सुंदर मंदिराची आठवण
काढून एकीकडे मोठ्याने रडू लागले, तर दुसरीकडे त्यांच्यापैकी काही
मोठ्या आनंदाने जयघोष करू लागले. 13 लोक इतक्या मोठ्याने
जयघोष करीत होते की त्यांचा आवाज दूर अंतरावरूनही ऐकू येत होता
आणि त्यामुळे रडण्याचा आवाज व आनंदाचा आवाज यातील फरक
लोकांना समजत नव्हता.

4 बंदिवासातून परत आलेले लोक याहवेह इस्राएलाच्या परमेश्वराचे
मंदिर पुन्हा बांधत आहेत, हे जेव्हा यहूदाह व बिन्यामीनच्या शत्रूंनी
ऐकले, 2 तेव्हा ते जरूब्बाबेल व इतर पुढाऱ्यांकडे आले व म्हणाले,
"आपण मिळून काम करू या. कारण तुमच्या परमेश्वराची तुम्हाला
जितकी आस्था आहे, तितकीच आम्हालाही आहे. अश्शूरचा राजा
एसरहद्दोनने आम्हाला येथे आणल्यापासून आम्ही याहवेहला अर्पणे
करीत आहोत." 3 पण जरूब्बाबेल, येशूआ व इतर यहूदी पुढाऱ्यांनी
उत्तर दिले, "तुम्हाला या कामात भाग घेता येणार नाही. पर्शियाचा
राजा कोरेशच्या आज्ञेप्रमाणे याहवेह इस्राएलांच्या परमेश्वराचे मंदिर
इस्राएली लोकांनीच बांधले पाहिजे." 4 नंतर तेथील स्थानिक रहिवाशांनी
यहूदीयातील लोकांना निराश करण्याचा व घाबरविण्याचा प्रयत्न केला.
5 त्यांनी अधिकाऱ्यांना त्यांच्या विरोधात काम करण्यासाठी लाच दिली
आणि त्यांचे मनसुबे उधळले. पर्शियाचा राजा कोरेशच्या सर्व कारकिर्दीत
व दारयावेश राजाच्या राजवटीपर्यंत हे चालले. 6 नंतर जेव्हा अहश्वेरोश
राजाची कारकीर्द सुरू झाली, तेव्हा त्यांच्या शत्रूंनी त्याला यहूदीया व
यरुशलेमच्या लोकांविरुद्ध आरोप करणारी काही पत्रे पाठविली. 7 राजा
अर्तहशश्तच्या कारकिर्दीतही त्यांनी असेच केले. बिश्लाम, मिथ्रदाथ,
ताबील आणि त्यांचे साथीदार यांनी पर्शियाचा राजा अर्तहशश्तला
अरामी भाषेत व अरामी लिपीत पत्र पाठविले. 8 राज्यपाल रहूम,
शिमशय लेखक यांनी यरुशलेमविरुद्ध पर्शियाचा राजा अर्तहशश्तला
अरामी भाषेत असे पत्र लिहिले: 9 राज्यपाल रहूम, शिमशय लेखक,
तसेच अनेक न्यायाधीश, स्थानिक पुढारी आणि पर्शियाचे, बाबेलच्या
येरेक आणि सुसा येथील एलामी लोक त्यात सामील होते. 10 तसेच
इतर अनेक राष्ट्रांचे लोकही या पत्राच्या लेखनात गोवलेले होते. त्यांना
महान आणि थोर आसनपर ने त्यांच्या स्वतःच्या देशातून काढून
पुन्हा यरुशलेमात, शोमरोनात व फरात नदीच्या पश्चिमेला असलेल्या
प्रदेशांमध्ये वसविले होते. 11 अर्तहशश्त राजास त्यांनी पाठविलेल्या
पत्रात असा मजकूर होता: अर्तहशश्त महाराज, फरात नदीच्या पश्चिमेला
राहणाऱ्या आपल्या विश्वासू प्रजाजनांकडून आपणास शुभेच्छा. 12
कृपया राजास ही बाब विदित असावी की, बाबेलमधून यरुशलेमला
पाठविलेले यहूदी लोक हे बंडखोर आणि दुष्ट शहर पुन्हा बांधत आहेत.
ते या शहराचे कोट पुन्हा बांधत आहेत व मंदिराच्या पायाची दुरुस्तीही
सुरू झाली आहे. 13 परंतु हे शहर पुन्हा बांधले गेले, शहराचे कोट पुन्हा
बांधले, तर त्यात महाराजांचे नुकसान आहे, कारण मग यहूदी लोक
आपली खंडणी, नजराणे व कर भरण्यास नकार देतील. 14 आमचे
आश्रयदाते म्हणून आम्ही आपले ऋणी आहोत आणि महाराजांच्या
चांगुलपणाचा असा गैरफायदा घेऊन, आपली अप्रतिष्ठा व्हावी, हे
आम्हाला बघण्याची इच्छा नाही. म्हणून आम्ही ही बातमी महाराजांस

पत्र पाठवून कळवीत आहोत. 15 आम्ही आपणास अशी विनंती करतो
की आपण या शहराचा राजद्रोहाचा जुना इतिहास आपल्या पूर्वजांच्या
जुन्या कागदपत्रात शोधून पाहावा, म्हणजे हे नगर मागील काळात किती
बंडखोर होते हे आपणास आढळून येईल. राजांच्या विरुद्ध आणि त्याला
ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या राष्ट्रांविरुद्ध बंडाळी केल्यामुळेच
या नगराचा नाश करण्यात आला होता. 16 आता आम्ही असे जाहीर
करू इच्छितो की जर हे नगर परत बांधले गेले आणि त्याची तटबंदी
पूर्ण झाली, तर फरात नदीच्या पलीकडील काहीही प्रदेश महाराजांच्या
ताब्यात राहणार नाही. 17 नंतर राजाने उत्तर दिले: राज्यपाल रहूम व
शिमशय लेखक व शोमरोनात राहणाऱ्या व फरात नदीच्या पश्चिमेस
राहणाऱ्या सर्वांना, शुभेच्छा! 18 आपण पाठविलेले पत्र भाषांतर करून
मला वाचून दाखविण्यात आले. 19 जुन्या नोंदी तपासून पाहण्याचा
मी हुकूम दिला आहे आणि गतकाळात यरुशलेम नगर खरोखरच
अनेक राजांची मोठी डोकेदुखी होती असे मला आढळून आले आहे.
वास्तविक पाहता बंडाळी व राजद्रोह या गोष्टी येथे नेहमीच्याच होत्या.
20 यरुशलेममध्ये असे बलवान राजे होते की त्यांनी फरात नदीच्या
पलीकडील संपूर्ण प्रदेशात राज्य केले व त्यांना कर, खंडणी, नजराणे
दिले जात असे. 21 म्हणून मी आज्ञा देतो की त्या लोकांनी नगर पुन्हा
बांधण्याचे काम, मी पुन्हा हुकूम देईपर्यंत थांबवावे. 22 सावध असा
आणि याकडे दुर्लक्ष करू नका. राजाला उपद्रव होईपर्यंत हा धोका का
वाढू द्यावा? 23 राजा अर्तहशश्तचे हे पत्र जेव्हा रहूम व शिमशय यांना
वाचून दाखविण्यात आले, तेव्हा ते लगेचच यरुशलेमला गेले आणि
यहूदी लोकांना जबरदस्तीने काम बंद करण्यास त्यांनी भाग पाडले. 24
अशा रीतीने यरुशलेममधील परमेश्वराच्या मंदिराचे बांधकाम पर्शियाचा
राजा दारयावेशच्या कारकिर्दीच्या दुसऱ्या वर्षापर्यंत स्थगित झाले.

**5** आता यरुशलेम व यहूदीया येथे हाग्गय संदेष्टा आणि इद्दोचा
वंशज जखऱ्याह संदेष्टा यांनी आता यहूदीया आणि यरुशलेममधील
यहूदी लोकांसाठी त्यांच्यावर असलेले इस्राएलचे परमेश्वराच्या नावाने
भविष्यवाणी केली. 2 मग शल्तीएलचा पुत्र जरूब्बाबेल व योसादाकाचा
पुत्र येशूआ यांनी यरुशलेमातील परमेश्वराच्या मंदिराच्या पुनर्बांधणीचे
काम सुरू केले. आणि परमेश्वराच्या संदेष्ट्यांनी त्यांच्याबरोबर राहून
त्यांना साहाय्य केले. 3 परंतु फरातच्या पश्चिमेकडील प्रदेशाचे राज्यपाल
ततनइ आणि शथर-बोजनइ व त्यांचे सोबती यरुशलेमात आले व
त्यांनी विचारले, “हे मंदिर पुनर्बांधणीची व पूर्ण करण्याची परवानगी
तुम्हाला कोणी दिली?” 4 त्यांनी हे देखील विचारले, “मंदिर बांधण्याचे
काम करणाऱ्या सर्व लोकांची नावे काय आहेत?” 5 पण त्यांच्या
परमेश्वराची नजर यहूदी वडीलजन त्यांच्यावर होती, दारयावेश राजा
त्याचे उत्तर देईपर्यंत त्यांचे काम त्यांना थांबविता आले नाही. 6 फरात
नदीपलीकडील प्रदेशाचे राज्यपाल ततनइ, शथर-बोजनइ आणि त्यांचे
सहकारी यांनी दारयावेश राजाला जे पत्र पाठविले त्याचा मजकूर
असा होता: 7 त्यांनी जे पत्र पाठविले ते असे: दारयावेश महाराज,
आपणास आमच्या शुभेच्छा! 8 आमची राजाला हे कळविण्याची
इच्छा आहे की, आम्ही यहूदीयाच्या महान परमेश्वराच्या मंदिराच्या
पुनर्बांधणीच्या जागी गेलो. ते मंदिर मोठमोठ्या पाषाणांनी बांधले जात
आहे आणि भिंतीत लाकडे घातली जात आहेत. त्यांच्या देखरेखीखाली
बांधकामाची अतिशय उत्साहाने आणि यशस्वी रीतीने प्रगती होत आहे.
9 आम्ही पुढाऱ्यांना विचारले, “या मंदिराची पुनर्बांधणीची करून ते
पूर्ण करण्याची परवानगी तुम्हाला कोणी दिली?” 10 आम्ही त्यांची
नांवे विचारली, कारण आम्ही त्यांच्या पुढाऱ्यांची नावे लिहून तुमच्या
माहिती करिता तुम्हास कळवावी. 11 त्यांनी आम्हाला असे उत्तर दिले:
“आम्ही स्वर्ग आणि पृथ्वीच्या परमेश्वराचे सेवक आहोत. या ठिकाणी
पुष्कळ शतकांपूर्वी एका महान इस्राएली राजाने जे मंदिर बांधून पूर्ण
केले होते, त्याची आम्ही पुनर्बांधणी करीत आहोत. 12 कारण आमच्या
पूर्वजांनी स्वर्गाच्या परमेश्वराला संतप्त केले, म्हणून त्यांनी आमच्या
लोकांना बाबेलचा खाल्डियन राजा नबुखद्नेस्सरच्या अधीन केले,
ज्याने मंदिराचाही नाश केला व लोकांना बाबेलच्या बंदिवासात नेले.
13 “बाबेलच्या कोरेश राजाने त्याच्या कारकिर्दीच्या पहिल्या वर्षी हे
परमेश्वराचे मंदिर बांधले जावे असा हुकूम केला. 14 नबुखद्नेस्सर राजाने
परमेश्वराच्या मंदिराची जी सोन्याचांदीची पात्रे यरुशलेमाच्या मंदिरातून
काढून नेली व बाबेलच्या मंदिरात ठेवली होती, ती कोरेश राजाने परत
केली. ती पात्रे त्याने नेमलेला यहूदाहचा राज्यपाल शेशबस्सरच्या
ताब्यात दिली. 15 त्याने त्याला सूचना दिली, ‘ही पात्रे घ्यावी आणि
यरुशलेमच्या मंदिरात ठेवावी. परमेश्वराचे मंदिर पूर्वी होते त्याच ठिकाणी
पुन्हा बांधले जावे.’ 16 “म्हणून शेशबस्सर आला व त्याने यरुशलेमच्या
मंदिराची पायाभरणी केली त्या वेळेपासून लोक मंदिराचे बांधकाम
करीत आहेत, पण ते अद्यापही पूर्ण झालेले नाही.” 17 आम्ही विनंती
करतो की बाबेलचे राजकीय दप्तर तपासले जावे व कोरेश राजाने
परमेश्वराच्या मंदिराची यरुशलेममध्ये पुनर्बांधणी करावी अशी आज्ञा
दिली होती की नाही हे पाहावे व मग आपली या प्रकरणी काय इच्छा
आहे हे आम्हाला कळवावे.

**6** म्हणून दारयावेश राजाने आज्ञा दिली की, जिथे कागदपत्रे राखून
ठेवली जात त्या बाबेलच्या दप्तरखान्यात कसून शोध केला
जावा. 2 शेवटी त्या चर्मपत्राची गुंडाळी मेदिया प्रांतातील अखमथा
नगरातील राजवाड्यात सापडली, त्यात असे लिहिले होते: लेखात
म्हटले होते: 3 कोरेश राजाच्या कारकिर्दीच्या पहिल्या वर्षी, यरुशलेम
येथील परमेश्वराच्या मंदिरासंबंधी एक हुकूमनामा पाठविला गेला
होता: तिथे अर्पणे करण्याकरिता ते मंदिर परत बांधले जावे आणि
त्याची पायाभरणी करावी. त्याची उंची साठ हात व रुंदी साठ हात
असावी. 4 पायांमध्ये मोठ्या दगडांचे तीन थर असतील व त्यांच्यावर
एक लाकडाचा थर असेल. त्याचा सर्व खर्च राजकीय खजिन्यातून
दिला जाईल; 5 आणि जी सोन्याचांदीची पात्रे नबुखद्नेस्सर राजाने
परमेश्वराच्या मंदिरातून बाबेलला नेली होती, ती सर्व यरुशलेमला परत
नेण्यात येतील व पूर्वीसारखी परमेश्वराच्या मंदिरात ठेवली जातील. 6
म्हणून फरात नदीच्या पलीकडील प्रदेशाचे राज्यपाल ततनइ, शथर-

बोजनइ आणि त्या प्रदेशाच्या इतर अधिकाऱ्यांना सांगण्यात येते
की, या स्थानापासून दूर राहा. 7 परमेश्वराच्या मंदिराच्या बांधकामात
अडथळे आणू नका. यहूदीयाचा राज्यपाल आणि इतर यहूदी पुढाऱ्यांनी
पूर्वीच्याच जागेवर ते मंदिर बांधावे. 8 एवढेच नव्हे, तर परमेश्वराच्या
मंदिराच्या बांधकामाकरिता यहूद्यांच्या मदतीसाठी हे करण्याची मी
तुम्हाला आज्ञा देतो: मंदिर बांधण्यास येणारा सर्व खर्च फरात नदीच्या
पलीकडील प्रदेशाच्या राजकीय खजिन्यातून त्यांच्या मागणीनुसार
देण्यात यावा, जेणेकरून कामास विलंब होणार नाही. 9 स्वर्गातील
परमेश्वराला होमार्पणे करण्यासाठी गोऱ्हे, मेंढरे व कोकरे द्यावीत,
आणखी त्यांना गहू, द्राक्षारस, मीठ आणि जैतुनाचे तेल हे पदार्थ
यरुशलेमातील याजकांच्या मागणीनुसार प्रत्येक दिवशी न चुकता
द्यावेत. 10 मग ते त्यांच्या स्वर्गातील परमेश्वराला मान्य होतील अशी
अर्पणे देऊ शकतील आणि राजा व त्याच्या पुत्रांच्या कल्याणासाठी
प्रार्थना करू शकतील. 11 कोणी या संदेशातील मजकूर कोणत्याही
प्रकारे बदलण्याचा प्रयत्न करेल, तर त्याच्या घराच्या तुळया उपसून
काढल्या जातील व त्या तुळयांवर त्याला फाशी देण्यात येईल आणि
त्याच्या घराचा उकिरडा केला जाईल. 12 ज्या परमेश्वराने त्यांच्या
नावाचे वसतिस्थान व्हावे यासाठी यरुशलेम नगरी निवडली आहे, ते
हा हुकूम बदलणाऱ्या व मंदिराचा नाश करणाऱ्या कोणत्याही राजाचा
आणि लोकांचा सर्वनाश करतील. मी, दारयावेशने हे फर्मान काढले
आहे व त्याची अंमलबजावणी तत्परतेने व्हावी. 13 फरात नदीच्या
पलीकडील प्रदेशाचा राज्यपाल ततनइ, शथर-बोजनइ आणि त्यांच्या
अधिकाऱ्यांनी दारयावेश राजाच्या या हुकुमाची अंमलबजावणी तातडीने
केली. 14 म्हणून यहूदी पुढाऱ्यांनी त्यांचे काम पुढे चालविले आणि
त्यांना संदेष्टा हाग्गय व इद्दोचा पुत्र जखऱ्याहच्या उपदेशामुळे चांगलेच
प्रोत्साहन मिळाले. शेवटी इस्राएलाच्या परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे व
पर्शियाचे राजे, कोरेश, दारयावेश आणि अर्तहशश्त यांच्या फर्मानाप्रमाणे
मंदिराचे काम पूर्ण झाले. 15 दारयावेश राजाच्या कारकिर्दीच्या सहाव्या
वर्षी, अदार महिन्याच्या तिसऱ्या दिवशी हे काम पूर्ण झाले. 16
याजकांनी, लेव्यांनी व सर्व इस्राएली लोकांनी अत्यंत हर्षाने मंदिराचा
समर्पणविधी साजरा केला. 17 या समर्पणविधीमध्ये शंभर बैल, दोनशे
मेंढे आणि चारशे नरकोकरे अर्पण केली गेली, आणि इस्राएलांच्या
बारा वंशासाठी बारा बोकडे पापार्पण म्हणून बळी दिले गेले. 18
मग त्यांनी मोशेच्या नियमशास्त्रात सांगितल्याप्रमाणे यरुशलेममध्ये
परमेश्वराची सेवा करण्यासाठी आपआपल्या विभागांसाठी याजक आणि
लेवींचीही नियुक्ती केली. 19 वल्हांडण सण पहिल्या महिन्याच्या चौदाव्या
दिवशी साजरा करण्यात आला. 20 तोपर्यंत याजक आणि लेवी यांनी
विधीनियमाप्रमाणे स्वत:ला शुद्ध करून घेतले होते. लेव्यांनी वल्हांडण
सणाच्या अर्पणासाठी बंदिवासातून परत आलेल्या लोकांसाठी आणि
याजकांसाठी व स्वत:साठी वल्हांडणाची मेंढरे वधली. 21 बंदिवासातून
परत आलेल्या यहूदी आणि यहूदीयात वस्ती करून राहिलेले इस्राएली
लोक मूर्तिपूजक परकीय लोकांच्या अशुद्ध चालीरीतींना सोडून, याहवेह
परमेश्वराच्या भक्तीमध्ये सामील झाले. 22 बेखमीर भाकरीचा सण सात
दिवस हर्षभराने पाळण्यात आला. सर्व देशभर आनंदोत्सव होता, कारण
याहवेहने अश्शूरच्या राजाला इस्राएलाशी कनवाळूपणे वागण्यास आणि
इस्राएलाच्या परमेश्वराच्या मंदिराच्या बांधकामामध्ये मदत करण्यास
प्रवृत्त केले.

7 या घटना घडल्यानंतर, पर्शियाचा राजा अर्तहशश्तच्या कारकिर्दीत
एज्रा, जो सेरायाहचा पुत्र होता. सेरायाह हा अजऱ्याहाचा पुत्र होता.
अजऱ्याह हा हिल्कियाहचा पुत्र होता. 2 हिल्कियाह हा शल्लूमचा पुत्र
होता. शल्लूम हा सादोकाचा पुत्र होता. सादोक हा अहीतूबचा पुत्र
होता. 3 अहीतूब हा अमऱ्याहचा पुत्र होता. अमऱ्याह हा अजऱ्याहाचा
पुत्र होता. अजऱ्याह हा मरायोथाचा पुत्र होता. 4 मरोयाथ जरह्याहचा
पुत्र होता. जरह्याह उज्जीचा पुत्र होता. उज्जी बुक्कीचा पुत्र होता.
बुक्की अबीशूवाचा पुत्र होता. 5 अबीशूवा फिनहासाचा पुत्र होता.
फिनहास एलअज़ाराचा पुत्र होता. एलअज़ार अहरोनाचा पुत्र होता.
अहरोन मुख्य याजक होता— 6 हा एज्रा बाबेलहून यरुशलेमला आला.
इस्राएली लोकांना याहवेह इस्राएलच्या परमेश्वराने दिलेल्या मोशेच्या
नियमशास्त्राचा एज्रा पारंगत शिक्षक होता. त्याने जे काही मागितले ते
सर्व राजाने त्याला दिले, कारण याहवेह त्याच्या परमेश्वराचा वरदहस्त
त्याच्यावर होता. 7 काही इस्राएली लोक व तसेच याजक, लेवी,
गायक, द्वारपाल व मंदिरातील सेवक यांनीही त्याच्याबरोबर प्रवास
केला व ते अर्तहशश्त राजाच्या कारकिर्दीच्या सातव्या वर्षी यरुशलेमला
पोहोचले. 8 राजाच्या कारकिर्दीच्या सातव्या वर्षातील पाचव्या महिन्यात
ते यरुशलेमला पोहोचले. 9 पहिल्या महिन्याच्या पहिल्या दिवशी त्यांनी
बाबेल सोडले, पाचव्या महिन्याच्या पहिल्या दिवशी ते यरुशलेमला
पोहोचले, कारण परमेश्वराचा वरदहस्त त्यांच्यावर होता. 10 कारण एज्रा
याहवेहच्या नियमांचा अभ्यास करण्यास, ते पाळण्यास, व ते नियम
इस्राएली लोकांना शिकविण्यासाठी समर्पित होता. 11 ही पत्राची प्रत
आहे जी अर्तहशश्त राजाने नियमशास्त्राचा शिक्षक आणि इस्राएलसाठी
याहवेहच्या आज्ञा आणि नियमांचा अभ्यासक एज्रा याजकाला दिली
होती: 12 राजांचा राजा, जो अर्तहशश्त याजकडून, स्वर्गातील परमेश्वराचे
नियम शिकविणारा शिक्षक एज्रा याजक यास: शुभेच्छा. 13 मी
असे फर्मावतो की, माझ्या राज्यातील कोणीही इस्राएली, याजक
आणि लेवी यांच्यासह त्यांना तुझ्याबरोबर यरुशलेमला स्वेच्छेने जाता
येईल. 14 राजा आणि त्याचे सातजणांचे सल्लागार मंडळ तुला सूचना
देत आहोत की, तुझ्याजवळ असलेल्या परमेश्वराच्या नियमानुसार
यहूदीया व यरुशलेमबद्दल समाचार घेण्यासाठी तुला पाठविण्यात येते.
15 शिवाय, राजा आणि त्याच्या सल्लागारांनी यरुशलेममध्ये ज्यांचे
वास्तव्य आहे, त्या इस्राएलाच्या परमेश्वराला दिलेले सोने-चांदी तू बरोबर
घेऊन जा. 16 सर्व बाबेल प्रांतामध्ये तू गोळा केलेले सोने व चांदी,
तसेच यरुशलेममधील आपल्या यरुशलेमच्या परमेश्वराच्या मंदिरासाठी
इस्राएली लोक व त्यांच्या याजकांनी स्वखुशीने दिलेली अर्पणेही बरोबर
घेऊन जावी. 17 या पैशाचा उपयोग बैल, मेंढे, कोकरे, अन्न व पेय विकत

घेण्यासाठी करून यरुशलेम येथील तुमच्या परमेश्वराच्या मंदिरात त्यांच्या
वेदीवर या सर्वांचे अर्पण करावे. 18 उरलेली रक्कम तू आणि तुझ्या
भाऊबंदांना योग्य वाटेल त्याप्रकारे परमेश्वराच्या इच्छेप्रमाणे खर्च करावी.
19 तुझ्याबरोबर सोन्याची पात्रे व इतर वस्तूही आम्ही देत आहोत. ही
यरुशलेमातील तुमच्या परमेश्वराच्या उपासनेसाठी आहेत. 20 मंदिराच्या
बांधकामाला अथवा तशाच प्रकारच्या कामासाठी तुम्हाला पैसा कमी
पडला तर राजकीय खजिन्यातून निधी मागून घे. 21 आता, मी राजा
अर्तहशश्त, हा हुकूमनामा फरात नदीच्या पश्चिमेकडील प्रांतातील सर्व
खजिनदारांकडे पाठवित आहे. स्वर्गातील परमेश्वराचे नियम शिकविणारा
शिक्षक व याजक एज्रा जी विनंती करेल व जे तुमच्याकडे मागेल ते
त्याला द्यावे— 22 ते पुढे नमूद केलेल्या शंभर तालांत पर्यंत चांदी,
शंभर कोर गहू, शंभर बथ द्राक्षारस, शंभर बथ जैतुनाचे तेल व मीठ
लागेल तेवढे द्यावे. 23 स्वर्गातील परमेश्वराच्या आज्ञेनुसार लागेल ते
सर्व काळजीपूर्वकपणे पुरवावे. कारण स्वर्गातील परमेश्वराचा क्रोध
राजावर आणि त्याच्या पुत्रांवर येण्याचा धोका आपण का पत्करावा?
24 मी अशीही आज्ञा देतो की याजक, लेवी, गायक, द्वारपाल, मंदिरात
काम करणारे आणि मंदिरातील इतर कामगार यांच्यापासून कुठलाही
कर, जकात वा चुंगी घेण्याचा तुला अधिकार नाही. 25 आणि एज्रा,
तुला परमेश्वराने दिलेली सुज्ञता वापरून परमेश्वराच्या नियमाचे पालन
करणाऱ्या न्यायाधीश व इतर अधिकारी यांची निवड आणि नेमणूक
करावी. हे अधिकारी फरात नदीच्या पश्चिमेकडील भागात न्यायदान
करतील. जर त्यांना तुमच्या परमेश्वराचे नियम माहीत नसतील, तर
तू ते त्यांना शिकवावे. 26 तुमच्या परमेश्वराची आज्ञा न मानणाऱ्यांना
आणि राजांचे नियम मोडणाऱ्यांना ताबडतोब मृत्यू, हद्दपारी, मालमत्तेची
जप्ती, किंवा तुरुंगवास यापैकी कोणतीही शिक्षा द्यावी. 27 तेव्हा एज्रा
म्हणाला, "याहवेह आमच्या पूर्वजांच्या परमेश्वराची स्तुती असो! कारण
त्यांनी राजाच्या अंतःकरणात यरुशलेममधील याहवेहच्या मंदिरास
याप्रकारे सन्मान देण्याचे सुचविले, 28 आणि त्यांनी राजासमोर व
त्याच्या सात जणांच्या सल्लागार मंडळासमोर व सरदारांसमोर माझ्यावर
मेहेरबानी केली. याहवेह माझ्या परमेश्वराच्या कृपेचा वरदहस्त माझ्यावर
असल्यामुळेच मी धाडस करून काही इस्राएली पुढाऱ्यांना मजबरोबर
यरुशलेमला येण्यासाठी जमा केले."

**8** अर्तहशश्त राजाच्या कारकिर्दीत, बाबेलहून माझ्याबरोबर आलेल्या
पुढाऱ्यांची नावे व वंशावळी येणेप्रमाणे आहे: 2 फिनहासाच्या
कुळातील: गेर्षोम; इथामाराच्या कुळातील: दानीएल; दावीदाच्या
कुळातील: हट्टूश 3 हा शखन्याहच्या कुळातील; पारोशच्या कुळातील:
जखऱ्याह व त्याच्याबरोबर 150 पुरुषांची नोंदणी झाली; 4 पहथ-
मोआबच्या कुळातील: जरह्याहचा पुत्र एलिओएनाइ व इतर 200
पुरुष; 5 जट्टूच्या कुळातील: यहजिएलाचा पुत्र शखन्याह व इतर 300
पुरुष; 6 आदीनाच्या कुळातील: योनाथानाचा पुत्र एबेद व इतर 50
पुरुष; 7 एलामाच्या कुळातील: अथल्याहचा पुत्र यशायाह व इतर 70
पुरुष; 8 शफाट्याहच्या कुळातील: मिखाएलचा पुत्र जबद्याह व इतर
80 पुरुष; 9 योआबाच्या कुळातील: यहीएलाचा पुत्र ओबद्याह व इतर
218 पुरुष; 10 बानीच्या कुळातील: योसिफ्याचा पुत्र शेलोमीथ व
इतर 160 पुरुष; 11 बेबाई कुळातील: बेबाईचा पुत्र जखऱ्याह व इतर
28 पुरुष; 12 अजगादाच्या कुळातील: हक्काटानाचा पुत्र योहानान
व इतर 110 पुरुष; 13 अदोनिकामच्या कुळातील: शेवटचे लोक
ज्यांची नावे एलिफेलेत, ईयेल व शमायाह होते, आणि त्यांच्याबरोबर
इतर 60 पुरुष; 14 बिग्वईच्या कुळातील: ऊथय व जक्कूर आणि
इतर 70 पुरुष. 15 अहवाकडे जाणाऱ्या कालव्याजवळ मी सर्वांना
एकत्र केले आणि तिथे तीन दिवस आम्ही तळ दिला. तिथे आलेल्या
लोकांची व याजकांची पाहणी केली, तेव्हा लेवी वंशातील कोणीही
मला आढळला नाही. 16 म्हणून मी निरोप पाठवून एलिएजर, अरीएल,
शमायाह, एलनाथान, यारीब, एलनाथान, नाथान, जखऱ्याह आणि
मशुल्लाम या लेवी पुढाऱ्यांना बोलाविले. मी योयारीब व एलनाथान
या दोघा शिक्षकांनाही बोलाविणे पाठविले. 17 मी त्यांना कासिफ्या
नावाच्या ठिकाणी असलेल्या यहूद्यांचा पुढारी इद्दो आणि मंदिरात
काम करणारे त्याचे लेवीबंधू याजकडे अशी विनंती करण्यासाठी
पाठविले की त्यांनी यरुशलेमातील आमच्या परमेश्वराच्या मंदिरातील
सेवेसाठी सेवेकरी पाठवावेत. 18 परमेश्वराच्या कृपेचा हात आमच्यावर
असल्याने त्यांनी आम्हाकडे इस्राएलचा पुत्र लेवीचा वंशज, महलीचा
पुत्र शेरेब्याह नावाचा एक सुज्ञ मनुष्य पाठविला. त्याच्याबरोबर त्याचे
पुत्र व भाऊ मिळून एकूण 18 जण होते. 19 हशब्याहसह मरारीचा
वंशज यशायाहलाही त्याचे पुत्र व बंधू अशा 20 जणांसह पाठविले. 20
दावीदाने व अधिकाऱ्यांनी जे लेव्यांच्या सेवेसाठी नेमले होते, असे 220
मंदिरसेवकही आणले, ज्यांची नांवे नोंदण्यात आली. 21 आम्ही अहवा
कालव्याच्या किनारी असतानाच मी जाहीर केले की सर्वांनी उपवास
करावा, म्हणजे आपल्या परमेश्वरासमोर आपण स्वतःला नम्र करून,
त्यांनी आमचे व आमच्या मुलाबाळांचे व मालमत्तेचे प्रवासात संरक्षण
करावे अशी प्रार्थना करावी. 22 कारण प्रवासात शत्रूपासून संरक्षण
मिळावे म्हणून राजाजवळ सैनिक व स्वार मागण्याची मला लाज
वाटली. आम्ही राजाला आधीच सांगितले होते, "जे आमच्या परमेश्वराची
भक्ती करतात, त्यांचा वरदहस्त त्यांच्यावर असतो आणि जे त्यांना
सोडतात, त्यांच्यावरच अरिष्ट येते." 23 म्हणून आम्ही उपास केला
आणि आमची काळजी घेण्याबद्दल परमेश्वराची प्रार्थना केली आणि
त्यांनी आमचे रक्षण केले. 24 मी याजकातून बारा पुढाऱ्यांची नेमणूक
केली ते शेरेब्याह, हशब्याह व इतर दहा याजकबंधू होते. 25 राजा,
त्याचे कारभारी मंडळ, पुढारी आणि इस्राएली लोक यांनी परमेश्वराच्या
मंदिरासाठी अर्पण केलेले सोने, चांदी, सोन्याची पात्रे व इतर वस्तू मोजून
दिले व ते यरुशलेमला नेण्याची जबाबदारी मी त्या बारा पुढाऱ्यांवर
टाकली. 26 याप्रकारे मी त्यांचे वजन केले, 650 तालंत चांदी, 100
तालंत चांदीची पात्रे, 100 तालंत सोने, 27 1,000 दारिक वजनाचे
वीस सोन्याचे कटोरे व उज्वल कास्याचे, सोन्याइतकेच मोलाचे दोन
सुंदर कटोरेही होते. 28 मग मी त्यांना म्हणालो, "तुम्ही, तसेच याहवेह

आमच्या पूर्वजांच्या परमेश्वराला वाहिलेली स्वैच्छिक अर्पणे म्हणजे
सोने चांदी व सोन्याचांदीची पात्रे याहवेह परमेश्वराला समर्पित केलेली
आहेत. 29 हे सर्व साठे याहवेहच्या मंदिराच्या भांडारात ठेवण्याकरिता
तोलून यरुशलेमात नेतृत्व करीत असलेले याजक, लेवी व इस्राएलचे
वडीलजन यांच्या स्वाधीन करण्याआधी यांचे काळजीपूर्वकरित्या रक्षण
करा." 30 तेव्हा याजक आणि लेवींनी तोलून दिलेले चांदी, सोने
व पवित्र पात्रे यरुशलेमातील परमेश्वराच्या मंदिरात पोचविण्याची
जबाबदारी स्वीकारली. 31 पहिल्या महिन्याच्या बाराव्या दिवशी अहवा
कालव्यापासून तळ उठवून आम्ही यरुशलेमकडे निघालो. आमच्या
परमेश्वराचा वरदहस्त आम्हावर होता आणि वाटेत त्यांनी शत्रू व लुटारू
यांच्यापासून आमचे रक्षण केले. 32 अशा तऱ्हेने आम्ही यरुशलेमला
पोहोचलो, तिथे तीन दिवस विश्रांती घेतली. 33 चवथ्या दिवशी उरीयाह
पुत्र मरेमोथ याजकाच्या हाती, फिनहासाचा पुत्र एलअज़ार, येशूआचा
पुत्र योजाबाद आणि बिन्नुईचा पुत्र नोअद्याह हे लेवी देखील त्याच्यासह
असून रुपे, सोने व इतर मोलवान वस्तू यांचे परमेश्वराच्या मंदिरात
वजन करून सोपविले. 34 प्रत्येक वस्तूची संख्या व वजन मोजण्यात
आले आणि त्यावेळी त्या वजनाची नोंद करण्यात आली. 35 नंतर
आमच्या पथकातील प्रत्येकाने इस्राएलाच्या परमेश्वराला पुढील होमार्पणे
केली: इस्राएली राष्ट्रासाठी बारा गोऱ्हे, शहाण्णव एडके, सत्याहत्तर
नरकोकरे आणि पापार्पण म्हणून बारा बोकडे. हे सर्व याहवेहस होमार्पण
म्हणून वाहण्यात आले. 36 नंतर फरात नदीच्या पश्चिमेस असलेल्या
सर्व प्रांताच्या प्रांतप्रमुखांना व राज्यपालांना राजाची फर्माने देण्यात
आली. मग अर्थात्, त्यांनी परमेश्वराचे मंदिर पुन्हा बांधण्याच्या कार्यात
आमच्याशी सहकार्य केले.

9 या सर्व गोष्टी आटोपल्यावर, यहूद्यांचे पुढारी माझ्याकडे आले.
त्यांनी मला सांगितले, "इस्राएली लोक, याजक आणि लेवी यांनी
स्वतःला कनानी, हिथी, परिज्जी, यबूसी, अम्मोनी, मोआबी, इजिप्तचे
व अमोरी या मूर्तिपूजक लोकांच्या घृणास्पद चालीरीतीपासून अलिप्त
ठेवले नाही. 2 या लोकांनी सभोवती असलेल्या राष्ट्रांच्या कन्यांचा
स्वतःशी व आपल्या पुत्रांशी केलेल्या या विवाहांमुळे परमेश्वराचे
पवित्र लोक मिश्रित झाले आहेत. काही राजकीय पुढारी आणि
अधिकाऱ्यांनी तर या विश्वासघातात पुढाकार घेतला आहे." 3 जेव्हा मी
हे ऐकले, तेव्हा मी माझा अंगरखा फाडला, डोक्याचे व दाढीचे केस
उपटले आणि अत्यंत भयभीत मनस्थितीत मी खाली बसलो. 4 या
विश्वासघातामुळे बंदिवासातून परतलेल्या इस्राएली लोकांच्या मनात
परमेश्वराच्या वचनाचे भय उत्पन्न झालेले पुष्कळजण माझ्याभोवती
गोळा झाले. सायंकाळच्या होमार्पणाची वेळ होईपर्यंत मी तिथेच बसून
राहिलो. 5 सरतेशेवटी, सायंकाळच्या होमार्पणाची वेळ झाल्यावर
अत्यंत गोंधळलेल्या, माझा झगा व अंगरखा फाटलेल्या स्थितीतच
मी गुडघे टेकले आणि याहवेह माझ्या परमेश्वराकडे हात उंचावले. 6
आणि त्यांचा धावा करून म्हटले: "हे माझ्या परमेश्वरा, माझे मुख
तुमच्याकडे वर करण्याची मला खरोखरच लाज व कलंकित झाल्यागत
वाटते. आमच्या पातकांची रास आता आमच्या डोक्यावरून गेली आहे,
कारण आमचे अपराध आकाशापर्यंत अमर्यादित झाले आहेत. 7
आमच्या पूर्वजांपासून आजतागायत आमची अत्यंत घोर पापे झाली
आहेत. आमच्या पातकांमुळेच, आम्ही, आमचे राजे, आमचे याजक,
गैरयहूदी राजांच्या तलवारीने मारले गेले, आम्हाला कैद करण्यात आले,
लुबाडण्यात आले व फजीत करण्यात आले. आजही आमची स्थिती
अशीच आहे. 8 "पण आता या थोड्या काळासाठी याहवेह आमच्या
परमेश्वराने आमच्यावर कृपा करून आमच्यापैकी काही थोड्या लोकांना
जिवंत राखले आणि त्यांच्या या पवित्रस्थानी आम्हाला स्थिर केले
आहे. आमच्या परमेश्वराने आमच्या दृष्टीस प्रकाश दिला व आम्हाला
गुलामगिरीतून थोडी विश्रांती दिली आहे. 9 आम्ही गुलाम आहोत,
पण आमच्या परमेश्वराने आम्हाला गुलामगिरीतही सोडून दिले नाही.
त्याऐवजी पर्शियाच्या राजाच्या नजरेत आम्हाला अशी कृपा दिली आहे:
आमच्या परमेश्वराच्या मंदिराची पुनर्बांधणी करण्यासाठी आणि त्याचा
जीर्णोद्धार करण्यासाठी आम्हाला नवीन जीवन दिले आहे. आम्हाला
यहूदीया आणि यरुशलेम येथे संरक्षणासाठी तटबंदी दिली आहे. 10
"पण हे आमच्या परमेश्वरा, आता आम्ही तुमच्यापुढे काय बोलावे?
कारण आम्ही तुमचे नियम मोडले आहेत. 11 तुमचे सेवक संदेष्टे, त्यांनी
आम्हाला आधीच इशारा देऊन ठेवला होता: 'जो देश आम्हाला वतन
म्हणून मिळेल, तो देश तिथे राहणाऱ्या लोकांच्या भयंकर अमंगळ
चाली व कृत्ये यांनी भ्रष्ट झालेला असेल. खरोखरच आज देशाच्या या
टोकापासून तर त्या टोकापर्यंत तो अपवित्रतेने भरलेला आहे. 12 म्हणून
आपल्या कन्या या राष्ट्रांच्या पुरुषांना देऊ नयेत आणि त्यांच्या कन्या
तुमच्या पुत्रांना करून घेऊ नयेत. त्या राष्ट्रांशी कोणत्याही प्रकारे मैत्रीचा
समेट करू नये. तरच तुम्ही सुदृढ होऊन तुम्हाला त्या भूमीचे उत्तम फळ
लाभेल व ती समृद्धी आमच्या मुलाबाळांस सदासर्वकाळचे वतन म्हणून
लाभेल.' 13 "तर सत्य हे आहे की ही परिस्थिती केवळ आपल्याच
वाईट कृत्यांमुळे आणि घृणास्पद अपराधांमुळे आपल्यावर आली आहे.
असे असूनही, आमच्या परमेश्वराने आमच्या अपराधास योग्य शिक्षेपेक्षा
कमी शिक्षा देऊन हा भाग आमच्या स्वाधीन केला आहेस 14 तरी
आमच्या दुष्टपणामुळे आम्ही पुन्हा तुमच्या आज्ञाचा भंग करून जे लोक
अमंगळ कृत्ये करतात, त्यांच्याशी मिश्रविवाह करावे काय? खरोखर
आता तुमचा संताप आम्हाला नष्ट करून आणि वाचून आलेले अवशिष्ट
इस्राएली लोकही नष्ट होणार नाहीत काय? 15 हे याहवेह, इस्राएलांच्या
परमेश्वरा, तुम्ही नीतिमान आहात! आता आम्ही अवशेष असे उरलो
आहोत. तुमच्या दृष्टीने आम्ही दोषी आहोत आणि आमच्या दोषांमुळेच
तुमच्या समक्षतेत उभे राहणे आम्हांपैकी कोणालाही शक्य नाही."

10 परमेश्वराच्या भवनासमोर जमिनीवर पडून एज्रा रडत प्रार्थना
करीत व पापांगिकार करीत असताना, इस्राएली पुरुष, स्त्रिया व
मुले यांचा एक फार मोठा समुदाय त्याच्याभोवती जमा झाला. तेही
अत्यंत दुःखाने रडू लागले. 2 मग एलाम वंशातल्या यहीएलाचा पुत्र
शखन्याह एज्राला म्हणाला, "आम्ही या गैरयहूदी स्त्रियांशी विवाह करून

आमच्या परमेश्वराविरुद्ध विश्वासघात केला आहे. पण या स्थितीतही
इस्राएलला आशा आहे. 3 आता जे आमच्या परमेश्वराचे भय धरतात
व त्यांच्या आज्ञा पाळतात, ते आपण या स्त्रियांना सोडून देण्याचे
वचन देऊ या. माझ्या स्वामीच्या सल्ल्यानुसार आम्ही त्यांना त्यांच्या
मुलांबाळांसह परत पाठवून देऊ. सर्वकाही परमेश्वराच्या नियमानुसार
झाले पाहिजे. 4 तर आता ऊठ; या सर्वगोष्टी तुझ्या हातात आहेत. आम्ही
तुला पूर्णपणे सहकार्य करू, म्हणून धैर्य धर व योग्य ते कर." 5 तेव्हा
एज्रा उठून उभा राहिला आणि त्याने याजक, लेवी आणि सर्व इस्राएली
लोकांच्या पुढाऱ्यांनी शखन्याह म्हणतो त्याप्रमाणे करण्याची शपथ
घ्यावी अशी मागणी केली आणि त्या सर्वांनी शपथ घेतली. 6 मग एज्रा
परमेश्वराच्या भवनापासून उठला व एल्याशीबाचा पुत्र यहोहानानच्या
खोलीवर गेला, त्याने अन्नपाणी घेण्याचे नाकारले, कारण बंदिवासातून
परत आलेल्या इस्राएलांच्या विश्वासघातासाठी तो शोक करीत राहिला.
7 मग संबध यहूदीयात व यरुशलेमात असे जाहीर करण्यात आले
की बंदिवासातून परतलेल्या प्रत्येक इस्राएलीने यरुशलेमला यावे. 8
इस्राएलांच्या पुढाऱ्यांनी आणि वडीलजनांनी असे ठरविले की जो कोणी
तीन दिवसाच्या आत यरुशलेमला येण्याचे नाकारील तो आपले वतन
गमावेल आणि त्याला बंदिवासातून परतलेल्या इस्राएलाच्या सभेतून
बहिष्कृत करण्यात येईल. 9 तीन दिवसांच्या आत, नवव्या महिन्याच्या
विसाव्या दिवशी, यहूदाहचे व बिन्यामीनचे सर्व लोक यरुशलेमात येऊन
पोहोचले व परमेश्वराच्या मंदिरासमोर चौकात बसले. या प्रकरणाच्या
गांभीर्यामुळे व जोरदार पावसामुळे ते अत्यंत क्लेशजनक स्थितीत
होते. 10 मग एज्रा याजक उभा राहिला आणि त्यांना म्हणाला, "तुम्ही
विश्वासघात केला आहे, कारण तुम्ही गैरयहूदी स्त्रियांशी विवाह केले
आहेत आणि आपण इस्राएलचे पातक आणखीच वाढविले आहे. 11
आता याहवेह आपल्या पूर्वजांच्या परमेश्वराचा गौरव करा येथून पुढे
त्यांच्याच इच्छेप्रमाणे करा. स्वत:ला सभोवतालच्या लोकांपासून आणि
या गैरयहूदी स्त्रियांपासून वेगळे करा." 12 तेव्हा सर्वजण मोठ्याने
उत्तर देत म्हणाले: "तुम्ही सांगता ते योग्य आहे! त्याप्रमाणे आम्ही
करू. 13 पण इथे अनेकजण आहेत आणि आता इतका जोरदार
पाऊस पडतो आहे की आम्ही येथे बाहेर आपल्या शक्तीने थांबूही शकत
नाही. तसेच आम्ही इतके घोर पातक केले आहे की हे सर्व सुरळीत
होण्यास एक दोन दिवस पुरेसे होणार नाहीत. 14 आमच्या पुढाऱ्यांना
न्यायदानाची व्यवस्था करू द्या. ज्याला गैरयहूदी पत्नी आहे असा
प्रत्येकजण ठरलेल्या वेळी आपल्या नगराचे वडीलजन व न्यायाधीश
यांच्यासह येईल. मग परिस्थिती निवळेल आणि आपल्या परमेश्वराचा
भयंकर कोप आम्हांपासून दूर होईल." 15 फक्त असाहेलचा पुत्र
योनाथान, तिकवाहचा पुत्र यहज्याह, ज्यांना मशुल्लाम व शब्बथई
लेवी यांनी पाठिंबा दिला होता त्यांनी या योजनेला विरोध दर्शविला.
16 तेव्हा बंदिवासातून परतलेल्यांना जी सूचना करण्यात आली होती
त्यानुसार केले. एज्रा याजकाने प्रत्येकाच्या नावाचा उल्लेख करून
सर्व पितृकुळांच्या पुढाऱ्यातून एकास निवडले. दहाव्या महिन्याच्या
पहिल्या दिवशी ते या बाबींची चौकशी करण्यास बसले. 17 आणि
गैरयहूदी स्त्रियांशी विवाह केलेल्या पुरुषांचा निवाडा करण्याचे काम
पहिल्या महिन्याच्या पहिल्या दिवशी संपविले. 18 ज्यांनी गैरयहूदी
स्त्रियांशी विवाह केले होते, त्या याजकांची यादी पुढीलप्रमाणे आहे:
योसादाकाचा पुत्र येशूआ व त्याचे भाऊबंद: मासेयाह, एलिएजर,
यारीब व गदल्याह. 19 (त्यांनी आपल्या पत्नींना घटस्फोट देऊन
सोडून देण्याची शपथ घेतली आणि मेंढ्याची अर्पणे करून आपली
पापे कबूल केली.) 20 इम्मेराचे वंशज: हनानी व जबद्याह. 21 हारीमाचे
वंशज: मासेयाह, एलीयाह, शमायाह, यहीएल व उज्जीयाह. 22
पशहूराचे वंशज: एलिओएनाइ, मासेयाह, इश्माएल, नथानेल, योजाबाद
व एलासाह. 23 लेवी मधून: योजाबाद, शिमी, कलायाह (उर्फ कलीता),
पथह्याह, यहूदाह, व एलिएजर. 24 गायकांपैकी: एल्याशीब हा होता.
द्वारपालापैकी: शल्लूम, तेलेम आणि उरी हे होते. 25 इतर इस्राएली
लोकांपैकी: पारोशाच्या कुळातील: रमियाह, यिज्जीयाह, मल्कीयाह,
मियामीन, एलअज़ार, मल्कीयाह व बेनाइयाह. 26 एलामाच्या कुळातील:
मत्तन्याह, जखऱ्याह, यहीएल, अब्दी, यरेमोथ व एलीयाह. 27 जत्तूच्या
कुळातील: एलिओएनाइ, एल्याशीब, मत्तन्याह, यरेमोथ, जाबाद व
अजीजा, 28 बेबाईच्या कुळातील: यहोहानान, हनन्याह, जब्बइ व
अथलाइ. 29 बानीच्या कुळातील: मशुल्लाम, मल्लूख, अदायाह, याशूब,
शेआल व रामोथ. 30 पहथ-मोआबाच्या कुळातील: अदना, कलाल,
बेनाइयाह, मासेयाह, मत्तन्याह, बसालेल, बिन्नुई व मनश्शेह, 31
हारीमाच्या कुळातील: एलिएजर, इश्शीयाह, मल्कीयाह, शमायाह,
शिमिओन, 32 बिन्यामीन, मल्लूख व शमरियाह. 33 हाशूमाच्या
कुळातील: मत्तनई, मत्तथाह, जाबाद, एलिफेलेत, यरेमई, मनश्शेह व
शिमी. 34 बानीच्या कुळातील: मादइ, अम्राम, ऊएल, 35 बेनाइयाह,
बेदयाह, कलूही, 36 वन्या, मरेमोथ, एल्याशीब, 37 मत्तन्याह, मत्तनई,
यासय. 38 बानी, बिन्नुई कुळातील: शिमी, 39 शेलेम्याह, नाथान,
अदायाह, 40 मखनदबइ, शेशय, शारइ, 41 अजरएल, शेलेम्याह,
शमरियाह, 42 शल्लूम, अमऱ्याह व योसेफ. 43 नबोच्या कुळातील:
ईयेल, मत्तिथ्याह, जाबाद, जबीना, इद्दो, योएल व बेनाइयाह. 44 या
पुरुषांनी गैरयहूदी स्त्रियांशी विवाह केला होता व त्यांच्यापैकी काहींना
त्यांच्यापासून लेकरे झाली होती.

# नहेम्याह

**1** हखल्याहचा पुत्र नहेम्याहची वचने: विसाव्या वर्षी किसलेव महिन्यात
मी शूशन राजवाड्यात असताना, 2 माझ्या यहूदी बांधवांपैकी
हनानी नावाचा एक बंधू मला भेटण्यासाठी काही लोकांना बरोबर घेऊन
यहूदीयाहून आला. बंदिवासातील अवशिष्ट यहूदाहचे व यरुशलेमचे
कसे काय चालले आहे याची मी चौकशी केली. 3 त्यांनी उत्तर दिले,
“जे बंदिवासातील उरलेले बंधू आहेत व त्या प्रदेशात राहू लागले
आहेत, ते फारच कष्टात व निंदनीय परिस्थितीत आहेत. यरुशलेमचा
तट पडलेल्याच अवस्थेत आहे आणि त्याच्या वेशी जाळून टाकलेल्या
आहेत.” 4 हे ऐकताच मी खाली बसलो व रडू लागलो. त्यानंतर काही
दिवस मी अन्नपाणी वर्ज्य केले व मी स्वर्गाच्या परमेश्वरासमोर मोठ्या
शोकाने प्रार्थना करीत राहिलो. 5 मग मी म्हणालो: “हे महान व भयावह
याहवेह, स्वर्गाच्या परमेश्वरा, जे तुमच्यावर प्रीती करतात व तुमच्या
आज्ञा पाळतात, त्या सर्वांना तुम्ही प्रीतीने दिलेला करार पाळता, 6
तुमचे कान माझ्या बोलण्याकडे लागो व तुमची दृष्टी तुमचा सेवक
इस्राएली लोकांसाठी रात्रंदिवस करीत असलेल्या प्रार्थनेकडे वळो.
आम्ही इस्राएली लोकांनी, मी व माझ्या पित्याच्या कुटुंबाने तुमच्याविरुद्ध
घोर पाप केले आहे, हे मी कबूल करतो. 7 आम्ही तुमच्याविरुद्ध दुष्टतेचे
आचरण केले आहे. तुम्ही तुमचा सेवक मोशेद्वारे आम्हाला दिलेल्या
आज्ञा, नियम व आदेश पाळले नाही. 8 “तुम्ही मोशेला काय सांगितले
होते याची कृपा करून आठवण करा. तुम्ही म्हटले होते, ‘जर तुम्ही
अविश्वासू व्हाल, तर मी तुम्हाला राष्ट्रांमध्ये विखरून टाकीन; 9 पण
तुम्ही माझ्याकडे परत याल, माझ्या आज्ञा पाळाल, तर जगाच्या अगदी
टोकाच्या कोपऱ्यातही बंदिवासात असलात, तरी मी तुम्हाला गोळा
करून जे ठिकाण मी माझ्या नामाच्या निवासासाठी निवडले आहे
तिथे आणेन.’ 10 “ते तुमचेच सेवक व लोक आहेत, ज्यांना तुम्ही
आपल्या महान शक्तीने व समर्थ हाताने सोडविले आहे. 11 हे प्रभू, कृपा
करून माझ्या प्रार्थनेकडे व जे तुमच्या नामाचा सन्मान करण्यात आनंद
मानतात, त्यांची प्रार्थना ऐका. मी राजाकडे एका मोठ्या कृपेची मागणी
करण्यासाठी जात आहे; आता कृपा करून या मनुष्याच्या सानिध्यात
माझ्याविषयी दया निर्माण होण्यासाठी मला यश द्या.” मी राजाचा
प्यालेबरदार होतो.

**2** पुढे अर्तहशश्तच्या राजवटीच्या विसाव्या वर्षी, निसान महिन्यामध्ये
एके दिवशी, राजाला द्राक्षारस देण्यात आला, तेव्हा मी प्याला भरला
व राजाला दिला. आजपर्यंत मी राजाच्या उपस्थितीत कधीही दु:खी
असा दिसलो नव्हतो. 2 म्हणून राजाने मला विचारले, “तू आजारी
नसताना तुझा चेहरा एवढा खिन्न का दिसतो? तुझ्या मनात निराशा
असल्याशिवाय असे होणार नाही.” मी घाबरलो, 3 पण मी राजाला उत्तर
दिले, “महाराज, अनंतकाळ चिरंजीव राहोत! माझा चेहरा दु:खी का असू
नये, कारण ज्या नगरामध्ये माझ्या पूर्वजांना पुरले आहे, त्या नगराचा
विध्वंस झाला आहे व त्याच्या वेशी जाळून टाकल्या आहेत.” 4 राजाने
मला विचारले, “तुझी काय इच्छा आहे?” स्वर्गातील परमेश्वराची मनात
प्रार्थना करून मी उत्तर दिले, 5 “महाराज प्रसन्न असतील आणि त्यांचा
सेवक शाही मर्जीतील असेल, तर जिथे माझ्या पूर्वजांना दफन केले
आहे त्या नगराची पुनर्बांधणी करण्यासाठी महाराजांनी मला यहूदीयाला
पाठवावे.” 6 नंतर राजाच्या शेजारी राणी बसलेली असताना, राजाने
मला विचारले, “किती काळासाठी तुला जावे लागेल व तू केव्हा परत
येशील?” मला पाठविण्याचे राजाच्या मर्जीस आले म्हणून मी माझ्या
जाण्याची वेळ ठरविली. 7 पुढील गोष्टींसाठी देखील मी विनंती केली,
“महाराज, आपण माझ्यावर प्रसन्न असाल, तर कृपा करून फरात
नदीच्या पश्चिमेकडील राज्यपालांसाठी मजजवळ पत्रे द्यावी, म्हणजे
त्यांनी मला त्यांच्या प्रांतातून यहूदीयाला सुखरुपपणे प्रवास करू द्यावा.
8 एक पत्र शाही जंगलाचा व्यवस्थापक आसाफ यांच्यासाठीही द्यावे.
त्या पत्रामध्ये मंदिराशेजारी असलेल्या गढीच्या दरवाजांसाठी, शहराच्या
कोटासाठी व माझ्या घराला लागणाऱ्या तुळयांसाठी लाकूड देण्याबद्दल
त्याला आज्ञा द्यावी.” माझ्यावर परमेश्वराची हस्तकृपा असल्यामुळे
राजाने या विनंत्या मान्य केल्या. 9 मी फरात नदीच्या पश्चिमेकडील
प्रांतात पोहोचलो, तेव्हा मी राजाची पत्रे तेथील राज्यपालांना दिली.
राजाने माझ्या संरक्षणासाठी लष्करी अधिकारी व घोडेस्वार सैनिक
माझ्याबरोबर पाठविले होते. 10 पण होरोनी सनबल्लट व अम्मोनी
अधिकारी तोबीयाह यांना हे जेव्हा समजले तेव्हा ते फारच अस्वस्थ झाले,
की कोणीतरी इस्राएलला मदत करण्यासाठी आले आहे. 11 यरुशलेमला
पोहोचल्यावर तिथे तीन दिवस राहिल्यानंतर, 12 मी थोडे लोक बरोबर
घेऊन रात्रीचा बाहेर पडलो. यरुशलेमबद्दल परमेश्वराने माझ्या मनात
उत्पन्न केलेली योजना मी कोणालाही सांगितलेली नव्हती. मी स्वार
असलेल्या पशूशिवाय इतर कोणताही पशू आमच्यासोबत नव्हता.
13 आम्ही खोरेवेशीतून बाहेर पडलो आणि कोल्ह्याच्या विहिरीवरून,
उकिरडा वेशीतून, यरुशलेमच्या पडलेल्या भिंती व जळालेल्या वेशी
पाहण्यास गेलो. 14 पुढे आम्ही झऱ्याच्या वेशीवरून राजकुंडाकडे गेलो.
पण तिथे पडलेल्या दगडविटांच्या ढिगांवरून माझा पशू पुढे जाऊ शकेल
इतकी तिथे जागा नव्हती. 15 म्हणून रात्र झाल्यावर आम्ही शहराला
वळसा घातला आणि मी ओहोळाच्या वाटेने वर चढून कोटाचे निरीक्षण
केले व परत खोरेवेशीने आत आलो. 16 शहरातील अधिकाऱ्यांना, मी
कुठे गेलो व काय केले याची गंधवार्ताही नव्हती, कारण आतापर्यंत
मी माझ्या योजनांबद्दल यहूदी, याजक किंवा प्रतिष्ठित नागरिक वा
अधिकारी या कोणाशीही बोललो नव्हतो. नव्हे. जे प्रत्यक्ष काम करणार
होते, त्यांच्याशी देखील बोललो नव्हतो. 17 मग मी त्यांना सांगितले,
“आपल्या शहराची दुर्दशा तुम्हा सर्वांना माहीतच आहे: यरुशलेम
उद्ध्वस्त झालेले आहे आणि त्याच्या वेशी जळालेल्या आहेत. आपण
यरुशलेमच्या तटाची पुनर्बांधणी करू आणि आपल्यावरील हा कलंक
धुऊन टाकू.” 18 परमेश्वराची हस्तकृपा माझ्यावर असून, तसेच माझे
राजाशी झालेले बोलणे आणि माझ्या योजनेला त्याने दिलेली संमती,
या गोष्टीही मी त्यांना सांगितल्या. त्यांनी उत्तर दिले, “आपण तटाची

पुनर्बांधणी सुरू करू या.” आणि अशा रीतीने त्यांनी या सत्कार्याला
सुरुवात केली. 19 पण होरोनी सनबल्लट, अम्मोनी अधिकारी तोबीयाह
आणि गेशेम अरबी यांनी आमच्या या योजनेबद्दल ऐकले, तेव्हा ते
आमची थट्टा व उपहास करून म्हणाले, “हे तुम्ही काय करीत आहात?
राजाविरुद्ध बंड करता काय?” 20 पण मी उत्तर दिले, “स्वर्गाचे परमेश्वर
आम्हाला यश देतील. आम्ही त्यांचे सेवक या तटाची पुनर्बांधणी करू,
परंतु यरुशलेममध्ये वा त्यातील ऐतिहासिक कार्यात तुमचा काहीही
सहभाग व अधिकार असणार नाही.”

**3** मुख्य याजक एल्याशीब आणि इतर याजकांनी काम सुरू करून
मेंढे वेस परत बांधली. ती समर्पित केली आणि तिला दारे लावली,
हनानेल मनोऱ्यापासून शंभराचा बुरूज येथपर्यंत बांधकाम केले. 2 यरीहो
शहराच्या लोकांनी त्याच्या पुढचे बांधकाम केले आणि त्यांच्या शेजारी
इम्रीचा पुत्र जक्कूर याने बांधकाम केले. 3 मासे फाटक हस्सनाहच्या
पुत्रांनी बांधले. त्यांनी तुळया बसविणे, दरवाजे, कड्या व अडसर लावणे
आणि गज बसविणे इत्यादी कामे केली. 4 हक्कोसचा पुत्र उरीयाह,
त्याचा पुत्र मरेमोथाने तटाचा पुढचा भाग दुरुस्त केला. त्याच्या शेजारी
मशुल्लाम, बेरेख्याहचा पुत्र, जो मशेजबेलचा पुत्र, त्याने दुरुस्ती केली
आणि बाअनाहाचा पुत्र सादोक दुरुस्ती करीत होते. 5 त्यांचा पुढील
भाग तकोवाच्या लोकांनी दुरुस्त केला. परंतु त्यांच्यातील प्रतिष्ठित
लोकांनी त्यांच्या मुकादमाच्या देखरेखीखाली कोणत्याही कामाची
जबाबदारी घेण्याचे टाळले. 6 येशनाह वेस पासेआहचा पुत्र यहोयादा
व बसोदयाहचा पुत्र मशुल्लाम यांनी दुरुस्त केली. त्यांनी तुळया
घातल्या, दरवाजे उभे केले, त्यांना कड्या, अडसर व लोखंडी गज
लावले. 7 त्यांच्या शेजारी, पश्चिम फरातच्या राज्यपालाच्या सत्तेखाली
असलेल्या गिबोन व मिस्पाह येथील लोकांनी डागडुजीचे काम केले.
गिबोनी मलतियाह व मेरोनोथी यादोन आले होते. 8 हरहयाहचा पुत्र
उज्जीएल व्यवसायाने सोनार होता, त्यानेही पुढच्या तटाची डागडुजी
केली. त्याच्या शेजारी अत्तरे तयार करणारा हनन्याह होता. त्यानेसुद्धा
डागडुजी केली. या दोघांनी यरुशलेमातील रुंद भिंती पर्यंत डागडुजी
केली. 9 यरुशलेमच्या अर्ध्या जिल्ह्याचा अधिकारी हूरचा पुत्र रफायाहने
त्यांच्या शेजारच्या तटाची डागडुजी केली. 10 हरूमाफाचा पुत्र यदायाहने
आपल्या स्वतःच्या घरासमोरील तटाची डागडुजी केली आणि त्याच्या
शेजारीच हशबन्याहचा पुत्र हट्टूशने डागडुजी केली. 11 यानंतर हारीमाचा
पुत्र मल्कीयाह आणि पहथ-मोआबाचा पुत्र हश्शूब यांनी एका विभागाची
आणि भट्टी मनोऱ्याची डागडुजी केली. 12 त्याच्या शेजारी यरुशलेमच्या
दुसऱ्या अर्ध्या जिल्ह्याचा अधिकारी हल्लोहेशचा पुत्र शल्लूमाने व त्याच्या
कन्यांनी डागडुजी केली. 13 हानून व जानोह येथील लोकांनी खोरे वेशीची
डागडुजी केली. तिचे दरवाजे उभे करून त्यांना कड्या, अडसर व गजही
लावले. नंतर त्यांनी उकिरडा वेशीपर्यंतच्या एक हजार हात लांबीच्या
तटाची दुरुस्ती केली. 14 रेखाबाचा पुत्र मल्कीयाहने उकिरडा वेस दुरुस्त
केली. मल्कीयाह हा बेथ-हक्करेम जिल्ह्याचा अधिकारी होता. ती वेस
बांधल्यावर, त्याने तिचे दरवाजे उभे केले व त्यांना कड्या, अडसर व
गज लावले. 15 कोल-होजेचा पुत्र शल्लूम मिस्पाह जिल्ह्याचा अधिकारी
होता. त्याने झरा वेशीची दुरुस्ती करून ती परत बांधली, तिच्यावर छत
टाकले व दरवाजे उभे करून त्यांना अडसर व गज लावले. नंतर शेलाह
तळ्यापासून राजाच्या बागेपर्यंतच्या, यरुशलेमच्या दावीदाच्या नगराच्या
उतारावरील पायऱ्यापर्यंतच्या कोटाची त्याने दुरुस्ती केली. 16 त्याच्या
पलीकडे अजबुकाचा पुत्र नहेम्याह होता. तो बेथ-सूर जिल्ह्याच्या अर्ध्या
भागाचा अधिकारी होता. त्याने दावीद राजाच्या कबरस्तानापर्यंत, कृत्रिम
तळ्यापर्यंत आणि वीरांचे गृह या ठिकाणापर्यंत दुरुस्ती केली. 17 त्याच्या
शेजारी लेवी बानीचा पुत्र रहूमच्या देखरेखीखाली डागडुजी करीत होता.
त्याच्या शेजारी कईलाह जिल्ह्याच्या अर्ध्या भागाचा अधिकारी हशब्याह
होता. त्याने आपल्या जिल्ह्यांच्या वतीने डागडुजी केली. 18 त्याच्या
शेजारी हेनादादचा पुत्र बिनुई च्या देखरेखीखाली लेव्याच्या वंशजांनी
डागडुजी केली. हा बवई कईलाह जिल्ह्याच्या दुसऱ्या अर्ध्या भागाचा
अधिकारी होता. 19 त्यांच्या शेजारी येशूआच्या पुत्र मिस्पाहचा अधिकारी
एजेरने एका भागात जिथे तट वळसा घेतो व शस्त्रागाराकडे जाण्याची
चढण लागते, तिथे डागडुजी केली. 20 त्यांच्या शेजारी जक्काईचा
पुत्र बारूख होता. त्याने कोटाच्या वळणापासून थेट मुख्य याजक
एल्याशीबच्या घराच्या दारापर्यंत उत्साहाने डागडुजी केली. 21 त्याच्या
शेजारी हक्कोसचा पुत्र उरीयाहचा पुत्र मरेमोथने एल्याशीबाच्या घराच्या
दारापासून शेवटापर्यंतचा कोटाचा भाग दुरुस्त केला. 22 मग सभोवती
राहणारे याजक आले व त्यांनीही पुढील दुरुस्ती केली. 23 त्यांच्या
शेजारी बिन्यामीन व हश्शूब यांनी आपल्या घरासमोरील भागाची दुरुस्ती
केली. त्यांच्या शेजारी मासेयाहचा पुत्र, जो अनन्याहचा पुत्र अजऱ्याहाने
आपल्या घराजवळ डागडुजी केली. 24 त्यांच्या शेजारी हेनादादचा
पुत्र बिन्नुईने अजऱ्याहच्या घरापासून कोपऱ्यापर्यंतच्या कोटाचा भाग
बांधला. 25 उजईचा पुत्र पलालने कोट कोपऱ्यापासून राजवाड्याच्या
वरच्या माळाजवळील तुरुंगाच्या अंगणापर्यंत काम करून बुरुजाचीही
डागडुजी केली. त्याच्या शेजारी पारोशाचा पुत्र पदायाहनेही डागडुजी
केली. 26 ओफेलमध्ये राहणाऱ्या मंदिराच्या सेवकांनी पूर्वेकडील
पाण्याच्या वेशीपर्यंत कोटाची दुरुस्ती केली आणि बुरुजाचा पुढे आलेला
भागही दुरुस्त केला. 27 तकोवा येथील लोकांनी मनोऱ्याच्या बुरुजाच्या
समोर असलेला भाग आणि ओफेलाच्या तटापर्यंतचा भाग दुरुस्त केला.
28 याजकांनी घोडे वेशीपासून प्रत्येकाने आपल्या घरासमोरील कोटाचा
भाग दुरुस्त केला. 29 इम्मेराचा पुत्र सादोकानेही आपल्या घरासमोरचा
कोट परत बांधला, त्याच्या पलीकडे शखन्याहचा पुत्र शमायाह, जो
पूर्ववेशीचा द्वारपाल होता, त्यानेही डागडुजी केली. 30 त्याच्या शेजारी
शेलेम्याहचा पुत्र हनन्याह, सलाफाचा सहावा पुत्र हानून यांनी दुरुस्ती
केली, त्याच्यापुढे बेरेख्याहचा पुत्र मशुल्लाम होता. त्याने आपल्या
घरासमोरची भिंत दुरुस्त केली. 31 सोनारांपैकी मल्कीयाहने मंदिराच्या
सेवकांच्या व व्यापाऱ्यांच्या घरांपर्यंतच्या निरीक्षण वेशीपर्यंतच्या आणि
कोपऱ्यावरील वरच्या कोठडीपर्यंतच्या कोटाची दुरुस्ती केली. 32 इतर

सोनारांनी आणि व्यापाऱ्यांनी त्या कोपऱ्यापासून मेंढेवेशीपर्यंत कोटाची
डागडुजी केली.

**4** आम्ही कोटाची पुन्हा बांधणी करीत आहोत, हे सनबल्लटाला
समजले, तेव्हा तो संतापला आणि अत्यंत कृद्ध झाला. त्याने यहूदी
लोकांचा उपहास केला. 2 आपले सोबती व शोमरोनचे सेनाधिकारी
यांच्यादेखत थट्टा करीत तो म्हणाला, “हे दुबळे यहूदी काय करीत
आहेत? ते तटाची पुनर्बांधणी करू शकतील काय? ते अर्पणे वाहू
शकतील काय? एका दिवसात ते कामे संपवू शकतील काय? मातीच्या
ढिगाऱ्यातून उपसून काढलेल्या दगडात ते प्राण घालू शकतील काय—ते
तर पार जळून गेलेले दगड!” 3 तोबीयाह अम्मोनी त्याच्या जवळच उभा
होता. तो बोलला, “काय तरी यांचे बांधकाम—एखादा कोल्हा जरी
यांच्या त्या तटावरून चालत गेला तरी तो दगडी तट कोसळेल!” 4
आमच्या परमेश्वरा, आमचे ऐका, कारण आमचा उपहास होत आहे.
त्यांची थट्टा त्यांच्याच शिरी उलटो आणि एखाद्या परकीय देशात बंदिवान
म्हणून त्यांची लूट होऊ द्या. 5 त्यांच्या अपराधांकडे डोळेझाक करू नका;
त्यांचे पाप पुसून टाकू नका, कारण बांधणाऱ्यांना त्यांनी अपमानित केले
आहे. 6 शेवटी मूळ उंचीच्या अर्ध्या उंचीपर्यंतचा तट पूर्ण झाला, कारण
लोकांनी अगदी मन लावून काम केले होते. 7 पण सनबल्लट, तोबीयाह
अरबी, अम्मोनी व अश्दोदी यांनी ऐकले की यरुशलेमच्या तटाचे काम
झपाट्याने पुढे चालले आहे आणि तटाची खिंडारे बुजू लागलेली आहेत,
तेव्हा ते अतिशय संतप्त झाले. 8 त्यांनी यरुशलेममध्ये दंगे व गोंधळ
निर्माण करण्याचा कट केला. 9 पण आम्ही आमच्या परमेश्वराची प्रार्थना
केली आणि आपले संरक्षण करण्यासाठी शहरावर रात्रंदिवस पहारा
ठेवला. 10 नंतर यहूदीयाचे लोक म्हणाले, “कामकऱ्यांची शक्ती घटत
चालली आहे आणि दगडविटांचे इतके खच पडले आहेत की पुढील
भिंत बांधणे अशक्यच वाटते.” 11 आमच्या शत्रूंनी हे देखील म्हटले,
“त्यांना काही कळण्याआधी व ते आपल्याला पाहण्याआधी, आपण
त्यांच्यामध्ये जाऊ, अचानक हल्ला करून आपण त्यांना ठार करू व
त्यांचे काम बंद करू.” 12 तेव्हा जवळपास राहणारे यहूदी लोक आले व
आम्हाला दहा वेळेस येऊन सांगून गेले, “तुम्ही ज्या दिशेने जाल, हे लोक
त्या दिशेने तुमच्यावर हल्ला करतील.” 13 याकारणास्तव मी प्रत्येक
कुटुंबानुसार काही लोक निवडले व त्यांना तलवारी, भाले व धनुष्यबाण
देऊन तटाच्या खालच्या मागील खुल्या जागी त्यांच्या घराण्याप्रमाणे
त्यांना पहारेकरी म्हणून बसविले. 14 संपूर्ण परिस्थितीकडे नजर
टाकल्यावर, मी उभा राहिलो व सर्व प्रतिष्ठितांना, अधिकाऱ्यांना व बाकी
लोकांना एकत्र बोलाविले आणि त्यांना म्हणालो, “त्यांना भिऊ नका!
महान व भयावह परमेश्वराची आठवण ठेवा. आपल्या कुटुंबांसाठी,
तुमच्या पुत्रांसाठी, तुमच्या कन्यांसाठी, तुमच्या पत्नीसाठी आणि
घरांसाठी लढा!” 15 आमच्या शत्रूंनी ऐकले की आम्हाला त्यांचा कट
समजला आहे आणि परमेश्वराने त्यांच्या सर्व योजना व्यर्थ केल्या
आहेत. मग आम्ही तट बांधण्याच्या कामाला पुन्हा लागलो. 16 पण त्या
दिवसापासून पुढे माझे फक्त अर्धेच पुरुष काम करीत असत व बाकी
अर्धे पाठीमागे भाले, ढाली, धनुष्य व शस्त्रे घेऊन होते. हे अधिकारी जे
यहूदीयाचे लोक 17 बांधकाम करीत होते त्यांच्यामागे उभे राहिले. जे
कामकरी सामान नेआण करीत, ते आपली लढाईची शस्त्रे एका हातात
ठेवून दुसऱ्या हाताने कामे करीत असत. 18 आपल्या कमरेला तलवारी
लटकवून प्रत्येकजण काम करीत असत. मात्र रणशिंग वाजविणारा
माझ्याजवळच असे. 19 मग मी प्रतिष्ठित लोक, अधिकारी आणि इतर
लोकांना समजावून सांगितले, “काम इतके मोठे व विस्तृत आहे की
त्यामुळे आपण भिंतीशी बांधकाम करीत असताना एकमेकांपासून लांब
लांब असतो. 20 म्हणून तुम्ही रणशिंगाचा आवाज ऐकाल, तेव्हा तुम्ही
आम्ही असलेल्या जागी धावत आले पाहिजे आणि आपले परमेश्वर
आपल्यासाठी लढतील!” 21 आम्ही सूर्योदयापासून कामाला सुरुवात
करून तारे दिसेपर्यंत करीत असू आणि अर्धे लोक भाले घेऊन नेहमीच
असत. 22 त्यावेळी मी सर्व लोकांना सांगितले, “प्रत्येकाने रात्रीच्या
मुक्कामाला यरुशलेमच्या आतच राहावे, म्हणजे ते रात्री पहाऱ्याचे
व दिवसा तटाच्या बांधकामाचे कार्य करू शकतील.” 23 याकाळात
आमच्यापैकी कोणीही, मी किंवा माझे बांधव, माझी माणसे किंवा
माझ्याबरोबर असणारे पहारेकरी, कोणीही आपले कपडे बदलले नाहीत
आणि जलाशयाला जाते वेळी देखील आम्ही आमची शस्त्रे नेहमीच
आमच्याबरोबर बाळगत असू.

**5** काही काळानंतर स्त्रीपुरुषांनी आपल्या यहूदी बांधवांविरूद्ध तक्रार
करण्यास सुरुवात केली. 2 काहीजण म्हणाले, “आम्ही व आमचे
पुत्र व कन्या असे बरेच लोक आहोत आणि जिवंत राहण्यासाठी
आम्हाला धान्याची गरज आहे.” 3 दुसरे म्हणाले, “दुष्काळापासून जीव
वाचवावा म्हणून धान्य मिळविण्यासाठी आम्हाला आमची शेते, द्राक्षमळे
आणि घरे गहाण टाकावी लागली आहेत.” 4 आणखी दुसरे काही
म्हणाले, “आमची शेते आणि द्राक्षमळे यावरील राजाचा कर भरता
यावा म्हणून आम्हाला कर्जाऊ पैसे काढावे लागले आहेत. 5 आम्ही
त्यांचेच बांधव आहोत आणि आमची मुले त्यांच्या मुलांबाळांसारखीच
आहेत, तरीसुद्धा जगण्यासाठी पुरेसे पैसे मिळावेत म्हणून आम्हाला
आमची मुले व मुली गुलाम म्हणून कामाला लावावी लागतात. आमच्या
काही कन्या आम्ही आधीच गुलाम म्हणून विकलेल्या आहेत, पण
आम्ही असमर्थ आहोत, कारण आमची शेते व द्राक्षमळेसुद्धा इतरांचे
झाले आहेत.” 6 जेव्हा मी त्यांचा हा आक्रोश व या तक्रारी ऐकल्या,
तेव्हा मी अतिशय संतापलो. 7 या परिस्थितीवर विचार केल्यानंतर
मी या प्रतिष्ठितांना व अधिकाऱ्यांना म्हणालो, “तुम्ही स्वतःच्याच
देशबांधवांकडून व्याज गोळा करीत आहात!” मग त्यांचा समाचार
घेण्यासाठी मी एक मोठी सभा बोलाविली. 8 या सभेत मी त्यांना
म्हणालो, “आम्ही गैरयहूद्यांना गुलामगिरीत विकलेल्या आपल्या यहूदी
बांधवांना शक्य होईल तितक्यांना परत आणले आहे. आता तुम्ही मात्र
तुमच्याच लोकांना विकून, त्यांना पुन्हा आम्हाला विकत आहात! त्यांची
सुटका आम्ही किती वेळा करावी?” हे ऐकून ते स्तब्ध राहिले कारण
त्यांना त्यावर उत्तरच सापडले नाही. 9 मग मी पुढे म्हणालो, “तुम्ही जे

करीत आहात, ते अयोग्य आहे. आपल्या सभोवतालच्या राष्ट्रांमध्ये
आपली निंदा होऊ नये म्हणून तुम्ही परमेश्वराचे भय बाळगू नये काय?
10 मी व माझे बंधू, आणि माझे लोक कोणतेही व्याज न घेता पैसे आणि
धान्य उसने देत आहोत. आपण हे व्याज घेणे बंद केले पाहिजे! 11
त्यांची शेते, द्राक्षमळे, जैतुनाचे मळे आणि घरे त्यांना लगेच परत करा
व पैसे, धान्य, नवा द्राक्षारस व जैतुनाचे तेल यावरील एक टक्का जे
व्याज म्हणून तुम्ही त्यांच्याकडून घेता ते सोडून द्या." 12 त्यांनी म्हटले,
"आम्ही त्यांना सर्वकाही परत देऊ. आणि त्यांच्याकडून काहीही मागणी
करणार नाही. तुम्ही म्हणता तसेच आम्ही करू." मग मी याजकांना
बोलाविणे पाठविले, प्रतिष्ठित व इतर अधिकाऱ्यांकडून त्यांनी जे वचन
दिले होते, त्या शपथा घेण्यास लावल्या. 13 व माझ्या अंगरख्याची दुमड
धरून तो झटकून म्हटले, "जो कोणी या शपथेचे पालन करणार नाही,
परमेश्वर त्याची घरे व त्याची संपत्ती असेच झटकून टाकेल. तर असा
मनुष्य असाच झटकला जाऊन पूर्णपणे रिकामा होवो!" यावर सभेतील
सर्व लोक म्हणाले, "आमेन" आणि त्यांनी याहवेहची स्तुती केली. सर्व
लोकांनी आपल्या वचनाप्रमाणे केले. 14 याशिवाय, अर्तहशश्त राजाच्या
कारकिर्दीच्या विसाव्या वर्षापासून बत्तिसाव्या वर्षापर्यंतच्या—बारा
वर्षांच्या संपूर्ण कालावधीत मी यहूदीयाचा राज्यपाल असताना, माझ्या
बंधूंनी आणि मी राज्यपालास नेमून दिलेल्या अन्नाचा वाटा घेतला नाही.
15 पण माझ्यापूर्वी असलेल्या राज्यपालांनी लोकांवर फारच जड ओझी
लादली आणि त्यांच्याकडून अन्न व द्राक्षारसाशिवाय चांदीची चाळीस
शेकेल यांची मागणी ते करीत असत. त्यांचे उपाधिकाराही प्रजेचे शोषण
करीत. परंतु मी परमेश्वराच्या भयात राहून त्यांच्याप्रमाणे वागलो नाही.
16 याउलट मी सर्व शक्तिनिशी तटाच्या कामास समर्पित राहिलो. माझे
सेवकही एकत्र येऊन कामास लागले. आम्ही कोणत्याही जमिनीची
खरेदी केली नाही. 17 माझ्या मेजावर नियमितपणे दीडशे यहूदी व
त्यांचे अधिकारी जेवण करीत असत. त्याचप्रमाणे शेजारच्या राष्ट्रांतून
आलेल्या लोकांनाही मी जेवू घालीत असे. 18 दररोज एक बैल, सहा पुष्ट
मेंढरे, काही पक्षी यापासून बनविलेले अन्न माझ्यासाठी शिजविण्यात
येत असे. तसेच दर दहा दिवसांनी मी त्यांना सर्वप्रकारचे द्राक्षारस विपुल
प्रमाणात पुरवित असे. इतके असूनही राज्यपालांना जो भोजनभत्ता
मिळण्याचा हक्क होता, तो मी कधीही मागितला नाही, कारण या सेवा
लोकांना भारी पडत होत्या. 19 हे माझ्या परमेश्वरा, मी जे काही या
लोकांसाठी केले आहे, त्याबद्दल प्रसन्न होऊन माझी आठवण ठेवा.

**6** सनबल्लट, तोबीयाह, गेशेम अरबी आणि आमच्या इतर शत्रूंना
समजले की मी तट बांधण्याचे काम अंदाजे पूर्ण केले आहे व एकही
भेग बाकी राहिली नाही—खरेतर वेशींना दरवाजे लावण्याचेच काम
राहिलेले होते, 2 तेव्हा सनबल्लट व गेशेम यांनी मला असा निरोप
पाठविला, "ये, आपण ओनोच्या मैदानातील एका खेडेगावात भेटू या."
पण ते मला दुखापत करण्याचा कट करीत असल्याचे मला समजले,
3 म्हणून मी त्यांच्याकडे उलट हा निरोप पाठविला: "मी एक महान
कार्य करीत आहे; ते कार्य थांबवून मी तुमच्या भेटीला का यावे?" 4
त्यांनी चार वेळा मला तो निरोप पाठविला आणि प्रत्येक वेळी मी तेच
उत्तर दिले. 5 पाचव्या वेळेला सनबल्लटाचा सेवक हातात तोच निरोप
असलेले एक खुले पत्र घेऊन आला. 6 त्या पत्रात असा मजकूर होता:
"देशादेशात असे ऐकिवात येत आहे की—गेशेमचे म्हणणे आहे की
हे सत्य आहे की, यहूदी लोक बंड करण्याची योजना आखीत आहेत
आणि त्यासाठीच तू हा तट बांधत आहेस. असेही म्हटले जाते की तू
त्यांचा राजा बनणार आहेस, 7 आणि अशी घोषणा करण्यासाठी तू
यरुशलेममध्ये संदेष्ट्याची नेमणूक केली आहेस की: 'यहूदीयामध्ये
आता एक राजा आहे!' ही बातमी राजाकडे जाणार आहे; म्हणून
इकडे येऊन या गोष्टी आमच्याशी बोल." 8 तेव्हा मी त्याला असे उत्तर
पाठविले, "तू जे काही बोलत आहेस त्यातील काहीही घडणार नाही; या
सर्व तुझ्या कल्पनेतील गोष्टी आहेत." 9 "यामुळे त्यांच्या हातातील
शक्ती गळून पडेल व ते त्यांचे काम पूर्ण करू शकणार नाहीत" असा
विचार करून ते आम्हाला भीती दाखविण्याचा प्रयत्न करीत होते. पण
मी प्रार्थना केली, "आता माझे बाहू बळकट करा." 10 एक दिवस मी
महेटाबेलाचा पुत्र दलायाहचा पुत्र शमायाह याच्या घरी गेलो, जो त्याच्या
घराबाहेर पडत नसे. तो म्हणाला, "आपण परमेश्वराच्या भवनात भेटू
या, मंदिराची दारे व कड्या लावून घेऊ, कारण तुला ठार मारण्यास
माणसे येत आहेत—आज रात्री ते तुला ठार करण्यासाठी येतील."
11 पण मी म्हणालो, "माझ्यासारख्या मनुष्याने पळून जावे काय?
अथवा माझ्यासारख्याने स्वतःचा प्राण वाचविण्याकरिता मंदिरात लपून
बसावे? मी मुळीच जाणार नाही!" 12 नंतर मला समजले की परमेश्वराने
त्याला पाठविले नव्हते, परंतु तोबीयाह व सनबल्लट यांनी माझ्याविरुद्ध
भविष्यवाणी करण्यासाठी त्याला लाच दिली होती. 13 मी घाबरून
माझ्याकडून असे पाप घडावे व त्यांनी मजवर दोषारोप करावा, मग मी
निंदेस पात्र व्हावे, अशा उद्देशानेच त्यांनी शमायाहला या कामासाठी
घेतले होते. 14 हे माझ्या परमेश्वरा, तोबीयाह, सनबल्लट हे माझ्याशी
कसे वागले हे विसरू नका. नोअद्याह संदेष्टी व इतर संदेष्टे ज्यांनी मला
भीती घालण्याचा प्रयत्न केला, त्यांनाही तुम्ही विसरू नका. 15 शेवटी
बावन्न दिवसांच्या अवधीत, एलूल महिन्याच्या पंचविसाव्या दिवशी तट
बांधून तयार झाला. 16 आमच्या शत्रूंनी व आजूबाजूच्या देशांनी याबद्दल
ऐकले, तेव्हा ते घाबरले आणि त्यांचा आत्मविश्वास ढासाळला, कारण हे
कार्य आमच्या परमेश्वराच्या मदतीनेच झाले आहे, याची त्यांना जाणीव
झाली. 17 तसेच, या दिवसात यहूदीयातील प्रतिष्ठित लोक तोबीयाहास
बरीच पत्रे पाठवू लागले व तोबीयाकडून त्यांना उत्तर मिळत गेले. 18
यहूदीयातील पुष्कळ लोकांनी तोबीयाहाशी एकनिष्ठ राहण्याची शपथ
घेतलेली होती, कारण तोबीयाहचा सासरा, आरहाचा पुत्र शखन्याह
होता आणि तोबीयाहचा पुत्र यहोहानान याने बेरेख्याहचा पुत्र मशुल्लाम
याच्या कन्येशी विवाह केला होता. 19 याशिवाय, तोबीयाहने किती
चांगली कामे केली आहेत, हे त्या सर्वांनी मला सांगितले व नंतर मी जे
काही बोललो ते सर्व त्यांनी त्याला सांगितले आणि तोबीयाहने मला
घाबरून सोडण्यासाठी पत्रे पाठवली.

7 तट बांधल्यावर मी वेशींना दारे लावली. द्वारपाल, संगीतकार व लेवी
यांची नेमणूकही केली; 2 मी यरुशलेमच्या शासनाची जबाबदारी
माझा भाऊ हनानी व गढीचा अधिपती हनन्याह यांना दिली. हनन्याह
अत्यंत विश्वासू असून सर्व लोकांपेक्षा तो परमेश्वराचे भय अधिक बाळगत
असे. 3 मी त्यांना म्हणालो, “यरुशलेमच्या वेशी सूर्य बराच उष्ण
होईपर्यंत उघडण्यात येऊ नयेत. पहारेकरी कामावर असतानाच, सर्व
वेशींना अडसर लावून त्या बंद करण्यात याव्या. तसेच यरुशलेममधील
रहिवाशांनाच पहारेकरी म्हणून नेमावे. काहीजण त्यांच्या चौकीवर तर
काहींनी त्यांच्या घराजवळच्या भागाचे रक्षण करावे.” 4 शहर मोठे
व विस्तृत होते, पण लोकसंख्या थोडी होती आणि जी घरे होती,
त्यांची पुनर्बांधणी झाली नव्हती. 5 नंतर माझ्या परमेश्वराने शहराच्या
सर्व प्रतिष्ठितांना, अधिकाऱ्यांना व सामान्य नागरिकांना एकत्र करून
वंशावळयांप्रमाणे त्यांची नोंदणी करावी असे विचार माझ्या मनात
घातले. जे सर्वप्रथम परतले त्यांच्या वंशावळयाची नावनिशी मला
सापडली. तिच्यात असे लिहिले होते: 6 बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर
याने जे लोक धरून नेले होते, त्यातील जे बंदिवासातून प्रांतात परतले
त्यांच्या नावांची यादी ही आहे (ते यरुशलेम व यहूदीया येथे येऊन
आपआपल्या गावी परतले. 7 जरूब्बाबेल, येशूआ, नहेम्याह, अजऱ्याह,
रामयाह, नहमानी, मर्दखय, बिलशान, मिस्पेरेथ, बिग्वई, नहूम व
बाअनाह): 8 पारोशचे वंशज 2,172, 9 शफाट्याहचे 372, 10 आरहचे
652, 11 पहथ-मोआब (येशूआ व योआब यांच्या कुळातून) 2,818,
12 एलामचे 1,254, 13 जत्तूचे 845, 14 जक्काईचे 760, 15 बिन्नुईचे
648, 16 बेबाईचे 628, 17 अजगादचे 2,322, 18 अदोनिकामचे
667, 19 बिग्वईचे 2,067, 20 आदीनचे 655, 21 हिज्कीयाहच्या
कुळातले आतेरचे 98, 22 हाशूमचे 328, 23 बेसाईचे 324, 24
हारीफचे 112, 25 गिबोनचे 95, 26 या ठिकाणातून पुरुष: बेथलेहेम व
नटोफाहचे 188, 27 अनाथोथचे 128, 28 बेथ-अजमावेथचे 42, 29
किर्याथ-यआरीम, कफीराह व बैरोथचे 743, 30 रामाह व गेबाचे 621,
31 मिकमाशचे 122, 32 बेथेल व आयचे 123, 33 दुसऱ्या नबोचे
52, 34 दुसऱ्या एलामचे 1,254, 35 हारीमचे 320, 36 यरीहोचे
345, 37 लोद, हादीद व ओनोचे 721, 38 सनाहाचे 3,930. 39
याजक: यांचे वंशज: यदायाहचे (येशूआच्या पितृकुळातील) 973, 40
इम्मेरचे 1,052, 41 पशहूरचे 1,247, 42 हारीमचे 1,017. 43 लेवी:
यांचे वंशज: येशूआचे (कदमीएलचे कुटुंबातील होदव्याहचे कुटुंबाद्वारे)
74. 44 संगीतकार: आसाफचे वंशज 148. 45 मंदिराचे द्वारपाल: यांचे
वंशज: शल्लूमचे, आतेरचे, तल्मोनचे, अक्कूबचे, हतीताचे, शोबाईचे,
एकूण 138. 46 मंदिराचे सेवक: खालील लोकांचे वंशज: झीहाचे,
हसूफाचे, तब्बावोथचे, 47 केरोसचे, सीयाचे, पादोनचे, 48 लबानाहचे,
हगाबाहचे, शलमाईचे, 49 हानानचे, गिद्देलचे, गहरचे, 50 रेआयाहचे,
रसीनचे, नकोदाचे, 51 गज्जामचे, उज्जाचे, पासेआहचे, 52 बेसाईचे,
मऊनीमचे, नफूसीमचे, 53 बकबुकचे, हकूफाचे, हर्हूरचे, 54 बसलूथचे,
महीदाचे, हर्षाचे, 55 बर्कोसचे, सिसेराचे, तामहचे, 56 नसीयाहचे व
हतीफाचे. 57 शलोमोनच्या सेवकांचे वंशज: पोकेरेथ-हस्सबाईम व
आमोन. यांचे वंशज: सोताईचे, सोफेरेथचे, पेरीदाचे, 58 यालाहचे,
दर्कोनचे, गिद्देलचे, 59 शफाट्याहचे, हत्तीलचे, पोखेरेथ-हज्ज़ेबाइमचे,
आमोनचे, 60 मंदिराचे सेवक व शलोमोनच्या सेवकांचे वंशज एकूण
392. 61 याच वेळी पर्शियाचा तेल-मेलाह, तेल-हर्षा, करूब, अद्दोन
व इम्मेर या शहरातून पुढील लोक आले. पण त्यांच्या वंशावळी
हरवल्यामुळे ते इस्राएली वंशज असल्याचे सिद्ध करू शकले नाहीत:
62 ते यांचे वंशज होते: दलायाहचे, तोबीयाहचे व नकोदाचे 642. 63
आणि याजक पितृकुळातील: यांचे वंशज: हबयाहचे, हक्कोसचे व
बारजिल्लईचे (बारजिल्लईने गिलआदी बारजिल्लई याच्या कन्यांपैकी
एकीशी विवाह केला आणि त्याने तिच्या घराण्याचे नाव धारण केले
होते). 64 यांनी आपल्या वंशावळींचा शोध घेतला, परंतु त्यांना ते
सापडले नाही, म्हणून त्यांना अशुद्ध म्हणून याजकपदातून वगळण्यात
गेले. 65 यास्तव राज्यपालांनी उरीम व थुम्मीम यांचा उपयोग करताना
इतर याजक असल्याशिवाय त्यांना अर्पणातील अन्नाचा याजकांचा वाटा
घेण्यास परवानगी दिली नाही. 66 सर्व सभेचे एकूण 42,360 लोक
होते. 67 याशिवाय त्यांचे 7,337 दास व दासी आणि 245 गायक व
गायिका होत्या. 68 त्यांनी आपल्याबरोबर 736 घोडे, 245 गाढव, 69
435 उंट आणि 6,720 गाढवे आणली होती. 70 त्यांच्यातील काही
पुढाऱ्यांनी कामासाठी देणग्या दिल्या. राज्यपालाने 1,000 दारिक सोने,
धार्मिक विधींसाठी लागणारे 50 कटोरे, आणि याजकांसाठी पोशाखांचे
530 संच दिले. 71 काही कुलप्रमुखांनी कामासाठी भांडारात 20,000
दारिक सोने, 2,200 मीना चांदी दिली. 72 बाकीच्या लोकांनी 20,000
दारिक सोने, 2,000 मीना चांदी आणि याजकांसाठी 67 झगे दिले. 73
इतर काही लोक आणि बाकीचे इस्राएली लोक जे आपआपल्या शहरात
स्थायिक झाले होते त्यांच्याबरोबर याजक, लेवी, संगीतकार, द्वारपाल
व मंदिरसेवक हे सुद्धा आपआपल्या नगरांत स्थायिक झाले. सातव्या
महिन्यापर्यंत ते यरुशलेमला आपआपल्या नगरात स्थायिक झाले.

8 आता सर्व लोक जल वेशीसमोरील चौकात एकत्र जमले. आणि
त्यांनी नियम शिकविणारा शिक्षक एज्राला विनंती केली की याहवेहने
इस्राएली लोकांना दिलेले मोशेचे नियमशास्त्र त्याने बाहेर आणून सर्वांना
वाचून दाखवावे. 2 तेव्हा सातव्या महिन्याच्या पहिल्या दिवशी एज्रा
याजक मोशेचे नियमशास्त्र घेऊन बाहेर आला. ते कळण्यास समर्थ
असलेले सर्व स्त्री-पुरुष सभेत एकत्र जमा झाले. 3 सकाळपासून
दुपारपर्यंत त्याने जल वेशीसमोरील चौकाच्या दिशेने आपले मुख करून
समजण्यास समर्थ असे जितके लोक होते त्यासर्वांच्या समक्षतेत वाचन
केले. सर्व लोकांनी नियमशास्त्र लक्षपूर्वक ऐकले. 4 त्या प्रसंगासाठी
खास तयार केलेल्या उंच लाकडी चौकटीवर एज्रा शिक्षक उभा राहिला.
त्याच्या उजवीकडे मत्तिथ्याह, शमा, अनायाह, उरीयाह, हिल्कियाह
व मासेयाह हे उभे होते; व त्याच्या डावीकडे पदायाह, मिशाएल,
मल्कीयाह, हाशूम, हश्बद्दानाह, जखऱ्याह व मशुल्लाम हे उभे होते. 5
एज्राने पुस्तक उघडले. प्रत्येकजण त्याला पाहू शकत होता, कारण तो

इतरांपेक्षा जास्त उंचीवर उभा होता; तो उघडीत असताना सर्वजण
उभे राहिले 6 नंतर एज्राने महान परमेश्वर याहवेहची स्तुती केली आणि
सर्व लोक आपले हात उंचाऊन उत्तरले “आमेन! आमेन!” आपली
मस्तके लववून, भूमीकडे मुखे करून त्यांनी याहवेहची आराधना केली.
7 लेवी—येशूआ, बानी, शेरेब्याह, यामीन, अक्कूब, शब्बथई, होदीयाह,
मासेयाह, कलीता, अजऱ्याह, योजाबाद, हानान व पेलतियाह—यांनी
तिथे उभे असलेल्या लोकांना नियमशास्त्राची माहिती स्पष्ट करून
सांगितली. 8 ते सर्व लोकांमध्ये जाऊन, वाचण्यात येणाऱ्या परमेश्वराच्या
नियमशास्त्रातील उताऱ्याचा अर्थ त्यांना समजावून सांगत होते. 9
मग राज्यपाल नहेम्याह, एज्रा याजक व शास्त्राचा शिक्षक व लोकांना
शिकविणारे लेवी सर्व लोकांना म्हणाले, “याहवेह तुमच्या परमेश्वराच्या
दृष्टीने आजचा दिवस पवित्र आहे. तुम्ही विलाप करू नये वा रडू नये.”
कारण लोक नियमशास्त्रातील वचने ऐकत असताना सर्वजण रडत होते.
10 नहेम्याह म्हणाला, “जा आणि मिष्टान्ने खा व गोड रस प्या व ज्यांनी
काहीही बनविले नाही अशांनाही ते पाठवा. आजचा दिवस प्रभूप्रित्यर्थ
पवित्र आहे. तुम्ही दुःखी असू नये, कारण याहवेहचा आनंद तुमचे
सामर्थ्य आहे.” 11 लेव्यांनी लोकांना शांत केले. ते म्हणाले, “तुम्ही शांत
राहा, कारण हा पवित्र दिवस आहे. दुःख करू नका.” 12 म्हणून लोक
मिष्टान्ने करून खाण्या-पिण्यासाठी आणि ताटे वाढून पाठविण्यासाठी
गेले. तो दिवस मोठ्या आनंदाने उत्सव करण्याचा होता, कारण त्यांना
देण्यात आलेले वचन आता त्यांना समजले होते. 13 महिन्याच्या दुसऱ्या
दिवशी सर्व कुलप्रमुख, याजक आणि लेवी नियमशास्त्राचे अधिक
काळजीपूर्वकरित्या वाचन ऐकण्यासाठी एज्रा शिक्षकाकडे एकत्र आले.
14 नियम ऐकत असताना, त्यांच्या निदर्शनास आले ते हे, याहवेहने
मोशेला सांगितले होते की सातव्या महिन्यात येणाऱ्या मंडपांच्या
सणाच्या काळात इस्राएली लोकांनी तात्पुरत्या मांडवात राहावे. 15
देशातील सर्व शहरांमध्ये आणि विशेषतः यरुशलेममध्ये हे वचन जाहीर
करावेः “लोकांनी डोंगरावर जाऊन जैतून, रानजैतून, मेंदी, खजुरी व
दाट पालवीच्या वृक्षांच्या फांद्या व डाहळ्या आणून त्याचे शास्त्रात
लिहिल्याप्रमाणे तात्पुरते मांडव तयार करावे व सणाच्या काळामध्ये
या मांडवांमध्येच राहावे.” 16 तेव्हा लोक बाहेर पडले आणि डाहळ्या
तोडून आपल्या घरांच्या धाब्यांवर, आपल्या अंगणात, परमेश्वराच्या
भवनाच्या अंगणात, जल वेशीच्या जवळील चौकात आणि एफ्राईम
वेशींच्या चौकात त्यांनी तात्पुरते मांडव घातले. 17 या मांडवामध्ये
बंदिवासातून परत आलेले सर्वजण सणाचे सात दिवस राहिले. नूनाचा
पुत्र येशूआ याच्या काळापासून हा सण इस्राएली लोकांनी अशा प्रकारे
साजरा केलेला नव्हता. प्रत्येकाचा आनंद खूप मोठा होता. 18 सणाच्या
या दिवसांच्या काळात, पहिल्या दिवसापासून शेवटच्या दिवसापर्यंत
एज्रा परमेश्वराच्या नियमशास्त्राचे वाचन करीत असे. सात दिवस सण
साजरा केल्यानंतर आठव्या दिवशी मोशेच्या नियमशास्त्राला अनुसरून
महासभा घेण्यात आली.

9 याच महिन्याच्या चोवीस तारखेला, इस्राएली एकत्र आले. यावेळी
त्यांनी उपास केला व गोणपाट पांघरूण त्यांनी आपल्या डोक्यावर
धूळ घातली 2 ज्या इस्राएली वंशजांनी स्वतःला सर्व गैरयहूद्यांपासून
वेगळे ठेवले, ते आपआपल्या जागेवर उभे राहिले व त्यांनी स्वतःची
आणि आपल्या पूर्वजांची पापे कबूल केली. 3 ते उभे असताना याहवेह
त्यांच्या परमेश्वराच्या नियमशास्त्राचा ग्रंथ त्यांना तीन तास मोठ्याने
वाचून दाखविण्यात आला. त्यानंतरचे तीन तास पापांगिकार केला व
याहवेह आपल्या परमेश्वराची भक्ती केली. 4 लेव्यांसाठी नेमलेल्या
पायऱ्यावर उभे राहून येशूआ, बानी, कदमीएल, शबन्याह, बुन्नी,
शेरेब्याह, बानी व कनानी या लेव्यांनी याहवेह त्यांच्या परमेश्वरासमोर
आपला आवाज उंचाविला. 5 मग लेवी—येशूआ, कदमीएल, बानी,
हशबन्याह, शेरेब्याह, होदीयाह, शबन्याह व पथह्याह—हे लोकांना
म्हणाले: “उभे राहा आणि याहवेह तुमच्या परमेश्वराची स्तुती करा,
कारण ते अनादि काळापासून शाश्वत परमेश्वर आहेत.” “तुमचे वैभवी
नाव धन्य असो आणि ते सर्व प्रशंसा व स्तवनाच्या उच्चस्थानी राहो. 6
केवळ तुम्हीच एकटे याहवेह आहात. तुम्ही आकाश, अत्युच्च स्वर्ग
व त्यातील सर्व तारकामंडल, पृथ्वी व तिच्यावरील सर्वकाही, समुद्र
आणि त्यातील सर्वकाही निर्माण केले आहे. तुम्ही सर्वांना जीवन
देता आणि स्वर्गातील असंख्य सेना तुमची आराधना करतात. 7
“याहवेह तुम्हीच परमेश्वर आहात, ज्यांनी अब्रामाला निवडले आणि
त्याला खाल्डियनांच्या ऊर शहरातून बाहेर काढून अब्राहाम असे नाव
दिले. 8 त्याचे अंतःकरण तुमच्याशी विश्वासू आहे हे तुम्ही बघितले,
म्हणून त्याच्या वंशजांना कनानी, हिथी, अमोरी, परिज्जी, यबूसी व
गिर्गाशीचा देश देण्याचा तुम्ही त्याच्याशी करार केला. तुम्ही वचन
दिल्याप्रमाणे केले, कारण तुम्ही विश्वासयोग्य आहात. 9 “इजिप्तमध्ये
आमच्या पूर्वजांच्या हालअपेष्टा तुम्ही पाहिल्या; तांबड्या समुद्राच्या
जवळ त्यांनी केलेला तुमचा धावा तुम्ही ऐकला. 10 फारोह व त्याच्या
अधिकाऱ्याविरुद्ध व त्याच्या प्रदेशातील सर्व लोकांविरुद्ध तुम्ही चिन्ह व
चमत्कार केले, कारण ते लोक त्यांना किती कठोरपणाची वागणूक
देत होते, हे तुम्हाला ठाऊक होते. तुमच्या नावाचा महिमा तुम्ही प्रकट
केला आणि तो आजवर आहे. 11 तुम्ही त्यांच्यासमोर समुद्र दुभागला,
म्हणजे त्यांनी कोरड्या जमिनीवरून चालत जावे. परंतु त्यांचा पाठलाग
करणाऱ्यांना असे खोलात फेकले, जणू प्रचंड जलाशयात एखादा दगड
फेकला जावा. 12 आमच्या पूर्वजांचे दिवसा मेघस्तंभाद्वारे व रात्री त्यांना
आपल्या मार्गाने जाता यावे म्हणून अग्निस्तंभाद्वारे मार्गदर्शन केले. 13
“तुम्ही सीनाय पर्वतावर खाली उतरले; त्यांच्याशी स्वर्गातून बोलले;
त्यांना न्याय्य व योग्य विधी व कायदे दिले आणि उत्तम नियम व आज्ञा
दिल्या. 14 तुम्ही त्यांना तुमच्या पवित्र शब्बाथाची ओळख करून दिली
व तुमचा सेवक मोशेद्वारे त्यांना आज्ञा, नियम व कायदे प्रदान केले.
15 ते भुकेले असताना त्यांना स्वर्गातून भाकर दिली आणि तहानलेले
असताना खडकातून पाणी दिले; तुम्ही त्यांना आज्ञा दिली की, त्यांनी
जावे व जी तुम्ही बाहू उभारून वचनदत्त केली होती, त्या भूमीचा ताबा

घ्यावा. 16 “पण ते, आमचे पूर्वज गर्विष्ठ व दुराग्रही बनले व त्यांनी
तुमच्या आज्ञा पाळल्या नाही. 17 त्यांनी तुमचे ऐकण्याचे नाकारले आणि
तुम्ही त्यांच्यामध्ये केलेल्या चमत्कारांची आठवण ठेवली नाही. उलट
त्यांनी बंडखोरी केली आणि परत गुलामगिरीत आपल्याला न्यावे म्हणून
एक पुढारी नेमला. पण तुम्ही क्षमाशील परमेश्वर आहात, दयाळू आणि
कृपाळू, मंदक्रोध व प्रेमाने ओतप्रोत भरलेले आहात. तुम्ही त्यांचा त्याग
केला नाही, 18 जरी त्यांनी वासराची ओतीव मूर्ती तयार केली आणि
जाहीर केले, ‘हे आमचे परमेश्वर आहेत; यांनीच आम्हाला इजिप्तमधून
बाहेर काढले,’ अथवा जेव्हा त्यांनी भयानक रीतीने ईशनिंदा केली
तरीही. 19 “तुमच्या महान करुणेमुळे रानातच त्यांचा त्याग केला नाही.
मेघस्तंभाने दिवसा त्यांना मार्गदर्शन केले आणि अग्निस्तंभाने रात्री
प्रकाश देऊन त्यांना वाट दाखविणे थांबविले नाही. 20 आपला चांगला
आत्मा पाठवून त्यांना बोध केला. त्यांच्या मुखासाठी स्वर्गातून तुमचा
मान्ना पुरविण्याचे आणि तहान भागविण्यासाठी पाणी देण्याचे तुम्ही
थांबविले नाही. 21 चाळीस वर्षापर्यंत रानात तुम्ही त्यांचे पालनपोषण
केले; त्यांना कशाचीही उणीव पडू दिली नाही, त्यांचे कपडे जीर्ण झाले
नाहीत की त्यांचे पाय सुजले नाहीत. 22 “नंतर राज्ये व राष्ट्रे तुम्ही
त्यांना दिली आणि दूरवरच्या कानाकोपऱ्यातील सरहद्दीही दिल्या. त्यांनी
हेशबोनचा राजा सीहोन व बाशानचा राजा ओगचे देश काबीज केले. 23
तुम्ही त्यांचे वंशज ताऱ्यागत बहुगुणित केले आणि त्यांच्या पूर्वजांना
जा व काबीज करा असे वचन दिलेल्या देशात तुम्ही त्यांना आणले.
24 त्यांची लेकरे आत गेली व त्यांनी तो प्रदेश ताब्यात घेतला. तुम्ही
त्यांच्यापुढे, तिथे राहणारे कनानी लोक नमविले. हे कनानी लोक व त्यांचे
राजेसुद्धा त्यांच्या हातात, त्यांना वाटेल तसे वागविण्यासाठी सुपूर्द केले.
25 त्यांनी तटबंदीची शहरे आणि सुपीक जमिनी काबीज केल्या; सर्व
चांगल्या वस्तूंनी भरलेली घरे, खोदलेल्या विहिरी, द्राक्षमळे, जैतुनाचे
मळे व विपुल फळझाडे हस्तगत केली. मग ते खाऊन तृप्त व उत्तमरित्या
पोषित झाले; आणि तुमच्या महान चांगुलपणाचा त्यांनी आनंद साजरा
केला. 26 “पण त्यांनी आज्ञाभंग केला आणि तुमच्याविरुद्ध बंड केले;
त्यांनी तुमच्या नियमांकडे पाठ फिरविली. लोकांनी तुमच्याकडे परत
यावे असे त्यांना सांगणाऱ्या संदेष्ट्यांना ठार मारले आणि इतर अनेक
तऱ्हेने महाभयंकर ईशनिंदा केली. 27 म्हणून तुम्ही त्यांना शत्रूंच्या हाती
दिले, ज्यांनी त्यांचा छळ केला. पण जेव्हा त्यांचा छळ होऊ लागला,
त्यावेळी त्यांनी तुमचा धावा केला. तो तुम्ही स्वर्गातून ऐकला. त्यांच्यावर
महान कृपा करून, शत्रूपासून मुक्त करणारे रक्षक त्यांच्याकडे पाठविले.
28 “पण सर्व सुरळीत झाले की, ते परत तुमच्या नजरेत पाप करू
लागले. मग तुम्ही त्यांना नाकारून, त्यांच्या शत्रूच्या हाती दिले, जे
त्यांच्यावर शासन करीत. आणि जेव्हा ते परत तुमचा धावा करीत, तेव्हा
तुम्ही तो स्वर्गातून ऐकून तुमच्या करुणेने त्यांना वेळोवेळी सोडवित
असत! 29 “त्यांनी तुमच्या आज्ञांकडे परत वळावे म्हणून तुम्ही त्यांना
ताकीद दिली, पण ते गर्विष्ठ झाले व त्यांनी तुमच्या आज्ञा मोडल्या.
त्यांनी तुमच्या आदेशाविरुद्ध पाप केले, ज्यात तुम्ही म्हटले होते, ‘जो या
आदेशानुसार वागेल तो मनुष्य जगेल.’ दुराग्रहाने त्यांनी तुमच्याकडे पाठ
फिरविली, गर्विष्ठ बनले व तुमचे ऐकण्याचे नाकारले. 30 अनेक वर्षे
तुम्ही त्यांच्याशी सहनशीलतेने वागलात. तुम्ही आपले संदेष्टे पाठवून
त्यांच्या पापांबद्दल त्यांना आत्म्याद्वारे ताकीद दिली. परंतु तरीही त्यांनी
दुर्लक्ष केले, तेव्हा तुम्ही शेजारील लोकांच्या हाती त्यांना दिले. 31 पण
तुमच्या महान दयेमुळे तुम्ही त्यांचा सर्वनाश केला नाही व त्यांचा त्याग
केला नाही, कारण तुम्ही कृपाळू व दयाळू परमेश्वर आहात. 32 “म्हणून
आता, हे आमच्या महान, पराक्रमी व भयावह परमेश्वरा, तुम्ही तुमच्या
प्रीतीचे वचन पाळता, म्हणून ज्या हालअपेष्टा आम्ही सहन केल्या,
त्यांना तुमच्या नजरेत क्षुल्लक मानू नका—जी आमच्यावर, आमच्या
राजांवर व अधिकाऱ्यांवर, आमच्या याजक व संदेष्ट्यांवर, आमच्या
पूर्वजांवर व तुमच्या सर्व लोकांवर, अश्शूरी राजाच्या राजवटीपासून
आतापर्यंत संकटे आली. 33 जे सर्वकाही आमच्याबाबत घडले, त्यात
तुमची विश्वासार्हता कायम होती; तुमची वागणूक विश्वासयोग्य होती,
पण आम्ही मात्र दुष्टपणे वागलो. 34 आमचे राजे, आमचे अधिकारी,
आमचे याजक आणि आमचे पूर्वज यांनी तुमचे नियम पाळले नाहीत
किंवा तुमच्या आज्ञा व आदेश पाळण्याच्या ताकिदीकडे लक्ष दिले नाही.
35 ते स्वतः राज्य करीत असताना, त्यांनी विशाल व सुपीक देशात
तुमच्या थोर चांगुलपणाचा उपभोग घेतला. तरी देखील त्यांनी तुमची
भक्ती केली नाही वा दुष्टपणापासून मागे वळले नाही. 36 “पण पाहा,
आज आम्ही गुलामगिरीत आहोत, आम्ही ज्या भूमीतील उत्तम फळे व
इतर गोष्टींचा उपभोग घ्यावा त्या आमच्या पूर्वजांना तुम्ही दिलेल्या या
समृद्ध देशात गुलाम आहोत. 37 आमच्या पापांमुळे, या देशाचे विपुल
उत्पन्न, आमच्यावर राज्य करणाऱ्या राजांकडे जात आहे. त्यांच्या
इच्छेप्रमाणे ते आमच्या शरीरावर व आमच्या पशूंवर सत्ता करतात.
खरोखर आम्ही घोर दैन्यावस्थेत आहोत. 38 “हे सर्व बघता, आम्ही असे
बंधनकारक, लिखित वचन देतो आणि आमचे अधिपती, आमचे लेवी व
आमचे याजक या करारांवर त्यांची मोहर लावतो.”

**10** या करारावर सही करणाऱ्यांची नावे: राज्यपाल: हखल्याहचा पुत्र
नहेम्याह. सिद्कीयाह, 2 सेरायाह, अजऱ्याह, यिर्मयाह, 3 पशहूर,
अमऱ्याह, मल्कीयाह, 4 हट्टूश, शबन्याह, मल्लूख, 5 हारीम, मरेमोथ,
ओबद्याह, 6 दानीएल, गिन्नथोन, नेरीयाहचा पुत्र बारूख, 7 मशुल्लाम,
अबीया, मियामीन, 8 माझियाह, बिल्गाई व शमायाह. वर नोंदवलेले
सर्वजण याजक होते. 9 लेवी: अजन्याहचा पुत्र येशूआ, हेनादादाचा
पुत्र बिन्नुई, कदमीएल, 10 आणि त्याचे सहकारी: शबन्याह, होदीयाह,
कलीता, पेलतियाह, हानान, 11 मीखा, रहोब, हशब्याह, 12 जक्कूर,
शेरेब्याह, शबन्याह, 13 होदीयाह, बानी व बनीनू. 14 लोकांचे पुढारी:
पारोश, पहथ-मोआब, एलाम, जत्तू, बानी, 15 बुन्नी, अजगाद, बेबाई,
16 अदोनियाह, बिग्वई, आदीन, 17 आतेर, हिज्कीयाह, अज्जूर, 18
होदीयाह, हाशूम, बेसाई, 19 हारीफ, अनाथोथ, नोबाई, 20 मग्पीयाश,
मशुल्लाम, हेजीर, 21 मशेजबेल, सादोक, यद्दूआ, 22 पेलतियाह, हानान,
अनायाह, 23 होशेय, हनन्याह, हश्शूब, 24 हल्लोहेश, पिल्हा, शोबेक,

25 रहूम, हशबनाह, मासेयाह, 26 अहीयाह, हानान, अनान, 27 मल्लूख,
हारीम व बाअनाह. 28 “बाकी सर्व—याजक, लेवी, द्वारपाल, संगीतकार,
मंदिराचे सेवक आणि बाकीचे इतर सर्व, ज्यांनी आपल्या पत्नी व
सज्ञान पुत्र व कन्या यांच्यासह, परमेश्वराच्या नियमासाठी स्वतःला
सभोवतीच्या लोकांपासून वेगळे केले होते— 29 त्यांच्या सहकारी
इस्राएली म्हणजे सरदारांसोबत एकत्र आले व त्यांनी परमेश्वराचा सेवक
मोशेद्वारे मिळालेले परमेश्वराचे नियम अनुसरण्याची व याहवेह आमच्या
प्रभूच्या आज्ञा, आदेश व कायदे काळजीपूर्वकरित्या पाळण्याची शपथ
घेतली आणि पाळल्या नाहीत तर परमेश्वराचा श्राप स्वतःवर बंधनकारक
केला. 30 “आम्ही असेही वचन देतो की आम्ही आमच्या कन्यांना
यहूदीतर पुरुषांशी व पुत्रांना यहूदीतर कन्यांशी विवाह करू देणार नाही.
31 “शेजारील देशात असणाऱ्या लोकांनी विक्रीसाठी धान्य किंवा इतर
उत्पन्न आणले, तर शब्बाथ दिवशी किंवा इतर पवित्र दिवशी आम्ही ते
विकत घेणार नाही. दर सातव्या वर्षी शेतात कोणतेही पीक न घेण्याचे
आम्ही मान्य केले आणि सर्व कर्ज प्रत्येक सातव्या वर्षी माफ करू.
32 “प्रत्येक वर्षी परमेश्वराच्या भवनाच्या सेवेकरिता: प्रत्येकी एक
शेकेलचा तिसरा भाग चांदी देण्याची आज्ञा पाळण्याची; 33 समक्षतेची
खास भाकर; नियमित धान्यार्पणे व होमार्पणे; शब्बाथासाठी अर्पणे,
अमावस्येचा सण आणि ठराविक सण; पवित्र अर्पणे; इस्राएलच्या
प्रायश्चित्तविधीसाठी पापार्पणे; आणि परमेश्वराच्या भवनाची सेवा
करण्याची जबाबदारीही आम्ही स्वीकारली. 34 “आम्ही—याजक,
लेवी आणि लोकांनी—लाकडांचा पुरवठा निर्धारित करण्यासाठी
चिठ्ठ्या टाकल्या की आमच्या प्रत्येक कुटुंबांनी आमच्या परमेश्वराच्या
भवनात आणावे जेणेकरून याहवेह आमच्या परमेश्वराच्या वेदीवर
जाळण्यासाठी नियमशास्त्रात लिहिल्याप्रमाणे लाकूड आणायचे आहे.
35 “प्रत्येक पिकाचा व प्रत्येक फळझाडाचा पहिला उपज दरवर्षी
याहवेहच्या भवनामध्ये द्यावा अशी जबाबदारीही आम्ही स्वीकारली. 36
“नियमांत लिहिल्यानुसार, प्रथम जन्मलेला पुत्र व आमच्या गोठ्यातील
व कळपातील जनावरांचे प्रथमवत्स, परमेश्वराच्या भवनामध्ये सेवा
करणाऱ्या याजकांकडे आम्ही ते सादर करू. 37 “याशिवाय आमच्या
परमेश्वराच्या भवनातील कोठारासाठी याजकाकडे प्रथम दळलेले पीठ,
आमचे धान्यार्पण व फलार्पण, नवा द्राक्षारस आणि जैतुनाच्या तेलाचा
पहिला हिस्सा आणू. आम्ही आमच्या प्रत्येक उत्पन्नाचा एक दशांश
लेव्यांना देण्याचे वचन दिले, कारण आम्ही जिथे काम करतो त्या सर्व
नगरातून दशांश जमा करण्याची जबाबदारी लेव्यांची होती. 38 लेवी
दशांश गोळा करीत असताना, त्यांच्याबरोबर अहरोनाच्या वंशातील एक
याजक असावा व लेव्यांनी दशांशाचा दशांश परमेश्वराच्या भवनामध्ये
समर्पित करून मंदिराच्या कोठारात जमा करावा. 39 इस्राएली लोकांनी
व लेवी यांनी धान्य, नवा द्राक्षारस, जैतुनाचे तेल, यांची अर्पणे कोठारात
आणून ती सेवा करणारे याजक, द्वारपाल आणि संगीतकार यांच्या
वापरासाठी असलेल्या पवित्र पात्रांमध्ये ठेवावीत. “अशा रीतीने आम्ही
परमेश्वराच्या भवनाकडे दुर्लक्ष करणार नाही.”

11 आता लोकांचे अधिकारी यरुशलेममध्ये स्थायिक झाले. बाकीच्या
लोकातील दहापैकी एकाने यरुशलेम, पवित्र नगरीत येऊन राहावे
म्हणून चिठ्ठ्या टाकून त्यांची निवड करण्यात आली, व उरलेल्या
नऊ लोकांनी स्वतःच्या नगरात राहावे. 2 यावेळी यरुशलेमला जे
स्वखुशीने गेले त्यांचा लोकांनी बहुमान केला. 3 यरुशलेमला येणाऱ्या
प्रांताधिकाऱ्यांच्या नावांची यादी पुढे दिली आहे (आता काही इस्राएली,
याजक, लेवी, मंदिराचे सेवक व शलोमोनच्या सेवकांचे वंशज यहूदीयाच्या
नगरात स्वतःच्या वतनांतच राहिले, प्रत्येकजण निरनिराळ्या नगरातील
स्वतःच्या मालकीच्या भूमीवर स्थायी झाला. 4 पण यहूदाह व बिन्यामीन
यांच्या गोत्रातील इतर सर्व यरुशलेमात राहिले): यहूदीयाच्या गोत्रातील:
अथायाह, हा उज्जीयाहचा पुत्र, तो जखऱ्याहचा पुत्र, तो अमऱ्याहचा
पुत्र, तो शफाट्याहचा पुत्र, तो महलालेलाचा पुत्र, तो पेरेसाचा वंशज
होता; 5 मासेयाह, हा बारूखाचा पुत्र, तो कोल-होजेचा पुत्र, तो
हजायाहचा पुत्र, तो अदायाहचा पुत्र, तो योयारीबचा पुत्र, तो जखऱ्याहचा
पुत्र व तो शिलोनी वंशज होता. 6 पेरेसाचे जे वंशज यरुशलेममध्ये
राहत होते ते सर्व 468 वीरपुरुष होते. 7 बिन्यामीनच्या गोत्रातील:
सल्लू, हा मशुल्लामाचा पुत्र, तो योएदाचा पुत्र, तो पदायाहचा पुत्र,
तो कोलायाहचा पुत्र, तो मासेयाहचा पुत्र, तो इथिएलाचा पुत्र, तो
यशायाहचा पुत्र होता. 8 आणि त्याला अनुसरणारे, गब्बई व सल्लाइ
928 पुरुष. 9 जिक्रीचा पुत्र योएल व हस्सनूआहाचा पुत्र यहूदाह हे
शहराच्या नव्या भागावर त्यांचे प्रमुख होते. 10 याजकांपैकी: यदायाह,
हा योयारीबाचा पुत्र होता; याखीन; 11 सेरायाह, हा हिल्कियाहचा पुत्र,
तो मशुल्लामाचा पुत्र, तो सादोकाचा पुत्र, तो मरायोथाचा पुत्र, जो
अहीतूबाचा पुत्र होता. अहीतूब हा परमेश्वराच्या भवनाचा अधिकृत
अधिकारी होता. 12 आणि त्यांचे मदतनीस, जे मंदिराची सेवा करीत
822 पुरुष या पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखाली काम करीत असत. अदायाह,
हा यरोहामाचा पुत्र, तो पलल्याहचा पुत्र, तो मशुल्लामाचा पुत्र, तो
अमसीचा पुत्र, तो जखऱ्याहचा पुत्र, तो पशहूराचा पुत्र, जो मल्कीयाहचा
पुत्र, 13 आणि त्याचे सहकारी, जे कुटुंबप्रमुख होते ते 242 पुरुष;
अमश्सइ, अजरएलाचा पुत्र, तो अहजईचा पुत्र, तो मेशिल्लेमोथाचा
पुत्र, जो इम्मेराचा पुत्र होता. 14 आणि त्याचे सहकारी, जे वीरपुरुष
होते 128. जब्दीएल, हगदोलीमाचा पुत्र हा मुख्य प्रधान होता. 15
लेवी गोत्रातील: शमायाह, हा हश्शूबचा पुत्र, तो अज्रीकामचा पुत्र, तो
हशब्याहाचा पुत्र, जो बुन्नीचा पुत्र होता; 16 शब्बथई व योजाबाद हे दोघे
लेव्यांचे प्रमुख परमेश्वराच्या भवनाचा बाहेरील कामाचे अधिकारी होते;
17 मत्तन्याह, हा मीखाहचा पुत्र, तो जब्दीचा पुत्र, जो आसाफाचा पुत्र,
तो उपकारस्तुतीत व प्रार्थनेत नेतृत्व करणारा प्रमुख होता; बकबुकियाह,
त्याच्या सहकाऱ्यातील दुसरा; आणि अब्दा, हा शम्मुवाचा पुत्र, तो
गालालचा पुत्र, जो यदूथूनाचा पुत्र होता. 18 पवित्र शहरामधील सर्व
लेवी एकूण 284. 19 द्वारपाल: अक्कूब, तल्मोन व त्यांचे सहकारी, जे
वेशींवर निगराणी ठेवीत ते 172 पुरुष. 20 राहिलेले इस्राएली, याजक व
लेवीसह यहूदीयाच्या सर्व नगरात, आपआपल्या घराण्यांची वतने जिथे

होती, तिथे राहत असत. 21 तरी मंदिराची सेवा करणारे, ज्यांचे पुढारी
झीहा व गिश्पा होते, ते सर्वजण ओफेल येथे राहत. 22 यरुशलेमच्या
लेव्यांवर व परमेश्वराच्या भवनात सेवेकऱ्यांचा प्रमुख अधिकारी उज्जी,
हा बानीचा पुत्र, तो हशब्याहाचा पुत्र, तो मत्तन्याहचा पुत्र, जो मीखाहचा
पुत्र होता. उज्जी, हा आसाफाचा वंशज होता. त्याचे कूळ परमेश्वराच्या
भवनातील संगीतकार म्हणून सेवा करीत होते. 23 राजाने संगीतकार
म्हणून त्यांची नेमणूक केली होती व त्यांचे दररोजचे कार्य निर्धारित केले
होते. 24 पथह्याह, तो मशेजबेलचा पुत्र, तो जेरहाचा वंशज, जो यहूदाहचा
पुत्र होता, हा लोकसेवेच्या कामी राजाचा प्रतिनिधी होता. 25 यहूदीयाचे
लोक राहत असलेली काही गावे व शेती होती, काही लोक किर्याथ-अर्बा
व त्यांच्या आसपासच्या वस्त्या, दिबोन व त्यांच्या आसपासच्या वस्त्या,
यकब्सेल आणि त्यांच्या आसपासची गावे: 26 येशूआ, मोलादाह, बेथ-
पेलेट, 27 हसर-शुआल, बेअर-शेबा, आणि त्यांची आसपासची गावे,
28 सिकलाग, मकोनाह व त्यांची आसपासची गावे. 29 एन-रिम्मोन,
सोराह, यर्मूथ, 30 जानोह, अदुल्लाम, आणि त्यांच्या आसपासची गावे,
लाखीश व त्यांची जवळपासची शेते; अजेकाह, त्यांची गावे; लोकांनी
बेअर-शेबापासून हिन्नोमाच्या खोऱ्यापर्यंत वस्ती केली. 31 बिन्यामीन
वंशातील लोक खालील ठिकाणी राहत होते: गेबा, मिकमाश, अय्याह,
बेथेल, आणि त्यांच्या सभोवतालची गावे, 32 अनाथोथ, नोब, अनन्याह,
33 हासोर, रामाह, गित्ताइम, 34 हादीद, सबोईम, नेबल्लाट, 35 लोद व
ओनो व गे-हाराशीम. 36 यहूदीयामध्ये राहणारे काही लेवी बिन्यामीन
गोत्राच्या लोकांबरोबर राहण्यासाठी गेले.

**12** शल्तीएलचा पुत्र जरूब्बाबेल व येशूआसह आलेल्या याजकांची
व लेव्यांची यादी पुढीलप्रमाणे आहे: सेरायाह, यिर्मयाह, एज्रा,
2 अमऱ्याह, मल्लूख, हट्टूश, 3 शखन्याह, रहूम, मरेमोथ, 4 इद्दो,
गिन्नथोई, अबीया, 5 मियामीन, मादियाह, बिल्गाह, 6 शमायाह,
योयारीब, यदायाह, 7 सल्लू, आमोक, हिल्कियाह व यदायाह. 8
लेवी हे होते, येशूआ, बिन्नुई, कदमीएल, शेरेब्याह, यहूदाह, मत्तन्याह
व त्याचे सहकारी उपकारस्तुतीच्या उपासनेसाठी जबाबदार होते. 9
बकबुकियाह व उन्नी यांचे सहकारी उपासनेच्या वेळी त्यांच्यासमोर
उभे राहत असत. 10 येशूआ योयाकिमाचा पिता होता; योयाकीम
एल्याशीबाचा पिता होता; एल्याशीब यहोयादाचा पिता होता; 11
यहोयादा योनाथानाचा पिता होता; योनाथान यद्दूआचा पिता होता. 12
मुख्य याजक योयाकीमच्या कार्यकालात, हे याजकांचे कुलप्रमुख होते.
मरायाह, सेरायाह कुळाचा प्रमुख; हनन्याह, यिर्मयाह कुळाचा प्रमुख; 13
मशुल्लाम, एज्रा कुळाचा प्रमुख; यहोहानान, अमऱ्याह कुळाचा प्रमुख;
14 योनाथान, मल्लूखी कुळाचा प्रमुख; योसेफ, शबन्याह कुळाचा प्रमुख;
15 अदना, हारीम कुळाचा प्रमुख; हेलकइ, मरायोथ कुळाचा प्रमुख; 16
जखऱ्याह, इद्दो कुळाचा प्रमुख; मशुल्लाम, गिन्नथोन कुळाचा प्रमुख; 17
जिक्री, अबीया कुळाचा प्रमुख; पिल्तय, मोवद्याह व मिन्यामीन कुळाचा
प्रमुख; 18 शम्मुवा, बिल्गाह कुळाचा प्रमुख; योनाथान, शमायाह कुळाचा
प्रमुख; 19 मत्तनई, योयारीब कुळाचा प्रमुख; उज्जी, यदायाह कुळाचा
प्रमुख; 20 कल्लय, सल्लू कुळाचा प्रमुख; एबर, आमोक कुळाचा
प्रमुख; 21 हशब्याह, हिल्कियाह कुळाचा प्रमुख; नथानेल, यदायाह
कुळाचा प्रमुख. 22 एल्याशीबाच्या कार्यकालात सर्व लेवीचे कुलप्रमुख
यहोयादा, योहानान व यद्दूआ होते, पर्शियाचा राजा दारयावेशच्या
कारकिर्दीत याजक व लेवीच्या वंशावळी तयार करण्यात आल्या
होत्या. 23 इतिहासाच्या पुस्तकामध्ये एल्याशीबाचा पुत्र योहानानच्या
काळापर्यंत लेवींच्या वंशजांची नावे नमूद केली होती. 24 त्यावेळी लेवीचे
कुलप्रमुख—हशब्याह, शेरेब्याह, व कदमीएलचा पुत्र येशूआ व त्यांचे
सहकारी. परमेश्वराचा मनुष्य दावीदच्या आज्ञेप्रमाणे मंदिरात स्तवन
व उपकारस्मरणाच्या वेळी त्यांचे कुलबांधव समोरासमोर उभे राहून
एकमेकांना प्रतिसाद देत असत. 25 मत्तन्याह, बकबुकियाह, ओबद्याह,
मशुल्लाम, तल्मोन व अक्कूब हे द्वारपाल दरवाजांजवळ असलेल्या
कोठारांचे संरक्षण करीत होते. 26 योसादाकाचा पुत्र येशूआचा पुत्र
योयाकीमच्या कार्यकालात म्हणजे जेव्हा नहेम्याह राज्यपाल होता
व एज्रा याजक व नियमाचा शिक्षक होता, तेव्हा हे कामावर होते.
27 यरुशलेमच्या नवीन तटाच्या समर्पणविधीमध्ये भाग घेण्यासाठी
देशातील सर्वच लेवी जिथे कुठे असतील तिथून शोधून यरुशलेम येथे
पाचारण करण्यात आले, जेणेकरून या विधीमध्ये त्यांनी भाग घेऊन
साह्य करावे, झांजा, सारंग्या, वीणा यांच्या संगीतासह गीते गाऊन
उपकारस्तुती करावी आणि हा आनंदोत्सवाचा सोहळा साजरा करावा.
28 संगीतकारांनाही यरुशलेम सभोवतालच्या प्रदेशातून व नटोफाथी
प्रांतातून आणले. 29 बेथ-गिलगाल, गेबाच्या प्रांतातून व अजमावेथ
येथूनही हे संगीतकार आले, कारण त्यांनी यरुशलेमच्या सभोवती
आपली उपनगरे बांधली होती. 30 प्रथम याजक व लेवींनी स्वत:ला
शुद्ध करून घेतले. नंतर त्यांनी लोकांना, तटाला आणि वेशींना शुद्ध
केले. 31 मी यहूदाह पुढाऱ्यांना तटावर नेले. धन्यवाद देण्याकरिता
त्यांचे दोन मोठे गायकवृंद तयार केले. स्तुतिस्तोत्रे गात त्या रांगा
एकमेकींच्या विरुद्ध दिशेने चालल्या. एक गायकवृंद तटाच्या वर
उजवीकडे म्हणजे उकिरडा वेशीकडे चालली. 32 होशयाह व यहूदाहच्या
पुढाऱ्यांपैकी अर्धे त्यांच्या मागोमाग चालले. 33 अजऱ्याह सोबत,
एज्रा, मशुल्लाम, 34 यहूदाह, बिन्यामीन, शमायाह व यिर्मयाह यांचा
त्यात समावेश होता. 35 तसेच काही याजकांनी कर्णे वाजविले आणि
जखऱ्याह, योनाथानाचा पुत्र, तो शमायाहचा पुत्र, तो मत्तन्याहचा
पुत्र, तो मिखायाहचा पुत्र, तो जक्कूराचा पुत्र, तो आसाफाचा पुत्र
होता, 36 त्याचे सहकारी—शमायाह, अजरएल, मिललई, गिललई,
माई, नथानेल, यहूदाह व हनानी—यांनी परमेश्वराचा मनुष्य दावीदाने
नेमून दिलेली वाद्ये वापरली. एज्रा शास्त्राचा शिक्षक त्यांच्या अग्रभागी
चालला होता. 37 ते झरावेशीजवळ आले, तेव्हा ते सरळ पुढे गेले
व दावीदाच्या नगराच्या पायऱ्यांवरून तटाच्या चढणीवर असलेल्या
दावीदाच्या महालाच्या वरच्या भागाकडून पूर्वेकडे पाणीवेशीपर्यंत गेले.
38 स्तुतिगान करणारे दुसरे गायकवृंद विरुद्ध दिशेने पुढे निघाले. मी
वरच्या बाजूने त्यांच्यात सामील होण्यास दुसऱ्या अर्ध्या लोकांबरोबर

निघालो—आम्ही भट्टीबुरुजापासून रुंद तटापर्यंत चालत गेलो. 39 नंतर
एफ्राईम वेशीपासून येशनाह वेस, मत्स्य वेस आणि हननेल मनोरा पार
करून शंभराचा बुरूजावरून आम्ही मेंढेवेशीपर्यंत गेलो आणि तिथून
पुढे द्वारपालाच्या वेशीजवळ जाऊन थांबलो. 40 नंतर धन्यवाद देणारे
दोन्ही गायकवृंद परमेश्वराच्या भवनात जाऊन त्यांनी आणि अर्ध्या
अधिकाऱ्यांसह मी देखील आपले नेमलेले स्थान ग्रहण केले. 41 तसेच
कर्णे वाजविणारे याजक—एल्याकीम, मासेयाह, मिन्यामीन, मिखायाह,
एलिओएनाइ, जखऱ्याह, आणि हनन्याह. 42 व मासेयाह, शमायाह,
एलअज़ार, उज्जी, यहोहानान, मल्कीयाह, एलाम व एजेर यांनीही
यिझ्रहयाहच्या मार्गदर्शनाखाली गायकवृंदाने गाईले. 43 या आनंदाच्या
दिवशी अनेक मोठमोठी अर्पणे करण्यात आणली, कारण परमेश्वराने
त्यांना फार मोठा हर्ष दिला होता. स्त्रिया व मुलांनी देखील आनंद
व्यक्त केला. यरुशलेममधील लोकांच्या आनंदाचे निनाद दूरवर ऐकू
आले. 44 त्यावेळी प्रथम हंगामाची अर्पणे व दशांश या अर्पणांच्या
भांडारावर पुरुष अधिकारी नेमण्यात आले. ही सर्व अर्पणे मोशेच्या
नियमशास्त्रात सांगितल्याप्रमाणे सभोवतीच्या नगरींच्या शेतांप्रमाणे
अर्पणे याजक व लेवींना नेमून देण्यात आली, त्यांनी ती गोळा करून
भांडारात जमा करावयाची होती. कारण यहूदीयाच्या लोकांना लेवी व
याजक आणि त्यांचे सेवाकार्य यांचे कौतुक वाटत होते. 45 दावीद आणि
त्याचा पुत्र शलोमोनाने घालून दिलेल्या नियमांप्रमाणे परमेश्वराच्या
उपासनेत आणि शुद्धीकरणविधीमध्ये गायक व द्वारपाल हे सहकार्य
करीत होते. 46 दावीदाच्या व आसाफाच्या काळापासून संगीतकारांसाठी
संचालक नेमण्याची व परमेश्वराची स्तुतिस्तोत्रे व उपकारस्तुती गाण्यास
सुरुवात झाली होती. 47 म्हणून सर्व इस्राएली जरूब्बाबेल आणि
नहेम्याहच्या काळात द्वारपाल, लेवी व संगीतकारांसाठी दररोज अन्नाचा
वाटा आणत असत. ते आपल्याला मिळालेल्या हिश्शातील काही भाग
इतर लेव्यांसाठी ठेवीत आणि लेवी आपल्यातील वाटा अहरोनाच्या
वंशजांसाठी समर्पित करीत असत.

**13** त्याच दिवशी, मोशेचे नियमशास्त्र मोठ्याने वाचण्यात येत
असताना, लोकांना एक विधान ऐकावयास मिळाले. त्यात असे
लिहिले होते की अम्मोनी व मोआबींना परमेश्वराच्या सभामध्ये प्रवेश
करण्याची कधीही परवानगी देण्यात येऊ नये, 2 कारण त्यांनी इस्राएली
लोकांना अन्न व पाण्याचा पुरवठा केला नाही. उलट त्यांनी त्यांना
शाप देण्यासाठी बलामाला पैसे देऊन बोलाविले. (पण परमेश्वराने त्या
शापाचे रूपांतर आशीर्वादात केले ही गोष्ट वेगळी.) 3 जेव्हा लोकांनी
नियमशास्त्रातील हे वचन ऐकले, तेव्हा त्यांनी सर्व विदेशी वंशजांच्या
लोकांना इस्राएलमधून वगळले. 4 ही घटना घडण्यापूर्वी, एल्याशीब
याजकाला परमेश्वराच्या भवनातील कोठड्यांचा रक्षक म्हणून नेमण्यात
आले होते. तो तोबीयाहाचा एक स्नेही होता. 5 त्याने तोबीयाहाला
एका कोठडी दिली. ही कोठडी पूर्वी धान्यार्पण, ऊद, मंदिराचे सामान,
तसेच धान्य, नवीन द्राक्षारस आणि जैतुनाचे तेल यांच्या दशांशांचे
साठे ठेवण्यासाठी वापरली जात असे. ही सर्व अर्पणे लेव्यांसाठी,
संगीतकारांच्या सभासदांसाठी आणि द्वारपालांसाठी, त्याचबरोबर
याजकांसाठी वर्गणी म्हणून असत. 6 हे सर्वकाही होत असताना, मी
यरुशलेमात नव्हतो, कारण बाबेलचा राजा अर्तहशश्तच्या कारकिर्दीच्या
बत्तिसाव्या वर्षी मी त्याच्याकडे परतलो होतो. काही काळानंतर मी
त्याला परवानगी मागितली, 7 आणि मी यरुशलेमला परत आलो. तेव्हा
मला एल्याशीबाने तोबीयाहास परमेश्वराच्या मंदिरातील अंगणात एका
कोठार देण्याचे गैरकृत्य केल्याचे कळले. 8 मी फारच नाराज झालो
आणि तोबीयाहाच्या सर्व वस्तू मी कोठडीबाहेर फेकून दिल्या. 9 नंतर
ती कोठडी संपूर्णपणे शुद्ध करून घ्यावी असा मी आदेश दिला. मग मी
परमेश्वराच्या भवनातील सामान, धान्यार्पणे व ऊद ही परत त्या कोठडीत
आणली. 10 मला असेही समजले की, लेव्यांना जो हिस्सा नेमून दिला
होता, तो त्यांना देण्यात आला नव्हता आणि यामुळे ते सर्व लेवी व
ज्यांची उपासना घेण्याची जबाबदारी होती, ते संगीतकार आपआपल्या
शेतांवर परत निघून गेले होते. 11 मी पुढाऱ्यांना भेटून त्यांचा समाचार
घेऊन विचारले, “परमेश्वराच्या भवनाकडे असे दुर्लक्ष का करण्यात आले
आहे?” नंतर मी सर्व लेव्यांना परत एकत्र बोलाविले व त्यांच्या पूर्वीच्याच
जागी त्यांची नेमणूक केली. 12 आणि पुन्हा एकदा यहूदीयाचे सर्व लोक
धान्य, नवा द्राक्षारस व तेलाचे दशांश मंदिराच्या कोठारांत आणू लागले.
13 मी शेलेम्याह याजक, सादोक शास्त्री आणि पदायाह नामक लेवींना
कोठारांत अधिकारी म्हणून नेमले व त्यांचा मदतनीस म्हणून हानान, जो
जक्कूराचा पुत्र व मत्तन्याहचा नातू होता, याची नेमणूक केली. कारण
हे सर्वजण विश्वासयोग्य मानले जात होते. आपल्या लेवी बांधवांना
अर्पणाचे वाटप प्रामाणिकपणे करण्याची त्यांना जबाबदारी देण्यात
आली. 14 हे माझ्या परमेश्वरा, या चांगल्या कृत्यांबद्दल माझी आठवण
ठेवा आणि परमेश्वराच्या भवनासाठी मी जे सर्व अत्यंत विश्वासूपणाने
केले आहे ते पुसून टाकू नका. 15 त्या दिवसात मी यहूदीयातील काही
पुरुषांना शब्बाथ दिवशी द्राक्षकुंडांत द्राक्षे तुडविताना व धान्यांच्या पेंढ्या
आणून गाढवांवर लादतांना, त्याचप्रमाणे द्राक्षारस, द्राक्षे, अंजीर व
इतर पदार्थांचे ओझे शब्बाथ दिवशी यरुशलेमला विक्रीसाठी घेऊन
जाताना पाहिले. तेव्हा मी त्यांना त्या दिवशी हे विक्री करण्यास विरोध
केला. 16 सोरचेही काही लोक मासे व नाना प्रकारचे पदार्थ यरुशलेमला
आणून शब्बाथ दिवशी यहूदीयांना लोकांना विकत असत. 17 मी
यहूदीयाच्या प्रतिष्ठितांना फटकारून विचारले, “तुम्ही हे काय दुराचरण
करीत आहात—शब्बाथ भ्रष्ट करीत आहात? 18 तुमच्या पूर्वजांनी हेच
केले व त्यामुळेच आपण व आपल्या शहरावर हे संकट परमेश्वराने
आणले आहे? आणि आता तर तुम्ही शब्बाथ दिवस अशा रीतीने
अपवित्र करून इस्राएली लोकांवर अधिक क्रोध आणत आहात.”
19 यरुशलेमच्या वेशींवर संध्याकाळचा अंधार पडेपर्यंत सर्व दारे बंद
केली जावीत व ती शब्बाथ संपेपर्यंत उघडली जाऊ नयेत असा मी
आदेश दिला. मग मी माझी काही माणसे वेशीवर पहारा ठेवण्यासाठी
नेमली. यासाठी की कुठल्याही प्रकारचा माल शब्बाथ दिवशी शहरात
आणला जाऊ नये. 20 सर्वप्रकारच्या सामानाचे व्यापारी व विक्रेते यांनी

यरुशलेमबाहेर एक दोनदा रात्र घालविली. 21 पण मी त्यांना ताकीद
दिली आणि म्हणालो, “तुम्ही येथे तटाजवळ रात्र का घालविली? परत
असे काही केले, तर मी तुम्हाला अटक करेन.” मग त्या दिवसानंतर
परत ते शब्बाथ दिवशी आले नाही. 22 नंतर मी लेव्यांना आज्ञा दिली
की त्यांनी स्वत:ला शुद्ध करून घ्यावे आणि शब्बाथ दिवसाचे पावित्र्य
राखण्यासाठी वेशींवर पहारा ठेवावा. हे माझ्या परमेश्वरा, या चांगल्या
कृत्यांबद्दल माझी आठवण ठेवा आणि आपल्या विपुल प्रीतीनुसार
मजवर दया करा. 23 याच सुमारास माझ्या निदर्शनास आले की काही
यहूदी पुरुषांनी अश्दोदी, अम्मोनी व मोआबी स्त्रियांशी विवाह केला
होता. 24 त्यांची अर्धी मुलेबाळे अश्दोदी अथवा इतर लोकांची भाषा
बोलत होती, पण त्यांना यहूदीयाची भाषा बोलता येत नसे. 25 तेव्हा
मी त्यांना धमकाविले, त्यांना शाप दिला. काही पुरुषांना मार दिला व
त्यांचे केस उपटून परमेश्वराची शपथ घालून त्यांच्याकडून वचन घेतले व
म्हटले, “इत:पर तुम्ही आपल्या कन्यांचा त्यांच्या पुत्रांशी वा त्यांच्या
कन्यांचा आपल्या पुत्रांशी विवाह करून देणार नाही. 26 शलोमोन राजा
अशाच प्रकारच्या गोष्टींनी पापमग्न झाला नव्हता काय? त्याच्याशी
तुलना करता येईल असा दुसरा राजा अनेक राष्ट्रांमध्ये नव्हता आणि
परमेश्वराने त्याच्यावर प्रीती केली व त्याला संपूर्ण इस्राएलचा राजा केले.
असे असूनही त्याला यहूदीतर स्त्रियांनी पापाकडे वळविले. 27 आता
तुम्हीही तोच सर्व भयंकर दुष्टपणा करता व यहूदीतर स्त्रियांशी विवाह
करून परमेश्वराशी विश्वासघात करीत आहात हे आम्ही ऐकावे काय?”
28 मुख्य याजक एल्याशीबचा पुत्र यहोयादाच्या पुत्रांपैकी एकजण
सनबल्लट होरोनी याचा जावई होता, म्हणून मी त्याला माझ्यापासून दूर
हाकलून दिले. 29 हे माझ्या परमेश्वरा, त्यांनी याजकपद व याजकांचे
आणि लेव्यांचे करार भ्रष्ट केले आहेत, त्यांची तुम्ही आठवण ठेवा.
30 तेव्हा मी त्या याजक व लेव्यांना सर्व यहूदीतर गोष्टींपासून शुद्ध
करून घेतले. याजकांची व लेव्यांची कामे आणि प्रत्येकाला त्यांच्या
जबाबदाऱ्या दिल्या. 31 वेदीसाठी वेळच्या वेळी लाकडे आणि अर्पणांची
आणि हंगामातील प्रथम उपजाची अर्पणे पुरविली. हे माझ्या परमेश्वरा,
मजवर प्रसन्न होऊन माझी आठवण ठेवा.

# एस्तेर

1 भारतापासून कूशपर्यंत पसरलेल्या व एकशे सत्तावीस प्रांत
असलेल्या या विस्तृत साम्राज्याचा बादशहा राजा अहश्वेरोश च्या
कारकिर्दीत हे घडले: 2 त्याकाळी राजा अहश्वेरोश शूशनच्या सिंहासनावर
विराजमान होता. 3 त्याच्या कारकिर्दीच्या तिसऱ्या वर्षी त्याने आपल्या
सर्व प्रतिष्ठित लोकांना व अधिकाऱ्यांना तिथे भरविलेल्या महोत्सवाचे
राजवाड्यात आमंत्रण दिले. या प्रसंगासाठी पर्शिया व मेदियातील
लष्करी अधिकारी, सरदार आणि त्या प्रांतातील प्रतिष्ठित लोक उपस्थित
होते. 4 सतत 180 दिवस त्याने याच्या साम्राज्याच्या दौलतीचे,
महिमा व वैभवाचे प्रदर्शन केले. 5 हे दिवस संपल्यानंतर, राजाने
शूशन राजवाड्यातील लहानापासून थोरापर्यंत सर्वांना राजवाड्याच्या
अंगणातील बागेत मेजवानी दिली, जी सात दिवस चालली. 6 सजावटीचे
पडदे पांढऱ्या आणि निळ्या रंगांचे होते आणि ते पांढऱ्या रंगाच्या
कापडी फितींनी व जांभळ्या कापडांनी रुपेरी कड्यांना बसविलेल्या
संगमरवरी खांबांना बांधलेले होते. संगमरवरी पाषाणांच्या फरशीवर
सोन्याचे व रुप्याची लाल-जांभळी रत्ने, संगमरवरी, मौल्यवान मोती व
इतर रत्नजडित आसने ठेवलेली होती. 7 निरनिराळे नक्षीकाम केलेल्या
सुवर्णपात्रांतून पेय दिले जात होते आणि शाही मद्य राजाच्या औदार्यास
साजेल असे विपुलतेने दिले जात होते. 8 राजाच्या हुकुमानुसार प्रत्येक
पाहुण्याच्या मद्य पिण्यावर कोणतेही बंधन नव्हते, राजाने मद्य वाढणाऱ्या
अधिकाऱ्यांना सूचना दिल्याप्रमाणे प्रत्येकाला त्याच्या इच्छेस येईल ते
मद्य पिण्याची पूर्ण मुभा होती. 9 वश्ती राणीनेही अहश्वेरोश राजाच्या
शाही महालातील स्त्रियांना मेजवानी दिली. 10 सातव्या दिवशी,
अहश्वेरोश राजा मद्य पिऊन पूर्णपणे उल्लसित झाला असताना त्याने
त्याच्या तैनातीस असलेल्या खोजांना—महूमान, बिजथा, हरबोना,
बिग्था, अबग्था, जेथर व कर्खस यांना— 11 राणी वश्तीला मस्तकावर
राजमुकुट घालून आपणाकडे आणण्यास सांगितले. हेतू हा की जमलेले
सर्व लोक व प्रतिष्ठितांसमोर तिच्या सौंदर्याचे प्रदर्शन करावे, कारण ती
एक अतिशय सुंदर स्त्री होती. 12 परंतु राजाची आज्ञा जेव्हा खोजांनी
वश्ती राणीला कळविली, तेव्हा तिने येण्यास नकार दिला. त्यामुळे राजा
अहश्वेरोश संतापला व त्याचा क्रोधाग्नी भडकला. 13 परंतु चालीरीतींना
अनुसरून राजाने कायदा व न्यायात पारंगत व्यक्तीचा सल्ला घेतला. ते
ज्ञानी गृहस्थ होते व त्यांना त्या काळाच्या परिस्थितीचे योग्य आकलन
होते. 14 शिवाय जे राजाचे जिवलग मित्र होते—कर्शना, शेथार,
अदमाथा, तार्शीश, मेरेस, मर्सेना व ममुकान—ते पर्शिया व मेदिया या
साम्राज्यातील सात प्रतिष्ठित लोक व सर्वात उच्चाधिकारी होते, ज्यांना
राजाच्या सानिध्यात प्रवेश करण्याची खास मुभा होती. 15 राजाने
त्यांना विचारले, “कायद्यानुसार, वश्ती राणीच्या बाबतीत काय करावे?
खोजाद्वारे पाठविलेली अहश्वेरोश राजाची आज्ञा तिने पाळली नाही.” 16
राजा व प्रतिष्ठितांच्या समक्षतेत ममुकानाने उत्तर दिले, “वश्ती राणीने
चूक केली आहे, केवळ राजाच्याच विरुद्ध नव्हे तर अहश्वेरोश राजाच्या
साम्राज्यातील सर्व प्रतिष्ठित व नागरिकांच्या विरुद्ध केली आहे. 17
कारण राणी वश्तीची वागणूक सर्व ठिकाणच्या स्त्रियांना समजल्यावर
त्याही आपआपल्या पतीची अवज्ञा करून म्हणतील, ‘अहश्वेरोश राजाने
वश्ती राणीस त्याच्या समक्षतेत आणण्याची आज्ञा दिली होती, पण ती
आली नाही.’ 18 आजच्या दिवशी पर्शिया व मेदिया या साम्राज्यातील
प्रतिष्ठितांच्या स्त्रिया राणीच्या आचरणाबद्धल ऐकून राजाच्या सर्व
प्रतिष्ठितांना असाच प्रतिसाद देतील. संपूर्ण साम्राज्यात अपमान व
मतभेदाचा अंत राहणार नाही. 19 “यास्तव, जर महाराजांना मान्य
असेल, तर त्यांनी राजाज्ञा द्यावी व तो मेदिया व पर्शिया या प्रांतातील
एक न बदलणारा कायदा म्हणून काढावा, त्यात हे नोंदलेले असावे
की वश्तीने राजा अहश्वेरोश यांच्या समक्षतेत पुन्हा कधीही येऊ नये.
आणि तिच्या जागी हे शाही स्थान ग्रहण करण्यास तिच्यापेक्षा चांगल्या
राणीची राजाने निवड करावी. 20 तुमच्या या विशाल साम्राज्यातून ही
राजाज्ञा प्रसिद्ध झाली तर सर्व ठिकाणच्या पतीचा, मग तो लहान असो
वा थोर त्यांच्या पत्नीकडून आदर केला जाईल!” 21 राजा आणि त्याचे
सर्व प्रतिष्ठित या सल्ल्याने प्रसन्न झाले, म्हणून राजाने ममुकानच्या
सल्ल्याप्रमाणे केले. 22 त्याने आपल्या राज्यातील सर्व प्रांतांना सर्व
स्थानिक भाषेत, प्रत्येक व्यक्तीस त्याच्या भाषेत कळेल असे पत्र
पाठविले. ज्याद्वारे जाहीर करण्यात आले की त्यांच्यामधून प्रत्येक
पुरुषाने आपल्या घरात सत्ता चालवावी आणि आपल्या अधिकाराची
अंमलबजावणी आपल्या मातृभाषेत करावी.

2 अहश्वेरोश राजाचा संताप शांत झाल्यानंतर त्याला वश्तीचे स्मरण
झाले आणि तिने काय केले व त्याने तिच्याविरुद्ध कोणता कायदा
बनविला हे कळून आले. 2 तेव्हा त्याच्या तैनातीतील सेवकांनी त्याला
सूचना केली, “एक सुंदर व तरुण कुमारिका राजासाठी शोधण्यात यावी.
3 राजाने याकरिता कारभारी नेमले जेणेकरून प्रत्येक प्रांतातील सुंदर व
तरुण कुमारिकांना शूशनच्या राजवाड्यातील अंत:पुरात आणण्यात
यावे. त्यांना अंत:पुराचा प्रमुख खोजा हेगाइकडे सोपविण्यात यावे, जो
त्यांच्यावर सौंदर्यप्रसाधनांचे उपचार करेल. 4 मग जी तरुणी तुम्हाला
अधिक प्रसन्न करेल ती वश्तीच्या जागी राणी केली जाईल.” या
सूचनेने राजा अतिशय संतुष्ट झाला आणि त्याने ती योजना अंमलात
आणली. 5 बिन्यामीन वंशातील कीशाचा पुत्र शिमीचा पुत्र याईर,
याचा पुत्र मर्दखय हा यहूदी मनुष्य शूशन राजवाड्यात कामास होता.
6 बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरने यरुशलेमातील यहूदीयाचा राजा
यकोन्याह च्याबरोबर व इतर अनेकांना बाबेलला बंदिवासात नेले, तेव्हा
मर्दखय यालाही पकडून नेले. 7 मर्दखयाला एक चुलतबहीण होती, तिचे
नाव हदस्साह होते, जिला त्याने वाढविले होते, कारण तिला आईवडील
नव्हते. या तरुणीस एस्तेरही म्हणत असत, जी बांधेसूद व देखणी
होती. एस्तेरचे आईवडील मरण पावल्यामुळे मर्दखयने तिला आपल्या
कुटुंबात स्वत:च्या मुलीसारखे वाढविले होते. 8 जेव्हा आता राजाची
आज्ञा जाहीर करण्यात आली, तेव्हा अनेक तरुण कुमारिका शूशन
राजवाड्यातील अंत:पुरात आणण्यात आल्या व हेगाइच्या देखरेखीत

ठेवण्यात आल्या. एस्तेरलाही राजवाड्यात आणून अंत:पुराचा अधिकारी
हेगाइच्या देखरेखीत ठेवण्यात आले. 9 एस्तेरला पाहून अंत:पुराचा
अधिकारी हेगाइची कृपादृष्टी तिच्यावर झाली; आणि लगेचच तिच्यासाठी
त्याने सौंदर्यप्रसाधनांची व खास भोजनपदार्थांची व्यवस्था केली.
राजवाड्यातील सात दासी तिच्या तैनातीला त्याने दिल्या व तिला
त्यांच्यासह अंत:पुरातील सर्वात उत्तम दालनात हालविले. 10 एस्तेरने
आपले राष्ट्रीयत्व व कौटुंबिक माहिती कोणालाही सांगितली नाही,
कारण मर्दखयाने तिला ते सांगू नये असे बजावले होते. 11 एस्तेरची
विचारपूस करण्यासाठी आणि तिच्या बाबतीत पुढे काय घडते हे जाणून
घेण्यासाठी, मर्दखय दररोज अंत:पुराच्या अंगणाजवळ येजा करीत असे.
12 अहश्वेरोश राजाच्या शयनमंदिरात नेण्यापुर्वी प्रत्येकीवर बारा महिने
सौंदर्यप्रसाधनांचे उपचार करण्यात येत, सहा महिने गंधरसाच्या तेलाचा
उपचार व सहा महिने खास सुवासिक द्रव्ये व प्रसाधनांचा उपचार केला
जाई. 13 मग जेव्हा प्रत्येक तरुणी राजाकडे जाई तेव्हा: वस्त्रांची व
अलंकारांची अंत:पुरातून आपल्या इच्छेप्रमाणे निवड करून राजमहालात
नेण्याची तिला मोकळीक होती. 14 तिला संध्याकाळी नेण्यात येई
आणि दुसऱ्या दिवशी सकाळी राजाच्या उपपत्नी राहत, त्या अंत:पुराच्या
दुसऱ्या भागात ती जाई. तिथे ती राजाच्या खोजांपैकी शाशगज नावाच्या
खोजाच्या देखरेखीखाली असे. राजाने तिचे नाव घेऊन तिला परत
बोलाविले नाही, तर राजाकडे तिला पुन्हा पाठविले जात नसे. 15
राजाकडे जाण्याची एस्तेरची (मर्दखयाने दत्तक घेतलेली, त्याचे काका
अबीहाईलच्या कन्याची) पाळी आली, तेव्हा तिने अंत:पुराचा प्रमुख
हेगाइचा सल्ला स्वीकारून त्याच्या सूचनेप्रमाणे वस्त्रे परिधान केली
आणि ज्यांनीही तिला पाहिले, त्यांची कृपादृष्टी तिच्यावर झाली. 16 तेव्हा
एस्तेरला अहश्वेरोश राजाच्या महालात त्याच्या कारकिर्दीच्या सातव्या
वर्षाच्या दहाव्या म्हणजे, तेबेथ महिन्यात नेण्यात आले. 17 इतर सर्व
स्त्रियांपेक्षा राजाने एस्तेरवर अधिक प्रीती केली, त्याने तिला इतर सर्व
कुमारिकांपेक्षा जास्त पसंत केले, तो तिच्यावर इतका प्रसन्न झाला की
त्याने तिच्या मस्तकांवर राणीचा राजमुकुट ठेवला आणि वश्तीच्या जागी
एस्तेरला राणी केले. 18 हा प्रसंग साजरा करण्यासाठी, राजाने आपल्या
सर्व अधिकाऱ्यांना व सेवकांना एस्तेरसाठी एक भव्य मेजवानी दिली.
त्यावेळी त्याने सर्व प्रांतांत रजा जाहीर केली आणि शाही उदारतेने
देणग्या दिल्या. 19 त्यानंतर जेव्हा सर्व कुमारिका पुन्हा एकत्र आणल्या
गेल्या, मर्दखय राजमहालाच्या व्दारात बसला होता. 20 एस्तेरने आपले
राष्ट्रीयत्व व कौटुंबिक माहिती मर्दखयाच्या सूचनेनुसार कोणालाही
सांगितली नव्हती. कारण मर्दखयाच्या घरी असताना ती ज्याप्रमाणे
आज्ञा पाळीत असे, त्याचप्रमाणे ती अद्यापही त्याच्या आज्ञा पाळीत
होती. 21 एके दिवशी मर्दखय राजवाड्याच्या द्वारात बसलेला असताना,
राजाचे दोन अधिकारी बिग्थान व तेरेश, जे राजवाड्याच्या द्वारी द्वारपाल
होते, ते राजावर संतापले आणि अहश्वेरोश राजाचा वध करण्याचा त्यांनी
कट केला. 22 मर्दखयाने या कटाची माहिती शोधून काढली व ती
बातमी त्याने एस्तेर राणीला कळवली. तिने ती राजास कळवली आणि
मर्दखयाकडून कटाची माहिती मिळाल्याचे त्याला सांगितले. 23 जेव्हा
तपास करण्यात आला तेव्हा ते दोन अधिकारी दोषी असल्याचे आढळून
आले, तेव्हा त्यांना सुळावर चढविण्यात आले. हे सर्व वृत्त राजाच्या
समक्षतेत कारकिर्दीच्या इतिहासग्रंथात नोंदण्यात आले.

**3** त्यानंतर अहश्वेरोश राजाने अगागी हम्मदाथाचा पुत्र हामानाचा
बहुमान करून त्याची इतर प्रतिष्ठितांपेक्षा सर्वश्रेष्ठ म्हणून नेमणूक
केली. 2 आता राजाज्ञेप्रमाणे राजद्वारावरील सर्व अधिकारी हामानाला
अतिशय आदराने गुडघे टेकवून मुजरा करू लागले. परंतु मर्दखयाने
गुडघे टेकवून मुजरा करण्याचे नाकारले. 3 मग राजद्वारावरील सर्व
अधिकारी मर्दखयाला विचारू लागले, "तू राजाची आज्ञा का पाळीत
नाहीस?" 4 दररोज लोक त्याला सांगत असत, परंतु तरीही त्याने ते
करण्याचे नाकारले. शेवटी त्याला या राजाज्ञेपासून सूट मिळू शकते
की काय हे पाहण्यासाठी ते हामानाशी बोलले, कारण आपण यहूदी
असल्याचे मर्दखयाने त्यांना सांगितले होते. 5 जेव्हा हामानाने पाहिले
की मर्दखया गुडघे टेकवित नाही व मुजराही करीत नाही, तेव्हा त्याला
अतिशय संताप आला. 6 परंतु मर्दखया कोणत्या समाजातून आला
आहे हे कळल्यावर, एकट्या मर्दखयावर हात टाकण्याचा विचार त्याला
कमीपणाचा वाटला. याउलट अहश्वेरोश राजाच्या संपूर्ण साम्राज्यातील
मर्दखयाच्या समाजाच्या सर्व लोकांचा म्हणजे यहूद्यांचा नायनाट
करण्याचा हामान मार्ग शोधू लागला. 7 अहश्वेरोश राजाच्या कारकिर्दीच्या
बाराव्या वर्षाच्या निसान महिन्यात, हामानाच्या समक्षतेत, योग्य दिवस
व महिना कोणता हे ठरविण्यासाठी पूर (चिठ्ठ्या) टाकण्यात आल्या.
चिठ्ठ्यांद्वारे या कामासाठी बारावा, अदार महिना निवडण्यात आला. 8
आता हामान अहश्वेरोश राजास म्हणाला, "सर्व प्रांतात एका विशिष्ट
जातीचे लोक विखुरलेले आहेत, जे स्वत:ला इतरांपासून वेगळे ठेवतात.
त्यांचे रीतिरिवाज इतर लोकांपासून भिन्न आहेत, हे लोक राजाचे
कायदे पाळत नाहीत; म्हणून या लोकांचे असे वागणे सहन करणे
राजाच्या हिताचे नाही. 9 जर हे राजास योग्य वाटले तर, या लोकांचा
नाश करण्याची राजाज्ञा देण्यात यावी, म्हणजे दहा हजार तालांत
चांदी मी स्वत: राजाच्या खजिन्यात भरेन." 10 तेव्हा राजाने आपल्या
बोटातील मुद्रा काढून ती यहूद्यांचा शत्रू, अगागी लोकातील हम्मदाथाचा
पुत्र हामानाच्या स्वाधीन केली. 11 राजा हामानाला म्हणाला, "पैसे
तुझ्याजवळच ठेव व या लोकांचे तुला योग्य वाटेल तसे कर." 12
नंतर पहिल्या महिन्याच्या तेराव्या दिवशी राजाच्या चिटणीसांना हजर
राहण्याचा हुकूम करण्यात आला. त्यांनी साम्राज्यातील प्रत्येक प्रांतात व
सर्व भाषेतून निरनिराळ्या राज्यपालांना आणि अधिकाऱ्यांना हामानाच्या
राजाज्ञेचा मजकूर लिहून घेतला. जी पत्रे लिहिलेली होती त्यांच्यावर
अहश्वेरोश राजाच्या नावाने राजमुद्रेची मोहर लावण्यात आली. 13 मग
ती पत्रे साम्राज्याच्या सर्व प्रांतांकडे संदेशवाहकांच्या हस्ते पाठविण्यात
आली. त्या पत्रांमध्ये अशी राजाज्ञा होती की, तरुण व वृद्ध, स्त्रिया व
मुले अशा सर्व यहूदी लोकांना—एकाच दिवशी, बारावा महिना, अदार
महिन्याच्या तेरा तारखेस ठार करण्यात यावे आणि त्यांच्या मालमत्तेची

लूट करणाऱ्यात यावी. 14 या राजाज्ञेचा उतारा प्रत्येक प्रांतात कायदा
म्हणून जाहीर केला जावा आणि प्रत्येक राज्यातील रहिवाशास त्याची
माहिती दिली जावी, म्हणजे नेमलेल्या दिवशी आपले कर्तव्य करण्यास
ते तयार राहतील. 15 राजाज्ञा प्रथम शूशन शहरात जाहीर करण्यात
आली, मग ती घेऊन संदेशवाहक निघाले. राजा आणि हामान मद्याची
मौज लुटण्यास बसले, पण शूशन शहरात गोंधळ पसरून गेला.

**4** जेव्हा मर्दखयाला समजले, ज्या सर्व गोष्टी करण्यात आल्या होत्या,
तेव्हा त्याने आपली वस्त्रे फाडून, गोणपाट नेसून, अंगाला राख
फासून व बाहेर शहरात जाऊन मोठमोठ्याने व अतिशय दु:खाने विलाप
केला. 2 तो राजद्वारापर्यंतच जाऊ शकला, कारण गोणपाट पांघरूण
राजवाड्यात प्रवेश करण्याची कोणाला परवानगी नसे. 3 साम्राज्यातील
सर्व प्रांतांत जिथेही राजाज्ञा जाहीर झाली, तेथील यहूदी लोक उपवास व
अत्यंत विलाप करीत, रडून आक्रोश करू लागले. अनेकजण गोणपाट
नेसून राखेत पडून राहिले. 4 एस्तेरच्या दासींनी आणि खोजांनी
येऊन तिला मर्दखयाबद्दल सांगितले, तेव्हा ती अतिशय खिन्न झाली.
मर्दखयाने गोणपाट काढून वस्त्रे घालावी म्हणून तिने त्याच्याकडे वस्त्रे
पाठविली, परंतु त्याने ते घेण्याचे नाकारले. 5 मग एस्तेरने राजांच्या
खोजांपैकी जो एस्तेरच्या तैनातीला असे, त्या हथाकाला बोलाविणे
पाठविले. मर्दखयावर कोणते संकट गुदरले होते व तो असा का वागत
होता, या गोष्टीची चौकशी करण्यासाठी तिने त्याला बाहेर मर्दखयाकडे
पाठविले. 6 तेव्हा हथाक मर्दखयाला भेटण्यास राजद्वारासमोरील
शहराच्या चौकात गेला. 7 मर्दखयाने त्याला त्याच्या बाबत घडलेले
सर्वकाही सांगितले. यहूदी लोकांचा नाश करण्यासाठी जी धनराशी शाही
खजिन्यात देण्याचे वचन हामानाने दिले होते त्यासंबंधीही सांगितले. 8
मर्दखयाने त्याला शूशनमध्ये जाहीर करण्यात आलेली, सर्व यहूद्यांचा
नायनाट करण्याच्या राजाज्ञेची एक प्रतही दिली आणि ती प्रत एस्तेरला
दाखवून त्यासंबंधी सर्वकाही सविस्तर कळविण्यासही सांगितले. तसेच
एस्तेरला तिने राजाकडे जावे आणि तिच्या लोकांसाठी तिने राजाजवळ
दयेसाठी रदबदली करावी आणि त्याला विनवणी करावी, अशा सूचनेचा
निरोपही त्याने त्याच्याजवळ दिला. 9 मग हथाक परत आला व
त्याने एस्तेरला मर्दखयाने सांगितलेला अहवाल दिला. 10 एस्तेरने
हथाकाला मर्दखयाकडे पुढील निरोप देऊन पाठविले, 11 “राजाच्या सर्व
अधिकाऱ्यांना व शाही प्रांतातील लोकांना माहीत आहे की एखादी व्यक्ती,
मग ती पुरुष असो वा स्त्री, राजाच्या आतील चौकात बोलाविल्यावाचून
गेली, तर त्यांच्यासाठी एकच कायदा आहे: त्यांना प्राणदंड देण्यात
यावा. पण जर राजाने आपला सोन्याचा राजदंड त्यांच्यापुढे केला तरच
त्यांना जीवदान मिळते. आता तीस दिवस होऊन गेले आहे, पण राजाने
मला आपल्याकडे बोलावलेले नाही.” 12 तेव्हा एस्तेरचा हा निरोप
मर्दखयाच्या कानी घालण्यात आला. 13 मर्दखयाने हे प्रत्युतर एस्तेरला
पाठविले: “असा विचार करू नको की तिथे राजवाड्यात आहेस म्हणून
इतर सर्व यहूदी मारले जात असताना तू एकटी वाचशील. 14 अशा
प्रसंगी तू जर शांत राहशील, तर दुसऱ्या मार्गाने यहूदी लोकांकरिता
मुक्ती व उद्धार येईल, परंतु तू आणि तुझ्या वडिलाचे कुटुंब नाश पावेल.
पण कोणजाणे कदाचित अशाच प्रसंगासाठी तुला हे शाही पद मिळाले
असेल का?” 15 तेव्हा एस्तेरने मर्दखयाला हे उत्तर पाठविले: 16 “जा,
शूशन नगरातील सर्व यहूदी लोकांना एकत्र गोळा करून तुम्ही सर्वजण
माझ्यासाठी उपवास करा. तीन दिवस आणि तीन रात्री अन्न किंवा
पाणी पिऊ नका. मी आणि माझ्या दासीदेखील तुम्हासह उपवास करू.
मग यानंतर, हे कायद्याविरुद्ध असले तरीही मी राजाला भेटण्यासाठी
जाईन, आणि माझा नाश झाला तर होवो.” 17 तेव्हा मर्दखया तिथून
गेला व एस्तेरच्या सूचनेप्रमाणे सर्व त्याने केले.

**5** मग तिसऱ्या दिवशी एस्तेरने तिची शाही वस्त्रे परिधान केली
आणि ती राजमहालाच्या आतील अंगणात, राजदरबाराच्या अगदी
समोर, जाऊन उभी राहिली. राजा राजदरबारात आपल्या राजासनावर,
प्रवेशद्वाराच्या सन्मुख बसला होता. 2 जेव्हा त्याने एस्तेर राणी अंगणात
उभी आहे असे पाहिले, तिला बघून तो प्रसन्न झाला, तेव्हा त्याने
आपला सोन्याचा राजदंड तिच्या दिशेने पुढे करून तिचे स्वागत केले,
म्हणून एस्तेर जवळ गेली आणि तिने राजदंडाच्या टोकास स्पर्श केला.
3 मग राजाने तिला विचारले, “एस्तेर राणी, तुला काय हवे आहे? तुझी
काय मागणी आहे? मी तुला सांगतो की ती मागणी अर्ध्या राज्याची
असली, तरी मी ती पुरवेन!” 4 त्यावर एस्तेरने उत्तर दिले, “महाराजांच्या
मर्जीस आले, तर मी तयार केलेल्या मेजवानीला आपण व हामानाने
आज यावे, अशी माझी इच्छा आहे.” 5 “जा, हामानाला लगेच घेऊन
या.” राजा म्हणाला, “म्हणजे एस्तेर जे सांगते ते करता येईल.” मग
राजा व हामान एस्तेरने तयार केलेल्या मेजवानीला गेले. 6 मेजवानीत
मद्य पुरविले जात असताना राजा परत एस्तेरला म्हणाला, “आता
तुझी काय विनंती आहे? ते तुला देण्यात येईल. तुला काय पाहिजे?
तुझी मागणी अर्ध्या राजाची असली, तर ती पूर्ण करण्यात येईल.”
7 एस्तेर उत्तरली, “माझी याचना आणि माझी मागणी ही आहे: 8
महाराजांची मजवर कृपा असेल आणि आपण मजवर प्रसन्न असाल
तर, माझी विनंती मान्य करा, आपण उद्या पुन्हा हामानाला बरोबर
घेऊन आपल्यासाठी मी तयार करणार असलेल्या मेजवानीला यावे;
आणि मग उद्या मी महाराजांच्या प्रश्नाचे उत्तर देईन.” 9 मेजवानीवरून
घरी परतल्यावर हामान खूपच आनंदात होता. परंतु राजवाड्याच्या
दाराजवळ बसलेल्या मर्दखयास बघितले व आपल्यासमोर तो उठून
उभा राहिला नाही, घाबरला नाही, हे पाहून हामान संतापाने भरून गेला.
10 तरी, हामानाने स्वत:ला आवरले व तो घरी गेला. त्याने आपले मित्र व
आपली पत्नी जेरेश यांना एकत्र बोलाविले. 11 त्यांच्यापुढे आपल्या
संपत्तीची, आपल्या अनेक मुलांची, राजाने दिलेल्या बहुमानाची आणि
संपूर्ण राज्यात इतर प्रतिष्ठित व अधिकाऱ्यांपेक्षा आपण सर्वात उच्च
कसे झालो या सर्वांची हामान बढाई मारू लागला. 12 मग हामान
पुढे म्हणाला, “आणि एवढेच नव्हे, एस्तेर राणीने आज राजाबरोबर
केवळ मलाच तिने तयार केलेल्या मेजवानीला बोलाविले होते आणि
उद्याही पुन्हा आम्हाला तिच्या मेजवानीचे आमंत्रण आहे!” 13 परंतु मी

राजद्वारासमोर बसणाऱ्या व मला मुजरा करण्याचे नाकारणाऱ्या यहूदी
मर्दखयाला पाहतो, तेव्हा ते मला मुळीच समाधान देत नाही. 14 तेव्हा
त्याची पत्नी जेरेश हिने आणि त्याच्या सर्व मित्रांनी त्याला सुचविले,
“पन्नास हात उंचीचा एक खांब तयार करून घ्या आणि सकाळीच
मर्दखयाला त्या खांबावर देण्याची परवानगी राजाजवळ मागून घ्या. हे
साध्य करून घेतल्यावर, राजाबरोबर खुशाल आनंदाने मेजवानीला जा.”
या सूचनेने हामान प्रसन्न झाला आणि त्याने खांब तयार करून घेतला.

**6** त्या रात्री राजाला झोप येईना, म्हणून त्याने राज्याच्या इतिहासाचा
ग्रंथ मागविला, त्याच्या कारकिर्दीचा इतिहास आणण्यात आला व
त्याचे वाचन करण्यात येऊ लागले. 2 ग्रंथाचे वाचन चालू असताना,
राजवाड्याचे दोन खोजे, द्वाररक्षक बिग्थाना व तेरेश यांनी अहश्वेरोश
राजाचा वध करण्याचा कट मर्दखय याने कसा उघडकीस आणला
होता, ही संपूर्ण हकिकत नोंदविण्यात आल्याचे कळले. 3 तेव्हा राजाने
विचारले, “याबद्दल मर्दखयाचा सन्मान करण्यात आला होता का?”
“त्याच्यासाठी काही करण्यात आले नाही,” सेवकांनी उत्तर दिले. 4
राजाने विचारले, “राजदरबारात कोण आहे?” त्याचवेळी हामानाने
नुकताच राजदरबाराच्या बाहेरच्या चौकात प्रवेश केला. आपण उभ्या
केलेल्या सुळावर मर्दखयाला फाशी देण्याची परवानगी राजापाशी
मागण्यासाठी तो आलेला होता. 5 तेव्हा राजदरबारी उत्तरले, “हामान
राजदरबारात उभा आहे.” “त्याला आत आणा,” राजाने फर्माविले.
6 मग हामान आत आल्यावर, राजाने त्याला विचारले, “जर एखाद्या
मनुष्याला बहुमान देण्यात राजाला संतोष वाटत असल्यास काय
करावयाला हवे?” आता हामानाने स्वतःबद्दल विचार केला, “राजाच्या
मर्जीत सन्मानास योग्य असणारा माझ्याशिवाय दुसरा कोण असेल?”
7 म्हणून हामानाने राजाला उत्तर दिले, “जर एखाद्या मनुष्याला बहुमान
देण्यात राजाला संतोष वाटत असल्यास, 8 राजाने स्वतः परिधान
केलेला पोशाख व राजाने स्वारी केलेला घोडा मागवावा आणि राजमुकुट
त्याच्या मस्तकावर ठेवावा. 9 आणि राजाच्या अत्यंत थोर सरदाराला तो
पोशाख व घोडा द्यावा. आणि राजा ज्याचा सन्मान करू इच्छितो त्याच्या
अंगावर ते कपडे चढवावे, आणि त्याच्यापुढे हे जाहीर करीत जावे,
‘राजाला जे प्रसन्न करतात, त्यांचा सन्मान राजा अशा रीतीने करतो!’”
10 राजाने हामानाला फर्माविले, “आता त्वरा कर आणि माझा पोशाख
आणि माझा घोडा घे आणि तू सांगितलेस अगदी त्याप्रमाणे राजद्वारी
बसणारा यहूदी मर्दखयाच्या बाबतीत कर. तू सुचवलेल्या कोणत्याही
बाबीकडे दुर्लक्ष करू नको.” 11 मग हामानाने राजाचा पोशाख व
घोडा घेतला व तो पोशाख मर्दखयाला घातला, राजाच्या घोड्यावर
बसवून, शहराच्या रस्त्यांमधून त्याला मिरवणुकीने नेले आणि त्यावेळी
त्याच्यापुढे तो ललकारत होता, “जे राजाला प्रसन्न करतात, त्यांचा
अशा रीतीने सन्मान केला जातो.” 12 नंतर मर्दखय राजद्वारी परत
आला, परंतु हामान घाईघाईने, आपले मस्तक अत्यंत शोकाने झाकून
घरी परतला. 13 मग हामानाने घडलेल्या गोष्टीची संपूर्ण हकिकत त्याची
पत्नी जेरेश व त्याच्या सर्व मित्रांना सांगितली. त्याचे सल्लागार व पत्नी
जेरेश त्याला म्हणाले, “मर्दखय यहूदी असेल, तर तुमचे अधःपतन सुरू
झाले आहे. तुम्ही त्याच्याविरुद्ध कधीही यशस्वी होणार नाही—आता
तुमचा निश्चितच नाश होणार!” 14 ते त्याच्याबरोबर ही चर्चा करीत
असतानाच, राजाचे खोजा आले व एस्तेरने तयार केलेल्या मेजवानीस
हामानाला घाईघाईने घेऊन गेले.

**7** मग राजा व हामान एस्तेर राणीच्या मेजवानीला गेले. 2 दुसऱ्या
दिवशी ते मद्य पीत असताना, राजाने परत एस्तेरला विचारले,
“एस्तेर राणी, तुझी विनंती काय आहे? ती तुला देण्यात येईल. तुझी
मागणी काय आहे? ती अर्ध्या राज्याची असली तरी, पूर्ण करण्यात
येईल.” 3 तेव्हा एस्तेर राणीने उत्तर दिले, “महाराज, जर मी तुमची कृपा
संपादन केली असेन, आणि महाराजांच्या मर्जीला येत असेन, तर माझे
प्राण वाचवा—हीच माझी विनंती आहे, आणि माझ्या लोकांचे—ही
माझी मागणी आहे. 4 कारण मी व माझे लोक, आमचा नाश, कत्तल व
नामशेष करणाऱ्यांना विकले गेलो आहोत. स्त्री व पुरुषांची केवळ गुलाम
म्हणून विक्री झाली असती, तर कदाचित मी गप्प राहिले असते. त्यामुळे
राजास कष्ट देण्याची गरज पडली नसती.” 5 तेव्हा अहश्वेरोश राजाने
एस्तेर राणीला विचारले, “तो कोण आहे? कुठे आहे तो—जो असे
काही करण्याचे धाडस करेल?” 6 त्यावर उत्तर देत एस्तेर म्हणाली, “हा
वैरी व शत्रू! हा दुष्ट हामान!” तेव्हा राजा आणि राणी यांच्यापुढे हामान
अत्यंत भयभीत झाला. 7 हे ऐकताच राजा तीव्र संतापाने एकदम उठला
आणि त्याचे मद्य सोडून बाहेर राजवाड्याच्या बागेत गेला. इकडे हामान,
राजाने आता आपले भवितव्य ठरविले आहे, हे ओळखून आपले प्राण
वाचवावे म्हणून एस्तेर राणीजवळ विनवणी करण्यासाठी तिथेच थांबला.
8 एस्तेर राणी ज्या आसनावर रेलून बसली होती, त्या आसनावर हामान
वाकलेला होता आणि नेमक्या त्याच क्षणी राजवाड्याच्या बागेत गेलेला
राजा परतला. तेव्हा संतापाने राजा ओरडला, “अरे, ती माझ्यासह इथे
घरात असताना देखील हा राणीवर बलात्कार करू पाहतो काय?”
राजाच्या मुखातून हे शब्द बाहेर पडताक्षणी राजसेवकांनी हामानाचा
चेहरा झाकून टाकला. 9 मग राजाच्या खोजापैकी हरबोना नावाचा सेवक
म्हणाला, “महाराज, पन्नास हात उंचीचा खांब हामानाच्या घराजवळ
उभा करण्यात आला आहे. राजाला मदत करण्यासाठी ज्या मर्दखयाने
सूचना दिली होती, त्याला फाशी देण्यासाठी याने तो तयार करवून
घेतलेला आहे.” तेव्हा राजा म्हणाला, “त्यावर यालाच फाशी द्या!” 10
त्याप्रमाणे त्यांनी हामानाला मर्दखयासाठी तयार केलेल्या खांबावर
फाशी दिले. तेव्हा राजाचा क्रोध शांत झाला.

**8** त्याच दिवशी अहश्वेरोश राजाने यहूद्यांचा शत्रू हामानची मालमत्ता
एस्तेर राणीला दिली. नंतर मर्दखयाला राजापुढे आणण्यात आले,
कारण एस्तेरने मर्दखया कसा आपला नातेवाईक आहे राजाला सांगितले
होते. 2 तेव्हा राजाने हामानापासून परत घेतलेली आपली मुद्रा मर्दखयाला
दिली. व एस्तेरने त्याला हामानाच्या मालमत्तेचा कारभारी नेमले. 3 आता
पुन्हा एकदा एस्तेर राजाच्या पायांवर पडून व अश्रू ढाळून तिने राजाजवळ

विनवणी केली. यहूद्यांच्या विरुद्ध अगागी हामानाने केलेली दुष्ट योजना
स्थगित करावी, अशी तिची मागणी होती. 4 राजाने पुन्हा आपली सोनेरी
राजदंड एस्तेरपुढे धरला, तेव्हा ती उठली आणि त्याच्यासमोर उभी
राहिली. 5 ती म्हणाली, “महाराज, आपल्या मर्जीस येत असेल व मजवर
आपली कृपादृष्टी असेल, व ते योग्य वाटत असेल, आणि आपण मजवर
प्रसन्न असाल तर, सर्व प्रांतांतील यहूद्यांचा नायनाट करण्याविषयीचा
अगागी हम्मदाथाचा पुत्र हामानाचा हुकूम रद्द करणारे फर्मान काढून
ते सर्वत्र पाठविण्यात यावे. 6 कारण माझ्या लोकांची कत्तल आणि
नायनाट झालेला पाहणे, मला कसे सहन होईल? माझ्या कुटुंबाचा नाश
पाहणे मी कसे सहन करेन?” 7 मग अहश्वेरोश राजा एस्तेर राणीला
आणि यहूदी मर्दखयाला म्हणाला, “कारण हामानाने यहूद्यांवर हल्ला
केला, म्हणून मी हामानाची संपत्ती एस्तेरला दिली आहे आणि त्याला
त्यानेच उभ्या केलेल्या फासावर लटकावले. 8 आता तुम्ही राजाच्या
नावाने यहूद्यांच्या वतीने तुम्हाला योग्य वाटेल तशी दुसरी राजाज्ञा
लिहा आणि त्यावर राजाची मोहोर लावा—कारण राजाच्या नावाने
लिहिलेले व राजाची मोहोर लावलेले पत्र कधीही रद्द होत नाही.” 9 तेव्हा
ताबडतोब राजाच्या चिटणीसांना बोलाविण्यात आले—तो तिसऱ्या,
म्हणजे सिवान महिन्याचा, तेविसावा दिवस होता. त्यांनी मर्दखयाने
भारतापासून कूशपर्यंतच्या 127 प्रांतातील यहूद्यांना, प्रांतप्रमुखांना,
राज्यपालांना, व प्रतिष्ठितांना पाठविण्यासाठी फर्मान लिहून घेतले.
राज्यातील विविध लोकांच्या विविध भाषांमधून व लिप्यांमधून, तसेच
यहूद्यास त्यांच्या भाषेत व लिपीत ते फर्मान लिहिण्यात आले. मर्दखयाने
अहश्वेरोश राजाच्या नावाने पत्र लिहून, ते बंद करून त्यावर राजाच्या
मुद्रेची मोहोर लावली. मग ती पत्रे राजाच्या निरोपासाठी वापरले जाणारे
खास वाढविलेले वेगवान घोडे, यांच्या स्वारांबरोबर पाठविली. 11 या
फर्मानाद्वारे सर्व नगरात राहत असलेल्या यहूद्यांना आपल्या प्राणाच्या व
कुटुंबाच्या रक्षणार्थ एकजूट होण्याची व त्यांचा नाश, कत्तल व नायनाट
करण्यासाठी त्यांच्यावर हल्ला करणाऱ्या, कोणत्याही राज्याच्या व
प्रांताच्या सशस्त्र लोकांना, त्यांच्या स्त्रिया व लेकरांना नष्ट करून त्यांची
घरेदारे घेण्याची परवानगी देण्यात आली. 12 हे सर्व करण्यासाठी
अहश्वेरोश राजाच्या सर्व प्रांतांसाठी एक दिवस म्हणजे बारावा म्हणजे
अदार महिन्याचा तेरावा दिवस निवडण्यात आला. 13 त्या पत्राच्या
प्रतिद्वारे प्रत्येक प्रांतातील सर्व जातीच्या नागरिकांना कळविण्यात आले,
हे फर्मान सर्वत्र कायदा म्हणून मान्य करण्यात यावे की आपल्या
शत्रूचा सूड घेण्यासाठी या दिवशी यहूदी लोक सज्ज राहतील. 14
अशा रीतीने संदेशवाहकांनी शाही वेगवान घोड्यांवर स्वार होऊन व
राजाज्ञेनुसार राज्यात सर्वत्र पत्र नेले. हे फर्मान शूशन राजवाड्यात
काढण्यात आले. 15 जेव्हा मर्दखया राजाच्या उपस्थितीतून बाहेर गेला,
तेव्हा त्याने निळ्या व पांढऱ्या रंगांची राजकीय वस्त्रे परिधान केले होते
व डोक्यावर सोन्याचा मोठा मुकुट ठेवून आणि व जांभळ्या रंगाचा व
तलम वस्त्राचा झगा घातला होता. आणि शूशन शहरात आनंदोत्सव
साजरा करण्यात आला. 16 यहूद्यांकरिता हा समय उल्लास व आनंद,
हर्ष व सन्मान साजरा करण्याचा होता. 17 राजाचे फर्मान ज्या प्रत्येक
शहरात आणि प्रत्येक प्रांतात जाऊन पोहोचले तेव्हा तेथील सर्व यहूद्यांनी
मेजवान्या देऊन उत्सव साजरा करून आपला हर्ष व उल्हास प्रकट
केला. इतर देशातील अनेक लोक यहूदी बनले, कारण यहूदी आपला
जबरदस्तीने ताबा घेतील अशी त्यांना भीती वाटली.

9 बाराव्या म्हणजे अदार महिन्याच्या तेराव्या दिवशी, राजाची दोन्हीही
फर्माने अंमलात यावयाची होती. त्या दिवशी यहूद्यांचे शत्रू यहूद्यांना
धुळीस मिळविण्याची आशा बाळगून होते. परंतु प्रत्यक्षात अगदी उलटेच
घडले. सर्व प्रांतांतील यहूदी लोक, त्यांना उपद्रव देणाऱ्यांना वरचढ
झाले. 2 त्या शत्रूपासून संरक्षण व्हावे म्हणून अहश्वेरोश राजाच्या सर्व
प्रांतांतील यहूदी लोक आपआपल्या शहरांमध्ये एकत्र आले. परंतु
त्यांना कोणीही उपद्रव दिला नाही, कारण सर्व जातीच्या लोकांना
यहूद्यांची धास्ती वाटू लागली होती. 3 सर्व प्रांतांच्या अधिपतींनी म्हणजे
राज्यपाल, प्रांतप्रमुख, प्रतिष्ठित व सरकारी कर्मचाऱ्यांनी यहूद्यांनाच
मदत केली, कारण ते मर्दखयाच्या भीतीने ग्रासून गेले होते. 4 मर्दखया
राजवाड्यात एक महत्त्वाचा व्यक्ती होता; त्याची किर्ती सर्व प्रांतात
पसरली होती व तो आता अत्यंत प्रबळ झालेला होता. 5 त्या नेमलेल्या
दिवशी यहूदी लोकांनी आपल्या शत्रूंची कत्तल करून संहार केला व
त्यांचा नाश केला आणि जे त्यांचा तिरस्कार करीत असत, त्यांना
आवडेल तसे वागविले. 6 यहूद्यांनी शूशन राजधानीत पाचशे पुरुष
ठार करून नष्ट केले. 7 त्यांनी यहूद्यांचा शत्रू म्हणजे हम्मदाथाचा पुत्र
हामानच्या पर्शन्दाथा, दलफोन, अस्पाथा, पोराथा, आदल्या, अरीदाथा,
पर्मश्ता, अरीसई, अरीदय व वैजाथा या दहा पुत्रांनाही ठार केले. परंतु
त्यांनी त्यांच्या मालमत्तेवर हात टाकला नाही. 11 शूशन राजधानीत ठार
झालेल्यांची संख्या राजाला त्याच दिवशी कळविण्यात आली, 12 तेव्हा
त्याने एस्तेर राणीला बोलाविले व तो म्हणाला, “शूशन राजधानीतच
यहूद्यांनी पाचशे लोक ठार केले आहेत आणि हामानाच्या दहा पुत्रांचाही
संहार केला आहे. तर राज्याच्या इतर प्रांतात त्यांनी काय केले असेल?
आता तुझी काय मागणी आहे? ते तुला दिले जाईल. तुझी काय
विनंती आहे? ते देखील करण्यात येईल.” 13 तेव्हा एस्तेर म्हणाली,
“महाराजांच्या मर्जीस येत असेल तर, येथे शूशन शहरातील यहूद्यांना
उद्याही राजाज्ञेप्रमाणे करण्याची परवानगी द्यावी आणि हामानाच्या
दहा पुत्रांची प्रेते खांबावर टांगण्यात यावी.” 14 तेव्हा राजाने हे सर्व
करण्याची आज्ञा दिली. फर्मान शूशन शहरात प्रसिद्ध करण्यात आले व
हामानाच्या दहा पुत्रांची प्रेते खांबावर लटकविण्यात आली. 15 मग
अदार महिन्याच्या चौदाव्या दिवशी शूशन शहरातील यहूदी एकत्र गोळा
झाले व त्यांनी शूशन शहरात आणखी तीनशे पुरुष ठार केले. परंतु
त्यांनी कोणाच्या मालमत्तेला हात लावला नाही. 16 इकडे राजाच्या सर्व
प्रांतातील इतर यहूदी लोक स्वतःच्या संरक्षणार्थ एकवटले आणि त्यांनी
आपल्या सर्व शत्रूंचा संहार केला. त्यांनी पंचाहत्तर हजार लोकांचा वध
केला. परंतु त्यांनी कोणाच्या मालमत्तेला हात लावला नाही. 17 हे अदार
महिन्याच्या तेराव्या दिवशी घडले, मग चौदाव्या दिवशी त्यांनी विश्रांती

घेतली आणि हा दिवस मेजवान्या व आनंद करून साजरा केला. 18
परंतु शूशन शहरातील यहूदी तेराव्या व चौदाव्या दिवशी एकत्र आले
व पंधराव्या दिवशी त्यांनी विश्रांती घेतली आणि हा दिवस मेजवान्या
व आनंद करून साजरा केला. 19 आणि म्हणूनच नगराच्या ग्रामीण
भागातील यहूदी लोक अदार महिन्याच्या चौदाव्या दिवशी आनंद करून
व एकमेकांना भेटी देऊन उत्सव साजरा करतात. 20 मर्दखयाने या
सर्व घटनांची नोंदणी केली आणि अहश्वेरोश राजाच्या दूर व जवळ
असलेल्या सर्व प्रांतांतील यहूद्यांना पत्रे पाठविली. 21 या पत्रांच्या द्वारे
अदार महिन्याच्या चौदाव्या व पंधराव्या दिवशी वार्षिक आनंदोत्सव
म्हणून जाहीर केला. 22 कारण त्या दिवशी यहूदी लोकांचे त्यांच्या
शत्रूपासून रक्षण झाले आणि त्यांच्या दुःखाचे हर्षात आणि त्यांच्या
शोकाचे आनंदोत्सवात रूपांतर झाले. आणि हा दिवस मेजवान्या देऊन
व एकमेकांना सर्व प्रकाराच्या भेटी देऊन व गोरगरिबांना दानधर्म करून
आनंदाने साजरा करावा असे त्याने पत्राद्वारे त्यांना कळविले. 23 तेव्हा
यहूदी लोकांनी मर्दखयाने लिहिल्यानुसार सूचना स्वीकारली आणि
हा उत्सव सुरू केला. 24 कारण अगागी हम्मदाथाचा पुत्र हामान,
यहूद्यांच्या शत्रूने सर्व यहूदी लोकांचा विध्वंस करून नाश करण्यासाठी
पूर (चिठ्ठ्या) टाकून कट केला होता. 25 या कटाचे प्रकरण राजापुढे
आले, तेव्हा राजाने फर्मान काढले की यहूदी लोकांविरुद्ध रचलेला
हामानाचा कट त्याच्याच डोक्यावर उलटविण्यात यावा आणि मग
हामान व त्याचे पुत्र यांना फासावर लटकविण्यात यावे. 26 (म्हणून या
दिवसांना पूर वरून "पुरीम" हे नाव पडले.) जे घडले त्या सर्वांची या
पत्रात नोंद करण्यात आली, कारण जे काही घडले व जे सर्व त्यांनी
बघितले होते. 27 राज्यातील सर्व यहूद्यांनी हा उत्सव सुरू करण्यास व
आपल्या वंशजांनी आणि यहूदी होणाऱ्या सर्वांनी न चुकता प्रत्येक वर्षी
हे दोन दिवस योग्य वेळी साजरे करण्याचा संकल्प केला. 28 आणि
साम्राज्यातील प्रत्येक प्रांतात व शहरांमधील, प्रत्येक पिढीतील प्रत्येक
कुटुंबात यहूदी लोक हे दोन दिवस वार्षिक उत्सवाचे प्रसंग म्हणून साजरे
करतील. आणि हे पुरीम उत्सवाचे दोन दिवस साजरे करण्यास कधीही
चुकू नये—यहूदी वंशातून या दिवसांची आठवण कधीही पुसली जाऊ
नये. 29 दरम्यानच्या काळात, अबीहाईलची कन्या एस्तेर राणीने व
यहूदी मर्दखयासह आपल्या पूर्ण अधिकाराने पुरीमची सूचना देण्यासाठी
दुसरे पत्र लिहिले. 30 याशिवाय, यहूदी मर्दखयाने अहश्वेरोश राजाच्या
साम्राज्यातील सर्व एकशे सत्तावीस प्रांतातील यहूद्यांना सदिच्छा व्यक्त
करणारी पत्रे पाठविली. 31 एस्तेर राणी व यहूदी मर्दखयाने यांनी
पुरस्कृत केलेल्या पुरीम सणाचे हे दोन दिवस वार्षिक सण म्हणून साजरे
करण्याचे फर्मान काढले, ज्याप्रकारे राष्ट्रीय उपासाचा आणि प्रार्थनेचा
सण पाळल्या जातो, त्याच प्रकारे पुरीमचा सणही पाळण्यात यावा.
32 अशा रीतीने एस्तेरच्या आज्ञेने या दोन दिवसांच्या तारखा निश्चित
करण्यात झाल्या आणि ग्रंथात त्यांची नोंद झाली.

**10** अहश्वेरोश राजाने आपल्या संपूर्ण साम्राज्याच्या मुख्य भूमीवर
व समुद्रकिनाऱ्यावरील बेटांवर कर लावला. 2 मर्दखय यहूदीस
उच्चपद प्रदान केले, मर्दखयाची थोरवी, त्याची महान कृत्ये आणि
त्याचप्रमाणे त्याला राजाकडून प्राप्त झालेले सन्मान यांची साद्यंत
हकिकत मेदिया व पर्शियाच्या राजाच्या इतिहासग्रंथात लिहिलेली नाही
काय? 3 खुद्द अहश्वेरोश राजाच्या खालोखाल मर्दखयचे पद होते. अर्थात्,
तो यहूदी लोकांमध्ये अतिशय थोर होता आणि त्याचे सर्व देशबांधव
त्याचा फार आदर करीत, कारण तो आपल्या लोकांचे कल्याण व्हावे
म्हणून खूप झटत असे व त्यांच्या हितासाठी रदबदली करीत असे.

# इय्योब

1 ऊस नावाच्या देशात इय्योब नावाचा एक मनुष्य राहत होता. तो
निर्दोष आणि सरळ; परमेश्वराचे भय धरणारा व पापापासून दूर
राहणारा असा होता. 2 त्याला सात पुत्र व तीन कन्या होत्या, 3
त्याच्याजवळ सात हजार मेंढ्या, तीन हजार उंट, पाचशे बैलजोड्या,
पाचशे गाढवे आणि पुष्कळ नोकरचाकरही होते. तो पूर्वेकडील सर्व
लोकात अत्यंत महान पुरुष होता. 4 त्याचे पुत्र त्यांच्या वाढदिवसाच्या
दिवशी त्यांच्या घरी मेजवानी देत असत, त्यावेळी ते आपल्या तीनही
बहिणींना मेजवानीचे आमंत्रण देत असत. 5 या भोजनसमारंभाचा
कालावधी आटोपल्यावर इय्योब त्यांच्या शुद्धीकरणाची व्यवस्था करी.
तो पहाटेस उठून त्या सर्वांकरिता होमार्पणाचा यज्ञ करी; कारण तो
विचार करीत असे, "न जाणो माझ्या लेकरांनी पाप केले असेल आणि
आपल्या अंतःकरणात परमेश्वराला शाप दिला असेल." असा इय्योबाचा
नित्यक्रम असे. 6 एके दिवशी देवदूत याहवेहसमोर स्वतःला सादर
करण्यासाठी आलेले असताना सैतानही त्यांच्याबरोबर आला. 7
याहवेहने सैतानाला विचारले, "तू कुठून आला आहेस?" सैतानाने उत्तर
दिले, "पृथ्वीवर इकडून तिकडून सर्वत्र भटकून आलो आहे." 8 तेव्हा
याहवेहने सैतानाला विचारले, "माझा सेवक इय्योब याच्याकडे तू लक्ष
दिलेस का? तो निर्दोष आणि सरळ, परमेश्वराला भिऊन वागणारा व
वाईटापासून दूर राहणारा आहे; अखिल पृथ्वीवर त्याच्यासारखा तुला
कोणीही आढळणार नाही." 9 सैतानाने याहवेहला उत्तर दिले, "इय्योब
परमेश्वराचे भय विनाकारण बाळगतो काय? 10 आपण त्याचे घरदार व
जे सर्वकाही त्याचे आहे त्याभोवती कुंपण घातलेले नाही का? तुम्ही
त्याच्या हाताचे श्रम आशीर्वादित केले आहेत व देशात त्याचे कळप
आणि गुरे वृद्धी पावत आहेत. 11 परंतु आता आपला हात पुढे करून जे
सर्वकाही त्याचे आहे ते हिरावून घ्या आणि मग पाहा, आपल्या तोंडावर
तो आपल्याला खचितच शाप देईल." 12 याहवेहने सैतानाला म्हटले,
"ठीक आहे, मग सर्वकाही जे त्याचे आहे त्यावर तुला अधिकार दिला
आहे, मात्र त्या मनुष्याला तू हात लावू नये." तेव्हा सैतान याहवेहच्या
समक्षतेतून निघून गेला. 13 एके दिवशी इय्योबाचे पुत्र व कन्या आपल्या
वडील भावाच्या घरी भोजन करीत व द्राक्षारस पीत असता, 14 एक
निरोप्या इय्योबाकडे आला आणि म्हणाला, "बैल नांगरीत होते व
गाढवे जवळपास चरत होती, 15 एवढ्यात शबाई लोकांनी आक्रमण
करून त्यांना लुटून नेले आणि सर्व चाकरांना तलवारीने वधले. तुम्हाला
सांगण्यासाठी मीच एकटा सुटून आलो आहे!" 16 तो बोलतच असताना,
दुसरा एक निरोप्या आला व म्हणाला, "परमेश्वराचा अग्नी आकाशातून
आला, त्याने मेंढरे आणि चाकरे भस्म केले, तुम्हाला सांगण्यासाठी मीच
एकटा सुटून आलो आहे!" 17 तो बोलतच आहे इतक्यात, आणखी एक
निरोप्या आला आणि म्हणाला, "खास्द्यांनी तीन टोळ्या केल्या व उंटांवर
आक्रमण करून त्यांना घेऊन गेले; त्यांनी चाकरांना तलवारीने वधले, हे
तुम्हाला सांगायला मीच एकटा सुटून आलो आहे!" 18 तो बोलतच
असताना, आणखी एक निरोप्या आला व म्हणाला, "तुमचे पुत्र आणि
कन्या त्यांच्या वडील भावाच्या घरी मेजवानी करीत आणि द्राक्षारस
पीत असता, 19 वाळवंटातून अचानक प्रचंड वारा आला आणि त्या
घराचे चारही कोपरे हादरले. त्यामुळे ते घर त्यांच्यावर कोसळले आणि
ते मरण पावले; हे तुम्हाला सांगायला मीच एकटा सुटून आलो आहे!"
20 हे ऐकताच इय्योब उठला आणि त्याने आपला झगा फाडला आणि
डोक्यावरून वस्तरा फिरविला. नंतर जमिनीवर पडून त्याने उपासना
केली 21 आणि म्हणाला: "आईच्या उदरातून मी नग्न आलो, आणि
नग्नच मी परत जाईन, याहवेहने दिले आणि याहवेहने परत घेतले; त्या
याहवेहचे नाव धन्यवादित असो." 22 या सर्व बाबतीत, इय्योबाने पाप
केले नाही किंवा परमेश्वराने अयोग्य केले असा दोष त्यांच्यावर लावला
नाही.

2 पुन्हा एके दिवशी देवदूत याहवेहसमोर स्वतःला सादर करण्यास
येऊन उभे राहिले; आणि त्यांच्याबरोबर सैतानही स्वतःला सादर
करण्यास याहवेहसमोर येऊन उभा राहिला. 2 आणि याहवेहने सैतानाला
विचारले, "तू कुठून आलास?" सैतानाने याहवेहला उत्तर दिले, "मी
पृथ्वीवर इकडून तिकडून सर्वत्र भटकून आलो आहे." 3 तेव्हा याहवेहने
त्याला विचारले, "मग माझा सेवक इय्योब याच्याकडे तुझे लक्ष गेले
का? पृथ्वीवर त्याच्यासारखा कोणी नाही; तो निर्दोष आणि सरळ,
परमेश्वराला भिऊन वागणारा आणि वाईटापासून दूर राहणारा मनुष्य
आहे. विनाकारण त्याचा नाश करण्यास जरी तू मला उत्तेजित केलेस,
तरी त्याने त्याच्या प्रामाणिकतेला दृढ धरून ठेवले आहे." 4 सैतानाने
याहवेहला उत्तर दिले, "त्वचेसाठी त्वचा! मनुष्याचे जे सर्वकाही आहे ते
तो आपल्या स्वतःच्या जिवासाठी देईल. 5 परंतु आता, आपला हात
पुढे करून त्याच्या हाडामांसाला लावून तर पाहा, म्हणजे तो खचितच
तुमच्या तोंडावर तुम्हाला शाप देईल." 6 त्यावर याहवेहने सैतानाला
म्हटले, "ठीक आहे, तो तुझ्या हातात आहे; मात्र तू त्याचा जीव वाचू दे."
7 मग सैतान याहवेहच्या समक्षतेतून निघून गेला आणि त्याने इय्योबाला
तळपायापासून त्याच्या डोक्यापर्यंत वेदनादायक गळवांनी पीडले, 8
तेव्हा इय्योबाने स्वतःचे अंग खाजविण्यासाठी एक फुटलेली खापर
घेतली आणि तो राखेमध्ये जाऊन बसला. 9 तेव्हा त्याची पत्नी त्याला
म्हणाली, "तुम्ही अजूनही सत्याला धरून आहात काय? परमेश्वराला
शाप द्या आणि मरून जा!" 10 यावर इय्योब म्हणाला, "तू एखाद्या मूर्ख
स्त्रीसारखी बोलत आहेस, परमेश्वरापासून सुखच घ्यावे आणि दुःख घेऊ
नये काय?" या सर्व गोष्टीत, इय्योबाने आपल्या शब्दाद्वारे पाप केले
नाही. 11 जेव्हा इय्योबाचे तीन मित्र एलीफाज तेमानी, बिल्दद शूही
व सोफर नामाथी यांनी इय्योबावर आलेल्या संकटांविषयी ऐकले, ते
आपआपल्या घरून निघाले; इय्योबाकडे आपण मिळून जावे व त्याला
सहानुभूती दाखवून त्याचे सांत्वन करावे असे त्यांनी एकमताने ठरविले.
12 त्यांनी इय्योबाला दुरून पाहिले, तेव्हा ते त्याला ओळखू शकले
नाहीत; मग ते मोठ्याने रडू लागले, त्यांनी आपले झगे फाडले आणि
आपल्या डोक्यावर धूळ घातली. 13 मग ते त्याच्याबरोबर सात दिवस व

सात रात्री जमिनीवर बसून राहिले. कोणी एक शब्दही त्याच्याबरोबर
बोलले नाही, कारण इय्योबाचे दु:ख फार मोठे आहे, हे त्यांना कळले
होते.

**3** यानंतर, इय्योबाने आपले तोंड उघडले आणि आपल्या जन्मदिवसाला
शाप दिला. 2 तो म्हणाला: 3 “माझा जन्मदिवस नष्ट होवो, आणि
‘पुत्र गर्भधारण झाले!’ असे ज्या रात्रीने म्हटले, 4 तो दिवस अंधकार
असा होवो; वर राहणाऱ्या परमेश्वरासही त्याचे ध्यान न राहो; त्या
दिवसावर प्रकाश न पडो. 5 होय, खिन्नता व संपूर्ण काळोख त्यावर
पुन्हा आपला हक्क गाजवो; त्यावर ढग वास्तव्य करून राहो; काळोख
त्यावर मात करो. 6 त्या रात्रीला अंधकार जप्त करो; वर्षाच्या दिवसात
त्याची गणती न होवो कोणत्याही महिन्यांमध्ये त्याची गणती न होवो. 7
ती रात्र उजाड होवो; आणि आनंदाचा गजर त्यातून ऐकू न येवो. 8 जे
दिवसाला शाप देतात, जे लिव्याथानाला चेतविण्यास तयार असतात, ते
त्याला शापित करोत. 9 त्या रात्रीचे तारे अंधकारमय होवोत; दिवसाच्या
प्रकाशाची ती व्यर्थ वाट पाहो आणि पहाटेचा पहिला किरण तिच्या
दृष्टीस न पडो, 10 कारण तिने माझ्यावर गर्भाशयद्वार बंद केले नाहीत
आणि दु:खाला माझ्या डोळ्याआड केले नाही. 11 “मी जन्माला आलो
तेव्हाच का नाश पावलो नाही? गर्भाशयातून निघताच माझे प्राण का
गेले नाहीत? 12 माझे स्वागत करण्यास मांड्या का तयार होत्या आणि
मला दुग्धपान करावे म्हणून स्तन का तयार होते? 13 कारण मी तर
आता शांतपणे पडून निजलेला असतो; मी झोपेत विश्रांती पावलेला
असतो. 14 पृथ्वीवरील राजे आणि अधिकारी, ज्यांनी स्वत:साठी वाडे
बांधले ते आता ओसाड पडले आहेत, 15 ज्या राजपुत्रांच्या जवळ सोने
होते, ज्यांनी आपली घरे रुप्यांनी भरली. 16 अकाली पतन पावलेल्या
गर्भासारखे, दिवसाचा प्रकाश कधी न पाहिलेल्या अर्भकासारखे मला
जमिनीत गाडून का ठेवले नाही? 17 कारण तिथे दुष्ट त्रास देण्याचे
थांबवितात, आणि थकलेले लोक विसावा पावतात. 18 तिथे बंदिवान
देखील स्वस्थ असतात, कारण तिथे गुलामाच्या अधिकाऱ्याचे ओरडणे
ऐकू येत नाही. 19 लहान आणि मोठे तिथे असतात, आणि गुलाम
आपल्या धन्यापासून मुक्त झालेले असतात. 20 “जे कष्टात आहेत
त्यांना प्रकाश, आणि जे आत्म्यात कडू आहेत त्यांना जीवन का द्यावे, 21
ते मृत्यूची उत्कट इच्छा करतात पण ते येत नाही, गुप्त धनापेक्षा अधिक
ते मृत्यूला शोधतात, 22 जेव्हा ते कबरेत पोहोचतात, तेव्हा ते आनंदाने
भरतात, आणि उल्हास पावतात. 23 ज्याचा मार्ग गुपित आहे, ज्याला
परमेश्वराने सुरक्षित ठेवले आहे अशा मनुष्याला जीवन का दिले आहे?
24 उसासे हे माझे रोजचे अन्न झाले आहे; माझे कण्हणे पाण्याप्रमाणे
ओतले जात आहे. 25 ज्याचे मला भय वाटत होते, तेच माझ्यावर चालून
आले आहे; जे भयानक तेच माझ्याकडे आले आहे. 26 मला शांती नाही,
स्वस्थता नाही; मला विश्रांती नाही, पण केवळ अस्वस्थता आहे.”

**4** एलीफाज तेमानीने उत्तर दिले: 2 “जर कोणी तुझ्याशी बोलण्याचा
प्रयत्न केला, तर तू धीराने ऐकशील का? परंतु बोलल्याशिवाय
कोणाच्याने राहवेल? 3 तू अनेक जणांना कसे शिकवलेस, तू दुर्बल
हात कशाप्रकारे सबळ केलेत याचा विचार कर. 4 तुझ्या शब्दांनी
अडखळलेल्यांना आधार दिला आहे; आणि लटपटणारे गुडघे तू स्थिर
केले आहेस. 5 परंतु आता तुझ्यावर संकट आले आणि तू निराश
झालास; तुझ्यावर आघात झाला आणि तू भयभीत झालास. 6 तुझी
भक्ती हा तुझा आत्मविश्वास नसावा काय आणि तुझे निर्दोष मार्ग
तुझी आशा असू नयेत काय? 7 “विचार कर: निरपराधी असून, कधी
कोणी नष्ट झाले आहेत का? सज्जनांचा नाश झाला आहे का? 8
मी असे पाहिले आहे की, जे दुष्टाईची नांगरणी करतात आणि दु:ख
पेरतात तेच त्यांची कापणी करतात. 9 परमेश्वराच्या श्वासाने ते नष्ट
होतात; त्यांच्या क्रोधाची केवळ एक फुंकर त्यांना नाहीसे करते. 10
सिंह डरकाळी फोडतील आणि गर्जना करतील, तरी त्या बलिष्ठ सिंहाचे
दात मोडलेले आहेत. 11 भक्ष्याच्या अभावी सिंह नाश पावतो, आणि
सिंहिणीची पिल्ले पांगून जातात. 12 “गुप्तपणे मला वचन सांगण्यात
आले, माझ्या कानांनी त्याची कुजबुज ऐकली. 13 रात्रीच्या अस्वस्थ
स्वप्नात, जेव्हा लोकांना गाढ झोप लागते, 14 तेव्हा मी भयभीत झालो
आणि घाबरून त्रस्त झालो त्यामुळे माझी सर्व हाडे थरथरली. 15
माझ्या मुखासमोरून एक आत्मा गेला, आणि माझ्या अंगावर रोमांच
उभे राहिले. 16 तो थांबला, परंतु काय आहे ते मात्र मला समजेना.
त्याचा आकार माझ्या डोळ्यासमोर होता, आणि त्याचे कुजबुजणे मी
ऐकले: 17 ‘मनुष्य परमेश्वरापेक्षा नीतिमान असू शकतो काय? बलवान
मनुष्य त्याच्या उत्पन्नकर्त्यापेक्षा अधिक शुद्ध असू शकतो काय? 18
जर परमेश्वर आपल्या सेवकांवर भरवसा ठेवत नाही, जर तो आपल्या
दूतांवर दोषारोप करतो, 19 तर मग जे मातीच्या घरात राहतात, ज्यांचा
पाया धुळीत आहे, जे पतंगा समान चिरडले जातात, त्यांच्यावर परमेश्वर
भरवसा ठेवील काय? 20 पहाटेपासून संध्याकाळपर्यंत त्यांचे तुकडे
होतात; कोणाच्या लक्षात न येताच ते सर्वकाळासाठी नष्ट होतात. 21
त्यांनी ज्ञानाविनाच मरून जावे म्हणून, त्यांच्या डेऱ्याचे दोर आतूनच
कापले जात नाही काय?’

**5** “आता हाक मारून पाहा, परंतु तुला कोण उत्तर देणार? पवित्र
लोकांपैकी कोणाकडे तू वळशील? 2 क्रोध मूर्खाचा घात करतो,
आणि सामान्य मनुष्याचा मत्सराने घात होतो. 3 मी मूर्खाला मूळ
धरताना पाहिले, परंतु अचानक त्याचे घर शापित झाले. 4 त्यांची
मुलेबाळे सुरक्षित नाहीत, वेशीत ते चिरडली जातात व त्यांना सोडविणारा
कोणी नाही. 5 त्यांच्या कापणीचा हंगाम भुकेले खाऊन टाकतात
काट्याकुट्यातून सुद्धा ते काढून नेतात; आणि कारस्थानी त्यांच्या
धनाचा लोभ धरतात. 6 कारण कष्ट मातीतून वाढत नाही, आणि
संकट सुद्धा जमिनीतून उगवत नाहीत. 7 खरोखर जशा अग्नीच्या
ठिणग्या वर उडतात तसा मनुष्यही कष्टासाठी जन्मला आहे. 8 “मी
तुझ्या जागी असतो तर मी माझी बाजू परमेश्वरासमोर सादर केली
असती; त्यांच्यापुढे मी आपला वाद मांडला असता. 9 आकलन होऊ
शकत नाहीत अशी महान चिन्हे, व मोजता येत नाहीत अशी अगणित

अद्भुत कृत्ये ते करतात. 10 ते पृथ्वीला पावसाचा पुरवठा करतात;
आणि शेतांवर पाणी पाडतात. 11 नम्र लोकांना ते उंचस्थानी ठेवतात,
जे विलाप करतात त्यांना सुरक्षित स्थळी नेतात. 12 धूर्त लोकांच्या
हाताला यश येऊ नये, म्हणून त्यांच्या योजना ते निष्फळ करतात, 13 ते
शहाण्या लोकांस त्यांच्याच धूर्तपणात पकडतात, आणि कुटिलांच्या
बेतांचा शेवट करतात. 14 दिवस असतानाच अंधकार त्यांच्यावर येतो;
आणि रात्र असल्याप्रमाणे भर दुपारच्या प्रहरी ते चाचपडतात. 15
परंतु गरजवंताला त्यांच्या मुखातील तलवारीपासून; व बलवानांच्या
तावडीतून वाचवितात. 16 म्हणून दीन लोकांस आशा आहे, आणि
अन्याय आपले तोंड बंद करेल. 17 “परमेश्वर ज्याची सुधारणा करतात
तो धन्य; म्हणून सर्वसमर्थाचे शासन तू तुच्छ मानू नको. 18 कारण ते
जखम करतात आणि पट्टीसुध्दा तेच बांधतात; ते दुखापत करतात, परंतु
त्यांचाच हात आरोग्य देतो. 19 सहा संकटातून ते तुला वाचवतील;
आणि सातव्यात तुम्हाला कोणतेही अनिष्ट स्पर्श करणार नाही. 20
दुष्काळामध्ये परमेश्वर तुला मरणापासून वाचवतील; युद्धकाळात ते
तुला तलवारीच्या प्रहारापासून वाचवतील. 21 जिभेच्या तडाख्यापासून
तू सुरक्षित राहशील, विनाश आल्यावर तुला भय बाळगण्याचे नाही.
22 विनाश व दुष्काळ यांना तू हसशील, आणि हिंस्त्र पशूंचे भय तुला
वाटणार नाही. 23 कारण शेतातील पाषाणांशी तुझा करार होईल,
आणि वनपशू तुझ्याशी शांतीने राहतील. 24 तुझा तंबू सुरक्षित आहे हे
तू जाणशील; तपास करशील तेव्हा तुझ्या मालमत्तेतील काहीही गहाळ
झालेले तुला आढळणार नाही. 25 तुला बरीच संतती झाली आहे हे
तुला समजेल, आणि तुझे वंशज पृथ्वीवरील गवतासारखे होतील. 26
जशा हंगामाच्या वेळी धान्याच्या पेंढ्या गोळा करण्यात येतात, तसेच तू
कबरेत जाईपर्यंत तुझ्या शौर्याचा ऱ्हास होणार नाही. 27 “हे सर्व अगदी
सत्य आहे आणि याची आम्ही परीक्षा केली आहे. म्हणून माझा हा
सल्ला ऐकून त्याचा अंगीकार करून घे.”

**6** इय्योबाने उत्तर दिले: 2 “माझे क्लेश जर केवळ तोलून पाहिले
आणि माझी सर्व विपत्ती तागडीत घातली तर! 3 ते खचितच वजनाने
समुद्राच्या वाळूपेक्षा जास्त भरतील. म्हणूनच माझे शब्द उतावळेपणाचे
आहेत ह्यात काही आश्चर्य नाही. 4 सर्वसमर्थाचे बाण माझ्यात शिरले
आहेत, त्या बाणांचे विष माझा आत्मा पिऊन टाकतो; परमेश्वराचा
आतंक माझ्याविरुद्ध उभा आहे. 5 गवत मिळते तेव्हा रानगाढव ओरडते
काय, किंवा बैलापुढे चारा असतो तेव्हा तो हंबरतो काय? 6 बेचव
पदार्थ मिठावाचून खाता येतो काय, किंवा अंड्याच्या पांढऱ्या बलकाला
रुची असते काय? 7 त्याला मी स्पर्श करण्याचे नाकारतो; असे अन्न
मला आजारी बनवते. 8 “अहा! जर मी मागितलेले मला मिळाले,
ज्याची मी आशा करतो ते परमेश्वराने दिले, 9 की परमेश्वराने त्यांच्या
इच्छेनुसार मला चिरडून टाकावे, आपला हात ढिला सोडून माझ्या
जिवाचा नाश करावा! 10 तरीही हे मला सांत्वनच असणार— आणि
तीव्र क्लेशातही माझा आनंद असणार— कारण त्या परमपवित्रांची
वचने मी धिक्कारली नाहीत. 11 “मी आशा धरावी अशी माझ्यात
काय शक्ती आहे? माझ्यात असे काय आहे की मी धीर धरावा? 12
माझ्याठायी खडकाचे सामर्थ्य आहे काय? किंवा माझे शरीर कास्याचे
आहे काय? 13 आता यश माझ्यापासून दूर केले गेले आहे, मग माझ्यात
स्वत:ला मदत करण्यासाठी शक्ती आहे का? 14 “जो कोणी मित्रावर
दया करण्यापासून स्वत:स आवरतो त्याने सर्वसमर्थाचे भय सोडून दिले
आहे. 15 माझे बंधुजन खंडित झालेल्या ओढ्याप्रमाणे, वाहून जाणाऱ्या
ओहोळाप्रमाणे दगा देणारे आहेत 16 जो ओढा वितळणाऱ्या बर्फाने
अदृश्य होतो; आणि द्रवीकरण होत असलेल्या हिमामुळे तो फुगून
जातो, 17 तो तापला म्हणजे आटून जातो; उन्हाळयात तो आपल्या
जागीच नाहीसा होतो. 18 प्रवासी काफिले टवटवीत होण्यासाठी बाजूला
वळतात, परंतु ते ओसाड ठिकाणी जातात आणि नष्ट होतात. 19
तेमाच्या काफिल्यांनी पाण्याचा शोध केला, शबाच्या व्यापारी प्रवाशांनी
पाण्याची आशा धरली. 20 ते त्रस्त झाले, कारण त्यांना खात्री झाली
होती; केवळ निराश होण्यासाठी ते तिथे आले. 21 तुम्ही सुद्धा माझी
मदत करू शकत नाही असे सिद्ध झाले आहे; कारण अनर्थ पाहिला की
तुम्ही घाबरून जाता. 22 ‘माझ्यावतीने काहीतरी द्या, तुमच्या संपत्तीतून
माझी किंमत मोजून मला मुक्त करा, 23 माझ्या शत्रूच्या हातातून मला
सोडवा, किंवा निर्दयाच्या तावडीतून माझी सुटका करा,’ मी कधी असे
म्हटले का? 24 “मला शिकवा आणि मी शांत बसेन; मी कुठे चुकलो ते
मला सांगा. 25 सत्य बोलणे हे किती क्लेशदायक असते! परंतु तुमचे
वाद काय सिद्ध करतात? 26 तुम्ही मला शब्दात धरावयास पाहता का,
माझे निराशेचे शब्द वाऱ्यासारखे वाटतात का? 27 तुम्ही तर अनाथांवर
चिठ्ठ्या टाकण्यास व आपल्या मित्रांची विक्री करण्यास चुकत नाही.
28 “पण आता कृपा करून माझ्याकडे नीट पाहा. मी तुमच्या तोंडावर
तुमच्याशी लबाडी करेन, असे तुम्हाला वाटते का? 29 कळवळा येऊ
द्या, अन्याय करू नका; पुन्हा विचार करा, कारण माझी सत्यता पणास
लागली आहे. 30 माझ्या जिभेवर काही दुष्टपणा आहे काय? माझ्या
मुखाला अधर्माची पारख नाही काय?

**7** “या पृथ्वीवर मानवाला कठीण श्रम करावे लागत नाहीत का?
त्यांचे दिवस हे मोलकऱ्यासारखे नाहीत काय? 2 जसा गुलाम
उत्कंठेने संध्याकाळच्या छायेची उत्कंठेने वाट पाहतो, किंवा जसा मजूर
वेतनासाठी आशा लाऊन असतो, 3 त्याचप्रमाणे मला निष्फळतेचे
महिने दिले गेलेले आहेत, कष्टाच्या रात्री माझ्यासाठी नेमलेल्या आहेत.
4 मी झोपी जाण्याच्या वेळी विचार करतो, ‘उठण्यासाठी अजून किती
वेळ आहे?’ रात्र काही संपतच नाही, पहाटेपर्यंत मी तळमळत असतो.
5 माझे मांस किड्यांनी व खपल्यांनी आच्छादून गेले आहे; माझी त्वचा
फाटून चिघळत आहे. 6 “माझे दिवस विणकऱ्याच्या मागापेक्षा वेगवान
आहेत, आणि ते आशेविनाच संपतात. 7 हे परमेश्वरा माझे जीवन मात्र
श्वास आहे याची आठवण करा; माझे नेत्र पुन्हा कधीही सुख पाहणार
नाहीत. 8 जे मला आता पाहतात ते मला आणखी पाहणार नाहीत;
तुम्ही मला शोधाल पण मी अस्तित्वहीन असेन. 9 ढग जसे विरळ
होऊन नाहीसे होतात, त्याचप्रमाणे जो कबरेत जातो तो कधीही परत

येत नाही. (Sheol h7585) 10 तो आपल्या घरी परत कधीही येणार नाही; त्याचे वसतिस्थान त्याला पुन्हा ओळखणार नाही. 11 “म्हणून मी शांत राहणार नाही; मी आपल्या आत्म्याचा खेद उघड करून सांगेन, माझ्या जिवाच्या कडूपणात मी गाऱ्हाणे करेन. 12 मी सागर किंवा खोल पाण्यातील विक्राळ जलचर आहे का, की तुम्ही माझ्यावर पहारा करावा? 13 जेव्हा मला वाटते की माझे अंथरूण मला समाधान देईल, आणि माझा पलंग माझे गाऱ्हाणे हलके करेल, 14 तेव्हा सुद्धा तुम्ही मला स्वप्नांनी घाबरवितात आणि दृष्टान्तांनी मला भेडसावतात, 15 असे की या माझ्या शारीरिक स्थितीपेक्षा, गळा दाबून मरणे मला बरे वाटते. 16 मी आपल्या जिवाचा तिरस्कार करतो; मी सर्वकाळ जगणार नाही. मला एकटे असू द्या; माझ्या जीवनाला काही अर्थ नाही. 17 “मानव तो काय की तुम्ही त्याला इतके महत्त्व द्यावे, व आपले चित्त त्याच्यावर ठेवावे, 18 दररोज सकाळी त्याची परीक्षा घ्यावी आणि प्रत्येक क्षणाला त्याची पारख करावी? 19 माझ्यावरची तुमची नजर कधीही वळवणार नाही का, एकही क्षण मला एकटे सोडणार नाही का? 20 जर मी पाप केले, तर ज्या तुमची नजर लोकांवर लागलेली असते, त्या तुमचे मी काय केले? माझ्यावर नेम धरावा म्हणून तुम्ही मला निशाणा करून का ठेवले आहे? मी तुम्हाला ओझे असे झालो आहे का? 21 माझ्या अपराधांची क्षमा करून माझ्या पापांची गय का करीत नाही? कारण लवकरच मी धुळीत पडणार आहे, तुम्ही माझा शोध कराल, परंतु मी अस्तित्वात नसेन.”

**8** तेव्हा बिल्दद शूहीने उत्तर दिले, 2 “कुठवर अशा गोष्टी तू बोलत राहशील? सोसाट्याच्या वाऱ्यासारखे तुझे शब्द आहेत. 3 परमेश्वर न्याय विपरीत करतात काय? सर्वसमर्थ जे योग्य आहे त्याचा विपर्यास करतात काय? 4 जेव्हा तुझ्या मुलांनी त्यांच्याविरुद्ध पाप केले, म्हणून परमेश्वराने त्यांच्या पापाची त्यांना शिक्षा केली. 5 परंतु जर तू मन:पूर्वक परमेश्वराला शोधशील आणि सर्वसमर्थाकडे विनवणी करशील, 6 जर तू शुद्ध व सरळ आहेस, आतासुद्धा ते तुझ्या वतीने उभे राहतील आणि तुला तुझ्या समृध्दीच्या स्थितीत पुनर्स्थापित करतील. 7 तुझा प्रारंभ लीन असला, तरी तुझे भावी आयुष्य समृद्धीचे होईल. 8 “पूर्वीच्या पिढ्यांना विचार आणि त्यांचे पूर्वज काय शिकले ते शोधून काढ, 9 कारण आपण तर केवळ काल जन्माला आलो आहोत आणि आपण काही जाणत नाही, आणि पृथ्वीवरील आपले दिवस केवळ सावलीच आहे. 10 आपले पूर्वज तुला बोध करून सांगणार नाहीत काय? त्यांच्या सुज्ञतेचे शब्द ते पुढे आणणार नाहीत काय? 11 लव्हाळ्याची चिखला वाचून वाढ होईल काय? वेत पाण्याविना भरभरून वाढेल काय? 12 तो वाढतो पण कापला जात नाही, गवतापेक्षा तो लवकर सुकून जातो. 13 जे सर्व परमेश्वराला विसरतात त्यांचा शेवट असाच होतो; देवहीन मनुष्याची आशा नष्ट होते. 14 ठिसूळ गोष्टींवर त्यांची भिस्त असते, ज्यावर ते अवलंबून राहतात ते मकडीच्या जाळासारखे आहे. 15 ते जाळ्यावर विसंबून राहतील, परंतु ते टिकून राहवयाचे नाही; ते त्याला बिलगतील, परंतु ते मजबूत राहत नाहीत. 16 सूर्यप्रकाशात भरपूर पाणी दिलेल्या रोपट्यासारखे ते होतात. त्यांच्या फांद्या बागेत सर्वत्र पसरतात. 17 त्याची मुळे दगडांच्या चोहो बाजूंना वेढतात. आणि त्यांच्यामध्ये आपली जागा शोधतात. 18 परंतु जेव्हा त्याला त्याच्या जागेवरून उपटून टाकले जाते, तर ती जागा त्याला नाकारून म्हणते, ‘मी तुला कधीही पाहिले नाही.’ 19 त्याचे जीवन खचित कोमेजून जाते, आणि मातीतून दुसरी रोपटे आनंदाने उगवतात. 20 “परंतु पाहा! जो निर्दोष आहे, अशाचा परमेश्वर धिक्कार करत नाही, किंवा दुष्कर्म्याचा हातही सबळ करत नाही. 21 परमेश्वर अजूनही तुझे मुख हास्याने, व तुझे ओठ आनंद घोषाने भरतील. 22 तुझे शत्रू लज्जा पांघरतील, आणि दुष्टांचे निवासस्थान अस्तित्वात राहणार नाही.”

**9** मग इय्योबाने उत्तर दिले, 2 “खरोखर, हे सत्य आहे हे मी जाणतो. परंतु सामान्य मनुष्य परमेश्वरासमोर आपली निर्दोषता कशी सिद्ध करेल? 3 त्याने जरी परमेश्वराशी वाद करण्याचे ठरविले, तरी हजारातून एकाचेही उत्तर त्याला देता येणार नाही. 4 त्यांचे ज्ञान अगाध व त्यांचे सामर्थ्य विशाल आहे. त्यांच्याशी विरोध करून कोण टिकला आहे? 5 ते पर्वतांना त्यांना नकळत त्यांच्या ठिकाणातून हलवितात, आणि आपल्या रागात त्यांना उलथून टाकतात. 6 ते पृथ्वीला तिच्या जागेवरून हालवितात, आणि तिचे स्तंभ डळमळीत करतात. 7 ते सूर्याशी बोलतात आणि तो प्रकाशित होत नाही; ते ताऱ्यांचा प्रकाश मुद्रित करतात. 8 तेच एकटे आकाश ताणून पसरवितात आणि समुद्राच्या लाटांवरून चालतात. 9 सप्तर्षी, मृगशीर्ष, कृत्तिका आणि दक्षिणेकडील नक्षत्रमंडळे यांचा तेच उत्पन्नकर्ता आहेत. 10 आकलन करू शकत नाही अशी अद्भुत कृत्ये; आणि मोजता येत नाहीत असे चमत्कार ते करतात. 11 ते माझ्या जवळून जातात; पण मी त्यांना पाहू शकत नाही; ते निघून जातात तरी मला आकलन होत नाही. 12 जर त्यांनी हिसकावून घेतले तरी त्यांना कोण थांबवेल? ‘तुम्ही काय करता,’ असे त्यांना कोण विचारणार? 13 परमेश्वर आपला क्रोध आवरत नाहीत; राहाबाच्या सैन्याची टोळी सुद्धा त्यांच्यापुढे गुडघे टेकते. 14 “तर मी त्यांच्याशी कसा वाद घालणार? त्यांच्याशी वाद घालण्यास शब्द मी कसे शोधू? 15 मी जरी निर्दोष असलो, तरी मी त्यांना उत्तर देणार नाही; मी केवळ माझ्या न्यायाधीशाजवळ दयेची भीक मागेन. 16 मी धावा केला असता तर त्यांनी प्रतिसाद दिला असता; तरी ते माझे ऐकतीलच अशी मला खात्री नाही. 17 वादळाने ते मला चेंगरून टाकतात आणि विनाकारण माझ्या जखमा वाढवतात. 18 ते मला श्वास घेऊ देत नाहीत, परंतु मला क्लेशांनी त्रस्त करतात. 19 जर बळाविषयी म्हटले तर, तेच बलवान आहेत! आणि जरी न्यायासंदर्भात म्हटले तर त्यांना कोण आव्हान देईल? 20 मी जरी निर्दोष असलो, तरी माझे मुख माझा निषेध करेल; मी दोषरहित असतो, तरी माझे मुख मलाच दोषी ठरवेल. 21 “मी जरी निर्दोष असलो, मला स्वत:बद्दल चिंता नाही; मी स्वत: माझे जीवन तुच्छ मानतो. 22 हे सर्व समानच आहे म्हणून मी म्हणतो, ‘निर्दोषी आणि दोषी या दोघांचाही ते नाश करतात.’ 23 जेव्हा एखादी पीडा अचानक मरण आणते, निरपराध्यांच्या निराशेचा ते उपहास करतात. 24 जेव्हा पृथ्वी दुष्टाच्या हाती जाते, ते न्यायाधीशांचे डोळे झाकतात. जर ते नाहीत, तर

मग कोण? 25 “माझे दिवस एखाद्या धावपट्टू पेक्षाही वेगवान आहेत;
आनंदाची झलक नसतानाच ते उडून जातात. 26 ते लव्हाळयाच्या
वेगवान तारवांसारखे, भक्ष्यावर झडप घालणाऱ्या गरुडासारखे निघून
जात आहेत. 27 मी जर म्हणालो की, ‘मी माझे गाऱ्हाणे विसरेन, माझे
भाव बदलून उल्हास करेन,’ 28 तरी माझ्यावर आणखी मोठी दु:खे
येतील; कारण हे परमेश्वरा, मला ठाऊक आहे की तुम्ही मला निर्दोष
ठरविणार नाही. 29 मी आधी दोषी ठरविला गेलो आहे, तर मग मी व्यर्थ
प्रयत्न का करावे? 30 जरी मी स्वत:ला साबणाने, आणि माझे हात
क्षाराने धुतले, 31 तरी देखील तुम्ही मला चिखलाच्या खड्ड्यात टाकाल,
आणि माझी वस्त्रे सुद्धा माझा तिरस्कार करतील. 32 “कारण ते
माझ्यासारखे मानव नाहीत की मी त्यांना उत्तर द्यावे, किंवा न्यायालयात
आम्ही समोरासमोर येऊन वाद घालू. 33 परंतु आमच्यामध्ये जर कोणी
मध्यस्थी करणारा असता, कोणी आम्हाला एकत्र आणणारा असता,
34 कोणीतरी परमेश्वराचा दंड माझ्यावरून काढावा, म्हणजे त्यांचा धाक
मला अजून भयभीत करणार नाही. 35 मग मी त्यांच्याशी निर्भयपणे
बोलेन, पण या घटकेला, मी ते करू शकत नाही.

**10** “मला माझ्या जिवाचा तिरस्कार आला आहे; म्हणून मनमोकळे
करून मी माझ्या जिवाच्या कडूपणाने बोलेन. 2 मी परमेश्वराला
म्हणेन: मला दोषी ठरवू नका, पण माझ्याविरुद्ध काय आरोप आहेत ते
मला सांगा. 3 माझा छळ करण्यात तुम्हाला आनंद वाटतो का, दुष्टांच्या
योजना पाहून तुम्ही हास्य पावता, आणि मी तुमची हस्तकृती आहे,
त्या मला तुम्ही झिडकारून देता? 4 तुम्हाला मानवी डोळे आहेत का?
मनुष्याप्रमाणे तुम्ही पाहू शकता का? 5 तुमचा जीवनक्रम मनुष्यासमान
आहे का, किंवा त्या बलवान मनुष्यासारखे तुमचे आयुष्य आहे, 6 म्हणून
तुम्ही माझे दोष शोधावेत आणि माझी पापे बारकाईने तपासून पाहावी;
7 मी दोषी नाही हे जरी तुम्हाला माहीत आहे आणि मला तुमच्या हातून
सोडविणारा कोणी नाही? 8 “तुमच्या हातांनी मला घडवून निर्माण
केले आहे. आणि तुम्हीच फिरून मला नष्ट करणार आहात काय? 9
तुम्ही मला मातीच्या कलशाप्रमाणे घडविले याचे स्मरण करा, पुन्हा
तुम्हीच मला धुळीत मिळविणार काय? 10 दुधाप्रमाणे तुम्ही मला
ओतले नाही का तरी दह्यासारखे तुम्हीच विरजवले आहे, 11 तुम्ही
मला त्वचा व मांस दिले, आणि हाडे व स्नायू यांनी मला जोडले नाही
का? 12 तुम्ही मला जीवन देऊन दया दाखविली, आणि तुमच्या निगेत
माझा आत्मा सुरक्षित राहिला. 13 “परंतु हे तुम्ही तुमच्या हृदयात
गुप्त ठेवले, आणि मला माहीत आहे की हे तुमच्या मनामध्ये होते: 14
मी जर पातक केले, तर तुमची नजर माझ्यावर आहे आणि माझ्या
पापांबद्दल शिक्षा दिल्यावाचून राहणार नाही. 15 जर मी दोषी असेन; तर
माझा धिक्कार असो! मी निष्पाप असलो, तरीसुद्धा मी माझे डोके उंच
करू शकत नाही, कारण मी लज्जेने व्याप्त झालो आहे आणि माझ्या
दु:खात बुडून गेलो आहे. 16 मी माझे मस्तक उंच करू लागलो, की
तुम्ही सिंहासारखी मजवर झडप घालणार आणि पुन्हा तुमच्या अद्भुत
शक्तीचे माझ्याविरुद्ध प्रदर्शन करणार. 17 तुम्ही माझ्याविरुद्ध नवीन
साक्षीदार आणता, आणि आपला क्रोध माझ्याविरुद्ध वाढविता; तुमचे
सामर्थ्य माझ्याविरुद्ध लाटांप्रमाणे एका पाठोपाठ येतात. 18 “मग तुम्ही
मला गर्भाशयातून बाहेर का आणले? कोणीही मला पाहण्यापूर्वी मला
मरण आले असते तर बरे झाले असते. 19 मी जर कधी अस्तित्वातच
आलो नसतो, किंवा गर्भाशयातून सरळ कबरेत गेलो असतो तर किती
बरे असते! 20 माझ्या थोड्या दिवसांची समाप्ती अजून झाली नाही
का? मला आनंदाचे क्षण उपभोगायला मिळावे म्हणून माझ्यापासून दूर
जा; 21 म्हणजे जिथून परत येणे होत नाही, जे अंधार आणि मृत्यूचे
स्थान, अशा ठिकाणी जाण्यापूर्वी, 22 जे मध्यरात्रीच्या काळोखासारखे
आहे, तिथे गाढ अंधकार व अव्यवस्था आहे, आणि तेथील प्रकाश सुद्धा
अंधकारासारखा असतो.”

**11** तेव्हा सोफर नामाथीने उत्तर दिले: 2 “हे सर्व शब्द निरुत्तरीत
राहतील काय? हा बडबडा मनुष्य न्यायी ठरेल काय? 3 तुझ्या
व्यर्थ गोष्टींनी लोक शांत होतील काय? तू उपहास करीत असताना,
कोणी तुझा निषेध करणार नाही का? 4 तू परमेश्वराला म्हणतोस,
‘माझा विश्वास अचूक आहे आणि मी तुमच्या दृष्टीने शुद्ध आहे.’ 5 अहा,
मला किती वाटते की परमेश्वराने बोलावे, आणि त्यांनी तुझ्याविरुद्ध
आपले तोंड उघडावे 6 आणि ज्ञानाचे रहस्य तुला प्रकट करावे, कारण
खऱ्या ज्ञानाला दोन बाजू आहेत. हे माहीत असू दे: की परमेश्वराने
तुझी काही पापे सोडली आहेत. 7 “परमेश्वराच्या रहस्याचा तुला थांग
लागेल काय? सर्वसमर्थाच्या मर्यादेचे तुला आकलन होईल का? 8
ती आकाशाहून उंच आहे; मग तू काय करशील? ती अधोलोकाहून
खोल आहे; तुला ते काय कळणार? (Sheol h7585) 9 त्यांचा विस्तार
पृथ्वीपेक्षा रुंद, आणि सागराहून ती अधिक विस्तृत आहे. 10 “जर
त्यांनी येऊन तुला बंदिवान केले व न्यायसभा बोलावली, तर त्यांना
कोण प्रतिबंध करू शकेल? 11 खरोखर ते फसविणाऱ्यास ओळखतात;
आणि जेव्हा ते दुष्टता पाहतात, तेव्हा ते दखल घेणार नाही का? 12 जसे
रानगाढवाचे शिंगरू मनुष्याचा जन्म घेऊ शकत नाही तसेच अक्कलशून्य
मनुष्य शहाणा होणार नाही. 13 “जर तू आपले हृदय परमेश्वराकडे
लावशील आणि त्यांच्याकडे आपले हात पसरशील, 14 तुझ्या हाती
असलेली पापे तू जर दूर करशील आणि आपल्या डेऱ्यात अन्याय राहू
देणार नाहीस, 15 तर दोषमुक्त असा, तू तुझे मुख वर करशील; तू स्थिर
आणि निर्भय असा उभा राहशील. 16 तुला खरोखर तुझ्या क्लेशांचा
विसर पडेल, केवळ वाहून गेलेल्या पाण्यासारखे ते तुला आठवतील. 17
तुझे जीवन मध्यानाच्या प्रकाशापेक्षा तेजस्वी होईल, आणि अंधकार
पहाटेसारखा होईल. 18 आशा प्राप्त झाल्याने तू निर्भय होशील; तू
तुझ्या सभोवती निरखून पाहशील आणि सुरक्षिततेत विश्रांती घेशील. 19
तू निर्भयपणे झोपशील, कोणी तुला घाबरवून टाकणार नाही, आणि
अनेकजण तुझ्या समर्थनाची अपेक्षा करतील. 20 परंतु दुष्टांची नजर
अंधुक होईल, आणि निसटून जाण्याचा मार्ग त्यांना आढळणार नाही;
मृत्यूची धाप हीच त्यांची आशा असेल.”

12 मग इय्योबाने उत्तर दिले, 2 "खचितच तुम्हीच ते विशिष्ट लोक
आहात, आणि ज्ञान तुमच्याबरोबरच नाहीसे होईल! 3 परंतु
मलाही तुमच्यासारखी बुद्धी आहे; मी तुमच्यापेक्षा कमी दर्जाचा नाही.
या सर्वगोष्टी कोणाला ठाऊक नाहीत? 4 "मी माझ्या मित्रांच्या चेष्टेचा
विषय बनलो आहे, मी परमेश्वराचा धावा केला आणि त्यांनी मला उत्तर
दिले— नीतिमान आणि निर्दोष असूनही मी केवळ चेष्टेचा विषय झालो
आहे! 5 सुखी मनुष्याला विपत्तीचा तिरस्कार वाटतो; मात्र ज्यांचे पाय
घसरतात त्यांच्यावर ती वार करते. 6 हिंसकांचे डेरे सुरक्षित असतात,
आणि जे परमेश्वराला चेतावणी देतात ते निर्भय राहतात— ते आपल्या
हातच्या सामर्थ्याला आपला देव समजतात. 7 "परंतु प्राण्यांना विचार,
ते तुला शिकवतील, किंवा आकाशातील पाखरे तुला सांगतील; 8
अथवा पृथ्वीशी बोलावे आणि ती तुला शिकवेल; किंवा सागरातील
माशांनी तुला माहिती देऊ दे. 9 या सर्वापैकी कोणासही ठाऊक नाही
का की याहवेहच्या हाताने हे केले आहे? 10 कारण प्रत्येक प्राण्याचा
जीव, आणि सर्व मानवजातीचा श्वास त्यांच्याच हातात आहे. 11 जशी
अन्नाची चव जिभेला समजते, तशीच शब्दांची पारख कान करीत नाहीत
का? 12 वयस्कांमध्ये ज्ञान आढळून येते की नाही? दीर्घ आयुष्याने
समज येते की नाही? 13 "ज्ञान आणि सामर्थ्य हे परमेश्वराचे आहेत;
सल्ला आणि समज त्यांचेच आहे. 14 ते जे पाडतात, ते पुन्हा बांधता
येत नाही; ते ज्याला बंदिवासात पकडतात, त्याला सुटका नाही. 15
परमेश्वराने जर पाऊस रोखून धरला, तर दुष्काळ पडतो; आणि त्याला
मोकळे सोडले, तर पृथ्वी उद्ध्वस्त होते. 16 पराक्रम आणि शहाणपण
ही त्यांची आहेत; फसणारे आणि फसविणारे दोन्हीही त्यांचेच आहेत.
17 ते मंत्र्यांना विवस्त्र करतात आणि न्यायाधीशांना मूर्ख ठरवितात.
18 राजांनी टाकलेली बेडी ते तोडून टाकतात आणि त्यांच्या कंबरेस
लंगोट बांधतात. 19 ते याजकांना अनवाणी चालावयास लावतात स्थिर
झालेल्या अधिकाऱ्यांना ते उलथून टाकतात. 20 विश्वासू सल्लागारांची
तोंडे ते बंद करतात आणि वडीलजनांचा विवेक काढून घेतात. 21 ते
सरदारांवर तिरस्कार ओततात, आणि सबळांना दुर्बल करतात. 22 ते
अंधारातील गुप्त गोष्टी प्रकट करतात आणि घोर अंधकाराला प्रकाशाने
उजळून टाकतात. 23 ते राष्ट्रांना महान करतात आणि त्याचा नाशही
करतात; ते राष्ट्रे विस्तृत करतात आणि त्यांचा नायनाट करतात. 24 ते
पृथ्वीवरील अधिकाऱ्यांची बुद्धी काढून घेतात; आणि त्यांना दिशाहीन
असे भटकण्यास लावतात. 25 ते अंधारात प्रकाशाविना चाचपडतात;
त्यांना मद्यपीसारखे लटपटण्यास लावतात.

13 "माझ्या नेत्रांनी हे सर्व पाहिले आहे, माझ्या कानांनी ते ऐकले
आणि समजले. 2 जे तुम्हाला माहीत आहे, ते मलाही माहीत
आहे; मी तुमच्यापेक्षा कमी दर्जाचा नाही. 3 पण मी सर्वसमर्थाशी बोलावे
आणि माझा वाद परमेश्वरासमोर मांडावा असे मी इच्छितो. 4 तुम्ही तर
मला लबाड्यांनी कलंकित करता; तुम्ही सर्व अयोग्य वैद्य आहात! 5
तुम्ही गप्प राहाल तर किती बरे होईल! कारण त्यातच तुमचे शहाणपण
आहे. 6 आता माझा वाद ऐकून घ्या; माझ्या ओठांच्या विनंतीकडे कान
द्या. 7 परमेश्वराच्या वतीने तुम्ही दुष्टतेने बोलणार का? त्यांच्याकरिता
तुम्ही कपटाचे भाषण कराल का? 8 तुम्ही त्यांना पक्षपात दाखविणार
का? परमेश्वराच्या वतीने त्यांचा वाद तुम्ही कराल काय? 9 त्यांनी जर
तुमची परीक्षा केली तर चांगले होईल काय? जसे मनुष्याला तसे तुम्ही
परमेश्वरालाही फसवू शकाल काय? 10 जर तुम्ही गुप्तपणे पक्षपात
कराल तर परमेश्वर तुमच्याकडून निश्चितच हिशोब मागेल. 11 त्यांचे
वैभव तुम्हाला भयभीत करीत नाही का? त्यांचे भय तुम्हावर पडणार
नाही का? 12 तुमच्या नीतिवचनांना राखेएवढेच मोल आहे; तुमचे रक्षण
हा मातीचा बचाव आहे. 13 "आता गप्प राहा व मला बोलू द्या; मग
माझ्यावर जे यावयाचे ते येवो. 14 मी स्वत:ला धोक्यात का टाकू आणि
माझे जीवन माझ्याच हातात का घेऊ? 15 जरी परमेश्वराने मला मारून
टाकले, तरीही मी त्यांच्यावर आशा ठेवेन; व खचितच त्यांच्यासमोर मी
माझ्या मार्गाचे समर्थन करेन. 16 खचितच ह्यातच माझी खरी मुक्ती
आहे, कारण कोणी देवहीन व्यक्ती त्यांच्यासमोर येण्याचे धाडस करणार
नाही! 17 मी जे सांगतो, ते लक्ष देऊन ऐका; माझे शब्द तुमच्या कानावर
पडू द्या. 18 मी माझा वाद तयार केला आहे, मला माहीत आहे की मी
दोषमुक्त ठरेन. 19 माझ्याविरुद्ध कोणी आरोप करेल काय? केलाच तर,
मी शांत राहीन आणि मरून जाईन. 20 "हे परमेश्वरा, मला या दोन गोष्टी
द्या, आणि मग मी तुमच्यापासून लपणार नाही: 21 माझ्यावरील आपला
हात दूर करा, आणि तुमच्या धाकाने मला आणखी घाबरवू नका. 22
मला आवाज द्या आणि मी उत्तर देईन, किंवा मी बोलेन आणि तुम्ही
मला उत्तर द्या. 23 मी किती चुका आणि पाप केलेत? माझे पाप आणि
माझे अपराध मला दाखवा. 24 तुम्ही आपले मुख का लपविता आणि
मला आपला शत्रू का मानता? 25 वाऱ्याने उडून जाणाऱ्या पानाला
तुम्ही छळणार का? कोरड्या भुशाचा तुम्ही पाठलाग करणार का? 26
कारण माझ्याविरुद्ध तुम्ही कटुत्वाच्या गोष्टी लिहिता, आणि माझ्या
तारुण्यातील पातकांची शिक्षा मला देता. 27 तुम्ही माझ्या पायात बेड्या
घालता; माझ्या पायांच्या तळव्यांना चिन्ह करून माझ्या सर्व मार्गावर
तुम्ही लक्ष ठेवले आहे. 28 "सडलेल्या वस्तूप्रमाणे, कसरीने खाल्लेल्या
वस्त्राप्रमाणे मनुष्य नष्ट होतो.

14 "स्त्रीपासून जन्मलेल्या मानवाचे जीवन, अल्पकालीन व त्रासाने
भरलेले आहे. 2 अशा फुलासारखे, जे फुलते आणि सुकून जाते;
क्षणभंगुर सावलीप्रमाणे ते जास्त काळ टिकत नाही. 3 अशा मानवांवर
तुम्ही आपली नजर लावता का? त्यांचा न्याय करण्यासाठी त्यांना
आपल्या उपस्थितीत आणणार का? 4 अशुद्धतेतून जे शुद्ध ते कोण
उत्पन्न करेल? कोणीही नाही! 5 मानवाचे दिवस ठरलेले आहेत; त्याच्या
महिन्यांची संख्या तुमच्या स्वाधीन आहे आणि त्याची नेमलेली मर्यादा
त्याला ओलांडता येत नाही. 6 रोजगाराच्या मजुराप्रमाणे त्याची वेळ
पूर्ण होईपर्यंत, आपली दृष्टी त्याच्यावरून काढून त्याला एकटे असू द्या.
7 "झाडाला देखील आशा असते: की त्याला कापून टाकले तरी ते पुन्हा
फुटणार, आणि त्याच्या नवीन फांद्या कोमेजणार नाहीत. 8 मातीत
त्याची मुळे जुनी झाली असली, आणि त्याचा बुंधा मातीत मृत झाला

असला, 9 तरी पाण्याच्या सुगंधाने ते फुलते आणि रोपट्याप्रमाणे,
त्याला पुन्हा कोंब फुटतात. 10 परंतु मनुष्य मरण पावतो व त्याला पुरले
जाते; तो आपला शेवटचा श्वास घेतो आणि नाहीसा होतो. 11 जसे
सरोवराचे पाणी आटते किंवा नदीचे पात्र आटून कोरडे होते, 12 तसा
मनुष्य पडल्यावर पुन्हा उठत नाही; आकाश नाहीसे होईपर्यंत लोक
पुन्हा उठणार नाहीत, ते झोपेतून जागे केले जाणार नाहीत. 13 “तुम्ही
केवळ मला कबरेमध्ये लपविले असते तुमचा क्रोध संपेपर्यंत मला गुप्त
ठेवले असते! आपण माझ्यासाठी समय नेमून ठेवावा आणि मग माझी
आठवण करावी! (Sheol h7585) 14 जर कोणी मेला तर पुन्हा जिवंत
होईल का? माझ्या सर्व कठीण श्रमाच्या दिवसात माझ्या सुटकेची मी
वाट पाहीन. 15 मग तुम्ही मला आवाज द्याल आणि मी तुम्हाला उत्तर
देईन; आपली हस्तकृती पुन्हा पाहावी असे तुम्हाला वाटेल. 16 तेव्हा
खचित आपण माझ्या पापांची नाही, तर माझ्या पावलांची मोजणी
कराल. 17 तुम्ही माझे अपराध एका थैलीत बंद करून; माझ्या पापांवर
पांघरूण घालाल. 18 “परंतु जसे पर्वत झिजतात व त्यांचा चुरा होतो,
आणि जसे खडक आपल्या ठिकाणातून ढळविले जातात, 19 जल
पाषाण झिजवून टाकते व पूर माती वाहून नेतो, त्याचप्रमाणे तुम्ही
मानवाची आशा नष्ट करता. 20 तुम्ही एकदाच मानवावर प्रबळ होता
आणि तो नाहीसा होतो; तुम्ही त्याचा चेहरा बदलता आणि त्याला दूर
पाठवून देता. 21 जरी त्याच्या संतानाचा सन्मान झाला, तरी त्याला
ते माहीत नसते; किंवा त्यांना नीच करण्यात आले, तरी ते त्याला
दिसत नाही. 22 त्यांना फक्त त्यांच्या शरीरातील दुःख जाणवते आणि
स्वतःसाठीच ते शोक करतात.”

**15** मग एलीफाज तेमानीने उत्तर देऊन म्हटले: 2 “सुज्ञ मनुष्य पोकळ
मताने उत्तर देईल का किंवा पूर्वेकडील गरम वाऱ्याने आपले पोट
भरणार काय? 3 कुचकामी शब्दांनी, आणि व्यर्थ भाषणाने ते वाद
घालतील काय? 4 परंतु तू तर धार्मिकता देखील कमी लेखतोस आणि
परमेश्वराच्या भक्तीत अडखळण आणतो. 5 तुझी पापे तुझ्या मुखाला
संकेत देतात; धूर्तांची जीभ तू अंगीकारतो. 6 माझे नव्हे, तर तुझे स्वतःचे
मुख तुला दोषी ठरविते; तुझे स्वतःचे ओठ तुझ्याविरुद्ध साक्ष देते. 7
“सर्व मानवजातीमध्ये तू प्रथम जन्मलेला आहेस का? पर्वत निर्माण
होण्यापूर्वी तू अस्तित्वात आला का? 8 परमेश्वराची मसलत तू ऐकतोस
काय? शहाणपणाचा ठेका तुझ्याकडे आहे का? 9 आम्हाला माहीत
नाही, अशी तुला काय माहिती आहे? आम्हाला आहे, त्याहून अधिक
कोणते ज्ञान तुला आहे? 10 केस पांढरे झालेले आणि वयोवृद्ध पुरुष
आमच्यामध्ये आहेत; जे तुझ्या वडिलांपेक्षाही अधिक वयाचे आहेत.
11 परमेश्वराचे सांत्वन आणि सौम्यतेचे शब्द तुझ्यासाठी पुरेसे नाहीत
का? 12 तुझ्या मनाने तुला का वाहवत नेले आहे, तुझे डोळे असे का
चमकतात, 13 यासाठी की आपला क्रोध तू परमेश्वरावर दाखवावा आणि
तुझ्या मुखातून असे शब्द ओतावे? 14 “मनुष्यप्राणी काय आहेत की ते
शुद्ध असावेत, किंवा स्त्रीपासून जन्मलेले नीतिमान असावेत? 15 जर
परमेश्वर आपल्या पवित्र जनांचाही देखील भरवसा करीत नाही, त्यांच्या
दृष्टीने जर प्रत्यक्ष स्वर्गदेखील शुद्ध नाही, 16 तर असत्य आणि भ्रष्ट
मनुष्य जो पाण्याप्रमाणे दुष्टता पितो, तो किती कमी दर्जाचा असावा! 17
“माझे लक्षपूर्वक ऐक, मी तुला स्पष्ट करून सांगतो; मी जे पाहिले आहे
ते तुला सांगू दे, 18 ज्ञानी लोकांनी जे त्यांच्या पूर्वजांपासून मिळविले,
त्यातील काहीच गुपित न ठेवता ते जाहीर केले, 19 (ज्यांना केवळ ही
भूमी देण्यात आली होती आणि त्यांच्यामध्ये कोणीही विदेशी नव्हता):
20 दुष्ट मनुष्य त्याच्या सर्व आयुष्यभर, तर निर्दयी मनुष्य त्याच्यासाठी
राखलेली सर्व वर्षे यातना सहन करतो. 21 त्याचे कान भयाच्या शब्दाने
भरतात; सर्वकाही चांगले असताना विध्वंसक त्याच्यावर हल्ला करतो.
22 अंधारातून सुटकेची आशा त्याला नाही; तलवारीसाठी त्याला नेमले
आहे. 23 गिधाडा सारखा तो आपल्या अन्नासाठी भटकतो; अंधकाराचा
दिवस जवळ आहे, हे त्याला माहीत आहे. 24 संकट व चिंता त्याला
घाबरे करतात; हल्ला करण्यास सज्ज झालेल्या राजासारखे ती त्याला
जेरीस आणतात, 25 कारण परमेश्वराकडे तो आपली मूठ फिरवितो
आणि सर्वसमर्थ्या विरुद्ध स्वतःची बढाई मिरवतो, 26 त्यांच्या विरोधात
अपमानाने जाड आणि मजबूत ढाल घेऊन तो दोष लावतो. 27 “कारण
या दुष्ट माणसाच्या अंगावर चरबी चढलेली आहे; त्याच्या कंबरेवर मांस
चढले आहे, 28 पडीक नगरांमध्ये तो वास्तव्य करेल, कोणी राहत
नाही अशा ठिकाणी, तुकडे पडलेल्या घरामध्ये त्याचा डेरा असेल. 29
त्याची श्रीमंती आणि त्याची संपत्ती टिकणार नाही, ना पृथ्वीवर त्याची
मालमत्ता वाढणार. 30 त्याला अंधकारातून सुटका नाही; अग्नीने त्याचा
अंकुर जळून जाईल, परमेश्वराचा मुखश्वास त्याला दूर वाहून नेईल. 31
निरर्थक धनावर विसंबून राहून त्याने स्वतःची फसवणूक करून घेऊ नये,
कारण त्याला त्याचा काही लाभ मिळणार नाही. 32 त्याच्या ठरलेल्या
वेळे आधी तो गळून जाईल, आणि त्याच्या फांद्या भरभराट पावणार
नाहीत. 33 न पिकलेले द्राक्ष झडून गेलेल्या द्राक्षवेलीसारखा, बहर
गाळून टाकत असलेल्या जैतुनाच्या झाडासारखा तो होईल. 34 कारण
देवहीनांचे सोबती निष्फळ होतील, आणि लाच घेणाऱ्यांचे डेरे अग्नी
जाळून टाकील. 35 ते क्लेशाची गर्भधारणा करतात आणि दुष्टतेला
जन्म देतात; आणि त्यांचे गर्भाशय कपट प्रसवते.”

**16** यावर इय्योब म्हणाला: 2 “अशा पुष्कळ गोष्टी मी ऐकल्या
आहेत; तुम्ही सर्व पोकळ सांत्वनकर्ते आहात! 3 तुमच्या या
लांबलचक भाषणांचा कधी शेवट होणार नाही का? तुम्हाला काय त्रास
होत आहे की तुम्ही सतत वाद घालावे? 4 तुम्ही माझ्या जागी असता,
तर मी सुध्दा तुमच्यासारखेच बोललो असतो; मीही तुमच्याविरुद्ध उत्तम
भाषण दिले असते आणि तुम्हाकडे पाहून माझे डोके हालविले असते.
5 परंतु माझे मुख तुम्हाला प्रोत्साहित करेल; तुम्हाला आराम मिळावा
म्हणून माझ्या ओठांनी मी तुमचे सांत्वन करेन. 6 “परंतु मी जरी बोललो
तरी, माझे दुःख कमी होत नाही; आणि जरी मी गप्प राहिलो तरी ते
जात नाही. 7 खचितच, हे परमेश्वरा, तुम्ही मला झिजवून टाकले आहे;
तुम्ही माझे घरदार उजाड केले आहे. 8 तुम्ही मला अगदी शुष्क असे
केले आहे—आणि तेच माझे साक्षीदार आहेत. माझी ओसाडी उठून

माझ्याविरुद्ध साक्ष देते. 9 परमेश्वर माझ्यावर तुटून पडतात आणि आपल्या क्रोधाने मला फाडून टाकतात, आणि माझ्यावर दात खातात; माझे विरोधी माझ्यावर कडक नजर लावून आहेत. 10 ते आपले मुख उघडून माझी थट्टा करतात; तिरस्काराने ते माझ्या गालावर मारतात. आणि माझ्याविरुद्ध एकजूट करतात. 11 परमेश्वराने मला देवहीनांच्या स्वाधीन केले आहे आणि दुष्टांच्या तावडीत सोपविले आहे. 12 मी सुखात राहत होतो, परंतु त्यांनी मला विखरून टाकले आहे. माझ्या मानेला पकडून त्यांनी माझा चुराडा केला आहे. त्यांनी मला त्यांचा निशाणा म्हणून केले आहे; 13 त्यांचे बाण माझ्या सभोवती आहेत. दया विरहित ते माझी आतडी छेदतात आणि माझे पित्त भूमीवर ओततात. 14 पुनः पुनः ते माझ्यावर हल्ला करतात; एखाद्या योद्ध्यांप्रमाणे ते माझ्यावर धावून येतात. 15 “मी गोणपाटाने माझे शरीर झाकले आहे आणि माझे डोके धुळीला मिळविले आहे. 16 रडून रडून माझा चेहरा लाल झाला आहे, आणि माझ्या डोळयांभोवती काळे डाग पडले आहेत. 17 तरीही माझ्या हातांनी जुलूम केला नाही आणि माझी प्रार्थना शुद्ध आहे. 18 “अगे पृथ्वी, माझे रक्त झाकून ठेवू नकोस; माझे रुदन कधीही विश्रांती न पावो! 19 तरी आतासुद्धा माझा साक्षीदार स्वर्गामध्ये आहे; माझा कैवारी उच्चस्थानी आहे. 20 माझा मध्यस्थ माझा मित्र आहे आणि परमेश्वरासमोर माझे नेत्र अश्रू गाळतात; 21 एखादा मनुष्य जसा आपल्या मित्रासाठी तसाच तो एका मनुष्याच्या वतीने परमेश्वराजवळ विनवणी करतो. 22 “केवळ काही वर्षे निघून जातील आणि फिरून परत येत नाही त्या वाटेने मी रवाना होईल.

**17** माझा आत्मा तुटून गेला आहे, माझ्या आयुष्याचे दिवस छाटले गेले आहे, कबर माझी वाट पाहत आहे. 2 खचितच थट्टा करणारे मला घेरून घेतात; त्यांच्या वैरभावावर माझी नजर लागली आहे. 3 “हे परमेश्वरा तुमच्या वचनानुसार माझ्याबरोबर करार करा. कारण मला जामीन आणखी कोण आहे? 4 तुम्ही त्यांचे मन सुज्ञतेस वंचित केले आहे; म्हणून तुम्ही त्यांना विजयी होऊ देणार नाही. 5 जे मोबदल्यासाठी आपल्या मित्रांचा घात करतात, त्यांच्या लेकरांचे डोळे अंध होतील. 6 “परमेश्वराने मला सर्वांसाठी थट्टेचा विषय केले आहे, असा मनुष्य, ज्याच्या तोंडावर लोक थुंकतात. 7 दुःखाने माझे डोळे अंधुक झाले आहेत; आणि माझे शरीर सावलीसारखे झाले आहे. 8 यामुळे प्रामाणिक लोक भयप्रद झाले आहेत; निर्दोष लोक देवहीनांवर उठले आहेत. 9 तरीही, नीतिमान आपल्या मार्गात स्थिर राहतील, आणि शुद्ध हृदयाचे लोक अधिक बलवान होत जातील. 10 “परंतु चला, तुम्ही सर्वजण पुन्हा प्रयत्न करा! तुमच्यात एकही बुद्धिमान मला सापडणार नाही. 11 माझे दिवस निघून गेले आहेत, माझ्या योजना विखुरल्या आहेत. परंतु माझ्या हृदयाची आशा भंगली नाही. 12 ते रात्रीला दिवसात बदलतात; आणि अंधारात असूनही दिवस जवळ आहे असे म्हणतात. 13 ज्या घराची मी आशा धरतो, ती जर कबर आहे, अंधकाराच्या राज्यात जर मी माझे अंथरूण पसरेल, (Sheol h7585) 14 जर कुजण्याला, ‘तू माझा पिता आहेस’ असे म्हटले आणि किडण्याला, ‘माझी आई’ किंवा ‘माझी बहीण’ म्हणेन, 15 तर मग माझी आशा कुठे आहे— आणि कोण माझ्यासाठी आशावादी असणार? 16 ती अधोलोकाच्या द्वारात जाणार का? आम्ही दोघेही धुळीमध्ये एकत्रच जाणार का?” (Sheol h7585)

**18** यावर बिल्दद शूहीने उत्तर दिले: 2 “ही अशी भाषणे तू कधी थांबविणार आहेस? जरा समजूतदारपणे घे आणि मग आपण बोलू. 3 आम्हाला जनावरांप्रमाणे का समजतोस तुझ्या नजरेत आम्ही मूर्ख आहोत का? 4 रागाने जो तू स्वतःला फाडतोस, त्या तुझ्यामुळे पृथ्वी ओसाड पडावी काय? किंवा खडक आपल्या ठिकाणातून कोसळू द्यावे काय? 5 “दुष्टांचा दिवा विझून जातो; त्याच्या अग्नीच्या ज्वाला पेटावयाच्या थांबतात. 6 त्याच्या तंबूतील प्रकाश अंधकार होऊन होतो; त्याच्या जवळचा दिवा विझून जातो. 7 त्याच्या पावलांचा प्रभाव दुर्बल होतो; त्याच्या स्वतःच्याच योजना त्याला खाली खेचतात. 8 त्याचेच पाऊल त्याला पाशात अडकवितात; आणि त्याच्या जाळयात तो सापडतो. 9 फास त्याची टाच पकडते; आणि तो सापळयात धरला जातो. 10 त्याच्यासाठी गळफास जमिनीत लपविलेला आहे; त्याच्या मार्गात सापळा ठेवलेला आहे. 11 आतंक त्याला चहूकडून घेरून आहे आणि त्याच्या प्रत्येक पावलांवर कुत्र्यांचे भय आहे. 12 विपत्ती त्याच्यासाठी भुकेलेली आहे; तो पडला तर, विनाश त्याच्यासाठी तयारच आहे. 13 रोगाने त्याची त्वचा खाऊन टाकली आहे; मृत्यूचे पहिले अपत्य त्याचे अवयव गिळून टाकतात. 14 त्याच्या सुरक्षित डेऱ्यांतून त्याला फाडून भयाच्या राजापुढे त्याला फरफटीत नेले आहे. 15 अग्नी त्याच्या डेऱ्यात वस्ती करते; त्याच्या घरावर गंधक विखुरले आहे. 16 त्याची मुळे खाली सुकतात आणि त्याच्यावर सर्व फांद्या वाळून जातात. 17 पृथ्वीवरून त्याच्या अस्तित्वाची आठवण नाहीशी होते; आणि आता भूमीवर त्याचे नाव राहणार नाही. 18 प्रकाशातून त्याला अंधाराच्या राज्यात घालविले आहे; आणि जगातून तो हद्दपार केला गेला आहे. 19 त्याच्या लोकात त्याला पुत्र किंवा कोणीही वारस नाहीत, तो जिथे राहत होता, तिथेही कोणी उरले नाहीत. 20 पश्चिमेचे लोक त्याची अवस्था बघून भयप्रद होतात; हा भयंकर अंत पाहून पूर्वेकडील लोक घाबरून जातात. 21 पातक्यांचे जीवन खचितच असे असते; परमेश्वराला जे ओळखीत नाहीत, त्यांचे ठिकाण असेच असते.”

**19** मग इय्योबाने उत्तर देत म्हटले: 2 “किती काळ तुम्ही मला त्रास देणार आणि आपल्या शब्दांनी मला चिरडणार? 3 एवढ्यात दहा वेळा माझी निंदा करून; निर्लज्या सारखा तुम्ही माझ्यावर हल्ला केला. 4 मी जर खरोखरच चुकलो असेन, तरी त्यासाठी मी स्वतः जबाबदार असणार. 5 जर स्वतःला तुम्ही खरच माझ्यापेक्षा थोर समजता आणि माझ्या या दैनावस्थेचा माझ्याविरुद्ध गैरउपयोग करता, 6 तर ही गोष्ट लक्षात घ्या, की ही स्थिती परमेश्वराने माझ्यावर आणली आहे आणि आपल्या जाळयात मला वेढले आहे. 7 “मी जरी ‘जुलूम!’ असे म्हणून ओरडतो, परंतु मला प्रतिसाद मिळत नाही; साहाय्यासाठी मी बोलावितो, परंतु मला न्याय मिळत नाही. 8 मी पार जाऊ नये म्हणून परमेश्वराने

माझी वाट अडविली आहे; त्यांनी माझे मार्ग अंधाराने झाकून टाकले
आहेत. 9 माझा सन्मान त्यांनी माझ्यापासून हिरावून घेतला आहे आणि
माझ्या मस्तकावरील मुकुट काढून घेतला आहे. 10 माझा सर्वनाश
होईपर्यंत त्यांनी मला चहूकडून तोडले आहे; झाडाप्रमाणे त्यांनी माझी
आशा उपटून टाकली आहे. 11 त्यांचा क्रोध माझ्याविरुद्ध भडकला आहे;
आपल्या शत्रूंमध्ये त्यांनी मला गणले आहे. 12 त्यांची फौज जोमाने पुढे
जात आहे; त्यांनी माझ्याविरुद्ध युद्ध रचले आहे आणि माझ्या डेऱ्या
सभोवती वेढा घातला आहे. 13 “माझे बंधुजन त्यांनी माझ्यापासून दूर
केले आहेत; माझे परिचित मला अगदी परके झाले आहेत. 14 माझे
नातलग माझ्यापासून दूर गेले आहेत; माझ्या जिवलग मित्रांना माझा
विसर पडला आहे. 15 माझे पाहुणे आणि माझ्या सेविका सुद्धा मला
परके मानतात; अनोळखी माणसाप्रमाणे ते माझ्याकडे बघतात. 16 मी
माझ्या सेवकाला आज्ञा करतो, आणि माझ्या मुखाने त्याला विनवणी
करतो, परंतु तो उत्तर देत नाही. 17 माझ्या पत्नीसाठी माझा श्वास
किळसवाणा झाला आहे; माझ्या परिवारासाठी मी घृणास्पद असा आहे.
18 लहान मुलेदेखील माझी निंदा करतात; मी दिसलो तरी ते माझा
अपमान करतात. 19 माझ्या जिवलग मित्रांनादेखील माझा वीट येतो;
ज्यांच्यावर मी प्रीती केली, तेही माझ्यावर उलटले. 20 मी आता फक्त
हाडे व कातडी असा उरलो आहे; आणि मृत्यूच्या संकटातून थोडक्यात
निभावून गेलो आहे. 21 “माझ्यावर दया करा, माझ्या मित्रांनो, माझ्यावर
दया करा, कारण परमेश्वराच्या हाताने माझ्यावर प्रहार केला आहे. 22
परमेश्वराने करावा असा तुम्हीही माझा छळ का करता? माझ्या वेदना
पाहून तुमचे समाधान झाले नाही काय? 23 “अहा, माझ्या शब्दांची
नोंद करण्यात आली असती, ते एका चर्मपत्राच्या गुंडाळीत लिहून
ठेवले असते, 24 लोखंडी कलमाने ते शिसावर, किंवा कायम स्वरुपाने
खडकावर कोरले असते तर किती बरे होते! 25 मला ठाऊक आहे की
माझा उद्धारक जिवंत आहे, आणि अखेरीस ते पृथ्वीवर उभे राहील; 26
आणि हे शरीर कुजून गेल्यानंतरही, आपल्या देहाशिवाय मी परमेश्वराला
पाहीन; 27 होय, मी स्वतः त्यांना पाहीन दुसरा कोणी नाही; तर मी
स्वतःच्या डोळयांनी मी त्यांना पाहीन. त्यासाठी माझ्या हृदयात मी
किती उतावळा झालो आहे! 28 “आणि आता जर तुम्ही असा विचार
केला की, ‘आम्ही कसे त्याला नीच करू, कारण समस्येचे मूळ तर
त्याच्यामध्येच आहे,’ 29 तुम्ही स्वतः तलवारी विषयी भय धरावे; कारण
क्रोधाची शिक्षा तलवारीने येणार, आणि मग न्याय अस्तित्वात आहे हे
तुम्हाला समजेल.”

**20** मग सोफर नामाथीने उत्तर देऊन म्हटले: 2 “माझे त्रस्त विचार
मला उत्तर देण्यास प्रेरित करीत आहेत कारण मी फारच अस्वस्थ
झालो आहे. 3 मला अपमानित करणाऱ्या धमक्या मला ऐकायला
येतात, आणि माझी सुबुद्धी उत्तर देण्यास मला प्रवृत्त करीत आहे. 4
“पुरातन काळापासूनची वस्तुस्थिती आणि मानवाची पृथ्वीवर उत्पत्ती
झाली, तेव्हापासूनच्या गोष्टी तुला खचित माहीत आहेत, 5 की दुष्टाचा
उल्हास हा अल्पकालीन आहे, देवहीन व्यक्तीचा आनंद क्षणभंगुर आहे.
6 जरी देवहीन मनुष्याचा गर्व आकाशापर्यंत पोहोचला आणि त्याचे डोके
आभाळाला जाऊन भिडले, 7 तरी तो आपल्या स्वतःच्या विष्ठेप्रमाणे
नष्ट होणार; जे त्याला ओळखीत होते, ते विचारीत राहतील, ‘तो कुठे
आहे?’ 8 तो स्वप्नासारखा विरून जाईल आणि पुन्हा सापडणार नाही.
रात्रीच्या दृष्टांताप्रमाणे तो नाहीसा होईल. 9 ज्यांनी त्याला पाहिले होते,
ते त्याला पुन्हा पाहणार नाहीत; त्याचे स्थान त्याच्याकडे पुन्हा पाहणार
नाही. 10 त्याची मुलेबाळे गरिबांची नुकसान भरपाई करतील; आणि
स्वतःच्या हातांनी आपली संपत्ती परत करतील. 11 तारुण्याचा जो
जोम त्याच्या हाडात भरलेला आहे तो त्याच्याबरोबरच धुळीत मिळेल.
12 “जरी दुष्टपणा त्याच्या जिभेला गोडवा देते आणि तो आपल्या
जिभेखाली ते दाबून ठेवतो, 13 ती चव नाहीशी होऊ नये असे त्याला
वाटते म्हणून हळूहळू चघळत राहतो, 14 तरीही त्याने खाल्लेले अन्न
त्याच्या पोटात आंबट होऊन त्याला पचत नाही; त्याच्या पोटात ते
सापाच्या विषासारखे होईल. 15 गिळून घेतलेली सर्व संपत्ती त्याला
थुंकावी लागणार; परमेश्वरच त्याच्या पोटातून त्याला ते ओकायला
लावेल. 16 तो सापाचे विष चोखून घेईल; विषारी सापाचा दंश त्याला
जिवे मारेल. 17 मधाने भरलेल्या नद्या आणि झरे जे लोण्याच्या प्रवाहाने
वाहतात, त्यांचा उपभोग त्याला घेता येणार नाही. 18 ज्यासाठी त्याने
परिश्रम केले, त्याची चव त्याला मिळणार नाही; त्याच्या व्यापाराचा
नफा त्याला मिळणार नाही. 19 कारण त्याने गोरगरिबांवर जुलूम करून
त्यांना निराधार सोडले; जी घरे त्याने बांधली नाहीत, ती त्याने जप्त
केली. 20 “त्याच्या हावेपासून त्याला कधीही सुटका मिळणार नाही;
त्याची संपत्ती त्याला वाचवू शकणार नाही. 21 गिळून टाकावे असे
आता काही उरले नाही; त्याची समृद्धी दीर्घकाल टिकणार नाही. 22
त्याच्या भरभराटीत विपत्ती त्याला गाठेल; आणि त्याच्यावर मोठ्या
यातना येऊन पडतील. 23 जेव्हा त्याने पोटभरून खाल्ले असणार, तेव्हा
परमेश्वराचा प्रचंड कोप त्याच्याविरुद्ध पेटेल आणि त्याच्यावर त्यांच्या
क्रोधाची वृष्टी होईल. 24 लोखंडी शस्त्रांपासून त्याने जरी पळ काढला,
तरी कास्य धनुष्यबाण त्याच्या पार जाईल. 25 बाण त्याच्या पाठीतून तो
ओढून काढेल, आणि त्याचे चमकणारे टोक त्याच्या पित्ताशयातून बाहेर
येईल. तो भीतीने ग्रस्त होईल. 26 निबिड अंधकार त्याच्या संपत्तीची
वाट पाहत आहे, अग्नी त्याला भस्म करेल आणि त्याच्या तंबूमध्ये
जे काही उरलेले आहे ते गिळून टाकेल. 27 आकाश त्याचे दोष प्रकट
करेल; आणि पृथ्वी त्याच्याविरुद्ध उभी राहील. 28 त्याचे घर पुराने वाहून
जाईल, परमेश्वराच्या क्रोधाच्या दिवशी त्याची सर्व संपत्ती पाण्याच्या
ओघात नष्ट होईल. 29 दुष्ट मनुष्याचा परमेश्वराने हाच वाटा नेमलेला
आहे, परमेश्वराने त्यांच्याकरिता नेमलेला वारसा तो हाच आहे.”

**21** मग इय्योबाने उत्तर देऊन म्हटले: 2 “माझे बोलणे लक्षपूर्वक
ऐका; आणि हेच तुमच्याकडून माझ्यासाठी सांत्वन असे असू द्या.
3 मी बोलत असताना धीर धरा, त्यानंतर खुशाल माझी थट्टा करा. 4
“माझी तक्रार मनुष्याविरुद्ध आहे काय? मी अधीर का असू नये? 5
माझ्याकडे पाहा आणि भयचकित व्हा; आपल्या मुखावर आपला हात

ठेवा. 6 याविषयी मी विचार करतो, त्यावेळी मी भयभीत होतो; भीतीने
माझे शरीर थरथर कापते. 7 दुर्जनांना दीर्घायुष्य का मिळते, वयाने
परिपक्व होऊन ते सशक्त का होतात? 8 त्यांची मुले त्यांच्याभोवती
स्थिर झालेली त्यांना दिसतात, आणि त्यांचे वंशज त्यांच्या दृष्टीपुढे
असतात. 9 त्यांची घरे भयविरहीत व सुरक्षित असतात; परमेश्वराचा
दंड त्यांच्यावर नसतो. 10 त्यांचा बैल निष्फळ असत नाही; त्यांच्या
गाई वासरांना जन्म देतात आणि त्यांचा गर्भपात होत नाही. 11 ते
आपली मुले कळपासारखी बाहेर पाठवितात; आणि त्यांची लेकरे
नाचत बागडतात. 12 डफ आणि वीणा यांच्या तालावर ते गीते गातात;
आणि बासरीच्या स्वरावर हर्षनाद करतात. 13 ते आपला जीवनक्रम
समृद्धीत घालवितात आणि शांतीने खाली कबरेत जातात. (Sheol h7585)
14 तरी ते परमेश्वराला म्हणतात, 'आमच्यापासून दूर जा! तुमचे मार्ग
जाणून घेण्याची आमची इच्छा नाही. 15 हा सर्वसमर्थ कोण आहे, की
आम्ही त्यांची सेवा करावी? त्यांच्याकडे विनंती करून आम्हाला काय
मिळणार?' 16 परंतु त्यांची समृद्धी त्यांच्या स्वतःच्या हातात नाही,
म्हणून मी दुष्टांच्या योजनांपासून दूर थांबतो. 17 "तरी दुष्टांचा दिवा
कितीदा विझला जातो? आणि कितीदा त्यांच्यावर विपत्ती येते, परमेश्वर
त्यांच्यावर आपला क्रोध कितीदा आणतात? 18 ते कितीदा वाऱ्यापुढे
वाळलेल्या पेंढ्यांप्रमाणे असतात, व वादळापुढे उडविलेल्या भुशासारखे
उडून जातात? 19 असे म्हटले जाते, 'परमेश्वर दुर्जनांची शिक्षा त्याच्या
संततीसाठी राखून ठेवतात.' दुर्जनालाच स्वतःच्या पापाची परतफेड करू
द्यावी, म्हणजे त्याला त्याचा अनुभव येईल! 20 आपला नाश होत आहे हे
त्याने स्वतःच्या डोळ्यांनी पाहावे; सर्वसमर्थाच्या क्रोधाचा प्याला त्याने
प्यावा. 21 जेव्हा त्याला नेमून दिलेला काळ समाप्त होतो तेव्हा आपण
आपल्यामागे सोडून दिलेल्या कुटुंबाविषयी त्याला काय चिंता? 22
"परमेश्वराला कोण ज्ञान शिकवू शकेल, कारण सर्वोच्च व्यक्तीचा न्याय
सुद्धा तेच करतात? 23 एखादा मनुष्य पूर्ण जोमात असताना मरण
पावतो, जो सुरक्षित आणि सुखी असतो, 24 जो शरीराने सुदृढ, आणि
हाडांनी धष्टपुष्ट आहे. 25 आणि दुसरा एखादा जिवाच्या कडूपणात
मरतो, ज्याने जीवनात कोणत्याही चांगल्या गोष्टींचा उपभोग घेतला
नसतो. 26 तरी ते दोघेही मेल्यानंतर मातीत एकमेका शेजारी पुरले
जातात, आणि दोघेही किड्यांनी झाकले जातात. 27 "आता तुम्ही काय
विचार करतात हे मला चांगले माहिती आहे, माझे वाईट होईल अशा
योजना तुम्ही करता. 28 तुम्ही विचारता, 'त्या महान व्यक्तीचे घर कुठे
आहे, ज्यात दुष्टाचा डेरा होता?' 29 जे प्रवास करतात त्यांना तुम्ही
कधीही प्रश्न विचारला नाही काय? आणि त्यांच्या अनुभवांकडे लक्ष
दिले नाही काय— 30 अरिष्टाच्या दिवशी बहुधा दुष्टाचा बचाव होतो,
आणि क्रोधाच्या दिवशी ते सोडविले जातात? 31 उघडपणे त्यांना कोण
दोष लावणार? त्यांनी जे केले आहे, त्याचे प्रतिफळ त्यांना कोण देणार?
32 त्यांना कबरेकडे वाहून नेले जाते, आणि त्यांच्या थोंड्यावर पहारा
ठेवतात. 33 दरीतील माती त्याला गोड लागते; असंख्य त्यांच्यापुढे गेले
आहेत, आणि सर्व लोक त्यांचे अनुसरण करतात. 34 "तर तुमच्या
निरर्थक शब्दांनी तुम्ही माझे सांत्वन कसे कराल? कारण तुमची प्रत्युत्तरे
केवळ असत्य आहेत!"

**22** मग एलीफाज तेमानीने उत्तर देऊन म्हटले: 2 "मानवाचा
परमेश्वराला काही उपयोग आहे का? अत्यंत सुज्ञ मनुष्याचा सुद्धा
त्यांना काय लाभ? 3 जरी तू नीतिमान असलास तरी त्यात सर्वसमर्थाला
काय आनंद? तू निर्दोष असलास, तरी त्यांना काय लाभ होणार? 4 "तू
भक्त आहेस म्हणून परमेश्वर तुझा निषेध आणि तुझ्याविरुद्ध आरोप
करीत आहेत का? 5 तुझी दुष्टता पुष्कळ नाही का? तुझे अपराध
अनंत नाही का? 6 तू निष्कारण आपल्या नातेवाईकांकडून गहाण
घेतलेस; आणि लोकांना वस्त्राशिवाय सोडले. 7 थकलेल्यांना तू पाणी
दिले नाही आणि तू भुकेल्यांपासून अन्न राखून ठेवलेस, 8 जरी तू
प्रभावी व्यक्ती, एक जमीनदार होतास; सन्माननीय मनुष्य असा त्या
भूमीवर राहत होतास 9 आणि तू विधवांना रिकाम्या हाती घालवून
दिले तसेच अनाथांना बलहीन केलेस. 10 म्हणूनच आता पाश तुझ्या
सभोवती आहे, अकस्मात आलेली संकटे तुला का भयभीत करतात,
11 इतका अंधकार का आहे की तुला दिसत नाही, आणि जलांच्या
पुराने तुला का झाकून टाकले आहे. 12 "परमेश्वर उच्चतम स्वर्गामध्ये
नाहीत काय? आणि अतिउंच असलेल्या त्या ताऱ्यांकडे बघ! 13 पण
तरीही तू म्हणतोस, 'परमेश्वराला काय माहीत? निबिड अंधकारातून ते
न्याय करतील काय? 14 ते जेव्हा घुमटकार नभोमंडळात चालतात
तेव्हा त्यांनी आम्हाला बघू नये म्हणून दाट ढगांनी त्यांच्यावर पडदा
टाकला आहे.' 15 पुरातन मार्ग जे दुष्टांनी पत्करले होते त्यावर अजून
किती काळ तू चालशील? 16 ते तर त्यांच्या नेमीत वेळेच्या आधी
उठविले गेले, त्यांच्या जीवनाचा पाया पुराच्या जलात वाहून गेला. 17 ते
परमेश्वराला म्हणाले, 'तुम्ही येथून निघून जा! सर्वसमर्थ आमच्यासाठी
काय करणार?' 18 तरीही परमेश्वराने त्यांची घरे उत्तम पदार्थांनी भरली,
म्हणून मी दुष्टांच्या योजनांपासून दूर राहतो. 19 नीतिमान दुष्टांचा नाश
झालेला पाहून हर्ष करतील; निर्दोष लोक त्यांचा उपहास करतील, 20 ते
म्हणतील, 'खचितच आमच्या शत्रूंचा नाश झाला आहे, अग्नीने त्यांची
संपत्ती भस्म केली आहे.' 21 "परमेश्वराला समर्पित होऊन त्यांच्याशी
समेट कर; म्हणजे तुझे वैपुल्य तुला परत मिळेल. 22 त्यांच्या मुखातून
आलेल्या आज्ञा स्वीकारून घे त्यांचे शब्द आपल्या हृदयात साठवून ठेव.
23 जर तू सर्वसमर्थाकडे परत वळून, आपल्या डेऱ्यातून दुष्टता काढून
टाकशील: तर तू पुनर्स्थापित होशील. 24 जर तू आपले सोने धुळीत
मिळवशील, आणि तुझे ओफीराचे सोने नदीच्या गाळात टाकून देशील,
25 तर सर्वसमर्थ स्वतःच तुझे सोने, आणि तुझे मौल्यवान रुपे होतील.
26 मग तू खरोखरच सर्वसमर्थामध्ये आनंद पावशील व आपली दृष्टी
परमेश्वराकडे वर लावशील. 27 तू त्यांच्याकडे प्रार्थना करशील आणि
ते तुझे ऐकतील, आणि तुझे नवस तू फेडशील. 28 ज्याची तू इच्छा
धरशील, ते घडून येईल, आणि तुझ्या मार्गावर प्रकाश पडेल. 29 जेव्हा
लोकांना नीच केले जाते तेव्हा तू म्हणशील, 'त्यांना उचलून धर!' जे
पडलेले ते वाचविले जातील. 30 आणि जे निर्दोष नाहीत त्यांना देखील

ते वाचवतील, आणि तुझ्या शुद्ध हातांकरवी ते पातक्यांना साहाय्य
करतील."

**23** मग इय्योबाने उत्तर दिले: 2 "आज देखील माझे गाऱ्हाणे कडू
आहे; मी कण्हत असतानाही परमेश्वराचा हात माझ्यावर भारी
आहे. 3 परमेश्वर कुठे आढळेल हे जर मला माहीत असते; मी जर त्यांच्या
निवासस्थानापर्यंत जाऊ शकलो असतो! 4 तर माझा वाद मी त्यांच्यापुढे
ठेवली असता माझी बाजू त्यांच्यापुढे सविस्तर मांडली असती. 5 ते
मला काय उत्तर देतील हे मी बघेन, आणि त्यांचे म्हणणे मी स्वीकारेन.
6 मोठ्या जोमाने ते माझा विरोध करतील काय? नाही, ते नक्कीच
मला दोष लावणार नाहीत. 7 सज्जन त्यांच्यासमोर आपली निर्दोषता
सिद्ध करू शकतो, आणि माझ्या न्यायाधीशापासून सर्वकाळासाठी
माझी सुटका होईल. 8 "परंतु मी जर पूर्वेकडे गेलो तर परमेश्वर तिथे
नाही; आणि पश्चिमेकडे गेलो, तिथेही ते मला सापडत नाहीत. 9 जेव्हा
ते उत्तरेकडे कार्यरत असतात, तरी मला ते दिसत नाहीत; जेव्हा ते
दक्षिणेकडे वळतात, तेव्हा मला ते ओझरतेही दिसत नाहीत. 10 परंतु
माझे मार्ग त्यांना अवगत आहेत; जेव्हा ते मला पारखतील, तेव्हा शुद्ध
सोन्यासारखा मी प्रमाणित होईन. 11 माझ्या पावलांनी काळजीपूर्वक
परमेश्वराच्या पावलांचे अनुसरण केले आहे; दुसरीकडे न वळता मी
त्यांच्या मार्गावरच राहिलो आहे. 12 मी त्यांच्या मुखातील आज्ञांपासून
अलिप्त झालो नाही; माझ्या दररोजच्या अन्नापेक्षा त्यांच्या तोंडचे शब्द
मला मौल्यवान आहेत. 13 "परंतु ते अतुलनीय आहेत आणि त्यांचा
विरोध करणारा कोण आहे? त्यांच्या मनास येईल तसेच ते करतात. 14
माझ्याविरुद्ध असलेला त्यांचा निवाडा ते पूर्णतेस नेतील, आणि अशा
पुष्कळ योजना त्यांनी माझ्यासाठी राखून ठेवल्या आहेत. 15 म्हणून
त्यांच्या समक्षतेत मला भय वाटते; जेव्हा या सर्वांचा मी विचार करतो,
तेव्हा मला त्यांचा दरारा वाटतो. 16 परमेश्वराने माझे हृदय क्षीण केले
आहे; सर्वसमर्थाने मला भीतीने जखडले आहे. 17 निबिड अंधकार माझे
मुख झाकून टाकतो, परंतु तो मला गप्प करू शकला नाही.

**24** "सर्वसमर्थ आपल्या न्यायाचा समय नेमून का ठेवीत नाही? जे
त्यांना ओळखतात त्यांनी त्या दिवसांची व्यर्थ वाट का पाहावी?
2 असे काही लोक आहेत की जे हद्दीच्या खुणा सरकवितात; चोरी करून
आणलेले कळप ते चारतात. 3 अनाथांची गाढवे ते हाकलून लावतात
आणि विधवेचा बैल तारण म्हणून ठेवून घेतात. 4 गरजवंतांना वाटेवरून
बाजूला ढकलून देतात देशातील सगळ्या गरिबांना लपून राहण्यास भाग
पाडतात. 5 रानातील रानगाढवां प्रमाणे, गरीब मनुष्य अन्नासाठी कष्ट
करीत भटकतात; पडीक जमिनीतून त्यांच्या लेकरांस भोजन पुरवठा
होतो. 6 ते रानातून चारा गोळा करतात आणि दुष्टांच्या द्राक्षमळ्यातून
वेचून घेतात. 7 पुरेशी वस्त्र नसल्याने त्यांना वस्त्रहीनच झोपावे लागते.
थंडीत पांघरण्यास देखील त्यांच्याकडे काही नसते. 8 पर्वतीय वृष्टीने
ते ओलेचिंब होतात आणि आश्रय नसल्यामुळे ते खडकांचा आधार
घेतात. 9 पितृहीन बालकांस मातेच्या स्तनापासून ओढून काढले
जाते; ऋण फेडून घेण्यासाठी गरिबांची तान्ही बाळे जप्त करतात.
10 पुरेशी वस्त्र नसल्याने, ते उघडेच असतात; ते धान्याच्या पेंढ्या
वाहतात तरी उपाशीच राहतात. 11 आपल्याच आवारात ते जैतुनाचे तेल
काढतात; द्राक्षकुंडात द्राक्षे तुडवितात, परंतु तहानेने व्याकूळ झालेले
असतात. 12 मरणासन्न असलेल्यांचे कण्हणे शहरातून ऐकू येते,
आणि घायाळ झालेल्यांचा मदतीसाठी आक्रोश चालू आहे. तरी देखील
परमेश्वर कोणालाही दोष देत नाही. 13 "काहीजण प्रकाशाविरुद्ध बंड
करतात, ज्यांना तो मार्ग अवगत नाही ते त्या मार्गात टिकूनही राहत
नाहीत. 14 दिवस मावळला म्हणजे हत्यारा सज्ज होतो, गरीब आणि
गरजवंतांना तो ठार करतो, आणि रात्रीच्या वेळी चोरासारखी चोरी
करतो. 15 व्यभिचाऱ्याचा डोळा दिवस मावळण्याची वाट पाहत असतो;
तो म्हणतो, 'मला कोणीही पाहत नाही.' तो आपला चेहरा झाकून घेतो.
16 चोर अंधारात घरे फोडतात, परंतु दिवसा ते लपून राहतात; त्यांना
प्रकाशाशी काहीही देणे घेणे नको असते. 17 मध्यरात्र त्या प्रत्येकासाठी
सकाळ असते, अंधारातील आतंकाशी त्यांचे सख्य असते. 18 "तरीही
पृथ्वीच्या पाठीवर ते फेसासारखे आहेत; त्यांच्या वाट्याची भूमी इतकी
शापित असते, की त्यांच्या द्राक्षमळ्यात कोणीही जात नाही. 19 जसे
उष्णता आणि दुष्काळ वितळलेल्या हिमाला शोषून घेते, त्याचप्रमाणे
पाप्यांची कबर त्यांना ओढून घेते. (Sheol h7585) 20 त्यांनी जन्म घेतलेले
उदर त्यांना विसरते, किडे त्यांचा फडशा पाडतात; दुष्टांची आठवण
देखील पुन्हा केली जात नाही आणि वृक्षाप्रमाणे ते मोडले जातात. 21
पुत्रहीन व वांझ स्त्रीस ते भक्ष करतात, आणि विधवांशी ते दयेने वागत
नाहीत. 22 परंतु परमेश्वर बलवानाला आपल्या सामर्थ्याने राखतात;
त्याला जीवनाची खात्री नसली तरी ते स्थिरावतात. 23 आम्ही सुरक्षित
आहोत असे त्यांना वाटू दिले, तरी परमेश्वराची नजर त्यांच्या मार्गावर
असते. 24 त्यांची बढती केवळ क्षणभंगुर आहे आणि ते लवकरच नष्ट
होतात; इतरांप्रमाणे ते देखील गळून पडतात; धान्याच्या कणसाप्रमाणे
ते कापले जातील. 25 "जर असे नाही तर, कोण मला खोटे ठरवेल
आणि माझे शब्द कोणाला शून्यात जमा करता येतील?"

**25** मग बिल्दद शूहीने उत्तर देत म्हटले: 2 "प्रभुत्व आणि भय हे
परमेश्वराचे आहे; तेच परमोच्च स्वर्गामध्ये शांती स्थापित करतात.
3 त्यांच्या सैन्याची गणती करता येईल काय? आणि त्यांचा प्रकाश
कोणावर पडत नाही? 4 मग मर्त्य परमेश्वरासमोर कसा नीतिमान ठरेल?
स्त्रीपासून जन्मलेला व्यक्ती पवित्र असू शकतो काय? 5 जर चंद्र
सुद्धा परमेश्वरासमोर प्रकाशमान नाही आणि तारेही त्यांच्या नजरेत
शुद्ध नाहीत, 6 मग मानव तो काय, जो केवळ एक कीटक आहे—
मानवप्राणी, तो तर केवळ अळीप्रमाणे आहे!"

**26** नंतर इय्योबाने उत्तर देऊन म्हटले: 2 "तुम्ही दुर्बळाचे कसे साहाय्य
केले! एखाद्या शक्ती नसलेल्या हाताला कसे संरक्षण दिले! 3
बुद्धिहीनाला तुम्ही काय सल्ला दिला! आणि कोणते प्रचंड अंतर्विचार
तुम्ही सादर केले आहे! 4 असे शब्द बोलण्यास तुम्हाला कोणी साहाय्य

केले? आणि कोणाचा आत्मा तुमच्या मुखाद्वारे बोलला आहे? 5 “जे
मेलेले आहेत ते मोठ्या यातनांमध्ये आहेत, जे जलांमध्ये आणि जलांच्या
खाली राहतात ते सुद्धा तसेच आहे. 6 मृतांचे जग परमेश्वरापुढे उघडे
आहे; त्यांच्या दृष्टीपासून नाश लपलेला नाही. (Sheol h7585) 7 परमेश्वर
उत्तरेकडील नभोमंडळ मोकळ्या अंतरिक्षावर पसरवितात; आणि पृथ्वी
निराधार टांगली आहे. 8 आपल्या घनदाट मेघांमध्ये ते जल कोंडून
ठेवतात, तरीही त्यांच्या वजनाने आभाळ फाटत नाहीत. 9 त्यांनी आपले
मेघ पसरवून, पौर्णिमेच्या चंद्राचे मुख झाकले आहे. 10 त्यांनी जलांवर
क्षितिज नेमून ठेवले आहे प्रकाश व अंधकारासाठीही सीमा आखून
दिल्या आहेत. 11 परमेश्वराच्या धमकावण्याने आकाशातील स्तंभ
थरथरतात, त्यांच्या धाकाने ते भयचकित होतात. 12 आपल्या शक्तीने
ते सागर घुसळून टाकतात; आणि आपल्या बुद्धीच्या बलाने राहाबाचे
तुकडे तुकडे करतात. 13 केवळ त्यांच्या श्वासाने आकाशाला सौंदर्य
लाभते; त्यांच्या हाताने वेगाने सळसळणाऱ्या सर्पाला विंधले आहे. 14
परमेश्वर करतात त्यातील या तर केवळ किरकोळ गोष्टी आहेत; आम्ही
मात्र त्यांचा कानोसा घेऊ शकतो! त्यांच्या सामर्थ्याचा गडगडाट कोण
समजू शकणार?”

**27** इय्योब आपला वाद पुढे चालवून म्हणाला: 2 “ज्या परमेश्वराने
मला न्याय देण्याचे नाकारले आहे, आणि ज्या सर्वसमर्थाने माझे
जीवन कटुत्वाने भरले आहे, त्यांना स्मरून मी सांगतो, 3 की जोपर्यंत
मी जिवंत आहे, आणि परमेश्वराचा श्वास माझ्या नाकपुड्यांत आहे, 4
तोपर्यंत माझे ओठ काहीच वाईट बोलणार नाहीत, आणि माझी जीभ
असत्य उच्चारणार नाही. 5 मी कधीही मान्य करणार नाही की तुमचे
म्हणणे बरोबर आहे; मी मरेपर्यंत, माझी प्रामाणिकता मी नाकारणार
नाही. 6 माझी निर्दोषता मी कधीही सोडून देणार नाही; मी जिवंत आहे
तोपर्यंत माझा विवेक मला दोष देणार नाही. 7 “माझे शत्रू दुष्टांप्रमाणे,
आणि माझे विरोधी अन्यायीप्रमाणे होवोत! 8 कारण परमेश्वराने जर
देवहीनाला छेदून टाकले, आणि त्याचा प्राण घेतला तर त्यांना काय
आशा आहे? 9 जेव्हा त्यांच्यावर संकट येईल, तेव्हा परमेश्वर त्यांची
आरोळी ऐकेल काय? 10 सर्वसमर्थामध्ये त्यांना संतोष मिळणार
काय? सर्वदा ते परमेश्वराचा धावा करतील काय? 11 “परमेश्वराच्या
सामर्थ्याविषयी मी तुम्हाला शिकवेन; सर्वसमर्थाचे मार्ग मी लपवणार
नाही. 12 तुम्ही सर्वांनी स्वतः हे बघितले आहे, मग या निरर्थक गोष्टी का
बोलता? 13 “दुष्टासाठी परमेश्वर जे नेमून देतात ते हेच आहे, कठोर
मनुष्याला सर्वसमर्थाच्या हातून हाच वारसा मिळतो: 14 त्याला कितीही
मुलेबाळे असली, तरी त्यांचा शेवट तलवारीने होणार; त्याच्या संततीस
कधीही पुरेसे अन्न मिळणार नाही. 15 आणि त्यातून जे वाचतील,
ते रोगाला बळी पडतील, आणि त्यांच्या विधवादेखील त्यांच्यासाठी
शोक करणार नाहीत. 16 दुर्जन धुळीसारखा धनाचा साठा करतो व
चिखलाप्रमाणे वस्त्र गोळा करून ठेवतो, 17 जे काही तो साठवून ठेवतो,
तरी न्यायी ती वस्त्रे पांघरतील, आणि निरपराधी त्याचे रुपे आपसात
वाटून घेतील. 18 त्याने बांधलेले घर पतंगाच्या कोशाप्रमाणे आहे,
पहारेकऱ्याच्या झोपडीप्रमाणे ते आहे. 19 धनवान व्यक्ती म्हणून तो रात्री
झोपी जातो; पण सकाळी उठून पाहिले तेव्हा काही उरलेले नसते.
20 संकटे पुराप्रमाणे त्याला गाठतात; रात्रीचे तुफान त्याच्यापासून
सर्वकाही हिसकावून घेते. 21 पूर्वेचा वारा त्याला वाहून घेऊन जातो
आणि तो नाहीसा होतो; त्याच्या स्थानातून तो उडवून टाकला जातो. 22
तो त्याच्या सामर्थ्यापासून पळ काढण्याचा बेत करतो तरी त्याच्यावर
दया न होता तो दूर फेकला जाईल. 23 टाळ्या वाजवित पूर्वेचा वारा
त्याची निंदा करेल आणि तिरस्काराने आपल्या ठिकाणातून तो हुसकून
टाकला जाईल.”

**28** चांदीसाठी खाण असते आणि सोने शुद्ध करण्याचे एक ठिकाण
असते. 2 लोखंड मातीतून घेतले जाते, आणि दगड वितळून तांबे
काढले जाते. 3 मनुष्य अंधाराची कदर न करता; खूप दूर त्या दाट
अंधकारात त्या धातूच्या दगडाचा शोध करीत असतो. 4 मनुष्यांच्या
वसतीपासून दूर, जिथे मानवाच्या पावलांचा कधी स्पर्श झाला नाही,
तिथे ते खोल खाण खणतात; व सर्वांपासून दूर घुटमळत व झोके
घेत असतात. 5 पृथ्वी, जी आम्हाला अन्न देते, ती खाली अग्नीने
पालटून गेली आहे; 6 तिच्या खडकातून नीलमणी येतात, आणि त्याच
धुळीत सोन्याचे गोळे असतात. 7 कोणत्याही शिकारी पक्ष्यास तो गुप्त
मार्ग माहीत नाही, कोणत्याही बहिरी ससाण्याची नजर त्यावर पडली
नाही. 8 गर्विष्ठ श्वापदाने ना कधी ती आपल्या पायाखाली तुडविली,
ना कोणत्याही सिंहाने त्यावर आपला पंजा ठेवला. 9 गारगोटीसारखा
कठीण खडक लोक आपल्या हातांनी फोडतात आणि पर्वतांना समूळ
उघडे करतात. 10 ते खडकामधून भुयारे तयार करतात; आणि त्यांचे
डोळे त्यातील मौल्यवान रत्ने पाहतात. 11 पाण्याच्या प्रवाहांना ते बांध
घालतात आणि गुप्त गोष्टी उजेडात आणतात. 12 परंतु ज्ञान कुठे
सापडेल? आणि सुज्ञतेचे घर कुठे आहे? 13 मानवाला त्याचे मोल
अवगत नाही; जिवंतांच्या भूमीत ते आढळू शकत नाही. 14 महासागर
म्हणतात, “ते माझ्यात नाही”; आणि समुद्र म्हणतो, “ते माझ्याकडे
नाही.” 15 अतिशुद्ध सोन्याने ते विकत घेता येत नाही, किंवा चांदीच्या
मापातही त्याचे मोल करता येत नाही. 16 ओफीराचे सोने, मोलवान
गोमेद किंवा नीलमणी, यांनीही त्याचे मोल करता येणार नाही. 17
सोने आणि रत्ने किंवा, शुद्ध सोन्याचे अलंकार त्या ज्ञानाच्या तुलनेत
बसत नाही. 18 प्रवाळ व सुर्यकांतमणींचा तर उल्लेखच नको; ज्ञानाचे
मोल माणकांपेक्षाही खूपच अधिक आहे. 19 कूशचा पुष्कराजही त्याची
बरोबरी करू शकत नाही, आणि शुद्ध सोन्याने ते विकत घेता येत नाही.
20 तर मग ज्ञान कुठून येते? आणि सुज्ञतेचे घर कुठे आहे? 21 ते प्रत्येक
जीवजंतूंच्या नजरेपासून गुप्त ठेवलेले आहे, आकाशातील पक्ष्यांपासून
देखील ते लपविलेले आहे. 22 विनाश आणि मृत्यू म्हणतात, “की
आमच्या कानी तर त्याची केवळ वार्ता आली आहे.” 23 परमेश्वरालाच
ज्ञानाकडे जाण्याचा मार्ग अवगत असतो ते कुठे आढळेल, हे फक्त
त्यांनाच माहीत आहे. 24 कारण परमेश्वर पृथ्वीच्या शेवटापर्यंत पाहू
शकतात. आणि आकाशाखालचे सर्वकाही त्यांना दिसते. 25 जेव्हा

त्यांनी वाऱ्याची गती स्थापित केली आणि जलांचे माप घेतले, 26 जेव्हा
त्यांनी पावसाला नियम, आणि गर्जणाऱ्या विजेला मार्ग आखून दिला,
27 तेव्हा त्यांनी ज्ञानाकडे पाहून त्याचे मुल्यमापन केले; त्याची पुष्टी
करून त्याची पारख केली. 28 याहवेहने सर्व मानवजातीला म्हटले,
“प्रभूचे भय—हेच ज्ञान आहे, वाईटापासून दूर राहणे हीच सुज्ञता होय.”

**29** इय्योब आपला वाद पुढे चालवून म्हणाला: 2 “माझे गेलेले
महिने, ज्यामध्ये परमेश्वराची नजर माझ्यावर होती, त्या दिवसांची
मला खूप आस आहे, 3 जेव्हा त्यांचा प्रकाशदीप माझ्या मस्तकावर
पडत असे मग अंधारातही त्यांच्याच प्रकाशात मी चालत असे! 4 माझ्या
उत्कृष्ट दिवसात, जेव्हा माझे घराणे परमेश्वराच्या जिव्हाळ्याच्या संगतीने
आशीर्वादित होते, 5 जेव्हा सर्वसमर्थाची साथ अजूनही माझ्याबरोबर
होती आणि माझी मुलेबाळे माझ्याभोवती होती, 6 जेव्हा माझी वाट
लोण्याने भिजली जात असे आणि खडक माझ्यासाठी जैतुनाच्या तेलाचे
झरे ओतून देत असे. 7 “जेव्हा मी नगराच्या वेशीमध्ये जाई आणि माझ्या
मानाचे आसन ग्रहण करीत असे, 8 तरुण मला पाहून बाजूला होत
असत, आणि वृद्ध आदराने उभे राहत; 9 अधिपती बोलणे टाळत स्तब्ध
उभे राहत आणि आपल्या मुखांवर हात ठेवीत; 10 सर्वश्रेष्ठ अधिकारीही
त्यांची जीभ टाळूला चिकटवून शांतपणे उभे राहत असत. 11 ज्यांनी
माझे बोलणे ऐकले ते सर्व माझ्याविषयी चांगले बोलत, आणि ज्यांनी
मला बघितले त्यांनी माझी प्रशंसा केली. 12 कारण जे गरीब मदतीसाठी
याचना करीत आणि ज्या अनाथांच्या मदतीला कोणी नसे, त्यांची मी
सुटका केली. 13 मरत असलेला व्यक्ती मला आशीर्वाद देत असे; आणि
विधवांचे हृदय मी आनंदित केले. 14 नीतिमत्वाला मी पांघरले होते; न्याय
हाच माझा झगा व मुकुट असे. 15 मी अंधाचे नेत्र आणि पांगळयांचे पाय
असा होतो. 16 मी गरजवंतांचा पिता होतो; आणि अनोळखी लोकांच्या
वतीने वाद करत असे. 17 मी दुष्टांचे जबडे फाडून त्यांच्या मुखातून
पीडितांना बाहेर ओढून काढले. 18 “मी विचार केला की, ‘मी माझ्या
घरातच मरण पावेन, मातीच्या कणांइतके माझ्या आयुष्याचे दिवस
असतील. 19 माझी मुळे खोल पाण्यापर्यंत पोहचतील, आणि रात्रभर
दहिवर माझ्या फांद्यांना भिजवतील. 20 माझे वैभव कधीही नष्ट होणार
नाही; आणि माझे धनुष्य सदैव माझ्या हातात नवेच राहील.’ 21 “लोक
माझे बोलणे उत्सुकतेने ऐकत, माझ्या सल्ल्याची शांतीने वाट बघत. 22
माझे बोलणे संपल्यावर; माझे शब्द त्यांच्या कानावर पडल्यावर ते
पुन्हा बोलत नसत. 23 पावसाच्या वर्षावाची पाहावी, तशी ते माझी वाट
पाहत माझे शब्द ते वसंत ऋतुतील पावसासारखे प्राशन करीत. 24 मी
त्यांच्याकडे हसतमुखाने बघितल्यास ते विश्वास करीत नसत; माझे
मुखतेज त्यांना मोलाचे वाटे. 25 त्यांचा पुढारी म्हणून मी त्यांच्याबरोबर
बसून त्यांना मार्गदर्शन केले; त्यांच्या सैन्याचा राजा म्हणून मी त्यांच्यात
वास केला; शोक करणाऱ्यांचे सांत्वन करणारा असा मी होतो.

**30** “परंतु आता जे माझ्याहून वयाने लहान आहेत, ते माझी चेष्टा
करतात, ज्यांच्या वडिलांना मी तिरस्काराने मेंढ्यांचे राखण
करणाऱ्या कुत्र्यांबरोबर बसविले. 2 त्यांच्या हातच्या सामर्थ्याचा मला
काय लाभ, जेव्हा त्यांचा जोम त्यांच्यात राहिलाच नाही? 3 भुकेने ते
निस्तेज पडले आहेत, रात्रीच्या वेळी शुष्क आणि निर्जन भूमीवर ते
वणवण भटकले. 4 ते औषधी वनस्पतीचा पाला गोळा करत होते,
केरसुणीच्या झाडाची मुळे त्यांचे अन्न होते. 5 त्यांना समाजातून घालवून
दिले होते, जसे चोरांवर ओरडावे तसे त्यांच्यामागून लोक ओरडत होते.
6 त्यांना कोरड्या पडलेल्या ओढ्याच्या पात्रामध्ये, खडकात आणि
भूमीतील बिळांमध्ये राहावे लागले. 7 झुडपांमधून ते कर्कश आवाजात
ओरडत आणि झुडपाखाली दाटून बसत. 8 आधार नसलेल्या आणि
अपरिचित पिलावळी सारखे त्यांना त्यांच्या देशातून हाकलून दिले
होते. 9 “आणि आता हेच तरुण लोक माझ्या निंदेची गाणी गातात; मी
त्यांच्या चर्चेचा विषय झालो आहे. 10 ते माझा तिरस्कार करतात आणि
माझ्यापासून दूर राहतात; माझ्या तोंडावर थुंकण्यास ते संकोच करीत
नाहीत. 11 आता तर परमेश्वरानेच माझ्या कमानीची तार सैल सोडून
मला पीडले आहे, माझ्यासमोर ते अनियंत्रितपणे वागतात. 12 माझ्या
उजव्या बाजूने घोळक्याने येऊन ते माझ्यावर हल्ला करतात; आणि
माझ्या वाटेवर जाळे पसरवितात, माझ्याविरुद्ध ते उतरणी बांधतात. 13
ते माझा मार्ग अडवितात; माझा नाश करण्यात त्यांना यश मिळते. ते
म्हणतात, ‘याला साहाय्य करणारा कोणीही नाही.’ 14 खिंडारातून
हल्ला केल्यासारखे ते माझ्यावर धावून येतात; माझा नाश करण्यासाठी
भग्नावशेषातून ते माझ्यावर लोंढ्यासारखे धावून येतात. 15 भयाने मला
ग्रासून टाकले आहे; माझा मान सन्मान वाऱ्याप्रमाणे नष्ट झाला आहे,
आणि माझी सुरक्षा ढगाप्रमाणे सरून गेली आहे. 16 “आणि आता
माझे जीवन संपुष्टात आले आहे; पीडेच्या काळाने माझ्यावर पकड
घट्ट केली आहे. 17 रात्रीच्या समयी माझी हाडे टोचू लागतात; मला
छळणाऱ्या वेदना थांबत नाहीत. 18 परमेश्वराच्या बलवान हाताने माझी
वस्त्रे आवळून धरली आहेत; वस्त्रांच्या गळबंदासारखे ते मला बांधत
आहेत. 19 परमेश्वराने मला चिखलात फेकले आहे, मी धूळ व राख
यांच्यासारखा क्षीण झालो आहे. 20 “हे परमेश्वरा, मी तुम्हाला हाक
मारतो, पण तुम्ही मला उत्तर देत नाहीत; मी उभा राहतो, पण तुम्ही
केवळ माझ्याकडे नजर टाकता. 21 तुम्ही माझ्याविषयी निष्ठुर झाला
आहात; आणि आपल्या हाताच्या बळाने माझ्यावर वार करता. 22 तुम्ही
मला ओढून वाऱ्यावर उडवून टाकता, आणि वादळामध्ये भिरकावून
फेकले आहे. 23 मला माहीत आहे की तुम्ही मी मरेपर्यंत खाली खेचणार
आहात, अशा ठिकाणी जे सर्व जीवितांसाठी नेमण्यात आले आहे. 24
“पीडित मनुष्य जेव्हा त्याच्या मदतीसाठी याचना करतो तेव्हा खचितच
कोणीही त्याला हात देत नाही. 25 संकटात असलेल्यांसाठी मी रडलो
नाही काय? गरिबांसाठी माझा जीव खिन्न झाला नाही काय? 26
तरीही मी जेव्हा चांगल्याची अपेक्षा केली, पण वाईटच मिळाले; आणि
मी प्रकाशाची वाट पाहिली, पण अंधकार आला. 27 माझ्या आतील
व्याकुळतेचे मंथन थांबत नाही; क्लेशाचे दिवस माझ्याशी सामना
करतात. 28 मी काळवंडून जात आहे, पण तो उन्हाने नव्हे; मी सभेत

उभा राहून मदतीची याचना करतो. 29 मी कोल्ह्यांचा भाऊ, आणि
घुबडाचा सोबती असा झालो आहे. 30 माझी त्वचा काळी पडून ती
सोलून निघत आहे; माझे शरीर तापाने फणफणत आहे. 31 माझी वीणा
रडण्याचे, आणि माझा पावा शोकाचे स्वर काढते.

**31** “मी माझ्या डोळयांशी करार केला आहे की कोणा तरुण
स्त्रीकडे कुवासनेने पाहणार नाही. 2 कारण वरून परमेश्वराचा
आमच्यासाठी वाटा, किंवा सर्वसमर्थ्याकडून आमचा वारसा काय आहे?
3 दुष्ट लोकांचा विनाश, आणि पापी लोकांचे अरिष्ट हा नाही काय? 4
माझे मार्ग परमेश्वर पाहात नाही का आणि माझे प्रत्येक पाऊल ते मोजत
नाहीत काय? 5 “जर मी खोटेपणात चाललो आहे किंवा कपटाकडे
माझा पाय घाईने उचलले; 6 तर परमेश्वर सत्याच्या तराजूत मला
तोलून पाहो आणि मी निरपराधी आहे हे त्यांना समजेल— 7 जर
माझे पाऊल मार्गातून भटकले असतील, जर माझ्या हृदयाने माझ्या
डोळयांचे अनुसरण केले असेल, अथवा माझे हात भ्रष्ट झाले असतील,
8 तर ज्याची पेरणी मी केली, त्याची कापणी दुसरा कोणी करो, आणि
माझे पीक उपटून टाकले जावो. 9 “जर माझे हृदय परस्त्रीद्वारे भुरळीत
झाले असेल, अथवा मी शेजाऱ्याच्या दाराशी दडून बसलो आहे, 10
तर माझी पत्नी परपुरुषाच्या घरातील धान्य दळो, आणि इतर माणसे
तिच्या अंथरुणात निजो. 11 कारण ते तर खूपच दुष्ट, आणि दंडास
पात्र असे पाप आहे. 12 हा भस्म करणारा अग्नी आहे; जो माझा
हंगाम उपटून टाकेल. 13 “जेव्हा माझे सेवक माझ्याविरुद्ध गाऱ्हाणे
घेऊन आले, मग ते स्त्री असो वा पुरुष, तेव्हा मी त्यांना न्याय देण्याचे
नाकारले असेल, 14 तर मी परमेश्वराला सामोरे कसे जाणार? मला जाब
विचारावयास बोलाविले असता, मी काय उत्तर देणार? 15 कारण ज्यांनी
मला गर्भात उत्पन्न केले त्यांनीच त्यांनाही उत्पन्न केले नाही काय?
एकाच परमेश्वराने आम्हा दोघांना आमच्या मातांच्या उदरात निर्माण केले
नाही काय? 16 “जर मी गरिबांच्या हृदयाच्या इच्छा नाकारल्या असतील
अथवा विधवांच्या डोळयात निराशा येण्याचे कारण झालो असेल, 17
जर मी माझे अन्न स्वतःपाशीच ठेवले, आणि ते मी अनाथांना वाटून
दिले नाही— 18 परंतु माझ्या तारुण्याच्या दिवसांपासून पित्याने करावे
तसे मी त्यांचे पोषण केले, आणि माझ्या जन्मापासून मी विधवांचे
मार्गदर्शन केले. 19 मी जर कोणाला वस्त्राविना, आणि गरजवंत लोक
ज्यांना पुरेसे कपडे नाहीत अशांचा नाश होताना पाहिले, 20 त्यांना ऊब
यावी म्हणून माझ्या मेंढरांच्या लोकरीचे पांघरूण दिले तरीही त्यांच्या
हृदयाने मला आशीर्वाद दिला नाही, 21 न्यायालयात मी प्रभावी आहे
हे जाणून, मी जर एखाद्या अनाथावर हात उगारला असेन, 22 तर
खांद्यापासून माझा हात गळून पडो, सांध्यापासून ते तुटून जावोत. 23
कारण परमेश्वरापासून आलेल्या विपत्तीने मला भयभीत केले आहे,
आणि त्यांच्या वैभवाच्या भयनिमित्ताने या सर्वगोष्टी मी केल्या नाहीत.
24 “जर मी सोन्यावर भरवसा ठेवला असेन किंवा शुद्ध सोन्याला म्हटले
असते की, ‘तू माझा रक्षक आहेस,’ 25 जर मी माझे मोठे धन, आणि
आपल्या हाताने मिळवलेल्या संपत्तीमध्ये आनंद बाळगला असेल, 26
जर आकाशात तळपणाऱ्या सूर्याकडे पाहून, अथवा वैभवशाली वाटेने
जाणाऱ्या चंद्राकडे पाहून, 27 माझे अंतःकरण गुप्तपणे मोहित झाले
असेल, आणि आपल्या हाताच्या चुंबनांने मी त्यांची उपासना केली
असेन, 28 तर या पापांचा सुद्धा न्याय झाला पाहिजे, कारण याप्रकारे
सर्वोच्च परमेश्वराशी माझे अविश्वासूपण असते. 29 “माझ्या शत्रूंची
आपत्ती पाहून मी जर कधी आनंद मानला असेन, किंवा त्याच्यावर
अरिष्ट आले म्हणून मी समाधानी झालो असेन; 30 त्यांच्या जीवनाच्या
विरोधात शाप उच्चारून मी आपल्या मुखाला पाप करू दिले नाही; 31
जर माझ्या सेवकांपैकी कधी कोणी म्हटले नाही की, ‘असे कोण आहे
ज्याने इय्योबाच्या घरी मांस खाल्ले नाही?’ 32 परंतु कोणी अनोळखी
व्यक्तीने देखील रस्त्यावर रात्र काढली नाही, कारण प्रवाशांसाठी माझ्या
घराचे दार नेहमीच उघडे असे; 33 अथवा इतर लोकांप्रमाणे मी माझे
अपराध झाकून ठेवले असते, व आपला दोष हृदयात लपवला असता
34 मी कधी मोठ्या जनसमूहाचे भय धरले काय, कुळाच्या तिरस्काराने
मी भयभीत झालो काय, शांतपणे मी घराबाहेर पडलो नाही काय— 35
(“अहा, माझे ऐकणारे कोणी असते! आता माझ्या समर्थनावर मी सही
करतो—सर्वसमर्थ मला उत्तर देवो; मला दोष देणाऱ्याने लेखी दोषारोप
द्यावा. 36 तो मी खचित खांद्यावर घेऊन वाहिला असता, आणि मी तो
मुकुटाप्रमाणे डोक्याला बांधला असता. 37 मी सर्वसमर्थाला माझ्या
प्रत्येक पावलांचा हिशोब दिला असता; एखाद्या राज्यकर्त्या समोर,
तसे मी ते त्यांच्यासमोर सादर करेन.) 38 “किंवा माझी जमीन जर
माझ्याविरुद्ध रडत आहे, आणि तिच्या खाचा जर अश्रूंनी ओल्या झाल्या
आहेत, 39 मोल चुकते न करताच जर मी त्याचा उपज खाल्ला असेल
किंवा भाडेकरूंचे मन मोडले असेल, 40 तर मग गव्हाऐवजी वनझुडूप
उगवोत आणि सातूऐवजी तिथे दुर्गंधी गवत येवो.” येथे इय्योबाचे भाषण
संपले.

**32** मग त्या तिघांनी इय्योबाला उत्तर देण्याचे थांबविले, कारण
आपल्या दृष्टीने तो स्वतः नीतिमान होता. 2 परंतु रामाच्या
कुळातील, बारकाएल बूजीचा पुत्र एलीहू खूप रागावला, कारण इय्योब
परमेश्वरापेक्षा स्वतःलाच न्यायी ठरवीत होता. 3 तीन मित्रांवर देखील तो
संतापला कारण त्यांनी कोणत्याही प्रकारे इय्योबाचे खंडन केले नाही
आणि तरीसुद्धा त्यांनी परमेश्वराला दोषी ठरविले होते. 4 एलीहू आता
इय्योबाशी बोलायचा थांबला होता, कारण ते त्याच्याहून वयाने मोठे
होते. 5 परंतु जेव्हा एलीहूने पाहिले की आणखी बोलण्यास त्यांच्याजवळ
काहीही उरले नाही, त्याचा राग भडकला. 6 आणि बूजी बारकाएलचा
पुत्र एलीहू बोलला: “मी वयाने लहान आहे, व आपण वयोवृद्ध आहात;
म्हणूनच मी घाबरलो, आणि मला जे माहीत आहे ते सांगण्याचे धाडस
केले नाही; 7 मला वाटले की, ‘वयाने मोठे असलेल्यांनी बोलावे; प्रौढ
असलेल्यांनी ज्ञान शिकवावे.’ 8 परंतु व्यक्तीमध्ये असलेला तो आत्मा,
आणि सर्वसमर्थाचा श्वासच आहे की जो शहाणपण देतो. 9 जे वयाने
मोठे तेच ज्ञानी आहेत असे नसते, जे योग्य ते केवळ वृद्धांनाच समजते
असेही नाही. 10 “म्हणून मी सांगतो ते लक्षपूर्वक ऐका; मी सुद्धा मला

जे माहीत आहे ते सांगतो. 11 तुम्ही बोलत असता, मी प्रतीक्षा करीत
बसलो, जेव्हा तुम्हाला शब्द अपुरे पडत होते; तेव्हा तुमचे ते तर्कवाद
मी ऐकले, 12 लक्षपूर्वक मी तुमचे ऐकले. परंतु तुमच्यातील एकानेही
इय्योबाला चुकीचे असे सिध्द केले नाही; तुमच्यापैकी कोणीही त्याच्या
वादास प्रत्युत्तर केले नाही. 13 ‘आम्हाला ज्ञान सापडले आहे’ असे म्हणू
नका; ‘परमेश्वराने त्याचे खंडन करावे, मनुष्याने नव्हे.’ 14 परंतु इय्योबाने
माझ्याविरुद्ध शब्द लढवले नाहीत, आणि तुमच्या वादांच्या साहाय्याने मी
त्याला उत्तर देणार नाही. 15 “ते निराश झाले आहेत आणि त्यांच्याकडे
बोलण्यासाठी आणखी काही उरले नाही; ते शब्दरहित झाले आहेत. 16
आता ते तिथे गप्प उभे आहेत, ते शांत आहेत म्हणून ते बोलतील याची
मी वाट का पाहावी? 17 मी देखील माझे म्हणणे सादर करेन; मला जे
माहीत आहे ते मी सुध्दा सांगेन. 18 कारण माझ्याकडे भरपूर शब्द
आहेत, आणि माझ्या आत माझा आत्मा मला बोलावयास भाग पाडत
आहे; 19 बाटलीमध्ये भरून ठेवलेल्या द्राक्षारसा समान, नवीन बुधला
जो फुटायला आला आहे, त्यासारखा मी झालो आहे. 20 मला आराम
मिळावा म्हणून मी बोलणारच; उत्तर देण्यासाठी मी माझे मुख उघडलेच
पाहिजे. 21 मी पक्षपात करणार नाही, ना मी कोणा मनुष्याची उगीच
प्रशंसा करणार; 22 कारण मी जर कोणाची फाजील स्तुती करण्यात
तरबेज असलो, तर माझा निर्माणकर्ता मला लवकरच घेऊन जाईल.

**33** “परंतु आता हे इय्योबा, माझे शब्द ऐक; मी जे बोलणार आहे त्या
सर्वाकडे लक्ष दे. 2 मी बोलायला माझे मुख उघडत आहे; माझे
शब्द माझ्या जिभेच्या टोकावर आहेत. 3 माझे शब्द सरळ हृदयातून
येतात; माझे ओठ जे मला माहीत आहे तेच खरेपणाने बोलतील.
4 परमेश्वराच्या आत्म्याने मला घडविले आहे; आणि सर्वसमर्थाचा
श्वास मला जीवन देतो. 5 तुला उत्तर देता येत असेल, तर मला उत्तर
दे; ऊठ आणि तुझा खटला माझ्यासमोर चालव. 6 परमेश्वरासमोर
जसा तू, तसा मीही आहे; मी सुद्धा मातीचा घडविलेला आहे. 7 माझे
भय बाळगण्याची तुला गरज नाही, किंवा माझा हात तुझ्यावर भारी
नसो. 8 “तुला असे बोलताना मी ऐकले आहे— हेच शब्द मी ऐकले
आहेत— 9 ‘मी शुद्ध आहे, मी काही पाप केले नाही; मी स्वच्छ आणि
दोषविरहीत आहे. 10 तरी देखील परमेश्वराला माझ्यात दोष सापडला
आहे; आणि ते मला त्यांचा शत्रू मानतात. 11 ते माझे पाय साखळ्यांनी
बांधतात; आणि माझ्या सर्व मार्गावर कडक नजर ठेवतात.’ 12 “परंतु
मी तुला सांगतो, याबाबतीत तू चुकतोस, कारण परमेश्वर कोणत्याही
मनुष्यापेक्षा महान आहे. 13 तू त्यांच्याविरुद्ध तक्रार का करतोस की ते
कोणाच्याही शब्दास प्रतिसाद देत नाही? 14 कारण परमेश्वर एकदा
एका, मग दुसऱ्या मार्गाने मानवांशी बोलत असतात— जरी कोणाला
त्याचे अवलोकन होत नाही. 15 रात्रीच्या स्वप्नात, दृष्टान्तामध्ये, जेव्हा
लोकांना गाढ झोप लागलेली असते त्यांच्या बिछान्यावर डुलक्या घेत
असताना, 16 परमेश्वर त्यांच्या कानात बोलून आणि चेतावणी देऊन
त्यांना घाबरवितात, 17 म्हणजे ते मनुष्याच्या चुकीच्या वर्तनापासून
फिरतील आणि अहंकारापासून दूर राहतील, 18 खड्ड्यात पडण्यापासून
आणि तलवारीने त्यांचे जीवन नष्ट होण्यापासून त्यांना राखतील. 19
“किंवा काहींना वेदनादायक बिछान्यावर त्यांच्या हाडांमध्ये सततच्या
क्लेशाने शासन होते, 20 अशासाठी की त्यांच्या शरीराला अन्नाची
किळस वाटेल आणि त्यांचा जीव मिष्टान्नाचा तिरस्कार करतो. 21
त्यांचे मांस दिसेनासे होते, आणि त्यांची लपलेली हाडे आता बाहेर
लटकलेली दिसतात. 22 ते त्यांच्या कबरेजवळ पोहोचतात, आणि त्यांचे
जीवन मृतांच्या ठिकाणाकडे जाऊन ठेपते. 23 तरीही त्यांच्या बाजूला
जर एखादा दूत, हजारांमधला कोणी एक मनुष्य निरोप्या असला,
जो न्यायी जीवन कसे जगावे याविषयी सांगण्यासाठी पाठविलेला
असला, 24 आणि त्या व्यक्तीबद्दल दया दाखवून तो परमेश्वराला म्हणतो,
‘त्यांना मरणाकडे जाण्यापासून वाचवा; त्यांच्यासाठी खंडणी मला
मिळाली आहे— 25 लहान लेकराप्रमाणे त्यांचे मांस पुन्हा भरून येवो;
तरुणपणाच्या दिवसांप्रमाणे त्यांची पुनर्रचना होवो’; 26 मग तो व्यक्ती
प्रार्थना करेल आणि परमेश्वराचा अनुग्रह त्याच्यावर होईल, ते परमेश्वराचे
मुख पाहतील आणि आनंदाचा गजर करतील; आणि परमेश्वर त्यांना
सुयश देऊन, त्यांची पुनर्स्थापना करतील. 27 मग ते जाऊन इतरांना
जाहीर करून सांगतील, ‘मी पाप केले होते, जे सरळ ते मी विकृत
केले, परंतु ज्यास मी पात्र होतो ते मला मिळाले नाही. 28 परमेश्वराने
मला त्या मृत्यूच्या गर्तेत जाण्यापासून वाचविले, आणि जीवनाच्या
प्रकाशाचा आनंद उपभोगत मी जीवन जगेन.’ 29 “परमेश्वर मानवासाठी
या सर्वगोष्टी करतात; दोनदा किंवा तीनदाही ते करीत असतात— 30
त्याचा जीव त्या गर्तेपासून फिरवितात, यासाठी की जीवनाचा प्रकाश
त्याच्यावर उज्वल व्हावा. 31 “हे इय्योबा, लक्ष दे आणि माझे ऐक; तू
शांत राहा आणि मी बोलेन. 32 जर तुला काही बोलायचे असेल तर मला
उत्तर दे; बोल, कारण तुझे समर्थन मी करावे असे मला वाटते. 33 परंतु
जर नाही तर माझे ऐक; तू शांत राहा आणि मी तुला ज्ञान शिकवेन.”

**34** मग एलीहू पुढे म्हणाला: 2 “सुज्ञ लोकहो, माझे शब्द ऐका;
विद्वानांनो, तुम्ही लक्षपूर्वक माझे ऐका. 3 कारण कानाला शब्दाची
पारख आहे जशी जिभेला अन्नाची चव आहे. 4 आमच्यासाठी जे योग्य
ते जाणून घेऊ या; आणि जे उत्तम ते एकत्र शिकू या. 5 “इय्योब
म्हणतो, ‘मी निर्दोष आहे, परंतु परमेश्वर मला न्याय देत नाहीत. 6 मी
जरी अचूक आहे, तरी मला लबाड ठरविले जाते; मी जरी दोष विरहित
आहे, भरणार नाही अशा जखमांनी त्यांचे बाण मला घायाळ करतात.’
7 इय्योबासारखा आणखी कोणी मनुष्य आहे काय, जो पाण्याप्रमाणे
उपहास पितो? 8 तो दुष्टांची सोबत धरतो; तो दुष्कर्म करणाऱ्यांशी
संबंध ठेवतो. 9 कारण तो म्हणतो, ‘परमेश्वराला प्रसन्न करण्यात काही
लाभ नाही.’ 10 “तर अहो समंजस मनुष्यांनो, माझे ऐका. वाईट करणे
हे परमेश्वरापासून आणि अयोग्य करावे असे सर्वसमर्थापासून दूरच
असो. 11 ते मनुष्याला त्याच्या कृत्यांचे प्रतिफळ देतात; आणि त्यांच्या
वर्तनास अनुरूप असे फळ त्यांना देतात. 12 परमेश्वर चूक करतील,
किंवा सर्वसमर्थ न्याय विपरीत करतील हे अकल्पनीय आहे. 13 त्यांची
या पृथ्वीवर कोणाला नियुक्त केले? किंवा संपूर्ण जगाचा अधिकार

त्यांना कोणी दिला? 14 जर त्यांच्या मनास आले आणि आपला आत्मा
व श्वास काढून घेतला, 15 तर सर्व मानवजात एकदम नष्ट होईल आणि
मनुष्यप्राणी परत धुळीला जाऊन मिळेल. 16 “तुम्हाला जर समज
आहे, तर हे ऐका; मला काय बोलायचे आहे ते लक्षपूर्वक ऐका. 17 जो
न्यायाचा द्वेष करतो तो अधिकार करेल काय? जो नीतिमान आणि
बलवान त्याचे तू खंडन करशील काय? 18 ‘तुम्ही मूल्यहीन आहात,’
असे राजांना सांगणारे, आणि ‘तुम्ही दुष्ट आहात’ असे सज्जनांना
म्हणणारे परमेश्वरच नाही काय? 19 जे राजपुत्रांना देखील पक्षपात
दाखवित नाही आणि गरिबांपेक्षा श्रीमंतावर उपकार करत नाही, कारण
ते सर्व त्यांचीच हस्तकृती नाहीत काय? 20 मध्यरात्री, एका क्षणात
त्यांचा अंत होतो; लोक डळमळतात आणि नाहीसे होतात; मानवी
मदतीशिवाय बलवान काढून टाकले जातात. 21 “मानवाच्या मार्गाकडे
त्यांचे डोळे लागलेले आहेत; परमेश्वराचे त्यांच्या प्रत्येक पावलांवर लक्ष
आहे. 22 कोणतीही दाट छाया ना गडद अंधकार आहे, जिथे दुष्कर्मी लपू
शकतील. 23 लोकांची पुढे अजून परीक्षा करावी अशी परमेश्वराला गरज
नाही, जेणेकरून त्यांनी न्यायासाठी त्यांच्यासमोर यावे. 24 चौकशी
न करताच ते बलवानांना छिन्नभिन्न करतात आणि त्यांच्या स्थानी
दुसऱ्यास स्थापितात. 25 कारण त्यांच्या प्रत्येक कृत्यांची ते नोंद घेतात,
रात्रीच्या वेळी ते दुष्टाला उलथून टाकतात आणि ते तुडविले जातात. 26
आणि सर्व लोक पाहू शकतील अशी शिक्षा त्यांच्या दुष्टपणामुळे परमेश्वर
त्यांना करतात, 27 कारण परमेश्वराचे अनुसरण करण्यापासून ते फिरले
आहेत आणि त्यांच्या कोणत्याही मार्गाविषयी दुष्टाला आदर नाही. 28
त्यांच्यामुळे गरिबांचे अश्रू परमेश्वरासमोर आले आहेत अशासाठी की
गरजवंत लोकांचा आक्रांत ते ऐकतील. 29 परंतु ते जर शांत राहिले, तर
त्यांना कोण दोष देईल? जर त्यांनी आपले मुख लपविले, तर कोण
त्यांना बघू शकेल? तरी व्यक्ती असो वा राष्ट्र, परमेश्वर त्यासर्वांच्या वर
एकसारखेच आहेत, 30 अशासाठी की देवहीन मनुष्याला अधिकार
देण्यापासून आणि लोकांसाठी जाळे टाकण्यापासून प्रतिबंध करता
यावा. 31 “समजा कोणी परमेश्वराला म्हटले, ‘मी पापी आहे, परंतु मी
यापुढे पाप करणार नाही. 32 मी पाहू शकत नाही ते मला शिकवा; मी
जर अपराध केला आहे, तर मी तो पुन्हा करणार नाही.’ 33 जेव्हा तुम्ही
पश्चात्ताप करण्याचे नाकारता तरी परमेश्वराने तुमच्या अटींनुसार न्याय
द्यावा काय? मी नाही तर तुम्हीच ते ठरविले पाहिजे; म्हणून तुम्हाला काय
माहीत आहे ते मला सांगा. 34 “बुद्धिमान मनुष्य जाहीर करतात, ज्ञानी
लोक जे माझे बोलणे ऐकतात ते म्हणतात, 35 ‘इय्योब अज्ञानाने बोलत
आहे; त्याच्या बोलण्यात सुज्ञता नाही.’ 36 त्या इय्योबाची पूर्णपणे
पारख केली जावी कारण तो दुष्टांप्रमाणे बोलत आहे! 37 कारण तो
आपल्या पापात बंडाची भर घालतो; आमच्यामध्ये तिरस्काराने हातांनी
टाळ्या वाजवितो आणि परमेश्वराविरुद्ध आपले शब्द वाढवितो.”

**35** एलीहू पुढे म्हणाला: 2 “हे न्याय्य आहे असे तुला वाटते काय?
तू म्हणतोस, ‘परमेश्वर नाही, तर मी न्यायी आहे,’ 3 तरी तू
त्यांना विचारतो की, ‘पाप न केल्याने मला काय फायदा आणि मी काय
मिळविणार?’ 4 “तुला व तुझ्याबरोबर तुझ्या मित्रांना मला उत्तर द्यायला
आवडेल. 5 वर आकाशाकडे दृष्टी लावून पाहा; तुझ्याहून फार उंच
असलेल्या ढगांकडे निरखून पाहा. 6 जर तू पाप केलेस, तर परमेश्वरावर
काय परिणाम होणार? तुझी पापे जरी पुष्कळ आहेत, तरी त्याचे त्यांना
काय? 7 जर तू न्यायी आहेस, तर तू त्यांना काय देणार, किंवा तुझ्या
हातून त्यांना काय मिळते? 8 तुझा दुष्टपणा केवळ तुझ्यासारख्याच
मानवांवर, आणि तुझे न्यायीपण इतर लोकांवर परिणाम करू शकतात.
9 “अत्याचाराच्या भाराने लोक आक्रोश करतात; बलवान मनुष्याच्या
हातून सुटकेसाठी आरोळी करतात. 10 तरी देखील कोणीही म्हणत
नाही, ‘परमेश्वर माझा निर्माणकर्ता कुठे आहे, जे रात्रीच्या वेळी गीत
देतात, ते कुठे आहेत, 11 जे पृथ्वीवरील पशूंपेक्षा आम्हाला जास्त
शिकवण देतात, आणि आकाशातील पक्ष्यांपेक्षा आम्हाला अधिक ज्ञानी
बनवितात?’ 12 परंतु दुष्टाच्या अहंकारामुळे जेव्हा ते लोक आरोळी
मारतात तेव्हा परमेश्वर उत्तर देत नाहीत. 13 खरोखर, परमेश्वर त्यांच्या
रिक्त विनंत्या ऐकत नाहीत; सर्वसमर्थ त्यांच्याकडे लक्ष देत नाहीत. 14
मग ते तुझे कसे ऐकतील, जेव्हा तू म्हणतो की तुला ते दिसत नाहीत,
की तुझा वाद त्यांच्यासमोर आहे आणि तू त्यांची वाट पाहावी, 15
आणि पुढे, ते त्यांच्या रागात कधीही शिक्षा करीत नाही आणि दुष्टतेची
थोडी सुद्धा नोंद घेत नाही. 16 म्हणून इय्योब रिकाम्या शब्दांनी आपले
मुख उघडतो; आणि ज्ञानाशिवाय शब्द वाढवित राहतो.”

**36** एलीहू पुढे म्हणाला: 2 “अजून थोडा वेळ माझ्याशी धीर धरून
राहा आणि मी तुला दाखवेन की परमेश्वराच्या बाजूने मला
आणखी पुष्कळ बोलायचे आहे. 3 माझे ज्ञान मला फार दुरून मिळते;
माझ्या निर्माणकर्त्याचे न्यायीपण मी वर्णन करून सांगेन. 4 ही खात्री
करून घे की माझे शब्द खोटे नाहीत; ज्याच्याकडे परिपूर्ण ज्ञान आहे
तो तुझ्याबरोबर आहे. 5 “परमेश्वर सामर्थ्यवान आहे, परंतु कोणाचा
तिरस्कार करीत नाही; ते बलवान असून त्यांच्या योजनांमध्ये स्थिर
आहेत. 6 दुष्टांना ते जिवंत ठेवत नाही परंतु पीडितांना त्यांचे हक्क
देतात. 7 न्यायी मनुष्यावरून त्यांची नजर सरकत नाही; राजांबरोबर
त्यांना ते राजासनावर बसवितात आणि सर्वकाळासाठी त्यांना थोर
बनवितात. 8 परंतु जर लोक साखळ्यांनी बांधलेले आहेत, आणि
दुःखाच्या दोरखंडात जखडलेले आहेत, 9 त्यांनी काय केले आहे हे
परमेश्वर त्यांना सांगतात— त्यांनी गर्विष्ठपणात पाप केले आहे. 10 ते
त्यांना सुधारणा ऐकून घेण्यास भाग पाडतात आणि त्यांनी केलेल्या
पापांसाठी पश्चात्ताप करण्याची आज्ञा करतात. 11 जर त्यांनी आज्ञा
पाळल्या आणि परमेश्वराची सेवा केली, तर त्यांच्या आयुष्याचे बाकीचे
दिवस ते समृद्धीत घालवतील आणि संतृप्तीची वर्षे बघतील. 12 परंतु
जर ते ऐकणार नाहीत, तर तलवारीने ते नाश होतील आणि ज्ञाना अभावी
मरण पावतील. 13 “देवहीन हृदयाचे लोक संताप साठवून ठेवतात;
त्यांना बेड्या बांधल्या, तरी ते मदतीसाठी रडत नाही. 14 त्यांच्या भर
तारुण्यातच मंदिरांना जीवन समर्पित असलेल्या पुरुषगामींसह ते मरण
पावतात. 15 परंतु जे क्लेश सहन करतात त्यांना परमेश्वर क्लेशातून

मुक्त करतात; त्यांच्या दु:खात ते त्यांच्याशी बोलतात. 16 “दु:खाच्या
जाभाड्यातून ते तुला निमंत्रण देतात आणि विशाल व मर्यादा नसलेल्या
ठिकाणी, तुझ्या आरामदायी मेजावर मिष्टान्नांनी परमेश्वर तुला तृप्त
करतात. 17 परंतु आता दुष्टांमुळे तुझ्यावर दंड लादला आहे; शिक्षा
आणि न्याय यांनी तुझी पकड घेतली आहे. 18 सावध राहा की कोणीही
आपल्या श्रीमंतीने तुला भुरळ पाडू नये; आणि मोठी लाच देऊन तुला
कोणी भटकू देऊ नये. 19 तुझी श्रीमंती किंवा तुझे शक्तिशाली प्रयत्न
संकटात पडण्यापासून तुला उचलून धरतील काय? 20 लोकांना त्यांच्या
घरातून ओढून दूर नेण्यासाठी, रात्रीच्या समयाची इच्छा करू नकोस. 21
दुष्टतेकडे तू वळणार नाहीस याची काळजी घे, कारण असेच दिसते की
तू कष्टापेक्षा दुष्टतेची निवड करतोस. 22 “परमेश्वर त्यांच्या सामर्थ्यात
उंचावलेले आहेत. त्यांच्यासारखा दुसरा शिक्षक कोण आहे? 23 त्यांचे
मार्ग त्यांच्यासाठी कोणी विदित केले आहेत, किंवा, ‘तुम्ही दुष्कृत्य
केले आहे’ असे त्यांना कोण म्हणणार? 24 ज्या कृत्यांबद्दल लोकांनी
गीते गाऊन स्तुती केली, ती त्यांची कृत्ये आठवून त्यांची प्रशंसा कर.
25 सर्व मानवजातीने हे पाहिले आहे; मनुष्य दुरूनच त्याच्याकडे टक
लावून पाहतात. 26 परमेश्वर किती महान आहे—ते समजणे आमच्या
बुद्धीपलीकडे आहे! त्यांच्या आयुष्याच्या संख्येचे आकलन करता येत
नाही. 27 “ते पाण्याचे थेंब वर आकर्षून घेतात, आणि झर्‍यासाठी त्याचे
रूपांतर पावसात करतात; 28 मेघ आपले दहिवर खाली ओततात आणि
मनुष्यांवर भरपूर वृष्टी होते. 29 ढगांना त्यांनी कसे पसरविले आहे,
आपल्या मंडपातून ते कसे गडगडाट करतात हे कोणाला समजते? 30
पाहा ते कशाप्रकारे आपल्या सभोवती वीज विखरून ठेवतात, आणि
समुद्राच्या खोलीला झाकून घेतात. 31 अशाप्रकारे परमेश्वर राष्ट्रांवर
अधिकार करतात आणि विपुलतेने अन्न पुरवितात. 32 चमकणाऱ्या
विजेला ते आपल्या हातात भरतात आणि त्याच्या नेमाने तडाखा
करण्यास आज्ञा करतात. 33 त्यांचा गडगडाट येणाऱ्या वादळाची घोषणा
करते; पशूप्राण्यांना सुद्धा त्यांच्या येण्याचे पूर्वज्ञान होते.

**37** “हे ऐकून माझे हृदय धडधडते ते आपल्याच ठिकाणी झेप घेते.
2 ऐका! परमेश्वराच्या डरकाळीचा आवाज ऐका, ती गर्जना जी
त्यांच्या मुखातून येते. 3 संपूर्ण आकाशाच्या खालून ते लखलखीत
वीज मोकळी सोडतात आणि पृथ्वीच्या शेवटापर्यंत पाठवितात. 4
त्यानंतर त्यांच्या डरकाळीचा आवाज येतो; त्यांच्या राजेशाही आवाजात
ते गडगडतात. जेव्हा त्यांचा आवाज सगळीकडे घुमतो, तेव्हा ते काहीही
मागे धरून ठेवीत नाहीत. 5 परमेश्वराची वाणी आश्चर्यकारकरित्या गर्जना
करते; आमच्या बुद्धीपलीकडील महान कार्य ते करतात. 6 हिमास,
‘तू पृथ्वीवर पड,’ आणि पावसाच्या सरींना, ‘मुसळधार वृष्टी होवो’
असे सांगतात. 7 त्यांनी निर्माण केलेल्या प्रत्येकाने परमेश्वराचे कार्य
ओळखावे, म्हणून ते सर्व लोकांचे कामकाज बंद करतात. 8 वनपशू
लपून राहतात; अथवा त्यांच्या गुहांमध्येच राहतात. 9 त्यांच्या भवनामधून
तुफान येते, आणि वादळी वाऱ्यातून थंडी येते. 10 परमेश्वराचा श्वास बर्फ
तयार करते, आणि मोठ्या पाण्याचा प्रवाह गोठून जातो. 11 ते मेघांना
दहिवराने भरून टाकतात; आणि त्यातूनच त्यांची लखलखीत वीज
पसरवितात. 12 परमेश्वर जे काही त्यांना मार्गदर्शन करून सांगतात ते
संपूर्ण पृथ्वीवर करण्यासाठी त्यांच्या दिशेने ते चोहीकडे फिरतात. 13
लोकांना शासन करावे म्हणून, किंवा पृथ्वीला पाणी देऊन त्यांचे प्रेम
व्यक्त करावे म्हणून ते मेघ आणतात. 14 “हे इय्योबा, लक्षपूर्वक ऐक;
थांब आणि परमेश्वराची आश्चर्यकर्मे समजून घे. 15 परमेश्वर मेघांवर कसे
नियंत्रण करतात आणि त्यांची वीज कशी चमकवितात हे तुला माहीत
आहे का? 16 मेघ शांत कसे होतात हे तुला माहीत आहे का त्यांच्या
त्या अद्भुत कृत्यांचे परिपूर्ण ज्ञान कोणाला आहे? 17 जेव्हा तुझ्या
वस्त्रांमध्ये तुला घाम फुटतो आणि दक्षिणेच्या वाऱ्यामुळे भूमी स्तब्ध
होते, 18 आकाश जे साच्यात असलेल्या कास्य आरशाप्रमाणे आहे, ते
परमेश्वराबरोबर तू पसरवशील काय? 19 “आपण त्यांच्याशी काय
बोलावे ते आम्हाला सांग; आपल्या अंधकारामुळे आपला वाद आपण
त्यांच्यापर्यंत घेऊन जाऊ शकत नाही. 20 मला बोलायचे आहे असे
त्यांना सांगावे काय? आपणास गिळून टाकावे म्हणून कोणी विचारतील
काय? 21 आता सूर्याकडे कोणीही बघू शकत नाही, तो आकाशांमध्ये
किती प्रखर आहे वाऱ्याने त्या मेघांना साफ पुसून टाकले आहे. 22
उत्तरेकडून ते सोनेरी वैभवाने येत आहे; होय, परमेश्वर अप्रतिम ऐश्वर्याने
येत आहेत. 23 सर्वसमर्थ आमच्या आवाक्याच्या बाहेर आहेत आणि ते
सामर्थ्याने उन्नत आहेत; त्यांच्या न्यायात आणि महान नीतिमत्वात ते
जुलूम करीत नाही. 24 म्हणून लोक त्यांची श्रद्धा बाळगतात, कारण जे
सर्व हृदयाने ज्ञानी आहेत त्यांच्याप्रती परमेश्वराला आदर नाही काय?”

**38** मग याहवेह वादळातून इय्योबाशी बोलले, ते म्हणाले: 2 “हा
कोण आहे जो अज्ञानी शब्दांनी माझ्या योजना अस्पष्ट करतो? 3
पुरुषाप्रमाणे आपली कंबर कसून घे; मी तुला प्रश्न विचारेन, आणि तू
मला उत्तर देशील. 4 “मी पृथ्वीचा पाया घातला तेव्हा तू कुठे होतास?
तुला समजत असेल तर सांग. 5 तिचे आकारमान कोणी आखले?
खचित तुला ठाऊक असणार! तिच्यावर मापनसूत्र कोणी ताणले? 6
तिचे पाये कशावर रोवले आहे, किंवा तिची कोनशिला कोणी बसवली—
7 जेव्हा प्रभात ताऱ्यांनी एकत्र गाणी गाईली आणि सर्व देवदूतांनी
हर्षनाद केला तेव्हा तू कुठे होता? 8 “सागर जसा गर्भातून उफाळून
समोर आला तेव्हा त्याला दारांच्या मागे कोणी अडविले, 9 जेव्हा मी
ढगांसाठी वस्त्र बनविली आणि त्यांना दाट अंधकारात लपेटले, 10 जेव्हा
त्याच्या मर्यादा मी निश्चित केल्या आणि त्यांची दारे आणि गजे त्यांच्या
ठिकाणी लावून दिली, 11 जेव्हा मी म्हणालो, ‘तुम्ही येथवरच यावे
आणि यापलीकडे नाही; तुझ्या उन्मत्त लाटा येथेच थांबतील’? 12 “तू
कधी तरी पहाटेला आदेश दिला आहे का, किंवा कधी प्रभातेला त्याचे
ठिकाण दाखविले आहे, 13 यासाठी की ते पृथ्वीच्या टोकांना पकडतील
आणि दुष्टांना त्यातून झटकून टाकतील? 14 जशी शिक्क्याच्या खाली
ओली माती, तशी पृथ्वी आकार घेते; आणि वस्त्रासारखी त्याची मुद्रा
उठून दिसते. 15 दुष्टांपासून त्यांचा प्रकाश मागे रोखला जातो, आणि
त्यांचा उगारलेला हात मोडला जातो. 16 “समुद्राच्या उगम स्थानांपर्यंत

तू कधी प्रवास केला काय किंवा त्याच्या खोल गर्तेमध्ये कधी चालत
गेलास काय? 17 मृत्यूची द्वारे तुला दाखविली गेली आहेत काय? अति
खोल अंधकाराचे दरवाजे तू पाहिलेस काय? 18 पृथ्वीचा विस्तार केवढा
आहे याचे आकलन तुला झाले आहे का, हे सर्व जर तू जाणतोस तर
मला सांग. 19 “प्रकाशाच्या निवासस्थानाकडे नेणारी वाट कोणती
आहे? आणि अंधार कुठे वस्ती करतो? 20 त्यांच्या ठिकाणांपर्यंत त्यांना
तू घेऊन जाशील काय? त्यांच्या घराच्या वाटा तुला माहीत आहेत
काय? 21 तुला हे नक्कीच माहीत असणार, कारण तेव्हा तर तू जन्मला
होता! तू तर पुष्कळ वर्षे जगला आहेस! 22 “हिमाच्या कोठारांमध्ये
तू प्रवेश केलास काय किंवा गारांची भांडारे तू पाहिलीस काय? 23
जी मी संकट काळासाठी, लढाई आणि युद्धाच्या दिवसांसाठी राखून
ठेवतो? 24 आकाशात चमकणारी वीज कुठून पांगवली जाते, किंवा
जिथून पूर्वेचा वारा पृथ्वीवर विखुरला जातो, त्याचा मार्ग कुठे आहे?
25 मुसळधार पावसासाठी प्रवाह, आणि वादळी पावसाची वाट कोण
खणतात, 26 म्हणजे ज्या भूमीवर कोणीही लोक राहत नाहीत, निर्जन
वाळवंटामध्ये पाणी पुरवठा करू शकेल, 27 यासाठी की ते ओसाड
उजाड भूमीला तृप्त करेल व तिथे गवत उगवू शकेल? 28 पावसाला
पिता आहे का? दहिवराच्या थेंबांचा पिता कोण आहे? 29 बर्फ कोणाच्या
उदरातून येते? आकाशातील गारठ्याला कोण जन्म देते 30 जेव्हा पाणी
दगडासारखे घट्ट होते, जेव्हा खोल सागराचा पृष्ठभाग गोठून जातो? 31
“कृत्तिकापुंजाचे सौंदर्य तू बांधू शकतो काय? मृगशीर्षाचे बंध तुझ्याने
सोडवतील काय? 32 तू त्यांच्या ऋतूनुसार नक्षत्रांचे समूह उगवतीस
आणू शकतो काय सप्तऋषीला व त्याच्या उपग्रहांना चालवशील काय?
33 स्वर्गाचे नियम तुला माहिती आहेत काय? परमेश्वराची सत्ता तू
पृथ्वीवर स्थापित करू शकतो काय? 34 “ढगांपर्यंत तुझा आवाज
तुला उंचाविता येईल काय पुराच्या पाण्याने स्वतःला झाकता येईल
काय? 35 आकाशातील विजेला कोसळण्यापासून तू थांबवू शकतो
काय? ‘आम्ही इथे आहोत’ असे निवेदन ते तुला देतात काय? 36
पाणपक्ष्याला ज्ञान कोण देते, किंवा कोंबड्याला समज कोणी दिला?
37 मेघांची गणना करण्याचे बुद्धिसामर्थ्य कोणाजवळ आहे? जेव्हा
माती कडक होते, आणि जमिनीची ढेकळे एकत्र चिकटतात? तेव्हा
आकाशातील बुधले कोणाला ओतता येतील? 39 “सिंहिणीसाठी तू
शिकार करतो का? तरुण सिंहांची भूक तू शमवतोस का? 40 ज्यावेळी
सिंह त्यांच्या गुहांमध्ये दबा धरून असतात किंवा दाट झाडीमध्ये वाट
बघत असतात? 41 कावळयांना अन्न कोण पुरवितो जेव्हा त्यांची पिल्ले
भुकेने परमेश्वराकडे आरोळी मारतात आणि अन्नाअभावी चोहीकडे
फिरतात?

**39** “रानशेळ्या कधी प्रसवितात हे तू जाणतो काय? हरिणी आपल्या
पाडसाला जन्म देताना तू पाहतो का? 2 प्रसवे पर्यंत त्यांचे महिने
तू मोजतो काय? त्यांचा प्रसविण्याचा समय तुला कळतो काय? 3 त्या
ओणवतात आणि आपल्या पिलांना प्रसवितात; व त्यांच्या प्रसूती वेदना
संपतात. 4 त्यांच्या पिल्लांची भरभराट होते व मोकळया रानात ते
जोमाने वाढतात; ते सोडून जातात व परत येत नाहीत. 5 “रानगाढवांना
कोणी मोकळे सोडून दिले? त्यांचे दोर कोणी सोडले? 6 मीच त्यांना रान
त्यांचे घर म्हणून दिले आहे, आणि क्षारभूमी त्यांचे वसतिस्थान म्हणून
दिले आहे. 7 नगरातील गोंधळाला ते हसतात; चालकाची ओरड त्याला
ऐकू येत नाही. 8 टेकड्यांवर कुरणासाठी ते रांगा धरतात आणि जे
काही हिरवेगार ते शोधत असतात. 9 “रानबैल तुझी सेवा करण्यासाठी
संमती देईल काय? रात्रीच्या वेळी तो तुझ्या गोठ्यात राहील काय? 10
त्याला जुंपणीने बांधून तुला नांगरणी करता येईल काय? तुझ्यामागे
जमिनीची मशागत तो करेल काय? 11 त्याच्या मोठ्या बलावर तू
अवलंबून राहशील काय? तुझी जड कामे तू त्याच्यावर सोडशील
काय? 12 खळयातून तुझे धान्य खेचून घेऊन ते तुझ्या मळणीपर्यंत
तो ते आणेल असा तू त्याच्यावर विश्वास ठेवशील काय? 13 “जरी
करकोचाच्या पंखांशी आणि पिसाऱ्याशी त्यांची तुलना करता येत नाही
तरी शहामृगाचे पंख आनंदाने फडफडतात. 14 ती धुळीत आपली
अंडी देते आणि वाळूमध्ये ती उबविते, 15 एखाद्याच्या पायाखाली ती
चिरडली जातील, किंवा कोणी वन्यपशू त्याला तुडवतील हे ती लक्षात
घेत नाही. 16 ती आपल्या पिलांना कठोरतेने वागवते, जसे काय ते
तिचे नाहीत; तिच्या प्रसूती वेदना व्यर्थ गेल्या याचे तिला काहीच वाटत
नाही, 17 कारण परमेश्वराने तिला ज्ञान बहाल केले नाही किंवा तिला
समजूतदारपणाचा वाटा दिला नाही. 18 परंतु जेव्हा ती धावण्यासाठी
आपले पंख पसरते, तेव्हा ती घोडा व त्याच्या स्वाराकडे बघून हसते. 19
“घोड्याला त्याचे बळ तू देतोस काय अथवा त्याच्या मानेवर आयाळ तू
पांघरलेस काय? 20 टोळाप्रमाणे त्याला तू उड्या मारण्यास लावतोस
काय? जे त्यांच्या गर्विष्ठपणात आतंक व्यक्त करतात? 21 ते यांच्या
भयंकर पंजाने ओरखडत आपल्या बळात उल्हास करतो, आणि शत्रूशी
सामना करण्यासाठी धावून येतो. 22 तो भयास हसतो आणि कशालाही
घाबरत नाही; तलवारीपासून तो मागे हटत नाही. 23 त्याच्या पाठीवर
असलेला भाता; व त्याच्याबरोबर ठेवलेला चमकणारा भाला व बरची
खणखणत असते. 24 तो बेभान आवेशात भूमी गिळंकृत करतो;
रणशिंगाच्या गर्जनेने तो स्तब्ध उभा राहू शकत नाही. 25 तुतारीच्या
नादाला तो ‘वाह!’ असे ओरडतो, दुरूनच तो लढाईचा वास घेतो, मग
ती सेनापतीची ओरड असो किंवा रणगर्जना. 26 “बहिरी ससाणा उंच
उडतो, आणि आपले पंख दक्षिणेकडे पसरतो, ते तो तुझ्या ज्ञानाने
करतो काय? 27 तुझ्या आज्ञेनेच गरुड उंच भराऱ्या मारत आणि आपले
घरटे उंचावर बांधतात काय? 28 तो उंच कडांवर वसतो आणि रात्री
तिथेच राहतो; खडकाळ सुळका त्याचा भक्कम किल्ला आहे. 29
तिथूनच तो आपले भक्ष्य शोधतो; त्याच्या नेत्रास ते दुरूनच दिसते. 30
तिची पिल्ले रक्त पिऊन मेजवानी करतात. आणि जिथे मेलेले असतात,
तिथे ती असतात.”

**40** याहवेहने इय्योबास पुढे म्हटले, 2 “जो सर्वसमर्थाशी वाद घालतो,
तो त्यांना सुधारणार का? जो परमेश्वरावर आरोप करतो, त्याने
परमेश्वराला उत्तर द्यावे!” 3 तेव्हा इय्योब याहवेहला म्हणाला: 4 “मी

अयोग्य आहे; मी तुम्हाला काय उत्तर देणार? मी माझा हात माझ्या मुखावर ठेवतो. 5 मी एकदा बोललो, पण माझ्याकडे उत्तर नाही; दोनदा मी बोललो, पण मी पुन्हा बोलणार नाही." 6 मग याहवेह वादळातून इय्योबाशी बोलले: 7 "पुरुषासारखी आपली कंबर कस; मी तुला प्रश्न विचारतो, आणि तू मला त्याचे उत्तर देशील. 8 "माझ्या न्याया विषयी तू संशय धरशील काय? स्वतःचे समर्थन करावे म्हणून तू मला दोष लावशील काय? 9 तुझा बाहू परमेश्वरासारखा आहे काय, तुझा आवाज त्यांच्यासारखा गडगडाट करू शकतो काय? 10 मग गौरव आणि वैभव यांनी स्वतःला सुशोभित कर, आणि सन्मान व ऐश्वर्य ही परिधान कर. 11 तू आपल्या क्रोधाचा त्वेष मोकळा सोडून दे, आणि प्रत्येक गर्विष्ठाकडे पाहा व त्यांना खाली वाकव, 12 जे अहंकारी आहेत त्या सर्वांकडे पाहा आणि त्यांना नम्र कर. दुष्ट जिथे उभे राहतात, तिथेच त्यांना पायाखाली तुडव. 13 त्या सर्वांना मातीत एकत्रच गाडून टाक; कबरेमध्ये त्यांची तोंडे कफनवस्त्रांनी झाकून टाक. 14 मग मी स्वतः हे मान्य करेन की तुझाच उजवा हात तुला वाचवू शकतो. 15 "बेहेमोथ कडे पाहा, तुझ्याबरोबर मी त्यालाही घडविले. तो बैलाप्रमाणे गवत खातो. 16 त्याच्या कमरेत किती शक्ती आहे, आणि त्याच्या पोटाचे स्नायू किती बळकट आहेत! 17 गंधसरूप्रमाणे त्याचे शेपूट झोकांडत असते. त्याच्या मांड्यांच्या हाडांचे स्नायू एकमेकांशी घट्ट जोडलेले आहेत. 18 त्याची हाडे कास्याच्या नळयासमान आहेत; त्याचे अवयव पोलादी गजासारखे आहेत. 19 परमेश्वराच्या कृत्यांमध्ये तो प्रथम क्रमांकावर आहे, तरीही त्याचा उत्पन्नकर्ता त्याच्याजवळ तलवार घेऊनच जातो. 20 डोंगर आपले उत्तम उत्पादन त्याला पुरवितात; आणि सर्व वनपशू त्याच्याभोवती खेळतात. 21 कमलिनीखाली तो पडून राहतो, लव्हाळयाच्या बेटात व दलदलीत तो लपून असतो. 22 कमलिनी आपल्या छायेत त्याला झाकतात; ओढ्याच्या सभोवतीची उंच वाळुंजे त्याला वेढून घेतात. 23 उफळत्या नदीचे प्रवाह त्याला हानी करत नाही; यार्देनेचा ओघ त्याच्या तोंडावर वेगाने आला तरी तो सुरक्षित असतो. 24 उघड्या डोळयांनी कोणी त्याला धरेल काय, किंवा त्याला जाळयात अडकवून त्याचे नाक टोचतील काय?

**41** "लिव्याथानाला माशाचा गळ घालून तू पकडू शकशील काय किंवा त्याच्या जिभेला दोर बांधू शकशील काय? 2 त्याच्या नाकातून तू दोरखंड टाकू शकतो काय किंवा त्याच्या जाभाडामध्ये आकडा खुपसशील काय? 3 दयेसाठी तो तुझ्याकडे विनवणी करीत राहील काय? तो तुझ्याशी सौम्य शब्दांनी बोलेल काय? 4 जन्मभर तुझा गुलाम म्हणून तू त्याला ठेवावे म्हणून तो तुझ्याशी करार करेल का? 5 एखाद्या पाळीव पक्ष्यासारखा तू त्याला ठेवशील काय किंवा तुझ्या घरातील तरुण स्त्रियांसाठी साखळीला बांधून ठेवू शकशील? 6 विक्रेते त्याच्यासाठी बोली लावतील काय? व्यापारी लोक त्याची आपसात वाटणी करून घेतील काय? 7 त्याच्या गुप्त चामड्यात बरची रोवशील काय किंवा मत्स्यबाण त्याच्या डोक्यात खुपसता येईल काय? 8 जर तू आपला हात त्याच्यावर ठेवला, तर त्या संघर्षाचे तुला स्मरण होऊन तसे तू पुन्हा कधीही करणार नाही! 9 त्याच्यावर वर्चस्व करण्याची कोणतीही आशा खोटी आहे; तो केवळ नजरेसमोर असणेच अत्यंत तीव्रतेचे आहे. 10 त्याला भडकवू शकेल इतके उग्र कोणीही नाही. तर मग माझ्याविरुद्ध कोण उभा राहील? 11 मला कोणाचे काही देणे लागते असा दावा कोणाकडे आहे? आकाशाखाली आहे ते सर्वकाही माझेच आहे. 12 "लिव्याथानाचे अवयव, त्याची शक्ती आणि त्याच्या शरीराच्या आकर्षक आकाराविषयी बोलण्यास मी चुकणार नाही. 13 त्याची बाह्य कातडी कोण उतरवू शकणार? त्याच्या दुहेरी चिलखतामधून कोण भेद करू शकेल? 14 जी भयानक दातांनी घेरलेली आहे, अशी त्याची मुखद्वारे उघडण्याचे धाडस कोणाला आहे? 15 त्याच्या पाठीवर ढालीच्या रांगा आहेत ज्या घट्ट एकत्र मुद्रित केलेल्या आहेत; 16 ती एकमेकांना इतकी जखडून आहेत की त्यामधून हवा देखील पार होऊ शकत नाही. 17 ती एकमेकांना घट्ट जोडलेली आहेत; ती एकमेकांना लगटून असतात आणि ती वेगळी करता येत नाहीत. 18 त्याच्या फुरफुरण्यातून प्रकाशाचे झोत येतात; त्याचे डोळे प्रभात किरणांसारखे आहेत. 19 त्याच्या मुखातून ज्वाला उफाळून येतात; अग्नीच्या ठिणग्या बाहेर उसळतात. 20 जळत्या लव्हाळयावर उकळत असलेल्या पात्रातून यावा तसा त्याच्या नाकपुड्यातून धूर निघत असतो. 21 त्याच्या श्वासाने कोळसा पेट घेतो, आणि त्याच्या मुखातून तापलेल्या ज्वाला पडतात. 22 त्याच्या मानेत सामर्थ्य राहते; त्याच्यापुढे भीती चालत असते. 23 त्याच्या मांसाचे थर घट्टपणे जोडलेले आहेत; ते दृढ आणि अढळ असतात. 24 त्याची छाती खडकासारखी कडक आहे, जात्याच्या तळीसारखी कणखर आहे. 25 तो जेव्हा उभा राहतो, पराक्रमी भयभीत होतात; त्याचा वार होण्याआधीच ते माघार घेतात. 26 त्याच्यावर वार केलेल्या तलवारीचा, अथवा भाला, बरची किंवा बाणाचा त्याच्यावर काहीही प्रभाव पडत नाही. 27 लोखंडाला तो वाळलेल्या गवतासारखे आणि कास्याला कुजलेले लाकूड असे लेखतो. 28 बाण त्याला पळवून लावू शकत नाही; आणि गोफणधोंडे त्याला भुसकटासारखे आहेत. 29 लाठी त्याला पेंढीच्या तुकड्यासारखीच वाटते; भाल्याच्या खुळखुळण्याला तो हसत असतो. 30 त्याच्या पोटावरील भाग तीक्ष्ण धारेच्या खापऱ्यांसारखा आहे, मळणीच्या घणाप्रमाणे आपल्या खुणा चिखलावर मागे सोडतो. 31 तो खोल समुद्राला उकळत्या कढईप्रमाणे घुसळतो आणि तेलाच्या पात्रासारखे सागरास ढवळतो. 32 तो आपल्यामागे चमकणारा मार्ग सोडतो; की एखाद्याला वाटेल की सागराला पांढरे केस आहेत. 33 त्याच्यासारखे पृथ्वीवर काहीही नाही; तो एक निर्भय प्राणी आहे. 34 तो घमेंडखोरांना खाली बघायला लावतो; जे सर्व गर्विष्ठ आहेत, त्यांचा तो राजा आहे."

**42** मग इय्योबाने याहवेहला म्हटले, 2 "तुम्हाला सर्वगोष्टी शक्य आहेत हे मला माहीत आहे; तुमचा कोणताही उद्देश निष्फळ होत नाही. 3 तुम्ही विचारले, 'हा कोण आहे जो अज्ञानी शब्दांनी माझ्या योजना अस्पष्ट करतो?' खरोखर अद्भुत आणि माझ्या समजबुद्धीत नसणाऱ्या गोष्टी, त्याविषयी मी बोललो. 4 "तुम्ही म्हणाला, 'आता

ऐक आणि मी बोलणार; मी तुला प्रश्न करणार, आणि तू मला उत्तर
देशील.' 5 माझ्या कानांनी तुमच्याविषयी ऐकले होते परंतु आता माझ्या
डोळयांनी तुम्हाला पाहिले आहे. 6 म्हणून मी माझाच तिरस्कार करतो,
आणि धूळ व राखेत बसून पश्चात्ताप करतो." 7 याहवेह या गोष्टी
इय्योबाशी बोलल्यानंतर, ते एलीफाज तेमानीला म्हणाले, "मी तुझ्यावर
व तुझ्या दोन्ही मित्रांवर रागावलो आहे, कारण माझा सेवक इय्योब
बोलला, त्याप्रमाणे तुम्ही माझ्याबद्दल जे सत्य ते बोलला नाहीत. 8
म्हणून आता सात बैल व सात मेंढे घेऊन माझा सेवक इय्योब याच्याकडे
जा आणि स्वतःसाठी होमबलीचे अर्पण करा. माझा सेवक इय्योब
तुमच्यासाठी प्रार्थना करेल आणि मी त्याची प्रार्थना स्वीकारेन व तुमच्या
मूर्खतेनुसार तुमच्याशी वागणार नाही. माझा सेवक इय्योब माझ्याबद्दल
जसे यथार्थ बोलला तसे तुम्ही माझ्याबद्दल बोलला नाही." 9 मग
एलीफाज तेमानी, बिल्दद शूही व सोफर नामाथी यांनी याहवेहनी त्यांना
सांगितल्याप्रमाणे केले आणि याहवेहने इय्योबाची प्रार्थना मान्य केली.
10 इय्योबाने आपल्या मित्रांसाठी प्रार्थना केल्यानंतर, याहवेहने त्याची
मालमत्ता पुनर्स्थापित केली आणि त्याच्याकडे होते त्यापेक्षा दुप्पट
त्याला परत दिले 11 त्याचे सर्व भाऊ, बहिणी व ते सर्वजण जे त्याला
पूर्वी ओळखत होते त्यांनी त्याच्या घरी येऊन त्याच्याबरोबर भोजन केले.
त्यांनी त्याचे सांत्वन केले आणि याहवेहने त्याच्यावर आणलेल्या प्रत्येक
संकटाविषयी सहानुभूती दाखविली, आणि प्रत्येकाने त्याला चांदीचे
नाणे व सोन्याची अंगठी दिली. 12 याहवेहने इय्योबाच्या जीवनाच्या
सुरवातीच्या दिवसांपेक्षा त्याच्या उतार वयात त्याला अधिक आशीर्वादित
केले. त्याच्याजवळ चौदा हजार मेंढरे, सहा हजार उंट, बैलांच्या हजार
जोड्या व हजार गाढवे होती. 13 आणि त्याला सात मुले व तीन मुली
होत्या. 14 त्याने त्याच्या पहिल्या मुलीचे नाव यमीमा, दुसरीचे कसीया
व तिसरीचे केरेन-हप्पूक असे ठेवले. 15 संपूर्ण देशामध्ये इय्योबाच्या
मुलींएवढ्या सुंदर मुली कुठेही नव्हत्या; त्यांच्या पित्याने त्यांच्या
भावांबरोबर त्यांनाही वतन दिले. 16 त्यानंतर इय्योब एकशेचाळीस वर्षे
जगला; त्याने आपली लेकरे व त्यांची लेकरे अशा चार पिढ्या पाहिल्या.
17 इय्योब वयस्कर व पूर्ण परिपक्व होऊन मरण पावला.

# स्तोत्रसंहिता

**1** धन्य ते लोक, जे दुष्टांच्या मसलतीने चालत नाहीत, किंवा पापी
लोकांच्या मार्गात उभे राहत नाहीत, आणि थट्टा करणाऱ्यांच्या
संगतीमध्ये बसत नाहीत. 2 पण ज्यांचा आनंद याहवेहच्या नियमांचे
पालन करणे, आणि त्यांच्या नियमावर रात्रंदिवस ध्यान करणे असतो.
3 ते अशा वृक्षासारखे आहेत जे सतत वाहणाऱ्या जलप्रवाहाजवळ
लावलेले असते, जे आपल्या ऋतूमध्ये फळ देते आणि ज्यांची पाने
कोमेजत नाहीत. त्यांनी हाती घेतलेले प्रत्येक काम सिद्धीस जाते. 4
परंतु दुष्ट तसे नाहीत. ते वाऱ्याने उडून जाणाऱ्या भुश्यासारखे आहेत. 5
म्हणून दुष्ट न्यायसभेत, किंवा पापी लोक नीतिमानांच्या सभेमध्ये उभे
राहणार नाहीत. 6 कारण नीतिमानांच्या मार्गावर याहवेह दृष्टी ठेवतात,
परंतु दुष्टांचा मार्ग सर्वनाशाकडेच ओढून नेतो.

**2** राष्ट्रे कट का रचत आहेत, आणि लोक व्यर्थच कुटिल योजना
का करीत आहेत? 2 याहवेह आणि त्यांच्या अभिषिक्ताविरुद्ध
पृथ्वीवरील राजे एकत्र येऊन उठाव करीत, असे म्हणत आहेत, 3
“चला, आपण त्यांची बंधने तोडून टाकू, आणि त्यांच्या बेड्या काढून
फेकून देऊ.” 4 स्वर्गातील सिंहासनावर जे विराजमान आहेत ते हसतात;
प्रभू त्यांचा उपहास करतात. 5 ते त्यांना क्रोधाने दटावतात आणि
याहवेहच्या संतापाने त्यांचा थरकाप होतो, ते असे म्हणतात, 6 “सीयोन
माझा पवित्र पर्वत, यावर मी माझ्या राजाला नियुक्त केले आहे.” 7 मी
याहवेहच्या नियमांची घोषणा करेन: ते मला असे म्हणतात, “तू माझा
पुत्र आहेस; आज मी तुझा पिता झालो आहे. 8 माझ्याकडे माग, म्हणजे
मी तुला राष्ट्रांचे वतन देईन, पृथ्वीच्या सीमा तुझे धन असेल. 9 तुम्ही
त्यांना लोखंडी राजदंडाने मोडून टाकणार, तुम्ही मातीच्या पात्रांप्रमाणे
त्यांचा चुराडा कराल.” 10 म्हणून अहो राजांनो, शहाणे व्हा; पृथ्वीवरील
शासक सावध व्हा. 11 भय धरून याहवेहची सेवा करा! थरथर कापत
त्यांच्या शासनाचा सन्मान करा. 12 त्यांच्या पुत्राचे चुंबन घ्या, नाहीतर
ते रागावतील, आणि तुमचे मार्ग तुम्हाला नाशाकडे घेऊन जातील,
कारण एका क्षणात त्यांचा क्रोधाग्नी पेटेल. धन्य आहेत ते सर्वजण जे
त्यांना शरण जातात.

**3** दावीदाचे स्तोत्र. जेव्हा तो त्याचा पुत्र अबशालोम याच्यापासून
पळाला. याहवेह, माझ्या शत्रूंची संख्या किती अधिक आहे! कितीतरी
लोक माझ्याविरुद्ध उठले आहेत! 2 पुष्कळजण माझ्याबद्दल म्हणतात,
“परमेश्वर त्याची सुटका करणार नाही.” सेला 3 परंतु याहवेह, तुम्ही
माझ्या सभोवती ढाल आहात. माझे गौरव आणि माझी मान उंचाविणारे
तुम्हीच आहात. 4 मी याहवेहचा धावा करतो, आणि ते त्यांच्या पवित्र
पर्वतांवरून मला उत्तर देतात. सेला 5 मी पहुडतो आणि झोप घेतो;
मी पुन्हा उठतो, कारण याहवेह माझे रक्षण करतात. 6 असंख्य मला
चहूबाजूंनी वेढतील, तरी मला मुळीच भीती वाटणार नाही. 7 याहवेह,
उठा! हे माझ्या परमेश्वरा, मला वाचवा! माझ्या सर्व शत्रूंच्या जबड्यांवर
प्रहार करा; त्या दुष्टांचे दात पाडून टाका. 8 कारण सुटका याहवेहपासूनच
आहे. तुमच्या लोकांवर तुमचा आशीर्वाद असो. सेला

**4** संगीत दिग्दर्शकासाठी; तंतुवाद्यावरील दावीदाचे स्तोत्र. हे माझ्या
नीतिमान परमेश्वरा, मी तुम्हाला हाक मारेन, तेव्हा मला उत्तर द्या.
माझ्या संकटात तुम्हीच मला साहाय्य करा. माझ्यावर दया करा, माझी
प्रार्थना ऐका. 2 अहो मनुष्यांनो, किती वेळा तुम्ही माझ्या गौरवाला
काळिमा लावणार? किती काळ तुम्ही फसवणुकीवर प्रीती कराल
आणि खोट्या दैवतांचा शोध कराल? सेलाह 3 हे लक्षात ठेवा, विश्वासू
सेवकांस याहवेहने स्वत:साठी निवडून बाजूला ठेवले आहे; मी जेव्हा
त्यांचा धावा करेन, तेव्हा ते माझे ऐकतील. 4 भीती बाळगा आणि पाप
करू नका. बिछान्यावर असता शांत अंत:करणाने त्यांचे चिंतन करा.
सेलाह 5 त्यांना नीतियुक्त यज्ञार्पणे करा. आणि याहवेहवर विश्वास
ठेवा. 6 “आमचे कल्याण कोण करणार,” असे अनेकजण म्हणतात, हे
याहवेह, तुमच्या चेहऱ्याचा प्रकाश आम्हावर पाडा. 7 विपुल धान्य व
द्राक्षारस देतो त्या आनंदापेक्षाही कितीतरी अधिक आनंद तुम्ही माझ्या
हृदयात दिला आहे. 8 मी शांतचित्ताने झोपी जाईन, कारण हे याहवेह
तुम्हीच मला सुरक्षित ठेवता.

**5** संगीत दिग्दर्शकासाठी; वाजंत्र्याच्या साथीने गावयाचे दावीदाचे
स्तोत्र. याहवेह, माझ्या शब्दांकडे कान द्या, माझ्या विलापाकडे लक्ष
द्या. 2 हे माझ्या राजा, माझ्या परमेश्वरा, माझ्या रडण्याकडे कान द्या,
कारण मी तुमच्याकडे प्रार्थना करतो. 3 याहवेह, दररोज सकाळी तुम्ही
माझी वाणी ऐकता; सकाळी मी माझ्या प्रार्थना तुम्हाला सादर करतो व
अपेक्षेने तुमची वाट पाहतो. 4 तुम्ही असे परमेश्वर नाहीत, ज्यांना दुष्टाईत
आनंद होतो; दुष्टांचे तुम्ही स्वागत करीत नाही. 5 तुमच्या उपस्थितीत
गर्विष्ठ उभे राहू शकत नाही. अनीतीने वागणाऱ्या सर्वांचा तुम्हाला वीट
आहे. 6 खोटे बोलणाऱ्यांचा तुम्ही त्यांना नाश करता. खुनी आणि
कपटींचा याहवेहला तिरस्कार आहे. 7 परंतु तुमच्या महान प्रीतीद्वारे,
मी तुमच्या भवनात येईन; अत्यंत आदराने तुमच्या पवित्र मंदिरात
तुम्हाला नमन करतो. 8 याहवेह, मला तुमच्या नीतिमार्गाने चालवा,
माझ्या शत्रूंमुळे— माझ्यासमोर तुमचा सरळ मार्ग मला दाखवा. 9
त्यांच्या मुखातून निघालेल्या एकाही शब्दावर विश्वास ठेऊ शकत नाही;
त्यांचे हृदय द्वेषाने भरलेले आहे. त्यांचे कंठ उघड्या कबरेप्रमाणे आहे;
त्यांच्या जिभेने ते खोटे बोलतात. 10 परमेश्वर, त्यांना दोषी घोषित करा!
त्यांच्या कारस्थानामुळेच त्यांचे पतन होवो. त्यांच्या अनेक अपराधांमुळे
त्यांना तुमच्यापासून दूर घालवून द्या, कारण त्यांनी तुमच्याविरुद्ध बंड
केले आहे. 11 परंतु जे सर्व तुमच्याठायी आश्रय घेतात ते आनंदित
होवोत; त्यांना सदैव हर्षगीते गाऊ द्या. तुम्ही त्यांचे रक्षण करता, ज्यांना
तुमचे नाव प्रिय आहे, त्यांनी तुमच्यामध्ये आनंद करावा. 12 याहवेह,
नीतिमानांना तुम्ही निश्चितच आशीर्वादित करता; तुमची कृपा एखाद्या
ढालीप्रमाणे त्यांना वेढलेली असते.

**6** संगीत दिग्दर्शकासाठी; तंतुवाद्यावरचे शेमीनीथ वर आधारित दावीदाचे स्तोत्र. याहवेह, रागाने माझा निषेध करू नका, तीव्र क्रोधाने मला शासन करू नका. 2 मजवर दया करा, कारण हे याहवेह, मी दुर्बल आहे; मला रोगमुक्त करा, कारण माझ्या हाडात तीव्र वेदना होत आहेत. 3 माझा आत्मा अत्यंत यातनेत आहे. याहवेह, तुम्ही किती विलंब लावणार? 4 याहवेह, परत येऊन मला सोडवा; तुमच्या दयेनुसार मला वाचवा. 5 मृतलोकात तुमचे स्मरण नाही; गर्तेमध्ये तुमचे उपकारस्मरण कोण करणार? (Sheol h7585) 6 माझ्या कण्हण्याने मी खंगून गेलो आहे. रात्रभर रडण्याने मी माझे अंथरूण भिजून ओलेचिंब करतो. माझ्या अश्रूंनी माझा बिछाना भिजून जातो. 7 दु:खाने माझे डोळे निस्तेज झाले आहेत; माझ्या शत्रूंमुळे माझी दृष्टी क्षीण झाली आहे. 8 दुष्टाई करणाऱ्यांनो, येथून चालते व्हा, कारण याहवेहनी माझे रडणे ऐकले आहे. 9 याहवेहनी माझ्या दयेची याचना ऐकली आहे; याहवेह माझ्या प्रार्थना स्वीकार करतील. 10 माझे सर्व शत्रू भय आणि लज्जा पावतील; ते मागे फिरतील आणि तत्काळ लज्जित होतील.

**7** बिन्यामीनी कूशच्या बोलण्यावरून याहवेहस गायलेले दावीदाचे शिग्गायोन. याहवेह, माझ्या परमेश्वरा, मी तुमचा आश्रय घेतो; जे माझ्या पाठीस लागले आहेत, त्या सर्वांपासून माझे रक्षण करा आणि मला सोडवा. 2 नाहीतर, सिंहाप्रमाणे ते मला फाडून टाकतील; मला सोडविण्यास कोणीही नाही म्हणून ते माझे तुकडे तुकडे करतील. 3 याहवेह, माझ्या परमेश्वरा, मी जर असे केले असेल, माझे हात सदोष असतील, 4 जर मी माझ्या मित्राच्या चांगुलपणाचा मोबदला दुष्टपणाने दिला असेल, माझ्या शत्रूला विनाकारण लुबाडले असेल— 5 तर माझे शत्रू माझा पाठलाग करोत व मला पकडोत; माझा जीव मातीत तुडवो आणि माझे गौरव धुळीस मिळवो. सेला 6 हे याहवेह, आपल्या रागाने उठा; माझ्या शत्रूंच्या क्रोधाविरुद्ध उभे राहा; जागे व्हा आणि न्याय्य निर्णय द्या. 7 उच्चस्थानी सिंहासनावर आरूढ असता, सर्व राष्ट्रांनी तुमच्याभोवती एकत्र जमावे. 8 याहवेहच, सर्व मानवजातीचा न्याय करोत. माझ्या प्रामाणिकपणानुसार तुम्ही माझे समर्थन करा. हे सर्वोच्च परमेश्वरा! माझ्या धार्मिकतेनुसार माझा न्याय करा. 9 दुष्टांच्या दुष्टाईचा अंत करा नीतिमानाला स्थिर करा— तुम्ही, हे नीतिमान परमेश्वरा, मने व अंत:करणे पारखणारे परमेश्वर आहात. 10 सर्वोच्च परमेश्वर माझ्या रक्षणाची ढाल आहेत, जे सरळ मनाचे आहेत, त्यांना ते वाचवितात. 11 परमेश्वर नीतिमान न्यायाधीश आहेत, जे दुष्टाईचा सदैव तिरस्कार करतात. 12 दुष्टांनी आपले मार्ग बदलले नाहीत, तर परमेश्वर आपली तलवार पाजळतील; आपले धनुष्य वाकवून त्याची दोरी ताणली आहे. मन 13 त्यांनी आपली घातक शस्त्रे सज्ज केली आहेत; आपले अग्निबाण तयार ठेवले आहेत. 14 जे दुष्टपणाचा वेणा देतात, ते उपद्रवाचे गर्भधारण करतात आणि फसवणुकीला जन्म देतात. 15 जे खड्डा खणतात आणि माती काढून खोल करतात ते स्वत:च त्यांनी खणलेल्या खड्ड्यात पडतात. 16 त्यांच्या दुष्टाईने त्यांनाच शासन होते; त्यांची हिंसा त्यांच्याच डोक्यावर येऊन बसते. 17 याहवेहच्या न्यायीपणाबद्दल मी ऋणी राहीन. परमोच्च याहवेहच्या नावाची मी स्तुतिस्तोत्रे गाईन.

**8** संगीत दिग्दर्शकासाठी. गित्तीथ वर आधारित दावीदाचे स्तोत्र. याहवेह, आमच्या प्रभो, संपूर्ण पृथ्वीवर तुमचे नाव किती वैभवी आहे! स्वर्गदिखील तुमचे गौरव प्रकट करते. 2 लेकरे आणि तान्ह्या बालकांच्या स्तुतीद्वारे तुमचे शत्रू व विरोध्यांना शांत करण्यासाठी शत्रूविरुद्ध बळ स्थापित केले आहे. 3 जेव्हा तुमच्या बोटांची रचना असलेल्या आकाशाकडे बघून मी विचार करतो, चंद्र आणि तारे यथास्थानी स्थापित केलेले पाहतो, 4 मनुष्य तो काय की तुम्ही त्याची आठवण ठेवावी? मानवप्राणी तो काय की तुम्ही त्याची काळजी करावी? 5 तुम्ही त्यांना देवदूतांपेक्षा किंचित कमी असे घडविले आहे. गौरव आणि सन्मान यांचा मुकुट तुम्ही त्यांच्या डोक्यावर ठेवला आहे. 6 तुमच्या प्रत्येक हस्तकृतीवर तुम्ही त्यांना सत्ता दिली आहे; सर्वगोष्टी त्यांच्या पायाखाली ठेवल्या. 7 सर्व कळप व गुरे, आणि वनपशू. 8 आकाशातील पक्षी, आणि समुद्रातील मासे, सागरात संचार करणारे सर्व प्राणी. 9 याहवेह, आमच्या प्रभो, संपूर्ण पृथ्वीवर तुमचे नाव किती वैभवी आहे!

**9** संगीत दिग्दर्शकासाठी; मूथ लब्बेन रागावर आधारित दावीदाचे स्तोत्र. याहवेह, मी माझ्या संपूर्ण मनापासून तुमचे आभार मानेन; मी तुमच्या सर्व अद्भुत कृत्यांबद्दल सांगेन. 2 मी आनंदित होईन आणि तुमच्यामध्ये हर्ष करेन; हे सर्वोच्च प्रभू, मी तुमच्या नावाची स्तुतिस्तोत्रे गाईन. 3 माझे शत्रू मागे वळतात; ते तुमच्यासमोर अडखळतात आणि नष्ट होतात. 4 कारण तुम्ही माझे अधिकार आणि न्यायाला पाठिंबा दिला आहे, तुम्ही नीतिमान न्यायाधीश म्हणून सिंहासनावर बसलेले आहात. 5 तुम्ही राष्ट्रांना धमकाविले आहे आणि दुष्टांना नष्ट केले आहे; त्यांची नावे तुम्ही कायमची पुसून टाकली आहेत. 6 माझे शत्रू कायमचे नष्ट झाले आहेत, तुम्ही त्यांची नगरे उद्ध्वस्त केली; त्यांची आठवणसुद्धा नाहीशी झाली आहे. 7 याहवेह सिंहासनावर सदासर्वकाळ विराजमान आहेत; न्यायनिवाडा करण्याकरिता त्यांनी आपले सिंहासन स्थापिले आहे. 8 ते नीतिमत्तेने जगावर राज्य करतात आणि समानतेने लोकांना रास्त न्याय देतात. 9 याहवेह, पीडितांसाठी आश्रय आहेत, संकटकाळी तेच आश्रयाचे दुर्ग आहेत. 10 ज्यांना तुमचे नाव ठाऊक आहे, ते तुमच्यावर भरवसा ठेवतात, कारण हे याहवेह, जे तुमचा धावा करतात त्यांना तुम्ही कधीही टाकत नाही. 11 सीयोनच्या सिंहासनावर विराजमान असलेल्या याहवेहची स्तुतिस्तोत्रे गा; त्यांनी केलेली अद्भुत कृत्ये सर्व राष्ट्रांमध्ये जाहीर करा. 12 जे रक्तपाताचा सूड घेतात, ते आठवण ठेवतात; दीनांच्या आक्रोशाकडे ते दुर्लक्ष करीत नाही. 13 हे याहवेह, माझे शत्रू माझा कसा छळ करतात ते पाहा! मजवर दया करा आणि मृत्यूच्या दारातून मला ओढून काढा, 14 मग मी सीयोनकन्येच्या वेशींवर तुमची स्तुतीची घोषणा करेन, आणि तुमच्या तारणात आनंद करेन. 15 दुसऱ्यांसाठी खणलेल्या खाचेतच राष्ट्रे पडली आहेत; स्वत:च लपवून ठेवलेल्या जाळयात त्यांचे पाय अडकले आहेत. 16 याहवेहची नीतिपूर्ण कृत्ये हीच

त्यांची ओळख आहे; दुष्ट स्वतःच्याच हस्तकर्माच्या सापळयात अडकले
आहेत. सेला 17 परमेश्वराला विसरणारी सर्व दुष्ट राष्ट्रे मृतांच्या राज्यात
पाठविली जातात. (Sheol h7585) 18 परंतु परमेश्वराला गरजवंताचा
कधीही विसर पडत नाही; दुःखितांच्या आशा कधीही नष्ट होणार नाहीत.
19 याहवेह, उठा, नाशवंत मानवाला विजयी होऊ देऊ नका; राष्ट्रांचा
न्याय तुमच्यासमोर होऊ द्या. 20 याहवेह, त्यांच्यावर भयाचा प्रहार करा;
आपण केवळ नाशवंत आहोत याची राष्ट्रांना जाणीव होऊ द्या. सेला

**10** याहवेह, तुम्ही दूर का उभे आहात? संकटसमयी तुम्ही स्वतःला
का लपविता? 2 दुष्ट मनुष्य आपल्या उद्धटपणात दुर्बलांचा छळ
करतो, त्याने योजलेल्या दुष्ट योजनांमध्ये असहाय अडकले जातात.
3 कारण हा दुष्ट मनुष्य स्वतःच्या दुष्ट वासनांची बढाई मारतो; तो
लोभी लोकांना आशीर्वाद देतो व याहवेहची निंदा करतो. 4 दुष्ट त्याच्या
गर्विष्ठपणामुळे परमेश्वराचा घेतच नाहीत; परमेश्वराचा विचारही त्याच्या
मनात येत नाही. 5 दुष्टाला प्रत्येक प्रयत्नात यश मिळते; तुमच्या
नियमांचा तो तिरस्कार करतो. त्याच्या विरोधकांकडे तो तुच्छतेने बघतो.
6 तो स्वतःशीच म्हणतो, “मला कधीही काही हलवू शकणार नाही.”
“मला कोणीही काही इजा करणार नाही,” अशी फुशारकी तो मारतो.
7 लबाडी व धमक्यांनी त्याचे मुख भरलेले आहे; त्याच्या जिभेखाली
उपद्रव आणि दुष्टता आहे. 8 गावात तो दबा धरून बसतो; गुप्तस्थळी तो
निर्दोषाचे रक्त पाडतो. त्याची नजर असहाय्याची शिकार करण्यासाठी
टपलेली असते; 9 तो सिंहासारखा दबा धरून बसतो; तो लाचार
लोकांना पकडण्याच्या प्रतिक्षेत असतो; तो दीनांना पकडून आपल्या
जाळयात ओढत नेतो. 10 बळी पडलेले लोक त्याच्या प्रबळ शक्तीखाली
दडपले जातात, त्याच्या प्रहारांनी चिरडले जातात. 11 तो स्वतःशी
बोलतो, “परमेश्वराच्या लक्षात हे कधीही येणार नाही, त्यांनी आपले
मुख लपविले आहे, ते हे पाहात नाहीत.” 12 याहवेह उठा, परमेश्वरा,
आपला हात उगारा! पीडितांना विसरू नका. 13 परमेश्वराला दुष्ट तुच्छ
का लेखतो? “परमेश्वर आपल्या दुष्कृत्यांचा झाडा कधीच घेणार नाही,”
असे तो आपल्या स्वतःशी का म्हणतो? 14 परंतु परमेश्वरा, तुम्ही
पीडितांच्या यातना पाहता; तुम्ही त्यांची संकटे लक्षात घेऊन आपल्या
नियंत्रणात घ्या. ते पीडित स्वतःला तुमच्या स्वाधीन करीत आहेत;
कारण तुम्ही पितृहीनांचे साहाय्यकर्ता आहात. 15 त्या दुष्टाचे भुजबळ
मोडून टाका; त्याच्या दुष्टपणाचा असा हिशोब घ्या, की त्याची दुष्टता
शोधून सापडणार नाही. 16 याहवेह हे सर्वकाळचे राजा आहेत; त्यांच्या
राज्यातून इतर राष्ट्रे नाहीशी झाली आहेत. 17 याहवेह, नम्र लोकांच्या
इच्छा तुम्ही जाणता; त्यांचा आक्रोश ऐकून तुम्ही त्यांचे सांत्वन करा.
18 गांजलेले व अनाथांचे रक्षण करा, म्हणजे मर्त्य मानवाची त्यांना पुन्हा
कधीही दहशत वाटणार नाही.

**11** संगीत दिग्दर्शकासाठी; दावीदाचे स्तोत्र. मी याहवेहचा आश्रय
घेतला आहे. तर मग तुम्ही मला असे का म्हणत आहात:
“पक्ष्याप्रमाणे तू आपल्या डोंगराकडे उडून जा,” 2 कारण पाहा, दुष्टांनी
आपली धनुष्ये वाकविली आहेत, त्यावर आपले बाण चढविले आहेत
की अंधारातून बाण मारून सरळ मनाच्या लोकांची हत्या करावी. 3
जर पायाच नष्ट झाला, तर नीतिमान काय करणार? 4 परंतु याहवेह
आपल्या पवित्र मंदिरात आहेत; याहवेह आपल्या स्वर्गीय सिंहासनावर
विराजमान आहेत. त्यांची दृष्टी सर्व मनुष्यास पाहते; पृथ्वीवर प्रत्येकास
ते पारखतात. 5 याहवेह नीतिमानाला पारखतात; परंतु दुष्ट, ज्यांना हिंसा
प्रिय आहे, अशांचा याहवेह आवेशाने द्वेष करतात. 6 जळते निखारे
आणि तप्त गंधकाचा पाऊस ते दुष्टांवर पाडतील; आपल्या दाहक
वाऱ्याने त्यांना होरपळून टाकतील. 7 कारण याहवेह नीतिमान आहेत,
न्यायीपण त्यांना प्रिय आहे; जे नीतिमान आहेत, त्यांना त्यांचे दर्शन
होईल.

**12** संगीत दिग्दर्शकासाठी; शमीनीथ वर आधारित दावीदाचे स्तोत्र.
याहवेह, साहाय्य करा, भक्तिमान नाहीसे होत आहेत; विश्वासयोग्य
लोक आता मनुष्यांमध्ये राहिलेले नाहीत. 2 प्रत्येकजण त्यांच्या
शेजाऱ्यांशी लबाड बोलतो, ते त्यांच्या ओठांनी खुशामत करतात परंतु
त्यांच्या हृदयात कपट असते. 3 खुशामत करणारे सर्व ओठ, आणि
प्रत्येक गर्विष्ठ जीभ याहवेह कापून टाको. 4 ते बढाई मारतात आणि
म्हणतात, “आम्ही आमच्या जिभेने प्रबल होऊ; आमचे ओठ आमचे
संरक्षण करतील, आम्हावर धनी कोण?” 5 याहवेह म्हणतात, “कारण
गरिबांना लुटले आहे व गरजवंत कण्हत आहेत. म्हणून मी आता उठेन
आणि त्यांची निंदा करणाऱ्यापासून त्यांना संरक्षण देईन.” 6 शुद्ध
केलेल्या चांदीप्रमाणे, सात वेळेस शुद्ध केलेल्या सोन्याप्रमाणे, याहवेहची
वचने शुद्ध आहेत. 7 जेव्हा मनुष्याच्या दुष्टपणाचा आदर केला जातो,
आणि दुष्ट सर्वत्र अहंकाराने फिरत असतात. याहवेह, तेव्हा तुम्हीच
गरजवंताचे रक्षण करणार आणि तुम्हीच त्यांना या दुष्टापासून सुरक्षित
ठेवाल.

**13** संगीत दिग्दर्शकासाठी; दावीदाचे स्तोत्र. याहवेह, आणखी किती
काळ? सर्वकाळ तुम्ही मला विसरणार का? किती काळ तुम्ही
मजपासून तुमचे मुख लपविणार? 2 मी किती काळ माझ्या विचारांशी
द्वंद करावे? कुठवर दुःखाने रात्रंदिवस माझे हृदय व्यापून टाकावे?
कुठवर माझ्या शत्रूंनी मजवर वरचढ व्हावे? 3 याहवेह, माझ्या परमेश्वरा,
मजकडे पाहा आणि मला उत्तर द्या. या अंधारात माझ्या डोळ्यांना
प्रकाश द्या, नाहीतर मजवर चिरनिद्रा ओढवेल. 4 माझे शत्रू म्हणतील
“मी त्याला पराभूत केले आहे,” आणि माझ्या पतनाबद्दल ते आनंदित
होतील. 5 कारण तुमच्या निरंतर प्रीतीवर मी भरवसा ठेवला आहे; माझे
हृदय तुमच्या तारणात हर्ष करीत आहे. 6 मी याहवेहची स्तुती गाईन,
कारण त्यांनी माझ्यावर उपकार केले आहेत.

**14** संगीत दिग्दर्शकासाठी. दावीदाचे स्तोत्र. मूर्ख आपल्या मनात
म्हणतो, “परमेश्वर नाही.” ते बहकलेले असून त्यांची कृत्ये दुष्ट
आहेत, सत्कर्म करणारा कोणी नाही. 2 मानवांमध्ये कोणी समंजस आहे
का? परमेश्वराचा शोध करणारे कोणी आहे का? हे पाहण्यासाठी याहवेह

स्वर्गातून खाली पाहतात. 3 प्रत्येकजण भटकून गेले आहेत; प्रत्येकजण
भ्रष्ट झाला आहे; सत्कर्म करणारा कोणीच नाही, एकही नाही. 4 दुष्कृत्य
करणाऱ्यांना हे ठाऊक नाही काय? भाकरी खाण्यासारखे ते माझ्या
लोकांना गिळून फस्त करतील. ते कधीही याहवेहला हाक मारत नाहीत.
5 पण पाहा, ते तिथे भयाने भरले आहेत, कारण परमेश्वर नीतिमानांच्या
पक्षाचे आहेत. 6 दुष्कर्मे करणारे, तुम्ही गरिबांच्या योजना उधळून
लावता, परंतु याहवेह त्यांचा आश्रय असतात. 7 अहाहा! सीयोनातून
इस्राएलची सुटका होईल! जेव्हा याहवेह त्यांच्या प्रजेची पुनर्स्थापना
करतील, तेव्हा याकोब हर्ष करो आणि इस्राएल आनंद करो!

**15** दावीदाचे स्तोत्र. याहवेह, तुमच्या पवित्र मंडपात कोण राहू
शकेल? तुमच्या पवित्र डोंगरावर कोण राहू शकेल? 2 ज्याचे
चालणे निर्दोष आहे, जो धार्मिकतेचे आचरण करतो, जो आपल्या
हृदयातून सत्य बोलतो; 3 जो आपल्या जिभेने निंदा करीत नाही,
जो आपल्या शेजाऱ्यांचे वाईट करीत नाही, आणि इतरांना कालिमा
लावत नाही; 4 जो कुटिल मनुष्याचा तिरस्कार करतो, याहवेहचे भय
धरणाऱ्यांचा सन्मान करतो, आणि जो स्वतःचे नुकसान होत असले तरी
दिलेले वचन पाळतो; 5 जो व्याज न आकारता पैसे उसने देतो; जो
निष्पाप लोकांविरुद्ध साक्ष देण्यासाठी लाच घेत नाही, जो कोणी या
गोष्टी करतो तो कधीही ढळणार नाही.

**16** दावीदाचे मिक्ताम परमेश्वरा, माझे रक्षण करा, कारण मी तुमच्या
आश्रयाला आलो आहे. 2 मी याहवेहला म्हणालो, “तुम्हीच
माझे प्रभू आहात; तुमच्याशिवाय दुसरे चांगले असे काहीच माझ्याकडे
नाही.” 3 पृथ्वीवरील लोक जे पवित्र आहेत, “ते आदरणीय आहेत,
त्यांच्याठायी मी प्रसन्न आहे.” 4 जे अन्य दैवतांच्या भजनी लागतात,
ते अनेक दुःखांनी ग्रासले जातील. अशा दैवतांना मी रक्तमय पेयार्पणे
अर्पिणार नाही किंवा त्यांची नावेही मी माझ्या ओठांनी उच्चारणार नाही.
5 याहवेह तुम्हीच माझे वतन, माझा प्याला आहात; तुम्हीच माझा वाटा
सुरक्षित करता. 6 माझ्या वाट्याला सीमारेषा सुखद ठिकाणी पडल्या
आहेत; माझ्यासाठी खरोखरच एक सुंदर वारसा आहे. 7 मी याहवेहची
स्तुती करणार, ज्यांनी माझे मार्गदर्शन केले आहे; रात्रीच्या समयी माझे
अंतःकरण मला बोध करते. 8 मी आपली दृष्टी सतत याहवेहवर ठेवली
आहे; ते माझ्या उजवीकडे आहेत, मी डळमळणार नाही. 9 यास्तव
माझे अंतःकरण उल्हासित आहे आणि माझी जीभ स्तुतिगान करीत
आहे; माझे शरीर देखील सुरक्षिततेत विसावा घेईल. 10 कारण तुम्ही
मला अधोलोकात राहू देणार नाही; किंवा तुमच्या विश्वासणाऱ्याला
तुम्ही कुजणे पाहू देणार नाही. (Sheol h7585) 11 तुम्ही मला जीवनाचा
मार्ग दाखवाल; तुमच्या समक्षतेत तुम्ही मला हर्षाने भराल, तुमच्या
उजव्या हातात सर्वदा सौख्य आहे.

**17** दावीदाची एक प्रार्थना. याहवेह, ऐका माझी विनंती न्यायपूर्ण
आहे, माझ्या आरोळीकडे लक्ष द्या. माझी प्रार्थना ऐका, जी कपटी
ओठातून येत नाही. 2 तुम्ही माझा रास्त न्याय करा; जे नीतियुक्त
तेच तुमच्या दृष्टीस पडो. 3 जरी तुम्ही माझे हृदय पारखले आहे,
रात्रीच्या वेळी तुम्ही माझी झडती घेतली आहे, तुम्ही मला पारखून
पाहिले, तरी माझ्यात तुम्हाला दोष आढळला नाही; माझ्या मुखाने
मी अपराध केले नाही. 4 जरी लोकांनी मला लाच देण्याचा प्रयत्न
केला, तरी तुमच्या मुखातील वचनांच्या आदेशानुसार मी त्यांच्या हिंसक
मार्गापासून स्वतःला अलिप्त ठेवले. 5 माझ्या पावलांनी तुमचा मार्ग
धरला आहेत, माझी पावले कधी घसरली नाहीत. 6 मी तुम्हालाच
हाक मारली आहे, कारण परमेश्वरा तुम्ही मला उत्तर द्याल; माझ्या
विनंतीकडे कान देऊन माझी प्रार्थना ऐका. 7 तुमचा आश्रय घेणाऱ्यांना
त्यांच्या शत्रूपासून उजव्या हाताने तुम्ही वाचविता, तुमच्या महान
प्रीतीची अद्भुत कृत्ये मला प्रकट करा. 8 तुमच्या पंखांच्या छायेखाली
तुमच्या डोळ्याच्या बुबुळाप्रमाणे माझे रक्षण करा; 9 मला ज्यांनी सर्व
बाजूने घेरले आहे त्या माझ्या प्राणघातक शत्रूंपासून, जे दुष्ट लोक
माझा नायनाट करण्यास तयार आहेत त्यांच्यापासून मला लपवा. 10
त्यांचे हृदय निर्दयी आहे, त्यांच्या मुखाचे शब्द गर्विष्ठपणाचे असतात.
11 त्यांनी माझा माग काढला व आता सर्व बाजूने मला घेरले आहे,
मला धुळीस मिळविण्यासाठी त्यांनी माझ्यावर पाळत ठेवली आहे. 12
शिकार करण्यास उत्सुक असलेल्या उपाशी सिंहासारखे, दबा धरून
बसलेल्या उग्र सिंहाप्रमाणे ते आहेत. 13 हे याहवेह, उठा, त्यांचा सामना
करा, त्यांचा नाश करा; तुमच्या तलवारीने दुष्टांपासून माझा बचाव करा.
14 याहवेह, तुमच्या हातांनी अशा लोकांपासून मला वाचवा, ज्यांना याच
जीवनात प्रतिफळ आहे. जी शिक्षा तुम्ही दुष्टांसाठी साठवून ठेवलेली
आहे त्यानेच त्यांचे पोट भरो, त्यांची संततीही तेच आधाशीपणे खाओ,
आणि त्यांचे उरलेले पुढच्या संततीलाही मिळो. 15 मी तर नीतिमत्वामुळे
तुमच्या मुखाचे दर्शन करणार; मी जागा होईन, तेव्हा तुमच्या दर्शनाने
माझे पूर्ण समाधान होईल.

**18** संगीत दिग्दर्शकासाठी; याहवेहचा सेवक दावीदाची रचना. जेव्हा
याहवेहने दावीदाला त्याच्या सर्व शत्रूंच्या हातातून आणि शौलाच्या
तावडीतून सोडविले, तेव्हा दावीदाने या शब्दात याहवेहसाठी गीत गाईले.
तो म्हणाला, याहवेह, माझे सामर्थ्य, माझे तुमच्यावर प्रेम आहे. 2
याहवेह माझे खडक, माझे दुर्ग आणि मला सोडविणारे; माझे परमेश्वर
माझे खडक आहेत, ज्यांच्या ठायी मी आश्रय घेतो, माझी ढाल आणि
माझ्या तारणाचे शिंग ते माझे शरणस्थान आहेत. 3 स्तुतीस योग्य
याहवेहचा मी धावा केला, आणि माझ्या शत्रूपासून माझी सुटका
झाली. 4 मृत्यूच्या साखळदंडानी मला जखडले, नाशाच्या प्रवाहांनी
मला बुडवून टाकले. 5 मृतलोकाच्या दोऱ्यांनी माझ्याभोवती वेटोळे
केले; मृत्यूचा पाश मला सामोरा आला. (Sheol h7585) 6 मी आपल्या
संकटात याहवेहचा धावा केला; परमेश्वराकडे मदतीसाठी मी हाक
मारली. त्यांनी आपल्या मंदिरातून माझी आरोळी ऐकली; माझा धावा
त्यांच्या कानांपर्यंत पोहोचला. 7 तेव्हा पृथ्वी हादरली व कंपित झाली,
आणि पर्वताचे पाये हादरले. याहवेहच्या क्रोधामुळे ते भयभीत झाले.
8 त्यांच्या नाकपुड्यातून धूर निघाला; भस्म करणारा अग्नी त्यांच्या

मुखातून निघाला, जळते निखारे त्यातून निघाले. 9 आकाशाला विभागून
याहवेह खाली आले; घनदाट ढग त्यांच्या पायाखाली होते. 10 करुबावर
आरूढ होऊन ते उडून आले; वाऱ्याच्या पंखांवर त्यांनी भरारी मारली.
11 अंधकार, व आकाशातील काळे मेघ यांचे आच्छादन; आपल्या
सभोवती त्यांचा मंडप केला आहे. 12 त्यांच्या तेजस्वी समक्षतेतून
ढगांमधून विजा लखलखल्या आणि गारांचे प्रचंड वादळ बाहेर पडले.
13 याहवेहने स्वर्गातून गर्जना केली; परात्पराच्या वाणीचा नाद झाला.
14 त्यांनी आपले बाण सोडले आणि शत्रूंची दाणादाण केली, मोठ्या
विजेच्या कडकडाटांनी त्यांना पळवून टाकले. 15 हे याहवेह, तुमच्या
धमकीने तुमच्या नाकपुड्यातील श्वासाच्या फुंकराने समुद्राचे तळ
उघडकीस आले, आणि पृथ्वीचे पाये उघडे पडले. 16 वरून त्यांनी
आपला हात लांब करून मला धरले; खोल जलांमधून त्यांनी मला बाहेर
काढले. 17 माझ्या बलवान शत्रूपासून माझे शत्रू जे माझ्यासाठी फार
शक्तिमान होते, त्यांच्यापासून मला सोडविले. 18 माझ्या विपत्कालच्या
दिवसात ते माझ्यावर चालून आले, परंतु याहवेह माझे आधार होते. 19
त्यांनी मला प्रशस्त ठिकाणी आणले; त्यांनी मला सोडविले कारण
त्यांना माझ्याठायी हर्ष होता. 20 याहवेहने माझ्या नीतिमत्तेनुसार
माझ्याशी व्यवहार केला आहे; माझ्या हाताच्या शुद्धतेनुसार त्यांनी मला
प्रतिफळ दिले आहे. 21 कारण याहवेहचे मार्ग मी पाळले आहेत; माझ्या
परमेश्वरापासून दूर गेल्याचा दोष माझ्यावर नाही. 22 त्यांचे सर्व नियम
माझ्यासमोर आहेत; मी त्यांच्या आज्ञेपासून दूर वळलो नाही. 23 मी
त्यांच्यापुढे निर्दोष आहे आणि मी स्वतःला पापापासून दूर ठेवले आहे.
24 याहवेहने माझ्या नीतिमत्तेनुसार, त्यांच्या दृष्टीसमोर माझ्या हाताच्या
शुद्धतेनुसार मला प्रतिफळ दिले आहे. 25 विश्वासणाऱ्यांशी तुम्ही विश्वासू
आहात, व निर्दोषांशी तुम्ही निर्दोषतेने वागता, 26 शुद्धजनांशी तुम्ही
शुद्धतेने वागता, परंतु कुटिलांशी तुम्ही चतुरतेने वागता. 27 नम्रजनांचा
तुम्ही उद्धार करता, परंतु उन्मत्त दृष्टीच्या लोकांचा तुम्ही पात करता.
28 याहवेह तुम्ही माझा दीप प्रज्वलित केला आहे; माझ्या परमेश्वराने
माझ्या अंधाराचा प्रकाश केला आहे. 29 तुमच्याच साहाय्याने मी
सैन्यावर मात करू शकतो; माझ्या परमेश्वरामुळे मी गड चढू शकतो.
30 परमेश्वराविषयी म्हणाल, तर त्यांचा मार्ग परिपूर्ण आहे. याहवेहचे
वचन दोषरहित आहे; जे याहवेहच्या ठायी आश्रय घेतात त्यांची ते
ढाल आहेत. 31 याहवेहखेरीज दुसरा कोण परमेश्वर आहे? आणि
आमच्या परमेश्वराशिवाय कोण खडक आहे? 32 परमेश्वरच मला सामर्थ्य
पुरवितात, आणि माझे मार्ग सरळ ठेवतात. 33 तेच माझे पाय हरिणींच्या
पायांसारखे करतात; कड्यांच्या माथ्यांवरून तेच मला सुखरुपपणे
नेतात. 34 ते माझ्या हातांना युद्धासाठी प्रशिक्षित करतात; माझे हात
कास्य धनुष्य वाकवितात. 35 माझी ढाल म्हणून तुम्ही मला तारण दिले
आहे, तुमचा उजवा हात मला आधार देतो; तुमच्या साहाय्याने मला थोर
केले आहे. 36 माझी पावले घसरू नयेत, म्हणून माझ्या पावलांसाठी
तुम्ही मार्ग विस्तृत केला आहे. 37 मी माझ्या शत्रूंचा पाठलाग केला,
त्यांना गाठले; त्यांचा नाश होईपर्यंत मी परतलो नाही. 38 मी त्यांना
असे तुडविले आहे, की ते उठू शकले नाही, ते माझ्या पायाखाली पडले.
39 तुमच्या शक्तीने मला युद्धासाठी सुसज्ज केले; माझ्या शत्रूंना तुम्ही
माझ्यासमोर लीन केले. 40 तुम्ही माझ्या वैऱ्यांना पाठ दाखविण्यास
भाग पाडले, आणि मी माझ्या शत्रूंचा नाश केला. 41 त्यांनी साहाय्याची
आरोळी केली, पण त्यांना वाचविण्यास कोणी नव्हते; त्यांनी याहवेहचा
धावा केला, परंतु त्यांनी उत्तर दिले नाही. 42 वाऱ्यावर उडून जाणाऱ्या
धुळीप्रमाणे मी त्यांचा भुगा केला; रस्त्यावरील चिखलाप्रमाणे त्यांना
तुडवून टाकले. 43 लोकांच्या हल्ल्यापासून तुम्ही माझी सुटका केली;
राष्ट्रांचा प्रमुख म्हणून तुम्ही मला नेमले. ज्या लोकांची मला ओळख
नव्हती ते आता माझी सेवा करतात, 44 परदेशीय माझ्यासमोर भीतीने
वाकतात; माझे नाव ऐकताच ते माझी आज्ञा पाळतात. 45 त्या सर्वांचे
धैर्य खचून गेले, ते त्यांच्या गडातून थरथर कापत बाहेर येतात. 46
याहवेह जिवंत आहेत! माझ्या खडकाची स्तुती असो! परमेश्वर माझा
तारणारा सर्वोच्च असो! 47 परमेश्वरच आहेत जे माझ्यासाठी सूड घेतात,
ते राष्ट्रांना माझ्या अधीन करतात, 48 ते माझी माझ्या वैऱ्यांपासून
सुटका करतात. तुम्ही मला माझ्या वैऱ्यांपेक्षा उंचावले आहे; हिंसक
मनुष्यापासून तुम्ही मला सोडविले. 49 म्हणून हे याहवेह, राष्ट्रांमध्ये मी
तुमची थोरवी गाईन; मी आपल्या नावाची स्तुती गाईन. 50 ते आपल्या
राजाला महान विजय देतात; ते आपल्या अभिषिक्तावर, दावीदावर
आणि त्याच्या वंशजांवरही सर्वदा प्रीती करतात.

**19** संगीत दिग्दर्शकासाठी. दावीदाचे स्तोत्र. आकाश परमेश्वराची
महिमा वर्णिते; अंतराळ त्यांच्या अद्भुत हस्तकृतीची घोषणा
करते. 2 दिवसेंदिवस ते वार्तालाप करतात; प्रत्येक रात्री ते ज्ञान प्रगट
करते. 3 या प्रकियेत बोलणे नाही, शब्दही नाही, त्यात आवाजही नाही;
4 तरीही पृथ्वीच्या दिगंतापर्यंत त्यांची वाणी जाते, कारण जगाच्या
शेवटपर्यंत त्यांचा शब्द गेला आहे. परमेश्वराने सूर्यासाठी स्वर्गात मंडप
तयार केला आहे. 5 आपल्या मंडपातून निघालेल्या तेजस्वी वराप्रमाणे,
जसा एखादा विजेता आपली धाव पूर्ण करण्यास उल्लासतो. 6 तो
आकाशाच्या एका टोकास उगवतो दुसऱ्या टोकापर्यंत परिक्रमा पूर्ण
करतो; त्याच्या उष्णतेपासून काहीही लपून राहू शकत नाही. 7 याहवेहचे
नियम उत्कृष्ट आहेत; ते आत्म्याला ताजेतवाने करतात. याहवेहचे नियम
विश्वसनीय आहेत, ते भोळ्यांना सुज्ञ करतात. 8 याहवेहचे नियम योग्य
आहेत, ते हृदयास आनंद देतात, याहवेहच्या आज्ञा तेजस्वी आहेत,
त्या नेत्रांना प्रकाश देतात. 9 याहवेहचे भय निर्मळ आहे, ते सर्वकाळ
टिकणारे आहेत. याहवेहचे निर्णय स्थिर आहेत, आणि ते सर्व पूर्णतः
नीतिमान आहेत. 10 सोन्यापेक्षा ते अधिक मौल्यवान आहेत, अतिशुद्ध
सोन्यापेक्षाही; ते मधापेक्षा मधुर आहेत, पोळ्यातील मधाहूनही ते
अधिक गोड आहेत. 11 कारण ते तुमच्या सेवकांस सावध करतात;
त्याचे पालन करणाऱ्यास मोठे प्रतिफळ मिळते. 12 स्वतःच्या चुका
कोणाला समजणार? माझ्या गुप्त दोषांबद्धल मला क्षमा करून निर्दोष
ठरवा. 13 तसेच जाणूनबुजून पाप करण्यापासून आपल्या सेवकास
थांबवा; ते मला त्याच्या अधीन करू नये. तेव्हाच मी दोषमुक्त होईन,

एखाद्या मोठ्या गुन्ह्याबाबत निर्दोष ठरेन. 14 याहवेह, माझे खडक
आणि माझे तारणहार, माझ्या मुखातून निघालेले शब्द आणि माझ्या
अंतःकरणातील मनन तुमच्या नजरेत संतोष देणारे होवोत.

**20** संगीत दिग्दर्शकासाठी. दावीदाचे स्तोत्र. संकटाच्या समयी याहवेह
तुझे ऐको; याकोबाच्या परमेश्वराचे नाम सर्व अरिष्टांपासून तुझे
रक्षण करो. 2 त्यांच्या पवित्रस्थानातून ते तुला मदत पाठवो आणि
ते तुला सीयोनातून साहाय्य पाठवो. 3 तू दिलेल्या सर्व अर्पणांचे
त्यांना स्मरण होवो आणि तुझी होमार्पणे ते स्वीकारोत. सेला 4 तुझ्या
हृदयातील मनोरथ ते पूर्ण करो आणि तुझ्या सर्व योजना ते सिद्धीस
नेवोत. 5 तुझ्या विजयात आम्ही आनंदाने गर्जना करू आणि आपल्या
परमेश्वराच्या नावाने आपला झेंडा उंचावू. याहवेह तुझे सर्व मनोरथ पूर्ण
करोत. 6 आता मला माहीत आहे: याहवेह आपल्या अभिषिक्तास
विजय प्रदान करतात; पवित्र स्वर्गातून त्यांच्या तारणदात्या उजव्या
हाताच्या सामर्थ्याने त्याला उत्तर देतात. 7 कोणी रथांवर आणि कोणी
घोड्यांवर भरवसा ठेवतात, परंतु आम्ही याहवेह आमच्या परमेश्वराच्या
नावावर भरवसा ठेऊ. 8 ती कोसळतील आणि नाश पावतील, पण
आम्ही उठू आणि बळकटपणे उभे राहू. 9 याहवेह, राजाला विजयी
करा! जेव्हा आम्ही हाक मारू, तेव्हा आमचे ऐका!

**21** संगीत दिग्दर्शकासाठी. दावीदाचे स्तोत्र. याहवेह, तुमच्या
सामर्थ्यांमुळे राजा केवढा हर्ष पावतो. तुम्ही दिलेल्या विजयामुळे
तो अत्यंत उल्लासतो! 2 कारण त्याचे मनोरथ तुम्ही पूर्ण केले आहेत;
त्याने मागितलेली एकही गोष्ट तुम्ही अमान्य केली नाही. सेला 3 उत्कृष्ट
आशीर्वादाने तुम्ही त्याचे स्वागत केले; तुम्ही त्याच्या मस्तकावर शुद्ध
सोन्याचा राजमुकुट घातला. 4 त्याने तुमच्याजवळ जीवनाची मागणी
केली— तुम्ही त्याला युगानुयुगाचे आयुष्य दिले. 5 तुम्ही त्याला विजय
आणि बहुमान दिला; तुम्ही त्याला ऐश्वर्य व वैभव दिले. 6 सर्वकाळचे
सुख देऊन तुम्ही त्याला संपन्न केले आणि तुमच्या समक्षतेचा आनंद
तुम्ही त्याला दिला. 7 कारण राजाचा भरवसा याहवेहवर आहे; सर्वोच्च
परमेश्वराच्या अक्षय प्रीतीमुळे तो कधीही ढळणार नाही. 8 तुमचा द्वेष
करणारे तुमचे सर्व शत्रू तुमच्या हाती सापडतील. तुमचा उजवा हात
तुमच्या विरोधकांचा ताबा घेईल. 9 तुम्ही युद्ध करण्यासाठी जेव्हा प्रगट
व्हाल, तेव्हा तुम्ही अग्नीच्या भट्टीमध्ये भस्म केल्यागत त्यांना नष्ट
कराल. आपल्या क्रोधाने याहवेह त्यांना गिळंकृत करतील, याहवेहचा
अग्नी त्यांना भस्म करेल. 10 तुम्ही त्यांची संतती पृथ्वीवरून, त्यांचे
वंशज मानवजातीतून कायमचे नाहीसे कराल. 11 ही माणसे जरी
तुमच्याविरुद्ध कट रचतात, आणि कुटिल योजना आखतात, परंतु ते
यशस्वी होणार नाहीत. 12 जेव्हा तुमचे धनुष्य ताणून तुम्ही सरळ
त्यांच्यावर रोखाल तेव्हा पाठ दाखवून पळण्यास तुम्ही त्यांना भाग
पाडाल. 13 याहवेह, तुम्ही आपल्या शक्तीने उंचविले जावो; आम्ही
तुमच्या सामर्थ्याचे गुणगान व स्तुतिगान करू.

**22** संगीत दिग्दर्शकासाठी. “पहाटेची हरिणी” या रागावर बसविलेले
दावीदाचे स्तोत्र. माझ्या परमेश्वरा, माझ्या परमेश्वरा, तुम्ही माझा
त्याग का केला? मला वाचविण्यास तुम्ही एवढे दूर का राहिले, माझ्या
विव्हळण्याची आरोळी तुम्हापासून दूर का? 2 माझ्या परमेश्वरा, मी
दिवसा तुम्हाला हाक मारतो, परंतु तुम्ही उत्तर देत नाही, रात्री पण मला
कोणताही विसावा नाही. 3 तरीपण तुम्ही पवित्र आहात; इस्राएलाच्या
स्तवनांवर तुम्ही विराजमान आहात. 4 तुमच्यावर आमच्या पूर्वजांनी
भरवसा ठेवला; तुमच्यावर त्यांनी भरवसा ठेवला आणि तुम्ही त्यांना
सोडविले. 5 त्यांनी तुमचा धावा केला आणि तुम्ही त्यांना वाचविले;
तुमच्यावरील विश्वासाने त्यांना लज्जित होऊ दिले नाही. 6 परंतु मी
तर कीटक आहे, मनुष्य नाही, मनुष्याकडून माझा तिरस्कार आणि
अवहेलना झाली आहे. 7 मला पाहून ते माझा उपहास करतात; ते
माझा अपमान करतात, आपले डोके हालवीत, 8 ते म्हणतात, “त्याने
याहवेहवर आपला भरवसा ठेवला आहे, याहवेह त्याला मुक्त करो.
तेच त्याची सुटका करो, कारण त्यांच्याठायी त्याला संतोष आहे.” 9
तुम्हीच मला माझ्या आईच्या उदरातून सुखरुप बाहेर काढले; मी माझ्या
आईच्या कुशीत होतो, तेव्हापासून मी तुमच्यावर भरवसा ठेवला आहे;
10 मी जन्मापासून तुमच्या संरक्षणाखाली आहे. मी आईच्या उदरात
असल्यापासून तुम्ही माझे परमेश्वर आहात. 11 माझ्यापासून दूर राहू
नका, कारण संकट जवळ आहे आणि मला साहाय्य करणारा कोणी
नाही. 12 अनेक बैलांनी मला घेरले; बाशानातील दांडग्या बैलांनी मला
घेरलेले आहे. 13 गर्जना करीत आपल्या भक्ष्यांवर तुटून पडणाऱ्या
सिंहाप्रमाणे उघड्या जबड्यांनी ते माझ्यावर चालून येत आहेत. 14
माझी शक्ती पाण्याप्रमाणे निथळून गेली आहे, माझी सर्व हाडे सांध्यातून
निखळली आहेत; माझे हृदय मेणासारखे झाले आहे; ते आतल्याआत
वितळून गेले आहे. 15 माझे मुख खापरीप्रमाणे शुष्क झाले आहे;
माझी जीभ माझ्या टाळूला चिकटली आहे; तुम्ही मला मृत्यूच्या धुळीत
मिळविले आहे. 16 मला कुत्र्यांनी वेढले आहे, दुष्कर्म्यांची टोळी
मला घेरून आहे; त्यांनी माझ्या हातापायाला विंधले आहे. 17 माझ्या
शरीरातील हाडे मी मोजू शकतो, हे लोक माझ्याकडे कसे टक लावून
पाहत आहेत. 18 ते माझी वस्त्रे आपसात वाटून घेतात आणि माझ्या
वस्त्रासाठी चिठ्ठ्या टाकतात. 19 परंतु याहवेह, तुम्ही माझ्यापासून दूर
राहू नका; हे माझ्या सामर्थ्या, माझ्या साहाय्यासाठी त्वरेने या. 20
तलवारीपासून मला सोडवा, कुत्र्यांच्या आक्रमणापासून माझे मोलवान
प्राण वाचवा. 21 सिंहाच्या जबड्यातून; रानटी बैलांच्या शिंगापासून
माझे रक्षण करा. 22 मी तुमचे नाव माझ्या लोकांसमोर जाहीर करेन; मी
मंडळीमध्ये तुमचे स्तवन करेन. 23 जे याहवेहचे भय बाळगतात, ते तुम्ही
त्यांची स्तुती करा! याकोब वंशजहो, त्यांचा सन्मान करा! इस्राएलचे
वंशजहो, त्यांचा आदर करा. 24 कारण त्यांनी दुःखितांचे दुःख, तुच्छ
जाणले नाही किंवा त्यांचा तिरस्कार केला नाही; त्यांनी आपले मुख
त्यांच्यापासून फिरविले नाही परंतु त्यांचा मदतीचा धावा त्यांनी ऐकला.
25 महासभेत उभा राहून तुमची स्तुती करण्याची प्रेरणा तुमच्याकडूनच

येत आहे; तुमचे भय धरणाऱ्यांपुढे मी माझे नवस फेडीन. 26 नम्र लोक खातील आणि तृप्त होतील; जे याहवेहचा शोध करतात, ते त्यांची स्तुती करतील. तुमची हृदये सर्वदा सजीव असो! 27 सर्व राष्ट्रे याहवेहस स्मरण करतील; दिगंतरीचे लोक त्यांच्याकडे वळतील; आणि राष्ट्रातील सर्व कुटुंब त्यांच्यासमोर नतमस्तक होतील. 28 कारण याहवेहचेच राज्य आहे आणि सर्व राष्ट्रांवर तेच अधिपती आहेत. 29 पृथ्वीवरील सर्व समृद्ध लोक मेजवानी व उपासना करतील; जे लोक स्वतःला वाचवू शकत नाहीत व धुळीस मिळणारे प्रत्येक त्यांच्यासमोर गुडघे टेकतील. 30 येणारी संपूर्ण पिढी त्यांची सेवा करेल; पुढच्या पिढीला ती प्रभूच्या अद्भुत कृत्यांबद्दल सांगेल. 31 ते परमेश्वराच्या नीतिमत्वाची घोषणा करतील, आणि न जन्मलेल्या पिढीला त्यांनीच हे सर्व केले असे जाहीर करतील.

**23** दावीदाचे स्तोत्र. याहवेह माझे मेंढपाळ आहेत, म्हणून मला काही उणे पडणार नाही. 2 ते मला हिरव्यागार कुरणात विश्रांती देतात, ते मला संथपणे वाहणाऱ्या झऱ्याजवळ नेतात. 3 ते माझा जीव ताजातवाना करतात. ते आपल्या नावासाठी मला नीतिमार्गाने चालवितात. 4 मृत्युछायेच्या दरीतूनही मी जात असलो, तरी कोणत्याही अरिष्टाला भिणार नाही, कारण तुम्ही माझ्याबरोबर आहात; तुमची आकडी व तुमची काठी मला धीर देतात. 5 तुम्ही माझ्या शत्रूंच्या देखत माझ्यापुढे ताट वाढता; तुम्ही माझ्या डोक्याला तेलाने अभिषेक करता; माझा प्याला भरभरून वाहत आहे. 6 खरोखर चांगुलपणा व करुणामयप्रीती मजबरोबर आयुष्यभर असतील, आणि मी याहवेहच्या, घरात सदासर्वदा राहीन.

**24** दावीदाचे एक स्तोत्र. पृथ्वी व तिच्यातील सर्वकाही याहवेहचे आहे. जग आणि त्यात राहणारे सारे त्यांचेच आहेत. 2 कारण त्यांनीच तिचा पाया महासागरांवर घातला, आणि त्यांनीच तिला जलप्रवाहांवर स्थिर केले. 3 याहवेहचा डोंगर कोण चढून जाईल? त्यांच्या पवित्रस्थानी कोण उभा राहील? 4 ज्याचे हात निर्मळ आणि ज्याचे हृदय शुद्ध आहे, जो मूर्तींवर भरवसा ठेवत नाही, जो खोटी शपथ वाहत नाही. 5 त्यांना याहवेहपासून आशीर्वाद लाभेल. त्यांचा तारणकर्ता परमेश्वर त्यांना नीतिमान ठरवेल. 6 हीच अशी पिढी आहे जी याहवेहचा शोध घेत आहे, याकोबाच्या परमेश्वरा, जे तुमच्या दर्शनासाठी आतुर आहेत. सेला 7 अहो वेशींनो, आपले मस्तक उंच करा; प्राचीन द्वारांनो, उच्च व्हा; गौरवाच्या राजाला आत प्रवेश करू द्या. 8 असा गौरवशाली राजा कोण आहेत? याहवेह जे समर्थ व प्रबळ आहेत, जे युद्धात पराक्रमी आहेत. 9 अहो वेशींनो, आपले मस्तक उंच करा; प्राचीन द्वारांनो, सताड उघडा; महातेजस्वी महाराज आत येतील. 10 हा गौरवशाली राजा कोण आहेत? सर्वशक्तिमान याहवेह— तेच आहेत गौरवशाली राजा. सेला

**25** दावीदाचे स्तोत्र. याहवेह, माझ्या परमेश्वरा, मी तुमच्यावर भरवसा ठेवतो. 2 माझ्या परमेश्वरा मी तुमच्यावर भरवसा ठेवतो. मला लज्जित होऊ देऊ नका, माझ्या शत्रूंना मजवर विजयी होऊ देऊ नका. 3 जो कोणी तुमच्यावर आशा धरतो, तो कधीही लज्जित होणार नाही. पण जे विनाकारण उपद्रव देतात, ते सर्वजण लज्जित होतील. 4 याहवेह, मला तुमचे मार्ग दाखवा, तुमचे मार्ग मला शिकवा. 5 मला तुमच्या सत्यामध्ये चालवा आणि शिक्षण द्या; कारण मला तारणारे परमेश्वर तुम्हीच आहात, आणि दिवसभर माझी आशा तुम्हामध्ये आहे. 6 याहवेह, तुम्ही आपली महान कृपा व प्रीती स्मरण करा, ती सनातन काळापासून आहेत. 7 माझी तारुण्यातील पातके आणि बंडखोर वृत्ती आठवू नका; तुमच्या प्रीतीनुसार माझे स्मरण करा, कारण याहवेह, तुम्ही चांगले आहात. 8 याहवेह चांगले आणि न्यायी आहेत; म्हणून ते पापी जनांस आपल्या मार्गांचे शिक्षण देतात. 9 ते नम्रजनांस नीतिमत्वाच्या मार्गावर नेतात, आणि त्यांना आपल्या मार्गाचे शिक्षण देतात. 10 जे याहवेहचे करार आणि नियमशास्त्र पाळतात, त्यांच्यासाठी त्यांचे सर्व मार्ग प्रीतीचे आणि विश्वासयोग्य आहेत. 11 याहवेह, आपल्या नावाच्या गौरवासाठी माझे अपराध क्षमा करा, कारण ते घोर आहेत. 12 याहवेहला भिऊन वागणारा मनुष्य कोण आहे? याहवेह, त्याने ज्या मार्गाने जावे, त्या मार्गाचे शिक्षण त्याला देतील. 13 ते समृद्धीत आपले दिवस व्यतीत करतील आणि त्यांची संतती पृथ्वीचे वतन पावतील. 14 याहवेहचे भय धरणाऱ्यांवर ते आपली रहस्ये प्रगट करतात; त्यांनाच ते आपला करार जाहीर करतात. 15 माझे नेत्र याहवेहकडे लागलेले आहेत, कारण तेच माझे पाय जाळ्यातून सोडवतील. 16 याहवेह, माझ्याकडे वळून मजवर दया करा, कारण मी एकटा आणि पीडित आहे. 17 माझ्या अंतःकरणातील यातना दूर करा आणि माझ्या तीव्र मनोवेदनेतून मला मुक्त करा. 18 माझे क्लेश आणि माझ्या वेदना पाहा आणि माझ्या सर्व पातकांची क्षमा करा. 19 पाहा, मला अनेक शत्रू आहेत आणि किती तीव्रपणे ते माझा द्वेष करतात. 20 माझ्या जिवाचे रक्षण करा आणि मला वाचवा; मला लज्जित होऊ देऊ नका, कारण मी तुमच्या आश्रयास आलो आहे. 21 सात्विकपणा व सरळपणा माझे रक्षण करो, कारण याहवेह, माझा भरवसा तुमच्यावर आहे. 22 परमेश्वरा, इस्राएली राष्ट्राची, त्यांच्या सर्व त्रासातून मुक्तता करा!

**26** दावीदाचे स्तोत्र. याहवेह, माझा न्याय करून मला निर्दोष जाहीर करा, मी दोषरहित जीवन जगलो; याहवेह, मी न डगमगता तुमच्यावर विश्वास ठेवला आहे. 2 याहवेह, माझी परीक्षा घ्या, माझे परीक्षण करा, माझे मन आणि हृदयाची पारख करा. 3 कारण मी नेहमीच तुमच्या अतुलनीय करुणेची आठवण ठेवतो आणि तुमच्या विश्वासूपणावर अवलंबून राहिलो. 4 कपटी लोकांसोबत मी बसत नाही किंवा ढोंगी लोकांची संगत मी धरत नाही. 5 दुष्कर्म करणाऱ्यांच्या सर्व सभा मला घृणास्पद वाटतात आणि मी त्या दुष्टांच्या संगतीत बसत नाही. 6 मी माझे हात धुऊन निर्दोषत्व सिद्ध करेन आणि याहवेह, मी तुमच्या वेदीला परिक्रमा घालेन, 7 म्हणजे उंच आवाजाने तुमची उपकारस्तुती करेन आणि तुमच्या अद्भुत कृत्यांचे वर्णन करेन. 8 याहवेह, मला तुमचे निवासस्थान आवडते, इथेच तुमचे वैभव वसती करते. 9 पातकी लोकांसोबत माझ्या जीवाला, आणि रक्तपिपासू लोकांसोबत

माझे प्राण घेऊ नका. 10 त्यांच्या हातात दुष्ट योजना आहेत, त्यांचा उजवा हात लाचेने भरलेला आहे. 11 मी तर माझे जीवन निर्दोषतेने जगेन; मला मुक्त करा आणि माझ्यावर कृपा करा. 12 माझे पाय सपाट जमिनीवर स्थिर आहेत; महासभेत मी याहवेहची जाहीरपणे स्तुती करेन.

**27** दावीदाचे स्तोत्र. याहवेह माझे प्रकाश व माझे तारण आहेत— मी कोणाचे भय बाळगू? याहवेह माझ्या जीवनाचे दुर्ग आहेत— मला कोणाचे भय आहे? 2 जेव्हा वाईट लोक मला गिळण्यास माझ्यावर हल्ला करतील, तेव्हा माझे शत्रू व माझे विरोधकच अडखळतील आणि पडतील. 3 जरी सैन्याने मजभोवती वेढा घातला, तरी माझे अंतःकरण भयभीत होणार नाही; माझ्याविरुद्ध युद्ध जरी पेटले, तरी मी निश्चिंत राहीन. 4 मी याहवेहला एक याचना केली, हीच माझी आकांक्षा आहे: मी आयुष्यभर याहवेहच्या भवनात वस्ती करावी जेणेकरून मी याहवेहचे सौंदर्य बघून त्यांच्या मंदिरात ध्यान करावे. 5 कारण संकटाच्या दिवसात ते मला त्यांच्या वसतिस्थानात सुरक्षित ठेवतील; तेच मला आपल्या निवासमंडपात लपवून ठेवतील; उंच खडकावर मला सुरक्षा देतील. 6 माझ्या सभोवती असणाऱ्या शत्रूंसमोर माझे मस्तक उंच करतील. मी त्यांच्या पवित्र मंडपात हर्षगर्जना करून यज्ञ अर्पण करेन; मी गायन व संगीताने माझ्या याहवेहची स्तुती करेन. 7 याहवेह, माझी याचना ऐका; माझ्यावर दया करा आणि मला उत्तर द्या. 8 तुमच्याविषयी माझे अंतःकरण म्हणाले, “त्यांचे मुख शोध!” हे याहवेह, मी तुमचे मुख शोधेन. 9 तुम्ही आपले मुख माझ्यापासून लपवू नका, तुमच्या दासाला रागाने दूर लोटू नका; तुम्हीच माझे सहायक राहिले आहात; हे माझ्या तारणकर्त्या परमेश्वरा, मला नाकारू नका वा माझा त्याग करू नका. 10 माझ्या आईवडिलांनी माझा त्याग केला. तरी याहवेह, माझा स्वीकार कराल. 11 याहवेह, मला तुमचे मार्ग शिकवा; माझी छळणूक करणाऱ्यांमुळे मला सरळ मार्गावर घेऊन चला. 12 मला माझ्या शत्रूंच्या तावडीत सापडू देऊ नका, कारण खोटी साक्ष देणारे आणि क्रूरपणाने फुत्कारणारे माझ्याविरुद्ध उठले आहेत. 13 मला हा पूर्णपणे विश्वास आहे: की मी या जीवनातच याहवेहच्या चांगुलपणाचा अनुभव घेणार. 14 याहवेहची प्रतीक्षा कर; हिंमत बांध, धैर्य धर; आणि याहवेहचीच प्रतीक्षा कर.

**28** दावीदाचे स्तोत्र. याहवेह, मी तुम्हाला हाक मारत आहे; तुम्ही माझे आश्रयदुर्ग आहात. माझ्यासाठी आपले कान बंद करू नका; जर तुम्ही उत्तर दिले नाही, तर मी खड्ड्यात पडलेल्या लोकांसारखा होईन. 2 मी पवित्रस्थानाकडे माझे हात उंच करतो; साहाय्यासाठी तुम्हाला हाक मारतो; माझी दयेची आरोळी ऐका. 3 दुष्टांना दिलेल्या शिक्षेमध्ये मला ओढू नका, जे अन्याय करतात, शेजाऱ्यांशी त्यांचे संभाषण अतिशय सलोख्याचे आहे, परंतु त्यांच्या हृदयात केवळ कपट असते. 4 जे शासन त्यासाठी उचित आहे, ते त्यांना पुरेपूर करा; त्यांच्या दुष्टाईच्या मानाने त्यांना यथायोग्य शासन करा; त्यांच्या सर्व दुष्ट कृत्यांबद्दल त्यांना योग्य परतफेड करा. 5 कारण याहवेहच्या महान कृत्यांचे व त्यांच्या हातांनी केलेल्या कार्याचे त्यांच्या दृष्टीने काही महत्त्व नाही. याहवेहच त्यांचा नाश करतील. मग ते पुन्हा कधीही पुन्हा उभे राहू शकणार नाही. 6 याहवेहची स्तुती करा, कारण त्यांनी माझी दयेची आरोळी ऐकली आहे. 7 याहवेह माझे सामर्थ्य आणि माझी ढाल आहेत; माझे हृदय त्यांच्यावर भरवसा ठेवते, तेच माझे साहाय्य करतात. माझे अंतःकरण आनंदाने उड्या मारत आहे, माझ्या गीताद्वारे मी त्यांचे स्तवन करेन. 8 याहवेह आपल्या प्रजेचे बल आहेत, आपल्या अभिषिक्ताच्या तारणाचे आश्रयदुर्ग आहेत. 9 तुम्ही आपल्या लोकांचे रक्षण करा आणि आपल्या वतनास आशीर्वाद द्या; त्यांचे मेंढपाळ होऊन त्यांना सदासर्वकाळ उचलून धरा.

**29** दावीदाचे स्तोत्र. अहो दिव्यदूतांनो, याहवेहला गौरव आणि सामर्थ्य द्या. 2 याहवेहच्या नावाला योग्य ते गौरव द्या; पवित्रतेच्या वैभवाने याहवेहची उपासना करा. 3 याहवेहची वाणी जलांवर आहे; गौरवशाली याहवेहची वाणी महा जलाशयांवर गर्जत आहे. 4 याहवेहची वाणी प्रतापशाली आहे; प्रभावी आहे याहवेहचा स्वर. 5 याहवेहच्या गर्जनेने देवदारू वृक्ष मोडून पडतात; लबानोनमधील देवदारू वृक्ष दुभंगतात. 6 लबानोनचा डोंगर वासराप्रमाणे आणि सिर्योन तरुण रानबैलाप्रमाणे बागडतो; 7 याहवेहचा आवाज कडाडतो, विजा चमकल्यासारखा. 8 याहवेहच्या आवाजाचा गडगडाट वाळवंटे ढवळून काढतात; कादेशचे अरण्य याहवेह कंपित करतात. 9 याहवेहच्या आवाजाने हरिणी प्रसवतात आणि वने पर्णहीन होतात. आणि त्यांच्या मंदिरात सर्वजण म्हणतात: “याहवेहचा, महिमा असो.” 10 याहवेह जलप्रलयावर सिंहासनावर आरूढ झालेले आहेत; याहवेहच महाराज बनून सिंहासनावर सर्वकाळ स्थानबद्ध झालेले आहेत. 11 याहवेह आपल्या लोकांना सामर्थ्य देतात; याहवेह आपल्या लोकांना शांती देऊन आशीर्वादित करतात.

**30** एक स्तोत्र. मंदिराच्या समर्पण सोहळयासाठी एक गाणे, दावीदाचे स्तोत्र याहवेह मी तुमची प्रशंसा करेन, कारण तुम्ही मला खोल दरीतून बाहेर काढले आहे आणि माझ्या शत्रूंना माझा उपहास करू दिला नाही. 2 हे याहवेह, माझ्या परमेश्वरा, मी तुम्हाला साहाय्यासाठी विनवणी केली आणि तुम्ही मला रोगमुक्त केले. 3 याहवेह तुम्ही मला अधोलोकातून बाहेर काढले; तुम्ही मला गर्तेत जाण्यापासून वाचविले. (Sheol h7585) 4 अहो याहवेहच्या भक्तांनो, त्यांची स्तुतिस्तोत्रे गा, त्यांच्या पवित्र नावाला धन्यवाद द्या. 5 त्यांचा क्रोध क्षणभर टिकतो, पण त्यांची कृपा जन्मभर राहते. विलाप करणे केवळ रात्रभर राहील, परंतु प्रातःकाल उगवताच आनंद होईल. 6 माझ्या भरभराटीच्या वेळी मी म्हणालो, “मी कधीही डगमगणार नाही.” 7 याहवेह, तुमच्या कृपेने मला बळकट पर्वताप्रमाणे स्थिर केले होते, परंतु तुम्ही आपले मुख लपविले, तेव्हा मी भयभीत झालो. 8 याहवेह मी तुमचा धावा केला, मी प्रभूला कृपेची विनवणी केली. 9 मी चिरनिद्रीत होण्यापासून मी अधोलोकात जाण्यापासून काय लाभ? माती तुमची स्तुती करेल काय? ती तुमच्या विश्वासूपणाची साक्ष देईल काय? 10 याहवेह, माझे ऐका,

मजवर दया करा; याहवेह मला साहाय्य करा. 11 तुम्ही माझ्या शोकाचे
रूपांतर हर्षनृत्यात केले. तुम्ही माझे शोकाचे गोणपाट काढून मला
उल्हासाची वस्त्रे घातली, 12 जेणेकरून मी शांत न राहता, माझ्या
हृदयाने सदैव तुमची स्तुतिस्तोत्रे गात राहावे. याहवेह, माझ्या परमेश्वरा,
मी सदासर्वकाळ तुमची प्रशंसा करीतच राहीन.

**31** संगीत दिग्दर्शकासाठी. दावीदाचे स्तोत्र याहवेह, मी केवळ
तुमच्याच ठायी आश्रय घेतला आहे; मला कधीही लज्जित होऊ
देऊ नका; आपल्या नीतिमत्वानुसार मला सोडवा. 2 तुम्ही आपले कान
माझ्याकडे लावा; त्वरेने येऊन मला सोडवा; माझ्या आश्रयाचे खडक
व्हा, मला वाचवण्यासाठी बळकट दुर्ग व्हा. 3 कारण तुम्हीच माझे खडक
व माझे दुर्ग आहात; तुमच्या नावाकरिता मला मार्गदर्शन करा आणि
मला चालवा. 4 माझ्यासाठी लावलेल्या सापळ्यांमधून तुम्ही मला
बाहेर काढा, कारण तुम्हीच माझे आश्रयदुर्ग आहात. 5 मी माझा आत्मा
तुमच्या स्वाधीन करतो; माझ्या विश्वासयोग्य याहवेह, तुम्ही मला मुक्त
केले. 6 मी व्यर्थ मूर्तिपूजकांचा तिरस्कार करतो; परंतु माझा भरवसा
याहवेहवर आहे. 7 तुमच्या प्रीतीमुळे मी आनंदाने प्रफुल्लित झालो आहे,
कारण तुम्ही माझ्या पीडा पाहिल्या आहेत आणि माझ्या आत्म्यातील
संघर्ष तुम्हाला समजले आहेत. 8 तुम्ही मला माझ्या शत्रूंच्या स्वाधीन
केलेले नाही, परंतु तुम्ही माझे पाय विशाल जागी स्थिरावले आहेत.
9 याहवेह, मजवर दया करा, कारण मी संकटात आहे; माझे डोळे
दुःखाने थकलेले आहेत; शोकाने माझा देह व माझा आत्मा ढासळला
आहे. 10 दुःखामुळे माझे आयुष्य व कण्हण्यामुळे माझी वर्षे कमी होत
आहेत; पापांनी माझी शक्ती शोषून घेतली आहे; माझी हाडे झिजून गेली
आहेत. 11 माझ्या सर्व शत्रूंमुळे माझे शेजारी माझा तिरस्कार करतात
आणि माझ्या जवळच्या मित्रांची मला भीती वाटते— जे मला रस्त्यावर
पाहताच माझ्यापासून दूर पळून जातात. 12 एखाद्या मृत मनुष्यासारखा
माझा विसर पडला आहे; एखाद्या फुटलेल्या भांड्यासारखी माझी
अवस्था झाली आहे. 13 कारण अनेकांना कुजबुजतांना मी ऐकले आहे.
“सर्व बाजूने दहशत आहे!” ते माझ्याविरुद्ध कट रचीत आहे आणि
माझा जीव घेण्यासाठी ते तयार आहेत. 14 परंतु याहवेह, माझा भरवसा
तुमच्यावर आहे. मी म्हणालो, “तुम्हीच माझे परमेश्वर आहात.” 15 माझे
दिवस तुमच्याच हातात आहेत. माझ्या शत्रूंच्या हातातून, माझा पाठलाग
करणाऱ्यांपासून तुम्हीच मला सोडवा. 16 तुमचा मुखप्रकाश तुमच्या
दासावर पडू द्या; तुमच्या प्रेमदयेने माझे तारण करा. 17 याहवेह, मला
लज्जित होऊ देऊ नका, मी तुमचा धावा केला आहे; दुष्ट लोक लज्जित
होवोत; ते अधोलोकात निःशब्द होवोत. (Sheol h7585) 18 त्यांचे असत्य
बोलणारे ओठ शांत केले जावो. कारण ते अहंकाराने आणि तिरस्काराने
प्रेरित होऊन नीतिमानाविरुद्ध गर्वाने बोलतात. 19 तुमचा चांगुलपणा
किती विपुल आहे, जो तुम्ही तुमच्या भय धरणाऱ्यांसाठी राखून ठेवला
आहे, आणि जे लोक तुमच्या ठायी आश्रय घेतात त्यांच्यावर त्याचा
सर्वांसमक्ष वर्षाव करता. 20 आपल्या उपस्थितीच्या आश्रयस्थानी
तुम्ही मनुष्यांच्या युक्तीपासून त्यांचे रक्षण करता; आपल्या मंडपात
तुम्ही त्यांना शत्रूंच्या आरोप करणाऱ्या जिभेपासून बचाव करता. 21
याहवेह धन्यवादित असोत, कारण ज्यावेळी मी शत्रूंनी वेढलेल्या शहरात
होतो, त्यांनी मला प्रेमदयेने अद्भुत कृत्ये दाखविली आहेत. 22 माझ्या
उतावळेपणात मी म्हटले, “मला तुमच्या दृष्टीपुढून काढून टाकले आहे!”
तरीही जेव्हा मी साहाय्यासाठी तुम्हाला हाक मारली तेव्हा माझी दयेची
विनवणी तुम्ही ऐकली. 23 अहो याहवेहच्या सर्व भक्तांनो, त्यांच्यावर
प्रीती करा! याहवेह प्रामाणिक लोकांना मदत करतात पण ते गर्विष्ठांना
पूर्ण मापाने शिक्षा करतात. 24 याहवेहवर भरवसा ठेवणारे सर्वजण,
खंबीर व्हा आणि धैर्याने राहा.

**32** दावीदाचे स्तोत्र; मासकील धन्य तो मनुष्य, ज्याच्या अपराधांची
क्षमा झालेली आहे, ज्याच्या पापांवर पांघरूण घातले आहे. 2
धन्य ती व्यक्ती, ज्याच्या हिशेबी याहवेह पापाचा दोष लावत नाही, आणि
ज्याच्या आत्म्यात कपट नाही. 3 मी गप्प राहिलो, तेव्हा संपूर्ण दिवस
माझी हाडे माझ्या कण्हण्यामुळे जर्जर झाली. 4 रात्रंदिवस तुमचा हात
माझ्यावर भारी होता; उष्मकालच्या उष्णतेप्रमाणे माझी शक्ती सुकून
गेली होती. सेला 5 नंतर मी माझी सर्व पातके तुमच्याजवळ कबूल
केली आणि माझे अपराध लपविले नाही. मी स्वतःशी म्हणालो, “मी
याहवेहजवळ माझी पातके कबूल करेन.” तेव्हा तुम्ही माझ्या पातकांच्या
दोषाची क्षमा केली. सेला 6 यासाठी प्रत्येक विश्वासणाऱ्याने तुम्हाला
पावण्याची संधी आहे तोपर्यंत तुमची प्रार्थना करावी; संकटे जलाच्या
महापूरासारखी आली तरी त्यांना त्याचा स्पर्श होणार नाही. 7 माझे
आश्रयस्थान तुम्ही आहात; संकटात तुम्हीच माझे रक्षण करणार आणि
मुक्ततेच्या गीतांनी तुम्ही मला वेढणार. सेलाह 8 याहवेह म्हणतात, जो
मार्ग तू अनुसरावा त्याचे मी तुला मार्गदर्शन व शिक्षण देईन; माझी प्रेमळ
नजर तुजवर ठेऊन मी तुला बोध करेन. 9 तुमची मनोवृत्ती घोड्यासारखी
किंवा खेचरासारखी नसावी, ज्यांना काही समज नसते. त्यांना नियंत्रित
करण्यासाठी अंकुश आणि लगाम लागतो, अन्यथा ते आपल्याजवळ
येणार नाहीत. 10 दुर्जनांवर अनेक दुःखे येतात. परंतु जे याहवेहवर
विश्वास ठेवतात, त्यांच्याभोवती त्यांच्या अक्षयप्रीतीचे वेष्टण असते. 11
नीतिमान लोकांनो, याहवेहमध्ये आनंद आणि हर्ष करा; तुम्ही जे सरळ
मनाचे आहात, ते आनंदाने आरोळ्या मारा.

**33** अहो नीतिमान लोकांनो, याहवेहमध्ये आनंद करा, कारण त्यांची
प्रशंसा करणे सरळ माणसांना शोभादायक आहे. 2 वीणेवर
याहवेहस धन्यवाद द्या; दशतंतू वाद्यावर त्यांचे संगीत गा. 3 त्यांच्यापुढे
नवीन गीत गा; जयघोष करीत कुशलतेने वाद्ये वाजवा. 4 कारण
याहवेहची वचने सरळ आहेत; आपल्या प्रत्येक कार्यात ते विश्वासयोग्य
आहेत. 5 याहवेहला नीती आणि न्याय प्रिय आहेत, पृथ्वी त्यांच्या
वात्सल्यमय प्रीतीने भरून गेली आहे. 6 याहवेहच्या शब्दाने स्वर्ग
अस्तित्वात आला; त्यांच्या मुख श्वासाने सर्व नक्षत्रे निर्माण झाली.
7 बुधल्यात पाणी भरावे, त्याप्रमाणे ते महासागराचे पाणी एकवटीत
आहेत; त्यांच्या भांडारात सागरांचा साठा करीत आहेत. 8 संपूर्ण पृथ्वीने
याहवेहचे भय धरावे; जगातील सर्व लोकांनी त्यांची आदरयुक्त भीती

बाळगावी. 9 कारण त्यांनी केवळ शब्द उच्चारला आणि जगाची उत्पत्ती
झाली, त्यांच्या आज्ञेने ते स्थिर झाले. 10 याहवेह राष्ट्रांच्या योजना व्यर्थ
करतात; ते लोकांचे बेत निष्फळ करतात. 11 परंतु याहवेहच्या योजना
सर्वकाळ स्थिर राहतात; त्यांच्या हृदयातील हेतू प्रत्येक पिढीसाठी
कायमस्वरूपी असतात. 12 ज्या राष्ट्रांचे परमेश्वर याहवेह आहेत, ज्या
लोकांना त्यांनी स्वतःच्या वतनाकरिता निवडले ते धन्य. 13 याहवेह
स्वर्गातून खाली पाहतात आणि संपूर्ण मानवजातीला न्याहाळतात; 14
ते आपल्या निवासस्थानामधून पृथ्वीवरील सर्व लोकांना पारखतात.
15 त्यांनीच सर्वांची हृदये घडविली, तेच प्रत्येकाचे कार्य पारखतात.
16 कोणताही राजा सैन्याच्या संख्येने विजय प्राप्त करतो असे नाही;
कोणताही योद्धा आपल्या महान शक्तीने स्वतःचा बचाव करू शकतो
असेही नाही. 17 युद्धात विजय प्राप्तीसाठी घोड्यावर भिस्त ठेवणे
निरर्थक आहे; घोडा बळकट असेल पण तो कोणाचा बचाव करू शकत
नाही. 18 परंतु जे त्यांचे भय धरतात, ज्यांची आशा त्यांच्या अक्षय
प्रीतीवर आहे, त्यांच्यावर याहवेहची दृष्टी असते. ते त्यांना मृत्यूपासून
सोडवून, दुष्काळात त्यांच्या प्राणाचे रक्षण करतात. 20 आम्ही याहवेहची
वाट पाहत आहोत; केवळ तेच आमचे साहाय्य आणि ढाल आहेत. 21
त्यांच्यामध्येच आमच्या हृदयात आनंद आहे, कारण त्यांच्या पवित्र
नावावर आमचा विश्वास आहे. 22 याहवेह तुमची अक्षय प्रीती आमच्या
सभोवती असू द्या, कारण आमच्या आशेचे स्थान केवळ तुम्हीच आहात.

**34** दावीदाचे स्तोत्र; जेव्हा अबीमेलेखापुढे त्याने वेडा झाल्याचे ढोंग
केल्यावर त्याला हाकलून लावण्यात आले आणि तो निघून गेला.
मी सर्व समयी याहवेहचा धन्यवाद करेन; माझ्या ओठांनी मी त्यांची
निरंतर स्तुती करेन. 2 याहवेहने माझ्यावर केलेल्या दयेची मी प्रतिष्ठा
मिरवीन; हे ऐकून दीनजन हर्ष करोत. 3 तुम्ही माझ्याबरोबर याहवेहची
स्तुती करा; आपण सर्व मिळून त्यांच्या नावाला उंच करू या. 4 कारण
मी याहवेहचा धावा केला आणि त्यांनी मला उत्तर दिले; त्यांनी मला
माझ्या सर्व भयांपासून सोडविले. 5 जे त्यांच्याकडे पाहतात ते तेजस्वी
होतात; त्यांचे मुख कधीही लज्जास्पद स्थितीत राहत नाही. 6 या
पामराने याहवेहचा धावा केला आणि त्यांनी तो ऐकला; त्याच्या सर्व
संकटातून त्यांनी त्याला सोडविले. 7 याहवेहचे भय धरणाऱ्याभोवती
त्यांचे देवदूत छावणी देतात आणि त्याला ते सोडवितात. 8 याहवेह
किती चांगले आहेत याचा अनुभव घ्या; जे त्यांच्यावर भाव ठेवतात ते
धन्य. 9 याहवेहची पवित्र प्रजा, त्यांचे भय बाळगा, कारण जे त्यांचे भय
बाळगतात, त्यांना काही उणे पडत नाही. 10 तरुण सिंहदेखील दुर्बल
होतील व उपाशी राहतील, परंतु याहवेहचा शोध घेणाऱ्यांना कोणत्याही
उत्तम गोष्टीची उणीव पडणार नाही. 11 माझ्या लेकरांनो या आणि माझे
ऐका; याहवेहचे भय कसे धरावे, हे मी तुम्हाला शिकवेन. 12 तुमच्यापैकी
जो जीवनावर प्रीती करतो आणि अनेक चांगले दिवस पाहण्याची अपेक्षा
करतो, 13 तर तू आपली जीभ वाईटापासून आणि आपले ओठ असत्य
बोलण्यापासून राखावे. 14 वाईटाचा त्याग कर आणि चांगले ते कर;
शांतीचा शोध घे व तिच्यामागे लाग. 15 याहवेहचे नेत्र नीतिमानांवर
आहेत, आणि त्यांचे कान नीतिमानांच्या आरोळीकडे लागलेले असतात.
16 परंतु जे वाईट करतात, याहवेहचे मुख त्यांच्याविरुद्ध आहे, त्यांची
नावे ते पृथ्वीवरून पुसून टाकतात. 17 याहवेह नीतिमानाचा धावा ऐकून,
त्यांना सर्व संकटामधून सोडवितात. 18 याहवेह भग्नहृदयी लोकांच्या
अगदी जवळ असतात आणि जे पश्चात्तापी आत्म्याचे आहेत त्यांचे ते
तारण करतात. 19 नीतिमानावर संकटे येत नाहीत असे नाही, परंतु
याहवेह त्याला प्रत्येक संकटातून सोडवितात. 20 ते त्याच्या प्रत्येक
हाडांचे रक्षण करतात, त्यातील एकही मोडणार नाही. 21 दुष्टांची दुष्टाई
त्यांचा नाश करेल; जे नीतिमानांचे शत्रू आहेत, त्यांना शिक्षा होईल. 22
जे त्यांची सेवा करतात, त्यांचा याहवेह उद्धार करतील; जे त्यांचा आश्रय
घेतात ते दंडित होणार नाहीत.

**35** दावीदाचे स्तोत्र. याहवेह, जे माझ्याशी लढतात त्यांच्याविरुद्ध
तुम्हीच लढा; जे माझ्यासोबत युद्ध करतात, तुम्हीच त्यांच्याशी
युद्ध करा. 2 तुम्ही चिलखत आणि ढाल घ्या; व उठून माझी मदत करा.
3 माझ्यामागे येणाऱ्या लोकांविरुद्ध भाला घेऊन त्यांचा मार्ग अडवा.
माझ्या आत्म्यास आश्वासन द्या, “मी तुझे तारण आहे.” 4 जे मला ठार
करण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्यांची तुम्ही धूळधाण करा; त्यांना मागे
फिरवा आणि त्यांना लज्जित करा. 5 वाऱ्याने उडणाऱ्या भुशाप्रमाणे,
याहवेहचा दूत त्यांना उडवून लावो; 6 त्यांच्यापुढील मार्ग हा अंधाराचा
व निसरडा करा, याहवेहचा दूत त्यांचा पाठलाग करो. 7 विनाकारण
त्यांनी माझ्यासाठी सापळा लावला आणि विनाकारण माझ्यासाठी
खड्डा खणला आहे. 8 सर्वनाश अचानक त्यांच्यावर ओढवो— त्यांनी
लावलेल्या सापळ्यात ते स्वतःच अडकोत व त्या खड्ड्यात पडोत व नष्ट
होवोत. 9 तेव्हा माझा जीव याहवेहमध्ये आनंद करेल आणि त्यांनी सिद्ध
केलेल्या तारणामुळे हर्षित होईल. 10 माझे संपूर्ण अस्तित्व ओरडून
म्हणेल, “याहवेह, तुमच्यासारखा कोण आहे? तुम्हीच दुबळ्यांची
बलवान लोकांपासून आणि लुबाडणाऱ्यांपासून गरीब आणि गरजवंतांची
सुटका करता.” 11 हे दुष्ट लोक शपथेवर खोटे बोलतात; ज्या गोष्टींची
मला जाणीवही नाही, अशा गोष्टीचे आरोप ते मजवर करतात. 12 ते
माझ्या बऱ्याची फेड वाईटानेच करतात. माझा जीव शोकग्रस्त झाला
आहे. 13 ते आजारी असताना, मी गोणपाट नेसून शोक केला; नम्र
होऊन मी त्यांच्यासाठी उपास केले. परंतु माझ्या प्रार्थना उत्तर न
मिळताच माझ्याकडे परत आल्या. 14 मी असा विलाप केला जणू काय
मी माझ्या मित्रासाठी किंवा भावासाठी विलाप करीत आहे. मी असा
शोक केला जसा मी माझ्या आईसाठी शोक करीत आहे. 15 पण आता
मी संकटात सापडलो असताना त्यांना आनंद होत आहे. माझ्यावर
आक्रमण करणारे मला माहीत नसताना एकत्र येऊन, माझी एकसारखी
निंदा करतात. 16 ते नास्तिकाप्रमाणे माझी क्रौर्याने थट्टा करीत होते;
माझ्यावर दातओठ खात होते. 17 हे प्रभू, तुम्ही केव्हापर्यंत पाहत
राहणार? त्यांच्या वाईट कृत्यापासून माझा बचाव करा, सिंहासारख्या
या दुष्टांपासून माझे रक्षण करा. 18 महासभेत मी तुमचे आभार
व्यक्त करेल; मोठ्या मेळाव्यासमोर मी तुमची उपकारस्तुती करेन. 19

जे विनाकारण माझे शत्रू बनले आहेत, त्यांना आता माझा उपहास
करण्यात आनंद करू देऊ नका; निष्कारण जे माझे विरोधी झाले
आहेत त्यांना डोळे मिचकाविण्याची संधी देऊ नका. 20 ते शांतता
प्रस्थापित करण्यासंबंधी चर्चा न करता, शांतीने राहणाऱ्या निरपराध
लोकांविरुद्ध कट करण्यासंबंधी चर्चा करीत असतात. 21 ते आपले तोंड
उघडून माझ्याविरुद्ध ओरडून सांगतात, “अहाहा! अहाहा! आम्ही स्वत:
डोळयांनी पाहिले आहे.” 22 याहवेह, सत्य तुमच्या दृष्टीत आहे; तुम्ही
शांत राहू नका; हे प्रभू, आता माझ्यापासून दूर राहू नका. 23 हे माझ्या
परमेश्वरा, माझ्या प्रभू, माझ्या सुरक्षेसाठी उठा, माझ्याकरिता युद्ध करा.
24 याहवेह माझ्या परमेश्वरा आपल्या नीतिमत्तेने मला निर्दोष जाहीर
करा; त्यांनी मजविरुद्ध आनंद करू नये. 25 त्यांनी असे मनात बोलू नये,
“हा हा हा! आम्हाला असेच हवे होते; आम्ही त्याला गिळून टाकले.”
असे त्यांना बोलू देऊ नका. 26 माझी संकटे पाहून आनंद करणाऱ्यांना
लज्जित आणि निराश करा; जे माझ्यापुढे प्रौढी मिरवितात, त्यांना
लज्जित आणि अपमानित करा. 27 परंतु माझे कल्याण व्हावे असे
इच्छा करणाऱ्या सर्वांना मोठा आनंद प्राप्त होऊ द्या; त्यांना आनंदाने
ओरडू द्या, “आपल्या सेवकाला आनंदाने साहाय्य करणारे याहवेह किती
थोर आहेत.” 28 माझी जीभ तुमच्या नीतिमत्वाची घोषणा करणार
आणि दिवसभर तुमची उपासना करीत राहणार.

**36** संगीत दिग्दर्शकासाठी. याहवेहचा सेवक दावीदाचे स्तोत्र. दुष्टांच्या
पापांबद्दल माझ्या हृदयात याहवेहचा संदेश आहे. त्यांच्या दृष्टीत
परमेश्वराचे मुळीच भय नसते. 2 ते स्वत:च्या नजरेत अशी आत्मस्तुती
करतात की, त्यांना आपला दोष दिसत नाही व ते आपल्या पापाचा
द्वेष करीतच नाहीत. 3 त्यांचा प्रत्येक शब्द कपटाचा आणि अनीतीचा
असतो; शहाणपणा आणि चांगुलपणा करण्यात ते अपयशी होतात. 4
ते दुष्ट योजनांचे कट रचीत रात्रभर जागे राहतात, ते स्वत:ला पापी
मार्गासाठी समर्पित करतात, आणि जे चुकीचे आहे ते नाकारत नाहीत.
5 याहवेह तुमची प्रीती स्वर्गापर्यंत, व तुमची सत्यता आकाशापर्यंत
पोहोचली आहे. 6 तुमचे नीतिमत्व विशाल पर्वतासारखे आहे, तुमचे
न्याय अथांग खोलीसारखे आहेत. याहवेह, तुम्ही मनुष्य आणि प्राण्यांची
जोपासना करता. 7 हे परमेश्वरा, तुमची अक्षय प्रीती किती अमूल्य
आहे! सर्व मानवजात तुमच्या पंखांच्या छायेत आश्रय घेते. 8 तुमच्या
भवनातील विपुलतेतून तुम्ही त्यांना तृप्त करता; आपल्या आनंदाच्या
नद्यांचे पाणी तुम्ही त्यांना पाजता. 9 कारण जीवनाचा झरा तुमच्याजवळ
आहे; तुमच्या प्रकाशानेच आम्हाला प्रकाश मिळतो. 10 जे तुम्हाला
ओळखतात त्यांच्यावर तुमची प्रीती, व जे सरळ अंत:करणाचे त्यांच्यावर
तुमचे नीतिमत्व असू द्या. 11 त्या गर्विष्ठ लोकांनी मला पायदळी तुडवू
नये, दुष्टांचे हात मला बाहेर ढकलून देऊ नये. 12 पाहा, दुष्कर्म करणारे
कसे खाली पडले आहेत— खाली फेकलेले, आता पुन्हा उठू शकणार
नाहीत!

**37** दावीदाचे स्तोत्र. दुष्टांचा हेवा करू नकोस; दुष्कर्म करणाऱ्यांमुळे
अस्वस्थ होऊ नकोस. 2 कारण ते गवताप्रमाणे लवकर वाळून
जातील, हिरवळीप्रमाणे ते शीघ्र नष्ट होऊन जातील. 3 याहवेहवर
भरवसा ठेव आणि चांगले ते कर; की तू सुरक्षित कुरणाचा आनंद
उपभोगून देशात वसती करू शकशील. 4 याहवेहमध्ये आनंद कर,
म्हणजे ते तुझ्या हृदयाची मागणी पूर्ण करतील. 5 तू आपला जीवनक्रम
याहवेहच्या स्वाधीन कर; त्यांच्यावर भरवसा ठेव, म्हणजे ते तुझ्यासाठी
हे करतील: 6 तुझ्या नीतिमत्त्वाचे फळ सूर्योदयेप्रमाणे प्रकाशित होईल,
तुझ्यातील सत्यता भर दुपारच्या सूर्यप्रकाशाप्रमाणे स्पष्ट होईल. 7
याहवेहसमोर निश्चिंत राहा व धीराने त्यांची वाट पाहा; जेव्हा लोकांना
त्यांच्या मार्गात यश मिळते, त्यांच्या दुष्ट योजना सफल होतात, तेव्हा तू
संतापू नकोस. 8 तुझा राग सोडून दे आणि चिरडीस येऊ नको; हेवा
करू नको—नाहीतर वाईट करण्यास तू प्रवृत्त होशील. 9 दुष्टांचा नाश
ठरलेलाच आहे. परंतु ज्यांची आशा याहवेहवर आहे, त्यांना पृथ्वीचे
वतन मिळेल. 10 थोडक्याच अवधीत दुष्ट लोक नाहीसे होतील; त्यांना
शोधूनही ते तुला सापडणार नाहीत. 11 परंतु नम्र लोकांना पृथ्वीचे वतन
मिळेल आणि ते विपुल शांती व समृद्धीचा उपभोग घेतील. 12 दुष्ट लोक
नीतिमानाविरुद्ध कट रचतात, त्यांना पाहून आपले दातओठ खातात; 13
प्रभू दुष्टांवर हसत आहे, कारण त्यांना माहीत आहे की त्यांचा दिवस येत
आहे. 14 दीनदुबळयांस ठार करावे व सरळ मार्गाने चालणाऱ्यांचा वध
करण्यास दुष्ट तलवार उपसतात आणि धनुष्य वाकवून सज्ज करतात.
15 परंतु त्यांच्या तलवारी त्यांच्याच हृदयास छेदणार, आणि त्यांची
धनुष्ये तोडून टाकली जाणार. 16 दुर्जनांनी दुष्टाईने मिळविलेल्या विपुल
धनापेक्षा नीतिमानाचे सीमित धन बरे; 17 दुष्टांचे सामर्थ्य मोडून टाकले
जाईल, परंतु याहवेह नीतिमानांना आधार देतात. 18 निर्दोष लोकांच्या
दिवसांवर याहवेहचे लक्ष असते, आणि त्यांचे वतन सर्वकाळ टिकते.
19 कठीण काळी ते लज्जित होणार नाही; दुष्काळात त्यांच्याजवळ
भरपूर असेल. 20 पण दुष्ट लोक मात्र नष्ट होतील: याहवेहचे शत्रू हे
मैदानातील फुलांप्रमाणे वाळून जातील आणि धुराप्रमाणे दिसेनासे
होतील. 21 दुष्ट लोक उसने घेतात पण फेडीत नाहीत, परंतु नीतिमान
उदारपणे देत असतो; 22 याहवेह ज्यांना आशीर्वाद देतात, ते पृथ्वीचे
वतन पावतील, परंतु जे शापित आहेत, ते नष्ट होतील. 23 ज्याला
याहवेह प्रिय वाटतात, त्या मनुष्याची पावले याहवेह स्थिर करतात; 24
जरी तो अडखळला, तरी तो खाली पडणार नाही, कारण याहवेह त्याला
आपल्या हाताने सावरतील. 25 मी तरुण होतो आणि आता प्रौढ झालो
आहे, तरी आजपर्यंत नीतिमानाला टाकलेला किंवा त्याच्या संततीला
भीक मागताना मी पाहिले नाही. 26 ते नेहमी इतरांना उदारतेने दान
आणि उसने देतात; त्यांची संतती आशीर्वाद असते. 27 वाईटापासून दूर
राहा आणि चांगले ते करा; म्हणजे तुम्ही या देशात कायमचे राहाल.
28 कारण याहवेहस न्यायी प्रिय आहे; ते आपल्या विश्वासू भक्तांचा
कधीही त्याग करणार नाही. दुष्टपणा करणारे लोक मात्र पूर्णपणे नाश
पावतील, दुष्टांची संतती नष्ट होऊन जाईल. 29 नीतिमानास पृथ्वीचे

वतन मिळेल आणि आपल्या वतनात ते सर्वदा राहतील. 30 नीतिमान
आपल्या मुखाने ज्ञानाच्या गोष्टी बोलतो, त्याची जीभ जे न्याय्य आहे ते
उच्चारते. 31 परमेश्वराचे नियम त्याच्या अंतःकरणात असतात; त्याची
पावले घसरणार नाही. 32 दुष्ट लोक नीतिमानांवर टपलेले असतात,
त्यांना जिवे मारण्याची वाट पाहत असतात. 33 परंतु याहवेह त्यांना दुष्ट
लोकांच्या हाती देणार नाही, किंवा न्यायालयात त्यांना ते दोषीही ठरविले
जाऊ देणार नाही. 34 याहवेहची प्रतीक्षा कर आणि त्यांच्या सन्मार्गाचे
अवलंबन कर. तेच तुला उंच करून पृथ्वीचे अधिकारी करतील; दुष्ट
लोक नष्ट झाल्याचे तू डोळ्यांनी पाहशील. 35 मी एक वाईट व क्रूर
मनुष्य पाहिला आहे. तो सुपीक जमिनीतील हिरव्यागार झाडासारखा
पसरलेला होता. 36 परंतु तो लवकरच नाहीसा झाला; मी त्याचा शोध
घेतला, पण तो मला सापडला नाही. 37 सात्विक मनुष्याकडे लक्ष लाव,
सरळ मनुष्याकडे पाहा; शांतताप्रिय मनुष्याचा भावी काळ सुखाचा
आहे. 38 परंतु सर्व पापी लोक नष्ट केले जातील; आणि त्याची संतती
छाटली जाईल. 39 याहवेहद्वारे नीतिमानांचे तारण होते. संकटकाळी ते
त्यांचे आश्रयदुर्ग असतात. 40 याहवेह त्यांचे साहाय्य करतात आणि
त्यांना मुक्त करतात; दुष्टांपासून सुटका करून त्यांचे रक्षण करतात,
कारण त्यांनी याहवेहचा आश्रय घेतला आहे.

**38** दावीदाचे स्तोत्र. एक याचिका. याहवेह, तुम्ही क्रोधाने मला
शासन करू नका. संतापून मला दंड करू नका. 2 तुमचे बाण
माझ्या शरीरात खोल रुतले आहेत; तुमचे हात माझ्यावर जड झाले
आहेत. 3 तुमच्या संतापामुळे माझे शरीर रोगजर्जर झाले आहे; माझ्या
पातकांमुळे माझ्या हाडांमध्ये स्वस्थता नाही. 4 माझे दोष इतके भारी
आहेत की ते वाहून नेणे अशक्य आहे. 5 माझ्या पापाच्या मूर्खपणामुळे,
माझ्या जखमा सडून त्यास दुर्गंधी सुटली आहे. 6 मी वाकून गेलो
आणि वेदनेने त्रस्त झालो आहे; मी दिवसभर शोक करीत असतो. 7
माझ्या पाठीचा दाह होत आहे; माझ्या अंगी अजिबात आरोग्य राहिलेले
नाही. 8 मी पार गळून व चिरडून गेलो आहे; माझ्या हृदयाच्या वेदनेने मी
कण्हत आहे. 9 प्रभू माझी तीव्र इच्छा काय आहे, हे तुम्ही जाणता;
माझा प्रत्येक उसासा तुम्ही ऐकता. 10 माझे हृदय धडधडत आहे,
माझी शक्ती म्लान होत आहे; मी आंधळा होत आहे असे मला वाटते.
11 माझे प्रियजन आणि माझे मित्र माझ्या आजारामुळे मजपासून दूर
राहतात; माझे कुटुंबीय माझ्यापासून दूर उभे राहतात. 12 माझा जीव
घेऊ पाहणारे त्यांचे जाळे रचतात, मला इजा करणारे माझ्या नाशाबद्दल
बोलतात; ते दिवसभर फसवणूक आणि लबाडी करतात. 13 परंतु
मी ऐकू न येणाऱ्या बहिऱ्यासारखा झालो आहे; बोलता न येणाऱ्या
मुक्या माणसासारखा मी झालो आहे. 14 ज्याला ऐकू येत नाही आणि
ज्याच्या मुखातून प्रत्युत्तर निघत नाही, अशा माणसासारखा मी आहे. 15
याहवेह, मी माझी भिस्त तुमच्यावर ठेवली आहे; प्रभू माझ्या परमेश्वरा
तुम्ही मला उत्तर द्या. 16 कारण मी म्हटले, “माझे पाऊल घसरले, तेव्हा
मजपुढे प्रौढी मिरविणाऱ्यांना आनंद मिळू देऊ नका.” 17 कारण मी
कोसळण्याच्या बेतात आहे आणि माझे दुःख सतत मजबरोबर आहे.
18 मी माझी पातके पदरी घेतो; माझ्या पापामुळे मी दुःखी आहे. 19
अनेक लोक विनाकारण माझे शत्रू झाले आहेत; विनाकारण माझा द्वेष
करणारे अनेक आहेत. 20 माझ्या चांगुलपणाची फेड ते दुष्टाईने करीत
आहेत आणि मी सत्याच्या बाजूने उभे राहिलो, तरीही ते माझा द्वेष
करीत आहेत. 21 याहवेह, मला सोडू नका; परमेश्वरा, मजपासून दूर
जाऊ नका. 22 माझे प्रभू, माझे तारणारे, लवकर या आणि त्वरेने मला
साहाय्य करा.

**39** संगीत दिग्दर्शकासाठी. यदूथून याकरिता दावीदाचे स्तोत्र. मी
स्वतःशी म्हणालो, “मी आपले आचरण जपणार आणि माझी
जीभ पापापासून जपणार; अनीतिमान लोक माझ्याभोवती असतील,
तेव्हा मी माझ्या मुखाला मुसक्या बांधीन.” 2 म्हणून मी काही चांगलेही
बोललो नाही, अगदी शांत राहिलो. पण माझा त्रास वाढतच गेला;
3 माझ्या अंतःकरणातील घालमेल अधिकच वाढत गेली, मी मनन
करत असताना, माझ्या अंतःकरणातील अग्नी तप्त होत होता; तेव्हा
मी आपल्या जिभेने बोललो: 4 याहवेह, माझ्या जीवनाचा अंत मला
दाखवा आणि माझे किती दिवस बाकी आहेत हे मला दाखवून द्या; माझे
आयुष्य किती क्षणभंगुर आहे ते मला कळू द्या. 5 पाहा, तुम्ही माझे
दिवस चार बोटे केले आहे; माझा जीवितकाल तुमच्या दृष्टीने केवळ एका
क्षणाचाच आहे; प्रत्येकजण, अगदी निश्चिंत असणारे लोकसुद्धा केवळ
एक श्वास आहेत. सेला 6 निश्चितच प्रत्येकजण खरोखर सावलीप्रमाणेच
जगतो; संपत्ती गोळा करण्याची त्याची सर्व धावपळ ही निरर्थकच,
याचा उपभोग कोण घेईल हे त्याला ठाऊक नाही. 7 तर प्रभू, मी आता
कोणत्या गोष्टींची प्रतीक्षा करू? माझी सर्व आशा तुमच्या ठायी आहे. 8
माझ्या पातकांपासून माझे रक्षण करा; मला मूर्खांच्या थट्टेचा विषय
होऊ देऊ नका. 9 मी शांत राहिलो; मी माझे तोंड उघडले नाही, कारण
तुम्हीच हे केले आहे. 10 तुमचा चाबूक माझ्यापासून दूर करा; तुमच्या
हाताच्या प्रहाराने मी म्लान झालो आहे. 11 तुम्ही मनुष्याला त्याच्या
पापाबद्दल फटके मारून शिस्त लावता, त्याचे ऐश्वर्य कसर लागलेल्या
वस्त्रांप्रमाणे निकृष्ट करता; निश्चितच मनुष्य खरोखर केवळ श्वासमात्र
आहे. सेला 12 “याहवेह, माझी प्रार्थना ऐका; माझी मदतीची आरोळी
ऐका; माझ्या अश्रूंकडे दुर्लक्ष करू नका. माझ्या सर्व पूर्वजांप्रमाणे या
पृथ्वीवर प्रवास करणारा मी एक परदेशीय आणि वाटसरू आहे. 13
मी जाण्यापूर्वी, माझ्यावरची तुमची कडक नजर मजपासून फिरवा.
जेणेकरून मी थोड्या काळासाठीच जीवनाचे सुख पुन्हा प्राप्त करू
शकेन.”

**40** संगीत दिग्दर्शकासाठी. दावीदाचे स्तोत्र. मी धीराने याहवेहची वाट
पाहिली; तेव्हा त्यांनी माझ्याकडे लक्ष दिले आणि माझी आरोळी
ऐकली. 2 निसरड्या खाचेतून, दलदलीच्या चिखलातून त्यांनी मला
बाहेर काढले; त्यांनी माझी पावले खडकावर ठेवली, आणि त्यांनी मला
उभे राहण्यास भक्कम ठिकाण दिले. 3 त्यांनी आपल्या परमेश्वराचे
स्तवन करण्यास माझ्या मुखात नवीन गीत दिले. हे अनेकजण पाहतील

व याहवेहचे भय धरतील आणि त्यांच्यावर विश्वास ठेवतील. 4 जे लोक
याहवेहवर भरवसा ठेवतात, जे गर्विष्ठांच्या व असत्याकडे वळणाऱ्यांच्या
वाऱ्यासही उभे राहत नाही, ते धन्य होत. 5 याहवेह, माझ्या परमेश्वरा,
तुम्ही अनेक चमत्कार केलेले आहेत; आमच्यासाठी तुम्ही केलेल्या
योजनेची तुलना करता येत नाही; त्याबद्दल बोलावयाचे झाले तर त्यांची
मोजदाद करता येणार नाही. 6 यज्ञ किंवा अन्नार्पणे यांची इच्छा तुम्हाला
नाही— परंतु तुम्ही माझे कान उघडले आहेत; होमार्पण आणि पापार्पण
यांनी तुम्हाला संतोष होत नाही. 7 तेव्हा मी म्हणालो, "पाहा मी
येथे आहे, आलो आहे— शास्त्रलेखात माझ्याविषयी लिहिले आहे.
8 हे माझ्या परमेश्वरा, तुमची इच्छा पूर्ण करावी असे मला वाटते;
तुमचे नियम माझ्या अंतःकरणात आहेत." 9 विशाल सभेत तुमच्या
तारणाच्या कृत्यांची घोषणा करतो; त्याबाबतीत मी माझे ओठ मुळीच
आवरून धरीत नाही, याहवेह हे तुम्हाला माहीत आहे. 10 हे नीतिमत्व
मी माझ्या हृदयात दडवून ठेवले नाही, मी तुमचा विश्वासूपणा आणि
तुमच्या तारणाच्या मदतीची चर्चा करतो. सर्व मंडळीपासून तुमची
प्रीतिपूर्ण दया आणि सत्य ही लपवित नाही. 11 याहवेह, तुमची कृपा
माझ्यापासून राखून धरू नका; तुमची प्रीती आणि विश्वासूपणा मला
नेहमी सुरक्षित ठेवील. 12 असंख्य समस्यांनी माझ्यावर मात केली
आहे; माझ्या अपराधांनी माझा पिच्छा पुरविला आहे आणि ते मी पाहू
शकत नाही. ते माझ्या डोक्यावरील केसांपेक्षा जास्त आहेत, आणि
माझे हृदय विव्हळत आहे. 13 याहवेह, प्रसन्न होऊन मला वाचवा;
त्वरेने या, याहवेह मला साहाय्य करा. 14 माझ्या जीव घेऊ पाहणाऱ्यांना
लज्जित करा व गोंधळात पाडा; त्यांना मागे हटवून त्यांची दाणादाण
करून त्यांना घालवून द्या; 15 जे लोक मला, "अहा! अहा!" म्हणतात,
ते स्वतःच्या लज्जेमुळे चकित होवोत. 16 परंतु जे तुम्हाला शोधतात ते
तुमच्यामध्ये आनंद आणि हर्ष करोत; जे तुमच्या तारणाच्या साहाय्याची
अपेक्षा बाळगतात ते सर्व हेच म्हणोत, "याहवेह किती थोर आहेत!" 17
मी गरीब आणि गरजवंत आहे, याहवेहला माझी आठवण असो; तुम्ही
माझे साहाय्यकर्ता आणि मला सोडविणारे आहात; माझ्या परमेश्वरा,
विलंब लावू नका.

**41** संगीत दिग्दर्शकासाठी. दावीदाचे स्तोत्र. जे दुर्बलांची चिंता
करतात, ते धन्य; याहवेह त्यांच्या संकटाच्या वेळी त्यांना मुक्त
करतील. 2 याहवेह त्यांचे रक्षण करून त्यांना सांभाळतील— ते
आपल्या राष्ट्रात आशीर्वादित होतील— ते त्यांना शत्रूंच्या इच्छेवर
सोडणार नाहीत. 3 ते रोगशय्येवर असता याहवेह त्यांना सांभाळतात;
ते आजारी असता त्यांना आरोग्य देऊन त्यांचे अंथरूण बदलतात. 4 मी
म्हणालो, "याहवेह, माझ्यावर दया करा; मला रोगमुक्त करा, कारण
मी तुमच्याविरुद्ध पातके केली आहेत." 5 माझे शत्रू माझ्याविषयी
अभद्र बोलून म्हणतात, "तो केव्हा मरणार आणि त्याचे नाव विसरले
जाणार?" 6 जेव्हा त्यांच्यापैकी कोणी मला भेटायला येतो, तेव्हा
तो पोकळपणा दर्शवितो, तो अंतःकरणात वाईटाचा संग्रह करतो; तो
बाहेर जाऊन या गोष्टीचा प्रचार करतो. 7 माझे सर्व शत्रू एकत्र मिळून
माझ्याविरुद्ध कुजबुज करतात; माझ्याबाबतीत वाईट बेत आखतात. 8
"त्याला असाध्य रोग झालेला आहे; तो आता या रोगशय्येवरून पुन्हा
उठणार नाही," असे ते म्हणतात. 9 प्रत्यक्ष माझा जिवलग मित्रदेखील,
ज्याच्यावर माझा पूर्ण विश्वास होता, ज्याने माझ्याबरोबर भाकर खाल्ली
तो माझ्यावर उलटला आहे. 10 परंतु याहवेह, मजवर कृपा करून मला
पुन्हा उठवा; म्हणजे मला त्यांचा सूड घेता येईल. 11 तुम्ही माझ्याविषयी
संतुष्ट आहात, म्हणून माझे शत्रू माझ्याविरुद्ध जयोत्सव करीत नाही. 12
तुम्ही मला माझ्या प्रामाणिकपणामुळे स्थिर ठेवा आणि सदैव तुमच्या
समक्षतेत ठेवा. 13 इस्राएलचे परमेश्वर, याहवेह, जे अनादिकालापासून
अनंत काळापर्यंत आहेत त्यांची स्तुती असो.

**42** संगीत दिग्दर्शकासाठी. कोरहाच्या मुलांचे मासकील. हरणी जशी
पाण्यासाठी उत्कट लालसा करते, तसा हे परमेश्वरा, माझा जीव
तुमच्यासाठी उत्कट लालसा करीत आहे. 2 माझा जीव परमेश्वराकरिता,
जिवंत परमेश्वराकरिता तहानलेला आहे. मी केव्हा परमेश्वरासमोर येऊन
त्यांचे दर्शन करणार? 3 रात्र आणि दिवस, माझे अश्रू माझा आहार
झाले आहेत. मला लोक सतत असे विचारीत आहेत. "कुठे आहे तुझा
परमेश्वर?" 4 या गोष्टींची आठवण करून माझा आत्मा तुटत आहे:
कसे मी परमेश्वराच्या भवनाकडे जाणाऱ्या विशाल गर्दीचे नेतृत्व करीत
होतो. त्यावेळी उत्सवाच्या वातावरणात आनंद, जयघोष आणि आभार
यांचा आवाज प्रतिध्वनित होत होता. 5 हे माझ्या जिवा, तू का खिन्न
झालास? आतल्याआत का तू तळमळत आहेस? परमेश्वराची आशा
धर. मी अजूनही माझा तारणारा आणि माझ्या परमेश्वराची स्तुती पुनः
करेन. 6 माझ्या परमेश्वरा, माझा जीव माझ्याठायी उदास झाला आहे;
तेव्हा मी यार्देन प्रदेशातून आणि हर्मोनाच्या शिखरावरून, मिसहार
पर्वतावरून तुमचे स्मरण करणार. 7 तुमच्या गर्जणाऱ्या धबधब्याप्रमाणे,
सागर सागराला आव्हान करतो; तुमच्या सर्व लाटा व त्यांचा कल्लोळ
माझ्यावर झपाटून आदळत आहेत. 8 तरी देखील याहवेह आपल्या
अढळ प्रीतीचा वर्षाव दिवसा माझ्यावर करतात, मला जीवन देणाऱ्या
परमेश्वराची मी रात्रभर गीते गातो, प्रार्थना करतो. 9 मी आरोळी
मारून म्हणतो, "हे परमेश्वरा, माझ्या आश्रयाचे खडक, तुम्ही मला का
विसरलात? शत्रूंच्या हल्ल्यामुळे शोकाकुल होऊन मी का फिरावे?" 10
माझे शत्रू दिवसभर थट्टेने मला विचारतात, "तुझा परमेश्वर कुठे आहे?"
यामुळे माझ्या हाडांना नश्वर वेदना होत आहे. 11 हे माझ्या जिवा, तू
खिन्न का झालास? आतल्याआत का तळमळत आहेस? परमेश्वरावर
आपली आशा ठेव, मी पुनः माझा तारणारा आणि माझ्या परमेश्वराची
स्तुती करेन.

**43** परमेश्वर, मला निर्दोष ठरवा आणि भक्तिहीन पिढीविरुद्ध माझ्या
बाजूने निकाल द्या. या दुष्ट आणि कपटी लोकांपासून माझा बचाव
करा. 2 कारण परमेश्वर तुम्हीच माझे बळकट दुर्ग आहात; तुम्ही माझा
त्याग का केला? शत्रूंद्वारे होणाऱ्या छळामुळे मी का दुःखी व्हावे? 3
तुमचा प्रकाश आणि तुमचे सत्य मला लाभोत; तीच मला मार्ग दाखवोत;

तुमच्या पवित्र पर्वतावरील, तुमच्या निवासमंडपात, तीच मला घेऊन जावोत. 4 तेव्हा मी परमेश्वराच्या वेदीजवळ जाईन, तेच परमेश्वर जे माझे परमानंद आहेत; आणि तिथे हे परमेश्वरा, माझ्या परमेश्वरा, वीणेवर मी तुमची स्तुतिस्तोत्रे गाईन. 5 हे माझ्या जिवा, तू खिन्न का झालास? आतल्याआत का तळमळत आहेस? परमेश्वरावर आपली आशा ठेव, मी पुन: माझा तारणारा आणि माझ्या परमेश्वराची स्तुती करेन.

**44** संगीत दिग्दर्शकासाठी. कोरहाच्या मुलांचे मासकील हे परमेश्वरा, प्राचीन काळी तुम्ही आमच्या पूर्वजांच्या दिवसांत केलेल्या कार्याचे वर्णन त्यांनी आम्हाला सांगितले आणि आम्ही आमच्या कानांनी ऐकले आहे. 2 तुम्ही आपल्या हातांनी राष्ट्रांना घालवून दिले आणि तिथे आमच्या पूर्वजांना स्थापित केले; तुम्ही त्या लोकांना चिरडले आणि आमच्या पूर्वजांना समृद्ध केले. 3 त्यांच्या तलवारीने त्यांनी हा देश जिंकला नाही, आणि त्यांच्या बाहुबलाने त्यांना विजयी केले असेही नाही; हे तुमच्या उजव्या हाताने, तुमच्या भुजांनी आणि तुमच्या मुखप्रकाशाने हे केले, कारण तुम्ही त्यांच्यावर प्रीती केली. 4 तुम्ही माझे राजा आणि परमेश्वर आहात, जे याकोबाच्या विजयाचा आदेश देतात. 5 कारण केवळ तुमच्याच शक्तीने व तुमच्याच नावाने, आम्ही आमचे शत्रू पायाखाली तुडवू शकलो. 6 मी माझ्या धनुष्यावर विश्वास ठेवीत नाही. माझी तलवार मला कधीही विजय प्राप्त करून देत नाही. 7 आमच्या शत्रूंवर तुम्हीच आम्हाला विजय मिळवून देता; आमचा द्वेष करणाऱ्यांना तुम्ही लज्जित करता. 8 आम्ही सतत परमेश्वराचीच प्रौढी मिरवितो. आम्ही तुमच्या नावाची प्रशंसा सदासर्वदा करणार. सेला 9 परंतु आता तुम्ही आम्हाला टाकले आहे व आमची फजिती केली; आमच्या सैन्यासोबत तुम्ही जात नाही. 10 तुम्ही आम्हास शत्रूंपुढे पाठ फिरविण्यास लावले आहे, आणि आमचा द्वेष करणारे आम्हाला लुटतात. 11 तुम्ही आम्हाला मेंढराप्रमाणे नष्ट होण्यासाठी सोडून दिले, आणि राष्ट्रांमध्ये आमची पांगापांग केली. 12 तुम्ही आम्हाला कवडीमोलाने विकले; तुम्हाला त्याचा काहीच फायदा झाला नाही. 13 तुम्ही आमच्यावर पाठविलेल्या सर्व अरिष्टांमुळे शेजारची राष्ट्रे आम्हाला हसतात आणि आमची थट्टा करतात. 14 तुम्ही आम्हाला राष्ट्रांमध्ये उपहास असे केले आहे; लोक आमच्याकडे पाहून डोके हालवितात. 15 सर्व दिवस मी अपमानित राहतो, आणि लज्जेने माझा चेहरा झाकला आहे. 16 टोमणे मारणारे व दुर्भाषण करणाऱ्या शब्दामुळे, शत्रू आणि सूड उगवणाऱ्यांमुळे माझी विटंबना होते. 17 आमच्यावर हे प्रसंग आले असताना आम्ही तुम्हाला विसरलो नाही; आम्ही तर तुमचा करार मोडलेला नव्हता. 18 आम्ही तुम्हाला सोडले नाही; तुमच्या मार्गातून आमचे पाय ढळले नाही. 19 पण तुम्ही आम्हाला चिरडले आणि आम्हाला कोल्ह्यांच्या गुहेत ठेवले. तुम्ही आम्हाला सर्वात गडद अंधारात लपविले आहे. 20 जर आम्ही आमच्या परमेश्वराचे नाव विसरलो असतो, किंवा अन्य दैवतांपुढे हात पसरविले असते, 21 तर परमेश्वराला ते समजले नसते काय? कारण हृदयातील प्रत्येक गुप्त विचार त्यांना माहीत असतात. 22 तरी तुमच्याकरिता आम्ही दिवसभर मृत्यूचा सामना करीत असतो; वधाची प्रतीक्षा करणाऱ्या मेंढरांसारखे आम्हाला गणण्यात आले आहे. 23 हे प्रभू, उठा, जागे व्हा! तुम्ही का झोपलात? जागृत व्हा! आमचा कायमचा त्याग करू नका. 24 तुम्ही आपले मुख का लपविता? आमची दु:खे आणि आमचा छळ याकडे तुम्ही दुर्लक्ष का करता? 25 आमचा जीव धुळीस मिळत आहे; आमची शरीरे जमिनीला चिकटली आहेत. 26 आम्हाला साहाय्य करण्यास उठा; तुमच्या अढळ प्रीतीने आम्हाला सोडवा.

**45** संगीत दिग्दर्शकासाठी. “कुमुदिनी” चालीवर आधारित. कोरहाच्या मुलांची रचना. एक मासकील. विवाह गीत. माझे हृदय एका चांगल्या गोष्टीने ओसंडून जात आहे! राजाकरिता लिहिलेली कविता मी म्हणून दाखवितो; माझी जीभ कुशल लेखकाची लेखणी बनली आहे. 2 तू पुरुषांमध्ये सर्वोत्तम आहे आणि तुझे ओठ कृपेने अभिषिक्त आहे, कारण परमेश्वराने तुला अनंतकाळासाठी आशीर्वादित केले आहे. 3 हे शूर वीरा, तू आपली तलवार बांध; तू वैभव व प्रताप धारण कर. 4 सत्य, नम्रता आणि न्याय यांच्या रक्षणाकरिता स्वारी कर आणि विजयशाली हो, तुझा उजवा हात तुला अद्भुत कृत्ये शिकवेल. 5 तुझे तीक्ष्ण बाण राजाच्या शत्रूंच्या हृदयात रुतले जाओ. राष्ट्रे तुझ्या पायात पडोत. 6 हे परमेश्वरा, तुमचे सिंहासन सदासर्वकाळ टिकेल; न्याय्यतेचा राजदंड त्यांच्या राज्याचे राजदंड राहील. 7 तुम्हाला नीतिमत्व प्रिय व दुष्टाईचा द्वेष आहे; म्हणूनच परमेश्वराने, तुझ्या परमेश्वराने, तुला हर्षाच्या तेलाने अभिषिक्त करून तुझ्या सोबत्यांपेक्षा तुला अधिक उच्चस्थळी स्थिर केले आहे. 8 तुझे झगे गंधरस, जटामांसी आणि दालचिनी यांनी सुगंधित केलेले आहेत; तुझ्या हस्तिदंती राजवाड्यामध्ये, तंतुवाद्याचे संगीत तुला आनंदित करतात. 9 राजकन्या तुझ्या आदरणीय स्त्रियांमध्ये आहेत; तुझ्या उजवीकडे राणी उभी असून तिने ओफीरच्या सोन्याचे दागिने घातले आहेत. 10 अगे कन्ये, ऐक, काळजीपूर्वक लक्ष दे; तू आपली माणसे आणि आपल्या पित्याचे घर विसर. 11 तेव्हा राजा तुझ्या सौंदर्यात आनंद करेल; त्याचा आदर कर, कारण तो तुझा स्वामी आहे. 12 सोराची कन्या नजराणे घेऊन येईल, श्रीमंत लोक तुमची कृपा लाभावी म्हणून इच्छा करतील. 13 राजकन्या, आपल्या अंत:पुरात तेजस्वी आहे; तिची भरजरी वस्त्रे सोन्याच्या धाग्यांनी विणलेली आहे. 14 नक्षीदार वस्त्रांनी नटवून तुला राजाकडे नेण्यात येत आहे; तिच्या कुमारी सख्या तिच्या मागोमाग चालल्या आहेत— त्यांना तुझ्याकडे आणण्यात येत आहे. 15 राजमहालात प्रवेश करीत असताना, त्यांची मिरवणूक किती आल्हाददायक आणि हर्षपूर्ण वाटते. 16 तुझे पुत्र आपल्या पित्याप्रमाणे राजे होतील, जगातील सर्व सिंहासनावर ते बसतील. 17 सर्व पिढ्यांमध्ये तुझ्या नावाचे स्मरण होईल, असे मी करेन; जगातील राष्ट्रे सर्वकाळ तुझी स्तुती करतील.

**46** संगीत दिग्दर्शकासाठी. कोरहाच्या मुलांची रचना. अलामोथ चालीवर आधारित. एक गीत. परमेश्वर आमचे आश्रय व सामर्थ्य आहेत; संकटात साहाय्य करण्यास ते सदा सिद्ध असतात. 2 पृथ्वी उलथीपालथी झाली आणि पर्वत सागराच्या हृदयात कोसळले, 3

सागरांच्या जलांनी गर्जना केल्या, आणि त्यांच्या प्रचंड कोलाहलाने पर्वत कंपित झाले, तरी आम्ही भिणार नाही. सेला 4 आपल्या परमेश्वराच्या परमपवित्र वसतिस्थानातून एक आनंददायी नदी वाहते; तिचे प्रवाह परमेश्वराच्या नगरास आनंद देतात. 5 परमेश्वर स्वतः त्या नगरीत राहतात; ती नगरी अढळ राहील; प्रभात होताच परमेश्वर साहाय्य करतील. 6 राष्ट्रे खवळली, राज्ये कोलमडली; त्यांच्या मोठ्या गर्जनेने पृथ्वी विरघळून जाते. 7 सर्वसमर्थ याहवेह आमच्याबरोबर आहेत; याकोबाचे परमेश्वर आमचे दुर्ग आहेत. सेला 8 या आणि आमचे याहवेह करीत असलेली अद्भुत कृत्ये पाहा; त्यांनी पृथ्वीचा नाश कसा केला आहे. 9 दिगंतापर्यंत युद्धे ते बंद करतात. ते धनुष्य तोडतात आणि भाल्याचे तुकडे तुकडे करतात; ते रथांना अग्नीत भस्म करतात. 10 ते म्हणतात, “शांत व्हा आणि मीच परमेश्वर आहे, हे जाणा; राष्ट्रांमध्ये माझी महिमा होईल. पृथ्वीवर माझी महिमा होईल.” 11 सर्वसमर्थ याहवेह आमच्याबरोबर आहेत; याकोबाचे परमेश्वर आमचे दुर्ग आहेत. सेला

**47** संगीत दिग्दर्शकासाठी. कोरहाच्या पुत्रांची रचना. एक स्तोत्र. अहो सर्व लोकांनो, टाळ्या वाजवा; उत्साहपूर्ण शब्दांनी परमेश्वराचा जयजयकार करा. 2 कारण सर्वोच्च याहवेह भयप्रद आहेत; ते अखिल पृथ्वीचे सार्वभौम राजा आहेत. 3 त्यांनीच लोकांना आमच्या सत्तेखाली आणि राष्ट्रांना आमच्या पायाखाली आणले. 4 ते आमच्यासाठी आमचे वतन निवडतात, हेच याकोबाचे वैभव आहे, ज्यांच्यावर त्यांनी प्रीती केली. सेला 5 प्रचंड जयघोष होत असताना, परमेश्वर वर गेले आहेत, तुतार्‍यांचे मोठे निनाद होत असताना, याहवेह वर गेले आहेत. 6 परमेश्वराची स्तुती गा, स्तुती गा; आमच्या राजाची स्तुती गा, स्तुती गा. 7 कारण परमेश्वर अखिल पृथ्वीचे राजाधिराज आहेत; त्यांच्याप्रीत्यर्थ स्तुतिस्तोत्रे गा. 8 परमेश्वर सर्व राष्ट्रांवर सत्ता गाजवितात; परमेश्वर आपल्या पवित्र सिंहासनावर विराजमान आहेत. 9 जगातील लोकांचे अधिपती, अब्राहामाच्या परमेश्वराचे लोक म्हणून एकत्र जमले आहेत; पृथ्वीवरील राजे वास्तविक परमेश्वराचेच आहेत, ते अत्यंत थोर आहेत.

**48** एक गीत. कोरहाच्या पुत्रांची एक स्तोत्र रचना. याहवेह महान आहेत, आमच्या परमेश्वराच्या नगरामध्ये, त्यांच्या पवित्र पर्वतावर ते सर्वोच्च स्तुतीस पात्र आहेत. 2 त्यांचे शिखर मनोहर आहेत, ज्यात संपूर्ण पृथ्वी आनंदित आहे, सीयोन पर्वत उत्तरेकडील झाफोन पर्वतासारखेच उंच आहे, जे राजाधिराजाची नगरी आहे. 3 परमेश्वराने स्वतःला तिच्या राजमहालांमध्ये उंच आश्रयदुर्ग असे तिला प्रकट केले आहे. 4 ज्यावेळी राजांनी आपली सैन्ये एकवटली, ज्यावेळी ते एकत्र होऊन आगेकूच करीत आले. 5 त्यांनी हिला पाहिले आणि ते आश्चर्यचकित झाले; भयभीत होऊन त्यांनी पळ काढला. 6 त्या ठिकाणी त्यांना कापरे भरले; स्त्रीला होणार्‍या प्रसूतीच्या वेदनांसारख्या वेदना त्यांना होऊ लागल्या. 7 पूर्वेकडील वार्‍याने तार्शीशच्या गलबतांच्या नष्ट व्हाव्यात, त्याप्रमाणे तुम्ही त्यांचा नाश केला. 8 आम्ही जे ऐकले होते, आणि आम्ही जे प्रत्यक्ष पहिले आहे सर्वशक्तिमान याहवेहच्या नगरात, आमच्या परमेश्वराच्या नगरात: परमेश्वर सर्वकाळासाठी तिला स्थिर करतील. सेला 9 परमेश्वरा, तुमच्या मंदिरात, आम्ही तुमच्या प्रेमदयेचे चिंतन करतो. 10 हे परमेश्वरा, तुमच्या नावाप्रमाणे, तुमची स्तुती देखील पृथ्वीवर सर्वत्र पसरली आहे. तुमचा उजवा हात नीतिमत्तेने परिपूर्ण आहे. 11 तुमच्या न्यायकृत्यांमुळे सीयोन पर्वत आनंद करो; यहूदाहची नगरे हर्ष करोत. 12 सीयोनेभोवती फिरा, तिची फेरी मारा, तिचे बुरूज मोजा. 13 तिची तटबंदी पाहा आणि तिच्यातील राजवाडे न्याहाळून पाहा, म्हणजे तुम्हाला तिचे वर्णन करून तुमच्या पुढील पिढीला सांगता येईल. 14 कारण हेच आमचे सनातन परमेश्वर आहेत; ते अखेरपर्यंत आमचे मार्गदर्शक राहतील.

**49** संगीत दिग्दर्शकासाठी. कोरहाच्या पुत्रांची रचना. एक स्तोत्र. अहो सर्व राष्ट्रांतील लोकहो, माझे शब्द ऐका; अहो सर्व जगातील, 2 उच्च व नीच अशा दोघांनी, श्रीमंत आणि गरीब लोकांनो, तुम्ही हे ऐकावे: 3 माझे मुख ज्ञानाचे शब्द बोलतात; माझ्या अंतःकरणाचे मनन सुज्ञतेचे असणार. 4 दृष्टांताकडे मी आपले कान लावेन; मी वीणेच्या साथीवर कोडे स्पष्ट करेन: 5 संकटकाळी मला भिण्याचे कारण काय, जेव्हा फसवणूक करणारे दुष्ट मला वेढतात— 6 जे आपल्या संपत्तीवर भिस्त ठेवतात, आणि आपल्या धनाच्या संपन्नतेची फुशारकी मारतात? 7 कोणत्याही व्यक्तीस इतर व्यक्तीचा उद्धार करण्यासाठी खंडणी भरता येत नाही; किंवा त्याच्या जिवाची खंडणी तो परमेश्वराला भरून देऊ शकत नाही. 8 कारण मनुष्याच्या जिवाच्या खंडणीचे मोल फार मोठे आहे, कोणतेही पैसे कधीही पुरेसे होत नाहीत— 9 जेणेकरून त्यांनी सर्वदा जिवंत राहावे आणि कबरेचा अनुभव त्यांना येऊ नये. 10 सुज्ञ माणसेही मरण पावतात, हे प्रत्येकाला दिसते; मूर्ख व अज्ञानी माणसेही मरण पावतात, ते आपली संपत्ती दुसर्‍यांसाठी ठेवून जातात. 11 त्यांनी आपल्या जमिनीला स्वतःची नावे दिलेली असली, तरी त्यांची थडगीच त्यांची कायमची घरे होतील; ती त्यांची पिढ्यान् पिढ्या वसतिस्थाने असतील. 12 परंतु लोकांची संपत्ती कितीही असली, तरी ते नाशवंत पशूसारखेच आहेत. 13 ज्यांचा स्वतःवर भरवसा आहे, व जे त्यांच्याशी सहमत आहेत, त्यांचेही असेच होणार. सेला 14 ते आपल्या कबरांमध्ये मेंढरांप्रमाणे पडून राहतात; मृत्यू त्यांचा मेंढपाळ होईल (प्रातःकाळी नीतिमान लोक प्रभुत्व करतील) त्यांचे देह कबरेत उतरतील, कारण त्यांना कोणताच आधार राहिला नाही. (Sheol h7585) 15 परंतु परमेश्वर मला मृत्यूच्या सामर्थ्यापासून सोडवतील आणि माझा स्वीकार करतील. सेला (Sheol h7585) 16 जेव्हा इतर लोक श्रीमंत होतात, त्यांच्या घराचे वैभव वाढेल, तेव्हा भेदरून जाऊ नका. 17 कारण जेव्हा ते मरण पावतात, तेव्हा ते सोबत काहीही नेत नाहीत; त्यांचे वैभव त्यांच्या मागोमाग जाणार नाही. 18 जेव्हा तो जिवंत होता, तेव्हा त्याने प्रशंसा प्राप्त केली— कारण मनुष्य समृद्ध झाल्यावर त्याची प्रशंसा केलीच जाते— 19 तरी अखेरीस तो इतर प्रत्येकाप्रमाणे मरण पावतो आणि

तो जीवनाचा प्रकाश कधीही पाहणार नाही. 20 समज नसलेल्या
मनुष्याजवळ संपत्ती असली, तरी तो नाशवंत पशूसारखाच आहे.

**50** आसाफाचे स्तोत्र. सर्वसमर्थ याहवेह, परमेश्वर पृथ्वीला, सूर्याच्या
उगविण्यापासून तो जिथे मावळतो तिथपर्यंत हाक मारून
बोलवितात. 2 सौंदर्यात परिपूर्ण असलेल्या सीयोनमधून, परमेश्वराचे
गौरव प्रकाशते. 3 आमचे परमेश्वर येतील आणि ते स्वस्थ राहणार
नाहीत; त्यांच्याभोवती खवळलेले वादळ व विध्वंस करणारा अग्नी
आहे. 4 ते आपल्या लोकांचा न्याय करावयास येतील; आकाशाला
आणि पृथ्वीला उद्देशून ते हाक मारतात: 5 "त्या माझ्या भक्तांना
माझ्याजवळ एकत्र करा, ज्यांनी यज्ञ करून माझ्याशी करार स्थापित
केला." 6 आणि आकाश त्यांचे नीतिमत्व जाहीर करते, कारण ते न्यायी
परमेश्वर आहेत. सेला 7 "ऐका, माझ्या लोकांनो ऐका, मी बोलत आहे;
इस्राएला, मी तुझ्याविरुद्ध साक्ष देत आहे: मी परमेश्वर, तुझा परमेश्वर
आहे. 8 तुझ्या अर्पणासंबंधी आणि होमार्पणाबद्दल माझी काहीही
तक्रार नाही, ते नियमित माझ्यापुढे आहेतच. 9 मी तुमच्या गोठ्यातील
बैल आणि मेंढवाड्यातील बोकड यज्ञपशू म्हणून घेणार नाही. 10
कारण वनातील सारे प्राणी माझे आहेत; हजारो टेकड्यांवरील गुरे
माझी आहेत; 11 पर्वतावरील सर्व पक्षी मला माहीत आहेत, भूमीवरील
सर्व प्राणीही माझेच आहेत. 12 मी भुकेला असलो, तरी तुमच्याकडे
खावयाला मागणार नाही, कारण संपूर्ण जग आणि त्यातील सर्वकाही
माझे आहे. 13 बैलाचे मांस माझा आहार आहे का किंवा बोकडांचे रक्त
माझे पेय आहे का? 14 "परमेश्वराला उपकारस्तुतीचे यज्ञ कर; सर्वोच्च
परमेश्वरापुढे आपले नवस फेड, 15 आणि संकटकाळी माझा धावा कर;
मी तुला संकटमुक्त करेन आणि तू माझे गौरव करशील." 16 परंतु
परमेश्वर दुष्ट लोकांना उद्देशून म्हणतात: माझ्या नियमांचे पाठांतर करू
नका आणि माझा करार आपल्या ओठांनी उच्चारणारा तू कोण? 17
कारण माझे नियम झुगारून तुम्ही माझी शिस्त अव्हेरली आहे. 18 तुम्ही
एखाद्या चोराला पाहता व त्याला साथ देता आणि तुम्ही व्यभिचाऱ्यांचे
भागीदार होता. 19 तुझी जीभ कपट रचते तुमच्या मुखातून ओंगळ
भाषा बोलली जाते. 20 तुम्ही बसून आपल्या भावाविरुद्ध साक्ष देता
आणि आपल्या सख्ख्या भावाची निंदा करता. 21 तुम्ही हे करीत असता
मी गप्प राहिलो, तेव्हा तुम्हाला वाटले की मी तुमच्यासारखाच आहे,
परंतु आता तुम्हाला शासन करण्याचा काळ आला आहे; तुमचे आरोप
मी तुमच्यापुढे ठेवणार. 22 "तुम्ही जे परमेश्वराला विसरला आहात,
याचा विचार करा, मी तुमचे तुकडे करण्यापूर्वी, कारण नंतर तुमचे
कोणीही रक्षण करू शकणार नाही: 23 जो कोणी उपकारस्तुतीचा यज्ञ
करतो तो माझे गौरव करतो आणि जो कोणी आपले आचरण यथायोग्य
ठेवतो, त्याला मी परमेश्वराचे तारण दाखवेन."

**51** संगीत दिग्दर्शकासाठी. दावीदाचे एक स्तोत्र. दावीद बथशेबाशी
व्यभिचार केल्यावर नाथान संदेष्टा त्याच्याकडे आला तेव्हा.
परमेश्वरा, तुमच्या प्रेमदयेमुळे माझ्यावर दया करा, तुमच्या महान
करुणेनुसार माझे अपराध पुसून टाका. 2 मला धुऊन माझे अपराध
काढून टाका आणि माझ्या पापदोषापासून मला शुद्ध करा. 3 कारण
माझे अपराध मला माहीत आहेत; माझी पापे नित्य माझ्यापुढे आहेत.
4 तुमच्याविरुद्ध आणि केवळ तुमच्याविरुद्धच मी पातक केले आहे
आणि तुमच्या दृष्टीने जे वाईट ते मी केले आहे; म्हणून तुम्ही यथायोग्य
न्याय दिला आहे आणि जेव्हा तुम्ही न्याय देता तेव्हा ते दोषमुक्त
असतात. 5 मी तर जन्माचाच पापी आहे, माझ्या आईने गर्भधारण केले,
तेव्हापासूनच मी पातकी आहे. 6 पाहा, अंतःकरणाची सत्यता तुम्हाला
आवडते, म्हणून माझ्या खोल अंतर्यामाला तुमच्या ज्ञानाचे शिक्षण
दिले. 7 एजोबाने मला स्वच्छ करा, म्हणजे मी शुद्ध होईन; मला धुवा,
म्हणजे मी हिमाहून पांढरा होईन. 8 आनंदाची व हर्षाची वाणी मला ऐकू
द्या; म्हणजे तुम्ही चिरडलेली माझी हाडे प्रफुल्लित होतील. 9 माझ्या
पातकांपासून आपले मुख फिरवा आणि माझे सर्व अपराध पुसून टाका.
10 परमेश्वरा, माझ्यामध्ये शुद्ध हृदय निर्माण करा आणि माझ्यात स्थिर
असा आत्मा पुनर्स्थापन करा. 11 मला आपल्या समक्षतेतून दूर करू
नका व तुमचा पवित्र आत्मा मजमधून काढून घेऊ नका. 12 तुमच्या
तारणाचा आनंद मला पुनरपि द्या आणि स्वतःला सावरून घेण्यासाठी
मला राजीपणाचा आत्मा द्या. 13 तेव्हा मी अपराध्यांना तुमचे मार्ग
शिकवेन, म्हणजे पातकी तुमच्याकडे परत वळतील. 14 परमेश्वरा,
माझ्या तारणकर्ता परमेश्वरा, मला रक्तपाताच्या दोषापासून मुक्त करा,
म्हणजे माझी जीभ तुमच्या नीतिमत्तेची स्तुती करेल. 15 प्रभू, माझे
ओठ उघडा, म्हणजे माझे मुख तुमची स्तुती करेल. 16 तुम्हाला यज्ञ
आवडत नाही, नाहीतर मी तो केला असता; तुम्ही होमार्पणाने प्रसन्न
होत नाही. 17 भग्न आत्मा हेच माझे अर्पण आहे, हे परमेश्वरा, पश्चात्तापी
आणि अनुतप्त हृदय तुम्ही धिक्कारणार नाही. 18 सीयोनचे हित करणे,
यरुशलेमेचे कोट बांधणे तुम्हाला प्रसन्न करो. 19 मग तुम्ही नीतिमान
लोकांचे यज्ञ आणि सर्व होमार्पणाच्या यज्ञाने प्रसन्न व्हाल. तेव्हा ते
तुमच्या वेदीवर बैल अर्पित करतील.

**52** संगीत दिग्दर्शकासाठी. दावीदाचे मासकील. हा त्यावेळचा संदर्भ
आहे, ज्यावेळी एदोमी दवेगने शौलाला कळविले की दावीद
अहीमेलेखच्या घरी आहे. हे बलवान पुरुषा, दुष्ट कृत्यांची बढाई का
मारतोस, तू दिवसभर कशाचा अभिमान बाळगतोस, तू जो परमेश्वराच्या
दृष्टीने निंदनीय आहेस? 2 तू जो फसव्या कृतीत गुंतलेला आहे,
दिवसभर तुझी जीभ तीक्ष्ण वस्तऱ्यासारखी विनाशाची योजना करीत
असते. 3 तुला चांगल्यापेक्षा दुष्टपणा, सत्य बोलण्यापेक्षा असत्य
अधिक प्रिय आहे. सेला 4 अगे कपटी जिभे, अपायकारक बोलणे
तुला प्रिय आहे! 5 परंतु परमेश्वर तुला शाश्वत विनाशाकडे आणतील;
तुझ्या डेऱ्यातून तुला ओढून बाहेर काढतील आणि जिवंतांच्या भूमीतून
समूळ नष्ट करून तुला दूर नेतील. सेला 6 नीतिमान लोक भयचकित
होऊन पाहतील; ते त्याला हसतील व म्हणतील: 7 "पाहा, हा असा
मनुष्य आहे ज्याने परमेश्वराला आपले आश्रयस्थान बनविले नाही तर
आपल्या विपुल संपत्तीवर विश्वास ठेवला आणि दुसऱ्यांचा नाश करून

तो बलवान झाला!” 8 परंतु मी तर परमेश्वराच्या आश्रयाखालील जैतून वृक्षाप्रमाणे सुरक्षित आहे; परमेश्वराच्या अक्षय प्रीतिवर मी सदासर्वकाळ विसंबून आहे. 9 कारण तुम्ही जे काही केले त्याबद्दल तुमच्या विश्वासू लोकांसमक्ष मी सदासर्वकाळ तुमची स्तुती करेन. आणि मी तुमच्या नावाची आशा करेन, कारण तुमचे नाव चांगले आहे.

**53** संगीत दिग्दर्शकासाठी. माहलथवर आधारित, दावीदाचे मासकील. मूर्ख आपल्या मनात म्हणतो, “परमेश्वर अस्तित्वात नाही.” ते बहकलेले आहेत आणि त्यांची कृत्ये दुष्टच समजावी, कारण सत्कर्म करणारा कोणी नाही. 2 मानवांमध्ये कोणी समंजस आहे का परमेश्वराचा शोध करणारे कोणी आहे का हे पाहण्यासाठी परमेश्वर स्वर्गातून खाली पाहतात. 3 प्रत्येकजण भटकून गेलेला आहेत; प्रत्येकजण भ्रष्ट झाला आहे; सत्कर्म करणारा कोणीच नाही, एकही नाही. 4 दुष्कृत्य करणाऱ्यांना हे ठाऊक नाही काय? भाकरी खाण्यासारखे ते माझ्या लोकांना गिळून टाकतील. ते कधीही परमेश्वराला हाक मारत नाहीत. 5 पण पाहा, जिथे भिण्याचे कारण नव्हते, तिथे ते भयाने भरले. परमेश्वराने त्यांची हाडे विखरून टाकली, ज्यांनी तुमच्याविरुद्ध तळ दिला होता; तुम्ही त्यांची फजिती केली, कारण ते परमेश्वराद्वारे लज्जित झाले आहेत. 6 अहाहा! सीयोनातून इस्राएलची सुटका होईल! जेव्हा परमेश्वर त्यांच्या प्रजेची पुनर्स्थापना करतील, तेव्हा याकोब हर्ष करो आणि इस्राएल आनंद करो!

**54** संगीत दिग्दर्शकासाठी. तंतुवाद्यांच्या साथीने गायचे दावीदाचे मासकील. जेव्हा जिफी लोकांनी जाऊन शौलाला कळविले: “दावीद आमच्याजवळ लपला आहे.” परमेश्वरा, तुम्ही आपल्या नावाने माझे तारण करा; आपल्या सामर्थ्याने मला निर्दोष जाहीर करा. 2 परमेश्वरा, माझी प्रार्थना ऐका. माझ्या मुखातील शब्दांकडे कान द्या. 3 कारण परकी माणसे माझ्याविरुद्ध उठली आहेत; परमेश्वराचा आदर न करणारे निर्दयी लोक— माझा जीव घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. सेला 4 परंतु परमेश्वर निश्चितच माझे साहाय्यकर्ता आहेत; परमेश्वरच आहेत, जे मला मदत करतात. 5 माझ्या शत्रूंच्या दुष्ट कृत्यांचा मोबदला त्यांना मिळो; परमेश्वरा, तुम्ही आपल्या विश्वासूपणाने त्यांचा नाश करा. 6 मी स्वेच्छेने माझे यज्ञ तुम्हाला अर्पण करणार; याहवेह, तुमच्या नावाची महिमा मी गाईन, कारण तुमचे नाव उत्तम आहे. 7 तुम्ही मला माझ्या सर्व संकटातून सोडविले आहे, आणि माझ्या डोळ्यांनी माझ्या शत्रूंचा पराजय पहिला आहे.

**55** संगीत दिग्दर्शकासाठी. तंतुवाद्यांच्या साथीने गायचे दावीदाचे मासकील. हे परमेश्वरा, माझी प्रार्थना ऐका; माझ्या विनवणीकडे दुर्लक्ष करू नका. 2 माझे ऐका आणि मला उत्तर द्या; माझ्या विचारांनी मी त्रस्त आणि व्याकूळ झालो आहे. 3 माझ्या शत्रूंच्या आवाजाने आणि दुष्टांच्या धमक्यांमुळे मी कण्हत आहे, कारण ते माझ्यावर अनर्थ आणतात आणि रागाने माझी निर्भत्सना करतात. 4 माझ्या हृदयात अत्यंत मनोवेदना होत आहेत; मरणाची भीती मला दडपून टाकीत आहे. 5 भीती आणि कंप यांनी मला ग्रस्त केले आहे. अतिभयाने मला ग्रासले आहे. 6 अहाहा, मला कबुतराचे पंख असते तर किती उत्तम झाले असते! दूर उडत जाऊन मी विश्रांती घेतली असती. 7 अतिदूरच्या रानात मी उडून गेलो असतो आणि तिथेच वस्ती केली असती. सेला 8 या तुफानी वारा आणि वादळापासून मी माझ्या आश्रयस्थानी उडून गेलो असतो. 9 प्रभू, दुष्टांमध्ये फूट पाडा, त्यांच्या शब्दांना गोंधळात टाका, कारण शहरात मला हिंसा आणि कलह दिसतात. 10 रात्रंदिवस ते तटाभोवती फिरत असतात; दुष्टपणा व अनीतिमानपणा नगरात आहे. 11 नगरात विध्वंसक शक्ती कार्यरत आहेत; धमक्या आणि खोट्या गोष्टी कधीही त्यांचा मार्ग सोडत नाही. 12 ज्याने माझी निंदा केली, तो काही माझा शत्रू नव्हता; असता तर मी ते सहन केले असते; मी लपून बसलो असतो आणि निसटून गेलो असतो. 13 परंतु माझी निंदा करणारा तूच होतास, माझ्यासारखाच मनुष्य, माझा सोबती आणि माझा जिवलग मित्र, 14 जेव्हा आम्ही आराधकांसह चालत होतो, तेव्हा त्याच्यासोबत परमेश्वराच्या भवनातील मधुर सहभागितेचा मी आनंद घेतला होता. 15 मृत्यू माझ्या शत्रूंना अकस्मात गाठो; ते जिवंतच अधोलोकात उतरले जावोत, कारण त्यांच्या घरात, त्यांच्या आत्म्यात दुष्टपणा आहे. (Sheol h7585) 16 मी तर परमेश्वराचा धावा करेन आणि याहवेह माझे तारण करतील. 17 संध्याकाळी, सकाळी आणि दुपारी मी वेदनांनी आरोळी देईन आणि ते माझी वाणी ऐकतील. 18 जरी माझे बरेच विरोधक तिथे होते, जे युद्ध माझ्याविरुद्ध सुरू होते, तरी ते मला कोणतीही इजा होऊ न देता सोडवितात. 19 परमेश्वर प्राचीन काळापासून राजासनारूढ आहेत, जे बदलत नाहीत— ते त्यांचे ऐकतील व त्यांना नम्र करतील, कारण त्यांना परमेश्वराचे भय नाही. सेला 20 माझा जोडीदार आपल्याच मित्रांवर प्रहार करीत आहे; त्याने केलेला करार तोच मोडत आहे. 21 त्याचे शब्द लोण्याप्रमाणे मृदू वाटतात, पण त्याच्या अंतःकरणात युद्ध सुरू आहे; त्याचे शब्द तेलापेक्षाही मऊ होते, पण उगारलेल्या तलवारींसारखे होते. 22 तू आपला भार याहवेहवर टाक आणि ते तुला आधार देतील; नीतिमानाला ते कधीही विचलित होऊ देणार नाही. 23 परंतु, हे परमेश्वरा, तुम्ही शत्रूंना नाशाच्या गर्तेत लोटून द्याल; खुनी आणि लबाड लोक त्यांचे अर्धे आयुष्यही जगणार नाहीत. परंतु मी तर तुमच्यावरच भरवसा ठेवतो.

**56** संगीत दिग्दर्शकासाठी. “दूरच्या एला वृक्षावर बसलेला कबुतर” या चालीवर आधारित. दावीदाची मिक्ताम गाण्याची रचना. पलिष्ट्यांनी गथ देशात दावीदाला धरले, त्या घटनेचा हा संदर्भ आहे. हे परमेश्वरा, मजवर दया करा, कारण शत्रू त्वेषाने माझा पाठलाग करीत आहे; दिवसभर निकराने ते माझ्यावर हल्ले करीतच असतात. 2 माझे शत्रू दिवसभर माझा पाठलाग करीत आहेत; माझ्यावर गर्वाने प्रहार करणारे अनेकजण आहेत. 3 परंतु ज्यावेळी मला भय वाटेल, त्यावेळी मी तुमच्यावर भरवसा टाकेन. 4 परमेश्वरामध्ये मी त्यांच्या वचनाची प्रशंसा करेन. मी परमेश्वरावर विसंबून आहे आणि मी भिणार नाही. मर्त्य मानव माझे काय करणार? 5 दिवसभर ते माझ्या शब्दांचा विपरीत

अर्थ काढतात; माझा पाडाव कसा करावा, यासंबंधीचाच ते विचार
करीत असतात. 6 ते एकत्र जमून कट रचतात, दबा धरतात; माझ्या
पावलांचा कानोसा घेत, मला ठार करण्याच्या संधीची वाट पाहतात. 7
त्यांच्या दुष्टतेमुळे त्यांना निसटून जाऊ देऊ नका; परमेश्वरा, आपल्या
संतापाने त्या राष्ट्रांना पाडून टाका. 8 तुम्ही माझ्या भटकण्याची ठिकाणे
मोजली आहेत; तुम्ही माझे अश्रू तुमच्या कुपीमध्ये ठेवले आहेत; तुमच्या
चर्मपत्राच्या गुंडाळीत त्यांची नोंद नाही काय? 9 ज्यावेळेस मी तुमचा
मदतीसाठी धावा करेन. माझे शत्रू मागे फिरून पळ काढतील; त्यावरून
हे प्रमाणित होणार की परमेश्वर माझ्या पक्षाचे आहेत. 10 परमेश्वरामध्ये
मी त्यांच्या वचनाची प्रशंसा करेन, याहवेहमध्ये मी त्यांच्या वचनाची
प्रशंसा करेन— 11 मी परमेश्वरावरच आपला भरवसा ठेवणार आणि मी
भिणार नाही, मनुष्य माझे काय करणार? 12 माझ्या परमेश्वरा, मी
तुम्हाला नवस केला आहे; मी तुम्हाला उपकारस्तुतीची अर्पणे करेन.
13 कारण तुम्ही माझा जीव मृत्यूपासून सोडविला आहे आणि माझे
पाय घसरण्यापासून सावरले आहेत; जेणेकरून मला परमेश्वरासमोर
जीवनाच्या प्रकाशात चालता यावे.

**57** संगीत दिग्दर्शकासाठी. “अल्तश्केथ” चालीवर आधारित.
दावीदाचे मिक्ताम गाण्याची रचना. दावीद शौलाच्या
उपस्थितीपासून निसटून गुहेत लपून बसला त्या संदर्भाचे आहे. माझ्या
परमेश्वरा, माझ्यावर दया करा, माझ्यावर दया करा. कारण मी तुमचा
आश्रय घेतला आहे; संकटे जाईपर्यंत मी तुमच्या पंखांच्या छायेखाली
आश्रय घेईन. 2 जे मला निर्दोष ठरवितात, त्या सर्वोच्च परमेश्वराचा मी
धावा करेन. 3 ते स्वर्गातून साहाय्य पाठवून माझे तारण करतील; जे
माझा पाठलाग करतात त्यांचा ते तिरस्कार करतात; सेला परमेश्वर
त्यांची प्रीती आणि विश्वासूपणा पाठवून देतील. 4 सिंहांनी मला घेरले
आहे; ज्यांचे दात भाले आणि बाण आहेत, ज्यांची जीभ तीक्ष्ण तलवार
आहे अशा हिंसक स्वभावाच्या मनुष्यांमध्ये मी पडलो आहे. 5 हे
परमेश्वरा, तुम्ही गगनमंडळाहून उदात्त केले जावोत; तुमचे गौरव सर्व
पृथ्वी व्यापून टाको. 6 माझ्या पावलांसाठी त्यांनी सापळा लावला
आहे— संकटात मी वाकून गेलो होतो. माझ्या वाटेवर त्यांनी माझ्यासाठी
खड्डा खणला होता— परंतु ते स्वतःच त्यात पडले आहेत. सेला 7 हे
परमेश्वरा, माझे अंतःकरण खंबीर आहे, माझे अंतःकरण खंबीर आहे; मी
तुमची स्तुती करीत गायन आणि वादन करणार. 8 हे माझ्या जिवा,
जागृत हो! अगे सारंगी, आणि वीणे, जागृत व्हा! मी प्रातःकाळाला
जागृत करेन. 9 हे प्रभू, मी प्रत्येक राष्ट्रात तुमची स्तुती करेन, मी सर्व
लोकात तुमची स्तुतिस्तोत्रे गाईन. 10 कारण तुमचे वात्सल्य महान
असून ते गगनमंडळाला भिडले आहे; तुमचे विश्वासूपण आकाशाला
जाऊन पोहोचते. 11 हे परमेश्वरा, तुम्ही गगनमंडळाहून उदात्त केले
जावोत; तुमचे गौरव सर्व पृथ्वी व्यापून टाको.

**58** संगीत दिग्दर्शकासाठी. “अल्तश्केथ” चालीवर आधारित.
दावीदाचे मिक्ताम गाण्याची रचना. अहो सत्ताधीशांनो, तुमचे
निकाल खरोखर योग्य असतात काय? तुम्ही लोकांचा न्याय
प्रामाणिकपणे करता काय? 2 नाही, विपरीत न्याय कसा करावा
याचा तुम्ही आपल्या मनात शोध लावता आणि तुमचे हात पृथ्वीवर
हिंसक कृत्ये पसरवितात. 3 दुष्ट लोक जन्मतःच चुकीच्या मार्गाने
जातात; गर्भात असतानाच ते लबाड्या करतात. 4 त्यांचे विष सर्पाच्या
विषासारखे आहे, ते कान बंद ठेवणाऱ्या नागसर्पांसारखे आहेत, 5
की गारुडी कितीही कुशल असला, तरी तो गारुड्याचा सूर ऐकणार
नाही. 6 हे परमेश्वरा, त्यांचे विषाचे दात पाडून टाका; याहवेह, या
सिंहांच्या दाढा उपटून काढा. 7 त्यांना पाण्यासारखे वाहू द्या आणि
विलीन करा; जेव्हा ते धनुष्य रोखतात, तेव्हा त्यांचे बाण लक्ष्य गाठू
नयेत. 8 गोगलगायीप्रमाणे चिखलातच त्यांना विरघळून जाऊ द्या;
सूर्याचे दर्शन न घेता मरण पावणाऱ्या, अकाली जन्मणाऱ्या गर्भासारखे
ते होवोत. 9 काटेरी झुडूपात लागलेल्या अग्नीची आच तुमच्या भांड्यांना
लागण्यापूर्वी— ते हिरवे असो वा वाळलेले—दुष्टही लगेच नाहीसे
होतील. 10 जेव्हा दुष्टांचा सूड घेतला जाईल, तेव्हा नीतिमान लोक
आनंद मानतील; दुष्ट लोकांच्या रक्ताने ते आपले पाय धुतील. 11 तेव्हा
लोक म्हणतील, “नीतिमानाला आताही निश्चितच प्रतिफळ मिळते;
आणि खचित पृथ्वीवर यथार्थपणे न्याय करणारे परमेश्वर आहेत.”

**59** संगीत दिग्दर्शकासाठी. “अल्तश्केथ” चालीवर आधारित.
दावीदाचे मिक्ताम गाण्याची रचना. दावीदाला ठार करण्याच्या
उद्देशाने शौलाने त्याचा घरावर पाळत ठेवण्यासाठी सैनिक पाठवले
तेव्हा ही घटना घडली. हे परमेश्वरा, मला माझ्या शत्रूपासून सोडवा; जे
माझ्याविरुद्ध उठले आहेत, त्यांच्यापासून रक्षण करण्यास माझे दुर्ग
व्हा. 2 दुष्कर्म करणाऱ्यांपासून आणि या रक्तपिपासू लोकांपासून माझा
बचाव करा. 3 पाहा, माझा जीव घेण्यासाठी ते कसा दबा धरून बसले
आहेत! याहवेह, मी कोणताही अपराध किंवा पाप केले नसता क्रूर
माणसे माझ्याविरुद्ध कट रचत आहेत. 4 मी काही चुकीचे केले नसले
तरी ते माझ्यावर आक्रमण करण्याची तयारी करीत आहेत. हे परमेश्वरा,
उठा, माझ्या कष्टांकडे पाहा आणि मला साहाय्य करा. 5 याहवेह,
सेनाधीश परमेश्वरा, इस्राएलाच्या परमेश्वरा, जागृत होऊन सर्व राष्ट्रांना
दंड करा. या दुष्ट, विश्वासघातकी लोकांना दयामाया दाखवू नका. सेला
6 संध्याकाळी ते परत येतात; कुत्र्यांसारखे गुरगुरत हल्ला करण्यास
ते नगराभोवती हिंडतात. 7 ते त्यांच्या तोंडातून काय ओकतात ते
पाहा. त्यांच्या तोंडातील शब्द तलवारीसारखे धारदार आहेत आणि ते
विचारतात, “आम्हाला कोण ऐकू शकेल?” 8 याहवेह, तुम्ही त्यांच्यावर
हसता; तुम्ही सर्व राष्ट्रांचा उपहास करता. 9 तुम्ही माझे सामर्थ्य आहात,
मी तुमची प्रतीक्षा करेन; कारण परमेश्वर तुम्हीच माझे आश्रयस्थान
आहात. 10 तुम्ही माझे प्रेमळ परमेश्वर आहात. परमेश्वर माझ्यापुढे
जातील, मग मी माझ्या निंदकांवर समाधानतेने उपहासात्मक दृष्टी टाकू
शकेन. 11 परंतु त्यांना जिवे मारू नका, माझे लोक लवकर विसरतील,
प्रभू, तुम्ही आमची ढाल आहात. आपल्या बलाने त्यांना मुळासकट
उपटा आणि त्यांना खाली पाडा. 12 त्यांच्या मुखाने केलेली पापे,

त्यांच्या ओठांचे शब्द आणि त्यांनी दिलेल्या शापांमुळे व लबाड्यांमुळे
त्यांना स्वतःच्या अहंकारात अडकू द्या. 13 त्यांना आपल्या क्रोधाच्या
अग्नीने भस्म करा, त्यांना असे भस्म करा, की त्यांच्यातील काहीही
शिल्लक राहणार नाही. तेव्हा दिगंतापर्यंत कळेल की परमेश्वर खरोखरच
याकोबाचे सत्ताधारी आहेत. सेला 14 संध्याकाळी ते परत येतात;
कुत्र्यांसारखे गुरगुरत, हल्ला करण्यास ते नगराभोवती हिंडतात. 15
अन्नाचा शोध करीत भटकतात आणि संतुष्ट झाले नाही तर भुंकत
राहतात. 16 परंतु मी दररोज सकाळी तुमचे सामर्थ्य आणि तुमची दया
यांची गीते गाईन, कारण माझ्या दुःखाच्या व संकटाच्या दिवसात तुम्ही
माझे आश्रयदुर्ग आणि शरणस्थान आहात. 17 हे माझ्या सामर्थ्या,
तुमची स्तुतिस्तोत्रे मी गात आहे, कारण हे माझ्या दयाळू परमेश्वरा,
तुम्हीच माझ्या सुरक्षिततेचे उंच दुर्ग आहात.

**60** संगीत दिग्दर्शकासाठी. “शूशन एदूथ” कराराची कुमुदिनीच्या
चालीवर आधारित. दावीदाचे मिक्ताम गाण्याची रचना. हे
शिकविण्यासाठी लिहिले गेले आहे. दावीद अराम-नहराईम आणि अराम-
झोबाह देशांशी युद्ध करीत असतानाच्या परिस्थितीचा हा उल्लेख आहे.
त्याचवेळी सेनापती योआब, क्षार खोऱ्यात परतला, त्याने बारा हजार
एदोमाच्या सैनिकांचा नाश केला. हे परमेश्वरा, तुम्ही आमचा त्याग केला,
आम्हाला फोडून टाकले आहे; तुम्ही आमच्यावर कोपला आहात—आता
आम्हाला पूर्वस्थितीवर आणा! 2 तुम्ही भूमी कंपित केली आहे आणि
तुम्ही तिला दुभंगले आहे; आता तुम्हीच तिला नीटनेटके करा, कारण ती
सर्वस्वी हादरली आहे. 3 तुम्ही आमच्याबाबत अतिशय कठोर झाले
आहात; तुम्ही आम्हाला झोकांड्या खावयास द्राक्षारस दिला आहे. 4
परंतु तुम्ही आपल्या भय बाळगणाऱ्यांकरिता एक झेंडा उंचाविला आहे
की तो आमच्या शत्रूंविरुद्ध प्रदर्शित करू. सेला 5 आम्हाला वाचवा
आणि तुमच्या उजव्या हाताने मदत करा म्हणजे तुम्ही ज्यांच्यावर प्रीती
करता त्यांचे तारण होईल. 6 परमेश्वराने त्यांच्या पवित्रस्थानी घोषणा
केली: “मी विजयाने शेखेमचे विभाजन करेन, आणि सुक्कोथाचे खोरे
मोजून त्याचे इतरांना वाटप करेन. 7 गिलआद माझा आहे. मनश्शेह
माझा आहे. एफ्राईम माझे शिरस्त्राण आहे. यहूदाह माझा राजदंड आहे.
8 मोआब माझे हात धुण्याचे गंगाळ आहे, आणि एदोमावर मी माझी
पादत्राणे फेकेन; पलेशेथावर मी विजयाचा जयघोष करेन.” 9 मला
तटबंदीच्या नगरात कोण आणेल? मला एदोम प्रांतात कोण नेईल?
10 परमेश्वरा, तुम्हीच आम्हाला नाकारले आहे ना, आणि आता तुम्ही
आमच्या सैन्याबरोबरही जात नाही? 11 शत्रूविरुद्ध तुम्ही आमचा पुरवठा
करा, कारण मानवाचे साहाय्य व्यर्थ आहे. 12 परमेश्वराच्या साहाय्याने
आमचा विजय सुनिश्चित आहे, आणि तेच आमच्या शत्रूंना पायदळी
तुडवतील.

**61** संगीत दिग्दर्शकासाठी. तंतुवाद्याच्या साथीने गायचे दावीदाचे
स्तोत्र. हे परमेश्वरा, माझा धावा ऐका, माझ्या प्रार्थनेकडे लक्ष
द्या. 2 दिगंतापासून मी तुमचा धावा करतो माझे हृदय व्याकूळ
झाले असताना; तुम्हीच मला उंच खडकावर न्या. 3 कारण तुम्हीच
माझे आश्रयस्थान, शत्रूविरुद्ध उंच बुरूज आहात. 4 तुमच्या मंडपात
सदासर्वकाळ राहण्यास आणि तुमच्या पंखांच्या सावलीखाली आश्रय
घेण्यास मी उत्कंठित आहे. सेला 5 कारण परमेश्वरा, मी तुम्हाला
केलेला नवस तुम्ही ऐकला आहे आणि तुमच्या नावाचे भय धरणाऱ्यांचे
वतन तुम्ही मला दिले आहेत. 6 तुम्ही राजाचे आयुष्य वाढवा; ते अनेक
पिढ्यांमधील पूर्ण भरलेल्या वर्षांप्रमाणे होवो. 7 तो परमेश्वराच्या समोर
सदासर्वकाळ राहो. तुमची प्रीती आणि सत्य त्याच्या रक्षणाकरिता
प्रकट करा. 8 म्हणजे मी तुमच्या नावाला सतत धन्यवाद देईन आणि
दररोज माझी शपथ पूर्ण करेन.

**62** संगीत दिग्दर्शकासाठी. यदूथूनाच्या चालीवर आधारित. दावीदाचे
स्तोत्र. परमेश्वरामध्ये निश्चितच माझ्या जिवास विश्रांती आहे;
माझे तारण त्यांच्याकडून येते. 2 फक्त तेच माझे खडक आणि माझे
तारण; तेच माझा दुर्ग आहेत, माझे ढळणे अशक्य आहे. 3 तुम्ही
सर्वजण या एका मनुष्याला खाली पाडावयास, कुठपर्यंत माझ्यावर प्रहार
करीत राहणार? मी तर एका वाकलेल्या भिंतीसारखा, कोसळलेल्या
कुंपणासारखा आहे. 4 मला उच्च स्थानावरून खाली पाडण्याचा
त्यांचा बेत आहे; त्यांना खोटे बोलणे आवडते; ते आपल्या तोंडाने
आशीर्वाद देतात, परंतु मनातून शाप देतात. सेला 5 तरीही माझा आत्मा
परमेश्वरामध्ये शांती पावेल; माझी आशा त्यांच्यापासून आहे. 6 खरोखर
तेच माझे खडक, तेच माझे तारण, तेच माझे दुर्ग आहेत; मी ढळणार
नाही. 7 माझे तारण आणि माझा सन्मान परमेश्वरावर अवलंबून आहे;
तेच माझे भक्कम खडक, माझे आश्रय आहेत. 8 माझ्या लोकांनो,
तुम्ही सर्वकाळ त्यांच्यावर भरवसा ठेवा; आपले हृदय त्यांच्यापुढेच
मोकळे करा, कारण परमेश्वरच आमचे आश्रयस्थान आहेत. सेला 9
साधारण मानव श्वासमात्र आहेत; विशिष्ट मानव फक्त मिथ्या आहेत;
तराजूत वजन केले की ते हलकेच भरतील; ते सर्व श्वासमात्र आहेत. 10
पिळवणूकीच्या धनावर विश्वास ठेवू नका किंवा चोरी केलेल्या वस्तूंवर
व्यर्थ आशा ठेवू नका; जरी तुमची संपत्ती वाढत असेल, तरी तिच्यावर
मन लावू नका. 11 परमेश्वर एकदा बोलले आहेत, मी दोनदा हे ऐकले
आहे: “सामर्थ्य याहवेहचेच आहे, 12 आणि प्रभू, तुमच्यामध्ये प्रेमदया
सदैव असते;” आणि, “तुम्ही प्रत्येकाला त्याच्या कृत्यानुसार प्रतिफळ
देता.”

**63** यहूदीयाच्या रानात असताना रचलेले दावीदाचे स्तोत्र. हे परमेश्वरा,
तुम्ही माझे परमेश्वर आहात, मी तुमचा कळकळीने शोध करतो;
या कोरड्या आणि वैराण भूमीत माझा जीव तुमच्यासाठी तहानलेला
झाला आहे; माझे सर्वस्व तुमच्यासाठी किती उत्कंठित झाले आहे.
2 तुमचे सामर्थ्य आणि गौरव मी तुमच्या पवित्रस्थानी पाहिले आहे.
3 कारण तुमची प्रीती जीवनाहून उत्तम आहे, माझे ओठ तुमचे गौरव
करतील. 4 माझ्या जिवात जीव आहे तोपर्यंत मी तुम्हाला धन्यवाद
देईन आणि माझे हात तुमच्या नावाने उंच करेन. 5 उत्कृष्ट भोजनाने
व्हावे तसा मी तृप्त होईल; गीत गाणाऱ्या ओठांनी मी तुमची स्तुती

करेन. 6 माझ्या बिछान्यावर मी तुमचे स्मरण करतो; रात्रीच्या प्रत्येक
प्रहरी मी तुमचे मनन करतो. 7 कारण तुम्ही माझे साहाय्य आहात,
तुमच्या पंखांच्या सावलीत मी गीत गातो. 8 मी तुम्हाला बिलगून राहतो;
तुमचा उजवा हात मला सावरून धरतो. 9 जे मला मारू इच्छितात त्यांचा
नाश होईल; ते पृथ्वीच्या खोल रसातळी जातील. 10 तलवारीच्या धारेने
ते पडतील; कोल्ह्यांचे ते भक्ष्य होतील. 11 परंतु राजा परमेश्वरामध्ये
उल्हास करेल; जे लोक परमेश्वराची शपथ घेतात, ते सर्व त्याचे गौरव
होईल; परंतु लबाडांची तोंडे बंद होतील.

**64** संगीत दिग्दर्शकासाठी. दावीदाचे स्तोत्र. हे परमेश्वरा, माझे
गाऱ्हाणे ऐका; शत्रूंच्या भयापासून माझ्या जिवास सुरक्षित ठेवा.
2 दुष्टांच्या षडयंत्रापासून आणि गुन्हेगार टोळक्यांच्या कारस्थानापासून
मला लपवा. 3 तलवारीप्रमाणे ते आपल्या जिभांना धारदार करतात
आणि बाणांप्रमाणे तीक्ष्ण असलेल्या कटुशब्दांनी लक्ष्य करतात. 4 दबा
धरून ते निरपराध्यांवर बाण सोडतात; ते निर्भयपणे अकस्मात त्यांच्यावर
मारा करतात; 5 दुष्कृत्य करण्यास ते एकमेकांना प्रोत्साहन देतात;
सापळे आखण्यासाठी ते गुप्तपणे एकत्र जमतात; ते म्हणतात, “ते
कोण पाहणार?” 6 ते कुटिल योजना बनवून म्हणतात, “आता आम्ही
उत्तम योजना तयार केली आहे!” मानवी अंतःकरण आणि हृदय समजणे
कठीण आहे. 7 परंतु स्वतः परमेश्वरच त्यांचा बाण मारतील; अचानक ते
घायाळ होतील. 8 परमेश्वर त्यांची जीभ त्यांच्याच विरुद्ध करतील आणि
त्यांचा नाश करतील. जे सर्व त्यांना पाहतील, ते उपहासाने आपले
डोके हालवतील. 9 मग सर्व मानव घाबरतील; ते परमेश्वराच्या कृत्यांची
थोरवी गातील; आणि त्यांनी केलेल्या चमत्काराविषयी मनन करतील.
10 पण नीतिमान लोक याहवेहमध्ये आनंद करतील व त्यांचा आश्रय
घेतील, सरळ हृदयाचे त्यांचे स्तवन करतील!

**65** संगीत दिग्दर्शकासाठी. दावीदाचे एक स्तोत्र. एक गीत. हे
परमेश्वरा, तुमची स्तुती सीयोनेत अपेक्षित आहे; तुम्हाला केलेला
नवस तिथे पूर्ण करण्यात येईल. 2 तुम्हीच प्रार्थनेचे उत्तर देता, म्हणून
तुमच्याकडे सर्व लोक येतील. 3 आमची अंतःकरणे पापांनी भरलेली
असली, तरी तुम्ही आमच्या अपराधांची क्षमा केली. 4 तुमच्या अंगणात
येऊन राहण्यासाठी तुम्ही ज्यांची निवड केली, ते धन्य! आम्ही तुमच्या
मंदिरातील पवित्रस्थानाच्या उत्कृष्ट पदार्थांनी संतुष्ट होऊ. 5 तुमच्या
अद्भुत आणि नीतिकार्याद्वारे तुम्ही आम्हाला प्रत्युत्तर देता, परमेश्वर,
आमचे तारणकर्ता, पृथ्वीच्या टोकापर्यंत आणि दुर्गम समुद्रापर्यंत, तुम्ही
सर्व भक्तांची आशा आहात. 6 आपल्या महान शक्तीने त्यांनी पर्वतांना
त्यांच्या ठिकाणी स्थिर ठेवले आहे. 7 तुम्ही महासागराच्या खवळलेल्या
लाटांना शांत करता आणि सर्व राष्ट्रांचे कोलाहल शांत करता. 8 संपूर्ण
पृथ्वी तुमच्या महाकृत्याने विस्मित होते; सूर्योदय आणि सूर्यास्त ही
आनंदाने जयघोष करीत आहेत. 9 तुम्ही या भूमीची काळजी घेता व ती
सिंचनासाठी देता. आपण ते विपुल व समृद्ध करता. लोकांना धान्य
मिळावे म्हणून परमेश्वराच्या नद्या पाण्याने भरल्या आहेत, कारण तुम्ही
ते निर्धारित केले आहे. 10 तुम्ही नांगरलेल्या सऱ्यांना पाणी देता आणि
तुम्ही तिचे उंचवटे सपाट करता; पावसाच्या सरींनी तिला मऊ करता;
तिच्या अंकुरांना आशीर्वाद देता. 11 तुम्ही तुमच्या औदार्यासह वर्षास
शिरोभूषण चढविता आणि तुमच्या गाड्या समृद्धीने ओसांडत आहेत.
12 राने हिरव्यागार लुसलुशीत गवताने आच्छादून टाकता; टेकड्या
आनंदाची वस्त्र परिधान करतात. 13 हिरवीगार कुरणे कळपांनी भरून
जातात आणि दऱ्यांची भूमी धान्यांनी आच्छादली जाते; ती आनंदाने
गजर करीत गाऊ लागते.

**66** संगीत दिग्दर्शकासाठी. एक गीत. एक स्तोत्र. अहो पृथ्वीवरील
सर्व लोकहो, आनंदाने परमेश्वराचा जयजयकार करा! 2 त्यांच्या
गौरवशाली नावाचा महिमा गा; ते किती अद्भुत आहेत, हे जगाला
सांगा. 3 परमेश्वराला म्हणा, “तुमची कृत्ये किती अद्भुत आहेत! तुमच्या
सामर्थ्यामुळे तुमचे शत्रू तुम्हाला दबकतात. 4 पृथ्वीवरील सर्व लोक
तुमच्यासमोर नतमस्तक होतील; ते तुमच्या गौरवांची गीते गातील,
ते तुमच्या नावाच्या गौरवांची गीते गातील.” सेला 5 या आणि पाहा,
परमेश्वराने काय केले, त्यांनी लोकांच्या बाबतीत किती अद्भुत कृत्ये
केली! 6 त्यांनी समुद्रात त्यांच्यासाठी कोरडी भूमी तयार केली; ते
जलातून पायी पलीकडे गेले— यास्तव त्यांच्यामध्ये आपण हर्ष करू
या. 7 आपल्या सामर्थ्याने ते सदासर्वकाळ राज्य करतात, प्रत्येक
राष्ट्रांना ते न्याहाळून पाहतात— की बंडखोरांनी त्यांच्याविरुद्ध विद्रोह
करू नये. सेला 8 अहो सर्व लोकहो. परमेश्वराची स्तुती करा, त्यांची
स्तुतिस्तोत्रे ऐकू येवो. 9 कारण आमचे जीवन त्यांच्या हाती आहे आणि
ते आमची पावले घसरू देत नाही. 10 हे परमेश्वरा, तुम्ही आमची परीक्षा
घेतली; चांदी शुद्ध करतात, तसे तुम्ही आम्हाला शुद्ध केले आहे. 11
तुम्ही आम्हाला कारागृहात आणले आणि आमच्या पाठीवर भारी ओझी
लादली. 12 तुम्ही लोकांना आमची डोकी तुडवून जाऊ दिले; आम्ही
अग्नी आणि प्रलय यामधून गेलो, परंतु तुम्ही आम्हाला बाहेर काढून
समृद्ध भूमीवर आणले आहे. 13 मी तुमच्या मंदिरात होमार्पणे घेऊन,
माझे नवस फेडण्यासाठी येणार आहे— 14 कारण मी संकटात होतो,
तेव्हा माझ्या ओठांनी अभिवचन दिले आणि माझ्या मुखाने मी ते विदित
केले. 15 म्हणूनच पुष्ट पशूंची तसेच मेंढ्याची होमार्पणे तुमच्याकडे
आणेन; मी गोऱ्हे आणि बोकडांचे अर्पण करेन. सेला 16 अहो तुम्ही, जे
परमेश्वराचे भय बाळगता, ते या आणि ऐका; त्यांनी माझ्यासाठी काय
काय केले ते सर्व मी तुम्हाला सांगेन. 17 साहाय्यासाठी मी मुखाने
त्यांचा धावा केला; आणि माझ्या जिभेवर त्यांची स्तुती होती. 18
मी माझी पातके माझ्या अंतःकरणात ठेवली असती, तर परमेश्वराने
माझा धावा ऐकला नसता; 19 परंतु परमेश्वराने ते ऐकले, त्यांनी माझ्या
प्रार्थनेच्या विनंतीकडे लक्ष दिले आहे. 20 परमेश्वराचा धन्यवाद असो,
त्यांनी माझी प्रार्थना अस्वीकार केली नाही, आणि माझ्यावर प्रीती
करण्याचे नाकारले नाही.

**67** संगीत दिग्दर्शकासाठी. तंतुवाद्यांच्या साथीने. एक स्तोत्र. एक
गीत. परमेश्वर आमच्यावर कृपा करो आणि आम्हाला आशीर्वाद
देवो आणि त्यांचा मुखप्रकाश आम्हांवर पडो; सेला 2 यासाठी की
पृथ्वीवर तुमचे मार्ग प्रकट व्हावे, तुम्ही सिद्ध केलेले तारण सर्व राष्ट्रांना
कळावे. 3 हे परमेश्वरा, राष्ट्रे तुमचे स्तवन करोत, सर्व राष्ट्रे तुमचे स्तवन
करोत. 4 राष्ट्रे हर्ष करोत आणि आनंदाने जयघोष करोत, कारण तुम्ही
न्यायाने लोकांचा न्यायनिवाडा कराल आणि पृथ्वीवरील राष्ट्रांना मार्ग
दाखवाल. सेला 5 हे परमेश्वरा, राष्ट्रे तुमचे स्तवन करोत; सर्व राष्ट्रे तुमचे
स्तवन करोत. 6 कारण पृथ्वीने विपुल उपज दिला आहे; परमेश्वर, आमचे
परमेश्वर, आम्हाला आशीर्वाद देतात. 7 परमेश्वर आम्हाला अजूनही
आशीर्वाद देवोत, जेणेकरून पृथ्वीवरील सर्व सीमा त्यांचे भय धरतील.

**68** संगीत दिग्दर्शकासाठी. दावीदाची रचना. एक स्तोत्र. एक गीत.
परमेश्वराने उठावे आणि त्यांच्या सर्व शत्रूंची दाणादाण होवो;
त्यांचे वैरी त्याच्यापुढून पळून जावोत. 2 तुम्ही त्यांना धुरासारखे उडवून
लावो— जसे अग्नी समक्ष मेण वितळते, तसे परमेश्वराच्या समक्षतेपुढून
दुष्ट लोक नष्ट होवोत. 3 परंतु नीतिमान मनुष्य हर्ष करो; परमेश्वरापुढे
आनंद करो; हर्षामुळे उल्लास करो. 4 परमेश्वराची स्तुतिस्तोत्रे गा,
त्यांच्या नावाचे स्तवन करा, जे मेघांवर स्वार होतात, त्यांची महिमा
करा; त्यांचे नाव याहवेह आहे—त्यांच्या समक्षतेत हर्ष करा. 5 परमेश्वर
पितृहीनांचे पिता आणि विधवांचे न्यायदाता आहेत, ते आपल्या पवित्र
निवासस्थानी आहेत. 6 एकाकी लोकांना ते कुटुंबात वसवितात, कैद्यांना
ते तुरुंगातून मुक्त करतात, तेव्हा ते आनंदाने गाऊ लागतात; परंतु
बंडखोरांच्या वाट्याला दुष्काळ आणि दुःखच येणार. 7 हे परमेश्वरा, जेव्हा
तुम्ही तुमच्या लोकांच्या पुढे चाललात, जेव्हा तुम्ही रानातून चाललात,
सेला 8 तेव्हा पृथ्वी थरथर कापली, परमेश्वरासमोर आकाशातून वृष्टी
झाली, परमेश्वरासमोर, इस्राएलाच्या परमेश्वरासमोर सीनाय पर्वत कंपित
झाला. 9 परमेश्वरा, तुम्ही मुबलक पाऊस दिला. तुम्ही तुमचा थकलेला
वारसा ताजातवाना करता. 10 तुमची प्रजा तिथे राहिली, परमेश्वरा,
तुमच्या भांडारातून तुम्ही दयाळूपणाने गरिबांना मदत केली. 11 प्रभूने
आज्ञा दिली आणि मोठ्या संख्येने महिलांनी मोठ्या आनंदाने या वार्तेचा
प्रसार केला: 12 "राजे आणि सेनांनी पळ काढला आहे; घरी राहिलेल्या
स्त्रिया लूट वाटून घेत आहेत. 13 जेव्हा तुम्ही मेंढवाड्यात पडून राहता,
तेव्हा असे दिसते की जणू कबुतराच्या पंखांना चांदी असते आणि
त्यांचे पाय चमकणाऱ्या सोन्याने मढविलेले असतात." 14 सर्वसमर्थाने,
सलमोन पर्वतावर वितळून जाणाऱ्या हिमकणांसारखी राजांची पांगापांग
केली. 15 बाशान पर्वता, वैभवी बाशान पर्वता, अनेक शिखरांच्या
रांगा असलेल्या पर्वता, बाशान पर्वता, 16 आपल्या सर्वकाळच्या
निवासासाठी परमेश्वराने ज्याची निवड केली, त्या सीयोन पर्वताकडे तू
हेव्याने का पाहतोस? याहवेहनी ते निवास करण्यासाठी निवडले. 17
परमेश्वराचे रथ दहा दहा हजार आणि हजारो हजार आहेत; प्रभू सीनाय
पर्वतावरून पवित्रस्थानी आले आहेत. 18 जेव्हा तुम्ही उच्चस्थानी
आरोहण करता, तुम्ही अनेक बंदिवान नेले; मनुष्यासाठी तुम्ही नजराणे
स्वीकारता; अगदी एकेकाळच्या बंडखोरांपासून सुद्धा— जेणेकरून येथे
याहवेह परमेश्वर आमच्यामध्ये वस्ती करतील. 19 परमेश्वर, आमचे प्रभू,
आमच्या तारकाचे स्तवन होवो, ते दररोज आमची ओझी वाहतात. सेला
20 आमचे परमेश्वरच, असे परमेश्वर आहेत जे आम्हाला तारण देतात;
आम्हाला मृत्यूपासून वाचविणारे सार्वभौम याहवेहच आहेत. 21 परमेश्वर
खात्रीने आपल्या शत्रूंची आणि पापमार्गाला चिकटून राहणाऱ्या लोकांची
डोकी फोडतील. 22 प्रभूने घोषणा केली, "बाशान येथून मी तुझे शत्रू
पुन्हा आणेन; समुद्राच्या तळातून मी त्यांना पुन्हा वर आणेन, 23
म्हणजे तुम्ही त्यांच्या रक्ताच्या पाटातून चालाल आणि तुमच्या कुत्र्यांना
ते रक्त मनसोक्त चाटता येईल." 24 हे परमेश्वरा, तुमची मिरवणूक
आता दिसू लागली आहे; पवित्रस्थानाकडे माझ्या परमेश्वराची, माझ्या
राजाची, मिरवणूक चालली आहे. 25 गाणारे पुढे, वाद्ये वाजविणारे
मागे आणि त्या दोहोंच्यामध्ये कुमारिका खंजिऱ्या वाजवित चालल्या
आहेत. 26 महासभेत परमेश्वराची स्तुती करोत; इस्राएलाच्या सभेत
याहवेहची स्तुती करोत. 27 बिन्यामीनचा छोटा वंश नेतृत्व करीत पुढे
चालला आहे, यहूदाह वंशाचे अधिपती आणि जबुलून व नफताली वंशाचे
अधिपती त्यामध्ये आहेत. 28 हे परमेश्वरा, तुमचे बळ एकवटून; तुम्ही
आमच्यासाठी पूर्वी केले, तसे तुमचे सामर्थ्य प्रगट करा. 29 पृथ्वीवरील
राजे यरुशलेमातील तुमच्या मंदिराच्या गौरवामुळे तुम्हाला भेटी घेऊन
येत आहेत. 30 हे परमेश्वरा, लव्हाळ्यात राहणाऱ्या वनपशूंना, बैलांचा
कळप आणि त्यांच्यासोबत त्यांच्या वासरांना धमकावा; खंडणीची
तीव्र इच्छा बाळगणाऱ्यांना पायाखाली तुडवा, आणि युद्धात आनंद
मानणाऱ्या राष्ट्रांची दाणादाण करा. 31 इजिप्त देशातून राजदूत येतील;
कूश परमेश्वरापुढे नम्र होईल. 32 पृथ्वीवरील राष्ट्रांनो, परमेश्वराचे गुणगान
गा, प्रभूचे स्तवन करा, सेला 33 अनादि काळापासून अत्युच्च आकाशात
स्वारी करतात, ज्यांचा प्रचंड आवाज ढगांच्या गर्जनांसारखा आहे. 34
परमेश्वराच्या सामर्थ्याची घोषणा करा; त्यांचे ऐश्वर्य इस्राएलवर प्रकाशित
आहे; त्यांचे महान सामर्थ्य आकाशात आहे. 35 परमेश्वरा, तुम्ही आपल्या
पवित्रस्थानात भयावह आहात; इस्राएलचे परमेश्वर आपल्या लोकांना
सामर्थ्य आणि बळ देतात. परमेश्वर धन्यवादित असो!

**69** संगीत दिग्दर्शकासाठी. "कुमुदिनी" चालीवर आधारित. दावीदाचे
स्तोत्र. परमेश्वरा, मला वाचवा; कारण पाणी गळ्यापर्यंत पोहोचले
आहे. 2 दलदलीत मी खोल रुतत चाललो आहे; मला माझ्या पायावर उभे
राहता येत नाही. मी खोल दलदलीत आलो आहे; माझ्या सभोवती पाणी
वाढत चालले आहे. 3 अगदी थकून जाईपर्यंत मी मदतीसाठी आक्रोश
केला आहे; माझा घसा कोरडा झाला आहे. आपल्या परमेश्वराची वाट
पाहत, माझे डोळे थकले आहेत. 4 माझा विनाकारण द्वेष करणाऱ्यांची
संख्या माझ्या डोक्यावरील केसांपेक्षा अधिक आहेत; पुष्कळ लोक
विनाकारण माझे शत्रू झाले आहेत. मला नष्ट करण्याची त्यांची इच्छा
आहे. मी जे चोरले नाही, त्याची भरपाई करण्याची माझ्यावर बळजबरी
होत आहे. 5 हे परमेश्वरा, माझा मूर्खपणा तुम्हाला माहीत आहे; माझे
दोष तुमच्यापासून लपलेले नाहीत. 6 हे प्रभू, सर्वशक्तिमान याहवेह, जे

तुमच्यावर आशा ठेवतात, माझ्यामुळे ते लज्जित होऊ नये; इस्राएलाच्या
परमेश्वरा, जे तुमचा शोध घेतात त्यांची माझ्यामुळे अप्रतिष्ठा होऊ देऊ
नका. 7 तुमच्याकरिता माझी विटंबना झाली आहे, माझे मुख लज्जेने
व्याप्त झाले आहे. 8 माझ्या कुटुंबासाठी मी परका आहे, माझी सख्खी
भावंडेही मला ओळखत नाही. 9 तुमच्या मंदिराविषयीच्या आवेशाने
मला ग्रासून टाकले आहे, आणि त्यांनी केलेला तुमचा अपमान माझ्यावर
पडला आहे. 10 जेव्हा मी शोक करून उपास केला, तेच माझ्यासाठी
निंदेचे कारण ठरले; 11 जेव्हा मी गोणपाट पांघरले, तेव्हा ते माझ्याबद्दल
उपहासाने बोलू लागले. 12 मी गावातील लोकांच्या कुत्सित चर्चेचा
विषय झालो आहे आणि मी मद्यप्यांच्या गीतांचा विषय झालो आहे.
13 तरी याहवेह, तुमच्या प्रसन्नतेच्या वेळेसाठी मी तुमच्याकडे प्रार्थना
करीत आहे; हे परमेश्वरा तुमच्या महान प्रीती निमित्त तुमच्या विश्वसनीय
तारणाद्वारे मला उत्तर द्या. 14 मला या दलदलीतून बाहेर काढा; मला
त्यामध्ये बुडू देऊ नका; माझा द्वेष करणाऱ्यापासून मला वाचवा. खोल
पाण्यातून मला बाहेर काढा. 15 महापुरांच्या लोंढ्यात मला बुडू देऊ
नका किंवा डोहाला मला गिळू देऊ नका; गर्तेच्या जाभाडात मला गुंतून
पडू देऊ नका. 16 याहवेह, तुमच्या प्रीतिपूर्ण दयेने माझ्या प्रार्थनेची
उत्तरे द्या; तुम्ही विपुल कृपेने आपले मुख माझ्याकडे करा. 17 तुम्ही
आपल्या सेवकापासून आपले मुख लपवू नका; त्वरेने मला उत्तर द्या,
कारण मी संकटात सापडलो आहे. 18 माझ्याजवळ या आणि माझा
बचाव करा; माझ्या शत्रूपासून मला सोडवा. 19 ते माझी कशी निंदा
करतात, विटंबना आणि अप्रतिष्ठा करतात हे तुम्ही जाणता; माझे सर्व
शत्रू तुमच्यापुढे आहेत. 20 त्यांच्याकडून होणाऱ्या तिरस्काराने माझे
हृदय भग्न झाले आहे; मी अत्यंत हतबल झालो आहे; मी सहानुभूतीची
अपेक्षा केली, पण ती मला मिळाली नाही; मी सांत्वना देणाऱ्यांचा
शोध घेतला पण मला कोणीही आढळले नाही. 21 अन्न म्हणून त्यांनी
मला विष दिले, तहान भागविण्यासाठी त्यांनी मला आंब दिला. 22
त्यांच्यासाठी तयार केलेला मेज सापळा असा होवो; ते स्वस्थ असता
त्यांच्यासाठी ते सूड व पाश ठरतील. 23 त्यांचे डोळे अंधकारमय होवोत
म्हणजे त्यांना दिसणार नाही, आणि त्यांची कंबर कायमची खाली
वाकवून ठेवा. 24 तुमचा सर्व क्रोध त्यांच्यावर ओता; तुमचा संतापाचा
भयानक अग्नी त्यांच्यावर येऊ द्या. 25 त्यांचे ठिकाण ओसाड पडो;
त्यांच्या तंबूत कोणीही वस्ती न करो. 26 कारण ज्याला तुम्ही शासन
केले, त्याचाच ते छळ करतात, आणि ज्याला तुम्ही घायाळ केले,
त्यांच्या वेदनेबद्दल ते बोलतात. 27 त्यांच्या दुष्कृत्यांच्या प्रमाणात तुम्ही
त्यांना शासन करा आणि तुमच्या तारणाचा वाटा त्यांना देऊ नका.
28 जीवनाच्या पुस्तकातून त्यांची नावे खोडली जावोत; नीतिमानांच्या
यादीत त्यांची नावे येऊ नयेत. 29 मी दुःखित आणि पीडित आहे—
परमेश्वर तुमचे तारणच माझी सुरक्षा आहे. 30 मी परमेश्वराची स्तुती
गीत गाऊन करेन आणि उपकारस्तुती करून त्यांचे गौरव करेन. 31
यामुळे याहवेहला, बैलाच्या किंवा शिंगे आणि खुरे असलेल्या गोऱ्ह्याच्या
यज्ञार्पणापेक्षा, अधिक आनंद होईल. 32 दीनजन हे पाहतील आणि
ते हर्षभरित होतील— तुम्ही जे परमेश्वराचा शोध करतात, त्यांच्या
हृदयात नवजीवन येवो. 33 याहवेह गरजूंचे ऐकतात आणि ते आपल्या
बंदिवानांचा अव्हेर करीत नाही. 34 हे आकाशा, अगे पृथ्वी, हे समुद्रा,
अहो समुद्रात संचार करणाऱ्या सर्व प्राण्यांनो, त्यांचे स्तवन करा, 35
कारण परमेश्वर सीयोनचे रक्षण करतील यहूदाह प्रांतातील शहरे ते
पुन्हा स्थापित करतील. त्यांचे लोक तिथे वस्ती करतील आणि तेथील
अधिकार घेतील; 36 त्यांच्या सेवकांच्या मुलांनाही हा देश वतन म्हणून
मिळेल, त्यांच्या नावावर प्रीती करणारे सर्वजण तिथे वसती करतील.

**70** संगीत दिग्दर्शकासाठी. दावीदाची रचना. एक याचिका. हे
परमेश्वरा, त्वरा करून मला वाचवा; याहवेह, मला साहाय्य
करण्यासाठी त्वरेने या. 2 माझा जीव घेऊ पाहणाऱ्यांना लज्जित करा व
गोंधळात पाडा; जे सर्वजण माझे विघ्नसंतोषी आहेत ते अप्रतिष्ठित
होऊन माघारी फिरोत. 3 जे लोक मला, "अहाहा! अहाहा!" म्हणतात,
ते लज्जित होऊन माघारी फिरोत. 4 परंतु जे सर्व तुमचा शोध घेतात ते
तुमच्यामध्ये आनंद आणि हर्ष करोत; जे तुमच्या तारणाच्या साहाय्याची
अपेक्षा बाळगतात ते सर्व नेहमी हेच म्हणोत, "परमेश्वर किती महान
आहेत!" 5 परंतु मी तर गरीब आणि गरजवंत आहे; हे परमेश्वरा,
माझ्याकडे त्वरेने या. तुम्ही माझे साहाय्यकर्ता आणि मला सोडविणारे
आहात; याहवेह, विलंब करू नका.

**71** याहवेह, मी केवळ तुमच्या ठायी आश्रय घेतला आहे; मला
लज्जित होऊ देऊ नका. 2 तुमच्या नीतिमत्वानुसार मला वाचवा
आणि सोडवा; तुम्ही आपले कान माझ्याकडे लावा आणि माझे तारण
करा. 3 मी सदैव जाऊ शकेन असे माझे आश्रयाचे खडक तुम्ही व्हा;
तुम्ही माझ्या तारणाची आज्ञा द्या, कारण तुम्हीच माझे खडक व माझे
दुर्ग आहात. 4 परमेश्वरा, मला दुष्ट लोकांच्या पंजातून सोडवा, अन्यायी
आणि क्रूर लोकांच्या तावडीतून मला मुक्त करा. 5 प्रभू याहवेह, केवळ
तुम्हीच माझे आशास्थान आहात; तारुण्यापासून मी तुमच्यावर भरवसा
ठेवला आहे. 6 जन्मापासूनच मी तुमच्यावर अवलंबून आहे; तुम्ही मला
माझ्या आईच्या गर्भातून बाहेर आणले. मी सर्वकाळ तुमची स्तुती
करेन. 7 अनेक लोकांसाठी मी एक उदाहरण झालो आहे; तुम्ही माझे
प्रबळ शरणस्थान आहात. 8 माझे मुख तुमच्या स्तुतीने भरलेले असते,
दिवसभर तुमच्या वैभवाची घोषणा करतो. 9 माझ्या वृद्धावस्थेत माझा
त्याग करू नका; माझी शक्ती म्लान होत असता मला सोडू नका.
10 माझे शत्रू माझ्याविरुद्ध बोलतात; माझा जीव घेणारे एकत्र येऊन
मसलत करतात. 11 ते म्हणतात, "परमेश्वराने त्याचा त्याग केला आहे;
त्याचा पाठलाग करून त्याला धरा, कारण त्याला कोणीही सोडविणारा
नाही." 12 परमेश्वरा, माझ्यापासून दूर राहू नका, माझ्या परमेश्वरा,
लवकर येऊन माझे साहाय्य करा. 13 जे माझ्यावर आरोप लावतात
ते लज्जित होऊन नष्ट होवोत; जे माझे वाईट करू इच्छितात त्यांना
अपयश आणि अप्रतिष्ठा यांनी आच्छादून टाका. 14 परंतु मी तर निरंतर
आशा करीतच राहणार; मी तुमची अधिकाधिक स्तुती करेन. 15 जरी
मला त्यांचे वर्णन करण्याची क्षमता नाही तरी दिवसभर माझे मुख

तुमच्या न्यायीपणाच्या— आणि तारणाच्या कृत्यांबद्दल घोषणा करेल.
16 मी येईन आणि प्रभू याहवेहच्या महान कार्याची घोषणा करेन;
मी तुमच्या, केवळ तुमच्याच, नीतियुक्त कृत्यांची घोषणा करेन. 17
परमेश्वरा, तारुण्यापासून तुम्ही मला शिकवीत आलेले आहात, आणि
आजपर्यंत मी तुमच्या अद्भुतकृत्यांना जाहीर करीत आहे. 18 आता
माझे केस पांढरे झालेले असताना आणि मी वयस्कर झालो असताना,
परमेश्वरा, माझा त्याग करू नका; तुमच्या सर्व सामर्थ्याचे वर्णन नवीन
पिढीला आणि त्यांच्या मुलांना देखील सांगण्यासाठी तुम्ही मला अवधी
द्या. 19 परमेश्वरा, तुमचे नीतिमत्व आकाशापर्यंत अत्यंत उंच आहे; तुम्ही
केलेली कृत्ये अद्भुत आहेत, परमेश्वरा, तुमच्यासारखा दुसरा कोण आहे?
20 असाध्य, असंख्य आणि अतितीव्र समस्या तुम्ही मला दाखविल्या
आहेत, तरी तुम्ही मला नवजीवन द्याल, आणि पृथ्वीच्या गर्भातून
तुम्ही मला पुन्हा वर काढाल. 21 तुम्ही माझा सन्मान वाढवाल आणि
माझ्याकडे वळून पुनः माझे सांत्वन कराल. 22 माझ्या परमेश्वरा, मी
सतारीवर तुमच्या विश्वासूपणाबद्दल तुमचे स्तवन करेन; हे इस्राएलाच्या
पवित्र परमेश्वरा, मी वीणेवर तुमची स्तुती गाईन. 23 हर्षभराने माझे
ओठ तुमचा जयजयकार करतील आणि तुम्ही माझा उद्धार केला म्हणून
मी तुमची स्तुतिस्तोत्रे उच्चस्वराने गाईन. 24 तुमच्या न्यायीपणाचे वर्णन
माझी जीभ दिवसभर करेल, कारण मला अपाय करण्याची योजना
करणारे सर्व लज्जित आणि अपमानित झाले आहेत.

**72** शलोमोनाची गीत रचना हे परमेश्वरा, राजाला न्यायदातृत्व आणि
राजपुत्रास नीतिमत्व प्रदान करा. 2 तो तुमच्या लोकांचा नीतीने
न्याय करो, तुमच्या पीडितांचा न्यायनिवाडा न्यायीपणाने करो. 3 मग
पर्वत लोकांना समृद्धी प्रदान करो, आणि डोंगर नीतिमत्वाची फळे
उत्पादित करो. 4 तो लोकांमधील पीडितांचा बचाव करो आणि गरजूंच्या
मुलांना वाचवो; तो जुलमीला चिरडून टाको. 5 जोपर्यंत सूर्य आणि
चंद्र आकाशात राहतील, तोपर्यंत पिढ्यान् पिढ्या तुमचे भय बाळगून
तुमचा आदर करोत. 6 कापलेल्या गवतावर पडणाऱ्या पावसाप्रमाणे,
पृथ्वीला पाणी देणाऱ्या सरीप्रमाणे तो होवो. 7 त्याच्या कारकिर्दीत
सर्व नीतिमानांची भरभराट होवो आणि चंद्र नाहीसा होईपर्यंत समृद्धी
वाढो. 8 त्याची सत्ता एका समुद्रापासून दुसऱ्या समुद्रापर्यंत आणि
नदीपासून पृथ्वीच्या दिगंतापर्यंत राहो. 9 अरण्यातील लोक त्याच्यासमोर
नतमस्तक होवोत आणि त्याचे शत्रू धूळ चाटोत. 10 तार्शीश आणि
तटवर्तीय राजे आपआपले नजराणे आणोत, शबा व सबा यांचे सर्व
राजे आपले उपहार आणोत. 11 होय, सर्व ठिकाणचे राजे त्याला नमन
करोत; सर्व राष्ट्रे त्याची सेवा करोत. 12 ज्यांचा कोणी सहायक नाही
अशा धावा करणाऱ्या दुःखितांना तो मुक्त करेल. 13 दुर्बल आणि दरिद्री
यांची त्याला दया येवो; तो गरजवंताला मृत्यूपासून वाचवेल. 14 तो
त्यांना छळ आणि हिंसा यांच्यापासून वाचवेल, कारण त्यांचे जीवित
रक्त मोलाचे आहे. 15 तो चिरायू होवो! त्याला शबाचे सोने मिळो;
त्याचे लोक सतत त्याच्यासाठी प्रार्थना करोत आणि दिवसभर त्याला
आशीर्वाद देवोत. 16 देशभर विपुल धान्य उगवो; लबानोनच्या शिखरावर
ते डोलू द्या, देशातील डोंगरही धान्याने आच्छादून जावोत; शेतातील
भरगच्च गवताप्रमाणे शहरे लोकांनी भरून गजबजून जावोत. 17 त्याचे
नाव सर्वकाळ राहो, जोपर्यंत सूर्य आहे, त्याचे नाव वाढत जावो. सर्व
राष्ट्रे त्याच्याद्वारे आशीर्वादित होवोत, आणि ते त्याला धन्य म्हणोत. 18
इस्राएलाचे परमेश्वर, याहवेह धन्यवादित असोत, केवळ तेच महान कार्य
करतात. 19 त्यांच्या गौरवशाली नावाचे सदासर्वकाळ स्तवन होवो; सर्व
पृथ्वी त्यांच्या गौरवाने भरो. 20 इशायाचा पुत्र दावीदच्या प्रार्थना समाप्त
झाल्या.

**73** आसाफाचे स्तोत्र. निश्चितच परमेश्वर इस्राएलसाठी, जे
अंतःकरणाचे शुद्ध आहेत, त्यांच्यासाठी चांगले आहेत. 2
माझ्याविषयी म्हणाल, तर माझे पाय अडखळू लागले होते; माझी
पावले घसरण्याच्या बेतास आली होती. 3 कारण दुष्टांची समृद्धी
पाहून मी गर्विष्ठांचा हेवा करू लागलो होतो. 4 होय, आयुष्यभर त्यांचा
मार्ग पीडारहित असतो; ते निरोगी आणि सुदृढ असतात. 5 इतर
मनुष्यांसारखी त्यांच्यावर सहसा संकटे येत नाहीत आणि इतरांप्रमाणे
आजाराने पीडलेही जात नाहीत. 6 अहंकार त्यांच्या गळ्यातील माळ;
हिंसा त्यांची वस्त्रे आहेत. 7 त्यांच्या संवेदनशून्य अंतःकरणातून
अपराधच निघतात; त्यांच्या मनातील दुष्ट कल्पनांना मर्यादा नाही.
8 ते उपहास करतात आणि वाईट गोष्टी बोलतात; गर्विष्ठपणामुळे ते
दडपशाहीची धमकी देतात. 9 ते प्रत्यक्ष स्वर्गावर दावा करतात आणि
त्यांची जीभ पृथ्वीवर फुशारक्या मारीत फिरते. 10 म्हणून त्यांचे लोक
त्यांच्याकडे वळतात, आणि ते विपुल प्रमाणात पाणी पितात. 11 ते
असेही म्हणतात, “परमेश्वराला कसे समजणार? परात्पर परमेश्वराला
सर्व गोष्टीचे ज्ञान आहे काय?” 12 असे असतात दुष्ट लोक—नेहमी
निश्चिंत; आणि त्यांची संपत्ती वाढतच जाते. 13 माझे हृदय शुद्ध ठेऊन
मला काय लाभ झाला आणि मी माझे हात व्यर्थच निर्दोष ठेवले. 14
दिवसभर मी छळ सहन करीत आहे आणि दररोज सकाळी नवीन
शिक्षा दिली जात आहे. 15 जर हे उद्गार माझ्या मुखातून बाहेर पडले
असते, तर मी तुमच्या प्रजेचा विश्वासघात करणारा ठरलो असतो. 16 ही
गोष्ट समजण्यासाठी मी विचार करू लागलो, तेव्हा त्याचे आकलन
मला अत्यंत कठीण वाटू लागले. 17 मग शेवटी मी परमेश्वराच्या
पवित्रस्थानात गेलो, तेव्हा दुष्टांचा शेवट काय होतो हे मला कळून
आले. 18 निश्चित तुम्ही त्यांना निसरड्या भूमीवर ठेवले आहे; तुम्ही
त्यांना सर्वनाशाकडे खाली लोटून द्याल. 19 क्षणार्धात त्यांच्या नाश
होईल, भयानकता त्यांच्या वाट्याला येईल. 20 जसे जागे होणाऱ्या
मनुष्याला स्वप्न पडते; त्याचप्रमाणे हे प्रभू, तुम्ही जागे व्हाल तेव्हा
त्यांचे दुस्वप्न तुच्छ जाणाल. 21 जेव्हा माझे हृदय दुःखित झाले आणि
माझा आत्मा कटुतेने भरून गेला होता, 22 त्यावेळस मी मूर्ख आणि
अज्ञानी होतो; मी तुमच्यापुढे जनावरासारखा होतो! 23 तरी नेहमी
मी तुमच्याबरोबर आहे; तुम्ही माझा उजवा हात धरलेला आहे. 24
तुमची सल्लामसलत माझे मार्गदर्शन करेल, आणि त्यानंतर गौरवात
तुम्ही माझा स्वीकार कराल. 25 स्वर्गात तुमच्याशिवाय माझे कोण

आहे? पृथ्वीवर तुमच्याएवढे प्रिय मला दुसरे कोणीही नाही. 26 माझे शरीर व माझे हृदय खचेल, तरी परमेश्वर माझ्या हृदयाचे सामर्थ्य असून सर्वकाळचा माझा वाटा आहेत. 27 जे तुमच्यापासून दूर आहेत त्यांचा नाश होईल; तुमच्याशी विश्वासघात करणाऱ्यांना तुम्ही नष्ट करता. 28 परंतु माझ्यासाठी परमेश्वराच्या सहवासात राहणे खूप सुंदर आहे. मी याहवेह माझे प्रभू यांना आश्रयस्थान केले आहे. जेणेकरून मी तुमच्या सर्व महान कृत्यांची घोषणा करेन.

**74** आसाफाचे मासकील हे परमेश्वरा, तुम्ही आम्हाला कायमचे टाकून दिले आहे का? स्वतःच्या कुरणातील कळपावर तुमचा क्रोधाग्नी एवढा का भडकला आहे? 2 जे राष्ट्र प्राचीन काळी मोलाने विकत घेतले, ज्यांना आपले वारस होण्याकरिता तुम्ही खंडणी भरून सोडविले— सीयोन पर्वत जे तुमचे वसतिस्थान, त्यांचे स्मरण करा. 3 या नगरीचा जो भयानक विध्वंस झाला आहे, त्यात तुम्ही चालत जा, शत्रूंनी पवित्रस्थानाची काय दुर्दशा केली आहे ती पाहा. 4 तुमच्या सभागृहात त्यांनी आपल्या रणगर्जना केल्या, आणि त्यांनी प्रमाण स्वरूप आपले ध्वज उभारले आहेत. 5 दाट वृक्षांना कुऱ्हाडीने उद्ध्वस्त करणाऱ्या माणसांसारखे ते वागले. 6 त्यांनी कुऱ्हाडी आणि घण घेऊन सर्व कोरीव नक्षीकामांची मोडतोड करून तुकडे केले. 7 त्यांनी तुमच्या मंदिराला आग लावून ते जमीनदोस्त केले; त्यांनी तुमच्या नावाचे निवासस्थान भ्रष्ट केले. 8 ते त्यांच्या मनात म्हणाले, "आम्ही अस्तित्वाचा मागमूसही आम्ही पुसून टाकू!" देशात परमेश्वराची उपासना होत असलेली सर्व सभास्थाने त्यांनी जाळून टाकली. 9 परमेश्वराकडून आम्हाला एकही चिन्ह मिळाले नाही; आता कोणताही संदेष्टा उरला नाही, हे असे कधीपर्यंत चालेल हे सांगणारा आमच्यात कोणी नाही. 10 हे परमेश्वरा, किती वेळ शत्रू तुमचा उपहास करणार? तुमच्या नावाची निंदा शत्रू सर्वकाळ करणार काय? 11 तुम्ही आपला हात, आपला उजवा हात का आवरून धरला आहे? आपल्या वस्त्रांमध्ये लपलेला हात बाहेर काढा आणि तुमच्या शत्रूचा संहार करा! 12 परमेश्वर तुम्ही पुरातन काळापासून माझे राजे आहात; पृथ्वीवर तारणाचे कार्य करणारे तुम्हीच आहात. 13 तुम्हीच आपल्या शक्तीने समुद्र दुभागले; तुम्हीच जलाशयातील प्रचंड प्राण्यांची मस्तके फोडली. 14 लिव्याथानाची मस्तके तुम्हीच चिरडून टाकली; तुम्हीच त्यांचे मांस वाळवंटातील पशूंना खाऊ घातले. 15 तुम्हीच झरे उफाळून जलप्रवाह बाहेर आणले; तुम्हीच सतत वाहणाऱ्या नदीचे पाणी आटवून दिले. 16 दिवस तुमचा आहे, रात्रही तुमचीच आहे; सूर्य आणि चंद्र तुम्हीच निर्माण केले आहे. 17 पृथ्वीच्या सर्व सीमा तुम्हीच निर्धारित केल्या आहेत; उन्हाळा आणि हिवाळादेखील तुम्हीच निर्माण केले आहे. 18 याहवेह, पाहा हे शत्रू तुमची कशी थट्टा करीत आहेत; उन्मत्त राष्ट्राने तुमच्या नावाची कशी निंदा केली आहे, याचे स्मरण करा. 19 आपल्या कबुतराचे जीवन हिंसक श्वापदाच्या हाती देऊ नका; आपल्या पीडित प्रजेचे जीवन कायमचे विसरू नका. 20 तुमच्या कराराचे स्मरण करा, कारण पृथ्वीवरील काळोखाचे प्रदेश हिंसेची स्थाने झाली आहेत. 21 पीडितांना अपमानात मागे फिरू देऊ नका; दरिद्री आणि दुःखी तुमच्या नावाची स्तुती करोत. 22 परमेश्वरा, उठा आणि आपला दावा स्वतःच चालवा; मूर्ख तुमची दिवसभर अवहेलना करीत असतात, याची आठवण ठेवा. 23 तुमच्या विरोधकांच्या आक्रोशाकडे दुर्लक्ष करू नका, तुमच्या शत्रूंचा कोलाहल क्षणोक्षणी वाढतच आहे.

**75** संगीत दिग्दर्शकासाठी. अल्तश्केथ या चालीवर आधारित. आसाफाचे एक स्तोत्र. एक गीत हे परमेश्वरा, आम्ही तुमची उपकारस्तुती करतो, तुमची उपकारस्तुती करतो, कारण तुमचे नाव समीप आहे; लोक तुमच्या अद्भुत कृत्यांचे वर्णन करतात. 2 तुम्ही म्हणाल, "मी निर्धारित वेळ निवडतो; मी सर्वांना रास्त न्याय देतो. 3 पृथ्वी आणि पृथ्वीवर राहणारे हादरले, तरी तिचे स्तंभ मीच स्थिर करून ठेवतो. सेला 4 मी गर्विष्ठांना म्हटले, 'गर्व करू नका,' आणि दुष्टांना म्हणालो, 'आपले शिंग उंच करू नका. 5 आपले शिंग स्वर्गाविरुद्ध उंचावू नका; आपले मस्तक उंच करून बोलू नका.'" 6 पूर्वेकडून, पश्चिमेकडून किंवा जंगलातून मनुष्याला स्वतःची उन्नती करता येत नाही. 7 मात्र परमेश्वरच न्याय करणारे आहेत: ते एकाला खाली पाडतात आणि दुसऱ्यास उंच करतात. 8 कारण याहवेहच्या हातात मसाला मिश्रित फेसाळलेल्या द्राक्षारसाचा प्याला आहे; तो प्याला म्हणजे पृथ्वीवरील दुष्ट लोकांवर त्यांनी ओतलेला न्यायच आहे; सर्व दुष्टांना तो गाळासह निथळून प्यावा लागेल. 9 मी तर ही घोषणा सर्वदा करीत राहीन; मी याकोबाच्या परमेश्वराची स्तुतिस्तोत्रे गाईन. 10 ते म्हणतात, "सर्व दुष्टांची शिंगे मी तोडून टाकीन, परंतु नीतिमान लोकांची शिंगे उंच करेन."

**76** संगीत दिग्दर्शकासाठी. तंतुवाद्यांच्या साथीने. आसाफाचे एक स्तोत्र. एक गीत. परमेश्वर यहूदीयात प्रसिद्ध आहेत; इस्राएलमध्ये त्यांचे नाव थोर आहे. 2 त्यांचा मंडप शालेम येथे आहे, त्यांचे निवासस्थान सीयोन येथे आहे. 3 तिथे त्यांनी चमकणारे बाण, ढाली आणि तलवारी, युद्धाची शस्त्रे मोडली. सेला 4 तुम्ही प्रकाशाने तेजस्वी आहात, प्राण्यांनी समृद्ध असलेल्या पर्वतांपेक्षा अधिक वैभवी. 5 प्रबळांची लूटमार झाली आहे, ते मृत्यूची निद्रा घेत आहेत; त्यांच्यातील एकाही योद्ध्याला हात उचलता येत नाही. 6 हे याकोबाच्या परमेश्वरा, तुम्ही फटकारल्यावर घोडे आणि स्वार गाढ झोपेत गेले आहेत. 7 तुम्हीच एकटेच भयास योग्य आहात. जेव्हा आपण रागावता, तेव्हा आपल्यासमोर कोण उभा राहू शकतो? 8 स्वर्गातून तुम्ही आपला निर्णय जाहीर केला, तेव्हा पृथ्वीचा थरकाप उडाला आणि ती स्तब्ध झाली— 9 पृथ्वीवरील पीडितांचे रक्षण करण्यासाठी, परमेश्वर उठून उभे राहिले तेव्हा असे झाले. सेला 10 खचित तुमचा मनुष्यावरचा क्रोध तुमच्या स्तुतीस कारणीभूत होईल, आणि तुमच्या रोषाने उर्वरितांना रोखण्यात आले. 11 तुमचे परमेश्वर याहवेह यांना केलेले सर्व नवस तुम्ही फेडा; शेजारच्या प्रत्येक राष्ट्राने त्यांच्यासाठी भेटी आणाव्यात; त्यांच्याबद्दल आदर आणि भीती बाळगावी. 12 कारण ते अधिपतींचा अभिमान नष्ट करतील; पृथ्वीवरील राजांकरिता ते भयावह आहेत.

**77** संगीत दिग्दर्शकासाठी. यदूथूनसाठी. आसाफाचे एक स्तोत्र. एक
गीत. मी परमेश्वराकडे मदतीसाठी धावा केला; परमेश्वराने माझे
ऐकावे म्हणून मी त्यांचा धावा केला. 2 माझ्या संकटाच्या वेळी मी
प्रभूला हाक मारली; रात्रीच्या वेळी न थकता मी त्यांच्याकडे हात पुढे
करत राहिलो, तरीही माझे सांत्वन झाले नाही. 3 परमेश्वरा, मी कण्हत
तुमचे स्मरण करतो; मी मनन करताना माझा आत्मा क्षीण झाला आहे.
सेला 4 तुम्ही माझे डोळे बंद होऊ दिले नाही; मला बोलताही येत नव्हते
इतका मी खिन्न झालो होतो. 5 मी पूर्वीच्या दिवसांबद्दल, फार पूर्वीच्या
वर्षांबद्दल विचार केला; 6 रात्रीच्या वेळी मी माझी गाणी आठवीत
असे; माझे हृदय विचारमग्न होई आणि माझ्या आत्म्याने विचारले: 7
“प्रभू कायमचाच आमचा त्याग करतील काय? ते पुन्हा कधीच प्रसन्न
होणार नाहीत काय? 8 त्यांची प्रीतिपूर्ण दया कायमची नाहीशी झाली
आहे काय? त्यांनी दिलेले अभिवचन पिढ्यान् पिढ्या निष्फळ राहणार
काय? 9 परमेश्वर आपली दया दाखविण्याचे विसरले आहेत काय?
क्रोधाने त्यांनी आपला कळवळा रोखून धरला आहे काय?” सेला 10
मग मी विचार केला, “खरेच माझ्या दुःखाचे कारण हे आहे: की सर्वोच्च
प्रभू परमेश्वराने त्यांचा उजवा हात रोखला आहे. 11 मी याहवेहच्या
कृत्यांचे स्मरण करेन; पुरातन काळात त्यांनी केलेल्या अद्भुतकृत्यांची
मी आठवण करेन. 12 मी तुमच्या सर्व कृत्यांचे मनन करेन आणि
मी तुमच्या सर्व महत्कार्यांचा विचार करेन.” 13 हे परमेश्वरा, तुमचे
मार्ग पवित्र आहेत. आपल्या परमेश्वरासारखा समर्थ ईश्वर कोणी आहे
का? 14 चमत्कार व अद्भुत गोष्टी करणारे परमेश्वर तुम्हीच आहात;
तुम्ही आपले सामर्थ्य लोकांमध्ये प्रगट करता. 15 जे याकोबाचे आणि
योसेफाचे वंशज आहेत, त्यांना तुम्ही आपल्या भुजांनी मुक्त केले आहे.
सेला 16 परमेश्वरा, जलांनी तुम्हाला पाहिले, जलांनी तुम्हाला पाहिले
आणि ते धडपडू लागले! त्यांच्या खोल तळापर्यंत धक्का बसला. 17
मेघांनी मुसळधार पाऊस पाडला; मेघगर्जनेने गडगडाट करून आकाश
दुमदुमून टाकले; तुमचे बाण आकाशातून या टोकापासून त्या टोकापर्यंत
चमकले. 18 चक्रीवादळामध्ये गर्जना झाली; विजेच्या लखलखाटाने
संपूर्ण जग प्रकाशित झाले; पृथ्वी थरारली आणि डळमळली. 19
तुमच्या पावलांचे ठसे दिसत नसले, तरी तुमची वाट समुद्रातून गेली
होती; तुमचा मार्ग प्रचंड जलाशयातून गेला होता. 20 मोशे व अहरोन
यांच्याद्वारे मेंढरांच्या कळपाप्रमाणे तुम्ही आपल्या लोकांना नेले.

**78** आसाफाचे मासकील. अहो माझ्या लोकांनो, माझे विधिनियम
ऐका; माझ्या मुखातून निघणाऱ्या वचनाकडे कान द्या. 2 मी
तोंड उघडून दाखल्यांनी त्यांच्याशी बोलेन; मी पूर्वकाळचे रहस्य;
जुन्या काळातील गुप्त गोष्टी सांगेन; 3 ज्यागोष्टी आम्ही ऐकल्या
आणि आम्हाला समजल्या आहे, त्या आमच्या पूर्वजांनी आम्हाला
सांगितल्या आहेत. 4 आम्ही त्या त्यांच्या वंशजांपासून गुप्त ठेवणार
नाही, आम्ही भावी पिढीच्या लोकांपुढे, याहवेहचे गौरव करू आणि
त्यांच्या सामर्थ्याचे आणि चमत्कारांचे वर्णन करू. 5 कारण त्यांनी
आपले नियम याकोबाला दिले, आणि इस्राएलात कायदे प्रस्थापित
केले, जे त्यांनी आपल्या मुलाबाळांना शिकवावे अशी पूर्वजांना आज्ञा
दिली. 6 जेणेकरून येणाऱ्या पिढ्या, म्हणजे जन्माला येणारी मुले त्यांना
ओळखतील; आणि त्यांनी आपल्या भावी पिढीस त्यांच्याबद्दल कथन
करण्यास तयार राहावे. 7 मग ते परमेश्वरावर आपला भरवसा ठेवतील
आणि त्यांची कृत्ये विसरणार नाहीत तर त्यांच्या आज्ञा पाळतील. 8 ते
त्यांच्या पूर्वजांसारखे नसतील— जे हट्टी व बंडखोर पिढीसारखे होते,
ज्यांचे हृदय परमेश्वराशी एकनिष्ठ नव्हते, ज्यांचे आत्मे त्यांच्याशी विश्वासू
नव्हते. 9 सर्व शस्त्रांनिशी धनुर्धारी असतानाही एफ्राईमच्या वंशजांनी
ऐन लढाईच्या दिवशी मागे फिरून पलायन केले. 10 त्यांनी परमेश्वराचा
करार पाळला नाही, आणि त्यांच्या नियमशास्त्राप्रमाणे जगण्यास
नकार दिला. 11 त्यांनी केलेली महत्कार्य, त्यांनी दाखविलेले अद्भुत
चमत्कार ते विसरले. 12 त्यांनी आपल्या पूर्वजांसमोर इजिप्तमधील
सोअनाच्या मैदानावर अद्भुत कृत्ये केली. 13 परमेश्वराने समुद्र दुभागला
आणि त्यातून त्यांना पार नेले; त्यांच्या दोन्ही बाजूंना पाणी भिंतीसारखे
उभे राहिले. 14 दिवसा ते त्यांना मेघाच्या साहाय्याने आणि रात्री
अग्निस्तंभाच्या प्रकाशाच्या साहाय्याने वाट दाखवित नेत असत. 15
त्यांनी रानात खडक फोडले आणि समुद्राइतके भरपूर पाणी त्यांना दिले.
16 त्यांनी खडकाळ सुळक्यातून पाण्याचे झरे काढले आणि नद्यांप्रमाणे
पाण्याला वाहविले. 17 असे असतानाही त्यांनी परमेश्वराविरुद्ध बंड करणे
आणि देवाधिदेवाविरुद्ध पाप करणे सुरूच ठेवले. 18 ज्या अन्नासाठी ते
आसुसलेले होते त्याचा आग्रह धरून त्यांनी स्वेच्छेने आपल्या मनात
परमेश्वराची परीक्षा घेतली. 19 ते परमेश्वराच्या विरोधात बोलले; ते
म्हणाले, “परमेश्वर खरोखर वाळवंटात मेज लावू शकतात का? 20
खरे आहे, त्यांनी खडकावर मारले, आणि पाण्याचे स्त्रोत फुटले, प्रचंड
प्रवाह वाहू लागले; पण काय ते आम्हाला भाकरदेखील देऊ शकतात?
काय ते आपल्या लोकांना मांस पुरवतील?” 21 जेव्हा याहवेहने हे
ऐकले, ते संतापले; त्यांचा अग्नी याकोबाविरुद्ध पेटला, आणि त्यांचा
क्रोध इस्राएलावर भडकला. 22 कारण परमेश्वरावर त्यांनी विश्वास
ठेवला नाही; ते आपली सुटका करतील असा भरवसा ठेवला नाही. 23
त्यांनी आकाशाला उघडण्याची आज्ञा केली; आणि आकाशाचे दरवाजे
उघडले; 24 लोकांच्या खाण्याकरिता त्यांनी मान्नाचा वर्षाव केला,
त्यांनी स्वर्गातील धान्य त्यांना दिले. 25 मनुष्यांनी देवदूतांची भाकर
खाल्ली; त्यांना खाता येईल तेवढे सर्व अन्न त्यांनी दिले. 26 त्यांनी
आकाशातून पूर्वेचा वारा सोडला आणि त्यांच्या सामर्थ्याने दक्षिणेकडील
वारा वाहू दिला. 27 त्यांनी धुळीप्रमाणे त्यांच्यावर मांसाचा पाऊस
पाडला, समुद्रातील वाळूसारखा पक्ष्यांचा वर्षाव केला. 28 त्यांनी त्यांच्या
छावणीच्या आत, त्यांच्या तंबूच्या सभोवती खाली यावयास लावले.
29 त्यांनी अधाशीपणाने तृप्त होईपर्यंत खाल्ले— त्यांनी जे मागितले
होते, ते सर्व त्यांना दिले. 30 पण त्यांना जे पाहिजे त्यापासून समाधानी
होण्यापूर्वी, जेवण अद्यापही त्यांच्या मुखात असतानाच, 31 परमेश्वराचा
क्रोध त्यांच्यावर भडकला; त्यांच्या धष्टपुष्टांस ठार करून, इस्राएलच्या
तरुणांना खाली पाडले. 32 इतके सर्व झाले तरी ते लोक पाप करीतच

राहिले; त्यांच्या अद्भुत कृत्यांवर त्यांनी विश्वास ठेवला नाही. 33 म्हणून
त्यांनी त्यांचे आयुष्य निरर्थक केले आणि घोर भीतीने त्यांची वर्षे व्यापून
टाकली. 34 जेव्हा परमेश्वर त्यांचा संहार करू लागले, तेव्हा ते त्यांच्या
शोध घेऊ लागले; ते मनापासून पुन्हा त्यांच्याकडे वळले. 35 परमेश्वर
आपल्या आश्रयाचा खडक आहेत आपली सुटका करणारे देवाधिदेव
आहेत याची त्यांना आठवण झाली; 36 परंतु ते केवळ त्यांच्या मुखाने
त्यांची खुशामत करीत; त्यांच्या जिभेने ते त्यांच्याशी लबाड बोलत; 37
त्यांची हृदये त्यांच्याशी प्रामाणिक नव्हती; त्यांच्याशी केलेल्या कराराशी
ते विश्वासू राहिले नाहीत. 38 तरी देखील परमेश्वर दयाळूच राहिले;
त्यांच्या पापांची त्यांनी क्षमा केली आणि त्या सर्वांचाच नाश केला नाही;
वारंवार त्यांनी आपला क्रोध आवरला आणि तो पराकोटीला जाऊ
दिला नाही. 39 कारण ते केवळ वाऱ्याच्या झुळकेप्रमाणे क्षणात नाहीसे
होणारे मर्त्य मानव आहेत, याचे त्यांना स्मरण झाले. 40 त्यांनी कितीदा
तरी त्यांच्याविरुद्ध बंड केले आणि अरण्यात त्यांना दुःख दिले! 41 पुन्हा
आणि पुन्हा त्यांनी परमेश्वराची परीक्षा पाहिली; इस्राएलाच्या पवित्र
परमेश्वराला त्यांनी चिथविले. 42 पीडा देणाऱ्यापासून त्यांनी केलेली
त्यांची सुटका— त्यांच्या सामर्थ्याचे त्यांनी स्मरण केले नाही, 43 ज्या
दिवशी त्यांनी इजिप्तमध्ये आपली चिन्हे प्रदर्शित केली, सोअनाच्या
प्रदेशात त्यांनी चमत्कार केले. 44 त्यांनी त्यांच्या नद्यांच्या पाण्याचे
रूपांतर रक्तात केले; त्यामुळे त्यांच्या जलप्रवाहातील पाणी पिता आले
नाही. 45 सर्व इजिप्त देश खाऊन टाकण्यासाठी त्यांनी कीटकांचे
थवेच्या थवे पाठविले आणि बेडकांनी सर्व विध्वंस करून टाकले. 46
त्यांनी त्यांची पिके सुरवंटांना खावयास दिली; त्यांचा हंगाम टोळांनी
फस्त केला. 47 त्यांनी गारांनी त्यांच्या द्राक्षवेलींचा आणि उंबराच्या
झाडांचा बर्फाने नाश केला. 48 त्यांनी त्यांची गुरे गारांनी नष्ट केली,
विजेने त्यांची मेंढरे ठार झाली. 49 त्यांनी त्यांच्यावर आपला तीव्र राग,
क्रोध, संताप आणि शत्रुत्व— आणि नाश करणारा देवदूतांचा एक गट
सोडला. 50 त्यांनी आपल्या क्रोधास मोकळी वाट करून दिली; त्यांनी
त्यांचे जीव मृत्यूपासून वाचविले नाहीत, तर त्यांना पीडेच्या हवाली केले.
51 इजिप्त देशाच्या प्रत्येक कुटुंबातील ज्येष्ठ पुत्रांस त्यांनी ठार केले; जे
हामाच्या डेऱ्यातील पौरुषाचे प्रथमफळ होते. 52 पण त्यांनी आपल्या
लोकांस मेंढरांसारखे बाहेर आणून, त्यांना वाट दाखवित मेंढरांसारखे
रानातून नेले, 53 त्यांनीच त्यांचे सुरक्षित मार्गदर्शन केले, म्हणून ते
भयभीत झाले नाहीत; परंतु त्यांच्या शत्रूंना मात्र समुद्रात बुडवून टाकले.
54 त्यांनी आपल्या उजव्या हाताने त्यांना आपल्या पवित्र भूमीच्या
सीमेवरील पर्वतीय देशात आणले. 55 त्यांनी राष्ट्रांना त्यांच्या समोरून
काढून टाकले आणि त्यांची जमीन त्यांना सूत्राने मापून वतन म्हणून
दिली; त्यांनी इस्राएलाच्या गोत्रास त्यांच्या घरात स्थायिक केले. 56 तरी
त्यांनी परमेश्वराची परीक्षा पाहिली आणि त्यांनी सर्वोच्च परमेश्वराविरुद्ध
बंड केले; त्यांच्या आज्ञा पाळण्याचे नाकारले. 57 जसा एक सदोष
धनुष्य दुसरीकडे वळतो, ते आपल्या पूर्वजांप्रमाणेच अविश्वासू आणि
विश्वासघातकी झाले. 58 त्यांनी त्यांच्या उच्च स्थानांमुळे त्यांचा राग
भडकविला; त्यांनी मूर्तींद्वारे त्यांना क्रोधाविष्ट केले. 59 त्यांचे ऐकून
परमेश्वराला अत्यंत क्रोध आला, आणि त्यांनी इस्राएलला पूर्णपणे
नाकारले. 60 त्यांनी मानवांमध्ये वस्ती केली होती, त्या शिलोह येथील
निवासमंडपाचा त्यांनी त्याग केला, 61 त्यांनी आपला कोश बंदिवासात
जाऊ दिला, त्यांनी आपले वैभव शत्रूंच्या हाती पडू दिले. 62 त्यांनी
आपल्या लोकांना तलवारीच्या स्वाधीन केले, वतनावरचा त्यांचा क्रोध
अनावर झाला होता. 63 त्यांचे तरुण अग्नीने खाऊन टाकले; त्यांच्या
कन्यांना विवाहगीते लाभलीच नाही. 64 याजकांचा तलवारीने वध
केला आणि त्यांच्या विधवांना रडण्याची संधी मिळालीच नाही. 65
झोपेतून एखादा मनुष्य जागा व्हावा, तसे प्रभू जागे झाले; द्राक्षरसाच्या
धुंदीमधून जागे झालेल्या योध्यासारखे ते उठले. 66 त्यांनी आपल्या
शत्रूंची दाणादाण केली आणि त्यांची कायमची फजिती केली. 67
परंतु त्यांनी योसेफाचा डेरा वर्ज्य केला; एफ्राईमचे गोत्र पसंत केले
नाही. 68 तर त्यांनी यहूदाहचे गोत्र निवडले, त्यांना प्रिय असलेल्या
सीयोन पर्वतास 69 त्यांनी आपले पवित्रस्थान अत्युच्च बांधले, आणि
पृथ्वीसारखे त्यांनी कायमचे निश्चित केले. 70 त्यांनी आपला सेवक
दावीदाची निवड केली, त्यांनी त्याला मेंढरांच्या कोंडवाड्यांतून घेतले.
71 मेंढरांची राखण करीत त्यांच्यामागे फिरत असतानाच, त्यांनी आपली
प्रजा याकोब अर्थात् आपले वतन इस्राएलाचा मेंढपाळ म्हणून त्याची
निवड केली. 72 आणि दावीदाने प्रामाणिक अंत:करणाने त्यांचे रक्षण
केले; कुशल हातांनी त्याने त्यांचे नेतृत्व केले.

**79** आसाफाचे एक स्तोत्र. हे परमेश्वरा, इतर राष्ट्रांनी तुमच्या वतनावर
आक्रमण केले आहे; त्यांनी तुमचे पवित्र मंदिर भ्रष्ट केले आहे,
आणि यरुशलेम नगरी नासधुशीचा ढीग झाली आहे. 2 तुमच्या
सेवकांचे मृतदेह उघड्यावर पडून आहेत, ते पक्ष्यांचे भक्ष्य झाले
आहेत, तुमच्या भक्तांचे मास वन्यपशूंचा आहार झाला आहे. 3 त्यांनी
लोकांचे रक्त यरुशलेमच्या सभोवती पाण्याप्रमाणे वाहविले आहे, मृतांना
पुरण्यासाठी कोणीही जिवंत नाही. 4 आमच्या शेजाऱ्यांसाठी व सभोवती
असणाऱ्यांसाठी, आम्ही तिरस्काराचे, तुच्छतेचे आणि उपहासाचे
पात्र झालो आहोत. 5 हे याहवेह, किती काळ? तुम्ही आमच्यावर
सदासर्वकाळ संतप्त राहाल काय? तुमचा क्रोधाग्नी केव्हापर्यंत पेटलेला
राहणार आहे? 6 अशा राष्ट्रांवर, जी राज्ये तुमची प्रार्थना करण्याचे
नाकारतात, जे तुमच्या नावाचा धावा करीत नाहीत; अशा राष्ट्रांवर
तुमच्या क्रोधाचा वर्षाव करा. 7 त्यांनी याकोबाला गिळंकृत केले आहे
आणि त्याच्या मातृभूमीचा विध्वंस केला आहे. 8 आमच्या पूर्वजांच्या
पातकांबद्दल आम्हाला दोषी धरू नका; तुमची कृपा लगेचच आमच्या
वाट्याला येऊ द्या, कारण आमची स्थिती अत्यंत गंभीर झाली आहे. 9 हे
आमच्या उद्धारक परमेश्वरा, तुमच्या नावाच्या गौरवाकरिता आम्हाला
साहाय्य करा; तुमच्या नामाकरिता आमची पापक्षमा करा व आम्हाला
मुक्त करा. 10 इतर राष्ट्रांनी का म्हणावे, “यांचा देव कुठे आहे?”
आमच्या डोळ्यादेखत या राष्ट्रांना प्रगट करा, की तुमच्या लोकांच्या
या भीषण कत्तलीचा तुम्ही सूड घेता. 11 बंदिवानांचे उसासे तुम्ही

ऐका; मरणदंड झालेल्याची सुटका करून तुम्ही आपल्या सामर्थ्याची थोरवी सिद्ध करा. 12 हे प्रभू, तुमची निंदा करणाऱ्या या शेजाऱ्यांचा सातपट सूड त्यांच्या झोळीत घाला. 13 मग आम्ही तुमचे लोक, तुमच्या कळपातील मेंढराप्रमाणे असलेले, सदासर्वकाळ तुमचा धन्यवाद करू; एका पिढीपासून अनेक पिढ्यांपर्यंत, आम्ही तुमचे उपकारस्मरण करीत राहू.

**80** संगीत निर्देशकाकरिता. "कराराची कुमुदिनी" च्या चालीवर आधारित. आसाफाची रचना. एक स्तोत्र. इस्राएलाच्या मेंढपाळा, आमचा धावा ऐका, तुम्हीच योसेफाला मेंढरांच्या कळपाप्रमाणे चालविले. करुबांच्या मध्ये विराजमान असलेले, तुमचे तेजस्वी गौरव प्रगट करा. 2 एफ्राईम, बिन्यामीन व मनश्शेहच्या समोर आपली प्रतापी शक्ती जागृत होऊ द्या; या व आमचे तारण करा. 3 हे परमेश्वरा, आम्हाला पूर्वस्थितीत आणा; आमचे तारण होण्यासाठी, तुमचे मुख आमच्यावर प्रकाशित करा. 4 हे याहवेह, सर्वशक्तिमान परमेश्वरा, तुमच्या प्रजेच्या प्रार्थनांविरुद्ध, कुठवर तुमचा क्रोध भडकत राहणार? 5 तुम्ही त्यांना दुःखाच्या भाकरीचा आहार खाऊ घातला; वाट्या भरून अश्रूंचे पेय त्यांना पाजले. 6 तुम्ही आम्हाला शेजाऱ्यांच्या निंदेचा विषय केले आहे; ते आपसात आमचा उपहास करतात. 7 हे सर्वशक्तिमान परमेश्वरा, आमची पुनर्स्थापना करा; आपला मुखप्रकाश आमच्यावर पाडा, म्हणजे आमचे तारण होईल. 8 तुम्ही एक द्राक्षवेल इजिप्त देशातून आणली; इतर राष्ट्रांना तिथून हाकलून तिला रुजविले. 9 तुम्ही जमिनीची मशागत केली व ती नांगरली; या वेलीने मूळ धरले व समस्त भूमी व्यापून टाकली. 10 मजबूत गंधसरू व तिच्या फांद्यांच्या सावलीने पर्वतदेखील झाकले गेले; 11 त्या फांद्या समुद्रापर्यंत, तसेच फरात नदीपर्यंत पसरत गेल्या. 12 तुम्ही त्याचे तट का मोडून टाकले, म्हणजे येणारे जाणारे सर्वजण त्याचे द्राक्ष तोडतील? 13 रानडुकरे त्याला गिळंकृत करत आहेत, आणि भूमीतील कीटकांचा ते आहार झाले आहेत. 14 हे सर्वशक्तिमान परमेश्वरा, आमच्याकडे परत या! स्वर्गातून खाली दृष्टी लावा! या द्राक्षवेलीची काळजी घ्या. 15 तुम्ही स्वतःच उजव्या हाताने लावलेल्या, स्वतःसाठी वाढविलेल्या या पुत्राकडे लक्ष द्या. 16 कारण तुमच्या द्राक्षवेलीला छाटले गेले आहे व अग्नीत भस्म केले जात आहे; तुमच्या फटकारण्याने लोक नष्ट होतात. 17 जो मनुष्य तुमच्या उजव्या बाजूला आहे त्याच्यावर तुमचा वरदहस्त असू द्या, स्वतःसाठी वाढविलेल्या या पुत्राकडे लक्ष द्या. 18 मग आम्ही तुमचा पुन्हा कधीही त्याग करणार नाही; आम्हाला संजीवित करा, म्हणजे आम्ही तुमच्या नावाचा धावा करू. 19 हे याहवेह, सर्वशक्तिमान परमेश्वरा, आम्हाला पुनर्स्थापित करा; आपला मुखप्रकाश आमच्यावर पाडा, तरच आमचे तारण होईल.

**81** संगीत निर्देशकाकरिता. "गित्तीथ" वर आधारित. आसाफाची रचना. परमेश्वर, जे आमचे सामर्थ्य आहेत, त्यांच्यासाठी हर्षाने गा; याकोबाच्या परमेश्वरासाठी जयघोष करा! 2 खंजिरीच्या तालावर संगीताचा प्रारंभ करा, वीणा व सतारीवर मधुर स्वर वाजवा. 3 नवचंद्राच्या समयी आणि पौर्णिमेच्या सणांच्या दिवशी, आमच्या आनंदोत्सवाच्या वेळी कर्णा वाजवा; 4 इस्राएलसाठी हे विधी आहेत, हे याकोबाच्या परमेश्वराचे नियम आहेत. 5 जेव्हा परमेश्वराने इजिप्त देशाचा प्रतिकार केला, तेव्हा त्यांनी योसेफाला हे नियम नेमून दिले. मी एक अज्ञात वाणी ऐकली व ती म्हणाली: 6 "आता मी त्यांच्या खांद्यावरील भार काढून टाकला आहे; मी त्यांचे हात भाऱ्याच्या ओझ्यापासून मुक्त केले आहेत. 7 तू संकटाच्या वेळी माझा धावा केलास आणि मी तुला सोडविले; मेघगर्जनेतून मी तुला उत्तर दिले; मरीबाह येथे मी तुझ्या विश्वासाची परीक्षा पाहिली. सेला 8 माझ्या लोकांनो, माझे ऐका, आणि मी तुम्हाला सावध करेन— हे इस्राएला, तू केवळ माझे ऐकशील तर किती बरे होईल! 9 तू कोणत्याही परराष्ट्रीय दैवताची कधीही उपासना करू नकोस; माझ्याशिवाय तू इतर कोणत्याही दैवताला वंदन करू नकोस. 10 मी याहवेह, तुझा परमेश्वर आहे, ज्याने तुला इजिप्तच्या भूमीतून सोडवून आणले. तू आपले मुख पूर्ण उघड आणि ते मी भरेन." 11 परंतु माझ्या लोकांनी माझे ऐकले नाही; इस्राएलने माझी आज्ञा पाळली नाही. 12 म्हणूनच त्यांच्या मनास येईल तसे हट्टीपणाने मी त्यांना वागू दिले, ते स्वतःची इच्छापूर्ती करत राहिले. 13 "परंतु माझ्या लोकांनी केवळ माझे ऐकले असते, जर इस्राएल माझ्या मार्गाने चालले असते तर, 14 मी त्याच्या शत्रूंचा किती त्वरेने पाडाव केला असता, आणि त्याच्या विरोधकांवर माझ्या हाताचा प्रहार केला असता! 15 जे याहवेहचा तिरस्कार करतात, ते दबकून गेले असते आणि त्यांना मिळालेली शिक्षा सर्वकाळ टिकली असती. 16 मग मी तुला उत्तमोत्तम गहू खाऊ घातले असते; तुला डोंगरातील उत्कृष्ट मधाने मी तुला तृप्त केले असते."

**82** आसाफाचे एक स्तोत्र. परमेश्वराने महासभेत आपले स्थान ग्रहण केले आहे; त्यांनी "दैवतांसमोर" आपला न्याय जाहीर केला आहे: 2 तुम्ही कुठवर दुष्टांचे समर्थन करणार, अन्यायी लोकांसाठी पक्षपात करत राहणार? सेला 3 दुबळे आणि पितृहीनांचे समर्थन करा, गरीब आणि पीडलेल्यांना यथायोग्य न्याय द्या. 4 दुर्बल आणि गरजवंत लोकांना वाचवा; दुष्टांच्या तावडीतून त्यांना सोडवा. 5 इतर "दैवतां" ना काहीही कळत नाही, काहीही समजत नाही. ते अंधकारात चालतात; पृथ्वीचे सर्व पाये डळमळीत झाले आहेत. 6 "मी म्हटले, 'तुम्ही "दैवते" आहात; तुम्ही सर्वोच्च परमेश्वराचे पुत्र आहात.' 7 परंतु तुम्ही मर्त्य मानवांप्रमाणेच मराल; आणि इतर शासकाप्रमाणे तुमचे पतन होईल." 8 हे परमेश्वरा, उठा आणि जगाचा न्याय करा, कारण समस्त राष्ट्र तुमचे वतन आहे.

**83** एक गीत. आसाफाचे एक स्तोत्र. हे परमेश्वरा, तुम्ही मौन धरू नका; आमच्यासाठी कान बहिरे करू नका, असे अलिप्त राहू नका. 2 पाहा तुमचे शत्रू कसे गुरगुरतात, तुमच्या विरोधकांनी आपले डोके वर काढले आहे. 3 तुमच्या लोकांविरुद्ध ते कट करतात; तुमच्या प्रिय लोकांविरुद्ध ते कारस्थान करीत आहेत. 4 ते म्हणतात, "चला, आपण इस्राएली राष्ट्रांचा समूळ नाश करू या; त्यांच्या अस्तित्वाची

आठवण देखील आपण नष्ट करून टाकू.” 5 एकजूट होऊन एकमताने
त्यांनी कट रचला; ते सर्व तुमच्याविरुद्ध संघटित झाले आहेत— 6
एदोमी तथा इश्माएली, मोआबी आणि हगरी लोकांचे डेरे, 7 गबाल,
अम्मोन, व अमालेक, पलेशेथ आणि सोरचे निवासी. 8 अश्शूरही
देखील त्यांना सामील झाला आहे की त्याने लोटाच्या वंशजांना सशक्त
करावे. सेला 9 पूर्वी जसा तुम्ही मिद्यानाशी, किंवा सिसेरा व किशोन
नदीजवळ याबीनांशी व्यवहार केला, तसाच यांच्याशीही करा. 10 ज्यांचा
विनाश एनदोर येथे झाला, आणि मग ते भूमीवर पडलेल्या शेणासारखे
झाले. 11 त्यांच्या सरदारांना ओरेब व जेब समान होऊ द्या; त्यांच्या
अधिपतींना जेबह व सलमुन्ना सारखेच होऊ द्या. 12 ते म्हणाले होते,
“चला परमेश्वराची कुरणे आपण हस्तगत करू या.” 13 हे माझ्या
परमेश्वरा, वावटळीच्या धुळीगत, वाऱ्याने उडणाऱ्या भुशागत त्यांना
करा. 14 अग्नी वनाला भस्म करतो, ज्वाला डोंगराला आग लावते, 15
आपल्या वादळाने त्यांचा पाठलाग करा, व आपल्या तुफानाने त्यांना
घाबरवून सोडा. 16 हे याहवेह, तुम्ही त्यांना पूर्णपणे लज्जित करा,
जेणेकरून त्यांनी तुमच्या नावाचा शोध करावा. 17 ते कायमचे फजीत
होवोत आणि गोंधळून जावोत; त्यांचा लज्जास्पद नाश होऊ द्या. 18
त्यांना समजू द्या की, ज्यांचे नाव याहवेह आहे— तेच या समस्त पृथ्वीचे
एकमेव परमश्रेष्ठ स्वामी आहेत.

**84** संगीत निर्देशकाकरिता. गित्तीथ वर आधारित. कोरहाच्या पुत्रांची
रचना. एक स्तोत्र. हे सर्वशक्तिमान याहवेह, तुमचे निवासस्थान
किती रम्य आहे! 2 याहवेह तुमच्या अंगणाच्या उत्कंठेने मी, मूर्छित
होईपर्यंत आतुर झालो आहे; माझा जीव व माझा देह जिवंत परमेश्वराला
आरोळी मारीत आहे. 3 हे सर्वशक्तिमान याहवेह, माझ्या राजा आणि
माझ्या देवा, तुमच्या वेद्यांजवळ चिमणीला घरटी बांधण्याचे, व निळवीला
देखील आपली पिल्ले ठेवण्याचे ठिकाण सापडले आहे. 4 जे तुमच्या
मंदिरात राहू शकतात, ते किती धन्य आहेत; ते निरंतर तुमचे स्तवन
करतात. सेला 5 ज्या मनुष्याच्या सामर्थ्याचा उगम तुम्हीच आहात, ते
किती धन्य आहेत, ज्यांचे अंतःकरण तुमच्या मार्गाचे यात्रेकरू आहेत.
6 ते बाका दरीतून जात असताना, ती त्यांना झऱ्यांचे स्थान होईल;
शरदऋतूतील पाऊसही तिला आशीर्वादाने झाकून टाकील. 7 सीयोनात
परमेश्वराच्या समोर प्रत्येकजण उपस्थित होईपर्यंत, त्यांचे सामर्थ्य
दिवसेंदिवस वाढेल. 8 याहवेह, सर्वशक्तिमान परमेश्वरा, माझी प्रार्थना
ऐका; याकोबाच्या परमेश्वरा, माझे ऐका. सेला 9 हे परमेश्वरा, तुम्ही
आमच्या ढालीवर दृष्टी टाका; आपल्या अभिषिक्तावर कृपादृष्टी करा. 10
तुमच्या अंगणात घालविलेला एक दिवस, इतर कुठेही घालविलेल्या
सहस्र दिवसांपेक्षा उत्तम आहे; दुष्टाईच्या मंडपात राहण्यापेक्षा, माझ्या
परमेश्वराच्या भवनाचा द्वारपाल होऊन राहण्यात मला अधिक आनंद
आहे. 11 कारण याहवेह परमेश्वर आमचा सूर्य आणि आमची ढाल
आहेत; ते आम्हाला कृपा व गौरव देतात; जे निष्कलंक असतात,
त्यांच्यापासून ते कोणतीही उत्तम गोष्ट रोखून धरणार नाहीत. 12
सर्वशक्तिमान याहवेह, जे लोक तुमच्यावर भाव ठेवतात, ते कितीतरी
धन्य होत.

**85** संगीत निर्देशकाकरिता. कोरहाच्या पुत्रांची रचना. एक स्तोत्र. हे
याहवेह, तुमच्या भूमीवर तुम्ही कृपा केली आहे; याकोबाचे ऐश्वर्य
तुम्ही त्याला परत दिले आहे. 2 तुम्ही आपल्या लोकांच्या अपराधाची
क्षमा केली आणि त्यांच्या पातकावर पांघरूण घातले. सेला 3 म्हणजेच
तुमचा सर्व क्रोध शांत झाला आहे, तुमचा भडकलेला संताप आता
शमला आहे. 4 हे परमेश्वरा, आमच्या उद्धारकर्त्या, आम्हाला पुनर्स्थापित
करा. आमच्याविरुद्ध तुमचा क्रोध पुन्हा भडकू देऊ नका. 5 तुम्ही
आमच्यावर सतत कोपलेले राहणार आहात काय? पिढ्यान् पिढ्यांवर
तुमचा राग टिकून राहणार आहे काय? 6 तुमचे लोक तुमच्या ठायी
हर्षित व्हावे, म्हणून तुम्ही आम्हाला पुनरुज्जीवित करणार नाही काय?
7 हे याहवेह, तुमच्या अक्षयप्रीतीचा आम्हावर वर्षाव करा आणि तुमचे
तारण आम्हाला प्रदान करा. 8 परमेश्वर याहवेह जे बोलतील, ते सर्व मी
ऐकणार; कारण त्यांनी आपल्या लोकांना व आपल्या भक्तांना शांतीचे
अभिवचन दिले आहे. परंतु आपल्या लोकांनी मूर्खपणा करण्याचे
थांबवावे. 9 याहवेहचे भय बाळगणारे खरोखरच त्यांच्या तारणाच्या
समीप असतात; मग आपला देश त्यांच्या गौरवाने भरून जाईल. 10
प्रीती आणि विश्वसनीयता एकमेकांना भेटले आहेत; नीतिमत्व आणि
शांती यांनी एकमेकांचे चुंबन घेतले आहे. 11 पृथ्वीतून विश्वसनीयता
उदय पावत आहे, आणि स्वर्गातून नीतिमत्व अवलोकन करीत आहे. 12
याहवेह उत्तम गोष्टीं आम्हाला प्रदान करणार आहेत, आणि आमची भूमी
मुबलक पीक देणार आहे. 13 नीतिमत्व त्यांच्या पुढे चालेल आणि
प्रभूच्या पावलांसाठी मार्ग सिद्ध करेल.

**86** दावीदाची एक प्रार्थना हे याहवेह, माझी विनंती ऐकून मला उत्तर
द्या, कारण मी दीन व दरिद्री आहे. 2 माझे रक्षण करा, कारण
मी तुम्हास समर्पित आहे; तुमच्यावर भरवसा ठेवणाऱ्या सेवकाला
वाचवा, तुम्ही माझे परमेश्वर आहात; 3 हे प्रभू, माझ्यावर कृपा करा,
कारण मी दिवसभर तुमचा धावा करतो. 4 हे प्रभू, माझ्या जीवाला
आनंद द्या, कारण मी केवळ तुमच्यावरच श्रद्धा ठेवली आहे. 5 हे
प्रभू, तुम्ही क्षमाशील आणि चांगले आहात, तुमच्याकडे धाव घेणाऱ्या
सर्वांवर तुम्ही विपुल दया करता. 6 याहवेह, माझी प्रार्थना ऐका; तुमच्या
कृपेसाठी केलेला माझा धावा ऐका. 7 मी आपल्या संकटसमयी तुमचा
धावा करेन, कारण तुम्ही मला उत्तर देता. 8 हे प्रभू, सर्व दैवतांमध्ये
तुमच्यासारखा परमेश्वर कुठेही नाही; तुमची महत्कृत्ये अतुलनीय आहेत.
9 हे प्रभू, तुम्ही निर्माण केलेली सर्व राष्ट्रे, तुमच्यासमोर सन्मानाप्रत
येतील व तुमची आराधना करतील; तुमच्या पवित्र नामाची थोरवी
गातील. 10 कारण तुम्ही महान आहात आणि अद्भुत चमत्कार करता;
तुम्हीच एकटे परमेश्वर आहात. 11 हे याहवेह, तुमचे मार्ग मला शिकवा,
म्हणजे तुमच्या विश्वासूपणावर मी भरवसा ठेवेन; मला एकचित्त हृदय
प्रदान करा, म्हणजे मी तुमच्या नावाचे भय बाळगेन. 12 माझ्या प्रभू

परमेश्वरा, मी माझ्या संपूर्ण हृदयाने तुमचे स्तवन करेन; मी तुमच्या नामाला सदासर्वकाळ गौरव देईन. 13 कारण माझ्यावर तुम्ही अत्यंत प्रीती करता; अधोलोकाच्या तळापासून तुम्ही माझे प्राण सोडविले आहेत. (Sheol h7585) 14 हे परमेश्वरा, उन्मत्त शत्रू माझ्यावर हल्ला करतात; निर्दयी लोकांची टोळी माझा जीव घेण्याचा प्रयत्न करीत आहे— त्यांना तुमची काहीही कदर नाही. 15 परंतु हे प्रभू, तुम्ही कृपाळू व दयाळू परमेश्वर आहात, मंदक्रोध, अति करुणामय आणि विश्वसनीयतेने संपन्न आहात. 16 माझ्याकडे वळून मजवर दया करा; आपल्या सेवकाच्या वतीने आपले सामर्थ्य दाखवून द्या; माझे तारण करा, कारण माझ्या आईप्रमाणेच मी देखील तुमची सेवा करतो. 17 तुमची माझ्यावरील कृपा दाखविणारे चिन्ह मला द्या, म्हणजे माझे शत्रू ते पाहतील व लज्जित होतील, कारण हे याहवेह, तुम्ही मला साहाय्य केले आणि माझे समाधान केले.

**87** कोरहाच्या पुत्रांची रचना. एक स्तोत्र. एक गीत. त्यांनी पवित्र पर्वतावर त्यांच्या नगरीचा पाया घातला. 2 याकोबाच्या सर्व नगरांपेक्षा, सीयोनाचे व्दार याहवेहला अधिक प्रिय आहे. 3 परमेश्वराच्या नगरी, तुझ्याबद्दल या उत्कृष्ट गोष्टी कथन होतात: सेला 4 “मी नोंद करेन की, राहाब आणि बाबिलोन हे देश माझे अस्तित्व मान्य करतात— पलेशेथ, सोर आणि कूश देखील असेच करतात— ते म्हणतील की, ‘हा सीयोनात जन्मलेला आहे.’” 5 खरोखर, त्या दिवसात सीयोनाबाबत म्हटले जाईल, “हा आणि तो सीयोनात जन्मलेला आहे, आणि प्रत्यक्ष देवाधिदेव या शहराला प्रस्थापित करतील.” 6 नागरिकांच्या नोंदवहीत याहवेह लिहितील: “याचा जन्म सीयोनात झाला आहे.” सेला 7 संगीत समारंभात ते गातील, “माझे सर्व झरे तुमच्यामध्येच आहेत.”

**88** एक गीत. कोरहाच्या पुत्रांची स्तोत्र रचना. संगीत निर्देशकाकरिता. माहालाथ लान्नोथ चालीवर आधारित. एज्रावंशी हेमानचा मासकील हे याहवेह, माझ्या तारणकर्त्या परमेश्वरा, रात्रंदिवस मी तुमच्यापुढे आक्रोश करीत आहे; 2 माझी प्रार्थना तुमच्यापर्यंत पोहचो; माझ्या आरोळीकडे कान द्या. 3 क्लेशांनी मला जेरीस आणले आहे आणि माझे जीवन मृत्यूच्या जवळ येत आहे. (Sheol h7585) 4 गर्तेत पडणाऱ्यांमध्ये माझी गणना झाली आहे; जणू काही माझी सर्व शक्ती नष्ट झाली आहे. 5 मृतांमध्ये मला असे टाकण्यात आले आहे, जसे वधलेल्यास कबरेत ठेवतात, आणि ज्यांचे तुम्हाला विस्मरण झाले आहे, ज्यांना तुमच्या आश्रयापासून दूर करण्यात आले आहे. 6 तुम्ही मला अत्यंत खोल दरीत ढकलून दिले आहे, काळ्याकुट्ट डोहात टाकले आहे. 7 तुमच्या क्रोधाचा भार मला फारच जड झाला आहे; तुमच्या क्रोधाच्या लाटांनी मला पीडले आहे. सेला 8 माझ्या जिवलग मित्रांना माझ्यापासून दूर करून, त्यांना माझा वीट येईल, असे तुम्ही केले आहे. मी कोंडलेला असून त्यातून बाहेर पडू शकत नाही. 9 वेदनेने माझे डोळे म्लान झाले आहेत. याहवेह, मी रोज तुमचा धावा करतो; हात पसरून तुमच्याकडे विनंती करतो. 10 कारण कबरेत गेलेल्यांमध्ये तुम्ही चमत्कार करणार काय? जे मेलेले आहेत ते उठून तुझी स्तुती करतील काय. सेला 11 तुमच्या प्रेमाची घोषणा कबरेत जाहीर होणार काय? तुमची विश्वसनीयता विनाशात कशी प्रदर्शित होणार? 12 अंधकारमय स्थान तुमची अद्भुत कृत्ये घोषित करेल काय? अथवा विस्मरणाच्या भूमीत तुमच्या नीतिमत्तेची साक्ष देता येईल काय? 13 परंतु हे याहवेह, मी तुमचा धावा करतो; माझी प्रार्थना दररोज प्रात:काळी तुमच्यापुढे सादर होवो. 14 हे याहवेह, तुम्ही माझा त्याग का केला, आणि आपले मुख माझ्यापासून का फिरविले? 15 तारुण्यापासून मी दु:खी आणि मरणोन्मुख आहे; तुमच्या भीतीने ग्रस्त होऊन मी असहाय झालो आहे. 16 तुमच्या क्रोधाने मला ग्रासले आहे. तुमच्या भीतीने माझा विध्वंस झाला आहे. 17 त्याने दिवसभर जलप्रलयाप्रमाणे सर्व बाजूंनी घेरले आहे. त्याने मला पूर्णपणे गिळंकृत केले आहे. 18 माझे प्रियजन आणि शेजाऱ्यांना तुम्ही माझ्यापासून दूर केले— अंधारच आता माझा घनिष्ठ मित्र झाला आहे.

**89** एज्रावंशातील एथानचा एक मासकील मी याहवेहच्या महान करुणामय प्रीतीचे सदासर्वदा गुणगान करेन; पिढ्यान् पिढ्या मी तुमच्या विश्वसनीयतेची माझ्या मुखाने साक्ष देईन. 2 मी जाहीर करेन की, तुमची प्रीती आणि तुमची दया सर्वकाळ टिकणारी आहेत; तुमचे सत्य स्वर्गामध्ये तुम्ही स्थिर केले आहे. 3 तुम्ही म्हणालात, “माझा निवडलेला सेवक, दावीद, याच्याशी मी एक करार केला आहे; मी शपथ वाहिली आहे की, 4 ‘दावीदाच्या सिंहासनावर त्याचे वंशज अनंतकाळ राज्य करतील आणि पिढ्यान् पिढ्या विराजमान होतील.’” सेला 5 याहवेह, सारे गगनमंडळ तुमच्या अद्भुत चमत्कारांची स्तुती करीत आहे. भक्तांच्या सभेत तुमच्या विश्वसनीय पावित्र्याचेही गुणगान केले जाते. 6 कारण याहवेहशी तुलना करता येईल असा स्वर्गात कोण आहे? दिव्यदूतांच्या मंडळात परमेश्वरासमान कोण आहे? 7 सात्विकांच्या सभेत एकत्र पवित्र परमेश्वराचे भय दिसून येते. त्यांच्याभोवती असणाऱ्या सर्वांपेक्षा ते अधिक भयावह आहेत. 8 हे याहवेह, सेनाधीश परमेश्वरा, तुमच्यासारखे समर्थ परमेश्वर दुसरे कोणी आहे का? विश्वासूपणाचे वलय तुमच्याभोवती आहे. 9 भयानक उसळणाऱ्या महासागरांवर तुम्हीच नियंत्रण ठेवता; लाटा उसळताच, तुम्ही त्या शांत करता. 10 तुम्ही रहाबास असे जमीनदोस्त केले जसे एखादे शव; तुमच्या शक्तिशाली बाहूने तुम्ही शत्रूंची दाणादाण केली. 11 स्वर्गाचे तुम्ही स्वामी आहात व पृथ्वीही तुमचीच आहे; कारण तुम्हीच ते आणि त्यामधील सगळे काही प्रस्थापित केले आहे. 12 उत्तर आणि दक्षिण दिशा तुम्हीच निर्माण केल्या; ताबोर व हर्मोन पर्वत तुमच्या नामाचा आनंदाने गजर करतात. 13 तुमचे बाहू प्रबळ आहेत; तुमचा हात बळकट आहे, उंचावलेला आहे तुमचा उजवा हात. 14 तुमच्या राजासनाचा पाया नीती व न्याय आहे; करुणामय प्रीती व विश्वसनीयता सतत तुमच्यापुढे चालतात. 15 याहवेह, तुमचा गौरव करण्याचे जे शिकले, आणि जे तुमच्या प्रकाशाच्या सानिध्यात चालतात, ते धन्य होत. 16 तुमच्या नामाची प्रशंसा ते दिवसभर आनंदाने करतात; आणि तुमच्या नीतिमत्तेचा उत्सव साजरा करतात. 17 तुम्हीच त्यांचे गौरव व सामर्थ्य

आहात; तुमच्या कृपेद्वारे आमचे शिंग उच्च केले जाईल. 18 खरोखर
याहवेहच आमची संरक्षक ढाल आहेत, आणि आमचा राजादेखील
इस्राएलचे पवित्र परमेश्वरच आहेत. 19 एकदा एका दृष्टान्ताद्वारे तुम्ही
आपल्या भक्तांशी बोललात: "एका वीर योद्ध्याला मी सामर्थ्याने परिपूर्ण
केले आहे; मी सामान्य लोकातून एक तरुण निवडला आहे; 20 तो
माझा सेवक दावीद, मला मिळाला आहे; माझ्या पवित्र तेलाने मी त्याचा
अभिषेक केला आहे. 21 माझे बाहू त्याला स्थिर करतील; निश्चितच
माझे हात त्याला बळकट करतील. 22 त्याचे शत्रू त्याला पराजित
करू शकणार नाहीत; किंवा दुष्ट लोक त्याला पीडणार नाहीत. 23 मी
त्याच्या शत्रूंना त्याच्यासमोर चिरडेन आणि त्याच्या विरोधकांना नष्ट
करेन. 24 माझी सत्यता व करुणा त्याजबरोबर राहील; माझ्या नावानेच
त्याचे शिंग उंचाविले जाईल. 25 मी त्याला समुद्रावर अधिकार देईन,
त्याचा उजवा हात नद्यांवर सत्ता गाजवेल. 26 तो माझा धावा करून
म्हणेल, 'तुम्ही माझे पिता आहात; तुम्ही माझे परमेश्वर, माझ्या तारणाचा
खडक आहात.' 27 मी त्याची माझा ज्येष्ठपुत्र म्हणून नेमणूक करेन,
आणि पृथ्वीवरील सर्वश्रेष्ठ राजा करेन. 28 माझ्या करुणामय प्रीतीची
छाया त्याजवर सदासर्वकाळ राहील; मी त्याच्याशी केलेल्या कराराचा
कधीही अंत होणार नाही. 29 मी त्याचे वंशज सर्वकाळ सुस्थापित
करेन, त्याचे सिंहासन गगनमंडळाच्या अस्तित्वापर्यंत राहील. 30 "जर
त्याच्या मुलांनी माझ्या नियमांचा त्याग केला आणि माझे विधी पाळले
नाहीत, 31 माझ्या आज्ञेचे पालन केले नाही आणि माझे नियम भंग
केले, 32 मी त्यांच्या पापांचा छडीने समाचार घेईन, व दुष्कृत्यांसाठी
चाबकाच्या फटकाऱ्यांची शिक्षा करेन. 33 पण मी माझी प्रेममयदया
त्याच्यापासून कधीही काढून घेणार नाही व माझी सत्यता मी त्यागणार
नाही. 34 मी माझा करार मोडणार नाही; मी जे बोललो त्यातील एक
शब्दही बदलणार नाही. 35 सर्वकाळासाठी एकदाच दावीदाला माझ्या
पवित्रतेची शपथ दिली— मी दावीदाशी खोटे बोलणार नाही— 36
दावीदाचा वंश सर्वकाळ टिकेल आणि त्याचे सिंहासन माझ्यासमोर
सूर्यासमान काळाच्या अंतापर्यंत राहील. 37 आकाशातील विश्वसनीय
साक्षीदार चंद्राप्रमाणे त्याचे सिंहासन युगानुयुग सुस्थिर राहील." सेला
38 मग माझा अव्हेर करून तुम्ही मला का दूर लोटले? तुम्ही तुमच्या
अभिषिक्तावर एवढे संतप्त झाला आहात. 39 तुमच्या सेवकाशी केलेला
करार तुम्ही झुगारून दिला आहे; आणि त्याचा राजमुकुट धुळीत फेकून
तो भ्रष्ट केला आहे. 40 त्याचे रक्षण करणारे तट तुम्ही मोडून टाकले
आहेत; त्याचा प्रत्येक किल्ला तुम्ही जमीनदोस्त केला आहे. 41 येणारा
जाणारा प्रत्येकजण त्याला लुबाडतो; आणि तो त्याच्या शेजाऱ्यांकरिता
घृणापात्र झाला आहे. 42 तुम्ही त्याच्या शत्रूचा उजवा हात उच्च केला
आहे; आणि त्यांना हर्षित केले आहे. 43 तुम्ही त्याच्या तलवारीची
धार बोथट केली आहे आणि लढाईत त्याला मदत करण्याचे नाकारले
आहे. 44 तुम्ही त्याचे वैभव नष्ट केले आहे आणि त्याचे सिंहासन धुळीत
टाकले आहे. 45 त्याच्या तारुण्याचे दिवस खुंटविले आहेत; आणि
त्याला लज्जेच्या वस्त्राने पांघरले आहे. सेला 46 हे याहवेह, असे कुठवर
चालणार? तुम्ही स्वतःला सर्वकाळ लपवून ठेवणार काय? कुठवर
तुमचा क्रोधाग्नी भडकत राहणार? 47 माझ्या आयुष्याच्या क्षणभंगुरतेचे
स्मरण करा. तुम्ही मानवाला किती व्यर्थ जीवन जगण्यासाठी निर्माण
केले! 48 कोण सर्वकाळ जगेल व ज्याला मरणाचा अनुभव येणार नाही,
कोण स्वतःला अधोलोकाच्या सत्तेपासून सोडवू शकेल? सेला (Sheol
h7585) 49 हे परमेश्वरा, तुमच्या पूर्वीच्या महान प्रीतीची शपथ, जी तुम्ही
दावीदाशी विश्वासूपणे केली होती, ती आता कुठे गेली? 50 हे परमेश्वरा,
तुमच्या सेवकाची कशी थट्टा झाली याची आठवण करा, माझ्या हृदयात
सर्व देशांचा तिरस्कार मी कसा सहन करू! 51 याहवेह, हे सर्व अपमान
जे तुमच्या शत्रूंनी केले, त्या उपहासाचे प्रहार पावलोपावली तुमच्या
अभिषिक्ताला मिळाले. 52 याहवेहचे सदासर्वकाळ स्तवन होवो!

**90** परमेश्वराचे प्रिय पात्र, मोशेची एक प्रार्थना हे प्रभू, पिढ्यान् पिढ्या
तुम्ही आमचे वसतिस्थान आहात. 2 पर्वत निर्माण होण्यापूर्वी,
सृष्टीची घडण होण्यापूर्वी, अनादि ते अंतापर्यंत तुम्हीच परमेश्वर आहात!
3 "मर्त्य मनुष्या, मातीत परत जा" असे शब्द बोलून, मनुष्याला तुम्ही
मातीत परत पाठविता. 4 हजार वर्षे ही तुम्हाला असे आहेत, जसा
कालचा गेलेला एक दिवस, किंवा रात्रीचा एक प्रहर. 5 तुम्ही लोकांना
झटकन मृत करून असे नाहीसे करता— जसे सकाळचे हिरवेगार
कोमल गवत: 6 ते सकाळी नवीन उगवते, पण सायंकाळपर्यंत करपून
जाते. 7 तुमच्या क्रोधाने आम्ही भस्म होतो; तुमच्या संतापाने आम्ही
दडपून जातो. 8 तुम्ही आमचे अपराध आपल्यापुढे पसरून ठेवता;
तुमच्या सानिध्यात आमची सर्व गुप्त पातकेही प्रकाशात येतात. 9
तुमच्या क्रोधाच्या छायेखाली आम्ही आमचे जीवन जगतो; कण्हत
आमची वर्षे सरतात. 10 आम्हाला सत्तर वर्षाचे आयुष्य दिले आहे;
आणि सशक्त असल्यास ऐंशी वर्षे; परंतु यातील उत्तम वर्षेदेखील
पुष्कळदा त्रास आणि दुःखे यांनीच भरलेली असतात; लवकरच ती
सरतात आणि आम्ही निघून जातो. 11 तुमच्या संतापाची भयानकता
जाणू शकलो असतो, तर बरे झाले असते! तुमचा क्रोध तितकाच
व्यापक आहे, जितकी त्याची भीती. 12 आमच्या जीवनाचे दिवस
मोजणे आम्हाला शिकवा, जेणेकरून आमचे अंतःकरण सुज्ञ होईल.
13 हे याहवेह, तुमच्या मनाला पाझर फुटू द्या, आणखी किती विलंब
लागणार? आपल्या सेवकांवर दया करा. 14 सकाळच्या समयी तुमच्या
अक्षयप्रीतीने आम्हाला तृप्त करा, म्हणजे आम्ही आनंदात राहू व
आमचे सर्व दिवस हर्षभरित होतील. 15 तुम्ही जितके दिवस हालअपेष्टा
भोगावयास लावले, तितके दिवस हर्षभरित करा, त्या वर्षांच्या प्रमाणात
आता आम्हाला आनंद द्या. 16 तुमची गौरवशाली कृत्ये तुमच्या सेवकांना
दिसो, तुमचे वैभव त्यांची मुलेबाळे बघोत. 17 आमच्या प्रभू परमेश्वराची
कृपा आम्हावर होवो; आणि आमची सर्व कार्ये सुस्थिर होवोत— होय,
आमच्या हाताच्या कार्यास सुस्थिरता येवो.

**91** जो परमोच्चाच्या आश्रयाखाली राहतो, तो सर्वसमर्थाच्या सावलीत
राहील. 2 मी याहवेहला म्हणेन, "तेच माझा आश्रय व माझा

दुर्ग आहेत, माझे परमेश्वर, ज्यांच्यावर मी भरवसा ठेवला आहे.” 3
कारण ते पारध्याच्या पाशापासून आणि प्राणघातक मरीपासून तुझे
रक्षण करतील. 4 ते आपल्या परांनी तुझ्यावर पाखर घालतील, त्यांच्या
पंखाखाली तुला आश्रय मिळेल; त्यांचे सत्य तुझी ढाल व गड होईल. 5
तुला अंधकाराच्या आतंकाचे भय वाटणार नाही, किंवा दिवसा सुटणाऱ्या
बाणांचेही नाही. 6 अंधारात दबा धरून राहणाऱ्या मरीचे, किंवा भर दुपारी
येणाऱ्या आपत्तीचेही भय वाटणार नाही. 7 हजार लोक तुझ्याजवळ
पडले, आणि दहा हजार तुझ्या उजव्या बाजूला पडले, तरी ती संकटे
तुझ्या जवळदेखील येणार नाहीत. 8 तू केवळ आपल्या दृष्टीने निरीक्षण
करशील, आणि दुष्टांना केलेली शिक्षा बघशील. 9 जर तू म्हणाला,
“याहवेह माझे आश्रयस्थान आहेत,” आणि तू परमोच्चास आपले
निवासस्थान केलेस, 10 तर तुला कोणतीही इजा होणार नाही, किंवा
कोणतेही अरिष्ट तुझ्या तंबूजवळ येणार नाही. 11 कारण ते आपल्या
स्वर्गदूतांना तुझ्यासंबंधाने आज्ञा देतील, म्हणजे तू जाशील तिथे तुझे
रक्षण व्हावे. 12 ते तुला त्यांच्या हातांवर उचलून धरतील, म्हणजे तुझ्या
पायाला दगडाची ठेच लागू नये. 13 तू सिंह आणि नागाला चिरडशील;
भयंकर सिंहाला व सर्पाला तू आपल्या पायाखाली तुडवशील. 14
याहवेह म्हणतात, “तो मजवर प्रीती करतो, म्हणून मी त्याला सोडवेन,
त्याचे रक्षण करेन, कारण त्याने माझ्या नामाधिकार मान्य केला आहे. 15
तो माझा धावा करेल, तेव्हा मी त्याला उत्तर देईन; त्याच्या संकटकाळी
मी त्याच्याबरोबर असेन; मी त्याला सोडवेन आणि त्याचा सन्मान
करेन. 16 दीर्घायुष्य देऊन मी त्याला तृप्त करेन, आणि त्याला माझ्या
तारणाचा अनुभव घडवेन.”

**92** एक स्तोत्र. एक गीत. शब्बाथ दिवसासाठी निर्धारित. याहवेहची
स्तुती गाणे, आणि हे परात्परा, तुमच्या नावाची गीते गाणे उत्तम
आहे. 2 प्रातःकाळी तुमच्या करुणामय प्रीतीची, आणि सायंकाळी
तुमच्या विश्वसनीयतेची घोषणा, 3 दशतंत्री सारंगीच्या संगीताद्वारे,
आणि वीणेच्या तालावर गायन-वादन करीत आहे. 4 हे याहवेह, तुमच्या
कृत्यांनी तुम्ही मला उल्हासित करता; तुमच्या हाताने केलेल्या कार्यांमुळे
मी हर्षगीते गात आहे. 5 हे याहवेह, तुमची कृत्ये किती महान आहेत!
तुमचे विचार किती गहन आहेत! 6 मतिमंद लोकांना त्याचे आकलन
होत नाही; मूर्खांना हे समजत नाही की, 7 दुष्ट लोक गवताप्रमाणे
जरी भराभर उगवतात व त्यांची भरभराट होते, तरी त्यांच्यापुढे केवळ
अनंतकालचा नाशच आहे. 8 परंतु याहवेह तुम्ही सदासर्वकाळ सर्वोच्च
आहात! 9 हे याहवेह, तुमच्या सर्व शत्रूंचा, निश्चितच सर्व शत्रूंचा नाश
होईल, आणि समस्त दुष्कर्म्यांची दाणादाण होईल. 10 परंतु तुम्ही माझे
शिंग रानबैलासारखे उंच केले आहे; नवीन तेलाने मला अभिषिक्त केले
आहे. 11 माझ्या डोळ्यांनी माझ्या शत्रूंचा पराजय पाहिला; माझ्या
विरोधकांची दाणादाण माझ्या कानांनी ऐकली. 12 नीतिमान लोक
खजुरीच्या झाडासारखे समृद्ध होतील, ते लबानोनातील गंधसरूसारखे
अभिवृद्ध होतील; 13 जे याहवेहच्या घरात रोपलेले, आणि परमेश्वराच्या
अंगणात लावलेले आहेत, ते समृद्ध होतील. 14 वृद्धापकाळातही ते फळे
देतच राहतील, आणि ते टवटवीत व हिरवेगार राहतील. 15 ते ही घोषणा
करतील, “याहवेह नीतिमान आहेत; ते माझे खडक आहेत; त्यांच्यामध्ये
दुष्टता नाही.”

**93** याहवेह राज्य करतात; ऐश्वर्याची वस्त्रे त्यांनी परिधान केली
आहेत; याहवेहनी राजेशाही वस्त्रे परिधान केली आहेत आणि
ते शक्तीने सुसज्जित आहेत; निश्चितच, त्यांनी पृथ्वी अत्यंत स्थिर व
अढळ केलेली आहे. 2 तुमचे सिंहासन अनादिकालापासून स्थापलेले
आहे; तुम्ही अनंतकाळापासून आहात. 3 याहवेह, महासागर उसळत
आहेत; महासागरांनी त्यांचा स्वर उंच केलेला आहे; समुद्राच्या प्रचंड
लाटांचा प्रहार उग्र होत आहे. 4 सर्व बलाढ्य लाटांहून कितीतरी अधिक
शक्तिशाली, तुम्ही महासागरापेक्षाही अधिक बलशाली आहात—
सर्वोच्च स्थानातील याहवेह सर्वशक्तिमान आहेत. 5 हे याहवेह, तुमच्या
आज्ञा अटळ आहेत; पवित्रता हे तुमच्या भवनाचे अनंतकाळचे आभूषण
आहे.

**94** याहवेह, सूड घेणारे परमेश्वर आहेत, हे सूड घेणारे याहवेह,
प्रज्वलित व्हा. 2 पृथ्वीच्या न्यायाधीशा उठा; गर्विष्ठांचा यथार्थ
सूड घ्या. 3 याहवेह, कुठवर दुष्कर्मी, हे दुष्ट कुठवर जयोत्सव करणार?
4 ते उन्मत्त शब्दांचा वर्षाव करतात; सर्व दुष्कर्मी बढाईखोरीने भरलेले
आहेत. 5 हे याहवेह, ते तुमच्या लोकांना तुडवितात; तुमच्या वारसांना ते
छळतात. 6 ते विधवा, निर्वासितांचा वध करतात; आणि अनाथांचा जीव
घेतात; 7 ते म्हणतात, “याहवेह पाहत नाहीत; याकोबाचा परमेश्वर
लक्ष देत नाही.” 8 विचार करा, या लोकांमधील मूर्खांनो; निर्बुद्ध्यांनो,
तुम्हाला शहाणपण कधी येणार? 9 ज्यांनी कान जडले ते बहिरे आहेत
काय? ज्यांनी डोळे घडविले त्यांना दृष्टी नाही काय? 10 जे राष्ट्रांना
शिस्त लावतात, ते शिक्षा करणार नाहीत काय? जे मानवाला शिक्षण
देतात, त्यांना ज्ञानाची कमतरता असेल काय? 11 याहवेह मनुष्याचे
सर्व विचार जाणतात; ते निरर्थक असतात हे त्यांना ठाऊक आहे. 12
याहवेह, धन्य तो पुरुष, ज्याला तुम्ही शिस्त लावता, ज्याला तुम्ही
तुमचे विधिनियम देण्यासाठी निवडले आहे; 13 जोपर्यंत दुष्टासाठी खाच
खोदली जात नाही, तोपर्यंत तुम्ही त्याला विपत्तीपासून विसावा देता. 14
याहवेह आपल्या प्रजेचा त्याग करणार नाहीत; त्यांच्या वारसांना ते
कधीही टाकणार नाहीत. 15 न्यायनिवाडा पुन्हा न्यायीपणानेच होईल,
आणि नीतिमान हृदयाचे त्याचे पालन करतील. 16 माझ्यातर्फे दुष्ट
लोकांविरुद्ध कोण उभा राहील? कुकर्मी लोकांविरुद्ध माझ्याकडून कोण
लढेल? 17 याहवेहने मला साहाय्य केले नसते, तर मी केव्हाच मरणाच्या
निःशब्दतेत निवास केला असता. 18 “हे याहवेह, मी घसरत आहे,”
असा मी धावा केला, तेव्हा त्यांच्या करुणामय प्रीतीने मला सावरले. 19
जेव्हा माझे अंतःकरण व्याकूळ झाले, तेव्हा तुमच्या सांत्वनाने मला
हर्षित केले. 20 भ्रष्ट सिंहासन तुमच्याशी संघटित होईल काय— जे
अन्यायी कायदे लागू करून दुर्दशा करतात? 21 दुष्ट नीतिमानाविरुद्ध
एकत्र होतात, आणि निरपराध्यास मृत्युदंड देतात. 22 परंतु याहवेह

माझा दुर्ग झाले आहेत, आणि तेच माझे परमेश्वर, माझ्या आश्रयाचे
खडक. 23 तेच त्यांच्या दुष्टतेचा सूड घेतील, आणि त्यांच्या दुष्टतेबद्दल
त्यांचा नाश करतील; याहवेह आमचे परमेश्वर त्यांचा नायनाट करतील.

**95** या हो या, आपण याहवेहचा जयजयकार करू या; आपल्या
तारणाच्या खडकासाठी आनंदाने जयघोष करू या. 2 कृतज्ञ
अंतःकरणांनी त्यांच्यापुढे येऊ; आणि वाद्यसंगीतासह स्तुतिस्तोत्रे गाऊन
स्तवन करू. 3 कारण याहवेह हे महान परमेश्वर आहेत; समस्त दैवतांवर
ते सर्वोच्च राजा आहेत. 4 पृथ्वीची खोल स्थळे त्यांच्या नियंत्रणात
आहेत, आणि पर्वताची शिखरेही त्यांचीच आहेत. 5 समुद्र त्यांचेच
आहेत, कारण ते त्यांनी उत्पन्न केले, आणि कोरडी भूमीही त्यांचीच
हस्तरचना आहे. 6 या हो या, आपण नतमस्तक होऊन आराधना करू
या, आपले उत्पन्नकर्ता याहवेह, यांच्यापुढे गुडघे टेकू; 7 कारण ते
आपले परमेश्वर आहेत. आपण त्यांच्या कुरणातील प्रजा आणि त्यांचा
संरक्षित मेंढरांचा कळप आहोत. आज जर तुम्ही त्यांची वाणी ऐकली,
तर किती बरे! 8 “मरीबाह येथे असताना केली तशी, जसे मस्सा च्या
दिवशी तुम्ही रानामध्ये केले तसे, तुमची अंतःकरणे कठीण करू नका.
9 माझे अनेक चमत्कार पाहिलेले असतानाही, तुमच्या पूर्वजांनी माझी
परीक्षा घेऊन मला कसोटीस लावले. 10 चाळीस वर्षे त्या पिढीवर मी
फार संतापलो; मी म्हणालो, ‘या लोकांची हृदये भटकलेली आहेत
आणि त्यांना माझे मार्ग कळलेच नाही.’ 11 मग मी रागाने शपथ घेतली
की, ‘ते माझ्या विसाव्यात कधीही प्रवेश करणार नाहीत.’”

**96** याहवेहप्रीत्यर्थ एक नवे गीत गा; हे सर्व पृथ्वी, याहवेहला समर्पित
गीत गा. 2 याहवेहसाठी स्तुतिस्तोत्रे गा; त्यांच्या नावाचा महिमा
करा; दररोज त्यांच्या तारणाची घोषणा करा. 3 सर्व राष्ट्रांमध्ये त्यांचे
गौरव, सर्व लोकांमध्ये त्यांची अद्भुत कृत्ये जाहीर करा. 4 कारण
याहवेह थोर आणि स्तुतीस पात्र आहेत; सर्व दैवतांपेक्षा त्यांचे भय
बाळगणे यथायोग्य आहे. 5 इतर देशांची दैवते केवळ मूर्ती आहेत.
परंतु याहवेहनी आकाशमंडलांची रचना केली आहे. 6 राजवैभव आणि
ऐश्वर्य त्यांच्या पुढे चालतात. त्यांच्या उपस्थितीत सामर्थ्य आणि महिमा
असतो. 7 अहो राष्ट्रातील सर्व कुळांनो याहवेहला गौरव द्या, याहवेहला
गौरव आणि सामर्थ्य द्या. 8 याहवेहच्या नावाला योग्य ते गौरव द्या;
अर्पणे आणून त्यांच्या समक्षतेत या. 9 त्यांच्या पवित्रतेच्या ऐश्वर्याने
याहवेहची उपासना करा; त्यांच्या उपस्थितीत हे पृथ्वी कंपित हो! 10
राष्ट्रांमध्ये म्हणा, “याहवेह राज्य करतात.” सर्व सृष्टी दृढपणे स्थिर
झालेली आहे; ती डळमळत नाही सर्व लोकांचा ते न्यायीपणाने न्याय
करतील. 11 आकाशे हर्ष करो, पृथ्वी उल्लास करो; सागर व त्यातील
सर्वकाही त्यांच्या गौरवाची गर्जना करोत. 12 शेते व त्यातील सर्वकाही
अति आनंदाने नाचू लागोत; वनातील सर्व झाडे हर्षाने गुणगान करो.
13 सर्व सृष्टी याहवेहच्या सानिध्यात उल्हासित होवो, कारण ते येत
आहेत, पृथ्वीचा न्याय करण्यास ते येत आहेत; ते धार्मिकतेने राष्ट्रांचा व
विश्वासूपणाने लोकांचा न्यायनिवाडा करतील.

**97** याहवेह राज्य करतात, सर्व पृथ्वी उल्हासित होवो; दूर असलेले
तटवर्ती क्षेत्रेही हर्ष करोत. 2 मेघ व गडद अंधकार यांनी ते
वेढलेले आहेत; धार्मिकता आणि न्याय त्यांच्या राजासनाचा पाया
आहे. 3 अग्नी त्यांच्यापुढे चालतो, आणि त्यांच्या शत्रूंना तो सर्व बाजूने
भस्म करतो. 4 त्यांच्या विजा जगाला प्रकाश देतात; हे पाहून पृथ्वी
कंपित होते. 5 याहवेहच्या उपस्थितीत, समस्त पृथ्वीचे सत्ताधीश व
सगळे पर्वत मेणाप्रमाणे वितळतात. 6 आकाश मंडल त्यांची नीतिमत्ता
जाहीर करते; संपूर्ण मानवजात त्यांचे गौरव पाहते. 7 जे प्रतिमांची
प्रौढी मिरवित होते, ते मूर्तीचे सर्व उपासक फजीत झाले. सर्व दैवतांनो,
त्यांची आराधना करा! 8 सीयोन ऐकते व उल्हासित होते, याहवेह,
तुमच्या निर्णयामुळे, यहूदीयातील गावे हर्षभरित होतात. 9 कारण
याहवेह तुम्हीच पृथ्वीवर परमश्रेष्ठ आहात; सर्व दैवतांहून तुम्ही अत्यंत
थोर आहात. 10 याहवेहवर प्रीती करणारे वाईटाचा द्वेष करोत, कारण ते
त्यांच्या भक्तांच्या जिवाचे रक्षण करतात आणि दुष्टांच्या हातातून त्यांना
सोडवितात. 11 नीतिमानांवर प्रकाश उजळतो आणि निष्ठावंताची हृदये
हर्ष पावतात. 12 सर्व नीतिमान, याहवेहच्या ठायी आनंद करा, आणि
त्यांच्या पवित्र नावाला गौरव द्या.

**98** एक स्तोत्र. याहवेहप्रीत्यर्थ एक नवे गीत गा, कारण त्यांनी अद्भुत
कार्य केले आहे; त्यांच्या उजव्या हाताने व पवित्र बाहूंनी तारण
मिळविण्याचे कार्य केले आहे. 2 याहवेहने त्यांचे तारण सर्व पृथ्वीला
दाखविले आहे, आणि राष्ट्रांसमक्ष आपली नीतिमत्ता प्रकाशित केली
आहे. 3 इस्राएलवरील त्यांची प्रीती आणि त्यांच्या विश्वसनीयतेचे त्यांना
स्मरण झाले आहे; पृथ्वीच्या सर्व सीमांनी आपल्या परमेश्वराने केलेले
तारण पाहिले आहे. 4 अगे पृथ्वी, याहवेहकरिता अत्यानंदाने हर्षोल्लास
कर, संगीतासह उचंबळून हर्षगीत गा; 5 वीणेवरील संगीताच्या साथीने
याहवेहचे स्तवन करा, वीणेच्या तालात आणि गीतांच्या सुरात गा, 6 शिंगे
आणि कर्णे हर्षनादाचा गजर करोत— याहवेह जे राजा आहेत, यांच्यापुढे
आनंदाचा जयघोष करा. 7 महासागर व त्यामधील सर्व स्तुतीचा हर्षनाद
करोत, तसेच पृथ्वी आणि त्यावर राहणारे सर्व प्राणीही करोत. 8 नदीच्या
लाटा टाळ्या वाजवोत, डोंगर व टेकड्या परमेश्वरासमोर हर्षगान करोत;
9 ते सर्व याहवेहच्या उपस्थितीमध्ये गावोत; कारण पृथ्वीचा रास्त न्याय
करण्यासाठी ते येत आहेत. ते जगाचा आणि सर्व मनुष्यप्राण्यांचा न्याय
त्यांच्या धार्मिकतेने व समानतेने करतील.

**99** याहवेह राज्य करतात, राष्ट्रे थरथर कापोत; ते करुबांमध्ये
सिंहासनावर आरूढ झाले आहेत; सर्व पृथ्वी कंपित होवो. 2
अतिमहान होत सीयोनातील याहवेह; ते सर्व राष्ट्रात परमोच्च असे
आहेत. 3 राष्ट्रे तुमच्या थोर व भयावह नामाची स्तुती करोत— याहवेह
पवित्र आहेत. 4 राजा सामर्थ्यशाली आहेत, त्यांना न्याय प्रिय आहे—
तुम्ही याकोबात निष्पक्षपात प्रस्थापित केला; जो न्यायसंगत व रास्त
आहे. 5 आपले परमेश्वर याहवेहची थोरवी गा, व त्यांच्या चरणी आराधना
करा; याहवेह पवित्र आहेत. 6 मोशे आणि अहरोन त्यांचे याजक

होते, व शमुवेल त्यांचा उपासक, त्यांचा धावा करणाऱ्यांपैकी होते;
यांनी याहवेहचा धावा केला, आणि त्यांनी त्यांना उत्तर दिले. 7 ते
त्यांच्याशी मेघस्तंभातून बोलले; त्यांच्याकडे सोपविलेल्या अधिनियमांचे
व आदेशांचे त्या लोकांनी पालन केले. 8 याहवेह, आमच्या परमेश्वरा,
तुम्ही त्यांना उत्तर दिले; त्यांच्या दुष्कृत्यांची त्यांना शिक्षा केली, तरी
इस्राएलसाठी तुम्ही क्षमाशील परमेश्वर होता. 9 आपल्या परमेश्वराची
थोरवी गा, आणि त्यांच्या पवित्र पर्वतावर उपासना करा, कारण आपले
परमेश्वर याहवेह पवित्र आहेत.

**100** एक स्तोत्र. उपकारस्तुतीचे गीत हे समस्त पृथ्वी, याहवेहसाठी
जयघोष कर. 2 आनंदाने याहवेहची आराधना करा; हर्षगीतांसह
त्यांच्या उपस्थितीत प्रवेश करा. 3 याहवेह हेच परमेश्वर आहेत, हे जाणून
घ्या. ते आपले निर्माणकर्ते आहेत व तेच आपले स्वामी आहेत; आपण
त्यांचे लोक, त्यांच्या कुरणातील मेंढराप्रमाणे आहोत. 4 उपकारस्तुती
करीत त्यांच्या द्वारातून आत जा; स्तुती करीत त्यांच्या अंगणात प्रवेश
करा; त्यांचे उपकार माना, त्यांच्या नावाला महिमा द्या. 5 कारण याहवेह
चांगले आहेत आणि त्यांची प्रीती सनातन आहे; त्यांचा विश्वासूपणा
पिढ्यान् पिढ्या टिकून राहतो.

**101** दावीदाची रचना. एक स्तोत्र. हे याहवेह, तुमची प्रीती आणि
न्याय याविषयी मी गीत गाईन; मी तुमची स्तुतिस्तोत्रे गाईन.
2 सुज्ञपणाने जीवन जगणे हे माझे लक्ष्य आहे— तुम्ही माझ्याकडे
कधी येणार? माझ्या घरातील माझा व्यवहार मी निष्कलंक तऱ्हेने
करेन. 3 मी कुठल्याच अनुचित वस्तूकडे नजर टाकणार नाही. मला
विश्वासहीन लोकांच्या व्यवहारांचा तिरस्कार आहे. त्यांच्यापासून मी
अलिप्त राहीन. 4 कुटिल हृदय माझ्यापासून दूर राहील; अनीतीच्या
कुठल्याच गोष्टीशी मी संबंध ठेवणार नाही. 5 आपल्या शेजाऱ्यांची
गुप्तपणे निंदानालस्ती करणाऱ्यास, मी नष्ट करेन; दुसऱ्यांकडे तुच्छतेने
पाहणाऱ्याचा व अहंकारी हृदयाच्या मनुष्याचा सहवास मला असह्य
वाटेल. 6 देशातील निष्ठावान लोकांवर मी माझी दृष्टी लावेन, जेणेकरून
ते माझ्या सहवासात राहतील; ज्यांचे आचरण दोषरहित असेल, असेच
लोक माझी सेवा करतील. 7 परंतु जे इतरांची फसवणूक करतात,
अशांना मी माझ्या घरात राहू देणार नाही, आणि जे असत्य बोलतात, ते
माझ्यापुढे उपस्थित राहणार नाहीत. 8 दररोज सकाळी मी आपल्या
राज्यातील दुर्जनांना नष्ट करेन; याहवेह देवाच्या या नगरीतील प्रत्येक
दुष्टाचा मी नायनाट करेन.

**102** संकटसमयीच्या आक्रांत पुरुषाची अभ्यर्थना. तो अत्यंत उदास
आहे आणि याहवेहच्या समोर स्वतःच्या हृदय-वेदनेचे वर्णन
करीत आहे. हे याहवेह, माझी प्रार्थना ऐका; माझी मदतीची विनवणी
तुमच्यापर्यंत पोहचो. 2 मी संकटसमयात असता तुम्ही आपले मुख
माझ्यापासून लपवू नका. जेव्हा मी तुमचा धावा करेन तेव्हा मला त्वरेने
उत्तर द्या; तुमचे कान माझ्याकडे लावा. 3 कारण माझे दिवस धुरासारखे
विरून जात आहेत; माझ्या हाडांचा जळत्या कोळशासारखा दाह होत
आहे. 4 माझे हृदय गवताप्रमाणे करपून व कोमेजून गेले आहे; अन्न
सेवन करण्याचेही मला स्मरण होत नाही. 5 निराशेने आता अधिकच
उच्चस्वरात कण्हत असून मी कातडी व हाडे यांचा सापळा झालो आहे.
6 ओसाड प्रदेशातील घुबडासारखा, भग्नावशेषातील घुबडासारखा
मी झालो आहे. 7 मी जागाच राहतो. छपरावर एकाकी असणाऱ्या
पक्ष्यासारखा मी झालो आहे. 8 माझे शत्रू दिवसेंदिवस मला टोचून
बोलतात; आणि माझा उपहास करणारे माझे नाव एखाद्या श्रापासारखे
देतात. 9 मी अन्न म्हणून राख खात आहे; आणि माझे अश्रू माझ्या
पेयात मिश्रित होतात, 10 तुम्ही माझ्यावर क्रोधाविष्ट झाला आहात;
कारण संतापाने तुम्ही मला उचलून फेकून दिले. 11 सायंकाळच्या
सावलीप्रमाणे माझे आयुष्य वेगाने संपत आहे; मी गवताप्रमाणे वाळून
जात आहे. 12 परंतु हे याहवेह देवा, तुम्ही सदासर्वकाळ सिंहासनावर
विराजमान आहात; तुमची किर्ती पिढ्यान् पिढ्या टिकून राहील. 13 तुम्ही
याल आणि सीयोनावर दया कराल, कारण तिच्यावरील कृपादृष्टीची वेळ
येऊन ठेपली आहे; तो निश्चित समय आलेला आहे. 14 यातील प्रत्येक
धोंड्यावर तुमचे सेवक प्रीती करतात; येथील धूळ देखील त्यांचे मन
द्रवित करते. 15 सर्व राष्ट्रे तुमच्या नामाचे भय धरतील, पृथ्वीवरील
सर्व राजे तुमच्या गौरवासमोर नतमस्तक होतील. 16 कारण याहवेह
सीयोनाची पुनर्बांधणी करतील; आणि त्यांच्या गौरवाने प्रगट होतील. 17
निराधार लोकांच्या प्रार्थना ते ऐकतील; त्यांच्या विनवण्यांचा ते तिरस्कार
करणार नाहीत. 18 भावी पिढ्यांच्या हितासाठी हे सर्व नमूद करून ठेवले
जावो, जे आजपर्यंत अस्तित्वात नाहीत, तेही याहवेहची स्तुती करतील:
19 “याहवेहने आपल्या महान पवित्रस्थानातून खाली दृष्टी टाकली, त्यांनी
स्वर्गातून पृथ्वीकडे पाहिले, 20 जेणेकरून गुलामगिरीतील लोकांचे
कण्हणे ऐकावे आणि मृत्युदंड मिळालेल्यांची सुटका करावी.” 21
म्हणजे सर्व लोक याहवेह देवाची महिमा सीयोनात जाहीर करतील
आणि यरुशलेमात त्यांची स्तुती करतील. 22 जेव्हा लोक व राष्ट्रेही
याहवेहची उपासना करण्यासाठी तिथे येतील. 23 माझ्या जीवनयात्रेच्या
मध्येच त्यांनी माझे बळ तोडले; त्यांनी माझे आयुष्य कमी केले. 24 पण
मी त्यांना आरोळी मारली: “हे परमेश्वरा, आयुष्याच्या मध्यातच मला
मृत्यू येऊ देऊ नका; तुमची वर्षे पिढ्यान् पिढ्या निरंतर असतात. 25
प्रारंभी पृथ्वीचा पाया तुम्हीच घातला, आणि आपल्या हातांनी तुम्ही
गगनमंडळे निर्माण केलीत. 26 ती नष्ट होतील, परंतु तुम्ही निरंतर
राहाल; ती सर्व जुन्या वस्त्राप्रमाणे जीर्ण होतील; जुनी वस्त्रे टाकून
नवी घालावी, तसे तुम्ही त्यांना बदलून टाकाल. 27 परंतु तुम्ही निरंतर
समान राहणार, आणि तुमची वर्षे कधीही संपुष्टात येणार नाहीत. 28
तुमच्या सेवकांचे संतान तुमच्या उपस्थितीत टिकून राहतील; तुमच्या
संरक्षणाखाली त्यांच्या वंशजांचे जतन होईल.”

**103** दावीदाची रचना माझ्या जिवा, याहवेहचे स्तवन कर; माझ्या
संपूर्ण अंतरात्म्या, त्यांच्या पवित्र नामाचे स्तवन कर. 2 हे
माझ्या जिवा, याहवेहचे स्तवन कर; त्यांनी केलेले उपकार कधीही
विसरू नको. 3 जे तुझ्या सर्व अपराधांची क्षमा करतात, जे तुझे

सर्व रोग बरे करतात. 4 जे नाशाच्या दरीतून तुझी सुटका करतात;
आपल्या प्रीतीचा आणि दयेचा तुला मुकुट घालतात. 5 जे तुझे आयुष्य
उत्तम पदार्थांनी तृप्त करतात; म्हणून गरुडासारखे तुझ्या तारुण्याचे
नवीनीकरण होते. 6 ज्यांच्यावर जुलूम केला गेला, त्या सर्वांना याहवेह
धार्मिकतेने व न्यायाने वागवितात. 7 त्यांनी आपले मार्ग मोशेला प्रगट
केले, आणि आपली अद्भुत कृत्ये इस्राएली लोकात केली: 8 याहवेह
कृपावान व करुणामय आहेत, ते मंदक्रोध व प्रीतीने विपुल आहेत. 9
ते सर्वदाच दोष देत राहणार नाहीत, व त्यांचा क्रोध सर्वकाळ टिकून
ठेवत नाहीत. 10 ते आपल्या अपराधास यथायोग्य असा दंड देत
नाहीत, अथवा आपल्या कुकृत्याच्या प्रमाणात प्रतिफळ देत नाहीत. 11
कारण पृथ्वीच्यावर आकाश जितके उंच आहे, तितकी त्यांची प्रीती,
त्यांचे भय बाळगणाऱ्यांवर विपुल आहे. 12 पूर्वेपासून पश्चिम जेवढी
दूर आहे, तेवढे त्यांनी आमचे अपराध आम्हांपासून दूर केले आहेत.
13 जशी पित्याची करुणा त्याच्या लेकरांवर असते, तसे त्यांचे भय
बाळगणाऱ्यांसाठी याहवेह कोमलहृदयी व सहानुभूतीने भरलेले आहेत.
14 कारण आम्ही कसे निर्माण झालो हे ते जाणतात, आम्ही धूळ आहोत
याचे त्यांना स्मरण आहे. 15 मर्त्यप्राण्याचे जीवन गवताप्रमाणे आहे, ते
मैदानावर एखाद्या फुलासारखे फुलतात; 16 परंतु उष्ण वारा त्यावर
येताच ते कायमचे नाहीसे होते, ते स्थळ त्याचे स्मरण करीत नाही.
17 परंतु याहवेहची प्रेममयदया त्यांचे भय धरणाऱ्यांवर अनादि पासून
अनंतकालापर्यंत तथा त्यांची नीतिमत्ता त्याच्या पुत्र पौत्रांना लाभते.
18 जे त्यांच्या कराराशी प्रामाणिक राहतात, आणि त्यांच्या आज्ञा
पाळण्याची आठवण ठेवतात. 19 याहवेहने स्वर्गात आपले सिंहासन
प्रस्थापित केले आहे, आणि संपूर्ण विश्वावर त्यांची सत्ता आहे. 20 अहो
प्रतापशाली स्वर्गदूतांनो, त्यांची आज्ञा अंमलात आणणारे, व त्यांच्या
वचनाचे पालन करणारे, याहवेहचे स्तवन करा. 21 अहो स्वर्गातील सर्व
सैन्यहो, त्यांची इच्छापूर्ती करणारे त्यांचे सेवकहो, याहवेहचे स्तवन
करा. 22 त्यांच्या अधिपत्यातील अखिल रचनांनो, याहवेहचे स्तवन
करा. हे माझ्या जिवा, याहवेहचे स्तवन कर.

**104** हे माझ्या जिवा, याहवेहचे स्तवन कर. हे याहवेह, माझ्या
परमेश्वरा, तुम्ही किती थोर आहात; तुम्ही राजवैभव आणि
तेजाने विभूषित आहात. 2 तुम्ही प्रकाशास वस्त्रासमान धारण केले
आहे; अंतराळास एखाद्या तंबूप्रमाणे विस्तीर्ण केले आहे, 3 आणि
आपल्या मजल्यांना जलस्तंभावर बसविले आहे. मेघ त्यांचे रथ आहेत;
ते वाऱ्याच्या पंखावर आरूढ होऊन जातात. 4 ते वायूला आपले दूत;
व अग्निज्वालांना आपले सेवक करतात. 5 तुम्ही पृथ्वीला तिच्या
पायावर असे स्थापित केले आहे, जे कधीही ढळणार नाही. 6 तुम्ही
पृथ्वीला गहन जलाशयरूपी वस्त्राने आच्छादिले; जलस्तर पर्वतापेक्षा
उंच केले. 7 परंतु तुम्ही धमकाविताच जलसंचयाने पलायन केले, तुमच्या
गर्जनेच्या आवाजाने ते भिऊन पळाले; 8 ते पाणी पर्वतांवरून वाहिले,
दऱ्याखोऱ्यातून गेले, आणि तुम्ही नेमलेल्या पातळयांवर ते स्थिर झाले.
9 तुम्ही त्यांना मर्यादा ठरवून दिली; जेणेकरून त्यांनी पृथ्वी पुन्हा कधीही
व्यापून टाकू नये. 10 त्यांनी खोऱ्यांमधून पाण्याचे वाहते झरे केले;
पर्वतामधून त्यांचे प्रवाह वाहत गेले. 11 ते कुरणातील सर्व प्राण्यांना
पाणी पुरवितात; त्या ठिकाणी रानगाढवेही आपली तहान भागवितात.
12 आकाशातील पक्षी त्या प्रवाहाकाठी घरटी बांधून राहतात; व वृक्षांच्या
फांद्यांवरून गाणी गातात. 13 ते त्यांच्या भवनाच्या वरच्या कक्षातून
पर्वतावर पाऊस पाडतात; पृथ्वी त्यांच्या फलवंत कार्याने समाधान
पावते. 14 ते जनावरांच्या पोषणाकरिता गवत उत्पन्न करतात, आणि
मानवाने मशागत करावी— जमिनीतून अन्न उत्पादन करावे म्हणून: 15
मानवाचे हृदय उल्हासित करण्यास द्राक्षारस, त्याचे मुख तुळतुळीत
राखण्यासाठी तेल आणि त्याच्या हृदयाचे जतन व्हावे म्हणून भाकर
उत्पन्न करतात. 16 याहवेहने लावलेल्या लबानोनाच्या गंधसरू वृक्षास
भरपूर पाणी पुरवठा असतो. 17 त्यावर पक्षी आपली घरटी करतात व
करकोचा त्याचे घरटे देवदारू वृक्षावर बांधतो. 18 उंच पर्वत रानबकऱ्यांचे
निवासस्थान आहेत, खडकांमध्ये डोंगरी ससे सुरक्षित बिळे करतात. 19
त्यांनी ऋतुंची नोंद करण्यासाठी चंद्राची निर्मिती केली, आणि सूर्यास
कधी अस्त व्हावे हे ठाऊक आहे. 20 ते अंधार पाठवितात आणि रात्र
होते, तेव्हा वनचर भक्ष्यार्थ बाहेर पडतात. 21 सिंह भक्ष्यासाठी गर्जना
करतात, आणि त्यांचे अन्न परमेश्वराकडून अपेक्षितात. 22 सूर्योदयाच्या
वेळी ते आपल्या गुहांमध्ये परत येऊन लपतात, व शांतपणे झोपतात.
23 मग लोक त्यांच्या कामासाठी घराबाहेर पडतात, व सायंकाळपर्यंत
परिश्रम करतात. 24 हे याहवेह! तुमचे कार्य किती विविध आहे: अद्भुत
ज्ञानाने तुम्ही सर्व घडविले आहे; तुमच्या रचनेने संपूर्ण पृथ्वी संपन्न
झाली आहे. 25 एकीकडे प्रचंड व विस्तृत महासागर पसरलेला आहे;
त्यात लहानमोठ्या अशा असंख्य प्राण्यांची रेलचेल आहे. 26 यात
जहाजांचे दळणवळण होत असते, आणि यात क्रीडा करण्यासाठी तुम्ही
लिव्याथान निर्माण केला. 27 निर्धारित वेळेवर अन्न मिळण्यासाठी,
प्रत्येक प्राणी आशेने तुमच्याकडे बघतो. 28 जेव्हा तुम्ही त्यांना पुरविता,
तेव्हा ते गोळा करतात; तुम्ही आपला हात पूर्णपणे उघडता आणि
तुमच्या विपुल पुरवठ्याने ते तृप्त होतात. 29 परंतु जेव्हा तुम्ही आपले
मुख लपविता, तेव्हा ते व्याकूळ होतात; जेव्हा तुम्ही त्यांचा श्वास काढून
घेता, तेव्हा ते मरतात व पुन्हा मातीत जाऊन मिसळतात. 30 मग तुम्ही
आपला आत्मा पाठविता, तेव्हा ते अस्तित्वात येतात, आणि पृथ्वीला
पुन्हा नवे स्वरूप आणता. 31 याहवेहचे वैभव सर्वकाळ राहो; याहवेहला
आपल्या कृतीपासून आनंद होवो— 32 त्यांच्या नेत्रकटाक्षांनी पृथ्वी
थरथर कापते; ते स्पर्श करताच पर्वतातून धुराचे लोट बाहेर पडतात.
33 मी आजीवन याहवेहचे स्तोत्र गाईन; माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत
मी माझ्या परमेश्वराचे स्तुतिगान करेन. 34 माझे चिंतन त्यांना संतुष्ट
करो, कारण याहवेहतच माझा आनंद परिपूर्ण आहे. 35 सर्व पातकी
पृथ्वीवरून नष्ट होवोत; दुष्ट परत न दिसोत. हे माझ्या जिवा, याहवेहचे
स्तवन कर. याहवेहचे स्तवन कर!

**105** याहवेहचे स्तवन करा, त्यांच्या नावाची घोषणा करा; त्यांनी
केलेली अद्भुत कृत्ये सर्व राष्ट्रात जाहीर करा. 2 त्यांची

स्तुतिस्तोत्रे गा आणि त्यांचे स्तवन करा; त्यांच्या सर्व अद्भुत कार्याचे
वर्णन करा. 3 त्यांच्या पवित्र नावाचा अभिमान बाळगा; जे याहवेहचा
शोध करतात, त्यांचे हृदय हर्षित होवो. 4 याहवेह व त्यांच्या सामर्थ्याकडे
पाहा; सतत त्यांचे मुख शोधा. 5 परमेश्वराने केलेली अद्भुत कार्ये,
त्यांचे चमत्कार आणि त्यांनी केलेले न्याय यांचे स्मरण करा. 6 अहो
त्यांचे सेवक, अब्राहामाच्या वंशजांनो, त्यांच्या निवडलेल्या लोकांनो,
याकोबाच्या संतानांनो, स्मरण करा. 7 कारण याहवेह आमचे परमेश्वर
आहेत. त्यांचे न्याय सर्व पृथ्वीवर आहेत. 8 जी अभिवचने त्यांनी हजारो
पिढ्यांना दिली होती, ते आपला करार सर्वदा स्मरणात ठेवतात. 9 हा
करार त्यांनी अब्राहामाशी केला, आणि इसहाकाशी शपथ वाहिली, 10
आणि त्यांनी याकोबासाठी नियम व इस्राएलसाठी सदासर्वकाळचा
करार या रूपाने कायम केला: 11 “मी तुम्हाला कनान देश तुमचे
वतन म्हणून देईन.” 12 त्यावेळी इस्राएली लोक अगदी मोजके होते
निश्चितच थोडे, वचनदत्त देशात ते परके होते. 13 ते एका देशातून दुसऱ्या
देशात, एका राज्यातून दुसऱ्या राज्यात भटकत असताना, 14 याहवेहने
कोणा मनुष्याला त्यांच्यावर जुलूम करू दिला नाही; त्यांच्याकरिता
त्यांनी राजांना दटाविले: 15 “माझ्या अभिषिक्तांना स्पर्श करू नका;
माझ्या संदेष्ट्यांना इजा करू नका.” 16 त्यांनी त्यांच्या देशावर दुष्काळ
आणला, आणि त्यांचा अन्नपुरवठा तोडून टाकला. 17 तेव्हा त्यांनी
एका पुरुषाला— योसेफाला पाठविले. 18 इजिप्तींनी योसेफाच्या
पायांना खोडे घालून इजा केली, त्याची मान लोखंडी गळपट्ट्यात
अडकविली. 19 याहवेहने ठरविलेली वेळ येईपर्यंत, त्यांनी दिलेले
अभिवचन पूर्णपणे पारखले जाईपर्यंत हे घडले. 20 मग राजाने त्याला
बोलाविणे पाठविले आणि त्याला मुक्त केले, प्रजेच्या शासकाने त्याला
सोडविले. 21 राजाने त्याला महालाचा प्रशासक म्हणून नेमले, सर्व
मालमत्तेवर त्याला अधिकार दिला. 22 त्याच्या राजपुत्रांचा सल्लागार,
आणि राजाच्या मंत्र्यांना बोध देण्यासाठी त्याची नेमणूक झाली. 23
नंतर याकोब, म्हणजे इस्राएल इजिप्तमध्ये आला; आणि उपरा म्हणून
हाम वंशजांच्या देशात राहिला. 24 याहवेहने इस्राएली लोकांना अत्यंत
समृद्ध केले; त्यांच्या शत्रूपेक्षाही त्यांची लोकसंख्या अधिक झाली, 25
त्यांच्या सेवकांविरुध्द कट करण्यासाठी परमेश्वराने इजिप्ती लोकांचे
मन फिरविले. 26 तेव्हा परमेश्वराने आपले प्रतिनिधी म्हणून मोशेला
व अहरोनाला निवडून पाठवले. 27 त्यांनी इजिप्ती समोर याहवेहचे
चमत्कार केले, हामच्या भूमीवर त्यांची अद्भुत कार्ये प्रकट केली. 28
परमेश्वराने अंधकार पाठवून त्या संपूर्ण देशाला अंधकारमय केले—
कारण त्यांनी परमेश्वराच्या आदेशाची अवहेलना केली नाही का? 29
त्यांनी इजिप्तच्या सर्व पाण्याचे रक्त केले, आणि परिणामत: त्यातील
मासे मरून गेले. 30 मग त्या राष्ट्रात प्रचंड संख्येने बेडके उत्पन्न
झाली, राजाच्या शयनकक्षात देखील ती पोहोचली. 31 ते बोलले
आणि गोमाश्यांचे, आणि कीटकांचे थवे प्रचंड प्रमाणात संपूर्ण देशावर
आले. 32 पावसाच्या पाण्याचे गारात रूपांतर केले, आणि विजेच्या
अग्निलोळांनी त्या राष्ट्रावर वर्षाव केला. 33 त्यांचे द्राक्षवेल आणि
अंजिराची झाडे त्यांनी उद्ध्वस्त केली, देशातील सर्व झाडे कोलमडून
पडली. 34 त्यांनी आदेश दिला आणि टोळांनी आक्रमण केले, टोळांचे
थवेच्या थवे आले; 35 त्यांनी देशातील सर्व हिरवळ खाऊन टाकली,
आणि सर्व पिके गिळंकृत केली. 36 मग त्यांनी त्यांच्या देशातील
प्रत्येक ज्येष्ठ संतानास ठार केले, जे त्यांच्या पुरुषत्वाचे प्रथमफळ
होते. 37 त्यांनी इस्राएलास विपुल चांदी आणि सोन्यासह इजिप्तमधून
बाहेर काढले, त्यावेळी त्यांच्या गोत्रातील कोणीही अडखळले नाही.
38 इस्राएली लोक गेल्यावर इजिप्ती लोकांना आनंद झाला, कारण
इस्राएलाच्या भयाने ते ग्रासले होते. 39 याहवेहनी इस्राएलावर मेघाचे
छत्र पसरले, आणि रात्री प्रकाशासाठी अग्निस्तंभ दिला. 40 त्यांनी
याचना केली, तेव्हा परमेश्वराने लावे पक्षी पाठविले; त्यांना स्वर्गातील
भाकर देऊन तृप्त केले. 41 त्यांनी खडक फोडला आणि पाणी उफाळून
बाहेर आले; त्याची नदी होऊन ती वैराण प्रदेशातून वाहू लागली. 42
कारण आपला सेवक अब्राहाम याला दिलेल्या पवित्र अभिवचनाची
त्यांना आठवण होती. 43 त्यांनी त्यांच्या लोकांना आनंदाची गाणी गात,
व आपल्या निवडलेल्यांना हर्षनाद करीत बाहेर आणले; 44 परमेश्वराने
अनेक राष्ट्रांची भूमी यांना दिली, परक्यांनी परिश्रम केलेल्या संपत्तीचे ते
वारस झाले— 45 जेणेकरून इस्राएली लोक त्यांचे विधिनियम व त्यांची
आज्ञा दक्षतेने पाळतील. याहवेहची स्तुती असो.

**106** याहवेहची स्तुती असो! याहवेहचे उपकारस्मरण करा, कारण
ते चांगले आहेत; त्यांची प्रीती अनंतकाळची आहे. 2 याहवेहची
सर्व गौरवशाली कृत्ये, किंवा त्यांची स्तुती पूर्णपणे कोण जाहीर करेल?
3 जे इतरांशी न्यायाने वागतात, आणि नेहमीच नीतीने आचरण करतात,
ते आशीर्वादित असतात. 4 हे याहवेह, जेव्हा तुमच्या प्रजेवर कृपादृष्टी
कराल, तेव्हा माझेही स्मरण करा, त्यांचे तारण कराल, तेव्हा मलाही
मदत करा. 5 म्हणजे तुम्ही निवडलेल्यांच्या समृद्धीत मलाही वाटा
मिळेल, आणि तुमच्या राष्ट्रांच्या सर्व आनंदामध्ये मीही सहभागी होईन,
आणि तुमच्या वारसांसह मी देखील तुमचे स्तुतिगान करेन. 6 आम्ही
आमच्या पूर्वजांप्रमाणे पाप केले; आम्ही अपराध केला आणि दुष्टतेने
वागलो. 7 जेव्हा ते इजिप्तमध्ये होते, तेव्हा तुम्ही केलेल्या अद्भुत
चमत्कारांकडे त्यांनी लक्ष दिले नाही; तुम्ही केलेली अनेक दयाळूपणाची
कृत्ये ते विसरले; उलट, तांबड्या समुद्राकाठी त्यांनी तुमच्याविरुद्ध बंड
केले. 8 तरीसुद्धा आपल्या नामासाठी, आपले सामर्थ्य प्रगट करण्यासाठी
परमेश्वराने त्यांचे तारण केले. 9 तांबड्या समुद्राला दरडावताच तो
कोरडा झाला; वाळवंटातून चालत असल्यासारखे त्यांना खोल समुद्रातून
चालविले. 10 त्यांना त्यांच्या शत्रूपासून सोडविले; शत्रूंच्या अधिकारातून
त्यांची सुटका केली. 11 त्यांच्या शत्रूंना जलसमाधी मिळाली; त्यापैकी
एकजणही वाचला नाही. 12 तेव्हा लोकांनी त्यांच्या वचनांवर विश्वास
ठेवला, व त्यांचे स्तुतिगान केले. 13 परंतु त्यांनी केलेले कार्य ते लवकर
विसरले, त्यांनी केलेली योजना पूर्ण होण्याची त्यांनी वाट पाहिली नाही.
14 ओसाड भूमीत त्यांनी आपल्या उत्कट इच्छांना मोकळी वाट करून
दिली; वाळवंटात परमेश्वराची परीक्षा पाहिली. 15 परमेश्वराने त्यांच्या

मागण्या पुरविल्या, परंतु जीव झुरणीस लावणारा रोगही त्यांच्याकडे
पाठविला. 16 तंबूत असताना मोशे आणि याहवेहचा अभिषिक्त अहरोन
यांच्या विरुद्धही त्यांचा हेवा वाढला. 17 मग पृथ्वी उघडली आणि तिने
दाथानाला गिळून टाकले; अबीराम व त्याच्या समुहाला दफन केले.
18 आणि त्यांच्या अनुयायांवर अग्निपात झाला; दुष्ट माणसांना भस्म
करण्यात आले. 19 होरेब येथे त्यांनी एका वासराची मूर्ती घडविली,
आणि त्या धातूच्या मूर्तीची आराधना केली. 20 परमेश्वराच्या गौरवाची
अदलाबदल गवत खाणाऱ्या बैलाच्या प्रतिमेशी केली. 21 त्या परमेश्वराला
ते विसरले, ज्यांनी त्यांना सोडविले, इजिप्त देशात महान चमत्कार
केले, 22 हामच्या भूमीत आश्चर्यकर्म केले, आणि तांबड्या समुद्राकाठी
चमत्कार केले. 23 मग ते म्हणाले की ते त्यांचा नाश करतील— जर
खुद्द त्यांनी निवडलेला पुरुष मोशे, मध्ये उभा राहिला नसता तर, त्यांनी
आपला क्रोध न आवरता त्या लोकांचा नाश केला असता. 24 वचनदत्त
देशास त्या लोकांनी तुच्छ लेखले; त्यांनी दिलेल्या अभिवचनांवर त्यांचा
विश्वास नव्हता. 25 त्यांनी आपल्या तंबूत कुरकुर केली, आणि याहवेहची
आज्ञा झिडकारली. 26 तेव्हा परमेश्वराने आपले हात उंचावून शपथ
घेतली, की या रानात ते त्यांना नष्ट करतील. 27 त्यांच्या वंशजांना
दूरदूरच्या राष्ट्रात पाठवतील, आणि समस्त पृथ्वीवर त्यांना विखरून
टाकतील. 28 त्यांनी बआल-पौराची पूजा-अर्चना केली आणि निर्जीव
दैवताला यज्ञ अर्पिले. 29 या सर्व दुष्टकर्मांनी त्यांनी याहवेहला क्रुद्ध केले,
म्हणून त्यांच्यामध्ये मरी पसरली. 30 तेव्हा फिनहास मध्यस्थ म्हणून
उभा राहिला, आणि मग मरी थांबली. 31 फिनहासाच्या या चांगल्या
कृत्यामुळे त्याची पिढ्यान् पिढ्या सर्वकाळ नीतिमानात गणना होईल.
32 मरीबाह जलाशयाजवळ देखील त्यांनी याहवेहला राग आणला, आणि
त्यांच्यामुळेच मोशेवर संकट आले; 33 परमेश्वराच्या आत्म्याविरुद्ध
त्यांनी बंडखोरी केली, आणि मोशे संतापला व अविचारीपणाने बोलला.
34 याहवेहनी तशी आज्ञा केली असूनही, त्यांनी इतर राष्ट्रातील लोकांचा
नाश केला नाही. 35 उलट ते अन्य राष्ट्रात मिसळले, आणि त्यांच्या प्रथा
आत्मसात केल्या. 36 त्यांनी त्यांच्या मूर्तींची आराधना केली, त्यामुळे ते
पाशात अडकले. 37 त्यांनी आपल्या लहान मुलामुलींनाही त्या खोट्या
दैवतांना अर्पण केले. 38 निष्पाप मुलामुलींचे नरबळी दिले, कनानाच्या
मूर्तींना अर्पणे वाहिली, आणि त्यांचे रक्त सांडून त्यांनी ती भूमी अपवित्र
केली. 39 आपल्याच कर्मानी ते भ्रष्ट झाले; आणि त्यांचे कृत्य व्यभिचारी
ठरले. 40 आणि म्हणून याहवेहचा क्रोध आपल्या लोकांविरुद्ध भडकला
आणि त्यांना त्यांच्या वारसांची घृणा आली. 41 त्यांनी त्यांना परराष्ट्रांच्या
अधीन केले, त्यांचे शत्रू त्यांच्यावर राज्य करू लागले. 42 त्यांच्या शत्रूंनी
त्यांना चिरडले आणि त्यांच्या शक्ती समोर त्यांना समर्पण करावे लागले.
43 बरेचदा परमेश्वराने त्यांना सोडविले, तरी त्यांच्याविरुद्ध ते बंडखोरी
करीत राहिले आणि शेवटी त्यांच्याच पापामुळे ते नाश पावले. 44 असे
असतानाही परमेश्वराने त्यांच्या यातनांची दखल घेतली आणि त्यांचा
आक्रोश ऐकला; 45 त्यांच्याकरिता त्यांनी आपल्या कराराचे स्मरण
केले, आणि त्यांच्या महान प्रीतीमुळे त्यांचे अंतःकरण द्रवले. 46 त्यांना
बंदिवासात नेलेल्या शत्रूंच्या मनात त्यांच्याकरिता कृपा उत्पन्न केली.
47 हे याहवेह, आमच्या परमेश्वरा, आम्हाला मुक्त करा; आम्हाला राष्ट्रांतून
एकवटून घ्या, जेणेकरून आम्ही तुमचे पवित्र नाव धन्यवादित करून,
तुमच्या स्तवनात गौरव मानावे. 48 इस्राएलचे परमेश्वर याहवेहची,
अनादिकालापासून अनंतकालापर्यंत स्तुती होवो. सर्व लोकांनी म्हणावे
“आमेन!” याहवेहची स्तुती होवो.

**107** याहवेहचे उपकारस्मरण करा, कारण ते चांगले आहेत; त्यांची
दया सनातन आहे. 2 याहवेहनी मुक्त केलेल्यांनी त्याचे कथन
करावे— ज्यांची त्यांनी शत्रूपासून सुटका केली आहे, 3 ज्यांना पूर्व
आणि पश्चिम, उत्तर आणि दक्षिण दिशेतून एकत्र गोळा केले आहे. 4
काहीजण उजाड प्रदेशातून भटकत होते, त्यांना स्थावर होण्यासाठी
शहराकडे जाणारा मार्ग सापडत नव्हता. 5 भूक व तहान यांनी ते
व्याकूळ झाले होते, ते दुर्बल होऊ लागले होते. 6 त्यांच्या संकटात
त्यांनी याहवेहकडे आरोळी मारली आणि याहवेहने या दुर्दशेतून त्यांना
मुक्त केले. 7 त्यांनी त्यांना एका अचूक मार्गाने चालविले, आणि वस्ती
करण्यास नगरात आणले. 8 याहवेहच्या या अक्षय प्रीतीबद्दल व त्यांनी
सर्व मनुष्यास्तव केलेल्या अद्भुतकार्याबद्दल ते त्यांचे उपकारस्मरण
करोत. 9 कारण ते तहानेल्यास तृप्त करतात, आणि भुकेल्या जिवास
उत्तम पदार्थांनी संतुष्ट करतात. 10 काही अंधारात आणि गडद अंधकारात
बसले होते, लोखंडी साखळदंडांत यातना सहन करणारे बंदिवान होते,
11 कारण त्यांनी परमेश्वराच्या आदेशाविरुद्ध बंडखोरी केली आणि
परमोच्चाच्या योजनेला तुच्छ मानले. 12 मग त्यांनी त्यांना कठोर
परिश्रम करण्यास भाग पाडले; ते पडले आणि त्यांचे साहाय्य करण्यास
कोणीही नव्हते. 13 त्यांच्या संकटात त्यांनी याहवेहकडे आरोळी मारली
आणि याहवेहने या दुर्दशेतून त्यांना मुक्त केले. 14 त्यांना काळोखातून
आणि गडद अंधकारातून बाहेर आणले, आणि त्यांचे साखळदंड तोडून
टाकले. 15 याहवेहच्या या अक्षय प्रीतीबद्दल व त्यांनी सर्व मनुष्यास्तव
केलेल्या अद्भुतकार्याबद्दल ते त्यांचे उपकारस्मरण करोत. 16 कारण
त्यांनीच त्यांचे कास्याचे दरवाजे मोडले, आणि त्यांच्या लोखंडी सळया
कापून टाकल्या. 17 काही लोकांनी त्यांच्या बंडखोर वृत्तीमुळे मूर्खपणा
केला, आणि त्यांनी केलेल्या पापामुळे ते पीडित झाले. 18 त्यांना सर्व
अन्नाचा तिटकारा वाटू लागला आणि ते मृत्यू दारात पोहोचले होते. 19
त्यांच्या संकटात त्यांनी याहवेहकडे आरोळी मारली आणि याहवेहने या
दुर्दशेतून त्यांना मुक्त केले. 20 ते शब्द मात्र बोलले आणि लोक बरे झाले;
परमेश्वराने त्यांना कबरेतून बाहेर काढले. 21 याहवेहच्या या अक्षय
प्रीतीबद्दल व त्यांनी सर्व मनुष्यास्तव केलेल्या अद्भुतकार्याबद्दल ते त्यांचे
उपकारस्मरण करोत. 22 ते त्याला उपकारस्तुतीचे यज्ञ अर्पोत, आणि
हर्षगीते गाऊन त्यांच्या कृत्यांचे वर्णन करोत. 23 काहीजण सागरात
गलबतांमधून प्रवास करीत; ते महासागरातून येजा करून व्यापार करीत.
24 त्यांनी याहवेहची कृत्ये, समुद्राच्या खोल तळाशी केलेले चमत्कार
पाहिले. 25 ते बोलले व सागरात प्रचंड उत्पात होऊन, त्या वादळाने
लाटा उंचच उंच उसळल्या. 26 त्या वर आकाशापर्यंत जातात, व मग

समुद्रतळापर्यंत खाली येतात; या धोक्यातून जाताना त्यांचा धीर खचतो.
27 ते मद्यप्यांसारखे डुलतात, झोकांड्या खातात; त्यांची मति कुंठित
होते. 28 त्यांच्या संकटात त्यांनी याहवेहकडे आरोळी मारली आणि
याहवेहने या दुर्दशेतून त्यांना मुक्त केले. 29 त्यांनी वादळ असे शांत
केले की ते कुजबुज करू लागले, आणि समुद्राच्या लाटा अगदी स्तब्ध
केल्या. 30 ते शांत वातावरण बघून हे लोक हर्षित झाले, याहवेहनी
त्यांना सुखरुपपणे त्यांच्या इच्छित बंदरात आणले. 31 याहवेहच्या या
अक्षय प्रीतीबद्दल व त्यांनी सर्व मनुष्यांस्तव केलेल्या अद्भुतकार्याबद्दल
ते त्यांचे उपकारस्मरण करोत. 32 लोकांच्या सभेत त्यांनी जाहीरपणे
परमेश्वराचा जयजयकार करावा, आणि पुढाऱ्यांच्या सभेत त्यांची महिमा
गावी. 33 ते नद्या आटवून त्यांचे वाळवंट करतात, आणि झरे आटवून
त्यांची कोरडी भूमी करतात; 34 आणि दुष्टांना त्यांच्या पातकाबद्दल
शासन करण्यासाठी, त्यांच्या चांगल्या भूमीचे ते क्षारभूमीत रूपांतर
करतात. 35 पुन्हा ते वाळवंटांचे जलमय भूमीत, आणि शुष्क भूमीचे
वाहत्या झऱ्यात रूपांतर करतात. 36 तिथे वस्ती करण्यासाठी त्यांनी
भुकेल्यांस आणले, व त्या लोकांनी तिथे वस्ती करून शहरे स्थापित
केली. 37 त्या ठिकाणी त्यांनी शेती केली व आपले द्राक्षमळे लावले,
ज्यांची त्यांना भरघोस पिके मिळाली. 38 त्यांनी त्यांना मोठा आशीर्वाद
दिला, त्यांची संख्या अनेक पटीने वाढली, तिथे त्यांच्या गुरांचीही हानी
होऊ दिली नाही. 39 परंतु मग त्यांची संख्या घटली, जुलूम, संकट
आणि दुःख यामुळे ते लीन झाले. 40 ते त्यांच्या सरदारांवर निंदा-
वृष्टी करतात, त्यांना बिनवाटेच्या टाकाऊ प्रदेशातून भटकवितात. 41
परंतु गरजवंतांची ते पीडेतून सुटका करतात, आणि त्यांच्या कुटुंबाची
कळपासारखी भरभराट करतात. 42 नीतिमान माणसे हे पाहून आनंदित
होतील, परंतु दुष्ट माणसांची तोंडे बंद होतील. 43 ज्ञानी जणांनी या सर्व
गोष्टींकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावे आणि याहवेहच्या प्रेममय कृत्यांचे
चिंतन करावे.

**108** एक गीत. दावीदाचे एक स्तोत्र. हे परमेश्वरा, माझे अंतःकरण
खंबीर आहे; मी पूर्ण अंतःकरणाने गायन आणि वादन करेन.
2 अगे सारंगी आणि वीणे, जागृत व्हा! मी प्रातःकाळाला जागृत करेन. 3
हे याहवेह, प्रत्येक राष्ट्रात मी तुमची स्तुती करेन, मी सर्व लोकात तुमची
स्तुतिस्तोत्रे गाईन. 4 कारण तुमचे वात्सल्य महान, गगनमंडळाहून उंच
आहे; तुमचे विश्वासूपण आकाशाला जाऊन पोहोचते. 5 हे परमेश्वरा,
तुम्ही गगनमंडळाहून उदात्त केले जावोत; तुमचे गौरव सर्व पृथ्वी व्यापून
टाको. 6 आम्हाला वाचवा आणि तुमच्या उजव्या हाताने मदत करा,
म्हणजे तुम्ही ज्यांच्यावर प्रीती करता त्यांचे तारण होईल. 7 परमेश्वराने
त्यांच्या पवित्रस्थानी घोषणा केली: “मी विजयाने शेखेमचे विभाजन
करेन, आणि सुक्कोथाचे खोरे मोजून त्याचे इतरांना वाटप करेन. 8
गिलआद माझा आहे. मनश्शेह माझा आहे; एफ्राईम माझे शिरस्त्राण
आहे, यहूदाह माझा राजदंड आहे. 9 मोआब माझे हात धुण्याचे पात्र,
आणि एदोमावर मी माझी पादत्राणे फेकेन; पलेशेथावर मी विजयाचा
जयघोष करेन.” 10 मला तटबंदीच्या नगरात कोण आणेल? मला एदोम
प्रांतात कोण नेईल? 11 परमेश्वरा, तुम्हीच आम्हाला नाकारले आहे ना,
आणि आता तुम्ही आमच्या सैन्याबरोबरही जात नाही? 12 शत्रूविरुद्ध
तुम्ही आमचा पुरवठा करा, कारण मानवाचे साहाय्य व्यर्थ आहे. 13
परमेश्वराच्या साहाय्याने आमचा विजय सुनिश्चित आहे, आणि तेच
आमच्या शत्रूंना पायदळी तुडवतील.

**109** संगीत दिग्दर्शकाकरिता. दावीदाची रचना. एक स्तोत्र. हे
माझ्या स्तुतिपात्र परमेश्वरा, तुम्ही मौन धारण करू नका, 2
कारण दुष्ट आणि कपटी लोकांनी माझ्याविरुद्ध त्यांचे मुख उघडले
आहे; ते माझ्याविरुद्ध असत्य गोष्टी बोलले आहेत. 3 त्यांनी द्वेषपूर्ण
शब्दांचा माझ्यावर वर्षाव केला; विनाकारण ते माझ्यावर हल्ला करतात.
4 माझ्या मैत्रीच्या बदल्यात ते माझ्यावर आरोप करतात, परंतु मी
निरंतर प्रार्थना करणारा मनुष्य आहे. 5 ते बऱ्याची फेड वाईटाने करतात
आणि प्रीतीच्या मोबदल्यात द्वेष करतात. 6 त्यांच्यावर अन्यायी मनुष्य
अधिकारी म्हणून नियुक्त करा; आरोप लावणारा त्याच्या उजव्या हातास
उभा ठेवा. 7 त्याचे प्रकरण निकालासाठी येताच तो दोषी ठरविल्या
जावो, त्याचीच प्रार्थना त्यास दंडाज्ञा देवो. 8 त्याच्या आयुष्याची वर्षे
अल्पकालीन होवोत; त्याचा अधिकार घेण्यासाठी इतर येवोत. 9 त्याची
मुले पितृहीन होवोत, आणि त्याची पत्नी विधवा होवो; 10 त्याची मुले
भीक मागत भटकोत, त्यांच्या उद्ध्वस्त झालेल्या घरातून ते बाहेर
हाकलण्यात येवो. 11 त्याची सर्व मालमत्ता सावकार हिरावून घेवो;
आणि त्याने कष्टाने मिळविलेले सर्वकाही परके लुटोत. 12 त्याच्यावर
दया करणारा कोणीही नसो; त्याच्या पितृहीन मुलांची कीव करणारा
कोणीही नसो, 13 त्याची सर्व पितृहीन मुले मरोत; एकाच पिढीमध्ये
त्याच्या वंशाचे नाव पुसून टाकले जावो. 14 त्याच्या आईवडिलांच्या
अपराधांबद्दल याहवेह त्याला शासन करो; त्याच्या मातेची पातके
कधीही पुसली न जावो. 15 त्याने केलेल्या दुष्ट कृत्यांची याहवेह सतत
आठवण ठेवो, व पृथ्वीवरून त्याचे नाव ते कायमचे पुसून टाकोत. 16
कारण त्याने इतरांना दया दाखविली नाही, उलट गरजवंतांचा त्याने
छळ केला आणि दुःखीकष्टी लोकांचा त्यांना मृत्यू येईपर्यंत पाठलाग
केला. 17 इतरांना शाप देणे त्याला आवडत असे— म्हणून त्याचे शाप
त्याच्यावरच उलटू द्या. इतरांचे हितचिंतन करण्यात त्याला आनंद वाटत
नसे— म्हणून त्याचेही हित न होवो. 18 त्याने शापाला आपली वस्त्रे
म्हणून पांघरली; ते त्याच्या शरीरात पाण्यासारखे, व त्याच्या हाडात
तेलासारखे शिरले. 19 आता त्याचे ते शाप त्याला वस्त्रांप्रमाणे पांघरूण
टाकोत, एखाद्या कटिबंधासमान ते त्याला जखडून टाकोत. 20 जे माझे
शत्रू माझ्याविषयी खोट्या गोष्टी उठवितात, त्यांना माझे याहवेह परमेश्वर
हाच मोबदला देवो. 21 तरी हे सार्वभौम याहवेह, तुमच्या नावासाठी
माझ्यावर कृपा करा; आपल्या करुणामय प्रीती अनुरूप माझी सुटका
करा. 22 कारण मी दीन आणि दरिद्री आहे, माझे अंतःकरण घायाळ
झाले आहे. 23 संध्याछायेसारखा मी समाप्त होत आहे; टोळा सारखा
मी झटकून टाकला जात आहे. 24 उपासाने माझे गुडघे शक्तिहीन
झाले आहेत; मी कातडी आणि हाडे यांचा सापळा झालो आहे. 25

विरोधकांसाठी मी अपयशाचे प्रतीक झालो आहे; मला पाहून ते डोकी हलवितात. 26 हे याहवेह माझ्या परमेश्वरा, तुमच्या अक्षय प्रीतिनुरुप माझे तारण करा. 27 हे याहवेह, सर्वांना कळावे की जे काही होत आहे, ते सर्वकाही तुमच्याच हातांनी केले आहे. 28 त्या सर्वांनी शाप दिले तरी तुम्ही मला आशीर्वादित करा; जे माझ्यावर हल्ला करतात, ते लज्जित होवोत, पण मी, तुमचा सेवक मात्र हर्षभरित होवो. 29 माझे विरोधक एखाद्या वस्त्राप्रमाणे अनादर धारण करोत, आणि लज्जेने ते स्वतःस पांघरूण घेवोत. 30 परंतु माझ्या मुखाने मी याहवेहचा सन्मान करेन, उपासकांच्या विशाल समुदायासमोर त्यांचे स्तवन करेन. 31 कारण ते सदैव गरजवंताच्या उजव्या बाजूस उभे असतात, त्यांना मृत्युदंड देणाऱ्यापासून ते त्यांना संरक्षण देतात.

**110** दावीदाची रचना. एक स्तोत्र. याहवेह माझ्या प्रभूला म्हणाले: “मी तुझ्या शत्रूंना तुझ्या पायाखाली ठेवीपर्यंत, तू माझ्या उजव्या हाताला बसून राहा.” 2 याहवेहच सीयोनातून तुझ्या सामर्थ्यवान राजदंडाचा विस्तार करतील व म्हणतील, “तू तुझ्या शत्रूंवर सत्ता गाजव!” 3 तुझी सेना युद्ध समयी स्वेच्छेने तुला साथ देईल. प्रातःकाळाच्या गर्भातून जन्मलेल्या दवाप्रमाणे पवित्रतेने सुशोभित होऊन तुझे तरुण तुझ्याकडे येतील. 4 याहवेहने जी शपथ घेतली आहे आणि ते त्यांचे मन कदापि बदलणार नाहीत: “मलकीसदेकाच्या संप्रदायाप्रमाणे तू सदासर्वकाळचा याजक आहेस.” 5 तुझ्या उजव्या हाताशी प्रभूचे सानिध्य आहे; आपल्या क्रोधाच्या दिवशी ते अनेक राजांना तुडवतील. 6 ते राष्ट्रांवर आपला यथार्थ निकाल घोषित करतील, मृतदेहांचा ढीग लागेल आणि ते संपूर्ण पृथ्वीच्या शासकांना चिरडून टाकतील. 7 तेव्हा प्रभू वाटेवरील ओहोळातील पाणी पितील, आणि आपले मस्तक उंचावतील.

**111** याहवेहचे स्तवन होवो. जिथे नीतिमान एकत्र येऊन सभा आयोजित करतात, तिथे मी संपूर्ण अंतःकरणापासून याहवेहचे स्तवन करेन. 2 याहवेहचे कार्य किती उदात्त आहेत, ते त्या अतिमहान कृत्यांचे मनन करतील. 3 गौरवशाली व वैभवशाली आहेत याहवेहची कृत्ये, आणि त्यांची नीतिमत्ता सर्वकाळ टिकते. 4 याहवेहनी आपल्या या कृत्यांना अविस्मरणीय केले आहे; ते कृपाळू व दयाळू आहेत. 5 जे त्यांचे भय धरतात त्यांना ते अन्नाचा पुरवठा करतात; ते आपला करार नेहमी स्मरणात ठेवतात. 6 त्यांच्या कृत्यांचे सामर्थ्य त्यांच्या लोकांना प्रकट होण्यास, त्यांनी अन्य राष्ट्रांची भूमी त्यांना वतनादाखल दिली. 7 त्यांच्या हाताने केलेली सर्व कृत्ये न्याय्य आणि विश्वसनीय असतात; त्यांचे सर्व नियम विश्वासयोग्य असतात. 8 ते नियम सदासर्वकाळ अटळ आहेत, सत्य आणि सात्विकतेला अनुसरून तयार केलेले आहेत. 9 त्यांनी आपल्या लोकांना मुक्तता दिली आहे; त्यांनी आपला करार अनंतकाळासाठी स्थापित केला आहे— त्यांचे नाव पवित्र व भयावह आहे. 10 याहवेहचे भय सुज्ञानाचा प्रारंभ होय; त्यांच्या नियमाचे पालन करणाऱ्यांना उत्तम आकलन शक्ती प्राप्त होते. याहवेहची सदासर्वकाळ स्तुती होवो.

**112** याहवेहचे स्तवन करा. याहवेहचे भय बाळगणारे, आणि त्यांच्या आज्ञापालनामध्ये आनंद मानणारे आशीर्वादित आहेत. 2 त्यांची संतती पृथ्वीवर अतिथोर होईल; नीतिमानाची पिढी आशीर्वादित होईल. 3 संपत्ती व समृद्धी त्यांच्या घरात वास करतील, आणि त्यांची धार्मिकता चिरकाल टिकून राहील. 4 सात्विकासाठी अंधकारातही प्रकाश उदय पावतो; ते कृपावान, दयाळू व नीतिमान असतात. 5 ज्यांचे अंतःकरण उदार असून ते मुक्तपणे उसने देतात त्यांचे भले होते, जे आपला व्यवहार न्यायाने करतात. 6 निश्चितच, नीतिमान कधीही पथभ्रष्ट होणार नाही; त्यांना सर्वकाळ स्मरणात ठेवले जाईल. 7 वाईट बातमी त्यांना भयभीत करणार नाही; याहवेहवर पूर्ण भरवसा असल्याने त्यांचे मन स्थिर असते. 8 यामुळेच त्यांचे अंतःकरण सुरक्षित असते, ते भयग्रस्त होत नाहीत; शेवटी तेच आपल्या शत्रूंवर विजयान्वित दृष्टी टाकतील. 9 गरजवंतांना ते उदारहस्ते दानधर्म करतात, त्यांची नीतिमत्ता चिरकाळ टिकते; गौरवाने त्यांचे शिंग उंचावले जाईल. 10 दुष्ट मनाची माणसे हे सर्व पाहून क्रुद्ध होतील; ती संतापाने दातओठ खातील व दुर्बल होतील, आणि त्यांच्या सर्व अभिलाषा नष्ट होतील.

**113** याहवेहचे स्तवन करा. हे याहवेहच्या सेवकांनो, याहवेहचे स्तवन करा; याहवेहच्या नावाची स्तुती करा. 2 याहवेहच्या नामाचे स्तवन होत राहो, आता आणि सदासर्वकाळ. 3 सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत, याहवेहच्या नामाचे स्तवन होवो. 4 याहवेह सर्व राष्ट्रांहून उच्च आहेत; त्यांचे गौरव गगनमंडळाहून उंच आहे. 5 आमचे परमेश्वर याहवेह, यांच्या समान कोण आहे, जे सर्वोच्च स्थानी सिंहासनावर विराजमान असतात, 6 जे वरून ओणवून, गगनमंडळ आणि पृथ्वीचे अवलोकन करतात? 7 ते दीनांस धुळीतून वर काढतात, आणि गरजवंतास राखेच्या ढिगाऱ्यातून वर उचलून घेतात; 8 ते त्यांना राजपुत्रांबरोबर, आपल्या प्रजेच्या प्रधानांसह बसवितात. 9 ते निपुत्रिक गृहिणीला तिच्या घरात स्थिरावतात, आणि तिला मुले देऊन आनंदी माता बनवितात. याहवेहचे स्तवन करा.

**114** जेव्हा इस्राएल इजिप्तमधून, परकीय भाषेच्या लोकातून याकोब बाहेर पडला, 2 यहूदाह परमेश्वराचे पवित्रस्थान, आणि इस्राएल त्यांचे सार्वभौमत्व झाले. 3 तांबड्या समुद्राने हे पाहून पळ काढला, आणि यार्देन नदी माघारी गेली; 4 पर्वतांनी मेंढ्यांप्रमाणे आणि टेकड्यांनी कोकरांसारख्या उड्या मारल्या. 5 हे समुद्रा, तू पलायन का केले? अगे यार्देने, तू मागे का फिरलीस? 6 पर्वतांनो, तुम्ही मेंढ्यांप्रमाणे, टेकड्यांनो, तुम्ही कोकरांसारखे का बागडलात? 7 अगे पृथ्वी, तू परमेश्वराच्या समक्षतेत, याकोबाच्या देवासमोर, थरथर काप. 8 कारण त्यांनीच खडकाचे झऱ्यात रूपांतर केले, अत्यंत कणखर खडकास जलाचे स्त्रोत बनविले.

**115** आमचे नको, हे याहवेह, आमचे नको, तुमची प्रेमदया आणि
तुमच्या विश्वसनीयते निमित्त, तुमचेच नाव गौरवित होवो. 2
इतर राष्ट्र असे का म्हणतात, “यांचा परमेश्वर कुठे आहे?” 3 आमचे
परमेश्वर तर स्वर्गात आहेत; त्यांना जे योग्य वाटते, तेच ते करतात. 4
पण त्या तर मानवी हातांनी बनविलेल्या चांदीच्या व सोन्याच्या मूर्ती
आहेत. 5 त्यांना तोंडे आहेत, पण बोलता येत नाही, त्यांना डोळे
आहेत, पण ते बघू शकत नाहीत. 6 त्यांना कान आहेत, पण ऐकू
येत नाही, नाक असून वासही येत नाही. 7 त्यांना हात असून स्पर्श
करता येत नाही, पाय आहेत पण चालता येत नाही; त्यांच्या कंठातून
कुठलाही ध्वनी बाहेर पडत नाही. 8 मूर्ती घडविणारे त्यांच्यासारखेच
होतील, आणि त्यांच्यावर भरवसा ठेवणारेही तसेच होतील. 9 हे समस्त
इस्राएला, याहवेहवर भरवसा ठेव— तेच त्यांचा साहाय्यकर्ता आणि
ढाल आहेत. 10 अहो अहरोनाच्या वंशजांनो, याहवेहवर भरवसा ठेवा—
तेच त्यांचा साहाय्यकर्ता आणि ढाल आहेत. 11 अहो देवाचे भय
मानणारे लोकहो, याहवेहवर भरवसा ठेवा— तेच त्यांचा साहाय्यकर्ता
आणि ढाल आहेत. 12 याहवेह आमची आठवण ठेवतात, ते आम्हाला
आशीर्वाद देतील: ते इस्राएली लोकांना आशीर्वाद देतील, ते अहरोनाच्या
वंशजांना आशीर्वाद देतील, 13 आणि जे याहवेहचे भय बाळगतात त्यांना
आशीर्वाद देतील— सर्व लहानथोरांना एकसमान. 14 याहवेह तुम्हाला
समृद्ध करो, तुम्हाला आणि तुमच्या मुलाबाळांनाही. 15 याहवेह, ज्यांनी
आकाश व पृथ्वी निर्माण केली तेच, तुम्हाला आशीर्वादित करोत. 16
सर्वोच्च स्वर्ग याहवेहचा आहे, परंतु त्यांनी पृथ्वी मानवजातीला दिलेली
आहे. 17 मृतक व चिरनिद्रा घेणारे, याहवेहची स्तुतिस्तोत्रे गात नसतात.
18 परंतु आम्हीच याहवेहची स्तोत्रे गातो, आता आणि सदासर्वकाळ.
याहवेहचे स्तवन करा.

**116** मी याहवेहवर प्रीती करतो, कारण त्यांनी माझी वाणी ऐकली;
माझी दयेची विनवणी ऐकली. 2 कारण त्यांनी आपला कान
माझ्या हाकेकडे लावला, म्हणून आजीवन मी त्यांचा धावा करीत राहीन.
3 मृत्यूच्या बंधनांनी मला वेष्टिले होते; कबरेच्या भयाने मला ग्रासले,
दुःख व क्लेशांनी माझ्यावर मात केली होती. (Sheol h7585) 4 तेव्हा
मी याहवेहचा धावा करून म्हणालो: “हे याहवेह, मला वाचवा!” 5
याहवेह कृपाळू आणि नीतिमान आहेत; आपले परमेश्वर करुणामय
आहेत. 6 याहवेह साध्याभोळ्या लोकांचे रक्षण करतात; मी गर्तेत
ओढला गेलो असताना, त्यांनी मला वाचविले. 7 हे माझ्या जिवा, पुन्हा
एकदा शांतचित्त हो, कारण याहवेहने तुझे भले केले आहे. 8 कारण हे
याहवेह, तुम्ही मला मृत्यूपासून सोडविले, माझे डोळे अश्रूंपासून आणि
माझे पाय अडखळण्यापासून रक्षिले आहेत. 9 जेणेकरून मी जिवंत
लोकांमध्ये राहून, याहवेहच्या समक्षतेत चालू शकेन. 10 जेव्हा मी
याहवेहवर विश्वास ठेवला तेव्हा मी बोललो, “मी फार पीडित आहे;” 11
घोर निराशेच्या भरात मी म्हणालो, “प्रत्येक मनुष्य लबाड आहे.” 12
परंतु याहवेहचे माझ्यावरील सर्व उपकार, मी कसे फेडणार? 13 मी
तारणाचा प्याला उंच करून, याहवेहच्या नावाचा धावा करेन. 14 मी
याहवेहस केलेले नवस त्यांच्या सर्व लोकांसमक्ष जाहीर रीतीने फेडीन.
15 याहवेहच्या दृष्टीने, त्यांच्या निष्ठावानांचा मृत्यू अतिशय मोलवान
आहे. 16 हे याहवेह, मी निश्चितच तुमचा सेवक आहे; माझ्या मातेसमान
मी देखील तुमची सेवा करेन; मला तुम्ही बंधन मुक्त केले आहे. 17 मी
तुम्हाला उपकारस्तुतीचे अर्पण करेन, आणि याहवेहच्या नामाचा धावा
करेन. 18 मी याहवेहस केलेले नवस त्यांच्या सर्व लोकांसमक्ष जाहीर
रीतीने फेडीन. 19 यरुशलेमात, तुमच्यासमक्ष याहवेहच्या या मंदिराच्या
अंगणात ते पूर्ण करेन. याहवेहचे स्तवन करा.

**117** अहो सर्व राष्ट्रांनो, याहवेहची स्तुती करा; अहो सर्व लोकांनो,
त्यांचे गौरव करा. 2 कारण ते आमच्यावर परम प्रीती करतात;
आणि याहवेहची विश्वसनीयता सर्वकाळ टिकते. याहवेहचे स्तवन करा.

**118** याहवेहचे उपकारस्मरण करा, कारण ते फार चांगले आहेत;
त्यांची प्रीती अनंतकाळची आहे. 2 इस्राएलने म्हणावे: “त्यांची
प्रीती अनंतकाळची आहे.” 3 अहरोनाच्या वंशजांनी म्हणावे: “त्यांची
प्रीती अनंतकाळची आहे.” 4 याहवेहचे भय धरणारे म्हणोत, “त्यांची
प्रीती अनंतकाळची आहे.” 5 संकटात असताना मी याहवेहचा धावा
केला; ते मला एका विशाल स्थळी घेऊन आले. 6 याहवेह माझ्यासोबत
आहेत, मला कशाचेही भय वाटणार नाही; नश्वर मानव मला काय
करणार? 7 याहवेह माझ्यासोबत आहेत; ते माझे सहायक आहेत. मी
माझ्या शत्रूकडे विजयान्वित दृष्टीने बघेन. 8 नश्वर मानवावर भरवसा
ठेवण्यापेक्षा, याहवेहचा आश्रय घेणे उत्तम आहे. 9 अधिपतींवर भरवसा
ठेवण्यापेक्षा, याहवेहचा आश्रय घेणे उत्तम आहे. 10 सर्व राष्ट्रांनी मला
वेढा घातला, परंतु याहवेहच्या नावाने मी त्यांचा नाश केला. 11 त्यांनी
सर्व बाजूने मला वेढा घातला, परंतु याहवेहच्या नावाने मी त्यांचा
नायनाट केला. 12 मधमाश्यांप्रमाणे ते माझ्याभोवती घोंगावत होते, पण
जळत्या काटेरी झुडूपांसारखे ते लगेच जळून खाक झाले; याहवेहच्या
नावाने मी त्यांचा नाश केला. 13 त्यांनी मला असे ढकलले की मी मागे
पडलो असतो, परंतु याहवेहने मला साहाय्य केले. 14 याहवेह माझे
सामर्थ्य आणि माझे संरक्षण आहेत; तेच माझे तारण झाले आहेत. 15
नीतिमान लोकांच्या घरातून आनंदाच्या व विजयाच्या गीतांचे प्रतिध्वनी
ऐकू येत आहेत: “याहवेहच्या उजव्या भुजाने सामर्थ्यवान कृत्ये केली
आहेत! 16 याहवेहचा उजवा हात उंचावलेला आहे; याहवेहच्या उजव्या
भुजेने सामर्थ्यवान कृत्ये केली आहेत!” 17 मी मरणार नाही तर जगेन,
आणि याहवेहची कृत्ये विदित करेन. 18 याहवेहने मला कठोर शिक्षा
केली, परंतु त्यांनी मला मृत्यूच्या हवाली केले नाही. 19 माझ्यासाठी
नीतिमत्वाची दारे उघडू द्या; मी आत प्रवेश करून याहवेहचे उपकारस्मरण
करेन. 20 याहवेहची दारे हीच आहेत; याच दारातून नीतिमान प्रवेश
करतात. 21 मी तुम्हाला धन्यवाद देईन, कारण तुम्ही माझ्या प्रार्थनेचे
उत्तर दिले; तुम्ही माझे तारण झाला आहात. 22 जो दगड बांधणाऱ्यांनी
नापसंत केला, तोच आता कोनशिला झाला आहे; 23 ही याहवेहची
करणी आहे, आणि आमच्या दृष्टीने ती अद्भुत आहे. 24 याहवेहने आज

हे केले आहे; आजच आपण आनंद व उल्लास करू. 25 याहवेह, आमचे
तारण करा! याहवेह, आम्हाला यशस्वी करा! 26 याहवेहच्या नावाने
येणारे धन्यवादित असो. आम्ही याहवेहच्या मंदिरातून तुम्हाला आशीर्वाद
देतो. 27 याहवेहच परमेश्वर आहेत; त्यांनी त्यांचा प्रकाश आमच्यावर
टाकला आहे. डहाळ्या हातात घेऊन वेदीच्या शिंगापर्यंत जाण्यासाठी
मिरवणुकीत सामील व्हा. 28 तुम्हीच माझे परमेश्वर आहात आणि मी
तुमचे स्तवन करेन; तुम्हीच माझे परमेश्वर आहात, मी तुमचे स्तुतिगान
करेन. 29 याहवेहचे उपकारस्मरण करा, कारण ते फार चांगले आहेत;
त्यांची प्रीती अनंतकाळची आहे.

**119** ज्यांचे मार्ग निष्कलंक असतात, जे याहवेहच्या नियमानुसार
आचरण करतात, ते सर्वजण धन्य होत. 2 जे मन:पूर्वक त्यांचा
शोध घेतात— आणि याहवेहचे अधिनियम पाळतात, ते सर्वजण धन्य
होत. 3 ते अनीती न करता त्यांच्या मार्गाने चालतात. 4 तुमचे नियम
पूर्णपणे पाळले जावेत, म्हणूनच ते तुम्ही योजलेले आहेत. 5 अहा,
तुमचे नियम पाळण्यास माझे आचरण नेहमी स्थिर असते तर किती
बरे झाले असते! 6 मी तुमचे नियम पाळले, तर माझी फजिती होणार
नाही. 7 जेव्हा मी तुमच्या सर्व धार्मिक नियमांचे पालन करेन, तेव्हा
सात्विक हृदयाने तुमचे उपकारस्मरण करेन. 8 मी तुमच्या विधींचे पालन
करेन; माझा पूर्णपणे त्याग करू नका. 9 तरुण मनुष्य शुद्ध मार्गावर
कसा चालत राहील? ते तुमच्या वचनानुसार आचरण करूनच. 10
तुम्हाला शोधण्याचा मी पूर्ण हृदयाने प्रयत्न केला आहे; त्या आज्ञेपासून
मला बहकून जाऊ देऊ नका. 11 मी तुमची वचने माझ्या हृदयात जपून
ठेवली आहेत, जेणेकरून मी तुमच्याविरुद्ध पाप करू नये. 12 हे याहवेह,
तुमचे स्तवन होवो; तुमचे विधी मला शिकवा. 13 तुमच्या मुखातून
निघालेले सर्व नियम आपल्या ओठांनी मी त्या सर्वांची पुनरुक्ती करतो.
14 तुमच्या नियमांचे पालन करण्यात मला असा अत्यानंद होतो, जसा
अमाप धनसंपत्ती मिळाल्यावर होतो. 15 मी तुमच्या नीति-सिद्धांताचे
मनन करतो, आणि तुमच्या मार्गाचा आदर करतो. 16 मी तुमच्या
नियमांनी हर्षित होतो; मी तुमच्या वचनांची उपेक्षा करणार नाही. 17 मी
जिवंत असेपर्यंत मला विपुल आशीर्वादित करा, म्हणजे मी तुमच्या
वचनाचे पालन करीत राहीन. 18 तुमच्या नियमशास्त्रातील अद्भुत रम्य
गोष्टी पाहण्यासाठी माझे डोळे उघडा. 19 या पृथ्वीवर मी केवळ एक
प्रवासी आहे; तुमच्या आज्ञा माझ्यापासून लपवून ठेऊ नका. 20 तुमच्या
नियमांची सतत लागलेली उत्कंठा मला कासावीस करते. 21 तुमच्या
आज्ञांपासून पथभ्रष्ट झालेल्या शापित आणि गर्विष्ठ लोकांना तुम्ही
धमकाविता. 22 त्यांनी केलेला उपहास व तिरस्कारास माझ्यापासून दूर
करा, कारण मी तुमच्या आज्ञा पाळतो. 23 अधिपती जरी एकत्र बसतात
व माझ्याविरुद्ध बोलतात, तरी तुमचा सेवक तुमच्या विधींचे मनन करेल.
24 तुमचे नियम मला आनंददायी वाटतात; तेच माझे सल्लागार आहेत.
25 मी पूर्णपणे निरुत्साही होऊन धुळीत पडून आहे; तुम्ही आपल्या
वचनानुसार माझ्या जीवनाचे जतन करा. 26 मी माझ्या मार्गाचे वर्णन
केले आणि तुम्ही मला उत्तर दिले; तुमचे नियम मला शिकवा. 27 तुमच्या
शिक्षणाची पद्धत मला समजू द्या, म्हणजे मी तुमच्या अद्भुत कृत्यांचे
मनन करेन. 28 दु:खाने मी हतबल झालो आहे; तुमच्या वचनांद्वारे मला
सशक्त करा. 29 असत्य मार्गापासून मला दूर ठेवा; तुमच्या कृपेनुसार
आपल्या विधिनियमांचे मला शिक्षण द्या. 30 विश्वसनीय मार्गाची मी
निवड केली आहे; तुमच्या नियमांवर मी आपले हृदय केंद्रित केले आहे.
31 याहवेह, मी तुमच्या आज्ञांना चिकटून राहतो, मला लज्जित होऊ देऊ
नका. 32 मी तुम्ही आज्ञापिलेल्या मार्गावर धावत आहे, कारण तुम्ही
माझी समज विस्तृत केली आहे. 33 हे याहवेह, तुमच्या विधींचे मला
शिक्षण द्या, जेणेकरून शेवटपर्यंत मी त्याचे पालन करावे. 34 मला
सुबुद्धी द्या, म्हणजे मी तुमचे नियम समजून त्यांचे पूर्ण हृदयाने पालन
करत राहीन. 35 तुमच्या मार्गावर चालण्यास माझे मार्गदर्शन करा,
कारण तेच मला आनंद देतात. 36 मी तुमच्या आज्ञापालनाची आवड
धरावी, परंतु स्वार्थाच्या लाभाची नव्हे. 37 निरर्थक गोष्टी पाहण्यापासून
माझी दृष्टी फिरवा; तुमच्या मार्गानुसार माझ्या जीवनाचे जतन करा.
38 तुमच्या सेवकाला दिलेली अभिवचने पूर्ण करा, म्हणजे तुमचे भय
कायम राहील. 39 लज्जेची भीती माझ्यापासून दूर करा, कारण तुमच्या
आज्ञा उत्तम आहेत. 40 तुमच्या आज्ञापालनास मी किती उत्कंठित आहे!
तुमच्या नीतिमत्तेनुसार माझ्या जीवनाचे जतन करा. 41 हे याहवेह, तुमची
अक्षय प्रीती मला प्रगट होऊन तुमच्या अभिवचनानुसार मला तारण
प्राप्त होवो; 42 मग मला टोचून बोलणाऱ्यांना मी उत्तर देईन, कारण
तुमच्या अभिवचनांवर मी विश्वास ठेवतो. 43 तुमचे सत्यवचन माझ्या
मुखातून कधीही काढून घेऊ नका, कारण तुमच्या अधिनियमावर मी
आशा ठेवली आहे. 44 मी सदासर्वकाळ, तुमच्या नियमांचे सतत पालन
करेन. 45 मी स्वातंत्र्याचे जीवन व्यतीत करतो, कारण मी तुमचे नियम
आत्मसात केले आहेत. 46 तुमचे नियम मी राजांसमोर विदित करेन
आणि मी लज्जित केला जाणार नाही. 47 तुमच्या नियमात माझा आनंद
आहे, कारण ते मला प्रिय आहेत. 48 मला प्रिय असलेल्या तुमच्या
आज्ञांकडे मी माझे हात पुढे करेन, जेणेकरून मी तुमच्या नियमांचे मनन
करू शकेन. 49 तुमच्या सेवकाला दिलेल्या अभिवचनाचे स्मरण करा,
कारण तुम्हीच मला आशा दिली आहे; 50 माझ्या संकटात माझे सांत्वन
हे आहे: तुमचे अभिवचन माझ्या जीवनाचे जतन करते. 51 गर्विष्ठ लोक
निर्दयपणे माझा उपहास करतात, तरी मी तुमच्या नियमशास्त्रापासून
ढळत नाही. 52 याहवेह, तुमच्या प्राचीन आज्ञांचे मी स्मरण करतो, व
त्यापासून माझे सांत्वन होते. 53 संताप मला व्यापून टाकतो, कारण
त्या दुष्टांनी तुमच्या आज्ञा धिक्कारल्या आहेत. 54 मी कुठेही राहिलो
तरी, तुमचे नियम माझ्या गीतांचे विषय झाले आहेत. 55 हे याहवेह, मी
रात्रीही तुमचे नामस्मरण करतो, जेणेकरून तुमच्या आज्ञा मी सतत
पाळीन. 56 तुमच्या आज्ञांचे पालन करणे: माझा परिपाठ झाला आहे.
57 याहवेह, तुम्ही माझा वाटा आहात; तुमचे नियम पालन करण्याचे
मी वचन दिले आहे. 58 पूर्ण हृदयाने मी तुमचे मुख पाहण्याचा प्रयास
करतो; आपल्या अभिवचनाप्रमाणे तुम्ही माझ्यावर कृपा करा. 59
माझ्या मार्गासंबंधी मी विचार केला, आणि तुमच्या नियमाचे पालन

करण्याकडे माझी पावले वळविली आहेत. 60 मी त्वरा करेन, आणि तुमच्या आदेशांचे अविलंब पालन करेन. 61 दुष्टांनी मला दोरखंडाने बांधले तरीही, मी तुमचे नियम विसरणार नाही. 62 मी मध्यरात्रीही उठून तुमच्या नीतियुक्त नियमांबद्दल तुमची उपकारस्तुती करेन. 63 माझी मैत्री त्या सर्वांशी आहे, जे तुमचे भय धरतात व तुमचे आज्ञापालन करतात. 64 हे याहवेह, तुमच्या वात्सल्याने पृथ्वी भरली आहे; तुमचे नियम मला शिकवा. 65 हे याहवेह, तुम्ही वचन दिल्याप्रमाणे, तुमच्या सेवकाचे कल्याण करा. 66 तुम्ही मला ज्ञान व विवेक शिकवा, कारण तुमच्या आज्ञांवर माझा पूर्ण विश्वास आहे. 67 पीडित होण्याआधी मी पथभ्रष्ट झालो होतो, पण आता तुमचे वचन मी पाळतो. 68 तुम्ही चांगले आहात आणि जे तुम्ही करता तेही भलेच असते; मला तुमचे विधिशिक्षण द्या. 69 गर्विष्ठ लोकांनी माझ्याविरुद्ध कुभांडे रचली आहेत, परंतु तुमचे नियम मी संपूर्ण अंतःकरणाने पाळतो. 70 त्यांची अंतःकरणे कठोर व संवेदनाहीन झाली आहेत, परंतु तुमच्या नियमशास्त्राने मी सुखावतो. 71 मला मिळालेली पीडा माझ्या हिताची होती, जेणेकरून मी तुमचे नियम शिकावे; 72 तुमच्या मुखातून निघालेले नियम, चांदी आणि सोने यांच्या हजारो नाण्यांपेक्षाही अधिक मोलाचे आहेत. 73 तुमच्या हातांनी मला घडविले आणि आकार दिला; आता तुमचे नियम समजण्यास मला सुबुद्धी द्या. 74 जे तुमचे भय धरतात ते सर्वजण मला बघून उल्हासित होवोत, कारण मी तुमच्या वचनावर आशा ठेवली आहे. 75 हे याहवेह, तुमचे निर्णय अगदी न्याय्य आहेत, हे मला माहीत आहे; सत्यतेने तुम्ही मला शिक्षा दिली; 76 तुमच्या अभिवचनानुसार तुमची अक्षय प्रीती माझे सांत्वन करो; 77 मी जगावे म्हणून तुमची दया मला प्राप्त होवो कारण तुमचे नियम माझा आनंद आहेत. 78 गर्विष्ठ लोकांची अप्रतिष्ठा होवो, विनाकारण त्यांनी मजवर अन्याय केला आहे, परंतु मी तुमच्या नियमांचे मनन करेन. 79 तुमचे भय धरणारे व तुमचे नियम समजणारे, ते सर्वजण माझ्याकडे वळोत. 80 मी निर्दोष अंतःकरणाने तुमच्या विधींचे पालन करेन, म्हणजे मी कधीच लज्जित होणार नाही. 81 तुम्ही केलेल्या तारणप्राप्तीसाठी माझा जीव उत्कंठित झाला आहे, पण तुमच्या वचनावर मी आशा ठेवतो. 82 तुमच्या अभिवचनपूर्तीची वाट पाहून माझे डोळे शिणले आहेत; मी म्हणतो, “तुम्ही माझे सांत्वन केव्हा करणार?” 83 जरी मी धुरात ठेवलेल्या बुधल्यासारखा झालो आहे; तरी मी तुमचे नियम कधीही विसरत नाही. 84 तुमच्या सेवकाने किती काळ वाट पाहावी? माझा छळ करणाऱ्यांना तुम्ही कधी शिक्षा कराल? 85 अहंकारी मला अडकविण्यासाठी खड्डे खणत आहेत, जे तुमच्या नियमाविरुद्ध आहे. 86 तुमच्या सर्व आज्ञा विश्वसनीय आहेत; तुम्ही मला साहाय्य करा, विनाकारण माझा छळ होत आहे. 87 त्यांनी पृथ्वीवरून मला जवळपास नामशेषच केले होते; तरी तुमचे नियम मी नाकारले नाही. 88 तुमच्या अक्षय प्रीतीस अनुसरून माझ्या जिवाचे रक्षण करा, म्हणजे तुमच्या मुखातून निघालेले नियम मला पाळता येतील. 89 हे याहवेह, तुमचे वचन अनंतकाळचे आहे; ते स्वर्गात सर्वकाळ स्थिर राहते. 90 तुमची विश्वसनीयता पिढ्यान् पिढ्या टिकून राहते; तुम्ही पृथ्वीची स्थापना केली आणि ती आजतागायत स्थिर आहे. 91 तुमचे नियम आजवर अस्तित्वात आहेत, कारण सर्वकाही तुमची सेवा करतात. 92 जर तुमचे नियम माझ्या सुखाचा ठेवा झाले नसते, तर पीडेने माझा केव्हाच अंत झाला असता. 93 मी तुमचे नियम कधीही विसरणार नाही, कारण त्यांच्याद्वारे तुम्ही माझ्या जीवनाचे जतन केले आहे. 94 मी तुमचा आहे, माझे तारण करा; कारण मी तुमच्या विधीचा शोधक आहे. 95 दुष्ट लोक माझा नाश करण्याची वाट पाहत आहेत, तरी मी माझे चित्त तुमच्या अधिनियमाकडे लावेन. 96 प्रत्येक परिपूर्णतेला सीमा असते, परंतु तुमच्या आज्ञा निस्सीम आहेत. 97 अहाहा, मी तुमच्या विधिनियमांवर कितीतरी प्रीती करतो! मी दिवसभर त्यांचे चिंतन करतो. 98 तुमची वचने सतत माझ्यासह असतात, आणि ती माझ्या शत्रूंपेक्षा मला अधिक ज्ञानी करतात. 99 मला माझ्या सर्व शिक्षकांहून अधिक शहाणपण आहे, कारण तुमच्या नियमांचे मी सतत मनन करतो. 100 मी माझ्या वडीलजनांपेक्षाही अधिक सुज्ञ आहे, कारण मी तुमच्या आज्ञा पाळतो. 101 दुष्टाईच्या मार्गावर मी माझी पावले टाकीत नाही, जेणेकरून मी तुमच्या आज्ञांचे पालन करू शकेन. 102 मी तुमच्या वचनाकडे पाठ फिरवीत नाही; कारण तुम्ही स्वतः मला शिक्षण दिले आहे. 103 किती मधुर आहेत तुमची वचने, माझ्या मुखात ती मला मधापेक्षाही गोड लागतात! 104 तुमच्या नियमांद्वारेच मला सुज्ञता प्राप्त होते; म्हणून मी प्रत्येक खोट्या मार्गाचा तिरस्कार करतो. 105 तुमचे वचन माझ्या पावलांकरिता दिवा व माझ्या मार्गावरील प्रकाश आहे. 106 मी शपथ घेतली आहे व सुनिश्चित केले आहे, की मी तुमच्या नीतियुक्त नियमांचे पालन करेन. 107 याहवेह, माझी पीडा असह्य झाली आहे; आपल्या अभिवचनाप्रमाणे माझे जतन करा. 108 याहवेह, माझ्या मुखातून निघालेल्या स्वैच्छिक स्तवनाचा स्वीकार करा, आणि तुमचे नियम मला शिकवा. 109 जरी मी माझे जीवन सतत स्वतःच्या हातात घेतो, तरी मी तुमचे नियम विसरणार नाही. 110 दुष्ट लोकांनी माझ्यासाठी सापळे लावलेले आहेत, तरीपण मी तुमच्या मार्गावरून ढळणार नाही. 111 तुमचे नियम माझा सर्वकाळचा वारसा आहेत, माझ्या अंतःकरणाचा उल्हास आहेत. 112 शेवटपर्यंत पूर्ण हृदयाने तुमचे आज्ञापालन करण्याचे मी निश्चित केले आहे. 113 दुटप्पी लोकांचा मला तिरस्कार वाटतो, पण मला तुमचे नियम प्रिय आहेत. 114 तुम्ही माझा आश्रय व माझी ढाल आहात; तुमच्या अभिवचनांवर मी आशा ठेवली आहे. 115 अहो कुकर्मी लोकांनो, माझ्यापासून दूर व्हा, जेणेकरून माझ्या परमेश्वराच्या आज्ञांचे मी पालन करेन. 116 हे परमेश्वरा, तुमच्या अभिवचनानुसार माझे जतन करा, म्हणजे मी जिवंत राहीन; माझी आशाभंग होऊ देऊ नका. 117 मला उचलून धरा म्हणजे माझी सुटका होईल; मी तुमच्या नियमांचा नेहमी आदर करतो. 118 जे तुमच्या नियमापासून पथभ्रष्ट होतात, त्यांना तुम्ही नाकारले आहे, त्यांचा संभ्रम निरर्थक ठरू द्या. 119 पृथ्वीवरील सर्व दुष्टांना तुम्ही एखाद्या गाळाप्रमाणे टाकून देता; म्हणूनच तुमचे नियम मला प्रिय आहेत. 120 तुमच्या भीतीने माझा देह थरथर कापतो; मला तुमच्या विधिनियमाचा दरारा वाटतो. 121 मी धर्माचरणाने

व न्यायीपणाने वागलो आहे; माझा छळ करणाऱ्यांच्या हाती मला सोपवू
नका. 122 आपल्या सेवकाचे कल्याण सुनिश्चित करा; गर्विष्ठांना माझा
छळ करू देऊ नका. 123 माझ्या तारणाचे तुमचे नीतियुक्त अभिवचन
पूर्ण होण्याची वाट पाहता माझे डोळे अंधुक झाले आहेत. 124 आपल्या
प्रेमदयेस अनुसरून तुमच्या सेवकाशी व्यवहार करा आणि मला तुमचे
नियम शिकवा. 125 मी तुमचा दास आहे; मला विवेकबुद्धी द्या, म्हणजे
तुमचे नियम समजतील. 126 हे याहवेह, तुम्ही कृती करण्याची वेळ
आली आहे; तुमच्या नियमांचे उल्लंघन होत आहे. 127 कारण मी
तुमच्या आज्ञा सोन्यापेक्षा, बावन्नकशी सोन्यापेक्षाही अधिक प्रिय
मानतो, 128 कारण तुमचा प्रत्येक नियम यथायोग्य मानतो; म्हणून
सर्व असत्य मार्गाचा मी द्वेष करतो. 129 तुमचे नियम अद्भुत आहेत;
म्हणून मी त्यांचे पालन करतो. 130 तुमचे वचन उलगडल्याने प्रकाश
मिळतो; ते साध्याभोळ्यांना शहाणपण देते. 131 माझे मुख उघडून मी
धापा टाकल्या, कारण तुमच्या आदेशाची मला आस लागली होती. 132
मजकडे वळा आणि माझ्यावर दया करा, जशी तुमच्या नामावर प्रीती
करणाऱ्यांवर तुम्ही नेहमी करता, तशी करा. 133 तुमच्या वचनानुसार
माझ्या पावलांचे मार्गदर्शन करा, म्हणजे पाप मजवर सत्ता गाजविणार
नाही. 134 मनुष्याच्या अत्याचारापासून मला सोडवा, म्हणजे मला
तुमच्या आज्ञा पाळता येतील. 135 तुमच्या सेवकावर आपला मुखप्रकाश
पडू द्या, आणि तुमचे सर्व नियम मला शिकवा. 136 माझ्या डोळ्यांतून
अश्रूंचे ओघ वाहतात, कारण तुमच्या नियमांचे उल्लंघन करण्यात येत
आहे. 137 हे याहवेह, तुम्ही न्यायी आहात, आणि तुमचे नियमही अचूक
आहेत. 138 तुम्ही योजलेले अधिनियम अत्यंत नीतियुक्त आहेत; ते
पूर्णपणे विश्वसनीय होत. 139 माझा आवेश मला पार झिजवित आहे,
कारण माझे शत्रू तुमचे नियम उपेक्षितात. 140 तुमची अभिवचने पूर्णपणे
पारखली गेली आहेत, म्हणूनच तुमच्या सेवकाला ती अतिशय प्रिय
आहेत. 141 मी स्वत: महत्त्वहीन व तिरस्कृत असलो, तरी तुमचे नियम
मी विसरत नाही. 142 तुमची धार्मिकता सार्वकालिक आहे, आणि
तुमचे नियम सत्य आहेत. 143 संकट आणि क्लेशाने मला घेरले आहे,
परंतु तुमच्या आज्ञा मला सुखावतात. 144 तुमचे नियम सर्वदा न्याय्य
असतात; ते समजण्यास मला साहाय्य करा म्हणजे मी जगेन. 145 हे
याहवेह, मी मनापासून धावा करीत आहे; मला उत्तर द्या, म्हणजे मी
तुमच्या नियमांचे पालन करेन. 146 मी आरोळी मारून म्हणतो, माझे
रक्षण करा म्हणजे मी तुमच्या आज्ञा पाळू शकेन. 147 सूर्योदयापूर्वी
मी उठून मदतीसाठी तुमचा धावा करतो; माझी संपूर्ण आशा तुमच्या
वचनावर आहे. 148 मी रात्रभर माझे नेत्र उघडेच ठेवतो, म्हणजे तुमच्या
अभिवचनांचे चिंतन करू शकेन. 149 तुमच्या वात्सल्य-कृपेनुसार माझी
प्रार्थना ऐका; याहवेह, तुमच्या वचनानुरुप माझे जतन करा. 150
माझ्याविरुद्ध कारस्थान करणारे निकट आले आहेत, पण ते तुमच्या
नियमशास्त्रापासून दूर आहेत. 151 परंतु हे याहवेह, तुम्ही माझ्याजवळ
आहात, व तुमच्या सर्व आज्ञा सत्य आहेत. 152 अनेक वर्षापूर्वी तुमच्या
अधिनियमांबद्दल मी हे शिकलो आहे की, ते तुम्ही सर्वकाळासाठी
स्थापिले आहेत. 153 माझ्या दु:खाकडे पाहा आणि मला त्यातून सोडवा,
कारण मी तुमच्या आज्ञा विसरलो नाही. 154 माझ्या वादाचे समर्थन करा
आणि माझी सुटका करा; आपल्या अभिवचनाप्रमाणे माझ्या जीवनाचे
जतन करा. 155 दुष्ट लोक तारणप्राप्तीपासून फार दूर आहेत, कारण ते
तुमच्या नियमांचा मुळीच शोध करीत नाहीत. 156 हे याहवेह, तुमची
दया किती महान आहे; तुमच्या नियमानुसार माझे जतन करा. 157 मला
छळणारे कितीतरी शत्रू आहेत, पण मी तुमचा आज्ञाभंग केला नाही.
158 मला या विश्वासघातक्यांचा वीट आला आहे, कारण ते तुमच्या
वचनाचे पालन करीत नाहीत. 159 याहवेह पाहा, मी तुमच्या आज्ञांवर
किती मनापासून प्रीती करतो; तुमच्या वात्सल्यानुरूप माझी जोपासना
करा. 160 तुमची सर्व वचने पूर्णपणे सत्य आहेत; तुमचे सर्व नीतियुक्त
न्याय अनंतकाळचे आहेत. 161 अधिपतींनी कारण नसताना माझा
छळ केला, परंतु माझे हृदय केवळ तुमच्याच वचनांनी कंपित होते.
162 मोठा धनसंचय सापडलेल्या मनुष्याला होतो, तसा मला तुमच्या
अभिवचनांनी आनंद होतो. 163 असत्याचा मी द्वेष व घृणा करतो, पण
तुमच्या नियमांवर मी प्रीती करतो. 164 तुमच्या नीतियुक्त नियमांबद्दल
दिवसातून सात वेळा मी तुमचे स्तवन करतो. 165 जे तुमच्या नियमांवर
प्रीती करतात, त्यांना मोठी शांती लाभते, आणि ते कधीही विचलित
होत नाहीत. 166 याहवेह, तुमच्या तारणाची मी प्रतीक्षा करतो, आणि
मी तुमच्या आज्ञा पाळतो. 167 मी तुमच्या आज्ञांचे पालन करतो, कारण
त्या मला अतिशय प्रिय आहेत. 168 मी तुमचे उपदेश व नियम पाळतो,
कारण माझा प्रत्येक मार्ग तुम्हाला माहीत आहे. 169 हे याहवेह, माझी
हाक तुम्हापर्यंत पोहचो; आपल्या वचनाप्रमाणे मला विवेकवंत करा.
170 माझी प्रार्थना तुम्हापर्यंत पोहचो; तुम्ही आपल्या अभिवचनाप्रमाणे
माझी सुटका करा. 171 माझे ओठ भरभरून तुमचे स्तवन करो, कारण
तुम्ही मला तुमचे विधी शिकविले आहेत. 172 माझी जीभ तुमच्या
वचनांची स्तुतिगीते गाओ, कारण तुमचे सर्व नियम नीतियुक्त आहेत.
173 मला साहाय्य करण्यास तुमची भुजा सतत तयार राहो, कारण मी
तुमच्या अधिनियमांचा स्वीकार केला आहे. 174 हे याहवेह, मी तुमच्या
तारणाची उत्कंठा धरलेली आहे; तुमचे नियम माझा अत्यानंद देतात.
175 मला आयुष्यमान करा, जेणेकरून मी तुझी स्तुती करेन, आणि
तुमचे नियम माझी जोपासना करोत. 176 हरवलेल्या मेंढराप्रमाणे मी
बहकलो, माझा शोध घ्या, कारण तुमच्या आज्ञा मी विसरलो नाही.

**120** प्रवाशांचे आराधना गीत. संकटसमयी मी याहवेहकडे आरोळी
मारली, आणि त्यांनी ती ऐकली. 2 हे याहवेह, असत्य
बोलणाऱ्या ओठांपासून व कपटी जिव्हेपासून माझा बचाव करा. 3
अगे कपटी जिभे, ते तुला काय करतील, आणखी तुला कशी वागणूक
मिळेल? 4 ते तुला योद्ध्यांच्या तीक्ष्ण बाणांनी, केरसुणीच्या लाकडांच्या
निखाऱ्यांनी दंड करतील. 5 धिक्कार असो माझा, जर मी मेशेख हे माझे
निवासस्थान केले, वा केदार येथे माझा डेरा घातला! 6 जे शांतिप्रिय
नाहीत अशा लोकांसह राहण्यात मी बराच काळ घालविला आहे. 7 मी
तर शांतताप्रिय आहे; पण मी काही बोलताच ते युद्धास तयार होतात.

**121** प्रवाशांचे आराधना गीत. मी आपली दृष्टी पर्वताकडे लावतो—
मला साहाय्य कुठून येईल? 2 स्वर्ग व पृथ्वीचे निर्माणकर्ते
याहवेह, तेच माझ्या साहाय्यतेचा उगम आहेत. 3 ते तुझा पाय कदापि
घसरू देणार नाहीत; तुझे रक्षक डुलकीही घेत नाही. 4 खरोखर जे
इस्राएलचे रक्षक आहेत ते झोपी जात नाहीत किंवा डुलकीही घेत नाहीत.
5 याहवेह स्वत: तुझे रक्षण करतात— याहवेह तुझ्या उजव्या हाताजवळ
सावलीसारखे आहेत. 6 दिवसाच्या सूर्याची तुला बाधा होणार नाही,
आणि रात्रीच्या चंद्राची देखील नाही. 7 याहवेह सर्व अनिष्टांपासून तुला
सुरक्षित ठेवतील— आणि तुझ्या जिवाचे रक्षण करतील. 8 तुझे आता
आणि सर्वकाळ येणे व जाणे, यावर याहवेह बारकाईने लक्ष ठेवतील.

**122** प्रवाशांचे आराधना गीत. दावीदाची रचना. मी हर्षित झालो,
जेव्हा ते मला म्हणाले, “चला आपण याहवेहच्या मंदिरात
जाऊ.” 2 अगे यरुशलेमे, आम्ही आता आपले पाऊल तुझ्या वेशीच्या
आत ठेवले आहे. 3 यरुशलेम नगरी अशी बांधलेली आहे, जशी एखादी
सुसंबद्धपणे रचलेली नगरी. 4 हेच ते स्थान आहे जिथे इस्राएलास
दिलेल्या नियमाप्रमाणे सर्व कुळे— याहवेहची कुळे— याहवेहची
उपकारस्तुती करण्यास येथे जमत आहेत. 5 इथेच न्याय-सिंहासन,
दावीदाच्या वंशाचे सिंहासन स्थापित केले आहे. 6 यरुशलेमवरील
शांतीसाठी प्रार्थना करा की या नगरीवर प्रीती करणाऱ्या सर्वांची सुरक्षा
होवो. 7 तुझ्या तटांच्या आत शांती नांदो; तुझ्या राजवाड्यामध्ये
सुरक्षितता राहो. 8 जे माझे कुटुंब व माझे स्नेही येथे राहतात,
त्यांच्यासाठी मी मागतो, “तुझ्यामध्ये शांती नांदो.” 9 आपले परमेश्वर
याहवेह, यांच्या मंदिराप्रीत्यर्थ, तुझा उत्कर्ष व्हावा, अशी अभिलाषा
करेन.

**123** प्रवाशांचे आराधना गीत. मी माझी दृष्टी वर, तुमच्याकडे
लावतो, तुम्ही जे स्वर्गात राजासनारूढ आहात. 2 जसा एखादा
दास आपली दृष्टी आपल्या धन्याच्या हाताकडे लावतो, किंवा एखादी
दासी आपल्या धनिणीच्या हाताकडे नजर लावते, तसेच दया आणि
कृपा प्राप्त व्हावी म्हणून, आमची दृष्टी आमचे परमेश्वर याहवेहकडे
लागलेली असते. 3 आम्हावर दया करा, हे याहवेह, आम्हावर दया करा,
कारण आम्ही पुष्कळ तिरस्कार सहन केला आहे. 4 उन्मत्त लोकांचा
घोर उपहास आम्ही सहन केला आणि गर्विष्ठांच्या घोर घृणेचे पात्र ठरलो
आहे.

**124** प्रवाशांचे आराधना गीत. दावीदाची रचना. सर्व इस्राएलने हे
कबूल करावे की— जर याहवेह आमच्या बाजूने नसते, 2
जेव्हा मनुष्यांनी आमच्यावर आक्रमण केले होते, जर याहवेह आमच्या
बाजूने नसते, 3 तर त्यांचा संताप आमच्यावर भडकला असता. तेव्हा
त्या शत्रूंनी आम्हाला जिवंत गिळून टाकले असते; 4 जलप्रलयात
आम्ही बुडून गेलो असतो व जलप्रवाहात आम्ही पार वाहून गेलो असतो,
5 उचंबळलेल्या लाटांनी आम्हाला गिळंकृत केले असते. 6 याहवेह
धन्यवादित असोत; त्यांनी आम्हाला शत्रूंचे भक्ष्य होऊ दिले नाही. 7
पारध्याच्या पाशातून पक्षी निसटावा, त्याप्रमाणे आम्ही जिवानिशी
निसटलो; पाश तुटलेला आहे आणि आम्ही मुक्त झालो आहोत. 8
आमच्या साहाय्याचा उगम, स्वर्ग व पृथ्वीचे निर्माणकर्ते परमेश्वर, याहवेह
यांचे नाव आहे.

**125** प्रवाशांचे आराधना गीत. ज्यांचा याहवेहवर विश्वास आहे, ते
सीयोन पर्वतासारखे स्थिर आहेत, कारण ते कधीही ढळत
नाहीत, तर सर्वकाळ टिकतात. 2 यरुशलेमला वेष्टण करणारे पर्वत जसे
तिचे रक्षण करतात, तसेच आता आणि सदासर्वकाळ, याहवेह आपल्या
लोकांना वेष्टून त्यांचे रक्षण करतात. 3 नीतिमान लोकांना दिलेल्या
वतनावर दुष्टांचा राजदंड टिकून राहणार नाही, नाहीतर नीतिमान लोकही
त्यांच्या हाताने दुष्टता करतील. 4 हे याहवेह, जे नीतिमान आहेत, ज्यांचे
हृदय निष्ठावंत आहे, त्यांचे तुम्ही कल्याण करा. 5 परंतु जे आपल्या
कुटिल मार्गांकडे वळतात, त्यास याहवेह दुष्कर्म्यांबरोबर घालवून देतील.
इस्राएलावर शांती असो.

**126** प्रवाशांचे आराधना गीत. जेव्हा याहवेहनी सीयोनाला पुन्हा
एकवार संपन्न केले, तेव्हा आम्ही स्वप्न पाहत होतो असे
वाटले. 2 आमचे मुख हास्याने भरले होते आणि किती हर्षगीते आम्ही
गाईली! तेव्हा विधर्मी राष्ट्रे म्हणाली: “पाहा याहवेहने त्यांच्यासाठी किती
थोर कृत्ये केली आहेत.” 3 याहवेहने आमच्यासाठी महान कृत्ये केलेली
आहेत, आणि आम्ही आनंदाने परिपूर्ण झालो आहोत. 4 हे याहवेह,
नेगेव नदीसारखी, आमची समृद्धी परत आम्हाला मिळू द्या. 5 जे अश्रूंनी
पेरणी करतात, ते आनंदाने कापणी करतील. 6 जे रडत पेरणीसाठी बी
घेऊन जातात, ते आपल्या पेंढ्या घेऊन, आनंदाने हर्षगीते गात परत
येतील.

**127** प्रवाशांचे एक आराधना गीत. शलोमोनाची रचना. याहवेहने
घर बांधले नाही, तर बांधकाम करणाऱ्यांचे श्रम व्यर्थ आहेत;
याहवेहने शहराचे रक्षण केले नाही, तर पहारेकऱ्यांचे जागणे व्यर्थ आहे.
2 तुमचे पहाटे उठणे आणि रात्री उशीरापर्यंत अन्नप्राप्तीसाठी कष्ट करणे
व्यर्थ आहे— कारण आपल्या प्रियजनांस याहवेहच शांत झोप देतात.
3 मुले, ही याहवेहकडून मिळालेला वारसा आहे, प्रसवशील कूस, हे
याहवेहकडून लाभणारे प्रतिफळ आहे. 4 तरुणपणी झालेली मुले,
शूरवीराच्या हातातील बाणांप्रमाणे आहेत. 5 ज्या पुरुषाचा भाता अशा
बाणांनी भरलेला आहे, तो धन्य! असे पुरुष वेशीत आपल्या शत्रूशी
न्यायालयात वाटाघाटी करतील, तेव्हा ते लज्जित होणार नाहीत.

**128** प्रवाशांचे आराधना गीत. जे याहवेहचे भय बाळगतात, आणि
त्यांच्या आज्ञा पाळतात, ते धन्य! 2 तू आपल्या हातांनी
केलेल्या श्रमाचे फळ खाशील; तू सुखी होशील व तुझे कल्याण होईल.
3 तुझी पत्नी तुझ्या घरात सफल द्राक्षवेलीसारखी होईल; तुझी मुले
तुझ्या मेजाभोवती जैतुनाच्या रोपांसारखी होतील. 4 होय, याहवेहचे
भय बाळगून त्यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्यांना हाच आशीर्वाद असणार.
5 याहवेह सीयोनातून तुला आशीर्वादित करो; तुझे आयुष्यभर तू

यरुशलेमची समृद्धी बघशील. 6 नातवंडाचे सुख लाभेल इतके दीर्घ
आयुष्य तुला मिळो— इस्राएलास शांती लाभो.

**129** प्रवाशांचे आराधना गीत. “माझ्या किशोरावस्थेपासून त्यांनी
माझ्यावर घोर अत्याचार केला आहे,” इस्राएल म्हणो; 2
“माझ्या किशोरावस्थेपासून माझ्यावर घोर अत्याचार करण्यात आला
आहे, तरीही त्यांना माझ्यावर विजय मिळविता आला नाही. 3 शेतकऱ्याने
नांगरल्याप्रमाणे त्यांनी माझ्या पाठीवर लांब लांब तासे काढली. 4
परंतु याहवेह न्यायी आहेत; त्यांनी मला त्या दुष्टांच्या बंधनातून मुक्त
केले.” 5 सीयोनाचा द्वेष करणारे सर्व लाजिरवाणा पराजय होऊन परत
जावोत. 6 घरांच्या छपरावर उगविलेल्या गवतासारखे ते होवोत, जे
अर्धवट वाढल्याबरोबर सुकून पिवळे पडते; 7 कापणाऱ्यांच्या हातात
काहीही पडत नाही, की बांधणाऱ्यांनाही पेंढ्या मिळत नाहीत. 8 येणारे
जाणारे लोक त्यांना असे न म्हणोत, “याहवेहचे आशीर्वाद तुम्हावर
येवोत; आम्ही तुम्हाला याहवेहच्या नावाने आशीर्वाद देतो.”

**130** प्रवाशांचे आराधना गीत. याहवेह, खोल ठिकाणातून मी तुमचा
धावा करीत आहे; 2 माझा धावा ऐका; प्रभू, माझ्या कृपेच्या
विनंतीकडे तुमचे कान लागोत. 3 याहवेह, तुम्ही आमच्या पापांचा
हिशोब ठेवला, तर प्रभू आमच्यापैकी कोण उभा राहील? 4 पण तुम्ही
क्षमाशील आहात; म्हणूनच आम्ही अत्यंत आदराने तुमची सेवा करू
शकतो. 5 मोठ्या अपेक्षेने माझा जीव याहवेहची वाट पाहतो, आणि मी
माझी आशा त्यांच्या वचनावर टाकली आहे. 6 पहारेकरी ज्या उत्कंठेने
अरुणोदयाची वाट पाहतो, त्याहीपेक्षा अधिक उत्कंठेने मी माझ्या
परमेश्वराची वाट पाहतो. 7 हे इस्राएला, याहवेहची आशा धर, वात्सल्य
याहवेहजवळच आहे; मनुष्यांचे संपूर्ण तारण त्यांच्याचकडेच आहे. 8 ते
स्वतः खंडणी भरून इस्राएलला सर्व पापांपासून मुक्त करतील.

**131** प्रवाशांचे आराधना गीत. दावीदाची रचना. हे याहवेह, माझे
हृदय गर्विष्ठ नाही, माझी नजर उन्मत्त नाही; मला समजत
नाही अशा महान आणि अद्भुत गोष्टींपासून मी स्वतःला दूर ठेवतो. 2
दूध तुटलेले मूल जसे आपल्या आईजवळ शांत व गप्प असते; दूध
तुटलेल्या मुलासारखा मी आता तृप्त होय. 3 हे इस्राएला, तू देखील
शांतपणे, आता आणि सर्वदा, याहवेहवर आशा ठेव.

**132** प्रवाशांचे आराधना गीत. हे याहवेह, दावीदाचे व त्याच्या
स्वसुखत्यागाचे स्मरण करा. 2 त्याने याहवेहची शपथ घेतली,
याकोबाच्या सर्वसमर्थास असा नवस केला: 3 “मी ना माझ्या घरात
प्रवेश करेन अथवा ना अंथरुणात पडेन, 4 माझ्या डोळ्यास झोप
लागू देणार नाही, वा डुलकीही घेणार नाही, 5 जेव्हापर्यंत याहवेहसाठी
मी एक जागा उपलब्ध करीत नाही, याकोबाच्या सर्वसमर्थासाठी
एक निवासस्थान बांधत नाही.” 6 याबद्दल आम्ही एफ्राथाहमध्ये
ऐकले, नंतर तो याआर प्रदेशात सापडला: 7 “चला आपण त्यांच्या
निवासस्थानी जाऊ, तिथे त्यांच्या चरणी त्यांची उपासना करू. 8 ‘हे
याहवेह, उठा आणि तुम्ही तुमच्या सामर्थ्याच्या कोशासह, तुमच्या
विश्रामस्थानी या. 9 तुमचे याजक धार्मिकतेची वस्त्रे परिधान करोत;
तुमचे भक्त आनंदघोष करोत.’” 10 तुमचा सेवक दावीदाकरिता तुमच्या
अभिषिक्ताचा अव्हेर करू नका. 11 याहवेहनी दावीदाला शपथ घेऊन
म्हटले की, एक अशी शपथ जी ते कधीही मोडणार नाहीत: “तुझ्या
वंशजांपैकी एकाला मी तुझ्या राजासनावर विराजमान करेन. 12 जर तुझे
वंशज मी केलेल्या करारातील अटींचे व मी शिकविलेल्या आज्ञांचे पालन
करतील, तर त्यांचे वंशजही सदासर्वकाळ तुझ्या राजासनावर विराजमान
होतील.” 13 कारण याहवेहनी सीयोनाची निवड केलेली आहे, आपल्या
निवासस्थानासाठी त्यांची ही अभिलाषा आहे, ते म्हणतात, 14 “हे
माझे कायमचे विश्रांतीचे स्थान आहे; मी येथे विराजमान होईन, कारण
येथेच राहण्याची माझी इच्छा आहे. 15 मी या नगरीची भरभराट करेन;
तिच्यातील गरिबांना अन्न देऊन तृप्त करेन. 16 तेथील याजकांना
तारणाची वस्त्रे नेसवेन, तेथील भक्त आनंदाने सदैव जयजयकार
करतील. 17 “येथे दावीदाच्या शिंगाला अंकुर फुटेल आणि आपल्या
अभिषिक्तासाठी मी एक दीप स्थापित करेन. 18 मी त्याच्या शत्रूंना
लज्जारूपी पांघरूण घालेन, परंतु त्याचे मस्तक राजमुकुटाने गौरवमंडित
होईल.”

**133** प्रवाशांचे आराधना गीत. दावीदाची रचना. ती किती मनोरम
आणि सुखदायी स्थिती असते, जेव्हा परमेश्वराचे लोक
एकोप्याने राहतात, 2 ते अहरोनाच्या मस्तकावर ओतलेल्या मोलवान
तेलासमान, त्याच्या दाढीवर ओघळलेल्या, अहरोनाच्या दाढीवर
ओघळलेल्या, झग्याच्या काठापर्यंत आलेल्या सुगंधी तेलाप्रमाणे आहे.
3 हे जणू सीयोन पर्वतावर पडणाऱ्या हर्मोनातील दवबिंदूप्रमाणे आहे.
कारण हे ते स्थान आहे, ज्याला सार्वकालिक आशीर्वाद देण्याचा
याहवेहनी संकल्प केला आहे.

**134** प्रवाशांचे आराधना गीत. अहो याहवेहचे सेवकहो, याहवेहचे
स्तवन करा. तुम्ही जे रोज रात्री मंदिरात सेवारत असता. 2
पवित्रस्थानात तुम्ही आपले हात उंच करा आणि याहवेहचे स्तवन करा.
3 स्वर्ग व पृथ्वी यांचे निर्माणकर्ते याहवेह, तुम्हाला सीयोनातून आशीर्वाद
देवो.

**135** याहवेहचे स्तवन करा. याहवेहच्या नामाचे स्तवन करा; तुम्ही,
जे याहवेहचे सेवक आहात, ते सर्व याहवेहचे स्तवन करोत. 2
व तुम्हीही, जे याहवेहच्या आवासात, आमच्या परमेश्वराच्या मंदिराच्या
अंगणात सेवा करतात. 3 याहवेहचे स्तवन करा, कारण ते चांगले
आहेत; त्यांच्या नावाचा महिमा गा, कारण ते करणे मनोरम आहे.
4 कारण याकोबाला आपलेसे करावे, इस्राएलला त्यांची मौल्यवान
संपत्ती म्हणून याहवेहने त्यांना निवडले. 5 मला माहीत आहे की याहवेह
महान आहेत, ते देवाधिदेव आहेत. 6 याहवेह, स्वर्गात तसेच पृथ्वीवर,
सागरांमध्ये आणि त्याच्या अत्यंत खोलात देखील, त्यांना जे योग्य
वाटते, तेच ते करतात. 7 पृथ्वीच्या दिगंतापासून ते मेघ वर चढवितात;
पर्जन्यवृष्टीसह ते विजा पाठवितात आणि आपल्या भांडारातून ते वारे

प्रवाहित करतात. 8 त्यांनी प्रत्येक इजिप्ती ज्येष्ठ संतानाचा नाश केला,
मनुष्य तसेच जनावरांच्या कळपातील प्रथम वत्साचा. 9 हे इजिप्त,
त्यांनीच तुझ्यामध्ये महान चमत्कार केले, जे फारोह आणि त्याच्या सर्व
लोकांविरुद्ध होते. 10 त्यांनीच मोठमोठ्या राष्ट्रांवर प्रहार केले, आणि
बलाढ्य राजांचा वध केला. 11 अमोरी लोकांचा राजा सीहोन, बाशानचा
राजा ओग आणि कनानाच्या सर्व राजाचा त्यांनी वध केला. 12 तत्पश्चात
त्यांची भूमी त्यांनी वतन म्हणून, आपली प्रजा इस्राएली लोकांना देऊ
केली. 13 हे याहवेह, तुमचे नाव चिरकाल टिकते; तुमची किर्ती पिढ्यान्
पिढ्या टिकणारी आहे. 14 कारण याहवेह आपल्या लोकांना निर्दोष
प्रमाणित करतील, आणि आपल्या सेवकांवर करुणा करतील. 15
परंतु राष्ट्रांच्या मूर्ती चांदीच्या आणि सोन्याच्या आहेत, त्या तर मानवी
हातांनी घडविलेल्या आहेत. 16 त्यांना तोंडे आहेत, परंतु बोलता येत
नाही, त्यांना डोळे आहेत, परंतु ते बघू शकत नाहीत. 17 त्यांना कान
आहेत, परंतु ऐकू येत नाही, ना त्यांना श्वास घेता येतो. 18 जे मूर्ती
घडवितात ते त्यांच्यासारखेच होतील, आणि सर्वजण जे त्यांच्यावर
भरवसा ठेवतात तेही तसेच होतील. 19 हे संपूर्ण इस्राएला, याहवेहचे
स्तवन कर; अहो अहरोनाच्या वंशजांनो, याहवेहचे स्तवन करा. 20
अहो, लेवीच्या वंशजांनो, याहवेहचे स्तवन करा; त्यांचे भय धरणाऱ्या
लोकांनो, याहवेहचे स्तवन करा. 21 सीयोनातून याहवेहचे स्तवन होवो,
अहो यरुशलेमातील सर्व रहिवाशांनो, याहवेहचे स्तवन करा. याहवेहचे
स्तवन करा.

**136** याहवेहचे उपकारस्मरण करा, कारण ते चांगले आहेत, 2
देवाधिदेवाचे उपकारस्मरण करा, 3 प्रभूंच्या प्रभूचे आभार
माना, 4 केवळ तेच असे महान चमत्कार करू शकतात, 5 ज्यांनी
आपल्या बुद्धिसामर्थ्याने स्वर्गाची निर्मिती केली, 6 त्यांनी जलावर
पृथ्वीचा विस्तार केला, 7 त्यांनी प्रचंड ज्योती निर्माण केल्या— 8
दिवसावर प्रभुत्व चालविण्यासाठी सूर्य, 9 रात्रीवरील प्रभुत्वासाठी चंद्र
व तारे निर्माण केले; 10 त्यांनी इजिप्ती लोकांच्या प्रथम संतानास मारून
टाकले, 11 त्यांनी इस्राएलास त्यांच्या तावडीतून सोडविले, 12 ज्यांनी
आपल्या सशक्त हातांनी व विस्तारलेल्या भुजांनी त्यांना सोडविले,
13 तांबडा समुद्र दुभागला, 14 आणि इस्राएली लोकांना त्यामधून
सुखरुपपणे पार नेले, 15 परंतु फारोह आणि त्याचे सैन्य तांबड्या
समुद्रात बुडवून टाकले; 16 ज्यांनी आपल्या लोकांना अरण्यातून नेले,
17 ज्यांनी प्रबळ राजांचा नायनाट केला, 18 ज्यांनी प्रतापी राजांना ठार
केले— 19 ज्यांनी अमोरी लोकांचा राजा सीहोन याला, 20 आणि
बाशान प्रांताचा राजा ओग यालाही— 21 आणि त्यांची भूमी इस्राएलला
कायमचे वतन म्हणून, 22 ज्यांनी आपला सेवक इस्राएल याला वारसा
म्हणून दिली, 23 ज्यांनी आमच्या पराकाष्ठेच्या दुबळेपणात आमची
आठवण केली, 24 आणि त्यांनी आम्हाला शत्रूपासून सोडविले, 25
ते सर्व प्राणिमात्राला अन्नपुरवठा करतात, 26 स्वर्गातील परमेश्वराचे
उपकारस्मरण करा,

**137** आम्ही बाबेलच्या नदीकाठावर बसलो आणि सीयोनाची
आठवण करीत रडलो. 2 आम्ही आमच्या वीणा वाळुंजाच्या
फांद्यावर टांगल्या, 3 कारण आम्हाला कैद करणाऱ्यांनी आम्हाला गात
गाण्यास सांगितले, आमचा छळ करणाऱ्यांनी आनंद गीते गाण्याची
मागणी केली, ते म्हणाले, “आमच्या करमणुकी करिता सीयोनाचे एखादे
गीत गाऊन दाखवा!” 4 या परदेशात आमच्या याहवेहचे स्तवनगीत
गाणे आम्हाला कसे शक्य आहे? 5 हे यरुशलेम, मी तुला विसरलो, तर
माझा उजवा हात त्याचे कौशल्य विसरो; 6 जर मी यरुशलेमला माझा
सर्वोच्च आनंद मानत नसेन, तर माझी जीभ माझ्या टाळूला चिकटो. 7 हे
याहवेह, माझ्या देवा, यरुशलेमचा पाडाव झाला त्या दिवशी एदोमाच्या
वंशजांनी काय केले याचे स्मरण करा. ते आरोळ्या मारत होते, “तिला
जमीनदोस्त करा, तिचा पाया देखील ढासळून टाका.” 8 अगे बाबेलच्या
कन्ये, तुझा नाश निश्चित आहे; तू जसा आमचा नाश केलास, तसा तुझी
परतफेड करणारा धन्य होईल. 9 जो तुझी तान्ही बालके घेऊन, त्यांना
खडकावर आपटेल, तो धन्य!

**138** दावीदाचे स्तोत्र. हे याहवेह, मी माझ्या अंतःकरणापासून तुमचे
उपकारस्मरण करेन; मी तुमची स्तुतिस्तोत्रे “दैवतांच्या” पुढे
गाईन. 2 उपासना करीत असताना, तुमच्या मंदिराकडे मी नतमस्तक
होईन, आणि तुमच्या सर्व दयामय प्रीतीबद्दल आणि विश्वासूपणाबद्दल,
तुमची उपकारस्तुती करेन, कारण तुम्ही तुमच्या वचनाला तुमच्या
किर्तीपेक्षा उंच केले आहे. 3 जेव्हा मी हाक मारली, तुम्ही प्रत्युत्तर
दिले; मला शक्ती देऊन खूप धैर्य दिले. 4 हे याहवेह, पृथ्वीवरील सर्व
राजे तुमचे उपकारस्मरण करतील, कारण यातील प्रत्येकजण तुमच्या
मुखाचे निर्णय ऐकतील. 5 ते याहवेहच्या गौरवशाली मार्गाचे गुणगान
करतील, कारण याहवेहचे गौरव अतिथोर आहे. 6 याहवेह महान असले
तरी ते दीनांची दयेने काळजी घेतात; गर्विष्ठ लोकांना मात्र ते दुरूनच
ओळखतात. 7 मी संकटांनी वेढलेला असलो, तरी तुम्ही मला त्यातून
सुखरुपपणे सोडविता; माझ्या संतापलेल्या शत्रूंवर तुम्ही आपला
हात उगारता; तुमचा उजवा हात माझा बचाव करतो. 8 याहवेह माझे
निर्दोषत्व सिद्ध करतील; परमेश्वरा, तुमची करुणा सनातन आहे—
आपल्या हस्तकृतीचा त्याग करू नका.

**139** संगीत दिग्दर्शकाकरिता दावीदाची रचना. एक स्तोत्र. याहवेह,
तुम्ही मला पारखले आहे आणि मला ओळखले आहे. 2 माझे
बसणे व माझे उठणे तुम्ही जाणता; दुरून देखील तुम्हाला माझा प्रत्येक
विचार समजतो. 3 माझे जाणे-येणे व विश्रांती घेणे, हे देखील तुम्ही
ओळखून आहात; माझ्याबद्दलची प्रत्येक गोष्ट तुम्हाला माहीत आहे. 4
हे याहवेह, माझ्या जिभेवर शब्द येण्यापूर्वीच, ते सर्व तुम्हाला माहीत
असतात. 5 तुम्ही माझ्यापुढे व मागे, माझ्या सभोवती असता; तुम्ही
आपला हात माझ्या मस्तकावर ठेवला आहे. 6 हे ज्ञान इतके भव्य व
अद्भुत आहे, की इतक्या उदात्ततेपर्यंत पोहोचणे मला अशक्य आहे. 7
तुमच्या आत्म्यापासून दूर मी कुठे जाऊ? तुमच्या समक्षतेपासून दूर मी

कुठे पळू? 8 मी वर स्वर्गात गेलो, तरी तिथे तुम्ही आहात; अधोलोकात माझे अंथरूण केले, तर तिथेही तुम्ही आहातच. (Sheol h7585) 9 मी पहाटेच्या पंखांवर स्वार होऊन अत्यंत दूरच्या महासागरापलिकडे वस्ती केली, 10 तर तिथेही तुमचा हात मला धरून चालवील; तुमचा उजवा हात मला आधार देईल. 11 मी म्हणालो, “अंधार मला लपवून टाकेल, आणि माझ्या सभोवतीचा प्रकाश रात्रीत बदलून जाईल,” 12 अंधकार देखील तुमच्यापुढे अंधकार नाही, कारण तुमच्यापुढे रात्र दिवसासारखीच प्रकाशमान आहे; कारण अंधकार हा तुम्हाला प्रकाशासमान आहे. 13 माझ्या शरीरातील अंतरंगाची घडण तुम्हीच केली आहे; माझ्या मातेच्या उदरात माझी देहरचना केली. 14 मी तुमची स्तुती करतो, कारण तुम्ही मला भयपूर्ण व अद्भुत रीतीने निर्माण केले आहे; तुमचे हे कार्य किती अद्भुत आहे, हे मी पूर्णपणे जाणतो. 15 गुप्तस्थानी माझी निर्मिती होत असताना, जेव्हा माझा सांगाडा तुमच्यापासून लपलेला नव्हता, जेव्हा पृथ्वीच्या गर्भामध्ये माझी घडण होत होती. 16 तुमच्या नेत्रांनी मला पिंडरूपात पाहिले; माझा एकही दिवस उगविण्यापूर्वी माझ्या आयुष्याच्या प्रत्येक दिवसाची तुम्ही लेखी नोंद केली. 17 हे परमेश्वरा, माझ्याबद्दलचे तुमचे विचार किती मौल्यवान आहेत! अबब, किती अगणित आहेत ते! 18 जर मी त्याची गणती केली, तर ती वाळूच्या कणापेक्षाही अधिक होईल— मी सकाळी जागा होतो, तेव्हाही मी तुमच्या समक्षतेत असतो. 19 हे परमेश्वरा, दुष्ट लोकांचा तुम्ही नायनाट केला तर किती बरे होईल! अहो रक्तपिपासू लोकांनो, माझ्यापासून दूर व्हा! 20 ते तुमच्याविरुद्ध दुष्टपणाच्या गोष्टींची योजना करतात; तुमचे शत्रू तुमच्या नामाचा गैरवापर करतात. 21 याहवेह, तुमचा द्वेष करणाऱ्यांचा मीही द्वेष करू नये काय आणि तुमच्याशी बंडखोरी करणाऱ्यांचा मी तिरस्कार करू नये काय? 22 मी त्यांचा पराकाष्ठेचा द्वेष करतो; मी त्यांना माझे शत्रू मानतो. 23 हे परमेश्वरा, माझे परीक्षण करा आणि माझे अंत:करण पारखून पहा; माझे चिंताग्रस्त विचार बारकाईने तपासून पाहा. 24 बघा की एखादी वाईट प्रवृत्ती तर माझ्यात नाही, आणि मग मला सार्वकालिक जीवनाच्या मार्गाने घेऊन जा.

**140** संगीत दिग्दर्शकाकरिता दावीदाची रचना. एक स्तोत्र. याहवेह, मला दुष्ट लोकांपासून सोडवा; हिंसक लोकांपासून मला सुरक्षित ठेवा. 2 ते सतत मनात दुष्ट योजना करीत असतात व दररोज युद्ध भडकावित असतात. 3 त्यांनी त्यांच्या जिभा सर्पाच्या जिभेप्रमाणे तीक्ष्ण केली आहे; नागाचे विष त्यांच्या ओठांवर असते. सेला 4 दुष्टांपासून माझे रक्षण करा, याहवेह; त्या हिंसक लोकांपासून मला सुरक्षित ठेवा, कारण मला पाडण्याचा ते कट करीत आहेत. 5 या गर्विष्ठ लोकांनी मला पकडण्यासाठी पाश लपविले आहेत; त्यांनी रस्त्याच्या बाजूस दोरांचे जाळे पसरले आहे, आणि माझ्या मार्गावर सापळे रचले आहेत. सेला 6 याहवेहला मी म्हणतो, “तुम्हीच माझे परमेश्वर आहात.” याहवेह, माझ्या विनवणीकडे कान द्या. 7 सार्वभौम याहवेह, माझ्या सामर्थ्यवान तारणकर्त्या, युद्ध समयी तुम्हीच माझे शिरस्त्राण व्हा. 8 या दुष्ट लोकांची अभिलाषा पूर्ण होऊ देऊ नका, याहवेह, त्यांच्या योजना यशस्वी होऊ देऊ नका. सेला 9 ज्यांनी मला वेढा घातला आहे, त्यांचे मस्तक गर्वाने उंचावलेले आहे; त्यांच्या मुखातून निघालेले कपट त्यांच्यावरच उलटो. 10 त्यांच्या मस्तकांवर निखारे पडोत; ते अग्नीत फेकले जावोत, जिथून सुटका होणार नाही, अशा खोल खाचात ते टाकले जावोत. 11 या आमच्या भूमीवर निंदकांची वस्ती होऊ नये; संकटे त्यांना शोधून त्यांचा नाश करोत. 12 मला माहीत आहे की याहवेह गरिबांना न्याय देतात, आणि गरजवंतांना खात्रीने साहाय्य करतात. 13 निश्चितच नीतिमान लोक तुमची उपकारस्तुती करतील; आणि नीतिमान तुमच्या समक्षतेत राहतील.

**141** दावीदाचे एक स्तोत्र. हे याहवेह, मी तुमचा धावा करतो, त्वरा करा व मजकडे या, जेव्हा तुमचा धावा करतो, तेव्हा माझे ऐका. 2 तुम्हाला माझी प्रार्थना सुगंधी धुपाप्रमाणे प्रसन्न करो; माझे हात उभारणे सायंकाळच्या यज्ञाप्रमाणे होवो. 3 हे याहवेह, माझ्या मुखावर पहारा ठेवा; माझ्या ओठांच्या द्वारावर नजर ठेवा. 4 माझ्या हृदयास अनीतीकडे ओढले जाऊ देऊ नका, पातक्यांच्या सहवासात राहून, कुकृत्यामध्ये सामील होण्यापासून मला दूर ठेवा; त्यांची मिष्टान्ने खाण्यापासून मला अलिप्त ठेवा. 5 नीतिमान मला शासन करो—ते माझ्यासाठी कृपाच ठरेल; त्यांनी केलेली कान उघाडणी—मला तैलाभ्यंगासारखी वाटते. माझे मस्तक ते कधीही नाकारणार नाही, दुष्ट माणसांच्या दुराचाराविरुद्ध मी सतत प्रार्थना करेन. 6 दुर्जनांचे पुढारी दोषी ठरून, त्यांना कडेलोटाचे शासन होईल; तेव्हा त्यांच्या हितासाठी असलेल्या माझ्या वक्तव्याचे त्यांना स्मरण होईल. 7 ते म्हणतील, “नांगर चालविल्यानंतर जसे मातीची ढेकळे मोडून विखुरतात, तशी आमची हाडे अधोलोकाच्या मुखावर विखुरली गेली आहेत.” (Sheol h7585) 8 परंतु सार्वभौम याहवेह, मी तुमच्यावरच दृष्टी केंद्रित केली आहे; तुम्हीच माझा आश्रय आहात—मला मृत्यूच्या हवाली करू नका. 9 दुष्टांच्या फासातून माझा बचाव करा, त्यांनी टाकलेल्या पाशापासून मला सोडवा. 10 दुर्जन त्यांच्याच जाळयांमध्ये अडकू दे, आणि मी मात्र सुखरुपपणे निसटून जाईन.

**142** दावीदाची मासकीलज्यावेळी तो गुहेमध्ये होता. एक अभ्यर्थना मी अगदी काकुळतीला येऊन याहवेहला विनवणी करतो; मी उच्चस्वरात याहवेहला दयेची विनंती करतो. 2 माझी तक्रार मी त्यांच्यापुढे ओतत आहे, आणि माझे कष्ट मी त्यांच्यासमोर प्रकट करत आहे. 3 कारण माझा आत्मा निराशेने व्याकूळ झाला आहे, तुमच्यासमोर माझी नियती नेहमी स्पष्ट असते. माझ्या शत्रूंनी माझ्या मार्गात सापळे लावले आहेत. 4 ते पाहा! माझ्या उजवीकडे मला साहाय्य करणारा कोणीही नाही; माझी कोणालाही पर्वा नाही. मला काहीच आश्रय नाही; माझ्या जिवाची कोणासही चिंता नाही. 5 मी याहवेहचा धावा करतो; मी म्हटले, “तुम्हीच माझे आश्रयस्थान आहात, जिवंतांच्या भूमीत तुम्हीच माझे विधिलिखित आहात.” 6 माझा धावा ऐका, कारण मी अत्यंत निराशाजनक मन:स्थितीत आहे; माझा छळ करणाऱ्यांपासून तुम्ही

मला मुक्त करा, कारण ते माझ्यापेक्षा अत्यंत बलिष्ठ आहेत. 7 मला
बंदिवासातून मुक्त करा, म्हणजे मला तुमची उपकारस्तुती करता येईल;
मग तुम्ही मला साहाय्य केले, म्हणून नीतिमान लोक माझ्याबरोबर
आनंदोत्सव करतील.

**143** दावीदाचे एक स्तोत्र. हे याहवेह, माझी प्रार्थना ऐका, कृपा
करून माझ्या विनवणीकडे लक्ष द्या, तुमच्या विश्वासूपणा व
नीतिमत्वास अनुसरून माझ्या मदतीच्या हाकेला उत्तर द्या. 2 आपल्या
सेवकाचा न्याय करून त्याला शासन करू नका, कारण जीवितांमध्ये
तुमच्यासमोर नीतिमान असा कोणीही नाही. 3 माझ्या शत्रूने पाठलाग
करून मला पकडले आहे; त्याने मला जमिनीवर तुडविले आहे; जसे
दीर्घकाळाच्या मृतास ठेवावे, तसे त्याने मला अंधारात जखडून ठेवले
आहे. 4 माझा आत्मा निराशेने व्याकूळ झाला आहे; भीतीने मी हतबल
झालो आहे. 5 मला पुरातन काळचे स्मरण होत आहे; तुम्ही केलेल्या
अद्भुत कृत्यांचे मी मनन करतो, आणि तुमचे हस्तकौशल्य माझ्या
विचारांचा विषय आहे. 6 मी माझे हात तुमच्यापुढे पसरतो; शुष्क
भूमीसारखा माझा जीव तुमच्यासाठी तहानलेला आहे. सेला 7 हे याहवेह,
त्वरेने मला उत्तर द्या; माझा आत्मा दुर्बल झाला आहे. तुम्ही आपले मुख
माझ्यापासून लपवू नका, नाहीतर मी अधोलोकात जाणाऱ्यासारखा
होईन. 8 प्रातःकाळी तुमच्या वात्सल्याचा मला प्रेमसंदेश येऊ द्या,
कारण मी तुमच्यावर विश्वास ठेवला आहे. माझे जीवन मी तुमच्या
हातात सोपविले आहे, म्हणून मी कोणत्या मार्गाने चालावे ते मला
दाखवा. 9 याहवेह, मला माझ्या शत्रूच्या तावडीतून सोडवा, कारण
मी तुमच्यामध्ये लपलो आहे. 10 तुमच्या इच्छेप्रमाणे वागण्यास मला
साहाय्य करा, कारण तुम्हीच माझे परमेश्वर आहात; तुमचा उत्तम आत्मा
मला नीतिमार्गाने नेवो. 11 हे याहवेह, तुमच्या नावाचे गौरव व्हावे म्हणून
माझे जीवन सुरक्षित ठेवा; तुमच्या नीतिमत्वास अनुसरून या संकटातून
मला बाहेर काढा. 12 माझ्यावरील तुमच्या अक्षय प्रीतीमुळे माझ्या
शत्रूंचा नाश करा; माझ्या सर्व विरोधकांचा नायनाट करा, कारण मी
तुमचा सेवक आहे.

**144** दावीदाचे स्तोत्र. याहवेहचे, माझ्या आश्रय खडकाचे स्तवन
असो, ते माझ्या बाहूंना युद्धाचे व माझ्या बोटांना लढाईचे
प्रशिक्षण देतात. 2 तेच माझे प्रेमळ परमेश्वर आणि माझा दुर्ग, सुरक्षितेचा
बुरूज आणि माझे मुक्तिदाता आहेत; तेच माझी ढाल, माझे आश्रयस्थान
आहेत, ते माझ्या प्रजेला माझ्यासमोर नम्र करतात. 3 हे याहवेह,
मानव तो काय की तुम्ही त्याची काळजी घ्यावी, नश्वर मानव तो काय
की त्याचा तुम्ही विचार करावा? 4 कारण मानव केवळ श्वासवत
आहे; सरणाऱ्या सावलीप्रमाणे त्याचे आयुष्य आहे. 5 हे याहवेह,
स्वर्ग उघडून खाली या; पर्वतांना स्पर्श करा म्हणजे ते धुमसतील.
6 विजांचे लोळ मोकळे सोडा आणि शत्रूंची दाणादाण उडवून द्या;
आपल्या बाणांचा वर्षाव करून त्यांना उधळून टाका. 7 स्वर्गातून
आपला हात लांब करून मला मुक्त करा; जलप्रवाहाच्या तडाख्यापासून
मला सोडवा, आणि परक्यांच्या सामर्थ्यापासून मला मुक्त करा. 8
त्यांचे मुख असत्य वचनांनी भरलेले असते; त्यांचे उजवे हात कुकर्म
करणारे आहेत. 9 हे परमेश्वरा, मी तुमच्यासाठी एक नवे गीत गाईन;
दशतंत्री वीणेवर मी तुमच्या स्तवनाचे संगीत बनवेन. 10 राजांना विजय
तुमच्यामुळेच प्राप्त होतो, आणि तुमचा सेवक दावीदाला सुरक्षा प्रदान
करणारे तुम्हीच आहात. घातकी तलवारीपासून 11 मला सोडवा;
ज्यांची मुखे लबाड्यांनी भरलेली आहेत, ज्यांचे उजवे हात फसविणारे
आहेत. त्या परक्यांच्या हातून मला सोडवा. 12 मग आमचे पुत्र,
तारुण्यात जोपासलेल्या परिपक्व रोपांसारखे होतील; आमच्या कन्या,
राजमहालाच्या सजावटीसाठी केलेल्या कोरीव स्तंभासारख्या होतील.
13 आमची अन्नभांडारे सर्वप्रकारच्या वस्तूंनी भरलेली असतील, आमच्या
कुरणात आमची मेंढरे सहस्त्रपट, दशसहस्त्रपट वाढतील. 14 आमची
सशक्त गुरे अवजड वाहने वाहतील. आमच्या तटबंदीला भगदाडे पडणार
नाहीत, आम्ही पारतंत्र्यात जाणार नाही, आमच्या रस्त्यावर दुःखाच्या
आरोळ्या ऐकू येणार नाहीत. 15 ज्या लोकांना असे आशीर्वाद लाभतात
ते सुखी होत; ज्या लोकांचा परमेश्वर याहवेह आहे, ते लोक धन्य आहेत.

**145** एक स्तवनगीत. दावीदाची रचना. हे माझ्या परमेश्वरा, माझ्या
राजा, मी तुमचे स्तवन करेन; तुमच्या नावाचे सदासर्वदा
गुणगान करेन. 2 प्रतिदिनी मी तुमचे स्तवन करेन आणि तुमच्या
नावाचे सदासर्वदा गुणगान करेन. 3 याहवेह महान आहेत व परमस्तुत्य
आहेत; त्यांची थोरवी अगाध आहे. 4 तुमच्या अद्भुतकृत्यांची महती एक
पिढी दुसऱ्या पिढीस विदित करते; ते तुमच्या महत्कार्याची उद्घोषणा
करतात. 5 ते तुमच्या गौरवी प्रभुसत्तेची महती सांगतात— आणि मी
तुमच्या अद्भुत कार्यांचे मनन करेन. 6 ते तुमच्या भयावह चमत्कारांची
प्रशंसा करतील— मी तुमच्या थोरवीची घोषणा करेन. 7 ते तुमचा
विपुल चांगुलपणा साजरा करतील, आणि आनंदाने तुमच्या नीतिमत्वाचे
गुणगान गातील. 8 याहवेह करुणामय व कृपावान आहेत, ते मंदक्रोध व
प्रीतीने ओतप्रोत भरलेले आहेत. 9 याहवेह सर्वांशी भलेपणाने वागतात;
त्यांची करुणा त्यांच्या सर्व निर्मितीवर स्थिर असते. 10 याहवेह तुमची
निर्मिती तुमची उपकारस्तुती करेल, आणि तुमचे संतजन तुम्हाला धन्य
म्हणतील. 11 ते तुमच्या साम्राज्याच्या भव्यतेचे वर्णन आणि तुमच्या
सामर्थ्याची उद्घोषणा करतील. 12 जेणेकरून तुम्ही केलेली अद्भुत कृत्ये
आणि तुमच्या अप्रतिम राजवैभवाबद्दल सर्व मानवजातीस ज्ञान होईल.
13 कारण तुमचे राज्य अनंतकाळचे राज्य आहे, तुमची सत्ता पिढ्यान्
पिढ्या चालते. याहवेह आपल्या सर्व प्रतिज्ञांशी एकनिष्ठ आहेत, त्यांच्या
सर्व कार्यात ते विश्वासू असतात. 14 याहवेह सर्व पतन पावलेल्यांस
उचलून घेतात व ओझ्याखाली वाकलेल्यास आधार देऊन उभे करतात.
15 सर्वांची दृष्टी तुमच्याकडे लागलेली असते आणि प्रत्येकास योग्य
वेळेवर तुम्ही अन्य पुरवठा करता. 16 तुम्ही आपला हात उघडता आणि
प्रत्येक जीवित प्राण्यांची सर्व इच्छा पूर्ण करता. 17 याहवेहचे प्रत्येक
मार्ग न्यायीपणाचे आहे आणि ते आपल्या सर्व कृत्यात विश्वासू आहेत.
18 जे त्यांचा धावा करतात, जे खरोखर मनापासून त्यांचा धावा करतात,

त्यासर्वांच्या समीप याहवेह असतात. 19 त्यांचे भय बाळगणाऱ्यांच्या
सर्व इच्छा ते पूर्ण करतात; त्यांचा धावा ते ऐकतात आणि त्यांना
संकटमुक्त करतात: 20 जे त्यांच्यावर प्रीती करतात, याहवेह त्या सर्वांचे
रक्षण करतात, परंतु ते सर्व दुष्टांचा नायनाट करतील. 21 माझे मुख
याहवेहची उपकारस्तुती करेल. प्रत्येक प्राणिमात्र त्यांच्या पवित्र नावाचे
युगानुयुग गौरव करोत.

**146** याहवेहचे स्तवन करा. हे माझ्या जिवा, याहवेहचे स्तवन कर.
2 आजीवन मी याहवेहचे स्तवन करेन; माझ्या जिवात जीव
असेपर्यंत मी माझ्या परमेश्वराची स्तुती करेन. 3 तुम्ही अधिपतींवर
भरवसा ठेवू नका; ते केवळ मानव आहेत; तारण करण्याचे सामर्थ्य
त्यांच्याजवळ नाही. 4 कारण जेव्हा त्यांचे प्राण जातात, त्यांचे शरीर
भूमीत परत जाऊन मिळते; त्या दिवशी त्यांनी केलेल्या सर्व योजना नष्ट
होतात. 5 तो मनुष्य धन्य होय, ज्याचा साहाय्यकर्ता याकोबाचा परमेश्वर
आहे, आणि ज्याची आशा याहवेह त्याच्या परमेश्वराच्या ठायी आहे,
6 कारण त्यांनीच आकाश, पृथ्वी, सागर, आणि त्यातील सर्वकाही
निर्माण केले; ते सदासर्वदा विश्वासयोग्य आहेत. 7 गरीब व गांजलेले
यांना तेच योग्य न्याय देतात; तसेच भुकेल्यांस ते अन्न देतात; याहवेह
बंदिवानांना मुक्त करतात, 8 ते आंधळयास दृष्टी प्रदान करतात, याहवेह
ओझ्याखाली वाकलेल्यास उचलून उभे करतात, परमेश्वराला नीतिमान
प्रिय आहेत. 9 याहवेह निर्वासितांचे रक्षण करतात, आणि अनाथ व
विधवा यांची काळजी घेतात, परंतु दुष्टांच्या योजना ते नष्ट करतात. 10
याहवेह सर्वकाळ राज्य करतील, हे सीयोना, तुझे परमेश्वर पिढ्यान्
पिढ्या राज्य करतील. याहवेहचे स्तवन करा.

**147** याहवेहचे स्तवन करा. परमेश्वराची स्तुतिस्तोत्रे गाणे किती
मनोरम, किती यथार्थ आहे! 2 यरुशलेम याहवेहची निर्मिती
आहे; इस्राएलाच्या निर्वासितांचे तिथे पुनर्वसन करत आहेत. 3 भग्नहृदयी
लोकांना ते बरे करतात, आणि त्यांच्या जखमांवर पट्टी बांधतात.
4 ते ताऱ्यांची गणती करतात आणि त्यांनी प्रत्येकास नाव दिलेले
आहे. 5 ते अत्यंत महान आहेत आणि त्यांचे सामर्थ्य अमर्याद आहे;
त्यांची बुद्धी अपरिमित आहे. 6 याहवेह नम्रजनांस आधार देतात, परंतु
दुर्जनास बहिष्कृत करतात. 7 याहवेहच्या उपकारस्तुतीची गीते गा;
वीणेच्या साथीवर आमच्या परमेश्वराची स्तुतिस्तोत्रे गा. 8 ते मेघांनी
आकाश व्यापून टाकतात; पावसाच्या सरी भूमीवर पाठवितात आणि
डोंगरावर हिरवे गवत रुजवितात. 9 ते पशूंना त्यांचा आहार पुरवितात व
हाक मारणाऱ्या कावळयांच्या पिलांना अन्न देतात. 10 घोड्यांचे बल
त्यांना प्रसन्न करीत नाही, मानवाचे सामर्थ्यवान पायही त्यांना संतुष्ट
करीत नाही. 11 याहवेह त्यांचे भय बाळगणाऱ्यांवर संतुष्ट असतात,
तसेच जे त्यांच्या प्रेमदयेची आशा धरतात. 12 यरुशलेम, याहवेहचा
महिमा कर; सीयोने, आपल्या परमेश्वराची स्तुती कर. 13 कारण
त्यांनी तुझ्या वेशींचे स्तंभ बळकट केले आहेत आणि त्या नगरातील
तुझ्या लोकांस आशीर्वाद दिला आहे. 14 ते तुझ्या सर्व सीमांत शांतता
प्रस्थापित करतात; ते उत्कृष्ट गव्हाने तुला तृप्त करतात. 15 ते आपल्या
आज्ञा पृथ्वीवर पाठवितात; त्यांचा शब्द वायुवेगाने पसरतो. 16 शुभ्र
लोकरीसारख्या हिमाचा ते वर्षाव करतात आणि हिमकण जमिनीवर
राखेसारखे विखुरतात. 17 ते पृथ्वीवर गारांच्या खड्यांप्रमाणे वर्षाव
करतात. त्यांच्या गोठविणाऱ्या थंडीपुढे कोण टिकेल? 18 परंतु नंतर
ते उष्ण हवेला आज्ञा करतात, तेव्हा हिम वितळते आणि जलप्रवाह
वाहू लागतो. 19 त्यांनी आपले वचन याकोबाला विदित केलेले आहेत
आणि विधी व नियम इस्राएलला स्पष्ट केले आहेत. 20 इतर कोणत्याही
राष्ट्राकरिता त्यांनी असे केले नाही; ते त्यांच्या आज्ञांबाबत अज्ञानी
आहेत. याहवेहचे स्तवन करा.

**148** याहवेहचे स्तवन करा. आकाशमंडलातून त्यांचे स्तवन करा;
ऊर्ध्वलोकी त्यांचे स्तवन करा. 2 त्यांचे सर्व स्वर्गदूत, त्यांचे
स्तवन करो; त्यांची सर्व स्वर्गीय सेना, त्यांचे स्तवन करो. 3 सूर्य आणि
चंद्रमा त्यांचे स्तवन करा; सर्व चमकत्या तारकांनो, त्यांचे स्तवन करा.
4 हे सर्वोच्च आकाशांनो, आणि आकाशाच्याही वरील जलांनो, त्यांचे
स्तवन करा. 5 त्यांची निर्मिती याहवेहचे स्तवन करो, कारण त्यांनी
आज्ञा दिली आणि ती अस्तित्वात आली. 6 आणि त्यांनी त्यांची स्थापना
सदासर्वकाळासाठी केली आहे— त्यांची राजाज्ञा कधीही रद्द केली
जाणार नाही. 7 पृथ्वीवर याहवेहचेच स्तवन होवो, खोल महासागर
व त्यातील समस्त विशालकाय प्राण्यांनो, 8 विजा व गारा, हिम व
धुके, तसेच वादळी वारे, त्यांचे स्तवन करोत. 9 अहो पर्वतांनो व सर्व
टेकड्यांनो, फळझाडे व समस्त गंधसरू, 10 हिंस्र पशू आणि सर्व गुरे,
सूक्ष्म जीव व उडणारे पक्षी, 11 पृथ्वीवरील राजे व सर्व राष्ट्रे, अहो
अधिपती व त्यांच्या न्यायाधीशांनो, 12 युवक व युवतींनो, वृद्ध व बालके.
13 तुम्ही सर्व याहवेहचे स्तवन करा, कारण केवळ त्यांच्याच नामाला
महिमा मिळो; त्यांचे ऐश्वर्य पृथ्वी आणि आकाशाहून महान आहे. 14
त्यांनी त्यांच्या लोकांचे शिंग उभारले आहे, ते त्यांच्या सर्व नीतिमान
भक्तांना, त्यांच्या अंतःकरणासमीप, त्यांना अत्यंत प्रिय अशा इस्राएली
लोकांना स्तवन पात्र केले आहे. याहवेहचे स्तवन करा.

**149** याहवेहचे स्तवन करा. याहवेहसाठी एक नवे गीत गा, त्यांच्या
भक्तांच्या सभेत त्यांची स्तुतिस्तोत्रे गायली जावोत. 2 हे
इस्राएला, आपल्या निर्माणकर्त्याच्या ठायी आनंदोत्सव कर; अहो
सीयोनकरांनो, आपल्या राजाच्या ठायी उल्लास पावा. 3 त्यांच्या
गौरवार्थ नृत्य करीत, डफ आणि वीणा यांच्या संगीताच्या साथीवर स्तुती
गा. 4 कारण याहवेहला आपल्या लोकांमुळे संतोष होतो; ते नम्रजनांस
विजयी करतात. 5 या सन्मानामुळे त्यांचे सात्विक उल्लास करोत आणि
आपल्या अंथरुणावर हर्षगीते गावोत. 6 त्यांच्या मुखात परमेश्वराची
आराधना असो आणि दुधारी तलवार त्यांच्या हातात धारण करून, 7
राष्ट्रांसाठी त्यांनी नेमलेल्या शिक्षा अंमलात आणण्यास सिद्ध व्हावे; 8
त्या राष्ट्रांच्या राजांना बेड्या घाला आणि त्यांच्या पुढाऱ्यांना लोखंडी

साखळदंडानी बांधा. 9 त्यांना दिलेल्या शिक्षांची अंमलबजावणी करा.
हाच याहवेहच्या विश्वासू लोकांचा गौरव आहे. याहवेहचे स्तवन करा.

**150** याहवेहचे स्तवन करा. त्यांच्या मंदिरात त्यांचे स्तवन
करा; त्यांच्या विशाल आकाशात त्यांचे स्तवन करा; 2
त्यांच्या सामर्थ्यवान कृत्याबद्दल त्यांचे स्तवन करा; त्यांच्या अद्बितीय
थोरवीकरिता त्यांचे स्तवन करा; 3 कर्णा वाजवून त्यांचे स्तवन करा;
सतार व वीणा वाजवून त्यांचे स्तवन करा; 4 डफ वाजवून व नृत्य करून
त्यांचे स्तवन करा; तंतुवाद्ये व बासरी वाजवून त्यांचे स्तवन करा. 5
खणखणणारे टाळ वाजवून त्यांचे स्तवन करा; झणझणणाऱ्या झांजा
वाजवून त्यांचे स्तवन करा. 6 प्रत्येक सजीव प्राणी याहवेहचे स्तवन
करो. याहवेहचे स्तवन करा.

# नीतिसूत्रे

**1** इस्राएलचा राजा दावीदाचा पुत्र शलोमोनाची नीतिसूत्रे: 2
सुज्ञान आणि शिक्षण मिळविण्यासाठी; अंतर्ज्ञानाचे शब्द समजून
घेण्यासाठी; 3 समंजसपणाने शिक्षणाचा स्वीकार करण्यासाठी, जे योग्य
आहे आणि न्याय्य आणि वाजवी आहे ते करण्यासाठी; 4 जे साधे भोळे
आहेत त्यांना समंजसपणा देण्यासाठी, तरुणांना ज्ञान आणि विवेकबुद्धी
देण्यासाठी— 5 शहाण्यांनी ऐकावे आणि त्यांचे ज्ञान वाढवावे, आणि
विवेकी मनुष्याला मार्गदर्शन मिळावे— 6 ज्ञानी मनुष्याची नीतिसूत्रे
व बोधकथा, प्रसिद्ध वचने आणि कोडे समजण्यासाठी ही नीतिसूत्रे
उपयुक्त होतील. 7 याहवेहचे भय हा सुज्ञानाचा प्रारंभ होय, परंतु मूर्ख
माणसे सुज्ञान आणि शिक्षण तुच्छ लेखतात. 8 माझ्या मुला, तुझ्या
वडिलांचे शिक्षण ऐकून घे आणि तुझ्या आईची शिकवण विसरू नकोस.
9 ती तुझ्या मस्तकाला अलंकृत करणारी माळ आहे आणि तुझ्या
गळ्यातील सुशोभित हार आहे. 10 माझ्या मुला, जर पापी माणसे तुला
मोहात पाडतील, तर त्यांच्यामध्ये जाऊ नकोस. 11 जर ते म्हणतील,
“आमच्याबरोबर ये; आपण निर्दोषांचा रक्तपात करण्यास टपून बसू,
चला काही निरुपद्रवी आत्म्यावर हल्ला करू या; 12 चला कबरेसारखे
आपण त्यांना जिवंत गिळंकृत करू, आणि ते पूर्णपणे आत जातील,
असे खोल खड्ड्यात घालू; (Sheol h7585) 13 आपल्याला सर्वप्रकारचा
मौल्यवान खजिना मिळेल आणि लुटलेल्या वस्तूंनी आपण आपली घरे
भरून टाकू; 14 आमच्याबरोबर चिठ्ठी टाक; लुटलेला माल आपण सर्व
वाटून घेऊ”— 15 माझ्या मुला, तू त्यांच्याबरोबर जाऊ नकोस, तू तुझे
पाऊल त्यांच्या मार्गात टाकू नकोस; 16 कारण दुष्कर्म करण्यासाठी
त्यांचे पाय धावतात, ते रक्तपात करण्यासाठी चपळाई करतात. 17 जिथे
पक्षी स्वतःच्या डोळ्यांनी पाहू शकेल असे जाळे पसरविणे किती व्यर्थ
आहे! 18 ही माणसे स्वतःच्याच रक्तपातासाठी टपून बसतात; ते केवळ
स्वतःवरच हल्ला करतात! 19 गैरमार्गाने प्राप्त केलेल्या मिळकतीचा
जे लोभ धरतात, त्या सर्वांचे हे मार्ग आहेत; असे मिळविलेले धन, ते
ज्यांच्या मालकीचे आहे त्यांचाच प्राण घेते. 20 बाहेर उघडपणे सुज्ञान
मोठ्याने आव्हान करते. भर चौकात ती तिचा आवाज उंचावते; 21
भिंतीच्या उंचीवरून ती ओरडते शहराच्या वेशीजवळ ती भाषण करते:
22 “अहो भोळ्यांनो, तुमच्या भोळेपणावर तुम्ही किती दिवस प्रीती
करणार? कुचेष्टा करणारे तुम्ही कुचेष्टा करण्यात किती वेळ आनंद
करणार आणि मूर्खांनो, किती काळ तुम्ही ज्ञानाचा द्वेष करणार? 23 मी
केलेली कान उघाडणी लक्षात घेऊन आणि पश्चात्ताप करा! तेव्हा मी
माझे विचार तुम्हाला कळवेन, तुम्हाला माझ्या शिक्षणाची माहिती करून
देईन. 24 परंतु जेव्हा मी बोलाविले तेव्हा तुम्ही ऐकण्याचे नाकारले,
आणि जेव्हा मी माझे हात पुढे केले, तेव्हा कोणीही लक्ष दिले नाही. 25
कारण तुम्ही माझा सल्ला जुमानला नाही. आणि माझे धमकाविणे
स्वीकारले नाहीत, 26 यामुळेच मी देखील तुमच्या संकटकाळी तुम्हाला
हसेन; जेव्हा तुमच्यावर आपत्ती येईल तेव्हा मी चेष्टा करेन— 27 जेव्हा
आपत्ती तुम्हाला वादळासारखी ग्रासून टाकेल, जेव्हा अनर्थ तुम्हाला
वावटळीसारखे वाहून नेईल, जेव्हा संकटे आणि त्रास तुम्हाला पूर्णपणे
दडपून टाकतील. 28 “तेव्हा तुम्ही मला हाक माराल, परंतु मी उत्तर
देणार नाही; ते माझा शोध करतील, परंतु मी सापडणार नाही, 29 कारण
त्यांनी ज्ञानाचा तिरस्कार केला, आणि याहवेहचे भय धरणे निवडले
नाही. 30 ते माझा सल्ला स्वीकारणार नाहीत; आणि माझ्या दटावणीला
झिडकारतील म्हणून, 31 त्यांना त्यांच्या मार्गाचे प्रतिफळ मिळेल, आणि
त्यांच्या वाईट कृत्यांचे पुरेपूर परिणाम मिळतील. 32 कारण भोळ्यांचा
हट्टीपणा त्यांना मारून टाकेल, आणि मूर्खांचा स्वच्छंदीपणा त्यांचा नाश
करेल; 33 परंतु जे माझे ऐकतात ते सर्वजण सुरक्षित राहतील, आणि
निर्भयतेने स्वस्थ जीवन जगतील.”

**2** माझ्या मुला, जर तू माझी वचने स्वीकारशील आणि माझ्या आज्ञा
तुझ्या अंतःकरणात साठवून ठेवशील, 2 सुज्ञानाच्या वाणीकडे
लक्ष देशील, तुझे मन समंजसपणाकडे लावशील— 3 मग निश्चितच,
अंतर्ज्ञानाचा धावा करशील, आणि शहाणपण आत्मसात करण्यासाठी
आक्रोश करशील, 4 आणि जसा चांदीचा शोध घेतात तसा तू त्याचा
शोध घेशील आणि गुप्त खजिना शोधतात तसा त्याचा शोध घेशील, 5
तेव्हा याहवेहचे भय काय आहे हे तुला समजेल आणि परमेश्वराविषयीचे
ज्ञान तुला प्राप्त होईल. 6 कारण याहवेह सुज्ञान देतात; त्यांच्या
मुखातून ज्ञान आणि शहाणपण येते. 7 नीतिमानांसाठी ते यश साठवून
ठेवतात, जे निर्दोषपणाने वागतात त्यांच्यासाठी ते ढाल आहेत. 8
कारण ते न्यायींच्या मार्गाचे रक्षण करतात आणि त्यांच्या भक्तांचे मार्ग
सुरक्षित ठेवतात. 9 तेव्हा कोणते योग्य व कायदेशीर, आणि निष्पक्ष
आहे—प्रत्येक सन्मार्ग तुला समजेल. 10 सुज्ञान तुझ्या अंतःकरणात
प्रवेश करेल, आणि ज्ञान तुझ्या जीवाला सुखदायक वाटेल, 11
तेव्हा विवेक तुझे रक्षण करेल, आणि सुज्ञता तुझे राखण करेल. 12
सुज्ञान तुला दुष्ट माणसांच्या मार्गापासून आणि शब्द विकृत करणाऱ्या
माणसांपासून दूर ठेवील. 13 ज्यांनी अंधाराच्या मार्गाने जाण्यासाठी
सरळपणाच्या वाटा सोडून दिल्या आहेत, 14 ज्यांना दुष्कर्म करण्यात
आनंद वाटतो आणि दुष्टांच्या कुटिलपणात जे उल्हासतात, 15 ज्यांचे
मार्ग विकृत आहेत आणि ज्यांच्या वाटा विपरीत आहेत! 16 सुज्ञान तुला
व्यभिचारी स्त्रीपासूनसुद्धा वाचवेल, तिच्या लाडिक बोलण्याने तुला
मोहात पाडणाऱ्या स्त्रीपासून, 17 जिने आपला तारुण्यातील सहचारी
सोडला आहे, आणि परमेश्वरासमोर केलेल्या कराराकडे दुर्लक्ष केले
आहे. 18 निश्चितच तिच्या घराची वाट मृत्यूकडे नेते आणि तिचे मार्ग
मृतांच्या आत्म्यांकडे घेऊन जातात. 19 तिच्याकडे जाणारा परत येत
नाही किंवा जीवनाच्या मार्गावर येत नाही. 20 यासाठी तू चांगल्या
लोकांच्या मार्गाने चालशील, आणि नीतिमानांच्या मार्गांचे अवलंबन
करशील. 21 कारण सरळ मनाचे लोकच देशात वस्ती करतील, आणि
निर्दोष लोक त्यात टिकून राहतील; 22 परंतु दुष्ट लोकांचा देशातून समूळ
नायनाट होईल आणि तेथील अविश्वासू लोकांचे उच्चाटन केले जाईल.

**3** माझ्या मुला, माझे शिक्षण विसरू नकोस, परंतु माझ्या आज्ञा
तुझ्या अंतःकरणात ठेव; 2 कारण ते तुझे आयुष्य अनेक वर्षापर्यंत
वाढवतील, आणि तुला शांती आणि समृद्धी देतील. 3 प्रीती आणि
विश्वासूपणा तुला कधीही न त्यागोत; त्यांना तू आपल्या गळ्याभोवती
बांध, त्यांना तुझ्या हृदयाच्या पटलावर लिहून ठेव. 4 तेव्हा तुला
परमेश्वराकडून आणि मानवाकडून अनुग्रह आणि सत्कीर्ती प्राप्त होतील.
5 तुझ्या संपूर्ण अंतःकरणापासून याहवेहवर भरवसा ठेव; आणि
स्वतःच्या बुद्धीवर अवलंबून राहू नकोस; 6 तुझ्या सर्व मार्गात तू त्यांच्या
अधीन राहा, आणि ते तुझे मार्ग सुकर करतील. 7 स्वतःच्या नजरेत
शहाणा होऊ नकोस; परंतु याहवेहचे भय बाळग आणि वाईटापासून दूर
राहा. 8 हे तुझ्या देहाला आरोग्य देईल आणि तुझ्या हाडांना पोषकसत्व
असे होईल. 9 तुझ्या संपत्तीने व तुझ्या सर्व पिकातील प्रथमफळांनी
याहवेहचा सन्मान कर; 10 तेव्हा तुझी कोठारे समृद्धीने भरून जातील,
आणि तुझी कुंडे नव्या द्राक्षारसाने ओसंडून वाहतील. 11 माझ्या पुत्रा,
याहवेहच्या शिस्तीचा अनादर करू नकोस; आणि त्यांनी निषेध केल्यास
चिडू नकोस; 12 कारण जसा पिता मुलामध्ये आनंद मानतो, तसाच
त्याला शिस्तही लावतो, याहवेह ज्यांच्यावर प्रीती करतात त्यालाच ते
शिस्त लावतात! 13 ज्या मानवांना सुज्ञान प्राप्त होते व जे समंजसपणा
मिळवितात ते धन्य. 14 कारण ती चांदीपेक्षा फारच लाभदायक आहे,
आणि ती सोन्यापेक्षा अधिक फायदा मिळवून देते. 15 ती माणकांपेक्षा
अधिक मोलवान आहे, तुला आवडणाऱ्या कोणत्याही वस्तूंची तुलना तू
तिच्याबरोबर करू शकत नाही. 16 तिच्या उजव्या हातात दीर्घायुष्य
आहे; आणि धन व सन्मान तिच्या डाव्या हातात आहेत. 17 तिचे मार्ग
आनंदाचे मार्ग आहेत, आणि तिच्या सर्व पाऊलवाटांवर शांती आहे. 18
जे तिला धरून राहतात त्यांना ती जीवनीवृक्षाप्रमाणे आहे; जे तिला घट्ट
धरून राहतात, ते आशीर्वादित होतील. 19 सुज्ञानाद्वारे याहवेह यांनी
पृथ्वीचा पाया घातला, शहाणपणाने त्यांनी आकाशाची स्थापना केली;
20 त्यांच्या ज्ञानाने खोल जले दुभागली गेली, आणि मेघांनी दवबिंदू
पाडले. 21 माझ्या मुला, सुज्ञान आणि शहाणपण तुझ्यापासून दूर जाऊ
देऊ नकोस, खरे न्यायीपण आणि विवेक जपून ठेव; 22 तीच तुझ्यासाठी
जीवन असतील, ती तुझ्या गळ्याला कृपेचा अलंकार असतील. 23 मग
तू तुझ्या मार्गाने सुरक्षित चालशील, आणि तुझा पाय अडखळणार नाही.
24 तू जेव्हा विसावा घेशील, तेव्हा तुला भीती वाटणार नाही; जेव्हा तू
झोपशील, तुला गोड झोप लागेल. 25 अचानक आलेल्या संकटाला तू
भिऊ नकोस, किंवा दुष्टांचा नाश होत असला तरी भिऊ नकोस; 26
कारण याहवेह तुझ्या बाजूला असतील आणि ते तुझा पाय पाशात
अडकू देणार नाहीत. 27 ज्यांचे भले करण्याचे तुझ्या आटोक्यात असले,
तर ते करण्यास नाकारू नकोस. 28 एखादी वस्तू तुझ्याजवळ असताना
"तू जा आणि उद्या परत ये, म्हणजे मी ती तुला देईन" असे तुझ्या
शेजाऱ्याला म्हणू नकोस. 29 तुझा शेजारी तुझ्याजवळ विश्वासाने राहत
असताना, त्याचे वाईट करण्याचे योजू नकोस. 30 जर एखाद्या मनुष्याने
तुझे वाईट केले नसेल, तर निष्कारण त्याच्यावर आरोप करू नकोस. 31
हिंसा करणाऱ्यांचा हेवा करू नकोस, किंवा त्यांच्या कोणत्याही मार्गाची
निवड करू नकोस. 32 कारण याहवेहना कुटिलपणाबद्दल घृणा वाटते,
परंतु जो नीतिमान आहे त्याला ते विश्वासपात्र मानतात. 33 याहवेहचा
शाप दुष्ट मनुष्याच्या घरावर असतो, परंतु नीतिमानाचे घर ते आशीर्वादित
करतात. 34 उपहास करणाऱ्या गर्विष्ठांचा ते उपहास करतात, परंतु जे
नम्र आणि पीडित आहेत त्यांच्यावर ते कृपा करतात. 35 ज्ञानी लोकांना
सन्मानाचा वारसा मिळतो, परंतु मूर्खांना फक्त लज्जा मिळते.

**4** माझ्या मुलांनो, वडिलांचा बोध ऐका; त्याकडे लक्ष द्या आणि
समंजसपणा मिळवा. 2 मी तुम्हाला उत्तम शिक्षण देतो, म्हणून
माझ्या शिक्षणाचा त्याग करू नका. 3 कारण मी सुद्धा माझ्या वडिलांचा
पुत्र होतो, अजूनही सुकुमार आणि आईच्या प्रेमात वाढलेला. 4
तेव्हा त्यांनी मला शिकविले आणि ते मला म्हणाले, "तुझ्या संपूर्ण
अंतःकरणापासून माझ्या वचनांकडे लक्ष लाव; माझ्या आज्ञांचे पालन
कर आणि तुला आयुष्य लाभेल. 5 सुज्ञान मिळव, समंजसपणा प्राप्त
कर; माझी वचने विसरू नकोस किंवा त्यांच्यापासून दूर जाऊ नकोस. 6
सुज्ञानाचा त्याग करू नकोस आणि ती तुझे रक्षण करेल; तिच्यावर
प्रीती कर आणि ती तुझे रक्षण करेल. 7 सुज्ञानाची सुरवात अशी आहे:
सुज्ञान मिळव. जरी तुझ्याकडे जे आहे ते सर्व खर्च करावे लागले तरी
समंजसपणा मिळव. 8 तू जर तिला उराशी जतन करशील तर ती तुला
उंचावेल. ज्ञानाला दृढ आलिंगन दे मग ती तुला सन्मान देईल; 9 ती तुझ्या
मस्तकांवर फुलांचा मुकुट देईल, आणि एक सुशोभित मुकुट तुला सादर
करेल." 10 माझ्या मुला ऐक, मी काय म्हणतो ते स्वीकार, आणि तुझ्या
आयुष्याची वर्षे पुष्कळ होतील. 11 मी तुला सुज्ञान मार्गाचे शिक्षण देतो,
आणि तुला सरळ वाटेने चालवितो. 12 जेव्हा तू चालशील तेव्हा तुझी
पावले लटपटणार नाहीत; जेव्हा तू धावशील, तू अडखळणार नाहीस.
13 बोधवचने अंमलात आण, ती सोडून देऊ नकोस; त्यांचे चांगले रक्षण
कर, कारण त्यातच तुझे जीवन आहे. 14 दुष्ट लोकांच्या मार्गात पाऊल
टाकू नकोस, किंवा दुष्कृत्ये करणाऱ्यांच्या मार्गाने जाऊ नकोस. 15
त्याकडे पाठ फिरव, त्यावर प्रवास करू नकोस, त्यांच्यापासून मागे वळ
आणि तुझ्या मार्गाने जा, 16 कारण दुष्कर्म केल्याशिवाय ते स्वस्थ राहू
शकत नाहीत; कोणाला तरी अडखळून पाडल्याशिवाय त्यांना झोप येत
नाही. 17 दुष्टाईने मिळविलेली भाकर ते खातात, आणि हिंसाचाराचा
द्राक्षारस ते पितात. 18 नीतिमान मनुष्याचा मार्ग सकाळच्या सूर्याप्रमाणे
आहे, दुपारपर्यंत अधिकच तेजस्वी होणाऱ्या प्रकाशाप्रमाणे तो आहे. 19
दुर्जनाचा मार्ग गडद अंधकाराप्रमाणे आहे; त्यांना काय अडखळविते हे
त्यांना कळत नाही. 20 माझ्या मुला, मी काय म्हणतो त्याकडे लक्ष
दे; माझ्या शब्दांकडे तुझे कान लाव. 21 त्यांना तुझ्या दृष्टीपासून दूर
जाऊ देऊ नकोस; त्यांना तुझ्या अंतःकरणात ठेव; 22 कारण ज्यांना
ते मिळतात, त्यांच्यासाठी ते जीवन आहेत. आणि ते त्यांच्या संपूर्ण
शरीराला आरोग्य देतात. 23 सर्वापेक्षा अधिक तुझ्या हृदयाचे रक्षण
कर, कारण जे सर्वकाही तू करतो, ते त्यापासून निष्पन्न होते. 24
सर्वप्रकारच्या विकृती तुझ्या मुखापासून दूर ठेव; अपभ्रष्ट भाषण तुझ्या

ओठांपासून दूर असू दे. 25 तुझ्या डोळ्यांनी तू समोरच पाहा; तुझी नजर एकटक सरळ बघेल असे लक्ष ठेव. 26 तुझ्या पावलांसाठी असलेल्या मार्गाचा काळजीपूर्वक विचार कर, आणि तुझ्या सर्व मार्गामध्ये तू स्थिर राहा. 27 उजवीकडे किंवा डावीकडे वळू नकोस; वाईटाकडे जाण्यापासून तुझी पावले दूर ठेव.

**5** माझ्या मुला, माझ्या सुज्ञानाकडे लक्ष दे, माझ्या अंतर्ज्ञानाच्या शब्दांकडे तुझे कान लाव; 2 म्हणजे विवेकबुद्धीने कसे वागावे हे तुला समजेल; आणि तुझी जीभ ज्ञानाचे रक्षण करेल. 3 कारण वेश्येचे बोलणे मधासारखे गोड असते, आणि तिचा संवाद तेलापेक्षा गुळगुळीत असतो; 4 परंतु शेवटी ती दवण्यासारखी कडू होते, आणि दुधारी तलवारीसारखी तीक्ष्ण होते. 5 तिचे पाय मृत्यूकडे जातात; तिची पावले सरळ अधोलोकी नेतात. **(Sheol h7585)** 6 जीवनाच्या मार्गाचा ती विचारच करीत नाही; तिचे मार्ग लक्ष्यहीनपणे भटकणारे आहेत, परंतु तिला ते माहीत नसते. 7 मग माझ्या मुलांनो, आता माझे ऐका; माझ्या बोधवचनांकडे पाठ फिरवू नका. 8 तू तुझा मार्ग अशा स्त्रीपासून दूर ठेव, तिच्या घराच्या दाराजवळ जाऊ नकोस, 9 असे होऊ नये की, तू तुझा मान दुसऱ्यांना द्यावा आणि तुझी प्रतिष्ठा क्रूर मनुष्याला मिळावी, 10 तुझ्या संपत्तीवर अपरिचित लोक मेजवानी करू नये आणि तुझ्या परिश्रमाने दुसऱ्याचे घर समृद्ध होऊ नये. 11 तुझ्या जीवन अंती, जेव्हा तुझे मांस आणि शरीर झिजून जाईल तेव्हा तू दुःखाने विव्हळशील. 12 तू म्हणशील, “अरेरे! मी शिस्तीचा किती तिरस्कार केला! माझ्या अंतःकरणाने सुधारणा कशी फेटाळून लावली! 13 मी माझ्या शिक्षकांचे आज्ञापालन करत नसे किंवा मला मार्गदर्शन करणाऱ्यांकडे मी कानाडोळा करीत असे. 14 आणि म्हणून लवकरच मी परमेश्वराच्या लोकांच्या सभेपुढे गंभीर अडचणीत आलो.” 15 तुझ्या स्वतःच्याच टाकीतील पाणी पी. तुझ्या स्वतःच्या विहिरीतील वाहते पाणी पी. 16 तुझे पाण्याचे झरे भरून रस्त्यांवर वाहून जावेत काय, तुझे पाण्याचे प्रवाह भर चौकात वाहावेत काय? 17 ते फक्त तुझ्यासाठीच असावेत, अनोळख्यांबरोबर ते कधीच वाटली जाऊ नयेत. 18 तुझे पौरुषत्व आशीर्वादित होवो; आपल्या तारुण्यातील पत्नीबरोबर आनंदाचा उपभोग घे. 19 प्रेमळ हरिणी सारखी, एक आकर्षक हरिणी अशी ती— तिचे स्तन तुला नेहमीच तृप्त करोत, तिच्या प्रेमाने तू नेहमी धुंद व्हावेस. 20 माझ्या मुला, तू दुसऱ्या मनुष्याच्या पत्नीबरोबर धुंद का व्हावेस? आणि स्वैर स्त्रीला आलिंगन का द्यावेस? 21 कारण तुझे मार्ग याहवेहच्या दृष्टीसमोर आहेत, आणि ते तुझ्या सर्व मार्गांचे परीक्षण करतात. 22 दुष्ट मनुष्याचा नाश स्वतःच्याच पातकांनी होतो; त्याचीच पातके दोर बनून त्याला पाशात पकडून ठेवतात. 23 कारण शिस्त नसल्यामुळे त्यांना मरण येईल, आणि स्वतःच्याच अतिमूर्खपणाने ते फसविले जातील.

**6** माझ्या मुला, जर तू तुझ्या शेजाऱ्याला जामीन राहिला आहेस, जर अनोळखी व्यक्तीचे कर्ज फेडण्यास तू वचनबद्ध झालास, 2 तर तू जे काही बोललास, त्यामुळे तू जाळ्यात सापडला आहेस, तुझ्या मुखातील वचनाने तू स्वतःला पाशात गुंतवून घेतले आहेस. 3 म्हणून माझ्या मुला, स्वतःला सोडवून घेण्यासाठी तू असे कर, कारण तू तुझ्या शेजाऱ्याच्या हाती सापडला आहेस: तर आता स्वतःला विनम्र करून त्याच्याकडे जा, आणि तुझ्या शेजाऱ्याची झोप उडवून टाक! 4 तुझ्या डोळ्यांना झोप येऊ देऊ नकोस, तुझ्या पापण्यास डुलक्या घेऊ नयेत. 5 शिकाऱ्याच्या हातातून निसटलेल्या हरिणासारखे, पारध्याच्या जाळ्यातून सुटलेल्या पक्ष्याप्रमाणे तू स्वतःला मुक्त कर. 6 अरे आळशा, मुंगीकडे जा; तिचे मार्ग लक्षात घे आणि शहाणा हो! 7 तिला कोणीही अधिकारी, मुकादम किंवा अधिपती नाही, 8 तरी ती तिचा अन्नसामुग्रींचा साठा उन्हाळ्यात करते आणि कापणीच्या हंगामात तिचे अन्न गोळा करते. 9 परंतु हे आळशी माणसा, तू तिथे किती वेळ झोपून राहशील? तुझ्या झोपेतून तू केव्हा जागा होणार आहेस? 10 आणखी थोडीशी झोप, आणखी थोडीशी डुलकी उशाखाली हात घेऊन थोडी विश्रांती— 11 आणि दारिद्र्य एका चोराप्रमाणे तुझ्यावर येईल आणि हत्यारबंद मनुष्याप्रमाणे गरिबी येईल. 12 त्रास देणारा आणि दुष्कर्मी मनुष्य, जो विपरीत गोष्टी बोलत फिरतो, 13 तो आपले डोळे मिचकावितो, आपल्या पायांनी इशारे करतो, आणि आपल्या हाताच्या बोटांनी खुणावतो. 14 जो त्याच्या हृदयात फसवणुकीच्या दुष्ट योजना करतो— तो नेहमीच भांडणाला चेतावणी देतो. 15 म्हणून त्याच्यावर अचानक आपत्ती येईल; अकस्मात त्याचा नाश होईल, त्यावर कोणताही इलाज नसेल. 16 याहवेह सहा गोष्टींचा द्वेष करतात, त्यांना सात गोष्टींचा तिटकारा वाटतो: 17 गर्विष्ठ नजर, खोटे बोलणारी जीभ, हात, जे निष्पाप व्यक्तीचा रक्तपात करतात, 18 हृदय, जे दुष्ट योजना करते पाय, जे दुष्कृत्य करण्यासाठी वेगाने धावतात. 19 खोटा साक्षीदार, जो असत्याचा वर्षाव करतो, आणि जो व्यक्ती समाजात कलह निर्माण करतो. 20 माझ्या मुला, तू तुझ्या पित्याची आज्ञा पाळ, आणि आपल्या आईचे शिक्षण सोडू नकोस. 21 त्यांचे उपदेश तू सतत आपल्या हृदयात बाळग; ते तुझ्या गळ्यात बांधून ठेव. 22 तू चालशील, तेव्हा ते तुला मार्ग दाखवेल; तू झोपशील, तेव्हा ते तुझे संरक्षण करतील; आणि तू जागा होशील तेव्हा ते तुझ्याशी बोलतील. 23 कारण ही आज्ञा एक दीपक आहे, आणि हे शिक्षण म्हणजे प्रकाश आहे; आणि ही सुधारणा व बोधवचने जीवनाचे मार्ग आहेत. 24 ते तुला तुझ्या शेजाऱ्याच्या पत्नीपासून दूर ठेवतात, वाईट स्त्रीच्या लाडिक शब्दांपासून सांभाळतात. 25 तू मनात तिच्या सौंदर्याबद्दल वासना बाळगू नकोस, किंवा तिच्या नेत्रकटाक्षांमुळे तिला वश होऊ नकोस. 26 कारण एका भाकरीचे मोल देऊन वेश्या मिळू शकते, परंतु दुसऱ्या मनुष्याची पत्नी तुझ्या जीविताची शिकार करते. 27 मनुष्याने आपल्या उराशी निखारे बाळगले, तर त्याची वस्त्रे जळून जाणार नाहीत काय? 28 मनुष्य जळत्या कोळशावरून चालल्यास त्याचे पाय पोळणार नाहीत काय? 29 तो असा मनुष्य आहे जो दुसऱ्याच्या पत्नीबरोबर व्यभिचार करतो; तिला स्पर्श करणाऱ्या कोणाही मनुष्याला शिक्षा झाल्यावाचून राहणार नाही. 30 भुकेला असताना भूक भागविण्यासाठी जो चोरी करतो, त्याचा लोक तिरस्कार करीत नाहीत. 31 तरीही जर

तो चोर सापडला जातो, तर त्याला सातपट भरपाई करावी लागते, त्याला त्याच्या घरातील सर्व संपत्ती विकावी लागते. 32 परंतु जो मनुष्य जारकर्म करतो त्याच्याकडे समज नसते; जो कोणी तसे करतो तो स्वत:चाच नाश करतो. 33 त्याला घाव आणि अप्रतिष्ठा प्राप्त होतील, आणि त्याची निंदा कधीही पुसली जाणार नाही. 34 कारण मत्सर नवऱ्यास संतप्त करतो आणि जेव्हा तो सूड घेतो, तेव्हा तो दयामाया दाखविणार नाही. 35 तो कोणतीही नुकसान भरपाई स्वीकारणार नाही; कितीही मोठी लाच असली तरी ती तो घेण्यास नकार देईल.

**7** माझ्या मुला, माझी वचने जपून ठेव, आणि माझ्या आज्ञांचा तुझ्या अंत:करणात संग्रह करून ठेव. 2 माझ्या आज्ञा पाळ म्हणजे तू जगशील; तुझ्या डोळयातील बाहुलीप्रमाणे माझ्या शिक्षणाचे रक्षण कर. 3 तुझ्या बोटांवर त्या बांधून ठेव; तुझ्या हृदयाच्या पटलावर त्या लिहून ठेव. 4 “तू माझी बहीण आहेस,” असे सुज्ञानाला, आणि “तू माझा नातेवाईक आहेस.” असे अंतर्ज्ञानाला म्हण. 5 म्हणजे व्यभिचारी स्त्रीपासून ते तुला दूर ठेवतील, वाईट स्त्रीच्या मोहक शब्दांपासून ते तुझे रक्षण करतील. 6 माझ्या घराच्या खिडकीच्या जाळीतून मी खाली पाहिले. 7 साध्याभोळ्या पुरुषांमध्ये मी पाहिले, तरुणांचे मी अवलोकन केले, तेव्हा एक विवेकशून्य तरुण दिसला. 8 तो तिच्या रस्त्याच्या कोपऱ्याजवळून जात होता, सरळ तिच्या घराच्या दिशेने जात होता. 9 दिवसाच्या संधिप्रकाशात, संध्याकाळच्या अंधारात होता. 10 तेव्हा त्याला भेटण्यास एक स्त्री बाहेर आली, तिची वेशभूषा एखाद्या वेश्येसारखी असून ती धूर्त होती. 11 (ती बेशिस्त आणि उर्मट आहे, तिचे पाय तिच्या घरात थांबत नाहीत; 12 आता तर ती रस्त्यावर आहे, आता ती चौकांमध्ये आहे प्रत्येक कोपऱ्यावर ती लपून बसते.) 13 तिने त्याला पकडले आणि त्याचे चुंबन घेतले, आणि निर्लज्ज चेहऱ्याने ती म्हणाली: 14 आज मी माझी वचने पूर्ण केली आहेत, आणि माझ्या घरी शांत्यर्पण आहे. 15 म्हणूनच मी तुला भेटण्यासाठी बाहेर आले; मी तुला शोधले आणि तू मला सापडलास! 16 मी माझा पलंग इजिप्त येथील सुताच्या रंगीबेरंगी चादरींनी सजविला आहे. 17 ऊद, जटामांसी व दालचिनी यांनी मी माझी शय्या सुवासिक केली आहे. 18 चल, पहाटेपर्यंत आपण प्रीतीत यथेच्छ रमून जाऊ; आपण एकमेकांना प्रीतीचा आनंद देऊ! 19 कारण माझे पती घरी नाहीत; ते दूर प्रवासाला गेले आहेत; 20 त्याने त्याची पैशाची थैली भरून घेतली आहे, आणि पौर्णिमेपर्यंत ते घरी परत येणार नाहीत. 21 तिच्या मोहक शब्दांनी वश करून तिने त्याला चुकीच्या मार्गाने नेले; गोड बोलून तिने त्याला मोहात पाडले. 22 जसा बैल कापणाऱ्याकडे जातो, तसा क्षणातच तो तिच्यामागे गेला, हरिण जसे दोऱ्यांच्या फासात पाय टाकते 23 तोपर्यंत बाण त्याच्या पोटात घुसतो, ज्याप्रमाणे पक्षी वेगाने पाशात अडकतो, त्याला माहीत नसते की ते त्याच्यासाठी प्राणघातक आहे. 24 तर आता माझ्या मुलांनो, माझे ऐका, मी काय बोलतो त्याकडे लक्ष द्या. 25 तुमचे मन तिच्या मार्गाकडे जाऊ देऊ नका किंवा बहकून जाऊन तिच्या वाटेने जाऊ नका. 26 कारण तिने अनेकांना घायाळ करून पाडले आहे; होय, अनेक बलवान पुरुषांना तिने ठार केले आहे. 27 तिचे घर हा नरकाकडे जाणारा महामार्ग, आणि खाली मृत्यूच्या खोल्यांकडे नेणारा मार्ग आहे. (Sheol h7585)

**8** सुज्ञान हाक मारीत नाही काय? समंजसपणा तिचा आवाज उंचावत नाही का? 2 रस्त्याच्या कडाला असलेल्या सर्वात उंच जागेवर, जिथे रस्ते जोडले जातात, तिथे ती उभी राहते; 3 शहरात जाणाऱ्या वेशीच्या बाजूला, प्रवेशद्वाराजवळ ती ओरडून सांगते: 4 “अहो लोकांनो, मी तुम्हाला बोलाविते; सर्व मानवजातीला उद्देशून मी माझा आवाज उंचाविते. 5 तुम्ही जे साधे भोळे आहात, समंजसपणा मिळवा; तुम्ही जे मूर्ख आहात, तुमचे लक्ष तिच्याकडे लावा. 6 ऐका! कारण मला काही विश्वसनीय गोष्टी सांगावयाच्या आहेत; योग्य ते सांगण्यासाठीच मी माझे मुख उघडते. 7 माझे मुख सत्य बोलते, कारण माझे ओठ वाईटाचा तिरस्कार करतात. 8 माझ्या मुखातील सर्व शब्द नीतियुक्त आहेत; त्यातील कोणतेही कुटिल किंवा विकृत नाहीत. 9 जे समजूतदार आहेत त्यांच्यासाठी ते योग्य आहेत; ज्यांना ज्ञान प्राप्त झाले आहे त्यांना माझी वचने सुबोध आहेत. 10 चांदीऐवजी माझ्या शिक्षणाची, आणि उत्कृष्ट सोन्यापेक्षा ज्ञानाची निवड कर.” 11 कारण सुज्ञान माणकांपेक्षा उत्तम आहे; तुला आवडणाऱ्या इतर कशाशीही तिची तुलना करता येणार नाही. 12 मी, सुज्ञान, सुज्ञतेबरोबर सहवास करते; ज्ञान आणि विवेक माझ्याकडे आहेत. 13 याहवेहचे भय धरणे म्हणजे वाईटाचा द्वेष करणे होय. गर्विष्ठपणा आणि उद्धटपणा, वाईट आचरण आणि विकृत भाषण यांचा मी तिरस्कार करते. 14 सल्ला आणि अचूक न्याय माझे आहेत; माझ्याकडे अंतर्ज्ञान आणि शक्ती आहे. 15 माझ्याद्वारे राजे राज्य करतात, आणि शासन करणारे योग्य तो हुकूमनामा देतात; 16 माझ्याच साहाय्याने अधिपती, आणि थोर—पृथ्वीवरील सर्व नीतिमान शासक अधिकार चालवितात. 17 जे माझ्यावर प्रीती करतात त्यांच्यावर मी प्रीती करते, आणि जे माझा शोध घेतात त्यांना मी सापडते. 18 माझ्याजवळ समृद्धी आणि सन्मान, कायम टिकणारी संपत्ती आणि वैभव आहे. 19 माझे फळ शुद्ध सोन्यापेक्षा चांगले आहे; आणि माझ्याद्वारे उत्पन्न झालेले उत्कृष्ट चांदीपेक्षा उत्तम आहे. 20 मी नीतिमत्वाच्या मार्गाने चालते, आणि न्याय्यमार्गाला धरून राहते, 21 माझ्यावर प्रीती करणाऱ्यांना मी समृद्ध वारसा देते. आणि त्यांची भांडारे मी भरून टाकते. 22 याहवेहनी त्यांच्या सृष्टी निर्मितीमध्ये, त्यांच्या पुरातन कार्यापूर्वी सर्वप्रथम माझी रचना केली; 23 अनादिकालापासून माझी रचना केलेली होती. जेव्हा जग अस्तित्वात आले तेव्हाच. 24 जेव्हा महासागर नव्हते, माझा जन्म झाला होता, तेव्हा ओसांडून वाहणारे झऱ्यांचे पाणीही नव्हते; 25 पर्वत त्यांच्या जागेवर स्थिर झाले नव्हते, डोंगर निर्माण होण्यापूर्वी माझा जन्म झाला होता, 26 त्यांनी पृथ्वी किंवा तिच्यावरील शेती किंवा पृथ्वीवरील धूळ निर्माण करण्यापूर्वी, 27 त्यांनी जेव्हा आकाशास त्याच्या ठिकाणी स्थापित केले, जेव्हा त्यांनी महासागरावर क्षितिजाची सीमा निश्चित केली तेव्हा मी तिथे होते, 28 जेव्हा त्यांनी वर अंतराळात ढगांची प्रस्थापना केली आणि पृथ्वीगर्भातील झऱ्यांना घट्ट बसविले, 29 जेव्हा त्यांनी सागरांना त्यांच्या मर्यादा घालून दिल्या, जेणेकरून पाणी त्यांच्या

आदेशाचे उल्लंघन करणार नाही. जेव्हा त्यांनी पृथ्वीचा पाया घातला,
30 तेव्हा मी सतत त्यांच्याभोवती होते; दिवसेंदिवस मी आनंदाने भरून
गेले होते. नेहमी त्यांच्या उपस्थितीचा आनंद मी घेत होते, 31 त्यांच्या
संपूर्ण जगामध्ये मी आनंदात आहे आणि मानवजातीमध्ये आनंद करीत
आहे. 32 “आणि म्हणून मुलांनो, माझे ऐका, कारण जे माझी शिकवण
आचरतात, ते खूप आशीर्वादित होतात. 33 माझे शिक्षण कान देऊन
ऐका आणि शहाणे व्हा; त्याचा अव्हेर करू नका. 34 जे व्यक्ती माझे
ऐकतात ते धन्य आहेत, ते रोज माझ्या दारांवर लक्ष ठेऊन, माझ्या
दारावर प्रतीक्षा करतात. 35 कारण ज्याला मी सापडते, त्याला जीवन
सापडते, आणि त्याला याहवेहकडून कृपादृष्टी मिळते. 36 परंतु जे माझा
शोध घेण्यास चुकतात, ते स्वतःचे नुकसान करून घेतात; जे सर्व माझा
तिरस्कार करतात, ते मृत्यूची आवड धरतात.”

**9** सुज्ञानाने आपले घर बांधले आहे; तिने तिचे सात खांब तयार केले
आहेत. 2 तिने तिच्याकडील मांसाहारी भोजन आणि तिचा द्राक्षारस
तयार केला आहे; तिने तिचा मेजसुद्धा सजविलेला आहे. 3 तिने तिच्या
दासांना बाहेर पाठवले आहे आणि ती नगराच्या सर्वात उच्च स्थानावरून
हाक मारते, 4 “जे साधे भोळे आहेत, त्या सर्वांनी माझ्या घरी यावे!” जे
विवेकशून्य आहेत त्यांना ती म्हणते, 5 “इकडे या, माझे भोजन खा
आणि मी मिसळलेला द्राक्षारस प्या. 6 तुमचे साधेभोळेपण सोडून द्या
म्हणजे तुम्ही जगाल; अंतर्ज्ञानाच्या मार्गाने चला.” 7 जो टवाळखोराची
सुधारणा करतो, तो अपमानास आमंत्रण देतो; जो दुष्टाला धमकावितो
त्याला अपशब्द ऐकावे लागतात. 8 टवाळखोरांची कान उघाडणी करू
नकोस, नाहीतर ते तुझा द्वेष करतील, सुज्ञ माणसांची कान उघाडणी
कर आणि ते तुजवर प्रीती करतील. 9 सुज्ञ मनुष्याला बोध कर म्हणजे
ते अधिक ज्ञानी होतील; नीतिमानाला शिक्षण दे आणि ते त्यांच्या
शिक्षणात भर घालतील. 10 याहवेहचे भय हा सुज्ञानाचा प्रारंभ होय,
आणि पवित्र परमेश्वराचे ज्ञान असणे हा सुज्ञपणा होय. 11 कारण
सुज्ञतेद्वारे तुझ्या आयुष्याचे दिवस बहुगुणित होतील, आणि तू उदंड
आयुष्य जगशील. 12 जर तू सुज्ञ असशील, तर तुझे सुज्ञान तुला बक्षीस
देईल; जर तू टवाळखोर आहेस, तर तू एकटाच यातना भोगशील. 13
मूर्खपणा एक स्वैर स्त्री आहे; ती साधीभोळी आहे आणि तिला काहीच
समज नाही. 14 ती तिच्या घराच्या दारात बसून राहते, तसेच नगराच्या
सर्वात उंच ठिकाणावर ती बसते. 15 तिच्याजवळून जाणाऱ्या, जे सरळ
त्यांच्या मार्गाने जातात, त्यांना ती बोलाविते, 16 “जे साधे भोळे आहेत
त्या सर्वांनी माझ्या घरी यावे!” जे विवेकशून्य आहेत त्यांना ती म्हणते,
17 “चोरलेले पाणी गोड लागते; गुप्तपणे खाल्लेले अन्न चविष्ट लागते!”
18 परंतु त्यांना हे माहीत नसते की तिथे मेलेले लोक आहेत, आणि तिचे
पाहुणे आता मृतांच्या खोल जगात आहेत. **(Sheol h7585)**

**10** शलोमोनाची नीतिसूत्रे: शहाणा मुलगा त्याच्या पित्याला सुखी
करतो, परंतु मूर्ख मुलगा त्याच्या आईला दुःख देतो. 2 दुष्टाईने
मिळविलेल्या संपत्तीस कायमचे मूल्य नसते परंतु धार्मिकता मृत्यूपासून
सोडविते. 3 याहवेह नीतिमान मनुष्याची उपासमार होऊ देत नाहीत,
परंतु दुष्टांची लालसा ते विफल करतात. 4 आळशी हात दरिद्री आणतो,
परंतु उद्योगी हात समृद्धी आणतो. 5 जो उन्हाळ्यात धान्याचा संचय
करतो तो शहाणा पुत्र होय; परंतु जो कापणीच्या हंगामात झोपून राहतो,
तो लज्जेचे कारण होतो. 6 आशीर्वाद हे नीतिमानाच्या मस्तकावरील
मुकुट आहेत, परंतु दुष्ट मनुष्याच्या मुखात हिंसाचार दडलेला असतो. 7
आशीर्वाद देण्यासाठी धार्मिक मनुष्याच्या नावाचा उपयोग करतात,
परंतु दुष्ट मनुष्याचे नाव सडून नाहीसे होते. 8 सुज्ञ अंतःकरणाचा मनुष्य
आज्ञेचे पालन करतो, परंतु मूर्खपणाची बडबड करणाऱ्या नाश होतो. 9
सात्विक व सरळ जीवन जगणारा निर्भयतेने चालतो, परंतु जो वाकड्या
मार्गानी चालतो तो पकडला जाईल. 10 जो दुष्टतेने डोळे मिचकावितो तो
दुःखाचे कारण होतो, परंतु मूर्खपणाची बडबड करणाऱ्या नाश होतो.
11 नीतिमान मनुष्याचे मुख जीवनाचा झरा आहे, परंतु दुष्टाचे मुख
हिंसाचाराचे कोठार आहे. 12 द्वेष कलहास चेतावणी देतो; परंतु प्रीती
सर्व अपराधांवर आच्छादन टाकते. 13 बुद्धिमानाच्या ओठावर सुज्ञान
वास करते, परंतु विवेकहीन माणसाच्या पाठीला काठीच योग्य ठरते.
14 सुज्ञ ज्ञानाचा साठा करतात, परंतु मूर्खाचे तोंड नाश ओढवून घेते. 15
धनवानाचे धन हे त्यांचे तटबंदीचे नगर आहे, दारिद्र्य गरिबाचा नाश आहे.
16 नीतिमान मनुष्याचे वेतन जीवन आहे, परंतु दुष्ट मनुष्याचे कमाई पाप
आणि मृत्यू हेच आहेत. 17 जो शिस्तीचे पालन करतो तो जीवनाचा मार्ग
दाखवितो परंतु जो सुधारणा नाकारतो, तो दुसऱ्यांची दिशाभूल करतो.
18 जो लबाडीच्या ओठांनी आपला द्वेष गुप्त ठेवितो, आणि चहाडी करीत
फिरतो, तो मूर्ख होय. 19 शब्द बहुगुणित करून पापाचा अंत होत नसतो;
पण सुज्ञ लोक त्यांच्या जिभेवर ताबा ठेवतात. 20 नीतिमान मनुष्याची
जिव्हा उत्तम चांदीप्रमाणे असते; परंतु दुष्टाच्या अंतःकरणास क्षुल्लक
किंमत असते. 21 नीतिमान मनुष्याचे ओठ अनेकांचे पोषण करतात;
परंतु मूर्ख लोक विवेकाच्या अभावी नाश पावतात. 22 याहवेहच्या
आशीर्वादाने धनसंपत्ती मिळते, त्यासाठी दुःखद परिश्रम करावे लागत
नाहीत. 23 दुष्कर्म करण्यात मूर्खाला मौज वाटते, परंतु सुज्ञ मनुष्य
सुज्ञानात आनंदित होतो. 24 दुष्ट ज्याला भितो, तेच त्याच्यावर येईल;
नीतिमान मनुष्याच्या इच्छा फलद्रूप होतील. 25 वावटळ येते आणि
निघून जाते, तसा दुष्ट नाहीसा होतो, परंतु नीतिमान सर्वकाळ स्थिर उभा
राहतो. 26 जशी आंब दातांस आणि धूर डोळ्यास, तसा आळशी मनुष्य
त्याला पाठविणाऱ्यास आहे. 27 याहवेहचे भय बाळगल्याने मनुष्याचे
आयुष्य वाढते, परंतु दुष्टांच्या आयुष्याची वर्षे कमी केली जातील. 28
नीतिमानाची अपेक्षा त्याला आनंद देते, परंतु दुष्टाची आशा फोल ठरते.
29 याहवेहचा मार्ग निर्दोष मनुष्याचे आश्रयस्थान आहे, परंतु जे दुष्कर्म
करतात त्यांच्यासाठी तो नाश आहे. 30 नीतिमान लोक कधीही उपटून
टाकले जाणार नाहीत, परंतु दुष्ट लोक भूमीवर राहणार नाहीत. 31
धार्मिक मनुष्याच्या मुखाद्वारे सुज्ञानाचे फळ निघते; परंतु विकृत जिभेला
शांत केले जाईल. 32 नीतिमानांच्या ओठास कृपा कशी मिळवावी हे
कळते, परंतु दुष्ट लोकांचे मुख फक्त विकृतीच जाणते.

**11** खोट्या तराजूंचा याहवेह तिरस्कार करतात, परंतु अचूक वजनांमुळे त्यांना संतोष होतो. 2 जेव्हा गर्विष्ठपणा येतो, तेव्हा अप्रतिष्ठा येते, परंतु विनम्रपणामुळे सुज्ञता प्राप्त होते. 3 नीतिमानाचा प्रामाणिकपणा त्यांचे मार्गदर्शन करतो, परंतु दुटप्पीपणा विश्वासघातकी लोकांचा नाश करतो. 4 प्रकोपाच्या दिवशी संपत्ती निरुपयोगी असते, परंतु नीतिमत्व मृत्यूपासून सोडविते. 5 निर्दोष मनुष्यांची नीतिमत्ता त्यांचे मार्ग सरळ ठेवते, परंतु दुष्ट लोक स्वतःच्या वाईट कृत्यांमुळे पतन पावतात. 6 नीतिमानाची नीतिमत्ता त्यांची सुटका करते, परंतु विश्वासघातकी त्यांच्या वाईट इच्छांच्या सापळ्यात अडकतात. 7 मर्त्य मानवांच्या मृत्यूने त्यांच्यावर ठेवलेली आशा नष्ट होते, त्यांच्या बळाने दिलेली सर्व अभिवचने निष्फळ होतात. 8 नीतिमान मनुष्याची संकटातून सुटका होते, आणि त्याऐवजी दुष्ट मनुष्य संकटात पडतो. 9 भक्तिहीनाच्या मुखातील शब्दांनी त्यांच्या शेजाऱ्याचा नाश होतो, परंतु नीतिमानांचे ज्ञान त्यांना नाशापासून वाचवते. 10 जेव्हा नीतिमानांना यश मिळते, तेव्हा नगर आनंदित होते; जेव्हा दुष्टांचा नाश होतो, तेव्हा जयघोषाचा निनाद होतो. 11 नीतिमानांच्या आशीर्वादाने नगरास प्रतिष्ठा मिळते, परंतु दुष्टांच्या वक्तव्यांनी नगराचा नाश होतो. 12 विवेकहीन मनुष्य आपल्या शेजाऱ्याची निंदा करतो; परंतु सुज्ञ मनुष्य आपल्या जिभेला लगाम घालतो. 13 चहाडी करण्याने विश्वासघात होतो, परंतु विश्वासपात्र मनुष्य गुपित उघड करीत नाही. 14 मार्गदर्शन नसल्यामुळे राष्ट्राचे पतन होते, परंतु अनेक सल्लागार असल्याने विजय प्राप्त होतो. 15 अपरिचितासाठी जामीन राहिल्यास निश्चितच नुकसान होते, परंतु जो जामीनकीच्या हात मिळवणी नकार देतो तो सुरक्षित राहतो. 16 दयाळू अंतःकरणाची स्त्री सन्मान संपादन करते, परंतु क्रूर पुरुष केवळ धन संपादन करतो. 17 दयाळू मनुष्य स्वतःचे भले करतो, परंतु क्रूर माणसे स्वतःवर नाश ओढवून घेतात. 18 दुष्ट मनुष्याला मिळणारे वेतन फसवे असते; परंतु जो नीतिमत्तेचे बीज पेरतो त्याला निश्चितच बक्षीस मिळते. 19 खरोखरच नीतिमानाला जीवन प्राप्त होते, परंतु दुष्कर्मांच्या मागे लागणारा मृत्यू ओढवून घेतो. 20 याहवेह विकृत अंतःकरणाच्या लोकांचा तिरस्कार करतात, परंतु निर्दोष मार्गाने चालणारे त्यांना प्रसन्न करतात. 21 याची खात्री असू दे: दुष्टाला शिक्षा झाल्यावाचून राहणार नाही, परंतु जे नीतिमान आहेत त्यांची सुटका होईल. 22 विवेकहीन सुंदर स्त्री जणू डुकराच्या नाकातील सोन्याची नथच समजावी. 23 नीतिमानाच्या इच्छेचा परिणाम चांगलाच असतो, परंतु दुष्टाची आशा केवळ प्रकोपच आणते. 24 एक मनुष्य सढळ हाताने देतो, तरी देखील तो समृद्ध होतो, दुसरा मनुष्य दान देणे उगाच नाकारतो आणि तो दरिद्री बनतो. 25 उदार मनुष्याची समृद्ध होईल; आणि जो दुसऱ्याला प्रोत्साहित करतो, तो स्वतः प्रोत्साहित होईल. 26 जो धान्य अडवून ठेवतो, त्याला लोक शाप देतात, परंतु जो विकण्यास इच्छुक असतो, त्याच्यासाठी लोक आशीर्वादाची प्रार्थना करतात. 27 जो चांगल्या गोष्टींचा शोध घेतो त्याला कृपा प्राप्त होते, परंतु जो वाईटाचा शोध घेतो त्याला तेच प्राप्त होते. 28 जे आपल्या संपत्तीवर भरवसा ठेवतात, तो नाश पावतील, परंतु नीतिमान मनुष्य हिरव्या पानाप्रमाणे बहरेल. 29 जो कोणी त्याच्या कुटुंबाचा नाश करतो, त्याला वारसा म्हणून केवळ वारा मिळेल, आणि मूर्खाला शहाण्याचा दास व्हावे लागेल. 30 नीतिमानाचे फळ जीवनाचा वृक्ष होय, आणि जो सुज्ञ आहे तो आत्मे जिंकतो. 31 जर नीतिमान लोकांना पृथ्वीवरच प्रतिफळ मिळते, तर मग अनीतिमान व पापी लोकांना किती मोठ्या प्रमाणात मिळेल!

**12** जो अनुशासन प्रिय असतो, त्याला ज्ञान प्रिय असते, परंतु ज्याला सुधारणा अप्रिय आहे, तो मूर्ख होय. 2 नीतिमान लोकांना याहवेहची कृपा प्राप्त होते, पण दुष्ट योजना रचणाऱ्या मनुष्याला याहवेह दोषी ठरवितात. 3 दुष्टाईने मनुष्य जीवनात स्थिर होत नाही, परंतु नीतिमानाचे मूळ कधीही उखडले जाऊ शकत नाही. 4 सद्गुणी स्त्री ही आपल्या पतीला मुकुटासारखी आहे, परंतु लज्जास्पद आचरणाची स्त्री त्याच्या हाडातील कुजकेपणासारखी आहे. 5 नीतिमान मनुष्याची योजना न्याय्य असते, परंतु दुष्टाचा सल्ला कपटी असतो. 6 दुष्टांचे शब्द रक्तपात करण्यासाठी टपून बसतात परंतु नीतिमानाची वाणी त्यांची सुटका करते. 7 दुर्जन उलथून टाकले जातात आणि ते नाहीसे होतात, परंतु नीतिमानाचे घराणे स्थिर उभे असते. 8 मनुष्याची प्रशंसा त्याच्या सुज्ञतेच्या प्रमाणात होते, परंतु विकृत बुद्धीचा मनुष्य घृणित लेखला जातो. 9 स्वतःला प्रतिष्ठित दर्शवून अन्नाचा अभाव असण्यापेक्षा सर्वसामान्य असून जवळ चाकर बाळगणारा असणे बरे. 10 नीतिमान मनुष्य आपल्या पशूच्या गरजांची काळजी घेतो, परंतु दुष्ट लोकांच्या अत्यंत दयेची कार्येही क्रूर असतात. 11 जे आपल्या जमिनीची मशागत करतात, त्यांना विपुल अन्न प्राप्त होईल, परंतु जे काल्पनिक गोष्टींच्या मागे धावतात, तो अक्कलशून्य असतात. 12 दुष्ट मनुष्य दुर्जनांच्या लुटीची इच्छा करतो, परंतु नीतिमानाचे मूळ टिकून राहते. 13 दुष्ट माणसे त्यांच्या वाईट बोलण्याने जाळ्यात सापडतात, आणि निर्दोष मनुष्य संकटातून बाहेर पडतो. 14 ओठांच्या फळांनी मनुष्याला उत्तम गोष्टी लाभतात, आणि हाताने केलेले परिश्रम त्यांना बक्षीस मिळवून देतात. 15 मूर्खाच्या दृष्टीने त्याचाच मार्ग योग्य असतो; परंतु जो शहाणा असतो, तो सल्ला ऐकतो. 16 मूर्ख आपला क्रोध तत्काळ दर्शवितो, परंतु सुज्ञ मनुष्य अपमानाकडे दुर्लक्ष करतो. 17 प्रामाणिक साक्षीदार सत्य बोलतो, परंतु खोटा साक्षीदार लबाड बोलतो. 18 निष्काळजीपणाने बोललेला शब्द तलवारीसारखा वेध घेतो, पण सुज्ञ मनुष्याचे बोलणे आरोग्यदायी असते. 19 सत्याची वाणी काळाच्या कसोटीला उतरते; लबाड जिव्हा ही क्षणिक आहे. 20 दुष्ट योजना करणाऱ्यांच्या हृदयात कपट असते, पण शांतीची मसलत देणाऱ्यांच्या हृदयात आनंद असतो. 21 न्यायी मनुष्यावर काहीही आपत्ती येणार नाही, परंतु दुष्ट लोक आपत्तींनी व्याप्त होतात. 22 असत्य बोलणाऱ्या ओठांची याहवेह घृणा करतात, परंतु विश्वसनीय लोक त्यांना प्रसन्न करतात. 23 सुज्ञ मनुष्य आपले ज्ञान प्रकट करीत नाही, परंतु मूर्खाचे हृदय मूर्खपणाचे प्रसरण करतात. 24 उद्योगी मनुष्यांचे हात सत्ता धारण करतील, पण आळशी लोकांना गुलामगिरी प्राप्त होईल. 25 चिंता हृदयावर दबाव आणते,

परंतु कोमल शब्द ते आनंदित करते. 26 नीतिमान आपल्या मित्रांची
काळजीपूर्वकरित्या निवड करतो, परंतु दुष्ट लोकांचा मार्ग त्यांनाच
बहकवितो. 27 आळशी मनुष्याला शिकार मिळत नाही, परंतु उद्योगी
मनुष्याला भरपूर मिळकत प्राप्त होते. 28 नीतिमानाचा मार्ग जीवनाकडे
जातो, व त्याच मार्गामधून अमरत्व मिळते.

**13** सुज्ञ पुत्र आपल्या पित्याच्या शिक्षणाकडे काळजीपूर्वक लक्ष
देतो, परंतु उपहास करणारा पुत्र फटकारास प्रतिसाद देत नाही.
2 मनुष्याला आपल्या मुखफळांनी उत्तम वस्तू प्राप्त होतील, परंतु कपटी
माणसांना हिंसाचाराची भूक लागते. 3 जो आपल्या जिभेवर नियंत्रण
ठेवतो, तो स्वतःचे जीवन सुरक्षित ठेवतो, परंतु जो विचार न करता
बोलतो, त्याचा नाश होतो. 4 आळशी मनुष्याची भूक कधीही मिटत
नाही, परंतु परिश्रमी मनुष्याच्या इच्छांचे पूर्णपणे समाधान केले जाते. 5
नीतिमान मनुष्य असत्याचा तिरस्कार करतो, परंतु दुष्ट मनुष्य स्वतःस
दुर्गंधपूर्ण करतो आणि आपली बेअब्रू करून घेतो. 6 नीतिमत्ता प्रामाणिक
मनुष्याचे रक्षण करते, परंतु दुष्टता पापी मनुष्याचा संपूर्ण विनाश
करते. 7 एखादी व्यक्ती श्रीमंतीचा दिखावा करते, परंतु त्याच्याकडे
काहीच नसते; दुसरा एकजण गरीब असल्याचा दिखावा करतो, परंतु
त्याच्याकडे खूप संपत्ती असते. 8 मनुष्याची श्रीमंती त्याच्या जिवासाठी
खंडणी देईल, परंतु गरीब मनुष्य अशा धमकीला प्रतिसाद देऊ शकत
नाही. 9 नीतिमानाचा प्रकाश तेजाने चकाकतो, परंतु दुष्टांची ज्योत
विझवली जाते. 10 जिथे भांडण आहे, तिथे गर्व उपस्थित आहे, परंतु
जे सल्ला स्वीकारतात त्यांच्यामध्ये सुज्ञता दिसून येते. 11 कपटाने
मिळविलेला पैसा झिजून नाहीसा होतो, पण जो हळूहळू कष्ट करून
पैसे जमा करतो, तो त्यात वाढ करतो. 12 आशेची प्राप्ती लांबणीवर
पडल्याने हृदय खिन्न होते, परंतु पूर्ण झालेली इच्छा, जीवनाचा वृक्ष
ठरते. 13 जो शिक्षण तुच्छ लेखतो, तो त्याचा परिणाम भोगेल, पण
जो आज्ञेचा मान राखतो, त्याला चांगले प्रतिफळ मिळेल. 14 सुज्ञ
मनुष्याचा सल्ला जीवनाचा झरा आहे. तो मृत्यूच्या पाशांपासून त्याला
वाचवितो. 15 उत्तम बोधामुळे अनुकूलता मिळते, परंतु विश्वासहीनांचे
मार्ग त्यांना नाशाकडे नेतात. 16 जे सर्व समंजस असतात ते सुज्ञतेने
वागतात, परंतु मूर्ख माणसे त्यांचा मूर्खपणा उघड करतात. 17 दुष्ट
निरोप्या संकटात पडतो, परंतु विश्वासू राजदूत आरोग्य आणतो. 18 जो
शिक्षण नाकारतो, त्याला दारिद्र्य आणि लज्जा प्राप्त होतात, पण
जो अनुशासन स्वीकारतो, त्याला सन्मान लाभेल. 19 अभिलाषेची
तृप्ती जीवाला मधुरता प्रदान करते, परंतु मूर्ख वाईटापासून वळण्याचा
तिरस्कार करतात. 20 सुज्ञ मनुष्याबरोबर मैत्री कर आणि सुज्ञ हो,
कारण मूर्खांच्या सोबतीने नुकसान सहन करावे लागते. 21 अरिष्ट
पातक्यांच्या पाठीस लागते, परंतु नीतिमानांना कल्याण हे प्रतिफळ
मिळेल. 22 चांगला मनुष्य त्यांच्या नातवंडांसाठी वतन ठेवून जातो,
परंतु पापी मनुष्याने साठविलेले धन नीतिमानांसाठी असते. 23 विना
नांगरलेल्या शेतातही गरिबांसाठी धान्य उत्पन्न होते; परंतु अन्याय ते
हिरावून नेते. 24 जे कोणी छडी आवरतात, ते त्यांच्या लेकरांचा द्वेष
करतात, परंतु जे त्यांच्या लेकरांवर प्रेम करतात, ते त्यांना काळजीपूर्वक
शिस्त लावतात. 25 नीतिमान मनुष्य जिवाचे समाधान होईपर्यंत खातो,
परंतु दुर्जनाचे पोट रिकामेच राहते.

**14** सुज्ञ स्त्री तिचे घर बांधते, परंतु मूर्ख स्त्री स्वतःच्याच हातांनी
ते जमीनदोस्त करते. 2 जो कोणी याहवेहचे भय बाळगतो तो
प्रामाणिकपणाने वागतो, परंतु जे त्यांचा तिरस्कार करतात त्यांचा मार्ग
कपटी असतो. 3 मूर्खाचे तोंड गर्विष्ठपणाने शब्दांचा मारा करते, पण सुज्ञ
मनुष्यांचे ओठ त्यांचे रक्षण करतात. 4 जिथे कुठे बैल नाहीत तेथील
गोठा रिकामा राहतो, परंतु बैलाच्या शक्तीने विपुल धान्याचा उपज होतो.
5 खरा साक्षीदार कधीच फसवणूक करीत नाही, परंतु खोटा साक्षीदार
मुखातून असत्य ओततात. 6 टवाळखोर ज्ञान शोधतो आणि ते त्याला
मिळत नाही, परंतु ज्ञान विवेकी मनुष्याकडे सहजपणे येते. 7 मूर्खापासून
दूर राहा; त्यांच्या बोलण्यातून तुला ज्ञान मिळणार नाही. 8 सुज्ञाची
सुज्ञता त्याला योग्य मार्ग दाखविते, पण मूर्खाची मूर्खता धोका आहे. 9
मूर्खांना पापक्षालन करणे म्हणजे थट्टा वाटते, परंतु नीतिमान लोकांमध्ये
सदिच्छा असतात. 10 प्रत्येक अंतःकरणाला स्वतःचे दुःख माहीत असते;
आणि इतर कोणीही त्याच्या आनंदात सहभागी होऊ शकत नाही.
11 दुष्टांचे घर नाश केले जाईल, परंतु नीतिमानाचा तंबू समृद्ध होईल.
12 एक मार्ग असा आहे जो योग्य वाटतो; परंतु तो शेवटी मृत्यूकडे
नेतो. 13 हसत असतानाही हृदयात वेदना असू शकते, उल्हासाचा अंत
दुःखातही होऊ शकतो. 14 विश्वासहीनांना त्यांच्या मार्गाची फळे पूर्ण
भोगावी लागतील, तसेच चांगल्या माणसांना त्यांच्या चांगुलपणाची. 15
साधीभोळी माणसे कोणत्याही गोष्टींवर विश्वास ठेवतात. परंतु सुज्ञ
विचारपूर्वक पाऊल उचलतो. 16 सुज्ञ मनुष्य याहवेहचे भय बाळगतो
आणि वाईटापासून दूर राहतो. परंतु मूर्ख तापट डोक्याचा आहे आणि
तरीही त्याला सुरक्षित वाटते. 17 तापट मनुष्य मूर्खपणाच्या गोष्टी करतो,
आणि दुष्टसंकल्पांची योजना करणाऱ्याचा तिरस्कार केला जाईल. 18
साध्याभोळयाला मूर्खपणाचा वारसा मिळतो, तर सुज्ञाला सुज्ञतेचा
मुकुट मिळतो. 19 दुष्ट माणसे चांगल्या माणसांसमोर, आणि पापी
माणसे नीतिमानांच्या द्वारासमोर शरणागती पत्करतील. 20 गरिबांना
त्यांचे शेजारीसुद्धा टाळतात, परंतु श्रीमंतांना मात्र खूप मित्र असतात.
21 शेजाऱ्यांचा द्वेष करणे पाप आहे; परंतु जे गरजवंतावर दया करतात ते
धन्य! 22 वाईट योजना करणारे मार्ग चुकत नाहीत काय? परंतु चांगल्या
योजना करणाऱ्यांना प्रीती आणि विश्वासूपणा मिळतो. 23 सर्व कष्टाच्या
कामाने नफा मिळतो, पण व्यर्थ बडबड भिकेला लावते. 24 सुज्ञांची
संपत्ती त्यांचा मुकुट असतो, परंतु मूर्खांची मूर्खता केवळ मूर्खताच
उत्पन्न करते. 25 सत्य सांगणारा साक्षीदार प्राण वाचवितो, परंतु खोटा
साक्षीदार विश्वासघातकी आहे. 26 याहवेहचा आदर मनुष्याचा दृढ गड
आहे, आणि त्याच्या मुलाबाळांना सुरक्षित आश्रयस्थान लाभते. 27
याहवेहचे भय म्हणजे जीवनाचा झरा आहे, ते मृत्यूच्या पाशांपासून
त्याला वाचवते. 28 वाढती लोकसंख्या राजाचे वैभव आहे; पण लोकच
नसले तर अधिपती नष्ट होतो! 29 जो सहनशील आहे, तो मोठा शहाणा

आहे; पण उतावळ्या स्वभावाचा मनुष्य मूर्खता प्रकट करतो. 30 शांत हृदय शरीर निरोगी ठेवते; परंतु ईर्षा हाडे कुजविते. 31 गरिबांवर जुलूम करणारा आपल्या उत्पन्नकर्त्याचा अपमान करतो; पण ज्यांना गरजवंताची दया येते, ते परमेश्वराचा सन्मान करतात. 32 नीतिमान माणसे मृत्युक्षणीही परमेश्वरात आश्रयस्थान शोधतात. पण जेव्हा संकट येते तेव्हा दुर्जन चिरडले जातात. 33 सुज्ञता विवेकी माणसाच्या हृदयास विश्रांती आणते; पण मूर्खांसही ती स्वत:ची ओळख करून देते. 34 नीतिमत्ता राष्ट्राची उन्नती करते. पण पाप कोणत्याही लोकास निंदनीय ठरविते. 35 सुज्ञ सेवक राजाला प्रसन्न करतो, परंतु निर्लज्ज सेवक राजास क्रोधिष्ट करतो.

**15** कोमल उत्तराने राग शांत होतो, परंतु कठोर शब्द क्रोध वाढवितात. 2 सुज्ञाची जिव्हा ज्ञानाने सुशोभित असते, परंतु मूर्खाचे तोंड मूर्खपणाच ओकते. 3 याहवेहचे नेत्र सर्वठिकाणी बघत आहेत, सज्जनांवर व दुर्जनांवर त्यांची नजर असते. 4 सांत्वन करणारी जीभ जीवनदायी वृक्ष आहे, पण विकृत जीभ आत्म्याला चिरडते. 5 मूर्ख पुत्र आपल्या आईवडिलांचा सल्ला तुच्छ मानतो, पण जो सुधारणा अंमलात आणतो, तो सुज्ञपणा दाखवितो. 6 नीतिमानाच्या घरात विपुल समृद्धी असते, परंतु दुष्टांची मिळकत विनाश आणते. 7 सुज्ञ व्यक्तीचे मुख ज्ञान पसरवितात, पण मूर्खांचे हृदय सरळ नसते. 8 याहवेहना दुष्टांच्या अर्पणाचा वीट आहे, पण सात्विक लोकांची प्रार्थना त्यांना आनंद देते. 9 दुष्टांच्या मार्गाचा याहवेह तिरस्कार करतात, पण जे नीतिमत्तेचा माग धरतात, त्यांच्यावर ते प्रीती करतात. 10 जे सत्याचा मार्ग सोडतात, कठोर शिक्षा त्यांची वाट पाहते; आणि जे सुधारणेचा तिरस्कार करतील ते मृत्युमुखी पडतील. 11 मृत्यू आणि नाश याहवेह यांच्या दृष्टीपुढे आहेत— त्याअर्थी त्यांना मानवी हृदयाचे ज्ञान कितीतरी अधिक असेल! (Sheol h7585) 12 उपहास करणाऱ्यांना सुधारणेचा राग येतो, म्हणून ते ज्ञानी लोकांस टाळतात. 13 आनंदी मन चेहरा उल्हासित करते, आणि शोकाकुल हृदयाने आत्मा खिन्न होतो. 14 सुज्ञ अंत:करण ज्ञानाचा माग घेते, परंतु मूर्खाच्या मुखाचे मूर्खतेनेच पोषण होते. 15 पीडित मनुष्याचे सर्व दिवस क्लेशपूर्ण असतात, परंतु आनंदी अंत:करणासाठी सर्व दिवस उत्सवाचे असतात. 16 अपार समृद्धी व त्यासोबत येणारी संकटे असणे, यापेक्षा याहवेहचे भय बाळगून मिळविलेले थोडेसे धन बरे. 17 तिरस्काराने वाढलेल्या पुष्ट वासराच्या मेजवानीपेक्षा प्रीतीने वाढलेले थोडेसे शाकाहारी जेवण बरे. 18 तापट मनुष्य कलह उत्पन्न करतो, तर शांत स्वभावाचा मनुष्य तंटा मिटवितो. 19 आळशी माणसाच्या वाटेवर काटेरी कुंपणासारखे अडथळे असतात, परंतु नीतिमानाची वाट राजमार्ग असतो. 20 समंजस पुत्र आपल्या वडिलांना आनंद देतो, परंतु मूर्ख मनुष्य आईला तुच्छ लेखतो. 21 मूर्खपणा विवेकहीन मनुष्यास आनंदित करतो, पण विवेकशील मनुष्य सरळ मार्ग धरून राहतो. 22 उपयुक्त सल्लागार नसले की योजना विफल होतात; परंतु अनेक सल्लागारांमुळे योजना यशस्वी होतात. 23 समर्पक उत्तर देण्यात प्रत्येकाला आनंद वाटतो— योग्य वेळी उपयुक्त सल्ला मिळणे किती महत्त्वाचे आहे! 24 सुज्ञासाठी जीवनाचा मार्ग वर चढविणारा असतो तो त्याला खाली मृतलोकात जाण्यापासून रोखतो. (Sheol h7585) 25 गर्विष्ठांच्या घराचा याहवेह नाश करतात, परंतु ते विधवांची दगडी सीमा सुरक्षित ठेवतात. 26 दुष्टाच्या विचारांचा याहवेह द्वेष करतात, परंतु प्रेमळ शब्द त्यांच्या दृष्टीने निर्मळ असतात. 27 लोभी माणसे त्यांच्या परिवारांवर विनाश आणतात, परंतु जो लाच घेणे घृणित मानतो, तो जगेल. 28 नीतिमानाचे अंत:करण विचारांती उत्तर देते, परंतु दुष्टाच्या मुखातून दुर्वचनाचा प्रवाह निघतो. 29 याहवेह दुष्टांपासून फारच दूर असतात, पण धार्मिकांच्या प्रार्थना मात्र ते ऐकतात. 30 निरोप्याच्या नजरेतील चमक हृदयाला आनंद देते, आणि शुभवार्ता हाडांना आरोग्य देते. 31 जीवनदायी शिक्षणाकडे जो काळजीपूर्वक लक्ष देतो, तो सुज्ञांसह वास करेल. 32 जे शिस्तीकडे दुर्लक्ष करतात ते स्वत:चा तिरस्कार करतात, परंतु जो सुधारणेकडे लक्ष लावतो तो समंजसपणा प्राप्त करतो. 33 याहवेहचे भय धरणे हेच सुज्ञतेचे शिक्षण होय, आणि सन्मान मिळण्याआधी विनम्रता येते.

**16** अंत:करणाच्या योजना मानव करतो, परंतु जिभेचे योग्य उत्तर याहवेहपासून येते. 2 मनुष्यास वाटते कि त्याचे सर्व मार्ग शुद्ध आहेत, परंतु याहवेह त्याचा उद्देश पारखतात. 3 तुम्ही जे काही काम करता ते याहवेहकडे सोपवून द्या, आणि ते तुमच्या योजना यशस्वी करतील. 4 याहवेह सर्व कार्ये योग्य रीतीने सिद्धीस नेतात. दुष्टांच्या विनाशासाठी देखील त्यांनी एक दिवस नेमला आहे. 5 याहवेह गर्विष्ठ अंत:करण असलेल्यांचा सर्वांचा तिरस्कार करतात. याची खात्री असू द्या: त्यांना शिक्षा झाल्यावाचून राहणार नाही. 6 दया व सत्य यामुळे पापांचे प्रायश्चित होते; आणि याहवेहचे भय धरल्यामुळे दुष्टता टाळली जाते. 7 जर एखाद्या मनुष्यांचे मार्ग याहवेहला आवडले, तर ते त्याच्या शत्रूंबरोबरसुद्धा त्यांचा समेट घडवून आणतात. 8 अप्रामाणिक मार्गाने मिळविलेल्या अफाट संपत्तीपेक्षा प्रामाणिकपणे मिळविलेले थोडकेच बरे. 9 मानव त्यांच्या हृदयात त्यांच्या योजना करतात परंतु याहवेह त्यांच्या मार्गांची दिशा ठरवितात. 10 राजाच्या ओठांतील शब्द एखाद्या दिव्य वाणीप्रमाणे आहेत, आणि त्याचे मुख न्याय-विसंगति करीत नाही. 11 प्रामाणिकपणाची मापे आणि तराजू याहवेहची आहेत पिशवीतील सर्व वजने त्यांनीच तयार केली आहेत. 12 राजांना वाईट कृत्यांचा तिरस्कार वाटतो; कारण न्यायीपणावरच सिंहासन स्थिर राहते. 13 प्रामाणिकपणे बोलणारे राजांना प्रसन्न करतात; जे योग्य ते बोलतात त्याच्यावर ते प्रीती करतात. 14 राजाचा क्रोध म्हणजे मृत्यूचा दूत, परंतु सुज्ञ मनुष्य तो क्रोध शमवेल. 15 जेव्हा राजाचा चेहरा चमकतो, याचा अर्थ जीवदान आहे; त्याची कृपा वसंतऋतूमध्ये आलेल्या पावसाच्या ढगासारखी आहे. 16 सोन्यापेक्षा सुज्ञता मिळविणे कितीतरी पटीने चांगले आहे, आणि समंजसपणा, चांदी मिळविण्यापेक्षा चांगले आहे! 17 सुज्ञांचा मार्ग दुष्टाईला टाळतो; जे त्यांच्या मार्गांचे रक्षण करतात, त्यांचे आयुष्य सुरक्षित राहते. 18 नाशापूर्वी गर्व आणि अध:पातापूर्वी मग्रूरी येते. 19 गर्विष्ठांबरोबर राहून लूट वाटून घेण्यापेक्षा दीनांबरोबर नम्रचित्त असणे बरे. 20 जो कोणी शिक्षणाकडे काळजीपूर्वक लक्ष देतो,

त्याची समृद्धी होते, आणि जो याहवेहवर भरवसा ठेवतो तो आशीर्वादित
असतो. 21 सुज्ञ अंतःकरण समंजस म्हणून ओळखले जाते, आणि
मधुर वचनांनी शिक्षणाला प्रोत्साहन मिळते. 22 सुज्ञाला सुज्ञता हा
जीवनाचा झरा आहे; पण मूर्खाची मूर्खताच त्यांच्यावर शिक्षा आणते.
23 शहाण्याचे मन त्याच्या मुखावर ताबा ठेवते, आणि त्याचे ओठ ज्ञान
प्रसार करते. 24 मधुर शब्द मधाच्या पोळासारखे असतात; ते आत्म्याला
गोड वाटतात आणि हाडांना आरोग्य देतात. 25 एक मार्ग असा आहे जो
योग्य वाटतो; परंतु तो शेवटी मृत्यूकडे नेतो. 26 परिश्रम करणाऱ्यांना
भूक लागणे योग्य; भूक भागविण्यासाठी त्यांना काम करण्याची प्रेरणा
मिळते. 27 अधम वाईट योजना करतो, आणि त्यांच्या ओठांवर ती
होरपळणाऱ्या अग्नीसारखी असते. 28 विकृत मनुष्य कलहास चेतावणी
देतो, आणि निंदानालस्ती जिवलग मित्रांना सुद्धा विभक्त करते. 29 हिंसा
करणारा आपल्या शेजाऱ्याला मोहात पाडतो आणि त्याला कुमार्गावर
जाण्यास प्रेरित करतो. 30 जो कोणी त्याचे डोळे मिचकावतो तो विकृत
योजना करीत असतो; जो कोणी त्याचे ओठ चावतो, तो वाईट प्रवृत्तीचा
आहे. 31 पांढरे केस गौरवी मुकुट आहे; नीतिमत्तेच्या मार्गात चालल्याने
तो लाभतो. 32 योद्धा असण्यापेक्षा शांत स्वभावी असणे बरे, शहर
जिंकून घेणाऱ्यापेक्षा स्वतःवर ताबा ठेवणारा उत्तम. 33 आपण पदरात
नाणेफेक करतो, पण त्याचा प्रत्येक निर्णय याहवेहच्या हाती असतो.

**17** कलहाच्या वातावरणात मेजवानी खाण्यापेक्षा शांती व
समाधानाने भाकरीचा कोरडा तुकडा खाणे बरे. 2 सुज्ञ गुलाम
आपल्या धन्याच्या लज्जास्पद मुलावर सत्ता गाजवील, आणि कुटुंब
सभासदाप्रमाणे मालमत्तेत वाटा मिळवील. 3 चांदी मुशीत आणि सोने
भट्टीत पारखले जाते, परंतु अंतःकरणाची पारख याहवेहच करतात. 4
दुष्ट व्यक्ती फसवणूक करणाऱ्याचे भाषण ऐकतो; लबाड बोलणारा
मनुष्य विनाशकारी जिभेचे लक्ष देऊन ऐकतो. 5 जो गरिबांची चेष्टा
करतो, तो त्याच्या निर्माणकर्त्याचा अनादर करतो; जो दुसऱ्यांवर
आलेल्या संकटामध्ये आनंद करतो, त्याला शिक्षा झाल्यावाचून राहणार
नाही. 6 वयस्क माणसांची नातवंडे त्यांचे गौरवी भूषण आहेत; आणि
मुलांचे भूषण त्यांचे मातापिता आहेत. 7 वक्तृत्वपूर्ण भाषण देवहीन
मूर्खाला शोभत नाही— राजाने खोटे बोलणे कितीतरी अशोभनीय आहे!
8 लाच देणाऱ्या माणसासाठी ती जादूच्या रत्नासारखी आहे; त्यांना
वाटते की त्याने त्यांची कामे यशस्वी होतील. 9 जो कोणी प्रीतीची
भावना जोपासतो तो अपराध झाकून देतो; परंतु जो कोणी ती अप्रिय
गोष्ट पुन्हापुन्हा बोलतो त्याचे जवळचे मित्र दूरावतात. 10 मूर्खाला
मारलेल्या शंभर फटक्यांपेक्षा विवेकी मनुष्याला रागावून बोललेला एक
शब्द अधिक प्रभावी असतो. 11 वाईट कृत्ये करणारे परमेश्वराविरुद्ध
बंडखोरी वाढवितात; मृत्यूचा दूत त्यांच्याकडे पाठविण्यात येईल. 12
जिची पिल्ले पळवून नेली आहेत त्या अस्वलीची तिची भेट झालेली
चालेल, परंतु मूर्खपणाचा अट्टाहास करणाऱ्या मूर्खाची भेट नको. 13
जो चांगल्याची फेड वाईटाने करतो, त्याच्या घराला अरिष्ट कधीही
सोडणार नाही. 14 भांडण सुरू करणे हे धरणाला भगदाड पाडण्यासारखे
आहे; म्हणून ते सुरू होण्याआधीच तो विषय संपविणे बरे. 15 दोषी
व्यक्तीला निर्दोष ठरविणे आणि निर्दोष व्यक्तीला दोषी ठरविणे— अशा
दोन्हीचा याहवेह तिरस्कार करतात. 16 जर ते समजू शकत नाहीत
तर ज्ञानवर्धनासाठी मूर्खाच्या हातात पैसे का असावेत? 17 खरा मित्र
नेहमीच प्रेम करतो; आणि संकटसमयासाठीच भावाचा जन्म झालेला
असतो. 18 जो हस्तांदोलन करून शपथ घेऊन शेजाऱ्याच्या कर्जफेडीची
हमी घेतो, तो विवेकहीन मनुष्य आहे. 19 जो कोणी कलहप्रिय असतो
तो पापाची आवड धरतो; जो कोणी उंच प्रवेशद्वार बांधतो तो आपत्तींना
आमंत्रण देतो. 20 ज्याचे हृदय भ्रष्ट आहे त्याची समृद्धी होत नाही; ज्याची
जीभ विकृत भाषण करते, तो संकटात पडतो. 21 जो मूर्खाला जन्म
देतो तो दुःखाला पाचारण करतो, आणि देवहीन मूर्खाच्या पालकांना
आनंद मिळत नाही. 22 आनंदी मन औषधाप्रमाणे हितकर असते, पण
खिन्न मन हाडे शुष्क करते. 23 न्यायाचे पारडे फिरविण्यासाठी, दुष्ट
मनुष्य गुप्त रीतीने लाच घेतो. 24 समंजस मनुष्याची दृष्टी ज्ञानावर
केंद्रित असते, पण मूर्खाची नजर पृथ्वीच्या शेवटपर्यंत सैरभैर फिरत
असते. 25 मूर्ख मुलगा आपल्या वडिलांच्या दुःखास कारणीभूत होतो,
आणि ज्या आईने त्याला जन्म दिला तिला क्लेश देतो. 26 निर्दोषांना दंड
देणे योग्य नव्हे, तसेच प्रामाणिक अधिपतींना शिक्षा करणे हे निश्चितच
चुकीचे आहे. 27 ज्ञानी संयमाने शब्दाचा वापर करतो, आणि समंजस
शांत स्वभावाचा असतो. 28 जर ते शांत राहिले तर मूर्खही शहाणे
समजले जातात, आणि जर त्यांच्या जिभेवर त्यांनी ताबा ठेवला, तर ते
विवेकशील मानले जातात.

**18** मैत्रीहीन मनुष्य शेवटी स्वार्थ साधून घेतो आणि सर्व यथार्थ
न्यायाविरुद्ध जाऊन भांडणे सुरू करतो. 2 मूर्ख समंजसपणामध्ये
संतोष मानत नाहीत; परंतु स्वतःची मते प्रकट करण्यात आनंद करतात.
3 जेव्हा दुष्टता येते तिथे तिरस्कार येतो, आणि निर्ल्लजपणाबरोबर
निंदा येते. 4 तोंडातील शब्द खोल पाण्यासारखे आहेत; परंतु सुज्ञतेचा
झरा म्हणजे पाण्याचा उफळता प्रवाह आहे. 5 न्यायाधीशाने दुष्टावर
कृपा करणे आणि निरपराध्याला न्यायापासून वंचित करणे चुकीचे
आहे. 6 मूर्खांच्या जिभा त्यांना कलहात पाडतात; आणि त्यांचे मुख
माराला आमंत्रण देते. 7 मूर्खाचे मुख त्यांच्या विनाशाचे कारण होते,
आणि त्यांच्या जिभेमुळे त्यांचे जीव सापळयात अडकतात. 8 अफवा
स्वादिष्ट भोजनासारख्या चवदार असतात; अंतःकरणात त्या खोलवर
रुजून जातात. 9 जो त्याचे काम करण्यात आळशी आहे, तो विध्वंस
करणाऱ्याचा भाऊ आहे. 10 याहवेहचे नाव बळकट दुर्ग आहे; नीतिमान
तिकडे धाव घेतात आणि सुरक्षित राहतात. 11 धनवानाचे धन त्यांचे
तटबंदीचे नगर आहे; ते कल्पना करतात की त्या उंच भिंती चढण्यास
दुष्कर आहेत. 12 मनुष्याचा नाश होण्याआधी त्याचे हृदय गर्वाने
भरते, परंतु सन्मान मिळण्याआधी मनुष्यास नम्रता येते. 13 ऐकून
घेण्याआधीच उत्तर देणे— ते मूर्खपणाचे आणि लाजिरवाणे आहे. 14
मनुष्याचा आत्मा त्याला आजारी अवस्थेतही स्थिर ठेवतो, पण तुटलेले
हृदय कोण सहन करू शकतो? 15 विवेकशील मनुष्याचे अंतःकरण

ज्ञान आत्मसात करते. सुज्ञाचे कान ज्ञानाचा शोध घेतात. 16 उपहार तो देणाऱ्याचा मार्ग मोकळा करते, तो तुम्हाला थोर लोकांच्या पुढे घेऊन जाईल! 17 दुसरा कोणीतरी पुढे येऊन पक्ष मांडत नाही, तोपर्यंत न्यायालयात प्रथम बोलणाऱ्याची बाजू योग्य वाटते. 18 नाणेफेक करून भांडण मिटवता येते, आणि प्रबळ प्रतिस्पर्ध्यांना दूर ठेवता येते. 19 चुकीची वागणूक मिळालेल्या भावाची समजूत घालण्यापेक्षा तटबंदीचे शहर जिंकणे सोपे आहे. वादविवाद राजवाड्यातील बंद द्वारासारखे आहे. 20 त्यांच्या मुखफळाने मनुष्याचे पोट भरले जाते; त्यांच्या ओठांनी केलेल्या उत्पन्नामुळे त्यांचे समाधान होते. 21 जिभेत जीवन आणि मृत्यूचे सामर्थ्य आहे. आणि जे तिच्यावर प्रेम करतात त्यांना तिचे प्रतिफळ मिळते. 22 ज्याला पत्नी लाभते, त्याला चांगुलपणा प्राप्त झाला आहे. ती त्याच्यासाठी याहवेहकडून आनंददायी भेट आहे. 23 गरीब दयेसाठी विनवण्या करतो आणि श्रीमंत त्याला क्रूरतेने उत्तर देतो. 24 ज्यांचे मित्र अविश्वासू असतात, त्यांचा नाश लवकर होतो, पण एक असा मित्र आहे की जो भावापेक्षाही एकनिष्ठ राहतो.

**19** विकृत ओठांच्या मूर्ख मनुष्यापेक्षा, निर्दोषपणाने वागणारा गरीब मनुष्य अधिक चांगला आहे. 2 योग्य ज्ञान असल्याशिवाय इच्छा धरणे चांगले नाही— घाई करणारे पाय कितीदा असे मार्ग चुकवितात! 3 मनुष्य स्वतःच्याच मूर्खपणाने आपल्या नाशाकडे जातो, तरीही त्याचे हृदय याहवेहविरुद्ध संतापते. 4 संपत्ती पुष्कळ मित्र आकर्षित करते, परंतु अगदी जवळचा मित्रही गरिबाला सोडून जातो. 5 खोट्या साक्षीदाराला शिक्षा झाल्यावाचून राहणार नाही. आणि खोटे शब्द ओतणाऱ्याची सुटका होणार नाही. 6 शासनकर्त्याची कृपा लाभावी म्हणून अनेकजण त्याचे स्तुतिपाठक बनतात, आणि प्रत्येकजण देणग्या देणाऱ्याचा मित्र असतो. 7 गरीब माणसांचे सर्व नातेवाईक त्याला टाळतात— तर त्याचे मित्र त्याला किती बरे टाळतील! गरीब मनुष्य गयावया करून कितीही त्यांच्यामागे गेला तरी ते कुठेही सापडत नाहीत. 8 जो सुज्ञता मिळवितो, तो त्याच्या जीवनावर प्रीती करतो; आणि जो समंजसपणाची आवड धरतो, तो लवकर समृद्ध होतो. 9 खोट्या साक्षीदाराला शिक्षा झाल्यावाचून राहणार नाही, आणि खोटे शब्द ओतणाऱ्याचा नाश होईल. 10 मूर्खाने ऐषारामात राहणे उचित नाही— तसेच गुलामाने राजपुत्रावर अधिकार गाजविणे योग्य नाही! 11 मनुष्याची सुज्ञता त्याला मंदक्रोधी राखते; आणि चुकांकडे दुर्लक्ष करणे त्याची प्रतिष्ठा असते. 12 राजाचा क्रोध सिंहाच्या गर्जनेसारखा असतो, परंतु त्याची कृपादृष्टी गवतावरील दवबिंदूसारखी असते. 13 मूर्ख संतान म्हणजे वडिलांच्या नाशाचे कारण आहे. आणि भांडखोर पत्नी ही सतत ठिबकणाऱ्या गळक्या छप्परासारखी आहे. 14 पूर्वजांपासून वारसांना घरेदारे व संपत्ती मिळते, परंतु समंजस पत्नी याहवेहपासून मिळते. 15 आळस मनुष्याला गाढ झोप आणतो आणि लक्ष्यहीन मनुष्य उपाशी राहतो. 16 जे याहवेहच्या आज्ञा पाळतात, ते आपला जीव सुरक्षित ठेवतात, परंतु जे आपल्या वर्तनाविषयी निष्काळजी असतात, ते मृत्युमुखी पडतात. 17 जो गरिबांना मदत करतो, तो याहवेहला उसने देतो, आणि त्यांच्या सत्कृत्याबद्दल याहवेह परतफेड करतील. 18 तुझ्या मुलांना शिस्त वेळेवर लाव, कारण त्यातच आशा आहे; परंतु शिस्त मर्यादे पलीकडे जाऊ नये, जेणेकरून त्यात त्याला मृत्युच येईल. 19 तापट मनुष्याला त्याच्या कृतीची शिक्षा भोगावीच लागते; त्यांना सोडविलेस, तर तुम्हाला पुन्हा तेच करावे लागेल. 20 बोध ऐका आणि शिक्षण स्वीकारा आणि शेवटी तुमची गणना सुज्ञांमध्ये होईल. 21 मनुष्य आपल्या मनात अनेक योजना आखतो, पण याहवेहची योजनाच यशस्वी होते. 22 मनुष्य इच्छा बाळगतो की त्याला अतूट प्रेम मिळावे; लबाडी करण्यापेक्षा गरीब राहणे बरे. 23 याहवेहच्या भयाने जीवनप्राप्ती होते; तेव्हा अरिष्टाचा स्पर्शही न होता, एखादा समाधानाने विश्रांती घेतो. 24 आळशी व्यक्ती आपला हात ताटात घालतो; तो हात पुन्हा तोंडापर्यंत आणत नाही! 25 निंदकाला चाबकाचा मार द्या, म्हणजे साधाभोळा धडा शिकेल; सुज्ञांना फटकारणी करा, म्हणजे ते अधिक सुज्ञ होतील. 26 जे कोणी त्यांच्या वडिलांना लुटतात आणि त्यांच्या आईला हाकलून देतात, ती अशी संतान आहे जी लज्जा व अप्रतिष्ठा यांना कारणीभूत होते. 27 माझ्या मुला, जर शिक्षण ऐकण्याचे थांबवलेस, तर ज्ञानाच्या वचनापासून तू दूर जाशील. 28 भ्रष्ट साक्षीदार न्यायाची अवहेलना करतात; दुष्टांचे मुख दुष्टता गिळून टाकतात. 29 निंदकांसाठी शिक्षा आणि मूर्खांची पाठ फटक्यांसाठी निर्धारित केली आहे.

**20** मद्य चेष्टा करते आणि मदिरा मोठमोठ्याने भांडणे काढते; तिच्यामुळे जे पथभ्रष्ट होतात ते शहाणे नाहीत. 2 राजाचा क्रोध सिंहाच्या गर्जनेसारखा भयप्रद आहे; जो त्याचा राग जागृत करतो त्याची प्राणहानी होते. 3 कलहापासून दूर राहणे मनुष्याचा सन्मान आहे, परंतु प्रत्येक मूर्ख भांडणास तत्पर असतो. 4 आळशी निर्धारित ऋतूमध्ये नांगरणी करीत नाहीत; म्हणून हंगामाच्या वेळी शोधून त्यांना काहीही मिळणार नाही. 5 मनुष्याच्या अंतःकरणाचे उद्देश हे खोल पाण्यासारखे आहेत, परंतु ज्याच्याकडे अंतर्दृष्टी असते तो त्या उद्देशांना ओढून बाहेर काढतो. 6 पुष्कळजण अतूट प्रेम असल्याचा दावा करतात, परंतु प्रामाणिक मनुष्य कोणाला सापडेल? 7 नीतिमान मनुष्य निष्कलंकीतपणे चालतो; त्याच्यामागे त्याच्या मुलाबाळांना आशीर्वाद प्राप्त होतात. 8 जेव्हा राजा न्याय करण्यासाठी सिंहासनावर बसतो तेव्हा तो त्याच्या नजरेने सर्व वाईट पाखडून दूर करतो. 9 "मी माझे अंतःकरण शुद्ध ठेवले आहे, मी शुद्ध आहे आणि पाप केलेले नाही." असे कोण म्हणू शकेल? 10 वजनावजनांत व मापामापांत फरक असणे— या दोन गोष्टींचा याहवेहला वीट आहे. 11 अगदी लहान मुलेसुद्धा खरोखरच प्रामाणिक आणि निर्दोष आहेत ते त्यांच्या कृत्यांवरून ओळखली जात नाहीत काय? 12 पाहणारे डोळे व ऐकणारे कान— दोन्हीही याहवेहचीच निर्मिती आहे. 13 तू झोपेची आवड धरू नकोस, नाहीतर तू गरीब होत जाशील; जागा राहा आणि तुझ्याकडे विपुल खाद्य शिल्लक राहील. 14 खरेदी करणारा म्हणतो, "हे चांगले नाही, हे चांगले नाही!" नंतर तो जातो आणि खरेदी बद्दल बढाई मारतो. 15 सोने आहे आणि माणकेही भरपूर आहेत, परंतु शहाणपणाचे शब्द बोलणारे ओठ दुर्मिळ रत्न आहे.

16 जो अनोळखी व्यक्तीला जामीन राहतो त्याचे वस्त्र काढून घे; जर ते
परक्यासाठी केले असेल तर ते गहाण म्हणून घे. 17 फसवणूक करून
मिळविलेले अन्न स्वादिष्ट लागते, परंतु त्याचे मुख शेवटी खड्यांनी
भरून जाईल. 18 सल्ला घेऊन योजना स्थापल्या जातात; म्हणून युद्ध
करण्यापूर्वी योग्य मार्गदर्शन मिळव. 19 चहाड्या करणारा विश्वासघात
करतो; म्हणून अतिशय बोलणाऱ्यापासून दूर राहावे. 20 जो आपल्या
आईवडिलांना शिव्याशाप देतो, त्याचा दीप गडद अंधारात विझून जाईल.
21 वारसासंपत्तीसाठी उतावळेपणे समयापूर्व केलेला दावा शेवटपर्यंत
आशीर्वादित राहत नाही. 22 “वाईटाची फेड मी नक्की करेन!” असे
म्हणू नकोस. याहवेहची प्रतीक्षा कर, ते तुझ्यासाठी प्रतिशोध घेतील.
23 वजनात व मापात फरक असणे याचा याहवेहला वीट आहे आणि
अप्रामाणिक वजनकाटे त्यांना प्रसन्न करीत नाहीत. 24 याहवेह मनुष्याचे
मार्ग निर्धारित करतात. तर मग स्वतःचे मार्ग कोण समजू शकेल? 25
विचार न करता घाईघाईने समर्पण करणे आणि नंतर दिलेल्या शपथांचा
विचार करणे, मनुष्यासाठी हा एक सापळा आहे. 26 सुज्ञ राजा दुष्टांना
पाखडून बाहेर काढतो; तो मळणीचे चक्र त्यांच्यावर फिरवितो. 27
मनुष्याचा आत्मा याहवेहचा दीप आहे. तो मनुष्याच्या अंतःकरणावर
प्रकाश टाकतो. 28 प्रीती आणि विश्वासूपणा राजाला सुरक्षित ठेवते;
तर प्रीतीद्वारे त्याचे सिंहासन सुरक्षित केले जाते. 29 तरुणांचे भूषण
त्यांचे बळ आहे. वृद्धांचे भूषण त्यांचे पांढरे केस आहेत. 30 बसलेला
मार आणि जखमा दुष्टता धुवून टाकते, आणि बसलेल्या फटक्यांनी
अंतःकरण शुद्ध होते.

**21** याहवेहच्या नियंत्रणात असलेले राजाचे हृदय पाण्याचा प्रवाह
आहे, जे त्यांना संतोष देतात त्यांच्याकडे ते वळवितात. 2
माणसांना वाटते की त्यांचेच मार्ग योग्य आहेत, परंतु याहवेह अंतःकरण
तोलून पाहतात. 3 अर्पणापेक्षा मनुष्याच्या न्याय्य व रास्त वागण्याने
याहवेहला अधिक संतोष होतो. 4 गर्विष्ठ दृष्टी आणि अभिमानी
अंतःकरण— दुष्टांचे नांगर न चालविलेले शेत—पाप उत्पन्न करतात.
5 कष्ट करणाऱ्यांच्या योजना भरभराटीस येतात, पण उतावळेपणा
दारिद्र्यास कारणीभूत होईल. 6 लबाड बोलून मिळवलेली संपत्ती,
म्हणजे उडून जाणारी वाफ आणि प्राणघातक सापळा आहे. 7 दुष्टांचा
हिंसाचार त्यांना ओढून घेऊन जाईल, कारण चांगले करण्यास ते नकार
देतात. 8 दोषी मनुष्याचा मार्ग फसविणारा आहे, परंतु निर्दोष मनुष्याचे
वागणे सरळपणाचे असते. 9 भांडखोर पत्नीसह घरात राहण्यापेक्षा
छतावरील एका कोपऱ्यात राहणे बरे. 10 दुष्ट माणसे वाईटाची इच्छा
धरतात; आणि त्यांच्या शेजाऱ्यांवर ते कधीही दया करीत नाहीत. 11
जेव्हा टवाळखोरांना शिक्षा होते, ते बघून साधाभोळा मनुष्य शहाणा
होतो; शहाण्या माणसांचे ऐकून ते ज्ञान मिळवितात. 12 नीतिमान
व्यक्ती दुष्टाच्या घरावर लक्ष ठेवतात आणि त्या दुष्टाची दुष्टता त्याचा
नाश करतात. 13 जे कोणी गरिबांच्या आक्रोशाकडे दुर्लक्ष करतात, ते
जेव्हा आक्रोश करतील तेव्हा त्यांना उत्तर मिळणार नाही. 14 गुप्तपणे
दिलेले बक्षीस राग शांत करते; झग्यात लपवून दिलेला उपहार तीव्र
क्रोध शांत करते. 15 जेव्हा न्याय मिळतो तेव्हा नीतिमान आनंद करतो.
पण दुष्ट कृत्ये करणाऱ्यांना ते प्राणसंकटच वाटते. 16 शहाणपणाचा
मार्ग सोडून दूर जाणारा मनुष्य मृतांच्या मंडळीत विश्रांतीसाठी येतो. 17
भोग विलासाची आवड असणारा गरीब होतो; मद्यपान व सुगंधी तेलाची
आवड धरणारा कधीही श्रीमंत होत नाही. 18 दुष्ट नीतिमानांसाठी, आणि
विश्वासघातकी सरळ लोकांसाठी खंडणी असतो. 19 भांडकुदळ व
सतत टोचून बोलणाऱ्या पत्नीबरोबर राहण्यापेक्षा वाळवंटात राहिलेले
बरे! 20 शहाणा मनुष्य उत्कृष्ट भोजन आणि जैतून तेलाचा साठा
करतो, पण मूर्ख मिळेल ते सर्व गिळून टाकतो. 21 जो कोणी नीतिमत्व
आणि प्रीती मिळविण्याचा प्रयत्न करतो, त्याला जीवन, समृद्धी व
सन्मान यांचा लाभ होतो. 22 सुज्ञ मनुष्य बलवानाच्या शहराविरुद्ध जाऊ
शकतो आणि ज्या किल्ल्यावर ते भरवसा ठेवतात ते तो उद्ध्वस्त
करतो. 23 जे कोणी त्यांच्या तोंडावर आणि त्यांच्या जिभेवर नियंत्रण
ठेवतात, ते संकटापासून दूर राहतात. 24 गर्विष्ठ, उद्धट ज्याचे नाव
“टवाळखोर” आहे, तो तीव्र संतापाने वागतो. 25 आळशी मनुष्याची
आशा त्याच्यासाठी मृत्यू ठरेल, कारण त्याचे हात काम करण्यास नकार
देतात. 26 अधिक मिळावे यासाठी तो दिवसभर तीव्र इच्छा करतो,
परंतु नीतिमान राखून न ठेवता दान देतात. 27 दुष्टांच्या यज्ञार्पणांचा
याहवेहला वीट आहे— तर मग जेव्हा वाईट हेतूने अर्पण आणले जाते
ते किती तिरस्करणीय असेल! 28 खोटा साक्षीदार नाश पावेल, परंतु
काळजीपूर्वक ऐकणारा यशस्वी रीतीने साक्ष देईल. 29 दुष्ट निर्भयतेचा
आव आणतो, पण सरळ मनुष्य मात्र विचारपूर्वक मार्ग निवडतो. 30
मनुष्याचे कोणतेही सुज्ञान, बुद्धिमत्ता, कोणत्याही योजना याहवेहविरुद्ध
यशस्वी होऊ शकत नाहीत. 31 लढाईसाठी घोड्याला तयार केले आहे,
परंतु विजय देणे याहवेहच्याच हाती असते.

**22** चांगले नाव मिळविणे पुष्कळ संपत्ती मिळविण्यापेक्षा व बहुमान
मिळविणे सोन्याचांदीपेक्षा अधिक श्रेष्ठ आहे. 2 श्रीमंत व गरीब
यांच्यामध्ये हे साम्य आहे; त्या दोघांनाही याहवेहनेच घडविले आहे. 3
सुज्ञ मनुष्य धोका ओळखतो आणि आश्रयास जातो, परंतु भोळा मनुष्य
पुढे जात राहतो आणि दंड भोगतो. 4 याहवेहचे भय ही नम्रता आहे;
त्याचे वेतन संपत्ती, सन्मान व दीर्घायुष्य आहे. 5 दुष्टाच्या मार्गात काटे व
पाश असतात; परंतु जे त्यांच्या जिवास जपतात, ते अशा मार्गांपासून
दूर राहतात. 6 लहान मुलांनी जसे वर्तन केले पाहिजे, तसेच त्यांना
वागावयास शिकवा, म्हणजे मोठेपणी ती मुले त्या मार्गापासून दूर
जाणार नाहीत. 7 जसा श्रीमंत गरिबावर सत्ता चालवितो, तसाच कर्जदार
आपल्या सावकाराचा नोकर होतो. 8 जो कोणी अन्यायाची पेरणी
करतो, तो अरिष्टांची कापणी करेल, आणि त्यांनी रागाने उगारलेली
काठी तुटून जाईल. 9 उदारपणे वागणारी माणसे स्वतःच आशीर्वादित
होतात, कारण ते त्यांच्या अन्नात गरिबांना वाटेकरी करतात. 10
टवाळखोराला हाकलून द्या, कलह आपोआप संपेल; भांडण आणि
अपमान देखील बंद होतील. 11 जो शुद्ध हृदयावर प्रेम करतो आणि
कृपायुक्त भाषण करतो तो राजाचा मित्र होईल. 12 याहवेहचे नेत्र

ज्ञानाचे रक्षण करतात, परंतु विश्वासघातकी मनुष्याचे शब्द ते निरर्थक करतात. 13 आळशी म्हणतो, “बाहेर सिंह आहे! तो मला भर चौकात ठार करेल!” 14 वेश्येचे मुख खोल खड्डा आहे; ज्यांच्यावर याहवेहचा क्रोध आहे तेच त्या खड्ड्यात पडतात. 15 बालकाचे मन मूर्खपणाने भरलेले असते, परंतु अनुशासनाच्या छडीने त्याचा मूर्खपणा दूर करता येईल. 16 श्रीमंत होण्यासाठी जो गरिबांवर जुलूम करतो तो आणि जो श्रीमंतांना बक्षिसे देतो—दोघेही दरिद्री होतील. 17 लक्ष दे आणि सुज्ञानाचा बोलण्याकडे तुझे कान वळव; मी जे शिक्षण देतो त्याचे तुझ्या हृदयापासून पालन कर, 18 जेव्हा तू ते आपल्या हृदयात ठेवशील आणि ते सर्व तुला मुखाग्र असतील तर तुला आनंद मिळेल. 19 म्हणजे तुझा याहवेहवर विश्वास राहील, मी आज तुला शिकवितो, होय तुलासुद्धा. 20 सल्लामसलत आणि ज्ञान याविषयी मी तीस वचने तुमच्यासाठी लिहिली नव्हती काय? 21 प्रामाणिक असणे आणि सत्य बोलणे तुला शिकविले नाही काय म्हणजे ज्यांच्याकडे तू काम करतोस त्यांच्यासाठी खरा अहवाल आणू शकशील? 22 गरिबांना ते गरीब आहेत म्हणून लुबाडू नका, आणि गरजवंतांना न्यायालयात चिरडू नका, 23 कारण याहवेह त्यांचा खटला लढतील आणि जीवनासाठी जीवन घेतील. 24 तापट माणसांची मैत्री करू नका, जो शीघ्रकोपी आहे त्याच्याबरोबर राहू नका, 25 नाहीतर तुम्ही त्यांचाच कित्ता गिरवाल, आणि तुम्ही स्वतःच आपला जीव पाशात घालाल. 26 वचन देऊन हात मिळवणी करणाऱ्यासारखे तुम्ही होऊ नका किंवा कर्जाचे जामीन होऊ नका; 27 जर तुमच्याकडे कर्ज फेडण्यास पैसे नसतील तर ते तुमचे अंथरूणसुद्धा काढून घेतील. 28 ज्या तुमच्या पूर्वजांनी निश्चित केल्या आहेत त्या पुरातन सीमारेषांच्या खुणा बदलू नका. 29 आपल्या कामात निपुण असणारी माणसे तू पाहिली आहे का? ते खालच्या श्रेणीच्या अधिकाऱ्यांसमोर नाही तर राजांसमोर सेवा करतील.

**23** जेव्हा तू अधिकाऱ्यांबरोबर भोजन करतोस, तेव्हा तुझ्यासमोर काय आहे हे चांगले लक्षात घे, 2 आणि जर तू खादाड असशील तर तुझ्या गळ्यावर सुरी लाव. 3 त्याच्या स्वादिष्ट पदार्थांची हाव धरू नकोस, कारण ते भोजन फसविणारे आहे. 4 श्रीमंत होण्यासाठी स्वतःला झिजवू नकोस; स्वतःच्या चातुर्यावर भरवसा ठेऊ नकोस. 5 तू श्रीमंतीकडे नजर टाकताच, ते निघून गेलेले असते, कारण पंख उगवताच गरुडाप्रमाणे ते आकाशात उडून जाईल. 6 कंजूष यजमानाचे अन्न खाऊ नकोस, त्याच्या स्वादिष्ट अन्नाची हाव धरू नकोस; 7 कारण तो अशा प्रकारचा व्यक्ती आहे जो नेहमीच किमतीबद्दल विचार करीत असतो. तो तुला म्हणतो “खा आणि पी” परंतु त्याचे मन तुझ्यावर नसते. 8 जे थोडेफार तू जेवला असशील ते ओकून टाकशील आणि तू केलेली प्रशंसा व्यर्थ होईल. 9 मूर्ख माणसांबरोबर बोलू नकोस, कारण ते तुझ्या समंजस शब्दांचा तिरस्कार करतील. 10 पुरातन सीमारेखांसाठी असलेले दगड हलवू नकोस किंवा अनाथाची शेती बळकावू नकोस. 11 कारण त्यांना वाचविणारा परमेश्वर सामर्थ्यशाली आहे; ते त्यांचा खटला तुझ्याविरुद्ध चालवितील. 12 तुझे चित्त शिक्षणाकडे, आणि तुझे कान ज्ञानाच्या वचनांकडे लाव. 13 मुलाला अनुशासन करण्यास संकोच करू नकोस; जर तू छडीने त्यांना शिक्षा करशील तर ते मरणार नाहीत. 14 छडीचा वापर करून त्यांना शिक्षा कर आणि मृत्यूपासून त्यांचे रक्षण कर. (Sheol h7585) 15 माझ्या मुला, जर तुझे अंतःकरण सुज्ञ असेल तर माझे मन खरोखरच आनंदी होईल; 16 जेव्हा तुझे ओठ न्यायपूर्ण शब्द बोलतील तेव्हा माझा अंतरात्मा उल्हास करेल. 17 तुझ्या अंतःकरणात दुष्टांचा हेवा करू नकोस, परंतु याहवेहचे भय बाळगण्यास सदैव आवेशी राहा. 18 कारण तुला तुझ्या भवितव्यामध्ये निश्चितच आशा आहे, आणि तुझी आशा नाश पावणार नाही. 19 माझ्या मुला, ऐक आणि सुज्ञ हो आणि तुझे अंतःकरण योग्य मार्गात स्थिर कर: 20 जे अतिमद्यपान करतात किंवा जे आधाशीपणे मांस खातात त्यांची संगत करू नको, 21 कारण मद्यपी व खादाड गरीब होतात, आणि गुंगीत असणाऱ्यांना फाटके कपडे घालावे लागतील. 22 आपल्या वडिलांचे ऐक ज्याने तुला जीवन दिले, आणि तुझी आई वृद्ध झाल्यावर तिचा तिरस्कार करू नको. 23 सत्याला मोलाने विकत घे आणि ते विकू नको—सुज्ञान, शिक्षण आणि समंजसपणासुद्धा मिळव. 24 नीतिमान मुलाच्या वडिलांना फार आनंद होतो; जो मनुष्य सुज्ञ पुत्राचा पिता आहे त्यामध्ये तो उल्लसित असतो. 25 तुझे वडील आणि आई आनंदी असावेत; आणि जिने तुला जन्म दिला ती हर्षित असो! 26 माझ्या मुला, तुझे अंतःकरण मला दे आणि तुझी दृष्टी माझ्या मार्गामध्ये प्रसन्न असावी, 27 कारण व्यभिचारी स्त्री एक खोल खड्डा आहे, आणि परस्त्री म्हणजे एक अरुंद विहीर आहे. 28 एखाद्या लुटारूप्रमाणे ती दबा धरून बसते आणि लोकांमध्ये विश्वासघातक्यांची संख्या वाढवते. 29 कोणाला हाय हाय आहे? कोणाला मोठे दुःख आहे? कोणाला खेद आहे? कोणाकडे तक्रारी आहेत? कोणाला विनाकारण जखमा आहेत? कोणाचे डोळे लाल आहेत? 30 जे मद्यपानासाठी घुटमळतात, जे मिश्रित मदिरेची चव घेण्यासाठी जातात. 31 जेव्हा द्राक्षारस लाल आहे, तेव्हा त्याकडे टक लावून पाहू नको, जेव्हा ते कपामध्ये चमकते, जेव्हा ते सहजपणे खाली उतरते! 32 शेवटी ते विषारी सर्पाप्रमाणे दंश करते आणि ते विष फुरसे सर्पाप्रमाणे विषारी असते. 33 तुझे डोळे विलक्षण दृष्ये पाहतील, आणि तुझे मन गोंधळलेल्या गोष्टींची कल्पना करेल. 34 तू उचंबळलेल्या समुद्रावर झोपल्यासारखा, जहाजाच्या शिडाच्या दोरीवर पडल्यासारखा असशील. 35 आणि तू म्हणशील, “त्यांनी मला मारले, परंतु मी जखमी झालो नाही! त्यांनी मला मारले, परंतु मला जाणवले नाही! जेव्हा मी जागा होईन, तेव्हा मी आणखी एक मद्याचा प्याला पिईन.”

**24** दुर्जनांचा मत्सर करू नका, त्यांच्या संगतीची इच्छा धरू नका; 2 कारण त्यांचे अंतःकरण हिंसाचार करण्याच्या योजना करतात, आणि त्यांचे ओठ भांडण लावण्याविषयी बोलतात. 3 सुज्ञानाद्वारे घर बांधले जाते, आणि समंजसपणामुळे ते स्थिर राहते; 4 ज्ञानाद्वारे त्याच्या खोल्या दुर्मिळ आणि सुंदर अशा मौल्यवान वस्तूंनी भरलेल्या असतात. 5 सुज्ञ, बलिष्ठ माणसापेक्षा अधिक सामर्थ्यवान आहे; आणि सुज्ञ आपली शक्ती वृद्धिंगत करतात. 6 लढाईवर जाण्यासाठी निश्चितच

तज्ञांच्या मार्गदर्शनाची गरज असते, कारण अनेक सल्लागारांद्वारे विजय
प्राप्त होते. 7 सुज्ञता मूर्खांच्या आवाक्याबाहेर असते; वेशीतील सभेत
त्यांनी आपले तोंड उघडू नये. 8 जे कोणी वाईट योजना करतात ते
कारस्थान करणारे म्हणून ओळखले जातील. 9 मूर्खाच्या योजना म्हणजे
पाप, आणि लोक टवाळखोर मनुष्याचा द्वेष करतात. 10 जर कठीण
परिस्थितीत तुम्ही खचून गेलात, तर तुमची शक्ती किती थोडी आहे!
11 ज्यांना अन्यायाने मृत्युदंड दिला आहे, अशांची सुटका करा; जे
लटपटणाऱ्या पायांनी वध होण्यासाठी जात आहेत, त्यांना थांबव. 12
जर तुम्ही असे म्हणाल, "यासंबंधी आम्हाला काहीही माहीत नव्हते," तर
त्यांच्या लक्षात येणार नाही का जे सर्वांची अंत:करणे तोलून पाहतात?
जे तुझ्या जीवनाची रक्षा करतात त्यांना हे माहीत नाही का? ते प्रत्येक
मनुष्याला त्यांच्या कर्माप्रमाणे फळ देणार नाहीत का? 13 माझ्या मुला,
मध खा, कारण तो चांगला आहे; आणि पोळयातून पाझरणारे मध तुझ्या
जिभेला गोड लागेल. 14 त्याचप्रमाणे सुज्ञता तुझ्यासाठी मधासारखी
आहे हे लक्षात घे: जर तुला ती मिळाली तर त्यातच तुझ्या भविष्याची
आशा आहे, आणि तुझी आशा कधीही तुटणार नाही. 15 चोरासारखा
नीतिमान माणसाच्या घराजवळ लपून बसू नकोस, त्यांच्या राहत्या
घराची लूट करू नको; 16 कारण नीतिमान जरी सात वेळा पडतात, तरी
ते पुन्हा सावरतात, परंतु जेव्हा दुष्ट लोकांवर अरिष्ट कोसळते, ते नाश
पावतात. 17 जेव्हा तुझा शत्रू पडतो तेव्हा आनंद करू नकोस; जेव्हा ते
अडखळतात तेव्हा तुझे मन आनंदित होऊ नये, 18 नाहीतर याहवेह ते
पाहतील आणि अमान्य करतील आणि त्यांच्या क्रोधापासून त्यांना दूर
करतील. 19 वाईट कृत्ये करणाऱ्या लोकांवर संतापू नका. किंवा दुष्ट
लोकांचा हेवा करू नका, 20 कारण दुष्ट माणसांना भावी आशा नसते;
आणि दुष्ट लोकांची ज्योत मालवली जाईल. 21 माझ्या मुला, याहवेहचे
आणि राजाचे भय धर आणि बंडखोर अधिकाऱ्यांना सहभागी होऊ
नकोस, 22 कारण तेच दोघे त्यांच्यावर अकस्मात नाश पाठवतील,
आणि कोणते संकट ते आणू शकतात हे कोणाला माहीत आहे? 23 ही
सुद्धा सुज्ञ माणसांची वचने आहेत: न्यायदान करताना पक्षपात दाखविणे
हे चांगले नाहीच: 24 जो कोणी दुष्टाला "तू निर्दोष आहेस," असे म्हणतो
त्याला लोक शाप देतील आणि राष्ट्रे त्याचा धिक्कार करतील. 25
परंतु जे लोक दोषी मनुष्याला दोषी ठरवतील, आणि त्यांच्यावर विपुल
आशीर्वाद येईल. 26 प्रामाणिकपणाने दिलेले उत्तर मिळणे म्हणजे
ओठांवरील चुंबनासारखे आहे. 27 तुझे बाहेरचे काम योग्यप्रकारे पूर्ण
कर आणि तुझे शेत तयार कर; त्यानंतर, तुझे घर बांध. 28 विनाकारण
तुझ्या शेजाऱ्याविरुद्ध साक्ष देऊ नकोस— गैरसमज करून देण्यासाठी
तू तुझ्या जिभेचा उपयोग करावा काय? 29 असे म्हणू नकोस, "ते जसे
माझ्याशी वागले आहेत तसेच मी त्यांच्याशी वागेन; त्यांनी जसे माझे
केले तशीच मी त्यांची परतफेड करेन." 30 एका आळशी मनुष्याच्या
शेताच्या बाजूने मी गेलो, ज्याच्याकडे विवेकबुद्धी नाही अशा माणसाच्या
द्राक्षमळयाच्या बाजूने मी गेलो; 31 सर्वत्र काटेरी झुडपे उगविलेली
होती, आणि संपूर्ण भूमी तणाने झाकली गेलेली होती; त्याचे दगडी
कुंपणही ढासळले होते. 32 जे काही मी पाहिले त्याचा मी विचार करू
लागलो आणि जे काही मी पाहिले त्यापासून एक धडा शिकलो: 33
आणखी थोडीशी झोप, आणखी थोडीशी डुलकी उशाखाली हात घेऊन
थोडी विश्रांती— 34 आणि दारिद्र्य एका चोराप्रमाणे तुझ्यावर येईल
आणि सशस्त्र मनुष्याप्रमाणे गरिबी येईल.

25 यहूदीयाचा राजा हिज्कीयाहच्या सहकाऱ्यांनी संग्रहित केलेली,
शलोमोन राजाची ही आणखी काही नीतिवचने आहेत: 2 रहस्य
गुप्त ठेवणे हे परमेश्वराचे गौरव आहे; आणि गुप्त गोष्टींचा शोध लावणे हे
राजाचे गौरव आहे. 3 जसे आकाशाची उंची आणि पृथ्वीची खोली,
तसेच राजांच्या मनाचाही थांग लागत नाही. 4 चांदीतील मळ काढला
म्हणजे रौप्यकार पात्र तयार करू शकतो; 5 राजाच्या दरबारातील भ्रष्ट
अधिकारी काढून टाका आणि मग त्याचे राज्य न्यायीपणामुळे स्थिर
राहील. 6 राजाच्या समक्षतेत प्रौढी मिरवू करू नकोस, आणि त्याच्या
प्रतिष्ठित व्यक्तीमध्ये स्थान ग्रहण करण्याचा दावा करू नकोस; 7 त्याच्या
प्रतिष्ठित लोकांसमोर त्याने तुझा अपमान करावा, यापेक्षा "इकडे वर ये"
असे तुला बोलणे अधिक रास्त वाटेल. तुझ्या डोळयांनी जे काही पाहिले
आहे 8 ते न्यायालयात नेण्याची घाई करू नकोस, कारण जर तुझा
शेजारी तुला फजीत करेल, तर शेवटी तू काय करशील? 9 जर तू तुझ्या
शेजाऱ्याला न्यायालयात घेऊन जातोस तर, दुसऱ्याच्या विश्वासाला
धोका देऊ नकोस, 10 नाहीतर तो ऐकणारा तुला निर्लज्ज ठरवेल आणि
तुझ्याविरुद्ध तो दावा दाखल करेल. 11 योग्य वेळेवर दिलेला सल्ला
हा चांदीच्या करंड्यात ठेवलेल्या सोन्याच्या सफरचंदासारखा आहे.
12 न्यायाधीशाने केलेली कान उघाडणी, ऐकणाऱ्या कानासाठी सुज्ञ
म्हणजे सोन्याचे कर्णफूल किंवा उत्तम सोन्याचा दागिना यासारखी आहे.
13 ज्याने विश्वासू सेवकाला पाठविले त्याच्यासाठी तो उन्हाळयातील
शीतल पेयासारखा आहे; तो त्याच्या मालकाला ताजेतवाने करतो. 14
कधीही न दिलेल्या देणगीबद्दल जो घमेंड करतो, तो वृष्टिहीन मेघ आणि
वारा यासारखा आहे. 15 सहनशीलते द्वारे शासकाचे मन वळविता
येते, कारण मृदू जिव्हा हाडे मोडू शकते. 16 तुम्हाला मध मिळाला
तर, पुरेसाच खा— जास्त मध खाल्ल्यास तुम्ही ओकारी कराल. 17
तुझ्या शेजाऱ्यांकडे पाय क्वचितच टाक— अतिपरिचय केल्यास शेजारी
तुझा द्वेष करतील. 18 शेजाऱ्याविरुद्ध खोटी साक्ष देणे म्हणजे, जाड
काठीने किंवा तलवारीने मारणे किंवा तीक्ष्ण बाण सोडणे यासारखे
आहे. 19 संकटसमयी बेभरवशाच्या माणसावर विश्वास ठेवणे म्हणजे
तुटक्या दातांनी चावणे किंवा मोडक्या पायांनी पळण्यासारखे आहे.
20 ज्याचे अंत:करण दु:खाने भरले आहे, त्याच्यासाठी हर्षगीत गाणे,
एखाद्याचे पांघरूण थंडीच्या दिवसात काढून घेणे, किंवा जखमेवर
शिरका ओतणाऱ्यासारखे आहे. 21 तुझा शत्रू भुकेला असेल तर त्याला
खावयास द्या; तो तान्हेला असेल तर त्याला प्यावयास पाणी दे. 22 असे
केल्याने तुम्ही त्याच्या डोक्यावर निखाऱ्यांची रास कराल, आणि याहवेह
तुम्हाला त्याचे प्रतिफळ देतील. 23 जसा उत्तरेकडील वारा अनपेक्षितपणे
पाऊस आणतो तसेच कावेबाज जीभ—क्रोधित मुद्रेला चेतावणी देते.

24 भांडखोर पत्नीसह घरात राहण्यापेक्षा छतावरील एका कोपऱ्यात राहणे बरे. 25 दूरवरून आलेला शुभ संदेश तान्हेल्याला मिळालेल्या शीतल जलासारखा आहे. 26 नीतिमान मनुष्याने दुष्टासमोर माघार घेणे, हे पाण्याचा झरा दूषित होणे किंवा जलकुंड गढूळ होण्यासारखे आहे. 27 जसे अति मध खाणे हानिकारक आहे आणि अति खोल गोष्टींचा शोध घेणे सन्माननीय नसते. 28 स्वतःवर ताबा नसलेला मनुष्य तटबंदी ढासळलेल्या नगरासारखा आहे.

**26** ज्याप्रमाणे उन्हाळ्यात बर्फ पडणे किंवा कापणीच्या वेळी पाऊस येणे जसे विसंगत आहे, त्याचप्रमाणे मूर्खाला सन्मान मिळणे शोभत नाही. 2 जशी फडफडणारी चिमणी निसटून जाते किंवा निळवी उडून जाते, तसाच गैरवाजवीपणे दिलेल्या शापाचा प्रभाव होत नाही. 3 घोड्याला चाबूक, गाढवाला लगाम आणि मूर्खाच्या पाठीला छडी पाहिजे! 4 मूर्खाला त्याच्या मूर्खतेप्रमाणे उत्तर देऊ नको, नाहीतर तू सुद्धा त्याच्यासारखाच होशील. 5 मूर्खाला त्याच्या मूर्खतेला योग्य असे उत्तर द्या, नाहीतर तो स्वतःला शहाणा समजू लागेल. 6 मूर्खाच्या हाती निरोप पाठविणे म्हणजे आपलेच पाय तोडून घेणे किंवा विष पिण्यासारखे आहे. 7 मूर्खाच्या मुखात नीतिवचने असणे, एखाद्या लंगड्या माणसाच्या निरुपयोगी पायांसारखे आहे. 8 मूर्खाचा सन्मान करणे म्हणजे गोफणीमध्ये दगड बांधून ठेवण्यासारखे आहे. 9 जसे दारुड्याच्या हातात काटेरी झाडाची फांदी, तसेच मूर्खाच्या मुखात नीतिवचने. 10 जो मूर्खाला किंवा जवळून जाणाऱ्या कोणा अनोळखीलाही कामावर ठेवतो. तो नेम न धरता कोणालाही जखम करणाऱ्या धनुर्धारीसारखा आहे. 11 जसा कुत्रा त्याच्या ओकारीकडे परत जातो तसाच मूर्ख पुन्हापुन्हा मूर्खपणा करतो. 12 आपल्याच दृष्टीत स्वतःला शहाणा समजणारा मनुष्य तुम्ही पाहिला आहे काय? अशा माणसापेक्षा मूर्खाला अधिक आशा आहे. 13 आळशी म्हणतो “बाहेर रस्त्यावर सिंह आहे, एक भयानक सिंह मार्गात फिरत आहे!” 14 दार त्याच्या बिजागऱ्यांवर फिरते तसा आळशी बिछान्यावर कूस बदलत असतो. 15 आळशी व्यक्ती आपला हात ताटात घालतो; तो हात पुन्हा तोंडापर्यंत नेण्यासाठीही त्याला आळस वाटतो. 16 स्वदृष्टीत शहाणा असणाऱ्या आळशास वाटते कि तो यथायोग्य उत्तर देणाऱ्या सात लोकांपेक्षाही जास्त शहाणा आहे. 17 आपला संबंध नसलेल्यांच्या भांडणामध्ये पडणारे एखाद्या भटक्या कुत्र्याचे कान ओढणाऱ्यासारखे असतात. 18 जसा एखादा माथेफिरू मृत्यूचे जळते बाण फेकतो, 19 तो अशा मनुष्यासारखा आहे, जो त्याच्या शेजाऱ्यांना फसवितो आणि म्हणतो, “मी तर गंमत करीत होतो!” 20 लाकूड नसले तर आग विझते; आणि चहाड्या नसल्या की भांडण नाहीसे होते. 21 जसे कोळसे निखारे आणि लाकूड अग्नी प्रज्वलित करते, तशाच प्रकारे भांडखोर मनुष्य कलह उत्पन्न करतो. 22 अफवा स्वादिष्ट भोजनासारख्या चवदार असतात; अंतःकरणात त्या खोलवर रुजून जातात. 23 गोड शब्द उच्चारणाऱ्या दुष्टाचे अंतःकरण चांदीचा मुलामा दिलेल्या मातीच्या पात्रासारखे आहे. 24 शत्रू त्यांच्या वाणीद्वारे स्वतःला लपवितात, परंतु कपटाला ते त्यांच्या मनात थारा देतात. 25 जरी त्यांचे भाषण प्रसन्न करणारे आहे, तरी त्यांच्यावर विश्वास ठेवू नका, कारण सात प्रकारच्या वाईट गोष्टींनी त्यांचे अंतःकरण भरलेले असते. 26 त्यांचा द्वेषभाव लबाडीद्वारे लपविलेला असला तरी, त्यांचा दुष्टपणा सभेमध्ये उघड केला जाईल. 27 जो कोणी खड्डा करतो, तोच त्याच्यात पडेल; जर कोणी दगड ढकलून टाकतो, तो परत त्यांच्यावरच ढकलून दिला जाईल. 28 लबाड बोलणारी जीभ ज्याचा द्वेष करते त्याला दुखविते, आणि खुशामत करणारी जीभ नाशास कारणीभूत होते.

**27** उद्याविषयी आज बढाई मारू नका; कारण उद्या काय घडेल ते तुम्हाला ठाऊक नाही. 2 दुसरा कोणीतरी तुमची स्तुती करो, तुमच्या स्वतःच्या मुखाने नको; बाहेरील व्यक्तीला ती करू द्या, पण तुम्ही स्वतःच्या ओठांनी करू नये. 3 दगड जड आहे आणि वाळू वजनदार असते, परंतु मूर्खाने दिलेली चिथावणी या दोन्हींपेक्षाही जड असते. 4 क्रोध क्रूर असतो आणि राग पूरासमान असतो; पण मत्सरापुढे कोण उभा राहू शकेल? 5 उघडपणे कान उघाडणी करणे, गुप्त प्रीतीपेक्षा चांगले आहे. 6 मित्राने केलेले घाव विश्वासयोग्य असतात, परंतु शत्रूची अनेक चुंबने कपटी होत. 7 एखाद्याला भरल्यापोटी मधसुद्धा बेचव लागतो, परंतु भुकेल्या मनुष्याला कडू अन्नसुद्धा गोड लागते. 8 घर सोडून भटकणारा मनुष्य घरटे सोडून भटकणाऱ्या पक्ष्यासारखा आहे. 9 अत्तर आणि सुगंध मनाला आनंद देतात, आणि अंतःकरणापासून दिलेल्या सल्ल्यातून मित्राचा आनंद उसळून येतो. 10 तुमचा मित्र किंवा तुमच्या कुटुंबाच्या मित्राला कधीही सोडू नका, आणि संकटसमयी नातेवाईकांच्या घरी जावू नका— दूर राहणाऱ्या नातेवाईकांपेक्षा जवळचा शेजारी बरा. 11 माझ्या मुला, शहाणा हो आणि माझे हृदय आनंदित कर; म्हणजे जे मला तिरस्काराने वागवितात, मी त्यांना उत्तर देऊ शकेन. 12 सुज्ञ मनुष्य धोका ओळखतो आणि आश्रयास जातो, परंतु भोळा मनुष्य पुढे जात राहतो आणि दंड भोगतो. 13 जो अनोळखी व्यक्तीला जामीन राहतो त्याचे वस्त्र काढून घे; जर ते परक्यासाठी केले असेल तर ते गहाण म्हणून घे. 14 जर कोणी आपल्या शेजाऱ्याला भल्या पहाटे ओरडून अभिवादन केले, तर ते त्याला शापासारखे वाटेल. 15 भांडखोर पत्नी ही पावसाळ्यात गळक्या छप्परासारखी आहे. 16 तिला ताब्यात ठेवणे म्हणजे वाऱ्याला ताब्यात ठेवण्यासारखे, किंवा हाताने तेल धरण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे. 17 जशी लोखंडाने लोखंडाला धार लागते, त्याप्रमाणे एक मनुष्य दुसऱ्याला सुधारतो. 18 जो अंजिराच्या झाडाची राखण करतो, तो त्या झाडाचे फळ खाईल. आणि जे त्यांच्या मालकाचे संरक्षण करतात त्यांचा सन्मान होईल. 19 पाणी जसे चेहऱ्याचे प्रतिबिंब दर्शविते, तसेच व्यक्तीचे जीवन त्याचे अंतःकरण दर्शविते, 20 मृत्यू आणि विध्वंस यांचे कधीही समाधान होत नाही, तसेच मनुष्याच्या नेत्रांचेही नव्हे. (Sheol h7585) 21 चांदी मुशीत आणि सोने भट्टीत पारखले जाते, तशी लोकांची पारख, त्यांच्या प्रशंसेद्वारे होते. 22 मूर्खाचा तुम्ही कुटणीमध्ये भुगा केला, मुसळात त्याला धान्यासारखे भरडले, तरी त्याची मूर्खता तुम्हाला वेगळी करता येणार नाही. 23

आपल्या कळपाच्या स्थितीची योग्य जाणीव ठेवा, तुमच्या पशूंकडे काळजीपूर्वक लक्ष द्या; 24 कारण संपत्ती सर्वकाळ टिकत नाही, आणि मुकुट पिढ्यान् पिढ्या सुरक्षित नसतो. 25 वाळलेले गवत काढून टाकले तेव्हा नवीन वाढ दिसून येते आणि टेकड्यांवरील गवत एकत्रित केले जाते, 26 तेव्हा मेंढ्या तुम्हाला कपडे पुरवतील, आणि शेतातील पैशाने शेळया मिळतील. 27 तुझ्या कुटुंबाला खाण्यासाठी आणि तुझ्या दासींचे पोषण करण्यासाठी तुझ्याकडे शेळयांचे पुष्कळ दूध असेल.

**28** कोणीही पाठलाग करीत नाही, तरी दुष्ट माणसे पळत असतात; पण नीतिमान सिंहासारखे निर्भय असतात. 2 जेव्हा एखादे राष्ट्र बंडखोर असते, तेव्हा तिथे अनेक शासक असतात, परंतु विवेकशील आणि ज्ञानी शासक सुव्यवस्था कायम ठेवतो. 3 गरीब लोकांवर जुलूम करणारा पुरुष, संपूर्ण पीक वाहून नेणाऱ्या घनघोर वृष्टिसारखा आहे. 4 नियमशास्त्राचा तिरस्कार करणारे दुर्जनांची स्तुती करतात, परंतु ते पालन करणारे, त्यांचा विरोध करतात. 5 योग्य ते काय आहे हे दुष्टकर्म करणाऱ्यांना समजत नाही, परंतु जे याहवेहचा शोध घेतात, त्यांना ते पूर्णपणे समजते. 6 विकृत मार्गावर चालणाऱ्या श्रीमंत माणसापेक्षा प्रामाणिकपणाने चालणारा गरीब मनुष्य बरा. 7 सुज्ञ पुत्र शिक्षणाकडे लक्ष लावतो, परंतु खादाडांची संगत करणारा पुत्र त्याच्या वडिलांचा अब्रू घालवितो. 8 जो गरिबांकडून व्याज किंवा फायदा घेऊन संपत्ती वाढवितो, ती दुसऱ्याकरिता साठवितो, जो गरिबांवर दया दाखवेल. 9 जर कोणी माझ्या नियमशास्त्राकडे कानाडोळा केला, तर त्यांच्या प्रार्थनासुद्धा तिरस्करणीय वाटतात. 10 जे कोणी नीतिमानाला वाईट मार्गाकडे घेऊन जातात, ते स्वतःच्याच जाळयात सापडतील, परंतु निर्दोष माणसांना उत्तम वारसा मिळेल. 11 श्रीमंत माणसे त्यांच्या दृष्टीने स्वतःला शहाणे समजतात; परंतु जो गरीब आणि विवेकी आहे तो पाहतो की श्रीमंत कसे भ्रमात पडलेले आहेत. 12 नीतिमान यशस्वी झाला तर हर्षोल्हास केला जातो; पण दुष्ट प्रबल झाले असता लोक स्वतःस लपवून ठेवतात. 13 जो कोणी त्याचे पाप झाकून ठेवतो, तो समृद्ध होत नाही, परंतु जो अपराध कबूल करून ते करण्याचे सोडून देतो त्याला कृपा प्राप्त होते. 14 परमेश्वराबद्दल नेहमी भय बाळगणारा मनुष्य धन्य, परंतु मन कठोर करणारा संकटात सापडतो. 15 असहाय लोकांवर राज्य करणारा दुष्ट राजा गर्जणाऱ्या सिंहासारखा किंवा आक्रमक अस्वलासारखा असतो. 16 जुलमी शासनकर्ता खंडणी वसूल करतो, परंतु जो कुमार्गाने मिळविलेल्या लाभाची घृणा करतो, तो पुष्कळ वर्षे राज्य करेल. 17 मनावर खुनाच्या दोषाचे ओझे असलेला यातनाग्रस्त मनुष्य कबरेमध्ये आसरा शोधेल; त्याला कोणीही थांबवू नये. 18 जो निर्दोषपणाने जीवन जगतो तो सुरक्षित राहतो, परंतु ज्याचे मार्ग विकृत आहेत तो खड्ड्यात पडेल. 19 जे आपल्या जमिनीची मशागत करतात, त्यांना विपुल अन्न प्राप्त होईल, परंतु जे काल्पनिक गोष्टींच्या मागे धावतात त्यांच्यावर दारिद्र्य येईल. 20 प्रामाणिक मनुष्याला भरपूर आशीर्वाद मिळेल, पण झटपट श्रीमंत होण्याची इच्छा धरणारा दंडापासून अलिप्त राहणार नाही. 21 पक्षपात करणे हे चांगले नाही—तरीही भाकरीच्या एका तुकड्यासाठी मनुष्य चुकीची गोष्ट करतो. 22 कंजूष माणसे श्रीमंत होण्यासाठी उतावळे असतात आणि त्यांना माहीत नसते की दारिद्र्य त्यांची वाट पाहत आहे. 23 खोटी स्तुती करणारी जीभ असलेल्या मनुष्यापेक्षा, एखाद्याची कान उघाडणी करणारा, शेवटी कृपा प्राप्त करेल. 24 जो आपल्या आईवडिलांना लुबाडतो आणि म्हणतो, "ते चुकीचे नाही," तो नाश करणाऱ्याचा भागीदार आहे. 25 लोभी मनुष्य भांडणे लावतो, परंतु जे याहवेहवर भरवसा ठेवतात त्यांची भरभराट होईल. 26 स्वतःवरच भरवसा ठेवणारा मनुष्य मूर्ख आहे. पण शहाणपणाने वागणारे सुरक्षित राहतील. 27 जे गरिबांना दान देतात, त्यांना कशाचीही कमतरता पडणार नाही, परंतु त्यांच्या गरजांकडे डोळेझाक करणाऱ्यांवर पुष्कळ शाप येतील. 28 जेव्हा दुर्जन सामर्थ्यवान होतात, तेव्हा लोक लपून बसतात; परंतु दुष्टांचा नायनाट झाला कि नीतिमान वृद्धी पावतात.

**29** अनेकदा कान उघाडणी केली तरीही जो ताठ मानेचाच राहतो, त्याचा अचानक नाश होईल—त्याला कोणताही इलाज नसेल. 2 जेव्हा नीतिमानाची भरभराट होते, तेव्हा लोक हर्षोल्हास करतात; जेव्हा दुष्ट सत्ताधारी झाले की, लोक दुःखाने विव्हळतात. 3 ज्या मनुष्याला ज्ञान प्रिय आहे, तो त्याच्या वडिलांना आनंदी करतो, परंतु वेश्यांच्या सहवासात राहणारा आपले धन उधळतो. 4 न्यायाने राजा राष्ट्राला स्थैर्य देतो, परंतु ज्याला लाचेचा लोभ असतो, तो ते कोसळून टाकतो. 5 जे लोक त्यांच्या शेजाऱ्यांची खुशामत करतात, ते त्यांच्या पायासाठी सापळा पसरवितात. 6 दुष्ट कृत्ये करणारे स्वतःच्या पापामुळेच सापळयात अडकतात, परंतु नीतिमान आनंदाने गर्जना करतात आणि हर्षित असतात. 7 नीतिमानाला गरिबांच्या हक्कांची काळजी असते, पण दुष्ट अशा गोष्टीची पर्वा करीत नाही. 8 टवाळी करणारे शहरात गोंधळ करतात, परंतु सुज्ञ लोक राग घालवून टाकतात. 9 सुज्ञानी मनुष्य जर मूर्खाबरोबर न्यायालयात गेला, तर मूर्ख संतापतो आणि थट्टा करतो आणि तिथे शांतिभंग करतो. 10 हिंसाचारी मनुष्य प्रामाणिक मनुष्याचा द्वेष करतो, आणि नीतिमानाची हत्या करण्याची योजना करतो. 11 मूर्ख त्याच्या रागाच्या उद्रेकाला पूर्ण वाट करून देतो, परंतु सुज्ञ माणसे शेवटी शांती प्रस्थापित करतात. 12 जर राजा लबाड गोष्टी ऐकत असेल, तर त्याचे सर्व अधिकारी दुष्ट होतील. 13 गरीब मनुष्य व जुलमी मनुष्य यांच्यामध्ये एक गोष्ट समान आहे: ती म्हणजे याहवेह दोघांना दृष्टी प्रदान करतात. 14 जर राजा गरिबांना योग्य न्याय देतो, तर त्याचे सिंहासन दीर्घकाल टिकेल. 15 छडी व ताकीद यामुळे ज्ञान मिळते; परंतु बालकाला बेशिस्त सोडल्यास, ते आपल्या आईला कलंकित करते. 16 जेव्हा दुष्टाची भरभराट होते, तेव्हा पापाचीही वाढ होते, परंतु नीतिमान दुष्टांचे पतन पाहतील. 17 तुमच्या बालकांना शिस्त लावा म्हणजे ते तुम्हाला शांती देतील; ते तुम्हाला पाहिजे तो आनंद देतील. 18 जिथे लोकांना दर्शन नाही, तिथे लोक बेबंद असतात. परंतु तो धन्य आहे जो ज्ञानाच्या शिक्षणाकडे लक्ष लावतो. 19 केवळ शब्दांनी नोकर सुधारू शकत नाहीत; जरी त्यांना समजते, तरी ते प्रतिसाद देणार नाहीत. 20

बोलण्यास उतावळा अशा कोणाला तुम्ही पाहिले आहे काय? मूर्खाला त्यांच्यापेक्षा अधिक आशा आहे. 21 ज्या चाकराचा लहानपणापासून लाड होतो, तर मोठेपणी तो उद्धट होईल. 22 क्रोधिष्ट मनुष्य भांडण सुरू करतो, आणि तापट मनुष्य अनेक पापे करतो. 23 अहंकार व्यक्तीच्या अध:पतनाचे कारण ठरतो; परंतु जो आत्म्याने नम्र आहे, त्याला सन्मान मिळतो. 24 चोरांचे साथीदार स्वत:चेच शत्रू आहेत; ते शपथ घेतात आणि सत्य सांगण्याचे धैर्य करत नाहीत. 25 मनुष्याचे भय धोकादायक सापळा असतो, परंतु जो याहवेहवर विश्वास ठेवतो त्याला सुरक्षित ठेवण्यात येते. 26 पुष्कळ लोक राजाची भेट घेण्याचा प्रयत्न करतात, परंतु योग्य न्याय याहवेहकडूनच मिळतो. 27 नीतिमान अप्रामाणिक माणसांचा द्वेष करतात; दुष्ट माणसे प्रामाणिक माणसांचा द्वेष करतात.

**30** मस्सा याकेहाचा पुत्र आगूराची आत्मप्रेरित वचने. या मनुष्याने इथिएल व उकाल यांना उद्देशून असे बोलले आहे: “परमेश्वरा, मी थकलो आहे, तरीही मी जिंकू शकतो. 2 मी फक्त पशुतुल्य आहे, मनुष्य नाही; मला मानवी समज नाही. 3 मी सुज्ञता शिकलो नाही, तसेच मला पवित्र परमेश्वराचे ज्ञानही नाही. 4 वर स्वर्गात कोण चढून गेला आणि मग खाली उतरला आहे? वाऱ्याला मुठीमध्ये धरलेला असा कोण आहे? अंगरख्यामध्ये कोणी पाणी बांधले आहे काय? पृथ्वीच्या सर्व सीमांची स्थापना कोणी केली आहे? त्याचे नाव काय आहे आणि त्याच्या पुत्राचे नाव काय आहे? तुम्हाला ते निश्चितच माहीत आहे! 5 “परमेश्वराचा प्रत्येक शब्द दोषरहित आहे; जे त्यांच्याकडे आश्रय घेतात, त्यांची ते ढाल आहेत. 6 त्यांच्या वचनात भर घालू नका. नाहीतर ते तुम्हाला रागावतील आणि तुम्ही लबाड आहात हे सिद्ध होईल. 7 “हे याहवेह, मी दोन कृपादानांची याचना करतो; माझ्या मरणापूर्वी मला नकार देऊ नका: 8 कपटी वागणे आणि असत्य बोलणे यापासून मला दूर ठेवा; मला दारिद्र्य किंवा श्रीमंतीही देऊ नका; परंतु फक्त माझी रोजची भाकर मला द्या. 9 कारण असे होऊ नये, कि मी श्रीमंत झालो तर तुम्हाला विसरेन आणि म्हणेन, ‘याहवेह कोण आहे?’ किंवा दरिद्री झालो तर कदाचित मी चोरी करेन आणि माझ्या परमेश्वराच्या नावाची निंदा होईल.” 10 दासाविरुद्ध त्याच्या धन्याकडे निंदानालस्ती करू नका; असे केल्यास तो तुम्हाला शाप देईल आणि तुम्ही दोषी ठराल. 11 असे काही लोक आहेत जे त्यांच्या वडिलांना शाप देतात, आणि त्यांच्या मातांनाही धन्यता देत नाहीत. 12 जे लोक आपल्या दृष्टीने स्वत:ला शुद्ध समजतात, तरीपण त्यांची मलिनता त्यांनी स्वच्छ केलेली नसते; 13 काही लोकांचे डोळे नेहमीच मग्रुरीत असतात, ज्यांच्या नजरा तिरस्काराने भरलेल्या असतात; 14 पृथ्वीवरील गरिबांना आणि मानवजातीतील गरजूंना गिळंकृत करण्यासाठी, त्यांचे दात करवतीसारखे आहेत, आणि ज्यांच्या जबड्यामध्ये चाकू ठेवलेले आहेत. 15 “जळूला दोन मुली आहेत. ‘दे! दे!’ असे त्या ओरडतात. “अशा तीन गोष्टी आहेत त्या कधीही समाधानी नसतात, ‘पुरे झाले!’ असे कधीही न बोलणाऱ्या चार गोष्टी आहेत: 16 अधोलोक आणि वांझ गर्भाशय; भूमी, जिचे पाण्याने कधीही समाधान होत नाही, अग्नी, जो कधीही म्हणत नाही, ‘पुरे झाले!’ (Sheol h7585) 17 “आपल्या वडिलांचा चेष्टा करणारे डोळे, आणि वृद्ध आईचा तिरस्कार करणारे डोळे, दरीतील डोमकावळे टोची मारून बाहेर काढतील, त्यांची शरीरे गिधाडे खातील. 18 “मला फारच आश्चर्यचकित करणाऱ्या तीन गोष्टी आहेत. चार गोष्टी मला समजत नाहीत: 19 गरुडाचा आकाशातील मार्ग, खडकावरून सरपटणारा साप, खवळलेल्या समुद्रात तरंगणारे जहाज, पुरुषाचा तरुणीशी संबंध? 20 “व्यभिचारी स्त्रीचा मार्ग असा आहे: ती खाऊन तोंड पुसते, आणि म्हणते, ‘मी काहीच वाईट केले नाही.’ 21 “तीन गोष्टीमुळे पृथ्वी हादरते, चार गोष्टी ती सहन करू शकत नाही: 22 एक नोकर जो राजा होतो, देवहीन मूर्ख ज्याला भरपूर खाण्यास मिळते, 23 तिरस्करणीय स्त्री जी विवाहबद्ध होते, आणि एक मोलकरीण तिच्या मालकिणीची जागा घेते. 24 “पृथ्वीवर चार लहान जीव आहेत, तरी त्या अत्यंत बुद्धिमान आहेत: 25 मुंग्या, दुर्बल प्राणी आहेत, तरीही उन्हाळ्यात ते त्यांचे धान्य साठवून ठेवतात; 26 खडकातील ससे अगदी नाजूक प्राणी! तरी ते खडकात स्वत:चे घर बनवतात; 27 टोळांना त्यांचा राजा नसतो, तरी ते टोळीटोळीने एकत्र पुढे चाल करतात; 28 पाल, त्यांना हाताने पकडणे शक्य आहे, तरीपण त्या राजांच्या महालात सापडतात. 29 “तीन गोष्टी आहेत, ज्यांची चाल अत्यंत डौलदार असते, चार प्राणी ज्यांची हालचाल डौलदार असते: 30 सिंह, सर्व प्राण्यात सामर्थ्यशाली, तो कोणाही समोर मागे सरत नाही; 31 तोऱ्यात चालणारा एक कोंबडा, बोकड, आणि बंडखोरीविरुद्ध सुरक्षित असलेला राजा. 32 “जर तू आत्मप्रशंसेने फुगून मूर्खपणा केला असशील किंवा दुष्ट योजना आखली असशील, तर हातांनी आपले तोंड झाकून घे. 33 कारण जसे साय घुसळल्याने लोणी मिळते, व नाक पिळण्याने रक्त निघते, तसेच क्रोध भडकविल्याने कलह उत्पन्न होतात.”

**31** राजा लमुवेलची ही नीतिसूत्रे—त्याच्या आईने प्रेरणेने शिकविलेली ही वचने आहेत. 2 माझ्या मुला ऐक! माझ्या पोटच्या मुला ऐक! माझ्या प्रार्थनांचे मिळालेले उत्तर, अशा माझ्या मुला ऐक! 3 तुझी शक्ती स्त्रियांच्या सहवासात घालवू नको. जे राजांचा नाश करतात, त्यांच्यासाठी तुझे बळ घालवू नको. 4 हे लमुवेला, राजांसाठी हे अयोग्य आहे— मद्य पिणे हे राजांसाठी योग्य नाही किंवा मदिरेची इच्छा बाळगणे हे राजांना शोभत नाही. 5 असे होऊ नये की, त्यांनी मद्य प्राशन करावे आणि त्यांना दिलेला हुकूमनामा विसरून जावे, आणि सर्व जाचलेल्यांना त्यांच्या अधिकारापासून वंचित करावे. 6 ज्यांचा नाश होत आहे त्यांना मदिरा पिऊ द्या, जे यातनेमध्ये आहेत त्यांना मद्य पिऊ द्या! 7 त्यांना पिऊ द्या आणि त्यांचे दारिद्र्य विसरू द्या, आणि त्यांच्या क्लेशाचे विस्मरण होऊ द्या. 8 जे स्वत:साठी बोलण्यास असमर्थ आहेत, त्यांच्यातर्फे बोल, जे सर्व निराश्रित आहेत त्यांच्या हक्कासाठी तू बोल. 9 गोरगरीब आणि गरजवंत यांचा कैवार घे; त्यांच्यासाठी बोल आणि त्यांना निष्पक्ष न्याय मिळवून दे. 10 सद्गुणी पत्नी कोणाला मिळेल? तर तिचे मोल माणकाहूनही अधिक आहे. 11 तिचा पती तिच्यावर पूर्ण भरवसा ठेवतो, आणि त्याला कोणत्याही मोलवान वस्तूची उणीव पडत नाही. 12

आयुष्यभर ती त्याच्या हितासाठी झटते, त्याचे अहित करीत नाही. 13 ती लोकर व ताग मिळविते आणि कामात गर्क राहून ते पिंजते. 14 ती एका व्यापारी जहाजासारखी आहे, तिची भोजनसामुग्री ती फार लांब जाऊन आणते. 15 ती रात्र सरताच उठते; आणि तिच्या कुटुंबीयांच्या भोजनाचा प्रबंध करते आणि दासींना त्यांचा वाटा पुरविते. 16 ती शेत घेण्याचा विचार करते, आणि ते विकत घेते; तिच्या मिळकतीमधून ती द्राक्षमळा लावते. 17 ती उत्साही व कष्टाळू आहे. कामे पूर्ण करण्यासाठी तिचे बाहू सशक्त आहेत. 18 तिचा व्यापार लाभदायक व्हावा यासाठी ती सतर्क असते, आणि तिचा दिवा रात्रीही मालवत नाही. 19 ती तिच्या हातांमध्ये चाती धरते, आणि ती बोटांनी चरकी चालविते. 20 ती गरिबांना उदारहस्ते देते आणि गरजूंना सढळ हाताने देते. 21 हिवाळा येतो तेव्हा तिला तिच्या कुटुंबाची चिंता करीत नसते; कारण ते सर्वजण किरमिजी वस्त्र घातलेले असतात. 22 ती तिचा पलंग सजविण्यासाठी चादरी विणते; ती रेशमी तागाचा आणि जांभळा पोशाख घालते. 23 तिच्या पतीला नगराच्या वेशीत सन्मान मिळतो, जिथे तो देशातील पुढाऱ्यांबरोबर बसतो. 24 ती तागाची वस्त्रे करून विकते आणि व्यापाऱ्यांना कमरबंद पुरविते. 25 बल व प्रताप तिची वस्त्रे आहेत. भविष्याबद्दल विचार करून ती आनंदी होते. 26 तिचे शब्द सुज्ञपणाचे आहेत. तिच्या जिभेवर विश्वासूपणाचे शिक्षण असते. 27 घरातील प्रत्येक गोष्टींवर तिचे बारकाईने लक्ष असते; आळसाने मिळवलेली भाकर ती कधीही खात नाही. 28 तिची मुले उठतात आणि तिला आशीर्वादित म्हणतात; आणि तिचा पतीसुद्धा तिची प्रशंसा करतो: 29 “उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अनेक स्त्रिया आहेत, पण त्या सर्वात तू उत्तम आहेस.” 30 मोहकपणा फसवा असू शकतो आणि सौंदर्य टिकाऊ नसते, परंतु याहवेहचे भय बाळगून त्यांचा आदर करणारी स्त्री प्रशंसनीय असते. 31 तिने केलेल्या सर्व कृत्यांसाठी तिचा सन्मान कर, आणि तिच्या कार्याबद्दल शहराच्या वेशीजवळ तिची प्रशंसा केली जावो.

# उपदेशक

**1** यरुशलेम येथील दावीद राजाचा पुत्र, उपदेशकाची वचने: 2 “व्यर्थ
आहे! व्यर्थ आहे!” उपदेशक म्हणतो. “निव्वळ व्यर्थ! सर्वकाही
व्यर्थ आहे.” 3 या सूर्याखाली लोक जे कष्ट करतात, त्याचा त्यांना काय
लाभ? 4 पिढ्या येतात आणि पिढ्या जातात, परंतु पृथ्वी सर्वकाळ
अस्तित्वात राहते. 5 सूर्य उगवतो आणि अस्त पावतो, आणि आपल्या
उगवतीच्या स्थानाकडे घाईने परत जातो. 6 वारा दक्षिणेकडे वाहतो
आणि उत्तरेकडे वळतो; तो गोल गोल भ्रमण करीत आपल्या ठिकाणी
परत जातो. 7 सर्व प्रवाह समुद्रास मिळतात, तरीही समुद्र कधी भरलेला
नाही. नद्या पुन्हा त्या स्थानाकडून वाहू लागतात, जिथून त्यांचा उगम
होतो, 8 सर्वकाही त्रासाने भरलेले आहे, जे कोणाला शब्दात सांगता
येत नाही. नेत्र बघून कधी समाधानी होत नाहीत. कान सुद्धा ऐकून भरत
नाहीत. 9 जे घडले ते पुन्हा एकदा होणार, जे केले गेले आहे, ते पुन्हा
केले जाईल; सूर्याखाली नवे असे काही नाही. 10 “पाहा! हे काहीतरी
नवे आहे, असे कोणी म्हणू शकेल काय?” हे तर पूर्वकाळापासूनच
होते; आमच्या काळापूर्वीच ते होते. 11 पुढे येणाऱ्या पिढीला, पूर्वीच्या
पिढ्यांची आठवण नाही आणि पुढे येणाऱ्या पिढीला सुद्धा त्याचे स्मरण
नसेल. 12 मी, उपदेशक, यरुशलेममध्ये इस्राएलचा राजा होतो. 13
आकाशाखाली घडत असलेल्या प्रत्येक गोष्टींचा अभ्यास आणि शोध
सुज्ञानाने करण्यासाठी मी माझ्या बुद्धीचा उपयोग केला. परमेश्वराने
मनुष्यावर किती जड ओझे लादले आहे! 14 सूर्याखाली होत असलेली
प्रत्येक गोष्टी मी पाहिली आहे; त्या सर्व, वाऱ्यामागे धावण्यासारखे व्यर्थ
आहेत. 15 जे वाकडे आहे, ते सरळ करता येत नाही; जी उणीव आहे,
ती मोजता येत नाही. 16 मी स्वतःला म्हटले, “पाहा, यरुशलेममध्ये
माझ्या आधी राज्य करून गेलेल्या राजांपेक्षा, मी अधिक सुज्ञान प्राप्त
केले आहे; सुज्ञान आणि विद्या यांचा मला सर्वात अधिक अनुभव घडला
आहे.” 17 मग मी सुज्ञता तसेच वेडेपणा व मूर्खपणा जाणून घेण्याचा
प्रयास केला, परंतु मला समजले की, हे देखील वाऱ्याचा पाठलाग
केल्यासारखे आहे. 18 कारण अधिक सुज्ञतेबरोबर अधिक दुःख येते;
जेवढी अधिक विद्या तेवढे अधिक दुःख.

**2** मी स्वतःशी म्हटले, “आता ये, चांगले काय आहे, ते शोधण्यासाठी
आनंदाने मी तुझी पारख करतो.” पण ते देखील व्यर्थच असे सिद्ध
झाले. 2 मी म्हणालो, “हास्य तर वेडेपणा आहे आणि सुखात काय
लाभ आहे?” 3 मी स्वतःला द्राक्षारसाने हर्षित करण्याचा प्रयत्न केला
व मूर्खता जवळ करून—तरीही माझे मन मला ज्ञानाने चालवित होते.
मनुष्य या पृथ्वीवरील थोडक्या दिवसांमध्ये काय चांगले करू शकतो
हे मला हे बघायचे होते. 4 मी मोठे प्रकल्प हाती घेतले: स्वतःसाठी
घरे बांधली आणि द्राक्षमळे लावले. 5 मी बागा आणि उद्याने बनवून
त्यामध्ये प्रत्येक प्रकारची फळझाडे लावली. 6 त्या बहरलेल्या झाडाना
पाणी मिळावे म्हणून मी जलाशय बनविले. 7 मी दास व दासी खरेदी
केले आणि माझ्या घरात जन्मलेले इतर दास देखील होते. माझ्यापूर्वी
यरुशलेममध्ये कोणाही कडे नव्हते इतके जास्त कळप आणि गुरे माझ्या
मालकीचे होते. 8 मी स्वतःसाठी चांदी आणि सोन्याचा व राजांच्या व
प्रांताच्या मौल्यवान वस्तूंचा मोठा संग्रह केला. मी गायक आणि गायिका
ठेवल्या, तसेच उपपत्न्यांसाठी जनानखानाही तयार केला—जे मनुष्याचे
हृदय हर्षित करते. 9 माझ्यापूर्वी यरुशलेममध्ये असलेल्यांपेक्षा मी फार
थोर झालो. या सर्वांमध्ये माझे ज्ञान माझ्यासोबत राहिले. 10 माझ्या
नेत्रांनी जे इच्छिले असे काहीही मी नाकारले नाही; माझ्या हृदयाला
कोणत्याही सुखासाठी नकार दिला नाही. माझ्या सर्व कष्टसाध्य कार्याने
माझे अंतःकरण हर्षित होत असे, हाच माझ्या सर्व परिश्रमांचा मोबदला
होता. 11 तरी जेव्हा माझ्या सर्व हस्तकृतीचे, आणि माझ्या कष्टसाध्य
कार्याने मी काय मिळविले याचा मी आढावा घेतला, तर सर्वकाही व्यर्थ,
वाऱ्याचा पाठलाग करण्यासारखे होते; सूर्याखाली काहीच लाभले नाही.
12 मग मी सुज्ञान समजून घ्यावे, आणि वेडेपणा व मूर्खता हे सुद्धा
कळावे म्हणून मी माझे विचार त्याकडे वळविले. जे गतकाळात केलेले
आहे त्यापेक्षा अधिक एखाद्या राजाच्या नंतर येणारा पुरुष काय करू
शकतो? 13 मी पाहिले की सुज्ञान मूर्खतेपेक्षा अधिक चांगले आहे,
जसा प्रकाश अंधारापेक्षा चांगला आहे. 14 सुज्ञ व्यक्तीच्या मस्तकावर
नेत्र आहेत, तर मूर्ख अंधारात चालत असतो; परंतु मला समजले की
अंतिम परिणाम त्या दोघांवर मात करतो. 15 मग मी स्वतःला म्हणालो,
“जे मूर्खाचे नशीब आहे तेच माझेही असेल” “तर शहाणपणाने मी
काय मिळविणार.” मी स्वतःला म्हणालो, “हे सुद्धा सर्व निरर्थक आहे.”
16 कारण सुज्ञसुद्धा मूर्खाप्रमाणे जास्त काळापर्यंत स्मरणात ठेवला
जाणार नाही; असे दिवस आले आहेत, जेव्हा दोघांचाही विसर पडेल.
मूर्खाप्रमाणे सुज्ञसुद्धा मरण पावेल! 17 म्हणून आता मला जीवनाचा
वीट आला आहे, कारण सूर्याखाली जे काही केले जात आहे, ते मला
दुःख देणारे आहे. ते सर्वकाही व्यर्थ, वाऱ्यामागे धावण्यासारखे आहे. 18
या सूर्याखाली मी ज्याच्यासाठी कष्ट केले, त्या सर्वाचा मला द्वेष वाटू
लागला, कारण जे लोक माझ्यानंतर येणार त्यांच्यासाठी ते मला सोडून
द्यावे लागणार. 19 कोणाला माहीत की तो व्यक्ती सुज्ञ असेल वा मूर्ख?
तरीही सूर्याखाली ज्यामध्ये मी माझे प्रयत्न आणि कौशल्य ओतले,
त्या माझ्या या कष्टाच्या प्रतिफळांचा ताबा त्यांच्याकडे असेल. हे सुद्धा
व्यर्थच आहे. 20 म्हणून या सूर्याखाली केलेल्या माझ्या सर्व श्रमाबद्दल
माझे हृदय निराश होऊ लागले. 21 कारण एखादी व्यक्ती सुज्ञान, विद्या
आणि कौशल्य यांच्या साहाय्याने कष्ट करते आणि ते अशा व्यक्तीच्या
हाती सोडते, की ज्याने त्यासाठी काहीही श्रम केलेले नाहीत. हे सुद्धा
निरर्थक आणि मोठ्या दुर्भाग्याचे आहेत. 22 सूर्याखाली त्या लोकांचे
सर्व कष्ट, ज्यासाठी त्यांनी मनापासून परिश्रम केले त्याचे त्यांना काय
मिळणार? 23 त्यांच्या सर्व दिवसांत, त्यांचे काम त्यांना दुःख आणि
वेदना अशा आहेत; रात्रीच्या वेळीसुध्दा त्यांचे मन विश्रांती घेत नाही. हे
सुद्धा व्यर्थच आहे. 24 खाणे आणि पिणे करून स्वतःच्या कष्टामधून
समाधान मिळविणे यापेक्षा मानव अधिक चांगले काय करू शकतो
आणि मी पाहतो की, हे सुद्धा परमेश्वराच्याच हातात आहे, 25 कारण

परमेश्वराशिवाय कोण उत्तम भोजन करेल व कोणाला आनंदाचा उपभोग घेता येईल? 26 जो व्यक्ती परमेश्वराला संतुष्ट करतो, त्याला परमेश्वर ज्ञान, बुद्धी आणि आनंद देतात, परंतु पाप्यांना संपत्ती गोळा करून ती जो व्यक्ती परमेश्वराला प्रसन्न करतो त्याच्या हाती सोपविण्याचे कार्य दिले आहे. हे सुद्धा वाऱ्याचा पाठलाग करण्यासारखे व्यर्थ आहे.

**3** प्रत्येक गोष्टींसाठी निश्चित वेळ आहे, आणि पृथ्वीवर प्रत्येक कामासाठी एक ऋतू ठरलेला असतो: 2 जन्म होण्याची वेळ आणि मृत्यू येण्याची वेळ, पेरणीची वेळ आणि कापणीची वेळ, 3 ठार मारण्याची वेळ आणि बरे करण्याची वेळ आहे; विध्वंसाची वेळ आणि बांधण्याची वेळ आहे; 4 रडण्याची वेळ आणि हसण्याची वेळ आहे; शोक करण्याची आणि नाचण्याची वेळ आहे; 5 दगड पसरून टाकण्याची वेळ आणि दगड गोळा करण्याची वेळ; आलिंगन देण्याची वेळ व आलिंगन टाळण्याची वेळ; 6 शोधण्याची वेळ आणि सोडण्याची वेळ; साठविण्याची वेळ व टाकून देण्याची वेळ; 7 फाडण्याची वेळ व दुरुस्त करण्याची वेळ; मौन धरण्याची वेळ व बोलण्याची वेळ; 8 प्रेम करण्याची वेळ व द्वेष करण्याची वेळ; युद्ध करण्याची वेळ आणि शांती राखण्याची वेळ. 9 कामकऱ्यांना त्यांच्या कष्टापासून काय मोबदला मिळतो? 10 परमेश्वराने मनुष्यावर लादलेले ओझे मी पाहिले आहे. 11 त्यांनी प्रत्येक गोष्ट, त्याच्या समयात सुंदर अशी बनविली आहे. परमेश्वराने मनुष्याच्या अंतःकरणात अनंतकाळचे जीवन ठेवलेले आहे. तरीसुद्धा परमेश्वराने आरंभापासून शेवटपर्यंत केलेली कृत्ये कोणीही समजू शकले नाहीत. 12 मला ठाऊक आहे की जिवंत असेपर्यंत मनुष्याने सुखी राहावे आणि दुसऱ्याचे हित करावे, यापेक्षा काहीही उत्तम नाही. 13 प्रत्येक मनुष्याने खावे, प्यावे व आपल्या कष्टाच्या कार्यात संतुष्ट राहावे—हे परमेश्वराने दिलेले दान आहे. 14 मला हे माहीत आहे की परमेश्वराने जे केले ते सर्वकाळ टिकणारे आहे; त्यात काही भर घालता येणार नाही किंवा त्यातून काही काढून घेता येणार नाही. मनुष्याने त्यांचे भय धरावे म्हणून परमेश्वर हे सर्व करतात. 15 जे आहे, ते सर्व यापूर्वी झालेलेच आहे; जे होणार, तेही होऊन गेले आहे. गतकाळात होऊन गेले तेच परमेश्वर पुन्हा घडवून आणतील. 16 मग मी सूर्याखाली आणखीही काही बघितले: दुष्टाईने—न्यायाचे स्थान घेतले होते. आणि न्यायीपणाच्या ठिकाणीसुद्धा—दुष्टताच होती. 17 मी स्वतःला म्हटले, "परमेश्वर नीतिमान आणि दुष्ट या दोघांचाही न्याय करणार, कारण प्रत्येक कृत्यांसाठी निर्धारित समय असणार, प्रत्येक कृत्यांचे न्याय होण्याची विशिष्ट वेळ." 18 मी स्वतःशी हे सुद्धा म्हणालो, "परमेश्वर मानवाची परीक्षा यासाठी घेतात की त्यांना हे समजावे की ते पशुवत् आहेत. 19 खरोखर मानवाचे नशीब हे इतर प्राण्यांप्रमाणे आहे; सारखेच नशीब हे दोघांसाठी वाट पाहत असते: जसा एक मरतो, तसाच दुसराही मरतो. सर्वांना सारखाच श्वास आहे; इतर प्राण्यांपेक्षा मानवाला अधिक लाभ नाही. सर्वकाही व्यर्थ आहे. 20 सर्वकाही एकाच ठिकाणी जाणार आहेत; सर्व मातीतून येतात आणि पुन्हा मातीत जाऊन मिळतात. 21 मनुष्याचा आत्मा वर घेतल्या जातो आणि जनावराचा प्राण भूतलात जातो, हे कोणाला माहीत आहे?" 22 मी हे पहिले की मानवांनी स्वतःच्या कामात आनंद मानावा, यापेक्षा त्यांच्यासाठी अधिक काही चांगले नाही, कारण हेच विधिलिखित आहे. ते गेल्यानंतर काय घडेल ते पाहण्यासाठी त्यांना कोण परत आणणार?

**4** मी पुन्हा पाहिले आणि मला सूर्याखाली होत असलेला जुलूम दिसला: पीडितांचे अश्रू मी पाहिले— आणि त्यांचे सांत्वन करणारा असा कोणी नाही. छळ करणाऱ्यांच्या हाती अधिकार होते— आणि त्यांचे सांत्वन करणारे कोणी नव्हते. 2 यावरून मी घोषित केले, मृत असलेल्या व्यक्ती, जिवंत असलेल्या माणसांपेक्षा अधिक संतुष्ट आहेत. 3 परंतु त्या दोघांपेक्षाही जो जन्मालाच आला नाही तो अधिक बरा. सूर्याखाली असलेले जे वाईट ते त्यांच्या पाहण्यात आले नाही. 4 आणि मी हे पाहिले की, एखाद्याला दुसऱ्याविषयी असलेल्या मत्सराच्या भावनेतून कष्ट आणि सर्व यश संपादन करता येते. हे सुद्धा व्यर्थच आहे, वाऱ्यामागे धावल्यासारखे आहे. 5 मूर्ख तर हात बांधून बसतात आणि स्वतःचा नाश करून घेतात. 6 अधिक कष्ट करून वाऱ्याच्या मागे धावून, दोन्ही हात भरून घेण्यापेक्षा, शांती समाधानाने एक हात भरून घेणे योग्य आहे. 7 पुन्हा एकदा या सूर्याखाली निरर्थक असे काहीतरी मी पाहिले: 8 एक एकटाच मनुष्य होता; त्याला ना मुलगा होता ना भाऊ. त्याच्या श्रमाला अंत नव्हता, तरी त्याच्या डोळ्यात धनाने तृप्तता नव्हती. तो विचारीत होता, "मी कोणासाठी हे श्रम करीत आहे," "आणि मी स्वतःला आनंदापासून का वंचित ठेवीत आहे?" हे सुद्धा व्यर्थ आहे— ही दैन्यावस्था आहे. 9 एकापेक्षा दोघेजण बरे! कारण त्यांच्या कष्टाचे अधिक चांगले प्रतिफळ मिळेल: 10 दोघांपैकी एकजण पडला, तर दुसरा त्याला मदत करून उठवेल, परंतु एकजण पडला आणि त्याला उचलण्यास कोणी नसला तर ते दयनीय आहे. 11 जेव्हा दोन व्यक्ती झोपतील तेव्हा ते एकमेकांना ऊब देतील, पण कोणी एकटा असल्यास, त्याला ऊब कशी मिळणार? 12 एकट्या व्यक्तीवर मात करता येते, दोघे स्वतःचा बचाव करू शकतात, तीन पदरी दोर सहजपणे तुटत नाही. 13 मूर्ख आणि संभाव्य संकटाचा इशारा न समजणारा राजा असण्यापेक्षा, गरीब परंतु सुज्ञ तरुण असणे चांगले. 14 तो तरुण तुरुंगातून राज्यपदावर आला असेल किंवा त्या राज्यात गरिबीत जन्मला असेल. 15 मी हे पाहिले की या सूर्याखाली जे जिवंत आहेत ते त्या तरुणाचे अनुकरण करतात, जो राज्याचा उत्तराधिकारी आहेत. 16 त्यांच्या पूर्वी असंख्य लोक होते. परंतु जे नंतर आले ते त्या उत्तराधिकाऱ्याशी संतुष्ट नव्हते. हे सर्वसुद्धा व्यर्थच, वाऱ्याचा पाठलाग करण्यासारखे आहे.

**5** परमेश्वराच्या मंदिरात जाताना तू तुझी पावले सांभाळ. बोध ऐकण्यासाठी परमेश्वराच्या समीप जा, मूर्ख लोकांसारखे यज्ञबली देण्यापेक्षा बरे, कारण आपण चूक करीत आहोत, हे त्यांना कळत नाही. 2 बोलण्यात उतावळा असू नको, परमेश्वरासमोर काहीही उच्चारण्यास आपल्या मनात घाई करू नकोस. कारण परमेश्वर स्वर्गात आहे आणि तू

तर पृथ्वीवर आहेस, म्हणून तुझे शब्द थोडकेच असू दे. 3 अनेक चिंता
असल्यास स्वप्न पडते, आणि जास्त बडबड करण्याने मूर्ख ओळखला
जातो. 4 परमेश्वराशी तू नवस केला असेल, तर तो फेडण्यास उशीर
करू नकोस, परमेश्वराला मूर्ख मनुष्यात प्रसन्नता वाटत नाही; तुझा
नवस फेडून टाक. 5 नवस करून न फेडण्यापेक्षा, तो न केलेला बरा. 6
तुझ्या मुखाने तुला पाप करावयास लावू नये. "मी चुकून नवस केला"
असे मंदिराच्या दूताला सांगून निषेध करू नकोस. तू जे बोलतो त्याबद्दल
परमेश्वराने रागावून तुझ्या हाताचे कार्य नष्ट का करावे? 7 पुष्कळ
स्वप्ने बघणे व अधिक शब्द वापरणे व्यर्थ आहे. म्हणून परमेश्वराचे भय
बाळग. 8 आपल्या नगरात गरिबांवर अत्याचार होत असताना किंवा
त्यांना न्याय आणि त्यांचे हक्क नाकारले जात असताना दिसल्यास
त्याबद्दल आश्चर्य बाळगू नकोस; एक अधिकाऱ्याचे निरीक्षण करणारा
वरिष्ठ अधिकारी आहे, आणि दोघांवर त्यांचा उच्चाधिकारी आहे. 9
भूमीचे फळ तर सर्वांसाठी आहे; राजासुद्धा त्याद्वारे नफा मिळवितो.
10 पैशावर प्रेम असणाऱ्याला पैसा कधीच पुरेसा नसतो; जो कोणी
संपत्तीवर प्रेम करतो, तो कधीही आपल्या मिळकती मध्ये समाधानी
नसतो, हे सुद्धा व्यर्थच आहे. 11 संपत्ती वाढली म्हणजे, तिचा उपभोग
घेणारे सुद्धा वाढतात. आणि ती केवळ आपल्या दृष्टीने बघून आनंदित
होण्या व्यतिरिक्त त्या मालकाला काय लाभ? 12 खाण्यास कमी
किंवा भरपूर मिळो कष्टकऱ्याला सुखाची झोप लागते. परंतु श्रीमंताची
विपुल संपत्ती त्यांना रात्री झोप येऊ देत नाही. 13 सूर्याखाली मी एक
भयंकर गोष्ट पाहिली: जसे मालकाची हानी होण्यासाठी साठविलेली
संपत्ती, 14 किंवा काही दुर्दैवी व्यवहारामध्ये तो सर्व पैसा गमावून बसतो
आणि शेवटी मुलाबाळांकडे वारसाहक्काने मिळण्यास काहीही शिल्लक
नसते. 15 प्रत्येकजण आपल्या आईच्या उदरातून नग्न येतो, आणि
जसे सर्वजण येतात, तसेच ते परत जातात. त्यांचे कष्टार्जित असे
काहीही त्यांच्या हातात घेऊन ते जाऊ शकत नाहीत. 16 ही देखील
अतिशय भयानक दुष्टता आहे: सर्वजण जसे येतात, तसेच ते जातात,
आणि वाऱ्यासाठी कष्ट करून त्यांना काय मिळते? 17 त्यांच्या सर्व
दिवसांत ते अंधारात राहून अत्यंत निराशा, यातना आणि क्रोधासह अन्न
खातात, 18 तरी एक चांगली गोष्ट मी पाहिली: मनुष्याने खावे, प्यावे
व परमेश्वराने आपल्याला सूर्याखाली दिलेल्या या थोड्या दिवसाच्या
कष्टमय जीवनात जे आहे, त्यात समाधान मानावे—हाच त्यांचा वाटा
आहे. 19 आणि याशिवाय परमेश्वराने जर कोणा मनुष्याला संपत्ती
आणि तिचा उपभोग घेण्यासाठी आरोग्य दिले असेल, तर त्यांनी त्या
परिश्रमात आनंद करावा—हे त्यांना परमेश्वराचे दान आहे. आनंदाने
काम करणे व जीवनात जे वाट्याला येईल त्यात समाधान मानणे,
ही खरोखर परमेश्वराची देणगी आहे. 20 असे करणाऱ्याला आपल्या
भूतकाळाचे मनन करावे लागत नाही, कारण परमेश्वर त्याचे अंतःकरण
आनंदाने भरून ठेवतो.

6 सूर्याखाली आढळणारी आणखी एक वाईट गोष्ट मला दिसली, जी
मानवावर अतिशय भारी आहे: 2 परमेश्वर काही माणसांना भरपूर
संपत्ती, मान सन्मान देतात; त्यांचे हृदय इच्छिते अशा कशाचीही त्यांना
वाण पडत नाही. मात्र त्याचा उपभोग घेण्याची क्षमता त्याला देत नाहीत
आणि परके त्याचा आनंद उपभोगतात. हे निरर्थक आहे, फार वाईट
आहे. 3 एखाद्या व्यक्तीला शंभर लेकरे असतील आणि तो दीर्घायुषी
जगला; तरी तो आपल्या समृद्धीचा आनंद उपभोगू शकत नसेल आणि
त्याला योग्य रीतीने मूठमाती मिळत नाही, तर मी असे म्हणतो की,
त्याच्यापेक्षा मृत जन्मलेला गर्भ बरा. 4 ते बाळ व्यर्थच जन्मते आणि
अंधारात विलीन होते आणि अंधारातच त्याचे नाव नाहीसे होऊन जाते.
5 जरी त्याने न कधी सूर्याला बघितले ना त्याविषयी काही जाणले, त्या
मनुष्यापेक्षा त्याला अधिक विसावा आहे. 6 जरी तो हजार किंवा दोन
हजार वर्षे जगला व त्याला संपत्तीसुखाचा आनंद लाभला नाही. सर्वजण
एकाच ठिकाणी जात नाही काय? 7 प्रत्येक मनुष्य आपल्या पोटासाठी
कष्ट करतो, परंतु त्यांची भूक कधीही तृप्त होत नाही. 8 शहाण्या
लोकांना मूर्ख लोकांपेक्षा काय फायदा? दुसऱ्या लोकांसमोर कसे वागावे
हे जाणून गरिबांना काय फायदा? 9 ज्यागोष्टी निरर्थक वाऱ्याचा पाठलाग
करण्यासारख्या आहेत, वासनेमागे धावण्यापेक्षा, आपल्या दृष्टीसमोर
आहे, त्यात संतुष्ट असणे बरे. 10 जे काही अस्तित्वात आहेत त्याला
आधी नाव दिलेले आहे, आणि मानवता तर ओळखीची होती; कोणीही
जो आपल्यापेक्षा अधिक शक्तिशाली आहे त्याच्याशी स्पर्धा करू शकत
नाही. 11 जेवढे जास्त शब्द तेवढा अर्थ कमी होतो, मग उगाच बोलण्याने
मनुष्यास काय लाभ? 12 वायफळ सावलीसारख्या अल्पकाळच्या
जीवनात उत्तम काय आहे हे कोणा मनुष्याला सांगता येईल काय?
मेल्यानंतर सूर्याच्या खाली काय होईल, हे कोणाला सांगता येईल?

7 सन्माननीय नाव हे सुवासिक अत्तरापेक्षा उत्तम आहे, आणि मृत्युदिन
जन्म दिवसापेक्षा उत्तम आहे. 2 मेजवानीच्या घरी जाण्यापेक्षा
शोकाकुल घरात जाणे हे अधिक उत्तम आहे, प्रत्येक मनुष्याने ही गोष्ट
लक्षात ठेवावी; मृत्यू हे सर्वांचे विधिलिखित आहे. 3 विलाप करणे हे
हसण्यापेक्षा बरे, कारण दुःखी चेहरा हृदयासाठी बरा आहे. 4 सुज्ञानी
मनुष्याचे हृदय शोकाकुल घरात असते, परंतु मूर्खांचे हृदय सुखाच्या
घरात असते. 5 सुज्ञानी व्यक्तीच्या निषेधाकडे लक्ष देणे मूर्खांचे गीत
ऐकण्यापेक्षा उत्तम आहे. 6 मूर्खाचे हसणे हे पात्राखालील अग्नीतील
तडतडणाऱ्या काट्यांप्रमाणे आहे, हे सुद्धा व्यर्थ आहे. 7 पिळवणूक
सुज्ञानी मनुष्याला मूर्ख बनविते, आणि लाच हृदयाला भ्रष्ट करते.
8 एखाद्या कामाचा शेवट त्याच्या आरंभापेक्षा बरा, आणि गर्वापेक्षा
सहनशीलता बरी. 9 क्रोधित होण्यास तुझ्या अंतःकरणात घाई करू
नकोस, क्रोध तर मूर्खाच्या मांडीवर वास करतो. 10 असे म्हणू नको,
"जुने दिवस सध्याच्या दिवसांपेक्षा अधिक चांगले का होते?" कारण
असे प्रश्न विचारणे हे सुज्ञान नव्हे. 11 सुज्ञान, हे वतन प्राप्तीप्रमाणे
चांगले आहे, आणि ज्यांना सूर्य दिसतो त्यांच्यासाठी ते लाभदायक आहे.
12 जसे धन तसेच सुज्ञान हे एक आश्रयस्थान आहे, परंतु सुज्ञानाचा
फायदा हा आहे: ज्ञान ज्यांच्या मालकीचे आहे, त्यांचे रक्षण करते.
13 परमेश्वराच्या कामावर मनन करा: त्यांनी जे वाकडे केले आहे ते

कोण सरळ करू शकतो? 14 जेव्हा वेळ अनुकूल असते तेव्हा आनंद करा; परंतु जेव्हा वेळ प्रतिकूल असते, तेव्हा हे लक्षात घ्या: परमेश्वराने जशी अनुकूल वेळ निर्माण केली तशी प्रतिकूल वेळही त्यांनीच निर्माण केली, म्हणून कोणा व्यक्तीला आपल्या भविष्याबद्दल जाणून घेता येत नाही. 15 या व्यर्थ जीवनामध्ये मी दोन्ही गोष्टी पाहिल्या आहेत: नीतिमान व्यक्ती त्यांच्या नीतिमत्वात नाहीसे होतात, आणि दुष्ट त्यांच्या दुष्टपणात दीर्घायुष्य जगतात. 16 अति नीतिमान होऊ नका, किंवा अति सुज्ञानीही असू नका— तुम्ही स्वतःचा नाश का करून घ्यावा? 17 अति दुष्ट होऊ नका, आणि मूर्खही असू नका— तुमची वेळ येण्यापूर्वी का मरावे? 18 पहिल्याला घट्ट धरून ठेवणे, आणि दुसऱ्यालाही सोडून न देणे हे बरे. जे परमेश्वराचे भय धरतात ते अतिरेक टाळतील. 19 सुज्ञान एखाद्या बुद्धिमान व्यक्तीला एका शहराच्या दहा शासकांपेक्षा अधिक शक्तिशाली बनवते. 20 खरोखर, या पृथ्वीवर नीतिमान असा कोणीही नाही, असा एकही व्यक्ती नाही जो चांगलेच करतो आणि कधीच पाप करीत नाही. 21 लोकांच्या प्रत्येक शब्दांकडे लक्ष देऊ नका, नाहीतर तुमचा चाकरसुद्धा तुम्हाला शाप देताना तुम्ही ऐकाल— 22 कारण तुम्ही इतरांना कितीदा शाप दिला हे तुम्हाला तुमच्या मनातच ठाऊक आहे. 23 सुज्ञानाने मी या सर्व गोष्टी तपासून पाहिल्या आणि म्हटले, “मी सुज्ञानी होण्याचे ठरविले आहे”— परंतु हे माझ्या शक्तीच्या पलीकडे होते. 24 जे काही अस्तित्वात आहे ते खूपच दूर आणि सखोल आहे, त्याचा शोध कोणाला घेता येईल? 25 ज्ञान व रचनेच्या पध्दती जाणून व त्याच शोध घेण्यासाठी आणि दुष्टतेची मूर्खता व मूर्खतेचा वेडेपणा समजण्यासाठी मी माझे मन वळविले. 26 मरणापेक्षाही अति कटू गोष्ट मला दिसून आली की, एक स्त्री जी एक पाश आहे, जिचे हृदय एक सापळा आहे जिचे हात साखळीप्रमाणे आहेत. जे परमेश्वराला प्रसन्न करतात ते तिच्यापासून निसटतील, परंतु पापींना ती पाशात अडकवेल. 27 “पाहा,” शिक्षक असे म्हणतो, “या गोष्टींचा मी शोध लावला आहे: “रचनेच्या पध्दती समजण्यासाठी मी एक गोष्ट दुसरीत मिळविली— 28 जेव्हा मी शोध घेत होतो मला काही निष्पन्न झाले नाही— हजारांमध्ये एक नीतिमान मनुष्य होता. परंतु त्या सर्वांमध्ये एकही स्त्री नीतिमान नव्हती. 29 एकच गोष्ट माझ्या लक्षात आली: परमेश्वराने मानवजात नीतिमान अशी निर्माण केली, परंतु ते अनेक योजनांचा शोधच करीत राहिले.”

**8** सुज्ञासारखा कोण आहे? गोष्टींचे स्पष्टीकरण कोणाला माहीत आहे? मनुष्यांचे सुज्ञान त्यांचे मुख उजळून टाकते आणि त्यांचे कठोर स्वरूप बदलते. 2 मी म्हणतो, राजाच्या आज्ञेचे पालन करा, कारण तशी तुम्ही परमेश्वरासमोर शपथ घेतली आहे. 3 राजाची उपस्थिती सोडण्याची घाई करू नका. परंतु एखाद्या वाईट गोष्टींच्या बाजूने उभे राहू नका, कारण राजा त्याला योग्य वाटेल ते करतो. 4 कारण राजाच्या वाणीत अधिकार आहे, “हे तू काय करतो” असे त्याला कोण म्हणणार? 5 त्याच्या आज्ञांचे पालन करणाऱ्यांना इजा होणार नाही, आणि सुज्ञ माणसाच्या अंतःकरणाला योग्य वेळ आणि प्रक्रिया माहीत होईल. 6 जरी त्या व्यक्तीला भारी यातना सोसाव्या लागतात, तरी प्रत्येक गोष्टींसाठी योग्य वेळ आणि प्रक्रिया ठरलेली असते. 7 जर कोणालाही आपले भविष्य माहीत नसते, तर पुढे काय घडणार हे तो इतरांना कसे सांगणार? 8 जसे कोणत्या मनुष्याला वाऱ्यावर नियंत्रण करण्याचे सामर्थ्य नाही, तसेच त्यांच्या मृत्यूच्या वेळेवरही कोणाला अधिकार नाही. जसे कोणालाही युद्धाच्या वेळी सुट्टी नसते, तसेच दुष्टता करणाऱ्यांना ती त्यातून सुटका देत नाही. 9 मी हे सर्व पाहिले, सूर्याखाली होत असलेल्या प्रत्येक गोष्टींकडे माझे चित्त लावले. अशीही एक वेळ आहे, जेव्हा एखादा व्यक्ती दुसऱ्यावर स्वतःच्याच यातनेमुळे अधिकार चालवितो. 10 जे पवित्रस्थानात येत-जात होते आणि या नगरीत त्यांची उगीच स्तुती केली जात असे, अशा दुष्टांना पुरले जात असताना सुद्धा मी पहिले; हे देखील अर्थहीन आहे. 11 जर एखाद्या अपराधासाठी त्वरित शिक्षा करण्यात आली नाही, तर लोकांचे हृदय चुकीचे कार्य करण्याच्या योजनेने भरतात. 12 जर एखादा दुष्ट मनुष्य शंभर गुन्हे करतो तरी तो दीर्घायुष्य जगतो, तरी मला माहीत आहे की जे परमेश्वराचे भय बाळगतात व जे त्यांचा आदर करतात त्यांचे अधिक हित होईल. 13 दुष्ट परमेश्वराचे भय बाळगत नाहीत, म्हणून त्यांचे भले होणार नाही आणि संध्याकाळच्या सावलीप्रमाणे त्यांचे दिवस वाढणार नाही. 14 पृथ्वीवर आणखी काही घडत आहे जे निरर्थक आहे: जे दुष्टासाठी निर्धारित असते ते नीतिमानाला मिळते व नीतिमानाच्या वाट्याचे दुष्टाला मिळते. मी म्हणतो हे सुद्धा अर्थहीन आहे. 15 म्हणून मी जीवनाच्या आनंदाची प्रशंसा केली, कारण मनुष्याने खावे, प्यावे, व आनंद करावा, सूर्याखाली त्याहून अधिक चांगले काही नाही. तेव्हा सूर्याखाली परमेश्वराने दिलेल्या त्यांच्या कष्टदायक जीवनाच्या सर्व दिवसात, त्यांना आनंदाची साथ लाभेल. 16 सुज्ञानाला जाणावे व पृथ्वीवर केलेले परिश्रम पाहावे—लोक जे अहोरात्र झोप न घेता करतात—म्हणून मी माझे चित्त लावले, 17 तेव्हा मी परमेश्वराने केलेले सर्वकाही पाहिले. सूर्याखाली होणाऱ्या कार्याला कोणीही समजू शकत नाही. शोध घेण्याचे कितीही प्रयत्न केले, तरीही त्याचा अर्थ कळू शकत नाही. जरी सुज्ञ लोक ते माहीत असल्याचा दावा करतात, तरी त्यांनाही ते खचितच समजू शकत नाही.

**9** मी या सर्वांवर मनन केले आणि हा निष्कर्ष काढला की नीतिमान व सुज्ञ आणि ते जे काही करतात ते सर्व परमेश्वराच्या हाती आहे, परंतु त्याच्यासाठी पुढे प्रेम किंवा द्वेष यापैकी काय ठेवले आहे हे कोणा मनुष्याला माहीत नसते. 2 सर्वांची नियती एकच आहे—नीतिमान आणि दुष्ट, चांगला आणि वाईट, शुद्ध आणि अशुद्ध, जे यज्ञार्पण करतात व जे करीत नाहीत. जसे चांगल्या व्यक्तीबरोबर, तसेच पापी व्यक्तीबरोबर; जसे शपथ घेणाऱ्यांशी, तसेच जे ती शपथ घ्यायला घाबरतात त्यांच्याशी. 3 सूर्याखाली घडत असलेल्या प्रत्येक गोष्टीत हे वाईट आहे: एकसमान नियती सर्वांवर मात करते. शिवाय, लोकांची अंतःकरणे दुष्टाईने भरलेली आहेत आणि जिवंत असताना त्यांच्या अंतःकरणात वेडेपणा आहे आणि नंतर ते मृतांमध्ये सामील होतात. 4

जिवंत लोकांमध्ये असलेल्या प्रत्येकाला ही आशा आहे—जिवंत कुत्रा
सुद्धा मृत सिंहापेक्षा बरा! 5 जिवंतांना आपण मरणार हे माहीत असते,
पण मेलेल्यांना काहीच माहीत नसते; त्यांना पुढे काही मोबदला नाही
आणि त्यांच्या नावाचे सुद्धा स्मरण नाही. 6 त्यांचे प्रेम, त्यांचा द्वेष
आणि त्यांचा हेवा हे सर्व फार पूर्वीच नाहीसे झाले आहे; सूर्याखाली
घडत असलेल्या कोणत्याही गोष्टीत पुन्हा त्यांचा वाटा नसेल. 7 जा,
आनंदाने तुझे भोजन कर, आणि हर्षित हृदयाने आपला द्राक्षारस पी,
कारण तू जे करतो ते परमेश्वराने आधी मान्य केले आहे. 8 तुमची वस्त्रे
सर्वदा शुभ्र असावीत व तुमच्या डोक्याला नेहमी तेलाभिषेक असावा. 9
सूर्याखाली परमेश्वराने तुला देऊ केलेल्या अर्थहीन जीवनाच्या आपल्या
सर्व दिवसांत आपली पत्नी, जिच्यावर तू प्रेम करतो, तिच्याबरोबर या
निरर्थक जीवनाचा आनंद उपभोग. कारण सूर्याखाली तुझ्या जीवनाचा व
श्रमाचा हाच वाटा आहे. 10 जे काम तुझ्या हाताला सापडते, ते तुझ्या
सर्व शक्तीने कर, कारण मृतलोकामध्ये, जिथे तुला जायचे आहे, तिथे
ना काम आहे, ना योजना, ना विद्या, ना सुज्ञान. **(Sheol h7585)** 11
मी सूर्याखाली आणखी काहीतरी वेगळे पाहिले: शर्यत वेगवानांसाठी
नाही, किंवा युद्ध बलवानाचे नाही, सुज्ञानी लोकांनाच भोजन मिळते
असे नाही किंवा बुद्धिमानाला धन मिळते असे ही नाही किंवा कुशल
कारागिरांवरच अनुग्रह होईल, असे नाही; परंतु समय व प्रसंग सर्वांनाच
येतो. 12 आपल्यावर कधी वेळ येणार हे कोणालाही ठाऊक नाही: जसा
मासा त्या क्रूर जाळयात सापडतो, किंवा पक्षी फासात अडकला जातो,
तसेच लोकसुद्धा त्यांच्यावर अचानक पडलेल्या वाईट समयात अडकले
जातात. 13 सुज्ञानाचे हे उदाहरण मी सूर्याखाली पाहून फार प्रभावित
झालो: 14 एक छोटेसे शहर होते. त्यात थोडेच लोक राहत होते आणि
एक अतिशय पराक्रमी राजा त्यांच्या विरोधात सैन्य घेऊन आला व
त्या शहराला त्याने वेढा दिला आणि गराडा घातला. 15 त्या शहरात
एक गरीब पण सुज्ञ मनुष्य होता, आणि आपल्या सुज्ञानाने त्याने शहर
वाचविले. पण त्या गरीब माणसाची कोणी आठवण केली नाही. 16
म्हणून मी म्हणालो, “सुज्ञान बळापेक्षा बरे आहे.” परंतु गरीब मनुष्याचे
ज्ञान तुच्छ लेखले गेले आणि त्याचा शब्द कोणी मानला नाही. 17
सुज्ञानी मनुष्याच्या शांत शब्दांकडे लक्ष देणे हे मूर्खांच्या राजाचे ओरडणे
ऐकण्यापेक्षा बरे. 18 युद्धाच्या शस्त्रांपेक्षा सुज्ञान बरे, पण एक पापी
पुष्कळ चांगल्या गोष्टींचा नाश करतो.

**10** जशा मेलेल्या माशा सुगंधी तेलाला दुर्गंधी बनवतात, तसेच
जराशी मूर्खता सुज्ञान आणि सन्मानावर भारी पडते. 2 सुज्ञानाचे
अंत:करण उजवीकडे नेते, म्हणजे त्याला सत्कार्यास प्रवृत्त करते,
पण मूर्खाचे अंत:करण त्याला डावीकडे, म्हणजे दुष्ट कृत्यांकडे ओढून
नेते. 3 मूर्ख व्यक्ती रस्त्याने चालत असला तरी, त्यांना बुद्धीचा अभाव
असतो, आणि सर्वांना दाखवितात की ते किती मूर्ख आहेत. 4 जर
तुझ्या अधिपतीचा राग तुझ्यावर भडकला, तर आपले स्थान सोडू
नकोस; विनम्रता मोठे अपराध शांतविते. 5 सूर्याखाली मी एक दुष्टता
पाहिली आहे, अशी चूक की जी अधिकाऱ्यांकडून घडते. 6 मूर्खांना
मोठी पदे दिले जातात, आणि श्रीमंतांना खालील स्थान दिले जाते.
7 गुलामांना मी घोड्यांवर स्वार झालेले पाहिले आहे, आणि राजपुत्र
गुलामाप्रमाणे पायी चालतात. 8 जो खड्डा खणतो तोच तिच्यात पडेल.
जो कुंपण मोडतो त्याला सर्प चावेल. 9 जो खडक खोदतो त्याला
त्यापासून दुखापत होते; जो लाकडे फोडतो त्याला त्यापासून धोका
होऊ शकेल. 10 जर कुऱ्हाड बोथट असली, आणि तिची धार तीक्ष्ण
नसेल, तर श्रम अधिक लागते, परंतु निपुणता यश आणेल. 11 साप
वश होण्यापूर्वी जर गारुड्याला चावला, तर गारुड्याला त्याचा काही
उपयोग नाही. 12 सुज्ञ व्यक्तीच्या मुखातील शब्द कृपेचे असतात, पण
मूर्खाचे ओठ त्याचाच नाश करतात. 13 त्यांचे बोलणे प्रथम मूर्खतेचे
असते; आणि त्यांच्या बोलण्याचा शेवट दुष्टाईच्या वेडेपणाने होतो; 14
मूर्ख शब्द वाढवून बोलतात. पुढे काय घडणार ते कोणी जाणत नाही;
त्यांच्यानंतर काय होणार असे एखाद्याला कोणी व्यक्ती सांगू शकणार
काय? 15 मूर्खांचे श्रम त्यांना थकवून टाकतात; नगराकडे जाणारी वाट
त्यांना ठाऊक नसते. 16 धिक्कार असो त्या देशाचा ज्याचा राजा एक
दास आहे, आणि ज्या देशाचे राजपुत्र सकाळीच मेजवानी सुरू करतात.
17 धन्य आहे तो देश ज्याचा राजा उच्चकुळात जन्मलेला आहे आणि
ज्या देशाचे राजपुत्र नशेसाठी नव्हे तर शक्तीसाठी योग्य समयी आपले
भोजन करतात. 18 आळशीपणामुळे घराचे छत पडते; आळशाच्या
हातांमुळे घर गळू लागते. 19 मनोरंजनासाठी मेजवानी असते, द्राक्षारस
जीवनाला आनंदित बनविते, आणि पैशाने सर्व समस्याचे समाधान होते.
20 राजाला आपल्या मनात देखील शाप देऊ नको, श्रीमंताला सुद्धा
आपल्या शयनकक्षातून शाप देऊ नकोस, कारण आकाशातील एक
पक्षी तुझे शब्द घेऊन जाईल, आणि आपल्या पंखाने उडत जाऊन तू
काय बोललास याचा अहवाल देईल.

**11** तू आपल्या धान्याची समुद्रावरून निर्यात कर; पुष्कळ दिवसांनी
त्याचा मोबदला तुला लाभेल. 2 सात उपक्रमांमध्ये, होय,
आठांमध्ये गुंतवणूक कर; कारण पृथ्वीवर कोणती दुर्घटना घडेल, हे
तुला ठाऊक नाही. 3 जर मेघ पाण्याने भरलेले आहेत, तर ते पृथ्वीवर
पाऊस ओततात. झाड दक्षिणेला पडो की उत्तरेला, ज्या ठिकाणी ते
पडते, तिथेच पडलेले राहते. 4 जो वाऱ्याकडे पाहत राहतो तो पेरणी
करणार नाही आणि जो ढगांना पाहत राहतो तो कापणी करत नाही. 5
जसे वाऱ्याचे मार्ग, किंवा आईच्या उदरात गर्भ कसा वाढतो हे तुला
कळत नाही, तसेच परमेश्वर जे सर्वांचे निर्माणकर्ता आहेत, त्यांची
कृत्येही तुला समजू शकत नाहीत. 6 तू आपले बी सकाळी पेर, आणि
संध्याकाळीही आपल्या हातांना विसावा देऊ नकोस. कारण त्यातील
कोणते फलदायी होईल, हे किंवा ते, किंवा ते दोन्हीही चांगले फळ
देतील, हे तुला ठाऊक नाही. 7 प्रकाश मधुर आहे, आणि सूर्य पाहणे
डोळयांना रम्य आहे. 8 एखादा मनुष्य कितीही दीर्घायुष्य जगो, त्या
सर्वांचा त्याने आनंद घ्यावा. परंतु त्यांनी अंधकाराचे दिवस आठवावे,
कारण ते पुष्कळ असतील. येणारे सर्वकाही व्यर्थ आहे. 9 जो तू तरुण
आहेस, तो तू तारुण्यात आनंदी राहा, तुझ्या तारुण्याच्या दिवसांत तुझे

हृदय तुला आनंद देवो. तुझे हृदय जे काही इच्छिते आणि तुझे नेत्र जे
काही पाहतात त्याप्रमाणे कर, परंतु हे लक्षात असू दे की परमेश्वर या
सर्वांनुसार तुझा न्याय करेल. 10 म्हणून तू आपल्या मनातून चिंता
नाहीशी कर आणि आपल्या देहातील वाईट गोष्टी काढून टाक, कारण
तारुण्य आणि जोश निरर्थक आहेत.

**12** तुझ्या तारुण्याच्या दिवसात तुझ्या निर्माणकर्त्याचे स्मरण कर,
आणि जोपर्यंत कष्टाचे दिवस येत नाहीत आणि अशी वर्षे
येत नाहीत जेव्हा तुम्ही म्हणाल, “मला त्यांच्यामध्ये काही संतोष
नाही”— 2 जोपर्यंत सूर्य आणि प्रकाश, आणि चंद्र आणि तारे
अंधकारमय होत नाहीत, पावसानंतर ढग परत जात नाहीत; 3 जेव्हा
घराचे पहारेकरी थरथर कापतील, आणि बलवान पुरुष वाकून जातील,
दळण करणाऱ्या थोडक्या आहेत म्हणून काम थांबवतील, आणि
खिडक्यांमधून पाहणाऱ्यांची नजर अंधुक होईल; 4 जेव्हा रस्त्याच्या
वेशी बंद असतील आणि जात्याचा आवाज मंद होईल; जेव्हा लोक
पक्ष्यांच्या आवाजाने उठतील, परंतु त्यांची सर्व गीते शांत होतील;
5 जेव्हा लोकांना उंच ठिकाणांची आणि वाटेतील धोक्याची भीती
वाटते; जेव्हा बदामाची झाडे फुलतात आणि नाकतोडा त्याबरोबर
फरफटत जातो आणि कोणतीही अभिलाषा जागृत होत नाही. तेव्हा
लोक आपल्या सनातन घराकडे जातात आणि शोक करणारे रस्त्यावर
येतात. 6 आयुष्याचा चांदीचा दोर तुटण्याआधी, आणि सोन्याचे भांडे
फुटण्याआधी; झऱ्यावरील घागर फुटण्याआधी, आणि विहिरीवरील
रहाट मोडण्याआधी, 7 आणि माती जिथून आली तिथे जाण्याआधी,
आणि परमेश्वराने दिलेला आत्मा त्याकडे परतण्याआधी आपल्या
निर्माणकर्त्याचे स्मरण कर. 8 उपदेशक म्हणतो, निरर्थक! निरर्थक!
सर्वकाही निरर्थक! 9 उपदेशक केवळ सुज्ञच नाही, तर त्याने लोकांनाही
विद्या शिकवली. त्याने विचार करून शोध केला आणि अनेक म्हणी
रचल्या. 10 उपदेशकाने योग्य शब्दांचा शोध केला आणि त्याने जे
काही लिहिले ते यथार्थ व सत्य होते. 11 सुज्ञानाची वचने पराणीप्रमाणे
आहेत, त्यांच्या शब्दांचा संग्रह एका मेंढपाळाने दिलेल्या घट्ट रोवलेल्या
खिळयांप्रमाणे आहेत. 12 याव्यतिरिक्त असलेल्या शिक्षणापासून माझ्या
मुला सावध राहा. अधिक पुस्तके लिहून ठेवायला अंत नाही आणि
पुष्कळ अभ्यास केल्याने शरीर थकते. 13 आता सर्व ऐकून झाले; सर्व
गोष्टींचा निष्कर्ष हाच की: परमेश्वराचे भय बाळग आणि त्यांच्या आज्ञा
पाळ, कारण सर्व मानवजातीचे हेच कर्तव्य आहे. 14 कारण प्रत्येक
गुप्त गोष्टीबद्दल, ती चांगली असो किंवा वाईट, त्याचा परमेश्वर न्याय
करतील.

# गीतरत्न

**1** हे गीतरत्न, शलोमोनाची रचना. 2 तो आपल्या मुखाच्या चुंबनांनी
माझे चुंबन घेवो— कारण तुझे प्रेम हे द्राक्षारसापेक्षा आनंददायक
आहे. 3 तुझ्या अत्तरांचा सुगंध सुखदायक आहे; तुझे नाव ओतलेल्या
अत्तरासारखे आहे. तरुण कुमारी तुझ्यावर प्रेम करतात यात आश्चर्य
नाही! 4 चल घाई करू या! मला तुझ्याबरोबर दूर घेऊन जा! राजाने मला
आपल्या अंत:पुरात न्यावे. मैत्रिणी आम्ही तुझ्यामध्ये उल्हास आणि
हर्षित होऊ; आम्ही द्राक्षारसापेक्षा तुझी अधिक प्रशंसा करू. नायिका
त्यांनी तुझ्यावर प्रीती करणे किती यथार्थ आहे! 5 अहो यरुशलेमच्या
कन्यांनो, मी सावळी असूनही सुंदर आहे, केदारच्या काळ्या तंबूसारखी,
शलोमोनच्या डेऱ्याच्या पडद्यासारखी. 6 मी सावळी आहे म्हणून
माझ्याकडे टक लावून पाहू नका, कारण मी सूर्यामुळे काळवंडले आहे.
माझ्या आईची मुले माझ्यावर रागावली आणि त्यांनी मला द्राक्षमळ्याची
राखण करावयास लावले; पण मी स्वतःच्या द्राक्षमळ्याकडे दुर्लक्षित
केले. 7 मी तुझ्यावर प्रेम करते, तर तूच मला सांग, तुझा कळप तू
कुठे चरावयास नेतो आणि मध्यानाच्या वेळी तू तुझ्या मेंढ्यांना कुठे
विसाव्याला लावतोस. पडद्यात असलेल्या स्त्रीप्रमाणे तुझ्या सोबत्यांच्या
कळपाच्या बाजूला मी का असावे? 8 अगे स्त्रियांमधील परमसुंदरी,
जर तुला ठाऊक नाही, तर कळपांच्या ठशांचे अनुसरण करत ये
आणि मेंढपाळाच्या तंबूशेजारी तू आपली करडे चार. 9 माझ्या प्रिये,
फारोहच्या रथामधील घोडीशी, मी तुझी तुलना करतो. 10 तुझे गाल
कर्णभूषणासह, तुझा गळा दागिन्यांच्या साखळीसह किती सुंदर आहे.
11 आपण तुझ्यासाठी सोन्याचे, रुपेजडित असे कर्णभूषण घडवून घेऊ.
12 राजा त्याच्या मेजाजवळ असता, माझ्या अत्तराचा सुगंध दरवळत
होता. 13 माझा प्रियकर माझ्यासाठी माझ्या स्तनांमध्ये ठेवलेल्या
गंधरसाच्या पुडीप्रमाणे आहे. 14 माझा प्रिय माझ्यासाठी जणू एन-
गेदीच्या द्राक्षमळ्यात असलेल्या मेंदीच्या फुलांचा गुच्छच आहे. 15
माझ्या प्रिये, तू किती सुंदर आहेस! अहा, किती सुंदर! तुझे नयन
कबुतरे आहेत. 16 माझ्या वल्लभा, तू किती सुंदर दिसतोस! अहा,
किती मोहक! आणि आपले अंथरूण ताजेतवाने आहे. 17 आमच्या
घराच्या तुळया केदारच्या; व छपर देवदारूच्या लाकडाचे आहे.

**2** मी शारोनाचा गुलाब आहे, खोऱ्यातील कमळ आहे. 2 खरेच,
काट्यांमध्ये कमळ तशी इतर तरुणींमध्ये माझी प्रिया आहे. 3 जसे
जंगलातील इतर झाडांमध्ये सफरचंदाचे झाड, तसा इतर तरुणांमध्ये
माझा प्रियकर आहे. त्याच्या छायेत बसणे मला आनंददायी आहे,
आणि त्याचे फळ मला चवीला गोड लागते. 4 त्याने मला आपल्या
मेजवानगृहात आणावे, त्याच्या प्रेमाचा ध्वज माझ्यावर असावा. 5
मनुक्यांनी मला बळ द्या, सफरचंदांनी मला ताजेतवाने करा, कारण
प्रेमात मी दुर्बल झाले आहे. 6 त्याचा डावा हात माझ्या डोक्याखाली
आहे, आणि त्याच्या उजव्या हाताने तो मला आलिंगन देतो. 7
यरुशलेमच्या कन्यांनो, तुम्हाला रानातील मृगांची आणि हरिणीची
शपथ, त्याची इच्छा आहे तोपर्यंत माझ्या प्रेमाला जागे करू नका. 8
ऐका! माझ्या प्रियांनो! पाहा! तो येत आहे, डोंगरामधून उड्या मारत,
टेकड्यांवरून बागडत येत आहे. 9 माझा प्रियकर हरिणीसारखा किंवा
तिच्या वत्सासारखा आहे. पाहा, तो तिथे आमच्या भिंतीआड उभा
राहून, खिडक्यांतून न्याहळत आहे, जाळीतून डोकावीत आहे. 10 माझा
प्रियतम मला म्हणाला, “माझ्या प्रिये, ऊठ, माझ्या सुंदरी, माझ्याबरोबर
ये. 11 पाहा! हिवाळा संपला आहे; आता पाऊससुद्धा होऊन गेला. 12
पृथ्वीवर फुले उमलली आहेत; गाण्याचा ऋतू आला आहे, कबुतरांचे
गीत आमच्या देशात ऐकू येत आहे. 13 अंजिराच्या झाडाची फळे लागली
आहेत; आणि द्राक्षवेलींच्या फुलांचा सुगंध दरवळत आहे. ऊठ, ये,
माझ्या प्रिये; माझ्या सुंदरी, माझ्याबरोबर ये.” 14 डोंगराच्या कपारीत,
कड्यांच्या गुप्त जागी राहणारी माझी कबुतरीण, मला तुझे मुख पाहू
दे, मला तुझा स्वर ऐकू दे; कारण तुझा स्वर गोड आणि तुझा चेहरा
मनोहर आहे. 15 कोल्हे व लहान खोकडे, जे द्राक्षमळ्यांची नासधूस
करतात त्यांना आमच्यासाठी पकडा, कारण आमच्या द्राक्षमळ्यात
आता बहर आला आहे. 16 माझा प्रियतम माझा, आणि मी त्याची आहे;
कमळांमध्ये तो आपला कळप चारीत आहे. 17 दिवस संपेपर्यंत आणि
सावली जाईपर्यंत, खडतर पर्वतावरच्या हरिणांसारखा किंवा लहान
वत्सासारखा हे प्रियतमा, माझ्याकडे परत ये.

**3** रात्रभर माझ्या अंथरुणावर मी त्याला शोधत होते ज्याच्यावर माझे
हृदय प्रेम करते; मी त्याला शोधले परंतु तो सापडला नाही. 2 मी
आता उठेन आणि शहरभर फिरेन, त्याच्या रस्त्यावर आणि चौकात
जाऊन; माझे हृदय ज्याच्यावर प्रेम करते त्याचा मी शोध करेन. मग मी
त्याला शोधले परंतु तो सापडला नाही. 3 जे पहारेकरी नगरात गस्त
घालतात त्यांना मी आढळले तेव्हा मी त्यांनाच विचारले, मी त्यांना
विचारले, “माझे हृदय ज्याच्यावर प्रेम करते, तो तुम्हाला दिसला काय?”
4 पहारेकऱ्यांपासून जराशी दूर गेले आणि ज्यावर माझे हृदय प्रीती करते
तो मला सापडला मी त्याला बिलगले आणि माझ्या आईच्या घरी, जिने
माझे गर्भधारण केले तिच्या खोलीत आणेपर्यंत त्याला जाऊ दिले नाही.
5 यरुशलेमच्या कन्यांनो, तुम्हाला रानातील मृगांची आणि हरिणीची
शपथ, त्याची इच्छा आहे तोपर्यंत माझ्या प्रेमाला जागे करू नका. 6 हा
धुराच्या स्तंभासारखे व्यापाऱ्यांच्या सर्व सुगंधित पदार्थांनी, ऊद आणि
गंधरस यांनी सुगंधित, असा रानातून हा कोण येत आहे? 7 पाहा!
ही तर शलोमोनाची पालखी आहे! इस्राएलातील निवडलेल्या साठ
योद्ध्याच्या दलाच्या पहाऱ्यात आलेली आहे. 8 ते सर्व धनुर्धारी, आणि
युद्धात अनुभवी आहेत. रात्री होणाऱ्या आतंकासाठी सज्ज असलेले,
प्रत्येकाने आपली तलवार सोबत घेतली आहे. 9 शलोमोन राजाने
लबानोनाच्या लाकडाची ही पालखी; स्वत:साठी बनविली आहे. 10
त्याचे खांब चांदीचे आहेत, त्याचे तळ सोन्याचे आहे. त्यातील बैठक
जांभळ्या वस्त्रांची आहे, तिच्या आतील भागाला यरुशलेमच्या कन्यांनी
प्रेमाने वेलबुट्टीने मढविले आहे. यरुशलेमच्या तरुणीकडून प्रेमपूर्वक
भेट. 11 अहो सीयोनच्या कन्यांनो, बाहेर या आणि पाहा, शलोमोन राजा

कसा मुकुटमंडित आहे ते पाहा, त्याच्या विवाहाच्या दिवशी त्याच्या
आईने त्याला तो घातला आहे, त्याचे हृदय आनंदित झाले तो हा दिवस.

**4** किती सुंदर आहेस तू, माझ्या प्रिये! आहा, किती सुंदर आहेस!
तुझ्या पडद्याआड तुझे नयन कबुतरे आहेत. तुझे केस त्या शेरडांच्या
कळपाप्रमाणे आहेत ज्या गिलआदाच्या टेकड्यांवरून झळकतात. 2
तुझे दात नुकत्याच धुतलेल्या मेंढरांच्या कळपाप्रमाणे आहेत, प्रत्येकाला
आपले जुळे आहेत; त्यापैकी कोणीही एकटे नाहीत. 3 किरमिजी
सुताप्रमाणे तुझे ओठ आहेत; तुझे ओठ मनमोहक आहेत. ओढणीआड
असलेले तुझे गाल डाळिंबाच्या दोन फोडींप्रमाणे आहेत. 4 तुझी
मान दावीदाने बांधलेल्या बुरुजाप्रमाणे आहे, जो शिलाकृतीने बांधला
आहे; ज्यावर योद्धांच्या एक हजार ढाली लटकलेल्या आहेत. 5 तुझे
स्तन दोन हरिणींसारखे आहेत, जुळ्या मृगांसारखे ते मनोरम आहेत,
कमळपुष्पांमध्ये चरतात 6 दिवस उजाडेपर्यंत, आणि छाया नाहीशी
होईपर्यंत, मी गंधरसाच्या पर्वतावर व बोळाच्या टेकडीवर जाईन. 7
माझ्या प्रिये, तू सर्वांगी सुंदर आहेस; तुझ्यात काहीही उणीव नाही. 8
माझ्या वधू, लबानोनाहून तू माझ्यासोबत ये, लबानोनाहून माझ्यासोबत
ये, अमानाह डोंगराच्या माथ्यावरून, सनीर व हर्मोनच्या शिखरावरून,
सिंहाच्या गुहांपासून आणि चित्ते वावरतात त्या डोंगरावरून खाली
उतरून ये. 9 अगे माझ्या भगिनी, माझी वधू; तुझ्या एकाच नजरेने
तुझ्या माळेच्या एकाच मणीने तू माझे हृदय चोरून घेतले आहेस. 10
माझ्या भगिनी, माझ्या वधू, तुझे प्रेम किती हर्षित करणारे आहे! तुझे
प्रेम द्राक्षारसापेक्षा कितीतरी उत्तम आहे, इतर सुगंधी द्रव्यांपेक्षा तुझ्या
अत्तराचा सुगंध अधिक मनमोहक आहे. 11 माझ्या वधू, तुझे ओठ
मधाच्या पोळ्याप्रमाणे मध गाळतात; दूध आणि मध तुझ्या जिभेखाली
आहेत. तुझ्या वस्त्रांचा सुगंध लबानोनाच्या सुगंधासारखा आहे. 12
माझ्या भगिनी, माझ्या वधू तू एका बंद केलेली बाग आहेस; तू एक
कुंपणाने घेरलेल्या झऱ्यासारखी, शिक्कामोर्तब कारंज्याप्रमाणे आहेस.
13 तुझी रोपे तर डाळिंबाचा मळा आहे, ज्यात सर्वोत्कृष्ट फळे, मेंदी
आणि सुगंधी अगरू आहेत, 14 अगरू आणि केशर, वेखंड आणि
दालचिनी, सर्व प्रकारची सुगंधी झाडे, तसेच गंधरस आणि जटामांसी
आणि सर्व उत्तम मसाले आहेत. 15 या बागेतील पाण्याचा झरा,
लबानोन पर्वतावरून खाली वाहणाऱ्या वाहत्या पाण्याची विहीर अशी तू
आहेस. 16 उत्तरेच्या वाऱ्या, जागा हो, आणि दक्षिणेच्या वाऱ्या, ये;
माझ्या बागेतील सुगंध चोहीकडे पसरावा, म्हणून माझ्या बागेवरून
वाहत जा. माझ्या प्रियकराला त्याच्या बागेत येऊ द्या, आणि बागेतील
सर्वोत्कृष्ट फळे खाऊ द्या.

**5** माझ्या भगिनी, माझ्या वधू, मी माझ्या बागेत आलो आहे; सुगंधी
द्रव्यांबरोबर मी माझा गंधरसही गोळा केला आहे. मी मधाबरोबर
आणि माझ्या मधाचे पोळे खात आहे. मी माझे द्राक्षारस आणि दूध
प्यालो आहे. मित्र माझ्या मित्रांनो, खा आणि प्या; प्रीतीच्या आनंदाने
भरून जा. 2 मी झोपले होते परंतु माझे हृदय जागेच होते. ऐका! माझा
प्रियकर दरवाजा ठोकीत आहे: “माझ्यासाठी उघड, माझ्या भगिनी,
माझ्या प्रिये, माझी कबुतरी, माझ्या सर्वांग सुंदरी. माझे डोके दवबिंदूने
चिंब भिजले आहे, माझे केस रात्रीमुळे ओलसर झाले आहे.” 3 माझा
पोशाख मी काढून ठेवला आहे— तो मी पुन्हा घालू काय? मी माझे
पाय धुतले आहेत, ते मी पुन्हा मळवू काय? 4 माझ्या प्रियसख्याने
बाहेरून हात घालून कडी उघडण्याचा प्रयत्न केला; तेव्हा माझे हृदय
त्याच्यासाठी धडधडू लागले. 5 माझ्या प्रियकरासाठी दार उघडण्यास मी
उठले, आणि दाराच्या कडीवर आणि माझ्या हातांतून गंधरसाचे अत्तर
पाझरले, माझ्या बोटांतून गंधरस स्त्रवला. 6 माझ्या प्रियसख्यासाठी मी
दार उघडले, पण तो तिथून निघून गेला होता; तेव्हा माझे हृदय गळून
गेले. मी त्याला चोहीकडे शोधले, पण तो कुठेच सापडला नाही. मी
त्याला हाक मारली, पण त्याने उत्तर दिले नाही. 7 पहारेकरी नगरात
गस्त घालत असता त्यांना मी सापडले. त्यांनी मला मारहाण केली;
मला जखमी केले; तटावरील पहारेकऱ्यांनी तर माझी ओढणी काढून
घेतली! 8 यरुशलेमच्या कन्यांनो, मला हे वचन द्या, मी तुम्हावर एक
कामगिरी सोपविते— जर तुम्हाला माझा प्रियकर सापडला, तर तुम्ही
त्याला काय सांगाल? मी त्याच्या प्रेमासाठी झुरत आहे, असे सांगा. 9
तुझ्या प्रियकरामध्ये इतरांहून अधिक असे काय आहे, हे परमसुंदरी?
तुझ्या प्रियकरामध्ये इतरांहून अधिक असे काय आहे, की तू आम्हाला
शपथ देऊन ही कामगिरी सोपवावीस? 10 माझा प्रियकर तेजस्वी आणि
लालबुंद, दहा हजारात श्रेष्ठ आहे. 11 त्याचे मस्तक शुद्ध सोन्यासारखे
आहे; त्याचे केस कुरळे असून डोमकावळ्यासारखे काळेभोर आहेत.
12 ओढ्याच्या काठावर असलेल्या, कबुतरांप्रमाणे त्याचे डोळे आहेत,
जसे ते दुधात धुतलेले, रत्नजडित केल्यासारखे आहेत. 13 त्याचे गाल
सुगंधी वनस्पतीच्या वाफ्यासारखे अत्तर दरवळणारे आहेत. त्याचे ओठ
गंधरस गाळणाऱ्या कमळपुष्पासारखे आहे. 14 त्याचे बाहू पुष्कराजाने
सुशोभित केलेल्या सुवर्णस्तंभासारखे आहेत. त्याचे शरीर नीलम रत्नांनी
सुशोभित करून उजळ केलेल्या हस्तिदंतासारखे आहे. 15 त्याचे पाय
शुद्ध सोन्याच्या कोंदणात बसविलेले संगमरवरी स्तंभच आहेत. त्याचे
रूप लबानोनासारखे आहे, उत्तम देवदारूसारखे आहे. 16 त्याचे मुख
परममधुर आहे; तो सर्वस्वी सुंदर आहे. यरुशलेमच्या कन्यांनो, हाच
माझा प्रियकर, हाच माझा मित्र आहे.

**6** हे सर्व स्त्रियांमधील परमसुंदरी, तुझा प्रियकर कुठे गेला? कोणत्या
मार्गाने वळला आहे, की तुझ्याबरोबर आम्हीही त्याला शोधू? 2
माझा प्रियकर त्याच्या बागेत, आपल्या सुगंधी झाडांच्या वाफ्यात, तो
कमळिनी शोधून गोळा करण्यास तो गेला आहे. 3 मी माझ्या प्रियकराची
आहे, आणि माझा प्रियकर माझाच आहे; कमळिनीमध्ये तो फुले
शोधित आहे. 4 माझ्या प्रिये, तू तिरजाह नगरीसारखी सुंदर आहेस, जसे
यरुशलेम मनोहर आहे, जसे ध्वज फडकविणारे विजयी सैन्य तशी तू
ऐश्वर्यशाली आहे. 5 माझ्यावरून तू आपली दृष्टी काढ; कारण तुझे नयन
मला भारावून सोडतात. तुझे केस गिलआद डोंगरावर चकाकणाऱ्या
शेळयांच्या कळपाप्रमाणे आहेत. 6 तुझे दात नुकत्याच धुतलेल्या

मेंढरांच्या कळपाप्रमाणे आहेत. प्रत्येकाला आपले जुळे आहेत, त्यात
एकही उणा नाही. 7 ओढणीआड असलेले तुझे गाल डाळिंबाच्या दोन
फोडींप्रमाणे आहेत. 8 तिथे साठ राण्या, आणि ऐंशी उपपत्नी, आणि
कुमारिका तर असंख्य असतील; 9 पण हे माझ्या कबुतरे, तू परिपूर्ण,
व निराळी आहेस, तिच्या आईची एकुलती एक कन्या असून, जिने
तिला जन्म दिला तिची लाडकी आहे. तरुण स्त्रियांनी तिला पाहून, धन्य
म्हटले; राण्या व उपपत्नी यांनी देखील तिची प्रशंसा केली. 10 जो
पहाटेसारखा प्रसन्न, चंद्रासारखा मनोरम, सूर्यासारखा प्रकाशमान,
मिरवणुकीतील ताऱ्यासारखे गौरवी दिसणारे असे हे कोण आहे? 11
दऱ्याखोऱ्यात वाढत असलेली नवी झाडे, द्राक्षवेलींना आलेले अंकुर,
आणि डाळिंबाला आलेली फुले पाहण्यासाठी मी खाली अक्रोडाच्या
झाडांच्या मळ्यात गेलो. 12 मला समजण्यापूर्वी, माझ्या इच्छेने मला
माझ्या लोकांच्या शाही रथामध्ये स्थान दिले. 13 परत ये, शुलेमकन्ये
परत ये; आम्ही तुला न्याहाळावे म्हणून परत ये, परत ये! मित्र महनाईमचे
नृत्य पाहण्यासारखे तुम्ही शुलेमकन्येला का न्याहाळता?

**7** हे राजकन्ये, पायतणे घातलेले तुझे पाय किती सुंदर दिसतात!
कुशल कारागिराने घडविलेल्या रत्नाप्रमाणे तुझ्या मांड्या वळणदार
आहेत. 2 तुझी नाभी गोलाकार पेल्यासारखी असून, त्यात मसालेदार
मद्याची कधीच वाण पडत नाही, तुझी कंबर कमळिनीपुष्पांनी वेढलेल्या
गव्हाच्या राशीसारखे आहे. 3 तुझे स्तन दोन हरिणींसारखे आहेत,
जुळया मृगांसारखे ते मनोरम आहेत. 4 हस्तिदंती मनोऱ्यासारखी तुझी
मान आहे. तुझे नयन बाथ-रब्बीमच्या वेशीकडे असलेल्या हेशबोनाच्या
तळयासारखे आहे. तुझे नाक जणू काही लबानोन येथील, जे दिमिष्कच्या
दिशेला असलेल्या बुरुजासारखे रेखीव आहे. 5 तुझ्या मस्तकाने
कर्मेल डोंगरासारखे तुला मुकुटमंडित केले आहे. तुझे केस जांभळया
रंगाच्या शाही पडद्यासारखे आहे; या केशसंभारात राजा बंदिस्त झाला
आहे. 6 माझ्या प्रिये, तू किती सुंदर आणि प्रसन्न करणारी आहेस,
तू अत्यंत मनमोहक आहेस! 7 तू खजुरीच्या झाडासारखी सडपातळ
आहेस. खजुरीच्या घोसासारखे तुझे स्तन आहेत. 8 मी म्हटले, मी
खजुरीच्या झाडावर आरोहण करेन आणि त्याच्या घोसांना धरीन; तुझे
स्तन द्राक्षवेलीमध्ये द्राक्षांच्या गुच्छासारखे होवोत, आणि तुझा श्वास
सफरचंदासारखा सुवासिक होवो, 9 तुझे मुख उत्तम द्राक्षारसासारखे
होवो. नायिका द्राक्षारस ओठांवरून दातांना स्पर्श करून, थेट माझ्या
प्रिये कडे जावो, 10 मी माझ्या प्रियकराची आहे, आणि तो माझीच
कामना करतो. 11 माझ्या प्रिया, ये, चल, आपण रानावनात जाऊ,
गावामध्ये रात्र घालवू. 12 सकाळीच उठून आपण द्राक्षमळयात जाऊ;
द्राक्षवेली मोहरल्या आहेत की काय, त्यांना कळया आल्यात की काय
ते पाहू. डाळिंबाच्या झाडांना फुले आलीत काय ते पाहू. आणि तिथे मी
माझ्या प्रीतीचा वर्षाव करेन. 13 त्या ठिकाणी दुदाफळाचे सुगंध दरवळत
असतात, आणि दुर्मिळ फळे आमच्या दाराशीच उपलब्ध होतात नवीन
आणि जुनीही फळे, ही सर्व माझ्या प्रियकरासाठी राखून ठेवली आहेत.

**8** किती बरे झाले असते जर तू माझ्या भावासारखा असतास, माझ्या
आईच्या दुधाने त्याचे पोषण झाले! जर मी तुला बाहेर भेटले तर,
मी तुझे चुंबन घेतले असते, आणि कोणीही माझा तिरस्कार केला
नसता. 2 मी तुझे मार्गदर्शन केले असते आणि तुला माझ्या आईच्या
घरी घेऊन गेले असते— तिने मला शिकविलेला मसालेदार द्राक्षारस मी
तुला, माझ्या डाळिंबाचा रस पिण्यास दिला असता. 3 त्याचा डावा
हात माझ्या डोक्याखाली आहे, आणि त्याच्या उजव्या हाताने तो मला
आलिंगन देतो. 4 यरुशलेमच्या कन्यांनो, मी तुम्हाला शपथ घालते:
इच्छा आहे तोपर्यंत माझ्या प्रेमाला जागे करू नका. 5 ही कोण आहे
जी वाळवंटातून आपल्या प्रियकरावर टेकून येत आहे? नायिका जिथे
तुझ्या आईने गर्भधारण केले ज्या सफरचंदाच्या झाडाखाली; तिथे तुझ्या
मातेला प्रसूती वेदना होऊन तिने तुला जन्म दिला, त्या ठिकाणी मी
तुला उत्तेजित केले. 6 तू मला आपल्या हृदयावर मोहर लावल्याप्रमाणे
ठेव, मुद्रेप्रमाणे आपल्या भुजांवर मला ठेव; कारण मृत्यूप्रमाणेच प्रीती
प्रबळ आहे, तिचा हेवा कबरेप्रमाणे आहे. तिचे उद्रेक अग्निज्वालेप्रमाणे
उसळतात, ते खरोखर आगीचे लोळच असतात. (Sheol h7585) 7
प्रेमाचा अग्नी विपुल जलाशयांनी विझत नाही; नद्यांमध्ये महापूर आला
तरी ती बुडत नाही. एखाद्याने आपल्या घरातील संपूर्ण संपत्ती देऊ
केली तरी प्रेमापुढे ती अगदी तुच्छ होय. 8 आमची एक लहान बहीण
आहे, तिला अजून ऊरही फुटले नाहीत, तिच्या मागणीच्या दिवशी
आम्ही आमच्या बहिणीसाठी काय करावे? 9 ती जर भिंत असती तर,
आम्ही तिच्यावर चांदीचे बुरूज बांधू. ती जर दार असती तर आम्ही
तिला, गंधसरूच्या फळयांनी झाकून टाकले असते. 10 मी एक भिंत
आहे, आणि माझे स्तन बुरुजासारखे आहेत. अशाप्रकारे मी माझ्या
प्रियकराच्या नजरेत त्याला समाधान आणणारी झाले आहे. 11 बआल-
हामोन येथे शलोमोनचा एक द्राक्षमळा होता; तो त्याने तेथील कुळांना
खंडाने दिला. त्याचे फळ म्हणून प्रत्येकाने हजार चांदीची शेकेल द्यायची
होती. 12 परंतु माझ्याकडे स्वतःचा द्राक्षमळा आहे; शलोमोन, हजार
शेकेल तुझीच आहेत, आणि मळ्याची देखरेख करणाऱ्यांना मी दोनशे
नाणी देईन. 13 बागेत राहणाऱ्या माझ्या प्रिये, तुझ्या सख्या तुझ्या सेवेत
हजर असतात, मला तुझा स्वर ऐकू दे! 14 माझ्या प्रियसख्या, लवकर
ये, आणि हरिणीसारखा हो, किंवा सुगंधाने भरलेल्या डोंगरावरील तरुण
काळवीटा प्रमाणे हो.

# यशायाह

**1** यहूदीयाचे राजे उज्जीयाह, योथाम, आहाज आणि हिज्कीयाहच्या
शासनकाळात आमोजाचा पुत्र यशायाहने यहूदीया आणि यरुशलेम
संबंधी दृष्टान्त पाहिला. 2 हे आकाशा, माझे ऐक! हे पृथ्वी ऐक! कारण
याहवेह असे म्हणाले: “मी मुलांचे संगोपन केले आणि त्यांना वाढविले,
परंतु त्यांनी माझ्याविरुद्ध बंड केले आहे. 3 बैल त्याच्या मालकाला
ओळखतो, गाढव त्याच्या मालकाचा गोठा ओळखतो, परंतु इस्राएल
ओळखत नाही, माझ्या लोकांना समजत नाही.” 4 हे पापी राष्ट्रा,
तुझा धिक्कार असो, तुम्ही लोक, ज्यांचा अपराध फार मोठा आहे,
वाईट कृत्ये करणाऱ्यांची पिल्ले, भ्रष्टाचारासाठी देऊन टाकलेली मुले!
त्यांनी याहवेहना सोडून दिले आहे; इस्राएलच्या पवित्राला तिरस्काराने
झिडकारले आहे, आणि त्यांच्याकडे पाठ फिरविली आहे. 5 तुम्हाला
आणखी मार का दिला जावा? तुम्ही विद्रोह का करीत राहावे? तुमच्या
संपूर्ण डोक्याला दुखापत झाली आहे, तुमचे संपूर्ण अंतःकरण ग्रस्त
झाले आहे. 6 पायाच्या तळव्यापासून ते डोक्याच्या टाळूपर्यंत काहीही
चांगले तिथे राहिले नाही— फक्त जखमा आणि खरचटलेले, आणि
उघडे व्रण आहेत, त्या स्वच्छ केलेल्या किंवा पट्ट्यांनी बांधलेल्या नाहीत
किंवा जैतुनाच्या तेलाने त्या पुसलेल्या नाहीत. 7 तुमचा देश उद्ध्वस्त
झाला आहे, तुमची शहरे अग्नीमध्ये जळाली आहेत; पाडाव केल्यानंतर
करावे तसे, तुमच्यादेखत तुमची शेते परदेशीयांनी ओरबाडून घेतली
आहेत. 8 सीयोनकन्येला द्राक्षमळयात असलेल्या आश्रयस्थानासारखे,
काकडीच्या शेतातील झोपडीसारखे, वेढा दिलेल्या शहराप्रमाणे आहे.
9 सर्वसमर्थ याहवेह यांनी जर आमच्यातील काहींना वाचविले नसते
तर, आम्ही सदोमासारखे झालो असतो, गमोरासारखी आमची गत
झाली असती. 10 अहो, सदोमाचे राज्यकर्ते, याहवेहचे शब्द ऐका; तुम्ही
गमोराचे लोकहो, आमच्या परमेश्वराची सूचना ऐका! 11 “तुमची असंख्य
होमर्पणे— ती माझ्यासाठी काय आहेत?” असे याहवेह म्हणतात.
“होमार्पणासाठी माझ्याकडे गरजेपेक्षा जास्त मेंढे आणि पुष्ट वासरे
यांची चरबी आहे; बैलांच्या, मेंढरांच्या किंवा शेळयांच्या रक्तामध्ये मला
काही आनंद नाही. 12 जेव्हा तुम्ही माझ्यासमोर येता, तुम्हाला कोणी
सांगितले, की माझ्या मंदिरांचे अंगण तुडवा? 13 अर्थशून्य अर्पणे
आणणे बंद करा! तुमच्या सुगंधी धूपाचा मला तिटकारा वाटतो. नवचंद्र
उत्सव, शब्बाथ आणि समारंभ— अशा तुमच्या निरर्थक सभा मी सहन
करू शकत नाही. 14 तुमचे अमावस्याचे उत्सव आणि तुमचे नेमलेले
सण यांचा मी माझ्या संपूर्णतेने तिरस्कार करतो. ते मला भार असे
झाले आहेत; त्यांना सहन करता मी थकून गेलो आहे. 15 प्रार्थनेमध्ये
जेव्हा तुम्ही तुमचे हात पसरता, तेव्हा मी तुमच्यापासून माझे डोळे
लपवितो; जेव्हा तुम्ही पुष्कळ विनवण्या करता, मी त्या ऐकत नाही.
तुमचे हात रक्ताने माखलेले आहेत! 16 “धुऊन तुम्ही स्वतःला स्वच्छ
करा. तुमची दुष्कृत्ये माझ्या दृष्टीबाहेर करा; वाईट कृत्ये करणे थांबवा.
17 योग्य तेच करण्यास शिका; न्यायीपणाचा शोध घ्या. पीडितांचे
संरक्षण करा. पितृहीनांच्या बाजूचे समर्थन करा; विधवांची बाजू मांडा.
18 “या आता, आपण वाद मिटवू या,” असे याहवेह म्हणतात. “जरी
तुमची पापे लाखेसारखी असली, तरी ती बर्फासारखी पांढरी होतील;
जरी ती किरमिजाप्रमाणे लाल असली, तरी ती लोकरीसारखी होतील.
19 जर तुमची तयारी असेल आणि तुम्ही आज्ञाकारक असाल, तर
तुम्ही भूमीच्या चांगल्या वस्तू खाल; 20 परंतु जर तुम्ही विरोध कराल
आणि विद्रोह कराल, तर तुमचा तलवारीने नाश केला जाईल.” कारण
हे शब्द याहवेहच्या मुखातील आहेत. 21 पाहा, ही विश्वासू नगरी
आता कशी वेश्या झाली आहे! ती न्यायाने भरलेली होती; नीतिमत्व
तिच्यामध्ये वास करीत होते— परंतु आता वध करणारे राहतात! 22
तुमची चांदी क्षुद्र झाली आहे, तुमचा उत्तम द्राक्षारस पाणी मिसळून
पांचट झाला आहे. 23 तुमचे राज्यकर्ते बंडखोर आहेत, चोरांचे भागीदार
आहेत; त्या सर्वांना लाच घ्यायला आवडते, आणि ते बक्षिसांच्या मागे
पळतात. ते अनाथांच्या बाजूचे रक्षण करीत नाहीत; विधवांचा खटल्याचे
समर्थन करीत नाहीत. 24 म्हणून प्रभू, सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचे
महाशक्तिमान असे जाहीर करतात: “अहा! मी माझ्या शत्रूंवर माझा
क्रोध मोकळा करेन आणि माझ्या शत्रूंचा मी स्वतः सूड घेईन. 25 मी
माझा हात तुमच्याविरुद्ध उचलेन; मी तुमची सर्व मलिनता पूर्णपणे
काढून टाकेन आणि तुमची सर्व अशुद्धता काढून दोषरहित करेन.
26 मी तुमच्या पुढाऱ्यांना परत पूर्वस्थितीत आणेन, तुमचे राज्यकर्त्ये
सुरुवातीला होते तसेच त्यांना परत करेन. त्यानंतर तुम्हाला, धार्मिकतेचे
शहर, विश्वासू शहर असे म्हटले जाईल.” 27 सीयोन न्यायाने, आणि
तिचे पश्चात्तापकर्त्ये नीतिमत्त्वाने सोडविले जातील. 28 परंतु बंडखोर
आणि पापी या दोघांना मोडण्यात येईल, आणि ज्यांनी याहवेहचा त्याग
केला, त्यांचा नाश होईल. 29 “ज्यांच्यामध्ये तुम्ही हर्षोत्सव केले, त्या
एलाच्या पवित्र वृक्षाबद्दल तुम्ही लज्जित व्हाल; ज्यांची तुम्ही निवड
केली आहे त्या बागांमुळे तुमचा अपमान केला जाईल. 30 तुम्ही पाने
कोमेजून गेलेल्या एलावृक्षासारखी, पाणी नसलेल्या बागेसारखे व्हाल.
31 पराक्रमी मनुष्य चकमकीसारखा होईल, आणि त्याचे काम ठिणगी
असे होईल; दोघेही एकत्र जळतील, ती आग विझविणारे कोणीही
नसेल.”

**2** यहूदीया व यरुशलेमविषयी आमोजाचा पुत्र यशायाहने पाहिलेला
दृष्टान्त: 2 पण शेवटच्या दिवसात याहवेहच्या मंदिराचे पर्वत
बळकट व उंच असे स्थापित केले जाईल; सर्व पर्वतांपेक्षा ते उंचावले
जाईल, आणि सर्व राष्ट्रे त्याकडे एकत्र येतील. 3 अनेक लोक येतील
आणि म्हणतील, “चला, आपण याहवेहच्या पर्वताकडे, याकोबाच्या
परमेश्वराच्या मंदिराला जाऊ. ते आपले मार्ग आम्हाला शिकवतील,
म्हणजे आम्ही त्या मार्गावर चालू.” कारण सीयोनमधून नियमशास्त्र,
यरुशलेमातून याहवेहचे वचन बाहेर जाईल. 4 ते राष्ट्रांमध्ये न्याय
करतील, आणि अनेक लोकांमधील वाद मिटवतील. ते आपल्या तलवारी
ठोकून त्यांचे नांगराचे फाळ करतील, व भाल्यांचे आकडे बनवतील.
एक देश दुसऱ्या देशाविरुद्ध तलवार उगारणार नाही, तसेच ते यापुढे

लष्करी प्रशिक्षण देणार नाहीत. 5 याकोबाच्या वंशजा ये, आपण
याहवेहच्या प्रकाशात चालू. 6 याहवेह, तुम्ही याकोबाच्या वंशजाचा
तुमच्या लोकांचा त्याग केला आहे, ते पूर्वेकडील अंधश्रद्धेने भरून गेलेले
आहेत; पलिष्टी लोकांप्रमाणे ते दुरात्म्यांशी संपर्क साधतात आणि
मूर्तिपूजकांच्या रूढी त्यांनी स्वीकारल्या आहेत. 7 त्यांची भूमी चांदी
आणि सोन्याने भरून गेली आहे; त्यांची संपत्ती अमाप आहे. चांदी व
सोने यांचे अमाप खजिने आहेत. त्यांच्या भूमीत असंख्य घोडे आहेत;
त्यांच्याकडे असंख्य रथही आहेत. 8 सर्व भूमी मूर्तींनी भरली आहे;
त्यांच्याच हस्तकृतींनी, जे त्यांच्या बोटांनी बनविले आहे, त्याला ते
नमन करतात. 9 म्हणून या लोकांचे पतन केले जाईल आणि सर्वजण
नमविले जातील— त्यांना क्षमा करू नका. 10 याहवेहच्या भयावह
सान्निध्यापासून आणि गौरवी प्रतापापासून वाचण्यास कड्याकपारीत
जा, जमिनीत लपून बसा! 11 उन्मताची नजर नमविली जाईल, आणि
मनुष्याचा गर्व उतरविला जाईल; त्या दिवशी याहवेह एकटेच गौरविले
जातील. 12 गर्विष्ठ आणि उद्धट लोकांना, जे सर्वकाही उच्च करण्यात
आले आहे त्यांना नम्र करण्यासाठी, सर्वसमर्थ याहवेहने एक दिवस
निर्धारित केला आहे— 13 लबानोनाचे सर्व उंच व भव्य गंधसरू आणि
बाशान येथील एलावृक्ष, 14 उंच उंच पर्वत आणि सर्व उंच डोंगर, 15
प्रत्येक भव्य बुरूज, प्रत्येक तटबंदीची भिंत, 16 तार्शीशमधील प्रत्येक
व्यापारी गलबत आणि बंदरातील डौलदार जहाजे, त्या दिवशी सर्व नष्ट
होतील. 17 मनुष्याचा सर्व अहंकार नमविला जाईल आणि मनुष्याचा
गर्व खाली करण्यात येईल; त्या दिवशी याहवेह एकटेच गौरविले
जातील. 18 सर्व मूर्तीचा समूळ उच्छेद होईल. 19 जेव्हा याहवेह पृथ्वीला
हलविण्यासाठी उभे राहतील तेव्हा त्यांच्या भयावह सान्निध्यापासून
आणि गौरवी प्रतापापासून वाचण्यास लोक खडकांच्या गुहांकडे धाव
घेतील आणि जमिनीतील खाचात लपतील. 20 त्या दिवशी लोक
उपासना करण्यासाठी त्यांनी घडविलेल्या त्यांच्या चांदी व सोन्याच्या
मूर्ती चिचुंद्र्या आणि वटवाघळे यांच्यापुढे फेकून देतील. 21 जेव्हा
याहवेह पृथ्वीला हलविण्यासाठी उभे राहतील तेव्हा त्यांच्या भयावह
सान्निध्यापासून आणि गौरवी प्रतापापासून वाचण्यास लोक खडकांच्या
गुहांकडे धाव घेतील डोंगराच्या लटकत्या कडांमध्ये लपतील. 22 मर्त्य
मनुष्यांवर भरवसा करणे बंद कर ज्यांच्या नाकामध्ये केवळ एक श्वासच
आहे. त्यांना इतका बहुमान का द्यावा?

**3** आता बघा, प्रभू सर्वसमर्थ याहवेह यरुशलेम व यहूदीयाचा
अन्नपुरवठा आणि पाठिंबा दोन्हीही बंद करणार आहेत— सर्व
अन्नाचा पुरवठा आणि पाण्याचा पुरवठा, 2 वीर योद्धे तथा सैनिक,
न्यायाधीश आणि संदेष्टे, दैवप्रश्न करणारे आणि वडीलजन, 3 पन्नास
लोकांवर असलेला सेनाधिकारी आणि उच्च पदाधिकारी, सल्लागार,
कुशल कारागीर आणि धूर्त मांत्रिक या सर्वांसहित अन्नाचा आणि
पाण्याचा पुरवठा ते काढून घेणार आहेत. 4 "मी किशोर मुलांना
त्यांचा अधिकारी बनवेन; बालके त्यांच्यावर राज्य करतील." 5 लोक
एकमेकांवर अत्याचार करतील— पुरुषा विरुद्ध पुरुष, शेजाऱ्याविरुद्ध
शेजारी. तरुण वृद्ध लोकांच्या विरोधात उठतील, मान्यवरांच्या विरोधात
तुच्छ लोक उठतील. 6 एखादा मनुष्य, आपल्या पित्याच्या घरात,
आपल्या भावास धरून म्हणेल, "भाऊ, तुझ्याकडे अंगरखा आहे,
तर तू आमचा पुढारी हो; या नासाडीच्या ढिगाऱ्याचा ताबा घे!" 7
पण त्या दिवशी तो ओरडेल, "माझ्याकडे त्याचा इलाज नाही. माझ्या
घरी अन्न किंवा वस्त्रे नाहीत; मला लोकांचा पुढारी बनवू नका." 8
यरुशलेम डगमगत आहे, यहूदीया कोसळत आहे; त्यांचे बोलणे आणि
कृत्ये याहवेहच्या विरोधात आहेत, त्यांच्या गौरवशाली उपस्थितीला
त्यांनी विरोध केला. 9 त्यांच्या चेहऱ्यावरील भाव त्यांच्याच विरोधात
साक्ष देतात; त्यांच्या पापांचे ते सदोम नगरीप्रमाणे प्रदर्शन करतात;
ते लपवित नाहीत. त्यांचा धिक्कार असो! त्यांनीच स्वतःवर आपत्ती
ओढवून घेतली आहे. 10 परंतु नीतिमानास सांगा त्यांना सुस्थिती
येईल. त्यांच्या सत्कृत्यांचे त्यांना प्रतिफळ मिळेल. 11 दुष्टांचा धिक्कार
असो! अरिष्ट त्यांच्यावर येत आहे! त्यांनी केलेल्या कृत्याचा, त्यांना
मोबदला मिळणार. 12 तरुण माझ्या लोकांवर अत्याचार करतात, स्त्रिया
त्यांच्यावर राज्य करतात. माझ्या लोकांनो, तुमचे मार्गदर्शक तुमची
दिशाभूल करतात; ते तुम्हाला पथभ्रष्ट करतात. 13 याहवेह त्यांच्या
न्यायसभेत स्थानापन्न होतात; ते लोकांचा न्याय करण्यासाठी उभे
राहतात. 14 त्यांच्या लोकांच्या वडिलजनांच्या व पुढाऱ्यांच्या विरोधात
न्याय करण्यासाठी याहवेह त्यांच्या न्यायसभेत प्रवेश करतात: "तुम्हीच
माझ्या द्राक्षमळ्याला उद्ध्वस्त केले आहे; गरिबांपासून लुबाडलेली लूट
तुमच्या घरांमध्ये आहे. 15 माझ्या लोकांना चिरडण्याचे व गरिबांचे चेहरे
ठेचण्याचे काय कारण होते?" प्रभू सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात. 16
याहवेह म्हणतात, "सीयोनातील स्त्रिया गर्विष्ठ आहेत, त्या मान उडवीत
चालतात, चंचल नेत्रकटाक्षांनी मन वेधतात, पायातल्या पैजणांचा
छुमछुम आवाज करीत, कंबर मटकत छोटी छोटी पावले टाकून चालतात.
17 म्हणून प्रभू सीयोनी स्त्रियांच्या डोक्यांना खवडे आणणार; याहवेह
त्यांचे टाळू टकले करणार." 18 त्या दिवशी त्यांची सर्व आभूषणे
प्रभू ओरबाडून काढतील: त्यांच्या बांगड्या, ललाटपट्टी, व चंद्रकोर
हार, 19 त्यांचे कानातील झुमके, कांकण आणि मुखावरण, 20 त्यांची
शिरोवेष्टणे, त्यांचे पैंजण आणि कमरपट्टे, अत्तरदाण्या आणि ताईत,
21 अंगठ्या आणि नथण्या, 22 उत्तम पोशाख, अधोवस्त्रे, अंगरखे,
आणि बटवे, 23 त्यांचे आरसे, त्यांची मलमलची वस्त्रे, मुकुट व शाली.
24 सुगंधाऐवजी त्यांच्याकडे दुर्गंध येईल; कमरपट्ट्याऐवजी एक दोरी
असेल; नीट केशरचनेऐवजी टक्कल; उत्तम पोशाखाऐवजी गोणपाट;
आणि सौंदर्याऐवजी व्रण त्यांच्या वाट्याला येतील. 25 तुमचे पुरुष
तलवारीने पडतील, तुमचे योद्धे युद्धभूमीवर ढासाळतील, 26 सीयोनच्या
वेशी आक्रोश करतील आणि विलाप करतील; ती निराधार होऊन
जमिनीवर बसलेली असेल.

**4** त्या दिवसात सात स्त्रिया एका पुरुषास धरून असे म्हणतील
"आम्ही स्वतःचे अन्न मिळवू आणि स्वतःचे वस्त्र मिळवू; आम्हाला
केवळ तुझे नाव चालवू दे, आणि आमची अप्रतिष्ठा घालवून दे!" 2

त्या दिवसात, याहवेहची शाखा सुंदर आणि गौरवशाली असेल, त्या
भूमीतील पिकांचा इस्राएलातील अवशिष्टांना अभिमान व गौरव वाटेल. 3
सीयोनात उरलेले लोक जे यरुशलेममध्येच राहिले, त्यांची नावे नोंदवली
गेली आहेत, ते पवित्र म्हणविले जातील. 4 प्रभू परमेश्वर सीयोनच्या
स्त्रियांची घाण धुवून टाकतील; ते न्यायाच्या आत्म्याने आणि अग्नीच्या
आत्म्याने यरुशलेममधील रक्ताचे डाग स्वच्छ करतील. 5 त्यानंतर
याहवेह संपूर्ण सीयोन पर्वतावर आणि तिथे जमलेल्या सर्वांवर दिवसा
धुराचा ढग आणि रात्रीच्या वेळेस प्रखर अग्नी प्रज्वलित करतील; या
सर्व गोष्टींवर गौरवाचे एक छत असेल. 6 दिवसाच्या उष्णतेपासून ते एक
आश्रय व सावली आणि वादळ व पावसापासून ते एक आश्रयस्थान
आणि लपण्याचे ठिकाण असेल.

**5** माझी ज्यांच्यावर प्रीती आहे त्यांच्या द्राक्षमळ्याबद्दल मी गीत गाईन:
सुपीक डोंगराळ भागावर माझ्या प्रियाचा एक द्राक्षमळा होता. 2
त्याने ते खोदले आणि त्यातील दगड काढून ते स्वच्छ केले आणि
मनपसंद द्राक्षवेलींचे तिथे रोपण केले. त्याने त्यामध्ये एक टेहळणी बुरूज
बांधला आणि त्याचबरोबर द्राक्षकुंडही तयार केला. नंतर त्याने उत्तम
द्राक्षांच्या पिकांची वाट पाहिली, परंतु तिथे फक्त वाईट फळे उपजली. 3
“आता यरुशलेमचे रहिवासी लोकहो आणि यहूदीयाचे लोकहो, मी आणि
माझा द्राक्षमळा यांच्यामध्ये न्याय करा. 4 माझ्या द्राक्षमळ्यासाठी
मी जे काही केले आहे त्यापेक्षा जास्त मी काय करू शकलो असतो?
मी जेव्हा चांगल्या द्राक्षांची अपेक्षा केली, तेव्हा तिथे फक्त वाईट फळे
का उपजली? 5 आता मी तुम्हाला सांगेन, मी माझ्या द्राक्षमळ्याचे
काय करणार आहे: मी त्याचे कुंपण काढून टाकेन, आणि त्याचा नाश
होईल; मी त्याची भिंत पाडेन, आणि ते तुडविले जाईल. 6 मी ती जमीन
उजाड करेन, तिथे छाटणी किंवा नांगरणी करणार नाही, आणि तिथे
कुसळे व काटेरी झुडपे वाढतील. मी ढगांना आज्ञा देईन की, त्यांच्यावर
पाऊस पाडू नका.” 7 इस्राएल राष्ट्र सर्वसमर्थ याहवेहचा द्राक्षमळा
आहे, आणि यहूदीयाचे लोक, त्यांना प्रसन्न करणाऱ्या द्राक्षलता आहेत,
ज्यामध्ये त्यांना आनंद होतो. आणि त्यांनी न्यायाची अपेक्षा केली,
परंतु त्यांना रक्तपातच दिसून आला; नीतिमत्वाची अपेक्षा केली, परंतु
पीडेचे रुदन ऐकू आले. 8 तुम्ही जे एका घरानंतर दुसरे घर बांधता,
आणि जोपर्यंत जागा संपत नाही शेताला शेत जोडून घेतात, आणि मग
त्या भूमीवर तुम्ही एकटेच राहता, त्यांना धिक्कार असो. 9 माझ्या
ऐकण्यात आले, सर्वसमर्थ याहवेहनी असे जाहीर केले आहे: “मोठमोठी
घरे निश्चितच निर्जन होतील, उत्तम महालांमध्ये कोणी रहिवासी नसेल.
10 दहा एकर द्राक्षमळ्यातून फक्त एक बथ द्राक्षारस निघेल; एक
होमेर बियाणे फक्त एक एफा धान्याचे पीक देईल.” 11 जे सकाळी
लवकर उठतात व मद्यप्राशनाकडे धाव घेतात, रात्री उशीरा द्राक्षमद्याच्या
नशेमध्ये धुंद होईपर्यंत जागे राहतात त्यांचा धिक्कार असो! 12 त्यांच्या
मेजवानीत त्यांच्याकडे वीणा आणि सारंगी आहेत, वाद्ये आणि डफ
आणि द्राक्षमद्य आहे, परंतु याहवेहनी केलेल्या कृत्यांकडे त्यांचे लक्ष
नाही. याहवेहच्या हातांनी केलेल्या कार्यांचा ते आदर करीत नाहीत.
13 म्हणून असमजंसपणामुळे माझे लोक बंदिवासात नेले जातील;
उच्च पदावरील लोक भुकेने मरतील आणि सर्वसाधारण लोक तहानेने
कोरडे पडतील. 14 म्हणून मृत्यू त्याचे जबडे पसरवितो, त्याचे तोंड
मोठे करून उघडतो. त्यांचे उच्चकुलीन आणि जनसमूह, त्यांच्याबरोबर
त्यांचे सर्व भांडखोर आणि चंगळ करणारे त्यामध्ये उतरतील. (Sheol
h7585) 15 म्हणून लोकांची अधोगती होईल आणि प्रत्येकजण नम्र
केला जाईल, गर्विष्ठांची नजर लीन केली जाईल. 16 परंतु सर्वसमर्थ
याहवेह त्यांच्या न्यायाद्वारे उच्च केले जातील, आणि पवित्र परमेश्वर
त्यांच्या नीतिमान कृत्यांद्वारे पवित्र ठरतील. 17 तेव्हा मेंढरे स्वतःच्या
कुरणात चरत असल्यासारखी चरतील; श्रीमंतांच्या अवशेषांमध्ये कोकरे
चरतील. 18 धिक्कार असो, जे कपटाच्या दोरीने पाप ओढवून घेतात,
आणि दोरीने गाडी ओढल्यागत जे दुष्टता ओढवून घेतात. 19 धिक्कार
असो, जे असे म्हणतात, “परमेश्वराला घाई करू द्या; त्यांना त्यांचे
काम लवकर करू द्या म्हणजे आपल्याला ते पाहता येईल. इस्राएलच्या
पवित्र परमेश्वराची योजना— ती जवळ येऊ द्या, ती दृष्टीस पडू द्या,
म्हणजे आम्हाला ती कळेल.” 20 धिक्कार असो, जे वाईटाला चांगले
म्हणतात आणि चांगल्याला वाईट म्हणतात, जे अंधाराला प्रकाश आणि
प्रकाशाला अंधार, जे गोड त्याला कडू आणि कडू त्याला गोड असे
म्हणतात. 21 धिक्कार असो, जे स्वतःच्या दृष्टीत शहाणे आहेत आणि
स्वतःच्या नजरेत हुशार आहेत. 22 धिक्कार असो, जे मद्य पिण्यामध्ये
वीर आहेत आणि पेय मिसळण्यात जे विजयीवीर आहेत, 23 लाच
घेऊन दुष्टाला जे सोडून देतात, परंतु निर्दोषांना योग्य न्यायापासून वंचित
करतात. 24 म्हणून, जसे अग्नीच्या ज्वाला पेंढी जाळून भस्म करतात
आणि जसे कोरडे गवत ज्वालेमध्ये राख होते, तशीच त्यांची मुळे कुजून
जातील, आणि त्यांची फुले वाऱ्याने धुळीसारखी उडून जातील; कारण
त्यांनी सर्वसमर्थ याहवेहचे नियम नाकारले आहे आणि इस्राएलच्या
पवित्र परमेश्वराचे वचन झिडकारले आहे. 25 म्हणूनच याहवेहचा क्रोध
त्यांच्या लोकांविरुद्ध भडकला आहे; त्यांनी हात उगारला आहे आणि
ते त्यांना मारून टाकतात. पर्वत डगमगतात, आणि मृतदेह रस्त्यांवर
कचऱ्यासारखे पडलेले आहेत. हे सर्व करूनही, त्यांचा क्रोधाग्नी अजून
शमला नाही, त्यांचा हात अजूनही उगारलेलाच आहे. 26 दूरवरच्या
राष्ट्रांसाठी ते एक ध्वज उंचावतात, पृथ्वीच्या दिगंतापर्यंत जे आहेत,
त्यांना ते शिट्ट्या वाजवून बोलवितात. हे बघा ते आले, तत्काळ आणि
वेगाने! 27 त्यांच्यापैकी एकजणसुद्धा थकत नाही किंवा अडखळत नाही,
एकजणसुद्धा डुलकी घेत नाही किंवा झोपत नाही; एकाही कमरेचा
पट्टा सैल केलेला नाही, एकाही चप्पलेचा पट्टा तुटलेला नाही. 28 त्यांचे
बाण तीक्ष्ण आहेत, त्यांच्या सर्व धनुष्यांच्या तारा ताणून तयार आहेत;
त्यांच्या घोड्यांचे खूर गारगोटी सारखे वाटतात, त्यांच्या रथाची चाके
वावटळीसारखी दिसतात. 29 त्यांची गर्जना एखाद्या सिंहासारखी आहे,
तरुण सिंहाप्रमाणे ते गर्जना करतात; ते गुरगुरतात व त्यांचे सावज
पकडतात, आणि ते घेऊन जातात तेव्हा कोणीही सोडविण्यास येत
नाही. 30 त्या दिवशी ते त्याच्यावर समुद्राच्या गर्जनेप्रमाणे गर्जना

करतील. आणि जर कोणी भूमीकडे पाहिले तर, तिथे फक्त अंधार आणि संकट आहे; ढगांमुळे सूर्यदेखील काळवंडेल.

**6** उज्जीयाह राजा मरण पावला त्या वर्षी, मी प्रभूला सिंहासनावर बसलेले उच्चतम आणि गौरवी असे पाहिले; आणि त्यांच्या अंगरख्याच्या घोळाने मंदिर भरून गेले होते. 2 त्यांच्या वरच्या बाजूला सराफीम होते, प्रत्येकाला सहा पंख होते: दोन पंखांनी त्यांनी स्वतःचे मुख झाकले होते, दोन पंखांनी पाय झाकले होते आणि दोन पंखांनी ते उडत होते. 3 आणि ते एकमेकांना म्हणत होते: "पवित्र, पवित्र, पवित्र सर्वसमर्थ याहवेह आहेत; त्याच्या तेजाने सर्व पृथ्वी भरली आहे!" 4 त्यांच्या आवाजाने मंदिराच्या दाराच्या चौकटी व उंबरठा हादरला व सर्व मंदिर धुराने भरले. 5 "मला धिक्कार असो!" मी ओरडलो. "मी उद्ध्वस्त झालो! कारण मी अशुद्ध ओठांचा मनुष्य आहे आणि मी अशुद्ध ओठांच्या लोकांमध्ये राहतो आणि माझ्या डोळ्यांनी महाराज सर्वसमर्थ याहवेह यांचे मुखावलोकन केले आहे!" 6 नंतर, सराफीम दूतांपैकी एकाने, वेदीवरील एक निखारा चिमट्याने उचलला व तो उडत माझ्याकडे आला. 7 माझ्या ओठांना निखाऱ्याने स्पर्श करून तो म्हणाला, "हा निखारा तुझ्या ओठाला लागला आहे, म्हणून तुझ्यातील दोष आता नाहीसा झाला आहे. तुझ्या पातकांसाठी प्रायश्चित करण्यात आले आहे." 8 नंतर मी प्रभूची वाणी ऐकली, "मी कोणाला पाठवावे? आणि आपल्यासाठी कोण जाईल?" मी उत्तर दिले, "हा मी इथे आहे, मला पाठवा!" 9 ते म्हणाले, "जा आणि या लोकांना सांग: "'ते नेहमी पाहत राहिले, तरी त्यांना दिसत नाही, ते नेहमी कानांनी ऐकत असले, तरी त्यांना ऐकू येत नाही व ते ग्रहण करत नाहीत.' 10 या लोकांचे अंतःकरण असंवेदनशील करा; त्यांचे कान मंद आणि त्यांचे डोळे बंद करा. नाहीतर ते त्यांच्या डोळ्यांनी पाहतील, त्यांच्या कानांनी ऐकतील, अंतःकरणापासून समजतील, आणि ते मागे वळतील आणि बरे होतील." 11 नंतर मी म्हणालो, "हे प्रभू, आणखी किती वेळ?" आणि त्यांनी उत्तर दिले: "शहरे जोपर्यंत उद्ध्वस्त होत नाहीत आणि तिथे कोणी लोक राहिले नाहीत, घरे ओसाड पडत नाहीत आणि शेतांची नासाडी होत नाही आणि ती उद्ध्वस्त होत नाहीत तोपर्यंत. 12 याहवेह सर्व लोकांना दूर पाठवून देईपर्यंत आणि देशाचा पूर्णपणे त्याग केला जाईपर्यंत. 13 आणि भूमीवर एक दशांश जरी राहिला तरी, तो पुन्हा उद्ध्वस्त होईल. परंतु जसे एला आणि अल्लोन जेव्हा कापून टाकल्यावर बुंधा उरतो, त्याचप्रमाणे पवित्र बियाणे हे भूमीमध्ये बुंध्याप्रमाणे होईल."

**7** जेव्हा यहूदीयाचा राजा आहाज, जो योथामचा पुत्र, जो उज्जीयाहचा पुत्र होता, अरामचा राजा रसीन आणि इस्राएलचा राजा रमाल्याहचा पुत्र पेकहने यरुशलेमवर हल्ला केला, परंतु त्यांच्यावर ते विजय मिळवू शकले नाहीत. 2 आता दावीदाच्या वंशजांना असे सांगण्यात आले, "अरामने एफ्राईमशी युती केली आहे;" तेव्हा जंगलातील झाडे जशी वाऱ्याने हादरली जातात तशीच आहाज आणि त्याच्या लोकांची मने हादरली. 3 तेव्हा याहवेह यशायाहला म्हणाले, "तू आणि तुझा पुत्र शेर-याशूब यांनी बाहेर पडावे आणि आहाजची भेट घेण्यासाठी धोब्याच्या शेताकडे जाणाऱ्या रस्त्यावर पाणी वाहून नेणाऱ्या वरच्या पुलाच्या शेवटी जावे. 4 आहाजाला सांग, 'सावध राहा, शांत राहा आणि घाबरू नकोस. जळाऊ लाकडाच्या या दोन धुरकट थोटकामुळे अंतःकरण खचून देऊ नको—रसीन आणि अराम आणि रमाल्याहच्या पुत्राच्या भयंकर रागामुळे अंतःकरण खचू देऊ नको. 5 अराम, एफ्राईम आणि रमाल्याहच्या पुत्राने असे म्हणून तुमच्या नाशाचा कट रचला आहे, 6 "चला, आपण यहूदीयावर हल्ला करू; चला आपण ते तोडून त्याचे तुकडे करू आणि आपसात वाटून ते घेऊ आणि ताबीलच्या पुत्राला त्यावर राजा बनवू." 7 तरीही सार्वभौम याहवेह असे म्हणतात: "'तसे होणार नाही, तसे घडणार नाही, 8 कारण दिमिष्क हे अरामाचे मस्तक आहे, आणि दिमिष्क हे केवळ रसीनचे मस्तक. पासष्ट वर्षांच्या आतच एफ्राईम असे हादरून जाईल की ते सर्व एककूळ म्हणून राहू शकणार नाहीत. 9 एफ्राईमचे मस्तक शोमरोन आहे, आणि शोमरोनचा प्रमुख केवळ रमाल्याहचा पुत्र आहे. जर तुम्ही तुमच्या विश्वासामध्ये स्थिर राहिला नाही तर तुम्ही उभे राहणारच नाही.'" 10 पुन्हा याहवेह आहाजबरोबर बोलले, 11 "याहवेह तुमच्या परमेश्वराकडे चिन्ह मागा, मग ते अधिक खोल तळातील असो किंवा ते सर्वोच्च उंचावरील असो." (Sheol h7585) 12 परंतु आहाज म्हणाला, "मी विचारणार नाही; मी याहवेहची परीक्षा घेणार नाही." 13 तेव्हा यशायाह म्हणाला, "अहो तुम्ही दावीदाच्या घराण्यांनो, आता ऐका! माणसांच्या सहनशक्तीची परीक्षा पाहणे पुरेसे झाले नाही का? तुम्ही माझ्या परमेश्वराच्यासुद्धा सहनशक्तीची परीक्षा घेणार आहात का? 14 म्हणून प्रभू स्वतः तुम्हाला एक चिन्ह देतील: कुमारी गर्भवती होईल आणि ती एक पुत्र प्रसवेल आणि त्याला इम्मानुएल हे नाव देतील. 15 जेव्हापर्यंत त्याला योग्य व अयोग्याची पारख करता येत नाही, तेव्हापर्यंत तो दही आणि मध खाईल, 16 कारण त्या मुलाला अयोग्य नाकारणे आणि योग्य निवडणे हे पुरेसे माहीत होण्याआधीच, ज्या दोन देशाच्या राजांची तुम्हाला भीती वाटत आहे ते नष्ट केले जातील. 17 एफ्राईम आणि यहूदीया विभक्त झाले त्या वेळेपासून अशी वेळ आली नव्हती, तशी वेळ याहवेह तुमच्यावर आणि तुमच्या लोकांवर आणि तुमच्या पित्याच्या घराण्यावर आणतील—ते अश्शूरच्या राजाला आणतील." 18 त्या दिवशी याहवेह इजिप्तमधील नाईल नदीच्या मुखप्रदेशातील माशा आणि अश्शूर देशामधील मधमाशांना शिट्टी वाजवून बोलावतील. 19 ते सर्व येतील आणि उतरत्या खोल दऱ्यांमध्ये, खडकांच्या कपाऱ्यांमध्ये, सर्व काटेरी झुडूपांवर आणि पाण्याच्या सर्व झऱ्यांवर वस्ती करतील. 20 त्या दिवशी प्रभू फरात नदीच्या पलीकडून भाड्याने आणलेला वस्तरा—अश्शूरचा राजा—याचा उपयोग तुमची डोकी आणि गुप्तांगाचे मुंडण करण्यासाठी आणि तुमच्या दाढ्या कापण्यासाठीही करतील. 21 त्या दिवशी एक मनुष्य एक कालवड आणि दोन शेळ्या जिवंत ठेवील. 22 आणि ते भरपूर दूध देत असल्यामुळे खाण्यासाठी तिथे दही असेल. त्या देशात

जे सर्व राहतील ते दही आणि मध खातील. 23 त्या दिवशी, ज्या
प्रत्येक ठिकाणी एक हजार द्राक्षवेली होत्या ज्याची किंमत एक हजार
चांदीचे शेकेल होते त्या ठिकाणी तिथे फक्त काटेरी झुडपे आणि कुसळे
असतील. 24 शिकारी धनुष्य आणि बाण घेऊन तिथे जातील, कारण
तेथील जमीन काटेरी झुडूपांनी आणि कुसळांनी झाकलेली असेल. 25
एकेकाळी सर्व टेकड्या कुदळाने मशागत केल्या जात होत्या, तिथे
आता तुम्ही काटेरी झुडपे आणि कुसळांच्या भीतीने कधीही जाणार
नाही; जिथे गुरे मोकाट फिरतात आणि मेंढरे पळतात अशी ती ठिकाणे
होतील.

**8** याहवेह मला म्हणाले, “एक मोठी चर्मपत्राची पाटी घे आणि
त्याच्यावर एका साध्या लेखणीने लिही: महेर-शालाल-हश-बाज.”
2 म्हणून मी उरीयाह याजकाला आणि यबेरेख्याहचा पुत्र जखऱ्याहला
माझ्यासाठी विश्वसनीय साक्षीदार म्हणून बोलाविले. 3 तेव्हा मी माझी
पत्नी, जी संदेष्टी आहे, तिच्याशी प्रीतिसंबंध केला आणि ती गरोदर
राहिली आणि तिने एका मुलाला जन्म दिला. आणि याहवेह मला
म्हणाले, “त्याचे नाव महेर-शालाल-हश-बाज असे ठेव. 4 कारण त्या
मुलाला ‘माझे वडील’ किंवा ‘माझी आई’ कसे म्हणायचे हे समजून
येण्याआधीच दिमिष्कची संपत्ती आणि शोमरोनची लूट अश्शूरच्या
राजाकडून नेली जाईल.” 5 याहवेह पुन्हा माझ्याबरोबर असे बोलले: 6
“कारण या लोकांनी हळूवारपणे वाहणारे शिलोहचे पाणी नाकारले
आहे आणि रसीन आणि रमाल्याहच्या पुत्राबद्दल आनंद व्यक्त केला
आहे. 7 म्हणून प्रभू आता त्यांच्यावर फरात नदीचे महाप्रलय आणणार
आहे— अश्शूरचा राजा त्याच्या सर्व वैभवात हे आणणार आहे. ते
त्याच्या सर्व खाडींवरून भरून वाहील, त्याच्या सर्व किनाऱ्यांवरून
वाहील, 8 हे इम्मानुएला! तो महाप्रलय यहूदीयावरही चढेल, तिच्यावरून
गरगर फिरेल, तिच्यामधून जाईल आणि तिच्या गळ्यापर्यंत पोहोचेल.
त्याचे पसरलेले पंख तुमच्या देशाचा विस्तार झाकून टाकतील.” 9
युद्धाची रणगर्जना करा, हे देशांनो, तुम्ही मोडून जाल! दूर राहणाऱ्या
लोकांनो ऐका, युद्धासाठी सज्ज व्हा आणि विखरून जा! युद्धासाठी
सज्ज व्हा आणि विखरून जा! 10 तुमची रणनीती तयार करा, परंतु ती
उलथवून टाकली जाईल; तुमची योजना सुचवा, परंतु ती चालणार नाही,
कारण परमेश्वर आमच्याबरोबर आहेत. 11 याहवेहचा शक्तिशाली हात
माझ्यावर ठेवून मला असे म्हणतात, या लोकांच्या मार्गाचे अनुसरण
करू नकोस: 12 “ज्या सर्वाला हे कारस्थान म्हणतात त्या प्रत्येक
गोष्टीला तुम्ही कारस्थान म्हणू नका; त्यांना ज्याचे भय वाटते त्याला
तुम्ही भिऊ नका, आणि त्याची धास्ती घेऊ नका. 13 याहवेह जे
सर्वसमर्थ आहेत, त्यांना तुम्ही पवित्र मानावे, तेच आहेत ज्यांचे तुम्ही
भय धरावे, तेच आहेत ज्यांना तुम्ही घाबरावे. 14 इस्राएल आणि
यहूदीया या दोघांसाठी; ते एक पवित्रस्थान असतील, लोकांना ठेच
लागण्याचा एक दगड व अडखळण्याचा एक खडक, ज्यामुळे ते
पडतील. आणि यरुशलेमच्या लोकांसाठी तो एक सापळा आणि
पाश होईल. 15 त्यांच्यापैकी पुष्कळजण अडखळतील; ते पडतील
आणि तुटून जातील, ते जाळयात अडकतील आणि बंदिवान केले
जातील.” 16 चेतावणीच्या या साक्षीला बांधून घ्या आणि परमेश्वराची
ही शिकवण माझ्या शिष्यांमध्ये मोहोरबंद करा. 17 मी याहवेहची
वाट पाहीन जे त्यांचे मुख याकोबाच्या वंशजांपासून लपवित आहेत.
मी त्यांच्यावर माझा भरवसा ठेवेन. 18 मी आणि याहवेहने मला
दिलेली लेकरेही येथे आहेत. आम्ही, सीयोन पर्वतावर राहणारे सर्वसमर्थ
याहवेहकडून इस्राएलला मिळालेले चिन्ह व प्रतीक आहोत. 19
जेव्हा कोणी तुम्हाला प्रेतात्म्यांकडून अर्थ सांगणाऱ्यांचा सल्ला आणि
भूतविद्येचा सल्ला घेण्यास सांगतात, जे कुजबुजतात आणि पुटपुटतात,
त्यांच्याकडे लोकांनी त्यांच्या परमेश्वराबद्दल विचारणा करावी काय?
जिवंत लोकांसाठी मृतांचा सल्ला का घ्यावा? 20 परमेश्वराच्या सूचनेचा
आणि चेतावणीच्या साक्षीचा सल्ला घ्या. जर कोणी या शब्दाप्रमाणे
बोलत नसेल तर त्यांच्याकडे पहाटेचा प्रकाश नाही. 21 दुःखी आणि
भुकेले असे ते देशभर फिरत राहतील; जेव्हा ते भुकेने व्याकूळ होतील,
तेव्हा ते रागावतील आणि वर पाहतील आणि त्यांच्या राजाला आणि
त्यांच्या परमेश्वराला शाप देतील. 22 तेव्हा ते खाली पृथ्वीकडे पाहतील
आणि त्यांना फक्त संकट, अंधकार आणि भयभीत करणारी निस्तेज
काळोखी दिसेल आणि त्यांना गडद अंधारात ढकलण्यात येईल.

**9** तरीसुद्धा, जे संकटात होते त्यांच्यासाठी यापुढे निस्तेज काळोखी
नसेल. भूतकाळात त्यांनी जबुलून प्रांत आणि नफताली प्रांतांना
नमविले होते, परंतु भविष्यामध्ये ते समुद्राच्या मार्गाकडून जाणाऱ्या
यार्देनेच्या पलीकडील गालील राष्ट्रांचा सन्मान करतील— 2 अंधारात
चालणाऱ्या लोकांनी मोठा प्रकाश पाहिला आहे; गडद अंधकार
असलेल्या देशात राहणाऱ्यांवर प्रकाश उदय पावला आहे. 3 तुम्ही
राष्ट्राचा विस्तार केला आहे आणि त्यांचा आनंद वाढविला आहे. जसे
लोक कापणीच्या वेळेस आनंद करतात, तसे ते तुमच्यासमोर आनंद
करतात, लुटलेला माल वाटून घेतांना युद्ध करणारे आनंद करतात तसे. 4
कारण जसे मिद्यानाच्या पराभवाच्या दिवसामध्ये, तुम्ही त्यांच्यावर ओझे
असलेले जोखड, त्यांच्या खांद्यांवरील लोखंडाची सळई, त्यांच्यावर जुलूम
करणाऱ्याची काठी मोडून टाकली आहे. 5 लढाईत वापरलेले प्रत्येक
योद्ध्याची पायतणे आणि रक्ताने माखलेले प्रत्येक वस्त्र जळण्यासाठी
पूर्वनियोजित केले जाईल, जाळण्यासाठी इंधन असे होईल. 6 कारण
आम्हासाठी एक बाळ जन्मले आहे, आमच्यासाठी एक पुत्र दिला
आहे, आणि सत्ता त्यांच्या खांद्यावर असेल. आणि त्यांना अद्भुत
सल्लागार, पराक्रमी परमेश्वर, सार्वकालिक पिता, शांतीचा राजकुमार
असे म्हणतील. 7 त्यांच्या सत्तेच्या महानतेचा आणि शांतीचा अंत
होणार नाही. ते दावीदाच्या सिंहासनावरून राज्य करतील आणि त्याच्या
राज्यावर राज्य करतील, ते त्या काळापासून आणि सर्वकाळपर्यंत
न्याय आणि धार्मिकता स्थापन करतील आणि टिकवतील. सर्वसमर्थ
याहवेहचा आवेश हे पूर्ण करेल. 8 प्रभूंनी याकोबाविरुद्ध संदेश पाठवला
आहे; तो इस्राएलवर पडेल. 9 सर्व लोकांना ते माहीत होईल— एफ्राईम
आणि शोमरोन येथील नागरिक— जे अभिमानाने आणि अंतःकरणाच्या

उद्धटपणाने असे म्हणतात, 10 “विटा खाली पडल्या आहेत, परंतु आम्ही
ते घडविलेल्या दगडाने पुन्हा बांधू; उंबराची झाडे कापली गेली आहेत,
परंतु आम्ही त्यांच्या जागी देवदारू लावू.” 11 परंतु याहवेहनी रसीनच्या
शत्रूंना त्यांच्याविरुद्ध बळकट केले आहे आणि त्यांच्या शत्रूंना प्रेरित केले
आहे. 12 पूर्वेकडून अरामी आणि पश्चिमेकडील पलिष्टींनी इस्राएलला
मोठा आ वासून गिळंकृत केले आहे. हे सर्व करूनही त्यांचा संताप
अजून शमला नाही, त्यांचा हात अजूनही उगारलेलाच आहे. 13 परंतु
ज्या लोकांनी त्यांना वधले, त्यांच्याकडे ते परत आले नाहीत, आणि
त्यांनी सर्वसमर्थ याहवेहचा शोधही घेतला नाही. 14 म्हणून याहवेह
एकाच दिवसात इस्राएलचे मस्तक आणि शेपूट, खजूराच्या फांद्या आणि
लव्हाळा हे दोन्ही कापून टाकतील; 15 वडीलजन आणि मान्यवर लोक
हे मस्तक आहेत, खोटे शिक्षण देणारे संदेष्टे हे शेपूट आहेत. 16 या
लोकांना मार्गदर्शन करणारे त्यांची दिशाभूल करतात, आणि ज्यांना
मार्गदर्शन मिळाले, ते पथभ्रष्ट झाले आहेत. 17 म्हणूनच प्रभू त्यांच्या
तरुण पुरुषांना पाहून प्रसन्न होणार नाहीत; त्यांना विधवांचा आणि
अनाथांचा कळवळा येणार नाही; कारण हे सर्वच अधर्मी व दुष्ट असून,
प्रत्येक मुख असत्य बोलणारे आहे. हे सर्व करूनही त्यांचा संताप अजून
शमला नाही, त्यांचा हात अजूनही उगारलेलाच आहे. 18 दुष्टता निश्चितच
अग्नीप्रमाणे जळते. ती काटेरी झुडपे आणि काटेरी झाडे यांना भस्म
करते, ती झाडेझुडपांचे रान पेटवून टाकते, त्यामुळे तो धुराचा एक स्तंभ
होऊन गरगर फिरत वर जातो. 19 सर्वसमर्थ याहवेहच्या क्रोधाने भूमी
होरपळून जाईल आणि लोक त्या आगीचे इंधन होतील; ते एकमेकांना
वाचविणार नाहीत. 20 उजव्या बाजूला असलेले ते फस्त करतील परंतु
ते भुकेले राहतील; डाव्या बाजूला असलेलेही खातील परंतु समाधानी
होणार नाहीत. प्रत्येकजण स्वतःच्याच संततीचे मांस खातील: 21
मनश्शेह एफ्राईमला आणि एफ्राईम मनश्शेहला खाऊन टाकेल; ते एकत्र
मिळून यहूदीयाच्या विरोधात जातील. हे सर्व करूनही त्यांचा संताप
अजून शमला नाही, त्यांचा हात अजूनही उगारलेलाच आहे.

**10** त्यांचा धिक्कार असो, जे अन्यायी कायदे बनवितात— जुलूम
करणारा हुकूमनामा जे काढतात, 2 गरिबांचे हक्क हिरावून
घेण्यासाठी आणि माझ्या लोकांपैकी पीडितांना न्यायापासून वंचित
करण्यासाठी, विधवांना त्यांचे सावज बनविण्यासाठी आणि अनाथांना
लुटण्यासाठी. 3 दंड मिळण्याच्या दिवशी तुम्ही काय कराल, जेव्हा फार
दुरून संकट येईल? तुम्ही कोणाकडे मदतीसाठी धावणार आहात? तुम्ही
तुमची संपत्ती कुठे सोडून देणार? 4 बंदिवानांमध्ये लपून बसणे, किंवा
मेलेल्यांमध्ये पडून राहाणे या वाचून काहीही उरणार नाही. हे सर्व करूनही
त्यांचा संताप अजून शमला नाही, त्यांचा हात अजूनही उगारलेलाच आहे.
5 “अश्शूरचा धिक्कार असो, जो माझ्या क्रोधाची काठी आहे, ज्याच्या
हातामध्ये माझ्या क्रोधाचा सोटा आहे! 6 मी त्याला अधार्मिक राष्ट्राविरुद्ध
पाठवितो, मला जे संताप आणतात, अशा लोकांविरुद्ध पाठवितो, त्यांची
लूटमार करण्यासाठी आणि लूट हिसकावून घेण्यासाठी, आणि त्यांना
रस्त्यांवरील चिखलाप्रमाणे तुडविण्यासाठी. 7 परंतु हा त्याचा उद्देश
नाही, त्याच्या मनात हे नाही; त्याचा उद्देश आहे की नाश करावा, अनेक
राष्ट्रांचा नाश करून त्यांचा अंत करावा. 8 ‘माझे सेनापती सर्व राजे
नाहीत काय?’ असे ते म्हणतात. 9 ‘कालनो कर्कमीश सारखे नाही
काय? हमाथ अर्पादसारखा आणि शोमरोन दिमिष्कसारखा नाही काय?
10 जशी माझ्या हाताने मूर्तीपूजक राज्ये ताब्यात घेतली, अशी राज्ये
ज्यांच्या प्रतिमा यरुशलेम आणि शोमरोनपेक्षा श्रेष्ठ होत्या— 11 शोमरोन
आणि तिच्या मूर्तींबरोबर मी जसा व्यवहार केला तसा व्यवहार मी
यरुशलेम आणि तिच्या मूर्तींबरोबर करू नये काय?’” 12 जेव्हा प्रभूने
सीयोन पर्वत आणि यरुशलेमविरुद्ध त्यांचे सर्व कार्य पूर्ण केले, तेव्हा ते
म्हणतील, “मी अश्शूरच्या राजाला त्याच्या अंतःकरणाच्या हेतुपुरस्सर
अभिमानाबद्दल आणि त्याच्या नजरेतील गर्विष्ठपणाबद्दल शिक्षा करेन.
13 कारण ते म्हणतात: “‘माझ्या हाताच्या शक्तीने मी हे केले आहे,
आणि माझ्या शहाणपणाने हे केले आहे, कारण माझ्याकडे समंजसपणा
आहे. मी राष्ट्रांच्या सीमा काढून टाकल्या, मी त्यांचे खजिने लुटले; एका
बलवानाप्रमाणे मी त्यांच्या राजांना वश केले. 14 जसा कोणी घरट्यात
पोहोचतो, तसेच राष्ट्रांच्या संपत्तीसाठी माझा हात पोहोचला. जसे लोक
सोडून दिलेली अंडी गोळा करतात, तसे मी सर्व देशांना एकत्र केले;
कोणीही पंख फडफडविला नाही, किंवा किलबिल करण्यासाठी तोंड
उघडले नाही.’” 15 जो कुर्‍हाड फिरवितो त्याच्यावरच कुर्‍हाड उठते
काय, किंवा करवतीचा जो वापर करतो त्याच्याचविरुद्ध ती बढाई मारते
काय? जसे एखादा व्यक्ती जी काठी उचलतो तीच त्याच्यावर उगारते
काय, किंवा जे लाकूड नाही, त्याला धमकावण्यासाठी जड काठी हवेत
फिरते काय! 16 म्हणून, प्रभू, सर्वसमर्थ याहवेह, त्याच्या दणकट
योद्धयांवर विनाशकारी रोग पाठवतील; त्यांच्या ऐश्वर्यात धगधगत्या
ज्योतीसारखा अग्नी प्रज्वलित केला जाईल अग्नी प्रज्वलित केला
जाईल. 17 इस्राएलचा प्रकाश अग्नी होईल, त्यांचे पवित्र परमेश्वर एक
ज्वाला होतील; त्याचे काटे आणि काटेरी झुडपे ते एकाच दिवसात
जळतील व भस्म करतील. 18 ज्याप्रकारे एखादा रोगी क्षय पावतो
त्याप्रकारे त्याच्या जंगलांचे आणि सुपीक शेत जमिनींचे वैभव, ते
पूर्णपणे नष्ट करतील. 19 आणि त्याच्या जंगलातील राहिलेली झाडे
इतकी कमी असतील की, एखादे लहान बालकही त्याची नोंद करेल.
20 त्या दिवशी इस्राएलचे अवशिष्ट, जिवंत राहिलेले याकोबाचे लोक,
ज्याने त्यांना मारून टाकले त्याच्यावर यापुढे अवलंबून राहणार नाहीत,
परंतु याहवेह, इस्राएलच्या पवित्र परमेश्वरावर ते खरोखरच भरवसा
ठेवतील. 21 याकोबाचा राहिलेला प्रत्येकजणही परत येईल, सर्वसमर्थ
परमेश्वराकडे परत येईल. 22 हे, इस्राएला, तुझे लोक समुद्राच्या वाळूच्या
कणासारखे असली तरी, उरलेलेच मात्र परत येतील. नाश करण्याचा
निर्णय घेण्यात आला आहे, परिपूर्ण आणि न्याययुक्त. 23 प्रभू, सर्वसमर्थ
याहवेह, नाश करण्याचा हुकूमनामा संपूर्ण देशामध्ये अंमलात आणतील.
24 म्हणून प्रभू, सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: “माझे लोकहो, जे
तुम्ही सीयोनमध्ये राहता, अश्शूरी लोकांना घाबरू नका, जे तुम्हाला
दांडक्याने मारतात. आणि इजिप्तने केले त्याप्रमाणे तुमच्याविरुद्ध सोटा

उगारतात. 25 तुमच्याविरुद्ध असलेला माझा राग लवकरच संपेल आणि
माझा क्रोध त्यांच्या नाशाच्या मार्गाकडे वळेल.” 26 सर्वसमर्थ याहवेह
त्यांना चाबकाने फोडून काढतील, जसे त्यांनी मिद्यानाला ओरेबच्या
खडकावर मारले होते; आणि ते त्यांची काठी पाण्यावर उंच करतील,
जसे त्यांनी इजिप्तमध्ये केले होते. 27 त्या दिवशी त्यांचे ओझे तुमच्या
खांद्यावरून, त्यांचे जू तुमच्या मानेवरून काढून घेतले जाईल. तुमच्या
खांद्यावरून जू तुटले जाईल. 28 ते अयाथमध्ये प्रवेश करतात; ते
मिग्रोनमधून पुढे जातात; ते मिकमाश येथे पुरवठा साठवितात. 29
ते पुढे पलीकडे जातात आणि म्हणतात, “आम्ही गेबा येथे रात्रभर
छावणी टाकू.” रामाह थरथर कापतो; शौलाचा गिबियाह पळून जातो.
30 गल्लीमच्या मुली, आरडाओरडा करा! ऐक, लईशाह! गरीब बिचारा
अनाथोथ! 31 मदमेनाह पळून गेला आहे; गेबीमचे लोक आश्रय घेत
आहेत. 32 आज ते नोब येथे थांबतील; सीयोन कन्येच्या डोंगराकडे,
यरुशलेमच्या टेकडीकडे ते त्यांच्या मुठी वळवतील. 33 हे पाहा, प्रभू,
सर्वसमर्थ याहवेह, मोठ्या सामर्थ्याने झाडांच्या मोठ्या फांद्या छाटून
टाकतील. भव्य झाडे पाडली जातील, उंच झाडे खाली आणली जातील.
34 ते कुऱ्हाडीने जंगलातील झाडेझुडपांचे रान कापून टाकतील; लबानोन
प्रतापी परमेश्वरासमोर पडेल.

**11** इशायाच्या बुंध्यापासून एक अंकुर निघून वर येईल; त्याच्या
मुळांपासून एक फांदी येऊन ती फळ देईल. 2 याहवेहचा आत्मा
त्यांच्यावर विसावेल— शहाणपणाचा आणि समंजसपणाचा आत्मा,
सल्ला आणि पराक्रमाचा आत्मा, ज्ञानाचा आत्मा आणि याहवेहच्या
भयाचा आत्मा— 3 आणि ते याहवेहचे भय बाळगण्यात आनंद मानतील.
ते तोंडदेखला न्याय करणार नाहीत, किंवा कानाने ऐकलेल्या गोष्टीवरून
ते निर्णय घेणार नाहीत. 4 परंतु ते नीतिमत्त्वाने गरजवंत लोकांचा
न्याय करतील, न्यायाने ते पृथ्वीवरील गरिबांसाठी निर्णय देतील. ते
त्यांच्या मुखाच्या काठीने पृथ्वीवर हल्ला करतील; ते त्यांच्या ओठांच्या
श्वासाने दुष्टांचा वध करतील. 5 धार्मिकता त्यांचा कटिबंध असेल
आणि विश्वासूपणा त्यांचा कंबरपट्टा असेल. 6 लांडगा कोकऱ्याबरोबर
राहील, चित्ता बकरीबरोबर झोपेल, वासरे आणि सिंह एकत्र राहतील;
आणि एक लहान बालक त्यांचे मार्गदर्शन करेल. 7 गाई अस्वलाबरोबर
चरतील, त्यांची पिल्ले एकत्र झोपतील, आणि सिंह बैलाप्रमाणे कडबा
खाईल. 8 लहान बाळ नागाच्या गुहेजवळ खेळेल, आणि बालक
विषारी फुरसे सर्पाच्या बिळात हात घालेल. 9 माझ्या पवित्र पर्वतावर
सर्वठिकाणी ते कोणाचेही नुकसान किंवा नाश करणार नाहीत, कारण
समुद्र जसा पाण्याने व्यापलेला आहे तशीच पृथ्वी याहवेहच्या ज्ञानाने
भरून जाईल. 10 त्या दिवशी इशायाचे मूळ लोकांसाठी ध्वज म्हणून
उभे राहील; राष्ट्रे त्यांच्याकडे एकत्र येतील आणि त्यांचे विश्रामस्थान
गौरवशाली असेल. 11 त्या दिवशी प्रभू अश्शूरमधून, इजिप्तच्या खालील
भागामधून, इजिप्तच्या वरील भागामधून, कूशमधून, पथरोसमधून,
एलाममधून, शिनारमधून, हमाथमधून आणि भूमध्यसागराच्या बेटांमधून
त्यांच्या अवशिष्ट लोकांवर पुन्हा हक्क सांगण्यासाठी दुसऱ्या वेळेस
त्यांचा हात पुढे करतील. 12 राष्ट्रांसाठी ते एक ध्वज उभा करतील आणि
इस्राएलच्या बंदिवासात गेलेल्यांना एकत्र करतील; पृथ्वीच्या चारही
कोपऱ्यातून यहूदीयाच्या विखुरलेल्या लोकांना ते एकत्र जमवतील.
13 एफ्राईमचा मत्सर नाहीसा होईल, आणि यहूदीयाच्या शत्रूंचा नाश
होईल; एफ्राईमला यहूदाहचा मत्सर वाटणार नाही, किंवा यहूदाह
एफ्राईमबरोबर शतृत्व करणार नाही. 14 ते पश्चिमेला पलिष्ट्यांच्या
उतारावर झेपावतील; एकत्र मिळून ते पूर्व दिशेकडील लोकांना लुटतील.
एदोम आणि मोआब या देशांना ते जिंकून घेतील, आणि अम्मोनी
लोक त्यांच्या अधीन होतील. 15 याहवेह, इजिप्तच्या समुद्राचे आखात
कोरडे करतील; होरपळणाऱ्या वाऱ्याने ते फरात नदीवर हात झटकून
टाकतील. ते त्याचे सात ओढे पाडतील जेणेकरून पायतणे घालूनही ती
ओलांडता येईल. 16 अश्शूरपासून त्यांच्या अवशिष्ट लोकांसाठी जेव्हा ते
इजिप्तमधून आले तेव्हा जसा इस्राएलसाठी केला होता, तसा एक
राजमार्ग असेल.

**12** त्या दिवशी तुम्ही म्हणाल: “याहवेह, मी तुमची स्तुती करेन, जरी
तुम्ही माझ्यावर रागावला होता, तरी तुमचा राग दूर झाला आहे
आणि तुम्ही माझे सांत्वन केले आहे. 2 निश्चितच परमेश्वर माझे तारण
आहेत; मी भरवसा ठेवेन आणि घाबरणार नाही. याहवेह, याहवेह स्वतः
माझे सामर्थ्य आणि माझे संरक्षण आहेत; ते माझे तारण झाले आहेत.”
3 तारणाच्या विहिरींतून तुम्ही आनंदाने पाणी काढाल. 4 त्या दिवशी
तुम्ही म्हणाल: “याहवेहची स्तुती करा, त्यांच्या नावाची घोषणा करा;
त्यांनी जे काही केले आहे ते राष्ट्रांमध्ये माहीत होऊ द्या, आणि असे
घोषित करा की, त्यांचे नाव गौरवान्वित आहे. 5 याहवेहसाठी गीत गा,
कारण त्यांनी गौरवशाली कार्ये केली आहेत; हे सर्व जगाला माहीत
करून द्या. 6 सीयोनच्या लोकांनो, मोठ्याने गर्जना करा आणि आनंद
गीते गा, कारण इस्राएलचे महान पवित्र परमेश्वर तुमच्यामध्ये आहेत.”

**13** आमोजाचा पुत्र यशायाहने बाबेलच्या विरोधात पाहिलेला दृष्टान्त:
2 उघड्या टेकडीच्या शिखरावर ध्वज उंच करा, मान्यवर लोकांच्या
फाटकांमधून प्रवेश करण्यासाठी त्यांना ओरडून सांगा; खुणा करून
त्यांना बोलवा. 3 ज्यांना मी युद्धासाठी सुसज्ज केले आहे, त्यांना मी
आज्ञा दिली आहे. जे माझ्या विजयाचा आनंद करीत आहेत— मी माझा
क्रोध अंमलात आणण्यासाठी त्या माझ्या योद्ध्यांना पाचारण केले
आहे. 4 ऐका, डोंगरावरील एक आवाज, मोठ्या लोकसमुदायासारखा
आवाज! ऐका, राज्यांमध्ये चालू असलेला गोंधळ, राष्ट्रे एकत्र जमत
असल्यासारखा आवाज! सर्वसमर्थ याहवेह, युद्धासाठी सैन्य जमा
करीत आहेत. 5 ते फार दूर देशातून येतात, आकाशाच्या शेवटच्या
टोकापासून— याहवेह आणि त्यांच्या क्रोधाची शस्त्रे संपूर्ण देशाचा
नाश करण्यासाठी येतात. 6 आक्रोश करा, कारण याहवेहचा दिवस
जवळ आला आहे; तो दिवस सर्वसमर्थ यांच्याकडून नाशाप्रमाणे येईल.
7 या कारणामुळे सर्वांचे हात शक्तिहीन होतील, प्रत्येकाचे हृदय भीतीने
वितळून जाईल. 8 दहशत त्यांच्यावर झडप घालेल, वेदना आणि

मनस्ताप त्यांना घट्ट पकडतील; प्रसूती होणाऱ्या स्त्रीप्रमाणे ते वेदनेने गडाबडा लोळतील. भयग्रस्त होऊन ते एकमेकांकडे पाहतील, त्यांचे चेहरे होरपळतील. 9 पाहा, याहवेहचा दिवस येत आहे —एक कठोर दिवस, क्रोधाचा आणि घोर संतापाचा— भूमी उजाड करण्यासाठी आणि तेथील पापी लोकांचा नाश करण्यासाठी. 10 आकाशातील तारे आणि त्यांची नक्षत्रे त्यांचा प्रकाश देणार नाहीत. उगवता सूर्य अंधकारमय होईल आणि चंद्र त्याचा प्रकाश देणार नाही. 11 मी जगाला त्याच्या दुष्टाईबद्दल दुष्टांना त्यांच्या पापांबद्दल शिक्षा करेन. मी गर्विष्ठांचा अहंकार नाहीसा करेन आणि निर्दयी अभिमानींना मी लीन करेन. 12 मी लोकांना शुद्ध सोन्यापेक्षा दुर्मिळ करेन, ओफीरच्या सोन्यापेक्षाही अप्राप्य करेन. 13 म्हणून सर्वसमर्थ याहवेह यांच्या क्रोधाने आणि त्यांच्या क्रोधाग्नीच्या दिवशी मी आकाशे थरथर कापतील असे करेन; पृथ्वी तिच्या जागेवर हादरेल. 14 शिकार केलेल्या छोट्या हरिणीप्रमाणे, जसे मेंढपाळ नसलेले मेंढरू, सर्व त्यांच्या त्यांच्या लोकांकडे परत जातील, ते त्यांच्या मातृभूमीत पळून जातील. 15 जो कोणी पकडला जाईल, त्याला आरपार खुपसले जाईल. जे सर्व पकडले गेले, ते तलवारीने मारले जातील. 16 त्यांची बालके त्यांच्या डोळ्यासमोर आपटून, त्यांचे तुकडे केले जातील; त्यांची घरे लुटली जातील आणि त्यांच्या स्त्रियांचा विनयभंग केला जाईल. 17 पाहा, ज्यांना चांदीची पर्वा नाही, आणि जे सोन्यामध्ये आनंद मानत नाहीत त्या मेदिया लोकांना मी त्यांच्याविरुद्ध चिथावणी देईन. 18 त्यांची धनुष्ये तरुणांना मारून टाकतील; ते तान्ह्या बालकांवर दया करणार नाहीत, किंवा ते लहान मुलांकडे दयेने पाहणार नाहीत. 19 खास्द्यांच्या राज्यांचे बहुमूल्य रत्न, बाबेलच्या लोकांचा अभिमान आणि गौरव, सदोम आणि गमोराप्रमाणे परमेश्वराकडून उद्ध्वस्त केल्या जाईल. 20 तिच्यात कोणी कधीही वसती करणार नाही किंवा पिढ्यान् पिढ्या रहिवास करणार नाही; कोणीही अरब त्यांचे तंबू तिथे ठोकणार नाहीत, तिथे कोणीही मेंढपाळ त्यांच्या कळपांना विश्रांती देणार नाहीत. 21 परंतु अरण्यातील प्राणी तिथे राहतील, तरसानी तिची घरे भरून जातील; तिथे घुबडे राहतील, आणि तिथे बोकडे उड्या मारतील. 22 तरस प्राणी तिच्या गडांवर वस्ती करतील, कोल्हे तिच्या आलिशान राजवाड्यांमध्ये वस्ती करतील. तिची वेळ फार जवळ आली आहे, आणि तिचे दिवस लांबणार नाहीत.

**14** याहवेह याकोबवर दया करतील; पुन्हा एकदा ते इस्राएलची निवड करतील आणि त्यांना त्यांच्या मातृभूमीत स्थायी करतील. परदेशी लोक त्यांच्यात सामील होतील आणि याकोबाच्या वंशजांसोबत एकत्र येतील. 2 अनेक राष्ट्रे त्यांना सहकार्य करतील व त्यांना त्यांच्या जागी आणतील. आणि इस्राएल राष्ट्रांवर ताबा मिळवतील, व याहवेहच्या भूमीत त्यांच्या स्त्रिया व पुरुषांना आपले सेवक बनवतील, त्यांना बंदिवासात नेलेल्यांना ते बंदी करतील त्यांना पीडलेल्यांवर ते राज्य करतील. 3 त्या दिवशी याहवेह तुम्हाला तुमच्या सर्व पीडा व अस्वस्थता व कठोर परिश्रमातून मुक्तता देतील. 4 तेव्हा बाबेलच्या राजाला तुच्छतेने तुम्ही म्हणाल: पाहा, तो जुलूमशहा कसा नाश पावला आहे! त्यांचा उन्मत्तपणा कसा नष्ट झाला आहे! 5 कारण याहवेहने दुष्टांची काठी, व तुझा दुष्टाईचा राजदंड मोडला आहे, 6 ज्या लोकांना तू क्रोधाने मारले, सतत ठोसा मारत राहिलास, बेफाम त्वेषाने व पाषाणहृदयी आवेशाने देशांना अधीन केले. 7 सर्व देश आता समाधानी आणि शांत आहेत; ते गाणी गात आहेत. 8 लबानोनची सनोवरची झाडे आणि गंधसरूसुद्धा आनंद व्यक्त करतात आणि म्हणतात, “आता तुम्हाला खाली पाडले आहे, तेव्हापासून आम्हाला तोडण्यासाठी कोणी आलेले नाही.” 9 अधोलोक तुम्हाला भेटण्यासाठी मृतांच्या रसातळात हालचाल होत आहे; मेलेल्यांचे आत्मे जागृत होऊन तुम्हाला अभिवादन करण्यासाठी— जगामध्ये जे सर्व पुढारी होते; जे सर्व राष्ट्रांवरील राजे होते, ते त्यांच्या सिंहासनावरून उठत आहेत. **(Sheol h7585)** 10 ते सर्व प्रतिसाद देतील, ते तुम्हाला असे म्हणतील, “जसे आम्ही आहोत, तसे तुम्ही सुद्धा दुर्बल झाला आहात; तुम्ही आमच्यासारखे झाला आहात.” 11 तुमच्या वीणांच्या आवाजासहीत, तुमचा सर्व डामडौल खाली थडग्यात आणण्यात आला आहे, कृमी तुमच्या खाली पसरलेल्या आहेत आणि कीटक तुम्हाला झाकून टाकत आहेत. **(Sheol h7585)** 12 पहाटेच्या ताऱ्या, सूर्योदयाच्या पुत्रा! तू स्वर्गातून कसा पडला आहेस, तू, ज्याने एकेकाळी राष्ट्रांना खाली पाडले, तू पृथ्वीवर फेकला गेला आहेस! 13 तू तुझ्या अंतःकरणात म्हणाला, “मी स्वर्गात चढून जाईन; मी माझे सिंहासन परमेश्वराच्या ताऱ्यांपेक्षा उंच करेन; मी लोकसभेच्या पर्वतावरील सिंहासनावर बसेन, झाफोनच्या सर्वात उंच पर्वतावर मी स्थानापन्न होईन. 14 मी ढगांच्या शिखरांवर जाईन; मी स्वतःला सर्वोच्च परमेश्वरासारखे करेन.” 15 परंतु आता तू मृतांच्या अधोलोकात, खोल खाईत लोटला गेला आहेस. **(Sheol h7585)** 16 जे तुझ्याकडे पाहतात ते टक लावून बघत आहेत, ते तुझ्या नशिबाविषयी विचार करतात: “हा तोच मनुष्य आहे काय, ज्याने पृथ्वीला हादरविले होते आणि राज्यांना कंप सुटेल असे केले होते. 17 ज्या मनुष्याने जगाला अरण्य केले ज्याने शहरे उद्ध्वस्त केली आणि तो त्याच्या बंदिवानांना घरी जाऊ देत नसे?” 18 राष्ट्रांचे सर्व राजे चिरनिद्रीत अवस्थेत आहेत, प्रत्येकजण स्वतःच्या कबरेत आहे. 19 परंतु तुला तुझ्या कबरेतून नको असलेल्या फांदीसारखे बाहेर टाकले आहे; ज्यांना तलवारीने भोसकून टाकले, जे दगडांच्या खड्ड्यात टाकण्यात येतात, ज्याप्रकारे माणसांची प्रेते पायाखाली तुडविली जातात तसे त्यांना तुमच्यावर झाकून टाकले आहे. 20 तुम्ही त्यांच्या दफनविधीमध्ये सामील होणार नाही, कारण तुम्ही तुमच्या देशाचा नाश केला आहे आणि तुमच्या लोकांना ठार मारले आहे. दुष्ट लोकांच्या संततीचा पुन्हा कधीही उल्लेख केला जाऊ नये. 21 भूमीचे वतन मिळविण्यासाठी ते उठू नये आणि त्यांच्या शहरांनी पृथ्वी व्यापली जाऊ नये, म्हणून त्याच्या पूर्वजांनी केलेल्या पापांसाठी त्याच्या मुलांना मारून टाकण्यासाठी जागा तयार करा. 22 सर्वसमर्थ याहवेह घोषित करतात, “मी त्यांच्याविरुद्ध उठेन, बाबेलचे नाव आणि तेथील जिवंत राहिलेले, तिची संतती आणि तिच्या वंशजांना मी नामशेष करून टाकेन,” असे याहवेह घोषित करतात. 23 “मी तिला घुबडांचे

निवासस्थान आणि दलदलीचा प्रदेश करेन; मी तिला नाशाच्या झाडूने
झाडून टाकेन,” असे सर्वसमर्थ याहवेह घोषित करतात. 24 सर्वसमर्थ
याहवेहनी शपथ घेतली आहे, “निश्चितच, मी जी योजना केली आहे,
तसेच होईल, आणि जो माझा संकल्प आहे, त्याप्रमाणे हे घडून येईल.
25 माझ्या भूमीवर मी अश्शूरांना चिरडून टाकेन; त्यांना माझ्या डोंगरावर
तुडवेन. त्याचे जू माझ्या लोकांवरून काढून टाकेन, आणि त्याचे ओझे
त्यांच्या खांद्यावरून उतरवेन.” 26 अखिल पृथ्वीसाठी ही योजना केली
आहे; सर्व देशांवर हा हात फिरविला जाईल. 27 सर्वसमर्थ याहवेहचा
हा संकल्प आहे, तो कोण निष्फळ करू शकतो? त्यांचा हात उठला
आहे, त्याला कोण आवर घालू शकतो? 28 आहाज राजा मरण पावला
त्या वर्षी हा संदेश मला प्राप्त झाला: 29 अहो पलिष्टी लोकांनो, ज्या
दांडक्याने तुम्हाला मारले तो मोडला आहे म्हणून आनंद करू नका. तरी
त्या सापापासून फुरसे निपजेल त्याचे फळ तुमचा वेध घेणारे विषारी
नाग असतील. 30 गरिबांतील गरिबांना कुरण सापडेल, आणि गरजवंत
सुरक्षिततेत झोप घेतील. पण तुझे मूळ दुष्काळाने नष्ट होईल; ते तुझ्या
अवशिष्टांचा तलवारीने नाश करतील. 31 वेशींनो, आक्रोश करा! नगरांनो
विलाप करा! पलिष्टी लोकांनो, भयाने वितळून जा! कारण उत्तरेकडून
धुराचा लोट येत आहे, त्यांच्या पलटणींत कोणीही रेंगाळणारे नाहीत. 32
आता राष्ट्रांच्या राजदूतांना काय उत्तर देण्यात यावे? “याहवेहने सीयोन
स्थापिले आहे, आणि त्यांच्या पीडितांना तिच्यात आश्रय मिळेल.”

**15** मोआब देशाविरुद्ध भविष्यवाणी: मोआब येथील आर शहर
उद्‌ध्वस्त झाले आहे, एका रात्रीत ते नष्ट झाले आहे! मोआबातील
कीर शहर उद्‌ध्वस्त झाले आहे, एका रात्रीत ते नष्ट झाले आहे!
2 दिबोन येथील लोक त्यांच्या उच्च स्थानावरील, मंदिरात विलाप
करण्यासाठी जात आहेत; नबो आणि मेदबासाठी मोआब आक्रोश
करीत आहे. प्रत्येकाच्या डोक्यावरील केस आणि दाढी काढलेली आहे.
3 रस्त्यांवर ते गोणपाट घालतात; छतावर आणि सार्वजनिक चौकांमध्ये
ते सर्व आक्रोश करतात, विलाप करीत पालथे पडतात. 4 हेशबोन
आणि एलिआलेह रडतात, त्यांचा आक्रोश दूरवर याहसपर्यंत ऐकू
येतो. म्हणून मोआबचे सशस्त्र लोक आक्रोश करतात, आणि त्यांची
अंतःकरणे दुर्बल झाली आहेत. 5 माझे मन मोआबसाठी रडते; तिचे
पलायन केलेले लोक सोअरपर्यंत, एग्लाथ-शलीशियापर्यंत पळतात. ते
लुहिथकडे टेकडीवर जातात, जाताना ते विलाप करतात; होरोनाईमच्या
वाटेवर ते त्यांच्या नाशासाठी विलाप करतात. 6 निम्रीमचे सर्व पाणी
आटून गेले आहे आणि गवत करपून गेले आहे; वनस्पती सुकून गेली
आहे; आणि हिरवळीसारखे काहीही उरले नाही. 7 म्हणून त्यांनी
मिळवलेली आणि साठविलेली संपत्ती ते वाळुंजाच्या खोऱ्यापलीकडे
घेऊन जातात. 8 त्यांच्या आक्रोशाचे प्रतिध्वनी मोआबच्या सीमेपर्यंत
येतात. त्यांचे आक्रंदन एग्लाइमपर्यंत पोहोचते, त्यांचा विलाप बीर
एलिमपर्यंत पोहोचतो. 9 दिमोनाचे पाणी रक्ताने भरलेले आहे, परंतु मी
दिमोनवर आणखी विपत्ती आणेन— मोआबच्या पलायन केलेल्या
लोकांवर आणि देशातील अवशिष्ट लोकांवर मी सिंह पाठवेन.

**16** देशाच्या अधिपतीकडे सेलापासून वाळवंटाच्या पलीकडे सीयोन
कन्येच्या पर्वतापर्यंत खंडणी म्हणून कोकरे पाठवा. 2 घरट्यातून
ढकलून दिलेल्या फडफडणाऱ्या पक्ष्यांप्रमाणे, मोआबच्या स्त्रिया
आर्णोनच्या घाटावर आहेत. 3 मोआब म्हणतो, “तुमच्या मनाची तयारी
करा, निर्णय द्या. तुमची सावली रात्रीसारखी करा— भर दुपारच्या
वेळेसारखी. पलायन केलेल्यांना लपवा, शरणार्थी लोकांचा विश्वासघात
करू नका. 4 पलायन केलेल्या मोआबी लोकांना तुमच्याबरोबर राहू द्या;
संहारकापासून त्यांचा आश्रय व्हा.” जुलूम करणाऱ्याचा शेवट होईल,
आणि नाश थांबेल; आक्रमण करणारे नाहीसे होतील. 5 प्रीतीने सिंहासन
स्थापित केले जाईल; दावीदाच्या घराण्यातील एकजण, विश्वासूपणाने
त्यावर बसेल— जो न्यायनिवाडा करताना न्यायाची बाजू घेतो आणि
धार्मिकतेची कामे जलदगतीने करतो. 6 मोआबाच्या अभिमानाबद्दल
आम्ही ऐकले आहे— तिचा अहंकार किती मोठा आहे! तिची घमेंड,
तिचा अभिमान आणि तिचा उर्मटपणा; परंतु तिच्या सर्व फुशारक्या
पोकळ आहेत. 7 म्हणून मोआबी मोठ्याने रडतात, मोआबसाठी ते
एकत्र मोठ्याने रडतात. कीर-हरेसेथचा बेदाणा किंवा मनुका मिश्रित
पिठाच्या गोड ढेपांसाठी विलाप आणि शोक करतात. 8 हेशबोनची
शेते सुकून गेली आहेत, सिबमाहच्या द्राक्षवेलीसुद्धा. ज्या एकवेळी
याजेरपर्यंत पोहोचल्या होत्या आणि वाळवंटाकडे पसरत गेल्या होत्या,
त्या खास निवडलेल्या द्राक्षवेली इतर देशांच्या राज्यकर्त्यांनी तुडवून
टाकल्या आहेत. त्यांची कोंबे बाहेर पसरली आणि ती समुद्रापर्यंत गेली
आहेत. 9 म्हणून सिबमाहच्या द्राक्षवेलींसाठी याजेरसह मीही रडतो.
हेशबोन आणि एलिआलेह, मी तुम्हाला अश्रूंनी भिजवितो! तुमच्या
पिकलेल्या फळांसाठी आणि तुमच्या कापणीच्या आनंदाचा जयघोष
शांत झाला आहे. 10 फळबागेतून आनंद आणि हर्ष काढून घेतला
आहे; द्राक्षमळ्यात कोणीही गाणे गात नाही किंवा हर्षनाद करत नाही;
कोणीही द्राक्षकुंडातून द्राक्षारस काढीत नाही, कारण मी हर्षनाद करणे
संपवून टाकले आहे. 11 माझे हृदय वीणेप्रमाणे मोआबसाठी विलाप
करीत आहे, कीर-हरेसेथसाठी माझे अंतःकरण विलाप करीत आहे. 12
जेव्हा मोआब तिच्या उच्चस्थानी दर्शनास जाते, तेव्हा ती फक्त स्वतःला
थकविते; जेव्हा ती तिच्या दैवतांची प्रार्थना करावयाला जाते, तेव्हा
त्याचा काही उपयोग होत नाही. 13 याहवेह यांनी मोआबविरुद्ध आधीच
हे वचन सांगितले आहे. 14 परंतु आता याहवेह असे म्हणतात: “तीन
वर्षात, कराराने बांधलेला सेवक त्यांची मोजणी करेल, मोआबचे वैभव
आणि तिच्या सर्व लोकांचा तिरस्कार केला जाईल आणि तिचे अवशिष्ट
लोक फारच कमी आणि दुर्बल असतील.”

**17** दिमिष्का विरुद्ध भविष्यवाणी: “पहा, दिमिष्क आता शहर असे
राहणार नाही परंतु ते नाशवंत वस्तूंचा ढिगारा असे होईल. 2
अरोएरची शहरे ओसाड होतील आणि ते कळपांना विश्रांती घेण्यासाठी
सोडले जाईल, तिथे त्यांना घाबरविणारा कोणीही नसेल. 3 तटबंदी
केलेले शहर एफ्राईमपासून नाहीसे होईल, आणि दिमिष्कमधून शाही
सामर्थ्य नाहीसे होईल; अराम नगरातील अवशिष्ट इस्राएली लोकांच्या

वैभवासारखे असतील,” असे सर्वसमर्थ याहवेह घोषित करतात. 4
“त्या दिवशी याकोबाचे वैभव कमी होईल; त्याच्या शरीरातील चरबी
व्यर्थ जाईल. 5 जेव्हा कापणी करणारे उभे पीक कापतात, आणि धान्य
त्यांच्या हातात गोळा करतात— जसे जेव्हा कोणी रेफाईमच्या खोऱ्यात
धान्याची कणसे गोळा करतात तसे होईल. 6 जसे जैतुनाच्या झाडाला
झोडपतात तेव्हा उंचटोकाच्या फांद्यांवर दोन किंवा तीन जैतून, आणि
फळ देणाऱ्या मोठ्या फांद्यांवर चार किंवा पाच जैतून राहून जातात,
तसे जमा करण्याचे काही शिल्लक राहील,” असे इस्राएलचे परमेश्वर
याहवेह घोषित करतात. 7 त्या दिवशी लोक त्यांच्या निर्माणकर्त्याकडे
पाहतील त्यांची दृष्टी इस्राएलच्या पवित्र परमेश्वराकडे वळवतील. 8
ते वेद्यांकडे, त्यांच्या हस्तकृतींकडे पाहणार नाहीत, आणि अशेरा
स्तंभांसाठी आणि त्यांच्या बोटांनी तयार केलेल्या धूप वेद्यांकडे आदराने
पाहणार नाहीत. 9 त्या दिवशी त्यांची आश्रयस्थान असलेली शहरे,
जी त्यांनी इस्राएली लोकांमुळे सोडली होती, ती आता काटेरी झाडे
आणि झुडपे वाढत असलेल्या ठिकाणांसारखी होतील. ती सर्व उजाड
होतील. 10 तुम्ही तुमचे तारणकर्ते परमेश्वरांना विसरले आहात; तुम्ही
तुमचा दुर्ग, तुमच्या खडकाची आठवण केली नाही. जरी तुम्ही अत्युत्तम
झाडांची लागवड केली आहे, आणि विदेशी द्राक्षवेलींची लागवड केली
आहे, 11 ज्या दिवशी तुम्ही त्यांना लावता, तुम्ही त्यांना वाढविता, आणि
सकाळी तुम्ही त्यांची पेरणी करता, तेव्हा तुम्ही त्यांना अंकुर फुटू देता,
तरीसुद्धा रोग आणि असाध्य वेदना होणाऱ्या दिवसामध्ये त्यांचे काहीच
उत्पादन होणार नाही. 12 पुष्कळ राष्ट्रे जी संतापतात त्यांना धिक्कार
असो— ते उफाळणाऱ्या समुद्राप्रमाणे रागावतात! गर्जना करणाऱ्या
लोकांचा धिक्कार असो— पाण्याच्या प्रचंड लोंढ्याप्रमाणे ते गर्जना
करतात! 13 जरी लोक उचंबळणाऱ्या पाण्याप्रमाणे गर्जना करतात,
जेव्हा याहवेह त्यांना दटावतात, तेव्हा ते दूर पळून जातात, टेकड्यांवरील
भुश्याप्रमाणे वाऱ्याने पुढे ढकलून दिले जातात, जणू काही वावटळीची
धूळ वादळी वाऱ्यासमोर जाते. 14 संध्याकाळी अचानक दहशत! सकाळ
होण्याआधीच ते गेले असतात! जे आम्हाला लुटतात त्यांच्या वाट्याला
हे येते, जे आमची लूटमार करतात त्यांचा हा वाटा आहे.

**18** कूशच्या नद्यांच्या काठावर असलेल्या देशांचा, जिथून पंखांचा
फडफड आवाज येतो त्यास धिक्कार असो. 2 जो समुद्रमार्गाने
पाण्यावरून पापिरस नौकांमधून दूतांना पाठवितो. जा, जलदगतीने
जाणाऱ्या दूतांनो, धिप्पाड आणि तुळतुळीत त्वचेच्या लोकांकडे जा,
त्यांची जबर असलेल्या दूरवरच्या लोकांकडे, विक्षिप्त भाषण करणारे
आक्रमक राष्ट्र, ज्यांची भूमी नद्यांमुळे विभागली गेली आहे. 3 अहो तुम्ही
जगातील सर्व लोकहो, तुम्ही जे पृथ्वीवर राहता, जेव्हा पर्वतांवर झेंडा
उभारला जाईल, तेव्हा तुम्हाला तो दिसेल, आणि जेव्हा तुतारी वाजेल
तेव्हा तुम्ही ती ऐकाल. 4 याहवेह मला असे म्हणतात: “मी शांत राहीन
आणि माझ्या निवासस्थानातून पाहीन, सूर्यप्रकाशामध्ये चमकणाऱ्या
उष्णतेसारखे, दव असलेले ढग कापणीच्या उन्हात असल्यासारखे.” 5
कारण, कापणीच्या आधी, जेव्हा फुलोरा संपेल आणि फुले पिकलेले
द्राक्ष होतात, ते छाटणीच्या सुऱ्यांनी फुटलेले कोंब कापून टाकतील,
आणि पसरत असलेल्या फांद्या कापून टाकतील आणि काढून टाकतील.
6 डोंगरावरील हिंस्र पक्ष्यांसाठी आणि वन्यप्राण्यांसाठी, भक्ष्य म्हणून
त्या सर्वांना तिथेच सोडले जाईल; संपूर्ण उन्हाळ्यात पक्षी त्यांचे भक्षण
करतील, आणि संपूर्ण हिवाळ्यात वन्यप्राणी त्यांचे भक्षण करतील. 7
त्याकाळी सर्वसमर्थ याहवेहसाठी सीयोनातून भेटी आणल्या जातील
धिप्पाड आणि तुळतुळीत त्वचेच्या लोकांकडून, ज्यांचे भय आहे अशा
दूरवरच्या लोकांकडून, विक्षिप्त भाषण करणाऱ्या आक्रमक राष्ट्राकडून,
ज्यांची भूमी नद्यांमुळे विभागली गेली आहे. अशा लोकांकडून सर्वसमर्थ
याहवेह यांच्यासाठी भेटी आणल्या जातील.

**19** इजिप्तविरुद्ध भविष्यवाणी: पाहा, याहवेह वेगवान ढगावर स्वार
होऊन इजिप्तला येत आहेत. इजिप्तच्या मूर्ती त्यांच्यापुढे थरथर
कापतात, आणि इजिप्तच्या लोकांची अंत:करणे भीतीने वितळून
जातात. 2 “मी इजिप्तच्या लोकांना इजिप्तच्या लोकांविरुद्ध चिथावेन—
भाऊ भावाविरुद्ध लढेल, शेजारी शेजाऱ्याविरुद्ध, शहर शहराविरुद्ध,
राज्य राज्याविरुद्ध. 3 इजिप्तच्या लोकांचे हृदय खचून जाईल, आणि
मी त्यांच्या योजना विफल करेन; मूर्तींबरोबर आणि मृतात्म्यांबरोबर,
माध्यमांशी आणि भूतविद्या करणाऱ्यांशी ते सल्लामसलत करतील. 4
मी इजिप्तच्या लोकांना क्रूर धन्याच्या सत्तेच्या स्वाधीन करेन, आणि
एक भयंकर राजा त्यांच्यावर राज्य करेल,” असे प्रभू, सर्वसमर्थ याहवेह
घोषित करतात. 5 नदीचे पाणी वाळून जाईल, आणि नदीचे पात्र कोरडे
आणि शुष्क होईल. 6 कालव्यांना दुर्गंधी येईल; मिसरचे झरे ओसरतील
आणि कोरडे होतील. लव्हाळे आणि वेळू सुकून जातील, 7 तसेच नाईल
नदीच्या काठावरील, नदिमुखावरील झाडेसुद्धा, नाईल नदीच्या काठावर
पेरणी केलेले प्रत्येक शेत कोरडे होईल व उडून नाहीसे होईल. 8 जे
नाईल नदीत आकड्या टाकतात, ते सर्व कोळीसुद्धा रडतील आणि
विलाप करतील; जे पाण्यावर जाळे टाकतात ते झुरणीस लागतील.
9 जे तागाच्या सूतकताईचे काम करतात ते निराश होतील, विणकर
आशा हरवतील. 10 कापडकामाचे कारागीर उदास होतील, आणि
सर्व मजुरी करणाऱ्यांची अंत:करणे रोगट होतील. 11 सोअन येथील
अधिकारी निरुपयोगीच नाहीत तर मूर्ख आहेत; फारोह राजाचे शहाणे
सल्लागार निरर्थक सल्ला देतात. तुम्ही फारोहला कसे म्हणू शकता,
“ज्ञानी लोकांपैकी एक मी आहे, प्राचीन राजांचा मी एक शिष्य आहे?”
12 आता तुमची ज्ञानी माणसे कुठे आहेत? त्यांनी तुम्हाला दाखवावे
किंवा तुमच्यापुढे यावे आणि माहीत करून द्यावे, कि सर्वसमर्थ याहवेह
यांनी इजिप्तविरुद्ध काय योजना केली आहे. 13 सोअनचे अधिकारी
मूर्ख बनले आहेत, मेम्फीसच्या पुढाऱ्यांची फसवणूक झाली आहे;
तिच्या लोकांच्या कोनशिलांनी इजिप्तला भरकटून टाकले आहे. 14
याहवेहनी त्यांच्यामध्ये भोंवळ येण्याचा आत्मा ओतला आहे; त्यामुळे
इजिप्तच्या सर्व कामात ती लटपटते, जसा मद्यपी, त्याने केलेल्या
ओकारी भोवती फिरतो. 15 इजिप्त काहीही करू शकत नाही— मस्तक
किंवा शेपूट, वर झावळयाची शाखा किंवा खालील लव्हाळे. 16 त्या

दिवशी इजिप्तचे लोक दुर्बल होतील. सर्वसमर्थ याहवेहनी त्यांच्याविरुद्ध उगारलेल्या हाताच्या धाकामुळे ते घाबरून थरकापतील. 17 यहूदीयाची भूमी इजिप्तच्या लोकांवर दहशत आणेल; आणि सर्वसमर्थ याहवेह जी योजना त्यांच्याविरुद्ध करीत आहेत, त्यामुळे कोणी यहूदीयाचा उल्लेख केलेला ऐकताच ते घाबरून जातील. 18 त्या दिवशी इजिप्तमधील पाच शहरे कनान देशाची भाषा बोलतील आणि सर्वसमर्थ याहवेह यांच्याबरोबर एकनिष्ठतेची शपथ घेतील. त्यापैकी एकाला सूर्याचे शहर म्हटले जाईल. 19 त्या दिवशी इजिप्तच्या मध्यभागी याहवेहसाठी वेदी असेल आणि त्यांच्या सीमेवर याहवेह यांचे स्मारक असेल. 20 इजिप्त देशामध्ये सर्वसमर्थ याहवेहसाठी ते एक चिन्ह आणि साक्ष असतील. जेव्हा ते त्यांच्या जुलमी लोकांमुळे याहवेहकडे धावा करतील, तेव्हा ते त्यांच्याकडे एक तारणारा आणि रक्षक पाठवतील आणि ते त्यांना सोडवतील. 21 तेव्हा याहवेह स्वत:ला इजिप्तच्या लोकांस प्रगट करतील आणि त्या दिवशी ते याहवेह यांना स्वीकारतील. यज्ञार्पणे आणि धान्यार्पणे यांच्यासहित ते आराधना करतील; ते याहवेहकडे शपथ वाहतील आणि त्याचे पालन करतील. 22 याहवेह इजिप्तवर महामारीच्या साथीने हल्ला करतील; ते त्यांच्यावर हल्ला करतील आणि त्यांना बरे करतील. ते याहवेहकडे वळतील आणि ते त्यांच्या विनवणीला प्रतिसाद देतील आणि त्यांना बरे करतील. 23 त्या दिवशी इजिप्तपासून अश्शूराकडे जाणारा एक महामार्ग असेल. अश्शूरचे लोक इजिप्तकडे आणि इजिप्तचे लोक अश्शूरला जातील. इजिप्तचे आणि अश्शूरचे लोक एकत्र भक्ती करतील. 24 त्या दिवशी इजिप्त आणि अश्शूरबरोबर इस्राएल हे पृथ्वीवरील तिसरे आशीर्वादित राष्ट्र असेल. 25 सर्वसमर्थ याहवेह त्यांना आशीर्वाद देतील आणि म्हणतील, “इजिप्तमधील माझे लोक आशीर्वादित असावेत, अश्शूर माझी हस्तकला आणि इस्राएल माझे वतन असो!”

**20** ज्या वर्षी अश्शूरचा राजा सार्गोनने पाठविलेला सर्वोच्च सेनापती अश्दोदला आला आणि त्याने हल्ला केला आणि ते ताब्यात घेतले— 2 त्यावेळेस आमोजचा पुत्र यशायाहद्वारे याहवेह बोलले. ते त्याला म्हणाले, “तुझ्या अंगावरील गोणपाट आणि पायातील चपला काढून टाक.” आणि त्याने तसे केले, वस्त्रहीन आणि अनवाणी असा तो फिरत राहिला. 3 तेव्हा याहवेह म्हणाले, “जसा माझा सेवक यशायाह तीन वर्षे विवस्त्र आणि अनवाणी चालला, त्याचप्रमाणे इजिप्त व कूश यांच्याविरुद्ध हे चिन्ह आणि अरिष्टसूचक गोष्ट असेल, 4 म्हणून अश्शूरचा राजा इजिप्तच्या बंदिवानांना आणि कूशच्या बंदिवानांना, तरुणांना आणि वृद्धांना उघडे ठेवलेले नितंब आणि अनवाणी असे—इजिप्तला लज्जित म्हणून चालवेल. 5 ज्यांनी कूशवर विश्वास ठेवला आणि इजिप्तबद्दल बढाई मारली ते निराश होतील आणि लज्जित होतील. 6 त्या दिवशी या किनाऱ्यावर राहणारे लोक असे म्हणतील की, ‘ज्यांच्यावर आम्ही विसंबून होतो, पहा हे त्यांचे काय झाले आहे. ज्यांच्याकडे आम्ही मदतीसाठी आणि अश्शूरच्या राजापासून आमची सुटका व्हावी यासाठी धाव घेतली होती, तर आता आमची सुटका कशी होईल?’”

**21** समुद्राकाठी असलेल्या वाळवंटी प्रदेशाविरुद्ध भविष्यवाणी: ज्याप्रकारे वावटळ दक्षिणेकडील प्रदेशांना झाडून जाते, त्याच प्रकारे हल्ला करणारा वाळवंटी प्रदेशातून, दहशती भूमीमधून येतो. 2 एक भयानक दृष्टान्त मला दाखविण्यात आला आहे: देशद्रोही विश्वासघात करतो, लूट करणारा लूट घेतो. हे एलाम, आक्रमण करा! मेदिया, वेढा घाला! तिने दिलेले दुःखाचे सर्व विव्हळणे मी संपवून टाकेन. 3 यामुळे माझ्या शरीराला यातनेने दुखविले आहे, प्रसूत स्त्रीच्या वेदनांप्रमाणे मला वेदनांनी घेरले आहे. जे काही मी ऐकतो, त्यामुळे मी लटपटून जातो, मी जे काही पाहतो, त्यामुळे मी भांबावून जातो. 4 माझे अंत:करण अडखळते, भीती मला थरथर कापविते; ज्या संध्याकाळची मी आतुरतेने वाट पाहत असे ती माझ्यासाठी भयप्रद अशी झाली आहे. 5 ते मेजावर भोजनाची तयारी करतात, ते गालिचे पसरवितात, ते खातात, ते पितात! अहो, अधिकारी, तुम्ही आता उठा, ढालींना तेल लावा! 6 प्रभू मला असे म्हणत आहेत: “जा, टेहळणी करणारा उभा कर, आणि त्याला जे काही दिसते ते त्याने कळवावे. 7 जेव्हा तो रथांना घोड्यांच्या ताफ्यासहीत, आणि गाढवावर स्वार असलेले किंवा उंटावर स्वार असलेले पाहतो, तेव्हा त्याने सावध राहावे, पूर्णपणे सावध राहावे.” 8 त्याप्रमाणे तटावर ठेवलेला पहारेकरी सिंहगर्जना करीत ओरडला, “महाराज, मी दिवसेंदिवस, रात्रीच्या रात्री येथे पहारा करीत राहिलो. 9 पाहा, एक मनुष्य रथात स्वार होऊन घोड्याच्या ताफ्याबरोबर इकडे येत आहे. आणि तो प्रत्युत्तर देत आहे: ‘बाबेल पडले आहे, ते पडले आहे! तिथे असलेल्या तिच्या दैवतांच्या सर्व मूर्तींचे तुकडे होऊन जमिनीवर पडले आहेत!’” 10 माझे लोक जे खळ्यावर चिरडले गेले आहेत, इस्राएलचे परमेश्वर, सर्वसमर्थ याहवेह यांच्याकडून, मी जे ऐकले आहे ते मी तुम्हाला सांगतो. 11 दूमाह विरुद्ध एक भविष्यवाणी: सेईरमधून कोणीतरी मला हाक मारत आहे, “रखवालदार, रात्र संपण्यास किती वेळ उरला आहे? रखवालदार, रात्र संपण्यास किती वेळ उरला आहे?” 12 पहारेकरी उत्तर देतो, “सकाळ होत आहे, पण रात्रही आली आहे. जर तुम्हाला विचारणा करावयाची आहे, तर मला विचारा; आणि मग पुन्हा या.” 13 अरेबियाविरुद्ध भविष्यवाणी: ददानी काफिल्यांनो, तुम्ही जे अरेबियाच्या अरण्यात वसती करता, 14 तुम्ही, तेमा येथे राहणाऱ्यांनो, तहानलेल्यांसाठी पाणी घेऊन या; पलायन केलेल्यांसाठी अन्न घेऊन या. 15 ते तलवारीपासून पळतात म्यानातून उपसलेल्या तलवारीपासून ते पळतात, वाकवून नेम धरलेल्या धनुष्यापासून आणि युद्धाच्या कठोरतेपासून पळतात. 16 प्रभू मला असे म्हणतात: “एका वर्षाच्या आत, कराराने बांधलेला सेवक जसे एकएक दिवस मोजत असतो, तसे केदारचे सर्व वैभव नाहीसे होईल. 17 केदारचे वाचलेले धनुर्धारी, योद्धे थोडेच असतील.” इस्राएलचे परमेश्वर, याहवेह असे बोलले आहेत.

**22** दृष्टान्ताच्या खोऱ्याविरुद्ध एक भविष्यवाणी: आता तुम्हाला काय त्रास होत आहे, ज्यामुळे तुम्ही सर्वजण छप्परावर गेलेले आहात? 2 हे गोंधळाने भरलेल्या नगरा, हे दंगा व चंगळबाजीने भरलेल्या शहरा,

तुमचे वधलेले लोक तलवारीने मारले गेले नव्हते, ते युद्धातही मरण
पावले नव्हते. 3 तुमचे सर्व पुढारी एकत्र मिळून पळून गेले आहेत;
धनुष्याचा वापर न करताच ते पकडले गेले आहेत. जेव्हा शत्रू अजून
दूर आहे, तोपर्यंत तुम्ही पळून गेला होता, ते तुम्ही सर्व पकडले गेले
व त्यांना कैदी करून नेले. 4 म्हणून मी म्हणालो, “माझ्यापासून दूर
जा; मला आवेगाने रडू द्या. माझ्या लोकांच्या नाशामुळे माझे सांत्वन
करण्याचा प्रयत्न करू नका.” 5 प्रभू, सर्वसमर्थ याहवेह, यांचा एक
दिवस आहे दृष्टान्ताच्या खोऱ्यामध्ये गोंधळाचा, तुडविण्याचा आणि
दहशतीचा, भिंती तोडून पाडण्याचा दिवस आणि पर्वतातून ओरडण्याचा
दिवस आहे. 6 एलाम मनुष्यांचे रथ, त्यांचा सारथी आणि घोडे व भाले
यासहित बाण ठेवण्याचा भाता हाती घेते; कीर ढाल उघडी करते.
7 तुमची आवडती खोरी रथांनी भरून गेली आहेत, आणि घोडेस्वार
नगराच्या फाटकांवर तैनात आहेत. 8 प्रभूने यहूदीयाचे संरक्षण काढून
टाकले, आणि तुम्ही त्या दिवशी जंगलाच्या राजवाड्यामध्ये असलेल्या
शस्त्रास्त्रांकडे पाहिले. 9 तुम्ही पाहिले की, दावीद नगराची तटबंदी
पुष्कळ ठिकाणी तुटलेली होती; खालच्या जलाशयात तुम्ही पाणी
साठविले होते. 10 यरुशलेममधील इमारती तुम्ही मोजल्या आणि
भिंती भक्कम करण्यासाठी घरे जमीनदोस्त करून टाकली. 11 जुन्या
जलाशयाच्या पाण्यासाठी तुम्ही दोन भिंतींमध्ये हौद बांधला, परंतु
ज्यांनी तो तयार केला, त्याच्याकडे तुम्ही लक्ष दिले नाही, किंवा ज्यांनी
ते फार पूर्वीपासून योजले होते, त्यांना आदर दिला नाही. 12 प्रभू,
सर्वसमर्थ याहवेह, रडण्यासाठी आणि आक्रोश करण्यासाठी, तुमचे केस
मुंडविण्यासाठी आणि गोणपाट घालण्यासाठी, त्या दिवशी तुम्हाला
बोलावतील. 13 परंतु पाहा, तिथे आनंद आणि चंगळ आहे, गुरांची
कत्तल आणि मेंढरांची हत्या, मांस खाणे आणि द्राक्षारस पिणे! तुम्ही
म्हणता, “चला, आपण खाऊ आणि पिऊ, कारण उद्या आपण मरणार
आहोत!” 14 सर्वसमर्थ याहवेहनी माझ्या ऐकण्यात हे प्रकट केले आहे:
“तुझ्या मरणाच्या दिवसापर्यंत या पापाचे प्रायश्चित्त केले जाणार नाही,”
असे प्रभू सर्वसमर्थ याहवेह म्हणतात. 15 प्रभू, सर्वसमर्थ याहवेह
असे म्हणतात: “जा, या कारभाऱ्याला सांग, राजवाड्याचा प्रशासक
शेबनाला सांग: 16 तुम्ही इथे काय करत आहात आणि या दगडातून
स्वत:साठी कबर कापण्याची उंचीवर तुमची कबर कोरण्याची, आणि या
खडकात तुमची विश्रांतीची जागा तयार करण्याची परवानगी तुम्हाला
कोणी दिली आहे? 17 “हे बलवान पुरुषा, याहवेहच तुला घट्ट पकडून
ठेवणार आहेत आणि आता तुला झुगारून फेकणार आहेत. 18 ते तुला
हातामध्ये चुरगाळून, चेंडूसारखे, दूर ओसाड प्रदेशात भिरकावून देणार
आहे आणि तिथेच तुझा अंत होईल. ज्या रथांचा तुला इतका अभिमान
होता ते तुझ्या मालकाच्या घरास लज्जित करतील. 19 मीच तुला तुझ्या
पदावरून काढून टाकेन आणि या अधिकाराच्या स्थानावरून ढकलून
देईन. 20 “मग मी माझा सेवक, हिल्कियाहचा पुत्र एल्याकीमला
पाचारण करेन. 21 तुझा पोशाख, तुझी पदवी, तुझा अधिकार मी त्याला
देईन. तो यहूदीयाच्या लोकांचा व यरुशलेममधील रहिवाशांचा पिता
होईल. 22 मी त्याच्या खांद्यावर दावीदाच्या घराण्याची चावी ठेवेन. तो जे
उघडेल, ते कोणीही बंद करू शकणार नाही आणि तो जे काही बंद
करेल, ते कधीही उघडू शकणार नाही. 23 मी त्याला एखाद्या खुंटीसारखे
मजबूत ठिकाणी रोवेन; त्याच्या पित्याच्या घराण्यासाठी सन्मानाचे
आसन होईल. 24 त्याच्या घराण्याचा लौकिक त्याच्यावर स्थिर करेन:
त्याचे वंशज व त्याच्या शाखा—त्याचे सर्व लहान पात्र, कटोऱ्यापासून
ते मोठ्या पात्रापर्यंत.” 25 सर्वसमर्थ याहवेह घोषित करतात, “त्या
दिवशी मजबूतपणे ठोकलेली पाचर डळमळीत होईल; ती उचकटून
जाईल व निखळून जमिनीवर पडेल, तिच्यावर आधारलेले सर्व ओझे
खाली पडेल.” ही याहवेहची वाणी आहे.

23 सोरविरुद्ध भविष्यवाणी: तार्शीशच्या जहाजांनो, विलाप करा!
कारण सोरचा नाश झाला आहे आणि तिथे घर किंवा बंदर असे
काहीच राहिले नाही. कित्तीम देशाकडून हे वचन त्यांच्याकडे आले
आहे. 2 तुम्ही बेटावरील रहिवाशांनो, आणि तुम्ही सीदोनचे व्यापारी,
ज्यांना खलाश्यांनी श्रीमंत केले आहे, शांत राहा. 3 प्रचंड जलाशयावरून
शिहोरचे धान्य आले; नाईल नदीकाठापासून कापणी केलेले पीक हे
सोरचे उत्पन्न होते, आणि ती राष्ट्रांची बाजारपेठ झाली. 4 सीदोन
आणि समुद्रातील किल्ल्यांनो, लज्जित व्हा, कारण समुद्र म्हणाला:
“मला कधीही बाळंतपणाच्या वेदना झाल्या नाहीत आणि मी कधीही
प्रसवलो नाही; मी कधीही मुलांचे संगोपन केले नाही किंवा मुलींचा
सांभाळ केला नाही.” 5 जेव्हा इजिप्तकडे निरोप येतो, तेव्हा सोरकडून
आलेल्या वृत्ताने ते कासावीस होतील. 6 तार्शीश ओलांडून पलीकडे जा;
बेटावरील लोकहो, आक्रोश करा. 7 ही तुमची रंगेलपणाची नगरी आहे
काय, फार जुने, पुरातन नगर, जिच्या पायांनी तिला फार दूर असलेल्या
प्रदेशात स्थायिक होण्यासाठी नेले आहे? 8 सोरच्या विरोधात अशी
योजना कोणी केली आहे, मुकुटाचा बहुमान प्रदान करणारे, ज्यांचे
व्यापारी राजकुमार आहेत, ज्यांचे व्यापारी पृथ्वीवरील प्रसिद्ध लोक
आहेत? 9 सर्वसमर्थ याहवेहनी ती योजना केली आहे, तिच्या सर्व
वैभवाचा गर्व कमी करण्यासाठी आणि पृथ्वीवर नामांकित असलेल्या
सर्वांना नम्र करण्यासाठी. 10 तार्शीश मुली, नाईल नदीच्या काठाने
तुमच्या जमिनीची मशागत करा, कारण आता तुमच्याकडे बंदर राहणार
नाही. 11 याहवेहनी त्यांचा हात समुद्रापलीकडे लांबविला आहे, आणि
तिच्या राज्यांना थरकाप आणला आहे. त्यांनी कनानच्या संदर्भात
आदेश दिले आहेत की, तिचे किल्ले नष्ट केले जावे. 12 ते म्हणाले,
“कुमारिके सीदोन, यापुढे तुझी चैनबाजी चालणार नाही. आता तू
चिरडली जावी! “वर कित्तीम पलीकडे गेलात; तर तिथेही तुम्हाला
विश्रांती मिळणार नाही.” 13 खास्द्यांच्या भूमीकडे बघा या लोकांचे
आता काहीही महत्त्व राहिले नाही! अश्शूर लोकांनी ते वाळवंटातील
श्वापदांसाठी एक ठिकाण केले आहे; त्यांनी त्यांचे वेढा बुरूज उभारले,
त्यांनी त्याचे मोठे किल्ले पाडले आणि त्याचे भग्नावशेष केले. 14
तार्शीशच्या जहाजांनो, विलाप करा; तुमचा किल्ला नष्ट झाला आहे! 15
त्यावेळी एका राजाच्या आयुष्याचा कालावधी, म्हणजे सत्तर वर्षे, सोर

विसरला जाईल. परंतु या सत्तर वर्षांच्या शेवटी, वेश्येच्या गाण्याप्रमाणे
सोरचे होईल: 16 “वीणा हाती घे, शहरामधून फीर, तू विसरून गेलेली
वेश्या; वीणा चांगली वाजव, पुष्कळ गाणी गा, म्हणजे तुझी आठवण
होत राहील.” 17 सत्तर वर्षांच्या शेवटी, याहवेह सोरबरोबर व्यवहार
करतील. ती तिच्या फायदेशीर वेश्याव्यवसायाकडे परत येईल आणि
पृथ्वीतलावरील सर्व राज्यांबरोबर तिचा व्यापार करेल. 18 तरीसुद्धा
तिचा नफा आणि तिचे उत्पन्न याहवेहसाठी वेगळे ठेवले जाईल; ते
साठविले जाणार नाही किंवा त्याचा गुप्तसंचय केला जाणार नाही.
तिचा फायदा याहवेहसमोर जे राहतात त्यांना भरपूर अन्न आणि उत्तम
कपडे मिळावे यासाठी त्यांच्याकडे जाईल.

**24** पाहा, याहवेह पृथ्वीचा नाश करणार आहेत आणि ती उद्ध्वस्त
करणार आहेत; ते तिचा चेहरा बिघडवून टाकतील आणि तेथील
रहिवाशांची पांगापांग करतील— 2 ते प्रत्येकासाठी समान असेल,
जसे लोकांसाठी तसेच याजकासाठी जसे सेवकासाठी तसेच त्याच्या
मालकासाठी जसे सेविकेसाठी तसेच तिच्या मालकिणीसाठी, जसे खरेदी
करणाऱ्यांसाठी तसेच विकत घेणाऱ्यांसाठी, जसे उसने देणाऱ्यासाठी
तसेच उसने घेणाऱ्यासाठी, जसे कर्जदारांसाठी तसेच कर्जदात्यांसाठी.
3 पृथ्वी पूर्णपणे पडीक जमीन होईल आणि संपूर्णपणे लुटली जाईल.
हे शब्द याहवेह बोलले आहेत. 4 पृथ्वी सुकते आणि कोमेजून जाते,
जग खंगून जाते आणि सुकून जाते, आकाश पृथ्वीबरोबर झुरत राहते.
5 पृथ्वीला तिच्या लोकांनी भ्रष्ट केले आहे. त्यांनी नियमांचे उल्लंघन
केले आहे, कायदे भंग केले आहेत आणि अनंतकाळाचा करार मोडला
आहे! 6 म्हणून शाप पृथ्वीला भस्मसात करतो. तिच्या लोकांना त्यांच्या
दोषाचे परिणाम भोगावे लागतील. त्यामुळे पृथ्वीचे रहिवासी जळून
गेले आहेत, आणि फारच थोडे उरले आहेत. 7 नवा द्राक्षारस सुकतो
आणि द्राक्षवेल कोमेजून जाते. आनंद करणारे सर्वजण विव्हळतात. 8
आनंददायक ढोलकी शांत झाली आहे, हर्षोल्हास करणाऱ्यांचा आवाज
थांबला आहे, आनंद करणारी वीणा शांत आहे. 9 गाणी म्हणत मद्यपान
करणे बंद पडले आहे! मद्याचा घोट मद्यपीला कडू लागतो! 10 उद्ध्वस्त
नगरी निर्जन झाली आहे; प्रत्येक घराचे प्रवेशद्वार बंद करण्यात आले
आहे. 11 रस्त्यावर ते मद्यासाठी आरडाओरडा करीत आहेत; सगळा
आनंद दुःखात बदलला आहे, हर्षोल्हासाचे स्वर पृथ्वीवरून नाहीसे झाले
आहेत! 12 नगर उद्ध्वस्त झाले आहे, त्याच्या वेशी तोडून त्यांचे तुकडे
करण्यात आले आहेत. 13 जसे जैतून वृक्ष झाडल्यानंतर किंवा द्राक्ष
गोळा करून द्राक्षाचा हंगाम संपल्यानंतर उरलले राहतात, तशी देशांची
अवस्था होईल, तशी या पृथ्वीची अवस्था होईल. 14 ते हर्षाने आरोळ्या
मारतील; आनंदाने गजर करतील, पश्चिमेकडून ते याहवेहच्या ऐश्वर्याची
स्तुती करतील. 15 म्हणून पूर्वेकडे याहवेहचा गौरव करा; समुद्राच्या
बेटांवर, इस्राएलचे परमेश्वर याहवेहच्या नावाचा गौरव करा. 16 पृथ्वीच्या
दिगंतापासून आपण हे गाणे ऐकतो: “नीतिमान परमेश्वराचा गौरव
असो.” पण मी म्हणालो, “माझा नाश होत आहे, माझा नाश होत
आहे! माझा धिक्कार असो! फसवणूक करणारा विश्वासघात करतो!
फसवणूक करून तो विश्वासघात करतो!” 17 पृथ्वीवरील सर्व लोकांनो,
तुमच्या वाट्याला दहशत, खड्डा व सापळा येणार आहे! 18 भीतीने
तुम्ही पळ काढण्याचा प्रयत्न कराल, तर खड्ड्यात पडाल; खड्ड्यातून
कसेबसे बाहेर पडाल, तर तुम्ही सापळ्यात अडकाल, कारण आकाशाचे
धरणद्वार उघडण्यात आले आहे, पृथ्वीचा पाया हादरला आहे. 19
पृथ्वीचे तुकडे झाले आहेत, पृथ्वी पूर्ण फाटून गेली आहे, पृथ्वीला
जबरदस्त हादरा मिळाला आहे. 20 पृथ्वी मद्यपीसारखी झोकांड्या
खात आहे. वादळात झोपडी हेलकावे खाते, तशी ती हेलकावे खात
आहे; कारण तिच्या बंडखोरपणाचे ओझे अत्यंत जड झाले आहे, ती
अशी कोसळेल—कि पुन्हा उठणार नाही. 21 त्या दिवशी याहवेह,
वर आकाशातील अधिपतींना आणि खाली पृथ्वीवरील राजांना शिक्षा
करतील. 22 त्यांना एकत्र गोळा करण्यात येईल आणि कैद्यांसारखे
त्यांना अंधारकोठडीत टाकण्यात येईल; त्यांना कारागृहात कोंडून
ठेवण्यात येईल. आणि त्यांना अनेक दिवसांकरिता शिक्षा देण्यात
येईल. 23 चंद्राची त्रेधा उडेल, सूर्य लज्जित होईल; कारण सर्वसमर्थ
याहवेह वैभवाने सीयोन पर्वतावर आणि यरुशलेममध्ये, आणि आपल्या
वडीलजनांसमोर—गौरवाने राज्य करतील.

**25** याहवेह तुम्ही माझे परमेश्वर आहात; मी तुम्हाला उंचावेन आणि
तुमच्या नावाची स्तुती करेन, कारण परिपूर्ण विश्वासूपणाने
तुम्ही अद्भुत गोष्टी केल्या आहेत, ज्या फार पूर्वीपासून योजलेल्या
होत्या. 2 तुम्ही शहराला दगडविटांच्या तुकड्यांचा ढीग बनविले, तटबंदी
असलेले नगर उद्ध्वस्त केले, परकियांचे किल्ले आता नगर म्हणून
अस्तित्वात नाहीत. ते परत कधीही बांधले जाणार नाही. 3 म्हणून
बलवान लोक तुमचा सन्मान करतील; निर्दयी राष्ट्रांची नगरे तुमचा आदर
करतील. 4 तुम्ही गरिबांसाठी आश्रयस्थान असे आहात, गरजवंतासाठी
त्यांच्या संकटातील आश्रयस्थान आहात, वादळामध्ये निवारा आहात
आणि उष्णतेमध्ये सावली आहात. कारण निर्दयी लोकांचा श्वास हा
भिंतीवर चालून येणाऱ्या वादळासारखा आहे, 5 आणि वाळवंटातील
उष्णतेसारखा. परदेश्यांची गर्जना तुम्ही शांत करता; जशी ढगाच्या
सावलीने उष्णता कमी होते, तसे निर्दयी लोकांचे हर्षगीत शांत होते. 6
या डोंगरावर सर्वशक्तिमान याहवेह सर्व लोकांसाठी उत्तम अन्नाच्या
मेजवानीची तयारी करतील, जुन्या द्राक्षारसाची मेजवानी— सर्वोत्तम
मांस आणि सर्वोत्कृष्ट द्राक्षारस. 7 जे आच्छादन सर्व लोकांना आच्छादून
टाकते, चादर जी सर्व राष्ट्रांना झाकते, या पर्वतावर याहवेह तिचा नाश
करतील; 8 सर्वकाळासाठी ते मृत्यूला गिळून टाकतील. सार्वभौम
याहवेह सर्वांच्या चेहऱ्यावरील अश्रू पुसून टाकतील; ते त्यांच्या लोकांची
अप्रतिष्ठा सर्व पृथ्वीवरून काढून टाकतील. याहवेह असे बोलले आहेत.
9 त्या दिवशी लोक असे म्हणतील, “निश्चितच, हे आमचे परमेश्वर आहेत;
आम्ही त्यांच्यावर विश्वास ठेवला आणि त्यांनी आम्हाला वाचविले. हे
याहवेह आहेत, आम्ही ज्यांच्यावर विश्वास ठेवला; चला आपण त्यांच्या
तारणात आनंद आणि हर्षोल्हास करू या.” 10 याहवेहचा हात या
पर्वतावर राहील; परंतु जसे कडबा खतामध्ये तुडविला जातो, तसे

मोआबी त्यांच्या भूमीत तुडविले जातील. 11 जसे पोहणारे पोहण्यासाठी
त्यांचे हात लांब करतात तसे ते त्यांचे हात त्यांच्यावर लांब करतील.
त्यांच्या हातात चतुराई असतानाही परमेश्वर त्यांचा अभिमान उतरवून
टाकतील. 12 ते तुमच्या तटबंदीच्या उंच भिंती खाली पाडतील आणि
त्या खाली येतील; ते त्यांना खाली जमिनीवर आणून, पूर्ण धुळीत
मिळवतील.

**26** त्या दिवशी सर्व यहूदीया देश हे गीत गाईल: आमच्याकडे एक
भक्कम शहर आहे; परमेश्वर त्याचे तारण त्याच्या भिंती आणि
तटबंदी करतात. 2 वेशी उघडा जेणेकरून नीतिमान राष्ट्र, जे राष्ट्र कायम
विश्वास ठेवते, ते प्रवेश करेल. 3 ज्यांचे मन स्थिर आहे, त्या तुम्हाला
परिपूर्ण शांती मिळेल, कारण ते तुमच्यावर भरवसा ठेवतात. 4 याहवेहवर
कायम भरवसा ठेवा, कारण याहवेह, याहवेह स्वत: सनातन खडक
आहेत. 5 जे उच्चस्थळी राहतात, त्यांना ते नम्र करतात वैभवशाली
असलेले शहर ते खाली पाडतात; ते त्याला भुईसपाट करतात आणि
त्याला धुळीत टाकून देतात. 6 पावलांनो ते तुडवा— पीडितांच्या
पावलांनो, गरिबांच्या पावलांनो. 7 नीतिमानाचा मार्ग समतल असतो;
तुम्ही जे परमनीतिमान आहात, नीतिमानांचा मार्ग सुकर करा. 8 होय,
याहवेह, तुमच्या नियमांना अनुसरून चालत असताना, आम्ही तुमची
वाट पाहतो; तुमचे नाव आणि किर्ती हीच आमच्या अंत:करणाची इच्छा
आहे. 9 रात्री माझ्या जीवाला तुमचा ध्यास लागतो; सकाळी माझा
आत्मा तुमच्यासाठी आसुसलेला असतो. जेव्हा तुमचे न्याय पृथ्वीवर
येतात, तेव्हा जगातील लोक धार्मिकता शिकतात. 10 परंतु जेव्हा दुष्टांवर
कृपा दाखविली जाते, तेव्हा ते धार्मिकता शिकत नाहीत. प्रामाणिकपणा
असलेल्या देशामध्येही ते दुष्कृत्ये करीत राहतात आणि याहवेहच्या
प्रतिष्ठेची ते पर्वा करीत नाहीत. 11 याहवेह, तुमचा हात उगारलेला आहे,
परंतु ते पाहात नाहीत. तुमच्या लोकांबद्दलचा तुमचा आवेश त्यांना
पाहू द्या व लज्जित होऊ द्या; तुमच्या शत्रूंना भस्म करण्यासाठी अग्नी
राखून ठेवा. 12 याहवेह, तुम्ही आमच्यासाठी शांती प्रस्थापित करता;
जे सर्वकाही आम्ही साध्य केले, ते तुम्ही आमच्यासाठी केले आहे.
13 याहवेह, आमच्या परमेश्वरा, आम्ही केवळ तुमच्या नावाचा आदर
करतो. तुमच्याशिवाय इतर प्रभूंनी आमच्यावर राज्य केले आहे, 14 ते
आता मरण पावले आहेत, ते आता जगणार नाहीत. त्यांचे मृतात्मे उठत
नाहीत. तुम्ही त्यांना शिक्षा केली आणि त्यांचा नाश केला; तुम्ही त्यांच्या
सर्व आठवणी पुसून टाकल्या. 15 याहवेह, तुम्ही राष्ट्राचा विस्तार केला
आहे; तुम्ही राष्ट्राचा विस्तार केला आहे. तुम्ही स्वत:साठी गौरव प्राप्त
केले आहे; तुम्ही देशाच्या सर्व सीमा वाढविल्या आहेत. 16 हे याहवेह, ते
त्यांच्या संकटात असताना तुमच्याकडे आले; जेव्हा तुम्ही त्यांना शिस्त
लावली, तेव्हा ते कुजबुजत थोडीफार प्रार्थना करू शकत होते. 17 जशी
गर्भवती स्त्री प्रसूत होण्याच्या वेळेस तिच्या वेदनांनी गडाबडा लोळते
आणि रडून ओरडते, याहवेह, तुमच्या उपस्थितीत आम्ही तसेच होतो. 18
आम्ही गरोदर होतो, प्रसूतीच्या वेदनांनी लोळलो, परंतु आम्ही वाऱ्याला
जन्म दिला. आम्ही देशात तारण आणलेले नाही, आणि जगातील लोक
जीवनाकडे आले नाहीत. 19 याहवेह, परंतु तुमचे मेलेले जगतील; त्यांची
शरीरे उठतील— जे धुळीमध्ये पडून राहतात त्यांना जागे होऊ द्या आणि
हर्षनाद करू द्या— तुमचे दव प्रात:काळच्या दवासारखे आहे; पृथ्वी
तिच्या मृत लोकांना जन्म देईल. 20 माझ्या लोकांनो, जा, तुमच्या
खोल्यांध्ये जा आणि तुमच्यामागे दारे बंद करा; थोडा वेळ पर्यंत तुम्ही
स्वत:ला लपवून ठेवा जोपर्यंत त्यांचा राग निघून जात नाही. 21 पाहा,
पृथ्वीवरील लोकांना त्यांच्या पापाबद्दल शिक्षा देण्याकरिता, याहवेह
त्यांच्या निवासस्थानातून बाहेर येत आहेत तिच्यावर झालेला रक्तपात
पृथ्वी प्रगट करेल; तिच्यावर वधलेले यापुढे पृथ्वी लपवून ठेवणार नाही.

**27** त्या दिवशी, याहवेह त्यांच्या तलवारीने शिक्षा करतील—
त्यांची हिंसक, मोठी आणि शक्तिशाली तलवार— लिव्याथान
सरपटणारा सर्प, गुंडाळून घेणारा सर्प लिव्हियाथान; ते समुद्रातील या
राक्षसाचा वध करतील. 2 त्या दिवशी— “फलवंत द्राक्षमळ्याबद्दल गीत
गा: 3 मी, याहवेह, त्यावर लक्ष ठेवतो; मी त्याला सतत पाणी देतो. मी
रात्रंदिवस त्याचे रक्षण करतो जेणेकरून कोणीही त्याला इजा करणार
नाही. 4 मी रागावलेलो नाही. परंतु जर माझ्यासमोर काटेरी झुडपे
आणि काटे आले तर! मी त्यांच्यावर हल्ला करून युद्ध केले असते; मी
त्या सर्वांना आग लावली असती. 5 नाहीतर त्यांना माझ्याकडे आश्रय
घेण्यासाठी येऊ द्या; त्यांनी माझ्याबरोबर सलोखा करावा, होय, त्यांनी
माझ्याबरोबर सलोखा करावा.” 6 येणाऱ्या दिवसात याकोब मूळ धरेल,
इस्राएलला अंकुर फुटेल आणि ती बहरेल आणि सर्व जगास फळांनी
भरेल. 7 याहवेहनी तिच्यावर हल्ला केला आहे का, ज्यांनी तिच्यावर
हल्ला केला, तिच्यावर याहवेहने हल्ला केला होता का? तिला मारण्यात
आले आहे का, ज्यांनी तिला मारले, त्यांना मारण्यात आले आहे का? 8
रणनीती आणि बंदिवास करून तुम्ही तिच्याबरोबर वाद घालता— जसे
एखाद्या दिवशी पूर्वेचा वारा वाहतो, तसे त्यांच्या हिंसक स्फोटाने ते
तिला घालवून देतात. 9 तेव्हा याप्रकारे याकोबाच्या अपराधाचे प्रायश्चित्त
होईल, आणि त्याचे पाप काढून टाकल्याचे हे पूर्ण फळ असेल: जेव्हा
ते वेदीच्या सर्व दगडाचे चुनखडीसारखे चूर्ण करतील. अशेरा दैवतेचे
स्तंभ किंवा धूपवेद्या तशाच उभ्या सोडतील. 10 तटबंदीचे शहर उजाड
झाले आहे, टाकून दिलेले आवास, टाकून दिलेल्या अरण्यासारखी
आहे; तिथे वासरे चरतात, तिथे ती झोपतात, ते त्याच्या फांद्या खाऊन
निष्पर्ण करतात. 11 जेव्हा झाडाच्या फांद्या वाळून शुष्क होतात व
मोडतात आणि स्त्रिया येतात व ते सरपण म्हणून जाळतात. तसे हे
लोक असमंजस आहेत; म्हणून त्यांना घडविणाऱ्याला त्यांची दया
येत नाही आणि त्यांचा निर्माणकर्ता त्यांच्यावर कृपा करीत नाही. 12
त्या दिवशी याहवेह वाहत्या फरात नदीपासून इजिप्तच्या खोऱ्यापर्यंत
मळणी करतील आणि तुम्ही, इस्राएल एकएक करून गोळा केले जाल.
13 आणि त्या दिवशी मोठा कर्णा वाजू लागेल. ज्यांचा अश्शूरमध्ये नाश
होत होता आणि जे इजिप्तमध्ये बंदिवासात गेले होते, ते येतील आणि
यरुशलेममधील पवित्र पर्वतावर याहवेहची उपासना करतील.

28 त्या मुकुटाला धिक्कार असो, जो एफ्राईमच्या दारुड्यांचा
अभिमान आहे, त्या फिके पडणाऱ्या फुलाला, त्याच्या तेजस्वी
सौंदर्याला, सुपीक खोऱ्याच्या टोकावर बसविलेल्या— त्या नगराला,
जो मद्याने क्षीण झालेल्यांचा अभिमान आहे! 2 पाहा, प्रभूकडे असा
एकजण आहे जो सामर्थ्यवान आणि बलवान आहे. तो गारपीट आणि
विध्वंस करणाऱ्या वावटळीसारखा, वेगाने फटकारणारा पाऊस आणि
पूरासारखा मुसळधार पाऊस, तो पूर्णशक्तीने त्याला जमिनीवर फेकून
देईल. 3 तो मुकुट, एफ्राईमच्या मद्यपींचा अभिमान, पायाखाली तुडविला
जाईल. 4 ते सुकत जाणारे फूल, सुपीक खोऱ्याच्या टोकावर बसविलेले,
त्याचे तेजस्वी सौंदर्य, कापणीच्या आधी पिकलेल्या अंजिरांसारखे
होईल— लोक त्यांना पाहताक्षणीच त्यांना हातात घेतात, व त्यांना
गिळंकृत करतात. 5 त्या दिवशी सर्वसमर्थ याहवेह त्यांच्या अवशिष्ट
लोकांसाठी एक गौरवशाली मुकुट, सुंदर पुष्पचक्र असे होतील. 6 जे
न्याय करण्यासाठी बसतात त्यांच्यासाठी ते न्यायाचा आत्मा होतील, जे
वेशीतूनच युद्धामधून मागे फिरतात त्यांच्यासाठी ते सामर्थ्याचा उगम
असतील. 7 आणि हे सुद्धा मद्य पिऊन लटपटतात आणि मद्यापासून
झोकांड्या देतात: याजक आणि संदेष्टे मद्यामुळे डगमगतात आणि
द्राक्षमद्याने अस्थिर होतात. आणि मद्यापासून झोकांड्या देतात ते दृष्टान्त
पाहत असताना लटपटतात, निर्णय देताना ते अडखळतात. 8 त्यांच्या
भोजनांची सर्व मेजे वांतीने भरली आहेत! आणि तिथे घाण नाही अशी
एकही जागा नाही. 9 "तो कोणाला शिकविण्याचा प्रयत्न करीत आहे?
त्याचा संदेश तो कोणाला समजावून सांगत आहे? त्यांच्या दूध तुटलेल्या
बालकांना, नुकतेच स्तनपान झालेल्या तान्ह्या बाळांना? 10 कारण
हे आहे: हे करा, ते करा, यासाठी एक नियम, त्यासाठी एक नियम;
थोडेसे इकडे, थोडेसे तिकडे." 11 ठीक आहे, तर परदेशी ओठांनी आणि
अपरिचित वाणीने परमेश्वर या लोकांशी बोलतील, 12 ज्यांना ते असे
म्हणाले, "हे विश्रांती घेण्याचे ठिकाण आहे, थकलेल्यांना विश्रांती घेऊ
द्या;" आणि, "ही विश्राम करण्याची जागा आहे;" परंतु ते ऐकणार
नाहीत. 13 म्हणून याहवेहचे वचन त्यांच्याकरिता असे होईल: हे करा, ते
करा, यासाठी एक नियम, त्यासाठी एक नियम; थोडेसे इकडे, थोडेसे
तिकडे— जेणेकरून ते मागे पडतील; ते जखमी होतील, सापळयात
अडकतील व पकडले जातील. 14 म्हणून, जे यरुशलेमच्या लोकांवर
राज्य करतात, त्या उपहास करणाऱ्या अधिकाऱ्यांनो, याहवेहचे वचन
ऐका: 15 तुम्ही बढाई मारता, "आम्ही मृत्यूबरोबर करार केला आहे,
अधोलोकाशी आम्ही करार केला आहे. जेव्हा दुःखदायक अरिष्टांचा
फटकारा येतो, तो आम्हाला स्पर्श करू शकत नाही, कारण आम्ही
खोट्या गोष्टींना आमचे आश्रयस्थान केले आहे आणि असत्यपणाच्या
आड स्वतःला लपविले आहे." (Sheol h7585) 16 म्हणून सार्वभौम
याहवेह असे म्हणतात: "पाहा, मी सीयोनमध्ये एक दगड ठेवतो, एक
परीक्षा घेतलेला दगड, खात्रीपूर्वक पायासाठी मौल्यवान कोनशिला;
त्यावर भिस्त ठेवणारा, कधीही भीतीने त्रस्त होत नाही. 17 मी न्यायाला
मापनदोरी आणि नीतिमत्वाला ओळंबा असे करेन. गारांनी तुमचा
खोटेपणा, तुमचे आश्रयस्थान झाडून काढला जाईल, आणि पाणी
तुमच्या लपण्याच्या जागेवर भरून वाहील. 18 मृत्यूबरोबर केलेला
तुमचा करार रद्द केला जाईल; अधोलोकाशी केलेला तुमचा करार
टिकणार नाही. जेव्हा दुःखदायक अरिष्ट झाडून काढते, तेव्हा तुम्हाला
त्याच्याकडून तुडविले जाईल. (Sheol h7585) 19 जितक्या वेळेस ते
येईल तितक्या वेळेस ते तुम्हाला वाहवत घेऊन जाईल; रोज सकाळी,
दिवसभर आणि रात्रभर, ते आरपार झाडत राहील." हा संदेश समजून
घेतल्याने अत्यंत भीती निर्माण होईल. 20 तुमचे अंथरूण फारच आखूड
आहे, तुमचे पांघरूण अगदी अरुंद आहे. 21 त्यांचे कार्य करण्यासाठी,
त्यांचे विक्षिप्त काम, आणि त्यांचे कठीण कार्य, होय, त्यांचे अद्भुत
कार्य सिद्ध करण्यासाठी, जसे ते पेराझीम पर्वतावर राहिले होते, तसे
याहवेह उभे राहतील, जसे गिबोनच्या खोऱ्यामध्ये केले होते, तसे
स्वतःला उभारतील. 22 आता तुमचे थट्टा करणे थांबवा, नाहीतर तुमच्या
साखळया आणखीच जड होतील. प्रभू, सर्वसमर्थ याहवेह, यांनी मला
सांगितले आहे, संपूर्ण भूमीचा नाश करण्याचे फर्मान काढण्यात आले
आहे. 23 ऐका व माझ्या म्हणण्याकडे कान द्या; मी तुम्हाला जे सांगतो
त्याकडे नीट लक्ष द्या. 24 जेव्हा शेतकरी लागवडीसाठी नांगरतो तेव्हा तो
सतत नांगरतो का? तो सतत ढेकळे मोडून मातीत काम करीत राहतो
का? 25 मग त्याने शेत नांगरून तयार केले, तर तो त्यात शहाजिरे व
जिऱ्याची पेरणी करत नाही काय? तो गव्हाच्या ठिकाणी गहू आणि
जव सरीने लावत नाही का? आणि ज्वारीच्या वाफ्यात ज्वारी पेरत
नाही का? 26 त्याचे परमेश्वर त्याला सूचना देतात आणि त्याला योग्य
रीत शिकवितात. 27 शहाजिऱ्याची मळणी करण्यासाठी जड वजनाचा
सोटा वापरीत नाही, किंवा मळणीसाठी गाडीचे चाक जिऱ्यावर फिरविले
जात नाही; शहाजिऱ्याची मळणी करण्यासाठी हलक्या वजनाची काठी
वापरतो, आणि जिऱ्याची मळणी बारीक काठीने करतो. 28 भाकरी
करण्यासाठी धान्याचे पीठ करावे लागते; म्हणून त्याची सतत मळणी
करत नाहीत. ते खळयात घालून त्यावर मळणीच्या गाडीची चाके
फिरविली जातात, पण त्याची मळणी करण्यासाठी घोड्याचा वापर
करत नाहीत. 29 ही सर्व माहिती सर्वसमर्थ याहवेहकडून प्राप्त होते.
त्यांच्या योजना चमत्कारिक असतात, त्यांचे ज्ञान अद्भुत आहे.

29 अरीएल, अरीएल, तुम्हाला धिक्कार असो ते नगर जिथे दावीदाने
वास्तव्य केले! वर्षा पुढे वर्ष जोडा आणि तुमच्या सणांचे चक्र पुढे
चालू द्या. 2 तरीसुद्धा मी अरीएलला वेढा घालेन; ती शोक करेल आणि
विलाप करेल, ती माझ्यासाठी वेदीच्या अरीएलसारखे होईल. 3 मी
तुमच्याविरुद्ध सर्व बाजूंनी छावणी टाकेन; मी तुमच्या भोवताली उंच
बुरुजांचे रिंगण उभे करेन. आणि मी तुमच्याविरुद्ध वेढा घालण्याची
कामे करेन. 4 तुम्हाला खाली टाकले आहे, तुम्ही भूमीवरून बोला. तुमचे
बोलणे धुळीतून पुटपुटत येईल. पृथ्वीवरून तुमचा आवाज भुतासारखा
येईल; धुळीमधून तुमचे बोलणे कुजबुज करेल. 5 परंतु तुमचे पुष्कळ
शत्रू बारीक धुळीसारखे होतील, उडालेल्या भुशासारखे निर्दयी लोकांच्या
झुंडी. अचानक, एका क्षणातच, 6 सर्वसमर्थ याहवेह येतील मेघगर्जना

आणि भूकंप आणि प्रचंड गर्जनेसह, सोसाट्याच्या वाऱ्याची वावटळ,
वादळ आणि गिळंकृत करणाऱ्या अग्निज्वालांसह येतील. 7 तेव्हा
अरीएलविरुद्ध लढणाऱ्या सर्व राष्ट्रांच्या झुंडी, जे तिच्यावर आणि तिच्या
गडांवर हल्ला करतील आणि तिला वेढा घालतील, ते स्वप्नासारखेच
होईल, ते रात्रीच्या दृष्टान्तासारखे— 8 जसे भूक लागलेला मनुष्य अन्न
खात असल्याची स्वप्ने पाहतो, परंतु तो जागा होतो तेव्हा भुकेलाच
असतो; जसे तहान लागलेला मनुष्य जेव्हा पाणी पिण्याची स्वप्ने
पाहतो, परंतु तो जागृत होतो तेव्हा दुर्बल आणि तहानलेलाच असतो.
तशाच प्रकारे सीयोन पर्वताविरुद्ध लढणाऱ्या सर्व राष्ट्रांच्या झुंडींचे होईल.
9 सुन्न व्हा आणि आश्चर्याने थक्क व्हा, तुम्ही स्वतःला अंध करा आणि
दृष्टीहीन व्हा. झिंगलेले व्हा, परंतु मद्याने नव्हे, लटपटणारे व्हा, परंतु
मद्याने नव्हे. 10 याहवेहनी तुम्हाला गाढ झोप आणली आहे: त्यांनी संदेष्टे,
म्हणजे तुमचे डोळे बंद केले आहेत; त्यांनी दृष्टान्त पाहणारे, म्हणजे
तुमच्या डोक्यावर आच्छादन घातले आहे. 11 तुमच्यासाठी हा संपूर्ण
दृष्टान्त फक्त चर्मपत्राच्या गुंडाळीत मोहोरबंद केलेल्या शब्दांव्यतिरिक्त
काहीच नाही, आणि जर तुम्ही वाचन करू शकणाऱ्या एखाद्याला ही
गुंडाळी द्याल आणि असे म्हणाल, "कृपया, हे वाचून दाखवा" ते उत्तर
देतील, "मी हे करू शकत नाही; ते मोहोरबंद केलेले आहे." 12 किंवा
ज्याला वाचता येत नाही अशा कोणाला तुम्ही ही गुंडाळी दिली आणि
म्हणाले, "कृपया हे वाचा," ते उत्तर देतील, "मला कसे वाचायचे
ते माहीत नाही." 13 प्रभू असे म्हणतात: "हे लोक केवळ त्यांच्या
मुखाने माझा सन्मान करतात, पण त्यांची अंतःकरणे माझ्यापासून दूर
आहेत. माझी उपासना ते व्यर्थपणे करतात; त्यांची शिकवण केवळ
मानवी नियम आहेत. 14 म्हणून मी पुन्हा एकदा या लोकांना विस्मित
करेन. चमत्कारानंतर चमत्कार करून; ज्ञानी लोकांचे ज्ञान नष्ट होईल,
बुद्धिमानाची बुद्धी नाहीशी होईल." 15 धिक्कार असो, जे त्यांच्या
योजना याहवेहपासून लपविण्यासाठी खूप खोलवर जातात, जे त्यांची
कार्ये अंधारात करतात आणि असा विचार करतात, "आम्हाला कोण
पाहतो? हे कोणाला माहीत होईल?" 16 तुम्ही गोष्टी उलटवून टाकता,
जणू कुंभार हा मातीसारखा असेल! ज्याला आकार दिला, तो आकार
देणाऱ्याला असे म्हणेल का, "तू माझी रचना केली नाहीस?" मडके
कुंभाराला म्हणू शकते का, "तुला काहीच माहीत नाही?" 17 लबानोनचा
थोड्याच वेळात सुपीक भूमीत बदल होणार नाही का, आणि सुपीक
भूमी जंगलासारखी होणार नाही का? 18 त्या दिवशी गुंडाळीतील शब्द
बहिऱ्यांना ऐकू येतील आणि अंधकार व औदासिन्यतेतून अंधाचे नेत्र
पाहू लागतील. 19 नम्र लोक पुन्हा याहवेहच्या सानिध्यात हर्षोल्हास
करतील; गरजवंत इस्राएलचे पवित्र परमेश्वराच्या सानिध्यात आनंद
साजरा करतील. 20 निर्दयी नाहीसे होतील, आणि उपहास करणारे
दिसेनासे होतील, वाईट नजर ठेवणाऱ्याचा सर्वांचा नाश होईल— 21 जे
इतरांना त्यांच्या शब्दाद्वारे दोषी ठरवितात, जे रक्षकाला सापळ्यात
अडकवितात, जे खोटी साक्ष देऊन निष्पाप लोकांना न्यायापासून वंचित
करतात. 22 म्हणूनच अब्राहामाचा उद्धार करणारे याहवेह, याकोबाच्या
वंशजांना म्हणतात: "येथून पुढे याकोब लज्जित होणार नाही. येथून पुढे
त्यांचे चेहरे पांढरेफटक पडणार नाहीत. 23 जेव्हा ते त्यांच्यामध्ये त्यांची
संतती, माझी हस्तकृती बघतील, तेव्हा ते माझे नाव पवित्र ठेवतील; ते
याकोबच्या पवित्र परमेश्वराची पवित्रता स्वीकारतील आणि इस्राएलच्या
परमेश्वराचा आदर करतील. 24 मूर्ख आत्म्याचे लोक समंजसपणा
शिकतील; आणि कुरकुरणारे शिक्षण ग्रहण करतील."

**30** याहवेह असे घोषित करतात, "दुराग्रही संततीचा धिक्कार असो,
ज्या योजना माझ्या नाहीत, त्या ते पूर्ण करतात, नाते जोडतात,
परंतु माझ्या आत्म्याने नाही, पापावर पापाचा ढीग रचतात; 2 जे
माझा सल्ला न घेता इजिप्तकडे जातात; जे आश्रयासाठी इजिप्तच्या
सावलीची फारोहच्या रक्षणासाठी मदतीची अपेक्षा करतात. 3 परंतु
फारोहचे रक्षण तुम्हाला लज्जित करेल, इजिप्तच्या सावलीने तुमची
अप्रतिष्ठा होईल. 4 जरी सोअनमध्ये त्यांचे अधिकारी आहेत आणि त्यांचे
दूत हानेस येथे पोहोचले आहेत, 5 तरी प्रत्येकाला लज्जित करण्यात
येईल कारण त्यांच्यासाठी ते निरुपयोगी लोक आहेत, जे काहीही मदत
किंवा लाभ आणत नाहीत. परंतु केवळ लज्जा आणि अपमान." 6
नेगेवच्या प्राण्यांबद्दलची भविष्यवाणी: कठीण परिश्रम आणि संकटाच्या
भूमीतून, सिंह आणि सिंहीण, फुरसे आणि उडणारे साप, दूत आपली
संपत्ती गाढवांच्या पाठीवर, त्यांचे खजिने उंटांच्या कुबड्यांवर लादून,
त्या लाभहीन राष्ट्राकडे घेऊन जातात, 7 इजिप्तकडे, ज्यांनी दिलेली
अभिवचने निरुपयोगी आहेत. म्हणून मी इजिप्तला निरुपयोगी राहाब
म्हणतो. 8 आता जा, त्यांच्यासाठी ते एका पाटीवर लिहा, चर्मपत्राच्या
गुंडाळीवर ते कोरून टाका, म्हणजे येणाऱ्या दिवसात ते सर्वकाळासाठी
साक्षीदार असेल. 9 कारण हे बंडखोर लोक आहेत, फसवणारी मुले
आहेत, याहवेहची शिकवण ऐकायला तयार नसलेली मुले. 10 दृष्टान्त
पाहणाऱ्यांना ते असे म्हणतात, "यापुढे दृष्टान्त पाहू नका!" आणि
संदेष्ट्यांना म्हणतात, "यापुढे काय योग्य आहे, याबद्दल आम्हाला
दर्शन देऊ नका! आनंद देणाऱ्या गोष्टी आम्हाला सांगा, भ्रामक कल्पना
असलेली भविष्यवाणी करा. 11 हा मार्ग सोडा, या वाटेवरून दुसरीकडे
जा, आणि इस्राएलचे जे पवित्र परमेश्वर आहेत त्यांच्याबरोबर आमची
समोरासमोर भेट करणे थांबवा!" 12 त्यामुळे इस्राएलचे पवित्र परमेश्वर
असे म्हणतात: "कारण तुम्ही हा संदेश नाकारला, जुलूम करण्यावर
भरवसा ठेवला आणि कपट करण्यावर अवलंबून राहिला, 13 हे पाप
तुमच्यासाठी उंच, भेगा पडलेल्या आणि फुगलेल्या भिंतीसारखे, जी
अचानक, क्षणार्धात कोसळते अशी होईल. 14 मातीच्या भांड्यांसारखे
त्याचे इतक्या निर्दयीपणाने तुकडे केले जातील की त्याच्या अनेक
बारीक तुकड्यांमध्ये चुलीमधून निखारे घेण्यासाठी किंवा रांजणातून
पाणी काढण्यासाठी एकही तुकडा सापडणार नाही." 15 सार्वभौम
याहवेह, इस्राएलचे पवित्र परमेश्वर असे म्हणतात: "पश्चात्ताप आणि
विश्रांती करणे हेच तुमचे तारण आहे, शांतता राखणे आणि विश्वास
ठेवणे यामध्ये तुमचे सामर्थ्य आहे, परंतु यापैकी तुम्हाकडे काहीही
नसेल. 16 तुम्ही असे म्हणाला की, 'नाही, आम्ही घोड्यांवर स्वार

होऊन पळून जाऊ.' म्हणून तुम्ही पळून जाल! तुम्ही असे म्हणाला,
'आम्ही वेगवान घोड्यांवर स्वार होऊ.' म्हणून तुमचे पाठलाग करणारे
चपळ होतील! 17 जोपर्यंत तुम्हाला डोंगराच्या शिखरावर असलेल्या
ध्वजस्तंभाप्रमाणे, टेकडीवर लावलेल्या पताक्याप्रमाणे सोडून दिले जात
नाही तोपर्यंत एका व्यक्तीच्या धमकीने एक हजार लोक पळून जातील;
पाच जणांच्या धमकीने तुम्ही सर्वजण पळून जाल." 18 तरीसुद्धा याहवेह
तुमच्यावर कृपा करण्यास आतुरलेले असतात; त्यामुळे तुमच्यावर
दया दाखविण्यास ते उभारतील. कारण याहवेह हे न्यायी परमेश्वर
आहेत. धन्य आहेत ते सर्व जे त्यांची वाट पाहतात! 19 यरुशलेममध्ये
राहणाऱ्या सीयोनच्या लोकांनो, तुम्ही यापुढे रडणार नाही. जेव्हा तुम्ही
मदतीसाठी हाक माराल, तेव्हा ते किती दयाळू असतील! तुमची हाक
ऐकताच ते तुम्हाला उत्तर देतील. 20 जरी प्रभू तुम्हाला आपत्तीची
भाकर आणि वेदनेचे पाणी देत असले, तरी तुमचे शिक्षक यापुढे लपून
राहणार नाहीत; तुम्ही त्यांना स्वतःच्या डोळ्यांनी पाहाल. 21 तुम्ही जरी
उजवीकडे किंवा डावीकडे वळलात तरी तुमच्यामागे तुमच्या कानांवर
एक आवाज पडेल, "हाच मार्ग आहे; त्यावर चाल." 22 मग तुम्ही
तुमच्या चांदीने मढविलेल्या मूर्ती आणि सोन्याने आच्छादित असलेल्या
तुमच्या प्रतिमांची विटंबना कराल. तुम्ही त्यांना मासिक पाळीच्या
कपड्याप्रमाणे फेकून द्याल आणि त्यांना असे म्हणाल, "आमच्यापासून
दूर व्हा!" 23 तुम्ही जमिनीत जे बीज पेरता, त्यासाठी ते तुमच्याकडे
पाऊससुद्धा पाठवतील आणि त्या जमिनीतून येणारे धान्य पौष्टिक आणि
विपुल असेल. त्या दिवशी तुमची गुरे विस्तीर्ण कुरणांमध्ये चरतील.
24 शेतात मशागतीचे काम करणारे बैल आणि गाढवे हे काटे आणि
फावड्याने उफणलेला चारा आणि उकडलेले बटाटे खातील. 25 त्या
मोठ्या कत्तलीच्या दिवशी, जेव्हा बुरूज पडतील, तेव्हा प्रत्येक उंच
डोंगरावर आणि प्रत्येक उंच पर्वतावर पाण्याचे प्रवाह वाहतील. 26 जेव्हा
याहवेह त्यांच्या लोकांच्या जखमांना बांधतील आणि त्यांनी दिलेल्या
जखमा बरे करतील, तेव्हा चंद्र सूर्यासारखा चमकेल आणि सूर्यप्रकाश
सात पटीने तेजस्वी होईल, सात पूर्ण दिवसांच्या प्रकाशासारखा तो
असेल. 27 पहा, धगधगत्या क्रोधाने आणि धुराच्या दाट ढगांबरोबर,
याहवेहचे नाव फार लांबून येत आहे; त्यांचे ओठ क्रोधाने भरलेले
आहेत, आणि त्यांची जीभ भस्म करणारा अग्नी आहे. 28 त्यांचा श्वास
जलदगतीने येणाऱ्या पाण्याच्या लोंढ्यासारखा आहे, तो गळ्यापर्यंत वर
येतो. ते नाशाच्या चाळणीने राष्ट्रांना हादरवितात; ते लोकांच्या जबड्यात
लगामाचा भाग ठेवतात जो त्यांना चुकीच्या मार्गाने घेऊन जातो. 29
आणि तुम्ही जसे रात्रीच्या वेळेस पवित्र सण साजरा करता त्याप्रमाणे
तुम्ही गाणी गाल; जेव्हा लोक बासरी वाजवित याहवेहच्या पर्वताकडे
वर इस्राएलच्या खडकाकडे जातात, तेव्हा तुमची अंतःकरणे आनंदित
होतील. 30 याहवेह त्यांची उदात्त वाणी लोकांना ऐकवतील आणि घोर
संतापाने आणि भस्मसात करणाऱ्या अग्नीने, ढगफुटी, वादळ आणि
गारा यांच्याबरोबर त्यांची भुजा खाली येत असताना लोक पहातील. 31
याहवेहचा आवाज अश्शूरला हादरून टाकेल; ते त्यांच्या काठीने त्यांना
तडाखा देतील. 32 याहवेह त्यांच्याकडील शिक्षेच्या दांड्याने त्यांच्यावर
दिलेला प्रत्येक प्रहार डफ आणि वीणा यांच्या संगीतावर असेल, जसे ते
त्यांच्या हाताच्या तडाख्याने युद्धामध्ये त्यांच्याशी लढतात. 33 तोफेथ
फार पूर्वीपासून तयार झालेला आहे; ते राजासाठी तयार केलेले आहे.
त्याचे अग्निकुंड खोल आणि रुंद केले आहे, त्यामध्ये भरपूर अग्नी
आणि लाकूड आहे; जळत्या गंधकाच्या प्रवाहासारखा, याहवेहचा श्वास
ते पेटवितो.

**31** जे इजिप्तकडे मदतीसाठी जातात, जे घोड्यांवर अवलंबून
असतात, त्यांचा धिक्कार असो, जे त्यांच्याकडील पुष्कळ
रथांच्या संख्येवर आणि घोडेस्वारांच्या मोठ्या सामर्थ्यावर विश्वास
ठेवतात, परंतु इस्राएलचे जे पवित्र परमेश्वराकडे पाहात नाहीत, किंवा
याहवेहकडून मदत घेत नाहीत. 2 तरीसुद्धा ते सुज्ञ आहेत आणि संकट
आणू शकतात. ते त्यांचे शब्द मागे घेत नाहीत. जे दुष्टांना मदत करतात
त्यांच्याविरुद्ध ते त्या दुष्ट राष्ट्राविरुद्ध उठाव करतील, 3 परंतु इजिप्तचे
लोक केवळ नश्वर आहेत आणि ते परमेश्वर नाहीत; त्यांचे घोडे मांसाचे
आहेत आणि आत्म्याचे नाहीत. जेव्हा याहवेह त्यांचा हात पुढे करतात
तेव्हा जे मदत करणारे ते अडखळतील, ज्यांना मदत मिळाली आहे ते
पडतील. सर्वजण एकत्र नाश पावतील. 4 याहवेह मला असे म्हणतात:
"जसा सिंह गुरगुरतो, एक मोठा सिंह त्याच्या भक्ष्यावर— आणि त्याला
विरोध करण्यासाठी जरी मेंढपाळांची संपूर्ण टोळी एकत्र बोलावली
जाते, तरी तो त्यांच्या ओरडण्याने घाबरत नाही किंवा त्यांच्या मोठ्या
गोंधळयाच्या आवाजाने अस्वस्थ होत नाही, म्हणून सर्वसमर्थ याहवेह
सीयोन पर्वतावर आणि त्याच्या उंचीवर युद्ध करण्यासाठी खाली येतील.
5 ज्याप्रमाणे पक्षी डोक्यावर घिरट्या घालतात, त्याप्रमाणे सर्वसमर्थ
याहवेह यरुशलेमची ढाल होतील; ते तिला संरक्षण देऊन सोडवतील,
ते त्यांना ओलांडून जातील आणि त्याला सोडवतील आणि त्याचा
बचाव करतील." 6 अहो तुम्ही इस्राएली लोकांनो, ज्यांच्याविरुद्ध तुम्ही
फार मोठेपणाने बंड केले आहे त्याच्याकडे परत या. 7 कारण त्या
दिवशी तुमच्यामधील प्रत्येकजण तुमच्या पापी हातांनी सोन्या-चांदीच्या
ज्या मूर्ती तयार केल्या आहेत, त्यांना नाकारतील. 8 "अश्शूर मानवी
तलवारीने पडणार नाही; एक तलवार, जी मर्त्य मानवांची नाही, ती
त्यांना गिळून टाकेल. तलवार पाहून ते पळून जातील आणि त्यांच्या
तरुणांना जबरदस्तीने मजुरीच्या कामाला ठेवले जाईल. 9 दहशतीमुळे
त्यांचा किल्ला पडून जाईल; युद्धाच्या ध्वजाचे दृश्य पाहून त्यांचे सेनापती
भयभीत होतील," ज्या याहवेहचा अग्नी सीयोनमध्ये आहे, ज्यांची भट्टी
यरुशलेममध्ये आहे, ते अशी घोषणा करतात.

**32** पाहा, एक राजा धार्मिकतेने राज्य करेल आणि राज्यकर्ते न्यायाने
सत्ता चालवितील. 2 प्रत्येकजण वाऱ्यापासून आश्रयस्थान
आणि वादळापासून आश्रयस्थान, वाळवंटामध्ये असलेल्या पाण्याच्या
प्रवाहासारखा आणि तहानलेल्या भूमीमध्ये मोठ्या खडकाच्या
सावलीसारखा असेल. 3 तेव्हा पाहणाऱ्यांचे डोळे बंद राहणार नाहीत,

आणि ज्यांच्या कानांना ऐकू येते ते ऐकतील. 4 भीती बाळगणाऱ्या
अंत:करणाला माहीत होईल आणि ते समजून घेतील आणि अडखळणारी
जीभ अस्खलित आणि स्पष्ट अशी होईल. 5 यापुढे मूर्खांना चांगले
व बदमाशांना थोर म्हटले जाणार नाही. 6 मूर्ख लोक मूर्खपणाच्या
गोष्टी करतात, त्यांचे अंत:करण वाईट कृत्य करण्यावरच केंद्रित
असते: ते देवहीनतेची कृत्ये करतात आणि याहवेहविरुद्ध चुकीच्या
गोष्टी पसरवितात; भुकेल्यांना ते उपाशी सोडतात आणि व तान्हेल्या
जिवांना पाण्यापासून वंचित ठेवतात. 7 बदमाश माणसे दुष्ट पद्धतीचा
वापर करतात, गरजवंताची याचना वाजवी असली तरी, ते दुष्टाईच्या
योजना बनवितात, ते लबाडीने गरिबांचा नाश करतात. 8 परंतु कुलीन
मनुष्य कुलीनतेच्या योजना बनवितो आणि कुलीनतेच्या कार्यावर स्थिर
राहतो. 9 आळसात लोळत पडणाऱ्या स्त्रियांनो, उठा व माझे ऐका;
हे निश्चिंत असणाऱ्या कन्यांनो, मी काय सांगतो याकडे लक्ष द्या! 10
एका वर्षाहून अधिक कालावधीत तुम्हाला जे सुरक्षित वाटते ते थरथर
कापतील; कारण द्राक्षाचा उपज बुडेल, आणि फळांचा हंगाम येणार
नाही. 11 आत्मसंतुष्ट स्त्रियांनो, थरथर कापा; निश्चिंत असलेल्या
कन्यांनो, तुमचा थरकाप होऊ द्या! आपली सुंदर वस्त्रे काढून शोक
करण्यासाठी गोणपाट गुंडाळा. 12 तुमचे ऊर बडवा, प्रसन्न करणाऱ्या
तुमच्या शेतांसाठी, फलवंत द्राक्षवेलीसाठी 13 आणि माझ्या लोकांच्या
भूमीसाठीही कारण शेतात सर्वत्र काटेकुसळे व झुडपे वाढतील— होय,
आनंदोत्सव करणाऱ्या तुमच्या घरांसाठी, व चैनबाजी करणाऱ्या या
शहरांसाठी विलाप करा. 14 गडाचा त्याग करण्यात येईल, गजबजलेली
शहरे रिकामी होतील; किल्ले व टेहळणी बुरूज कायमची पडीक स्थाने
होतील, जिथे रानगाढवांचे व शेरडेमेंढरांचे कळप आनंदात चरतील, 15
परंतु जेव्हा उच्च स्थानावरून परमेश्वराचा आत्मा आपल्यावर ओतल्या
जाईल, ओसाड भूमी सुपीक होईल, आणि सुपीक भूमी अरण्यासारखी
वाटू लागेल. 16 याहवेहचा न्याय वाळवंटातही वास्तव्य करेल, व त्यांची
नीतिमत्ता सुपीक भूमीत नांदेल. 17 शांती नीतिमत्तेचे फळ असेल;
नीतिमत्तेचे कार्य तर सार्वकालिक शांतता आणि धैर्य आहे. 18 माझ्या
लोकांची घरे शांतीने भरलेली आणि सुरक्षित असतील, त्यांची शांतिभंग
न होता ते विश्रांती घेतील. 19 जरी गारांनी अरण्याचा नाश होईल आणि
सर्व शहरे जमीनदोस्त होतील. 20 तरी तुम्ही किती आशीर्वादित व्हाल,
प्रत्येक झऱ्याजवळ तुमचे बीज पेराल, आणि तुमची गुरे आणि गाढवे
मुक्तपणे चरतील.

**33** हे विनाशका, तुझा धिक्कार असो, तू, ज्याचा नाश करण्यात
आला नाही! हे विश्वासघातक्यांनो, तुमचा धिक्कार असो, तुम्ही,
ज्यांचा विश्वासघात करण्यात आला नाही! जेव्हा तुम्ही नाश करणे
थांबवाल, तेव्हा तुमचा नाश होईल; जेव्हा तुम्ही विश्वासघात करणे
थांबवाल, तेव्हा तुमचा विश्वासघात केला जाईल. 2 हे याहवेह, आम्हावर
कृपा करा; आम्ही तुमची आस धरलेली आहे. रोज सकाळी तुम्ही
आमचे सामर्थ्य व्हा, संकटाच्या वेळी आमचे तारण व्हा. 3 तुमच्या
सैन्याच्या रणगर्जनेने लोक पलायन करतात. जेव्हा तुम्ही युद्धासाठी
सज्ज होता, तेव्हा राष्ट्रांची पांगापांग होते. 4 अहो राष्ट्रांनो, तरुण टोळांनी
तुम्ही केलेल्या लुटीची कापणी केली आहे. टोळांच्या थव्याप्रमाणे
लोक त्यावर झडप घालतात. 5 याहवेहना उच्च केले आहे, कारण ते
उच्चस्थानी राहतात; सीयोनला ते त्यांच्या न्यायाने आणि धार्मिकतेने
भरून टाकतील. 6 तुमच्या वेळेसाठी ते निश्चित पाया असे असतील,
तारण, शहाणपण आणि सुज्ञान यांचे ते विपुल भांडार असतील;
याहवेहचे भय हेच या खजिन्याची चावी आहे. 7 पाहा, त्यांचे शूर लोक
रस्त्यावर मोठ्याने आक्रोश करत आहेत. शांतीचे दूत मोठ्या दु:खाने
रडत आहेत. 8 नगरातील महामार्ग निर्जन झाले आहेत, रस्त्यावर कोणी
प्रवासी नाहीत. करार मोडला आहे, त्याचे साक्षीदार तुच्छ झाले आहेत,
कोणाचाही आदर केल्या जात नाही. 9 भूमी शुष्क होत आहे आणि
ओसाड झाली आहे, लबानोन शरमिंदा झाला आहे आणि कोमेजला
आहे; शारोनची कुरणे अरबी वाळवंटसारखी झाली आहेत, आणि
बाशान व कर्मेल त्यांची पाने गळून पडत आहेत. 10 याहवेह म्हणतात,
"मी आता उठेन, मी आता उच्च केल्या जाईन; आता मला उंच केले
जाईल. 11 तुम्ही भुशाची गर्भधारणा करता, तुम्ही पेंढीला जन्म देता;
तुमचा श्वास हा अग्नी आहे, जो तुम्हाला भस्म करतो. 12 लोक जळून
राख होतील; कापलेल्या काटेरी झुडूपांप्रमाणे ते जाळले जातील." 13
तुम्ही जे फार दूर आहात, मी काय केले आहे ते ऐका. तुम्ही जे जवळ
आहात ते, माझे सामर्थ्य मान्य करा! 14 सीयोनमध्ये असलेले पापी जन
घाबरले आहेत; देवहीन लोक थरथर कापत आहेत: "भस्म करणाऱ्या
अग्नीमध्ये आमच्यामधील कोण राहू शकेल? सार्वकालिक अग्नीत
आमच्यामधील कोण जळत राहू शकेल काय?" 15 जे नीतीने चालतात
आणि जे योग्य तेच बोलतात, जे पिळवणूक करून मिळविलेला लाभ
नाकारतात आणि लाच घेण्यापासून त्यांचे हात लांब ठेवतात, खुनाच्या
कारस्थानाबाबत जे त्यांचे कान बंद ठेवतात दुष्टतेचा बेत करण्याबाबत
त्यांचे डोळे बंद करतात— 16 ज्यांचा आश्रय पर्वतावरील गड असेल,
तेच उच्चस्थानी वास करतील. त्यांच्या भाकरीचा पुरवठा केला जाईल,
आणि त्यांना पाण्याची कमतरता पडणार नाही. 17 तुमची दृष्टी राजाला
त्यांच्या सौंदर्यात पाहतील आणि फार दूरवर पसरत असलेला देश
पाहतील. 18 तुम्ही यापूर्वीच्या दहशत बसविणाऱ्या गोष्टींचा नीट विचार
कराल: "तो मुख्याधिकारी कुठे आहे? ज्याने महसूल कर घेतला, तो
कुठे आहे? उंच बुरुजावरील प्रमुख अधिकारी कुठे आहे?" 19 ज्यांचे
बोलणे अस्पष्ट आहे, ज्यांची भाषा अनोळखी आणि न समजण्यासारखी
आहे, असे उर्मट लोक तुम्हाला इथूनपुढे दिसणार नाहीत. 20 आमच्या
सणांचे शहर, सीयोनाकडे पहा; तुमची दृष्टी यरुशलेम पाहतील, शांत
असलेले निवासस्थान, हालविल्या न जाणारा तंबू; त्याच्या खुंट्या
कधीही उपटल्या जाणार नाहीत, किंवा त्याच्या कोणत्याही दोऱ्या
तोडल्या जाणार नाहीत. 21 आमचे प्रतापी याहवेह तिथे असतील.
विस्तीर्ण नद्या आणि प्रवाह असलेले ते ठिकाण असेल. कोणत्याही
लहान जहाजाचे वल्हे त्यांच्यावर स्वार होणार नाही, कोणतेही प्रचंड
जहाज त्यांच्यावरून जाणार नाही. 22 कारण याहवेह आमचे न्यायाधीश

आहेत, याहवेह आम्हाला कायदा प्रदान करणारे आहेत, याहवेह आमचे
राजा आहेत; तेच आम्हाला वाचविणार आहेत. 23 तुमच्या जहाजांना
आधार देण्याऱ्या दोऱ्या सैल सोडलेल्या आहेत: जहाजाची शीडकाठी
सुरक्षित धरलेली नाही, जहाजाचे शीड पसरलेले नाही. तेव्हा लूट
केलेल्या विपुल मालाची वाटणी केली जाईल आणि लंगडेसुद्धा लूट
घेऊन जातील. 24 सीयोनमध्ये राहणारा कोणीही असे म्हणणार नाही,
“मी आजारी आहे;” आणि तिथे जे राहणारे आहेत, त्यांच्या पापांची
क्षमा केली जाईल.

**34** अहो तुम्ही सर्व राष्ट्रांनो, जवळ या आणि ऐका; लोकांनो! तुम्ही
इकडे लक्ष द्या! पृथ्वी आणि तिच्यामध्ये असणाऱ्या सर्वांना हे ऐकू
द्या, जग आणि त्यापासून निर्माण होणाऱ्या सर्वांना ऐकू द्या! 2 याहवेह सर्व
राष्ट्रांवर रागावले आहेत; त्यांचा क्रोध सर्व सैन्यांवर आला आहे. ते त्यांचा
संपूर्णपणे नाश करतील, ते त्यांना वध करणाऱ्यांकडे सोपवून देतील. 3
त्यांच्या वधलेल्यांना बाहेर फेकून देण्यात येईल, त्यांच्या मृतदेहांना
दुर्गंधी येईल; पर्वत त्यांच्या रक्ताने भिजून जातील. 4 आकाशातील
सर्व तारे विरघळून जातील आणि आकाशे चर्मपत्राच्या गुंडाळीसारखे
गुंडाळले जातील; द्राक्षवेलावरील कोमेजलेल्या पानांप्रमाणे, अंजिराच्या
झाडावरील सुकून गेलेल्या अंजिरांप्रमाणे सर्व तारांगण गळून पडतील.
5 माझी तलवार आकाशांमध्ये पिऊन तृप्त झाली आहे. पाहा, एदोमावर
न्यायनिवाडा करण्यासाठी ती उतरत आहे, त्या लोकांचा मी संपूर्णपणे
नाश केला आहे. 6 याहवेहच्या तलवारीने रक्तात आंघोळ केली आहे,
ती चरबीने झाकलेली आहे— कोकरे आणि शेळयांचे रक्त, मेंढ्यांच्या
मूत्रपिंडाच्या चरबीने ती झाकली आहे. कारण याहवेहसाठी बस्रा
येथे अर्पणे आणि एदोम देशात मोठे यज्ञबली केले आहेत. 7 आणि
त्यांच्याबरोबर रानबैल आणि गोऱ्हे व मोठे बैल यज्ञात पडतील. त्यांची
भूमी रक्ताने चिंब भिजून जाईल, आणि धूळ चरबीमध्ये पूर्ण भिजली
जाईल. 8 कारण याहवेहकडे सूड घेण्याचा एक दिवस आहे, सीयोनला
पाठिंबा देण्यासाठी शिक्षा देणारे वर्ष. 9 एदोम येथील प्रवाह मैदानासारखे
होतील, तिची धूळ जळत्या गंधकात बदलली जाईल. तिची भूमी
धगधगते मैदान होईल! 10 रात्री किंवा दिवसा ते विझविले जाणार नाही.
त्याचा धूर कायमचा उठत राहील. पिढ्यान् पिढ्या ते ओसाड पडून
राहील. यामधून पुन्हा कोणीही प्रवास करणार नाही. 11 ससाणे आणि
साळू त्याचा ताबा घेतील; मोठी घुबडे आणि डोमकावळे तिथे घरटी
बांधतील. कारण परमेश्वराने एदोमच्या भूमीवर मापनदोरी ताणली आहे
आणि नाशाचा ओळंबा लावला आहे. 12 तिच्या उच्चकुलीन लोकांना
त्या ठिकाणी राज्य असे काहीही राहणार नाही, तिचे सर्व राजपुत्र
नाहीसे होतील. 13 काट्यांनी तिचे किल्ले व्यापून टाकले जातील,
जंगली झाडे आणि रानटी काटेरी झुडूपे तिचे गड ग्रासून टाकतील.
कोल्ह्यांना संचार करण्याची ती जागा होईल, घुबडांचे घर होईल. 14
वाळवंटातील श्वापद तरसांना भेटतील, आणि रानबोकडे एकमेकांना
साद घालतील; तिथे निशाचरही झोपतील आणि त्यांना विश्रांतीच्या
जागा मिळतील. 15 तिथे घुबड घरटे बांधून अंडी घालेल, ती तिच्या
पंखाच्या सावलीत त्यांना उबवेल आणि पिलांची काळजी घेईल; तिथे
प्रत्येक बाज पक्षीही आपल्या जोडीदारासह जमतील. 16 याहवेहच्या
चर्मपत्राच्या गुंडाळीत पाहा आणि वाचा: यामधील कोणाचाही अभाव
होणार नाही, एकालाही जोडीदाराची कमतरता पडणार नाही. कारण ही
त्यांच्याच मुखाने दिलेली आज्ञा आहे, आणि त्यांचा आत्मा त्यांना एकत्र
करेल. 17 ते त्यांच्या भागांचे वाटप करतात; त्यांच्या हाताने त्यांना
मोजून वाटतात. तो भाग सर्वकाळासाठी त्यांच्याकडे राहील आणि ते
पिढ्यान् पिढ्या तिथे निवास करतील.

**35** वाळवंट आणि शुष्क भूमी आनंदित होईल; अरण्य हर्षोल्हास
करेल आणि बहरून येईल. केशराच्या फुलाप्रमाणे, 2 त्याच्या
फुलोऱ्याचा स्फोट होईल; तो मोठा आनंद करेल आणि उल्हासाने
ओरडेल. लबानोनचे गौरव, कर्मेल आणि शारोन यांचे वैभव त्याला दिले
जाईल; ते याहवेहचे गौरव, आमच्या परमेश्वराची भव्यता पाहतील. 3
अशक्त हात बळकट करा, निर्बल झालेले गुडघे स्थिर करा; 4 भयभीत
अंतःकरणाच्या लोकांना सांगा, “बलवान व्हा, घाबरू नका; तुमचे
परमेश्वर येतील, ते सूड घेण्यास येतील. दैवी प्रतिफळ देऊन तुम्हाला
वाचवण्यासाठी येतील.” 5 तेव्हा आंधळयांचे डोळे उघडतील आणि
बहिऱ्यांचे कान उघडले जातील. 6 तेव्हा पांगळे हरिणाप्रमाणे उड्या
मारतील, आणि मुकी जीभ आनंदाने ओरडेल. अरण्यामध्ये पाणी आणि
वाळवंटात झरे उफाळून वर येतील. 7 तप्त झालेली वाळू एक जलाशय
होईल, आणि तहानलेल्या जमिनीवर उफाळणारे झरे येतील. जिथे कधी
कोल्हे निजले, त्या जागी बोरू व लव्हाळे यासहित गवत उगवेल. 8
आणि तिथे एक महामार्ग असेल; त्याला पवित्रतेचा मार्ग म्हटले जाईल;
तो त्यांच्यासाठी असेल जे त्या पवित्र मार्गावरून चालतात. अशुद्ध
असलेले त्यावरून प्रवास करणार नाहीत. दुष्ट मूर्ख लोक त्यावरून
चालणार नाहीत. 9 तिथे कोणताही सिंह नसेल, किंवा कोणताही
वखवखलेला हिंस्र पशू नसेल. ते तिथे सापडणार नाहीत. फक्त तारण
झालेलेच तिथे चालतील, 10 आणि ज्यांना याहवेहने सोडविले, ते लोक
परत येतील. ते हर्षगीते गात सीयोनात प्रवेश करतील; अनंतकाळचा
उल्हास त्यांच्या मस्तकावर असेल. हर्ष व उल्हासाने ते भरून जातील,
दुःख व शोक दूर पळून जातील.

**36** हिज्कीयाह राजाच्या कारकिर्दीच्या चौदाव्या वर्षी, अश्शूरचा
राजा सन्हेरीबने यहूदीयाच्या सर्व तटबंदीच्या शहरांवर आक्रमण
केले आणि ती ताब्यात घेतली 2 अश्शूरच्या राजाने आपल्या मोठ्या
सैन्यासह सरसेनापतीला लाखीशहून हिज्कीयाह राजाकडे यरुशलेमला
पाठविले. जेव्हा सेनापती वरच्या हौदाच्या पाटाजवळ रस्त्याच्या कडेला
थांबला 3 तेव्हा हिल्कियाहचा पुत्र एल्याकीम त्याच्या राजवाड्याचा
कारभारी, चिटणीस शेबना व इतिहासलेखक योवाह जो आसाफाचा पुत्र,
त्यांच्याकडे गेले. 4 तेव्हा सेनाप्रमुख त्यांना म्हणाला, “हिज्कीयाहला
सांगा: “‘महान राजा, अश्शूरचा राजा असे म्हणतो: तुझा हा भरवसा तू
कशावर ठेवला आहेस? 5 तू म्हणतोस की तुझ्याजवळ युद्ध करण्याची
युक्ती आणि सामर्थ्य आहे—परंतु तुम्ही फक्त पोकळ शब्द बोलता.

तू कोणावर अवलंबून आहेस की तू माझ्याविरुद्ध बंड करतोस? 6
पाहा, मला माहीत आहे की तू इजिप्तवर अवलंबून आहेस. पाहा,
जी एक तुटलेली वेळूची काठी आहे, जो कोणी त्यावर टिकेल ती
त्याच्या हाताला टोचणार! इजिप्तचा राजा फारोह, त्याच्यावर भरवसा
ठेवणाऱ्या सर्वांसाठी असेच असल्याचे सिद्ध होते. 7 पण जर तुम्ही मला
म्हणाल, "आम्ही याहवेह आमच्या परमेश्वरावर अवलंबून आहोत."
तर हिज्कीयाहने ज्याची उच्च स्थाने आणि वेद्या काढून घेतल्या आणि
यहूदाह आणि यरुशलेमला सांगितले, "तुम्ही याच वेदीवर उपासना
करा, तो तोच नाही काय?" 8 "'तेव्हा आता या आणि आमचा
स्वामी, अश्शूरच्या राजाशी करार करा: मी तुला दोन हजार घोडे देईन,
जर तुमच्याकडे त्यांच्यासाठी तेवढे घोडेस्वार असतील तर! 9 रथ
आणि घोडेस्वारांसाठी तुम्ही इजिप्तवर अवलंबून असताना माझ्या
स्वामीच्या सर्वात कनिष्ठ अधिकाऱ्यांपैकी एका अधिकाऱ्याचा तुम्ही
कसा पराभव करणार? 10 शिवाय, मी याहवेहशिवाय या भूमीवर
हल्ला करण्यासाठी आणि नाश करण्यासाठी आलो आहे काय?
याहवेहने स्वतःच मला या देशाविरुद्ध चाल करून येण्यास आणि त्याचा
नाश करण्यास सांगितले आहे.'" 11 तेव्हा एल्याकीम, शेबना आणि
योवाह सेनापतीला म्हणाले, "कृपया तुमच्या सेवकांशी अरामी भाषेत
बोला, कारण आम्हाला ती समजते. भिंतीवर असलेले लोक ऐकत
असताना आमच्याबरोबर यहूदीयाच्या हिब्रू भाषेत बोलू नका." 12 परंतु
सेनापतीने उत्तर दिले, "माझ्या धन्याने मला या गोष्टी सांगायला पाठवले
होते, ते काय फक्त तुझ्या धन्याला आणि तुला सांगण्यासाठी आणि
भिंतीवर बसलेल्या लोकांसाठी नाही काय; ज्यांना तुझ्यासारखेच त्यांची
स्वतःचीच विष्ठा खावी लागेल आणि स्वतःचेच मूत्र प्यावे लागेल?" 13
मग सेनाप्रमुख उभा राहिला आणि यहूदीयाच्या हिब्रू भाषेत मोठ्याने
ओरडून म्हणाला, "महान राजा, अश्शूरचे महाराज यांचे ऐका! 14
महाराज असे म्हणतात: हिज्कीयाहास तुम्हाला फसवू देऊ नका. मूर्ख
बनवू देऊ नका. तो तुम्हाला माझ्या हातून सोडवू शकणार नाही. 15
हिज्कीयाहाला तुम्हाला याहवेहवर भरवसा ठेवण्यास प्रवृत्त करू देऊ
नका, जेव्हा तो म्हणेल, 'याहवेह आपल्याला नक्कीच सोडवितील; हे
शहर अश्शूरच्या राजाच्या ताब्यात जाणार नाही.' 16 "हिज्कीयाहचे ऐकू
नका. अश्शूरचे महराज असे म्हणतात: माझ्यासोबत शांतता प्रस्थापित
करा आणि माझ्याकडे या. मग तुम्ही आपल्या प्रत्येक द्राक्षवेलीचे
आणि अंजिराचे फळ खाल आणि आपल्या विहिरीचे पाणी प्याल,
17 जोपर्यंत मी येऊन तुम्हाला तुमच्या देशासारख्या देशात; म्हणजेच
धान्य आणि नवीन द्राक्षारसाचा देश, भाकरी आणि द्राक्षमळ्यांच्या
देशात घेऊन जाईपर्यंत. 18 "हिज्कीयाहला तुमची दिशाभूल करू देऊ
नका जेव्हा म्हणतो की, 'याहवेह आम्हाला सोडवतील.' कोणत्याही
राष्ट्रांच्या दैवतांनी कधीही अश्शूरच्या राजाच्या हातून आपल्या राष्ट्रांची
सुटका केली आहे काय? 19 हमाथ आणि अर्पादची दैवते कुठे आहेत?
सफरवाईमची दैवते कुठे आहेत? त्यांनी शोमरोनला माझ्या हातून
सोडविले आहे काय? 20 या देशातील सर्व दैवतांपैकी कोण त्यांच्या
देशांना माझ्यापासून वाचवू शकले? तर मग याहवेह माझ्या हातातून
यरुशलेमची सुटका कशी करू शकतील?" 21 परंतु लोक गप्प राहिले
आणि उत्तर देण्यासाठी काहीच बोलले नाहीत, कारण राजाने आज्ञा
केली होती, "त्याला उत्तर देऊ नका." 22 यानंतर हिल्कियाहचा पुत्र,
राजवाड्याचा कारभारी एल्याकीम, चिटणीस शेबना आणि आसाफाचा
पुत्र इतिहासलेखक योवाह यांनी आपली वस्त्रे फाडली व हिज्कीयाहकडे
जाऊन सेनाप्रमुखाने जे काही सांगितले होते ते त्याला सांगितले.

**37** जेव्हा हिज्कीयाह राजाने हे ऐकले, तेव्हा त्याने आपली वस्त्रे
फाडली आणि तो गोणपाट नेसून याहवेहच्या मंदिरात गेला. 2
त्याने राजवाड्याचा कारभारी एल्याकीम, चिटणीस शेबना आणि वडील
याजक यांना गोणपाट नेसून आमोजाचा पुत्र यशायाह संदेष्ट्याकडे
पाठविले. 3 ते त्याला म्हणाले, "हिज्कीयाह असे म्हणतो: आजचा
दिवस क्लेश, शिक्षा व अपमानाचा दिवस आहे, कारण लेकरे होण्याची
वेळ आली परंतु ते प्रसवण्याची शक्ती नाही. 4 कदाचित याहवेह तुमचे
परमेश्वर सेनाप्रमुखाचे शब्द ऐकतील, त्याचा स्वामी अश्शूरच्या राजाने
आपल्या जिवंत परमेश्वराची निंदा करण्यास पाठविले आहे आणि हे शब्द
ऐकून याहवेह तुमचे परमेश्वर त्याचा निषेध करतील. म्हणून जे थोडके
उरलेले आहेत त्यांच्यासाठी प्रार्थना करा." 5 जेव्हा हिज्कीयाह राजाचे
अधिकारी यशायाहकडे आले, 6 यशायाह त्यांना म्हणाला, "तुमच्या
धन्याला सांगा, 'याहवेह असे म्हणतात: तुम्ही जे ऐकले आहे त्यामुळे
घाबरून जाऊ नका—त्या शब्दांनी अश्शूरच्या राजाच्या सेवकांनी माझी
निंदा केली आहे. 7 ऐका! जेव्हा तो एक ठराविक अहवाल ऐकेल, तेव्हा
मी त्याला त्याच्या स्वतःच्या देशात परत जाण्याची इच्छा व्हावी असे
करेन आणि तिथे तो तलवारीने वधला जाईल असे मी करेन.'" 8 जेव्हा
सेनाप्रमुखाने ऐकले की अश्शूरच्या राजाने लाखीश सोडले आहे, तेव्हा
त्याने आपला तळ उठविला आणि राजा लिब्नाह येथे युद्ध करताना
त्याला आढळला. 9 आता सन्हेरीबला बातमी मिळाली की कूशाचा
राजा तिऱ्हाकाह त्याच्याशी युद्ध करण्यास निघाला आहे. जेव्हा त्याने
हे ऐकले तेव्हा त्याने पुन्हा हिज्कीयाहकडे असे सांगत दूत पाठवले:
10 "यहूदीयाचा राजा हिज्कीयाहला हे सांगा: 'अश्शूरच्या राजाच्या
हाती यरुशलेम दिले जाणार नाही' असे म्हणत असताना तुम्ही ज्या
देवावर अवलंबून आहात त्याला तुमची फसवणूक करू देऊ नका.
11 अश्शूरच्या राजाने सर्व राष्ट्रांचा नाश कसा केला, हे तुम्ही ऐकलेच
आहे. मग तुमची सुटका होईल काय? 12 माझ्या पूर्वीच्या राजांनी
ज्या राष्ट्रांचा; म्हणजे गोजान, हारान, रेसफ तलास्सारतील एदेन यांचा
नाश केला, त्यांना त्यांच्या दैवतांनी वाचविले होते काय? 13 हमाथ
नगरीचा राजा किंवा अर्पादचा राजा हे कुठे आहेत? सफरवाईम, हेना व
इव्वाह यांचे राजे कुठे आहेत?" 14 हिज्कीयाहला दूताद्वारे पत्र मिळाले
आणि त्याने ते वाचले. त्यानंतर त्याने जाऊन याहवेहच्या मंदिरात
याहवेहसमोर ते उघडून ठेवले. 15 आणि हिज्कीयाहने याहवेहला प्रार्थना
केली: 16 "अहो सर्वसमर्थ याहवेह इस्राएलांचे परमेश्वरा, करुबांच्या
सिंहासनावर आरूढ असलेल्या परमेश्वरा, पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांचे तुम्ही

एकमेव परमेश्वर आहात. स्वर्ग व पृथ्वी तुम्हीच उत्पन्न केली आहे. 17 हे
याहवेह, आपले कान लावा आणि ऐका; याहवेह, आपले डोळे उघडा
आणि पाहा; आणि जिवंत परमेश्वराचा उपहास करण्यास पाठविलेले
सन्हेरीबचे सर्व शब्द ऐका. 18 “हे याहवेह, हे खरे आहे की अश्शूरच्या
राजांनी या सर्व लोकांचा आणि त्यांच्या भूमीचा नाश केला आहे. 19
आणि त्यांनी त्यांची दैवते अग्नीत फेकून दिली आहेत, कारण त्या मूर्ती
परमेश्वर नव्हत्या. ते तर मनुष्याने घडविलेले लाकूड आणि दगड होते.
20 आता हे याहवेह, आमच्या परमेश्वरा, त्याच्या तावडीतून आम्हाला
सोडव, म्हणजे याहवेह केवळ तुम्हीच परमेश्वर आहात, हे पृथ्वीवरील
सर्व राज्यांना कळेल.” 21 मग आमोजाचा पुत्र यशायाह याने हिज्कीयाह
राजाला हा संदेश पाठविला: “इस्राएलचे परमेश्वर याहवेह म्हणतात:
कारण तू अश्शूरचा राजा सन्हेरीब याच्याविषयी माझ्याकडे प्रार्थना
केली, 22 त्याच्याविरुद्ध बोललेले याहवेहचे वचन हे आहे: “सीयोनाची
कुमारी कन्या तुझा उपहास आणि तिरस्कार करते. यरुशलेम कन्या
तुझे पलायन बघून आपले डोके हालविते. 23 तू कोणाचा उपहास व
निंदा केलीस? तू कोणाविरुद्ध उंच आवाजात बोललास, गर्विष्ठपणाने
कोणाकडे नजर उचलून बघितलेस? इस्राएलाच्या पवित्र परमेश्वराविरुद्ध
तू हे केलेस! 24 तुझे दूत पाठवून तू प्रभूची चेष्टा केली. आणि तू
म्हणतोस, ‘मी माझ्या अनेक रथांनी उंचच उंच पर्वतावर चढून गेलो,
लबानोनच्या सर्वात उंच पर्वतावर गेलो. मी तिचे सर्वात उंच देवदारू
तोडले, निवडक गंधसरू तोडले. मी तिच्या दुर्गम उंचीवर पोहोचलो
तिच्या अत्यंत उत्तम जंगलात गेलो. 25 अनेक परकीय देशात मी विहिरी
खणल्या आणि तेथील पाणी प्यालो. माझ्या पावलाच्या तळव्याने मी
मिसरचे सर्व झरे आटवून टाकले.’ 26 “हे तू ऐकले नव्हते काय? याचा
निश्चय मी फार पूर्वीच केलेला होता. या घटना मी प्राचीन काळातच
योजून ठेवल्या होत्या; आता मी त्या अंमलात आणल्या आहेत, जी
तटबंदीची शहरे तू उद्ध्वस्त करून त्यांचा दगडांचा ढिगारा केलास. 27
त्यांच्या लोकांची शक्ती कमी होत गेली, ते निराश व लज्जित झालेले
आहेत. ते शेतातील पिकासारखे, कोवळी पाने आलेल्या रोपासारखे,
छतावर उगविलेल्या गवतासारखे, पूर्ण वाढण्याआधीच उन्हाने करपून
गेलेले होते. 28 “परंतु मी जाणतो तू कुठे आहेस तू कधी जातो व येतो
आणि तू माझ्यावर कसा संतापतोस. 29 कारण तू माझ्यावर संतापतो व
तुझा उन्मत्तपणा माझ्या कानावर आल्यामुळे, मी तुझ्या नाकात वेसण
अडकवेन व तुझ्या तोंडात लगाम घालेन आणि मग तू आलास त्याच
वाटेने तुझ्याच देशात तुला परत नेईन. 30 “हिज्कीयाह, तुझ्यासाठी
चिन्ह असेल: “या वर्षी तुम्ही आपोआप उगविलेले धान्य खाल, तरी
पुढील वर्षी त्यातूनच उगविलेले खाल. परंतु तिसऱ्या वर्षी पेरणी व
कापणी कराल, द्राक्षमळे लावाल व त्याची फळे खाल. 31 पुन्हा एकदा
यहूदीया राज्यातील अवशिष्ट लोक जमिनीत रुजाल आणि फलद्रूप
व्हाल. 32 यरुशलेममधून अवशिष्ट लोक येतील, सीयोन पर्वतातून
वाचलेल्याची टोळी येईल. सर्वसमर्थ याहवेहच्या आवेशाने हे सर्व घडून
येईल. 33 “म्हणून अश्शूरच्या राजाविषयी याहवेह असे म्हणतात: “तो
या शहरात प्रवेश करणार नाही किंवा एखादा बाणही सोडणार नाही. तो
या ठिकाणी ढाल घेऊन येणार नाही किंवा तटबंदीबाहेर मोर्चे बांधणार
नाही. 34 ज्या रस्त्याने तो आला, त्याच रस्त्याने तो परत जाईल; तो
या शहरात प्रवेश करणार नाही,” असे याहवेह घोषित करतात. 35
“माझ्याकरिता आणि माझा सेवक दावीद याच्या स्मरणार्थ, मी या
यरुशलेम नगराचे रक्षण करेन!” 36 त्या रात्री याहवेहच्या दूताने अश्शूर
सैनिकांच्या छावणीत एक लक्ष पंचाऐंशी हजार सैनिक ठार केले. दुसऱ्या
दिवशी सकाळी लोक उठून पाहतात—तो त्यांच्या सर्व बाजूला प्रेते
पसरलेली होती. 37 म्हणून अश्शूरचा राजा सन्हेरीबने छावणी उठविली
व तो माघारी परतला. तो निनवेहला परत गेला व तिथेच राहिला. 38
एके दिवशी, तो निस्रोख या त्याच्या दैवताच्या मंदिरात पूजा करीत
असताना, त्याचे पुत्र अद्राम्मेलेक व शरेसर यांनी तलवारीने त्याचा वध
केला व ते अरारात देशात पळून गेले. नंतर त्याचा वारस, त्याचा पुत्र
एसरहद्दोन राजा झाला.

**38** त्या दिवसांमध्ये हिज्कीयाह राजा आजारी पडला आणि
मरणपंथाला लागला. आमोजाचा पुत्र यशायाह संदेष्टा त्याच्याकडे
गेला आणि म्हणाला, “याहवेह असे म्हणतात: तुझे घर व्यवस्थित
ठेव, कारण तू मरणार आहेस; तू बरा होणार नाहीस.” 2 हे ऐकताच
हिज्कीयाहने आपले तोंड भिंतीकडे वळविले आणि याहवेहकडे प्रार्थना
केली, 3 “हे याहवेह, मी तुमच्यापुढे कसा विश्वासूपणाने आणि पूर्ण
मनोभावे समर्पित होऊन चाललो व नेहमी तुमच्या दृष्टीने योग्य तेच केले,
याचे स्मरण करा.” आणि हिज्कीयाह अतिदुःखाने रडू लागला. 4 तेव्हा
याहवेहचे वचन यशायाहकडे आले: 5 “जा आणि हिज्कीयाहला सांग,
‘तुझे पूर्वज दावीदाचे परमेश्वर, याहवेह असे म्हणतात: मी तुझी प्रार्थना
ऐकली आणि तुझे अश्रू पाहिले आहेत; मी तुझ्या आयुष्यात पंधरा
वर्षांची भर घालेन. 6 आणि मी तुला आणि या शहराला अश्शूरच्या
राजाच्या हातातून सोडवेन. मी या शहराचे रक्षण करेन. 7 “‘याहवेहनी
जे वचन दिले आहे, त्याप्रमाणे ते करतील यासाठी याहवेहनी तुम्हाला हे
चिन्ह दिले आहे: 8 मी सूर्याच्या सावलीला आहाजच्या पायऱ्यांवरून
दहा पावले मागे जाईल असे करेन.’” तेव्हा सूर्यप्रकाश जिथून तो गेला
होता, त्याच्या दहा पावले मागे गेला. 9 यहूदीयाचा राजा हिज्कीयाहने
त्याच्या आजारपणा नंतर आणि बरा झाल्यावर केलेले लिखाण: 10 मी
म्हणाला, “माझ्या जीवनाच्या बहराच्या काळात मला मृत्यूच्या दारातून
जावे लागेल काय आणि माझी उरलेली वर्षे लुटली जावी काय?” (Sheol
h7585) 11 मी म्हणालो, “मी जिवंतांच्या देशात पुन्हा याहवेह यांना
स्वतः पाहणार नाही; येथून पुढे मला माझे सहकारी दिसणार नाहीत,
किंवा जे आता या जगात आहेत त्यांच्याबरोबर मी राहणार नाही. 12
मेंढपाळाच्या तंबूप्रमाणे माझे घर पाडले गेले आणि माझ्याकडून काढून
घेतले गेले. विणकराप्रमाणे मी माझे जीवन गुंडाळून टाकले आहे, आणि
त्यांनी मला विणकऱ्याच्या मागापासून तोडून टाकले आहे; रात्री आणि
दिवसा तुम्ही माझा अंत व्हावा असे केले. 13 मी धीर धरून पहाटेपर्यंत
वाट पाहिली, परंतु सिंहासारखे त्यांनी माझी सर्व हाडे मोडली; रात्री

आणि दिवसा तुम्ही माझा अंत व्हावा असे केले. 14 मी निळवी किंवा
सारसाप्रमाणे चित्कारलो मी शोक करणाऱ्या कबुतरासारखा कण्हत
राहिलो. आकाशाकडे पाहून माझे डोळे दुर्बल झाले. मला धमकाविण्यात
आले आहे; हे प्रभू, मला मदत करण्यासाठी या!” 15 परंतु मी काय बोलू
शकतो? ते माझ्याशी बोलले आहेत आणि त्यांनी स्वःताच हे केले आहे.
कारण माझ्या या तीव्र मनोवेदनेमुळे माझी सर्व वर्षे मी नम्रपणाने चालेन.
16 हे प्रभू, अशा गोष्टी करून लोक जगतात; आणि माझ्या आत्म्याला
त्यांच्यामध्येही जीवन सापडते. तुम्ही माझे आरोग्य पुनः प्रदान केले
आहे आणि मला जीवन दिले आहे. 17 अशा मनोवेदना मी सहन करणे
निश्चितच माझ्या भल्याचे होते. तुमच्या प्रेमाखातर तुम्ही मला नाशाच्या
गर्तेपासून वाचविले; तुम्ही माझी सर्व पापे तुमच्या पाठीमागे टाकली
आहेत. 18 कारण अधोलोक तुमची स्तुती करू शकत नाही, मृत्यू
तुमचे स्तुतिगान करू शकत नाही. जे खाली गर्तेत जातात ते तुमच्या
विश्वासूपणाची आशा करू शकत नाहीत. **(Sheol h7585)** 19 जिवंत, जे
जिवंत आहेत—ते तुमची स्तुती करतात, जसे मी आज करीत आहे;
पालक त्यांच्या मुलांना तुमच्या विश्वासूपणाबद्दल सांगतात. 20 याहवेह
मला वाचवतील, आणि आपण याहवेहच्या मंदिरात आपल्या आयुष्याचे
सर्व दिवस तंतुवाद्याच्या साहाय्याने गाणी गात राहू. 21 यशायाहने म्हटले
होते, “अंजिराचा लेप तयार करा आणि तो गळवावर लावा आणि तो
बरा होईल.” 22 हिज्कीयाहने विचारले होते, “मी याहवेहच्या मंदिरात
जाईन याचे चिन्ह काय असेल?”

**39** त्यावेळी बाबेलचा राजा बलदानचा पुत्र मरोदख-बलादानने
हिज्कीयाहला पत्रे आणि भेटवस्तू पाठविल्या, कारण त्याने
त्याच्या आजारपणाबद्दल आणि बरे झाल्याबद्दल ऐकले होते. 2
हिज्कीयाहने राजदूतांचे आनंदाने स्वागत केले आणि त्याच्या भांडारांमध्ये
काय आहे ते दाखविले—चांदी, सोने, मसाले, उत्तम जैतुनाचे तेल—त्याचे
संपूर्ण शस्त्रागार आणि त्याच्या खजिन्यामध्ये असलेली सर्व संपत्ती.
त्याच्या राजवाड्यात किंवा त्याच्या संपूर्ण राज्यात हिज्कीयाहने त्यांना
दाखविले नाही असे काहीही नव्हते. 3 तेव्हा यशायाह संदेष्टा राजा
हिज्कीयाहकडे गेला आणि त्याने विचारले, “ती माणसे काय म्हणाली
आणि ती कुठून आली होती?” हिज्कीयाहने उत्तर दिले, “दूरवरील
देशातून, ते बाबेलहून माझ्याकडे आले आहेत.” 4 संदेष्ट्याने विचारले,
“त्यांनी तुझ्या राजवाड्यात काय पाहिले?” हिज्कीयाह म्हणाला,
“त्यांनी माझ्या राजवाड्यातील सर्वकाही पाहिले. माझ्या खजिन्यांमध्ये
असे काहीही राहिले नाही, जे मी त्यांना दाखविले नाही.” 5 तेव्हा
यशायाह हिज्कीयाहला म्हणाला, “सर्वसमर्थ याहवेहचे वचन ऐका: 6
अशी वेळ निश्चितच येईल जेव्हा तुमच्या राजवाड्यामधील सर्वकाही
आणि तुमच्या पूर्वजांनी आजपर्यंत जे काही साठवून ठेवले आहे ते
सर्व, बाबेलला नेले जाईल. काहीही सोडले जाणार नाही, असे याहवेह
म्हणतात. 7 आणि तुमच्या वंशजांपैकी काही, तुमच्या मांसाचे आणि
तुमच्या रक्ताचे जे तुमच्यापासून जन्माला येतील, ते नेले जातील
आणि ते बाबेलच्या राजाच्या राजवाड्यात खोजे करण्यात येतील.” 8
हिज्कीयाहने यशायाहास उत्तर दिले, “तुम्ही बोललेले याहवेह यांचे वचन
चांगले आहे,” कारण त्याने असा विचार केला, “माझ्या आयुष्यभर
शांती आणि सुरक्षितता असेल.”

**40** सांत्वन करा, माझ्या लोकांचे सांत्वन करा, तुमचे परमेश्वर असे
म्हणतात. 2 यरुशलेम बरोबर कोमलपणे बोला, आणि तिला
असे घोषित करा की, तिची कठोर सेवा पूर्ण झाली आहे, तिच्या
पापाची परतफेड झाली आहे, याहवेहच्या हातातून तिला तिच्या सर्व
पापांसाठी दुप्पट मिळाले आहे. 3 बोलविणाऱ्याचा आवाज म्हणतो:
“अरण्यात घोषणा करणाऱ्या एकाची वाणी झाली याहवेहसाठी मार्ग
तयार करा; आणि आमच्या परमेश्वरासाठी वाळवंटामध्ये महामार्ग सरळ
करा, 4 प्रत्येक दरी उंच केली जाईल, प्रत्येक डोंगर आणि टेकडी
खाली केली जाईल; खडबडीत जमीन सपाट होईल, खडकाळ जागा
सखल भूप्रदेश करण्यात येईल. 5 आणि याहवेहचे गौरव प्रगट होईल,
आणि सर्व लोक ते एकत्र पाहतील. कारण याहवेहच्या मुखाने हे बोलले
आहे.” 6 एक वाणी म्हणाली, “आरोळी द्या.” आणि मी म्हणालो, “मी
काय आरोळी देऊ?” “सर्व लोक गवतासारखे आहेत, आणि त्यांचे
विश्वासूपण वनातील फुलांसारखे आहे. 7 गवत सुकते आणि फुले
गळून पडतात, कारण याहवेहचा श्वास त्यावर फुंकर घालतो. निश्चितच
लोक गवत आहेत. 8 गवत सुकते आणि फुले गळून पडतात, परंतु
आपल्या परमेश्वराचे वचन सर्वकाळ टिकते.” 9 तुम्ही जे सीयोनसाठी
सुवार्ता आणता, उंच डोंगरावर जा. यरुशलेममध्ये सुवार्ता आणणारे
तुम्ही, तुमचा आवाज उंचावून आरोळी द्या, आवाज उंच करा, घाबरू
नका; यहूदीयाच्या नगरांना सांगा, “तुमचे परमेश्वर येत आहेत!” 10
पाहा, सार्वभौम याहवेह सामर्थ्याने येत आहेत, आणि ते बलाढ्य हाताने
राज्य करतात. पाहा, त्यांचे बक्षीस त्यांच्याबरोबर आहे, आणि ते देत
असलेला मोबदला त्यांच्याबरोबर आहे. 11 ते मेंढपाळाप्रमाणे त्यांच्या
कळपाचे संगोपन करतात: ते कोकरांना त्यांच्या कवेत एकत्र करतात
आणि आपल्या हृदयाजवळ ठेवतात; जे अजून पिल्ले आहेत, त्यांना
ते सौम्यपणाने नेतात. 12 त्यांच्या ओंजळीत असलेले पाणी कोणी
मोजले आहे, किंवा त्यांच्या हाताच्या रुंदीने आकाशात चिन्हे मापली
आहेत? पृथ्वीवरील धूळ टोपलीत कोणी ठेवली आहे, किंवा पर्वतांचे
वजन तराजूवर कोणी केले आहे आणि कोणी टेकड्या तोलल्या आहेत?
13 याहवेहचा आत्मा कोण जाणू शकेल, किंवा याहवेहना सल्ला देऊ
शकेल असा कोण सल्लागार आहे? 14 ज्ञान प्राप्त करण्यासाठी याहवेह
यांना कोणी सल्ला दिला, आणि त्यांना योग्य मार्ग कोणी शिकवला?
असा कोण होता ज्याने त्यांना ज्ञान शिकविले, किंवा कोणी त्यांना
समंजसपणाचा मार्ग दाखविला? 15 राष्ट्रे ही निश्चितच बादलीतील
थेंबासारखी आहेत; त्यांना तराजूवर असलेली धूळ समजले जाते; बेटांना
ते असे तोलतात, जणू ते धूलिकण आहेत. 16 लबानोनांच्या विशाल
वनाची लाकडे वेदीच्या अग्नीसाठी पुरेशी नाहीत, तसेच होमार्पणासाठी
तेथील असंख्य जनावरे सुद्धा पुरेशी नाहीत. 17 त्यांच्यापुढे सर्व राष्ट्रे
काहीच नसल्यासारखी आहेत; ते त्यांना निरुपयोगी असे समजतात.

त्यांच्या दृष्टीने शून्यवत आहेत. 18 तर मग तुम्ही परमेश्वराची तुलना
कोणाबरोबर कराल? तुम्ही कोणत्या प्रतिमेला त्यांची उपमा द्याल?
19 एक धातूकाम करणारा ओतीव मूर्ती तयार करतो, आणि सोनार
त्याला सोन्याने मढवितो आणि तिची चांदीच्या साखळ्यांनी सजावट
करतो. 20 गरीब लोक अशा प्रकारचे अर्पण करू शकत नाही सडले
जाणार नाही, असे लाकूड ते निवडतात; ती मूर्ती पडणार नाही अशी
तिची रचना करण्यासाठी ते एका कुशल कारागिराला शोधतात. 21
तुम्हाला माहीत नाही काय? तुम्ही ते कधी ऐकले नाही काय? तुम्हाला ते
सुरुवातीपासूनच सांगितले नव्हते काय? पृथ्वीची स्थापना होताच तुम्ही
ते कधी जाणले नाही काय? 22 जे पृथ्वीवरील मंडलावर विराजमान
होतात, त्यावरील लोक त्यांना टोळांप्रमाणे दिसतात. ते आकाशे एखाद्या
आच्छादनाप्रमाणे पसरवितात, आणि तंबूप्रमाणे त्याला फैलावून आपला
डेरा तयार करतात. 23 ते राजपुत्रांना तुच्छतेस आणतात आणि या
जगातील राज्यकर्त्यांना शून्यवत करून टाकतात. 24 लागण करताच,
पेरणी करताच, ते जमिनीत मूळ धरू लागते तोच, ते त्यांच्यावर फुंकर
घालतात आणि ते कोमेजून जाते, आणि भुशाप्रमाणे वारा ते वाहून
नेतो. 25 “माझी तुलना तुम्ही कोणाशी कराल? माझी बरोबरी करेल
असा कोण आहे?” असे पवित्र परमेश्वर विचारतात. 26 तुमची दृष्टी
वर करा व आकाशाकडे पाहा: हे सर्व कोणी निर्माण केले आहे?
एकामागून एक असे हे तारांगण कोणी अस्तित्वात आणले आहे, आणि
त्यातील प्रत्येकाला ते नावाने हाक मारतात. त्यांच्या थोर सामर्थ्यामुळे
व त्यांच्या अमर्याद शक्तीमुळे त्यातील एकही कधी हरवत नाही. 27
हे याकोबा, तू अशी तक्रार का करतो? हे इस्राएला, असे तू कसे
म्हणतोस, “याहवेहपासून माझे मार्ग लपलेले आहेत; माझे परमेश्वर
माझ्या संकटाकडे दुर्लक्ष का करतात”? 28 तुम्हाला माहीत नाही
काय? तुम्ही ते कधी ऐकले नाही काय? याहवेहच सनातन परमेश्वर
आहेत, पृथ्वीच्या दिगंताचे उत्पन्नकर्ता तेच आहेत. ते कधी थकणार वा
कंटाळणार नाहीत, त्यांची आकलन शक्ती अगम्य आहे. 29 थकलेल्यास
ते शक्ती देतात आणि बलहीनाचे सामर्थ्य वाढवितात. 30 तरुण थकतात
व कंटाळतात, तरुण पुरुष देखील ठेचाळतात व पडतात; 31 पण जे
याहवेहवर आशा ठेवतात ते नवे सामर्थ्य प्राप्त करतात, ते त्यांच्या
पंखांनी गरुडाप्रमाणे वर झेप घेतील; ते धावतील पण दमणार नाहीत, ते
चालतील पण क्षीण होणार नाहीत.

**41** “हे बेटांनो, तुम्ही माझ्यासमोर शांत राहा! राष्ट्रांना त्यांच्या
सामर्थ्याचे नूतनीकरण करू द्या! त्यांना पुढे येऊन बोलू द्या;
न्यायनिवाड्यासाठी आपण एकत्र भेटू या. 2 “पूर्वेकडून कोणी एकाला
चिथविले, नीतिमत्वात त्यांची सेवा करण्यासाठी त्याला बोलाविले?
राष्ट्रांना ते त्याच्या स्वाधीन करतात आणि राजांना त्याच्या अधीन
करतात. ते त्याच्या तलवारीने त्यांची धूळधाण करतात, त्याच्या धनुष्याने
वाऱ्याने उडणारा भुसा करतात. 3 तो त्यांचा पाठलाग करतो व काहीही
इजा न होता, आणि आधी प्रवास न केलेल्या वाटेने सुरक्षित पुढे निघून
जातो. 4 पुरातन काळापासून पिढ्यांना कोणी पाचारण केले व हे
घडवून आणले? मी, याहवेह—मी आदि आहे, मी अंत आहे—तो मीच
आहे.” 5 बेटांनी हे बघितले व ते भयभीत झाले; पृथ्वीचा दिगंतापासून
थरकाप झाला. त्यांनी प्रवेश केला व ते पुढे आले; 6 ते एकमेकास
साहाय्य करू लागले व त्यांच्या सहकार्यास म्हणाले “धैर्यवान हो!”
7 धातू कारागीर सोनाराला प्रोत्साहित करतो, आणि हातोडीने धातू
गुळगुळीत करणारा, ऐरणीवर घण मारणाऱ्यास उत्तेजन देतो. धातू
जोडणीबद्दल तो म्हणतो, “हे चांगले आहे.” मग दुसरा, ती मूर्ती कलंडू
नये म्हणून त्यास खिळे ठोकतो. 8 “परंतु हे इस्राएल, माझे सेवक,
याकोब, माझे निवडलेले, कारण तुम्ही माझा मित्र अब्राहामाचे वंशज
आहात, 9 पृथ्वीच्या दिगंतांपासून मी तुम्हाला निवडले आहे, तिच्या
सर्वात शेवटच्या कोपऱ्यातून मी तुम्हाला बोलाविले आहे. मी म्हटले,
‘तुम्ही माझे सेवक आहात’; मी तुम्हाला निवडले आहे व तुम्हाला
नाकारले नाही. 10 भिऊ नका, कारण मी तुम्हाबरोबर आहे; हिंमत
खचू देऊ नका, कारण मी तुमचा परमेश्वर आहे. मी तुम्हाला समर्थ
करेन व तुम्हाला मदत करेन; मी माझ्या नीतिमत्तेच्या उजव्या हाताने
तुम्हाला उचलून धरेन. 11 “पाहा, जे तुमच्यावर चवताळले, ते निश्चितच
लज्जित व अपमानित होतील; ज्यांनी तुम्हाला विरोध केला ते नाहीसे
होऊन नाश पावतील. 12 तुम्ही तुमच्या शत्रूचा शोध कराल, पण
ते तुम्हाला सापडणार नाहीत. जे तुमच्याविरुद्ध युद्ध करतात त्यांचे
अस्तित्वच राहणार नाही. 13 कारण मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे, जो
तुमचा उजवा हात धरतो आणि तुम्हाला म्हणतो, भिऊ नको; मी तुला
साहाय्य करेन. 14 हे कीटका याकोबा, भयभीत होऊ नको, हे लहानग्या
इस्राएला, घाबरू नकोस, कारण मी स्वतः तुम्हाला मदत करेन,” असे
याहवेह, तुमचे उद्धारकर्ता, इस्राएलचे पवित्र परमेश्वर घोषित करतात, 15
“पाहा, मी तुम्हाला असे मळणी यंत्र करेन ज्याचे दात नवीन व तीक्ष्ण
असतील आणि तुम्ही पर्वतांची मळणी करून त्याचा चुराडा कराल आणि
डोंगराचे भुसकट करून त्याची घट कराल. 16 तुम्ही त्यांना पाखडाल
व वारा त्यांना उडवून नेईल, आणि वावटळ त्यांना विखरून टाकेल;
मग तुम्ही याहवेहमध्ये आनंद कराल इस्राएलाच्या पवित्र परमेश्वराचा
तुम्ही गौरव कराल. 17 “गरीब व गरजवंत पाण्याचा शोध घेतात, पण
पाणी कुठेही नाही; तहानेने त्यांची जीभ कोरडी पडली आहे. पण मी
याहवेह, त्यांच्या हाकेला उत्तर देईन; मी, इस्राएलचा परमेश्वर, त्यांना
टाकणार नाही. 18 ओसाड उंच पठारावर मी नद्या वाहवेन त्यांच्यासाठी
दऱ्यात मी पाण्याचे झरे उफळवेन. मी वाळवंटाचे जलाशयात रूपांतर
करेन, आणि शुष्क भूमीवरून झरे वाहतील. 19 मी वाळवंटात देवदारू,
बाभळी, मेंदी, जैतून लावेन. गंधसरूची झाडे माळरानात लावेन, चिनार
व भद्रदारूची झाडे ही लावेन. 20 जेणेकरून लोक हा चमत्कार पाहतील
व जाणतील, ते विचार करतील व त्यांना समजेल, याहवेहच्या बाहूंनी हे
सर्व केले आहे, इस्राएलाच्या पवित्र परमेश्वरानेच हे निर्माण केले आहे.
21 “तुमचा वाद पुढे आणा,” असे याहवेह म्हणतात. “तुमचा विवाद
पुढे चालवा” असे याकोबाचा राजा म्हणतो. 22 “हे मूर्तींनो, आम्हाला
सांगा, भावी काळात काय घडणार आहे. आम्हाला सांगा, गतकाळात

कोणत्या घटना घडल्या, म्हणजे आम्ही त्याबद्दल विचार करू आणि
त्यांचा परिणाम आम्हाला कळेल. किंवा पुढे होणाऱ्या घटना तरी सांगा,
23 भविष्यात काय घडणार ते सांगा, जेणेकरून आम्हाला कळेल की
तुम्ही देव आहात. काही तरी करा, चांगले वा वाईट, म्हणजे आम्ही
भयभीत होऊ व घाबरून जाऊ. 24 परंतु तुम्ही शून्यते पेक्षाही कमी
आहात आणि तुमची कामे पूर्णपणे व्यर्थ आहेत; जो कोणी तुमची
निवड करतो, तो धिक्कार-योग्य आहे. 25 “मी उत्तरेकडून एकाला
चिथविले आहे आणि तो येत आहे— एक जो सूर्योदयाकडून येतो
आणि माझ्या नावाचा धावा करतो. तो राज्यकर्त्यांना तुडवेल, जणू
ते बांधकामाचा चुना आहेत, जणू तो माती तुडविणारा कुंभार आहे.
26 हे घडेल असे प्रारंभापासून कोणी सांगितले होते, सांगा म्हणजे
आम्हाला कळू शकेल, किंवा आधीच सांगा, मग आम्ही म्हणू, ‘त्याचे
म्हणणे न्यायी होते?’ कोणीही हे सांगितले नाही, कोणीही हे भविष्य
केले नाही, कोणी तुमच्याकडून आलेला एकही शब्द ऐकला नाही. 27
मीच सीयोनला सर्वप्रथम हे सांगितले, ‘हे पाहा, ते आले आहेत!’ मीच
यरुशलेमकडे शुभ संदेश सांगणारा एक निरोप्या पाठविला. 28 मी
बघितले, पण तिथे कोणीही नव्हते— तुमच्या दैवतांपैकी कोणीही
सल्ला दिला नाही, मी विचारले तेव्हा त्यांच्यातील कोणीही उत्तर दिले
नाही. 29 पाहा, ती सर्व खोटी आहेत! त्यांची कामे व्यर्थ आहेत; त्यांच्या
मूर्ती केवळ वायू असून, त्या गोंधळात टाकणाऱ्या आहेत.

**42** “पाहा, हा माझा सेवक! याला माझे पाठबळ आहे! माझा
निवडलेला, ज्याच्याविषयी मी संतुष्ट आहे; माझा आत्मा मी
त्याच्या ठायी ठेवेन. राष्ट्रांना तो न्याय आणेल. 2 तो ओरडणार नाही किंवा
आक्रोश करणार नाही. किंवा रस्त्यांमध्ये त्याचा आवाज उंचावणार नाही.
3 चेपलेला बोरू तो मोडणार नाही. मिणमिणती वात तो विझविणार
नाही. तो विश्वासूपणाने न्यायदान करेल; 4 पृथ्वीवर नीतिमत्वाचे
अधिराज्य स्थापेपर्यंत, तो अडखळणार नाही किंवा निराश होणार नाही
त्याच्या शिक्षणावर द्वीपही आशा ठेवतील.” 5 परमेश्वर याहवेह हे असे
म्हणतात— आकाश निर्माण करून ते विस्तारणारे, पृथ्वीवर सर्वकाही
उगविणारे व ते पसरविणारे, ते तिच्यावरील लोकांना श्वास प्रदान
करतात, आणि जे तिच्यावरून चालतात, त्यांना जीवन प्रदान करतात:
6 “मी, याहवेहने, नीतिमत्वात तुम्हाला पाचारण केले आहे; मी तुमचा
हात धरून तुम्हाला पाठिंबा देईन, मी तुमचे संगोपन करेन आणि तुम्हाला
कराराच्या पूर्ततेचे लोक बनवेन आणि इतर राष्ट्रांना प्रकाश देणारे, 7
जे डोळे अंध आहेत, ते उघडणारे आणि बंदीशाळेत आहेत, त्यांना
सोडविणारे अंधारात बसलेल्यांची सुटका करणारे असे करेन. 8 “मीच
याहवेह आहे; हेच माझे नाव आहे! मी माझे गौरव दुसऱ्या कोणालाही
किंवा माझे गौरव मूर्तींना देणार नाही. 9 पाहा, गतकाळातील गोष्टी
झालेल्या आहेत, आता मी नवीन गोष्टी घोषित करतो; भावी काळातील
घटना प्रत्यक्ष घडण्यापूर्वीच मी ते तुमच्याकडे जाहीर करतो.” 10
याहवेहसाठी एक नवे गीत गा, पृथ्वीच्या दिगंतापर्यंत त्याची स्तुतिस्तोत्रे
गा, तुम्ही जे सागराच्या खोलात जाऊन राहता आणि त्यात असलेले
सर्वकाही, तुम्ही बेटांनो व त्यावर राहणारे सर्वजण गीत गा. 11 अरण्यात
व त्याभोवती असणाऱ्या नगरांचे आवाज उंचावू दे; जिथे केदारचा
रहिवास आहे, त्या वस्त्या आनंद करोत. सेलाच्या लोकांनो हर्षगीते
गा; त्यांना पर्वतशिखरावरून गर्जना करू दे. 12 त्यांनी याहवेहला गौरव
प्रदान करावे आणि त्यांचा महिमा बेटांना घोषित करावा. 13 याहवेह
एखाद्या लढवय्याप्रमाणे आघाडीवर निघतील, एखाद्या योद्ध्याप्रमाणे
ते आपला आवेश चेतवतील; ते गर्जना करून युद्धाची नांदी देतील
आणि त्यांच्या शत्रूंवर विजयी होतील. 14 “दीर्घकालापासून मी स्तब्ध
राहिलो आहे, मी शांत राहून स्वतःला आवर घातला आहे. परंतु आता,
प्रसूत होणाऱ्या स्त्रीप्रमाणे, मी आक्रोश करेन, धापा टाकेन व माझी
दमछाक होईल. 15 मी पर्वत व टेकड्या उजाड करेन. त्यांची सर्व
हिरवळ वाळवून टाकेन; मी नद्यांना बेटांमध्ये रूपांतरित करेन, आणि
जलाशय वाळवून टाकेन. 16 मी आंधळयांना त्यांना माहीत नसलेल्या
मार्गावरून चालवेन, अपरिचित रस्त्यावरून मी त्यांचे मार्गदर्शन करेन;
मी त्यांच्यापुढील अंधकार प्रकाशात बदलेन आणि खडबडीत जागा
सपाट करेन. या गोष्टी मी करेन; मी त्यांना टाकणार नाही. 17 परंतु जे
मूर्तींवर विश्वास ठेवतात, जे मूर्तींना म्हणतात कि, ‘तुम्ही आमची दैवते
आहात,’ ते पूर्णपणे लज्जित होऊन मागे फिरतील. 18 “अहो, तुम्ही
बहिऱ्यांनो ऐका; पाहा, तुम्ही आंधळयांनो आणि बघा! 19 आंधळे कोण
आहेत, केवळ माझे सेवक, आणि बहिरे कोण आहेत, मी पाठविलेले
संदेशवाहक? आंधळे कोण आहेत, ज्यांनी माझ्याशी करार केला आहे,
याहवेहच्या सेवकासारखे आंधळे? 20 तुम्ही बऱ्याच गोष्टी बघितल्या
आहेत, परंतु तुम्ही त्याकडे लक्ष देत नाही; तुमचे कान उघडे आहेत,
परंतु तुम्हाला ऐकावयास येत नाही.” 21 त्यांच्या नीतिमत्तेप्रीत्यर्थ
त्यांचे नियमशास्त्र महान व गौरवित केल्याने याहवेह प्रसन्न होतात.
22 पण हेच लोक लुटले व लुबाडले गेले आहेत, ते सर्वजण खड्ड्यात
अडकले आहेत किंवा तुरुंगात लपवून ठेवण्यात आले आहेत. तेच लूट
बनले आहेत, त्यांना सोडविणारा कोणी नाही; त्यांना लूट बनविण्यात
आले आहे, “त्यांना परत पाठवा,” असे म्हणणारे कोणीही नाही. 23
भावी काळात तुमच्यापैकी कोण हे ऐकेल किंवा काळजीपूर्वक लक्ष
देईल? 24 याकोबाची लूट होण्यासाठी त्यांना कोणी हवाली केले,
आणि इस्राएलला लुबाडू दिले? ज्यांच्याविरुद्ध आम्ही पातक केले ते
याहवेहच नाहीत काय? त्यांनी याहवेहचे मार्ग अनुसरले नाहीत; त्यांच्या
नियमांचे पालन केले नाही, 25 म्हणूनच याहवेहने आपला क्रोधाग्नी
आणि लढाईचा विध्वंस त्यांच्यावर ओतला. चारही बाजूने ते ज्वालांनी
वेढले गेले होते, तरीसुद्धा त्यांना उमगले नाही; ज्वालांनी ते भस्म झाले,
पण त्यांनी ते मनावर घेतले नाही.

**43** परंतु आता, याहवेह असे म्हणतात— याकोबा, ज्यांनी तुला
निर्माण केले, इस्राएला, ज्यांनी तुझी रचना केली: “भिऊ नको,
कारण खंडणी भरून मी तुझी सुटका केली आहे. मी तुला नावाने हाक
मारली आहे; तू माझीच आहेस. 2 जेव्हा तू खोल जलातून जाशील, मी
तुझ्याबरोबर असेन, जेव्हा तू नद्या ओलांडून पुढे जाशील, त्या तुला

बुडविणार नाही! जेव्हा तू अग्नीतून चालत जाशील, तू भाजली जाणार
नाही. त्या ज्वाला तुला भस्म करणार नाहीत. 3 कारण मी याहवेह,
तुझा परमेश्वर आहे, इस्राएलचा पवित्र परमेश्वर, तुझा तारणकर्ता; तुझ्या
खंडणीसाठी मी इजिप्तला दिले, तुझा मोबदला म्हणून कूश आणि
सबा दिले, 4 कारण तू माझ्यासाठी मौल्यवान व आदरणीय आहेस,
आणि मी तुझ्यावर प्रीती करतो, मी तुझ्या मोबदल्यात लोकांना देईन,
तुझ्या जिवाच्या मोबदल्यात मी राष्ट्रांना देईन. 5 भिऊ नको, कारण मी
तुझ्याबरोबर आहे; मीच तुझ्या संततीला पूर्वेकडून आणि पश्चिमेकडून
एकत्र करेन, 6 मी उत्तरेला म्हणेन, 'त्यांना सोडून द्या!' आणि दक्षिणेला
म्हणेन, 'त्यांना धरून ठेवू नका.' माझ्या पुत्रांना दूरवरून आणि पृथ्वीच्या
कोपऱ्यातून माझ्या कन्यांना घेऊन या— 7 जो कोणी माझ्या नावाने
ओळखला जातो, ज्यांना मी माझ्या गौरवासाठी निर्माण केले, ज्यांना
मी घडविले आहे, त्यांना घेऊन या." 8 जे डोळे असून अंध आहेत,
जे कान असून बहिरे आहेत, अशांना बाहेर काढ. 9 सर्व राष्ट्रे एकत्र
येतात आणि सर्व लोक एकजूट होतात. त्यांच्या कोणत्या मूर्तींनी हे
भाकीत केले होते आणि भावी गोष्टी आम्हाला घोषित केल्या? त्या
सत्य बोलल्या तर त्याचे साक्षीदार त्यांनी आणावे, जेणेकरून ऐकणारे
म्हणतील, "हे न्याय्य आहे." 10 परंतु याहवेह घोषित करतात, "हे
इस्राएला, तुम्ही माझे साक्षीदार आहात, आणि तुम्ही माझे निवडलेले
सेवक आहात. जेणेकरून तुम्ही ओळखावे आणि माझ्यावर विश्वास
ठेवावा, मीच परमेश्वर आहे हे समजून घ्यावे. माझ्यापूर्वी दुसरा कोणी
देव अस्तित्वात नव्हता, आणि माझ्या नंतरही नसेल. 11 मी, केवळ मीच
याहवेह आहे, माझ्याशिवाय दुसरा कोणीही तारणकर्ता नाही. 12 मी
प्रगट केले, वाचविले व घोषित केले— मीच केले, तुमच्यातील इतर
कोणत्याही विदेशी दैवताने केले नाही." याहवेह घोषित करतात, तुम्ही
माझे साक्षीदार आहात की, "मीच परमेश्वर आहे. 13 सनातनकालापासून
मीच परमेश्वर म्हणून अस्तित्वात आहे. माझ्या हातातून कोणाचीही
सुटका होऊ शकत नाही. मी जेव्हा कार्य करतो, त्याला कोणीही उलट
करू शकत नाही." 14 तुमचे उद्धारकर्ता, इस्राएलचे पवित्र परमेश्वर
याहवेह असे म्हणतात— "तुमच्याकरिता मी खास्द्यांवर सैन्य पाठवेन
आणि सर्व बाबेलच्या लोकांना ज्यांचा त्यांना अत्यंत अभिमान होता,
त्या त्यांच्याच जहाजात पलायन करणारे म्हणून मी त्यांना आणेन. 15
मी याहवेह, तुमचा पवित्र परमेश्वर आहे, इस्राएलचा निर्माणकर्ता व
तुमचा राजा आहे." 16 याहवेह असे म्हणतात— ज्यांनी समुद्रातून
मार्ग काढला, महासागरामधून रस्ता तयार केला, 17 ज्यांनी इजिप्तच्या
सैन्याला व त्याच्या रथांसह व घोड्यांसह व त्यांच्या मजबूतीच्या ज्यादा
कुमकीसह बुडविले, तेव्हा तेवत्या वाती मालवाव्या तशा, त्यांच्या
प्राणज्योती अशा मालविल्या, कि ते परत कधीही न उठण्यासाठी
तिथेच गारद झाले: 18 "पण पूर्वीच्या गोष्टी विसरा; गतकाळाचा जास्त
विचार करू नका. 19 पाहा, मी एक नवी गोष्ट करणार आहे! ती आता
उभारत आहे; तुम्हाला ते आकलन होत नाही का? मी अरण्यातून रस्ता
तयार करत आहे ओसाड भूमीत झरे बनवित आहे. 20 रानातील हिंस्र
श्वापदे कोल्हे आणि घुबडे माझा आदर करतात, कारण मी अरण्यात
त्यांना जलपुरवठा करतो माझ्या त्या निवडलेल्या लोकांना पिण्यासाठी,
ओसाड भूमीत झरे बनवितो, 21 ज्या लोकांना मी माझ्यासाठी निर्माण
केले ते माझ्या प्रशंसेची घोषणा करतील. 22 "परंतु याकोबा, तू माझा
धावा केला नाही, इस्राएला, तुम्ही माझ्यासाठी स्वतःला थकविले नाही.
23 होमार्पणासाठी तुम्ही कोकरे आणली नाहीत. अर्पणे करून तुम्ही
माझा सन्मान केला नाही. मी तुम्हाला अन्नार्पणाचे ओझे दिले नाही धूप
जाळण्याचा आग्रह करून थकविले नाही. 24 तुम्ही माझ्यासाठी कधी
सुगंधी दालचिनी विकत आणली नाही, किंवा भरगच्च चरबीचे यज्ञार्पण
केले नाही. उलट, केवळ तुमच्या पातकांचे ओझे मला दिले व तुमच्या
अपराधांनी मला शिणविले. 25 "मी, खरोखर केवळ माझ्याकरिताच मी
तुमचे अपराध पुसेन आणि पुन्हा त्यांची आठवणही करणार नाही. 26
भूतकाळाचे परीक्षण करा, चला, याबद्दल चर्चा करू या; तुम्ही निष्पाप
आहा हे सिद्ध करण्यास आपली बाजू मांडा. 27 तुमच्या पूर्वपित्याने
पातके केली; ज्याला मी पाठविले, कि तुम्हाला माझ्याविरुद्ध बंडखोरी
करण्यास शिकवावे. 28 म्हणूनच मी तुमच्या मंदिराच्या अधिपतींची
मानहानी केली; मी याकोबाला विध्वंसाच्या हवाली केले व इस्राएलला
तिरस्कारास्पद केले.

**44** "परंतु आता माझ्या सेवका याकोबा, माझ्या निवडलेल्या
इस्राएला, ऐक, 2 याहवेह असे म्हणतात— ज्यांनी तुला निर्माण
केले व तुला गर्भाशयात घडविले, आणि जे तुला साहाय्य करतील:
याकोबा, माझ्या सेवका, भिऊ नको, हे यशुरून, ज्याला मी निवडले
आहे, घाबरू नको. 3 कारण मी तहानलेल्या भूमीवर पाण्याचा वर्षाव
करेन, आणि शुष्क जमिनीला झरे देईन; तुमच्या मुलाबाळांवर मी
माझा आत्मा ओतेन व तुमच्या वंशजांना आशीर्वाद देईन. 4 कुरणातील
गवतासारखे ते उगवतील वाहत्या झऱ्याच्या काठावरील वाळुंजाच्या
वृक्षासारखे ते वाढतील. 5 काहीजण म्हणतील 'मी याहवेहचा आहे';
तर इतरजण स्वतःला याकोबाच्या नावाने संबोधतील; आणखी दुसरे
आपल्या हातावर 'याहवेहचा' असे लिहून स्वतःचे नाव इस्राएल ठेवतील.
6 "सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचा राजा व उद्धारक, याहवेह असे
म्हणतात— मी आदि व अंत आहे. माझ्याशिवाय इतर कोणीही परमेश्वर
नाही. 7 माझ्यासारखे कोणी आहे काय? त्याने ते घोषित करावे. त्याने
तसे जाहीर करावे आणि माझ्यासमोर प्रस्तुत करावे, मी माझ्या पुरातन
लोकांची स्थापना केल्यापासून काय घडले, आणि पुढे काय होणार
आहे होय, काय घडणार आहे हे त्यांनी सांगावे. 8 भिऊ नका, थरथर
कापू नका. मी अशी घोषणा केली नव्हती का व हे फार पूर्वी जाहीर केले
नव्हते का? तुम्ही माझे साक्षीदार आहात. माझ्याशिवाय कोणी दुसरा
परमेश्वर आहे काय? नाही, माझ्याशिवाय दुसरा खडक नाही; माझ्या
माहितीत कोणी नाही." 9 कोरीव मूर्ती घडविणारे किती शून्यवत आहेत,
आणि त्यांना जे मौल्यवान वाटते ते मातीमोल आहे. जे त्यांच्यावतीने
बोलतात, ते अंध आहेत; ते अज्ञानी असून ते लज्जित झाले आहेत. 10
जिच्यापासून काहीही लाभ होत नाही अशा दैवतांना आकार कोण देतो

व त्या मूर्ती कोण घडवितो? 11 हे करणारे लोक लज्जित होतील; हे सर्व
कारागीर तर केवळ मानव आहेत. या सर्वांनी एकत्र यावे व सिद्ध करावे;
त्यांना भयभीत करून लज्जित करण्यात येईल. 12 लोहार अवजारे घेतो
आणि आपल्या भट्टीपाशी उभा राहून तो काम करतो; मूर्तीला आकार
देण्यासाठी तो हातोडी वापरतो, त्याच्या बाहूच्या शक्तीने तो त्याला
ठोकून घडवितो. मग त्याला भूक लागते व तो शक्तिहीन होतो; तो
पाणी पीत नाही आणि दुर्बल होतो. 13 सुतार लाकडाचा एक ओंडका
घेऊन त्याचे मोजपट्टीने माप घेतो आणि त्यावर लेखणीने खुणा करतो;
पटाशीने ते तासून गुळगुळीत करतो. कंपासने त्यावर निशाणी करतो.
त्याला मानवाच्या शरीराचा आकार देतो, सर्व मानवी गौरवाने अलंकृत
करतो, जेणेकरून त्याची मंदिरात स्थापना होऊ शकेल. 14 तो गंधसरू
तोडतो किंवा बहुतेक सुरू वा एला ही झाडे निवडतो, तो त्या झाडाला
रानातील इतर झाडांसह वाढवितो, किंवा देवदारू लावतो व पावसाच्या
पाण्यावर त्याला वाढू देतो. 15 मनुष्य त्याचा उपयोग जळणासाठी
करतो; काही लाकूड जाळून स्वत:ला ऊब मिळण्यासाठी, आणि आग
पेटवून भाकर भाजण्यासाठी. परंतु तो त्या लाकडातून स्वत:साठी एक
देवही निर्माण करतो व त्याची आराधना करतो; तो एक मूर्ती तयार
करतो व त्यास नमन करतो. 16 अर्धे लाकूड तो जळण म्हणून वापरतो;
त्यावर आपले अन्न शिजवितो, तो त्यावर मांस भाजतो व खाऊन तृप्त
होतो. आपल्याला ऊबही आणतो व म्हणतो, “अहा! मी किती उबदार
झालो आहे; मला अग्नी दिसत आहे.” 17 आणि उरलेल्या लाकडापासून
तो आपले दैवत म्हणजे मूर्ती तयार करतो; त्या मूर्तीस नमन करून तिची
पूजा करतो, तो त्याची प्रार्थना करतो आणि म्हणतो “माझी सुटका कर!
तू माझ्या देव आहेस!” 18 ते अज्ञानी आहेत, त्यांना काहीही कळत
नाही; त्यांनी बघू नये म्हणून त्यांच्या डोळ्यावर पट्टी बांधली आहे.
त्यांना समज येऊ नये म्हणून त्यांची अंत:करणे बधिर केली आहेत. 19
कोणीही थांबून विचार करीत नाही, कोणालाही समज नाही व ते जाणून
असे म्हणत नाहीत, “अरे! हा तर लाकडाचा ठोकळा आहे; यातील
काही भाग मी सरपण म्हणून वापरला, याच्या कोळशावर मी भाकरही
भाजली व मांस शिजवून ते खाल्ले. मग यातील अवशिष्ट भागाची
मी तिरस्करणीय वस्तू बनवावी काय? मी लाकडाच्या ठोकळ्याला
नमन करावे काय?” 20 असा मनुष्य राख भक्षण करतो; संभ्रमात
पडलेले अंत:करण त्याला चुकीचे मार्गदर्शन करते; तो स्वत:ला वाचवू
शकत नाही किंवा म्हणू शकत नाही “ही माझ्या उजव्या हातातील वस्तू
निव्वळ खोटेपणा नाही का?” 21 “हे याकोबा, या गोष्टी आठवणीत
ठेव, इस्राएला, तू माझा सेवक आहेस. मीच तुला निर्माण केले, तू
माझा सेवक आहेस; इस्राएला, तुला मी विसरणार नाही. 22 मी तुझी
पापे आकाशातील मेघांप्रमाणे, सकाळच्या धुक्याप्रमाणे विरून टाकली
आहेत. माझ्याकडे परत ये, मी खंडणी भरून तुला मुक्त केले आहे.” 23
अहो आकाशांनो, आनंद गीते गा, कारण याहवेहने हे अद्भुत कृत्य केले
आहे; हे खालील पृथ्वी, गर्जना कर, हे पर्वतांनो, अरण्यांनो आणि सर्व
वृक्षांनो, गायनाचा कल्लोळ उसळू द्या. कारण याहवेहने याकोबाचा
उद्धार केला आहे. इस्राएलमध्ये त्यांनी त्यांचे गौरव प्रकट केले आहे! 24
“याहवेह असे म्हणतात; तुमचे उद्धारकर्ता, ज्यांनी तुमची गर्भाशयात
घडण केली: मी याहवेह आहे, संपूर्ण आकाश मी एकट्याने पसरले,
मीच सर्व गोष्टींचा निर्माणकर्ता, ज्याने आकाश ताणले, ज्याने स्वत:
पृथ्वी पसरविली, 25 खोट्या संदेष्ट्यांची चिन्हे जे व्यर्थ करतात आणि
दैवप्रश्न करणाऱ्यांना मूर्ख ठरवितात, जो सुज्ञ माणसांचे ज्ञान उलथून
टाकतो आणि ते निरर्थक बनवितो. 26 जो त्याच्या सेवकाच्या वचनांना
पाठिंबा देतो आणि त्याच्या संदेशवाहकांच्या भविष्यवाण्यांची परिपूर्ती
करतो, जो यरुशलेमविषयी म्हणतो, ‘मी यरुशलेम पुन: रहिवासित
करेन,’ यहूदीयाच्या नगराविषयी म्हणतो, ‘ती पुन: बांधली जाईल,’
आणि तेथील भग्नावशेषाविषयी म्हणतो, ‘मी त्यांची पुनर्बांधणी करेन,’
27 जो खोल जलाशयाला म्हणतो, ‘आटून जा, आणि मी तुमचे झरे
कोरडे करेन,’ 28 कोरेशविषयी जो म्हणतो, ‘तो माझा मेंढपाळ आहे
तेव्हा तो माझ्या सर्व इच्छा पूर्ण करेल; तो यरुशलेमविषयी म्हणेल,
“त्याची पुनर्बांधणी होवो,” आणि मंदिराविषयी म्हणेल, “त्याचा पाया
बांधण्यात येवो.”’

**45** “त्यांच्या अभिषिक्ताला दिलेला याहवेहचा संदेश, कोरेशने अनेक
देश जिंकावे आणि राजांना शस्त्र विरहित करावे यासाठी मी
त्याचा उजवा हात धरला आहे. मी त्याच्यासाठी दारे उघडेन; यापुढे या
वेशी बंद होणार नाहीत: 2 हे कोरेशा, मी तुझ्यापुढे चालेन, मी पर्वत
जमीनदोस्त करेन आणि कास्याच्या वेशी तोडेन व त्यांच्या लोखंडी
सळया कापून टाकेन. 3 दडवून ठेवलेली भांडारे, गुप्तस्थळी जमा करून
ठेवलेली संपत्ती, मी तुला देईन, जेणेकरून तुला तुझ्या नावाने हाक
मारणारा, याहवेह इस्राएलचा परमेश्वर मीच आहे हे तुला समजेल. 4
माझा सेवक याकोबासाठी, माझ्या निवडलेल्या इस्राएलसाठी, तू जरी
माझा अधिकार मान्य करत नाही, तरी मी तुला नावाने हाक मारून
बोलाविले आणि तुला मानाच्या उपाधीने अलंकृत केले. 5 मीच याहवेह
आहे, माझ्याशिवाय दुसरा कोणीही नाही; माझ्या व्यतिरिक्त इतर
कोणीही परमेश्वर नाही. तू जरी माझा अधिकार मान्य करत नाही, तरी मी
तुला सामर्थ्य देईन. 6 मग सूर्योदयापासून ते सूर्यास्तापर्यंत सर्व लोकांना
कळेल की माझ्याशिवाय दुसरा परमेश्वर नाहीच. मीच याहवेह आहे,
माझ्याशिवाय दुसरा कोणीही नाही; 7 मीच प्रकाश व अंधकार निर्माण
करतो. मीच कल्याण व अरिष्ट आणतो, या सर्व गोष्टी करणारा याहवेह
मीच आहे. 8 “अहो वरील आकाशांनो, माझ्या नीतिमत्तेचा पाऊस पडू
द्या; मेघ त्यांचा वर्षाव करोत, पृथ्वी पूर्ण रुंदीने उघडून जावो, तारण
उसळून वर येवो त्यासह नीतिमत्वाचीही भरभराट होवो; मी, याहवेहने
हे निर्माण केले आहे. 9 “जो आपल्या उत्पन्नकर्त्याशी वाद घालतो,
त्याला धिक्कार असो. जो जमिनीवर पडलेल्या मडक्याच्या अनेक
तुकड्यांमधील केवळ एक मडक्याच्या तुकडा आहे. माती कुंभाराला
म्हणते काय, ‘हे तू काय घडवित आहेस?’ तुझी हस्तकृती तुला म्हणते
काय, ‘कुंभाराला तर हातच नाहीत’? 10 धिक्कार असो त्या मुलाला,
जो त्याच्या पित्याला म्हणतो ‘तुम्ही कोणाला जन्म दिलात?’ किंवा

त्याच्या आईला विचारतो, ‘तू कोणाला जन्मास घातले?’ 11 “इस्राएलचे
पवित्र परमेश्वर आणि तिचे निर्माणकर्ता, याहवेह हे असे म्हणतात: जे
पुढे घडणार आहे त्याविषयी, माझ्या लेकरांबद्धल तुम्ही मला प्रश्न
विचारता काय, किंवा माझ्या हस्तकृतीसाठी मला आज्ञा देता काय? 12
ज्याने पृथ्वी अस्तित्वात आणली व तिच्यावर मानवजात निर्माण केली,
तो मीच आहे. माझ्या हातांनी मी अंतराळ पसरले त्यांच्या तारकागण
माझ्याच आज्ञेत आहेत. 13 माझा न्याय्य हेतू सिद्धीस नेण्यास मीच
कोरेशाला उभारेन: त्याचे सर्व मार्ग मी सरळ करेन. तो माझे शहर
पुनर्निर्मित करेल, माझे बंदिवान लोक मोकळे करेल, पण ते तो बक्षीस
किंवा मोबदल्यासाठी करणार नाही, सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात.”
14 याहवेह असे म्हणतात: “इजिप्तचे उत्पादन आणि कूशचा सर्व
व्यापारी माल व शबाईचे ते उंच लोक— ते तुमच्याकडे येतील ते
सर्वकाही तुमचेच होईल. बेड्या घातलेल्या बंदिवानाप्रमाणे ते पाय ओढत
तुमच्यामागे चालतील ते साखळदंडाने बांधलेले तुमच्याकडे येतील.
तुम्हाला नमन करतील व विनंती करून म्हणतील, ‘निश्चितच परमेश्वर
तुमच्याबरोबर आहे, दुसरे कोणी नाही; त्यांच्याशिवाय दुसरा देव नाही.’”
15 हे परमेश्वरा आणि इस्राएलाच्या तारणकर्त्या, खरोखर तुम्ही परमेश्वर
आहात, जे स्वतःला अदृश्य ठेवतात. 16 जे मूर्ती घडवितात, ते लज्जित व
अपमानित होतील; ते सर्वजण एकत्र अपमानित केले जातील. 17 परंतु
अनंतकाळच्या तारणाने याहवेह इस्राएलला सोडवतील; युगानुयुगापर्यंत
ते कधीही लज्जित व अपमानित होणार नाहीत. 18 याहवेह असे
म्हणतात— ज्यांनी आकाशे निर्माण केली तेच परमेश्वर आहेत; ज्यांनी
पृथ्वीची निर्मिती केली व घडण केली, ती प्रस्थापित केली; ती ओसाड व
निर्जन घडविली नाही, परंतु त्यावर वसतिस्थान व्हावे म्हणून निर्माण
केली— ते म्हणतात: “मीच याहवेह आहे. माझ्या व्यतिरिक्त दुसरा
कोणीही नाही. 19 मी गुप्तपणे, एखाद्या अंधाऱ्या ठिकाणाहून बोललो
नाही; मी याकोबाच्या वंशजांना असे म्हटले नाही, ‘माझा व्यर्थच शोध
घ्या.’ मी, याहवेह, जे सत्य तेच बोलतो; जे योग्य आहे तेच घोषित
करतो. 20 “हे देशातून पलायन करणाऱ्यांनो, एकत्र या, जमा होऊन
एकत्र या; लाकडी मूर्ती घेऊन फिरणारे अज्ञानी लोक, ते अशा दैवतांची
प्रार्थना करतात, जे त्यांची सोडवणूक करू शकत नाहीत. 21 पुढे काय
होणार आहे ते विचारार्थ हजर करा— आपसात विचारविनिमय करा.
पुरातन कालातच हे सर्व भविष्य कोणी सांगितले, अत्यंत जुन्या काळी हे
कोणी घोषित केले? तो मीच, याहवेह नव्हतो काय? कारण मजवेगळा
दुसरा परमेश्वरच नाही, न्यायी परमेश्वर व उद्धारकर्ता माझ्या व्यतिरिक्त
दुसरा कोणीही नाही. 22 “पृथ्वीच्या सर्व टोकांनो, माझ्याकडे वळा व
उद्धार पावा; कारण मीच परमेश्वर आहे, अन्य कोणीही नाही. 23 मी
स्वतः शपथ वाहिली आहे, माझ्या मुखाने संपूर्ण प्रामाणिकपणाने हे शब्द
उच्चारले आहेत ते हे शब्द आहेत, जे कधीही रद्द केले जाणार नाहीत:
प्रत्येक गुडघा माझ्यापुढे टेकला जाईल; आणि प्रत्येक जीभ माझ्या
नावाने शपथ घेईल. 24 ते माझ्याबद्दल म्हणतील, ‘केवळ याहवेहमध्येच
आमची सुटका व सामर्थ्य आहे.’” जेव्हा त्यांच्यावर संतापलेले सर्वजण
त्यांच्याकडे येतील, तेव्हा ते लज्जित होतील. 25 इस्राएलचे सर्व वंशज
याहवेहमध्ये सुटका पावतील आणि त्यांच्याबद्दल अभिमान बाळगतील.

**46** बेल नतमस्तक होतो, नबो वाकून जातो; ओझे वाहणारे पशू
त्यांच्या मूर्ती वाहून नेतात. या प्रतिमांची नेआण तापदायक, व
थकेलेल्यांना अधिकच ओझे देणारे आहे. 2 ते एकत्र मिळून लवतात व
नतमस्तक होतात; हे ओझे सोडविणे अशक्य झाल्यामुळे, ते स्वतःच
बंदिवासात जातात. 3 “याकोबाच्या वंशजांनो, इस्राएलच्या सर्व अवशिष्ट
लोकांनो, माझे ऐका, तुम्ही जन्माला आल्यापासून मीच तुमचे संगोपन
केले आहे, आणि तुमच्या जन्मापासून मीच तुमची काळजी घेतली आहे.
4 वयस्कर होऊन तुमचे केस पांढरे होईपर्यंत तो मी आहे, तो मी आहे
जो तुम्हाला आधार देईल. मी तुम्हाला निर्माण केले आहे व मी तुमचा
सांभाळ करेन; मी तुम्हाला आधार देईन व तुम्हाला सोडवेन. 5 “तुम्ही
कोणाशी माझी तुलना कराल किंवा माझी बरोबरी कराल? तुम्हाला
माझ्यासारखा असा कोण आढळेल, ज्याच्याशी तुम्ही माझी तुलना
कराल? 6 काहीजण त्यांच्या पिशवीतून सोने काढून ते ओततात व
चांदी तराजूत तोलतात; ते एखाद्या सोनाराला दैवत घडविण्यासाठी
मजुरीने कामाला लावतात, आणि मग ते त्याच्यापुढे नमन करून त्याची
पूजा करतात. 7 ते त्याला आपल्या खांद्यावर घेतात व वाहून नेतात;
नंतर ते त्याला त्याच्या स्थानी ठेवतात, तेव्हा ते दैवत तिथेच राहते.
त्या ठिकाणाहून त्याला हालता येत नाही. कोणी त्याचा धावा केला,
तरी ते उत्तर देऊ शकत नाही; ते कोणालाही त्यांच्या संकटातून सोडवू
शकत नाही. 8 “बंडखोरांनो, हे लक्षात ठेवा, विसरू नका, हे जरा
मनावर घ्या. 9 भूतकाळात घडलेल्या गोष्टींची आठवण करा, फार
पुरातन काळातील गोष्टी; मी परमेश्वर आहे, माझ्या व्यतिरिक्त इतर
कोणीही नाही; मी परमेश्वर आहे आणि माझ्यासारखा दुसरा कोणीही
नाही. 10 मी सुरुवातीपासूनच शेवट कळवितो व पुरातन काळातच भावी
काळात होणाऱ्या गोष्टी प्रगट करतो. मी म्हणतो, ‘माझ्या योजना कायम
राहतील, आणि माझ्या इच्छेस येईल ते मी करेन.’ 11 मी पूर्वेकडून त्या
वेगवान हिंस्र पक्ष्याला, त्या अति दूर असलेल्या मनुष्याला माझा हेतू
साध्य करण्यासाठी बोलवेन. जे मी बोललो, ते मी घडवून आणणार; जे
मी योजले आहे, ते मी करेनच! 12 अहो हट्टी अंतःकरणाच्या लोकांनो,
तुम्ही, जे आता माझ्या नीतिमत्वापासून फार दूर गेलेले आहात, माझे
ऐका. 13 मी माझे नीतिमत्व तुमच्याजवळ आणत आहे, ते फार दूर
नाही; आणि माझ्या तारणास विलंब लागणार नाही. मी माझे तारण
सीयोनाला माझे वैभव इस्राएलला बहाल करेन.

**47** “हे कुमारी खाल्डियन कन्ये, सिंहासनावरून खाली उतर व धुळीत
बस; हे बाबेल्यांच्या नगराची महाराणी, सिंहासन सोडून जमिनीवर
बस. तू यापुढे कोमल व नाजूक म्हणविली जाणार नाहीस. 2 जाते घेऊन
धान्य दळीत बस; तुझा बुरखा काढून टाक. तुझ्या घागऱ्याचा घोळ उचल
आणि पाय उघडे करून ओढ्यातून पायपीट करत जा. 3 तुझ्या नग्नतेचे
प्रदर्शन होईल, आणि तुझी लज्जा अनावृत होईल. मी सूड उगवेन; मी

कोणा मनुष्याला सोडणार नाही.” 4 आमचे उद्धारकर्ता—सर्वसमर्थ
याहवेह हे ज्यांचे नाव आहे— तेच इस्राएलचे पवित्र परमेश्वर आहेत. 5
“स्तब्ध बस, अंधारात जा, खास्द्यांच्या नगराची राणी. तू यापुढे राज्याची
महाराणी म्हणविली जाणार नाहीस. 6 मी माझ्या लोकांवर संतापलो
होतो आणि माझ्या वारसांना भ्रष्ट केले; त्यांना तुझ्या हाती दिले, पण
तू त्यांना थोडीसुध्दा दया दाखविली नाहीस. वयस्कर लोकांवरही तू
अवघड ओझे लादलेस. 7 तू म्हटले, ‘मी सदैव अस्तित्वात आहे—
सर्वकाळाची राणी आहे!’ परंतु तू या गोष्टींचा विचार केला नाहीस किंवा
परिणामी काय होऊ शकेल याकडे लक्ष दिले नाही. 8 “अगे चैनबाजीचे
वेड असणारी, सुरक्षितपणे विलासणारी, आणि स्वतःला म्हणणारी,
‘मीच आहे, माझ्यासारखे कोणीही नाही. मी कधीही विधवा होणार
नाही माझी लेकरे मी कधी गमावणार नाही.’ 9 पण आता या दोन्ही
आपत्ती तुझ्यावर त्याच क्षणी, एकाच दिवशी, पूर्णपणे गुदरतील: तू
विधवा होशील आणि तुझी मुलेही गमावशील. येथे तुझे अनेक चेटके
आणि तुझा सर्व जादूटोणा असूनही हे सर्व पूर्ण मापाने भरून तुझ्यावर
पडेल. 10 तू तुझ्या दुष्टाईवर भरवसा ठेवला ‘मला कोणी पाहत नाही,’
असे तू म्हणालीस. तुझ्या ज्ञानाने व शहाणपणाने तुला पथभ्रष्ट केले
जेव्हा तू स्वतःला म्हणालीस, ‘मीच आहे आणि माझ्यासारखी दुसरी
कोणी नाही.’ 11 तुझ्यावर आपत्ती कोसळेल आणि ती हातचलाखी
करून कशी उलटावी हे तुला कळणार नाही. तुझ्यावर संकट कोसळेल
खंडणी भरूनही त्याचे निवारण करता येणार नाही; जी येईल असे वाटले
नाही अशी एक घोर विपत्ती अकस्मात तुझ्यावर येईल. 12 “मग तुझा
जादूटोणा व मंत्रतंत्र, ज्याचा अनेक वर्षापासून परिश्रम करून तू अभ्यास
केला, ते चालू दे. कदाचित तुला यश मिळेल, कदाचित दहशत निर्माण
करशील. 13 तुला मिळालेल्या सर्व सल्ल्यांनी तू थकली आहेस! तुझे
ज्योतिषी पुढे येवोत, नक्षत्र पाहून महिन्याच्या महिने भविष्यकथन
करणारे, तुझ्यावर पुढे येणाऱ्या संकटापासून तुझे रक्षण करो. 14 ते
निश्चितच भुसकटासारखे आहेत; अग्नी त्यांना भस्म करेल. ते अग्नीच्या
सामर्थ्यापासून स्वतःचेही संरक्षण करू शकत नाहीत. हे ऊब देणारे
निखारे नाहीत; ही जवळ बसविणारी शेकोटी नव्हे. 15 ते तुझ्यासाठी
एवढेच करतील की— ज्यांच्याशी तू आयुष्यभर व्यवहार केलास, आणि
बालपणापासून ज्यांच्यासह कष्ट केलेस, ते सर्व त्यांच्या चुका कायम
करीतच राहतील; आणि तुझा बचाव करण्यासाठी कोणीही राहणार
नाही.

**48** “याकोबाच्या वंशजांनो, हे ऐका तुम्ही जे इस्राएल या नावाने
ओळखले जाता, आणि यहूदाह वंशावळीतून येता, तुम्ही जे
याहवेहच्या नावाने शपथ घेता आणि इस्राएलाच्या परमेश्वराचा धावा
करता— परंतु सत्यतेत किंवा नीतिमत्तेत नव्हे— 2 पवित्र नगरीचे
रहिवासी असल्याचा दावा करता आणि इस्राएलाच्या परमेश्वरावर
अवलंबून असल्याची फुशारकी मारता— ज्यांचे नाव सर्वसमर्थ याहवेह
आहे: 3 भावी काळात काय घडणार याबद्दल भविष्यवाणी मी फार
पूर्वी केलेली आहे मी माझ्या मुखाने ते घोषित करून जाहीर केले; मग
अकस्मात मी ते प्रत्यक्ष केले व तसे घडले. 4 तुम्ही किती हेकेखोर
आहात हे मला माहीत होते; तुमच्या मानेचे स्नायू लोखंडाचे आणि
तुमचे कपाळ कास्याचे आहेत. 5 याकारणास्तव या गोष्टी फार पूर्वीच
सांगितल्या; प्रत्यक्ष वेळ येण्यापूर्वीच त्या मी तुम्हाला जाहीर केल्या,
जेणेकरून तुम्ही असे म्हणू शकणार नाही, ‘आमच्या कोरीव मूर्तीने
हे घडवून आणले; आमच्या लाकडी मूर्तीने व धातूच्या दैवतांनी ती
आज्ञा दिली होती.’ 6 ही भविष्ये तुम्ही ऐकलेली आहेत; त्या सर्वांकडे
बघा. ती तुम्ही स्वीकारीत नाही का? “यापुढे मी तुमच्यापासून लपवून
ठेवलेल्या नव्या गोष्टी सांगतो. 7 त्या आताच घडविण्यात आल्या आहेत,
फार पूर्वी नव्हे; आजच्या आधी त्या तुम्ही ऐकलेल्या नाहीत. तुम्ही
असे म्हणू शकणार नाही, ‘होय, त्या आम्हाला माहीत होत्या.’ 8 तुम्ही
त्या ऐकलेल्या नाहीत किंवा तुम्हाला उमगल्या नाहीत; पूर्वीपासूनच
तुमचे कान उघडलेले नाहीत. कारण मला चांगले माहीत आहे कि
तुम्ही किती विश्वासघातकी आहात; जन्मापासूनच तुम्ही बंडखोर म्हटले
गेले. 9 तरी माझ्या नावाकरिता मी माझ्या प्रकोपास विलंब करेन,
आणि माझ्या प्रशंसेकरिता तुमच्यावरून आवरून धरेन आणि तुमचा
सर्वस्वी नाश करणार नाही. 10 पाहा, मी तुम्हाला शुद्ध केले आहे,
पण चांदीइतके नव्हे; पीडेच्या भट्टीत मी तुमची परीक्षा घेतली. 11
तरीही माझ्या प्रीत्यर्थ, होय, माझ्याच प्रीत्यर्थ मी हे करेन. मी स्वतःची
अपकीर्ती कशी होऊ देईन? माझे गौरव मी इतरांना घेऊ देणार नाही.
12 “याकोबा, मी ज्यांना बोलाविले, त्या इस्राएला, माझे ऐक, मीच
परमेश्वर आहे; मीच आदि आणि मीच अंत आहे. 13 मी माझ्या स्वतःच्या
हाताने पृथ्वीचा पाया घातला, आणि माझ्या उजव्या हाताने आकाश
आच्छादले; मी जेव्हा त्यांना हजर होण्याची आज्ञा देतो, ते सर्व एकत्र उभे
राहतात. 14 “एकत्र या, तुम्ही सर्वजण आणि ऐका: तुमच्या कोणत्या
मूर्तीने तुम्हाला हे भविष्य सांगितले होते? याहवेहचा निवडलेला मित्र
बाबेलच्या विरुद्ध त्यांचे हेतू साध्य करेल; बाबेलवर ते त्यांचा हात
उगारतील. 15 मी, जरी मी हे बोललो; होय, मीच त्याला बोलाविले
आहे. मी त्याला आणेन. आणि या कामगिरीत तो यशस्वी होईल. 16
“माझ्याजवळ या व हे लक्षपूर्वक ऐका: “माझ्या पहिल्या घोषणेपासूनच
मी गुप्तपणे बोललो नाही; ज्यावेळी ते घडेल, मी तिथे हजर आहे.”
आणि आता सार्वभौम याहवेहने, त्यांच्या पवित्र आत्म्याची देणगी
देऊन मला पाठविले आहे. 17 याहवेह हे असे म्हणतात— जे तुमचे
उद्धारकर्ता, इस्राएलचे पवित्र परमेश्वर आहेत: “मी याहवेह, तुमचा
परमेश्वर आहे, जो तुमच्या हितासाठीच तुम्हाला शिक्षण देतो, जे मार्ग
तुम्ही अनुसरावे, त्यांनीच तुम्हाला मार्गस्थ करतो. 18 केवळ तुम्ही
माझ्या आज्ञांकडे लक्ष दिले असते, तर शांती एखाद्या नदीप्रमाणे, तुमचे
सुयश समुद्रातील लाटांप्रमाणे वाहिले असते, 19 तुमचे वंशज वाळूसारखे
झाले असते. तुमची संतती धान्यकणासारखी अगणित असती; त्यांचे
नाव कधीही मिटले नसते ना ते माझ्यासमोर कधी नष्ट झाले असते.”
20 बाबेलमधून निघा, खास्द्यांपासून पलायन करा! हे हर्षगर्जना करून
जाहीर करा व घोषित करा, “याहवेहने आपला सेवक याकोबाचा उद्धार

केला आहे.” अशी घोषणा पृथ्वीच्या दिगंतापर्यंत पोहचू द्या. 21 त्यांनी
त्यांना वाळवंटातून नेले, तेव्हा ते तहानले नाहीत; त्यांनी त्यांच्याकरिता
खडकातून पाणी वाहत बाहेर आणले. त्यांनी खडक दुभांगला आणि
पाणी उफाळून बाहेर आले. 22 “दुष्टांना शांती नसते,” असे याहवेह
म्हणतात.

**49** हे द्वीपांनो, माझे ऐका; हे दूरवरील देशांनो, माझ्या बोलण्याकडे
कान द्या: माझा जन्म होण्यापूर्वीच याहवेहने मला बोलाविले;
गर्भाशयात असतानाच त्यांनी माझे नाव उच्चारले. 2 त्यांनी माझे मुख
तलवारीसारखे धारदार केले आहेत, त्यांनी मला आपल्या हाताच्या
छायेत लपवून ठेवले आहे; त्यांनी मला बाणाप्रमाणे तीक्ष्ण केले आहे
त्यांनी मला त्यांच्या भात्यात झाकून ठेवले आहे. 3 ते मला म्हणाले,
“तू माझा सेवक आहेस; इस्राएला, तुझ्यामध्ये मी माझे गौरव प्रकट
करेन.” 4 मी उत्तर दिले, “मी व्यर्थच सर्व कष्ट केले. मी माझे सामर्थ्य
निरुपयोगीच खर्ची घातले, तरीपण माझे प्रतिफळ म्हणजे याहवेहचा
वरदहस्त आणि माझे बक्षीस माझ्या परमेश्वराकडे आहे.” 5 आणि आता
याहवेह म्हणतात— याकोबाला त्यांच्याकडे परत आणावे व इस्राएलला
स्वतःसाठी एकत्र करावे, यासाठी त्यांचा सेवक व्हावा म्हणून ज्याची
गर्भाशयातच घडण केली, आणि हे काम देऊन माझा बहुमान केला व
माझे परमेश्वर माझे सामर्थ्य आहेत— 6 ते म्हणतात, “याकोबाच्या
कुळांना पुनर्स्थापित करणे आणि माझ्या अवशिष्ट इस्राएलच्या लोकांना
परत आणणे, हे करण्यासाठी माझा सेवक होणे, हे काम फारच लहानसे
आहे, तर पृथ्वीच्या दिगंतापर्यंत माझे तारण पोचवावे यासाठी मी तुला
गैरयहूदीयांसाठी त्यांचा प्रकाश व्हावा असेही करेन.” 7 ज्याला राष्ट्रांनी
तुच्छ व घृणास्पद मानलेले आहे, जो शासनकर्त्यांचा सेवक आहे, त्याला:
उद्धारकर्ता आणि इस्राएलचे पवित्र परमेश्वर, याहवेह असे म्हणतात—
“जेव्हा राजे तुला बघतील तेव्हा ते उठून उभे राहतील, अधिपती तुला
लवून मुजरा करतील, कारण याहवेहने, जे विश्वसनीय आहेत, जे
इस्राएलचे पवित्र परमेश्वर आहेत, त्यांनी तुला निवडले आहे.” 8 याहवेह
असे म्हणतात: “माझ्या कृपेच्या समयी मी तुम्हाला उत्तर देईन, आणि
तारणाच्या दिवशी, मी तुम्हाला साहाय्य करेन; मी तुमचे संगोपन करेन
आणि तुम्हाला सर्व लोकांसाठी एक करार असे करेन, जेणेकरून, तुमची
भूमी पुनर्स्थापित होईल, आणि ओसाड वतने पुन्हा तुमच्या स्वाधीन
होतील, 9 बंदिवानांना ‘बाहेर निघा,’ असे म्हणावे आणि जे अंधारात
आहेत, त्यांना म्हणावे, ‘स्वतंत्र व्हा!’ “ते रस्त्याच्या काठावर चरतील
आणि प्रत्येक नापीक टेकड्यांवर त्यांना गवत सापडेल. 10 ते तहानलेले
किंवा भुकेले होणार नाहीत. वाळवंटातील किंवा सूर्याची उष्णता त्यांना
इजा करणार नाही. ज्यांनी त्यांच्यावर करुणा केली आहे, ते त्याचे
मार्गदर्शन करतील आणि त्यांना पाण्याच्या झर्‍यांजवळून चालवितील.
11 मी माझ्या सर्व पर्वतांच्या सरळ वाटा करेन, आणि माझे महामार्ग
उंचावले जातील. 12 पाहा, ते दूरच्या ठिकाणांहून येतील— काही
उत्तरेकडून, काही पश्चिमेकडून, तर काही सीनीम प्रांतातून येतील.” 13
हे आकाशांनो, हर्षगर्जना करा; अगे पृथ्वी, आनंदित हो; अहो पर्वतांनो,
गीते वर उचंबळून येऊ द्या! कारण याहवेहने आपल्या लोकांचे सांत्वन
केले आहे व त्यांच्या पीडितांवर करुणा ते करतील. 14 परंतु सीयोन
म्हणते, “आमच्या याहवेहने आम्हाला टाकले आहे; प्रभू आम्हाला
विसरले आहेत.” 15 “आईला आपल्या दुधपित्या तान्ह्या बाळाचा
विसर पडेल का आपल्या जन्मदात्या मुलावरील तिची माया कधी
आटेल का? ती कदाचित विसरेल, पण मी तुम्हाला विसरणार नाही. 16
पाहा, तुम्हाला मी माझ्या तळहातावर कोरले आहे व तुझे तट सदोदित
माझ्यासमोर आहेत. 17 तुमची संतती घाईघाईने परत येईल, आणि
तुम्हाला उजाड करणारे तुम्हाला सोडून निघून जातील. 18 तुमची
नजर वर उचला आणि सभोवती पाहा; तुमची सर्व संतती एकत्र येऊन
तुमच्याकडे परत येतील. मी जिवंत आहे,” याहवेह घोषणा करतात,
“तुम्ही त्यांना आभूषणाप्रमाणे अंगावर धारण कराल, वधूप्रमाणे तुम्ही
त्यांना परिधान कराल. 19 “जरी तुम्ही उद्ध्वस्त झाले व ओसाड
करण्यात आले होते आणि जी तुमची भूमी उजाड झाली, ती तुमच्या
लोकांना फारच कमी पडेल, आणि तुम्हाला गिळंकृत करणारे खूप
दूर गेलेले असतील. 20 विलापाच्या काळात जन्मलेल्या संततीला
असे म्हणताना तुम्ही ऐकाल, ‘आम्हाला ही जागा फारच कमी पडते;
आम्हाला राहण्यास आणखी जास्त जागा पाहिजे.’ 21 तेव्हा तू मनात
म्हणशील, ‘यांना माझ्यासाठी कोणी जन्माला घातले? मी दुःखी व
निर्वंश होते; मी बंदिवासात व नाकारलेली होते. माझ्यासाठी यांना कोणी
वाढविले? मला एकटेच टाकण्यात आले होते, मग हे सर्व—कुठून
आले?’” 22 सार्वभौम याहवेह असे म्हणतात: “पाहा, मी राष्ट्रांना इशारा
करेन, मी माझा झेंडा लोकांपुढे उंचावेन; ते तुझ्या पुत्रांना खांद्यांवर
उचलून आणतील व तुझ्या कन्यांना कडेवर घेऊन आणतील. 23 राजे
तुला उपपित्यासमान होतील, व त्यांच्या राण्या तुला उपमातेसमान
होतील. ती तुझ्यासमोर भुईपर्यंत लवून मुजरा करतील; आणि तुझी
पायधूळ चाटतील. तेव्हा मीच याहवेह आहे, हे तुला समजेल. माझ्यावर
आशा ठेवणारा, कधीच निराश होणार नाही.” 24 योद्ध्याच्या हातून लूट
घेता येईल काय? किंवा अत्याचारीकडून नीतिमान बंदिवानांना सोडविता
येईल काय? 25 परंतु याहवेह हे असे म्हणतात: “होय, योद्ध्याच्या हातून
बंदिवान सोडविले जातील, व अत्याचारीकडून लूट हिसकावून घेतली
जाईल; तुमच्याशी झगडणाऱ्यांशी मी झगडेन, आणि मी तुमच्या मुलांना
वाचवेन. 26 तुम्हाला पिडणाऱ्यांना मी त्यांचेच मांस खाऊ घालेन; आणि
त्यांच्याच रक्ताच्या नद्यांचे रक्त पिऊन ते मद्य पिल्यासारखे धुंद होतील.
मग हे सर्व मानवजातीला समजेल कि मी, याहवेह, तुझा त्राता, तुझा
उद्धारकर्ता व याकोबाचा सर्वसमर्थ परमेश्वर आहे.”

**50** याहवेह असे म्हणतात: “मी तुमच्या आईला घटस्फोट दिला,
जो दाखला देऊन मी तिला पाठविले, तो कुठे आहे? मी तुम्हाला
माझ्या कोणत्या कर्जदारांना विकून टाकले? तुमच्या पापांमुळेच तुम्ही
विकले गेले आहात; आणि तुमच्या अपराधांमुळे तुमच्या आईला
पाठविण्यात आले. 2 मी जेव्हा आलो, तेव्हा तिथे कोणीही का नव्हते?
मी जेव्हा हाक मारली, तेव्हा कोणीही उत्तर का दिले नाही? तुम्हाला

सोडविण्यासाठी माझा हात फारच आखूड होता काय? तुमचे तारण
करण्यास माझ्याकडे सामर्थ्य नाही काय? मी केवळ धमकाविले तरी
समुद्र आटून जाईल! नद्यांचे मी वाळवंटात रूपांतर करतो; त्यातील मासे
पाण्याच्या अभावी सडतात आणि तहानेने मरतात. 3 मी आकाशास
अंधकार परिधान करवितो आणि गोणपाट त्याचे आच्छादन करतो.” 4
सार्वभौम याहवेहने माझ्या मुखात उपदेशात्मक जीभ दिली आहे, त्यावर
थकलेल्या लोकांना पडू न देणारी वचने आहेत, ते मला रोज सकाळी
जागे करतात, शिक्षण प्राप्त करणाऱ्यासाठी उघडावे, तसे ते माझे कान
उघडतात. 5 सार्वभौम याहवेहनी माझे कान उघडले आहेत; मी बंडखोर
नव्हतो, मी मागे फिरलो नाही. 6 जे मला चाबकाचे फटकारे मारतात,
त्यांना मी आपली पाठ देऊ केली, जे माझी दाढी उपटतात, त्यांना मी
आपले गाल देऊ केले; उपहास करणारे व थुंकणाऱ्यांपासून मी तोंड
लपवित नाही. 7 मी लज्जित होणार नाही, कारण सार्वभौम याहवेह
मला साहाय्य करतात. म्हणूनच मी माझा चेहरा गारगोटीसारखा कठीण
केला आहे आणि मी लज्जित होणार नाही, हे मला माहीत आहे. 8
मला न्याय देणारे माझ्या निकट आहेत. मग माझ्याविरुद्ध कोण आरोप
करेल? चला आपण एकमेकांचा सामना करू या! माझ्यावर आरोप
करणारा कोण आहे? त्याने माझा सामना करावा! 9 सार्वभौम याहवेह
मला साहाय्य करतात. मला कोण दोषी ठरविणार? माझ्यावर आरोप
करणारे सर्व जुन्या कपड्याप्रमाणे विरून जातील; कसर त्यांना खाऊन
टाकेल. 10 तुमच्यामध्ये कोण आहे जो याहवेहचे भय बाळगतो आणि
त्यांच्या सेवकाच्या आज्ञा पाळतो? जो अंधारात चालतो, ज्याच्याकडे
प्रकाश नाही, त्याने याहवेहच्या नावावर विश्वास ठेवावा आणि त्याने
आपल्या परमेश्वरावर विसंबून राहावे. 11 परंतु आता, तुम्ही जे अग्नी
प्रज्वलित करता आणि स्वत:ला जळत्या मशालीचा पुरवठा करता,
जा, तुम्ही स्वतः प्रज्वलित केलेल्या, आणि तुम्ही ज्वलंत केलेल्या
मशालीच्या प्रकाशात चला, माझ्यापासून मात्र तुम्हाला हे प्राप्त होईल:
तुम्ही यातनामध्ये पडून राहाल.

**51** “तुम्ही, ज्यांनी नीतिमत्तेचा ध्यास घेतला आहे व जे याहवेहचा
शोध घेता, ते सर्वजण, माझे ऐका: ज्या खडकातून तुम्हाला
कापून काढले, आणि ज्या खाणीतून तुम्हाला खोदून काढले, त्याकडे
बघा; 2 होय, तुमचा पिता अब्राहामाकडे, आणि साराहकडे, जिने
तुम्हाला जन्म दिला, त्यांच्याकडे बघा. मी अब्राहामाला बोलाविले, तेव्हा
तो एकटा होता, मी त्याला आशीर्वाद दिला, तेव्हा तो बहुगुणित झाला.
3 तर याहवेह सीयोनचे निश्चितच सांत्वन करतील आणि तिच्या सर्व
ओसाड प्रदेशाकडे दयेने बघतील; ते तिचे वाळवंट एदेन बागेसारखे
सुंदर करतील, तिची उजाड ठिकाणे याहवेहच्या बागेसारखी होतील.
तिथे आनंद व उल्लास व्यक्त करण्यात येईल. उपकारस्मरण व गीतांचे
स्वर तिथे ऐकू येतील. 4 “माझ्या लोकांनो, माझे ऐका; माझ्या देशा,
माझ्याकडे लक्ष दे: माझाकडूनच तुम्हाला उपदेश प्राप्त होईल. माझा
न्याय राष्ट्रांसाठी प्रकाश बनेल. 5 माझी नीतिमत्ता वेगाने जवळ येत
आहे, माझे तारण येण्याच्या मार्गावर आहे. माझी भुजा राष्ट्रांना न्याय
प्रदान करेल. द्वीप माझा शोध घेतील आणि माझ्या भुजेची आशेने वाट
पाहतील. 6 तुमची दृष्टी वर आकाशाकडे करा, आणि खाली पृथ्वीकडे
पाहा; आकाश धुरासारखे विरून नाहीसे होईल, पृथ्वी वस्त्रांप्रमाणे जीर्ण
होईल आणि पृथ्वीवरील लोक चिलटांप्रमाणे मरतील. परंतु माझे तारण
सदासर्वकाळ टिकेल. माझ्या नीतिमत्तेचा कधीही अंत होणार नाही. 7
“हे, नीतिमत्ता जाणणाऱ्या लोकांनो, माझ्या नियमांवर अंतःकरणापासून
भाव ठेवणाऱ्यांनो माझे ऐका: मर्त्य मानवाच्या उपहासाने भयभीत
होऊ नका किंवा त्यांनी केलेल्या निंदेला घाबरू नका. 8 कारण कसर
त्यांचाही वस्त्रांसारखा नाश करेल; कीड लोकरीसारखे त्यांनाही खाऊन
टाकेल. परंतु माझी नीतिमत्ता सदासर्वकाळ टिकेल. व माझे तारण
पिढ्यान् पिढ्या टिकून राहील.” 9 उठा, उठा, हे याहवेहच्या भुजा,
सामर्थ्याचे वस्त्र परिधान करा. उठा, पूर्वी जसे जागे झाले होते, पुरातन
पिढीत जसे उठले होते. नाईल नदीतील राहाब सर्पाचे तुकडे केले, ते
तुम्हीच नाही का, त्या समुद्रातील राक्षसाचा छेद केला, ते तुम्हीच नाही
का? 10 ते तुम्हीच नाही का, ज्यांनी समुद्र आटवून कोरडा केला, त्या
अति खोल पाण्याला आटविले, ज्यांनी समुद्राच्या खोलीत मार्ग तयार
केला जेणेकरून तुमचे सोडविलेले लोक ते पार करतील? 11 ज्यांना
याहवेहने सोडविले, ते लोक परत येतील. ते हर्षगीते गात सीयोनात
प्रवेश करतील; अनंतकाळचा उल्हास त्यांच्या मस्तकावर असेल. हर्ष व
उल्हासाने ते भरून जातील, दु:ख व शोक दूर पळून जातील. 12 “मी,
तो मीच आहे, जो तुमचे सांत्वन करेल. तुम्ही कोण आहात जे मर्त्य
मानवांना भिता, मानवप्राणी, जे केवळ गवताप्रमाणे असतात, 13 तुम्ही
जे तुमच्या निर्माणकर्त्याला, याहवेहला विसरता, ज्यांनी आकाश ताणून
पसरले आणि ज्यांनी पृथ्वीचा पाया घातला, तुम्ही सतत दहशतीखाली
का जगता दिवसभर विरोधकांच्या क्रोधाच्या भीतीत का राहता? कारण
त्यांनी तुमचा नाश करण्याचा निर्धार केला आहे? विरोधकांचा क्रोध
कुठे आहे? 14 भीतीने थिजलेल्या बंदिवानांची लवकरच सुटका होईल;
ते त्यांच्या अंधारकोठडीत मरणार नाहीत, त्यांना भाकरीची उणीव
भासणार नाही. 15 कारण मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे, जो लाटांनी
गर्जना करावी म्हणून समुद्र ढवळतो— सर्वसमर्थ याहवेह हे त्याचे नाव
आहे. 16 मी माझी वचने तुमच्या मुखात घातली आहेत आणि तुम्हाला
माझ्या हाताच्या सावलीत झाकून ठेवले आहे— मीच आहे, ज्याने
आकाशाला स्थिर असे ठेवले, आणि सर्व पृथ्वीसाठी पाया घातला,
आणि जो सीयोनला म्हणतो, ‘तुम्ही माझे आहात.’” 17 ऊठ, ऊठ! अगे
यरुशलेमे, जागी हो, तू, जिने क्रोधाचा प्याला याहवेहच्या हातून भरपूर
प्याला आहे, दहशतीचा प्याला तू गाळासकट पिऊन टाकला आहेस, तो
प्याला, जो लोकांना मद्यधुंद करून अडखळवितो. 18 तिने जन्माला
घातलेल्या लेकरांपैकी तिचे मार्गदर्शन करण्यासाठी कोणीही नव्हते; तिने
संगोपन केलेल्या लेकरांपैकी तिचा हात धरून चालविण्यासाठी कोणीही
नव्हते. 19 ओसाडी आणि विध्वंस, दुष्काळ आणि तलवार ही दुप्पट
अरिष्टे तुझ्यावर आली आहेत— कोण तुझे सांत्वन करू शकेल? कोण
तुझे दु:खपरिहार करू शकेल? 20 कारण तुझी लेकरे ग्लानी येऊन,

प्रत्येक रस्त्याच्या कोपऱ्यात पडली आहेत, हरिणाप्रमाणे ते जाळयात
अडकलेले आहेत. याहवेहच्या क्रोधाने आणि तुमच्या परमेश्वराच्या
धमकीने भरले आहेत. 21 म्हणून गांजलेल्यांनो, हे ऐका! तुम्ही धुंद
झालेले आहात, मद्याने नव्हे. 22 तुमचे सार्वभौम याहवेह, तुमचे परमेश्वर,
जे त्यांच्या लोकांना सुरक्षित ठेवतात, ते असे म्हणतात: “पाहा, जो
प्याला तुम्हाला धुंद करून अडखळवितो तो मी तुमच्या हातातून काढून
घेतला आहे; त्या प्याल्यातून, माझ्या क्रोधाच्या प्याल्यातून तुम्ही यापुढे
कधीही पिणार नाही. 23 तुमचा छळ करणाऱ्यांच्या हातात मी तो देईन,
जे तुम्हाला म्हणाले, ‘भूमीवर पडा, म्हणजे आम्ही तुमच्यावरून चालत
जाऊ.’ आणि तुम्ही तुमची पाठ जमिनीसारखी केली, जणू रस्ताच,
ज्यावरून चालत जावे.”

**52** ऊठ, ऊठ, हे सीयोना, सामर्थ्याचे वस्त्र परिधान कर! यरुशलेम,
हे पवित्र नगरी, आपली वैभवशाली वस्त्रे परिधान कर. बेसुंती
आणि भ्रष्ट यापुढे तुझ्या वेशीतून प्रवेश करणार नाहीत. 2 हे यरुशलेमे,
तुझ्यावरील धूळ झटकून टाक, ऊठ व सिंहासनारुढ हो. बंदिवान
सीयोनकन्ये, दास्यतेची बंधने आपल्या गळयांतून काढून मुक्त हो. 3
कारण याहवेह म्हणतात: “तुम्हाला विनामूल्य बंदिवासात विकले, आणि
आता पैशावाचून तुम्हाला सोडविण्यात येईल.” 4 कारण सार्वभौम
याहवेह असे म्हणतात: “प्रथम माझे लोक इजिप्त देशात राहवयास गेले;
नंतर अश्शूरच्या लोकांनी त्यांचा छळ केला.” 5 याहवेह घोषणा करतात,
“आणि आता माझ्याकडे काय राहिले आहे? माझ्या लोकांना विनामूल्य
नेण्यात आले आहे, आणि जे त्यांच्यावर सत्ता गाजवितात ते त्यांचा
उपहास करतात,” याहवेह घोषणा करतात, “संपूर्ण दिवसभर माझ्या
नावाची सतत निंदा करण्यात येते. 6 माझे लोक माझे नाव जाणतील;
म्हणून त्या दिवशी त्यांना समजेल कि ते भविष्यकथन करणारा तो
मीच आहे. होय, तो मीच आहे.” 7 पर्वतावरून शुभवार्ता आणणाऱ्याचे
पाय किती मनोरम आहेत, जे आनंददायी वार्ता आणतात, जे शांतीची
घोषणा करतात, जे शुभ संदेश आणतात, जे तारणाची घोषणा करतात,
जे सीयोनास म्हणतात, “तुमचे परमेश्वर राज्य करतात!” 8 ऐका!
तुमचे पहारेकरी त्यांचा आवाज उंचावतात; एकत्र मिळून ते आनंदाचा
जयघोष करतात. जेव्हा याहवेह सीयोनास परत येतील, ते प्रत्यक्ष
त्यांच्या डोळयाने पाहतील. 9 यरुशलेमच्या उद्ध्वस्त स्थळांनो, सर्वांनी
एकत्र उसळून हर्षगीतांनी जयघोष करा, कारण याहवेहने आपल्या
लोकांचे सांत्वन केले आहे, त्यांनी यरुशलेमास सोडविले आहे. 10
याहवेह आपली पवित्र भुजा सर्व राष्ट्रांसमक्ष उघडणार आहेत, आणि
पृथ्वीच्या सर्व दिगंतापर्यंत आमच्या परमेश्वराचे तारण दिसेल. 11 निघा,
निघा, इथून बाहेर पडा! अपवित्र वस्तूला स्पर्श करू नका! तुम्ही जे
याहवेहच्या मंदिरातील पात्रांची नेआण करता, इथून बाहेर पडा व
स्वतःला शुद्ध करा. 12 परंतु तुम्हाला इथून पलायन करावे लागणार नाही
वा घाईने निघावे लागणार नाही; कारण याहवेह तुमच्यापुढे जातील,
आणि इस्राएलचे परमेश्वर तुमचे पाठीराखे असतील. 13 पाहा, माझा
सेवक सुज्ञतेने वागेल; तो उच्च केला जाईल व उत्कर्ष पावेल आणि
त्याचे मोठे गौरव होईल. 14 जसे त्याला पाहताच अनेकजण विस्मित
झाले होते— त्याचे स्वरूप मनुष्यप्राण्याच्या पलीकडे विद्रुप करण्यात
आले होते आणि त्याचा आकार मानवसदृश्य राहिला नव्हता— 15
यास्तव तो अनेक राष्ट्रांवर शिंपडेल, आणि त्याच्यामुळे राजे आपले मुख
बंद करतील. कारण त्यांना पूर्वी कधी कोणी जे सांगितले नव्हते, ते
आता बघतील, आणि ज्यांनी ऐकले नाही, त्यांना समजेल.

**53** आमच्या वार्तेवर कोणी विश्वास ठेवला आणि याहवेहचा भुज
कोणाला प्रकट झाला आहे? 2 त्यांच्यासमोर तो कोवळया
अंकुरासारखा वाढला, शुष्क भूमीतून उगविलेल्या मुळासारखा होता.
आम्हाला आकर्षित करेल असे कोणतेही सौंदर्य वा वैभव त्याच्यामध्ये
नव्हते, तो आम्हाला हवासा वाटेल असे त्याच्या स्वरुपात काहीही नव्हते.
3 मनुष्यांनी त्याला तुच्छ लेखले आणि त्याला नाकारले, कारण क्लेशांनी
व्यापलेला व व्याधींशी परिचित असा तो पुरुष होता. जणू एखाद्याला
पाहून लोकांनी आपली तोंडे लपवावी तसा तो तिरस्कृत व खालच्या
दर्जात गणलेला होता. 4 तरी देखील त्याने आमचे दुःख स्वतःवर घेतले,
आणि आमचे क्लेश वाहिले, आम्हाला मात्र वाटले की परमेश्वरानेच
त्याला ही शिक्षा दिली, त्यांनीच दुःखी केले व ही पीडा दिली. 5 परंतु तो
आमच्या अपराधांमुळे भोसकला गेला, तो आमच्या पापामुळे चिरडला
गेला; आम्हाला शांती देणारी शिक्षा त्याच्यावर आली, आणि त्याच्या
जखमांद्वारे आम्हाला आरोग्य प्राप्त झाले. 6 आम्ही सर्व मेंढराप्रमाणे
भटकून गेलो होतो, आम्हा प्रत्येकाने स्वतःचेच मार्ग धरले होते; आणि
याहवेहने आम्हा सर्वांचा दोष त्याच्यावर लादला. 7 त्याला छळले व
जाचले, तरीही त्याने आपले मुख उघडले नाही; वधावयाला नेणाऱ्या
कोकराप्रमाणे त्याला नेण्यात आले, आणि लोकर कातरणाऱ्यांसमोर
मेंढरू जसे स्तब्ध राहते, तसेच त्याने आपले मुख उघडले नाही. 8
अत्याचार करून, दोषी ठरविल्यावर ते त्याला जिवे मारण्यासाठी घेऊन
गेले. तरी त्याच्या पिढीतून कोणी विरोध केला? कारण तो जिवंताच्या
भूमीवरून काढून टाकण्यात आला; माझ्या लोकांच्या अपराधांसाठी
त्याला शिक्षा देण्यात आली. 9 दुष्ट माणसांच्या सोबत त्याला कबर
नेमून देण्यात आली, आणि श्रीमंताच्या कबरेमध्ये पुरण्यात आले, परंतु
त्याने काहीही हिंसा केली नव्हती, आणि त्याच्या मुखात कोणतेही
कपट नव्हते. 10 परंतु त्याला चिरडून टाकावे व पीडित करावे अशीच
याहवेहची इच्छा होती, आणि जरी त्याचे जीवन पापार्पण म्हणून अर्पण
झाले, तरी तो त्याची संतती बघेल आणि त्याचा जीवनकाल लांबेल,
आणि याहवेहची इच्छा त्याच्या हातून सिद्धीस जाईल. 11 वेदना सहन
केल्यानंतर, तो जीवनाचा प्रकाश बघेल आणि समाधान पावेल; माझा
नीतिमान सेवक त्याच्या सुज्ञतेमुळे अनेकांना निर्दोष ठरवेल, आणि
त्यांची पापे स्वतःवर लादून घेईल. 12 म्हणूनच महान लोकांसह मी
त्याला वतन देईन, आणि अनेक सामर्थ्यशाली लोकांसह लूट वाटून
घेईल. कारण त्याने आपले जीवन मरेपर्यंत ओतले, आणि अपराधी
लोकांत त्याची गणना झाली. त्याने अनेकांचा पापाचा भार वाहिला,
आणि पाप्यांसाठी मध्यस्थी केली.

**54** “हे वांझ स्त्रिये, तू जी कधीही प्रसवली नाही; उचंबळून गीत
गा, मोठ्याने जयघोष कर, कारण विवाहित स्त्रीपेक्षा, तू, जिला
प्रसूती वेदना झाल्या नाही, त्या परित्यक्ता स्त्रीला अधिक लेकरे आहेत,”
असे याहवेह म्हणतात. 2 “आपले तंबू प्रशस्त कर, तुझ्या तंबूच्या
कनातीचा विस्तार वाढव, हात आवरू नको; दोरबंद लांब कर, खुंट्या
मजबूत कर. 3 कारण तू उजवीकडे व डावीकडे पसरशील; तुझे वंशज
इतर राष्ट्रांना हुसकावून लावतील आणि त्यांची उजाड झालेली नगरे पुन्हा
वसवतील. 4 “भयभीत होऊ नको; तुला लज्जित व्हावे लागणार नाही.
अप्रतिष्ठेला घाबरू नको; तुला अपमानित व्हावे लागणार नाही. तुझ्या
तारुण्यातील लज्जा तू विसरून जाशील आणि वैधव्यातील दु:खांची
तुला आठवणही राहणार नाही. 5 कारण तुझा निर्माणकर्ता तुझा पती
आहे— सर्वसमर्थ याहवेह हे त्यांचे नाव आहे— इस्राएलचे पवित्र
परमेश्वर तुझे उद्धारकर्ता आहेत; त्यांना सर्व पृथ्वीचे परमेश्वर म्हणतात.
6 याहवेह तुला माघारी बोलावतील जणू काही तू त्याग केलेली व दु:खी
आत्म्याची पत्नी होतीस— केवळ टाकून देण्याकरिता जी तारुण्यात
विवाहित झाली होती,” असे तुझे परमेश्वर म्हणतात. 7 “केवळ काही
क्षणासाठी मी तुझा त्याग केला होता, पण आता मोठ्या करुणेने
मी तुला जवळ घेईन. 8 क्षणिक रागाच्या भरात मी थोडा वेळ माझे
मुख तुझ्यापासून लपविले होते, परंतु आता सर्वकाळच्या प्रीतीने मी
तुझ्यावर करुणा करेन,” असे याहवेह तुझे उद्धारकर्ता म्हणतात. 9 “हे
माझ्याकरिता नोआहच्या दिवसासारखे आहे, मी पृथ्वी पुन्हा नोआहच्या
जलाने आच्छादित करणार नाही, अशी मी शपथ वाहिली होती. आता
ही शपथ वाहतो, यापुढे तुझ्यावर क्रोधित होणार नाही, तुला पुन्हा
कधीही रागविणार नाही. 10 कारण पर्वत हलतील व टेकड्या काढून
टाकल्या जातील, परंतु तुझ्यावरील माझी अढळ प्रीती कधीही हलणार
नाही वा माझा शांतीचा करार कधीही भंग होणार नाही,” असे याहवेह,
तुझ्यावर करुणा करणारे म्हणतात. 11 “हे पीडित नगरी, वादळांनी
फटकारलेल्या व सांत्वन न पावलेल्यांनो, पाचूरत्नांनी मी तुमची पुन्हा
उभारणी करेन, व तुमचा पाया मौल्यवान नीलमणींवर करेन. 12 अगे
यरुशलेमे, मी तुझे बुरूज गोमेद रत्नांनी बांधीन आणि तुझ्या वेशी
चकाकणाऱ्या रत्नांच्या व तुझ्या सर्व भिंती मौल्यवान रत्नांच्या करेन.
13 तुझ्या सर्व लेकरांना याहवेह शिकवतील, व त्यांना मोठी शांती प्राप्त
होईल. 14 तुम्ही नीतिमत्तेने प्रस्थापित व्हाल: जुलूमशाही तुमच्यापासून
दूर राहील; तुम्हाला काहीही भयभीत करू शकणार नाही. दहशत
तुमच्यापासून दूर करण्यात येईल; ती तुमच्याजवळ येणार नाही. 15
जर कोणी तुमच्यावर हल्ला केला, तर ती माझी करणी नसेल; जे
कोणी तुमच्यावर हल्ला करतील, ते तुम्हाला शरण जातील. 16 “पाहा,
भट्टीतले कोळसे फुलविणाऱ्या व कामास येणारी शस्त्रास्त्रे घडविणाऱ्या
लोहाराला मीच उत्पन्न केले आहे. व आपत्ती करणाऱ्या विनाशकाची
उत्पत्तीही मीच केली आहे; 17 तुमच्याविरुद्ध घडविलेले कोणतेही शस्त्र
कधीच सफल होणार नाही आणि तुमच्यावर आरोप करणारी प्रत्येक
जीभ खोटी ठरविली जाईल. याहवेहच्या सेवकांचा हा वारसा आहे, हाच
न्याय मी तुम्हाला दिला आहे,” अशी याहवेह घोषणा करतात.

**55** “तुमच्यातील सर्व तान्हेल्यांनो, पाण्याजवळ या; आणि तुम्ही,
ज्यांच्याकडे पैसे नाहीत, या, घ्या व खा! या, द्राक्षारस अथवा दूध
घ्या पैसे न देता, विनामूल्य घ्या. 2 जी भाकर नाही त्या अन्नपदार्थांवर
व्यर्थ पैसे का खर्च करावे, आणि ज्याने समाधान होत नाही त्यासाठी
कष्ट का करावे? ऐका, माझे ऐकून घ्या आणि जे चांगले आहे ते खा,
आणि हे उत्तम अन्नपदार्थ खाऊन तुम्ही अत्यंत आनंदित व्हाल. 3
माझे ऐका आणि मजकडे या; लक्ष द्या, म्हणजे तुम्ही जिवंत राहाल. मी
तुमच्याबरोबर सर्वकाळचा करार करेन, माझ्या विश्वासू प्रीतीचे वचन
मी दावीदाला दिलेले आहे. 4 पाहा, मी त्याला लोकांसमोर साक्षीदार,
एक शासनकर्ता व लोकांचा अधिकारी बनविले. 5 निश्चितच ज्यांना
तुम्ही ओळखत नाही अशा राष्ट्रांना बोलवाल, आणि ज्यांना तुम्ही
ओळखत नाही अशी राष्ट्रे तुमच्याकडे पळत येतील, कारण याहवेह,
तुमचे परमेश्वर, इस्राएलचे पवित्र परमेश्वर आहेत, त्यांनी तुम्हाला गौरवाने
संपन्न केले आहे.” 6 याहवेहच्या प्राप्तीचा काळ आहे, तेव्हा पर्यंतच
त्यांचा शोध घ्या. ते समीप आहेत, तेव्हा पर्यंतच त्यांचा धावा करा. 7
दुष्टांनी आपले दुष्टमार्ग सोडून द्यावे अनीतिमानांनी त्यांचे विचार मनातून
काढावे. त्यांनी याहवेहकडे वळावे, म्हणजे ते त्यांच्यावर दया करतील,
आपल्या परमेश्वराकडे धाव घ्यावी, म्हणजे ते त्यांना मुक्तपणे क्षमा
करतील. 8 “जे माझे विचार आहेत, ते तुमचे विचार नाहीत, माझे मार्ग,
ते तुमचे मार्ग नाहीत.” असे याहवेह म्हणतात. 9 “कारण आकाश
पृथ्वीहून जसे उंच आहे, तसे माझे मार्ग तुमच्या मार्गांहून उच्च आहेत
आणि माझे विचार तुमच्या विचाराहून उच्च आहेत. 10 आकाशातून
पाऊस व हिम ज्याप्रमाणे खाली पडतात आणि पृथ्वीला भिजवून
टाकल्याशिवाय परत जात नाहीत आणि तिला अंकुरतात व बहरतात,
जेणेकरून पेरणाऱ्यासाठी बीज निपजते व खाणाऱ्याला भाकर मिळते,
11 त्याप्रमाणे माझे वचन, जे माझ्या मुखातून बाहेर पडते: ते कार्य
केल्याशिवाय माझ्याकडे परत येत नाही, पण ते माझ्या इच्छेप्रमाणे सर्व
परिपूर्ण करते व ज्या कार्यासाठी पाठविण्यात आले, तो माझा हेतू साध्य
करते. 12 तुम्ही आनंदाने प्रस्थान कराल व शांतीने मार्गदर्शित व्हाल;
पर्वते आणि टेकड्या, तुमच्यापुढे उचंबळून गीते गातील, आणि रानातील
सर्व वृक्ष टाळ्या वाजवतील. 13 काटेरी झुडपांच्या ऐवजी तिथे, सुरूचे
वृक्ष वाढतील, आणि तिथे रिंगणीच्या जागी मेंदीची झाडे वाढतील. हे
याहवेहच्या नामाच्या थोरवीकरिता असेल जे अनंतकाळपर्यंत टिकेल,
असे ते सर्वकाळचे चिन्ह होईल.”

**56** याहवेह असे म्हणतात: “न्यायीपणाने वागा, जे योग्य तेच करा,
कारण माझे तारण अगदी हाताशी आलेले आहे आणि माझे
नीतिमत्व लवकरच प्रगट होणार आहे. 2 जो शब्बाथाच्या दिवसास
अपवित्र न करता त्याचे पालन करतो, अयोग्य गोष्ट करण्यापासून
स्वत:ला आवरतो, या सर्व गोष्टींवर अढळ राहतो, जो असे वागतो, तो

मनुष्य धन्य होय.” 3 जो विदेशी मनुष्य याहवेहशी एकनिष्ठ राहतो, त्याने
असे म्हणू नये, “याहवेह निश्चितच मला त्यांच्या लोकांमधून वगळतील.”
आणि कोणत्याही षंढाने अशी तक्रार करू नये, “मी तर केवळ एक
शुष्क वृक्ष आहे.” 4 तर याहवेह असे म्हणतात: “जे षंढ माझे शब्बाथ
पवित्रपणे पाळतात, जे मला आवडणाऱ्या गोष्टीच निवडतात, आणि
माझा करार दृढ धरून राहतात— 5 त्यांना मी माझ्या मंदिरामध्ये व
त्याच्या भिंतीच्या आत पुत्र व कन्यापेक्षाही चांगले असे संस्मरणीय
बनवेन व एक नाव देईन. त्यांना मी सर्वकाळ टिकणारे नाव देईन, जे
नाव कधीही नाहीसे होणार नाही. 6 आणि जे विदेशी याहवेहशी एकनिष्ठ
राहतात, जे त्यांची सेवा करतात, त्यांच्या नावावर प्रीती करतात, आणि
त्यांचे सेवक झाले आहेत, जे सर्व त्यांच्या शब्बाथास अपवित्र न करता
त्याचे पालन करतात, आणि माझा करार दृढ धरून राहतात— 7 अशांना
मी माझ्या पवित्र पर्वतावर आणेन आणि माझ्या प्रार्थना मंदिरामध्ये
त्यांना आनंदित करेन. त्यांच्या होमार्पणे व अर्पणांचा माझ्या वेदीवर
स्वीकार केला जाईल; कारण माझ्या घराला सर्व राष्ट्रांसाठी प्रार्थनेचे
घर असे म्हणतील.” 8 जे इस्राएलच्या निर्वासित झालेल्यांना एकत्र
करतात, ते सार्वभौम याहवेह अशी घोषणा करतात— “ज्यांना पूर्वी
एकत्र करण्यात आले आहे, त्या लोकांशिवाय इतर लोकांनाही मी
त्यांच्यात गोळा करेन.” 9 या, कुरणातील सर्व पशूंनो, या, रानातील सर्व
हिंस्र श्वापदांनो, येऊन आधाशीपणे खा! 10 इस्राएलचे पहारेकरी आंधळे
आहेत, ते सर्व ज्ञानशून्य आहेत; ते सर्व मुके कुत्रे आहेत, त्यांना भुंकता
येत नाही; ते पडून राहतात व स्वप्ने पाहतत, त्यांना झोपायला फार
आवडते. 11 ते कुत्र्याप्रमाणे खूप खादाड आहेत; त्यांची तृप्ती कधीही
होत नाही. ते असमंजस मेंढपाळ आहेत; ते सर्व आपल्याच मर्जीने
चालतात, केवळ स्वतःच्या स्वार्थाची काळजी घेतात. 12 प्रत्येकजण
म्हणतो, “या, मला मद्य आणू द्या! चला, मद्य पिऊन आपण धुंद होऊ
या! आणि उद्याचा दिवसही आजसारखाच असेल, किंबहुना याहून जास्त
चैनीचा असेल.”

**57** नीतिमान नष्ट होतात, आणि ते कोणीही मनावर घेत नाही;
दयाळू माणसे उचलून घेतली जातात, आणि कोणालाही हे
उमगत नाही कि भावी काळातील अनर्थापासून राखण्यासाठीच त्यांना
नेण्यात येते. 2 जे नीतिमार्गाने चालतात ते शांती पावतात; त्यांच्या
मरणोत्तर त्यांना विसावा प्राप्त होतो. 3 “पण तुम्ही—अहो चेटकिणीच्या
पुत्रांनो, जारकर्मीच्या व वेश्यांच्या संतानांनो, तुम्ही इकडे या! 4 तुम्ही
कोणाची चेष्टा करता? कोणाकडे पाहून नाके मुरडता व आपल्या जिभा
दाखविता? तुम्ही बंडखोरांची पिल्ले व लबाडांची संतती नाही काय? 5
एला वृक्षाच्या झाडीत आणि प्रत्येक घनदाट वृक्षाच्या सावलीत तुम्ही
कामांध होता; खोल दऱ्यात, खडकांच्या कड्याखाली नरबळी म्हणून
आपल्या लेकरांचे बळी देता. 6 खडकांच्या कड्याखालील गुळगुळीत
दगडाच्या मूर्ती ही तुझी दैवते आहेत; खरोखर, हाच तुझा भाग आहे.
होय, त्यांनाच तू पेयार्पणे करते आणि अन्नार्पणे करते. हे सर्व बघून,
मला पाझर फुटेल का? 7 डोंगरमाथ्यांवर व अत्यंत उच्चस्थानी तू
आपला बिछाना बनविला आहेस; तिथे वर जाऊन तू तुझी अर्पणे
वाहिली. 8 बंद दरवाज्यामागे व उंबरठ्यावर तू तुझ्या अन्य दैवतांची
चिन्हे लावली आहेस. माझा नकार करून, तू तुझा बिछाना उघडा केला
आहेस, त्यावर तू झोपून तो आणखी जास्त उघडला आहेस; ज्यांचा
बिछाना तुला प्रिय वाटतो, त्यांच्याशी तू समेट केला आहे, आणि त्यांच्या
नग्न शरीराकडे तू कामातुर नजरेने बघते. 9 मोलखाला तू जैतुनाचे तेल
वाहिले व तुझी सुगंधी अत्तरे वाढवून अर्पण केलीस. तू तुझ्या दूतांना
दूरवर पाठविले; अगदी प्रत्यक्ष मृतलोकांच्या राज्यापर्यंत गेलीस. (Sheol
h7585) 10 हे सर्व करून तू स्वतःला थकवून टाकले, पण तू असे म्हटले
नाही, ‘हे किती निराशाजनक आहे.’ स्वतःला नव्या बलाने संचारित केले,
म्हणून तू मूर्छित झाली नाही. 11 “इतकी दहशत व भीती तुला कोणाची
वाटते कि तू माझ्याशी असत्याने वागते, तू माझे स्मरण केले नाही कि हे
मनावरही घेतले नाही? मी बराच काळ निःशब्द राहिलो आहे म्हणून का
तुला माझा धाक वाटत नाही? 12 मी तुझे नीतिमत्व आणि तुझी कर्मे
उघडकीस आणेन, आणि ती तुला लाभदायक होणार नाही. 13 जेव्हा तू
मदतीसाठी धावा करशील, तुझ्या संग्रहातील मूर्तींना तुझा बचाव करू
दे! वारा त्या सर्वांना उडवून नेईल, श्वासाच्या एका फुंकराने त्या उडून
जातील. परंतु जो कोणी माझा आधार घेतो तो या भूमीचा ताबा घेईल
व माझ्या पवित्र पर्वताचा स्वामी होईल.” 14 आणि असे म्हणण्यात
येईल: “बांधा, बांधा, महामार्ग बांधा! माझ्या लोकांच्या वाटेतील सर्व
अडथळे बाजूला करा.” 15 जे अनंतकाळ अस्तित्वात आहेत, ज्यांचे नाम
पवित्र आहे जे सर्वोच्च व परमथोर आहेत, ते म्हणतात— “मी परमोच्च
व पवित्रस्थानी राहतो, परंतु जे पश्चात्तापी व आत्म्याने लीन आहेत,
अशांसोबतही राहतो, मी नम्र जणांच्या आत्म्यांना ताजेतवाने करतो व
पश्चात्तापी अंतःकरणाच्या लोकांना नवा धीर देतो. 16 मी त्यांना कायमचे
दोषी ठरविणार नाही, नेहमीच क्रोध प्रकट करणार नाही, नाहीतर मी
प्रत्यक्ष माझ्या हातांनी घडवले लोक माझ्यामुळे मूर्छित होतील. 17
मी त्यांच्या पापमय लोभामुळे संतापलो; आणि त्यांना ताडण केले
व माझे मुख रागाने लपविले, तरी त्यांनी स्वेच्छेने करण्याचे सोडले
नाही. 18 त्यांची वर्तणूक मी पाहिली आहे, तरीही मी त्यांना निरोगी
करेन; मी त्यांचे मार्गदर्शन करेन व इस्राएलच्या दुःखितांचे सांत्वन परत
देईन, 19 त्यांच्या ओठांवर प्रशंसा निर्माण करेन. शांती, शांती, दूरच्या व
जवळच्या सर्वांना शांतीचा लाभ होवो, आणि मी त्या सर्वांना बरे करेन.”
असे याहवेह म्हणतात. 20 परंतु दुष्ट लोक खवळलेल्या सागरांसारखे
आहेत, ज्याला विसावा नसतो, ज्याच्या लाटा उसळून चिखल व गाळ
बाहेर टाकतात. 21 माझे परमेश्वर म्हणतात, “दुष्टांना शांती नसते.”

**58** “उंच स्वरात गर्जना करा, रोखून ठेऊ नका. रणशिंगाच्या
निनादाप्रमाणे तुमचा आवाज उंच करा. माझ्या लोकांची बंडखोरी
आणि याकोबाच्या वंशजांना त्यांची पापे जाहीर करा. 2 दिवसेन् दिवस
ते माझा शोध घेतात; माझे मार्ग जाणून घेण्याचा कसून प्रयत्न करीत
असल्याचा दिखावा करतात, जणू काही ते राष्ट्र सर्वकाही यथायोग्य
करते आणि त्यांच्या परमेश्वराच्या आज्ञा त्यांनी फेटाळल्या नाहीत. ते

मला रास्त निर्णय मागतात आणि परमेश्वराने त्यांच्या निकट यावे म्हणून
आतुर आहेत असे दर्शवितात. 3 ते म्हणतात, ‘आम्ही उपास केला, पण
तुम्ही बघितलेही नाही? आम्ही नम्र झालो, आणि तुम्ही त्याकडे लक्षही
दिले नाही?’ “तरी तुमच्या उपासाच्या दिवशी, तुम्ही मनाला वाटेल
तसे करता आणि तुमच्या कामगारांची पिळवणूक करता. 4 तुमचे
उपास कलह व भांडणाने आणि एकमेकांशी दुष्टपणे मारामारी करण्याने
संपतात. तुम्ही जसा उपास करता, तसा आता करून तुमचा आवाज
उच्चस्थानी ऐकला जाईल अशी अपेक्षा करता. 5 असा उपास मी
निवडला आहे काय, लोकांनी नम्र होण्याचा एक दिवस? केवळ वाऱ्याने
लवणाऱ्या लव्हाळ्याप्रमाणे वाकण्याकरिता, आणि गोणपाट नेसून
राख फासण्याकरिता? यालाच तुम्ही उपास म्हणता का, याहवेहला
असा दिवस मान्य असेल काय? 6 “मी निवडलेला उपास याप्रकारचा
नाही का: अन्यायाची बंधने तुटली जावी आणि जोखडाचे बंद सोडावे,
पीडितांना मुक्त करावे आणि प्रत्येक जोखड तोडून टाकला जावा? 7
भुकेल्यांना तुमच्या अन्नात तुम्ही वाटेकरी करू नये काय व निराश्रितांना
आश्रय द्यावा— जेव्हा तुम्ही निर्वस्त्राला बघाल, त्याला पांघरूण घाला,
आणि आपल्या रक्त व मांसाच्या बाधवांना दूर लोटावे का? 8 मग तुमचा
प्रकाश सूर्योदयाप्रमाणे उजाडेल, आणि तुमचे आरोग्य लगेच तुम्हाला
प्राप्त होईल; तुमची धार्मिकता तुमच्यापुढे चालेल, आणि याहवेहचे गौरव
तुमची पाठराखण करेल. 9 मग तुम्ही हाक माराल आणि याहवेह त्यास
उत्तर देतील; तुम्ही मदतीसाठी धावा कराल व ते म्हणतील: हा मी येथे
आहे. “जर तुम्ही पीडितांना जोखडातून मुक्त कराल, एखाद्याकडे बोट
रोखून आरोप लादण्याचे आणि द्वेषयुक्त बोलणे थांबवाल, 10 भुकेल्यांना
खाऊ घालण्यासाठी स्वतःचे जीवन खर्ची घालाल, पीडितांच्या गरजांचा
पुरवठा कराल, तर तुमचा प्रकाश अंधारातून झळकेल आणि तुमची
रात्र मध्यान्हासारखी उजळेल. 11 याहवेह तुम्हाला सतत मार्गदर्शन
करतील; सूर्याच्या उष्णतेने शुष्क भूमीत राहूनही ते तुमच्या गरजा
भागवतील व तुमच्या हाडांना बळकट करतील. मग तुम्ही भरपूर पाणी
पाजलेल्या बागेप्रमाणे, कधीही पाणी न आटणाऱ्या झऱ्याप्रमाणे व्हाल.
12 तुमचे लोक पुरातन भग्नावशेषांची पुनर्बांधणी करतील आणि प्राचीन
पाये पुन्हा उभारतील; भग्न झालेली तटबंदी दुरुस्त करणारे, बांधकाम
व रस्ते पूर्वस्थितीत आणणारे असे तुम्ही म्हणविले जाल. 13 “जर
तुम्ही शब्बाथदिन अशुद्ध करण्यापासून तुमची पावले दूर ठेवाल आणि
माझ्या पवित्र दिवशी आपलीच मनमानी करणे सोडून द्याल, जर तुम्ही
शब्बाथदिनास आनंदाचा दिवस मानाल आणि तो याहवेहचा पवित्र
दिवस आहे म्हणून त्याचा सन्मान कराल, आणि त्या दिवसाचा आदर
करून स्वतःच्या इच्छा बाजूला साराल आणि मनमानेल असे न वागता व
निरर्थक गोष्टींची चर्चा करणार नाही, 14 तर याहवेहमध्ये तुम्हाला आनंद
प्राप्त होईल, आणि मी तुम्हाला या भूतलाच्या उच्चस्थानी विजयाने
चालवेन आणि तुमचा पिता याकोबाच्या वतनातील उपजावर मेजवानी
देईन.” ही याहवेहच्या मुखातील वचने आहेत.

**59** निश्चितच, याहवेहची भुजा तारण करू शकणार नाही इतकी
आखूड नाही, वा ऐकू येणार नाही असे त्यांचे कान बहिरे नाहीत.
2 परंतु तुमच्या पातकांनी तुम्हाला तुमच्या परमेश्वरापासून दूर केले आहे;
तुमच्या पापांनी त्यांचे मुख तुमच्यापासून लपविले आहे, जेणेकरून
त्यांना ऐकू येणार नाही. 3 कारण तुमचे हात रक्ताने माखलेले आहेत,
तुमची बोटे दोषीपणाने बरबटलेली आहेत. तुमच्या ओठांनी असत्य
बोललेले आहे, आणि तुमची जीभ दुष्टतेच्या गोष्टी पुटपुटते. 4 कोणी
न्यायाने वागत नाही; कोणीही सत्याने खटला लढत नाही. ते निरर्थक
वाद घालतात आणि खोटे शब्द उच्चारतात; ते क्षुब्धतेची गर्भधारण
करतात आणि दुष्टतेस जन्म देतात. 5 ते विषारी फुरसे सर्पांची अंडी
उबवितात आणि मकडीचे जाळे विणतात. जो कोणी त्यांची अंडी खाईल
तो मरेल आणि जेव्हा एखादे अंडे फुटते, त्यामधून साप निघतो. 6
त्यांनी विणलेले जाळे वस्त्र बनविण्याच्या उपयोगाचे नसते; त्यांनी
जे बनविले त्याने ते स्वतःला पांघरू शकत नाहीत. त्यांच्या कृती
दुष्टतेच्या कृती आहेत, हिंसात्मक कृती करणे हेच त्यांच्या हातात
आहे. 7 पाप करावयाला त्यांचे पाय धाव घेतात; निर्दोषाचा रक्तपात
करण्यास ते चपळ असतात. ते दुष्ट योजनेचा पाठपुरावा करतात;
हिंसात्मक कृत्यांनी त्यांचे मार्ग ओळखले जातात, 8 आणि शांतीचा
मार्ग त्यांना माहीत नाही; त्यांच्या वाटेवर न्याय नसतो. त्यांनी ते मार्ग
वाकडे करून टाकले आहेत; त्यांच्यासोबत चालणाऱ्या कोणासही
शांतीचा अनुभव येत नाही. 9 याकारणास्तव न्याय आमच्यापासून
लांब असतो, आणि धार्मिकतेचा आम्हाला बोध मिळत नाही. आम्ही
प्रकाशाची अपेक्षा करतो, पण सर्वत्र अंधकारच असतो; तेजस्वीपणाची
अपेक्षा करतो, पण गडद सावलीत चालतो. 10 आंधळ्याप्रमाणे
आम्ही भिंती लगत चाचपडत चालतो, दृष्टिहीनांप्रमाणे स्पर्शाद्वारे मार्ग
चाचपडतो. मध्यान्हात आम्ही संधिप्रकाशात असल्याप्रमाणे अडखळतो;
बलवानांमध्ये आम्ही मेलेल्यांसारखे असतो. 11 आम्ही अस्वलांसारखे
गुरगुरतो; कबुतरांप्रमाणे शोकाने हुंकारतो. आम्ही न्यायाचा शोध घेतो,
पण तो सापडत नाही; सुटकेसाठी धडपडतो, पण ती फार दूर गेलेली
असते. 12 कारण तुमच्या नजरेत आमचे अनेक अपराध आहेत, आणि
आमची पापेच आमच्याविरुद्ध साक्ष देतात. आमचे अपराध सतत
आमच्यासह असतात आमचे हे घोर अन्याय आम्ही कबूल करतो: 13
याहवेहच्या विरुद्ध केलेली बंडखोरी व लबाडी, परमेश्वराकडे फिरविलेली
पाठ, बंडखोरी व छळवणूकीस प्रक्षुब्ध करणे, आमच्या अंतःकरणातून
प्रसवलेले निखालस असत्य. 14 म्हणून न्याय मागे सरला आहे, आणि
नीतिमत्ता दूर उभी आहे; सत्य रस्त्यावर अडखळले आहे, प्रमाणिकपणा
प्रवेश करू शकत नाही. 15 सत्य कुठेही शोधून सापडत नाही, आणि
जो कोणी दुष्टपणा टाळतो, तोच सावज बनतो. याहवेहने हे पाहिले व
ते असंतुष्ट झाले कारण न्याय्य कुठेही नाही. 16 त्यांनी बघितले की
कोणीही नाही, कोणीच मध्यस्थी करणारा नाही, हे पाहून ते अस्वस्थ
झाले; म्हणून स्वतःच्या भुजेने त्यांनी त्यांच्याप्रीत्यर्थ तारण निर्माण
केले, आणि स्वतःच्या नीतिमत्वाने त्यांना आधार दिला. 17 त्यांनी

नीतिमत्वास त्यांचे चिलखत म्हणून चढविले आणि त्यांच्या मस्तकावर
तारणाचे शिरस्त्राण घातले; सूडरूपी वस्त्र परिधान केला आवेश हा
अंगरखा म्हणून स्वतःला पांघरले. 18 त्यांनी केलेल्या दुष्कृत्यांच्या
प्रमाणात ते परतफेड करतील. त्यांच्या शत्रूंचा क्रोध आणि शत्रूंच्या
अपराधाबद्दल योग्य शिक्षा देतील; द्वीपांची त्यांच्या कृत्यानुसार ते
परतफेड करतील. 19 पश्चिमेकडील लोक याहवेहच्या नावाचे भय
धरतील, आणि सूर्योदयाकडील लोक त्यांच्या वैभवाचा गौरव करतील.
ज्याला याहवेहचा श्वास जोराने पुढे नेतो तसे ते कोंडलेल्या महापूरासारखे
येतील. 20 “याकोबातील ज्या लोकांनी आपल्या पापाबद्दल पश्चात्ताप
केला आहे, सीयोनात त्यांचा उद्धारक येईल,” अशी याहवेह घोषणा
करतात. 21 याहवेह म्हणतात, “माझ्याबाबतीत म्हणाल, तर त्यांच्याशी
केलेला हा माझा करार आहे. माझा पवित्र आत्मा जो तुमच्यावर आहे,
तो तुमचा त्याग करणार नाही आणि माझे वचन जे मी तुमच्या मुखात
घातले आहे, ते सदोदित तुमच्या ओठांवर, तुमच्या संततीच्या ओठांवर
आणि त्यांच्या वंशजांच्या ओठांवर; आतापासून आणि सदासर्वकाळ
राहील,” असे याहवेह म्हणतात.

**60** “ऊठ, प्रकाशमान हो, कारण तुझा प्रकाश आला आहे, आणि
याहवेहचे गौरव तुझ्यावर उदय पावले आहे. 2 पाहा, काळोख
पृथ्वीला आच्छादित आहे, आणि गडद अंधकार लोकांवर येत आहे,
परंतु याहवेहचा तुझ्यावर उदय होत आहे, आणि त्यांचे गौरव तुझ्यावर
प्रकट होत आहे. 3 राष्ट्रे तुझ्या प्रकाशात येतील, आणि राजे तुझ्या
उदयाच्या तेजामध्ये येतील. 4 “आपली दृष्टी वर कर आणि सभोवती
पाहा: सर्व सभा एकत्र येऊन तुझ्याकडे येत आहे; तुझे पुत्र दूरवरून येत
आहेत, तुझ्या कन्या कमरेवर उचलून आणण्यात येत आहेत. 5 मग तू ते
बघशील व उल्हासित होशील, तुझे अंतःकरण स्पंदेल व आनंदाने फुगून
जाईल; सागराची संपत्ती तुझ्याकडे आणण्यात येईल, अनेक देशांची
समृद्धी तुझ्याकडे येईल. 6 उंटांचे काफिले तुझी भूमी व्यापतील, तरुण
उंट मिद्यान व एफाह येथून येतील. आणि सर्व शबातून सोने व ऊद घेऊन
तुझ्याकडे येतील. आणि याहवेहच्या स्तुतीची घोषणा केली जाईल. 7
केदारचे सर्व कळप तुला दिले जातील व नबायोथचे मेंढे तुला सेवेसाठी
देण्यात येतील; ते माझ्या वेद्यांवर अर्पण म्हणून मान्य केले जातील,
आणि मी माझे गौरवशाली मंदिर सुशोभित करेन. 8 “मेघाप्रमाणे
उडणारे हे कोण आहे, जणू घरट्यांकडे परतणारी कबुतरे? 9 निश्चितच
द्वीप माझ्याकडे बघतात; सर्वात पुढे तार्शीशची गलबते आहेत, तुझी
लेकरे दूरवरून तुझ्याकडे आणत आहेत, त्यांनी आपले चांदी व सोनेही
बरोबर आणले आहे, इस्राएलचे पवित्र परमेश्वर याहवेह, आमच्या
परमेश्वराला गौरविण्यासाठी त्यांनी तुला ईश्वरदत्त तेजस्विता बहाल
केली आहे. 10 “परदेशी तुझ्या तटबंदीची पुनर्बांधणी करतील, राजे
तुझी सेवा करतील. जरी मी माझ्या क्रोधाने तुला फटकारले, तरी आता
कृपावंत होऊन मी तुझ्यावर दया करेन. 11 तुझ्या वेशी सतत उघड्या
राहतील, त्या रात्री वा दिवसा, बंद केल्या जाणार नाहीत, जेणेकरून
अनेक देशातून लोक तुझ्याकडे संपत्ती आणू शकतील— त्यांचे राजे
विजयोत्सवाने मिरवणूक चालवितील. 12 जी राष्ट्रे वा देश तुझ्या अधीन
होण्याचे नाकारतील, ती पूर्णपणे उद्ध्वस्त होतील. 13 “लबानोनांचे
वैभव तुझ्याकडे येईल, सुरू, देवदारू व भद्रदारू माझे पवित्रस्थान
शोभिवंत करतील; आणि माझ्या पावलांचे स्थान गौरवशाली करतील.
14 तुमच्यावर अत्याचार करणाऱ्यांचे पुत्र येऊन तुला नमन करतील; जे
सर्व तुझा तिरस्कार करीत, ते तुझ्या पायावर लोटांगण घालतील. ते
तुला याहवेहचे शहर, आणि इस्राएलाच्या पवित्र परमेश्वराचे सीयोन
असे म्हणतील. 15 “जरी तुझा तिरस्कार व त्याग करण्यात आला
होता, तुझ्यामधून कोणीही प्रवास करीत नसत, तरी मी तुला कायमचे
अभिमानास्पद स्थान बनवेन, आणि सर्व पिढ्यांकरिता हर्षदायक करेन.
16 तू अनेक देशांचे दूध प्राशन करशील आणि तुला राजांचे स्तनपान
करविण्यात येईल. तेव्हा तुला कळेल कि मी, याहवेह तुझा उद्धारकर्ता
मी तुझा तारणारा, याकोबाचा सर्वसमर्थ आहे. 17 कास्याच्या ऐवजी मी
तुझ्यासाठी सोने, तुझ्या लोखंडाच्या ऐवजी चांदी आणेन, लाकडाच्या
ऐवजी कास्य, आणि तुझ्या दगडांच्या ऐवजी लोखंड आणेन. शांतता हे
तुझ्यावरील अधिकारी, व कल्याण हे तुझ्यावरील शासक नियुक्त करेन.
18 यापुढे तुझ्या देशातून हिंसाचार, किंवा अधोगती व विध्वंस तुझ्या
सीमेत ऐकिवात येणार नाही, परंतु तुझ्या तटबंदीस तू तारण व तुझ्या
वेशींना स्तुती असे म्हणशील. 19 यापुढे दिवसा सूर्यप्रकाश व चंद्राचे
तेज तुझ्यावर पडणार नाही, कारण तुझे याहवेहच तुझा अक्षय प्रकाश
होतील व तुझे परमेश्वर तुझा गौरव होतील. 20 तुझा सूर्य पुन्हा कधीही
मावळणार नाही, आणि तुझ्या चंद्राचा कधी ऱ्हास होणार नाही. कारण
याहवेहच तुझा सर्वकाळचा प्रकाश असतील; आणि तुझे शोकाचे दिवस
संपतील. 21 मग तुझे सर्व लोक नीतिमान होतील आणि ते त्यांच्या
भूमीचे सर्वकाळचे मालक बनतील. कारण ते मी रोपलेली फांदी आहेत,
माझा गौरव प्रकट करण्यासाठी माझी हस्तकृती आहेत. 22 तुमच्यातील
सर्वात कनिष्ठ, हजारोंच्या संख्येत बहुगुणित होतील, सर्वात लहान एक
बलाढ्य राष्ट्र होईल, मी याहवेह आहे; योग्य त्या समयी, मी हे सर्व वेगाने
घडवेन.”

**61** सार्वभौम याहवेहचा आत्मा मजवर आहे, कारण गरिबांना शुभवार्ता
सांगण्यासाठी याहवेहने माझा अभिषेक केला आहे. भग्नहृदयी
लोकांचे सांत्वन करण्यासाठी, कैद्यांना सुटका जाहीर करण्यासाठी व
अंधकारातून बंदिवानांना मुक्त करण्यासाठी त्यांनी मला पाठविले आहे.
2 याहवेहच्या कृपेचे वर्ष आणि परमेश्वराचा सूड घेण्याचा दिवस आला
आहे, हे जाहीर करण्यास, आणि जे सर्व विलाप करतात त्यांचे सांत्वन
करण्यासाठी त्यांनी मला पाठविले आहे. 3 सीयोनातील जे सर्व शोक
करतात त्यांना— राखेऐवजी सौंदर्याचा मुकुट, विलापाऐवजी आनंदाचे
तेल, निराशेच्या आत्म्याऐवजी स्तुतीचे वस्त्र बहाल करण्यासाठी. कारण
त्यांचे गौरव प्रकट करण्यासाठी ते नीतिमत्तेचे एला वृक्ष याहवेहने स्वतः
रोपलेले असे संबोधले जातील. 4 ते प्राचीन भग्नावशेषाची पुनर्बांधणी
करतील फार पूर्वी उद्ध्वस्त झालेल्या शहरांची डागडुजी करतील; ते
पुरातन पडीक नगरांचा, जी पिढ्यान् पिढ्या उद्ध्वस्त झाली होती,

त्यांचा जीर्णोद्धार करतील. 5 अपरिचित लोक तुमचे कळप राखतील;
विदेशी तुमची शेते व द्राक्षमळयांची निगा राखतील. 6 तुम्हाला याहवेहचे
याजक म्हणतील तुम्ही आमच्या परमेश्वराचे सेवक म्हणून संबोधले
जाल. राष्ट्रांच्या संपत्तीतून तुमचे पोषण होईल, व तुम्ही त्यांच्या समृद्धीचा
अभिमान बाळगाल. 7 लज्जेच्या ऐवजी तुम्ही दुपटीने सन्मान मिळवाल,
आणि अप्रतिष्ठे ऐवजी तुम्हाला तुमच्या वतनात आनंद प्राप्त होईल.
आणि तुम्ही दुपटीने तुमच्या वतनभूमीचे वारसदार व्हाल, आणि तुम्ही
अनंतकाळचा आनंद प्राप्त कराल. 8 “कारण मी याहवेह, मी न्याय प्रिय
आहे; चोरी आणि अन्यायाचा मला तिटकारा आहे. माझ्या विश्वासूपणाने
मी माझ्या लोकांना मोबदला देईन आणि त्यांच्याबरोबर सर्वकाळचा
करार करेन. 9 राष्ट्रांमध्ये त्यांच्या वंशजांचा लौकिक होईल, आणि त्यांची
संतती लोकांमध्ये बहुमानीत होतील. जे सर्व त्यांना बघून हे कबूल
करतील की ते याहवेहचे आशीर्वादित लोक आहेत.” 10 मी याहवेहमध्ये
अत्यानंदित होतो; माझा आत्मा माझ्या परमेश्वरात हर्षोल्हासित होतो.
जसे वराचे मस्तक याजकाप्रमाणे विभूषित केले जाते, किंवा वधू
दागिन्यांनी स्वतःला अलंकृत करते, तशी त्यांनी मला तारणाची वस्त्रे
नेसविली आहेत आणि नीतिमत्वाच्या अंगरख्याने मला आच्छादले आहे.
11 जशी माती अंकुराला उगविते आणि बाग बीज वाढविते तसे सार्वभौम
याहवेह नीतिमत्व आणि प्रशंसा सर्व राष्ट्रासमोर अंकुरित करतील.

**62** सीयोनचा निर्दोषपणा सूर्योदयासारखा उजळून, मी निःशब्द
राहणार नाही, व यरुशलेमचे तारण जळत्या मशालीसारखे सिद्ध
होईपर्यंत, मी शांत राहणार नाही. 2 राष्ट्रे तुझा निर्दोषपणा, आणि सर्व
राजे तुझे वैभव बघतील; याहवेहच्या मुखाने बहाल केलेल्या नवीन
नावाने तुला संबोधण्यात येईल. 3 तू याहवेहच्या हातातील गौरवशाली
मुकुट, आणि तुझ्या परमेश्वराच्या हातातील राजेशाही किरीट होशील. 4
यापुढे तुला ते त्याग केलेली असे म्हणणार नाहीत, अथवा तुझ्या भूमीला
ओसाड असे म्हणणार नाही. पण हेफसीबा हे तुझे नवे नाव असेल
आणि तुझ्या भूमीला बिऊला म्हणतील; कारण याहवेहला तुझ्यामुळे
आनंद होईल, आणि तुझी भूमी विवाहित होईल. 5 जसा एक तरुण
एका तरुणीशी विवाह करतो, तसाच तुझा निर्माणकर्ता तुझ्याशी विवाह
करेल; जसा एखाद्या वराला आपल्या वधूविषयी आनंद होतो, तसाच
तुझ्या परमेश्वराला तुझ्यामुळे आनंद होईल. 6 अगे यरुशलेमे, तुझ्या
कोटांवर मी पहारेकरी नेमले आहेत; ते रात्री किंवा दिवसा, असे कधीही
स्तब्ध राहणार नाहीत. तू जी याहवेहचा धावा करते, स्वतःला विसावा
देऊ नको, 7 आणि ते यरुशलेमची पुन्हा स्थापना करेपर्यंत व सर्व
पृथ्वीवर तिला स्तुतीस योग्य करेपर्यंत, परमेश्वरालाही विसावा घेऊ देऊ
नको. 8 आपल्या उजव्या हाताने आणि त्यांच्या सामर्थ्यशाली भुजेने
याहवेहने शपथ वाहिली आहे: “यापुढे मी कधीही तुझे धान्य, त्यांचे
अन्न म्हणून तुझ्या शत्रूंच्या स्वाधीन करणार नाही, आणि तू परिश्रम
करून काढलेला नवा द्राक्षारस, परकीय येऊन कधीही पिणार नाहीत. 9
परंतु जे पीक काढतील, तेच ते खाईल आणि याहवेहची स्तुती करतील,
आणि जे द्राक्ष गोळा करतील, तेच पवित्रस्थानाच्या आवारात द्राक्षारस
पितील.” 10 बाहेर पडा! वेशींच्या बाहेर पडा! माझ्या लोकांसाठी मार्ग
तयार करा. बांधा, महामार्ग बांधा! दगडधोंडे काढून टाका. राष्ट्रांकरिता
ध्वज उंच फडकवा. 11 याहवेहनी पृथ्वीच्या दिगंतापर्यंत घोषणा केली
आहे: “सीयोनकन्येला सांगा, ‘पाहा, तुझे उद्धारकर्ता येत आहेत! पाहा,
त्यांचे बक्षीस त्यांच्याकडे आहे, आणि त्यांची भरपाई त्यांच्यासोबत
आहे.’” 12 त्यांना पवित्र लोक, याहवेहने खंडणी भरून सोडविलेले,
असे म्हणण्यात येईल, आणि तुला खूप मागणी असलेला देश, कधीही
न टाकलेले नगर असे म्हणतील.

**63** एदोमाहून व बस्रा शहराहून, किरमिजी रंगाने रंगविलेली वस्त्रे
घालून, वैभवी वस्त्रे परिधान करून त्यांच्या महान सामर्थ्याने
वेगाने पावले पुढे टाकत येणारे हे कोण आहेत? “विजयाची घोषणा
करीत, तारण करण्यास समर्थ असलेला, हा मी आहे.” 2 तुमची
वस्त्रे द्राक्षकुंडात तुडविणाऱ्यांसारखी लाल रंगाची का आहेत? 3
“द्राक्षकुंड मी एकट्यानेच तुडविले; राष्ट्रातून माझ्यासोबत कोणी नव्हते.
माझ्या क्रोधाने मी ती तुडविली आणि त्यांना आपल्या संतापाने
चिरडले; त्यांचेच रक्त माझ्या वस्त्रांवर उडाले, म्हणून माझी सर्व वस्त्रे
माखली. 4 माझ्याकरिता तो सूड घेण्याचा दिवस होता; आणि ते उद्धार
करण्याचे वर्ष आले होते. 5 मी शोधले, परंतु तिथे साहाय्याला कोणीही
नव्हते, कोणी मदतीला नसल्यामुळे मला धक्का बसला; तेव्हा माझ्या
स्वतःच्या बाहूने माझ्याकरिता मी उद्धार मिळविला, आणि माझ्या
स्वतःच्या क्रोधाने मला राखले. 6 क्रोधाच्या भरात मी राष्ट्रांना तुडविले;
माझ्या संतापाच्या भरात मी त्यांना मद्यधुंद केले आणि त्यांचे रक्त
जमिनीवर ओतले.” 7 मी याहवेहच्या दयाळूपणाबद्दल त्यांनी केलेल्या
सर्व स्तुतिपात्र कृत्यांबद्दल सांगेन, जे सर्व याहवेहनी आमच्यासाठी
केले— होय, ज्या अनेक गोष्टी त्यांच्या करुणेने व विपुल दयेने, त्यांनी
इस्राएलसाठी केल्या. 8 ते म्हणाले, “ते निश्चितच माझे लोक आहेत,
जी लेकरे माझ्याशी एकनिष्ठ राहतील;” म्हणून ते त्यांचे तारणकर्ता
झाले. 9 त्यांना होणाऱ्या सर्व क्लेशांनी तेही व्यथित झाले, आणि
त्यांच्या समक्षतेच्या स्वर्गदूताने इस्राएलचा उद्धार केला. याहवेहच्या
प्रीती व करुणेमुळेच त्यांनी त्यांचा उद्धार केला; व त्यांना उचलून
प्राचीन कालापासून त्यांचा भार वाहिला. 10 तरीही त्यांनी बंड केले व
याहवेहच्या पवित्र आत्म्याला खिन्न केले. म्हणून याहवेह मागे वळले व
त्यांचे शत्रू झाले आणि याहवेहने स्वतः त्यांच्याविरुद्ध लढा दिला. 11 मग
त्यांच्या लोकांना पूर्वीचे दिवस आठवले, मोशे आणि त्यांच्या लोकांचे
दिवस— ज्यांनी त्यांच्या मेंढपाळासह पूर्ण कळपाला समुद्रमार्गी बाहेर
काढले, ते कुठे आहेत? त्यांच्यामध्ये आपला पवित्र आत्मा पाठविणारे
ते कुठे आहेत? 12 मोशेच्या उजव्या हाताजवळ राहण्यासाठी आपल्या
प्रतापी सामर्थ्याची भुजा पाठविणारे, त्यांच्यासमोर समुद्राच्या जलास
दुभागून अजरामर किर्ती मिळविली, 13 समुद्राच्या तळातून त्यांना कोणी
पार नेले? उघड्या रानात असणाऱ्या घोड्यांप्रमाणे, ते कधी अडखळले
नाहीत; 14 जशी गुरे सपाटीवर जातात, तसे याहवेहच्या आत्म्याने
त्यांना विसावा दिला. आपले नाव प्रतापी व्हावे म्हणून तुम्ही तुमच्या

लोकांचे मार्गदर्शन केले. 15 हे याहवेह, स्वर्गातून अवलोकन करा व
पाहा, तुमच्या भव्य, पवित्र, गौरवी सिंहासनावरून खाली पाहा. तुमचा
तो आवेश व तुमचे सामर्थ्य कुठे आहेत? तुमची आमच्यावरील कोमलता
व करुणा आम्हाला देण्याचे तुम्ही आवरून धरले आहे. 16 परंतु तुम्हीच
आमचे पिता आहात, जरी अब्राहाम आम्हाला ओळखत नाही इस्राएलने
आम्हाला नाकारले आहे; तरी तुम्ही, हे याहवेह, आमचे पिता आहात,
आमचे युगायुगांचे उद्धारकर्ता, हेच तुमचे नाव आहे. 17 हे याहवेह, तुम्ही
आम्हाला तुमच्या मार्गावरून भटकून का जाऊ दिले? आणि आम्ही
तुमचा सन्मान करणार नाही, अशी आमची अंतःकरणे कठीण का
केली? जे वंशज तुमचे वारस आहेत, त्या तुमच्या सेवकांप्रीत्यर्थ परत
या. 18 थोड्या काळाकरिता तुमच्या लोकांनी तुमच्या पवित्र भूमीचा
ताबा घेतला, परंतु आता आमच्या शत्रूंनी तुमच्या पवित्रस्थानास तुडविले
आहे. 19 तुम्ही प्राचीन काळापासून अस्तित्वात आहात; पण तुम्ही
त्यांच्यावर राज्य केले नाही, ते तुमच्या नावाने संबोधले जात नाहीत.

**64** अहा, आकाश विदारून तुम्ही खाली आलात, तर किती बरे
झाले असते, तुमच्यासमोर पर्वत थरथर कापले असते! 2 जसा
अग्नी शाखांना जाळून भस्म करतो, व ज्यामुळे पाणी उकळले जाते,
तुम्ही खाली या व तुमच्या नामाची महती तुमच्या शत्रूंना समजू द्या
ज्यामुळे राष्ट्रे तुमच्यासमोर थरथर कापली जातील! 3 जेव्हाही आम्हाला
अनपेक्षित असे अत्यंत अद्भुत चमत्कार करण्यास, तुम्ही खाली आले,
पर्वतांनी तुम्हाला पाहताच ते भीतीने तुमच्यासमोर डळमळले. 4 प्राचीन
युगापासून कोणी कधी ऐकले नाही, कोणत्याही कानावर ते पडले नाही,
कोणीही तुमच्याशिवाय इतर कोणताही परमेश्वर कधी पाहिला नाही
जो, जे त्यांची आशेने वाट पाहतात, त्यांच्यावतीने कार्य करतात. 5 जे
आनंदाने चांगली कृत्ये करतात, व ज्यांना तुमच्या मार्गाचे स्मरण असते,
त्यांच्या मदतीसाठी तुम्ही येता. परंतु जेव्हा आम्ही तुमच्याविरुद्ध सतत
पाप करत राहिलो, तेव्हा तुमचा क्रोध आम्हावर भडकला. आता आमचा
उद्धार कसा होणार? 6 आम्ही सर्वच अशुद्ध व्यक्तीसारखे झालो आहोत.
आणि आमच्या नीतीची कृत्ये घाणेरड्या चिंध्या आहेत; आम्ही सर्व
पानांप्रमाणे कोमेजतो, वाऱ्याने उडवून न्यावे, तशी आमची पापे आम्हाला
दूर वाहून नेतात. 7 तरीही कोणी तुमच्या नावाचा धावा करीत नाही
किंवा तुमचा ध्यास घेत नाही; कारण तुम्ही आमच्यापासून आपले मुख
लपविले आहे आणि आम्हाला आमच्या पापांच्या स्वाधीन केले आहे. 8
परंतु हे याहवेह, तुम्हीच आमचे पिता आहात. आम्ही माती आहोत,
तुम्ही कुंभार आहात; आम्ही सर्व तुमची हस्तकृती आहोत. 9 हे याहवेह,
आमच्यावर प्रमाणाबाहेर रागावू नका; आमची पापे सदासर्वकाळ आठवू
नका. हे याहवेह, आम्ही प्रार्थना करतो, आमच्यावर कृपादृष्टी करा,
कारण आम्ही सर्व तुमचेच लोक आहोत. 10 तुमची पवित्र शहरे ओसाड
झाली आहेत; सीयोनही ओसाड झाले आहे, यरुशलेम तर उजाड रान
झाले आहे. 11 जिथे आमच्या पूर्वजांनी तुमची स्तुतिप्रशंसा केली,
ते आमचे पवित्र व वैभवी मंदिर बेचिराख झाले आहे, आणि आम्ही
जोपासलेल्या सर्व वस्तूंची राखरांगोळी झाली आहे. 12 हे सर्व होऊनही
याहवेह, आम्हाला साहाय्य करण्यास तुम्ही स्वतःस रोखणार? तुम्ही
स्तब्ध राहून आम्हाला प्रमाणाबाहेर शिक्षा करणार काय?

**65** “ज्यांनी माझ्याविषयी विचारपूस केली नव्हती, त्यांना मी स्वतःस
प्रकट केले; ज्यांनी माझा शोध केला नव्हता, त्यांना मी सापडलो
आहे. ज्या राष्ट्रांनी माझा धावा केला नाही त्यांना मी म्हटले, ‘पाहा मी इथे
आहे, मी इथे आहे.’ 2 ते जे अयोग्य मार्गावरून चालतात, जे स्वतःच्याच
कल्पनांचे अनुसरण करतात— त्या हट्टी लोकांसाठी, मी आपले हात
दिवसभर पुढे केले आहेत, 3 हे लोक, जे मला सतत चिरडीस आणतात,
माझ्यासमक्ष माझा अपमान करतात. बागांमध्ये अर्पणे वाहतात आणि
विटांनी बांधलेल्या वेदीवर धूप जाळतात; 4 जे कबरांच्या मध्ये जाऊन
बसतात आणि गुप्तते मध्ये जागरण करण्यात रात्र घालवितात; जे
डुकरांचे मांस खातात, आणि त्यांच्या भांड्यात निषिद्ध मांसाचा रस्सा
असतो; 5 जे म्हणतात, ‘दूर हो; माझ्याजवळ येऊ नकोस, कारण मी
तुझ्याहून अधिक पवित्र आहे!’ असे लोक माझ्या नाकातील धूर आहेत,
एक अग्नी, जो संपूर्ण दिवस जळत असतो. 6 “पाहा, ते माझ्यासमोर
लिहून ठेवलेले आहे: मी शांत राहणार नाही, पण त्याची पूर्णपणे
परतफेड करेन; तुमच्या पापांचे व तुमच्या पूर्वजांच्या पापांचेही, प्रतिफळ
त्यांच्या मांडीवर मोजून टाकेन,” असे याहवेह म्हणतात. “कारण त्यांनी
पर्वतांवर धूप जाळला आणि टेकड्यांवर माझा अपमान केला. मी
त्यांच्या पूर्वीच्या दुष्कृत्यांचे पुरेपूर वेतन त्या मापाने त्यांच्या मांडीवर
टाकेन.” 8 याहवेह असे म्हणतात: “कारण द्राक्षांच्या घोसात थोडाफार
रस शिल्लक असतो आणि लोक म्हणतात, ‘यांचा नाश करू नका, त्यात
अजूनही आशीर्वाद बाकी आहे,’ त्याप्रमाणे मी माझ्या सेवकांप्रीत्यर्थ
करेन; मी त्या सर्वांचा नाश करणार नाही. 9 मी याकोबाचे वंशज पुढे
आणेन, आणि यहूदाहचे वंशज माझ्या पर्वतांचा ताबा घेतील; माझे
निवडलेले लोक त्याचे वारसदार होतील, व तिथे माझे सेवक वसती
करतील. 10 माझा शोध करणाऱ्या माझ्या लोकांसाठी शारोन त्यांच्या
कळपांची कुरणे बनतील, आणि अखोरचे खोरे गुरांचे विश्रांतिस्थान
होईल. 11 “पण तुम्ही जे याहवेहचा त्याग करता आणि माझ्या पवित्र
पर्वताला विसरता, जे भाग्य दैवतासाठी (गादसाठी) मेज पसरविता
आणि विधिलिखितासाठी मिश्रित मद्य पात्रात ठेवता, 12 तुमच्यासाठी
मी तलवार तुमची नियती करेन, आणि तुम्ही सर्वजण तिच्या कत्तलीस
बळी पडाल; कारण मी हाक मारली, तेव्हा तुम्ही उत्तर दिले नाही, मी
बोललो पण तुम्ही ऐकले नाही. तुम्ही माझ्या डोळ्यादेखत पाप केले
मला ज्याचा तिरस्कार आहे, नेमके तेच करण्याचे निवडले.” 13 म्हणून
सार्वभौम याहवेह असे म्हणतात: “माझ्या सेवकांना अन्न मिळेल, पण
तुम्ही उपाशी राहाल; माझ्या सेवकांना पेय मिळेल, पण तुम्ही तहानेने
व्याकूळ व्हाल. माझे सेवक हर्षोल्हास करतील, पण तुम्हाला लज्जास्पद
केले जाईल. 14 त्यांच्या अंतःकरणातून उफाळणाऱ्या आनंदाने माझे
सेवक गाणी गातील, पण अंतःकरणातील क्लेशांनी तुम्ही विव्हळाल
आणि भग्नहृदयी होऊन हृदयाच्या वेदनेने आकांत कराल. 15 माझ्या
निवडलेल्या लोकांमध्ये तुमचे नाव शापवचन असे होईल; सार्वभौम

याहवेह तुम्हाला ठार करतील, परंतु आपल्या सेवकांना नवीन नावाने
संबोधतील. 16 जो कोणी या भूमीवर आशीर्वादासाठी धावा करतो तो
खऱ्या परमेश्वराद्वारेच करेल; जो कोणी या भूमीवर शपथ घेतो तो खऱ्या
परमेश्वराचीच घेईल. कारण जुने त्रास विसरण्यात येतील, आणि माझ्या
नजरेपासून लपविल्या जातील. 17 “कारण पाहा, मी नवे आकाश व
नवी पृथ्वी उत्पन्न करेन. पूर्वीच्या गोष्टींची आठवण केल्या जाणार नाही,
मनात त्यांचे स्मरणदेखील होणार नाही. 18 परंतु मी जी निर्मिती करेन
त्यामध्ये आनंद करा व सदोदित हर्ष करा. कारण मी यरुशलेम नगरी
संतोषमय व तिचे लोक आनंदी असे निर्माण करेन. 19 मी यरुशलेमसाठी
आनंद करेन आणि माझे लोक मला आनंददायी होतील; यापुढे तिथे
रडण्याचा व विलापाचा ध्वनी कधीही कानांवर पडणार नाही. 20 “यापुढे
तान्ही बाळे कधीही मृत्युमुखी पडणार नाहीत. आणि वयातीत मनुष्य
त्याची पूर्ण वर्षे जगेल; यापुढे शंभर वर्षांचा मनुष्य मृत झाल्यास तो
किती बालवयातच मृत झाला असे म्हणण्यात येईल; जो कोणी त्याची
शंभरी पार न करता मृत झाल्यास तो शापित समजल्या जाईल. 21 त्या
दिवसात जो कोणी घर बांधेल, तोच त्यात राहील; ते द्राक्षमळे लावतील
आणि त्यांची फळे स्वतः खातील. 22 त्यांनी घरे बांधावी आणि इतरजण
त्यात येऊन राहतील, किंवा ते पेरतील आणि इतरजण खातील, असे
आता कदापि होणार नाही, कारण जितका जीवनकाल वृक्षाचा असेल,
तसेच माझे लोक दीर्घायुषी होतील; माझे निवडलेले लोक त्यांच्या हाताने
मिळविलेले प्रतिफळ सुखाने बहुतकाळ उपभोगतील. 23 त्यांचे परिश्रम
व्यर्थ जाणार नाहीत, त्यांची मुले दुर्दैवास सामोरी जाण्यासाठी जन्मणार
नाहीत. कारण ते लोक आणि त्यांचे वंशज याहवेहने आशीर्वादित लोक
असे होतील. 24 मला हाक मारण्यापूर्वीच मी त्यांना उत्तर देईन; ते मला
बोलून सांगताहेत तोच मी ऐकेन. 25 लांडगा व कोकरू एकत्र चरतील.
सिंहदेखील बैलाप्रमाणे कडबा खाईल आणि यापुढे धूळ हेच सर्पाचे
अन्न असेल. माझ्या कोणत्याही पवित्र पर्वतांवर ते इजा पोहोचविणार
नाही किंवा नाश करणार नाहीत,” असे याहवेह म्हणतात.

**66** याहवेह असे म्हणतात: “स्वर्ग माझे सिंहासन आहे आणि पृथ्वी
माझे पादासन आहे. तुम्ही माझ्यासाठी निवासस्थान बांधणार
ते कुठे आहे? माझे विश्रांतिस्थान कुठे असणार? 2 माझ्या हाताने हे
सर्व घडवले आणि म्हणून ते अस्तित्वात आले नाहीत काय?” अशी
याहवेह घोषणा करतात. “ज्यांच्यावर मी प्रसन्न होतो ते असे असतात:
जे लीन व भग्न आत्म्याचे आहेत, आणि जे माझ्या वचनांनी कंपित
होतात. 3 परंतु जो वेदीवर बैल अर्पण करतो, त्याने ते अर्पण नरबली
देण्यासारखेच असते, जो कोणी वेदीवर कोकऱ्याचे होमार्पण करतो तो
अशा व्यक्तीसारखा आहे, जो कुत्र्याची मान मोडतो; जो कोणी अन्नार्पण
करतो, तो डुकराचे रक्त अर्पण करणाऱ्यासारखा आहे, आणि जो कोणी
स्मरणार्थ धूप जाळतो तो एखाद्या मूर्तिपूजकासारखा आहे. त्यांनी आपले
मार्ग निवडले आहेत, ते त्यांच्या घृणास्पद गोष्टी करण्यामध्ये धन्यता
मानतात; 4 म्हणून मी देखील त्यांच्यासाठी कठोर शिक्षा निवडणार
आहे ज्याची त्यांना धास्ती वाटते, तेच मी त्यांच्यावर पाठवेन. कारण
मी जेव्हा त्यांना हाक मारली, तेव्हा कोणीही उत्तर दिले नाही, मी
त्यांच्याशी बोललो, तेव्हा कोणीही माझे ऐकले नाही. त्यांनी माझ्यासमक्ष
दुष्कृत्ये केली आणि मला वीट आणणाऱ्या गोष्टी करणे निवडले.”
5 याहवेहची वचने ऐकून कंपित होणाऱ्या लोकांनो, याहवेहची वचने
ऐका: “तुमचे भाऊबंद जे तुमचा द्वेष करतात, आणि माझ्या नामाशी
एकनिष्ठ राहिल्यामुळे तुम्हाला वाळीत टाकतात, ते थट्टेने म्हणतात,
‘याहवेहचा गौरव असो, जेणेकरून, आम्ही तुमचा हर्षोल्हास बघू!’ पण
ते फजीत केले जातील. 6 शहरामध्ये चाललेला आरडाओरडा ऐका,
मंदिरातून येणारा गलबला ऐका! आपल्या शत्रूंची यथायोग्य परतफेड
करणाऱ्या याहवेहचा हा ध्वनी आहे. 7 “प्रसववेदना सुरू होण्यापूर्वीच
तिची प्रसूती होईल; वेणा येण्यापूर्वीच ती पुत्र प्रसवेल. 8 असे झालेले
कोणी कधी ऐकले आहे का? असे कोणी कधी पाहिले आहे का? एका
दिवसात एखादे राष्ट्र जन्मास येते किंवा एका क्षणात एखादे राष्ट्र उत्पन्न
होते? तरी देखील सीयोनाच्या प्रसववेदना सुरू होण्यापूर्वीच ती तिच्या
संततीस जन्म देते. 9 जन्म देण्याच्या क्षणापर्यंत आणल्यावर, मी प्रसूत
करणार नाही काय?” असे याहवेह म्हणतात. “प्रसूतीस आणल्यावर मी
गर्भाशय बंद करतो काय?” असे परमेश्वर म्हणतात. 10 “यरुशलेमवर
प्रीती करणाऱ्यांनो, तिच्याबरोबर हर्ष करा व तिच्यासाठी आनंद साजरा
करा; तिच्यासाठी शोक करणाऱ्या सर्व लोकांनो, तिच्याबरोबर मोठा
उल्हास करा. 11 कारण तिच्या सांत्वन करणाऱ्या स्तनाने तुमचे संगोपन
होऊन तुम्ही तृप्त व्हाल; तान्हेबाळ मनमुरादपणे मातेचे स्तनपान करते,
तसे तुम्हीही तिच्या ओसंडून वाहणाऱ्या विपुलतेत आनंद कराल.” 12
कारण याहवेह असे म्हणतात: “मी तिच्या शांततेस नदीप्रमाणे वाढवेन,
आणि राष्ट्रांची समृद्धी ओसंडून वाहणाऱ्या झऱ्यांसारखी करेन; तुमचे
संगोपन होईल व तुम्ही तिच्या कडेवर बसून फिराल, आणि तिच्या
मांडीवर जोजवले जाल. 13 जसे आई तान्ह्या बाळाचे सांत्वन करते,
तसे मी तुमचे सांत्वन करेन; आणि तुम्ही यरुशलेमाप्रीत्यर्थ सांत्वन
पावाल.” 14 हे तुमच्या नजरेस पडताच, तुम्हाला आनंदाचे भरते येईल
व तुम्ही गवतासारखे बहरून जाल; याहवेहचा कल्याणकारी हात त्यांच्या
सेवकांस प्रकट होईल, पण त्यांच्या शत्रूंना त्यांचा क्रोध दाखविण्यात
येईल. 15 पाहा, याहवेह आपल्या क्रोधाग्नीसह येत आहेत, आणि त्यांचे
रथ वावटळीसारखे आहेत; त्यांचा क्रोध ते प्रकोपासह आणतील, आणि
त्यांचे फटकारणे अग्निज्वालांसह असेल. 16 कारण अग्नीने व आपल्या
तलवारीने याहवेह सर्व लोकांवरील त्यांचा न्याय अंमलात आणतील,
आणि अनेकजण याहवेहद्वारे वधल्या जातील. 17 “जे स्वतःला पवित्र व
शुद्ध करतात, ते बागेत जातील, मात्र जे डुकरे, उंदीर यासारखे इतर
प्रकारचे निषिद्ध मांस खातात—अशा सर्व लोकांचा भयानक शेवट
त्यांनी अनुसरलेल्या लोकांसह होईल,” अशी याहवेह घोषणा करतात.
18 “यास्तव मी सर्व राष्ट्रांतील लोकांना आणि भाषिकांना एकत्र करेन,
कारण त्यांनी कोणती योजना केली व कोणती कृत्ये केली आहेत, ते
सर्व तिथे येतील व त्यांना माझे गौरव दिसेल. 19 “मी तिथे त्यांच्यामध्ये
एक चिन्ह पाठवेन आणि त्यातून जे राष्ट्रांतील अवशिष्ट आहेत, त्यांना

मी—तार्शीश, पूल, लूद (धनुर्धारी म्हणून प्रसिद्ध असलेले), तूबाल,
यावान या देशांमध्ये व दूरवर असलेल्या द्वीपांवर, जिथे कुठेही माझी
किर्ती ज्यांच्या कानी पडली नाही व माझे गौरव ज्यांनी पाहिले नाही,
अशा ठिकाणी त्यांना पाठवेन. त्या देशांमध्ये ते माझ्या गौरवाची घोषणा
करतील. 20 आणि सर्व राष्ट्रातून, तुमच्या सर्व लोकांना ते यरुशलेममधील
माझ्या पवित्र पर्वतावर—घोड्यांवरून, रथातून, डोल्यांतून, खेचरांवरून
व उंटावरून याहवेहसाठी अर्पण म्हणून आणतील,” असे याहवेह
म्हणतात. “इस्राएल लोक ज्याप्रमाणे अन्नार्पण करतात त्याप्रमाणे ते
परमेश्वराच्या मंदिरात विधिपूर्वक शुद्ध पात्रात आणतील. 21 आणि परत
येणाऱ्या या लोकांमधून काहींची माझे याजक व लेवी व्हावे म्हणून मी
त्यांची नेमणूक करेन,” असे याहवेह म्हणतात. 22 “मी निर्माण केलेले
नवे आकाश व पृथ्वी जसे टिकून राहतील,” याहवेह घोषित करतात,
“तसेच तुमचे नाव व तुमची संतती सदासर्वकाळ टिकून राहील. 23
एका नवचंद्राच्या दिवसापासून दुसऱ्या नवचंद्राच्या दिवसापर्यंत आणि
एका शब्बाथ दिवसापासून दुसऱ्या शब्बाथ दिवसापर्यंत सर्व मानवजात
माझ्यापुढे उपासना करण्यास येतील,” असे याहवेह म्हणतात. 24 “ते
बाहेर जातील आणि माझ्याविरुद्ध बंड केलेल्यांची प्रेते पाहतील; कारण
त्यांना खाणारे किडे कधी मरणार नाही, त्यांना पेटवणारा अग्नी कधीही
विझणार नाही आणि सर्व मानवजातीला ते अमंगळ दृश्य पाहून किळस
येईल.”

# यिर्मयाह

1 बिन्यामीन प्रांतातील अनाथोथ येथील याजकांपैकी हिल्कियाहचा
पुत्र यिर्मयाहचे वचन. 2 यहूदीयाचा राजा आमोनाचा पुत्र योशीयाह,
याच्या राजवटीच्या तेराव्या वर्षी याहवेहचे वचन यिर्मयाहकडे आले,
3 आणि यहूदीयाचा राजा, योशीयाहचा पुत्र यहोयाकीम, याच्या
राजवटीपासून आणि यहूदीयाचा राजा योशीयाहचा पुत्र सिद्कीयाह
याच्या राजवटीच्या अकराव्या वर्षाच्या पाचवा महिना संपला, जेव्हा
यरुशलेममधील लोक बंदिवान करून नेण्यात आले तेव्हा. 4 याहवेहचे
वचन मला मिळाले ते असे, 5 “मी तुला गर्भाशयात घडविण्याच्या
पूर्वीपासून ओळखतो, तुझा जन्म होण्यापूर्वीच मी तुला समर्पित केले
आहे; आणि राष्ट्रांकरिता माझा संदेष्टा म्हणून तुझी नेमणूक केली आहे.”
6 मी म्हटले, “अहो सार्वभौम याहवेह, पाहा, मला तर बोलताही येत
नाही; मी केवळ एक कोवळा तरुण आहे.” 7 परंतु याहवेह मला
म्हणाले, “‘मी कोवळा तरुण आहे,’ असे म्हणू नकोस. मी तुला जिथे
पाठवेन, तिथे तुला जावे लागेल आणि मी जे तुला सांगेन, ते तुला बोलावे
लागेल. 8 त्यांना भिऊ नकोस, मी तुला संकटातून सोडविण्यासाठी
तुझ्यासह आहे,” याहवेह असे जाहीर करीत आहेत. 9 तेव्हा याहवेहने
माझ्या मुखाला त्यांच्या हातांनी स्पर्श केला आणि मला म्हटले, “माझे
वचन मी तुझ्या मुखात टाकले आहे. 10 पाहा, आज मी तुझी काही राष्ट्रे
आणि राज्ये उपटून टाकण्यासाठी, काहींचा नाश करण्यासाठी, तर
काहींची स्थापना, त्यांचे पालनपोषण करण्यासाठी त्यांच्यावर तुझी
नेमणूक करीत आहे.” 11 याहवेहचे वचन माझ्याकडे आले: “यिर्मयाह,
तुला काय दिसते?” तेव्हा मी उत्तर दिले, “मला बदाम वृक्षाची फांदी
दिसते.” 12 याहवेहनी मला म्हटले, “तुला योग्य दिसले, अगदी बरोबर
सांगितलेस, मी आपले वचन पूर्ण झालेले पाहत आहे.” 13 याहवेहचे
वचन पुन्हा मला प्राप्त झाले: “तुला काय दिसते?” मी उत्तर दिले, “मला
उकळत्या पाण्याचे एक भांडे दिसत आहे. ते उत्तरेकडून आमच्या दिशेने
तिरपे झालेले आहे.” 14 याहवेह मला म्हणाले, “या राष्ट्रात राहणाऱ्या
लोकांवर उत्तरेकडून संकट येऊन पडेल. 15 मी उत्तरेकडील राष्ट्रांच्या
सर्व लोकांना आवाहन केले आहे,” असे याहवेह जाहीर करतात. “त्यांचे
राजे येतील व त्यांची सिंहासने यरुशलेमच्या प्रवेश व्दारावर स्थापतील.
ते तटाच्या सर्व बाजूला व यहूदीयाच्या सर्व नगरांविरुद्ध येतील. 16 मी
माझ्या लोकांविरुद्ध माझ्या न्यायाची घोषणा करेन, कारण त्यांनी माझा
त्याग करण्याचे वाईट कृत्य केले आहे. इतर दैवतांच्या मूर्तीला धूप
जाळला व स्वतःच्या हस्तकृतींची पूजा केली आहे. 17 “तू स्वतःला
तयार कर! उठून जा आणि मी तुला सांगतो ते सर्व त्यांना सांग.
त्यांना घाबरू नकोस, नाहीतर त्यांच्यासमोर मी तुला भयभीत करेन.
18 आज मी तुला तटबंदीचे नगर केले आहे, या संपूर्ण राष्ट्राविरुद्ध
उभे राहण्यासाठी लोहस्तंभासारखे व भक्कम कास्य दरवाजांसारखे
केले आहे—यहूदीयाचे राजे, त्यांचे अधिकारी, याजक आणि लोक
या सर्वांविरुद्धच. 19 ते तुझ्याशी युद्ध करतील, परंतु तुझ्यावर विजयी
होणार नाही, कारण मी तुझ्यासह आहे आणि तुझा बचाव करेन,” असे
याहवेह म्हणतात.

2 तेव्हा याहवेहचे वचन मला प्राप्त झाले: 2 “जा आणि यरुशलेमच्या
लोकांस याची घोषणा कर: “याहवेह असे म्हणतात: “‘मला आठवण
आहे, मला प्रसन्न करण्यासाठी तुम्ही एखाद्या नववधूप्रमाणे मजवर कशी
प्रीती केली. आणि रानात व पेरणीरहित भूमीत देखील मला अनुसरला.
3 इस्राएल हे याहवेहकरिता पवित्र होते; त्यांच्या हंगामाचे प्रथमफळ होते.
ज्यांनी त्यांचा नाश केला, त्यांच्यावर दोष लावण्यात आला आणि घोर
आपत्तीने त्यांना गाठले,’” असे याहवेह जाहीर करतात. 4 याकोबाचे
वंशजा, याहवेहचे वचन ऐका, सर्व इस्राएली कुळांनो तुम्ही सुद्धा. 5
याहवेह असे म्हणतात: “तुमच्या पूर्वजांना माझ्याठायी असा कोणता
अन्याय दिसला की ते माझ्यापासून इतके दूर गेले? आणि ते व्यर्थ
मूर्तींना अनुसरू लागले, आणि स्वतःही तसेच निरुपयोगी बनले? 6
त्यांनी असे विचारले नाही, ‘ज्यांनी आम्हाला इजिप्तमधून बाहेर आणले
आणि वैराण प्रदेशातून मार्गस्थ केले, वाळवंटातून व दऱ्याखोऱ्यातून नेले,
निर्जल आणि गडद अंधकाराच्या भूमीतून नेले, ज्या प्रदेशातून कोणीही
प्रवास करीत नाही व जिथे मनुष्यवस्ती नाही त्यातून आम्हाला नेले, ते
याहवेह कुठे आहेत?’ 7 मी तुम्हाला एका सुपीक भूमीवर घेऊन आलो,
तिची उपज आणि तिचे उत्तमोत्तम पदार्थ खाण्यासाठी आणले. परंतु
तुम्ही ती भूमी अशुद्ध केली आणि माझे वतन अमंगळ केले. 8 याजकांनी
विचारले नाही, ‘याहवेह कुठे आहेत?’ नियमांचा अभ्यास करणाऱ्यांना
माझी ओळख नव्हती; त्यांचे अधिपती तर माझ्याविरुद्ध बंड केले आहे.
संदेष्टे बआल दैवताद्वारे संदेश देऊ लागले, आणि व्यर्थ मूर्तीचे अनुसरण
करू लागले. 9 “यास्तव मी तुमच्याविरुद्ध आरोप करणार आहे,” असे
याहवेह जाहीर करतात. “आणि मी तुमच्या मुलांच्या मुलांवरही आरोप
लावणार. 10 समुद्राचा किनारा ओलांडून कित्तीम बेटाच्या तटावर जा
आणि पाहा, केदारच्या वाळवंटात पाठवा व जवळून चौकशी करा; अशा
प्रकारे कधी काही घडले का ते पहा: 11 कोणत्याही राष्ट्रांनी आपले दैवत
बदलले आहे काय? (जरी ते सर्व देव नाहीतच.) परंतु माझ्या लोकांनी
आपल्या गौरवी परमेश्वराची व्यर्थ मूर्तीशी अदलाबदल केली. 12 हे पाहून
आकाश, विस्मयाने हादरून जा आणि भीतीने गर्भगळीत व्हा,” अशी
याहवेह घोषणा करतात. 13 “माझ्या लोकांनी दोन दुष्कर्मे केली आहेत:
त्यांनी जीवनदायी पाण्याच्या झऱ्याला, म्हणजे मला, सोडले आहे,
आणि ज्यात पाणी राहत नाही असे फुटके, गळके हौद स्वतःसाठी
बांधले आहेत. 14 जन्मापासूनच इस्राएल एक दास, गुलाम आहेत
का? मग ते सगळ्यांची लूट का झाले आहेत? 15 सिंहगर्जना करतात;
त्यांनी त्यांच्यावर मोठ्याने गर्जना केली. त्यांनी त्यांची भूमी उद्ध्वस्त
केली; त्यांची गावे जाळली व वैराण केली आहेत. 16 मेम्फीस आणि
तहपनहेसच्या सर्व लोकांनी तुमच्या कवट्यांना भेग पाडली आहे. 17
ज्या याहवेहनी तुम्हाला योग्य मार्गाने चालविले त्या तुमच्या परमेश्वराचा
त्याग करून, ही परिस्थिती तुम्ही स्वतःवर ओढवून घेतली नाही का? 18
आता इजिप्तकडे कशाला जाता नील नदीचे पाणी पिण्यासाठी काय?

आणि अश्शूराकडे का जावे फरात नदीचे पाणी पिण्यासाठी काय?
19 तुमचा दुष्टपणाच तुम्हाला शिक्षा देईल; तुमचे माघार घेणे तुम्हाला
दोषी ठरवेल. म्हणून विचार करा आणि तुमच्या लक्षात येईल याहवेह
तुमच्या परमेश्वराचा त्याग करून दूर जाणे तुमच्यासाठी किती वाईट
आणि कटू आहे, आणि माझे भय तुमच्यामध्ये नाही,” सर्वशक्तिमान
याहवेह असे म्हणतात. 20 “फार फार पूर्वी तुम्ही माझे जू झुगारून दिले
व मी बांधलेले दावे तोडून टाकले; तुम्ही म्हटले, ‘आम्ही तुमची सेवा
करणार नाही!’ अर्थात्, प्रत्येक उंच टेकडीवर, आणि प्रत्येक विस्तृत
वृक्षाखाली तुम्ही वेश्येप्रमाणे निजलात. 21 मी तुम्हाला एका उत्तम
द्राक्षवेलीप्रमाणे लावले होते उत्कृष्ट व विश्वसनीय असे खोड दिले होते.
मग तुम्ही माझ्याविरुद्ध का झालात भ्रष्ट व रानटी लता का झालात? 22
तुम्ही स्वतःला साबणाने धुतले आणि विपुल प्रमाणात धुण्याची पावडर
वापरली, तरी तुमचे कलंक माझ्यापुढे तसेच आहेत,” असे सार्वभौम
याहवेह म्हणतात. 23 “तुम्हाला कसे म्हणता येईल ‘मी अशुद्ध नाही; मी
बआल दैवताच्या मागे गेलो नाही’? दरीत जाऊन तुम्ही कसे वागले ते
पाहा, तुमच्या आचरणाबद्धल विचार करा. इकडे तिकडे पळणाऱ्या
चपळ उंटिणीसारखे तुम्ही आहात. 24 वाळवंटात भटकण्याची सवय
असलेल्या रानगाढवी प्रमाणे आहात, तुमच्या अनावर वासनांमुळे प्रत्येक
वाऱ्याचा शोध घेणारे आहात; तुमच्या वासनांना कोणी आवर घालावा?
कोणत्याही नराने तुमचा माग घेत असता स्वतःस थकवा आणू नये;
संभोगासमयी त्यांना ती सापडेल. 25 तुझे पाय पूर्णपणे खळयात उघडे
पडेपर्यंत पळू नको, आणि तुझ्या घशाला कोरड पडली आहे. परंतु तू
म्हटले, ‘याचा काही उपयोग नाही! मी परकीय दैवतावर प्रेम करतो,
आणि मी त्यांचेच अनुसरण करणार.’ 26 “चोराला पकडल्यावर जशी
त्याला लाज वाटते, तसे इस्राएल शरमिंदा झाला आहे— ते, त्यांचे
राजे व त्यांचे सरदार, त्यांचे याजक व त्यांचे संदेष्टे हे सर्वजण. 27
लाकडाच्या खांबाला ते म्हणतात, ‘तू आमचा पिता आहेस,’ आणि
पाषाणाला म्हणतात, ‘तू मला जन्म दिलास.’ त्यांनी माझ्याकडे पाठ
फिरविली आहे, पण त्यांचे मुख नव्हे; परंतु संकट समय येताच ते
माझा धावा करून म्हणतात, ‘या आणि आमचे रक्षण करा!’ 28 तुम्ही
स्वतःसाठी निर्माण केलेली दैवते कुठे आहेत? जर ते तुमचे रक्षण करू
शकतील, तर त्यांनी यावे तुमच्या संकटसमयी यावे! तुम्ही यहूदीया,
तुमच्या दैवतांची संख्या इतकी आहे जेवढी नगरे तुमच्या प्रांतात आहेत.
29 “तुम्ही माझ्याविरुद्ध आरोप का करता? तुम्हा सर्वांनी माझ्याविरुद्ध
बंड केले आहे,” असे याहवेह म्हणतात. 30 “मी तुमच्या लोकांना उगाच
शिक्षा केली; त्यांनी सुधारणेचा स्वीकार केला नाही. तुमच्याच तलवारीने
तुमच्या संदेष्ट्यांचा नाश केला जणू एखादा खवखवलेला सिंहच.
31 “या पिढीच्या लोकांनो, याहवेहच्या वचनावर विचार करा: “मी
इस्राएलशी एखाद्यावर निर्जन प्रदेशाप्रमाणे किंवा अंधाऱ्याप्रदेशाप्रमाणे
वागलो काय? माझे लोक असे का म्हणतात, ‘आम्ही मन मानेल
तसे भटकण्यास मोकळे आहोत; आता पुन्हा आम्ही तुमच्याशी संबंध
ठेवणार नाही’? 32 एखादी कुमारी आपले दागदागिने किंवा एखादी
वधू आपली विवाहभूषणे विसरेल का? तरी माझे लोक मला, असंख्य
दिवसापासून विसरले आहेत. 33 तुमच्या प्रियकराचे मन वळविण्यात
तुम्ही किती तरबेज आहात! अत्यंत चरित्रहीन स्त्रियांनाही तुमच्यापासून
धडे शिकता येतील. 34 निष्पाप लोकांच्या रक्ताने तुमची वस्त्रे माखली
आहेत, तुमच्या घरात चोरी करण्यासाठी शिरतांना त्यांना तुम्ही बघितले
नाही. असे सर्व असूनही 35 तुम्ही म्हणता, ‘मी निर्दोष आहे; परमेश्वर
माझ्यावर रागावले नाहीत.’ परंतु मी तुमचा न्याय करेन कारण तुम्ही
म्हटले, ‘मी पाप केलेले नाही.’ 36 तुम्ही आपले मार्ग सोडून पथभ्रष्ट का
होता? अश्शूरने तुमचा आशाभंग केला तसाच इजिप्तही करेल. 37
तुम्हीही आपले स्थान सोडणार आपले हात डोक्यावर ठेऊन जाल,
कारण ज्यांच्यावर तुमचा भरवसा आहे, त्यांनाच याहवेहने नाकारले
आहे. ते तुम्हाला मदत करणारच नाहीत.

**3** “जर एखाद्या पुरुषाने आपल्या स्त्रीला घटस्फोट दिला आणि त्या
स्त्रीने दुसऱ्या पुरुषाशी लग्न केले, तर तिच्या पहिल्या पतीकडे
तिच्याकडे परत जावे काय? असे करण्याने ही भूमी पूर्णपणे भ्रष्ट होणार
नाही काय? परंतु तू एका वेश्येप्रमाणे अनेक प्रियकरांसह राहिलीस—
तू माझ्याकडे आता परत येणार का?” असे याहवेह म्हणतात. 2
“उजाड टेकडीकडे आपली दृष्टी कर व पाहा. असे कोणते स्थान आहे
जिथे तुझ्यासह कुकर्म केले गेले नाही? रस्त्याच्या कडेला तू आपल्या
प्रियकरांची वाट बघतेस, एखाद्या अरबीचे जीवन जगणाऱ्या व्यक्तीसारखी
बसून राहतेस. आपल्या कुकर्माने व जारकर्माने तू सर्व भूमी दूषित केली
आहेस. 3 यास्तव वृष्टी होण्याची थांबली आहे. वसंतऋतूतील पाऊस
देखील पडला नाही, तू एका लज्जाहीन वेश्येसारखी दिसतेस, पण तू
शरमिंदी होण्यास नकार देते. 4 तू मला आताच म्हणालीस ना, ‘माझ्या
पित्या, माझ्या तारुण्यातील मित्रा, 5 तू नेहमीसाठी रागावला आहेस
का? हा क्रोध नेहमीसाठी राहील काय?’ याप्रकारे तू बोलतेस, परंतु तू
करता येईल ते सर्वप्रकारचे कुकर्म करतेस.” 6 योशीयाह राजाच्या
शासनकाळात, याहवेहने मला म्हटले, “तुम्ही पहिले का अविश्वासू
इस्राएलने काय केले आहे? एखाद्या दुराचारी स्त्रीप्रमाणे प्रत्येक उंच
डोंगरावर व प्रत्येक विस्तृत वृक्षाखाली व्यभिचार करते. 7 मला वाटले हे
सर्वकाही झाल्यानंतर ती माझ्याकडे परत येईल, परंतु ती माझ्याकडे
परत आलीच नाही आणि हा बंडखोरपणा तिच्या विश्वासघातकी
बहिणीने, यहूदीया हिने पाहिला. 8 मी अविश्वासू इस्राएलला तिच्या
घटस्फोटाचे प्रमाणपत्र दिले आणि तिच्या सर्व व्यभिचारामुळे तिला
पाठवले. तरीही मी पाहिले की तिची अविश्वासू बहीण यहूदाहला मुळीच
भय वाटले नाही. तीही बाहेर गेली व तिने व्यभिचार केला. 9 कारण
इस्राएलच्या दृष्टीत हा व्यभिचार अल्पमात्र होता, तिने सर्व भूमीला भ्रष्ट
केले आहे आणि लाकडांच्या व दगडांच्या मूर्तीशी व्यभिचार केला आहे.
10 हे सगळे घडून सुद्धा तिची अविश्वासू बहीण, यहूदीया, तिच्या संपूर्ण
हृदयाने माझ्याकडे परतली नाही, परंतु तिच्यात खोटेपणाच दिसला,”
असे याहवेह म्हणतात. 11 याहवेहने मला म्हटले, “विश्वासघातकी
यहूदीयापेक्षा विश्वासहीन इस्राएल अधिक नीतिमान आहे. 12 उत्तर

दिशाकडे जाऊन, संदेशाची घोषणा करा: "'हे अविश्वासू इस्राएल परत
ये, मी तुझ्यावर कायमचाच राग धरणार नाही, कारण मी विश्वासू आहे,'
याहवेह म्हणतात 'मी नेहमीच क्रोध करणार नाही, 13 केवळ तुम्ही
आपली पापे स्वीकार करा— तुमचे याहवेह परमेश्वर यांच्याविरुद्ध
तुम्ही बंड केले आहे, इतर परकीय दैवतांची तुम्ही उपासना केली
प्रत्येक विस्तृत वृक्षाखाली, माझे आज्ञापालन केले नाही,'" असे याहवेह
म्हणतात. 14 "विश्वासहीन लोकांनो, परत या," याहवेह म्हणतात,
"कारण मी तुमचा धनी आहे. मी तुमची निवड करेन—एका नगरातून
एक आणि एका कुळातून दोन—आणि तुला सीयोनास आणेन. 15 नंतर
मी तुम्हाला माझ्या मनासारखा असा मेंढपाळ देईन, तो शहाणपणाने
आणि समजूतदारपणाने तुम्हाला मार्गदर्शन करेल. 16 हे त्या दिवसामध्ये
होईल, जेव्हा तुम्ही देशात बहुगुणित व्हाल," याहवेह अशी घोषणा
करतात, "तेव्हा लोक असे म्हणणार नाहीत, 'याहवेहच्या कराराचा
कोश त्यांच्या मनात येणार नाही.' ते कधीही त्यांच्या लक्षात येणार
नाही, त्यांना आठवणसुद्धा राहणार नाही; ते त्याच्याविषयी पुन्हा विचार
करणार नाहीत, दुसरा कोश पुन्हा निर्माण होणार नाही. 17 त्यावेळी
ते यरुशलेमला याहवेहचे सिंहासन असे म्हणतील, आणि याहवेहच्या
नावाला आदर देण्यासाठी सर्व राष्ट्रे तिथे तिच्याकडे येतील. ते त्यांच्या
हृदयाच्या हट्टीपणाने चालणार नाहीत. 18 त्या दिवसामध्ये यहूदीयाचे
लोक इस्राएलच्या लोकांसोबत येतील, आणि ते लोक उत्तरेकडून
एकत्र येईल. त्यांच्या पूर्वजांना मी कायमचे वतन म्हणून दिलेल्या
देशात ते परत येतील. 19 "मी स्वतःला म्हटले, "'तुम्हाला माझ्या
मुलाबाळांप्रमाणे वागवितांना मला किती आनंद होईल आणि मी तुम्हाला
सुखद भूमी देईन, कोणत्याही देशापेक्षा अधिक सुंदर वतन.' मला
वाटले तू मला 'पिता' म्हणून हाक मारशील आणि माझे अनुसरण
करण्यापासून मागे फिरणार नाही. 20 परंतु आपल्या पतीला सोडून
जाणाऱ्या विश्वासघातकी स्त्रीसारखे तू इस्राएलाच्या घराण्या माझा
विश्वासघात केला," असे याहवेह म्हणतात. 21 उजाड पर्वतांवरून
रडण्याचा आवाज ऐकू येत आहे, तो इस्राएलाच्या लोकांच्या विलाप
करण्याचा व धावा करण्याचा आवाज, कारण ते मार्गभ्रष्ट झाले आहेत
आणि त्यांच्या याहवेह परमेश्वराला विसरले आहेत. 22 "विश्वासहीन
लोकांनो परत या; मी तुमच्यामागे घसरणीस बरे करेन." "होय, आम्ही
तुमच्याकडे येऊ, कारण तुम्हीच आमचे परमेश्वर याहवेह आहात. 23
निश्चितच डोंगरावरील गोंधळ व पर्वतावरील फसवणूक; निश्चितच आमचे
परमेश्वर याहवेह हेच इस्राएलचे तारण आहेत. 24 आमच्या तारुण्यापासून
लाजिरवाण्या दैवतांनी आमच्या पूर्वजांच्या कष्टाची फळे— त्यांच्या
जनावरांचे थवे व कळप, त्यांचे पुत्र आणि कन्या गिळंकृत केले आहेत.
25 आम्ही लज्जास्पद अवस्थेत लोळू आमची विटंबना आम्हाला झाकून
टाको. आम्ही आमच्या याहवेह परमेश्वराविरुद्ध पाप केले आहे, आम्ही
आणि आमच्या पूर्वजांनी; तारुण्यापासून आजपर्यंत आमच्या याहवेह
परमेश्वराची आज्ञा आम्ही पाळली नाही."

**4** याहवेह म्हणतात, "हे इस्राएला, जर तू परत फिरशील," "मग
माझ्याकडे परत ये." "जर तू आपल्या अमंगळ मूर्ती पूर्णपणे माझ्या
दृष्टीसमोरून दूर करशील आणि तू कधीही पथभ्रष्ट होणार नाही, 2
आणि जर सत्यतेने, न्यायीपणाने आणि नीतिमार्गाने चालशील, 'जिवंत
याहवेहची शपथ वाहशील,' तर मग राष्ट्रे याहवेहच्या द्वारे आशीर्वादित
होतील. आणि याहवेहच्या नामामध्ये त्यांचा गौरव करतील." 3 यहूदीया
आणि यरुशलेम येथील लोकांना याहवेह असे म्हणतात: "तुमची
कठीण भूमीवर नांगरून घ्या, काट्यांमध्ये बीजारोपण करू नका. 4
अहो यहूदीया आणि यरुशलेम निवासियांनो याहवेहसाठी तुमची सुंता
करा, तुमच्या अंतःकरणाची सुंता करा, नाहीतर माझा राग भडकेल व
अग्नीसारखा भडकेल कारण तुम्ही पापे केली आहेत— तो क्रोधाग्नी
कोणालाच विझविता येणार नाही." 5 "यहूदीयात याची घोषणा करा
आणि यरुशलेमात जाहीर करा व सांगा: 'संपूर्ण राष्ट्रांत रणशिंगे फुंका!'
मोठ्याने ओरडून सांगा: 'सर्वजण एकत्र या! तटबंदीच्या नगरात शरण
घ्या!' 6 सीयोनच्या दिशेने ध्वजेचा संकेत करा! विलंब न करता सुरक्षित
ठिकाणी पळ काढा! कारण मी उत्तरेकडून महान संकट आणत आहे,
होय, एक भयानक विनाश." 7 सिंह आपल्या गुहेतून बाहेर पडला आहे;
राष्ट्रांचा विनाशक आलेला आहे. त्याने आपले निवास सोडले आहे.
तुमच्या भूमीला उद्ध्वस्त करण्यासाठी. तुमची नगरे उजाड होतील आणि
निर्जन होतील. 8 म्हणून आपल्या अंगावर गोणपाट वेष चढवा, शोक व
आक्रोश करा. कारण याहवेहचा महाभयंकर क्रोध अजून आमच्यावरून
शमलेला नाही. 9 याहवेह असे म्हणतात, "त्या दिवशी असे घडेल,"
"राजा आणि अधिकारी भीतीने गर्भगळीत होतील, याजकांना भयाने
धडकी भरेल आणि संदेष्टे भीतीने गांगरून जातील," 10 त्यावर मी
म्हटले, "परंतु हे सार्वभौम याहवेह! तुम्ही यरुशलेमातील लोकांची
पूर्णपणे दिशाभूल केली आहे, असे म्हणून 'तुम्हाला शांती लाभेल,' पण
आम्हाला जिवे मारण्यासाठी तलवार गळयावर उगारली आहे!" 11
त्यावेळी या लोकांना व यरुशलेमला सांगितल्या जाईल, "वाळवंटातील
उजाड टेकड्यांवरून दाहक वारा माझ्या लोकांकडे येईल, परंतु पाखडणे
किंवा स्वच्छ करण्यासाठी नाही. 12 तो झंझावाती वारा माझ्याकडून
येईल. आता मी त्यांच्याविरुद्ध माझा न्याय जाहीर करेन." 13 पाहा! तो
ढगांसारखा पुढे येत आहे, चक्रीवादळाप्रमाणे त्याचे रथ आहेत, त्यांच्या
घोड्यांचा वेग गरुडांहून जास्त आहे. हाय! हाय! आमचा नायनाट झाला
आहे! 14 यरुशलेम, तुमच्या अंतःकरणाची अशुद्धता स्वच्छ करा आणि
तुमचे रक्षण होईल. किती काळ तुम्ही तुमचे दुष्ट विचार अंतःकरणात
ठेवणार? 15 दान येथून एक उंच वाणी घोषणा करू लागली, एफ्राईम
पर्वतावरून नाश जाहीर करण्यात आला आहे. 16 "राष्ट्रांना सांगा,
यरुशलेमविषयी घोषणा करा: 'शहराला वेढा घालण्यासाठी दूर देशाचे
सैन्य येत आहे, यहूदीयाच्या शहराविरुद्ध रणगर्जना करीत आहेत. 17
त्यांनी तिला एखाद्या शेताच्या राखणदारांसारखे घेरले आहे, कारण तिने
माझ्याविरुद्ध बंड केले आहे,'" असे याहवेह म्हणतात. 18 "तुमच्या
वागणुकीमुळे व वाईट कृत्यामुळे हा प्रसंग तुम्ही स्वतःवर ओढवून घेतला

आहे. तुमची ही शिक्षा आहे! किती कडू आहे हे! कसे अंत:करण छेदून
टाकले आहे!” 19 अहो, माझ्या यातना, माझ्या यातना! मला अत्यंत
वेदना होत आहेत. अहो, माझ्या हृदयाच्या यातना! माझे हृदय माझ्यातच
धडधडते, मी शांत राहू शकत नाही. कारण मी रणशिंगाचा आवाज
ऐकला आहे; मी युद्धाची ललकारी ऐकली आहे. 20 एका आपत्तीच्या
पाठोपाठ दुसरी आपत्ती येते; सर्व राष्ट्र उद्ध्वस्त झाले आहे. माझा
तंबूचा एका क्षणात नाश झाला आहे, क्षणार्धात माझे निवासस्थान
जमीनदोस्त झाले आहे. 21 किती काळ मी युद्धाचा ध्वज पाहणार आहे
आणि केव्हापर्यंत रणशिंगाचा आवाज ऐकत राहणार? 22 “माझे लोक
मूर्ख आहेत; ते मला ओळखत नाही. ते असमंजस मुलांसारखे आहेत.
त्यांना समज अजिबात नाही. दुष्ट कामे करण्यात त्यांचा हातखंडा आहे;
त्यांना चांगले कार्य करावयाचे माहीत नाही.” 23 मी पृथ्वीकडे पाहिले,
आणि ती निराकार आणि रिकामी होती; आणि आकाशाकडे दृष्टी केली
आणि तेथील प्रकाश नाहीसा झाला होता. 24 मी पर्वतांकडे पाहिले, ते
कंपायमान झालेले होते; सर्व डोंगर डळमळत होते. 25 मी पाहिले आणि
तिथे कोणीही मनुष्य नव्हता; आकाशातील सर्व पक्षी उडून गेलेले होते.
26 सुपीक जमीन ही एक वाळवंट झाली होती; आणि येथील सर्व नगरे
उद्ध्वस्त होती याहवेहच्या समोर, त्यांच्या भयंकर क्रोधाग्नीपुढे. 27
याहवेह असे म्हणतात: “संपूर्ण भूमी उजाड होईल, तरीपण मी त्याचा
पूर्ण अंत करणार नाही. 28 यास्तव पृथ्वी शोक करेल आणि आकाशात
काळोख होईल, कारण मी बोललो आहे, त्यात आता बदल होणार
नाही, मी निर्णय घेतला आहे आणि मागे फिरणार नाही.” 29 घोडेस्वार
आणि धनुष्यधारी यांची वाणी ऐकताच आवाजाने सर्व नगरे घाबरून
पळतात. काही लोक झुडूपात लपून बसतात; आणि डोंगरा-पर्वतांवर
चढतात. सर्व नगरे उजाड पडली आहेत; कोणीही त्यात राहत नाही. 30
हे उद्ध्वस्त झालेल्या, तू काय करीत आहे? कशासाठी तू ही गडद
वस्त्रे परिधान केली आहेस आणि अंगावर सोन्याचे दागिने चढविले
आहेस? आपल्या डोळ्यांत काजळ घालून ते सजविले आहेस? या
सर्व शृंगारांचा तुला काही एक उपयोग होणार नाही. तुझे प्रियकर तुझा
तिरस्कार करतात; तुला ठार करण्याची त्यांची इच्छा आहे. 31 एक स्त्री
प्रसूतीच्या वेळी ओरडते तसा मला आवाज ऐकू आला, जणू तिला
पहिल्यांदा मूल होते, अशा प्रकारचा आक्रोश— सीयोनच्या कन्येचा
श्वास कोंडला आहे, ती आपले हात पसरून म्हणत आहे, “हाय रे हाय!
मला मूर्च्छा येत आहे; माझा जीव मी घातक्यापुढे ठेवला आहे.”

**5** “यरुशलेमच्या प्रत्येक रस्त्यावरून येजा कर, शोध घे व विचार कर,
तिच्या चौकात तपास कर. असा एक जरी मनुष्य आढळला जो
प्रामाणिक व सत्यशोधक आहे, तरी मी या नगराला क्षमा करेन. 2
‘जिवंत याहवेहची शपथ’ असे ते ओरडून म्हणतात पण ते ही खोटीच
शपथ घेतात.” 3 हे याहवेह, तुमची दृष्टी सत्याला शोधत नाही का?
तुम्ही त्यांना शिक्षा केली, पण त्यांना मुळीच वेदना झाली नाही. तुम्ही
त्यांना चिरडून टाकले, पण ते आपल्या पापांपासून मागे वळण्याचे
नाकारतात. आपली मुखे त्यांनी खडकासारखी कठीण केली व पश्चात्ताप
न करण्याचे त्यांनी ठरविले. 4 मी विचार केला, “हे फार गरीब आहेत;
ते निर्बुद्ध आहेत, त्यांना त्यांच्या याहवेहचे मार्ग काय आहे हे ठाऊक
नाही त्यांना त्यांच्या परमेश्वराच्या अपेक्षा काय आहेत हे माहीत नाही.
5 मी त्यांच्या पुढाऱ्यांकडे जाईन व त्यांच्याशी बोलेन; कारण त्यांना
निश्चितच याहवेहचे मार्ग ठाऊक आहेत. त्यांना त्यांच्या परमेश्वराची
अपेक्षा काय आहे हे ठाऊक आहे.” पण त्या सर्वांनी एकमताने माझे जू
झिडकारून टाकले आहे. आणि माझी बंधने तोडून टाकली आहेत. 6
म्हणून जंगलातील सिंह त्यांच्यावर हल्ला करेल, वाळवंटातील लांडगा
त्यांना फस्त करेल, त्यांच्या नगरांभोवती चित्ता दबा धरून बसेल, आणि
बाहेर पडणाऱ्या प्रत्येकाला तो फाडून टाकील; कारण त्यांची बंडखोरी
फार मोठी आहे त्यांची घसरण फार मोठी आहे. 7 “मी तुम्हाला का
क्षमा करू? तुमच्या मुलांनी माझा त्याग केला आहे आणि जे देव
नाहीत त्यांची ते शपथ घेऊ लागले आहेत. मी त्यांच्या सर्व गरजांचा
पुरवठा केला, तरी त्यांनी व्यभिचार केला वेश्यागृहात गर्दी केली. 8
हे तर खाऊन पिऊन मस्तावलेले घोडे आहेत, प्रत्येकजण आपल्या
शेजाऱ्याच्या पत्नीची लालसा धरतो. 9 हे सर्व पाहून मी त्यांना शिक्षा
करू नये काय? ही याहवेहची जाहीर वाणी आहे. अशा दुष्ट राष्ट्राचा मी
स्वत: प्रतिकार करू नये काय? 10 “त्यांच्या द्राक्षमळ्यातून फिरा आणि
त्यांचा नाश करा. पण त्यांचा पूर्णपणे नाश करू नका. वेलीच्या फांद्या
तोडून टाका, कारण हे लोक याहवेहचे नाहीत. 11 इस्राएलच्या लोकांनी
आणि यहूदीयाच्या लोकांनी माझा घोर विश्वासघात केला आहे,” असे
याहवेह म्हणतात. 12 ते याहवेहबद्दल खोटे बोलतात; ते म्हणतात, “ते
काहीही करणार नाहीत! आमच्यावर अरिष्ट कोसळणारच नाही; आम्ही
दुष्काळ आणि लढाई बघणारही नाही. 13 संदेष्टे निव्वळ वारा आहेत
त्यांच्यामध्ये परमेश्वराचे वचन नाही. म्हणून ते जे काही बोलतात ते सर्व
त्यांच्यावरच कोसळू दे.” 14 म्हणून सर्वसमर्थ याहवेह परमेश्वर असे
म्हणतात: “कारण या लोकांनी हे शब्द उच्चारले आहेत, मी तुमच्या
मुखात माझे शब्द भडकत्या अग्नीसारखे करेन आणि जो या लोकांना
सरपणाच्या लाकडांप्रमाणे जाळून भस्म करेल.” 15 याहवेह म्हणतात,
“हे इस्राएलच्या लोकांनो, मी तुमच्याविरुद्ध एका दूरच्या बलाढ्य व
प्राचीन राष्ट्रास उभे करेन— त्यांची भाषा तू जाणत नाही, त्यांची वाणी
तुला समजत नाही. 16 त्यांचा भाता उघड्या कबरेप्रमाणे आहे; त्यांचे
सर्व योद्धे प्रतापी आहेत. 17 ते तुमची उपज व अन्न गिळंकृत करतील,
तुमचे पुत्र व कन्या यांना गिळंकृत करतील, गाईगुरे व शेळयामेंढ्यांचे
कळप हे देखील गिळंकृत करतील, आणि तुमची द्राक्षे व अंजिरेही
गिळंकृत करतील. त्यांच्या तलवारीने ते तुमची जी भिस्त म्हणून तुम्ही
समजता ती तटबंदीची नगरे ते नाश करतील. 18 “परंतु त्या दिवसात मी
तुमचा पूर्णपणे नि:पात करणार नाही,” असे याहवेह म्हणतात. 19
जेव्हा तुझे लोक विचारतील, “याहवेह आम्हाला हे असे शासन का
करीत आहे?” तेव्हा तू सांगशील, “तुम्ही त्यांचा त्याग केलात, आणि
स्वदेशातच तुम्ही परकीय दैवतांचे भक्त झालात, तर आता परकीय
लोकांच्या देशात तुम्ही त्यांची सेवा कराल. 20 “याकोबाच्या वंशजांना

आणि यहूदीयाला हे जाहीर कर: 21 ऐका, अहो मूर्खांनो व बुद्धिहीन
लोकांनो, तुम्हाला डोळे आहेत तरी तुम्हाला दिसत नाही, कान आहेत
तरी तुम्हाला ऐकू येत नाही: 22 तुम्ही माझे भय बाळगू नये काय?”
असे याहवेह विचारतात. “माझ्या उपस्थितीत तुम्ही थरथर कापू नये
काय? सागराच्या सीमारेषा वाळूने मर्यादित मीच केल्या आहेत, एक
अनंतकाळची मर्यादा जी ओलांडता येत नाही, म्हणूनच सागर कितीही
उसळले, तरी ते विजयी होऊ शकत नाही; त्यांनी कितीही गर्जना केल्या,
तरी या सीमांचे त्यांना उल्लंघन करता येत नाही. 23 परंतु माझ्या
लोकांची अंतःकरणे हट्टी व बंडखोर आहेत; माझ्याकडे पाठ फिरवून
ते पथभ्रष्ट झाले आहेत. 24 ते स्वतःस असे म्हणत नाहीत, ‘आपण
आपल्या याहवेह परमेश्वराचे भय धरू, जे आपल्याला प्रत्येक वर्षी
वसंतऋतूत, हिवाळयात पाऊस देतात, जे आपल्याला निश्चित वेळेवर
पीक देतात.’ 25 तुमच्या अपराधांमुळे तुम्ही या सर्व गोष्टींपासून दूर
आहात; तुमच्या पातकांमुळे तुम्ही उत्तम गोष्टींना मुकले आहात. 26
“माझ्या लोकांमध्ये दुष्ट लोक आहेत शिकारी जसा आडोशाला दबा
धरून पक्षांची वाट बघतो, तसे ते माणसांना पकडण्यासाठी सापळे
लावतात. 27 पक्ष्यांनी खुराडे भरलेले असावे, तशी त्यांची घरे कपटाने
भरलेली आहेत, म्हणून आता ते बलवान व श्रीमंत बनले आहेत. 28
ते खाऊन पिऊन धष्टपुष्ट झाले आहेत. त्यांच्या दुष्कर्मांना मर्यादाच
नाही; ते न्याय करीत नाहीत. अनाथांच्या न्यायाचा पाठपुरावा करीत
नाहीत; आणि गरिबांच्या रास्त हक्काचे समर्थन करत नाहीत. 29 मी
त्यांना याची शिक्षा देऊ नये काय?” असे याहवेह विचारतात. “अशा
राष्ट्राचा मी स्वतः सूड घेऊ नये का? 30 “या देशात एक महाभयंकर व
धक्कादायक गोष्ट घडली आहे: 31 संदेष्टे खोटी भविष्यवाणी करतात,
याजक स्वतःचेच अधिकार चालवितात, आणि माझ्या लोकांना ते
आवडते. पण शेवटी तुम्ही काय करणार आहात?

**6** “बिन्यामीन वंशजानो, आपल्या सुरक्षेसाठी तुम्ही पलायन करा!
यरुशलेममधून पळून जा! तकोवा इथून कर्ण्याचा आवाज येताच
बेथ-हक्करेम येथे धोक्याची सूचना देणारे संकेत द्या! कारण उत्तरेकडून
येणारा नाश पुढे दिसत आहे, भयंकर विनाश. 2 सीयोनाच्या सुंदर आणि
सुकुमार कन्येला मी उद्ध्वस्त करेन. 3 मेंढपाळ त्यांचे कळप सोबत
घेऊन तिच्याविरुद्ध येतील; ते तिच्या नगराभोवती त्यांचे तंबू ठोकतील,
प्रत्येक कळपासाठी कुरणे विभागतील.” 4 “तिच्याविरुद्ध युद्धाची तयारी
करा! उठा, चला दुपारच्या वेळी हल्ला करू! हाय हाय! परंतु आता
दिवसाचा प्रकाश मंदावला आहे. आणि संध्याकाळची छाया लांब वाढत
आहे. 5 चला, आता आपण रात्री हल्ला चढवू आणि तिच्या गडांचा नाश
करू!” 6 कारण सर्वसमर्थ याहवेह परमेश्वर असे म्हणतात: “झाडे तोडून
टाका आणि यरुशलेममध्ये तटबंदीची बांधणी करा. या नगराला शिक्षा
झालीच पाहिजे; तिच्यात जुलूम भरलेला आहे. 7 ज्याप्रमाणे विहिरीच्या
झऱ्यातून पाणी बाहेर वाहते, तशी तिची दुष्टाई झऱ्याप्रमाणे उफाळून
येते. तिच्या रस्त्यारस्त्यातून हिंसाचार व विनाशाचे आवाज घुमतात;
तिचे रोग व तिच्या जखमा सदोदित माझ्या नजरेसमोर आहेत. 8 हे
यरुशलेम, तुला हा इशारा आहे. नाही तर मी तुझ्यापासून दूर होईन आणि
मी तुझ्या देशाला उजाड करेन जिथे कोणीही मनुष्य राहणार नाही.”
9 सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: “ज्या प्रकारे उरलेले थोडेथोडे
द्राक्ष गोळा करण्यात येतात त्याचप्रमाणे इस्राएलमधून थोड्याफार
उरलेल्या निवडक लोकांना एकत्र करण्यात येईल; ज्या प्रकारे द्राक्ष
गोळा करण्यात येतात, त्याप्रकारे तुमचे हात पुन्हा फांद्यांवरून फिरवा.”
10 मी कोणाशी बोलू व सावधगिरीचा इशारा देऊ? माझे कोण ऐकेल?
त्यांचे कान बंद झाले आहेत त्यांना ऐकूच येत नाही. याहवेहचे वचन
त्यांना संतप्त करते; त्यांना ते सुखद वाटत नाही. 11 परंतु मी याहवेहच्या
क्रोधाने भडकलो आहे, हा क्रोध मला आवरून धरवत नाही. “मी हा क्रोध
रस्तोरस्ती असलेल्या मुलांवर आणि तरुणांच्या गटांवर ओततो; दोघे
पतिपत्नी त्यात अडकले जातील, आणि वयस्कर, जे वयातीत आहेत
ते देखील. 12 त्यांची घरे दुसऱ्यांना देण्यात येतील, ते त्यांची शेते व
त्यांच्या स्त्रियाही इतरांना दिल्या जातील, जेव्हा माझा हात मी या देशात
राहणाऱ्या लोकांविरुद्ध उगारेन, तेव्हा हे घडेल,” असे याहवेह जाहीर
करतात. 13 “त्यांच्यातील लहानापासून ते मोठ्यांपर्यंत सर्वजण लोभी
आहेत; संदेष्टे आणि याजक सर्व एकसारखेच, कपटी व्यवहार करतात.
14 माझ्या लोकांच्या घावावर ते असा उपचार करतात की जणू ते फारसे
गंभीर नाही. ‘शांती, शांती आहे’ असे ते म्हणतात, परंतु शांती कुठेही
नाही. 15 त्यांना त्यांच्या वाईट कृत्याबद्दल लाज वाटते का? नाही, त्यांना
मुळीच लज्जा वाटत नाही; लाज वाटणे म्हणजे काय असते हे त्यांना
माहीतच नाही. म्हणून ते पतन पावलेल्या लोकांमध्ये पतन पावतील;
मी जेव्हा त्यांना शिक्षा देईल तेव्हा त्यांचे पतन होईल,” असे याहवेह
म्हणतात. 16 याहवेह असे म्हणतात: “चौरस्त्यावर उभे राहा व पाहा;
पुरातन मार्गाची विचारणा करा, तो चांगला मार्ग कुठे आहे ते विचारा
आणि त्या मार्गाने जा, तसे केल्यास तुमच्या आत्म्याला शांती लाभेल.
परंतु तुम्ही म्हटले, ‘आम्ही त्या मार्गाने चालणार नाही.’ 17 मी तुमच्यावर
पहारेकरी नेमले आणि म्हटले, ‘रणशिंगाच्या आवाजाकडे लक्ष द्या!’
परंतु तुम्ही म्हटले, ‘आम्ही ऐकणार नाही.’ 18 म्हणून माझ्या राष्ट्रांनो
माझे ऐका; तुम्ही माझे साक्षीदार आहात, त्यांचे काय होईल ते समजून
घ्या. 19 हे पृथ्वी तू ऐक: मी या लोकांवर महासंकट आणत आहे,
त्यांच्याच कारस्थानाचे फळ, कारण त्यांनी माझी वचने ऐकली नाही
आणि माझे नियम नाकारले. 20 शबाहून आणलेल्या सुगंधी धूपाचा मला
काय उपयोग किंवा दूरदेशातील मोलाच्या द्रव्याचा काय उपयोग? तुमची
होमार्पणे मला संतुष्ट करीत नाही; तुमचे यज्ञबली मला प्रसन्न करीत
नाहीत.” 21 म्हणून याहवेह असे म्हणतात: “मी या लोकांच्या मार्गात
अडथळे पाठवेन. त्यावर मातापिता आणि लेकरे सारखेच अडखळतील.
शेजारी आणि मित्र नाश पावतील.” 22 याहवेह असे म्हणतात: “पाहा,
उत्तरेकडील देशातून सैन्य येत आहे; पृथ्वीच्या शेवटापासून एक मोठे राष्ट्र
भडकविले जात आहे. 23 त्यांचे सैनिक धनुष्य व भाल्यासहित सज्ज
आहेत. ते अत्यंत क्रूर असून दया दाखवित नाही. ते घोड्यांवर स्वार झाले
असता त्यांचा आवाज गर्जणाऱ्या समुद्राप्रमाणे आहे. हे सीयोनकन्ये

तुझ्यावर हल्ला करण्यासाठी युद्धासाठी सुसज्जित असलेल्यांप्रमाणे ते
येत आहेत.” 24 आम्ही त्यांच्याबद्दल वार्ता ऐकली आहे, आणि आमचे
बाहू निखळले आहेत. बाळाला जन्म देणाऱ्या स्त्रीच्या क्लेशाप्रमाणे
वेदनांनी आम्हाला ग्रासले आहे. 25 शेतातून बाहेर जाऊ नका, किंवा
रस्त्यांवरून प्रवास करू नका, कारण शत्रूकडे तलवार आहे, आणि
प्रत्येक बाजूला आतंक पसरलेला आहे. 26 माझ्या लोकांनो, गोणपाट
धारण करा, आणि राखेत लोळा; एकुलत्या एका पुत्रासाठी आक्रोश
करतो तसा आक्रोश कर. कारण संहारक सेना एकाएकी तुझ्यावर
हल्ला करेल. 27 “मी तुला धातूंची पारख करणारा केले आहे. आणि
माझ्या लोकांना अशुद्ध धातू, जेणेकरून तू त्यांना पारखावे, व त्यांच्या
मार्गाची परीक्षा करावी. 28 ते सर्व कठोर बंडखोर आहेत, निंदा करीत
फिरत आहेत. ते कास्य आणि लोखंडासारखे; त्या सर्वांची वर्तणूक
दूषित आहे. 29 भट्टीचा भाता भयानकपणे वाजत आहे. शुद्ध करणारा
अग्नी शिसे भस्म करीत आहे, परंतु हे शुद्धीकरण व्यर्थ होत आहे, दुष्ट
मार्गांनी चालणारे पूर्णपणे शुद्ध होत नाहीत. 30 ते अशुद्ध चांदीसारखे
नाकारलेले आहेत, कारण याहवेहने त्यांचा त्याग केला आहे.”

7 याहवेहकडून यिर्मयाहला हे वचन प्राप्त झाले: 2 “याहवेहच्या
मंदिराच्या प्रवेशद्वारापाशी उभा राहा आणि तिथे हा संदेश जाहीर
कर: “‘यहूदीयातील सर्व लोक जे या प्रवेशद्वारातून याहवेहची उपासना
करण्यासाठी आत येतात ते लोकहो, याहवेहचे हे वचन ऐका. 3
इस्राएलचे सर्वसमर्थ परमेश्वर याहवेह असे म्हणतात: तुमच्या मार्गाची व
वर्तणुकीची सुधारणा करा, मग मी तुम्हाला या ठिकाणी राहू देईन. 4
तुमची फसवणूक करणाऱ्या शब्दांवर विश्वास ठेऊन असे म्हणू नका, “हे
याहवेहचे मंदिर आहे, हे याहवेहचे मंदिर आहे, हे याहवेहचे मंदिर आहे!”
5 तुम्ही तुमचे मार्ग व वर्तणूक खरोखर बदलली तर व इतरांशी न्यायाने
वागाल, 6 जर तुम्ही परकीय, अनाथ आणि विधवा यांच्यावर अत्याचार
करत नसाल, या ठिकाणी निष्कलंक रक्त पाडणार नसाल, आणि
जे तुमच्या नाशाचे कारण असलेल्या इतर दैवतांचे अनुसरण करणार
नाही, 7 तरच मी तुम्हाला या भूमीत, जी मी तुमच्या वाडवडिलांना
कायमचे वतन म्हणून दिली, तिच्यात राहू देईन. 8 परंतु पाहा, तुम्ही
खोट्या आश्वासनावर भरवसा ठेवता जी निरर्थक आहेत. 9 “‘तुम्ही
चोरी, वध, व्यभिचार, खोट्या शपथा घेतल्या, बआल दैवत व तुम्हाला
माहीत नसलेली इतर दैवते यांचे अनुसरण करून, 10 आणि मग
येथे येऊन, ज्या मंदिराने माझे नाव धारण केले आहे, त्या मंदिरात
माझ्यासमोर उभे राहता व म्हणता “आम्ही सुरक्षित आहोत;” हे सर्व
दुष्कृत्य करण्यासाठी सुरक्षित आहात काय? 11 हे मंदिर ज्याने माझे
नाव धारण केले आहे, तुमच्यासाठी लुटारूंची गुहा झाली आहे काय?
परंतु मी त्याच्याकडे लक्ष दिले आहे! अशी याहवेह घोषणा करीत
आहेत. 12 “‘शिलोह नगरात जा, जिथे मी सर्वप्रथम माझ्या नावाचे
निवासस्थान केले, आणि माझ्या इस्राएली लोकांच्या दुष्टाईमुळे मी
काय केले ते पाहा. 13 याहवेह म्हणाले, तुम्ही ही सर्व दुष्कृत्ये करीत
असताना, मी तुमच्याशी वारंवार बोललो, परंतु तुम्ही माझे ऐकले
नाही; मी तुम्हाला हाक मारली, पण मला उत्तर दिले नाही. 14 म्हणून
माझे नाव धारण केलेले मंदिर, ज्याच्यावर तुम्ही भरवसा ठेवता, जे
मी तुम्हाला व तुमच्या पूर्वजांना दिले होते, आता त्या मंदिराचे, मी
शिलोहचे केले तसेच करेन. 15 मी तुम्हाला माझ्या उपस्थितीतून दूर
लोटेन, जसे तुमचे इस्राएली भाऊबंद, म्हणजे एफ्राईमच्या लोकांना
केले तसे करेन.’ 16 “म्हणून या लोकांसाठी प्रार्थना करू नकोस,
किंवा यांच्यासाठी माझ्याकडे विनंती किंवा विनवण्या करू नकोस.
कारण मी तुझे ऐकणार नाही. 17 यहूदीयाच्या सर्व नगरात आणि
यरुशलेमच्या रस्त्यात ते काय करीत आहेत, ते तुला दिसत नाही का?
18 मुलेबाळे लाकडे गोळा करतात, त्यांचे वडील अग्नी पेटवितात,
आणि स्त्रिया, आकाशराणीस पोळया तयार करून अर्पण करतात.
मला क्रोधित करण्यासाठी इतर दैवतांना पेयार्पणे करतात. 19 याहवेह
विचारतात, या त्यांच्या करणीने ते मला चिथावणी देतात का? नाही!
यामुळे त्यांचेच मोठे नुकसान होत नाही का, त्यांचीच बेअब्रू होत नाही
का? 20 “‘म्हणून सार्वभौम याहवेह असे म्हणतात: मी माझा कोप
आणि माझा क्रोध मी या जागेवर ओतेन—लोक, पशू, वृक्ष, आणि रोपे
भस्मसात होतील—आणि तो अग्नी भडकेल व तो न शमणार नाही.
21 “‘सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचे परमेश्वर म्हणतात: जा पुढाकार
घ्या, तुमची होमार्पणे इतर अर्पणात टाका व ते मांस तुम्हीच खा! 22
तुमच्या पूर्वजांना मी इजिप्त देशातून बाहेर आणले तेव्हा मी त्यांना
केवळ होमार्पणे व यज्ञार्पणे याविषयीच आज्ञा दिली नव्हती, 23 पण मी
अशी आज्ञा दिली होती की: माझ्या आज्ञा पाळा, म्हणजे मी तुमचा
परमेश्वर होईन व तुम्ही माझे लोक व्हाल. मी सांगतो ते सर्व पालन करा,
म्हणजे तुमचे कल्याण होईल. 24 पण त्यांनी माझे ऐकले नाही वा
त्याकडे लक्ष दिले नाही; याउलट, स्वतःच्या अंतःकरणाच्या हट्टी व दुष्ट
विचारांना अनुसरले. ते पुढे जाण्याऐवजी त्यांची माघारच झाली. 25
तुमच्या पूर्वजांनी इजिप्त देश सोडला त्या दिवसापासून आजपर्यंत,
दिवसेंदिवस, पुन्हापुन्हा मी माझे संदेष्टे पाठवित राहिलो. 26 परंतु त्यांनी
माझे ऐकले नाही व माझ्याकडे लक्ष दिले नाही. ते हेकेखोर होते व
त्यांच्या पूर्वजांहून त्यांनी अधिक दुष्टाई केली.’ 27 “जेव्हा हे सर्व तू
त्यांना सांगशील, ते तुझे ऐकणार नाहीत; तू त्यांना हाक मारशील, पण
ते त्यांना प्रतिसाद देणार नाहीत. 28 म्हणून त्यांना तू हे सांग, ‘आपल्या
याहवेह परमेश्वराच्या आज्ञा झिडकारणारे व सुधारणा करण्यास तयार
नसणारे असे हे राष्ट्र आहे. सत्यता नष्ट झाली आहे; त्यांच्या ओठातून ती
नाहीशी झाली आहे. 29 “‘आपले केस कापून टाक, ते फेकून दे; आणि
वनस्पतिहीन पर्वतावर विलाप कर, कारण याहवेहने आपल्या क्रोधामुळे
या पिढीला धिक्कारले आहे व त्यांचा त्याग केला आहे. 30 “‘याहवेह
म्हणतात, यहूदीयाच्या लोकांनी माझ्या दृष्टीत पाप केले आहे. ज्या
मंदिराने माझे नाव धारण केले आहे त्यामध्ये त्यांनी त्यांच्या अमंगळ
मूर्ती ठेवून, ते मंदिर भ्रष्ट केले आहे. 31 बेन-हिन्नोमच्या खोऱ्यात त्यांनी
तोफेत नावाची एक उच्च वेदी बांधली आहे—तिथे त्यांच्या दैवतांना ते
आपल्या मुलामुलींचे होमबली देतात—अशी आज्ञा मी त्यांना मुळीच

दिली नव्हती, असे भयानक कृत्य माझ्या कधी मनातही आले नाही.
32 म्हणून सावध राहा, ते दिवस येत आहे, याहवेह असे म्हणतात,
लोक त्या खोऱ्याला तोफेत किंवा बेन-हिन्नोमचे खोरे असे म्हणणार
नाही, परंतु कत्तलीचे खोरे हे नाव पडेल, कारण तोफेतमध्ये एवढ्यांना
पुरण्यात येईल, की त्या सर्व प्रेतांना पुरण्यास जागा उरणार नाही. 33
नंतर या लोकांची प्रेते जंगली पशू व पक्ष्यांना खाद्य असे होतील, आणि
त्यांना हाकलून लावण्यासही कोणी उरणार नाही. 34 तेव्हा मी हर्षगीते
व आनंदाचे गायन आणि वर-वधू यांचे आनंदी बोल यहूदीया नगरात व
यरुशलेमच्या रस्त्यावरून संपविणार आहे, कारण संपूर्ण भूमी उजाड
अशी होईल.

**8** "'याहवेह असे म्हणतात, यहूदीयाच्या राजांची आणि अधिपतींची
हाडे, याजकांची हाडे व संदेष्ट्यांची हाडे व यरुशलेमच्या लोकांची
हाडे त्यांच्या कबरांतून बाहेर काढली जातील. 2 आणि ती हाडे चंद्र,
सूर्य व तारे यांच्यापुढे पसरील. हीच माझ्या लोकांची दैवते आहेत.
यांच्यावरच त्यांचे प्रेम होते, यांना ते अनुसरत होते, यांचा ते सल्ला घेत,
यांचीच ते उपासना करीत असत. ही हाडे पुन्हा कोणी गोळा करणार
नाहीत वा पुरणार नाहीत. जमिनीवर पडलेल्या शेणाप्रमाणे ती विखुरली
जातील. 3 जिथे कुठेही मी या राष्ट्राला हद्दपार केले, या दुष्ट राष्ट्रातील सर्व
वाचलेल्या लोकांना जगण्यापेक्षा मेलेले बरे असे वाटेल, असे सर्वसमर्थ
याहवेह म्हणतात.' 4 "त्यांना सांग, 'याहवेह असे म्हणतात: "'जेव्हा
लोक पडतात, तेव्हा ते पुन्हा उठत नाहीत काय? जेव्हा कोणी रस्ता
चुकला असेल, तर तो मागे फिरत नाही काय? 5 मग हे लोक परत का
वळले नाही? यरुशलेम नेहमी बंडखोरी का करते? ते कपटाला चिकटून
राहिले आहेत; ते वळण्यास कबूल होत नाहीत. 6 मी त्यांचे लक्षपूर्वक
ऐकले आहे, परंतु ते योग्य ते बोलत नाहीत. त्यांच्यातील कोणीही
आपल्या दुष्टपणाबद्दल पश्चात्ताप करीत नाही, असे म्हणत नाही की "हे
मी काय केले?" प्रत्येकजण आपल्या निवडलेल्या मार्गाचा पाठपुरावा
करतो जणू एखादा घोडा युद्धात धाव घेतो. 7 आकाशातील करकोचाला
तिचे निवडलेले ऋतू माहीत आहे, आणि तसेच कबुतर, बगळा व निळवी
देखील त्यांच्या स्थलांतराच्या वेळेकडे लक्ष ठेऊन असतात. परंतु माझ्या
लोकांना माहीतच नाही याहवेहच्या काय अपेक्षा आहेत. 8 "'तुम्ही कसे
म्हणू शकता, "आम्ही बुद्धिमान आहोत, कारण आमच्याकडे याहवेहचे
नियम आहेत," खरेतर लेखनिकाच्या खोट्या लेखणीने याचा विपर्यास
केला आहे? 9 बुद्धिमान लज्जित केले जातील; त्यांची त्रेधा उडेल आणि
ते सापळयात अडकतील. कारण त्यांनी याहवेहचे वचन झिडकारले
आहे, त्यांना कशाप्रकारचा शहाणपणा असेल? 10 यास्तव मी त्यांच्या
स्त्रिया इतर पुरुषांना देईन आणि त्यांची शेतीवाडी नवीन मालकांना
देईन. त्यांच्यातील लहानापासून ते मोठ्यांपर्यंत सर्वजण लोभी आहेत;
संदेष्टे आणि याजक सर्व एकसारखेच, कपटी व्यवहार करतात. 11
माझ्या लोकांच्या घावावर ते असा उपचार करतात की जणू ते फारसे
गंभीर नाही. "शांती, शांती आहे," असे ते म्हणतात, परंतु शांती कुठेही
नाही. 12 त्यांना त्यांच्या वाईट कृत्याबद्दल लाज वाटते का? नाही,
त्यांना मुळीच लज्जा वाटत नाही; लाज वाटणे म्हणजे काय असते
हे त्यांना माहीतच नाही. म्हणून ते पतन पावलेल्या लोकांमध्ये पतन
पावतील; त्यांना शिक्षा मिळेल तेव्हा त्यांचे पतन होईल, असे याहवेह
म्हणतात. 13 "'मी त्यांचे पीक काढून घेईन, याहवेह घोषित करतात
द्राक्षलतेला द्राक्ष नसतील, झाडांवर अंजीर फळ दिसणार नाही, त्यांची
पाने सुद्धा वाळून जातील. मी त्यांना जे काही दिले आहे त्यांच्यापासून
परत घेतले जाईल.'" 14 आम्ही इथे का बसलो आहोत? एकत्र होऊ
या! आपण तटबंदीच्या शहरात पलायन करू आणि तिथेच मरू! कारण
आमच्या याहवेह परमेश्वराने आमचा नाश होण्यासाठी आम्हाला टाकून
दिले आहे आणि त्यांनी आम्हाला विषारी पाणी पिण्यासाठी दिले आहे,
कारण आम्ही त्यांच्याविरुद्ध पाप केले आहे. 15 आम्ही शांतीची आशा
करीत होतो, परंतु चांगले काही लाभलेच नाही, आरोग्य मिळण्याच्या
वेळेची आशा करीत होतो, केवळ भयंकर दहशत मिळाली. 16 दान
इथून शत्रूच्या घोड्यांचा फुरफुरण्याचा आवाज येतो; घोड्यांच्या मोठ्या
किंकाळण्यांनी सर्व भूमीवर थरकाप उडाला आहे. ते भूमी आणि
त्यात जे काही आहे, हे नगर आणि जे सर्व इथे राहतात, ते सर्वनाश
करण्यासाठी आले आहेत. 17 "पाहा, मी तुमच्यामध्ये विषारी फुरसे
सर्प पाठवेन, असे सर्प ज्यांना तुम्ही मंत्रमुग्ध करू शकणार नाही. आणि
ते तुम्हाला दंश करतील," याहवेह असे घोषित करतात. 18 तुम्ही, जे
दुःखात माझे सांत्वन करतात, माझे अंतःकरण क्षीण झाले आहे. 19
माझ्या लोकांचे आक्रोश ऐका दूर देशातून ते ऐकू येत आहे: "सीयोनेत
याहवेह नाहीत काय? तिचा राजा तिथे नाही काय?" "त्यांनी कोरीव
मूर्ती करून मला का संताप आणला, त्यांनी व्यर्थ परकीय दैवत का
पुजले?" 20 "हंगाम संपला, उन्हाळा सरला आणि तरीही आमचे तारण
झाले नाही." 21 माझे लोक चिरडले गेले, मी चिरडलो; मी शोकाकुल
झालो, भीतीने मला दहशत भरली आहे. 22 गिलआदात काही औषध
नाही का? तिथे कोणी वैद्य नाही का? मग माझ्या लोकांच्या जखमा
तिथे बऱ्या का होत नाहीत?

**9** हाय, हाय! माझे मस्तक पाण्याचे एक स्त्रोत आणि माझे डोळे एक
अश्रूंचा झरा असता! तर मी रात्रंदिवस सारखे अश्रू ढाळीत माझ्या
घात केलेल्या लोकांकरिता विलाप केला असता. 2 बरे झाले असते,
जर ओसाड रानात माझ्याकडे या यात्रेकरूंकरिता एखादे आश्रयस्थान
असते. जेणेकरून मी माझ्या लोकांचा त्याग करून त्यांच्यापासून दूर
गेलो असतो; कारण ते सर्वजण व्यभिचारी आहेत, विश्वासघातकी
लोकांचा एक जमाव. 3 "ते आपल्या जिभांना खोट्या शब्दांचा प्रहार
करण्यासाठी धनुष्यांप्रमाणे तयार करतात; ते सत्याने या भूमीत विजय
मिळवित नाहीत. ते एका पापापासून दुसऱ्या पापाकडे धाव घेतात ते
माझ्या अस्तित्वाची दखल घेत नाहीत," असे याहवेह जाहीर करतात. 4
"तुमच्या मित्रांपासून सावध राहा; तुमच्या भाऊबंदावर भरवसा करू
नका. कारण त्यांच्यातील प्रत्येकजण फसविणारा आहे, व प्रत्येक
मित्र निंदा करणारा आहे. 5 मित्र मित्रास फसवितो, आणि कोणीही
सत्य बोलत नाही. त्यांनी त्यांच्या जिभेला खोटे बोलणे शिकविले आहे;

अगदी दमून जाईपर्यंत ते पाप करीत राहतात. 6 तू फसवणुकीच्या मध्ये
आपले निवास बनविले आहे; त्यांच्या या कपटामुळे ते माझे अस्तित्व
नाकारतात," असे याहवेह म्हणतात. 7 म्हणून सर्वसमर्थ याहवेह असे
म्हणतात: "पाहा, मी यांना शुद्ध करेन व पारखेन, याशिवाय यांचे मी
दुसरे काय करणार याचे कारण माझ्या लोकांची पापेच नव्हे काय? 8
त्यांच्या जिभा विषारी बाणांप्रमाणे आहेत; ते असत्य वचने बोलतात.
त्यांच्या मुखाने ते त्यांच्या शेजाऱ्यांशी सलोख्याने बोलतात, परंतु मनात
ते त्यांना पाशात अडकविण्याची योजना करतात. 9 अशा गोष्टीबद्दल
मी त्यांना शासन करू नये का?" अशी याहवेह घोषणा करतात. "या
अशा राष्ट्रावर मी स्वतः सूड उगवू नये काय?" 10 मी डोंगराविषयी
विलाप आणि आक्रोश करेन आणि तसेच रानातल्या निर्जन कुरणाबद्दल
विलाप करेन. कारण सर्वकाही ओसाड पडलेले व प्रवास करण्यायोग्य
नाहीत, गाईगुरांचे हंबरणे ऐकू येत नाही. पक्षीसुद्धा उडून गेले आहेत.
आणि जनावरेही गेली आहेत. 11 "मी यरुशलेमला उद्ध्वस्त करून
त्याचा ढिगारा करेन, आणि त्यात कोल्ह्यांची विवरे होतील. यहूदीयातील
नगरे उजाड करेन तिथे कोणीही वस्ती करू शकणार नाही." 12 हे सर्व
समजण्याइतपत शहाणा कोण आहे? याहवेहने हे त्याला समजावून
सांगितले व तो त्याचे स्पष्टीकरण करेल तो कुठे आहे? हा देश एवढा
ओसाड व वाळवंटासारखा का झाला की यातून प्रवास करण्यासही
कोणी धजत नाही? 13 याहवेह म्हणाले, "कारण माझ्या लोकांनी
माझ्या आज्ञांचा त्याग केला, जे मी त्यांच्यापुढे ठेवले होते; त्यांनी
मला अनुसरण केले नाही व माझ्या नियमाचे पालन केले नाही. 14
याउलट ते हट्टीपणाने मनाला येईल तसे वागले, आणि त्यांच्या पूर्वजांनी
शिकविल्याप्रमाणे त्यांनी बआलच्या मूर्तीचे अनुसरण केले." 15 म्हणून
सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचे परमेश्वर असे म्हणतात: "पाहा, मी त्यांना
कडू अन्न खावयास घालेन आणि विषारी पाणी प्यावयास देईन. 16 जे
त्यांच्या पूर्वजांना माहीत नाही, अशा देशात मी त्यांची पांगापांग करेन,
तिथे सुद्धा त्यांचा पूर्ण नायनाट करेपर्यंत माझी तलवार त्यांची पाठ
सोडणार नाही." 17 सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: "विचार करा!
आक्रंदन करणाऱ्या स्त्रियांना बोलवा; त्यामधून कुशल अशा स्त्रियांना
पाठवा. 18 त्यांना त्वरित येऊ द्या आणि आमच्यासाठी आक्रोश करतील
व आमच्या डोळ्यातून अश्रू वाहतील आणि डोळ्याच्या पापण्या धारा
काढतील. 19 सीयोनातून आक्रंदन ऐकू येत आहे: 'आमचा किती
सत्यानाश झाला आहे! आमच्यावर घोर लज्जा आली आहे! आम्ही
आमचा देश सोडून गेले पाहिजे कारण आमच्या घरांची पडझड झाली
आहे.'" 20 आता स्त्रियांनो, याहवेहचे शब्द ऐका! त्यांच्या मुखातील
शब्द ऐकण्यासाठी तुमचे कान उघडा. तुमच्या कन्यांना विलाप करण्यास
शिकवा; एकमेकींना आकांत करण्यास शिकवा. 21 कारण तुमच्या
खिडक्यातून मरणाचा शिरकाव झाला आणि त्याने आमच्या गडात
प्रवेश केला आहे; त्याने रस्त्यांवरून बालकांना आणि तुमच्या तरुणांना
चौकातून काढून घेतले आहे. 22 त्यांना सांग, "याहवेह असे म्हणतात:
"'मृतदेह उघड्या जागांवर विष्ठेप्रमाणे पसरली जातील; कापणाऱ्यांच्या
मागे पेंढ्या पडाव्यात तशी ती दिसतील, आणि कोणी मनुष्य त्यांना
मूठमाती देणार नाही.'" 23 याहवेहने असे म्हणतात: "शहाण्याने
स्वतःच्या शहाणपणाचा अभिमान बाळगू नये. बलाढ्य मनुष्याने बलाचा
तोरा मिरवू नये आणि श्रीमंताने श्रीमंतीचा गर्व करू नये. 24 जो प्रौढी
मिरवतो त्याने याविषयी प्रौढी मिरवावी मी याहवेह, जो कृपा करणारा
पृथ्वीवर न्याय आणि नीती करणारा आहे, असे त्यांनी मला खरोखर
समजावे, ह्यात मला संतोष आहे, असे याहवेहने म्हणतात." 25 याहवेह
असे म्हणतात, "असे दिवस येत आहेत, मी त्या सर्वांना शिक्षा करेन,
ज्यांची केवळ शारीरिक सुंता झाली आहे— 26 म्हणजे इजिप्ती, एदोमी,
अम्मोनी, मोआबी, अरबी, आणि होय, तुम्ही यहूदीयातील लोकांना
आणि ते सर्व जे वाळवंटातील दूरच्या प्रदेशात राहतात. या सर्व राष्ट्रांची
सुंता झाली नाही, परंतु इस्राएलच्या हट्टी अंतःकरणाची सुंता झालेली
नाही."

**10** हे इस्राएलच्या लोकांनो, याहवेहचे वचन ऐका. 2 याहवेह असे
म्हणतात: "इतर राष्ट्रांचे मार्ग शिकू नका जरी त्यांच्यामुळे इतर
राष्ट्रे भयभीत होतात, तरी आकाशाच्या चिन्हांनी तुम्ही भयभीत होऊ
नका. 3 कारण लोकांच्या प्रथा व्यर्थ आहेत; ते जंगलातील एक लाकूड
कापून आणतात, आणि एक कारागीर हातातील छेनीने त्यास आकार
देतो. 4 ते त्याला सोने आणि चांदीने सजवितात; ती एका जागी स्थिर
रहावी, पडू नये म्हणून खिळे व हातोडा यांनी ती ठोकून घट्ट बसवितात.
5 ते जणू काही काकडीच्या मळयातील बुजगावणेच, या मूर्तीला बोलता
येत नाही; तिला तर उचलून न्यावे लागते कारण तिला चालता येत
नाही. त्यांना घाबरू नकोस; त्या काहीही इजा करू शकत नाही तुमचे
काही भले सुद्धा करत नाही." 6 हे याहवेह, तुमच्यासारखे कोणीही
नाही. कारण तुम्ही महान आहात, आणि तुमचे नाव अति सामर्थ्यशाली
आहे. 7 हे राष्ट्रांच्या राजा, तुमचे भय नाही असा कोण आहे? अशा
श्रद्धेच्या योग्य केवळ तुम्हीच आहात, सर्व राष्ट्रातील सुज्ञ पुढाऱ्यांमध्ये
आणि जगातील सर्व राज्यांमध्ये तुमच्यासारखे दुसरे कोणीच नाही.
8 लाकडाच्या व्यर्थ मूर्तीद्वारे ज्यांना शिक्षण मिळते, ते सर्व निर्बुद्ध व
मूर्ख आहेत; 9 ते तार्शीशहून चांदीचे पत्रे आणि उफाजहून सोन्याचे पत्रे
आणून कुशल कारागीर व सोनारांकडून मूर्ती घडवून घेतात. मग त्यावर
ते निळी व जांभळी वस्त्रे चढवितात— हे सर्व निष्णात कारागिरांनी
तयार केलेले असते. 10 परंतु याहवेह हेच खरे परमेश्वर आहेत; ते जिवंत
परमेश्वर आहेत, ते सनातन राजा आहेत. जेव्हा ते क्रोधित होतात,
सर्व पृथ्वी कंपायमान होते; त्याच्या प्रकोपापुढे राष्ट्रांचा टिकाव लागत
नाही. 11 "त्यांना हे सांग: 'ही दैवते, ज्यांनी आकाश आणि पृथ्वी
निर्माण केली नाही, ती या पृथ्वीवरून आणि आकाशाच्या खालून नष्ट
होतील.'" 12 परंतु परमेश्वराने त्यांच्या सामर्थ्याने पृथ्वीची निर्मिती
केली; संपूर्ण विश्वाची प्रस्थापना त्यांच्या सुज्ञतेने केली आणि त्यांच्या
बुद्धीने आकाश विस्तीर्ण केले. 13 जेव्हा ते गर्जना करतात, तेव्हा
आकाशातील मेघगर्जना करतात; ते मेघांना पृथ्वीच्या एका टोकापासून
दुसऱ्या टोकापर्यंत उभारतात. ते विजा आणि पाऊस पाठवितात आणि

त्यांच्या भांडारातून वारा बाहेर काढतात. 14 प्रत्येक मनुष्य असमंजस व
ज्ञानहीन आहे; प्रत्येक सोनार त्याच्या मूर्तीनी लज्जित झाला आहे. त्याने
घडविलेल्या प्रतिमा खोट्या आहेत. त्यांच्यामध्ये श्वास नाही. 15 त्या
व्यर्थ असून उपहासाचा विषय आहेत; जेव्हा त्यांचा न्याय होईल, तेव्हा
त्यांचा नाश होईल. 16 परंतु जो याकोबाचा वाटा आहे, तो यासारखा
नाही. कारण तेच सर्वांचे निर्माणकर्ता आहेत, इस्राएलसहित, ते लोक
त्यांचे वारस आहेत; सर्वसमर्थ याहवेह हे त्यांचे नाव आहे. 17 तुम्ही, जे
वेढ्यात राहत आहात, उठा, ही भूमी सोडण्यासाठी तुमच्या सामानाची
बांधाबांध करा. 18 कारण याहवेह असे म्हणतात: "जे या देशाचे
रहिवासी आहेत त्यांना यावेळी मी तुम्हाला या देशातून बाहेर भिरकावून
देईन; त्यांच्यावर महासंकटे आणेन म्हणजे ते सहजगत्या पकडल्या
जातील." 19 मला धिक्कार असो! कारण मला जखम झाली आहे! ती
असाध्य आहे! तरी देखील मी स्वतःला म्हटले, "हा माझा आजार आहे
आणि तो मला सहन केलाच पाहिजे." 20 माझा तंबू धुळीला मिळाला
आहे; त्याच्या सर्व दोऱ्या तुटल्या आहेत. माझी मुले माझ्यापासून दूर
गेली आहेत आणि नाहीशी झाली आहेत; माझा तंबू उभारण्यासाठी
कोणीही राहिले नाही, माझे निवासस्थान पुन्हा बांधण्यास कोणीही
नाही. 21 माझे मेंढपाळ असमंजस आहेत कारण ते याहवेहचे मार्गदर्शन
घेत नाहीत; म्हणून ते समृद्ध होत नाहीत आणि त्यांच्या सर्व कळपांची
पांगापांग होते. 22 ऐका! तो अहवाल येत आहे— उत्तरेकडून एक
महाभयंकर ध्वनी ऐकू येत आहे! तो यहूदीयाची नगरे निर्जन करेल, तिथे
कोल्हे भटकतील. 23 याहवेह, मला माहीत आहे की मानवाचे जीवन
त्यांच्या हातात नाही; ते स्वतःचे मार्गदर्शन करू शकत नाहीत. 24 हे
याहवेह मला अनुशासित करा, परंतु ते रास्तपणे करा— रागाने करू
नका, नाहीतर मी नाहीसा होईन. 25 या राष्ट्रांवर आपल्या क्रोधाग्नीचा
वर्षाव करा जे तुमचा अधिकार मान्य करीत नाहीत, जे लोक तुमच्या
नावाचा धावा करीत नाहीत. त्यांनी याकोबाला गिळले आहे; त्याला
संपूर्णपणे गिळंकृत केले आहे आणि त्यांच्या मातृभूमीचा नायनाट केला
आहे.

**11** याहवेहकडून यिर्मयाहला हे वचन प्राप्त झाले: 2 "या कराराच्या
ठराविक अटी ऐकून घे व यहूदीयाचे लोक व यरुशलेममध्ये
राहणारे लोक, यांना त्या सांग. 3 त्यांना सांग मी इस्राएलचा परमेश्वर
याहवेह असे म्हणतो: या कराराच्या अटींचे पालन न करणारा मनुष्य
शापित आहे— 4 'इजिप्तच्या गुलामगिरीतून, लोखंडी भट्टीतून मी
त्यांना सोडवून बाहेर आणले तेव्हा मी त्यांना हे नियम सांगितले होते.'
मी म्हटले 'माझ्या आज्ञा व मी जे सुचविले ते पालन करा, आणि मग
तुम्ही माझे लोक व्हाल आणि मी तुमचा परमेश्वर होईन. 5 तेव्हा मी
तुमच्या पूर्वजांना वाहलेली शपथ पूर्ण करेन, आणि दूध व मध वाहणारा
देश' ज्यात आज तुम्ही राहत आहात तो मी तुम्हाला देईन." मी उत्तर
दिले, "याहवेह, आमेन." 6 नंतर याहवेहने मला म्हटले, "यहूदीयाच्या
प्रत्येक नगरात व यरुशलेमच्या रस्त्यातून जा व हा संदेश घोषित कर:
'कराराच्या अटी ऐकून घ्या व त्यांचे पालन करा. 7 कारण तुमच्या
पूर्वजांना मी इजिप्तमधून बाहेर आणले तेव्हापासून मी त्यांना पुन्हापुन्हा
बजावून सांगितले होत, "तुम्ही माझी आज्ञा पाळा." 8 परंतु त्यांनी
ऐकले नाही वा त्याकडे लक्ष दिले नाही; याउलट प्रत्येकजण आपल्या
दुष्ट अंतःकरणाच्या हट्टीपणाने करीत राहिला. परंतु माझ्या ज्या आज्ञा
पाळण्यास त्यांना सांगितले होते ते नाकारले म्हणून करारामध्ये नमूद
केल्याप्रमाणे सर्व श्राप मी त्यांच्यावर आणले.'" 9 नंतर याहवेह मला
म्हणाले, "यहूदीया व यरुशलेम येथील लोकांनी माझ्याविरुद्ध कट
केला आहे. 10 ते त्यांच्या पूर्वजांच्या पापाकडे परतले आहेत, ज्यांनी
माझे वचन पाळणे नाकारले होते. त्यांनी इतर दैवतांचे अनुसरण करून
सेवा केली. त्यामुळे यहूदीया व इस्राएलाच्या पूर्वजांशी मी केलेला
करार मोडला आहे. 11 म्हणून याहवेह असे म्हणाले: 'मी त्यांच्यावर
घोर आपत्ती घेऊन येणार त्यातून त्यांची सुटका होणार नाही. ते
रडून दयेसाठी आरोळी मारतील तरी मी त्यांचे ऐकणार नाही. 12
यहूदीयातील नगर आणि यरुशलेममधील लोकांनी ज्या अन्य देवतांसमोर
धूप जाळला, ते त्यांचा धावा करतील, परंतु त्यांना ते आपत्तीतून
सोडवू शकणार नाही. निराशेच्या आपत्तीतून त्यांना सोडवू शकणार
नाही. 13 हे यहूदीया, जेवढी तुमची शहरे आहेत तेवढीच त्या दैवतांची
संख्या; आणि तुमच्या या लाजिरवाण्या दैवतांच्या वेद्या, बआलापुढे धूप
जाळण्याच्या वेद्या यरुशलेमच्या प्रत्येक रस्त्यावर आहेत.' 14 "म्हणून
हे यिर्मयाह, इतःपर या लोकांसाठी प्रार्थना करू नकोस, त्यांच्यासाठी
रडू नकोस अथवा विनवण्याही करू नकोस; कारण अखेरीस निराशेने
व्याकूळ होऊन ते माझ्यापुढे पदर पसरतील. परंतु मी त्यांचे ऐकणार
नाही. 15 "माझी प्रिया माझ्या मंदिरात काय करीत आहे? इतरांसह
मिळून ती तिच्या दुष्ट कारस्थानाची योजना करीत आहे का? तुमच्या
अर्पणाचे शुद्धीकरण करून तुमची शिक्षा परतवू शकाल का? जेव्हा
तुम्ही तुमच्या दुष्ट योजना पार पाडण्यात व्यस्त राहता, तेव्हा तुम्ही
आनंदित होता." 16 याहवेह तुम्हाला बहरलेला जैतून वृक्ष म्हणत
असत सुंदर आकाराच्या फळांनी भरलेला. परंतु एखाद्या वादळाच्या
भयंकर गर्जनेने ते आता त्याला अग्नीने भस्म करतील, आणि त्याच्या
फांद्या मोडून जातील. 17 सर्वसमर्थ याहवेह, ज्यांनी तुमचे रोपण केले,
त्यांनी तुमचा सर्वनाश करण्याची आज्ञा दिली आहे, कारण इस्राएल
व यहूदीया या दोन्ही लोकांनी दुष्टपणा केला आहे आणि बआलापुढे
धूप जाळून माझा क्रोधाग्नी भडकविला आहे. 18 याहवेहने त्यांचे सर्व
कारस्थान मला सांगितले, म्हणून ज्यावेळी त्यांनी ते काय करीत आहेत
हे मला दाखविले, मला ते आधीच कळले होते. 19 कत्तलखान्याकडे
चालविलेल्या अज्ञान कोकरासारखा मी भोळाभाबडा होतो; मलाच ठार
मारण्याचा त्यांचा बेत होता याची मला जाणीवही नव्हती, ते म्हणाले,
"झाडाचा त्याच्या फळांसहित नाश करू या; याला जिवंताच्या भूमीवरून
नाहीसे करू या, म्हणजे याची नावनिशाणीही राहणार नाही." 20
सर्वसमर्थ याहवेह, तुम्ही नीतिमत्तेने न्याय करता मन व अंतःकरणाची
परीक्षा घेता, त्यांच्यावरील तुम्ही घेतलेला सूड मला स्वतःच्या नजरेने
बघू द्या, कारण माझ्या समस्या मी तुमच्याकडे सोपविल्या आहेत.

21 म्हणून अनाथोथच्या लोकांविषयी, जे माझा जीव घेण्याची धमकी
देतात, ते म्हणतात “याहवेहच्या नावाने भविष्यवाणी करू नको, नाहीतर
आमच्या हातून तुझा जीव जाईल;” 22 म्हणून सर्वसमर्थ याहवेहने मला
असे उत्तर दिले: “मी त्यांना शिक्षा देईन. त्यांचे पुरुष तलवारीस बळी
जातील, त्यांचे पुत्र व कन्या उपासमारीने मरतील. 23 त्यांच्यातील
एकही जिवंत राहणार नाही. कारण त्यांच्या शिक्षेचे वर्ष येताच मी
अनाथोथच्या लोकांवर अरिष्ट आणेन.”

**12** हे याहवेह, मी तुमच्यापुढे जेव्हा निवाड्यासाठी वाद आणतो,
तेव्हा तुम्ही मला नेहमी धार्मिकतेने वागविता. तरी देखील मला
तुमच्या न्यायनिवाड्याबद्धल बोलू द्या: वाईट माणसे एवढी समृद्ध का
असतात? सर्व विश्वासहीन लोक सुखी का असतात? 2 तुम्हीच त्यांचे
रोपण केले आणि ते मुळावले; ते वाढतात व फलवंत होतात. तुमचे
नाव सतत त्यांच्या मुखात असते परंतु त्यांच्या अंतःकरणापासून तुम्ही
फार दूर असता. 3 पण याहवेह, तुम्ही मला ओळखता; मला बघता व
तुमच्याबद्दल माझ्या विचारांची परीक्षा घेता. मेंढरांना कत्तलखान्याकडे
फरफटत न्यावे तसे त्यांना न्या! कत्तलीच्या दिवसासाठी त्यांना वेगळे
करा! 4 किती काळ ही भूमी कोरडी ठणठणीत राहील आणि प्रत्येक
कुरणातील गवत सुकलेले असेल? कारण जे या ठिकाणी राहतात ते
दुष्ट आहेत, पशू व पक्षी नाहीसे झाले आहेत. त्यावर लोक म्हणतात,
“परमेश्वर आमचा परिणाम बघणारही नाही.” 5 “जर माणसांबरोबर तू
पायी धावतो आणि तू थकून इतका झिजून गेलास, तर घोड्यांबरोबर
तू स्पर्धा कशी करशील? जर सुरक्षित देशात तू अडखळतोस, तर
यार्देनेच्या जंगलात तू कसे करशील? 6 तुझे नातेवाईक, तुझ्या स्वतःच्या
कुटुंबातील सदस्य— यांनी देखील तुझा विश्वासघात केला आहे; ते
मोठ्याने ओरडून तुझा विरोध करतात. तुझ्याशी ते गोड गोड गोष्टी
बोलले तरी त्यांच्यावर भरवसा ठेवू नकोस. 7 “मी माझ्या लोकांचा
त्याग करेन, माझ्या वारसांचा परित्याग करेन; माझ्या अतिप्रियजनांना
मी त्यांच्या शत्रूंच्या हवाली करेन. 8 माझे वारस माझ्याकरिता जणू
वनातील सिंहिणीप्रमाणे झाले आहेत. ती माझ्यावर गर्जना करते;
म्हणून मी तिचा तिरस्कार करतो. 9 माझे वारसदार एखाद्या ठिपकेदार
पक्ष्यासारखे झाले नाहीत का, त्यांच्यावर इतर हिंस्र पक्ष्यांनी चहूबाजूंनी
हल्ले चढविले नाहीत का? जा आणि त्यांना गिळंकृत करण्यासाठी
सर्व वनपशूंना एकत्र कर. 10 अनेक मेंढपाळ माझ्या द्राक्षमळ्यांची
नासाडी करतील मळा पायाखाली तुडवतील; ते माझा रमणीय मळा
ओसाड करतील. 11 माझ्यापुढे कोरडा व उद्ध्वस्त करून तो ओसाड
केला जाईल, संपूर्ण भूमी वैराण करण्यात येईल, कारण तिची राखण
करणारे कोणीही नसेल. 12 उजाड वाळवंटाच्या टोकांवर संहार करणारे
झुंडीने येतील, कारण याहवेहची तलवार भूमीला गिळून टाकेल, एका
टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत कोणीही सुरक्षित राहणार नाही. 13
माझे लोक गहू पेरतील पण काट्यांची कापणी करतील; ते कष्ट करून
स्वतःला झिजवतील, पण त्याचा काही फायदा होणार नाही. कारण
याहवेहच्या भयंकर क्रोधामुळे ते लज्जेचे पीक गोळा करतील.” 14
म्हणून याहवेह असे म्हणतात: “माझ्या सर्व दुष्ट शेजाऱ्यांनी, मी माझ्या
इस्राएली लोकांना जो देश वतन म्हणून दिला, तो बळकावला. त्यांना
मी त्यांच्या भूमीतून उखडून टाकेन आणि मी यहूदीयाच्या लोकांना
त्यांच्यामधून घालवून देईन. 15 परंतु त्यांना घालवून दिल्यानंतर मी
पुन्हा सर्वांवर करुणा करेन आणि तुमच्यातील प्रत्येक मनुष्याला
परत तुमच्या वतनात, तुमच्या देशात आणेन. 16 आणि जर हे लोक
माझे मार्ग शिकतील व माझ्या नावाने शपथ घेऊन म्हणतील, ‘जिवंत
याहवेहची शपथ,’ जरी त्यांनी माझ्या लोकांना बआल दैवताच्या नावाची
शपथ घेण्यास शिकविले—ते माझ्या लोकांमध्ये स्थिर केल्या जातील.
17 परंतु माझ्या आज्ञा पाळण्याचे नाकारणाऱ्या राष्ट्राला मी पूर्णपणे
मुळासकट उपटून टाकेन व नष्ट करेन,” असे याहवेह जाहीर करतात.

**13** याहवेहने मला म्हटले, “जा आणि तागाचा एक कमरबंद विकत
घे. तो कमरेस गुंडाळ, पण त्याला पाणी लागू देऊ नकोस.”
2 तेव्हा याहवेहच्या सांगण्याप्रमाणे मी एक कमरबंद विकत घेतला
आणि तो कमरेस गुंडाळला. 3 नंतर मला दुसऱ्यांदा याहवेहचा संदेश
मिळाला: 4 “जो कमरबंद तू विकत घेतला आणि तो कमरेस गुंडाळला,
तो कमरबंद घेऊन फरात नदीवर जा आणि तिथे तो खडकांमधील एका
कपारीत लपवून ठेव.” 5 मी याहवेहने सांगितल्याप्रमाणे फरात येथे
गेलो व तो लपवून ठेवला. 6 बऱ्याच दिवसानंतर याहवेह मला म्हणाले,
“आता पुन्हा फरात नदीवर जा आणि तिथे मी लपवून ठेवण्यास
सांगितलेला तो कमरबंद काढ.” 7 मग मी फरात नदीवर गेलो व तो
लपवून ठेवलेला कमरबंद तिथून बाहेर काढला. परंतु आता तो कुजला
असून अगदी निरुपयोगी झाला होता. 8 तेव्हा याहवेहचे वचन माझ्याकडे
आले: 9 “याहवेह असे म्हणतात: अशाच प्रकारे मी यहूदीयाचा गर्व व
यरुशलेमचा महागर्व नष्ट करणार आहे. 10 हे दुष्ट लोक, माझी वचने
ऐकण्याचे नाकारतात, आणि स्वतःच्या अंतःकरणाच्या हट्टीपणाच्या
मागे जातात आणि इतर दैवतांची सेवा व आराधना करतात, ते या
कमरबंदाप्रमाणे होतील—पूर्णपणे निरुपयोगी! 11 याहवेह म्हणतात,
‘मनुष्याचा कमरबंद त्याच्या कमरेला वेढा घातलेला असतो, त्याचप्रमाणे
यहूदीयाच्या सर्व लोकांना व इस्राएलच्या सर्व लोकांना मी वेढा घातला
आहे, जेणेकरून त्यांनी माझ्या गौरवाचे व प्रशंसेचे व मानाचे लोक व्हावे.
पण त्यांनी ऐकले नाही.’ 12 “त्यांना सांग: ‘इस्राएलचे परमेश्वर याहवेह
असे म्हणतात: सर्व बुधल्या द्राक्षारसाने भरलेल्या असाव्या.’ यावर
ते जर तुला म्हणतील, ‘सर्व बुधल्या द्राक्षारसाने भरलेल्या असाव्या
हे आम्हाला माहीत नाही काय?’ 13 मग त्यांना सांग, ‘याहवेह असे
म्हणतात: या देशातील सर्व रहिवाशांना, अगदी दावीदाच्या राजासनावर
बसणारा राजा, याजक व संदेष्टे यांच्यापासून ते सर्व यरुशलेमनिवासी
यांना मी मदिरेने झिंगून टाकणार आहे. 14 ते सर्व एकमेकांना विरोध
करतील, आईपिता व मुलेदेखील एकमेकांना चिरडतील असे मी करेन,
त्यांचा सर्वनाश होईल. मी त्यांची मुळीच गय करणार नाही व त्यांना
दयामाया दाखविणार नाही, असे याहवेह जाहीर करतात.’” 15 ऐका व
लक्ष द्या, उर्मट होऊ नका, कारण असे याहवेहने म्हटले आहे. 16 तुमच्या

याहवेह परमेश्वराला गौरव द्या तुमच्यावर त्यांनी निबिड अंधार पाडण्याच्या
आधी, अंधारलेल्या डोंगरावर तुमची पावले अडखळण्याआधी, तुम्ही
प्रकाशाची आशा कराल, पण ते त्यास गहन अंधकारात आणि निबिड
काळोखात बदलतील. 17 जर तुम्ही माझे ऐकले नाही, तर मी एकांतात
अश्रू ढाळेन तुमच्या गर्विष्ठपणामुळे; माझे डोळे घोर रुदन करतील,
माझ्या अश्रूंचा पूर लोटेल, कारण याहवेहच्या कळपाला बंदिवान करून
नेण्यात येईल. 18 राजाला व राजमातेला सांगा, “तुमच्या राजासनावरून
खाली उतरा, कारण तुमचे वैभवी मुकुट तुमच्या मस्तकांवरून पडतील.”
19 यहूदीयाच्या दक्षिणेकडील नेगेवप्रांतातील नगरवेशी बंद होतील, आणि
त्या उघडण्यास तिथे कोणीही नसेल. संपूर्ण यहूदीयाला बंदिवासात
नेण्यात येईल पूर्णपणे नेण्यात येईल. 20 नेत्र उंच करा व पाहा उत्तरेकडून
कूच करीत चालून येणाऱ्यांना पाहा. ज्या मेंढरांचा तुला अभिमान होता,
विश्वासाने तुझ्या सुपूर्द केलेला तुझा कळप कुठे आहे? 21 ज्यांचे
संगोपन करून त्यांना आपले विशेष मित्र बनविले त्यांनाच याहवेहने
तुझ्यावर सत्ता दिली, तर मग तू काय म्हणशील? तेव्हा तू प्रसूती
वेदनांनी तळमळणाऱ्या स्त्रीप्रमाणे तळमळणार नाही का? 22 “हे सर्व
माझ्यावर का ओढवले?” असा प्रश्न तू जर स्वतःला विचारलास— तर
तुझ्या घोर पापांमुळे हे घडत आहे तुझी वस्त्रे फाडण्यात आली तुझ्या
शरीरास दुष्टतेने वागविले आहे. 23 कूशी मनुष्याला आपल्या त्वचेचा रंग
बदलता येईल का चित्त्याला आपल्या शरीरावरील ठिपके बदलता येतील
का? त्याचप्रमाणे तुला सत्कर्मे करता येत नाहीत दुष्कर्मे करण्याची
तुला चटक लागली आहे. 24 “वाऱ्यांनी भूस उडून जावे तसे मी तुला
उडवून लावेन जणू वाळवंटी वाऱ्याने उडणारी. 25 हाच तुझा वाटा आहे,
तुला माझ्याकडून मिळावयाचा वतनभाग हाच होय,” असे याहवेह
जाहीर करतात, “कारण तू मला विसरला आहेस आणि खोट्या दैवतांवर
विश्वास ठेवलास. 26 म्हणून मी तुझी वस्त्रे वर ओढून तुझ्या चेहऱ्यावर
टाकेन जेणेकरून तुझी लाज उघडी पडेल— 27 तुझा व्याभिचार व तुझे
ते कामातुरपणे खिंकाळणे, व तुझी निर्लज्ज वेश्यावृत्ती! डोंगरावर आणि
शेतात चाललेली तुझी अमंगळ कामे मी बघितली आहेत. हे यरुशलेम,
तुला धिक्कार असो! तू केव्हापर्यंत शुद्ध राहणार नाही?”

**14** अनावृष्टि संबंधित खुलासा करणारा संदेश याहवेहकडून
यिर्मयाहला प्राप्त झाला. 2 “यहूदीया विलाप करीत आहे, तिची
नगरे झुरणीला लागली आहेत; ते या भूमीसाठी शोक करीत आहेत,
आणि यरुशलेममधून आक्रोश वर जात आहेत. 3 त्यातील प्रतिष्ठित
लोक विहिरीतून पाणी आणण्यासाठी आपले दास पाठवितात; ते
विहिरीवर जातात परंतु त्यांना पाणी मिळत नाही. ते रिकामी घागरी
घेऊन परत येतात; गोंधळून व निराश होऊन आपली डोकी झाकून
घेतात. 4 जमिनीला भेगा पडल्या आहेत कारण भूमीवर पाऊस पडलेला
नाही; शेतकरी घाबरले आहेत म्हणून ते आपली डोकी झाकून घेतात. 5
हरिणी देखील आपली पाडसे शेतात सोडून जात आहे कारण गवताचा
मागमूसही उरला नाही. 6 रानगाढवे उजाड टेकड्यांवर उभी राहून
कोल्ह्यागत धापा टाकत आहेत; अन्नाशिवाय त्यांची नजर निस्तेज
झाली आहे.” 7 जरी आमची पापे आमच्याविरुद्ध साक्ष देतात, तरी हे
याहवेह, तुमच्या नामाखातर तुम्ही काहीतरी करा. आम्ही तुमच्याविरुद्ध
नेहमी बंडखोरी केली आहे; आम्ही तुमच्याविरुद्ध घोर पातक केले
आहे! 8 तुम्हीच इस्राएलची आशा आहात, संकटसमयीच्या आमच्या
त्रात्या, तुम्ही या देशात आमच्याशी परकेपणाने का वागता, केवळ
रात्रभर मुक्काम करणाऱ्या वाटसरूसारखे का झाला आहात? 9 एखाद्या
विस्मित झालेल्या व्यक्तीसारखे तुम्ही का आहात? एखाद्या वाचविण्यास
अशक्त योद्ध्याप्रमाणे? हे याहवेह, तुम्ही तर येथेच आमच्यामध्ये आहात,
आम्ही तुमचे नाव धारण केले आहे; आमचा त्याग करू नका! 10
यावर याहवेहने या लोकांबद्दल असे म्हटले: “माझ्यापासून दूर भटकणे
त्यांना फार आवडते; ते त्यांची पावले ताब्यात ठेवत नाहीत. म्हणून
याहवेह तुमचा स्वीकार करीत नाहीत; आता मी तुमची दुष्कर्मे आठवेन
आणि तुमच्या पापांबद्दल तुम्हाला शासन करेन.” 11 मग याहवेहने
मला म्हटले, “त्यांच्या भल्यासाठी इतःपर प्रार्थना करू नकोस. 12 जर
ते उपवास करतील, तरी मी त्यांच्या रडण्याकडे मुळीच लक्ष देणार
नाही; मला ते होमार्पणे आणि अन्नार्पणे आणतील, मी त्यांचा स्वीकार
करणार नाही. याउलट तलवार, दुष्काळ व रोगराई यांनी मी त्यांची
परतफेड करेन.” 13 परंतु मी म्हटले, “अरेरे, हे सार्वभौम याहवेह!
त्यांचे संदेष्टे त्यांना सांगतात, ‘तलवार किंवा दुष्काळ निश्चितच येणार
नाहीत. मी या ठिकाणी तुम्हाला खात्रीने स्थायी शांतता देईन.’” 14
त्यावर याहवेहने मला म्हटले, “संदेष्टे माझ्या नावाने असत्य संदेश
सांगत आहेत. मी काही त्यांना पाठविले नाही किंवा त्यांना नेमले नाही
वा त्यांच्याशी बोललो नाही. खोट्या दृष्टान्तावरून, प्रकटीकरणांवरून,
व्यर्थ शकुनविद्येवरून आणि स्वतःच्या मनाच्या भ्रांतीवरून ते तुम्हाला
खोटी भविष्ये सांगतात.” 15 म्हणून माझ्या नावाने भविष्यवाणी
करणाऱ्यांबद्दल याहवेह असे म्हणतात: “मी पाठविले नसतानाही
‘तलवार किंवा दुष्काळ या भूमीला स्पर्श करणार नाही,’ असे बोलणारे
हे संदेष्टेच तलवारीला व दुष्काळाला बळी पडतील. 16 आणि हे लबाड
लोक ज्यांना संदेश देतात तेही तलवारीला व दुष्काळाला बळी पडून
यरुशलेमच्या रस्त्यांवर फेकून दिले जातील आणि त्यांना, पत्नी, पुत्र व
कन्यांना मूठमाती द्यायलाही कोणी राहणार नाही. कारण मी त्यांच्यावर
घोर विपत्ती पाठविणार ज्याला ते पात्र आहेत. 17 “हे वचन तू त्यांना
सांग: “‘रात्रंदिवस माझ्या नेत्रातून अश्रू वाहू दे मी माझे रडणे थांबविणार
नाही; माझे लोक, कुमारी कन्या, तिच्यासाठी, कारण ती जखमांनी
घायाळ होऊन तुडविली गेली आहे. 18 नगराबाहेर जाऊन पाहावे
तर, मी तलवारीला बळी पडलेल्यांची प्रेते बघतो; नगरातून गेलो तर
उपासमारीला बळी पडलेले दिसतात. संदेष्टे व याजक त्यांना माहीत
नसलेल्या देशात गेले आहेत.’” 19 तुम्ही यहूदीयाचा पूर्णपणे त्याग केला
आहे काय? सीयोनाचा तुम्हाला वीट आला आहे काय? तुम्ही आम्हाला
अशी वेदना का दिली म्हणजे आम्हाला कधीही आरोग्य मिळणार नाही?
आम्ही शांतीची आशा केली होती पण त्यातून काहीही चांगले निष्पन्न
झाले नाही, आरोग्य मिळण्याच्या ऐवजी सर्वत्र दहशतच पसरली आहे.

20 हे याहवेह, आम्ही आमचा दुष्टपणा पदरी घेतो आणि आमच्या
पूर्वजांचा अपराध स्वीकार करतो; आम्ही निश्चितच तुमच्याविरुद्ध पाप
केले आहे. 21 तुमच्या नामासाठी आमचा तिरस्कार करू नका; तुमच्या
गौरवी राजासनाची अप्रतिष्ठा करू नका. आमच्यासह केलेल्या कराराची
आठवण करा आणि तो मोडू नका. 22 या मूर्तिपूजक राष्ट्रातील कोणते
व्यर्थ दैवत पाऊस पाडू शकेल का? आकाश स्वतःहून वर्षाव करू शकेल
काय? हे याहवेह, आमच्या परमेश्वरा, हे तुमच्याशिवाय कोणीच करणार
नाही. म्हणूनच आमची आशा तुमच्यावरच आहे, तुम्हीच हे सर्व करू
शकता.

**15** तेव्हा याहवेहने मला म्हटले: “जर मोशे व शमुवेल माझ्यासमोर
येऊन उभे राहिले तरीसुद्धा या लोकांकरिता माझे हृदय द्रवित
होणार नाही. त्यांना माझ्या दृष्टीसमोरून घालवून दे! त्यांना जाऊ दे!
2 आणि जर त्यांनी तुला विचारले, ‘आम्ही कुठे जावे?’ तर त्यांना
सांग, ‘याहवेह असे म्हणतात: “‘ज्यांना मरणासाठी नेमले आहे,
त्यांनी मरणाकडे जावे; तलवारीने ज्यांचा वध व्हावयाचा आहे, त्यांनी
तलवारीकडे जावे; उपासमारीने जे मरणार आहेत, त्यांनी दुष्काळाकडे
जावे; जे बंदिवासासाठी नेमलेले आहेत, त्यांनी बंदिवासात जावे.’ 3 “मी
त्यांच्यावर चार प्रकारचे संहारक नेमणार आहे,” याहवेहने असे म्हटले,
“ठार करण्यासाठी तलवार, फरपटून नेण्यासाठी कुत्री, खाऊन नष्ट
करण्यासाठी पक्षी व हिंस्र श्वापदे. 4 यहूदीयाचा राजा हिज्कीयाहचा पुत्र
मनश्शेह, याने यरुशलेममध्ये जे अनाचार केले, त्याबद्दल मी केलेले
शासन पाहून सर्व जगातील राष्ट्रांना दहशत बसेल. 5 “हे यरुशलेम,
तुझ्यावर कोण दया करेल? तुझ्यासाठी कोण शोक करेल? तू कसा
आहे अशी विचारपूस कोण करेल? 6 तुम्ही मला नाकारले आहे,”
याहवेह असे म्हणतात. “तुमची घसरण सुरूच आहे. म्हणून मी माझे
हात तुमच्याविरुद्ध करेन व तुमचा नाश करेन; विनाश राखून ठेवण्याचा
मला वीट आला आहे. 7 मी शहरांच्या वेशींमध्येच त्यांना पाखडेन. मी
विध्वंस आणि शोककळा माझ्या लोकांवर आणेन, कारण ते आपल्या
वाईट मार्गापासून वळले नाही. 8 मी त्यांच्या विधवांची संख्या समुद्राच्या
वाळूपेक्षा अगणित करेन. मी त्यांच्या तरुणांच्या आईविरुद्ध भर दुपारी
मृत्यूचा विनाशक पाठवेन; अचानक त्यांच्यावर वेदना आणि क्लेश
ओढवतील, 9 सात मुलांची माता बेशुद्ध होऊन मृत्युमुखी पडेल.
भरदिवसा तिचा सूर्य मावळेल; आता ती अपमानित आणि लज्जित
होऊन बसेल. त्यातून वाचलेल्यांना त्यांच्या वैऱ्यांसमक्ष मी तलवारीस
बळी देईन,” याहवेहने असे जाहीर करतात. 10 हे माझ्या आई, हाय
हाय, तू मला जन्म दिला, मी या सर्व राष्ट्राच्या दृष्टीने झगडा आणि
विद्रोह करणारा झालो आहे! मी कोणाही कडून कर्ज घेतलेले नाही, ना
कोणी माझ्याकडून घेतलेले आहे, तरीपण प्रत्येकजण मला श्राप देतात.
11 याहवेह म्हणाले, “चांगल्या कार्यासाठी मी निश्चितच तुझी सुटका
करेन; तुझे शत्रू संकटात आणि क्लेशदायक समयी तुला विनवण्या
करतील असे मी करेन. 12 “एखाद्या मनुष्याला लोखंड— उत्तरेकडील
लोखंडाचे—किंवा कास्याचे गज मोडता येतील का? 13 “मी तुमची
संपत्ती व तुमचा ठेवा बेमोबदला तुमच्या शत्रूच्या स्वाधीन करेन, कारण
तुम्ही केलेल्या सर्व पातकांमुळे संपूर्ण देशात असे घडेल. 14 जो देश
तुम्हाला पूर्वी कधी माहीत नव्हता, त्या देशात मी तुम्हाला तुमच्या
शत्रूंचे गुलाम करेन, कारण माझा क्रोध अग्नीप्रमाणे भडकला आहे,
आणि तो तुम्हाला भस्म करून टाकील.” 15 हे याहवेह, तुम्हाला सर्व
कळते; माझी आठवण ठेवा व माझी काळजी घ्या. माझ्यावर अत्याचार
करणाऱ्यांचा सूड घ्या, तुम्ही सहनशील आहात—मला दूर करू नका;
विचार करा तुमच्यामुळे मला किती निंदा सहन करावी लागते. 16 जेव्हा
तुमचे वचन माझ्याकडे आले मी ते गिळंकृत केले; ते माझा आनंद आणि
माझ्या हृदयाचा उल्लास होते, याहवेह, सर्वसमर्थ परमेश्वरा, कारण मी
तुमचे नाव धारण केले आहे. 17 मी चैन करण्याऱ्या लोकांमध्ये मुळीच
बसलो नाही, त्यांच्यासोबत कधीच आनंद केला नाही; मी एकटाच
होतो, कारण तुमचा हात माझ्यावर होता आणि तुम्ही मला त्वेषाने
भरले आहे. 18 माझ्या दुःखाचा निश्चित अंत का होत नाही आणि
माझ्या जखमा त्रासदायक आणि असाध्य का आहेत? तुम्ही मला एका
फसविणाऱ्या झऱ्यासारखे आहात, जणू एखादा बिनपाण्याचा ओढा.
19 म्हणून याहवेहने असे म्हणतात: “जर तू पश्चात्ताप करशील, तर मी
तुला पुनर्स्थापित करेन म्हणजे तू माझी सेवा करशील; जर तू अयोग्य
नव्हे, तर योग्य शब्द उच्चारशील, मग तू माझ्यावतीने बोलणारा होशील.
या लोकांना तुझ्याकडे परत येऊ दे, परंतु तू त्यांच्याकडे वळू नको. 20
मी तुला या लोकांसाठी भिंत बनवेन, कास्याच्या तटबंदीची भिंत; ते
तुझ्याशी युद्ध करतील परंतु ते तुझ्यावर प्रभावी होणार नाहीत, तुला
सोडविण्यास व तुझा बचाव करण्यास मी तुझ्यासोबत आहे,” याहवेह
असे म्हणतात. 21 “या दुष्ट लोकांच्या हातातून मी तुझी सुटका करेन
आणि निर्दयी लोकांच्या तावडीतून मी तुला सोडवेन.”

**16** तेव्हा याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 2 “तू येथे विवाह करू
नये व तुला येथे मुलेही होऊ नयेत.” 3 कारण ज्यांना या भूमीवर
पुत्र आणि कन्या झाले आहेत आणि ज्या स्त्रिया त्यांच्या आई आणि
जे पुरुष त्यांचे वडील झाले त्यांच्याबद्दल याहवेह असे म्हणतात: 4
“ते भयानक रोगांना बळी पळून मरतील. त्यांच्यासाठी कोणी शोक
करणार नाही, की त्यांना मूठमाती देणार नाही, तर त्यांची प्रेते जमिनीवर
शेणासारखे पडून राहतील. तलवार व दुष्काळ यांनी त्यांचा अंत होईल
आणि त्यांची प्रेते पक्षी आणि हिंस्र श्वापदे यांचे खाद्य होतील.” 5 कारण
याहवेह असे म्हणतात: “ज्या घरात मयतीचे भोजन होत आहे तिथे प्रवेश
करू नको; शोक करू नको किंवा सांत्वना देऊ नको, कारण मी माझे
आशीर्वाद, माझे प्रेम आणि माझी दया या लोकांपासून काढून घेतली
आहेत.” याहवेहची ही घोषणा आहे, 6 “या राष्ट्रातील थोर आणि लहान
सर्व मरतील. त्यांना मूठमाती मिळणार नाही, कोणी त्यांच्यासाठी शोक
करणार नाही. प्रथेप्रमाणे दुःखाचे चिन्ह म्हणून ते स्वतःच्या शरीरास
दुखापत करणार नाहीत किंवा डोक्याचे मुंडण करणार नाहीत. 7 शोक
करणाऱ्यांना अन्न देऊन कोणी त्यांचे—त्यांच्या आई वा वडिलांच्या
मृत्यूबद्दल—समाधान करणार नाही. सांत्वन करण्यासाठी कोणी त्यांना

प्यालाभर द्राक्षारसही देणार नाही. 8 “ज्या घरात मेजवानी होत आहे,
त्या घरात तू प्रवेश करू नकोस व त्यांच्याबरोबर खाण्यापिण्या करिता
बसू नकोस. 9 कारण इस्राएलचे परमेश्वर, सर्वसमर्थ याहवेह असे
म्हणतात: ‘त्या दिवसामध्ये तुमच्या डोळ्यादेखत या ठिकाणी मी
त्यांच्या हर्ष व आनंद गीतांचा, वर आणि वधूंच्या आवाजाचा शेवट
करेन.’ 10 “हे सर्व तू लोकांना सांगशील, तेव्हा ते विचारतील, ‘याहवेहने
ही भयानक संकटे आमच्यावर पाठविण्याचा हुकूम का दिला आहे?
आम्ही कोणती चूक केली आहे? आमच्या याहवेह परमेश्वराच्या विरुद्ध
आम्ही असे कोणते पाप केले आहे?’ 11 तेव्हा त्यांना सांग, याहवेह असे
म्हणाले, ‘कारण तुमच्या पूर्वजांनी मला सोडले. त्यांनी इतर दैवतांची
उपासना केली, त्यांची सेवा केली आणि माझ्या आज्ञा पाळल्या नाहीत,
12 परंतु तुम्ही तर तुमच्या पूर्वजांच्यापेक्षा अधिक दुष्टपणा केला आहे.
पाहा, माझी आज्ञा पाळण्याऐवजी, तुम्ही तुमच्या दुष्ट अंतःकरणाच्या
हट्टीपणाने वागता. 13 म्हणून मी तुम्हाला या राष्ट्रातून बाहेर फेकून देईन
आणि तुमच्या पूर्वजांना अनोळखी अशा देशात तुम्हाला पळवून लावेन.
तिथे गेल्यावर तुम्ही इतर दैवतांची रात्रंदिवस सेवा कराल, मी तुमच्यावर
मुळीच कृपा करणार नाही.’ 14 “तथापि, असे दिवस येत आहेत,”
याहवेह असे म्हणतात, “‘ज्या याहवेहने इस्राएलांना इजिप्तमधून आणले
त्याच्या जीविताची शपथ’ असे कोणी म्हणणार नाही, 15 परंतु असे
म्हटले जाईल, ‘जिवंत याहवेहची शपथ, ज्यांनी इस्राएलला उत्तर दिशेच्या
भूमीतून व गुलामगिरीत पाठविलेल्या सर्व देशातून त्यांना बाहेर आणले.’
त्यांच्या पूर्वजांना दिलेल्या या देशात मी त्यांना पुनर्वसित करेन. 16
“परंतु आता मी अनेक मासे पकडणारे पाठवेन,” याहवेह अशी घोषणा
करतात, “व ते त्यांना पकडतील. त्यानंतर मी शिकाऱ्यांना पाठवेन,
आणि ते प्रत्येक पर्वतातून, डोंगरातून आणि खडकाच्या कपारीतून
त्यांचा शोध घेऊन त्यांची शिकार करतील. 17 कारण माझी नजर
तुझ्या सर्व मार्गावर लक्ष ठेऊन आहे; ते माझ्यापासून लपू शकत नाही,
आणि त्यांचे कोणतेही पाप माझ्या नजरेतून सुटत नाही. 18 त्यांच्या
दुष्टतेबद्दल व पापांबद्दल मी त्यांना दुप्पट शासन करणार आहे, कारण
त्यांनी त्यांच्या निर्जीव आकाराच्या निरुपयोगी प्रतिकृतींनी माझा देश
भ्रष्ट केला आहे आणि माझे वतन त्यांच्या घृणास्पद मूर्तींनी भरून
टाकला आहे.” 19 याहवेह, माझे सामर्थ्य व माझे दुर्ग, संकटकाळच्या
वेळी माझा आश्रय, जगातील सर्व राष्ट्रे अगदी शेवटापासून तुमच्याकडे
येऊन म्हणतील, “आमच्या पूर्वजांकडे खोट्या दैवतांशिवाय काहीही
नव्हते, व्यर्थ मूर्ती, ज्या त्यांचे काही भले करू शकल्या नाही. 20 लोक
स्वतःसाठी दैवते निर्माण करतात काय? होय, परंतु ते देव नाहीत!” 21
“म्हणून मी त्यांना शिक्षण देईन— यावेळी मी त्यांना शिकवेन माझे
सामर्थ्य व माझा प्रताप. मग त्यांना कळेल की माझे नाव याहवेह आहे.

**17** “त्यांच्या हृदय पटलावर आणि त्यांच्या वेद्यांच्या शिंगावर
यहूदीयाचे पाप जणू काही लोखंडी कलमाने एखाद्या हिरकटोकाने
कोरलेल्या आहेत, 2 घनदाट वृक्षाजवळ आणि उंच डोंगरावरील, प्रत्येक
वेदी व अशेरास्तंभाची त्यांची लेकरे सुद्धा आठवण करतात. 3 या
भूमीवर माझे उंच पर्वत आणि तुमची संपत्ती व सर्व भांडारे तुमच्या उच्च
स्थळासहित, लूट म्हणून मी देईन, कारण संपूर्ण देशभर तुम्ही पाप केले
आहे. 4 तुमच्याच चुकीमुळे मी तुम्हास दिलेले वतन तुम्ही घालवाल.
तुमच्या शत्रूंकडे, तुम्हाला माहीत नसलेल्या राष्ट्रांत मी तुम्हाला गुलाम
म्हणून पाठवेन. कारण तुम्ही माझा क्रोधाग्नी पेटविला आहे आणि
तो सतत जळत राहील.” 5 याहवेह असे म्हणतात: “जो मनुष्यावर
विश्वास ठेवतो, जो मर्त्य मनुष्यापासून सामर्थ्य मिळवितो आणि ज्याचे
अंतःकरण याहवेहपासून दूर गेले आहे, तो शापित असो. 6 तो मनुष्य
वैराण वाळवंटातील खुरट्या झुडूपासारखा आहे; उन्नतीचे चांगले दिवस
त्यांना कधीच दिसणार नाहीत. ते वाळवंटातील उजाड भूमीमध्ये, ज्या
क्षारभूमीत जीवन नसेल, तिथे राहतील. 7 “परंतु जो मनुष्य याहवेहवर
भरवसा ठेवतो, जो फक्त याहेवेहवर विश्वास ठेवतो, तो आशीर्वादित
असो, 8 ते पाण्याच्या जवळ लावलेल्या झाडासारखे आहेत. त्याची मुळे
खोलवर पाण्यात गेलेली असतात. या झाडाला उष्णतेचे भय वाटत
नाही; त्याची पाने सदा हिरवी राहतात. अवर्षणाच्या वर्षांची त्याला
काळजी वाटत नाही. आणि ते आपली रसाळ फळे देण्याचे कधीच
थांबत नाही.” 9 सर्वात कपटी काही असेल तर, ते म्हणजे अंतःकरण
आणि ते बरे करण्याच्या पलीकडे आहे. हे कळण्यास कोण समर्थ
आहे? 10 “मी याहवेह, अंतःकरणे पारखतो, आणि मनाची परीक्षा घेतो,
म्हणून प्रत्येक मानवाला त्याने केलेल्या आचरणाप्रमाणे, प्रत्येकाला
त्याच्या कर्मांप्रमाणे रास्त प्रतिफळ देतो.” 11 तित्तर पक्षी आपण न
दिलेल्या अंडींना उबवितो अशाप्रकारे अन्यायाने संपत्ती मिळविणारे
लोक असतात. अर्ध्या जीवनात त्यांची संपत्ती त्यांना सोडून जाते,
आणि आयुष्याच्या अखेरीस ते एक मूर्ख ठरविले जातात. 12 तुमचे
गौरवी सिंहासन प्रारंभापासून उच्च आहे, हेच आमचे आश्रयस्थान आहे.
13 हे याहवेह, तुम्हीच इस्राएलची आशा आहात; ज्यांनी याहवेहला
सोडले आहे, ते लाजिरवाणे होतील. जे तुमच्या मार्गापासून दूर गेले
आहेत, त्यांचे नाव धुळीत लिहिले जाईल कारण त्यांनी याहवेहचा
त्याग केला, जिवंत पाण्याच्या झऱ्याला सोडले आहे. 14 हे याहवेह,
मला आरोग्य द्या, म्हणजे मी बरा होईन; माझे रक्षण करा, म्हणजे मी
सुरक्षित राहीन, कारण मी केवळ तुमचेच स्तवन करतो. 15 ते मला
सतत म्हणत असतात, “याहवेहचे वचन कुठे आहे? ते आता पूर्ण होऊ
द्या!” 16 मी तुमचा मेंढपाळ होण्यापासून पळून गेलेलो नाही; तुम्हाला
ठाऊक आहे मी अशा भयंकर दिवसाची इच्छा केली नव्हती. माझ्या
मुखातून काय निघाले हे तुम्हाला ठाऊक आहे. 17 माझ्यासाठी तुम्ही
भीतिदायक होऊ नका; संकटसमयी तुम्हीच माझे आश्रय आहात.
18 माझा छळ करणाऱ्यांना लज्जित करा, परंतु मला फजिती पासून
सोडवा; त्यांना भयभीत करा परंतु मला भय मुक्त करा. त्यांच्यावर
संकटाचे दिवस येऊ दे; त्यांच्यावर दुप्पट नाश ओढवू दे. 19 याहवेह
मला असे म्हणाले: “जा आणि लोकांच्या प्रवेश दारावर उभा राहा. ज्या
प्रवेश दारांनी यहूदीयाचा राजा प्रवेश करतो; आणि यरुशलेमच्या इतर
सर्व प्रवेश दाराशी जाऊन उभा राहा. 20 लोकांना सांग, ‘याहवेहचे हे

वचन ऐका, यहूदीयाच्या राजांनो, यहूदीयातील सर्व लोकांनो, आणि
यरुशलेमच्या नागरिकांनो, तुम्ही जे या प्रवेशदारातून प्रवेश करता, 21
याहवेह असे म्हणत आहेत: सावध असा, शब्बाथ दिवशी कोणतेही
भार वाहू नका, यरुशलेमच्या प्रवेश व्दारातून ते नेआण करू नका.
22 शब्बाथ दिवशी तुमच्या घरातून काही भार बाहेर नेऊ नका; किंवा
कामधंदा करू नका, परंतु शब्बाथ दिवस पवित्रपणे पाळा, जशी तुमच्या
पूर्वजांना मी आज्ञा दिली होती. 23 परंतु त्यांनी ती ऐकली नाही किंवा
त्याकडे लक्ष दिले नाही. ते हट्टी होते आणि ते ऐकत नव्हते वा शिस्तीस
प्रतिसाद देत नव्हते. 24 याहवेह म्हणतात, परंतु तुम्ही जर माझ्या आज्ञा
काळजीपूर्वक पाळल्या, आणि शब्बाथ दिवशी कोणताही भार नगरीच्या
प्रवेश व्दारातून नेआण न करता, काहीही काम न करता तो पवित्र
दिवस असा पाळलात, 25 तर असे होईल, दावीदाच्या सिंहासनावर
बसणारे राजे आणि अधिपती थाटाने, वैभवाने रथारूढ व अश्वारूढ होऊन
येणारे या शहराच्या प्रवेश व्दारातून प्रवेश करतील, आणि त्यांचे सरदार,
यहूदीयाचे लोक व यरुशलेमनिवासी या लोकांवर राज्य करतील आणि
हे शहर कायम वसलेले राहील. 26 तेव्हा लोकसमुदाय यहूदीयाच्या
शहरातून आणि यरुशलेमच्या परिसरातून, त्याचप्रमाणे बिन्यामीन या
प्रांतांच्या डोंगरदऱ्यांच्या नेगेव येथून, पश्चिमेकडील तळवटीतून, सर्व
लोक आपआपली होमार्पणे, धान्यार्पणे व ऊद आणतील व याहवेहच्या
मंदिरामध्ये त्यांना उपकारस्तुतीची अर्पणे आणतील. 27 परंतु जर तुम्ही
शब्बाथ पवित्रपणे पाळण्याचे ऐकले नाही, शब्बाथ दिवशी यरुशलेमच्या
या प्रवेश व्दारातून इतर दिवशी करता तसे मालाचे भार आणले, तर मी
या यरुशलेमचे प्रवेश व्दार पेटवून त्याचा पूर्णपणे विध्वंस करेन, जो
अग्नी कधीही विझणार नाही, जो तेथील गड भस्म करेल.'"

**18** याहवेहकडून यिर्मयाहला हे वचन प्राप्त झाले: 2 "कुंभाराच्या
घरी जा आणि तिथे मी तुला माझा संदेश देईन." 3 म्हणून मी
कुंभाराच्या घरी गेलो, आणि तिथे तो आपल्या चाकावर काम करताना
मला दिसला. 4 परंतु तो जे मडके करीत होता, त्याच्या हातातील
मातीचा आकार बिघडला; म्हणून त्याने त्याचे, त्याला योग्य वाटेल तसे
दुसरे मडके बनविले. 5 तेव्हा याहवेहचे वचन माझ्याकडे आले. 6 ते
म्हणाले, "हे इस्राएला, या कुंभाराने आपल्या मातीचे केले तसे मला
तुझे करता येणार नाही काय? कुंभाराच्या हातात माती असते तसे
इस्राएला, तुम्ही माझ्या हातात आहात," असे याहवेह जाहीर करतात.
7 एखाद्या राष्ट्राचा भेद पाडावा, त्याचे निर्मूलन करावे, व समूळ नाश
करावा, असे जेव्हा मी जाहीर करतो, 8 तेव्हा ज्यास मी सावध केले
त्या राष्ट्राने आपल्या कुमार्गाबद्दल पश्चात्ताप केला, तर मी त्यांच्यावर
दया करेन व माझ्या योजनेप्रमाणे त्यांचा नाश करणार नाही. 9 आणि
जर मी एखाद्या राष्ट्राची बांधणी करण्याची आणि वसविण्याची घोषणा
केली, 10 आणि जर त्यांनी माझ्या दृष्टीने पाप केले आणि माझी आज्ञा
पाळली नाही, तर मी त्याला आशीर्वाद देण्यासाठी पुनर्विचार करेन. 11
"म्हणून आता यहूदीयातील लोकांना आणि जे यरुशलेममध्ये राहतात,
त्यांना सांग, 'याहवेहचा संदेश ऐका: पाहा! मी तुमच्यासाठी विपत्ती
तयार करीत आहे आणि तुमच्याविरुद्ध योजना आखीत आहे. म्हणून
तुम्ही प्रत्येकजण दुष्ट मार्गापासून वळा, व तुमचे मार्ग व तुमचे आचरण
सुधारा.' 12 परंतु त्यांनी उत्तर दिले, 'हे उपयोगाचे नाही. आम्ही आमच्या
आखलेल्या योजनेप्रमाणे करीत राहू; आम्ही आमच्या हृदयाच्या हट्टीपणा
व दुष्टपणानेच चालणार.'" 13 म्हणून याहवेह असे म्हणतात: "आता
राष्ट्रांमध्ये जाऊन चौकशी करा: असा प्रकार कोणी कधी ऐकला आहे
काय? इस्राएलाच्या कुमारिकेने एवढे भयंकर कर्म केले आहे. 14
लबानोनच्या खडकाळ घसरणीचा बर्फ कधी वितळतो का? दूरच्या
स्त्रोतातून वाहत येणारे थंड पाणी कधी वाहण्याचे थांबते काय? 15
तरीसुद्धा माझे लोक मला विसरले; ते व्यर्थ मूर्तीला व्यर्थ धूप जाळतात,
ते त्यांना अडखळत चालावयास लावतात ते पूर्वजांचे मार्ग आहेत. जे
मार्ग नीट बांधलेले नाही, म्हणून त्या आडमार्गावरून त्यांना चलविले गेले.
16 त्यांचा देश भयानकतेचे, आणि नेहमीसाठी तिरस्काराचे उदाहरण
होईल; येजा करणाऱ्या सर्वांना हे बघून दहशत भरेल आणि ते आश्चर्याने
आपली डोकी हालवितील. 17 जसा पूर्वेकडील वारा धूळ उडवितो,
त्याप्रमाणे मी त्यांना त्यांच्या शत्रूंपुढे उडवेन; त्यांच्या दुर्दशेच्या दिवशी
मी माझे मुख नव्हे, तर त्यांच्याकडे पाठ फिरवेन." 18 त्यांनी म्हटले,
"चला, उठा, यिर्मयाह विरुद्ध काहीतरी कारस्थान करू; आम्हाला नियम
शिकविण्यास आमचे याजक, बोध देण्यासाठी आमचे ज्ञानी लोक,
आणि संदेश देण्यासाठी आमचे संदेष्टेही नष्ट होणार नाहीत. म्हणून
चला, आपण त्याच्यावर वाक्बाणाचा हल्ला करू आणि तो काय बोलतो
याच्याकडे लक्ष देऊ नये." 19 "हे याहवेह, माझे ऐका, माझ्याविरुद्ध
कारस्थान करणारे काय म्हणतात ते ऐका! 20 चांगल्याची वाईटाने
भरपाई करावी का? माझा जीव घेण्यासाठी त्यांनी खड्डा खोदला आहे.
आठवण ठेवा की मी आपल्यासमोर उभा राहिलो आणि त्यांच्यावतीने
बोललो जेणेकरून तुमचा क्रोध त्यांच्यापासून दूर व्हावा. 21 म्हणून
त्यांच्या मुलांना दुष्काळामध्ये जाऊ द्या; त्यांना तलवारीच्या बलाच्या
स्वाधीन करा. त्यांच्या स्त्रिया अपत्यहीन व विधवा होऊ द्या; त्यांचे पुरुष
मृत्यू पावोत, व त्यांचे तरुण लढाईत तलवारीने मारले जावोत. 22 जेव्हा
स्वारी करणारे त्यांच्यावर अचानक हल्ला करतील तेव्हा त्यांच्या घरातून
आक्रोश व किंचाळ्या ऐकू येवोत, कारण मला पकडावे म्हणून त्यांनी
खड्डा खणला आहे आणि माझ्या वाटेवर त्यांनी गुप्त सापळे लावले
आहेत. 23 परंतु याहवेह, मला मारण्याच्या त्यांच्या सर्व युक्त्या तुम्ही
जाणता. त्यांच्या अपराधांची क्षमा करू नका, किंवा त्यांचे पाप दृष्टीपुढून
पुसून जाऊ नये. ते तुमच्यापुढे उलटून पडोत; तुम्ही आपल्या क्रोधाच्या
वेळी त्यांचा समाचार घ्या."

**19** याहवेह मला असे म्हणतात: "जा व एक मातीचे मडके विकत
घे आणि जाताना लोकांमधील काही वडीलजन आणि काही
याजक यांना आपल्याबरोबर घे. 2 आणि बेन-हिन्नोमच्या खोऱ्यातून
जा, तुटलेल्या मडक्याच्या व्दारा जवळ जा. तिथे जाऊन मी सांगेन
त्या वचनाची घोषणा कर, 3 आणि म्हण, अहो यहूदीयाच्या राजांनो,
आणि यरुशलेमच्या लोकांनो, याहवेहचे वचन ऐका! सर्वसमर्थ याहवेह

इस्राएलचे परमेश्वर म्हणतात: या स्थानावर मी असे भयंकर अरिष्ट
आणेन की त्याविषयी जे ऐकतील त्यांचे कान भणभणतील. 4 कारण
त्यांनी मला सोडले आहे आणि हे स्थान त्यांनी परक्या दैवताचे केले
आहे; हे लोक अन्य दैवतांपुढे धूप जाळतात, जे त्यांच्या पूर्वजांना किंवा
यहूदीयाच्या राजांना कधीही माहीत नव्हते, आणि त्यांनी ही जागा
निर्दोष रक्ताने भरून टाकली आहे. 5 त्यांनी बआल दैवतासाठी होमार्पण
म्हणून वेद्या बांधल्या आहेत आणि त्यावर ते आपल्या मुलांचा होम
करतात—असे करण्याची मी त्यांना कधी आज्ञा दिली नव्हती किंवा
कधी उल्लेखही केला नव्हता, अथवा विचारही केला नव्हता. 6 याहवेह
म्हणाले, पाहा, असे दिवस येत आहेत, तेव्हा या खोऱ्याला 'तोफेत'
किंवा 'बेन-हिन्नोमचे खोरे' असे म्हणणार नाहीत, तर 'कत्तलीचे खोरे'
असे म्हणतील. 7 "'या ठिकाणी यहूदीया व यरुशलेम यांच्या योजना मी
उधळून लावेन. मी त्यांच्या शत्रूच्या समक्ष तलवारीने त्यांचा वध करेन,
जे त्यांचा प्राण घेऊ पाहतात, आणि मी त्यांची प्रेते पक्ष्यांना आणि हिंस्र
पशूंना खावयास देईन. 8 मी या नगराचा नाश करेन आणि ते दहशतीचे व
आणि घृणेचे ठिकाण बनवीन; त्याच्या जवळून जाणारा कोणीही त्याच्या
सर्व जखमांमुळे भयचकित होतील आणि त्यांचा उपहास करतील. 9 मी
त्यांना त्यांच्या पुत्र आणि कन्यांचे मांस खाण्यास लावेन, आणि त्यांचे
शत्रू त्यांच्या सभोवतीच्या वेढ्याने त्यांच्यावर एवढा दबाव आणतील की
ते एक दुसऱ्याचे मांस खातील.' 10 "यिर्मयाह, आता हे लोक पाहत
असताना तू आणलेले ते मडके फोडून टाक, 11 आणि त्यांना सांग,
'सर्वसमर्थ याहवेहचा तुम्हाला हा संदेश आहे: ज्याप्रमाणे या मडक्याच्या
ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या आहेत व हे मडके जसे पुन्हा नीट करता येणार
नाही, त्याप्रमाणेच मी या नगरीच्या लोकांचा चुराडा करेन. तोफेतमध्ये
इतक्या प्रेतांना मूठमाती देण्यात येईल की कुठे जागा उरणार नाही.
12 या ठिकाणी मी हेच करणार व इथे राहणाऱ्या लोकांनाही करेन,
ही याहवेहची घोषणा आहे. मी या नगराला तोफेतासारखे करेन. 13
यरुशलेममधील घरे व यहूदीयांच्या राजांचे राजवाडे तोफेतासारखे
भ्रष्ट करेन—ज्या घरांच्या धाब्यांवर त्यांनी आकाशातील शक्तींना धूप
जाळला व इतर दैवतांस पेयार्पणे वाहिली.'" 14 नंतर यिर्मयाह तोफेत
येथे हा संदेश देऊन परतला, जिथे याहवेहने यिर्मयाहला भविष्यवाणी
करण्यासाठी पाठविले होते, तिथे तो मंदिरापुढे थांबला व सर्व लोकांना
उद्देशून म्हणाला, 15 "सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचे परमेश्वर, काय
म्हणतात: 'ऐका! मी या नगरावर आणि सभोवतालच्या गावावर मी
शपथपूर्वक म्हटल्याप्रमाणे सर्व अरिष्टे आणणार आहे, कारण ते हट्टी
होते व माझी वचने ऐकत नव्हते.'"

**20** जेव्हा याहवेहच्या मंदिराचा मुख्य अधिकारी इम्मेरचा पुत्र पशहूर
याजक, याने यिर्मयाहास अशी भविष्यवाणी करताना ऐकले,
तेव्हा 2 पशहूराने यिर्मयाह संदेष्ट्याला पकडून फटके मारविले आणि
याहवेहच्या मंदिराजवळच्या बिन्यामीन दरवाजाजवळ खोड्यात अडकवून
ठेवले. 3 पशहूरने जेव्हा दुसऱ्या दिवशी यिर्मयाहाला खोड्यातून मोकळे
केले, तेव्हा यिर्मयाह त्याला म्हणाला, "याहवेहने तुझे पशहूर नाव
बदलून, येथून पुढे सर्व बाजूने दहशत असे ठेवले आहे. 4 याहवेह असे
म्हणतात: मी तुला स्वतःकरिता व तुझ्या मित्राकरिता दहशत असे करेन;
ते सर्व शत्रूंच्या तलवारींनी बळी पडलेले तू आपल्या नजरेने पाहशील.
मी संपूर्ण यहूदीया प्रांत बाबेलच्या राजाच्या स्वाधीन करेन, तो या
लोकांना गुलाम करून बाबेलला नेईल किंवा त्यांना ठार मारेल. 5 मी या
नगरातील सर्व संपत्ती त्यांच्या शत्रूंच्या हातात देईन—सर्व उत्पादन, सर्व
जडजवाहीर आणि यहूदीयाच्या राजांचा सर्व खजिना. ते त्यांना लुटतील
आणि बाबेलला ते घेऊन जातील. 6 आणि हे पशहूरा, तू स्वतः व
तुझ्यासह तुझ्या घरात राहणारे सर्वजण बाबेलमध्ये बंदिवासात जाल. तू
तिथेच मरशील व पुरला जाशील, तू व ज्यांच्याकडे तू खोटी भविष्यवाणी
केलीस त्या तुझ्या सर्व मित्रगणाची गतही तशीच होईल." 7 याहवेह,
तुम्ही मला फसविले आणि मी फसलो; तुम्ही माझ्यापेक्षा प्रबळ आहात
म्हणून विजयी झालात. मी दिवसभर उपहासाचा विषय झालो आहे;
सर्वजण माझी थट्टा करतात. 8 जेव्हा मी बोलू लागतो, मी आक्रोश करतो
हिंसाचार व विनाश हेच जाहीर करतो. कारण याहवेहच्या वचनामुळे
माझ्या वाट्याला दिवसभर निंदा व अप्रतिष्ठाच आली आहे. 9 परंतु
जर मी म्हटले, "मी त्यांचे शब्द उच्चारणार नाही किंवा त्यांच्या नावाने
संदेश देणार नाही," तर त्यांचे वचन माझ्या अंतःकरणात अग्नीप्रमाणे
पेटते, व तो अग्नी माझ्या हाडात बंदिस्त राहतो. तो आतील आत
इतःपर दाबून ठेवणे मला असह्य होते. निश्चितच, मी ते करू शकत नाही.
10 मी कित्येकांना कुजबुजतांना ऐकले आहे, "सर्व बाजूंनी दहशत!
त्याला दोषी ठरवा! चला, त्याला दोषी ठरवू या!" माझे सर्व मित्रगण
माझ्या हातून एखादी चूक होण्याची वाट पाहत आहेत. ते म्हणतात,
"कदाचित त्याची फसवणूक होईल; मग आपण त्याच्यावर वर्चस्व करू
आणि आपला सूड उगवू." 11 परंतु याहवेह सामर्थ्यवान योद्ध्यासारखे
माझ्यासोबत आहेत; म्हणून माझा छळ करणारे अडखळतील व वरचढ
होणार नाहीत. ते पराजित होतील आणि पुरेपूर फजीत होतील; आणि
त्यांची अप्रतिष्ठा कधीही विसरली जाणार नाही. 12 हे सर्वसमर्थ याहवेह,
तुम्ही नीतिमानाची पारख करता अंतःकरणाची व मनाची तपासणी
करता, तुम्ही त्यांचा सूड घेतांना मला पाहू द्या, कारण मी माझी फिर्याद
तुमच्यापुढे सादर केली आहे. 13 याहवेहचे स्तवन करा! याहवेहची
स्तुती गा! दुष्टजनांच्या हातातून ते गरजवंताचे प्राण वाचवितात. 14 मी
जन्मलो तो दिवस शापित होवो! ज्या दिवशी आईने मला जन्म दिला तो
आशीर्वादित नसो! 15 "तुला बाळ झाले आहे—पुत्र झाला आहे!"
हा संदेश ज्या मनुष्याने माझ्या पित्यास कळविला, तो मनुष्य शापित
असो, याव्दारे त्यांना मोठा आनंद झाला होता. 16 याहवेहने दयामाया न
दाखविता प्राचीन नगरांचा जसा नाश केला, तसाच त्या निरोप्याचाही
नाश होवो. सकाळी तो शोकगीते ऐको, व दुपारी रणगर्जना. 17 कारण
त्यांनी मला गर्भाशयामध्ये मारून टाकले नाही, मी माझ्या आईच्या
उदरातच मेलो असतो, तिचे गर्भाशयच माझी कबर होऊन ते विस्तृत
झाले असते, 18 मी गर्भाशयातून बाहेरच का आलो, ही संकटे व दुःख
बघण्यासाठी आणि अप्रतिष्ठा सोसत जीवनाचा शेवट करण्यासाठी?

**21** याहवेहचे वचन यिर्मयाहकडे आले जेव्हा सिद्कीयाह राजाने
मल्कीयाहचा पुत्र पशहूर व मासेयाहचा पुत्र सफन्याह याजक
यांना यिर्मयाहकडे पाठविले. ते त्याला म्हणाले, 2 “आम्हाला साहाय्य
करावे, अशी विनंती याहवेहला कर, कारण बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर
आमच्यावर आक्रमण करणार आहे. याहवेह आमच्यावर कृपा करतील
आणि प्राचीन काळी ते करीत असत तसा एखादा महान चमत्कार करून
नबुखद्नेस्सरला सैन्य घेऊन परत जायला भाग पाडतील.” 3 यावर
यिर्मयाहने उत्तर दिले, “सिद्कीयाहला सांगा, 4 ‘इस्राएलचे परमेश्वर
याहवेह म्हणतात की तुम्हाला ज्या बाबेलच्या राजाने व खाल्डियन
लोकांनी वेढा घातला आहे, त्यांच्याशी लढताना मी तुमची शस्त्रे तुमच्याच
विरुद्ध करेन. मी तुमच्या शत्रूंना या नगराच्या आत एकत्रित करणार
आहे. 5 माझ्या अतिक्रोध व भयानक कोपामुळे माझा उगारलेला हात व
शक्तिशाली भुजा घेऊन मी स्वतःच तुमच्याविरुद्ध लढणार आहे. 6 या
नगरात राहणाऱ्या सर्वांवर—मनुष्य व प्राणी या दोघांवर—मी भयानक
मरी पाठवेन आणि ते मरतील. 7 त्यानंतर याहवेहने ही घोषणा केली, मी
यहूदीयाचा राजा सिद्कीयाह, त्याचे अधिकारी, व मरीमधून वाचलेल्या
या नगरातील सर्व लोकांना बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर व त्यांचे शत्रू, जे
त्यांचा प्राण घेऊ पाहतात त्यांच्या हाती देईन. तो त्यांना तलवारीने ठार
करेल; तो त्यांच्यावर कोणतीही दया, करुणा वा कृपा करणार नाही.’
8 “पुढे या लोकांना सांग, ‘याहवेह म्हणतात: पाहा मी तुमच्यासमोर
जीवनाचा मार्ग आणि मरणाचा मार्ग ठेवला आहे. 9 या नगरात जे कोणी
राहतील ते तलवारीने, दुष्काळाने, मरीने मरतील. परंतु जे कोणी ज्यांनी
तुम्हाला वेढा घातला आहे त्या खास्द्यांच्या सैन्यास समर्पण करतील ते
जगतील; त्यांचा जीव वाचेल. 10 कारण मी या नगराचे भले नाही, तर
विध्वंस करण्याचा निर्धार केला आहे, ही याहवेहची घोषणा आहे. हे
नगर बाबेलच्या राजाच्या हाती देण्यात येईल आणि तो ते अग्नीने जाळून
भस्म करेल.’ 11 “यहूदीयाच्या राजघराण्याला असे म्हण, ‘याहवेहचे
वचन ऐका. 12 दावीदाच्या घराण्याला, याहवेह काय म्हणतात ते
ऐका: “‘रोज सकाळी योग्य न्यायनिवाडा करा; दुष्टांनी ज्याला लुबाडले
आहे अशांना त्यांच्या हातातून सोडवा, नाहीतर माझा क्रोध भडकेल
व अग्नीसारखा पेटेल कारण तुम्ही दुष्कर्म केले आहे— हा क्रोधाग्नी
कोणीही शांत करू शकणार नाही. 13 हे यरुशलेमा, मी तुझ्याविरुद्ध
आहे, तुम्ही जे या खोऱ्यावर राहता खडकाळ पठारावरील रहिवासी,
याहवेह असे म्हणतात; तुम्ही म्हणता, “आमच्याविरुद्ध कोण येईल?
आमच्या वस्ती मध्ये कोण प्रवेश करेल?” 14 याहवेह म्हणतात, तुमच्या
कृत्याच्या योग्य शिक्षा मी तुम्हाला करेन. मी तुमच्या अरण्यामध्ये अग्नी
पेटवेन तो तुमच्या सभोवती असलेले सर्वकाही जाळून टाकेल.’”

**22** याहवेह असे म्हणतात: “यहूदीयांच्या राजाच्या राजवाड्यात जा
आणि या संदेशाची तिथे घोषणा कर: 2 ‘दावीदाच्या राजासनावर
बसलेल्या हे यहूदीयाच्या राजा, याहवेहचा हा संदेश तुझ्यासाठी
आहे—तू, तुझे अधिकारी आणि लोक जे या व्दारातून आत येतात
या सर्वांसाठी. 3 याहवेहचे असे म्हणणे आहे: तुमचा न्यायनिवाडा
न्यायी व यथायोग्य असो. ज्यांना लुबाडण्यात आले आहे, त्यांना जुलमी
लोकांपासून सोडवा. परकीय, अनाथ आणि विधवा यांना अन्याय किंवा
हिंसा करू नका, आणि या स्थानावर निरपराध्यांचे रक्त सांडवू नका.
4 जर तुम्ही या आज्ञेचे काळजीपूर्वक पालन केले, नंतर दावीदाच्या
राजासनावर बसलेले राजे या महालाच्या व्दारातून रथ आणि घोड्यांवर
स्वार होऊन, त्यांचे अधिकारी आणि लोक यांच्यासह प्रवेश करतील. 5
परंतु जर तुम्ही या आज्ञेचे पालन नाही केले तर, याहवेह जाहीर करतात,
मी माझी शपथ घेऊन इशारा देतो की, हा राजवाडा ओसाड होईल.’” 6
कारण या यहूदीयांच्या राजवाड्यासंबंधी, याहवेह असे म्हणाले: “जरी
तू मला गिलआद प्रांतासारखा आहे, व लबानोनच्या शिखरासारखा
आहेस, मी निश्चितच तुझा विध्वंस करून तुला ओसाड आणि निर्जन
नगरीसारखे करेन. 7 मी तुझ्याविरुद्ध विध्वंसकांची टोळी पाठवेन,
प्रत्येक मनुष्य आपल्या शस्त्रांनी सुसज्ज असेल, ते तुझ्या सर्व उत्तम
गंधसरूच्या तुळया कापतील आणि त्या तोडून अग्नीत टाकतील. 8
“अनेक राष्ट्रातील लोक या शहराजवळून जातील आणि येथील विध्वंस
पाहून ते एकमेकांना म्हणतील, ‘याहवेहने हे एवढे भव्य शहर का बरे नष्ट
केले?’ 9 आणि याचे उत्तर मिळेल: ‘कारण त्यांना याहवेह परमेश्वराच्या
कराराचा त्याग केला होता आणि त्यांनी दुसऱ्या दैवतांची आराधना व
सेवा केली.’” 10 मेलेल्यां राजासाठी रडू नका किंवा त्यांच्या हानीकरिता
शोक करू नका; त्याऐवजी, जो बंदिवासात गेला आहे त्याच्यासाठी
विलाप करा, कारण तो मायदेशी परत येणार नाही किंवा मातृभूमी पुन्हा
कधीही पाहणार नाही. 11 यहूदीयाचा राजा योशीयाह याचा पुत्र शल्लूम
याच्यानंतर गादीवर बसला, पण त्याला या ठिकाणाहून नेण्यात आले,
त्याबद्दल याहवेह म्हणाले: “पुन्हा तो कधीच परत येणार नाही. 12
त्याला ज्या ठिकाणी त्यांनी बंदी करून नेले, तिथेच मरण पावेल; तो ही
भूमी पुन्हा कधी पाहणार नाही.” 13 “धिक्कार असो, जो आपला महाल
अधर्माने बांधतो, अन्यायाने माळे बांधतो, त्याच्या स्वतःच्या लोकांना
बिनपगारी कामासाठी लावतो, आणि त्यांच्या परिश्रमाचा मोबदला
त्यांना देत नाही. 14 तो म्हणतो, ‘मी माझ्यासाठी एक भव्य राजवाडा
बांधेन, ज्यामध्ये वरच्या मजल्यावर मोठमोठ्या खोल्या असतील.’ तो
त्याला अनेक मोठ्या खिडक्या बांधतो, गंधसरूची तक्तपोशी करतो
आणि सुंदर लाल रंगाने सजवितो. 15 “तू गंधसरूचा जास्तीत जास्त
वापर केला तर ते तुला राजा बनविल काय? तुझा पिता खातपीत
नव्हता काय? त्याने जे योग्य आणि न्याय्य केले, म्हणून त्याचे सर्व
चांगलेच झाले. 16 त्याने गोरगरीब, गरजवंताचे साह्य केले, म्हणून
त्याचे सर्व भले झाले. मला जाणून घेणे म्हणजे हेच नाही काय?” असे
याहवेह म्हणतात. 17 “परंतु तुझे डोळे आणि तुझे अंतःकरण केवळ
अनीतीने धन कसे मिळवावे, निर्दोष्यांचे रक्त कसे वाहवे, आणि जुलूम
व अन्यायाने कसे बळकावे याचाच शोध घेत असतात.” 18 म्हणून
यहूदीयाचा राजा योशीयाहचा पुत्र यहोयाकीम याबद्दल याहवेह असे
म्हणतात: “त्याच्यासाठी ते शोक करणार नाही: ‘हाय, माझ्या भाऊ
आणि बहिणींनो!’ त्याच्यासाठी ते शोक करणार नाही: ‘अहो, माझ्या

धन्या! अहो, त्याची थोरवी!’ 19 त्याला मेलेल्या गाढवासारखी मूठमाती
देण्यात येईल— त्याला सिंहासनावरून फरफटत आणून यरुशलेमच्या
द्वाराबाहेर फेकतील!” 20 “लबानोनात जा व विलाप करा, बाशानात
तुमचा आवाज ऐकू आला पाहिजे, अबारीमाहून आरोळी मारा, कारण
तुमचे सर्व मित्र चिरडले गेले आहेत. 21 तुम्हाला सुरक्षित वाटत होते,
तेव्हाच मी तुम्हाला सावधगिरीचा इशारा दिला होता, परंतु तुम्ही उत्तर
दिले, ‘मी ऐकणार नाही!’ लहानपणापासून तुम्ही असेच आहात; तुम्ही
आज्ञापालन केलेच नाही! 22 आता वाऱ्याच्या झोतासरशी तुझे मेंढपाळ
उडून जातील, तुमच्या सर्व मित्रांना बंदिवासात नेण्यात येईल. मग तुम्ही
शरमिंदे व्हाल व तुमच्या सर्व दुष्टपणामुळे तुम्ही तुमची प्रतिष्ठा घालवाल.
23 तुम्ही जे लबानोनच्या गंधसरूच्या राजवाड्यात रहिवास करीत होते,
जेव्हा तुम्हाला वेदना सहन कराव्या लागतील तेव्हा तुम्ही तळमळाल;
एखादी स्त्री प्रसूती वेदनांनी व्याकूळ होऊन तळमळते तसे तुमचे होईल!
24 “मी माझ्या जिवाची शपथ घेऊन सांगतो,” असे म्हणून याहवेह
जाहीर करतात, यहूदीयाचा राजा यहोयाकीम याचा पुत्र कोन्याह, तू
माझ्या उजव्या हातातील मुद्रिकेसारखा असलास, तरीही मी तुला ओढून
काढेन, 25 आणि तुझा वध करू पाहणाऱ्यांच्या हाती देईन, ज्यांची
तुला भयंकर भीती वाटते—जसे खास्द्यांचा राजा नबुखद्नेस्सर आणि
बाबेलची प्रजा. 26 तू व तुझी माता, यांना मी अशा देशाबाहेर भिरकावून
टाकेन, जिथे तुमचा जन्म झाला नव्हता आणि त्या देशात तुम्हाला मरण
येईल. 27 ज्या देशात परत येण्याची तू उत्कट इच्छा करशील, त्या
देशात तू कधीच परतणार नाहीस. 28 हा मनुष्य, कोन्याह, फुटक्या
भांड्यासारखा कोणालाही नको असलेली वस्तू नाही का? तो व त्याच्या
मुलांना त्यांना माहीत नसलेल्या देशात बंदिवान करून भिरकावून का
टाकले गेले. 29 अगे, हे भूमी, हे भूमी, हे भूमी तू याहवेहचे वचन ऐक!
30 याहवेह असे म्हणतात: “कान्याह हा मनुष्य जणू अपत्यहीन आहे
अशी नोंद करा, कारण त्याच्या जीवनात तो कधीही समृद्ध होणार नाही,
त्याच्या मुलांपैकी कोणीही समृद्ध होणार नाही, त्याचा कोणताही वारस
दावीदाच्या राजासनावर बसणार नाही, किंवा यहूदीया प्रांतावर राज्य
करणार नाही.”

**23** “धिक्कार असो त्या मेंढपाळांवर जे माझ्या कुरणातील मेंढरांचा
नाश करतात व त्यांची पांगापांग करतात!” असे याहवेह जाहीर
करतात. 2 म्हणून याहवेह, इस्राएलचे परमेश्वर मेंढपाळांना जे माझ्या
लोकांची राखण करतात त्यांना असे म्हणतात: “कारण तुम्ही माझ्या
कळपाची पांगापांग केली व त्यांना हुसकून लावले आणि त्यांची
काळजी घेतली नाही, आता तुम्ही त्यांच्याशी केलेल्या दुष्टपणाबद्दल
मी तुमच्यावर शिक्षांचा वर्षाव करेन.” असे याहवेह जाहीर करतात. 3
“जिथे माझ्या कळपाला मी पाठविले आहे, तिथून मी माझ्या कळपाच्या
अवशेषाला त्या सर्व देशातून एकत्र करून पुन्हा त्यांच्या मेंढवाड्यात
आणेन आणि मग ती मेंढरे फलद्रूप होतील व त्यांची संख्यावाढ होईल.
4 त्यांची काळजी घेण्यासाठी मी असे मेंढपाळ नेमीन, जे त्यांचे संगोपन
करतील, व त्यांना पुन्हा भीती आणि दहशत वाटण्याचे कारण राहणार
नाही, तसेच त्यातील कोणी हरविणारही नाही,” असे याहवेह जाहीर
करतात. 5 याहवेह म्हणतात, “असे दिवस येत आहेत की, त्या समयी
मी दावीदातून एक नीतिमान शाखा पुन्हा उगवेन, तो राजा सर्व देशात
सुज्ञतेने, खरेपणाने आणि न्यायाने राज्य करेल. 6 तेव्हा यहूदीयाचे रक्षण
होईल आणि इस्राएल सुरक्षिततेने जगेल. याहवेह आमचे नीतिमान
तारणकर्ता या नावाने त्यांना संबोधित करण्यात येईल. 7 “असे
दिवस येत आहेत की,” याहवेह म्हणतात, “शपथ घेताना इस्राएलचे
लोक, ‘ज्या जिवंत याहवेहने इस्राएली लोकांना इजिप्त देशातून बाहेर
आणले, त्यांच्या जीविताची शपथ’ असे न म्हणता, 8 ‘ज्या जिवंत
याहवेहने इस्राएली लोकांच्या वंशजांना उत्तरेकडील भूमीतून आणि ज्या
वेगवेगळ्या देशात पांगविले होते, त्या देशातून परत आणले आहे. त्या
जिवंत परमेश्वराची शपथ’ असे म्हणतील. मग ते स्वतःच्या भूमीवर
वस्ती करतील.” 9 संदेष्ट्याविषयी: माझे अंतःकरण विदीर्ण झाले आहे;
माझी सर्व हाडे थरथर कापत आहेत. मद्यप्यासारखा माझा झोक जात
आहे, एखाद्या बलवान पुरुषावर मद्याने मात केली आहे, कारण याहवेह
व त्यांचे पवित्र शब्द. 10 सर्व देश व्यभिचाऱ्यांनी व्यापून टाकला आहे;
कारण शाप त्यांच्यावर येऊन भूमी ओसाड झाली आहे. अरण्यातील
हिरवीगार कुरणे वाळून गेली आहेत, कारण संदेष्टे दुष्कर्मे करतात आणि
त्यांचे सामर्थ्य अयोग्य रीतीने वापरतात. 11 “याजक व संदेष्टे हे दोघेही
देवहीन आहेत; माझ्या मंदिरातही मी त्यांची तिरस्करणीय कृत्ये पाहिली
आहेत,” असे याहवेह म्हणतात. 12 “म्हणूनच त्यांचे मार्ग निसरडे
होतील; त्यांना अंधारात हद्दपार करण्यात येईल आणि तिथे ते पडतील.
ज्या वर्षी त्यांना शिक्षा देईन मी त्यांच्यावर अरिष्टे आणेन.” असे याहवेह
म्हणतात. 13 “शोमरोनच्या संदेष्ट्यांमध्ये मी ही तिरस्करणीय गोष्ट
बघितली: त्यांनी बआल दैवताच्या नावाने संदेश देऊन माझ्या इस्राएली
लोकांना मार्गभ्रष्ट केले. 14 आणि यरुशलेममधील संदेष्ट्यात मी काही
भयानक गोष्टी बघितल्या: ते व्यभिचार करतात आणि लबाडीत जीवन
जगतात. ते दुष्कर्म्यांचे बाहू मजबूत करतात, जेणेकरून दुष्टतेपासून
कोणीही परावृत्त होत नाही. ते सर्व मला सदोमातील लोकांसारखे
वाटतात; यरुशलेम येथील लोक गमोरातील लोकांसारखे वाटतात.” 15
म्हणून सर्वसमर्थ याहवेह संदेष्ट्यांबद्धल असे म्हणतात: “मी त्यांना
खावयास कडू दवणा देईन व प्यावयास विषारी पाणी देईन, कारण
यरुशलेमच्या संदेष्ट्यांमुळेच देवहीनता देश व्यापून टाकीत आहे.” 16
सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: “हे संदेष्टे जे संदेश तुम्हाला सांगतात
ते ऐकू नका; ते तुम्हाला खोट्या आशेने भरून टाकतात. ते त्यांच्या
मनाचेच दृष्टान्त सांगतात, त्यांचे शब्द याहवेहच्या मुखातील नाहीत! 17
माझा तिरस्कार करणाऱ्या बंडखोरांना ते म्हणतात, ‘याहवेह म्हणतात:
तुम्हाला शांतता लाभेल’ आणि जे स्वतःच्या मनाच्या हट्टीपणाने
चालतात त्यांना ते म्हणतात, ‘तुमच्यावर कोणतेही संकट येणार नाही.’
18 परंतु त्यांचे वचन काय म्हणते हे बघण्यासाठी वा ऐकण्यासाठी,
त्यांच्यापैकी कोण याहवेहच्या न्यायसभेत राहिला आहे, कोणी त्यांच्या
वचनाकडे कान दिला आहे आणि ते ऐकले आहे? 19 पाहा, याहवेहचे

भयावह वादळ पाहा. त्याचा प्रकोपात स्फोट होईल, दुष्टांच्या मस्तकावर
ते एका वावटळीप्रमाणे येईल. 20 याहवेहच्या अंतःकरणाचा उद्देश
पूर्ण झाल्याशिवाय त्यांचा महाभयंकर क्रोध शांत होणार नाही. पुढे
येणाऱ्या दिवसात तुला ते अगदी स्पष्टपणे कळेल. 21 या संदेष्ट्यांना
मी पाठविलेले नाही, तरीसुद्धा ते त्यांचा संदेश घेऊन धाव घेतात;
मी त्यांच्याशी बोललो नाही, तरी ते संदेश देतात. 22 जर ते माझ्या
समक्षतेत उभे राहिले असते, तर त्यांनी माझ्या लोकांना माझे वचन
जाहीर केले असते आणि ते दुष्ट मार्गापासून परावृत्त झाले असते व
त्यांच्या दुष्टकर्मापासून दूर झाले असते. 23 "मी केवळ जवळ असणाराच
परमेश्वर आहे काय, दुरून बघणारा परमेश्वर नाही काय?" असे याहवेह
जाहीर करतात. 24 "माझ्यापासून कोणाला गुप्तस्थळी लपून राहता
येईल काय? जेणेकरून मी त्यांना बघू शकणार नाही." असे याहवेह
जाहीर करतात. मी स्वर्ग आणि पृथ्वी व्यापून टाकणारा नाही काय? असे
याहवेह जाहीर करतात. 25 "माझ्या नावाने खोटे संदेश देणारे संदेष्टे काय
म्हणतात ते मी ऐकले आहे. ते म्हणतात, 'मला स्वप्न पडले! मला स्वप्न
पडले!' 26 हा प्रकार या खोट्या संदेष्ट्यांच्या अंतःकरणात किती काळ
चालणार, जे त्यांच्या मनाच्या भ्रांतीने भविष्यवाणी करतात? 27 त्यांचे
पूर्वज बआल दैवताच्या उपासनेमुळे मला विसरले, तसे आपली खोटी
स्वप्ने सांगितल्यास माझे लोक मला विसरून जातील असा ते विचार
करतात. 28 ज्या खोट्या संदेष्ट्यांना स्वप्ने पडतात, त्यांना ती स्वप्ने
सांगू दे, परंतु ज्याला माझे वचन प्राप्त झाले आहे, त्याने ते विश्वासूपणे
सांगावे. कोंड्याचा गव्हाशी काय संबंध आहे?" असे याहवेह जाहीर
करतात. 29 याहवेह जाहीर करतात, "माझे वचन अग्नीसारखे ज्वलंत
नाही काय? खडक फोडून त्यांचे तुकडे तुकडे करणाऱ्या हातोडीसारखे
ते नाही काय? 30 "जे आपले संदेश एकमेकांपासून माझ्यापासून
चोरतात, अशा संदेष्ट्यांच्या मी विरुद्ध उभा आहे," याहवेह जाहीर
करतात. 31 होय, याहवेह जाहीर करतात, हा संदेश याहवेहकडून आहे,
असे जाहीर करून स्वतःच्या जिभा हेलकावितात, अशा संदेष्ट्यांच्या मी
विरुद्ध उभा आहे. 32 जे खोटी स्वप्ने सांगून भविष्यवाणी करतात,
अशा संदेष्ट्यांच्या मी निश्चितच विरुद्ध उभा आहे, असे याहवेह जाहीर
करतात. ते त्यांना वाचाळपणाने लबाडपणे सांगतात आणि माझ्या
लोकांना पापाकडे नेतात. याहवेह म्हणतात, "मी त्यांना पाठविले नाही
किंवा त्यांना निवडले नाही. या लोकांच्या भल्यासाठी यांचा काहीही
उपयोग नाही," असे याहवेह जाहीर करतात. 33 "या लोकांपैकी, या
संदेष्ट्यांपैकी, किंवा याजकांपैकी कोणी तुला विचारेल, 'अरे यिर्मयाह,
आज याहवेहकडून काय संदेश आहे?' तेव्हा तू त्यांना असे उत्तर द्यावेस,
'कसला संदेश? मी तुम्हाला दूर लोटून टाकणार आहे, असे याहवेह
जाहीर करतात.' 34 आणि 'हा याहवेहकडून आलेला संदेश आहे,'
असे हक्काने सांगणारे संदेष्टे आणि याजक वा इतर कोणीही लोक
या सर्वांना आणि त्यांच्या कुटुंबांना मी शासन करेन. 35 तुम्ही व इतर
इस्राएली एकमेकांना विचारीत असता, 'याहवेहने काय उत्तर दिले?
किंवा याहवेहने काय सांगितले?' 36 परंतु 'परमेश्वराचा संदेश' हा
शब्दप्रयोग तुम्ही पुन्हा करू नये, कारण तुम्हा प्रत्येकाचे वचन तुमचा
व्यक्तिगत संदेश होतो. म्हणून तुम्ही जिवंत परमेश्वर, सर्वसमर्थ याहवेह,
आपले परमेश्वर यांच्या वचनाचा विपर्यास करता. 37 तुम्ही संदेष्ट्याला
सतत विचारता, 'याहवेहने तुला काय उत्तर दिले? किंवा याहवेहने काय
सांगितले?' 38 'हा याहवेहकडून आलेला संदेश आहे,' असे हक्काने
तुम्ही सांगता, याहवेह असे म्हणतात: 'हा याहवेहकडून आलेला संदेश
आहे,' मी तुम्हाला हे वापरू नये अशी ताकीद दिल्यानंतरही हे शब्द
तुम्ही वापरता. 39 म्हणून मी निश्चितच तुम्हाला विसरेन आणि तुम्हाला
व तुमच्या पूर्वजांना दिलेल्या या शहराला माझ्या समक्षतेतून घालवून
देईन. 40 मी तुमची कायमची अप्रतिष्ठा—तुम्हाला कायमचे लज्जास्पद
करेन, जे कधीही विसरल्या जाणार नाही."

**24** बाबिलोनचा राजा नबुखद्नेस्सर याने यहूदीयाचा राजा, यहोयाकीम
याचा पुत्र, यकोन्याह, याच्याबरोबरच यहूदीयाचे अधिपती,
निष्णात सुतार व लोहार असे कारागीर यांना यरुशलेमहून बाबिलोन येथे
बंदिवासात नेले. या घटनेनंतर याहवेहने यरुशलेम येथील मंदिरासमोर
अंजीर भरून ठेवलेल्या दोन टोपल्या मला दाखविल्या. 2 एका
टोपलीमध्ये उत्तम, आधी पिकलेले अंजीर होते, परंतु दुसऱ्या टोपलीतले
अंजीर मात्र खराब झालेले होते, इतके खराब की ते खाण्यास योग्य
नव्हते. 3 तेव्हा याहवेहने मला विचारले, "यिर्मयाह, तुला काय दिसते?"
मी उत्तर दिले. "अंजीर, काही जे चांगले आहेत ते अत्युत्तम आणि काही
खराब, ते इतके खराब की खाण्यास अयोग्य." 4 तेव्हा याहवेहचे वचन
माझ्याकडे आले: 5 "याहवेह, इस्राएलचे परमेश्वर असे म्हणतात: 'हे
उत्तम अंजीर यहूदीयातून बंदिवासात पाठवलेल्यांचे प्रतीक आहे, ज्यांना
मी या ठिकाणातून खास्द्यांच्या देशामध्ये रवाना केले आहे. 6 त्यांचे बरे
होईल याकडे माझे लक्ष राहील, आणि मी त्यांना इकडे परत आणेन, मी
त्यांना उभारेन आणि त्यांना उद्ध्वस्त करणार नाही; मी त्यांना रोपीन,
उपटून टाकणार नाही. 7 मी त्यांना असे अंतःकरण देईन जेणेकरून
ते मला ओळखतील, की मीच याहवेह आहे. ते माझे लोक होतील
व मी त्यांचा परमेश्वर होईन, कारण ते पूर्ण अंतःकरणाने माझ्याकडे
परत येतील. 8 "'परंतु नासके अंजीर जे इतके नासके आहेत की ते
खाण्यायोग्य नाहीत, हे यहूदीयाचा राजा सिद्कीयाह, त्याचे अधिकारी व
या देशात उरलेले यरुशलेमचे सर्व लोक यांचे प्रतीक आहेत; मग ते
यरुशलेमचे अवशिष्ट लोक असोत वा इजिप्तमध्ये वस्ती करून राहिलेले
असोत, याहवेह म्हणतात. 9 मी त्यांना असे करेन की पृथ्वीवरील
प्रत्येक राष्ट्राला त्यांची घृणा येईल, आणि मी जिथे मी घालवून देईन,
तिथे निंदा, कुचेष्टा, शाप आणि ते उपहासाचा विषय होतील. 10 त्यांना
व त्यांच्या पूर्वजांना मी दिलेल्या या भूमीतून त्यांचा पूर्णपणे नायनाट
होईपर्यंत, मी त्यांच्यावर तलवार, दुष्काळ व मरी पाठवेन.'"

**25** यहूदीयाचा राजा, योशीयाहचा पुत्र, यहोयाकीम याच्या
कारकिर्दीच्या चौथ्या वर्षी व बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर याच्या
कारकिर्दीच्या पहिल्या वर्षी यहूदीयाच्या सर्व लोकांबद्दल यिर्मयाहला

संदेश मिळाला. 2 मग यिर्मयाह संदेष्ट्याने यहूदीयाच्या सर्व लोकांना व
यरुशलेमच्या रहिवाशांना म्हणाला: 3 गेली तेवीस वर्षे—यहूदीयाचा
राजा आमोनचा पुत्र योशीयाह याच्या राजवटीच्या तेराव्या वर्षापासून
आजपर्यंत—याहवेह मला त्यांचे संदेश देत आले आहेत आणि मी
तेच संदेश परत परत तुम्हाला सांगत आलो आहे, पण तुम्ही ते ऐकले
नाहीत. 4 पुनः पुनः याहवेहने आपले सर्व सेवक संदेष्टे तुमच्याकडे
पाठविले, पण तुम्ही ऐकावयाचे नाकारले व त्याकडे दुर्लक्ष केले. 5
त्यांनी तुम्हाला संदेश दिला: “तुम्ही प्रत्येकजण तुमच्या दुष्ट मार्गापासून
व जी दुष्कर्मे करीत आहात त्यापासून मागे फिरा, तरच याहवेहने
तुम्हाला व तुमच्या पूर्वजांना सर्वकाळासाठी दिलेल्या या देशात तुम्ही
राहाल. 6 इतर दैवतांची सेवा करण्यासाठी त्यांचे अनुसरण करू नका व
त्यांची उपासना करू नका; तुमच्या हस्तकृतींमुळे माझा क्रोध भडकवू
नका. तर मी तुम्हाला अपाय करणार नाही.” 7 याहवेह म्हणतात,
“पण तुम्ही माझे ऐकले नाही आणि तुमच्या हस्तकृतींमुळे माझा क्रोध
भडकविला व सर्व संकटे तुम्ही स्वतःवर ओढवून घेतली.” 8 म्हणून
आता सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: “तुम्ही माझी वचने ऐकली नाही,
9 मी उत्तरेकडील सर्व लोक व माझा सेवक बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर
यांना एकवटेन. त्याच्या सर्व सैन्यांना मी या देशावर, येथील लोकांवर व
तुमच्या आसपासच्या इतर राष्ट्रांवर आणेन. मी त्यांचा संपूर्ण नायनाट
करून त्यांना दहशत, तिरस्कार व नाशाचा कायमचा विषय करेन,”
याहवेह म्हणतात, 10 “त्यांचे हर्ष व त्यांच्या आनंदोत्सवाचे स्वर, वर
आणि वधूंचे स्वर, त्यांच्या जात्यांचे आवाज व त्यांच्या दिव्यांचा प्रकाश
मी नाहीसा करेन. 11 हा सर्व देश ओसाड व पडीक असा होईल. हे
देश सत्तर वर्षे बाबेलच्या राजाची सेवा करतील. 12 “गुलामगिरीची
ही सत्तर वर्षे संपल्यानंतर, मी बाबेलचा राजा व त्याचे लोक यांना
त्यांच्या अपराधांबद्दल शासन करेन; मी खाल्डियनांचा देश कायमचा
ओसाड करेन, 13 या पुस्तकात मी जाहीर केलेले सर्व भयानक अनर्थ
आणि यिर्मयाहने सर्व राष्ट्रांविरुद्ध भविष्यवाणीत केलेल्या शिक्षा, मी या
खाल्डियनांच्या देशावर आणेन. 14 अनेक राष्ट्रे व महान राजे त्यांना
गुलाम करतील. त्यांनी माझ्या लोकांचा कृत्याद्वारे व हस्तकृतीद्वारे ज्या
प्रमाणात छळ केला, त्याच प्रमाणात मी त्यांना शासन करेन,” याहवेह
असे म्हणतात. 15 याहवेह इस्राएलाचे परमेश्वर मला जे म्हणाले ते असे
होते: “माझ्या संतापाने काठोकाठ भरलेला हा द्राक्षारसाचा प्याला
माझ्या हातून घे, आणि मी तुला ज्या राष्ट्रांकडे पाठवेन, त्या सर्व राष्ट्रांना
त्या प्याल्यातून प्यावयला लाव. 16 जेव्हा ते यातून पितील तेव्हा ते
झोकांड्या खातील व वेडे होतील, कारण मी त्यांच्यावर तलवारीचा
प्रहार करेन.” 17 तेव्हा मी याहवेहच्या हातातून तो प्याला घेतला
आणि त्यांनी मला ज्या राष्ट्रांकडे पाठविले, त्या प्रत्येक राष्ट्राला त्यातून
प्यावयला लावले: 18 यरुशलेम व यहूदीयाची नगरे, आणि त्यांचे
राजे आणि अधिपती या सर्वांनी पडीक व भयानकतेचे एक उदाहरण,
तिरस्कृत व शापित व्हावे—जसे ते आजही आहेत; 19 इजिप्तचा राजा
फारोह व त्याचे सेवक, अधिपती व सर्व लोक, त्या देशात असलेले सर्व
परकीय लोक; 20 त्याचप्रमाणे ऊस देशातील राजे; व पलिष्ट्यांचे राजे
(अष्कलोन, गाझा, एक्रोन, अश्दोदचे अवशिष्ट लोक); 21 एदोम, मोआब
व अम्मोन; 22 तसेच सोर व सीदोन येथील सर्व राजे; समुद्रापलीकडच्या
तटवर्तीप्रदेशातील सर्व राजे; 23 ददान, तेमा व बूज, तसेच जे दूरच्या
देशात असलेले; 24 आणि अरबस्थानातील सर्व राजे व वाळवंटात
राहणारे विदेशी लोकांचे राजे; 25 जिम्री, एलाम व मेदिया येथील
सर्व राजे; 26 तसेच एकामागून एक उत्तरेकडील सर्व देशातील दूर व
जवळचे सर्व राजे; जगातील सर्व राजे; सरतेशेवटी शेशाकचा राजा या
प्याल्यातून पिईल. 27 “त्यांना सांग, ‘सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचे
परमेश्वर म्हणतात: माझ्या क्रोधाने भरलेल्या या प्याल्यातून तुम्ही
प्या, धुंद होईपर्यंत प्या, आणि मग ओकारी करा, व पुन्हा कधीही न
उठण्याकरिता पडा, कारण मी तुमच्यावर तलवार पाठवित आहे.’ 28 हा
प्याला पिण्याचे त्यांनी नाकारले, तर त्यांना सांग, ‘सर्वसमर्थ याहवेह
असे म्हणतात: हा प्याला तुम्हाला प्यावाच लागेल! 29 माझे नाव धारण
करणाऱ्या नगरावर मी विपत्ती आणत आहे, आणि मग तुम्ही शिक्षेवाचून
राहाल काय? तुम्हाला शिक्षा चुकवता येणार नाही, कारण पृथ्वीवरील
सर्व राष्ट्रांविरुद्ध मी तलवार चालविणार आहे, असे सर्वसमर्थ याहवेह
जाहीर करतात.’ 30 “म्हणून आता त्यांच्याविरुद्ध हा सर्व संदेश दे व
त्यांना सांग: “‘याहवेह त्यांच्या उच्च स्थानातून गर्जना करतील; त्यांच्या
पवित्रस्थानातून ते मेघनाद करतील आणि स्वतःच्या भूमीविरुद्ध गर्जना
करतील पृथ्वीवरील सर्व रहिवाशांविरुद्ध. द्राक्षे तुडविणाऱ्यासारखे ते
आरोळी मारतील, 31 हा क्षोभ पृथ्वीच्या दिगंतापर्यंत दुमदुमेल, कारण
सर्व राष्ट्रांविरुद्ध याहवेह आरोप करतील; ते संपूर्ण मानवजातीचा न्याय
करतील सर्व दुष्ट लोकांना तलवारीच्या स्वाधीन करतील.’” याहवेहची
ही घोषणा आहे. 32 सर्वसमर्थ याहवेह जाहीर करतात, “पाहा! विपत्ती
पसरत आहे एका राष्ट्रातून दुसऱ्या राष्ट्रात; पृथ्वीच्या टोकापासून एक
भयंकर वादळ उठत आहे.” 33 त्या दिवशी याहवेहने वधलेल्या लोकांनी
पृथ्वी व्यापून जाईल—त्यांच्यासाठी कोणीही विलाप करणार नाही,
अथवा मूठमाती देण्यासाठी त्यांची प्रेते कोणी गोळा करणार नाही.
ते भूमीवर शेणाप्रमाणे पडून राहतील. 34 अहो मेंढपाळांनो, दुःखाने
रडा आणि विलाप करा; मानवजातीच्या कळपांच्या पुढाऱ्यांनो, धुळीत
लोळा. कारण तुमचा वध होण्याची वेळ आता आली आहे; मातीच्या
उत्तम भांड्यासारखे तुम्ही सर्व कोसळून पडाल. 35 मेंढपाळांना पळून
जाण्यास कुठेही जागा मिळणार नाही, पुढाऱ्यांना सुटकेसाठी मार्ग
आढळणार नाही. 36 मेंढपाळ मारीत असलेल्या आरोळ्या ऐका,
कळपांच्या पुढाऱ्यांचा विलाप ऐका! याहवेह त्यांची कुरणे उद्ध्वस्त
करीत आहेत. 37 आता शांत कुरणे उजाड होतील याहवेहच्या भयानक
क्रोधाला बळी पडतील. 38 सिंह आपली गुहा सोडतो तसे ते आपले
विश्रांतिस्थान सोडतील, आणि जुलूम करणाऱ्यांच्या तलवारीमुळे आणि
परमेश्वराच्या तीव्र क्रोधामुळे त्यांची भूमी उद्ध्वस्त होईल.

**26** यहूदीयाचा राजा, योशीयाहचा पुत्र यहोयाकीम याच्या
कारकिर्दीच्या प्रारंभी यिर्मयाहला याहवेहकडून हा संदेश मिळाला:

2 याहवेह असे म्हणतात, “यहूदीया प्रांताच्या विविध नगरातून लोक
उपासना करावयास आले आहेत, तेव्हा तू याहवेहच्या मंदिरासमोर उभा
राहा आणि यहूदीया नगरातील सर्व लोकांना जे याहवेहच्या मंदिरात
उपासना करण्यास आले त्यांच्याशी बोल. मी तुला सांगितलेले सर्व
त्यांना सांग; त्यातील एकही शब्द कमी करू नकोस. 3 कारण कदाचित
ते ऐकतील आणि आपल्या कुमार्गापासून मागे वळतील; मग त्यांच्या
कुकर्माबद्दल मी त्यांना करणार होतो तो विनाश आवरून धरेन. 4 त्यांना
सांग, ‘याहवेह म्हणतात: जर तुम्ही माझे ऐकणार नाही व मी तुमच्यापुढे
ठेवलेले नियम तुम्ही पाळणार नाही, 5 आणि मी पाठविलेल्या माझ्या
सेवक संदेष्ट्यांचे संदेश तुम्ही ऐकणार नाही, मी माझे संदेष्टे तुम्हाला
सावध करण्याकरिता पुन: पुन: पाठविले (पण तुम्ही त्यांच्याकडे लक्ष
दिले नाही), 6 तर या मंदिरास मी शिलोह आणि या नगरासारखे
पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांमध्ये शाप असे करेन.’” 7 याजक, संदेष्टे व
सर्व लोकांनी यिर्मयाहने याहवेहची आज्ञापिलेली वचने सांगितलेले
ऐकले. 8 यिर्मयाहने याहवेहची आज्ञापिलेली वचने सांगणे संपविताच
याजक, संदेष्टे व मंदिरातील सर्व लोकांनी त्याला घेरून त्याला म्हटले
“तू मेलाच पाहिजे! 9 तू याहवेहच्या नावाने का भविष्यवाणी करतोस,
की हे भवन शिलोहसारखे होईल व हे नगर निर्जन व उजाड होईल?”
मग सर्व लोकांनी याहवेहच्या मंदिरात यिर्मयाहभोवती गर्दी केली. 10
जेव्हा यहूदीयाच्या अधिकाऱ्यांनी हे ऐकले, तेव्हा ते राजवाड्यातून
निघून मंदिराच्या दरवाजापाशी आले व याहवेहच्या मंदिराच्या देवडीत
बसले. 11 मग याजक व संदेष्टे, अधिकारी व लोकांस म्हणाले, “या
मनुष्यास मरणदंड दिलाच पाहिजे, कारण या नगराविरुद्ध याने संदेश
दिला आहे, तो तुम्ही आपल्या कानांनी ऐकला आहे!” 12 मग यिर्मयाह
सर्व अधिकाऱ्यांना आणि सर्व लोकांना म्हणाला: “या मंदिराविरुद्ध
आणि या शहराविरुद्ध तुम्ही ऐकलेल्या सर्व गोष्टीसाठी भविष्यवाणी
करण्यासाठी याहवेहने मला पाठविले आहे. 13 आता तुम्ही तुमचे मार्ग,
तुमची कर्मे बदला व याहवेह तुमचे परमेश्वर यांच्या आज्ञा पाळा. मग ते
त्यांचे मन बदलतील व तुमच्याविरुद्ध जाहीर केलेली सर्व संकटे रद्द
करतील. 14 माझ्याबाबतीत म्हणाल, तर मी तुमच्या हातात आहे.
तुमच्यामते जे योग्य व वाजवी आहे ते येईल माझे करा. 15 परंतु एक
गोष्ट नक्की, तुम्ही मला ठार केले, तर एका निरपराध मनुष्याला ठार
केल्याचा ठपका तुमच्यावर, या नगरावर व येथील प्रत्येक रहिवाशावर
येईल; कारण तुम्ही ऐकलेला प्रत्येक शब्द तुम्हाला सांगण्यासाठी
याहवेहने मला पाठविले, हे अगदी सत्य आहे.” 16 यावर अधिकारी
व लोक, याजकांना आणि संदेष्ट्यांना उद्देशून म्हणाले, “हा मनुष्य
मरणदंडाला पात्र नाही, कारण तो आमचे परमेश्वर याहवेहच्या नावाने
आमच्याशी बोलला आहे.” 17 नंतर काही वडीलजन पुढे आले व
संपूर्ण सभेतील लोकांना उद्देशून बोलू लागले, 18 “यहूदीयाचा राजा
हिज्कीयाह, याच्या कारकिर्दीत मोरेशेथ येथील संदेष्टा मीखाहने संदेश
दिला, ‘सर्वसमर्थ याहवेह म्हणतात: “‘सीयोन शेताप्रमाणे नांगरला
जाईल, यरुशलेम दगडांचा ढिगारा होईल, मंदिराच्या टेकडीवर दाटीने
झाडेझुडपे वाढतील.’ 19 “परंतु यहूदीयाचा हिज्कीयाह राजा व इतर
कोणी या संदेशाबद्दल मिखायाहला ठार केले का? हिज्कीयाहला
याहवेहचे भय नव्हते काय व त्याने त्यांच्या कृपेची याचना केली नाही
का? मग याहवेहनी ठरविलेली विपत्ती त्यांच्यावर आणण्याचा आपला
विचार बदलला नाही का? आपण यिर्मयाहला ठार करून स्वत:वर
घोर संकट आणणारच होतो!” 20 (आता किर्याथ-यआरीम येथील
शमायाहचा पुत्र उरीयाह हा याहवेहच्या नावाने संदेश देणारा दुसरा
संदेष्टा होता. त्यानेही यिर्मयाहप्रमाणे नगरांविरुद्ध व देशाविरुद्ध या
सारखाच संदेश दिला. 21 परंतु यहोयाकीम राजा, सेनाधिकारी व इतर
अधिकारी वर्ग यांनी त्याचे शब्द ऐकले. तेव्हा राजाने त्याला मारण्याचे
ठरविले. ही बातमी उरीयाहाला कळताच तो घाबरून इजिप्त देशात पळून
गेला. 22 तेव्हा यहोयाकीम राजाने अकबोरचा पुत्र एलनाथान व बरोबर
काही माणसे देऊन त्यांना इजिप्त देशी पाठविले. 23 इजिप्त देशातून
त्यांनी उरीयाहला परत आणले, त्याला राजा यहोयाकीम राजाकडे
परत आणले, त्याने त्याला तलवारीने ठार मारले आणि ज्या ठिकाणी
सामान्य लोक पुरले होते तिथे त्याचा मृतदेह फेकून दिला.) 24 परंतु
शाफानचा पुत्र हा अहीकाम यिर्मयाहच्या बाजूने उभा राहिला व त्याला
मारण्यासाठी त्याला जमावाच्या हवाली करण्यात आले नाही.

**27** यहूदीयाचा राजा, योशीयाहचा पुत्र, यहोयाकीम याच्या
कारकिर्दीच्या आरंभी हा संदेश याहवेहकडून यिर्मयाहला मिळाला:
2 याहवेहनी मला असे म्हटले आहे: “चामड्याच्या वाद्यांचा व गुणाकार
चिन्हाच्या सळयांचा एक जू तयार कर आणि तो तुझ्या मानेवर ठेव. 3 मग
एदोम, मोआब, अम्मोन, सोर व सीदोन यांच्या राजांना, यरुशलेममध्ये
यहूदीयाचा राजा सिद्कीयाहकडे आलेल्या दूतांसह हा संदेश पाठव, 4
त्यांच्या अधिकाऱ्यांसाठी एक संदेश दे आणि सांग, ‘इस्राएलचे परमेश्वर,
सर्वसमर्थ याहवेह, असे म्हणतात: “तुमच्या धन्यांना सांगा की: 5
माझ्या महान शक्तीने व उगारलेल्या भुजेने मी पृथ्वी, सर्व मानवजात, व
प्राणिमात्रेस निर्माण केले आणि या सर्वगोष्टी मी माझ्या इच्छेस येईल
त्याला देतो. 6 यास्तव आता तुमचे सर्व देश, मी माझा सेवक बाबेलचा
राजा नबुखद्नेस्सर याच्या हवाली केले आहेत. मी सर्व वनपशूदेखील
त्याच्या अधीन होतील असे केले आहे. 7 सर्व राष्ट्रे, त्या देशाची वेळ
येईपर्यंत, त्याच्या पुत्राची व त्याच्या नातवाची सेवा करतील आणि
नंतर अनेक राष्ट्रे व मोठमोठे राजे बाबिलोन जिंकून घेतील आणि त्याला
आपला गुलाम करतील. 8 “‘“जर कोणतेही राष्ट्र किंवा राज्य बाबेलचा
राजा नबुखद्नेस्सरची सेवा करणार नाही किंवा त्याचा जू आपल्या
मानेवर ठेवणार नाही, मी त्या राष्ट्राला तलवार, दुष्काळ आणि मरीने
शिक्षा करेन, जोपर्यंत मी त्याच्या हाताने त्यांचा नाश करत नाही, असे
याहवेह घोषित करतात. 9 तुमचे संदेष्टे, दैवप्रश्न करणारे, स्वप्नांचा अर्थ
सांगणारे, मांत्रिक व जादूटोणा करणारे म्हणतील, ‘तुम्ही बाबेलच्या
राजाची सेवा करणार नाही,’ पण त्यांचे ऐकू नका. 10 कारण ते
तुम्हाला खोटे संदेश देत आहेत. त्यांचे ऐकून तुम्ही केवळ तुमच्या
देशातून दूर जाल; मी तुम्हाला तुमच्या देशातून हाकलून देईन आणि

तुमचा नाश होईल. 11 परंतु बाबेलच्या राजाच्या गुलामीला शरण
जाणाऱ्या कोणत्याही राष्ट्राच्या लोकांना त्यांच्याच देशात राहण्याची
मुभा असेल आणि त्यांना नेहमीप्रमाणे आपल्या शेतीची मशागत
करता येईल, याहवेह असे म्हणतात.’”” 12 हा संदेश मी यहूदीयाचा
राजा सिद्कीयाह यास सांगितला. मी म्हणालो, “बाबेलच्या राजाचे जू
आपल्या मानेवर ठेव; त्याची व त्याच्या लोकांची सेवा कर, म्हणजे
तुम्ही जगाल. 13 जे राष्ट्र बाबेलच्या राजाला अधीन होणार नाही, त्यांना
याहवेहने देऊ केलेल्या युद्ध, दुष्काळ व मरी यांनी तू आणि तुझे लोक
का मरावे? 14 ‘तुम्ही बाबेलच्या राजाची सेवा करणार नाही,’ असे
सांगणाऱ्या संदेष्ट्यांचे ऐकू नका, कारण ते तुम्हाला खोटे संदेश देत
आहेत. 15 याहवेह म्हणतात, ‘मी त्यांना पाठविलेले नाही, ते माझ्या
नावाने खोटी भविष्यवाणी करतात. म्हणून मी तुमचा आणि या खोट्या
संदेष्ट्यांचा नाश करण्यासाठी या देशातून तुम्हाला हाकलून देईन.’”
16 मी याजकांशी व सर्व लोकांशी बोललो आणि त्यांना सांगितले,
“याहवेह म्हणतात: ‘मंदिरातून नेलेली सुवर्णपात्रे लवकरच बाबेलमधून
परत आणली जातील,’ असे सांगणाऱ्या तुमच्या संदेष्ट्यांचे मुळीच
ऐकू नका. ते तुम्हाला खोटे भविष्य सांगत आहेत. 17 त्यांचे ऐकू
नका. बाबेलच्या राजाच्या अधीन व्हा, तर तुम्ही जिवंत राहाल. हे
नगर उद्ध्वस्त का व्हावे? 18 जर ते संदेष्टे असतील व त्यांच्याकडे
याहवेहचे वचन असेल तर, याहवेहच्या मंदिरातील सुवर्णपात्रे मंदिरात व
यहूदीयाच्या राजाच्या महालात आणि यरुशलेममधील महालांमध्येच
राहवी, ती बाबेलला नेली जाऊ नयेत, अशी त्यांनी सर्वसमर्थ याहवेहस
विनंती करावी. 19 कारण स्तंभ, कास्याचे गंगाळ, धातूच्या बैठकी व या
नगरात उरलेल्या इतर वस्तूंच्या बाबतीत सर्वसमर्थ याहवेह म्हणतात,
20 बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर याने यहूदीयाचा राजा, यहोयाकीमचा
पुत्र यकोन्याह, याच्यासह यहूदीया व यरुशलेम येथील सर्व महत्त्वाच्या
व्यक्तींना बाबिलोन येथे कैद करून नेले, 21 मंदिरातील उरलेली पात्रे व
यहूदीया आणि यरुशलेमच्या राजांच्या महालातील उरलेल्या मौल्यवान
वस्तू याविषयी सर्वसमर्थ याहवेह इस्राएलाचे परमेश्वर असे म्हणतात:
22 ‘होय, त्या आता बाबेलला नेण्यात येतील आणि मी त्यांची भेट
घेईपर्यंत त्या तिथेच राहतील,’ याहवेह घोषित करतात. ‘नंतर पुढे मी हे
सर्व यरुशलेमला परत आणेन व पुनर्स्थापित करेन.’”

**28** त्याच वर्षी, म्हणजे यहूदीयाचा राजा सिद्कीयाह याच्या
कारकिर्दीच्या प्रारंभी म्हणजे चौथ्या वर्षातील पाचव्या महिन्यात,
गिबोन येथील अज्जूरचा पुत्र हनन्याह नावाचा जो संदेष्टा होता, तो
याजक व सर्व लोकांच्या समक्ष मला उद्देशून याहवेहच्या भवनात
जाहीरपणे म्हणाला: 2 “सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचे परमेश्वर जाहीर
करतात: ‘तुमच्या मानेवरील बाबेलच्या राजाचे जू मी काढून टाकेन. 3
बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरने लुटून नेलेली याहवेहच्या मंदिरातील
सर्व पात्रे मी दोन वर्षात परत आणेन. 4 आणि यहोयाकीमचा पुत्र,
यहूदीयाचा राजा यकोन्याह व खास्द्यांच्या देशात बंदिवासात पाठविलेले
सर्व बंदी यांनाही मी परत आणेन. बाबेलच्या राजाचे जोखड मी तोडून
टाकेन,’ असे याहवेह जाहीर करतात.” 5 यावर याहवेहच्या मंदिरात
उभे असलेले सर्व लोक आणि याजकांच्या समक्ष यिर्मयाह संदेष्टा
हनन्याहला म्हणाला, 6 यिर्मयाह संदेष्टा म्हणाला, “आमेन! तुझे संदेश
याहवेह खरे करोत! तू दिलेल्या संदेशाच्या वचनानुसार याहवेहच्या
मंदिरातील पात्र व सर्व बंदिवान बाबेलमधून परत येवोत. 7 परंतु तरी
देखील, आता या सर्व लोकांसमक्ष व तुझ्यासमक्ष मी जे सांगतो ते तू
ऐक: 8 तुझ्या आणि माझ्या आधी जे संदेष्टे होऊन गेले, ज्यांनी युद्ध,
विनाश व मरी याविषयी अनेक राष्ट्रांना व शक्तिशाली राज्यांना संदेश
दिला. 9 परंतु जो संदेष्टा शांतीचा संदेश देत असे व त्याचे भविष्य खरे
ठरताच, तो खरोखर याहवेहने पाठविला आहे, असे समजले जात असे.”
10 यावर संदेष्टा हनन्याह याने यिर्मयाहच्या मानेवरील जू घेतले व ते
मोडले; 11 आणि तिथे जमलेल्या समुदायाला उद्देशून हनन्याह म्हणाला,
“याहवेह असे म्हणतात: याचप्रकारे बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर याने
सर्व राष्ट्रांच्या मानेवर ठेवलेले जोखड मी दोन वर्षात तोडून टाकेन.” हे
ऐकताच यिर्मयाह संदेष्टा तिथून चालता झाला. 12 संदेष्टा हनन्याहने
यिर्मयाहच्या मानेवरील जू मोडल्यानंतर याहवेहचे वचन यिर्मयाहला
आले: 13 “जा आणि हनन्याहला सांग, ‘याहवेह असे म्हणतात, तू
लाकडी जोखड मोडलेस, पण त्याऐवजी तुझ्या मानेवर लोखंडाची
जोखड येईल. 14 सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचे परमेश्वर असे म्हणतात:
या सर्व राष्ट्रांच्या मानेवर मी लोखंडी जोखड ठेवले आहे, त्यांना मी
बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरची गुलामगिरी करण्यास लावेन, व ते
करतील. मी वनपशूही त्याच्या ताब्यात देईन.’” 15 मग यिर्मयाह संदेष्टा
हनन्याहला म्हणाला, “हनन्याह, ऐक! याहवेहने तुला पाठविलेले नाही,
परंतु तू तुझ्या खोट्या संदेशावर विश्वास ठेवण्यास या राष्ट्रास विवश
केले. 16 म्हणून याहवेह असे म्हणतात: ‘मी तुला पृथ्वीतलावरून काढून
टाकणार आहे. याच वर्षी तुला मरण येईल, कारण तू याहवेहशी बंडखोरी
करण्याचा संदेश दिला आहेस.’” 17 यानंतर त्याच वर्षी, सातव्या
महिन्यात संदेष्टा हनन्याह मरण पावला.

**29** नबुखद्नेस्सरने यरुशलेमहून बाबेलला बंदिवासात नेलेल्या
लोकांपैकी अवशेष वडीलजनांना, याजकांना, संदेष्ट्यांना व
इतर सर्व लोकांना यिर्मयाहने लिहिलेल्या पत्राचा हा मजकूर आहे. 2
(राजा यकोन्याह, राजमाता, न्यायालयातील अधिकारी, यहूदाहचे व
यरुशलेमचे अधिकारी व कारागीर अशा सर्वांना यरुशलेमहून बाबेलला
बंदिवासात नेण्यात आले होते.) 3 यिर्मयाहने शाफानचा पुत्र एलासाह व
हिल्कियाहचा पुत्र गमऱ्याह यांच्याकडे सुपूर्द ते केले, जे यहूदीयाचा
राजा सिद्कीयाहने बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरकडे पाठविले. त्या
पत्रातील मजकूर असा: 4 यरुशलेमहून बाबिलोन येथे बंदिवान करून
आणलेल्या सर्वांना सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचे परमेश्वर यांचा हा
संदेश आहे: 5 “बाबेलमध्ये घरे बांधा व तिथे वस्ती करा; मळे लावा व
तेथील उत्पादन खा. 6 लग्न करा, पुत्र व कन्याचा जन्म होऊ द्या; आणि
तुमच्या पुत्रांसाठीही वधू शोधा व तुमच्या कन्यांचा विवाह करून द्या,
म्हणजे त्यांनाही पुत्र व कन्या होतील. तिथे बहुगुणित व्हा; पण ऱ्हास

नव्हे. 7 ज्या खास्द्यांच्या नगरात तुम्हाला बंदिवान म्हणून नेण्यात आले
आहे तिथे शांतता आणि समृद्धी नांदावी म्हणून प्रयत्न करा. खास्द्यांसाठी
याहवेहकडे प्रार्थना करा, कारण तिथे समृद्धी आल्यास तुम्हासही समृद्धी
लाभेल.” 8 होय, सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचे परमेश्वर असे म्हणतात:
“तुम्हामध्ये असलेल्या संदेष्टे व दैवप्रश्न करणारे त्यांच्या फसवेगिरीला
बळी पडू नका. त्यांनी स्वप्ने बघावी म्हणून तुम्ही त्यांना प्रोत्साहित केले
असेल तर ती स्वप्ने ऐकू नका. 9 कारण माझ्या नावाने ते खोटे संदेश
देतात. मी काही त्यांना पाठविले नाही,” असे याहवेह जाहीर करतात.
10 याहवेह असे म्हणतात: “बाबेलमध्ये सत्तर वर्षे पूर्ण झाल्यानंतर
मी तुमची भेट घेईन आणि तुम्हाला दिलेल्या उत्तम अभिवचनानुसार
पुन्हा तुम्हाला या ठिकाणी आणेन.” 11 याहवेह असे जाहीर करतात,
“कारण मी तुमच्यासाठी केलेल्या योजना मला माहीत आहेत, त्या
योजना तुमच्या भल्यासाठी आहेत, वाईटासाठी नाहीत, तुम्हाला आशा
व उज्वल भविष्यकाळ देण्याच्या त्या योजना आहेत. 12 मग तुम्ही
माझ्याकडे याल व माझी प्रार्थना कराल, तेव्हा त्या मी ऐकेन. 13
तुम्ही माझा शोध कराल, मनापासून माझा शोध कराल, तेव्हा मी
तुम्हाला सापडेन.” 14 याहवेह जाहीर करतात, “मी तुम्हाला आढळेन व
तुमच्या दास्यातून तुम्हाला परत आणेन, तुम्हाला ज्या सर्व राष्ट्रातून
व ठिकाणाहून इतर देशात बंदिवासात पाठविले, तर तुम्हाला त्याच
ठिकाणी परत आणेन,” असे याहवेह जाहीर करतात. 15 तुम्ही म्हणाल,
“याहवेहने बाबेलमध्ये आपल्यासाठी संदेष्टे उभे केले आहेत,” 16 परंतु
याहवेह असे म्हणतात, जो दावीदाच्या सिंहासनावर बसलेला राजा
आणि या नगरात उरलेल्या लोकांबद्दल आहे, जे तुमचे बांधव म्हणून
बंदिवासात गेले नाहीत— 17 होय, सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात:
“मी त्यांच्यावर तलवार, दुष्काळ व मरी पाठवेन, व त्यांना नासक्या
आणि खाण्यास अयोग्य अशा अंजिरासारखे करेन. 18 मी त्यांचा
तलवार, दुष्काळ व मरीने पाठलाग करेन, जगभरातील सर्व राष्ट्राचे
लोक त्यांची घृणा करतील, व त्यांना मी जिथेही हाकलून लावले तेथील
लोक शाप देतील, त्यांची नाचक्की करतील, त्यांची चेष्टा करतील. 19
कारण त्यांनी माझी वचने ऐकली नाही, माझी वचने घेऊन माझे सेवक
संदेष्टे मी त्यांच्याकडे पुनः पुन्हा पाठविले, परंतु तुम्ही बंदिवानांनीही
माझे ऐकण्यास नकार दिला,” असे याहवेह जाहीर करतात. 20 म्हणून
यरुशलेम येथून बाबिलोन येथे मी पाठविलेल्या सर्व यहूदी बंदिवानांनो,
आता याहवेहचे वचन ऐका. 21 सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचे परमेश्वर
कोलायाहचा पुत्र अहाब व मासेयाहचा पुत्र सिद्कीयाह या तुमच्या
खोट्या संदेष्ट्याविषयी असे म्हणतात: “त्यांचा तुमच्यासमोर जाहीरपणे
वध व्हावा म्हणून मी त्यांना बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरच्या हवाली
करणार आहे. 22 ज्या लोकांना यहूदीयामधून खास्द्यांमध्ये बंदिवान
म्हणून नेले, ते शाप देताना म्हणतील: ‘ज्याप्रमाणे बाबेलच्या राजाने
सिद्कीयाह व अहाब यांना जिवंत जाळले, त्यांच्याप्रमाणेच याहवेह
तुझे करो.’ 23 कारण त्यांनी इस्राएलमध्ये एक अति घृणास्पद कृत्य
केले आहे; त्यांनी आपल्या शेजाऱ्यांच्या स्त्रियांशी व्यभिचार केला,
आणि माझ्या नावाने खोटे संदेश दिले—जो अधिकार मी त्यांना दिला
नव्हता. हे मला माहीत आहे, कारण त्यांचे प्रत्येक कृत्य मी पाहिले
आहे,” असे याहवेह जाहीर करतात. 24 नेहेलामी शमायाह याला सांग,
25 “सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचे परमेश्वर असे म्हणतात: तू स्वतःच्या
नावाने मासेयाहचा पुत्र सफन्याह याजक याला, इतर सर्व याजकांना व
यरुशलेममधील प्रत्येकाला पत्रे लिहिली आहेस. तू सफन्याहला असे
म्हटले, 26 ‘यहोयादाच्या जागेवर याजक म्हणून याहवेहने तुला नेमले
आहे; म्हणून एखादा वेडा मनुष्य स्वतःला संदेष्टा म्हणवू लागला, तर
त्याला खोड्यात घालून लोखंडी गळपट्टा घालण्याची जबाबदारी तुझ्यावर
आहे. 27 मग तू या अनाथोथच्या यिर्मयाहला का फटकारले नाहीस, जो
स्वतःला संदेष्टा म्हणवितो? 28 कारण त्याने आम्हाला येथे बाबेलमध्ये
हा संदेश पाठविला आहे: आमचा बंदिवास दीर्घकाळचा आहे. आम्ही
येथे पक्की खरे बांधून वसती करावी; मळा लावावा व त्यातील उत्पादन
खावे.’” 29 याजक सफन्याह हे पत्र घेऊन यिर्मयाह संदेष्ट्याकडे गेला
व त्याने त्याला वाचून दाखविले. 30 तेव्हा याहवेहचे यिर्मयाहला हे वचन
मिळाले: 31 “खास्द्यांमध्ये बंदिवासात असलेल्या सर्वांना हा संदेश
पाठव: ‘नेहेलामी शमायाहविषयी याहवेह असे म्हणतात: कारण त्याला
मी पाठविले नसतानाही त्याने तुम्हाला संदेश दिला, आणि त्याच्या
खोट्या वचनावर विश्वास ठेवण्यास तुम्हाला विवश केले, 32 याहवेह
असे म्हणतात: मी नेहेलामी शमायाहला व त्याच्या वंशजांना निश्चितच
शिक्षा करेन. त्याच्या लोकांपैकी कोणीही हयात राहणार नाही, माझ्या
लोकांचे जे अभीष्ट मी करणार आहे, ते तो बघू शकणार नाही, असे
याहवेह जाहीर करतात, कारण माझ्याविरुद्ध बंडखोरी करण्याचा त्याने
संदेश दिला आहे.’”

**30** याहवेहकडून यिर्मयाहला हे वचन प्राप्त झाले: 2 “इस्राएलचे
परमेश्वर याहवेह असे म्हणतात: ‘मी तुला सांगितलेली सर्व वचने
एका नोंदवहीत लिहून ठेव. 3 याहवेह जाहीर करतात, असे दिवस
येत आहेत की जेव्हा मी इस्राएल आणि यहूदीयातील माझ्या लोकांना
बंदिवासातून परत आणेन व त्यांच्या पूर्वजांना मी वतन म्हणून दिलेल्या
भूमीवर पुनर्स्थापित करेन,’ असे याहवेह म्हणतात.” 4 इस्राएल व
यहूदीया यांच्यासंबंधी याहवेह असे म्हणतात: 5 “याहवेह म्हणतात:
“‘त्यांचा भयभीत आक्रोश ऐकू येत आहे— शांती नव्हे, तर दहशत. 6
विचारून पाहा: पुरुष मुले प्रसवू शकतात काय? मग प्रसूती वेदनांनी
व्याकूळ झालेल्या स्त्रियांप्रमाणे आपल्या पोटावर हात ठेऊन मेल्यागत
फिक्के पडलेल्या चेहऱ्याचे बलवान पुरुष मला का दिसत आहेत? 7
हाय हाय! तो दिवस किती भयंकर असेल! इतर कोणताही दिवस
असा नसेल. याकोबासाठी तो संकटकाळ असेल. पण तो यातून
वाचून बाहेर पडेल. 8 “कारण सर्वसमर्थ याहवेह जाहीर करतात, ‘त्या
दिवशी,’ मी त्यांच्या मानेवरचे जू मोडून टाकेन, त्यांच्या बेड्या तोडेन,
आणि यापुढे परकीय लोक त्यांना गुलाम करणार नाहीत; 9 याउलट,
ते व दावीद, त्यांचा राजा, ज्याला मी त्यांच्यातून उभारेन, ते त्यांचे
परमेश्वर याहवेहची सेवा करतील! 10 “‘म्हणून भिऊ नको! याकोबा,

माझ्या सेवका; हे इस्राएला, निराश होऊ नको,’ याहवेह असे जाहीर
करतात. ‘मी तुला निश्चितच दूरच्या देशातून, व तुझ्या वंशजांना त्यांच्या
बंदिवासातून वाचवेन. याकोबाला परत शांती व संरक्षण लाभेल आणि
त्यांना कोणीही भयभीत करणार नाही.’ 11 कारण याहवेह जाहीर
करतात, ‘मी तुझ्याबरोबर आहे आणि तुझी मुक्तता करेन. जरी ज्या
राष्ट्रात मी तुझी पांगापांग केली, त्या राष्ट्रांचा मी समूळ नायनाट केला,
तरी मी तुझा पूर्णपणे नायनाट करणार नाही. मी तुला योग्य शासन
करेन, पण ते मर्यादित; तुला शिक्षा केल्यावाचून सोडणार नाही.’ 12
“याहवेह असे म्हणतात: “‘तुझी जखम असाध्य आहे, तुझा घाव बरा
होण्यापलिकडे आहे. 13 तुझे समर्थन करण्यासाठी कोणीही नाही,
तुझ्या दुखापतीवर काहीही इलाज नाही, तुला आरोग्य प्राप्त होणार
नाही. 14 तुझे सर्व मित्रगण तुला विसरले आहेत; त्यांना तुझी चिंता
नाही; एखाद्या शत्रुगत मी तुला जखमी केले आहे निर्दयागत मी तुला
शासन केले, कारण तुझा अपराध फार मोठा आहे तुझी पातके पुष्कळ
झाली आहेत. 15 तुझ्या जखमेबद्दल तू विलाप का करतोस, तुझ्या
दुखण्यावर काहीही इलाज नाही का? कारण तुझा अपराध खूप मोठा व
तुझी पातके अनेक आहेत म्हणून मी तुझ्याशी असा व्यवहार केला. 16
“‘परंतु ज्यांनी तुला गिळंकृत केले, ते गिळंकृत केले जातील; तुझे सर्व
शत्रू बंदिवासात जातील. ज्यांनी तुला लुटले, तेच लुटले जातील; ज्यांनी
तुला लुबाडले, तेच लुबाडल्या जातील. 17 मी तुझे आरोग्य पुनर्स्थापित
करेन आणि तुझ्या जखमा बऱ्या करेन,’ याहवेह जाहीर करतात, ‘कारण
तू बहिष्कृत म्हणविली जात होती, सीयोन नगरी, जिची कोणासही
चिंता नाही.’ 18 “परंतु याहवेह असे म्हणतात: “‘मी तुझी धनसंपत्ती
तुला परत देईन, आणि याकोबाच्या निवासावर करुणा करेन; त्याच्या
भग्नावशेषांवरही नगरी पुन्हा बांधली जाईल आणि राजवाडा पुन्हा
त्याच्या ठराविक जागी उभारला जाईल. 19 तिथून उपकारस्तुतिगान
गाईले जातील आणि आनंदगीतांचे ध्वनी येतील. मी त्यांची लोकसंख्या
वाढवेन, पण त्यात घट होऊ देणार नाही; मी त्यांना प्रतिष्ठित करेन, पण
ते तुच्छ मानले जाणार नाहीत. 20 त्यांची मुलेबाळे पूर्ववत होतील, त्यांचे
समाज माझ्यासमोर स्थापित होतील; त्यांचा छळ करणाऱ्या सर्वांना
मी शिक्षा करेन. 21 त्यांना त्यांच्या स्वजनापैकीच राजा पुन्हा लाभेल;
त्यांचा शासनकर्ता त्यांच्यामधून उभारल्या जाईल. मी त्याला माझ्या
निकट आणेन आणि तो माझ्या निकट येईल, कारण माझ्या निकट
येण्यासाठी त्याने स्वतःस मला समर्पित केले पाहिजे ना?’ असे याहवेह
जाहीर करतात. 22 ‘तुम्ही माझे लोक व्हाल व मी तुमचा परमेश्वर
होईन.’” 23 पाहा, याहवेहचे भयावह वादळ पाहा. त्याचा प्रकोपात
स्फोट होईल, दुष्टांच्या मस्तकावर ते एका वावटळीप्रमाणे येईल. 24
याहवेहच्या अंतःकरणाचा उद्देश पूर्ण झाल्याशिवाय त्यांचा महाभयंकर
क्रोध शांत होणार नाही. पुढे येणाऱ्या दिवसात तुला हे कळेल.

**31** याहवेह जाहीर करतात, “त्याकाळी मी इस्राएलमधील सर्व
कुळांचा परमेश्वर असेन व ते माझे लोक असतील.” 2 याहवेह
जे म्हणतात ते असे: “जे तलवारीच्या प्रहारातून वाचले त्यांना रानात
अनुकूलता सापडेल इस्राएलला विश्रांती देण्यासाठी मी स्वतः येईन.” 3
कारण पूर्वी याहवेहने आम्हाला दर्शन दिले व म्हटले: “मी सार्वकालिक
प्रीतीने तुमच्यावर प्रीती केली आहे; मी अविनाशी प्रेमदयेने तुम्हाला
माझ्याकडे ओढून घेतले आहे. 4 मी तुला पुन्हा उभारेन, आणि तू,
इस्राएली कुमारिके, पुनर्वसित होशील. तू पुन्हा तुझे खंजीर घेशील
आणि बाहेर जाऊन आनंदाने नृत्य करशील. 5 शोमरोनच्या डोंगरावर तू
पुन्हा आपले द्राक्षमळे लावशील; शेतकरी ते मळे लावतील व स्वतःची
फळे खाण्याचा आनंद उपभोगतील. 6 ‘चला, उठा, आपण सीयोनकडे
जाऊ, आपले परमेश्वर याहवेहकडे, जाऊ या.’” पहारेकरी एफ्राईमच्या
टेकड्यांवरून अशी आरोळी मारण्याचा दिवस येत आहे, 7 याहवेह
असे म्हणतात: “याकोबासाठी हर्षाने गाणी गा; सर्वश्रेष्ठ इस्राएली
राष्ट्रासाठी गर्जना करा. तुमचे स्तुतिगान जाहीरपणे ऐकू यावे आणि
म्हणा, ‘याहवेह, आपल्या लोकांचे, इस्राएलाच्या अवशेषाचे तारण
करा’ 8 पाहा, मी त्यांना उत्तरेकडील देशातून आणेन आणि पृथ्वीच्या
दिगंतापासून गोळा करेन. त्यांच्यात आंधळे व पांगळे, गर्भवती स्त्रिया,
प्रसूती वेदना लागलेल्या माता असतील; फार मोठा समुदाय परत
येईल. 9 ते आनंदाश्रू ढाळतील. मी त्यांना परत आणतांना ते प्रार्थना
करतील. मी त्यांना जलप्रवाहाच्या बाजूने चालवेन समतल भूमीवरून
ते न अडखळता चालतील, कारण मी इस्राएलचा पिता आहे, आणि
एफ्राईम माझा ज्येष्ठपुत्र आहे. 10 “अहो राष्ट्रांनो, याहवेहचे वचन ऐका,
आणि दूरवरील सर्व सागरतीरांवर ते जाहीर करा: ‘ज्यांनी इस्राएली
लोकांना विखरले, तेच त्यांना एकत्र करतील. मेंढपाळाप्रमाणे आपल्या
कळपांची निगा राखतील.’ 11 याहवेह याकोबाची सुटका करतील
आणि त्यांच्यापेक्षा बलाढ्य राष्ट्रांपासून त्यांना सोडवितील. 12 ते येतील
आणि सीयोनाच्या टेकड्यांवर हर्षगीते गातील; याहवेहच्या विपुल
पुरवठ्यासाठी— धान्य, नवा द्राक्षारस, आणि जैतुनाचे तेल, गुरातील
व कळपातील पिल्लांसाठी आनंद करतील. भरपूर पाणी दिलेल्या
बागेप्रमाणे ते होतील आणि त्यांची सर्व दुःखे नाहीशी होतील. 13 त्या
समयी तरुण कुमारिका नृत्य करून हर्षावतील, तरुण व ज्येष्ठ लोकही
त्यात सहभागी होतील. कारण मी त्यांच्या विलापाचे आनंदात रूपांतर
करेन; मी त्यांचे सांत्वन करेन आणि दुःखाऐवजी त्यांना हर्ष प्रदान
करेन. 14 मी मंदिरातील याजकांना विपुल पुरवठ्याने समाधानी करेन,
आणि माझे लोक भरघोस साठ्याने तृप्त होतील.” असे याहवेह जाहीर
करतात. 15 याहवेह असे म्हणतात: “रामाह मधून आवाज ऐकू येत
आहे, शोक आणि घोर आकांत, राहेल आपल्या लेकरांसाठी रडत आहे.
ती सांत्वन पावण्यास नकार देते, कारण ते आता राहिले नाहीत.” 16
परंतु याहवेह असे म्हणतात: “तुझा रुदनस्वर आणि तुझ्या डोळ्यातील
अश्रू आता आवर, कारण तुझ्या कार्यास फलप्राप्ती होणार आहे,”
याहवेह असे जाहीर करतात “ते शत्रूच्या देशातून परत येतील. 17
तुझ्या वंशजासाठी आशा आहे,” याहवेह असे जाहीर करतात. तुझी मुले
आपल्या देशात परत येतील. 18 “मी एफ्राईमचे आक्रंदन निश्चितच
ऐकले: ‘तुम्ही मला अनावर वासराला लावावी तशी शिस्त लावली आहे,

आणि मी ही शिस्त ग्रहण केली आहे. मला पुन्हा माझ्या पूर्वस्थितीत
आणा, म्हणजे मी पूर्ववत होईन, कारण तुम्ही याहवेह, माझे परमेश्वर
आहात. 19 मी भरकटल्यानंतर, मला पश्चात्ताप झाला; मला समज
आल्यानंतर, मी दु:खातिशयाने ऊर बडवून घेतला. माझ्या तरुणपणाच्या
दिवसात मी जे आचरण केले, त्यामुळे मी लज्जित व अपमानित झालो
आहे.’ 20 हा एफ्राईम माझा लाडका पुत्र नाही का, जे माझे लेकरू,
मला अत्यंत सुखदायक? जरी मी बरेचदा त्याच्याविरुद्ध बोललो, तरी
मला आताही त्याची आठवण येते. म्हणून माझ्या मनाला त्याची ओढ
लागली आहे; मला त्याची अत्यंत दया येते.” असे याहवेह जाहीर
करतात. 21 “जाताना वाटेवर खुणा कर; दिशादर्शक लाव. तू गेलीस
तो महामार्ग ध्यानात ठेव, त्या मार्गावर लक्ष ठेव. हे इस्राएली कुमारी,
परत ये, तू आपल्या नगरांमध्ये परत ये. 22 अगे विश्वासघातकी कन्ये,
तू कुठवर भटकत राहणार? याहवेह पृथ्वीवर नवीन गोष्ट घडविणार
आहेत— स्त्री पुरुषाकडे परत येईल.” 23 सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचे
परमेश्वर असे म्हणतात: “मी जेव्हा बंदिवासातून त्यांना परत आणेन,
तेव्हा यहूदीयामधील व त्यांच्या नगरांमधील लोक असे म्हणतील: हे
समृद्ध नगरी, ‘हे पवित्र डोंगरा, याहवेह तुला आशीर्वादित करो’ 24 मग
यहूदीया नगरवासी—शेतकरी व कळप घेऊन फिरणारे मेंढपाळ सर्वच
एकत्र नांदतील. 25 मी थकलेल्यांना व मूर्छित झालेल्यांना ताजेतवाने
व संतुष्ट करेन.” 26 एवढ्यात मी जागा झालो व सभोवती पाहिले.
माझी झोप अत्यंत सुखद होती. 27 याहवेह जाहीर करतात, “असे
दिवस येत आहेत जेव्हा लोकांच्या व गुरांच्या वंशजाचे मी इस्राएल व
यहूदीयामध्ये रोपण करेन. 28 जसे त्यांना उपटून टाकताना व विदीर्ण
होतांना, जमीनदोस्त होतांना, नष्ट होतांना व विपत्ती येत असताना
लक्षपूर्वक नजर ठेवून होतो, तर पुन्हा त्यांचे रोपण व उभारणेही लक्ष
लावून बघेन,” असे याहवेह जाहीर करतात. 29 “लोक त्या दिवसात
पुन्हा म्हणणार नाहीत, ‘पालकांनी आंबट द्राक्षे खाल्ली, आणि मुलांचे
दात आंबले.’ 30 कारण प्रत्येकजण स्वत:च्या पापांमुळे मरेल; जो
कोणी आंबट द्राक्षे खाईल—त्याचेच दात आंबतील. 31 “असे दिवस
येतील जेव्हा, इस्राएलच्या लोकांशी व यहूदीयाच्या लोकांशी मी एक
नवीन करार करेन,” याहवेह म्हणतात. 32 “मी त्यांच्या पूर्वजांचा
हात धरून त्यांना इजिप्त देशातून बाहेर आणले, तेव्हा मी त्यांच्याशी
केलेल्या कराराप्रमाणे हा करार नसेल. मी जरी त्यांचा पती होतो, तरी
त्यांनी माझा करार मोडला.” असे याहवेह जाहीर करतात. 33 “परंतु
मी इस्राएलाच्या लोकांबरोबर करार करेन तो असा” याहवेह जाहीर
करतात, “त्या वेळेनंतर मी माझा नियम त्यांच्या मनात ठेवेन, आणि
ते त्यांच्या हृदयावर लिहेन, मी त्यांचा परमेश्वर होईन, आणि ते माझे
लोक होतील. 34 कोणीही आपल्या शेजाऱ्याला बोध करणार नाही,
किंवा ‘याहवेहला ओळखा’ असे कोणी कोणाला बोलणार नाही, कारण
लहानापासून ते थोरापर्यंत सर्वजण मला ओळखतील,” असे याहवेह
जाहीर करतात. “मी त्यांच्या दुष्कृत्यांची क्षमा करेन व यापुढे त्यांची
पापे स्मरणार नाही.” 35 याहवेह असे म्हणतात, दिवसा सूर्यप्रकाश
द्यावा म्हणून ज्यांनी सूर्याला नियुक्त केले, व रात्री प्रकाश देण्यासाठी
चंद्र व ताऱ्यांना आज्ञा दिली, गर्जना करणाऱ्या लाटा उसळाव्यात
म्हणून जे समुद्र ढवळतात; त्यांचे नाव सर्वसमर्थ याहवेह असे आहे:
36 “जर हे नियम माझ्या नजरेपुढून नाहीसे झाले तरच माझ्यापुढे
एक राष्ट्र म्हणून इस्राएलचे अस्तित्व समाप्त होईल.” याहवेह असे
जाहीर करतात. 37 याहवेह असे म्हणतात: “जर आकाशाचे मोजमाप
करता आले असते व पृथ्वीच्या पायांचा थांग लावता आला असता,
तर मी माझ्या इस्राएली लोकांच्या सर्व वंशजांना त्यांनी जे सर्व केले
त्याबद्दल त्यांना नाकारले असते,” याहवेह जाहीर करतात. 38 याहवेह
जाहीर करतात, “असे दिवस येत आहेत, कोपऱ्यातील हनानेलच्या
बुरुजापासून कोपऱ्याच्या वेशीपर्यंत या नगरीची पुनर्बांधणी होईल.
39 आणि गारेबच्या टेकडीपासून गोआहपर्यंत मापनसूत्र विस्तारित
केले जाईल. 40 संपूर्ण खोरे जिथे प्रेते व राख फेकण्यात येत असे, व
त्याचप्रमाणे किद्रोनच्या खोऱ्यापर्यंतची आणि तिथून पूर्वेकडील घोडवेशी
पर्यंतची सर्व शेते याहवेहला पवित्र अशी होतील. या नगराचा पुन्हा
कधीही पाडाव किंवा विध्वंस होणार नाही.”

**32** यहूदीयाचा राजा सिद्कीयाह याच्या राजवटीच्या दहाव्या वर्षी,
म्हणजे बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरच्या कारकिर्दीच्या अठराव्या
वर्षी, याहवेहकडून यिर्मयाहला पुढील वचन प्राप्त झाले: 2 यावेळी
बाबेलच्या राजाच्या सैन्याने यरुशलेमला वेढा घातलेला होता, व यिर्मयाह
संदेष्टा यहूदीयाच्या राजवाड्याच्या तळघरातील कोठडीत कैदेत होता. 3
यहूदीयाचा राजा सिद्कीयाहने यिर्मयाहला कैदेत टाकले, असे म्हणून,
“तू असा संदेश का देतोस? तू म्हणतोस याहवेह असे म्हणतात: ‘मी
आता बाबेलच्या राजाच्या हातात हे नगर देणार आहे, आणि तो ते
हस्तगत करणार आहे. 4 यहूदीयाचा राजा सिद्कीयाहची खास्द्यांच्या
हातून सुटका होणार नाही, पण तो निश्चितच बाबेलच्या राजाच्या
हातात पडेल व त्याच्याशी तो समोरासमोर बोलेल आणि सर्व स्वत:च्या
डोळ्याने बघेल. 5 तो राजा सिद्कीयाहला खास्द्यांच्या येथे नेईल व मी
येऊन तुझी भेट घेईपर्यंत तो तिथेच राहील, असे याहवेह जाहीर करतात.
जर तू बाबेलांशी युद्ध केलेस तरी तुला विजय मिळणार नाही.’” 6
यिर्मयाह म्हणाला, याहवेहकडून मला हे वचन आले आहे: 7 शल्लूमचा
पुत्र हानामेल, तुझा चुलतभाऊ, लवकरच येऊन तुला भेटेल व म्हणेल,
‘अनाथोथ येथील माझे शेत तू विकत घे, कारण तू माझा सर्वात जवळचा
नातेवाईक म्हणून ते विकत घेण्याचे तुझे कर्तव्य आहे.’ 8 “याहवेहने
म्हटल्याप्रमाणे माझा चुलतभाऊ हानामेल आला व त्याने तुरुंगात माझी
भेट घेतली. तो मला म्हणाला, ‘बिन्यामीन प्रांतातील अनाथोथ येथील
माझे शेत विकत घे, कारण कायद्याप्रमाणे ते सोडवून त्याची मालकी
घेण्याचा प्रथम हक्क तुझा आहे, म्हणून ते तुझ्यासाठी तू विकत घे.’
“तत्काळ माझी खात्री झाली की हा संदेश खरोखर याहवेहकडून आला
होता; 9 मग मी माझा चुलतभाऊ हानामेलला सतरा शेकेल चांदी देऊन
अनाथोथ येथील ते शेत विकत घेतले. 10 साक्षीदारांच्या सहीसमेत
मी खरेदीखतावर सही केली, त्यावर शिक्का मारला व चांदी तोलून

त्याला दिली. 11 नंतर मी शर्ती व अटी नमूद केलेले—मोहोरबंद केलेले
खरेदीखत घेतले, तसेच त्या खतपत्राची मोहोर न केलेली प्रत घेतली—
12 आणि सर्वांसमक्ष, माझा चुलतभाऊ हानामेल, खरेदीखतावर सह्या
करणारे साक्षीदार त्यांच्या समक्ष व सर्व यहूदी पहारेकऱ्यांच्या चौकात
बसले असताना, ती कागदपत्रे बारूख, जो नेरीयाहचा पुत्र, महसेयाहचा
नातू, याच्या स्वाधीन केली. 13 “सर्व लोक ऐकत असताना मी
नेरीयाहचा पुत्र बारूखाला या सूचना दिल्या: 14 ‘सर्वसमर्थ याहवेह,
इस्राएलचे परमेश्वर असे म्हणतात: मोहोरबंद खरेदीखत व त्याची प्रत ही
दोन्हीही घेऊन दीर्घकाळापर्यंत टिकून राहवी म्हणून ती मातीच्या एका
पात्रात घालून ठेव. 15 कारण सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचे परमेश्वर
असे म्हणतात: पुढे या देशामध्ये पुन्हा घरेदारे, शेते, द्राक्षमळे यांची
खरेदी करण्यात येईल.’ 16 “मग खरेदीखत नेरीयाहचा पुत्र, नेरीयाहचा
पुत्र बारूखच्या हवाली केल्यावर मी याहवेहकडे प्रार्थना केली. 17 “हे
सार्वभौम याहवेह, तुमच्या महान शक्तीने व विस्तारलेल्या भुजेने तुम्ही
स्वर्ग व पृथ्वी निर्माण केली आहे. तुम्हाला अवघड असे काहीच नाही.
18 तुम्ही हजारांवर प्रीती करता, परंतु वडिलांच्या पापांसाठी मुलांना
शिक्षा होतेच. परमथोर आणि सामर्थ्यवान, ज्यांचे नाव सर्वसमर्थ याहवेह
आहे. 19 तुमच्या योजना महान आहेत व तुमची कार्ये अद्वितीय आहेत.
सर्व मानवजातीचे मार्ग तुमच्या नेत्रांना उघड दिसतात; प्रत्येकाला तुम्ही
त्याच्या वागणुकीनुसार व कृत्यानुसार योग्य मोबदला देता. 20 तुम्ही
इजिप्त देशात, इस्राएलमध्ये व सर्व मानवजातीत चिन्हे व चमत्कार
केले व आजही करीत आहात, त्यामुळे तुमच्या नावाला आजतागायत
महान थोरवी लाभली आहे. 21 चिन्ह व चमत्कारांनी आणि सशक्त
बाहूंनी व विस्तारलेल्या भुजांनी, तसेच मोठी दहशत बसवून तुम्ही
तुमच्या इस्राएली लोकांना इजिप्तमधून बाहेर आणले. 22 आमच्या
पूर्वजांना दिलेल्या शपथपूर्वक वचनाप्रमाणे, तुम्ही इस्राएलला दूध व मध
वाहता देश दिला. 23 ते इथे आले व त्यांनी या देशाचा ताबा घेतला,
परंतु तुमचे आज्ञापालन करण्याचे व तुमचे नियम अनुसरण्याचे त्यांनी
नाकारले; म्हणूनच तुम्ही त्यांच्यावर हे सर्व अरिष्ट आणले आहे. 24
“पाहा, वेढा घालणाऱ्यांनी शहराचा ताबा घेण्यासाठी भिंत बांधली
आहे. तलवार, दुष्काळ व मरी यांच्यामुळे हे शहर हल्ला करणाऱ्या
खास्द्यांच्या हाती पडेल. तुम्ही जे होईल असे म्हटले होते, तेच आता
घडतांना तुम्ही बघू शकता. 25 सार्वभौम याहवेह, खास्द्यांच्या हाती
हे नगर दिले जाणार असूनही तुम्ही मला म्हणता, ‘चांदीची नाणी
देऊन शेत विकत घे आणि साक्षीदारांच्या सहीने खरेदीखत तयार
कर.’” 26 नंतर यिर्मयाहला याहवेहचे पुढील वचन आले: 27 “मी,
याहवेह, अखिल मानवजातीचा परमेश्वर आहे. मला कोणतीही गोष्ट
करणे अवघड आहे का? 28 म्हणून याहवेह असे म्हणतात: मी हे
नगर बाबिलोनचे लोक व बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर यांच्या हाती
देणार आहे, जो ते हस्तगत करेल. 29 हल्ला करणारे बाबिलोनचे
सैनिक आत शिरतील, आणि शहराला आग लावतील. माझा संताप
चेतविण्यासाठी ज्या घरांच्या धाब्यावरून बआलमूर्तीस धूप जाळण्यात
आला आणि दैवतांना पेयार्पणे वाहण्यात आली, ती सर्व घरे जाळून
टाकण्यात येतील. 30 “त्यांच्या तारुण्यापासून इस्राएलने व यहूदीयाने
माझ्या नजरेत दुष्कर्म करण्याशिवाय दुसरे काहीही केले नाही; खरोखर,
स्वतःच्या हस्तकृतींची उपासना करून माझा क्रोध भडकविण्याशिवाय
त्यांनी दुसरे काहीही केले नाही, असे याहवेह जाहीर करतात. 31 हे
शहर बांधले त्या दिवसापासून आतापर्यंत या शहराने माझा क्रोध व
संताप इतका भडकविला आहे की या शहराला मी आपल्या दृष्टीसमोरून
काढून टाकणार आहे. 32 इस्राएली व यहूदीयाच्या लोकांनी—ते, त्यांचे
राजे व अधिकारी, त्यांचे याजक व संदेष्टे, यरुशलेम नगरात व यहूदीयात
राहणाऱ्या लोकांनी त्यांच्या दुष्कर्मांने मला अत्यंत संताप आणला आहे.
33 त्यांनी माझ्याकडे त्यांचे मुख नव्हे तर पाठ फिरविली आहे; परत परत
मी त्यांना शिक्षण दिले, पण त्यांनी माझे ऐकले नाही किंवा माझ्या
शिस्तीस प्रतिसाद दिला नाही. 34 माझे नाव धारण केलेल्या मंदिरात
त्यांनी त्यांच्या अमंगळ मूर्तीची स्थापना केली व ते भ्रष्ट केले आहे. 35
बेन हिन्नोम खोऱ्यांमध्ये त्यांनी बआल दैवतासाठी उंच उंच वेद्या बांधल्या
आहेत. तिथे त्यांनी त्यांचे पुत्र व कन्या मोलख मूर्तीस अर्पण केले, हे
करण्याचे मी त्यांना कधीही आज्ञापिले नव्हते—असे माझ्या मनातही
कधी आले नव्हते—की ते अशी घृणास्पद कृत्ये करतील व यहूदीयास
पाप करण्यास लावतील. 36 “या नगराबद्धल तुम्ही असे म्हणता,
‘तलवार, दुष्काळ व मरी यामुळे हे शहर बाबेलच्या राजाच्या हाती
पडेल, परंतु याहवेह इस्राएलचे परमेश्वर असे म्हणतात: 37 परंतु माझ्या
महाक्रोधाने व उग्र कोपाने मी त्यांना ज्या देशात हाकलून दिले, त्या
सर्व देशातून मी माझ्या लोकांना एकत्र करेन; मी त्यांना याच ठिकाणी
परत आणेन आणि ते सुरक्षितपणे वस्ती करतील. 38 मग ते माझे
लोक होतील आणि मी त्यांचा परमेश्वर होईन. 39 मी त्यांना एकनिष्ठ
अंतःकरण व एकमात्र कार्य देईन, जेणेकरून ते नेहमी माझे भय धरतील
आणि त्यांचे व त्यांच्यानंतर त्यांच्या मुलाबाळांचे सर्वदा कल्याण होईल.
40 मी त्यांच्याबरोबर अनंतकाळचा करार करेन: मी त्यांचे कल्याण
करणे कधीही थांबविणार नाही, त्यांना माझे भय धरण्यास प्रोत्साहित
करेन, जेणेकरून ते माझ्यापासून कधीही विमुख होणार नाहीत. 41
त्यांचे कल्याण करण्यात मला आनंद वाटेल व माझ्या पूर्ण मनाने व
आत्म्याने मी त्यांना या देशामध्ये पुन्हा स्थापन करेन. 42 “याहवेह
म्हणतात ते असे: ही सर्व भयंकर संकटे मी या लोकांवर आणली,
म्हणून आता मी त्यांना अभिवचन दिल्याप्रमाणे समृद्धी देईन. 43 या
देशाबद्दल तुम्ही म्हणत, ‘हा देश उजाड झाला आहे, इथे माणसे आणि
पशू यांचा मागमूस राहिलेला नाही, कारण हा बाबिलोनचे लोकांच्या
हाती देण्यात आला होता,’ तिथे शेतांची खरेदी पुन्हा सुरू होईल. 44
बिन्यामीन प्रांतात, येथे यरुशलेममध्ये, तसेच यहूदीयाच्या शहरात,
डोंगराळ प्रदेशातील नगरात, पश्चिमेच्या तळवटीच्या प्रदेशात व नेगेवमध्ये
देखील चांदीची नाणी देऊन खरेदीखतांवर सह्या होतील, त्यावर शिक्का
मारला जाईल, साक्षीदारांच्या सह्या होतील, कारण मी त्यांची पूर्वीची
समृद्धी निश्चित परत देईन, असे याहवेह जाहीर करतात.”

**33** यिर्मयाह अद्यापही तुरुंगात असताना याहवेहचे त्याला दुसऱ्यांदा वचन आले: 2 “याहवेह असे म्हणतात, आकाश व पृथ्वी ज्यांनी निर्माण केली व स्थापित केली—ज्यांचे नाव याहवेह आहे, ते म्हणतात: 3 ‘मला हाक मार म्हणजे मी तुला उत्तर देईन, व तुला माहीत नसलेल्या महान आणि शोधता न येणाऱ्या गोष्टी तुला सांगेन.’ 4 याहवेह, इस्राएलचे परमेश्वर, या नगरातील जी घरे आणि यहूदीयातील राजवाडे वेढा देऊन व तलवारीच्या प्रहाराचा उपयोग करून पाडून टाकण्यात आले आहेत, त्याविषयी असे म्हणतात, 5 बाबेलांशी युद्ध करताना: ‘ज्या लोकांवर मी माझ्या कोपाने प्रहार करणार आहे, ते त्या लोकांच्या शवांनी भरून जातील. त्यांनी केलेल्या सर्व दुष्टतेमुळे मी या नगराला विमुख होईन. 6 “‘तरी देखील, मी यरुशलेमला आरोग्य व स्वास्थ्य प्रदान करेन; मी त्यांना आरोग्य देईन व विपुल शांती आणि सुरक्षितेचा आनंद उपभोगू देईन. 7 मी यहूदीया आणि इस्राएलना बंदिवासातून परत आणेन व त्यांची पुनर्बांधणी करून त्यांना पूर्ववत करेन. 8 त्यांनी माझ्याविरुद्ध केलेली सर्व पापे मी शुद्ध करेन, आणि माझ्याविरुद्ध बंडखोरी करून केलेल्या सर्व पापांची क्षमा करेन. 9 मग पृथ्वीवरील जी सर्व राष्ट्रे मी त्यांच्यासाठी केलल्या सर्व चांगल्या गोष्टी ऐकतील, त्यांच्यापुढे हे नगर मला बहुमानास्पद, आनंददायक, प्रशंसा व आदर देणारे होईल; माझ्या लोकांना मी प्रदान केलेली विपुल समृद्धी व शांती पाहून, त्या राष्ट्रांना दरारा व आदरयुक्त भीती वाटेल.’ 10 “याहवेह असे म्हणतात: ‘या नगराविषयी तुम्ही म्हणता, “हे उद्ध्वस्त झालेले ठिकाण आहे, इथे ना लोक राहतात ना पशू.” तरी देखील वैराण झालेल्या यहूदीयाच्या नगरात व यरुशलेमच्या रस्त्यांवर पुन्हा ते स्वर ऐकू येतील. 11 आनंद व हर्षाचे स्वर, वरांचे आणि वधूंचे आवाज आणि याहवेहला उपकारस्तुतीची अर्पणे आणणाऱ्यांची हर्षगीते पुन्हा ऐकू येतील. ते म्हणतील, “याहवेहला धन्यवाद द्या, कारण ते चांगले आहेत; त्यांची प्रीती सर्वकाळ टिकते.” मी हा देश आधी होती तशी समृद्धी परत देऊन पुनर्वसित करेन,’ याहवेह असे म्हणतात. 12 “याहवेह असे म्हणतात: ‘कोणीही मनुष्य व पशू नसलेल्या या उजाड ठिकाणी—यातील सर्व नगरात कळपांना विश्रांती मिळण्यासाठी मेंढपाळांना कुरणे मिळतील. 13 पश्चिमेकडील डोंगरातील गावात व तळवटीत, व नेगेवच्या गावात, बिन्यामीन प्रांतात, यरुशलेमच्या सभोवतालच्या प्रदेशात आणि यहूदीयाच्या सर्व नगरात, मोजणाऱ्यांच्या हाताखालून पुन्हा त्यांचे कळप जातील,’ असे याहवेह म्हणतात. 14 “‘असे दिवस येतील, जेव्हा इस्राएल व यहूदीयाला दिलेले अभिवचन मी पूर्ण करेन, याहवेह जाहीर करतात. 15 “‘त्या दिवसात व त्या समयी मी दावीदाच्या वंशातून एक नीतिमान शाखा पुन्हा उगवेन; आणि तो या राष्ट्रात न्यायाने व नीतीने कार्य करेल. 16 त्या दिवसात यहूदीयाचा बचाव होईल व यरुशलेम येथील लोक सुरक्षितपणे राहतील. याहवेह जे आमचे नीतिमान तारणकर्ता या नावाने संबोधित करण्यात येईल.’ 17 कारण याहवेह असे म्हणतात: ‘इस्राएलाच्या सिंहासनावर बसण्यासाठी दावीदाला वारसाचा अभाव कधीही होणार नाही. 18 तसेच माझ्या समक्षतेत निरंतर होमार्पणे, अन्नार्पणे व यज्ञार्पणे करण्यासाठी लेवीय याजकाचा अभाव कधीही होणार नाही.’” 19 नंतर यिर्मयाहला याहवेहकडून हे वचन आले: 20 “याहवेह असे म्हणतात, ‘मी दिवसाशी केलेला करार व रात्रीशी केलेला करार तुम्ही मोडू शकला, तर दिवस व रात्र योग्य समयी येणार नाहीत, 21 मग माझा सेवक दावीद याच्या बरोबरचा माझा करार—त्याचप्रमाणे माझ्या समक्षतेत उभे राहून सेवा करणारे लेवीय याजक यांच्या बरोबरचा माझा करार—भंग पावू शकेल आणि दावीदाच्या सिंहासनावर बसून राज्य करण्यास त्याचा कोणीही वंशज असणार नाही. 22 ज्याप्रमाणे आकाशातील तारे मोजता येत नाहीत व समुद्र किनाऱ्यावरील वाळूचे मापन करता येत नाही, त्याचप्रमाणे माझा सेवक दावीद याचे वंशज आणि माझी सेवा करणाऱ्या लेवी वंशज यांना मी असंख्य करेन.’” 23 याहवेहचे वचन यिर्मयाहला आले: 24 “लोक काय म्हणतात ते तुझ्या लक्षात आले आहे काय, ते म्हणतात, ‘याहवेहने निवडलेल्या यहूदीया व इस्राएल राज्यांचा त्याग केला’? म्हणून ते माझ्या लोकांची घृणा करतात आणि त्यांना एक राष्ट्र म्हणून ओळखत नाहीत. 25 यावर याहवेह असे म्हणतात: ‘जर मी रात्र व दिवस यांच्याशी करार केला नसता व आकाश व पृथ्वी स्थापित केले नसते, 26 तर मी अब्राहाम, इसहाक व याकोब यांच्या या वंशजांवर राज्य करण्यास याकोबाचे व माझा सेवक दावीदाचे वंशज नाकारले असते व दावीदाच्या पुत्राला निवडले नसते. पण मी त्यांची पूर्वीची समृद्धी त्यांना परत देईन व त्यांच्यावर दया करेन.’”

**34** बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर, त्याची संपूर्ण सेना व त्याच्या अंकित असलेल्या सर्व राज्यांच्या व लोकांच्या सेना, यरुशलेम व सभोवतालची सर्व नगरे यांच्याबरोबर युद्ध करीत असताना, यिर्मयाहला याहवेहकडून हे वचन आले: 2 “इस्राएलचे परमेश्वर, याहवेह असे म्हणतात: यहूदीयाचा राजा सिद्कीयाह, याला जाऊन सांग की याहवेह म्हणतात, ‘मी हे नगर बाबेलच्या राजाच्या हातात देईन व तो ते जाळून टाकील. 3 तू त्याच्या तावडीतून सुटणार नाहीस पण तू पकडल्या जाशील व त्याच्या हातात पडशील. तू स्वतःच्या डोळ्यांनी बाबेलच्या राजाला बघशील, आणि तो तुझ्याशी समोरासमोर बोलेल व तू बाबेलला जाशील. 4 “‘परंतु हे सिद्कीयाह, यहूदीयाच्या राजा, याहवेहचे हे वचन ऐक! याहवेह तुझ्याविषयी असे म्हणतात: तलवारीने तुझा वध होणार नाही; 5 पण तू शांतीने मरण पावशील. जसा तुझ्याआधी होऊन गेलेल्या राजांसाठी लोकांनी सन्मानदर्शक मृतकाग्नी जाळला, तसा तुझ्या सन्मानार्थही जाळतील आणि ते तुझ्यासाठी विलाप करून म्हणतील, “हाय हाय! आमच्या स्वामी!” मी स्वतः हे वचन देत आहे, असे याहवेह घोषित करतात.’” 6 त्याप्रमाणे यिर्मयाह संदेष्ट्याने यहूदीयाचा सिद्कीयाह राजाला यरुशलेममध्ये हे सर्वकाही सांगितले. 7 यावेळी बाबेलच्या राजाचे सैन्य यरुशलेमशी युद्ध करीत होते, यहूदीया प्रांतातील इतर नगरे—लाखीश व अजेकाह—अद्यापही टिकाव धरून होती. यहूदीयात एवढीच तटबंदी असलेली शहरे बाकी होती. 8 यहूदीयाचा राजा, सिद्कीयाह, याने सर्व गुलामांची मुक्तता करण्याचा यरुशलेममधील लोकांशी करार केल्यानंतर यिर्मयाहला याहवेहकडून

हे वचन आले. 9 प्रत्येकाने आपआपले इब्री दास व दासी यांना मुक्त
करावे; कोणत्याही यहूदी मनुष्याने दुसऱ्या यहूदी मनुष्यास बंदी बनवून
ठेऊ नये. 10 सर्व अधिपतींनी व लोकांनी हा करार स्वीकारला की
ते त्यांच्या दास व दासींना मुक्त करतील व यापुढे त्यांना बंदी बनवून
ठेवणार नाहीत. त्यांनी हे मान्य केले व सर्व दास व दासींना मुक्त केले.
11 पण नंतर त्यांनी आपले मन बदलले व मुक्त केलेल्या आपल्या
सेवकांना पुन्हा गुलाम केले. 12 मग यिर्मयाहला याहवेहकडून हे वचन
आले: 13 “इस्राएलचे परमेश्वर, याहवेह असे म्हणतात: मी तुमच्या
पूर्वजांना इजिप्तमधून बाहेर काढले, त्यांच्या गुलामगिरीतून बाहेर
आणले, त्यावेळी मी त्यांच्याशी एक करार केला होता. मी म्हटले,
14 ‘प्रत्येक सातव्या वर्षी कोणत्याही इब्री गुलामाला, ज्याने स्वतःस
तुम्हाला विकले होते, त्यांना तुम्ही मुक्त केले पाहिजे. सहा वर्षे त्यांनी
तुमची सेवा केल्यानंतर तुम्ही त्यांना मुक्त केले पाहिजे.’ तुमच्या पूर्वजांनी
मात्र माझे ऐकले नाही वा त्याकडे लक्ष दिले नाही. 15 अलीकडेच तुम्ही
पश्चात्ताप केला व माझ्या दृष्टीने योग्य ते केले: आपल्या लोकांची मुक्तता
करण्याची घोषणा केली. आम्ही तसे करू, असे तुम्ही मला माझे नाव
धारण केलेल्या मंदिरात शपथपूर्वक वचन दिले होते. 16 परंतु आता
तुम्ही मागे वळले व माझे नाव अपवित्र केले; प्रत्येकाने त्यांना हवे
तिकडे जाण्याचे स्वातंत्र्य असण्यास मुक्त केलेले दास व दासी परत
घेतले. यांना परत गुलाम होण्याची बळजबरी केली. 17 “म्हणून याहवेह
असे म्हणतात: तुम्ही माझी आज्ञा पाळली नाही; तुमच्या स्वतःच्या
लोकांची मुक्तता करण्याची घोषणा करीत नाही. म्हणून मी आता तुमची
‘मुक्तता’ करेन, असे याहवेह जाहीर करतात—युद्ध, दुष्काळ व मरी
यांच्याद्वारे तुम्हाला मरणाची ‘मुक्तता’ मिळेल. सर्व जगातील राज्यात मी
तुम्हाला घृणास्पद असे करेन. 18 ज्यांनी माझा करार मोडला व माझ्या
करारातील अटी पूर्ण करण्याचे नाकारले आहे, त्यांना ज्याप्रमाणे वासरू
कापून त्याचे दोन भाग करून त्यामधून चालत जावे, त्याचप्रमाणे मी
त्यांना वागवेन. 19 यहूदीया व यरुशलेममधील अधिपती, न्यायालयीन
अधिकारी, याजक व सामान्य लोक जे दोन भाग केलेल्या वासराच्या
मधून चालत गेले, 20 मी जे तुम्हाला ठार करू पाहतात त्या तुमच्या
शत्रूंच्या हवाली करेन. त्यांची प्रेते पक्षी व हिंस्र श्वापदांचे अन्न होतील.
21 “बाबेलच्या राजाचे सैन्य या शहरातून काही काळासाठी गेले असले,
तरी मी यहूदीयाचा राजा सिद्कीयाह व त्याचे अधिकारी यांना जे त्यांना
ठार करू पाहतात, त्या त्यांच्या शत्रूंच्या हवाली करेन. 22 मी हा आदेश
देणार आहे, असे याहवेह जाहीर करतात, मी त्यांना या शहरात परत
आणेन. ते पुन्हा या नगरांविरुद्ध लढतील, ते जिंकतील व त्यास जाळून
टाकतील. यहूदीयाची सर्व शहरे मी अशी ओसाड करेन जिथे कोणीही
वसती करू शकणार नाही.”

**35** योशीयाहचा पुत्र, यहोयाकीम, हा यहूदीयाचा राजा असताना,
यिर्मयाहला याहवेहकडून आलेले वचन हेच आहे: 2 “रेखाबी
लोकांच्या घराण्याकडे जा आणि त्यांना याहवेहच्या मंदिरातील एखाद्या
आतील खोलीत ने आणि द्राक्षारस प्यावयास दे.” 3 त्याप्रमाणे
याजन्याह, यिर्मयाहचा पुत्र, याजन्याहचा नातू, हबसिन्याहचा पुत्र,
तो, त्याचे भाऊ व सर्व पुत्र—म्हणजे पूर्ण रेखाबी कुटुंब यांना मी
भेटण्यास गेलो. 4 सर्वांना मी याहवेहच्या मंदिरात आणले व इग्दल्याह,
परमेश्वराच्या मनुष्याचा पुत्र, हानानाचे पुत्र जी खोली वापरीत असत,
त्या खोलीत त्यांना नेले. ही खोली राजवाड्याचे अधिकारी वापरीत
असलेल्या खोलीच्या बाजूस आणि मंदिराचा द्वारपाल शल्लूमचा पुत्र
मासेयाह, याच्या खोलीच्या बरोबर वर होती. 5 मग त्या रेखाबीसमोर मी
द्राक्षारसाचे कटोरे व काही पेले ठेवले आणि, “द्राक्षारस प्या,” असे
त्यांना म्हणालो. 6 परंतु त्यांनी द्राक्षारस घेण्यास नकार दिला. ते म्हणाले,
“आम्ही पीत नाही, कारण आमचा पूर्वज, रेखाबचा पुत्र योनादाब याने
आम्हाला अशी आज्ञा केली की, आम्ही किंवा आमच्या वंशजापैकी
कोणीही कधीही द्राक्षारस पिऊ नये. 7 त्या शिवाय आम्ही कधीही घरे
बांधू नयेत, बीज पेरणी करू नये, द्राक्षमळे लावू नयेत; यापैकी कशाचीही
मालकी पत्करू नये, तर आम्ही आजीवन तंबूंमध्येच राहावे. तर ज्या
भूमीवर आम्ही विमुक्त म्हणून वसती करू, तिथे दीर्घकाळ राहू. 8 आम्ही
आमचा पिता रेखाबचा पुत्र यहोनादाब याने आम्हाला दिलेल्या सर्व आज्ञा
पाळल्या आहेत. आम्ही, आमच्या पत्नींनी, पुत्रांनी वा कन्यांनी कधीही
द्राक्षारस प्याला नाही. 9 किंवा राहण्यासाठी घरे बांधली, वा द्राक्षमळे,
शेते अथवा पिके घेतली नाहीत. 10 आम्ही तंबूत राहिलो व आमचा
पिता योनादाब याने आम्हाला दिलेल्या सर्व आज्ञा तंतोतंत पाळल्या
आहेत. 11 परंतु जेव्हा बाबेलचा राजा, नबुखद्नेस्सरने या देशावर हल्ला
केला, आम्ही म्हटले, ‘चला, बाबिलोनचे व अराम्यांपासून आपला
बचाव करण्यासाठी आपण यरुशलेमला पलायन करू या.’ म्हणून
आम्ही यरुशलेम येथेच राहत आलो आहोत.” 12 नंतर यिर्मयाहला
याहवेहकडून हे वचन आले: 13 “सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचे परमेश्वर
असे म्हणतात: जा आणि यहूदीयाच्या लोकांना व जे यरुशलेममध्ये
राहतात त्यांना सांग, ‘रेखाबवंशातील घराण्याकडून तुम्ही काही धडा
शिकून माझी वचने का पाळली नाहीत?’ याहवेह असे जाहीर करतात.
14 ‘रेखाबचा पुत्र यहोनादाब याने त्याच्या वंशजांना आज्ञा दिली होती की
द्राक्षारस पिऊ नये, आणि ही आज्ञा त्यांनी पाळली. त्यांच्या पूर्वजांची
आज्ञा पाळण्याकरिता, आजतागायत ते द्राक्षारस पीत नाहीत. मी
तुमच्याशी पुन्हापुन्हा बोललो, पण माझ्या आज्ञा तुम्ही पाळल्या नाहीत.
15 पुन्हापुन्हा मी तुमच्याकडे माझे सेवक संदेष्टे पाठविले. ते म्हणाले,
“तुम्हा प्रत्येकाने आपल्या कुमार्गापासून मागे वळावे व आपल्या
आचरणात सुधारणा करावी; इतर दैवतांची सेवा करणे सोडून द्यावे. तर
मी जो देश तुम्हाला व तुमच्या पूर्वजांना दिला होता, त्या देशात तुम्ही
सुखरुपपणे राहाल.” परंतु तुम्ही त्याकडे लक्ष दिले नाही वा माझे ऐकले
नाही. 16 रेखाबचा पुत्र यहोनादाबच्या वंशजांनी आपल्या पित्याच्या
आज्ञा संपूर्णपणे पाळल्या आहेत, पण या लोकांनी माझ्या आज्ञा
पाळण्यास नकार दिला आहे.’ 17 “म्हणून सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचे
परमेश्वर असे म्हणतात: ‘ऐका! मी यहूदीयावर व यरुशलेमवर जी
अरिष्टे आणण्याची घोषणा केली होती ती अरिष्टे आणेन. मी त्यांच्याशी

बोललो, पण ते ऐकत नाहीत; मी हाक मारतो, तेव्हा ते उत्तर देत
नाहीत.'" 18 मग यिर्मयाह रेखाबी लोकांच्या कुटुंबाकडे वळून त्यांना
म्हणाला, "सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचे परमेश्वर असे म्हणतात: 'तुम्ही
तुमचे पूर्वज यहोनादाबचे प्रत्येक बाबतीत आज्ञापालन केले व त्याने
सांगितलेल्या सर्व गोष्टी केल्या.' 19 म्हणून सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचे
परमेश्वर असे म्हणतात: 'रेखाबचा पुत्र योनादाबच्या वंशामध्ये माझी
सेवा करणाऱ्यांचा कधीही अभाव होणार नाही.'"

**36** योशीयाहचा पुत्र, यहूदीयाचा राजा यहोयाकीम, याच्या
कारकिर्दीच्या चौथ्या वर्षी यिर्मयाहला याहवेहचे हे वचन आले:
2 "तू एक गुंडाळी घेऊन त्याच्यावर इस्राएल, यहूदीया व इतर राष्ट्रे
यांच्याविषयी योशीयाहच्या काळापासून आतापर्यंत मी जे सर्व संदेश देत
आलो आहे, ते लिही. 3 जी भयानक संकटे मी यहूदीयाच्या लोकांवर
आणणार आहे, ती त्यांनी चर्मपत्रावर लिहिलेली प्रत्यक्ष पाहिली, तर
कदाचित ते त्यांच्या दुष्टकर्मापासून मागे वळतील; मग मी त्यांच्या
दुष्कर्माची व पापांची क्षमा करेन." 4 तेव्हा यिर्मयाहने नेरीयाहचा
पुत्र बारूख, याला बोलावून त्याला याहवेहने सांगितलेली सर्व वचने
बोलून दाखविली आणि बारूखने ते चर्मपत्रावर लिहिले. 5 मग यिर्मयाह
नेरीयाहचा पुत्र बारूखला म्हणाला, "माझ्यावर इथे प्रतिबंध लावण्यात
आला आहे; मला याहवेहच्या मंदिरात जाण्याची परवानगी नाही. 6
म्हणून उपवासाच्या दिवशी तू याहवेहच्या मंदिरात जा आणि मी सांगून
तू चर्मपत्रावर लिहिलेली याहवेहची वचने वाचून दाखव. त्या दिवशी
यहूदीया प्रांताच्या नगरांतून आलेल्या सर्व लोकांना वाचून दाखव.
7 कदाचित ते याहवेहकडे क्षमेची याचना करतील व आपल्या दुष्ट
मार्गापासून वळतील, कारण या लोकांविरुद्ध याहवेहने उच्चारलेले संताप
व प्रकोप अत्यंत घोर आहेत." 8 यिर्मयाह संदेष्ट्याने सांगितल्याप्रमाणे
नेरीयाहचा पुत्र बारूखने ते सर्व केले; याहवेहच्या मंदिरात चर्मपत्रावर
लिहिलेली याहवेहची वचने लोकांना वाचून दाखविली. 9 योशीयाहचा
पुत्र राजा यहोयाकीम, याच्या कारकिर्दीच्या पाचव्या वर्षी नवव्या
महिन्यात यरुशलेममधील लोकास व जे यहूदीया प्रांतातील नगरातून
आले होते, त्या लोकास याहवेहपुढे उपवास करण्याची घोषणा करण्यात
आली होती. 10 शाफानचा पुत्र गमऱ्याह चिटणीस, याच्या याहवेहच्या
मंदिरात वरच्या सभागृहाच्या बाजूस नव्या द्वारातील प्रवेशमार्गाजवळील
कचेरीमध्ये नेरीयाहचा पुत्र बारूख यिर्मयाहची वचने लिहिलेले हे चर्मपत्र
वाचण्यासाठी गेला. 11 शाफानचा नातू, गमऱ्याहचा पुत्र, मिखायाह
याने चर्मपत्रावर लिहिलेली याहवेहची सर्व वचने ऐकली, 12 तेव्हा
तो राजवाड्यातील चिटणीसाच्या दालनात खाली गेला, तिथे सर्व
अधिकारी—एलीशामा चिटणीस, शमायाहचा पुत्र दलायाह, अकबोरचा
पुत्र एलनाथान, शाफानचा पुत्र गमऱ्याह, हनन्याहचा पुत्र सिद्कीयाह व
तसेच इतर सर्व वरिष्ठ अधिकारी मसलतीसाठी जमले होते. 13 नेरीयाहचा
पुत्र बारूखाने चर्मपत्रावर लिहिलेले वाचून दाखविलेले सर्व मिखायाहने
त्या अधिकाऱ्यांना सांगितले. 14 तेव्हा अधिकाऱ्यांनी कूशीचा पणतू,
शेलेम्याहचा नातू, नथन्याहचा पुत्र, यहूदी याच्या हाती नेरीयाहचा पुत्र
बारूखला सांगून पाठविले, "तू लोकांना वाचून दाखविलेले चर्मपत्र
घेऊन इकडे ये." त्याप्रमाणे नेरीयाहचा पुत्र बारूख हातात चर्मपत्र घेऊन
त्यांच्याकडे गेला. 15 ते त्याला म्हणाले, "कृपया, बसा, व आम्हाला
वाचून दाखवा." म्हणून नेरीयाहचा पुत्र बारूखाने त्यांना वाचून दाखविले.
16 जेव्हा त्यांनी ती सर्व वचने ऐकली, तेव्हा सर्व अधिकारी अतिशय
भयभीत नजरेने एकमेकांकडे बघू लागले व नेरीयाहचा पुत्र बारूखाला
म्हणाले, "या सर्व वचनांचा राजाला अहवाल दिलाच पाहिजे." 17
त्यांनी नेरीयाहचा पुत्र बारूखाला विचारले, "आम्हाला सांग, हे सर्व तू
कसे काय लिहिले? यिर्मयाहने सांगून तू हे लिहिले का?" 18 त्यावर
नेरीयाहचा पुत्र बारूखने म्हटले, "यिर्मयाहने ही वचने सांगितली व
मी ती चर्मपत्रावर शाईने लिहिली." 19 अधिकारी नेरीयाहचा पुत्र
बारूखला म्हणाले, "तू आणि यिर्मयाह दोघेही लपून राहा. तुम्ही कुठे
आहात हे कोणालाही कळवू नका." 20 नंतर अधिकाऱ्यांनी एलीशामा
चिटणीसाच्या खोलीमध्ये ते चर्मपत्र ठेवले आणि राजाला भेटण्यासाठी
ते राज्यसभेत गेले व ही सर्व गोष्ट त्यांनी राजाला सांगितली. 21 मग
राजाने यहूदीस ते चर्मपत्र आणण्यासाठी पाठविले, व यहूदीने चिटणीस
एलीशामाच्या खोलीमधून ते आणले आणि सर्व अधिकारी राजाजवळ
उभे असताना, त्याने तो राजाला वाचून दाखविले. 22 हा नववा महिना
असून राजा राजवाड्याच्या एका खास हिवाळी दालनात शेगडी पुढे
घेऊन शेकत बसला होता. 23 यहूदीने तीन-चार रकाने वाचून संपवली
की राजा वाचलेला भाग लेखनिकाच्या चाकूने तेवढा कापून विस्तवात
टाकी. असे संपूर्ण चर्मपत्र जळून नष्ट झाले. 24 राजा व त्याच्या इतर सर्व
सेवेकऱ्यांनी हे ऐकल्यानंतर भय वाटल्याचे दर्शविले नाही वा संतापाने
आपले वस्त्र फाडले नाही. 25 त्यावेळी एलनाथान, दलायाह व गमऱ्याह
या तिघांनी हे चर्मपत्र जाळू नये असे राजाला परोपरीने विनविले,
परंतु राजाने त्यांचे ऐकले नाही. 26 याउलट, राजाने राजपुत्र यरहमेल,
अज्रीएलचा पुत्र सेरायाह व अब्देलचा पुत्र शेलेम्याह यांना हुकूम केला
की त्यांनी नेरीयाहचा पुत्र लेखनिक बारूख व यिर्मयाह संदेष्टा यांना
अटक करावी. परंतु याहवेहने त्यांना लपवून ठेवले. 27 राजाने यिर्मयाह
संदेष्ट्याला सांगून नेरीयाहचा पुत्र बारूखाने लिहिलेली वचने असलेले
ते चर्मपत्र जाळून टाकल्यावर, यिर्मयाहला याहवेहची वचने आली:
28 "दुसरे एक चर्मपत्र घे व त्यावर यहूदीयाचा राजा यहोयाकीमने
जाळून टाकलेल्या पहिल्या चर्मपत्रावर लिहिलेली सर्व वचने लिहून
काढ. 29 याशिवाय यहूदीयाचा राजा यहोयाकीमला सांग, 'याहवेह असे
म्हणतात: तू ते चर्मपत्र जाळले व म्हटले, "बाबेलचा राजा निश्चितच
येईल व हा देश नष्ट करेल आणि मनुष्य व पशूंना पूर्णपणे नाहीसे
करेल, असे त्या चर्मपत्रावर का लिहिले?" 30 म्हणून यहूदीयाचा राजा
यहोयाकीमविषयी, याहवेह असे म्हणतात: दावीदाच्या राजासनावर
बसण्यासाठी त्याला कोणीही वारस असणार नाही; त्याचे प्रेत बाहेर
दिवसा उन्हामध्ये व रात्रीच्या हिवात पडून राहील. 31 मी त्याला, त्याच्या
लेकरांना व त्याच्या सेवेकऱ्यांना त्यांच्या सर्व दुष्टतेकरिता शिक्षा देईन;
मी पूर्वी म्हटल्याप्रमाणे त्यांच्यावर, तसेच यहूदीयात राहणाऱ्या लोकांवर

व यरुशलेम येथील सर्व लोकांवर घोषित केलेली अरिष्टे आणेन, कारण
त्यांनी माझे ऐकले नाही.'" 32 मग यिर्मयाहने पुन्हा दुसरे चर्मपत्र घेतले,
यहूदीयाचा राजा यहोयाकीमने जाळलेल्या चर्मपत्रावर लिहिलेली सर्व
वचने नेरीयाहचा पुत्र लेखनिक बारूखाला पुन्हा सांगून त्याच्याकडून
लिहून घेतली. आणि त्यासारख्या आणखी पुष्कळ वचनाची त्यामध्ये
भर घातली गेली.

**37** बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर याने यहोयाकीमचा पुत्र कोन्याह
याची यहूदीयाचा नवा राजा म्हणून नेमणूक केली नाही. त्याऐवजी
त्याने योशीयाहचा पुत्र सिद्कीयाह याची निवड केली. 2 याहवेह
यिर्मयाह संदेष्ट्याद्वारे जी वचने सांगत होते, त्याकडे सिद्कीयाह राजा,
त्याचे सेवेकरी व देशातील लोक यापैकी कोणीही लक्ष दिले नाही. 3
तरीपण सिद्कीयाह राजाने शेलेम्याहचा पुत्र यहूकल व मासेयाहचा पुत्र
सफन्याह याजक यांना यिर्मयाह संदेष्ट्याकडे अशी विनंती करण्यास
पाठविले: "तू आमच्यासाठी आमचे परमेश्वर याहवेह यांच्याकडे प्रार्थना
कर." 4 यावेळी यिर्मयाह अद्यापही बंदिवासात टाकला गेला नव्हता,
त्यामुळे तो आपल्या इच्छेप्रमाणे लोकांमध्ये जाणे-येणे करू शकत असे.
5 इजिप्तच्या फारोहच्या सैन्याने इजिप्तमधून कूच केले आहे, ही बातमी
जेव्हा बाबेल्यांनी ऐकली, तेव्हा त्यांनी यरुशलेमच्या वेढ्यापासून माघार
घेतली. 6 त्यावेळी यिर्मयाह संदेष्ट्याला याहवेहचे हे वचन आले: 7
"इस्राएलचे परमेश्वर याहवेह असे म्हणतात: यहूदीयाच्या राजाने माझा
संदेश विचारण्यासाठी तुला पाठविले आहे, तर त्याला सांग, 'फारोहचे
सैन्य इजिप्तमधून तुमच्या साहाय्यासाठी आले असले, तरी ते इजिप्तला
परत जातील. 8 बाबिलोनचे सैन्य माघारी येतील, हे शहर हस्तगत करून
ते जाळून जमीनदोस्त करतील.' 9 "याहवेह असे म्हणतात: 'बाबिलोनचे
सैन्याने आपल्याला निश्चितच सोडणार आहेत.' असा गैरसमज करून
घेऊ नका. ते सोडून जाणार नाहीत! 10 तू बाबेलच्या सैन्याचा पराभव
केलास, व त्यांच्यातील घायाळ झालेले सैनिकच त्यांच्या तंबूत उरले,
तरी ते बाहेर येतील व हे शहर पेटवून देतील!" 11 जेव्हा फारोहच्या
सैन्यामुळे बाबेलच्या सैन्याने यरुशलेमहून माघार घेतली, 12 तेव्हा
यिर्मयाह शहरातून बाहेर पडू लागला व बिन्यामीन प्रांतातील त्याने
विकत घेतलेल्या जमिनीचा ताबा घेण्यासाठी यरुशलेमहून निघाला.
13 परंतु तो बिन्यामीन वेशीतून बाहेर जात असता, हनन्याहचा नातू,
शेलेम्याहचा पुत्र इरीयाह या पहारेकऱ्याच्या प्रमुखाने त्याला पकडले व
यिर्मयाह संदेष्ट्याला म्हणाला, "तू बाबेलच्या सैन्यास फितूर झाला
आहेस!" 14 तेव्हा यिर्मयाह म्हणाला, "हे खोटे आहे! मी बाबेलच्या
सैन्यास फितूर झालो नाही." परंतु इरीयाहने त्याचे ऐकले नाही;
याउलट त्याने यिर्मयाहला अटक करून अधिकाऱ्यांपुढे उभे केले. 15
ते यिर्मयाहवर संतापले आणि त्यांनी त्याला फटके मारवले आणि
योनाथान चिटणीसाच्या घरात, जे त्यांनी कारागृह केले होते, त्यात
त्याला कैद केले. 16 यिर्मयाहास भुयारागत खोलीत ठेवण्यात आले.
तिथेच तो अनेक दिवस राहिला. 17 मग राजा सिद्कीयाहने यिर्मयाहला
मुक्त केले व राजवाड्यात आणले, आणि खाजगीरित्या विचारले,
"याहवेहकडून काही वचन आले आहे काय?" यिर्मयाह उत्तरला, "होय,
तुम्हाला बाबेलच्या राजाच्या हातात सोपविण्यात येणार." 18 नंतर
यिर्मयाहने सिद्कीयाह राजाला विचारले, "मी तुमच्याविरुद्ध किंवा
तुमच्या अधिकाऱ्यांविरुद्ध किंवा लोकांविरुद्ध कोणते पाप केले आहे, की
मला तुरुंगवासाची शिक्षा व्हावी? 19 बाबेलचा राजा तुमच्यावर किंवा या
देशावर हल्ला करणार नाही, असे तुम्हाला सांगणारे ते संदेष्टे आता कुठे
आहेत? 20 महाराज, माझे स्वामी, कृपया माझे ऐका. माझी विनंती
तुमच्यापुढे ठेऊ द्या: मला परत त्या योनाथान चिटणीसाच्या घरात पाठवू
नका, नाहीतर मी तिथे मरेन." 21 त्यावर यिर्मयाहला अंधारकोठडीत
पाठवू नये, तर त्याऐवजी राजवाड्यातील तुरुंगात ठेवावे, आणि शहरात
भाकरीचा पुरवठा संपेपर्यंत, त्याला रोज एक ताजी भाकर देण्यात
यावी, असा सिद्कीयाह राजाने हुकूम दिला. त्याप्रमाणे यिर्मयाहला
राजवाड्यातील पहारेकरांच्या अंगणात ठेवण्यात आले.

**38** परंतु यिर्मयाह लोकांना काय सांगत आहे हे मत्तानचा पुत्र
शफाट्याह, पशहूरचा पुत्र गदल्याह, शेलेम्याहचा पुत्र युकाल व
मल्कीयाहचा पुत्र पशहूर यांनी ऐकले. 2 यिर्मयाह सांगत होता, "याहवेह
असे म्हणतात: 'यरुशलेम नगरीमध्ये जे कोणी राहतील ते सर्व तलवार,
दुष्काळ व मरी यांना बळी पडतील. पण जे बाबिलोनचे सेनेला शरण
जातील ते जगतील. त्यांचा जीव वाचेल; ते जगतील.' 3 आणि याहवेह
असे म्हणतात: 'हे शहर निश्चितच बाबिलोनचे राजाच्या सेनेच्या हाती
देण्यात येईल, तो ते हस्तगत करेल.'" 4 मग हे ऐकताच अधिकारी
राजाकडे गेले व म्हणाले, "महाराज, या मनुष्याला जिवे मारलेच पाहिजे.
कारण याच्या बोलण्याने नगरात आपल्या उरलेल्या सैनिकांचे आणि
जनतेचेही मनोधैर्य खचत आहे, हा या लोकांच्या कल्याणाचे बोलत
नाही, तर त्यांच्या नाशाबद्दल बोलतो." 5 यावर सिद्कीयाह राजा
म्हणाला, "तो तुमच्या हातात आहे. राजा तुमच्या विरोधात काही करू
शकत नाही." 6 मग त्यांनी यिर्मयाहला बाहेर काढले व त्याला दोरांच्या
साहाय्याने राजपुत्र मल्कीयाह याच्या राजवाड्याच्या आवारातील एका
अंधार विहिरीत सोडले; त्यात पाणी नव्हते, पण तळाशी खूप गाळ
होता आणि यिर्मयाह त्या गाळात रुतला. 7 यिर्मयाहला राजवाड्यातील
अंधार विहिरीत टाकले आहे, हे वृत्त यरुशलेमच्या राजवाड्यातील एबेद-
मेलेख नावाच्या एका प्रमुख अधिकाऱ्याने ऐकले. तो कूशी देशाचा मूळ
रहिवासी होता. यावेळी राजा बिन्यामीन वेशीपाशी बसला होता. 8
एबेद-मेलेख लागलीच राजवाड्याच्या बाहेर गेला व राजाला म्हणाला,
9 "महाराज, माझे स्वामी, या माणसांनी यिर्मयाह संदेष्ट्याला अंधार
विहिरीत टाकले, हे फार वाईट कृत्य केले आहे. तिथे तो उपासमारीने
मरेल, कारण शहरातील सर्व भाकर संपली आहे." 10 मग राजाने कूशी
एबेद-मेलेखला सांगितले, "तू तीस माणसे घेऊन जा आणि यिर्मयाह
संदेष्टा मरण्याआधीच त्याला त्या अंधार विहिरीतून बाहेर काढ." 11
तेव्हा इथिओपी एबेद-मेलेखने माणसे घेतली आणि तो राजवाड्यातील
एका कोठारात गेला. तिथे टाकून दिलेल्या वस्तू व जुने कपडे ठेवलेले
होते. तिथून काही चिंध्या व जुने कपडे घेऊन तो अंधार विहिरीकडे गेला

व दोरीला बांधून ते बोचके त्याने खाली यिर्मयाहकडे विहिरीत सोडले.
12 कूशी एबेद-मेलेखने यिर्मयाहला सांगितले, “तुला दोऱ्या काचू नयेत
म्हणून या चिंध्या आपल्या बगलेत ठेव.” यिर्मयाहने त्याप्रमाणे केल्यावर
13 यिर्मयाहला त्यांनी ओढून अंधार विहिरीतून बाहेर काढले व परत
राजवाड्यातील अंगणात आणले व तिथे तो राहिला. 14 एके दिवशी
सिद्कीयाह राजाने निरोप पाठविला की यिर्मयाह संदेष्ट्याला याहवेहच्या
मंदिराच्या बाजूच्या देवडीत घेऊन यावे. राजा यिर्मयाहला म्हणाला,
“मी तुला काही विचारणार आहे. तर खरे तेच सांग. मजपासून काहीही
लपविण्याचा प्रयत्न करू नकोस.” 15 त्यावर यिर्मयाह सिद्कीयाह
राजा म्हणाला, “मी तुम्हाला उत्तर दिले, तर तुम्ही मला ठार करणार
नाही का? आणि मी तुम्हाला काही सल्ला जरी दिला तरी तुम्ही माझे
ऐकणार नाहीच.” 16 तेव्हा सिद्कीयाह राजाने यिर्मयाहला त्याचे
उत्पन्नकर्ता, सर्वसमर्थ याहवेह, यांची गुप्तपणे शपथ वाहिली: “मी
तुला ठार मारणार नाही किंवा तुझा जीव घेऊ पाहणाऱ्यांच्या हाती तुला
देणार नाही.” 17 मग यिर्मयाह सिद्कीयाहला म्हणाला, “सर्वसमर्थ
परमेश्वर याहवेह, इस्राएलचे परमेश्वर म्हणतात: तुम्ही बाबेलच्या राजाला
शरण गेलात तर तुमचा जीव वाचेल आणि हे शहर जाळण्यात येणार
नाही; तुम्ही व तुमचे घराणे जगेल. 18 परंतु तुम्ही बाबेलच्या राजाच्या
अधिकाऱ्यांना शरण जाण्याचे नाकारलेस, तर हे शहर बाबेल्यांच्या
हाती देण्यात येईल आणि ते या शहराला आग लावील आणि तुम्हीही
त्यांच्या हातून सुटणार नाहीस.” 19 यावर राजा सिद्कीयाह यिर्मयाहला
म्हणाला, “मला पुढे बाबेलला गेलेल्या यहूद्यांची भीती वाटते, कारण
बाबिलोनचे लोक मला यहूद्यांच्या हाती देतील व ते माझे हाल करतील.”
20 यिर्मयाहने उत्तर दिले, “ते तुम्हाला त्यांच्या हवाली करणार नाही.
तुम्ही याहवेहच्या आज्ञा पाळा व मी काय सांगतो ते करा. तर ते तुम्हाला
हितकारक ठरेल आणि तुमचा जीव वाचेल. 21 मात्र आत्मसमर्पण
करण्याचे नाकारले, तर याहवेहने मला हे प्रगट केले आहे: 22 तुमच्या
यहूदीयाच्या राजाच्या राजवाड्यात उरलेल्या सर्व स्त्रियांना बाहेर आणून
बाबिलोनच्या सरदारांच्या स्वाधीन केले जाईल, तेव्हा त्या स्त्रिया
तुम्हाला म्हणतील: “‘त्यांनी तुला चुकीच्या मार्गावर नेले व तुझ्यावर
मात केली— ते तुझे विश्वसनीय मित्र. तुझी पावले आता गाळात रुतली
आहेत; त्यांनी टाकून दिले आहे.’ 23 “तुमच्या सर्व स्त्रिया व मुले यांना
बाबिलोनच्या लोकांच्या हवाली केले जाईल, आणि तुम्हीही त्यांच्या
हातून सुटणार नाही. बाबिलोनचा राजा तुम्हाला पकडेल आणि हे शहर
जळून खाक होईल.” 24 मग सिद्कीयाह यिर्मयाहला म्हणाला, “या
चर्चेबद्दल कोणाला काही कळू देऊ नकोस, नाहीतर तुझा वध होईल. 25
मी तुझ्याशी बोललो, हे माझ्या अधिकाऱ्यांना कळले, व ‘आम्हाला सांग,
राजाला तू काय सांगितले व राजाने तुला काय सांगितले; काहीही लपवू
नकोस नाहीतर, आम्ही तुला ठार करतो,’ अशी त्यांनी तुला धमकी
दिली, 26 तर त्यांना एवढेच सांग, ‘योनाथानच्या घरच्या अंधारकोठडीत
मला पुन्हा पाठवू नका, नाहीतर तिथे मी मरेन, एवढीच विनवणी मी
राजाला केली.’” 27 सर्व नगराधिकारी यिर्मयाहकडे आले व त्याला
प्रश्न विचारू लागले. तेव्हा राजाने आज्ञापिल्याप्रमाणे यिर्मयाहने त्यांना
सांगितले. मग त्यांनी त्याला काहीही विचारले नाही व राजाशी त्याचा
झालेला संवाद कोणीही ऐकला नव्हता. 28 आणि बाबिलोनच्या लोकांनी
यरुशलेम पुन्हा जिंकून घेईपर्यंत, यिर्मयाह राजवाड्यातील अंगणात
राहिला. यरुशलेमचा अशाप्रकारे पाडाव झाला.

**39** यहूदीयाचा राजा सिद्कीयाह याच्या कारकिर्दीच्या नवव्या वर्षी,
दहाव्या महिन्याच्या दहाव्या दिवशी, बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर
आपले सर्व सैन्य घेऊन यरुशलेमवर चालून आला व त्याभोवती वेढा
घातला. 2 आणि सिद्कीयाह राजाच्या राजवटीच्या अकराव्या वर्षी,
चौथ्या महिन्याच्या नवव्या दिवशी त्यांनी नगराच्या तटाला खिंड पाडली.
3 बाबिलोनच्या सैन्यातील सर्व अधिकारी—सामगरचा नेरगल-शरेसर
उच्चाधिकारी, प्रमुख अधिकारी नेबो-सर्सखीम, उच्चाधिकारी नेर्गल-
शरेसर व बाबिलोनच्या राजाचे इतर सर्व अधिकाऱ्यांनी आत प्रवेश
केला व ते मधल्या वेशीत येऊन बसले. 4 हे पाहताच यहूदीयाचा राजा
सिद्कीयाह व त्याचे सैनिक रात्रीच्या वेळी शहर सोडले, त्यांनी राजाच्या
बागेजवळ दोन भिंतीमध्ये असलेल्या वेशीतून अराबाहच्या दिशेने पळून
गेले. 5 परंतु बाबेलच्या सैन्याने त्यांचा पाठलाग केला व सिद्कीयाहला
यरीहोच्या मैदानात पकडले व बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर, याच्याकडे
हमाथ राज्यातील रिब्लाह या शहरात आणण्यात आले. त्या ठिकाणी
सिद्कीयाला शिक्षा सुनाविण्यात आली. 6 बाबेलचा राजाने रिब्लाहात
सिद्कीयाहच्या डोळयादेखत त्याच्या मुलांचा वध केला व यहूदीयाचे
सर्व प्रतिष्ठित लोक यांचाही वध केला. 7 मग त्याने सिद्कीयाहचे डोळे
उपटून काढले आणि त्याला बाबेलास बंदिवान म्हणून पाठविण्यासाठी
कास्याच्या साखळयांनी बांधले. 8 बाबेलच्या सैन्याने राजवाडा आणि
लोकांची घरे जाळली आणि यरुशलेमचे तट पाडून टाकले. 9 मग
गारद्यांचा सरदार नबुजरदान याने शहरात उरलेल्यांना, त्यांना पूर्वीच
फितूर झालेल्या सर्वांना व शेष लोकांना बाबेलला बंदिवासात घेऊन
गेला. 10 परंतु सर्व यहूदाह प्रांतात त्याने अगदी गरीब असलेल्या
लोकांना, ज्यांच्याकडे काहीही नव्हते त्यांना नबुजरदानने तिथेच राहू
दिले व त्यांना शेते आणि द्राक्षमळे दिले. 11 आता बाबेलचा राजा
नबुखद्नेस्सरने गारद्यांचा सरदार नबुजरदानला यिर्मयाहविषयी अशी
आज्ञा दिली: 12 “त्याला ताब्यात घेऊन त्याची नीट काळजी घ्या;
त्याला काही इजा होऊ देऊ नका व तो मागेल ते त्याला द्या,” 13
त्याप्रमाणे गारद्यांचा सरदार नबुजरदान, खोजांचा प्रमुख नबूशजबान व
राजाचा सल्लागार नेरगल-शरेसर व बाबिलोनचे इतर उच्चाधिकारी यांनी
14 सैनिक पाठवून यिर्मयाहला पहारेकऱ्यांच्या आंगणातून बाहेर आणले
व त्याला परत त्याच्या घरी नेण्यासाठी शाफानचा नातू व अहीकामचा
पुत्र गदल्याह याच्याकडे सोपविले. मग यिर्मयाह देशामध्ये उरलेल्या
त्याच्या लोकांमध्ये राहिला. 15 यिर्मयाह पहारेकऱ्यांच्या आंगणातच
असताना त्याला याहवेहचे वचन आले: 16 “जा आणि कूशी एबेद-
मेलेखला सांग, ‘सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचे परमेश्वर असे म्हणतात:
मी या शहराविरुद्ध दिलेली माझी वचने पूर्ण करण्याची वेळ आली

आहे—समृद्धी नव्हे तर विध्वंस. तुझ्या डोळ्यादेखत मी ते पूर्ण करेन.
17 परंतु त्या दिवशी तुझी मात्र मी सुटका करेन, असे याहवेह जाहीर
करतात; ज्यांची तुला भीती वाटते, त्यांच्या हातात तुला देणार नाही.
18 मी तुला वाचवेन; तलवारीने तुझा वध होणार नाही, पण मी तुझा
जीव वाचवेन, कारण तू माझ्यावर भिस्त ठेवलीस, असे याहवेह जाहीर
करतात.'"

**40** पहारेकऱ्यांचा नायक नबुजरदान याला, बाबिलोन येथे बंदिवासात
यरुशलेम व यहूदीया येथील जे लोक पाठविले जाणार होते,
त्यांच्याबरोबर यिर्मयाह साखळदंडात बांधलेला आढळला. तेव्हा त्याने
त्याला रामाह येथे नेले, त्याची सुटका केली. यानंतर यिर्मयाहला
याहवेहचे वचन आले. 2 पहारेकऱ्यांच्या नायकाला जेव्हा यिर्मयाह
सापडला, तेव्हा त्याने त्याला बोलावून म्हटले, "तुझे परमेश्वर याहवेहने
या देशावर हे सर्व अरिष्ट आणण्याचा निवाडा केला होता. 3 आणि
जसे त्यांनी पूर्वी सांगितलेच होते, आता तसा हा अनर्थ ओढवला आहे;
हे सर्व यामुळे घडले, कारण या लोकांनी याहवेहची आज्ञा न पाळता
त्यांच्याविरुद्ध पाप केले. 4 आज मी तुझ्या हातातील बेड्या काढून
तुला मोकळे करतो. माझ्याबरोबर बाबेलला यावे अशी तुझी इच्छा
असेल तर चल. मी तुझा सांभाळ करेन; पण तिकडे यावे असे तुला
वाटत नसेल, तर येऊ नकोस. संपूर्ण देश तुझ्यासमोर आहे, तुझ्या
मनात येईल तिकडे जा." 5 यिर्मयाह वळून त्याच्यापुढून जाण्याआधी
नबुजरदान म्हणाला, "शाफानचा पुत्र अहीकाम याचा पुत्र गदल्याह
याच्याकडे परत जा. त्याला बाबेलच्या राजाने यहूदीया प्रांतातील
नगरांवर राज्यपाल नेमले आहे. त्याच्यासह या लोकांबरोबर राहा किंवा
तुझ्या मर्जीप्रमाणे तुला पाहिजे तिकडे जा." नंतर नबुजरदानने त्याला
शिदोरी व भेट दिली व त्याला सोडून दिले. 6 तेव्हा यिर्मयाह मिस्पाह येथे
अहीकामचा पुत्र गदल्याहकडे गेला व देशातील उरलेल्या लोकांमध्ये
राहिला. 7 अजूनही मोकळ्या मैदानात असणारे सर्व सेनेचे अधिकारी
आणि त्यांच्या माणसांनी ऐकले की बाबेलच्या राजाने अहीकामचा
पुत्र गदल्याहची देशाचा राज्यपाल म्हणून नेमणूक केली आहे, आणि
अत्यंत गरीब असे पुरुष, स्त्रिया व लेकरे व ज्यांना बाबेलास बंदिवासात
नेले नाही अशांवर अधिकारी केले आहे. राज्यपाल म्हणून गदल्याहचा
पुत्र अहीकामची नेमणूक केली आहे, 8 तेव्हा ते म्हणजे नथन्याहचा
पुत्र इश्माएल, कोरहाचे पुत्र योहानान व योनाथान, तन्हुमेथचा पुत्र
सेरायाह, नटोफाथी एफै याचे पुत्र, व माकाथी यजन्याह व त्यांचे लोक
गदल्याहकडे मिस्पाह येथे आले. 9 शाफानचा पुत्र अहीकाम याचा पुत्र
गदल्याह याने त्यांना व त्यांच्या लोकांना पुन: खात्री देण्यासाठी शपथ
घेतली. तो म्हणाला, "खास्द्यांच्या अधिकाऱ्यांची सेवा करण्यास भिऊ
नका, देशात स्थायिक व्हा आणि बाबेलच्या राजाची सेवा करा, आणि
तुमचे बरे होईल. 10 मी स्वत: मिस्पाह येथे राहीन. माझ्या कारभाराची
पाहणी करावयास बाबिलोनचे अधिकारी येतील, तेव्हा त्यांच्याकडे मी
तुमच्यासाठी मध्यस्थी करेन. द्राक्षांचे पीक गोळा करा, उन्हाळी फळे व
जैतुनाची फळे गोळा करा व ती साठवून ठेवा. तुमच्या मनाला येईल
त्या शहरात राहा." 11 यहूदीया प्रांतामध्ये अजून काही लोक उरले
आहेत, बाबेलच्या राजाने सर्वांनाच कैद करून नेले नाही व शाफानचा
नातू, अहीकामचा पुत्र गदल्याह हा राज्यपाल म्हणून नियुक्त झाला
आहे, असे मोआब, अम्मोन, एदोम, या प्रांतात व आजूबाजूच्या देशात
असलेल्या यहूद्यांनी ऐकले, तेव्हा 12 तेही जिथे विखरून गेले होते, तिथून
यहूदीया प्रांतात मिस्पाह येथे गदल्याहकडे आले. नंतर त्यांनी द्राक्षारस
आणि उन्हाळी फळे या पिकांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन केले. 13
कारेहपुत्र योहानान व मोकळ्या रानातील सैनिकांचे प्रमुख मिस्पाह
येथे गदल्याहकडे आले, 14 व तो गदल्याहला सतर्क करून म्हणाला,
"अम्मोनी लोकांचा राजा बालीस, याने नथन्याहचा पुत्र इश्माएल,
याला तुझा वध करण्यास पाठविले आहे, हे तुला माहीत नाही काय?"
परंतु अहीकामचा पुत्र गदल्याहने त्याच्यावर विश्वास ठेवला नाही. 15
नंतर कारेहाचा पुत्र योहानानने मिस्पाह येथे गदल्याहशी गुप्तपणे चर्चा
केली व त्याला म्हटले, "मी नथन्याहचा पुत्र इश्माएलचा वध करतो,
कोणालाही कळणार नाही. त्याला तुमचा वध का करू द्यावा, जे यहूदी
गोळा होऊन तुझ्याकडे परतले आहेत, त्यांची पांगापांग होऊन उरलेल्या
यहूदीयाचा नाश का होऊ द्यावा?" 16 परंतु अहीकामचा पुत्र गदल्याह
कारेहाचा पुत्र योहानानला म्हणाला, "अशी कोणतीही गोष्ट तू करू नये!
कारण तू इश्माएलबद्दल खोटे सांगत आहेस."

**41** परंतु सातव्या महिन्यात एलीशामाचा पुत्र नथन्याह याचा पुत्र,
इश्माएल, जो राजघराण्यातील व राजाच्या उच्चाधिकाऱ्यांपैकी
एक होता. हा आपल्याबरोबर दहा माणसे घेऊन मिस्पाह येथे
अहीकामचा पुत्र गदल्याहस भेटण्यासाठी आला. ते सर्व भोजन करीत
असताना, 2 नथन्याहचा पुत्र इश्माएल व त्याच्या सोबतीची दहा
माणसे एकाएकी उठली. त्यांनी तलवारी उपसल्या व ज्याची बाबेलच्या
राजाने राज्यपाल म्हणून नेमणूक केली होती, तो शाफानचा नातू,
अहीकामचा पुत्र गदल्याहस, ठार मारले. 3 नंतर त्याने गदल्याह
बरोबर मिस्पाह येथे असलेले यहूदीयातील अधिकारी व बाबिलोनचे
सैनिक यांचीही इश्माएलाने कत्तल केली. 4 गदल्याहाच्या खुनाच्या
दुसऱ्या दिवशी, कोणालाही हे समजण्यापूर्वी, 5 याहवेहच्या मंदिरामध्ये
उपासना करण्यासाठी शेखेम, शिलोह व शोमरोनात येथून ऐंशी माणसे
मिस्पाहच्या रोखाने आली. त्यांच्या दाढ्या काढल्या होत्या. त्यांनी
आपले कपडे फाडले होते, तसेच त्यांनी स्वत:ला जखमा करून घेतल्या
होत्या; त्यांनी बरोबर अर्पणे व ऊद आणली होती. 6 नथन्याहचा
पुत्र इश्माएल रडत त्यांना भेटण्यासाठी मिस्पाह शहरातून निघाला व
म्हणाला "चला! आपण अहीकामचा पुत्र गदल्याहची भेट घेऊ." 7
मग ते सर्वजण शहराच्या आत आल्यावर, नथन्याहचा पुत्र इश्माएल व
त्याची माणसे यांनी त्यांच्यापैकी दहा जणांना सोडून बाकी सर्वांना जिवे
मारले व त्यांची प्रेते एका विहिरीत टाकली. 8 त्यापैकी दहाजणांनी
इश्माएलशी बोलणे केले, "तू आम्हाला ठार मारू नको! आम्ही गहू,
जव, तेल व मध यांचे मोठे साठे एका शेतात लपवून ठेवले आहेत."
म्हणून त्याने इतरांसह त्यांचा वध न करता त्यांना सोडून दिले. 9

वध केलेल्या लोकांचे व गदल्याहचे प्रेत नथन्याहचा पुत्र इश्माएलने
ज्या विहिरीत टाकले होते, ती भली मोठी विहीर, इस्राएलचा राजा
बाशा, याच्यापासून आपले संरक्षण करण्याकरिता आसा राजाने बांधली
होती. नथन्याहचा पुत्र इश्माएलने ती विहीर प्रेतांनी भरून टाकली.
10 नथन्याहचा पुत्र इश्माएलने पहारेकऱ्यांचा नायक नबुजरदान याने
मिस्पाहमध्ये अहीकामचा पुत्र गदल्याहच्या स्वाधीन केलेल्या लोकांना
व राजकन्यांना आणि उरलेल्या सर्वांनाही ताब्यात घेतले. सर्व कैद्यांना
त्याने बरोबर घेऊन तो पलीकडील अम्मोनी लोकांकडे चालू लागला. 11
परंतु कारेहपुत्र योहानान व इतर सर्व सेना प्रमुखांनी नथन्याहचा पुत्र
इश्माएलने केलेल्या गुन्ह्याबद्दल ऐकले, 12 तेव्हा त्यांनी आपले सर्व लोक
गोळा केले आणि नथन्याहचा पुत्र इश्माएलशी युद्ध करण्यास ते निघाले.
गिबोनजवळच्या महाकुंडापाशी त्यांनी त्याला गाठले. 13 इश्माएल
बरोबरच्या लोकांनी कारेहचा पुत्र योहानान व त्याच्यासोबत असलेल्या
सरदारांना पाहताच आनंदाने जयघोष केला. 14 इश्माएलने मिस्पाह येथे
बंदिवान म्हणून नेलेले सर्व लोक वळले व कारेहपुत्र योहानानला जाऊन
मिळाले. 15 परंतु नथन्याहचा पुत्र इश्माएल, योहानानपासून सुटून
त्याच्या आठ माणसांसह अम्मोन्यांकडे पळून गेला. 16 मग कारेहापुत्र
योहानान व त्याच्यासोबत असलेल्या सेनाधिकाऱ्यांनी अहीकामचा पुत्र
गदल्याहचा नथन्याहचा पुत्र इश्माएलने वध केल्यानंतर मिस्पाह इथे
उरलेल्या लोकांना—सैनिक, स्त्रिया, मुले व गिबोन येथून सोडविलेले
राजदरबारातील अधिकारी यांना घेऊन ते निघाले. 17 इजिप्त येथे
जाण्याच्या उद्देशाने ते बेथलेहेम नजीकच्या गेरूथ किमहाम या गावी गेले.
18 त्यांना बाबिलोनच्या लोकांचे भय वाटू लागले व ते त्यांना चुकविण्याचा
प्रयत्न करू लागले, कारण नथन्याहचा पुत्र इश्माएलने बाबिलोनच्या
राजाने देशाचा राज्यपाल म्हणून नियुक्त केलेल्या अहीकामचा पुत्र
गदल्याहचा वध केला होता.

**42** मग सर्व सैन्यप्रमुख म्हणजे कारेहाचा पुत्र योहानान, होशयाहचा
पुत्र यजन्याह, व लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्व लोक 2
यिर्मयाह संदेष्ट्याकडे आले आणि त्याला म्हणाले, “आम्ही सर्व
उरलेल्या लोकांसाठी याहवेह, तुझे परमेश्वर यांची प्रार्थना कर. कारण
आम्ही पूर्वी पुष्कळ होतो, आता फारच थोडे उरलो आहोत, हे तू
पाहतोस. 3 आम्ही काय करावे, कुठे जावे हे आम्हाला दाखवावे, म्हणून
याहवेह, तुझ्या परमेश्वराला विनवणी कर.” 4 यिर्मयाह संदेष्ट्याने उत्तर
दिले, “मी तुमचे ऐकले आहे, मी निश्चितच याहवेह, तुमचे परमेश्वर
यांच्याकडे तुमच्या विनवणीप्रमाणे प्रार्थना करतो; आणि ते काय
म्हणतात ते तुम्हाला मी सांगतो, मी तुमच्यापासून काही लपविणार
नाही.” 5 त्यावर ते यिर्मयाहला म्हणाले, “आम्हाला याहवेह जे
करावयास सांगतील, ते आम्ही करण्याचे नाकारले, तर याहवेह आमचे
परमेश्वर आमच्याविरुद्ध सत्य व विश्वसनीय साक्षीदार असतील. 6
त्यांचा संदेश आम्हाला अनुकूल असो वा प्रतिकूल, आम्ही आमच्या
याहवेहच्या आज्ञा पाळू, आम्ही तुला ज्यांच्याकडे विनंती करण्यास
पाठवित आहोत, त्या आमच्या परमेश्वर याहवेहचे आम्ही ऐकू.” 7 दहा
दिवसांनी यिर्मयाहला याहवेहचे वचन आले. 8 तेव्हा त्याने कारेहाचा पुत्र
योहानान, त्याच्याबरोबर असलेले सर्व सेनाप्रमुख व सर्व लहान थोर
लोक यांना एकत्र बोलाविले. 9 तो त्यांना म्हणाला, “तुम्ही आपली
विनंती सादर करण्यासाठी मला याहवेह, इस्राएलाच्या परमेश्वराकडे
पाठविले, ते असे म्हणतात: 10 ‘तुम्ही जर याच देशात राहिलात
तर मी तुम्हाला उभारेन आणि तुम्हाला उद्ध्वस्त करणार नाही; मी
तुम्हाला रोपीन, आणि उपटून टाकणार नाही, कारण तुमच्यावर अरिष्ट
आणल्याचा मला अनुताप होत आहे. 11 आता ज्याला तुम्ही घाबरता
त्या बाबेलच्या राजाचे मुळीच भय बाळगू नका. त्याला भयभीत होऊ
नका, याहवेह असे जाहीर करतात, कारण मी तुम्हासह असेन व तुम्हाला
त्याच्या हातातून सोडवेन. 12 त्याने तुमच्यावर दया करावी व तुम्हाला
तुमच्या भूमीवर परत पुनर्वसित करावे म्हणून मी तुमच्यावर दया करेन.’
13 “परंतु तुम्ही याहवेह तुमच्या परमेश्वराच्या आज्ञा धिक्कारून म्हणाल,
‘आम्ही येथे राहणार नाही, 14 आणि आम्ही इजिप्तमध्ये जाऊन राहू,
जिथे आम्हाला लढाई, रणशिंगे ऐकू येणार नाहीत किंवा अन्नाची
भूक यापासून सुटका मिळेल,’ 15 तर तुम्हाला याहवेहचे हे वचन
मिळत आहे, हे यहूदीयाच्या अवशेषा, इस्राएलचे परमेश्वर, सर्वसमर्थ
याहवेह म्हणतात: ‘जर तुम्ही इजिप्तमध्ये जाण्याचा व तिथेच राहण्याचा
हट्ट कराल, 16 तर ज्या लढाईच्या व दुष्काळाच्या आपत्तींना तुम्ही
घाबरता, त्या तुमच्या मागोमाग इजिप्तमध्ये येतील व तुम्ही तिथे नाश
पावाल. 17 तुमच्यापैकी इजिप्तमध्ये जाऊन राहण्याचा आग्रह धरणाऱ्या
प्रत्येकाची हीच गत होईल. होय, तुम्ही तलवार, दुष्काळ व मरी यांना
बळी पडाल तिथे मी तुमच्यावर जी संकटे आणेन त्यातून तुमच्यापैकी
एकही वाचणार नाही.’ 18 कारण इस्राएलचे परमेश्वर, सर्वसमर्थ याहवेह
म्हणतात: ‘यरुशलेमच्या लोकांवर माझ्या रागाचा व क्रोधाचा वर्षाव
झाला, तसाच तुम्ही इजिप्तमध्ये प्रवेश कराल तेव्हा तुमच्यावर होईल.
तिथे तुम्ही घृणा, शाप व उपहासाचा विषय व्हाल; तुम्हाला हा देश
परत कधी दिसणार नाही.’ 19 “कारण याहवेहने तुम्हाला म्हटले आहे.
‘अहो यहूदीयातील अवशिष्ट लोकांनो, इजिप्तमध्ये जाऊ नका! आज
मी तुम्हाला इशारा दिला आहे, तो कधी विसरू नका. 20 तुम्ही ही
भयानक चूक केली आहे, तुम्हीच मला याहवेह, तुमच्या परमेश्वराकडे
प्रार्थना करण्यासाठी पाठविले होते व सांगितले की आमच्या याहवेह
परमेश्वराकडे प्रार्थना करून ते काय म्हणतात ते सर्व आम्हाला सांग,
म्हणजे आम्ही त्याप्रमाणे करू.’ 21 याहवेह तुमचे परमेश्वर यांनी जे
सांगण्यास मला तुमच्याकडे पाठविले, ते मी तुम्हाला आज सांगितले,
परंतु तुम्ही ते अद्यापि पाळले नाही. 22 म्हणून आता तुम्ही हे निश्चित
समजा: जिथे जाऊन वसती करण्याची तुमची इच्छा आहे, तिथे तुम्ही
तलवार, दुष्काळ व मरी यांना बळी पडाल.”

**43** जेव्हा यिर्मयाहने याहवेहचे वचन सर्व लोकांना सांगणे संपविले—जे
सर्व त्यांना सांगण्यास याहवेह त्यांचे परमेश्वर यांनी त्याला
पाठविले होते—तेव्हा 2 होशयाहचा पुत्र अजऱ्याह, कारेहचा पुत्र
योहानान व इतर सर्व गर्विष्ठ माणसे यिर्मयाहला म्हणाली: “तू खोटे

बोलतोस! ‘तुम्ही इजिप्तला जाऊन तिथे वसती करू नये,’ असे आम्हाला
सांगण्यास तुला आमचे परमेश्वर याहवेहने पाठविले नाही. 3 नेरीयाहचा
पुत्र नेरीयाहचा पुत्र बारूख याने तुला हे आम्हास सांगण्यास चिथविले
आहे, म्हणजे आम्ही येथेच राहू आणि बाबिलोनच्या सैन्याकडून मारले
जाऊ किंवा गुलाम करून बाबेलला नेले जाऊ.” 4 अशाप्रकारे कारेहचा
पुत्र योहानान, सर्व सेनाप्रमुख व सर्व लोकांनी यहूदीयात राहण्याची
याहवेहची अवज्ञा केली. 5 यहूदीया जे इतर देशात विखुरलेले पण आता
परत आलेल्या सर्व उरलेल्या लोकांना कारेहचा पुत्र योहानान, सर्व
सेनाप्रमुख आपल्या देखरेखीत घेऊन निघाले. 6 त्या जमावात पुरुष,
स्त्रिया, मुले, राजाच्या कन्या व तसेच पहारेकऱ्यांचा नायक नबुजरदान
याने अहीकामचा पुत्र, शाफानचा नातू गदल्याहच्या स्वाधीन केलेले सर्व
लोक होते. त्यांनी यिर्मयाह संदेष्टा व नेरीयाहचा पुत्र बारूख ह्यांनाही
आपल्याबरोबर घेतले. 7 त्यांनी याहवेहची आज्ञा न पाळता इजिप्तमध्ये
प्रवेश केला आणि ते तहपनहेस पर्यंत येऊन पोहोचले. 8 तहपनहेस येथे
यिर्मयाहला याहवेहचे वचन आले: 9 “यहूदी लोक तुझ्याकडे पाहत
असताना त्यांच्या समक्ष तहपनहेस येथील फारोहच्या राजवाड्याच्या
प्रवेशद्वारी फरसबंदीचे जे दगड आहेत, त्यांच्यामध्ये काही मोठे धोंडे
मातीत पुरून टाक, 10 आणि मग त्यांना सांग, ‘सर्वसमर्थ परमेश्वर
याहवेह, इस्राएलचे परमेश्वर असे म्हणतात: मी माझा सेवक बाबेलचा
राजा नबुखद्नेस्सरला इजिप्तमध्ये पाठवेन. मी त्याचे सिंहासन याच
लपविलेल्या धोंड्यावर स्थापन करेन; मग तो त्यावर आपला राजमंडप
पसरेल. 11 तो येईल व इजिप्त देशावर हल्ला करेल, जे मृत्यूसाठी
नियुक्त आहेत, त्यांना तो मृत्यू देईल, जे बंदिवासासाठी नियुक्त आहेत,
त्यांना बंदिवासात टाकेल, आणि जे तलवारीसाठी नियुक्त आहेत, त्यांचा
तो तलवारीने वध करेल. 12 तो इजिप्तच्या दैवतांच्या मंदिरांना आग
लावील; तो त्यांची मंदिरे जाळून त्यांच्या मूर्ती ताब्यात घेईल. एखादा
धनगर आपल्या अंगरख्यातील पिसवा वेचून स्वच्छ करतो, त्याप्रमाणे
तो इजिप्त देशातील सर्व वेचूनवेचून लुटून नेईल. 13 तसेच इजिप्तमधील
सूर्यदेवतेच्या मंदिरातील बेथ-शेमेशचे स्तंभ नष्ट करून तो मोडून टाकील
व इजिप्तच्या दैवतांची मंदिरे जाळून भस्म करेल.’”

**44** इजिप्तच्या उत्तरेस मिग्दोल, तहपनहेस, व मेम्फीस या शहरात
व संबंध दक्षिण इजिप्तमधील पथरोस प्रदेशात राहत असलेल्या
यहूद्यांसंबंधी याहवेहचे यिर्मयाहला हे वचन आले: 2 “सर्वसमर्थ परमेश्वर
याहवेह, इस्राएलचे परमेश्वर असे म्हणतात: यरुशलेम व यहूदीयाची
सर्व नगरे यांच्यावर मी कसा विनाश आणला, ते तुम्ही पाहिले आहे. ते
आता टाकलेल्या लोकागत भग्नावशेषात निवास करतात, 3 त्यांनी
केलेल्या दुष्टाईमुळेच असे झाले. त्यांनी इतर दैवतांना धूप जाळला व
त्यांची आराधना केली म्हणून माझा क्रोध त्यांच्यावर भडकला. अशी
दैवते जी त्यांना किंवा तुम्हाला किंवा तुमच्या पूर्वजांनाही माहीत नव्हती.
4 मी माझे सेवक संदेष्टे त्यांच्याकडे वारंवार पाठविले, हे सांगण्यास,
‘ज्यांचा मला तिरस्कार वाटतो, त्या घृणास्पद गोष्टी करू नका!’ 5 पण
त्यांनी माझे ऐकले नाही वा त्याकडे लक्ष दिले नाही; आणि आपल्या
कुमार्गापासून ते माघारी फिरले नाहीत व इतर दैवतांना धूप जाळण्याचे
बंदही केले नाही. 6 यामुळे माझा क्रोधाग्नी उफाळून आला; त्याचा
यहूदीयातील नगरांवर, यरुशलेमच्या रस्त्यावर वर्षाव झाला. त्याने ती
नगरे ओसाड केली, जसे ते आजही आहेत. 7 “आता सर्वसमर्थ याहवेह,
इस्राएलचे परमेश्वर असे म्हणतात: तुम्ही स्वतःवर विनाश आणला.
यहूदीयातील तुमचे पुरुष, स्त्री, अथवा लेकरे व तान्हीमुले देखील
वाचणार नाहीत व तुमचे कोणीही अवशेष राहणार नाहीत असे तुम्ही का
करीत आहात? 8 इथे तुम्ही बनविलेल्या मूर्ती केल्या. इजिप्तमध्ये, जिथे
तुम्ही निवास करण्यास आला आहात, तेथील इतर दैवतांना धूप जाळून,
तुम्ही माझा क्रोध का भडकावित आहात व तुमचा पूर्ण नाश करावयाला
मला का लावत आहात? तुम्ही स्वतःस पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांना शाप व
त्यांच्या उपहासाचा विषय बनवित आहात. 9 तुम्ही तुमच्या पूर्वजांनी
केलेली पापे, यहूदीयाचे राजे व राण्यांनी केलेली पापे, यहूदीया नगरात
व यरुशलेमच्या रस्त्यावर तुम्ही व तुमच्या स्त्रियांनी केलेली पापे, ही सर्व
विसरला काय? 10 आणि अद्यापही कोणी लीन होऊन माझ्याविषयी
श्रद्धा व्यक्त केली नाही, किंवा मी तुम्हाला व तुमच्या पूर्वजांना दिलेले
नियम व आज्ञा पाळल्या नाही. 11 “म्हणून सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचे
परमेश्वर असे म्हणतात: मी तुम्हावर अरिष्ट आणून संपूर्ण यहूदीयाचा
नाश करण्याचा निर्धार केला आहे. 12 इजिप्तमध्ये जाण्याचा हट्ट
धरणाऱ्या या यहूदीयातील उरलेल्या लोकांना मी नाहीसे करेन. ते
सर्वजण इजिप्तमध्ये नष्ट होतील; ते तलवारीने वा दुष्काळाने मरण
पावतील. अगदी लहानांपासून थोरापर्यंत सर्व तलवारीने वा दुष्काळाने
मरतील. ते एक असा शाप होतील, ते भयानकतेचा, तिरस्काराचा, व
शापाचा विषय होतील. 13 यरुशलेममध्ये राहणाऱ्यांना मी जशी शिक्षा
केली, तशीच या इजिप्तमध्ये राहणाऱ्यांनाही मी तलवार, दुष्काळ व
मरी यांनी शिक्षा करेन. 14 इजिप्तमध्ये निवास करण्यास गेलेल्या
यहूदीयाच्या अवशेषांपैकी एकही जण, जिथे परत येऊन राहण्याची
त्यांची उत्कट इच्छा आहे, तिथे सुटून परत यहूदीयात येण्यासाठी जिवंत
राहणार नाहीत; मोजक्या फराऱ्यांशिवाय कोणीही परतणार नाही.”
15 त्यांच्या स्त्रिया इतर सर्व उपस्थित स्त्रियांसोबत—एका विशाल
सभेत—परकीय दैवतांना धूप जाळीत असतात हे माहीत असलेल्या
पुरुषांनी व वरच्या व खालच्या इजिप्तच्या पथरोसमध्ये राहणाऱ्या सर्व
लोकांनी यिर्मयाहला उत्तर दिले: 16 “याहवेहच्या नावाने तू देत असलेले
संदेश आम्ही ऐकणार नाही! 17 आम्ही जे करणार असे म्हटले होते,
तसे आम्ही निश्चितच करू. आम्ही आकाशराणीस धूप जाळू आणि तिला
पेयार्पण करू, जसे आम्ही व आमच्या पूर्वजांनी, आणि आमचे राजे व
अधिपती यांनी यहूदीयाच्या नगरात, यरुशलेमच्या रस्त्यात नेहमी केले,
तसेच आम्हीही करू. कारण त्या दिवसात आमच्याकडे विपुल अन्न
होते आणि आम्ही सुखात होतो व आम्हाला काहीही इजा झाली नाही.
18 जेव्हापासून आम्ही आकाशराणीला धूप जाळणे थांबविले व तिला
पेयार्पणे करण्याचे थांबविले, तेव्हापासून आम्हाला सर्व गोष्टींचा अभाव
झाला असून तलवारीने आणि दुष्काळाने आमचा नाश होत आहे.” 19

स्त्रिया त्याची पुष्टी करीत म्हणाल्या, “आम्ही आकाशराणीची पूजा करीत होतो, तिला पेयार्पणे ओतीत होतो, तिच्यासाठी तिची प्रतिमा असलेल्या पोळ्या करीत होतो, हे सर्व आमच्या पतींना माहीत नव्हते काय?” 20 तेव्हा हे उत्तर देणाऱ्या सर्व स्त्रीपुरुषांना यिर्मयाह म्हणाला, 21 “तुम्ही, तुमचे पूर्वज, तुमचे राजे व अधिपती, आणि सर्व लोक यहूदीयाच्या नगरामध्ये, आणि यरुशलेमच्या रस्त्यांवर मूर्तींपुढे धूप जाळीत होता, हे याहवेहच्या स्मरणात नाही का व ते त्यांनी दर्शवून दिले नाही का? 22 तुम्ही जी सर्व दुष्कृत्ये करीत होता, ती सहन करणे याहवेहला अशक्य झाले; म्हणून तुमची भूमी शापित झाली व ओसाड होऊन निर्मनुष्य झाली, जशी ती आजही आहे. 23 जी तुम्ही बघता ती भयानक संकटे तुमच्यावर कोसळली याचे खरे कारण एकच आहे, ते म्हणजे तुम्ही मूर्तीपुढे धूप जाळला, याहवेहविरुद्ध पाप केले आणि त्यांच्या आज्ञा, नियम व करार पाळण्याचे नाकारले.” 24 मग यिर्मयाह पुन्हा त्या सर्वांना व त्यांच्याबरोबर असलेल्या स्त्रियांना म्हणाला, “इजिप्तमध्ये असलेल्या यहूदीयाच्या सर्व नागरिकांनो, याहवेहचा संदेश ऐका! 25 सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचे परमेश्वर असे म्हणतात: तुम्ही आणि तुमच्या स्त्रियांनी म्हटले, ‘आम्ही निश्चितच आकाशराणीस धूप जाळू व तिला पेयार्पणे करू.’ “तर मग करा, तिला दिलेली वचने पूर्ण करा! तुमचे संकल्पही पूर्ण करा! 26 तरीपण इजिप्त देशात राहणाऱ्या सर्व यहूद्यांनो, याहवेहचे वचन ऐका: ‘मी आपल्या थोर नामाची शपथ घेत आहे, याहवेह म्हणतात, इजिप्त देशात राहणारे कोणीही यहूदीयाचे नागरिक “सार्वभौम याहवेहच्या नावाची शपथ.” असे कधीही म्हणणार नाही. 27 इजिप्तमधील सर्व यहूदी लोक तलवारीने व दुष्काळाने नाश पावतील; तोपर्यंत त्यांच्या भल्यासाठी नव्हे तर अनिष्टासाठी माझी त्यांच्यावर नजर आहे. 28 तलवारीपासून वाचलेले जे इजिप्त देशातून यहूदीयाला परत जातील, ते अगदी थोडके असतील. मग इजिप्त देशात येऊन राहणाऱ्या यहूदीयाच्या सर्व अवशेष नागरिकांना कळेल की कोणाचा शब्द खरा ठरतो—माझा की त्यांचा. 29 “‘याहवेह जाहीर करतात, या ठिकाणी मी तुम्हाला शिक्षा करण्याचे हे चिन्ह मी तुम्हाला देईन, म्हणजे तुमच्यावर संकटे कोसळणार या मी दिलेल्या धमक्या खऱ्या आहेत हे तुम्हाला कळेल.’ 30 याहवेह असे म्हणतात: ‘जसे मी यहूदीयाचा राजा सिद्कीयाह याला त्याचा जीव घेऊ पाहणाऱ्या बाबेलचा राजा, नबुखद्नेस्सरच्या हवाली केले होते, तसेच मी इजिप्तचा राजा, फारोह होफ्रा, याला त्याचा जीव घेऊ पाहणाऱ्यांच्या हातात देईन.’”

**45** यहूदीयाचा राजा योशीयाहचा पुत्र, यहोयाकीम राजा, याच्या कारकिर्दीच्या चौथ्या वर्षी, यिर्मयाह संदेष्ट्याने सांगितलेली याहवेहची सर्व वचने लिहून घेण्याचे काम नेरीयाहचा पुत्र बारूखाने संपविल्यानंतर, यिर्मयाहने हा संदेश त्याला दिला: 2 “हे नेरीयाहचा पुत्र बारूखा, याहवेह इस्राएलाचे परमेश्वर तुला असे सांगत आहेत: 3 तू म्हणालास, ‘मला धिक्कार असो! माझ्या क्लेशात याहवेहने दु:खाची भर घातली आहे; मी उसासे टाकून थकून गेलो आहे आणि मला काही विश्रांती मिळत नाही.’ 4 परंतु याहवेहने मला तुला हे सांगण्यास म्हटले, ‘याहवेह असे म्हणतात: जे मी बांधलेले आहे ते मी नष्ट करेन, संपूर्ण पृथ्वीवर मी जे पेरले, ते मीच उपटून टाकेन. 5 मग तू स्वत:साठी मोठमोठ्या गोष्टी मिळवू पाहतोस काय? तसे करू नकोस, कारण या सर्व लोकांवर मी महान विपत्ती आणणार असलो, तरी मात्र तू जिथे जाशील, तिथे मी तुझा जीव वाचवेन,’ असे याहवेह जाहीर करतात.”

**46** राष्ट्रांसंबंधी यिर्मयाह संदेष्ट्याला याहवेहचे हे वचन आले: 2 इजिप्तसंबंधी: योशीयाहचा पुत्र, यहूदीयाचा राजा यहोयाकीम, याच्या कारकिर्दीच्या चौथ्या वर्षी, बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर याने फरात नदीजवळ कर्कमीशच्या लढाईत इजिप्तचा राजा फारोह नखो व त्याचे सैन्य यांचा पराभव केला. त्या प्रसंगी इजिप्तच्या सेनेविरुद्ध हा संदेश देण्यात आला. 3 “तुमच्या ढाली सिद्ध करा, लहान व मोठ्या अशा दोन्ही, आणि लढाईसाठी कूच करा! 4 घोड्यांवर खोगीर चढवा, आणि अश्वारूढ व्हा! शिरस्त्राण घालून मोर्चा बांधा! भाल्यांना धार लावा, व चिलखते चढवा! 5 मी हे काय पाहात आहे? ते भयभीत झालेले आहेत, ते माघार घेत आहेत, त्यांचे योद्धे पराजित झाले आहेत. मागे वळूनदेखील न पाहता ते घाईघाईत पळत आहेत, आणि सर्वत्र आतंक पसरला आहे,” याहवेह जाहीर करतात. 6 “चपळ सैनिक पळू शकत नाहीत. वा बलाढ्य निसटून शकत नाहीत. उत्तरेकडे फरात नदीकाठी ते अडखळून पडत आहेत. 7 “नाईल नदीसारखा हा कोण उभारून येत आहे, पाण्याने उफाळणाऱ्या नदीसारखा हा कोण आहे? 8 इजिप्त नाईल नदीसारखी उभारून येत आहे, पाण्याने उफाळणाऱ्या नदीसारखी. ती म्हणते, ‘मी उभारेन व पृथ्वी व्यापून टाकेन; मी नगरांना व त्यांच्या लोकांना नष्ट करेन.’ 9 अश्वांनो, तुम्ही हल्ला करा! सारथ्यांनो, तुम्ही आवेशाने धाव घ्या! योद्धयांनो—पूट व कूश या प्रांतातील ढालधारक, लूदीमवासी बाण जे सोडतात, ते तुम्ही सर्वजण पुढे कूच करा! 10 कारण हा दिवस प्रभू, सर्वसमर्थ याहवेहचा आहे— हा सूड उगविण्याचा, त्यांच्या शत्रूंवर सूड उगविण्याचा दिवस आहे. रक्त पिऊन तिची तृप्ती होईपर्यंत तलवार तृप्त होईपर्यंत गिळंकृत करीत राहील. कारण प्रभू, सर्वसमर्थ याहवेह, उत्तरेकडील फरात नदीकाठील प्रदेशात यज्ञार्पण करणार. 11 “हे इजिप्तच्या कुमारिके, वर गिलआदामध्ये जाऊन औषध आण. तुझे घाव बरे व्हावे म्हणून तू अनेक औषधे वापरलीस, पण तुझे घाव बरे करेल असे औषधच नाही. 12 राष्ट्रे तुझ्या लज्जेची वार्ता ऐकतील; तुझ्या आक्रोशाने संपूर्ण पृथ्वी भरेल. तुझे योद्धे परस्परांवर अडखळून पडतील; दोघेही एकमेकांसोबत एकत्र पडतील.” 13 यानंतर याहवेहने संदेष्टा यिर्मयाहला जो संदेश दिला तो इजिप्तवर हल्ला करावयास येणाऱ्या बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर, याच्याविषयी होता: 14 “इजिप्तमध्ये घोषणा करा, मिग्दोलमध्ये जाहीर करा; मेम्फीस व तहपनहेस या शहरांमध्येही जाहीर करा! ‘चला, सिद्ध व्हा, व मोर्चा बांधा, कारण तुमच्या सभोवतालच्यांना तलवार गिळंकृत करीत आहे.’ 15 तुमचे योद्धे कोलमडून का पडले? ते उभे राहू शकत नाहीत, कारण याहवेहने त्यांना खाली ढकलले आहे. 16 ते पुन्हापुन्हा अडखळतील; ते एकमेकांवर कोसळून पडतील. ते म्हणतील, ‘चला, उठा, आपल्या लोकांकडे व

आपल्या जन्मभूमीत आपण परत जाऊ, या छळवाद्यांच्या तलवारीपासून
दूर जाऊ.’ 17 तिथे ते उद्गारतील, ‘इजिप्तचा राजा फारोह होफ्रा व्यर्थ
गोंगाट करणारा मनुष्य आहे; त्याने त्याला मिळालेली सुसंधी घालविली.’
18 “ज्याचे नाव सर्वसमर्थ याहवेह आहे, ते महाराज म्हणतात, ‘माझ्या
जीविताची शपथ,’ जो येणार आहे, तो पर्वतांमधील ताबोर पर्वतासारखा,
समुद्राजवळील कर्मेलासारखा आहे. 19 इजिप्तमधील रहिवाशांनो,
सामानाची बांधाबांध करा, कारण मेम्फीस शहराचा नाश होणार आहे
व ते ओसाड होऊन एक निर्जन स्थान होईल. 20 “इजिप्त ही सुंदर
कालवड आहे; परंतु उत्तरेकडून तिच्याविरुद्ध गांधीलमाशी येत आहे. 21
तिच्या सैन्यातील भाडोत्री सैनिक एखाद्या धष्टपुष्ट वासरांसारखे झाले
आहेत. तेही वळून एकत्र पलायन करतील, ते भूमीवर टिकाव धरू
शकणार नाही, कारण त्यांच्यावरील संकटाचा दिवस जवळ येत आहे,
त्यांना शिक्षा मिळण्याचा हा समय आहे. 22 जसे त्यांचे बलाढ्य शत्रूपुढे
चाल करतील, जंगलतोड्यांगत येऊन त्यांच्यावर ते कुर्‍हाड घेऊन
आक्रमण करतील. तेव्हा इजिप्त फुत्कारणार्‍या सर्पाप्रमाणे पळ काढेल;
23 याहवेह जाहीर करतात, कितीही घनदाट असलेले जंगल ते कापून
नष्ट करतील. ते टोळांपेक्षाही असंख्य असे असतील, ज्यांची संख्या
मोजता येणार नाही. 24 उत्तरेकडील लोकांच्या तावडीत सापडलेल्या
इजिप्तच्या कुमारिकेची लज्जा घालविण्यात येईल.” 25 सर्वसमर्थ
याहवेह, इस्राएलचे परमेश्वर म्हणतात: मी थेबेस येथील दैवत आमोनला,
फारोहला, इजिप्तला व तिच्या दैवतांना, तिच्या राजाला आणि तिची
सर्व दैवते व तिच्यावर भरवसा ठेवणार्‍यांनाही शिक्षा करणार आहे. 26
त्यांना ठार मारावे अशी इच्छा धरणारे—बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर व
त्याचे सैन्य यांच्या तावडीत मी त्यांना देईन. परंतु नंतर मात्र हा इजिप्त
लढाईच्या उत्पातातून सावरेल आणि तिथे पूर्ववत वस्ती होईल, असे
याहवेह जाहीर करतात. 27 “याकोबा, माझ्या सेवका, घाबरू नको;
इस्राएला, निराश होऊ नका. मी बंदिवासाच्या देशातून तुमच्या वंशजांचा
दूर देशातून तुमचा बचाव करेन, याकोबाला पुन्हा शांती व संरक्षण
मिळेल, त्याला कोणीही भयभीत करणार नाही. 28 याकोबा, माझ्या
सेवका, भिऊ नको, कारण मी तुझ्याबरोबर आहे.” असे याहवेह जाहीर
करतात. “मी तुला ज्या राष्ट्रांमध्ये विखरून दिले होते, त्या राष्ट्रांचा
जरी नाश केला, परंतु तुझा संपूर्ण नाश करणार नाही. मी तुला शिस्त
लावण्यासाठी एका मयदित शिक्षा करेन. तुला पूर्णपणे विना शिक्षेचे मी
सोडणार नाही.”

**47** गाझा शहरावर फारोहने आक्रमण करण्यापूर्वी तेथील पलिष्टी
लोकांविषयी याहवेहचे यिर्मयाह संदेष्ट्याला वचन आले ते असे:
2 याहवेह हे असे म्हणतात: “पाहा, उत्तरेकडून जलस्तर उफाळून येत
आहे; तो प्रचंड प्रवाहात परिवर्तित होईल. जो त्यांच्या भूमीला व तेथील
सर्व गोष्टीला आच्छादित करेल म्हणजे त्यात असणारी नगरे व तिथे
राहणारे. लोक किंकाळ्या मारतील; त्या भूमीवरील सर्व रहिवासी
विलाप करतील. कारण त्यांच्या वेगाने धावणार्‍या घोड्यांच्या टापांचा
आवाज, शत्रूंच्या रथाचा आवाज आणि त्यांच्या चाकांचा खडखडाट
ऐकू येत आहे. त्यांचे पालक वळून त्यांच्या मुलांना मदत करू शकणार
नाहीत; त्यांचे हात गळून गेल्यागत झाले आहेत. 4 कारण सर्व पलिष्टी
लोकांचा नाश करण्यास आणि सर्व अवषेशांना बाहेर काढण्याचा, सोर
व सीदोन येथील लोकांना मदत करण्याचा समय आला आहे. याहवेह
पलिष्टी लोकांचा नाश करणार आहेत, कफतोरहून आलेल्या रहिवाशांचा
निःपात करणार आहेत. 5 गाझा विलापाचे चिन्ह म्हणून आपले मुंडण
करेल; अष्कलोन पूर्णपणे निःशब्द होईल. अहो तुम्ही घाटातील अवशिष्ट
लोकहो, तुम्ही केव्हापर्यंत स्वतःच्या देहास जखमी कराल? 6 “‘हाय रे,
याहवेहच्या तलवारी, तू पुन्हा केव्हा विसावा घेणार? जा! आपल्या
म्यानात परत जा; शांत राहा व स्तब्ध हो.’ 7 परंतु जर याहवेहने तिला
आज्ञा दिली आहे, तर ती स्वस्थ कशी बसेल, त्यांनीच तिला आदेश
दिला आहे ना अष्कलोन व समुद्राकाठी राहणार्‍यांवर हल्ला कर?”

**48** मोआबी लोकांविषयी: इस्राएलचे परमेश्वर, सर्वसमर्थ याहवेह,
यांनी दिलेला संदेश हा आहे: “नबो शहराचा धिक्कार असो, कारण
त्याचा विध्वंस होईल. किर्याथाईम लज्जित होईल व हस्तगत करण्यात
येईल; तेथील किल्ले लज्जित होतील व चक्काचूर करण्यात येतील. 2
आता यापुढे मोआबाची कोणीही प्रशंसा करणार नाही; हेशबोनमधील
लोक तिच्या अधःपतनाचा कट रचतील: ते म्हणतील, ‘चला, आपण त्या
राष्ट्राचा अंत करू.’ तुम्ही मदमेनमधील लोकही निःशब्द केले जातील;
तलवार तुमचा पाठलाग करेल. 3 नंतर होरोनाईममधून विलापध्वनी ऐकू
येत आहे, प्रचंड संहाराचा व विध्वंसाचा आक्रांत ऐकू येत आहे. 4 कारण
मोआब भूमीचा भंग केला जाणार आहे, तिचे बालक विलाप करतील. 5
ते लुहिथच्या डोंगरावर चढतील व चढताना आक्रोश करीत जातील;
व होरोनाईम नगराच्या उतरणीवरून विनाश बघतांनाच्या किंकाळ्या
ऐकू येतील. 6 पळा, जीव घेऊन पळा! रानावनात झुडूपागत व्हा. 7
कारण तुम्ही आपल्या कार्यावर व धनसंपत्तीवर भरवसा ठेवला होता,
तुम्हालादेखील बंदिवान म्हणून नेण्यात येईल. तुमचे दैवत कमोश
बंदिवासात जाईल, त्याचे याजक आणि सरदार हे सर्वजण नेले जातील.
8 विनाशक प्रत्येक नगराविरुद्ध येईल, एकाही नगराची त्याच्या हातून
सुटका होणार नाही. दर्‍याखोर्‍यांचा नाश होईल, आणि पठारे उद्ध्वस्त
होतील, कारण याहवेहने तसे म्हटले आहे. 9 मोआबावर मीठ टाका
कारण तिचा उकिरडा बनेल; तिची नगरे उजाड़ होतील, तिथे कोणीही
वसती करणार नाही. 10 “याहवेहने सोपविलेले कार्य आळशीपणाने
करणारा शापित असो! रक्तपात न करता तलवार म्यानात ठेवणारे
शापित असो! 11 “अगदी बालपणापासून मोआब सुखात राहिली.
गाळावर स्थिर वसलेल्या द्राक्षारसाप्रमाणे, तरी तिला या पात्रातून त्या
पात्रात ओतले गेले नाही— ती बंदिवासात गेलेली नाही. म्हणून ती
पूर्ववत चवदारच आहे, आणि तिचा सुवासही बदललेला नाही. 12
परंतु याहवेह म्हणतात, लवकरच असे दिवस येत आहेत, मी तिला
बुधल्यातून ओतणारी माणसे पाठवेन, ते तिला या पात्रातून ओतून
बाहेर टाकतील; ते तिचे बुधले रिकामी करतील व नंतर तिची पात्रे
फोडून टाकतील. 13 इस्राएलने बेथेल येथे भरवसा ठेवला, व मग त्यांना

जशी आपल्या वासराच्या मूर्तीची लाज वाटली. तशीच मोआबाला
आपल्या कमोशाची लाज वाटेल, 14 "'आम्ही वीरपुरुष, पराक्रमी योद्धे
आहोत!' असे तुम्ही कसे बोलू शकता? 15 परंतु आता मोआबचा
सर्वनाश होणार आहे, तिची नगरे हस्तगत केली जाणार आहेत; तिच्या
अत्यंत उमद्या तरुणांची कत्तल होईल," असे राजाधिराज, ज्यांचे नाव
सर्वसमर्थ याहवेह आहे ते म्हणतात. 16 "मोआबचा पाडाव अगदी जवळ
आलेला आहे; तिच्यावरील अरिष्ट वेगाने येणार आहे. 17 तिच्याभोवती
असणाऱ्या सर्व लोकांनो, तिच्यासाठी विलाप करा, तिची किर्ती माहीत
असणारे सर्व सामील व्हा; म्हणा, 'तिचा बलशाली राजदंड कसा मोडला,
इतकी वैभवशाली काठी कशी मोडली!' 18 "अहो दिबोन कन्येचे
निवासी, आपल्या वैभवावरून खाली उतरा आणि शुष्क भूमीवर येऊन
बसा, कारण जे मोआब भूमीचा विनाशक तुमच्याविरुद्ध येत आहेत
आणि ते तिच्या सर्व तटबंदीची नगरे नष्ट करतील. 19 अरोएरवासी
जनहो, तटस्थ होऊन रस्त्याच्या कडेला उभे राहून पाहा, आणि पळ
काढणाऱ्या पुरुषांना व बचाव करून निघणाऱ्या स्त्रियांना विचारा,
'तिथे काय घडले?' 20 मोआब लज्जित झाली आहे, ती भंग पावली
आहे. रडा व आकांत करा! आर्णोनच्या काठी घोषणा करा मोआब
नष्ट झाले आहे. 21 पठारे—होलोन, याहसाह, मेफाथ यांनाही शिक्षा
मिळाली आहे. 22 दिबोन, नबो, बेथ-दिबलाथाईम, 23 किर्याथाईम,
बेथ-गामूल, बेथ-मौन 24 करीयोथ, बस्रा— मोआबभूमीच्या जवळच्या
व दूरच्या सर्वच नगरांना शिक्षा झाली आहे. 25 मोआबभूमीचे शिंग
तोडून टाकण्यात आले आहे. तिचे बाहू मोडले आहेत." असे याहवेह
जाहीर करतात. 26 "तिला एखाद्या दारुड्यागत होऊ दे, कारण तिने
याहवेहविरुद्ध बंड केले आहे. मोआबभूमी आपल्याच वांतीत लोळू दे;
तिला उपहासाचा विषय होऊ दे. 27 इस्राएलही तुमच्या उपहासाचा
विषय नव्हता का? ती चोरांच्यामध्ये पकडली गेली का, कारण जेव्हाही
तिचा उल्लेख होतो, घृणाभावनेने तुम्ही आपली मान हालविता नाही का?
28 मोआबभूमीच्या रहिवाशांनो आपली नगरे सोडा आणि खडकांच्या
कपारीत जाऊन राहा. गुहेच्या तोंडाशी घरी बांधणाऱ्या पारव्याप्रमाणे
व्हा. 29 "आम्ही मोआबच्या गर्वाविषयी ऐकले आहे— तिचा गर्व किती
मोठा आहे— तिचा उर्मटपणा, तिचा उन्मत्तपणा, तिचा अहंभाव आणि
तिच्या अंत:करणाची मग्रुरीही सर्व आम्हाला माहीत आहे. 30 याहवेहने
जाहीर केले, मला मोआब भूमीचा उद्धटपणा माहीत आहे, परंतु तो
व्यर्थ आहे, तिच्या फुशारक्यांनी काहीही प्राप्त होत नाही. 31 म्हणून
मी मोआबभूमीसाठी विलाप करतो, मी मोआबसाठी अश्रू गाळतो,
कीर-हरेसेथच्या लोकांसाठी मी शोक करतो. 32 जसे याजेर शोक
करतो, तसे मी सिबमाहच्या द्राक्षलतांसाठी शोक करतो. तुमच्या फांद्या
समुद्रापर्यंत पसरलेल्या आहेत, त्या याजेरपर्यंत पोहोचतात; संहार
करणाऱ्याने तुमच्या पिकलेल्या फळांवर व द्राक्षांवर हल्ला केला आहे.
33 मोआबभूमीच्या मळयामधून व शेतातून आनंद व हर्ष लयास गेले
आहेत. द्राक्षकुंडातून द्राक्षारसाचा प्रवाह मी बंद केला आहे; हर्षनाद
करून द्राक्षे तुडविणारा कोणी नाही. ओरडणे आहे, होय पण ते आनंदाचे
नाही. 34 "त्यांच्या आक्रोशाचा ध्वनी उंचाविला जात आहे हेशबोनपासून
एलिआलेह आणि याहसापर्यंत, सोअरापासून होरोनाईम आणि एग्लाथ-
शलीशियापर्यंत तो ऐकू येत आहे, निम्रीमाची कुरणेही आता शुष्क झाली
आहेत. 35 जे उच्चस्थळी जाऊन अर्पणे वाहतात, आणि त्यांच्या खोट्या
दैवतांना धूप जाळतात त्या मोआबभूमीत या गोष्टी मी आता बंद पाडेन,"
याहवेह असे जाहीर करतात. 36 "माझे अंत:करण मोआबसाठी जणू
बासरीवर शोकगीत गात आहे; कीर-हरेसेथसाठी विलापाने बासरीगत
गीत गात आहे. त्यांनी साठविलेली विपुल संपत्ती नाहीशी झाली आहे.
37 तेथील प्रत्येक डोक्याचे मुंडण झाले आहे व प्रत्येक दाढीचे बोडण
झाले आहे; प्रत्येक हातावर घाव करण्यात आला आहे व प्रत्येक कमरेवर
गोणपाट नेसलेला आहे. 38 मोआबभूमीतील प्रत्येक घराच्या छतावर
आणि प्रत्येक चौरस्त्यावर केवळ आकांतच आढळत आहे, कारण जुन्या
निकामी पात्रांचा चक्काचूर करावा त्याप्रमाणे मोआब भूमीचा मी चुराडा
केला आहे," याहवेह असे जाहीर करतात. 39 "पाहा, मोआबभूमी कशी
मोडकळीस आली आहे! ती कशी विलाप करीत आहे! मोआबने लज्जेने
कशी पाठ फिरविली आहे ते पाहा! मोआब तिच्या सभोवती असलेल्या
लोकांच्या उपहासाचा व दहशतीचा विषय झाली आहे." 40 याहवेह
असे म्हणतात: पाहा! एक गरुड आकाशातून खाली झेप घेत आहे,
मोआबभूमीवर आपले पंख पसरवित आहे. 41 करीयोथ पडले आहेत,
व तेथील दुर्गमस्थाने जिंकून घेतली आहेत. प्रसूती वेदनांनी व्याकूळ
झालेल्या स्त्रियांच्या हृदयाप्रमाणे मोआबच्या योद्ध्यांचे हृदय होईल.
42 मोआब एक राष्ट्र म्हणून न राहता तिचा नाश होईल. कारण तिने
याहवेहविरुद्ध उर्मटपणा केला आहे. 43 हे मोआबातील लोकांनो, दहशत,
खड्डे व पाश तुझ्या वाट्याला येतील, असे याहवेह म्हणतात. 44 "जो
कोणी दहशतीपासून दूर पळेल तो खड्ड्यात पडेल, जो कोणी खड्ड्यातून
बाहेर पडेल, तो पाशात सापडेल. कारण मी मोआबावर तिच्या शिक्षेचे
वर्ष आणणार आहे. याहवेह असे जाहीर करतात. 45 "हेशबोनच्या
सावलीत फरारी हतबलपणे उभे आहेत, हेशबोनमधून अग्नी येत आहे,
सीहोनच्या मध्यातून ज्वाला पसरत आहेत; त्या मोआबाचे कपाळ
जाळून टाकीत आहे, त्या कर्कश बढाईखोरांचे मस्तक जाळीत आहे. 46
हे मोआबा, तुला धिक्कार असो! कमोश दैवताचे उपासक नष्ट झाले
आहेत; आणि तुझ्या पुत्रांना बंदिवासात नेण्यात येत आहे व कन्यांना
गुलाम करून नेण्यात येत आहे. 47 "परंतु मी मोआबच्या समृद्धीची
येत्या दिवसात पुन्हा भरपाई करेन," असे याहवेह म्हणतात. मोआबाच्या
न्यायाचे भाकीत येथे संपते.

**49** अम्मोनी लोकांविषयी: याहवेह असे म्हणतात: "इस्राएलला पुत्र
नाहीत काय? इस्राएलला वारस नाहीत काय? अम्मोनी राजाने
गादचा ताबा का घेतला आहे? त्याचे लोक त्यांच्या नगरात का राहत
आहेत? 2 याहवेह जाहीर करतात, असे दिवस येत आहेत, जेव्हा
मी अम्मोन्यांच्या राब्बाह नगराविरुद्ध रणगर्जना करेन, ते नासाडीचा
ढिगारा होईल, आणि त्याच्या सभोवतीची सर्व गावे जाळून टाकली
जातील. मग इस्राएली येईल आणि आपला देश तुमच्याकडून परत

घेतील. मग ज्यांनी इस्राएलला हाकलून लावले, त्या सर्वांना ती हाकलून
लावेल.” असे याहवेह म्हणतात. 3 “हेशबोना, आकांत कर, कारण
आय शहर नष्ट झाले आहे! राब्बाहच्या रहिवाशांनो, तुम्ही आक्रोश करा!
गोणपाटाची वस्त्रे धारण करून विलाप करा; भिंतीच्या आत इकडे
तिकडे धावाधाव करा, कारण त्याच्या सरदारांसह व पुजाऱ्यांसह दैवत
मोलेख बंदिवासात जाईल. 4 तुझ्या खोऱ्यांचा तू गर्व का करतेस, सुपीक
खोऱ्यांची तू बढाई का मारते? हे अमोन्यांच्या अविश्वासू कुमारिके,
तुझ्या संपत्तीवर भरवसा करून तू म्हणतेस, माझ्यावर कोण हल्ला करू
शकतो? 5 तुझ्या सर्व बाजूने मी तुझ्यावर भयंकर अनर्थ आणेन, असे
प्रभू, सर्वसमर्थ याहवेह म्हणतात. तुझ्यातील प्रत्येकजण देशोघडीला
लागेल, त्या फरारी लोकांना एकत्र करण्यास तिथे कोणीही नसेल. 6
“परंतु नंतर मी अम्मोन्यांच्या समृद्धीची भरपाई करेन,” याहवेह जाहीर
करतात. 7 एदोम्यांविषयी: सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: “तेमान
प्रांतात आता शहाणपणा राहिलेला नाही का? शहाण्या मनुष्यातून बोध
नाहीसा झाला आहे काय? त्यांच्यातील समंजसपणा क्षय पावला आहे
काय? 8 ददान प्रदेशातील रहिवाशांनो, मागे वळा व पलायन करा,
खोल गुहेत जाऊन लपा, कारण मी जेव्हा त्याला शिक्षा करेन, तेव्हा मी
एसावावर अरिष्ट आणेन. 9 जर द्राक्ष वेचणारे तुमच्याकडे आले, तर ते
थोडी द्राक्षे सोडणार नाहीत काय? जर रात्रीच्या वेळी चोर आले, तर ते
त्यांना हवे तेवढेच चोरत नाहीत काय? 10 परंतु मी एसावला पूर्णपणे
विवस्त्र करेन; मी त्याची लपण्याची ठिकाणे उघडी करेन, म्हणजे तो
स्वतःला गुप्त ठेऊ शकणार नाही. त्याचे शस्त्रधारी पुरुष, तसेच त्यांचे
मित्रगण व शेजारीदेखील नष्ट झाले आहेत, म्हणून तिथे असे म्हणणारा
कोणीही राहिलेला नाही, 11 ‘तुझ्या पितृहीन मुलांना माझ्याकडे ठेव;
मी त्यांना जिवंत ठेवेन. आणि तुझ्या विधवाही माझ्यावर विसंबून राहू
शकतात.’” 12 याहवेह असे म्हणतात: “जे हे पेय पिण्यास पात्र नाहीत
त्यांनी ते प्यालेच पाहिजे, तुम्हाला शिक्षा का होऊ नये? तुम्ही शिक्षा
भोगलीच पाहिजे, तुम्ही ते प्यालेच पाहिजे. 13 याहवेह जाहीर करतात,
मी माझ्या नावाची शपथ वाहून म्हणत आहे, बस्रा उद्ध्वस्त व शापित
होईल, ते दहशत व उपहासाचा विषय बनतील; आणि त्याची सर्व
नगरे कायमची ओसाड होतील.” 14 मी याहवेहकडून हा संदेश ऐकला
आहे; “एदोमावर हल्ला करण्यास एकत्र या! युद्ध करण्यास सज्ज
व्हा!” असे सर्व राष्ट्रांना सांगण्यासाठी एक दूत पाठवण्यात आला
होता. 15 “आता राष्ट्रांमध्ये मी तुला लहान करेन व सर्व मानवजात
तुमचा तिरस्कार करतील. 16 तुम्ही दहशतीस दिलेले प्रोत्साहन आणि
तुमच्या अंतःकरणाच्या गर्विष्ठपणाने तुमची फसवणूक केली आहे,
तुम्ही जे खडकांच्या कपारीत राहता, तुम्ही ज्यांनी डोंगरावरील उच्च
स्थाने व्यापली आहेत. जरी तुम्ही तुमची घरटी गरुडांच्या घरट्यांप्रमाणे
उंच बांधली आहेत, तरी तिथून मी तुला खाली आणेन. असे याहवेह
जाहीर करतात. 17 एदोम दहशतीचे ठिकाण होईल; त्याच्या जवळून
जाणारा कोणीही त्याच्या सर्व जखमांमुळे भयचकित होतील आणि
त्यांचा उपहास करतील. 18 याहवेह जाहीर करतात जसा सदोम व
गमोराचा त्यांच्या सभोवतालच्या नगरांसह नाश झाला, म्हणजे तिथे
कोणी राहणार नाही; त्यात लोक वस्ती करणार नाहीत. 19 “यार्देन
नदीच्या झुडूपातून सुपीक कुरणात झेप घेणाऱ्या सिंहाप्रमाणे, एदोमच्या
लोकांना त्यांच्या भूमीवरून मी एका क्षणात पळवून लावेन. मी नियुक्त
करावे असा या कार्यासाठी कोण निवडलेला आहे? माझ्यासारखा दुसरा
कोण आहे? मला चेतावणी करणारा कोण आहे? कोणता मेंढपाळ
माझ्याविरुद्ध उभा राहील?” 20 एदोमविरुद्ध याहवेहचा संकल्प काय
आहे ते ऐका. तेमानमध्ये राहणाऱ्या लोकांविरुद्ध त्यांची काय योजना
आहे, हे ऐकून घ्या. त्यांच्या कळपातील तरुणांना फरफटत ओढत
नेण्यात येईल. त्यांच्या कुरणांना या दुर्दैवाने भयंकर धक्का बसेल. 21
एदोमच्या पतनाच्या आवाजाने पृथ्वी कंपित होईल; त्यांचा आक्रोश
तांबड्या समुद्रापर्यंत प्रतिध्वनित होईल. 22 पाहा! एक गरुड झेप
घेऊन वेगाने खाली येईल, व बस्रावर आपले पंख पसरेल. त्या दिवशी
एदोमाच्या योध्यांची अंतःकरणे वेणा देणाऱ्या स्त्रीच्या अंतःकरणाप्रमाणे
होतील. 23 दिमिष्क विषयी: “हमाथ व अर्पाद ही शहरे भीतीने घाबरी
झाली आहेत, कारण त्यांना वाईट बातमी समजली आहे. ते निराश
झाले आहेत, एखाद्या खवळलेल्या समुद्रागत अस्वस्थ झाले आहेत. 24
दिमिष्क दुर्बल झाले आहे, पलायन करण्यासाठी ती माघारी फिरली
आहे आणि भयाने त्यांना धडकी भरली आहे; जशा प्रसूत होणाऱ्या
वेदना स्त्रियांना घेरतात, त्याप्रमाणे वेदना व पीडा यांनी त्यांना घेरले
आहे. 25 जी नगरी मला प्रसन्न करते, त्या प्रसिद्ध नगरीस टाकून देण्यात
का आले नाही? 26 निश्चितच तुझे तरुण रस्तोरस्ती मरून पडतील;
तुझे सर्व सैनिक त्या दिवशी निःशब्द केल्या जातील,” असे सर्वसमर्थ
याहवेह म्हणतात. 27 “आणि मी दिमिष्कच्या सीमेवर अग्नी पेटवेन व
तो अग्नी बेन-हदादचे राजवाडे जाळून टाकील.” 28 केदार व हासोरची
राज्ये ज्यांच्यावर बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरने हल्ला केला त्याविषयी:
याहवेह असे म्हणतात: “सज्ज व्हा, व केदारवर हल्ला करा आणि
पूर्वेच्या लोकांना नष्ट करा. 29 त्यांचे कळप व त्यांचे तंबू उचलून नेण्यात
येतील; त्यांची आश्रयस्थाने, सर्व घरगुती सामान व उंटही हस्तगत केले
जातील. लोक त्यांच्यावर ओरडून म्हणतील, ‘प्रत्येक बाजूला आतंक
पसरला आहे!’ 30 “लवकर दूर पळा! हासोरवासीयांनो, खोल गुहेत
दडून बसा,” कारण बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरने तुमच्याविरुद्ध कट
केला आहे; नबुखद्नेस्सर, त्याने तुमच्याविरुद्ध कारस्थान रचले आहे,
याहवेह जाहीर करतात. 31 “सज्ज हो आणि सुखात राहणाऱ्या राष्ट्रांवर
हल्ला कर, जे आत्मविश्वासाने जगतात,” याहवेह जाहीर करतात. “ज्या
राष्ट्रांना प्रवेशद्वार नाही वा सळया नाहीत; त्यातील लोक धोक्यांपासून
दूर राहतात. 32 त्यांचे सर्व उंट लुटून नेले जातील, व त्यांचे मोठमोठे
कळप युद्धाची लूट सामुग्री होतील. या मूर्तिपूजक लोकांची मी वाऱ्यागत
पांगापांग करेन मी त्यांच्यावर चहूकडून अरिष्ट आणेन. याहवेह असे
जाहीर करतात. 33 हासोरात कोल्हे संचार करतील, ते कायमचे ओसाड
होईल. तिथे पुन्हा कोणीही राहणार नाही; मनुष्य तिथे वस्ती करणार
नाही.” 34 यहूदीयाचा राजा सिद्कीयाह, याच्या कारकिर्दीच्या आरंभी

एलामविषयी याहवेहकडून हा संदेश यिर्मयाह संदेष्ट्याला प्राप्त झाला.
35 सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: “मी एलामचा धनुष्य तोडणार
आहे, जो त्यांच्या सामर्थ्याचा मुख्य आधार आहे. 36 मी एलामच्या विरुद्ध
चारही दिशातील वाऱ्याला आणेन; ते आकाशाच्या चारही कोपऱ्यातून
येतील; मी त्यांना चारही दिशातील वाऱ्यावर पसरवून टाकेन, असे
एकही राष्ट्र नसेल जिथे एलामचे निर्वासित नसतील. 37 जे एलामचा
वध करू इच्छितात, त्या त्यांच्या शत्रूदेखत मी पांगापांग करेन; मी
त्यांच्यावर अरिष्ट आणेन, माझा भयंकर क्रोधही आणेन,” असे याहवेह
जाहीर करतात. “मी त्यांचा समूळ नाश करेपर्यंत त्यांचा तलवारीने
पाठलाग करेन. 38 मी माझे राजासन एलाम येथे स्थापन करेन मी तिचा
राजा व तिचे सरदार यांचा नाश करेन. असे याहवेह जाहीर करतात. 39
“तरी येत्या दिवसात मी एलामची समृद्धी परत आणेन,” याहवेह जाहीर
करतात.

**50** बाबिलोन व बाबिलोनच्या लोकांचा देश यांच्याविरुद्ध याहवेहने
संदेष्टा यिर्मयाहला सांगितलेले हे वचन आहे: 2 “राष्ट्रांमध्ये
जाहीर कर व घोषणा कर, ध्वज उंचावून घोषणा कर; काहीही मागे
सोडू नको, पण म्हण, ‘बाबेलचा पाडाव होणार आहे; तिचे दैवत बेल
लज्जित करण्यात येणार आहे, मरोदख भयाने व्याप्त होणार. तिच्या
मूर्ती लज्जित करण्यात येणार आहेत तिची दैवते भयाने व्याप्त होणार
आहेत.’ 3 तिच्यावर उत्तरेकडून एक राष्ट्र हल्ला करेल आणि तिच्या
भूमीचा विध्वंस करेल. तिथे पुन्हा कोणीही राहणार नाही; लोक आणि
पशू पलायन करतील. 4 “त्या समयी, त्या दिवसात इस्राएलचे लोक
आणि यहूदीयाचे लोक एकत्र येतील, आणि अश्रू गाळीत त्यांचे परमेश्वर
याहवेहचा शोध घेतील, याहवेह जाहीर करतात. 5 ते सीयोनकडे
जाणाऱ्या मार्गाची विचारणा करतील आणि त्या दिशेने ते अभिमुख
होतील. ते येतील व याहवेहशी, कधीही विस्मृतित न जाणाऱ्या, एका
सार्वकालिक कराराशी जडून जातील. 6 “माझे लोक हरवलेली मेंढरे
होती; त्यांच्या मेंढपाळांनीच त्यांची वाट चुकविली त्यांना डोंगरांवर
भटकण्यासाठी सोडून दिले होते. ते डोंगर व पर्वतावर भटकत राहिले
व त्यांच्या मेंढवाड्यास ते विसरले. 7 ज्यांना ते सापडले, त्यांनी
त्यांना गिळंकृत केले; त्यांचे शत्रू म्हणाले, ‘आपण दोषी नाही, कारण
याहवेह, त्यांचे हिरवेगार कुरण, आणि त्यांच्या पूर्वजांचे आशास्थान,
यांच्याविरुद्धच ज्यांनी पाप केले आहे.’ 8 “बाबेलच्या बाहेर पळा;
बाबिलोनच्या लोकांच्या भूमीचा त्याग करा, आणि त्या बोकडांसारखे
व्हा, जे कळपाचे नेतृत्व करतात. 9 कारण मी उत्तरेकडील महान राष्ट्रांना
एकवटून बाबेलवर हल्ला करण्यास प्रेरित करणार. ते बाबेलवर हल्ला
करण्यास सज्ज होतील, आणि उत्तरेकडून तिचा पाडाव होईल. त्यांचे
बाण लक्ष्यवेधी योद्ध्यांसारखे असतील ते रिकाम्या हाताने परत जात
नसतात. 10 तर मग बाबेलची लूट करण्यात येईल; ते सर्व तिची
मनसोक्त लूट करतील,” असे याहवेह जाहीर करतात. 11 “तुम्ही जे माझे
वतन लुटता, तुम्ही आनंद व उल्हास करतात, तुम्ही धान्य मळणाऱ्या
कालवडीप्रमाणे बागडता आणि घोड्यांसारखे खिंकाळत असाल, 12
पण तुमची माता अत्यंत लज्जित होईल; जिने तुम्हाला जन्म दिला,
तिची अप्रतिष्ठा होईल, ती सर्व राष्ट्रात सर्वात क्षुद्र होईल— मग ती
अरण्यात असो, शुष्क भूमीत, वा वाळवंटात असो. 13 याहवेहच्या
क्रोधामुळे ती आवासित होणार नाही, पण पूर्णपणे ओसाड होईल.
आणि तिची अवस्था पाहून बाबेलातून येजा करणाऱ्यांना दहशत वाटेल;
तिच्या जखमा पाहून ते तिचा उपहास करतील. 14 “बाबेलच्या सभोवती
तिच्याविरुद्ध मोर्चा बांधा, धनुर्धाऱ्यांनो तिच्यावर बाणांचा नेम धरा.
तिच्यावर बाण मारा, कोणताही बाण राखून ठेवू नका. कारण तिने
याहवेहविरुद्ध पाप केले आहे. 15 तिच्याविरुद्ध चहूबाजूंनी आवाज
उठवा! ती शरण येत आहे, तिचे बुरूज धराशायी झाले आहेत, तिच्या
तटाच्या भिंती कोसळल्या आहेत. हा याहवेहने घेतलेला सूड आहे,
तुम्हीही तिचा सूड घ्या; जसे तिने इतरांचे केले तसेच तिचेही करा. 16
बाबेलच्या शेतकऱ्यांना तिथून काढून टाका, कापणी करणारे आपले विळे
घेऊन निघून जावोत. अत्याचाऱ्याच्या तलवारीमुळे प्रत्येकाने आपल्या
लोकांकडे परत जावे. प्रत्येकाने आपल्या देशाकडे पलायन करावे. 17
“इस्राएली लोकांची मेंढराप्रमाणे पांगापांग झाली आहे, सिंहाने पाठलाग
करून त्यांना पळविले आहे. प्रथम ज्याने त्यांना गिळंकृत केले तो
अश्शूरचा राजा होता; नंतर त्यांच्या हाडांचा चुराडा केला तो बाबेलचा
राजा नबुखद्नेस्सर होता.” 18 म्हणून सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचे
परमेश्वर म्हणतात: “मी बाबेलच्या राजाला व त्याच्या भूमीला शिक्षा
देईन, अश्शूरच्या राजाला व त्याच्या भूमीला शिक्षा देईन. 19 पण मी
इस्राएलला त्यांच्या स्वतःच्या कुरणात परत आणेन, ते कर्मेल व बाशान
येथे चरतील; एफ्राईम व गिलआदच्या डोंगरावर ते खाऊन तृप्त होतील.
20 त्या दिवसात, त्या समयी, याहवेह घोषित करतात, इस्राएलमध्ये
दोषाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला तरी ते आढळणार नाहीत, आणि
यहूदीयामध्ये पाप शोध घेण्याचा प्रयत्न केला तरी आढळणार नाही,
लोकांना मी क्षमा करेन. कारण मी वाचवून ठेवलेल्या अवशेषाला क्षमा
करेन. 21 “मराथाईम प्रदेशावर आक्रमण करा आणि पकोड येथील
रहिवाशांवर स्वारी करा. त्यांचा पाठलाग करा, त्यांचा वध करा व
त्यांना समूळ नष्ट करा.” असे याहवेह जाहीर करतात. “मी तुम्हाला
आज्ञापिलेले सर्वकाही करा. 22 देशामध्ये रणगर्जनेचा ध्वनी ऐकू येत
आहे. प्रचंड विध्वंसतेचा ध्वनी! 23 कसा मोडणारा व चुराडा करणारा
संपूर्ण पृथ्वीतलावरील अत्यंत जबरदस्त असा हा हातोडा! सर्व राष्ट्रांमध्ये
बाबिलोन किती ओसाड बनले आहे! 24 अगे बाबिलोन, मी तुझ्यासाठी
सापळा लावला आणि तुला कळण्या आधीच तू त्यात अडकलीस; तू
सापडलीस व पकडण्यात आलीस कारण तू याहवेहस विरोध केला.
25 याहवेहने आपले शस्त्रागार उघडले व आपल्या क्रोधाचा स्फोट
करण्यासाठी शस्त्रे बाहेर काढली, कारण सार्वभौम सर्वसमर्थ याहवेहस
बाबेलच्या भूमीवर कार्य करावयाचे आहे. 26 या! दूरदूरच्या राष्ट्रांमधून
बाबेलवर स्वारी करण्यासाठी या! तिची धान्यांची कोठारे फोडा; तिच्या
भिंती पाडा, धान्याच्या राशी सारखा तिचा ढिगारा करा. आणि तिचा
समूळ नायनाट करा तिच्यातील कोणीही शिल्लक ठेवू नका. 27 तिच्या

सर्व तरुण बैलांची कत्तल करा; त्यांना वध होण्यासाठी जाऊ द्या!
त्यांचा धिक्कार असो! कारण त्यांचा समय आला आहे, त्यांना शिक्षा
करण्याची वेळ आली आहे. 28 बाबेलमधील फरारी व निर्वासित लोक
सीयोनात काय म्हणतात ते ऐका याहवेह, आमच्या परमेश्वराने कसा
सूड घेतला, त्यांच्या मंदिराबद्दल सूड घेतला. हे याहवेह जाहीर करतात.
29 “धनुर्धाऱ्यांना बाबेलविरुद्ध पाचारण करा, धनुष्य ताणणाऱ्या सर्वांना
बोलवा. नगरीला वेढा घाला; कोणालाही निसटून जाऊ देऊ नका. तिच्या
कृत्याची परतफेड करा; तिने इतरांचे जसे केले, तसे तिचे करा. तिने
याहवेहला, इस्राएलाच्या पवित्र परमेश्वराला उद्दामपणे तुच्छ लेखले, 30
म्हणून, तिचे तरुण रस्तोरस्ती धराशायी होतील; त्या दिवशी तिचे सर्व
योद्धे निःशब्द होतील,” हे याहवेह जाहीर करतात. 31 “पाहा, अहो गर्विष्ठ
लोकांनो, मीच तुमच्याविरुद्ध आहे आता तुमचा दिवस आला आहे,
तुम्हाला शिक्षा देण्याचा समय आला आहे! प्रभू सर्वसमर्थ याहवेह जाहीर
करतात. 32 गर्विष्ठ अडखळतील व पडतील, तिला मदतीचा हात देऊन
कोणीही उठविणार नाही; मी तिच्या नगरांमध्ये अग्नी पेटवेन तो अग्नी
सभोवतालचे सर्वकाही गिळंकृत करेल.” 33 सर्वसमर्थ याहवेह असे
म्हणतात: “इस्राएलाच्या लोकांवर जुलूम झाला आहे. व यहूदीयाच्या
लोकांवरही झाला आहे. त्यांना कैद करणाऱ्यांनी त्यांना घट्ट पकडून
ठेवले आहे व त्यांना जाऊ देण्याचे ते नाकारतात. 34 परंतु त्यांचे
उद्धारकर्ता सामर्थ्यशाली आहेत; सर्वसमर्थ याहवेह असे त्यांचे नाव आहे.
ते जोमाने त्यांचा बचाव करतील आणि इस्राएली देशात त्यांना शांतीने
राहता यावे, म्हणून ते त्यांच्या भूमीला शांती प्रदान करतील, परंतु,
बाबेलच्या लोकांना अशांती मिळेल. 35 “बाबेलवर तलवारीचा प्रहार
होईल! ती बाबेलमध्ये राहणाऱ्या लोकांवर आणि तिच्या अधिपतींवर,
सुज्ञ लोकांवरही प्रहार करेल! याहवेह असे जाहीर करतात. 36 तिच्या
खोट्या संदेष्ट्यांवर तलवारीचा प्रहार होईल ते सल्लागार मूर्ख बनतील!
तिच्या योद्ध्यांवर तलवारीचा प्रहार होईल! ते अत्यंत भयभीत होतील.
37 तिचे घोडे, रथांवर तलवारीचा प्रहार होईल! आणि तिच्यात राहणाऱ्या
विदेशीयांवरही होईल! ते दुर्बल होतील. तिच्या संपत्तीवर तलवारीचा
प्रहार होईल! त्यांची लूट केली जाईल. 38 तिच्या पाण्यावर तलवारीचा
प्रहार होईल! ते शुष्क होतील. कारण ही मूर्तींची भूमी आहे, आणि
या मूर्ती भयाने वेड्या होतील. 39 “म्हणून या नगरीत वनपशू व तरस
वास करतील, व घुबडे येऊन राहतील. येथे आता पुन्हा कधी मानवाची
वस्ती होणार नाही; किंवा ही नगरीत पिढ्यान् पिढ्या ओसाड पडेल. 40
याहवेह जाहीर करतात, जसा मी परमेश्वराने सदोम व गमोराचा त्यांच्या
सभोवतालच्या नगरांसह नाश केला, म्हणजे तिथे कोणी राहणार नाही.
त्यात लोक वस्ती करणार नाहीत. 41 “पाहा, उत्तरेकडील देशातून सैन्य
येत आहे; पृथ्वीच्या शेवटापासून एक मोठे राष्ट्र व अनेक राजे भडकविले
जात आहेत. 42 त्यांचे सैनिक धनुष्ये व भाल्यांसहित सज्ज आहेत. ते
अत्यंत क्रूर व दयाहीन आहेत. ते घोड्यांवर स्वार झाले असता त्यांचा
आवाज गर्जणाऱ्या समुद्राप्रमाणे आहे. हे बाबिलोन कन्ये तुझ्यावर हल्ला
करण्यासाठी युद्धासाठी सुसज्जित असलेल्यांप्रमाणे ते येत आहेत. 43
बाबेलच्या राजाने त्यांच्याबद्दल वार्ता ऐकली आहे. त्याचे बाहू निखळले
आहेत. बाळाला जन्म देणाऱ्या स्त्रीच्या क्लेशाप्रमाणे वेदनांनी त्याला
ग्रासले आहे. 44 यार्देन नदीच्या झुडूपातून सुपीक कुरणात झेप घेणाऱ्या
सिंहाप्रमाणे, बाबेलच्या लोकांना त्यांच्या भूमीवरून मी एका क्षणात
पळवून लावेन. मी नियुक्त करावे असा या कार्यासाठी कोण निवडलेला
आहे? माझ्यासारखा दुसरा कोण आहे? मला चेतावणी करणारा कोण
आहे? कोणता मेंढपाळ माझ्याविरुद्ध उभा राहील?” 45 बाबेलविरुद्ध
याहवेहचा संकल्प काय आहे ते ऐका. बाबेलच्या लोकांच्या भूमीविरुद्ध
त्यांची काय योजना आहे, हे ऐकून घ्या. त्यांच्या कळपातील तरुणांना
फरफटत ओढत नेण्यात येईल. त्यांच्या कुरणांना या दुर्दैवाने भयंकर
धक्का बसेल. 46 बाबेलच्या पतनाच्या आवाजाने पृथ्वी कंपित होईल;
त्याचा आक्रोश राष्ट्रांत प्रतिध्वनित होईल.

**51** याहवेहचे म्हणणे हे असे आहे, “बाबिलोन व बाबिलोनच्या
लोकांवर चाल करून जाण्यास मी एका संहारक आत्म्याला प्रेरित
करेन. 2 त्यांना पाखडण्यात यावे व त्यांच्या भूमीचा विध्वंस व्हावा
म्हणून मी बाबेलविरुद्ध विदेशी लोकांना पाठवेन; तिच्या विनाशाच्या
दिवशी ते प्रत्येक दिशेने तिच्या विरोधात येतील. 3 तिच्या सैनिकांना
त्यांचे धनुष्य ताणू देऊ नका. तिच्या योद्ध्यांची चिलखते अंगात घालू
देऊ नका. त्यांच्या तरुणांनाही सोडू नका; त्यांच्या सैन्याचा संपूर्ण नाश
करा. 4 बाबेलमध्ये ते मरून पडतील. तिच्या रस्त्यांवर ते मरणोप्राय
जखमी होतील. 5 त्यांची भूमी इस्राएलच्या पवित्र परमेश्वरासमोर जरी
तिच्या अपराधाने भरलेली आहे तरीही त्यांचे परमेश्वर सर्वसमर्थ याहवेह
यांनी इस्राएल व यहूदीयाचा त्याग केला नाही. 6 “बाबेलमधून पलायन
करा! आपला जीव वाचविण्यास पळा! तिच्या पापांमुळे तुम्ही तुमचा
नाश करून घेऊ नका. हा याहवेहचा सूड घेण्याचा समय आहे; ज्यास ती
पात्र आहे, त्याचा मोबदला ते तिला देतील. 7 बाबिलोन याहवेहच्या
हातातील सुवर्णपात्र होते; तिने संपूर्ण पृथ्वीला ते पाजून मद्यधुंद केले.
सर्व राष्ट्र तिचे मद्य प्याले; म्हणून आता ते वेडे झाले आहेत. 8 बाबिलोनचे
अचानक पतन होईल व ती मोडली जाईल. तिच्यासाठी विलाप करा!
तिच्या वेदना जाण्यासाठी औषध आणा; कदाचित ती बरी होऊ शकेल.
9 “‘आम्ही बाबेलला बरे केले असते. पण ती बरी होऊ शकत नाही.
आपण तिला सोडून आपल्या देशात परत जाऊ या. कारण तिचा न्याय
आता आकाशापर्यंत पोचला आहे, तो स्वर्गाच्या उंचीपर्यंत पोहोचला
आहे.’ 10 “‘याहवेहने आम्हाला निर्दोष घोषित केले आहे; चला, आपण
सीयोनात जाऊन सांगू आमचे परमेश्वर याहवेहने काय केले आहे.’ 11
“बाणांना धार लावा, ढाली उचलून घ्या! याहवेहनी मेदियाच्या राजाला
प्रेरित केले आहे, कारण त्यांचा हेतू बाबेलचा नाश करण्याचा आहे.
याहवेह बाबेल्यांचा सूड उगवतील, हा त्यांच्या मंदिराबद्दलचा सूड आहे.
12 बाबेलच्या तटबंदीविरुद्ध तुमचे झेंडे उंच करा! पहारेकऱ्यांची कुमक
पाठवून मजबूत करा, पहारेकऱ्यांना स्थानबद्ध करा, दबा धरून बसण्याची
तयारी करा! याहवेहनी बाबेलच्या लोकांविरुद्ध दिलेल्या फर्मानाचा हेतू
ते सिद्धीस नेतील. 13 तुम्ही, जे बऱ्याच जलाशयाकाठी वास करता,

आणि अतिसंपन्न आहात, तुमचा अंत जवळ आला आहे, तुमचा नाश
होण्याचा समय आला आहे. 14 सर्वसमर्थ याहवेह, स्वतःच्याच नावाची
शपथ घेतात: मी निश्चितच तुम्हाला टोळधाडीसारख्या असंख्य सैनिकांनी
भरून टाकेन आणि लोक तुमच्यावरील विजयोन्मादाने गर्जना करतील.
15 "त्यांनी त्यांच्या सामर्थ्याने पृथ्वीची निर्मिती केली; संपूर्ण विश्वाची
प्रस्थापना त्यांच्या सुज्ञतेने केली आणि त्यांच्या बुद्धीने आकाश विस्तीर्ण
केले. 16 जेव्हा ते गर्जना करतात, तेव्हा आकाशातील मेघ गर्जना
करतात; ते मेघांना पृथ्वीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत
उभारतात. ते विजा आणि पाऊस पाठवितात आणि त्यांच्या भांडारातून
वारा बाहेर काढतात. 17 "प्रत्येक मनुष्य असमंजस व ज्ञानहीन आहे;
प्रत्येक सोनार त्याच्या मूर्तींनी लज्जित झाला आहे. त्याने घडविलेल्या
प्रतिमा खोट्या आहेत. त्यांच्यामध्ये श्वास नाही. 18 त्या व्यर्थ असून
उपहासाचा विषय आहेत; जेव्हा त्यांचा न्याय होईल, तेव्हा त्यांचा
नाश होईल. 19 परंतु जो याकोबाचा वाटा आहे, तो यासारखा नाही.
कारण तेच सर्वांचे निर्माणकर्ता आहेत, ते लोक त्यांचे वारस आहेत;
सर्वसमर्थ याहवेह हे त्यांचे नाव आहे. 20 "तू माझ्या युद्धाचा सोटा
आहेस. माझे युध्दशस्त्र— तुझ्याद्वारे मी राष्ट्रांना डळमळीत करेन,
तुझ्याद्वारे मी राज्ये नष्ट करेन, 21 तुझ्याद्वारे मी घोडा आणि घोडेस्वाराचा
संपूर्ण नाश करेन, तुझ्याद्वारे मी रथ आणि सारथी यांचा संपूर्ण नाश
करेन, 22 तुझ्याद्वारे मी पुरुष व स्त्रीचा संपूर्ण नाश करेन, तुझ्याद्वारे मी
वृद्धाचा व तरुणाचा संपूर्ण नाश करेन, तुझ्याद्वारे मी तरुण व तरुणींचा
संपूर्ण नाश करेन, 23 तुझ्याद्वारे मी मेंढपाळांचा आणि कळपांचा
संपूर्ण नाश करेन, तुझ्याद्वारे मी शेतकऱ्यांचा आणि बैलांचा संपूर्ण
नाश करेन, तुझ्याद्वारे मी राज्यपालांचा आणि अधिपतींचा संपूर्ण नाश
करेन. 24 "बाबिलोन व बाबिलोनचे लोक यांनी सीयोनाशी जे दुष्कृत्य
केले, त्याबद्दल मी तुझ्या डोळ्यादेखत त्यांची परतफेड करेन." असे
याहवेह जाहीर करतात. 25 "हे संहारक पर्वता, तू जो संपूर्ण पृथ्वीचा
विध्वंस करतो, मी तुझ्याविरुद्ध आहे," याहवेह जाहीर करतात, "मी
माझा हात तुझ्याविरुद्ध उगारेन, तुला कडेलोट करेन, आणि तुला भस्म
झालेला डोंगर करेन. 26 तुझ्यातील पाषाण कोनशिलेसाठी वापरण्यात
येणार नाहीत. पायाभरणीसाठीही तुझे डबर घेणार नाहीत, तू कायमची
उजाड होशील," याहवेह जाहीर करतात. 27 "या भूमीवर आपले ध्वज
फडकवा! राष्ट्रांमध्ये रणशिंगे वाजवा! तिच्याशी युद्ध करण्यासाठी राष्ट्रांना
सुसज्ज करा; या राष्ट्रांना तिच्याविरुद्ध पाचारण करा: अरारात, मिन्नी व
आष्कनाज. तिच्याविरुद्ध सेनापतीची नेमणूक करा; टोळधाडी सारखा
घोड्यांचा प्रचंड समुदाय पाठवा. 28 तिच्याशी युद्ध करण्यासाठी राष्ट्रांना
सुसज्ज करा— मेदिया राजे, त्यांचे राज्यपाल आणि अधिपती, आणि
ज्यावर ते शासन करतात अशी सर्व राष्ट्रे. 29 भूमी थरथरत व वेदनांनी
तळमळत आहे, कारण याहवेहने बाबेलविरुद्ध केलेला संकल्प कायमचा
आहे— बाबेलची भूमी ओसाड होईल जेणेकरून तिथे कोणीही राहणार
नाही. 30 बाबिलोनचे योद्धे युद्ध करण्याचे थांबले आहेत; ते त्यांच्या गडात
बसून आहेत. त्यांचे सामर्थ्य संपुष्टात आले आहे; ते दुर्बल झाले आहेत.
तिचे आवास जळत आहेत; तिच्या प्रवेशद्वाराच्या सळया मोडल्या आहेत.
31 बाबेलच्या राजाला वर्तमान सांगण्यासाठी, की त्याचे संपूर्ण नगर
हस्तगत करण्यात आले आहे, संदेशवाहक एका पाठोपाठ धावत आहेत
निरोपे एका पाठोपाठ येत आहेत, 32 नदीवरील पूल जप्त करण्यात
आले आहेत, दलदली जळत आहेत, सैन्य भयभीत झाले आहेत." 33
कारण सर्वसमर्थ याहवेह, इस्राएलचे परमेश्वर असे म्हणतात: "बाबेलची
कन्या अशा खळयाप्रमाणे आहे जिची तुडवणी सुरू होण्याची वेळ आली
आहे; तिचे पीक घेण्याचा समय लवकरच येणार आहे." 34 "बाबेलच्या
नबुखद्नेस्सर राजाने आम्हाला गिळंकृत केले आहे, त्याने आम्हाला
निराशेत ढकलले आहे, त्याने आम्हाला रिक्त भांड्यासारखे केले आहे.
सर्पासारखे त्याने आम्हाला गिळले आहे. आणि आमच्या मिष्टान्नाने
स्वतःचे पोट भरले आहे, आणि मग आम्हाला बाहेर थुंकून दिले आहे.
35 सीयोनचे रहिवासी म्हणतात, आमच्या संतानांवर जसा अत्याचार
केला, तसा बाबेलवर येवो," यरुशलेम म्हणते, "आमचे रक्त सांडल्याचा
सर्व दोष बाबेल्यांवर पडो." 36 म्हणून याहवेह असे म्हणतात: "मी
तुमची बाजू मांडेन मी तुमचा सूड उगवेन; मी तिचे समुद्र आटवून टाकेन
आणि तिचे झरे शुष्क करेन. 37 बाबिलोन भग्नावशेषाचा ढिगारा
होईल, तिथे कोल्ह्यांचा संचार होईल, ते भयानकतेचा व तिरस्काराचा
विषय होतील, जिथे कोणीही राहत नाही असे ठिकाण. 38 तिचे
सर्व लोक तरुण सिंहाप्रमाणे गर्जना करतील, सिंहाच्या छाव्यासारखे
डरकाळ्या मारतील. 39 पण ते जेव्हा जागृत होतील, मी त्यांच्यासाठी
मेजवानी सिद्ध करेन त्यांना मद्यधुंद करेन, म्हणजे ते किंकाळ्या मारून
हसतील—मग ते कायमचे झोपतील मग ते चिरनिद्रा घेतील व उठणार
नाहीत." असे याहवेह जाहीर करतात. 40 मी त्यांना कोकरागत, मेंढ्या
व बोकडागत कत्तल करण्यास खाली आणेन. 41 "शेशाक कसे हस्तगत
केल्या जाईल, संपूर्ण पृथ्वीचे अभिमान पात्र जप्त केल्या जाईल! सर्व
राष्ट्रांमध्ये बाबिलोन किती ओसाड होईल! 42 बाबेलवर सागर उसळून
येईल; सागरलाटांनी ती भूमी झाकून जाईल. 43 तिची शहरे ओसाड
होतील, ती एक शुष्क व निर्जन भूमी होईल, एक अशी भूमी जिथे
कोणी मनुष्य राहत नाही, जिच्यामधून कोणीही प्रवास करीत नाही.
44 मी बेलला बाबिलोन मध्येच शिक्षा देईन आणि त्याने जे गिळले ते
मी त्याला थुंकावयास लावेन. यापुढे राष्ट्रे त्याच्याकडे जमावाने येणार
नाहीत. बाबेलची तटबंदी कोसळून पडेल. 45 "अहो माझ्या लोकांनो,
तिच्यामधून बाहेर पडा! पलायन करून आपला जीव वाचवा! याहवेहच्या
भयंकर क्रोधापासून दूर पळा. 46 जेव्हा तुम्हाला देशात अफवा ऐकिवात
येतील तेव्हा तुमचे अंतःकरण खचू देऊ नका किंवा भयभीत होऊ नका;
देशात आणि एका राजाने दुसऱ्या राजाविरुद्ध केलेल्या हिंसाचारांच्या
अफवा ऐकू येतील, एक अफवा या वर्षी येते तर दुसरी पुढील वर्षी
येते. 47 असा समय निश्चित येईल जेव्हा मी बाबेलच्या मूर्तींना शिक्षा
करेन; तिच्या संपूर्ण देशाची अप्रतिष्ठा होईल वध केलेल्यांचे शव तिच्या
भूमीवर पडलेले दिसतील. 48 मग स्वर्गात व पृथ्वीवर व त्यामध्ये
असलेले सर्व बाबेलवरील विजयोत्सवाच्या आनंदाने गर्जना करतील,

कारण उत्तरेकडून विनाशक तिच्यावर हल्ला करतील.” असे याहवेह
जाहीर करतात. 49 “जसे संपूर्ण पृथ्वीवर वध झालेले मृतदेह पडतात,
तसेच इस्राएल लोकांच्या केलेल्या हत्येमुळे बाबेलचा पाडाव होईल.
50 जे तुम्ही तलवारीपासून वाचला आहात, ते तुम्ही निघून जा, उगाच
रेंगाळू नका! दूरवरील भूमीवर याहवेहचे स्मरण करा, आणि यरुशलेम
तुमच्या स्मरणात येवो.” 51 “आमची अप्रतिष्ठा झाली आहे, आमचा
अपमान झाला आहे लज्जेने आमची मुखमंडले झाकली गेली आहेत,
कारण परकीय लोकांनी याहवेहच्या भवनातील पवित्रस्थानी प्रवेश
केला आहे.” 52 याहवेह जाहीर करतात, “पण असे दिवस येत आहेत,
जेव्हा मी तिच्या मूर्तींना शिक्षा देईन, संपूर्ण देशभरातील जखमी लोक
कण्हतील. 53 बाबिलोन जरी गगनापर्यंत पोचली आणि तिने आपल्या
गढांची तटबंदी केली, तरी मी तिच्याविरुद्ध विनाशक पाठवेन,” याहवेह
जाहीर करतात. 54 “बाबेलमधून विलापाचा ध्वनी ऐकू येत आहे, तिच्या
घोर विनाशाचा ध्वनी बाबेलांच्या प्रदेशातूनच ऐकू येत आहे. 55 याहवेह
बाबेलचा विनाश करणार आहेत; तेच तिच्यामधील कोलाहल शांत
करतील. शत्रूंच्या लाटा तिच्यावर प्रचंड पाण्यासारख्या कोसळतील;
त्या आवाजाच्या गर्जनेचा प्रतिध्वनी ऐकू येईल. 56 बाबेलांच्या विरुद्ध
विनाशक येईल; तिचे योद्धे बंदी बनविले जातील, आणि त्यांचे धनुष्य
मोडून टाकण्यात येतील. कारण याहवेह परतफेड करणारे परमेश्वर
आहेत; ते पुरेपूर परतफेड करतील. 57 मी तिचे राज्यपाल, सुज्ञ लोक,
अधिपती, सेनापती व योद्धे या सर्वांना मद्यधुंद करेन; ते झोपतील आणि
पुन्हा कधीच उठणार नाहीत,” महाराज, सर्वसमर्थ याहवेह असे जाहीर
करतात. 58 सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: “बाबेलची दुर्गम तटबंदी
भुईसपाट होईल आणि तिच्या उंच वेशी अग्नीने भस्म करण्यात येतील;
लोकांचे कष्ट व्यर्थ ठरतील, देशाने केलेले श्रम अग्नीचे जळण होईल.”
59 सिद्कीयाहच्या कारकिर्दीच्या चौथ्या वर्षी जेव्हा यिर्मयाह संदेष्ट्याने
यहूदीयाचा राजा सिद्कीयाहसह बाबेलला गेला, तेव्हा त्याने सेरायाहस,
जो नेरीयाहचा पुत्र, जो महसेयाहचा नातू, तो सैन्यात दुय्यम दर्जाचा
एक अधिकारी होता त्याला हा संदेश दिला. 60 बाबेलवर जी भयंकर
अरिष्टे येणार होती, ती यिर्मयाहने एका गुंडाळीवर लिहिली—बाबेलवर
येणाऱ्या सर्व अरिष्टांची नोंद करून ठेवण्यात आली होती. 61 यिर्मयाह
सेरायाहाला म्हणाला, “तू बाबिलोन येथे गेल्यावर मी लिहिलेले सर्व
मोठ्याने वाच. 62 मग म्हण, ‘हे याहवेह, तुम्ही म्हटले की तुम्ही बाबेलचा
नाश कराल व तिथे कोणीही मनुष्य वा पशूप्राणी वसती करणार नाही;
ती कायमची ओसाड होईल.’ 63 मग तू ही गुंडाळी वाचून संपवलीस की
तिला एक दगड बांधून ती फरात नदीत फेकून दे. 64 आणि म्हण,
‘बाबेलही अशीच बुडेल व पुन्हा कधीही वर येणार नाही, कारण मी
तिच्यावर अरिष्ट आणणार आहे, आणि तिच्यामधील लोक पडतील.’”
इथे यिर्मयाहच्या संदेशाचा शेवट होतो.

**52** सिद्कीयाह एकवीस वर्षाचा असताना राजा झाला आणि त्याने
यरुशलेमात अकरा वर्षे राज्य केले. त्याच्या आईचे नाव हमूटल
असून ती लिब्नाह येथील यिर्मयाहची कन्या होती. 2 यहोयाकीमप्रमाणेच
त्याने याहवेहच्या दृष्टीने जे वाईट ते केले. 3 यरुशलेम व यहूदीयामध्ये
हे सर्व याहवेहच्या क्रोधामुळे घडले आणि शेवटी त्यांनी या लोकांना
स्वतःच्या समक्षतेतून काढून टाकले. आता सिद्कीयाहने बाबेलच्या
राजाविरुद्ध बंड केले. 4 म्हणून सिद्कीयाह राजाच्या कारकिर्दीच्या
नवव्या वर्षी, दहाव्या महिन्याच्या दहाव्या दिवशी, बाबेलचा राजा
नबुखद्नेस्सर आपले सर्व सैन्य घेऊन यरुशलेमवर चालून आला व
त्यांनी त्यांच्या सभोवार वेढा घालून मोर्चे बांधले. 5 सिद्कीयाह राजाच्या
कारकिर्दीच्या अकराव्या वर्षापर्यंत शहराला वेढा दिलेला होता. 6 चौथ्या
महिन्याच्या नवव्या दिवशी, शहरातील दुष्काळ इतका भयंकर झाला की
लोकांना खाण्यासाठी अन्न राहिले नाही. 7 तेव्हा नगराचा तट तोडण्यात
आला व सर्व सैनिक पळून गेले. सर्व सभोवताली बाबिलोनी सैन्याचा वेढा
असूनही ते रात्रीच्या वेळी राजाच्या बागेजवळ दोन भिंतीमध्ये असलेल्या
वेशीतून ते अराबाह च्या दिशेने पळून गेले. 8 परंतु बाबिलोनच्या
सैनिकांनी सिद्कीयाह राजाचा पाठलाग केला आणि त्याला यरीहोच्या
मैदानात पकडले, कारण त्याचे सर्व सैन्य त्याच्यापासून पांगून दूर
गेले होते, 9 आणि तो पकडला गेला. त्याला बाबिलोनी राजासमोर
हमाथ राज्यातील रिब्लाह या शहरात आणण्यात आले. त्या ठिकाणी
सिद्कीयाला शिक्षा सुनाविण्यात आली. 10 बाबेलचा राजाने रिब्लाहात
सिद्कीयाहच्या डोळयादेखत त्याच्या मुलांचा वध केला व यहूदीयाचे
सर्व प्रतिष्ठित लोक यांचाही वध केला. 11 मग त्याने सिद्कीयाहचे
डोळे उपटून काढले आणि त्याला बाबिलोन राजाकडे बंदिवान म्हणून
पाठविण्यासाठी कास्याच्या साखळयांनी बांधले. व बाबेलला नेऊन
मरेपर्यंत तुरुंगात टाकले. 12 बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर, याच्या
कारकिर्दीच्या एकोणविसाव्या वर्षाच्या पाचव्या महिन्याच्या दहाव्या
दिवशी, रक्षक दलाचा अधिकारी नबुजरदान यरुशलेमास आला. 13
त्याने याहवेहचे मंदिर, राजवाडा व यरुशलेमातील सर्व घरे अग्नीने
जाळून टाकली. प्रत्येक महत्त्वाची इमारत त्याने जाळून भस्म केली. 14
रक्षक दलाच्या अधिकाराच्या नेतृत्वाखाली खास्द्यांच्या सर्व सैनिकांनी
यरुशलेमची तटे पाडून टाकली. 15 नंतर रक्षक दलाचा अधिकारी
नबुजरदान याने काही अगदी गरीब लोक, शहराच्या विध्वंसातून वाचलेले
लोक, आणि जे बाबेलच्या राजाला शरण गेले होते त्यांना व बाकीचे
कारागीर यांना बंदिवासात नेले. 16 परंतु नबुजरदानने देशातील जे लोक
अत्यंत गरीब होते त्यांना द्राक्षमळयाची व शेताची मशागत करण्यास
मागे ठेवले. 17 बाबेलच्या लोकांनी याहवेहच्या मंदिरातील कास्याचे
खांब, बैठकी आणि कास्याची मोठी टाकी मोडली आणि सर्व कास्य ते
बाबेलास घेऊन गेले. 18 त्यांनी भांडी, फावडे, चिमटे, शिंपडण्याची
भांडी आणि मंदिरात उपासनेसाठी वापरण्यात येणारी कास्याची सर्व
भांडी सोबत नेली. 19 रक्षक दलाच्या अधिकाऱ्याने गंगाळे, अग्निपात्रे
आणि शिंपडण्याची भांडी, वाट्या, दीपस्तंभे, आणि पेयार्पणासाठी
वापरण्यात येणारी ताटे व पात्रे काढून घेतले—जे सर्व शुद्ध सोन्याचे
किंवा चांदीचे होते. 20 याहवेहच्या मंदिरासाठी शलोमोन राजाने तयार
केलेले दोन खांब, मोठी टाकी व त्याखालील बारा बैल आणि बैठकी

यांचे वजन करणे कठीण होते. 21 प्रत्येक खांब अठरा हात उंच आणि
बारा त्याचा हाताचा घेर होता; प्रत्येक चार बोटांइतके जाड आणि पोकळ
होते. 22 एका खांबावर कास्याचा कळस होता जो पाच हात उंच असून
त्यावर सभोवती कास्याच्या डाळिंबाचे नक्षीकाम होते. डाळिंबांसह दुसरा
खांबही तसाच होता. 23 खांबाच्या चारही बाजूंना शहाण्णव डाळिंबे
होती; राहिलेल्या भागावरच्या जाळीच्या नक्षीकामात एकूण शंभर
डाळिंबे कोरली होती. 24 रक्षक दलाच्या अधिकाऱ्याने प्रमुख याजक
सेरायाह, दुसरा याजक सफन्याह आणि तीन द्वारपाल यांना बंदिवान
म्हणून नेले. 25 जे अजूनही शहरात होते त्यांच्याकडून त्याने योद्ध्यांचा
एक अधिकारी आणि सात राजकीय सल्लागार घेतले. लोकांची सैन्यात
भरती करण्यासाठी मुख्य अधिकारी असलेल्या सचिवाला आणि शहरात
सापडलेल्या साठ माणसांनाही त्याने काढून नेले. 26 रक्षक दलाचा
अधिकारी नबुजरदान याने सर्वांना घेतले आणि रिब्लाह येथे बाबेलच्या
राजाकडे आणले. 27 हमाथ देशातील रिब्लाह येथे बाबेलच्या राजाने
त्यांचा वध केला. याप्रकारे यहूदीयाचे लोक आपल्या देशापासून दूर
बंदिवासात गेले. 28 बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरने बंदिवासात नेलेल्या
लोकांची संख्या अशी: सातव्या वर्षी, 3,023 यहूदी; 29 बाबेलचा
राजा नबुखद्नेस्सरच्या अठराव्या वर्षी, 832 लोक यरुशलेममधून; 30
नबुखद्नेस्सरच्या तेविसाव्या वर्षी, पहारेकऱ्यांचा नायक नबुजरदान
याने 745 यहूदी लोक बाबेलला नेले. 31 यहूदीयाचा राजा यहोयाखीन
याच्या बंदिवासातील सदतिसाव्या वर्षी, एवील-मरोदख हा बाबेलचा
राजा झाला. त्याच्या कारकिर्दीत, बाराव्या महिन्याच्या पंचविसाव्या
दिवशी त्याने यहूदीयाचा राजा यहोयाखीनला मुक्त केले व तुरुंगातून
बाहेर काढले. 32 तो त्याच्याशी कृपेने बोलला आणि त्याचे राजासन जे
राजे त्याच्यासोबत बाबिलोन येथे होते त्यांच्या राजासनापेक्षा उंच केले.
33 यहोयाखीनने तुरुंगातील कपडे वेगळे ठेवले आणि त्याने आयुष्यभर
राजाच्या मेजावर भोजन केले. 34 यहोयाखीन जिवंत असेपर्यंत बाबेलचा
राजा त्याला प्रती दिवस तो मरेपर्यंत नियमित पुरवठा देत असे.

# विलापगीत

1 एकेकाळी माणसांनी गजबजलेली ही नगरी, आता कशी निर्जन
झाली आहे! एकेकाळी राष्ट्रांमध्ये जी सर्वोत्कृष्ट नगरी होती, तिला
आता कसे वैधव्यच प्राप्त झाले आहे! एकेकाळची ही सर्व प्रांताची राणी
आता कशी दासी झाली आहे. 2 रात्रभर ती अत्यंत रडत असते; तिच्या
गालांवरून अश्रू ओघळत आहेत. तिच्या सर्व प्रियकरात तिचे सांत्वन
करणारा कोणी नाही; तिच्या सर्व मित्रांनी तिचा विश्वासघात केला आहे;
ते तिचे शत्रू बनले आहेत. 3 पीडा व कठोर परिश्रम केल्यानंतर यहूदाह
बंदिवासात गेली आहे. ती अन्य राष्ट्रांमध्ये राहते; आता तिला कुठेही
आराम मिळत नाही. जे तिचा पाठलाग करीत असत, त्यांनी तिच्या
पीडित परिस्थितीत तिला मागे टाकून दिले आहे. 4 सीयोनकडे जाणारे
रस्ते विलाप करीत आहेत, निर्धारित सणाला तिच्याकडे कोणीही येत
नाही. तिच्या सर्व वेशी उजाड झाल्या आहेत, तिचे याजक कण्हत
आहेत, तिच्या तरुणी शोकग्रस्त आहेत, आणि तिला अत्यंत पीडा होत
आहे. 5 तिचे प्रतिपक्षी तिचे मालक बनले आहेत; तिचे शत्रू सुखात
आहेत. याहवेहने तिला दुःख दिले आहे, कारण तिने अनेक पापे केली
आहेत. तिचे बालक बंदिवासात गेले आहेत. ते तिच्या शत्रूचे गुलाम
झाले आहेत. 6 सीयोनकन्येचे सर्व वैभव लुप्त झाले आहे. तिचे राजपुत्र
ज्यांना चरण्याकरिता कुरण उपलब्ध नाही अशा हरिणासारखे झाले
आहेत; सामर्थ्यहीन होऊन ते त्यांच्या पाठलाग करणाऱ्यांपासून त्यांनी
पलायन केले आहे. 7 यरुशलेमच्या या पीडित व भटकंतीमध्ये ती तिच्या
समृद्धीचे स्मरण करते जे तिचे गतवैभवाचे दिवस होते. जेव्हा तिचे लोक
शत्रूच्या हातात पडले, तिला साहाय्य करणारे कोणीही नव्हते. तिचे शत्रू
तिच्याकडे बघतात, आणि तिच्या विध्वंसामुळे तिचा उपहास करतात. 8
कारण यरुशलेमेने भयंकर पापे केली म्हणूनच ती किळसवाणी झाली
आहे. तिचा मान सन्मान करणारे आता तिला तुच्छ मानतात, कारण
तिला विवस्त्र असे त्यांनी पाहिले आहे; ती कण्हते व वळून निघून
जाते. 9 तिची अशुद्धता तिच्या वस्त्राला चिकटली आहे; तिने तिच्या
भविष्याचा विचार केला नाही. तिचे पतन अचंबित करून सोडणारे होते;
तिचे सांत्वन करणारा कोणी नाही. "हे याहवेह, माझी दुर्दशा पाहा,
शत्रू विजयी झाला आहे." 10 तिच्या सर्व संपत्तीवर तिच्या शत्रूंनी हात
टाकला आहे. परकीय राष्ट्रांनी तिच्या पवित्र मंदिरात प्रवेश करताना
तिने बघितले होते— तुम्ही निषिद्ध केलेल्यांनी तुमच्या सभास्थानात
प्रवेश केला. 11 अन्नाचा शोध घेत असताना तिचे लोक कण्हत आहेत;
मौल्यवान वस्तूच्या मोबदल्यात ते अन्न विकत घेत आहेत जेणेकरून ते
जिवंत राहतील. "हे याहवेह, पाहा आणि याकडे लक्ष द्या, मी कशी
घृणास्पद झाले आहे." 12 या वाटेच्या वाटसरूंनो माझी दुर्दशा पाहून
तुम्हाला काहीच वाटत नाही काय? मला जे दुःख देण्यात आले आहे,
त्या माझ्या दुःखासारखे दुसरे दुःख आहे काय? याहवेहने आपल्या
संतप्त क्रोधाच्या दिवशी ही वेदना माझ्यावर लादली आहे. 13 त्यांनी
उच्च स्थानातून अग्नी पाठविला आहे व तो माझ्या हाडांमध्ये जळत
आहे. त्यांनी माझ्या पावलात सापळा पसरविला आहे व मला मागे
वळविले आहे. त्यांनी मला उद्ध्वस्त केले आहे, मी दिवसभर मूर्छित होत
आहे. 14 माझी पापे गुलामगिरीचे जोखड बनली आहेत; त्यांच्या हातांनी
ती एकत्र विणली गेली आहेत. ती माझ्या गळयात अडकविण्यात आली
आहेत, आणि प्रभूने माझी शक्ती खचविली आहे. मी ज्यांचा सामना
करू शकत नाही, त्यांच्या हाती मला दिले आहे. 15 "माझ्यामध्ये
असलेल्या सर्व योद्ध्यांना प्रभूने नाकारले आहे; माझ्या तरुणांना चिरडून
टाकण्यासाठी प्रभूंनी एका मोठ्या सैन्यास हजर राहण्यास फर्माविले
आहे. त्यांच्या द्राक्षकुंडात प्रभूंनी कुमारी कन्या यहूदीयास तुडविले आहे.
16 "याकारणास्तव मी रडत आहे आणि माझ्या डोळयातून अश्रुपात होत
आहे. माझे सांत्वन करण्यास माझ्याजवळ कोणीही नाही, माझा आत्मा
पुनरुज्जीवित करण्यासाठी कोणीही नाही. माझी मुलेबाळे निराश्रित
झाली आहेत. कारण शत्रूचे वर्चस्व झाले आहे." 17 सीयोन हात पसरीत
आहे, पण तिचे सांत्वन करण्यास कोणीही नाही. कारण याहवेहने
याकोबाविषयी फर्मान काढले आहे तिचे शेजारीच तिचे शत्रू होवोत;
तिच्या शेजाऱ्यामध्ये यरुशलेम अमंगळ वस्तूसारखी झाली आहे. 18
"याहवेह नीतिमान आहेत, तरीसुद्धा मी त्यांच्या आज्ञेविरुद्ध बंड केले.
सर्व लोकांनो, इकडे लक्ष द्या; माझ्या वेदना पाहा. कारण माझे तरुण व
तरुणी बंदिवासात गेले आहेत. 19 "मी माझ्या मित्रगणांना बोलाविले
पण त्यांनी माझा विश्वासघात केला. माझे याजक आणि वडीलजन
स्वतःस जिवंत ठेवण्यासाठी जेव्हा ते अन्नाचा शोध घेत होते तेव्हा ते
नगरात नष्ट झाले. 20 "हे याहवेह, माझ्या वेदना पाहा! माझे अंतःकरण
यातनाग्रस्त झाले आहे, आणि माझे हृदय अस्वस्थ झाले आहे. कारण
मी अत्यंत बंडखोर झाले होते. बाहेर तलवार मला मृत्यू आणते; आत तर
केवळ मरणच आहे. 21 "लोकांनी माझे कण्हणे ऐकले आहे, पण माझे
सांत्वन करण्यास कोणीही नाही. माझ्या सर्व शत्रूंनी माझ्या संकटांबद्दल
ऐकले आहे तुम्ही जे केले ते पाहून त्यांना आनंद झाला आहे; तुम्ही
घोषणा केलेला दिवस येवो म्हणजे ते देखील माझ्यासारखेच होतील.
22 "त्यांची सर्व दुष्कृत्ये तुमच्यापुढे येवोत; माझ्या सर्व पापांमुळे तुम्ही
माझ्याशी जसा व्यवहार केला तसाच त्यांच्याशीही करा. माझे उसासे
खूप आहेत व माझे हृदय मूर्छित झाले आहे."

2 प्रभूने सीयोनकन्येला आपल्या क्रोधरूपी मेघाने कसे आच्छादून
टाकले आहे! त्यांनी इस्राएलचे वैभव स्वर्गातून पृथ्वीवर खाली धुळीत
फेकले आहे; क्रोधाच्या दिवशी त्यांनी आपल्या पादासनाचेही स्मरण
केले नाही. 2 प्रभूने कसलीच दयामाया न दाखविता याकोबाच्या सर्व
आवासांना गिळंकृत केले आहे; त्यांच्या क्रोधाग्नीने यहूदाह कन्येच्या
तटबंदीची प्रत्येक भिंत पाडून टाकली आहे. तिचे राज्य व तिचे अधिपती
या सर्वांना अपमानित करून त्यांनी जमीनदोस्त केले आहे. 3 त्यांच्या
क्रोधात त्यांनी इस्राएलचे प्रत्येक शिंग नष्ट केले आहे. शत्रूने हल्ला केला
तेव्हा त्यांनी त्यांचा संरक्षण करणारा उजवा हात काढून घेतला आहे.
पेटलेल्या अग्नीप्रमाणे त्यांनी याकोबाभोवती असलेले सर्वकाही भस्म
करून टाकले आहे. 4 शत्रूसारखे त्यांनी धनुष्य वाकविले आहे; त्यांचा

उजवा हात सज्ज झाला आहे. शत्रूसारखे त्यांनी नयनरम्य तरुणांचा
संहार केला आहे. त्यांनी त्यांच्या क्रोधाग्नीचा सीयोन कन्येच्या तंबूवर
वर्षाव केला आहे. 5 प्रभू शत्रूसारखे झाले आहेत; त्यांनी इस्राएलला
गिळंकृत केले आहे. त्यांनी तिचे सर्व राजवाडे गिळंकृत केले आहेत
आणि दुर्ग उद्ध्वस्त केले आहेत. यहूदीया कन्येचा शोक व विलाप त्यांनी
बहुगुणित केला आहे. 6 बागेसारख्या आवासांना त्यांनी उकिरड्यागत
केले आहे; त्यांच्या भेटण्याचे स्थान नष्ट केले आहे. याहवेहने सीयोनला
तिच्या सर्व निर्धारित उत्सव व शब्बाथाचे विस्मरण केले आहे; राजे व
याजक या दोघांना त्यांनी क्रोधित तिरस्काराने नाकारले आहे. 7 प्रभूने
आपल्या वेदीस नाकारले आहे आणि त्यांच्या पवित्रस्थानाचा त्याग
केला आहे. त्यांनी तिच्या राजवाड्यांच्या भिंती तिच्या शत्रूंच्या हातात
दिल्या आहेत; एका निर्धारित उत्सवाच्या दिवसात करण्याचा जयघोष
याहवेहच्या भवनात त्यांच्या शत्रूंनी केला आहे. 8 सीयोन कन्येच्या
भिंतींना धराशायी करण्याचा याहवेहने निर्धार केला आहे. त्यांनी मापक
दोरी ताणली आहे विनाश करण्यास आपला हात रोखला नाही. त्यांनी
संरक्षक भिंत व तटबंदीस विलाप करण्यास लावले ते एकत्रच ढासळून
पडले. 9 तिच्या वेशी जमिनीत धसल्या आहेत; त्यांच्या सळया मोडून
नष्ट झाल्या आहेत. तिचे राजे आणि अधिपती इतर देशात बंदिवासात
गेले आहेत, तिथे नियमशास्त्र राहिले नाही, आणि तेथील संदेष्ट्यांना
आता याहवेहकडून दृष्टान्तही मिळत नाहीत. 10 सीयोनकन्येचे वडीलजन
मूकपणे जमिनीवर बसले आहेत; त्यांनी मस्तकांवर धूळ शिंपडून
घेतली आहे आणि त्यांनी गोणपाट नेसले आहे. यरुशलेमच्या तरुणींनी
माना खाली घातल्या आहेत. 11 माझे डोळे आता रडून थकले आहेत,
मला आतून उत्कट यातना होत आहेत; माझे अंतःकरण जणू भूमीवर
ओतले जात आहे कारण माझ्या लोकांचा सर्वनाश झाला आहे, कारण
लहान मुले व तान्ही बाळे नगराच्या रस्त्यांवर मूर्छित होऊन पडत
आहेत. 12 ते त्यांच्या मातांना विचारत आहेत, “द्राक्षारस व धान्य
कुठे आहे?” ते नगराच्या रस्त्यांवर घायाळ झालेल्याप्रमाणे बेशुद्ध
होऊन पडत आहेत, त्यांच्या मातांच्या बाहूत या मुलांचे प्राण हळूहळू
निघून जात आहेत. 13 हे यरुशलेमकन्ये, सर्व जगात असले दुःख
मी तुला काय म्हणू? मी तुझी तुलना कशाशी करू? मी तुला कोणा
समान लेखू? जेणेकरून मी तुझे सांत्वन करू शकेन? हे सीयोनच्या
कुमारी कन्ये? तुझा घाव सागराएवढा खोल आहे. तुला कोण बरे करू
शकेल? 14 तुझ्या संदेष्ट्यांनी सांगितलेले दृष्टान्त खोटे व व्यर्थ होते;
तुला बंदिवासात पडण्यापासून वाचविण्याकरिता तुझी पापे उघडकीस
आणली नाहीत. त्यांनी तुला दिलेले संदेश खोटे व दिशाभूल करणारे
होते. 15 वाटेने जाणारे सर्व वाटसरू तुझी स्थिती बघून टाळ्या वाजवित
होते; यरुशलेमकन्ये. तुझा उपहास करून डोकी हालवून ते म्हणतात,
“सौंदर्याची परिपूर्णता, संपूर्ण पृथ्वीचा आनंद असे संबोधली जाणारी
नगरी ती हीच आहे का?” 16 तुझ्या सर्व शत्रूंनी तुझ्याविरुद्ध त्यांचे मुख
मोठे रुंद उघडले आहे; दात खाऊन रागाने फुत्कार टाकीत ते म्हणतात,
“आपण अखेरीस तिला गिळंकृत केले. या दिवसाची आम्ही किती
वाट पाहत होतो; ते बघण्यास आपण जिवंत आहोत.” 17 याहवेहने
योजल्यानुसार केले आहे; त्यांनी त्यांचे वचन पूर्ण केले, जे संकल्प
त्यांनी फार पूर्वी जाहीर केले होते. त्यांनी दयामाया न दाखविता तुम्हाला
जमीनदोस्त केले आहे, तुमची स्थिती बघून तुमच्या शत्रूचे समाधान केले
आहे, त्यांनी तुमच्या शत्रूंचे शिंग उंचावले आहे. 18 लोकांची अंतःकरणे.
प्रभूकडे विलाप करतात. सीयोन कन्येच्या तटांनो, स्वतःला विसावा
न देता, तुमचे डोळे आराम न करता एखाद्या नदीप्रमाणे तुमचे अश्रू
रात्रंदिवस वाहोत. 19 उठा, रात्री धावा करा, जसा रात्रीचा प्रहर सुरू
होतो; त्यांच्यापुढे आपले हात उंचावून, प्रत्येक रस्त्याच्या कोपर्‍यावर
भुकेने व्याकूळ होऊन बेशुद्ध पडणाऱ्या तुमच्या मुलांच्या जीवनासाठी
विनवण्या करा. प्रभूच्या समक्षतेत आपली अंतःकरणे पाण्यासारखी
ओता. 20 याहवेह, बघा व विचार करा: तुम्ही कधी तरी कोणालाही असे
वागविले आहे का? ज्या मातांनी आपल्या मुलांचे संगोपन केले, त्या
मातांनी ही आपली पोटची फळे खावीत काय? प्रभूच्या मंदिरातच त्यांचे
याजक आणि संदेष्ट्यांचा संहार व्हावा काय? 21 पाहा वृद्ध व तरुण
एकत्र रस्त्यांवरील धुळीत पडली आहेत; माझे तरुण व तरुणी शत्रूंच्या
तलवारींनी ठार होऊन मरून पडली आहेत. तुमच्या क्रोधाच्या दिवशी
तुम्ही त्यांचा संहार केला; कसलीच दयामाया न दाखविता तुम्ही त्यांचा
वध केला. 22 “सणासाठी आमंत्रित केल्याप्रमाणे, तुम्ही माझ्याविरुद्ध
संकटांना सर्व बाजूंनी बोलाविले. याहवेहच्या क्रोधाच्या दिवशी एकही
मनुष्य निसटला नाही किंवा जिवंत राहिला नाही. ज्यांचे मी संगोपन
केले आणि वाढविले, त्या सर्वांचा माझ्या शत्रूकडून नाश झाला आहे.”

**3** याहवेहच्या क्रोध-दंडाने कशा वेदना होतात, याचा प्रत्यक्ष अनुभव
घेतलेला मी मनुष्य आहे. 2 त्यांनी मला हाकलून लावले व प्रकाशात
नव्हे तर निबिड अंधारात मला चालविले आहे; 3 निश्चितच त्यांनी परत
परत, दिवसभर माझ्याविरुद्ध त्यांचा हात उगारला आहे. 4 त्यांनी माझे
मांस व माझी त्वचा जीर्ण केली आहेत आणि त्यांनी माझी हाडे मोडली
आहेत. 5 विषारी व कठीण परिश्रमाने हाल आणि यातना यांच्या कोंडीत
पकडून माझ्याभोवती वेढा दिला आहे. 6 जसे दीर्घकालापूर्वीच मृत
झाल्यागत त्यांनी मला अंधकारात राहण्यास सोडले आहे. 7 त्यांनी
माझ्याभोवती भिंत बांधली, म्हणजे मी सुटून जाऊ शकणार नाही;
त्यांनी मला अवजड साखळदंडानी जखडले आहे. 8 जरी मी एवढा धावा
करतो व मदतीसाठी ओरडतो, तरी ते माझ्या प्रार्थना ऐकत नाहीत. 9
मोठमोठे दगड ठेऊन माझ्या मार्गात बाधा घातली आहे. त्यांनी माझी
वाट आडवळणांची केली आहे. 10 दबा धरून बसलेल्या अस्वलाप्रमाणे,
लपून बसलेल्या सिंहाप्रमाणे 11 त्यांनी मला माझ्या वाटेवरून ओढून नेले
आणि छिन्नविछिन्न केले आणि मला तसेच असहाय्य टाकून दिले. 12
त्यांनी आपले धनुष्य ताणून मला आपल्या बाणाचे लक्ष्य बनविले आहे.
13 आणि त्यांच्या भात्यातील बाणांनी माझे अंतर्याम छेदले आहे. 14 मी
माझ्या लोकांच्या उपहासाचा विषय झालो आहे; ते दिवसभर माझ्या
चेष्टेची गीते गातात. 15 प्रभूने मला कडू दवण्याने भरून टाकले आहे,
आणि मला आंब प्यावयास दिली आहे. 16 त्यांनी माझे दात खड्यांनी

पाडले आहेत. त्यांनी मला धुळीत तुडविले आहे. 17 माझी शांती हिरावून
गेली आहे; समृद्धी म्हणजे काय असते हे मी विसरलो आहे. 18 म्हणून
मी म्हणतो, “माझे वैभव निघून गेले आहे व याहवेहकडून काहीही
मिळण्याची आशा नष्ट झाली आहे.” 19 माझी पीडा व भटकंतीची,
विषारी वनस्पती व कडू दवणा यांची मला आठवण येते. 20 ते माझ्या
चांगलेच स्मरणात आहे, आणि त्याने माझा आत्मा अत्यंत खिन्न होतो.
21 तरीपण आशेचा हा एक किरण उरला आहे: 22 याहवेहच्या महान
प्रीतीमुळे आम्ही पूर्णपणे भस्म झालेलो नाही कारण त्यांच्या कृपेचा
कधीही ऱ्हास होत नाही. 23 त्यांची प्रेमदया प्रतिदिवशी नवी होते; तुमची
विश्वसनीयता महान आहे. 24 मी स्वतःस म्हणतो, “याहवेह माझा वाटा
आहेत; म्हणूनच मी त्यांची प्रतीक्षा करेन.” 25 जे याहवेहवर त्यांची
आशा ठेवतात, आणि जे त्यांचा शोध घेतात, त्या सर्वांसाठी ते भले
आहेत. 26 याहवेहच्या तारणाची शांतपणे वाट पाहणे हितकारक आहे.
27 मनुष्याने त्याच्या तारुण्यात जू वाहणे त्याच्या हितासाठी आहे. 28
कारण ते याहवेहनेच त्याच्यावर लादले आहे म्हणून त्याने एकांतात शांत
बसावे. 29 त्याला त्याचे मुख धुळीत पुरू दे— तरी आशा कायम असेल.
30 जे त्याला चपराक मारतात, त्यांच्यापुढे त्याने दुसरा गालही करावा,
आणि तो सर्व अपमानाने भरून जाऊ दे. 31 कारण प्रभू कोणाचाही
कायमचा त्याग करत नाहीत. 32 जरी त्यांनी त्याला दुःख दिले, तरी ते
करुणा करतात, त्यांची महान प्रेमदया अथांग आहे. 33 ते स्वखुशीने
माणसांना पीडा देत नाहीत व त्यांना दुखवित नाहीत. 34 जगातील
सर्व बंदिवानांना पायाखाली तुडवून चिरडणे, 35 परमोच्चांनी दिलेले
हक्क त्यांच्यापासून हिरावून घेणे, 36 कोणा मनुष्याची न्याय-वंचना
करणे— या गोष्टी प्रभू बघणार नाहीत काय? 37 प्रभूने परवानगी
दिल्याशिवाय बोलून तसे घडविण्याचे सामर्थ्य कोणामध्ये आहे? 38
अनिष्ट व इष्ट ही दोन्हीही परमोच्चाच्या मुखातून येत नाहीत काय? 39
आमच्या पापांबद्दल आम्हाला शिक्षा होते, तेव्हा आम्ही जिवंत मानवांनी
तक्रार का करावी? 40 आपण स्वतःच्या आचरणांचे निरीक्षण करू व
त्यांची परीक्षा घेऊ, आणि परत याहवेहकडे वळू. 41 आपण स्वर्गातील
परमेश्वराकडे आपले अंतःकरण आणि आपले हात उंच करू व म्हणू:
42 आम्ही पाप केले आणि बंड केले आणि तुम्ही त्याची क्षमा केली
नाही. 43 “तुम्ही आपल्या संतापाने स्वतःला वेष्टिले आणि आमचा
पाठलाग केला; तुम्ही निर्दयपणे संहार केला. 44 तुम्ही स्वतःस मेघाने
आच्छादून घेतले आहे जेणेकरून कोणतीही प्रार्थना तुमच्यापर्यंत पोचू
नये. 45 तुम्ही आम्हाला राष्ट्रांमध्ये केरकचरा गाळ व उकिरडा केले
आहे. 46 “सर्व शत्रूंनी आपले मुख आमच्याविरुद्ध खूप रुंद उघडले
आहे. 47 आम्ही दहशत व जोखिम, विनाश आणि विध्वंस यातून गेलो
आहोत.” 48 माझ्या लोकांच्या विनाशामुळे माझ्या डोळ्यांतून अश्रूंचे
प्रवाह निघत आहेत. 49 माझे डोळे अखंडपणे, न थांबता, अश्रुपात
करीत राहतील, 50 याहवेह स्वर्गातून खाली दृष्टी करून पाहीपर्यंत ते
वाहत राहतील. 51 माझ्या नगरातील स्त्रियांना बघून माझे अंतःकरण
पीडित होत आहे. 52 जे विनाकारण माझे शत्रू बनले होते, त्यांनी
एखाद्या पक्ष्याप्रमाणे माझी शिकार केली आहे. 53 त्यांनी एका खड्ड्यात
माझा जीव घेण्याचा प्रयत्न केला आणि माझ्यावर दगडमार केला; 54
पाणी माझ्या डोक्याच्या वरपर्यंत आले, आणि मला वाटले की आता
माझा नाश होणार. 55 याहवेह, त्या खोल डोहातून मी तुमच्या नावाचा
धावा केला, 56 तुम्ही माझी विनंती ऐकली: “माझ्या विनवणीकडे तुम्ही
दुर्लक्ष करू नका.” 57 मी धावा करताच तुम्ही मजजवळ आले आणि
म्हणाले, “भिऊ नकोस.” 58 हे प्रभू, तुम्हीच माझा वाद चालविला;
तुम्ही माझ्या जीवनाची खंडणी दिली. 59 याहवेह, माझ्यावर झालेला
अन्याय तुम्ही पाहिला आहे. तुम्हीच माझी बाजू उचलून धरा! 60 तुम्ही
माझ्याविरुद्ध असलेली सुडाची गहनता, त्यांनी रचलेले सर्व कारस्थान
तुम्ही पाहिले आहे. 61 याहवेह, त्यांनी केलेले अपमान तुम्ही ऐकले
आहेत, त्यांनी रचलेले सर्व कारस्थान— 62 माझे शत्रू माझ्याविरुद्ध
दिवसभर काय बोलतात व काय कुजबुजतात, हे सर्व तुम्ही ऐकले आहे.
63 त्यांच्याकडे बघा! उभे राहून वा बसून, ते माझ्या उपहासाची गाणी
गातात. 64 हे याहवेह, त्यांच्या दुष्कृत्यांबद्दल ते ज्यास पात्र आहेत, असे
प्रतिफळ त्यांना द्या. 65 त्यांच्या हृदयावर आवरण टाका, तुमचा शाप
त्यांच्यावर पडो! 66 क्रोधाने त्यांचा पाठलाग करा आणि याहवेहच्या
आकाशाखालून त्यांना पूर्णपणे नाहीसे करा.

**4** सोन्याची चमक कशी नाहीशी झाली आहे, उत्तम सोने निस्तेज झाले
आहे! पवित्र रत्ने प्रत्येक रस्त्याच्या कोपऱ्यात विखुरली आहेत. 2
सुवर्णतुल्य असलेल्या, सीयोनाच्या लेकरांना, आता कुंभाराच्या हातांनी
घडविलेल्या मातीच्या पात्रांप्रमाणे लेखले जात आहे! 3 कोल्हीदेखील
आपल्या पिलांना स्तनपान करते, पण माझे लोक वाळवंटातील
शहामृगांसारखे निर्दयी झाले आहेत. 4 तहानेमुळे शिशूंच्या जिभा टाळूला
चिकटल्या आहेत; भाकरीसाठी लेकरे याचना करीत आहेत, पण त्यांना
कोणीही देत नाही. 5 उत्तम पक्वान्ने खाणारे आता रस्तोरस्ती निराधार
असे फिरत आहेत. जांभळी शाही वस्त्रे परिधान केलेले आता राखेत
लोळत आहेत. 6 माझ्या लोकांची शिक्षा सदोमापेक्षाही घोर झाली आहे,
ज्यांना इतर कोणी मदत करण्याआधी त्यांचा एका क्षणात नायनाट
झाला. 7 त्यांचे अधिपती हिमापेक्षा अधिक तेजस्वी आणि दूधापेक्षा
अधिक धवल होते, त्यांचे देह माणकांपेक्षा अधिक तुकतुकीत, सशक्त
व निरोगी त्यांची देहरचना नीलरत्नापेक्षा अधिक तेजस्वी होती. 8
पण आता ते चेहरे काजळीपेक्षा काळेकुट्ट झाले आहेत; त्यांना वाटेत
कोणी ओळखू शकत नाही. त्यांची कातडी हाडांना चिकटली आहे; ती
काठीसारखी शुष्क झाली आहे. 9 उपासमारीने हळूहळू मरण्यापेक्षा
तलवारीने मरणारे फार बरे; कारण शेतातील उपज नसल्यामुळे भुकेपायी
व्याकूळ होऊन ते क्षय पावतात. 10 करुणामयी स्त्रियांनी स्वतःच्या
हाताने आपलीच मुले-बाळे शिजविली, जेव्हा माझ्या लोकांचा नायनाट
झाला, ती त्यांचे अन्न बनली. 11 याहवेहने त्यांच्या क्रोधास निर्बंध
सोडले आहे; त्यांचा अत्यंत भयानक क्रोध ओतला गेला आहे. त्यांनी
सीयोनमध्ये अग्नी पेटविला त्या अग्नीने तिच्या पायांना भस्म करून
टाकले आहे. 12 यरुशलेमच्या वेशीतून आत एखादा शत्रू वा विरोधी शिरू

शकेल, यावर संपूर्ण पृथ्वीवरील राजांनी तसेच जगातील कोणत्याही
लोकांनी विश्वास ठेवला नाही. 13 तेथील संदेष्ट्यांनी केलेली पापे आणि
निर्दोष व्यक्तींचे रक्त या नगरीत सांडून याजकांनी केलेला अधर्मामुळे
तसे घडले. 14 आता तेच लोक आंधळयासारखे झोकांड्या खात चालले
आहेत. ते रक्ताने माखून असे भ्रष्ट झाले आहेत की त्यांच्या वस्त्रांना
स्पर्श करण्याचे कोणीही धाडस करीत नाही. 15 लोक त्यांच्यावर
खेकसतात: “चालते व्हा! तुम्ही अशुद्ध आहात! दूर! दूर! आम्हाला
स्पर्श करू नका!” जेव्हा ते पलायन करतात आणि तिथे भटकतात,
त्या देशातील लोक म्हणतात, “ते आता इथे राहू शकत नाहीत.” 16
स्वत: याहवेहने त्यांची पांगापांग केली आहे; ते आता त्यांचा सांभाळ
करणार नाहीत. याजक सन्मानयोग्य राहिले नाहीत, वडीलजन कृपेयोग्य
राहिले नाहीत. 17 शिवाय, मदतगार शोधून आमची दृष्टी मंद झाली
आहे; जे आमच्या मदतीसाठी येणार नाहीत अशा राष्ट्रांवर आमच्या
बुरुजांवरून आम्ही लक्ष ठेवले. 18 आम्हाला बाहेर रस्त्यांवर चालता येत
नाही, कारण लोक प्रत्येक पावलावर आमचा पाठलाग करतात. आमचा
अंत जवळ आला आहे, आणि आमचे मोजकेच दिवस राहिले आहेत.
आमचा अंत आलेलाच आहे. 19 आमचा पाठलाग करणारे आकाशातील
गरुडांपेक्षा वेगवान आहेत; ते पर्वतांवरही आम्हाला शोधून काढतात
आणि वाळवंटात आमची वाट पाहत दबा धरून बसलेले असतात. 20
याहवेह द्वारा अभिषिक्त, आमच्या जीवनाचा श्वास, त्यांच्या जाळयात
अडकला. आम्ही विचार केला होता की त्यांच्या छत्राखाली कोणत्याही
परकीय राष्ट्रात आम्ही रहिवास करू. 21 ऊस प्रांतात राहणाऱ्या एदोम
कन्ये, हर्ष कर व उल्हासित हो. परंतु तुझ्याकडे देखील तो प्याला
आणल्या जाईल; तू तो पिऊन मदोन्मत्त होऊन पूर्णत: निर्वस्त्र होशील.
22 सीयोनकन्ये, तुझी शिक्षा संपेल, ते तुझा बंदिवास वाढविणार नाहीत.
पण एदोम कन्ये, तुझ्या पापांची ते तुला शिक्षा देतील, आणि तुझी
दुष्टता उघडकीस आणतील.

**5** हे याहवेह, आम्हाला काय झाले आहे यांचे स्मरण करा; आमच्या
अपमानाकडे लक्ष द्या. 2 आमचे वतन अपरिचितांना देण्यात आले
आहे, आमची घरे परकियांनी दिली आहेत. 3 आम्ही पितृहीन झालो
आहोत, आमच्या माता विधवा झाल्या आहेत. 4 पिण्याचे पाणीदेखील
आम्हाला विकत घ्यावे लागते; किंमत चुकविल्याशिवाय आम्हाला
जळण मिळत नाही. 5 पाठलाग करणारे आमच्या अगदी जवळ येऊन
पोचले आहेत. आम्ही अत्यंत थकलो आहोत व आम्हाला आराम असा
नाहीच. 6 पुरेशी भाकरी मिळण्याकरिता आम्ही इजिप्तला आणि
अश्शूरला स्वत:चे समर्पण केले आहे. 7 आमच्या पूर्वजांनी पाप केले व ते
आता हयात नाहीत. आणि आम्ही त्यांची शिक्षा भोगत आहोत. 8 गुलाम
आता आमचे धनी झाले आहेत, त्यांच्या हातातून आम्हाला सोडविणारा
कोणीही नाही. 9 भाकरी मिळविण्यासाठी आम्हाला आमचा जीव
धोक्यात घालावा लागतो, कारण निर्जन प्रदेशात तलवारीने वध होऊ
शकतो. 10 आमची त्वचा भट्टीप्रमाणे तप्त झाली आहे, कारण भुकेमुळे
आम्ही तापाळलेले आहोत. 11 स्त्रियांना सीयोनात भ्रष्ट करण्यात आले
आहे, व कुमारिकांना यहूदीयातील नगरात. 12 आमच्या अधिपतींना
त्यांच्या हातांवर लटकविण्यात आले आहे; आमच्या वडीलजनांचा
मान राखला जात नाही. 13 तरुण गिरणीवर काबाडकष्ट करतात; तर
किशोर लाकडाच्या भारी ओझ्यांखाली डळमळतात. 14 वडीलजनांनी
वेशीतील बैठकी सोडून दिल्या आहेत; तरुणांनी त्यांचे संगीत बंद केले
आहे. 15 आमच्या हृदयातील आनंद निघून गेला आहे; आमच्या नृत्यांचे
रूपांतर विलापात झाले आहे. 16 आमच्या मस्तकावरील मुकुट धुळीत
पडला आहे. धिक्कार असो आमचा, कारण आम्ही पाप केले आहे! 17
याकारणास्तव आमची अंत:करणे खचली आहेत, या सर्व गोष्टींमुळे
आमचे डोळे निस्तेज झाले आहेत. 18 सीयोन पर्वत आता ओसाड झाला
आहे, तिथे आता लांडगे शिकारीसाठी संचार करतात. 19 हे याहवेह,
तुमचे शासन सदासर्वकाळचे आहे; तुमचे राजासन पिढ्यान् पिढ्या
स्थिर आहे. 20 मग तुम्ही आम्हाला नेहमी का विसरता? तुम्ही आमचा
इतक्या दीर्घकालापर्यंत त्याग का केला? 21 याहवेह, तुम्ही आमचा
स्वत:शी पुन: संबंध स्थापित करा, म्हणजे आम्ही तुमच्याकडे परत
येऊ; पूर्वीच्या दिवसांसारखे आमच्या दिवसांना नवनिर्मित करा, 22 जर
तुम्ही आमच्यावर मर्यादेपलिकडे क्रोधित झाला नसाल आणि आमचा
कायमचा त्याग केला नसेल तर.

# यहेज्केल

**1** माझ्या तिसाव्या वर्षी, चौथ्या महिन्याच्या पाचव्या दिवशी, खेबर
नदीजवळ मी निर्वासित लोकांबरोबर असताना, स्वर्ग उघडले आणि
मी परमेश्वराचा दृष्टान्त पाहिला. 2 यहोयाकीन राजाच्या बंदिवासाच्या
पाचव्या वर्षी; महिन्याच्या पाचव्या दिवशी; 3 बूजीचा पुत्र यहेज्केल
याजक बाबिलोनी लोकांच्या देशात, खेबर नदीच्या किनाऱ्याकडे
असताना याहवेहचे वचन त्याच्याकडे आले; तिथे याहवेहचा हात
त्याच्यावर होता. 4 मी दृष्टी लावली आणि उत्तरेकडून तुफानी वारा,
चकाकणाऱ्या विजांसहित एक मोठा ढग प्रखर प्रकाशाने गुंडाळलेला
असा मला दिसला. अग्नीचा मध्यभाग झळकत्या धातूसारखा होता, 5
आणि त्या अग्नीमध्ये चार जिवंत प्राण्यांसारखे काही होते. त्यांचे रूप
मनुष्यांसारखे होते, 6 परंतु प्रत्येकाला चार मुखे व चार पंख होते. 7 त्यांचे
पाय सरळ होते; त्यांच्या पायाचे तळवे वासराच्या तळव्यांसारखे असून
ते उजळत्या कास्यासारखे चमकत होते. 8 त्यांच्या चारही बाजूच्या
पंखांखाली त्यांना मानवी हात होते. त्या चौघांना मुखे व पंख होते. 9
एकाचे पंख दुसऱ्याच्या पंखांना स्पर्श करीत होते. प्रत्येक सरळ पुढे जात
असे व हालचाल करताना वळत नसे. 10 त्यांची मुखे अशा प्रकारे दिसत
होती: प्रत्येकाला एक मानवी मुख होते, प्रत्येकाच्या उजव्या बाजूचे मुख
सिंहाचे होते, आणि डावीकडील मुख बैलाचे होते; प्रत्येकाला गरुडाचे
मुख सुद्धा होते. 11 अशाप्रकारे त्यांची मुखे होती. प्रत्येकाचे वरच्या
बाजूने पसरलेले पंख होते जे त्यांच्या बाजूला असलेल्या प्राण्याच्या
पंखाला स्पर्श करीत होते; आणि प्रत्येकाला आणखी दोन पंख होते
ज्यांनी त्यांचे अंग झाकले जाई. 12 आत्मा जाईल तिथे ते प्रत्येक सरळ
पुढे जात असत आणि जात असताना ते अजिबात वळत नसत. 13
त्या जिवंत प्राण्यांचे रूप जळत्या निखाऱ्यासारखे किंवा मशालीसारखे
होते. अग्नी त्या प्राण्यांमधून पुढे मागे जात असे; तो प्रखर होता आणि
त्यातून विजा चमकत होत्या. 14 ते प्राणी विजेच्या गतीने इकडून तिकडे
धावत असत. 15 जेव्हा मी त्या जिवंत प्राण्यांकडे पाहात होतो, तेव्हा
मला दिसले प्रत्येक प्राण्याजवळ त्यांच्या चार मुखांच्या बाजूला भूमीवर
एकएक चाक होते. 16 त्या चाकांचे रूप व घडण अशाप्रकारे होते:
ते पुष्कराजसारखे चमकत होते आणि चारही चाके सारखीच दिसत
होती. ते असे दिसत होते की जसे एका चाकात दुसरे चाक आहे. 17
ते चालत असताना, ज्या दिशेकडे त्यांच्यापैकी एकाचे मुख आहे त्या
कोणत्याही एका दिशेने चालत असत; आणि ते प्राणी जात असता
चाकांनी आपली दिशा बदलली नाही. 18 त्यांच्या काठा उंच व भयावह
होत्या आणि चारही कडांना सर्वत्र डोळे होते. 19 ते जिवंत प्राणी जसे
पुढे जात, त्यांच्या बाजूला असलेली चाकेसुद्धा पुढे जात असत; आणि
जेव्हा जिवंत प्राणी भूमीवरून उठत, चाकेही उठत असत. 20 जिथे
कुठे आत्मा जाईल, तिथे ते जाई, आणि त्यांच्याबरोबर चाकेसुद्धा उठत
असत, कारण त्या जिवंत प्राण्यांचा आत्मा त्या चाकांमध्ये होता. 21
जेव्हा प्राणी पुढे जात, तेव्हा ते देखील पुढे जात; जेव्हा प्राणी स्थिर
उभे राहत, ते देखील स्थिर उभे राहत असत; आणि जेव्हा प्राणी
भूमीवरून उठत, चाकेसुद्धा त्यांच्याबरोबर उठत असत, कारण त्या
जिवंत प्राण्यांचा आत्मा त्या चाकांमध्ये होता. 22 त्या जिवंत प्राण्यांच्या
डोक्यावर घुमटासारखे दिसणारे, स्फटिकासारखे चमकणारे अद्भुत
असे काहीतरी होते. 23 त्या घुमटाखाली त्यांचे पंख एकमेकांकडे
पसरलेले होते आणि प्रत्येकाचे दोन पंख त्यांचे अंग झाकीत होते. 24 ते
प्राणी पुढे चालत, तेव्हा मी त्यांच्या पंखांचा आवाज ऐकला, तो जोरात
वाहणाऱ्या जलाशयासारखा, सर्वसमर्थाच्या वाणीसारखा, लष्करी
सेनेच्या घोषणेसारखा होता. जेव्हा ते स्थिर उभे राहत, तेव्हा ते त्यांची
पंखे खाली करीत असत. 25 ते त्यांचे पंख खाली करून उभे असताना
त्यांच्या डोक्यावरील घुमटामधून एक वाणी आली. 26 त्यांच्या डोक्यावर
असलेल्या घुमटावर नीलमणी रत्नाच्या सिंहासनासारखे काहीतरी होते
आणि त्या सिंहासनावर उंच मनुष्याच्या आकृतिसारखा कोणी होता. 27
त्याचा कमरेसारखा दिसणारा वरचा भाग चकाकत्या धातूसारखा, जणू
काही अग्नीने प्रज्वलित झाला होता आणि कमरेपासून खालचा भाग
अग्नीसारखा होता; आणि त्याच्याभोवती अप्रतिम प्रकाश झळकत
होता. 28 पावसाच्या दिवशी मेघांत दिसणाऱ्या मेघधनुष्यासारखे त्याच्या
सभोवती तेज होते. याहवेहच्या वैभवासारखे त्याचे रूप होते. जेव्हा मी ते
पाहिले, तेव्हा मी उपडा पडलो आणि बोलणाऱ्याची वाणी मी ऐकली.

**2** तो मला म्हणाला, “हे मानवपुत्रा, तुझ्या पायांवर उभा राहा,
म्हणजे मी तुझ्याशी बोलेन.” 2 तो बोलत असताना, आत्म्याने
माझ्यामध्ये प्रवेश केला व मला माझ्या पायांवर उभे केले आणि तो
माझ्याशी बोलताना मी ऐकले. 3 तो म्हणाला, “हे मानवपुत्रा, ज्या
राष्ट्राने माझ्याविरुद्ध बंड केले, अशा बंडखोर इस्राएल राष्ट्राकडे मी तुला
पाठवित आहे; ते व त्यांचे पूर्वज यांनी आजपर्यंत माझ्याशी फितुरी
केली आहे. 4 ज्या लोकांकडे मी तुला पाठवित आहे ते उद्धट व हट्टी
आहेत. त्यांना सांग, ‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात.’ 5 ते ऐको
किंवा न ऐकोत—कारण ते बंडखोर लोक आहेत—त्यांना कळेल की
त्यांच्यामध्ये एक संदेष्टा आहे. 6 आणि हे मानवपुत्रा, त्यांना किंवा
त्यांच्या शब्दांना घाबरू नकोस. तुझ्याभोवती झुडपे व काटे असतील
आणि तू विंचवांमध्ये राहशील तरी घाबरू नकोस. जरी ते बंडखोर लोक
आहेत तरी ते काय बोलतात त्याला तू घाबरू नकोस किंवा त्यांना
भयभीत होऊ नकोस. 7 तू माझे शब्द त्यांना सांगितले पाहिजे, मग ते
ऐको किंवा न ऐकोत, कारण ते बंडखोर आहेत. 8 परंतु तू हे मानवपुत्रा,
मी तुला जे सांगतो ते ऐक. त्या बंडखोर लोकांप्रमाणे तू बंड करू नकोस;
तुझे तोंड उघड आणि मी तुला जे देतो ते खा.” 9 तेव्हा मी पाहिले, की
एक हात माझ्याकडे पसरलेला होता आणि त्यात एक गुंडाळी होती, 10
ती त्याने माझ्यापुढे उघडली. त्याच्या दोन्ही बाजूंना विलाप आणि शोक
आणि दुःखाचे शब्द लिहिलेले होते.

**3** आणि तो मला म्हणाला, “हे मानवपुत्रा, तुझ्यापुढे जे आहे ते खा, ही
गुंडाळी खा; नंतर इस्राएली लोकांशी बोल.” 2 तेव्हा मी आपले तोंड

उघडले आणि त्याने मला खाण्यासाठी गुंडाळी दिली. 3 तेव्हा तो मला
म्हणाला, “मानवपुत्रा, ही जी गुंडाळी मी तुला देत आहे ती पोटभरून
खा.” म्हणून ती मी खाल्ली आणि ती माझ्या तोंडात मधासारखी गोड
लागली. 4 नंतर तो मला म्हणाला, “हे मानवपुत्रा, आता इस्राएली
लोकांकडे जा आणि त्यांना माझी वचने सांग. 5 अस्पष्ट बोलीच्या
किंवा अनोळखी भाषेच्या लोकांकडे नाही, तर इस्राएली लोकांकडे
तुला पाठवले जात आहे; 6 दुर्बोध किंवा अनोळखी भाषेचे पुष्कळ
लोक, ज्यांची भाषा तुला समजत नाही, त्यांच्याकडे नाही. खचितच
जर त्यांच्याकडे मी तुला पाठवले तर त्यांनी तुझे ऐकले असते. 7
परंतु इस्राएल लोक तुझे ऐकत नाही कारण ते माझे वचन ऐकू इच्छित
नाही, कारण सर्व इस्राएली लोक कठोर व हट्टी आहेत. 8 पण मी
तुला त्यांच्यासारखाच निग्रही व कठोर बनवीन. 9 मी तुझे कपाळ
हिऱ्यापेक्षा अधिक कठोर, गारगोटीपेक्षा कठीण करेन, जरी ते बंडखोर
लोक आहेत तरी त्यांना भयभीत होऊ नको; किंवा घाबरू नको.” 10
आणि तो मला म्हणाला, “मानवपुत्रा, मी तुझ्याशी जी वचने बोलतो ती
काळजीपूर्वक ऐक आणि आपल्या हृदयात जपून ठेव. 11 तर आता
निर्वासित असलेल्या तुझ्या लोकांकडे जा आणि त्यांच्याशी बोल. त्यांना
सांग, ‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात,’ मग ते तुझे ऐको किंवा न
ऐकोत.” 12 मग आत्म्याने मला वर उचलले आणि माझ्या पाठीमागून
मोठ्या गर्जनेचा मी आवाज ऐकला, जेव्हा धन्य याहवेहचे वैभव आपल्या
स्थानातून उठले. 13 हा त्या जिवंत प्राण्यांच्या पंखांचा आवाज होता,
जे एकमेकांच्या पंखांना घासत होते आणि त्याच्या बाजूंना असलेल्या
चाकांचा मोठ्या गर्जनेचा आवाज होता. 14 तेव्हा आत्म्याने मला वर
उचलले आणि मी माझ्या आत्म्यात कटूत्व व रागाने भरून दूर गेलो
आणि याहवेहचा मजबूत हात माझ्यावर होता. 15 खेबर नदीजवळ
तेल-अवीवकडे राहत असलेल्या निर्वासित लोकांकडे मी आलो आणि
ते जिथे राहत होते, तिथे त्यांच्याबरोबर; मी अतिदुःखाने सात दिवस
बसलो. 16 सात दिवसांच्या शेवटी, याहवेहचे वचन माझ्याकडे आले:
17 “मानवपुत्रा, मी तुला इस्राएली लोकांचा पहारेकरी केले आहे; तर जे
वचन मी सांगतो ते ऐक आणि माझ्यावतीने त्यांना सावध कर. 18
जेव्हा मी दुष्टाला म्हणतो, ‘तू खचितच मरशील,’ आणि त्या व्यक्तीने
आपल्या मार्गांपासून वळावे म्हणून तू त्यांना चेतावणी दिली नाहीस
किंवा त्यांनी त्यांचे दुष्टमार्ग सोडून त्यांचा जीव वाचवावा म्हणून तू त्यांना
सांगितले नाहीस, तर ते दुष्ट व्यक्ती त्यांच्या पापामुळे मरतील आणि
त्यांच्या रक्तासाठी मी तुला दोषी ठरवेन. 19 परंतु त्या दुष्ट व्यक्तीने
त्याच्या दुष्टाईपासून व त्यांच्या कुमार्गापासून वळावे म्हणून तू त्याला
सावध केलेस आणि ते तसे करीत नाहीत, तर ते त्यांच्या पापामुळे
मरतील; परंतु तू स्वतः वाचशील. 20 “त्याच प्रकारे, जेव्हा एखादा
न्यायी आपल्या न्यायत्वापासून मागे फिरतो आणि जे वाईट ते करतो
आणि मी त्यांच्यापुढे एक अडखळण ठेवेन आणि तो मरण पावेल.
कारण तू त्याला चेतावणी दिली नाही, तो त्याच्या पापामुळे मरेल. जी
न्यायीपणाची कृत्ये त्या व्यक्तीने केली ती आठवली जाणार नाहीत,
आणि त्याच्या रक्तासाठी मी तुला दोषी ठरवेन. 21 परंतु पाप करू
नये म्हणून तू त्या न्यायी व्यक्तीला चेतावणी दिली आणि त्याने पाप
केले नाही आणि त्याने ती चेतावणी स्वीकारली म्हणून तो खचितच
जगेल आणि तू स्वतःला वाचवशील.” 22 त्या ठिकाणी याहवेहचा हात
माझ्यावर होता, आणि ते मला म्हणाले, “ऊठ आणि मैदानाकडे जा,
तिथे मी तुझ्याशी बोलेन.” 23 तेव्हा मी उठलो व मैदानाकडे गेलो.
आणि मी खेबर नदीकाठी पाहिलेल्या वैभवासारखे याहवेहचे वैभव तिथे
उभे होते आणि मी उपडा पडलो. 24 नंतर आत्मा माझ्यामध्ये आला
आणि मला माझ्या पायावर उभे केले. याहवेह माझ्याशी बोलले आणि
म्हणाले: “जा, स्वतःला आपल्या घरात बंद करून घे. 25 आणि तू हे
मानवपुत्रा, ते तुला दोऱ्यांनी बांधतील; तू लोकांमध्ये बाहेर जाऊ नये
म्हणून तुला बांधले जाईल. 26 तू शांत असावे आणि त्यांचा निषेध करू
नये म्हणून तुझी जीभ तुझ्या टाळूला चिकटेल असे मी करेन, कारण ते
बंडखोर लोक आहेत. 27 परंतु मी तुझ्याशी बोलेन, तेव्हा मी तुझे मुख
उघडेन आणि तू त्यांना सांगशील, ‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात.’
ज्याला ऐकावयाचे आहे ते ऐकतील आणि ज्याला ऐकावयाचे नसेल
त्याने ऐकू नये; कारण ते बंडखोर लोक आहेत.

**4** “आता हे मानवपुत्रा, ओल्या मातीची एक वीट घे आणि ती तुझ्यापुढे
ठेव व तिच्यावर यरुशलेम शहराचे चित्र काढ. 2 नंतर त्याला वेढा
टाक: ज्याच्यासमोर वेढ्याचे काम चालू आहे, त्याच्यावर एक उतार
रच, त्याच्यासमोर डेरे मांड व त्याच्या सभोवती युद्धाची यंत्रे बनविली
आहेत, असे चित्र त्या विटेवर काढ. 3 नंतर एक लोखंडी कढई घे;
ती तुझ्यामध्ये व शहरामध्ये लोखंडी भिंतीप्रमाणे ठेव आणि आपले
तोंड त्याकडे कर. ती वेढ्यात आहे आणि तू तिला वेढा देशील. हे
इस्राएली लोकांस एक चिन्ह म्हणून असेल. 4 “त्यानंतर तू आपल्या
डाव्या कूशीवर पड आणि इस्राएली लोकांचे पाप आपल्या स्वतःवर ठेव.
जितके दिवस तू एका कूशीवर पडशील तितके दिवस त्यांच्या पापाचा
भार तू वाहशील. 5 त्यांच्या पापाच्या वर्षांइतके दिवस मी तुला ठरवून
देत आहे. म्हणून तीनशे नव्वद दिवस तू इस्राएली लोकांच्या पापाचा
भार वाहशील. 6 “हे संपवल्यानंतर, परंतु यावेळी आपल्या उजव्या
कूशीवर तू पुन्हा पड आणि यहूदीयाच्या लोकांच्या पापाचा भार वाहा.
त्यासाठी प्रत्येक वर्षासाठी एक दिवस असे चाळीस दिवस मी तुला
नेमून दिले आहेत. 7 मग तू यरुशलेमच्या वेढ्याकडे तोंड वळव आणि
उघड्या हातांनी तिच्याविरुद्ध भविष्य सांग. 8 मी तुला दोऱ्यांनी बांधीन
म्हणजे तुझे वेढा घालण्याचे दिवस संपेपर्यंत तू एका कूशीवरून दुसऱ्या
कूशीवर वळू शकणार नाहीस. 9 “तू गहू, जव, शेंगा, डाळ, बाजरी
आणि खपल्या गहू घे; आणि ते एका पात्रात साठव व त्याची भाकर
बनवण्यासाठी त्याचा वापर कर. तुझ्या कूशीवर निजलेले असताना
तीनशे नव्वद दिवस तुला ती खावयाची आहे. 10 प्रत्येक दिवसासाठी
वीस शेकेल अन्न वजन करून खा आणि ते ठरविलेल्या वेळेतच खा. 11
त्याचप्रमाणे हिनाचा सहावा भाग पाणी घेऊन तेही नेमलेल्या वेळेतच पी.
12 जवाच्या भाकरीप्रमाणे ती तू खा; ती भाजण्यासाठी इंधन म्हणून तू

ती मानवी विष्ठेवर लोकांसमोर भाज.” 13 याहवेह म्हणतात, “याप्रकारे ज्या राष्ट्रांमध्ये मी त्यांना घालवून देईन तिथे इस्राएली लोक अमंगळ अन्न खातील.” 14 तेव्हा मी म्हणालो, “हे सार्वभौम याहवेह, असे नको! मी स्वत:ला कधी विटाळले नाही. माझ्या लहानपणापासून आजपर्यंत मेलेले किंवा जंगली जनावरांनी फाडलेले असे मी काहीही खाल्ले नाही. कोणतेही अशुद्ध मांस माझ्या मुखात कधीही गेले नाही.” 15 तेव्हा याहवेहने म्हटले, “तर मग ठीक आहे, मानवी विष्ठेऐवजी गाईच्या शेणावर आपली भाकरी भाजण्यास मी तुला परवानगी देतो.” 16 नंतर याहवेहने मला म्हटले: “हे मानवपुत्रा, यरुशलेममध्ये मी भाकरीचा पुरवठा खंडित करणार आहे. लोक कष्टी होऊन तोलून अन्न खातील आणि निराशेने पाणी मापून पितील. 17 कारण अन्नाची व पाण्याची तूट पडेल. ते एकमेकांना पाहून घाबरतील आणि आपल्या पापामुळे नाश पावतील.

**5** “आता, हे मानवपुत्रा, धारदार तलवार घे व ती न्हाव्याच्या वस्तऱ्या प्रमाणे वापरून तुझे डोके व दाढीचे मुंडण कर. मग तराजूवर त्याचे माप करून केसांची वाटणी कर. 2 जेव्हा तुझे वेढ्याचे दिवस संपतील, तेव्हा केसांचा तिसरा भाग शहरामध्ये जाळ. मग केसांचा तिसरा भाग शहराभोवती तलवारीने कापत जा. आणि तिसरा भाग वाऱ्यावर उडव, कारण मी आपली तलवार उपसून त्यांचा पाठलाग करेन. 3 परंतु त्यातील काही केस घेऊन ते आपल्या कपड्यात खोचून ठेव. 4 पुन्हा त्यातून काही केस घे व ते अग्नीत जाळून टाक. तिथूनच सर्व इस्राएलमध्ये अग्नी पसरेल. 5 “सार्वभौम याहवेह असे म्हणतात: हे यरुशलेम आहे, ज्याला मी सर्व राष्ट्रांच्या मधोमध स्थापित केले, आणि तिच्याभोवती सर्व राष्ट्रे ठेवली. 6 तरीही आपल्या दुष्टतेने तिने माझे नियम व विधींचा तिच्याभोवती असलेल्या राष्ट्रांपेक्षा अधिक विरोध केला आहे. तिने माझे नियम नाकारले व माझ्या विधींचे पालन केले नाही. 7 “यामुळे सार्वभौम याहवेह असे म्हणतात: तुम्ही आपल्या सभोवती असलेल्या राष्ट्रांपेक्षा अधिक मोकाट झाला आहात आणि तुम्ही माझे विधी व माझे नियम पाळले नाही. तुमच्या सभोवती असलेल्या राष्ट्रांप्रमाणे देखील तुम्ही वागला नाहीत. 8 “म्हणून सार्वभौम याहवेह असे म्हणतात: हे यरुशलेमे, मी स्वतःच तुझ्याविरुद्ध आहे आणि मी सर्व राष्ट्रांसमक्ष तुला शासन करेन. 9 जे मी पूर्वी कधी केले नाही किंवा पुन्हा करणार नाही असे तुझ्या अमंगळ मूर्तींमुळे तुला करेन. 10 म्हणून तुझ्यामधील आईवडील आपल्या लेकरांना खातील व लेकरे त्यांच्या आईवडिलांना खातील. मी तुमच्यावर न्यायशासन आणेन आणि बाकीच्यांना वाऱ्यावर पसरवून टाकीन. 11 म्हणून सार्वभौम याहवेह असे घोषित करतात, की माझ्या जिवाची शपथ, तुम्ही तुमच्या व्यर्थ मूर्तींनी व अमंगळ कृत्यांनी माझे पवित्रस्थान भ्रष्ट केले आहे, म्हणून मी स्वत: तुमचे मुंडण करेन; मी तुमच्यावर दया करणार नाही किंवा तुमची गय करणार नाही. 12 तुमच्यातील एकतृतीयांश लोक मरीने किंवा तुमच्यामध्ये येणाऱ्या दुष्काळाने मरतील; एकतृतीयांश लोक तुझ्या भिंतींच्या बाहेर तलवारीने पडतील; आणि एकतृतीयांश मी वाऱ्यावर पसरवीन व उपसलेल्या तलवारीने त्यांचा पाठलाग करेन. 13 “तेव्हा माझा राग शांत होईल आणि त्यांच्याविषयी असलेला क्रोध कमी होईल आणि माझा सूड पूर्ण होईल. जेव्हा त्यांच्यावरील माझा क्रोध संपेल, तेव्हा ते जाणतील की मी याहवेह आपल्या ईर्षेने बोललो आहे. 14 “तुझ्या सभोवतालच्या सर्व राष्ट्रांमध्ये आणि जे तुझ्याजवळून जातील त्यांच्या समक्ष मी तुझा नाश व तुला निंदा असे करेन. 15 जेव्हा मी माझा राग व क्रोधाच्या फटक्याने व निषेधाच्या आरोपाने तुला शासन करेन, तेव्हा तू तुझ्या सभोवतालच्या राष्ट्रांना निंदा व टोमणा, चेतावणी व भयाचा विषय होशील. मी याहवेह हे बोललो आहे. 16 जेव्हा मी तुझ्यावर दुष्काळाच्या घातक व नाशवंत बाणांनी वार करेन, ते मी तुझा नाश करण्यासाठी करेन. मी तुझ्यावर अधिक आणि अधिक दुष्काळ आणेन व तुझा अन्नपुरवठा संपुष्टात आणेन. 17 मी तुझ्याविरुद्ध दुष्काळ आणि जंगली श्वापदे पाठवेन आणि ती तुला अपत्यहीन करतील. मरी व रक्तपात तुमच्यात असतील, आणि तुझ्याविरुद्ध मी तलवार आणेन. मी याहवेह हे बोललो आहे.”

**6** याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 2 “हे मानवपुत्रा, इस्राएलच्या पर्वतांकडे आपले मुख कर; आणि त्यांच्याविरुद्ध भविष्य सांग 3 आणि सांग: ‘अहो इस्राएलच्या पर्वतांनो, तुम्ही सार्वभौम याहवेहचे वचन ऐका. सार्वभौम याहवेह पर्वतांना व डोंगरांना, झऱ्यांना व दऱ्यांना असे म्हणतात: मी तुमच्याविरुद्ध तलवार आणेन, आणि मी तुमची उंचावरील पूजास्थाने नष्ट करेन. 4 तुमच्या वेद्या फोडल्या जातील आणि तुमच्या धुपांच्या वेद्यांचा चुराडा करण्यात येईल; आणि तुमच्या मूर्तींपुढे तुमच्या लोकांना मी जिवे मारीन. 5 इस्राएली लोकांची प्रेते मी त्यांच्या मूर्तींपुढे टाकीन आणि तुमची हाडे मी तुमच्या वेद्यांपुढे पसरवून टाकीन. 6 तुम्ही जिथे वस्ती कराल, ती नगरे ओसाड होतील आणि तेथील उच्च स्थाने उद्ध्वस्त होतील, यासाठी की तुमच्या वेद्या ओसाड होऊन नष्ट होतील, तुमच्या मूर्तींचा चुराडा होऊन भुगा होतील, तुमच्या धुपांच्या वेद्या पाडल्या जातील आणि तुम्ही जे काही बनविले ते सर्व पुसून टाकल्या जातील. 7 तुमचे लोक तुमच्यामध्ये मारून पाडले जाईल आणि तुम्ही जाणाल की मीच याहवेह आहे. 8 “‘परंतु मी काहींना वाचवेन, कारण जेव्हा तुम्ही देशात व राष्ट्रात पांगविले जाल तेव्हा तुमच्यातील काही तलवारीपासून वाचतील. 9 मग ज्या राष्ट्रांमध्ये ते निर्वासित म्हणून जातील व जे वाचतील ते माझे स्मरण करतील; त्यांचे व्यभिचारी हृदय, जे माझ्यापासून दूर वळले आहे आणि त्यांचे डोळे, जे त्यांच्या मूर्तीमागच्या वासनांनी पेटले आहे, त्याने मला किती दु:खी केले. त्यांनी जी वाईट कृत्ये केली आणि त्यांच्या अमंगळ कृत्यांमुळे ते स्वत:चीच घृणा करतील. 10 आणि ते जाणतील की मीच याहवेह आहे; त्यांच्यावर हे अरिष्ट आणेन अशी धमकी मी निरर्थकच दिली नाही. 11 “‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात: इस्राएली लोकांच्या सर्व दुष्ट व अमंगळ कृत्यांसाठी तुमचे हात एकमेकांवर मारा आणि “अरेरे!” असे म्हणत तुमचे पाय आपटून रडा, कारण ते तलवार, दुष्काळ व पीडा यांनी पडतील. 12 जो दूर असेल तो पीडेने मरेल आणि जो जवळ आहे तो तलवारीने मरेल आणि जो त्यातून वाचेल तो दुष्काळाने मरेल. याप्रकारे मी त्यांच्यावर माझा क्रोध ओतेन. 13 त्यांच्या मूर्तीसमोर,

त्यांच्या वेद्यांभोवती, प्रत्येक उंच टेकड्यांवर व सर्व डोंगरमाथ्यांवर,
प्रत्येक गडद सावलीच्या झाडाखाली आणि दाट पाने असलेल्या प्रत्येक
एला वृक्षाखाली; ज्या ठिकाणी त्यांनी त्यांच्या सर्व मूर्तींना सुवासिक
धूप अर्पण केले, जेव्हा त्यांचे लोक तिथेच पडतील, तेव्हा ते जाणतील
की मीच याहवेह आहे. 14 मी आपला हात त्यांच्याविरुद्ध उगारेन आणि
दिबलाहच्या वाळवंटापासून ते जिथे कुठे राहतील मी त्यांचा देश ओसाड
करेन; तेव्हा ते जाणतील की मीच याहवेह आहे.’”

**7** याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 2 “मानवपुत्रा, इस्राएल देशाला
सार्वभौम याहवेह असे म्हणतात: “‘अंत! देशाच्या चारही कोपर्‍यांवर
शेवट आला आहे! 3 आता तुमचा शेवट आला आहे, आणि तुमच्याविरुद्ध
मी माझा राग मोकळा सोडेन. तुमच्या कृत्यांनुसार मी तुमचा न्याय
करेन आणि तुमच्या सर्व अमंगळ कृत्यांचे प्रतिफळ तुम्हाला देईन.
4 मी तुमच्याकडे दयेने पाहणार नाही; मी तुमची गय करणार नाही.
मी खचितच तुमच्या कृत्यांचे आणि तुमच्यातील अमंगळ कृत्यांचे
प्रतिफळ तुम्हाला देईन. तेव्हा तुम्ही जाणाल की मीच याहवेह आहे.’ 5
“सार्वभौम याहवेह असे म्हणतात: “‘विपत्ती! कधी ऐकली नाही अशी
विपत्ती पाहा, ती येत आहे! 6 अंत आला आहे! अंत आला आहे! तो
स्वतः तुझ्याविरुद्ध उठला आहे. पाहा, तो येत आहे! 7 तुम्ही जे देशात
राहतात, त्या तुमच्यावर विनाश आला आहे. समय आला आहे! दिवस
जवळ आहे! डोंगरावर आनंद नाही, तर गोंधळ आहे. 8 मी आपला
क्रोध तुमच्यावर लवकरच ओतीत आहे आणि माझा राग तुमच्याविरुद्ध
भडकणार आहे. तुमच्या कृत्यांनुसार मी तुमचा न्याय करेन आणि
तुमच्या सर्व अमंगळ कृत्यांचे प्रतिफळ तुम्हाला देईन. 9 मी तुमच्याकडे
दयेने पाहणार नाही; मी तुमची गय करणार नाही. मी तुम्हाला तुमच्या
कृत्यांचे आणि तुमच्यातील अमंगळ कार्याचे प्रतिफळ देईन. “‘तेव्हा
तुम्ही जाणाल की मी याहवेहने तुमच्यावर वार केला आहे. 10 “‘पाहा,
तो दिवस! पाहा, तो येत आहे! विनाशाचा भडका उठला आहे, काठीला
अंकुर फुटला आहे, अहंकार फुलला आहे! 11 हिंसा उदय पावली आहे,
दुष्टाला शिक्षा करण्यास काठी उठली आहे. त्या लोकांतून कोणीही,
त्या समुहातील कोणीही सुटणार नाही; त्यांच्या संपत्तीतील, कशाचे
काहीही मोल राहणार नाही. 12 समय आला आहे! दिवस येऊन ठेपला
आहे! विकत घेणार्‍याने आनंद करू नये किंवा विकत देणार्‍याने दुःखी
होऊ नये, कारण माझा क्रोध संपूर्ण समुहावर आहे. 13 जोपर्यंत विकत
घेणारा व देणारा जिवंत आहे तोपर्यंत जी संपत्ती विकण्यात आली
होती; त्याची फेड होणार नाही. कारण संपूर्ण समुहाविषयी असलेला
दृष्टान्त पलटणार नाही. त्यांच्या पापामुळे त्यांच्यातील एकही व्यक्ती
आपला जीव वाचविणार नाही. 14 “‘त्यांनी कर्णे वाजविली आहे, त्यांनी
सर्वकाही सज्ज केले आहे, परंतु कोणी युद्धात जाणार नाही, कारण
संपूर्ण समुहावर माझा क्रोध आहे. 15 बाहेर तलवार आहे; व आत पीडा
व दुष्काळ आहे. जे देशात राहतात ते तलवारीने मरतील; जे शहरात
आहेत ते दुष्काळ व पीडांनी नाश पावतील. 16 आश्रयासाठी पळ
काढणारे डोंगराकडे पळतील. खोर्‍यातील पारव्यांप्रमाणे, आपल्या
स्वतःच्या पापाकरिता, ते सर्व शोक करतील. 17 प्रत्येक हात ढिले
पडतील; प्रत्येक पाय लघवीने भिजेल. 18 ते गोणपाट नेसतील आणि
भयाचे वस्त्र घालतील. प्रत्येक चेहरा लज्जेने झाकला जाईल, आणि
प्रत्येक डोक्याचे मुंडण केले जाईल. 19 “‘ते आपली चांदी रस्त्यावर
फेकतील, आणि त्यांचे सोने अशुद्ध मानले जाईल. याहवेहच्या क्रोधाच्या
दिवशी त्यांचे चांदी व सोने त्यांची सुटका करू शकणार नाही. ते त्यांची
भूक मिटवणार नाही किंवा त्यांचे पोट भरणार नाही, कारण त्यांच्या
संपत्तीनेच त्यांना पापात पडण्यास भाग पाडले आहे. 20 त्यांनी त्यांच्या
सुंदर दागिन्यांविषयी गर्व केला आणि त्यांच्या अमंगळ मूर्ती बनवण्यास
त्यांचा उपयोग केला. त्यांनी त्यांच्या व्यर्थ प्रतिमा बनविल्या; म्हणून ते
दागिने मी त्यांच्यासाठी अशुद्ध करेन. 21 मी त्यांची संपत्ती परदेशीयांना
लूट अशी देईन आणि पृथ्वीतील दुष्ट ते लुबाडून घेतील, व ते भ्रष्ट
करतील. 22 लोकांपासून मी आपले मुख वळवेन, आणि मी जतन
केलेले माझे मौल्यवान स्थळ लुटारू अपवित्र करतील. ते त्यात शिरतील
आणि त्यास भ्रष्ट करतील. 23 “‘साखळ्या तयार करा! कारण देश
रक्तपाताने, आणि शहर हिंसेने भरले आहे. 24 सर्वात दुष्ट राष्ट्रांना
मी आणेन जे त्यांच्या घरांचा ताबा घेतील. बलवानाच्या गर्वाचा मी
शेवट करेन, आणि त्यांची पवित्रस्थाने भ्रष्ट होतील. 25 जेव्हा आतंक
येतो, ते व्यर्थच शांतीचा शोध करतील. 26 विपत्तीनंतर विपत्ती, आणि
अफवांवर अफवा येतील. संदेष्ट्याकडून दृष्टान्ताचा शोध करतील,
नियमशास्त्रातील याजकीय सूचना थांबतील, वडील लोकांच्या बोधप्रद
मसलतीचा शेवट होईल. 27 राजा शोक करेल, राजकुमार निराशेची
वस्त्रे पांघरेल, आणि देशातील लोकांचे हात थरथर कापतील. त्यांच्या
कृत्यांनुसार मी त्यांच्याशी वागेन, आणि त्यांच्या स्वतःच्या मापानुसार
मी त्यांचा न्याय करेन. “‘तेव्हा ते जाणतील की मीच याहवेह आहे.’”

**8** सहाव्या वर्षाच्या सहाव्या महिन्याच्या पाचव्या दिवशी, जेव्हा मी
माझ्या घरात बसलो होतो आणि यहूदीयाचे वडीलजन माझ्यापुढे
बसले होते, तिथे सार्वभौम याहवेहचा हात माझ्यावर आला. 2 मी पाहिले,
आणि मनुष्यासारखी दिसणारी एक आकृती मला दिसली. त्याच्या
कमरेसारख्या दिसणार्‍या भागापासून खालचा भाग अग्नीसारखा होता
आणि तिथून वरच्या भागाचे रूप तेजस्वी धातूसारखे प्रज्वलित होते. 3
हातांसारख्या दिसणार्‍या आकृतिसारखे त्याने काहीतरी पुढे केले व माझे
डोक्याचे केस धरले. मग आत्म्याने मला पृथ्वी व आकाशाच्या दरम्यान
वर उचलले आणि परमेश्वराच्या दृष्टान्तामध्ये त्याने मला यरुशलेमला,
आतील अंगणाच्या उत्तरेकडील दरवाजाच्या प्रवेशाकडे नेले, जिथे ईर्षेस
प्रवृत्त करणारी मूर्ती उभी होती. 4 आणि जसे मैदानात मी पाहिले
होते असेच तिथे इस्राएलच्या परमेश्वराचे वैभव माझ्यासमोर होते. 5
तेव्हा तो मला म्हणाला, “हे मानवपुत्रा, उत्तरेकडे पाहा.” म्हणून मी
पाहिले आणि वेदीच्या उत्तरेकडील द्वाराच्या प्रवेश स्थानात मला ती
ईर्षेची मूर्ती दिसली. 6 आणि तो मला म्हणाला, “हे मानवपुत्रा, ते जे
काही करीत आहेत ते तू पाहतोस काय; इस्राएली लोक या ठिकाणी
अमंगळ गोष्टी करीत आहेत, ज्यामुळे माझ्या पवित्रस्थानातून मी दूर

केला जाईन? परंतु यापेक्षाही अधिक अमंगळ गोष्टी तू पाहशील.” 7 मग
त्याने मला अंगणाच्या प्रवेशाजवळ आणले. मी पाहिले आणि भिंतीमध्ये
एक छिद्र असल्याचे मला दिसले. 8 तो मला म्हणाला, “मानवपुत्रा,
आता भिंत खोद.” म्हणून मी भिंत खोदली आणि त्यात मला एक
दरवाजा दिसला. 9 आणि तो मला म्हणाला, “आत जा आणि ते इथे
करीत असलेले दुष्ट व अमंगळ कृत्ये पाहा.” 10 म्हणून मी आत गेलो
आणि पाहिले की भिंतीवर सर्वत्र सर्वप्रकारचे सरपटणारे प्राणी आणि
अशुद्ध जनावरे व इस्राएलच्या मूर्तींची चित्रे बनविलेली मला दिसली.
11 त्याच्यासमोर इस्राएलचे सत्तर वडील उभे होते आणि शाफानचा
पुत्र याजन्याह त्यांच्यामध्ये उभा होता, प्रत्येकाच्या हातात धुपाटणे
होते आणि सुगंधी धूपाचा ढग वर चढत होता. 12 तो मला म्हणाला,
“मानवपुत्रा, इस्राएलचे वडीलजन आपआपल्या मूर्तिघराच्या अंधारात
काय करीत आहेत ते तू पाहिलेस काय? ते म्हणतात, ‘याहवेह आम्हाला
पाहत नाही; याहवेहने आम्हाला टाकले आहे.’” 13 तो पुन्हा म्हणाला,
“यापेक्षाही अधिक अमंगळ कृत्ये करताना तू त्यांना पाहशील.” 14 मग
त्याने मला याहवेहच्या मंदिराच्या उत्तरेकडील प्रवेशद्वाराकडे आणले,
तिथे मी स्त्रिया पाहिल्या ज्या बसून तम्मुत्स दैवतासाठी शोक करीत
होत्या. 15 तो मला म्हणाला, “मानवपुत्रा, तू हे पाहतोस काय? यापेक्षा
अधिक अमंगळ गोष्टी तू पाहशील.” 16 मग त्याने मला याहवेहच्या
मंदिराच्या आतील अंगणात आणले आणि तिथे मंदिराच्या प्रवेशद्वारात,
देवडीच्या व वेदीच्या दरम्यान, सुमारे पंचवीस पुरुष होते. याहवेहच्या
मंदिराकडे त्यांची पाठ असून त्यांचे तोंड पूर्वेकडे करीत ते पूर्वेकडे
सूर्यापूढे वाकून त्याची उपासना करीत होते. 17 तो मला म्हणाला,
“मानवपुत्रा, तू हे पाहिलेस काय? या ज्या अमंगळ गोष्टी ते करतात
ते यहूदाहसाठी क्षुल्लक आहेत काय? त्यांनी आतंकाने देश भरून
सातत्याने माझा राग भडकवावा काय? त्यांच्याकडे पाहा, ते कशी
आपल्या नाकाला फांदी लावत आहेत! 18 म्हणून मी त्यांच्याशी क्रोधाने
वागेन; मी त्यांच्याकडे दयेने पाहणार नाही किंवा त्यांची गय करणार
नाही. जरी ते माझ्या कानात रडतील, तरी मी त्यांचे ऐकणार नाही.”

**9** नंतर मी त्याला उंच आवाजात बोलताना ऐकले, “शहरावर
न्यायनिवाडा आणण्यासाठी ज्यांना नेमले आहे त्यांना बोलवा,
प्रत्येकाच्या हाती शस्त्र असावे.” 2 आणि वरील दरवाजा, ज्याचे मुख
उत्तरेकडे होते त्या दिशेकडून सहा पुरुष येत असलेले मी पाहिले,
प्रत्येकाच्या हाती घातक शस्त्रे होती. त्यांच्याबरोबर एक पुरुष होता
ज्याने तागाची वस्त्रे घातली होती व त्याच्याकडे लेखन सामुग्री होती.
ते येऊन कास्य वेदीजवळ उभे राहिले. 3 आता करुबांवर असलेले
इस्राएलच्या परमेश्वराचे वैभव तिथून वर जाऊन, मंदिराच्या उंबरठ्यावर
आले. तेव्हा ज्या पुरुषाने तागाची वस्त्रे घातली होती व ज्याच्याकडे
लेखन सामुग्री होती, त्याला याहवेहने बोलाविले 4 आणि याहवेहने
त्याला म्हटले, “संपूर्ण यरुशलेम शहरातून जा आणि त्यात अमंगळ
कृत्ये केल्याबद्दल जे दुःख व विलाप करतात त्यांच्या कपाळावर एक
चिन्ह कर.” 5 मी हे ऐकत असताना, याहवेहने बाकीच्यांना म्हटले,
“त्याच्यामागे शहरात जा आणि दया किंवा सहानुभूती न दाखविता
त्यांना मारून टाका. 6 वयस्कर पुरुष, तरुण पुरुष व स्त्रिया, आई व
लेकरे सर्वांची कत्तल करा, परंतु ज्यांच्या कपाळावर चिन्ह केलेले आहे
त्यांना स्पर्श करू नका. माझ्या पवित्रस्थानापासून सुरुवात करा.” तेव्हा
त्यांनी त्या वयस्क पुरुषांपासून सुरुवात केली जे मंदिराच्या समोर होते.
7 मग तो म्हणाला, “मंदिर भ्रष्ट करा आणि वधलेल्यांनी अंगणे भरून
टाका. जा!” तेव्हा ते बाहेर गेले आणि शहरात सर्वत्र लोकांना मारू
लागले. 8 ते लोकांना मारीत असताना मी एकटाच होतो, मी उपडा पडून
मोठ्याने रडलो, “हाय हाय, सार्वभौम याहवेह! यरुशलेमवर आपण
आपला कोप ओतून उरलेल्या सर्वच इस्राएली लोकांचा नाश करणार
आहात काय?” 9 याहवेहने मला म्हटले, “इस्राएल व यहूदीयाच्या
लोकांचे अपराध फारच घोर आहेत; देश रक्तपाताने व शहर अन्यायाने
भरले आहे. ते म्हणतात, ‘याहवेहने देशाला सोडून टाकले आहे; आणि
याहवेह पाहत नाही.’ 10 म्हणून मी त्यांना दयेने पाहणार नाही किंवा
त्यांची गय करणार नाही, आणि त्यांनी जे काही केले आहे ते मी
त्यांच्याच डोक्यावर आणणार आहे.” 11 तेव्हा लेखन सामुग्री जवळ
असलेला, तागाची वस्त्रे घातलेल्या पुरुषाने येऊन सांगितले, “आपण
आज्ञापिल्याप्रमाणे मी केले आहे.”

**10** मग मी पाहिले आणि करुबांच्या डोक्यावर असलेल्या घुमटावर
नीलमण्यासारखे दिसणारे सिंहासन मला दिसले. 2 तेव्हा तागाची
वस्त्रे घातलेल्या पुरुषाला याहवेहने म्हटले, “करुबाखालच्या चाकांमधून
जा आणि करुबांच्या मधील जळत्या निखाऱ्यांनी आपली ओंजळ
भर आणि ते शहरात पसरून टाक.” मी पाहत असता, तो आत
गेला. 3 तो मनुष्य आत गेला, तेव्हा करूब मंदिराच्या दक्षिणेकडे उभे
होते आणि आतील अंगण ढगांनी भरून गेले. 4 मग याहवेहचे वैभव
करुबांवरून उठले आणि मंदिराच्या उंबरठ्याकडे गेले. मंदिर ढगांनी
भरले आणि याहवेहच्या तेजाच्या प्रकाशाने अंगण भरले. 5 करुबांच्या
पंखांचा आवाज बाहेरील अंगणात ऐकू येत होता, तो तर सर्वसमर्थ
परमेश्वर बोलतात असा त्यांच्या वाणीसारखा होता. 6 जेव्हा याहवेहने
तागाची वस्त्रे परिधान केलेल्या पुरुषाला आज्ञा दिली, “चाकांच्या मधून,
करुबांच्या मधून अग्नी घे,” तो पुरुष जाऊन एका चाकाच्या बाजूला
उभा राहिला. 7 तेव्हा करुबातील एकाने त्यांच्यामध्ये जो अग्नी होता
त्याकडे आपला हात लांब केला. त्याने त्यातील काही इंगळ घेतले
व तागाची वस्त्रे घातलेल्या पुरुषाच्या हातात ठेवले, त्याने ते घेतले
आणि बाहेर गेला. 8 (करुबांच्या पंखाखाली मनुष्याच्या हातासारखे
दिसणारे काहीतरी होते.) 9 मी पाहिले, करुबांच्या बाजूला चार चाके,
प्रत्येक करुबाच्या बाजूला एक चाक; आणि ती चाके पुष्कराजसारखी
चकाकत होती. 10 ती चारही चाके सारखीच दिसत होती; प्रत्येक
चाक जसे दुसऱ्या चाकातून छेदून जात होती. 11 जेव्हा करूब पुढे
जात असे, तेव्हा त्यांची तोंडे ज्या दिशेने होती त्या चार दिशांपैकी एका
दिशेने चाके जात; करूब जात असताना चाके इकडे तिकडे वळत
नसत. आणि ते ज्या दिशेने त्यांचे तोंड आहे त्याच दिशेने, कुठेही न

वळता जात असत. 12 त्यांची पाठ, त्यांचे हात आणि त्यांचे पंख
यांच्यासह त्यांच्या संपूर्ण शरीरावर डोळे होते, त्यांच्या चाकांवर सुद्धा
डोळे होते. 13 “गरगर फिरणारी चाके” असे त्या चाकांना म्हटले गेलेले
मी ऐकले. 14 प्रत्येक करुबाला चार तोंडे होती: एक करुबाचे होते,
दुसरे मनुष्याच्या तोंडासारखे, तिसरे सिंहासारखे व चौथे गरुडासारखे
होते. 15 नंतर करूब वर उठले. हे तर तेच जिवंत प्राणी होते जे मी खेबर
नदीकाठी पाहिले होते. 16 जेव्हा करूब पुढे निघाले, त्यांच्या बाजूला
असलेली चाकेसुद्धा पुढे जात; आणि जमिनीवरून उठण्यासाठी जेव्हा
करूब आपले पंख पसरवित असे, चाके आपली बाजू सोडत नसत.
17 करूब जेव्हा स्थिर उभे राहात, ते सुद्धा स्थिर उभे राहात असत;
आणि जेव्हा करूब उठत असे, ते त्यांच्याबरोबर उठत, कारण जिवंत
प्राण्यांचा आत्मा त्या चाकांमध्ये होता. 18 मग याहवेहचे वैभव मंदिराच्या
उंबरठ्यावरून निघाले आणि करुबांवर जाऊन थांबले. 19 मी पाहत
असता, करुबांनी आपली पंखे पसरली आणि जमिनीवरून उठले, ते पुढे
जात असता, चाकेही त्यांच्याबरोबर गेली. ते याहवेहच्या भवनाच्या
पूर्वेकडील प्रवेशद्वाराकडे थांबले, आणि इस्राएलच्या परमेश्वराचे वैभव
त्यांच्यावर होते. 20 हे तेच जिवंत प्राणी होते ज्यांना मी इस्राएलच्या
परमेश्वराच्या आसनाखाली खेबर नदीकाठी पाहिले होते, आणि मला
समजले की हे तेच करूब आहेत. 21 प्रत्येकाला चार तोंडे व चार पंख
होते आणि त्यांच्या पंखाखाली मानवी हातांसारखे काहीतरी होते. 22
त्यांच्या मुखाचे स्वरूप तर मी खेबर नदीकाठी पाहिले होते तसेच होते.
प्रत्येकजण पुढे सरळ चालत असे.

**11** नंतर आत्म्याने मला उचलून याहवेहच्या मंदिराच्या पूर्वेकडील
द्वाराजवळ आणले. तिथे द्वाराच्या प्रवेशाकडे पंचवीस पुरुष
होते आणि त्यांच्यामध्ये लोकांचे पुढारी अज्जूरचा पुत्र याजन्याह व
बेनाइयाहचा पुत्र पेलातियाह यांना मी पाहिले. 2 याहवेहने मला म्हटले,
“मानवपुत्रा, हे ते पुरुष आहेत जे दुष्टतेचा कट करून शहरात वाईट
सल्ला देतात. 3 ते म्हणतात, ‘तुम्ही आपली घरांची हल्लीच पुनर्बांधणी
केली नाही काय? हे शहर एक कढई व आपण त्यातील मांस असे
आहोत.’ 4 म्हणून त्यांच्याविरुद्ध भविष्य सांग; मानवपुत्रा, भविष्यवाणी
कर.” 5 मग याहवेहचा आत्मा माझ्यावर आला आणि त्यांनी मला
असे बोलावयास सांगितले: “याहवेह असे म्हणतात: इस्राएलाच्या
पुढाऱ्यांनो तुम्ही असेच म्हणतात, परंतु तुमच्या मनात काय सुरू आहे ते
मी जाणतो. 6 तुम्ही या नगरामध्ये पुष्कळांना मारून टाकले आणि
त्यातील रस्ते प्रेतांनी भरून टाकले. 7 “म्हणून सार्वभौम याहवेह असे
म्हणतात: जी शरीरे तुम्ही तिथे टाकली आहेत ती मांस आहेत आणि हे
शहर कढई असे आहे, परंतु मी तुम्हाला त्यातून बाहेर काढेन. 8 तुम्हाला
तलवारीचे भय आहे आणि मी तुमच्याविरुद्ध तलवारच आणणार आहे,
असे सार्वभौम याहवेह घोषित करतात. 9 मी तुम्हाला शहरातून बाहेर
घालवेन आणि तुम्हाला विदेशी लोकांच्या हाती देईन आणि तुमच्यावर
शिक्षा आणेन. 10 तुम्ही तलवारीने पडाल आणि इस्राएलच्या सीमांवर
मी तुमच्यावर न्याय आणेन. तेव्हा तुम्ही जाणाल की मीच याहवेह
आहे. 11 हे शहर तुम्हाला कढई असे असणार नाही किंवा तुम्ही त्यात
मांसही नसाल; इस्राएलच्या सीमेवर मी तुमचा न्याय करेन. 12 आणि
तुम्ही जाणाल की मीच याहवेह आहे, कारण तुम्ही माझ्या आज्ञा
पाळल्या नाही किंवा माझे विधी मानले नाही, परंतु तुमच्या सभोवती
असलेल्या राष्ट्रांच्या मापांप्रमाणे तुम्ही वागला.” 13 आता मी भविष्य
सांगत असतानाच बेनाइयाहचा पुत्र पेलातियाह मरण पावला. तेव्हा
मी उपडा पडून मोठ्या आवाजात रडलो, “अरेरे, सार्वभौम याहवेह!
इस्राएलच्या उरलेल्यांचा आपण सर्वनाश करणार काय?” 14 याहवेहचे
वचन माझ्याकडे आले: 15 “मानवपुत्रा, यरुशलेमचे लोक तुमच्या
निर्वासित भाऊबंदांविषयी व इतर सर्व इस्राएली लोकांविषयी म्हणाले,
‘ते याहवेहपासून फार दूर आहेत; हा देश आम्हाला आमचे वतन म्हणून
दिला गेला होता.’ 16 “म्हणून असे म्हण: ‘सार्वभौम याहवेह असे
म्हणतात: जरी मी त्यांना राष्ट्रामध्ये दूर पाठवले आणि त्यांना देशांमध्ये
पांगविले, तरीही ज्या देशांमध्ये ते गेले आहेत तिथे काही काळासाठी मी
त्यांचे पवित्रस्थान होतो.’ 17 “म्हणून असे म्हण: ‘सार्वभौम याहवेह
असे म्हणतात: मी तुम्हाला राष्ट्रातून गोळा करेन आणि ज्या देशात
तुम्ही पांगले आहात तिथून तुम्हाला परत आणेन आणि इस्राएल देश मी
तुम्हाला परत देईन.’ 18 “ते तिथे परत येतील आणि त्यातील सर्व व्यर्थ
प्रतिमा व अमंगळ मूर्ती काढून टाकतील. 19 मी त्यांना अविभाजित
हृदय देईन आणि त्यांच्यात नवीन आत्मा घालेन; मी त्यांच्यामधून त्यांचे
दगडरुपी हृदय काढून त्यांना मांसमय हृदय देईन. 20 तेव्हा ते माझे
विधी आचरणात आणतील व काळजीपूर्वक माझे नियम पाळतील. ते
माझे लोक होतील आणि मी त्यांचा परमेश्वर होईन. 21 परंतु ज्यांची
हृदये त्यांच्या व्यर्थ प्रतिमा व अमंगळ मूर्तींकडे लागलेली आहेत, त्यांनी
केलेल्या कृत्यांना मी त्यांच्याच डोक्यावर पाडीन, असे सार्वभौम याहवेह
घोषित करतात.” 22 नंतर करुबांनी, त्यांच्या बाजूला असलेल्या
चाकांबरोबर आपले पंख पसरले आणि इस्राएलच्या परमेश्वराचे वैभव
त्यांच्यावर होते. 23 नंतर याहवेहचे गौरव शहरातून वर निघाले व पूर्वेकडे
असलेल्या डोंगरावर जाऊन थांबले. 24 आणि परमेश्वराच्या आत्म्याद्वारे
दिलेल्या दृष्टान्तामध्ये, आत्म्याने मला वर उचलले आणि बाबेलच्या
निर्वासित लोकांकडे आणले. तेव्हा जो दृष्टान्त मी पाहत होतो तो समाप्त
झाला, 25 आणि याहवेहने मला जे दाखविले होते ते सर्व मी निर्वासित
असलेल्यांना सांगितले.

**12** याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 2 “हे मानवपुत्रा, तू बंडखोर
लोकांमध्ये राहत आहेस. पाहण्यासाठी त्यांना डोळे आहेत परंतु
ते पाहत नाहीत, ऐकण्यासाठी त्यांना कान आहेत परंतु ते ऐकत
नाहीत, कारण ते बंडखोर लोक आहेत. 3 “म्हणून, हे मानवपुत्रा,
निर्वासित होऊन जाण्यास तू आपले सामान बांध आणि दिवसाच्या
प्रकाशात ते तुला पाहत असताच तू जिथे आहेस तिथून नीघ आणि
दुसऱ्या ठिकाणाकडे जा. जरी ते बंडखोर लोक आहेत, तरी कदाचित ते
समजतील. 4 दिवसाच्या प्रकाशात, ते तुला पाहत असता निर्वासित
म्हणून जाण्यास तू बांधलेले आपले सामान आण आणि संध्याकाळी ते

पाहत असता, निर्वासित जाण्यास निघतात त्यांच्यासारखा तू बाहेर जा.
5 ते पाहत असताच भिंत खण व त्यातून आपले सामान बाहेर काढ. 6
ते पाहत असताच ते सामान आपल्या खांद्यावर घे आणि अंधार पडायला
लागताच नीघ. तुला भूमी दिसू नये म्हणून आपला चेहरा झाक, कारण
मी तुला इस्राएलसाठी एक चिन्ह केले आहे.” 7 मग मला आज्ञा दिली
त्याप्रमाणे मी केले. निर्वासित म्हणून जाण्यासाठी दिवसाच्या वेळी मी
माझे सामान बाहेर आणले. मग संध्याकाळी माझ्या हाताने मी भिंत
खोदली. अंधार पडायला लागला तेव्हा लोक पाहत असता माझ्या
खांद्यावर मी माझे सामान वाहून घेतले. 8 सकाळी याहवेहचे वचन
माझ्याकडे आले: 9 “हे मानवपुत्रा, इस्राएलच्या लोकांनी, त्या बंडखोर
लोकांनी, ‘तू काय करीत आहेस’ असे विचारले नाही काय? 10 “त्यांना
सांग, ‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात: ही भविष्यवाणी यरुशलेमातील
राजपुत्र व तिथे राहत असलेल्या सर्व इस्राएली लोकांसाठी आहे.’
11 त्यांना सांग, ‘तुमच्यासाठी मी चिन्ह आहे.’ “मी जसे केले आहे,
तसेच त्यांचेही करण्यात येईल. ते निर्वासित कैद करून नेले जातील.
12 “त्यांच्यातील राजपुत्र आपले सामान आपल्या खांद्यावर घेऊन
संध्याकाळच्या वेळी निघेल आणि त्याला जाण्यासाठी भिंतीत खोदून
एक खिंडार खोदले जाईल. भूमी दिसू नये म्हणून तो आपला चेहरा
झाकून घेईल. 13 त्याच्यासाठी मी माझे जाळे पसरवीन आणि तो माझ्या
पाशात अकडला जाईल; मी त्याला बाबेलमध्ये, खास्द्यांच्या देशात
आणेन, पण तो त्याला दिसणार नाही, तो तिथे मरून जाईल. 14 त्याच्या
सभोवती असलेले; त्याचे कामकरी व त्याचे सैन्य मी वाऱ्यावर पसरवीन;
आणि उपसलेल्या तलवारीने मी त्यांचा पाठलाग करेन. 15 “जेव्हा
मी त्यांना राष्ट्रांमध्ये पांगून टाकीन आणि देशांमध्ये त्यांना पसरवीन,
तेव्हा ते जाणतील की मीच याहवेह आहे. 16 परंतु त्यांच्यापैकी काहीं
लोकांना तलवार, दुष्काळ व मरी यांच्यापासून वाचवेन, यासाठी की
ज्या देशांत ते जातील तिथे त्यांची अमंगळ कृत्ये कबूल करतील. तेव्हा
ते जाणतील की मीच याहवेह आहे.” 17 याहवेहचे वचन माझ्याकडे
आले: 18 “मानवपुत्रा, थरथर कापत आपले अन्न खा आणि आपले
पाणी पिताना ते भीतीने पी. 19 देशातील लोकांना सांग: ‘इस्राएल
व यरुशलेमात राहणाऱ्यांविषयी सार्वभौम याहवेह असे म्हणतात: ते
त्यांचे अन्न चिंतेने खातील व आपले पाणी घाबरत पितील, कारण त्यात
राहणाऱ्या लोकांच्या क्रूरतेमुळे त्यांच्या देशात असलेले सर्वकाही काढून
टाकले जाईल. 20 वसलेली नगरे ओसाड होतील आणि भूमी उजाड
होईल. तेव्हा तुम्ही जाणाल की मीच याहवेह आहे.’” 21 याहवेहचे वचन
माझ्याकडे आले: 22 “मानवपुत्रा, इस्राएल देशात ही काय म्हण आहे:
‘दिवस निघून जातात आणि प्रत्येक दृष्टान्त निष्फळ होत आहे’? 23
त्यांना सांग, ‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात, या म्हणीचा मी शेवट
करणार आहे आणि ते इस्राएलमध्ये पुन्हा तिचा उच्चार करणार नाहीत.’
त्यांना सांग, ‘प्रत्येक दृष्टान्ताची पूर्तता होण्याचे दिवस जवळ येत आहेत.
24 कारण इस्राएल लोकांमध्ये आणखी खोटे दृष्टान्त किंवा खुशामत
करणारा जादूटोणा नसेल. 25 परंतु मी याहवेह, मला जे वाटते ते बोलेन
आणि विलंब न करता ते पूर्ण होईल. कारण अहो बंडखोर लोकहो,
तुमच्या याच दिवसात, मी जे बोलेन ते पूर्ण करेन, असे सार्वभौम याहवेह
जाहीर करतात.’” 26 याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 27 “मानवपुत्रा,
इस्राएलचे लोक म्हणतात, ‘जो दृष्टान्त तो पाहतो तो यापुढील अनेक
वर्षांसाठी आहे आणि तो दूरच्या काळाविषयी भविष्यवाणी करतो.’ 28
“म्हणून त्यांना सांग, ‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात: माझा कोणताही
शब्द आणखी विलंब करणार नाही; जेव्हा मी ते बोलेन ते पूर्णतेस
जाईल, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात.’”

**13** याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 2 “मानवपुत्रा, इस्राएलचे
संदेष्टे जे आता भविष्यवाणी करीत आहेत त्यांच्याविरुद्ध भविष्य
सांग. जे आपल्याच स्वतःच्या कल्पनेनुसार भविष्य करतात त्यांना
सांग: ‘याहवेहचे वचन ऐका! 3 सार्वभौम याहवेह असे म्हणतात: मूर्ख
संदेष्टे ज्यांनी काहीही पाहिले नाही तरी स्वतःच्याच आत्म्याचे अनुसरण
करतात त्यांचा धिक्कार असो! 4 हे इस्राएला, तुझे संदेष्टे ओसाड
जागेतील कोल्ह्यांसारखे आहेत. 5 याहवेहच्या दिवशी युद्धात टिकून
उभे राहावे म्हणून इस्राएलच्या लोकांसाठी भिंतींच्या खिंडारांना दुरुस्त
करावयाला तुम्ही वरती गेला नाही. 6 त्यांचे दृष्टान्त खोटे आहेत आणि
त्यांचे शकुन लबाड आहेत. जरी त्यांना याहवेहने पाठवले नाही, तरी ते
म्हणतात, “याहवेह जाहीर करतात,” आणि याहवेहने त्यांच्या शब्दाची
पूर्तता करावी अशी अपेक्षा बाळगतात. 7 तुम्ही खोटे दृष्टान्त पाहिले
नाही काय आणि मी बोललो नाही तरीही, “याहवेह हे जाहीर करतात,”
असे तुम्ही म्हणता तेव्हा तुम्ही खोटा शकुन उच्चारला नाही काय? 8
“‘म्हणून सार्वभौम याहवेह असे म्हणतात: तुमची खोटी वचने व लबाड
दृष्टान्त यामुळे मी तुमच्याविरुद्ध आहे असे सार्वभौम याहवेह जाहीर
करतात. 9 जे खोटे दृष्टान्त पाहतात आणि लबाड शकुन उच्चारतात,
मी माझा हात त्या संदेष्ट्यांच्या विरुद्ध उगारणार. ते माझ्या लोकांच्या
बैठकीचा भाग नसतील किंवा इस्राएलच्या यादीत त्यांची नोंद केली
जाणार नाही, ना ते इस्राएलच्या देशात प्रवेश करतील. तेव्हा तुम्ही
जाणाल की मीच सार्वभौम याहवेह आहे. 10 “‘कारण जरी शांती नसली
तरी ते माझ्या लोकांना, “शांती” असे म्हणत बहकवितात, कारण
कच्ची भिंत बांधून ते त्यावर चुन्याचा लेप लावतात, 11 म्हणून जे
पडणारच आहे त्याला चुन्याचा लेप जे लावतात त्यांना सांग, मुसळधार
पाऊस येईल आणि मी मोठ्या गारा खाली पाठवेन आणि तुफानी
वारा सुटेल. 12 जेव्हा भिंत कोसळेल तेव्हा, “तुम्ही दिलेला चुन्याचा
लेप कुठे आहे” असे लोक तुम्हाला विचारणार नाहीत काय?” 13
“‘म्हणून सार्वभौम याहवेह असे म्हणतात: माझ्या क्रोधाने तुफानी वारा
सोडेन आणि माझ्या रागाने नाशाच्या संतापाने गारा व मुसळधार पाऊस
पडेल. 14 तुम्ही चुन्याचा लेप लावलेली भिंत मी पाडून टाकेन आणि
ती धुळीस मिळवेन, म्हणजे तिचा पाया उघडा पडेल. जेव्हा ती पडेल
तेव्हा तिच्याबरोबर तुमचाही नाश होईल; आणि तुम्ही जाणाल की मीच
याहवेह आहे. 15 याप्रकारे त्या भिंतीविरुद्ध व ज्यांनी तिला चुन्याचा लेप
दिला त्यांच्याविरुद्ध मी माझा क्रोध ओतेन. मी तुम्हाला म्हणणार, “भिंत

गेली व ज्यांनी तिला चुन्याचा लेप दिला ते सुद्धा गेले, 16 इस्राएलचे
ते संदेष्टे ज्यांनी यरुशलेमविषयी भविष्यवाणी केली आणि शांती
नसतानाही शांती विषयी दृष्टान्त पाहिले त्यांच्याविषयी सार्वभौम याहवेह
असे जाहीर करतात.”’ 17 “तर आता हे मानवपुत्रा, आपल्यातील
कन्या ज्या त्यांच्याच कल्पनेने भविष्य सांगतात, त्यांच्याविरुद्ध भविष्य
सांग 18 आणि सांग, “सार्वभौम याहवेह असे म्हणतात: ज्या स्त्रिया
आपल्या मनगटांवर जादूच्या ताईत शिवून बांधतात आणि लोकांना
फसविण्यासाठी आपल्या डोक्यासाठी वेगवेगळ्या लांबीचे बुरखे तयार
करतात, त्या स्त्रियांचा धिक्कार असो. आपला जीव वाचवावा म्हणून
तुम्ही माझ्या लोकांचा जीव पाशात टाकता काय? 19 तुम्ही मूठभर
जवासाठी आणि भाकरीच्या तुकड्यांसाठी माझ्या लोकांमध्ये मला
अपवित्र केले आहे. जे माझे लोक लबाड्या ऐकतात, त्यांच्याशी तुम्ही
खोटे बोलला आहात, ज्यांनी मरू नये अशांना तुम्ही मारून टाकले
आणि ज्यांनी जगू नये अशांना तुम्ही वाचविले आहे. 20 “‘म्हणून
सार्वभौम याहवेह असे म्हणतात: जादूचे जे ताईत ज्याद्वारे तुम्ही माझ्या
लोकांना पक्ष्यांसारखे फसविता, त्याविरुद्ध मी आहे आणि ते मी तुमच्या
मनगटांवरून काढून टाकेन; तुम्ही पक्ष्यांप्रमाणे फसविलेल्या लोकांना
मी मुक्त करेन. 21 मी तुमच्या डोक्यावरील बुरखे फाडून टाकीन आणि
तुमच्या हातून माझ्या लोकांना वाचवेन आणि ते आणखी तुमच्या
हाताच्या सामर्थ्याला बळी पडणार नाही. तेव्हा तुम्ही जाणाल की
मीच याहवेह आहे. 22 कारण ज्या नीतिमानास मी दुखविले नाही,
त्यांना तुम्ही तुमच्या लबाड्यांनी निराश केले आहे आणि दुष्टांनी त्यांच्या
कुमार्गापासून वळू नये म्हणून तुम्ही त्यांना उत्तेजन देत त्यांचा जीव
वाचविता, 23 म्हणून यापुढे तुम्ही खोटे दृष्टान्त पाहणार नाही किंवा
शकुन करणार नाही. माझ्या लोकांना मी तुमच्या हातून सोडवेन. तेव्हा
तुम्ही जाणाल की मीच याहवेह आहे.’”

**14** इस्राएलच्या वडिलांपैकी काहीजण माझ्याकडे आले व
माझ्यासमोर बसले. 2 तेव्हा याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 3
“मानवपुत्रा, या माणसांनी आपल्या हृदयात मूर्ती बसविल्या आहेत
आणि त्यांच्या मुखासमोर त्यांनी दुष्ट अडखळण्याचे धोंडे ठेवले आहेत.
त्यांना मी, मला प्रश्न विचारू द्यावा काय? 4 म्हणून त्यांच्याशी बोल
आणि त्यांना सांग, ‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात: इस्राएलमध्ये
जेव्हा कोणी आपल्या हृदयात मूर्ती बसवितात आणि आपल्यासमोर
दुष्ट अडखळण्याचे धोंडे ठेवून मग संदेष्ट्याकडे जातात, मी सार्वभौम
याहवेह, स्वतः त्यांची मोठी मूर्तिपूजा लक्षात ठेवून त्यांना उत्तर देईन. 5
आपल्या मूर्तींसाठी ज्यांनी मला सोडले आहे, त्या इस्राएल लोकांची मने
पुन्हा फिरावी म्हणून मी असे करेन.’ 6 “म्हणून इस्राएल लोकांना सांग,
‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात: पश्चात्ताप करा! तुमच्या मूर्तींपासून
वळा आणि आपली अमंगळ कृत्ये टाकून द्या! 7 “‘जेव्हा इस्राएलातील
किंवा इस्राएलमध्ये राहत असलेला कोणी परदेशी स्वतःला माझ्यापासून
वेगळे करतात आणि त्यांच्या हृदयात मूर्ती बसवितात आणि आपल्या
मुखासमोर दुष्ट अडखळण्याचे धोंडे ठेवून मग माझ्याविषयी विचारण्यास
संदेष्ट्याकडे जातात, त्यांना मी याहवेह स्वतः उत्तर देईन. 8 मी
आपले मुख त्यांच्याविरुद्ध करेन आणि त्यांना एक चिन्ह व निंदेचा एक
विषय असे करेन. मी त्यांना माझ्या लोकांमधून नाहीसे करेन, तेव्हा
तुम्ही जाणाल की मीच याहवेह आहे. 9 “‘जर एखादा संदेष्टा भविष्य
सांगण्यासाठी भुलविला गेला, तर त्याला मी याहवेहने भुलविले आहे
आणि त्याच्याविरुद्ध मी माझा हात लांब करेन आणि माझ्या इस्राएली
लोकांतून त्यांचा नाश करेन. 10 त्यांना आपला दोष वाहून घ्यावा
लागेल; त्या संदेष्टाकडून सल्ला घेणारा जितका दोषी असणार, संदेष्टा
सुद्धा तितकाच दोषी असेल. 11 तेव्हा इस्राएली लोक माझ्यापासून
आणखी बहकून जाणार नाहीत किंवा ते स्वतःला आपल्या सर्व पापांनी
आणखी विटाळविणार नाहीत. ते माझे लोक होतील आणि मी त्यांचा
परमेश्वर होईन, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात.’” 12 याहवेहचे
वचन माझ्याकडे आले: 13 “हे मानवपुत्रा, जर एखाद्या देशाने अविश्वासू
राहून माझ्याविरुद्ध पाप केले आणि त्यांचा अन्नपुरवठा बंद करण्यास व
त्यावर दुष्काळ आणून त्यातील लोक व जनावरे मारून टाकण्यास
त्याविरुद्ध मी माझा हात लांब केला, 14 जरी नोआह, दानीएल व
इय्योब हे तिघे त्या देशात असते; तरी त्यांच्या नीतिमत्वामुळे केवळ
तेच वाचले असते, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात. 15 “किंवा
त्या देशभरात मी जंगली जनावरे पाठवली आणि त्यांनी तो अपत्यहीन
केला आणि जंगली जनावरांमुळे कोणीही त्यातून येणे जाणे करीत
नाही, त्यामुळे देश ओसाड पडला, 16 तर सार्वभौम याहवेह घोषित
करतात की माझ्या जिवाची शपथ, जरी हे तीन पुरुष त्यात असले, ते
आपल्या स्वतःच्या मुला-मुलींना वाचवू शकले नसते. केवळ तेच वाचले
असते, परंतु देश ओसाड पडला असता. 17 “किंवा त्या देशाविरुद्ध
तलवार आणली आणि म्हटले, ‘तलवार संपूर्ण देशभर चालो,’ आणि
त्यातील सर्व लोकांना व जनावरांना मारून टाकले, 18 सार्वभौम याहवेह
जाहीर करतात माझ्या जिवाची शपथ, जरी हे तीन पुरुष त्यात असले,
ते आपल्या स्वतःच्या मुला-मुलींना वाचवू शकले नसते. केवळ तेच
वाचले असते. 19 “किंवा त्या देशावर मी मरी पाठवून त्यातील लोकांना
व जनावरांना मारून रक्तपाताने माझा क्रोध त्यावर ओतला, 20 तर
सार्वभौम याहवेह जाहीर करतात की माझ्या जिवाची शपथ, जरी
नोआह, दानीएल व इय्योब त्यात असते, ते आपल्या मुलांना किंवा
मुलींना वाचवू शकले नसते. त्यांच्या नीतिमत्वामुळे केवळ ते आपलाच
जीव वाचवू शकले असते. 21 “कारण सार्वभौम याहवेह असे म्हणतात:
ते किती भयंकर असणार, जेव्हा मी माझ्या चार उग्र शिक्षा; तलवार व
दुष्काळ व जंगली जनावरे आणि मरी यरुशलेमविरुद्ध आणेन व त्यातील
लोक व त्यांची जनावरे मारून टाकेन! 22 तरीही त्यातून काही वाचतील;
काही पुत्र व कन्या ज्यांना त्यातून बाहेर काढले जाईल. ते तुमच्याजवळ
येतील आणि तुम्ही जेव्हा त्यांची वागणूक व त्यांची कृत्ये पाहाल, मी
यरुशलेमवर आणलेल्या प्रत्येक अनर्थाविषयी तुम्ही सांत्वन पावाल. 23
तुम्ही जेव्हा त्यांचे वर्तन व त्यांची कृत्ये पाहाल तेव्हा तुमचे सांत्वन

होईल, कारण तुम्ही जाणाल की मी त्यात विनाकारण असे काहीही केले नाही, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात.”

**15** याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 2 “मानवपुत्रा, द्राक्षवेलीचे लाकूड व वनातील इतर झाडांच्या फांद्यांमध्ये काय फरक आहे? 3 काही उपयोगी वस्तू बनवण्यासाठी तिचे लाकूड कधी घेतले गेले काय? वस्तू टांगून ठेवण्यासाठी लोक तिच्या खुंट्या बनवतात काय? 4 आणि जेव्हा तिला अग्नीत टाकले जाते व तिचे दोन्ही टोक जळून जातात आणि मधला भाग भस्म होतो, तेव्हा ते कोणत्या कामास योग्य असतात? 5 ती संपूर्ण असता कोणत्याही कामास येत नाही तर, अग्नीत जळून भस्म झाल्यावर कोणती उपयोगी वस्तू बनवण्यास ती कामास येईल? 6 “म्हणून सार्वभौम याहवेह असे म्हणतात: जसे मी द्राक्षवेलीच्या लाकडाला वनातील इतर झाडांबरोबर अग्नीचे इंधन म्हणून दिले आहे, त्याचप्रमाणे यरुशलेमात राहणाऱ्या लोकांशी मी वागेन. 7 मी आपले मुख त्यांच्यापासून फिरवेन. जरी ते अग्नीतून बाहेर आले, तरीही अग्नी त्यांना संपुष्टात आणेल. आणि जेव्हा मी आपले मुख त्यांच्यापासून फिरवेन, तुम्ही जाणाल की मीच याहवेह आहे. 8 ते अविश्वासू आहेत म्हणून मी त्या देशाला ओसाड करेन, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात.”

**16** याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 2 “मानवपुत्रा, यरुशलेमच्या अमंगळ कृत्यांबद्दल तिचा विरोध कर 3 आणि म्हण, ‘सार्वभौम याहवेह यरुशलेमास असे म्हणतात: तुझे पूर्वज व तुझा जन्म कनानी लोकांच्या देशातील आहे; तुझा पिता अमोरी आणि तुझी आई हिथी होती. 4 तुझा जन्म झाला त्या दिवशी तुझी नाळ कापली नव्हती, ना तुला पाण्याने धुवून स्वच्छ केले होते व तुला ना मिठाने चोळले होते, ना कापडाने गुंडाळले होते. 5 तुझ्याकडे कोणी दयेने पाहिले नाही किंवा तुझ्यासाठी यापैकी कोणतीही गोष्टी करावी म्हणून कोणाला सहानुभूती आली नाही. तर तुला मोकळ्या मैदानात टाकून दिले होते, तुझ्या जन्माच्या दिवशीच तू तुच्छ मानली गेली होती. 6 “‘तेव्हा मी तिथून जाताना तुला तुझ्या रक्तात लोळताना पाहिले आणि तू तिथे तुझ्या रक्तात पडलेली असताना मी तुला म्हटले, “जिवंत राहा!” 7 शेतातील रोपट्याप्रमाणे मी तुला वाढवले. तू वाढून मोठी होऊन वयात आलीस. तुझे स्तन विकसित झाले आणि तुझे केस वाढले, तरीही तू नग्नच होतीस. 8 “‘नंतर मी तिथून गेलो आणि जेव्हा मी तुला पाहिले आणि मला दिसले की तू प्रीती करण्याच्या वयात आली होतीस, तेव्हा मी आपल्या वस्त्राचा कोपरा तुझ्यावर पसरून तुझे नग्न शरीर झाकले. तुला मी आपली पवित्र शपथ देऊन तुझ्याशी करार केला आणि तू माझी झालीस, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात. 9 “‘पाण्याने तुला स्नान करवून तुझ्यावरील रक्त मी धुऊन टाकले आणि तुला तेल लावले. 10 तुला मी नक्षीकाम केलेली वस्त्रे घातली आणि उत्तम चामड्याची पायतणे चढविली. तुझ्यावर मी उत्तम रेशमी कपडे व भरजरी वस्त्रे पांघरली. 11 मी तुला दागिन्यांनी सजविले: मी तुझ्या हातांवर बांगड्या व गळयात साखळी घातली, 12 आणि मी तुझ्या नाकात नथ, कानात कुंडली आणि तुझ्या डोक्यावर एक सुंदर मुकुट घातला. 13 याप्रकारे तू सोन्या-चांदीने नटली; तुझी वस्त्रे रेशमी आणि किमती व नक्षीकाम केलेले सुंदर तुझे कपडे होते. मध, जैतुनाचे तेल आणि सपीठ तुझे अन्न होते. तू अति सुंदर होऊन राणी होण्यास योग्य झालीस. 14 तुझ्या सौंदर्यामुळे तुझी किर्ती अनेक देशांत पसरली, कारण मी तुला दिलेल्या वैभवाने तुझे सौंदर्य परिपूर्ण झाले होते, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात. 15 “‘परंतु तू आपल्याच सौंदर्यावर भरवसा केला आणि वेश्या होण्यास आपल्या सौंदर्याचा उपयोग केला. जे कोणी तुझ्या वाटेने गेले त्यांना तुझ्या सौंदर्याने तू भुरळ घातली आणि तुझे सौंदर्य त्याचे झाले. 16 आपली काही वस्त्रे घेऊन त्यांची भडक उच्च पूजास्थाने तू बनविली, तिथे तू आपला वेश्याव्यवसाय चालू ठेवला. तू त्याच्याकडे गेलीस आणि त्याने तुझ्या सौंदर्यावर कब्जा केला. 17 मी तुला दिलेले उत्तम दागिने तू घेतले, दागिने जे माझ्या सोन्याचांदीचे बनले होते, ते घेऊन तू त्याच्या पुरुषमूर्ती बनविल्या आणि त्यांच्याशी वेश्यावृत्ती करू लागली. 18 तू आपल्या नक्षीदार कापडाने त्यांना झाकले आणि मी तुला दिलेले तेल व अत्तर त्यांना अर्पण केले. 19 मी तुला दिलेले भोजन; म्हणजेच सपीठ, जैतुनाचे तेल आणि मध, जे मी तुला खायला दिले; ते तू सुवासिक धूप म्हणून त्यांना अर्पण केले. हे असेच घडले, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात. 20 “‘आणि ज्यांना माझ्यापासून जन्म दिला ते आपले पुत्र व कन्यांना तू मूर्तींना अन्न म्हणून अर्पण केले. तुझी वेश्यावृत्ती पुरेशी नव्हती काय? 21 माझ्या लेकरांचा तू वध केला आणि मूर्तींना यज्ञ केला. 22 तुझी सर्व अमंगळ कृत्ये आणि तुझी वेश्यावृत्ती यामध्ये तुझे तारुण्यातील दिवस, जेव्हा तू नग्न व उघडी, तुझ्या रक्तात लोळत होती त्याची आठवण तुला राहिली नाही. 23 “‘धिक्कार! तुझा धिक्कार असो, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात. तुझ्या इतर दुष्टतेबरोबर, 24 तू स्वतःसाठी घुमट बांधले आणि प्रत्येक चौकात उच्च पूजास्थान बनविले. 25 प्रत्येक रस्त्याच्या कोपऱ्यावर तू आपली उच्च स्थाने बनविली आणि तिथून जात येत असलेल्या प्रत्येकासमोर आपले पाय पसरून वाढत्या व्यभिचाराने आपल्या सौंदर्याचा अवमान केला. 26 मोठ्या लैंगिक अवयवांचे इजिप्तचे लोक तुझे शेजारी, यांच्याशी तू वेश्यावृत्ती केली आणि तुझ्या या वाढत्या व्यभिचाराने तू माझा क्रोध भडकावला. 27 यामुळे मी माझा हात तुझ्याविरुद्ध पसरविला आणि तुझी सीमा कमी केली; मी तुला तुझ्या वैरिणी, म्हणजेच पलिष्टी स्त्रियांच्या हावेस स्वाधीन केले, ज्यांना तुझ्या या अश्लील वर्तनामुळे धक्का बसला आहे. 28 तू अधाशी होतीस म्हणून अश्शूरी लोकांबरोबर सुद्धा तू वेश्यावृत्ती केली; आणि त्यानंतरही तुझी तृप्ती झाली नाही. 29 तेव्हा तू आपली व्यभिचारी प्रवृत्ती वाढवली व बाबिलोन जो व्यापाऱ्यांच्या देशाला सामील केले, परंतु त्यातही तू तृप्त झाली नाही. 30 “‘सार्वभौम याहवेह जाहीर करतात की, जेव्हा तू या सर्व गोष्टी करीत एका निर्लज्ज वेश्येप्रमाणे वागतेस, तेव्हा मी तुझ्याविरुद्ध क्रोधाने भरतो! 31 तू जेव्हा प्रत्येक रस्त्याच्या कोपऱ्यावर तुझी वेश्यागृहे आणि प्रत्येक चौकात

तुझी उच्च पूजास्थाने बांधली, तू एका वेश्येप्रमाणे नव्हती, कारण तू
मोबदला नाकारला. 32 "'हे व्यभिचारी पत्नी! आपल्या पतीपेक्षा तुला
अनोळखी लोक आवडतात! 33 प्रत्येक वेश्येस भेट मिळते, परंतु तू
आपल्या सर्व प्रियकरांना भेट देतेस, त्यांनी चहूकडून तुझ्या अश्लील
वासना पुरविण्यासाठी यावे म्हणून त्यांना लालूच देतेस. 34 म्हणून
तुझ्या वेश्या व्यवसायाबाबत तू इतरांपेक्षा वेगळी आहेस; तू आवडते
म्हणून कोणीही तुझ्यामागे धावत नाही. तू अगदी वेगळी आहेस, कारण
तू वेतन देतेस आणि तुला काही मिळत नाही. 35 "'म्हणून हे वेश्या,
याहवेहचे वचन तू ऐक! 36 सार्वभौम याहवेह असे म्हणतात: तू तुझी
वासना ओतली आणि स्वैरपणाने तुझ्या प्रियकरांसमोर तुझे नग्न शरीर
उघडे केले आणि तुझ्या अमंगळ मूर्तींमुळे आणि तू तुझ्या लेकरांचे रक्त
सांडले, 37 यामुळे ज्यांच्याठायी तुला सुख मिळाले त्या तुझ्या सर्व
प्रियकरांना मी एकत्र करेन, ज्यांच्यावर तू प्रेम केले, तसेच ज्यांचा तू वीट
केला. मी त्यांना चहूकडून तुझ्याविरुद्ध एकत्र करेन आणि त्यांच्यासमोर
तुला नग्न करेन आणि ते तुझी पूर्ण नग्नता पाहतील. 38 ज्या स्त्रिया
व्यभिचार करतात व रक्तपात करतात त्यांची शिक्षा मी तुला देईन; मी
आपल्या कोपाने व ईर्ष्येच्या क्रोधाने तुझ्यावर रक्तदोष आणेन. 39
तेव्हा मी तुला तुझ्या प्रियकरांच्या हाती स्वाधीन करेन आणि ते तुझे
घुमट पाडतील आणि तुझ्या उच्च पूजास्थानांचा नाश करतील. ते तुझी
वस्त्रे उतरवतील आणि तुझे उत्तम दागिने घेऊन तुला अगदी पूर्णतः
नग्न करून सोडतील. 40 ते तुझ्या विरोधात टोळी आणतील, जे तुला
धोंडमार करून आपल्या तलवारीने तुझे तुकडे करतील. 41 ते तुझी
घरे जाळतील व अनेक स्त्रियांदेखत तुला शिक्षा करतील. मी तुझ्या
वेश्यावृत्तीचा अंत करेन आणि यापुढे तू तुझ्या प्रियकरांना आणखी वेतन
देणार नाहीस. 42 तेव्हा तुझ्यावरचा माझा कोप शांत होईल आणि माझा
ईर्ष्येचा क्रोध निघून जाईल; मी शांत होईन व आणखी रागावणार नाही.
43 "'तू आपल्या तारुण्यातील दिवसांची आठवण केली नाहीस तर ज्या
सर्व कृत्यांनी मला चिडविले, तू केलेल्या कृत्यांचे प्रतिफळ मी खचितच
तुझ्या माथ्यावर आणेन, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात. तू
तुझ्या सर्व अमंगळ कृत्यांमध्ये अश्लीलतेची भर घातली नाही काय? 44
"'प्रत्येक व्यक्ती जे या म्हणींचा उपयोग करतात, ती तुझ्यासाठी हीच
म्हण वापरतील: "जशी आई तशी लेक." 45 तू तुझ्या आईची खरी
मुलगी आहेस, जिने तिच्या नवऱ्याचा व तिच्या लेकरांचा धिक्कार केला;
आणि तुझ्या बहिणींची तू सख्खी बहीण आहेस, ज्यांनी त्यांच्या पतींचा
व त्यांच्या लेकरांचा धिक्कार केला. तुझी आई हिथी होती आणि तुझा
पिता अमोरी होता. 46 शोमरोन तुझी थोरली बहीण होती, जी आपल्या
मुलींसह तुझ्या उत्तरेस राहत होती; आणि तुझ्या दक्षिणेस राहणारी
तुझी धाकटी बहीण सदोम आहे. 47 तू त्यांच्या मार्गांचे केवळ अनुसरण
करून त्यांची अमंगळ कृत्ये अंमलात आणली नाही, तर लवकरच तू
त्यांच्याहीपेक्षा अति भ्रष्ट झालीस. 48 सार्वभौम याहवेह जाहीर करतात
की, माझ्या जिवाची शपथ, तू व तुझ्या मुलींनी केलेली कृत्ये तुझी बहीण
सदोम आणि तिच्या मुलींनी केली नाहीत. 49 "'तुझी बहीण सदोम हिचे
अपराध हे होते: ती व तिच्या मुली अहंकारी, खादाड व इतरांची काळजी
न करणाऱ्या अशा होत्या; त्यांनी गरीब व गरजवंतांना मदत केली नाही.
50 त्या उन्मत्त असून माझ्यासमोर त्यांनी अमंगळ कृत्ये केली. म्हणून
मी त्यांना माझ्यापासून दूर केले ते तर तू पाहिलेच आहे. 51 शोमरोनने
तर तुझ्या तुलनेत अर्धीसुद्धा पातके केली नाहीत. तू त्यांच्यापेक्षा अधिक
अमंगळ कृत्ये केली आहेत आणि तू अशी कृत्ये करून तुझ्या बहिणींना
नीतिमान असे दाखविले आहे. 52 आपला कलंक वाहून घे, कारण तू
तुझ्या बहिणींचे काही प्रमाणात समर्थन केले आहे. कारण तुझी पापे
त्यांच्याहून अधिक घाणेरडी होती, तुझ्या बहिणी तुझ्यापेक्षा अधिक
नीतिमान दिसतात. तर मग, लाज धर आणि आपला कलंक वाहून घे,
कारण तू तुझ्या बहिणींना नीतिमान असे दाखविले आहे. 53 "'तथापि,
सदोम व तिच्या मुलींची संपत्ती मी पुनर्स्थापित करेन आणि शोमरोन व
तिच्या मुली व त्यांच्याबरोबर तुझीही संपत्ती पुनर्स्थापित करेन, 54
यासाठी की त्यांचे सांत्वन करताना तू तुझा कलंक वाहून घेशील आणि
तू केलेल्या कृत्यांची तुला लाज वाटेल. 55 तुझ्या बहिणी सदोम व
तिच्या मुली आणि शोमरोन व तिच्या मुली, त्यांच्या पूर्वस्थितीत परत
जातील; आणि तू व तुझ्या मुली सुद्धा तुमच्या पूर्वस्थितीत परत जाल.
56 तुझ्या गर्वाच्या दिवसात जेव्हा तुझी दुष्टता प्रगट झाली नव्हती, तेव्हा
तू तर तुझी बहीण सदोमचे नाव देखील घेत नसे. त्याचप्रमाणे, आता,
अरामाच्या कन्या व त्यांचे सर्व शेजारी आणि पलिष्ट्यांच्या कन्या यांनी
तुझी अप्रतिष्ठा केली—तुझ्या सभोवती असलेल्या सर्वांनी तुला तुच्छ
मानले. 58 तुझ्या अश्लील व अमंगळ कृत्यांचे परिणाम तू भोगशील,
असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात. 59 "'सार्वभौम याहवेह असे
म्हणतात: तू ज्यास पात्र आहेस, तसा व्यवहार मी तुझ्याशी करेन,
कारण करार मोडून तू माझी शपथ तुच्छ मानली आहेस. 60 तरीही
तुझ्या तारुण्याच्या दिवसांत मी तुझ्याशी केलेला करार मी स्मरण करेन
आणि तुझ्याबरोबर सर्वकाळचा करार मी स्थापित करेन. 61 आणि
तुझ्यापेक्षा थोरल्या व धाकट्या बहिणींचे तू स्वागत करशील, तेव्हा
तुला तुझे मार्ग आठवतील व तुला लाज वाटेल. तुझ्याबरोबरच्या माझ्या
करारानुसार नसले तरी मी त्यांना तुझ्या मुलींप्रमाणे तुला देईन. 62
तुझ्याशी मी आपला करार स्थापित करेन आणि मीच याहवेह आहे हे तू
जाणशील. 63 तुझ्यासाठी व जे सर्व तू केले त्यासाठी मी जेव्हा प्रायश्चित
करेन, तेव्हा तुला आठवण होईल व लाज वाटेल आणि अवमानामुळे
पुन्हा कधी आपले मुख उघडणार नाहीस, असे सार्वभौम याहवेह जाहीर
करतात.'"

**17** याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 2 "हे मानवपुत्रा, एक रूपक
घे आणि ते दाखला म्हणून इस्राएलच्या लोकांना सांग. 3 त्यांना
म्हण, 'सार्वभौम याहवेह असे म्हणतात: ज्याचे पंख शक्तिशाली आहेत,
लांब पिसांचा व निरनिराळया रंगाचा पिसारा असलेला एक गरुड
लबानोनमध्ये आला व त्याने गंधसरूच्या टोकावरील फांदी पकडली, 4
त्याने त्यावरील अगदी वरचा कोंब तोडला, तो व्यापाऱ्यांच्या देशात नेला
आणि तिथे विक्रेत्यांच्या शहरात लावला. 5 "'त्याने देशातील एक रोप

घेतले आणि ते सुपीक भूमीत लावले. त्याने ते वाळुंजीप्रमाणे भरपूर
पाण्याजवळ लावले, 6 आणि ते फुटले, पसरट व कमी उंचीची वाढून
द्राक्षवेल झाली. तिच्या फांद्या त्या गरुडाच्या दिशेने वळल्या होत्या, परंतु
तिची मुळे तिच्याच खाली होती. ती एक द्राक्षवेल झाली आणि तिला
पानांनी भरलेल्या फांद्या आल्या. 7 “‘परंतु अजून एक मोठा गरुड आला,
ज्याचे शक्तिशाली पंख आणि भरलेला पिसारा होता. द्राक्षवेलीने आता
आपली मुळे ती जिथे लावली होती तिथून त्या गरुडाकडे पसरविली
आणि पाण्यासाठी आपल्या फांद्या त्याच्याकडे लांब केल्या. 8 त्या
द्राक्षवेलीला पाने आणि फळ यावे व ती एक उत्कृष्ट द्राक्षवेल व्हावी
म्हणून भरपूर पाणी असलेल्या चांगल्या भूमीत ती लावली गेली होती.’
9 “त्यांना सांग, ‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात: तिची भरभराट होईल
काय? ती वाळून जावी म्हणून तिचे फळ काढून घेऊन तिला मुळापासून
उपटले जाईल काय? तिची सर्व नवीन पालवी वाळून जाईल. तिला
समूळ उपटण्यासाठी ना मजबूत हात लागणार ना पुष्कळ लोकांची
गरज लागणार. 10 तिला लावले तर आहे, पण तिची भरभराट होईल
काय? पूर्वेकडील वारा तिला लागला म्हणजे ती पूर्णपणे वाळून—ज्या
ठिकाणी वाढली त्याच ठिकाणी ती वाळणार नाही काय?’” 11 तेव्हा
याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 12 “बंडखोर लोकांना सांग, ‘या
गोष्टींचा अर्थ तुम्हाला माहीत नाही काय?’ त्यांना सांग: ‘बाबेलचा राजा
यरुशलेमात गेला आणि तिचा राजा व सरदारांना घेऊन त्याच्याबरोबर
परत बाबिलोनात आणले. 13 मग त्याने राजघराण्यातील एक सदस्य
घेतला व त्याच्याशी करार केला आणि त्याला शपथेत बांधले. त्याने
देशातील प्रमुख पुरुषांना देखील नेले, 14 म्हणजे राज्याचा पडाव होऊन
ते पुन्हा उठू शकणार नाही आणि केवळ त्याचा करार पाळूनच वाचेल.
15 परंतु राजाने त्याच्याविरुद्ध बंड केले आणि आपले घोडे व मोठे
सैन्य आणण्यासाठी इजिप्तला त्याचे राजदूत पाठवले. तो यशस्वी
होईल काय? अशा प्रकारचे काम करणारा वाचेल काय? करार तोडला
तरी वाचेल काय? 16 “‘सार्वभौम याहवेह जाहीर करतात, माझ्या
जिवाची शपथ, तो बाबेलमध्ये, ज्याने त्याला राजासनावर बसविले,
ज्याची शपथ त्याने तुच्छ मानली आणि ज्याचा करार त्याने मोडला,
त्याच राजाच्या देशात तो मरेल. 17 पुष्कळ जिवांचा नाश करण्यासाठी
जेव्हा मोर्चे बांधतील व बुरूज उभारतील, तेव्हा फारोह त्याच्या बलवान
सैन्य व मोठ्या जमावाच्या मदतीने त्या युद्धात त्याचे साहाय्य करू
शकणार नाही. 18 त्याने करार मोडून शपथ तुच्छ मानली आहे. कारण
त्याने हातात हात देऊन प्रतिज्ञा केली आणि तरीही त्याने या सर्व गोष्टी
केल्या, त्याचा निभाव होणार नाही. 19 “‘म्हणून सार्वभौम याहवेह
असे म्हणतात: माझ्या जिवाची शपथ, माझी शपथ तुच्छ मानली व
माझा करार मोडला, म्हणून मी त्याचा न्याय करेन. 20 त्याच्यासाठी
मी माझे जाळे पसरवीन आणि तो त्या पाशात पकडला जाईल. मी
त्याला बाबेलमध्ये आणेन आणि तिथे त्याच्यावर न्याय आणेन कारण
तो माझ्याशी अविश्वासू राहिला. 21 त्याचे सर्व उत्तम सैन्य तलवारीने
पडेल आणि त्यातून जे वाचतील ते वाऱ्याच्या दिशेने पसरतील. तेव्हा
तुम्ही जाणाल की मी याहवेह हे बोललो आहे. 22 “‘सार्वभौम याहवेह
असे म्हणतात: मी एका गंधसरूचा सर्वात उंच शेंडा घेऊन तो लावेन; मी
त्याचा अगदी वरचा लवचिक शेंडा तोडेन आणि तो सर्वात उंच व मोठ्या
पर्वतावर लावेन. 23 इस्राएलच्या उंच पर्वतावर मी तो लावेन; त्याला
फांद्या फुटतील व ते फळ देईल आणि ते वैभवी गंधसरू बनेल. प्रत्येक
प्रकारचे पक्षी त्यात घरटे बनवतील; त्यांना त्या गंधसरूच्या फांद्यांच्या
छायेत आसरा मिळेल. 24 रानातील सर्व झाडे जाणतील की मी याहवेह
उंच झाडांना वाकवितो आणि वाकलेल्या झाडांना उंच वाढवतो. हिरव्या
झाडांना मी वाळवितो आणि वाळलेल्या झाडांना भरभराटीस आणतो.
“‘मी याहवेह हे बोललो आहे आणि मी हे करणारच.’”

**18** याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 2 “याचा अर्थ काय जेव्हा तुम्ही
इस्राएल देशात ही म्हण वापरता: “‘आईवडिलांनी आंबट द्राक्षे
खाल्ली, आणि लेकरांचे दात आंबले’? 3 “सार्वभौम याहवेह जाहीर
करतात, माझ्या जिवाची शपथ यापुढे तुम्ही इस्राएलमध्ये या म्हणीचा
उपयोग करणार नाही. 4 कारण सर्वजण माझे आहेत, आईवडील व
लेकरे; दोघेही एकसारखे माझेच आहेत. जे पाप करतील तेच मरतील.
5 “समजा एक नीतिमान मनुष्य आहे जो न्याय्य व योग्य आहे तेच
करतो जे. 6 तो डोंगरावरील पूजास्थानातील प्रसाद खात नाही किंवा
इस्राएलच्या मूर्तींकडे पाहत नाही. तो आपल्या शेजाऱ्याच्या पत्नीला
भ्रष्ट करीत नाही किंवा मासिक पाळीच्या वेळी स्त्रीबरोबर लैंगिक संबंध
करीत नाही. 7 तो कोणावर अत्याचार करीत नाही, तर उसने देताना
घेतलेले गहाण परत करतो. जो लुटत नाही तर आपले अन्न भुकेल्यांस
देतो आणि वस्त्रहीनांना कपडे पुरवितो. 8 व्याजावर कोणाला उसने देत
नाही त्यांच्याकडून आपला नफा करून घेत नाही. वाईट करण्यापासून
आपला हात आवरतो आणि दोन गटांमधील न्याय सत्याने करतो. 9 तो
माझे विधी पाळतो आणि विश्वासूपणे माझे नियम राखतो. तो मनुष्य
न्यायी आहे; तो निश्चित जगेल, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात.
10 “समजा त्याच मनुष्याचा एक हिंसक मुलगा आहे, जो रक्तपात
किंवा त्यासारख्या इतर गोष्टी करतो 11 (जरी त्याच्या पित्याने त्यापैकी
एकही केले नव्हते): “तो डोंगरावरील पूजास्थानातील प्रसाद खातो. तो
आपल्या शेजाऱ्याची पत्नी भ्रष्ट करतो. 12 गरीब व गरजवंतावर तो
अत्याचार करतो. तो इतरांना लुटतो. उसने देताना घेतलेले गहाण परत
करीत नाही. तो मूर्तींकडे आपली नजर लावतो. तो अमंगळ कृत्ये करतो.
13 तो व्याजाने उसने देतो आणि नफा घेतो. असा मनुष्य जगेल काय?
तो जगणार नाही! कारण त्याने ही सर्व अमंगळ कृत्ये केली आहेत,
तो मारला जाईल; आणि त्याचे रक्त त्याच्याच माथ्यावर राहील. 14
“परंतु समजा, या मनुष्याला एक मुलगा आहे जो आपला पिता करीत
असलेली ही सर्व पापे पाहतो आणि जरी तो पाहतो, तरी त्या गोष्टी तो
स्वत: करीत नाही: 15 “तो डोंगरावरील पूजास्थानातील प्रसाद खात
नाही किंवा इस्राएलच्या मूर्तींकडे पाहत नाही. तो आपल्या शेजाऱ्याची
पत्नी भ्रष्ट करीत नाही. 16 तो कोणावर अत्याचार करीत नाही किंवा
उसने देण्यासाठी गहाण ठेवून घेत नाही. तो लुटत नाही तर भुकेल्याला

आपले अन्न देतो आणि वस्त्रहीनांना कपडे पुरवितो. 17 तो गरिबांचे
वाईट करण्यापासून आपला हात आवरतो आणि त्यांच्याकडून व्याज
किंवा नफा घेत नाही. तो माझे नियम आचरतो व माझे विधी पाळतो. तो
आपल्या पित्याच्या पापासाठी मरणार नाही; तर तो खचितच जगेल. 18
पण त्याचा पिता स्वतःच्या पापामुळे मरेल, कारण त्याने फसवणूक
केली, आपल्या भावाला लुटले आणि जे चुकीचे ते आपल्या लोकांत
केले. 19 "तरीही तुम्ही विचारता, 'मुलगा आपल्या पित्याचा दोष का
वाहत नाही?' मुलाने जे सरळ व योग्य ते केले व काळजीपूर्वक माझे
सर्व विधी आचरले, म्हणून तो खचितच जगेल. 20 जो पाप करतो
तोच मरेल. आपल्या आईवडिलांचा दोष त्यांची संतती वाहणार नाही
किंवा आईवडील आपल्या संततीचा दोष वाहणार नाहीत. नीतिमानाचे
नीतिमत्व त्यांच्यासाठी मोजले जाईल आणि दुष्टाची दुष्टता त्यांच्याविरुद्ध
मोजली जाईल. 21 "पण जर एखादा दुष्ट मनुष्य त्याने केलेल्या सर्व
पापांपासून मागे फिरला आणि माझ्या सर्व विधींचे पालन केले आणि जे
न्याय्य व योग्य ते केले, तो व्यक्ती खचित जगेल; तो मरणार नाही.
22 पूर्वी केलेल्या कोणत्याही पापांची त्याच्याविरुद्ध आठवण केली
जाणार नाही. जी नीतिमान कृत्ये त्याने केली आहे त्यामुळे तो खचितच
जगेल. 23 दुष्टाच्या मरणात मी आनंद पावतो काय? परंतु आपल्या
मार्गापासून वळून ते जीवन जगतात त्यात मी संतुष्ट नाही काय? असे
सार्वभौम याहवेह जाहीर करतात. 24 "परंतु जर कोणी नीतिमान व्यक्ती
त्यांच्या नीतिमत्तेपासून वळतील आणि त्यांनी दुष्ट व्यक्तीसारखे पाप
करून अमंगळ कृत्ये केली, तर ते जगतील काय? त्या व्यक्तीने केलेली
कोणतीही नीतीची कृत्ये आठवली जाणार नाहीत. अविश्वासूपणामुळे ते
दोषी आहेत आणि त्यांनी केलेल्या पापामुळे, ते मरतील. 25 "तरीही
तुम्ही म्हणता: 'प्रभूचा मार्ग न्यायाचा नाही.' अहो इस्राएल लोकांनो
ऐका: माझा मार्ग अन्यायी आहे काय? जे अन्यायी मार्ग आहेत ते तुमचेच
नाहीत काय? 26 जर कोणी नीतिमान व्यक्ती त्यांच्या नीतिमत्तेपासून
वळतात आणि पाप करतात, त्यामुळे ते मरतील; जे पाप त्यांनी केले
आहे, त्यामुळे ते मरतील. 27 परंतु जर एखादा दुष्ट व्यक्ती त्यांनी
केलेल्या दुष्टाईपासून वळेल आणि जे न्याययुक्त व योग्य ते करेल, तर ते
त्याचा जीव वाचवेल. 28 त्याने केलेली आपली सर्व पापे लक्षात आणून
त्यापासून तो वळला, म्हणून ती व्यक्ती खचितच वाचेल; आणि मरणार
नाही. 29 तरीही इस्राएल लोक म्हणतात, 'प्रभूचा मार्ग न्यायाचा नाही.'
अहो इस्राएल लोकहो, जे अन्यायी मार्ग आहेत ते तुमचेच नाहीत काय?
30 "म्हणून, सार्वभौम याहवेह जाहीर करतात, तुम्ही अहो इस्राएल
लोकहो, मी तुम्हा प्रत्येकाचा तुमच्या स्वतःच्या कृत्यांनुसार न्याय करेन.
पश्चात्ताप करा! तुमच्या सर्व पापांपासून दूर वळा; म्हणजे तुमचे पाप
तुमच्या पतनाचे कारण होणार नाही. 31 तुम्ही केलेले सर्व अपराध दूर
टाकून द्या आणि नवीन हृदय व नवीन आत्मा घ्या. इस्राएल लोकहो,
तुम्ही का मरावे? 32 कारण कोणाच्याही मरणाने मला आनंद होत नाही,
असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात. पश्चात्ताप करा आणि जिवंत
राहा!

**19** "इस्राएलच्या राजपुत्रांसाठी विलाप कर 2 आणि म्हण: "'तुझी
आई सिंहांमध्ये सिंहीण होती! ती त्यांच्यामध्ये वसत होती आणि
तिने तिच्या पिल्लांचे संगोपन केले. 3 तिच्या पिल्लांपैकी एकाला तिने
वाढवले, आणि तो एक बलवान सिंह झाला. तो शिकार फाडण्यास
शिकला आणि तो नर-भक्षक झाला. 4 तेव्हा राष्ट्रांनी त्याच्याविषयी
ऐकले, आणि तो त्यांच्या खड्ड्यात अडकला गेला. त्यांनी त्याला फासात
अडकवून इजिप्त देशात नेले. 5 "'जेव्हा त्या सिंहिणीने आपल्या भग्न
होत असलेल्या आशा पहिल्या, तिच्या अपेक्षा गेल्या, तिने तिच्या
पिल्लांमधून अजून एक पिल्लू घेतले आणि त्याला बलवान सिंह
बनविले. 6 तो इतर सिंहांमध्ये फिरू लागला, कारण तो आता बलवान
सिंह होता. तो शिकार फाडण्यास शिकला आणि तो नर-भक्षक झाला.
7 त्याने त्यांचे किल्ले मोडले आणि त्यांची नगरे उद्ध्वस्त केली. तो देश
व त्यातील राहणारे सर्वजण त्याच्या गर्जनेने भयभीत झाले. 8 तेव्हा
इतर राष्ट्र व सभोवतालचे प्रांत त्याच्याविरुद्ध आले, त्यांनी त्याच्यासाठी
जाळे पसरले, आणि तो त्यांच्या खड्ड्यात अडकला. 9 त्यांनी त्याला
आकड्याने ओढून पिंजऱ्यात टाकले आणि त्याला बाबेलच्या राजाकडे
आणले. त्याने त्याला तुरुंगात ठेवले, म्हणून इस्राएलच्या पर्वतांवर त्याची
गर्जना पुन्हा ऐकू आली नाही. 10 "'तुमची आई तुमच्या द्राक्षमळ्यात
पाण्याजवळ लावलेल्या द्राक्षवेलीप्रमाणे होती; विपुल पाण्यामुळे ती
फलदायी व फांद्यांनी भरलेली होती. 11 तिच्या फांद्या मजबूत असून,
अधिकाऱ्याच्या राजदंडासाठी योग्य होत्या. झाडाच्या दाट पानांच्या वर
त्या उंच वाढल्या, तिची उंची व तिच्या पुष्कळ फांद्यांमुळे ती उल्लेखनीय
दिसत होती. 12 परंतु क्रोधामुळे ती समूळ उपटली जाऊन जमिनीवर
फेकण्यात आली. पूर्वेकडील वाऱ्याने ती वाळून गेली, तिची फळे गळून
पडली; तिच्या मजबूत फांद्या वाळून गेल्या आणि अग्नीने त्या भस्म
केल्या. 13 आता ती वेल वाळवंटात, कोरड्या व तहानेल्या भूमीवर
लावली आहे. 14 तिच्या एका मुख्य फांदीमधून अग्नी पसरला आणि
तिचे फळ भस्म केले. अधिकाऱ्याच्या राजदंडासाठी योग्य अशी एकही
मजबूत फांदी तिच्यावर राहिली नाही.' हे विलापगीत आहे आणि
विलापगीत म्हणूनच त्याचा उपयोग व्हावा."

**20** सातव्या वर्षाच्या पाचव्या महिन्याच्या दहाव्या दिवशी,
इस्राएलातील काही वडील लोक याहवेहकडून विचारण्यास आले
आणि ते माझ्यापुढे बसले. 2 तेव्हा याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 3
"मानवपुत्रा, इस्राएलाच्या वडिलांशी बोल आणि त्यांना सांग, 'सार्वभौम
याहवेह असे म्हणतात: माझ्याकडून विचारपूस करण्यास तुम्ही आला
आहात काय? माझ्या जिवाची शपथ, मी तुम्हाला माझ्याकडे विचारपूस
करू देणार नाही, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात.' 4 "तू त्यांचा
न्याय करशील काय? हे मानवपुत्रा, तू त्यांचा न्याय करशील काय? तर
त्यांच्या पूर्वजांच्या अमंगळ कृत्यांविषयी त्यांचा निषेध कर 5 आणि
त्यांना सांग: 'सार्वभौम याहवेह असे म्हणतात: इस्राएलची मी निवड
केली, त्या दिवशी, मी शपथ घेतली व याकोबाच्या वंशजांकडे आपला
हात उंच केला व मी स्वतः इजिप्तमध्ये त्यांना प्रकट झालो. उंचावलेल्या

हाताने मी त्यांना म्हटले, “मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे.” 6 त्या
दिवशी मी त्यांच्याशी शपथ वाहिली की मी त्यांना इजिप्तमधून जो
देश मी त्यांच्यासाठी शोधला आहे, जिथे दूध व मध वाहते अशा देशात
मी त्यांना आणेन, जो सर्व देशांपेक्षा अति सुंदर आहे. 7 आणि मी
त्यांना म्हटले, “तुम्ही प्रत्येकाने ज्या घृणास्पद मूर्तींवर आपली नजर
लावली आहे, त्या टाकून द्या, आणि इजिप्तच्या मूर्तींनी स्वतःस विटाळू
नका. मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे.” 8 “‘परंतु त्यांनी माझ्याविरुद्ध
बंड केले आणि माझा शब्द मानला नाही; ज्या घृणास्पद मूर्तींवर
त्यांनी आपली नजर लावली होती, त्यांना त्यांनी टाकून दिले नाही,
ना त्यांनी इजिप्तच्या मूर्तींचा त्याग केला. त्यामुळे मी म्हणालो मी
त्यांच्यावर माझा क्रोध ओतेन आणि इजिप्तमध्ये मी त्यांच्यावर माझा
कोप दाखवेन. 9 परंतु माझ्या नावासाठी मी त्यांना इजिप्तमधून बाहेर
आणले. ज्या लोकांमध्ये ते राहिले आणि ज्यांच्यासमोर मी इस्राएली
लोकांना प्रकट झालो, त्यांच्या दृष्टीत माझ्या नावाचा अनादर होऊ नये
म्हणून मी असे केले 10 म्हणून त्यांना मी इजिप्तमधून काढले आणि
त्यांना रानात आणले. 11 त्यांना मी माझे विधी दिले आणि त्यांना माझे
नियम कळविले, ज्यामुळे जे लोक त्याचे पालन करतील ते जगतील.
12 त्याचप्रमाणे आमच्यामधील चिन्ह म्हणून मी त्यांना माझा शब्बाथ
दिला, यासाठी की त्यांनी जाणावे की मी याहवेहने त्यांना पवित्र केले
आहे. 13 “‘तरीही इस्राएली लोकांनी रानात माझ्याविरुद्ध बंड केले.
त्यांनी माझे विधी पाळले नाही तर माझ्या नियमांचा धिक्कार केला;
ज्यामुळे ज्यांनी नियमाचे पालन केले असते ते जगले असते; आणि
त्यांनी माझ्या शब्बाथाला पूर्णपणे अपवित्र केले. म्हणून मी म्हणालो
मी माझा क्रोध त्यांच्यावर ओतेन आणि रानात त्यांचा नाश करेन. 14
परंतु ज्या राष्ट्रांदेखत मी त्यांना बाहेर आणले त्यांच्या दृष्टीत माझ्या
नावाचा अनादर होऊ नये म्हणून मी माझ्या नावासाठी असे केले. 15
आणि रानात माझा हात उंच करून मी त्यांच्याशी शपथ वाहिली की
दूध व मध वाहणारा देश; जो सर्वात सुंदर देश मी त्यांना देऊ केला
होतात, त्यात मी त्यांना नेणार नाही; 16 कारण त्यांनी माझ्या नियमांचा
धिक्कार केला आणि माझ्या विधींचे पालन केले नाही आणि माझे
शब्बाथ विटाळले. कारण त्यांचे हृदय त्यांच्या मूर्तींकडे लागलेले होते.
17 तरीही मी त्यांच्याकडे दयेने पाहिले आणि रानात मी त्यांचा नाश
करून त्यांचा शेवट केला नाही. 18 त्यांच्या लेकरांना मी रानात म्हटले,
“तुमच्या आईवडिलांच्या कायद्याचे अनुसरण करू नका किंवा त्यांचे
नियम पाळू नका व त्यांच्या मूर्तींमुळे तुम्हास विटाळू नका. 19 मी
याहवेह तुमचा परमेश्वर आहे; माझ्या विधींचे अनुसरण करा आणि
काळजीपूर्वक माझे नियम पाळा. 20 माझे शब्बाथ पवित्र माना, यासाठी
की ते आपल्यातील चिन्ह असावे. मग तुम्ही जाणाल की मी याहवेह
तुमचा परमेश्वर आहे.” 21 “‘परंतु त्यांच्या लेकरांनी माझ्याविरुद्ध बंड
केले: त्यांनी माझ्या विधींचे अनुसरण केले नाही, माझे नियम त्यांनी
काळजीपूर्वक पाळले नाही, ज्याविषयी मी म्हटले होते, “की जे त्याचे
पालन करतील ते त्यानुसार जगतील,” आणि त्या लोकांनी माझे शब्बाथ
विटाळले. म्हणून मी म्हणालो मी माझा क्रोध त्यांच्यावर ओतेन आणि
रानात माझा कोप त्यांच्याविरुद्ध दाखवेन. 22 तरीही मी माझा हात
आवरला आणि ज्या राष्ट्रांदेखत मी त्यांना बाहेर आणले त्यांच्या दृष्टीत
माझ्या नावाचा अनादर होऊ नये म्हणून मी माझ्या नावासाठी असे केले.
23 आणि उंचावलेल्या हाताने मी त्यांच्याशी रानात शपथ वाहिली, की
राष्ट्रांमध्ये मी त्यांची पांगापांग करेन आणि देशांमध्ये मी त्यांना विखरेन,
24 कारण त्यांनी माझे नियम पाळले नाहीत, तर माझ्या विधींचा धिक्कार
केला व माझे शब्बाथ विटाळले आणि त्यांच्या डोळ्यांनी त्यांच्या
आईवडिलांच्या मूर्तींची वासना बाळगली. 25 म्हणून मी त्यांना इतर जे
चांगले नाहीत असे कायदे दिले आणि असे नियम ज्यामुळे ते जगणार
नाहीत; 26 त्यांच्याच भेटींनी मी त्यांना अशुद्ध केले; म्हणजेच प्रत्येक
प्रथम जन्मलेल्याचा यज्ञ अशासाठी की मी त्यांना भयाने भरावे, म्हणजे
ते जाणतील की मीच याहवेह आहे.’ 27 “म्हणून हे मानवपुत्रा, इस्राएली
लोकांशी बोल आणि त्यांना सांग, ‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात:
याबाबतीत तुमच्या पूर्वजांनी सुद्धा माझ्याशी अविश्वासू राहून दुर्भाषण
केले होते: 28 जो देश मी त्यांना शपथ वाहून देऊ केला होता, त्यात
जेव्हा मी त्यांना आणले आणि त्यांनी एखादे उंच डोंगर किंवा दाट
पानांनी भरलेले झाड पाहिले, तिथे त्यांनी यज्ञ केले, माझा राग पेटेल
अशी अर्पणे त्यांनी केली, त्यांचे सुवासिक धूप सादर करीत त्यांची
पेयार्पणे ओतली. 29 तेव्हा मी त्यांना म्हणालो: हे उच्च पूजास्थान
जिथे तुम्ही जाता ते काय आहे?’” (आजवर त्या ठिकाणास बामाह
म्हणतात.) 30 “म्हणून इस्राएली लोकांना सांग: ‘सार्वभौम याहवेह असे
म्हणतात: तुमच्या पूर्वजांप्रमाणे तुम्हीदेखील स्वतःला अशुद्ध करून
आणि त्यांच्या घृणास्पद मूर्तींची वासना बाळगणार काय? 31 जेव्हा
तुम्ही तुमच्या भेटी सादर करता, म्हणजेच तुमच्या लेकरांचा अग्नीत यज्ञ
करता; तुम्ही तुमच्या मूर्तींमुळे असेच स्वतःला अशुद्ध करीत राहता.
अहो इस्राएल लोकहो, तुम्ही माझ्याकडे विचारपूस करावी असे मी होऊ
द्यावे काय? सार्वभौम याहवेह जाहीर करतात, माझ्या जिवाची शपथ, मी
तुम्हाला माझ्याकडे विचारपूस करू देणार नाही. 32 “‘तुम्ही म्हणता,
“राष्ट्रांप्रमाणे, जगाच्या लोकांप्रमाणे आम्हाला व्हायचे आहे, जे लाकूड व
दगडाची सेवा करतात.” परंतु तुमच्या मनात जे आहे, ते कधीही घडणार
नाही. 33 सार्वभौम याहवेह जाहीर करतात, माझ्या जिवाची शपथ,
बलवान हाताने, उगारलेल्या बाहूने व क्रोधाची वृष्टी करीत मी तुमच्यावर
राज्य करेन. 34 मी तुम्हाला राष्ट्रांमधून आणेन आणि ज्या ठिकाणी
तुम्ही पांगला आहात त्या देशांमधून; बलवान हाताने, उगारलेल्या बाहूने
व क्रोधवृष्टी करीत मी तुम्हाला एकत्र करेन. 35 राष्ट्रांच्या रानात मी
तुम्हाला आणेन आणि तिथे समोरासमोर मी तुमचा न्याय करेन. 36
इजिप्त देशाच्या रानात जसा मी तुमच्या पूर्वजांचा न्याय केला, तसाच
मी तुमचा न्याय करेन, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात. 37 माझ्या
काठीखालून तुम्ही जात असता मी बारकाईने तुम्हाला पाहीन आणि
तुम्हाला कराराच्या बंधनात आणेन. 38 जे माझ्याविरुद्ध उठतात आणि
बंड करतात त्यांच्यापासून मी तुम्हाला वेगळे करेन. जरी ज्या देशात

ते राहतात तिथून मी त्यांना बाहेर आणेन, तरीही इस्राएल देशात ते
प्रवेश करणार नाहीत. तेव्हा तुम्ही जाणाल की मीच याहवेह आहे. 39
"'अहो इस्राएली लोकहो, तुमच्याविषयी म्हटले तर, सार्वभौम याहवेह
असे म्हणतात: जा तुम्ही प्रत्येकजण तुमच्या मूर्तींची सेवा करा! परंतु
त्यानंतर तुम्ही खचितच माझे ऐकाल आणि तुमच्या भेटींनी व मूर्तींनी
माझे नाव आणखी अपवित्र करणार नाही. 40 कारण सार्वभौम याहवेह
जाहीर करतात, माझ्या पवित्र पर्वतावर, इस्राएलातील उंच पर्वतावर
त्या भूमीवर इस्राएलचे सर्व लोक माझी सेवा करतील आणि तिथे मी
त्यांचा स्वीकार करेन. तिथे तुमच्या सर्व पवित्र यज्ञांबरोबर तुमची अर्पणे
व तुमच्या उत्तम भेटी मी मागेन. 41 जेव्हा मी तुम्हाला राष्ट्रांतून बाहेर
आणेन आणि ज्या देशांमध्ये तुमची पांगापांग झाली तिथून मी तुम्हाला
एकत्र करेन, तेव्हा सुवासिक धुपाप्रमाणे मी तुम्हाला स्वीकारेन आणि
मी तुमच्याद्वारे राष्ट्रांदेखत पवित्र मानला जाईन. 42 जेव्हा इस्राएल
देश, जो देश मी माझा हात उंच करून तुम्हाला शपथ वाहून दिला
होता त्यात मी तुम्हाला आणेन, तेव्हा तुम्ही जाणाल की मीच याहवेह
आहे. 43 तिथे तुम्ही तुमचे वर्तन व तुमची कृत्ये, ज्यामुळे तुम्ही स्वतःस
भ्रष्ट केले त्यांची आठवण कराल आणि ज्या सर्व वाईट गोष्टी तुम्ही
केल्या त्यामुळे तुम्ही स्वतःचा वीट कराल. 44 इस्राएलाच्या घराण्या
तुमचे वाईट मार्ग आणि दुष्कर्मांनुसार नाही तर माझ्या नामाकरिता
मी तुमच्याशी वागेन, तेव्हा तुम्ही जाणाल मीच याहवेह आहे, असे
सार्वभौम याहवेह जाहीर करतात.'" 45 याहवेहचे वचन माझ्याकडे
आले: 46 "मानवपुत्रा, दक्षिणेकडे आपले तोंड कर; दक्षिणेविरुद्ध संदेश
दे आणि दक्षिण भूमीच्या वनाविरुद्ध भविष्यवाणी कर. 47 दक्षिणेच्या
वनाला सांग: 'याहवेहचा शब्द ऐका. सार्वभौम याहवेह असे म्हणतात:
मी तुझ्यावर अग्नी पाठविणार आहे आणि तो तुझ्या सर्व झाडांना
भस्म करेल, ते हिरवे असो वा वाळलेले. ती धगधगती आग विझणार
नाही आणि दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत प्रत्येक चेहरा त्यामुळे भाजेल. 48
प्रत्येकजण पाहील की मी याहवेहने अग्नी पेटविला आहे; तो विझणार
नाही.'" 49 मग मी म्हणालो, "हे सार्वभौम याहवेह, माझ्याविषयी हे
लोक म्हणतात, 'हा केवळ दाखलेच सांगत नाही ना?'"

**21** याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 2 "मानवपुत्रा, यरुशलेमविरुद्ध
आपले तोंड कर आणि पवित्रस्थानाविरुद्ध संदेश दे. इस्राएल
देशाविरुद्ध भविष्यवाणी कर. 3 आणि इस्राएलाच्या भूमीला सांग:
'याहवेह असे म्हणतात: मी तुझ्याविरुद्ध आहे. माझ्या म्यानातून मी
माझी तलवार उपसून नीतिमान आणि दुष्ट अशा दोघांनाही तुझ्यातून
छेदून टाकेन. 4 कारण मी नीतिमानास व दुष्टास छेदून टाकणार आहे,
दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत प्रत्येकाविरुद्ध माझी तलवार म्यानातून उपसली
जाईल. 5 तेव्हा सर्व लोक जाणतील मी याहवेहने आपल्या म्यानातून
तलवार उपसली आहे; ती परत त्यात जाणार नाही.' 6 "म्हणून
मानवपुत्रा, आक्रोश कर! भग्न हृदयाने व कष्टाने त्यांच्यासमोर उसासे
टाक. 7 आणि जेव्हा ते तुला विचारतील, 'तू उसासे का टाकतोस?' तू
सांग की, 'जी वार्ता येणार आहे म्हणून प्रत्येक हृदय भीतीने विरघळेल
आणि प्रत्येक हात लुळा पडेल; प्रत्येक आत्मा अशक्त होईल आणि
प्रत्येक पाय मुत्राने भिजेल.' ते येत आहे! ते नक्कीच घडणार, असे
सार्वभौम याहवेह जाहीर करतात." 8 याहवेहचे वचन माझ्याकडे आले:
9 "मानवपुत्रा, भविष्यवाणी कर आणि म्हण, 'प्रभू असे म्हणतात:
"'एक तलवार, एक तलवार, धार लावलेली आणि चमकविलेली; 10
कत्तल करण्यास धार लावलेली, विजेप्रमाणे चमकणारी अशी केलेली!
"'माझ्या राजपुत्राच्या राजदंडामुळे आम्ही आनंद करावा काय? तलवार
अशा प्रत्येक काठीला तुच्छ लेखते. 11 "'हातात धरता यावी म्हणून,
तलवार चमकण्यास नेमली आहे; ती धारदार व चमकविली गेली
आहे, आणि कत्तल करणाऱ्याच्या हातासाठी ती तयार केली गेली
आहे. 12 हे मानवपुत्रा, मोठ्याने रड आणि विलाप कर, कारण हे
माझ्या लोकांविरुद्ध आहे; ते इस्राएलच्या सर्व राजपुत्रांविरुद्ध आहे.
माझ्या लोकांसहित त्यांनासुद्धा तलवारीस देण्यात आले आहे. म्हणून तू
आपले ऊर बडव. 13 "'कसोटी खचितच होणार आणि तलवारीने तुच्छ
लेखलेला राजदंड पुढे चालला नाही तर काय होईल? असे सार्वभौम
याहवेह जाहीर करतात.' 14 "तर हे मानवपुत्रा, भविष्यवाणी कर
आणि तुझ्या हातावर हात मार. तलवार दोन वेळा वार करो, किंवा
तीन वेळाही चालेल. ही तलवार कत्तल करण्यासाठी; तलवार जी
मोठ्या वधासाठी आहे, जिने त्यांना चहूकडून घेरले आहे. 15 म्हणजे
त्यांची हृदये भीतीने पाणी पाणी होतील आणि पुष्कळ पडतील, कत्तल
करण्यासाठीच ही तलवार त्यांच्या सर्व फाटकांवर मी नेमली आहे.
पाहा! विजेसारखा वार करण्यास ती बनविली गेली आहे, हत्येसाठी
ती उपसली गेली आहे. 16 अगे तलवारी, उजवीकडे वार कर, मग
डावीकडे वार कर, जिथे तुझे पाते फिरेल तिथे वार कर. 17 मी सुद्धा
माझा हात हातावर मारीन, आणि माझा क्रोध शांत होईल. मी याहवेह हे
बोललो आहे." 18 याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 19 "मानवपुत्रा,
बाबेलच्या राजाच्या तलवारीसाठी दोन रस्ते आखून घे, दोन्ही एकाच
देशातून निघतील. शहराकडे जाताना जिथे दुहेरी वाटा निघतात तिथे
चिन्हस्तंभ लाव. 20 अम्मोन्यांच्या राब्बाहविरुद्ध येणाऱ्या तलवारीसाठी
एक वाट आणि यहूदाह व तटबंदीच्या यरुशलेमच्या विरुद्ध येणाऱ्या
तलवारीसाठी दुसरी वाट आखून ठेव. 21 कारण बाबेलचा राजा शकुन
पाहण्यासाठी दुहेरी वाटेच्या मधोमध, त्या दोन वाटांच्या चौकात थांबेल:
तो बाणांनी चिठ्ठ्या टाकेल, तो मूर्तींचा सल्ला घेईल आणि काळजाची
परीक्षा करून शकुन पाहील. 22 त्याच्या उजव्या हातात यरुशलेमची
चिठ्ठी निघेल, जिथे तो युद्धाची यंत्रे लावेल, यासाठी की वध करण्याची
आज्ञा द्यावी, युद्धाची घोषणा करावी, द्वारांना युद्धाची यंत्रे लावावी, मोर्चे
बांधावे व तट उभारावे. 23 ज्यांनी त्याच्याशी निष्ठेने शपथ वाहिली त्यांना
तो शकुन खोटा वाटेल, परंतु तो त्यांना त्यांच्या दोषाची आठवण करून
देईल व त्यांना कैद करून नेईल. 24 "यास्तव सार्वभौम याहवेह असे
म्हणतात: 'तुम्ही लोकांनी उघड बंड करून आणि तुम्ही जे काही करता
त्याद्वारे तुमचे अपराध उघड करून, तुमच्या मनात दोष आणला आहे;
आणि तुम्ही असे केले आहे म्हणून तुम्ही बंदिवासात नेले जाल. 25 "'हे

इस्राएलाच्या अपवित्र व दुष्ट राजपुत्रा, ज्याचा दिवस आला आहे, ज्याला दंड द्यायचा शेवटचा समय आला आहे, 26 त्या तुला सार्वभौम याहवेह असे म्हणतात: तुझा टोप उतरव, मुकुट काढून टाक. तो जसा होता तसा आता नसेल: जे नम्र ते उंच केले जातील व जे उंच ते नम्र केले जातील. 27 नाश! नाश! मी याचा नाश करेन! ज्याच्याकडे त्या मुकुटाचा खरा अधिकार आहे तो येईपर्यंत हा मुकुट पुनर्स्थापित होणार नाही; त्यालाच मी तो देईन.' 28 "आणि तू हे मानवपुत्रा, भविष्यवाणी कर आणि सांग, 'अम्मोनी लोक व त्यांच्या निंदेविषयी सार्वभौम याहवेह असे म्हणतात: "'एक तलवार, एक तलवार, कत्तल करण्यास उपसलेली, नाश करण्यास व विजेप्रमाणे; ती चमकविलेली व चमकणारी आहे! 29 जरी तुमच्याविषयीचे खोटे दृष्टान्त व तुमच्याबद्दलचे लबाड शकुन केले, तरीही ज्या दुष्टांचा नाश झाला पाहिजे म्हणून त्यांच्या मानेवर तलवार ठेवली जाईल, त्यांचा दिवस आला आहे, त्यांना दंड द्यायचा शेवटचा समय येऊन ठेपला आहे. 30 "'तलवार परत तिच्या म्यानात जाऊ द्या. ज्या ठिकाणी तू निर्माण केली गेली, तुझ्या पूर्वजांच्या भूमीत, मी तुझा न्याय करेन. 31 मी माझा क्रोध तुझ्यावर ओतेन आणि माझ्या कोपाचा अग्नी तुझ्यावर फुंकेन; क्रूर लोक जे नाश करण्यात निपुण आहेत, त्यांच्या हाती मी तुला सोपवेन. 32 तू अग्नीला इंधन अशी होशील, तुझे रक्त तुझ्याच देशात सांडेल, तुझी आठवण आणखी केली जाणार नाही; कारण मी याहवेह हे बोललो आहे.'"

**22** याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 2 "मानवपुत्रा, तू तिचा न्याय करशील काय? या रक्तपाती शहराचा न्याय तू करशील काय? तर तिच्या सर्व अमंगळ कृत्यांविषयी तिचा निषेध कर 3 आणि म्हण: 'सार्वभौम याहवेह असे म्हणतात: हे नगरी, तू रक्तपात करून व मूर्ती बनवून स्वतःला अशुद्ध करून आपला नाश ओढवून घेतला आहेस, 4 जो रक्तपात तू केलास त्यामुळे तू दोषी झालीस आणि ज्या मूर्ती तू बनविल्यास त्यामुळे तू विटाळली आहेस. तुझे दिवस जवळ आणले आहेस आणि तुझ्या वर्षांचा शेवट आला आहे. म्हणून मी तुला राष्ट्राकरिता निंदा व देशांसाठी हास्य असे करेन. 5 हे अपकीर्तिच्या, उपद्रवाने भरलेल्या नगरी, जे तुझ्याजवळ आहेत व जे दूर आहेत, ते सर्व तुझी थट्टा करतील. 6 "'पाहा, इस्राएलचे प्रत्येक राजपुत्र त्यांच्या अधिकाराचा उपयोग कसा रक्तपातासाठी करीत आहेत. 7 तुझ्यातील आईवडिलांना त्यांनी तुच्छ मानले; त्यांनी तुझ्यातील विदेशीयांवर अत्याचार केला आणि अनाथ व विधवांना अयोग्य वागणूक दिली. 8 तुम्ही माझ्या पवित्र वस्तूंचा अवमान केला आणि माझे शब्बाथ अपवित्र केले आहेत. 9 तुझ्यात निंदक राहतात, ज्यांचा कल रक्तपाताकडे आहे; तुझ्यात असे लोक आहेत जे डोंगरावरील पूजास्थानात प्रसाद खातात आणि अश्लील कृत्ये करतात. 10 तुझ्यात असे लोक आहेत ज्यांनी आपल्या पित्याचा पलंग विटाळला आहे; जे मासिक पाळीच्या वेळी जेव्हा स्त्रिया विधीनुसार अशुद्ध असतात, तेव्हा त्यांच्याशी लैंगिक संबंध ठेवतात. 11 तुझ्यातील एक पुरुष त्याच्या शेजाऱ्याच्या पत्नीशी निंद्यकर्म करतो, तर दुसरा त्याच्या सुनेला भ्रष्ट करतो आणि अजून दुसरा त्याच्या बहिणीला, त्याच्याच पित्याच्या मुलीला भ्रष्ट करतो. 12 तुझ्यात लोक आहेत, जे रक्तपात करण्यास लाच घेतात; तू व्याज घेते आणि गरिबांकडून नफा करून घेतेस. तू आपल्या शेजाऱ्याकडून जबरीने वसूल करून लाभ घेतेस. आणि तुला माझा विसर पडला आहे, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात. 13 "'अन्यायाने तू जो लाभ करून घेतला आहे, आणि तुमच्यात जो रक्तपात तू केला आहे, त्यामुळे संतापाने मी माझे हात एकत्र चालवेन. 14 मी तुझा झाडा घेईन त्या दिवशी तुझे धाडस टिकेल काय किंवा तुझे हात दृढ राहतील काय? मी याहवेह हे बोललो आहे आणि मी हे करणारच. 15 राष्ट्रांमध्ये मी तुमची पांगापांग आणि देशांमध्ये तुम्हाला विखरून टाकीन; आणि तुमच्या अशुद्धतेचा शेवट मी करेन. 16 राष्ट्रांच्या नजरेत तू जेव्हा विटाळलेली ठरशील, तेव्हा तू जाणशील की मीच याहवेह आहे.'" 17 तेव्हा याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 18 "मानवपुत्रा, इस्राएली लोक माझ्यासाठी गाळ असे झाले आहेत; ते सर्व भट्टीत राहिलेले कास्य, कथील, लोखंड व शिसे यासारखे आहेत. ते केवळ चांदीचा गाळ आहेत. 19 म्हणून सार्वभौम याहवेह असे म्हणतात: 'तुम्ही सर्वजण गाळ असे झाला आहात, म्हणून मी तुम्हाला यरुशलेममध्ये एकत्र करेन. 20 जसे चांदी, कास्य, लोखंड, शिसे व कथील वितळण्यासाठी धगधगत्या आगीच्या भट्टीत टाकली जातात, तसेच मी तुम्हाला माझ्या रागाने व क्रोधाने एकत्र करेन आणि तुम्हाला शहरात ठेवून वितळवीन. 21 मी तुम्हाला एकत्र करेन व तुमच्यावर माझा क्रोधाग्नी फुंकेन, आणि तुम्ही त्या शहरात वितळून जाल. 22 जशी चांदी भट्टीत वितळली जाते, असेच तुम्ही त्या शहरात वितळून जाल आणि तुम्ही जाणाल की मी याहवेहने माझा कोप तुमच्यावर ओतला आहे.'" 23 याहवेहचे वचन पुन्हा माझ्याकडे आले: 24 "मानवपुत्रा, या देशाला सांग, 'तुम्ही असा एक देश आहात जो कोपाच्या दिवशी ना शुद्ध केला गेला ना ज्यावर पाऊस पडला.' 25 तिच्यातील राजपुत्रांचा एक कट आहे, ते गर्जना करीत भक्ष फाडणाऱ्या सिंहाप्रमाणे आहेत; ते लोकांना ग्रस्त करतात, ते खजिना व मोलवान वस्तू घेतात आणि त्यांच्यात पुष्कळांना विधवा बनवतात. 26 तिचे याजक माझ्या नियमाचे उल्लंघन करतात व माझ्या पवित्र वस्तूंना अपवित्र करतात; पवित्र व सर्वसामान्य यात ते फरक ठेवत नाहीत; शुद्ध व अशुद्ध यात काही भेद नाही अशी शिकवण ते देतात आणि त्यांच्यात मी अपवित्र मानला जाईल म्हणून माझ्या शब्बाथांकडे दुर्लक्ष करतात. 27 तिचे सरदार भक्ष फाडणाऱ्या लांडग्याप्रमाणे आहेत; अन्यायाने लाभ करून घेण्यासाठी ते रक्तपात करतात व लोकांना जिवे मारतात. 28 त्यांचे संदेष्टे खोटे दर्शन व लबाड शकुनाद्वारे या सर्व कृत्यांवर चुन्याचा लेप फासतात आणि याहवेह बोलले नाही तरी ते म्हणतात, 'सार्वभौम याहवेह असे म्हणतात.' 29 या देशातील लोक फसवणूक व लुटारूपण करतात; ते गरीब व गरजवंतावर अत्याचार करतात आणि विदेशी लोकांना न्याय न देता अन्यायाने वागवितात. 30 "या देशाचा मी नाश करू नये म्हणून तिच्यातील कोणी एक भिंत बांधेल आणि देशासाठी माझ्यासमोर खिंडारात उभा राहील अशा व्यक्तीला मी त्यांच्यात शोधले, परंतु मला

कोणी सापडला नाही. 31 म्हणून मी त्यांच्यावर माझा क्रोध ओतेन
आणि माझ्या कोपाग्नीने त्यांना भस्म करेन त्यांनी जे काही केले ते मी
त्यांच्याच माथ्यावर आणेन, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात.”

**23** याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 2 “मानवपुत्रा, दोन स्त्रिया
होत्या, ज्या एकाच आईच्या मुली होत्या. 3 त्या इजिप्तमध्ये
वेश्या होऊन, त्यांच्या तारुण्यापासून वेश्यावृत्ती करीत होत्या. त्या
देशात त्यांची स्तने हाताळली गेली आणि त्यांच्या कुमारावस्थेतील छाती
कुरवाळली गेली. 4 थोरलीचे नाव ओहोलाह होते आणि ओहोलीबाह
तिची लहान बहीण होती. त्या माझ्या होत्या आणि त्यांनी मुलांना व
मुलींना जन्म दिला. ओहोलाह ही शोमरोन आहे आणि ओहोलीबाह
यरुशलेम आहे. 5 “ओहोलाह माझी असतानाच वेश्यावृत्ती करू लागली;
आणि तिचे प्रियकर; म्हणजेच अश्शूरी योद्ध्यांची अभिलाषा करू
लागली 6 ते निळी वस्त्रे घातलेले, राज्यपाल व सेनापती होते, ते सर्व
सुंदर तरुण पुरुष घोडेस्वार होते. 7 तिने स्वतःला या उच्चभ्रू अश्शूरी
लोकांच्या स्वाधीन करून ज्या सर्वांच्या मूर्तींची आस धरली होती त्यामुळे
स्वतःला विटाळवून टाकले. 8 इजिप्तमध्ये सुरू केलेली वेश्यावृत्ती
तिने सोडली नाही, जिथे पुरुष तिच्या तारुण्यात तिच्याबरोबर झोपले
तिच्या कुमारावस्थेतील छाती त्यांनी कुरवाळली आणि त्यांच्या वासना
तिच्यावर ओतल्या. 9 “म्हणून मी तिला तिचे अश्शूरी प्रियकर, ज्यांची
अभिलाषा तिने बाळगली त्यांच्या हाती दिले. 10 त्यांनी तिला नग्न केले,
तिची मुले व मुली घेऊन तिला तलवारीने मारून टाकले. स्त्रियांमध्ये ती
म्हणीप्रमाणे झाली आणि तिला दंड देण्यात आला. 11 “तिची बहीण
ओहोलीबाहने हे पाहिले, तरीही तिच्या वासना व वेश्यावृत्तीत ती तिच्या
बहिणीपेक्षा अधिक व ती दुर्गुणी होती. 12 ती अश्शूरी लोकांच्या मागे
वासनेने आसक्त झाली—राज्यपाल आणि सेनापती, गणवेष घातलेले
योद्धे, घोडेस्वार आणि सर्व देखणे पुरुष होते. 13 मी पाहिले की तिने
सुद्धा स्वतःला अपवित्र केले; त्या दोघीही एकाच मार्गाने गेल्या. 14
“परंतु तिने तिची वेश्यावृत्ती अजून पुढे नेली. भिंतीवर रेखाटलेल्या
पुरुषांच्या प्रतिमा तिने पाहिल्या, जी लाल रंगाने रंगविलेली खास्द्यांची
चित्रे होती, 15 त्यांच्या कंबरेला पट्टे होते व त्यांच्या डोक्यावर सुंदर
फेटे होते; ते सर्व बाबेलच्या रथ अधिकाऱ्यांसारखे, खास्द्यांचे रहिवासी
असे दिसत होते. 16 ती चित्रे पाहताच त्यांची वासना तिला झाली
आणि खास्द्यांच्या देशात त्यांच्याकडे दूत पाठवले. 17 मग बाबेलचे
लोक तिच्याकडे प्रेमाच्या पलंगावर आले, आणि त्यांच्या वासनांनी
तिला भ्रष्ट केले, तेव्हा तिने तिचे मन त्यांच्यापासून घृणेने वळविले. 18
जेव्हा उघडपणे तिने तिची वेश्यावृत्ती केली आणि तिचे नग्न शरीर उघडे
केले, तेव्हा जसे मी तिच्या बहिणीपासून झालो तसाच तिरस्काराने मी
तिच्यापासून दूर झालो. 19 तरीही तारुण्याच्या दिवसांत इजिप्तमध्ये
वेश्या होती त्या दिवसांची आठवण करीत ती अजूनच स्वैराचाराने वागू
लागली. 20 तिथे ती वेश्या तिच्या प्रियकरांची वासना करू लागली,
ज्यांचे जननेंद्रिय गाढवांप्रमाणे व त्यांचा स्त्राव घोड्यांसारखा होता.
21 याप्रकारे जेव्हा इजिप्तमध्ये तुझ्या छातीला कुरवाळले गेले व तुझे
तरुण स्तन हाताळले गेले, त्या तुझ्या तारुण्यातील अश्लीलतेची
अभिलाषा तू धरलीस. 22 “म्हणून, हे ओहोलीबाह, सार्वभौम याहवेह
असे म्हणतात: ज्या तुझ्या प्रियकरांपासून तू तिरस्काराने दूर झालीस
त्यांना मी तुझ्याविरुद्ध भडकवीन, प्रत्येक बाजूंनी मी त्यांना तुझ्याविरुद्ध
आणेन; 23 बाबेल व खास्द्यांचे लोक, पकोड, शोआ व कोआतील पुरुष
आणि त्यांच्यासह सर्व अश्शूरी, सुंदर तरुण पुरुष, त्यांचे राज्यपाल
आणि सरदार, रथ अधिकारी, उच्च पदाधिकारी व घोडेस्वार. 24 हत्यारे,
रथ व गाडे व लोकांचा घोळका घेऊन ते तुझ्याविरुद्ध येतील; ते सर्व
बाजूंनी तुझ्याविरुद्ध मोठ्या व लहान ढाली आणि शिरटोप घालून
तुझ्याविरुद्ध येतील. तुला शिक्षा करावी म्हणून मी तुला त्यांच्या हाती
देईन आणि त्यांच्या मापदंडानुसार ते तुला शिक्षा करतील. 25 मी
आपला ईर्षायुक्त क्रोध तुझ्यावर आणेन आणि संतापाने ते तुझ्याशी
वागतील. ते तुझे नाक व कान कापतील आणि तुझ्यातील मागे राहिलेले
ते तलवारीने पडतील आणि त्यातूनही जे वाचतील ते अग्नीने भस्म
होतील. 26 ते तुझी वस्त्रे काढून घेतील व तुझे दागिने हिसकावून घेतील.
27 म्हणजे जी अश्लीलता व वेश्यावृत्ती तू इजिप्तमध्ये चालू केली तिचा
शेवट मी करेन. या गोष्टींकडे तू पुन्हा पाहणार नाहीस आणि यापुढे
इजिप्तचे स्मरण आणखी करणार नाहीस. 28 “कारण सार्वभौम याहवेह
असे म्हणतात: ज्यांचा तू द्वेष करतेस, तिरस्काराने ज्यांच्यापासून तू दूर
झालीस त्यांच्या हाती मी तुला देत आहे. 29 ते तुझ्याशी द्वेषाने वागतील
आणि ज्यासाठी तू काम केले त्या सर्व गोष्टी ते तुझ्यापासून हिसकावून
घेतील. ते तुला अगदी नग्न करतील आणि तुझ्या वेश्यावृत्तीची लाज
उघडी पडेल. 30 तुझी अश्लीलता व दुराचारांनी हे सर्व तू तुझ्यावर
ओढवून घेतले आहे, कारण तू राष्ट्रांची अभिलाषा धरलीस आणि त्यांच्या
मूर्तींनी स्वतःला विटाळून टाकले. 31 तू आपल्या बहिणीच्या मार्गाने
गेलीस; म्हणून तिचा पेला मी तुझ्या हाती देईन. 32 “सार्वभौम याहवेह
असे म्हणतात: “तू तुझ्या बहिणीचा पेला पिशील, जो पेला मोठा व
खोल आहे; तो तुझ्यावर हास्य व थट्टा आणेल, कारण त्यात पुष्कळ
मावते. 33 नशा व दुःख यांनी तू भरशील हा पेला नाश व विध्वंसाचा
आहे, तो पेला तुझी बहीण शोमरोन हिचा आहे. 34 तू तो पेला पिऊन
कोरडा करशील आणि त्याचे तुकडे चावशील; आणि तू आपली छाती
फाडशील. हे मी बोललो आहे, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात.
35 “म्हणून सार्वभौम याहवेह असे म्हणतात: तू मला विसरलीस व
माझ्याकडे पाठ फिरवलीस, म्हणून त्याचा परिणाम तू भोगलाच पाहिजे,
तू तुझ्या अश्लीलतेचे व वेश्यावृत्तीचे प्रतिफळ भोगलेच पाहिजे.” 36
याहवेहने मला म्हटले: “मानवपुत्रा, ओहोलाह व ओहोलीबाहचा न्याय तू
करशील काय? मग त्यांच्या अमंगळ कृत्यांबद्दल त्यांचा निषेध कर. 37
कारण त्यांनी व्यभिचार केला आहे आणि रक्त त्यांच्या हातावर आहे.
त्यांनी त्यांच्या मूर्तींशी व्यभिचार केला; त्या मूर्तींना अन्न म्हणून ज्या
लेकरांना त्यांनी माझ्यापासून जन्म दिला त्यांचा यज्ञ त्यांनी मूर्तींना
केला. 38 त्यांनी मलाही असेच केले: त्याचवेळी त्यांनी माझे पवित्रस्थान
अपवित्र आणि माझे शब्बाथ भ्रष्ट केले. 39 त्याच दिवशी त्यांनी त्यांच्या

लेकरांचे यज्ञ त्यांच्या मूर्तींना केले, ते माझ्या पवित्रस्थानात आले आणि
ते अपवित्र केले. माझ्या घरात त्यांनी ही कृत्ये केली. 40 “जी माणसे
दुरून आली होती त्यांना देखील त्यांनी बोलाविणे पाठवले आणि जेव्हा
ते आले त्यांच्यासाठी तू स्नान केले, डोळ्यात काजळ घातले आणि
आपले दागिने चढविले. 41 तू एका सुंदर पलंगावर बसलीस, ज्यापुढे
एक मेज ठेवलास त्यावर जे माझे होते ते धूप व जैतुनाचे तेल ठेवले. 42
“चैनबाजी करणाऱ्या लोकांच्या गर्दीचा आवाज तिच्या आजूबाजूला
होता; गोंधळी लोकांबरोबर दारूबाज लोक आणले गेले होते आणि त्यांनी
स्त्रिया व त्यांच्या बहिणीच्या हातात बांगड्या आणि त्यांच्या डोक्यावर
सुंदर मुकुट घातले. 43 तेव्हा जी स्त्री व्यभिचार करून निकामी झाली
होती तिच्याविषयी म्हटले, ‘वेश्या म्हणून त्यांनी तिचा उपयोग करावा,
कारण ती वेश्याच तर आहे.’ 44 आणि ते तिच्याबरोबर झोपले. पुरुष
जसे वेश्यांबरोबर झोपतात तसेच ते त्या अश्लील स्त्रिया, ओहोलाह व
ओहोलीबाह यांच्याबरोबर झोपले. 45 परंतु ज्या व्यभिचार करतात
आणि रक्त सांडतात, त्या स्त्रियांना नीतिमान न्यायाधीश दंड देतील,
कारण त्या व्यभिचारी आहेत आणि त्यांचे हात रक्ताने भरले आहेत. 46
“सार्वभौम याहवेह असे म्हणतात: त्यांच्याविरुद्ध मोठा जमाव आणा
आणि त्यांना आतंक व लुटेच्या स्वाधीन करा. 47 लोकांचा जमाव त्यांना
धोंडमार करतील आणि त्यांना तलवारीने कापतील; ते त्यांच्या मुलांना व
मुलींना जिवे मारतील आणि त्यांची घरे जाळून टाकतील. 48 “देशातील
अश्लीलतेचा मी शेवट करेन, म्हणजे सर्व स्त्रिया सावध राहतील आणि
तुमच्याप्रमाणे त्या करणार नाही. 49 तुमच्या अश्लीलतेचा दंड तुम्ही
भोगाल आणि तुमच्या मूर्तिपूजेच्या पापाचे परिणाम तुम्ही भोगाल. तेव्हा
तुम्ही जाणाल की मीच सार्वभौम याहवेह आहे.”

**24** नवव्या वर्षी, दहाव्या महिन्याच्या दहाव्या दिवशी, याहवेहचे
वचन माझ्याकडे आले: 2 “हे मानवपुत्रा, ही तारीख, हा दिवस
नोंदून ठेव, कारण आजच्याच दिवशी बाबेलच्या राजाने यरुशलेमला
वेढा घातला. 3 या बंडखोर लोकांना एक दाखला सांग आणि म्हण:
‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात: “‘एक कढई घे; आणि विस्तवावर
ठेव आणि त्यात पाणी ओत. 4 त्यात मांसाचे तुकडे टाक, सर्वात
उत्तम तुकडे; मांडी आणि खांदा. यांच्या उत्तम हाडांनी कढई भर; 5
कळपातील उत्तम मेंढरू निवडून घे. हाडांसाठी कढईच्या खाली लाकडे
ठेव; आणि ते उकळून त्यात हाडे शिजव. 6 “‘कारण सार्वभौम याहवेह
असे म्हणतात: “‘रक्तपाताच्या शहराचा धिक्कार असो, ज्या कढईला
गंज लागला आहे, ज्याचा थर जाणार नाही! जसे काढता येईल तसा
एकएक मांसाचा तुकडा काढून घ्या. 7 “‘कारण तिने सांडलेले रक्त
तिच्यामध्येच आहे: ते तिने उघड्या खडकावर ओतले; तिने ते मातीने
झाकले जाईल असे, जमिनीवर ओतले नाही. 8 कोप भडकवावा व
सूड घ्यावा म्हणून मी तिचे रक्त उघड्या खडकावर ओतेन, म्हणजे ते
झाकले जाणार नाही. 9 “‘म्हणून सार्वभौम याहवेह असे म्हणतात:
“‘रक्तपाताच्या शहराचा धिक्कार असो! मी देखील लाकडाचा ढीग उंच
करेन. 10 तर लाकडाचा ढीग करा आणि अग्नी पेटवा. मसाले मिसळून;
मास चांगले शिजवून घ्या, हाडे पूर्णपणे जळू द्या. 11 मग रिकामी कढई
निखाऱ्यावर ठेवा ती गरम होऊन तिचे तांबे चमकू द्या, म्हणजे तिची
अशुद्धता वितळून जाईल आणि त्याचा थर पूर्णपणे जळून जाईल.
12 परंतु सर्व प्रयत्न वाया गेले; तिच्यावर बसलेला दाट थर निघाला
नाही, तो अग्नीने देखील निघाला नाही. 13 “‘आता तुझी अशुद्धता तर
दुराचार आहे. कारण तुला शुद्ध करण्याचा मी प्रयत्न केला, परंतु तू
तुझ्या अशुद्धतेपासून शुद्ध झाली नाहीस, आता तुझ्याविरुद्ध माझा कोप
शांत होईपर्यंत तू शुद्ध होणार नाहीस. 14 “‘मी याहवेह हे बोललो आहे
आणि मी ते करण्याची वेळ आली आहे. मी आवरून धरणार नाही;
मी दया करणार नाही, मी अनुतापणारही नाही. तुझे वर्तन व तुझी
कृत्ये यानुसार तुझा न्याय केला जाईल, असे सार्वभौम याहवेह जाहीर
करतात.’ ” 15 याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 16 “हे मानवपुत्रा,
एका झटक्यात तुझ्या डोळ्याचा आनंद मी तुझ्यापासून काढून घेणार
आहे. परंतु तू शोक करू नकोस किंवा रडू नकोस वा अश्रू गाळू नकोस.
17 शांततेने कण्ह; मेलेल्यासाठी शोक करू नकोस. तुझा पागोटा काढू
नकोस आणि आपली पायतणे पायातच असू दे; तुझे तोंड झाकू
नकोस किंवा प्रथेनुसार शोक करणाऱ्यांसाठी आणलेले अन्न तू खाऊ
नकोस.” 18 म्हणून सकाळी मी लोकांशी बोललो आणि संध्याकाळी
माझी पत्नी मरण पावली. दुसऱ्या सकाळी मला आज्ञापिल्याप्रमाणे मी
केले. 19 तेव्हा लोकांनी मला विचारले, “या सर्व गोष्टींचे आमच्याशी
काय देणे घेणे आहे? तू असे का वागत आहेस?” 20 तेव्हा मी त्यांना
म्हटले, “याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 21 इस्राएली लोकांना सांग,
‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात: माझे पवित्रस्थान; तो बलवान गड
ज्याविषयी तुम्ही अभिमान बाळगता, तुमच्या डोळ्यांचा आनंद, ज्यावर
तुम्ही मनापासून प्रेम करता, तो मी अपवित्र करणार आहे. तुमची मुले व
मुली जे तुम्ही मागे सोडले ते तलवारीने पडतील. 22 आणि जसे मी केले
तसेच तुम्हीही कराल. तुम्ही आपली मिशी आणि दाढी झाकणार नाही
किंवा प्रथेनुसार शोक करणाऱ्यांसाठी आणलेले अन्न तुम्ही खाणार
नाही. 23 तुम्ही आपले पागोटे आपल्या डोक्यावर आणि तुमची पायतणे
तुमच्या पायात असू द्यावीत. तुम्ही शोक करू नये किंवा रडू नये, तर
तुमच्या पापांमुळे तुम्ही झुराल व आपसातच कण्हाल. 24 यहेज्केल
तुमच्यासाठी एक चिन्ह असा आहे; जसे त्याने केले तसेच तुम्हीही
करा. हे जेव्हा घडेल, तेव्हा तुम्ही जाणाल की मीच सार्वभौम याहवेह
आहे.’ 25 “आणि तू, हे मानवपुत्रा, ज्या दिवशी मी त्यांचे बलवान दुर्ग,
त्यांचा हर्ष आणि गौरव, त्यांच्या डोळ्यांचा आनंद, त्याच्या हृदयाची
इच्छा आणि त्यांची मुले व मुली सुद्धा काढून घेईन; 26 त्या दिवशी एक
फरार झालेला तुम्हाला वर्तमान सांगण्यास येईल. 27 त्यावेळी तुझे तोंड
उघडेल; तू त्याच्याशी बोलशील, आणखी शांत बसणार नाही. याप्रकारे
तू त्यांच्यासाठी एक चिन्ह असा असशील, आणि ते जाणतील की मीच
याहवेह आहे.”

**25** याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 2 “हे मानवपुत्रा, अम्मोन्यांकडे
आपले तोंड कर आणि त्यांच्याविषयी भविष्यवाणी कर. 3

अम्मोन्यांना सांग, ‘सार्वभौम याहवेहचे वचन ऐका. सार्वभौम याहवेह
असे म्हणतात: जेव्हा माझे पवित्रस्थान अपवित्र करण्यात आले, आणि
इस्राएल देश ओसाड झाला व जेव्हा यहूदीयाचे लोक बंदिवासात गेले,
तेव्हा तुम्ही “आहा!” असे म्हटले, 4 म्हणून तुमच्या पूर्वेस असलेल्या
लोकांना त्यांची मालमत्ता म्हणून तुम्हाला मी त्यांच्या स्वाधीन करेन. ते
त्यांच्या छावण्या तुमच्यात उभारतील व त्यांचे तंबू तुमच्यात बांधतील;
ते तुमची फळे खातील व तुमचे दूध पितील. 5 मी राब्बाह नगराला
उंटांचा तबेला व अम्मोनला मेंढरांचे विश्रामस्थान असे करेन. तेव्हा
तुम्ही जाणाल की मीच याहवेह आहे. 6 कारण सार्वभौम याहवेह असे
म्हणतात: कारण तुम्ही टाळया वाजविल्या व उड्या मारल्या आणि
इस्राएल देशाप्रती आपल्या हृदयात द्वेष ठेऊन आनंद केला, 7 आता मी
माझा हात तुझ्याविरुद्ध उगारेन व तुला राष्ट्रांना लूट म्हणून देईन. राष्ट्रांतून
मी तुला पुसून टाकेन आणि देशातून तुला नाहीसे करेन. मी तुझा
नाश करेन आणि तू जाणशील की मीच याहवेह आहे.’” 8 “सार्वभौम
याहवेह असे म्हणतात: ‘मोआब आणि सेईर म्हणाले, “पाहा, यहूदाह
तर इतर राष्ट्रांसारखाच झाला आहे,” 9 म्हणून मी मोआबाची हद्द,
त्याच्या सीमेवरील नगरे—बेथ-यशिमोथ, बआल-मेओन व त्या देशाचे
वैभव किर्याथाईम उघडे करेन. 10 अम्मोनी लोकांबरोबर मोआबला
सुद्धा मी पूर्वेकडील लोकांना त्यांची मालमत्ता म्हणून स्वाधीन करेन,
म्हणजे राष्ट्रांमध्ये अम्मोनी लोकांचे स्मरण केले जाणार नाही; 11 आणि
मोआबाला मी शिक्षा करेन. तेव्हा ते जाणतील की मीच याहवेह आहे.’”
12 “सार्वभौम याहवेह असे म्हणतात: ‘एदोमने यहूदाहचा सूड घेतला
आणि त्यामुळे तो अतिशय दोषी ठरला, 13 म्हणून सार्वभौम याहवेह
असे म्हणतात: एदोमविरुद्ध मी माझा हात लांब करेन आणि मनुष्य
व पशूंना मी मारून टाकीन. मी त्याला ओसाड करेन आणि तेमान
पासून ददानपर्यंत ते तलवारीने पडतील. 14 माझ्या इस्राएली लोकांच्या
हातूनच मी एदोमवर माझा सूड घेईन, आणि माझा राग व क्रोधानुसार ते
त्यांच्याशी वागतील; ते माझा सूड अनुभवतील, असे सार्वभौम याहवेह
जाहीर करतात.’” 15 “सार्वभौम याहवेह असे म्हणतात: ‘पलिष्टी लोक
प्रतिकाराने वागले व निरंतरच्या वैरभावाने यहूदाहचा नाश करण्यासाठी
आपल्या हृदयात द्वेषबुद्धी ठेऊन त्यांचा सूड घेतला आहे. 16 म्हणून
सार्वभौम याहवेह असे म्हणतात: पलिष्ट्यांविरुद्ध मी माझा हात उगाणार
आहे आणि करेथी लोकांना नाहीसे करेन आणि समुद्रकिनाऱ्यावर
उरलेल्यांना नष्ट करेन. 17 मी त्यांच्यावर माझा सूड उगवेन आणि माझ्या
क्रोधाने त्यांचा नाश करेन. जेव्हा मी त्यांचा सूड घेईन, तेव्हा ते जाणतील
की मीच याहवेह आहे.’”

**26** बाराव्या वर्षाच्या अकराव्या महिन्याच्या पहिल्या दिवशी, याहवेहचे
वचन माझ्याकडे आले: 2 “मानवपुत्रा, यरुशलेमविषयी सोरने
म्हटले, ‘आहा! राष्ट्रांचे प्रवेशद्वार मोडले आहे आणि त्याचे दरवाजे
माझ्यासाठी उघडे पडले आहेत; ती उजाड झाली आहे, तर आता माझी
भरभराट होईल,’ 3 यामुळे सार्वभौम याहवेह असे म्हणतात: अगे
सोर, मी तुझ्याविरुद्ध आहे आणि जशा समुद्राच्या लाटा उसळतात
तसे अनेक राष्ट्र मी तुझ्याविरुद्ध आणेन. 4 ते सोरचे तट पाडतील व
तिच्या बुरुजांचा विध्वंस करतील; मी तिची माती खरडून काढेन व तिला
एक उघडा खडक करेन. 5 ती बाहेर समुद्रावर जाळे पसरण्याचे स्थान
होईल, कारण मी हे बोललो आहे, असे सार्वभौम याहवेह म्हणतात. ती
राष्ट्रांसाठी लूट होईल, 6 आणि भूप्रदेशात असलेले तिचे लोक तलवारीने
पडतील. तेव्हा ते जाणतील की मीच याहवेह आहे. 7 “कारण सार्वभौम
याहवेह असे म्हणतात: बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर त्याचे घोडे व रथ,
घोडेस्वार व विराट सैन्याला उत्तरेकडून सोरवर हल्ला करण्यास मी
आणेन. 8 भूप्रदेशात असलेल्या तुमच्या वस्त्यांचा तलवारीने तो नाश
करेल; तो तुमच्याविरुद्ध घेराबंदी करेल, तुमच्या भिंतीस चढ बांधेल
आणि तुझ्याविरुद्ध त्याची ढाल उंच करेल. 9 तो तुझ्या तटांसमोर
युद्धाची यंत्रे लावेल व आपल्या हत्यारांनी तुझे बुरूज नष्ट करेल. 10
त्याचे घोडे इतके असतील की त्यांनी उडविलेल्या धुळीने तू झाकला
जाशील. युद्धाचे घोडे, गाडे व रथासह तो जेव्हा तुझ्या द्वारातून प्रवेश
करेल आणि ज्या शहराच्या भिंती कोसळल्या आहेत, त्यातून त्याचे
सैन्य प्रवेश करतील तेव्हा तुझ्या भिंती त्यांच्या मोठ्या आवाजाने
थरकापतील. 11 त्यांच्या घोड्यांच्या खुरांनी तुझे सर्व रस्ते तुडविले
जातील; तो तुझ्या लोकांना तलवारीने मारेल आणि तुझे मजबूत स्तंभ
जमिनीवर पडतील. 12 ते तुझी संपत्ती व व्यापारी वस्तू लुटून घेतील; ते
तुझ्या भिंती फोडतील आणि तुझ्यातील सुंदर घरांचा ते नाश करतील व
तुझे धोंडे, लाकूड व माती समुद्रात फेकतील. 13 तुझ्या गीतांचा आवाज
मी बंद पाडेन आणि तुझ्या वीणांचा सूर पुन्हा ऐकू येणार नाही. 14 मी
तुला उघडे खडक बनवीन आणि तू मासेमारीचे जाळे पसरविण्याचे
ठिकाण बनशील. तू कधीही पुनर्स्थापित होणार नाहीस, कारण मी
याहवेह हे बोललो आहे, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात. 15 “सोर
शहरास सार्वभौम याहवेह असे म्हणतात: तुझ्या पतनाच्या आवाजाने,
जखमी लोकांच्या कण्हण्याने आणि तुझ्यात होत असलेल्या कत्तलीमुळे
समुद्रतटांचा थरकाप होणार नाही काय? 16 तेव्हा सर्व समुद्रतटाचे
राजकुमार आपआपल्या राजासनांवरून खाली उतरतील आणि आपले
झगे काढून बाजूला ठेवतील व आपली नक्षीदार वस्त्रे काढून टाकतील.
भीतीची वस्त्रे घालून, प्रत्येक क्षणी थरथर कापत, तुझ्याविषयी भयभीत
होऊन ते जमिनीवर बसतील. 17 मग ते तुझ्यासाठी विलाप करून
तुला म्हणतील: “‘हे प्रसिद्ध शहरा, ज्या तुझ्यात खलाशी लोक वसत
होते! ज्या तुला समुद्रातही शक्ती होती, तू व तुझे रहिवासी; तिथे राहत
असलेल्या सर्वांना आतंक होतीस त्या तुझा नाश कसा झाला. 18
आता तुझ्या पतनाच्या दिवशी समुद्रतट कापतात; तू कोसळून पडली
म्हणून समुद्रातील द्वीपे भयभीत झाली आहेत.’ 19 “सार्वभौम याहवेह
असे म्हणतात: ज्यामध्ये कोणी आणखी वस्ती करीत नाही, अशा
शहरांसारखे जेव्हा मी तुला ओसाड शहर करेन आणि जेव्हा मी खोल
समुद्र तुझ्यावर आणेन आणि त्याचे प्रचंड पाणी तुला झाकून टाकेल,
20 आणि जे खाली गर्तेत आधी गेले आहेत त्यांच्याजवळ मी तुला खाली
आणेन. पृथ्वीच्या खाली, अधोलोकाच्या खोल गर्तेत जिथे पुरातन

ओसाडी आहेत, जे तिथे खाली गर्तेत आहेत आणि जे परत येणार
नाहीत किंवा या जिवंतांच्या भूमीवर तुझे स्थान घेणार नाहीत अशा
ठिकाणी मी तुला वसवीन. 21 मी तुझा भयंकर शेवट करेन आणि तुझे
अस्तित्व मी नाहीसे करेन. तुझा शोध घेतला, तरी तू पुन्हा कधीही
सापडणार नाहीस, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात.”

**27** याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 2 “मानवपुत्रा, सोरसाठी विलाप
कर. 3 सोरला सांग, तू जी समुद्राच्या प्रवेशद्वाराजवळ वसलेली,
अनेक समुद्रतटावर लोकांशी व्यापार करणारी, ‘त्या तुझ्याविषयी
सार्वभौम याहवेह म्हणतात: “‘अगे सोर, तू म्हणतेस, “मी सौंदर्याने
परिपूर्ण आहे.” 4 उंच समुद्रांवर तुझे राज्य होते; तुला बांधणाऱ्यांनी तुझे
सौंदर्य पूर्णतेस आणले. 5 त्यांनी तुझ्या फळया सनीरच्या देवदारूच्या
बनविल्या; त्यांनी लबानोनचे गंधसरू घेतले आणि डोलकाठी बनविली.
6 त्यांनी तुझी वल्ही बाशानच्या एला झाडाची बनविली; त्यांनी तुझ्या
बैठकी कित्तीम द्वीपातील सुरूच्या लाकडाच्या बनविल्या आणि त्यांना
हस्तिदंताने सजविले. 7 तुझे शीड इजिप्तचे नक्षीदार रेशमी ताग होते
ते तुझा झेंडा होते; तुझे छत एलिशाह द्वीपातील निळया व जांभळया
रंगाच्या कापडाचे होते. 8 सीदोन व आरवदचे पुरुष तुझे वल्हेकरी
होते; हे सोर, तुझ्यातील कुशल लोक, जहाजावर तुझे खलाशी म्हणून
होते. 9 गबालचे अनुभवी वडील जहाजाची फूट दुरुस्ती करण्यास
जहाजावर होते. समुद्रावरील सर्व जहाजे व त्यांचे खलाशी तुझ्या
मालाचा व्यापार करण्यास तुझ्याजवळ आले. 10 “‘पर्शिया, लूद आणि
पूत व कूशच्या माणसांनी तुझ्या सैन्यात योद्धे म्हणून सेवा केली.
त्यांनी त्यांच्या ढाली व शिरटोप तुझ्या भिंतीवर टांगून तुला वैभवी
बनविले. 11 आरवद व हेलेकच्या माणसांनी चहूकडून तुझ्या तटांचे
रक्षण केले; गम्मादचे पुरुष तुझ्या बुरुजावर होते. त्यांनी त्यांच्या ढाली
तुझ्या भिंतींवर चोहीकडे टांगल्या; त्यांनी तुझे सौंदर्य पूर्णतेस आणले.
12 “‘तुझ्या महान संपत्तीमुळे तार्शीशने तुझ्याबरोबर व्यापार केला;
तुझ्या मालाच्या मोबदल्यात त्यांनी चांदी, लोखंड, कथील व शिसे
दिली. 13 “‘ग्रीस, तूबाल व मेशेख यांनीही तुझ्याबरोबर व्यापार केला;
त्यांनी तुझ्या मालाच्या मोबदल्यात मानवप्राणी व कास्याच्या वस्तू
दिल्या. 14 “‘बेथ-तोगर्माहचे लोक तुझ्या मालाच्या मोबदल्यात स्वाराचे
घोडे, युद्धाचे घोडे आणि खेचरे देत असत. 15 “‘ददानच्या लोकांनी
तुझ्याबरोबर व्यापार केला आणि पुष्कळ समुद्रतट तुझे ग्राहक होते;
त्यांनी तुला मोबदला म्हणून हस्तिदंत आणि टेंबुरणीचे लाकूड दिले.
16 “‘तुझ्याकडील पुष्कळ उत्पादनांमुळे अरामने तुझ्याबरोबर व्यापार
केला; आणि तुझ्या मालाचा मोबदला म्हणून त्यांनी तुला नीलमणी,
जांभळया तागाचे कापड, नक्षीकाम केलेले कापड, बारीक सूत, प्रवाळ
व माणके दिली. 17 “‘यहूदाह व इस्राएलने तुझ्याबरोबर व्यापार केला;
आणि तुझ्या मालाचे वेतन म्हणून त्यांनी तुला मिन्नीथचा गहू व मेवा,
मध, जैतुनाचे तेल आणि मलम दिले. 18 “‘तुझ्या पुष्कळ उत्पादनांमुळे
व महान संपत्तीमुळे दिमिष्कने तुझ्याबरोबर व्यापार केला. त्यांनी तुला
हेल्बोनचा द्राक्षारस व झहारची लोकर 19 आणि यावान येथील खास
घडविलेले लोखंड, दालचिनी व वेत या तुझ्या मालाबद्दल इझालच्या
द्राक्षारसाची पिंपे त्यांनी तुला देऊ केली. 20 “‘ददान तुझ्याबरोबर
व्यापार करून तुला घोड्यावर पसरविण्यासाठी खोगीर देत असे. 21
“‘अरबी लोक व केदारचे सर्व राजपुत्र तुझे ग्राहक होते; त्यांनी तुला
कोकरे, एडके व बोकडे देऊन तुझ्याबरोबर व्यापार केला. 22 “‘शबा
आणि रामाहच्या व्यापारांनी तुझ्याबरोबर व्यापार केला; तुझ्या मालाचा
मोबदला म्हणून त्यांनी तुला सर्वप्रकारचे उत्तम मसाले, मोलवान रत्ने
व सोने दिले. 23 “‘हारान, कन्नेह आणि एदेन व शबा, अश्शूर व
किलमाद येथील व्यापाऱ्यांनी तुझ्याबरोबर व्यापार केला. 24 तुझ्या
बाजारपेठेत त्यांनी सुंदर वस्त्रे, निळे कापड, नक्षीदार काम व दोऱ्यांनी
वळवून घट्ट गाठ बांधलेले वेगवेगळया रंगाचे गालिचे देऊन तुझ्याबरोबर
व्यापार केला. 25 “‘तार्शीशची जहाजे तुझा माल वाहून तुझी सेवा
करीत असत. तू समुद्रावर प्रवास करीत असता तू मालाने भरलेली असे.
26 तुझ्या वल्हेकऱ्यांनी तुला खोल समुद्रात आणले. परंतु त्या खोल
समुद्रामध्ये पूर्वेकडील वारा तुझे तुकडे करेल. 27 तुझी संपत्ती, माल व
व्यापारी माल, तुझे नावाडी, खलाशी व जहाज दुरुस्ती करणारे, तुझे
व्यापारी व तुझे सर्व सैनिक, आणि ज्या दिवशी तुझे जहाज फुटेल तेव्हा
जहाजात असलेली प्रत्येक व्यक्ती समुद्राच्या मधोमध बुडून जातील. 28
जेव्हा तुझे खलाशी मोठ्याने रडतील तेव्हा समुद्रतटाचा कंप होईल.
29 सर्व वल्हेकरी जहाज टाकून देतील; नावाडी आणि सर्व खलाशी
किनाऱ्यावर उभे राहतील. 30 आपला आवाज उंच करून तुझ्यासाठी
हेल काढून रडतील; ते आपल्या डोक्यावर धूळ उडवतील व राखेत
लोळतील. 31 तुझ्यासाठी ते आपली डोकी मुंडून गोणपाट नेसतील. ते
आपल्या जिवाच्या आकांताने व अति शोकाने तुझ्यासाठी रडतील. 32
ते तुझ्यासाठी विलाप व शोक करीत असता, ते तुझ्यासाठी विलापगीत
गातील: “सोर, जी समुद्रात निःशब्द झाली, तिच्याप्रमाणे अजून कोण
आहे?” 33 जेव्हा तुझा माल समुद्रावरून जात असे, तेव्हा तू पुष्कळ
राष्ट्रांना संतुष्ट केले; तुझ्या महान संपत्ती व मालाने पृथ्वीवरील राजांना तू
समृद्ध केलेस. 34 आता तू समुद्राकडून पाण्याच्या खोलीमध्ये तुटून
गेली आहेस; तुझा माल व तुझे साथीदार तुझ्याबरोबर खाली बुडले
आहेत. 35 समुद्रतटावर वसलेले तुला पाहून घाबरून जातात; त्यांचे राजे
भीतीने कापतात आणि त्यांचे चेहरे भयाने काळवंडले आहेत. 36 राष्ट्रांचे
व्यापारी तुझा धिक्कार करतात; तुझा भयंकर अंत झाला आहे आणि
तुझे अस्तित्वच नाहीसे होणार आहे.’”

**28** याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 2 “मानवपुत्रा, सोरच्या
अधिपतीला सांग: सार्वभौम याहवेह असे म्हणतात: “‘आपल्या
अंतःकरणातील गर्वाने तू म्हणालास, “मी देव आहे; देवाच्या आसनावर
समुद्राच्या हृदयात मी बसतो.” तुला वाटते की तू देवासारखा सुज्ञ
आहे, परंतु तू मानव आहेस आणि देव नाही. 3 तू दानीएलापेक्षा सुज्ञ
आहेस काय? तुझ्यापासून काही गुपित नाही काय? 4 तुझी सुज्ञता
व समज याद्वारे तू आपल्यासाठी संपत्ती मिळविली आणि आपल्या
खजिन्यात सोने आणि चांदीचा साठा केलास. 5 व्यापारातील तुझ्या

महान कुशलतेने तू आपले धन वाढविलेस, आणि तुझ्या संपत्तीमुळे तुझे
हृदय गर्विष्ठ झाले आहे. 6 "'यास्तव सार्वभौम याहवेह असे म्हणतात:
"'कारण तू स्वत:ला ज्ञानी, अगदी देवासारखे ज्ञानी समजतोस, 7
म्हणून मी परकीय लोकांना तुझ्याविरुद्ध आणेन, जे राष्ट्रांमध्ये सर्वात
क्रूर आहेत; तुझे सौंदर्य व ज्ञान याविरुद्ध ते त्यांची तलवार उपसतील
आणि ती तुझ्या चमकत्या वैभवाला भेदून जाईल. 8 ते तुला खाली
गर्तेत आणतील, आणि तिथे समुद्राच्या मधोमध तुझा भयानक मृत्यू
होईल. 9 तेव्हा जे लोक तुला मारतात त्यांच्यादेखत तू म्हणशील काय,
"मी देव आहे?" जे तुझा वध करतात त्यांच्या हातात, तू केवळ मानव
असशील, देव नाही. 10 परकीय लोकांच्या हातून तू बेसुंती लोकांसारखा
मृत्यू पावशील. हे मी बोललो आहे, असे सार्वभौम याहवेह म्हणतात.'"
11 याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 12 "मानवपुत्रा, सोरच्या राजासाठी
विलाप कर आणि त्याला सांग: 'सार्वभौम याहवेह असे म्हणतात: "'तू
पूर्णतेची मुद्रा होता, जो ज्ञानाने भरलेला व सौंदर्याने परिपूर्ण होता. 13 तू
एदेन बागेत, परमेश्वराच्या बागेत होतास; प्रत्येक मौल्यवान पाषाण
म्हणजेच अलाक, पुष्कराज आणि हिरा, लसणा, गोमेद, यास्फे आणि
नीलमणी, पाचू, माणिक व रत्ने अशांनी तू सजला होता. तुझ्या बैठकी
व पाटे सोन्याच्या घडल्या होत्या; तू जन्मला त्याच दिवशी ते तयार
केले होते. 14 संरक्षक करूब म्हणून तुला अभिषिक्त केले, म्हणून
मी तुझी नेमणूक केली. परमेश्वराच्या पवित्र डोंगरावर होता; आणि
तू अग्निपाषाणात फिरत असे. 15 तुझी निर्मिती झाली तेव्हापासून
तुझ्यात दुष्टता आढळली तोपर्यंत तू तुझ्या मार्गात सरळ होता. 16 तुझ्या
विस्तारित व्यापारामुळे तू आतंकाने भरला आणि तू पाप केले. म्हणून
लज्जेने मी तुला परमेश्वराच्या डोंगरावरून लोटून दिले, आणि हे संरक्षक
करुबा, मी तुला अग्निपाषाणातून काढून टाकले. 17 तुझे हृदय तुझ्या
सौंदर्यामुळे अहंकारी झाले, आणि तुझ्या वैभवामुळे तू तुझ्या ज्ञानाला
भ्रष्ट केले. म्हणून मी तुला भूमीवर टाकून दिले; आणि राजांसमोर मी
तुला तमाशा असे केले. 18 तुझ्या पुष्कळ पापाने व खोट्या व्यापारामुळे
तू तुझी पवित्रस्थाने विटाळलीस. म्हणून तुझ्यातून अग्नी येईल आणि
तुला भस्म करेल असे मी केले, आणि सर्व बघणाऱ्यांच्या देखत मी
तुला राखेत मिळविले. 19 ज्या सर्व राष्ट्रांना तुझी ओळख होती ते तुला
पाहून भयभीत झाले आहेत; तुझा भयंकर अंत झाला आहे आणि
तुझे अस्तित्व नाहीसे झाले आहे.'" 20 याहवेहचे वचन माझ्याकडे
आले: 21 "मानवपुत्रा, सीदोनेकडे आपले मुख कर; आणि तिच्याविषयी
भविष्यवाणी कर 22 आणि म्हण: 'सार्वभौम याहवेह असे म्हणतात:
"'हे सीदोन नगरी, मी तुझ्याविरुद्ध आहे, आणि तुझ्यामध्ये मी माझे
गौरव प्रकट करेन. जेव्हा मी तुला शिक्षेने पिडेन, आणि तुझ्यात मी
पवित्र मानला जाईन तेव्हा तू जाणशील की मीच याहवेह आहे. 23 मी
तुझ्यावर मरी पाठवेन आणि तुझ्या रस्त्यांवर रक्त वाहवीन. चहूकडून
तुझ्याविरुद्ध चालविलेल्या तलवारीने वधलेले तुझ्यातच पडतील. तेव्हा
तुम्ही जाणाल की मीच याहवेह आहे. 24 "'इस्राएली लोकांना काटेरी
झुडूपांसारखे आणि धारदार काट्यांप्रमाणे द्वेष्ट वृत्ती असलेले शेजारी
आणखी नसतील. तेव्हा ते जाणतील की मीच सार्वभौम याहवेह आहे.
25 "'सार्वभौम याहवेह असे म्हणतात: ज्या राष्ट्रांमध्ये इस्राएली लोक
पांगले आहेत तिथून मी त्यांना जेव्हा एकवट करेन, तेव्हा त्यांच्याद्वारे
राष्ट्रांच्या देखत मी पवित्र मानला जाईन. तेव्हा जो देश मी माझा सेवक
याकोबाला देऊ केला होता, ते त्यांच्या त्या स्वदेशात राहतील. 26 ते
तिथे सुरक्षित राहतील आणि घरे बांधतील व द्राक्षमळे लावतील. ते
सुरक्षित असतील जेव्हा मी त्यांचे शेजारी ज्यांनी माझ्या लोकांची चहाडी
केली त्यांना मी दंडाने पिडेन. तेव्हा ते जाणतील की मीच याहवेह त्यांचा
परमेश्वर आहे.'"

**29** दहाव्या वर्षी, दहाव्या महिन्याच्या बाराव्या दिवशी, याहवेहचे वचन
माझ्याकडे आले: 2 "मानवपुत्रा, इजिप्तचा राजा फारोहकडे
आपले तोंड कर आणि त्याच्या व सर्व इजिप्तविरुद्ध भविष्यवाणी कर.
3 त्याच्याशी बोल आणि त्याला सांग: 'सार्वभौम याहवेह असे म्हणतात:
"'हे इजिप्तच्या फारोह राजा मी तुझ्याविरुद्ध आहे, तू तो प्रचंड मोठा
श्वापद आहेस जो पाण्याच्या प्रवाहात पडून असतो. तू म्हणतोस,
"नाईल नदी माझी आहे; तिला मी माझ्यासाठी बनविले आहे." 4 मी
तुझ्या जाभाडात गळ अडकवेन आणि तुझ्या प्रवाहातील मासे तुझ्या
खवल्यांना चिकटतील असे मी करेन. मी तुला तुझ्या प्रवाहातून ओढून
बाहेर काढेन आणि त्यातील सर्व मासे तुझ्या खवल्यांना चिकटतील.
5 मी तुला व तुझ्या प्रवाहातील सर्व माशांना वाळवंटात सोडून देईन.
तू मोकळ्या मैदानात पडशील आणि तुला ना कोणी जवळ करणार
ना उचलणार. पृथ्वीवरील प्राणी व आकाशातील पक्ष्यांसाठी तू खाद्य
होशील. 6 तेव्हा इजिप्तमध्ये राहणारे जाणतील की मीच याहवेह आहे.
"'तू इस्राएल लोकांसाठी बोरूच्या काठीप्रमाणे होतास. 7 जेव्हा त्यांनी
त्यांच्या हातांनी तुला पकडले, तू त्यांना खरडले व त्यांचे खांदे मोडले;
जेव्हा ते तुझ्यावर टेकले, तेव्हा तू मोडलास व त्यांच्या कंबरा खचविल्या.
8 "'यामुळे सार्वभौम याहवेह असे म्हणतात: मी तुझ्याविरुद्ध तलवार
आणेन, मनुष्य व जनावरे या दोघांनाही मारून टाकीन. 9 इजिप्त देश
निर्जन व ओसाड होईल. तेव्हा ते जाणतील की मीच याहवेह आहे.
"'तू म्हणालास, "नाईल नदी माझी आहे; मी ती निर्माण केली," 10
म्हणून मी तुझ्याविरुद्ध आणि तुझ्या प्रवाहांच्या विरुद्ध आहे आणि
मिग्दोलपासून असवानपर्यंत, अगदी कूशच्या सीमेपर्यंत मी इजिप्त
देश ओसाड व वैराण करेन. 11 ना कोणी मनुष्य ना पशू त्यामधून
जाईल; चाळीस वर्षे तिथे कोणी वस्ती करणार नाही. 12 उजाडलेल्या
देशांमध्ये इजिप्त देश मी सर्वात अधिक ओसाड करेन आणि सर्व ओसाड
पडलेल्या देशांमध्ये इजिप्तची शहरे चाळीस वर्षे ओसाड पडतील आणि
इजिप्तच्या लोकांना मी राष्ट्रांमध्ये विखरून टाकीन आणि इतर देशांमध्ये
त्यांना पसरून टाकेन. 13 "'तरीही, सार्वभौम याहवेह असे म्हणतात:
चाळीस वर्षे संपल्यावर जिथे ते विखुरले गेले त्या राष्ट्रांमधून इजिप्तच्या
लोकांना मी एकवट करेन. 14 बंदिवासातून मी त्यांना इजिप्तच्या
पथरोस भागात, त्यांच्या पूर्वजांचा देश पत्रोसला परत आणेन, तिथे ते
कमी दर्जाचे राज्य होईल. 15 ते सर्वात कमी दर्जाचे राज्य असतील

आणि कधीही इतर राष्ट्रांच्या वर होणार नाहीत. मी त्याला इतके कमी
करेन की ते राष्ट्रांवर पुन्हा राज्य करणार नाही. 16 इजिप्त यापुढे
इस्राएल लोकांसाठी आणखी आधार नसतील परंतु त्यांच्या पापाची
आठवण म्हणून ते त्यांच्याकडे मदतीसाठी जातील. तेव्हा ते जाणतील
की मीच सार्वभौम याहवेह आहे.'" 17 सत्ताविसाव्या वर्षी, पहिल्या
महिन्याच्या पहिल्या दिवशी, याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 18
"मानवपुत्रा, बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरने त्याच्या सैन्याला कठोरतेने
सोरविरुद्ध पाठवले; प्रत्येक डोके टकले झाले आणि प्रत्येक खांदा
सोलून काढला. तरीही त्याने हे जे कठीण कष्टाचे अभियान सोरविरुद्ध
चालविले त्याबद्दल त्याला व त्याच्या सैन्याला काहीही प्रतिफळ मिळाले
नाही. 19 यास्तव सार्वभौम याहवेह असे म्हणतात: मी इजिप्त देशाला
बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरच्या हाती देणार आहे आणि तो त्यांची
संपत्ती घेऊन जाईल. तो हरण करून लुटून घेईल आणि तो देश त्याच्या
सैन्याला मोबदला म्हणून होईल. 20 त्याने केलेल्या परिश्रमासाठी मी
त्याला इजिप्त देश त्याचे प्रतिफळ म्हणून दिला आहे, कारण त्याने व
त्याच्या सैन्याने ते माझ्यासाठी केले, असे सार्वभौम याहवेह जाहीर
करतात. 21 "त्या दिवशी मी इस्राएलच्या घराण्याचे शिंग लांब उगवेन
आणि त्यांच्यामध्ये तुझे तोंड उघडेन. तेव्हा ते जाणतील की मीच याहवेह
आहे."

**30** याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 2 "मानवपुत्रा, भविष्यवाणी
कर आणि सांग: 'सार्वभौम याहवेह असे म्हणतात: "'आक्रोश
करून सांग, "त्या दिवसाला हाय हाय!" 3 कारण दिवस जवळ आहे,
याहवेहचा दिवस जवळ आहे; तो आभाळाचा दिवस, राष्ट्रांच्या नाशाचा
दिवस असेल. 4 इजिप्तविरुद्ध एक तलवार येईल आणि कूशवर वेदना
येतील. जेव्हा वधलेले इजिप्तमध्ये पडतील, तिची संपत्ती काढून घेतली
जाईल आणि तिचे पाये मोडून टाकले जातील. 5 कूश आणि लिबिया,
लूद व संपूर्ण अरब, कूब आणि कराराच्या देशाचे लोक इजिप्तबरोबर
तलवारीने पडतील. 6 "'सार्वभौम याहवेह असे म्हणतात: "'इजिप्तचे
मित्रगण पडतील तिचे अहंकारी बळ सुद्धा पडेल. मिग्दोलपासून
असवानपर्यंत सर्व तिच्यामध्ये तलवारीने पडतील, असे सार्वभौम याहवेह
जाहीर करतात. 7 सर्व ओसाड पडलेल्या देशांमध्ये, ते ओसाड पडतील,
आणि त्यांची शहरे उद्ध्वस्त झालेल्या शहरांमध्ये पडतील. 8 तेव्हा ते
जाणतील की मीच याहवेह आहे, मी जेव्हा इजिप्तला आग लावेन,
तेव्हा तिला मदत करणाऱ्यांचाही चुरा होईल. 9 "'त्या दिवशी त्या कूशी
लोकांना घाबरवून त्यांच्या निश्चिंतेतून बाहेर काढावे म्हणून माझ्याकडून
जहाजामध्ये संदेष्टे जातील. इजिप्तच्या नाशाच्या दिवशी वेदना त्यांचा
ताबा घेईल, कारण तो दिवस खचितच येत आहे. 10 "'सार्वभौम याहवेह
असे म्हणतात: "'बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरच्या हातून मी इजिप्तच्या
टोळीचा अंत करेन. 11 तो व त्याचे सैन्य; जे राष्ट्रांमध्ये सर्वाधिक क्रूर
आहेत; त्यांना इजिप्तचा नाश करण्यास आणले जाईल. ते इजिप्तविरुद्ध
त्यांची तलवार उपसतील आणि वधलेल्यांनी देश भरून टाकतील. 12
नाईल नदीचे पाणी मी आटवून टाकेन आणि तो देश दुष्ट राष्ट्रांना विकून
टाकेन; विदेशी लोकांच्या हातून मी तो देश व त्यातील सर्वकाही ओसाड
करेन. मी याहवेह हे बोललो आहे. 13 "'सार्वभौम याहवेह म्हणतात:
"'मी मूर्तींचा नाश करेन आणि मेम्फीस येथील प्रतिमांचा मी शेवट
करेन. इजिप्तमध्ये यापुढे राजकुमार नसतील, आणि संपूर्ण देशभर मी
भय पसरवेन. 14 इजिप्तचा पथरोस मी उजाड करेन, सोअन नगराला
आग लावेन आणि नओ नगराला दंड देईन. 15 सीन जो इजिप्तचा
बळकट दुर्ग, यावर मी माझा कोप ओतेन, आणि नओचे सैन्य नष्ट करेन.
16 मी इजिप्तला आग लावेन; सीन वेदनांनी तळमळेल. नओ वादळात
उडून जाईल; मेम्फीस सातत्याने कष्टात राहील. 17 ओन व पी-बेसेथचे
तरुण पुरुष तलवारीने पडतील, आणि शहरे बंदिवासात जातील. 18
तहपनहेसमध्ये दिवसा काळोख होईल जेव्हा मी इजिप्तचे जू मोडून
टाकीन; तेव्हा तिच्या अहंकाराच्या सामर्थ्याचा शेवट करेन. ती ढगांनी
झाकली जाईल, आणि तिची गावे बंदिवासात जातील. 19 याप्रकारे मी
इजिप्तवर दंड आणेन आणि ते जाणतील की मीच याहवेह आहे.'"
20 अकराव्या वर्षी, पहिल्या महिन्याच्या सातव्या दिवशी, याहवेहचे
वचन माझ्याकडे आले: 21 "मानवपुत्रा, इजिप्तचा राजा फारोह याचा
हात मी मोडला आहे. तो बरा व्हावा म्हणून त्याला पट्टी बांधली नाही
किंवा तलवार धरता येईल इतकी शक्ती मिळावी म्हणून दोरीतही ठेवला
नाही. 22 म्हणून सार्वभौम याहवेह असे म्हणतात, मी इजिप्तचा राजा
फारोह याच्याविरुद्ध आहे. मी त्याचे हात म्हणजे जो अभंग आहे व जो
मोडलेला आहे असे दोन्ही हात मोडेन, म्हणजे त्याच्या हातून तलवार
गळून पडेल. 23 मी इजिप्तच्या लोकांची राष्ट्रांमध्ये पांगापांग करेन
आणि इतर देशांमध्ये त्यांना विखरून टाकेन. 24 मी बाबेलच्या राजाचे
हात बळकट करेन आणि माझी तलवार त्याच्या हाती देईन पण फारोहचे
हात मोडेन आणि तो बाबेलच्या राजासमोर मरणपंथास टेकलेल्या
घायाळ मनुष्याप्रमाणे कण्हेल. 25 मी बाबेलच्या राजाचे हात बळकट
करेन, परंतु फारोहचे हात लुळे पडतील. जेव्हा मी बाबेलच्या राजाच्या
हाती माझी तलवार देईन आणि जेव्हा तो ती इजिप्तविरुद्ध चालवील,
तेव्हा ते जाणतील की मीच याहवेह आहे. 26 इजिप्तच्या लोकांना
मी राष्ट्रांमध्ये पांगवेन आणि इतर देशांमध्ये त्यांना विखरेन. तेव्हा ते
जाणतील की मीच याहवेह आहे."

**31** अकराव्या वर्षी, तिसऱ्या महिन्याच्या पहिल्या दिवशी, याहवेहचे
वचन माझ्याकडे आले: 2 "मानवपुत्रा, इजिप्तचा राजा फारोह व
त्याच्या सर्व लोकांना सांग: "'वैभवाबाबतीत तुझ्याशी कोणाची तुलना
होऊ शकते? 3 अश्शूरला पाहा, लबानोनमधील एक गंधसरू असलेला,
ज्याच्या सुंदर फांद्या जंगलास झाकून देत असत; तो सर्वात उंच वाढून,
त्याचा शेंडा दाट झाडींच्या वर जातो. 4 पाण्याने त्याला पोषण दिले,
खोल झऱ्यांनी त्याला उंच वाढवले; त्याचे प्रवाह त्याच्या सभोवार वाहिले
आणि त्याच्या धारा रानातील सर्व झाडांपर्यंत पाठविल्या. 5 म्हणून
रानातील इतर सर्व झाडांपेक्षा; ते उंच वाढले. विपुल पाण्यामुळे त्याच्या
डहाळ्या पसरल्या व त्याच्या फांद्या लांब वाढल्या. 6 आकाशातील सर्व
पक्ष्यांनी त्याच्या फांद्यांमध्ये घरटी केली, जंगलातील प्राणी त्याच्या

फांद्यांखाली आपल्या पिलांना जन्म देत असत; सर्व महान राष्ट्रे त्याच्या
छायेत राहिली. 7 आपल्या पसरलेल्या फांद्या आणि वैभवाने तो
सुंदर होता, कारण त्याची मुळे विपुल पाण्याकडे पोहोचली होती.
8 परमेश्वराच्या बागेतील देवदारू त्याच्याशी तुलना करू शकत नसे,
गंधसरू त्याच्या फांद्यांची बरोबरी करू शकली नाही, ना अर्मोनवृक्षाची
त्याच्या डहाळ्यांशी तुलना झाली; परमेश्वराच्या बागेतील कोणतेही
वृक्ष त्याच्या सौंदर्याशी बरोबरी करू शकत नव्हते. 9 पुष्कळ फांद्यांनी
मी त्याला सुंदर बनविले, परमेश्वराच्या बागेतील, एदेन बागेतील झाडे
त्याचा हेवा करीत असत. 10 "'यास्तव सार्वभौम याहवेह म्हणतात:
मोठे देवदारू दाट झाडींच्या वर उंच झाले आणि त्याला त्याच्या उंचीचा
गर्व झाला, 11 त्याच्या दुष्टतेनुसार त्याला वागवावे म्हणून मी त्याला
राष्ट्रांच्या अधिपतींच्या हातात दिले. मी त्याला सोडून दिले आहे, 12
आणि अधिक क्रूर विदेशी राष्ट्रांनी त्याचा छेद करून त्याला टाकून दिले.
त्याच्या डहाळ्या डोंगरांवर व दऱ्यांमध्ये पडल्या; त्याच्या फांद्या देशाच्या
सर्व झऱ्यांमध्ये तुटून पडल्या. पृथ्वीवरील सर्व राष्ट्रे त्याच्या सावलीतून
बाहेर निघाले आणि त्यांनी त्याला टाकून दिले. 13 सर्व पक्षी पडलेल्या
झाडावर वस्ती करू लागले आणि सर्व जंगली जनावरे त्याच्या फांद्यांमध्ये
राहू लागले. 14 म्हणून पाण्याजवळ असलेले कोणतेही झाड यापुढे
दाट झाडींच्या वर गर्वाने उंच वाढणार नाही. भरपूर पाणी मिळालेल्या
झाडांपैकी कोणतेही झाड तेवढ्या उंचीपर्यंत वाढणार नाही; ते मरणास
नेमलेले आहेत, पृथ्वीच्या खाली, मेलेल्यांमध्ये, जे मृतलोकात उतरले
आहेत त्या लोकांत त्यांची जागा आहे. 15 "'सार्वभौम याहवेह असे
म्हणतात: त्या दिवशी तो मृतलोकात आणला गेला, त्याच्यासाठी शोक
करावा म्हणून खोल समुद्र मी झाकून टाकला; मी त्याचे प्रवाह थांबविले,
आणि त्याचे विपुल पाणी मी रोखून ठेवले. त्याच्यामुळे मी लबानोनला
दुःखित केले आणि रानातील प्रत्येक झाड वाळून गेले. (Sheol h7585)
16 गर्तेत जाणाऱ्यांबरोबर त्याला मी अधोलोकात आणले, त्यात तो
पडला तेव्हा त्याच्या आवाजाने राष्ट्रे थरथर कापले. तेव्हा एदेनातील सर्व
झाडे, लबानोनातील सर्वोत्तम, पाण्याचा पुष्कळ पुरवठा असलेली झाडे,
पृथ्वीच्या खाली सांत्वन पावले. (Sheol h7585) 17 मोठ्या देवदारूप्रमाणे
ते सुद्धा मृतलोकात, राष्ट्रांच्या लोकांमध्ये त्याच्या सावलीखाली राहत
होते त्या हत्यारबंदी लोकांबरोबर तलवारीने मारले गेले. (Sheol h7585)
18 "'वैभव व ऐश्वर्यासंबंधात यापैकी एदेनातील कोणत्या झाडाची तुलना
होऊ शकते? तरीही, तू सुद्धा एदेनातील झाडांबरोबर खाली पृथ्वीवर
आणला जाशील; बेसुंती लोक, जे तलवारीने मारले गेले त्यांच्याबरोबर तू
पडून राहशील. "'हे फारोह व त्याच्या सैन्याबरोबर घडेल असे सार्वभौम
याहवेह जाहीर करतात.'"

**32** बाराव्या वर्षी, बाराव्या महिन्याच्या पहिल्या दिवशी, याहवेहचे वचन
माझ्याकडे आले: 2 "मानवपुत्रा, इजिप्तचा राजा फारोहसाठी
विलाप कर आणि त्याला सांग: "'राष्ट्रांमध्ये तू सिंहासारखा आहेस; तू
समुद्रातील श्वापदासारखा आहेस, तुझ्या झऱ्यांमध्ये उसळ्या मारल्यास,
आपल्या पायांनी पाणी घुसळले आणि झऱ्यात चिखल केलास. 3
"'सार्वभौम याहवेह असे म्हणतात: "'लोकांच्या मोठ्या जमावाद्वारे
माझे जाळे मी तुझ्यावर टाकेन, आणि ते तुला माझ्या जाळ्यात ओढून
घेतील. 4 मी तुला जमिनीवर फेकून देईन आणि उघड्या मैदानात तुला
टाकून देईन. आकाशातील सर्व पक्ष्यांना मी तुझ्यावर वसू देईन आणि
जंगलातील सर्व प्राणी तुला लचके मारून खातील. 5 मी तुझे मांस
डोंगरांवर पसरवीन आणि तुझ्या अवशेषाने खोरे भरेन. 6 तुझ्या वाहत्या
रक्ताने अगदी डोंगरांपर्यंत मी देश भिजवेन आणि तुझ्या मांसाने ओहोळे
भरतील. 7 जेव्हा मी तुझा नाश करेन, मी आकाशे झाकीन आणि
त्यातील तारे अंधुक करेन; सूर्याला मी ढगांनी आच्छादेन आणि चंद्र
आपला प्रकाश देणार नाही. 8 आकाशातील प्रत्येक चमकणारी ज्योत
मी तुझ्यावर अंधार अशी करेन; मी तुझ्या देशावर अंधकार आणेन,
असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात. 9 जेव्हा जे देश व जी राष्ट्रे
तुला ओळखत नाहीत त्यात मी तुझा नाश करेन, तेव्हा मी पुष्कळ
लोकांचे हृदय कष्टी करेन. 10 अनेक लोक तुझ्याकडे पाहून भयचकित
होतील असे मी करेन, जेव्हा त्यांच्यासमोर मी माझी तलवार चालवेन
तेव्हा त्यांचे राजे तुझ्यामुळे भयाने कापतील, तुझे पतन होईल त्या
दिवशी सर्वजण आपल्या आयुष्याच्या प्रत्येक क्षणी भयभीत होतील.
11 "'कारण सार्वभौम याहवेह असे म्हणतात: "'बाबेलच्या राजाची
तलवार तुझ्याविरुद्ध येईल. 12 राष्ट्रांतील जे सर्वात क्रूर अशा बलवान
मनुष्यांच्या तलवारीने मी तुझे सैन्य पाडून टाकीन. इजिप्तचा अहंकार ते
मोडून टाकतील, आणि तिच्या सर्व सैन्यांचा नाश होईल. 13 पाण्याच्या
प्रवाहांजवळ असणाऱ्या तिच्या सर्व जनावरांचा मी नाश करेन. ती
पुन्हा कोणत्याही मनुष्याच्या पायांनी तुडविली जाणार नाही ना पशूंच्या
खुरांनी तिथे चिखल होणार. 14 तेव्हा मी तिचे पाणी स्थिर करेन आणि
तिचे प्रवाह तेलाप्रमाणे वाहतील, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात.
15 जेव्हा मी इजिप्त ओसाड करेन आणि देशात असलेले सर्वकाही
काढून घेईन, जेव्हा तिथे वसत असलेल्या सर्वांचा मी नाश करेन, तेव्हा
ते जाणतील की मीच याहवेह आहे.' 16 "तिच्यासाठी जे विलापगीत
ते गातील ते हेच. राष्ट्रांच्या कन्या हे गातील; इजिप्त व तिच्या सर्व
सैन्यासाठी त्या हे गातील, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात." 17
बाराव्या वर्षी, महिन्याच्या पंधराव्या दिवशी, याहवेहचे वचन माझ्याकडे
आले: 18 "मानवपुत्रा, इजिप्तच्या सैन्यासाठी विलाप कर आणि तिला
व शक्तिशाली राष्ट्रांच्या कन्यांना खाली गर्तेत जाणाऱ्यांबरोबर पृथ्वीच्या
खाली हवाली कर. 19 त्यांना सांग, 'इतरांपेक्षा तू अधिक कृपा पावलेली
आहेस काय? तर खाली जा आणि बेसुंत्यांबरोबर जाऊन पड.' 20 जे
तलवारीने पडले त्यांच्याबरोबर ते पडतील. तलवार उगारलेली आहे;
तिच्या सर्व समूहास ओढून न्या. 21 मृतलोकातून इजिप्त व तिचे
सहयोगी याबद्दल बलवान पुढारी म्हणतील, 'ते खाली आले आणि
तलवारीने पडलेल्या बेसुंतीबरोबर ते पडले आहेत.' (Sheol h7585)
22 "अश्शूर तिच्या संपूर्ण सैन्याबरोबर आहे; तिच्यातील वधलेले, जे
तलवारीने पडले आहेत त्यांच्या कबरा तिच्याभोवती आहेत. 23 त्यांच्या
कबरा खोल गर्तेत आहेत आणि तिचे सैन्य तिच्याच कबरेभोवती पडलेले

आहेत. जिवंताच्या भूमीवर ज्यांनी आतंक पसरविला होता त्यांचा वध
झाला आहे, ते तलवारीने पडले आहेत. 24 “एलाम तिथे आहे आणि
तिच्याबरोबर तिचे मोठे सैन्य तिच्या कबरेभोवती आहेत. त्या सर्वांचा वध
झाला आहे, ते तलवारीने पडले आहेत. ज्या सर्वांनी जिवंताच्या भूमीवर
आतंक पसरविला ते पृथ्वीच्या खाली बेसुंत्यांबरोबर अधोलोकात गेले
आहेत. जे खाली गर्तेत गेले आहेत, त्यांच्याबरोबर ते लज्जित झाले
आहेत. 25 वधलेल्यांबरोबर तिचा बिछाना केलेला आहे आणि तिचे
सैन्य तिच्या कबरेभोवती आहेत. ज्यांना तलवारीने वधले आहे, ते सर्व
बेसुंती आहेत, कारण जिवंतांच्या भूमीवर त्यांचा आतंक पसरला होता.
जे खाली गर्तेत गेले आहेत त्यांच्याबरोबर ते लज्जित झाले आहेत;
वधलेल्यांबरोबर त्यांना ठेवले आहे. 26 “मेशेख व तूबाल तिथे आहेत
आणि त्यांचे सैन्य त्यांच्याभोवती आहेत. जिवंतांच्या भूमीवर आतंक
पसरविला ते सर्व बेसुंती आहेत, म्हणून ते तलवारीने वधले आहेत. 27
परंतु त्यांच्या आधी मेलेल्या दुष्ट पुरातन बेसुंती योद्ध्यांबरोबर ते निजलेले
नाहीत, जे त्यांच्या युद्धाच्या शस्त्रांसह खाली अधोलोकात गेले; ज्यांच्या
तलवारी त्यांच्या उशाखाली व त्यांच्या ढाली त्यांच्या हाडांवर आहेत; या
योद्ध्यांनी सुद्धा जिवंतांच्या भूमीवर आतंक पसरविला होता. (Sheol
h7585) 28 “हे फारोह, तू सुद्धा मोडला जाशील व जे तलवारीने वधले
आहे, त्या बेसुंत्यांबरोबर जाऊन पडशील. 29 “एदोम, तिचे राजे व
तिचे सर्व राजपुत्र तिथे आहेत, ते बलवान असूनही, जे तलवारीने वधले
आहेत ते बेसुंती लोकांबरोबर व जे खाली गर्तेत जातात त्यांच्याबरोबर
पडले आहेत. 30 “उत्तरेकडील सर्व राजपुत्र आणि सर्व सीदोनी लोक
तिथे आहेत; त्यांच्या बलाने जरी त्यांनी आतंक पसरविला तरीही ते
वधलेल्यांबरोबर अप्रतिष्ठेने खाली गेले. जे तलवारीने वधले आहेत
त्यांच्याबरोबर ते बेसुंती पडले आणि गर्तेत गेलेल्यांप्रमाणे ते लज्जित
झाले आहेत. 31 “फारोह व त्याचे सर्व सैन्य त्यांना पाहतील आणि
तलवारीने वधलेल्या त्याच्या सर्व सैन्यांसाठी तो सांत्वन पावेल, असे
सार्वभौम याहवेह जाहीर करतात. 32 जरी जिवंताच्या भूमीवर फारोहचे
भय मी पसरविले होते, तरीही फारोह व त्याचे सर्व सैन्य जे लोक
तलवारीने वधलेले, सुंता न झालेल्या आहेत त्यांच्याबरोबर पडतील,
असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात.”

**33** याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 2 “मानवपुत्रा, तुझ्या लोकांशी
बोल आणि त्यांना सांग: ‘जेव्हा मी एका देशावर तलवार आणतो,
तेव्हा त्या देशाचे लोक त्यांच्या लोकांतील एकाची निवड करून त्याची
पहारेकरी म्हणून नेमणूक करतात, 3 आणि ती तलवार देशावर येत
आहे असे पाहताच लोकांना सावध करण्यासाठी तो कर्णा वाजवितो, 4
तेव्हा जर कोणी कर्ण्याचा आवाज ऐकूनही इशाऱ्याकडे लक्ष देत नाही
आणि तलवार येऊन त्यांचा जीव घेते, तर त्यांचे रक्त त्यांच्याच माथ्यावर
असेल. 5 जरी त्यांनी कर्ण्यांचा आवाज ऐकला तरी इशाऱ्याकडे लक्ष
दिले नाही, म्हणून त्यांचे रक्त त्यांच्याच माथ्यावर असेल. जर ते सावध
झाले असते, तर त्यांनी स्वतःस वाचविले असते. 6 परंतु तलवार
येत आहे असे पाहूनही इशारा देण्यासाठी पहारेकरी कर्णा वाजवित
नाही आणि तलवार येऊन त्यातील एकाचा जीव घेते, तर त्यांच्या
पापामुळे त्या व्यक्तीचा जीव गेला तरी त्यांच्या रक्ताचा जाब मी त्या
पहारेकऱ्याकडून घेईन.’ 7 “मानवपुत्रा, मी तुला इस्राएली लोकांचा
पहारेकरी केले आहे; तर जे वचन मी सांगतो ते ऐक आणि माझ्यावतीने
त्यांना सावध कर. 8 जेव्हा मी दुष्टाला म्हणतो, ‘अरे दुष्टा, तू खचितच
मरशील,’ आणि त्या व्यक्तीने आपल्या मार्गांपासून वळावे म्हणून तू
सांगत नाहीस, तर ते दुष्ट व्यक्ती त्यांच्या पापामुळे मरतील आणि त्यांच्या
रक्तासाठी मी तुला दोषी ठरवेन. 9 परंतु त्या दुष्ट व्यक्तीने त्याच्या
मार्गापासून वळावे म्हणून तू त्याला सावध केलेस आणि ते तसे करीत
नाहीत, तर ते त्यांच्या पापामुळे मरतील, परंतु तू स्वतः वाचशील. 10
“मानवपुत्रा, इस्राएली लोकांना सांग, ‘तुम्ही असे म्हणता: “आमचे
अपराध व पापे आम्हावर भारी आहेत आणि त्यामुळे आम्ही नाश पावत
आहोत. मग आम्ही कसे जगू शकतो?”’ 11 त्यांना सांग, ‘सार्वभौम
याहवेह जाहीर करतात, माझ्या जीविताची शपथ, दुष्टाच्या मरणात
मला संतोष नाही, परंतु त्यांनी आपल्या मार्गापासून वळावे व जगावे.
वळा! आपल्या दुष्ट मार्गापासून वळा! मग अहो इस्राएली लोकहो
तुम्ही का मरावे?’ 12 “म्हणून, हे मानवपुत्रा, तुझ्या लोकांना सांग,
‘एखाद्या नीतिमान व्यक्तीने जर आज्ञाभंग केला, तर त्या व्यक्तीची पूर्वीची
नीतिमत्ता मोजण्यात येणार नाही. आणि एखादा दुष्ट पश्चात्ताप करतो,
त्या व्यक्तीची पूर्वीची दुष्टता त्याच्यावर दंड आणणार नाही. नीतिमान
व्यक्ती जो पाप करतो, तो जरी पूर्वी नीतिमान असला तरी त्याला जगू
दिले जाणार नाही.’ 13 जर मी एका नीतिमान व्यक्तीला म्हटले की
ते अवश्य जगतील, परंतु त्यांच्या नीतिमत्तेवर भरवसा करून त्यांनी
दुष्टाई केली, त्या व्यक्तीने केलेली कोणतीही नीतीची कृत्ये आठवली
जाणार नाही; जी दुष्टाई त्यांनी केली, त्यामुळे ते मरतील. 14 आणि
मी जर एखाद्या दुष्ट मनुष्याला म्हटले, ‘तू खचित मरशील,’ परंतु ते
त्यांच्या पापापासून वळले आणि जे न्याय्य व योग्य ते केले; 15 गहाण
ठेवलेल्या वस्तू त्यांनी जर परत केल्या, चोरून घेतलेले परत केले,
जीवन देणारे नियम पाळले आणि काही वाईट केले नाही; तो व्यक्ती
खचित जगेल; ते मरणार नाहीत. 16 पूर्वी केलेल्या कोणत्याही पापांची
त्यांच्याविरुद्ध आठवण केली जाणार नाही. जे न्याययुक्त व योग्य ते
त्यांनी केले आहे; त्यामुळे ते खचितच जगतील. 17 “तरी तुझे लोक
म्हणतात, ‘प्रभूचा मार्ग न्यायाचा नाही.’ परंतु त्यांचेच मार्ग न्याययुक्त
नाहीत. 18 जर नीतिमान व्यक्ती त्यांच्या नीतिमत्तेपासून वळतात आणि
जे वाईट ते करतात, तर त्यामुळे ते मरतील. 19 आणि जर दुष्ट व्यक्ती
त्यांच्या दुष्टाईपासून वळतील आणि जे न्याययुक्त व योग्य ते करतील,
तर त्यामुळे ते जगतील. 20 तरीही तुम्ही इस्राएली लोक म्हणता, ‘प्रभूचा
मार्ग न्यायाचा नाही.’ परंतु तुम्हा सर्वांच्या मार्गांनुसार मी तुमचा न्याय
करेन.” 21 बंदिवासाच्या बाराव्या वर्षी, दहाव्या महिन्याच्या पाचव्या
दिवशी, एक मनुष्य जो यरुशलेमहून निसटून आला होता, तो माझ्याकडे
येऊन म्हणाला, “शहर पडले आहे!” 22 तो मनुष्य आला त्याच्या
आदल्या दिवशी संध्याकाळी, याहवेहचा हात माझ्यावर होता आणि

याहवेहने सकाळी तो मनुष्य माझ्याकडे येण्यापूर्वी माझे तोंड उघडले.
म्हणून माझे तोंड उघडलेले होते आणि मी आणखी शांत नव्हतो. 23
तेव्हा याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 24 “मानवपुत्रा, इस्राएलात
ओसाडीमध्ये राहत असलेले लोक म्हणतात, ‘अब्राहाम केवळ एक
मनुष्य होता, तरीही त्याला देश वतन मिळाला. परंतु आम्ही तर पुष्कळ
आहोत; खचितच हा देश आम्हाला आमचे वतन म्हणून दिला गेला
आहे.’ 25 म्हणून त्यांना सांग, ‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात: मांसात
रक्त असताच तुम्ही ते खाता आणि रक्तपात करत तुमच्या मूर्तींकडे
बघता, तर मग तुम्ही या देशाचे वतन मिळविणार काय? 26 तुम्ही
तुमच्या तलवारीवर भिस्त ठेवता, तुम्ही अमंगळ कृत्ये करता, तुम्हातील
प्रत्येकजण आपल्या शेजार्‍याच्या पत्नीला भ्रष्ट करतो. तरी तुम्हाला
देशाचे वतन मिळावे काय?’ 27 “त्यांना असे सांग: ‘सार्वभौम याहवेह
असे म्हणतात: माझ्या जीविताची शपथ, जे ओसाडीमध्ये उरलेले
आहेत ते तलवारीने पडतील, जे शहराच्या बाहेर आहेत त्यांना जंगली
जनावरांनी खावे म्हणून मी देऊन टाकेन, आणि जे गडात व गुहेत
आहेत ते मरीने मरतील. 28 मी या देशास वैराण करेन आणि तिच्या
अहंकारी बळाचा शेवट होईल आणि इस्राएलचे डोंगर ओसाड पडतील व
त्यातून कोणी पार जाणार नाही. 29 त्यांनी केलेल्या अमंगळ कृत्यांमुळे
जेव्हा मी हा देश ओसाड करेन, तेव्हा ते जाणतील की मीच याहवेह
आहे.’ 30 “मानवपुत्रा, तुझ्याविषयी म्हटले तर, तुझे लोक भिंतींजवळ
व घरांच्या दरवाजांजवळ तुझ्याविषयी बोलत आहेत व एकमेकांना
म्हणत आहेत, ‘या आणि याहवेहकडून आलेला संदेश ऐका.’ 31
नियमाप्रमाणे येतात तसे माझे लोक तुझ्याकडे येतात आणि तुझे वचन
ऐकण्यासाठी तुझ्यासमोर बसतात, परंतु ते त्याप्रमाणे अनुसरण करीत
नाहीत. ते मुखाने प्रीतीविषयी बोलतात, परंतु त्यांची हृदये अन्यायाने
लाभ मिळविण्यासाठी लोभी आहेत. 32 खरोखर, त्यांच्यासाठी तू
केवळ मंजूळ आवाजात चांगले वाद्य वाजवित सुंदर प्रेमगीत गाणार्‍या
एका मनुष्यासारखा आहेस, कारण ते तुझे वचन तर ऐकतात परंतु
त्याचे अनुसरण करीत नाहीत. 33 “जेव्हा हे सर्वकाही घडेल; आणि ते
खचितच घडेल; तेव्हा ते जाणतील की त्यांच्यामध्ये एक संदेष्टा आहे.”

**34** याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 2 “मानवपुत्रा, इस्राएलच्या
मेंढपाळांविरुद्ध भविष्यवाणी कर; भविष्यवाणी करून त्यांना
सांग: ‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात: इस्राएलच्या मेंढपाळांनो तुम्हास
धिक्कार असो! तुम्ही केवळ स्वत:विषयी काळजी करता, मेंढपाळांनी
आपल्या कळपाची काळजी घेऊ नये काय? 3 तुम्ही दही खाता, उत्तम
मेंढरे कापून तुम्ही आपल्यावर लोकर पांघरता, परंतु तुम्ही आपल्या
कळपाची काळजी घेत नाही. 4 तुम्ही अशक्तांस सशक्त केले नाही, ना
रोग्याला आरोग्य दिले ना जखमेला पट्टी केली. भटकलेल्यास तुम्ही परत
आणले नाही किंवा हरवलेल्यास शोधून आणले नाही. तुम्ही त्यांच्यावर
कठोर व क्रूरतेने राज्य केले. 5 म्हणून मेंढपाळ नसल्यामुळे त्यांची
पांगापांग झाली आणि जेव्हा ते पांगले गेले तेव्हा हिंस्र पशूंसाठी भक्ष्य
झाले. 6 माझी मेंढरे सर्व डोंगरांवर व प्रत्येक उंच पर्वतांवर भटकली.
संपूर्ण पृथ्वीभर ते पसरले आणि कोणी त्यांचा शोध केला नाही किंवा
त्यांची नोंद घेतली नाही. 7 “‘म्हणून, तुम्ही मेंढपाळांनो, याहवेहचे वचन
ऐका: 8 सार्वभौम याहवेह जाहीर करतात माझ्या जीविताची शपथ,
माझ्या कळपाला मेंढपाळ नाही आणि म्हणून त्यांची लूट झाली व हिंस्र
श्वापदासाठी भक्ष्य झाली आणि माझ्या मेंढपाळांनी माझ्या कळपाचा
शोध केला नाही आणि कळपाची काळजी न घेता स्वत:चीच काळजी
घेतली, 9 म्हणून मेंढपाळांनो, तुम्ही याहवेहचे वचन ऐका: 10 सार्वभौम
याहवेह असे म्हणतात: मी मेंढपाळांविरुद्ध आहे आणि माझ्या कळपाचा
जाब त्यांच्यापासून घेईन. माझा कळप राखण्याचे काम मी त्यांच्यापासून
काढून घेईन, म्हणजे मेंढपाळ पुन्हा स्वत:स पोसणार नाही. त्यांच्या
तोंडातून मी माझ्या कळपाची सुटका करेन आणि यापुढे ते त्यांचा
आहार होणार नाही. 11 “‘कारण सार्वभौम याहवेह असे म्हणतात: मी
स्वतः माझ्या मेंढरांचा शोध करेन आणि त्यांची काळजी घेईन. 12
मेंढपाळ जेव्हा आपल्या मेंढरांमध्ये राहून पांगलेल्या मेंढरांची काळजी
घेतो, तसेच मी माझ्या मेंढरांची काळजी घेईन. ढगाळ व अंधकाराच्या
दिवसात ते पांगून गेले त्या सर्व ठिकाणातून मी त्यांना सोडवेन. 13
राष्ट्रांतून मी त्यांना आणेन आणि देशांमधून त्यांना एकवट करेन आणि
मी त्यांना स्वदेशात आणेन. इस्राएलच्या डोंगरांवर, ओहोळात व देशाच्या
सर्व वस्त्यांमध्ये मी त्यांना चारीन. 14 मी त्यांना उत्तम कुरणात पाळीन
आणि इस्राएलच्या डोंगरांचे माथे त्यांची चरण्याची ठिकाणे होतील. तिथे
ते चांगल्या कुरणात बसतील आणि तिथे इस्राएलच्या डोंगरांवर सर्वोत्तम
कुरणात चरतील. 15 मी स्वत: माझ्या मेंढरांना पाळीन आणि त्यांना
विसावा देईन, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात. 16 जे हरवले
आहेत त्यांचा शोध मी करेन आणि भटकून गेलेल्यांना मी परत आणेन.
जखमी झालेल्यांची पट्टी करेन आणि दुबळयांना शक्ती देईन, परंतु पुष्ट
व बलवानांना मी नष्ट करेन. मी कळपाला न्यायाने पाळीन. 17 “‘हे
माझ्या कळपा, तुझ्याविषयी सार्वभौम याहवेह असे म्हणतात: एक
मेंढरू व दुसरे मेंढरू आणि एडके व बोकडे यामध्ये मी न्याय करेन. 18
चांगला चारा तुम्हाला खायला मिळाला ते तुम्हाला पुरेसे नाही काय?
तुमचे बाकीचे कुरण तुम्ही तुमच्या पायाखाली तुडवावे काय? तुम्हाला
पिण्यास स्वच्छ पाणी मिळाले ते तुम्हाला पुरेसे नाही काय? बाकीचे
पाणी तुम्ही तुमच्या पायांनी गढूळ करावे काय? 19 तुम्ही जे तुमच्या
पायाखाली तुडविले ते माझ्या कळपाने खावे काय आणि जे तुमच्या
पायांनी तुम्ही गढूळ केले ते पाणी त्यांनी प्यावे काय? 20 “‘यास्तव
सार्वभौम याहवेह त्यांना म्हणतात: मी स्वतः पुष्ट मेंढरे आणि दुबळी
मेंढरे यांच्यात न्याय करेन. 21 अशक्त मेंढरांना तुम्ही तुमच्या बाजूंनी
व खांद्यांनी धक्के दिले आणि त्यांना तुमच्या शिंगांनी ढकलत बाहेर
हाकलून दिले, 22 म्हणून मी माझ्या कळपाला वाचवेन आणि त्यांची
यापुढे लूट होणार नाही. मी एक मेंढरू व दुसर्‍या मेंढरांमध्ये न्याय
करेन. 23 मी त्यांच्यावर एक मेंढपाळ नेमीन तो माझा सेवक दावीद
असेल आणि तो त्यांचे राखण करेल; तो त्यांची जोपासना करेल व
त्यांचा मेंढपाळ होईल. 24 मी याहवेह त्यांचा परमेश्वर होईन आणि

माझा सेवक दावीद त्यांच्यात राजपुत्र असेल. मी याहवेह हे बोललो
आहे. 25 “‘मी त्यांच्याशी शांतीचा करार करेन आणि क्रूर श्वापदांपासून
देशाची सुटका करेन म्हणजे ते अरण्यात राहू शकतील आणि जंगलात
सुरक्षित झोपतील. 26 मी त्यांना आणि माझ्या डोंगराभोवती असलेल्या
ठिकाणांना आशीर्वाद असे करेन. मी नेमलेल्या ऋतूत पाऊस पाडेन;
आशीर्वादाची वृष्टी असेल. 27 झाडे त्यांची फळे देतील आणि भूमी
तिचे पीक उपजवेल; लोक त्यांच्या देशात सुरक्षित राहतील. जेव्हा मी
त्यांच्या जोखडाची बंधने तोडेन आणि ज्यांनी त्यांना गुलाम करून घेतले,
त्यांच्या हातून त्यांना सोडवेन, तेव्हा ते जाणतील की मीच याहवेह आहे.
28 ते यापुढे राष्ट्रांची लूट होणार नाहीत व हिंस्र पशू त्यांना फाडून खाणार
नाहीत. ते सुरक्षिततेत राहतील आणि कोणीही त्यांना घाबरविणार
नाही. 29 आपल्या पिकासाठी प्रसिद्ध असणारा देश मी त्यांना देईन
आणि यापुढे ते देशात दुष्काळाने पीडित होणार नाहीत किंवा राष्ट्रांची
थट्टा त्यांना सोसावी लागणार नाही. 30 तेव्हा ते जाणतील की मी
याहवेह त्यांचा परमेश्वर त्यांच्याबरोबर आहे आणि ते इस्राएली माझे
लोक आहेत, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात. 31 तुम्ही माझी
मेंढरे आहात, तुम्ही मानव माझ्या कुरणातील मेंढरे आहात आणि मी
तुमचा परमेश्वर आहे, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात.’”

**35** याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 2 “मानवपुत्रा, सेईर पर्वताकडे
मुख करून त्याच्याविरुद्ध भविष्यवाणी कर 3 आणि म्हण:
‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात: हे सेईर पर्वता, मी तुझ्याविरुद्ध आहे
आणि मी तुझ्याविरुद्ध माझा हात उगारेन आणि तुला ओसाड करेन.
4 मी तुझी नगरे निष्फळ करेन आणि तू उजाड होशील. तेव्हा तुम्ही
जाणाल की मीच याहवेह आहे. 5 “‘कारण तुझ्याठायी तू निरंतर वैर
ठेवले आणि संकटाच्या काळी, जेव्हा त्यांच्या शिक्षाकाळ कळसाला
जाऊन पोहोचला, तेव्हा तू इस्राएली लोकांवर तलवार चालविली, 6
म्हणून सार्वभौम याहवेह जाहीर करतात, माझ्या जीविताची शपथ, मी
तुला रक्तपाताच्या स्वाधीन करेन आणि रक्तपात तुमचा पाठलाग करेल.
कारण तू रक्तपाताचा द्वेष केला नाही, म्हणून रक्तपात तुझा पाठलाग
करेल. 7 मी सेईर पर्वताला ओसाड करेन आणि जे त्यावरून येणे जाणे
करतात त्यांचा मी नाश करेन. 8 वधलेल्यांनी मी तुमचे पर्वत भरून
टाकीन; जे तलवारीने मारले जातील ते तुझ्या टेकड्यांवर आणि तुझ्या
खोऱ्यात आणि तुझ्या ओहोळात पडतील. 9 मी तुला कायमचे ओसाड
करेन; तुझ्या नगरांत पुन्हा कोणीही वसणार नाही. तेव्हा तुम्ही जाणाल
की मीच याहवेह आहे. 10 “‘कारण मी याहवेह तिथे होतो तरीही तुम्ही
म्हटले, “हे दोन देश व राष्ट्रे आमची होतील आणि आम्ही त्याचे वतन
पावू,” 11 म्हणून सार्वभौम याहवेह जाहीर करतात, माझ्या जीविताची
शपथ, त्यांच्याप्रीत्यर्थ तुम्ही जो राग व हेवा प्रकट केला त्यानुसार मी
तुमच्याशी वागेन आणि जेव्हा मी तुमचा न्याय करेन, तेव्हा मी स्वतःला
त्यांच्यामध्ये प्रकट करेन. 12 तेव्हा तुम्ही जाणाल मी याहवेहने त्या
तिरस्करणीय गोष्टी ऐकल्या आहेत ज्या तुम्ही इस्राएलच्या पर्वतांविरुद्ध
उच्चारल्या. तुम्ही म्हटले, “ते उजाड पडले आहेत आणि आम्ही गिळून
टाकावे म्हणून त्यांना आमच्या हाती दिले आहे.” 13 तुम्ही माझ्याविरुद्ध
फुशारकी मारली आणि संयम न ठेवता माझ्याविरुद्ध बोलला आणि ते
मी ऐकले. 14 सार्वभौम याहवेह असे म्हणतात: सर्व पृथ्वी हर्ष करीत
असताना मी तुम्हाला उजाड करेन. 15 कारण जेव्हा इस्राएलचे वतन
उजाड पडत होते तेव्हा तू हर्ष केला, त्याचप्रमाणे मी तुला वागवेन. हे
सेईर पर्वता तू व संपूर्ण एदोम उजाड पडेल. तेव्हा तुम्ही जाणाल की
मीच याहवेह आहे.’”

**36** “मानवपुत्रा, इस्राएलच्या पर्वतांना भविष्यवाणी करून सांग,
‘इस्राएलच्या पर्वतांनो, याहवेहचे वचन ऐका. 2 सार्वभौम याहवेह
असे म्हणतात: शत्रूंनी तुम्हाला म्हटले, “अाहा! पुरातन शिखरे आमचे
वतन झाले आहे.”’ 3 म्हणून भविष्यवाणी कर आणि सांग, ‘सार्वभौम
याहवेह असे म्हणतात: तुम्ही बाकीच्या राष्ट्रांचे वतन व्हावे व लोकांच्या
द्वेष व निंदेचा विषय व्हावे म्हणून चहूकडून त्यांनी तुम्हाला उद्ध्वस्त
करून तुम्हाला सर्व बाजूंनी ठेचले आहे, 4 यास्तव, इस्राएलच्या पर्वतांनो
सार्वभौम याहवेहचे वचन ऐका: पर्वत व टेकड्यांना, ओहोळे व खोऱ्यांना,
ओसाड अवशेष व तुमच्या सभोवती असलेल्या बाकीच्या राष्ट्रांनी लुटून
अपमानित केलेल्या उजाड नगरांना सार्वभौम याहवेह असे म्हणतात; 5
सार्वभौम याहवेह म्हणतात: माझ्या पेटलेल्या आवेशात बाकी राष्ट्रांच्या
विरुद्ध, आणि एदोमविरुद्ध मी बोललो, कारण त्यांच्या हृदयातील
उल्हास व द्वेषाने त्यांनी माझ्या देशातील कुरणे लुटावी म्हणून त्याला
आपलेच वतन करून घेतले.’ 6 म्हणून इस्राएल देशासंबंधी भविष्यवाणी
कर आणि पर्वत व टेकड्यांना, ओहोळे व खोऱ्यांना सांग: ‘सार्वभौम
याहवेह असे म्हणतात: तुम्ही राष्ट्रांचा अपमान सहन केला म्हणून
मी माझ्या ईर्षेच्या क्रोधात बोलतो. 7 म्हणून सार्वभौम याहवेह असे
म्हणतात: माझ्या उंचावलेल्या हाताने मी शपथ घेतो की, तुमच्या
सभोवती असलेली राष्ट्रे देखील अपमान सहन करतील. 8 “‘पण
इस्राएलच्या पर्वतांनो, तुम्हावर माझ्या इस्राएली लोकांसाठी फांद्या फुटून
फळे येतील, म्हणजे माझे लोक लवकर घरी येतील. 9 मी तुझ्याविषयी
विचार करतो आणि मी तुझ्याकडे कृपादृष्टीने पाहीन; तुझ्यावर नांगरणी
व पेरणी होईल, 10 आणि तुझ्यात, होय, सर्व इस्राएलात पुष्कळ लोक
वसतील असे मी करेन. नगरे वसतील आणि भग्नावशेष पुन्हा बांधले
जातील. 11 तुमच्यात राहणाऱ्या लोकांची व प्राण्यांची संख्या मी वाढवेन
आणि ते फलद्रूप होतील व संख्येने वाढतील. पूर्वीप्रमाणे मी तुझ्यावर
लोकांना वसवीन आणि पूर्वीपेक्षा तुझी अधिक समृद्धी करेन. तेव्हा तुम्ही
जाणाल की मीच याहवेह आहे. 12 लोकांनी, माझ्या इस्राएल लोकांनी
तुम्हावर वस्ती करावी असे मी करेन. ते तुमचा ताबा घेतील आणि
तुम्ही त्यांचे वतन व्हाल; तुम्ही पुन्हा त्यांना लेकरांपासून वंचित करणार
नाही. 13 “‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात: कारण काहीजण तुम्हाला
म्हणतात, “तुम्ही लोकांना गिळून टाकता आणि राष्ट्राला लेकरांपासून
वंचित ठेवतात,” 14 यामुळे यापुढे तुम्ही लोकांना गिळणार नाही, ना
राष्ट्राला अपत्यहीन ठेवाल, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात. 15
मी तुम्हाला पुन्हा राष्ट्रांचे टोमणे ऐकू देणार नाही आणि तुम्ही पुन्हा

लोकांचा अपमान सहन करणार नाही किंवा तुमच्या राष्ट्राचे पतन होऊ
देणार नाही, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात.’” 16 याहवेहचे
वचन पुन्हा माझ्याकडे आले: 17 “मानवपुत्रा, इस्राएली लोक जेव्हा
स्वदेशात राहत होते, तेव्हा त्यांनी तो त्यांच्या वर्तनाने व कृत्यांनी भ्रष्ट
केला. त्यांची कृत्ये माझ्या दृष्टीत स्त्रियांच्या महिन्याच्या अशुद्धतेप्रमाणे
होती. 18 म्हणून मी माझा क्रोध त्यांच्यावर ओतला कारण त्यांनी देशात
रक्तपात केला आणि त्यांनी देशाला त्यांच्या मूर्तींनी विटाळले. 19 म्हणून
मी त्यांना राष्ट्रांमध्ये विखुरले आणि ते देशांमध्ये पांगले; मी त्यांचा
त्यांच्या वर्तनानुसार आणि त्यांच्या कृत्यांनुसार न्याय केला. 20 आणि
राष्ट्रांमध्ये ते जिथे कुठे गेले त्यांनी माझ्या पवित्र नावाला कलंक लावला,
कारण त्यांच्याविषयी असे म्हटले गेले होते, ‘हे याहवेहचे लोक आहेत,
तरीही याहवेहचा देश त्यांना सोडावा लागला.’ 21 माझ्या पवित्र नावाची
मला काळजी होती, जे इस्राएली लोकांनी ते ज्या राष्ट्रांमध्ये गेले तिथे
कलंकित केले होते. 22 “म्हणून इस्राएली लोकांना सांग, ‘सार्वभौम
याहवेह असे म्हणतात: इस्राएली लोकांनो या गोष्टी मी तुमच्यासाठी
नाही, तर जे नाव तुम्ही ज्या राष्ट्रांमध्ये गेला तिथे अपवित्र केले होते त्या
माझ्या पवित्र नावासाठी करणार आहे. 23 मी माझ्या महान नावाचे
पावित्र्य दाखवेन, जे राष्ट्रांमध्ये अपवित्र केले गेले, ते नाव त्यांच्यामध्ये
तुम्ही अपवित्र केले आहे. जेव्हा तुमच्याद्वारे त्यांच्या दृष्टीत माझे नाव
पवित्र मानले जाईल, तेव्हा राष्ट्रे जाणतील की मीच याहवेह आहे, असे
सार्वभौम याहवेह जाहीर करतात. 24 “‘कारण मी तुम्हाला राष्ट्रांतून
बाहेर काढेन; सर्व देशातून मी तुम्हाला एकवट करेन आणि तुम्हाला
तुमच्या स्वदेशात आणेन. 25 मी तुमच्यावर स्वच्छ पाणी शिंपडेन,
आणि तुम्ही शुद्ध व्हाल; मी तुम्हाला तुमच्या सर्व अशुद्धतेपासून आणि
तुमच्या मूर्तींपासून शुद्ध करेन. 26 मी तुम्हाला नवे हृदय देईन आणि
तुमच्यात नवा आत्मा ओतेन; मी तुमच्यातून तुमचे पाषाणी हृदय काढून
मांसमय हृदय तुम्हाला देईन. 27 आणि मी माझा आत्मा तुमच्यामध्ये
घालेन, तुम्ही माझे विधी आचारावे व माझे नियम काळजीपूर्वक पाळावे
म्हणून मी तुम्हाला चालवेन. 28 तेव्हा तुमच्या पूर्वजांना जो देश मी देऊ
केला त्यात तुम्ही वस्ती कराल; तुम्ही माझे लोक व्हाल आणि मी तुमचा
परमेश्वर होईन. 29 मी तुम्हाला तुमच्या सर्व अशुद्धतेपासून मुक्त करेन. मी
धान्यास आज्ञा देईन आणि ते अनेकपट करेन आणि तुमच्यावर दुष्काळ
आणणार नाही. 30 तुमच्या झाडांची फळे व तुमच्या शेतातील पीक मी
वाढवेन, यासाठी की तुम्ही दुष्काळामुळे राष्ट्रांमध्ये आणखी अपमान
सहन करणार नाही. 31 तेव्हा तुम्हाला तुमचे कुमार्ग आणि दुष्कृत्यांची
आठवण होईल आणि तुमच्या पापांमुळे व अमंगळ कामांमुळे तुम्हाला
तुमचीच किळस वाटेल. 32 माझी इच्छा आहे तुम्ही हे जाणावे की हे मी
तुमच्यासाठी करीत नाही, सार्वभौम याहवेह जाहीर करतात की अहो
इस्राएली लोकांनो तुम्ही आपल्या वर्तनामुळे लाजिरवाणी व कलंकित
असावे! 33 “‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात: ज्या दिवशी मी तुम्हाला
तुमच्या सर्व पापांपासून शुद्ध करेन, मी तुमची नगरे पुनर्स्थापित करेन
आणि उद्ध्वस्त झालेल्याची पुनर्बांधणी करेन. 34 येजा करणाऱ्यांच्या
नजरेसमोर उजाडलेली भूमी वैराण पडण्याऐवजी तिची मशागत होईल.
35 ते म्हणतील, “ही भूमी जी ओसाड पडली होती ती एदेन बागेसारखी
झाली आहे; शहरे जी उद्ध्वस्त, उजाड व ओसाड पडली होती, ती आता
तटबंदीची होऊन त्यात वस्ती झाली आहे.” 36 तेव्हा तुमच्या सभोवती
उरलेली राष्ट्रे जाणतील की मी याहवेहने उजाड झालेले पुन्हा बांधले
आहे आणि ओसाड पडलेले होते त्याची पुन्हा लागवड केली आहे. मी
याहवेह हे बोललो आहे, आणि ते मी करणारच.’ 37 “सार्वभौम याहवेह
असे म्हणतात: एकदा पुन्हा मी इस्राएलची विनंती मान्य करेन आणि
त्यांच्यासाठी हे करेन: त्यांचे लोक मी मेंढरांसारखे असंख्य करेन, 38
तिच्या नेमलेल्या सणांच्या वेळी यरुशलेममध्ये अर्पणासाठी लागतील
तेवढे असंख्य कळप मी करेन. म्हणजे पडीक असलेली शहरे लोकांच्या
कळपांनी भरतील. तेव्हा ते जाणतील की मीच याहवेह आहे.”

**37** याहवेहचा हात माझ्यावर होता आणि त्यांनी मला याहवेहच्या
आत्म्याच्या द्वारे बाहेर आणले आणि खोऱ्याच्या मधोमध ठेवले;
ते हाडांनी भरलेले होते. 2 त्याने मला त्यातून चहूकडून फिरविले आणि
मी पाहिले की खोऱ्याच्या भूमीवर पुष्कळ हाडे होती, ती हाडे तर शुष्क
होती. 3 याहवेहने मला विचारले, “मानवपुत्रा, ही हाडे जिवंत होतील
काय?” मी म्हणालो, “सार्वभौम याहवेह, ते तर केवळ तुम्हीच जाणता.”
4 तेव्हा याहवेहने मला म्हटले, “या हाडांना भविष्यवाणी करून त्यांना
सांग, ‘शुष्क हाडांनो, याहवेहचे वचन ऐका! 5 या हाडांना सार्वभौम
याहवेह म्हणतात: मी तुमच्यात श्वास घालेन आणि तुम्ही जिवंत व्हाल.
6 मी तुम्हावर स्नायू लावेन आणि तुम्हावर मांस चढवेन आणि तुम्हाला
कातडीने आच्छादेन; मी तुम्हामध्ये श्वास घालेन आणि तुम्ही जिवंत
व्हाल. तेव्हा तुम्ही जाणाल की मीच याहवेह आहे.’” 7 तेव्हा मला
आज्ञा झाल्याप्रमाणे मी भविष्यवाणी केली. आणि मी भविष्यवाणी
करीत असता, मोठा आवाज, खडखडाट झाला, तेव्हा एक हाड दुसऱ्या
हाडाशी, अशी हाडे एकत्र जडली. 8 तेव्हा मी पाहिले, स्नायू आणि मांस
त्यांच्यावर आले आणि कातडीने त्यांना आच्छादले, पण त्यांच्यात श्वास
नव्हता. 9 तेव्हा याहवेहने मला म्हटले, “श्वासाला भविष्य करून सांग;
मानवपुत्रा, भविष्यवाणी कर आणि त्याला सांग, ‘सार्वभौम याहवेह
असे म्हणतात: हे श्वासा, चारही बाजूंनी ये आणि या वधलेल्यांवर फुंकर
घाल, म्हणजे ते जिवंत होतील.’” 10 याहवेहने मला आज्ञा केल्याप्रमाणे
मी भविष्यवाणी केली आणि श्वास त्यांच्यात आला; ते जिवंत झाले
आणि एक मोठे सैन्य त्यांच्या पायांवर उभे राहिले. 11 तेव्हा याहवेहने
मला म्हटले: “मानवपुत्रा, ही हाडे म्हणजे इस्राएली लोक आहेत. ते
म्हणतात, ‘आमची हाडे शुष्क झाली आहेत आणि आमची आशा नाहीशी
झाली आहे; आम्ही नाश पावलो आहोत.’ 12 यास्तव भविष्यवाणी कर
आणि त्यांना सांग: ‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात: माझ्या लोकांनो
मी तुमच्या कबरा उघडून त्यातून तुम्हाला बाहेर काढणार आहे; मी
तुम्हाला इस्राएल देशात परत आणेन. 13 जेव्हा मी तुमच्या कबरा
उघडेन आणि त्यातून तुम्हाला बाहेर आणेन तेव्हा तुम्ही जाणाल की
मीच याहवेह आहे. 14 मी माझा आत्मा तुमच्यात घालेन आणि तुम्ही

जिवंत व्हाल आणि मी तुम्हाला तुमच्या देशात स्थायिक करेन. तेव्हा
तुम्ही जाणाल की मी याहवेह जे बोललो आहे, तेच मी केले आहे, असे
याहवेह जाहीर करतात.’” 15 याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 16
“मानवपुत्रा, लाकडाची एक काठी घे आणि त्यावर लिही, ‘यहूदाह
व त्याच्या सोबतीच्या इस्राएली लोकांचे.’ मग लाकडाची आणखी
एक काठी घे आणि त्यावर लिही, ‘योसेफ (म्हणजेच एफ्राईम) आणि
त्याच्या सोबतीच्या सर्व इस्राएली लोकांचे.’ 17 या दोन काठ्यांना जोडून
ती एक काठी दिसेल अशी ती तुझ्या हातात धर. 18 “जेव्हा तुझे लोक
तुला विचारतील, ‘याचा अर्थ काय आहे हे तू आम्हाला सांगणार नाही
काय?’ 19 त्यांना सांग, ‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात: योसेफाची
काठी; जी एफ्राईमच्या हातात आहे तिला व इस्राएलचे जे लोक त्याचे
सोबती आहेत, त्यांना मी घेऊन यहूदीयाच्या काठीशी जोडीन. मी त्यांना
लाकडाची एक काठी करेन आणि ते माझ्या हातात एक होतील.’ 20
ज्या काठ्यांवर तू लिहिले त्या काठ्या त्यांच्या नजरेसमोर धर 21
आणि त्यांना सांग, ‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात: इस्राएली लोक
ज्या राष्ट्रांमध्ये गेले आहेत, तिथून मी त्यांना बाहेर काढेन. चहूकडून
मी त्यांना एकवटेन आणि त्यांना स्वदेशात आणेन. 22 मी त्यांना या
देशात, इस्राएलच्या पर्वतांवर एक राष्ट्र असे करेन. त्या सर्वांवर एक राजा
असणार आणि ते यापुढे दोन राष्ट्र नसतील किंवा ते दोन राज्यांमध्ये
विभागले जाणार नाहीत. 23 आणि ते पुन्हा त्यांच्या मूर्तींनी व अमंगळ
प्रतिमांनी किंवा त्यांच्या पातकांनी यापुढे स्वतःला भ्रष्ट करणार नाहीत,
कारण त्यांच्या सर्व पापमय घसरणीपासून मी त्यांना वाचवेन आणि
मी त्यांना शुद्ध करेन. ते माझे लोक होतील आणि मी त्यांचा परमेश्वर
होईन. 24 “‘माझा सेवक दावीद, त्यांच्यावर राजा होईल, आणि त्या
सर्वांना एकच मेंढपाळ असेल. ते माझ्या नियमांचे अनुसरण करतील
आणि माझे विधी काळजीपूर्वक पाळतील. 25 माझा सेवक याकोबाला
मी दिलेल्या देशात, जिथे तुमचे पूर्वज राहिले तिथे ते राहतील. ते व
त्यांची लेकरे आणि त्यांच्या लेकरांची लेकरे सर्वकाळ तिथे राहतील
आणि माझा सेवक दावीद सर्वकाळासाठी त्यांचा राजपुत्र असेल. 26 मी
त्यांच्याशी शांतीचा करार करेन; तो सर्वकाळचा करार असेल. मी त्यांना
स्थापित करेन आणि त्यांची संख्या बहुगुणित करेन, आणि मी माझे
पवित्रस्थान सर्वकाळासाठी त्यांच्यात ठेवेन. 27 माझे निवासस्थान
त्यांच्याबरोबर राहील; मी त्यांचा परमेश्वर होईन आणि ते माझे लोक
होतील. 28 जेव्हा माझे पवित्रस्थान सदासर्वकाळ त्यांच्यामध्ये राहील,
तेव्हा सर्व राष्ट्रे जाणतील की मी याहवेह इस्राएलला पवित्र करतो.’”

**38** याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 2 “मानवपुत्रा, मागोग देशाचा
रोष, जो मेशेख व तूबाल यांचा राजपुत्र आहे त्याच्याकडे आपले
मुख कर व त्याच्याविरुद्ध भविष्यवाणी कर 3 आणि सांग: ‘सार्वभौम
याहवेह असे म्हणतात: मेशेख व तूबालच्या मुख्य राजपुत्रा रोष, मी
तुझ्याविरुद्ध आहे. 4 मी तुला उपडे पाडेन, तुझ्या जाभाडात गळ
अडकवेन आणि तुझे घोडे व संपूर्ण हत्यारबंद असलेले घोडेस्वार आणि
मोठ्या व लहान ढाली घेतलेल्या लोकांचा मोठा समूह, सर्व धनुर्धारी
यासर्वांसह मी तुला बाहेर काढेन. 5 पर्शिया, कूश आणि पूट हे सर्व
त्यांच्या ढाली व शिरटोप यासह त्यांच्याबरोबर असतील. 6 गोमेर
आपल्या सर्व सैन्यासह आणि उत्तरेकडील बेथ-तोगर्माह आपल्या
पूर्ण सैन्यासह—अनेक राष्ट्रे तुझ्याबरोबर बाहेर निघतील. 7 “‘तू व
तुझ्याकडे एकत्र झालेला समूह सिद्ध व्हा; तयार राहा आणि त्यांचा
नायक हो. 8 पुष्कळ दिवस गेल्यानंतर तुला बोलाविण्यात येईल. येत्या
काळात जो देश युद्धातून परत आलेला आहे, ज्याचे लोक पुष्कळ
राष्ट्रांतून इस्राएलच्या पर्वतांकडे एकत्र केले आहेत. जो पुष्कळ काळ
ओसाड पडला होता. त्यांना राष्ट्रांतून बाहेर आणले गेले आणि जे आता
सुरक्षिततेत राहतात, तू त्या देशावर आक्रमण करशील. 9 तू आणि
तुझे सर्व सैन्य व तुझ्याबरोबर अनेक राष्ट्रे वादळाप्रमाणे पुढे जातील;
तुम्ही मेघांप्रमाणे देश झाकून टाकाल. 10 “‘सार्वभौम याहवेह असे
म्हणतात: त्या दिवशी तुमच्या मनात विचार येतील आणि तुम्ही वाईट
युक्ती योजाल. 11 तू म्हणशील, “तट नसलेल्या गावांवर मी आक्रमण
करेन; शांतीच्या व निश्चिंत असलेल्या लोकांवर मी हल्ला करेन; ते
सर्व तटाशिवाय व दरवाजे व कुंपणाशिवाय राहतात. 12 मी त्यांना
लुटेन व लुबाडून घेईन आणि माझा हात पुन्हा स्थायिक झालेल्या
ओसाडीवर व राष्ट्रांतून एकत्र केलेले लोक, देशाच्या मधोमध राहणारी
उत्तम गुरे आणि संपत्ती यावर पडेल.” 13 शबा, ददानचे लोक आणि
तार्शीशचे व्यापारी व त्यांची सर्व गावे तुला म्हणतील, “तू लुटायला
आला आहे काय? लूट घेण्यास, सोने व चांदी वाहून नेण्यास, गुरे व
संपत्ती घेऊन नेण्यास व पुष्कळ लूट ताब्यात घेण्यासाठी तुझे पुष्कळ
लोक तू एकत्र केले काय?”’ 14 “यास्तव, मानवपुत्रा, भविष्यवाणी कर
आणि गोगला सांग: ‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात: त्या दिवशी,
जेव्हा माझे इस्राएली लोक सुरक्षिततेत राहात आहेत, त्यांची नोंद तू
घेणार नाही काय? 15 उत्तरेकडील तुझ्या स्थानातून तू येशील, तू आणि
तुझ्याबरोबर पुष्कळ राष्ट्रे, त्यातील प्रत्येक घोड्यावर स्वार असलेले,
मोठे दळ, मोठे सैन्य असेल. 16 मेघांनी देशाला झाकून टाकावे, तसे तू
माझ्या इस्राएली लोकांवर हल्ला करशील. येणाऱ्या दिवसांत, हे गोग, मी
तुला माझ्या देशाच्या विरुद्ध आणेन, म्हणजे तुझ्याद्वारे राष्ट्रांच्या दृष्टीत
जेव्हा मी पवित्र मानला जाईल तेव्हा ते मला जाणतील. 17 “‘सार्वभौम
याहवेह असे म्हणतात: तूच तो आहे, ज्याबद्दल मी पुरातन काळी माझ्या
सेवकांद्वारे व इस्राएलच्या संदेष्ट्यांद्वारे बोललो होतो. त्यावेळी त्यांनी
पुष्कळ वर्षे भविष्यवाणी केली की मी तुला त्यांच्याविरुद्ध आणेन.
18 त्या दिवशी असे होईल: जेव्हा गोग इस्राएल देशावर हल्ला करेल,
तेव्हा माझा तापलेला क्रोध भडकेल, असे सार्वभौम याहवेह जाहीर
करतात. 19 माझी ईर्षा व पेटलेल्या संतापाने मी जाहीर करतो की,
त्यावेळी इस्राएल देशात मोठा भूकंप येईल. 20 समुद्रातील मासे,
आकाशातील पक्षी, रानातील पशू, भूमीवर सरपटणारा प्रत्येक प्राणी
आणि पृथ्वीच्या पाठीवरील सर्व लोक माझ्या समक्षतेत थरथर कापतील.
पर्वत कोसळतील, कडे खचतील आणि प्रत्येक भिंत जमिनीवर पडेल.
21 मी गोगविरुद्ध माझ्या सर्व पर्वतांवर तलवार बोलवेन, असे सार्वभौम

याहवेह जाहीर करतात. प्रत्येकाची तलवार आपआपल्या भावाविरुद्ध
चालेल. 22 मरी व रक्तपाताद्वारे मी त्याच्यावर न्याय आणेन; त्याच्यावर
व त्याच्या सैन्यावर व त्याच्याबरोबर असलेल्या पुष्कळ राष्ट्रांवर मी
मुसळधार पाऊस, गारा व जळते गंधक ओतेन. 23 अशाप्रकारे मी माझी
महानता व पवित्रता दाखवेन, आणि अनेक राष्ट्रांदेखत मी स्वत:स प्रकट
करेन. तेव्हा ते जाणतील की मीच याहवेह आहे.’

**39** “मानवपुत्रा, गोगविरुद्ध भविष्यवाणी कर आणि सांग: ‘सार्वभौम
याहवेह असे म्हणतात: मेशेख आणि तूबालच्या मुख्य राजपुत्रा
रोष, मी तुझ्याविरुद्ध आहे. 2 मी तुला उपडे पाडून तुला ओढत नेईन. मी
तुला दूर उत्तरेकडून आणेन आणि इस्राएलच्या पर्वतांविरुद्ध पाठवेन.
3 मग मी तुझ्या डाव्या हातातला धनुष्य मारीन आणि तुझ्या उजव्या
हातातील बाण खाली पाडीन. 4 तू इस्राएलच्या पर्वतांवर पडशील,
तू व तुझे सैन्य आणि तुझ्याबरोबरची राष्ट्रे सुद्धा पडतील. मी तुम्हाला
सर्वप्रकारच्या मांसाहारी हिंस्र पक्ष्यांना व हिंस्र पशूंना भक्ष म्हणून देईन.
5 तू मोकळ्या रानात पडशील, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात.
6 मी मागोगवर आणि समुद्रकिनाऱ्यावर सुरक्षितपणे राहणाऱ्या लोकांवर
अग्नी पाठवेन आणि ते जाणतील की मीच याहवेह आहे. 7 “‘माझ्या
इस्राएली लोकांमध्ये मी माझे पवित्र नाव प्रकट करेन. यापुढे मी माझ्या
पवित्र नावाला कलंकित होऊ देणार नाही आणि राष्ट्रे जाणतील की
इस्राएलातील पवित्र मीच याहवेह आहे. 8 हे येत आहे! हे खचितच
घडेल, हा तोच दिवस आहे ज्याबद्दल मी बोललो होतो, असे सार्वभौम
याहवेह जाहीर करतात. 9 “‘तेव्हा जे इस्राएलच्या नगरात राहतात ते
बाहेर जातील आणि इंधन म्हणून आपली हत्यारे; म्हणजेच लहान व
मोठ्या ढाली, धनुष्य व बाण, युद्धाच्या बरच्या व भाले जाळतील. ते
सात वर्षे इंधनासाठी त्यांचा उपयोग करतील. 10 रानातून लाकडे गोळा
करण्याची किंवा जंगलातील झाडे तोडण्याची त्यांना गरज नसणार,
कारण ते हत्यारांचा उपयोग इंधन म्हणून करतील आणि ज्यांनी त्यांची
लूट घेतली त्यांना ते लुटतील आणि ज्यांनी त्यांना लुबाडले, त्यांना ते
लुबाडतील, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात. 11 “‘त्या दिवशी
मी गोगला इस्राएलमध्ये मृतकांना पुरण्याचे एक ठिकाण देईन, जे
समुद्राच्या पूर्वेकडे प्रवास करणाऱ्यांच्या खोऱ्यामध्ये आहे. त्यामुळे
प्रवाशांची वाट अडविली जाईल, कारण गोग आणि त्याचे सर्व सैन्य
तिथे पुरले जातील. म्हणून त्याला हामोन-गोगचे खोरे म्हटले जाईल.
12 “‘देश शुद्ध करण्यासाठी इस्राएली लोक त्या मृतकांना सात महिने
पूरत राहतील. 13 देशातील सर्व लोक त्यांना पुरतील आणि मी माझे
वैभव प्रकट करेन तो दिवस त्यांच्यासाठी अविस्मरणीय असेल, असे
सार्वभौम याहवेह जाहीर करतात. 14 देश सातत्याने शुद्ध करण्यासाठी
लोकांना कामावर लावले जाईल. ते अजून इतर लोकांबरोबर देशभर
पसरतील, जमिनीवर जे मृतदेह पडलेले असतील त्यांना ते पुरतील.
“‘सात महिने संपल्यावर ते अजून बारीक शोध करतील. 15 जेव्हा
ते देशभर फिरतील, तेव्हा ज्या कोणाला मानवी हाड सापडेल, तिथे
ते चिन्ह करून ठेवतील आणि कबर खोदणारे त्यांना हामोन गोगच्या
खोऱ्यात, 16 जे हामोनाह नगरात आहे तिथे पुरेपर्यंत असे होत जाईल.
अशाप्रकारे ते देशाला शुद्ध करतील.’ 17 “मानवपुत्रा, सार्वभौम याहवेह
असे म्हणतात: प्रत्येक प्रकारच्या पक्ष्यांना आणि हिंस्र पशूंना बोलावून
सांग: ‘एकवट व्हा आणि जो यज्ञ, एक मोठा यज्ञ मी इस्राएलच्या
पर्वतांवर तयार करीत आहे त्यासाठी चहूकडून एकत्र या. तिथे तुम्ही
मांस खाल व रक्त प्याल. 18 तुम्ही बलवान पुरुषांचे मांस खाल व
पृथ्वीच्या राजपुत्रांचे रक्त प्याल, जणू ते बाशानातील पोसलेले सर्व
प्राणी म्हणजेच मेंढे व कोकरे, बोकडे व वासरे आहेत. 19 जो यज्ञ मी
तुम्हासाठी तयार करीत आहे, त्यात तृप्ती होईपर्यंत तुम्ही चरबी खाल
व पिऊन मस्त होईपर्यंत रक्त प्याल. 20 माझ्या मेजावर बसून घोडे
व स्वार, बलवान पुरुष आणि सर्वप्रकारच्या सैनिकांना खाऊन तुम्ही
तृप्त व्हाल,’ असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात. 21 “राष्ट्रांमध्ये
मी माझे वैभव प्रकट करेन आणि त्यांना मी केलेली शिक्षा आणि मी
त्यांच्यावर उगारलेला हात, सर्व राष्ट्रे पाहतील. 22 त्या दिवसापासून
पुढे इस्राएली लोक जाणतील की मी याहवेह त्यांचा परमेश्वर आहे. 23
आणि राष्ट्रे जाणतील की इस्राएली लोक त्यांच्या पापामुळे निर्वासित
झाले, कारण ते माझ्याशी अविश्वासू होते. म्हणून त्यांच्यापासून मी माझे
मुख लपविले आणि त्यांना त्यांच्या वैऱ्यांच्या हाती सोपविले, आणि
ते सर्व तलवारीने पडले. 24 त्यांच्या अशुद्धतेनुसार आणि पापांनुसार
त्यांच्याशी व्यवहार केला आणि त्यांच्यापासून मी माझे मुख लपविले.
25 “म्हणून सार्वभौम याहवेह असे म्हणतात: मी याकोबाची संपत्ती परत
करेन आणि इस्राएलच्या सर्व लोकांवर दया करेन आणि माझ्या पवित्र
नावासाठी ईर्षा बाळगेन. 26 जेव्हा ते त्यांच्या देशात सुरक्षित राहतील
आणि त्यांना घाबरविण्यास कोणीही नसेल, तेव्हा त्यांची लज्जा व मला
दाखविलेले सर्व अविश्वासूपण ते विसरून जातील. 27 जेव्हा मी त्यांना
राष्ट्रांतून परत आणेन आणि त्यांच्या शत्रूंच्या देशांमधून त्यांना एकत्र
करेन, तेव्हा त्यांच्याद्वारे अनेक राष्ट्रांच्या दृष्टीत मी पवित्र मानला जाईन.
28 तेव्हा ते जाणतील की मी याहवेह त्यांचा परमेश्वर आहे, कारण जरी
राष्ट्रांमध्ये मी त्यांना निर्वासित असे पाठवले, तरी मी त्यांना त्यांच्या
देशात एकत्र करेन, कोणीही मागे सोडला जाणार नाही. 29 यापुढे मी
आपले मुख त्यांच्यापासून लपवणार नाही, कारण इस्राएली लोकांवर
मी माझा आत्मा ओतेन, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात.”

**40** आमच्या बंदिवासाच्या पंचविसाव्या वर्षी, वर्षाच्या सुरुवातीला,
महिन्याच्या दहाव्या दिवशी, शहराचे पतन झाल्यानंतर चौदाव्या
वर्षी; त्याच दिवशी याहवेहचा हात माझ्यावर होता आणि त्यांनी मला
तिथे नेले. 2 परमेश्वराच्या दृष्टान्तांमध्ये याहवेहनी मला इस्राएल देशात
नेले आणि एका अत्यंत उंच पर्वतावर ठेवले. त्याच्या दक्षिणेकडे काही
इमारती होत्या, ज्या शहरासारख्या दिसत होत्या. 3 याहवेहने मला तिथे
नेले आणि मी एक मनुष्य पाहिला जो कास्यासारखा दिसत होता; तो
तागाची एक दोरी व मापन-दंड हातात घेऊन वेशीवर उभा होता. 4 तो
मनुष्य मला म्हणाला, “मानवपुत्रा, काळजीपूर्वक पाहा आणि जवळ
येऊन ऐक आणि जे काही मी तुला दाखविणार आहे त्याकडे लक्ष दे,

त्यासाठीच तुला येथे आणले गेले आहे. तू जे काही बघतो ते इस्राएली
लोकांना सांग.” 5 मंदिराच्या क्षेत्राच्या सभोवती असलेली भिंत मी
पाहिली. त्या मनुष्याच्या हातात असलेला मापन-दंड सहा हात लांब
होता, ते प्रत्येक माप एक हात आणि एक वीत होते. त्याने भिंतीचे
माप घेतले; ते एक काठी जाडी व एक काठी उंच होती. 6 मग तो
पूर्वेकडील द्वाराकडे गेला. त्याने त्याच्या पायऱ्या चढून जाऊन द्वाराच्या
उंबरठ्याचे माप घेतले; तो एक मापन-दंड होता. 7 पहारेकऱ्यांची चौकी
एक काठी लांब व एक काठी रुंद होती, आणि दोन्ही चौक्यांमध्ये
पाच हात अंतर होते. आणि मंदिरासमोर असलेल्या देवडीजवळच्या
द्वाराचा उंबरठा एका मापन-दंडा इतका होता. 8 त्यानंतर त्याने मापन-
दंडाने वेशीच्या देवडीचे माप घेतले; 9 ते आठ हात होते आणि त्याचे
खांब दोन हात होते. वेशीची देवडी मंदिरासमोर होती. 10 पूर्वेकडील
द्वाराच्या आतून प्रत्येक बाजूला तीन चौक्या होत्या; त्या तीनही एकाच
मापाच्या होत्या आणि प्रत्येक बाजूच्या भिंतींचे माप सुद्धा सारखेच
होते. 11 मग त्याने वेशीच्या प्रवेशद्वाराची रुंदी मापली; ती दहा हात
होती आणि त्याची लांबी तेरा हात होती. 12 प्रत्येक चौकीच्या समोर
एक हात उंच भिंत होती आणि चौक्या दोन्ही बाजूंनी सहा हात होत्या.
13 मग त्याने एका चौकीच्या भिंतीच्या मागच्या बाजूच्या वरपासून
दुसऱ्या भिंतीच्या वरपर्यंतचे वेशीचे माप घेतले; त्यातील अंतर एका
कठड्यापासून दुसऱ्यापर्यंत पंचवीस हात मापले. 14 त्याने वेशीच्या
आतील बाजूने भिंतींचे सर्वबाजूंनी माप घेतले ते साठ हात होते. हे
माप अंगणासमोरील देवडीपर्यंत होते. 15 वेशीच्या प्रवेशद्वारापासून
तिच्या शेवटच्या देवडीपर्यंत तिचे माप पन्नास हात होते. 16 वेशीच्या
आतील चौक्या आणि भिंतीच्या चहूबाजूंना झरोके असलेले कठडे
होते, तसेच देवडींनाही आतील बाजूने झरोके होते. भिंती खजुरीच्या
झाडांचे कोरीवकाम करून सजविल्या होते. 17 मग त्याने मला बाहेरच्या
अंगणात आणले. तिथे अंगणाच्या सभोवती काही खोल्या व बांधलेली
पाऊलवाट मी पाहिली; पाऊलवाटेच्या बाजूने तीस खोल्या होत्या. 18
त्या खोल्या वेशीच्या बाजूला लागूनच होत्या आणि जितकी त्यांची
लांबी तितकीच त्यांची रुंदी होती; ही खालची पाऊलवाट होती. 19
मग त्याने खालच्या वेशीच्या आतील बाजूपासून आतील अंगणाच्या
बाहेरच्या बाजूपर्यंतच्या अंतराचे माप घेतले; त्याचे माप पूर्वेकडून
तसेच उत्तरेकडूनही शंभर हात होते. 20 मग त्याने बाहेरील अंगणाकडे
जाणाऱ्या उत्तरेकडील द्वाराची लांबी व रुंदी मापली. 21 त्यांच्या दोन्ही
बाजूंनी प्रत्येकी तीन चौक्या होत्या; त्याच्या भिंती आणि देवडीचेही तेच
माप होते जे पहिल्या वेशीचे होते. ते पन्नास हात लांब आणि पंचवीस
हात रुंद होते. 22 त्याचे झरोके, त्याची देवडी आणि त्याचे खजुरीच्या
झाडांचे कोरीवकाम केलेली सजावट यांचे माप पूर्वेकडील द्वाराच्या
मापाइतकेच होते. त्यावर चढून जाण्यासाठी सात पायऱ्या होत्या आणि
त्याची देवडी त्याच्यासमोर होती. 23 जसे पूर्वेच्या बाजूने होते तसेच
आतील अंगणातही एक द्वार होते जे उत्तरेच्या बाजूने होते. त्याने एका
द्वारापासून त्याच्या समोरील द्वारापर्यंत माप घेतले; ते शंभर हात मापले.
24 मग त्या मनुष्याने मला दक्षिणेकडे नेले आणि मी दक्षिणेच्या बाजूला
द्वार पाहिले. त्याने त्याच्या खांबांचे व देवडीचे माप घेतले आणि इतर
खांब व देवडींप्रमाणेच याचेही माप होते. 25 त्याच्या वेशी व देवडींना
चहूकडून इतर वेशी व देवड्यांप्रमाणेच अरुंद झरोके होते. त्याची लांबी
पन्नास हात व रुंदी पंचवीस हात होती. 26 त्याच्यावर जाण्यासाठी
सात पायऱ्या होत्या आणि त्याच्यासमोर देवडी होती; त्याच्या भिंतींच्या
प्रत्येक बाजूला खजुरीच्या झाडाचे कोरीवकाम केलेली सजावट होती.
27 आतील अंगणात सुद्धा एक द्वार होते ज्याचे तोंड दक्षिणेच्या बाजूला
होते, त्याने या द्वारापासून दक्षिणेच्या बाहेरच्या द्वारापर्यंत माप घेतले; ते
शंभर हात होते. 28 त्यानंतर त्या मनुष्याने मला दक्षिणेकडील द्वारातून
आतील अंगणात आणले आणि त्याने दक्षिणेकडील द्वार मापले; इतर
द्वारांप्रमाणेच त्याचेही माप होते. 29 त्याच्या चौक्या, त्याच्या भिंती
आणि त्याच्या देवड्यांचे माप हे सुद्धा तितकेच होते. वेशी व त्याच्या
देवड्यांना चहूकडून झरोके होते. त्याची लांबी पन्नास हात आणि रुंदी
पंचवीस हात होती. 30 (आतील अंगणाच्या चहूकडून वेशीच्या देवड्या
पंचवीस हात रुंद आणि पाच हात खोल होत्या.) 31 त्याची देवडी
बाहेरील अंगणासमोर होती; खजुरीच्या झाडांचे कोरीवकाम करून
त्याच्या खांबांना सजविले होते आणि त्यावर जाण्यास आठ पायऱ्या
होत्या. 32 त्यानंतर त्याने मला पूर्वेच्या बाजूने आतील अंगणात आणले,
आणि त्याने वेशीचे माप घेतले; इतर वेशींप्रमाणेच हिचेही माप भरले.
33 त्याच्या चौक्या, त्याच्या भिंती आणि त्याच्या देवड्यांचे माप हे सुद्धा
तितकेच होते. वेशी व त्याच्या देवड्यांना चहूकडून झरोके होते. त्याची
लांबी पन्नास हात आणि रुंदी पंचवीस हात होती. 34 त्याच्या देवड्याचे
तोंड बाहेरील अंगणाकडे होते; खजुरीच्या झाडांच्या कोरीवकामाने
त्याचे स्तंभ सजविले होते आणि त्यावर जाण्यास आठ पायऱ्या होत्या.
35 नंतर त्याने मला उत्तरेच्या द्वाराकडे आणले व त्याचे माप घेतले.
इतरांप्रमाणेच त्याचेही माप भरले. 36 त्याप्रमाणेच त्याच्या चौक्या,
त्याच्या भिंती आणि त्याच्या देवड्या होत्या, आणि चहूकडून त्याला
झरोके होते. ते पन्नास हात लांब आणि पंचवीस हात रुंद होते. 37
त्याच्या देवड्याचे तोंड बाहेरील अंगणाकडे होते; खजुरीच्या झाडांच्या
कोरीवकामाने त्याचे स्तंभ सजविले होते आणि त्यावर जाण्यास आठ
पायऱ्या होत्या. 38 प्रत्येक आतील वेशीच्या देवडीकडे द्वार असलेली
खोली होती, जिथे होमार्पणे धुतली जात असत. 39 वेशीच्या देवडीमध्ये
दोन्ही बाजूंना दोन मेज होते, ज्यावर होमार्पणे, पापार्पणे व दोषार्पणे
वधली जात असत. 40 वेशीच्या देवडीच्या बाहेरील भिंतीजवळ, उत्तरेच्या
वेशीच्या प्रवेशद्वाराजवळ दोन मेज होते आणि पायऱ्यांच्या दुसऱ्या बाजूने
दोन मेज होते. 41 म्हणजेच वेशीच्या एका बाजूला चार मेज होते आणि
दुसऱ्या बाजूला चार; असे एकूण आठ मेज होते; ज्यावर अर्पणे कापली
जात असत. 42 होमार्पणासाठी कोरीव दगडाचे अजून चार मेज होते, जे
प्रत्येकी दीड हात लांब, दीड हात रुंद आणि एक हात उंच होते. त्या
मेजांवर होमार्पणांचा व इतर अर्पणांचा वध करण्यासाठी उपकरणे व
पात्रे ठेवण्यात आली होती. 43 भिंतीच्या चहूकडून प्रत्येकी चार बोटे

असे दुहेरी टोके असलेले आकडे अडकविले होते. ते मेज अर्पणाच्या
मांसासाठी होते. 44 आतील द्वाराच्या बाहेर, आतील अंगणाच्या आत
दोन खोल्या होत्या. उत्तरेच्या द्वाराजवळ दक्षिणेकडे तोंड केलेली एक
खोली तर दुसरी खोली दक्षिणेच्या द्वाराजवळ उत्तरेकडे तोंड केलेली
होती. 45 तो मनुष्य मला म्हणाला, “दक्षिणेकडे तोंड असलेली खोली
मंदिराचे राखण करणाऱ्या याजकांसाठी आहे 46 आणि उत्तरेकडे
तोंड असलेली खोली वेदीचे राखण करणाऱ्या याजकांसाठी आहे.
हे सादोकचे पुत्र आहेत, केवळ तेच लेवी आहेत, जे याहवेहची सेवा
करताना याहवेहसमोर येऊ शकतात.” 47 मग त्याने अंगणाचे माप
घेतले: ते चौरस असून दोन्ही बाजूंनी शंभर हात लांब व शंभर हात रुंद
होते आणि वेदी मंदिरासमोर होती. 48 त्याने मला मंदिराच्या देवडीजवळ
आणले आणि देवडीच्या खांबांचे माप घेतले; ते दोन्ही बाजूंनी पाच
हात होते. प्रवेशद्वाराची रुंदी चौदा हात होती आणि त्याच्या भिंती दोन्ही
बाजूंनी तीन हात रुंद होत्या. 49 देवडी वीस हात रुंद होती, आणि मागून
पुढून बारा हात होती. त्यावर जाण्यासाठी पुष्कळ पायऱ्या होत्या आणि
खांबांच्या प्रत्येक बाजूला खांब होते.

**41** नंतर त्या मनुष्याने मला मुख्य दिवाणखान्यात आणले आणि
तेथील स्तंभ मापले; प्रत्येक बाजूंनी त्या खांबांची रुंदी सहा हात
होती. 2 प्रवेशद्वार दहा हात रुंद होते आणि भिंतींची रुंदी प्रत्येक बाजूने
पाच हात होती. त्याने मुख्य दिवाणखाना देखील मापला; तो चाळीस
हात लांब आणि वीस हात रुंद होता. 3 मग तो आतील पवित्रस्थानात
गेला आणि प्रवेशद्वाराच्या खांबांचे माप घेतले; प्रत्येक खांब दोन हात
रुंद होते. प्रवेशद्वार सहा हात रुंद होते आणि भिंतींची रुंदी प्रत्येक बाजूने
सात हात होती. 4 आणि त्याने आतील पवित्रस्थानाची लांबी मापली;
ती वीस हात होती आणि मुख्य दिवाणखान्याच्या शेवटपर्यंत त्याची रुंदी
वीस हात होती. तो मला म्हणाला, “हे परमपवित्रस्थान आहे.” 5 नंतर
त्याने मंदिराच्या भिंतीचे माप घेतले; ती सहा हात जाड होती आणि
मंदिराच्या सभोवती असलेल्या खोल्या प्रत्येकी चार हात रुंद होत्या. 6
बाजूला असलेल्या खोल्या एकावर एक अशा तीन मजल्यांवर होत्या,
प्रत्येक मजल्यावर तीस खोल्या होत्या. बाजूला असलेल्या खोल्यांना
आधार असावा म्हणून मंदिराच्या सभोवती असलेल्या भिंतींना फळ्या
होत्या, ज्या मंदिराच्या भिंतीमधून टाकल्या गेल्या नव्हत्या. 7 मंदिराच्या
बाजूस असलेल्या खोल्या प्रत्येक मजल्यावर रुंद होत गेल्या. मंदिराच्या
सभोवती असलेली इमारत चढत्या रचनेत बांधली होती, म्हणजे प्रत्येक
मजल्यावरील खोल्या त्याच्या खालच्या मजल्यावरील खोल्यांपेक्षा रुंद
होत्या. सर्वात खालच्या मजल्यापासून मधल्या मजल्यालगत जाऊन,
सर्वात वरच्या मजल्यापर्यंत पायऱ्या होत्या. 8 मी पाहिले की मंदिराला
सभोवार उंच केलेला एक आधार होता, जो बाजूच्या खोल्यांसाठी
पाया होता. तो मापन-दंडाच्या लांबीचा म्हणजेच सहा हात लांब होता.
9 बाजूच्या खोल्यांची बाहेरील भिंत पाच हात जाड होती. मंदिराच्या
बाजूच्या खोल्या 10 आणि याजकांच्या खोल्यामधील मोकळया जागेचे
माप मंदिराच्या सभोवती वीस हात रुंद होते. 11 त्या मोकळया जागेकडून
खोल्यांसाठी प्रवेशद्वार होते, एक उत्तरेकडे तर दुसरे दक्षिणेकडे; आणि
मोकळया जागेलगत सभोवार असलेला आधार पाच हात रुंद होता. 12
मंदिराच्या अंगणासमोरील पश्चिमेकडील इमारत सत्तर हात रुंद होती.
सभोवार त्या इमारतीची भिंत पाच हात जाड होती आणि त्याची लांबी
नव्वद हात होती. 13 त्यानंतर त्याने मंदिराचे माप घेतले; ते शंभर
हात लांब होते आणि मंदिराचे अंगण व त्याच्या भिंतीसह इमारतीची
लांबी देखील शंभर हात होती. 14 मंदिराच्या समोरच्या बाजूसह,
पूर्वेच्या बाजूने मंदिराची रुंदी शंभर हात होती. 15 नंतर त्याने मंदिराच्या
मागच्या बाजूच्या समोरच्या इमारतीची लांबी मापली, ती तिच्या दोन्ही
बाजूंच्या सज्ज्यांसह शंभर हात होती. मुख्य दिवाणखाना, आतील
पवित्रस्थान आणि अंगणासमोरील देवडी, 16 त्याचप्रमाणे उंबरठे आणि
अरुंद खिडक्या आणि त्या सभोवार असलेले तीनही सज्जे; उंबरठा
व त्याच्या पलीकडील सर्वकाही लाकडाने आच्छादले होते—जमीन,
खिडक्यापर्यंतच्या भिंती आणि खिडक्या झाकलेल्या होत्या. 17 आतील
पवित्रस्थानाच्या प्रवेशद्वाराच्या बाहेरील वरचा भाग आणि आतील व
बाहेरील पवित्रस्थानाच्या सभोवारच्या भिंतीवर टप्प्या टप्प्याने 18 करूब
व खजुरीची झाडे कोरली होती. एका खजुरीच्या झाडानंतर एक करूब
कोरले होते. प्रत्येक करुबाला दोन मुखे होती: 19 एका खजुरीच्या
झाडाकडून मनुष्याचे मुख तर दुसऱ्या खजुरीच्या झाडाकडून सिंहाचे
मुख, मंदिरात चोहीकडे ते कोरलेले होते. 20 मुख्य दिवाणखान्याच्या
भिंतींवर जमिनीपासून प्रवेशद्वाराच्या वरच्या भागापर्यंत करूब आणि
खजुरीची झाडे कोरली होती. 21 मुख्य दिवाणखान्याला चौरस द्वारपट्टी
होती आणि ती परमपवित्रस्थानाच्या द्वारपट्टीसारखीच होती. 22 तिथे
एक लाकडी वेदी होती ती तीन हात उंच आणि दोन हात लांब होती,
तिचे कोपरे, तिची बैठक आणि तिच्या बाजू लाकडाच्या होत्या. तो
मनुष्य मला म्हणाला, “हा तोच मेज आहे जो याहवेहसमोर असतो.”
23 मुख्य दिवाणखाना आणि परमपवित्रस्थानाला दुहेरी दरवाजे होते. 24
प्रत्येक द्वाराला दोन झडपा होत्या; प्रत्येक द्वाराला बिजागरी लावलेल्या
दोन झडपा होत्या. 25 मुख्य दिवाणखान्याच्या द्वारावर त्यासारखीच
करूब व खजुरीची झाडे कोरलेली होती आणि देवडीसमोर लाकडाच्या
लोंबत्या तुळया होत्या. 26 देवडीच्या बाजूच्या भिंतींवर अरुंद खिडक्या
होत्या, ज्यावर प्रत्येक बाजूंनी खजुरीची झाडे कोरली होती. मंदिराच्या
बाजूला असलेल्या खोल्यांमध्ये सुद्धा लोंबत्या तुळया होत्या.

**42** मग त्या मनुष्याने मला उत्तरेकडून बाहेरील अंगणात आणले
आणि मंदिराच्या अंगणासमोर व उत्तरेच्या बाहेरील भिंतीच्या
समोर असलेल्या खोल्यांमध्ये आणले. 2 या इमारतीचे द्वार जे उत्तरेकडे
होते त्याची लांबी शंभर हात व रुंदी पन्नास हात होती. 3 आतील
अंगणापासून बाहेरील अंगणाच्या पाऊलवाटेच्या समोरपर्यंत दोन्ही वीस
हाताच्या खंडात होते, तीन मजल्यांवर समोरासमोर सज्जे होते. 4
खोल्यांच्या समोर आतील मार्ग होता जो दहा हात रुंद आणि शंभर
हात लांब होता. त्याच्या उत्तरेच्या बाजूने दरवाजे होते. 5 तळ आणि
मधल्या मजल्यावरील खोल्यांपेक्षा वरील मजल्यावरील खोल्या अरुंद

होत्या, कारण सज्ज्यांनी अधिक जागा घेतली होती. 6 जसे अंगणात
होते तसे वरच्या मजल्याच्या खोल्यांना खांब नव्हते; म्हणून तळ आणि
मधल्या मजल्यांपेक्षा त्या मजल्याची जागा कमी होती. 7 खोल्या आणि
बाहेरील अंगणाला समांतर अशी बाहेरून एक भिंत होती; ती खोल्यांच्या
समोर पन्नास हाताइतकी पुढे गेली होती. 8 बाहेरील अंगणाच्या बाजूला
असलेल्या खोल्यांची रांग पन्नास हात लांब होती आणि पवित्रस्थानाच्या
अगदी जवळ असलेल्या खोल्यांची रांग शंभर हात लांब होती. 9
बाहेरील अंगणातून तळ मजल्यावरील खोल्यांमध्ये जाण्याऱ्यांसाठी
पूर्वेकडून प्रवेशद्वार होते. 10 दक्षिणेच्या बाजूला बाहेरील अंगणाच्या
भिंतीच्या लांबीलगत, मंदिराच्या अंगणाला जोडलेल्या आणि बाहेरील
भिंतीसमोर खोल्या होत्या 11 ज्यांच्यासमोर एक पाऊलवाट होती.
उत्तरेकडे असलेल्या खोल्यांप्रमाणेच या खोल्या होत्या; त्यांची लांबी व
रुंदी सारखीच होती आणि बाहेर जाण्याचा मार्ग व त्याचा आकार उत्तरेला
असलेल्या दरवाजा सारखाच होता. 12 दक्षिणेकडील खोल्यांचाही
दरवाजा होता. खोल्यांमध्ये जाण्यास मार्गाच्या सुरुवातीला एक दरवाजा
होता, हा मार्ग पूर्वेच्या बाजूने वाढत जाऊन त्या भिंतीला समांतर होत्या.
13 तेव्हा तो मनुष्य मला म्हणाला, “मंदिराच्या अंगणासमोर उत्तर व
दक्षिणेच्या बाजूला असलेल्या खोल्या याजकांच्या खोल्या आहेत,
तिथे जे याजक याहवेहसमोर जातात ते परमपवित्र अर्पणे; म्हणजेच
धान्यार्पणे, पापार्पणे आणि दोषार्पणे खातील; कारण ते ठिकाण पवित्र
आहे. 14 जेव्हा कधी याजक पवित्रस्थानात प्रवेश करतात, तेव्हा जी
वस्त्रे घालून ते सेवा करतात ती पवित्रस्थानात ठेवल्याशिवाय त्यांनी
बाहेरील अंगणात जाऊ नये, कारण ती पवित्र वस्त्रे आहेत. लोकांकडे
जाण्यासाठी ठरलेल्या ठिकाणी जाण्याअगोदर याजकांनी दुसरी वस्त्रे
घालावी.” 15 मंदिराच्या आतील भागात असलेल्या वस्तूंची मापे
घेण्याचे संपविल्यावर, त्याने मला पूर्वेकडील द्वारातून बाहेर आणले
आणि सभोवतालचा भाग मापला. 16 मापन-दंडाने त्याने पूर्वेकडील
भाग मापला; तो पाचशे हात होता. 17 त्याने उत्तरेकडील भाग मापला;
तो मापन-दंडाने पाचशे हात भरला. 18 त्याने दक्षिणेचा भाग मापला;
तो मापन-दंडाने पाचशे हात होता. 19 मग त्याने वळून पश्चिमेचे माप
घेतले; ते मापन-दंडाने पाचशे हात होते. 20 याप्रकारे त्याने चारही बाजूंचे
माप घेतले. त्याच्याभोवती एक भिंत होती, जी पाचशे हात लांब आणि
पाचशे हात रुंद असून पवित्रस्थानाला सर्वसाधारण स्थानापासून वेगळी
करीत होती.

**43** त्यानंतर त्या मनुष्याने मला पूर्वेकडे तोंड असलेल्या द्वाराकडे
आणले 2 आणि मी इस्राएलच्या परमेश्वराचे वैभव पूर्वेकडून
येताना पाहिले. जोरदार पाण्याच्या गर्जनेप्रमाणे त्याचा आवाज होता
आणि परमेश्वराच्या वैभवाने पृथ्वी प्रकाशमय झाली. 3 जो दृष्टान्त मी
पाहिला तो त्या दृष्टान्तासारखा होता जेव्हा तो शहरास नष्ट करण्यास
आला होता आणि जो दृष्टान्त मी खेबर नदीकिनारी पाहिला होता
त्यासारखा होता, तेव्हा मी उपडा पडलो. 4 पूर्वेकडे तोंड असलेल्या
द्वारातून याहवेहच्या वैभवाने मंदिरात प्रवेश केला. 5 तेव्हा आत्म्याने मला
उचलून आतील अंगणात आणले आणि याहवेहच्या वैभवाने मंदिर भरले.
6 तो मनुष्य माझ्याशेजारी उभा असता, मंदिरातून कोणी माझ्याशी
बोलत असल्याचे मी ऐकले. 7 परमेश्वराने मला म्हटले: “मानवपुत्रा,
हे माझ्या सिंहासनाचे स्थान, माझ्या तळपायाचे ठिकाण आहे. या
ठिकाणी इस्राएली लोकांमध्ये मी सर्वकाळ राहीन. इस्राएली लोक; ते
किंवा त्यांचे राजे यापुढे त्यांच्या वेश्यावृत्तीने आणि त्यांच्या राजांच्या
अंत्यविधीच्या अर्पणांद्वारे माझे नाव पुन्हा कलंकित करणार नाहीत.
8 जेव्हा त्यांनी त्यांचे उंबरठे माझ्या उंबरठ्याशेजारी आणि त्यांच्या
द्वाराच्या चौकटी माझ्या चौकटीशेजारी उभारल्या, माझ्या व त्यांच्यामध्ये
केवळ एक भिंत होती, त्यांच्या अमंगळ कृत्यांनी त्यांनी माझे पवित्र नाव
कलंकित केले. म्हणून माझ्या रागाने मी त्यांचा नाश केला. 9 आता
त्यांनी त्यांची वेश्यावृत्ती आणि त्यांच्या राजांसाठी अंत्यविधीची अर्पणे
माझ्यापासून दूर करावी आणि मी सर्वकाळ त्यांच्यामध्ये राहीन. 10
“मानवपुत्रा, इस्राएलाच्या लोकांना मंदिराविषयी स्पष्ट कर, म्हणजे ते
त्यांच्या पापाविषयी लज्जित होतील. त्यांनी त्यांच्या परिपूर्णतेबद्दल
विचार करावा, 11 आणि त्यांनी जे काही केले त्याबद्दल जर त्यांना
लाज वाटली, तर त्यांना मंदिराच्या आराखड्याबद्दल; म्हणजेच त्याची
रचना, बाहेर जाण्याचा व प्रवेश करण्याचा मार्ग; त्याचा संपूर्ण आराखडा
आणि त्याचे सर्व विधी नियम याची माहिती दे. ते त्यांच्यासमोर लिही
म्हणजे ते त्याच्या आराखड्याशी विश्वासू राहतील आणि त्याचे सर्व
नियम पाळतील. 12 “मंदिराचा हा नियम आहे: पर्वतांच्या माथ्याच्या
सभोवतालचा सर्व भाग परमपवित्र असणार. मंदिराचा नियम असाच
आहे. 13 “वेदीच्या लांबीचे हाताने माप याप्रकारे आहेत, म्हणजेच एक
हात आणि चार बोटे: त्याच्या तळभागाचे माप एक हात खोल आणि एक
हात रुंद होती, त्याचा कड व काठ याचे माप एक वीत होते आणि ही
वेदीची उंची होती: 14 भूमीवरील तळभागापासून वेदीच्या सभोवतालच्या
खालच्या बैठकीपर्यंतची उंची दोन हात आणि बैठक एक हात रुंद आहे.
या खालच्या बैठकीपासून वरील बैठकीपर्यंत जे वेदीसभोवती जाते ती
चार हात उंच आणि ती सुद्धा एक हात रुंद आहे. 15 त्याच्यावरती, वेदीचा
अग्निकुंड चार हात उंच, आणि वेदीच्या अग्निकुंडाला जोडून चार शिंगे
वर निघाली होती. 16 वेदीचा अग्निकुंड चौरस असून तो बारा हात लांब
आणि बारा हात रुंद आहे. 17 वरील बैठक सुद्धा चौरस असून ती चौदा
हात लांब आणि चौदा हात रुंद आहे. वेदीच्या चहूकडील तळभाग एक
हात व त्याचा काठ अर्धा हात आहे. वेदीच्या पायऱ्या पूर्वेकडे आहेत.”
18 तेव्हा तो मनुष्य मला म्हणाला, “मानवपुत्रा, सार्वभौम याहवेह
असे म्हणतात: होमार्पणासाठी व वेदी बांधून झाल्यावर त्यावर रक्त
शिंपडण्यासाठी जे नियम आहेत ते हे: 19 सादोकच्या कुटुंबाच्या लेवी
कुळातील याजकांना तुम्ही पापार्पणासाठी एक गोऱ्हा द्यावा. हे याजक
माझी सेवा करण्यास माझ्यासमोर येतात, असे सार्वभौम याहवेह जाहीर
करतात. 20 तू त्याचे काही रक्त घेऊन वेदीच्या चार शिंगांना आणि
वरील बैठकीच्या चारही कोपऱ्यांना आणि काठाला सर्वत्र लावावे आणि
याप्रकारे वेदीला शुद्ध करून त्यासाठी प्रायश्चित कर. 21 पापार्पणासाठी

तू गोऱ्हा घ्यावा आणि पवित्रस्थानाबाहेर मंदिराच्या नेमलेल्या ठिकाणी
तो जाळून टाकावा. 22 “दुसऱ्या दिवशी पापार्पणासाठी निर्दोष बोकड
घ्यावा आणि वेदी शुद्ध करावी, ज्याप्रकारे गोऱ्ह्याद्वारे शुद्ध केली होती.
23 ती शुद्ध केल्यानंतर, एक गोऱ्हा व मेंढरातील एका मेंढ्याचे अर्पण
करावे, ते दोन्ही निर्दोष असावेत. 24 त्यांना तू याहवेहसमोर अर्पण
करावे आणि याजकांनी त्यांच्यावर मीठ टाकावे आणि होमार्पण म्हणून
याहवेहसमोर अर्पण करावे. 25 “सात दिवस प्रतिदिनी तू एक बोकड
पापार्पण म्हणून अर्पण करावा; एक गोऱ्हा व मेंढरातील एक मेंढा
आणावा, ते दोन्ही निर्दोष असावेत. 26 सात दिवस त्यांनी वेदीसाठी
प्रायश्चित करून ती शुद्ध करावी; याप्रकारे ते वेदीचे समर्पण करतील. 27
हे दिवस समाप्त झाल्यानंतर, आठव्या दिवसापासून पुढे, याजकांनी
तुमची होमार्पणे व शांत्यर्पणे वेदीवर अर्पण करावी. तेव्हा मी तुमचा
स्वीकार करेन, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात.”

**44** तेव्हा त्या मनुष्याने मला मंदिराच्या बाहेरील द्वाराकडे परत
आणले, ज्याचे तोंड पूर्वेकडे होते आणि ते बंद होते. 2 याहवेहने
मला म्हटले, “हे द्वार बंदच असावे. ते उघडले जाऊ नये; त्यातून कोणीही
प्रवेश करू नये. ते बंदच असावे कारण याहवेह इस्राएलच्या परमेश्वराने
त्यातून प्रवेश केला. 3 केवळ राजपुत्रच स्वतः द्वारात बसून याहवेहसमोर
भोजन करू शकेल. त्याने देवडीच्या द्वारातून आत यावे आणि तिथूनच
बाहेर जावे.” 4 नंतर त्या मनुष्याने मला उत्तरेकडील द्वारातून मंदिरासमोर
आणले. तेव्हा मंदिर याहवेहच्या वैभवाने भरत असताना मी पाहिले
आणि मी तिथे उपडा पडलो. 5 याहवेहने मला म्हटले, “मानवपुत्रा,
काळजीपूर्वक पाहा, जवळून ऐक आणि याहवेहच्या मंदिराविषयी जे
सर्व नियम व सूचना मी तुला सांगतो त्या सर्वांकडे लक्ष दे. मंदिराच्या
सर्व प्रवेशद्वारांकडे आणि पवित्रस्थानातून बाहेर जाण्याच्या मार्गांकडे
लक्ष दे. 6 बंडखोर इस्राएलास सांग, ‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात:
अहो इस्राएली लोकांनो तुम्ही जी अमंगळ कृत्ये केली ती पुरे! 7 तुमच्या
अमंगळ कृत्यांसह तुम्ही हृदयाने आणि शरीराने बेसुंती असे विदेशी
लोक माझ्या पवित्रस्थानात आणले, अन्न, चरबी आणि रक्ताची अर्पणे
करून तुम्ही माझे मंदिर भ्रष्ट केले आणि माझा करार मोडला. 8 माझ्या
पवित्र वस्तूंबाबत तुमची जबाबदारी पार पाडण्याऐवजी, तुम्ही माझ्या
पवित्रस्थानाची कर्तव्ये इतरांना सोपविली. 9 सार्वभौम याहवेह असे
म्हणतात: हृदयाने व शरीराने बेसुंती असे विदेशी माझ्या पवित्रस्थानात
प्रवेश करणार नाहीत, जे विदेशी इस्राएलात राहतात त्यांनी सुद्धा येऊ
नये. 10 “‘इस्राएली लोक बहकले तेव्हा जे लेवी माझ्यापासून भरकटले
व दूर गेले आणि त्यांच्या मूर्तींच्या मागे गेले ते त्यांच्या पापाचे प्रतिफळ
भोगतील. 11 मंदिराच्या द्वारांवर पहारा करीत तिथे माझ्या पवित्रस्थानात
सेवा करू शकतील; लोकांसाठी होमार्पण व यज्ञाचे पशू ते कापतील
आणि लोकांपुढे उभे राहून त्यांची सेवा करतील. 12 परंतु त्यांनी त्यांच्या
मूर्तीसमोर लोकांची सेवा केली आणि इस्राएली लोकांना पाप करण्यास
भाग पाडले, म्हणून मी उंचावलेल्या बाहूंनी शपथ घेतली आहे की त्यांनी
त्यांच्या पापाचे प्रतिफळ भोगावे, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात.
13 त्यांनी याजक म्हणून माझी सेवा करण्यास जवळ येऊ नये किंवा
माझ्या कोणत्याही पवित्र वस्तूंच्या किंवा परमपवित्र अर्पणांच्या जवळ
येऊ नये; त्यांनी त्यांच्या अमंगळ कृत्यांची लाज भोगावी. 14 मंदिराची
राखण करण्यासाठी व तिथे जी सर्व कामे केली जातात त्यावर मी त्यांची
नेमणूक करेन. 15 “‘परंतु लेवी गोत्रातील याजक जे सादोकचे वंशज
आहेत, इस्राएली लोक माझ्यापासून बहकून गेले होते, तेव्हा ज्यांनी
माझ्या पवित्रस्थानाची राखण केली, ते माझ्यासमोर सेवा करण्यास
जवळ येतील; चरबी व रक्ताची यज्ञे अर्पिण्यासाठी ते माझ्यासमोर उभे
राहतील, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात. 16 केवळ तेच माझ्या
पवित्रस्थानात प्रवेश करतील, केवळ तेच माझ्यासमोर सेवा करण्यास
माझ्या मेजाजवळ येतील आणि पहारेकरी म्हणून माझी सेवा करतील.
17 “‘ते जेव्हा आतील अंगणाच्या द्वारातून प्रवेश करतील, तेव्हा त्यांनी
तागाची वस्त्रे घालावी; आतील अंगणाच्या द्वारात किंवा मंदिरात सेवा
करीत असताना त्यांनी कोणतेही लोकरीचे वस्त्र घालू नये. 18 त्यांनी
आपल्या डोक्यावर तागाचे फेटे आणि आपल्या कंबरेभोवती तागाची
अंतर्वस्त्रे घालावी. त्यांना घाम येईल अशी वस्त्रे त्यांनी घालू नये. 19
लोक आहेत तिथे बाहेरील अंगणात जेव्हा ते जातात, तेव्हा जी वस्त्रे
घालून ते सेवा करीत होते ते काढून पवित्र खोलीत ते ठेवावे आणि दुसरे
कपडे घालावे, म्हणजे त्यांच्या वस्त्रांना स्पर्श करून लोकांनी पवित्र होऊ
नये. 20 “‘त्यांनी आपल्या डोक्यांचे मुंडण करू नये किंवा आपले केस
लांब वाढू देऊ नये, परंतु त्यांनी आपल्या डोक्यावरील केस कापावे. 21
आतील अंगणात जाताना कोणत्याही याजकाने द्राक्षारस पिऊ नये. 22
त्यांनी विधवा किंवा घटस्फोट झालेल्या स्त्रीशी विवाह करू नये; केवळ
इस्राएली गोत्रातील कुमारिकांशी किंवा याजकाच्या विधवेशी विवाह
करावा. 23 पवित्र व साधारण यातील फरक आणि शुद्ध व अशुद्ध यात
कसा फरक करावा हे त्यांनी माझ्या लोकांना शिकवावे. 24 “‘कोणताही
विवाद असल्यास, याजकांनी न्यायाधीश म्हणून असावे आणि माझ्या
निर्णयानुसार निर्णय घ्यावा. माझ्या नेमलेल्या सर्व सणांसाठी त्यांनी
माझे नियम व विधी पाळावे आणि त्यांनी माझे शब्बाथ पवित्र राखावे.
25 “‘मृत देहाकडे जाऊन याजकाने स्वतःस अशुद्ध करू नये; तरीही ती
मृत व्यक्ती जर त्याचा पिता किंवा आई, मुलगा किंवा मुलगी, भाऊ
किंवा अविवाहित बहीण असली, तर तो स्वतःस अशुद्ध करू शकतो.
26 शुद्धीकरण झाल्यावर त्याने सात दिवस थांबावे. 27 ज्या दिवशी
पवित्रस्थानात सेवा करण्यास तो आतील अंगणात जातो, तेव्हा त्याने
स्वतःसाठी पापार्पण करावे, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात.
28 “‘याजकांचे वतन केवळ मीच आहे. तुम्ही त्यांना इस्राएलमध्ये
कोणताही वाटा देऊ नये; मीच त्यांचा वाटा आहे. 29 अन्नार्पणे,
पापार्पणे आणि दोषार्पणे यातून ते खातील; आणि जे सर्वकाही इस्राएल
लोक याहवेहस समर्पित करतात ते याजकांच्या मालकीचे होईल. 30
प्रथमफळातील जे सर्वोत्तम आणि तुमच्या सर्व विशेष भेटी याजकांच्या
होतील. तुमच्या भूमीतील प्रथम भाग याजकांना द्यावा म्हणजे तुमच्या

घराण्यावर आशीर्वाद राहेल. 31 मेलेला किंवा हिंस्र पशूने फाडलेला
कोणताही मृत पक्षी किंवा पशू याजकांनी खाऊ नये.

**45** “‘जेव्हा तुम्ही भूमीची वतन म्हणून वाटणी कराल, तेव्हा तुम्ही
भूमीचा एक भाग याहवेहसाठी एक पवित्र प्रदेश म्हणून समर्पित
करावा, तो पंचवीस हजार हात लांब आणि वीस हजार हात रुंद
असावा; तो संपूर्ण भाग पवित्र असावा. 2 यामधून, पाचशे हात
समचौरस पवित्रस्थानासाठी असावा, आणि त्याच्याभोवती पन्नास हात
मोकळी जागा सोडावी. 3 या पवित्र प्रदेशात, पंचवीस हजार हात लांब
आणि दहा हजार हात रुंद असा भाग मोजून घे. त्यात पवित्रस्थान,
परमपवित्रस्थान असेल. 4 याजक जे पवित्रस्थानात सेवा करतात आणि
याहवेहसमोर सेवा करण्यास जे जवळ येतात त्या याजकांसाठी भूमीचा
हा भाग पवित्र असेल. त्याचप्रमाणे हे ठिकाण त्यांच्या घरांसाठी आणि
पवित्रस्थानासाठी पवित्र ठिकाण असे असावे. 5 पंचवीस हजार हात
लांब आणि दहा हजार हात रुंद असलेला हा भाग, जे लेवी लोक मंदिरात
सेवा करतात त्यांच्यासाठी त्यांचे वतन म्हणून त्यांना राहण्यासाठी नगरे
अशी असतील. 6 “‘पवित्र प्रदेशाला लागून पाच हजार हात रुंदीचा
आणि पंचवीस हजार हात लांबीचा जो भाग आहे तो तुम्ही शहराची
मालमत्ता म्हणून द्यावी; ती सर्व इस्राएलच्या हक्काची असणार. 7
“‘पवित्र प्रदेशाच्या भोवती व शहराची मालमत्ता याला लागून प्रत्येक
बाजूची सीमा राजपुत्राची असेल. तिचा विस्तार पश्चिमेपासून पश्चिमेकडे
आणि पूर्वेकडून पूर्वेकडे असून त्याची लांबी पश्चिमेच्या सीमेपासून
पूर्वेच्या सीमेपर्यंत एका गोत्राच्या भागाच्या समांतर अशी असेल. 8 ही
भूमी इस्राएलमध्ये राजपुत्राचे वतन असेल. आणि यापुढे माझे राजपुत्र
माझ्या इस्राएली लोकांवर अत्याचार करणार नाहीत, तर इस्राएली
लोकांना त्यांच्या गोत्रानुसार देशाचे वतन घेऊ देतील. 9 “‘सार्वभौम
याहवेह असे म्हणतात, अहो इस्राएलाच्या राजपुत्रांनो, तुम्ही फार
पुढे गेला आहात! तुमचा आतंक आणि अत्याचार टाकून द्या आणि
जे नीतिपूर्ण व योग्य ते करा. माझ्या लोकांचे वतन काढून घेण्याचे
थांबवा, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात. 10 तुम्ही अचूक काटा,
अचूक एफाह आणि अचूक बथ वापरावा. 11 एफाह आणि बथ एकाच
मापाचे असावे, म्हणजे बथमध्ये होमेरचा दहावा भाग व एफाहमध्ये
होमेरचा दहावा भाग असावा; होमेर हे दोन्ही मापांसाठी एकच माप
असावे. 12 शेकेलमध्ये वीस गेराह असावे. वीस शेकेल आणि पंचवीस
शेकेल आणि पंधरा शेकेल हे एक मीना समान आहेत. 13 “‘तुम्ही
अर्पण करावी ती विशेष भेट ही आहे: गव्हाच्या प्रत्येक होमेरातून एक
एफाहचा सहावा भाग आणि जवाच्या प्रत्येक होमेरातून एक एफाहचा
सहावा भाग. 14 बथने मापलेले जैतुनाच्या तेलाचा नेमलेला भाग,
जो प्रत्येक कोर मधून एक बथचा दहावा भाग आहे (ज्यात दहा बथ
किंवा एक होमेर मावते, कारण दहा बथ हे एका होमेरसमान आहेत).
15 इस्राएलमधील पुष्कळ पाणी असलेल्या कुरणातील कळपातून
दोनशे मेंढरांमागे एक मेंढरू द्यावे. याचा उपयोग लोकांचे प्रायश्चित करावे
म्हणून धान्यार्पणे, होमार्पणे आणि शांत्यर्पणे यासाठी केला जावा, असे
सार्वभौम याहवेह जाहीर करतात. 16 देशातील सर्व लोकांनी ही विशेष
अर्पणे इस्राएलच्या राजपुत्राला देणे आवश्यक आहे. 17 हे राजपुत्राचे
कर्तव्य असावे की त्याने इस्राएलच्या सर्व नेमलेल्या सणांच्या वेळी;
म्हणजेच अमावस्या आणि शब्बाथाच्या वेळी होमार्पणे, धान्यार्पणे
आणि पेयार्पणे आणावी. त्याने पापार्पणे, धान्यार्पणे, होमार्पणे आणि
शांत्यर्पणे आणून इस्राएली लोकांसाठी प्रायश्चित करावे. 18 “‘सार्वभौम
याहवेह असे म्हणतात: पहिल्या महिन्याच्या पहिल्या दिवशी तुम्ही एक
निर्दोष गोर्‍हा घेऊन पवित्रस्थान शुद्ध करावे. 19 याजकाने पापार्पणातील
काही रक्त घेऊन मंदिराच्या द्वार पट्टीवर, वेदीच्या वरील बैठकीच्या
चार कोपर्‍यांना आणि आतील अंगणाच्या द्वार पाट्यांवर लावावे. 20
त्याचप्रमाणे सातव्या दिवशी तुम्ही तसेच करावे जर कोणी नकळत
भोळेपणाने किंवा अज्ञानात पाप केले; तर मंदिरासाठी तुम्ही ते प्रायश्चित
करावे. 21 “‘पहिल्या महिन्याच्या चौदाव्या दिवशी तुम्ही वल्हांडण सण
पाळावा, तो सण सात दिवसांचा असावा, त्यात तुम्ही खमीर नसलेली
भाकर खावी. 22 त्या दिवशी राजपुत्राने स्वतःसाठी व देशातील सर्व
लोकांच्या पापार्पणासाठी एक गोर्‍हा द्यावा. 23 सणाच्या सात दिवसाच्या
दरम्यान दररोज त्याने सात निर्दोष गोर्‍हे व सात एडके होमार्पण म्हणून
याहवेहसमोर आणावे, त्याचप्रमाणे पापार्पणासाठी एक बोकड आणावे.
24 धान्यार्पण म्हणून त्याने प्रत्येक गोर्‍ह्याबरोबर एक एफाह व एका
मेंढ्याबरोबर एक एफाह द्यावा, त्याचबरोबर एका एफाहमागे एक हीन
जैतुनाचे तेल आणावे. 25 “‘त्याचप्रमाणे सात दिवसांच्या सणाच्या
दरम्यान, ज्याची सुरुवात सातव्या महिन्याच्या पंधराव्या दिवशी होते,
त्याने पापार्पणे, होमार्पणे व धान्यार्पणे आणि तेल आणावे.

**46** “‘सार्वभौम याहवेह असे म्हणतात: आतील अंगणाचे पूर्वेकडील
द्वार कार्याच्या सर्व सहा दिवसा दरम्यान बंद असावे, परंतु शब्बाथ
दिवशी व अमावस्येच्या दिवशी ते उघडे असावे. 2 राजपुत्राने बाहेरून
द्वाराच्या देवडीकडून जाणार्‍या मार्गाने प्रवेश करावा आणि चौकीकडे
उभे राहावे. याजकांनी राजपुत्राच्या होमार्पण आणि शांत्यर्पणाचा यज्ञ
करावा. त्याने द्वाराच्या उंबरठ्यावर उपासना करीत नमन करावे आणि
त्यानंतर बाहेर जावे, परंतु संध्याकाळपर्यंत द्वार बंद करू नये. 3 शब्बाथ
दिवशी व अमावस्येच्या दिवशी देशातील लोकांनी त्या द्वारात याहवेहच्या
समक्षतेत उपासना करावी. 4 शब्बाथ दिवशी राजपुत्र जे होमार्पण म्हणून
याहवेहसाठी आणेल, ते सहा कोकरे आणि एक एडका असून ते सर्व
निर्दोष असावे. 5 एका एडक्यासह दिलेले अन्नार्पण एक एफाह असावे
आणि कोकर्‍याबरोबरचे धान्य त्याच्या आवडीनुसार एका एफाहसाठी
एक हीन जैतून तेलाबरोबर द्यावे. 6 अमावस्येच्या दिवशी त्याने एक
गोर्‍हा, सहा कोकरे आणि एक एडका हे द्यावे, ते सर्व निर्दोष असावे. 7
त्याने एका गोर्‍ह्यामागे एक एफाह व एका एडक्यामागे एक एफाह
असे धान्यार्पण आणावे, आणि कोकर्‍याबरोबर आपल्या आवडीनुसार
एक एफाह एक हीन तेलाबरोबर आणावे. 8 जेव्हा राजपुत्र प्रवेश
करतो, त्याने द्वाराच्या देवडीकडील मार्गाने जावे आणि त्याच मार्गाने
त्याने परत यावे. 9 “‘नेमलेल्या सणाच्या वेळी जेव्हा देशातील लोक

याहवेहसमोर येतात, तेव्हा जो कोणी उपासना करण्यासाठी उत्तरेकडील
द्वाराने आत येईल, त्याने दक्षिणेकडील द्वाराने बाहेर जावे; आणि जो
कोणी दक्षिणेकडील द्वाराने आत येईल त्याने उत्तरेकडील द्वाराने बाहेर
जावे. ज्या द्वाराने ते आत आले त्या द्वाराने कोणीही परत जाऊ नये, तर
त्यांनी त्या समोरच्या द्वाराने जावे. 10 राजपुत्राने देखील त्यांच्यासोबतच
असावे, म्हणजेच लोक जेव्हा आत जातील तेव्हा आत जावे आणि
बाहेर जातील तेव्हा त्यानेही बाहेर जावे. 11 मेजवान्या आणि नेमलेल्या
सणांच्या वेळी, एका गोऱ्ह्यामागे एक एफाह, एका एडक्यामागे एक
एफाह आणि कोकऱ्यांबरोबर त्याला आवडेल त्याप्रमाणे धान्य आणावे
आणि एका एफाहमागे एक हीन तेल आणावे. 12 "'जेव्हा राजपुत्र
याहवेहला स्वैच्छिक अर्पण आणतो; ते होमार्पण असो वा शांत्यर्पण;
त्याच्यासाठी पूर्वेकडील द्वार उघडावे. तो करतो त्याचप्रमाणे त्याचे
होमार्पण किंवा शांत्यर्पण तो शब्बाथ दिवशी करेल. मग तो बाहेर
जाईल आणि तो बाहेर गेल्यानंतर, द्वार बंद केले जाईल. 13 "'तुम्ही
दररोज एक वर्षाचे निर्दोष कोकरू होमार्पण म्हणून याहवेहला अर्पण
करावे; तुम्ही ते दररोज सकाळी करावे. 14 तसेच त्याबरोबर रोज
सकाळी एका एफाहचा सहावा भाग व पीठ भिजवण्यासाठी हिनाचा
तिसरा भाग धान्यार्पण म्हणून आणावे. याहवेहसमोर हे धान्यार्पण
सादर करण्याचा नियम सर्वकाळासाठी असावा. 15 याप्रमाणे दररोज
सकाळी नियमित होमार्पणासाठी कोकरू आणि धान्यार्पण आणि तेल
आणावे. 16 "'सार्वभौम याहवेह असे म्हणतात: जर राजपुत्राने त्याच्या
एका मुलासाठी आपल्या वतनातून काही भेट म्हणून दिली, ती त्याच्या
वंशजांच्या मालकीची होईल; वारसानुसार ती त्यांची मालमत्ता होईल.
17 तथापि, जर त्याने आपल्या वतनातून त्याच्या एखाद्या चाकराला काही
भेट म्हणून दिले, तो चाकर स्वतंत्र होण्याच्या वर्षापर्यंत ती भेट ठेवू
शकतो; मग ती पुन्हा राजपुत्राची होईल. राजपुत्राचे वतन केवळ त्याच्या
मुलांच्याच मालकीचे आहे; ते त्यांचेच आहे. 18 राजपुत्राने लोकांच्या
वतनातून काही घेऊ नये, त्यांची मालमत्ता त्यांच्यापासून हिरावून घेऊ
नये. त्याने त्याच्या मुलांना त्यांचा वाटा स्वतःच्या मालमत्तेतून द्यावा,
म्हणजे माझ्या लोकांतून कोणीही त्यांच्या मालमत्तेपासून वंचित केला
जाणार नाही.'" 19 त्यानंतर त्या मनुष्याने मला बाजूच्या द्वाराच्या
प्रवेशद्वाराने उत्तरेकडे तोंड असलेल्या याजकांच्या पवित्र खोल्यांकडे
आणले आणि पश्चिमेच्या शेवटाकडे असलेली एक जागा दाखविली. 20
तो मला म्हणाला, "हे ते ठिकाण आहे जिथे याजकांनी दोषार्पण व
पापार्पण शिजवावे आणि धान्यार्पण भाजावे, यामुळे बाहेरील अंगणात
आणणे व लोकांना शुद्ध करण्याचे टाळता येईल." 21 नंतर त्याने मला
बाहेरच्या अंगणात आणले आणि त्याच्या चारही कोपऱ्यातून फिरविले
आणि प्रत्येक कोपऱ्यात आणखी एक अंगण मी पाहिले. 22 बाहेरील
अंगणाच्या चार कोपऱ्यात चाळीस हात लांब आणि तीस हात रुंद अंगणे
मला दिसली; चार कोपऱ्यातील प्रत्येक अंगण एकाच मापाचे होते. 23
प्रत्येक अंगणाच्या आतील बाजूच्या कडेला दगडाची रांग होती, त्या
काठांच्या खाली विस्तवासाठी चुली बांधलेल्या होत्या. 24 तो मला
म्हणाला, "या स्वयंपाकाच्या खोल्या आहेत जिथे मंदिरात सेवा करीत
असलेल्या याजकांनी लोकांसाठी करीत असलेली अर्पणे शिजवावी."

**47** त्या मनुष्याने मला परत मंदिराच्या प्रवेशद्वाराकडे आणले आणि
मी मंदिराच्या उंबरठ्याखालून पूर्वेकडे पाणी बाहेर येत असताना
पाहिले (कारण मंदिराचे तोंड पूर्वेकडे होते). मंदिराच्या दक्षिणेकडून,
वेदीच्या दक्षिणेकडून पाणी खाली येत होते. 2 मग त्याने मला
उत्तरेकडील द्वाराने बाहेर आणले, पूर्वेकडे तोंड असलेल्या बाहेरील
द्वाराच्या सभोवार फिरविले, आणि पाण्याचे थेंब दक्षिणेच्या बाजूने पडत
होते. 3 तो मनुष्य आपल्या हातात मापनदोरी घेऊन पूर्वेच्या दिशेने
गेला, त्याने एक हजार हात मापले आणि घोट्यापर्यंत खोल पाण्यातून
मला नेले. 4 त्याने आणखी हजार हात मापले आणि गुडघ्यापर्यंत
खोल पाण्यातून मला नेले. त्याने आणखी हजार हात मापले आणि
कंबरेपर्यंत खोल पाण्यातून मला नेले. 5 त्याने आणखी हजार हात
मापले, परंतु आता ती अशी नदी होती जी मी पार करू शकलो नाही,
कारण पोहून जाता येईल इतके ते पाणी वाढले होते; अशी नदी जी
कोणीही पार करू शकत नव्हते. 6 त्याने मला विचारले, "मानवपुत्रा,
तू हे पाहतोस काय?" मग त्याने मला परत नदीच्या किनारी नेले. 7
जेव्हा मी तिथे गेलो, तेव्हा नदीच्या दोन्ही बाजूंना मी पुष्कळ झाडे
पाहिली. 8 तो मला म्हणाला, "हे पाणी पूर्वेच्या प्रदेशाकडे वाहत जाऊन
खाली अराबाहमध्ये जाते, तिथे ते मृत समुद्रात जाऊन मिळते. जेव्हा ते
समुद्रात जाते, तेव्हा खारट पाणी गोड होते. 9 जिथे पाणी वाहील, तिथे
जिवंत प्राण्यांचे थवे राहतील. तिथे पुष्कळ मासे असतील, कारण ते
पाणी तिथे वाहत जाऊन खारट पाणी गोड करते; म्हणून जिथे नदी
वाहते तिथे सर्वकाही जिवंत राहेल. 10 तिच्या किनारी मासेमारी करणारे
उभे राहतील; एन-गेदीपासून एन-एग्लाइमपर्यंत जाळे पसरविण्यासाठी
जागा असेल. भूमध्य समुद्रातील माशांप्रमाणे तिथे पुष्कळ प्रकारचे
मासे असतील. 11 परंतु पानथळ आणि दलदल शुद्ध होणार नाही; ते
खारटच राहतील. 12 नदीच्या दोन्ही बाजूंना सर्वप्रकारच्या फळांची
झाडे वाढतील. त्यांची पाने वाळणार नाहीत, ना त्यांची फळे संपतील.
प्रत्येक महिन्यात ते फळे देतील, कारण त्यांच्याकडे पवित्रस्थानातून
पाणी वाहते. त्यांची फळे खाण्यासाठी व त्यांची पाने आरोग्यासाठी
वापरली जातील." 13 सार्वभौम याहवेह असे म्हणतात, "देशाच्या या
सीमा आहेत, जेव्हा इस्राएलच्या बारा गोत्रांना त्यांचे वतन म्हणून या
देशाची तू विभागणी करशील, त्यात दोन भाग योसेफाचे असतील.
14 त्यांच्यात तो देश तू समानतेने वाटावा. कारण मी हात उंच करून
शपथ घेतली होती की, मी हा देश तुमच्या पूर्वजांना देईन, हा देश
तुमचे वतन होईल. 15 "देशाची सीमा ही असावी: "उत्तरेस ती भूमध्य
समुद्राकडून हेथलोन मार्गापलिकडे लबो-हमाथ पासून जेदादपर्यंत
असेल, 16 बेरोथाह व सिबराईमपासून (जी दिमिष्क व हमाथाच्या
मध्ये आहे), हाजेर-हत्तीकोनपर्यंत, जे हवरानच्या सीमेवर आहे. 17 ही
सीमा समुद्रापासून हाजार-एनानपर्यंत वाढेल, जी दिमिष्कच्या उत्तरेच्या
सीमेपर्यंत असेल व उत्तरेस हमाथची सीमा आहे. ही उत्तरेची सीमा

आहे. 18 पूर्वेकडील सीमा हवरान व दिमिष्कमधून जात, यार्देन नदीच्या
बाजूने गिलआद व इस्राएल देशातून, मृत समुद्रापर्यंत जाईल आणि
पुढे तामारपर्यंत. ही पूर्वेकडील सीमा. 19 दक्षिणेच्या बाजूने वतनसीमा
तामारपासून मरीबाह-कादेशच्या पाण्यापर्यंत असेल व इजिप्तच्या
खाडीपासून भूमध्य समुद्रापर्यंत. ही दक्षिणेकडील सीमा. 20 पश्चिमेच्या
बाजूने भूमध्य समुद्रापासून लेबो हमाथाच्या समोरच्या भागापर्यंत. ही
पश्चिमेकडील सीमा. 21 “इस्राएलच्या गोत्रानुसार हा देश तुम्ही आपसात
वाटून घ्या. 22 तुम्ही तो तुमच्यासाठी व तुमच्यात राहणाऱ्या विदेशी
लोकांमध्ये व ज्यांना लेकरे आहेत, त्यांच्यासाठी वतन म्हणून वाटायचे
आहे. तुम्ही त्यांना देशात जन्मलेल्या इस्राएली लोकांप्रमाणेच समजले
पाहिजे; तुमच्याबरोबर त्यांनाही इस्राएलच्या गोत्रांमध्ये वतन वाटून
द्यावे. 23 कोणत्याही गोत्रांमध्ये विदेशी राहत असेल, तिथे तू त्यांना
त्यांचे वतन द्यावे,” असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात.

**48** “यादीत दिलेल्या गोत्रांची नावे ही: “उत्तरेकडील सीमेपासून
दानला एक भाग असेल; तो हेथलोन मार्गापासून लेबो हमाथ,
हाजार-एनानपर्यंत आणि हमाथ आणि हमाथनंतरची दिमिष्काची
उत्तरेकडील सीमा पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत. 2 दानच्या सीमेला लागून
पूर्वेपासून पश्चिमेपर्यंतचा आशेरचा एक भाग असेल. 3 आशेरच्या
सीमेला लागून पूर्वेपासून पश्चिमेपर्यंतचा नफतालीचा एक भाग असेल. 4
नफतालीच्या सीमेला लागून पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत मनश्शेहचा एक भाग
असेल. 5 मनश्शेहच्या सीमेला लागून पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत एफ्राईमचा
एक भाग असेल. 6 एफ्राईमच्या सीमेला लागून पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत
रऊबेनचा एक भाग असेल. 7 रऊबेनच्या सीमेला लागून पूर्वेपासून
पश्चिमेपर्यंत यहूदाहचा एक भाग असेल. 8 “यहूदीयाच्या सीमेला लागून
पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत भाग तू विशेष भेट म्हणून द्यावा. तो पंचवीस
हजार हात रुंद, आणि त्याची लांबी पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत इतर गोत्रांना
दिलेल्या भागासमान असावी; त्याच्या मधोमध पवित्रस्थान असेल. 9
“जो विशेष भाग तू याहवेहस अर्पण करावयाचा आहे, तो पंचवीस हजार
हात लांब आणि दहा हजार हात रुंद असावा. 10 याजकांसाठी हा पवित्र
भाग असणार. उत्तरेस त्याची लांबी पंचवीस हजार हात, पश्चिमेकडून
रुंदी दहा हजार हात, पूर्वेकडून रुंदी दहा हजार हात आणि दक्षिणेकडून
लांबी पंचवीस हजार हात. त्याच्या मधोमध याहवेहचे पवित्रस्थान
असावे. 11 सादोकाच्या संतानातील पवित्र केलेले याजक, जे माझी
सेवा करण्यात विश्वासू होते आणि जेव्हा इस्राएली लोक बहकून गेले,
तेव्हा जसे लेवी लोक बहकले, तसे ते बहकले नाही. 12 देशाच्या पवित्र
भागातून त्यांच्यासाठी ही एक विशेष भेट असेल, तो लेवी लोकांच्या
सीमेला लागून आहे. 13 “याजकांच्या सीमेस लागून लेवी लोकांसाठी
पंचवीस हजार हात लांबीचा व दहा हजार हात रुंदीचा प्रदेश द्यावा. त्याची
एकूण लांबी पंचवीस हजार हात आणि रुंदी दहा हजार हात असावी. 14
त्यातील काहीही त्यांनी विकू नये किंवा बदलू नये. ही सर्वोत्तम भूमी आहे
ती दुसऱ्या कोणाच्या हाती जाऊ देऊ नये, कारण ती याहवेहसाठी पवित्र
आहे. 15 “उरलेला विभाग, जो पाच हजार हात रुंदीचा आणि पंचवीस
हजार हात लांबीचा आहे, तो शहराच्या सर्वसाधारण उपयोगासाठी
म्हणजेच घरे आणि कुरणे यासाठी असेल. त्याच्या मधोमध शहर
वसणार 16 आणि त्याचे माप असे असावे: उत्तरेची बाजू चार हजार
पाचशे हात, दक्षिणेची बाजू चार हजार पाचशे हात आणि पश्चिमेची
बाजू चार हजार पाचशे हात. 17 शहराचे कुरण उत्तरेकडे दोनशे पन्नास
हात दक्षिणेकडे दोनशे पन्नास हात पूर्वेकडे दोनशे पन्नास हात व
पश्चिमेकडे दोनशे पन्नास हात असावे. 18 पवित्र भागाच्या सीमेला
लागून जो उरलेला भाग जो त्याच्याच लांबीचा आहे, तो पूर्वेकडून
दहा हजार हात आणि पश्चिमेकडून दहा हजार हात आहे. त्या भूमीचे
उत्पन्न शहरातील काम करणाऱ्यांसाठी अन्न होईल. 19 शहरातील
शेतीकाम करणारे कामकरी इस्राएलच्या सर्व गोत्रातील असतील. 20
तो संपूर्ण भाग चौरस असून प्रत्येक बाजूने पंचवीस हजार हात असेल.
एक विशेष भेट म्हणून हा पवित्र भाग शहराच्या मालमत्तेपासून वेगळा
ठेवावा. 21 “पवित्र भागाच्या दोन्ही बाजूला जो उरलेला भाग आहे
तो आणि शहराची मालमत्ता राजपुत्राच्या हक्काची असेल. पवित्र
भागाच्या पंचवीस हजार हाताच्या पूर्वेपासून पूर्वेच्या सीमेपर्यंत आणि
पंचवीस हजार हाताच्या पश्चिमेपासून पश्चिमेच्या सीमेपर्यंत वाढेल. हे
दोन्ही भाग जे इस्राएलच्या गोत्रांच्या भागाच्या लांबीइतकेच आहे, ते
राजपुत्राच्या हक्काचे होतील आणि मंदिराच्या पवित्रस्थानासहित पवित्र
भाग या सर्वांच्या मधोमध असावे. 22 याप्रकारे लेवी लोकांची मालमत्ता
आणि शहराची मालमत्ता राजपुत्राच्या विभागाच्या मधोमध असेल.
राजपुत्राचा भाग यहूदाहची सीमा व बिन्यामीनची सीमा यामध्ये असणार.
23 “बाकीच्या गोत्रांसाठी: “पूर्वेच्या बाजूपासून पश्चिमेकडे जाणारा
एक भाग बिन्यामीनचा. 24 बिन्यामीनच्या सीमेला लागून पूर्वेपासून
पश्चिमेपर्यंत एक भाग शिमओनचा. 25 शिमओनच्या सीमेला लागून
पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत एक भाग इस्साखारचा. 26 इस्साखारच्या सीमेला
लागून पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत एक भाग जबुलूनचा. 27 जबुलूनच्या
सीमेला लागून पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत एक भाग गादचा असणार. 28
गादची दक्षिणेकडील वतनाची सीमा तामारपासून मरीबाह-कादेशच्या
पाण्यापर्यंत व इजिप्तच्या खाडीपासून भूमध्य समुद्रापर्यंत जाईल.
29 “हा देश तू इस्राएलच्या गोत्रांना त्यांचे वतन म्हणून द्यावे, आणि
हे त्यांचे भाग असतील,” असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात. 30
“शहरातून बाहेर जाण्याचे मार्ग हे असतील: “उत्तरेकडील सुरुवात जी
चार हजार पाचशे हात लांब आहे, 31 शहराची द्वारे इस्राएल गोत्रांच्या
नावानुसार असतील. उत्तरेकडील तीन द्वारे असतील: रऊबेनचे द्वार,
यहूदाहचे द्वार आणि लेवीचे द्वार असणार. 32 पूर्वेची बाजू जी चार
हजार पाचशे हात लांब आहे, तिथे तीन द्वारे असतील: योसेफाचे द्वार,
बिन्यामीनचे द्वार आणि दानचे द्वार. 33 दक्षिणेची बाजू जिचे माप चार
हजार पाचशे हात आहे, तिथे तीन द्वारे असतील: शिमओनचे द्वार,
इस्साखारचे द्वार आणि जबुलूनचे द्वार. 34 पश्चिमेची बाजू जिची लांबी
चार हजार पाचशे हात आहे, तिथे तीन द्वारे असतील: गादचे द्वार,
आशेरचे द्वार आणि नफतालीचे द्वार. 35 “चोहीकडील अंतर अठरा हजार

हात असणार. “आणि त्या काळापासून शहराचे नाव, ‘याहवेह-शाम्माह’
असे असणार.”

# दानीएल

**1** यहूदीयाचा राजा यहोयाकीमच्या कारकिर्दीच्या तिसऱ्या वर्षी
बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरने यरुशलेमला वेढा दिला. 2 आणि
प्रभूने यहूदीयाच्या राजा यहोयाकीमला परमेश्वराच्या मंदिरातील काही
पात्रांसोबत त्याच्या हाती दिले. ती शिनार प्रांतातील त्याच्या दैवताच्या
मंदिरासाठी नेली आणि त्याच्या दैवताच्या खजिन्यात नेऊन ठेवली.
3 मग राजाने आपल्या दरबारातील प्रमुख अधिकारी अश्पनजास
राजघराण्यातील काही इस्राएली आणि कुलीन लोकांना राजाच्या सेवेत
आणण्याचा आदेश दिला— 4 शारीरिक दोष नसलेले तरुण पुरुष,
देखणे, सर्वप्रकारच्या विद्येत निष्णात, ज्ञानसंपन्न, समजण्यास त्वरित
आणि राजाच्या महालात सेवा करण्यास पात्र. त्याने त्यांना खाल्डियन
भाषा व विद्या शिकवावी. 5 राजाने स्वतःच्या भोजनातून रोजचे भोजन
आणि द्राक्षारसातून देण्याचा आदेश दिला. त्यांना तीन वर्षे प्रशिक्षित
करावे आणि त्यानंतर त्यांना राजाच्या सेवेत आणावे. 6 जे निवडलेले
होते, त्यामध्ये काही यहूदाह वंशातील होते: दानीएल, हनन्याह, मिशाएल
व अजऱ्याह. 7 अश्पनज अधिकाऱ्याने त्यांना नवीन नावे दिली: त्याने
दानीएलला बेलटशास्सर; हनन्याहला शद्रख; मिशाएलला मेशख; आणि
अजऱ्याहला अबेदनगो. 8 पण दानीएलने राजाचे अन्न व द्राक्षारस
घेऊन स्वतःला भ्रष्ट न करण्याचा निर्धार केला आणि त्याने मुख्य
अधिकाऱ्याला अशा प्रकारे स्वतःला भ्रष्ट न करण्याची विनंती केली. 9
आता परमेश्वराने दानीएलविषयी अधिकाऱ्याची कृपा आणि दया प्राप्त
होईल असे केले, 10 परंतु अधिकारी दानीएलास म्हणाला, “मला माझे
स्वामीराजाचे भय आहे, ज्यांनी मला तुमच्या खाण्या आणि पिण्याची
देखरेख करण्यास नेमले आहे. तुमच्याबरोबरीच्या तरुणापेक्षा तुम्ही
अशक्त का दिसावे? राजा तुमच्यामुळे माझे डोके उडवेल.” 11 दानीएल,
हनन्याह, मिशाएल व अजऱ्याह यांच्या देखरेखीसाठी अधिकाऱ्याने
जो कारभारी नेमला होता, त्याला दानीएल म्हणाला, 12 “कृपा करून
आपल्या सेवकांना दहा दिवस पारखून पाहावे: आम्हाला काहीही देऊ
नको, आम्हाला खाण्यास फक्त डाळ आणि पिण्यास पाणी द्या. 13 मग
आम्ही कसे दिसतो याची तुलना राजाच्या मेजवानीत भोजन करणाऱ्या
तरुणांशी करा आणि या तुमच्या सेवकांना तुमच्या दृष्टीस जे दिसेल
त्याप्रमाणे वागवा.” 14 तो हे करण्यास सहमत झाला आणि त्याने
त्यांना दहा दिवस पारखून पाहिले. 15 दहा दिवसानंतर राजाचे भोजन
खाणाऱ्या तरुणापेक्षा ते स्वस्थ आणि धष्टपुष्ट दिसू लागले. 16 म्हणून
कारभाऱ्याने त्यांच्यासाठी नेमलेले भोजन आणि जे द्राक्षारस पीत होते ते
काढून घेतले आणि त्याऐवजी डाळी देऊ लागला. 17 परमेश्वराने या चार
तरुणांना सर्वप्रकारच्या साहित्याचे ज्ञान आणि समज दिली. दानीएलला
सर्व प्रकारची स्वप्ने व दृष्टान्त समजत असत. 18 राजाने नेमून दिलेल्या
वेळेनंतर प्रमुख अधिकाऱ्याने त्यांना बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरपुढे
त्याच्या सेवेसाठी प्रस्तुत केले. 19 राजा त्यांच्यासोबत बोलला आणि
त्या सर्वांमध्ये दानीएल, हनन्याह, मिशाएल व अजऱ्याह यांच्यासारखे
कोणीही सापडले नाही; म्हणून त्यांना राजाच्या सेवेसाठी निवडण्यात
आले. 20 बुद्धीच्या आणि शहाणपणाच्या प्रत्येक बाबतीत ज्याबद्दल
जेव्हा राजाने त्यांना विचारले, त्याला ते त्याच्या संपूर्ण राज्यातील सर्व
जादूगार आणि ज्योतिषीच्या सल्ल्यापेक्षा दसपटीने चांगले आहेत,
असे आढळून आले. 21 आणि कोरेश राजाच्या कारकिर्दीच्या पहिल्या
वर्षापर्यंत दानीएल राजाचा सल्लागार या पदावर होता.

**2** आपल्या कारकिर्दीच्या दुसऱ्या वर्षी बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरला
स्वप्न पडले; त्याचे मन व्याकूळ झाले आणि त्याला झोप येत
नव्हती. 2 म्हणून राजाने आदेश दिला की जादूगार, मांत्रिक, तांत्रिक
आणि ज्योतिषी यांना बोलवावे आणि त्याला जे स्वप्न पडले ते सांगावे,
जेव्हा ते आत आले आणि राजासमोर उभे राहिले, 3 तो राजा त्यांना
म्हणाला, “मला एक स्वप्न पडले आहे, ज्यामुळे मी व्याकूळ झालो
आणि त्याचा अर्थ मला जाणून घ्यायचा आहे.” 4 त्या ज्योतिषांनी
राजाला उत्तर दिले, “महाराज, चिरायू असा! आपले स्वप्न काय होते ते
आपल्या सेवकांना सांगावे, म्हणजे आम्ही त्याचा अर्थ सांगू.” 5 त्यावर
राजाने ज्योतिषांना उत्तर दिले, “मी हा दृढ निश्चय केले आहे: जर मला ते
स्वप्न कोणते आणि त्याचा अर्थ काय हे तुम्ही सांगितले नाहीतर मी
तुमचे तुकडे करेन आणि तुमच्या घरादारांचे उकिरडे केले जातील. 6 पण
माझे स्वप्न काय होते, त्याचा अर्थ काय आहे, हे तुम्ही मला सांगितले,
तर तुम्ही माझ्याकडून भेट व इनामे आणि मोठा सन्मान प्राप्त कराल.
म्हणून मला माझे स्वप्न सांगा आणि त्या स्वप्नांचा अर्थ सांगा.” 7
त्यांनी पुन्हा उत्तर दिले, “महाराजांनी, स्वप्न आपल्या सेवकांना सांगावे
आणि आम्ही त्याचा अर्थ सांगू.” 8 तेव्हा राजाने उत्तर दिले, मला आता
खात्री झाली आहे की तुम्ही वेळ काढण्याचा प्रयत्न करीत आहात,
कारण मी हा दृढ निश्चय केला आहे, हे तुम्हाला कळले आहे: 9 जर
तुम्ही मला माझे स्वप्न सांगणार नाही, तर तुम्हासाठी फक्त एकच
शिक्षा आहे. परिस्थिती बदलेल या आशेने तुम्ही मला भ्रामक आणि
दुष्ट गोष्टी सांगण्याचा कट रचला आहे. म्हणून तुम्ही मला स्वप्न सांगा
आणि मला कळेल की तुम्ही मला त्याचा परिणाम सांगू शकता. 10
ज्योतिषी लोकांनी राजाला उत्तर दिले, “पृथ्वीवर असा कोणताही व्यक्ती
नाही, जे राजाने सांगितले आहे ते करू शकेल! कोणत्याही राजाने
मग तो कितीही महान आणि पराक्रमी असला तरी जादूगार किंवा
तांत्रिक किंवा ज्योतिषी यांना असे विचारले नाही. 11 महाराजाने जे
विचारत आहेत ते अशक्य आहे. ज्या दैवतांचे राहणे मनुष्यात नाही,
त्यांच्या खेरीज हे महाराजांना कोणीही प्रकट करू शकणार नाही.”
12 हे ऐकून राजाला क्रोध आला आणि तो संतप्त झाला आणि त्याने
फर्मान काढले की बाबेलमधील सर्व ज्ञानी लोकांचा शिरच्छेद करा. 13
ज्ञानी लोकांना मारण्याचे फर्मान काढण्यात आले आणि दानीएल व
त्याच्या मित्रांचा वध करण्यासाठी लोकांना पाठविण्यात आले. 14 जेव्हा
अर्योक हा राजाच्या संरक्षकांचा प्रमुख बाबेलमधील ज्ञानी पुरुषांचा वध
करण्यासाठी गेला तेव्हा दानीएल शहाणपणाने व सुज्ञपणे त्याच्याशी
बोलला. 15 त्याने राजाच्या अधिकाऱ्याला विचारले, “राजाने असा

कठोर निर्णय का घेतला?” अर्योकने मग दानीएलला सर्व हकिकत
सांगितली. 16 ते ऐकून दानीएलने राजाची भेट घेतली व त्याला म्हणाला
मला थोडा वेळ देण्याची मागणी केली, म्हणजे तो स्वप्न व त्याचा
अर्थ सांगू शकेल. 17 मग दानीएल आपल्या घरी परत आला व सर्व
घटना त्याने आपल्या सोबत्यांना हनन्याह, मिशाएल व अजऱ्याह यांना
सांगितली. 18 दानीएलाने त्यांना या रहस्याबद्दल स्वर्गाच्या परमेश्वराची
दया मागण्याची विनंती केली, जेणेकरून बाबेलमधील इतर ज्ञानी
माणसांसह त्याचा आणि त्याच्या मित्रांचा नाश होऊ नये. 19 त्या रात्री
याहवेहने दानीएलला दृष्टान्तात ते रहस्य प्रकट केले. तेव्हा दानीएलने
स्वर्गाच्या परमेश्वराला धन्यवाद दिला. 20 आणि दानीएल म्हणाला:
“परमेश्वराचे नाव सदासर्वकाळ धन्यवादित असो; कारण ज्ञान आणि
सामर्थ्य हे त्यांचेच आहे. 21 ते समय व ऋतू बदलतात; ते राजांना
पदच्युत करतात व इतरांना उंच करतात. शहाण्यांना तेच शहाणपण
देतात, सुज्ञांना बुध्दीही देतात. 22 गहन आणि गूढ रहस्य तेच प्रकट
करतात; अंधारात काय आहे हे ते जाणतात आणि प्रकाश त्यांच्यामध्ये
राहतो. 23 हे आमच्या पूर्वजांच्या परमेश्वरा, मी तुम्हाला धन्यवाद देतो
व तुमची स्तुती करतो: तुम्हीच मला ज्ञान आणि सामर्थ्य दिले, मी
तुम्हाला जे काही मागितले, ते मला ज्ञात करून दिले, तुम्ही आम्हाला
राजाचे स्वप्न ज्ञात करून दिले.” 24 बाबेलमधील ज्ञानी लोकांचा वध
करण्याचे काम अर्योकवर सोपविले होते. दानीएल त्याला जाऊन भेटला
व म्हणाला, “बाबेलमधील ज्ञानी लोकांचा वध करू नका. मला राजाकडे
घेऊन चला आणि मी राजाच्या स्वप्नाचा अर्थ सांगेन.” 25 अर्योकने
लगबगीने दानीएलला राजाकडे घेऊन गेला आणि म्हणाला, “यहूदी
कैद्यांपैकी मला एक पुरुष सापडला आहे जो राजाच्या स्वप्नाचा अर्थ
सांगू शकेल.” 26 राजाने दानीएलला (ज्याला बेलटशास्सर असेही
म्हटले जाते) विचारले, “मी जे स्वप्न पाहिले ते आणि त्याचा अर्थ तू
सांगण्यास सक्षम आहेस काय?” 27 दानीएलने उत्तर दिले, “महाराजांनी
ज्या रहस्याबद्दल विचारले, त्याबद्दल कोणीही ज्ञानी मनुष्य, ज्योतिषी,
जादूगार किंवा दैवप्रश्न करणारे राजाला या गोष्टी सांगू शकणार नाही, 28
परंतु स्वर्गामधील परमेश्वर गूढ रहस्ये प्रकट करतात. येणाऱ्या दिवसात
काय घडणार ते त्यांनीच नबुखद्नेस्सर राजाला दाखविले आहे. तुम्ही
आपल्या बिछान्यावर पडले असता तुमचे स्वप्न आणि दृष्टान्त जे तुमच्या
मनातून पार झाले ते हे आहेत: 29 “महाराज जेव्हा तुम्ही आपल्या
बिछान्यावर पडले असता, तुमचे मन होणाऱ्या भावी घटनेकडे लागले
आणि रहस्ये प्रकट करणाऱ्यांनी तुम्हाला भविष्यात काय होणार आहे हे
दाखविले आहे. 30 माझ्यासाठी, हे रहस्य मला उघड केले गेले कारण
माझ्याकडे इतर जिवंत माणसापेक्षा जास्त बुद्धी आहे म्हणून नाही, परंतु
महाराजांना रहस्याचा अर्थ कळावा आणि तुमच्या मनात काय चालले
आहे ते समजावे. 31 “महाराज, तुम्ही पाहिले की तुमच्यापुढे एक प्रचंड
पुतळा उभा आहे—एक प्रचंड, चकाकदार पुतळा, दिसण्यात अद्भुत.
32 त्या पुतळ्याचे डोके शुद्ध सोन्याचे होते, त्याची छाती व दंड चांदीचे
होते, त्याचे पोट व मांड्या कास्याच्या होत्या, 33 त्याचे पाय लोखंडाचे
होते आणि पावले लोखंडाची व त्यात काही अंश मातीचा होता. 34
तुम्ही पहात असताना, एका खडकाने कोणताही मानवी स्पर्श न होता
स्वतःला छेदले आणि त्या मूर्तीच्या लोखंडी आणि मातीच्या पायावर
अशा प्रकारे आदळले की त्याचा चुराडा झाला. 35 मग लोखंड, माती,
कास्य, चांदी आणि सोने यांचे तुकडे तुकडे झाले आणि ते उन्हाळ्यात
खळ्यातील भुशाप्रमाणे झाले. वाऱ्याने त्यांना अशा प्रकारे उडवून दिले
की त्यांचा एक छोटासा तुकडाही शिल्लक राहिला नाही. पण ज्या
दगडाने पुतळा उलथून टाकला, त्या दगडाचा एक प्रचंड डोंगर झाला व
त्याने सर्व पृथ्वी झाकून टाकली. 36 “हे आपले स्वप्न आणि आता
त्याचा अर्थ महाराजासाठी सांगतो. 37 महाराज, आपण राजाधिराज
आहात. स्वर्गाच्या परमेश्वरानेच आपणाला हे राज्य, सत्ता, सामर्थ्य
आणि वैभव दिले आहे; 38 आपल्या हाताखाली त्यांनी सर्व मनुष्यप्राणी,
भूमीवरील प्राणी आणि आकाशातील पक्षी निर्माण केले आहेत. ते
जिथे कुठेही राहतात, त्यांनी तुम्हाला त्यांचा अधिपती म्हणून नियुक्त
केले आहे. ते सोन्याचे मस्तक म्हणजे आपण स्वतःच आहात. 39
“तुमच्यानंतर आणखी एक राज्य उदयास येईल जे तुमच्या राज्यापेक्षा
कमी दर्जाचे असेल. त्यानंतर, तिसरे राज्य उदयास येईल, एक कास्याची
प्रतिमा, जी संपूर्ण पृथ्वीवर राज्य करेल. 40 शेवटी, एक चौथे राज्य
असेल जे लोखंडासारखे मजबूत असेल—कारण लोखंड सर्व गोष्टींचे
तुकडे करतो आणि चुराडा करतो—आणि लोखंड ज्याप्रमाणे गोष्टींचे
तुकडे करेल, त्याचप्रमाणे हे राज्य त्याचे तुकडे करून चुराडा करेल.
41 जसे तुम्ही पाहिले की पाय आणि बोटे काही प्रमाणात भाजलेल्या
मातीची होती आणि काही प्रमाणात लोखंडाची होती, म्हणून ते एक
विभाजित राज्य असेल; तरीही त्यात काही लोखंडी ताकद असेल, जसे
तुम्ही लोखंड मातीत मिसळलेले पाहिले. 42 काही लोखंड व काही
माती यांनी बनलेली पावले आणि बोटे आपल्याला दिसली म्हणजेच हे
साम्राज्य काही मजबूत व काही दुबळी असतील. 43 आणि जसे तुम्ही
लोखंडाला भाजलेल्या मातीत मिसळलेले पाहिले, तसे लोक मिसळले
जातील, पण एकरूप होणार नाहीत, कारण लोखंड मातीत मिसळत
नाही. 44 “त्या राजांच्या काळात, स्वर्गातील परमेश्वर एक राज्य स्थापन
करतील, ज्याचा नाश होणार नाही किंवा इतर कोणीही त्याच्यावर
राज्य करू शकणार नाही. हे त्या सर्व राज्यांना चिरडून टाकेल आणि
त्यांचा नाश करेल, परंतु ते स्वतःच कायम टिकून राहील. 45 हा त्या
खडकाच्या दृष्टान्ताचा अर्थ आहे, जो मनुष्याच्या हातून नव्हता, परंतु
स्वतः एका पर्वतापासून तो खडका वेगळा झाला होता—ज्याने लोखंड,
कास्य, माती, चांदी आणि सोने यांचा सर्वांचा चुराडा केला होता. “महान
परमेश्वराने महाराजांना भविष्यात काय घडणार आहे हे दाखवून दिले.
हे स्वप्न खरे आहे आणि त्याचा अर्थ विश्वास ठेवण्यालायक आहे.”
46 मग नबुखद्नेस्सर राजाने दानीएलसमोर साष्टांग दंडवत घालत तो
पालथा पडला आणि आज्ञा केली की त्याला अर्पणे व सुगंधी द्रव्ये सादर
करावी. 47 राजा दानीएलला म्हणाला, “निश्चितच तुझा परमेश्वर देवांचा
देव आणि राजांचा प्रभू आणि रहस्ये उघड करणारा आहे, कारण तू

या रहस्याचा अर्थ समजावून सांगण्यास योग्य ठरला आहे.” 48 मग
राजाने दानीएलला उच्चपदास चढविले, त्याला अनेक मौल्यवान देणग्या
दिल्या. त्याने संपूर्ण बाबेलप्रांतावर त्याला प्रमुख अधिपती नेमले आणि
सर्व ज्ञानी लोकांवर प्रमुख अधिकारी म्हणून त्याची नेमणूक केली. 49
मग दानीएलच्या विनंतीवरून राजाने शद्रख, मेशख व अबेदनगो यांना
बाबेल प्रांताचा प्रशासक सहायक म्हणून नेमले, परंतु की दानीएल
राजाच्या दरबारातच राहिला.

3 नबुखद्नेस्सर राजाने एक सुवर्ण पुतळा घडविला. त्याची उंची
साठ हात आणि रुंदी सहा हात होती, आणि बाबेल प्रांतातील दूरा
नावाच्या मैदानात हा पुतळा स्थापित केला. 2 मग नबुखद्नेस्सरने
आपल्या साम्राज्यातील राजपुत्र, सर्व राज्यपाल, सेनानायक, न्यायाधीश,
कोषाधिकारी, मंत्री, सर्व प्रांताचे अधिकारी या सर्वांना त्याने स्थापिलेल्या
पुतळयाच्या प्रतिष्ठापनेसाठी बोलाविले. 3 राजपुत्र, राज्यपाल,
सेनानायक, न्यायाधीश, कोषाधिकारी, मंत्री, सर्व प्रांताचे अधिकारी
नबुखद्नेस्सर राजाने स्थापिलेल्या पुतळयाच्या प्रतिष्ठापनेसाठी एकत्र
झाले आणि त्या पुतळयाच्या पुढे उभे राहिले. 4 तेव्हा ललकारी
देणाऱ्याने मोठ्याने घोषणा केली, “अहो सर्व राष्ट्रातील आणि विविध
भाषा बोलणारे लोकहो, तुम्हाला ही आज्ञा देण्यात येते: 5 शिंग, बासरी,
सतार, सारंगी, वीणा, पावा आणि सर्वप्रकारच्या वाद्यांचा गजर ऐकताच,
तुम्हाला नबुखद्नेस्सर महाराजांनी उभारलेल्या या सुवर्ण पुतळयाला
दंडवत घालून उपासना करावी लागेल. 6 जो कोणी दंडवत घालून
उपासना करणार नाही, त्याला ताबडतोब अग्नीच्या धगधगत्या भट्टीत
टाकण्यात येईल.” 7 म्हणून जेव्हा त्यांनी कर्णे, बासरी, सतार, तंतुवाद्य,
वीणा आणि सर्वप्रकारचे संगीत ऐकले, तेव्हा सर्व वंश आणि भाषांचे
लोक पालथे पडले आणि त्यांनी राजा नबुखद्नेस्सरने प्रतिष्ठापन केलेल्या
सोन्याच्या मूर्तीची आराधना केली. 8 यावेळी काही ज्योतिषी राजाकडे
गेले व यहूदींवर आरोप लावला. 9 ते नबुखद्नेस्सर राजाला म्हणाले,
“महाराज, चिरायू असा! 10 महाराज तुम्ही आदेश दिला आहे की शिंग,
बासरी, सतार, सारंगी, वीणा, पावा आणि सर्वप्रकारच्या वाद्यांचा गजर
ऐकताच सर्वांनी सुवर्ण पुतळयाला दंडवत घालून उपासना करावी, 11
आणि जो कोणी असे करणार नाही त्याला अग्नीच्या धगधगत्या भट्टीत
टाकण्यात यावे. 12 परंतु काही यहूदी आहेत ज्यांना तुम्ही बाबेलच्या
कारभारावर नेमलेले आहे—शद्रख, मेशख, व अबेदनगो—जे तुमच्या
आज्ञेकडे लक्ष्य देत नाही. महाराज, यांनी आपली आज्ञा मानली नाही. ते
तुमच्या दैवतांची सेवा करीत नाही किंवा आपण उभारलेल्या सुवर्ण
पुतळयाला नमनही करीत नाही.” 13 नबुखद्नेस्सर क्रोधाने संतप्त
झाला व शद्रख, मेशख व अबेदनगो यांना हजर करावे असा त्याने हुकूम
दिला. तेव्हा या लोकांना राजासमोर आणण्यात आले, 14 नबुखद्नेस्सर
त्यांना म्हणाला, “शद्रख, मेशख आणि अबेदनगो, तुम्ही माझ्या दैवतांची
सेवा व मी स्थापन केलेल्या सुवर्ण पुतळयाची उपासना करीत नाही,
हे खरे आहे काय? 15 मग आता जेव्हा तुम्ही शिंग, बासरी, सतार,
सारंगी, वीणा, पावा आणि सर्वप्रकारच्या वाद्यांचा गजर ऐकताच मी
तयार केलेल्या पुतळयाला तुम्ही नमन केले आणि उपासना केली
तर उत्तम. परंतु जर तुम्ही उपासना नाही केली तर त्याच घटकेस
तुम्हाला अग्नीच्या धगधगत्या भट्टीत टाकण्यात येईल. मग माझ्या
हातून कोणता देव तुम्हाला सोडवितो ते पाहूया?” 16 शद्रख, मेशख व
अबेदनगो यांनी त्याला उत्तर दिले, “नबुखद्नेस्सर महाराज, याबद्दल
तुमच्यासमोर आमचा बचाव करण्याची आम्हाला गरज नाही. 17 जर
आम्हाला धगधगत्या भट्टीत टाकले, तर आमचे परमेश्वर ज्यांची आम्ही
सेवा करतो ते आम्हाला तिच्यातून सोडविण्यास समर्थ आहे आणि
महाराज, तेच आम्हाला आपल्या हातून सोडवतील. 18 परंतु असे जरी
झाले नाही, तरीही महाराज तुम्हाला हे कळावे की आम्ही तुझ्या दैवतांची
सेवा करणार नाही किंवा आपण स्थापन केलेल्या या सुवर्ण पुतळयाला
नमनही करणार नाही.” 19 तेव्हा नबुखद्नेस्सर हा शद्रख, मेशख आणि
अबेदनगो यांच्यावर रागाने संतप्त झाला आणि त्याची त्यांच्याबद्दलीची
भावना बदलली. नेहमीपेक्षा भट्टी सातपट तापवावी असा त्याने हुकूम
सोडला, 20 आणि शद्रख, मेशख आणि अबेदनगो यांना बांधून भट्टीत
फेकण्यासाठी त्याने आपल्या सैन्यातील बलदंड वीरांना बोलाविले.
21 तेव्हा त्या पुरुषांना त्यांचे पायमोजे, अंगरखे, झगे वगैरे वस्त्रासह
बांधण्यात आले आणि धगधगत्या भट्टीत फेकण्यात आले. 22 राजाची
आज्ञा कडक होती आणि भट्टी अतिशय तापली होती यामुळे ज्या
सैनिकांनी शद्रख, मेशख आणि अबेदनगो यांना भट्टीत टाकण्यासाठी
उचलले होते, त्यांनाच अग्नीच्या ज्वालांनी ठार केले, 23 आणि हे तीन
पुरुष शद्रख, मेशख व अबेदनगो घट्ट बांधलेले असे धगधगत्या भट्टीत
फेकण्यात आले. 24 नबुखद्नेस्सर राजा चकित होऊन ताडकन उभा
राहिला व आपल्या मंत्र्यांना विचारले, “आपण तीन माणसांना बांधून
भट्टीत टाकले होते ना?” ते म्हणाले, “होय, निश्चित महाराज.” 25
तो म्हणाला, “इकडे पाहा! मी चार पुरुष अग्नीत फिरत असलेले
पाहत आहे आणि त्यांचे बंध सुटलेले आहेत आणि त्यांना कोणतीच
हानी झालेली नाही, आणि त्यातील चौथा तर देवपुत्रासारखा दिसत
आहे.” 26 नबुखद्नेस्सर त्या धगधगत्या भट्टीच्या दाराजवळ गेला आणि
मोठ्याने हाक मारून म्हणाला, “परमोच्च परमेश्वराचे सेवक शद्रख,
मेशख आणि अबेदनगो, बाहेर या! इकडे या!” तेव्हा शद्रख, मेशख
आणि अबेदनगो अग्नीतून बाहेर आले, 27 मग राजपुत्र, राज्यपाल,
सेनानायक, सल्लागार इत्यादी सर्व त्यांच्याभोवती गोळा झाले. त्यांच्या
शरीराला विस्तवाची झळ लागली नाही, अथवा त्यांच्या डोक्याचा एक
केससुद्धा होरपळला नव्हता; त्यांचे कपडे काळवंडले नव्हते आणि
त्याच्या अंगाला धुराचा वासही येत नव्हता, असे सर्वांनी पाहिले. 28
तेव्हा नबुखद्नेस्सर म्हणाला, “शद्रख, मेशख व अबेदनगोचे परमेश्वर
धन्यवादित असो. ज्यांनी राजाची आज्ञा मोडून आपल्या परमेश्वराशिवाय
अन्य दैवतांची सेवा किंवा उपासना करावयाची नाही असे ठरवून
मरण पत्करले, तेव्हा त्याने आपला दिव्यदूत पाठवून आपल्या विश्वासू
सेवकांची सुटका केली. 29 म्हणून मी असे फर्मान काढतो की शद्रख,
मेशख आणि अबेदनगोच्या परमेश्वराविरुद्ध कोणतेही राष्ट्र किंवा भाषा

बोलणारे काहीही बोलतील तर त्यांचे तुकडे तुकडे करावेत आणि त्यांच्या
घरादाराचेही उकिरडे करण्यात यावे. कारण परमेश्वर जसे सोडवितात,
तसे दुसऱ्या कोणत्याही दैवताला करता येणार नाही.” 30 नंतर राजाने
शद्रख, मेशख व अबेदनगो यांना बाबेल प्रांतात बढती दिली.

4 नबुखद्नेस्सर राजाने, जगातील सर्व राष्ट्रातील विविध भाषा
बोलणाऱ्या सर्व लोकांना जाहीरनामा पाठविला तो हा: तुम्हा सर्वांची
भरभराट होवो. 2 परमोच्च परमेश्वराने मला जी चिन्हे व चमत्कार
दाखविले ते तुम्ही सर्वांना सांगण्यात मला आनंद होत आहे. 3 किती
महान त्यांनी प्रकट केलेली चिन्हे, 4 मी नबुखद्नेस्सर आपल्या महालात
शांतीने, संतुष्टीचे आणि समृद्धीचे जीवन जगत होतो. 5 मी एक स्वप्न
पाहिले, जेव्हा मी माझ्या बिछान्यावर निजलेला होतो, ते चित्र आणि
दृष्टान्त जे माझ्या मनात आले, त्यामुळे मी अतिशय भयभीत झालो. 6
माझ्या स्वप्नाचा अर्थ काय ते कळावे या हेतूने मी बाबेलमधील सर्व ज्ञानी
लोकांना आज्ञा दिली. 7 जेव्हा जादूगार, मांत्रिक, ज्योतिषी, दैवप्रश्न
सांगणारे आले, तेव्हा मी त्यांना माझे स्वप्न सांगितले, पण ते मला त्याचा
अर्थ सांगू शकले नाही. 8 अखेरीस दानीएल माझ्या उपस्थितीत आला
आणि मी त्याला माझे स्वप्न सांगितले. (माझ्या देवाच्या नावावरून
मी त्याचे बेलटशास्सर असे नाव ठेवले होते. याच माणसामध्ये पवित्र
देवाचा आत्मा आहे.) 9 मी म्हणालो, “हे बेलटशास्सर, धुरंधर जादुगारा,
पवित्र देवाचा आत्मा तुझ्यामध्ये आहे हे मला ठाऊक आहे आणि
तुझ्यासाठी कोणतेच रहस्य कठीण नाही. माझे हे स्वप्न आहे; मला
त्याचा अर्थ सांग. 10 मी माझ्या बिछान्यावर निजलेला असताना हे
दृष्टान्त पाहिले: पृथ्वीच्या मध्यभागी एक वृक्ष लावलेला मी पाहिले. तो
प्रचंड उंचच उंच होता. 11 तो वृक्ष वाढला आणि मजबूत झाला आणि
त्याचा शेंडा आकाशापर्यंत पोहोचला; पृथ्वीच्या सीमेपासूनही तो दिसू
शकत होता. 12 त्याची पाने हिरवीगार होती, त्याला फळे भरपूर होती
आणि त्यामध्ये प्रत्येकासाठी भोजन होते. त्याच्या खाली जंगली पशू
विसावले होते, आणि त्याच्या फांद्यांमध्ये पक्षी राहत असत; त्यांनी
आपली घरटी बांधली. त्यातून प्रत्येक प्राण्याला खायला मिळत असे.
13 “मी बिछान्यावर निजलेला असताना हे दृष्टान्त पाहिले की, स्वर्गातून
एक पवित्र, एक दूत खाली येत आहे. 14 त्याने मोठ्याने ओरडून
सांगितले ‘हे वृक्ष तोडून टाका, फांद्या कापून टाका; पाने ओरबाडून
काढा आणि फळे विखरून द्या. त्याच्या खालचे पशू निघून जावोत
आणि फांद्यांवरील पक्षी उडून जावोत. 15 परंतु त्याचा बुंधा व मुळे
लोखंड व कास्याने बांधून सभोवतालच्या गवतात जमिनीवरच राहू द्या.
“‘आकाशातील दव पडून त्यास भिजू द्या आणि त्याला भूमीवरील
गवतामध्ये पशूंसोबत राहू द्या. 16 सात वर्षापर्यंत, त्याचे माणसाचे मन
बदलले जावो आणि त्याला पशूचे मन दिले जावो. 17 “‘हा निर्णय
दूतांद्वारे घोषित केला जातो, पवित्र लोक हा निर्णय जाहीर करतात,
जेणेकरून जिवंतांना हे कळावे की जे परात्पर आहेत, ते पृथ्वीवरील सर्व
राज्यांवर सर्वोच्च राज्यकर्ता आहेत आणि ज्याला ते इच्छितात, त्यांना
ते देतात आणि त्यांच्यावर अगदी कनिष्ठाला नियुक्त करतात.’ 18 “हे
स्वप्न आहे जे मी, राजा नबुखद्नेस्सरने पाहिले. हे बेलटशास्सर, आता
याचा अर्थ काय तो मला सांग, कारण माझ्या राज्यात कोणताही ज्ञानी
मनुष्य मला त्याचा अर्थ सांगू शकत नाही. फक्त तूच मला अर्थ सांगू
शकशील, कारण पवित्र देवांचा आत्मा तुझ्यामध्ये आहे.” 19 नंतर
दानीएल (ज्याला बेलटशास्सर असेही म्हटले जात), काही वेळेसाठी
व्याकूळ झाला आणि त्याचे विचार त्याला भयभीत करू लागले. म्हणून
राजा म्हणाला, “हे बेलटशास्सर, माझे स्वप्न किंवा त्याचा अर्थ यामुळे
भयभीत होऊ नको.” तेव्हा बेलटशास्सराने (अर्थात् दानीएलाने) उत्तर
दिले, “महाराज, जर हे स्वप्न तुमच्या शत्रूंवर आणि त्याचा अर्थ तुमच्या
विरोधकांवर ओढवला असता, तर किती बरे झाले असते! 20 तुम्ही
पाहिलेले वृक्ष, जे वाढले आणि मजबूत झाले, ज्याचे शिखर आकाशाला
स्पर्श करू लागले आणि जे सर्व पृथ्वीवरून पाहिले जाऊ शकते, 21
ज्यामध्ये सुंदर पाने आणि विपुल फळे होती, ज्याने सर्वांना अन्न दिले,
ज्याने वन्यपशूंना आश्रय दिला आणि ज्याच्या फांद्यांवर पक्षी घरटे
बांधली; 22 महाराज, तुम्ही तो वृक्ष आहात! आपण समर्थ व थोर झाला
आहात. आपले थोरपण आकाशाला जाऊन भिडले आहे आणि आपली
सत्ता पृथ्वीच्या टोकांपर्यंत गेली आहे. 23 “हे महाराज, नंतर आपणाला
येणारा एक पवित्र दूत दिसला आणि तो म्हणत होता, ‘वृक्ष तोडा,
त्याचा नाश करा, पण त्याचा बुंधा व मुळे तशीच जमिनीतील गवतात
राखा. त्याच्याभोवती हिरवळ असेल व तो लोखंडाच्या आणि कास्याच्या
पट्टयाने बांधलेला असेल. आकाशातील दवाने तो भिजून जावो! सात
वर्षे मैदानातल्या पशूंसारखी त्याची गत होवो!’ 24 “महाराज हे आहे
याचा अर्थ, आणि महाराज, हा अर्थ आहे आणि परात्पर परमेश्वराने
माझ्या स्वामी राजाच्या विरुद्ध काढलेला हा आदेश आहे: 25 तुम्हाला
लोकांमधून हाकलून देण्यात येईल आणि तुम्ही वन्यप्राण्यांबरोबर
राहाल; तुम्ही बैलाप्रमाणे गवत खाल आणि आकाशाच्या दवाने भिजून
जाल. सात कालखंड संपेपर्यंत तुम्ही या स्थितीत राहाल आणि मग
तुमचा असा विश्वास असेल की सार्वभौम परमेश्वर हे पृथ्वीवरील सर्व
राज्यांवर सर्वोच्च परमेश्वर आहेत आणि ते ज्याला इच्छितात त्याला
ही राज्ये देतात. 26 परंतु बुंधा व मुळे जमिनीतच ठेवण्याची आज्ञा
देण्यात आली आहे, याचा अर्थ असा की, जेव्हा तुम्ही स्वीकाराल स्वर्ग
राज्य करते तेव्हा तुमचे राज्य तुम्हाला परत केले जाईल. 27 म्हणून
महाराज, आनंदाने माझा सल्ला स्वीकारा: चांगले ते करून आपली
पापे सोडा आणि वाईट सोडून पीडितांवर दया करा. मग तुमची समृद्धी
होत राहील.” 28 हे सगळे नबुखद्नेस्सर राजासोबत झाले. 29 बारा
महिन्यानंतर राजा बाबेलमधील राजवाड्याच्या गच्चीवर फिरत होता, 30
मग राजा म्हणाला, “हे महान बाबेल नाही का, जे मी माझ्या प्रतापी
सामर्थ्याने माझ्या वैभवाच्या गौरवासाठी शाही निवासस्थान म्हणून
बांधले आहे?” 31 तो हे शब्द उच्चारतो न उच्चारतो, तोच स्वर्गातून
वाणी आली, “हे राजा नबुखद्नेस्सर, तुझ्यासाठी हे फर्मान घेण्यात
आले आहे: तुझा राजेशाही अधिकार तुझ्यापासून काढून घेण्यात
आला आहे. 32 तुला लोकांमधून हाकलून देण्यात येईल आणि तू

वन्यप्राण्यांसह राहशील; तू बैलाप्रमाणे गवत खाशील. सात कालखंड
संपेपर्यंत तू असे स्वीकारशील की सार्वभौम परमेश्वर हे पृथ्वीवरील सर्व
राज्यांवर सर्वोच्च परमेश्वर आहेत आणि ते ज्याला इच्छितात त्याला
राज्ये देतात." 33 नबुखद्नेस्सरबद्दल जे बोलण्यात आले होते ते त्याच
घटकेला पूर्ण झाले. त्याला लोकांमधून हाकलून देण्यात आले आणि तो
बैलाप्रमाणे गवत खाऊ लागला. त्याचे शरीर दवाने भिजून ओलेचिंब
झाले, त्याचे केस गरुडाच्या पिसांसारखे लांब वाढले आणि पक्ष्यांच्या
नखांसारखी त्याची नखे वाढली. 34 निर्धारित कालखंडाच्या शेवटी,
मी, नबुखद्नेस्सरने माझी नजर वर स्वर्गाकडे वळवली आणि माझी
बुद्धी मला पुन्हा लाभली. मग मी परात्पर परमेश्वराची महिमा केली;
त्यांना आदर आणि गौरव दिला, जे सदासर्वकाळ जिवंत आहेत, 35
पृथ्वीवरील सर्व लोक 36 माझी बुद्धी मला परत लाभली. त्याचप्रमाणे
माझा मान, वैभव आणि राज्य हेदेखील सर्व मला परत मिळाले. माझे
मंत्री व अधिकारी माझ्याकडे परत आले, आणि मी माझ्या सिंहासनावर
पुन्हा बसलो आणि मी पूर्वीपेक्षा अधिक महान झालो. 37 आता मी,
नबुखद्नेस्सर, स्वर्गाच्या राजाधिराजाची स्तुती, गौरव व सन्मान करतो,
कारण ते जे काही करतात ते योग्य करतात आणि त्यांचे सर्व मार्ग
न्याय्य आहेत. आणि जे गर्वाने चालतात त्यांना ते नम्र करण्यास समर्थ
आहेत.

**5** बेलशस्सर राजाने त्याच्या एक हजार अधिकाऱ्यांना मोठी मेजवानी
दिली आणि तो त्यांच्याबरोबर द्राक्षारस प्याला. 2 बेलशस्सर
द्राक्षारस पीत असताना, त्याने आज्ञा दिली की त्याचे पिता नबुखद्नेस्सर
यांनी यरुशलेमच्या मंदिरातून आणलेल्या सोन्याची आणि चांदीची पात्रे
आणावीत, जेणेकरून राजा, त्याचे अधिकारी, त्याच्या पत्नी आणि
त्याच्या उपपत्नी त्यामधून पिऊ शकतील. 3 म्हणून यरुशलेमच्या
मंदिरातून आणलेल्या सोन्याची आणि चांदीची पात्रे आणण्यात आली
आणि राजा, त्याचे अधिकारी, त्याच्या पत्नी आणि त्याच्या उपपत्नी
त्यामधून पिऊ लागली. 4 द्राक्षारस पिऊन त्यांनी सोने, चांदी, कास्य,
लोखंड, लाकूड, दगड यापासून बनविलेल्या दैवतांचे स्तवन केले. 5
एकाएकी मानवी हाताची बोटे प्रकट झाली आणि राजवाड्यातील
दिवठणीच्या समोरच्या भिंतीच्या गिलाव्यावर काहीतरी लिहू लागली. ती
हाताची बोटे लिहित असतानाच राजाने ती पाहिली. 6 तेव्हा राजाचा
चेहरा पांढराफटक झाला आणि त्याला एवढा धसका बसला की
त्याची कंबरच खचली आणि त्याचे गुडघे थरथर कापू लागले. 7 मग
राजाने मांत्रिक, ज्योतिषी आणि दैवप्रश्न करणाऱ्यांना बोलावून घेतले.
नंतर तो बाबेलच्या ज्ञानी लोकांना म्हणाला, "जो कोणी हे लिखाण
वाचून त्याचा अर्थ मला समजावून सांगेल, त्याला जांभळा पोशाख
देण्यात येईल आणि गळयात सोन्याची साखळी घालण्यात येईल आणि
राज्यात तो तिसऱ्या क्रमांकाचा सत्ताधारी होईल." 8 नंतर राजाचे सर्व
ज्ञानी लोक आत आले, पण त्यांना त्या लेखाचा उमज पडेना किंवा
त्याचा अर्थही राजाला सांगता येईना. 9 यामुळे राजा बेलशस्सर अत्यंत
भयभीत झाला आणि त्याचा चेहरा अधिक पांढराफटक झाला. त्याचे
अधिकारीदेखील गोंधळून गेले. 10 राजा आणि अधिकाऱ्यांचा आवाज
ऐकून राणी मेजवानीच्या दिवाणखान्यात आली. ती म्हणाली, "महाराज,
चिरायू असा! घाबरू नका, आपली मुद्रा पालटू देऊ नका. 11 कारण
ज्याच्यामध्ये पवित्र देवांचा आत्मा आहे असा एक मनुष्य आपल्या
राज्यात आहे. तुमच्या पित्याच्या कारकिर्दीत हा मनुष्य जणू काय
देवच आहे अशा ज्ञानाने व शहाणपणाने परिपूर्ण असून असे आढळून
आले होते. तुमचा पिता नबुखद्नेस्सर राजाच्या कारकिर्दीत त्याला
बाबेलमधील सर्व जादूगार, मांत्रिक, ज्योतिषी, दैवप्रश्न सांगणारे या
सर्वांवर प्रमुख नेमण्यात आले होते. 12 त्याने हे केले कारण दानीएल हा
ज्याला राजा बेलटशास्सर म्हणत होता, त्याच्याकडे उत्तम मन आणि
ज्ञान आणि समज होती आणि त्याच्याकडे स्वप्नांचा अर्थ सांगण्याचे,
कोडे सोडविण्याचे आणि कठीण समस्या सोडविण्याची क्षमता होती.
म्हणून दानीएलला बोलवा म्हणजे तो तुम्हाला त्या लिखाणाचा अर्थ
सांगेल." 13 तेव्हा दानीएलला राजासमोर आणण्यात आले आणि
राजाने त्याला म्हटले, "दानीएल तो तूच आहेस काय, ज्याला माझे
पिता राजा यांनी यहूदीयातून कैदी म्हणून आणला होता? 14 तुझ्यामध्ये
देवांचा आत्मा आहे आणि प्रकाश, बुद्धी आणि उत्कृष्ट शहाणपण यांनी
तू परिपूर्ण आहेस असे मी ऐकले आहे. 15 ज्ञानी लोकांनी आणि
ज्योतिषांनी भिंतीवरील हे लिखाण वाचावे आणि त्याचा अर्थ काय आहे
हे सांगावे म्हणून त्यांना माझ्यापुढे आणले पण ते अर्थ सांगू शकले
नाही. 16 मी तुझ्याबद्दल ऐकले आहे की तू अर्थ सांगण्यात आणि कोडी
सोडविण्यात सक्षम आहेस. जर तू हे लिखाण वाचशील आणि त्याचा
अर्थ मला समजावून सांगशील, तर तुला जांभळा पोशाख देण्यात येईल
आणि गळयात सोन्याची साखळी घालण्यात येईल आणि राज्यात तू
तिसऱ्या क्रमांकाचा सत्ताधारी होशील." 17 दानीएलने राजाला उत्तर
दिले. "आपल्या देणग्या आपल्याजवळच ठेवा आणि तुमचे पारितोषिक
दुसऱ्या कोणाला द्या. तरीही मी हे लिखाण राजासाठी वाचेन आणि
त्याचा अर्थ त्यांना सांगेन. 18 "महाराज, परात्पर परमेश्वराने तुमचे पिता
नबुखद्नेस्सर राजाला राज्य आणि महानता वैभव आणि गौरव दिले
होते. 19 कारण त्यांनी राजाला असे उच्च स्थान दिले की, सर्व राष्ट्रे
आणि प्रत्येक भाषा बोलणारे त्यांच्यासमोर थरथर कापत आणि त्याला
भीत असत. राजाला ज्याला ठार करावयाचे होते त्याला ठार करीत
असत; ज्याला वाचवायचे होते त्याला वाचवित असत; ज्याला बढती
द्यायची त्याला बढती देत असत; आणि ज्याला नम्र करावयाचे त्याला
नम्र करीत असत. 20 परंतु जेव्हा त्यांचे अंत:करण गर्विष्ठ झाले व गर्वाने
फुगून ताठ झाले, तेव्हा त्यांना राजासनावरून काढण्यात आले व त्यांचे
वैभवही हिरावून घेण्यात आले. 21 त्यांना लोकांमधून हाकलून देण्यात
आले आणि प्राण्याचे मन देण्यात आले; ते रानगाढवांमध्ये राहिले आणि
बैलासारखे गवत खात असत; आणि त्यांचे शरीर आकाशाच्या दवबिंदूंनी
भिजले होते, जोपर्यंत त्यांनी हे मान्य केले नाही की सार्वभौम परमेश्वर
हे पृथ्वीवरील सर्व राज्यांवर सर्वोच्च परमेश्वर आहेत आणि त्यांना
पाहिजे त्याला ते राज्यांचा अधिपती म्हणून नियुक्त करतात. 22 "परंतु

बेलशस्सर तुम्ही त्याचे पुत्र असून स्वतःला नम्र केले नाही, जेव्हा की
आपल्याला हे सर्व माहिती आहे. 23 त्याऐवजी तुम्ही स्वर्गाच्या प्रभूच्या
विरोधात उभे राहिले. त्यांच्या मंदिरातील पात्रे तुम्ही आपल्याकडे
आणली. आपण स्वतः आणि आपले अधिकारी, राण्या, उपपत्नीसह
द्राक्षारस प्याले. चांदी आणि सोने, कास्य, लोखंड, लाकूड आणि दगड
या दैवतांची, ज्यांना पाहता येत नाही की ऐकता येत नाही की समजत
नाही, त्यांची स्तुती केली. पण ज्यांच्या हातात तुमचे जीवन आणि तुमचे
संपूर्ण मार्ग आहे त्या परमेश्वराचा तुम्ही आदर केला नाही. 24 म्हणून
त्यांनी हा हात पाठविला आहे, ज्याने हे लिखाण लिहिले आहे. 25 “हा
तो शिलालेख आहे जो लिहिण्यात आला: मने, मने तकेल, ऊ फारसीन.
26 “या शब्दांचा अर्थ हा असा: “मने: परमेश्वराने आपल्या राजवटीचे
दिवस मोजले आहेत आणि त्याचा अंत केला आहे. 27 “तकेल: तराजूत
आपणास तोलण्यात आले आहे आणि आपण वजनात कमी भरला
आहात. 28 “फारसीन: आपल्या राज्याचे दोन भाग करण्यात आले
आहे आणि मेदिया व पर्शियन यांना देण्यात आले आहेत.” 29 नंतर
बेलशस्सरच्या आज्ञेवरून दानीएलला जांभळा पोशाख घालण्यात आला.
त्याच्या गळयात सोन्याची साखळी घालण्यात आली व तो राज्यातील
तिसऱ्या क्रमांकाचा अधिपती आहे, असे जाहीर करण्यात आले. 30
त्याच रात्री खाल्डियन लोकांचा राजा बेलशस्सर याचा वध झाला; 31
आणि मेदिया राजा दारयावेश, याने नगरात प्रवेश केला व वयाच्या
बासष्टाव्या वर्षी तो राज्य करू लागला.

**6** दारयावेश राजाने आपल्या मर्जीनुसार आपल्या संपूर्ण साम्राज्यात
राज्य करण्यासाठी 120 प्रांताधिकारी नियुक्त करावे, 2 व त्यांच्यावर
तीन अध्यक्षांची नेमणूक करण्यात आली होती, ज्यामध्ये दानीएल
एक होता. राजाला कोणत्याच प्रकारची हानी होऊ नये म्हणून
प्रांताधिकाऱ्यांनी त्यांना हिशोब द्यावा. 3 दानीएल हा अध्यक्ष व
प्रांताधिकारी यांच्यापेक्षा त्याच्या विलक्षण गुणांमुळे सरस असल्यामुळे
शासक म्हणून त्यालाच संपूर्ण साम्राज्यावर नेमावे अशी राजाची योजना
होती. 4 यामुळे अध्यक्ष आणि प्रांताधिकारी दानीएलविरुद्ध राज्य
कारभारातील दोष शोधण्याचा प्रयत्न करू लागले. त्यांना त्याच्यामध्ये
कोणताही भ्रष्टाचार आढळला नाही, कारण तो विश्वासू होता आणि तो
भ्रष्ट नव्हता किंवा निष्काळजीपणाही करीत नव्हता. 5 शेवटी हे लोक
म्हणाले, “आम्हाला दानीएलाविरुद्ध त्याच्या परमेश्वराच्या नियमाशिवाय
कोणत्याही बाबतीत आरोपाचे कारण सापडणार नाही.” 6 तेव्हा अध्यक्ष
आणि प्रांताधिकारी हे राजाकडे गेले आणि म्हणाले, “दारयावेश महाराज
चिरायू होवोत! 7 आम्ही सर्वांनी म्हणजे अध्यक्ष, राज्यपाल, मंत्री नायब
यांनी एकमताने ठरविले आहे की, महाराजांनी एक फर्मान काढावे
व त्याचे पालन करण्यात यावे, त्यानुसार येणाऱ्या तीस दिवसांमध्ये
कोणीही, महाराजांऐवजी इतर कोणत्याही देवाकडे किंवा मनुष्याकडे
प्रार्थना करेल, तर त्याला सिंहाच्या गुहेत टाकावे. 8 तर आता महाराज,
या फर्मानावर शिक्कामोर्तब करा आणि ते लिखित स्वरुपात द्या म्हणजे
ते बदलता येणार नाही—म्हणजे मेदिया व पारसीच्या कायद्यानुसार जो
रद्द करता येणार नाही.” 9 तेव्हा दारयावेश राजाने या फर्मानावर सही
केली. 10 जेव्हा दानीएलला हे फर्मान निघाल्याचे समजले, तेव्हा तो घरी
गेला व माडीवर खोलीत गेला. या खोलीच्या खिडक्या यरुशलेमच्या
दिशेकडे उघडलेल्या होत्या. आपल्या नित्याच्या रिवाजाप्रमाणे दिवसातून
तीन वेळा त्याने गुडघे टेकून प्रार्थना केली आणि त्याच्या परमेश्वराचे
आभार मानले. 11 नंतर हे लोक त्याच्या घरी जमावाने आले आणि त्यांनी
दानीएलला परमेश्वराला प्रार्थना करताना व मदत मागताना पाहिले. 12
मग ते राजाकडे गेले आणि त्याच्यासोबत त्याच्या फर्मानाबद्दल बोलले:
तुम्ही फर्मान काढले नाही काय की येणाऱ्या तीस दिवसांमध्ये कोणीही,
महाराजांऐवजी इतर कोणत्याही देवाकडे किंवा मनुष्याकडे प्रार्थना
करेल, तर त्याला सिंहाच्या गुहेत टाकण्यात यावे? राजाने उत्तर दिले,
“हे फर्मान कायम आहे—मेदिया व पारसीच्या कायद्यानुसार जो रद्द
करता येणार नाही.” 13 नंतर ते राजाला म्हणाले, “महाराज, यहूदी
कैद्यांपैकी दानीएल, तो आपली किंवा आपल्या फर्मानाची मुळीच पर्वा
करीत नाही. तो आताही दिवसातून तीन वेळा प्रार्थना करतो.” 14
जेव्हा राजाने हे ऐकले, तेव्हा तो फारच अस्वस्थ झाला; दानीएलला
यातून वाचवावे असा त्याने निश्चय केला आणि त्याने सूर्यास्त होईपर्यंत
दानीएलला कसे सोडवावे याचे सर्वतोपरी प्रयत्न केले. 15 नंतर लोक
जमावाने राजाकडे आले आणि त्यांना म्हटले, “महाराज, मेदिया व
पारसीच्या कायद्यानुसार राजा जे फर्मान काढतो त्याला ते रद्द करता
येणार नाही.” 16 तेव्हा राजाने हुकूम दिला आणि दानीएलला सिंहांच्या
गुहेत टाकण्यात आले. राजा दानीएलला म्हणाला, “ज्या परमेश्वराची तू
सतत सेवा करतोस ते तुझी सुटका करो!” 17 आणि एक मोठी शिळा
आणण्यात आली आणि गुहेच्या तोंडावर ठेवली व राजाने आपल्या
स्वतःच्या आणि अधिकाऱ्यांच्या मुद्रांनी शिक्कामोर्तब केले, जेणेकरून
दानीएलच्या परिस्थितीत कोणताच बदल करता येऊ नये. 18 मग राजा
आपल्या महालात परतला व काहीही जेवण न करता आणि कोणतीही
करमणूक न करता त्याने संपूर्ण रात्र काढली आणि त्याला झोप येत
नव्हती. 19 राजा भल्या पहाटे उठला आणि लगबगीने सिंहांच्या गुहेकडे
गेला. 20 जेव्हा राजा गुहेच्या जवळ आला, त्याने दानीएलला मोठ्या
दुःखाने त्याने हाक मारली. “दानीएला, दानीएला, जिवंत परमेश्वराच्या
सेवका, ज्या परमेश्वराची तू सतत सेवा करतोस, त्यांनी तुला सिंहांपासून
सोडविले आहे काय?” 21 तेव्हा दानीएलने उत्तर दिले, “महाराज चिरायू
असो! 22 माझ्या परमेश्वराने आपले दूत पाठविले आणि त्याने सिंहांची
तोंडे बंद केली. त्यांनी मला उपद्रव केला नाही. कारण मी त्यांच्या
दृष्टीत निरपराधी आढळलो आहे. तसेच महाराज, मी तुमच्यासमोरही
काही अपराध केलेला नाही.” 23 तेव्हा राजा अतिशय आनंदित झाला
आणि दानीएलला गुहेतून बाहेर काढण्याचा त्याने हुकूम सोडला. जेव्हा
दानीएलला गुहेतून वर काढण्यात आले, तेव्हा त्याच्या शरीरावर एकही
जखम नव्हती, कारण त्याने आपल्या परमेश्वरावर भरवसा ठेवला
होता. 24 नंतर राजाने आज्ञा केली त्याप्रमाणे दानीएलवर खोटे आरोप
करणाऱ्यांना पकडण्यात आले व त्यांच्या पत्नी व मुलांसहित त्या

सर्वांना सिंहांच्या गुहेत टाकण्यात आले. आणि ते गुहेच्या तळाशी
पोहचण्यापूर्वीच सिंहांनी प्रबळ होऊन झेप घातली आणि त्यांच्या सर्व
हाडांचे तुकडे केले. 25 नंतर दारयावेश राजाने पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांना
आणि सर्व भाषा बोलणाऱ्यांना लोकांना लिहिले: "तुमची भरपूर उन्नती
होवो! 26 "माझ्या राज्याच्या प्रत्येक भागातील लोकांनी दानीएलच्या
परमेश्वराचे भय बाळगावे आणि आदर करावा. 27 ते सुटका करतात व
ते वाचवितात; 28 याप्रमाणे दारयावेश राजाच्या आणि कोरेश पारसीच्या
कारकिर्दीत दानीएल समृद्ध झाला.

**7** बाबेलचा राजा बेलशस्सर याच्या कारकिर्दीच्या पहिल्या वर्षी
दानीएल आपल्या बिछान्यावर पडला असताना त्याने स्वप्न पाहिले
व मनात दृष्टान्त पाहिला. त्याने आपल्या स्वप्नाचा सारांश लिहून
ठेवला. 2 दानीएल म्हणाला: रात्री मी आपल्या दृष्टान्तात पाहिले,
माझ्यापुढे स्वर्गातील चार वाऱ्यांनी मोठ्या समुद्राला घुसळले. 3 चार
महाकाय पशू समुद्रातून वर आले. प्रत्येक पशू एकमेकांपासून वेगळा
होता. 4 "पहिला पशू सिंहासारखा होता आणि त्याला गरुडाचे पंख
होते. मी पाहत असतानाच त्याचे पंख उपसून काढण्यात आले आणि
त्याला जमिनीवरून उचलून माणसासारखे दोन पायांवर उभे करण्यात
आले आणि त्याला मानवाचे अंत:करण देण्यात आले. 5 "आणि
तिथे मी माझ्यापुढे दुसरा पशू पाहिला, जो अस्वलासारखा दिसत
होता. त्याच्या शरीराची एका बाजू वर उचललेली होता. त्याने आपल्या
दातांमध्ये तीन फासळ्या धरल्या होत्या. त्याला सांगण्यात आले,
'ऊठ! पोटभर मांस खा!' 6 "यानंतर मी पाहिले तो, मला आणखी
एक पशू माझ्यापुढे दिसला, तो एखाद्या चित्त्यासारखा दिसत होता.
त्याच्या पाठीवर पक्ष्यांसारखे चार पंख होते. या पशूला चार डोकी होती
आणि सत्ता गाजविण्याचा त्याला अधिकार देण्यात आला होता. 7
"यानंतर रात्री मी दृष्टान्तात पाहत होतो आणि तिथे माझ्यापुढे चौथा पशू
होता—तो भयंकर आणि विक्राळ आणि फार बलिष्ठ होता. त्याला मोठे
लोखंडी दात होते; त्याने आपल्या काही बळींना चिरडून टाकले, काहींना
फाडून खाल्ले आणि उरलेल्यांना पायाखाली तुडविले. पूर्वीच्या सर्व
पशूपेक्षा हा पशू वेगळा होता. त्याला दहा शिंगे होती. 8 "या शिंगांविषयी
मी विचार करीत असता, त्या शिंगांमध्ये आणखी एक लहान शिंग
उगवले आणि आधीच्या शिंगांपैकी तीन शिंगांना या नव्या शिंगाने
मुळासकट उपटून टाकले. या शिंगाला माणसासारखे डोळे होते आणि
बढाई करणारे तोंडही होते. 9 "जसे मी पाहिले, "सिंहासने मांडली
गेली आणि प्राचीन पुरुष आपल्या आसनावर बसला आहे. त्याची वस्त्रे
हिमासारखी शुभ्र होती; त्याच्या मस्तकावरील केस लोकरीप्रमाणे पांढरे
होते. त्याचे सिंहासन अग्निज्वालायुक्त होते, आणि त्याच्या सिंहासनाची
चाके प्रज्वलित केलेल्या अग्नीप्रमाणे होती. 10 अग्नीची नदी निघून
वाहत होती जी त्याच्यामधून बाहेर येत होती. हजारोच्या हजार लोक
त्याची सेवा करीत होते; कोट्यावधी लोक त्याच्यासमोर उभे होते.
न्यायालयाचे कामकाज सुरू झाले आणि पुस्तके उघडली गेली. 11
"मग मी सतत त्याच्याकडे पाहत होतो कारण ते शिंग फुशारकीचे शब्द
बोलत होते. मी सतत पाहत राहिलो जोपर्यंत चौथ्या पशूचे वध करण्यात
आले नाही आणि त्याचे शरीर अग्निज्वालांमध्ये फेकण्यात आले नाही.
12 (इतर पशूंचे अधिकार काढून घेण्यात आले, परंतु त्यांना आणखी
काही काळ जिवंत राहण्याची परवानगी देण्यात आली.) 13 "नंतर रात्री
दृष्टान्तात पाहत होतो आणि मी पाहिले, मानवपुत्रासारखा आकाशात
मेघारूढ होऊन येत असलेला दिसला. तो प्राचीन पुरुषाकडे गेला आणि
त्याच्या उपस्थितीत त्याला सादर करण्यात आले. 14 त्याला अधिकार,
गौरव व सार्वभौम सामर्थ्य देण्यात आले; सर्व राष्ट्रांनी आणि प्रत्येक सर्व
भाषा बोलणाऱ्यांनी त्याची उपासना केली. त्याचे सामर्थ्य शाश्वतचे
आहे, जे कधीही ढळणार नाही आणि त्याचा कधी अंत होत नाही आणि
म्हणून त्याचे राज्य हे असे राज्य आहे, ज्याचा कधीही नाश होणार नाही.
15 "मी, दानीएल, माझ्या आत्म्यात खूप व्यथित झालो आणि मी माझ्या
मनात जो दृष्टान्त पाहिला, त्यामुळे मी गोंधळून गेलो. 16 मी तिथे उभ्या
असलेल्यांपैकी एकाकडे गेलो आणि मी त्याला या सर्व गोष्टींचा अर्थ
काय हे विचारले. "मग त्याने मला सांगितले व गोष्टींचा अर्थ समजावून
सांगितला: 17 'हे चार महाकाय पशू म्हणजे पृथ्वीवर उदय पावणारे चार
राजे आहेत. 18 तरी परमोच्च परमेश्वराच्या पवित्र जणांना राज्य मिळेल
आणि ते सदासर्वकाळ त्याच्या ताब्यात राहतील—होय, सदासर्वकाळ.'
19 "मग मला चौथ्या प्राण्याचा अर्थ जाणून घ्यायचा होता, जो इतर सर्व
पशूंपेक्षा वेगळा होता. तो आपल्या लोखंडी दातांनी आणि कास्याच्या
नखांमुळे अति भयानक होता—त्याने आपल्या काही बळींना चिरडून
टाकले, काहींना फाडून खाल्ले आणि उरलेल्यांना पायाखाली तुडविले.
20 मला हे देखील जाणून घ्यायचे होते की त्याच्या डोक्यावर असलेली
दहा शिंगे आणि दुसरे शिंग जे बाहेर आले, त्यापैकी तीन शिंगे बाहेर
आल्यावर पडली. मला त्या दहा शिंगांविषयी आणि जे शिंग नंतर आले,
ज्याच्या येण्याने तेथील तीन शिंगे तुटून पडली—ते शिंग जे इतरांपेक्षा
अधिक आकर्षक दिसले आणि ज्याला डोळे होते व फुशारकी मारणारे
बढाईखोर तोंड होते, मला हे जाणून घ्यायचे होते. 21 मी पाहिले की,
हे शिंग पवित्र लोकांशी युद्ध करीत आहे आणि त्यांचा पराभव करीत
राहिले, 22 जोपर्यंत सनातन पुरुष येईपर्यंत आणि परमोच्च परमेश्वराच्या
पवित्र लोकांच्या बाजूने निर्णय घोषित होईपर्यंत, त्यांनी राज्य ताब्यात
घेण्याची वेळ आली. 23 "त्याने मला हे स्पष्टीकरण दिले: 'हा चौथा पशू
म्हणजे हे चौथे राज्य होईल जे पृथ्वीवर प्रकट होईल. ते सर्व राज्याहून
निराळे होईल आणि ते संपूर्ण पृथ्वीला गिळंकृत करेल, तिला तुडवून
टाकेल, आणि तिचे तुकडे करेल. 24 ती दहा शिंगे म्हणजे दहा राजे. जे
या राज्यातून येतील. यानंतर आणखी एक राजा येईल, जो आधीच्या
राजांपेक्षा भिन्न असणार; तो या तिघांना वश करेल. 25 तो परमोच्च
परमेश्वराच्या विरुद्ध बोलेल आणि त्यांच्या पवित्र लोकांवर अत्याचार
करेल आणि निर्धारित वेळ आणि कायदे बदलण्याचा प्रयत्न करेल.
पवित्र लोक एक वेळ, दोन वेळा आणि अर्धा वेळ त्याच्या हातात
देण्यात येतील. 26 "'परंतु न्यायसभा बसेल आणि त्याचे सामर्थ्य
काढून घेण्यात येईल आणि त्याचा कायमचा नाश करण्यात येईल. 27

मग परमोच्च परमेश्वराच्या पवित्र लोकांना आकाशाखाली असलेल्या
राज्यांचे सार्वभौमत्व, सामर्थ्य आणि महानता देण्यात येईल. त्यांचे
राज्य सनातन राज्य आहे आणि सर्व शासक त्यांची सेवा करतील व
त्यांच्या आज्ञा पाळतील.' 28 "येथे हा विषय समाप्त होतो. मी दानीएल,
आपल्या विचारांनी व्याकूळ झालो. आणि माझा चेहरा पांढराफटक
पडला, परंतु मी ही गोष्ट आपल्या मनात ठेवली."

**8** बेलशस्सर राजाच्या कारकिर्दीच्या तिसऱ्या वर्षी, मी जो दानीएलने
पहिल्यासारखाच आणखी एक दृष्टान्त पाहिला. 2 माझ्या दृष्टान्तात
मी असे पाहिले की, मी एलाम प्रांतातील शूशनच्या किल्ल्यात आहे;
मी दृष्टान्तात उलई नदीकाठी उभा होतो. 3 मी आपले डोळे वर करून
पाहिले की नदीच्या काठावर उभा असलेला एक मेंढा दिसला, त्याला
दोन शिंगे होती आणि ती शिंगे लांब होती. एक शिंग दुसऱ्यापेक्षा अधिक
लांब होते परंतु नंतर ते वाढले. 4 मी पाहिले की तो मेंढा पश्चिमेकडे,
उत्तरेकडे, आणि दक्षिणेकडे धडक मारीत होता. दुसऱ्या कोणताही प्राणी
त्याच्यासमोर उभा राहू शकला नाही आणि त्याच्या सामर्थ्यापासून वाचू
शकला नाही. त्याला ज्यात संतोष वाटला, ते त्याने केले आणि तो
महान झाला. 5 जेव्हा मी याचा विचार करीत होतो, तेव्हा मी पाहिले
की एक बोकड त्याचे पाय जमिनीवर ठरत नव्हते, जो सर्व पृथ्वीला
पार करून आला. या बोकडाला डोळयांच्या मधोमध एक ठळक शिंग
होते. 6 तो दोन शिंगे असलेल्या मेंढ्याजवळ आला जो नदीसमोर
उभा होता आणि पूर्णशक्तीने त्याने त्यावर हल्ला केला. 7 मी पाहिले
की त्याने फार क्रोधित होऊन मेंढ्यावर हल्ला केला आणि धडक
देत त्याचा दोन्ही शिंगांना मोडून टाकले. मेंढा त्याच्या विरोधात उभा
राहण्यास शक्तिहीन होता; बोकडाने त्याला जमिनीवर आपटले आणि
पायाखाली तुडविले आणि त्याच्या शक्तीपासून मेंढ्याला कोणालाही
सोडविता आले नाही. 8 तो बोकड फार महान झाला, परंतु तो बलिष्ठ
झाल्यामुळे त्याचे मोठे शिंग मोडले आणि त्या शिंगाच्या जागी चार
ठळक शिंगे फुटली. त्यांची टोके चारही दिशांनी वाढली. 9 त्यांच्यापैकी
एकामधून दुसरे शिंग फुटले, लहान म्हणून त्याचा प्रारंभ झाला, परंतु
दक्षिण, पूर्व आणि वैभवी देशाच्या दिशेने मोठ्या प्रमाणात वाढले. 10
तो आकाशाच्या सैन्यापर्यंत पोहोचेपर्यंत वाढला आणि त्याने काही
ताऱ्यांचे सैन्य पृथ्वीवर फेकले आणि त्यांना तुडविले. 11 त्याने स्वतःला
याहवेहच्या अधिपतीप्रमाणे उच्च केले; त्याने दररोज याहवेहला अर्पण
केले जाणारे यज्ञ काढून घेतले आणि त्यांचे पवित्रस्थान पाडून टाकले.
12 दैनंदिन यज्ञ बंडखोरीमुळे याहवेहचे लोक त्याच्या हाती देण्यात आले.
त्याने जे काही केले त्यात उन्नती केली आणि सत्य मातीला मिळविले.
13 नंतर एका पवित्रजनाला बोलताना मी ऐकले आणि दुसरा पवित्रजन
त्याला म्हणाला, "दृष्टान्त पूर्ण होण्यास किती काळ लागेल—त्या
दृष्टान्तामध्ये रोजचे अर्पण, विध्वंसक पातक ज्यामुळे ओसाडी येते,
पवित्रस्थानाचे समर्पण आणि याहवेहच्या लोकांना पायदळी तुडविले
जाणे हे दाखविले आहे?" 14 तो मला म्हणाला, "यासाठी 2,300
संध्याकाळ आणि सकाळ लागतील; नंतर पवित्रस्थान शुद्ध करण्यात
येईल." 15 मग मी दानीएल, या दृष्टान्ताचा अर्थ काय असावा ते
जाणून घेण्याच्या प्रयत्न करू लागलो, तेवढ्यात एकाएकी मानवासारखा
दिसणारा कोणी एक पुरुष माझ्यासमोर उभा राहिला. 16 आणि मी
उलईपलीकडून आलेली एक मनुष्यवाणी मी ऐकली "हे गब्रीएला,
या मनुष्यास त्याच्या दृष्टान्ताचा अर्थ सांग." 17 जिथे मी उभा होतो
त्या जागेजवळ तो आला, तेव्हा मला धडकी भरली व मी जमिनीवर
पालथा पडलो. तेव्हा तो मला म्हणाला, "हे मानवपुत्रा, हे दृष्टान्त
शेवटच्या काळाशी संबंधित आहे हे समजून घे." 18 तो माझ्याशी बोलत
असतानाच मी जमिनीकडे तोंड करून गाढ झोपी गेलो. तेव्हा त्याने स्पर्श
करून मला जागे केले व मला माझ्या पायांवर उभे केले. 19 तो म्हणाला:
"क्रोधाच्या अखेरच्या समयात काय घडणार आहे हे मी तुला सांगणार
आहे, कारण हा दृष्टान्त नेमलेल्या काळाच्या समाप्तीच्या संबंधी आहे.
20 जो मेंढ्याचा स्वामी आणि तू पाहिलेल्या मेंढ्याची दोन शिंगे म्हणजे
मेदिया व पर्शियाचे राजे आहेत. 21 तो केसाळ बोकड म्हणजे ग्रीस
राष्ट्र होय आणि त्याच्या डोळयांच्या मधोमध मोठे शिंग म्हणजे त्या
देशाचा पहिला राजा होय. 22 तुटलेल्या शिंगाच्या जागी बाहेर आलेली
चार शिंगे एकाच देशातून उदयास येणाऱ्या चार राज्यांचे प्रतिनिधित्व
करतात, परंतु त्यांची शक्ती पूर्वीच्या राज्यासारखी नसेल. 23 "त्याच्या
कारकिर्दी नंतरच्या काळात, जेव्हा बंडखोर पूर्ण दुष्टाईत येतील, तेव्हा
एक भयानक रूपाचा राजा उदयास येईल, जो कूटप्रश्न समजणारा तज्ञ
असेल. 24 त्याचे सामर्थ्य मोठे असेल, पण ते त्याचे स्वतःचे नसेल.
तो भयंकर नाश करणार आणि जे काही तो करेल, त्यामध्ये त्याला
यश मिळेल. जे बलवान आणि पवित्र आहेत अशा लोकांचा तो नाश
करेल. 25 तो कपटाचा उपयोग समृद्ध होण्यास करेल आणि तो स्वतःला
श्रेष्ठ समजेल. जेव्हा त्यांना सुरक्षित वाटेल तेव्हा तो अनेकांचा नाश
करेल आणि राजपुत्रांच्या राजपुत्राच्या विरोधात उभा राहील. तरीही तो
नष्ट होईल, परंतु मनुष्याच्या सामर्थ्याने नाही. 26 "संध्याकाळ आणि
सकाळचा दृष्टान्त जो तुला देण्यात आला आहे तो खरा आहे, पण हा
दृष्टान्त तू गुप्त ठेव. कारण तो येणाऱ्या भविष्यकाळाशी संबंधित आहे."
27 मग मी दानीएल, बेशुद्ध झालो आणि पुढेही कित्येक दिवस आजारी
होतो. पुढे मी उभा झालो आणि राजाचा कारभार पाहू लागलो. परंतु या
दृष्टान्तामुळे मी विस्मित झालो, माझे अंतःकरण फार अस्वस्थ झाले; ते
समजण्यापलीकडे होते.

**9** अहश्वेरोशचा पुत्र दारयावेशच्या कारकिर्दीचे ते पहिलेच वर्ष होते.
दारयावेश हा मेदिया वंशातील होता, तो खाल्डियन राज्यावर राजा
करण्यात आला होता; 2 त्याच्या कारकिर्दीच्या पहिल्या वर्षी मला,
दानीएलला, संदेष्टा यिर्मयाहला दिलेल्या याहवेहच्या वचनानुसार पवित्र
शास्त्रातून समजले की यरुशलेम सत्तर वर्षे उजाड अशा अवस्थेत
राहील. 3 तेव्हा मी याहवेह परमेश्वराकडे वळून प्रार्थना आणि उपवास
करून आणि गोणपाट नेसून आणि अंगाला राख फासून त्यांना विनंती
केली. 4 याहवेह माझ्या परमेश्वराला मी प्रार्थना केली आणि पापे
कबूल केली: "हे याहवेह, महान व प्रतापी परमेश्वरा, तुमच्यावर प्रीती

करणाऱ्यांना आणि तुमच्या आज्ञा पाळणाऱ्यांकरिता तुम्ही केलेला
तुमच्या प्रीतीचा करार पाळता, 5 परंतु आम्ही पाप आणि चूक केली
आहे. आम्ही दुष्ट आणि बंडखोर आहोत; तुमच्या आज्ञांपासून आणि
नियमांपासून आम्ही बहकलो आहोत. 6 आम्ही तुमचे सेवक संदेष्टे
जे तुमच्या नावाने आमचे राजे, आमचे राजपुत्र आणि आमचे पूर्वज
आणि देशातील सर्व लोकांना तुमच्या नावाने संदेश देत असत, त्यांचे
आम्ही ऐकले नाही. 7 “हे प्रभू, तुम्ही नीतिमान आहात, परंतु आज
आम्ही लज्जित झालो आहोत; यहूदीयात राहणारे, यरुशलेमात राहणारे,
जवळ व दूर राहणारे सर्व इस्राएली लोक आणि ज्यांना तुमच्याविरुद्ध
केलेल्या अविश्वासाच्या कृत्यांमुळे सर्व देशांमध्ये तुम्ही घालवून दिले. 8
हे याहवेह, आम्ही, आमचे राजे, आमचे राजपुत्र, आणि आमचे पूर्वज
फार लज्जित आहोत, कारण आम्ही तुमच्याविरुद्ध पाप केले आहे.
9 जरी आम्ही त्यांच्याविरुद्ध बंडखोरी केली, तरीही याहवेह आमचे
परमेश्वर दयाळू आणि क्षमा करणारे आहेत; 10 आम्ही याहवेह आमच्या
परमेश्वराच्या आज्ञेचे पालन केले नाही आणि त्यांनी आपल्या सेवक
संदेष्ट्यांच्या मार्फत दिलेले नियम आम्ही पाळले नाही. 11 सर्व इस्राएली
लोकांनी तुमच्या नियमांचे आज्ञाभंग केले आहे आणि तुमची आज्ञा
पाळण्यास आपली पाठ फिरविली आहे. “म्हणूनच परमेश्वराचा सेवक
मोशे याच्या नियमशास्त्रात लिहून ठेवलेले शाप आणि शपथेवरचा
दंड आमच्यावर ओतला गेला आहे, कारण आम्ही तुमच्याविरुद्ध पाप
केले आहे. 12 आमच्यावर मोठी संकटे आणून तुम्ही आम्हाला आणि
आमच्या अधिपतींविरुद्ध दिलेले वचन पूर्ण केले आहे. संपूर्ण स्वर्गाच्या
खाली असे काहीही झाले नाही, जसे यरुशलेमसोबत करण्यात आले.
13 मोशेच्या नियमशास्त्रामध्ये आमच्याविरुद्ध लिहून ठेवलेली सर्व
संकटे आमच्यावर आली आहेत, तरीही आमच्या अपराधांपासून वळून
आणि तुमच्या सत्याकडे लक्ष लावण्यास आम्ही याहवेह आमच्या
परमेश्वराला विनंती केली नाही. 14 म्हणूनच याहवेहने कोणताही
संकोच बाळगता आमच्यावर संकटे पाठविली, कारण याहवेह आमचे
परमेश्वर जे काही करतात त्यामध्ये ते नीतिमान आहेत; तरीही आम्ही
त्यांच्या आज्ञा पाळल्या नाहीत. 15 “आणि आता याहवेह आमच्या
परमेश्वरा, तुम्ही आपल्या महान हातांनी तुमच्या लोकांना इजिप्त देशातून
बाहेर आणले आणि आपल्या नावाची महिमा प्रस्थापित केली, जी
आजपर्यंत आहे. आम्ही पाप केले आणि आम्ही चूक केली. 16 हे प्रभू,
तुमच्या पूर्ण न्यायकृत्यांप्रमाणे तुमच्या यरुशलेम नगरांवरून, तुमच्या
पवित्र डोंगरावरील तुझ्या विश्वसनीय करुणेमुळे यरुशलेमवरील, तुझ्या
स्वतःच्या नगरीवरील, तुझ्या पवित्र डोंगरावरील, तुमचा क्रोध आणि
राग दूर करा. कारण आमच्या पातकांमुळे आणि आमच्या पूर्वजांच्या
अपराधांमुळे यरुशलेम आणि तुमचे लोक सभोवतालच्या सर्वांना
निंदा असे झालो आहोत. 17 “आता हे आमच्या परमेश्वरा, आपल्या
दासाची प्रार्थना आणि विनवणी ऐका. याहवेह, उजाड झालेल्या तुमच्या
पवित्रस्थानावर तुमचे मुखतेज पडू द्या. 18 हे आमच्या परमेश्वरा कान द्या
आणि ऐका; आपले डोळे उघडा आणि ज्या नगरास तुमचे नाव दिले
आहे ते कसे उद्ध्वस्त झाले आहे ते पाहा. आम्ही नीतिमान आहोत
म्हणून विनवणी करीत आहोत असे नाही, परंतु तुमची दया विपुल आहे.
19 हे याहवेह, ऐका! हे याहवेह, क्षमा करा! हे याहवेह, ऐका आणि कृती
करा. अहो माझ्या परमेश्वरा, तुम्ही आपल्या स्वतःकरिता विलंब करू
नका, कारण तुमच्या नगराला आणि तुमच्या लोकांना तुमचे नाव दिले
आहे.” 20 जेव्हा मी माझे पाप आणि आपल्या इस्राएली लोकांचे पाप
कबूल करीत बोलत आणि प्रार्थना करीत होतो आणि याहवेह माझ्या
परमेश्वर यांची त्यांच्या पवित्र डोंगरासाठी प्रार्थना करीत होतो; 21 जेव्हा
मी प्रार्थना करीतच होतो, गब्रीएल ज्याला मी आधीच्या दृष्टान्तात पाहिले
होते, संध्याकाळच्या अर्पणासमयी माझ्याकडे आला; 22 त्याने मला
समज दिली आणि मला म्हटले, “दानीएला, आता मी तुला ज्ञान आणि
समज देण्यासाठी आलो आहे. 23 ज्या क्षणाला तू प्रार्थना करण्यास
सुरुवात केलीस, त्याच क्षणाला एक आज्ञा देण्यात आली, ती काय
आहे हे तुला सांगण्यासाठीच मी आलो आहे. कारण तू अतिशय प्रिय
आहेस. म्हणून या गोष्टींचा विचार कर आणि दृष्टान्त नीट समजून घे: 24
“तुमचे लोक आणि तुमचे पवित्र शहर यासाठी सत्तर ‘सप्तके’ निर्धारित
केली गेली आहे की त्यांनी अपराधाचा अंत करावा आणि पापाचा
शेवट करावा आणि दुष्टतेसाठी पश्चात्ताप करावा, सनातन नीतिमत्व
आणावे, दृष्टान्त आणि संदेश यावर शिक्कामोर्तब करण्यासाठी आणि
परमपवित्रस्थानाला अभिषेक करण्यात यावा. 25 “हे जाणा आणि
समजून घ्या: यरुशलेमची पुनर्स्थापना आणि पुनर्बांधणी करण्यासाठी
सात ‘सप्तके’ आणि बासष्ट ‘सप्तके’ निश्चित केली आहेत. ते शब्द
बाहेर येण्यापासून तो अभिषिक्त शासनकर्ता होईपर्यंतचा वेळ ठरविला
आहे. अडचणीच्या वेळी रस्त्यावर आणि खंदकाने पुन्हा बांधले जाईल,
26 बासष्ट ‘सप्तके’ हा काळ संपल्यावर अभिषिक्ताचा वध करण्यात
येईल आणि त्याला काही उरणार नाही. मग अधिपतीचे लोक शहराचा
आणि पवित्रस्थानाचा विध्वंस करतील. शेवट महापुराप्रमाणे येईल:
शेवट होईपर्यंत युद्ध चालू राहील आणि सर्वकाही ओसाड व्हावे असे
ठरले आहे. 27 तो एका ‘सप्तका’ साठी अनेकांसोबत कराराची पुष्टी
करेल. ‘सप्तका’ मध्ये, यज्ञ करण्यास व अन्नार्पणे वाहण्याचे बंद करेल.
आणि मंदिरात अमंगळ वस्तू स्थापित करेल, ज्यामुळे ओसाडी पडेल.
नेमलेल्या समाप्तीपर्यंत सर्वनाश करणाऱ्यावर कोपाचा वर्षाव होईल.”

## 10

पर्शियाचा राजा कोरेश च्या कारकिर्दीच्या तिसऱ्या वर्षी दानीएलला
(ज्याला बेलटशास्सर असे म्हटले जाते) एक प्रकटीकरण झाले.
तो संदेश खरा असून त्याचा संबंध मोठ्या युद्धाशी होता. संदेशाचा
समज दृष्टान्ताद्वारे त्याच्याकडे आला. 2 त्यावेळेस मी, दानीएल, तीन
आठवडे शोक करीत होतो. 3 मी माझे आवडते भोजन केले नाही; मी
मांस खाल्ले नाही वा द्राक्षारस आपल्या ओठाला लावले नाही; तीन
आठवडे पूर्ण होईपर्यंत मी तेलाचा अभ्यंगसुद्धा केले नाही. 4 पहिल्या
महिन्याच्या चोविसाव्या दिवशी मी महानदी फरातच्या तीरावर उभा
होतो, 5 तेव्हा मी वर पाहिले आणि एक तागाची वस्त्रे परिधान केलेला
आणि कमरेला उफाज देशाच्या शुद्ध सोन्याचा पट्टा घातलेला असा

पुरुष उभा होता. 6 त्याची त्वचा तेजस्वी होती, त्याचा चेहरा विजा
चमकाव्यात तसा लखलखत होता. त्याचे डोळे अग्नीच्या ज्योतीसारखे
होते. त्यांचे बाहू आणि पाय उज्ज्वल कास्यासारखे चमकत होते आणि
त्याची वाणी फार मोठ्या लोकसमुदायाच्या आवाजासारखी प्रचंड
होती. 7 हा दृष्टान्त केवळ मला, दानीएललाच दिसला; जे माझ्याबरोबर
होते, त्यांना तो दिसला नाही, परंतु त्यांना अतिशय भीतीने ग्रासले
व लपण्यासाठी ते पळून गेले. 8 मग मी एकटाच राहिलो आणि हा
महान दृष्टान्त पहात राहिलो; माझ्यात शक्ती उरली नाही, माझा चेहरा
पांढराफटक पडला आणि मी असहाय्य झालो. 9 नंतर मी त्याला
बोलताना ऐकले आणि मी जमिनीवर पालथा पडलो आणि मला गाढ
झोप लागली. 10 परंतु एका हाताने त्याने मला स्पर्श केला आणि
माझ्या थरथर कापत असणाऱ्या मला हातांवर व गुडघ्यांवर ठेवले. 11
त्याने म्हटले, “हे दानीएला, परमप्रिय पुरुषा, मी जी काही वचने तुला
सांगत आहे, ती लक्षपूर्वक ऐक आणि नीट उभा राहा, कारण मला
तुझ्याकडे पाठविण्यात आले आहे.” आणि जेव्हा त्याने हे म्हटले, तेव्हा
मी थरथर कापत उभा राहिलो. 12 तो पुढे म्हणाला, “दानीएला, भिऊ
नकोस. कारण ज्या पहिल्या दिवशी तू समजून घेण्यास आणि स्वत:ला
आपल्या परमेश्वरासमोर नम्र करण्यास मन लावलेस, त्या दिवसापासून
तुझे शब्द ऐकण्यात आले आहे आणि आणि मी त्यांना प्रतिसाद म्हणून
आलो आहे. 13 परंतु पर्शिया राज्याच्या राजपुत्राने माझी वाट एकवीस
दिवस अडविली. नंतर मिखाएल, स्वर्गातील राजपुत्रांपैकी एक, माझ्या
साहाय्यासाठी आला, कारण पर्शियाच्या राजाकडे मला अडविण्यात
आले होते. 14 आता मी येथे भविष्यात तुझ्या लोकांसोबत काय होणार
आहे ते समजविण्यासाठी आलो आहे, कारण हा दृष्टान्त पूर्ण होण्यास
बराच वेळ आहे.” 15 तो माझ्यासोबत हे बोलत असता, मी माझे
तोंड जमिनीकडे केले आणि मी काही बोलू शकलो नाही. 16 तेव्हा
कोणीतरी जो मानवासारखा दिसणाऱ्याने माझ्या ओठांना स्पर्श केला
आणि मी माझे मुख उघडले आणि मी बोलू लागलो. जो माझ्यापुढे
उभा होता त्याला म्हटले, “प्रभू या दृष्टान्तामुळे मी मनोवेदनांनी ग्रस्त
झालो आहे; आणि माझ्यात काही बळ उरले नाही. 17 माझ्या प्रभू,
मी तुमचा सेवक, मी तुमच्यासोबत कसे बोलू शकतो? माझी शक्ती
नष्ट झाली आहे. मला श्वासही घेववत नाही.” 18 तेव्हा मानवासारख्या
दिसणाऱ्या पुरुषाने मला पुन्हा स्पर्श केला आणि मला शक्ती दिली.
19 “भिऊ नको, तू फार परमप्रिय आहेस,” तो म्हणाला. “तुला शांती
लाभो! आता बलवान हो; बलवान हो!” जेव्हा त्याने हे म्हटले तेव्हा मला
सामर्थ्य आले आणि मी त्याला म्हटले, “माझ्या प्रभू बोला, कारण
तुम्ही मला सामर्थ्य दिले आहे.” 20 तेव्हा तो म्हणाला, “मी तुझ्याकडे
का आलो हे तुला ठाऊक आहे काय? फार लवकर, मी पर्शियाच्या
राजपुत्राशी लढायला परत येईन आणि मी निघून गेल्यावर ग्रीसचा
राजपुत्र येईल; 21 परंतु सत्याच्या पुस्तकात काय लिहिले आहे ते मी
तुला प्रथम सांगतो. (तुमचा राजपुत्र मिखाएलाशिवाय त्यांच्याविरुद्ध
माझी मदत करणारा कोणीही नाही.

**11** मेदिया राजा दारयावेशच्या कारकिर्दीच्या पहिल्या वर्षी, त्याला
साहाय्य करण्यास आणि संरक्षण देण्यास मी उभा राहिलो.) 2
“आता मी तुला सत्य सांगतो: आता पुढे घडणाऱ्या गोष्टींचा दृष्टान्त मी
तुला दाखवितो. पर्शियात आणखी तीन राजे उदयास येतील आणि मग
चौथा राजा जो सर्वांहून अतिशय धनवान असेल. तो धनसंपत्तीने प्रबळ
झाला म्हणजे तो सर्वांना ग्रीसच्या राज्याविरुद्ध उठवेल. 3 तेव्हा आणखी
एक पराक्रमी राजा उदयास येईल, जो महान पराक्रमाने राज्य करेल
आणि त्याला वाटेल त्याप्रमाणे तो करेल. 4 त्याचा उदय झाल्यानंतर
त्याचे राज्य भंग पावेल आणि चार दिशांत त्याची विभागणी होईल. हे
त्याच्या वंशजांकडे जाणार नाही किंवा ज्या सामर्थ्याने त्याने राज्य केले
ते त्यांच्याकडे नसेल, कारण त्याचे साम्राज्य उपटले जाईल आणि ते
दुसऱ्यांना दिले जाईल. 5 “दक्षिणेचा राजा सामर्थ्यशाली होईल, परंतु
त्याच्या सेनापतींपैकी एक त्याच्यापेक्षाही बलाढ्य होईल आणि तो
स्वत:च्या राज्यावर बलशाली होऊन राज्य करेल. 6 काही वर्षांनंतर
ते एकमेकांशी सलोखा करतील. दक्षिणेच्या राजाची कन्या उत्तरेच्या
राजाकडे तह करण्यासाठी जाईल, परंतु तिच्याकडे सामर्थ्य राहणार
नाही आणि तो व त्याची शक्ती टिकणार नाही. त्या दिवसांत, शाही
रक्षकांसह आणि तिचे वडील आणि मदतनीस तिच्यासोबत विश्वासघात
करतील. 7 “तिच्या कुळातील एकाचा उदय होईल जो तिची जागा घेईल.
तो उत्तरेच्या राजाच्या सैन्यावर हल्ला करेल आणि त्याच्या किल्ल्यात
प्रवेश करेल; तो त्यांच्याशी युद्ध करेल आणि विजयी होईल. 8 तो त्यांचे
दैवत, त्यांच्या धातूच्या मूर्ती आणि सोन्या-चांदीच्या मौल्यवान पात्रांना
ताब्यात घेऊन इजिप्तला नेईल. काही वर्षे तो उत्तरेकडील राजाला
एकटा सोडेल. 9 मग उत्तरेकडील राजा दक्षिणेकडील राजाच्या राज्यावर
कूच करेल, परंतु तो आपल्या देशात परत जाईल. 10 त्याचे पुत्र युद्धाची
तयारी करतील आणि प्रचंड सैन्य गोळा करतील. जे एका अप्रतिकार्य
पुरासारखे पुढे जातील आणि युद्ध त्याच्या किल्ल्यापर्यंत घेऊन जातील.
11 “नंतर दक्षिणेचा राजा क्रोधिष्ट होऊन पुढे जाईल आणि उत्तरेच्या
राजाशी युद्ध करेल, जो एक मोठे सैन्य उभारेल, परंतु त्याचा पराभव
होईल. 12 जेव्हा सैन्याचा नाश होईल, तेव्हा दक्षिणेचा राजा गर्वाने
धुंद होऊन जाईल आणि अनेक हजारो लोकांचा वध करेल, तरीही तो
विजयी होणार नाही. 13 कारण उत्तरेचा राजा दुसरे सैन्य उभे करेल, जे
त्याच्या आधीच्या सैन्यापेक्षा मोठे असेल; आणि बऱ्याच वर्षांनंतर तो
पूर्ण तयारीने मोठ्या सैन्यासह पुढे जाईल. 14 “त्या काळात अनेक
दक्षिणेच्या राजाविरुद्ध उभे राहतील. तुझ्या स्वत:च्या लोकांपैकीच काही
बंडखोर विचारांचे हिंसक लोकसुद्धा दृष्टान्त पूर्णतेसाठी विद्रोह करतील,
परंतु ते अपयशी होतील. 15 नंतर उत्तरेचा राजा येईल आणि आणि वेढा
बांधून तटबंदी असलेले शहर ताब्यात घेईल. दक्षिणेकडील सैन्यांना
प्रतिकार करण्यास शक्ती राहणार नाही; त्यांच्या सर्वोत्तम सैन्यालाही
सामना करण्याची ताकद नसेल. 16 आक्रमण करणारा त्याला वाटेल
तसे तो करेल; त्याच्या विरोधात कोणीही उभे राहू शकणार नाही. तो
सुंदर देशात स्वत:ची स्थापना करेल आणि त्याचा नाश करण्याची

शक्ती त्याच्याकडे असेल. 17 तो आपल्या राज्याच्या सर्व सामर्थ्याने
येण्याचा निर्धार करेल आणि तो दक्षिणेच्या राजाबरोबर करार करेल.
त्याचे राज्य जिंकण्यासाठी तो आपली एक मुलगी विवाहात देईल,
परंतु त्याची ही योजना यशस्वी होणार नाही वा त्याला काही मदत
मिळणार नाही. 18 यानंतर तो आपले लक्ष किनारपट्टीवरील शहरांकडे
वळवील व त्यातील अनेक जिंकून घेईल. परंतु एक सेनापती त्याला
प्रतिकार करेल व त्याला लाजिरवाणी माघार घ्यावी लागेल. 19 यानंतर
तो आपल्या स्वत:च्या देशातील दुर्गाकडे मोर्चा फिरवेल, पण तो ठेच
लागून पडेल व त्याचे अस्तित्व सापडणार नाही. 20 “त्याच्या जागी
एकजण येईल, जो त्या वैभवी देशात कर वसूल करणाऱ्यास पाठवेल.
काही वर्षात, त्याचा नाश केला जाईल, तरीही त्याचा नाश क्रोधाने
किंवा युद्धात होणार नाही. 21 “त्याच्या जागी असा नीच मनुष्य येईल
ज्याला राजघराण्याचा मान मिळालेला नाही. जेव्हा जनतेला सुरक्षित
वाटत असेल, तेव्हाच तो राज्यावर आक्रमण करेल आणि कट रचून
राज्य आपल्या ताब्यात घेईल. 22 मग त्याच्यापुढे मोठ्या सैन्याचा नाश
होईल; तो आणि कराराचा राजपुत्र दोघेही नष्ट होतील. 23 त्याच्यासोबत
करार केल्यानंतर तो कपटाने वागेल, आणि काही मोजक्या लोकांसह
तो समर्थ होईल. 24 जेव्हा श्रीमंतांना राज्य सुरक्षित वाटत असेल,
तेव्हाच तो त्यांच्यावर आक्रमण करेल आणि असे यश प्राप्त करेल की,
त्याच्या पित्याने किंवा त्याच्या पित्याच्या पित्याने प्राप्त केले नसेल.
तो धन, लूट आणि संपत्ती आपल्या अनुयायांमध्ये वाटून देईल. तो
किल्ले पाडण्याचा कट रचेल—पण फक्त काही काळासाठी. 25 “प्रचंड
सैन्य घेऊन तो दक्षिणेच्या राजाविरुद्ध आपले सामर्थ्य आणि धाडस
उत्तेजित करेल. दक्षिणेचा राजाही प्रचंड आणि बलाढ्य सैन्यासह लढेल,
परंतु त्याच्याविरुद्ध रचलेल्या कटामुळे तो तोंड देऊ शकणार नाही.
26 जे राजाच्या मेजावर भोजन करीत असे ते त्याचा नाश करण्याचा
प्रयत्न करतील; त्याच्या सैन्याचा नाश होईल आणि बरेच लोक युद्धात
मारले जातील. 27 दोन्ही राजे मनात वाईट गोष्टी घेऊन एकाच मेजावर
बसतील आणि एकमेकांशी खोटे बोलतील, त्यातून काहीच निष्पन्न
होणार नाही, कारण अंत ठरलेल्या वेळी होईल. 28 उत्तरेचा राजा पुष्कळ
धनसंपत्ती घेऊन आपल्या देशात परत येईल, परंतु त्याचे मन पवित्र
कराराविरुद्ध राहील. त्याच्या मनाला वाटेल तसा तो वागेल आणि मग
आपल्या देशात परत येईल. 29 “निर्धारित वेळी तो पुन्हा दक्षिणेवर
आक्रमण करेल, परंतु पहिल्या दोन प्रसंगी झाले त्याहून अगदी वेगळे
परिणाम आता होतील. 30 पश्चिमेकडील कित्तीम बेटांतील जहाजे त्याला
विरोध करतील आणि त्याचे धैर्य तुटेल. मग तो पवित्र करारावर आपला
रोष काढण्यासाठी परत येईल. तो परत येईल आणि पवित्र कराराचा
त्याग करणाऱ्यांवर कृपा दाखवेल. 31 “त्याचे सशस्त्र सैन्य मंदिराच्या
दुर्गास अपवित्र करण्यासाठी पुढे येतील आणि दैनंदिन होमार्पण बंद
केले जाईल. मग ते ओसाड करणारा अमंगळ पदार्थ स्थापतील. 32
जे कराराविरुद्ध दुष्टता करतात, त्यांना तो खुशामत करून भ्रष्ट करेल,
पण ज्यांना त्यांचा परमेश्वर माहीत आहे ते त्याला खात्रीने सामोरे
जातील. 33 “जे ज्ञानी आहेत ते पुष्कळांना शिक्षण देतील, जरी काही
काळासाठी, ते तलवारीने मारले जातील किंवा जाळले जातील किंवा
पकडले जातील किंवा लुटले जातील. 34 जेव्हा ते पडतील तेव्हा त्यांना
खूप कमी मदत मिळेल आणि प्रामाणिक नसलेले बरेच लोक त्यांच्यात
सामील होतील. 35 सुज्ञानी लोकांपैकी काही अडखळतील, यासाठी की
शेवटच्या वेळेपर्यंत ते स्वच्छ, शुद्ध आणि निर्दोष राहतील, कारण अंत
नेमलेल्या वेळी होईल. 36 “राजा स्वत:च्या इच्छेप्रमाणे वागेल; सर्व
दैवतांपेक्षा आपण श्रेष्ठ आहोत असे तो म्हणेल. तो देवाधिदेवाचीही
निंदा करेल आणि त्याची महासंकटकाळाच्या शेवटपर्यंत भरभराट
होईल. कारण जे ठरवून दिले आहे ते नक्कीच घडेल. 37 तो आपल्या
पूर्वजांच्या दैवतांचा आदर करणार नाही, किंवा स्त्रियांच्या इच्छांची
पर्वा करणार नाही, किंवा कोणत्याही दैवताचा आदर करणार नाही,
परंतु तो स्वत:ला त्या सर्वांपेक्षा श्रेष्ठ ठरवेल. 38 पण त्यांच्याऐवजी तो
दुर्गदैवतांचा सन्मान करेल; जे दैवत त्याच्या पूर्वजांना माहीत नव्हते
त्यांचा सन्मान तो सोने, चांदी, मौल्यवान रत्ने आणि किमती देणग्या
यांनी करेल. 39 तो या परकीय दैवतांच्या साहाय्याने मजबूत किल्ल्यांवर
आक्रमण करेल आणि जे त्याचा राजा म्हणून स्वीकार करतील त्यांचा
आदर करेल. तो त्यांना अनेक लोकांवर अधिकारी म्हणून नियुक्त
करेल आणि बक्षीस म्हणून त्यांना जमीन वाटून देईल. 40 “अखेरच्या
काळात दक्षिणेचा राजा त्याच्यावर हल्ला करेल आणि उत्तरेचा राजा
वादळी झंझावातासारखा रथ, घोडेस्वार आणि पुष्कळ जहाजे घेऊन
त्याच्यावर हल्ला करेल. तो अनेक देशांवर स्वाऱ्या करेल आणि एखाद्या
महापुराप्रमाणे त्यांच्यामधून निघून जाईल. 41 तो सुंदर देशावर आक्रमण
करेल. पुष्कळ देशांची उलथापालथ होईल, पण एदोम, मोआब आणि
अम्मोनचे प्रमुख त्याच्या तावडीतून सुटतील. 42 तो अनेक देशांवर
आपल्या शक्तीचा विस्तार करेल; इजिप्त देश देखील सुटणार नाही.
43 तो इजिप्त देशामधील सोन्याच्या व चांदीच्या खजिन्यांवर व सर्व
मौल्यवान वस्तूंवर ताबा मिळवेल, लिबिया व कूशी हे देश त्याचे दास
होतील. 44 परंतु पूर्वेकडून व उत्तरेकडून येणाऱ्या बातम्यांनी तो अस्वस्थ
होईल आणि मोठ्या क्रोधाने पुष्कळांचा नाश आणि अनेकांना नाहीसे
करण्यास बाहेर पडेल. 45 समुद्राच्या मध्यभागी असलेल्या सुंदर पवित्र
पर्वताजवळ तो आपला शाही तंबू उभारेल. तरीही त्याचा अंत होईल
आणि त्याच्या साहाय्यासाठी कोणीही नसेल.

**12** “त्यावेळी तुमच्या लोकांचा रक्षक, समर्थ अधिपती मिखाएलचा
उदय होईल. राष्ट्रांच्या सुरुवातीपासून आजतागायत कधीही
आलेला नाही असा संकटाचा काळ येईल. परंतु त्यावेळी तुझ्या
लोकांपैकी—ज्यांची नावे पुस्तकात नोंदलेली आहेत—त्या सर्वांची
मुक्तता होईल. 2 पृथ्वीच्या धुळीत झोपलेले बरेच लोक जागे होतील:
काहीजण सर्वकाळच्या जीवनासाठी तर काही निर्लज्जता व सर्वकाळच्या
अपमानासाठी उठतील. 3 जे सुज्ञ आहेत ते आकाशातील प्रकाशासारखे
प्रज्वलित होतील. तसेच अनेकांना नीतिमार्गाकडे वळवणारे सदासर्वकाळ
ताऱ्यांप्रमाणे चकाकतील. 4 पण हे दानीएला, गुंडाळीतील ही वचने

गुप्त ठेव आणि गुंडाळी शेवटच्या काळासाठी मोहोरबंद करून ठेव.
पुष्कळजण इकडून तिकडे फिरतील आणि ज्ञान वाढत जाईल.” 5 तेव्हा
मी दानीएलाने पाहिले, नदीच्या या तीरावर एक आणि त्या तीरावर एक
असे दोन पुरुष उभे असलेले मला दिसले. 6 त्यांच्यातील एकाने तागाची
वस्त्रे नेसलेल्या व आता नदीच्या पाण्यावर उभ्या असलेल्या पुरुषाला
विचारले, “आधी सांगितलेल्या अद्भुत गोष्टींची समाप्ती होण्यास किती
काळ लागेल?” 7 तागाची वस्त्रे नेसलेल्या व नदीच्या पाण्यावर
उभ्या असलेल्या पुरुषाने आपला उजवा हात आणि त्याचा डावा हात
स्वर्गाकडे उंचाविला व जे सदासर्वकाळ जिवंत आहेत, त्यांची शपथ
देऊन सांगितले, “एक समय, दोन समय आणि अर्धा समय. शेवटी जेव्हा
पवित्र लोकांच्या शक्तीचा नाश होईल तेव्हा या सर्व गोष्टी पूर्ण होतील.”
8 हे मी ऐकले, पण त्यांचा अर्थ मला समजला नाही. म्हणून मी विचारले,
“माझ्या प्रभू, या सर्वांचा शेवट कसा काय होणार?” 9 त्याने उत्तर दिले,
“हे दानीएला, आता जा, कारण अखेरचा काळ येईपर्यंत या गोष्टींना
गुंडाळून आणि शिक्का मारून बंद करण्यात आले आहे. 10 पुष्कळ
लोक शुद्ध, निष्कलंक आणि निर्मळ केले जातील, परंतु दुष्ट आपल्या
दुष्टपणातच मग्न राहतील; एकाही दुष्टाला या गोष्टी समजणार नाही,
परंतु जे सुज्ञ आहेत त्यांनाच याचा अर्थ काय ते समजेल. 11 “रोजचे
यज्ञार्पण बंद होईल व ओसाड करणारा अमंगळ पदार्थ स्थापित होईल
तेव्हापासून 1,290 दिवस लोटतील. 12 धन्य ते जे 1,335 दिवस
वाट पाहत राहतील आणि शेवट पाहतील. 13 “आता तू शेवटपर्यंत
तुझ्या मार्गाने जा. तू विसावा घेशील आणि तुझ्यासाठी राखून ठेवण्यात
आलेले तुझे संपूर्ण वतन घेण्यासाठी तू पुन्हा उठशील.”

# होशेय

**1** यहूदाहचे राजे उज्जीयाह, योथाम, आहाज, हिज्कीयाह आणि
इस्राएलचा राजा, योआशचा पुत्र यरोबोअम यांच्या कारकिर्दीत
बैरीचा पुत्र होशेय याच्याकडे याहवेहचे जे वचन आले ते हे: 2 जेव्हा
याहवेहने प्रथम होशेयद्वारे बोलण्यास प्रारंभ केला, तेव्हा याहवेह त्याला
म्हणाले, “जा आणि एखाद्या व्यभिचारी स्त्रीबरोबर विवाह कर आणि
तिच्यापासून लेकरे जन्माला घाल. कारण हा देश एका व्यभिचारी
पत्नीप्रमाणे याहवेहशी अविश्वासूपणाचा दोषी आहे.” 3 म्हणून त्याने
दिब्लाइमाची कन्या गोमेर हिच्याशी विवाह केला आणि ती गरोदर
राहिली. तिने त्याच्या पुत्राला जन्म दिला. 4 तेव्हा याहवेह होशेयला
म्हणाले, “त्याचे नाव येज्रील ठेव, कारण मी लवकरच येहूच्या घराण्याला
येज्रीलच्या रक्ताबद्दल शिक्षा देईन आणि मी इस्राएल राज्याचा शेवट
करेन. 5 त्या दिवशी येज्रीलच्या खोऱ्यात मी इस्राएलचे धनुष्य मोडून
टाकीन.” 6 गोमेर पुन्हा गर्भवती झाली आणि तिने कन्येला जन्म दिला.
तेव्हा याहवेह होशेयला म्हणाले, “हिचे नाव लो-रुहामा असे ठेव, कारण
येथून पुढे त्यांना क्षमा करावी अशी प्रीती मी इस्राएलवर दाखविणार
नाही. 7 पण मी यहूदीयाच्या वंशावर मी प्रीती करेन; आणि मी त्यांना
वाचवेन—धनुष्य, तलवार किंवा युद्ध, किंवा घोडे आणि घोडेस्वार
यांच्याद्वारे नाही, परंतु मी याहवेह त्यांचा परमेश्वर, त्यांना वाचवेन.” 8
लो-रुहामाचे दूध तोडल्यावर गोमेरने आणखी एका पुत्राला जन्म दिला.
9 तेव्हा याहवेह म्हणाले, “याचे नाव लो-अम्मी असे ठेव, कारण तुम्ही
माझे लोक नाहीत आणि मी तुमचा परमेश्वर नाही. 10 “तरीही इस्राएली
लोक समुद्रकिनाऱ्यावरील वाळूप्रमाणे असंख्य असतील जी मापता
येणार नाही किंवा मोजता येणार नाही, असे. ज्या ठिकाणी म्हटले होते,
तुम्ही माझे लोक नाहीत, तिथे त्यांना जिवंत परमेश्वराची लेकरे म्हणतील
11 तेव्हा यहूदाहचे संतान व इस्राएलचे संतान एकत्र येतील; ते एक
पुढारी नेमतील आणि देशातून एकत्र बाहेर येतील, कारण तो येज्रीलचा
किती महान दिवस असेल.

**2** “तुमच्या बंधूंना, ‘माझे लोक’ आणि तुमच्या भगिनींना, ‘माझी
प्रिय व्यक्ती.’ असे म्हणा. 2 “तुम्ही आपल्या आईला रागवा, तिला
रागवाच, कारण ती माझी पत्नी नाही, आणि मी तिचा पती नाही. ती
आपल्या मुखावरून तिचे व्यभिचारी रूप आणि अविश्वासूपणा तिच्या
स्तनांमधून दूर करो. 3 नाही तर मी तिचे वस्त्र काढून तिला नग्न
करेन, जशी तिच्या जन्माच्या दिवशी ती नग्न होती; तिला मी वैराण
प्रदेशासारखी करेन, निर्जल भूमीसारखी ठेवेन व तिला तहानेने जिवे
मारीन. 4 मी तिच्या मुलांच्या प्रती आपली प्रीती दाखविणार नाही,
कारण ती मुले व्यभिचाराची आहेत. 5 कारण त्यांची आई अविश्वासू
आहे आणि तिने लाजिरवाणी गोष्ट करून त्यांचे गर्भधारणा केली आहे.
ती म्हणाली, ‘मी माझ्या प्रियकरांच्या मागे जाईन, जे मला माझे अन्न
आणि माझे पाणी, माझी लोकर आणि माझे ताग, माझे जैतुनाचे तेल
आणि माझे पेय देतात.’ 6 म्हणून मी तिच्या मार्गात काटेरी झाडांचे
कुंपण घालेन; मी तिच्यापुढे अशी आडभिंत उभी करेन की तिला तिच्या
वाटा सापडणार नाही. 7 ती तिच्या प्रियकरांमागे धावेल, पण त्यांना
गाठू शकणार नाही. ती त्यांना शोधेल, पण ते तिला सापडणार नाहीत.
मग ती म्हणेल, ‘मी आता माझ्या पहिल्या पतीकडे परत जाईन, कारण
माझी परिस्थिती सध्यापेक्षा तेव्हा चांगली होती.’ 8 तिने ओळखले
नाही की, तो मीच होतो ज्याने तिला धान्य, नवीन द्राक्षारस आणि
तेल दिले, ज्याने उदारहस्ते तिला चांदी आणि सोने दिले; जे त्यांनी
बआलसाठी वापरले. 9 “म्हणून जेव्हा माझे धान्य पिकेल मी ते काढून
घेईन, आणि माझा नवीन द्राक्षारस तयार होईल तेव्हा तो काढून घेईन.
तिचे नग्न शरीर झाकण्यासाठी, मी माझी लोकर आणि माझी तागाची
वस्त्रे दिली होती ती परत घेईन. 10 म्हणून मी आता तिची अश्लीलता
तिच्या प्रियकरांसमोर उघडी करेन; माझ्या हातून तिला कोणीही वाचवू
शकणार नाही. 11 मी तिचे सर्व उत्सव: तिचे वार्षिक सण, तिचे नवीन
चंद्रदर्शन, तिचे शब्बाथाचे दिवस—नेमून दिलेले तिचे सर्व सण बंद
करेन. 12 मी तिच्या द्राक्षमळ्यांचा व अंजिराच्या झाडांचा नाश करेन,
जो तिच्या प्रियकरांनी तिला वेतन म्हणून दिला होता, असे तिचे म्हणणे
आहे; मी त्यांचे गर्द झाडी करेन व वनपशू ते खाऊन टाकतील. 13 जेव्हा
तिने बआलसाठी धूप जाळला, तिला मी त्या दिवसांसाठी शिक्षा करेन;
तिने स्वतःला अंगठ्यांनी आणि दागिन्यांनी सजविले, आणि तिच्या
प्रियकरांच्या मागे गेली, परंतु मला मात्र ती विसरून गेली,” असे याहवेह
घोषित करतात. 14 “म्हणून तिला मी भुलविणार; तिला रानात घेऊन
जाईन आणि तिच्याबरोबर कोमलतेने बोलेन. 15 तिथे मी तिला तिचे
द्राक्षमळे परत करेन, आणि अखोरचे खोरे तिला आशेचे द्वार असे देईन.
जेव्हा ती इजिप्तमधून बाहेर आली, तिच्या तारुण्याच्या दिवसात जसे
उत्तर देत होती तसेच उत्तर देईल. 16 “त्या दिवशी, तुम्ही मला ‘माझा
पती’ असे म्हणाल; यापुढे तुम्ही मला ‘माझे बआल’ असे म्हणणार
नाही, याहवेह असे घोषित करतात. 17 मी तिच्या मुखातून बआलची
नावे काढून टाकीन; यापुढे त्यांची नावे कधीही घेतली जाणार नाही. 18
त्या दिवशी मी त्यांच्यासाठी रानातील पशू, आकाशातील पक्षी आणि
भूमीवर सरपटणारे यांच्यामध्ये मी करार घडवून आणेन. धनुष्य आणि
तलवार आणि लढाया मी देशातून काढून टाकेन, म्हणजे तुम्ही सर्वजण
सुरक्षितपणे विश्राम कराल. 19 मी तुला माझ्याबरोबर कायमचे वाग्दत्त
असे करेन; मी तुम्हाला नीतिमत्व आणि न्याय, प्रीती आणि करुणा
यामध्ये वाग्दत्त करेन. 20 विश्वासूपणाने तुला वाग्दत्त करून घेईन, आणि
याहवेहची ओळख तुला होईल. 21 “त्या दिवशी मी प्रतिसाद देईन; मी
आकाशाला प्रतिसाद देईन आणि ते पृथ्वीला प्रतिसाद देतील;” याहवेह
अशी घोषणा करतात. 22 “आणि पृथ्वी धान्य, नवीन द्राक्षारस आणि
जैतून तेल यांना प्रतिसाद देईल, आणि ते येज्रीलास प्रतिसाद देतील. 23
मी तिची माझ्यासाठी देशात पेरणी करेन; ‘माझी प्रिया नाही’ असे मी
ज्यांना म्हटले त्याला मी माझी प्रीती दाखवेन. जे ‘माझे लोक नाहीत,’
असे म्हटले त्यांना ‘तुम्ही माझे लोक आहात’ असे म्हणेन; आणि ते
म्हणतील, ‘तुम्ही आमचे परमेश्वर आहात.’”

3 मग याहवेह मला म्हणाले, “जा आणि आपल्या पत्नीस आपली
प्रीती पुन: प्रकट कर, जरी तिला दुसरा कोणता पुरुष प्रीती करतो
आणि ती एक व्यभिचारिणी आहे. जरी ते इतर दैवतांकडे वळले असून
पवित्र मनुकांच्या ढेपांची आवड धरतात, तरी याहवेह इस्राएली लोकांवर
प्रीती करतात.” 2 तेव्हा मी तिच्या सुटकेसाठी चांदीची पंधरा शेकेल
व एक होमेर व एक लेथेक जव देऊन तिला विकत घेतले. 3 मग मी
तिला म्हणालो, “तुला अनेक दिवस माझ्याबरोबर राहवयाचे आहे;
जारकर्म करू नकोस अथवा इतर पुरुषांकडे जाऊ नकोस, आणि
मीही तुझ्यासोबत तसाच वागेन.” 4 कारण दीर्घकाळापर्यंत इस्राएली
लोक राजा अथवा राजपुत्र, यज्ञ अथवा पवित्र दगड, एफोद अथवा
कुलदैवतांशिवाय राहतील. 5 त्यानंतर इस्राएली लोक परत येतील
आणि याहवेह त्यांच्या परमेश्वराला आणि त्यांचा राजा दावीदाचा शोध
घेतील. अखेरच्या काळात याहवेहकडे ते थरथर कापत आणि त्यांच्या
आशीर्वादासाठी येतील.

4 इस्राएली लोकहो, याहवेहचे वचन ऐका. या देशात राहणाऱ्यांवर
याहवेहचा आरोप आहे: या देशात विश्वासूपणा नाही, प्रीती नाही,
परमेश्वराप्रती ज्ञान नाही. 2 या ठिकाणी फक्त शाप, खोटे बोलणे आणि
खून, चोरी आणि व्यभिचार आहे; सर्व सीमाबंदी ते मोडून टाकतात,
आणि रक्तपातानंतर रक्तपात होतो. 3 म्हणूनच तुमची भूमी कोरडी पडत
आहे, येथे राहणारे सर्व नाश पावत आहे; रान पशू, आकाशातील पक्षी
आणि समुद्रातील मासे नाहीसे होत आहेत. 4 परंतु कोणीही आरोप
करू नका, तुम्ही इतरांवर आळ घेऊ नका, कारण तुमचे लोक असे
आहेत जे याजकांवर दोष लावतात. 5 तुम्ही दिवस व रात्र अडखळता,
आणि संदेष्टेही तुमच्याबरोबर अडखळतात. म्हणून मी तुमच्या आईचा
नाश करेन— 6 ज्ञान नसल्यामुळे माझ्या लोकांचा नाश होत आहे,
“कारण, तुम्ही ज्ञानाला नाकारले आहे, म्हणून मी तुम्हाला माझे याजक
म्हणून नाकारत आहे; कारण तुम्ही तुमच्या परमेश्वराच्या नियमांकडे
दुर्लक्ष केले आहे, म्हणून मी सुद्धा तुमच्या मुलांकडे दुर्लक्ष करेन. 7
जितकी याजकांची संख्या वाढत गेली, तितकी अधिक पापे त्यांनी
माझ्याविरुद्ध केली; त्यांच्या वैभवशाली परमेश्वराच्या बदल्यात त्यांनी
लाजिरवाणी गोष्ट स्वीकारली. 8 माझ्या लोकांच्या पापांवर ते पोषण
करतात आणि त्यांच्या दुष्टतेचा आनंद घेतात. 9 आणि असे होईल की:
जसे लोक तसे याजक होतील. मी दोघांनाही त्यांच्या आचरणामुळे
शासन करेन आणि त्यांच्या कृत्यांसाठी त्यांना परतफेड करेन. 10
“ते खातील परंतु ते तृप्त होणार नाहीत; ते व्यभिचार करतील परंतु
त्यांची भरभराट होणार नाही, कारण त्यांनी याहवेहचा त्याग केला आहे
आणि स्वत:स वेश्या व्यवसायास सोपविले आहे. 11 जुना द्राक्षारस
आणि नवीन द्राक्षारस त्यांचा समंजसपणा दूर करतात. 12 माझे लोक
लाकडी मूर्तींचा सल्ला घेतात आणि दैवप्रश्न करणाऱ्यांची काठी त्यांचे
भविष्य सांगते. व्यभिचाराचा आत्मा त्यांना भरकटवितो; ते त्यांच्या
परमेश्वराला विश्वासू राहिले नाहीत. 13 एला वृक्ष, हिवर आणि एला या
झाडांखाली, जिथे सुखदायक सावली असते तिथे पर्वतांच्या शिखरांवर
यज्ञ करतात आणि टेकड्यांवर ते होमार्पण करतात. म्हणून तुमच्या
कन्या वेश्याव्यवसायाकडे वळतात आणि तुमच्या सुना व्यभिचार
करतात. 14 “जेव्हा त्या वेश्याव्यवसायाकडे वळतात, अथवा तुमच्या
सुना त्या व्यभिचार करतात, मी तुमच्या कन्यांना शासन करणार नाही,
कारण पुरुष स्वत: वेश्यांबरोबर सहवास करतात आणि पवित्र स्थळी
असलेल्या देवदासींबरोबर बलिदान करतात— समंजसपणा नसलेल्या
लोकांचा नाश होईल! 15 “हे इस्राएला, जरी तू व्यभिचार केला आहेस,
तरी यहूदाहला दोषी होऊ देऊ नकोस. “गिलगालकडे जाऊ नका; वर
बेथ-आवेन येथे जाऊ नका. आणि ‘याहवेहच्या जीविताची शपथ!’ अशी
शपथ घेऊ नका. 16 जशी कालवड हट्टी असते, तसे इस्राएली लोक हट्टी
आहेत. मग जशी कोकरे कुरणात चरतात, त्याप्रमाणे याहवेह त्यांना
कुरणात कसे नेतील? 17 एफ्राईम मूर्तींबरोबर जोडले गेले आहे, त्याला
एकटे सोडून द्या! 18 जेव्हा त्यांचे मद्य संपते तेव्हा सुद्धा, ते त्यांचा
वेश्याव्यवसाय चालू ठेवतात; त्यांचे शासक लज्जास्पद कृतिंवर अधिक
प्रीती करतात. 19 एक वावटळ त्यांना वाहून नेईल, आणि त्यांच्या
अर्पणांमुळे त्यांना लाज वाटेल.

5 “तुम्ही याजकांनो, हे ऐका! अहो इस्राएलाच्या घराण्यांनो, लक्ष
द्या! राजघराणे, ऐका! हा न्याय तुमच्याविरुद्ध आहे: मिस्पाह येथे
तुम्ही पाश झाला आहात, ताबोरावर पसरलेले जाळे झाले आहात. 2
बंडखोरांनी भयंकर कत्तल केली आहे, मी त्या सर्वांना शिस्त लावेन.
3 एफ्राईमाबद्दल मला सर्वकाही माहीत आहे; इस्राएल माझ्यापासून
लपलेले नाही. हे एफ्राईमा, तू आता वेश्याव्यवसायाकडे वळला आहेस;
इस्राएल भ्रष्ट झालेला आहे. 4 “त्यांची कर्मे त्यांना पुन्हा त्यांच्या
परमेश्वराकडे येऊ देत नाहीत. वेश्यावृत्तीचा आत्मा त्यांच्या अंत:करणात
आहे; ते याहवेहला ओळखत नाहीत. 5 इस्राएलचा उन्मत्तपणाच
त्यांच्याविरुद्ध साक्ष देतो; इस्राएल आणि एफ्राईम सुद्धा आपल्या पापात
अडखळतात; यहूदीया देखील त्यांच्यासोबत अडखळतो. 6 जेव्हा ते
आपले मेंढरांचे व गुरांचे कळप घेऊन याहवेहच्या शोधात फिरतील,
ते त्यांना सापडणार नाही; कारण त्यांनी स्वत:ला त्यांच्यापासून दूर
केले आहेत. 7 ते याहवेहशी अविश्वासू राहिले; ते अनौरस लेकरांना
जन्म देतात. जेव्हा ते अमावस्येचा उत्सव साजरा करतील, तेव्हा ते
त्यांच्या शेताला गिळून टाकतील. 8 “तुम्ही गिबियाहात शिंग फुंका,
रामाह येथे कर्णा वाजवा. बेथ-आवेन येथे उंच आवाजात युद्धाची
घोषणा करा; बिन्यामीन आमचे नेतृत्व करा. 9 एफ्राईम शासनाच्या
दिवशी ओसाड पडेल. इस्राएली गोत्रात जे निश्चितच होणार त्याची
घोषणा करणार. 10 यहूदाहचे पुढारी सीमारेषांचे दगड हालविणारे
झाले आहेत. एखाद्या जलप्रलयाप्रमाणे मी माझा संताप त्यांच्यावर
ओतेन. 11 एफ्राईम चिरडला गेला आहे, न्यायात चेंगरलेला आहे. कारण
मूर्तींच्या मागे जाण्याचा त्याचा निश्चय आहे. 12 एफ्राईमाला मी कसर,
आणि यहूदाहसाठी सडीचा रोग आहे. 13 “ज्यावेळी एफ्राईमने त्याचा
आजार पाहिला, आणि यहूदाहने त्याची जखम पाहिली, तेव्हा एफ्राईम
अश्शूराकडे वळला, आणि महान राजाकडे मदतीसाठी विनंती केली.

परंतु तो तुला बरे करू शकत नाही, तुझ्या जखमाही बऱ्या करू शकत
नाही. 14 कारण मी एफ्राईमला एखाद्या सिंहासारखा, व यहूदाहला
मोठ्या सिंहासारखा होईन. मी त्यांना फाडून टाकीन आणि दूर निघून
जाईन; मी त्यांना घेऊन जाईन आणि त्यांना सोडविणारा कोणीही
नसेल. 15 ते आपला अपराध कबूल करेपर्यंत व साहाय्यासाठी माझे
मुख पुन्हा शोधेपर्यंत मी आपल्या गुहेत परत जाईन— कारण संकट
आल्याबरोबर, ते माझा शोध कळकळीने करतील.”

**6** “चला, आपण याहवेहकडे परत जाऊ. त्यांनी आम्हाला फाडले आहे,
व तेच आम्हाला बरे करतील; त्यांनी आम्हाला जखम केली आहे, व
आता तेच पट्टी बांधतील. 2 ते आम्हाला दोन दिवसात पुनरुज्जीवन
देतील; तिसऱ्या दिवशी ते आम्हाला पुनर्स्थापित करतील, जेणेकरून
आपण त्यांच्या उपस्थितीत जिवंत राहू शकू. 3 चला, याहवेहचा
आपण स्वीकार करू या; चला, त्यांचा स्वीकार करण्यास आपण
झटू या. सूर्याचे उगविणे जसे निश्चित आहे, तसेच त्यांचे प्रकट होणे
निश्चित आहे; हिवाळ्यातील पावसाप्रमाणे, पृथ्वीला सिंचन घालणाऱ्या
वसंतऋतूप्रमाणे ते आमच्याकडे येतील.” 4 “एफ्राईमा मी तुमचे काय
करू? यहूदाह मी तुमचे काय करू? कारण तुमची प्रीती सकाळच्या
ढगांप्रमाणे, पहाटेच्या दवबिंदूप्रमाणे नाहीशी होते. 5 म्हणून माझ्या
संदेष्ट्याद्वारे मी तुमचे तुकडे केले आहे, माझ्या मुखाच्या शब्दांनी
तुम्हाला ठार केले— तेव्हा माझ्या न्याय सूर्याच्या प्रकाशाप्रमाणे पुढे
वाढत जातो. 6 कारण मला तुमची अर्पणे नव्हे, तर दया हवी आहे,
आणि होमार्पण पेक्षा परमेश्वराचे ज्ञान प्रिय आहे. 7 आदामाप्रमाणे तुम्ही
माझा करार मोडला आहे; तिथे ते माझ्याशी अविश्वासूपणे वागले होते.
8 गिलआद हे दुष्कर्म करणारे शहर आहे, त्यावर रक्ताची पावले उमटली
आहेत. 9 जसे लुटारू बळी पडणाऱ्याची वाट पाहत दबा धरून बसतात,
तसेच याजकांच्या टोळ्या शेखेमाच्या वाटेवर वध करतात, ते आपल्या
दुष्ट योजना पूर्ण करतात. 10 मी इस्राएलमध्ये एक भयानक गोष्ट
पाहिली आहे: एफ्राईम वेश्याव्यवसाय करण्यास दिला आहे, इस्राएल
अपवित्र झाला आहे. 11 “हे यहूदाह, तुझ्यासाठी हंगामाची वेळ नेमलेली
आहे. “जेव्हा मी माझ्या लोकांना जुन्या दिवसात पुनर्स्थापित करेन,

**7** जेव्हा मी इस्राएलला आरोग्य देतो, तेव्हा एफ्राईमचे पाप आणि
शोमरोनचे अपराध प्रकट होतात. ते लबाडी करतात, चोर घरात
चोरी करतात, लुटारू रस्त्यावर लूटमार करतात; 2 परंतु त्यांना हे
कळत नाही की त्यांची सर्व वाईट कृत्ये मला स्मरण आहेत. त्यांच्या
पापकर्मांनी त्यांना घेरले आहे; ते नेहमी माझ्यासमोर असतात. 3 “ते
राजाला आपल्या दुष्टाईने, अधिपतीला आपल्या लबाड्यांनी हर्षित
करतात. 4 ते सर्वच व्यभिचारी आहेत; रोटी भाजणाऱ्याच्या सतत
पेटलेल्या भट्टीप्रमाणे ते आहेत. पीठ मळून ते फुगेपर्यंत तो विस्तव
चाळविण्याचे थांबवितो. 5 आमच्या राजाच्या उत्सवाच्या दिवशी
अधिपती द्राक्षारसाने धुंद होतात, आणि त्याने आपला हात कुचेष्टा
करणाऱ्यांबरोबर मिळविला आहे. 6 कारस्थाने करताना त्यांची हृदये
तापलेल्या भट्टीसारखी होतात. त्यांची उत्कटता रात्रभर धुमसत असते;
सकाळी तो प्रज्वलित अग्नीसारखा पेट घेतो. 7 ते सर्व भट्टीसारखे तप्त
आहेत; ते त्यांच्या अधिपतींना गिळून टाकतात. त्यांचे सर्व राजे पतन
पावले आहेत, त्यातील कोणी मला हाक मारीत नाही. 8 “एफ्राईम गैर
यहूदीयांसोबत मिसळतो; एफ्राईम न पलटलेल्या भाकरीसारखा झाला
आहे. 9 परकीय लोक त्याच्या शक्तीचे शोषण करतात, पण त्याला हे
कळत नाही त्याचे केस पांढरे होत चालले आहेत, पण तो त्याची नोंद
घेत नाही. 10 इस्राएलचा उन्मत्तपणाच त्याच्याविरुद्ध साक्ष देतात, हे
सर्व असूनही तो याहवेह त्याच्या परमेश्वराकडे वळत नाही, किंवा त्यांचा
शोध घेत नाही. 11 “एफ्राईम एखाद्या खुळ्या पारव्यासारखा बुद्धिहीन
आणि सहज फसणारा आहे— तो आता इजिप्तला हाक मारतो; आता
तो अश्शूराकडे धाव घेतो. 12 जेव्हा ते जातील तेव्हा मी माझे जाळे
त्याच्यावर फेकेन; मी त्यांना आकाशातील पक्ष्याप्रमाणे खाली आणेन.
जेव्हा मी ऐकेन की ते एकत्र होत आहेत, तेव्हा मी त्यांना पकडेन. 13
ते माझ्यापासून बहकले आहेत म्हणून त्यांचा धिक्कार असो! त्यांचा
नाश होवो, कारण त्यांनी माझ्याविरुद्ध विद्रोह केला आहे. मला त्यांचा
उद्धार करावयाची इच्छा होती, पण ते माझ्याबद्दल खोटे बोलतात. 14 ते
मला त्यांच्या हृदयापासून हाक मारत नाहीत, परंतु त्यांच्या बिछान्यांवर
विलाप करतात. ते धान्य आणि नवीन द्राक्षारसासाठी त्यांच्या दैवतांकडे
भीक मागून स्वतःला जखमा करतात, पण ते माझ्यापासून दूर राहतात.
15 मी त्यांना शिक्षण दिले आहे आणि त्यांचे बाहू बळकट केले आहे,
परंतु ते माझ्याविरुद्ध वाईट कल्पना मनात आणतात. 16 ते परमोच्च
परमेश्वराकडे फिरत नाहीत; तर ते सदोष धनुष्यांसारखे आहेत. उर्मट
शब्दांमुळे त्यांचे पुढारी तलवारीला बळी पडतील. यामुळे इजिप्त देशात
त्यांची थट्टा करण्यात येईल.

**8** “तू कर्णे आपल्या मुखाला लाव! याहवेहच्या भवनावर एक गरुड
आहे, कारण लोकांनी माझा करार मोडला आहे आणि माझ्या
नियमशास्त्राविरुद्ध बंड केले आहे. 2 इस्राएल माझा धावा करून
आता म्हणतो, ‘आमच्या परमेश्वरा, आम्ही तुमचा स्वीकार करतो!’ 3
इस्राएलने जे उत्तम ते नाकारले आहे; शत्रू त्याचा पाठलाग करतील. 4
त्यांनी माझ्या संमतीशिवाय राजे नेमले आहेत; ते माझ्या मान्येतेशिवाय
अधिपतींना निवडतात. त्यांनी आपले चांदी आणि सोने घेऊन स्वतःच्या
नाशाकरिता मूर्ती बनविल्या आहेत. 5 हे शोमरोना, तुझी वासराची
मूर्ती फेकून दे! त्यांच्याविरुद्ध माझा राग पेटला आहे. ते अजून किती
काळ शुद्ध होण्यास असमर्थ राहतील? 6 ते इस्राएलाकडून आहे! हे
वासरू—एका कारागिराने बनविले आहे; तो परमेश्वर नाही. शोमरोनाच्या
या वासराचे तुकडे तुकडे करण्यात येतील. 7 “ते वारा पेरतात आणि
ते वावटळीची कापणी करतात. त्यांच्या पिकांना कणसे येत नाहीत;
त्यातून पीठ तयार होत नाही. जर त्यातून अन्न तयार झाले तर परकीय ते
गिळून टाकतील. 8 इस्राएलास गिळून टाकण्यात आले आहे; राष्ट्रांमध्ये
ती कोणासही आवडत नाही. 9 एकाकी भटकणाऱ्या रानगाढवासारखे
ते वर अश्शूराकडे गेले आहे. एफ्राईमने स्वतःस तिच्या प्रियकरांना
विकले आहे. 10 जरी त्यांना स्वतःला राष्ट्रांमध्ये विकले असेल, तरीही

आता मी त्यांना एकत्र करेन. बलाढ्य राजाच्या अत्याचाराने ते नष्ट होऊ
लागतील. 11 “एफ्राईमने पापार्पण करण्यास पुष्कळ वेद्या बांधल्या
आहेत, पण ते पाप करण्याच्या वेद्या झाल्या आहेत. 12 मी त्यांच्यासाठी
माझ्या नियमशास्त्राच्या पुष्कळ गोष्टी लिहिल्या, पण त्यांनी ते परकीय
मानले. 13 जरी ते त्यांचे यज्ञार्पण मला भेटस्वरूप अर्पितात, आणि
तरीही ते मांस खातात, याहवेह त्यांच्याशी प्रसन्न नाही. आता ते त्यांचा
दुष्टपणा स्मरणार आणि त्यांच्या पापांची शिक्षा देणार: ते इजिप्तला
परततील. 14 कारण इस्राएल आपल्या निर्माणकर्त्याला विसरला आहे
आणि राजवाडे बांधले; यहूदाहने अनेक तटबंदीची नगरे बांधली आहेत.
पण मी त्यांच्या नगरांवर अग्नी पाठवून त्यांचे किल्ले भस्म करेन.”

**9** हे इस्राएला, आनंद करू नकोस; इतर राष्ट्रांसारखे उल्लासू नकोस,
कारण तू तुझ्या परमेश्वराशी अविश्वासू झाला आहेस; धान्याच्या
प्रत्येक खळ्यावर वेश्याव्यवसाय करून मिळणारी कमाई तुला आवडते.
2 खळे आणि द्राक्षकुंड लोकांना खाऊ घालणार नाही; नवा द्राक्षारस
त्यांना दगा देईल. 3 याहवेहच्या देशात ते राहणार नाहीत; एफ्राईम
इजिप्त देशात परत जाईल आणि अश्शूर येथे अशुद्ध भोजन खाईल. 4
ते याहवेहला द्राक्षारसाची पेयार्पणे करू शकणार नाही, किंवा त्यांच्या
यज्ञार्पणाने याहवेहला संतोष होणार नाही. कारण असे यज्ञ त्यांच्यासाठी
शोक करणाऱ्यांच्या अन्नासारखे होईल; त्यास खाणारे सर्वजण अमंगळ
होतील. ते भोजन त्यांच्यासाठीच असेल; ते याहवेहच्या मंदिरात आणता
येणार नाही. 5 मग तू ठरविलेल्या उत्सवाच्या दिवशी, याहवेहच्या
सणाच्या दिवशी काय करशील? 6 जरी ते नाशापासून सुटले तरी
इजिप्त त्यांना गोळा करेल, आणि मेम्फीस त्यांना मूठमाती देतील.
काटेकुसळे त्यांच्या चांदीच्या वस्तू नेतील, आणि त्यांच्या तंबूत काटेरी
झाडे उगवतील. 7 शासन करण्याची वेळ जवळ आली आहे; प्रतिफळ
घेण्याचे दिवस जवळ आले आहेत. इस्राएलला हे समजून यावे. कारण
तुमची पापे अधिक आहेत आणि तुमचे शत्रुत्व जास्त आहे, संदेष्टा मूर्ख
ठरत आहे, प्रेरित वेडा समजला जातो. 8 संदेष्टा माझ्या परमेश्वरासोबत,
एफ्राईमचा पहारेकरी आहे, तरीही त्याच्या सर्व मार्गात सापळा त्याची
वाट पाहत आहे, आणि परमेश्वराच्या भवनात शत्रुत्व आहे. 9 जसे
गिबियाहमधील दिवसात केले तसे त्यांनी स्वतःला अधिक भ्रष्ट केले
आहे. परमेश्वर त्यांचे दुष्कर्म स्मरणात ठेवतील आणि त्यांना त्यांच्या
पापांबद्दल शिक्षा करतील. 10 “जेव्हा मला इस्राएल आढळला, तेव्हा ते
रानात द्राक्षे आढळल्यासारखे होते; जेव्हा मी तुमच्या पूर्वजांना पाहिले,
ते अंजिराच्या झाडावर प्रथमफळ पाहण्यासारखे होते. पण जेव्हा ते
बआल-पौराला आले तेव्हा त्यांनी त्या घृणास्पद मूर्तींपुढे स्वतःला
समर्पित केले आणि त्यांच्या आवडत्या वस्तूप्रमाणे अमंगळ झाले. 11
एफ्राईमचे वैभव पक्ष्याप्रमाणे उडून जाईल— जन्म नाही, गर्भधारणा
नाही, गर्भसंभव नाही. 12 जरी त्यांनी मुलांचे संगोपन केले, तरी मी
त्यांना सर्वांपासून दूर करेन. मी त्या लोकांपासून निघून जाईन, तेव्हा
त्यांचा धिक्कार असो. 13 सोर जसा सुखदायी ठिकाणी लावलेला
मी पाहिला, तसाच एफ्राईम आहे, परंतु एफ्राईम आपल्या मुलांना
वध करणाऱ्याकडे घेऊन येईल.” 14 हे याहवेह, त्यांना द्या— तुम्ही
त्यांना काय द्याल? त्यांना वांझ गर्भाशये आणि शुष्क स्तने द्या. 15
“गिलगालात त्यांची सर्व दुष्कृत्ये आहेत, मी त्यांचा तिथेच द्वेष केला.
त्यांच्या पापी कृत्यांमुळे, मी त्यांना माझ्या घरातून हाकलून देईन. मी
यापुढे त्यांच्यावर प्रीती करणार नाही; त्यांचे सर्व पुढारी बंडखोर आहेत.
16 एफ्राईम नाश पावला आहे. त्यांची मुळे सुकून गेली आहेत. ते फळ
देत नाही. जरी ते मुलांना जन्म देतील, तर मी त्यांचे प्रिय मूल मारून
टाकेन.” 17 माझा परमेश्वर त्यांना नाकारील कारण त्यांनी त्यांची आज्ञा
पाळली नाही; ते देशादेशातून भटकत राहतील.

**10** इस्राएल एक पसरणारा द्राक्षवेल होता. त्याने स्वतःसाठी फळे
आणली. जसे त्याचे फळ वाढले, तसे त्याने आणखी वेद्या
बांधल्या; जसा त्याचा देश समृद्ध झाला, तसे त्याने त्याच्या पवित्र
दगडांना सुशोभित केले. 2 त्यांचे अंतःकरण फसवणूक करणारे आहे,
आणि आता त्यांना त्यांचे अपराध भोगावेच लागतील. याहवेह त्यांच्या
वेद्या पाडून टाकतील आणि त्यांच्या पवित्र दगडांचे तुकडे करतील.
3 मग ते म्हणतील, “आम्हाला राजा नाही कारण आम्ही याहवेहचा
आदर केला नाही. पण आमचा राजा असला तरी त्याने आमच्यासाठी
काय केले असते?” 4 ते अनेक अभिवचने देतात, खोट्या शपथा
घेतात आणि करार करतात; त्यामुळे नांगरलेल्या शेतात उगविलेल्या
विषारी तणाप्रमाणे खटले सुरू होतात. 5 शोमरोनात राहणारे लोक बेथ-
आवेनच्या वासरूच्या मूर्तीला घाबरतात. त्याचे लोक त्याच्यासाठी शोक
करतील आणि त्याचप्रमाणे त्याचे मूर्तिपूजक पुजारी करतील, जे पूर्वी
त्याच्या वैभवात आनंदित होते. कारण ते वैभव त्यांच्याकडून हिसकावून
त्यांना बंदिवासात नेण्यात आले आहे. 6 महान राजाला भेट म्हणून
सादर करण्यासाठी ते अश्शूरला नेले जातील. एफ्राईमला लज्जित
केले जाईल; बाहेरील लोकांशी संबंध ठेवल्यामुळे इस्राएलही आपल्या
मसलतीविषयी लज्जित होईल. 7 शोमरोनच्या राजाचा नाश होईल,
पाण्याच्या पृष्ठभागावर पडलेली डहाळी जशी वाहून जाते, तसा तो वाहून
जाईल. 8 दुष्टता असलेल्या उच्च स्थानांचा नाश केला जाईल— हे
इस्राएलचे पाप आहे. काटेरी झाडे आणि कुसळे उगवतील आणि त्यांच्या
वेद्या झाकून घेतील. मग ते पर्वतांना म्हणतील, “आम्हाला झाकून
टाका!” आणि टेकड्यांना म्हणतील, “आमच्यावर येऊन पडा!” 9 “हे
इस्राएला, गिबियाहतील दिवसापासून तू पाप करीत आला आहेस आणि
तू तिथेच राहिला. गिबियाहच्या दुष्कृत्य करणाऱ्या विरुद्ध पुन्हा युद्ध
भडकणार नाही काय? 10 जेव्हा माझी इच्छा होईल तेव्हा मी त्यांना दंड
देईन; त्यांनी केलेल्या दोन्ही पापांसाठी त्यांना बेड्या टाकण्यासाठी राष्ट्रे
त्यांच्याविरुद्ध एकत्र होतील. 11 एफ्राईम शिकविलेली कालवड आहे.
तिला मळणी करण्याची आवड आहे; म्हणून मी तिच्या नाजूक मानेवर
जू ठेवेन. मी एफ्राईमला नांगराला जुंपेन, यहूदाहला नांगरणी करणे
व याकोबाला माती फोडणे आवश्यक आहे. 12 तुम्ही आपल्यासाठी
नीतिमत्वाची पेरणी करा, न बदलणाऱ्या प्रीतीचे फळ घ्या, आणि पडीक
जमीन नांगरून टाका; जोपर्यंत ते येऊन तुमच्यावर नीतिमत्वाचा वर्षाव

करत नाही तोपर्यंत, याहवेहला शोधण्याची हीच वेळ आहे. 13 पण तुम्ही दुष्टतेची नांगरणी केली आहे आणि अन्यायाचे पीक काढले आहे, तुम्ही लबाडीचे फळ खाल्ले आहे. कारण तुम्ही स्वतःच्या सामर्थ्यावर आणि आपल्या अनेक योद्धांवर विश्वास ठेवला आहे, 14 तुझ्या लोकांच्या विरुद्ध युद्धाची गर्जना होईल, जेणेकरून तुझ्या सर्व गडांचा नाश होईल; जसे शलमनाने युद्धाच्या दिवशी बेथ-आर्बेलाचा नाश केला, जेव्हा मातेला तिच्या मुलांसहित आपटून ठार मारण्यात आले. 15 तसेच बेथेल तुझ्यासोबत होईल, कारण तुझी दुष्टता फार अधिक आहे. तेव्हा त्या दिवशी सकाळच्या प्रहरी इस्राएलाच्या राजाचा पूर्णरीतीने नाश केला जाईल.

**11** “इस्राएल जेव्हा लहान मूल होते तेव्हा मी त्याच्यावर प्रीती केली, आणि इजिप्तमधून माझ्या पुत्राला बोलाविले. 2 पण त्यांना जितके जास्त बोलाविले, तितके ते माझ्यापासून दूर गेले. त्यांनी बआलापुढे बळी दिले आणि त्यांनी मूर्तीला धूप जाळला. 3 मी तोच होतो ज्याने एफ्राईमला चालण्यास शिकविले, मी त्यांना कडेवर वागवले; तो मीच होतो ज्याने त्यांना आरोग्य दिले, परंतु हे त्यांना समजले नाही. 4 मी त्यांना मानवी दयाळूपणाच्या दोरीने आणि प्रीतीच्या बंधनाने चालविले. त्यांच्यासाठी मी एखाद्या लहान मुलाला गालापर्यंत उचलल्यासारखा होतो, आणि मी खाली वाकून त्यांना खायला घालत असे. 5 “ते इजिप्त देशात परत जाणार नाहीत काय आणि अश्शूर त्यांच्यावर राज्य करणार नाही काय कारण ते पश्चात्ताप करण्यास नकार देतात? 6 त्यांच्या शहरातून तलवार चमकेल; ती त्यांच्या खोट्या संदेष्ट्यांना मारून टाकेल व त्यांच्या योजनांचा अंत करेल. 7 माझ्या लोकांनी माझा त्याग करून दूर जाण्याचा निश्चय केला आहे. त्यांनी मला परमोच्च परमेश्वर म्हटले तरी मी त्यांना कोणत्याही प्रकारे उन्नत करणार नाही. 8 “अरे एफ्राईमा, मी तुला कसे सोडू शकतो? अरे इस्राएला, मी तुला दुसऱ्याच्या हाती कसे सोपवून देऊ? मी तुला अदमाहसारखे कसे वागवू शकतो? मी तुला सबोईमसारखा कसे बनवू शकतो? माझे हृदय आतल्याआत आक्रोश करीत आहे; माझी सर्व करुणा जागृत झाली आहे. 9 मी माझ्या तीव्र रागाप्रमाणे वागणार नाही, मी एफ्राईमचा पुन्हा नाश करणार नाही. कारण मी तुमच्यामध्ये एक पवित्र परमेश्वर आहे. मनुष्य नाही. मी त्यांच्या शहरांविरुद्ध येणार नाही. 10 ते याहवेहला अनुसरतील; ते सिंहासारखी गर्जना करतील. जेव्हा ते गर्जना करतील, तेव्हा त्यांची मुले थरथर कापत पश्चिमेकडून परत येतील. 11 पक्ष्यांच्या थरथरणाऱ्या थव्याप्रमाणे ते इजिप्तकडून येतील, पारव्यांप्रमाणे पंख फडफडत अश्शूरहून येतील. आणि मी त्यांना त्यांच्या घरी स्थायिक करेन,” असे याहवेह घोषणा करतात. 12 एफ्राईमने मला खोटेपणाने, इस्राएलने फसवेगिरीने वेढून टाकले आहे. आणि यहूदाह उद्धटपणाने परमेश्वराच्या विरोधात आहे, शिवाय जे परमेश्वर विश्वासू व पवित्र आहेत, त्यांच्याविरुद्ध आहे.

**12** एफ्राईम वाऱ्यावर चरतो; तो दिवसभर पूर्वेकडील वाऱ्याचा पाठलाग करतो आणि खोटेपणा व हिंसाचार वाढवितो. तो अश्शूरसोबत करार करतो आणि इजिप्तला जैतून तेल पाठवितो. 2 याहवेह यहूदीयाच्या विरुद्ध वाद आणत आहेत; याकोबाला त्याच्या मार्गाप्रमाणे ते शासन करतील आणि त्याच्या कार्यानुसार त्याला प्रतिफळ देतील. 3 त्याने गर्भात असता आपल्या भावाची टाच धरली; एका मनुष्य असून त्याने परमेश्वराशी झुंज केली. 4 तो स्वर्गदूताशी झगडला आणि त्याच्यावर विजयी झाला; तो रडला आणि त्याची मेहेरबानी व्हावी म्हणून त्याने भीक मागितली. बेथेलला ते त्याला भेटले आणि तिथे तो त्यांच्याशी बोलला— 5 याहवेह सर्वसमर्थ परमेश्वर, याहवेह हे त्यांचे नाव! 6 पण तू आपल्या परमेश्वराकडे परत आलेच पाहिजे; प्रीती आणि न्यायाचे पालन कर आणि सतत आपल्या परमेश्वराची प्रतीक्षा कर. 7 व्यापारी चुकीचे माप वापरतो आणि त्याला लबाडी करणे आवडते. 8 एफ्राईम बढाई मारतो, “मी फार धनवान आहे; मी श्रीमंत झालो आहे. माझ्या सर्व संपत्तीसह त्यांना माझ्यामध्ये कोणताही अपराध किंवा पाप आढळणार नाही.” 9 “तू इजिप्तमधून बाहेर आल्यापासून मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे; तुझ्या नेमलेल्या उत्सवाच्या दिवसात मी तुला पुन्हा तंबूमध्ये राहवयास लावेन. 10 मी संदेष्ट्यांबरोबर बोललो, त्यांना अनेक दृष्टान्त दिले आणि त्यांच्याद्वारे दाखले सांगितले.” 11 गिलआद दुष्ट आहे काय? त्याचे लोक निरुपयोगी आहेत! ते गिलगालात बैलांचे अर्पण करतात का? त्यांच्या वेद्या नांगरलेल्या शेतातील दगडांच्या ढिगाऱ्यासारख्या असतील. 12 याकोब अराम देशात पळून गेला; इस्राएलने पत्नी मिळविण्यासाठी चाकरी केली आणि तिची किंमत चुकविण्यासाठी त्याने मेंढरे राखली. 13 याहवेहने इजिप्तमधून इस्राएलला बाहेर काढण्यासाठी संदेष्ट्याच्या उपयोग केला, एका संदेष्ट्याच्या मार्फत त्याची काळजी घेतली. 14 पण एफ्राईमने त्यांचा कोप भयंकर चेतविला आहे; त्याचे प्रभू त्याच्या रक्ताचा दोष त्याच्यावरच राहू देतील आणि त्याला त्याच्या अपमानाची भरपाई देतील.

**13** जेव्हा एफ्राईम बोलत असे, तेव्हा लोक थरथर कापत असत; कारण तो इस्राएलाचा अधिपती होता. पण तो बआल मूर्तीच्या उपासनेचा दोषी झाला आणि मरण पावला. 2 आता ते अधिकाधिक पाप करीत आहेत; ते आपल्या चांदीपासून स्वतःसाठी मूर्ती बनवतात, हुशारीने तयार केलेल्या प्रतिमा, त्या सर्व कारागिरांची हस्तकृती आहेत. या लोकांबद्दल असे म्हटले जाते, “हे नरबली देतात! ते वासराच्या मूर्तीचे चुंबन घेतात!” 3 म्हणून ते सकाळच्या धुक्यासारखे, पहाटेच्या लवकर उडून जाणाऱ्या दहिवरासारखे, खळयातून उडून जाणाऱ्या भुशासारखे, धुराड्यातून निघणाऱ्या धुराप्रमाणे होतील. 4 “तू इजिप्तमधून बाहेर आल्यापासून मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे; माझ्याशिवाय इतर कोणत्याही परमेश्वराला तू स्वीकारणार नाहीस, माझ्याशिवाय इतर कोणीही तारणारा नाही. 5 मी रानात, त्या तप्त उष्णतेच्या प्रदेशात, तुझी काळजी वाहिली. 6 जेव्हा मी त्यांना भोजन दिले ते तृप्त झाले;

जेव्हा ते तृप्त झाले तेव्हा ते गर्विष्ठ झाले; नंतर ते मला विसरले. 7 म्हणून
मी त्यांच्यासाठी सिंहासारखा होईन, चित्त्यासारखा त्यांच्या वाटेवर दबा
धरून बसेन. 8 जिची पिल्ले हरण केली आहेत, अशा अस्वलीप्रमाणे
मी त्यांच्यावर हल्ला करेन आणि त्यांचे तुकडे तुकडे करेन; मी त्यांना
सिंहाप्रमाणे फाडून टाकेन— वनपशू त्यांना फाडून टाकतील. 9
“हे इस्राएला, तुझा नाश झाला आहे, कारण तू माझ्याविरुद्ध, तुझ्या
साहाय्यकर्त्यांच्या विरुद्ध आहेस. 10 तुला वाचविणारा तुझा राजा कुठे
आहे? ‘मला राजा व राजपुत्र द्या’ ज्यांच्याबद्दल तू असे म्हटले होते,
ते तुझे सर्व नगरांचे अधिकारी कुठे आहेत? 11 म्हणून माझ्या रागात
मी तुला राजा दिला आणि माझ्या क्रोधात त्याला मी काढून टाकले
आहे. 12 एफ्राईमची पातके जमा केली आहेत, त्याची पापे साठवून
ठेवली आहेत. 13 बाळंतपणात स्त्रीला होणारा त्रास त्याला होईल,
पण तो बुद्धी नसलेला एक बालक आहे; जेव्हा प्रसूतीची वेळ येते
तेव्हा त्याला गर्भातून बाहेर येण्याचे ज्ञान नसते. 14 “मी या लोकांना
कबरेच्या सामर्थ्यापासून सुटका देईन; मी त्यांना मृत्यूपासून वाचवेन.
अरे मरणा, तुझ्या पीडा कुठे आहे? हे कबरे, तुझा नाश कुठे आहे?
“मला काहीही कळवळा येणार नाही, (Sheol h7585) 15 जरी तो त्याच्या
भावांमध्ये अत्यंत फलद्रूप होता, परंतु याहवेहकडून पूर्वेकडील वारा
येईल, तो वाळवंटातून येईल; त्याचे झरे सुकून जातील आणि त्याची
विहीर कोरडी पडेल. त्याच्या भांडारातील सर्व खजिना लुटला जाईल.
16 शोमरोनच्या लोकांनी त्यांचा दोष वाहिलाच पाहिजे, कारण त्यांनी
त्यांच्या परमेश्वराविरुद्ध बंड केले. ते तलवारीने पडतील; त्यांची बालके
जमिनीवर आपटली जातील, आणि त्यांच्या गर्भवती स्त्रियांना चिरून
टाकण्यात येईल.”

**14** हे इस्राएला, याहवेह तुमच्या परमेश्वराकडे परत ये. कारण तुझे
पापच तुझ्या पतनाचे कारण झाले आहे! 2 परमेश्वराच्या वचनांचे
पालन कर आणि याहवेहकडे परत ये. त्यांना सांगा: “आमच्या सर्व
पापांची क्षमा करा, आणि कृपापूर्वक आमचा स्वीकार करा, म्हणजे
आम्ही आमच्या ओठांची फळे वासराच्या अर्पणाप्रमाणे अर्पण करू. 3
अश्शूर आमचे तारण करू शकणार नाही; आम्ही युद्धाच्या घोड्यावर
स्वार होणार नाही. हातांनी बनविलेल्या मूर्तींना आम्ही ‘आमची दैवते’
असे इतःपर म्हणणार नाही. कारण अनाथांना तुमच्याठायीच दया
मिळते.” 4 “मी त्यांचा स्वच्छंदीपणा दूर करेन आणि त्यांच्यावर मुक्तपणे
प्रीती करेन, कारण माझा राग त्यांच्यापासून दूर झाला आहे. 5 मी
इस्राएलला दहिवराप्रमाणे होईन. तो कुमुदिनीप्रमाणे फुलेल आणि त्याची
मुळे लबानोनातील गंधसरूंच्या मुळांप्रमाणे जातील; 6 त्याच्या फांद्या
पसरतील. त्याचे वैभव एका जैतून वृक्षासारखे होईल. त्याचा सुगंध
लबानोनातील गंधसरू सारखा होईल. 7 लोक परत त्यांच्या छायेत
विश्रांती घेतील; ते धान्यासारखे पुनरुज्जीवित होतील, द्राक्षवेलीप्रमाणे
ते फळे देतील— इस्राएलची प्रसिद्धी लबानोनच्या द्राक्षारसाप्रमाणे
होईल. 8 हे एफ्राईमा, आता माझा या मूर्तीशी काय संबंध आहे? मी
त्याला उत्तर देईन आणि त्याची काळजी घेईन. मी सदाहरित गंधसरू
वृक्षासारखा आहे; तुमचे फलवंत होणे माझ्यामुळे येते.” 9 कोण शहाणा
आहे? त्यांना या गोष्टींची जाणीव होऊ द्या. कोण समंजस आहे? त्यांना
समजू द्या. कारण याहवेहचे मार्ग योग्य आहेत; नीतिमान त्यावरून
चालतील, पण पातकी त्यावर अडखळून पडतील.

# योएल

1 पेथूएलचा पुत्र योएलकडे याहवेहचे वचन आले. 2 वडिलजनहो,
हे ऐका; या देशात राहणारे प्रत्येकजण हे ऐको. तुमच्या दिवसात
किंवा तुमच्या पूर्वजांच्या दिवसात असे कधी घडले होते काय? 3
तुम्ही ते आपल्या लेकरांना सांगा, आणि तुमच्या लेकरांनी ते त्यांच्या
लेकरांना सांगावे, आणि त्यांच्या लेकरांनी पुढील पिढीला सांगावे. 4
कुरतडणाऱ्या टोळांनी जे सोडले होते, ते झुंडींनी येणाऱ्या टोळांनी
खाल्ले; जे झुंडींनी येणाऱ्या टोळांनी सोडले ते खुरडत चालणाऱ्या
टोळांनी खाल्ले; जे खुरडत चालणाऱ्या टोळांनी सोडले ते इतर टोळांनी
खाल्ले. 5 अहो मद्यप्यांनो, जागे व्हा आणि रडा! हे सर्व द्राक्षारस
पिणाऱ्यांनो विलाप करा; नवीन द्राक्षारसाकरिता विलाप करा कारण तो
तुमच्या ओठातून काढून घेतला आहे. 6 एक राष्ट्र माझ्या देशावर चालून
आले आहे, ते सैन्य बलाढ्य आणि असंख्य आहे; त्यांचे दात हे सिंहाचे
दात आहे, त्यांचे सुळे हे सिंहिणीचे सुळे आहेत. 7 त्या राष्ट्रांनी माझ्या
द्राक्षवेलींची नासधूस केली आहेत आणि अंजिराच्या झाडांचा नाश
केला आहे. त्यांनी त्याचे खोड सोलून साल दूर फेकली आहे, त्यांच्या
फांद्या पांढऱ्या केल्या आहेत. 8 जशी एक कुमारी गोणपाट नेसून
आपल्या तारुण्यातील प्रियकरासाठी करते, तसा तुम्हीही शोक करा. 9
याहवेहच्या मंदिरात वाहण्याची अन्नार्पणे व पेयार्पणे बंद झाली आहेत;
याहवेहसमोर सेवा करणारे याजक विलाप करीत आहे. 10 शेतांची
धूळधाण झाली आहेत, भूमी कोरडी पडली आहे; धान्याचा नाश झाला
आहे, नवीन द्राक्षारस सुकला आहे, जैतून तेल समाप्त झाले आहे. 11
अहो, शेतकऱ्यांनो, लज्जित व्हा, द्राक्षमळ्यांची मशागत करणाऱ्यांनो,
आकांत करा; गहू व जव याकरिता विलाप करा, कारण शेतातील
पिके नष्ट झाली आहेत. 12 द्राक्षवेल वाळून गेली आहे अंजिराचे झाड
कोमेजले आहे; डाळिंब, खजुराचे आणि सफरचंदाचे झाड; शेतातील
सर्व झाडे सुकून गेली आहेत. खचितच लोकांचा आनंद विरून गेला आहे.
13 अहो याजकांनो, गोणपाट परिधान करा आणि शोक करा; वेदीची
सेवा करणाऱ्यांनो, विलाप करा. तुम्ही जी परमेश्वराची सेवा करता, या,
गोणपाट परिधान करीत रात्र घालावा; कारण अन्नार्पणे व पेयार्पणे
तुमच्या परमेश्वराच्या भवनात येणे बंद झाले आहेत. 14 एक पवित्र
उपास जाहीर करा; लोकांची एक धार्मिक सभा बोलवा. वडीलजनास व
देशात राहणाऱ्यांना याहवेह तुमच्या परमेश्वराच्या भवनात बोलवा, आणि
याहवेहपुढे शोक करा. 15 त्या दिवसाबद्दल हाय! याहवेहचा दिवस
जवळ आहे; सर्वसमर्थापासून जसा नाश तसे ते येतील. 16 आपल्या
डोळ्यादेखत अन्न नाहीसे झाले नाही काय— आमच्या परमेश्वराच्या
भवनातील सर्व आनंद व उल्हास गेले नाही काय? 17 जमिनीच्या
ढेकळांखाली बीज कुजून जात आहे. कोठारे उद्ध्वस्त झाली आहेत
आणि गोदामे मोडली आहेत, कारण धान्य करपून गेले आहे. 18 गुरे
कशी कण्हत आहेत! शेरडामेंढरांचे कळप व्याकूळ झाले आहेत, कारण
त्यांना चरण्यासाठी कुरणेच नाहीत; मेंढ्यांचे कळप विव्हळत आहेत. 19
हे याहवेह, मी तुम्हाला हाक मारीत आहेत, कारण अग्नीच्या उष्णतेने
कुरणे जाळून फस्त केली आहेत, आणि अग्नीने मैदानातील सर्व झाडे
भस्मसात झाली आहेत. 20 आणि वनपशूदेखील तुमच्याकडे आक्रोश
करीत आहेत, पाण्याचे झरे कोरडे पडले आहेत. आणि आणि अग्नीने
रानातील कुरणे होरपळून निघाली आहे.

2 सीयोनात कर्णा वाजवा; माझ्या पवित्र पर्वतावर धोक्याची घंटा
वाजवा. देशात राहणाऱ्या प्रत्येकाचा भीतीने थरकाप होवो, कारण
याहवेहचा दिवस येत आहे. तो अगदी हाताशी आहे— 2 तो दिवस
अंधाराचा व औदासिन्याचा, मेघांचा व दाट काळोखाचा दिवस. जसे
डोंगरावर विस्तारलेल्या पहाटेसारखा आहे तसे विशाल व बलवान
सैन्य चालून येत आहे, यापूर्वी असे कधी झाले नव्हते, नंतरही अनेक
पिढ्या पुन्हा कधीच होणार नाही. 3 त्यांच्यापुढे अग्नी विनाश करीत
आहे, त्यांच्यामागे ज्वाला पेटली आहे. त्यांच्यापुढील प्रदेश एदेन
बागेसारखा आहे, त्यांच्यामागील प्रदेश ओसाड वाळवंट आहे— त्यांच्या
तावडीतून काहीच वाचू शकत नाही. 4 त्यांचे स्वरूप घोड्यांप्रमाणेच
आहेत; आणि घोडेस्वारा प्रमाणे ते जोरात धावतात. 5 रथांच्या
आवाजाप्रमाणे, पर्वताच्या माथ्यांवर ते उड्या मारतात, भुसा भस्म
करणाऱ्या अग्नीप्रमाणे, युद्धासाठी सज्ज झालेल्या पराक्रमी सैन्याप्रमाणे
आहे. 6 त्यांच्यासमोर राष्ट्रे भयभीत होतात; हे प्रत्येक चेहरा फिका
पडतो. 7 वीरांप्रमाणे ते हल्ला करतात; सैनिकांप्रमाणे ते तटाच्या भिंती
चढतात. आपल्या रांगा न मोडता ते सरळ आगेकूच करतात. 8 ते
एकमेकांना धक्काबुक्की करीत नाहीत; प्रत्येकजण सरळ पुढे जातो.
समोर शस्त्रे असताना ते जखमी न होता रांग न मोडता त्यातून पार
जातात. 9 शहराकडे ते धाव घेतात; ते तटाच्या भिंतीवर धावतात; ते
चढून घरात शिरतात, जणू काही खिडक्यांतून प्रवेश करणारे चोरच! 10
पृथ्वी त्यांच्यापुढे कापते आणि आकाशे थरथरतात, सूर्य आणि चंद्र
काळवंडतात, आणि तारे चमकणे सोडून देतात. 11 याहवेह आपल्या
सैन्यापुढे गर्जना करीत चालतात; त्यांचे सैन्य असंख्य आहेत, आणि
त्यांची आज्ञा मानणारे बलवान सैन्य आहे. याहवेहचा दिवस महान
आहे; अति भयंकर दिवस आहे. त्यास कोण सहन करू शकेल? 12
तरी आताही याहवेह म्हणतात, तुम्ही आपल्या संपूर्ण अंतःकरणाने,
उपास, आक्रंदन व शोक करीत मजकडे परत या. 13 तुमची वस्त्रे
फाडून नव्हे, तर तुमचे अंतःकरण फाडा. याहवेह तुमच्या परमेश्वराकडे
परत या, कारण ते कृपाळू व दयाळू आहेत. ते मंदक्रोध आणि अधिक
प्रीती करणारे आहेत, आणि ते विपत्तीविषयी अनुताप करतात. 14
कोण जाणो? याहवेह तुमचे परमेश्वर वळतील व अनुताप करतील
आणि तुमच्यासाठी एक आशीर्वाद सोडतील— मग याहवेह तुमच्या
परमेश्वराला तुम्ही धान्यार्पण व पेयार्पण करू शकाल. 15 सीयोनात
कर्णा वाजवा! पवित्र उपास घोषित करा पवित्र सभा बोलवा. 16
लोकांना एकत्र करा, सभेला पवित्र करा; वडिलजनांना एकत्र आणा,
बालकांना आणि स्तनपान करणाऱ्या अर्भकांना देखील एकत्र आणा.
वराला त्याच्या निवासस्थानातून आणि वधूला तिच्या खोलीतून बोलवा.

17 याहवेहसमोर सेवा करणाऱ्या याजकांनी, द्वारमंडप आणि वेदी
यांच्यामध्ये रडत उभे राहावे. आणि त्यांनी असे म्हणावे, “हे याहवेह,
तुमच्या लोकांना वाचवा, आपल्या वतनाला राष्ट्रांमध्ये अप्रतिष्ठा किंवा
चेष्टेचे कारण होऊ देऊ नका. ‘त्यांचा परमेश्वर कुठे आहे?’ असे त्यांनी
लोकांमध्ये का म्हणावे.” 18 मग याहवेहने आपल्या देशासाठी ईर्ष्या
धरली, आणि ते आपल्या लोकांवर दया करतील. 19 याहवेहने त्यांना
उत्तर दिले: “मी तुम्हाला धान्य, नवा द्राक्षारस व जैतून तेल पाठवित
आहे, जे तुम्हाला तृप्त करण्यास भरपूर आहे; पुन्हा कधीही मी तुम्हाला
राष्ट्रांमध्ये उपहासाचा विषय होऊ देणार नाही. 20 “मी उत्तरेकडील
उपद्रवी टोळीस काढून त्यांना तुझ्यापासून दूर नेईन; मी त्यांना होरपळून
निघालेला ओसाड प्रदेशात ढकलून देईन; त्याची पूर्वेचा रांग मृत समुद्रात
बुडवेन व पश्चिमी रांग भूमध्य समुद्रात बुडवेन. आणि मग त्यांचा दुर्गंध
वर जाईल; त्यांचा दर्प वाढत जाईल.” निश्चितच याहवेहने महान कार्य
केले आहे! 21 हे यहूदीय देशा, भिऊ नको; आनंद व उल्हास करा,
निश्चितच याहवेहने महान कार्य केले आहेत! 22 वन्य पशूंनो तुम्ही घाबरू
नका, कारण रानातील कुरणे हिरवीगार होत आहेत. झाडे आपली फळे
देत आहेत; अंजिराची झाडे आणि द्राक्षवेली पुन्हा आपले सत्व देत
आहेत. 23 सीयोनच्या लोकांनो, आनंद करा; तुमच्या याहवेहच्या ठायी
आनंद करा, कारण त्यांनी शरदऋतूतील पाऊस दिला आहे कारण
ते विश्वासयोग्य आहेत. परमेश्वर तुमच्यासाठी विपुल वृष्टी करतात,
शरदऋतूतील आणि वसंतऋतूतील भरपूर पाऊस पाहिल्याप्रमाणे दिला
आहे. 24 खळी पुन्हा गव्हाच्या उंच राशींनी भरून जातील; आणि कुंडे
तेलाने आणि द्राक्षारसाने ओसंडून वाहू लागतील. 25 “मोठे टोळ व
तरुण टोळ इतर टोळ व टोळांचे थवे, म्हणजेच माझे मोठे सैन्य जे मी
तुमच्यामध्ये पाठवले होते; त्यांनी खाल्लेल्या तुमच्या वर्षांची मी भरपाई
करेन. 26 जोपर्यंत तुम्ही तृप्त होत नाही तोपर्यंत तुम्ही खाल, ज्यांनी
तुमच्यासाठी अद्भुत कार्य केले आहेत त्या याहवेह तुमच्या परमेश्वराच्या
नावाची तुम्ही स्तुती कराल, माझे लोक पुन्हा कधीही लज्जित होणार
नाहीत. 27 तुम्हाला कळून येईल की मी इस्राएलमध्ये आहे, आणि मीच
याहवेह तुमचा परमेश्वर आहे, आणि दुसरा कोणीही नाही; माझे लोक
पुन्हा कधीही लज्जित होणार नाहीत. 28 “आणि त्यानंतर, मी माझा
आत्मा सर्व लोकांवर ओतेन. तुमचे पुत्र व तुमच्या कन्या भविष्यवाणी
सांगतील, व तुमचे वृद्ध स्वप्ने पाहतील, तुमचे तरुण दृष्टान्त पाहतील.
29 माझ्या दासांवर म्हणजेच, स्त्री आणि पुरुष दोघांवरही, त्या दिवसांत
मी माझा आत्मा ओतेन. 30 आकाशात व पृथ्वीवर, रक्त व अग्नी व
धुरांचे स्तंभ अशी विलक्षण चिन्हे मी दाखवेन. 31 याहवेहचा महान व
भयंकर दिवस येण्यापूर्वी सूर्य अंधकारमय व चंद्र रक्तमय होईल. 32
आणि प्रत्येकजण जो प्रभूच्या नावाने त्यांचा धावा करेल तोच वाचेल;
कारण याहवेहने म्हटले आहे सीयोन डोंगरावर आणि यरुशलेममध्ये व
जे उरलेले असतील ते वाचतील आणि ज्यांना याहवेहने बोलाविले ते
सुद्धा तारण पावतील.

3 “त्या दिवसात आणि त्या समयी जेव्हा मी यहूदाह व यरुशलेम
भविष्य पुनर्संचयित करेन, 2 मी सर्व राष्ट्रांना एकत्र करेन आणि
त्यांना खाली यहोशाफाट च्या खोऱ्यात आणेन. त्यांनी माझ्या वतनास,
माझ्या इस्राएली लोकांशी जे केले त्याबद्दल मी त्यांची परीक्षा घेईन.
कारण त्यांनी माझ्या लोकांना राष्ट्रांमध्ये विखुरले आहे आणि माझ्या
देशाचे विभाजन केले आहे. 3 त्यांनी माझ्या लोकांकरिता चिठ्ठ्या
टाकल्या आणि वेश्यांसाठी मुलांचा व्यापार केला; मद्याकरिता आपल्या
मुलींना विकले. 4 “अहो सोर आणि सीदोन, पलेशेथच्या शहरांनो, आता
तुमच्याजवळ माझ्याविरुद्ध काय आहे? मी जे काही केले आहे त्याची
परतफेड मला करीत आहात काय? तुम्ही मजवर सूड उगविण्याचा
प्रयत्न करीत आहात काय? कारण मी त्वरेने उलट प्रहार करेन आणि
तुमचेच कृत्य तुमच्या माथ्यावर उलटवेन. 5 तुम्ही माझे रूप आणि सोने
हरण केले आहे आणि माझी सर्व मोलवान भांडारे घेऊन ती तुमच्या
मंदिरात ठेवली आहेत. 6 तुम्ही यहूदीयाच्या आणि यरुशलेमच्या लोकांना
त्यांच्या देशापासून दूर नेण्यासाठी यावानी लोकांना विकले. 7 “परंतु
जिथे तुम्ही त्यास विकून पाठविले, त्या सर्व ठिकाणांहून मी त्यांना परत
आणेन आणि तुम्ही जे हे सर्व केले त्याची परतफेड तुमच्या माथ्यावर
फेडीन. 8 मी तुमचे पुत्र व तुमच्या कन्या यहूदीयातील लोकांना विकून
टाकेन आणि ते त्यांना दूरच्या शबाई लोकांस विकतील.” याहवेहने हे
म्हटले आहे. 9 राष्ट्रांमध्ये ही घोषणा करा: युद्धासाठी सुसज्ज व्हा!
योद्ध्यांना आव्हान करा! तुमचे सर्व लढवय्ये जवळ या आणि हल्ला
करा. 10 तुमचा फाळ वितळवून त्यांच्या तलवारी तयार करा आणि
तुमच्या कोयत्यांचे भाले बनवा. दुर्बल असे म्हणो, “मी सबल आहे!”
11 सभोवतालच्या राष्ट्रांनो, तुम्ही लवकर या, आणि तिथे एकत्र व्हा.
हे याहवेह, तुमचे योद्धे खाली आणा! 12 “राष्ट्रे जागृत व्हावी; त्यांनी
यहोशाफाटाच्या खोऱ्यात यावे, कारण तिथे मी न्यायासनावर बसून
चारही बाजूंच्या सर्व राष्ट्रांचा न्याय करणार आहे. 13 आता विळा चालवा,
कारण पीक तयार झाले आहे. या, द्राक्षांचा घाणा तुडवा, कारण द्राक्षकुंडे
भरली आहेत आणि कुंडे ओसंडून वाहत आहेत— कारण त्यांची दुष्टाई
फार मोठी आहे!” 14 निर्णयाच्या खोऱ्यात लोकांची गर्दीच गर्दी आहे!
कारण निर्णयाच्या खोऱ्यात याहवेहचा दिवस येऊन ठेपला आहे. 15 सूर्य
व चंद्र काळे पडतील आणि तारे यापुढे प्रकाशणार नाही. 16 याहवेह
सीयोनातून गर्जना करतील आणि यरुशलेमातून गडगडाट होईल;
पृथ्वी व आकाश थरथर कापतील. परंतु याहवेह त्याच्या लोकांसाठी
आश्रयस्थान आणि इस्राएल लोकांसाठी दुर्ग असतील. 17 “तेव्हा
तुम्हाला कळून येईल की सीयोनात, माझ्या पवित्र पर्वतावर, राहणारा
मी याहवेह तुमचा परमेश्वर आहे. यरुशलेम पवित्र होईल; परकीय लोक
तिच्यावर पुन्हा कधीही आक्रमण करणार नाहीत. 18 “त्या दिवशी
नवीन द्राक्षारस पर्वतांवरून पाझरेल, आणि टेकड्यांवरून दूध वाहील;
यहूदीयातील ओहोळांची कोरडी पात्रे पाण्याने भरून वाहतील आणि
याहवेहच्या मंदिरातून एक झरा निघेल व तो शिट्टीमच्या खोऱ्यात पाणी
पुरवेल. 19 इजिप्त देश उजाड होईल आणि एदोम देश ओसाड होईल,

कारण त्यांनी यहूदीयाच्या लोकांवर अत्याचार केला त्यांच्या देशात
त्यांनी निर्दोष रक्त पाडले आहे. **20** परंतु यहूदाह सदासर्वकाळ आणि
यरुशलेम पिढ्यान् पिढ्या वसलेले राहील. **21** त्यांच्या निर्दोष रक्ताचा
सूड न घेता मी जाईन काय? नाही, मुळीच नाही.”

# आमोस

**1** तकोवा येथील एक मेंढपाळ आमोसाची वचने—त्याने उज्जीयाह
यहूदाहचा आणि योआश चा पुत्र यरोबोअम इस्राएलचा राजा असता,
भूकंपाच्या दोन वर्षे आधी इस्राएलाबद्दल जे दृष्टान्तामध्ये पाहिले ते हे. 2
त्याने म्हटले: “याहवेह सीयोनातून गर्जना करतात आणि यरुशलेमातून
गडगडाट करतात; मेंढपाळांची कुरणे सुकून जातात, आणि कर्मेलचा
माथा कोमेजून जाईल.” 3 याहवेह असे म्हणतात: “दिमिष्कच्या तीन
नव्हे तर चार अपराधांसाठी शासन करण्यापासून मी अनुताप करणार
नाही. कारण तिने गिलआदला मळणी करण्याच्या लोखंडी काट्यांनी
मळले आहे, 4 म्हणून मी हजाएलच्या घरावर अग्नी पाठवेन व बेन-
हदादच्या किल्ल्याला भस्म करेन. 5 दिमिष्कचे प्रवेशद्वार तोडून टाकेन;
आणि आवेन खोर्‍यातील राजा आणि बेथ-एदेनचा राजदंड धरणार्‍यांना
मी नष्ट करेन. अरामाचे लोक कीर येथे गुलाम म्हणून जातील.” याहवेह
असे म्हणतात. 6 याहवेह असे म्हणतात: “गाझाच्या तीन नव्हे तर चार
अपराधांसाठी शासन करण्यापासून मी अनुताप करणार नाही. कारण
तिने सर्व लोकांना बंदिवासात घेतले आणि त्यांना एदोमला विकले, 7
म्हणून मी गाझाच्या तटांवर अग्नी पाठवेन आणि तिच्या किल्ल्याला
भस्म करेन. 8 मी अश्दोदच्या राजाचा आणि अष्कलोनचा राजदंड
धरणार्‍याचा नाश करेन. शेवटच्या पलिष्टीचा नाश होत नाही तोपर्यंत मी
आपला हात एक्रोनावर चालवेन,” असे सार्वभौम याहवेह म्हणतात.
9 याहवेह असे म्हणतात: “सोरच्या तीन नव्हे तर चार अपराधांसाठी
शासन करण्यापासून मी अनुताप करणार नाही. कारण बंदिवासातील
सर्वांना एदोमास विकले आणि बंधुत्वाच्या कराराची अवहेलना केली
आहे. 10 म्हणून मी सोरच्या तटांवर अग्नी पाठवेन आणि तिच्या
किल्ल्यांना भस्म करेन.” 11 याहवेह असे म्हणतात: “एदोमच्या तीन
नव्हे तर चार अपराधांसाठी शासन करण्यापासून अनुताप करणार नाही.
कारण त्याने तलवार घेऊन आपल्या भावाचा पाठलाग केला आणि
देशातील स्त्रियांचा वध केला, कारण त्याचा क्रोध निरंतर वाढत होता,
आणि त्याच्या क्रोध अनियंत्रित वाढत गेला, 12 म्हणून मी तेमानवर
अग्नी पाठवेन आणि ती आग बस्राचे किल्ले भस्म करून टाकील.” 13
याहवेह असे म्हणतात, “अम्मोनच्या तीन नाही तर चार अपराधांसाठी
शासन करण्यापासून मी अनुताप करणार नाही. कारण आपल्या सीमा
वाढविण्यासाठी गिलआदाच्या गरोदर स्त्रियांना चिरले, 14 म्हणून
मी राब्बाहच्या तटांवर अग्नी पाठवेन आणि त्यामुळे त्यांचे किल्ले व
राजमहाल भस्म होतील. महान वादळामध्ये वावटळीचा आवाज व्हावा
तसा भयानक रणगर्जना होतील; 15 आणि तिचा राजा आणि राजाचे
अधिपती बरोबरच बंदिवासात जातील.” याहवेहने म्हटले.

**2** याहवेह असे म्हणतात, “मोआबच्या तीन नव्हे तर चार अपराधांसाठी
शासन करण्यापासून मी अनुताप करणार नाही. कारण त्याने एदोम
राजाची हाडे जाळून त्याची राख केली आहे. 2 मी मोआबावर अग्नी
पाठवेन तो करीयोथच्या किल्ल्याला भस्म करेन. युद्धाच्या आक्रोशात
आणि रणशिंगाच्या आवाजात मोआब प्रचंड नाशाने खाली जाईल.
3 मी तिच्या शासकाचा नाश करेन आणि त्याच्यासोबत तिच्या सर्व
अधिकार्‍यांना मारून टाकेन.” असे याहवेह म्हणतात. 4 याहवेह असे
म्हणतात: “यहूदीयाच्या तीन नव्हे तर चार अपराधांसाठी शासन
करण्यापासून मागे फिरणार नाही. कारण त्यांनी याहवेहचे नियमशास्त्र
धिक्कारले आहे व त्यांचे विधी पाळले नाही. ज्या दैवतांचे अनुसरण
त्यांच्या पूर्वजांनी केले होते त्या त्यांच्या खोट्या दैवतांनी त्यांची दिशाभूल
केली होती, 5 म्हणून मी यहूदीयावर अग्नी पाठवेन आणि यरुशलेमचे
किल्ले भस्म करेन.” 6 याहवेह असे म्हणतात, “इस्राएलला तीन
नव्हे तर चार अपराधांसाठी शासन करण्यापासून मी अनुताप करणार
नाही. चांदीसाठी ते एका न्यायी व्यक्तीला, आणि पायातील एका
जोड्यासाठी गरजवंत व्यक्तीला विकतात. 7 ते गरिबांच्या डोक्याला
भूमिवरील धुळीत पायदळी तुडवितात आणि दीनदुबळ्यांचा न्याय करीत
नाही. मुलगा व पिता एकाच तरुणीकडे जाऊन माझ्या पवित्र नामाला
काळिमा लावतात. 8 प्रत्येक वेदीजवळ गहाण ठेवलेल्या वस्त्रांवर पडून
राहतात आणि आपल्या दैवतांच्या घरात दंड म्हणून घेतलेला द्राक्षारस
पितात. 9 “जरी ते गंधसरूंसारखे उंच व एलावृक्षांसारखे मजबूत होते,
तरी मी त्यांच्यासमोर अमोरी लोकांचा संहार केला. मी वरून त्यांचे
फळ व खालून त्यांचे मूळ नासविले. 10 अमोर्‍यांचा देश तुम्हाला
द्यावा म्हणून मी तुम्हाला इजिप्त देशातून बाहेर आणले व चाळीस वर्षे
तुम्हाला रानात चालविले. 11 “तुमच्या मुलांपैकी काहींना संदेष्टे म्हणून
आणि तरुणांतील काहींना नाजीर होण्याकरिता वाढवले आहे. अहो
इस्राएलच्या लोकांनो, हे खरे नाही काय?” असे याहवेह जाहीर करतात.
12 “पण तुम्ही नाजीरांना द्राक्षारस पिण्यास आणि संदेष्ट्यांना भविष्य
न सांगण्याची आज्ञा दिली. 13 “म्हणून धान्याच्या पेंढ्यांखाली गच्च
भरलेली गाडी जशी दबते, तसे मी तुम्हाला दाबेन आणि तुम्ही कण्हाल.
14 चपळ निसटून जाणार नाहीत, शक्तिमानाला आपले सामर्थ्य लावता
येणार नाही, आणि वीराला आपला जीव वाचविता येणार नाही. 15
धनुर्धार्‍याला आपल्या भूमीवर उभे राहता येणार नाही, अत्यंत वेगाने
धावणारा सैनिक सुटणार नाही, आणि घोडेस्वाराला आपला जीव
वाचवता येणार नाही. 16 वीरांपैकी महाधैर्यवानही त्या दिवशी वस्त्रे
टाकून पळतील.” याहवेह असे जाहीर करतात.

**3** इस्राएलच्या लोकांनो, हे वचन ऐका, जे याहवेह तुमच्याविरुद्ध बोलले
आहेत—त्या संपूर्ण घराण्याविरुद्ध आहे ज्यांना मी इजिप्तमधून
बाहेर आणले आहे: 2 “पृथ्वीवरील सर्व राष्ट्रातील लोकांमधून मी
फक्त तुझीच निवड केली आहे; म्हणून तुझ्या सर्व पापांबद्दल मी तुला
शिक्षा करेन.” 3 दोन व्यक्ती एकमताचे झाल्यावाचून ते सोबत चालू
शकतील काय? 4 शिकार नसली तर सिंह गर्जना करेन काय? काही
धरल्याशिवाय तो त्याच्या गुहेत गुरगुरणार काय? 5 अमिष नसताना
पक्षी भूमीवरील सापळयात अडकतो काय? जर सापळयात काही
अडकले नसेल तर ते भूमीवरून उडेल काय? 6 नगरात जेव्हा रणशिंगाचा
आवाज येतो, तेव्हा लोक घाबरत नाही काय? शहरात विपत्ती आली तर,

ती याहवेहने घडवून आणली नाही काय? 7 सार्वभौम याहवेह आपल्या
सेवक संदेष्ट्यांना त्याच्या योजना प्रकट केल्याशिवाय निश्चितच काहीही
करणार नाही. 8 सिंहाने गर्जना केली आहे— कोण भिणार नाही?
सार्वभौम याहवेहने बोलले आहेत; तर मग संदेश दिल्यावाचून कोणी
राहील काय? 9 अश्दोदच्या गडांना आणि इजिप्तच्या गडांना ही घोषणा
करा: “शोमरोनच्या पर्वतावर एकत्र व्हा; तिच्यामधील गोंधळ आणि
तिच्या लोकांवरील अत्याचाराकडे पाहा.” 10 “जे योग्य ते कसे करावे
हे त्यांना माहीत नाही,” याहवेह जाहीर करतात, “त्यांनी लुटलेला व
चोरी केलेला माल त्यांच्या महालात कोणी साठवून ठेवला आहे.”
11 यास्तव सार्वभौम याहवेह असे म्हणतात, “एक शत्रू जो तुमचा
देश व्यापून टाकेल, तो तुमचे किल्ले कोसळून टाकेल आणि तुमचे
गड लुटेल.” 12 याहवेह असे म्हणतात: “जसा मेंढपाळ सिंहाच्या
तोंडातून केवळ दोन तंगड्या आणि कानाचा एक तुकडा सोडवितो,
तसे शोमरोनातील इस्राएल लोक जे पलंगाच्या शीरपट्टीने आणि
बिछान्यावरील रेशमी कापडाच्या तुकड्याने सोडविले जातील.” 13
“हे ऐका आणि याकोबाच्या घराण्याविरुद्ध साक्ष द्या,” असे याहवेह
सर्वसमर्थ परमेश्वर म्हणतात: 14 “ज्या दिवशी मी इस्राएलला तिच्या
पातकाबद्दल शिक्षा करेन, त्याच दिवशी मी बेथेलमधल्या वेद्यांचा नाश
करेन; वेद्यांची शिंगे कापून टाकण्यात येतील आणि ती जमिनीवर
पडतील. 15 मी ग्रीष्मकालीनघर आणि उष्मकालीनघर पाडून टाकेन;
हस्तिदंताने सजविलेल्या घरांचा विध्वंस होईल भवने जमीनदोस्त
होतील,” असे याहवेह जाहीर करतात.

**4** शोमरोनच्या डोंगरावर राहणाऱ्या बाशानच्या गाईंनो हे वचन ऐका,
तुम्ही स्त्रिया, ज्या तुम्ही गरिबांवर अत्याचार करता आणि गरजवंतांना
चिरडता आणि आपल्या नवऱ्यांना म्हणता, “आम्हाला काही पेय
आणा!” 2 सार्वभौम याहवेहने आपल्या पवित्रतेची शपथ घेऊन म्हटले
आहे: “खचितच अशी वेळ येईल जेव्हा तुम्हाला आकड्यांनी आणि
तुमच्यातील शिल्लक राहिलेल्यांना मासे धरण्याच्या गळांनी ओढून
नेतील. 3 तुमच्यातील प्रत्येक भिंतीच्या भगदाडातून सरळ निघून जाल.
तुम्ही हर्मोनात आपणाला टाकाल.” असे याहवेह म्हणतात. 4 “बेथेलास
जा आणि पाप करा; गिलगालास जाऊन आणि अधिक पाप करा.
रोज सकाळी आपली अर्पणे, दर तीन वर्षांनी आपला दशांश आणा. 5
उपकारस्तुती म्हणून खमिराची भाकरी जाळून टाका आणि तुमच्या
स्वैच्छिक अर्पणांची फुशारकी मारा; इस्राएली लोकहो तुम्ही याविषयी
बढाई मिरवा, कारण असेच करणे तुम्हाला आवडते.” असे सार्वभौम
याहवेह जाहीर करतात. 6 “मी तुम्हाला प्रत्येक शहरात उपाशी पोटी
ठेवले आणि प्रत्येक नगरात भाकरीची कमतरता केली, तरीही तुम्ही
मजकडे वळला नाही.” असे याहवेह जाहीर करतात. 7 “हंगामाच्या
आधी तीन महिने मी पाऊस रोखून धरला. मी एका नगरावर पाऊस
पाडला, पण दुसऱ्यावर पाडला नाही. एका शेतावर पाऊस पडला;
दुसऱ्या शेतावर पाऊस नव्हता आणि ते सुकून गेले. 8 पाण्यासाठी
लोक नगरोनगरी भटकले परंतु त्यांना पिण्यास पुरेसे मिळाले नाही,
तरीही तुम्ही मजकडे वळला नाही.” असे याहवेह जाहीर करतात. 9 “मी
तुमच्या शेतांवर व द्राक्षमळ्यांवर तांबेरा आणि भेरड हे रोग पाठविले;
टोळांनी तुमची अंजिराची व जैतुनाची झाडे खाऊन टाकली, आणि
तरीही तुम्ही माझ्याकडे वळला नाही,” असे याहवेह जाहीर करतात.
10 “इजिप्तमध्ये पाठविल्या तशा पीडा मी तुमच्यामध्ये पाठविल्या.
मी तुमच्या तरुणांना तुमच्या लुटलेल्या घोड्यांसहित तलवारीने मारून
टाकले. तुमच्या छावणीतील दुर्गंध तुमच्या नाकात भरला, तरीही तुम्ही
माझ्याकडे वळला नाही,” असे याहवेह जाहीर करतात. 11 “तुमच्यातील
काहींचा नाश असा केला जसा मी, परमेश्वराने, सदोम आणि गमोराचा
केला. तुम्ही अग्नीच्या भट्टीतून ओढून काढलेल्या जळत्या काठीप्रमाणे
होता, तरीही तुम्ही माझ्याकडे वळला नाही,” असे याहवेह जाहीर
करतात. 12 “म्हणून हे इस्राएला, मी तझ्यासोबत असेच करणार आहे,
कारण मी तुझ्याशी असे करणार आहे, म्हणून तुझ्या परमेश्वराला
भेटण्यास तयार हो.” 13 ज्यांनी पर्वतांची रचना केली, ज्यांनी वारे
निर्माण केले, आणि जे आपले विचार मानवजातीला प्रकट करतात,
जे प्रभात समयाला अंधकारात बदलतात आणि पर्वताला आपल्या
पायाखाली तुडवितात; याहवेह सर्वसमर्थ परमेश्वर, हे त्यांचे नाव आहे.

**5** हे इस्राएला, या वचनास ऐक, मी तुझ्याबद्दल विलाप करतो: 2
“इस्राएलची कुमारी पडली आहे, ती पुन्हा कधीही उठणार नाही,
तिच्या स्वतःच्या भूमीत उजाड आहे, तिला उठविणारा कोणीही नाही.”
3 कारण सार्वभौम याहवेह इस्राएलास असे म्हणतात: “तुमच्या शहरातून
एक हजार शूर निघतात, त्यातील शंभरच उरतील; तुमच्या शहरातून
शंभर निघतात, त्यातील दहाच उरतील.” 4 याहवेह इस्राएलाच्या
लोकांना असे म्हणतात, “मला शोधा म्हणजे तुम्ही जिवंत राहाल. 5
बेथेलचा शोध करू नका, गिलगाल येथे जाऊ नका, किंवा बेअर-शेबा
येथे प्रवास करू नका. कारण गिलगाल खचितच बंदिवासात जाईल,
आणि बेथेलचा पूर्ण नाश होईल” 6 याहवेहचा शोध करा म्हणजे तुम्ही
वाचाल, नाहीतर याहवेह योसेफाच्या गोत्रावर अग्नीसारखे भडकतील;
आणि त्याला भस्म करून टाकील, आणि बेथेलमध्ये त्याला विझवणारा
कोणीही नसेल. 7 असे लोक आहेत जे न्यायाला कडूपणात बदलतात
आणि नीतिमत्ता धुळीस मिळवितात. 8 ज्यांनी कृत्तिका नक्षत्रे व मृगशीर्ष
नक्षत्रे निर्माण केले, जे मध्यरात्रीचे रूपांतर पहाटेत करतात, आणि जे
दिवसाचे रूपांतर रात्रीत करतात, जे समुद्राच्या पाण्यास बोलवितात
आणि ते जमिनीच्या पृष्ठभागावर ओततात— याहवेह, हे त्यांचे नाव
आहे. 9 अंधारी आणणाऱ्या क्षणिक प्रकाशाने ते किल्ला उद्ध्वस्त
करतात आणि तटबंदी असलेल्या शहराचा नाश करतात. 10 असे
लोक आहे जे न्यायालयात न्यायाची बाजू घेणाऱ्यांचा द्वेष आणि सत्य
बोलणाऱ्यांचा तिरस्कार करतात. 11 तुम्ही गरिबांच्या पेंढ्यावरही कर
लावता आणि त्यांच्या धान्यावरही कर लावता. म्हणून जरी स्वतःसाठी
चिरेबंदी भवन बांधले असतील तरी त्यामध्ये कधीही राहणार नाही,
किंवा तुम्ही लावत असलेल्या भरघोस पीक देणाऱ्या रमणीय जरी तुम्ही
कसदार द्राक्षमळा लावला तरी त्यातील द्राक्षारस कधीच पिऊ शकणार

नाही. 12 कारण तुमचे अपराध किती अधिक आणि तुमची पातके किती
घोर आहेत हे मला माहीत आहे. निरपराधांवर अत्याचार करून लाच
घेतात व गरिबांना न्यायालयात न्याय मिळण्यापासून वंचित करतात
असेही लोक आहेत. 13 अशा वेळी जे शहाणे आहेत ते मौन धरतात,
कारण वेळ वाईट आहे. 14 वाईट नको, तर चांगले ते शोधा, म्हणजे
तुम्ही जगाल. तुम्ही जसे ते म्हणतात त्याचप्रमाणे याहवेह सर्वसमर्थ
परमेश्वर तुमच्यासोबत असतील. 15 दुष्टाईचा द्वेष करा, चांगल्यावर
प्रीती करा; न्यायालयात न्याय स्थापित करा. मग कदाचित याहवेह
सर्वसमर्थ परमेश्वर योसेफाच्या उरलेल्या लोकांवर दया करतील. 16
यास्तव प्रभू, याहवेह सर्वसमर्थ परमेश्वर असे म्हणतात: “सर्व रस्त्यांवर
विलाप होईल आणि प्रत्येक चौकात आक्रंदन होईल. तुमच्याबरोबर
शोक करण्यासाठी शेतकऱ्यांनाही बोलाविले जाईल; रडण्यासाठी शोक
करणाऱ्यांना बोलाविले जाईल. 17 प्रत्येक द्राक्षमळ्यामध्ये आक्रंदन
होईल, कारण मी तुमच्यामधून जाईन,” असे याहवेह म्हणतात. 18 जे
याहवेहच्या दिवसाची इच्छा बाळगतात त्यांच्या धिक्कार असो! तुम्ही
याहवेहच्या दिवसाची इच्छा का बाळगता? कारण तो दिवस प्रकाशाचा
नाही तर अंधाराचा असेल. 19 जसे काय एखादा मनुष्य सिंहापासून
पळाला आणि त्याला अस्वलाने गाठले, किंवा जसे काय आपल्या घरात
येऊन त्याने हात भिंतीला टेकविला आणि त्याला साप चावला. 20
याहवेहचा दिवस हा प्रकाशाचा नसून अंधकाराचा दिवस असेल; गडद
अंधकार, प्रकाशाचा एकही किरण नसेल? 21 “मला तुमच्या धार्मिक
उत्सवांचा तिरस्कार वाटतो; तुमच्या सभा माझ्यासाठी दुर्गंधीप्रमाणे
आहेत. 22 तुमची गोऱ्ह्यांची होमार्पणे व उपकारस्तुतीची अर्पणे आणली
तरीही मी स्वीकारणार नाही. तुमच्या उत्तम शांत्यर्पणामुळे मी संतुष्ट
होणार नाही. 23 तुमच्या गीतांचा गोंगाट माझ्यापासून दूर ठेवा! मी
तुमच्या वीणांचे संगीत ऐकणार नाही. 24 परंतु न्याय नदीप्रमाणे व
नीतिमत्ता प्रचंड लोंढ्याप्रमाणे वाहू द्या! 25 “अहो इस्राएल लोकहो,
रानात असताना चाळीस वर्षे तुम्ही मला अर्पणे आणली व होम केले
काय? 26 तुम्ही तुमच्या राजाचा देव्हारा, तुमच्या काइवान मूर्तीची बैठक,
तुमच्या दैवताचा तारा उंचाविला; जो तुम्ही तुमच्यासाठी बनविला. 27
म्हणून मी तुम्हाला, दिमिष्कच्या पलीकडे बंदिवासात पाठवेन,” असे
याहवेह म्हणतात, ज्यांचे नाव सर्वसमर्थ परमेश्वर आहे.

**6** तुम्ही जे सीयोनेत आरामात राहता, आणि शोमरोनच्या पर्वतावर
निश्चिंत असण्याचा विचार करता की तुम्ही जे राष्ट्रातील मुख्य लोक
आहात, ज्यांच्याजवळ इस्राएलचे लोक येतात, त्या तुमचा धिक्कार
असो! 2 कालनेह येथे जा आणि तिला पाहा; तिथून महान हमाथास
जा, आणि तिथून खाली पलिष्ट्यांच्या गथ येथे जा. हे तुमच्या दोन
राज्याहून अधिक उत्तम आहेत काय? त्यांचा देश तुमच्या देशाहून मोठा
आहे काय? 3 तुम्ही विपत्तीचे दिवस बाजूला सारता, आणि दहशतीचे
राज्य जवळ आणता. 4 तुम्ही हस्तिदंतांनी सजविलेल्या पलंगावर
लोळता; आणि तुम्ही अंथरुणावर पडून राहतात. उत्तम कोकरे आणि
चरबीयुक्त वासरे खाता. 5 तुम्ही वीणेच्या सुरावर निरर्थक गाणी गाता,
आणि दावीदासारखे आहोत याची भ्रामक कल्पना करता. 6 तुम्ही
वाट्या भरून द्राक्षारस पिता. उत्तम तेलांनी स्वतःला माखता, परंतु
तुम्ही योसेफाच्या नाशाबद्दल दुःख करत नाही. 7 म्हणून तुम्ही प्रथम
बंदिवासात जाल; आणि तुमची चैनबाजी आणि मौज मस्ती नाहीशी
होईल. 8 सार्वभौम याहवेहनी स्वतः शपथ घेतली आहे—याहवेह
सर्वसमर्थ परमेश्वर घोषणा करतात: “याकोबाच्या गर्वाचा मी तिरस्कार
करतो आणि त्यांचे किल्ले मी घृणास्पद मानतो; मी या शहराला आणि
तिच्यातील सर्वकाही शत्रूंच्या हाती देईन.” 9 जर एका घरात फक्त
दहाच लोक उरले असले तरीही ते सर्व मरतील. 10 आणि मृतदेह
जाळण्यासाठी घरातून बाहेर काढायला आलेल्या त्याच्या नातेवाईकांनी
तिथे लपून बसलेल्या कोणाला विचारले तर तुझ्यासोबत आणखी कोणी
आहे काय? आणि तो म्हणेल, “नाही,” तो त्याला पुढे म्हणेल, “गप्प
राहा, याहवेहचे नाव घेऊ नको.” 11 कारण याहवेहने अशी आज्ञा
दिली आहे, आणि ते मोठ्या घरांचे तुकडे तुकडे आणि लहान घरांना
चक्काचूर करतील. 12 घोडे खडकाळ कडांवर पळतात काय? बैल
घेऊन कोणी समुद्र नांगरतो काय? पण तुम्ही न्यायाला विषामध्ये आणि
नीतिमत्तेच्या फळाला कडवटपणामध्ये बदलले आहे; 13 लो-देबारला
आपल्या ताब्यात घेण्यात तुम्ही आनंद मानता आणि म्हणता, “आम्ही
स्वतःच्या बळाने करनाईम घेतला नाही काय?” 14 याहवेह, सर्वसमर्थ
परमेश्वर जाहीर करतात, “हे इस्राएला, मी तुझ्याविरुद्ध एक राष्ट्र उठवेन,
लेबो हमाथपासून अराबाच्या ओहोळापर्यंत ते तुझ्यावर जुलूम करेल.”

**7** सार्वभौम याहवेहने मला जे दाखविले, ते हे आहे: जेव्हा राजाच्या
पिकांची कापणी झाली आणि पुढचे पीक येणार होते, तेव्हा याहवेह
टोळांची एक प्रचंड झुंड तयार करीत होते. 2 जेव्हा त्यांनी जमीन
साफ केली, तेव्हा मी मोठ्याने ओरडलो, “सार्वभौम याहवेह, क्षमा
करा! याकोब कसा टिकू शकेल? तो फार लहान आहे!” 3 तेव्हा
याहवेहचे मन द्रवले, “पुन्हा हे घडणार नाही,” याहवेह असे म्हणाले.
4 सार्वभौम याहवेहने हे मला दाखविले: सार्वभौम याहवेहने अग्नीला
न्याय करण्यास बोलाविले; त्यांनी खोल समुद्र कोरडा केला आहे आणि
त्यांनी भूमी गिळंकृत केली आहे. 5 तेव्हा मी म्हणालो, “अहो सार्वभौम
याहवेह, मी तुम्हाला विनंती करतो, थांबा! याकोब कसा वाचेल? तो
फार लहान आहे!” 6 मग याहवेहचे मन द्रवले. आणि सार्वभौम याहवेह
म्हणाले, “हे देखील घडणार नाही.” 7 त्यांनी मला हे दाखविले: ओळंबा
लावून बांधलेल्या एका भिंतीच्या जवळ, प्रभू हातात ओळंबा घेऊन
उभे होते. 8 आणि याहवेहने मला विचारले, “आमोस, तुला काय
दिसते?” मी म्हणालो, “ओळंबा!” नंतर प्रभू म्हणाले, “पाहा मी माझे
लोक इस्राएल यांच्यामध्ये ओळंबा धरणार आहे; यापुढे मी त्यांची गय
करणार नाही. 9 “इसहाकाचे उच्च पूजास्थाने नाश करण्यात येतील
आणि इस्राएलची पवित्रस्थाने पाडण्यात येतील; मी माझ्या तलवारीने
यरोबोअमाच्या विरुद्ध उठेन.” 10 तेव्हा बेथेलचा याजक, अमस्याहने
इस्राएलचा राजा यरोबोअमाला हा निरोप पाठविला: आमोस इस्राएलच्या
हृदयात तुमच्याविरुद्ध कट रचीत आहे. त्याचेही सर्व शब्द देशासाठी

असह्य आहेत. 11 कारण आमोस असे म्हणत आहे: “‘यरोबोअम हा
तलवारीने मरणार आहे, आणि इस्राएल खात्रीने, आपल्या भूमीवरून
दूर बंदिवासात जाईल.’” 12 नंतर अमस्याह आमोसला म्हणाला,
“हे संदेष्ट्या, येथून यहूदीया प्रांतात परत जा आणि तिथे जाऊन
आपली भाकर कमव आणि तुझे संदेश तिथे सांगत राहा! 13 याच्यापुढे
बेथेल येथे संदेश देऊ नकोस, कारण हे राजकीय भवन आहे आणि
राज्याचे मंदिर आहे.” 14 आमोसने अमस्याहला उत्तर दिले, “मी तर
संदेष्टा नाही आणि मी संदेष्ट्याचा पुत्रही नाही, मी तर मेंढपाळ आणि
उंबरांच्या झाडांची निगा राखणारा होतो. 15 परंतु मी गुरांची राखण
करीत असताना याहवेहने मला दूर नेले आणि मला म्हणाले, ‘जा,
आणि माझ्या इस्राएली लोकांना संदेश सांग.’ 16 म्हणून आता तुम्ही
याहवेहचे वचन ऐका, व तुम्ही म्हणतात, “‘इस्राएलविरुद्ध भविष्यवाणी
करू नकोस, आणि इसहाकाच्या घराण्याविरुद्ध प्रचार करणे थांबव.’ 17
“म्हणून याहवेह असे म्हणतात: “‘तुझी पत्नी शहरात वेश्या होईल, तुझे
पुत्र व कन्या तलवारीने मरतील, तुझी जमीन मोजण्यात येईल आणि
सूत्राने विभागली जाईल, आणि तू स्वत: अपवित्र देशात मरशील.
इस्राएलचे लोक निश्चितच आपल्या देशातून दूर बंदिवासात गुलाम म्हणून
जातील.’”

**8** सार्वभौम याहवेहने मला हे दाखविले: पिकलेल्या फळांनी भरलेली
एक टोपली दाखविली. 2 “आमोसा, तुला काय दिसते?” त्यांनी
विचारले. मी उत्तर दिले, “मला पिकलेल्या फळांची एक टोपली दिसते.”
मग याहवेह मला म्हणाले, “माझ्या इस्राएली लोकांचा समय परिपक्व
झाला आहे; मी त्यांची गय करणार नाही.” 3 सार्वभौम याहवेह घोषित
करतात, “त्या दिवशी, मंदिरातील त्यांचे गीत मी आकांतात बदलेन.
सर्वत्र अनेक मृतदेह मौन धरून पडलेली असतील!” 4 जे तुम्ही
गरजवंतांना तुडवितात आणि देशाच्या गरिबांना दूर लोटता, 5 असे
म्हणता, “अमावस्या केव्हा निघून जाईल म्हणजे आम्ही धान्य विकू
शकू? आणि शब्बाथ केव्हा निघून जाईल, म्हणजे आम्ही धान्याचे
कोठार उघडू?” तराजूत लबाडी करून, लबाडीच्या मापाने, किंमत
वाढवू. 6 म्हणजे चांदीच्या मापात गरिबांना आणि पायतणाच्या एका
जोडीसाठी गरजूंना विकत घेऊ, आणि गव्हाचा भुसाही विकायचा. 7
याकोबाचे वैभव असलेले याहवेह यांनी स्वत:ची शपथ घेऊन सांगितले
आहे: “मी त्यांनी जे केले ते कधीही विसरणार नाही! 8 “यामुळे पृथ्वी
थरथर कापणार नाही काय, आणि तिच्यात राहणारे सर्व शोक करणार
नाहीत काय? संपूर्ण पृथ्वी नाईल नदीसारखी उठेल; ती नील नदीप्रमाणे
खवळेल आणि मग इजिप्तच्या नदीप्रमाणे बुडून जाईल. 9 “त्या
दिवशी,” सार्वभौम याहवेह घोषणा करतात, “दुपारच्या वेळी मी सूर्यास्त
करेन आणि भरदिवसा पृथ्वीला अंधकारमय करेन. 10 मी तुमचे धार्मिक
उत्सव शोकामध्ये उलटवेन आणि तुमची सर्व गीते विलापात बदलून
टाकीन. मी तुम्हा सर्वांना गोणपाट घालेन आणि तुमचे मुंडण करेन.
मी तो काळ एकुलत्या एक मुलासाठी विलाप करण्यासारखा आणि
त्याचा शेवट कडू दिवसासारखा करेन. 11 “असे दिवस येत आहेत,”
सार्वभौम याहवेह घोषित करतात, “मी देशावर दुष्काळ आणेन—
तो अन्नाचा दुष्काळ किंवा पाण्याची तहान नव्हे, तर याहवेहचे वचन
ऐकण्याचा दुष्काळ पाडेन— 12 आणि लोक याहवेहच्या वचनाच्या
शोधात समुद्रापासून समुद्रापर्यंत आणि उत्तरेपासून पूर्वेकडे भटकतील,
पण त्यांना ते सापडणार नाही. 13 “त्या दिवसात “तहानेने व्याकूळ
होऊन सुंदर कुमारी आणि उमदे तरुण निस्तेज होऊन जातील. 14 जे
शोमरोनच्या पापाची शपथ घेतात; जे म्हणतात, ‘हे दान, तुझ्या दैवतेची
शपथ’ किंवा ‘बेअर-शेबाच्या दैवतेची शपथ,’— ते असे पडतील की
पुन्हा कधीही उठणार नाहीत.”

**9** मी प्रभूला वेदीजवळ उभे असलेले पाहिले आणि ते म्हणाले:
“खांबांच्या वरच्या भागावर प्रहार करा म्हणजे उंबरठे हलतील. आणि
ते सर्व लोकांच्या डोक्यावर खाली पाड; जे त्यातून वाचतील त्यांना मी
तलवारीने मारून टाकीन. एक सुद्धा वाचणार नाही, कोणीही निसटणार
नाही. 2 खोल खणीत ते अधोलोकापर्यंत जाऊन पोहोचले, तरी तिथे
जाऊन माझ्या हात त्यांना वर ओढून आणेन; वर चढत ते आकाशापर्यंत
आले, तरी तिथूनही मी त्यांना खाली आणेन. (Sheol h7585) 3 कर्मेल
पर्वताच्या शिखरावर ते लपून राहिले, तरी मी त्यांची शिकार करून
त्यांना पकडेन. ते महासागराच्या तळाशी माझ्या दृष्टिआड लपून बसले
तरी, मी सर्पाला त्यांना चावा घेण्याची आज्ञा देईन. 4 जरी शत्रूंनी त्यांना
कैद करून बंदिवासात नेले, तरी मी तलवारीला त्यांना ठार मारण्याची
आज्ञा देईन. “मी त्यांच्यावर माझी नजर ठेवेन ती तर हानीसाठी असणार
भल्यासाठी नाही.” 5 प्रभू, सेनाधीश याहवेह— भूमीला स्पर्श करतात
आणि ती विरघळून जाते, आणि त्यामध्ये राहणारे सर्व लोक शोक
करतात. संपूर्ण देश नाईल नदीसारखा वर येतो आणि इजिप्तच्या
नदीप्रमाणे खाली बुडतो; 6 ते आकाशात आपले भव्य राजवाडे बांधतात
आणि त्याचा पाया पृथ्वीवर ठेवतात; ते समुद्राच्या पाण्याला बोलवितात
आणि ते पृथ्वीच्या पृष्ठभागावर ओततात; याहवेह हे त्यांचे नाव आहे. 7
“तुम्ही इस्राएली लोक माझ्यासाठी कूशी लोकांसारखेच नाहीत काय?”
असे याहवेह घोषित करतात. “मी इस्राएल लोकांना इजिप्त देशातून,
पलिष्ट्यांना कफतोरातून आणि अरामी लोकांना कीर देशातून बाहेर
काढले नाही काय? 8 “खचितच, सार्वभौम याहवेहची दृष्टी या पापी
राज्यावर आहे. आणि मी त्यांचा पृथ्वीच्या पृष्ठभागावरून नाश करेन;
तरीसुद्धा मी याकोबाच्या संतानांचा कायमचा नाश करणार नाही,” असे
याहवेह घोषित करतात. 9 “तर पाहा, मी आज्ञा करेन आणि जसे
चाळणीने धान्य चाळावे त्याप्रमाणे इस्राएलला इतर राष्ट्रांनी चाळावे,
पण त्याचा एक खडाही भूमीवर पडणार नाही. 10 माझ्या लोकांतील
जे सर्व पापी म्हणतात, ‘संकटे आमच्यावर येणार नाही वा आम्हाला
गाठणार नाहीत, ते तलवारीने मरतील.’ 11 “त्या दिवशी “दावीदाचा
पतन झालेला आश्रय मी पुनर्स्थापित करेन; मी तिची तुटलेली तटबंदी
दुरुस्त करेन, आणि तिचे अवशेष दुरुस्त करेन— आणि पूर्वीसारखीच
तिची पुनर्बांधणी करेन, 12 यासाठी की त्यांनी एदोमच्या अवशेषांवर
व माझे नाव धारण करणाऱ्या सर्व राष्ट्रांचा ताबा घ्यावा,” ही कार्ये

करणारे याहवेह ही घोषणा करतात. 13 “ते दिवस येत आहेत,” याहवेह
जाहीर करतात, “जेव्हा नांगरणारा कापणी करणाऱ्याला आणि द्राक्षे
तुडविणारा बी पेरणाऱ्याला मागे टाकेल. नवीन द्राक्षारस पर्वतांवरून गळू
लागेल आणि ते सर्व टेकड्यांवरून वाहू लागेल, 14 मी माझ्या इस्राएली
लोकांना बंदिवासातून परत आणेन. “ते त्यांच्या उद्ध्वस्त झालेल्या
नगरांची पुनर्बांधणी करून त्यात राहतील. ते द्राक्षमळे लावतील आणि
त्याचा द्राक्षारस पितील; ते बागा लावतील आणि त्याची फळे खातील.
15 मी इस्राएलला त्यांच्या स्वतःच्या भूमीमध्ये पेरीन, मी त्यांना दिलेल्या
भूमीतून त्यांना पुन्हा उपटून टाकण्यात येणार नाही.” असे याहवेह
तुमचे परमेश्वर म्हणतात.

# ओबद्याह

1 ओबद्याहचा दृष्टान्त हा. एदोमाबद्दल सार्वभौम याहवेह असे म्हणतात;
आम्ही याहवेहकडून हा संदेश ऐकला: राष्ट्रांना सांगण्यासाठी एक
दूत पाठविण्यात आला होता, “उठा, आपण तिच्याविरुद्ध युद्ध करण्यास
जाऊ.” 2 “पाहा, राष्ट्रांमध्ये मी तुला लहान करेन; तुझा पूर्णपणे
तिरस्कार करण्यात येईल. 3 तुमच्या अंतःकरणाच्या गर्विष्ठपणाने तुमची
फसवणूक केली आहे, तुम्ही जे खडकांच्या कपारीत राहता आणि तुमचे
घर उंचावर बांधता, तुम्ही जे स्वतःला म्हणता, ‘मला खाली जमिनीवर
कोण आणू शकेल?’ 4 तू गरुडांप्रमाणे उंच भराऱ्या मारीत असलास
किंवा आपले घरटे ताऱ्यांमध्ये बांधत असलास, तरी तिथून मी तुला
खाली आणेन,” असे याहवेह जाहीर करतात. 5 “जरी तुमच्याकडे
चोर आले, जरी रात्री लुटारू आले तर पाहा, संकट कसे तुमची वाट
पाहत आहे! त्यांना हवे तेवढेच चोरत नाहीत काय? जर द्राक्ष वेचणारे
तुमच्याकडे आले, तर ते थोडी द्राक्षे सोडणार नाहीत काय? 6 परंतु
एसावला लुटण्यात येईल, आणि त्याचा गुप्त खजिना हस्तगत केला
जाईल! 7 तुझ्यासोबत करार केलेले सर्व मित्र राष्ट्रे तुला तुझ्या सीमेपर्यंत
ढकलतील; तुझे मित्र तुला फसवतील आणि तुझा ताबा घेतील; जे
तुझी भाकरी खातात, तेच तुझ्यासाठी सापळा रचतील, परंतु तुला ते
कळणारही नाही.” 8 याहवेह असे जाहीर करतात, “त्या दिवशी, मी
एदोमच्या ज्ञानी पुरुषांचा, एसावच्या डोंगरावर जे समजूतदार आहेत,
त्यांचा नाश करणार नाही काय? 9 तेमान, तुझे योद्धे घाबरून जातील,
आणि एसावाच्या डोंगरांमध्ये असलेला प्रत्येकजण कापला जाईल. 10
तुझा भाऊ याकोब याच्यावर केलेल्या अत्याचारामुळे, तू लाजेने झाकून
जाशील; आणि तुझा कायमचा नाश करण्यात येईल. 11 अनोळखी
लोकांनी जेव्हा त्याची संपत्ती पळवून नेली त्या दिवशी तू अलिप्त राहिला
आणि परदेशी लोक त्याच्या वेशीत शिरले आणि यरुशलेमसाठी चिठ्ठ्या
टाकल्या, तेव्हा तू त्यांच्यापैकी एक होतास. 12 आपल्या भावाच्या
दुःखाच्या दिवशी त्याच्याबद्दल आनंद करू नकोस, किंवा यहूदीयाच्या
रहिवाशांवर आनंद मानू नकोस, त्यांच्या संकटाच्या दिवशी अधिक
गर्व करू नकोस. 13 तुम्ही माझ्या लोकांच्या संकटाच्या दिवशी माझ्या
लोकांच्या नगरात प्रवेश करू नका, किंवा त्यांच्या आपत्तीच्या दिवशी
त्यावर आनंद करू नका, किंवा त्यांच्या विपत्तीच्या दिवशी. त्यांच्या
संपत्तीवर ताबा मिळवू नका. 14 त्यांच्या फरार झालेल्यांना मारण्यासाठी
चौकात उभा राहू नको किंवा त्यांच्या संकटाच्या वेळी त्यांच्या शत्रूच्या
स्वाधीन करू नको. 15 “सर्व राष्ट्रांसाठी नेमलेला याहवेहचा दिवस जवळ
आला आहे. जसे तू केलेस, तसे तुझ्यासोबतही केले जाईल होईल;
तुझ्याद्वारे करण्यात आलेली दुष्कर्मे तुझ्याच माथ्यावर उलटतील. 16
जसा तू माझ्या पवित्र पर्वतावर प्याला, तसेच सर्व राष्ट्रे सतत पीत
राहतील; ते पितील आणि पीत राहतील आणि जसे ते कधीच नव्हते
तसे बनतील. 17 पण सीयोन पर्वतावर तारण होईल; ते पवित्र होईल,
आणि याकोबास त्याचे वतन मिळेल. 18 याकोब अग्नीसारखा आणि
योसेफ ज्वालासारखे असतील; एसाव उरलेल्या भुशासारखे होतील,
आणि ते त्यांना जाळून नष्ट करतील. एसावच्या वंशजांपैकी कोणीही
जिवंत राहणार नाही.” याहवेहने हे म्हटले आहे. 19 एसावाचा पर्वत
दक्षिणेतील लोक ताब्यात घेतील, आणि पलिष्टी लोकांच्या देशाला
डोंगराच्या पायथ्याशी राहणारे आपल्या ताब्यात घेतील. ते एफ्राईम
आणि शोमरोनच्या भूमीचा ताबा घेतील आणि बिन्यामीन गिलआद प्रांत
व्यापून घेतील. 20 बंदिवान इस्राएल लोकांचा हा गट, जो कनानमध्ये
आहे, तो कनानी लोकांचा सारेफथपर्यंतचा प्रदेश ताब्यात घेतील;
यरुशलेमेचे बंदिवान, जे सफारदात शहरात आहेत, ते नेगेवची शहरे
ताब्यात घेतील. 21 सुटका करणारे एसाव पर्वतावर राज्य करण्यासाठी
सीयोन पर्वतावर चढतील. आणि ते याहवेहचे राज्य असेल.

# योनाह

1 याहवेहचे वचन अमित्तयाचा पुत्र योनाहकडे आले: 2 “महान
शहर निनवेहस जा आणि त्याविरुद्ध संदेश दे, कारण त्यांची दुष्टाई
माझ्यासमोर आली आहे.” 3 परंतु योनाह याहवेहपासून पळाला आणि
तार्शीशला गेला. तो पुढे खाली याफो येथे गेला, तिथे त्याला त्या बंदरात
बांधलेले एक जहाज सापडले. भाडे दिल्यानंतर, तो जहाजावर चढला
आणि याहवेहपासून पळून जाण्यासाठी तार्शीशकडे जहाजाचा प्रवास
प्रारंभ गेला. 4 मग याहवेहने समुद्रावर एक प्रचंड वारा सोडला आणि
इतके भयंकर वादळ उठले की जहाज फुटण्याचे भय उद्भवले. 5 सर्व
खलाशी घाबरले आणि प्रत्येकजण आपआपल्या दैवतांचा धावा करू
लागला. आणि जहाजाचा भार कमी व्हावा म्हणून त्यांनी जहाजात
भरलेले साहित्य समुद्रात टाकण्यास सुरुवात केली. पण योनाह मात्र
जहाजाच्या तळघरात अगदी गाढ झोपला होता. 6 तेव्हा जहाजाचा
कप्तान खाली तळघरात त्याच्याकडे गेला आणि म्हणाला, “अशा वेळी
तू कसा झोपू शकतोस? चल, ऊठ आणि तुझ्या दैवताला हाक मार
आणि ते आपल्याकडे लक्ष देतील व कृपा करतील म्हणजे आपला
नाश होणार नाही.” 7 तेव्हा खलाशी एकमेकांना म्हणाले, “आपण
चिठ्ठ्या टाकून कोणामुळे हे संकट आले आहे ते शोधू या.” मग त्यांनी
चिठ्ठ्या टाकल्या आणि योनाहच्या नावाने चिठ्ठी निघाली. 8 यावर त्यांनी
योनाहला विचारले, “आम्हाला सांग, आमच्यावर हे संकट कोणामुळे
आले आहे? तू काय काम करतो? तू कुठे राहतो? तुझा देश कोणता? तू
कोणत्या लोकांपैकी आहेस?” 9 योनाहने त्यांना उत्तर दिले, “मी एक
इब्री आहे आणि मी स्वर्गातील याहवेह परमेश्वराची उपासना करतो,
ज्यांनी समुद्र आणि कोरडी जमीन निर्माण केली.” 10 हे ऐकून ते घाबरले
आणि योनाहला म्हणाले, “तू हे काय केलेस?” (कारण योनाहने
त्यांना सांगितले होते की तो याहवेहच्या उपस्थितीतून पळून जात
आहे.) 11 मग त्यांनी योनाहला विचारले, “आम्ही तुझ्यासोबत काय
करावे जेणेकरून समुद्र आमच्यासाठी शांत होईल?” कारण समुद्र तर
अधिकाधिक उग्र होत होता. 12 तेव्हा त्याने त्यांना उत्तर दिले, “मला
समुद्रात फेकून द्या, म्हणजे समुद्र पुन्हा शांत होईल. कारण माझ्या
चुकीमुळेच हे भयंकर वादळ तुमच्यावर आले आहे, हे मला ठाऊक
आहे.” 13 तरीही खलाश्यांनी जहाज किनाऱ्यावर नेण्याचा आटोकाट
प्रयत्न केला. पण ते यशस्वी झाले नाहीत, कारण समुद्र पूर्वीपेक्षा जास्त
उग्र होत होता. 14 मग ते मोठ्या आवाजात याहवेहचा धावा करत
म्हणाले, “याहवेह, कृपया या मनुष्याचा जीव घेतल्याने आमचा नाश
होऊ देऊ नका. एका निरपराध व्यक्तीला मारल्याबद्दल आम्हाला दोष
देऊ नका, कारण तुम्हाला जे आवडले ते तुम्ही केले आहे.” 15 मग
त्यांनी योनाहला उचलले आणि जहाजावरून समुद्रात फेकून दिले, आणि
उग्र समुद्र तत्काळ शांत झाला! 16 यामुळे त्या लोकांना याहवेहची
भीती वाटली आणि त्यांनी याहवेहला यज्ञ केला आणि नवस केला. 17
याहवेहने एक मोठा मासा नेमला ज्याने योनाहला गिळंकृत केले आणि
योनाह त्या माशाच्या पोटात तीन दिवस आणि तीन रात्री राहिला.

2 मग माशाच्या पोटातून योनाहने याहवेह त्याच्या परमेश्वराची प्रार्थना
केली. 2 तो म्हणाला: “माझ्या संकटात मी याहवेहचा धावा
केला आणि त्यांनी मला उत्तर दिले. मृत्यूच्या खोल अधोलोकातून
मी मदतीसाठी हाक मारली आणि तुम्ही माझी हाक ऐकली. **(Sheol
h7585)** 3 तुम्ही मला खोलवर, समुद्राच्या अगदी हृदयात फेकून दिले
आणि प्रवाहाने मला घेरले; आणि तुमच्या बेफाम लाटा आणि कल्लोळ
यांनी मला झाकून टाकले. 4 मी म्हणालो, ‘मला तुमच्या नजरेसमोरून
दूर करण्यात आले आहे; तरीही मी तुमच्या पवित्र मंदिराकडे दृष्टी
लावेन.’ 5 बुडविणाऱ्या पाण्याने मला घाबरविले, माझ्या सभोवताली
खोल डोह होता; माझे डोके समुद्राच्या शेवाळाने गुंडाळले होते. 6
मी पर्वतांच्या मुळाशी पोहोचलो होतो; मी कायमचा जमिनीत बंदिस्त
झालो होतो. तरीसुद्धा, हे याहवेह माझ्या परमेश्वरा, तुम्ही माझा जीव
खड्ड्यातून वर आणला. 7 “जेव्हा माझे जीवन क्षीण होत होते, तेव्हा मी
याहवेहचे स्मरण केले, आणि माझी प्रार्थना वर तुमच्याकडे, तुमच्या
पवित्र मंदिराकडे पोहोचली. 8 “जे निरुपयोगी मूर्तींना कवटाळून
राहतात ते स्वतःला परमेश्वराच्या प्रीतीपासून दूर ठेवतात. 9 परंतु मी,
उपकारस्तुतीच्या जयघोषाने, तुमच्यासाठी यज्ञ अर्पण करेन. मी जो
नवस केला होता, तो मी पूर्ण करेन. मी म्हणेन, ‘तारण याहवेहकडून
येते.’” 10 मग याहवेहने माशाला आज्ञा केली आणि त्याने योनाहला
कोरड्या भूमीवर ओकून टाकले.

3 मग याहवेहचे वचन दुसऱ्या वेळेस योनाहकडे आले: 2 “ऊठ,
त्या महान निनवेह शहरात जा आणि मी जो संदेश तुला देत आहे
त्याची घोषणा कर.” 3 तेव्हा योनाहने याहवेहच्या वचनाप्रमाणे केले
आणि निनवेह शहरास गेला. आता निनवेह हे फारच मोठे शहर होते.
ते पार करण्यास तीन दिवस लागत होते. 4 जेव्हा योनाहने शहरात
एक दिवसाचा प्रवास सुरू केला आणि घोषणा केली, “आतापासून
चाळीस दिवसांनी निनवेहचा नाश होईल.” 5 तेव्हा निनवेहच्या लोकांनी
परमेश्वरावर विश्वास ठेवला. सर्वत्र उपवास जाहीर केला आणि त्या
सर्वांनी, मोठ्यांपासून लहानापर्यंत सर्वांनी गोणपाट परिधान केले. 6
जेव्हा योनाहची चेतावणी निनवेहच्या राजापर्यंत पोहोचली, तेव्हा तो
आपल्या सिंहासनावरून उठला, आपली राजवस्त्रे काढून बाजूला ठेवली
व गोणपाट परिधान करून तो राखेत जाऊन बसला. 7 त्याने निनवेहमध्ये
ही घोषणा केली: “राजा आणि त्याच्या सरदारांच्या आदेशानुसार:
“कोणत्याही मनुष्याने किंवा पशूने, गुरे किंवा मेंढरांनी, काहीही चाखू
नये; त्यांनी काहीही खाऊ किंवा पिऊ नये. 8 पण मनुष्याने आणि
प्राण्याने गोणपाट घालावे. प्रत्येकाने त्वरित परमेश्वराचा धावा केला
करावा आणि आपली वाईट कृत्ये आणि हिंसाचार सोडावा. 9 कोण
जाणो? परमेश्वर दया करतील आणि त्यांची इच्छा बदलू शकेल आणि
त्यांचा तीव्र क्रोध शांत होईल आणि आपण विनाशापासून वाचू.”

10 जेव्हा परमेश्वराने पाहिले, त्यांनी काय केले आणि आपल्या दुष्ट
मार्गांपासून कसे फिरले आहेत, तेव्हा त्यांनी आपली इच्छा बदलली
आणि त्यांनी ठरविलेला नाश त्यांच्यावर आणला नाही.

4 परंतु योनाहला हे फार चुकीचे आहे असे वाटले आणि त्याला
राग आला. 2 त्याने याहवेहकडे प्रार्थना केली, "हे याहवेह, जेव्हा
मी आपल्या देशात होतो, तेव्हा मी हे म्हटले नाही काय? म्हणून मी
तार्शीशला पळून जाण्याचा प्रयत्न केला. मला माहीत होते की तुम्ही
कृपाळू आणि दयाळू परमेश्वर आहात, मंदक्रोध आणि विपुल प्रीती
करणारे आहात, विपत्ती आणल्याबद्दल अनुताप करणारे परमेश्वर
आहात. 3 तेव्हा हे याहवेह, माझा जीव घ्या, कारण मला जगण्यापेक्षा
मरणेच बरे आहे." 4 परंतु याहवेहनी उत्तर दिले, "तुला राग येणे योग्य
आहे का?" 5 मग योनाह बाहेर गेला आणि शहराच्या पूर्वेकडे बसला.
तिथे त्याने एक मंडप बांधून सावलीत बसला आणि तिथून शहराचे काय
होते, याची वाट बघत बसला. 6 मग याहवेह परमेश्वराने योनाहच्या
डोक्यावर छाया पडावी आणि त्याला त्रास होऊ नये म्हणून एक वेलाचे
रोपटे वाढविले. त्या रोपामुळे योनाहला खूप आनंद झाला. 7 पण
दुसऱ्या दिवशी पहाटे परमेश्वराने एक कीटक पाठविला, ज्याने रोपटे
कुरतडले आणि त्यामुळे रोपटे सुकले. 8 जेव्हा सूर्य उगवला तेव्हा
परमेश्वराने पूर्वेचा एक प्रखर वारा पाठवला आणि योनाहच्या डोक्यावर
सूर्याची उष्णता आदळली, ज्यामुळे तो मूर्छित झाला. त्याला मरावेसे
वाटू लागले, आणि तो म्हणाला, "मला जगण्यापेक्षा मरण बरे." 9 तेव्हा
परमेश्वर योनाहला म्हणाले, "रोपट्यामुळे तू रागवावेस, हे योग्य आहे
का?" तो म्हणाला, "होय, तेच योग्य आहे. मला इतका राग आला आहे
की मला मरावेसे वाटते." 10 परंतु याहवेह म्हणाले, "तू या रोपट्यासाठी
चिंतित आहेस, ज्याची काळजी तू घेतली नाहीस किंवा वाढविले नाहीस.
ती एका रात्रीत मोठी झाली आणि एका रात्रीत नष्ट झाली. 11 मग मी
निनवेह या महान शहराची काळजी का करू नये? ज्यामध्ये एक लाख
वीस हजारांहून अधिक लोक राहतात, ज्यांना त्यांच्या उजव्या आणि
डाव्या हातातील फरक देखील माहीत नाही—आणि या शहरात अनेक
प्राणीही आहेत."

# मीखाह

**1** यहूदीयाचे राजे योथाम, आहाज आणि हिज्कीयाहच्या कारकिर्दीत,
मोरेशेथचा रहिवासी मीखाहला याहवेहचा संदेश आला—त्याने
शोमरोन आणि यरुशलेमबद्दल दृष्टान्तात पाहिला. 2 सर्व लोकहो,
तुम्ही सर्वजण, ऐका, पृथ्वी आणि जे सर्व त्यामध्ये राहतात, लक्ष द्या,
सार्वभौम याहवेह परमेश्वर, त्यांच्या पवित्र मंदिरातून, तुमच्याविरुद्ध साक्ष
देतील. 3 पाहा! याहवेह त्यांच्या निवासस्थानातून बाहेर पडत आहेत.
ते खाली उतरतात आणि पृथ्वीच्या उंच जागा तुडवितात. 4 त्यांच्या
पायाखाली पर्वत वितळतात जसे अग्नीपुढे मेण, जसे पाणी उतारावरून
खाली येते, तशा दऱ्या दुभंगतात. 5 हे सर्व याकोबाच्या अपराधामुळे
आणि इस्राएली लोकांच्या पापाचे परिणाम आहे. याकोबाचा अपराध
काय आहे? ते शोमरोन आहे की नाही? यहूदीयाचे उच्च स्थान कोणते
आहे? ते यरुशलेम नाही की नाही? 6 “म्हणून मी शोमरोनला मातीचा
ढिगारा, द्राक्षमळे लावण्याची जागा करेन. मी तिचे दगड खोऱ्यात
टाकेन आणि तिचा पाया उघडा करेन. 7 तिच्या सर्व मूर्ती फोडून
तुकडे करण्यात येतील; तिच्या मंदिरातील सर्व भेटवस्तू अग्नीत भस्म
होतील; मी तिच्या सर्व प्रतिमा नष्ट करेन. कारण तिने आपल्या भेटवस्तू
वेश्याव्यवसाय करून मिळवल्या आहेत, आणि त्या पुन्हा वेश्यावृत्तीची
मजुरी म्हणून वापरली जाईल.” 8 म्हणून मी शोक व आक्रंदन करेन; मी
अनवाणी व वस्त्रहीन फिरेन. कोल्ह्यासारखा मी आक्रोश करेन; आणि
घुबडाप्रमाणे विव्हळेन. 9 कारण शोमरोनची पीडा असाध्य आहे; ती
यहूदीयामध्ये पसरली आहे. ती माझ्या लोकांच्या वेशीपर्यंत पोहोचली
आहे, ती यरुशलेमपर्यंतही पोहोचली आहे. 10 गथ मध्ये ही बातमी
देऊ नका; अजिबात रडू नका. बेथ-ले-अफ्राह मध्ये जाऊन धुळीत
लोळ. 11 शाफीर मध्ये राहणारे तुम्ही वस्त्रहीन आणि निर्लज्जपणे
निघून जा. जे झानन मध्ये राहतात ते बाहेर जाणार नाहीत. बेथ-एसल
विलाप करीत आहे; ते तुम्हाला यापुढे संरक्षण देऊ शकत नाही. 12
मारोथ मध्ये राहणारे लोक वेदनांनी रडत आहेत, आणि मदतीची वाट
पाहत आहेत, कारण यरुशलेमच्या प्रवेशद्वारापर्यंत पीडा याहवेहने
पाठविलेली आहे. 13 लाखीशमध्ये राहणाऱ्यांनो, वेगवान घोडे रथाला
जुंपा. तुझ्यापासून सीयोनच्या कन्येचे पाप सुरू झाले, कारण तुझ्यामध्ये
इस्राएलचे अपराध आढळून आले. 14 त्यामुळे तू मोरेशेथ-गथला
निरोपाची भेट देशील. अकजीब चे रहिवासी इस्राएलच्या राजांना
फसविणारी ठरतील. 15 मारेशाहच्या रहिवाशांनो, मी तुमच्यावर विजय
मिळविणारा पाठवेन. इस्राएलचे प्रतिष्ठित लोक अदुल्लामला पळून
जातील. 16 ज्या मुलांमध्ये तुम्ही आनंदी आहात त्यांच्यासाठी शोक
करताना आपले डोके मुंडण करा; गिधाडासारखे तुमच्या डोक्याचे मुंडण
करा, कारण ते तुमच्यापासून गुलाम म्हणून जातील.

**2** जे वाईट कृत्याची योजना करतात, जे आपल्या अंथरुणावर कट
रचतात, त्यांचा धिक्कार असो! पहाट होताच ते त्यांचा कट पूर्ण
करतात कारण हे सामर्थ्य त्यांच्या हातात असते. 2 ते लोभीपणाने
इतरांची शेते बळकावतात, दुसऱ्यांची घरेही हिसकावून घेतात. ते
कपटाने लोकांची घरे बळकावतात आणि त्यांच्या पूर्वजांची संपत्ती
लुटतात. 3 म्हणून याहवेह म्हणतात: “मी या लोकांविरुद्ध विपत्ती
योजत आहे, ज्यापासून तुम्ही स्वतःला वाचवू शकत नाही. तुम्ही पुन्हा
कधीही गर्वाने चालणार नाही, कारण तो आपत्तीचा काळ असेल. 4
त्या दिवशी लोकांकरिता तुम्ही चेष्टेचा विषय व्हाल; ते तुम्हाला या
विलाप गीताने टोमणे मारतील: ‘आमचा संपूर्ण नाश झाला आहे; माझ्या
लोकांच्या मालमत्तेची विभागणी झाली आहे. ते ती माझ्यापासून काढून
घेतात! ते आमची शेते बंडखोरांना देतात.’” 5 म्हणून याहवेहच्या सभेत
चिठ्ठ्या टाकून सूत्राने जमिनीची वाटणी करण्यास तुमच्याकडे कोणी
राहणार नाही. 6 त्यांचे संदेष्टे म्हणतात, “संदेश देऊ नका, या गोष्टींबद्दल
संदेश देऊ नका; आमच्यावर अप्रतिष्ठा येणार नाही.” 7 हे याकोबाच्या
घराण्या, “असे म्हटले जावे काय, याहवेह अधीर होतात काय? ते अशी
कामे करतात काय? “ज्याचे मार्ग सरळ आहेत त्याचे माझे शब्द भले
करत नाहीत काय? 8 अलीकडे माझे लोक शत्रूसारखे उठले आहेत.
जे लोक निष्काळजीपणे जवळून जातात त्यांचे किमती कपडे तुम्ही
काढून घेता, जसे युद्धातून परत येणारे पुरुष करतात. 9 तुम्ही माझ्या
लोकांच्या स्त्रियांना त्यांच्या सुखी घरातून हाकलून देतात. तुम्ही त्यांच्या
मुलांकडून माझे आशीर्वाद कायमचे हिरावून घेता. 10 उठा, चालते व्हा!
कारण हे तुमचे विश्रांतिस्थान नाही, कारण हे अशुद्ध झाले आहे, सर्व
उपायांच्या पलीकडे, ते उद्ध्वस्त झाले आहे. 11 जर एखादा लबाड
आणि फसवणूक करणारा येऊन म्हणाला, ‘मी तुम्हाला भरपूर द्राक्षारस
व मद्याची भविष्यवाणी करेन,’ तर अशीच व्यक्ती या लोकांसाठी योग्य
संदेष्टा होईल! 12 “हे याकोबा, मी तुम्हा सर्वांना निश्चित गोळा करेन;
इस्राएलच्या उरलेल्यांना मी खचित गोळा करेन. जसे मेंढवाड्यात मेंढरे,
जसे कुरणात कळप, तसे मी त्यांना एकत्र गोळा करेन; आणि ती जागा
लोकांनी फुलून जाईल. 13 जे कुंपण तोडून मार्ग उघडणारे त्यांच्या पुढे
जातील; ते द्वार तोडून त्यातून बाहेर जातील. त्यांचा राजा त्यांच्या पुढे
जाईल, याहवेह त्यांचे पुढारी असतील.”

**3** तेव्हा मी म्हणालो, याकोबाच्या पुढाऱ्यांनो, इस्राएलाच्या
अधिकाऱ्यांनो, ऐका. तुम्ही न्यायाला स्वीकारू नये काय, 2 तुम्ही
जो चांगल्याचा द्वेष करता व वाईटावर प्रीती करता; तुम्ही माझ्या
लोकांची कातडी सोलता, आणि त्यांच्या हाडापर्यंतच्या मांसाचे लचके
तोडता; 3 तुम्ही जे माझ्या लोकांचे मांस खाता, त्यांची कातडी सोलता
आणि त्यांची हाडे मोडता, आणि पातेल्यात शिजविण्यासाठी मांसाचे
तुकडे करावेत तसे त्यांचे तुकडे करता. 4 मग ते याहवेहचा धावा
करतील, पण याहवेह त्यांचे ऐकणार नाही. त्यावेळी त्यांच्या वाईट
कृत्यांमुळे याहवेह त्यांच्यापासून आपला चेहरा लपवतील. 5 याहवेह
असे म्हणतात: “माझ्या लोकांना चुकीच्या मार्गाने नेणारे संदेष्टे, त्यांना
काही खायला मिळाल्यास ते ‘शांती’ ची घोषणा करतात. परंतु जो
त्यांना खाण्याचे देण्यास नकार देतो त्याच्याशी युद्ध करण्यास सुसज्ज
राहतात. 6 म्हणूनच तुझ्यावर रात्र येईल, दृष्टान्त दिसणार नाही, आणि

अंधार येईल, तुम्ही दैवप्रश्न पाहिल्याशिवाय! या संदेष्ट्यांसाठी सूर्यास्त
होईल आणि दिवस असता त्यांच्यावर अंधार पडेल. 7 द्रष्ट्यांना लाज
वाटेल आणि दैवप्रश्न करणारे फजीत होतील. ते सर्व आपली मुखे
झाकतील कारण त्यांना परमेश्वराकडून उत्तर आलेले नाही.” 8 परंतु
माझ्याबाबतीत म्हणाल, तर याकोबाला त्याचे अपराध आणि इस्राएलला
त्याचे पाप सांगण्यासाठी मी याहवेहच्या आत्म्याने, न्यायाने आणि
सामर्थ्याने परिपूर्ण आहे. 9 अहो याकोबाच्या पुढाऱ्यांनो, इस्राएलाच्या
अधिकाऱ्यांनो, माझे ऐका, तुम्ही न्यायाला तुच्छ लेखता आणि चांगल्या
गोष्टी विकृत करता; 10 सीयोनला रक्तपाताने आणि यरुशलेमला
दुष्टपणाने बांधले आहे. 11 तिचे पुढारी लाच घेऊन न्याय करतात, तिचे
याजक किंमत घेऊन शिकवितात, व तिचे संदेष्टे पैशासाठी भविष्य
सांगतात. तरीही ते याहवेहच्या मदतीसाठी आसुसलेले असतात आणि
म्हणतात, “याहवेह आपल्यामध्ये नाहीत काय? आमच्यावर कोणतेही
संकट येणार नाही.” 12 म्हणून तुमच्यामुळे, सीयोन शेताप्रमाणे नांगरला
जाईल, यरुशलेम दगडांचा ढिगारा होईल, मंदिराच्या टेकडीवर दाटीने
झाडेझुडपे वाढतील.

**4** पण शेवटच्या दिवसात याहवेहच्या मंदिराचे पर्वत बळकट व उंच असे
स्थापित केले जातील; सर्व पर्वतांपेक्षा ते उंचावले जातील, आणि
लोकांचा लोंढा त्याकडे एकत्र येईल. 2 अनेक राष्ट्रे येतील आणि म्हणतील,
“चला, आपण याहवेहच्या पर्वताकडे, याकोबाच्या परमेश्वराच्या मंदिराला
जाऊ. ते आपले मार्ग आम्हाला शिकवतील, म्हणजे आम्ही त्या मार्गावर
चालू.” कारण सीयोनमधून नियमशास्त्र, यरुशलेमातून याहवेहचे वचन
बाहेर जाईल. 3 ते देशांमधील अनेक लोकांचा न्याय करतील, दूरदूरच्या
बलाढ्य राष्ट्रांमधील वाद मिटवतील. ते आपल्या तलवारी ठोकून त्यांचे
नांगराचे फाळ करतील, व भाल्यांचे आकडे बनवतील. एक देश दुसऱ्या
देशाविरुद्ध तलवार उगारणार नाही, तसेच ते यापुढे लष्करी प्रशिक्षण
देणार नाहीत. 4 प्रत्येकजण आपआपल्या द्राक्षवेलीखाली आणि
आपआपल्या अंजिराच्या झाडाखाली बसेल, आणि कोणीही त्यांना
घाबरविणार नाही, कारण सर्वसमर्थ याहवेहने म्हटले आहे. 5 सर्व राष्ट्रे
आपआपल्या दैवतांच्या नावाने चालतील, पण आम्ही नेहमी याहवेह
आमच्या परमेश्वराच्या नावाने चालत राहू. 6 याहवेह घोषित करतात,
“त्या दिवशी, मी लंगड्यांना एकत्र करेन; बहिष्कृत लोकांना आणि
ज्यांना मी दुखविले आहे त्यांनाही एकत्र करेन. 7 मी लंगड्यांना माझे
अवशेष करेन, आणि बहिष्कृत लोकांना एक बलाढ्य राष्ट्र करेन. त्या
दिवसापासून याहवेह सीयोन पर्वतावरून सदासर्वदा राज्य करतील. 8
आणि तू, कळपाच्या टेहळणीच्या बुरुजा, सीयोन कन्येच्या मजबूत
किल्ल्या, तुझे पूर्वीचे राज्य तुला परत देण्यात येईल; यरुशलेमच्या
कन्येला सिंहासन दिले जाईल.” 9 तू आता मोठ्याने का रडत आहेस—
तुला राजा नाही काय? तुमचा अधिकारी नष्ट झाला आहे काय, म्हणून
तुम्ही स्त्रीच्या प्रसूती वेदनांप्रमाणे व्याकूळ झाला आहात काय? 10 हे
सीयोनच्या कन्ये, बाळंतपणाच्या प्रसूती वेदनांनी कण्हत राहा, कारण तू
आता शहर सोडून मोकळ्या मैदानात तळ ठोकला पाहिजे. तू बाबेलला
जाशील; आणि तिथे तुझी सुटका होईल आणि याहवेह तिथून तुम्हाला
तुमच्या शत्रूंच्या हातातून मुक्त करतील. 11 पण आता पुष्कळ राष्ट्रे
तुमच्याविरुद्ध एकत्र झाली आहेत. ते म्हणतात, “तिला अशुद्ध होऊ
द्या, आपण सीयोनेवर दुष्ट नजर टाकून आनंद करू!” 12 पण त्यांना
याहवेहचे विचार माहीत नाहीत; त्यांना याहवेहच्या योजना समजत नाही,
खळ्यातील पेंढ्यांप्रमाणे याहवेहने त्यांना गोळा केले आहे. 13 “अगे
सीयोनकन्ये, ऊठ, मळणी कर; कारण मी तुला लोखंडाची शिंगे व
कास्याचे खूर देईन, आणि तू अनेक राष्ट्रांचे तुकडे करशील.” त्यांची लूट
तू याहवेहला, त्यांची संपत्ती सर्व पृथ्वीच्या प्रभूला अर्पण करशील.

**5** हे सैन्याच्या नगरी, आता आपल्या सैन्याला एकत्र करा, कारण
आमच्याविरुद्ध वेढा पडला आहे. ते काठीने इस्राएलाच्या शासकाच्या
गालावर मारतील. 2 “परंतु, तू हे बेथलेहेम एफ्राथा, तू जरी यहूदीयाच्या
वंशजांपैकी सर्वात लहान आहेस, तरी तुझ्यातून माझ्यासाठी इस्राएलचा
शासक उदय पावेल, ज्याची उत्पत्ती प्राचीन काळातील आहे.” 3
म्हणून प्रसूती वेदनेत असलेली एका मुलाला जन्म देईपर्यंत आणि
तिचे बाकीचे भाऊ परत इस्राएल लोकांमध्ये येईपर्यंत इस्राएलचा त्याग
केला जाईल. 4 तो याहवेहच्या सामर्थ्याने, याहवेह त्याच्या परमेश्वराच्या
नावाच्या वैभवात उठेल आणि आपल्या कळपाचा मेंढपाळ होईल आणि
ते सुरक्षित राहतील, कारण तेव्हा पृथ्वीच्या टोकापर्यंतच्या लोकांना
याहवेहची महानता कळेल. 5 ते पुरुष आपली शांती असतील जेव्हा
अश्शूरी आपल्या देशावर हल्ला करतील आणि आपल्या किल्ल्यांमध्ये
प्रवेश करतील, तेव्हा आम्ही त्यांच्याविरुद्ध सात मेंढपाळ, आठ देखील
सेनापती उभे करू, 6 अश्शूर देशावर तलवारीने, निम्रोदाच्या देशावर
उपसलेल्या तलवारीने कोण शासन करेल. अश्शूरचे लोक जेव्हा आपल्या
देशावर आक्रमण करतील आणि आपली सीमा ओलांडतील तेव्हा
याहवेह आपल्याला त्यांच्यापासून सोडवतील. 7 याकोबाचे उरलेले लोक
अनेक लोकांमध्ये असतील, ते याहवेहने पाठविलेल्या दहिवराप्रमाणे,
गवतावर पडणाऱ्या पावसाप्रमाणे असतील, जे कोणाचीही वाट पाहत
नाही आणि कोणा मनष्यावर अवलंबून राहत नाही. 8 याकोबाचे
अवशेष राष्ट्रांमध्ये आणि अनेक लोकांमध्ये असणार, जंगली श्वापदांमध्ये
सिंहासारखे आणि मेंढरांच्या कळपामध्ये तरुण सिंहासारखे असतील,
ते त्यांच्यावर झेप घेतील आणि त्यांना ठार करीत पुढे जातील आणि
कोणीही त्यांना वाचवू शकत नाही. 9 तुझ्या शत्रूंवर विजय मिळवून तुझा
हात उंच होईल आणि तुझ्या सर्व शत्रूंचा नाश होईल. 10 “त्या दिवशी,”
याहवेह ही घोषणा करतात, “मी तुमच्या घोड्यांचा तुमच्यामध्ये नाश
करेन आणि तुमच्या रथांनाही नष्ट करेन. 11 मी तुझ्या देशातील शहरांचा
नाश करेन आणि तुझे किल्ले उद्ध्वस्त करेन. 12 मी तुमच्यातील
चेटके नष्ट करेन आणि यापुढे तुझ्यामध्ये कोणीही शकुन पाहणार नाही.
13 मी तुमच्या मूर्ती आणि तुमच्यातील पवित्र दगडांचा नाश करेन;
तुमच्या हस्तकृतींना तुम्ही पुन्हा दंडवत करणार नाही. 14 जेव्हा मी तुझी
नगरे उद्ध्वस्त करेन, तेव्हा तुझे अशेरा स्तंभ उपटून टाकीन. 15 ज्या

राष्ट्रांनी माझी आज्ञा पाळली नाही, त्यांचा मी रागाने आणि क्रोधाने सूड
उगवेन.”

**6** याहवेह काय म्हणतात ते ऐका: “उभे राहा, पर्वतांसमोर माझ्या
दावा मांडा; आणि तुला काय बोलायचे आहे ते टेकड्या ऐको.
2 “हे पर्वतांनो, याहवेहने केलेल्या आरोपाकडे लक्ष द्या; हे पृथ्वीच्या
अढळ पाया, तूही ऐक. कारण याहवेहचा त्यांच्या लोकांविरुद्ध एक
दावा आहे. ते इस्राएली लोकांविरुद्ध वाद दाखल करीत आहेत. 3 “हे
माझ्या लोकांनो, मी तुम्हाला काय केले आहे? मी तुमच्यावर कोणते
ओझे टाकले आहे? मला उत्तर द्या. 4 मी तुम्हाला इजिप्त देशातून बाहेर
काढले आणि तुम्हाला गुलामगिरीतून देशातून मुक्त केले. मी मोशेला
तुमचे नेतृत्व करण्यास पाठवले, अहरोन आणि मिर्यामलाही पाठवले. 5
माझ्या लोकांनो, मोआबाचा राजा बालाक याने काय कट केला आणि
बौराचा पुत्र बलाम याने काय उत्तर दिले ते स्मरणात ठेवा. शिट्टीम
ते गिलगालपर्यंतचा तुमचा प्रवास स्मरणात ठेवा, म्हणजे याहवेहच्या
न्यायीपणाच्या कृती तुम्हाला कळतील.” 6 मी याहवेहसमोर काय
आणावे आणि स्तुतीस पात्र असलेल्या परमेश्वरासमोर मी नमन करावे?
होमार्पणासाठी मी एक वर्षाचे वासरू घेऊन त्यांच्यासमोर येऊ का? 7
एक हजार मेंढे किंवा जैतून तेलाच्या दहा हजार नद्यांनी याहवेह संतुष्ट
होतील काय? माझ्या अपराधाचे प्रायश्चित्त म्हणून मी माझा ज्येष्ठपुत्र
अर्पावा काय, माझ्या आत्म्याच्या पापासाठी माझ्या शरीराचे फळ द्यावे
काय? 8 हे मनुष्या, त्यांनी तुला चांगले काय ते दाखविले आहे. आणि
याहवेह तुझ्याकडून काय अपेक्षा करतात? नीतीने वागणे आणि दयेने
प्रीती करणे आणि तुझ्या परमेश्वराबरोबर नम्रपणे चालणे. 9 ऐका!
याहवेह नगराला हाक मारीत आहेत— आणि तुमच्या नावाचे भय
बाळगणे हे ज्ञान आहे— “काठी आणि त्यास नियुक्त करणाऱ्याचे ऐका.
10 हे दुष्ट घरा, अजूनही तुझी अन्यायाने मिळवलेली संपत्ती, आणि उणे
एफा माप जे शापित आहे त्यास विसरेन काय? 11 चुकीच्या वजनाच्या
पिशवीने, कपटाच्या वजनांनी मी कोणाची सुटका करू काय? 12 तुमचे
श्रीमंत लोक हिंसा करतात; तुमचे रहिवासी लबाड आहेत आणि त्यांची
जीभ कपटी गोष्ट बोलते. 13 म्हणून तुमच्या पातकांमुळे तुमचा नायनाट
व नाश करण्यास मी सुरुवात केली आहे. 14 तू खाशील तृप्त होणार
नाही; खाल्ल्यानंतरही तुझे पोट रिकामे राहील. तू साठवून ठेवशील,
पण काहीही उरणार नाही, कारण मी तुझी बचत तलवारीला देईन. 15 तू
पेरणी करशील पण कापणी करणार नाही; तुम्ही जैतून फळे तुडवाल,
पण ते तेल वापरणार नाही, तू द्राक्षे चिरडशील, पण त्याचा द्राक्षारस
पिणार नाही. 16 तू ओमरीचे नियम आणि अहाबाच्या घराण्याच्या सर्व
चालीरीती पाळल्या आहेत; तुम्हीही त्यांच्या रूढी पाळल्या आहेत.
म्हणून मी तुझा नाश करेन व तुझ्या प्रजेची थट्टा करेन; तू राष्ट्रांची निंदा
सहन करशील.”

**7** काय ही माझी दुःखद स्थिती! मी द्राक्षमळयातील उन्हाळी फळे
गोळा करणाऱ्यासारखा आहे; खाण्यास द्राक्षांचा घडही उरला नाही,
अंजिराच्या ज्या पहिल्या फळाची मला इच्छा होती ती सुद्धा नाही. 2
पृथ्वीवरून विश्वासू लोकांचा नाश झाला आहे; एकही प्रामाणिक मनुष्य
उरला नाही. प्रत्येकजण रक्तपात करण्यात गुंतला आहे; ते सापळा
रचून एकमेकांची शिकार करतात. 3 वाईट करण्यात दोन्ही हात निपुण
आहेत; शासक भेटवस्तूंची मागणी करतो, न्यायाधीश लाच घेतात,
सामर्थ्यवान लोक बळजबरीने त्यांच्या इच्छा पूर्ण करतात; ते सर्व मिळून
कट रचतात. 4 त्यांच्यामध्ये जो सर्वोत्कृष्ट मानला जातो तो काटेरी
झुडूप आणि जो नीतिमान तो काट्याच्या कुंपणापेक्षाही वाईट आहे.
परमेश्वराने तुमच्याकडे येण्याचा दिवस आला आहे, म्हणजेच तुमच्या
पहारेकऱ्याने आवाज देण्याची वेळ आली आहे. आता तुमच्या गोंधळाची
वेळ आली आहे. 5 शेजाऱ्यावर भरवसा ठेवू नका; आणि मित्रांवर
विश्वास ठेवू नका. तुझ्या मिठीत असलेली स्त्रीबरोबर असतानाही, तुझ्या
ओठांच्या शब्दांचे रक्षण कर. 6 कारण पुत्र आपल्या पित्याचा अनादर
करतो, मुलगी तिच्या आईविरुद्ध, आणि सून तिच्या सासूविरुद्ध उठते—
मनुष्याचे शत्रू त्याच्या आपल्याच कुटुंबातील सदस्य असतात. 7 मी
तर, याहवेहची आशेने वाट पाहतो, मी माझ्या तारणाऱ्या परमेश्वराची
प्रतीक्षा करतो; माझे परमेश्वर माझे ऐकतील. 8 अरे माझ्या वैऱ्या,
माझी परिस्थिती बघून आनंद करू नकोस! कारण मी पडलो, तरी पुन्हा
उठेन. जरी मी अंधारात बसलो, तरी याहवेह माझा प्रकाश होतील.
9 मी याहवेहविरुद्ध पाप केल्यामुळे, ते माझी बाजू ऐकून मला न्याय
देईपर्यंत मी याहवेहचा कोप सहन करेन. ते मला प्रकाशात आणतील;
आणि मी त्यांचे न्यायीपण पाहीन. 10 मग माझे शत्रू हे पाहून ते लज्जेने
झाकले जातील, ती जी मला म्हणत होती, “याहवेह तुझा परमेश्वर कुठे
आहे?” माझे डोळे तिचे पतन पाहतील; रस्त्याच्या चिखलाप्रमाणे तीही
पायाखाली तुडविली जाईल. 11 तुमचे तट बांधण्याचा दिवस येईल,
आणि तुमच्या सीमा विस्तारित करण्याचा दिवस येईल. 12 अश्शूरपासून
इजिप्तच्या नगरांपर्यंत आणि मिसरपासून फरात नदीपर्यंत, समुद्रापासून
समुद्रापर्यंत आणि डोंगरांपासून डोंगरांपर्यंत, त्या दिवशी लोक तुझ्याकडे
येतील. 13 पृथ्वीवरील रहिवाशांमुळे, त्यांच्या कृतींचा परिणाम म्हणून,
पृथ्वी उजाड होईल. 14 आपल्या लोकांचा काठीसह मेंढपाळ हो, जो
तुझ्या वतनाचा कळप आहे, जो एकटाच जंगलात, सुपीक कुरणात
राहतो. त्यांना पूर्वीप्रमाणे बाशानात व गिलआदात यथेच्छ चरू द्या. 15
“तुम्ही इजिप्तमधून बाहेर आलात त्या दिवसांप्रमाणे, मी त्यांना माझे
चमत्कार दाखवेन.” 16 राष्ट्रे हे पाहतील आणि लज्जित होतील, त्यांच्या
सत्तेपासून वंचित राहतील. ते आपली मुखे हाताने झाकतील आणि
त्यांचे कान बहिरे होतील. 17 ते सर्पाप्रमाणे, भूमीवर सरपटणाऱ्या
प्राण्यांप्रमाणे धूळ चाटतील. ते आपल्या बिळातून थरथर कापत बाहेर
पडतील; भयभीत होऊन ते याहवेह आमच्या परमेश्वराकडे वळतील
आणि तुमचे भय बाळगतील. 18 तुम्ही जे अन्यायाची क्षमा करतात,
आपल्या वतनातील उरलेल्यांची पापे मागे टाकतात त्या तुमच्यासारखा
कोण परमेश्वर आहे? तुम्ही सर्वकाळ क्रोध धरीत नाहीत, परंतु दया
दाखविण्यात आनंद मानता. 19 पुन्हा एकदा तुम्ही आम्हावर दया

कराल; तुम्ही आमची पापे आपल्या पायाखाली तुडविणार; आणि
आमची दुष्कृत्ये समुद्राच्या खोलीत फेकून द्याल. 20 फार पूर्वी, आमच्या
पूर्वजांना वचन दिल्याप्रमाणे, तुम्ही याकोबाशी विश्वासू असाल, आणि
अब्राहामवर प्रीती दाखवाल.

# नहूम

1 निनवेहविषयी भविष्यवाणी. एल्कोशवासी नहूमच्या दृष्टान्ताचे
पुस्तक. 2 याहवेह ईर्ष्यावान व सूड घेणारे परमेश्वर आहेत; याहवेह
सूड घेणारे आणि क्रोधाने भरलेले आहेत. त्यांच्या शत्रूंचा ते सूड
घेतात आणि आपला कोप त्यांच्याविरुद्ध मोकळा करतात. 3 याहवेह
मंदक्रोध आहेत, पण अत्यंत सामर्थ्यशाली आहेत; याहवेह दुष्टांना
शिक्षा दिल्याशिवाय सोडत नाही. त्यांचे मार्ग चक्रीवादळ व वादळामधून
जातात. ढग त्यांच्या पायाखालची धूळ आहेत. 4 ते समुद्रास फटकारतात
आणि तो शुष्क होतो; ते सर्व नद्यांना कोरडे करतात. बाशान व कर्मेल
मलूल होतात; लबानोनचा मोहोर कोमेजतो. 5 त्यांच्यासमोर पर्वत
कंपित होतात व टेकड्या विरघळतात. पृथ्वी आणि जग व त्यात राहणारे
सर्वजण त्यांच्या समक्षतेत थरकापतात. 6 संतप्त याहवेहपुढे कोणाचा
निभाव लागेल? त्यांचा क्रोध कोण सहन करू शकेल? त्यांचा उग्र क्रोध
अग्नीसारखा ओतला जातो; त्यांच्यापुढे खडक ढासळून पडतात. 7
याहवेह चांगले आहेत, संकटसमयी आश्रयस्थान आहेत. त्यांच्यावर
भरवसा ठेवणाऱ्या प्रत्येकाची ते काळजी घेतात. 8 परंतु भयंकर
महापुराने ते निनवेहचा अंत करतील; त्यांच्या शत्रूचा ते अंधकाराच्या
साम्राज्यातही पाठलाग करतात. 9 याहवेहच्या विरुद्ध ते जे काही
कारस्थान करतात त्याचा ते अंत करतील; ते संकट दुसऱ्यांदा येणार
नाही. 10 याहवेहचे शत्रू काटेरी झुडूपात गुंतून पडतील आणि स्वतःचेच
मद्य पिऊन ते धुंद होतील; वाळलेल्या गवताप्रमाणे ते अग्नीमध्ये भस्म
होतील. 11 हे निनवेह, तुमच्यापैकी कोण आहे जो याहवेहविरुद्ध कट
रचेल आणि दुष्ट योजना करू शकेल? 12 याहवेह असे म्हणतात:
“यद्यपि त्यांना अनेक दोस्त राष्ट्र आहेत व ते असंख्य आहेत, तरी ते
नष्ट होतील व त्यांचे अस्तित्व नाहीसे होईल. हे यहूदाह, मी जरी तुला
पीडित केले, तरी आता मी तुला पीडा देणार नाही. 13 आता मी तुमच्या
मानेवरील जू मोडून टाकीन आणि तुमच्या शृंखला तोडून टाकीन.” 14
हे निनवेह, याहवेहने तुझ्याविषयी आज्ञा दिली आहे: “तुझे नाव पुढे
चालविणारी कोणीही संतती राहणार नाही. आणि जी तुझ्या दैवताच्या
मंदिरात आहेत ती तुझी दैवते आणि मूर्ती मी नष्ट करेन. मी तुझी कबर
तयार करेन, कारण तू तिरस्करणीय आहेस.” 15 पाहा, पर्वतांवरून
संदेशवाहक येत आहेत, ज्यांची पावले एक शुभवार्ता आणत आहेत, जे
शांतीची घोषणा करतात! हे यहूदाह, तू तुझे सण साजरे कर, आणि तुझे
नवस फेड. कारण आता कोणी दुष्ट लोक तुझ्यावर आक्रमण करणार
नाहीत; त्यांचा कायमचा उच्छेद होईल.

2 हे निनवेह, एक आक्रमक तुझ्याविरुद्ध येत आहे. आपल्या गडांवर
पहारा दे, मार्गांची रखवाली कर, मोर्चा बांध, आपल्या सर्व शक्तिनिशी
सैन्यांची संरक्षक फळी मजबूत कर! 2 जरी संहारकाने तो देश उद्ध्वस्त
केला आहे आणि त्यांचे द्राक्षमळे नष्ट केले आहेत तरी, इस्राएलच्या
वैभवासारखे याहवेह याकोबाचे वैभव पुनर्स्थापित करणार आहेत. 3
ज्या दिवसाची त्यांनी तयारी केली आहे; त्या दिवसासाठी रथांवरील धातू
चकाकत आहेत, सैनिकांच्या ढाली तांबड्या आहेत; योद्धे किरमिजी
पेहराव केलेले आहेत सनोवरचे भाले परजलेले आहेत. 4 रथही
मार्गांवरून बेफामपणे धावत आहेत, चौकातून झपाट्याने मागेपुढे होत
आहेत. ते प्रज्वलित मशालीप्रमाणे दिसत आहेत; ते वीजगतीने दौडत
आहेत. 5 निनवेहने आपल्या निवडक सैनिकांना पाचारण केले आहे,
तरी ते आपल्या मार्गांवर अडखळत आहेत. ते तटाच्या भिंतीकडे धाव
घेतात; संरक्षक ढाल नियोजित ठिकाणी ठेवलेली आहे. 6 नदीकडचे
दरवाजे सताड उघडले गेले आहेत आणि राजवाडे ढासळत आहेत.
7 अशी राजाज्ञा सुनावण्यात आली आहे, की निनवेहला बंदिवासात
टाकून नेण्यात यावे. तिच्या दासी पारव्यांच्या घुमण्याप्रमाणे विलाप
करीत आहेत आणि त्यांचे ऊर बडवित आहेत. 8 निनवेह एखाद्या
जलाशयाप्रमाणे आहे जिचे पाणी गळून चालले आहे. “थांबा, थांबा,” ते
ओरडतात, पण कोणीही वळून तिच्याकडे परत येत नाही. 9 चांदी लुटा!
सोने लुटा! निनवेहची संपत्ती येथील मौल्यवान वस्तूंचा अमर्याद संग्रह
आहे! 10 ती लुटल्या गेली, लुबाडल्या गेली व विवस्त्र करण्यात आली
आहे! तिच्या लोकांची अंतःकरणे वितळून गेली आहेत व गुडघे निकामी
झाले आहेत, त्यांची शरीरे थरथर कापत आहेत व त्यांचे चेहरे फिके
पडले आहेत. 11 ती सिंहाची गुहा कुठे आहे जिथे ते त्यांच्या बछड्यांचे
पालनपोषण करीत असत, जिथे सिंह आणि सिंहिणी जातात, कोवळी
मुलेदेखील निर्भयतेने राहात असत, आणि त्यांच्या बछड्यांना कशाचेही
भय नसे? 12 सिंह आपल्या बछड्यांना पुरेलशी शिकार करत असे व
आपल्या सिंहिणींना भक्ष्य पुरविण्यासाठी सावजाची नरडी दाबून ठार
मारत असे, आपल्या गुहेत ते जमा करीत असत आणि आपली गुहा
भक्षांनी भरून टाकीत असत. 13 सर्वसमर्थ याहवेह जाहीर करतात: “मी
तुझ्याविरुद्ध उठलो आहे, मी तुझे रथ भस्म करून त्यांचा धूर करेन,
आणि तलवार तुझ्या सिंहाच्या बछड्यांना गिळंकृत करेल. मी पृथ्वीवर
तुझ्यासाठी एकही भक्ष ठेवणार नाही. तुझ्या संदेशवाहकांचे आवाज
यापुढे कधीही ऐकू येणार नाहीत.”

3 हे रक्तपात करणाऱ्या नगरी, तुला धिक्कार असो, लबाड्यांनी गच्च
भरलेली, लूटमाऱ्यांनी भरलेली, कधीही पीडितांशिवाय नसणारी! 2
चाबकांच्या फटकाऱ्यांचा आवाज, चाकांचा खडखडाट, चौखूर धावणारे
घोडे आणि हिसके देणारे रथ! 3 आक्रमक घोडेस्वारांची पलटण
लखलखणाऱ्या तलवारी चमचमणारे भाले! पडलेली अनेक प्रेते, सर्वत्र
मृतांचे ढीग, अगणित मृत शरीरे, प्रेतांना अडखळून पडणारे लोक— 4
या सर्वांचे कारण, एका वेश्येच्या रंगेलपणाची वासना, ती भुलविणारी,
जादूटोण्याची स्वामिनी आहे, तिने आपल्या वेश्यागिरीने राष्ट्रांना आणि
जादूटोण्याने लोकांना गुलाम बनविले. 5 सर्वसमर्थ याहवेह जाहीर
करतात, “मी तुझ्याविरुद्ध आहे, मी तुझे वस्त्र तुझ्या चेहऱ्यावर उचलेन.
तुझी नग्नता सर्व राष्ट्रांना आणि तुझी लज्जा सर्व देशांना दाखवेन. 6 मी
तुझ्यावर घृणास्पद गोष्टी फेकेन, मी तुला अपमानित करेन आणि तुला
तमाशा बनवेन. 7 तुला पाहणारे सर्व भयभीत होऊन तुझ्यापासून दूर
पळतील व म्हणतील, ‘निनवेह उद्ध्वस्त झाली आहे—तिच्यासाठी

कोण शोक करेल?’ तुझे सांत्वन करणारा मला कुठे मिळेल?” 8 नाईल
नदीकाठी वसलेल्या, सर्व बाजूंनी पाण्याने घेरलेल्या थेबेस नगरीपेक्षा
तू अधिक चांगली आहेस काय? नदीच तिला संरक्षण देते, नदीच
तिची तटबंदी आहे. 9 कूश आणि इजिप्त तिचे अपरिमित सामर्थ्य
होते; पूट व लिबिया तिच्या मित्रराष्ट्रांपैकी होते. 10 असे असूनही
थीब्जचा पाडाव झाला आणि तिला बंदिवासात नेण्यात आले. तिची
बालके रस्त्यांच्या प्रत्येक कोपऱ्यावर दगडांवर आपटून ठार मारण्यात
आली. तिच्या अधिकाऱ्यांसाठी चिठ्ठ्या टाकण्यात आल्या, तिच्या
सर्व प्रतिष्ठित व्यक्तींना साखळदंडानी बांधण्यात आले. 11 तू देखील
मद्यपीप्रमाणे धुंद होशील; तू लपून बसशील आणि सुरक्षिततेसाठी तुझ्या
शत्रूपासून आश्रय शोधशील. 12 तुझे सर्व गड अंजिरांच्या झाडासारखे
होतील त्यांच्या प्रथम पिकलेल्या फळांगत; जेव्हा ते हलविले जातात,
तेव्हा ते नेमके खाणाऱ्याच्या तोंडात पडतात. 13 तुझ्या सैन्य-दलांकडे
पाहा— ते सर्व दुर्बल आहेत. तुझ्या देशाच्या वेशी तुझ्या शत्रूंसाठी
सताड उघडलेल्या आहेत; तुझ्या वेशीच्या सळया अग्नीने भस्म केल्या
आहेत. 14 तुला पडणाऱ्या वेढ्यासाठी पाण्याचा साठा करून ठेव, तुझे
किल्ले मजबूत कर! चिखल तुडवून ठेव, चिखलाचा गारा साच्यांत भर,
वीटकाम दुरुस्त कर! 15 तिथे तुला अग्नी भस्म करेल; तलवार तुला
कापून टाकेल— एखाद्या टोळधाडीप्रमाणे ते तुला गिळंकृत करतील.
नाकतोड्यासारखे बहुगुणित व्हा, टोळांसारखे बहुगुणित व्हा! 16 तू
तुझ्या व्यापाऱ्यांची संख्या वाढविली आहे त्यांची संख्या आकाशातील
ताऱ्यांपेक्षाही जास्त वाढली आहे, परंतु ते एखाद्या टोळधाडीप्रमाणे
संपूर्ण भूमी ओरबाडून टाकतात व मग ते उडून जातात. 17 तुझे रक्षक
टोळांसारखे आहेत, तुझे अधिकारी टोळांच्या झुंडीप्रमाणे आहेत थंडीच्या
दिवसात ते भिंतीमध्ये वसतात— पण सूर्योदय होताच उडून जातात,
आणि कुठे जातात ते कोणालाच कळत नाही. 18 हे अश्शूरच्या राजा,
तुझे मेंढपाळ डुलकी घेतात; तुझे प्रतिष्ठित लोक विश्रांती घेण्यासाठी
पहुडले आहेत. तुझे लोक डोंगरांवर विखुरले आहेत त्यांना एकत्र
करण्यास कोणीही नाही. 19 तुला कशानेही आरोग्य मिळणार नाही;
तुझी जखम घातक आहे. तुझ्या दुर्दशेची बातमी जे कोणी ऐकतील ते
सर्वजण आनंदाने टाळ्या वाजवितील, तुझ्या क्रूरतेचा उपद्रव ज्याला
झाला नाही, असा कोण आहे?

# हबक्कूक

1 संदेष्टा हबक्कूकला प्राप्त झालेली ही भविष्यवाणी आहे: 2 हे
याहवेह, मी कुठवर तुमचा धावा करावा? पण तुम्ही ऐकत नाहीत?
मी तुम्हाला ओरडून हाक मारतो, “हिंसा!” पण तुम्ही वाचवित नाहीत.
3 तुम्ही मला अन्यायाकडे का पहायला लावता? तुम्ही चुकीचे कार्य का
सहन करता? विनाश आणि हिंसाचार माझ्यापुढे होत आहे; वाद व
कलह वाढत आहेत. 4 म्हणून कायदा नेभळा झाला आहे, आणि योग्य
न्याय कधीही दिला जात नाही, दुष्टांनी नीतिमानांना वेढले आहे, म्हणून
कायदा विपरीत केला जातो. 5 “देशांकडे पाहा आणि लक्षपूर्वक बघ—
आणि अत्यंत आश्चर्यचकित हो. कारण आता मी तुझ्या काळात जे
कार्य करणार आहे जरी ते तुला सांगितले तरी त्यावर तुझा विश्वास
बसणार नाही. 6 मी बाबेलच्या लोकांना उभारणार आहे, ते निर्दयी
आणि उतावळे लोक आहेत, जे संपूर्ण पृथ्वीला पादाक्रांत करीत आहेत
ते स्वतःचे नसलेले आवास काबीज करतील. 7 ते दहशत वाटेलसे
व भीतिदायक लोक आहेत; ते स्वतःचाच कायदा बनवितात आणि
स्वतःचाच मान राखतात. 8 त्यांचे घोडे चित्त्यांपेक्षा चपळ आहेत,
संधिप्रकाशात फिरणाऱ्या लांडग्यापेक्षाही ते उग्र आहेत. त्यांचे घोडदळ
बेफामपणे पुढे धाव घेते; त्यांचे स्वार दूर देशातून येतात. भक्ष्यावर
तुटून पडणाऱ्या गरुडांप्रमाणे ते झेप घेतात; 9 हिंसाचार करण्याच्या
योजनेनेच ते सर्व येतात, वाळवंटातील वावटळीप्रमाणे त्यांची टोळी
येते आणि वाळूच्या कणांप्रमाणे ते बंदिवान गोळा करतात. 10 ते
राजांचा उपहास करतात आणि अधिपतींची चेष्टा करतात. त्यांच्या
सर्व तटबंदीच्या नगरांचे हंसे करतात; ते मातीचे ढिगारे उभे करून
किल्ले काबीज करतात. 11 वाऱ्याप्रमाणे ते झपाट्याने येतात आणि पुढे
निघून जातात— ते अपराधी लोक, ज्यांचे सामर्थ्य त्यांच्या दैवतांपासून
आहे.” 12 हे याहवेह, तुम्ही अनादिकालापासून नाही का? माझ्या
परमेश्वरा, माझ्या पवित्र परमेश्वरा, तुम्हाला कधीही मृत्यू येणार नाही.
हे याहवेह, तुम्ही आमचा न्याय करण्यासाठी त्यांना निवडले आहे;
आमच्या आश्रयाच्या खडका, तुम्ही शिक्षा देण्यासाठीच यांना नियुक्त
केले आहे. 13 तुमची दृष्टी इतकी पवित्र आहे की ती कोणतीही दुष्टता
पाहू शकत नाही; तुम्ही कोणत्याही स्वरुपातील पातक सहन करू शकत
नाही. मग या विश्वासघातकी लोकांना तुम्ही कसे सहन करता? जेव्हा
दुष्ट लोक त्यांच्याहून नीतिमान लोकांना गिळंकृत करतात, तेव्हा तुम्ही
स्तब्ध कसे राहता? 14 तुम्ही लोकांना समुद्रातील माशाप्रमाणे बनविले
आहे, जसे काही समुद्री जीव, ज्यांचा कोणी शासक नसतो. 15 दुष्ट शत्रू
गळ टाकतो व त्यांना वर ओढतो, तो त्यांना जाळ्यात पकडतो, मग
तो त्यांना त्याच्या अडणीजाळ्यात जमा करतो, आणि तो आनंदित
व उल्हासित होतो. 16 म्हणून तो आपल्या जाळ्यास अर्पणे वाहतो
व अडणीजाळ्यापुढे धूप जाळतो, कारण त्याच्या जाळ्यामुळेच तो
धनवान होतो आणि आपल्या मनपसंद भोजनाचा आस्वाद घेतो. 17 तो
सर्वकाळ असेच जाळे रिकामे करीत राहणार आहे काय, निर्दयीपणे
देशांना नष्ट करीत राहणार आहे काय?

2 मी पहारा देण्यासाठी उभा राहीन आणि टेहळणीच्या बुरुजावर
चढेन; मी बघेन व ते मला काय उत्तर देतात हे पाहेन आणि या
तक्रारीला मी काय उत्तर द्यावे ते पाहेन. 2 तेव्हा याहवेहने उत्तर दिले: “हे
प्रगटीकरण लिही आणि सरळ स्वरुपात एका फळयावर लिही म्हणजे
घोषणा करणारा धावतांनाही वाचू शकेल. 3 कारण प्रगटीकरण त्याच्या
नियोजित वेळेची वाट पाहते; ते अंत समयाबद्धल बोलते आणि ते खोटे
ठरत नाही. जरी ते विलंबित होते, तरी त्याची वाट पाहा; ते निश्चितच
येईल आणि त्याला उशीर होणार नाही. 4 “बघ, शत्रू फुशारक्या
मारत आहे; त्याच्या इच्छा दुष्ट आहेत— पण नीतिमान व्यक्ती त्याच्या
विश्वासयोग्यतेमुळे जगेल. 5 खरोखर, मद्य त्यांचा घात करते; तो उन्मत्त
आहे व त्याला कधीही चैन पडत नाही. कारण तो कबरेसारखा लोभी
आहे आणि मृत्यूप्रमाणे तो कधीही समाधानी होत नाही, तो अनेक राष्ट्रे
गोळा करीत आहे, आणि सर्व लोकांना बंदिवान करीत आहे. (Sheol
h7585) 6 “ते सगळे त्याचा उपहास व अपमान करून टोमणा मारून
म्हणणार नाहीत काय, “‘जो चोरीच्या सामानाचे ढीग लावतो आणि
अवैध कामे करून स्वतःला धनवान बनवितो, त्याचा धिक्कार असो! हे
असे केव्हापर्यंत चालत राहणार?’ 7 तुमचे कर्जदाते अचानक तुमच्यापुढे
येणार नाहीत काय? ते उठून तुमचा थरकाप करणार नाहीत काय?
मग तुम्ही त्यांचे सावज बनाल. 8 कारण तुम्ही पुष्कळ राष्ट्रांची लूट
केली आहे, मग जे राहिलेले लोक आहेत, ते तुमची लूट करतील. तुम्ही
मनुष्यांचे रक्त वाहिले आहे; तुम्ही देश व नगरांचा आणि त्यात राहणाऱ्या
प्रत्येकाचा नाश केला. 9 “धिक्कार असो त्याचा, जो अन्यायाच्या
कमाईने त्याचे घर बांधतो, विनाशापासून पळ काढावा म्हणून जो
उंच ठिकाणी आपले घरटे बांधतो! 10 तुम्ही अनेक लोकांच्या नाशाचे
कारस्थान करून, व घराचे दार इतरांकरिता बंद करून, स्वतःचा जीव
गमाविला. 11 खुद्द तुमच्या घरातील भिंतीचे दगडच आक्रोश करतील,
आणि छताच्या तुळया तो प्रतिध्वनित करतील. 12 “धिक्कार असो,
जो रक्तपात करून शहरे बांधतो आणि अन्यायाने नगर वसवितो! 13
लोकांचे कष्ट अग्नीत घालण्याचे सरपण होणे, आणि देशांनी केलेले सर्व
श्रम व्यर्थच जावे असे सर्वसमर्थ याहवेहनी निर्धारित केले नाही काय?
14 कारण समुद्र जसा पाण्याने व्यापलेला आहे तशीच पृथ्वी याहवेहच्या
गौरवाच्या ज्ञानाने भरून जाईल. 15 “धिक्कार असो तुला, जो शेजाऱ्यास
मद्य पाजतो, ते मद्यधुंद होईपर्यंत थेट पखालीतून ओतून पाजतो, म्हणजे
तो त्यांची विवस्त्र शरीरे पाहू शकेल! 16 तुम्ही गौरवाऐवजी लज्जेने
भरून जाल. आता तुमची वेळ आहे, प्या व तुमची नग्नता उघडी होऊ
द्या! याहवेहच्या उजव्या हातातील प्याला तुमच्याकडे येत आहे, आणि
कलंक तुमचा गौरव झाकून टाकेल. 17 लबानोनमध्ये तुम्ही केलेला
हिंसाचार तुम्हाला व्याकूळ करेल, आणि तुम्ही केलेला प्राण्यांचा नाश
तुम्हाला भयभीत करेल, कारण तुम्ही मनुष्याचे रक्त वाहिले आहे; तुम्ही
देश व नगरांचा आणि त्यात राहणाऱ्या प्रत्येकाचा नाश केला आहे. 18

“मूर्तीकाराने निर्मित केलेल्या मूर्तीची काय किंमत आहे? किंवा प्रतिमा,
जी असत्य शिकविते? स्वतःच्या हस्तकृतीवर भरवसा ठेवणारे; तो
मूर्ती घडवितो जी बोलू शकत नाही. 19 धिक्कार असो, जो लाकडाला
म्हणतो, ‘जिवंत हो!’ किंवा निर्जीव दगडाला म्हणतो, ‘जागा हो!’ ते
मार्गदर्शन करू शकतात काय? त्या सोन्याने व रुप्याने मढविलेल्या
आहेत; पण त्यांच्यात श्वास नाही.” 20 परंतु याहवेह आपल्या पवित्र
मंदिरात आहेत; सर्व पृथ्वी त्यांच्या पुढे स्तब्ध राहो.

**3** ही हबक्कूक संदेष्ट्याची प्रार्थना. शिगयोनोथच्या शैलीत. 2 हे
याहवेह, मी तुमची किर्ती ऐकली आहे; मी तुमच्या कृत्यामुळे भयप्रद
झालो आहे. आमच्या दिवसातही त्या कार्याची पुनरावृत्ती करा, आमच्या
काळात त्या प्रसिद्ध होऊ द्या; क्रोधित असतानाही कृपेची आठवण
असू द्या. 3 परमेश्वर तेमान वरून आले, परमपवित्र पारान पर्वतावरून
आले. सेला त्याच्या गौरवाने आकाश व्यापून गेले आहे व पृथ्वी त्याच्या
स्तुतीने भरून गेली आहे. 4 त्यांचे तेज सूर्योदयेसारखे होते; किरणे
त्यांच्या हातांतून चकाकत बाहेर निघत होती, जिथे त्यांचे सामर्थ्य
लपलेले होते. 5 महामारी त्यांच्या पुढे चालते; घातकी रोग त्यांच्यामागे
चालतात. 6 ते थांबले व त्यांनी पृथ्वीस हालवून टाकले; त्यांनी बघितले
व देशास थरकाप आणला. पुरातन पर्वतांचा चुराडा झाला प्राचीन डोंगर
ढासळले— परंतु ते सर्वकाळ मार्गस्थ आहेत. 7 कूशानाचे तंबू पीडित
झालेले मी बघितले, व मिद्यानाचे रहिवासी भयग्रस्त झालेले मी पाहिले.
8 हे याहवेह, तुम्ही नद्यांवर संतापला होता काय? झर्‍यांविरुद्ध तुमचा
कोप होता काय? जेव्हा जय मिळविण्यासाठी तुम्ही अश्वारूढ झालात व
तुमच्या रथात स्वार झालात, तेव्हा तुम्ही समुद्राविरुद्ध क्रोधित झाला
होता काय? 9 तुम्ही तुमचे धनुष्य बाहेर काढले, व अनेक बाण मागविले.
सेला नद्यांनी भूमी विभागली; 10 पर्वतांनी हे पाहिले आणि ते कंपित
झाले. पाण्याचा प्रखर प्रवाह झपाट्याने आला; खोल समुद्र गरजला
आणि त्याने आपल्या लाटा उंच उफाळल्या. 11 तुमच्या झेप घेणाऱ्या
बाणांच्या तेजाने विजेप्रमाणे चकाकणाऱ्या तुमच्या भाल्याच्या प्रकाशाने
सूर्य व चंद्र आकाशात स्तब्ध उभे राहिले. 12 क्रोधित होऊन तुम्ही
पृथ्वीवर चालत गेला आणि संतापाने तुम्ही राष्ट्रांना पायदळी तुडविले.
13 तुम्ही आपल्या लोकांना तारण्यास व अभिषिक्तांना वाचविण्यासाठी
बाहेर पडलात. तुम्ही दुष्ट भूमीच्या पुढाऱ्यांचा चुराडा केला आणि त्यांना
डोक्यापासून पायांपर्यंत विवस्त्र केले. सेला 14 आमची दाणादाण
करण्यासाठी त्यांचे योद्धे धावून आले, तेव्हा त्याने स्वतःच्याच भाल्याने
आपले मस्तक छेदून घेतले, लपलेल्या दुष्टास जणू तो गिळंकृत करेल
अशा हावरटपणाने तो आला. 15 तुमच्या घोड्यांनी समुद्रास असे
तुडविले, की महाजलाशय घुसळले. 16 मी हे ऐकले आणि माझ्या
हृदयात धडकी भरली, भीतीने माझे ओठ कापू लागले; माझ्या हाडात
नाशाने प्रवेश केला, आणि माझे पाय थरथरू लागले. तरी देखील मी
आमच्यावर आक्रमण करणाऱ्या देशावर येणाऱ्या संकटाच्या दिवसाची
शांतपणे वाट पाहत राहीन. 17 अंजिरांची झाडे ना बहरली आणि
द्राक्षलतांवर फळे राहिली नाहीत, जैतुनाचे सर्व पीक बुडाले आणि शेते
नापीक झाली, जरी मेंढवाड्यात मेंढरे राहिली नाहीत, गोठ्यात गुरे
नाहीत, 18 तरी मी याहवेहच्या ठायी आनंद करेन; मला तारण देणाऱ्या
परमेश्वराच्या ठायी मी हर्ष करेन. 19 सार्वभौम याहवेह माझे सामर्थ्य
आहेत; मला उंची गाठण्यास समर्थ करण्यास ते माझी पावले हरणाच्या
पावलांसारखी करतील. गायकवर्गाच्या संचालकास सूचना: हे कवन
गाताना तंतुवाद्यांची साथ असावी.

# सफन्याह

1 सफन्याहला, जो कूशीचा पुत्र, जो गदल्याहचा पुत्र, जो अमऱ्याहचा
पुत्र, जो हिज्कीयाहचा पुत्र, यहूदीयाचा राजा योशीयाह, जो आमोनचा
पुत्र होता, याच्या कारकिर्दीत याहवेहकडून आलेले वचन ते असे: 2
“मी पृथ्वीतलावरून सर्वकाही झटकून नाहीसे करेन.” असे याहवेह
जाहीर करतात. 3 “मी माणसे आणि जनावरे दोन्हीही नष्ट करेन; मी
आकाशातील पक्षी नष्ट करेन आणि समुद्रातील मासेही— त्या मूर्ती ज्या
दुष्टाच्या अडखळण्याचे कारण बनते.” याहवेह जाहीर करतात, “जेव्हा
मी पृथ्वीवरून सर्व मानवजातीला नष्ट करेन, 4 तेव्हा मी यहूदीयातील
आणि यरुशलेम येथील सर्व रहिवाशांच्या विरुद्ध माझा हात उगारेन. या
ठिकाणावरील बआलच्या सर्व शेष उपासकांचा मी नाश करेन प्रत्येक
मूर्तिपूजक पुजाऱ्यांच्या नावाचा— 5 जे त्यांच्या घरांच्या धाब्यांवर
जातात आणि आकाशातील नक्षत्रांना नमन करतात. जे याहवेहला नमन
करून त्यांची शपथ घेतात, आणि मोलेख दैवताचीही शपथ घेतात,
6 जे याहवेहचे अनुसरण करण्यापासून मागे फिरले आहेत आणि जे
याहवेहचा शोध घेत नाहीत वा त्यांची इच्छा जाणून घेत नाहीत.”
7 सार्वभौम याहवेहपुढे स्तब्ध राहा. कारण त्यांच्या न्यायाचा दिवस
जवळ आला आहे; याहवेहने अर्पण सिद्ध केले आहे; ज्यांना त्यांनी
आमंत्रित केले, त्यांचे पवित्रीकरण केले आहे. 8 याहवेहच्या अर्पणाच्या
दिवशी मी अधिपतींना आणि राजपुत्रांना आणि परकीय वस्त्रे परिधान
करणाऱ्या सर्वांना शिक्षा करेन. 9 त्या दिवशी या सर्वांना शिक्षा करेन
जे उंबरठ्यावर पाऊल ठेवण्याचे टाळतात जे त्यांच्या दैवतांची मंदिरे
हिंसाचार व लबाडीने भरतात. 10 याहवेह जाहीर करतात, “त्या दिवशी
मत्स्य वेशीपासून एक मोठी आरोळी ऐकू जाईल, नगरातील नव्या
विभागातून विलापाचा ध्वनी, आणि डोंगरातून मोठ्या स्फोटाचा आवाज
ऐकू येईल; 11 विलाप करा, तुम्ही जे मक्तेशातील व्यापारी भागात
राहता, तुमचे सर्व व्यापारी, सोन्याचांदीचा व्यवहार करणारे सर्वजण
नष्ट होतील. 12 त्या समयी मी दिवा घेऊन यरुशलेममध्ये शोधेन
आणि जे बेफिकीर असतात, जे पखालीत सोडलेल्या द्राक्षारसाच्या
गाळासारखे आहेत, जे विचार करतात की याहवेह आपले बरे किंवा
वाईट असे काहीही करणार नाहीत, अशांना शिक्षा करेन. 13 या
लोकांची मालमत्ता लुटली जाईल, यांचीच घरे ढासाळून टाकली जातील,
जरी त्यांनी घरे बांधली असतील, त्या घरात ते राहू शकणार नाहीत;
जरी त्यांनी द्राक्षमळा लावला असेल, द्राक्षांचा रस ते पिणार नाहीत.”
14 याहवेहचा तो भयावह दिवस जवळ— तो वेगाने अगदी जवळ
येत आहे. याहवेहच्या दिवसाची गर्जना मर्मभेदक आहे; सामर्थ्यशाली
योद्धे त्याची रणगर्जना करतील. 15 तो दिवस क्रोधाग्नीचा दिवस
असेल— तो दिवस दुःखाचा व क्लेशाचा, तो दिवस अरिष्ट व उजाडतेचा,
तो दिवस अंधकाराचा व उदासीनतेचा, तो दिवस अभ्रांचा व निबिड
काळोखाचा— 16 तो दिवस तटबंदीच्या नगरांविरुद्ध आणि कोपऱ्यातील
बुरुजा विरुद्ध रणशिंगाचा व रणगर्जनांच्या निनादांचा असेल. 17
“मी सर्व लोकांवर अशा विपत्ती आणेन, ते मार्ग शोधणाऱ्या एखाद्या
आंधळ्या माणसाप्रमाणे चाचपडतील, कारण त्यांनी याहवेहविरुद्ध पाप
केले आहे. त्यांचे रक्त धुळीसारखे ओतले जाईल व त्यांच्या आतड्या
शेणासारख्या विखुरतील. 18 त्यांचे सोने किंवा त्यांची चांदी त्यांना
याहवेहच्या क्रोधापासून वाचवू शकणार नाही.” त्यांच्या ईर्षेच्या अग्नीने
संपूर्ण पृथ्वी भस्म होईल, कारण जे सर्व पृथ्वीवर रहिवास करतात
त्यांचा ते अकस्मातपणे अंत करतील.

2 हे निर्लज्ज राष्ट्रा एकत्र ये, स्वतःला एकवटून घे, 2 फर्मानाचा प्रभाव
सुरू होण्याआधी आणि तो दिवस वाऱ्याने उडालेल्या भुशासारखा
उडून जाण्यापूर्वी, याहवेहचा भयंकर संताप तुझ्यावर कोसळण्यापूर्वी,
याहवेहच्या भयानक क्रोधाचा दिवस, तुझ्यावर कोसळण्यापूर्वी एकत्र
ये. 3 या देशातील नम्रजन हो, याहवेहचा ध्यास करा, तुम्ही जे त्यांच्या
आज्ञा पाळता. धार्मिकतेचा ध्यास करा, नम्रतेचा ध्यास करा; याहवेहच्या
क्रोधाच्या दिवशी कदाचित तुम्हाला आश्रयस्थान मिळेल. 4 गाझाचा
त्याग करण्यात येईल आणि अष्कलोन ओसाड पडेल. भर दुपारी
अश्दोद नगर रिकामे होईल आणि एक्रोन समूळ उपटले जाईल. 5
हे करेथीयाच्या लोकांनो, समुद्र किनाऱ्यावरील रहिवाशांनो तुम्हाला
धिक्कार असो; कनान देशात राहणाऱ्या पलिष्टी लोकांनो, याहवेहचे
वचन तुमच्याविरुद्ध आहे. ते म्हणतात, “मी तुमचा असा नाश करेन,
की तुमच्यातील कोणीही वाचणार नाही.” 6 समुद्रकिनाऱ्याची भूमी
एक कुरण बनेल मेंढपाळांसाठी विहिरी असलेले स्थान व मेंढरांसाठी
मेंढवाड्याचे ठिकाण होईल. 7 ती भूमी यहूदीयाच्या वंशातील अवशेषाचे
वतन होईल; तिथे त्यांची कुरणे असतील. संध्याकाळी ते अष्कलोन
येथील घरात विश्रांती घेतील. याहवेह, त्यांचे परमेश्वर आपल्या लोकांची
काळजी घेतील; त्यांचे पूर्वीचे वैभव त्यांना परत प्राप्त करून देतील.
8 “मोआबी लोकांच्या अपमानास्पद गोष्टी आणि अम्मोनी लोकांचे
टोमणे मी ऐकले आहेत, जे माझ्या लोकांचा उपहास करतात आणि
त्यांच्या प्रदेशाविरुद्ध धमक्याही मी ऐकल्या आहेत. 9 म्हणून माझ्या
जिवाची शपथ,” इस्राएलचे परमेश्वर, सर्वसमर्थ याहवेह जाहीर करतात.
“निश्चितच मोआब हा सदोमासारखा, अम्मोनी गमोरासारखा होईल तण
वाढलेले ठिकाण व मिठाची आगरे कायमची ओसाड ठिकाणे होतील.
माझे अवशिष्ट लोक त्यांची लूट करतील; माझे अवशिष्ट राष्ट्र त्यांच्या
भूमीचे वारस बनतील.” 10 त्यांना त्यांच्या गर्विष्ठपणाचे हे प्रतिफळ
मिळेल. कारण त्यांनी सर्वसमर्थ याहवेहच्या लोकांचा अपमान व उपहास
केला. 11 जेव्हा याहवेह पृथ्वीवरील सर्व दैवतांचा नाश करतील, तेव्हा
याहवेह त्यांना भयावह वाटतील. दूरदेशातील सर्व राष्ट्रे आपआपल्या
भूमीवर त्यांच्यापुढे नतमस्तक होतील. 12 “अहो कूशी लोकांनो,
तुमचाही माझ्या तलवारीने वध होईल.” 13 ते उत्तरेविरुद्ध आपला हात
उगारतील आणि अश्शूरचा नाश करतील, निनवेह नगरीस ते पूर्णपणे
ओसाड आणि वाळवंटाप्रमाणे शुष्क ठिकाण करतील. 14 कळप व
मेंढरे सर्व राष्ट्रांचे प्राणी तिथे विश्रांती घेतील. तिथे वाळवंटातील घुबडे व
कर्कश किंचाळणारी घुबडे तिच्या स्तंभावर निवारा घेतील. घुबडांची

घूं घूं खिडक्यांमधून प्रतिध्वनित होईल, तिची प्रवेशद्वारे दगडविटांच्या
तुकड्यांनी भरलेली असतील, देवदारूचे स्तंभ उघडे बोडके होतील. 15
ही नगरी चैनबाजी करणारी, सुरक्षितेत वसणारी होती. ती स्वत:शी
म्हणत असे, “मी एकटीच आहे, माझ्यासारखी नगरी जगात दुसरी
नाही.” पण आता तिची कशी भग्नावस्था झाली आहे, जंगली श्वापदे
राहण्याचे ठिकाण! तिच्याजवळून जाणारे सर्वजण तिचा उपहास करून
त्यांचे डोके हलवितात.

**3** हे जुलमी लोकांच्या नगरी, विद्रोही व भ्रष्ट नगरी, तुला धिक्कार असो!
2 ती कोणाचीही आज्ञा पाळत नाही, ती कोणतीही सुधारणा स्वीकारत
नाही. ती याहवेहवर विश्वास ठेवीत नाही, ती तिच्या परमेश्वराच्या
समीप जात नाही. 3 तिच्यामध्ये असलेले तिचे अधिकारी गर्जना
करणाऱ्या सिंहासारखे आहेत; तिचे शासनकर्ते निशाचर लांडगे आहेत ते
सकाळपर्यंत काहीही शिल्लक राहू देत नाहीत. 4 तिचे संदेष्टे अधर्म
करणारे आहेत; ते विश्वासघातकी लोक आहेत. तिचे याजक मंदिर
अपवित्र करतात ते आज्ञेचे उल्लंघन करतात. 5 परंतु तिच्यात असणारे
याहवेह नीतिमान आहेत; ते काहीही अयोग्य करीत नाहीत. प्रतिदिन
सकाळी ते त्यांचे न्यायदान करतात, आणि कोणत्याही नवदिनी ते
असफल होत नाहीत, तरी अधर्म्यांना लाज काय ते ठाऊकच नाही. 6
“मी अनेक राष्ट्रांचा नाश केला; त्यांच्या गडांना उद्ध्वस्त केले आहे. मी
त्यांचे रस्ते ओसाड केले आहेत तिथून कोणीही प्रवास करीत नाही.
आणि त्यांची शहरे निर्जन केली आहेत; ते त्यागलेले व रिकामे झाले
आहेत. 7 यरुशलेमबद्दल मी विचार केला, ‘निश्चितच तू माझे भय
धरशील; आणि माझ्या सुधारणांचा स्वीकार करशील!’ तेव्हा तिचे
आश्रयस्थान उद्ध्वस्त होणार नाही. माझ्या सर्व शिक्षा तिच्यावर येणार
नाहीत, पण तरीही पूर्वीसारखीच भ्रष्टाचारी दुष्कर्मे करण्यास ती उत्सुक
आहे.” 8 याहवेह जाहीर करतात, “म्हणून माझी वाट पाहा, त्या दिवशी
मी दोषारोप करण्यास उभा राहीन. पृथ्वीवरील सर्व राज्ये व राष्ट्रे एकत्र
करण्याचा मी निर्धार केला आहे आणि त्यांच्यावर माझ्या कोपाचा
वर्षाव करेन; माझ्या अत्यंत तीव्र क्रोधाग्नीने आणि माझ्या ईर्षेच्या
अग्नीने संपूर्ण विश्व जळून भस्म होईल. 9 “मग मी त्यांच्या ओठांचे
शुद्धीकरण करेन, असे की ते सर्व याहवेहच्या नामाचा धावा करतील
आणि खांद्याला खांदा लावून त्यांची सेवा करतील. 10 कूश देशाच्या
नद्यांपलीकडून माझे उपासक, माझे विखुरलेले लोक माझ्यासाठी अर्पणे
आणतील. 11 त्या दिवशी तू यरुशलेमा, माझ्याविरुद्ध जे काही दुष्कृत्य
केलेस, त्याबद्दल तू लज्जित केली जाणार नाही, तेव्हा तू माझ्याविरुद्ध
बंड करणारी अशी राहणारच नाहीस. कारण मी तुझ्यातील सर्व गर्वाने
उन्मत्त झालेली माणसे काढून टाकेन. माझ्या पवित्र पर्वतावर पुन्हा
कधीही गर्विष्ठपणा केला जाणार नाही. 12 मी तुझ्यामध्ये जे गरीब व
दीन, असेच अवशिष्ट लोक ठेवेन. इस्राएलचे अवशिष्ट लोक असतील
आणि ते याहवेहच्या नामात आश्रय घेतील. 13 इस्राएलमधील उरलेले
कोणतेही दुष्कृत्य करणार नाहीत; ते असत्य बोलणार नाहीत. लबाडी
करणारी जीभ त्यांच्या मुखात असणार नाही. ते अन्न सेवन करून
विसावा घेतील आणि त्यांना कोणीही भीती दाखविणार नाही.” 14
हे सीयोनकन्ये, तू गीत गा; हे इस्राएला, तू मोठ्याने गजर कर! अगे
यरुशलेमकन्ये, अगदी मनापासून आनंद कर, उल्लास कर. 15 कारण
याहवेहने तुझी शिक्षा काढून घेतली आहे, तुझ्या शत्रूचे सैन्य परत गेले
आहे. याहवेह, इस्राएलचे राजा तुझ्यासह आहेत; यापुढे हानीचे भय तू
बाळगणार नाही. 16 त्या दिवशी ते यरुशलेमला असे म्हणतील, “हे
सीयोना, भिऊ नकोस, तुझे बाहू दुर्बल होऊ देऊ नकोस. 17 महाप्रतापी
योद्धा जे रक्षणकर्ता आहेत, ते याहवेह तुझे परमेश्वर तुझ्यासह आहेत.
त्यांना तुझ्यामुळे अत्यंत आनंद होतो; तुझ्यावरील प्रीतीमुळे ते तुजवर
दोषारोपण करणार नाहीत. त्याऐवजी तुझ्याबद्दल ते गीत गाऊन उल्हास
व्यक्त करतील.” 18 “जे निर्धारित सण तुझ्याकरिता ओझे व कलंक
आहेत, ते सण साजरे करता आले नाही म्हणून जे लोक शोक करतात,
त्या सर्वांना मी तुझ्यामधून काढून टाकेन. 19 त्या समयी ज्यांनी तुझ्यावर
जुलूम केला त्यांना मी अतिशय कडक शिक्षा करेन. त्या सर्वांचा मी
जाब घेईन. जे लंगडे आहेत त्यांची मी सोडवणूक करेन; बंदिवासात
गेलेल्यांना मी एकत्र करेन. जिथे ते लज्जित झाले त्या प्रत्येक भूमीवर
त्यांना मी प्रशंसा व गौरव बहाल करेन. 20 त्यावेळी मी तुम्हा सर्वांना
एकत्र गोळा करेन; त्यावेळी मी तुम्हाला घरी परत आणेन. जेव्हा मी
तुमची संपन्नता तुम्हाला परत देईन तेव्हा पृथ्वीवरील सर्व लोकांमध्ये,
स्वत:च्या दृष्टीसमोर मी तुम्हाला गौरव व प्रशंसा बहाल करेन,” असे
याहवेह म्हणतात.

# हाग्गय

1 दारयावेश राजाच्या कारकिर्दीच्या दुसऱ्या वर्षी, सहाव्या महिन्याच्या
पहिल्या दिवशी, याहवेहचे वचन हाग्गय संदेष्ट्याला यहूदीयाचा
राज्यपाल, शल्तीएलचा पुत्र जरूब्बाबेल, व प्रमुख याजक, यहोसादाकाचा
पुत्र यहोशुआ यांना उद्देशून आला: 2 सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात:
“हे लोक म्हणतात, ‘याहवेहच्या भवनाच्या पुनर्बांधणीची योग्य वेळ
अजून आलेली नाही.’” 3 मग हाग्गय संदेष्ट्याला याहवेहचे हे वचन
आले: 4 “भवन उद्ध्वस्त अवस्थेत असताना, तुम्ही स्वतः नक्षीदार
तावदाने असलेल्या घरात राहण्यासाठी ही वेळ योग्य आहे काय?”
5 सर्वसमर्थ याहवेह म्हणतात ते असे: “तुम्ही तुमच्या आचरणाकडे
नीट लक्ष द्या. 6 तुम्ही पुष्कळ पेरणी केली, पण कापणी मात्र फारच
थोडीच केली. तुम्ही जेवता, पण ते कधीही पुरेसे नसते. तुम्ही पीता, पण
तुमची तहान भागत नाही. तुम्ही वस्त्र घालता, पण तुम्हाला ऊब मिळत
नाही. तुम्ही वेतन मिळविता, पण तुम्ही ते पुष्कळ भोके असलेल्या
खिशांमध्ये ठेवता.” 7 सर्वसमर्थ याहवेह म्हणतात ते असे: “तुम्ही
तुमच्या आचरणाकडे नीट लक्ष द्या. 8 पर्वतावर जा आणि लाकडे घेऊन
या आणि माझे भवन बांधा. म्हणजे मी त्यात संतोष पावेन आणि
गौरवित होईन,” असे याहवेह म्हणतात. 9 “तुम्ही पुष्कळाची आशा
केली, परंतु पाहा, तुम्हाला किती थोडेसे मिळाले. तुम्ही जे घरी आणले,
मी ते फुंकर घालून उडविले का? सर्वसमर्थ याहवेह जाहीर करतात,
कारण माझे भवन ओसाड पडलेले आहे आणि तुम्ही स्वतःच्या घरात
व्यस्त आहात. 10 म्हणून तुमच्यामुळे आकाशाने त्याचे दव आणि पृथ्वीने
तिची उपज आवरून धरले आहे. 11 मी शेतावर, डोंगराळ भागांवर,
धान्यावर, नव्या द्राक्षारसावर, जैतुनाच्या तेलावर व इतर सर्व ज्यांची
भूमीतून उपज होते, लोकांवर आणि पशूंवर, तसेच तुमच्या हाताच्या
कष्टाच्या कमाईवर मी अवर्षण बोलाविले आहे.” 12 तेव्हा यहूदीयाचा
राज्यपाल, शल्तीएलचा पुत्र जरूब्बाबेल, आणि यहोसादाकाचा पुत्र
यहोशुआ, प्रमुख याजक, आणि देशातील अवशिष्ट लोकांनी त्यांचे
परमेश्वर याहवेहच्या वाणीचे व हाग्गयाला मिळालेल्या संदेशाचे पालन
केले, कारण त्यांचे परमेश्वर याहवेहनेच त्याला पाठविले होते आणि
लोकांना याहवेहचे भय वाटू लागले. 13 मग याहवेहचा संदेष्टा हाग्गयद्वारे
याहवेहने लोकांना संदेश पाठविला: “मी तुम्हाबरोबर आहे,” याहवेह
जाहीर करतात. 14 याहवेहने यहूदीयाचा राज्यपाल, शल्तीएलचा पुत्र
जरूब्बाबेलच्या आत्म्याला व यहोसादाकाचा पुत्र यहोशुआ, प्रमुख
याजकच्या आत्म्याला आणि सर्व अवशिष्ट लोकांच्या आत्म्याला जागृत
करून प्रेरित केले. ते आले व त्यांनी त्यांचे परमेश्वर सर्वसमर्थ याहवेहचे
भवन बांधण्यास सुरुवात केली. 15 हे सहाव्या महिन्याच्या चोविसाव्या
दिवशी घडले. दारयावेश राजाच्या कारकिर्दीच्या दुसऱ्या वर्षी हे घडले.

2 सातव्या महिन्याच्या एकविसाव्या दिवशी, हाग्गय संदेष्ट्याद्वारे
याहवेहचे हे वचन आले: 2 शल्तीएलचा पुत्र जरूब्बाबेल, यहूदीयाचा
राज्यपाल व यहोसादाकाचा पुत्र यहोशुआ, प्रमुख याजक आणि
देशातील अवशिष्ट लोकांशी बोल. त्यांना विचार, 3 “या भवनाची पूर्वीची
भव्यता कशी होती हे सांगण्यास तुमच्यातील कोणी उरले आहे काय?
हे सध्याचे काहीच नाही असे तुम्हाला वाटते ना? 4 परंतु हे जरूब्बाबेला,
बलवंत हो. हे प्रमुख याजका यहोशुआ, यहोसादाकाच्या पुत्रा बलवंत
हो. या देशातील सर्व लोकहो, बलवंत व्हा आणि कामाला लागा, याहवेह
जाहीर करतात. कारण ‘मी तुम्हाबरोबर आहे,’ असे सर्वसमर्थ याहवेह
जाहीर करतात. 5 ‘कारण तुम्ही इजिप्त देश सोडला, तेव्हाच मी तुम्हाला
अभिवचन दिले होते की माझा आत्मा तुम्हामध्ये वास करेल. भिऊ
नका.’ 6 “सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: ‘थोड्या वेळात मी आकाश,
पृथ्वी, सागर आणि कोरडी भूमी पुन्हा हलविणार आहे. 7 मी सर्व राष्ट्रे
हलवेन आणि सर्व राष्ट्रांची जी इच्छा आहे ते येईल आणि मी गौरवाने हे
स्थान भरेन,’ असे सर्वसमर्थ याहवेह म्हणतात. 8 ‘रुपे माझे आहे व
सोनेही माझे आहे,’ सर्वसमर्थ याहवेह जाहीर करतात. 9 सर्वसमर्थ
याहवेह असे म्हणतात, ‘सध्याच्या या भवनाचे वैभव पहिल्या भवनाच्या
वैभवापेक्षा श्रेष्ठ असेल, या स्थळात मी शांती बहाल करेन,’ असे
सर्वसमर्थ याहवेह जाहीर करतात.” 10 दारयावेश राजाच्या कारकिर्दीच्या
दुसऱ्या वर्षी, नवव्या महिन्याच्या चोविसाव्या दिवशी, संदेष्टा हाग्गयद्वारे
याहवेहचे हे वचन आले: 11 “सर्वसमर्थ याहवेहचे असे म्हणणे आहे:
‘याजकांना विचार नियमशास्त्र काय म्हणते: 12 तुमच्यापैकी कोणी
आपल्या झग्यामध्ये पवित्र मांस घेऊन जात असेल आणि त्यावेळी
त्याच्या झग्याचा स्पर्श भाकर, द्राक्षारस अथवा मांस यांना झाला, तर
स्पर्श झालेला पदार्थ पवित्र होईल काय?’” त्यावर याजकांनी उत्तर दिले,
“नाही.” 13 मग हाग्गयाने त्यांना विचारले, “समजा, कोणी एखाद्या
प्रेताला शिवले आणि विधिनियमानुसार तो अपवित्र झाला आणि नंतर
त्याचा स्पर्श या वस्तूंना झाला, तर ते अपवित्र होते काय?” याजकांनी
उत्तर दिले, “होय, ते अपवित्र होते.” 14 नंतर हाग्गयने म्हटले, “‘तर हे
लोक व हे राष्ट्र माझ्या नजरेत हे असेच आहे,’ याहवेह जाहीर करतात.
‘ते जे काही करतात व जी अर्पणे आणता ती अपवित्र असतात. 15
“‘आता तुम्ही आजपासून गंभीरपणे याचा विचार करा; याहवेहचे मंदिर
बांधण्यास आरंभ केला तेव्हा एका दगडावर दुसरा दगड ठेवीपर्यंत सर्व
परिस्थिती कशी होती. 16 जेव्हा कोणी वीस मापे धान्याच्या राशीची
अपेक्षा केल्यास, तिथे फक्त दहा मापेच धान्य मिळत असे. जर कोणी
द्राक्षकुंडातून पन्नास मापे द्राक्षारस काढला, तर त्याला वीसच मापे
मिळत असे. 17 तुमच्या हाताच्या सर्व कार्यास मी तांबेरा, भेरड आणि
गारांनी फटका दिला, तरीही तुम्ही माझ्याकडे परत येण्याचे नाकारले,’
असे याहवेह जाहीर करतात. 18 ‘आजपासून म्हणजे नवव्या महिन्याच्या
चोविसाव्या दिवशी, ज्या दिवशी याहवेहच्या मंदिराचा पाया घालण्याचे
काम पूर्ण झाले, त्या दिवसाचा गंभीरपणे विचार करा. गंभीरपणे विचार
करा: 19 धान्याच्या कणगीत एक तरी धान्यकण उरला आहे का?
आतापर्यंत द्राक्षवेल, अंजिराच्या झाडाला, डाळिंबाला आणि जैतुनाच्या
झाडाला फळे लागलीच नाहीत. “‘आजपासून मी तुम्हाला आशीर्वाद
देईन.’” 20 त्या महिन्याच्या चोविसाव्या दिवशी याहवेहकडून हाग्गयला

दुसऱ्यांदा वचन आले: 21 “यहूदीयाचा राज्यपाल जरूब्बाबेलला सांग,
मी आकाश व पृथ्वी हलवून सोडणार आहे. 22 सर्व राष्ट्रांमधील राजासने
उलथून टाकेन व परकियांचे सामर्थ्य डळमळीत करणार आहे. मी त्यांचे
रथ व त्यांचे सारथी उलथून टाकेन; घोडे व त्यावरील स्वार पडतील,
प्रत्येकजण त्याच्या भावाच्या तलवारीने पडेल. 23 “‘त्या दिवशी माझ्या
सेवका,’ सर्वसमर्थ याहवेह म्हणतात, ‘हे शल्तीएलचा पुत्र जरूब्बाबेला,
मी तुला माझ्या बोटातील मुद्रेची अंगठी करेन; कारण मी तुला निवडले
आहे,’ असे याहवेह जाहीर करतात.”

# जखऱ्याह

1 दारयावेश राजाच्या कारकिर्दीच्या दुसऱ्या वर्षी आठव्या महिन्यात
इद्दोचा नातू व बेरेख्याहचा पुत्र, संदेष्टा जखऱ्याहला याहवेहकडून हे
वचन प्राप्त झाले: 2 “याहवेह तुमच्या पूर्वजांवर अत्यंत क्रोधित झाले
होते. 3 म्हणून लोकांना सांग: सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: ‘तुम्ही
माझ्याकडे परत या आणि मी तुम्हाकडे परत येईन,’ सर्वसमर्थ याहवेह
असे म्हणतात. 4 तुमच्या पूर्वजांसारखे तुम्ही होऊ नका, ज्यांना पूर्वीच्या
संदेष्ट्यांनी घोषणा केली: ‘आपल्या दुष्ट मार्गापासून व दुष्ट प्रथांपासून
मागे वळा.’ पण त्यांनी माझे ऐकले नाही वा त्याच्याकडे लक्ष दिले नाही,
याहवेह जाहीर करतात. 5 तुमचे पूर्वज कुठे आहेत? आणि संदेष्टे, ते
कायमचे जगतात का? 6 पण माझी वचने व माझे नियम जे मी माझ्या
सेवक संदेष्ट्यांना आज्ञापिले होते, त्यांनी तुमच्या पूर्वजांना मागे टाकले
आहे ना? “तेव्हा त्यांनी पश्चात्ताप केला व ते म्हणाले, ‘आमचे वागणे
व प्रथांमुळे याहवेहकडून आम्हाला जी शिक्षा मिळाली, त्यास आम्ही
पात्र आहोत. जी करण्याचा त्यांनी निर्धार केला होता.’” 7 दारयावेश
राजाच्या कारकिर्दीच्या दुसऱ्या वर्षी वर्षाच्या अकराव्या महिन्यातील
चोविसाव्या दिवशी, शबात महिन्यात, संदेष्टा जखऱ्याह, बेरेख्याहचा पुत्र
व इद्दोचा नातू याला याहवेहचे वचन प्राप्त झाले. 8 रात्रीच्या वेळी मला
एक दृष्टान्त मिळाला, एका तांबड्या घोड्यावर एक मनुष्य बसलेला मी
पाहिला. तो एका खोऱ्यात मेंदीच्या झुडपांमध्ये उभा होता. त्याच्या
पाठीमागे तांबडे, तपकिरी व पांढरे असे दुसरे घोडे होते. 9 मी विचारले,
“माझ्या प्रभू, हे सर्व काय आहे?” एक स्वर्गदूत जो माझ्याशी बोलत
होता, त्याने उत्तर दिले, “ते काय आहे हे मी तुला दाखवेन.” 10 मग
मेंदीच्या झुडपांमध्ये उभे असलेल्या मनुष्याने सांगितले, “याहवेहने
यांना संपूर्ण पृथ्वीवरून फेरी मारण्याकरिता पाठविले आहे.” 11 मग
त्यांनी मेंदीच्या झुडपांमध्ये उभ्या असलेल्या याहवेहच्या दूताला वृतांत
सांगितला, “आम्ही सर्व पृथ्वीवरून फिरून आलो आहोत आणि संपूर्ण
जगात विश्रांती व शांतता नांदत आहे.” 12 मग याहवेहच्या दूताने म्हटले:
“हे सर्वसमर्थ याहवेह, गेली सत्तर वर्षे तुम्ही यरुशलेम व यहूदीयाच्या
नगरांवर संतापलेले आहात, त्यांच्यावर दया करण्याचे तुम्ही किती वेळ
नाकारणार आहात?” 13 तेव्हा माझ्याशी संवाद करीत असलेल्या
दूताला याहवेहने सांत्वनपर व आश्वासनदायक उत्तर दिले. 14 मग
माझ्याशी संवाद करीत असलेला याहवेहचा स्वर्गदूत म्हणाला, “या
वचनाची घोषणा कर: सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: ‘मी यरुशलेम
व सीयोनाबाबत अत्यंत ईर्ष्यावान आहे, 15 ज्या अन्य राष्ट्रांना सुरक्षित
वाटते त्यांच्यावर मी फार क्रोधित झालो आहे, कारण आधी मी माझ्या
लोकांवर थोडा नाराज होतो, पण त्यांना शिक्षा देण्याचा अधिकार
मिळालेली राष्ट्रे मर्यादेपलिकडे गेली.’ 16 “म्हणून याहवेह असे म्हणतात:
‘मी करुणायुक्त होऊन यरुशलेमकडे परत येईन आणि तिथे माझे भवन
पुन्हा बांधले जाईल आणि मापनपट्टी यरुशलेमवर ताणली जाईल,’ असे
सर्वसमर्थ याहवेह जाहीर करतात. 17 “आणखी पुढे घोषणा करा:
सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: ‘माझी नगरे पुन्हा समृद्धीने ओसंडून
वाहू लागतील आणि याहवेह पुन्हा सीयोनाचे सांत्वन करतील आणि
यरुशलेमची निवड करतील.’” 18 नंतर मी वर पाहिले तर मला चार शिंगे
दिसली. 19 मी माझ्याशी संवाद करीत असलेल्या दूताला विचारले,
“हे काय आहे?” त्याने उत्तर दिले, “ही शिंगे आहेत, ज्यांनी यहूदीया,
इस्राएल आणि यरुशलेम येथील लोकांची पांगापांग केली.” 20 नंतर
याहवेहने मला चार शिल्पकार दाखविले. 21 तेव्हा मी विचारले, “हे
काय करण्यासाठी आले आहेत?” तेव्हा याहवेहच्या दूताने उत्तर दिले,
“ही ती चार शिंगे आहेत ज्यांनी यहूदीयाची इतकी पांगापांग केली, की
कोणीही आपले मस्तक वर उचलू शकले नाही, पण हे शिल्पकार त्या
चार शिंगांना पकडून भयभीत करून व यहूदीयाविरुद्ध आपली शिंगे उंच
करून तिच्या लोकांची पांगापांग करणाऱ्या राष्ट्रांना फेकून देण्यासाठी
आले आहेत.”

2 मग मी वर पाहिले, तेव्हा माझ्यासमोर हातात मापनपट्टी घेतलेला
एक मनुष्य मला दिसला. 2 मी त्याला विचारले, “तू कुठे जात
आहेस?” तो म्हणाला, “मी यरुशलेमचे मोजमाप घेण्यासाठी चाललो
आहे. ती किती लांब व किती रुंद आहे हे मला पाहावयाचे आहे.” 3
आणि पाहा, जो स्वर्गदूत माझ्याशी बोलत होता तो जाऊ लागला, तेव्हा
दुसरा एक स्वर्गदूत त्याला भेटण्यास आला. 4 व त्याला म्हणाला:
“पळत जा आणि त्या तरुणाला सांग, की यरुशलेम तटबंदी नसलेले
नगर होईल कारण तिथे असंख्य लोक व जनावरे असतील. 5 आणि मी
स्वत: त्याभोवती अग्नीचा कोट होईन व आत त्या नगरीचे वैभव होईन,”
असे याहवेह जाहीर करतात. 6 “चला! चला! उत्तरेकडील देशांमधून
बाहेर पळा, कारण मी तुम्हाला स्वर्गातील वाऱ्याच्या चारही दिशांना
विखुरले आहे,” असे याहवेह जाहीर करतात. 7 “चल सीयोने! जी तू
बाबेल कन्येत राहते!” 8 सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात, “गौरवशाली
प्रभूने तुम्हाला लूटणाऱ्या राष्ट्राविरुद्ध मला पाठविले—जो कोणी तुम्हाला
स्पर्श करतो, तो याहवेहच्या डोळ्यातील बुबुळाला स्पर्श करतो— 9
मी निश्चितच त्यांच्याविरुद्ध माझा हात उगारेन, म्हणजे त्यांचेच गुलाम
त्यांची लुटालूट करतील. मग तुम्हाला कळेल की सर्वसमर्थ याहवेहने
मला पाठविले आहे. 10 “अगे सीयोनकन्ये, गीत गा आणि उल्हास
कर! कारण मी येत आहे आणि मी तुम्हामध्ये वस्ती करेन,” याहवेह
जाहीर करतात. 11 “त्या दिवसात अनेक राष्ट्रे याहवेहकडे वळतील.
मी तुम्हामध्ये वस्ती करेन मग तुम्हाला कळेल की सर्वसमर्थ याहवेहने
मला पाठविले आहे. 12 आणि यहूदीया ही पवित्र भूमी याहवेहचे वतन
होईल, आणि ते पुन्हा यरुशलेमला निवडतील. 13 हे सर्व मानवजाती,
याहवेहपुढे स्तब्ध राहा, कारण ते आपल्या पवित्र निवासस्थानातून
जागृत झाले आहेत.”

3 नंतर प्रमुख याजक यहोशुआ हा याहवेहच्या दूतापुढे उभा असल्याचे
दूताने मला दाखविले आणि सैतान ही तिथे दूताच्या उजव्या
बाजूला होता आणि तो यहोशुआवर आरोप करीत होता. 2 तेव्हा
याहवेह सैतानाला म्हणाले, “अरे सैताना, याहवेह तुला धमकावितात!

यरुशलेमची निवड करणारे याहवेह तुला धमकावितात! अग्नीतून बाहेर ओढून काढलेल्या जळत्या कोलितासारखा हा मनुष्य नाही का?” 3 याहवेहच्या दूतासमोर उभ्या असलेल्या यहोशुआची वस्त्रे घाणेरडी होती. 4 तेव्हा तिथे उभे असलेल्यांना स्वर्गदूत म्हणाला, “त्याची घाणेरडी वस्त्रे काढा.” मग यहोशुआला तो म्हणाला, “पाहा, मी तुझी पापे दूर केली आहेत आणि आता मी तुला ही महायाजकाची वस्त्रे घालीत आहे.” 5 मग मी म्हणालो, “त्याच्या डोक्याला स्वच्छ फेटा बांधा.” तेव्हा याहवेहचा स्वर्गदूत तिथे उभा असताना त्यांनी त्याच्या डोक्याला एक स्वच्छ फेटा बांधला व वस्त्रे चढविली. 6 नंतर याहवेहच्या दूताने यहोशुआवर ही जबाबदारी सोपविली: 7 “सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: ‘जर तू आज्ञाधारकपणे माझ्या मार्गांनी चालशील, तर तू माझ्या भवनावर शासन करशील आणि माझ्या न्यायमंदिरावर अधिकार चालवशील. ते पवित्र ठेवावेस म्हणून मी ते तुझ्या ताब्यात देईन; आणि इथे उभे असलेल्यांच्या बरोबरीने तू स्थान ग्रहण करशील. 8 “‘ऐक, हे प्रमुख याजका यहोशुआ, तू आणि तुझ्याबरोबर बसलेले तुझे सहकारी, जे भावी काळाची चिन्हे आहेत: मी माझा सेवक, शाखा आणणार आहे. 9 पाहा, मी यहोशुआसमोर एक दगड ठेवला आहे! या दगडाला सात नेत्र आहेत, मी त्यावर एक शिलालेख कोरणार आहे आणि या देशाची पापे एका दिवसात दूर करेन,’ सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात. 10 “‘त्या दिवशी तुम्ही तुमच्या शेजाऱ्यांना तुमच्या द्राक्षलतेच्या व अंजिराच्या झाडाखाली बसण्यास आमंत्रित करणार,’ सर्वसमर्थ याहवेह असे जाहीर करतात.”

**4** मग जो याहवेहचा स्वर्गदूत माझ्याशी बोलत होता, तो परत आला व त्याने मला जागे केले, जणू काय मी झोपेतच होतो. 2 त्याने मला विचारले, “तुला आता काय दिसते?” मी उत्तर दिले, “सात दिवे असलेला एक ठोस सोन्याचा दीपवृक्ष मला दिसत आहे. त्याच्या वरच्या टोकाला एक कटोरा असून, त्यात सात दिवे होते व त्याला लावलेल्या नळयांमधून त्या दिव्यांना तेल पुरविले जाई. 3 या कटोऱ्याच्या उजव्या बाजूस एक व डाव्या बाजूस एक अशी दोन जैतुनाची झाडे मला दिसतात.” 4 तेव्हा जो स्वर्गदूत माझ्याशी बोलत होता, त्याला मी विचारले, “माझ्या प्रभू, हे काय आहे?” 5 त्यावर देवदूताने उत्तर दिले, “हे काय आहे तुला माहीत नाही काय?” तेव्हा मी म्हणालो, “नाही, प्रभू.” 6 मग तो मला म्हणाला, “जरूब्बाबेलासाठी याहवेहचा हा संदेश आहे: ‘बलाने नव्हे, पराक्रमाने नव्हे, तर माझ्या आत्म्याने कार्यसिद्धी होईल,’ असे सर्वसमर्थ याहवेह म्हणतात. 7 “हे विशाल पर्वता, तू कोण आहेस? जरूब्बाबेलापुढे तू सपाट मैदान असा होशील. मग तो शिखरशिलेस बाहेर आणून प्रचंड गजर करेल, ‘याहवेह आशीर्वादित करो! याहवेह आशीर्वादित करो!’” 8 याहवेहकडून मला एक वचन मिळाले: 9 “जरूब्बाबेलाच्या हस्ते या मंदिराचा पाया घातला; आणि तोच स्वहस्ते ते पूर्ण करेल. तेव्हा तुम्हाला समजेल की सर्वसमर्थ याहवेहने मला तुमच्याकडे पाठविले आहे. 10 “ही सुरुवात अगदी लहान असली तरी तिला तुच्छ मानण्यास कोण धजावेल, कारण याहवेहचे सात नेत्र संपूर्ण पृथ्वीभर फिरतात व जरूब्बाबेलाच्या हातात शिखरशिला आहे, हे पाहून हर्षाने प्रफुल्लित होतात?” 11 मग मी त्या दूताला विचारले, “दीपवृक्षाच्या उजव्या बाजूस एक व डाव्या बाजूस एक अशी दोन जैतुनाची झाडे का आहेत?” 12 मी पुन्हा त्याला विचारले, “तसेच तेल ओतणाऱ्या सोन्याच्या दोन नळयांजवळ दोन जैतुनाच्या फांद्या का आहेत?” 13 त्यावर त्याने मला विचारले, “तुला हे काय आहे ते माहीत नाही काय?” मी म्हटले, “नाही, प्रभू.” 14 तेव्हा त्याने मला सांगितले, “अखिल पृथ्वीचे प्रभू आहेत, त्यांची सेवा करणारे हे दोन अभिषिक्त आहेत.”

**5** मी पुन्हा वर पाहिले आणि उडत असलेली एक चर्मपत्राची गुंडाळी मला दिसली. 2 त्या दूताने मला विचारले, “तुला काय दिसते?” मी उत्तर दिले, “मला एक उडती गुंडाळी दिसते! ती सुमारे वीस हात लांब व दहा हात रुंद असावी.” 3 मग तो मला म्हणाला, “हा तो शाप आहे, जो या सर्व भूमीवर येणार आहे; चर्मपत्राच्या गुंडाळीच्या एका बाजूस जे लिहिलेले आहे ते असे, देशातून प्रत्येक चोर घालवून दिला जाईल आणि दुसऱ्या बाजूस म्हटले आहे, जो कोणी शपथ घेऊन खोटे बोलतो, त्या दोषीलाही देशातून घालवून दिले जाईल. 4 सर्वसमर्थ याहवेह जाहीर करतात, ‘मी हा शाप पाठवेन, तो प्रत्येक चोराच्या घरात व माझ्या नावाने खोटी शपथ वाहणाऱ्या प्रत्येकाच्या घरात प्रवेश करेल. तो त्या घरावर राहील आणि त्याचे लाकूड व दगडासहित सर्वांचा संपूर्ण नाश करेल.’” 5 मग जो स्वर्गदूत माझ्याशी बोलत होता तो पुढे आला आणि मला म्हणाला, “वर पाहा आणि बघ काय प्रगट होत आहे.” 6 मी विचारले, “ते काय आहे?” “त्याने उत्तर दिले, ती एक टोपली आहे.” तो पुढे बोलला, “ती संपूर्ण देशातील लोकांची पातके आहेत.” 7 मग तिचे शिसाचे झाकण वर उघडले गेले आणि त्या टोपलीच्या आत बसलेली एक स्त्री मला दिसली! 8 याहवेहचा स्वर्गदूत म्हणाला, “ती दुष्टाई आहे.” असे म्हणून त्याने तिला पुन्हा त्या टोपलीत ढकलले आणि त्या टोपलीचे शिसाचे झाकण बंद केले. 9 मग मी वर बघितले—आणि मला दोन स्त्रिया उडतांना दिसल्या, त्यांच्या पंखात वारा भरलेला होता! त्यांचे पंख करकोचाच्या पंखांप्रमाणे होते आणि त्यांनी ती टोपली आकाश व पृथ्वीच्या मध्ये उचलली. 10 तेव्हा जो स्वर्गदूत माझ्याशी बोलत होता त्याला मी विचारले, “ती टोपली त्या कुठे नेत आहेत?” 11 त्याने उत्तर दिले, “शिनार देशात, तिच्याकरिता घर बांधण्यासाठी. जेव्हा घर तयार होईल, तेव्हा ही टोपली त्यामध्ये तिच्या ठिकाणी ठेवण्यात येईल.”

**6** मग मी पुन्हा वर पाहिले, तो दोन पर्वतांमधून चार रथ येत असलेले मला दिसले. ते पर्वत कास्याचे होते. 2 पहिला रथ तांबडे घोडे ओढीत होते, दुसरा रथ काळे घोडे ओढीत होते, 3 तिसरा रथ पांढरे घोडे, तर चौथा रथ पंचरंगी घोडे ओढीत होते. 4 तेव्हा मी जो स्वर्गदूत माझ्याशी बोलत होता, त्याला विचारले, “प्रभू, हे काय आहेत?” 5 देवदूताने मला उत्तर दिले, “अखिल पृथ्वीच्या प्रभूच्या समोर उभे राहणारे हे चार स्वर्गीय आत्मे आहेत, ते तिथून बाहेर जात आहेत. 6 काळ्या घोड्यांचा रथ उत्तरेला जाईल आणि पांढऱ्या घोड्यांचा रथ पश्चिमेकडे,

पंचरंगी घोड्यांचा रथ दक्षिणेकडे जाईल.” 7 जेव्हा ते शक्तिशाली घोडे
निघाले, ते संपूर्ण पृथ्वीवर जाण्यास आतुर झाले होते आणि तो त्यांना
म्हणाला, “संपूर्ण पृथ्वीवर जा!” तेव्हा ते संपूर्ण पृथ्वीवर गेले. 8 मग
त्याने मला बोलाविले आणि तो मला म्हणाला, “जे उत्तरेला गेले,
त्यांनी उत्तरेकडील भूमीला माझ्या आत्म्याची शांती दिली आहे.” 9
याहवेहचे वचन माझ्याकडे आले: 10 “हेल्दय, तोबीयाह व यदायाह यांनी
बाबेलमध्ये बंदिवासात असलेल्या यहूदी लोकांकडून आणलेले रुपे व
सोने घे. त्याच दिवशी तू सफन्याहचा पुत्र योशीयाहच्या घरी जा. 11 रुपे
व सोने घेऊन त्यांचा एक मुकुट तयार कर. मग तो मुकुट यहोसादाकाचा
पुत्र, प्रमुख याजक यहोशुआच्या मस्तकावर ठेव. 12 त्याला सांग की
सर्वसमर्थ याहवेह म्हणतात, ‘हा तो पुरुष आहे, ज्याचे नाव “शाखा”
आहे, जो त्याच्या ठिकाणापासून शाखा काढेल आणि याहवेहचे मंदिर
बांधेल. 13 तो याहवेहचे मंदिर बांधेल व तो वैभवशाली वस्त्र परिधान
करेल आणि राजासनावर बसेल व राज्य करेल. तो त्याच्या सिंहासनावर
याजक होईल आणि या दोघात समन्वय होईल.’ 14 हेलेम, तोबीयाह
आणि यदायाह आणि सफन्याहचा पुत्र हेन, यांना याहवेहच्या मंदिराचे
स्मृतिचिन्ह म्हणून मुकुट देण्यात येईल. 15 दूरवर असलेले लोकही
येतील व याहवेहचे मंदिर बांधण्यासाठी मदत करतील, तेव्हा तुला कळेल
की सर्वसमर्थ याहवेहनी मला तुझ्याकडे पाठवले आहे. तुझे परमेश्वर
याहवेह त्यांच्या आज्ञा तू काळजीपूर्वक पाळशील तरच हे घडेल.”

**7** दारयावेश राजाच्या कारकिर्दीत चौथ्या वर्षी नवव्या म्हणजे किसलेव
महिन्याच्या चवथ्या दिवशी जखऱ्याहला याहवेहकडून संदेश मिळाला.
2 बेथेल शहरात राहणाऱ्या यहूदी लोकांनी राजाचा प्रमुख शासकीय
अधिकारी शरेसर आणि रगेम-मेलेकच्या नेतृत्वाखाली लोकांचे एक
पथक यरुशलेमच्या मंदिरात याहवेहचा आशीर्वाद मागण्यासाठी, 3
सर्वसमर्थ याहवेहच्या मंदिराच्या याजकांना आणि संदेष्ट्यांना विचारून,
“मी इतकी वर्षे करत आलो त्याप्रमाणे मी पाचव्या महिन्यात शोक
व उपवास करावा काय?” 4 मग सर्वसमर्थ याहवेहचे वचन मला
आले: 5 “तुमच्या देशातील सर्व लोकांना आणि याजकांना हा प्रश्न
विचार, ‘गेली सत्तर वर्षे तुम्ही पाचव्या आणि सातव्या महिन्यात जे
उपवास आणि शोक करीत होता, ते खरोखर माझ्यासाठी उपवास
करत होते काय? 6 आणि आता देखील तुम्ही मेजवान्या करता,
तेव्हा तुम्ही स्वत:साठी करीत नाही का? 7 ज्यावेळी यरुशलेम आणि
तिच्या सभोवतीची उपनगरात शांती व समृद्ध होती आणि नेगेव व
दक्षिणेकडील तळवटीच्या प्रदेशातील लोकांचा तिथे जम बसला होता,
त्यावेळीच याहवेहनी संदेष्ट्यांद्वारे लोकांना इशारा दिला नव्हता का?’”
8 जखऱ्याहला याहवेहकडून पुन्हा संदेश आला: 9 “सर्वसमर्थ याहवेह
असे म्हणतात: ‘निष्पक्ष न्यायदान करा; एकमेकांशी करुणेने व दयेने
वागा. 10 विधवा व अनाथ, परदेशीय व गरीब लोक यांच्यावर जुलूम करू
नका. तसेच एकमेकांविरुद्ध दुष्ट कट रचू नका.’ 11 “पण त्यांनी माझ्या
संदेशाकडे लक्ष देण्याचे नाकारले; त्यांनी हट्टीपणाने माझ्याकडे पाठ
केली व आपल्या कानात बोटे घातली. 12 त्यांनी आपली अंत:करणे
गारगोटीसारखी कठीण केली आणि सर्वसमर्थ याहवेहने आरंभीच्या
संदेष्ट्यांना आपल्या आत्म्याने प्रेरित करून त्यांच्याद्वारे दिलेल्या आज्ञा
किंवा वचने ऐकण्याचे त्यांनी नाकारले. म्हणूनच याहवेहला त्यांच्यावर
अत्यंत क्रोध आला. 13 “‘जेव्हा मी त्यांना हाक मारली, त्यांनी ऐकण्याचे
नाकारले; म्हणून त्यांनी मला हाक मारली, की मी त्यांचे ऐकणार नाही,
असे सर्वसमर्थ याहवेह म्हणतात. 14 चक्रीवादळाप्रमाणे मी त्यांची
दूरदूरच्या देशांत पांगापांग केली. त्यांनी मागे सोडलेला त्यांचा देश
असा ओसाड झाला, की त्यातून कोणी प्रवासदेखील करेनासे झाले.
एकेकाळचा तो रमणीय देश आता त्यांनी निर्जन केला.’”

**8** सर्वसमर्थ याहवेहचे वचन मला प्राप्त झाले. 2 सर्वसमर्थ याहवेह असे
म्हणतात: “सीयोनेबाबत मला अत्यंत ईर्षा वाटते; मी तिच्याबद्दल
ईर्षेने ज्वलंत झालो आहे.” 3 याहवेह असे म्हणतात: “मी सीयोनात
परत जाईन आणि यरुशलेमात वास्तव्य करेन. मग यरुशलेमला
विश्वासू नगरी आणि सर्वसमर्थ याहवेहच्या पर्वतास पवित्रगिरी असे
म्हणतील.” 4 सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: “पुन्हा एकदा त्या
नगरीतील परिपक्व वयाचे स्त्री व पुरुष यरुशलेमच्या रस्त्यांवर बसतील,
प्रत्येकजण वयातीत असल्यामुळे आपल्या काठ्या टेकीत येतील,
5 आणि नगरातील रस्ते तिथे खेळणाऱ्या मुलांनी व मुलींनी भरून
जातील.” 6 सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: “त्यावेळी हे अवशिष्ट
लोकांना अद्भुत वाटेल, परंतु मला ते अद्भुत वाटेल का?” सर्वसमर्थ
याहवेह जाहीर करतात. 7 सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: “मी
माझ्या लोकांना पूर्वेकडून आणि पश्चिमेकडून सोडवून आणेन. 8 त्यांनी
यरुशलेमात राहावे यासाठी मी त्यांना पुन्हा आणेन; आणि ते माझे
लोक होतील आणि मी त्यांचा विश्वासयोग्य आणि न्यायी परमेश्वर
होईन.” 9 सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: “आता हे शब्द ऐका,
‘तुमचे बाहू बलवंत करा, जेणेकरून मंदिर बांधून पूर्ण होईल.’ जेव्हा
सर्वसमर्थ याहवेहच्या मंदिराचा पाया घातला, तेव्हा जे संदेष्टे तिथे हजर
होते, त्यांनी तुम्हाला हे सांगितले होते. 10 त्या वेळेपर्यंत लोकांना
कामासाठी मजुरी नव्हती किंवा जनावरे भाड्याने मिळत नव्हती. शत्रूच्या
भयापायी कामधंदे करण्यास इतरत्र जाणे सुरक्षित नव्हते, कारण मी
तुम्हा प्रत्येकाला त्यांच्या शेजाऱ्याविरुद्ध केले होते. 11 पण आधी मी
वागलो तसे मी आता या अवशिष्ट लोकांशी वागणार नाही,” सर्वसमर्थ
याहवेह जाहीर करतात. 12 “ते बियाणे चांगले वाढेल, द्राक्षवेली फळे
देतील, भूमी पीक देईल, आणि आकाश त्याचे दव पाडेल. मी या
लोकांच्या अवशिष्टास त्यांचा वारसाहक्क म्हणून हे सर्व देईन. 13 जसे
तुम्ही, यहूदीया व इस्राएल सर्व राष्ट्रात शाप म्हटले जात असत, तर मी
तुम्हाला वाचवून तुम्हाला आशीर्वाद असे करेन. तुम्ही भिऊ नका तर
तुमचे बाहू बलवान करा.” 14 सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: “जसा
तुमच्यावर अरिष्ट आणण्याचा व तुमच्या पूर्वजांनी मला क्रोध आणला
तेव्हा मुळीच करुणा न करण्याचा मी निर्धार केला, 15 तर आता मी
यहूदीया व यरुशलेमचे परत भले करण्याचा निर्धार केला आहे. तुम्ही
भिऊ नका. 16 आता तुम्ही या गोष्टी करावयाच्या आहेत: एकमेकांशी

सत्य बोला, सत्यता व शांततेने तुमच्या न्यायलयात योग्य निर्णय द्या;
17 एकमेकांविरुद्ध दुष्ट कारस्थान करू नका आणि खोटी शपथ घेण्याची
आवड धरू नका. मला या सर्वाचा अतिशय तिरस्कार वाटतो,” असे
याहवेह जाहीर करतात. 18 सर्वसमर्थ याहवेहकडून मला वचन आले.
19 सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: “चवथ्या, पाचव्या, सातव्या आणि
दहाव्या महिन्यातील उपवास आता यहूदीयाच्या घराण्यास आनंदाचा
व उल्हासाचा काळ व हर्षोत्सव म्हणून पाळले जातील. म्हणून सत्य
व शांती यावर प्रीती करा.” 20 सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात:
“जगभरचे लोक व अनेक नगरांमधील रहिवासी येतील, 21 आणि
एका नगरामधील रहिवासी दुसऱ्या नगरात जातील व त्यांना म्हणतील,
‘चला आपण याहवेहला विनंती करू व सर्वसमर्थ याहवेहचा शोध घेऊ.
मी स्वतःच जात आहे.’ 22 आणि पुष्कळ लोक आणि बलाढ्य राष्ट्रे
देखील यरुशलेमला येतील व सर्वसमर्थ याहवेहकडे विनंती करतील.”
23 सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: “त्या दिवसात सर्व राष्ट्रांतील व
सर्व भाषिक अशी दहा माणसे एका यहूदीच्या अंगरख्याच्या टोकास
पकडून म्हणतील, ‘आम्हाला तुमच्याबरोबर येऊ द्या, कारण परमेश्वर
तुम्हासोबत आहेत असे आम्ही ऐकले आहे.’”

9 ही एक भविष्यवाणी आहे: हद्राख देशाविरुद्ध याहवेहचे वचन आले,
आणि याचा प्रभाव दिमिष्कवरही पडेल; कारण सर्व लोकांची व
इस्राएलच्या सर्व कुळांची दृष्टी याहवेहवर लागलेली आहे; 2 सोर व
सीदोनवर, आणि त्याच्या सीमेलगत असलेल्या हमाथवरही लागलेली
आहे, जरी ते अत्यंत कुशल आहेत. 3 सोर नगरीने स्वतःसाठी भक्कम
गड बांधले आहेत; तिने रुपे धुळीच्या व सोने रस्त्यावरील कचऱ्याच्या
राशीप्रमाणे साठवून ठेवले आहे. 4 परंतु प्रभू तिची सर्व संपत्ती हिरावून
घेतील आणि तिची समुद्रावरील शक्ती नष्ट करतील, आणि ती अग्नीत
भस्म होईल. 5 अष्कलोन हे पाहून भयभीत होईल; गाझा वेदनेने
कळवळेल, व एक्रोन देखील निराशेने कोमेजून जाईल. गाझा नगरीच्या
राजाला ठार करण्यात येईल आणि अष्कलोन नगरी ओसाड होईल. 6
मिश्रजातीचे लोक अश्दोदास व्यापून टाकतील, आणि मी पलिष्ट्यांच्या
गर्वाचा अंत करेन. 7 मी त्यांच्या मुखातून रक्त व त्यांच्या दातांमधून
अमंगळ अन्न बाहेर काढेन. जे अवशिष्ट लोक राहतील ते आपल्या
परमेश्वराचे होतील आणि यहूदीयाच्या कुळात समाविष्ट करण्यात येतील
पलिष्टी आणि एक्रोनचे पूर्वी जसे होते तसे हे लोक यबूसी लोकांप्रमाणे
होतील. 8 परंतु लुटारूंच्या आक्रमणापासून रक्षण करण्यासाठी मी
माझ्या मंदिराभोवती ठाण मांडेन. यापुढे माझ्या लोकांवर कोणीही जुलूम
करणारे अधिकार गाजविणार नाहीत, आता मी त्यांच्यावर लक्ष ठेवेन. 9
सीयोनकन्ये, फार आनंद कर! यरुशलेमकन्ये, गर्जना कर! पाहा, तुझा
राजा तुझ्याकडे येत आहे, तो नीतिमान व विजयी आहे, तरी तो लीन आहे
व गाढवीवर बसून तो येत आहे होय, एका गाढवीच्या शिंगरावर बसून तो
येत आहे! 10 मी एफ्राईमचे रथ आणि यरुशलेमचे युद्धाचे अश्व काढून
घेईन, आणि युद्धाचे धनुष्य मोडून टाकले जातील. आणि तो राष्ट्रांमध्ये
शांतीची घोषणा करेल. त्याच्या राज्याचा विस्तार एका समुद्रापासून
दुसऱ्या समुद्रापर्यंत आणि फरात नदीपासून पृथ्वीच्या दिगंतापर्यंत
असेल. 11 तुमच्या बाबत बोलायचे तर, रक्ताने शिक्कामोर्तब करून
तुमच्याशी केलेल्या करारामुळे, मी तुमच्या बंदिवानांना निर्जल गर्तेतील
मृत्यूपासून सोडविणार आहे. 12 अहो सर्व सुटकेची आशा करणाऱ्या
बंदिवानांनो, तुमच्या गडात परत या; आता मी ही घोषणा करतो की,
तुमची दुप्पटीने परतफेड करेन. 13 यहूदाहास मी असे वाकवेन, जसे
माझे धनुष्य वाकवितो आणि एफ्राईमने ते बाणासारखे भरेन. अगे,
सीयोना, मी तुझ्या पुत्रांना हे ग्रीस देशा, तुझ्या पुत्रां विरुद्ध प्रोत्साहित
करेन, आणि तुला योद्ध्याच्या तलवारीसारखे करेन. 14 मग याहवेह
त्यांच्यावर प्रगट होतील; त्यांचे बाण विजेसारखे चमकतील. सार्वभौम
याहवेह रणशिंग फुंकतील; ते दक्षिणेतील वादळातून चालतील, 15
आणि सर्वसमर्थ याहवेह त्यांचे रक्षण करतील. ते नष्ट करतील, आणि
गोफणीच्या दगडांनी विजयी होतील. ते प्राशन करतील व मद्यपीसारखे
गर्जना करतील; ते वाटीसारखे ओतप्रोत भरतील आणि वेदीच्या
कोपऱ्यांवर शिंपडण्यासाठी उपयोगात येतील. 16 त्या दिवशी मेंढपाळ
जसा आपल्या मेंढरांना वाचवितो, त्याप्रमाणे याहवेह त्यांचे परमेश्वर
त्यांच्या लोकांना वाचवतील. मुकुटामध्ये बसविलेल्या रत्नांप्रमाणे ते
त्यांच्या देशात चमकतील. 17 ते सर्व किती अद्भुत व सुंदर असतील!
धान्य तरुणांची आणि नवा द्राक्षारस तरुणींची भरभराट करेल.

10 “वसंतऋतूमध्ये पाऊस पडावा म्हणून याहवेहस विनंती करा;
याहवेहच कडाडणाऱ्या मेघगर्जना पाठवितात. तेच सर्व लोकांवर
पावसाचा वर्षाव करतात आणि प्रत्येकाला शेतातील पीक देतात. 2
मूर्ती लबाड बोलतात, दैवप्रश्न करणारे खोटे दृष्टान्त बघतात; ते जी
स्वप्ने सांगतात ती खरी नसतात, त्यांनी केलेले सांत्वन व्यर्थ असते.
म्हणून लोक मेंढपाळ नसल्यामुळे जुलमाच्या दबावाखाली मेंढराप्रमाणे
भटकतात. 3 “माझा संताप मेंढपाळांविरुद्ध भडकतो, आणि मी
पुढाऱ्यांना शिक्षा करेन; कारण आपल्या कळपाची, यहूदीयाच्या लोकांची
काळजी सर्वसमर्थ याहवेह करतील, आणि त्यांना युद्धातील कुशल
घोड्यांप्रमाणे करतील. 4 यहूदातून कोनशिला येईल, त्याच्यातूनच तंबूचा
खिळा, त्याच्यातूनच युद्धाचे धनुष्य, त्याच्यातूनच प्रत्येक अधिकारी
येईल. 5 एकत्र ते योद्ध्यांसारखे होतील ते आपले शत्रू रस्त्यातील
चिखलात तुडवतील. ते लढतील कारण याहवेह त्यांच्याबरोबर आहेत,
आणि ते त्यांच्या शत्रूंच्या घोडेस्वारांना लज्जित करतील. 6 “मी
यहूदाहला बलवान करेन आणि योसेफाच्या वंशास वाचवेन. मी त्यांची
पुनर्स्थापना करेन कारण मी त्यांच्यावर करुणा करतो. ते असे होतील,
जणू काही मी त्यांचा त्याग कधी केलाच नव्हता, कारण मी त्यांचा
याहवेह परमेश्वर आहे आणि मी त्यांचा धावा ऐकेन. 7 एफ्राईमी
योद्ध्यांसारखे होतील, द्राक्षारसाने व्हावे तसे त्यांचे हृदय आनंदित होईल.
त्यांची मुलेसुद्धा हे पाहतील आणि उल्लास पावतील; त्यांची हृदये
याहवेहच्या ठायी आनंदित होतील. 8 मी त्यांना संकेत देईन, आणि
त्यांना एकत्र करेन. मी निश्चितच त्यांना सोडवेन; ते पुन्हा पूर्वीसारखेच
असंख्य होतील. 9 जरी मी त्यांना लोकांमध्ये विखुरले आहे, तरी देखील

त्या दूर देशी ते माझी आठवण करतील. ते व त्यांची सर्व मुलेबाळे
जगतील, आणि ते परत येतील. 10 मी त्यांना इजिप्तमधून परत
आणेन, आणि अश्शूरातून एकत्र गोळा करेन. गिलआद व लबानोनमध्ये
त्यांचे पुनर्वसन करेन, आणि तिथे त्यांना जागा पुरेशी होणार नाही.
11 ते संकटांच्या समुद्रातून प्रवास करतील; उफाळणाऱ्या लाटा शांत
केल्या जातील आणि नाईल नदीचे खोल पाणी शुष्क होईल. अश्शूरचा
गर्व खाली करण्यात येईल व इजिप्तचा राजदंड निघून जाईल. 12
मी याहवेहमध्ये त्यांना सामर्थ्यवान करेन आणि त्यांच्या नामामध्ये ते
सुरक्षितपणे जगतील," असे याहवेह जाहीर करतात.

11 हे लबानोना, आपल्या वेशी उघड, म्हणजे अग्नी तुझ्या गंधसरूच्या
वृक्षांना भस्म करेल! 2 अहो सनोवरच्या वृक्षांनो, गंधसरूच्या सर्व
नष्ट झालेल्या वृक्षांसाठी आकांत करा; डौलदार वृक्ष उद्ध्वस्त झाले
आहेत! बाशानातील एलावृक्षांनो, आकांत करा; घनदाट वने तोडून
टाकली जात आहेत! 3 मेंढपाळांचा आकांत ऐका; त्यांची सुपीक कुरणे
नष्ट झाली आहेत! सिंहाच्या गर्जना ऐका; यार्देनेच्या खोऱ्यातील गर्द
झाडी उद्ध्वस्त झाली आहे. 4 मग माझे परमेश्वर याहवेह असे म्हणाले:
"कत्तल करण्यासाठी राखीव मेंढरांचा मेंढपाळ हो. 5 त्यांचे ग्राहक त्यांची
कत्तल करतात आणि त्याबद्दल काहीही शिक्षा न होता निसटून जातात.
जे त्यांना विकतात, ते म्हणतात, 'याहवेहची उपकारस्तुती असो, मी
श्रीमंत आहे!' त्यांचे स्वतःचे मेंढपाळदेखील त्यांना दयामाया दाखवित
नाहीत. 6 या देशातील लोकांची मी देखील गय करणार नाही," असे
याहवेह जाहीर करतात. "मी प्रत्येकाला त्यांच्या शेजाऱ्याच्या व त्यांच्या
राजांच्या हाती देईन. ते देश उद्ध्वस्त करतील आणि मी त्यांच्यापासून
कोणालाही सोडविणार नाही." 7 तेव्हा मी कत्तल करण्यासाठी राखीव
मेंढरांचा, विशेषतः कळपात अत्याचार होत असलेल्या मेंढरांचा मेंढपाळ
झालो. मग मी मेंढपाळांच्या दोन काठ्या घेतल्या, एकीला मी कृपा व
दुसरीला ऐक्य असे नाव दिले आणि मेंढरांचे राखण केले. 8 आणि
एका महिन्यातच मी तीन मेंढपाळांना काढून टाकले. परंतु त्या मेंढरांना
माझी घृणा आली, त्यामुळे मी त्रागलो, 9 आणि मी म्हणालो, "मी
तुमचा मेंढपाळ राहणार नाही. जे मरत असतील, ते मरो आणि जे
नाश होत असतील, ते नाश पावोत. जे उरलेले आहेत, ते एकमेकांचे
मांस खावोत." 10 मग मी कृपा नावाची माझी काठी घेतली आणि ती
मोडली, सर्व राष्ट्रांशी मी केलेला करार रद्द केला. 11 त्या दिवशी तो
करार रद्द झाला, आणि माझ्याकडे पाहणाऱ्या अत्याचार होत असलेल्या
मेंढरांच्या कळपास कळले की हे याहवेहचे वचन होते. 12 मी म्हणालो,
"तुम्हाला योग्य वाटत असेल तर मला माझे वेतन द्या; पण तुम्हाला
वाटत नसेल तर देऊ नका." तेव्हा त्यांनी मला चांदीची तीस नाणी
दिली. 13 मग याहवेहने मला सांगितले, "ही नाणी कुंभारापुढे फेकून
दे," त्यांनी माझ्यासाठी किती भारी मोल ठरविले! मग मी ती चांदीची
तीस नाणी घेतली व ती याहवेहच्या भवनातील कुंभारापुढे फेकली. 14
मग मी माझी ऐक्य नावाची दुसरी काठी मोडली, यहूदीया व इस्राएल
यामधील कौटुंबिक ऐक्य भंग केले. 15 मग याहवेहने मला सांगितले,
"परत जाऊन मूर्ख मेंढपाळाची अवजारे घे. 16 मी या राष्ट्रास एका
अशा मेंढपाळाच्या हाती देईन, जो हरविलेल्या मेंढरांची काळजी घेणार
नाही, कोकरांकडे लक्ष देणार नाही, जखमी मेंढरांना औषध देणार नाही
किंवा सशक्त मेंढरांना चारा देणार नाही. त्याऐवजी तो पुष्ट मेंढरे खाऊन
टाकील व त्यांची खुरे विदारून त्याचे तुकडे करेल. 17 "धिक्कार असो
अशा कुचकामी मेंढपाळाला, जो कळपाला सोडून पळून जातो! तलवार
त्याचा हात कापून व उजवा डोळा फोडून टाको! त्याचा हात पूर्णपणे
निकामी होवो, आणि त्याचा उजवा डोळा पूर्णपणे अंध होवो!"

12 एक भविष्यवाणी: इस्राएलच्या बाबत याहवेहचे वचन. याहवेह,
ज्यांनी आकाश विस्तारले, पृथ्वीचा पाया घातला आणि मनुष्यांच्या
अंतर्यामी आत्मा घातला, ते जाहीर करतात: 2 "मी यरुशलेमला
प्याल्याप्रमाणे करेन, जो पिऊन सभोवतालची राष्ट्रे झोकांड्या खातील.
यहूदीया तसेच इस्राएलच्या सभोवती वेढा घातल्या जाईल. 3 त्या
दिवशी, पृथ्वीवरील सर्व राष्ट्रे एकत्र होतील, तेव्हा मी यरुशलेमला
हालविता न येणारा खडक करेन. जे तिला हालविण्याचा प्रयत्न
करतील, उलट ती राष्ट्रेच घायाळ होतील. 4 त्या दिवशी, मी प्रत्येक
घोड्याला भयचकित करेन व त्याच्या स्वारांची मति भ्रष्ट करेन. मी
यहूदीयाच्या लोकांवर लक्षपूर्वक नजर ठेवेन, पण इतर राष्ट्रांना आंधळे
करेन," असे याहवेह जाहीर करतात. 5 "मग यहूदाहची कुळे आपल्या
मनात म्हणतील, 'यरुशलेमचे लोक सामर्थ्यशाली आहेत, कारण
सर्वसमर्थ याहवेह त्यांचे परमेश्वर आहेत.' 6 "त्या दिवशी मी यहूदीयाच्या
कुळांना, लाकडाच्या ढिगाऱ्यातील आगटीसारखे, पेंढ्यांमध्ये टाकलेल्या
पेटत्या मशालीसारखे करेन; ती कुळे उजवीकडील व डावीकडील सर्व
शेजारील राष्ट्रांना जाळून भस्म करतील. यरुशलेम मात्र अचल अशी
राहील. 7 "याहवेह यहूदीयाच्या आवासाला प्रथम वाचवतील, जेणेकरून
दावीदाच्या घराण्याचा व यरुशलेमच्या रहिवाशांचा आदर यहूदीयापेक्षा
महान होणार नाही. 8 त्या दिवशी याहवेह यरुशलेमच्या रहिवाशांचे रक्षण
करतील, जेणेकरून त्यांच्यातील अत्यंत दुर्बलदेखील दावीद राजासारखे
होतील, महापराक्रमी ठरतील. आणि दावीदाचे राजघराणे परमेश्वरासारखे
होईल, त्यांच्या अग्रभागी चालणाऱ्या याहवेहच्या दूतासारखे होईल.
9 त्या दिवशी यरुशलेमवर हल्ला करणाऱ्या सर्व राष्ट्रांना मी नष्ट
करण्यास निघेन. 10 "मग मी दावीदाच्या घराण्यावर व यरुशलेमच्या
सर्व रहिवाशांवर कृपेचा आणि विनंतीचा आत्मा ओतेन आणि ज्याला
त्यांनी भोसकले त्या माझ्याकडे ते पाहतील आणि एकुलत्या एका
पुत्रासाठी करावा, तसा ते त्याच्यासाठी शोक करतील आणि प्रथम
पुत्रासाठी करावा, तसा ते त्याच्यासाठी विलाप करतील. 11 त्या दिवशी
यरुशलेमातील आकांत इतका मोठा असेल, जसा मगिद्दोच्या खोऱ्यात
ठार झालेल्या हदाद-रिम्मोनासाठी होता. 12 संपूर्ण इस्राएल राष्ट्र दुःखाने
आक्रंदन करेल, प्रत्येक गोत्र, ते स्वतः व त्यांच्या पत्नींसह: दावीदाच्या
घराण्याचे गोत्र व त्यांच्या पत्नी, नाथानाच्या घराण्याचे गोत्र व त्यांच्या
पत्नी, 13 लेवी घराण्याचे गोत्र व त्यांच्या पत्नी, शिमी घराण्याचे गोत्र व
त्यांच्या पत्नी, 14 आणि राहिलेले सर्व गोत्र व त्यांच्या पत्नी.

**13** “त्या दिवशी दावीदाच्या घराण्यातून आणि यरुशलेममधील
लोकांमधून एक झरा उगम पावेल, तो त्याच्या लोकांना सर्व
पापांपासून आणि अशुद्धतेपासून शुद्ध करेल. 2 “त्या दिवशी, मी संपूर्ण
देशातून मूर्तींच्या नावाचा समूळ उच्छेद करेन, ते त्यांच्या स्मरणातही
राहणार नाही. सर्व खोट्या संदेष्ट्यांचा आणि अशुद्धतेच्या आत्म्याचा मी
समूळ नाश करेन,” सर्वसमर्थ याहवेह जाहीर करतात. 3 “आणि जर
कोणी पुन्हा खोटे भविष्यकथन करू लागला, ज्यांनी त्याला जन्म दिला
ते त्याचे खुद्द आईवडीलच त्याला सांगतील, ‘तू मेलाच पाहिजे, कारण
तू याहवेहच्या नावाने खोटे बोलत आहेस.’ ते भविष्यकथन करणाऱ्यास
भोसकून जिवे मारतील! 4 “त्या दिवशी प्रत्येक खोटा संदेष्टा आपल्या
भविष्यकथनाच्या दानाबद्दल लज्जित होईल. ते संदेष्ट्यांसाठी केसांनी
बनविलेली विशिष्ट वस्त्रे घालणार नाहीत. 5 प्रत्येकजण म्हणेल, ‘मी
संदेष्टा नाही; मी एक शेतकरी आहे; तारुण्यापासून भूमीची मशागत
करणे माझ्या उपजीविकेचे साधन आहे.’ 6 त्याला कोणी विचारले,
‘तुझ्या छातीवर आणि पाठीवर हे घाव कशाचे आहेत?’ तेव्हा तो म्हणेल,
‘माझ्या मित्राच्या घरी या जखमा मला दिल्या आहेत!’ 7 “अगे तलवारी,
माझ्या मेंढपाळाविरुद्ध जागी हो, माझ्या घनिष्ठ सोबत्याविरुद्ध ऊठ!”
सर्वसमर्थ याहवेह म्हणतात, “मेंढपाळावर प्रहार कर, म्हणजे मेंढरांची
पांगापांग होईल, आणि मी माझा हात कोकरांविरुद्ध उगारेन.” 8 याहवेह
जाहीर करतात, “इस्राएलाच्या संपूर्ण राष्ट्रातील दोन तृतीयांश लोकांचा
उच्छेद होईल व ते मरण पावतील, परंतु एकतृतीयांश लोक देशात
उरतील. 9 हा तिसरा भाग अग्नीत घालून चांदी शुद्ध करतात तसा मी
शुद्ध करेन. आणि सोन्यासारखी त्यांची परीक्षा करेन. ते मला माझ्या
नावाने हाक मारतील आणि मी त्यांच्या हाकेला उत्तर देईन; मी म्हणेन,
‘ते माझे लोक आहेत,’ आणि ते म्हणतील, ‘याहवेह आमचे परमेश्वर
आहेत.’”

**14** याहवेहचा दिवस येत आहे, ज्या दिवशी तुमची संपत्ती लुटली
जाईल आणि तुमच्याच भिंतीच्या आत त्याची वाटणी केली
जाईल. 2 मी यरुशलेमविरुद्ध युद्ध करण्यास सर्व राष्ट्रांना एकत्र करेन;
नगर हस्तगत केले जाईल आणि घरे लुटली जातील, स्त्रियांवर बलात्कार
करण्यात येईल. नगरीतील अर्धे लोक बंदिवासात जातील, परंतु उरलेले
लोक नगरीतच राहतील. 3 मग याहवेह बाहेर पडून लढाईच्या दिवशी
करतात तसे, त्या राष्ट्रांशी युद्ध करतील. 4 त्या दिवशी त्यांचे पाय
यरुशलेमच्या पूर्वेस असलेल्या जैतुनाच्या पर्वतावर उभे राहतील आणि
जैतूनांचा पर्वत पूर्वपश्चिम दुभागून मध्ये एक मोठे खोरे निर्माण होईल,
अर्धा पर्वत उत्तरेकडे व अर्धा पर्वत दक्षिणेकडे सरेल. 5 तुम्ही माझ्या
खोऱ्यातून पळ काढाल, कारण ते खोरे आझल नगरीच्या वेशीपर्यंत
भिडेल. ज्याप्रमाणे अनेक शतकांपूर्वी तुमचे लोक, यहूदीयाचा राजा
उज्जीयाहच्या काळात भूकंप झाला होता तेव्हा निसटून गेले होते,
त्याचप्रमाणे तुम्हीही निसटून जाल आणि मग याहवेह, माझे परमेश्वर
येतील आणि त्यांच्याबरोबर त्यांचे सर्व पवित्रजनही येतील. 6 त्या
दिवशी सूर्यप्रकाश नसेल व थंड, धुक्याचा अंधकारही नसेल. 7 तो
एक अद्वितीय दिवस असेल—फक्त याहवेहलाच माहीत असलेला तो
दिवस असेल—दिवस व रात्रीत फरक राहणार नाही. संध्याकाळ झाली,
तरीही प्रकाश असेल. 8 त्या दिवशी जीवनजल यरुशलेमातून बाहेर
वाहील, त्यातील अर्धे पूर्व दिशेला मृत समुद्राकडे व अर्धे पश्चिम दिशेला
भूमध्यसमुद्राकडे वाहतील, उन्हाळ्यात व हिवाळ्यात ते निरंतर वाहत
राहतील. 9 तेव्हा याहवेह सर्व पृथ्वीचे राजा होतील. त्या दिवशी फक्त
एकच याहवेह असतील व केवळ त्यांच्याच नामाची उपासना होईल. 10
यहूदीयाच्या उत्तरेकडील सीमेपासून म्हणजे गेबापासून ते दक्षिणेकडील
सीमेपर्यंतची म्हणजे रिम्मोन पर्यंतची सर्व भूमी अराबासारखी शुष्क
होईल, परंतु यरुशलेम उंचावल्या जाईल, बिन्यामीनच्या वेशीपासून
पहिल्या वेशीपर्यंत व कोपऱ्याच्या वेशीपर्यंत आणि हनानेलाच्या
बुरुजापासून शाही द्राक्षकुंडांपर्यंत असेल व या स्थानावर ते अचल राहील.
11 तिच्यात लोकवस्ती होईल; पुन्हा कधीही तिचा नाश होणार नाही.
यरुशलेम सुरक्षित होईल. 12 जे लोक यरुशलेमविरुद्ध लढले, त्या सर्व
लोकांवर याहवेह ही मरी पाठवतील: स्वतःच्या पायावर उभे असतानाच
त्यांचे मांस सडत जाईल; त्यांचे डोळे त्यांच्या खाचेत सडतील, आणि
त्यांच्या जिभा त्यांच्या तोंडातच सडतील. 13 याहवेहकडून आलेल्या
भयंकर भीतीने त्यांना धडकी भरेल. त्यांची त्रेधा उडून ते एकमेकांवर
हल्ला करतील. 14 यहूदीयाही यरुशलेमात लढेल. शेजारच्या सर्व राष्ट्रांची
संपत्ती—सोने आणि रुपे व तलम कपडे यांचे मोठमोठे साठे जप्त केले
जातील. 15 अशीच मरी घोडे, खेचरे, उंट, गाढवे यावर आणि शत्रूच्या
ठाण्यातील इतर सर्व प्राण्यांवर पसरेल. 16 मग ज्यांनी यरुशलेमवर
आक्रमण केले त्या सर्व राष्ट्रातून वाचलेले अवशिष्ट लोक प्रत्येक वर्षी वर
यरुशलेमला राजाधिराज सर्वसमर्थ याहवेहची भक्ती करण्यास, मंडपाचा
सण पाळण्यास व आराधना करण्यास जातील. 17 आणि या संपूर्ण
जगातील एखाद्या राष्ट्रातील लोकांनी यरुशलेमला येण्याचे व राजाधिराज
सर्वसमर्थ याहवेहची आराधना करण्याचे नाकारले, तर त्यावर पर्जन्यवृष्टी
होणार नाही. 18 जर इजिप्तच्या लोकांनी येण्याचे नाकारले तर त्यांना
पर्जन्यवृष्टी मिळणार नाही. याहवेह त्यांच्यावर मरी पाठवतील, जे
मंडपाचा सण पाळण्यास यरुशलेमला येण्याचे नाकारतात. 19 म्हणून
इजिप्त व इतर राष्ट्रे जे मंडपाचा सण पाळण्यास यरुशलेमला येण्याचे
नाकारतील, त्या सर्वांना ही शिक्षा करण्यात येईल. 20 त्या दिवशी
घोड्यांच्या गळ्यात घातलेल्या घंटावर “याहवेहसाठी पवित्र” असे
लिहिलेले असेल आणि याहवेहच्या भवनातील सर्व स्वयंपाकाची भांडी
वेदीपुढे ठेवावयाच्या पवित्र कटोऱ्यांसारखी होतील. 21 यरुशलेम व
यहूदीयातील प्रत्येक पातेले सर्वसमर्थ याहवेहला पवित्र वाटेल; आराधना
करण्यासाठी येणारे लोक त्यातील पात्र घेऊन व त्यात त्यांची अर्पणे
शिजवतील. यापुढे सर्वसमर्थ याहवेहच्या भवनात कोणीही कनानी
नसतील.

# मलाखी

**1** एक भविष्यवाणी: संदेष्टा मलाखी द्वारे याहवेहने इस्राएलला दिलेले
वचन. 2 याहवेह म्हणतात, “मी तुमच्यावर नितांत प्रेम केले आहे.”
पण यावर तुम्ही विचारता, “हे प्रेम तुम्ही कसे केले?” याहवेह जाहीर
करतात, “एसाव याकोबाचा सख्खा भाऊ नव्हता काय? तरी देखील मी
याकोबावर प्रीती केली. 3 परंतु मी एसावाचा द्वेष केला आणि त्याचा
डोंगराळ प्रदेश टाकाऊ भूमी केला व त्याचे वतन रानातील कोल्ह्यांकरिता
सोडले.” 4 एसावाचा वंशज, एदोमाने म्हटले, “जरी आम्ही चिरडले
गेलो आहोत तरी देखील, भग्न झालेली स्थळे आम्ही पुन्हा बांधू.” परंतु
सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात: “ते बांधतील, पण मी ते उद्ध्वस्त
करेन, कारण त्या देशाचे नाव दुष्टाईचा देश आणि त्या लोकांवर नेहमीच
याहवेहचा कोप राहील. 5 तू स्वतःच्या डोळ्याने बघशील व म्हणशील,
‘इस्राएलच्या सीमेपलीकडे देखील याहवेह महान आहेत!’ 6 “पुत्र
आपल्या पित्याचा आदर करतो, नोकर आपल्या धन्याचा आदर करतो.
जर मी तुमचा पिता आहे, तर मला दिला जाणारा योग्य आदर कुठे आहे?
मी जर धनी आहे, तर मला दिला जाणारा योग्य आदर कुठे आहे?”
सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात. “ते तुम्ही याजक आहात, जे माझ्या
नामाचा अनादर करतात. “पण तुम्ही विचारता, ‘आम्ही तुमच्या नामाचा
अनादर कसा केला?’ 7 “तुम्ही माझ्या वेदीवर भ्रष्ट अर्पणे आणता तेव्हा.
“परंतु तुम्ही विचारता, ‘आम्ही तुम्हाला कसे अमंगळ केले?’ “याहवेहचा
मेज तुच्छ आहे असे तुमच्या म्हणण्याने. 8 जेव्हा तुम्ही वेदीवर आंधळे
पशू अर्पण करता, हे चुकीचे नाही काय? जेव्हा तुम्ही वेदीवर लंगडे वा
रोगट पशू अर्पण करता, हे चुकीचे नाही काय? हे अर्पण तुम्ही आपल्या
राज्यपालांना करून पाहा! ते तुमच्यावर प्रसन्न होतील का? ते तुमचा
स्वीकार करतील का?” सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात. 9 “मग तुम्ही
विनंती करता, परमेश्वरा आम्हावर दया करा. पण अशा प्रकारची अर्पणे
हातात घेऊन येता, तर ते तुमचा स्वीकार करतील का?” सर्वसमर्थ
याहवेह असे म्हणतात. 10 “अहा, तुमच्यापैकी कोणीतरी मंदिराची दारे
बंद करावी, म्हणजे तुम्ही माझ्या वेदीवर निरर्थक धूप जाळणार नाही!
मी तुमच्यावर मुळीच प्रसन्न नाही, आणि तुमच्या हातातील अर्पणांचा
स्वीकार करणार नाही.” सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात. 11 “जिथून
सूर्य उगवतो व जिथे तो मावळतो तिथपर्यंतच्या सर्व राष्ट्रांमध्ये माझे नाम
महान केले जाईल. प्रत्येक ठिकाणी माझ्या सन्मानार्थ सुवासिक धूप
जाळण्यात येईल व शुद्ध अर्पणे वाहण्यात येतील, कारण माझे नाम सर्व
राष्ट्रांमध्ये थोर होईल,” सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात. 12 “‘प्रभूचा
मेज अशुद्ध आहे’ व ‘त्यावरील अन्न तुच्छ आहे,’ असे सांगून तुम्ही
माझे नाम अपवित्र करता. 13 ‘किती हे ओझे आहे!’ असे म्हणून तुम्ही
त्याकडे घृणेने नाक मुरडता,” सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात. “जेव्हा
तुम्ही जखमी, लंगडे आणि आजारी पशू आणता व ते अर्पणे म्हणून
वाहता, मी ते तुमच्या हातून स्वीकारावे काय?” याहवेह असे म्हणतात.
14 “प्रभूला आपल्या कळपातील एखादा धष्टपुष्ट मेंढा असूनही व त्याचे
अर्पण करण्याचे वचन देऊन, जो आजारी असलेला मेंढा अर्पण करतो,
तो लबाड शापित असो. कारण मी परमथोर राजा आहे आणि माझे नाव
सर्व देशांमध्ये अत्यंत भयनीय आहे.” सर्वसमर्थ याहवेह असे म्हणतात.

**2** “आणि आता, अहो याजकांनो ऐका, हा सावधानतेचा इशारा
तुमच्याकरिता आहे. 2 जर तुम्ही ऐकले नाही आणि माझ्या नावाचे
गौरव करण्याचा निश्चय केला नाही, तर मी तुम्हावर शाप पाठवेन आणि
तुमच्या आशीर्वादास शाप देईन. होय, मी ते आधीच शापित केले आहेत,
कारण तुम्ही माझ्या नावाचे गौरव करण्याचा निश्चय केला नाही,” असे
सर्वसमर्थ याहवेह म्हणतात. 3 “हे लक्षात ठेवा की मी तुमच्या मुलांना
धमकावेन आणि तुम्ही मला सणासाठी अर्पण म्हणून आणलेल्या पशूंची
विष्ठा मी तुमच्या मुखांना फाशीन आणि तुम्हाला तसेच जाऊ देईन. 4
आणि मग तुम्हाला समजेल की मी तुम्हाला हा सावधानतेचा इशारा
दिला आहे, जेणेकरून लेवी वंशाशी माझा करार कायम राहील,” असे
सर्वसमर्थ याहवेह म्हणतात. 5 “माझा करार लेवी वंशाशी होता, जीवन
आणि शांतीचा करार आणि मी हे सर्व त्याला दिले; हे प्राप्त व्हावे
म्हणून आदर करण्याची गरज होती आणि त्याने मला आदर दिला व
माझ्या नामाचे भय बाळगले. 6 सत्याचे शिक्षण त्याच्या मुखात होते व
त्याच्या जिभेवर काहीही असत्य असे नव्हते. तो माझ्यासह शांती व
नीतिमत्तेत चालला आणि त्याने अनेकांना त्यांच्या पापी जीवनापासून
वळविले. 7 “याजकांच्या ओठात याहवेहसंबंधीचे ज्ञान साठविलेले
असावे, कारण तो सर्वसमर्थ याहवेहचा संदेष्टा आहे आणि लोक त्याच्या
मुखाद्वारे शिकवण शोधतात. 8 पण तुम्ही पथभ्रष्ट झाला आहात व
तुमच्या शिक्षणामुळे अनेकजण अडखळून पडले आहेत; तुम्ही लेव्याचा
करार विपरीत केला आहे,” असे सर्वसमर्थ याहवेह म्हणतात. 9 “म्हणून
सर्व लोकांच्या दृष्टीने मी तुम्हाला तिरस्करणीय व तुच्छ केले आहे;
कारण तुम्ही स्वत: माझे मार्ग अनुसरले नाहीतच, पण कायद्याबाबत
तुम्ही पक्षपात केला.” 10 आपण सर्व एकाच पित्याची मुले नाही का?
आपल्याला एकाच परमेश्वराने निर्माण केले नाही का? मग आपण
एकमेकांचा विश्वासघात करून आपल्या पूर्वजांचा करार का मोडतो?
11 यहूदाहने विश्वासघात केला. इस्राएल आणि यरुशलेम येथे अत्यंत
घृणास्पद कार्य केले आहे: यहूदीयाच्या पुरुषांनी याहवेहचे प्रिय मंदिर
परकीय मूर्तिपूजक स्त्रियांशी विवाह करून भ्रष्ट केले आहे. 12 ज्याने
अशी गोष्ट केली आहे, मग तो कोणीही असो, तो सर्वसमर्थ याहवेहस
अर्पणे वाहत असेल तरीही याहवेह त्याला याकोबाच्या तंबूमधून काढून
टाको. 13 दुसरी गोष्ट तुम्ही ही करता: तुम्ही याहवेहच्या वेदीवर अश्रूंचा
पूर वाहता. तुम्ही रडता व आक्रोश करता, कारण ते तुमच्या हातातील
अर्पणांवर कृपादृष्टी टाकत नाहीत व प्रसन्नतेने त्यांचा स्वीकार करीत
नाहीत. 14 तुम्ही विचारता, “का?” कारण याहवेह तुम्ही व तुमच्या
तारुण्यातील पत्नी मधील साक्षीदार आहेत. ती तुमची सहचारिणी
आहे व तुमच्या वैवाहिक कराराद्वारे तुमची पत्नी आहे, तरीही तुम्ही
तिचा विश्वासघात केला. 15 तुम्हाला एकाच परमेश्वराने निर्माण केले
नाही का? तुमचे शरीर व आत्मा त्यांचाच मालकीचे आहे. आणि एका

परमेश्वरास काय हवे असते? धार्मिक संतती. म्हणून सावध राहा,
आपल्या तारुण्यातील पत्नीचा विश्वासघात करू नका. 16 याहवेह
इस्राएलाचे परमेश्वर म्हणतात, “जिला संरक्षण देणे हे त्याचे कर्तव्य
आहे, तिच्याविरुद्ध तो हिंसाचार करतो, तिचा तो तिरस्कार करतो व
तिला घटस्फोट देतो.” म्हणून सावध राहा व विश्वासघात करू नका.
17 तुम्ही आपल्या शब्दांनी याहवेहला त्रागा आणला आहे. पण तुम्ही
विचारता, “आम्ही याहवेहला त्रागा कसा आणला?” असे म्हणूनच,
“जे सर्व लोक दुष्टता करतात, ते याहवेहच्या दृष्टीने चांगले आहेत व ते
त्यांच्यावर प्रसन्न आहेत, मग न्यायी परमेश्वर कुठे आहेत?”

3 “मी माझा संदेष्टा पाठवेन, जो माझ्यापुढे मार्ग तयार करेल. मग
ज्यांची तुम्ही वाट पाहत आहात, ते प्रभू अकस्मात त्यांच्या मंदिरात
येतील; ते कराराचे संदेशवाहक, ज्यांची तुम्ही फार आतुरतेने इच्छा
करीत आहात ते येतील,” असे सर्वसमर्थ याहवेह म्हणतात. 2 पण
त्यांच्या येण्याचा दिवस कोण सहन करू शकेल? त्यांच्या आगमनास
कोण सामोरा जाऊ शकेल? कारण तो मौल्यवान धातू शुद्ध करणार्‍या
धगधगत्या अग्नीसारखा आहे आणि मलीन वस्त्रे धुणार्‍या साबणासारखा
असेल. 3 रुपे शुद्ध करणार्‍यासारखा तो बसेल; तो लेवींना सोने व
रुप्याप्रमाणे शुद्ध करेल. मग याहवेहकडे नीतिमत्तेने अर्पणे वाहणारे
पुरुष असतील, 4 मग पूर्वीच्या दिवसाप्रमाणे आणि गतवर्षासारखे पुन्हा
एकदा यहूदीया व यरुशलेम येथील लोकांनी आणलेली अर्पणे याहवेहस
मान्य होतील. 5 “त्यावेळी मी येईन आणि तुमची पारख करून न्याय
करेन. जादूटोणा करणारे, व्यभिचारी व खोटी साक्ष देणारे, आपल्या
मजुरांना लुबाडणारे, विधवा व अनाथांवर जुलूम करणारे, परकियांना
न्यायापासून वंचित करणारे, पण माझे भय न बाळगणारे, अशा सर्व
दुष्ट लोकांविरुद्ध मी त्वरित कारवाई करेन,” असे सर्वसमर्थ याहवेह
म्हणतात. 6 “मी याहवेह बदलत नाहीत. म्हणून तुम्ही, याकोबाचे
वंशज नष्ट झाला नाहीत. 7 तुमच्या पूर्वजांच्या काळापासून तुम्ही
माझ्या विधिनियमापासून दूर जात आहात व त्यांचे पालन करीत नाही.
माझ्याकडे पुन्हा या व मी तुमच्याकडे परत येईन,” असे सर्वसमर्थ
याहवेह म्हणतात. “पण तुम्ही विचारता, ‘आम्ही तुमच्याकडे परत
कसे यावे?’ 8 “एखादा मर्त्यमनुष्य परमेश्वराला लुबाडू शकेल काय?
तरीही तुम्ही मला लुबाडले आहे. “पण तुम्ही विचारता, ‘आम्ही तुम्हाला
कसे लुबाडत आहोत?’ “दशांश आणि अर्पणात. 9 तुमच्यावर शाप
आहे—तुमचे संपूर्ण राष्ट्र—तुम्ही मला लुबाडीत आहात. 10 तुमचा
सर्व दशांश मंदिराच्या भांडारात आणा म्हणजे माझ्या भवनात पुरेसे
अन्न राहील. याबाबत तुम्ही माझी परीक्षा घ्या,” सर्वसमर्थ याहवेह
म्हणतात. “आणि बघा तुमच्यासाठी मी स्वर्गाची धरणद्वारे उघडेन
आणि तुमच्यावर आशीर्वादाचा एवढा वर्षाव करेन की ते साठविण्यास
तुमच्याजवळ पुरेशी जागाही असणार नाही. 11 कीटकांना तुमची
पिके नाश करण्यापासून मी रोखेन आणि तुमच्या मळयातील द्राक्षे
पिकण्यापूर्वी गळणार नाहीत,” असे सर्वसमर्थ याहवेह म्हणतात. 12
“सर्व राष्ट्रे तुम्हाला धन्य म्हणतील, कारण तुमची भूमी आनंददायी
असेल.” असे सर्वसमर्थ याहवेह म्हणतात. 13 याहवेह म्हणतात, “तुम्ही
माझ्याविरुद्ध उर्मटपणे बोलता.” “तरी तुम्ही विचारता, ‘तुमच्याविरुद्ध
आम्ही काय बोललो?’ 14 “तुम्ही असे म्हणाला, ‘परमेश्वराची सेवा करणे
व्यर्थ आहे. त्यांचे सर्व विधिनियम पाळण्याने किंवा सर्वसमर्थ याहवेहपुढे
शोक करणार्‍यासारखे जाण्याने आम्हाला काय मिळते? 15 पण आता,
आपण जे उद्धट ते धन्य असे म्हणू. कारण दुष्टाई करणार्‍यांची निश्चितच
भरभराट होते आणि ते परमेश्वराची परीक्षा पाहतात, तरी ते निर्दोष
ठरतात.’” 16 मग याहवेहचे भय बाळगणार्‍यांनी एकमेकांशी चर्चा केली
आणि याहवेहने ती लक्षपूर्वक ऐकली. नंतर याहवेहच्या समक्ष, एका
चर्मपत्राच्या गुंडाळीवर याहवेहचे भय बाळगणारे व त्यांच्या नावाचा
सन्मान करणारे यांच्यासंबंधीची स्मरण पुस्तिका लिहिण्यात आली. 17
सर्वसमर्थ याहवेह म्हणतात, “त्या दिवशी मी कृती करेन, ते लोक माझी
मौल्यवान संपत्ती होतील; आणि ज्याप्रमाणे एखादा पिता आपली सेवा
करणार्‍या पुत्राची गय करतो, त्याप्रमाणे मी त्यांची गय करेन. 18 मग
नीतिमान व दुष्ट माणसे, त्याचप्रमाणे परमेश्वराची सेवा करणारे व सेवा
न करणारे यातील फरक तुम्हाला दिसून येईल.”

4 सर्वसमर्थ याहवेह म्हणतात, “निश्चितच तो दिवस येत आहे, जो
धगधगत्या भट्टीसारखा ज्वलंत असेल. त्या भट्टीत गर्विष्ठ आणि
दुष्ट लोक गवताच्या काडीप्रमाणे जळून जातील. तो दिवस येत आहे,
जो त्यांना अग्नीत भस्मसात करेल. त्यांचे एकही मूळ अथवा फांदी
त्यावर उरणार नाही. 2 परंतु तुम्ही जे माझे नाव सन्माननीय मानता, त्या
तुम्हासाठी नीतिमत्वाचा सूर्य उगवेल आणि त्याच्या किरणात आरोग्य
असेल. मग तुम्ही बाहेर जाल व धष्टपुष्ट वासरांप्रमाणे बागडाल. 3 जेव्हा
मी कार्य करेन, त्या दिवशी तुम्ही दुष्ट लोकांना तुडवाल, ते तुमच्या
पायाखालच्या राखेप्रमाणे होतील,” असे सर्वसमर्थ याहवेह म्हणतात. 4
“होरेब पर्वतावर माझा सेवक मोशेमार्फत सर्व इस्राएली लोकांसाठी मी
जे नियमशास्त्र दिले त्याची आठवण ठेवा. 5 “पाहा! याहवेहचा तो महान
व भयंकर दिवस येण्यापूर्वी, मी तुमच्याकडे संदेष्टा एलीयाहला पाठवेन.
6 तो पालकांचे अंत:करण त्यांच्या मुलांकडे व मुलांचे अंत:करण त्यांच्या
पालकांकडे करेल; अन्यथा मी फटकारून त्यांच्या देशाचा संपूर्ण नाश
करेन.”

# नवा करार




तेव्हा येशू म्हणाले, “हे पित्या, यांना क्षमा कर, कारण ते काय करीत आहेत, ते त्यांना समजत नाही.”
आणि येशूंची वस्त्रे सैनिकांनी चिठ्या टाकून वाटून घेतली.
लूक 23:34

# मत्तय

**1** अब्राहामाचा पुत्र दावीदाचा पुत्र, येशू ख्रिस्ताची ही वंशावळी: 2
अब्राहाम इसहाकाचा पिता होता, इसहाक याकोबाचा पिता, याकोब
यहूदाह व त्याच्या भावांचा पिता होता, 3 यहूदाह पेरेस व जेरहचा पिता,
त्यांची आई तामार होती. पेरेस हेस्रोनचा पिता, हेस्रोन अरामचा पिता, 4
अराम अम्मीनादाबाचा पिता, अम्मीनादाब नहशोनाचा पिता, नहशोन
हा सल्मोनाचा पिता, 5 सल्मोन बवाजाचा पिता व त्याची आई राहाब
होती, बवाज ओबेदाचा पिता, ओबेदची आई रूथ होती, ओबेद इशायाचा
पिता, 6 इशाय दावीद राजाचा पिता, दावीद शलोमोनाचा पिता,
शलोमोनाची आई पूर्वी उरीयाहची पत्नी होती, 7 शलोमोन रहबामाचा
पिता, रहबाम अबीयाचा पिता, अबीया आसाचा पिता, 8 आसा
यहोशाफाटाचा पिता, यहोशाफाट योरामाचा पिता, योराम उज्जीयाहचा
पिता, 9 उज्जीयाह योथामाचा पिता, योथाम आहाजाचा पिता, आहाज
हिज्कीयाचा पिता, 10 हिज्कीयाह मनश्शेहचा पिता, मनश्शेह आमोनाचा
पिता, आमोन योशीयाहचा, 11 योशीयाह यखन्या व त्यांच्या भावांचा
पिता होता, हे बाबेलमध्ये हद्दपार केले तेव्हा झाले. 12 बाबेलमध्ये हद्दपार
झाल्यावर: यखन्या शल्तीएलचा पिता, शल्तीएल जरूब्बाबेलाचे पिता,
13 जरूब्बाबेल अबीहूदचा पिता, अबीहूद एल्याकीमचा पिता, एल्याकीम
अज्जूरचा पिता, 14 अज्जूर सादोकाचा पिता, सादोक याखीमचा पिता,
याखीम एलीहूदाचा पिता, 15 एलीहूद एलअज़ाराचा पिता, एलअज़ार
मत्तानाचा पिता, मत्तान याकोबाचा पिता, 16 याकोब योसेफाचा पिता,
योसेफ मरीयेचा पती होता; मरीया, ज्यांना ख्रिस्त म्हणत त्या येशूची
आई होती. 17 अब्राहामापासून दावीदापर्यंत सर्व मिळून चौदा पिढ्या,
दावीदापासून बाबेलच्या बंदिवासापर्यंत चौदा पिढ्या, बंदिवासापासून
ख्रिस्तापर्यंत चौदा पिढ्या. 18 येशू ख्रिस्ताचा जन्म अशाप्रकारे झाला:
त्यांची आई मरीयाचा विवाह योसेफाबरोबर ठरला होता. परंतु ते दोघे
एकत्र येण्यापूर्वीच, मरीया पवित्र आत्म्याद्वारे गर्भवती आहे असे आढळून
आले. 19 तिचा पती योसेफ हा नीतिमान होता, आणि समाजात तिला
लज्जित करू नये म्हणून त्याने तिला गुप्तपणे घटस्फोट देण्याचे मनात
ठरविले. 20 परंतु हे त्याने ठरविल्यानंतर, प्रभूचा एक दूत त्याला स्वप्नात
प्रकट झाला आणि म्हणाला, “दावीदाच्या पुत्रा योसेफा, आपली पत्नी
म्हणून मरीयेला घरी नेण्यास भिऊ नकोस, कारण तिच्या गर्भामध्ये जो
आहे तो पवित्र आत्म्याकडून आहे. 21 ती पुत्राला जन्म देईल आणि तू
त्याचे नाव येशू ठेव, कारण तेच आपल्या लोकांचे त्यांच्या पापांपासून
तारण करतील.” 22 प्रभूने आपल्या संदेष्ट्यांच्याद्वारे जे सांगितले होते
ते पूर्ण व्हावे म्हणून हे सर्व घडून आले. 23 “कुमारी गर्भवती होईल
आणि ती एक पुत्र प्रसवेल आणि त्याला इम्मानुएल हे नाव देतील”
(इम्मानुएलचा अर्थ “परमेश्वर आम्हाबरोबर”). 24 योसेफाने जागा
झाल्यावर, प्रभूच्या दूताने दिलेल्या आज्ञेप्रमाणे केले आणि मरीयेला
त्याची पत्नी म्हणून घरी आणले. 25 तरीपण तिच्या पुत्राचा जन्म
होईपर्यंत त्याने तिच्याशी शरीर संबंध ठेवला नाही. योसेफाने पुत्राचे नाव
येशू ठेवले.

**2** येशूंचा जन्म हेरोद राजाच्या कारकिर्दीत, यहूदीया प्रांतातील बेथलेहेम
नावाच्या गावी झाल्यानंतर, पूर्वेकडून खगोलशास्त्रज्ञ यरुशलेमात
आले. 2 ते विचारू लागले, “ज्यांचा जन्म झाला आहे ते यहूद्यांचे राजे कुठे
आहेत? आम्ही त्यांचा तारा पाहिला आणि त्यांची उपासना करावयास
आलो आहोत.” 3 हेरोद राजाने हे ऐकले तेव्हा तो अस्वस्थ झाला
आणि त्याच्याबरोबरच सर्व यरुशलेमही अस्वस्थ झाले. 4 हेरोदाने सर्व
यहूदी लोकांचे महायाजक व नियमशास्त्र शिक्षकांना एकत्र बोलाविले
आणि विचारले, “ख्रिस्ताचा जन्म कुठे व्हावा?” 5 “यहूदीयातील
बेथलेहेमात,” त्यांनी उत्तर दिले, “कारण संदेष्ट्याने असे लिहिले आहे:
6 “‘परंतु तू यहूदीया प्रांतातील बेथलेहेमा, यहूदीयांच्या शासकांमध्ये तू
कोणत्याही प्रकारे कमी नाही, तुझ्यातून एक शासक उदय पावेल, तो
माझ्या इस्राएली लोकांचा मेंढपाळ होईल.’” 7 मग हेरोदाने त्या खगोल
शास्त्रज्ञांना खासगी निरोप पाठवून बोलावून घेतले आणि तारा नक्की
कोणत्या वेळी प्रकट झाला याची माहिती मिळविली. 8 मग हेरोदाने
त्यांना बेथलेहेमात पाठविले आणि म्हणाला, “जा आणि त्या बालकाचा
बारकाईने शोध करा; तो सापडल्यावर, इकडे परत या आणि मला
सांगा, म्हणजे मी सुद्धा जाऊन त्यांची उपासना करेन.” 9 राजाचे सर्व
बोलणे ऐकल्यानंतर ते शास्त्रज्ञ पुढे निघाले, जो तारा त्यांनी पाहिला
होता, तो तारा बालक जिथे होता, तिथे येईपर्यंत त्यांच्यापुढे चालला. 10
तो तारा पाहून त्यांना फार आनंद झाला. 11 ज्या घरात बालक व त्याची
आई मरीया होती, तिथे ते गेले आणि त्यांनी दंडवत घालून त्याला नमन
केले. नंतर त्यांनी आपले नजराणे उघडले आणि बालकाला सोने, ऊद
व गंधरस हे अर्पण केले. 12 पण स्वप्नाद्वारे हेरोदाकडे न जाण्याची
सूचना मिळाल्यामुळे ते दुसऱ्या रस्त्याने त्यांच्या देशी परत गेले. 13 ते
गेल्यानंतर, प्रभूचा एक दूताने योसेफाला स्वप्नात दर्शन देऊन म्हटले,
“ऊठ! बालकाला आणि त्याच्या आईला घेऊन इजिप्त देशात पळून जा
आणि मी तुला सांगेपर्यंत तिथेच राहा, कारण हेरोद बालकाचा शोध
करून ठार मारण्याचा कट करीत आहे.” 14 तेव्हा तो उठला, त्याच रात्री
योसेफ बालकाला आणि मरीयेला घेऊन इजिप्त देशात निघून गेला.
15 हेरोद राजाचा मृत्यू होईपर्यंत तो तिथेच राहिला आणि अशाप्रकारे,
“मी इजिप्तमधून माझ्या पुत्राला बोलाविले!” असे जे प्रभूने आपल्या
संदेष्ट्यांच्याद्वारे सांगितले होते, ते भविष्य पूर्ण झाले. 16 शास्त्रज्ञांनी
आपल्याला फसविले, हे पाहून हेरोद राजा संतापला आणि शास्त्रज्ञांनी
दिलेल्या वेळेनुसार बेथलेहेम आणि आसपासच्या प्रदेशात दोन वर्षे
किंवा कमी वय असलेल्या प्रत्येक मुलाला ठार करण्याचा त्याने हुकूम
केला. 17 संदेष्टा यिर्मयाह याच्याद्वारे जे सांगितले होते, ती भविष्यवाणी
खरी ठरली ती अशी: 18 “रामाह मधून आवाज ऐकू येत आहे, आकांत
आणि घोर शोक, राहेल आपल्या लेकरांसाठी रडत आहे. ती सांत्वन
पावण्यास नकार देते, कारण ते आता राहिले नाहीत.” 19 हेरोद मरण
पावल्यानंतर, प्रभूच्या दूताने योसेफाला इजिप्तमध्ये पुन्हा स्वप्नात

दर्शन दिले, 20 आणि सांगितले, “ऊठ, बालक व त्याच्या आईला घेऊन
इस्राएल देशात परत जा, कारण बालकाचा जीव घेण्यास जे पाहत होते,
ते मरण पावले आहेत.” 21 त्याप्रमाणे तो उठला, बालक व त्याच्या
आईला घेऊन इस्राएल देशामध्ये परतला. 22 परंतु यहूदीया प्रांतात
हेरोदा ऐवजी त्याचा पुत्र अर्खेलाव राज्य करीत आहे हे त्याला समजले,
तेव्हा तिकडे जाण्यास त्याला भीती वाटली. मग स्वप्नात त्यांना अशी
सूचना मिळाली म्हणून तिकडे न जाता तो गालील प्रांतात गेला. 23
आणि ते नासरेथ या गावात राहिले. संदेष्ट्यांनी केलेले भविष्य पूर्ण
झाले ते असे: “त्यांना नासरेथकर म्हणतील.”

**3** त्याच दिवसात, बाप्तिस्मा करणारा योहान आला व यहूदीयाच्या
अरण्यात गेला व लोकांना संदेश देऊ लागला, 2 व म्हणाला,
“पश्चात्ताप करा, कारण स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे.” 3 तो हाच
आहे ज्याच्याबद्दल संदेष्टा यशायाह बोलला होता: “अरण्यात घोषणा
करणाऱ्या एकाची वाणी झाली, ‘प्रभूसाठी मार्ग तयार करा, त्यांच्यासाठी
मार्ग सरळ करा.’” 4 योहानाचा पोशाख उंटाच्या केसांपासून तयार
केलेला आणि त्याच्या कंबरेला चामड्याचा पट्टा बांधलेला होता. त्याचे
भोजन टोळ आणि रानमध होते. 5 यरुशलेम, सर्व यहूदीया आणि
यार्देन प्रांतातील प्रत्येक भागातून लोक त्यांच्याकडे आले. 6 त्यांनी
पापे कबूल केल्यानंतर यार्देन नदीमध्ये योहानाकडून त्यांचा बाप्तिस्मा
केला जात असे. 7 परंतु पुष्कळ परूशी व सदूकी लोक त्यांच्याकडे
बाप्तिस्मा घेण्याच्या विचाराने येऊ लागले, तेव्हा तो त्यांना म्हणाला,
“अहो सापांच्या पिलांनो, येणाऱ्या क्रोधापासून पळून जाण्यास तुम्हाला
कोणी सावध केले? 8 जा, पश्चात्तापाला साजेल अशी फळे द्या. 9
आमचा पिता तर अब्राहाम आहे असे आपल्या मनात म्हणू नका.
कारण मी तुम्हाला सांगतो की, परमेश्वर या दगडांपासून देखील
अब्राहामासाठी संतती निर्माण करण्यास समर्थ आहे. 10 कुऱ्हाड
झाडांच्या मुळावर आधी ठेवलेली आहे, आणि प्रत्येक झाड जे चांगले
फळ देत नाही ते तोडले जाईल आणि अग्नीत टाकण्यात येईल.” 11
योहान म्हणाला, “पश्चात्तापासाठी मी तुमचा पाण्याने बाप्तिस्मा करतो,
परंतु ज्यांची पादत्राणे वाहण्यासही माझी पात्रता नाही, जे माझ्यापेक्षा
फार सामर्थ्यवान आहेत, असे दुसरे कोणीतरी येत आहे. ते तुमचा
बाप्तिस्मा पवित्र आत्म्याने आणि अग्नीने करतील. 12 खळे स्वच्छ
करण्यास त्यांच्या हातात धान्य पाखडण्याचे सूप आहे, ते गहू कोठारात
साठवतील आणि न विझणाऱ्या अग्नीमध्ये भुसा जाळून टाकतील.” 13
तेव्हा योहानाकडून बाप्तिस्मा घ्यावा यासाठी येशू गालील प्रांतामधून
यार्देन नदीवर आले. 14 पण योहान त्यांना नकार देत म्हणाला,
“वास्तविक मीच तुमच्या हातून बाप्तिस्मा घेतला पाहिजे, मग तुम्ही
माझ्याकडे बाप्तिस्मा घेण्यास का आलात?” 15 येशू त्याला म्हणाले,
“आता असेच होऊ दे, कारण सर्व नीतिमत्व अशाप्रकारे पूर्ण करणे
आपल्याला योग्य आहे.” तेव्हा योहानाने त्यांचा बाप्तिस्मा केला. 16
येशूंचा बाप्तिस्मा झाल्याबरोबर ते पाण्यातून वर आले. त्याक्षणीच स्वर्ग
उघडला आणि त्यांनी परमेश्वराचा आत्मा कबुतरासारखा आपल्यावर
उतरतांना आणि स्थिरावताना पाहिला; 17 आणि स्वर्गातून वाणी झाली,
“हा माझा प्रिय पुत्र; त्याच्यावर मी संतुष्ट आहे.”

**4** मग सैतानाकडून येशूंची परीक्षा व्हावी म्हणून पवित्र आत्म्याने
त्यांना अरण्यात नेले. 2 चाळीस दिवस व चाळीस रात्र त्यांनी
उपवास केला, तेव्हा त्यांना भूक लागली. 3 मग परीक्षक येशूंकडे
आला व म्हणाला, “तू परमेश्वराचा पुत्र असशील तर या दगडांना
भाकरीत रूपांतर होण्यास सांग.” 4 तेव्हा येशूंनी उत्तर दिले, “‘मनुष्य
केवळ भाकरीने नव्हे, तर परमेश्वराच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक
वचनाने जगेल’ असे लिहिले आहे.” 5 मग सैतानाने पवित्र नगरीतील
मंदिराच्या सर्वात उंच टोकावर त्यांना उभे केले. 6 तो म्हणाला, “तू
परमेश्वराचा पुत्र आहेस, तर खाली उडी टाक, कारण असे लिहिले
आहे: “तो आपल्या देवदूतांना तुझ्यासंबंधाने आज्ञा देईल, आणि तुझ्या
पायाला दगडाची ठेच लागू नये म्हणून ते तुला आपल्या हातांवर उचलून
धरतील.” 7 तेव्हा येशूंनी प्रत्युत्तर दिले, “असेही लिहिले आहे: ‘प्रभू
तुमच्या परमेश्वराची परीक्षा पाहू नका.’” 8 मग सैतानाने येशूंना एका
उंच पर्वतावर नेले. तिथून त्याने त्यांना जगातील सर्व राज्ये व त्याचे गौरव
दाखविले. 9 “जर तू पाया पडून माझी उपासना करशील,” तो म्हणाला,
“तर हे सर्व मी तुला देईन.” 10 येशूंनी त्याला म्हटले, “अरे सैताना,
माझ्यापासून दूर जा! असे लिहिले आहे: ‘केवळ प्रभू परमेश्वरालाच
नमन कर आणि त्यांचीच सेवा कर.’” 11 मग सैतान त्यांना सोडून
निघून गेला आणि देवदूतांनी येऊन त्यांची सेवा केली. 12 योहानाला
बंदिवासात टाकले आहे हे ऐकताच, येशू गालील प्रांतात निघून गेले. 13
नासरेथ सोडल्यानंतर जबुलून व नफताली या प्रांताजवळ असलेल्या
सरोवराच्या किनाऱ्यावरील कफर्णहूम येथे गेले. 14 या घटनेने संदेष्टा
यशायाह याने केलेले भाकीत पूर्ण झाले. ते असे: 15 “जबुलून प्रांत
आणि नफताली प्रांत, समुद्राच्या मार्गावरचा आणि यार्देनेच्या पलीकडचा
प्रांत, गैरयहूदीयांचा गालील प्रांत— 16 अंधारात राहणाऱ्या लोकांनी
मोठा प्रकाश पाहिला; मृत्युछायेच्या दरीत बसलेल्यांवर प्रकाश उदय
पावला आहे.” 17 तेव्हापासून येशूंनी उपदेश करण्यास सुरुवात केली,
“पश्चात्ताप करा, कारण स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे.” 18 येशू
गालील सरोवराच्या जवळून चालत असताना, त्यांनी शिमोन ज्याचे
नाव पेत्र असेही होते आणि त्याचा भाऊ आंद्रिया यांना पाहिले. ते
सरोवरात जाळे टाकीत होते, कारण ते मासे धरणारे होते. 19 येशू त्यांना
म्हणाले, “चला माझ्यामागे या, म्हणजे मी तुम्हाला माणसे धरणारे
करेन.” 20 लगेच त्यांनी त्यांची जाळी सोडली आणि ते त्यांच्यामागे
गेले. 21 किनाऱ्यावरून पुढे गेल्यावर त्यांनी आणखी दोन भाऊ,
म्हणजे जब्दीचे पुत्र, याकोब आणि त्याचा भाऊ योहानला पाहिले.
ते आपल्या वडिलांसह होडीत बसून आपली जाळी तयार करत होते.
येशूंनी त्यांनाही हाक मारून बोलाविले, 22 आणि ताबडतोब त्यांनी नाव
व आपला पिता यांना सोडून त्यांच्यामागे गेले. 23 येशू सभागृहांमध्ये
शिक्षण देत, राज्याच्या शुभवार्तेची घोषणा, व लोकांचा प्रत्येक आजार
आणि विकार बरे करीत सर्व गालील प्रांतात फिरले. 24 त्याचा वृत्तांत

गालील प्रांताच्या सीमेपलीकडेही पसरत गेला. त्यामुळे सीरियासारख्या
दूरदूरच्या ठिकाणाहूनही आजारी लोक बरे होण्यासाठी त्यांच्याकडे येऊ
लागले. कसल्याही प्रकारचा आजार किंवा वेदना झालेले, भूतग्रस्त
किंवा झटके येत असलेले, तसेच पक्षघात झालेले लोक, या सर्वांना
त्यांनी बरे केले. 25 गालील प्रांत, दकापलीस, यरुशलेम, यहूदीया आणि
यार्देन पलीकडील प्रदेशातून येथूनही मोठा समुदाय त्यांच्यामागे आला.

**5** लोकांची गर्दी पाहून, येशू टेकडीवर गेले आणि तिथे बसले. त्यांचे
शिष्य त्यांच्याकडे आले. 2 मग ते त्यांना शिकवू लागले. ते म्हणाले:
3 “धन्य आहेत ते, जे आत्म्याने नम्र आहेत, कारण स्वर्गाचे राज्य
त्यांचे आहे. 4 धन्य आहेत ते, जे शोकग्रस्त आहेत, कारण त्यांना
सांत्वन मिळेल. 5 धन्य आहेत ते, जे सौम्य आहेत, कारण ते पृथ्वीचे
वतनाधिकारी होतील. 6 धन्य आहेत ते, ज्यांना नीतिमत्वाची तहान व
भूक लागली आहे, कारण ते तृप्त केले जातील. 7 धन्य ते, जे दयाळू
आहेत, कारण त्यांना दयाळूपणाने वागविले जाईल. 8 धन्य आहेत ते,
जे शुद्ध अंतःकरणाचे आहेत, कारण त्यांना परमेश्वराचे दर्शन घडेल.
9 धन्य आहेत ते, जे शांती प्रस्थापित करतात, कारण ते परमेश्वराची
मुले म्हटले जातील. 10 धन्य आहेत ते, ज्यांचा नीतिमत्वासाठी छळ
करण्यात येतो, कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. 11 “माझे अनुयायी
असल्यामुळे लोक तुमची निंदा, तुमचा अपमान व छळ करतील व
तुमच्याविरुद्ध सर्वप्रकारच्या गोष्टी लबाडीने बोलतील, तेव्हा तुम्ही धन्य
आहात. 12 तुम्ही आनंद व उल्हास करा, कारण स्वर्गामध्ये तुमचे
प्रतिफळ मोठे आहे, त्यांनी प्राचीन काळाच्या संदेष्ट्यांनाही असेच
छळले होते. 13 “तुम्ही पृथ्वीचे मीठ आहात, पण मिठाचा खारटपणा
गेला तर त्याचा खारटपणा परत कशाने आणू शकता? ते बाहेर टाकून
दिले पाहिजे व असे मीठ पायदळी तुडविण्याच्या लायकीचे आहे. 14
“तुम्ही जगाचा प्रकाश आहात. डोंगरावर वसलेले शहर लपू शकत
नाही. 15 त्याचप्रमाणे लोक दिवा लावून तो मापाखाली ठेवत नाही.
त्याऐवजी, दिवठणीवर ठेवतात म्हणजे घरातील प्रत्येकाला प्रकाश
मिळावा. 16 याचप्रकारे लोकांनी तुमची चांगली कामे पाहून तुमच्या
स्वर्गीय पित्याचे गौरव करावे म्हणून तुमचा प्रकाश उजळू द्या. 17 “मी
मोशेचे नियमशास्त्र व संदेष्ट्यांची भाकिते रद्द करण्यासाठी नाही, तर ती
पूर्ण करण्यासाठी आलो आहे. 18 मी तुम्हाला सत्य सांगतो की आकाश
व पृथ्वी नाहीतशी होतील तोपर्यंत, आणि सर्वगोष्टी पूर्ण होईपर्यंत
नियमशास्त्रातील एकही शब्द अथवा कानामात्रा कशानेही नाहीसा
होणार नाही. 19 जो कोणी नियमशास्त्रातील लहान आज्ञा मोडेल
आणि दुसऱ्यांनाही त्यानुसार शिकविल, तो स्वर्गाच्या राज्यात कनिष्ठ
गणला जाईल. परंतु जे परमेश्वराचे नियम शिकवितात आणि पाळतात
ते परमेश्वराच्या राज्यात श्रेष्ठ ठरतील. 20 कारण मी तुम्हाला सांगतो
की, परूशी आणि इतर नियमशास्त्र शिक्षक यांच्या नीतिमत्वापेक्षा
तुमचे नीतिमत्व अधिक असल्याशिवाय, तुम्हाला स्वर्गाच्या राज्यात
कधीही प्रवेश मिळणार नाही. 21 “‘तू खून करू नको, आणि जो कोणी
खून करेल तो न्यायास पात्र ठरेल,’ असे प्राचीन काळाच्या लोकांना
सांगितले होते, ते तुम्ही ऐकले आहे. 22 पण मी सांगतो की, तुम्ही
बहीण किंवा भावावर रागवाल, तर तुम्ही न्यायदंडास पात्र व्हाल, जो
कोणी त्यांना ‘मूर्ख’ असे म्हणेल, तर त्याला न्यायालयासमोर उत्तर
द्यावे लागेल. पण जो कोणी ‘तू मूर्ख’ असे म्हणेल तर त्याला नरकाच्या
अग्नीत टाकले जाण्याची भीती आहे. (Geenna g1067) 23 “यास्तव, जर
तुम्ही वेदीवर भेट अर्पण करीत असाल आणि तिथे तुम्हाला आठवले
की, तुझ्या बंधू किंवा भगिनीच्या मनात तुमच्याविरुद्ध काहीतरी आहे,
24 तर तुमची भेट तिथेच वेदीपुढे ठेवा. आधी जाऊन त्यांच्याबरोबर
समेट करा आणि मग येऊन आपली भेट अर्पण करा. 25 “तुमच्या
शत्रूने तुम्हाला न्यायालयात नेण्यापूर्वीच, तुम्ही त्याच्याबरोबर वाटेत
असतानाच लवकर त्याच्याशी संबंध नीट करा. नाही तर तुमचा शत्रू
तुम्हाला न्यायाधीशाच्या स्वाधीन करेल आणि न्यायाधीश तुम्हाला
शिपायांच्या स्वाधीन करेल आणि तुम्हाला तुरुंगात टाकेल. 26 मी
तुम्हाला निश्चित सांगतो की प्रत्येक दमडी चुकती केल्याशिवाय तुमची
तुरुंगातून सुटका होणार नाही. 27 “‘तू व्यभिचार करू नको,’ असे
सांगितले होते ते तुम्ही ऐकले आहे. 28 पण मी तुम्हाला सांगतो, जो
कोणी एखाद्या स्त्रीकडे कामवासनेच्या दृष्टीने पाहतो, त्याने तिच्याबरोबर
आपल्या अंतःकरणात आधीच व्यभिचार केला आहे. 29 जर तुमचा
उजवा डोळा तुम्हाला अडखळण करीत असेल तर तो उपटून फेकून द्या.
तुमचे संपूर्ण शरीर नरकात जाण्यापेक्षा शरीराचा एक भाग गमविणे
अधिक उत्तम आहे; (Geenna g1067) 30 आणि जर तुमचा उजवा हात
तुम्हाला अडखळण करीत असेल, तर तो कापून टाक. संपूर्ण शरीर
नरकात जाण्याऐवजी तुम्ही तुमच्या शरीराच्या एका भागाला मुकणे
अधिक हिताचे होईल. (Geenna g1067) 31 “नियमशास्त्र सांगते की, ‘जो
कोणी आपल्या पत्नीपासून विभक्त होऊ इच्छितो, त्याने तिला सूटपत्र
लिहून द्यावे.’ 32 मी तुम्हाला सांगतो, जो कोणी आपल्या पत्नीला
व्यभिचाराच्या कारणाशिवाय सूटपत्र देतो तो तिला व्यभिचाराचे भक्ष
करतो आणि सोडलेल्या स्त्रीशी जो कोणी लग्न करतो तो व्यभिचार
करतो. 33 “प्राचीन काळाच्या लोकांना सांगितले होते ते तुम्ही ऐकले
आहे, ‘शपथ मोडू नका, तर प्रभूला वाहिलेली प्रत्येक शपथ पूर्ण करा.’
34 परंतु मी तुम्हाला सांगतो, शपथ वाहू नका. स्वर्गाची नव्हे, कारण ते
परमेश्वराचे सिंहासन आहे. 35 किंवा पृथ्वीची, कारण ते त्यांचे पायासन
आहे; किंवा यरुशलेमची, कारण ती थोर राजाची नगरी आहे, 36 आणि
स्वतःच्या मस्तकाचीही शपथ वाहू नका, कारण तुम्हाला एक केसही
पांढरा किंवा काळा करता येत नाही. 37 जे काही तुम्हाला म्हणावयाचे
ते साधे ‘होय’ किंवा ‘नाही’ असावे; यापेक्षा अधिक त्या दुष्टापासून
येते. 38 “‘डोळ्याबद्दल डोळा व दाताबद्दल दात,’ असे म्हटलेले तुम्ही
ऐकले आहे, 39 पण मी तुम्हाला सांगतो, दुष्ट मनुष्याला प्रतिकार करू
नका. तुमच्या एका गालावर कोणी चापट मारली तर दुसराही गाल पुढे
करा. 40 जो कोणी तुमच्यावर फिर्याद किंवा वाद करून तुमची बंडी घेऊ
पाहतो, त्याला तुमच्या अंगरखाही देऊन टाका. 41 जर कोणी तुम्हाला
एक मैल जाण्याची सक्ती करेल, तर त्याच्याबरोबर दोन मैल जा. 42

तुम्हाजवळ कोणी काही मागत असल्यास त्यांना द्या आणि ज्यांना उसने
हवे असेल तर त्यांच्याकडे दुर्लक्ष करू नका. 43 "'तुमच्या शेजाऱ्यावर
प्रीती करा आणि शत्रूंचा द्वेष करा,' असे सांगितले होते ते तुम्ही ऐकले
आहे. 44 पण मी तुम्हाला सांगतो, तुमच्या शत्रूंवर प्रीती करा आणि जे
तुमचा छळ करतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा. 45 अशा वागण्याने
तुम्ही स्वर्गीय पित्याचे पुत्र व्हाल. कारण ते आपला सूर्यप्रकाश चांगले
आणि वाईट करणाऱ्या अशा दोघांनाही देतात आणि नीतिमान व
अनीतिमान या दोघांवरही पाऊस पाडतात. 46 जे तुमच्यावर प्रीती
करतात त्यांच्यावरच तुम्ही प्रीती केली, तर त्यात तुम्हाला असे कोणते
मोठे श्रेय मिळणार आहे? जकातदारही तसेच करतात की नाही? 47
आणि तुम्ही आपल्या बंधूनाच अभिवादन करीत असाल तर इतरांहून
चांगले ते काय करता? गैरयहूदी तसेच करतात की नाही? 48 म्हणून
जसा तुमचा स्वर्गीय पिता परिपूर्ण आहे, तसे तुम्हीही परिपूर्ण असावे."

**6** "तुमच्या नीतिमत्वाचे आचरण लोकांसमोर न करण्याची काळजी
घ्या. कारण तसे केल्याने तुमच्या स्वर्गीय पित्यापासून मिळणाऱ्या
प्रतिफळास तुम्ही मुकाल. 2 "म्हणून तुम्ही एखाद्या गरजवंताला दान
देता, तेव्हा तुताऱ्या वाजवून जाहीर करू नका, जसे ढोंगी रस्त्यांवर
किंवा सभागृहांमध्ये लोकांकडून मान करून घेण्यासाठी करतात. मी
तुम्हाला खरोखर सांगतो की, त्यांना त्यांचे पूर्ण प्रतिफळ मिळाले
आहे. 3 तुम्ही गरजवंतास देता तेव्हा तुमचा उजवा हात काय करतो हे
तुमच्या डाव्या हाताला कळू देऊ नका. 4 म्हणजे तुमचे दान करणे
गुप्त राहील, मग तुमच्या गुप्त गोष्टी पाहणारा पिता तुम्हाला प्रतिफळ
देईल. 5 "तुम्ही प्रार्थना करताना ढोंग्यासारखे होऊ नका, रस्त्यांच्या
कोपऱ्यात किंवा सभागृहांमध्ये उभे राहून, दुसऱ्यांना दिसावे म्हणून
प्रार्थना करण्यास त्यांना आवडते. मी तुम्हाला खचित सांगतो की, ते
आपले प्रतिफळ भरून पावले आहेत. 6 तुम्ही प्रार्थना करता, तेव्हा
आपल्या खोलीत जा, दार बंद करा आणि मग तुमच्या अदृश्य पित्याची
प्रार्थना करा. तुम्ही गुप्त प्रकारे केलेली प्रार्थना तुमचा पिता ऐकेल, तेव्हा
ते तुम्हाला प्रतिफळ देतील. 7 आणि तुम्ही प्रार्थना करता, तेव्हा गैरयहूदी
लोकांप्रमाणे निरर्थक बडबड करू नका, त्यांच्या पुष्कळ बोलण्यामुळे
त्यांचे म्हणणे ऐकले जाईल असे त्यांना वाटते. 8 त्यांच्यासारखे होऊ
नका, तुम्ही मागण्यापूर्वीच तुम्हाला कशाची गरज आहे हे तुमच्या
पित्याला माहीत असते. 9 "तर, तुम्ही याप्रमाणे प्रार्थना करीत जा:
"'हे आमच्या स्वर्गातील पित्या, तुमचे नाव पवित्र मानिले जावो, 10
तुमचे राज्य येवो, जशी स्वर्गात तशीच पृथ्वीवरही, तुमची इच्छा पूर्ण
होवो. 11 आमची रोजची भाकर आज आम्हाला द्या. 12 आणि जशी
आम्ही आमच्या अपराध्यांस क्षमा केली आहे, तशी तुम्ही आमच्या
अपराधांची क्षमा करा. 13 आणि आम्हास परीक्षेत आणू नका, परंतु
त्या दुष्टापासून आम्हास सोडवा. कारण की राज्य, सामर्थ्य आणि गौरव
हे सर्वकाळ तुमचेच आहेत. आमेन' 14 ज्यांनी तुमच्याविरुद्ध पाप केले,
त्यांना तुम्ही क्षमा केली, तर तुमचा स्वर्गीय पिता तुमच्याही पातकांची
क्षमा करतील. 15 पण जर तुम्ही त्यांना क्षमा करण्याचे नाकारले,
तर तुमचा पिताही तुम्हाला क्षमा करणार नाही. 16 "तुम्ही उपास
करता त्यावेळी, ढोंग्याप्रमाणे उदास चेहरा करू नका. आपण उपास
करीत आहोत असे लोकांना दाखविण्यासाठी ते कोमेजलेल्या चेहऱ्यांनी
वावरतात. मी तुम्हाला खरोखरच सांगतो की, त्यांचे संपूर्ण प्रतिफळ
त्यांना मिळून चुकले आहे. 17 तुम्ही उपास करता तेव्हा डोक्याला तेल
लावा व आपले तोंड धुवा, 18 म्हणजे तुम्ही उपास करीत आहात असे
लोकांना समजणार नाही. पण केवळ तुमच्या अदृश्य पित्याला समजेल
आणि मग तुमचा पिता जे तुम्ही गुप्त प्रकारे केलेल्या गोष्टी पाहतात ते
तुम्हाला प्रतिफळ देतील. 19 "तुमची धनसंपत्ती तुम्ही पृथ्वीवर साठवून
ठेवू नका, कारण तिथे तिला कसर लागून, गंजून तिचा नाश होतो.
शिवाय चोरही ती लुटून नेतात. 20 पण तुमची धनसंपत्ती स्वत:साठी
स्वर्गामध्ये साठवून ठेवा. कारण तिथे तिला कसर लागत नाही व ती
गंजून जात नाही, तिचा नाश होत नाही आणि चोरही ती लुटून नेत
नाहीत. 21 कारण जिथे तुमची संपत्ती आहे, तिथे तुमचे मनही असेल.
22 "डोळा शरीराचा दिवा आहे. तुझे डोळे निर्दोष असले, तर सर्व शरीरही
प्रकाशमय होईल. 23 पण तुमचे डोळे दोषपूर्ण असले, तर तुमचे संपूर्ण
शरीर अंधाराने भरून जाईल. म्हणून तुमच्यातील प्रकाशच जर अंधार
असला, तर तो अंधार केवढा मोठा! 24 "कोणी दोन धन्यांची चाकरी
करू शकत नाही. तुम्ही एकाचा द्वेष कराल आणि दुसऱ्यावर प्रीती
कराल किंवा एकाला समर्पित असाल आणि दुसऱ्याला तुच्छ मानाल.
तुम्हाला परमेश्वराची आणि धनाची सेवा एकाच वेळी करता येणार
नाही. 25 "मी तुम्हाला सांगतो, आपण काय खावे, किंवा काय प्यावे
अशी आपल्या जिवाविषयी, किंवा आपण काय पांघरावे अशी आपल्या
शरीराविषयी काळजी करू नका. अन्नापेक्षा जीव आणि वस्त्रांपेक्षा
शरीर अधिक महत्त्वाचे नाही काय? 26 आकाशातील पाखरांकडे पाहा;
ते धान्य पेरीत नाही, कापणी करीत नाही व कोठारात साठवित नाही
आणि तरी देखील तुमचे स्वर्गीय पिता त्यांना खायला घालतात. तुम्ही
त्यांच्यापेक्षा कितीतरी अधिक मोलवान नाही का? 27 शिवाय काळजी
करून आयुष्यातील एक तास तरी कोणास वाढविता येईल काय?
28 "आणि तुम्ही वस्त्राविषयी काळजी का करावी? रानातील फुले
कशी वाढतात हे पाहा. ती कष्ट करीत नाहीत किंवा कातीत नाहीत. 29
तरी मी तुम्हाला सांगतो की शलोमोनदेखील आपल्या सर्व वैभवात
त्यांच्याइतका नटला नव्हता. 30 जे आज आहे आणि उद्या अग्नीत
टाकले जाते, त्या गवताला जर परमेश्वर असा पोशाख घालतात, तर
अहो अल्पविश्वासी, ते तुम्हाला अधिक विशेष पोशाख घालणार नाहीत
काय? 31 म्हणून 'आम्ही काय खाणार?' किंवा 'आम्ही काय पिणार?'
किंवा 'आम्ही काय पांघरावे?' असे म्हणत काळजी करू नका. 32
कारण परकीय लोक या गोष्टींच्या मागे लागतात, आणि तुम्हाला या
गोष्टींची गरज आहे, हे तुमच्या स्वर्गातील पित्याला माहीत आहे. 33 परंतु
तुम्ही प्रथम त्यांचे राज्य आणि नीतिमत्व मिळविण्यासाठी झटा म्हणजे
या सर्व गोष्टीही तुम्हाला प्राप्त होतील. 34 म्हणून उद्याच्या गोष्टींची चिंता

करू नका, उद्याची चिंता उद्या, प्रत्येक दिवसाचा त्रास त्या दिवसासाठी
पुरेसा आहे.

**7** “इतरांचा न्याय करू नका, म्हणजे तुमचाही न्याय होणार नाही.
2 कारण ज्या पद्धतीने तुम्ही इतरांचा न्याय कराल, त्याच पद्धतीने
तुमचाही न्याय करण्यात येईल, ज्या मापाने तुम्ही मापून द्याल, त्याच
मापाने तुम्हाला मापून देण्यात येईल. 3 “आपल्या डोळयातील मुसळ
लक्षात न आणता तू आपल्या भावाच्या डोळयातील कुसळ का
पाहतोस? 4 सर्व वेळ स्वतःच्या डोळयामध्ये मुसळ असताना, ‘तुझ्या
डोळयातील कुसळ मला काढू दे’ असे तू आपल्या भावाला कसे म्हणू
शकतोस? 5 अरे ढोंगी माणसा! पहिल्याने तू आपल्या डोळयातील
मुसळ काढ, मग तुझ्या भावाच्या डोळयातील कुसळ काढण्यासाठी तुला
स्पष्ट दिसेल. 6 “जे पवित्र ते कुत्र्यांना घालू नका आणि आपले मोती
डुकरांपुढे टाकू नका. जर टाकले तर ते कदाचित आपल्या पायाखाली
तुडवतील आणि फाडून तुमचे तुकडे करतील. 7 “मागा म्हणजे मिळेल,
शोधा म्हणजे तुम्हाला सापडेल, दार ठोका म्हणजे ते उघडले जाईल.
8 कारण जो कोणी मागतो त्याला मिळेल, जो कोणी शोधतो त्याला
सापडेल आणि जो कोणी ठोकतो त्याच्यासाठी दार उघडले जाईल. 9
“जर तुमच्या मुलाने भाकर मागितली, तर त्याला दगड देईल असा
तुम्हामध्ये कोण आहे? 10 किंवा मासा मागितला, तर साप देईल? 11
जर तुम्ही वाईट असूनही तुमच्या लेकरांना चांगल्या देणग्या देण्याचे
तुम्हाला समजते, तर मग स्वर्गीय पित्याजवळ जे मागतात, त्यांना ते
चांगल्या देणग्या किती विशेषकरून देतील? 12 तर मग जे सर्व इतरांनी
तुमच्यासाठी करावे असे तुम्हाला वाटते, तसेच तुम्हीही त्यांच्यासाठी
करा. नियमशास्त्र आणि संदेष्ट्यांचे सार हेच आहे. 13 “अरुंद दाराने
प्रवेश करा, कारण नाशाकडे नेणारा दरवाजा रुंद व पसरट आहे. पुष्कळ
लोक त्याच दरवाजातून प्रवेश करतात. 14 तरी जीवनाकडे नेणारा
दरवाजा लहान असून मार्गही अरुंद आहे आणि अगदी थोडक्यांना तो
सापडतो. 15 “खोट्या संदेष्ट्यांच्या विषयी अतिशय सावधगिरी बाळगा.
ते मेंढरांची वस्त्रे धारण करून तुमच्याकडे येतात पण आतून क्रूर लांडगे
असतात. 16 त्यांच्या फळांवरून तुम्हाला त्यांना ओळखता येते. लोक
कधी काटेरी झुडपांवरून अंजीर किंवा रानगुलाबाच्या झुडपांवरून द्राक्षे
काढतात काय? 17 प्रत्येक चांगले झाड चांगले फळ देते आणि वाईट
झाड वाईट फळ देते. 18 चांगली झाडे वाईट फळे देणार नाहीत आणि
वाईट झाडे चांगली फळे देणार नाही. 19 या कारणामुळे चांगली फळे
न देणारी झाडे तोडून टाकण्यात येतील व जाळून टाकली जातील.
20 अशाप्रकारे त्यांच्या फळांवरून तुम्हाला त्यांना ओळखता येईल.
21 “जो कोणी मला, ‘प्रभूजी, प्रभूजी’ म्हणत राहतो, तो प्रत्येकजण
स्वर्गाच्या राज्यात प्रवेश करेल असे नाही, तर जो कोणी माझ्या स्वर्गीय
पित्याच्या इच्छेप्रमाणे करतो, तोच स्वर्गाच्या राज्यात प्रवेश करेल. 22
त्या दिवशी पुष्कळजण मला म्हणतील, ‘प्रभूजी, प्रभूजी आम्ही तुमच्या
नावाने भविष्यवाणी केली नाही काय, तुमच्या नावाने भुते घालविली
नाहीत काय, तुमच्या नावाने मोठे चमत्कार केले नाहीत काय?’ 23
तेव्हा मी त्यांना स्पष्टपणे सांगेन, ‘मी तुम्हाला कधीच ओळखत नव्हतो.
अहो दुष्टांनो, माझ्यापासून दूर निघून जा.’ 24 “यास्तव माझी शिकवण
ऐकणारे व त्याप्रमाणे वागणारे सर्वजण एका शहाण्या मनुष्यासारखे
आहेत. त्याने आपले घर खडकावर बांधले. 25 पाऊस पडला, पूर
आला, वारेही सुटले आणि त्या घरावर जोराने आदळले; तरी ते पडले
नाही, कारण त्याचा पाया खडकावर घातला होता. 26 जो कोणी माझी
वचने ऐकतो पण ती आपल्या आचरणात आणत नाही, तो पाया न
घालता आपले घर वाळूवर बांधणाऱ्या मूर्ख माणसासारखा आहे. 27
मग पाऊस पडला, पूर आला, वारेही सुटले आणि त्या घरावर जोराने
आदळले आणि ते घर कोसळून पडले.” 28 येशूंनी या गोष्टी सांगण्याचे
संपविले, तेव्हा समुदाय त्यांच्या शिकवणीवरून थक्क झाले. 29 कारण
ते नियमशास्त्राच्या शिक्षकांप्रमाणे नव्हे तर ज्याला अधिकार आहे असे
त्यांना शिकवीत होते.

**8** येशू डोंगरावरून खाली आले, तेव्हा मोठा लोकसमुदाय त्यांच्यामागे
चालू लागला. 2 एक कुष्ठरोगी येशूंकडे आला आणि त्यांच्यापुढे गुडघे
टेकून म्हणाला, “प्रभू, तुमची इच्छा असल्यास मला शुद्ध करण्यास
तुम्ही समर्थ आहात.” 3 येशूंनी आपला हात लांब करून त्याला स्पर्श
केला आणि म्हटले, “माझी इच्छा आहे. शुद्ध हो!” तत्काळ त्याच्या
कुष्ठरोगापासून तो शुद्ध झाला. 4 मग येशू त्याला म्हणाले, “हे कोणाला
सांगू नकोस. परंतु जा, स्वतःस याजकाला दाखव व कुष्ठरोग बरे
झाल्यानंतर शुद्धीकरणाचे प्रमाण म्हणून मोशेच्या नियमशास्त्राप्रमाणे जे
अर्पण करावयाचे असते, ते कर.” 5 येशूंनी कफर्णहूममध्ये प्रवेश केला.
तेव्हा एका रोमी शताधिपतीने त्यांच्याकडे येऊन त्यांना विनंती केली, 6
“प्रभू, माझा नोकर घरी पक्षघाताने आजारी असून वेदनांनी तळमळत
आहे.” 7 येशूने त्याला म्हटले, “मी येऊन त्याला बरे करू का?” 8
तेव्हा तो शताधिपती म्हणाला, “प्रभू, तुम्ही माझ्या छप्पराखाली यावे
यास मी योग्य नाही, शब्द मात्र बोला, म्हणजे माझा नोकर बरा होईल.
9 कारण मी स्वतः अधिकाराच्या अधीन असलेला मनुष्य असून माझ्या
अधिकाराखाली सैनिक आहेत. मी एकाला, ‘जा,’ म्हटले की तो जातो
आणि दुसऱ्याला, ‘ये,’ म्हटले की तो येतो आणि माझ्या नोकराला,
‘हे कर,’ अथवा ‘ते कर,’ असे म्हटले तर तो ते करतो.” 10 येशूंनी
हे ऐकले, तेव्हा ते आश्चर्यचकित झाले आणि समुदायाला म्हणाले,
“मी तुम्हाला सत्य सांगतो, एवढा मोठा विश्वास मला इस्राएलातील
कोणामध्येही आढळला नाही. 11 मी तुम्हाला सांगतो की, अनेकजण
पूर्व आणि पश्चिमेकडून येतील, आणि स्वर्गीय राज्यात चाललेल्या
मेजवानीत, अब्राहाम, इसहाक आणि याकोब यांच्याबरोबर आपल्या
जागा घेतील. 12 परंतु राज्याची प्रजा बाहेर अंधकारात टाकली जाईल,
जिथे रडणे आणि दातखाणे असेल.” 13 नंतर येशू त्या शताधिपतीला
म्हणाले, “जा! जसा तू विश्वास ठेवलास, तसेच होवो.” आणि त्याच
घटकेस त्याचा नोकर बरा झाला. 14 येशू पेत्राच्या घरी आले, तेव्हा
त्यांनी पेत्राची सासू तापाने फणफणली असून अंथरुणावर पडून होती
असे पाहिले. 15 तेव्हा येशूंनी हात धरून तिला उठविले आणि त्यांनी

स्पर्श करताच तिचा ताप गेला; ती उठली आणि त्यांची सेवा केली. 16
संध्याकाळ झाल्यावर अनेक भूतग्रस्तांना त्यांच्याकडे आणण्यात आले
आणि केवळ त्यांच्या शब्दाने त्या दुष्ट आत्म्यांना येशूंनी हाकलून दिले
आणि सर्व रोग्यांना बरे केले. 17 यशायाह संदेष्ट्याद्वारे जे म्हटले गेले ते
पूर्ण व्हावे म्हणून असे झाले: “त्याने आमचे विकार स्वत:वर घेतले
आणि आमचे रोग वाहिले.” 18 येशूंनी आपल्या भोवताली जमलेली गर्दी
पाहिली तेव्हा शिष्यांना आज्ञा करून ते म्हणाले, “आपण सरोवराच्या
पलीकडे जाऊ.” 19 तेवढ्यात एक नियमशास्त्र शिक्षक येशूंकडे येऊन
म्हणाला, “आपण जिथे कुठे जाल, तिथे मी तुमच्यामागे येईन.” 20
येशूंनी उत्तर दिले, “कोल्ह्यांना बिळे आणि आकाशातील पक्ष्यांना घरटी
आहेत, परंतु मानवपुत्राला डोके टेकण्यासही जागा नाही.” 21 त्यांच्या
शिष्यांपैकी दुसर्‍या एकाने म्हटले, “प्रभूजी, प्रथम मला माझ्या वडिलांना
पुरावयास जाऊ द्या.” 22 येशूंनी त्याला म्हटले, “मला अनुसर आणि जे
मेलेले आहेत, त्यांना आपल्या मृतांना मूठमाती देऊ दे.” 23 मग त्यांचे
शिष्य होडीत बसून त्यांच्याबरोबर गेले. 24 तेव्हा, एकाएकी सरोवरात
भयंकर वादळ सुटले, लाटा होडीवर आदळू लागल्या व त्यांची होडी बुडू
लागली. पण येशू झोपी गेले होते. 25 तेव्हा शिष्यांनी त्यांना उठविले
आणि ते त्यांना म्हणाले, “प्रभूजी, आम्हाला वाचवा! आपण सर्वजण
बुडत आहोत!” 26 येशू त्यांना म्हणाले, “अहो, अल्पविश्वासी, तुम्ही
इतके का घाबरला?” मग ते उठले आणि त्यांनी वार्‍याला व लाटांना
धमकाविले आणि सर्वकाही शांत झाले. 27 ते पाहून शिष्य चकित झाले
आणि एकमेकास म्हणू लागले: “हे कोणत्या प्रकारचे व्यक्ती आहेत?
वारा आणि लाटाही त्यांच्या आज्ञा पाळतात!” 28 सरोवराच्या पलीकडे
गदरेकरांच्या देशात येशू आले, तेव्हा भुताने पछाडलेले दोन मनुष्य
कबरस्तानातून धावत आले व त्यांना भेटले. ती माणसे इतकी हिंसक
होती की त्या परिसरातून कोणालाही जाणे शक्य नव्हते. 29 येशूंना
पाहून ते मोठ्याने ओरडून म्हणाले, “हे परमेश्वराच्या पुत्रा, तुम्हाला
आमच्याशी काय काम? ठरलेल्या वेळेपूर्वीच तुम्ही आम्हाला छळण्यास
आले आहे का?” 30 दूर अंतरावर डुकरांचा एक मोठा कळप चरत होता.
31 भुतांनी येशूंना विनंती केली, “तुम्ही आम्हाला हाकलून देणार असाल
तर आम्हाला डुकरांमध्ये जाण्याची परवानगी द्या.” 32 येशू म्हणाले,
“जा.” तत्काळ भुते बाहेर आली आणि डुकरांमध्ये शिरली व तो सर्व
कळप डोंगराच्या कडेने धावत सुटला आणि सरोवराच्या पाण्यात बुडून
मेला. 33 डुकरांचे कळप राखणारे जवळच्या नगरात धावत गेले आणि
त्यांनी ही बातमी सर्वांना सांगितली. भुतग्रस्तांच्या बाबतीत काय घडले
हे त्यांनी लोकांना सांगितले. 34 तेव्हा नगरातील सर्व लोक येशूंना
भेटण्यास गेले आणि त्यांना भेटल्यावर, त्यांच्या भागातून निघून जावे
अशी येशूंना विनंती केली.

**9** येशू एका होडीत चढले आणि सरोवराच्या पलीकडे आपल्या शहरात
आले. 2 काही लोकांनी एका पक्षघाती मनुष्याला, खाटेवर ठेऊन
त्यांच्याकडे आणले. जेव्हा येशूने त्यांचा विश्वास पाहिला, त्या मनुष्याला
म्हणाले, “मुला, धीर धर, तुझ्या पापांची क्षमा झाली आहे.” 3 तेव्हा
तिथे उपस्थित असलेले काही नियमशास्त्र शिक्षक आपसात म्हणू
लागले, “हा मनुष्य दुर्भाषण करतो!” 4 त्यांचे विचार येशूंनी ओळखून
त्यांना विचारले, “तुम्ही तुमच्या मनामध्ये दुष्टाईने भरलेले विचार का
करता? 5 यातून कोणते म्हणणे सोपे आहे, ‘तुझ्या पापांची क्षमा
झाली आहे,’ किंवा ‘ऊठ आपली बाज उचलून चालू लाग?’ 6 तुम्हाला
हे समजण्याची गरज आहे की मानवपुत्राला पृथ्वीवर पापांची क्षमा
करण्याचा अधिकार आहे.” ते पक्षघाती मनुष्याला म्हणाले, “ऊठ,
आपले अंथरूण उचल आणि घरी जा.” 7 तेव्हा तो मनुष्य उठला आणि
आपल्या घरी गेला. 8 प्रत्यक्ष घडलेला हा चमत्कार पाहून जमावाला
भीती वाटली व ज्यांनी मनुष्यास असा अधिकार दिला त्या परमेश्वराची
त्या सर्वांनी स्तुती केली. 9 मग येशू तिथून गेले, येशूंनी मत्तय नावाच्या
एका मनुष्याला जकात नाक्यावर बसलेला पाहिले. येशूंनी त्याला
म्हटले, “माझ्यामागे ये,” आणि मत्तय उठला आणि त्यांना अनुसरला.
10 नंतर संध्याकाळी येशू आणि त्यांचे शिष्य मत्तयाच्या घरी भोजन
करत होते. त्यांच्या पंक्तीला अनेक जकातदार आणि पापी लोक बसले
होते. 11 ते पाहून परूशी लोकांनी येशूंच्या शिष्यांना विचारले, “तुमचे
गुरू जकातदार व पापी लोकांच्या पंक्तीला बसून का जेवतात?” 12 हे
ऐकून, येशू त्यांना म्हणाले, “जे निरोगी आहेत त्यांना वैद्याची गरज
नसते, परंतु रोग्यास असते. 13 ते पुढे म्हणाले जा आणि याचा अर्थ
काय आहे शिकून घ्या: ‘मला तुमची अर्पणे नकोत.’ पण दया हवी आहे.
मी नीतिमानांस नव्हे, तर पापी जनांस बोलविण्यास आलो आहे.” 14
एके दिवशी बाप्तिस्मा करणार्‍या योहानाचे शिष्य येशूंकडे आले आणि
त्यांनी त्यांना प्रश्न केला, “गुरुजी, आम्ही आणि परूशी लोक उपास
करतो तसे तुमचे शिष्य का करत नाहीत?” 15 येशूंनी उत्तर दिले, “वराचे
पाहुणे वर त्यांच्याबरोबर असताना शोक कसे करू शकतात? परंतु अशी
वेळ येत आहे की, वर त्यांच्यापासून काढून घेण्यात येईल आणि मग ते
उपास करतील. 16 “नवीन कापडाचा तुकडा घेऊन जुन्या कापडाला
ठिगळ म्हणून कोणीही लावत नाही. कारण ते ठिगळ वस्त्राला फाडील
आणि छिद्र अधिक मोठे होईल. 17 त्याचप्रमाणे कोणीही नवा द्राक्षारस
जुन्या बुधल्यांमध्ये ओतीत नाही. नाही तर, नवीन द्राक्षारसामुळे बुधले
फुटून जातील; द्राक्षारस वाहून जाईल आणि बुधल्याचा नाश होईल.
नाही, तसे होऊ नये म्हणून ते नवा द्राक्षारस नवीन बुधल्यांमध्ये ओततात
आणि दोन्ही सुरक्षित राहतात.” 18 हे बोलत आहे तोच, सभागृहाचा
पुढारी आला आणि त्यांच्यापुढे गुडघे टेकून म्हणाला, “माझी कन्या
नुकतीच मरण पावली आहे, कृपा करून या व आपला हात तिच्यावर
ठेवा म्हणजे ती पुन्हा जिवंत होईल!” 19 येशू उठून त्याच्याबरोबर
गेले आणि त्यांचे शिष्यही त्यांच्याबरोबर निघाले. 20 तेव्हा बारा वर्षे
रक्तस्रावाने आजारी असलेल्या एका स्त्रीने त्यांच्या पाठीमागे येऊन
त्यांच्या झग्याच्या काठाला स्पर्श केला. 21 कारण तिने आपल्या मनात
म्हटले, “मी त्यांच्या वस्त्राला नुसता स्पर्श जरी केला तरी बरी होईन.”
22 येशू मागे वळून तिला म्हणाले, “मुली, धीर धर, तुझ्या विश्वासाने
तुला बरे केले आहे” आणि त्याच क्षणी ती स्त्री बरी झाली. 23 येशू त्या

सभागृहाच्या अधिकाऱ्याच्या घरी आले, तेव्हा त्यांनी आकांत करणारा
मोठा जमाव तिथे पाहिला. लोक बासरी वाजवून शोक करीत होते. 24 ते
म्हणाले, “बाहेर जा. मुलगी मरण पावली नाही पण झोपली आहे!” हे
ऐकून ते त्यांना हसू लागले. 25 शेवटी सर्व जमाव बाहेर आल्यानंतर
येशू त्या मुलीला ठेवले होते तिथे गेले; त्यांनी तिच्या हाताला धरून
तिला उठविले आणि ती उठून बसली. 26 याविषयीची बातमी त्या सर्व
प्रदेशात पसरली. 27 येशू तिथून पुढे निघाल्यावर, दोन आंधळे माणसे
त्यांच्यामागे आले व मोठ्याने म्हणाले, “अहो, दावीदाचे पुत्र, आम्हावर
दया करा.” 28 जेव्हा ते घरात गेले त्यावेळी ते आंधळे त्यांच्याकडे
आले आणि येशूंनी त्यांना विचारले, “मी हे करण्यास समर्थ आहे असा
तुमचा विश्वास आहे काय?” “होय प्रभू,” त्यांनी उत्तर दिले. 29 मग
येशूंनी त्यांच्या डोळयांना स्पर्श केला आणि ते त्यांना म्हणाले, “तुमच्या
विश्वासानुसार तुम्हासाठी केले जावो.” 30 आणि त्याच क्षणाला त्यांना
दिसू लागले. येशूंनी त्यांना सक्त ताकीद दिली, “याविषयी कोणालाही
काहीही सांगू नका,” 31 परंतु याउलट त्यांनी येशूंची किर्ती त्या सर्व
भागात पसरविली. 32 ते बाहेर जात असताना, एका मुक्या भूतग्रस्त
मनुष्याला येशूंकडे आणले. 33 येशूंनी तो दुरात्मा त्याच्यामधून हाकलून
लावला, तेव्हा त्या मुक्या मनुष्याला बोलता येऊ लागले. ते पाहून
गर्दीतील लोक आश्चर्यचकित होऊन म्हणाले, “असा अद्भुत प्रकार
इस्राएलात आम्ही कधीच पाहिला नव्हता.” 34 परंतु परूशी लोक
म्हणाले, “भुतांचा राजा सैतानाच्या साहाय्याने तो भुते घालवितो.”
35 येशू सर्व नगरांत व गावात सभागृहांमध्ये शिक्षण देत, राज्याच्या
शुभवार्तेची घोषणा करीत आणि प्रत्येक आजार व विकार बरे करीत
फिरले. 36 त्यांनी समुहाला पाहिले तेव्हा त्यांना त्यांचा कळवळा आला,
कारण ते मेंढपाळ नसलेल्या मेंढरांसारखे होते. 37 ते आपल्या शिष्यांना
म्हणाले, “पीक अमाप आहे, पण कामकरी थोडे आहेत. 38 हंगामाच्या
प्रभूने पिकासाठी शेतावर कामकरी पाठवावे म्हणून त्यांना विनंती
करा.”

10 येशूंनी आपल्या बारा शिष्यांना जवळ बोलाविले आणि त्यांना
अशुद्ध आत्म्यांना घालवून देण्याचा आणि प्रत्येक रोग व आजार
बरे करण्याचा अधिकार दिला. 2 त्यांच्या बारा प्रेषितांची नावे ही: शिमोन
ज्याला पेत्र असेही म्हणतात आणि त्याचा भाऊ आंद्रिया; जब्दीचा
पुत्र याकोब, त्याचा भाऊ योहान; 3 फिलिप्प आणि बर्थलमय; थोमा
आणि मत्तय जकातदार; अल्फीचा पुत्र याकोब आणि तद्दय; 4 शिमोन
कनानी आणि यहूदाह इस्कर्योत ज्याने येशूंना विश्वासघाताने धरून दिले.
5 येशूंनी बारा प्रेषितांना सूचना देऊन पाठविले: “गैरयहूदी लोकांकडे
जाऊ नका किंवा शोमरोन्यांच्या कोणत्याही शहरात प्रवेश करू नका. 6
इस्राएलांच्या हरवलेल्या मेंढराकडे जा. 7 जात असताना, ‘स्वर्गाचे राज्य
जवळ आले आहे’ अशी घोषणा करा. 8 आजाऱ्यांना बरे करा, मृतांना
जिवंत करा, कुष्ठरोग्यांना शुद्ध करा, भूतग्रस्तांतून भुते काढून टाका.
तुम्हाला विनामूल्य मिळाले आहे, तुम्हीही विनामूल्य द्या. 9 “प्रवासाला
जाताना कमरपट्ट्यात सोने, चांदी किंवा तांबे असे काहीही घेऊ नका.
10 तुमच्या प्रवासासाठी थैली किंवा अधिक अंगरखा किंवा पायतण
किंवा काठी घेऊ नका; कारण कामकरी अन्नास पात्र आहे. 11 ज्या
एखाद्या शहरात किंवा गावात तुम्ही प्रवेश कराल, त्यावेळी एखाद्या योग्य
मनुष्याचा शोध करा आणि निघेपर्यंत त्याच्याच घरी राहा. 12 एखाद्या
घरात प्रवेश करताना शुभेच्छा द्या. 13 ते घर योग्य असेल, तर तुमच्या
आशीर्वादाप्रमाणे तिथे शांती नांदेल. पण याउलट परिस्थिती असली तर
तुमचा आशीर्वाद तुम्हाकडे परत येईल. 14 जर कोणी तुमचे स्वागत केले
नाही किंवा तुमचे शब्द ऐकले नाही, तर त्या घरातून किंवा शहरातून निघा
आणि तुमच्या पायाची धूळ तिथेच झटकून टाका. 15 मी तुम्हाला निश्चित
सांगतो की, न्यायाचा दिवस सदोम व गमोराला त्या नगरापेक्षा अधिक
सुसह्य असेल. 16 “मेंढरांनी लांडग्यांमध्ये जावे त्याप्रमाणे मी तुम्हाला
पाठवित आहे म्हणून तुम्ही सर्पासारखे चतुर आणि कबुतरांसारखे
निर्दोष असा. 17 तुम्ही सावध असले पाहिजे. तुम्हाला न्यायालयाकडे
सोपविले जाईल आणि सभागृहामध्ये तुम्हाला फटके मारण्यात येईल.
18 तुम्हाला माझ्या नावासाठी त्यांना व गैरयहूदीयांना साक्ष व्हावी म्हणून
अधिकारी व राजांसमोर आणले जाईल. 19 तुम्हाला अटक करून
नेल्यावर न्यायालयासमोर काय बोलावे व कसे बोलावे याविषयी चिंता
करू नका. त्यावेळी तुम्हाला काय बोलावे ते सुचविले जाईल. 20 कारण
तुम्ही बोलणार नाही पण तुमच्या पित्याचा आत्मा तुमच्याद्वारे बोलेल.
21 “भाऊ भावाला, पिता आपल्या लेकरांना जिवे मारण्याकरिता
विश्वासघाताने धरून देतील. लेकरेही आपल्या आईवडिलांविरुद्ध बंड
करतील आणि त्यांचा वध घडवून आणतील. 22 माझ्यामुळे सर्वजण
तुमचा द्वेष करतील. परंतु जो शेवटपर्यंत स्थिर राहतील, त्याचे मात्र
तारण होईल. 23 तुमचा एका शहरात छळ होऊ लागला की दुसऱ्या
शहरात पळून जा. कारण मी तुम्हाला निश्चितपणे सांगतो, मानवपुत्र
येण्याअगोदर इस्राएलाच्या नगरांमधून तुमचे फिरणे संपणारच नाही.
24 “शिष्य गुरूपेक्षा थोर नाही, किंवा दास आपल्या धन्यापेक्षा थोर
नाही. 25 शिष्याने आपल्या गुरू सारखे असणे आणि दासाने आपल्या
धन्यासारखे असणे पुरे आहे. जर घर प्रमुखाला बालजबूल म्हटले, तर
घरच्या सभासदांना कितीतरी अधिक म्हणतील! 26 “तुम्ही त्यांना भिऊ
नका, जे प्रकट होणार नाही, असे काही झाकलेले नाही उघडकीस
येणार नाही असे काही गुप्त नाही. 27 आता मी तुम्हाला अंधारात सांगत
आहे, ते दिवसाच्या प्रकाशात सांगा; जे मी तुमच्या कानात सांगत
आहे, ते घराच्या धाब्यावरून जाहीर करा. 28 जे तुमच्या शरीराचा वध
करू शकतात, परंतु आत्म्याचा नाश करू शकत नाहीत, अशांना भिऊ
नका. तर तुमचा आत्मा आणि शरीर या दोहोंचा नरकामध्ये जे नाश
करू शकतात, त्या परमेश्वराचे मात्र भय धरा. (Geenna g1067) 29 दोन
चिमण्या एका पैशात विकत नाहीत काय? तरी त्यापैकी एकही चिमणी
तुमच्या पित्याच्या इच्छेविना जमिनीवर पडणार नाही. 30 आणि तुमच्या
डोक्याचे सर्व केसही मोजलेले आहेत. 31 म्हणून भीती बाळगू नका,
कारण तुम्ही पुष्कळ चिमण्यांपेक्षा अधिक मोलवान आहात. 32 “जो
कोणी मला इतरांपुढे जाहीरपणे स्वीकारेल, तर मीही त्याचा माझ्या

स्वर्गीय पित्यासमोर जाहीरपणे स्वीकार करेन. 33 जे मला लोकांसमोर
नाकारतात, मीही त्यांना माझ्या स्वर्गीय पित्यासमोर जाहीरपणे नाकारेन.
34 “मी पृथ्वीवर शांती देण्यासाठी आलो आहे, अशी कल्पना करू
नका. शांती देण्यासाठी नाही, तर तलवार चालविण्यास आलो आहे.
35 “‘मनुष्य आपल्या पित्याविरुद्ध, मुलगी तिच्या आईविरुद्ध, आणि
सून तिच्या सासूविरुद्ध करण्यासाठी मी आलो आहे. 36 मनुष्याचे
शत्रू त्याच्या आपल्याच कुटुंबातील सदस्य असतील.’ 37 “जो कोणी
माझ्यापेक्षा आपल्या आईवडीलांवर अधिक प्रेम करीत असेल, तर
तो मला पात्र नाही; जो कोणी माझ्यापेक्षा आपल्या पुत्र व कन्यांवर
अधिक प्रेम करीत असेल, तर ते मला पात्र नाही. 38 जो कोणी आपला
क्रूसखांब उचलून घेऊन माझ्यामागे येत नाही, तो मला पात्र नाही. 39
कारण जो कोणी आपला जीव मिळवितो तो आपल्या जीवाला मुकेल,
पण जो कोणी माझ्यासाठी आपल्या जीवाला गमावेल, तो त्याचा जीव
वाचवेल. 40 “जे तुमचे स्वागत करतात, ते माझे स्वागत करतात,
आणि जे माझे स्वागत करतात, ते ज्यांनी मला पाठविले त्यांचे स्वागत
करतात. 41 जो संदेष्ट्यांचा संदेष्टा म्हणून स्वीकार करतो, त्याला
संदेष्ट्यांचे प्रतिफळ मिळेल; जो कोणी नीतिमान व्यक्तीचा नीतिमान
म्हणून स्वीकार करतो, त्याला नीतिमान व्यक्तीचे प्रतिफळ मिळेल. 42
मी तुम्हाला निश्चित सांगतो की, जर कोणी या लहानातील एकाला, जो
माझा शिष्य आहे, त्याला पेलाभर थंड पाणी प्यावयास दिले, तर तो
आपल्या पारितोषिकाला मुकणार नाही.”

**11** येशूंनी आपल्या बारा शिष्यांना या सूचना देण्याचे संपविल्यावर,
तिथून ते गालील प्रांतातील शहरांमध्ये उपदेश करण्यास व
शिक्षण देण्यास गेले. 2 जेव्हा बाप्तिस्मा करणारा योहान तुरुंगात
होता, ख्रिस्त करीत असलेल्या कामाविषयी त्याने ऐकले, आपल्या
शिष्यांना हे विचारावयास पाठविले, 3 “जे यावयाचे ते आपण आहात
की आम्ही दुसऱ्या कोणाची वाट पाहावी?” 4 येशूंनी उत्तर दिले,
“तुम्ही जे ऐकता व पाहता ते योहानाला जाऊन सांगा: 5 आंधळयांना
दृष्टी मिळते, लंगडे चालतात, कुष्ठरोगी शुद्ध होतात, बहिऱ्यांना ऐकू
येते, मेलेले जिवंत होतात आणि गरीब लोकांना शुभवार्ता सांगितली
जाते. 6 जो कोणी माझ्यासंबंधाने अडखळत नाही तो धन्य होय.” 7
योहानाचे शिष्य निघून गेल्यावर येशू जमावाशी योहानाविषयी बोलू
लागले. ते म्हणाले, “तुम्ही ओसाड अरण्यात काय पाहण्यासाठी गेला?
वाऱ्याच्या झोताने हलणाऱ्या लव्हाळयाला काय? 8 जर नाही, तर मग
काय पाहावयाला तुम्ही गेला होता? किमती पोशाख घातलेला एखादा
पुरुष काय? नाही, भारी पोशाख घालणारे राजाच्या राजवाड्यातच
आहेत. 9 तर मग तुम्ही काय पाहावयास गेला होता? संदेष्टा? होय,
मी तुम्हाला सांगतो, संदेष्ट्यापेक्षाही अधिक.” 10 हा तोच आहे
ज्याच्याविषयी लिहिले आहे: “‘मी माझा संदेष्टा तुझ्यापुढे पाठवेन आणि
तो तुझा मार्ग तुझ्यापुढे सिद्ध करेल.’ 11 मी तुम्हाला निश्चित सांगतो,
स्त्रियांपासून जन्मलेल्या व्यक्तीमध्ये योहानापेक्षा कोणीही श्रेष्ठ नाही.
तरीपण स्वर्गाच्या राज्यामध्ये जो कनिष्ठ आहे, तो त्याच्यापेक्षाही श्रेष्ठ
आहे. 12 योहानाच्या काळापासून आतापर्यंत स्वर्गाचे राज्य मोठ्या
शक्तीने पसरत आहे. आणि आवेशी लोक याचे अधिकार प्राप्त करीत
आहेत. 13 कारण सर्व संदेष्ट्यांनी आणि नियमशास्त्रांनी योहानापर्यंत
भविष्यकथन केलेले आहे. 14 आणि ते मान्य करण्याची तुमची तयारी
असेल तर ऐका: येणारा एलीयाह तो हाच आहे. 15 ज्यांना कान आहेत,
त्यांनी ऐकावे. 16 “या पिढीच्या लोकांची तुलना मी कशाशी करू?
बाजारात बसून इतरांना हाक मारणाऱ्या लहान मुलांसारखी ही पिढी
आहे: 17 “‘आम्ही तुमच्यासाठी बासरी वाजविली तरी तुम्ही नाचला
नाही; आम्ही शोकगीत गाईले, तरी तुम्ही शोक केला नाही.’ 18 कारण
योहान काहीही न खाता किंवा पिता आला होता आणि ते म्हणतात, ‘तो
दुरात्म्याने ग्रस्त आहे.’ 19 मनुष्याचा पुत्र खातपीत आला आणि ते
म्हणतात, ‘पाहा, हा खादाड आणि मद्यपी मनुष्य! जकातदार आणि
पापी लोकांचा मित्र!’ परंतु ज्ञान आपल्या कृत्याने खरे सिद्ध झाले आहे.”
20 मग ज्या नगरांमध्ये सर्वात अधिक चमत्कार केले होते आणि तरीही
त्यांनी पश्चात्ताप केला नाही, त्यांच्यावर येशूंनी टीका करण्यास सुरुवात
केली. 21 “खोराजिना, तुला धिक्कार असो! बेथसैदा, तुला धिक्कार
असो! कारण जे चमत्कार तुमच्यामध्ये केले ते सोर आणि सीदोनात केले
असते, तर त्यांनी गोणपाट नेसून आणि डोक्यात राख घालून केव्हाच
पश्चात्ताप केला असता. 22 परंतु मी तुम्हाला सांगतो, न्यायाचा दिवस
तुमच्यापेक्षा सोर व सीदोनला अधिक सुसह्य असेल. 23 हे कफर्णहूमा,
तुला आकाशापर्यंत उंच केले जाईल काय? नाही, तू नरकात खोलवर
जाशील, कारण जी अद्भुत कृत्ये मी तुझ्यात केली ती सदोममध्ये
केली असती तर सदोम आजपर्यंत अस्तित्वात असते. **(Hadēs g86)** 24
परंतु मी तुम्हाला सांगतो की न्यायाचा दिवस तुमच्यापेक्षा सदोमाला
अधिक सुसह्य असेल.” 25 त्यावेळी येशूंनी ही प्रार्थना केली, “हे पित्या,
स्वर्गाच्या आणि पृथ्वीच्या प्रभू, स्वतःस ज्ञानी आणि सुज्ञ समजणाऱ्या
लोकांपासून या गोष्टी गुप्त ठेऊन, त्या तुम्ही लहान बालकांना प्रगट
केल्यास म्हणून मी तुमचे आभार मानतो. 26 कारण हे पित्या, असे
करणेच तुम्हाला उचित वाटले. 27 “माझ्या पित्याने माझ्याकडे सर्वकाही
सोपविले आहे. पित्याशिवाय पुत्राला कोणी ओळखत नाही, आणि पिता
कोण आहे हे पुत्राशिवाय, आणि पुत्र ज्यांना प्रकट करण्यास निवडतो
त्यांच्याशिवाय कोणालाही माहीत नाही. 28 “जे तुम्ही थकलेले आणि
भाराक्रांत आहात, ते तुम्ही सर्वजण माझ्याकडे या, मी तुम्हाला विश्रांती
देईन. 29 माझे जू आपणावर घ्या आणि माझ्याकडून शिका; कारण मी
सौम्य व लीन मनाचा आहे आणि तुमच्या आत्म्याला विसावा मिळेल.
30 कारण माझे जू हलके व माझे ओझे सहज पेलवणारे आहे.”

**12** शब्बाथाच्या दिवशी येशू धान्याच्या शेतामधून गेले. त्यांच्या
शिष्यांना भूक लागली होती म्हणून ते कणसे तोडून खाऊ लागले.
2 जेव्हा परूश्यांनी हे पाहिले, ते त्यांना म्हणाले, “पाहा! तुमचे शिष्य
शब्बाथ दिवशी जे नियमशास्त्राविरुद्ध आहे ते करतात.” 3 येशूंनी उत्तर
दिले, “दावीद आणि त्याच्या सोबत्यांना भूक लागली असता त्यांनी काय
केले, हे तुम्ही कधी वाचले नाही काय? 4 तो परमेश्वराच्या मंदिरात गेला,

त्याने आणि त्याच्या सोबत्यांनी समर्पित भाकरी खाल्या, हे नियमानुसार
नव्हते, त्या केवळ याजकांसाठीच होत्या. 5 किंवा, मंदिरात सेवा करीत
असलेले याजक शब्बाथ दिवशी काम करून शब्बाथ विटाळवितात तरी
ते निर्दोष असतात, हे तुम्ही नियमशास्त्रात वाचले नाही काय? 6 मी
तुम्हाला सांगतो की मंदिरापेक्षा श्रेष्ठ असलेला एकजण येथे आहे. 7
'मला तुमची अर्पणे नकोत पण दया हवी आहे.' या शास्त्रवचनाचा
अर्थ तुम्हाला समजला असता तर जे दोषी नाहीत त्यांच्यावर आरोप
लावला नसता. 8 कारण मानवपुत्र हा शब्बाथाचाही प्रभू आहे." 9
नंतर ते तिथून निघाले आणि सभागृहामध्ये गेले. 10 तिथे हात वाळून
गेलेला एक मनुष्य उपस्थित होता. येशूंवर आरोप सिद्ध व्हावे म्हणून
त्यांनी विचारले, "शब्बाथ दिवशी बरे करणे नियमानुसार आहे काय?"
11 येशूंनी त्यांना उत्तर दिले, "समजा, तुमच्याजवळ एकच मेंढरू आहे
आणि शब्बाथ दिवशी ते विहिरीत पडले, तर तुम्ही त्याला धरून वर
काढणार नाही काय? 12 मग मेंढरापेक्षा मनुष्य कितीतरी पटीने अधिक
मोलवान आहे! म्हणून शब्बाथ दिवशी नियमानुसार चांगले करणे योग्य
आहे." 13 मग ते त्या मनुष्याला म्हणाले, "तुझा हात लांब कर." त्याने
हात लांब केला आणि तो दुसऱ्या हातासारखा अगदी चांगला झाला. 14
परंतु परूश्यांनी जाऊन येशूंना जिवे कसे मारता येईल याची योजना
आखली. 15 परंतु त्यांचा कट येशूंनी जाणला, व ते मंदिरातून निघून
गेले. त्यांच्यामागे एक मोठा जनसमुदाय निघाला, आणि येशूंनी सर्व
आजाऱ्यांना बरे केले. 16 त्यांच्याबद्दल इतरांना सांगू नका, अशी त्यांनी
लोकांना सूचनाही दिली. 17 या घटनेद्वारे यशायाह संदेष्ट्याने येशूंविषयी
केलेली भविष्यवाणी पूर्ण झाली; ती अशी: 18 "पाहा, हा माझा सेवक,
ज्याला मी निवडलेले आहे, जो मला प्रिय आहे, त्याच्याविषयी मी संतुष्ट
आहे; माझा आत्मा मी त्याच्या ठायी ठेवेन. राष्ट्रांना तो न्याय जाहीर
करेल. 19 तो भांडणार नाही किंवा आक्रोश करणार नाही. रस्त्यांमध्ये
त्याचा आवाज ऐकू येणार नाही. 20 जोपर्यंत तो न्याय विजयास
आणणार नाही तोपर्यंत चेपलेला बोरू तो मोडणार नाही, मिणमिणती
वात तो विझवणार नाही. 21 त्याच्या नावावर सर्व राष्ट्रे आपली आशा
ठेवतील." 22 नंतर त्यांनी एका भूतग्रस्त मनुष्याला येशूंकडे आणले,
जो आंधळा व मुका होता, आणि येशूंनी त्याला बरे केले, व त्याला
बोलता व पाहता येऊ लागले. 23 तेव्हा सर्व लोक आश्चर्यचकित होऊन
म्हणाले, "हाच दावीदाचा पुत्र असेल काय?" 24 परंतु हे ऐकल्यावर
परूशी लोक म्हणाले, "हा मनुष्य केवळ बालजबूल, जो भुतांचा राजा
सैतान, याच्या साहाय्याने भुते घालवितो." 25 त्यांचे विचार येशूंना
माहीत होते, आणि ते त्यांना म्हणाले, "प्रत्येक फूट पडलेल्या राज्याचा
नाश होतो किंवा एखाद्या शहरातील किंवा घरातील लोकांत आपसात
फूट पडली, तर ते शहर किंवा ते घर टिकू शकत नाही. 26 जर सैतानच
सैतानाला घालवू लागला आणि त्याच्यात फूट पडली, तर त्याचे राज्य
कसे टिकेल? 27 आणि जर मी बालजबूलाच्या साहाय्याने भुते काढतो,
तर तुमचे लोक कोणाच्या साहाय्याने भुते काढतात? तर मग, ते तुमचे
न्यायाधीश असतील. 28 परंतु, मी जर परमेश्वराच्या आत्म्याने भुते
काढतो, तर परमेश्वराचे राज्य तुमच्यावर आले आहे. 29 "किंवा मग,
बळकट माणसाच्या घरात प्रवेश करून त्याला आधी बांधल्याशिवाय
त्याची मालमत्ता लुटून नेणे कसे शक्य होईल? त्याला बांधल्यावरच
त्याचे घर लुटता येईल. 30 "जो माझ्याबरोबर नाही तो माझ्याविरुद्ध
आहे, आणि जो माझ्याबरोबर गोळा करीत नाही तो विखुरतो. 31 आणि
म्हणून मी तुम्हाला सांगतो, प्रत्येक प्रकारचे पाप किंवा निंदा यांची क्षमा
होऊ शकेल, परंतु पवित्र आत्म्याविरुद्ध केलेल्या निंदेची क्षमा होणार
नाही. 32 जो कोणी मानवपुत्राच्या विरुद्ध बोलेल त्याला क्षमा होईल,
परंतु जो कोणी पवित्र आत्म्याविरुद्ध दुर्भाषण करेल, त्याला या युगात
आणि येणाऱ्या युगात कधीही क्षमा होणार नाही. (aiōn g165) 33 "जर
झाड चांगले असेल तर त्याचे फळ देखील चांगले असते आणि जर
झाड चांगले नसेल तर त्याचे फळ देखील चांगले नसते. झाड त्याच्या
फळावरून ओळखले जाते. 34 अहो सापांच्या पिलांनो! तुमच्यासारख्या
दुष्टांना चांगले आणि यथायोग्य कसे बोलता येईल? कारण अंतःकरणात
जे भरलेले आहे तेच मुखातून बाहेर पडते. 35 चांगला मनुष्य आपल्यात
साठविलेल्या चांगल्या गोष्टी बाहेर काढतो, तर दुष्ट मनुष्य वाईटाने
भरलेल्या साठ्यातून वाईटच बाहेर काढतो. 36 मी तुम्हाला सांगतो
की न्यायाच्या दिवशी प्रत्येकाला त्याच्या प्रत्येक निरर्थक शब्दाबद्दल
जाब द्यावा लागणार आहे. 37 कारण तुमच्या शब्दांवरूनच तुम्ही निर्दोष
ठराल, किंवा तुमच्या शब्दांवरूनच तुम्ही दोषी ठराल." 38 मग परूशी
व नियमशास्त्र शिक्षक यांच्यापैकी काही येशूंना म्हणाले, "गुरुजी,
तुमच्याकडून आम्हास चिन्ह पाहायचे आहे." 39 येशू त्यांना म्हणाले,
"दुष्ट आणि व्यभिचारी पिढी चिन्ह मागते! परंतु योनाह संदेष्ट्याच्या
चिन्हाखेरीज दुसरे कोणतेही चिन्ह दिले जाणार नाही. 40 कारण
ज्याप्रमाणे योनाह मोठ्या माशाच्या पोटात तीन दिवस आणि तीन रात्री
राहिला, तसेच मानवपुत्र, भूमीच्या पोटात तीन दिवस आणि तीन रात्री
राहील. 41 न्यायाच्या दिवशी निनवेहचे लोक उठून या पिढीला दोषी
ठरवतील, कारण योनाहचा उपदेश ऐकून त्यांनी पश्चात्ताप केला; आणि
पाहा, योनाहपेक्षाही श्रेष्ठ असा एकजण येथे आहे. 42 दक्षिणेची राणी
न्यायकाळी या पिढीबरोबर उठेल आणि त्यांना दंडपात्र ठरवेल, कारण
ती शलोमोनाचे ज्ञान ऐकण्यास पृथ्वीच्या टोकाकडून आली; आणि
पाहा, आता तर शलोमोनापेक्षा थोर असा कोणी येथे आहे. 43 "एखाद्या
मनुष्यातून अशुद्ध आत्मा निघाला, म्हणजे तो रुक्ष ठिकाणी विश्रांती
घेण्यासाठी जागा शोधतो, आणि ती त्याला सापडत नाही, 44 त्यावेळी
तो म्हणतो, 'जे घर मी सोडले, तिथे परत जाईन.' तो परत आला म्हणजे
त्याला ते घर रिकामे, झाडून स्वच्छ केलेले व व्यवस्थित ठेवलेले असे
आढळते. 45 नंतर तो जाऊन आपल्यापेक्षा अधिक दुष्ट असे आणखी
सात दुरात्मे आपल्याबरोबर घेऊन येतो व ते आत जाऊन तिथे राहतात,
आणि मग त्या मनुष्याची अवस्था पहिल्यापेक्षा वाईट होते. तसेच या
दुष्ट पिढीचे होईल." 46 येशू समुहाशी बोलत असताना त्यांची आई
आणि भाऊ त्यांच्याशी बोलण्यासाठी बाहेर उभे राहिले होते. 47 कोणी
त्यांना सांगितले, "तुमची आई आणि तुमचे भाऊ बाहेर उभे आहेत व

आपल्याशी बोलू इच्छित आहेत.” 48 त्यांनी त्याला उत्तर दिले, “कोण
माझी आई आणि कोण माझे भाऊ?” 49 मग आपल्या शिष्यांकडे बोट
दाखवित ते म्हणाले, “हे माझी आई आणि माझे भाऊ आहेत. 50 ते पुढे
म्हणाले, जो कोणी माझ्या स्वर्गीय पित्याच्या इच्छेप्रमाणे करतो, तोच
माझा भाऊ, तीच माझी बहीण आणि माझी आई आहे.”

**13** त्याच दिवशी येशू घरातून बाहेर पडले आणि सरोवराच्या
किनाऱ्यावर बसले. 2 तेव्हा लोकांनी त्यांच्याभोवती इतकी मोठी
गर्दी केली, म्हणून ते एका होडीत बसून किनाऱ्यावर उभे असलेल्या
लोकांना शिकवू लागले. 3 अनेक गोष्टी त्यांना दाखल्याद्वारे शिकवीत
ते म्हणाले: “एक शेतकरी बी पेरण्याकरिता निघाला. 4 तो बी पेरीत
असताना, काही बी वाटेवर पडले, ते पक्ष्यांनी खाऊन टाकले. 5 काही
बी खडकाळ जमिनीवर पडले, तिथे पुरेशी माती नव्हती व माती खोल
नसल्यामुळे ते झटकन उगवले. 6 परंतु सूर्य उगवल्यावर, ती रोपे
करपून गेली आणि मूळ नसल्यामुळे वाळून गेली. 7 काही बी काटेरी
झुडपांमध्ये पडले; ते उगवले खरे पण काटेरी झुडूपांनी त्याची वाढ
खुंटविली. 8 परंतु काही बी सुपीक जमिनीत पडले आणि जेवढे पेरले
होते त्या काही ठिकाणी शंभरपट, साठपट किंवा तीसपट पीक आले.
9 ज्याला ऐकावयास कान आहेत त्यांनी ऐकावे.” 10 आणि त्यांचे
शिष्य त्यांच्याकडे आले व त्यांना विचारले, “लोकांशी तुम्ही दाखल्यांनी
का बोलता?” 11 यावर येशूंनी खुलासा केला, “स्वर्गाच्या राज्याची
रहस्ये जाणून घेण्याचे ज्ञान तुम्हाला दिले आहे, परंतु त्यांना ते दिलेले
नाही. 12 कारण ज्यांच्याजवळ आहे त्यांना अधिक दिले जाईल, म्हणजे
त्यांच्याकडे विपुल असेल. ज्यांच्याजवळ नाही, त्यांच्याजवळ जे असेल
ते देखील त्यांच्यापासून काढून घेतले जाईल. 13 “ते नेहमी पाहत असले,
तरी त्यांना दिसत नाही, ते नेहमी कानांनी ऐकत असले, तरी त्यांना ऐकू
येत नाही व ते ग्रहण करत नाहीत. म्हणूनच मी त्यांच्याशी दाखल्यांनी
बोलतो! 14 त्यांच्याविषयी यशायाह संदेष्ट्याची ही भविष्यवाणी पूर्ण
होत आहे: “‘ते नेहमी पाहत राहिले, तरी त्यांना दिसत नाही, ते नेहमी
कानांनी ऐकत असले, तरी त्यांना ऐकू येत नाही व ते ग्रहण करत
नाहीत. 15 या लोकांचे अंतःकरण असंवेदनशील करा; त्यांचे कान मंद
आणि त्यांचे डोळे बंद करा. नाहीतर ते त्यांच्या डोळयांनी पाहतील,
त्यांच्या कानांनी ऐकतील, अंतःकरणापासून समजतील, आणि ते मागे
वळतील आणि बरे होतील.’ 16 परंतु तुमचे डोळे धन्य आहेत, कारण ते
पाहतात; तुमचे कान धन्य आहेत, कारण ते ऐकतात. 17 कारण मी
तुम्हाला निश्चित सांगतो, तुम्ही जे पाहिले आणि ऐकले, ते पाहण्याची
आणि ऐकण्याची अनेक संदेष्ट्यांनी आणि नीतिमान लोकांनी उत्कंठा
बाळगली होती. 18 “तर पेरणी करणाऱ्याच्या दाखल्याचा अर्थ काय आहे
ते ऐका: 19 वाटेवर पडलेले बी अशा हृदयाच्या लोकांचे प्रतीक आहे की,
ते परमेश्वराच्या राज्याची शुभवार्ता ऐकतात पण त्यातील त्यांना काहीही
समजत नाही. मग सैतान येतो आणि त्यांच्या हृदयात पेरलेले वचन
हिरावून नेतो. 20 खडकाळ जमिनीत पडलेले बी त्यांच्याप्रमाणे आहेत जे
वचन ऐकतात आणि तत्काळ आनंदाने स्वीकारतात. 21 परंतु वचनामुळे
संकटे आली किंवा छळ होऊ लागला की ते लगेच मागे जातात. त्यांना
मूळ नसल्यामुळे, ते लवकर नाहीसे होतात. 22 काटेरी झाडांमध्ये
पेरलेले बी, जे वचन ऐकतात; परंतु संसाराची चिंता, पैशांची लालसा
त्यांना भुरळ पाडते त्यामुळे परमेश्वराच्या वचनाची वाढ खुंटते व फळ
देत नाही, त्यांच्याप्रमाणे आहे. (aiōn g165) 23 परंतु चांगल्या जमिनीत
पडलेले बी असा व्यक्ती आहे की जो परमेश्वराचे वचन ऐकतो आणि
समजतो आणि मग, जे पेरले होते त्यापेक्षा शंभरपट पीक, साठपट
किंवा तीसपट पीक देतो.” 24 येशूंनी त्यांना दुसरा दाखला सांगितला:
“स्वर्गाचे राज्य, आपल्या शेतामध्ये उत्तम प्रतीचे बी पेरणाऱ्या एका
मनुष्यासारखे आहे. 25 पण रात्री सर्व झोपलेले असताना त्याचा शत्रू
आला. आणि गव्हामध्ये रानगवताचे बी पेरले, आणि निघून गेला. 26
पीक वाढू लागले, आणि दाणे आले तसे त्याच्याबरोबर रानगवतही दिसू
लागले. 27 “तेव्हा शेतातील मजूर मालकाकडे आले आणि म्हणाले,
‘महाराज, शेतात तुम्ही उत्तम प्रतीचे बी पेरले होते की नाही? तर मग
रानगवत कुठून आले?’ 28 “तेव्हा मालकाने म्हटले, ‘हे शत्रूने केले
आहे.’ “मजुरांनी त्याला विचारले, आम्ही ते उपटून टाकावे काय? 29
“‘नाही,’ मालक म्हणाला, ‘तुम्ही रानगवत उपटून काढीत असताना
त्याच्याबरोबर कदाचित गहूही उपटाल. 30 तर हंगामापर्यंत दोघांनाही
बरोबरच वाढू द्या. त्यावेळी मी कापणी करणाऱ्यांना सांगेन की पहिल्याने
रानगवत गोळा करून ते जाळण्यासाठी त्यांच्या पेंढ्या बांधा, मग गहू
गोळा करून माझ्या कोठारात आणा.’” 31 येशूंनी त्यांना आणखी एक
दाखला सांगितला: “स्वर्गाचे राज्य मोहरीच्या दाण्यासारखे आहे, जो
एका मनुष्याने घेऊन आपल्या शेतात लावला. 32 तो सर्व दाण्यापैकी
सर्वात लहान असला तरी जेव्हा ते वाढते तेव्हा ते बागेतील सर्वात मोठे
झाड होते, मग त्याच्या फांद्यांमध्ये आकाशातील पक्षी येऊन विसावा
घेतात.” 33 त्यांनी त्यांना आणखी एक दाखला सांगितला: “स्वर्गाचे
राज्य त्या खमिरासारखे आहे, जे एका स्त्रीने ते घेतले आणि तीन माप
पिठात एकत्र केले की त्यामुळे सर्व पीठ फुगले.” 34 या सर्वगोष्टी
येशू गर्दीतील लोकांशी दाखल्यांद्वारे बोलले; आणि ते दाखल्यांवाचून
त्यांच्याशी काहीच बोलले नाही. 35 याप्रमाणे संदेष्ट्यांद्वारे जे भविष्य
सांगितले होते ते पूर्ण झाले ते हे: “मी तोंड उघडून दाखल्यांनी त्यांच्याशी
बोलेन. जगाच्या उत्पत्तीपासून ठेवलेले रहस्य मी त्यांना सांगेन.” 36
गर्दीला बाहेर सोडून ते घरात गेले, तेव्हा त्यांचे शिष्य त्यांच्याकडे आले
आणि म्हणाले, “शेतातील रानगवताच्या दाखल्याचा अर्थ आम्हाला
स्पष्ट करून सांगा.” 37 ते म्हणाले, “उत्तम प्रतीचे बी पेरणारा मानवपुत्र
आहे. 38 जग हे शेत आहे आणि चांगले बी हे परमेश्वराच्या राज्याचे
लोक आहेत. रानगवत सैतानाच्या लोकांचे प्रतीक आहे. 39 गव्हामध्ये
रानगवताचे बी पेरणारा शत्रू म्हणजे सैतान आहे. हंगाम म्हणजे युगाचा
अंत आणि कापणी करणारे म्हणजे देवदूत आहेत. (aiōn g165) 40 “जसे
रानगवत उपटून अग्नीत जाळण्यात आले, त्याचप्रमाणे युगाच्या शेवटी
होईल. (aiōn g165) 41 मानवपुत्र त्यांचे देवदूत पाठवेल आणि पाप व
दुष्टाई करणाऱ्या सर्वांना त्यांच्या राज्यातून बाहेर काढेल. 42 त्यांना

जळत्या भट्टीत टाकण्यात येईल जिथे रडणे आणि दातखाणे चालेल. 43
मग नीतिमान लोक आपल्या पित्याच्या राज्यात सूर्यासारखे चमकतील.
ज्यांना ऐकावयास कान आहेत त्यांनी ऐकावे. 44 “स्वर्गाचे राज्य शेतात
दडवून ठेवलेल्या धनासारखे आहे. एका मनुष्याला ते सापडले, तेव्हा
त्याने ते पुन्हा लपविले आणि अतिशय आनंदाने त्याच्याजवळ होते
ते सारे विकून ते शेत विकत घेतले. 45 “पुन्हा, स्वर्गाचे राज्य उत्तम
प्रतीच्या मोत्यांच्या शोधात असलेल्या एका व्यापाऱ्यासारखे आहे. 46
त्याला फार मोठ्या किमतीचे एक मोती सापडले तेव्हा त्याने जाऊन
आपल्या मालकीचे सर्वकाही विकून ते विकत घेतले. 47 “आणखी,
स्वर्गाचे राज्य मासे धरणाऱ्या एका जाळयासारखे आहे. ते सरोवरात
टाकले आणि जाळयात सर्वप्रकारचे मासे लागले. 48 जाळे भरल्यावर
कोळी लोकांनी ते ओढून काठावर आणले. मग खाली बसून त्यांनी
चांगले मासे भांड्यात भरले आणि वाईट मासे फेकून दिले. 49 युगाच्या
शेवटीही असेच होईल देवदूत येतील आणि वाईट लोकांना नीतिमान
लोकांतून वेगळे करतील. (aiōn g165) 50 आणि त्यांना जळत्या भट्टीत
टाकण्यात येईल जिथे रडणे आणि दातखाणे चालेल. 51 “तुम्हाला
या सर्वगोष्टी समजल्या काय?” येशूंनी विचारले. “होय,” ते म्हणाले.
52 मग येशू त्यांना म्हणाले, “म्हणून नियमशास्त्राचा प्रत्येक शिक्षक
जो स्वर्गाच्या राज्यात शिष्य झाला आहे, तो त्या घरमालकासारखा
आहे जो त्याच्या भांडारातून जुने आणि नवे धन काढतो.” 53 येशूंनी हे
दाखले सांगण्याचे संपविल्यावर ते तिथून निघाले. 54 स्वतःच्या गावी
येऊन, तेथील सभागृहामध्ये असलेल्या लोकांना त्यांनी शिकविण्यास
सुरुवात केली आणि ते सर्व आश्चर्यचकित झाले. त्यांनी विचारले, “या
मनुष्याला हे ज्ञान व चमत्कार करण्याचे सामर्थ्य कुठून प्राप्त झाले?
55 हा सुताराचा मुलगा नाही काय? याच्या आईचे नाव मरीया नाही
काय, आणि याकोब, योसेफ, शिमोन आणि यहूदाह हे त्याचे भाऊ
नाहीत काय? 56 याच्या सर्व बहिणी आपल्यातच नाहीत का? मग या
मनुष्याला या सर्वगोष्टी कुठून प्राप्त झाल्या?” 57 आणि ते त्याच्यावर
संतापले. तेव्हा येशू त्यांना म्हणाले, “संदेष्ट्याचा मान होत नाही असे
नाही; फक्त आपले गाव आणि आपले घर यांच्यात तो मान्यता पावत
नाही.” 58 आणि त्यांच्या अविश्वासामुळे त्यांनी त्या ठिकाणी फार
चमत्कार केले नाहीत.

**14** त्यावेळी प्रांताधिकारी हेरोदाने येशूंविषयी ऐकले, 2 तो आपल्या
सेवकांना म्हणाला, “हा मेलेल्यातून जिवंत होऊन आलेला
बाप्तिस्मा करणारा योहानच आहे! म्हणूनच आश्चर्यकर्म करण्याचे
सामर्थ्य त्याच्यामध्ये दिसत आहे.” 3 आता हेरोदाने आपली पत्नी
हेरोदिया, जी पूर्वी त्याचा भाऊ फिलिप्प याची पत्नी होती हिच्या
मागणीनुसार योहानाला बांधून तुरुंगात ठेवले होते. 4 कारण योहान
त्याला म्हणत असे: “तू तिला ठेवावे हे नियमाने योग्य नाही.” 5
म्हणून हेरोद त्याचा जीव घेण्यास पाहत होता, पण लोकांना तो भीत
होता, कारण योहान संदेष्टा आहे असे लोक मानत होते. 6 हेरोदाच्या
वाढदिवशी हेरोदियेच्या कन्येने पाहुण्यांसाठी नृत्य करून हेरोदाला खूप
संतुष्ट केले. 7 त्यामुळे वचन देऊन ती जे मागेल ते देण्याची त्याने शपथ
वाहिली. 8 तिने आपल्या आईच्या संकेताप्रमाणे म्हटले, “बाप्तिस्मा
करणाऱ्या योहानाचे शिर एका तबकात मला द्या.” 9 तेव्हा राजा
अस्वस्थ झाला, पण आपल्या शपथेमुळे आणि भोजनाला आलेल्या
पाहुण्यांमुळे त्याने मुलीची मागणी अंमलात आणण्यासाठी हुकूम दिला,
10 आणि योहानाचा तुरुंगात शिरच्छेद करण्यात आला. 11 त्याचे शिर
एका तबकात आणून त्या मुलीला देण्यात आले व तिने ते आपल्या
आईला दिले. 12 योहानाचे शिष्य आले आणि त्यांनी त्याचे शव घेतले
आणि पुरले. नंतर जे घडले ते त्यांनी येशूंना सांगितले. 13 जे घडले ते
ऐकल्यानंतर, येशू एका होडीत बसून एकटेच दूर एकांतस्थळी गेले,
परंतु हे गर्दीतील लोकांनी ऐकले, तेव्हा शहरातील लोक त्यांच्याकडे
पायी चालत आले. 14 जेव्हा येशू होडीतून उतरले, त्यांनी मोठा समुदाय
पाहिला, तेव्हा त्यांना त्यांचा कळवळा आला व त्यांनी आजाऱ्यांना बरे
केले. 15 संध्याकाळ झाल्यावर शिष्य येशूंकडे येऊन म्हणाले, “ही
ओसाड जागा आहे शिवाय उशीरही होत आहे. लोकांना आसपासच्या
गावात जाऊन काही अन्न विकत घ्यावे म्हणून त्यांना निरोप द्या.” 16
यावर येशूंनी उत्तर दिले, “त्यांना जाण्याची गरज नाही; तुम्ही त्यांना
काहीतरी खावयास द्या.” 17 त्यांनी उत्तर दिले, “आमच्याजवळ पाच
भाकरी आणि दोन मासे आहेत.” 18 येशू म्हणाले, “ते माझ्याकडे
आणा.” 19 येशूंनी लोकांना गवतावर बसावयास सांगितले. मग
येशूंनी त्या पाच भाकरी व दोन मासे घेतले, स्वर्गाकडे पाहून त्याबद्दल
आभार मानले आणि मग त्या भाकरी मोडून शिष्यांजवळ लोकांना
वाढण्यासाठी दिले. 20 ते सर्वजण जेवले आणि तृप्त झाले आणि
शिष्यांनी उरलेल्या तुकड्यांनी बारा टोपल्या उचलल्या. 21 जेवणाऱ्या
पुरुषांची संख्या सुमारे पाच हजार होती. यात स्त्रिया व मुले यांची संख्या
धरलेली नाही. 22 लगेच येशूंनी आपल्या शिष्यांना होडीत बसून पुढे
सरोवराच्या पैलतीराला जाण्यास सांगितले आणि ते स्वत: लोकांना
निरोप देण्यासाठी मागे राहिले. 23 त्यांना निरोप दिल्यावर, येशू प्रार्थना
करण्यासाठी डोंगरावर गेले. रात्र झाली तरी तिथे ते एकांती होते. 24
तेव्हा होडी किनाऱ्यापासून बरीच दूर गेली होती आणि वारा त्यांच्याविरुद्ध
दिशेने वाहत असल्यामुळे लाटांनी हेलकावे खात होती. 25 पहाटेच्या
सुमारास येशू पाण्यावरून चालत त्यांच्याकडे आले. 26 शिष्यांनी येशूंना
सरोवरावरून चालताना पाहिले, तेव्हा ते फार घाबरले आणि ओरडून
म्हणाले, “हे भूत आहे.” 27 पण येशू त्यांना तत्काळ म्हणाले, “धीर
धरा, मीच आहे. भिऊ नका.” 28 मग पेत्र म्हणाला, “प्रभूजी, जर आपण
असाल, तर पाण्यावरून चालत आपल्याकडे येण्यास मला सांगा.” 29
ते म्हणाले “ये.” तेव्हा पेत्र होडीतून उतरला आणि पाण्यावरून येशूंकडे
चालत जाऊ लागला. 30 परंतु उंच लाटांकडे त्याचे लक्ष गेले, तेव्हा
तो घाबरला आणि लागला, “प्रभूजी, मला वाचवा!” त्याने आरोळी
मारली. 31 तत्क्षणी येशूंनी हात पुढे करून त्याला धरले. येशू म्हणाले,
“अल्पविश्वासी, तू संशय का धरलास?” 32 मग जेव्हा ते होडीत चढले
तेव्हा वादळ शांत झाले. 33 होडीत असलेले दुसरे शिष्य त्यांच्या पाया

पडून म्हणाले, “खरोखर तुम्ही परमेश्वराचे पुत्र आहात.” 34 ते पलीकडे
गेल्यावर गनेसरेत येथे उतरले. 35 तेथील लोकांनी येशूंना ओळखले
व आसपासच्या सर्व भागात संदेश पाठविला. लोकांनी सर्व आजारी
लोकांना त्यांच्याकडे आणले. 36 “तुमच्या झग्याच्या काठाला तरी
आम्हाला शिवू द्या.” अशी त्यांनी त्यांना विनंती केली आणि जितक्यांनी
त्यांना स्पर्श केला तितके सर्व बरे झाले.

**15** परूशी आणि यरुशलेमहून आलेले नियमशास्त्राचे काही शिक्षक
येशूंकडे येऊन विचारू लागले, 2 “तुमचे शिष्य आपल्या
वाडवडीलांच्या परंपरा का मोडतात? जेवणापूर्वी ते आपले हात धूत
नाहीत!” 3 येशूंनी उत्तर दिले, “तुमच्या प्रथा पाळण्याकरिता तुम्ही
परमेश्वराच्या आज्ञा का मोडता? 4 परमेश्वर म्हणाले, ‘तुझ्या वडिलांचा
आणि आईचा सन्मान करा’ आणि ‘जो कोणी आपल्या आई किंवा
वडिलास शाप देईल त्यास जिवे मारावे.’ 5 परंतु तुम्ही म्हणता, जर
कोणी असे घोषित करतो की, आईवडिलांना करत असलेली मदत, ही
‘परमेश्वराला समर्पित’ आहे. 6 अशाप्रकारे ते त्यांच्या आईवडिलांचा
मान ठेवीत नाहीत, पण तुमच्या परंपरा पाळल्या जाव्या म्हणून तुम्ही
परमेश्वराचे वचन रद्द करता. 7 अहो ढोंग्यांनो! यशायाह संदेष्ट्याने
तुमच्या ढोंगीपणाचे अचूक वर्णन केले आहे, तो म्हणतो: 8 “‘हे लोक
केवळ त्यांच्या मुखाने माझा सन्मान करतात, पण त्यांची अंतःकरणे
माझ्यापासून दूर आहेत. 9 माझी उपासना ते व्यर्थपणे करतात; त्यांची
शिकवण केवळ मानवी नियम आहेत.’” 10 येशूने गर्दीतील लोकांना
आपल्याकडे बोलाविले आणि म्हटले, “ऐका आणि समजून घ्या.
11 मनुष्याच्या मुखात जे जाते ते त्यांना अशुद्ध करीत नाही, पण जे
त्यांच्या मुखातून बाहेर पडते ते त्यांना अशुद्ध करते.” 12 थोड्या वेळाने
त्यांच्या शिष्यांनी त्यांच्याकडे येऊन विचारले, “आपल्या उद्गारांनी परूशी
लोकांची मने दुखावली आहेत हे तुम्हाला कळले काय?” 13 येशू
म्हणाले, “माझ्या स्वर्गीय पित्याने न लावलेले प्रत्येक झाड उपटून
टाकण्यात येईल. 14 त्यांच्याकडे लक्ष देऊ नका; ते आंधळे मार्गदर्शक
आहेत. जर एक आंधळा मनुष्य दुसऱ्या आंधळ्याला वाट दाखवेल, तर
ते दोघेही खाचेत पडतील.” 15 पेत्र म्हणाला, “आम्हाला हा दाखला
स्पष्ट करून सांगा.” 16 “तुम्ही अजूनही अज्ञानी आहात काय?” येशूंनी
त्यांना विचारले. 17 “तुम्हाला हे समजत नाही काय की, जे मुखात
जाते ते पोटात उतरते आणि शरीरातून बाहेर पडते? 18 परंतु जे शब्द
मुखातून बाहेर येतात ते हृदयातून येतात आणि तेच मनुष्याला अशुद्ध
करतात. 19 कारण हृदयातून दुष्ट विचार, खून, जारकर्म, व्यभिचार,
चोरी, खोटी साक्ष, निंदा ही बाहेर पडतात; 20 आणि हेच मनुष्याला
अशुद्ध करतात. परंतु हात धुतल्याशिवाय अन्न खाल्याने ते अशुद्ध होत
नाहीत.” 21 नंतर येशूंनी तो प्रांत सोडला आणि सोर व सीदोन या
प्रांतात गेले. 22 एक कनानी स्त्री त्या भागातून येशूंकडे आली आणि
त्यांना विनवणी करून म्हणाली, “प्रभू, दावीद राजाचे पुत्र, माझ्यावर
दया करा! माझी मुलगी भूतग्रस्त झाली असून, ती पुष्कळ छळ सहन
करीत आहे.” 23 पण येशूंनी एका शब्दानेही तिला उत्तर दिले नाही;
तेव्हा त्यांच्या शिष्यांनी त्यांना विनंती केली, “प्रभूजी, तिला पाठवून
द्या, कारण ती आपल्यामागे सारखी ओरडत येत आहे.” 24 तेव्हा येशू
त्या स्त्रीला म्हणाले, “हरवलेल्या इस्राएली मेंढराकडेच मला पाठविले
आहे.” 25 परंतु ती बाई पुढे आली आणि त्यांच्या पाया पडून म्हणाली,
“प्रभूजी, मला मदत करा.” 26 येशू म्हणाले, “लेकरांची भाकर काढून
कुत्र्यांना घालणे बरोबर नाही.” 27 “हे प्रभू आपले म्हणणे अगदी बरोबर
आहे!” स्त्रीने उत्तर दिले, “स्वामीच्या मेजाखाली जे तुकडे पडतात ते
कुत्रेही खातात.” 28 ते ऐकून येशू तिला म्हणाले, “बाई, तुझा विश्वास
फार मोठा आहे! म्हणून तुझी विनंती मान्य करण्यात आली आहे.”
आणि त्याच क्षणी तिची मुलगी बरी झाली. 29 नंतर येशूंनी ते ठिकाण
सोडले आणि गालील सरोवराच्या किनाऱ्याने गेले. मग ते एका डोंगरावर
जाऊन बसले. 30 खूप मोठी गर्दी त्यांच्याजवळ जमली. लोकांनी
आपल्यातील लंगडे, आंधळे, मुके, अपंग आणि इतर रोगांनी आजारी
असलेल्यांना त्यांच्या चरणांजवळ आणले आणि त्या सर्वांना त्यांनी
बरे केले. 31 मुके बोलू लागले, जे लंगडे होते ते चालू लागले आणि
आंधळे पाहू लागले. सर्व जमाव आश्चर्यचकित होऊन इस्राएलाच्या
परमेश्वराची मनःपूर्वक स्तुती करू लागला. 32 येशूंनी आपल्या शिष्यांना
जवळ बोलाविले आणि म्हणाले, “मला या लोकांचा कळवळा येतो.
कारण ते तीन दिवसापासून आहेत आणि त्यांना खावयास काही नाही.
त्यांना तसेच उपाशी पाठवून देण्याची माझी इच्छा नाही, तसे केले तर
ते रस्त्यातच कोसळून पडतील.” 33 शिष्यांनी उत्तर दिले, “एवढ्या
लोकांना पुरेल इतके अन्न या ओसाड रानात कुठून आणावे?” 34
येशूंनी विचारले, “तुमच्याजवळ किती भाकरी आहेत?” शिष्यांनी उत्तर
दिले, “सात आणि काही लहान मासे.” 35 तेव्हा त्यांनी जमावाला
जमिनीवर बसावयास सांगितले. 36 मग त्या सात भाकरी व मासे
घेऊन त्या भाकरीबद्दल परमेश्वराचे आभार मानले आणि त्या मोडल्या
व शिष्यांना दिल्या आणि त्यांनी ते लोकांना वाढले. 37 ते सर्वजण
जेवले व तृप्त झाले. नंतर शिष्यांनी उरलेले तुकडे गोळा केले तेव्हा सात
टोपल्या भरल्या. 38 स्त्रिया व लेकरांशिवाय जे जेवले ते चार हजार
पुरुष होते. 39 येशूंनी लोकांना घरी जाण्यास निरोप दिल्यानंतर ते एका
होडीत बसून मगादान नावाच्या भागात आले.

**16** तिथे परूशी व सदूकी लोक येऊन येशूंना प्रश्न विचारू लागले.
त्यांची परीक्षा पाहण्याकरिता, ते म्हणाले, “आकाशातून आम्हास
चिन्ह दाखवा.” 2 तेव्हा येशूंनी उत्तर दिले, “संध्याकाळ झाली, तेव्हा
तुम्ही म्हणता, ‘आकाश तांबूस झाले आहे, म्हणजे हवामान अनुकूल
होईल.’ 3 आणि सकाळी तुम्ही म्हणता, ‘आकाश तांबूस आणि गडद
आहे, म्हणजे वादळी हवा सुटेल,’ आकाशात होणाऱ्या बदलांवरून
त्याचा अर्थ तुम्हाला काढता येतो, परंतु काळाच्या चिन्हांचा अर्थ तुम्हाला
लावता येत नाही. 4 दुष्ट आणि व्यभिचारी पिढी चिन्ह मागते, परंतु
योनाहच्या चिन्हाखेरीज दुसरे कोणतेही चिन्ह दिले जाणार नाही.”
मग येशू तिथून निघून गेले. 5 सरोवराच्या पलीकडे गेले आणि शिष्य
आपल्याबरोबर भाकरी घ्यावयास विसरले. 6 येशूने त्यांना म्हटले,

“सांभाळा, परूशी व सदूकी लोकांच्या खमिरापासून सावध असा.” 7 तेव्हा शिष्य आपसात चर्चा करू लागले आणि म्हणाले, “आपण भाकर आणली नाही म्हणून ते असे बोलत आहेत.” 8 त्यांच्या चर्चेचा विषय ओळखून येशू म्हणाले, “अहो, अल्पविश्वासी, तुम्ही भाकर नाही याबद्दल आपसात का बोलता? 9 तुम्हाला अजून समजले नाही काय? पाच हजारांना पाच भाकरींनी जेवू घातले तेव्हा तुम्ही किती टोपल्या गोळा केल्या ते तुम्हाला आठवत नाही काय? 10 किंवा सात भाकरींनी चार हजारांना जेवू घातले तेव्हा उरलेल्या अन्नाच्या तुम्ही किती टोपल्या गोळा केल्या? 11 तुम्हाला कसे समजत नाही की भाकरीविषयी मी बोलत नाही? परंतु परूशी व सदूकी यांच्या खमिराविषयी सावध असण्यास सांगत आहे.” 12 मग भाकरीमध्ये घालण्यात येणाऱ्या खमिराबद्दल ते बोलत नसून परूशी व सदूकी यांच्या चुकीच्या शिक्षणाबद्दल ते बोलत होते हे त्यांच्या लक्षात आले. 13 येशू कैसरीया फ़िलिप्पी प्रांतात आले, तेव्हा त्यांनी आपल्या शिष्यांना विचारले, “मानवपुत्र कोण आहे असे लोक म्हणतात?” 14 त्यांनी उत्तर दिले, “काहीजण म्हणतात बाप्तिस्मा करणारा योहान; काही एलीयाह म्हणतात; आणि आणखी काही यिर्मयाह किंवा संदेष्ट्यापैकी एक.” 15 “परंतु तुमचे मत काय?” येशूंनी विचारले, “मी कोण आहे, असे तुम्ही म्हणता?” 16 शिमोन पेत्राने उत्तर दिले, “तुम्ही ख्रिस्त, जिवंत परमेश्वराचे पुत्र आहात.” 17 येशूंनी उत्तर दिले, “योनाहच्या पुत्रा शिमोना, तू धन्य आहेस, हे तुला मांस किंवा रक्त यांनी नव्हे, तर माझ्या स्वर्गीय पित्याने प्रकट केले आहे 18 आणि मी तुला सांगतो की तू पेत्र आहेस आणि या खडकावर मी माझी मंडळी उभारेन; तिच्यापुढे अधोलोकाच्या द्वाराचा विजय होणार नाही. (Hadēs g86) 19 मी तुला स्वर्गाच्या राज्याच्या किल्ल्या देईन; पृथ्वीवर जे काही तू बंद करशील ते स्वर्गात बंद केले जाईल आणि पृथ्वीवर जे काही तू मोकळे करशील ते स्वर्गात मोकळे केले जाईल.” 20 मग येशूंनी शिष्यांना ताकीद दिली, “मी ख्रिस्त आहे हे कोणालाही सांगू नका.” 21 तेव्हापासून, येशू आपल्या शिष्यांना सांगू लागले की त्यांनी यरुशलेमास जाणे, वडील व मुख्य याजक, नियमशास्त्राचे शिक्षक यांच्याकडून अनेक दुःख सहन करणे, जिवे मारले जाणे आणि तिसऱ्या दिवशी पुन्हा जिवंत होणे हे अगत्य आहे. 22 पेत्र त्यांना बाजूला घेऊन त्यांचा निषेध करू लागला व म्हणाला, “प्रभूजी, असे तुम्हाला कधीच होणार नाही.” 23 तेव्हा येशू पेत्राकडे वळून म्हणाले, “अरे सैताना, माझ्या दृष्टिआड हो! तू मला अडखळण आहे. तुझे मन परमेश्वराच्या गोष्टींकडे नाही, परंतु केवळ मनुष्याच्या गोष्टींकडे आहे.” 24 मग येशू आपल्या शिष्यांना म्हणाले, “जर कोणी माझा शिष्य होऊ पाहतो तर त्याने स्वतःस नाकारावे, त्याचा क्रूसखांब उचलावा आणि माझ्यामागे यावे. 25 कारण जो कोणी आपला जीव वाचवेल तो आपल्या जीवाला मुकेल, पण जो कोणी माझ्यासाठी आपल्या जीवाला गमावेल, तो त्याचा जीव वाचवेल. 26 कोणी सर्व जग मिळविले आणि आपला आत्मा गमविला तर त्यातून काय चांगले निष्पन्न होणार? आपल्या आत्म्याच्या मोबदल्यात मनुष्याला दुसरे काही देता येईल का? 27 कारण, मानवपुत्र आपल्या पित्याच्या वैभवानिशी त्यांच्या दिव्य दूतांबरोबर येईल, तेव्हा प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या कृत्यांप्रमाणे प्रतिफळ देईल. 28 “मी तुम्हाला निश्चित सांगतो, की येथे उभे असणारे काहीजण असे आहेत की, ते मानवपुत्राला त्यांच्या राज्यात येताना पाहीपर्यंत, त्यांना मरणाचा अनुभव येणार नाही.”

17 सहा दिवसानंतर पेत्र, याकोब आणि याकोबाचा भाऊ योहान या तिघांना बरोबर घेऊन येशू एका उंच डोंगरावर गेले; 2 तिथे त्यांच्यासमोर येशूंचे रूपांतर झाले, त्यांचा चेहरा सूर्यासारखा तेजस्वी झाला आणि त्यांची वस्त्रे प्रकाशासारखी शुभ्र झाली. 3 त्याचवेळी मोशे आणि एलीयाह तिथे प्रकट झाले आणि येशूंबरोबर संवाद करू लागले. 4 तेव्हा पेत्र येशूंना म्हणाला, “प्रभूजी, आपल्याला येथेच राहता आले, तर फार चांगले होईल. आपली इच्छा असेल, तर मी येथे तीन मंडप उभारेन एक तुमच्यासाठी, एक मोशेसाठी आणि एक एलीयाहसाठी.” 5 पण तो हे बोलत असतानाच, तेजस्वी मेघाने त्यांच्यावर छाया केली आणि मेघातून वाणी ऐकू आली, “हा माझा परमप्रिय पुत्र आहे आणि त्याच्याविषयी मी संतुष्ट आहे. याचे तुम्ही ऐका!” 6 ही वाणी कानी पडताच, शिष्य अतिशय भयभीत झाले आणि जमिनीवर पालथे पडले. 7 पण येशूंनी येऊन त्यांना स्पर्श करून म्हणाले, “उठा, भिऊ नका!” 8 जेव्हा त्यांनी वर पाहिले, त्यावेळी येशू व्यतिरिक्त त्यांना कोणीही दिसले नाही. 9 ते डोंगरावरून खाली उतरत असताना येशूंनी त्यांना आज्ञा केली, “तुम्ही जे काही पाहिले, ते मानवपुत्र मरणातून पुन्हा उठेपर्यंत कोणालाही सांगू नका.” 10 शिष्यांनी येशूंना विचारले, “एलीयाह प्रथम आला पाहिजे, असे नियमशास्त्राचे शिक्षक का म्हणतात?” 11 येशूंनी उत्तर दिले, “एलीयाह येईल व सर्वकाही व्यवस्थित करेल याची खात्री बाळगा. 12 पण मी तुम्हाला सांगतो, एलीयाह आधीच आलेला आहे आणि त्यांनी त्याला ओळखले नाही, परंतु त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांनी त्याला वाटेल तसे वागविले आहे.” अशाच प्रकारे मानवपुत्रालाही त्यांच्या हातून यातना भोगावयास लागतील. 13 तेव्हा येशू बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाविषयी बोलत आहेत, हे शिष्यांच्या लक्षात आले. 14 जेव्हा ते समुदायाकडे आले, त्यातील एक मनुष्य येशूंकडे आला आणि त्यांच्यापुढे गुडघे टेकून म्हणाला, 15 “प्रभूजी, माझ्या मुलावर दया करा, कारण तो फेपरेकरी आहे आणि त्यामुळे त्याला फार यातना भोगाव्या लागतात. तो वारंवार अग्नीत नाही तर पाण्यात पडतो. 16 मी मुलाला तुमच्या शिष्यांकडे घेऊन आलो, पण त्यांना बरे करता आले नाही.” 17 येशूंनी उत्तर दिले, “हे विश्वासहीन व दुष्ट पिढी, आणखी किती काळ मी तुमच्याबरोबर राहिले पाहिजे? आणखी किती काळ मी सहन करू? त्या मुलाला माझ्याकडे आणा.” 18 मग येशूंनी त्या मुलामधील दुरात्म्याला धमकावून घालवून दिले व त्या क्षणापासून तो मुलगा बरा झाला. 19 मग येशूंच्या शिष्यांनी त्यांच्याकडे एकांतात येऊन त्यांना विचारले, “त्याला आम्ही का काढू शकलो नाही?” 20 येशूंनी उत्तर दिले, “तुमच्या अल्पविश्वासामुळे,” मी तुम्हाला सत्य सांगतो, तुमच्याजवळ मोहरीच्या दाण्याएवढा विश्वास असला आणि या डोंगराला तू इथून पलीकडे

सरक, असे तुम्ही म्हणाला, तरी तो दूर सरकेल. तुम्हाला कोणतीही गोष्ट अशक्य होणार नाही. 21 असा प्रकार प्रार्थना व उपास याद्वारेच जाऊ शकतो. 22 ते गालीलात एकत्र आले असताना, येशूंनी शिष्यांना सांगितले, “मानवपुत्राला, मनुष्यांच्या हाती दिले जाईल. 23 ते त्याला जिवे मारतील. पण तिसऱ्या दिवशी तो पुन्हा जिवंत केला जाईल.” हे ऐकून शिष्यांची अंतःकरणे दुःखाने व्यापून गेली. 24 येशू व त्यांचे शिष्य कफर्णहूमात आल्यानंतर, दोन द्राह्मा मंदिर कर वसूल करणारे पेत्राकडे येऊन म्हणाले, “तुमचे गुरुजी मंदिराचा कर भरीत नसतात काय?” 25 “अर्थात् ते कर भरीत असतात,” पेत्राने उत्तर दिले. मग पेत्र घरात गेला, तेव्हा तो काही बोलण्या आधी येशूंनी त्याला विचारले, “शिमोना, तुला काय वाटते? पृथ्वीचे राजे कर कसे गोळा करतात; स्वतःच्या लेकरांकडून की इतर लोकांकडून?” 26 “इतर लोकांकडून,” पेत्राने उत्तर दिले. “लेकरे कर भरण्यापासून मुक्त आहेत.” तेव्हा येशू म्हणाले 27 “पण आपण अडखळण होऊ नये, म्हणून सरोवराच्या किनाऱ्यावर जा व तुझा गळ टाक आणि प्रथम जो मासा धरशील त्या माशाचे तोंड उघड आणि त्यात तुला चार द्राह्माचे नाणे मिळेल. ते घे आणि माझ्यासाठी व तुझ्यासाठी कर भर.”

**18** त्याच सुमारास शिष्य येशूंकडे आले आणि त्यांना विचारले, “स्वर्गाच्या राज्यात सर्वात श्रेष्ठ कोण आहे?” 2 तेव्हा येशूंनी एका लहान लेकराला जवळ बोलाविले आणि त्या लेकराला त्यांच्यामध्ये उभे केले. 3 मग येशू त्यांना म्हणाले, “मी तुम्हाला निश्चितपणे सांगतो, जोपर्यंत तुमच्यात बदल होऊन तुम्ही लहान बालकासारखे होत नाही तोपर्यंत स्वर्गाच्या राज्यात कधीही तुमचा प्रवेश होणार नाही. 4 म्हणून जो कोणी स्वतःला या बालकासारखे नम्र करतो तोच स्वर्गाच्या राज्यात सर्वश्रेष्ठ होईल. 5 आणि कोणीही माझ्या नावाने अशा लहान बालकाचा स्वीकार करतो, तो माझा स्वीकार करतो. 6 “जर कोणी माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या अशा लहानातील एकालाही अडखळण आणतो, तर त्यांच्या गळयात जात्याची मोठी तळी बांधून समुद्रात फेकून देणे हे त्यांच्यासाठी अधिक हिताचे ठरेल. 7 ज्याच्यामुळे लोकांना अडखळण येतात त्या जगाचा धिक्कार असो! अडखळण येणारच नाही हे अशक्य आहे, परंतु ज्याच्याद्वारे अडखळण येईल, त्याला धिक्कार असो. 8 तुझा हात किंवा पाय तुम्हाला अडखळण करीत असेल तर तो कापून टाकून दे. दोन पाय असून शाश्वत अग्नीत टाकले जावे, यापेक्षा एका पायाने अपंग होऊन जीवनात प्रवेश करणे हे तुझ्या हिताचे आहे (aiōnios g166) 9 जर तुझा डोळा तुला अडखळण करीत असेल, तर तो उपटून फेकून दे. दोन डोळयांसह अग्नीच्या नरकात जाण्यापेक्षा एका डोळयाने जीवनात जाणे उत्तम आहे. (Geenna g1067) 10 “या लहान बालकांपैकी एकालाही तुच्छ लेखू नका, कारण मी तुम्हाला सांगतो की स्वर्गात त्यांचे देवदूत माझ्या पित्याचे मुख निरंतर पाहत असतात. 11 मानवपुत्र हरवलेले शोधावयास आणि उद्धार करावयास आला आहे. 12 “तुम्हाला काय वाटते? एखाद्याजवळ शंभर मेंढरे आहेत आणि त्यातील एक हरवले, तर तो मनुष्य काय करेल? तो आपली नव्याण्णव मेंढरे डोंगरावर सोडून ते हरवलेले मेंढरू शोधण्यास जाणार नाही काय? 13 आणि मी तुम्हाला खचित सांगतो, ते सापडल्यावर, आपली नव्याण्णव मेंढरे सुखरुप आहेत त्यापेक्षा, आपले हरवलेले मेंढरू सापडले म्हणून तो अधिक आनंद करेल. 14 त्याच प्रकारे या लहान बालकातील एकाचाही नाश होऊ नये अशी तुमच्या स्वर्गीय पित्याची इच्छा आहे. 15 “तुझ्या भावाने किंवा बहिणीने पाप केले असेल, तर त्याची चूक त्याला समजावून सांग, परंतु हे तुमच्या दोघांमध्ये असू दे. त्यांनी तुझे ऐकले, तर तू त्यांना परत मिळविले आहेस. 16 जर त्यांनी ऐकले नाही तर, एक किंवा दोन साक्षीदारांना बरोबर घेऊन जा, म्हणजे ‘दोन किंवा तीन साक्षीदारांच्या संमतीने प्रकरण स्थापित होईल.’ 17 यावरही ते तुझे ऐकण्यास तयार झाले नाही, तर तुझा दावा मंडळीकडे घेऊन जा आणि मंडळीचेही ऐकण्याचे त्यांनी नाकारले, तर तो एखादा गैरयहूदी किंवा जकातदार आहे असे समजून तू त्याच्याशी वाग. 18 “मी तुम्हाला खरोखर सांगतो, पृथ्वीवर जे काही तुम्ही बांधाल ते स्वर्गात बांधले जाईल आणि पृथ्वीवर जे काही तुम्ही मोकळे कराल ते स्वर्गात मोकळे केले जाईल. 19 “मी तुम्हाला पुन्हा निश्चितपणे सांगतो की, या पृथ्वीवर तुम्हापैकी दोघे एकचित्त होऊन कोणतीही मागणी करतील, तर माझा स्वर्गीय पिता तुमची ती मागणी मान्य करेल. 20 कारण जिथे दोघे किंवा तिघे माझ्या नावाने एकत्र येतात, तिथे मी उपस्थित आहे.” 21 मग पेत्र येशूंकडे आला आणि त्याने त्यांना विचारले, “प्रभूजी, माझ्या भावाने अथवा बहिणीने माझ्याविरुद्ध पाप केले, तर मी त्यांना किती वेळा क्षमा करावी? सात वेळेस का?” 22 येशूंनी उत्तर दिले, “सात नाही तर साताच्या सत्तर वेळा! 23 “म्हणून स्वर्गाचे राज्य त्या राजासारखे आहे, ज्याला आपल्या नोकरांकडून हिशोब घ्यायचा होता. 24 हिशोब घेत असताना, ज्या नोकरावर राजाचे दहा हजार तालांतचे कर्ज होते, त्याला राजापुढे आणण्यात आले. 25 त्या नोकराला हे कर्ज फेडणे अशक्य होते, म्हणून प्रभूने कर्जदार, त्याची पत्नी, त्याची मुले, आणि त्याचे जे सगळे होते ते विकून कर्ज वसूल करण्याची आज्ञा दिली. 26 “तेव्हा तो नोकर गुडघे टेकून खाली पडला आणि गयावया करून राजाला म्हणाला, ‘महाराज, थोडा धीर धरा. मी आपले सर्व कर्ज फेडीन.’ 27 तेव्हा प्रभूला त्या नोकराची दया आली, त्याचे सर्व कर्ज माफ केले आणि त्याला सोडून दिले. 28 “पण तो नोकर बाहेर गेला आणि ज्याच्याकडे त्याचे शंभर दिनारचे कर्ज होते तो सोबतीचा नोकर त्याला भेटला, त्याने त्याची मानगुट पकडली आणि ताबडतोब आपले कर्ज देण्याची त्याने मागणी केली. 29 “त्याचा कर्जदार त्याच्यापुढे पालथा पडला व विनंती करू लागला, ‘थोडा धीर धरा, मी सर्व कर्ज फेडीन.’ 30 “पण तो थांबावयास तयार नव्हता. त्याने त्या मनुष्याला अटक करवून तो पैसे फेडेपर्यंत तुरुंगात डांबून ठेवले. 31 जेव्हा इतर नोकरांनी हे पाहिले, तेव्हा ते क्रोधाने भरून प्रभूकडे गेले आणि काय घडले हे सर्व त्यांनी राजाला सांगितले.” 32 तेव्हा प्रभूने ज्या नोकराला क्षमा केली होती, त्या नोकराला बोलाविले. राजा त्याला म्हणाला, “अरे दुष्ट माणसा, मी तुझे सर्व कर्ज माफ केले, कारण तू मला तशी विनंती केलीस; 33

ज्याप्रमाणे मी तुझ्यावर दया केली त्याप्रमाणे तू त्याच्यावर दया करू नये
काय? 34 मग संतप्त झालेल्या प्रभूने त्या दुष्ट मनुष्याला, तो सर्व कर्ज
फेडीपर्यंत तुरुंगामध्ये कोंडून ठेवले. 35 “जर तुम्ही तुमच्या भावाची व
बहिणीची मनापासून क्षमा करणार नाही, तर माझा स्वर्गीय पिताही
याचप्रकारे तुम्हा प्रत्येकाला वागवेल.”

**19** आपले बोलणे संपविल्यावर येशू गालील प्रांत सोडून यार्देन
नदीच्या पार यहूदीया प्रांतात आले. 2 लोक मोठ्या संख्येने
त्यांच्यामागे जात होते आणि त्यांनी त्यांना बरे केले. 3 काही परूशी
त्यांची परीक्षा पाहण्यासाठी तिथे आले. त्यांनी विचारले, “एखाद्या
मनुष्याने प्रत्येक किंवा कोणत्याही कारणासाठी त्याच्या पत्नीला
घटस्फोट देणे नियमानुसार आहे काय?” 4 येशूंनी उलट विचारले,
“तुम्ही वाचले नाही काय? प्रारंभी ‘परमेश्वराने पुरुष व स्त्री असे निर्माण
केली,’ 5 आणि, ‘या कारणासाठी पुरुष आपल्या आईवडिलांना सोडून
आपल्या पत्नीशी जडून राहील आणि दोघे एकदेह होतील.’ 6 म्हणून
येथून पुढे ते दोघे नसून एकदेह आहेत. म्हणून परमेश्वराने जे जोडले
आहे, ते कोणीही विभक्त करू नये.” 7 “मग” त्यांनी विचारले, “एखाद्या
मनुष्याने आपल्या पत्नीला सूटपत्र लिहून द्यावा व तिला पाठवून द्यावे
असे मोशेने का सांगितले?” 8 यावर येशूंनी उत्तर दिले, “तुमच्या कठोर
अंत:करणामुळे मोशेने तुम्हाला आज्ञा दिली. परंतु मुळात परमेश्वराची
तशी इच्छा नव्हती. 9 मी तुम्हाला सांगतो, व्यभिचाराच्या कारणाशिवाय
जो कोणी आपल्या पत्नीला सूटपत्र देतो आणि दुसऱ्या स्त्रीशी लग्न
करतो, तो व्यभिचार करतो.” 10 येशूंचे शिष्य त्यांना म्हणाले, “जर
अशी परिस्थिती पती आणि पत्नीमध्ये असेल, तर मग लग्न न केलेले
बरे.” 11 येशू म्हणाले, “हे शिक्षण प्रत्येकाला स्वीकारता येईल असे
नाही; पण ज्यांना तसे दान दिले आहे, त्यानांच ते स्वीकारता येईल.
12 कारण काहीजण जन्मत:च नपुंसक असतात आणि काही जणांना
मनुष्यांनीच तसे केलेले असते; आणि काहींनी स्वर्गाच्या राज्यासाठी ही
जीवनपद्धती स्वीकारली आहे. ज्यांना ही स्वीकारावयाची आहे, त्यांनी
ती स्वीकारावी.” 13 येशूंनी त्यांच्यावर हात ठेवावे व प्रार्थना करावी
म्हणून लोक आपल्या लहान बालकांना येशूंकडे घेऊन आले. परंतु
शिष्यांनी त्यांना दटाविले. 14 येशू शिष्यांना म्हणाले, “लहान बालकांना
माझ्याजवळ येऊ द्या, त्यांना प्रतिबंध करू नका; कारण स्वर्गाचे राज्य
अशांचेच आहे.” 15 त्या ठिकाणाहून निघण्यापूर्वी येशूंनी त्यांच्यावर
हात ठेवले. 16 आता एक मनुष्य येशूंकडे आला व त्यांना विचारले,
“गुरुजी, सार्वकालिक जीवन मिळविण्याकरिता मी कोणत्या चांगल्या
गोष्टी कराव्या?” (aiōnios g166) 17 तेव्हा येशूंनी त्याला म्हटले, “तू मला
उत्तम काय आहे हे का विचारतोस? फक्त परमेश्वरच खऱ्या अर्थाने उत्तम
आहेत. पण तू आज्ञा पाळ म्हणजे तुला जीवनात प्रवेश मिळेल.” 18
“कोणत्या आज्ञा?” त्याने विचारले. येशूंनी उत्तर दिले, “‘तू खून करू
नको, तू व्यभिचार करू नको, तू चोरी करू नको, तू खोटी साक्ष देऊ
नको, 19 तुझ्या आई आणि वडिलांचा मान राख,’ आणि ‘जशी तुम्ही
स्वत:वर तशी तुमच्या शेजाऱ्यावर प्रीती करा.’” 20 तो तरुण म्हणाला,
“या सर्व मी पाळल्या आहेत. मी अजून कशात उणा आहे?” 21 येशू
म्हणाले, “तू परिपूर्ण होऊ इच्छित असल्यास जा, तुझी मालमत्ता विकून
टाक आणि गरिबांना वाटून दे आणि तुला स्वर्गात संपत्ती मिळेल. मग
ये व मला अनुसर.” 22 पण त्या तरुणाने हे ऐकले, तेव्हा तो खिन्न
झाला आणि निघून गेला, कारण त्याच्याजवळ पुष्कळ संपत्ती होती.
23 मग येशू आपल्या शिष्यांना म्हणाले, “मी तुम्हाला सत्य सांगतो,
श्रीमंतांना स्वर्गाच्या राज्यात प्रवेश करणे कठीण आहे! 24 मी पुन्हा
सांगतो की, श्रीमंत मनुष्याला परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करणे यापेक्षा
उंटाला सुईच्या नाकातून जाणे सोपे आहे.” 25 येशूंच्या या विधानाने
शिष्य गोंधळात पडले व त्यांनी विचारले, “मग कोणाचे तारण होऊ
शकेल?” 26 येशूंनी त्यांच्याकडे पाहिले आणि म्हटले, “मानवाला हे
अशक्य आहे, परंतु परमेश्वराला सर्वगोष्टी शक्य आहेत.” 27 यावर पेत्र
येशूंना म्हणाला, “आपल्याला अनुसरण्यासाठी आम्ही सर्वकाही सोडून
दिले आहे; त्याच्या मोबदल्यात आम्हाला काय मिळेल?” 28 येशूंनी
त्यांना उत्तर दिले, “मी तुम्हाला सत्य सांगतो, सर्व गोष्टीचे नूतनीकरण
होईल, तेव्हा मानवपुत्र गौरवी सिंहासनावर बसेल आणि जे तुम्ही मला
अनुसरता ते तुम्ही सुद्धा बारा सिंहासनावर बसाल व इस्राएलाच्या बारा
वंशाचा न्याय कराल. 29 ज्या कोणी मला अनुसरण्यासाठी आपले
घर, भाऊ बहीण, आई, पिता, पत्नी, मुले, मालमत्ता यांचा त्याग केला
आहे, त्याला शंभरपट मोबदला तर मिळेलच, पण सार्वकालिक जीवनही
मिळेल. (aiōnios g166) 30 पण अनेकजण जे पहिले आहेत, ते शेवटचे
होतील आणि जे शेवटचे आहेत ते पहिले होतील.”

**20** “स्वर्गाचे राज्य एका जमीनदारासारखे आहे. तो आपल्या
द्राक्षमळ्यातील हंगामाचे पीक कापण्याकरिता मजूर
शोधण्यासाठी अगदी सकाळीच बाहेर पडला. 2 एक दिवसासाठी एक
दिनार देण्याचे कबूल करून, त्याने मजुरांना आपल्या द्राक्षमळ्यात
पाठविले. 3 “सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास तो बाहेर गेला, तेव्हा
बाजारपेठेत दुसरे काही मजूर रिकामे उभे असल्याचे त्याने पाहिले. 4
त्याने त्यांना म्हटले, ‘तुम्ही जाऊन माझ्या द्राक्षमळ्यात काम करा आणि
योग्य ती मजुरी मी तुम्हाला देईन.’ 5 म्हणून ते गेले. “तो पुन्हा दुपारच्या
सुमारास बाहेर गेला. दुपारी तीन वाजण्याच्या सुमारासही त्याने असेच
केले. 6 पाच वाजता तो बाहेर गेला असताना, काही लोक रिकामे उभे
असलेले त्याने पाहिले. त्याने त्यांना विचारले, ‘तुम्ही येथे दिवसभर काही
काम न करता का थांबला आहात?’ 7 “‘आम्हाला कोणी मजुरीवर
लावले नाही,’ त्यांनी उत्तर दिले. “तो त्यांना म्हणाला, ‘मग तुम्ही
सुद्धा जाऊन माझ्या द्राक्षमळ्यात काम करा.’ 8 “संध्याकाळी धन्याने
आपल्या मुकादमाला सांगितले, ‘द्राक्षमळ्यामध्ये आलेल्या मजुरांना
बोलवा आणि जे शेवटी आले होते त्यांच्यापासून आरंभ करून जे प्रथम
आले होते त्या सर्वांना मजुरी द्या.’ 9 “तेव्हा संध्याकाळी पाच वाजता
आलेल्या मजुरांना एक दिनार मजुरी मिळाली. 10 त्यावरून आधी
आलेल्या मजुरांना, आपल्याला अधिक मजुरी मिळेल, असे वाटले; परंतु
त्यांनाही एका दिवसाचीच मजुरी मिळाली. 11 जेव्हा त्यांना ती मिळाली,

तेव्हा त्यांनी धन्याविरुद्ध कुरकुर करण्यास सुरुवात केली. 12 ‘त्या माणसांनी फक्त एकच तास काम केले, तरी त्यांना तुम्ही दिवसभराची मजुरी दिली आणि आम्ही येथे सकाळपासून उन्हात दिवसभर राबलो, तरी आम्हाला तुम्ही त्यांच्यासारखेच केले.’ 13 “त्याने त्यांच्यापैकी एकाला म्हटले, ‘मित्रा, तुझ्यावर मी कोणताही अन्याय केलेला नाही; याच मजुरीत दिवसभर काम करण्याचे तू कबूल केले होतेस की नाही? 14 मग तुझी मजुरी घे आणि जा; जेवढी मी तुला दिली तेवढीच मजुरी जो शेवटी आला त्यालाही द्यावी असे मला वाटते. 15 माझा पैसा मी माझ्या इच्छेप्रमाणे खर्च करण्याचा अधिकार मला नाही काय? किंवा मी उदार आहे म्हणून तुला का राग यावा?’ 16 “याप्रमाणे जे शेवटचे ते पहिले, आणि जे पहिले ते शेवटचे होतील.” 17 येशू यरुशलेमला जात होते. वाटेत त्यांनी आपल्या बारा शिष्यांना एका बाजूला घेतले आणि त्यांना म्हटले, 18 “आपण यरुशलेमात जात आहोत आणि तिथे मानवपुत्राला महायाजक व नियमशास्त्र शिक्षक यांच्या हवाली करण्यात येईल. ते त्याच्यावर आरोप करून त्याला मृत्युदंड देतील आणि नंतर त्याला गैरयहूदीयांच्या हाती सोपवून देण्यात येईल. 19 ते लोक त्याची थट्टा करतील, त्याला फटके मारतील व क्रूसावर खिळतील; परंतु तीन दिवसानंतर तो मरणातून पुन्हा उठेल.” 20 मग जब्दीच्या पुत्रांची आई तिच्या मुलांना घेऊन येशूंकडे आली. तिने त्यांच्यासमोर गुडघे टेकले आणि त्यांच्याजवळ एक कृपादान मागितले. 21 येशूंनी तिला विचारले, “तुला काय पाहिजे?” ती म्हणाली, “तुमच्या राज्यामध्ये माझ्या या दोन पुत्रातील एकाला आपल्या उजवीकडे व दुसऱ्याला डावीकडे बसू द्यावे.” 22 यावर येशू त्यांना म्हणाले, “तुम्ही काय मागता हे तुम्हाला समजत नाही. जो प्याला मी पिणार आहे, तो तुम्ही पिऊ शकाल काय?” त्यांनी उत्तर दिले, “आम्ही तो पिऊ शकू!” 23 “त्या प्याल्यातून तुम्ही प्याल यात शंका नाही,” येशूंनी त्यांना म्हटले, “परंतु माझ्या उजवीकडे किंवा डावीकडे कोणी बसावे, हे ठरविण्याचा अधिकार मला नाही. या जागा माझ्या पित्याने ज्यांच्यासाठी तयार केल्या आहेत, त्यांनाच मिळतील.” 24 हे बाकीच्या दहा शिष्यांनी ऐकले, तेव्हा त्यांना त्या दोन्ही भावांचा खूप राग आला. 25 हे पाहून येशूंनी त्यांना एकत्र बोलावून म्हटले, “गैरयहूदी लोकांचे शासक त्यांच्यावर हुकमत चालवितात आणि त्यांचे उच्चाधिकारी त्यांच्यावर अधिकार गाजविणारे हे तुम्हाला माहीत आहे. 26 पण तुम्हामध्ये तसे नसावे. तुमच्यामध्ये जो कोणी श्रेष्ठ होऊ पाहतो, त्याने तुमचा सेवक झाले पाहिजे. 27 आणि जो कोणी प्रथम होऊ पाहतो, त्याने तुमचा गुलाम व्हावे. 28 मी मानवपुत्र, सेवा करवून घ्यावयास नाही, तर सेवा करावयास आणि पुष्कळांच्या उद्धारासाठी आपला जीव खंडणी म्हणून द्यावयास आलो आहे.” 29 येशू व त्यांचे शिष्य हे यरीहो शहर सोडून जात असताना, त्यांच्यामागे खूप मोठी गर्दी चालली होती. 30 दोन आंधळी माणसे रस्त्याच्या कडेला बसली होती. येशू आपल्या बाजूने येत आहेत, हे त्यांनी ऐकले, तेव्हा ते मोठ्याने ओरडू लागले, “प्रभू, दावीदाचे पुत्र! आम्हावर दया करा!” 31 गर्दीतील लोकांनी त्यांना धमकाविले आणि गप्प बसण्यास सांगितले, तर ते अधिक मोठमोठ्याने ओरडून म्हणू लागले, “अहो प्रभू, दावीदाचे, पुत्र, आम्हावर दया करा!” 32 येशू थांबले आणि त्यांनी आंधळ्यांना बोलाविले व ते म्हणाले, “मी तुमच्यासाठी काय करावे अशी तुमची इच्छा आहे?” 33 “प्रभूजी,” त्यांनी उत्तर दिले, “आम्हाला आमची दृष्टी यावी.” 34 येशूंना त्यांचा कळवळा आला; त्यांनी त्यांच्या डोळ्यांना स्पर्श केला; ताबडतोब त्यांना दिसू लागले आणि ते त्यांच्यामागे चालू लागले.

**21** ते यरुशलेमजवळ आले आणि जैतून डोंगरावर असलेल्या बेथफगे या गावात आले, तेव्हा येशूंनी आपल्या दोन शिष्यांना असे सांगून पाठविले, 2 त्यांना म्हणाले, “समोरच्या गावात जा, तिथे पोहोचताच, तुम्हाला एक गाढवी दिसेल, तिच्याजवळ शिंगरू बांधून ठेवलेले असेल; त्यांना सोडून माझ्याकडे आणा. 3 कोणी तुम्हाला विचारले, तर त्यांना एवढेच सांगा, प्रभूला त्याची गरज आहे आणि ते लागलीच पाठवून देतील.” 4 संदेष्ट्याने केलेले भविष्यकथन पूर्ण व्हावे म्हणून असे झाले: 5 “सीयोनकन्येला सांगा की, पाहा, तुझा राजा तुझ्याकडे येत आहे. तो लीन आहे व गाढवीवर बसून येत आहे, आणि गाढवीच्या शिंगरावर बसून तो येत आहे.” 6 शिष्य गेले आणि येशूंनी त्यांना सांगितल्याप्रमाणेच त्यांनी केले. 7 त्यांनी गाढवी व शिंगरू आणली आणि त्यांचे वस्त्रे गाढवी व शिंगरूच्या पाठीवर टाकले मग येशू त्यावर बसले. 8 गर्दीतील काही लोकांनी आपले अंगरखे काढून रस्त्यावर पसरले; तर इतर काहींनी झाडांच्या डाहळ्या तोडून रस्त्यावर पसरल्या. 9 मग जमावातील जे लोक त्यांच्यापुढे गेलेले आणि जे त्यांच्यामागून चालले, ते मोठ्याने ओरडून म्हणाले, “दावीदाच्या पुत्राला होसान्ना!” “प्रभूच्या नावाने येणारा धन्यवादित असो.” “सर्वोच्च स्वर्गात होसान्ना!” 10 येशूंनी यरुशलेममध्ये प्रवेश केला, तेव्हा सर्व शहर जागे झाले आणि त्यांनी विचारले, “हा कोण आहे?” 11 “हे येशू आहेत!” गर्दीतील लोकांनी उत्तर दिले, “गालीलाच्या नासरेथहून आलेले संदेष्टा आहेत.” 12 येशू मंदिराच्या अंगणात गेले आणि तिथे खरेदीविक्री करणाऱ्या सर्वांना त्यांनी बाहेर घालवून दिले. पैशाची अदलाबदल करणाऱ्यांचे मेज आणि कबुतरे विकणाऱ्यांची आसने त्यांनी उधळून लावली. 13 ते त्यांना म्हणाले, “असे लिहिले आहे, माझ्या घराला प्रार्थनेचे घर म्हणतील पण तुम्ही याला लुटारूंची गुहा केली आहे.” 14 मग मंदिरात त्यांच्याकडे आंधळे व अपंग लोक आले आणि त्यांनी त्यांना बरे केले. 15 तरी जेव्हा मुख्य याजक आणि नियमशास्त्र शिक्षकांनी ही अद्भुत कामे पाहिली आणि लहान मुलांना मंदिराच्या परिसरात, “दावीदाच्या पुत्राला होसान्ना!” असे ओरडतांना ऐकले, तेव्हा ते संतापले. 16 त्यांनी येशूंना विचारले, “ही मुले काय म्हणत आहेत, हे तुम्ही ऐकत आहात ना?” येशूंनी उत्तर दिले, “हो, हे तुम्ही कधी वाचले नाही काय? “‘लेकरे आणि तान्ही बालके यांच्याद्वारे हे प्रभू तू आपली स्तुती प्रकट केली आहे,’” 17 मग ते बेथानीस परत आले आणि रात्रीचा मुक्काम त्यांनी तिथेच केला. 18 अगदी पहाटेच ते पुन्हा शहराकडे निघाले. रस्त्यात असताना येशूंना भूक लागली. 19 जवळच त्यांना अंजिराचे झाड दिसले. त्यावर काही अंजीर आहेत काय हे पाहण्यास ते झाडाजवळ गेले. त्या झाडावर

त्यांना पानांशिवाय काही आढळले नाही. मग ते त्या झाडाला म्हणाले,
“यापुढे तुला फलप्राप्ती होणार नाही.” आणि तत्काळ ते झाड वाळून
गेले. (aiōn g165) 20 हे पाहून शिष्य आश्चर्यचकित झाले. त्यांनी येशूंना
विचारले, “ते अंजिराचे झाड इतक्या लवकर कसे वाळून गेले?” 21
मग येशूंनी त्यांना म्हटले, “मी तुम्हाला सत्य सांगतो की, तुम्ही संशय
न धरता विश्वास ठेवाल, तर जे काही अंजिराच्या झाडाबाबत झाले ते
तुम्ही सुद्धा कराल, या डोंगराला ‘ऊठ आणि समुद्रात पड,’ असे तुम्ही
म्हणालात, तर ही गोष्ट केली जाईल. 22 तुम्ही विश्वास ठेऊन आणि
प्रार्थना करून जे काही मागाल ते तुम्हाला मिळेल.” 23 येशूंनी मंदिराच्या
आवारात प्रवेश केला आणि ते शिकवीत असता मुख्य याजक व यहूदी
पुढारी त्यांच्याकडे आले व त्यांना जाब त्यांना विचारू लागले, “कोणत्या
अधिकाराने या गोष्टी तुम्ही करत आहात? हा अधिकार तुम्हाला कोणी
दिला?” 24 येशूंनी उत्तर दिले, “मी तुम्हाला एक प्रश्न विचारतो. त्याचे
उत्तर द्या मग मी कोणत्या अधिकाराने करीत आहे, हे तुम्हाला सांगेन.
25 योहानाला बाप्तिस्मा करण्याचा अधिकार कुठून प्राप्त झाला होता,
स्वर्गापासून किंवा मनुष्याकडून?” या प्रश्नावर त्यांनी एकमेकांबरोबर
चर्चा केली, “योहानाचा बाप्तिस्मा, ‘स्वर्गापासून होता,’ असे आपण
म्हणालो, तर ते विचारतील, ‘त्यावर तुम्ही विश्वास का ठेवला नाही’?
26 जर आपण म्हणालो, ‘मनुष्यांपासून होता’ तर आम्हाला लोकांची
भीती आहे. कारण योहान संदेष्टा होता, असा सर्वांचाच ठाम विश्वास
होता.” 27 शेवटी त्यांनी उत्तर दिले, “आम्हाला माहीत नाही.” यावर
येशू म्हणाले, “तर मग मीही या गोष्टी कोणत्या अधिकाराने करतो हे
तुम्हाला सांगणार नाही. 28 “तुम्हाला काय वाटते? एका मनुष्याला दोन
मुलगे होते. तो मोठ्या मुलाला म्हणाला, ‘मुला, आज द्राक्षमळयामध्ये
जा व काम कर.’” 29 मुलगा म्हणाला, “‘मी द्राक्षमळयात जाणार
नाही,’ पण नंतर त्याने आपले मन बदलले आणि तो गेला. 30 “मग
पिता धाकट्या मुलालाही तसेच म्हणाला. मुलगा म्हणाला, ‘मी जातो,
बाबा.’ पण तो गेलाच नाही.” 31 मी विचारतो, “पित्यास जे पाहिजे
होते ते या दोन मुलांपैकी कोणत्या मुलाने केले?” “वडील मुलाने,”
त्या लोकांनी उत्तर दिले. मग येशू आपल्या दाखल्याचा खुलासा करीत
म्हणाले, “मी खरे सांगतो, जकातदार लोक आणि वेश्या तुमच्या आधी
परमेश्वराच्या राज्यात जात आहेत. 32 कारण योहान नीतिमत्वाचा मार्ग
दाखवित तुम्हाकडे आला, पण तुम्ही त्याच्यावर विश्वास ठेवला नाही;
उलट जकातदार लोक आणि वेश्यांनी तसे केले. हे प्रत्यक्ष डोळयांनी
पाहिलेले असतानाही, तुम्ही पश्चात्ताप करण्याचे आणि विश्वास ठेवण्याचे
नाकारले. 33 “दुसरा एक दाखला ऐका: एका जमीनदाराने एक
द्राक्षमळा लावला. त्याच्याभोवती भिंत बांधली व त्यात द्राक्षारसासाठी
कुंड खणले आणि संरक्षणासाठी एक बुरूजही बांधला. मग द्राक्षमळा
काही शेतकऱ्यांना भाड्याने देऊन दुसऱ्या ठिकाणी राहवयास गेला. 34
हंगामाचे दिवस आल्यावर फळातून काही मिळावे म्हणून त्याने नोकरांना
शेतकऱ्यांकडे पाठविले. 35 “परंतु शेतकऱ्यांनी सेवकांना धरले; एकाला
मारले, दुसऱ्याला ठार केले आणि तिसऱ्याला दगडमार केला. 36 मग
जमीनदाराने त्यांच्याकडे पहिल्या वेळेपेक्षा जास्त नोकर पाठविले. पण
त्यांनाही त्यांनी तसेच केले. 37 सर्वात शेवटी, त्याने आपल्या पुत्राला
त्यांच्याकडे पाठविले व म्हणाला, ‘ते माझ्या पुत्राचा तरी मान राखतील.’
38 “पण शेतकऱ्यांनी जमीनदारांच्या पुत्राला येताना पाहिले, तेव्हा ते
आपसात म्हणाले, ‘हा तर वारस आहे. चला, आपण त्याला ठार मारू
या आणि त्याचे वतन घेऊ या.’ 39 त्याप्रमाणे त्यांनी त्याला धरले आणि
त्याचा वध करून त्याला द्राक्षमळयाच्या बाहेर फेकून दिले आणि त्याचा
जीव घेतला. 40 “आता, जेव्हा द्राक्षमळयाचा धनी येईल, त्यावेळी तेव्हा
तो त्या भाडेकऱ्यांचे काय करेल असे तुम्हाला वाटते?” 41 त्यांनी
उत्तर दिले, “तो या दुष्ट लोकांना ठार करेल आणि जे त्याला हंगामाच्या
वेळी फळ देतील, अशा दुसऱ्या शेतकऱ्यांना तो द्राक्षमळा भाड्याने
देईल.” 42 येशूंनी त्यांना म्हटले, “धर्मशास्त्रात तुम्ही वाचले नाही काय:
“‘जो दगड बांधणाऱ्यांनी नापसंत केला, तोच कोनशिला झाला आहे;
प्रभूने हे केले आहे, आणि आमच्या दृष्टीने ते अद्भुत आहे.’ 43 “यास्तव
परमेश्वराचे राज्य तुमच्याकडून काढून घेतले जाईल आणि जे लोक फळ
देतील त्यांना दिले जाईल. 44 या खडकावर जे आदळतील त्यांचे तुकडे
होतील, परंतु ज्यांच्यावर हा खडक आदळेल त्यांचा चुराडा होईल.”
45 आपल्याविषयीच या गोष्टीमधून येशू बोलत आहेत हे महायाजक
आणि परूशी यांच्या ध्यानात आले, 46 तेव्हा येशूंना अटक करण्याचा ते
काहीतरी मार्ग शोधू लागले. पण त्यांना लोकांची भीती वाटत होती,
कारण सर्व लोक येशूंना संदेष्टा मानीत होते.

**22** येशूंनी परत त्यांना दाखला सांगितला: 2 ते म्हणाले, “स्वर्गाचे
राज्य, एका राजासारखे आहे ज्याने आपल्या मुलाच्या विवाह
निमित्ताने मेजवानी तयार केली. 3 ज्यांना आमंत्रित केले होते त्या
सर्वांस मेजवानीसाठी यावे म्हणून राजाने दासांना त्यांच्याकडे पाठविले.
पण त्यांनी मेजवानीस येण्याचे नाकारले. 4 “तेव्हा त्याने आणखी
काही दास पाठविले, ‘ज्यांना आमंत्रित केले आहे त्यांना सांगा की मी
मेजवानी तयार केली आहे, माझे बैल आणि पुष्ट गुरे कापली आहेत
आणि सर्वकाही तयार आहे. लग्नाच्या मेजवानीस या.’ 5 “परंतु त्यांनी
मुळीच लक्ष दिले नाही आणि एकजण आपल्या शेतावर, तर दुसरा
आपल्या व्यापारासाठी निघून गेला. 6 बाकीच्या आमंत्रितांनी तर
राजाच्या दासांना पकडले, अपमानित वागणूक दिली आणि ठारही
मारले. 7 राजाला खूपच राग आला. त्याने आपले सैन्य पाठवून दासांना
ठार करणाऱ्यांचा नाश केला. त्यांची शहरे जाळून टाकली. 8 “यानंतर
राजा आपल्या दासांना म्हणाला, ‘लग्नाची मेजवानी तयार आहे, पण
ज्यांना मी आमंत्रण दिले ते लोक या बहुमानास पात्र नाहीत. 9
तेव्हा तुम्ही रस्त्यांच्या चौकामध्ये जा आणि तिथे जे दिसतील, त्यांना
मेजवानीस घेऊन या.’ 10 राजाच्या आज्ञेप्रमाणे दास बाहेर गेले आणि
चांगले वाईट, असे जे कोणी त्यांना रस्त्यांत सापडले, त्या सर्वांना ते
मेजवानीस घेऊन आले आणि मेजवानीचा कक्ष आमंत्रितांनी भरून
गेला. 11 “राजा पाहुणे मंडळीस भेटावयास आला, त्यावेळी एक
मनुष्य विवाहोत्सवाचा पोशाख न घालताच आलेला दिसला. 12 राजाने

त्या मनुष्याला विचारले, ‘मित्रा, लग्नाच्या पोषाखाशिवाय तू आत
कसा आलास?’ तो मनुष्य स्तब्ध झाला. 13 “मग राजा आपल्या
नोकरास म्हणाला, ‘या मनुष्याचे हातपाय बांधा आणि त्याला बाहेरच्या
अंधारात फेकून द्या. त्या ठिकाणी रडणे आणि दातखाणे चालेल.’ 14
“कारण बोलावलेले पुष्कळ आहेत, पण निवडलेले थोडके आहेत.”
15 मग परूशी लोक बाहेर गेले आणि येशूंना त्यांच्या बोलण्यात कसे
पकडावे यासंबंधी चर्चा केली. 16 त्यानुसार परूश्यांनी आपल्या काही
शिष्यांना हेरोदी गटाच्या लोकांबरोबर येशूंकडे पाठविले व म्हणाले,
“गुरुजी, तुम्ही प्रामाणिक व्यक्ती आहात, हे आम्हाला माहीत आहे.
तुम्ही कोणाचे समर्थन करीत नाही, कोणाची पर्वा न करता खरेपणाने
परमेश्वराचा मार्ग शिकविता आणि भेदभाव न करता, ते कोण आहेत
याकडे लक्ष देत नाहीत. 17 तर आता आम्हाला हे सांगा की, कैसराला
कर देणे योग्य आहे की नाही?” 18 पण त्यांचा हेतू काय आहे हे
येशूंनी ओळखले. “अहो, ढोंग्यांनो,” येशू म्हणाले, “मला सापळयात
पाडू पाहता काय? 19 कर भरण्यासाठी वापरलेले एक नाणे मला
दाखवा.” आणि त्यांनी त्यांना दिनारचे एक नाणे दाखविले. 20 येशूंनी
त्यांना विचारले, “या नाण्यावर कोणाचा मुखवटा आणि कोणाचा लेख
आहे?” 21 “कैसराचे!” त्यांनी उत्तर दिले. “मग,” येशू म्हणाले, “जे
कैसराचे आहे, ते कैसराला द्या आणि जे परमेश्वराचे आहे ते परमेश्वराला
द्या.” 22 त्यांच्या उत्तराने ते आश्चर्यचकित झाले आणि मग ते त्यांना
सोडून निघून गेले. 23 त्याच दिवशी, पुनरुत्थान नाही असे म्हणणारे
सदूकी त्यांच्याकडे आले व प्रश्न करू लागले. 24 “गुरुजी, मोशेने
आम्हाला सांगितले आहे की, एखादा मनुष्य, मूल न होता मरण पावला,
तर त्याच्या भावाने त्याच्या विधवेशी लग्न करून त्याच्यासाठी संतती
वाढवावी. 25 आता सात भाऊ होते. त्यातील पहिल्याने लग्न केले,
पण एकही मूल न होता तो मरण पावला. तेव्हा त्याची विधवा त्याच्या
धाकट्या भावाची पत्नी झाली. 26 पण हीच गोष्ट दुसऱ्या व तिसऱ्या
भावापासून सातव्या भावापर्यंत झाली. 27 सर्वात शेवटी ती स्त्री मरण
पावली. 28 जेव्हा, पुनरुत्थान होईल तेव्हा ती कोणाची पत्नी होईल,
कारण त्या सातही जणांनी तिच्याशी लग्न केले होते?” 29 येशूंनी उत्तर
दिले, “तुम्ही चुकत आहात, कारण ना तुम्ही धर्मशास्त्र जाणता, ना
परमेश्वराचे सामर्थ्य ओळखता. 30 पुनरुत्थानामध्ये लग्न करत नाही
किंवा लग्न करूनही देत नाही; तर ते स्वर्गातील देवदूतांप्रमाणे असतील.
31 पण आता मृतांच्या पुनरुत्थाना संदर्भात परमेश्वर तुमच्याशी काय
बोलत आहे हे तुम्ही वाचले नाही काय? 32 ‘मी अब्राहामाचा परमेश्वर,
इसहाकाचा परमेश्वर आणि याकोबाचा परमेश्वर आहे,’ तो मृतांचा
परमेश्वर नसून जिवंतांचा आहे.” 33 सभोवार जमलेली गर्दी येशूंच्या
उत्तरांनी विलक्षण प्रभावित झाली. 34 येशूंनी सदूकींना निरुत्तर केले, हे
परूश्यांनी ऐकले, तेव्हा ते एकत्र जमले. 35 कोणी एक नियमशास्त्र
तज्ञ आला व त्यांची परीक्षा पाहण्याकरिता त्यांना हा प्रश्न विचारला:
36 “गुरुजी, मोशेच्या नियमशास्त्रानुसार सर्वात मोठी आज्ञा कोणती
आहे?” 37 येशूंनी उत्तर दिले, “‘प्रभू तुमचे परमेश्वर यांच्यावर तुमच्या
पूर्ण हृदयाने आणि तुमच्या पूर्ण जिवाने आणि तुमच्या पूर्ण मनाने प्रीती
करा.’ 38 हीच सर्वात पहिली आणि महान आज्ञा आहे. 39 यासारखीच
दुसरी ही आहे: ‘जशी स्वतःवर तशी तुमच्या शेजाऱ्यावर प्रीती करा.’ 40
सर्व नियम आणि संदेष्ट्यांची शिकवण या दोन आज्ञांवरच आधारित
आहे.” 41 एकदा परूशी लोक एकत्र गोळा झाले असताना, येशूंनी
त्यांना विचारले, 42 “ख्रिस्ताबद्दल तुमचे काय म्हणणे आहे? तो कोणाचा
पुत्र आहे?” “तो दावीदाचा पुत्र आहे,” त्यांनी उत्तर दिले. 43 येशूंनी
विचारले, “मग दावीद त्याला आत्म्याद्वारे ‘प्रभू,’ असे कसे म्हणतो? 44
“‘प्रभू माझ्या प्रभूला म्हणाले: “मी तुझ्या शत्रूंना तुझ्या पायाखाली
ठेवीपर्यंत तू माझ्या उजव्या हाताला बसून राहा.”’ 45 जर दावीद त्यांना
‘प्रभू’ म्हणतो, तर ते त्याचा पुत्र कसा असू शकेल?” 46 यावर त्यांना
काही उत्तर देता येईना आणि तेव्हापासून कोणी त्यांना आणखी प्रश्न
विचारावयास धजले नाहीत.

**23** मग येशू लोकसमुदायाला आणि आपल्या शिष्यांना म्हणाले:
2 “नियमशास्त्राचे शिक्षक आणि परूशी मोशेच्या सिंहासनावर
बसतात. 3 त्यांच्या सांगण्याप्रमाणे करा, पण ते जसे करतात तसे
आचरण करू नका, कारण ते सांगतात त्याप्रमाणे करीत नाहीत. 4
ते जड, अवघड ओझी बांधतात व इतर लोकांच्या खांद्यावर लादतात,
परंतु ती हालविण्यास स्वतःचे बोटही लावण्याची त्यांची इच्छा नसते. 5
“जे काही करतात ते सर्व लोकांना दाखविण्यासाठी असते: ते वचने
लिहिलेल्या चामड्याच्या पट्ट्या लोकांना दिसाव्या म्हणून रुंद करतात
आणि आपल्या झग्यांचे गोंडे लांब करतात. 6 मेजवान्यात मानाची
स्थाने आणि सभागृहांमध्ये प्रमुख जागेवर बसणे त्यांना प्रिय आहे.
7 बाजारात लोकांकडून आदरपूर्वक अभिवादन घेणे आणि ‘रब्बी’
संबोधन त्यांना फार आवडते. 8 “परंतु तुम्ही स्वतः ‘रब्बी,’ म्हणून घेऊ
नका, कारण तुमचा गुरू एकच आहे आणि तुम्ही सर्व एकमेकांचे भाऊ
आहात. 9 आणि या पृथ्वीवर कोणालाही ‘पिता’ म्हणून संबोधू नका,
कारण तुम्हाला एकच पिता आहेत व ते स्वर्गात आहेत. 10 स्वतःला
‘मार्गदर्शक’ म्हणवून घेऊ नका, कारण एकटे ख्रिस्त हे एकच तुमचे
‘मार्गदर्शक’ आहेत. 11 जो तुम्हामध्ये सर्वात मोठा होऊ पाहतो त्याने
तुमचा सेवक व्हावे. 12 कारण जे स्वतःला उच्च करतात, त्यांना नम्र
केले जाईल आणि जे स्वतःला नम्र करतात, ते उंच केले जातील. 13
“अहो परूश्यांनो, आणि नियमशास्त्र शिक्षकांनो, ढोंग्यांनो तुम्हाला
धिक्कार असो. कारण तुम्ही लोकांच्या तोंडावर स्वर्गाचे द्वार बंद करता,
स्वतःही प्रवेश करीत नाही, आणि जे प्रवेश करू इच्छितात त्यांनाही
आत जाऊ देत नाहीत. 14 जे देखाव्यासाठी लांबलचक प्रार्थना करतात
आणि विधवांची घरे लुबाडतात. अशा लोकांना अधिक शिक्षा होईल. 15
“अहो नियमशास्त्र शिक्षकांनो आणि परूश्यांनो, अहो ढोंग्यांनो, तुम्हाला
धिक्कार असो. एका माणसाचे परिवर्तन करण्याकरिता तुम्ही भूमार्गाने
आणि जलमार्गाने प्रवास करता आणि जेव्हा त्याचे परिवर्तन होते,
तेव्हा तुम्ही त्याला आपल्यापेक्षा दुप्पट प्रमाणात नरकपुत्र बनविता.
(Geenna g1067) 16 “आंधळया मार्गदर्शकांनो, तुमचा धिक्कार असो!

‘परमेश्वराच्या मंदिराची शपथ घेऊन तुम्ही म्हणता, मंदिराची शपथ
मोडली तरी चालेल, पण मंदिरातील सोन्याच्या शपथेने मात्र तो
बांधील आहे.’ 17 अहो आंधळ्या मूर्खांनो! ते सोने श्रेष्ठ आहे की त्या
सोन्याला पवित्र करणारे ते मंदिर श्रेष्ठ आहे? 18 तुम्ही असेही म्हणता,
‘मंदिरातील वेदीची शपथ घेतली आणि ती मोडली तरी चालेल,’ पण
वेदीवरील दानाची शपथ घेतली तर तो त्यास बंधनकारक आहे. 19 अहो
आंधळयांनो, ती देणगी श्रेष्ठ आहे की त्या देणगीला पवित्र करणारी
वेदी श्रेष्ठ आहे? 20 लक्षात ठेवा, ज्यावेळी तुम्ही वेदीची शपथ वाहता,
त्यावेळी वेदीबरोबर वेदीवरील सर्व वस्तूंचीही शपथ वाहता. 21 आणि
ज्यावेळी तुम्ही मंदिराची शपथ वाहता, त्यावेळी मंदिराबरोबरच मंदिरात
राहणाऱ्या परमेश्वराचीही शपथ वाहता. 22 ज्यावेळी तुम्ही स्वर्गाची शपथ
वाहता, त्यावेळी तुम्ही परमेश्वराच्या सिंहासनाची आणि खुद्द परमेश्वराची
शपथ वाहता. 23 “तुम्हा परूश्यांचा व नियमशास्त्र शिक्षकांचा धिक्कार
असो, अहो ढोंग्यांनो! तुम्ही पुदिना, बडीशेप आणि जिरे या मसाल्यांचा
दशांश देता, परंतु न्याय, दया आणि विश्वासूपणा या अत्यंत महत्त्वाच्या
गोष्टींकडे दुर्लक्ष करता. या गोष्टी तर तुम्ही कराव्यात, पण त्याचबरोबरच
ज्या अधिक महत्त्वाच्या गोष्टी आहेत त्याकडे दुर्लक्ष करू नये. 24 तुम्ही
आंधळे मार्गदर्शक! तुम्ही एक चिलट गाळून काढता, पण उंट गिळून
टाकता. 25 “तुम्हा परूश्यांचा आणि नियमशास्त्र शिक्षकांचा धिक्कार
असो, अहो ढोंग्यांनो! तुम्ही आपले ताट व वाटी बाहेरून स्वच्छ करता
पण तुमची मने लोभ व असंयम यांनी भरलेली आहे. 26 आंधळया
परूश्यांनो! पहिल्यांदा थाळी व प्याला आतून स्वच्छ करा म्हणजे ती
बाहेरून देखील स्वच्छ होतील. 27 “अहो परूश्यांनो आणि नियमशास्त्र
शिक्षकांनो, अहो ढोंग्यांनो, तुमचा धिक्कार असो; कारण तुम्ही चुन्याचा
लेप लावलेल्या कबरांप्रमाणे आहात. ज्या बाहेरून सुंदर दिसतात, पण
आत मृतांच्या हाडांनी व सर्वप्रकारच्या अशुद्धतेने व दुष्कृत्याने भरलेल्या
असतात. 28 त्याचप्रमाणे तुम्ही बाहेरून लोकांना नीतिमान दिसता, पण
आतून कबरांसारखे आहात, ढोंगाने आणि दुष्कृत्याने भरलेले. 29 “अहो
परूश्यांनो आणि नियमशास्त्र शिक्षकांनो, अहो ढोंग्यांनो, तुमचा धिक्कार
असो. तुम्ही संदेष्ट्यांच्या कबरा बांधता आणि नीतिमानांच्या कबरा
सजविता 30 तुम्ही म्हणता, ‘आम्ही आमच्या वाडवडीलांच्या काळात
राहत असतो, तर संदेष्ट्यांचे रक्त सांडण्यामध्ये आम्ही त्यांच्याबरोबर
कधीही भाग घेतला नसता.’ 31 पण असे बोलताना, तुम्ही स्वत:विरुद्ध
साक्ष देता की तुम्ही संदेष्ट्यांचे खून करणाऱ्या वाडवडीलांची संताने
आहात. 32 मग जा आणि ज्याचा तुमच्या पूर्वजांनी आरंभ केला होता
ते पूर्ण करा. 33 “अहो सापांनो! विषारी सापांच्या पिलांनो! नरक-
दंडापासून स्वत:ची सुटका कशी कराल? (Geenna g1067) 34 यास्तव मी
तुमच्याकडे संदेष्टे, ज्ञानी आणि शिक्षक पाठवित आहे. काहींचा तुम्ही
वध कराल आणि क्रूसावर द्याल; काहींना सभागृहात फटके माराल
आणि नगरोनगरी त्यांच्या पाठीस लागाल. 35 नीतिमान हाबेलाच्या
रक्तापासून मंदिर आणि वेदी यांच्यामध्ये ज्याचा वध तुम्ही केला तो
बरख्याचा पुत्र जखऱ्याहच्या रक्तापर्यंत, जे सर्व नीतिमान रक्त पृथ्वीवर
पाडण्यात आले त्याचा दोष तुम्हावर येईल. 36 मी तुम्हाला सत्य सांगतो
की, तो याच पिढीवर येईल. 37 “हे यरुशलेम, यरुशलेम! संदेष्ट्यांना
ठार मारणारे आणि तुझ्याकडे पाठविलेल्यांना धोंडमार करणारे! जशी
कोंबडी आपल्या पिलांना पंखाखाली एकवटते, तसे तुझ्या लेकरांना
एकवटण्याची माझी कितीतरी इच्छा होती. पण तुमची नव्हती. 38
आणि पाहा! आताच तुझे घर ओसाड पडले आहे. 39 मी तुला सांगतो
की, ‘प्रभूच्या नावाने येणारे धन्यवादित असो, असे तू म्हणेपर्यंत मी
तुझ्या दृष्टीस पडणार नाही.’”

**24** येशू मंदिरातून बाहेर पडले व चालत असता त्यांचे शिष्य
त्यांच्याकडे आले आणि त्यांचे लक्ष मंदिराच्या इमारतींकडे वेधले.
2 येशू त्यांना म्हणाले, “हे सर्व तुम्ही आता पाहत आहात ना? मी तुम्हाला
खचित सांगतो की, एका दगडावर दुसरा दगड राहणार नाही. प्रत्येक
दगड खाली पडेल.” 3 येशू मंदिराच्या समोर असलेल्या जैतुनाच्या
डोंगरावर बसले असताना, शिष्य त्यांच्याकडे एकांतात आले आणि
विचारले, “या घटना केव्हा घडतील आणि तुमच्या येण्याचे आणि या
युगाच्या समाप्तीची चिन्हे काय असतील हे आम्हाला सांगा.” (aiōn
g165) 4 येशूंनी त्यांना म्हटले, “कोणीही तुम्हाला फसवू नये म्हणून
सावध राहा. 5 कारण अनेकजण माझ्या नावाने येतील आणि ‘मी
ख्रिस्त आहे,’ असा दावा करतील आणि पुष्कळांना फसवतील. 6 तुम्ही
लढायासंबंधी ऐकाल आणि लढायांच्या अफवा ऐकाल, पण त्यामुळे
घाबरू नका. कारण या गोष्टी घडल्याच पाहिजेत, पण शेवट अजूनही
यावयाचा आहे. 7 कारण राष्ट्रांविरुद्ध राष्ट्र व राज्याविरुद्ध राज्य उठतील.
वेगवेगळया ठिकाणी भूकंप होतील, दुष्काळही पडतील. 8 या घटना तर
प्रसूती वेदनांची सुरुवात आहेत. 9 “छळ करण्यासाठी आणि जिवे
मारण्याकरिता तुम्हाला धरून दिले जाईल आणि माझ्यामुळे सर्व राष्ट्रे
तुमचा द्वेष करतील. 10 त्यावेळी पुष्कळजण विश्वासापासून दूर जातील
व एकमेकांचा द्वेष करतील. 11 अनेक खोटे संदेष्टे उदयास येतील
आणि पुष्कळांना फसवतील. 12 दुष्टता वाढेल व त्यामुळे पुष्कळांची
प्रीती थंडावेल. 13 परंतु जो शेवटपर्यंत स्थिर राहील त्याचे मात्र तारण
होईल. 14 सर्व जगामध्ये साक्ष म्हणून राज्याच्या शुभवार्तेचा प्रचार
सर्व राष्ट्रांमध्ये झाला पाहिजे आणि मगच शेवट होईल. 15 “संदेष्टा
दानीएलाने सांगितलेला ‘ओसाडीचा अमंगळ पदार्थ’ पवित्रस्थानी उभा
असलेला तुम्ही पाहाल—वाचकाने हे समजून घ्यावे— 16 त्यावेळी जे
यहूदीयात आहेत त्यांनी डोंगरांकडे पळून जावे. 17 जो कोणी घराच्या
छपरांवर असेल, त्याने घरातून काही आणण्याकरिता खाली उतरू नये.
18 जो शेतात असेल, त्याने आपला अंगरखा नेण्यासाठी परत जाऊ
नये. 19 गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या स्त्रियांसाठी तर तो काळ
किती क्लेशाचा असेल! 20 तुमच्या पलायनाचा काळ हिवाळ्यात
किंवा शब्बाथ दिवशी येऊ नये म्हणून प्रार्थना करा. 21 कारण ते दिवस
इतके भयानक असतील की, परमेश्वराने पृथ्वी निर्माण केल्यापासून
आजपर्यंत असे दिवस आले नाहीत किंवा पुढेही येणार नाहीत. 22 “ते
दिवस जर कमी केले गेले नसते, तर कोणी वाचले नसते. तरी केवळ

निवडलेल्या लोकांसाठी ते दिवस कमी केले जातील. 23 त्या काळात
'येथे ख्रिस्त आहे,' किंवा 'पाहा, तो तिथे आहे,' असे जर कोणी तुम्हाला
सांगितले, तर अजिबात विश्वास ठेवू नका. 24 कारण खोटे ख्रिस्त
आणि खोटे संदेष्टे उदय पावतील आणि मोठी चिन्हे व अद्भुते करून,
साधेल तर, निवडलेल्या लोकांनाही फसवतील. 25 पाहा मी तुम्हाला
आधीच सांगून ठेवलेले आहे. 26 "जर कोणी तुम्हाला सांगेल, 'तो तिथे
रानात आहे,' तर तिकडे जाऊ नका किंवा तो तिथे 'आतील खोलीत
आहे,' तर विश्वास ठेवू नका. 27 कारण जशी वीज पूर्वेकडून निघते
आणि पश्चिमेकडे प्रकाशतांना दिसते, तसाच प्रकारे मानवपुत्राचे आगमन
होईल. 28 जिथे मृतदेह आहे, तिथे गिधाडे जमतील. 29 "क्लेशांच्या
काळाची समाप्ती झाल्यावर "'त्या दिवसात, सूर्य अंधकारमय होईल,
आणि चंद्र आपला प्रकाश देणार नाही; आकाशातून तारे गळून पडतील,
आणि आकाशमंडळ डळमळेल.' 30 "मानवपुत्राच्या आगमनाचे चिन्ह
आकाशात दिसेल आणि पृथ्वीवरील सर्व राष्ट्रे मोठा आक्रोश करतील. ते
मानवपुत्राला आकाशात मेघारूढ होऊन पराक्रमाने परत येत असलेले
पाहतील. 31 तो कर्ण्यांच्या महानादाबरोबर आकाशांच्या या टोकापासून
दुसऱ्या टोकापर्यंत आणि चारही दिशेकडून त्याच्या निवडलेल्या लोकांना
एकत्र करण्यासाठी आपल्या दूतांस पाठवेल. 32 "आता अंजिराच्या
झाडापासून हा बोध घ्या व शिका. त्या झाडाच्या डाहळया कोवळया
झाल्या आणि त्यांना पालवी फुटू लागली म्हणजे उन्हाळा जवळ आला
आहे, हे तुम्ही ओळखता. 33 या सर्व घटना घडत असताना तुम्ही
पाहाल, तेव्हा ते अगदी जवळ, दारातच आहे हे समजून घ्या. 34
मी तुम्हाला निश्चित सांगतो की, या सर्वगोष्टी घडून आल्याशिवाय
ही पिढी खात्रीने नाहीशी होणार नाही. 35 आकाश व पृथ्वी नाहीशी
होतील, पण माझी वचने नाहीशी होणार नाहीत. 36 "तरीपण त्या
दिवसाबद्दल किंवा वेळेबद्दल कोणालाही माहीत नाही, म्हणजे स्वर्गातील
दूतांना नाही, पुत्रालाही नाही, ते फक्त पित्यालाच ठाऊक आहे. 37
जसे नोआहच्या दिवसात घडत होते, तसेच मानवपुत्र येण्याच्या वेळी
होईल. 38 जलप्रलय येण्यापूर्वी, नोआह प्रत्यक्ष तारवात गेला, त्या
दिवसापर्यंत लोक खातपीत होते, लग्न करून घेत होते, लग्न करून देत
होते. 39 आपले काय होणार आहे हे त्यांना माहीत नव्हते, मग एकाएकी
जलप्रलय आला आणि त्या सर्वांनाच जलसमाधी मिळाली. मानवपुत्र
परत येईल त्यावेळीही अगदी असेच होईल. 40 शेतात काम करीत
असलेल्या दोन मनुष्यांपैकी एक घेतला जाईल व दुसरा ठेवला जाईल.
41 जात्यावर दळीत बसलेल्या दोन स्त्रियांपैकी एकीला घेतले जाईल व
दुसरीला ठेवले जाईल. 42 "यास्तव तुम्ही जागृत राहा, कारण तुमच्या
प्रभूच्या आगमनाचा दिवस कोणता, हे तुम्हाला ठाऊक नाही. 43 पण
एक गोष्ट नीट समजून घ्या की चोर रात्रीच्या कोणत्या घटकेला येणार
ती घरधन्याला आधी समजली असती, तर त्याने पहारा ठेवला असता
आणि आपले घर फोडू दिले नसते. 44 म्हणून तुम्ही सदैव तयारीत
राहा. कारण मानवपुत्र तुम्हाला कल्पना नसेल अशा घटकेला येईल.
45 "तुमच्यामध्ये प्रामाणिक व सुज्ञ कारभारी कोण आहे? ज्याच्यावर
घरधनी त्याच्या कुटुंबीयांची देखभाल करण्याचे व अन्नाचे योग्य वेळी
वाटप करण्याचे काम सोपवितो. 46 धनी येईल, तेव्हा जो दास आपली
कामगिरी बजावीत असताना त्याला आढळेल, तो धन्य होय. 47 मी
तुम्हाला निश्चित सांगतो की तो धनी आपल्या सर्व मालमत्तेवर त्याची
नेमणूक करेल. 48 परंतु समजा तो दुष्ट दास आपल्या मनात म्हणेल,
'माझा धनी येण्यास पुष्कळ विलंब होत आहे,' 49 आणि तो सोबतीच्या
दासांना मारहाण करू लागेल आणि मद्यपीं बरोबर खाऊ आणि पिऊ
लागेल. 50 तर त्या दासाचा धनी, तो अपेक्षा करीत नाही आणि तो
सावध नाही अशा घटकेला येईल. 51 त्या दासाचे तुकडे करेल व
ढोंग्यांबरोबर जिथे रडणे व दातखाणे होईल तिथे त्याला वाटा देईल.

**25** "त्यावेळी स्वर्गाचे राज्य, आपआपले दिवे घेऊन वराला सामोऱ्या
जाणाऱ्या दहा कुमारींसारखे होईल. 2 त्यांच्यापैकी पाच मूर्ख
होत्या व पाच शहाण्या होत्या. 3 मूर्ख कुमारींनी दिव्यांबरोबर आपले
तेल घेतले नाही. 4 शहाण्यांनी मात्र दिव्यांबरोबरच आपआपल्या कुपीत
तेलही घेतले. 5 वराला येण्यास उशीर लागला म्हणून सर्वांना डुलक्या
लागल्या व त्या झोपी गेल्या. 6 "मध्यरात्री, 'वर येत आहे; त्याच्या
स्वागतासाठी बाहेर यावे!' अशी हाक त्यांच्या कानी आली. 7 "मग
सर्व कुमारी गडबडीने उठल्या आणि त्यांनी दिवे तयार केले. 8 मूर्ख
कुमारी शहाण्या कुमारींना म्हणाल्या, 'तुमच्या तेलामधून आम्हाला थोडे
द्या; कारण आमचे दिवे विझू लागले आहेत.' 9 "त्यांनी उत्तर दिले,
'नाही, ते तुम्हास व आम्हास पुरणार नाही. तुम्ही तेल विकणाऱ्यांकडे
जा आणि स्वत:साठी विकत आणा.' 10 "त्या तेल विकत आणावयास
गेल्या. वाटेत असतानाच, वर आला आणि ज्या कुमारी तयारीत होत्या,
त्या वराबरोबर लग्नाच्या मेजवानीस आत गेल्या आणि दरवाजा बंद
करण्यात आला. 11 "काही वेळाने त्या दुसऱ्याही कुमारी आल्या व
म्हणू लागल्या, 'प्रभू, प्रभू, आम्हासाठी दार उघडा!' 12 "पण वराने
उत्तर दिले, 'मी तुम्हाला खरेच सांगतो, मी तुम्हाला ओळखत नाही.' 13
"म्हणून तुम्ही जागृत राहा, कारण तो दिवस व ती घटका तुम्हाला माहीत
नाही. 14 "पुन्हा, ते प्रवासाला निघालेल्या एका मनुष्यासारखे आहे.
त्याने त्याच्या दासांना एकत्र बोलाविले आणि प्रत्येकाला त्याने ठराविक
रक्कम दिली. 15 त्याने एकाला सोन्याचे पाच तालांत, दुसऱ्याला दोन
आणि तिसऱ्याला एक, असे ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे दिले आणि
मग तो आपल्या प्रवासाला निघून गेला. 16 नंतर, ज्या सेवकाला पाच
सोन्याच्या थैल्या मिळाल्या होत्या, त्याने ताबडतोब कामधंदा सुरू केला
आणि लवकरच त्याने पाच थैल्या अधिक मिळविल्या. 17 त्याचप्रमाणे
ज्याला दोन सोन्याच्या थैल्या मिळाल्या होत्या, त्यानेही आणखी दोन
थैल्या मिळविल्या. 18 पण ज्याला एक थैली मिळाली, तो गेला व त्याने
जमिनीत एक खोल खड्डा केला आणि सुरक्षित राहावी म्हणून त्याच्या
मालकाची थैली दडवून ठेवली. 19 "बऱ्याच काळानंतर त्यांचा धनी
परतला आणि त्याने आपल्या सेवकांना पैशाचा हिशोब देण्यासाठी
बोलाविले. 20 ज्याला पाच थैल्या मिळाल्या होत्या, त्याने धन्याला
दहा आणून दिल्या. तो म्हणाला, 'महाराज, तुम्ही मला पाच थैल्या

दिल्या होत्या; पाहा, मी त्यावर आणखी पाच मिळविल्या आहेत.’ 21
“त्याचा धनी म्हणाला, ‘शाबास, चांगल्या व विश्वासू दासा! तू लहान
गोष्टीत विश्वासू राहिलास; मी तुझी पुष्कळ गोष्टींवर नेमणूक करेन; ये
आणि तुझ्या धन्याच्या आनंदात सहभागी हो!’ 22 “यानंतर ज्याला दोन
थैल्या दिल्या होत्या, तो सेवक सुद्धा पुढे आला; तो म्हणाला, ‘महाराज,
तुम्ही मला दोन थैल्या दिल्या होत्या, त्या मी दुप्पट केल्या आहेत.’ 23
“त्याचा धनी म्हणाला, ‘शाबास, चांगल्या व विश्वासू दासा! तू लहान
गोष्टीत विश्वासू राहिलास; मी तुझी पुष्कळ गोष्टींवर नेमणूक करेन; ये
आणि तुझ्या धन्याच्या आनंदात सहभागी हो!’ 24 “नंतर ज्याला एक
थैली दिली होती, तो सेवक पुढे आला. तो म्हणाला, ‘महाराज, तुम्ही
एक कठोर गृहस्थ आहात, हे मला माहीत होते. जिथे तुम्ही पेरले नाही,
तिथे कापणी करता आणि जिथे तुम्ही विखुरले नाही तिथे गोळा करता.
25 मला तुमची भीती वाटली, म्हणून मी गेलो व तुम्ही दिलेली एक थैली
भूमीत दडवून ठेवली. पाहा, ती आता मी तुम्हाला परत करण्याकरिता
आणली आहे.’ 26 “यावर त्याचा धनी म्हणाला, ‘अरे, दुष्ट आणि
आळशी दासा, जिथे मी पेरले नाही तिथे मी कापणी करतो आणि जिथे
मी विखुरले नाही तिथे गोळा करतो, तुला एवढे तुला माहीत होते. 27 तर
मग तू माझे सोने सावकाराकडे तरी गुंतवून ठेवावयास होते, म्हणजे मी
परत आल्यावर मला ते व्याजासहित मिळाले असते. 28 “‘तर त्या
सोन्याची थैली त्याच्याकडून घ्या आणि ज्याच्याजवळ दहा थैल्या आहेत
त्याला द्या. 29 कारण ज्यांच्याजवळ आहे त्यांना अधिक दिले जाईल,
म्हणजे त्यांना विपुलतेने मिळेल. ज्यांच्याकडे नाही, त्यांच्याजवळ जे
काही असेल ते देखील त्यांच्यापासून काढून घेतले जाईल. 30 आता त्या
कुचकामी सेवकाला बाहेरच्या अंधारात फेकून द्या; ज्या ठिकाणी रडणे
आणि दातखाणे चालेल.’ 31 “जेव्हा मानवपुत्र सर्व देवदूतांना बरोबर
वैभवाने येईल, त्यावेळी तो वैभवशाली सिंहासनावर बसेल. 32 मग सर्व
राष्ट्रे त्याच्यासमोर एकत्र होतील आणि मेंढपाळ मेंढरे व शेरडे वेगळे
करतो तसा तो लोकांना एकमेकांपासून वेगळे करेल. 33 मेंढरांना तो
त्याच्या उजवीकडे आणि शेरड्यांना त्याच्या डावीकडे करेल. 34 “मग
राजा त्याच्या उजवीकडे असलेल्या लोकांना म्हणेल, ‘अहो, माझ्या
पित्याने दिलेल्या आशीर्वादांनी धन्य झालेले लोकहो, या आणि जगाच्या
उत्पत्तीपासून जे राज्य तुम्हाकरिता तयार करून ठेवले आहे ते वतन
करून घ्या. 35 मी भुकेला होतो आणि तुम्ही मला काही खावयास दिले;
मी तान्हेला होतो आणि तुम्ही मला प्यावयास दिले; मी परका होतो
आणि तुम्ही मला आत घेतले; 36 मला वस्त्रांची गरज होती, तेव्हा तुम्ही
मला वस्त्रे दिली; मी आजारी होतो, तेव्हा तुम्ही माझी काळजी घेतली,
तुरुंगात होतो तेव्हा तुम्ही माझी भेट घेतली.’ 37 “त्यावेळी नीतिमान
लोक त्याला म्हणतील, ‘प्रभूजी, तुम्ही भुकेले असताना आम्ही तुम्हाला
केव्हा पाहिले आणि अन्न दिले आणि तहानलेले असताना तुम्हाला
प्यावयाला दिले? 38 तुम्ही परके असताना आम्ही तुम्हाला केव्हा
पाहिले आणि घरात घेतले किंवा तुम्ही वस्त्रहीन असताना तुम्हाला वस्त्रे
दिली? 39 तुम्ही आजारी असताना किंवा तुरुंगात असताना, आम्ही
केव्हा तुमच्या भेटीला आलो?’ 40 “मग राजा उत्तर देऊन म्हणेल,
‘मी तुम्हाला निश्चित सांगतो, जे काही या लहानातील माझ्या एकाही
भावा-बहिणीसाठी तुम्ही केले ते तुम्ही माझ्यासाठी केले.’ 41 “नंतर
तो त्याच्या डावीकडे असलेल्या लोकांना म्हणेल, ‘अहो शापग्रस्त
लोकांनो, तुम्ही माझ्यापुढून निघून जा. सैतान आणि त्याच्या दूतांसाठी
जो सार्वकालिक अग्नी तयार ठेवला आहे त्यात जा. **(aiōnios g166)** 42
कारण मी भुकेला होतो, तेव्हा तुम्ही मला काही खावयास दिले नाही;
तान्हेला होतो, तेव्हा तुम्ही मला काही प्यावयास दिले नाही. 43 परका
होतो, तेव्हा तुम्ही मला घरात घेतले नाही; वस्त्रहीन होतो तेव्हा तुम्ही
मला वस्त्र दिले नाही; आजारी होतो, तुरुंगात होतो, तेव्हा तुम्ही माझी
काळजी घेतली नाही.’ 44 “ते सुद्धा असे उत्तर देतील, ‘प्रभूजी तुम्ही
भुकेले, तहानलेले, परके, उघडे, आजारी किंवा तुरुंगात असताना आम्ही
तुम्हाला केव्हा पाहिले आणि तुमची मदत केली नाही?’ 45 “तो त्यांना
उत्तर देईल, ‘खरोखर, या कनिष्ठांना करण्याचे तुम्ही नाकारले, तेव्हा
तुम्ही माझ्यासाठी करण्याचे नाकारले.’ 46 “मग त्यांना सार्वकालिक
मृत्यूची शिक्षा मिळेल, पण जे नीतिमान आहेत ते सार्वकालिक जीवनात
प्रवेश करतील.” **(aiōnios g166)**

**26** आपले हे सर्व बोलणे संपविल्यावर येशू आपल्या शिष्यांना
म्हणाले, 2 “जसे तुम्हाला माहीत आहे की, वल्हांडण आणि
बेखमीर भाकरीच्या सणाला दोनच दिवसांचा अवधी आहे आणि
मानवपुत्र क्रूसावर खिळण्यासाठी धरून दिला जाईल.” 3 नंतर प्रमुख
याजकवर्ग आणि लोकांचे वडीलजन महायाजक कयफाच्या राजवाड्यात
एकत्र जमले. 4 आणि येशूंना गुप्तपणे धरून जिवे मारावे म्हणून संधी
शोधीत होते. 5 पण ते म्हणाले, “आपण हे सणात करू नये, कारण तसे
केले तर लोक कदाचित दंगल करतील.” 6 येशू बेथानी येथे कुष्ठरोगी
शिमोन याच्या घरी होते. 7 तिथे ते जेवायला बसले असताना, एक स्त्री
अतिशय मोलवान सुगंधी तेल असलेली एक अलाबास्त्र कुपी घेऊन
आत आली आणि तिने ते बसले असताना येशूंच्या मस्तकावर तेल
ओतले. 8 जेव्हा शिष्यांनी हे पाहिले त्यावेळी ते संतापले. ते म्हणाले,
“ही नासाडी कशाला? 9 हे तेल अधिक किमतीस विकून ते पैसे
गोरगरिबांना देता आले असते.” 10 हे जाणून येशू त्यांना म्हणाले,
“तुम्ही या स्त्रीला त्रास का देता? तिने माझ्यासाठी एक सुंदर कृत्य केले
आहे. 11 गरीब लोक तर नेहमीच तुमच्याबरोबर असतील, परंतु मी
तुमच्याबरोबर नेहमीच असणार नाही. 12 माझ्या अंत्यविधीची तयारी
म्हणून तिने हे तेल माझ्या शरीरावर ओतले आहे. 13 मी तुम्हाला निश्चित
सांगतो की, जगात जिथे कुठे ही शुभवार्ता गाजविण्यात येईल, तिथे हिने
केलेले हे सत्कार्य हिच्या आठवणीसाठी सांगितले जाईल.” 14 यानंतर
बारा शिष्यांपैकी एक जो यहूदाह इस्कर्योत; महायाजकांकडे गेला. 15
आणि त्याने त्यांना विचारले, “येशूंना मी तुमच्या स्वाधीन केले, तर
तुम्ही मला काय द्याल?” तेव्हा त्यांनी त्याला चांदीची तीस नाणी मोजून
दिली. 16 त्या वेळेपासून यहूदाह येशूंना धरून देण्याची योग्य संधी
शोधू लागला. 17 बेखमीर भाकरीच्या सणाच्या पहिल्या दिवशी शिष्य

येशूंकडे आले आणि त्यांनी त्यांना विचारले, “वल्हांडणाच्या भोजनाची
तयारी आम्ही कुठे करावी?” 18 येशूंनी उत्तर दिले, “शहरात जा आणि
या एका माणसाची भेट घ्या. त्याला सांगा की, ‘गुरुजी म्हणतात: माझी
नेमलेली वेळ जवळ आली आहे. मी माझ्या शिष्यांबरोबर वल्हांडणाचे
भोजन तुझ्या घरी करेन.’” 19 येशूंनी सांगितल्याप्रमाणे शिष्यांनी
केले आणि वल्हांडणाच्या भोजनाची तयारी केली. 20 संध्याकाळ
झाल्यावर येशू आपल्या बारा शिष्यांबरोबर मेजावर टेकून बसले होते.
21 आणि ते भोजन करीत असताना येशू म्हणाले, “मी तुम्हाला निश्चित
सांगतो की तुमच्यापैकी एकजण माझा विश्वासघात करेल.” 22 येशूंचे
हे उद्गार ऐकताच शिष्यांची अंतःकरणे दुःखी झाली आणि ते त्यांना
विचारू लागले, “प्रभूजी, खरोखर तो मी तर नाही ना?” 23 येशूंनी
उत्तर दिले, “ज्याने माझ्याबरोबर ताटात हात घातला आहे तोच माझा
विश्वासघात करणार आहे. 24 कारण त्यांच्याबद्दल लिहिल्याप्रमाणे
मानवपुत्र जातो खरा. परंतु जो मानवपुत्राला विश्वासघाताने धरून देतो,
त्याचा धिक्कार असो. तो जन्मलाच नसता, तर ते त्याला अधिक हिताचे
झाले असते.” 25 मग जो त्यांना धरून देणारा होता, त्या यहूदाहने
येशूंना विचारले, “खरोखर रब्बी, तो मी तर नाही ना?” त्यावर येशूने
उत्तर दिले, “तू स्वतःच तसे म्हटले आहेस.” 26 भोजन करीत असताना,
येशूने भाकर घेतली आणि आशीर्वाद मागितल्यावर ती मोडली आणि
आपल्या शिष्यांना दिली. मग ते म्हणाले, “घ्या आणि खा, हे माझे
शरीर आहे.” 27 त्यांनी द्राक्षारसाचा प्याला हाती घेतला व त्याबद्दल
आभार मानले आणि मग तो प्याला त्यांना दिला व म्हणाले, “तुम्ही
प्रत्येकजण यामधून प्या; 28 हे माझ्या कराराचे रक्त आहे. बहुतांना
पापक्षमा मिळावी म्हणून ते पुष्कळांसाठी ओतले जात आहे. 29 मी
तुम्हाला सांगतो की, येथून पुढे मी पित्याच्या राज्यात तुम्हाबरोबर
नवा द्राक्षारस पिईन, त्या दिवसापर्यंत द्राक्षवेलीचा उपज मी पिणार
नाही.” 30 मग त्या सर्वांनी मिळून एक गीत गाईले आणि ते जैतुनाच्या
डोंगराकडे गेले. 31 मग येशू शिष्यांना म्हणाले, “आज रात्री तुम्ही
सर्वजण मला एकट्याला सोडून पळून जाल, कारण धर्मशास्त्रात असे
लिहिले आहे: “‘मी मेंढपाळावर प्रहार करेन, आणि कळपातील मेंढरांची
पांगापांग होईल.’ 32 परंतु मी पुन्हा जिवंत झाल्यावर, तुमच्या आधी
गालीलात जाईन आणि तिथे तुम्हाला भेटेन.” 33 यावर पेत्राने त्यांना
म्हटले, “जरी सर्वांनी सोडले, तरी मी तुम्हाला कधीच सोडून जाणार
नाही.” 34 येशू म्हणाले मी तुला निश्चित सांगतो, “आज रात्रीच,
कोंबडा आरवण्यापूर्वी तू मला तीन वेळा नाकारशील.” 35 परंतु पेत्र
जाहीरपणे म्हणाला, “मला तुमच्याबरोबर मरावे लागले, तरी मी तुम्हाला
नाकारणार नाही.” आणि बाकीचे सर्व शिष्यही असेच म्हणाले. 36 मग
येशू आपल्या शिष्यांसोबत गेथशेमाने नावाच्या ठिकाणी आले आणि
येशू त्यांना म्हणाले, “मी तिथे जाऊन प्रार्थना करेपर्यंत येथे बसा.” 37
मग त्यांनी पेत्र आणि जब्दीचे दोन पुत्र, याकोब व योहानला बरोबर
घेतले आणि ते अस्वस्थ आणि दुःखीकष्टी होऊ लागले. 38 ते त्यांना
म्हणाले, “मरणप्राय दुःखाने माझा आत्मा विव्हळ झाला आहे. तुम्ही
येथेच थांबा आणि माझ्याबरोबर जागे राहा.” 39 मग थोडे पुढे जाऊन ते
भूमीवर पालथे पडून त्यांनी प्रार्थना केली, “हे माझ्या पित्या, शक्य
असल्यास हा प्याला माझ्यापासून दूर करा. तरी माझ्या इच्छेप्रमाणे
नको, तर तुमच्या इच्छेप्रमाणे होवो.” 40 यानंतर ते आपल्या शिष्यांकडे
परत आले, पण ते झोपी गेले आहेत असे त्यांना आढळले. पेत्राला
त्यांनी म्हटले, “तुम्ही माणसे एक तासभरही माझ्याबरोबर जागे राहू
शकला नाही का? 41 तुम्ही परीक्षेत पडू नये म्हणून सावध राहा आणि
प्रार्थना करा. आत्मा उत्सुक आहे, परंतु देह अशक्त आहे.” 42 येशू
पुन्हा गेले आणि प्रार्थना केली, “हे माझ्या पित्या, जर हा प्याला मी
प्याल्याशिवाय दूर करता येणार नसेल, तर तुमच्या इच्छेप्रमाणे होवो.”
43 नंतर ते परत त्यांच्याकडे आले, त्यावेळीही ते झोपी गेलेले आढळले,
कारण त्यांचे डोळे जड झाले होते. 44 म्हणून ते प्रार्थना करण्यासाठी
परत गेले आणि पुन्हा त्यांनी तेच शब्द उच्चारून प्रार्थना केली. 45
नंतर ते शिष्यांकडे परत आले आणि त्यांना म्हणाले, “तुम्ही अजूनही
झोप व विसावा घेत आहात काय? पाहा, वेळ आली आहे आणि
मानवपुत्र पापी लोकांच्या हाती धरून दिला जात आहे. 46 उठा, आपण
जाऊ! माझा विश्वासघात करणारा आला आहे.” 47 येशू बोलत आहेत
तोच, त्यांच्या बारा पैकी एक, यहूदाह तिथे पोहोचला. त्याच्याबरोबर
महायाजक आणि वडीलजनांनी पाठविलेला मोठा जमाव तरवारी आणि
सोटे घेऊन आला होता. 48 आता विश्वासघातक्याने जमावाला खूण
देऊन ठेवली होती, “ज्या मनुष्याचे मी चुंबन घेईन त्याला अटक करा.”
49 तत्क्षणी यहूदाह येशूंच्या जवळ गेला, “सलाम, रब्बी!” त्याने उद्गार
काढले आणि त्यांचे चुंबन घेतले. 50 येशू त्याला म्हणाले, “मित्रा, ज्या
कामासाठी तू आला आहेस ते आटोपून घे.” मग त्या पुरुषांनी पुढे येऊन
येशूंना धरले आणि अटक केले. 51 तेवढ्यात येशूंच्या बरोबर जे होते,
त्यांच्यातील एकाने तरवार उपसली आणि महायाजकाच्या दासाचा
कान कापून टाकला. 52 तत्काळ येशू त्यांना म्हणाले, “तुझी तलवार
म्यानात घाल,” कारण “तलवार उपसणारे तलवारीनेच मारले जातील.
53 मी माझ्या पित्याला विनंती केली तर, ते देवदूतांच्या बारापेक्षा अधिक
सैन्यतुकड्या ताबडतोब पाठविणार नाहीत काय? 54 पण मी तशी
विनंती केली तर जे काही घडत आहे, त्याविषयाचे धर्मशास्त्रात लिहिलेले
भविष्य कसे पूर्ण होईल?” 55 त्यावेळी येशू जमावाला म्हणाले, “मी
बंडखोरांचा नेता आहे काय, की तुम्ही तरवारी आणि लाठ्या घेऊन
मला धरावयास आला आहात? मी दररोज मंदिराच्या परिसरात बसून
शिकवीत असे, पण त्यावेळी तुम्ही मला धरले नाही. 56 यासाठी की
संदेष्ट्यांनी लिहिलेल्या शास्त्राप्रमाणे होण्यासाठीच हे सर्व घडत आहे.”
मग सर्व शिष्य त्यांना एकट्याला सोडून पळून गेले. 57 येशूंना अटक
करून त्यांना महायाजक कयफा याच्याकडे नेले; त्या ठिकाणी सर्व
वडीलजन आणि नियमशास्त्र शिक्षक एकत्र झाले होते. 58 परंतु पेत्र
काही अंतरावरून त्यांच्यामागे चालत, महायाजकाच्या अंगणात आला.
त्याने प्रवेश केला आणि पहारेकऱ्यांसोबत जाऊन काय होते ते पाहत
बसला. 59 मुख्य याजक आणि सर्व यहूदी न्यायसभा येशूंना जिवे

मारण्यासाठी खोटे पुरावे शोधण्याचा प्रयत्न करीत होते. 60 परंतु अनेक
खोटे साक्षीदार पुढे आले तरी ते त्यांना सापडले नाही. शेवटी दोन माणसे
पुढे आली, 61 “हा मनुष्य म्हणाला, ‘मी परमेश्वराच्या मंदिराचा विध्वंस
करण्यास व तीन दिवसात ते पुन्हा बांधण्यास समर्थ आहे.’” 62 हे ऐकून
महायाजक उभा राहिला आणि त्याने येशूंना म्हटले, “या आरोपांना तू
उत्तर देणार नाही काय? हे लोक जी साक्ष तुझ्याविरुद्ध सांगत आहेत
ती काय आहे?” 63 पण येशू शांत राहिले. नंतर महायाजकाने त्यांना
विचारले, “जिवंत परमेश्वराच्या नावाने शपथ घालून मी तुला विचारतो
की, परमेश्वराचा पुत्र ख्रिस्त तो तू आहेस का?” 64 येशूंनी उत्तर दिले,
“असे तुम्ही म्हणता, परंतु मी तुम्हा सर्वांना सांगतो की येथून पुढे तुम्ही
मला, अर्थात् मानवपुत्राला, सर्वसमर्थाच्या उजवीकडे बसलेले आणि
आकाशातून मेघारूढ होऊन परत येत असलेले पाहाल.” 65 येशूंचे हे
उद्गार ऐकल्याबरोबर महायाजकाने आपली वस्त्रे फाडली आणि तो
ओरडला, “याने ईश्वरनिंदा केली आहे! आता आणखी साक्षीदारांची
आपल्याला गरजच काय? पाहा, तुम्ही ईश्वरनिंदा ऐकली आहे. 66
तुम्हाला काय वाटते?” “तो मृत्युदंडास योग्य आहे.” त्यांनी ओरडून
प्रत्युत्तर दिले. 67 मग ते येशूंच्या तोंडावर थुंकले आणि त्यांना बुक्क्या
मारल्या. काहींनी त्यांच्या तोंडात चपराका मारल्या, 68 आणि म्हटले,
“ख्रिस्ता, आम्हासाठी भविष्यवाणी करा. तुम्हाला कोणी मारले?”
69 हे सर्व होत असताना, पेत्र अंगणात बाहेर बसला होता आणि
एक दासी त्याच्याकडे आली व ती त्याला म्हणाली, “तू गालीलकर
येशूंबरोबर होतास.” 70 परंतु पेत्राने सर्वांच्यासमोर नकार दिला. तो
म्हणाला, “तू कशाबद्दल बोलतेस हे मला समजत नाही.” 71 मग
तो बाहेरील आवाराच्या दाराजवळ गेला, तिथे त्याला दुसऱ्या एका
दासीने पाहिले आणि ती लोकांना म्हणाली, “हा मनुष्य नासरेथच्या
येशूंबरोबर होता.” 72 या खेपेसही पेत्र नाकारून आणि शपथ घेऊन
म्हणाला, “मी त्या मनुष्याला ओळखत नाही!” 73 थोड्या वेळाने जी
माणसे तिथे उभी होती, ती पेत्राला म्हणाली, “तू खरोखर त्यांच्यापैकीच
आहेस हे आम्हाला माहीत आहे. तुझ्या भाषा-शैलीवरून आम्ही हे सांगू
शकतो.” 74 हे ऐकून पेत्र शाप देऊ लागला व शपथ घेऊन त्यांना
म्हणू लागला, “मी त्या मनुष्याला ओळखत नाही.” तेवढ्यात कोंबडा
आरवला. 75 त्याच क्षणाला पेत्राला येशूंचे शब्द आठवले, “पेत्रा,
कोंबडा आरवण्यापूर्वी तू मला तीन वेळा नाकारशील.” पेत्र दूर निघून
गेला आणि अतिशय दुःखाने रडला.

**27** प्रातःकाळ झाल्यावर सर्व महायाजक आणि लोकांच्या
वडीलजनांनी येशूंचा वध कसा करता येईल याची योजना केली.
2 सभेनंतर त्यांनी येशूंना बंदिस्त करून रोमी राज्यपाल पिलाताच्या
स्वाधीन केले. 3 ज्या यहूदाहने, त्यांचा घात केला होता, त्याने पाहिले
की येशूंना दोषी ठरविण्यात आले, तेव्हा त्याला खेद झाला आणि त्याने
चांदीची तीस नाणी महायाजक व वडीलजन यांच्याकडे परत केली. 4
“मी पाप केले आहे.” तो म्हणाला, “मी निर्दोष रक्ताचा विश्वासघात
केला आहे.” “त्याचे आम्हाला काय? तू स्वतःच त्याला जबाबदार
आहेस,” त्यांनी प्रत्युत्तर केले. 5 यावर त्याने ते पैसे मंदिरात फेकून दिले
आणि बाहेर जाऊन गळफास घेतला. 6 महायाजकांनी ते पैसे गोळा
केले आणि ते म्हणाले, “हे पैसे आपल्याला मंदिराच्या खजिन्यात भरता
येणार नाहीत, हे नियमाविरुद्ध आहे. कारण हे रक्ताचे पैसे आहेत.” 7
म्हणून त्या पैशात परदेशी लोकांच्या दफनासाठी कुंभाराचे शेत विकत
घेण्याचा त्यांनी निर्णय घेतला. 8 यामुळे त्या शेताला रक्ताचे शेत
असे आजपर्यंत म्हणतात. 9 हे शेत विकत घेण्याच्या घटनेने यिर्मयाह
संदेष्ट्याची भविष्यवाणी पूर्ण झाली. ती अशी: “त्यांनी चांदीची तीस
नाणी घेतली आणि इस्राएली लोकांनी त्याचे मोल ठरविले, 10 आणि
प्रभूने मला आज्ञा दिल्याप्रमाणे, त्यांनी कुंभाराचे शेत विकत घेण्यासाठी
त्यांचा उपयोग केला.” 11 येशू राज्यपालाच्या पुढे उभे होते आणि
राज्यपालाने त्यांना विचारले, “तू यहूद्यांचा राजा आहेस काय?” येशूंनी
उत्तर दिले, “तुम्ही म्हटले तसे.” 12 महायाजक आणि यहूदी पुढाऱ्यांनी
येशूंवर अनेक आरोप केले त्यावेळी येशू अगदी शांत राहिले. 13 “हे
लोक तुझ्यावर अनेक गोष्टींचा दोषारोप करीत आहेत, हे तू ऐकत नाही
काय?” पिलाताने येशूंना विचारले, 14 परंतु येशूंनी एकाही आरोपाचे
उत्तर दिले नाही. राज्यपालासाठी ही खूप आश्चर्यचकित गोष्ट होती. 15
आता सणामध्ये जमावाच्या निवडीनुसार एका कैद्याला सोडून देण्याची
राजपालांची प्रथा होती. 16 या वर्षी येशू बरब्बास नावाचा एक प्रसिद्ध
गुन्हेगार तुरुंगात होता. 17 त्या ठिकाणी लोकांची खूप गर्दी जमली
असताना, पिलाताने लोकांना विचारले, “सणानिमित्त मी तुमच्यासाठी
कोणाला सोडून देऊ? येशू बरब्बास किंवा ख्रिस्त म्हटलेल्या येशूंना?”
18 कारण पिलाताला कळले होते की, लोकांनी स्वतःच्या हितासाठी
येशूंना धरून दिले होते. 19 त्याचवेळी, पिलात न्यायासनावर बसला
असतानाच त्याच्या पत्नीने त्याला निरोप पाठविला, “त्या निर्दोष
माणसाच्या विरुद्ध जाऊ नका, कारण आज स्वप्नात मी त्याच्यामुळे
फार दुःख भोगले आहे.” 20 परंतु तोपर्यंत प्रमुख याजकांनी व वडील
यांनी “बरब्बाला सोडा” अशी मागणी करून येशूंना जिवे मारावे म्हणून
समुदायाचे मन वळविले. 21 राज्यपालांनी विचारले, “या दोघांपैकी मी
तुम्हाकरिता कोणाला सोडावे, अशी तुमची इच्छा आहे?” जमावाने
उत्तर दिले, “बरब्बाला सोडावे!” 22 “मग ख्रिस्त जो येशू यांचे मी
काय करावे?” पिलाताने विचारले. “त्याला क्रूसावर खिळा,” लोक
मोठ्याने ओरडले. 23 “पण का?” पिलाताने खुलासा विचारला,
“त्याने असा कोणता गुन्हा केला आहे?” पण लोकांनी अधिकच
मोठ्याने गर्जना केली, “त्याला क्रूसावर खिळा!” 24 पिलाताला समजले
की आपण काहीही करू शकत नाही, दंगल वाढत आहे असे त्याने
पाहिले, तेव्हा त्याने पाणी घेतले आणि सर्व जमावापुढे आपले हात
धुतले. “मी या माणसाच्या रक्ताबाबत निर्दोष आहे.” तो म्हणाला, “ही
तुमची जबाबदारी आहे.” 25 यावर सर्व जमाव ओरडला, “त्याचे रक्त
आम्हावर आणि आमच्या मुलाबाळांवर असो.” 26 तेव्हा पिलाताने
बरब्बाला सोडून दिले आणि येशूंना फटके मारल्यानंतर त्यांना क्रूसावर
खिळण्याकरिता सैनिकांच्या स्वाधीन केले. 27 मग राज्यपालाच्या

शिपायांनी येशूंना आपल्या ताब्यात घेतले आणि त्यांना राजवाड्यात
प्राइतोरियम येथे नेऊन सर्व सैनिकांच्या टोळीला तिथे एकत्र बोलाविले
28 तिथे त्यांनी त्यांचे कपडे काढले आणि त्यांना किरमिजी रंगाचा झगा
घातला. 29 मग त्यांनी काट्यांचा एक मुकुट गुंफला आणि त्यांच्या
मस्तकांवर घातला. राजदंड म्हणून त्यांनी त्यांच्या उजव्या हातात एक
काठी दिली आणि त्यांनी गुडघे टेकले आणि त्यांचा उपहास करीत
ते त्यांना म्हणाले, "हे यहूद्यांच्या राजा, तुझा जयजयकार असो!"
30 ते त्यांच्या तोंडावर थुंकले, त्यांच्या हातात दिलेली काठी त्यांनी
हिसकावून घेतली आणि त्यांच्या मस्तकावर वारंवार मारले. 31 येशूंची
अशी थट्टा केल्यावर त्यांनी झगा काढून घेतला आणि त्यांचे कपडे
पुन्हा त्यांच्या अंगावर चढविले. मग त्यांना क्रूसावर खिळण्याकरिता
घेऊन गेले. 32 ते त्यांना घेऊन क्रूसावर खिळण्याच्या जागेकडे निघाले.
वाटेत त्यांना कुरेने गावचा शिमोन नावाचा मनुष्य भेटला. त्यांनी त्याला
जबरदस्तीने क्रूस वाहण्यास भाग पाडले. 33 मग ते गोलगोथा या नावाने
ओळखल्या जाणाऱ्या जागी आले. गोलगोथाचा अर्थ "कवटीची जागा".
34 त्या ठिकाणी त्यांना पित्त मिसळलेला द्राक्षारस प्यावयास दिला.
परंतु त्यांनी तो चाखून पाहिल्यावर घेतला नाही. 35 येशूंना क्रूसावर
खिळल्यानंतर त्यांची वस्त्रे सैनिकांनी चिठ्ठ्या टाकून वाटून घेतली. 36
मग क्रूसावर टांगलेल्या येशूंवर पहारा करीत ते जवळच बसले. 37
त्यांच्या डोक्याच्या वरच्या बाजूला दोषपत्राचा लेख लावण्यात आला
होता, त्यावर लिहिले होते: हा येशू, यहूद्यांचा राजा आहे. 38 त्यांनी दोन
बंडखोरांना त्यांच्याबरोबर क्रूसावर खिळले, एक उजवीकडे आणि दुसरा
त्यांच्या डावीकडे होता. 39 जे जवळून जात होते त्यांनी त्यांचा अपमान
केला, ते डोकी हालवीत 40 म्हणाले, "तू मंदिर उद्ध्वस्त करून तीन
दिवसात पुन्हा बांधणार आहे ना! जर तू परमेश्वराचा पुत्र आहेस, तर
क्रूसावरून खाली ये आणि स्वतःला वाचव." 41 त्याचप्रमाणे प्रमुख
याजकवर्ग आणि नियमशास्त्र शिक्षक यांनीही त्यांची थट्टा केली. 42 ते
म्हणाले, "त्याने दुसऱ्यांचे तारण केले, पण त्याला स्वतःचा बचाव करता
येत नाही. तो इस्राएलाचा राजा आहे! मग त्याला क्रूसावरून खाली
उतरून येऊ दे म्हणजे आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवू. 43 तो परमेश्वरावर
भरवसा ठेवतो. मग परमेश्वराची इच्छा असल्यास त्याने त्याची सुटका
करावी, कारण तो म्हणाला होता की, 'मी परमेश्वराचा पुत्र आहे.'"
44 त्यांच्याबरोबर क्रूसावर खिळलेल्या त्या चोरांनीही त्यांचा अपमान
केला. 45 त्या दिवशी दुपारपासून तीन वाजेपर्यंत सर्व प्रांतावर अंधार
पडला. 46 दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास येशूंनी मोठ्याने आरोळी
मारली, "एली, एली, लमा सबकतनी," म्हणजे, "माझ्या परमेश्वरा,
माझ्या परमेश्वरा, तुम्ही माझा त्याग का केला?" 47 तिथे उभे असलेल्या
काही लोकांनी हे ऐकले व ते म्हणाले की तो, "एलीयाहला बोलावित
आहे." 48 लागलीच त्यांच्यापैकी एकाने धावत जाऊन शिरक्यात
भिजविलेला एक स्पंज काठीवर ठेवून येशूंना प्यावयास दिला, 49 इतर
म्हणाले, "त्याला एकटे सोडा. एलीयाह त्याला खाली उतरावयास व
तारावयास येतो की काय हे आपण पाहू!" 50 मग येशूंनी पुन्हा एकदा
मोठी आरोळी मारली आणि आपला प्राण सोडला. 51 त्याच क्षणाला,
पवित्रस्थानातील पडदा वरपासून खालपर्यंत दोन भागात फाटला, पृथ्वी
हादरली, खडक फुटले 52 आणि कबरा उघडल्या. मृत पावलेल्या अनेक
पवित्र लोकांची शरीरे पुन्हा उठविली गेली. 53 येशूंच्या पुनरुत्थानानंतर
ते कबरेच्या बाहेर आले आणि पवित्र शहरात गेले आणि पुष्कळ लोकांनी
त्यांना पाहिले. 54 जेव्हा शताधिपतीने आणि त्याच्याबरोबर येशूंवर
पहारा करणारे रोमी शिपायांनी भूकंप आणि घडलेल्या इतर सर्वगोष्टी
पाहिल्या, तेव्हा ते अत्यंत भयभीत झाले आणि त्यांनी उद्गार काढले,
"खरोखरच हा परमेश्वराचा पुत्र होता!" 55 अनेक स्त्रिया हे दुरून पाहत
होत्या. त्या गालील प्रांतातून येशूंची सेवा करीत त्यांच्यामागे आल्या
होत्या. 56 त्या स्त्रियांमध्ये मरीया मग्दालिया; याकोब व योसेफ यांची
आई मरीया आणि जब्दीचे पुत्र याकोब व योहानाची आई होती. 57
संध्याकाळ झाली असताना, येशूंचा अनुयायी झालेला, अरिमथिया
शहराचा योसेफ नावाचा एक श्रीमंत मनुष्य, 58 पिलाताकडे गेला व
त्याने येशूंचे शरीर मागितले आणि पिलाताने ते त्याला देण्यात यावे
अशी आज्ञा दिली. 59 योसेफाने येशूंचे शरीर घेतले, एका स्वच्छ
तागाच्या वस्त्रात गुंडाळले, 60 आणि खडकात खोदलेल्या आपल्या
मालकीच्या एका नव्या कबरेमध्ये ते ठेवले. कबरेच्या दाराशी त्याने
एक मोठी शिला लोटून ठेवली. नंतर तो तिथून निघून गेला. 61 मरीया
मग्दालिया आणि दुसरी मरीया या दोघीजणी कबरेसमोर बसल्या होत्या.
62 सणाच्या तयारीच्या दुसऱ्या दिवशी, वल्हांडण सणाचा पहिला दिवस
संपताना, प्रमुख याजकवर्ग आणि परूशी लोक पिलाताकडे गेले. 63
"महाराज," ते म्हणाले, "आम्हाला आठवण आहे की तो लबाड जिवंत
असताना म्हणाला होता की, 'तीन दिवसानंतर मी पुन्हा जिवंत होईन'
64 यास्तव त्याची कबर तीन दिवसापर्यंत सुरक्षित ठेवण्याचा हुकूम
आपण द्यावा. नाही तर त्याचे शिष्य येऊन शरीर चोरून नेतील आणि तो
पुन्हा जिवंत झाला आहे, असे लोकांना सांगतील. असे झाले तर ही
शेवटची फसवणूक पहिल्यापेक्षा अधिक वाईट होईल." 65 पिलाताने
उत्तर दिले, "सैनिकांना घ्या, तुमच्याने होईल तसा कबरेचा बंदोबस्त
करा." 66 याप्रमाणे ते गेले आणि कबरेवरील शिला शिक्कामोर्तब करून
त्यांनी ती सुरक्षित केली व पहारेकरीही ठेवले.

**28** शब्बाथ संपल्यानंतर, आठवड्याच्या पहिल्या दिवशी पहाटेस
मरीया मग्दालिया आणि दुसरी मरीया कबर पाहावयला गेल्या. 2
तेवढ्यात एकाएकी तीव्र भूकंप झाला, कारण स्वर्गातून प्रभूचा एक
दूत खाली आला, कबरेजवळ जाऊन त्याने कबरेवरील धोंड बाजूला
लोटली आणि तो तिच्यावर बसला. 3 त्याचे मुख विजेसारखे तेजस्वी
आणि त्याचे वस्त्रे हिमासारखी शुभ्र होती. 4 पहारेकऱ्यांनी त्याला
पाहिले व ते भयभीत झाले, थरथर कापले आणि मृतवत झाले. 5
देवदूत त्या स्त्रियांना म्हणाला, "भिऊ नका, क्रूसावर खिळलेल्या येशूंना
तुम्ही शोधीत आहात, हे मला माहीत आहे. 6 ते येथे नाहीत; त्यांनी
सांगितल्याप्रमाणे ते उठले आहेत. या आणि ज्या ठिकाणी त्यांना ठेवले
होते ती जागा पाहा. 7 आता लवकर जा आणि त्यांच्या शिष्यांना सांगा:

'येशू मेलेल्यामधून पुन्हा उठले आहेत आणि ते तुमच्यापुढे गालीलात
जात आहेत. ते तिथे तुम्हाला भेटतील.' जसे मी तुम्हाला सांगितले."
8 भयभीत पण अतिशय आनंदित होऊन त्या स्त्रिया कबरेपासून
दूर गेल्या, शिष्यांना देवदूताचा निरोप सांगण्यासाठी त्या धावतच
निघाल्या. 9 अकस्मात येशू त्यांना भेटले व "अभिवादन" असे म्हणाले.
त्यांच्याजवळ जाऊन त्यांनी त्यांचे चरण धरले आणि त्यांची उपासना
केली. 10 मग येशू त्यांना म्हणाले, "भिऊ नका. माझ्या भावांकडे जा,
त्यांना सांगा आणि मला भेटण्यासाठी ताबडतोब गालीलात या. तिथे मी
त्यांच्या दृष्टीस पडेन." 11 त्या स्त्रिया वाटेवर असताना, काही शिपाई
महायाजकाकडे गेले आणि काय घडले यासंबंधीचा सर्व वृतांत त्यांनी
महायाजकांना सांगितला. 12 यहूदी पुढाऱ्यांची सभा बोलाविण्यात
आली. त्या सभेत शिपायांना लाच देऊन, 13 त्यांना असे सांगावयास
लावले, "रात्री आम्ही झोपेत असताना त्यांच्या शिष्यांनी येऊन त्यांचे
शरीर पळवून नेले. 14 राज्यपालांना हे समजले तर भिण्याचे काही
कारण नाही. आम्ही तुमच्यावतीने बोलू. सर्वकाही ठीक होईल." 15 या
आश्वासनानंतर शिपायांनी लाच घेतली आणि त्यांना शिकविल्याप्रमाणे
त्यांनी सांगितले आणि ही गोष्ट यहूदी लोकांमध्ये पसरली आणि ती
आजही प्रचलित आहे. 16 यानंतर येशूंचे अकरा शिष्य गालीलातील ज्या
डोंगरावर येशूंनी त्यांना जमावयास सांगितले होते, त्या डोंगरावर गेले.
17 त्यांनी त्यांना पाहिले आणि त्यांची उपासना केली. परंतु काहींनी
संशय धरला. 18 मग येशू त्यांच्याजवळ येऊन त्यांना म्हणाले, "स्वर्गात
आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला देण्यात आलेला आहे. 19 यास्तव
सर्व राष्ट्रांमध्ये जाऊन शिष्य बनवा आणि त्यांना पित्याच्या, पुत्राच्या
आणि पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या; 20 आणि मी तुम्हाला
आज्ञा केल्याप्रमाणे त्यांना सर्वकाही पाळावयास शिकवा आणि मी
सदैव, युगाच्या अंतापर्यंत तुमच्याबरोबर आहे." **(aiōn g165)**

# मार्क

1 परमेश्वराचे पुत्र येशू ख्रिस्त, यांच्याबद्दलच्या शुभवार्तेचा प्रारंभ.
2 यशायाह संदेष्ट्याच्या ग्रंथात लिहिले आहे: “मी माझा संदेष्टा
तुझ्यापुढे पाठवेन, तो तुझा मार्ग तयार करेल,” 3 “अरण्यात घोषणा
करणाऱ्या एकाची वाणी झाली, ‘प्रभूसाठी मार्ग तयार करा, आणि
त्यांच्यासाठी मार्ग सरळ करा.’” 4 आणि म्हणून बाप्तिस्मा करणारा
योहान पापक्षमेसाठी पश्चात्तापाच्या बाप्तिस्म्याचा संदेश देत अरण्यात
प्रकट झाला. 5 यहूदीया प्रांतातील आणि सर्व यरुशलेमातील लोक
त्याच्याकडे आले. त्यांनी पापे कबूल केल्यानंतर, यार्देन नदीमध्ये
योहानाकडून त्यांचा बाप्तिस्मा होत असे. 6 योहान उंटाच्या केसांपासून
तयार केलेल्या कापडाचा झगा घालीत असे, कंबरेला चामड्याचा पट्टा
बांधत असे. तो टोळ आणि रानमध सेवन करीत असे. 7 त्याचा संदेश हा
होता: “माझ्यानंतर एकजण येत आहे, जे माझ्यापेक्षा फार सामर्थ्यवान
आहेत व त्यांच्या पादत्राणाचे बंद सोडणारा एक गुलाम होण्याची सुद्धा
माझी पात्रता नाही. 8 मी तुमचा बाप्तिस्मा पाण्याने करतो, पण ते
तुमचा बाप्तिस्मा पवित्र आत्म्याने करतील.” 9 त्यावेळी येशू गालील
प्रांतातील नासरेथ गावातून आले आणि योहानाने यार्देन नदीत त्यांचा
बाप्तिस्मा केला. 10 येशू पाण्यातून बाहेर येत होते त्याचवेळेस, आकाश
उघडलेले आणि आत्मा कबुतरासारखा त्यांच्यावर उतरत आहे असे
त्यांनी पाहिले 11 त्याचवेळी स्वर्गातून एक वाणी झाली: “तू माझा प्रिय
पुत्र आहेस, तुझ्यावर मी संतुष्ट आहे.” 12 नंतर लगेच पवित्र आत्म्याने
त्यांना अरण्यात पाठविले, 13 रानात चाळीस दिवस असताना, सैतानाने
त्यांची परीक्षा घेतली. त्यांच्या सोबतीला जंगली प्राणी होते आणि
देवदूतांनी त्यांची सेवा केली. 14 योहानाला बंदिवासात टाकल्यानंतर,
परमेश्वराच्या शुभवार्तेची घोषणा करीत येशू गालील प्रांतात आले. 15 ते
म्हणाले, “वेळ आली आहे,” व “परमेश्वराचे राज्य जवळ आले आहे.
पश्चात्ताप करा आणि शुभवार्तेवर विश्वास ठेवा!” 16 एके दिवशी येशू
गालील सरोवराच्या जवळून चालत असताना, त्यांनी शिमोन पेत्र आणि
त्याचा भाऊ आंद्रिया यांना सरोवरात जाळे टाकताना पाहिले, कारण
ते मासे धरणारे होते. 17 येशू त्यांना म्हणाले, “चला, माझ्यामागे या
म्हणजे मी तुम्हाला माणसे धरणारे करेन.” 18 लगेच त्यांनी त्यांची
जाळी सोडली आणि ते त्यांच्यामागे गेले. 19 थोडे पुढे जाताच, त्यांनी
जब्दीचे पुत्र याकोब आणि त्याचा भाऊ योहान यांना होडीत बसून
आपली जाळी तयार करताना पाहिले. 20 त्यांनी उशीर न करता त्यांना
बोलाविले, तेव्हा ते आपला पिता जब्दी याला नावेमध्ये मजुरांबरोबर
सोडून त्यांच्यामागे गेले. 21 ते कफर्णहूम येथे गेले, आणि शब्बाथ
आला तेव्हा सभागृहामध्ये जाऊन शिक्षण देण्यास सुरुवात केली. 22
त्यांच्या शिकवणीवरून लोक थक्क झाले, कारण ते नियमशास्त्राच्या
शिक्षकांप्रमाणे नव्हे तर ज्याला अधिकार आहे असे त्यांना शिकवीत
होते. 23 इतक्यात, सभागृहामध्ये अशुद्ध आत्म्याने पछाडलेला एक
मनुष्य ओरडला, 24 “हे नासरेथकर येशू, तुम्हाला आमच्याशी काय
काम? तुम्ही आमचा नाश करावयास आले काय? तुम्ही कोण आहात
हे मला माहीत आहे—परमेश्वराचा पवित्रजन आहेस!” 25 “गप्प
राहा!” येशूंनी धमकाविले, “यातून बाहेर ये!” 26 त्या अशुद्ध आत्म्याने
किंकाळी फोडली आणि त्या मनुष्याला पिळवटून तो त्याच्यामधून
निघून गेला. 27 हे पाहून सर्व लोक चकित झाले आणि आपसात म्हणू
लागले, “हे काय आहे? नवी शिकवण आणि काय हा अधिकार! ते
अशुद्ध आत्म्यांना आदेश करतात आणि ते त्यांची आज्ञा पाळतात.” 28
त्यांच्याबद्दलची बातमी पूर्ण गालील प्रांताच्या सर्व भागात झपाट्याने
पसरत गेली. 29 सभागृहातून बाहेर पडल्याबरोबर ताबडतोब, याकोब
व योहानासह शिमोन व आंद्रियाच्या घरी गेले. 30 तिथे शिमोनाची
सासू तापाने फणफणली असून अंथरुणावर पडून होती आणि त्यांनी
लगेच तिच्याबद्दल येशूंना सांगितले. 31 येशू तिच्याजवळ गेले आणि
त्यांनी तिचा हात धरून तिला उठविले. तेव्हा एकाएकी तिचा ताप
नाहीसा झाला आणि ती त्यांची सेवा करू लागली. 32 त्या दिवशी
सूर्यास्ताच्या वेळी लोकांनी येशूंकडे सर्व रोग्यांना आणि भूतग्रस्तांना
आणले. 33 संपूर्ण शहर दारात गोळा झाले होते, 34 तेव्हा येशूंनी
वेगवेगळया प्रकारच्या रोगांनी ग्रासलेल्या पुष्कळांना बरे केले व अनेक
दुरात्म्यांना हाकलून दिले, परंतु दुरात्म्यांना बोलण्यास सक्त मनाई केली,
कारण ते कोण आहेत, हे त्यांना माहीत होते. 35 अगदी पहाटेस, अंधार
असताना, ते उठले आणि घर सोडून एकांतस्थळी गेले आणि तिथे
त्यांनी प्रार्थना केली. 36 शिमोन व त्याचे सोबती त्यांना शोधीत तिथे
गेले. 37 ते सापडल्यावर ते त्यांना म्हणाले, “सर्वजण तुमचा शोध करीत
आहे!” 38 येशूंनी म्हटले, “आपण दुसरीकडे कुठेतरी आसपासच्या
गावात जाऊ म्हणजे मला तिथे प्रवचन देता येईल कारण त्यासाठीच मी
आलो आहे.” 39 मग ते सर्वत्र गालील प्रांतात प्रवास करीत, त्यांच्या
सभागृहांमध्ये उपदेश करीत आणि दुरात्म्यांना बाहेर काढीत फिरले. 40
एक कुष्ठरोगी येशूंकडे आला आणि गुडघे टेकून विनंती करून म्हणाला,
“तुमची इच्छा असेल तर मला शुद्ध करण्यास तुम्ही समर्थ आहात.” 41
येशूंना कळवळा आला. त्यांनी आपला हात लांब करून त्याला स्पर्श
केला म्हटले, “माझी इच्छा आहे, शुद्ध हो!” 42 त्याचा कुष्ठरोग निघून
गेला आणि तो शुद्ध झाला. 43 येशूंनी त्याला निक्षून सांगितले: 44
“पाहा हे कोणाला सांगू नकोस. परंतु जा, स्वतःस याजकाला दाखव
आणि मोशेच्या नियमशास्त्राप्रमाणे, कुष्ठरोग बरे झाल्यानंतर जे अर्पण
करावयाचे असते, ते कर, म्हणजे तू शुद्ध झाला आहेस याचे हे प्रमाण
प्रत्येकाला पटेल.” 45 याउलट, त्याने ही बातमी जाहीरपणे सांगून
पसरविली की त्यामुळे येशूंना उघडपणे गावात प्रवेश करता येईना,
म्हणून ते एकांतस्थळी राहिले. पण तिथेही चहूकडून लोक त्यांच्याकडे
आले.

2 काही दिवसानंतर, जेव्हा येशू कफर्णहूम या ठिकाणी पुन्हा आले,
तेव्हा लोकांनी ऐकले की ते घरी आले आहेत. 2 ते इतक्या मोठ्या
संख्येने जमले की जागा उरली नाही, दाराबाहेरही जागा उरली नाही
आणि येशूंनी वचनातून लोकांना उपदेश केला. 3 तेवढ्यात काही लोक

एका पक्षघाती मनुष्याला त्यांच्याकडे घेऊन आले, त्याला चार जणांनी
उचलून आणले. 4 आणि तिथे मोठी गर्दी असल्यामुळे ते त्या मनुष्याला
येशूंजवळ घेऊन जाऊ शकले नाहीत, तेव्हा त्यांनी येशू जिथे बसले
होते त्या ठिकाणचे छप्पर उघडले आणि तिथून त्या मनुष्याला त्याच्या
अंथरुणासहित खाली सोडले 5 जेव्हा येशूंनी त्यांचा विश्वास पाहिला
तेव्हा ते त्या पक्षघाती मनुष्याला म्हणाले, “मुला, तुझ्या पापांची क्षमा
झाली आहे.” 6 हे ऐकून तिथे बसलेले काही नियमशास्त्र शिक्षक
आपसात विचार करू लागले, 7 “हा मनुष्य अशाप्रकारे का बोलतो? तो
दुर्भाषण करतो! परमेश्वराशिवाय पापांची क्षमा कोण करू शकतो?”
8 ते काय विचार करीत आहेत, हे येशूंनी लगेच त्यांच्या आत्म्यामध्ये
ओळखले आणि ते त्यांना म्हणाले, “तुम्ही या गोष्टींचा असा विचार
का करता? 9 या पक्षघाती मनुष्याला ‘तुझ्या पापांची क्षमा झाली
आहे,’ किंवा ‘ऊठ आपले अंथरूण उचलून घे व चालू लाग’? यातून
काय म्हणणे सोपे आहे. 10 तुम्हाला हे समजण्याची गरज आहे की
मानवपुत्राला पृथ्वीवर पापांची क्षमा करण्याचा अधिकार आहे.” 11 ते
पक्षघाती मनुष्याला म्हणाले, “ऊठ, आपले अंथरूण उचल आणि घरी
जा.” 12 तो मनुष्य उठला आणि लगेच अंथरूण उचलून त्या सर्वांसमोर
चालत गेला. तेव्हा सर्वांना आश्चर्य वाटले व सर्वांनी परमेश्वराची स्तुती
केली. ते म्हणाले, “आम्ही असे काही कधीही पाहिले नाही!” 13 नंतर
येशू पुन्हा सरोवरावर चालत गेले आणि तिथे त्यांच्याभोवती मोठा
लोकसमुदाय जमा झाला व ते त्यांना शिकवू लागले. 14 येशू चालत
असताना जकात नाक्यावर बसलेला अल्फीचा पुत्र लेवी त्यांच्या दृष्टीस
पडला. येशू त्याला म्हणाले, “माझ्यामागे ये.” तेव्हा लेवी उठला आणि
त्यांना अनुसरला. 15 येशू आणि त्यांचे शिष्य लेवीच्या घरी भोजन करत
असताना, त्यांच्या पंक्तीला अनेक जकातदार व पापी लोक भोजन करत
होते. कारण येशूंच्या मागे आलेले पुष्कळजण तिथे होते. 16 जेव्हा
नियमशास्त्र शिक्षक जे परूशी होते त्यांनी येशूंना जकातदार व पापी
लोकांबरोबर जेवत असताना पाहिले, तेव्हा त्यांनी शिष्यांना विचारले,
“तुमचे गुरू जकातदार व पापी लोक यांच्याबरोबर का जेवतात?” 17
हे ऐकून येशू त्यांना म्हणाले, “जे निरोगी आहेत त्यांना वैद्याची गरज
नसते, परंतु रोग्यास असते. मी नीतिमानांस नव्हे, तर पापी जनांस
बोलविण्यास आलो आहे.” 18 आता योहानाचे शिष्य आणि परूशी
उपवास करीत होते. काही लोक येशूंकडे आले आणि त्यांनी त्यांना
विचारले, “योहानाचे शिष्य आणि परूशी उपवास करतात, परंतु तुमचे
शिष्य का करत नाही?” 19 येशूंनी उत्तर दिले, “वराचे पाहुणे वर
त्यांच्याबरोबर असताना उपवास कसे करू शकतात? जोपर्यंत वर
त्यांच्याबरोबर आहे तोपर्यंत ते उपवास करू शकत नाहीत. 20 परंतु
अशी वेळ येत आहे की, वर त्यांच्यापासून काढून घेण्यात येईल आणि
मग ते उपवास करतील. 21 “नवीन कापडाचा तुकडा जुन्या कापडाला
ठिगळ म्हणून कोणीही लावत नाही. नाहीतर ते नवीन ठिगळ वस्त्राला
फाडेल आणि छिद्र अधिक मोठे होईल. 22 आणि कोणीही नवा द्राक्षारस
जुन्या बुधल्यांमध्ये ओतीत नाही. नाही तर, नवीन द्राक्षारसामुळे बुधले
फुटून जाईल, द्राक्षारस वाहून जाईल आणि द्राक्षारस व बुधल्याचा नाश
होईल. नाही, तसे होऊ नये म्हणून ते नवा द्राक्षारस नवीन बुधल्यांमध्ये
ओततात.” 23 एका शब्बाथ दिवशी येशू धान्याच्या शेतामधून जात होते
आणि त्यांचे शिष्य त्यांच्याबरोबर चालत असताना, ते गव्हाची काही
कणसे तोडू लागले. 24 ते पाहून परूशी त्यांना म्हणाले, “पाहा, शब्बाथ
दिवशी जे नियमशास्त्राविरुद्ध आहे असे ते का करतात?” 25 येशूंनी
उत्तर दिले, “दावीद आणि त्याच्या सोबत्यांना भूक लागली असता व
त्यांना गरज असताना त्याने काय केले हे तुम्ही कधी वाचले नाही का?
26 महायाजक अबीयाथार यांच्या दिवसात तो परमेश्वराच्या मंदिरात
गेला आणि त्याने त्या समर्पित भाकरी खाल्या, ज्या भाकरी फक्त
याजकांनीच खाव्यात असा नियम होता आणि त्याने त्यातून काही
त्याच्या सोबत्यांना सुद्धा दिल्या.” 27 मग येशूंनी त्यांना म्हटले, “शब्बाथ
मनुष्यासाठी निर्माण केला आहे, मनुष्य शब्बाथासाठी नाही. 28 म्हणून
मानवपुत्र हा शब्बाथाचा देखील प्रभू आहे.”

**3** आणखी एका वेळेला येशू सभागृहामध्ये गेले आणि तिथे हात
वाळलेला एक मनुष्य होता. 2 काही लोक त्यांच्यावर आरोप
ठेवण्यास कारण पाहत होते, शब्बाथ दिवशी येशू त्याला बरे करतात
काय हे पाहण्यासाठी बारकाईने नजर ठेवून होते. 3 येशू त्या वाळलेल्या
हाताच्या मनुष्याला म्हणाले, “असा सर्वांसमोर उभा राहा.” 4 नंतर
येशू त्यांना म्हणाले, “शब्बाथ दिवशी नियमानुसार कोणती गोष्ट योग्य
आहे: चांगली कामे करणे किंवा वाईट कामे करणे, जीव वाचविणे किंवा
जीव घेणे?” परंतु ते शांत बसले. 5 त्यांनी सभोवार जमलेल्यांकडे
रागाने आपली नजर फिरविली आणि त्यांची कठीण हृदये पाहून ते
अत्यंत अस्वस्थ झाले व त्या मनुष्याला म्हणाले, “तुझा हात लांब
कर.” त्याने हात लांब केला आणि त्याचा हात पहिल्यासारखा बरा
झाला. 6 यानंतर परूश्यांनी जाऊन येशूंना कसे जिवे मारता येईल
याविषयी हेरोदियांबरोबर योजना केली. 7 इकडे येशू आणि त्यांचे
शिष्य सरोवराकडे निघून गेले. त्यांच्यामागे गालील प्रांतातून मोठा
समुदाय आला होता. 8 येशूंनी जे सर्वकाही केले होते ते ऐकून, पुष्कळ
लोक त्यांच्याकडे यहूदीया, यरुशलेम, इदूमिया, यार्देन नदीपलीकडील
प्रदेश, सोर व सीदोन येथून आले होते. 9 तिथे गर्दी असल्यामुळे व
येशूंच्या भोवती लोकांची गर्दी थांबविण्यासाठी त्यांनी शिष्यांना एक
लहान होडी तयार ठेवावी असे सांगितले. 10 कारण त्यांनी पुष्कळांना
बरे केले होते, त्यामुळे जे लोक आजारी होते ते येशूंना स्पर्श करावा
म्हणून पुढे रेटत होते. 11 जेव्हा अशुद्ध आत्म्यांनी पछाडलेले त्यांना
पाहत असत, तेव्हा ते त्यांच्यापुढे खाली पडत आणि मोठ्याने ओरडून
म्हणत, “तुम्ही परमेश्वराचे पुत्र आहात!” 12 परंतु त्यांनी त्यांना सक्त
ताकीद दिली की त्यांच्याबद्दल इतरांना सांगू नका. 13 येशू डोंगरावर
गेले आणि त्यांना ज्यांची गरज होती त्यांना स्वत:कडे बोलाविले आणि
ते त्यांच्याकडे आले. 14 तेव्हा त्यांनी बारा जणांची निवड केली,
यासाठी की त्यांनी त्यांच्याबरोबर असावे आणि प्रचार करण्यासाठी
बाहेर पाठविता यावे 15 आणि त्यांना भुते काढण्याचा अधिकार द्यावा.

16 त्यांनी नेमणूक केलेल्या बारा जणांची नावे अशी: शिमोन (याला
त्यांनी पेत्र हे नाव दिले), 17 जब्दीचे पुत्र याकोब आणि त्याचा भाऊ
योहान (त्यांना बोओनेर्गेस हे नाव दिले, याचा अर्थ “गर्जनेचे पुत्र”
असा होता), 18 आंद्रिया, फिलिप्प, बर्थलमय, मत्तय, थोमा, अल्फीचा
पुत्र याकोब, तद्द्य, शिमोन कनानी 19 आणि यहूदाह इस्कर्योत ज्याने
त्यांचा विश्वासघात केला. 20 येशू एका घरात गेले आणि समुदायाने
पुन्हा गर्दी करण्यास सुरुवात केली, त्यामुळे त्यांना आणि त्यांच्या
शिष्यांना भोजन करण्यासही वेळ मिळेना. 21 येशूंच्या कुटुंबीयांनी
जेव्हा हे ऐकले, तेव्हा ते त्यांना घेऊन जाण्यासाठी आले, कारण ते
म्हणाले, “याला वेड लागले आहे.” 22 आणि यरुशलेमहून आलेले
नियमशास्त्र शिक्षक म्हणाले, “तो बालजबूलाने पछाडलेला आहे! तो
भुतांचा राजा सैतान याच्या साहाय्याने भुते घालवितो.” 23 येशूंनी
त्यांना जवळ बोलाविले आणि त्यांच्याबरोबर दाखल्याने बोलण्यास
सुरुवात केली: “सैतानच सैतानाला कसा काढू शकेल? 24 जर एखाद्या
राज्यात फूट पडली तर ते राज्य स्थिर राहू शकत नाही. 25 जर एखाद्या
घरात फूट पडलेली आहे, तर ते घर स्थिर राहू शकत नाही. 26 सैतानच
स्वत:विरुद्ध झाला आणि सैतानातच फूट पडली तर त्याचा टिकाव
लागणार नाही; त्याचा शेवट झालाच आहे. 27 खरोखर, एखाद्या बळकट
माणसाच्या घरात प्रवेश करून त्याची मालमत्ता लुटता येणार नाही.
प्रथम त्या बळकट मनुष्याला बांधले पाहिजे मगच त्याचे घर लुटता
येईल. 28 मी तुम्हाला निश्चित सांगतो की, मनुष्याला सर्व पापांची
व प्रत्येक दुर्भाषण केल्याची क्षमा होईल, 29 परंतु जे कोणी पवित्र
आत्म्याविरुद्ध दुर्भाषण करतात त्यांना कधीही क्षमा केली जाणार नाही;
ते सार्वकालिक पापाचे दोषी आहेत.” **(aiōn g165, aiōnios g166)** 30 असे
त्यांनी म्हटले कारण येशूंमध्ये, “अशुद्ध आत्मा आहे” असे ते म्हणत
होते. 31 इतक्यात येशूंची आई आणि भाऊ येऊन बाहेर उभे राहिले
आणि एकाला त्यांना बोलविण्यास पाठविले. 32 त्यांच्या सभोवती
समुदाय बसला होता आणि त्याने त्यांना सांगितले, “तुमची आई आणि
तुमचे भाऊ बाहेर थांबले आहेत आणि ते तुमचा शोध घेत आहेत.” 33
यावर त्यांनी म्हटले, “कोण माझी आई आणि कोण माझे भाऊ?” 34
नंतर सभोवतालच्या समुदायाकडे नजर फिरवित ते म्हणाले, “ही माझी
आई आणि माझे भाऊ आहेत! 35 जो कोणी परमेश्वराच्या इच्छेप्रमाणे
करतो तोच माझा भाऊ, तीच माझी बहीण आणि आई आहे.”

**4** येशूंनी सरोवराच्या किनाऱ्यावर शिकविण्यास सुरुवात केली. पुन्हा
एकदा त्यांच्याभोवती जमा झालेला समुदाय इतका मोठा होता की,
ते एका होडीत बसून किनाऱ्यावरील लोकांना शिकवू लागले. 2 त्यांनी
अनेक गोष्टी त्यांना दाखल्याद्वारे शिकविल्या, त्यांच्या शिक्षणात त्यांनी
सांगितले: 3 “ऐका! एक शेतकरी बी पेरण्याकरिता निघाला. 4 तो बी
पेरीत असताना, काही बी वाटेवर पडले, ते पक्ष्यांनी खाऊन टाकले.
5 काही बी खडकाळ जमिनीवर पडले, तिथे पुरेशी माती नव्हती व
माती खोल नसल्यामुळे ते लवकर उगवले. 6 परंतु सूर्य उगवल्यावर,
ती रोपे करपून गेली आणि मूळ नसल्यामुळे वाळून गेली. 7 काही बी
काटेरी झुडपांमध्ये पडले, ते उगवले खरे पण काटेरी झुडूपांनी त्याची
वाढ खुंटविली व त्याला पीक आले नाही. 8 पण काही बी सुपीक
जमिनीत पडले. ते उगवले, त्याची वाढ झाली आणि त्या काही ठिकाणी
तीसपट, साठपट किंवा शंभरपट पीक आले.” 9 मग येशू म्हणाले,
“ज्या कोणाला ऐकावयास कान आहेत, त्यांनी ऐकावे.” 10 मग ते
एकटे असताना बारा जणांनी आणि इतरांनी त्यांना दाखल्याबद्दल
विचारले. 11 ते म्हणाले, “परमेश्वराच्या राज्याची रहस्ये जाणून घेण्याचे
ज्ञान तुम्हाला दिले आहे. परंतु बाहेरच्यांना सर्वगोष्टी दाखल्याद्वारेच
सांगण्यात येतील. 12 यासाठी की, “ते पाहत असले तरी त्यांना काही
दिसत नाही, आणि ते ऐकतात तर, परंतु काही समजत नाही; कदाचित
ते वळतील आणि त्यांची क्षमा होईल!” 13 नंतर येशू त्यांना म्हणाले,
“तुम्हाला हा दाखला समजत नाही का? तर इतर दाखले तुम्हाला कसे
समजतील? 14 शेतकरी वचनाची पेरणी करतो. 15 काही लोक त्या
वाटेवर पडलेल्या बी प्रमाणे आहेत, जिथे वचन पेरले जाते. ते वचन
लगेच ऐकतात, पण सैतान येतो आणि त्यांच्या हृदयात पेरलेले वचन
हिरावून नेतो. 16 काहीजण, खडकाळ जमिनीत बी पडते त्याप्रमाणे
आहेत, ते वचन ऐकतात आणि तत्काळ आनंदाने स्वीकारतात. 17 पण
वचनामुळे संकटे आली किंवा त्यांचा छळ होऊ लागला की ते लगेच
मागे जातात. पण त्यांना मूळ नसल्यामुळे थोडा काळ टिकतात. 18
काही असे आहेत, की ते काटेरी झुडपांमध्ये पेरणी केलेल्या बियांप्रमाणे
आहेत, ते वचन ऐकतात; 19 परंतु संसाराची चिंता, पैशांची लालसा व
इतर गोष्टींची हाव यांची त्यांना भुरळ पडते आणि त्यामुळे परमेश्वराच्या
वचनाची वाढ खुंटते व फळ येत नाही. **(aiōn g165)** 20 याउलट काहीजण
उत्तम जमिनीत बी पडते त्याप्रमाणे आहेत, ते वचन ऐकतात, स्वीकार
करतात, पीक देतात—जे पेरले होते त्यापेक्षा तीसपट, साठपट आणि
शंभरपट पीक देतात.” 21 नंतर येशूंनी त्यांना म्हटले, “कोणी दिवा
लावून मापाखाली किंवा खाटेखाली ठेवतो काय? त्याऐवजी, तुम्ही
दिवठणीवर ठेवत नाही का? 22 असे काही झाकलेले नाही जे उघड
होणार नाही किंवा असे काही गुप्त नाही जे जाहीर केले जाणार नाही.
23 ज्या कोणाला ऐकावयास कान आहेत, त्यांनी ऐकावे.” 24 ते त्यांना
पुन्हा म्हणाले, “तुम्ही जे ऐकता ते नीट ध्यानात घ्या. ज्या मापाने
तुम्ही मापून द्याल, त्याच मापाने तुम्हाला मापून देण्यात येईल आणि
त्यापेक्षा अधिक जास्त तुम्हाला देण्यात येईल. 25 कारण ज्यांच्याजवळ
आहे त्यांना अधिक दिले जाईल; ज्यांच्याजवळ नाही, त्यांच्याजवळ जे
असेल नसेल ते देखील त्यांच्यापासून काढून घेतले जाईल.” 26 येशू
आणखी म्हणाले, “परमेश्वराचे राज्य असे आहे. एक मनुष्य जमिनीवर
बी विखरतो. 27 रात्र आणि दिवस, तो झोपतो किंवा उठतो, इकडे
बी उगवते आणि कसे वाढते, ते त्याला कळतही नाही. 28 कारण
जमीन स्वत: पीक उत्पन्न करते—पहिल्यांदा अंकुर, कणसे आणि
मग कणसात दाणे भरतात. 29 अशा क्रमाने पीक तयार झाल्याबरोबर
तो विळा चालवून पीक कापून नेतो, कारण हंगाम आलेला आहे.”
30 आणखी ते म्हणाले, “परमेश्वराचे राज्य कसे आहे किंवा कोणता

दाखला देऊन त्याचे वर्णन करता येईल? 31 ते मोहरीच्या दाण्यासारखे
आहे, तो पृथ्वीवरील सर्व दाण्यापैकी सर्वात लहान असला तरी, 32 तो
दाणा वाढून त्याचे झाड होऊन बागेतील सर्वात मोठे झाड होते आणि
त्याच्या मोठ्या फांद्यांवर आकाशातील पक्षी विसावा घेऊ शकतात." 33
अशाच प्रकारच्या अनेक दाखल्यांद्वारे जसे ते समजू शकतील तसे येशू
त्यांच्यासोबत वचनाद्वारे बोलले. 34 ते दाखल्यांवाचून त्यांच्याशी काहीच
बोलले नाही. परंतु एकांतात मात्र ते आपल्या शिष्यांना सर्व स्पष्ट करून
सांगत असत. 35 त्या दिवशी संध्याकाळ झाल्यावर, येशू आपल्या
शिष्यांना म्हणाले, "आपण सरोवराच्या पलीकडे जाऊ." 36 तेव्हा
लोकांची गर्दी मागे सोडून शिष्य येशूंना ते जसे होडीत होते तसेच त्यांना
त्यांच्याबरोबर घेऊन गेले. इतर होड्याही त्यांच्याबरोबर होत्या. 37
थोड्याच वेळात सरोवरात भयंकर वादळ सुटले, लाटा होडीवर आदळू
लागल्या आणि होडी बुडू लागली. 38 येशू नावेच्या मागच्या भागास
उशी घेऊन झोपी गेले होते. तेव्हा शिष्य त्यांना जागे करून म्हणाले,
"गुरुजी, आपण सर्वजण बुडत आहोत, याची तुम्हाला काळजी नाही
काय?" 39 मग ते उठले आणि त्यांनी वाऱ्याला धमकाविले व लाटांना,
"शांत हो" असे म्हटले! तेव्हा ताबडतोब वादळ शमले आणि सर्व शांत
झाले. 40 त्यांनी शिष्यांना विचारले, "तुम्ही इतके का घाबरला? तुम्हाला
अद्यापही विश्वास नाही का?" 41 शिष्य घाबरून गेले आणि एकमेकास
म्हणू लागले, "हे आहेत तरी कोण? वारा आणि लाटाही त्यांच्या आज्ञा
पाळतात?"

**5** ते सरोवराच्या पलीकडे गरसेकरांच्या प्रांतात आले. 2 येशू होडीतून
उतरले, तेव्हा त्यांना भेटण्यासाठी अशुद्ध आत्मा लागलेला एक
मनुष्य कबरस्तानातून धावत बाहेर आला. 3 हा मनुष्य स्मशानभूमीत
राहत होता आणि त्याला बांधून ठेवणे अशक्य होते, साखळदंडाने
बांधणेही शक्य नव्हते. 4 बरेचदा त्याचे हात व पाय साखळदंडाने बांधले
असतानाही त्याने साखळदंड तोडून टाकले व पायातील लोखंडाच्या
बेड्यांचे तुकडे केले. त्याला ताब्यात ठेवण्याची ताकद कोणातही नव्हती.
5 दिवस आणि रात्र तो स्वतःला दगडांनी ठेचून घेई व थडग्यामध्ये आणि
डोंगरामधून मोठमोठ्याने ओरडत असे. 6 येशूंना त्याने दूर अंतरावरून
पाहिले व तो धावत आला आणि त्यांच्यासमोर गुडघे टेकून पाया पडला,
7 तो मोठ्याने ओरडून म्हणाला, "हे येशू, परात्पर परमेश्वराच्या पुत्रा,
तुला माझ्याशी काय काम? परमेश्वराची शपथ मला छळू नकोस." 8
कारण येशूंनी त्याला म्हटले होते, "अरे अशुद्ध आत्म्या, या मनुष्यातून
बाहेर ये." 9 "तुझे नाव काय?" येशूंनी विचारले, त्याने उत्तर दिले,
"माझे नाव लेगियोन आहे, कारण आम्ही पुष्कळजण आहोत. 10
आम्हाला या प्रांतातून घालवून देऊ नकोस," अशी त्यांनी येशूंना पुन्हा
विनंती केली. 11 त्याचवेळी डोंगराच्या कडेला डुकरांचा एक मोठा कळप
चरत होता. 12 "आम्हाला त्या डुकरांमध्ये जाण्याची परवानगी दे." अशी
भुतांनी येशूंना विनंती केली. 13 येशूंनी त्यांना तशी परवानगी दिली,
लगेच अशुद्ध आत्मे त्या मनुष्यातून बाहेर निघाले आणि डुकरांमध्ये
शिरले व त्या दोन हजार डुकरांचा कळप डोंगराच्या उतरंडी वरून धावत
सुटला आणि सरोवराच्या पाण्यात पडला व बुडाला. 14 डुकरांचे कळप
राखणारे जवळच्या नगरात आणि ग्रामीण भागात जाऊन ही घटना
सांगितली, काय घडले हे पाहावे म्हणून लोक बाहेर आले. 15 जेव्हा ते
येशूंकडे आले, तेव्हा त्यांनी त्या मनुष्याला पाहिले जो भुताच्या सैन्याने
पछाडलेला होता तो बसलेला, कपडे घातलेला आणि भानावर आलेला
आहे; हे पाहून ते अतिशय भयभीत झाले. 16 प्रत्यक्ष पाहणाऱ्यांनी
भूतग्रस्त मनुष्याचे काय झाले आणि डुकरांच्या बाबतीत काय झाले, ते
सर्वांना सांगितले. 17 तेव्हा येशूंनी आमच्या भागातून निघून जावे अशी
लोकांनी त्यांना विनंती केली. 18 येशू पुन्हा होडीत चढत असताना, जो
मनुष्य पूर्वी भूतग्रस्त होता, त्याने आपल्यालाही बरोबर न्यावे, अशी
येशूंना विनंती केली. 19 पण येशूंनी ती मान्य केली नाही, परंतु ते त्याला
म्हणाले, "आपल्या प्रियजनांकडे घरी जा आणि प्रभूने तुझ्यासाठी जे
काही केले आणि तुझ्यावर किती मोठी दया केली हे त्यांना सांग." 20
त्याप्रमाणे तो मनुष्य गेला आणि त्या भागात असलेल्या दकापलीस
येथे येशूंनी त्याच्यासाठी किती मोठ्या गोष्टी केल्या हे सांगू लागला
आणि प्रत्येकजण विस्मयाने थक्क झाला. 21 जेव्हा येशू होडीत बसून
पलीकडच्या तीरावर गेले, तेव्हा त्यांच्याभोवती खूप मोठा समुदाय गोळा
झाला, त्यावेळी ते सरोवराच्या किनाऱ्याजवळ होते. 22 त्यावेळी याईर
नावाचा सभागृहाचा एक पुढारी आला, येशूंना पाहून त्यांच्या पाया
पडला. 23 त्यांना आग्रहाने विनंती करू लागला, "माझी लहान मुलगी
मरणाच्या पंथाला लागली आहे, कृपा करून या व आपला हात तिच्यावर
ठेवा म्हणजे ती बरी होईल व वाचेल." 24 म्हणून येशू त्यांच्याबरोबर
निघाले. सभोवतालचा जमावही त्यांच्याबरोबर निघाला व गर्दी करू
लागला. 25 आणि तिथे एक स्त्री होती, जी बारा वर्षे रक्तस्रावाने आजारी
होती. 26 याकाळात तिने अनेक वैद्यांच्या उपचारांमुळे पुष्कळ दु:ख
सहन केले होते व ती कंगाल झाली होती आणि एवढे करूनही बरी
न होता उलट तिचा आजार अधिकच बळावला होता. 27 जेव्हा तिने
येशूंबद्दल ऐकले, तेव्हा तिने मोठ्या गर्दीतून त्यांच्या पाठीमागे येऊन
त्यांच्या झग्याच्या काठाला स्पर्श केला. 28 "मी त्यांच्या वस्त्राला नुसता
स्पर्श जरी केला तरी बरी होईन," असे तिला वाटत होते. 29 तत्काळ
तिचा रक्तस्राव थांबला आणि आपण आजारातून मुक्त झालो आहोत
याची तिला शरीरात जाणीव झाली. 30 तत्क्षणी येशूंनी आपल्यामधून
शक्ती बाहेर पडली असे जाणले आणि समुदायाकडे मागे वळून त्यांनी
विचारले, "माझ्या वस्त्राला कोणी स्पर्श केला?" 31 "यावर त्यांचे शिष्य
म्हणाले, एवढी मोठी गर्दी तुमच्याभोवती असताना तुम्ही विचारता,
'मला कोणी स्पर्श केला?'" 32 तरी आपल्याला कोणी स्पर्श केला, हे
पाहण्यासाठी ते आजूबाजूला शोधू लागले. 33 तेव्हा भयभीत झालेली
ती स्त्री आपल्या बाबतीत काय घडले हे लक्षात घेऊन थरथर कापत
आली आणि त्यांच्या पाया पडून तिने त्यांना सर्व खरे सांगितले. 34
येशू तिला म्हणाले, "मुली, तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे. आता
शांतीने जा आणि आपल्या पीडेपासून मुक्त राहा." 35 येशू अजून
बोलतच होते, तोच सभागृहाचा अधिकारी याईराच्या घरून काही लोक

आले. ते म्हणाले, “तुमची कन्या मरण पावली आहे, आता गुरुजींना
त्रास देण्यात अर्थ नाही.” 36 त्यांचे बोलणे ऐकून येशू सभागृहाच्या
अधिकाऱ्याला म्हणाले, “भिऊ नकोस, फक्त विश्वास ठेव.” 37 येशूंनी
पेत्र, याकोब आणि याकोबाचा भाऊ योहान यांच्याशिवाय कोणासही
बरोबर येऊ दिले नाही. 38 ते सभागृहाच्या अधिकाऱ्याच्या घरी आले,
तेव्हा गडबड व उच्च स्वरात लोकांची रडारड, आक्रोश त्यांना दिसून
आला. 39 ते आत गेले आणि लोकांना म्हणाले, “हा गोंधळ आणि
आक्रोश कशासाठी? ही मुलगी मरण पावली नाही, पण झोपली आहे.”
40 परंतु ते त्याला हसू लागले. त्या सर्वांना बाहेर घालविल्यावर, तिचे
आईवडील आणि आपले शिष्य यांना घेऊन त्या बालिकेला ज्या खोलीत
ठेवले होते तिथे गेले. 41 तिच्या हाताला धरून येशू तिला म्हणाले,
“तलीथा कूम!” (म्हणजे “छोट्या मुली, मी तुला सांगतो, ऊठ!”) 42 ते
ऐकताच ती उठून उभी राहिली आणि चालू फिरू लागली. तिचे वय
बारा वर्षांचे होते. यावरून त्यांना अतिशय आश्चर्य वाटले. 43 येशूंनी
त्यांना कडक आदेश दिला की, याविषयी कोणाला सांगू नका व मुलीला
काहीतरी खावयास द्यावे असे सांगितले.

6 येशू तिथून निघाले व त्यांच्या शिष्यांसह स्वतःच्या गावी परतले.
2 शब्बाथ आला त्यावेळी त्यांनी तेथील सभागृहामध्ये असलेल्या
लोकांना शिक्षण देण्यास सुरुवात केली आणि ज्या सर्वांनी त्यांचे शिक्षण
ऐकले ते आश्चर्यचकित झाले. त्यांनी विचारले, “या मनुष्याला हे कुठून
प्राप्त झाले? कशाप्रकारचे हे सुज्ञान त्यांना देण्यात आले आहे? हा
अद्भुत चमत्कारसुद्धा कसे करतो? 3 हा एक सुतार नाही का? याची
आई मरीया आणि याकोब, योसेफ, शिमोन, यहूदाह हे त्याचे भाऊ
आहे ना? आणि याच्या बहिणी तर आपल्यातच आहेत ना” आणि ते
त्याच्यावर संतापले. 4 मग येशू त्यांना म्हणाले, “संदेष्टा सन्मानित
होत नाही असे नाही; फक्त आपले गाव आणि आपले घर व नातेवाईक
यांच्यात तो मान्यता पावत नाही.” 5 काही आजाऱ्यांवर हात ठेवून
त्यांना बरे करण्याशिवाय तिथे त्यांनी काही चमत्कार केले नाहीत. 6
त्यांच्या अविश्वासाबद्धल येशूंना नवल वाटले. मग येशू गावोगावी शिक्षण
देत फिरले. 7 त्यांनी बारा प्रेषितांना आपल्याकडे बोलाविले आणि त्यांना
जोडीजोडीने बाहेर पाठविण्यास सुरुवात केली आणि त्यांना अशुद्ध
आत्म्यांवर अधिकार दिला. 8 त्यांनी त्यास सूचना दिली: “प्रवासाला
जाताना काठीशिवाय तुमच्यासोबत अन्न, झोळी, कमरपट्ट्यात पैसे
असे काहीही घेऊ नका. 9 जोडे घाला, पण अतिरिक्त अंगरखा घेऊ
नका. 10 ज्यावेळी तुम्ही एखाद्या घरामध्ये प्रवेश कराल, त्यावेळी त्या
गावातून निघेपर्यंत तिथेच राहा. 11 एखाद्या ठिकाणी तुमचे स्वागत
झाले नाही किंवा तुमचे ऐकले नाही, तर ते ठिकाण सोडून द्या व तुमच्या
पायांची धूळ तिथेच झटकून टाका, ही त्यांच्याविरुद्ध साक्ष राहील.” 12
त्याप्रमाणे शिष्य बाहेर पडले आणि लोकांनी पश्चात्ताप करावा असा
त्यांनी संदेश दिला. 13 त्यांनी पुष्कळ भुते काढली, अनेक आजाऱ्यांना
तैलाभ्यंग केले आणि त्यांना बरे केले. 14 हेरोद राजाने याबद्दल ऐकले,
कारण येशूंचे नाव सर्वठिकाणी प्रसिद्ध झाले होते. काहीजण म्हणत
होते, “बाप्तिस्मा करणारा योहान मरणातून उठला आहे आणि म्हणूनच
आश्चर्यकर्म करण्याचे सामर्थ्य त्यांच्यामध्ये दिसत आहे.” 15 आणखी
दुसरे म्हणाले, “हा एलीयाह आहे.” तर आणखी काही लोकांनी असा
दावा मांडला, “तो प्राचीन संदेष्ट्यांसारखा एक संदेष्टा आहे.” 16 परंतु
हेरोदाने हे ऐकले, तेव्हा तो म्हणाला, “ज्या योहानाचा मी शिरच्छेद
केला, तोच पुनः जिवंत झाला आहे!” 17 कारण हेरोदाने योहानाला
बांधून तुरुंगात टाकण्यासाठी हुकूम दिला होता. हेरोदाने हे यासाठी
केले, की त्याचा भाऊ फिलिप्पाची पत्नी हेरोदिया हिच्याशी त्याने विवाह
केला होता. 18 कारण योहान हेरोदाला म्हणत असे, “आपला भाऊ
फिलिप्पाची पत्नी हेरोदिया हिला तू ठेवावे हे नियमाने अयोग्य आहे.”
19 यामुळे हेरोदियाने योहानाविरुद्ध डाव धरला होता आणि ती योहानाचा
जीव घेण्यास पाहत होती. परंतु ती काही करू शकत नव्हती, 20 कारण
हेरोद योहानाला भीत असे आणि तो नीतिमान व पवित्र मनुष्य आहे
म्हणून त्याचे संरक्षण करत असे. हेरोद योहानाचे बोलणे ऐकून गोंधळात
पडत असे; तरी त्याचे ऐकून घ्यावयास त्याला आवडे असे. 21 अखेर
योग्य समय आला. हेरोदाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्याने आपल्या
दरबारातील मुख्य अधिकारी आणि लष्करातील सेनापती तसेच गालील
प्रांतातील प्रमुख नागरिकांना मोठी मेजवानी दिली. 22 त्या समारंभात
हेरोदियेची कन्या आत आली व नृत्य करून तिने हेरोदाला संतुष्ट केले
आणि त्याचबरोबर मेजवानीसाठी आलेल्या इतर पाहुणे मंडळीलाही खुश
केले. हेरोद राजाने मुलीला म्हटले, “तुला हवे असेल ते माग आणि ते मी
तुला देईन.” 23 शपथ घेऊन व वचन देऊन तो तिला म्हणाला, “माझ्या
अर्ध्या राज्याइतके जे काही तू मला मागशील, ते मी तुला देईन.” 24
ती बाहेर गेली आणि आपल्या आईला विचारले, “मी काय मागू?”
आईने सल्ला दिला, “बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचे शिर माग.” 25
घाईघाईने ती मुलगी राजाकडे परत आली आणि त्याला म्हणाली, “मला
बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचे शिर तबकात घालून आता हवे आहे.”
26 तेव्हा राजा अतिशय अस्वस्थ झाला, पण आपल्या शपथेमुळे आणि
भोजनाला आलेल्या पाहुण्यांमुळे तिला नकार देणे त्याला बरे वाटले
नाही. 27 शेवटी राजाने आपल्या एका शिरच्छेद करणाऱ्याला तुरुंगात
पाठवून योहानाचे शिर आणण्याची आज्ञा केली. त्या मनुष्याने योहानाचा
तुरुंगात शिरच्छेद केला, 28 आणि त्याचे शिर तबकात घालून त्या
मुलीला दिले व तिने ते आपल्या आईला दिले. 29 ही घटना ऐकल्यानंतर,
योहानाचे शिष्य आले आणि त्यांनी त्याचे शव घेतले आणि कबरेत
ठेवले. 30 नंतर प्रेषित येशूंभोवती गोळा झाले आणि आपण काय केले
व काय शिकविले यासंबंधीचा सर्व वृत्तांत त्यांनी सांगितला. 31 नंतर
येशूंनी सुचविले, “तुम्ही माझ्याबरोबर या, आपण शांत ठिकाणी जाऊ
आणि थोडा विसावा घेऊ.” कारण इतके लोक येजा करीत होते की,
त्यांना जेवण करण्यासाठी वेळ मिळाला नाही. 32 त्याप्रमाणे होडीत
बसून ते एकांतस्थळी गेले. 33 अनेकांनी त्यांना जाताना पाहिले व त्यांना
ओळखले. तेव्हा नगरातील लोक त्यांच्याकडे पायी आले आणि त्यांच्या
आधी तिथे पोहोचले. 34 जेव्हा येशू होडीतून उतरले आणि त्यांनी

मोठा समुदाय पाहिला, तेव्हा त्यांना त्यांचा कळवळा आला, कारण
ते मेंढपाळ नसलेल्या मेंढरांसारखे होते. येशूंनी त्यांना पुष्कळ गोष्टी
शिकविण्यास सुरुवात केली. 35 दिवस मावळण्याच्या सुमारास, त्यांचे
शिष्य त्यांच्याकडे आले आणि त्यांना म्हणाले, “ही ओसाड जागा आहे,
शिवाय उशीरही होत चालला आहे. 36 या लोकांना आसपासच्या गावात
जाऊन खाण्यासाठी अन्न विकत घ्यावे म्हणून निरोप द्या.” 37 यावर
येशू म्हणाले, “तुम्ही त्यांना काहीतरी खावयास द्या.” त्यांनी विचारले,
“इतक्या लोकांना जेवू घालावयाचे म्हणजे अर्ध्या वर्षाच्या मजुरी पेक्षा
अधिक रक्कम खर्च करावी काय?” 38 ते म्हणाले, “तुमच्याजवळ
किती भाकरी आहेत? जा आणि पाहा.” जेव्हा त्यांनी शोधले तेव्हा
त्यांना कळले व ते म्हणाले, “पाच भाकरी आणि दोन मासे आहेत.”
39 मग येशूंनी लोकांना गवतावर गटागटाने बसावयास सांगितले. 40
त्याप्रमाणे लोक पन्नास आणि शंभर अशा गटांनी बसले. 41 मग येशूंनी
त्या पाच भाकरी व दोन मासे घेतले आणि स्वर्गाकडे पाहून त्याबद्दल
आभार मानले आणि मग त्या भाकरीचे तुकडे करून ते शिष्यांजवळ
लोकांना वाढण्यासाठी दिले आणि दोन मासळयांचेही असेच वाटप
केले. 42 ते सर्वजण जेवले आणि तृप्त झाले, 43 आणि शिष्यांनी
उरलेले भाकरीचे तुकडे व मासे गोळा केले त्यावेळी बारा टोपल्या
उचलल्या. 44 तिथे जेवणाऱ्या पुरुषांची संख्या सुमारे पाच हजार होती.
45 लगेच येशूंनी आपल्या शिष्यांना होडीत बसून पुढे बेथसैदास जाण्यास
सांगितले आणि ते स्वतः लोकांना निरोप देण्यासाठी मागे राहिले. 46
त्यांना निरोप दिल्यानंतर, येशू प्रार्थना करण्यासाठी डोंगरावर गेले.
47 रात्र झाली, तेव्हा होडी सरोवराच्या मध्यावर गेली होती आणि ते
एकटेच जमिनीवर होते. 48 तिथून त्यांनी आपल्या शिष्यांना वल्ही
मारणे कठीण जात आहे असे पाहिले, कारण वारा त्यांच्याविरुद्ध दिशेने
वाहत होता. पहाटेच्या सुमारास येशू पाण्यावरून चालत त्यांच्याकडे
आले. ते त्यांना ओलांडून पुढे जाऊ लागले, 49 परंतु त्यांनी येशूंना
सरोवरावरून चालताना पाहिले, तेव्हा ते भूतच असले पाहिजे असे
त्यांना वाटले व ते ओरडले, 50 कारण त्या सर्वांनीच त्यांना पाहिले
आणि ते फार घाबरले. पण ते त्यांना तत्काळ म्हणाले, “धीर धरा, मीच
आहे. भिऊ नका.” 51 मग ते त्यांच्याबरोबर होडीत चढले तेव्हा वादळ
शांत झाले. शिष्य आश्चर्याने थक्क झाले. 52 कारण भाकरी संबंधात
त्यांना समजले नव्हते आणि त्यांची हृदये कठीण झाली होती. 53 ते
पलीकडे गेल्यावर गनेसरेत येथे उतरले व त्यांनी होडी तिथे लावली, 54
ते होडीतून उतरले न उतरले तोच, लोकांनी येशूंना ओळखले; 55 लोक
त्या संपूर्ण परिसरात धावत गेले आणि ते जिथे कुठे आहे असे त्यांनी
ऐकले तिथे आजारग्रस्त लोकांना अंथरुणावर घालून त्यांच्याकडे घेऊन
गेले. 56 आणि जिथे कुठेही येशू गेले—गावात, शहरात—बाजारपेठेत
लोक आजाऱ्यांना घेऊन जात आणि तुमच्या झग्याच्या काठाला तरी
स्पर्श करू द्या अशी त्यांना विनंती करत आणि जितक्यांनी त्यांना स्पर्श
केला तितके सर्व बरे झाले.

**7** परूशी आणि यरुशलेम नगरातून आलेले नियमशास्त्राचे काही
शिक्षक येशूंच्या भोवती गोळा झाले. 2 येशूंचे काही शिष्य अशुद्ध
हाताने, म्हणजे हात न धुताच जेवतात, असे त्यांनी पाहिले होते. 3
परूशी आणि सर्व यहूदी लोक, वाडवडीलांच्या परंपरेस अनुसरून आपले
हात विधिपूर्वक धुतल्याशिवाय कधीही जेवत नसत. 4 ज्यावेळी ते
बाजारातून घरी येत, त्या त्यावेळेस हात धुतल्याशिवाय ते जेवत नसत.
भांडी, पातेली, ताटे वगैरे धुण्यासंबंधीच्या अनेक रूढी ते पाळीत असत.
5 या कारणामुळे परूशी आणि नियमशास्त्राच्या शिक्षकांनी येशूंना
विचारले, “तुमचे शिष्य आपल्या वाडवडीलांच्या परंपरे प्रमाणे का वागत
नाहीत व ते आपले हात अशुद्ध असताना का जेवतात?” 6 त्यांनी उत्तर
दिले, “यशायाह संदेष्ट्याने तुमच्या ढोंगीपणाचे अचूक वर्णन केले
आहे; कारण असे लिहिलेले आहे: “‘हे लोक त्यांच्या ओठांनी माझा
सन्मान करतात, पण त्यांची हृदये माझ्यापासून दूर आहेत. 7 माझी
उपासना ते व्यर्थपणे करतात; त्यांची शिकवण केवळ मानवी नियम
आहेत.’ 8 तुम्ही परमेश्वराने दिलेल्या आज्ञा टाळता आणि मनुष्याच्या
परंपरेला चिटकून बसता.” 9 आणि पुढे ते म्हणाले, “तुमच्या रीती
पाळण्यासाठी, परमेश्वराच्या आज्ञा टाळण्याचा सुलभ मार्ग तुम्हाला
माहीत आहे! 10 मोशे म्हणाला, ‘तुझ्या आईवडिलांचा मान राख,’ आणि
‘जो कोणी आपल्या वडिलांना किंवा आईला शाप देतो तो मरणदंडास
पात्र व्हावा.’ 11 परंतु तुम्ही म्हणता, जर कोणी असे घोषित करतो की,
आईवडिलांना करत असलेली मदत, ही ‘परमेश्वराला समर्पित’ आहे
ते अर्पण आहे— 12 त्यामुळे तुम्ही त्यांना आईवडिलांसाठी काहीही
करण्यास मनाई करता. 13 या ज्या तुमच्या परंपरा पूर्वजांपासून चालत
आलेल्या आहेत, त्यासाठी तुम्ही परमेश्वराचे वचन रद्द करता आणि
अशा प्रकारच्या पुष्कळच गोष्टी तुम्ही करता.” 14 येशूने परत गर्दीतील
लोकांना आपल्याकडे बोलाविले आणि म्हटले, “तुम्ही माझे ऐका
आणि हे समजून घ्या. 15 अशी कोणतीच गोष्ट नाही की जी बाहेरून
मनुष्यामध्ये प्रवेश करून त्याला अशुद्ध करू शकेल. 16 वास्तविक
मनुष्यामधून जे बाहेर पडते, तेच त्याला अशुद्ध करते. ज्याला ऐकावयास
कान आहेत, तो ऐको.” 17 गर्दीतून निघून घरी गेल्यावर, शिष्यांनी त्यांना
दाखल्याचा अर्थ विचारला. 18 “तुम्ही इतके मतिमंद आहात काय?”
त्यांनी विचारले, “जे काही मनुष्यामध्ये बाहेरून शिरते ते त्याला अशुद्ध
करू शकत नाही, हे तुम्ही पाहू शकत नाही काय? 19 ते त्यांच्या हृदयात
जात नाही पण पोटात उतरते आणि नंतर शरीरातून बाहेर पडते.” या
म्हणण्यावरून सर्व अन्न शुद्ध आहे, असे येशूंनी जाहीर केले. 20 ते पुढे
म्हणाले, “मनुष्यामधून जे बाहेर पडते तेच मनुष्याला अशुद्ध करते.
21 कारण आतून, मनुष्याच्या हृदयातून, दुष्ट विचार, खून, जारकर्म,
व्यभिचार, चोरी, लैंगिक पापे, 22 बदफैलीपणा, दुष्कृत्ये, फसवेगिरी,
कामातुरपणा, मत्सर, निंदा, गर्विष्ठपणा आणि मूर्खपणा 23 या सर्व
अमंगळ गोष्टी आतून निघतात आणि मनुष्याला अशुद्ध करतात.” 24
नंतर येशूंनी ते स्थान सोडले आणि ते सोर आणि सीदोन या प्रांतात
गेले. ते एका घरात गेले आणि हे कोणाला कळू नये अशी त्यांची इच्छा

होती; परंतु त्यांची उपस्थिती लपून राहू शकली नाही. 25 त्यांच्याविषयी
ऐकताच, एक स्त्री जिच्या लहान मुलीला अशुद्ध आत्म्याने पछाडले होते,
त्यांच्याकडे आली आणि त्यांच्या पाया पडली. 26 आपल्या कन्येला
दुरात्म्याच्या तावडीतून सोडवावे, अशी तिने त्यांच्याजवळ विनंती केली.
ती स्त्री ग्रीक असून सुरफुनीकी प्रांतात जन्मली होती. 27 “प्रथम
लेकरांना जेवढे पाहिजे तेवढे खाऊ द्या,” ते म्हणाले, “मुलांची भाकर
काढून कुत्र्यांना घालणे बरोबर नाही.” 28 “प्रभू” तिने प्रत्युत्तर दिले,
“मुलांच्या मेजाखाली जे तुकडे पडतात ते कुत्रेही खातात.” 29 येशूंनी
उद्गार काढले, “या उत्तरामुळे तू जाऊ शकतेस; दुरात्म्याने तुझ्या मुलीला
सोडले आहे.” 30 ती घरी आली त्यावेळी तिला तिची मुलगी बाजेवर
झोपलेली आढळली आणि दुरात्मा तिच्यामधून निघून गेला होता. 31
सोर सोडून येशू सीदोन प्रांतामधून गेले आणि तिथून दकापलीस रस्त्याने
ते पुन्हा गालील समुद्राकडे आले. 32 तिथे काही लोकांनी एका बहिऱ्या
आणि बोबड्या अशा मनुष्याला त्यांच्याकडे आणले. येशूंनी त्याच्यावर
हात ठेवून त्याला बरे करावे अशी लोकांनी येशूंना विनंती केली. 33
येशूंनी त्याला गर्दीतून बाजूला नेले. त्याच्या कानात त्यांनी बोटे घातली.
नंतर ते थुंकले आणि त्या मनुष्याच्या जिभेला केला. 34 मग स्वर्गाकडे
दृष्टी लावून व एक निःश्वास सोडून ते म्हणाले, “इप्फाता” म्हणजे,
“मोकळा हो” 35 ताबडतोब त्या मनुष्याचे कान उघडले व त्याच्या
जिभेचे बंधन मोकळे झाले आणि त्याला स्पष्ट बोलता येऊ लागले. 36
याविषयी कोणाला सांगू नका, असे येशूंनी निक्षून सांगितले. परंतु ते
जसे सांगत गेले तशी ही बातमी अधिकच प्रसिद्ध होत गेली. 37 लोक
कमालीचे आश्चर्यचकित झाले होते. ते म्हणाले, “त्यांनी सर्वकाही उत्कृष्ट
केले आहे. ते बहिऱ्यांना ऐकण्यास व मुक्यांना बोलावयास लावतात.”

**8** त्या दिवसांमध्ये दुसरा एक मोठा समुदाय जमला आणि त्यांच्याजवळ
खाण्यासाठी काही नव्हते. येशूंनी आपल्या शिष्यांना जवळ बोलाविले
आणि म्हणाले, 2 “मला या लोकांचा कळवळा येतो, कारण ते तीन
दिवसापासून माझ्याबरोबर आहेत आणि त्यांना खावयास काही नाही.
3 मी त्यांना तसेच भुकेले घरी पाठविले तर ते रस्त्यातच बेशुद्ध होऊन
पडतील, कारण त्यांच्यापैकी काहीजण खूप लांबून आलेले आहेत.” 4
शिष्यांनी उत्तर दिले, “इतक्या लोकांना पुरेल इतके अन्न या ओसाड
रानात कुठून आणावे?” 5 येशूंनी विचारले, “तुमच्याजवळ किती
भाकरी आहेत?” शिष्यांनी उत्तर दिले, “सात.” 6 त्यांनी जमावाला
जमिनीवर बसावयास सांगितले. मग त्यांनी त्या सात भाकरी घेतल्या
आणि त्या भाकरीबद्दल परमेश्वराचे आभार मानले, नंतर त्याचे तुकडे
करून ते त्यांनी शिष्यांना दिले आणि त्यांनी तसे केले. 7 त्यांच्याजवळ
थोडे लहान मासेही होते; त्यावरही येशूंनी आभार मानले आणि लोकांना
वाढावयास सांगितले. 8 लोक जेवले व तृप्त झाले. नंतर शिष्यांनी
उरलेले तुकडे गोळा केले तेव्हा सात टोपल्या भरल्या. 9 तिथे सुमारे
चार हजार लोक उपस्थित होते. त्यांना निरोप दिल्यानंतर, 10 येशू
शिष्यांसह होडीत बसून दल्मनुथा प्रांतात आले. 11 तिथे परूशी लोक
आले व त्यांना प्रश्न विचारू लागले. त्यांची परीक्षा पाहण्याकरिता त्यांनी
आकाशातून चिन्ह मागितले. 12 हे ऐकून त्यांनी एक दीर्घ निःश्वास
सोडला आणि म्हणाले, “ही पिढी चिन्ह का मागते? खरोखर या पिढीला
कोणतेही चिन्ह दिले जाणार नाही.” 13 नंतर ते त्यांना सोडून निघून गेले
व होडीत जाऊन बसले आणि सरोवराच्या पलीकडे गेले. 14 शिष्य
आपल्याबरोबर भाकरी घ्यावयास विसरले होते, त्यांच्याजवळ होडीत
मात्र एकच भाकर शिल्लक राहिली होती. 15 “सावध असा,” येशूंनी
त्यांना इशारा दिला, “हेरोद राजा आणि परूशी लोकांच्या खमिरापासून
सांभाळा.” 16 ते एकमेकांबरोबर चर्चा करू लागले आणि म्हणाले,
“आपल्याजवळ भाकर नाही,” म्हणून ते असे म्हणत असतील. 17 परंतु
त्यांची चर्चा ऐकून येशू त्यांना म्हणाले, “तुम्ही भाकर नाही याबद्दल का
बोलता? अजूनही तुम्ही पाहू शकत नाही किंवा समजू शकत नाही का?
तुमची हृदये कठीण झाली आहेत का? 18 तुम्हाला डोळे आहेत तरी पाहू
शकत नाही आणि कान आहे पण ऐकू येत नाही का? तुम्हाला आठवत
नाही का? 19 पाच हजारांना पाच भाकरींनी जेवू घातले, त्यावेळी तुम्ही
तुकड्यांच्या किती टोपल्या उचलल्या?” “बारा” त्यांनी उत्तर दिले. 20
“आणि सात भाकरींनी चार हजारांना जेवू घातले, तेव्हा तुम्ही उरलेल्या
तुकड्यांच्या किती टोपल्या उचलल्या?” “सात,” त्यांनी उत्तर दिले. 21
येशूंनी त्यांना विचारले, “अजूनही तुम्हाला समजत नाही का?” 22 ते
बेथसैदा येथे आले, तेव्हा काही लोकांनी एका आंधळया मनुष्याला
त्यांच्याकडे आणले आणि येशूंनी त्याला स्पर्श करावा अशी विनंती
केली. 23 येशूंनी त्या आंधळया मनुष्याला हाताशी धरून गावाबाहेर
नेले. त्याच्या डोळयांमध्ये थुंकल्यावर व त्याच्यावर हात ठेवल्यावर,
येशूंनी त्याला विचारले, “आता तुला काही दिसते का?” 24 तो वर दृष्टी
करून म्हणाला, “मला माणसे दिसत आहेत; ती झाडांसारखी, इकडे
तिकडे चालताना दिसतात.” 25 तेव्हा येशूंनी पुन: आपले हात त्याच्या
डोळ्यांवर ठेवले. तेव्हा त्याचे डोळे उघडले, त्याला दृष्टी प्राप्त झाली व
त्याला सर्वकाही स्पष्ट दिसू लागले. 26 “या गावात जाऊ नकोस,”
येशूंनी अशी ताकीद देऊन त्याला त्याच्या घरी पाठविले. 27 येशू आणि
त्यांचे शिष्य कैसरीया फिलिप्पाच्या गावात गेले. वाटेत असताना त्यांनी
आपल्या शिष्यांना विचारले, “मी कोण आहे असे लोक म्हणतात?” 28
त्यांनी उत्तर दिले, “काही म्हणतात बाप्तिस्मा करणारा योहान; काही
एलीयाह; तर आणखी काही संदेष्ट्यांपैकी एक असे म्हणतात.” 29
“परंतु तुमचे मत काय?” त्यांनी विचारले, “मी कोण आहे, असे तुम्ही
म्हणता?” पेत्राने उत्तर दिले, “तुम्ही ख्रिस्त आहात.” 30 “ही गोष्ट
कोणालाही सांगू नका.” असे येशूंनी त्यांना निक्षून सांगितले. 31 यानंतर
येशू त्यांना शिकवू लागले की, मानवपुत्राने पुष्कळ दुःखे सहन करावी,
वडील व मुख्य याजक, नियमशास्त्राचे शिक्षक यांच्याकडून नाकारले
जावे व जिवे मारले जावे आणि तिसऱ्या दिवशी पुन्हा जिवंत होणे याचे
अगत्य आहे. 32 ते या गोष्टीविषयी त्यांच्याशी अगदी मनमोकळेपणाने
बोलले आणि पेत्र त्यांना बाजूला घेऊन त्यांचा निषेध करू लागला. 33
येशूंनी वळून आपल्या शिष्यांकडे पाहिले आणि मग पेत्राला ते धमकावून
म्हणाले, “अरे सैताना, माझ्या दृष्टिआड हो. तुझे मन परमेश्वराच्या

गोष्टींकडे नाही, परंतु केवळ मनुष्याच्या गोष्टींकडे आहे.” 34 नंतर
शिष्यांना आणि जमावाला त्यांनी जवळ बोलाविले आणि म्हणाले:
“जर कोणी माझा शिष्य होऊ पाहतो तर त्याने स्वत:स नाकारावे,
त्याचा क्रूसखांब उचलावा आणि माझ्यामागे यावे. 35 कारण जो कोणी
आपला जीव स्वत:साठीच राखून ठेवतो तो आपल्या जीवाला मुकेल,
पण जो कोणी माझ्यासाठी आणि शुभवार्तेसाठी आपल्या जीवाला
मुकेल, तो त्याचा जीव वाचवेल. 36 कोणी सारे जग मिळविले आणि
आपला आत्मा गमावला तर त्यातून चांगले काय निष्पन्न होणार? 37
आपल्या आत्म्याच्या मोबदल्यात मनुष्याला दुसरे काही देता येईल का?
38 ज्या कोणाला या भ्रष्ट व पापी पिढीसमोर माझी व माझ्या वचनाची
लाज वाटेल, त्याची मला, मानवपुत्रालाही, त्याच्या पित्याच्या गौरवात व
पवित्र देवदूतांच्या समवेत परत येईन तेव्हा लाज वाटेल.”

9 ते त्यांना म्हणाले, “मी तुम्हाला निश्चित सांगतो, की येथे उभे असणारे
काहीजण असे आहेत की, परमेश्वराचे राज्य सामर्थ्याने आलेले
पाहतील तोपर्यंत मरणाचा अनुभव घेणार नाहीत.” 2 सहा दिवसानंतर
पेत्र, याकोब आणि योहान या तिघांना बरोबर घेऊन येशू एका उंच
डोंगरावर गेले, तिथे ते एकटे असताना त्यांच्यासमोर येशूंचे रूपांतर
झाले. 3 त्यांची वस्त्रे इतकी शुभ्र, चमकणारी झाली की जगामध्ये इतर
कोणालाही त्यापेक्षा शुभ्र करता येणार नाही. 4 तिथे त्यांच्यासमोर
एलीयाह आणि मोशे प्रकट झाले आणि ते येशूंबरोबर संवाद करू
लागले. 5 तेव्हा पेत्र येशूंना म्हणाला, “गुरुजी, आपल्याला येथेच राहता
आले, तर फार चांगले होईल! आपण या ठिकाणी तीन मंडप उभारू
या—एक तुमच्यासाठी, एक मोशेसाठी आणि एक एलीयाहसाठी.” 6
त्याला काय बोलावे हे समजत नव्हते, कारण ते भयभीत झाले होते. 7
इतक्यात ढगाने येऊन त्यांच्यावर छाया केली आणि मेघातून एक वाणी
ऐकू आली: “हा माझा परमप्रिय पुत्र आहे. याचे तुम्ही ऐका!” 8 मग
एकाएकी, जेव्हा त्यांनी आजूबाजूला पाहिले, त्यावेळी येशू व्यतिरिक्त
त्यांच्या नजरेस कोणीही पडले नाही. 9 ते डोंगरावरून खाली उतरत
असताना, येशूंनी त्यांना आज्ञा केली, तुम्ही जे पाहिले त्याविषयी,
मानवपुत्र मरणातून पुन्हा उठेपर्यंत कोणालाही सांगू नका. 10 म्हणून
त्यांनी ही गोष्ट आपसातच ठेवली आणि, “मरणातून पुन्हा उठणे”
म्हणजे काय या गोष्टीविषयी ते चर्चा करू लागले. 11 नंतर शिष्यांनी
येशूंना विचारले, “एलीयाह प्रथम आला पाहिजे, असे नियमशास्त्राचे
शिक्षक का म्हणतात?” 12 येशूंनी उत्तर दिले, “एलीयाह प्रथम येईल व
सर्वकाही व्यवस्थित करेल याची खात्री बाळगा. पण मानवपुत्राने पुष्कळ
दु:खे सहन करावीत आणि तुच्छ मानले जावे असे कशाला लिहिले आहे?
13 पण मी तुम्हाला सांगतो, एलीयाह आलेला आहे आणि त्याच्याविषयी
जसे लिहून ठेवले आहे, त्यानुसार त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांनी त्याला
वाटेल तसे वागविले आहे.” 14 जेव्हा ते बाकीच्या शिष्यांकडे आले,
तेव्हा त्यांच्याभोवती मोठा समुदाय होता आणि काही नियमशास्त्र
शिक्षक त्यांच्याशी वाद घालत आहेत, असे त्यांना दिसले. 15 येशूंना
पाहून सर्व समुदायाला आश्चर्य वाटले आणि त्यांचे अभिवादन करण्यास
ते धावत गेले. 16 येशूंनी विचारले, “तुम्ही त्यांच्याशी कशाविषयी
वाद करीत होता?” 17 गर्दीतील एक मनुष्य उत्तरला, “गुरुजी, मी
माझ्या मुलाला तुमच्याकडे घेऊन आलो, त्याला दुरात्म्याने पछाडलेले
आहे व त्याने त्याची वाणी हिरावून घेतली आहे; 18 ज्यावेळी दुरात्मा
त्याला ताब्यात घेतो, तेव्हा तो त्याला जमिनीवर आपटतो. त्याच्या
तोंडाला फेस येतो, क्रोधाने दात खातो आणि त्याचे शरीर ताठ होते. त्या
दुरात्म्याला हाकलून लावण्याची आपल्या शिष्यांना विनंती केली, पण
ते करू शकले नाहीत.” 19 येशूंनी उत्तर दिले, “हे विश्वासहीन पिढी,
आणखी किती काळ मी तुमच्याबरोबर राहिले पाहिजे? आणखी किती
काळ मी तुमचे सहन करू? मुलाला माझ्याकडे आणा.” 20 त्याप्रमाणे
ते मुलाला घेऊन आले. पण दुरात्म्याने येशूंना पाहिले, तेव्हा त्याने
त्या मुलाला झटके आणले आणि तो मुलगा जमिनीवर पडून लोळू
लागला व त्याच्या तोंडामधून फेस येऊ लागला. 21 “हा केव्हापासून
असा आहे?” येशूंनी त्याच्या वडिलांना विचारले. वडिलांनी उत्तर दिले,
“अगदी बालपणापासून, 22 त्याने मुलाला अनेकदा जिवे मारण्याकरिता
विस्तवात, नाही तर पाण्यात फेकून दिले आहे. परंतु जर तुम्हाला शक्य
असेल तर आमच्यावर दया करा आणि आम्हाला मदत करा.” 23
“जर तुम्हाला शक्य असेल?” येशू म्हणाले, “जो विश्वास ठेवतो त्याला
सर्वकाही शक्य आहे.” 24 मुलाच्या वडिलांनी झटकन उत्तर दिले, “मी
विश्वास ठेवतो, माझा अविश्वास दूर करण्यास मला साहाय्य करा!”
25 हे पाहण्याकरिता लोक धावत तिथे येत आहेत, हे पाहून येशूंनी
अशुद्ध आत्म्याला धमकावून म्हटले, “अरे बहिरेपणाच्या व मुकेपणाच्या
आत्म्या, या मुलामधून बाहेर येण्याची मी तुला आज्ञा करीत आहे
आणि पुन्हा कधीही त्याच्यामध्ये प्रवेश करू नकोस.” 26 हे ऐकून
दुरात्म्याने किंकाळी फोडली व त्याला पिळून बाहेर निघून गेला. मुलगा
मेल्यासारखा पडला होता. “तो मरण पावला आहे,” असे लोक म्हणू
लागले. 27 परंतु येशूंनी मुलाचा हात धरून त्याला उभे राहण्यास मदत
केली आणि तो उभा राहिला. 28 नंतर येशू आत गेल्यानंतर, शिष्यांनी
खाजगी रीतीने विचारले, “त्याला आम्ही का काढू शकलो नाही?” 29
त्याने उत्तर दिले, “असा प्रकार फक्त प्रार्थनेद्वारेच निघू शकतो.” 30
ते ठिकाण सोडल्यानंतर ते गालील प्रांतामधून गेले. येशूंनी आपण
कुठे आहोत हे कोणालाही कळू न देण्याचा प्रयत्न केला, 31 कारण ते
आपल्या शिष्यांना शिक्षण देत होते. ते त्यांना म्हणाले, “मानवपुत्राला
मनुष्यांच्या हाती धरून दिले जाईल. ते त्याला जिवे मारतील, पण तीन
दिवसानंतर तो पुन्हा उठेल.” 32 परंतु ते काय म्हणतात हे ते समजले
नाहीत आणि त्या गोष्टींविषयी विचारण्याची त्यांना भीती वाटली. 33 मग
ते कफर्णहूमात आले. घरात गेल्यानंतर येशूने त्यांना विचारले, “तुम्ही
रस्त्यात कशाविषयी चर्चा करीत होता?” 34 परंतु शिष्य शांत राहिले
कारण मार्गावर असताना आपल्यापैकी सर्वात श्रेष्ठ कोण यासंबंधी
शिष्यांचा वादविवाद सुरू झाला होता. 35 ते खाली बसले, त्यांनी
आपल्या बारा शिष्यांना बोलाविले आणि म्हणाले, “तुमच्यामध्ये जो
कोणी प्रथम होऊ पाहतो, त्याने सर्वात शेवटचा, आणि सर्वांचा सेवक

झाले पाहिजे.” 36 मग त्यांनी एका लहान लेकराला त्यांच्यामध्ये ठेवले.
मग त्या लेकराला कवेत उचलून घेत त्यांना म्हणाले, 37 “जो कोणी
माझ्या नावाने अशा लहान बालकाचा स्वीकार करतो, तो माझा स्वीकार
करतो आणि जो कोणी माझा स्वीकार करतो, तो माझा नव्हे तर ज्याने
मला पाठविले त्याचा स्वीकार करतो.” 38 योहान म्हणाला, “गुरुजी,
आम्ही कोणा एकाला तुमच्या नावाने भुते काढताना पाहिले. आम्ही
त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला, कारण तो आपल्यातील नव्हता.”
39 येशू म्हणाले, “त्याला मना करू नका, कारण जो माझ्या नावाने
चमत्कार करतो तो कोणीही असला, तरी तो लगेचच माझ्याविरुद्ध वाईट
बोलणार नाही. 40 कारण जो आपल्याविरुद्ध नाही, तो आपल्या बाजूचा
आहे. 41 मी तुम्हाला निश्चित सांगतो, तुम्ही ख्रिस्ताचे आहात म्हणून
माझ्या नावाने कोणी तुम्हाला पेलाभर पाणी दिले, तर तो आपल्या
पारितोषिकाला मुकणार नाही. 42 “जर कोणी माझ्यावर विश्वास
ठेवणाऱ्या या लहानातील एकालाही अडखळण करण्यास प्रवृत्त करतो,
त्याच्या गळयात जात्याची मोठी तळी बांधून त्याला सरोवरात फेकून
द्यावे हे त्याच्या चांगल्यासाठी होईल. 43 जर तुझा हात अडखळण
करीत असेल, तर तो कापून टाक. दोन हात असून नरकात जावे व न
विझणाऱ्या अग्नीत जाण्याऐवजी एका हाताने अधू होऊन जीवनात
प्रवेश करणे अधिक हिताचे होईल.” (Geenna g1067) 44 ज्या ठिकाणी
त्यांना खाणारे किडे कधी मरत नाहीत किंवा तेथील अग्नी कधी विझत
नाही. 45 जर तुझा पाय अडखळण करीत असेल, तर तो कापून टाक.
दोन पाय असून नरकात टाकले जावे, यापेक्षा एका पायाने अपंग होऊन
जीवनात प्रवेश करणे हे तुझ्या हिताचे आहे. (Geenna g1067) 46 ज्या
ठिकाणी त्यांना खाणारे किडे कधी मरत नाहीत किंवा तेथील अग्नी
कधी विझत नाही. 47 जर तुझा डोळा तुला अडखळण करीत असेल,
तर तो उपटून फेकून दे. दोन डोळयांसह अग्नीच्या नरकात जाण्यापेक्षा
एका डोळयाने परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करणे हे उत्तम आहे. (Geenna
g1067) 48 ज्या ठिकाणी, “‘त्यांना खाणारे किडे कधी मरत नाहीत,
किंवा तेथील अग्नी कधी विझत नाही.’ 49 प्रत्येकजण अग्नीद्वारे खारट
केले जातील. 50 “मीठ चांगले आहे, पण मिठाचा खारटपणा गेला
तर त्याचा खारटपणा कशाने आणाल? तुमच्यातील मीठ गमावू नका,
एकमेकांशी शांतीने राहा.”

**10** येशू कफर्णहूम प्रांत सोडून यार्देनेच्या यहूदीया प्रांतात आले.
त्यांच्यामागे लोकांची गर्दी होती आणि रीतीप्रमाणे त्यांना त्यांनी
शिक्षण दिले. 2 काही परूशी आले आणि त्यांची परीक्षा पाहण्याकरिता
त्यांना विचारले, “एखाद्या मनुष्याने त्याच्या पत्नीला घटस्फोट देणे
नियमानुसार आहे काय?” 3 त्यांनी उत्तर दिले, “मोशेने तुम्हाला काय
आज्ञा दिली आहे?” 4 ते म्हणाले, “पत्नीला सूटपत्र लिहून द्यावा व
तिला पाठवून द्यावे अशी परवानगी मोशेने पुरुषांना दिली आहे.” 5
येशूंनी उत्तर दिले, “तुमच्या कठोर अंत:करणामुळे मोशेने हे नियम
तुम्हाला लिहून दिले. 6 परंतु सृष्टीच्या प्रारंभापासूनच परमेश्वराने त्यांना
‘पुरुष व स्त्री.’ असे निर्माण केले. 7 ‘या कारणासाठी पुरुष आपल्या
आईवडिलांना सोडून आपल्या पत्नीशी जडून राहील, 8 आणि ते दोघे
एकदेह होतील.’ म्हणून येथून पुढे ते दोघे नसून एकदेह आहेत. 9
म्हणून परमेश्वराने जे जोडले आहे, ते कोणीही विभक्त करू नये.” 10
नंतर ते शिष्यांबरोबर पुन: घरात असताना, त्यांनी येशूंना त्याबद्दल
विचारले. 11 त्यांनी उत्तर दिले, “जो कोणी व्यभिचाराच्या कारणाशिवाय
आपल्या पत्नीला सूटपत्र देतो आणि दुसऱ्या स्त्रीशी लग्न करतो, तो
व्यभिचार करतो. 12 आणि एखादी स्त्री आपल्या पतीला सूटपत्र देते
आणि दुसऱ्या पुरुषाबरोबर लग्न करते, तेव्हा ती व्यभिचार करते.”
13 लोक आपल्या लहान बालकांना, येशूंनी त्यांच्यावर हात ठेवावे
म्हणून त्यांच्याकडे आणत होते, परंतु शिष्यांनी त्यांना दटाविले. 14
जेव्हा येशूंनी पाहिले, तेव्हा ते रागावले व म्हणाले, “लहान बालकांना
माझ्याजवळ येऊ द्या, त्यांना प्रतिबंध करू नका, कारण परमेश्वराचे
राज्य त्यांच्यासारख्यांचेच आहे. 15 मी तुम्हाला निश्चित सांगतो की,
जोपर्यंत तुम्ही या लहान बालकासारखे होऊन परमेश्वराच्या राज्याचा
स्वीकार करीत नाही, तोपर्यंत त्यात तुमचा प्रवेश होऊ शकणार नाही.”
16 नंतर त्यांनी बालकांना कवेत घेतले, त्यांच्यावर हात ठेवले आणि
त्यांना आशीर्वाद दिला. 17 येशू वाटेला लागणार तोच, एक मनुष्य
त्यांच्याकडे धावत आला आणि त्यांच्यापुढे गुडघे टेकून त्यांना म्हणाला,
“उत्तम गुरुजी, सार्वकालिक जीवन हे वतन मिळावे म्हणून मी काय
करावे?” (aiōnios g166) 18 येशूंनी उत्तर दिले, “तू मला उत्तम कशाला
म्हणतोस? परमेश्वराशिवाय कोणी उत्तम नाही. 19 तुला आज्ञा ठाऊक
आहेत: ‘तू खून करू नको, तू व्यभिचार करू नको, तू चोरी करू नको,
तू खोटी साक्ष देऊ नको, तू फसवू नको, तुझ्या आईवडिलांचा मान
राख.’” 20 “गुरुजी” तो तरुण जाहीरपणे म्हणाला, “मी बालक होतो
तेव्हापासूनच या सर्व आज्ञांचे पालन करत आलो आहे.” 21 येशूंनी
त्याच्याकडे पाहिले आणि त्याच्यावर प्रीती केली. “तू एका गोष्टीत
उणा आहेस,” तो म्हणाला. जा, “तुझे आहे ते सर्वकाही विकून टाक
आणि गरिबांना वाटून दे आणि तुला स्वर्गात संपत्ती मिळेल. मग ये व
मला अनुसर.” 22 यावर त्या तरुणाचा चेहरा पडला. तो खिन्न झाला
आणि निघून गेला, कारण त्याच्याजवळ पुष्कळ संपत्ती होती. 23
येशूंनी सभोवती पाहिले व आपल्या शिष्यांना म्हणाले, “श्रीमंतांना
परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करणे किती अवघड आहे!” 24 हे ऐकून
त्यांच्या बोलण्याचे शिष्यांना आश्चर्य वाटले. मग येशू पुन्हा म्हणाले,
“मुलांनो, परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करणे कितीतरी अवघड आहे. 25
श्रीमंत मनुष्याला परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करणे यापेक्षा उंटाला
सुईच्या नाकातून जाणे सोपे आहे.” 26 शिष्य आणखी चकित झाले व
ते एकमेकास म्हणू लागले, “मग कोणाचे तारण होऊ शकेल?” 27
येशूंनी त्यांच्याकडे निरखून पाहिले आणि म्हटले, “मानवाला हे अशक्य
आहे, परंतु परमेश्वराला नाही; परमेश्वराला सर्वगोष्टी शक्य आहेत.” 28
पेत्र बोलला, “आपल्याला अनुसरण्यासाठी आम्ही सर्वकाही सोडून
दिले आहे!” 29 येशूंनी उत्तर दिले, “मी तुम्हाला निश्चित सांगतो की,
ज्यांनी मला अनुसरण्यासाठी व शुभवार्तेसाठी आपले घर, भाऊ, बहीण,

आई, पिता, मुले आणि जमिनीचा त्याग केला आहे. 30 या वर्तमान
युगात त्याला शंभरपट मोबदला तर मिळेलच, घरे, भाऊ बहीण, आई,
मुले आणि जमीन आणि याबरोबरच छळ आणि येणाऱ्या युगात त्याला
सार्वकालिक जीवनही मिळाल्याशिवाय राहणार नाही. (aiōn g165,
aiōnios g166) 31 पण अनेकजण जे पहिले आहेत, ते शेवटचे होतील
आणि जे शेवटचे आहेत ते पहिले होतील.” 32 ते आता यरुशलेमच्या
वाटेला लागले असताना, येशू पुढे चालले होते, शिष्य आश्चर्यचकित
झाले होते, तर त्यांच्यामागे चालणारे जे इतर लोक होते, ते भयभीत
झाले होते. पुन्हा एकदा येशूंनी आपल्या बारा शिष्यांना एका बाजूला
नेले आणि त्यांच्या बाबतीत काय घडणार हे त्यांना सांगू लागले. 33
“आपण यरुशलेमात जात आहोत” ते म्हणाले, “तिथे मानवपुत्राला
प्रमुख याजक व नियमशास्त्र शिक्षक यांच्या हवाली करण्यात येईल.
ते त्याच्यावर आरोप करून त्याला मृत्युदंड देतील आणि गैरयहूदी
लोकांच्या स्वाधीन करतील. 34 ते त्याची थट्टा करतील, त्याच्यावर
थुंकतील, त्याला फटके मारतील आणि त्याचा जीव घेतील; परंतु तीन
दिवसानंतर तो पुन्हा उठेल.” 35 नंतर जब्दीचे पुत्र याकोब आणि योहान
येशूंकडे आले. “गुरुजी,” ते म्हणाले, “आम्ही आपल्याजवळ जे काही
मागतो, ते आपण आमच्यासाठी करावे.” 36 “मी तुमच्यासाठी काय
करावे, अशी तुमची इच्छा आहे?” येशूंनी विचारले. 37 ते म्हणाले,
“आपण आपल्या वैभवात आमच्यापैकी एकाला आपल्या उजवीकडे
व एकाला डावीकडे बसू द्यावे.” 38 “तुम्ही काय मागता हे तुम्हाला
समजत नाही,” येशू म्हणाले, “जो प्याला मी पिणार आहे तो तुम्ही
पिऊ शकाल काय किंवा ज्या बाप्तिस्माने मी बाप्तिस्मा पावलो आहे तो
बाप्तिस्मा तुम्ही घेऊ शकाल का?” 39 ते उत्तरले, “आम्ही तो पिऊ
शकू.” येशूंनी त्यांना म्हटले, “मी जो प्याला पिणार आहे तो तुम्ही प्याल
खरा आणि जो बाप्तिस्मा मला दिला आहे तो बाप्तिस्मा तुम्हीही घ्याल.
40 परंतु माझ्या उजवीकडे किंवा डावीकडे कोणी बसावे, हे ठरविण्याचा
अधिकार मला नाही. या जागा ज्यांच्यासाठी तयार करण्यात आल्या
आहेत, त्यांनाच त्या मिळतील.” 41 हे बाकीच्या दहा शिष्यांनी ऐकले,
तेव्हा ते याकोब आणि योहानवर रागावले. 42 येशूंनी त्यांना एकत्र
बोलावून म्हटले, “गैरयहूदीयांवर शासन करणारे त्यांच्यावर हुकमत
चालवितात आणि त्यांचे उच्चाधिकारी त्यांच्यावर अधिकार गाजविणारे
हे तुम्हाला माहीत आहे. 43 पण तुम्हामध्ये तसे नसावे. तुमच्यामध्ये
जो कोणी श्रेष्ठ होऊ पाहतो, त्याने तुमचा सेवक झाले पाहिजे. 44
आणि जो कोणी प्रथम होऊ पाहतो, तो सर्वांचा गुलाम झाला पाहिजे.
45 मी मानवपुत्र, सेवा करवून घ्यावयास नाही, तर सेवा करावयास
आणि पुष्कळांच्या उद्धारासाठी आपला जीव खंडणी म्हणून द्यावयास
आलो आहे.” 46 मग येशू यरीहो शहरात आले. तिथे येशू आणि त्यांचे
शिष्य, मोठ्या समुदायासह शहर सोडून जात असताना, तीमयाचा पुत्र
बार्तीमय हा आंधळा, येशू ज्या रस्त्याने चालले होते, त्या रस्त्याच्या
कडेला भीक मागत बसला होता. 47 जेव्हा हे नासरेथकर येशू जात
आहेत असे त्याने ऐकले, तेव्हा तो मोठ्याने ओरडू लागला, “अहो येशू,
दावीदाचे पुत्र, माझ्यावर दया करा!” 48 अनेकांनी त्याला धमकाविले
आणि गप्प बसण्यास सांगितले, पण तो अधिकच मोठमोठ्याने ओरडून
म्हणू लागला, “अहो, दावीदाचे पुत्र, माझ्यावर दया करा!” 49 येशू
थांबले आणि म्हणाले, “त्याला इकडे बोलवा.” त्याप्रमाणे लोक त्या
आंधळ्या मनुष्याला म्हणाले, “धीर धर, आपल्या पायांवर उभा राहा, ते
तुला बोलावत आहेत.” 50 हे ऐकताच बार्तीमयने आपला अंगरखा
भिरकावून दिला, उडी मारून तो उठला आणि येशूंकडे आला. 51
“मी तुझ्यासाठी काय करावे अशी तुझी इच्छा आहे?” येशूंनी त्याला
विचारले. आंधळा मनुष्य म्हणाला, “गुरुजी मला दृष्टी यावी.” 52 येशू
म्हणाले, “जा, तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे.” त्याच क्षणाला
त्याला दिसू लागले आणि तो रस्त्याने येशूंच्या मागे चालू लागला.

**11** ते यरुशलेमजवळ आले आणि जैतून डोंगरावर असलेल्या बेथफगे
व बेथानी या गावात आले, तेव्हा येशूंनी आपल्या शिष्यांपैकी दोन
शिष्यांना असे सांगून पाठविले, 2 “समोरच्या गावात जा आणि तिथे
शिरताच, ज्याच्यावर कधी कोणी स्वार झाले नाही असे एक शिंगरू
बांधून ठेवलेले तुम्हाला आढळेल, ते सोडून इकडे आणा. 3 ‘तुम्ही हे
का करीत आहात?’ असे जर कोणी तुम्हाला विचारले, तर एवढेच
म्हणा की, ‘प्रभूला त्याची गरज आहे आणि ते लगेच त्याला पाठवून
देतील.’” 4 ते निघाले व त्यांना एका रस्त्यावर फाटकाच्या बाहेर शिंगरू
बांधलेले आढळले. ते सोडू लागले, 5 त्यावेळी उभ्या असलेल्या काहींनी
विचारले, “तुम्ही बांधलेल्या शिंगरूचे काय करत आहात?” 6 येशूंनी
त्यांना सांगितल्याप्रमाणेच त्यांनी उत्तर दिले. तेव्हा त्या माणसांनी त्यांना
जाऊ दिले. 7 जेव्हा त्यांनी ते शिंगरू येशूंकडे आणले आणि त्यावर
बसण्यासाठी आपले वस्त्रे शिंगराच्या पाठीवर घातले, तेव्हा येशू त्यावर
बसले. 8 अनेक लोकांनी आपले अंगरखे काढून रस्त्यावर पसरले आणि
दुसऱ्यांनी शेतातून तोडून आणलेल्या डाहळ्या रस्त्यावर पसरल्या.
9 मग जे त्यांच्यापुढे गेले आणि जे त्यांच्यामागून चालले ते मोठ्याने
ओरडून म्हणाले: “होसान्ना!” “प्रभूच्या नावाने येणारा धन्यवादित
असो!” 10 “आमचा पिता दावीदाचे येणारे राज्य आशीर्वादित होवो!”
“सर्वोच्च स्वर्गात होसान्ना!” 11 येशूंनी यरुशलेममध्ये प्रवेश केला आणि
ते मंदिराच्या अंगणात गेले. त्यांनी सर्व गोष्टींचे बारकाईने निरीक्षण केले,
कारण आता उशीर झाला होता, म्हणून आपल्या बारा शिष्यांबरोबर ते
बेथानीस गेले. 12 दुसऱ्या दिवशी ते बेथानी सोडत असताना, येशूंना
भूक लागली. 13 काही अंतरावर पानांनी बहरलेले एक अंजिराचे झाड
त्यांच्या दृष्टीस पडले, त्यावर काही फळे सापडतील या शोधार्थ ते तिथे
गेले. तिथे पोहोचल्यावर, त्यांना फक्त पानांशिवाय काही आढळले
नाही, कारण तो अंजिरांचा हंगाम नव्हता. 14 तेव्हा येशू झाडाला
म्हणाले, “तुझे फळ कोणीही कधीही न खावो.” त्यांचे हे बोलणे
शिष्य ऐकत होते. (aiōn g165) 15 यरुशलेमला पोहोचल्यावर, येशू
मंदिराच्या अंगणात गेले आणि तिथे खरेदीविक्री करणाऱ्या सर्वांना ते
बाहेर घालवून देऊ लागले. पैशाची अदलाबदल करणाऱ्यांचे मेज आणि
कबुतरे विकणाऱ्यांची आसने त्यांनी उधळून लावली. 16 त्याचप्रमाणे

मंदिराच्या आवारातून विक्रीच्या मालाची नेआण करण्यासही त्यांनी
मनाई केली. 17 येशू त्यांना शिकवीत होते, ते म्हणाले, “असे लिहिले
नाही का: माझ्या घराला ‘सर्व राष्ट्रांसाठी प्रार्थना घर म्हणतील,’ परंतु
तुम्ही ती ‘लुटारूंची गुहा केली आहे.’” 18 येशूंनी काय केले, हे प्रमुख
याजकवर्ग आणि इतर नियमशास्त्र शिक्षकांनी ऐकले, तेव्हा त्यांना
कसे ठार मारता येईल याचा मार्ग ते शोधू लागले. त्यांना येशूंची भीती
वाटत होती. कारण त्यांच्या शिक्षणामुळे सर्व समुदाय आश्चर्यचकित
झाला होता. 19 संध्याकाळ झाली, तेव्हा येशू व त्यांचे शिष्य शहराच्या
बाहेर गेले. 20 सकाळी जात असताना अंजिराचे झाड मुळापासून सुकून
गेले आहे असे त्यांना दिसले! 21 पेत्राला आठवण आली आणि त्यांनी
येशूंना म्हटले, “गुरुजी, पाहा! ज्याला आपण शाप दिला ते अंजिराचे
झाड वाळून गेले आहे!” 22 येशूंनी उत्तर दिले, “परमेश्वरावर विश्वास
ठेवा, 23 मी तुम्हाला निश्चित सांगतो की, जर कोणी या डोंगराला, ‘ऊठ
आणि समुद्रात जाऊन पड,’ असे म्हणेल आणि अंतःकरणात संशय
न धरता आपण म्हटले तसे होईल असा विश्वास धरला, तर ती गोष्ट
त्यांच्यासाठी केली जाईल. 24 यास्तव मी तुम्हाला सांगतो की, प्रार्थना
करून जे काही मागाल, ते तुम्हाला मिळालेच आहे असा विश्वास ठेवा
आणि ते तुम्हाला प्राप्त होईल. 25 आणि जेव्हा तुम्ही प्रार्थना करावयास
उभे राहता, तेव्हा तुमच्या मनात कोणाविरुद्ध काही असेल, तर त्याची
क्षमा करा, म्हणजे तुमचा स्वर्गीय पिता तुम्हाला तुमच्या पातकांची
क्षमा करतील. 26 पण तुम्ही क्षमा करणार नाही, तर तुमचा स्वर्गीय
पिताही तुम्हाला क्षमा करणार नाही.” 27 ते परत यरुशलेमला आले,
तेव्हा येशू मंदिराच्या आवारात चालत असता, मुख्य याजक व यहूदी
पुढारी त्यांच्याकडे आले. 28 “कोणत्या अधिकाराने या गोष्टी तुम्ही
करत आहात? व तुम्हाला हा अधिकार कोणी दिला?” असे त्यांना
विचारू लागले. 29 येशूंनी उत्तर दिले, “मी तुम्हाला एक प्रश्न विचारतो.
त्याचे उत्तर द्या आणि मी हे कोणत्या अधिकाराने करीत आहे, हे मी
तुम्हाला सांगेन. 30 मला सांगा, योहानाचा बाप्तिस्मा स्वर्गापासून किंवा
मनुष्याकडून होता?” 31 या प्रश्नावर त्यांनी एकमेकांबरोबर चर्चा केली
आणि म्हणाले, “योहानाचा बाप्तिस्मा ‘स्वर्गापासून होता’ असे जर
आपण म्हणालो तर ते विचारतील ‘त्यावर तुम्ही विश्वास का ठेवला
नाही?’ 32 पण जर आपण म्हणालो, ‘मनुष्यांपासून होता,’” त्यांना
लोकांचे भय वाटत होते, कारण योहान संदेष्टा होता असे प्रत्येकजण
मानत होता. 33 शेवटी त्यांनी उत्तर दिले, “आम्हाला माहीत नाही.”
यावर येशू त्यांना म्हणाले, “तर मग मीही या गोष्टी कोणत्या अधिकाराने
करतो, हे तुम्हाला सांगणार नाही.”

**12** मग येशू त्यांच्याशी दाखले देऊन बोलू लागले: “एका मनुष्याने
द्राक्षमळा लावला. त्याच्याभोवती भिंत बांधली, द्राक्षारसासाठी
कुंड खणले आणि संरक्षणासाठी एक बुरूजही बांधला. मग द्राक्षमळा
काही शेतकऱ्यांना भाड्याने देऊन तो दुसऱ्या ठिकाणी राहवयास गेला.
2 हंगामाचे दिवस आल्यावर द्राक्षमळ्यातील फळातून काही मिळावे
म्हणून त्याने आपला एक सेवक शेतकऱ्यांकडे पाठविला. 3 परंतु त्यांनी
त्या सेवकाला धरले, मार दिला आणि रिकाम्या हाताने माघारी पाठविले.
4 त्याने दुसरा सेवक त्याच्याकडे पाठविला; पण त्यांनी त्या माणसाच्या
डोक्यावर प्रहार केला आणि त्याला अपमानास्पद वागणूक दिली. 5
त्यानंतर त्याने आणखी एकाला पाठविले, त्याला तर त्यांनी ठारच
केले आणि त्यानंतर अनेकांना पाठविले, त्यातील काहींना त्यांनी चोप
दिला व इतरांना जिवे मारले. 6 “आता त्याच्याजवळ पाठविण्यासाठी
केवळ ज्याच्यावर त्याची प्रीती होती तो त्याचा पुत्र राहिला होता. त्याने
त्याला सर्वात शेवटी पाठविले, व तो म्हणाला की, ‘ते माझ्या पुत्राचा
तरी मान राखतील.’ 7 “पण शेतकऱ्यांनी मालकाच्या पुत्राला येतांना
पाहिले, तेव्हा ते म्हणाले, ‘हा तर वारस आहे. चला, आपण त्याला
ठार करू या, म्हणजे हे वतन आपलेच होईल.’ 8 त्याप्रमाणे त्यांनी
त्याला धरले आणि त्याचा वध करून त्याला द्राक्षमळयाच्या बाहेर फेकून
दिले. 9 “द्राक्षमळयाचा धनी काय करेल असे तुम्हाला वाटते? तो येईल
आणि त्या भाडेकऱ्यांना मारून टाकेल आणि द्राक्षमळा दुसऱ्यांना देईल.
10 धर्मशास्त्रात तुम्ही वाचले नाही काय: “‘जो दगड बांधणाऱ्यांनी
नापसंत केला, तोच कोनशिला झाला आहे; 11 प्रभूने हे केले आहे,
आणि आमच्या दृष्टीने ते अद्भुत आहे.’” 12 प्रमुख याजक, नियमशास्त्र
शिक्षक आणि वडील येशूंना अटक करण्याचा मार्ग शोधू लागले, कारण
तो दाखला त्यांच्याविरुद्ध सांगितला होता हे त्यांनी ओळखले. पण
त्यांना लोकांची भीती वाटत होती; मग ते त्यांना सोडून निघून गेले. 13
काही काळानंतर येशूंना शब्दात पकडावे, या उद्देशाने काही परूशी व
हेरोदियांना पाठविण्यात आले. 14 ते त्याच्याकडे आले व म्हणाले,
“गुरुजी, तुम्ही प्रामाणिक व्यक्ती आहात हे आम्हाला माहीत आहे.
तुम्ही कोणाचे समर्थन करीत नाही, कोणाची पर्वा न करता, भेदभाव न
करता, ते कोण आहेत याकडे लक्ष देत नाही व खरेपणाने परमेश्वराचा
मार्ग शिकविता; तर आम्हाला सांगा, कैसराला कर देणे योग्य आहे
की नाही? 15 आम्ही कर भरावा की नाही?” परंतु येशूंनी त्यांचे ढोंग
ओळखले व ते म्हणाले, “तुम्ही मला सापळयात का पाडू पाहता? एक
दिनार आणा आणि मला दाखवा.” 16 त्याप्रमाणे त्यांना एक नाणे
दिले आणि त्यांनी विचारले, “या नाण्यावर कोणाचा मुखवटा आणि
कोणाचा लेख आहे?” “कैसराचा” त्यांनी उत्तर दिले. 17 तेव्हा प्रभू येशू
म्हणाले, “जे कैसराचे आहे ते कैसराला द्या आणि जे परमेश्वराचे आहे ते
परमेश्वराला द्या.” तेव्हा ते त्यांच्याविषयी आश्चर्यचकित झाले. 18 मग
पुनरुत्थान नाही असे म्हणणारे सदूकी, आपला प्रश्न घेऊन त्यांच्याकडे
आले. 19 त्यांनी विचारले, “गुरुजी, मोशेने आपल्यासाठी असे लिहिले
आहे की, एखादा मनुष्य मूलबाळ न होता मरण पावला, तर त्याच्या
भावाने त्याच्या विधवेशी विवाह करून त्याच्यासाठी संतती वाढवावी.
20 आता, सात भाऊ होते. त्यातील पहिल्याने लग्न केले परंतु संतती न
होता तो मरण पावला. 21 मग दुसऱ्या भावाने विधवेशी लग्न केले,
पण तोही काही मूलबाळ न होताच मरण पावला. तिसऱ्याचेही तसेच
झाले. 22 ते सातही भाऊ मूलबाळ न होता मरण पावले. सर्वांच्या शेवटी
ती स्त्री मरण पावली. 23 आता पुनरुत्थान होईल त्यावेळी ती स्त्री

कोणाची पत्नी होईल, कारण त्या सातही जणांनी तिच्याशी विवाह
केला होता?” 24 येशूंनी उत्तर दिले, “तुम्ही चुकत नाहीत काय, कारण
ना तुम्ही धर्मशास्त्र जाणता, नाही परमेश्वराचे सामर्थ्य ओळखता? 25
जेव्हा मृत लोक उठतील, ते विवाह करत नाही किंवा विवाह करूनही
देत नाही; तर ते स्वर्गातील देवदूतांप्रमाणे असतील. 26 पण आता
मृतांच्या पुनरुत्थानासंबंधी, मोशेच्या पुस्तकात जळत्या झुडूपांच्या
संदर्भात वाचले नाही काय? परमेश्वराने त्याला असे सांगितले, ‘मी
अब्राहामाचा परमेश्वर, इसहाकाचा परमेश्वर आणि याकोबाचा परमेश्वर
आहे?’ 27 ते मृतांचे नसून जिवंतांचे परमेश्वर आहेत, तुम्ही फार मोठी
चूक करत आहात.” 28 कोणी एक नियमशास्त्र शिक्षक तिथे आला
व त्याने त्यांचा वाद ऐकला. येशूंनी योग्य उत्तर दिले आहे, हे पाहून
त्याने येशूंना विचारले, “सर्व आज्ञांपैकी महत्त्वाची कोणती आहे?”
29 येशूंनी उत्तर दिले, “सर्वात महत्त्वाची आज्ञा ही आहे: ‘हे इस्राएला
ऐक: प्रभू आपले परमेश्वर एकच प्रभू आहेत. 30 प्रभू तुमचे परमेश्वर
यांच्यावर तुमच्या पूर्ण हृदयाने, तुमच्या पूर्ण जिवाने आणि तुमच्या पूर्ण
मनाने आणि तुमच्या पूर्णशक्तीने प्रीती करा.’ 31 दुसरी ही आहे: ‘जशी
तुम्ही स्वतःवर तशी तुमच्या शेजार्‍यावर प्रीती करा.’ या आज्ञांपेक्षा
दुसरी कोणतीही आज्ञा मोठी नाही.” 32 “योग्य बोललात, गुरुजी” त्या
मनुष्याने उत्तर दिले, “परमेश्वर ‘एकच आहेत आणि त्यांच्याशिवाय दुसरे
परमेश्वर नाहीत’ हे आपण बरोबर सांगितले आहे. 33 त्यांच्यावर पूर्ण
अंतःकरणाने आणि तुमच्या पूर्ण जिवाने आणि तुमच्या पूर्णशक्तीने प्रीती
करणे आणि जशी स्वतःवर तशी तुमच्या शेजार्‍यावर प्रीती करणे, हे
सर्व प्रकारची होमार्पणे व बली वाहण्यापेक्षा फारच महत्त्वाचे आहे.”
34 त्याने सुज्ञतेने उत्तर दिले आहे हे पाहून येशू त्याला म्हणाले, “तू
परमेश्वराच्या राज्यापासून दूर नाहीस.” आणि तेव्हापासून कोणी त्यांना
आणखी प्रश्न विचारावयास धजले नाहीत. 35 नंतर मंदिराच्या आवारात
लोकांना शिक्षण देतांना, येशूंनी त्यांना विचारले, “ख्रिस्त, हा दावीदाचा
पुत्र आहे, असे तुमचे नियमशास्त्र शिक्षक का म्हणतात?” 36 कारण
दावीद स्वतः पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने म्हणतो, “‘प्रभू माझ्या प्रभूला
म्हणाले, “मी तुझ्या शत्रूंना, तुझ्या पायाखाली ठेवीपर्यंत, तू माझ्या
उजव्या हाताला बसून राहा.”’ 37 स्वतः दावीद त्यांना ‘प्रभू’ असे
म्हणतो तर तो त्याचा पुत्र कसा असू शकेल?” जमलेला मोठा जमाव
येशूंचे भाषण मोठ्या आनंदाने ऐकत होता. 38 येशू शिकवीत होते, ते
म्हणाले, “या नियमशास्त्राच्या शिक्षकांबाबत खबरदारी बाळगा! त्यांना
लांब झगे घालून बाजारात लोकांकडून आदरपूर्वक अभिवादन घेणे, 39
सभागृहामध्ये आणि मेजवान्यामध्ये उत्तम व मानाच्या जागा मिळविणे
फार आवडते. 40 ते देखाव्यासाठी लांबलचक प्रार्थना करतात आणि
विधवांची घरे लुबाडतात, अशा लोकांना अधिक शिक्षा होईल.” 41 येशू
दानपात्रासमोर बसले आणि समुदाय मंदिरातील दानपात्रामध्ये आपले
दान कसे टाकतात हे लक्षपूर्वक पाहत होते. पुष्कळ धनवान लोकांनी
पुष्कळ दान टाकले. 42 मग एक गरीब विधवा आली आणि या गरीब
विधवेला तांब्याची दोन छोटी नाणी टाकताना त्यांनी पाहिले, ज्याची
किंमत फक्त एक पैसा होती. 43 ते पाहून येशूंनी आपल्या शिष्यांना
जवळ बोलावून सांगितले, “मी तुम्हाला निश्चित सांगतो की, या गरीब
विधवेने दान पात्रात इतर सर्वांपेक्षा अधिक टाकले आहे. 44 कारण
त्या सर्वांनी आपल्या संपत्तीतून थोडेसे दिले, पण हिने तर आपल्या
गरिबीतून सर्व देऊन टाकले—जी तिची उपजीविका होती.”

13 येशू मंदिरातून बाहेर निघत असताना, त्यांच्या शिष्यांपैकी एकजण
त्यांना म्हणाले, “पाहा ना, गुरुजी! किती भव्य हे दगड आणि
सुंदर इमारती!” 2 येशू उत्तरले, “तुम्ही आता या भव्य इमारती पाहता
ना? याच्या एका दगडावर दुसरा दगड राहणार नाही. प्रत्येक दगड
पाडला जाईल.” 3 येशू मंदिरासमोर असलेल्या जैतुनाच्या डोंगरावर
बसले असताना, पेत्र, याकोब, योहान आणि आंद्रिया यांनी त्यांना
खाजगी रीतीने विचारले, 4 “या घटना केव्हा घडतील या गोष्टी पूर्ण
होण्याच्या सुमारास काय चिन्ह असतील हे आम्हाला सांगा.” 5 येशू
त्यांना म्हणाले, “कोणीही तुम्हाला फसवू नये म्हणून सावध राहा. 6
कारण अनेकजण माझ्या नावाने येतील आणि, ‘तो मीच आहे,’ असा
दावा करतील आणि पुष्कळांना फसवतील. 7 जेव्हा तुम्ही लढायांसंबंधी
ऐकाल आणि लढायांच्या अफवा ऐकाल, तेव्हा तुम्ही घाबरू नका.
या गोष्टी घडल्याच पाहिजेत. पण शेवट अजूनही यावयाचा आहे. 8
कारण राष्ट्रांविरुद्ध राष्ट्र व राज्याविरुद्ध राज्य उठतील. निरनिराळ्या
ठिकाणी भूकंप होतील, दुष्काळ पडतील. या गोष्टी तर प्रसूती वेदनांची
सुरुवात आहेत. 9 “तुम्ही सावध असले पाहिजे. तुम्हाला न्यायालयाकडे
सोपविले जाईल आणि सभागृहामध्ये तुम्हाला फटके मारण्यात येईल
आणि माझ्यामुळे तुम्हाला राज्यपाल आणि राजे त्यांच्यापुढे माझे साक्षी
व्हावे लागेल. 10 प्रथम शुभवार्तेचा प्रचार सर्व राष्ट्रांमध्ये झालाच पाहिजे.
11 परंतु जेव्हा ते तुम्हाला धरून नेतील व तुमच्याविरुद्ध खटला सुरू
होईल, तेव्हा तुम्ही काय बोलावे याविषयी आधी चिंता करू नका.
त्यावेळी तुम्हाला जे सुचविले जाईल ते बोला. कारण तुम्ही ते बोलणार
नाही, तर पवित्र आत्मा बोलेल. 12 “भाऊ भावाला, पिता आपल्या
पोटच्या लेकरांना जिवे मारण्याकरिता विश्वासघाताने धरून देतील.
लेकरेही आपल्या आईवडिलांविरुद्ध बंड करतील आणि त्यांचा वध
घडवून आणतील. 13 माझ्यामुळे सर्वजण तुमचा द्वेष करतील, परंतु जो
शेवटपर्यंत स्थिर राहील, त्याचे मात्र तारण होईल. 14 “जेव्हा तुम्ही
‘ओसाडीचा अमंगळ पदार्थ’ ज्या ठिकाणी त्याचा संबंध नाही, त्या
ठिकाणी उभा असलेला पाहाल—वाचकाने हे समजून घ्यावे—त्यावेळी
जे यहूदीयात आहेत त्यांनी डोंगरांकडे पळून जावे. 15 जो कोणी
घराच्या छपरांवर असेल, त्याने घरातून काही आणण्याकरिता प्रवेश
करू नये; 16 जो शेतात असेल, त्याने आपला अंगरखा नेण्यासाठी
परत जाऊ नये. 17 गर्भवती आणि दूध पाजणार्‍या स्त्रियांसाठी तर
तो काळ किती क्लेशाचा असेल! 18 तरी हे हिवाळ्यामध्ये होऊ नये,
म्हणून प्रार्थना करा, 19 कारण ते दिवस इतके कष्टाचे असतील की,
परमेश्वराने पृथ्वी निर्माण केल्यापासून आजपर्यंत असे दिवस आले
नाहीत किंवा पुढेही येणार नाहीत. 20 “जर प्रभूने ते दिवस कमी केले

नसते, तर कोणी वाचला नसता. तरी केवळ निवडलेल्या लोकांसाठी,
ज्यांना त्यांनी निवडले आहे, त्यांच्यासाठी ते कमी केले जातील. 21
त्या काळात, ‘येथे ख्रिस्त आहे!’ किंवा ‘पाहा, तो तिथे आहे,’ असे
जर कोणी तुम्हाला सांगितले, तर अजिबात विश्वास ठेवू नका. 22
कारण खोटे ख्रिस्त आणि खोटे संदेष्टे उदय पावतील आणि मोठी चिन्हे
व अद्भुते करून, साधेल तर, निवडलेल्या लोकांनाही फसवतील. 23
म्हणून तुम्ही सावध राहा. मी तुम्हाला आधी सर्वकाही सांगून ठेवलेले
आहे. 24 “हा भयानक क्लेशांचा काळ संपल्याबरोबर त्या दिवसात,
“‘सूर्य अंधकारमय होईल, आणि चंद्र आपला प्रकाश देणार नाही; 25
आकाशातून तारे गळून पडतील, आणि आकाशमंडळ डळमळेल.’ 26
“त्यावेळी लोक मानवपुत्राला परमेश्वराच्या उजवीकडे बसलेले आणि
सामर्थ्याने व पराक्रमाने आकाशात मेघारूढ होऊन परत येत असलेले
पाहतील. 27 आणि चारही दिशांकडून, पृथ्वीच्या व आकाशांच्या या
टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत त्यांच्या निवडलेल्या लोकांना एकत्र
करण्यासाठी ते आपल्या दूतांस पाठवतील. 28 “आता अंजिराच्या
झाडापासून हा बोध घ्या व शिका: त्या झाडाच्या डाहळ्या कोवळ्या
झाल्या आणि त्यांना पालवी फुटू लागली म्हणजे उन्हाळा जवळ आला
आहे, हे तुम्ही ओळखता. 29 या घटना घडत असताना तुम्ही पाहाल,
तेव्हा ते जवळ अगदी दारातच आहे, हे समजून घ्या. 30 मी तुम्हाला
निश्चित सांगतो की या सर्वगोष्टी घडून आल्याशिवाय ही पिढी नाहीशी
होणार नाही. 31 आकाश व पृथ्वी नाहीशी होतील, पण माझी वचने
नाहीशी होणार नाहीत. 32 “तरीपण त्या दिवसाबद्दल किंवा वेळेबद्दल
कोणालाच माहीत नाही, म्हणजे स्वर्गातील दूतांना नाही, पुत्रालाही नाही,
ते फक्त पित्यालाच ठाऊक आहे. 33 सावध असा! जागृत राहा! ती वेळ
केव्हा येईल, हे तुम्हाला माहीत नाही! 34 हे एका दूरच्या प्रवासावर
निघालेल्या मनुष्यासारखे आहे: तो आपले घर सोडतो, त्याच्या दासांना
अधिकार देतो, प्रत्येकाला ज्याचे त्याचे काम वाटून देतो आणि तो परत
येईपर्यंत बारकाईने लक्ष ठेवावे, असे द्वारपालाला सांगतो. 35 “यास्तव
तुम्ही जागृत राहा, कारण घराचा मालक कोणत्या दिवशी परत येईल;
संध्याकाळी, मध्यरात्री, कोंबडा आरवेल त्यावेळी किंवा पहाटे येईल हे
तुम्हाला ठाऊक नाही. 36 तो जर एकाएकी आला तर तुम्ही त्याला
झोपेत असलेले सापडू नये. 37 मी जे तुम्हाला सांगतो ते प्रत्येकाला
सांगत आहे: ‘सावध राहा!’”

**14** वल्हांडण आणि बेखमीर भाकरीचा सण यांना दोनच दिवसांचा
अवधी होता आणि प्रमुख याजकवर्ग आणि नियमशास्त्र शिक्षक,
येशूंना गुप्तपणे धरून जिवे मारावे म्हणून संधी शोधत होते. 2 ते
म्हणाले, “आपण हे सणाच्या समयी करू नये, कारण तसे केले तर
लोक कदाचित दंगल करतील.” 3 येशू बेथानी येथे असताना, “कुष्ठरोगी
शिमोन,” याच्या घरी भोजनास बसले होते, त्यावेळी एक स्त्री, शुद्ध
जटामांसीपासून बनविलेले अतिशय मोलवान सुगंधी तेल असलेली एक
अलाबास्त्र कुपी घेऊन आत आली आणि तिने ती कुपी फोडून येशूंच्या
मस्तकावर ओतली. 4 तिथे हजर असलेल्यांपैकी काहीजण एकमेकांना
संतापाने म्हणत होते, “तेलाची ही नासाडी कशाला? 5 एका वर्षाच्या
मजुरीपेक्षाही अधिक किमतीस विकून ते पैसे गोरगरिबांना देता आले
असते.” आणि त्यांनी कठोरपणे तिचा निषेध केला. 6 “तिच्या वाटेस
जाऊ नका,” येशू त्यांना म्हणाले, “तुम्ही तिला त्रास का देता? तिने
माझ्यासाठी एक सुंदर कृत्य केले आहे. 7 गरीब लोक तर नेहमीच
तुमच्याबरोबर असतील. तुम्हाला पाहिजे तेव्हा त्यांना मदत करता येईल.
पण मी तुमच्याबरोबर नेहमीच असणार नाही. 8 तिला जे करता आले,
ते तिने केले. माझ्या अंत्यसंस्कारासाठी तिने माझ्या शरीरावर आधी
सुगंधी तेल ओतले आहे. 9 मी तुम्हाला निश्चित सांगतो की, जगात
जिथे कुठे शुभवार्ता गाजविण्यात येईल, तिथे हिने केलेले हे सत्कार्य
हिच्या आठवणीसाठी सांगितले जाईल.” 10 नंतर बारा शिष्यांपैकी एक,
यहूदाह इस्कर्योत येशूंना विश्वासघाताने धरून देण्यास महायाजकांकडे
गेला. 11 तेव्हा त्यांना आनंद झाला आणि त्याला मोबदला देण्याचे
त्यांनी वचन दिले. मग तो येशूंना त्यांच्या हातात धरून देण्याची योग्य
संधी शोधू लागला. 12 बेखमीर भाकरीच्या सणाच्या पहिल्या दिवशी,
म्हणजे रीतीप्रमाणे ज्या दिवशी वल्हांडणाच्या कोकऱ्याचा यज्ञ करत
असत, येशूंच्या शिष्यांनी त्यांना विचारले, “वल्हांडणाच्या भोजनाची
तयारी आम्ही कुठे करावी अशी आपली इच्छा आहे?” 13 तेव्हा
येशूंनी त्यांच्या शिष्यांपैकी दोघांना पाठविले आणि सांगितले, “तुम्ही
शहरात जा आणि एक मनुष्य पाण्याने भरलेली मोठी घागर घेऊन
जात असलेला तुम्हाला भेटेल, त्याच्यामागे जा. 14 तो ज्या घरात
जाईल त्या घराच्या मालकाला सांगा, ‘गुरुजी विचारत आहेत की, ज्या
खोलीत मला माझ्या शिष्यांबरोबर वल्हांडणाचे भोजन करता येईल, ती
पाहुण्यांची खोली कुठे आहे?’ 15 तो तुम्हाला माडीवरील मोठी तयार
व सुसज्ज असलेली एक खोली दाखवेल. तिथे आपल्यासाठी तयारी
करा.” 16 ते शिष्य नगरात गेले आणि येशूंनी सांगितल्याप्रमाणे त्यांना
आढळून आले. तेव्हा त्यांनी वल्हांडणाच्या भोजनाची तयारी केली. 17
संध्याकाळ झाल्यावर येशू आपल्या बारा शिष्यांबरोबर तिथे आले, 18
ते सर्व मेजाभोवती बसून भोजन करीत असताना येशू म्हणाले, “मी
तुम्हाला निश्चित सांगतो की, तुमच्यापैकी एकजण माझा विश्वासघात
करेल—तो माझ्याबरोबर पंक्तीला बसून जेवत आहे.” 19 ते दुःखाने
भरून गेले आणि एकामागून एक त्यांना विचारू लागले, “खरोखर तो
मी तर नाही ना?” 20 “तो तुम्हा बाराजणांपैकी एक आहे.” त्यांनी
उत्तर दिले, “जो माझ्याबरोबर ताटात भाकर बुडवीत आहे. 21 कारण
त्यांच्याबद्दल लिहिले होते त्याप्रमाणे मानवपुत्र जातो खरा. परंतु जो
मानवपुत्राला विश्वासघाताने धरून देतो, त्याचा धिक्कार असो. तो
जन्मलाच नसता, तर ते त्याला अधिक हिताचे झाले असते.” 22
भोजन करीत असताना, येशूंनी भाकर घेतली, तिच्यावर आशीर्वाद
मागितल्यावर, ती मोडली आणि आपल्या शिष्यांना देत ते म्हणाले,
“ही घ्या, हे माझे शरीर आहे.” 23 त्यांनी द्राक्षारसाचा प्याला हाती
घेतला व त्याबद्दल आभार मानले आणि मग तो प्याला त्यांना दिला
आणि मग ते सर्व त्यातून प्याले. 24 मग येशू त्यांना म्हणाले, “हे माझ्या

कराराचे रक्त आहे व ते पुष्कळांसाठी ओतले जात आहे 25 मी तुम्हाला
निश्चित सांगतो की, परमेश्वराच्या राज्यात मी नवा द्राक्षारस पिईन, त्या
दिवसापर्यंत द्राक्षवेलीचा उपज मी पिणार नाही.” 26 मग त्या सर्वांनी
मिळून एक गीत गाईले आणि ते जैतुनाच्या डोंगराकडे गेले. 27 “तुम्ही
सर्वजण मला सोडून जाल,” येशू शिष्यांना सांगू लागले, “कारण असे
लिहिले आहे: “मी मेंढपाळावर प्रहार करेन आणि मेंढरांची पांगापांग
होईल. 28 परंतु मी पुन्हा जिवंत झाल्यावर, तुमच्या आधी गालीलात
जाईन आणि तिथे तुम्हाला भेटेन.” 29 पेत्र जाहीरपणे म्हणाला, “जरी
सर्वांनी सोडले, तरी मी तुम्हाला सोडून जाणार नाही.” 30 “पेत्रा,”
येशू म्हणाले, “मी तुला निश्चित सांगतो की, आज; होय, आजच रात्री
दोन वेळा कोंबडा आरवण्यापूर्वी तू मला तीन वेळा नाकारशील.” 31
परंतु पेत्र ठामपणे म्हणाला, “मला तुमच्याबरोबर मरावे लागले, तरी मी
तुम्हाला नाकारणार नाही.” आणि बाकीचे सर्व असेच म्हणाले. 32
आता ते गेथशेमाने नावाच्या ठिकाणी आले. येशू आपल्या शिष्यांना
म्हणाले, “मी प्रार्थना करेपर्यंत येथे थांबा.” 33 त्यांनी पेत्र, याकोब
आणि योहान यांना बरोबर घेतले आणि ते अत्यंत अस्वस्थ आणि
व्याकूळ होऊ लागले. 34 ते त्यांना म्हणाले, “मरणप्राय दुःखाने माझा
आत्मा अतिशय व्याकूळ झाला आहे. तुम्ही येथेच थांबा आणि जागे
राहा.” 35 थोडे पुढे जाऊन ते भूमीवर पालथे पडले आणि त्यांनी प्रार्थना
केली की शक्य असल्यास ही घटका त्यांच्यापासून टळून जावी. 36
“अब्बा! पित्या!” ते म्हणाले, “आपल्याला शक्य असल्यास, हा प्याला
दूर करा. तरीपण माझ्या इच्छेप्रमाणे नव्हे, तर आपल्या इच्छेप्रमाणे
होवो.” 37 नंतर ते शिष्यांकडे परत आले, तेव्हा ते झोपी गेले आहेत,
असे त्यांना आढळले. “शिमोना,” ते पेत्राला म्हणाले, “तू झोपी गेला
आहेस काय? एक तासभरही तू जागे राहू शकला नाही का? 38 तुम्ही
परीक्षेत पडू नये म्हणून सावध राहा आणि प्रार्थना करा. आत्मा उत्सुक
आहे, परंतु देह अशक्त आहे.” 39 येशू पुन्हा गेले आणि त्यांनी तीच
प्रार्थना केली. 40 नंतर ते परत त्यांच्याकडे आले, त्यावेळीही ते झोपी
गेलेले आढळले, कारण त्यांचे डोळे जड झाले होते आणि त्यांना काय
उत्तर द्यावे हे समजले नाही. 41 मग ते तिसऱ्या वेळेस परत आले आणि
त्यांना म्हणाले, “तुम्ही अजूनही झोप व विसावा घेत आहात काय? पुरे
झाले! पाहा वेळ आली आहे आणि मानवपुत्र पापी लोकांच्या हाती धरून
दिला जात आहे. 42 उठा, आपण जाऊ! माझा विश्वासघात करणारा
आला आहे.” 43 ते बोलत आहेत तेव्हाच, त्यांच्या बारा शिष्यांपैकी एक
यहूदा, महायाजकांनी आणि वडीलजनांनी पाठविलेल्या तरवारी आणि
सोटे धारण करणाऱ्या जमावाला बरोबर घेऊन पुढे आला. 44 आता त्या
विश्वासघातक्याने जमावाला खूण देऊन ठेवली होती, “ज्या मनुष्याचे मी
चुंबन घेईन त्याला अटक करा आणि शिपायांच्या बंदोबस्तात घेऊन
जा.” 45 तत्क्षणी यहूदाह येशूंच्या जवळ गेला, “गुरुजी!” त्याने उद्गार
काढले आणि त्यांचे चुंबन घेतले. 46 त्या पुरुषांनी येशूंना धरले आणि
अटक केले. 47 पण तेवढ्यात जे उभे होते त्यांच्यातील एकाने तरवार
उपसून महायाजकाच्या दासावर वार करून त्याचा कान कापून टाकला.
48 येशूंनी विचारले, “मी बंडखोरांचा नेता आहे काय, की तुम्ही तरवारी
आणि लाठ्या घेऊन मला धरावयास आला आहात? 49 मी दररोज
तुमच्याबरोबर होतो, मंदिराच्या परिसरात शिकवीत असे, पण तुम्ही मला
धरले नाही. परंतु धर्मशास्त्र पूर्ण झाले पाहिजे.” 50 मग सर्वजण त्यांना
सोडून पळून गेले. 51 मात्र, तागाच्या वस्त्राशिवाय अंगावर काहीही न
पांघरलेला एक तरुण येशूंच्या मागे चालला होता. जमावाने त्यालाही
धरण्याचा प्रयत्न केला, 52 परंतु आपले वस्त्र सोडून तो तसाच उघडा
पळून गेला. 53 येशूंना महायाजक कयफाकडे नेण्यात आले. लवकरच
दुसरे सर्व मुख्य याजक व वडीलजन आणि नियमशास्त्र शिक्षक गोळा
झाले. 54 पेत्र काही अंतरावरून, त्यांच्यामागे चालत, महायाजकाच्या
अंगणात आला आणि तिथे तो पहारेकऱ्यांसोबत जाऊन बसला आणि
शेकोटीजवळ ऊब घेत बसला. 55 मुख्य याजक आणि सर्व यहूदी
न्यायसभा येशूंना जिवे मारण्यासाठी पुरावे शोधण्याचा प्रयत्न करीत
होते, परंतु ते त्यांना सापडले नाही. 56 नंतर अनेकांनी त्यांच्याविरुद्ध
खोटी साक्ष दिली, परंतु त्यांच्या बोलण्यात ताळमेळ बसत नव्हता. 57
नंतर काहींनी उठून त्यांच्याविरुद्ध ही खोटी साक्ष दिली: 58 “आम्ही
त्याला बोलताना ऐकले, ‘मनुष्यांनी बांधलेले हे परमेश्वराचे मंदिर मी
उद्ध्वस्त करेन आणि तीन दिवसात हातांनी न बांधलेले असे दुसरे मंदिर
पुन्हा उभे करेन.’” 59 तरीपण त्यांच्या साक्षीमध्येही काही ताळमेळ
नव्हता. 60 हे ऐकून महायाजक त्यांच्यापुढे उभा राहिला आणि त्याने
येशूंना विचारले, “या आरोपांना तू उत्तर देणार नाही काय?” हे लोक
जी साक्ष तुझ्याविरुद्ध सांगत आहेत ती काय आहे? 61 पण ख्रिस्त
शांत राहिले आणि त्यांनी काही उत्तर दिले नाही. नंतर महायाजकाने
त्यांना पुन्हा विचारले, “धन्यवादित परमेश्वराचा पुत्र ख्रिस्त तो तू आहेस
का?” 62 “मी आहे,” येशूंनी उत्तर दिले, “आणि तुम्ही मानवपुत्राला
सर्वसमर्थाच्या उजवीकडे बसलेले आणि आकाशातून मेघारूढ होऊन
परत येत असलेले पाहाल.” 63 महायाजकाने आपली वस्त्रे फाडली
आणि तो म्हणाला, “आता आणखी साक्षीदारांची आपल्याला काय
गरज आहे? 64 तुम्ही ईश्वरनिंदा ऐकली आहे, आता तुम्हाला काय
वाटते?” तो मृत्युदंडास पात्र आहे असा सर्वांनी त्यांच्यावर आरोप
केला. 65 त्यांच्यापैकी काहीजण येशूंवर थुंकू लागले. त्यांनी त्यांचे डोळे
बांधले, त्यांना बुक्क्या मारल्या आणि म्हटले, “भविष्यवाणी करा!”
मग पहारेकऱ्यांनी त्यांना चपराका मारून आपल्या ताब्यात घेतले. 66 हे
सर्व होत असताना, पेत्र खाली अंगणातच होता, तिथे महायाजकाची
एक दासी आली. 67 तिने पेत्राला शेकोटीसमोर शेकताना पाहिले,
तिने त्याच्याकडे निरखून पाहिले. “तू नासरेथकर येशूंबरोबर होतास.”
68 पण पेत्र नकार देत म्हणाला, “तू कशासंबंधी बोलतेस हे मला
समजत नाही.” मग तो द्वाराकडे गेला. 69 त्याला तिथे उभे असलेल्या
दासीने पाहिले आणि ती पुन्हा म्हणाली, “हा मनुष्य त्यांच्यापैकी एक
आहे!” 70 पेत्राने ते पुन्हा नाकारले. थोड्या वेळाने जी माणसे तिथे उभी
होती. त्यातील काहीजण पेत्राला म्हणाले, “तू खरोखर त्यांच्यापैकीच
आहेस, कारण तू गालील प्रांताचा आहेस!” 71 हे ऐकून पेत्र शाप

देऊ लागला व शपथ घेऊन त्यांना म्हणू लागला, “ज्या माणसाविषयी
तुम्ही बोलत आहात, त्या मनुष्याला मी ओळखत सुद्धा नाही.” 72
तेवढ्यात कोंबडा दुसऱ्या वेळेला आरवला. त्याबरोबर पेत्राला येशूंचे
शब्द आठवले, “कोंबडा दोन वेळा आरवण्यापूर्वी तू मला तीन वेळा
नाकारशील.” तेव्हा पेत्र दूर निघून गेला आणि अतिशय दुःखाने रडला.

**15** प्रातःकाळ झाल्यावर सर्व महायाजक आणि लोकांचे वडीलजन,
नियमशास्त्राचे शिक्षक आणि पूर्ण न्यायसभा यांनी योजना
केली. सभेनंतर त्यांनी येशूंना बंदिस्त करून रोमी राज्यपाल पिलाताच्या
स्वाधीन केले. 2 पिलाताने येशूंना विचारले, “तू यहूद्यांचा राजा आहेस
काय?” येशूंनी उत्तर दिले, “तुम्ही म्हणता तसेच.” 3 प्रमुख याजक
आणि यहूदी पुढाऱ्यांनी येशूंवर अनेक आरोप केले. 4 म्हणून पिलाताने
येशूंना विचारले, “तू त्यांना उत्तर देणार नाहीस काय? ते तुझ्यावर
कितीतरी गोष्टींचा दोषारोप करीत आहे.” 5 परंतु येशूंनी काही उत्तर
दिले नाही. याचे पिलाताला नवल वाटले. 6 आता सणामध्ये एका
कैद्याला लोकांच्या विनंतीप्रमाणे सोडून देण्याची प्रथा होती. 7 बरब्बा
म्हटलेला एक मनुष्य त्यावेळी बंडखोरांबरोबर तुरुंगात शिक्षा भोगत
होता, त्याने उठाव करून खून केला होता. 8 आता जसे पिलात
रीतीप्रमाणे करीत असे, तसे त्याने करावे अशी मागणी समुदाय त्याला
करू लागला. 9 “तुमच्यासाठी मी यहूद्यांच्या राजाला सोडावे अशी
तुमची इच्छा आहे का?” पिलाताने विचारले, 10 प्रमुख याजकांनी
स्वतःच्या हितासाठी येशूंना धरून दिले हे पिलाताच्या लक्षात आले
होते. 11 पण तेवढ्यात येशूंच्या ऐवजी बरब्बाला सोडा अशी मागणी
करण्यासाठी प्रमुख याजकांनी समुदायास चिथाविले. 12 पिलाताने
विचारले, “ज्याला तुम्ही यहूद्यांचा राजा म्हणता, त्याचे मी काय करावे?”
13 लोक ओरडून म्हणाले, “त्याला क्रूसावर खिळा!” 14 “पण का?”
पिलाताने खुलासा विचारला, “त्याने असा कोणता गुन्हा केला आहे?”
पण लोकांनी अधिकच मोठ्याने गर्जना केली, “त्याला क्रूसावर खिळा!”
15 लोकांना खुश करण्याच्या विचाराने, पिलाताने त्यांच्यासाठी बरब्बाला
सोडून दिले आणि येशूंना फटके मारल्यानंतर क्रूसावर खिळण्याकरिता
त्यांच्या स्वाधीन केले. 16 मग सैनिकांनी त्यांना राजवाड्यात म्हणजे
प्राइतोरियम येथे नेले आणि सर्व सैनिकांच्या टोळीला एकत्र बोलाविले.
17 त्यांनी त्यांना जांभळा झगा घातला आणि काट्यांचा एक मुकुट
गुंफून त्यांच्या मस्तकावर ठेवला. 18 नंतर ते त्याला प्रणाम करून
म्हणू लागले, “हे यहूद्यांच्या राजा, तुझा जयजयकार असो!” 19 त्यांनी
त्यांच्या मस्तकांवर काठीने वारंवार मारले व ते त्यांच्या तोंडावर थुंकले.
त्यांच्यासमोर त्यांनी गुडघे टेकून त्यांची उपासना केली. 20 येशूंची अशी
थट्टा केल्यावर, त्यांनी त्याला घातलेला जांभळा झगा काढून घेतला
आणि त्यांचे कपडे पुन्हा त्यांच्या अंगावर चढविले. मग त्यांना क्रूसावर
खिळण्याकरिता बाहेर घेऊन गेले. 21 कुरेने गावचा एक रहिवासी,
आलेक्सांद्र व रूफस यांचा पिता शिमोन रानातून परत येत होता व
जवळून जात असता, त्यांनी त्याला जबरदस्तीने क्रूस वाहण्यास भाग
पाडले. 22 मग त्यांनी येशूंना गोलगोथा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या
जागी आणले. गोलगोथाचा अर्थ “कवटीची जागा” असा आहे. 23 त्यांनी
येशूंना गंधरस मिसळलेला द्राक्षारस दिला, परंतु त्यांनी त्याचा स्वीकार
केला नाही. 24 मग त्यांनी त्याला क्रूसावर खिळल्यानंतर, त्यांची
वस्त्रे वाटून, प्रत्येकाला काय मिळेल हे पाहण्यासाठी त्यांनी चिठ्ठ्या
टाकल्या. 25 त्यांना क्रूसावर खिळले त्यावेळी सकाळचे नऊ वाजले
होते. 26 एक दोषपत्राचा लेख वर लावण्यात आला होता: यहूद्यांचा
राजा. 27 त्यांनी दोन बंडखोरांना त्यांच्याबरोबर क्रूसावर खिळले, एक
उजवीकडे आणि दुसरा त्यांच्या डावीकडे होता. 28 अशा रीतीने,
“अपराधी लोकांत त्याची गणना झाली,” हा शास्त्रलेख पूर्ण झाला.
29 जे जवळून जात होते त्यांनी त्यांचा अपमान केला, डोकी हालवीत
म्हणाले, “तू मंदिर उद्ध्वस्त करून तीन दिवसात पुन्हा बांधणार आहे
ना, 30 तर क्रूसावरून खाली ये आणि स्वतःला वाचव!” 31 त्याचप्रमाणे
प्रमुख याजकवर्ग आणि नियमशास्त्र शिक्षकांनीही त्यांची थट्टा केली.
ते म्हणाले, “त्याने दुसऱ्यांचे तारण केले, पण त्याला स्वतःचा बचाव
करता येत नाही. 32 तो इस्राएलाचा राजा व ख्रिस्त आहे, त्याला आता
क्रूसावरून खाली उतरून येऊ दे, म्हणजे आम्ही पाहू आणि विश्वास
ठेवू.” त्यांच्याबरोबर क्रूसावर खिळलेल्यांनीही त्यांच्यावर अपमानाची
रास केली. 33 संपूर्ण देशावर दुपारच्या तीन वाजेपर्यंत अंधार पडला. 34
आणि दुपारी तीन वाजता, येशूंनी मोठ्याने आरोळी मारली, “एलोई,
एलोई, लमा सबकतनी,” म्हणजे “माझ्या परमेश्वरा माझ्या परमेश्वरा,
तुम्ही माझा त्याग का केला?” 35 तिथे जवळ उभे असलेल्या काही
लोकांनी हे ऐकले व ते म्हणाले, “पाहा, तो एलीयाहला बोलावित
आहे.” 36 कोणी एक धावला, शिरक्यात भिजविलेला, एक स्पंज
काठीवर ठेवून येशूंना प्यावयास दिला व तो म्हणाला, “त्याला एकटे
सोडा. एलीयाह त्याला खाली उतरविण्यास येतो की काय, हे आपण
पाहू!” 37 मग येशूंनी मोठी आरोळी मारून, शेवटचा श्वास घेतला.
38 तेव्हा मंदिराच्या पवित्रस्थानातील पडदा वरपासून खालपर्यंत दोन
भागात फाटला. 39 जेव्हा येशूंच्या समोर उभे असलेल्या शताधिपतीने
ते कसे मरण पावले हे पाहिले, तेव्हा तो म्हणाला, “खरोखरच हा
मनुष्य परमेश्वराचा पुत्र होता!” 40 अनेक स्त्रिया हे दुरून पाहत होत्या.
त्यांच्यामध्ये मरीया मग्दालिया, धाकटा याकोब व योसेफ यांची आई
मरीया, सलोमी होत्या. 41 गालीलामध्ये असताना या स्त्रिया येशूंना
अनुसरून त्यांची सेवा करीत असत. यरुशलेममधून त्यांच्याबरोबर
आलेल्या इतर अनेक स्त्रियाही तिथे होत्या. 42 हा तयारी करण्याचा
दिवस होता (शब्बाथाच्या आधीचा दिवस). संध्याकाळ झाली असताना,
43 सभेचा एक सन्मान्य सभासद अरिमथियाकर योसेफ, स्वतः जो
परमेश्वराच्या राज्याची वाट पाहत होता, तो धैर्य करून पिलाताकडे गेला
आणि त्याने येशूंचे शरीर मागितले. 44 येशू इतक्या लवकर मरण पावले
हे ऐकून पिलाताला नवल वाटले. त्याने शताधिपतीला बोलाविले आणि
विचारले, येशूंचा मृत्यू आधी झाला आहे की काय? 45 ते खरे असल्याचे
शताधिपतीकडून समजल्यावर, त्याने येशूंचे शरीर योसेफाच्या ताब्यात
दिले. 46 योसेफाने एक तागाचे कापड विकत आणले, येशूंचे शरीर

खाली काढले, तागाच्या वस्त्राने गुंडाळले आणि खडकात खोदलेल्या
एका कबरेत ठेवले. कबरेच्या दाराशी त्याने शिळा लोटून ठेवली. 47
त्यांना कबरेत कुठे ठेवले हे, मरीया मग्दालिया आणि योसेफाची आई
मरीया यांनी पाहिले.

16 शब्बाथ संपल्यानंतर मरीया मग्दालिया, याकोबाची आई मरीया
आणि सलोमी यांनी जाऊन येशूंच्या शरीराला अभिषेक करावा
म्हणून सुगंधी मसाले विकत आणले. 2 आठवड्याच्या पहिल्या दिवशी
पहाटेस, सूर्योदय झाल्यावर त्या कबरेकडे जाण्यास निघाल्या. 3
“आपल्यासाठी कबरेच्या द्वाराशी असलेली धोंड कोण बाजूला करेल?”
याविषयी त्या आपसात चर्चा करीत होत्या. 4 त्यांनी वर पाहिले तेव्हा
जी धोंड अतिशय मोठी होती, ती प्रवेशद्वारातून बाजूला लोटलेली आहे
असे त्यांना दिसले. 5 त्यांनी कबरेच्या आत प्रवेश केला आणि उजव्या
बाजूला चमकदार पांढरी वस्त्रे परिधान केलेला एक तरुण तिथे बसला
होता हे पाहून त्या भयभीत झाल्या. 6 “भिऊ नका,” तो म्हणाला,
“क्रूसावर खिळलेल्या ज्या नासरेथकर येशूंना तुम्ही शोधीत आहात. ते
येथे नाहीत, ते पुन्हा उठले आहेत. त्यांना ठेवले होते ती जागा पाहा!
7 पण जा, ही बातमी त्यांच्या शिष्यांना आणि पेत्रालाही सांगा, ‘ते
तुमच्यापुढे गालीलात जात आहेत. जसे त्यांनी तुम्हाला सांगितले होते
तसे ते तिथे तुम्हाला भेटतील.’” 8 भयभीत होऊन व थरथर कापत त्या
स्त्रिया कबरेपासून पळाल्या. त्यांनी कोणाला काही सांगितले नाही,
कारण त्या घाबरल्या होत्या. 9 **(note: The most reliable and earliest
manuscripts do not include Mark 16:9-20.)** येशू आठवड्याच्या पहिल्या
दिवशी पहाटे पुनरुत्थित झाले. ते सर्वप्रथम ज्या स्त्रीमधून त्यांनी सात
भुते काढली होती त्या मग्दालिया मरीयेला प्रकट झाले. 10 जे लोक
येशूंबरोबर होते आणि जे शोक व विलाप करीत होते, त्यांच्याकडे जाऊन
तिने हे वर्तमान त्यांना सांगितले. 11 येशू जिवंत आहे आणि तिने त्यांना
प्रत्यक्ष बघितले होते, हे जेव्हा त्यांनी ऐकले तेव्हा त्यावर त्यांनी विश्वास
ठेवला नाही. 12 नंतर त्याच दिवशी शहरातून चाललेल्या दोघांना येशूंनी
वेगळ्या रूपात दर्शन दिले. 13 ते परत आले व इतरांना अहवाल दिला,
परंतु त्यांच्यावरही त्यांनी विश्वास ठेवला नाही. 14 नंतर अकरा शिष्य
भोजन करण्यास बसले असताना, येशू त्यांना प्रकट झाले. ज्यांनी त्यांना
मरणातून उठलेले पाहिले होते, त्यांच्या वार्तेवर त्यांनी विश्वास ठेवला
नाही, म्हणून त्यांनी अविश्वास व हृदयाच्या कठीणपणा बद्दल त्यांचा
निषेध केला. 15 ते त्यांना म्हणाले, “सर्व सृष्टीमध्ये जाऊन प्रत्येकाला
शुभवार्तेचा प्रचार करा. 16 जे विश्वास ठेवतील आणि बाप्तिस्मा घेतील,
त्यांचे तारण होईल. पण जे विश्वास ठेवण्यास नकार देतील, ते दंडास
पात्र ठरतील. 17 आणि विश्वास ठेवणाऱ्याबरोबर ही चिन्हे असतील:
माझ्या नावाने ते भुते काढतील आणि नव्या भाषा बोलतील. 18 ते
सापांना आपल्या हातांनी उचलून धरतील; ते कुठलेही प्राणघातक विष
प्याले तरी त्यांच्यावर कसलाही दुष्परिणाम होणार नाही; ते आजाऱ्यांवर
हात ठेवतील व ते बरे होतील.” 19 प्रभू येशू त्यांच्याशी बोलल्यानंतर, ते
स्वर्गात वर घेतले गेले आणि परमेश्वराच्या उजवीकडे बसले. 20 मग
शिष्य सर्वत्र संदेश सांगत फिरले, प्रभू त्यांच्याबरोबर कार्य करीत होते
आणि जी चिन्हे झाली त्यावरून त्यांचे वचन सत्य असल्याची खात्री
होत होती.

# लूक

1 आम्हामध्ये ज्या घटना घडल्या त्यांचा वृतांत संग्रहित करण्याचे
काम अनेकांनी हाती घेतले. 2 या घटनांचे वृतांत प्रत्यक्षात स्वत:च्या
डोळ्यांनी पाहिलेल्या प्रथम साक्षीदारांनी व परमेश्वराच्या वचनाची
सेवा करणाऱ्यांनी आमच्याकडे सोपविलेले आहेत. 3 सन्माननीय
थियफिल, तुमच्यासाठी एक अचूक व अधिकृत वृतांत लिहून काढावा,
हे मनात ठेऊन मी स्वत:सुद्धा प्रत्येक गोष्टीचा अगदी सुरुवातीपासून
बारकाईने व काळजीपूर्वक शोध केला आहे. 4 यासाठी की, ज्यागोष्टी
तुम्हाला शिकविण्यात आल्या आहेत, त्यांची तुम्हाला खात्री होईल.
5 यहूदीयाचा राजा हेरोद याच्या काळात तिथे जखऱ्याह नावाचा एक
याजक होता, तो अबीयाच्या याजकवर्गातील होता; त्याची पत्नी
अलीशिबासुद्धा अहरोनाच्या वंशाची होती. 6 दोघेही परमेश्वराच्या दृष्टीने
नीतिमान असून प्रभूच्या आज्ञा व नियम पालन करण्यामध्ये निर्दोष
होते. 7 त्यांना मूलबाळ नव्हते, कारण अलीशिबा गर्भधारण करू
शकत नव्हती आणि ती दोघेही खूप वयस्कर झालेली होती. 8 एकदा
आपल्या गटाच्या अनुक्रमाने जखऱ्याह परमेश्वरापुढे याजक म्हणून सेवा
करीत असताना, 9 परमेश्वराच्या मंदिरात जाऊन धूप जाळण्यासाठी
याजकांच्या रीतीप्रमाणे चिठ्ठ्या टाकून त्याची निवड करण्यात आली.
10 आणि जेव्हा धूप जाळण्याची वेळ आली तेव्हा, जमलेले सर्व भक्तजन
बाहेर प्रार्थना करीत होते. 11 तेव्हा जखऱ्याहच्या समोर प्रभूचा एक दूत
प्रगट झाला, तो धूपवेदीच्या उजव्या बाजूला उभा राहिला. 12 त्याला
पाहताच जखऱ्याह चकित आणि भयभीत झाला. 13 पण देवदूत त्याला
म्हणाला, “जखऱ्याह भिऊ नकोस, कारण परमेश्वराने तुझी प्रार्थना
ऐकली आहे. तुझी पत्नी अलीशिबा तुझ्यासाठी एक पुत्र प्रसवेल आणि
तू त्याचे नाव योहान असे ठेव. 14 तो तुला आनंद व उल्हास होईल आणि
त्याच्या जन्मामुळे अनेकांना हर्ष वाटेल. 15 तो प्रभूच्या दृष्टीने अतिमहान
होईल. तो कधीही द्राक्षारस किंवा मद्य पिणार नाही आणि मातेच्या
गर्भात असतानाच तो पवित्र आत्म्याने भरून जाईल. 16 तो अनेक
इस्राएली लोकांना प्रभू त्यांच्या परमेश्वराकडे परत घेऊन येईल. 17 तो
एलीयाहच्या आत्म्याने व सामर्थ्याने प्रभूच्या पुढे चालेल, आईवडिलांची
हृदये त्यांच्या लेकरांकडे वळवेल व अवज्ञा करणाऱ्यांना नीतिमानांच्या
ज्ञानाकडे वळवेल व लोकांना प्रभूच्या मार्गाप्रमाणे चालण्यासाठी तयार
करेल.” 18 जखऱ्याह देवदूताला म्हणाला, “मी याबद्दल खात्री कशी
बाळगावी? मी वयस्क मनुष्य आहे आणि माझ्या पत्नीचेही वय होऊन
गेले आहे.” 19 यावर देवदूत म्हणाला, “मी गब्रीएल आहे. मी प्रत्यक्ष
परमेश्वराच्या समक्षतेत उभा असतो आणि तुझ्याबरोबर बोलण्यास व ही
शुभवार्ता तुला सांगण्यासाठी मला पाठविण्यात आले आहे, 20 आणि
आता हे पूर्ण होईल त्या दिवसापर्यंत तू मुका होशील व तुला बोलता
येणार नाही, कारण नेमलेल्या समयी माझे शब्द खरे होतील या माझ्या
शब्दांवर तू विश्वास ठेवला नाही.” 21 इकडे लोक जखऱ्याहची वाट पाहत
होते. तो मंदिरात इतका वेळ का थांबला याचे त्यांना आश्चर्य वाटले.
22 तो बाहेर आला तेव्हा त्याला त्यांच्याशी बोलता येईना. यावरून
त्याने मंदिरात दृष्टान्त पाहिला असेल हे त्यांनी ओळखले, मात्र बोलू न
शकल्यामुळे तो त्यांना खुणा करीत होता. 23 मग त्याच्या सेवाकार्याचा
काळ संपला व तो घरी परतला. 24 त्यानंतर त्याची पत्नी अलीशिबा
गर्भवती झाली आणि पाच महिने एकांतवासात राहिली. 25 ती म्हणाली,
“प्रभूने हे माझ्यासाठी केले आहे, या दिवसांमध्ये त्यांची कृपादृष्टी
मजवर करून लोकांमध्ये होणारी माझी मानहानी दूर केली आहे.” 26
अलीशिबेला गर्भवती होऊन सहा महिने झाले असताना, परमेश्वराने
गब्रीएल दूताला गालील प्रांतातील नासरेथ नावाच्या गावात, 27 एका
कुमारीकडे पाठविले, जिचा विवाह दावीद राजाच्या वंशावळीतील योसेफ
नावाच्या मनुष्याबरोबर निश्चित झाला होता. त्या कुमारीचे नाव मरीया
होते. 28 गब्रीएल देवदूत मरीयेपुढे प्रगट झाला आणि तिला म्हणाला,
“हे कृपा पावलेल्या स्त्रिये, अभिवादन! प्रभू तुझ्याबरोबर आहेत.” 29
देवदूताच्या शब्दांनी मरीया फारच अस्वस्थ झाली आणि हे अभिवादन
कशाप्रकारचे असावे, याविषयी ती विचार करू लागली. 30 देवदूत तिला
म्हणाला, “मरीये, भिऊ नकोस; कारण परमेश्वराची कृपा तुझ्यावर
झाली आहे. 31 तू गर्भधारण करून पुत्राला जन्म देशील आणि त्याचे
नाव येशू ठेवावे. 32 ते परमथोर होतील आणि त्यांना परात्पराचा पुत्र
म्हणतील आणि प्रभू परमेश्वर त्यांना त्यांचा पूर्वज दावीदाचे सिंहासन
देतील. 33 ते याकोबाच्या संतानांवर सदासर्वकाळ राज्य करतील व
त्यांच्या राज्याचा कधीच अंत होणार नाही.” (aiōn g165) 34 मरीयेने
देवदूताला विचारले, “हे कसे होईल? मी तर कुमारिका आहे!” 35
यावर देवदूताने उत्तर दिले, “पवित्र आत्मा तुझ्यावर उतरेल आणि
सर्वोच्च परमेश्वराचे सामर्थ्य तुझ्यावर छाया करेल. त्यामुळे जो पवित्र
पुत्र तुला होणार आहे त्यांना परमेश्वराचा पुत्र म्हणतील. 36 तुझी
नातलग अलीशिबा हिलासुद्धा तिच्या वृद्धापकाळात बाळ होणार आहे
आणि जी गर्भधारणा करू शकत नव्हती, तिला आता सहावा महिना
आहे. 37 कारण परमेश्वराला कोणतेही वचन पूर्ण करणे अशक्य नाही.”
38 मरीया म्हणाली, “मी प्रभूची दासी आहे, तुम्ही जे वचन मला दिले
आहे त्याची पूर्तता होवो.” आणि मग देवदूत तिला सोडून गेला. 39 त्या
दिवसात मरीया लगेच तयारी करून यहूदीयाच्या डोंगराळ भागातील
एका गावाकडे घाईघाईने गेली. 40 तिने जखऱ्याहच्या घरात प्रवेश
करून अलीशिबेला अभिवादन केले. 41 जेव्हा मरीयेचे अभिवादन
अलीशिबेने ऐकले, तेव्हा तिच्या गर्भाशयातील बालकाने उडी मारली
आणि अलीशिबा पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाली. 42 अलीशिबा मोठ्या
आवाजात म्हणाली: “तू सर्व स्त्रियांमध्ये धन्य आहेस आणि जे बाळ
तुझ्या पोटी जन्म घेईल ते धन्य असो. 43 परंतु माझ्या प्रभूच्या आईने
माझ्याकडे यावे ही माझ्यावर किती मोठी कृपा आहे? 44 ज्या क्षणाला
तुझ्या अभिवादनाचा आवाज माझ्या कानाने ऐकला, त्याच क्षणाला
बाळाने माझ्या गर्भात आनंदाने उडी मारली. 45 धन्य आहे ती, कारण
प्रभूने तिला दिलेल्या वचनाची ते पूर्णता करतील असा तिने विश्वास
ठेवला.” 46 मरीया म्हणाली: “माझा आत्मा प्रभूचे गौरव करतो 47

माझा आत्मा माझ्या तारणाऱ्या परमेश्वरामध्ये आनंद करतो, 48 कारण
आता त्यांनी त्यांच्या दासीच्या लीन अवस्थेकडे दृष्टी टाकली आहे.
यापुढे सर्व पिढ्या मला धन्य म्हणतील. 49 कारण ज्या सर्वशक्तिमान
परमेश्वराने माझ्यासाठी महान कृत्ये केली आहेत, त्यांचे नाव पवित्र आहे.
50 त्यांचे भय बाळगणाऱ्यांवर त्यांची करुणा एका पिढीपासून दुसऱ्या
पिढीपर्यंत टिकून राहते. 51 त्यांनी आपल्या बाहूने महान कार्य केले
आहेत; जे अंतर्मनातील विचारांमध्ये गर्विष्ठ आहेत, त्यांना त्यांनी विखुरले
आहे. 52 त्यांनी शासकांना त्यांच्या सिंहासनावरून खाली आणले आहे.
पण नम्रजनांस उच्च केले आहे. 53 भुकेल्यास त्यांनी उत्तम गोष्टींनी
तृप्त केले आहे. परंतु श्रीमंतांना रिकामे पाठविले आहे. 54 त्यांचा सेवक
इस्राएलास दयाळू ते असल्याचे आठवून त्याला साहाय्य पाठविले, 55
जसे आपल्या पूर्वजांना त्यांनी वचन दिले होते, ते अब्राहाम आणि त्यांच्या
संततीवर सदासर्वकाळ राहील.” (aiōn g165) 56 मरीया अलीशिबेजवळ
सुमारे तीन महिने राहिली आणि नंतर ती तिच्या घरी परत गेली. 57
अलीशिबेच्या प्रसूतीची वेळ आली, तेव्हा तिने पुत्राला जन्म दिला. 58
प्रभूने तिच्यावर किती मोठी दया दाखविली हे ऐकून तिचे शेजारी व
नातेवाईक तिच्या आनंदात सामील झाले. 59 मग आठव्या दिवशी जे
बाळाची सुंता करण्यासाठी आले, ते त्याच्या वडिलांचे जखऱ्याह हेच
नाव त्याला देणार होते, 60 पण त्याची आई अलीशिबा म्हणाली, “नाही,
त्याचे नाव योहान आहे.” 61 तेव्हा त्यांनी तिला म्हटले पण, “हे नाव
तुमच्या नातलगात सापडत नाही.” 62 नंतर त्यांनी हातांनी खुणा करून
त्याच्या वडिलांना, बाळाचे नाव काय ठेवायचे आहे असे विचारले. 63
वडिलांनी एक पाटी मागवून त्यावर, “त्याचे नाव योहान आहे” असे
लिहिले आणि प्रत्येकजण आश्चर्यचकित झाला. 64 तत्क्षणी जखऱ्याहचे
तोंड उघडले व त्याची जीभ मोकळी झाली आणि तो बोलू लागला व
परमेश्वराची स्तुती करू लागला. 65 आणि सर्व शेजारी भयभीत झाले
व डोंगराळ यहूदीया प्रदेशात राहणारे, येथील सर्व गोष्टींविषयी बोलू
लागले. 66 ज्या प्रत्येकाने याविषयी ऐकले व नवल करून म्हटले, “हा
बालक पुढे कोण होणार?” कारण प्रभूचा हात त्याजबरोबर होता.
67 नंतर बालकाचा पिता जखऱ्याह पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाला
आणि भविष्यवाणी करू लागला: 68 “प्रभूची स्तुती करा! इस्राएलाच्या
परमेश्वराची स्तुती करा, कारण ते आपल्या लोकांकडे आले आहेत
आणि त्यांनी त्यांच्यासाठी खंडणी भरली आहे. 69 त्यांनी आपला सेवक
दावीदाच्या घराण्यातून आपल्यासाठी तारणाचे शिंग उभारले आहे.
70 जसे त्यांनी फार पूर्वी आपल्या पवित्र संदेष्ट्यांच्याद्वारे सांगितले
होते— (aiōn g165) 71 आमच्या शत्रूपासून आणि आमचा द्वेष करणाऱ्या
सर्वांच्या हातातून आमचा उद्धार करावा, 72 आमच्या पूर्वजांवर दया
करावी आणि त्यांच्या पवित्र कराराची आठवण करावी. 73 आणि त्यांनी
आमचा पूर्वज अब्राहामाला शपथ देऊन वचन दिले: 74 आमच्या शत्रूंच्या
हातून आमची सुटका करावी, आणि समर्थ होऊन निर्भयतेने त्यांची
सेवा करावी, 75 पवित्रपणाने आणि नीतिमत्त्वाने आमचे सर्व दिवस
त्यांच्यासमोर घालवावेत. 76 “आणि तू, माझ्या बाळा, तुला परात्पराचा
संदेष्टा असे म्हणतील; कारण तू प्रभूच्या पुढे जाऊन त्यांचा मार्ग तयार
करशील, 77 त्यांच्या पापांच्या क्षमेद्वारे, त्याच्या लोकांना तारणाचे ज्ञान
देशील. 78 कारण परमेश्वराच्या करुणेमुळे, आपल्यावर स्वर्गातून दिव्य
प्रभातेचा उदय होण्याची वेळ आली आहे. 79 जे अंधारात जगत आहेत,
जे मरणाच्या छायेत आहेत त्यांच्यावर प्रकाश पडावा आणि, आमच्या
पायांना शांतीच्या मार्गाचे मार्गदर्शन प्राप्त व्हावे.” 80 तो बालक वाढत
गेला आणि आत्म्यात बलवान झाला व त्याची वाढ झाली आणि तो
इस्राएली लोकांस जाहीरपणे प्रकट होईपर्यंत अरण्यात राहिला.

**2** त्या दिवसात कैसर औगुस्ताने सर्व जगातील रोमी लोकांची
शिरगणती करावी असा हुकूम काढला. 2 ही पहिली जनगणना
क्विरीनिय हा सीरियाचा राज्यपाल असताना घेण्यात आली होती. 3
तेव्हा प्रत्येकजण आपआपल्या गावी नोंदणी करण्यासाठी गेले. 4
योसेफसुद्धा दावीदाच्या घराण्यातील व वंशातील असल्यामुळे, तो
यहूदीया प्रांतातील गालीलातील नासरेथ या दावीदाच्या गावी बेथलेहेम
येथे वर गेला. 5 नाव नोंदणीसाठी त्याने आपली भावी वधू मरीया
हिला बरोबर घेतले कारण तिला लवकरच बाळ होणे अपेक्षित होते.
6 जेव्हा ते त्या ठिकाणी होते, तेव्हा बाळाचा जन्म होण्याची वेळ
आली, 7 आणि तिने आपल्या प्रथमपुत्राला जन्म दिला. तिने त्याला
गोठ्यातील गव्हाणीत ठेवले, कारण तिथे त्यांच्यासाठी विश्रांतिगृह
उपलब्ध नव्हते. 8 आणि त्या भागात मेंढपाळ रानात राहून, रात्रीच्या
समयी त्यांचे कळप राखीत होते. 9 इतक्यात त्यांच्यामध्ये प्रभूचा
देवदूत प्रकट झाला आणि परमेश्वराचे गौरव त्यांच्याभोवती प्रकाशले
आणि ते अत्यंत भयभीत झाले. 10 परंतु देवदूत मेंढपाळांना म्हणाला,
“भिऊ नका. मी तुमच्यासाठी एक शुभवार्ता आणली आहे, ज्यामुळे सर्व
लोकांना मोठा हर्ष होईल. 11 आज दावीदाच्या नगरात तुमच्यासाठी
तारणारा जन्मला आहे; तोच ख्रिस्त प्रभू आहे. 12 त्याची खूण ही
आहे: बाळंत्याने गुंडाळलेले व गव्हाणीत निजविलेले असे बालक
तुम्हाला सापडेल.” 13 अचानक त्या दूताबरोबर स्वर्गदूतांचा एक
मोठा समूह त्यांना दिसला, ते परमेश्वराची स्तुती करीत म्हणाले, 14
“सर्वोच्च स्वर्गामध्ये परमेश्वराला गौरव, आणि पृथ्वीवर ज्यांच्यावर
त्यांची कृपादृष्टी झाली आहे, त्यांना शांती असो.” 15 देवदूत त्यांना
सोडून स्वर्गात वर गेल्यानंतर, मेंढपाळ एकमेकास म्हणू लागले: “चला,
आपण बेथलेहेमला जाऊ आणि प्रभूने सांगितलेली ही जी घटना घडली
आहे, ती प्रत्यक्ष पाहू.” 16 ते घाईघाईने गेले आणि ज्या ठिकाणी
ते बालक गव्हाणीत निजले होते तिथे त्यांनी मरीया आणि योसेफ
यांना शोधून काढले. 17 त्यांनी त्या बालकाला पाहिल्यानंतर, त्या
बालकाविषयी त्यांना जे काही सांगण्यात आले होते, ते सर्वठिकाणी
विदित केले. 18 मेंढपाळांनी जे सांगितले व ज्यांनी ऐकले ते सर्वजण
आश्चर्यचकित झाले. 19 परंतु मरीयेने ते सर्व आपल्या हृदयात साठवून
ठेवले आणि त्यावर ती विचार करीत असे. 20 मेंढपाळांना जे सांगण्यात
आले होते, त्याप्रमाणे सर्वगोष्टी घडल्या व त्यांनी सर्वगोष्टी ऐकल्या
व पाहिल्यानंतर ते परमेश्वराचे गौरव व स्तुती करीत परत गेले. 21

आठव्या दिवशी, बालकाची सुंता करण्याची वेळ आली, त्यावेळी त्यांचे
नाव येशू ठेवण्यात आले, हे नाव त्यांना त्यांची गर्भधारणा होण्यापूर्वीच
देवदूताने दिले होते. 22 मोशेच्या नियमशास्त्रात सांगितल्याप्रमाणे
शुद्धीकरणाच्या अर्पणाची वेळ आली, तेव्हा त्यांच्या आईवडिलांनी
त्याला प्रभूला सादर करण्यासाठी यरुशलेमला नेले. 23 कारण प्रभूच्या
नियमात असे लिहिलेले आहे, “प्रत्येक प्रथम जन्मलेला पुत्र प्रभूला
समर्पित केला पाहिजे.” 24 प्रभूच्या नियमशास्त्रात सांगितल्याप्रमाणे
हे अर्पण: “दोन कबुतरे किंवा पारव्याची दोन पिल्ले,” असे होते. 25
यरुशलेम येथे शिमोन नावाचा एक मनुष्य होता, तो नीतिमान आणि
भक्तिमान होता व इस्राएलाच्या सांत्वनाची वाट पाहत असून पवित्र
आत्मा त्याजवर होता. 26 कारण प्रभू ख्रिस्ताला पाहिल्याशिवाय तुला
मरण येणार नाही, असे पवित्र आत्म्याने त्याला प्रकट केले होते. 27
पवित्र आत्म्याने प्रवृत्त होऊन तो मंदिराच्या परिसरात गेला. तेव्हा
आईवडिलांनी नियमशास्त्रात सांगितलेला विधी पूर्ण करण्यासाठी येशू
बाळाला मंदिरात आणले, 28 तेव्हा शिमोनाने बाळाला आपल्या हातात
घेतले आणि परमेश्वराची स्तुती करीत म्हटले: 29 “हे सर्वशक्तिमान प्रभू,
तुमच्या वचनाप्रमाणे आता तुमच्या सेवकाला शांतीने घेऊन जावे. 30 मी
तुमचे तारण माझ्या डोळ्यांनी पाहिले आहे. 31 जे तुम्ही सर्व राष्ट्रांच्या
नजरेसमोर सिद्ध केले आहे, 32 ते गैरयहूदीयांसाठी प्रकटीकरणाचा
प्रकाश, आणि आपल्या इस्राएली लोकांचे गौरव आहे.” 33 आपल्या
पुत्राविषयी हे बोलणे ऐकून योसेफ आणि मरीया आश्चर्यचकित झाले.
34 मग शिमोनाने त्यांना आशीर्वाद दिला आणि बाळाची आई मरीयाला
म्हणाला: “इस्राएलमध्ये अनेकांचे पतन व पुन्हा उठणे आणि ज्या
विरुद्ध लोक बोलतील, हा असे चिन्ह होईल, यासाठी या बालकाला
नेमून ठेवले आहे. 35 यावेळी अनेकांच्या हृदयातील विचार उघड केले
जातील व तुझ्या जिवातून तलवार भोसकली जाईल.” 36 त्यावेळी
हन्ना एक संदेष्टी होती, ती आशेर वंशातील फनूएलाची कन्या असून
फार वयोवृद्ध होती. विवाहानंतर सात वर्षे ती तिच्या पतीबरोबर राहिली
होती. 37 आणि चौऱ्याऐंशी वर्षापर्यंत विधवा होती. तिने मंदिर कधीच
न सोडता, रात्रंदिवस प्रार्थना व उपास करून परमेश्वराची आराधना
केली. 38 तिने त्यावेळी तिथे येऊन, परमेश्वराची उपकारस्तुती केली
आणि जे यरुशलेमची सुटका होण्याची वाट पाहत होते त्या प्रत्येकाला
त्या बाळाविषयी सांगू लागली. 39 येशूंच्या आईवडिलांनी प्रभूच्या
नियमशास्त्राप्रमाणे सर्वकाही केल्यानंतर ते गालीलातील नासरेथ गावी
आपल्या घरी परत आले. 40 तो बालक वाढत गेला आणि बलवान
झाला; तो शहाणपणाने भरलेला होता आणि त्याच्यावर परमेश्वराची
कृपा होती. 41 येशूंचे आईवडील दरवर्षी वल्हांडण सणासाठी यरुशलेम
येथे जात. 42 जेव्हा येशू बारा वर्षांचे होते, तेव्हा रिवाजाप्रमाणे ते
सणासाठी तिथे गेले. 43 सण संपल्यानंतर येशूंचे आईवडील घरी परत
जात असताना, येशू यरुशलेमातच मागे राहिले आहेत याची त्यांना
कल्पना नव्हती. 44 ते त्यांच्याच बरोबर येत आहेत, असा विचार करून
एक दिवसाची वाट चालून गेले. तेव्हा त्यांनी त्यांच्या नातेवाईकांकडे
आणि मित्रमंडळींकडे त्याला शोधण्यास सुरुवात केली. 45 पण त्यांना ते
कुठेच सापडले नाही, म्हणून ते त्यांना शोधण्यासाठी परत यरुशलेमला
गेले. 46 तीन दिवसानंतर त्यांना ते मंदिराच्या परिसरात सापडले,
शिक्षकांमध्ये बसून आणि त्यांचे ऐकून त्यांना ते प्रश्न विचारत होते. 47
प्रत्येकजण जो त्यांचे ऐकत होता तो त्यांची बुद्धी आणि त्यांच्या उत्तरांनी
आश्चर्यचकित झाला होता. 48 त्यांना पाहून त्यांचे आईवडील विस्मित
झाले. आईने विचारले, “मुला, तू आमच्याशी असा का वागलास? तुझे
वडील आणि मी चिंतित होऊन तुला शोधत आहोत.” 49 त्यांनी म्हटले,
“तुम्ही माझा शोध का केला? मी माझ्या पित्याच्या घरामध्ये असावे, हे
तुमच्या लक्षात कसे आले नाही?” 50 परंतु ते त्यांना काय सांगत होते
ते त्यांना समजले नाही. 51 नंतर ते आईवडिलांबरोबर नासरेथला आले
आणि त्यांच्या आज्ञेत राहिले. त्यांच्या आईने या सर्वगोष्टी आपल्या
हृदयात साठवून ठेवल्या. 52 आणि येशू ज्ञानाने व शरीराने परमेश्वराच्या
व मनुष्याच्या कृपेत वाढले.

**3** तिबिर्य कैसराच्या कारकिर्दीच्या पंधराव्या वर्षी—ज्यावेळी पिलात
यहूदीयाचा राज्यपाल होता, हेरोद गालील प्रांताचा, त्याचा भाऊ
फिलिप्प इतुरीया व त्राखोनीतीचा आणि लूसनिया अबिलेनेचा शासक
होता. 2 हन्ना व कयफा हे महायाजक पदावर होते. यावेळी जखऱ्याहचा
पुत्र योहानास अरण्यात परमेश्वराचे वचन प्राप्त झाले. 3 आणि तो
यार्देनेच्या आसपासच्या सर्व प्रदेशात, पापक्षमेसाठी पश्चात्तापाच्या
बाप्तिस्म्याचा संदेश देत फिरला. 4 यशायाह संदेष्ट्याच्या शब्दांच्या
पुस्तकात लिहिले आहे: “अरण्यात घोषणा करणाऱ्या एकाची वाणी
झाली, ‘प्रभूसाठी मार्ग तयार करा, त्यांच्यासाठी मार्ग सरळ करा. 5
प्रत्येक दरी भरून जाईल, प्रत्येक डोंगर आणि टेकडी समान होतील,
वाकड्या वाटा सरळ होतील, खडतर रस्ते सुरळीत होतील. 6 आणि
सर्व लोक परमेश्वराचे तारण पाहतील.’” 7 त्याच्याकडून बाप्तिस्मा
घेण्यासाठी आलेल्या समुदायास योहान म्हणाला, “अहो सापांच्या
पिलांनो, येणाऱ्या क्रोधापासून पळून जाण्यास तुम्हाला कोणी सावध
केले? 8 पश्चात्तापाला साजेल अशी फळे द्या. ‘आमचा पिता तर अब्राहाम
आहे,’ असे आपल्या मनात म्हणू नका. कारण मी तुम्हाला सांगतो
की, परमेश्वर या दगडांपासून देखील अब्राहामासाठी संतती निर्माण
करण्यास समर्थ आहे. 9 कुऱ्हाड आधीच झाडांच्या मुळावर ठेवलेली
आहे आणि प्रत्येक झाड जे चांगले फळ देत नाही ते तोडले जाईल आणि
अग्नीत टाकण्यात येईल.” 10 यावर समुदायाने त्याला विचारले, “तर
मग आम्ही काय करावे?” 11 यावर योहानाने उत्तर दिले, “तुमच्याजवळ
दोन अंगरखे असतील, तर ज्याच्याजवळ एकही नाही त्याला द्यावा,
तुमच्याजवळ अन्न असेल, तर त्यांनीही तसेच करावे.” 12 जकातदारही
बाप्तिस्मा घेण्यासाठी आले आणि त्यांनी त्याला विचारले, “गुरुजी,
आम्ही काय करावे?” 13 योहानाने उत्तर दिले, “जे जमा करावयाचे
आहे, त्यापेक्षा अधिक घेऊ नका.” 14 काही शिपायांनी विचारले,
“आम्ही काय करावे?” योहानाने उत्तर दिले. “धमक्या देऊन किंवा
खोटे आरोप रचून पैसा उकळू नका आणि आपल्या वेतनात संतुष्ट

राहा.” 15 लोक अपेक्षेने वाट पाहत होते आणि त्यांच्या मनात आश्चर्य
करीत होते की कदाचित योहानच ख्रिस्त असले पाहिजे. 16 योहानाने
त्या सर्वांना उत्तर दिले, “मी तुमचा बाप्तिस्मा पाण्याने करतो. परंतु
जे माझ्यापेक्षा अधिक सामर्थ्यवान आहेत ते येतील, त्यांचा गुलाम
होऊन त्यांच्या पादत्राणाचे बंद सोडण्याचीही माझी योग्यता नाही. ते
तुमचा बाप्तिस्मा पवित्र आत्म्याने आणि अग्नीने करतील. 17 खळे
स्वच्छ करण्यास त्यांच्या हातात धान्य पाखडण्याचे सूप आहे, ते गहू
कोठारात साठवतील आणि न विझणाऱ्या अग्नीमध्ये भुसा जाळून
टाकतील.” 18 दुसऱ्या अनेक शब्दांनी योहानाने लोकांना बोध केला
आणि जाहीरपणे शुभवार्ता सांगितली. 19 योहानाने मांडलिक हेरोदाला
दोष दिला, कारण त्याने आपल्या भावाची पत्नी हेरोदिया हिच्याशी
विवाह केला आणि इतर अनेक वाईट गोष्टी केल्या, 20 या सर्वांमध्ये
हेरोदाने आणखी भर घातली: त्याने योहानाला तुरुंगात टाकले. 21
जेव्हा सर्व लोक बाप्तिस्मा घेत होते त्यावेळी येशूंचाही बाप्तिस्मा झाला
आणि येशू प्रार्थना करीत असताना स्वर्ग उघडला, 22 आणि पवित्र
आत्मा कबुतरासारखा शारीरिक रूपामध्ये त्यांच्यावर स्थिरावला आणि
स्वर्गातून एक वाणी झाली, “तू माझा प्रिय पुत्र आहेस, तुझ्यावर मी
संतुष्ट आहे.” 23 येशूंनी आपले कार्य सुरू केले, त्यावेळी ते सुमारे तीस
वर्षांचे होते. त्यांच्या वडिलांचे नाव योसेफ आहे, असे लोक समजत
असत. योसेफ हा एलीचा पुत्र होता. 24 एली हा मत्ताथाचा पुत्र, तो
लेवीचा पुत्र, तो मल्खीचा पुत्र, तो यन्नयाचा पुत्र, तो योसेफाचा पुत्र, 25
तो मत्तिथ्याहचा पुत्र, तो आमोसाचा पुत्र, तो नहुमाचा पुत्र, तो हेस्लीचा
पुत्र, तो नग्गयाचा पुत्र, 26 तो महथाचा पुत्र, तो मत्तिथ्याहचा पुत्र, तो
शिमयीचा पुत्र, तो योसेखाचा पुत्र, तो योदाचा पुत्र, 27 तो योहानाचा
पुत्र, तो रेशाचा पुत्र, तो जरूब्बाबेलाचा पुत्र, तो शल्तीएलचा पुत्र,
तो नेरीचा पुत्र, 28 तो मल्खीचा पुत्र, तो अद्दीचा पुत्र, तो कोसामाचा
पुत्र, तो एल्मदामाचा पुत्र, तो एराचा पुत्र, 29 तो यहोशुआचा पुत्र, तो
एलिएजराचा पुत्र, तो योरिमाचा पुत्र, तो मत्ताथाचा पुत्र, तो लेवीचा
पुत्र, 30 तो शिमोनाचा पुत्र, तो यहूदाहचा पुत्र, तो योसेफाचा पुत्र, तो
योनामाचा पुत्र, तो एल्याकीमचा पुत्र, 31 तो मल्याचा पुत्र, तो मिन्नाचा
पुत्र, तो मत्ताथाचा पुत्र, तो नाथानाचा पुत्र, तो दावीदाचा पुत्र, 32 तो
इशायाचा पुत्र, तो ओबेदाचा पुत्र, तो बवाजाचा पुत्र, तो सल्मोनाचा पुत्र,
तो नहशोनाचा पुत्र, 33 तो अम्मीनादाबाचा, हा अम्मीनादाब रामाचा
पुत्र, तो हेस्रोनाचा, तो पेरेसाचा, तो यहूदाहचा, 34 तो याकोबाचा पुत्र,
तो इसहाकाचा पुत्र, तो अब्राहामाचा पुत्र, तो तेरहाचा पुत्र, तो नाहोराचा
पुत्र, 35 तो सरुगाचा पुत्र, तो रऊचा पुत्र, तो पेलेगाचा पुत्र, तो एवराचा
पुत्र, तो शेलहाचा पुत्र, 36 तो केनानाचा पुत्र, तो अर्पक्षदाचा पुत्र, तो
शेमाचा पुत्र, तो नोआहचा पुत्र, तो लामेखाचा पुत्र, 37 तो मथुशलहाचा
पुत्र, तो हनोखाचा पुत्र, तो यारेदाचा पुत्र, तो महललेलाचा पुत्र, तो
केनानाचा पुत्र, 38 तो एनोशाचा पुत्र, तो शेथाचा पुत्र, तो आदामाचा
पुत्र, तो परमेश्वराचा पुत्र होता.

4 पवित्र आत्म्याने भरलेल्या येशूंनी यार्देन सोडले आणि आत्म्याने
त्यांना अरण्यात नेले, 2 तिथे चाळीस दिवस सैतानाने त्यांची परीक्षा
घेतली. या दिवसांमध्ये त्यांनी काही खाल्ले नाही आणि ते संपल्यानंतर
त्यांना भूक लागली. 3 सैतान येशूंना म्हणाला, “जर तू परमेश्वराचा पुत्र
असशील, तर या दगडाला भाकर होण्यास सांग.” 4 पण येशूंनी उत्तर
दिले, “असे लिहिले आहे: ‘मनुष्य केवळ भाकरीने जगत नाही.’” 5
नंतर सैतानाने येशूंना एका उंच ठिकाणी नेऊन जगातील सर्व राज्ये
एका क्षणात दाखविली. 6 आणि सैतानाने त्यांना म्हटले, “मी तुला या
सर्वांवर अधिकार व वैभव देईन; कारण ती मला देण्यात आली आहेत
आणि ज्याला पाहिजे त्याला मी देऊ शकतो. 7 जर तू माझी उपासना
करशील, तर हे सगळे तुझेच होईल.” 8 येशूंनी उत्तर दिले, “असे लिहिले
आहे, ‘केवळ प्रभू तुझ्या परमेश्वरांनाच नमन कर आणि त्यांचीच सेवा
कर.’” 9 मग सैतानाने त्याला यरुशलेमास नेऊन मंदिराच्या सर्वात उंच
टोकावर उभे केले आणि तो म्हणाला, “तू परमेश्वराचा पुत्र आहेस, तर
येथून खाली उडी टाक,” 10 कारण असे लिहिले आहे: “‘तुझे रक्षण
व्हावे म्हणून तो आपल्या देवदूतांना तुझ्यासंबंधाने आज्ञा देईल; 11 तुझ्या
पायाला दगडाची ठेच लागू नये, म्हणून ते तुला आपल्या हातांवर उचलून
धरतील.’” 12 येशूंनी उत्तर दिले, “असे म्हटले आहे: ‘प्रभू तुमच्या
परमेश्वराची परीक्षा पाहू नका.’” 13 या सर्व परीक्षा संपल्यानंतर, योग्य
संधी मिळेपर्यंत सैतान त्यांना सोडून निघून गेला. 14 यानंतर पवित्र
आत्म्याच्या शक्तीने भरलेले येशू गालील प्रांतात परतले आणि त्यांची
किर्ती चहूकडील सर्व प्रांतात पसरली. 15 ते त्यांच्या सभागृहांमध्ये
शिक्षण देत होते आणि प्रत्येकाने त्यांची स्तुती केली. 16 ज्या नासरेथ
गावी त्यांची वाढ झाली होती, तिथे ते आले व नेहमीप्रमाणे शब्बाथ
दिवशी आपल्या प्रथेप्रमाणे सभागृहामध्ये पवित्रशास्त्र वाचण्यासाठी
उभे राहिले. 17 यशायाह संदेष्ट्याचे भविष्य असलेल्या अभिलेखाची
गुंडाळी त्यांच्या हाती देण्यात आली आणि त्यांनी ती उघडली, ज्यात
असे लिहिलेले होते: 18 “परमेश्वराचा आत्मा मजवर आहे, कारण
गरिबांना शुभवार्ता सांगण्यासाठी प्रभूने माझा अभिषेक केला आहे.
कैद्यांना सुटका जाहीर करण्यासाठी, अंधांना दृष्टी देण्यासाठी, त्यांनी
मला पाठविले आहे. 19 प्रभूच्या कृपेचे वर्ष जाहीर करण्यास पाठविले
आहे.” 20 नंतर गुंडाळी गुंडाळून, ती सेवकाकडे दिली व ते खाली बसले.
सभागृहामधील प्रत्येक व्यक्तीची नजर त्यांच्यावर एकवटली होती. 21
येशू पुढे त्यांना म्हणाले, “हा शास्त्रलेख जो आज तुम्ही ऐकत आहात,
तो पूर्ण झाला आहे.” 22 सर्व लोक त्यांच्याबद्दल चांगले बोलले आणि
कृपेची वचने त्यांच्या मुखातून बाहेर पडली हे ऐकून विस्मित झाले. ते
म्हणाले, “हा योसेफाचा पुत्र आहे ना?” 23 येशू त्यांना म्हणाले, “तुम्ही
मला ही म्हण लागू कराल: अरे ‘वैद्या, तू स्वतःलाच बरे कर!’ आणि
तुम्ही मला म्हणाल, ‘ज्याकाही गोष्टी तुम्ही कफर्णहूम या गावात केल्या
त्याविषयी आम्ही ऐकले आहे, त्या गोष्टी येथे स्वतःच्या गावात करा.’”
24 “पण मी तुम्हाला निश्चित सांगतो,” ते पुढे म्हणाले, “संदेष्ट्याला
स्वतःच्या गावी सन्मान मिळत नाही. 25 हे मी खात्रीपूर्वक सांगतो,

जेव्हा साडेतीन वर्षे आकाश बंद झाले व सर्व देशभर भयंकर दुष्काळ
पडला होता, त्यावेळी इस्राएलमध्ये एलीयाहच्या काळात अनेक विधवा
होत्या. 26 तरीही एलीयाहला कोणाकडे पाठविले नाही, पण सीदोन
प्रदेशातील सारफथ येथील विधवेकडे पाठविले. 27 आणि त्याचप्रमाणे
संदेष्टा अलीशाच्या काळात इस्राएलमध्ये अनेक कुष्ठरोगी होते पण
त्यांच्यापैकी कोणी शुद्ध झाला नाही—केवळ सिरिया देशातील नामान.”
28 जेव्हा त्यांनी हे ऐकले तेव्हा सभागृहातील सर्व लोक संतप्त झाले. 29
ते उठले, त्याला नगराबाहेर घालविले व ज्या टेकडीवर ते शहर वसले
होते, त्या टेकडीच्या कड्यावरून ढकलून देण्यासाठी घेऊन आले. 30
पण ते भरगर्दीतून चालतच त्यांच्या मार्गाने निघून गेले. 31 नंतर येशू
खाली गालील प्रांतातील कफर्णहूम येथे गेले आणि शब्बाथ दिवशी
लोकांना शिकवू लागले. 32 येथेही लोक त्यांच्या शिकवणीवरून थक्क
झाले, कारण त्यांच्या शब्दांमध्ये अधिकार होता. 33 सभागृहामध्ये
भुताने पछाडलेला, अशुद्ध आत्मा लागलेला, एक मनुष्य होता तो
उच्चस्वराने म्हणाला, 34 “नासरेथकर येशू येथून निघून जा! तुम्हाला
आमच्याशी काय काम? आमचा नाश करावयास आले आहात काय?
तुम्ही कोण आहात हे मला माहीत आहे—परमेश्वराचा पवित्रजन!” 35
“गप्प राहा!” येशूंनी धमकाविले, “यातून बाहेर ये!” मग त्या भुताने त्या
मनुष्याला सर्वांसमोर खाली पाडले आणि त्याला काहीही उपद्रव न
करता तो निघून गेला. 36 सर्व लोक चकित झाले आणि आपसात म्हणू
लागले, “हे काय आहे! काय हा अधिकार आणि त्यांच्या शक्तीने ते
अशुद्ध आत्म्यांना आदेश देतात व ते बाहेर येतात!” 37 त्यांच्याबद्दलची
बातमी त्या आसपासच्या प्रदेशात पसरत गेली. 38 येशू सभागृहातून
बाहेर पडल्यानंतर शिमोनाच्या घरी गेले. तिथे शिमोनाची सासू तापाने
फणफणली होती, तिला मदत करावी असे त्यांनी येशूंना सांगितले. 39
त्यांनी तिच्यावर वाकून तापाला धमकाविले व तिचा ताप नाहीसा झाला.
ती लगेच उठली आणि त्यांची सेवा करू लागली. 40 सूर्यास्ताच्या वेळी,
लोकांनी ज्यांना वेगवेगळ्या प्रकारचे आजार होते त्या सर्वांना येशूंकडे
आणले आणि त्यांनी त्या प्रत्येकावर हात ठेऊन त्यांना बरे केले. 41
याशिवाय, लोकांमधून पुष्कळ भुतेही, “तुम्ही परमेश्वराचा पुत्र आहात!”
असे ओरडून बाहेर आले. येशूंनी त्यांना धमकाविले व बोलण्यास सक्त
मनाई केली, कारण ते ख्रिस्त आहे, हे त्यांना माहीत होते. 42 पहाटेच,
येशू एकांतस्थळी गेले. लोक त्यांना शोधीत जिथे ते होते तिथे गेले. तेव्हा
येशू त्यांना सोडून निघून जाऊ नये म्हणून प्रयत्न केले. 43 पण त्यांनी
उत्तर दिले, “मला परमेश्वराच्या राज्याची शुभवार्ता दुसऱ्या गावांमध्येही
सांगितली पाहिजे, कारण त्यासाठीच मला पाठविले आहे.” 44 आणि ते
सर्व यहूदीया प्रांतातील प्रत्येक सभागृहांमध्ये उपदेश करीत राहिले.

**5** एके दिवशी येशू गनेसरेत सरोवराच्या किनाऱ्यावर उभे होते,
परमेश्वराचे वचन ऐकण्यासाठी लोकांनी त्यांच्याभोवती गर्दी केली.
2 त्यांनी पाण्याच्या कडेला कोळयांनी ठेवलेल्या दोन होड्या पाहिल्या,
कारण कोळी आपली जाळी धूत होते. 3 त्यापैकी एका होडीत ते
बसले जी शिमोनाची होती आणि ती काठापासून थोडीशी बाजूला
करावी असे त्यांनी शिमोनाला सांगितले. मग त्या होडीत बसून त्यांनी
लोकांना शिक्षण दिले. 4 येशूंनी आपले बोलणे संपविल्यानंतर, ते
शिमोनास म्हणाले, “होडी खोल पाण्यात ने आणि मासे पकडण्यासाठी
जाळी टाक.” 5 शिमोनाने उत्तर दिले, “गुरुजी, आम्ही रात्रभर परिश्रम
केले, पण काहीच हाती लागले नाही. पण तुम्ही सांगता, म्हणून जाळे
टाकतो.” 6 तसे केल्यानंतर त्यांनी इतक्या मोठ्या संख्येने मासे पकडले
की त्यांच्या जाळया फाटू लागल्या. 7 जे सहकारी दुसऱ्या होडीत होते,
त्यांनी येऊन आपल्याला मदत करावी म्हणून त्यांनी त्यांना इशारा केला
आणि लवकरच त्या दोन होड्या माशांनी इतक्या गच्च भरल्या की
बुडू लागल्या. 8 शिमोन पेत्राने हे पाहिले, तेव्हा त्याने येशूंच्या पुढे
गुडघे टेकले आणि म्हणाला, “प्रभू कृपा करून, माझ्यापासून दूर जा,
कारण मी पापी मनुष्य आहे!” 9 कारण त्यांनी धरलेले पुष्कळ मासे
पाहून, तो आणि त्याच्या बरोबरचे इतर जोडीदार आश्चर्यचकित झाले
होते; 10 आणि त्याचबरोबर शिमोनाचे भागीदार जब्दीचे पुत्र याकोब
आणि योहान यांनाही आश्चर्य वाटले होते. येशू शिमोनाला म्हणाले,
“भिऊ नको, येथून पुढे मी तुला माणसे धरणारा करेन.” 11 त्यांनी होडी
काठाला लावल्यावर सर्वकाही तिथेच सोडले आणि ते त्यांच्यामागे गेले.
12 येशू एका गावात असता एक कुष्ठरोगाने भरलेला मनुष्य तिथे आला.
त्याने येशूंना पाहिले, तेव्हा त्यांच्यापुढे गुडघे टेकून म्हणाला, “प्रभू, जर
तुमची इच्छा असेल, तर मला शुद्ध करण्यास तुम्ही समर्थ आहात.” 13
येशूंनी आपला हात लांब करून त्याला स्पर्श केला आणि म्हटले, “माझी
इच्छा आहे. शुद्ध हो!” आणि तत्काळ त्याचा कुष्ठरोग निघून गेला. 14
नंतर येशूंनी त्याला निक्षून सांगितले, “हे कोणाला सांगू नकोस, पण
जा, मोशेच्या नियमशास्त्राप्रमाणे कुष्ठरोग बरे झाल्यानंतर जे अर्पण
करावयाचे असते ते कर, म्हणजे तू शुद्ध झाला आहेस, याचे प्रमाण
प्रत्येकाला पटेल.” 15 तरीपण येशूंविषयीचे वर्तमान अधिकच पसरत
गेले, त्यामुळे त्यांचे ऐकण्यासाठी व रोगमुक्त होण्यासाठी लोकसमुदाय
येऊ लागले. 16 परंतु बरेचदा येशू प्रार्थना करण्यासाठी एकांतात
जात असत. 17 एके दिवशी येशू शिक्षण देत असताना, परूशी आणि
नियमशास्त्राचे शिक्षक तिथे बसले होते. ते गालील आणि यहूदीया
प्रांतातील प्रत्येक खेड्यातून, तसेच यरुशलेमातूनही आले होते. आजारी
लोकांना निरोगी करण्याचे प्रभूचे सामर्थ्य येशूंच्या ठायी होते. 18 काही
लोकांनी एका पक्षघाती मनुष्याला खाटेवर घेऊन त्याला घरात येशूंच्या
समोर ठेवण्याचा प्रयत्न केला. 19 जेव्हा गर्दी असल्यामुळे ते मार्ग काढू
शकले नाहीत, म्हणून ते छतावर चढले आणि घराच्या कौलातून त्यांनी
त्याला अंथरुणासहित येशूंच्या पुढे गर्दीमध्ये खाली सोडले. 20 जेव्हा
येशूंनी त्यांचा विश्वास पाहिला तेव्हा ते म्हणाले, “मित्रा, तुझ्या पापांची
क्षमा झाली आहे.” 21 यावेळी परूशी व नियमशास्त्र शिक्षक आपसात
विचार करू लागले, “दुर्भाषण करणारा हा कोण आहे? परमेश्वराशिवाय
पापांची क्षमा कोण करू शकतो?” 22 ते काय विचार करीत होते हे
येशूंनी ओळखले आणि त्यांना विचारले, “तुम्ही तुमच्या मनामध्ये या
गोष्टींचा विचार का करता? 23 यातून कोणते म्हणणे सोपे आहे ‘तुझ्या

पापांची क्षमा झाली आहे,’ किंवा ‘ऊठ आपली बाज उचलून चालू लाग?’
24 तुम्हाला हे समजण्याची गरज आहे की मानवपुत्राला पृथ्वीवर पापांची
क्षमा करण्याचा अधिकार आहे.” ते पक्षघाती मनुष्याला म्हणाले,
“ऊठ, आपले अंथरूण उचल आणि घरी जा.” 25 त्याचवेळी तो
त्यांच्यासमोर उभा राहिला आणि ज्या बिछान्यावर तो झोपत असे, ते
घेऊन परमेश्वराची स्तुती करीत घरी गेला. 26 सर्व लोक चकित झाले
आणि त्यांनी परमेश्वराची स्तुती केली. तेव्हा सर्वांना भय प्राप्त झाले व
म्हणाले, “आज आम्ही अद्भुत गोष्टी पाहिल्या आहेत.” 27 नंतर येशू
तिथून बाहेर गेले व जकातीच्या नाक्यावर एक जकातदार ज्याचे नाव
लेवी होते तो त्यांच्या दृष्टीस पडला. येशू त्याला म्हणाले, “माझ्यामागे
ये.” 28 तेव्हा लेवी उठला व सर्वकाही टाकून त्यांना अनुसरला. 29
नंतर लेवीने आपल्या घरी येशूंसाठी एक भव्य मेजवानी आयोजित
केली. त्या ठिकाणी लेवीचे अनेक सहकारी जकातदार आणि इतर
पाहुणे येशूंबरोबर भोजन करत होते. 30 तरी त्या पंथाचे परूशी आणि
नियमशास्त्र शिक्षक यांनी शिष्यांजवळ तक्रार केली, “तुम्ही जकातदार
व पापी लोकांबरोबर खाणे व पिणे का करता?” 31 येशूंनी त्यांना उत्तर
दिले, “जे निरोगी आहेत त्यांना वैद्याची गरज नसते, परंतु रोग्यास असते.
32 मी नीतिमानांस नव्हे, तर पापी जनास पश्चात्तापासाठी बोलविण्यास
आलो आहे.” 33 ते येशूंना म्हणाले, “योहानाचे शिष्य वारंवार उपास
व प्रार्थना करतात आणि परूश्यांचे शिष्य उपास करतात, परंतु तुमचे
शिष्य मात्र खातात व पितात.” 34 यावर येशूंनी त्यांना विचारले, “वराचे
मित्र त्यांच्याबरोबर वर असताना उपवास कसे करतील? 35 तरी अशी
वेळ येत आहे, की त्यावेळी वर त्यांच्यापासून काढून घेण्यात येईल
आणि मग ते उपास करतील.” 36 नंतर येशूंनी त्यांना एक दाखला
सांगितला: ते म्हणाले, “नवीन कापडाचा तुकडा घेऊन जुन्या कापडाला
ठिगळ म्हणून कोणीही लावत नाही. कारण ते ठिगळ वस्त्राला फाडील
आणि छिद्र अधिक मोठे होईल. 37 कोणीही नवा द्राक्षारस जुन्या
बुधल्यांमध्ये ओतीत नाही. नाही तर, नवीन द्राक्षारसामुळे बुधले फुटून
जातील; द्राक्षारस वाहून जाईल आणि बुधल्यांचा नाश होईल. 38 तसे
होऊ नये, म्हणून नवा द्राक्षारस नवीन बुधल्यांमध्ये ओततात. 39 जुना
द्राक्षारस प्याल्यानंतर कोणालाही नवा द्राक्षारस घ्यावासा वाटत नाही.
ते म्हणतात, ‘जुना द्राक्षारसच उत्तम आहे.’”

**6** एका शब्बाथ दिवशी येशू धान्याच्या शेतामधून जात होते आणि त्यांचे
शिष्य गव्हाची काही कणसे तोडून हातांवर चोळून दाणे खाऊ लागले.
2 ते पाहून परूशी म्हणाले, “तुम्ही शब्बाथ दिवशी जे नियमशास्त्राविरुद्ध
आहे ते का करता?” 3 येशूंनी त्यांना उत्तर दिले, “दावीद आणि त्याच्या
सोबत्यांना भूक लागली असता काय केले, हे तुम्ही कधी वाचले नाही
काय? 4 दावीद परमेश्वराच्या मंदिरात गेला आणि त्याने त्या समर्पित
भाकरी खाल्या ज्या भाकरी फक्त याजकांनीच खाव्यात असा नियम
होता आणि त्याने त्याच्यातून काही त्याच्या सोबत्यांना सुद्धा दिल्या.” 5
मग येशू त्यांना म्हणाले, “मानवपुत्र हा शब्बाथाचाही प्रभू आहे.” 6
दुसऱ्या एका शब्बाथ दिवशी सभागृहामध्ये ते शिक्षण देत असताना,
उजवा हात वाळून गेलेला असा एक मनुष्य तिथे उपस्थित होता. 7
नियमशास्त्राचे शिक्षक आणि परूशी लोक, त्यांच्यावर आरोप ठेवण्यास
कारण शोधत होते, शब्बाथ दिवशी येशू त्याला बरे करतात की काय हे
पाहण्यासाठी बारकाईने नजर ठेवून होते. 8 परंतु येशूंना माहीत होते की
ते काय विचार करीत आहेत, तेव्हा त्या वाळलेल्या हाताच्या मनुष्याला
म्हणाले, “ऊठ आणि सर्वांसमोर उभा राहा.” तेव्हा तो उठला आणि
तिथे उभा राहिला. 9 नंतर येशू म्हणाले, “मी तुम्हाला विचारतो, शब्बाथ
दिवशी नियमानुसार कोणती गोष्ट योग्य आहे: चांगली कामे करणे
किंवा वाईट कामे करणे, एखाद्याचा जीव वाचवणे किंवा त्याचा नाश
करणे?” 10 त्यांनी जमलेल्यांकडे आपली नजर फिरविली आणि नंतर
ते त्या मनुष्याला म्हणाले, “तुझा हात लांब कर.” त्याने हात लांब केला
आणि त्याचा हात पहिल्यासारखा बरा झाला. 11 परंतु परूश्यांना व
नियमशास्त्र शिक्षकांना क्रोध आला आणि येशूंना जिवे कसे मारता येईल
याची त्यांनी एकमेकांबरोबर चर्चा सुरू केली. 12 त्या दिवसांमध्ये प्रार्थना
करण्यासाठी येशू डोंगरावर गेले आणि त्यांनी तिथे रात्रभर परमेश्वराची
प्रार्थना केली. 13 दिवस उगवताच त्यांनी आपल्या शिष्यांना स्वतःकडे
बोलाविले आणि त्यांच्यापैकी बारा जणांना निवडले, ज्यांना त्यांनी
प्रेषित पद प्रदान केले: 14 शिमोन, ज्याला पेत्र असे नाव दिले, त्याचा
भाऊ आंद्रिया, याकोब, योहान, फिलिप्प, बर्थलमय, 15 मत्तय, थोमा,
अल्फीचा पुत्र याकोब, शिमोन कनानी, 16 याकोबाचा पुत्र यहूदाह,
आणि यहूदाह इस्कर्योत जो विश्वासघातकी झाला. 17 ते खाली आले
आणि एका सपाट मैदानावर उभे राहिले. त्यांच्याभोवती शिष्यांचा मोठा
समुदाय आणि यरुशलेम, यहूदीया आणि सोर व सीदोन व उत्तरेकडील
समुद्रकिनाऱ्यांच्या नगरातूनही आलेले अनेक लोक होते. 18 ते येशूंचे
ऐकण्यासाठी व रोगमुक्त होण्यासाठी आले होते. जे अशुद्ध आत्म्याने
पीडलेले होते, त्यांनाही त्यांनी बरे केले. 19 प्रत्येकजण त्यांना स्पर्श
करण्याचा प्रयत्न करीत होता, कारण त्यांच्यामधून सामर्थ्य बाहेर निघून
ते बरे होत. 20 नंतर आपल्या शिष्यांना पाहून म्हणाले: “जे दीन आहेत
ते तुम्ही धन्य, कारण परमेश्वराचे राज्य तुमचे आहे. 21 जे आता भुकेले
आहेत ते तुम्ही धन्य, कारण ते तृप्त होतील. जे आता विलाप करीत
आहात ते तुम्ही धन्य कारण तुम्ही हसाल. 22 मानवपुत्रामुळे जेव्हा लोक
तुमचा द्वेष करतात, तुमच्यावर बहिष्कार टाकतात आणि तुमचा अपमान
करतात, दुष्ट म्हणून तुमचे नाव नाकारतात, तेव्हा तुम्ही धन्य. 23 “त्या
दिवशी आनंदाने उड्या मारा, कारण स्वर्गामध्ये तुमचे प्रतिफळ मोठे
आहे. त्यांच्या पूर्वजांनीही संदेष्ट्यांना असेच वागविले होते. 24 “तुम्हा
श्रीमंतास धिक्कार असो, कारण तुम्हाला तुमचे सांत्वन आधीच मिळाले
आहे. 25 जे तुम्ही आता तृप्त आहात, त्या तुम्हाला धिक्कार असो,
कारण तुम्ही उपाशी राहाल. आता जे तुम्ही हसत आहात, त्या तुम्हाला
धिक्कार असो, कारण तुम्ही विलाप कराल व रडाल. 26 जेव्हा सर्व
लोक तुम्हाविषयी चांगले बोलतात, त्या तुम्हाला धिक्कार असो, कारण
आपले पूर्वज खोट्या संदेष्ट्यांना असेच वागवित असत. 27 “पण तुम्ही
जे माझे ऐकत आहात, त्यांना मी सांगतो: तुमच्या शत्रूंवर प्रीती करा.

जे तुमचा द्वेष करतात, त्यांचे भले करा. 28 जे तुम्हाला शाप देतात,
त्यांना आशीर्वाद द्या. जे तुमच्याबरोबर वाईट वागतात, त्यांच्यासाठी
प्रार्थना करा. 29 जर कोणी तुमच्या एका गालावर चापट मारली, तर
त्यांच्यापुढे दुसराही गाल करा. जर कोणी तुमचा अंगरखा काढून घेतला,
तर त्यांना तुमची बंडीही घेण्यास मनाई करू नका. 30 जे तुम्हाजवळ
मागतात त्यांना द्या आणि जो तुमचे घेतो, त्याची परत मागणी करू
नका. 31 जो व्यवहार इतरांनी तुमच्यासाठी करावा अशी तुमची इच्छा
आहे, तसेच तुम्ही त्यांच्यासाठी करा. 32 “जे तुमच्यावर प्रीती करतात
त्यांच्यावरच तुम्ही प्रीती केली तर त्यात तुमचा काय लाभ? कारण
पापी लोकही त्यांच्यावर प्रेम करणाऱ्यांवर प्रेम करतात. 33 आणि जे
तुमचे भले करतात त्यांचे भले केले, तर त्यात तुम्हाला काय लाभ?
पापी लोकही तसेच करतात. 34 जे तुमचे पैसे परत करू शकतील
अशी तुमची आशा आहे, त्यांनाच तुम्ही उसने देता, तर त्यात तुम्ही
चांगले ते काय करता? दुष्टही आपल्या सर्व रकमेची फेड करणाऱ्या
दुष्टाला उसने देतो. 35 तुमच्या शत्रूवर प्रेम करा, त्यांचे भले करा आणि
परतफेड करण्याची आशा बाळगू नका. असे केले म्हणजे तुम्हाला फार
मोठे प्रतिफळ मिळेल आणि तुम्ही परात्पराची लेकरे व्हाल, कारण
ते अनुपकारी आणि दुष्ट यांनाही दयाळूपणाने वागवितात. 36 जसा
तुमचे पिता कनवाळू आहेत, तसे तुम्हीही व्हा. 37 “न्याय करू नका,
म्हणजे तुमचा न्याय होणार नाही. दोषी ठरवू नका, म्हणजे तुम्हाला
दोषी ठरविण्यात येणार नाही. क्षमा करा, म्हणजे तुम्हाला क्षमा केली
जाईल. 38 द्या आणि तुम्हाला दिले जाईल. मोठ्या प्रमाणात दाबून,
हालवून, ओसांडून वाहू लागेल अशा मापाने परत मिळेल. कारण ज्या
मापाने तुम्ही मापून द्याल, त्याच मापाने तुम्हाला परत मापून देण्यात
येईल.” 39 येशूंनी त्यांना हा दाखलासुद्धा सांगितला: “आंधळा मनुष्य
दुसऱ्या आंधळयाला वाट दाखवू शकतो काय? ते दोघेही खड्ड्यात
पडणार नाहीत काय? 40 शिष्य गुरूपेक्षा किंवा दास धन्यापेक्षा थोर
नाही. परंतु प्रत्येकजण जो पूर्णत: प्रशिक्षित होतो तो आपल्या गुरू
सारखा होईल. 41 “आपल्या डोळयातील मुसळाकडे लक्ष न देता
तू आपल्या भावाच्या डोळ्यातील कुसळ का पाहतोस? 42 जेव्हा तू
स्वत:च्या डोळयामध्ये मुसळ पाहण्यास अपयशी होतो, तेव्हा ‘तुझ्या
डोळयातील कुसळ मला काढू दे,’ असे तू आपल्या भावाला कसे म्हणू
शकतोस? अरे ढोंगी माणसा! पहिल्याने तू आपल्या डोळयातील मुसळ
काढ, मग तुझ्या भावाच्या डोळयातील कुसळ काढण्यासाठी तुला
स्पष्ट दिसेल. 43 “चांगल्या जातीचे झाड वाईट फळ देत नाही किंवा
वाईट जातीचे झाड चांगले फळ देत नाही. 44 प्रत्येक झाडाची ओळख
त्याच्या फळावरून होते. लोक काटेरी झुडूपावरून अंजीर काढीत नाहीत
किंवा काटेरी झुडूपावरून द्राक्षे काढीत नाहीत. 45 कारण अंत:करणात
जे भरलेले असते तेच मुखातून बाहेर पडते. चांगला मनुष्य त्याच्या
अंत:करणात ज्या चांगल्या गोष्टी साठविलेल्या आहेत त्या बाहेर काढतो,
तर दुष्ट अंत:करणाचा मनुष्य वाईट गोष्टी बाहेर काढतो. 46 “तुम्ही
मला, ‘प्रभूजी, प्रभूजी’ असे का म्हणता आणि मी जे सांगितले ते
करीत नाही? 47 असे प्रत्येकजण जे माझ्याकडे येतात आणि माझी
वचने ऐकतात आणि त्याप्रमाणे वागतात, ते कशाप्रकारचे आहेत हे
मी तुम्हाला दाखवितो. 48 ते कोणाएका मनुष्यासारखे आहेत, ज्याने
खोल पाया खणून आपले घर खडकावर बांधले. मग पूर आला आणि
पाण्याचा लोंढा त्या घरावर जोराने आदळला; तरी त्यामुळे ते घर हलू
शकले नाही, कारण ते भक्कमपणे बांधले होते. 49 जे कोणी माझी
वचने ऐकतात पण ते आचरणात आणत नाहीत, तर ते पाया न घालता
आपले घर वाळूवर बांधण्याऱ्या मूर्ख माणसासारखे आहेत. ज्या क्षणी
जोराचा प्रवाह त्या घरावर आदळला, त्याच क्षणी ते कोसळले आणि
त्याचा संपूर्ण नाश झाला.”

**7** जे लोकांनी ऐकावे ते सांगून पूर्ण केल्यावर, येशूंनी कफर्णहूममध्ये
प्रवेश केला. 2 तिथे एका शताधिपतीचा सेवक, जो त्याच्या दृष्टीने
महत्त्वाचा होता, तो आजारी असून मरावयास टेकला होता. 3 त्या
शताधिपतीने येशूंविषयी ऐकले तेव्हा त्याने काही यहूदी वडिलांना
येशूंकडे पाठवून, त्यांना आपण येऊन सेवकाला बरे करावे अशी विनंती
केली. 4 ते येशूंकडे आले आणि त्यांना आग्रहाने विनंती करून म्हणाले,
“तुम्ही हे करावे यासाठी हा मनुष्य पात्र आहे, 5 कारण तो आमच्या
राष्ट्रावर प्रेम करतो, एवढेच नाही, तर त्याने आमच्यासाठी सभागृह ही
बांधून दिले आहे.” 6 म्हणून येशू त्यांच्याबरोबर निघाले. पण घरापासून
फार दूर नव्हते तेव्हा शताधिपतीने आपल्या मित्रांच्या हाती निरोप
पाठविला: “प्रभू, माझ्या छप्पराखाली येण्याचा आपण त्रास घेऊ नका
कारण त्यासाठी मी योग्य नाही. 7 आणि याकारणामुळेच तुमच्याकडे
येण्यासाठी मी स्वत:ला योग्य समजत नाही. परंतु तुम्ही शब्द मात्र बोला
म्हणजे माझा नोकर बरा होईल. 8 कारण मी स्वत: अधिकाऱ्याच्या
अधीन असलेला मनुष्य असून, माझ्याही अधिकाराखाली सैनिक आहेत.
मी एकाला, ‘जा,’ म्हटले की तो जातो आणि दुसऱ्याला, ‘ये,’ म्हटले की
तो येतो आणि माझ्या नोकराला, ‘हे,’ कर अथवा, ‘ते,’ कर असे म्हटले
तर तो ते करतो.” 9 येशूंनी हे ऐकले, तेव्हा ते त्याच्या बोलण्यावरून
आश्चर्यचकित झाले आणि त्यांच्यामागे आलेल्या लोकांच्या गर्दीकडे
वळून ते म्हणाले, “मी तुम्हाला सांगतो, एवढा मोठा विश्वास मला
इस्राएलींमध्ये सुद्धा दिसून आला नाही.” 10 त्या अधिकाऱ्याचे मित्र
त्याच्या घरी परतले, तेव्हा सेवक पूर्ण बरा झालेला त्यांना आढळला.
11 त्यानंतर लगेच, येशू नाईन नावाच्या गावी गेले आणि त्यांचे शिष्य
आणि मोठा जमावही त्यांच्याबरोबर गेला. 12 ते गावाच्या वेशीजवळ
आले असता एका मुलाची प्रेतयात्रा बाहेर पडत होती व तो आपल्या
विधवा आईचा एकुलता एक पुत्र होता. तिच्याबरोबर गावातील मोठा
लोकसमूह होता. 13 प्रभूने तिला पाहिले, तेव्हा त्यांचे हृदय कळवळले
आणि ते तिला म्हणाले, “रडू नकोस.” 14 नंतर पुढे जाऊन ज्या
तिरडीवर त्याला ठेवले होते त्याला स्पर्श केला, तेव्हा तिरडी वाहणारे
थांबले. येशूंनी म्हटले, “तरुणा, मी तुला सांगतो, ऊठ!” 15 तेव्हा
तो मृत मुलगा उठून बसला आणि बोलू लागला. मग येशूंनी त्याला
त्याच्या आईच्या स्वाधीन केले. 16 हे पाहून सर्व लोक भयचकित झाले

आणि परमेश्वराची स्तुती करीत म्हणाले, “आम्हामध्ये एक थोर संदेष्टा
उदय पावला आहे. परमेश्वर आपल्या लोकांच्या साहाय्यासाठी आले
आहेत.” 17 येशूंची ही बातमी यहूदीया प्रांताच्या कानाकोपऱ्यातून आणि
सीमेच्या पलीकडेही पसरली. 18 योहानालाही या सर्व गोष्टींविषयी
त्याच्या शिष्यांनी सांगितले. त्याने दोघांना बोलाविले, 19 आणि त्यांना
प्रभूकडे विचारण्यास पाठविले: “जे यावयाचे ते आपण आहात किंवा
आम्ही इतर कोणाची वाट पाहावी?” 20 ते लोक येशूंकडे आल्यानंतर
त्यांना म्हणाले, “बाप्तिस्मा करणारा योहानाने आम्हास आपणाकडे
असे विचारावयास पाठविले आहे की, जे यावयाचे ते आपण आहात
की आम्ही दुसऱ्या कोणाची वाट पाहावी?” 21 त्याच घटकेस, येशूंनी
पुष्कळ लोकांस रोग, पीडा व दुरात्मे यापासून मुक्त केले होते आणि
पुष्कळ आंधळयांना दृष्टी दिली. 22 तेव्हा जे निरोप घेऊन आले
होते त्यांना म्हणाले, “तुम्ही जे पाहिले आणि ऐकले ते योहानाला
सांगा: आंधळयांना दृष्टी मिळते, लंगडे चालतात, कुष्ठरोगी शुद्ध होतात,
बहिऱ्यांना ऐकू येते, मेलेले जिवंत होतात आणि गरीब लोकांना शुभवार्ता
सांगितली जाते. 23 जो कोणी माझ्यासंबंधाने अडखळत नाही तो धन्य
होय.” 24 योहानाचे शिष्य गेल्यानंतर, येशू जमावाशी योहानाविषयी
बोलू लागले. ते म्हणाले, “तुम्ही ओसाड अरण्यात काय पाहण्यासाठी
गेला? वाऱ्याच्या झोताने हलणाऱ्या लव्हाळयाला काय? 25 जर नाही,
तर मग काय पाहावयाला तुम्ही गेला होता? किमती पोशाख घातलेला
एखादा पुरुष काय? नाही. भारी पोशाख घालणारे व सुखविलासातील
लोक राजवाड्यात राहतात. 26 परंतु तुम्ही काय पाहावयास गेला होता?
संदेष्टा? होय, मी तुम्हाला सांगतो, संदेष्ट्यापेक्षाही अधिक. 27 हा तोच
आहे ज्याच्याविषयी लिहिले आहे: “मी माझा संदेष्टा तुझ्यापुढे पाठवेन
आणि, तो तुझा मार्ग तुझ्यापुढे सिद्ध करेल, 28 मी तुम्हाला सांगतो,
स्त्रियांपासून जन्मलेल्या व्यक्तीमध्ये योहानापेक्षा कोणीही श्रेष्ठ नाही.
तरीपण परमेश्वराच्या राज्यामध्ये जो कनिष्ठ आहे, तो त्याच्यापेक्षाही श्रेष्ठ
आहे.” 29 जकातदारांसह सर्व लोकांनी येशूंचे हे शब्द ऐकले. परमेश्वराचे
मार्ग न्याय्य आहेत, हे त्यांनी योहानाकडून पूर्वीच बाप्तिस्मा घेऊन
मान्य केले होते. 30 तरी, परूशी आणि नियमशास्त्रज्ञांनी त्यांच्याबद्दल
असलेला परमेश्वराचा संकल्प धुडकावून लावला होता व योहानाकडून
बाप्तिस्मा घेतला नाही. 31 येशू पुढे बोलत राहिले, “तर मग काय, या
पिढीच्या लोकांची तुलना मी कशाशी करू? ते कोणासारखे आहेत?”
32 लहान मुलांसारखी ही पिढी आहे. ते बाजारात बसून इतरांना हाक
मारतात: “‘आम्ही तुमच्यासाठी बासरी वाजविली, तरी तुम्ही नाचला
नाही; आम्ही शोकगीत गाईले, तरी तुम्ही रडला नाही.’ 33 कारण
योहान भाकरी खात नसे किंवा द्राक्षारस पीत नसे आणि तुम्ही म्हणता,
‘त्याला दुरात्म्याने पछाडले आहे.’ 34 मनुष्याचा पुत्र खातपीत आला
आणि तुम्ही म्हणता, ‘पाहा, हा खादाड आणि मद्यपी मनुष्य! जकातदार
आणि पापी लोकांचा मित्र!’ 35 परंतु ज्ञान आपल्या मुलांच्या योगे
न्यायी ठरते.” 36 एका परूश्याने येशूंना आपल्या घरी भोजनासाठी
आमंत्रण दिले व येशूंनी ते स्वीकारले. ते भोजनास बसले असताना, 37
येशू परूश्याच्या घरी भोजनास गेले आहेत हे ऐकून, त्या नगरातील
एक पापी स्त्री मोलवान सुगंधी तेलाने भरलेली एक संगमरवरी कुपी
घेऊन तिथे आली. 38 आत जाऊन ती येशूंच्या मागे उभी राहिली व
रडू लागली आणि आपल्या अश्रूंनी त्यांचे पाय भिजवू लागली. मग
तिने ते आपल्या केसांनी पुसले. त्यांच्या पायांची चुंबने घेतली आणि
सुगंधी तेल त्यावर ओतले. 39 ज्या परूश्याने येशूंना भोजनाचे आमंत्रण
दिले होते, त्याने हे पाहिले तेव्हा तो मनाशीच म्हणाला, “यावरूनच येशू
संदेष्टा नाहीत हे सिद्ध होते, कारण परमेश्वराने त्यांना खरोखरच पाठविले
असते, तर ही स्त्री पापी आहे हे त्यांना समजले असते.” 40 येशू त्या
परूश्याला म्हणाले, “शिमोना, मला तुला काहीतरी सांगावयाचे आहे.”
शिमोन म्हणाला, “गुरुजी बोला.” 41 तेव्हा येशूंनी त्याला एक दाखला
सांगितला: “एका सावकाराने दोन माणसांना कर्ज दिले, एकाला चांदीची
पाचशे नाणी आणि दुसऱ्याला चांदीची पन्नास नाणी. 42 परंतु त्यापैकी
एकालाही त्याची परतफेड करता आली नाही. तेव्हा त्याने दोघांचेही कर्ज
माफ केले. आता या दोघांपैकी कोणाला त्याच्याबद्दल अधिक प्रीती
वाटेल?” 43 “ज्याचे अधिक कर्ज माफ झाले त्याला” शिमोनाने उत्तर
दिले. येशू म्हणाले, “तू बरोबर न्याय केला आहेस.” 44 नंतर ते त्या
स्त्रीकडे वळाले आणि शिमोनाला म्हणाले, “तू ही स्त्री पाहिली का? मी
तुझ्या घरात आलो. माझे पाय धुण्यासाठी तू मला पाणी दिले नाहीस,
परंतु तिने माझे पाय तिच्या अश्रूंनी भिजविले आणि तिच्या केसांनी ते
पुसले. 45 तू मला चुंबन दिले नाहीस. परंतु मी आत आलो तेव्हापासून
हिने माझ्या पायांचे चुंबन घेणे थांबविले नाही. 46 तू माझ्या डोक्यावर
तेल लावले नाहीस, परंतु हिने तर माझ्या पायांवर सुगंधी अत्तर ओतून
दिले आहे. 47 यास्तव मी तुला सांगतो, हिने दाखविलेल्या पुष्कळ
प्रीतीमुळे तिच्या अनेक पापांची क्षमा करण्यात आली आहे. ज्याच्या
थोड्या पापांची क्षमा होते, त्याची प्रीतीही थोडीच असते.” 48 येशू त्या
स्त्रीला म्हणाले, “तुझ्या पापांची क्षमा करण्यात आली आहे.” 49 त्या
ठिकाणी आलेल्या दुसऱ्या पाहुण्यांनी एकमेकांमध्ये बोलण्यास सुरुवात
केली, “हा कोण आहे जो पापांची सुद्धा क्षमा करतो?” 50 येशू त्या
स्त्रीला म्हणाले, “तुझ्या विश्वासाने तुझे तारण झाले आहे; शांतीने जा.”

**8** यानंतर येशूंनी एका शहरातून दुसऱ्या शहरात आणि गावोगावी प्रवास
करीत परमेश्वराच्या राज्याच्या शुभवार्तेची घोषणा केली. त्यांचे बारा
शिष्य त्यांच्याबरोबर होते, 2 काही स्त्रियांमधून त्यांनी दुरात्मे काढले,
काहींना रोगमुक्त केले होते, मरीया मग्दालिया जिच्यामधून त्यांनी
सात भुते काढली होती; 3 हेरोदाचा घरगुती कारभारी खुजा, त्याची
पत्नी योहान्ना, सुसान्ना व इतर अनेक स्त्रिया, स्वतःच्या मिळकतीतून
त्यांना मदत करीत असत. 4 लोकांची मोठी गर्दी होत होती आणि
वेगवेगळया गावांमधून लोक येशूंकडे येत होते, त्यावेळेस त्यांनी हा
दाखला सांगितला: 5 “एक शेतकरी बी पेरण्याकरिता निघाला. तो बी
पेरीत असताना, काही वाटेवर पडले; व तुडविले गेले व आकाशातील
पक्ष्यांनी ते खाऊन टाकले. 6 काही बी खडकाळ जमिनीवर पडले, ते
वर आले, परंतु ओलाव्याच्या अभावी ती रोपे करपून गेली. 7 काही

बी काटेरी झुडपांमध्ये पडले, ते उगवले आणि त्याबरोबर वाढले, पण
झुडपांनी त्याची वाढ खुंटविली. 8 काही बी सुपीक जमिनीत पडले. ते
उगवले आणि जेवढे पेरले होते, त्यापेक्षा शंभरपट पीक आले.” हे सांगून
ते म्हणाले, “ज्याला ऐकावयास कान आहेत, त्यांनी ऐकावे.” 9 त्यांच्या
शिष्यांनी त्यांना विचारले, “या दाखल्याचा अर्थ काय आहे?” 10 तेव्हा
येशूंनी उत्तर दिले, “परमेश्वराच्या राज्याची रहस्ये जाणून घेण्याचे ज्ञान
तुम्हाला दिलेले आहे, परंतु दुसऱ्यांना दाखल्याद्वारेच सांगण्यात येईल,”
ते यासाठी की, “‘ते पाहत असले तरी त्यांना दिसू नये, ते कानांनी ऐकत
असले, तरी त्यांना समजू नये.’ 11 “या दाखल्याचा अर्थ असा आहे: बी
हे परमेश्वराचे वचन आहे. 12 पायवाटेवर पडलेले ते, जे वचन ऐकतात,
पण सैतान येतो आणि पेरलेले वचन हृदयातून हिरावून नेतो आणि
त्यामुळे त्यांना विश्वास ठेवण्याची व तारणाची संधी मिळत नाही. 13
खडकाळ जमिनीसारखे असलेले ते हे, जे वचन आनंदाने स्वीकारतात,
पण त्यांना मूळ नसल्यामुळे ते किंचितकाळ विश्वास ठेवतात, परंतु
परीक्षा आली म्हणजे ते पडतात. 14 काटेरी झाडांमध्ये काही बी पडले,
ते असे आहेत की जे ऐकतात, परंतु जीवन जगतांना, जीवनातील
काळजी, पैसा, सुखविलास यामुळे त्यांची वाढ खुंटते व ते परिपक्व होत
नाहीत; 15 काही बी उत्तम जमिनीत पडते, ते प्रामाणिक व चांगल्या
अंत:करणाच्या लोकांचे प्रतीक आहे, जे परमेश्वराचे वचन ऐकतात
व धरून राहतात आणि धीराने पीक देतात. 16 “कोणी दिवा लावून
मातीच्या भांड्याखाली मापाखाली किंवा खाटेखाली ठेवीत नाही! जे
आत येणारे आहेत त्यांना दिव्याचा प्रकाश मिळावा म्हणून दिवठणीवर
ठेवतात. 17 कारण जे प्रकट होणार नाही असे काही लपलेले नाही किंवा
जे उघडकीस येणार नाही व कळणार नाही असे काही गुप्त नाही. 18
यास्तव तुम्ही कसे ऐकता याविषयी काळजी घ्या. ज्यांच्याजवळ आहे
त्यांना अधिक दिले जाईल; ज्यांच्याजवळ नाही, जे त्यांच्याजवळ आहे
असे त्यांना वाटते ते देखील त्यांच्यापासून काढून घेतले जाईल.” 19
एकदा येशूंची आई आणि भाऊ त्यांना भेटावयास आले, पण गर्दीमुळे
त्यांच्याजवळ त्यांना जाता येईना. 20 कोणी त्यांना सांगितले, “तुमची
आई आणि तुमचे भाऊ बाहेर थांबले आहेत व आपल्याला भेटू इच्छित
आहेत.” 21 तेव्हा ते म्हणाले, “जो कोणी परमेश्वराचे वचन ऐकतो
व त्यानुसार आचरण करतो, तोच माझा भाऊ व बहीण आणि माझी
आई.” 22 एके दिवशी येशू आपल्या शिष्यांना म्हणाले, “आपण
सरोवराच्या पलीकडे जाऊ.” ते व त्यांचे शिष्य होडीत बसून निघाले. 23
ते जात असताना येशू होडीत झोपी गेले आणि सरोवरात भयंकर वादळ
आले व होडी बुडू लागली आणि ते मोठ्या संकटात सापडले. 24 तेव्हा
शिष्यांनी त्यांना उठविले आणि ते त्यांना म्हणाले, “गुरुजी, गुरुजी,
आपण सर्वजण बुडत आहोत.” ते उठले आणि त्यांनी वाऱ्याला व
लाटांना धमकाविले व वादळ थांबले आणि सर्वकाही शांत झाले. 25 नंतर
येशूंनी शिष्यांना विचारले, “तुमचा विश्वास कुठे आहे?” भीती आणि
विस्मयाने ते एकमेकांना म्हणू लागले, “हे कोण आहेत? ते वारा आणि
लाटांनाही आज्ञा करतात आणि ते त्यांची आज्ञा पाळतात.” 26 मग ते
गालील सरोवरातून प्रवास करीत पलीकडे असलेल्या गरसेकरांच्या
प्रांतात आले. 27 येशू होडीतून किनाऱ्यावर उतरले, त्यावेळी त्यांची भेट
दुरात्म्याने पछाडलेल्या एक मनुष्याशी झाली. बऱ्याच काळापर्यंत हा
मनुष्य बेघर आणि वस्त्रहीन अवस्थेत असून कबरस्तानात राहत होता.
28 येशूंना पाहिल्याबरोबर तो त्यांच्या पाया पडून ओरडून म्हणाला, “हे
येशू परात्पर परमेश्वराच्या पुत्रा, तुम्हाला माझ्याशी काय काम आहे,
मी तुमच्याजवळ विनंती करतो की, कृपा करून मला छळू नका.” 29
कारण येशूंनी त्या दुरात्म्याला त्याच्यामधून बाहेर पडण्याची आज्ञा केली
होती. तरी पुष्कळदा तो त्याच्यावर प्रबळ होत असे आणि जरी त्याचे
हातपाय साखळयांनी बांधले आणि पहारा ठेवला, तरी साखळया तोडून
त्याला एकांत ठिकाणाकडे घेऊन जात असे. 30 येशूंनी त्याला विचारले,
“तुझे नाव काय आहे?” “माझे नाव लेगियोन आहे,” त्याने उत्तर दिले.
कारण त्याच्यामध्ये पुष्कळ दुरात्मे वास करीत होते. 31 ते दुरात्मे
येशूंना पुन्हा आणि पुन्हा विनंती करू लागले, “आम्हाला अथांग कूपात
जाण्याची आज्ञा करू नका.” **(Abyssos g12)** 32 जवळच डोंगराच्या
कडेला डुकरांचा एक कळप चरत होता. तेव्हा दुरात्म्यांनी, “आम्हाला
डुकरांमध्ये जाऊ द्या,” अशी येशूंना विनंती केली आणि येशूंनी त्यांना
तशी परवानगी दिली. 33 दुरात्मे त्या मनुष्यातून बाहेर आले आणि
डुकरांमध्ये शिरले. त्याक्षणीच तो संपूर्ण कळप डोंगराच्या कडेने धावत
सुटला आणि सरोवरात बुडाला. 34 डुकरांचे कळप राखणाऱ्यांनी काय
घडले ते पाहिले आणि त्यांनी धावत जाऊन ही बातमी जवळच्या नगरात
आणि ग्रामीण भागात सांगितली. 35 तेव्हा खरे काय झाले आहे, हे
पाहण्यासाठी लोक तिथे जमले, जेव्हा ते येशूंकडे आले, तेव्हा त्यांनी
त्या मनुष्याला पाहिले ज्याच्यामधून भुते निघून गेली होती, तो येशूंच्या
चरणाशी बसलेला, कपडे घातलेला आणि भानावर आलेला आहे; हे
पाहून ते अतिशय भयभीत झाले. 36 प्रत्यक्ष पाहणाऱ्यांनी भूतग्रस्त
मनुष्याचे काय झाले व तो कसा बरा झाला ते सर्वांना सांगितले.
37 तेव्हा गरसेकरांच्या चहूकडील प्रांतातील सर्व लोकांनी, “आमच्या
भागातून निघून जावे,” अशी त्यांना विनंती केली कारण ते फार भयभीत
झाले होते. तेव्हा येशू होडीत बसून माघारी जाण्यास निघाले. 38 ज्या
मनुष्यातून दुरात्मे निघाले होते, त्याने येशूंबरोबर जाण्यासाठी विनंती
केली, परंतु येशूंनी त्याला असे सांगून पाठवून दिले, 39 “आपल्या घरी
परत जा आणि परमेश्वराने तुझ्यासाठी जे काही केले आहे ते त्यांना
सांग.” तेव्हा तो मनुष्य निघून गेला आणि येशूंनी त्याच्यासाठी किती
मोठी गोष्ट केली हे त्याने शहरात सर्व भागात जाऊन सांगितले. 40 जेव्हा
येशू परतल्यावर, लोकांनी त्यांचे स्वागत केले, कारण ते त्यांची वाटच
पाहत होते. 41 इतक्यात याईर नावाचा एक सभागृहाचा पुढारी आला,
त्याने येशूंच्या पाया पडून त्यांनी आपल्या घरी यावे अशी आग्रहपूर्वक
विनंती केली. 42 कारण त्याची बारा वर्षाची एकुलती एक मुलगी
मरणाच्या पंथाला लागली होती. येशू वाटेवर असताना, लोकांच्या गर्दीने
त्यांना जणू काय चेंगरून टाकले. 43 आणि तिथे एक स्त्री होती जी
बारा वर्षे रक्तस्रावाने आजारी होती, परंतु कोणीही तिला बरे करू शकले

नव्हते. 44 तिने येशूंच्या पाठीमागे येऊन त्यांच्या झग्याच्या काठाला
स्पर्श केला आणि तत्क्षणी तिचा रक्तस्राव थांबला. 45 तेव्हा येशूंनी
विचारले, "मला कोणी स्पर्श केला?" जेव्हा प्रत्येकाने ते नाकारले,
पेत्र म्हणाला, "गुरुजी, लोक तुमच्याभोवती गर्दी करून तुमच्याकडे
रेटले जात आहेत." 46 परंतु येशू म्हणाले, "कोणीतरी मला स्पर्श केला
आहे. मला माहीत आहे माझ्यामधून शक्ती बाहेर पडली आहे." 47 मग
आपण गुप्त राहिलो नाही, असे पाहून ती स्त्री थरथर कापत पुढे आली
आणि त्यांच्या पाया पडून, आपण कोणत्या कारणास्तव येशूंना स्पर्श
केला व कसे तत्काळ बरे झालो, हे तिने सर्व लोकांसमक्ष सांगितले. 48
येशू तिला म्हणाले, "मुली, तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे. आता
शांतीने जा." 49 येशू अजून बोलतच होते तोच सभागृहाचा अधिकारी
याईराच्या घराकडून एक सेवक आला आणि म्हणाला, "तुमची कन्या
मरण पावली आहे. आता गुरुजींना त्रास देऊ नका." 50 हे ऐकताच येशू
याईराला म्हणाले, "भिऊ नकोस, फक्त विश्वास ठेव आणि ती बरी
होईल." 51 याईराच्या घरी पोहोचल्यावर, येशूंनी पेत्र, याकोब, योहान
आणि त्या मुलीचे आईवडील यांच्याशिवाय इतर कोणालाही आत येऊ
दिले नाही. 52 ते घर शोक करणाऱ्या लोकांनी भरून गेले होते. पण
येशू त्यांना म्हणाले, "रडणे थांबवा. ही मुलगी मरण पावली नाही,
पण झोपली आहे." 53 तेव्हा ते त्यांना हसू लागले, कारण ती मेली
होती, हे त्या सर्वांना माहीत होते. 54 मग येशूंनी तिचा हात धरून तिला
म्हटले, "माझ्या मुली ऊठ!" 55 त्यावेळी तिचा प्राण परत आला आणि
ती तत्काळ उठून उभी राहिली. तेव्हा येशू म्हणाले, "तिला काहीतरी
खावयास द्या." 56 तिचे आईवडील विस्मित झाले, परंतु येशूंनी त्यांना
निक्षून सांगितले, "जे घडले, ते कोणालाही सांगू नका."

**9** जेव्हा येशूंनी त्यांच्या बारा जणांना एकत्र बोलाविले, तेव्हा त्यांना
दुरात्म्यांना घालवून देण्याचा आणि प्रत्येक रोग व आजार बरे
करण्याचा अधिकार दिला. 2 नंतर त्यांनी आपल्या बारा शिष्यांना
परमेश्वराच्या राज्याची घोषणा करण्यास व आजाऱ्यांना बरे करण्यास
पाठविले. 3 येशूंनी त्यांना सांगितले, "प्रवासाला जाताना काठी,
झोळी, अन्न किंवा पैसे, अतिरिक्त अंगरखा असे काहीही घेऊ नका, 4
एखाद्या घरामध्ये प्रवेश कराल, तेव्हा ते गाव सोडेपर्यंत तिथेच राहा.
5 जर एखाद्या गावातील लोकांनी तुमचे स्वागत केले नाही, तर त्या
गावातून बाहेर पडा आणि तुमच्या पायांची धूळ तिथेच झटकून टाका,
ही त्यांच्याविरुद्ध साक्ष राहील." 6 त्याप्रमाणे शिष्य शुभवार्ता गाजवीत
आणि सर्वत्र आजाऱ्यांना बरे करीत गावोगाव फिरू लागले. 7 येशूंबद्दल
शासक हेरोदाने सर्वकाही ऐकले. तेव्हा तो घोटाळ्यात पडला. कारण
काही लोक म्हणत होते, "हा बाप्तिस्मा करणारा योहान पुन्हा जिवंत
झाला आहे." 8 आणखी दुसरे म्हणत होते की एलीयाह प्रकट झाला
आहे, तर आणखी काही प्राचीन संदेष्ट्यांपैकी एक संदेष्टा मृतातून उठून
उदय पावला आहे असे म्हणत होते. 9 पण हेरोद म्हणाला, "मी तर
योहानाचा शिरच्छेद केला होता, मग हा मनुष्य कोण ज्याच्याबद्दल मी
ऐकत आहे?" आणि तो येशूंना भेटण्याचा प्रयत्न करू लागला. 10 नंतर
प्रेषित परत आले आणि आपण काय केले याचा सर्व वृतांत त्यांनी
सादर केला, येशू त्यांना घेऊन बेथसैदा या शहराकडे एकांतस्थळी गेले.
11 परंतु समुदायाला हे कळले व ते त्यांच्यामागे गेले. येशूंनी त्यांचे
स्वागत केले व त्यांना परमेश्वराच्या राज्याविषयी शिक्षण दिले आणि बरे
होण्याची ज्यांना गरज होती त्यांना बरे केले. 12 दुपार टळल्यानंतर बारा
शिष्य त्यांच्याकडे आले आणि म्हणाले, "लोकांना पाठवून द्या म्हणजे ते
आजूबाजूच्या खेड्यांमध्ये व गावांमध्ये जातील आणि त्यांच्या खाण्याची
व राहण्याची व्यवस्था करतील, कारण आपण येथे निर्जन ठिकाणी
आहोत." 13 त्यांनी उत्तर दिले, "तुम्ही त्यांना काहीतरी खावयास द्या."
यावर ते म्हणाले, "आमच्याजवळ केवळ पाच भाकरी आणि दोन मासे
आहेत—या सर्व लोकांस पुरेल इतके अन्न आम्ही जाऊन विकत आणले
तरच हे शक्य आहे" 14 तिथे पुरुषांचीच संख्या अंदाजे पाच हजार होती.
येशू शिष्यांना म्हणाले, "अंदाजे पन्नास लोक अशाप्रकारे गटागटाने
त्यांना खाली बसावयास सांगा." 15 तेव्हा शिष्यांनी त्याप्रमाणे केले
आणि सर्व लोक खाली बसले. 16 येशूंनी त्या पाच भाकरी व दोन मासे
घेतले आणि स्वर्गाकडे पाहून आभार मानले आणि त्या भाकरीचे तुकडे
केले. नंतर त्यांनी ते शिष्यांजवळ लोकांना वाढण्यासाठी दिले. 17 ते
सर्वजण जेवले आणि तृप्त झाले आणि शिष्यांनी उरलेल्या तुकड्यांनी
भरलेल्या बारा टोपल्या उचलल्या. 18 एकदा येशू एकटेच प्रार्थना करीत
होते आणि त्यांचे शिष्य जवळच होते. येशूंनी त्यांना विचारले, "मी
कोण आहे म्हणून लोकसमुदाय मला ओळखतात?" 19 ते म्हणाले,
"काही म्हणतात बाप्तिस्मा करणारा योहान; काही एलीयाह; आणखी
काहीजण म्हणतात, आपण मरणातून उठलेले प्राचीन काळातील
संदेष्ट्यांपैकी एक आहात." 20 "परंतु तुमचे मत काय?" येशूंनी
विचारले, "मी कोण आहे, असे तुम्ही म्हणता?" पेत्राने उत्तर दिले,
"तुम्ही परमेश्वराचे ख्रिस्त आहात." 21 येशूंनी त्यांना निक्षून आज्ञा केली
की हे कोणालाही सांगू नका. 22 ते म्हणाले, "मानवपुत्राला पुष्कळ दुःखे
सहन करावी आणि वडीलजन व मुख्य याजक, नियमशास्त्राचे शिक्षक
यांच्याकडून नाकारले जाऊन जिवे मारले जावे आणि तिसऱ्या दिवशी
पुन्हा जिवंत होणे याचे अगत्य आहे." 23 नंतर ते सर्वांना म्हणाले,
"जर कोणी माझा शिष्य होऊ पाहतो तर त्याने स्वतःस नाकारावे,
दररोज त्याचा क्रूसखांब उचलावा आणि माझ्यामागे यावे. 24 कारण
जो कोणी आपला जीव वाचवेल तो आपल्या जीवाला मुकेल, पण जो
कोणी माझ्यासाठी आपल्या जीवाला गमावेल, तो त्याचा जीव वाचवेल.
25 कोणी सारे जग मिळविले आणि आपल्या स्वतःला गमाविले व
नाश करून घेतला तर त्याला काय लाभ? 26 ज्या कोणाला माझी
व माझ्या वचनाची लाज वाटेल, तर जेव्हा मानवपुत्र पित्याच्या व
पवित्र देवदूतांच्या गौरवाने येईन तेव्हा त्यालाही त्याची लाज वाटेल. 27
"मी तुम्हाला निश्चित सांगतो, येथे उभे असणारे काहीजण परमेश्वराचे
राज्य पाहीपर्यंत, त्यांना मरणाचा अनुभव येणार नाही." 28 या गोष्टी
सांगितल्यानंतर सुमारे आठ दिवसांनी पेत्र, याकोब आणि योहान यांना
येशूंनी बरोबर घेतले आणि ते प्रार्थना करण्यासाठी डोंगरावर गेले.

29 येशू प्रार्थना करीत असताना त्यांच्या मुखाचे रूपांतर झाले आणि
त्यांची वस्त्रे विजेसारखी लखलखीत झाली. 30 मग दोन पुरुष म्हणजे
स्वत: मोशे आणि एलीयाह तिथे प्रकट झाले आणि येशूंबरोबर संवाद
करू लागले. 31 आणि ते त्यांच्याबरोबर परमेश्वराच्या संकल्पाप्रमाणे
नियोजित केलेल्या व यरुशलेममध्ये येशूंना होणाऱ्या प्रयाणासंबंधाने
बोलत होते. 32 यावेळी पेत्र आणि इतर दोन शिष्यांना अतिशय झोप
आली होती, परंतु जागे झाल्यानंतर त्यांनी येशूंचे वैभव पाहिले आणि
दोन पुरुष त्यांच्याजवळ उभे असलेले पाहिले. 33 मग मोशे व एलीयाह
येशूंना सोडून जात असताना, पेत्र येशूंना म्हणाले, “गुरुजी, आपल्याला
येथेच राहता आले, तर फार चांगले होईल! आपण येथे तीन मंडप—एक
तुमच्यासाठी, एक मोशेसाठी आणि एक एलीयाहसाठी बांधू या.”
त्याला काय बोलावे हे समजत नव्हते. 34 पण तो हे बोलत असतानाच,
मेघाने त्यांच्यावर छाया केली आणि त्यात प्रवेश करते वेळी ते भयभीत
झाले. 35 मेघातून एक वाणी म्हणाली, “हा माझा पुत्र आहे, मी याला
निवडले आहे, याचे तुम्ही ऐका.” 36 ही वाणी झाली, तेव्हा येशू एकटेच
त्यांच्या दृष्टीस पडले. त्यांनी काय पाहिले याविषयी शिष्यांनी कोणाला
काहीही सांगितले नाही. 37 दुसऱ्या दिवशी जेव्हा ते डोंगरावरून खाली
उतरले, त्यावेळी येशूंना एक मोठा समुदाय येऊन भेटला 38 गर्दीतील
एक मनुष्य येशूंना हाक मारून म्हणाला, “गुरुजी, मी तुमच्याजवळ
विनंती करतो की माझ्या एकुलत्या एका पुत्राला आपण पाहावे, 39 एक
दुरात्मा याला धरून ठेवतो आणि तो एकाएकी किंचाळू लागतो; हा
आत्मा त्याला पिळून काढतो व मुलाच्या तोंडाला फेस येतो. तो त्याला
फार ठेचतो, जखमा करतो व त्याचा नाश करावयास पाहतो. 40 या
दुरात्म्याला बाहेर काढावे अशी मी तुमच्या शिष्यांना विनंती केली की,
परंतु ते काढू शकले नाहीत.” 41 येशूंनी उत्तर दिले, “हे विश्वासहीन
व दुष्ट पिढी, मी किती वेळ तुमच्याबरोबर राहू व तुमचे सहन करू?
मुलाला इकडे घेऊन या.” 42 मुलगा येशूंकडे येत असताना, अशुद्ध
आत्म्याने त्याला जमिनीवर आपटले व त्याला झटके आले. परंतु येशूंनी
दुरात्म्याला धमकावून त्या मुलाला बरे केले व वडिलांच्या स्वाधीन
केले. 43 परमेश्वराच्या शक्तीचे हे प्रात्यक्षिक पाहून लोक आश्चर्यचकित
झाले. येशू करीत असलेल्या चमत्कारांच्या गोष्टींविषयी लोक आश्चर्य
व्यक्त करीत असतानाच, येशू आपल्या शिष्यांना म्हणाले, 44 “मी
तुम्हाला जे काही सांगणार आहे ते काळजीपूर्वक ऐका: मानवपुत्राला,
मनुष्यांच्या हाती धरून दिले जाणार आहे.” 45 परंतु ते काय म्हणतात हे
त्यांना समजले नाही. त्याचे आकलन होऊ नये म्हणून त्यांच्यापासून ते
गुप्त ठेवण्यात आले होते आणि या गोष्टींविषयी त्यास विचारण्याची
त्यांना भीती वाटली. 46 आपल्यामध्ये सर्वात श्रेष्ठ कोण होईल, याबद्दल
शिष्यांमध्ये वादविवाद सुरू झाला. 47 पण येशूंनी, त्यांच्या मनातील
विचार ओळखले आणि त्यांनी एका लहान बालकाला आपल्या बाजूला
उभे करून, 48 ते शिष्यांना म्हणाले, “जो कोणी या बालकाचा माझ्या
नावाने स्वीकार करतो आणि जो कोणी माझा स्वीकार करतो, तो मला
पाठविणाऱ्याचा स्वीकार करतो. जो तुम्हामध्ये सर्वात कनिष्ठ आहे
तोच थोर आहे.” 49 योहान म्हणाला, “गुरुजी, आम्ही कोणा एकाला
तुमच्या नावाने भुते काढताना पाहिले आणि त्याला थांबविण्याचा
प्रयत्न केला, कारण तो आपल्यापैकी नव्हता.” 50 येशू म्हणाले,
“त्याला मना करू नका कारण जो तुमच्याविरुद्ध नाही, तो तुमच्या
बाजूचा आहे.” 51 येशूंना स्वर्गात वर घेतले जाण्याची वेळ जवळ
आली, तेव्हा ते यरुशलेमकडे ठामपणे निघाले. 52 मग एका शोमरोनी
गावात त्यांच्यासाठी तयारी करण्याकरिता त्यांनी आपले संदेशवाहक
पुढे पाठविले. 53 परंतु त्या ठिकाणच्या लोकांनी त्यांचे स्वागत केले
नाही कारण ते यरुशलेमकडे जात होते. 54 जेव्हा याकोब आणि
योहान या शिष्यांनी हे पाहिले, ते म्हणाले, “प्रभूजी, त्या लोकांना
भस्म करण्यासाठी आम्ही स्वर्गातून अग्नीची मागणी करावी काय?”
55 परंतु येशूंनी वळून त्यांना धमकाविले. 56 नंतर ते व त्यांचे शिष्य
दुसऱ्या गावाकडे निघून गेले. 57 ते रस्त्याने जात असताना, एका
मनुष्याने येशूंना म्हटले, “आपण जिथे कुठे जाल तिथे मी तुमच्यामागे
येईन.” 58 येशूंनी उत्तर दिले, “हे लक्षात ठेवा की कोल्ह्यांना बिळे
आणि आकाशातील पक्ष्यांना घरटी आहेत, परंतु मानवपुत्राला, डोके
टेकण्यासही जागा नाही.” 59 आणखी एका मनुष्याला ते म्हणाले,
“माझ्यामागे ये.” परंतु त्याने उत्तर दिले, “प्रभूजी, प्रथम मला माझ्या
वडिलांना पुरावयास जाऊ द्या.” 60 येशूंनी त्याला उत्तर दिले, “जे मेलेले
आहेत, त्यांना आपल्या मृतांना मूठमाती देऊ दे, परंतु तू जा आणि
परमेश्वराच्या राज्याची घोषणा कर.” 61 आणखी एकजण म्हणाला,
“प्रभूजी, मी निश्चितच येईन. पण प्रथम माझ्या घरच्या लोकांचा निरोप
घेऊ द्या.” 62 पण येशूंनी त्याला सांगितले, “जो कोणी नांगराला हात
घातल्यावर मागे पाहतो, तो परमेश्वराच्या राज्यास उपयोगी नाही.”

**10** यानंतर प्रभूने आणखी बाहत्तर शिष्य नेमले आणि त्यांना दोघे दोघे
ज्या गावात व ठिकाणात ते जाणार होते तिथे त्यांना आपल्यापुढे
पाठविले. 2 त्यांनी त्यांना सांगितले, “पीक अमाप आहे, पण कामकरी
थोडे आहेत. हंगामाच्या प्रभूने पिकासाठी शेतावर कामकरी पाठवावे
म्हणून प्रार्थना करा. 3 जा, कोकरांनी लांडग्यांमध्ये जावे त्याप्रमाणे
मी तुम्हाला पाठवित आहे. 4 पैसे किंवा झोळी किंवा पायतण घेऊ
नका आणि रस्त्यात कोणाला सलाम करू नका. 5 “ज्यावेळी तुम्ही
एखाद्या घरामध्ये प्रवेश कराल, प्रथम, ‘या घरास शांती लाभो’ असे
म्हणा. 6 जर एखादी शांतिप्रिय व्यक्ती तिथे असेल तर तुमची शांती
त्यांच्यावर राहील; नसेल तर ती तुम्हाकडे परत येईल. 7 घरोघरी न
जाता तिथेच राहा आणि तुम्हाला जे देण्यात येईल, ते खा व प्या.
कारण कामकरी आपल्या वेतनास पात्र आहे. 8 “एखाद्या गावाने
तुमचे स्वागत केले, तर तिथे तुमच्यापुढे जे वाढण्यात येईल ते खा,
9 आजाऱ्यांस बरे करा आणि त्यांना सांगा, ‘परमेश्वराचे राज्य आता
तुमच्याजवळ आले आहे.’ 10 पण जेव्हा तुम्ही एखाद्या गावात प्रवेश
करता आणि त्यांनी तुम्हाला स्वीकारले नाही, तर त्यांच्या रस्त्यांवर
जाऊन सांगा, 11 ‘आमच्या पायांना लागलेली तुमच्या गावाची धूळ
इशारा म्हणून झटकून टाकतो. परमेश्वराचे राज्य जवळ आले आहे,

याची खात्री बाळगा.’ 12 मी तुम्हाला सांगतो, तो दिवस या नगरांपेक्षा
सदोमाला अधिक सुसह्य असेल. 13 “खोराजिना, तुला धिक्कार असो!
बेथसैदा, तुला धिक्कार असो! कारण जे चमत्कार तुमच्यामध्ये केले
ते सोर आणि सीदोनात केले असते, तर ते गोणपाट नेसून आणि
डोक्यात राख घालून केव्हाच पश्चात्ताप करीत बसले असते. 14 परंतु
न्यायाच्या वेळी ते तुमच्यापेक्षा सोर व सीदोन यांना ते अधिक सुसह्य
असेल 15 हे कफर्णहूमा, तू स्वर्गात घेतला जाशील काय? नाही, तू
नरकात खोलवर जाशील. (Hadēs g86) 16 “जे तुमचे ऐकतात, ते माझे
ऐकतात आणि जे तुम्हाला नाकारतात, ते मला नाकारतात. परंतु जे
मला नाकारतात, ते ज्यांनी मला पाठविले आहे त्यांना नाकारतात.”
17 नंतर ते बाहत्तर आनंदाने परतले आले आणि म्हणाले, “प्रभूजी,
तुमच्या नावाने भुतेदेखील वश होतात.” 18 त्यांनी उत्तर दिले, “मी
सैतानाला स्वर्गातून वीज कोसळावी तसे कोसळताना पाहिले. 19 मी
तुम्हाला साप आणि विंचू यांना तुडवून टाकण्याचे आणि शत्रूवर विजयी
होण्याचे सामर्थ्य दिले आहे; तुम्हाला इजा होणार नाही. 20 तरीपण
दुष्टात्मे तुमची आज्ञा पाळतात, या गोष्टींचा आनंद करण्यापेक्षा तुमची
नावे स्वर्गात नोंदली गेली आहेत याचा आनंद करा.” 21 त्यावेळी येशू
पवित्र आत्म्याद्वारे आनंदित होऊन म्हणाले, “हे पित्या, स्वर्गाच्या आणि
पृथ्वीच्या प्रभू, स्वतःस ज्ञानी आणि सुज्ञ समजणाऱ्यांपासून या गोष्टी
गुप्त ठेवल्या आणि लहान बालकांना प्रगट केल्या, म्हणून मी तुमचे
आभार मानतो कारण हे पित्या, असे करणेच तुम्हाला उचित वाटले.
22 “माझ्या पित्याने माझ्याकडे सर्वकाही सोपविले आहे. पुत्र कोण
आहे हे पित्याशिवाय कोणी ओळखत नाही आणि पिता कोण आहे हे
पुत्राशिवाय आणि पुत्र ज्यांना प्रकट करण्यास निवडतो त्यांच्याशिवाय
कोणालाही माहीत नाही.” 23 नंतर ते आपल्या बारा शिष्यांकडे वळून
खासगी रीतीने म्हणाले, “परंतु जे तुम्ही पाहता ते पाहणारे डोळे धन्य.
24 कारण मी तुम्हाला सांगतो अनेक संदेष्ट्यांनी आणि राजे यांनी तुम्ही
जे पाहिले आणि ऐकले, ते पाहण्याची आणि ऐकण्याची उत्कंठा धरली
होती, परंतु ती पूर्ण झाली नाही.” 25 एका प्रसंगी एक नियमशास्त्र
तज्ञ येशूंची परीक्षा पाहावी म्हणून आला, “गुरुजी, सार्वकालिक जीवन
हे वतन मिळविण्याकरिता मी काय करावे?” (aiōnios g166) 26 येशू
म्हणाले, “याबाबत नियमशास्त्र काय म्हणते? तू काय वाचतोस?”
27 त्याने उत्तर दिले, “‘प्रभू तुमचा परमेश्वर यांच्यावर तुमच्या पूर्ण
अंत:करणाने आणि तुमच्या पूर्ण जिवाने’ आणि ‘तुमच्या पूर्णशक्तीने
आणि तुमच्या पूर्ण मनाने प्रीती करा आणि जशी स्वत:वर तशी तुमच्या
शेजाऱ्यावर प्रीती करा.’” 28 “अगदी बरोबर सांगितलेस,” येशू म्हणाले,
“तसेच कर म्हणजे तू जगशील.” 29 तरी आपले न्यायीपणाचे समर्थन
करण्यासाठी त्याने येशूंना विचारले, “माझा शेजारी कोण?” 30 उत्तर
देत येशू म्हणाले: “एक मनुष्य खाली यरुशलेमाहून यरीहोला जात
असताना, चोरांनी त्याच्यावर हल्ला केला, कपडे हिसकावून घेतले,
मारहाण केली आणि त्याला अर्धमेल्या अवस्थेत टाकून ते निघून
गेले. 31 एक याजक त्या बाजूने आला आणि त्या मनुष्याला तिथे
पडलेले पाहून, रस्ता ओलांडून निघून गेला. 32 त्याचप्रमाणे एक लेवी
आला, त्याने त्याला पाहिले, पण तो तसाच पुढे गेला. 33 नंतर एक
शोमरोनी, प्रवास करीत जिथे तो होता तिथे आला आणि त्याला पाहून
त्याचा कळवळा आला. 34 त्याच्याजवळ जाऊन त्या मनुष्याने त्याच्या
जखमांना तेल व द्राक्षारस लावून पट्ट्या बांधल्या. त्याला आपल्या
गाढवावर बसवून तो एका उतारशाळेत आला आणि त्याने त्याची सेवा
केली. 35 दुसऱ्या दिवशी त्याने उतारशाळेच्या मालकाला चांदीची दोन
नाणी देऊन सांगितले, ‘या माणसाची काळजी घ्या,’ आणि ‘मी परत
येईन, त्यावेळी जास्त खर्च झाला असेल तर त्याची भरपाई करेन.’ 36
“आता या तिघांपैकी चोरांच्या हाती सापडलेल्या मनुष्याचा शेजारी
कोण होता असे तुला वाटते?” 37 त्या नियमशास्त्रज्ञाने उत्तर दिले,
“ज्याने त्याला दया दाखविली, तोच.” यावर येशू त्याला म्हणाले, “जा
आणि असेच कर.” 38 येशू आणि त्यांचे शिष्य त्यांच्या मार्गाने जात
असताना एका नगरात आले तिथे मार्था नावाच्या एका स्त्रीने आपल्या
घरी त्यांचे स्वागत केले. 39 तिला मरीया नावाची एक बहीण होती. ती
प्रभूच्या चरणाजवळ बसून त्यांचे शब्द ऐकत होती. 40 तरी सर्व गोष्टींची
तयारी करताना मार्था कंटाळून गेली आणि प्रभूला म्हणाली, “प्रभूजी,
माझ्या बहिणीने कामाचा भार माझ्या एकटीवरच टाकला आहे, याची
तुम्हाला काळजी नाही काय? तिला मला मदत करावयास सांगा.”
41 पण प्रभू तिला म्हणाले, “मार्था, मार्था, तू उगाच पुष्कळ गोष्टींची
काळजी करीत असते. 42 परंतु वास्तविक, केवळ एकाच गोष्टीची गरज
आहे. मरीयेने चांगला वाटा निवडून घेतला आहे तो तिच्यापासून काढून
घेतला जाणार नाही.”

**11** एके दिवशी येशू एका ठिकाणी प्रार्थना करीत होते. प्रार्थना
संपल्यावर त्यांच्या शिष्यांपैकी एकाने त्यांना म्हटले, “प्रभूजी,
योहानाने जशी त्याच्या शिष्यांना प्रार्थना करावयास शिकविले, त्याप्रमाणे
तुम्हीही आम्हास शिकवा.” 2 येशूंनी शिष्यांना सांगितले, “अशा रीतीने
प्रार्थना करा: “‘हे पित्या, तुमचे नाव पवित्र मानिले जावो; तुमचे राज्य
येवो. 3 आमची रोजची भाकर प्रतिदिनी आम्हाला द्या. 4 कारण जशी
आम्ही आमच्या अपराध्यांस क्षमा करतो; तशी तुम्ही आमच्या पापांची
क्षमा करा आम्हास परीक्षेत आणू नका.’” 5 येशू त्यांना म्हणाले,
“समजा तुमचा एक मित्र आहे, मध्यरात्री तुम्ही त्याच्याकडे जाऊन
म्हणता, ‘मित्रा, मला तीन भाकरी उसन्या दे; 6 माझा मित्र प्रवास
करून घरी आला आहे, पण त्याला वाढण्यासाठी माझ्याजवळ काहीच
नाही.’ 7 समजा तुमचा मित्र आतून उत्तर देईल, ‘मला त्रास देऊ नको.
दार बंद झाले आहे आणि मी व माझी मुले अंथरुणात आहोत आणि
आता मी उठून तुला काही देऊ शकत नाही.’ 8 परंतु मी तुम्हाला सांगतो
की, जरी मैत्रीमुळे तो उठून त्याला भाकर देणार नाही, तरी तुमच्या
आग्रहामुळे तो नक्कीच उठेल आणि जितकी तुमची गरज आहे तितके
तो तुम्हाला देईल. 9 “मी तुम्हाला सांगतो, मागा म्हणजे तुम्हाला
मिळेल, शोधा म्हणजे तुम्हाला सापडेल, दार ठोका म्हणजे ते उघडले
जाईल. 10 कारण जो कोणी मागतो त्याला मिळेल, जो कोणी शोधतो

त्याला सापडेल आणि जो कोणी ठोकतो, त्याच्यासाठी दार उघडले
जाईल. 11 “तुमच्यातील कोण असे वडील आहेत, जर तुमच्या मुलाने
तुमच्याजवळ मासा मागितला, तर तुम्ही त्याला साप द्याल? 12 किंवा
जर त्याने अंडे मागितले, तर त्याला विंचू द्याल? 13 तर तुम्ही दुष्ट
असताना तुमच्या लेकरांना चांगल्या देणग्या देण्याचे तुम्हाला समजते,
तर मग स्वर्गीय पित्याजवळ जे मागतात, त्यांना ते कितीतरी विपुलतेने
पवित्र आत्मा देणार!” 14 येशू एका मुक्या दुरात्म्याला काढत होते, तो
दुरात्मा निघून गेल्यानंतर, त्या मुक्या मनुष्याला बोलता येऊ लागले. ते
पाहून गर्दीतील लोक आश्चर्यचकित झाले. 15 पण काहीजण म्हणाले,
“हा बालजबूल, भुतांचा राजा सैतानाच्या साहाय्याने भुतांना घालवित
असतो.” 16 दुसऱ्यांनी परीक्षा पाहण्याकरिता आकाशातून चिन्ह दाखवा
अशी मागणी केली. 17 त्यांचे विचार येशूंना माहीत होते आणि ते त्यांना
म्हणाले, “ज्या राज्यात फूट पडलेली आहे, त्या राज्याचा नाश होतो
आणि आपसात फूट पडलेले घर कोसळून पडते. 18 जर सैतानातच
फूट पडली, तर त्याचे राज्य कसे टिकेल?” कारण तुम्ही असा दावा
करता की मी बालजबूलच्या साहाय्याने भुते काढतो, 19 आता मी जर
बालजबूलच्या साहाय्याने भुते काढतो, तर तुमचे अनुयायी कोणाच्या
साहाय्याने भुते काढतात? मग तेच तुमचे न्यायाधीश असतील. 20 परंतु
मी जर परमेश्वराच्या शक्तीने भुते काढतो, तर परमेश्वराचे राज्य तुमच्यावर
आले आहे. 21 “जोपर्यंत एखादा बळकट मनुष्य, पूर्ण सशस्त्र होऊन
आपल्या घराची रखवाली करतो, तोपर्यंत त्याची मालमत्ता सुरक्षित
राहते. 22 पण एखादा अधिक बलवान येऊन त्याला जिंकतो व ज्या
शस्त्रांवर त्याचा भरवसा होता ते काढून त्याची सर्व मालमत्ता लुटतो व
वाटून देतो. 23 “जो माझ्याबरोबर नाही तो माझ्याविरुद्ध आहे आणि जो
माझ्याबरोबर गोळा करीत नाही तो विखुरतो. 24 “एखाद्या मनुष्यातून
अशुद्ध आत्मा निघाला म्हणजे तो रुक्ष ठिकाणी विश्रांती घेण्यासाठी
जागा शोधतो आणि ती त्याला सापडत नाही. त्यावेळी तो म्हणतो, ‘जे
घर मी सोडले, तिथे परत जाईन.’ 25 तो परत आला म्हणजे त्याला ते
घर झाडून स्वच्छ केलेले व व्यवस्थित ठेवलेले असे आढळते. 26 नंतर
तो जाऊन आपल्यापेक्षा अधिक दुष्ट असे आणखी सात दुरात्मे घेऊन
येतो व ते आत जाऊन तिथे राहतात आणि मग त्या मनुष्याची अवस्था
पहिल्यापेक्षा वाईट होते.” 27 येशू बोलत असताना त्या गर्दीतील एक
स्त्री ओरडून म्हणाली, “धन्य तुझी माता, जिने तुला जन्म दिला, दूध
पाजले व तुझे पोषण केले!” 28 त्याने उत्तर दिले, “परंतु जे परमेश्वराचे
वचन ऐकतात आणि त्याप्रमाणे आचरण करतात, ते अधिक धन्य
आहेत.” 29 आपल्या भोवती लोकांची खूपच गर्दी वाढली हे पाहून
येशू म्हणाले, “ही दुष्ट पिढी चिन्ह मागते पण योनाहच्या चिन्हाखेरीज
दुसरे चिन्ह या पिढीला दिले जाणार नाही. 30 कारण ज्याप्रमाणे योनाह
निनवेहच्या लोकांना चिन्ह होता, तसेच मानवपुत्र या पिढीला चिन्ह असा
होईल. 31 दक्षिणेची राणी न्यायकाळी या पिढीच्या लोकांबरोबर उठेल
आणि त्यांना दंडपात्र ठरवेल, कारण ती शलोमोनाचे ज्ञान ऐकण्यास
पृथ्वीच्या टोकाकडून आली; आणि आता तर शलोमोनापेक्षा थोर असा
कोणी येथे आहे. 32 न्यायाच्या दिवशी निनवेहचे लोक उठून या पिढीला
दोषी ठरवतील, कारण योनाहचा उपदेश ऐकून त्यांनी पश्चात्ताप केला
आणि योनाहपेक्षाही श्रेष्ठ असा एकजण येथे आहे. 33 “कोणी दिवा
लावून त्याचा प्रकाश लपून राहील अशा ठिकाणी किंवा मापाखाली
ठेवत नाही. उलट दिवठणीवर ठेवतात, यासाठी की आत येणाऱ्यांनाही
प्रकाश मिळावा. 34 तुझा डोळा शरीराचा दिवा आहे. तुझे डोळे निर्दोष
असले म्हणजे तुझे सर्व शरीरही प्रकाशमय होईल. पण जर ते दोषी
असतील तर तुझे शरीरही अंधकारमय असेल. 35 म्हणून तुझ्यामध्ये जो
प्रकाश आहे, तो अंधार तर नाही ना, याविषयी काळजी घे. 36 यास्तव,
जर तुझे सर्व शरीर प्रकाशाने भरलेले असले आणि कोणताही भाग
अंधकारमय नसला, तर दिव्याचा प्रकाश तुझ्यावर पडेल तसे ते पूर्णपणे
प्रकाशमय होईल.” 37 येशूंनी आपले बोलणे संपविले, त्यावेळी एका
परूश्याने त्यांना भोजनास यावे अशी विनंती केली; त्याप्रमाणे ते गेले व
मेजाभोवती बसले. 38 परंतु जेव्हा त्याने पाहिले की येशूंनी जेवणासाठी
प्रथम हात धुतले नाहीत तेव्हा त्या परूश्याला आश्चर्य वाटले. 39 ते पाहून
प्रभू त्याला म्हणाले, “तुम्ही परूशी लोक थाळी व प्याला बाहेरून स्वच्छ
करता, पण तुमची मने लोभ आणि दुष्टपणा यांनी भरलेली असतात. 40
अहो मूर्ख लोकांनो! ज्याने बाहेरील भाग घडविला त्यानेच अंतर्भाग सुद्धा
घडविला नाही काय? 41 तुमच्या अंतर्भागाबद्धल बोलायचे तर गरिबांना
उदारता दाखवा म्हणजे तुम्हाला सर्वकाही शुद्ध असल्याचे आढळेल.
42 “तुम्हा परूश्यांना धिक्कार असो! तुम्ही पुदिना, शेपू व बागेतील
प्रत्येक प्रकारची भाजी यांचा दशांश देत असला, तरी तुम्ही न्याय आणि
परमेश्वराची प्रीती याकडे दुर्लक्ष करता. तुम्ही दशांश निश्चितच द्यावा, पण
ज्या अधिक महत्त्वाच्या गोष्टी आहेत त्या तुम्ही सोडू नयेत. 43 “अहो
परूश्यांनो, तुम्हाला धिक्कार असो! कारण भरबाजारात लोकांकडून
मुजरे घेणे व सभागृहामध्ये प्रमुख जागेवर बसणे हे तुम्हाला प्रिय आहे.
44 “तुमचा धिक्कार असो! कारण तुम्ही खुणा नसलेल्या कबरांसारखे
आहात, लोकांना त्यावरून चालताना त्यांना माहीत होत नाही.” 45
त्यावेळी तिथे असलेला एक नियमशास्त्रज्ञ म्हणाला, “गुरुजी, तुम्ही
आता जे बोलला, त्यामुळे तुम्ही आमचा सुद्धा अपमान करीत आहात.”
46 येशूंनी उत्तर दिले, “आणि तुम्ही जे नियमशास्त्रतज्ञ आहात, त्या
तुम्हाला धिक्कार असो, कारण तुम्ही लोकांच्या खांद्यावर अशी अवघड
ओझी लादता, जी ते वाहू शकत नाहीत, परंतु त्यांना मदत करण्यासाठी
स्वत:चे एकही बोट लावण्याची तुमची इच्छा नसते. 47 “तुम्हाला
धिक्कार असो! कारण तुम्ही संदेष्ट्यांच्या कबरा बांधता ज्यांना तुमच्या
पूर्वजांनी मारून टाकले. 48 म्हणून तुमच्या पूर्वजांनी जे काही केले ते
योग्यच होते अशी तुम्ही साक्ष देत आहात; त्यांनी संदेष्ट्यांचा वध केला
आणि तुम्ही त्यांच्या कबरा बांधता. 49 याकारणास्तव परमेश्वर त्यांच्या
ज्ञानाप्रमाणे म्हणतात, ‘मी तुमच्याकडे संदेष्टे व प्रेषित पाठवेन आणि
त्यांच्यापैकी काहींचा तुम्ही वध कराल आणि इतरांचा छळ कराल.’ 50
म्हणून जगाच्या प्रारंभापासून सर्व संदेष्ट्यांचे जे रक्त सांडण्यात आले,
त्याबद्दल या पिढीला जबाबदार धरले जाईल. 51 हाबेलाच्या रक्तापासून

तर जखऱ्याहच्या रक्तापर्यंत जो मंदिर आणि वेदी यांच्यामध्ये वधला
गेला होता. त्याबद्दल या पिढीला जबाबदार धरले जाईल हे मी तुम्हाला
सांगतो. 52 “तुम्हा नियमशास्त्र तज्ञांना धिक्कार असो, कारण तुम्ही
ज्ञानाची किल्ली काढून घेतली. तुम्ही स्वतः प्रवेश करत नाही व जे प्रवेश
करू पाहतात त्यांनाही अडखळण करता.” 53 येशू बाहेर गेल्यानंतर,
परूशी आणि नियमशास्त्राच्या शिक्षकांनी त्यांना उग्रपणाने विरोध
करण्यास सुरुवात केली आणि त्यांना घेराव घालून त्यांच्यावर प्रश्नांचा
भडिमार केला. 54 त्यांना शब्दात धरण्याची ते संधी शोधू लागले.

**12** त्या दरम्यान हजारोंच्या संख्येने लोक एकत्र झाले त्यामुळे ते
एकमेकास चेंगरू लागले. तेव्हा येशू प्रथम आपल्या शिष्यांना
म्हणाले, “या परूशी लोकांच्या खमिरापासून म्हणजे ढोंगीपणापासून
सांभाळा. 2 जे प्रकट होणार नाही असे काही झाकलेले नाही किंवा जे
गुप्त आहे ते उघडकीस येणार नाही. 3 जे तुम्ही अंधारात सांगितले
आहे, ते दिवसाच्या प्रकाशात ऐकले जाईल; जे तुम्ही आतील खोलीत
कानात सांगितले, ते घराच्या धाब्यावरून जाहीर केले जाईल. 4 “माझ्या
मित्रांनो, जे शरीराचा नाश करतात व त्यानंतर काही करण्यास समर्थ
नाहीत अशांना भिऊ नका. 5 कोणाचे भय बाळगावे, हे मी तुम्हाला
सांगतो: शरीराचा वध केल्यानंतर, नरकात टाकण्याचा ज्याला अधिकार
आहे, त्याची भीती बाळगा. होय, मी सांगतो त्याचीच भीती बाळगा.
(Geenna g1067) 6 पाच चिमण्या दोन पैशात विकत नाहीत काय? तरी
त्यापैकी एकही चिमणीचा परमेश्वराला विसर पडत नाही. 7 खरोखर,
तुमच्या डोक्याचे सर्व केसही मोजलेले आहेत. म्हणून भीती बाळगू नका;
कारण तुम्ही पुष्कळ चिमण्यांपेक्षा अधिक मोलवान आहात. 8 “मी
तुम्हाला सांगतो, की जर कोणी मला इतरांपुढे जाहीरपणे स्वीकारेल,
तर मानवपुत्र सुद्धा देवदूतांसमक्ष जाहीरपणे तुमचा स्वीकार करेन. 9
तरी जे मला लोकांसमोर नाकारतात, त्यांना मी परमेश्वराच्या दूतांसमक्ष
नाकारीन. 10 आणि प्रत्येकजण जो मानवपुत्राच्या विरुद्ध बोलेल त्याला
क्षमा होईल, परंतु जे कोणी पवित्र आत्म्याविरुद्ध दुर्भाषण करतात
त्यांना कधीही क्षमा केली जाणार नाही. 11 “ज्यावेळी तुम्हाला सभागृह,
पुढारी, राज्यकर्ते यांच्यापुढे आणण्यात येईल, तेव्हा तुम्ही स्वतःचा
बचाव कसा करावा व काय बोलावे याविषयी चिंता करू नका. 12
कारण तुम्ही तिथे उभे असताना, काय बोलावे हे पवित्र आत्मा तुम्हाला
शिकवेल.” 13 तेवढ्यात समुदायामधून एकजण म्हणाला, “गुरुजी,
माझ्या भावाला मजबरोबर वतनाची विभागणी करण्यास सांगा.” 14
परंतु येशूंनी त्याला उत्तर दिले, “मला न्यायनिवाडा करण्यासाठी कोणी
तुम्हावर न्यायाधीश नेमले?” 15 नंतर येशू त्यांना म्हणाले, “सावध
राहा, सर्वप्रकारच्या लोभापासून दूर राहा, कारण पुष्कळ धनसंपत्ती
मध्ये जीवन नसते.” 16 नंतर येशूंनी एक दाखला सांगितला: “एका
श्रीमंत माणसाच्या शेतामध्ये भरपूर पीक आले. 17 तो मनाशी विचार
करू लागला, ‘मी काय करू? माझ्याजवळ धान्य ठेवावयास जागा
नाही.’ 18 “तो म्हणाला, ‘मी असे करतो. मी माझी सगळी कोठारे
पाडून टाकेन आणि यापेक्षाही मोठी बांधेन, म्हणजे मला धान्य साठविता
येईल. 19 आणि मी स्वतःस म्हणेन, “पुढे अनेक वर्षे पुरेल एवढ्या
धान्यांचा तुझ्याकडे साठा आहे. आता विसावा घे; खा, पी आणि आनंद
कर.”’ 20 “पण परमेश्वर त्याला म्हणाले, ‘अरे मूर्खा! आज रात्रीच
जर तुझा जीव मागितला गेला तर; जे सर्व तू स्वतःसाठी तयार केले
आहे ते कोणाचे होईल?’ 21 “परमेश्वराच्या मोलवान आशीर्वादांची
संपत्ती मिळविण्याऐवजी, जो मनुष्य स्वतःसाठी द्रव्याचा नुसता संचय
करतो, त्याचीही अशीच गत होणार आहे.” 22 तेव्हा येशू त्यांच्या
शिष्यांना म्हणाले: “मी तुम्हाला सांगतो, तुम्ही काय खावे अशी तुमच्या
जिवाबद्दल किंवा तुम्ही काय पांघरावे अशी तुमच्या शरीराबद्दल चिंता
करू नका. 23 अन्नापेक्षा जीव आणि वस्त्रांपेक्षा शरीर अधिक महत्त्वाचे
नाही काय? 24 कावळ्यांचा विचार करा; ते धान्य पेरीत नाही, कापणी
करीत नाही, त्यांच्याकडे कोठार वा भांडार नसते, तरीही परमेश्वर त्यांना
खायला घालतात आणि तुम्ही तर पक्ष्यांपेक्षा कितीतरी अधिक मोलवान
आहात! 25 शिवाय काळजी करून आयुष्यातील एक तास तरी कोणास
वाढविता येईल काय? 26 तुम्ही साध्या गोष्टी देखील करू शकत नाही
तर इतर गोष्टीबद्दल काळजी का करता? 27 “रानातील फुले कशी
वाढतात याचा विचार करा. ती कष्ट करीत नाहीत किंवा कातीत नाहीत.
तरी मी तुम्हाला सांगतो की शलोमोनदेखील आपल्या सर्व वैभवात
त्यांच्याइतका नटला नव्हता. 28 जे आज आहे आणि उद्या अग्नीत
टाकले जाते, त्या गवताला जर परमेश्वर असा पोशाख घालतात, तर
अहो अल्पविश्वासी, ते तुम्हाला किती विशेषकरून पोशाख घालतील!
29 तसेच, काय खावे, काय प्यावे याविषयी आपल्या मनात मुळीच
काळजी करू नका. 30 कारण परकीय लोक या गोष्टींच्या मागे लागतात,
पण तुम्हाला या गोष्टींची गरज आहे, हे तुमच्या पित्याला माहीत आहे.
31 परंतु तुम्ही त्यांचे राज्य मिळविण्यासाठी झटा म्हणजे या सर्व गोष्टीही
तुम्हाला प्राप्त होतील. 32 “हे लहान कळपा, तू भिऊ नकोस कारण
तुम्हाला राज्य देण्यास पित्याला आनंद होतो. 33 तुमची मालमत्ता विका
आणि गरिबांना द्या. कधीही जीर्ण होणार नाही अशा पिशव्या स्वतःसाठी
घ्या, वर स्वर्गामध्ये नष्ट न होणारा खजिना ठेवा, जिथे कोणी चोर येणार
नाही की त्याला कसरही लागणार नाही. 34 कारण जिथे तुमची संपत्ती
आहे, तिथे तुमचे मनही असेल. 35 “तुम्ही सेवेसाठी सज्ज व्हा व आपले
दिवे जळत राहू द्या, 36 अशा सेवकांसारखे असावे की, जे त्यांचा धनी
लग्नाच्या मेजवानीवरून परत येईल म्हणून वाट पाहत आहेत, यासाठी
की जेव्हा तो येतो आणि दार ठोठावतो त्याक्षणीच त्याच्यासाठी दार
उघडावे. 37 त्या सेवकांसाठी हे फारच चांगले असेल की, त्यांचा धनी
येतो, तेव्हा ते जागे आहेत असे त्याला दिसून येते. मी तुम्हाला निश्चित
सांगतो, तो धनी स्वतः त्यांची सेवा करण्यासाठी वस्त्रे घालेल आणि
त्यांना मेजाभोवती मागे टेकून बसावयास सांगेल आणि तो येईल आणि
त्यांना जेवण वाढेल. 38 तो मध्यरात्री येवो किंवा पहाटे, पण एवढे मात्र
निश्चित की तो केव्हाही आला, तरी त्याची वाट पाहत तयारीत असणाऱ्या
सेवकांना फार मोठा आशीर्वाद प्राप्त होईल. 39 पण एक गोष्ट नीट
समजून घ्या की चोर केव्हा येणार ती घटका घरधन्याला आधी समजली

असती, तर तो जागा राहिला असता आणि आपले घर फोडू दिले नसते.
40 तुम्ही सदैव तयारीत राहा. कारण मानवपुत्र तुम्हाला कल्पना नसेल
अशा घटकेला येईल.” 41 पेत्राने विचारले, “प्रभूजी, तुम्ही हा दाखला
आम्हाला उद्देशून सांगत आहात की सर्वांना?” 42 यावर प्रभूजींनी उत्तर
दिले, “प्रामाणिक व सुज्ञ कारभारी कोण आहे, ज्याच्यावर घरधनी
त्याच्या सेवकांच्या अन्नाचे योग्य वेळी वाटप करण्याचे काम सोपवितो?
43 धनी येईल, तेव्हा जो दास आपली कामगिरी बजावीत असताना
त्याला आढळेल, तो धन्य होय. 44 मी तुम्हाला निश्चित सांगतो की
तो धनी आपल्या सर्व मालमत्तेवर त्याची नेमणूक करेल. 45 परंतु जो
सेवक आपल्या मनात म्हणेल, ‘माझा धनी येण्यास पुष्कळ विलंब होत
आहे,’ आणि तो सोबतीच्या दासांना व दासींना मारहाण करू लागेल
आणि पिणाऱ्यांबरोबर खाऊ आणि पिऊ लागेल. 46 तर त्या दासाचा
धनी, तो अपेक्षा करीत नाही आणि तो सावध नाही अशा घटकेला
येईल. तो त्या दासाचे तुकडे करेल व अविश्वासणाऱ्यांबरोबर त्याला
वाटा देईल. 47 “मग त्या सेवकाला पुष्कळ फटके मारण्यात येतील,
कारण धन्याची इच्छा माहीत असूनही त्याने तयारी केली नाही किंवा
धन्याला जे पाहिजे ते केले नाही. 48 परंतु ज्यांना माहीत नाही की त्यांनी
शिक्षेस पात्र अशी कृत्ये केली आहेत त्यांना थोडेच फटके मारण्यात
येतील. ज्या प्रत्येकाला भरपूर दिलेले आहे, त्याच्याकडून भरपूर मागणी
केली जाईल आणि ज्याच्याकडे अधिक सोपविलेले आहे, त्याच्याकडून
खूप अधिक मागण्यात येईल. 49 “मी पृथ्वीवर आग आणली आहे, ती
आधी पेटली असती तर किती बरे झाले असते, 50 मला एक बाप्तिस्मा
घ्यावयाचा आहे. त्याची पूर्णता होईपर्यंत माझ्यावर कितीतरी दडपण
आहे! 51 मी पृथ्वीवर शांती देण्यासाठी आलो आहे, असे तुम्हाला
वाटते का? नाही, मी तर फूट पाडण्यासाठी आलो आहे. 52 येथून
पुढे एका कुटुंबात असलेल्या पाचजणांत एकमेकांविरुद्ध फूट पडेल,
तिघांविरूद्ध दोघे आणि दोघांविरुद्ध तिघे असे होतील. 53 ते विभागले
जातील त्यांच्यामध्ये फूट पडेल, बापाविरुद्ध पुत्र आणि पुत्राविरुद्ध पिता,
मुलगी आईविरुद्ध आणि आई मुलीविरुद्ध, सासू सुनेविरुद्ध आणि सून
सासूविरुद्ध.” 54 ते लोकांना म्हणाले: “पश्चिमेकडे ढग जमलेले तुम्हाला
दिसले, म्हणजे तुम्ही लगेच म्हणता, ‘आता पाऊस पडेल,’ आणि तो
पडतो. 55 आणि जेव्हा दक्षिणेकडील वारा वाहू लागतो, तेव्हा तुम्ही
म्हणता, ‘आज उकडेल’ आणि तसे होते. 56 ढोंगी जनहो! पृथ्वीवरील व
आकाशात होणाऱ्या बदलांचे अर्थ तुम्हाला कळतात, परंतु आताच्या
काळाच्या चिन्हांचा अर्थ तुम्हाला का लावता येत नाही? 57 “जे काही
योग्य आहे, त्याविषयी तुम्हीच स्वत:साठी न्याय का करीत नाही?
58 ज्यावेळी तुम्ही शत्रूबरोबर न्यायालयात जाण्यापूर्वी वाटेत एकत्रित
असतानाच संबंध नीट करा, नाहीतर तुमचा शत्रू तुम्हाला न्यायाधीशाकडे
ओढून नेईल, न्यायाधीश अधिकाऱ्याच्या हाती सोपवून देईल आणि
अधिकारी तुम्हाला तुरुंगात टाकेल. 59 मी तुम्हाला सांगतो की प्रत्येक
दमडी चुकती केल्याशिवाय तुमची तुरुंगातून सुटका होणार नाही.”

**13** त्या सुमारास तिथे जे हजर होते, त्यांनी असे वृत्त येशूंना
सांगितले की, गालील येथील रहिवाशांचे रक्त पिलाताने त्यांच्या
बलिदानांमध्ये मिश्रित केले होते. 2 येशूंनी उत्तर दिले, “गालीलातील
लोक इतर लोकांपेक्षा अधिक पापी होते म्हणून त्यांनी दु:ख सोसले
असे तुम्हाला वाटते काय? 3 मी तुम्हाला सांगतो, तसे मुळीच नाही. जर
तुम्हीही पश्चात्ताप केला नाही तर तुम्हा सर्वांचा नाश होईल. 4 किंवा
शिलोआमाचा बुरूज जेव्हा त्या अठरा लोकांवर पडला आणि ते मरण
पावले, तर तुम्हाला असे वाटते काय की, यरुशलेममध्ये राहणाऱ्या
सर्वांपेक्षा ते अधिक दोषी होते? 5 नाही, मुळीच नाही! परंतु तुम्ही
पश्चात्ताप केला नाही, तर तुमचाही नाश होईल.” 6 नंतर त्यांनी हा
दाखला सांगितला: “एका मनुष्याच्या बागेमध्ये अंजिराचे झाड वाढत
होते, आणि तो फळ पाहावयास गेला पण त्याला काही सापडले नाही.
7 जो मळ्याची काळजी घेत होता त्यास म्हणाला, ‘तीन वर्षांपासून मी
या अंजिराच्या झाडावर फळ शोधायला येत आहे आणि मला काहीच
मिळाले नाही. ते उपटून टाक! या जागेचा व्यर्थ उपयोग का बरे?’
8 “त्यावर माळी धन्याला म्हणाला, ‘आणखी एक वर्ष राहू द्या, मी
त्याच्याभोवती खोदून खतपाणी घालेन. 9 पुढील वर्षी फळ आले तर
ठीक! नाही मिळाले तर उपटून टाका.’” 10 एकदा शब्बाथ दिवशी येशू
एका सभागृहामध्ये शिक्षण देत होते, 11 तिथे एका स्त्रीला दुरात्म्याने
अठरा वर्षे अपंग करून ठेवले होते. ती कुबडी असल्यामुळे तिला नीट
उभे राहता येत नव्हते. 12 येशूंनी तिला आपल्याजवळ बोलाविले,
आणि ते तिला म्हणाले, “बाई, तू तुझ्या विकारापासून मुक्त झाली
आहेस.” 13 त्यांनी तिला स्पर्श केला आणि तत्काळ तिला सरळ
उभे राहता आले. तेव्हा ती परमेश्वराची स्तुती करू लागली. 14 येशूंनी
शब्बाथ दिवशी बरे केले हे पाहून सभागृहाचा प्रमुख खूपच संतप्त
झाला व लोकांना म्हणाला, “काम करण्यासाठी सहा दिवस आहेत;
त्या दिवसातच आजारातून बरे होण्यासाठी येत जा; शब्बाथ दिवशी
नाही.” 15 प्रभूने त्यांना उत्तर दिले, “ढोंग्यांनो! तुमच्यातील कोणी
शब्बाथ दिवशी आपल्या बैलाला किंवा गाढवाला गोठ्यातून बाहेर पाणी
पाजण्यास नेत नाहीत काय? 16 ही स्त्री अब्राहामाच्या वंशातील कन्या
आहे, तिला सैतानाने अठरा वर्षे कैद करून बंधनात जखडून ठेवले होते,
शब्बाथ दिवशी तिला बंधमुक्त करणे योग्य नाही का?” 17 येशूंचे हे
उद्गार ऐकून त्याचे सर्व विरोधक लज्जित झाले, पण लोक मात्र ते करीत
असलेल्या अद्भुत कृत्यांमुळे हर्षभरित झाले. 18 नंतर येशूंनी विचारले,
“परमेश्वराचे राज्य कशाप्रकारचे आहे? त्याची तुलना मी कशाशी करू?
19 एका मनुष्याने आपल्या बागेत पेरलेल्या मोहरीच्या दाण्यासारखे
आहे. ते वाढून मोठे झाड होते आणि त्याच्या फांद्यांमध्ये आकाशातील
पक्षी विसावा घेतात.” 20 पुन्हा येशूंनी विचारले, “परमेश्वराच्या राज्याची
तुलना मी कशाबरोबर करू? 21 ते खमिरासारखे आहे, एका स्त्रीने ते
घेतले आणि तीन माप पिठात तोपर्यंत एकत्र केले की त्यामुळे सर्व
पीठ चांगले फुगले.” 22 नंतर येशू शहरातून आणि गावातून शिक्षण
देत यरुशलेमकडे जाण्यासाठी निघाले. 23 त्यावेळी कोणीतरी त्यांना

विचारले, “प्रभूजी, फक्त थोड्याच लोकांना तारण प्राप्त होणार का?”
येशू त्यांना म्हणाले, 24 “अरुंद द्वाराने प्रवेश करण्याचा प्रयत्न करा,
पुष्कळजण आत जाण्याचा प्रयत्न करतील, पण आत जाऊ शकणार
नाहीत. 25 एकदा जर घर प्रमुखाने दार लावून घेतले, तर तुम्ही बाहेर उभे
राहून दार ठोकीत व विनंती करून म्हणाल, ‘महाराज, आम्हासाठी दार
उघडा.’ “तो तुम्हाला उत्तर देईल, ‘मी तुम्हाला ओळखीत नाही किंवा
तुम्ही कुठून आला हे मला माहीत नाही.’ 26 “पण तुम्ही म्हणाल, ‘आम्ही
तुमच्याबरोबर खाणेपिणे केले, आणि तुम्ही आमच्या रस्त्यावर शिक्षण
दिले.’ 27 “त्यावर तो तुम्हाला उत्तर देईल, ‘मी तुम्हाला ओळखीत
नाही व तुम्ही कुठले आहात हे मला माहीत नाही. तुम्ही सर्व अन्याय
करणाऱ्यांनो माझ्यापासून दूर निघून जा!’ 28 “अब्राहाम, इसहाक,
याकोब आणि सर्व संदेष्टे परमेश्वराच्या राज्यात असलेले पाहाल पण
स्वतःला मात्र बाहेर टाकलेले पाहाल, तेव्हा तुमच्यामध्ये रडणे आणि
दातखाणे असेल. 29 पूर्व आणि पश्चिमेकडून, उत्तर व दक्षिणेकडून
लोक येतील, आणि परमेश्वराच्या राज्याच्या मेजवानीत सामील होऊन
आपआपल्या जागा घेतील. 30 खरोखर, जे शेवटचे ते पहिले आणि
जे पहिले ते शेवटचे होतील.” 31 काही परूशी येशूंकडे येऊन त्यांना
म्हणाले, “आपण येथून निघून जा, कारण हेरोद राजा आपणास जिवे
मारावयास पाहत आहे.” 32 येशूंनी उत्तर दिले, “त्या कोल्ह्याला जाऊन
सांगा, की ‘मी आज व उद्या भुते काढीत आणि रोग बरे करीत राहीन
आणि तिसऱ्या दिवशी माझा उद्देश पूर्ण करेन.’ 33 काही झाले तरी मला
आज, उद्या आणि परवा प्रवास केलाच पाहिजे कारण संदेष्ट्यांची हत्या
यरुशलेमच्या बाहेर होणे शक्य नाही. 34 “हे यरुशलेम, यरुशलेम!
संदेष्ट्यांना ठार मारणारे आणि तुझ्याकडे पाठविलेल्यांना धोंडमार
करणारे! जशी कोंबडी आपल्या पिलांना पंखाखाली एकवटते, तसे
तुझ्या लेकरांना एकवटण्याची माझी कितीतरी इच्छा होती. पण तुमची
नव्हती. 35 आणि पाहा! आताच तुझे घर ओसाड पडले आहे. मी तुला
सांगतो की, ‘प्रभूच्या नावाने येणारे धन्यवादित असो’ असे तू म्हणेपर्यंत
मी तुझ्या दृष्टीस पडणार नाही.”

**14** एका शब्बाथ दिवशी येशू एका प्रमुख परूश्याच्या घरी जेवावयास
गेले असताना त्यांच्यावर काळजीपूर्वक लक्ष ठेवले जात होते. 2
तिथे त्यांच्यासमोर शरीरावर असाधारण सूज असलेला एक मनुष्य
होता. 3 परूशी व नियमशास्त्रज्ञ यांना येशूंनी विचारले, “शब्बाथ दिवशी
बरे करणे हे नियमानुसार आहे का?” 4 परंतु ते शांत राहिले. येशूंनी त्या
आजारी मनुष्याचा हात धरून त्याला बरे केले आणि जाऊ दिले. 5 नंतर
ते म्हणाले, “जर तुमचे लहान लेकरू किंवा बैल शब्बाथ दिवशी विहिरीत
पडले, तर तुम्ही त्याला ताबडतोब बाहेर काढणार नाही का?” 6 पण ते
काहीच बोलले नाही. 7 पाहुणे पंक्तीत मानाच्या जागा पटकावण्याच्या
खटपटीत असलेले पाहून त्यांनी त्यास दाखला सांगितला 8 “तुम्हाला
कोणी लग्नाच्या मेजवानीस आमंत्रण दिले, तर मानाची जागा घेऊ नका,
कारण तुमच्यापेक्षा अधिक आदरणीय व्यक्तीस आमंत्रण दिले असेल 9
तर आमंत्रण देणारा, ज्याने तुम्हा दोघांना आमंत्रित केले आहे तो येईल
आणि तुम्हाला म्हणेल, ‘या गृहस्थांना या जागेवर बसू द्या.’ तेव्हा तुमचा
अपमान होईल व कमी प्रतीच्या जागेवर जाऊन बसावे लागेल. 10 परंतु
जेव्हा तुम्हाला आमंत्रण दिलेले असेल तर खालच्या जागेवर जाऊन
बसा, म्हणजे जेव्हा तुमचा यजमान येतो, तो तुम्हाला म्हणेल, ‘मित्रा,
चांगल्या जागेवर ये.’ तेव्हा दुसऱ्या सर्व पाहुण्यांच्या उपस्थितीमध्ये
तुमचा सन्मान होईल. 11 कारण जे सर्व स्वतःला उच्च करतात, त्यांना
नम्र केले जाईल आणि जे स्वतःला नम्र करतात, ते उंच केले जातील.”
12 नंतर येशू यजमानास म्हणाले, “जेव्हा तुम्ही दुपारी व संध्याकाळी
मेजवानी देता, त्यावेळी तुमचे मित्र, भाऊ किंवा बहीण, नातेवाईक
आणि श्रीमंत शेजारी यांना आमंत्रण देऊ नका, जर तुम्ही तसे कराल तर
ते तुमच्या आमंत्रणाची परतफेड करतील. 13 तुम्ही मेजवानी देता, तेव्हा
गोरगरीब, लुळेपांगळे आणि आंधळे अशांना आमंत्रण द्या. 14 म्हणजे
नीतिमानांच्या पुनरुत्थानासमयी, ज्यांना परतफेड करता येत नाही, अशा
लोकांना दिल्याबद्दल तुम्हाला आशीर्वाद दिला जाईल.” 15 येशूंच्या
बरोबर पंक्तीस बसलेल्या एकाने हे ऐकले, व तो येशूंना म्हणाला, “धन्य
आहे तो मनुष्य, जो परमेश्वराच्या राज्यातील मेजवानीत भोजन करेल.”
16 येशूंनी उत्तर दिले: “एक मनुष्य मोठी मेजवानी देण्याची तयारी करत
होता आणि त्याने अनेक पाहुण्यांना आमंत्रणे दिली. 17 मेजवानीच्या
वेळेला त्याने त्याच्या दासांना ज्यांना आमंत्रणे दिली होती त्यांना, ‘चला
आता भोजनाची सर्व तयारी झाली आहे’ असे सांगण्यास पाठविले. 18
“परंतु ते प्रत्येकजण सबबी सांगू लागले. पहिला म्हणाला, ‘मी नुकतेच
शेत विकत घेतले आहे आणि ते मला जाऊन पहिले पाहिजे, म्हणून
मला माफ करा.’ 19 “दुसरा म्हणाला, ‘मी बैलांच्या पाच जोड्या विकत
घेतल्या आहेत, मी त्यांची तपासणी करावयास जातो, म्हणून क्षमा
असावी.’ 20 “तिसरा म्हणाला, ‘माझा नुकताच विवाह झाला आहे
म्हणून मी येऊ शकत नाही.’ 21 “शेवटी दास आपल्या धन्याकडे परत
आला आणि त्याला सर्व सांगितले. त्यावेळी धनी खूप रागावला व
आपल्या दासाला आदेश दिला, ‘तू शहरातील रस्त्यांत व गल्ल्याबोळात
जा आणि भिकारी, लुळेपांगळे आणि आंधळे सापडतील, त्यांना आण.’
22 “‘महाराज,’ दास म्हणाले, ‘आपल्या आदेशाप्रमाणे केले आहे,
परंतु अजून पुष्कळ जागा रिकामी राहिली आहे.’ 23 “त्यावेळी धनी
दासाला म्हणाला, ‘आता गावातील रस्त्यावर आणि गल्लीत जा आणि
जे तुला भेटतील, त्यांना आग्रहाने घेऊन ये, म्हणजे माझे घर भरून
जाईल. 24 कारण ज्यांना आमंत्रण दिले होते, त्यांना भोजनातले काहीही
चाखावयास मिळणार नाही.’” 25 लोकांचा मोठा घोळका येशूंच्या मागे
चालला होता. तेव्हा ते मागे वळून लोकांना म्हणाले, 26 “जो कोणी
माझ्याकडे येतो आणि जर आपले आईवडील, पत्नी आणि मुले, भाऊ
व बहिणी किंबहुना स्वतःच्या जिवाचाही द्वेष करणार नाही तर तो माझा
शिष्य होऊ शकणार नाही. 27 त्याचप्रमाणे जो कोणी आपला क्रूसखांब
उचलून घेऊन माझ्यामागे येत नाही, त्याला माझा शिष्य होता येणार
नाही. 28 “समजा कोणा एकास बुरूज बांधावयाचा असेल, तर प्रथम
बसून खर्चाचा नीट अंदाज करून व तो पूर्ण करण्यासाठी पुरेसे पैसे आहे

की नाही याचा अंदाज घेत नाही का? 29 कारण जर तुम्ही पाया घातला
आणि नंतर जर तो पूर्ण करण्यास समर्थ झाला नाही, तर ते पाहून
प्रत्येकजण त्याची थट्टा करतील. 30 म्हणतील, ‘या मनुष्याने बांधण्यास
सुरुवात केली खरी, पण तो पूर्ण करू शकला नाही.’ 31 “किंवा असा
कोण राजा आहे, जो दुसऱ्या राजाच्या विरुद्ध युद्धास जाणार आहे. तो
बसून विचार करणार नाही का, जो वीस हजार सैनिक घेऊन येत आहे
त्याच्याविरुद्ध लढण्यासाठी त्याला दहा हजारांना घेऊन जाणे शक्य
होईल का? 32 जर त्याला हे शक्य नसेल, तर शत्रू दूर आहे तेव्हाच
शांतीच्या प्रस्तावाचे बोलणे करण्यासाठी प्रतिनिधीमंडळ पाठवेल. 33
त्याचप्रमाणे तुम्ही तुमच्याजवळ आहे त्या सर्व गोष्टींचा त्याग करीत नाही
तर तुम्हाला माझा शिष्य होता येणार नाही. 34 “मीठ चांगले आहे, पण
मिठाचा खारटपणा गेला, तर त्याचा खारटपणा कशाने परत आणाल?
35 ते जमिनीच्या व खताच्याही उपयोगाचे नाही; ते बाहेर टाकून दिले
जाईल. “ज्यांना ऐकावयास कान आहेत त्यांनी ऐकावे.”

**15** आता जकातदार आणि अनेक पापी येशूंचे उपदेश ऐकण्यासाठी
आले होते. 2 हे पाहून परूशी आणि नियमशास्त्र शिक्षक तक्रार
करू लागले, “येशू पापी लोकांचे स्वागत करतात आणि त्यांच्या पंक्तीस
बसून जेवतात.” 3 त्यावेळी येशूंनी त्यांना हा दाखला सांगितला: 4
“समजा, एखाद्याजवळ शंभर मेंढरे आहेत आणि त्यातील एक हरवले,
तर नव्याण्णव रानात सोडून हरवलेले मेंढरू सापडेपर्यंत त्याला शोधणार
नाही काय? 5 ते सापडल्यावर तो त्याला आनंदाने आपल्या खांद्यावर
उचलून घेईल 6 आणि घरी येईल. आपल्या मित्रांना आणि शेजाऱ्यांना
बोलावून म्हणेल, ‘मजबरोबर आनंद करा कारण माझे हरवलेले मेंढरू
सापडले आहे.’ 7 त्याचप्रमाणे मी तुम्हाला सांगतो की ज्या नव्याण्णव
नीतिमान लोकांना पश्चात्तापाची गरज नाही, त्यांच्यापेक्षा पश्चात्ताप
करणाऱ्या एका पापी मनुष्याबद्दल स्वर्गात अधिक आनंद होतो. 8
“एका स्त्री जवळ चांदीची दहा नाणी असून त्यातील एक हरवले, तर ती
दिवा लावून, घर झाडून ते सापडेपर्यंत त्याचा शोध करणार नाही काय?
9 ते तिला सापडल्यावर, आपल्या मैत्रिणींना आणि शेजाऱ्यांना बोलावून
म्हणते, ‘माझ्याबरोबर आनंद करा, कारण माझे हरवलेले नाणे सापडले
आहे.’ 10 त्याचप्रमाणे मी तुम्हाला सांगतो, पश्चात्ताप करणाऱ्या एका
पाप्याबद्दल परमेश्वराच्या दूतांच्या समक्षतेत आनंद केला जातो.” 11
येशू पुढे म्हणाले, “एका मनुष्याला दोन पुत्र होते. 12 त्यातील धाकटा
आपल्या वडिलांना म्हणाला, ‘बाबा, मालमत्तेतील माझा वाटा मला द्या’
त्यावेळी त्याच्या वडिलांनी आपली मालमत्ता त्यांच्यामध्ये वाटून दिली.
13 “काही दिवस झाले नाही तोच, धाकट्या पुत्राने सर्वकाही जमा केले व
दूर देशी निघून गेला, तिथे आपला सर्व पैसा चैनबाजीत उधळून टाकला.
14 सर्वकाही खर्च करून झाल्यानंतर, त्या संपूर्ण देशामध्ये कडक
दुष्काळ पडला आणि त्याला प्रत्येक वस्तूची उणीव भासू लागली. 15
तेव्हा तो स्वतःला मजुरीवर घेण्यासाठी त्या देशातील एका नागरिकाकडे
गेला, त्याने त्याला त्याच्या शेतात डुकरे चारावयास पाठविले. 16 शेवटी
आपले पोट भरण्यासाठी, डुकरे खात असलेल्या शेंगा खाव्या असे
त्याला वाटले, कारण त्याला कोणीच काही दिले नव्हते. 17 “शेवटी तो
शुद्धीवर आला आणि स्वतःशीच म्हणाला, ‘माझ्या पित्याच्या घरी नोकर
चाकरांनाही पुरून उरेल इतके अन्न असते, पण मी मात्र इकडे उपाशी
मरत आहे. 18 मी आता माझ्या पित्याकडे जाईन आणि म्हणेन: बाबा,
मी स्वर्गाविरुद्ध आणि तुमच्याविरुद्ध पाप केले आहे. 19 आता तुमचा
पुत्र म्हणवून घेण्यास लायक राहिलो नाही; मला एका चाकरांसारखे
ठेवा.’ 20 तेव्हा तो उठला आपल्या पित्याकडे निघाला. “तो अजून दूर
अंतरावर असतानाच वडिलांनी त्याला पाहिले आणि वडिलांचे हृदय
कळवळले. ते धावत त्याच्याकडे गेले, त्याला मिठी मारून त्याचे चुंबन
घेतले. 21 “मुलगा म्हणाला, ‘बाबा, मी स्वर्गाविरुद्ध आणि तुमच्याविरुद्ध
पाप केले आहे. तुमचा मुलगा म्हणवून घेण्यास लायक राहिलो नाही.
मला तुमच्या नोकरासारखे ठेवा.’ 22 “परंतु त्याच्या वडिलांनी मात्र
आपल्या चाकरांना आज्ञा केली, ‘त्वरा करा, सर्वात उत्तम झगा आणून
त्याला घाला. त्याचप्रमाणे त्याच्या बोटात अंगठी घाला आणि पायात
पायतण घाला. 23 खास पोसलेले एक वासरू कापा. हा आनंदाचा प्रसंग
आपण मेजवानीने साजरा करू. 24 कारण हा माझा मुलगा मरण पावला
होता, आता तो जिवंत झाला आहे, हरवला होता, आणि आता तो
सापडला आहे.’ त्यांनी अशा रीतीने आनंद केला. 25 “तेवढ्यात थोरला
मुलगा शेतातील आपले काम आटोपून घरी आला आणि त्याला घरातून
येणारे नृत्यसंगीत ऐकू आले. 26 तेव्हा त्याने एका नोकराला बोलावून
विचारले, ‘हे काय चालले आहे?’ 27 यावर त्याला सांगण्यात आले,
‘तुझा भाऊ परत आला आहे. तो सुखरुपपणे घरी आला म्हणून तुमच्या
वडिलांनी एक पोसलेले वासरू कापले आहे!’ 28 “हे ऐकताच थोरला
भाऊ खूप रागावला. तो घरात जाईना. तेव्हा त्याचे वडील बाहेर आले
आणि त्याला विनंती करू लागले. 29 परंतु त्याने वडिलांना उत्तर दिले,
‘बाबा, मी इतकी वर्षे सेवा केली आणि तुमची एकही आज्ञा मोडली
नाही, तरी तुम्ही आजपर्यंत मी माझ्या मित्रांबरोबर आनंद करावा म्हणून
एक करडूही दिले नाही. 30 पण आता हा तुमचा पुत्र आपली सर्व संपत्ती
वेश्यांवर उधळून घरी आला, तेव्हा तुम्ही त्याच्यासाठी धष्टपुष्ट वासरू
कापले आहे!’ 31 “यावर त्याचे वडील त्याला म्हणाले, ‘माझ्या मुला, तू
माझ्याबरोबर नेहमीच असतोस आणि जे माझे आहे, ते सर्व तुझेच आहे.
32 हा आनंदाचा प्रसंग हर्षाने साजरा करावयाचा आहे कारण तुझा भाऊ
मरण पावला होता, तो आज परत जिवंत झाला आहे. तो हरवला होता,
पण आता सापडला आहे.’”

**16** येशूंनी आपल्या शिष्यांना सांगितले: “एक श्रीमंत मनुष्य होता,
त्याचा कारभारी संपत्तीचा दुरुपयोग करतो असा आरोप त्याच्यावर
होता. 2 त्याच्या धन्याने त्याला बोलावून विचारले, ‘तुझ्याबद्दल मी हे
काय ऐकत आहे? तू तुझ्या कारभाराचा हिशोब कर, कारण आता तू
कारभारी म्हणून राहणार नाहीस.’ 3 “त्या कारभाऱ्याने मनाशी विचार
केला, ‘आता मी काय करावे? माझे महाराज माझ्याकडून कारभार
काढून घेत आहे! खड्डे खणण्याची तर माझ्यात ताकद नाही, भीक
मागण्याची मला लाज वाटते— 4 मला समजले आहे की मी काय

करावे, म्हणजे मला कारभारावरून काढले, तरी लोक त्यांच्या घरांमध्ये
माझे स्वागत करतील.' 5 "मग त्याने आपल्या धन्याच्या प्रत्येक
कर्जदाराला बोलाविले. त्याने पहिल्यास विचारले, 'माझ्या धन्याचे
तुझ्यावर किती कर्ज आहे?' 6 "तो म्हणाला, 'नऊशे बथ जैतुनाचे
तेल.'" यावर कारभारी म्हणाला, "हा तुझा सहीचा करारनामा घे आणि
तो फाडून टाक, व दुसरा करारनामा घेऊन त्यावर चारशे पन्नास आकडा
मांड. 7 "नंतर त्याने दुसऱ्याला विचारले, 'तुझ्यावर किती कर्ज आहे?'
"'एक हजार पोती गहू,' तो म्हणाला. "त्याने त्याला सांगितले 'हा
तुझा करारनामा घे आणि त्यावर फक्त आठशे पोती लिही.' 8 "त्या
लबाड कारभाऱ्याची ही धूर्तता पाहून धन्याने त्याची वाहवा केली. या
जगाचे लोक त्यांच्यासारख्यांशी व्यवहार करताना फार धूर्ततेने वागतात.
प्रकाशाच्या लोकांना मात्र तसे वागता येत नाही. **(aiōn g165)** 9 जगातील
संपत्ती आपल्याला मित्र मिळविण्यासाठी वापरा म्हणजे ज्यावेळेस ती
नाहीशी होईल तेव्हा तुम्हाला सार्वकालिक घरामध्ये निश्चितपणे प्रवेश
मिळेल. **(aiōnios g166)** 10 "जर तुम्ही अगदी लहान गोष्टींत विश्वासू
राहिला तर पुष्कळ गोष्टींत विश्वासू असाल, जर कोणी अगदी लहान
गोष्टीत अप्रामाणिक राहिला तर पुष्कळ गोष्टीत अप्रामाणिक असेल.
11 तुम्ही ऐहिक संपत्ती हाताळण्यासंबंधी प्रामाणिक नसाल, तर खरी
संपत्ती कोण तुम्हाला सोपवून देईल? 12 तुम्ही इतर लोकांच्या संपत्ती
संबंधी विश्वासू नसाल, तर तुम्हाला स्वतःची संपत्ती कोण देईल? 13
"कोणी दोन धन्यांची चाकरी करू शकत नाही. तुम्ही एकाचा द्वेष कराल
आणि दुसऱ्यावर प्रीती कराल किंवा एकाला समर्पित असाल आणि
दुसऱ्याला तुच्छ मानाल. तुम्हाला परमेश्वराची आणि धनाची सेवा एकाच
वेळी करता येणार नाही." 14 हे ऐकून परूश्यांनी त्यांचा उपहास केला,
कारण ते पैशावर प्रेम करत होते. 15 येशू त्यांना म्हणाले, "तुम्ही स्वतःस
दुसऱ्यांच्या दृष्टीने नीतिमान ठरविणारे आहात, परंतु परमेश्वर तुमचे हृदय
जाणून आहे. लोक ज्याला महत्त्व देतात त्या गोष्टी परमेश्वराच्या दृष्टीने
तुच्छ आहेत. 16 "योहान येईपर्यंत मोशेचे नियमशास्त्र आणि संदेष्टे
होते त्या वेळेपासून परमेश्वराच्या राज्याची शुभवार्ता गाजविली जात
आहे आणि प्रत्येकजण आत जाण्याचा नेटाने प्रयत्न करीत आहे. 17
नियमशास्त्रातील एकही शब्द अथवा कानामात्रा काढून टाकणे यापेक्षा
आकाश व पृथ्वी नाहीशी होणे हे सोपे आहे. 18 "जो कोणी आपल्या
पत्नीला सूटपत्र देतो आणि दुसऱ्या स्त्रीशी लग्न करतो, तो व्यभिचार
करतो आणि जो पुरुष सूटपत्र दिलेल्या स्त्रीसोबत विवाह करतो तो
व्यभिचार करतो." 19 येशू म्हणाले, "कोणी एक श्रीमंत मनुष्य होता.
तो दररोज जांभळी आणि सुंदर वस्त्रे परिधान करीत असे आणि चैनीत
राहत असे. 20 त्याच्या फाटकाजवळ लाजर नावाचा भिकारी पडून
होता, तो फोडांनी भरलेला होता. 21 त्या श्रीमंत मनुष्याच्या मेजावरून
खाली पडलेला चुरा मिळावा या आशेने तो तिथे पडलेला असताना कुत्री
येऊन त्याचे फोड चाटीत असत. 22 "अशी वेळ आली की तो भिकारी
मरण पावला आणि दूतांनी त्याला अब्राहामाजवळ नेले. श्रीमंत मनुष्यही
मरण पावला, तेव्हा त्याला पुरण्यात आले. 23 आणि त्याचा आत्मा
अधोलोकात गेला. तिथे तो यातना भोगीत असताना, तिथून त्याने
दूर अंतरावर लाजराला अब्राहामाच्या जवळ असलेले पाहिले. **(Hadēs
g86)** 24 त्याने त्याला हाक मारली, 'हे पित्या अब्राहामा, माझ्यावर
दया करून लाजराला पाठीव यासाठी की त्याने आपल्या बोटाचे टोक
पाण्यात बुडवून माझी जीभ थंड करावी, कारण या अग्निज्वालांमध्ये मी
कासावीस झालो आहे.' 25 "परंतु अब्राहामाने उत्तर दिले, 'मुला, तुझ्या
आयुष्यात तुला चांगल्या गोष्टी मिळाल्या, पण लाजराला वाईट गोष्टी
मिळाल्या, म्हणून तो आता सांत्वन पावत आहे आणि तू क्लेश भोगीत
आहेस. 26 आणि याव्यतिरिक्त, आमच्या आणि तुमच्यामध्ये एक मोठी
दरी स्थापलेली आहे, जे येथून तुझ्याकडे जाण्याची इच्छा करतात ते
जाऊ शकत नाहीत किंवा तिथून आम्हापर्यंत ती दरी ओलांडून कोणीही
येऊ शकत नाही.' 27 "तो म्हणाला, 'मग हे पित्या, मी तुम्हाला विनवितो
की, लाजाराला माझ्या कुटुंबाकडे पाठवा. 28 कारण मला पाच भाऊ
आहेत. ते सुद्धा या यातना स्थळी येऊ नयेत, म्हणून त्याने त्यांना सावध
करावे.' 29 "पण अब्राहामाने उत्तर दिले, 'त्यांच्याजवळ मोशे आणि
संदेष्टे आहेत त्यांचे त्यांनी ऐकावे.' 30 "'हे पित्या अब्राहामा, असे नाही.
परंतु मृतातून त्यांच्याकडे कोणी गेले तर, ते पश्चात्ताप करतील.' 31
"अब्राहाम त्याला म्हणाला, 'ते मोशे किंवा संदेष्ट्यांचे ऐकत नाहीत, तर
मृतातून जिवंत होऊन कोणी गेला, तरी ते निश्चितच ऐकणार नाहीत.'"

**17** येशू आपल्या शिष्यांना म्हणाले, "लोकांना अडखळण होतील
अशा गोष्टी निश्चितच येतीलच, परंतु ज्याच्याद्वारे अडखळण
येईल, त्याचा धिक्कार असो. 2 जो कोणी या लहानातील एकालाही
अडखळण करतो, त्याच्या गळयात जात्याची तळी बांधून त्याला
समुद्रात फेकून द्यावे हे त्याच्या अधिक हिताचे ठरेल. 3 म्हणूनच तुम्ही
स्वतःला सांभाळा. "तुझ्या भावाने किंवा बहिणीने पाप केले, तर त्यांचा
निषेध कर आणि त्यांनी पश्चात्ताप केला, तर त्यांना क्षमा कर. 4
त्याने दिवसातून सात वेळा तुझ्याविरुद्ध पाप केले आणि सात वेळा
परत क्षमेची याचना करून म्हटले 'मी पश्चात्ताप केला आहे,' तर तू
त्याला क्षमा कर." 5 एके दिवशी शिष्य प्रभूला म्हणाले, "आमचा
विश्वास वाढवा." 6 प्रभू येशूंनी उत्तर दिले, "तुम्हामध्ये मोहरीच्या
दाण्याएवढा जरी विश्वास असला, तरी या तुतीच्या झाडाला म्हणाल
की 'तू उपटून समुद्रात लावला जा,' तरी ते तुमची आज्ञा पाळील.
7 "समजा, तुमच्यापैकी एकाजवळ शेत नांगरण्यासाठी किंवा मेंढरे
राखण्यासाठी एक नोकर आहे. आपला नोकर शेतावरून आल्यानंतर,
'ये, भोजनास बस,' असे त्याचा धनी त्याला म्हणेल काय? 8 याउलट
तो असे म्हणणार नाही का, 'माझे भोजन तयार कर, स्वतः तयार
हो आणि मी खात आणि पीत असताना माझी सेवा कर, त्यानंतर तू
खा आणि पी'? 9 सांगितलेले काम केल्याबद्दल तो आपल्या दासाचे
आभार मानेल काय? 10 अगदी त्याचप्रमाणे तुम्हाला सांगितलेले सर्व
काम केल्यानंतर, 'आम्ही अपात्र दास आहोत, आम्ही फक्त आमचे
कर्तव्य बजावले आहे, असे म्हणा.'" 11 यरुशलेमकडे वाटचाल करत
येशू प्रवास करीत गालील प्रांत आणि शोमरोनच्या हद्दीवर आले. 12

ते गावात जात असताना, काही अंतरावर उभे असलेले दहा कुष्ठरोगी
त्यांना भेटले. 13 हे कुष्ठरोगी येशूंना मोठ्याने हाक मारून म्हणत होते,
“येशू महाराज, आमच्यावर दया करा!” 14 त्यांना पाहून येशू म्हणाले,
“तुम्ही याजकाकडे जा आणि त्याला दाखवा.” आणि ते वाटेत जात
असतानाच त्यांचा कुष्ठरोग नाहीसा झाला. 15 त्यांच्यापैकी एकाने
आपण शुद्ध झालो आहोत असे पाहिले, तेव्हा तो उच्चस्वराने परमेश्वराची
स्तुती करीत परत आला. 16 तो येशूंच्या पायाजवळ पालथा पडला
आणि त्याने त्यांचे आभार मानले—तो एक शोमरोनी होता. 17 येशूंनी
विचारले, “मी दहा लोकांना शुद्ध केले ना? मग बाकीचे नऊ कुठे आहेत?
18 परमेश्वराचे गौरव करण्यासाठी हा एकटाच आणि तोही परकीय
मनुष्य आला काय?” 19 मग येशू त्याला म्हणाले, “ऊठ आणि जा;
तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे.” 20 काही परूश्यांनी विचारले,
“परमेश्वराचे राज्य केव्हा येईल?” तेव्हा येशूंनी उत्तर दिले, “दृश्य रूपाने
नजरेस पडेल अशा रीतीने परमेश्वराचे राज्य येत नाही, 21 परमेश्वराचे
राज्य, ‘ते येथे’ किंवा ‘ते तिथे’ आहे, असे लोक म्हणणार नाहीत, कारण
परमेश्वराचे राज्य तुम्हामध्ये आहे.” 22 ते शिष्यांना म्हणाले, “अशी वेळ
येत आहे की, मानवपुत्राच्या राज्याचा एक दिवस पाहावा अशी तुम्हाला
उत्कंठा लागेल, परंतु तुम्हाला ते दिसणार नाही. 23 लोक तुम्हाला
सांगतील, ‘तो येथे आहे’ किंवा ‘तो तिथे आहे’ त्यांच्यामागे धावत इकडे
तिकडे जाऊ नका. 24 कारण वीज चमकली म्हणजे आकाशाच्या एका
सीमेपासून दुसऱ्या सीमेपर्यंत प्रकाशते, तशाच प्रकारे मानवपुत्राच्या
दिवसात होईल. 25 परंतु प्रथम त्याने अनेक दुःखे सोसणे आणि
या पिढीकडून नाकारले जाणे आवश्यक आहे. 26 “जसे नोआहच्या
दिवसात घडत होते, तसेच मानवपुत्र येण्याच्या दिवसात होईल. 27
नोआह प्रत्यक्ष तारवात गेला, त्या दिवसापर्यंत लोक खातपीत होते,
लग्न करून घेत होते, लग्न करून देत होते. नंतर जलप्रलय आला व
त्या सर्वांचा नाश झाला. 28 “त्याचप्रमाणे लोटाच्या दिवसातही असेच
झाले. लोक खातपीत होते, विकत घेत होते, विकत देत होते, पेरणी
करीत होते, घरे बांधत होते. 29 ज्या दिवशी लोटाने सदोम शहर सोडले,
त्याच दिवशी अग्नी आणि गंधकाचा स्वर्गातून वर्षाव झाला आणि
त्या सर्वांचा नाश झाला. 30 “मानवपुत्र प्रकट होईल त्या दिवशीही
हे अशाच प्रकारे असेल. 31 त्या दिवशी जो कोणी घराच्या छपरावर
असेल, त्याने सामान घेण्यासाठी घरात जाऊ नये. त्याचप्रमाणे शेतात
काम करणाऱ्याने कशासाठीही परत जाऊ नये. 32 लोटाच्या पत्नीची
आठवण ठेवा! 33 जो कोणी आपला जीव वाचविण्याचा प्रयत्न करेल
तो आपल्या जीवाला मुकेल, पण जो कोणी आपल्या जीवाला गमावेल,
तो त्याचा जीव वाचवेल. 34 मी तुम्हाला सांगतो की, त्या रात्री दोघेजण
एका अंथरुणात झोपलेले असतील; एक घेतला जाईल व दुसरा ठेवला
जाईल. 35 जात्यावर एकत्र धान्य दळीत बसलेल्या दोन स्त्रियांपैकी
एकीला घेतले जाईल व दुसरीला ठेवले जाईल. 36 दोघेजण शेतात
असतील; एकाला घेतले जाईल व दुसऱ्याला ठेवले जाईल.” 37 यावर
शिष्यांनी त्यांना विचारले, “गुरुजी, त्यांना कुठे नेण्यात येईल?” येशूंनी
उत्तर दिले, “जिथे मृतदेह आहे, तिथे गिधाडे जमतील.”

**18** नंतर येशूंनी आपल्या शिष्यांना सतत प्रार्थना करावी व ती
ही चिकाटीने करावी यासाठी एक दाखला सांगितला. 2 येशू
म्हणाले, “एका शहरात परमेश्वराचे भय न बाळगणारा आणि कोणाची
पर्वा न करणारा एक न्यायाधीश होता. 3 त्या शहरातील एक विधवा
आपली विनंती घेऊन वारंवार त्या न्यायाधीशाकडे येऊन म्हणत असे,
‘माझ्या शत्रूपासून मला न्याय द्या.’ 4 “त्याने काही काळ लक्ष दिले
नाही, परंतु शेवटी तो स्वतःशीच म्हणाला, ‘मी परमेश्वराला भीत नाही
किंवा लोक काय म्हणतील याची काळजी करीत नाही, 5 पण ही
विधवा मला एकसारखी त्रास देत आहे. म्हणून तिला न्याय मिळाला
पाहिजे, कारण ती सारखी येऊन मला त्रास करीत आहे!’” 6 नंतर
प्रभू म्हणाले, “अन्यायी न्यायाधीश काय म्हणतो ते ऐका. 7 तर
परमेश्वराचे जे निवडलेले लोक रात्रंदिवस त्यांना विनवण्या करतात,
त्या लोकांना ते न्याय देणार नाहीत काय? ते त्यांच्यासंबंधी उशीर
करतील काय? 8 मी तुम्हाला सांगतो, ते त्यांना लवकर न्याय मिळेल
याकडे लक्ष लावतील. यासाठी, जेव्हा मानवपुत्र परत येईल त्यावेळी
त्यांना या पृथ्वीवर विश्वास आढळेल का?” 9 आपण नीतिमान आहोत
याचे समर्थन करून इतर सर्वांना तुच्छ मानत होते अशा लोकांसाठी
त्यांनी हा दाखला सांगितला: 10 “दोन माणसे प्रार्थना करण्यासाठी
मंदिरात गेली. एक परूशी होता आणि दुसरा जकातदार. 11 परूशी
स्वतः उभा राहिला आणि प्रार्थना केली: ‘हे परमेश्वरा, मी तुमचे फार
आभार मानतो, कारण मी इतर लोकांसारखा लुटारू, कुकर्मी, व्यभिचारी
किंवा या जकातदारासारखा नाही. 12 मी आठवड्यातून दोनदा उपवास
करतो, तसेच माझ्या मिळकतीचा दशांश देतो.’ 13 “परंतु जकातदार
दूर उभा राहिला. आपले डोळे वर आकाशाकडे न लावता आपल्या
छातीवर मारून म्हणाला, ‘हे परमेश्वरा, मज पाप्यावर दया कर.’ 14 “मी
तुम्हाला सांगतो, हा मनुष्य, त्या दुसऱ्यापेक्षा परमेश्वरासमोर नीतिमान
ठरून घरी गेला. कारण जे सर्व स्वतःला उच्च करतात त्यांना नम्र
केले जाईल आणि जे स्वतःला नम्र करतात, त्यांना उंच केले जाईल.”
15 लोकांनी आपल्या बालकांना येशूंनी त्यांच्यावर हात ठेवावे म्हणून
त्यांच्याकडे आणले. परंतु शिष्यांनी त्यांना दटाविले. 16 येशूंनी त्या
बालकांना आपल्याजवळ बोलाविले आणि म्हणाले, “लहान बालकांना
माझ्याजवळ येऊ द्या, त्यांना प्रतिबंध करू नका, कारण परमेश्वराचे
राज्य अशांचेच आहे. 17 मी तुम्हाला निश्चित सांगतो की, तुम्ही या
लहान बालकासारखे होऊन परमेश्वराच्या राज्याचा स्वीकार करीत नाही,
तोपर्यंत त्यात तुमचा प्रवेश होऊ शकणार नाही.” 18 एका शासकाने
येशूंना विचारले: “उत्तम गुरुजी, सार्वकालिक जीवन हे वतन मिळावे
म्हणून मी काय करावे?” (aiōnios g166) 19 येशूंनी उत्तर दिले, “तू मला
उत्तम कशाला म्हणतोस? परमेश्वराशिवाय कोणी उत्तम नाही. 20 तुला
आज्ञा ठाऊक आहेत: ‘तू खून करू नको, तू व्यभिचार करू नको, तू चोरी
करू नको, तू खोटी साक्ष देऊ नको, तुझ्या आईवडिलांचा मान राख.’”

21 तो म्हणाला, “मी लहान होतो, तेव्हापासूनच मी या सर्व आज्ञांचे
पालन करीत आहे.” 22 जेव्हा येशूंनी हे ऐकले, ते त्याला म्हणाले, “पण
तू एका गोष्टीत उणा आहेस. तुझे आहे ते सर्वकाही विकून टाक आणि
गरिबांना वाटून दे आणि तुला स्वर्गात संपत्ती मिळेल. मग ये व मला
अनुसर.” 23 जेव्हा त्याने हे बोलणे ऐकले, तेव्हा तो अतिशय खिन्न
झाला, कारण तो फार श्रीमंत होता. 24 येशूंनी त्याच्याकडे पाहिले
आणि म्हणाले, “श्रीमंतांना परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करणे किती
कठीण आहे! 25 एखाद्या श्रीमंत मनुष्याला परमेश्वराच्या राज्यात प्रवेश
करणे यापेक्षा उंटाला सुईच्या नाकातून जाणे सोपे आहे.” 26 ज्यांनी हे
बोलणे ऐकले, त्यांनी विचारले, “मग कोणाचे तारण होऊ शकेल?”
27 येशूंनी उत्तर दिले, “जे काही मानवाला अशक्य आहे, परंतु त्या
सर्वगोष्टी परमेश्वराला शक्य आहेत.” 28 तेव्हा पेत्र येशूंना म्हणाला,
“आपणास अनुसरावे म्हणून आम्ही सर्वकाही सोडून दिले आहे!” 29
“मी तुम्हाला निश्चित सांगतो,” येशूंनी म्हटले, “असे कोणी नाही की
ज्यांनी परमेश्वराच्या राज्यासाठी आपले घर, भाऊ बहीण, आई, पिता,
पत्नी, मुले, यांचा त्याग केला, 30 त्याला या जगात अनेक पटीने दिले
जाईलच पण येणाऱ्या युगात सार्वकालिक जीवनही लाभेल.” **(aiōn
g165, aiōnios g166)** 31 येशूंनी त्यांच्या बारा शिष्यांना बाजूला बोलावून
घेतले आणि त्यांना सांगितले, “आपण यरुशलेमात जात आहोत आणि
संदेष्ट्यांनी मानवपुत्रासंबंधी, म्हणजे माझ्याबद्दल, जे सर्वकाही लिहून
ठेवलेले आहे ते पूर्ण होईल. 32 त्याला गैरयहूदीयांच्या हाती सोपवून
देण्यात येईल. ते त्याची थट्टा करतील, त्याचा अपमान करतील आणि
त्याच्यावर थुंकतील, 33 त्याला फटके मारतील आणि त्याचा जीव
घेतील परंतु तीन दिवसानंतर तो पुन्हा उठेल.” 34 त्यातील शिष्यांना
काहीही समजले नाही. ते त्यांना आकलन होऊ नये म्हणून त्यांच्यापासून
गुप्त ठेवण्यात आले होते. येशू काय बोलत आहेत हे त्यांना माहीत
नव्हते. 35 येशू यरीहो शहराजवळ आले, तेव्हा एक आंधळा भिकारी,
रस्त्याच्या कडेला भीक मागत बसला होता. 36 जवळून जात असलेल्या
गर्दीचा आवाज त्याने ऐकला, तेव्हा त्याने विचारले काय चालले आहे.
37 त्यांनी त्याला सांगितले, “नासरेथकर येशू रस्त्याने जात आहेत.”
38 तो मोठ्याने ओरडला, “अहो येशू, दावीदाचे पुत्र, माझ्यावर दया
करा.” 39 येशूंच्या पुढे चाललेल्या गर्दीतील लोकांनी त्याला धमकाविले
आणि गप्प बसण्यास सांगितले, पण तो उलट अधिक मोठमोठ्याने
ओरडतच राहिला, “अहो दावीदाचे पुत्र, माझ्यावर दया करा.” 40 येशू
थांबले आणि त्या मनुष्याला त्यांच्याकडे आणण्यास सांगितले. जेव्हा
तो आंधळा जवळ आला, येशूंनी त्याला विचारले, 41 “मी तुझ्यासाठी
काय करावे अशी तुझी इच्छा आहे?” “प्रभू मला दृष्टी यावी.” त्याने
उत्तर दिले. 42 यावर येशू म्हणाले, “ठीक आहे, तुला दृष्टी दिली आहे.
तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे.” 43 त्याच क्षणाला त्याला दिसू
लागले आणि परमेश्वराची स्तुती करीत तो येशूंच्या मागे चालू लागला.
जेव्हा सर्व लोकांनी हे पाहिले, त्यांनी सुद्धा परमेश्वराची स्तुती केली.

**19** येशू यरीहोत प्रवेश करून त्यातून जात होते, 2 तिथे जक्कय
नावाचा एक मनुष्य होता; तो प्रमुख जकातदार होता आणि
श्रीमंत होता. 3 येशू कोण आहे हे पाहण्याची त्याची उत्कट इच्छा
होती, परंतु तो ठेंगणा असल्यामुळे गर्दीतून पाहणे त्याला शक्य नव्हते.
4 तो धावत पुढे गेला आणि उंबराच्या झाडावर चढला, कारण येशू
त्याच वाटेने येत होते. 5 येशू त्या झाडाखाली आले आणि वर पाहून
जक्कयाला म्हणाले, “जक्कया, त्वरा कर आणि खाली उतर, कारण
आज मी तुझ्या घरी पाहुणा म्हणून येणार आहे.” 6 तेव्हा तो लगेच
खाली उतरला आणि त्याने त्यांचे आनंदाने स्वागत केले. 7 सर्व लोकांनी
हे पाहिले आणि ते कुरकुर करू लागले, “तो एका पापी माणसाच्या घरी
पाहुणा म्हणून गेला आहे.” 8 पण जक्कय उभा राहून प्रभूला म्हणाला,
“प्रभूजी, पाहा, आताच मी माझी अर्धी धनसंपत्ती गरिबांना देऊन टाकतो
आणि मी फसवणूक करून कोणाचे काही घेतले असेल, तर चौपट
रक्कम परत करतो.” 9 येशू त्याला म्हणाले, “आज या घरात तारणाने
प्रवेश केला आहे, हा मनुष्य अब्राहामाचा पुत्र आहे. 10 मानवपुत्र
हरवलेल्यांना शोधण्यासाठी आणि वाचवण्यासाठी आला आहे.” 11 ते
ऐकत असतानाच, येशूंनी त्यांना पुढे एक दाखला सांगितला, कारण
ते यरुशलेमजवळ होते आणि लोकांना असे वाटले की परमेश्वराचे
राज्य आता लवकरच प्रकट होणार आहे. 12 येशू म्हणाले, “प्रतिष्ठित
समाजातील एक मनुष्य राजा म्हणून नियुक्त करून घेण्यासाठी दूर
देशी गेला आणि परत येणार होता. 13 त्याने आपल्या दहा दासांना
बोलाविले व त्यांना दहा मीना दिल्या व म्हणाला, ‘मी परत येईपर्यंत
यावर व्यापार करा.’ 14 “परंतु त्याच्या प्रजेने त्याचा द्वेष केला व त्यांनी
त्याच्या पाठोपाठ एक प्रतिनिधीमंडळ हे सांगण्यासाठी पाठविले, ‘हा
मनुष्य आमचा राजा असावा अशी आमची इच्छा नाही.’ 15 “तरीपण
त्याचा राज्याभिषेक करण्यात येऊन तो घरी परतला. मग त्याने ज्या
दासांना पैसे दिले होते, त्यांनी त्या पैशावर किती नफा मिळविला, हे
पाहण्याकरिता बोलाविले. 16 “पहिला सेवक म्हणाला, ‘महाराज,
मी तुमच्या एका मीनावर आणखी दहा मीना मिळविल्या आहेत.’ 17
“त्याचा धनी म्हणाला, ‘शाबास, चांगल्या दासा! अतिशय थोडक्या
बाबतीत तू विश्वासू राहिलास, म्हणून तू दहा शहरांची जबाबदारी घे.’
18 “नंतर दुसरा दास आला आणि म्हणाला, ‘महाराज, मी तुमच्या
मीनावर आणखी पाच मीना मिळविल्या आहेत.’ 19 “त्याचा धनी त्याला
म्हणाला, ‘तू पाच शहरांची जबाबदारी घे.’ 20 “मग तिसरा दास पुढे
येऊन म्हणाला, ‘महाराज, ही तुमची मीना घ्या; मी ती एका कापडात
गुंडाळून जपून ठेवली होती, 21 तुम्ही एक कठोर गृहस्थ आहात, म्हणून
मला तुमची भीती वाटली. जिथे तुम्ही ठेवले नाही, तिथे घेता आणि जे
पेरलेले नाही, ते कापून नेता.’ 22 “यावर त्याचा धनी म्हणाला, ‘अरे दुष्ट
दासा! मी आता तुझ्या शब्दाप्रमाणेच तुझा न्याय करतो, तुला माहीत होते
की मी कठोर स्वभावाचा आहे, जे माझे नाही ते बळकावितो आणि मी
स्वत: पेरले नाही ते कापून नेतो, 23 तर माझे रुपये सावकाराकडे गुंतवून
ठेवावयास हवे होते, म्हणजे मी परत आल्यावर त्यावर काही व्याज

तरी मिळाले असते?’ 24 “नंतर तो त्याच्याजवळ जे उभे होते त्यांना
म्हणाला, ‘त्याच्याकडून त्याची मीना घ्या आणि ज्याच्याजवळ दहा
मीना आहेत त्याला द्या.’ 25 “पण ‘महाराज,’ ते म्हणाले, ‘त्याच्याजवळ
आधीच दहा मीना आहेत.’ 26 “यावर त्याने उत्तर दिले, ‘मी तुम्हाला
सांगतो, कारण ज्याला आहे त्याला अधिक दिले जाईल व ज्याच्याजवळ
नाही त्याच्याजवळ जे असेल ते देखील त्याच्यापासून काढून घेतले
जाईल.’ 27 आणि आता ज्यांनी मला त्यांचा राजा मानण्याचे नाकारले
आहे, त्या माझ्या शत्रूंना येथे आणा आणि माझ्यासमोर त्यांचा वध
करा.” 28 हा दाखला सांगितल्यानंतर येशू यरुशलेमच्या दिशेने निघाले.
ते आपल्या शिष्यांपुढे चालत होते. 29 जैतून डोंगरावर असलेल्या
बेथफगे व बेथानी या गावाजवळ ते आले, तेव्हा येशूंनी आपल्या
शिष्यांपैकी दोन शिष्यांना असे सांगून पाठविले की: 30 “समोरच्या
गावात जा आणि तिथे शिरताच, ज्याच्यावर कधी कोणी स्वार झाले
नाही असे एक शिंगरू बांधून ठेवलेले तुम्हाला आढळेल. ते सोडून
इकडे आणा. 31 ‘तुम्ही हे शिंगरू का सोडीत आहात?’ असे कोणी
तुम्हाला विचारले, तर त्याला सांगा, ‘प्रभूला त्याची गरज आहे.’” 32
ज्यांना पुढे पाठविले होते, ते तिथे गेल्यावर त्यांना सांगितल्याप्रमाणेच
आढळून आले. 33 ते शिंगरू सोडीत असताना शिंगराच्या धन्यांनी
त्यांना विचारले, “तुम्ही शिंगरू का सोडीत आहात?” 34 त्यांनी उत्तर
दिले, “प्रभूला याची गरज आहे.” 35 त्यांनी ते शिंगरू येशूंकडे आणले,
त्यांनी त्यांची वस्त्रे, शिंगराच्या पाठीवर घातली आणि येशूंना त्याच्यावर
बसविले. 36 जेव्हा ते त्यांच्याबरोबर निघाले, लोकांनी आपले अंगरखे
रस्त्यावर पसरले. 37 जैतून डोंगराच्या उतरणीवरून सुरू होणाऱ्या
रस्त्यावर त्यांच्या शिष्यांचा समुदाय होता, ज्यांनी येशूंचे जे अद्भुत
चमत्कार पाहिले होते, त्याबद्दल ते परमेश्वराची स्तुती करीत घोषणा देऊ
लागले: 38 “प्रभूच्या नावाने येणारा राजा धन्यवादित असो!” “स्वर्गात
शांती आणि परमोच्चस्थानी गौरव!” 39 गर्दीत असलेले काही परूशी
येशूंना म्हणाले, “गुरुजी, तुमच्या शिष्यांचा निषेध करा.” 40 पण येशूंनी
त्यांना उत्तर दिले, “त्यांनी तोंडे बंद केली, तर धोंडे ओरडतील.” 41
जसे ते यरुशलेमजवळ आले आणि ते शहर पाहिले, त्यावरून ते रडले
आणि म्हणाले, 42 “जर तू, हो तू सुद्धा, आज या दिवशी फक्त शांतीच्या
गोष्टी जाणून घेतल्या असत्या तर! पण आता त्या तुझ्या दृष्टिआड
झाल्या आहेत. 43 कारण अशी वेळ येत आहे की तुझे शत्रू तुझ्याभोवती
मेढेकोट बांधून तुला वेढतील आणि चहूबाजूंनी तुला कोंडीत धरतील.
44 ते तुला जमीनदोस्त करून टाकतील, तुला आणि तुझ्या मुलांना
भिंतींमध्ये गाडतील. ते एका दगडावर दुसरा दगड राहू देणार नाहीत,
कारण परमेश्वराची तुझ्याकडे येण्याची वेळ तू ओळखली नाहीस.” 45
नंतर येशू मंदिराच्या अंगणात आले आणि तिथे विक्री करणाऱ्यास बाहेर
घालवून देऊ लागले. 46 ते त्यांना म्हणाले, “असे लिहिले आहे, ‘माझे
घर हे प्रार्थनेचे घर होईल’ पण तुम्ही ते ‘एक लुटारूंची गुहा केली आहे.’”
47 त्यानंतर येशू मंदिराच्या आवारात दररोज शिक्षण देऊ लागले. परंतु
प्रमुख याजकवर्ग आणि इतर नियमशास्त्र शिक्षक व वडीलजन त्यांना
ठार मारण्याचा बेत करीत होते. 48 परंतु त्यांना कोणताही मार्ग सापडत
नव्हता. कारण सर्व लोक येशूंचे मन लावून ऐकत होते.

**20** एके दिवशी येशू मंदिराच्या अंगणात लोकांना शिकवीत होते
आणि शुभवार्तेची घोषणा करीत होते, तेव्हा मुख्य याजक आणि
यहूदी पुढारी त्यांच्याकडे आले. 2 त्यांनी येशूंना विचारले, “आम्हाला
हे सांगा की तुम्ही कोणत्या अधिकाराने हे करत आहात? तुम्हाला
हा अधिकार कोणी दिला?” 3 येशूंनी उत्तर दिले, “मी तुम्हाला एक
प्रश्न विचारतो, मला सांगा: 4 योहानाचा बाप्तिस्मा स्वर्गापासून किंवा
मनुष्याकडून होता?” 5 या प्रश्नावर त्यांनी एकमेकांबरोबर चर्चा केली
आणि म्हणाले, “जर आपण म्हणालो, ‘स्वर्गापासून होता,’ तर ते
विचारतील, ‘त्यावर तुम्ही विश्वास का ठेवला नाही?’ 6 पण जर आपण
म्हणालो ‘मनुष्यापासून होता,’ तर सर्व लोक आपल्याला दगडमार
करतील. कारण योहान संदेष्टा होता, याबद्दल लोकांची पुरेपूर खात्री
होती.” 7 शेवटी त्यांनी उत्तर दिले, “तो कुठून होता हे आम्हाला
माहीत नाही.” 8 यावर येशू त्यांना म्हणाले, “तर मग मीही या गोष्टी
कोणत्या अधिकाराने करतो, हे तुम्हाला सांगणार नाही.” 9 नंतर
लोकांकडे वळून येशूंनी त्यांना हा दाखला सांगितला, “एका मनुष्याने
एक द्राक्षमळा लावला. तो मळा काही शेतकऱ्यांना भाड्याने देऊन तो
बऱ्याच दिवसासाठी दूर निघून गेला. 10 हंगामाचे दिवस आल्यावर
द्राक्षमळ्यातील फळातून काही मिळावे, म्हणून त्याने आपला एक
सेवक शेतकऱ्यांकडे पाठविला. परंतु शेतकऱ्यांनी त्याला मार दिला
आणि रिकाम्या हाताने माघारी पाठवून दिले. 11 त्याने दुसऱ्या सेवकाला
त्यांच्याकडे पाठविले, परंतु त्यांनी त्यालासुद्धा मारले आणि लज्जास्पद
वागणूक दिली व रिकाम्या हाताने परत पाठविले. 12 तरी त्याने
तिसऱ्याला पाठविले आणि त्यांनी त्याला जखमी केले आणि मळयाबाहेर
फेकून दिले. 13 “तेव्हा द्राक्षमळयाचा धनी स्वतःशीच म्हणाला, ‘मी
काय करावे बरे? आता माझा पुत्र ज्याच्यावर मी प्रीती करतो त्याला
त्यांच्याकडे पाठवितो. कदाचित ते त्याचा मान राखतील.’ 14 “पण
शेतकऱ्यांनी मालकाच्या पुत्राला येताना पाहिले, तेव्हा ते आपसात
विचार करून म्हणाले, ‘हा तर वारस आहे. आपण त्याला ठार करू या,
म्हणजे हे वतन आपलेच होईल.’ 15 तेव्हा त्यांनी त्याला द्राक्षमळयाच्या
बाहेर फेकून त्याला मारून टाकले. “आता त्या द्राक्षमळयाचा धनी
त्यांचे काय करेल? 16 तो येईल आणि त्या भाडेकऱ्यांना मारून टाकेल
आणि द्राक्षमळा दुसऱ्यांना देईल.” लोकांनी हे ऐकले, तेव्हा ते म्हणाले,
“परमेश्वर करो असे कधीही न होवो!” 17 येशूंनी त्यांच्याकडे निरखून
पाहिले व विचारले, “तर मग, “‘जो दगड बांधणाऱ्यांनी नापसंत केला,
तोच कोनशिला झाला’ असे जे धर्मशास्त्रात लिहिले आहे, त्याचा अर्थ
काय आहे? 18 जे सर्व त्या खडकावर आदळतील त्यांचे तुकडे होतील,
परंतु ज्यांच्यावर हा खडक आदळेल त्यांचा चुराडा होईल.” 19 प्रमुख
याजक आणि नियमशास्त्र शिक्षक यांनी हा दाखला ऐकला, तेव्हा
येशूंना ताबडतोब अटक करण्याचा मार्ग ते शोधू लागले, कारण तो
दाखला त्यांच्याविरुद्ध सांगितला होता हे त्यांनी ओळखले पण त्यांना

लोकांची भीती वाटत होती. 20 त्यांच्यावर बारकाईने पाळत ठेऊन,
त्यांनी गुप्तहेरांना प्रामाणिक माणसे आहेत असे ढोंग करून त्यांच्याकडे
पाठविले यासाठी की येशूंना त्यांच्या शब्दात पकडावे आणि त्यांना
राज्यपालाच्या अधिकारकक्षेत आणावे. 21 त्या गुप्तहेरांनी येशूंना प्रश्न
विचारला: “गुरुजी, हे आम्हाला माहीत आहे की तुम्ही जे योग्य आहे ते
बोलता व शिकविता आणि पक्षपात न करता परमेश्वराचा मार्ग सत्याने
शिकविता. 22 आम्ही कैसराला कर देणे योग्य आहे की नाही?” 23
येशूंनी त्यांच्या मनातील कपट ओळखले आणि ते त्यांना म्हणाले, 24
“मला एक नाणे दाखवा. या नाण्यावर कोणाचा मुखवटा आणि कोणाचे
नाव आहे?” “कैसराचे,” त्यांनी उत्तर दिले. 25 मग येशू म्हणाले,
“कैसराचे ते कैसराला, जे परमेश्वराचे आहे ते परमेश्वराला द्या.” 26
अशा रीतीने लोकांपुढे त्यांना ते शब्दात पकडू शकले नाही. त्यांच्या
उत्तराने ते आश्चर्यचकित झाले आणि गप्प राहिले. 27 पुनरुत्थान नाही
असे मानणाऱ्या सदूकी लोकांपैकी काहीजण येशूंकडे आले आणि
त्यांनी त्यांना विचारले, 28 “गुरुजी, मोशेने आम्हासाठी असे लिहिले
आहे की, एखादा मनुष्य मूलबाळ न होता मरण पावला, तर त्याच्या
भावाने त्याच्या विधवेशी विवाह करून त्याच्यासाठी संतती वाढवावी.
29 आता एका कुटुंबात सात भाऊ होते. त्यातील पहिल्याने लग्न केले
पण काही मूलबाळ न होता, तो मरण पावला. 30 मग दुसऱ्या आणि
तिसऱ्यानेही तिच्याशी लग्न केले आणि याप्रमाणे ते सातही भाऊ संतान
न होताच मरण पावले. 32 शेवटी ती स्त्री मरण पावली. 33 आता
पुनरुत्थान होईल त्यावेळी ती स्त्री कोणाची पत्नी होईल, कारण त्या
सातही जणांनी तिच्याशी लग्न केले होते?” 34 येशूंनी उत्तर दिले,
“लग्न करण्याची रीत या पृथ्वीवरील लोकांसाठीच आहे. (aiōn g165) 35
तरी, त्या युगात वाटेकरी होण्यासाठी आणि जे मृतांतून पुनरुत्थित
होणार आहेत, ते लग्न करत नाही किंवा लग्न करूनही देत नाही. (aiōn
g165) 36 आणि ते मरणार नाहीत, कारण ते देवदूतांसारखे आहेत. ती
परमेश्वराची लेकरे आहेत, कारण ती पुनरुत्थानाची लेकरे झाली आहेत.
37 मोशेच्या जळत्या झुडूपांच्या निवेदनात, तो प्रभूला ‘अब्राहामाचा
परमेश्वर, इसहाकाचा परमेश्वर आणि याकोब यांचा परमेश्वर आहे’ असे
म्हणतो यावरून त्याने हेच दर्शविले आहे की, मेलेले उठविले जातात. 38
कारण ते मृतांचे परमेश्वर नसून, जिवंतांचे परमेश्वर आहेत आणि त्यांच्या
दृष्टीने सर्व लोक जिवंत आहेत.” 39 काही नियमशास्त्र शिक्षकांनी
प्रतिसाद दिला, “गुरुजी, आपण फार योग्य उत्तर दिले.” 40 मग कोणी
त्यांना आणखी प्रश्न विचारावयास धजले नाहीत. 41 नंतर येशूंनी त्यांना
एक प्रश्न विचारला, “ख्रिस्त हा दावीदाचा पुत्र आहे असे का म्हटले
जाते? 42 कारण दावीदाने स्वत: स्तोत्रांच्या पुस्तकात म्हटले आहे:
“‘प्रभू माझ्या प्रभूला म्हणाले, “मी तुझ्या शत्रूंना तुझ्या पायाखाली
ठेवीपर्यंत माझ्या उजव्या हाताला बसून राहा.”’ 44 दावीदच ख्रिस्ताला
‘प्रभू’ म्हणतो तर तो त्याचा पुत्र कसा असू शकेल?” 45 सभोवतालचा
लोकसमुदाय हे ऐकत असतानाच ते आपल्या शिष्यांकडे वळून त्यांना
म्हणाले, 46 “या नियमशास्त्राच्या शिक्षकांपासून सावध राहा. त्यांना
लांब झगे घालून बाजारात लोकांकडून आदरपूर्वक अभिवादन घेणे,
सभागृहामध्ये आणि मेजवान्यामध्ये उत्तम व मानाच्या जागा मिळविणे
प्रिय आहे. 47 ते देखाव्यासाठी लांबलचक प्रार्थना करतात आणि
विधवांची घरे लुबाडतात. अशा लोकांना अधिक शिक्षा होईल.”

21 जेव्हा येशूंनी पाहिले, की श्रीमंत लोक मंदिरातील दानपात्रामध्ये
आपले दान टाकत होते. 2 त्यांनी एका गरीब विधवेलासुद्धा
तांब्याची दोन छोटी नाणी टाकताना पाहिले. 3 येशू म्हणाले, “मी
तुम्हाला निश्चित सांगतो की, या गरीब विधवेने इतर सर्वांपेक्षा अधिक
दिले आहे. 4 कारण या सर्व लोकांनी आपल्या संपत्तीतून दान दिले
आहे, परंतु हिने तर आपल्या गरिबीतून सर्व उपजीविका देऊन टाकली.”
5 त्यांचे काही शिष्य मंदिराबद्दल प्रशंसा करीत होते की, ते कसे सुंदर
पाषाणांनी आणि परमेश्वराला अर्पण केलेल्या देणग्यांनी सजविले आहे.
परंतु येशू म्हणाले, 6 “जे तुम्ही पाहत आहात, पण अशी वेळ येत
आहे की, त्यावेळेस एकावर एक स्थापित असा एकही दगड राहणार
नाही; त्यांच्यामधील प्रत्येक दगड खाली पाडला जाईल.” 7 “गुरुजी,”
शिष्यांनी विचारले, “या गोष्टी केव्हा घडतील? व या गोष्टी होण्याच्या
सुमारास काय चिन्हे असतील?” 8 येशूंनी उत्तर दिले, “तुम्ही फसविले
जाऊ नये म्हणून सावध राहा, कारण अनेकजण माझ्या नावाने येतील
आणि ‘मीच तो आहे,’ असा दावा करतील. ते म्हणतील ‘काळ जवळ
आला आहे,’ त्यांच्यामागे जाऊ नका. 9 तुम्ही लढायासंबंधी ऐकाल
व दंगे याविषयी ऐकाल, तेव्हा भयभीत होऊ नका. प्रथम या गोष्टी
घडल्याच पाहिजेत, पण शेवट एवढ्यात होणार नाही.” 10 मग त्यांनी
म्हटले: “राष्ट्रांविरुद्ध राष्ट्र व राज्याविरुद्ध राज्य उठतील. 11 निरनिराळ्या
ठिकाणी भूकंप होतील, दुष्काळही पडतील आणि वेगवेगळ्या ठिकाणी
साथीचे रोग उद्भवतील, भीतिदायक घटना आणि आकाशात मोठी चिन्हे
घडतील. 12 “तरी हे सर्व घडण्यापूर्वी, ते तुम्हाला पकडून तुमचा छळ
करतील. माझ्या नावामुळे तुम्हाला सभागृहामध्ये नेतील व तुरुंगात
टाकतील आणि तुम्हाला राज्यपाल आणि राजे यांच्यापुढे आणण्यात
येईल. 13 यामुळे तुम्हाला त्यांच्यापुढे माझे साक्षी व्हावे लागेल. 14
तेव्हा स्वत:चा बचाव कसा करावा व काय बोलावे याविषयी आधी
चिंता करू नका. 15 कारण मी तुम्हाला योग्य शब्द आणि सुज्ञपणाचे
विचार सुचवेन की ज्यास तुमचे शत्रू तुम्हाला अडविण्यास किंवा त्याचे
खंडन करण्यास असमर्थ ठरतील. 16 आईवडील, भाऊ आणि बहीण,
नातेवाईक आणि मित्र, देखील तुमचा विश्वासघात करतील व तुम्हापैकी
काहींना जिवे मारतील. 17 माझ्यामुळे सर्वजण तुमचा द्वेष करतील. 18
परंतु तुमच्या डोक्यावरील एका केसाचा देखील नाश होणार नाही. 19
खंबीरपणे उभे राहा, म्हणजे जीवन मिळवाल. 20 “तुम्ही यरुशलेम शहर
शत्रुसैन्यांनी वेढलेले पाहाल, तेव्हा त्याचा विनाशकाळ जवळ आला
आहे, हे तुमच्या लक्षात येईल. 21 त्यावेळी जे यहूदीयात आहेत त्यांनी
डोंगरांकडे पळून जावे, जे शहरात आहेत त्यांनी ते सोडावे आणि जे
बाहेर रानात आहेत, त्यांनी शहरात येण्याचा प्रयत्न करू नये. 22 कारण
आता जे सर्व लिहिलेले आहे ते पूर्ण होण्यासाठी हे शिक्षेचे दिवस आहेत.

23 गर्भवती आणि दूध पाजणाऱ्या स्त्रियांसाठी तर तो काळ क्लेशाचा
असेल! कारण पृथ्वीवर महान संकटे कोसळतील आणि लोकांवर
क्रोधाचा वर्षाव होईल. 24 काही तलवारीमुळे पडतील आणि काहींना
सर्व राष्ट्रांमध्ये कैद करून नेण्यात येईल आणि गैरयहूदीयांचा काळ
पूर्ण होईपर्यंत यरुशलेम शहरास गैरयहूदी पायाखाली तुडवतील. 25
"तेव्हा सूर्य, चंद्र व तारे यामध्ये चिन्हे घडतील. पृथ्वीवर राष्ट्रे समुद्राच्या
गर्जणाऱ्या लाटांनी हैराण होतील आणि गोंधळून जातील. 26 भीतीमुळे
लोक बेशुद्ध पडतील, जगावर काय घडून येणार आहे, या गोष्टीमुळे
काळजीत पडतील. कारण आकाशमंडळ डळमळेल. 27 त्यावेळी ते
मानवपुत्राला परमेश्वराच्या उजवीकडे बसलेले आणि आकाशात मेघारूढ
होऊन सामर्थ्याने व पराक्रमाने परत येत असलेले पाहाल. 28 या
सर्वगोष्टी घडण्यास प्रारंभ होईल, तेव्हा उभे राहा आणि वर नजर लावा
कारण तुमच्या सुटकेची वेळ जवळ आली आहे असे समजा." 29
नंतर येशूंनी लोकांना हा दाखला सांगितला: "अंजिराच्या झाडाकडे
आणि सर्व झाडांकडे पाहा. 30 जेव्हा पालवी फुटू लागते तेव्हा तुम्ही
स्वतःच पाहू शकता आणि ओळखता की उन्हाळा जवळ आला आहे.
31 तसेच मी सांगितलेल्या गोष्टी घडत असताना तुम्ही पाहाल, तेव्हा
परमेश्वराचे राज्य जवळ आहे हे समजून घ्या. 32 "मी तुम्हाला निश्चित
सांगतो की या सर्वगोष्टी घडून आल्याशिवाय ही पिढी खात्रीने नाहीशी
होणार नाही. 33 आकाश व पृथ्वी नाहीशी होतील, पण माझी वचने
नाहीशी होणार नाहीत. 34 "सावध राहा! नाही तर तुमची अंतःकरणे
दारुबाजी, मद्यपान आणि जीवनातील चिंता यामुळे निराश होतील आणि
तो दिवस तुम्हावर अकस्मात एखाद्या पाशासारखा येईल. 35 कारण
संपूर्ण पृथ्वीवर राहणाऱ्या सर्व लोकांवर तो येईल. 36 पुढे घडणाऱ्या या
सर्व गोष्टीतून सुटण्यास आणि मानवपुत्रासमोर उभे राहण्यास तुम्ही
समर्थ व्हावे, म्हणून प्रार्थना करा आणि जागृत राहा." 37 येशू दररोज
मंदिरात शिक्षण देण्यासाठी जात असत, नंतर रोज संध्याकाळी ते जैतून
डोंगरावर रात्र घालविण्यासाठी जात असत. 38 आणि सर्व लोक त्यांचे
ऐकण्यासाठी सकाळीच मंदिराकडे येत.

**22** आता वल्हांडण सण जवळ आला होता. यालाच बेखमीर
भाकरीचा सण म्हणत असत. 2 प्रमुख याजकवर्ग आणि
नियमशास्त्र शिक्षक आता येशूंना कसे ठार करावे याचा विचार करू
लागले. कारण ते लोकांना भीत होते. 3 तेव्हा येशूंच्या बारा शिष्यांपैकी
एक म्हणजे यहूदाह इस्कर्योत याच्यात सैतानाने प्रवेश केला. 4 तो
प्रमुख याजकवर्ग आणि मंदिराचे सुरक्षा अधिकाऱ्यांकडे गेला आणि
येशूंना विश्वासघाताने कसे धरून देता येईल, याविषयी त्याने त्यांच्याशी
चर्चा केली. 5 त्यांना आनंद झाला आणि त्यांनी त्याला मोबदला देण्याचे
मान्य केले. 6 या गोष्टीला त्याने मान्यता दिली आणि येशूंभोवती
समुदाय नसताना त्यांना त्यांच्या हाती देण्याची योग्य संधी तो शोधू
लागला. 7 आता बेखमीर भाकरीच्या सणाचा दिवस आला, त्या दिवशी
वल्हांडणाच्या कोकऱ्याचा बळी दिला जाणार होता. 8 येशूंनी पेत्र
आणि योहान यांना पुढे पाठविले व म्हणाले, "जा आणि आपल्यासाठी
वल्हांडणाच्या भोजनाची तयारी करा." 9 तेव्हा त्या दोघांनी विचारले,
"आम्ही कुठे तयारी करावी?" 10 येशूंनी उत्तर दिले, "तुम्ही शहरात
जा आणि एक मनुष्य पाण्याने भरलेली मोठी घागर घेऊन जात
असलेला तुम्हाला भेटेल. ज्या घरात तो जाईल तिथे त्याच्यामागे जा.
11 त्या घराच्या मालकाला सांगा, 'गुरुजी विचारत आहेत की, ज्या
ठिकाणी मला माझ्या शिष्यांबरोबर वल्हांडणाचे भोजन करता येईल
ती पाहुण्यांची खोली कुठे आहे?' 12 तो तुम्हाला माडीवरील मोठी
तयार असलेली एक खोली दाखवेल. तिथे तयारी करा." 13 ते गेले
आणि येशूंनी सांगितल्याप्रमाणे त्यांना आढळून आले. तेव्हा त्यांनी
वल्हांडणाच्या भोजनाची तयारी केली. 14 जेव्हा ती वेळ आली तेव्हा
येशू आणि त्यांचे शिष्य मेजावर टेकून भोजन करण्यास बसले. 15 मग
ते शिष्यांना म्हणाले, "माझ्या दुःख सहन करण्यापूर्वी तुमच्याबरोबर हे
वल्हांडणाचे भोजन करावे अशी माझी फार इच्छा होती. 16 कारण मी
तुम्हाला सांगतो की, परमेश्वराच्या राज्यात याची पूर्तता झाल्याशिवाय
मी हे भोजन पुन्हा करणार नाही." 17 नंतर त्यांनी प्याला घेतला,
त्याबद्दल उपकार मानले आणि ते म्हणाले, "हा घ्या आणि तुमच्यामध्ये
त्याची वाटणी करा. 18 मी तुम्हाला सांगतो की, परमेश्वराचे राज्य
येईपर्यंत मी पुन्हा द्राक्षवेलीचा उपज पिणार नाही." 19 नंतर येशूंनी
भाकर घेतली, आभार मानले आणि ती मोडली आणि ती त्यांना
देत असताना म्हणाले, "हे माझे शरीर असून ते तुमच्याकरिता दिले
जात आहे; माझ्या स्मरणार्थ हे करा." 20 भोजन झाल्यानंतर येशूंनी
द्राक्षारसाचा प्याला हाती घेतला व म्हणाले, "हा प्याला माझ्या रक्ताने
केलेला नवा करार आहे, जे रक्त पुष्कळांसाठी ओतले जात आहे. 21
पण पाहा, जो माझा विश्वासघात करणार आहे त्याचा हात माझ्याबरोबर
या मेजावर आहे. 22 परमेश्वराच्या संकल्पाप्रमाणे मानवपुत्र जातो
खरा, पण जो मनुष्य त्यांना विश्वासघाताने धरून देत आहे त्याचा
धिक्कार असो." 23 हे ऐकून असे कृत्य करणारा आपल्यापैकी कोण
असेल, असा प्रश्न ते आपसात विचारू लागले. 24 नंतर शिष्यात
आपल्यापैकी सर्वात श्रेष्ठ कोण असा वादविवाद सुरू झाला. 25 येशू
त्यांना म्हणाले, "गैरयहूदी लोकांचे राजे त्यांच्यावर हुकमत चालवितात
आणि त्यांच्यावर अधिकार गाजविणारे स्वतःला त्यांचे उपकारकर्ते
म्हणतात. 26 परंतु तुम्ही त्यांच्यासारखे असू नये. तुमच्यामध्ये जो
कोणी श्रेष्ठ होऊ पाहतो, त्याने लहानासारखे झाले पाहिजे आणि जो
अधिकार चालवितो त्याने तुमचा सेवक असावे. 27 श्रेष्ठ कोण आहे, जो
भोजन करतो, की जो सेवा करतो? अर्थात् जो बसून जेवतो तोच ना?
पाहा, सेवा करणाऱ्यासारखा मी तुम्हामध्ये आहे. 28 माझ्या परीक्षामध्ये
माझ्या बाजूने जे उभे राहिले, ते तुम्हीच आहात. 29 मी तुम्हाला राज्य
बहाल करतो, ज्याप्रमाणे माझ्या पित्याने मला एक राज्य बहाल केले
आहे, 30 तसेच माझ्या राज्यामध्ये माझ्याबरोबर बसून खातापिता येईल
आणि तुम्ही सिंहासनावर बसून इस्राएलाच्या बारा वंशाचा न्यायनिवाडा
कराल. 31 "शिमोना, शिमोना, तुम्हा सर्वांची गव्हासारखी चाळणी
करावी म्हणून सैतानाने विचारले आहे. 32 परंतु शिमोना, तुझा विश्वास

डळमळू नये म्हणून मी प्रार्थना केली आहे, की तू आपल्या विश्वासात
खचू नये. ज्यावेळी तू परत वळशील, त्यावेळी आपल्या बंधूंना बळकट
कर.” 33 शिमोन म्हणाला, “प्रभूजी, आपल्याबरोबर तुरुंगात जाण्यास
व जीव देण्याचीही माझी तयारी आहे.” 34 तेव्हा येशूंनी त्याला म्हटले,
“पेत्रा, मी तुला निश्चित सांगतो, आज कोंबडा आरवण्यापूर्वी तू मला
तीन वेळा नाकारशील.” 35 नंतर येशूंनी त्यांना विचारले, “मी तुम्हाला
झोळी, पिशवी किंवा पायतणे न घेता पाठविले, तेव्हा तुम्हाला काही
कमी पडले का?” “नाही,” त्यांनी उत्तर दिले. 36 यावर येशू त्यांना
म्हणाले, “पण आता तुमच्याजवळ झोळी असल्यास ती घ्या आणि
पिशवी पण घ्या. तुमच्याजवळ तरवार नसली, तर आपली वस्त्रे विका
व ती विकत घ्या. 37 कारण माझ्याविषयीचे भविष्य पूर्ण होण्याचा
समय आला आहे. ते भविष्य हे: ‘अधर्मी लोकांत त्याची गणना झाली.’
संदेष्ट्यांनी माझ्याविषयी जे काही लिहून ठेवले आहे; ते सर्व पूर्णतेस
जाईल.” 38 तेव्हा शिष्य त्यांना म्हणाले, “हे पाहा प्रभू, येथे दोन तरवारी
आहेत.” येशू म्हणाले, “पुरे आहे.” 39 नेहमीप्रमाणे जैतून डोंगराकडे
जाण्यासाठी येशू बाहेर पडले आणि त्यांचे शिष्य त्यांच्या मागोमाग गेले.
40 तिथे पोहोचल्यावर, ते शिष्यांना म्हणाले, “तुम्ही परीक्षेत पडू नये
म्हणून प्रार्थना करा.” 41 नंतर ते त्यांच्यापासून सुमारे दगड फेकला
जाईल इतक्या अंतरावर गेले, त्यांनी गुडघे टेकले आणि प्रार्थना केली.
42 “हे पित्या, जर तुमची इच्छा असेल, तर हा प्याला माझ्यापासून दूर
करा; तरी माझी इच्छा नाही तर तुमची पूर्ण होऊ द्या.” 43 तेव्हा स्वर्गातून
एक देवदूत त्यांच्यापुढे प्रकट झाला आणि त्यांना सामर्थ्य पुरविले. 44
येशू आत्म्यामध्ये इतके व्याकूळ झाले की, त्यांनी अधिक कळकळीने
प्रार्थना केली आणि त्यांचा घाम रक्ताच्या थेंबासारखा जमिनीवर पडत
होता. 45 शेवटी प्रार्थना करून उठल्यानंतर, ते आपल्या शिष्यांकडे
परत आले, पण तेही दुःखामुळे झोपी गेले होते असे त्यांना आढळले.
46 “तुम्ही झोप का घेत आहात?” येशू त्यांना म्हणाले, “उठा, तुम्ही
परीक्षेत पडू नये म्हणून प्रार्थना करा.” 47 ते बोलत असतानाच लोकांचा
मोठा जमाव तिथे आला आणि येशूंच्या बारा शिष्यांपैकी एक, ज्याला
यहूदाह म्हणत होते तो त्यांना मार्ग दाखवित होता. तो येशूंचे चुंबन
घ्यावयास जवळ आला, 48 तेव्हा येशूने त्याला विचारले, “यहूदा,
चुंबन घेऊन तू मानवपुत्राचा विश्वासघात करतो काय?” 49 आता
काय होणार हे शिष्यांनी ओळखले आणि येशूंना विचारले, “प्रभूजी,
आम्ही तरवार चालवावी काय?” 50 तेवढ्यात त्यांच्यातील एकाने
महायाजकाच्या दासावर वार करून त्याचा उजवा कान कापून टाकला.
51 येशूंनी शिष्यांना म्हटले, “पुरे करा.” आणि त्यांनी त्या मनुष्याचा कान
स्पर्श करून बरा केला. 52 नंतर मुख्य याजक, मंदिराच्या द्वारपालांचे
अधिकारी आणि वडीलजन यांना येशूंनी म्हटले, “मी बंडखोरांचा नेता
आहे काय की तुम्ही तरवारी व लाठ्या घेऊन आला आहात? 53 मी
दररोज मंदिराच्या परिसरात तुमच्याबरोबर होतो, पण त्यावेळी तुम्ही
मला धरले नाही. परंतु आता हीच तुमची वेळ आहे, येथे अंधाराची सत्ता
आहे.” 54 शेवटी त्यांनी येशूंना अटक करून महायाजक कयफाच्या
घरी नेले. पेत्र काही अंतरावरून, त्यांच्यामागे चालत होता. 55 आणि
जेव्हा काहीजणांनी तिथे अंगणाच्या मधोमध शेकोटी पेटवली होती
आणि एकत्रित खाली बसले होते, पेत्र त्यांच्याबरोबर खाली बसला. 56
एका दासीने त्याला शेकोटीच्या उजेडात बसलेले पाहिले आणि ती
त्याच्याकडे निरखून पाहून म्हणाली, “हा मनुष्य येशूंच्या बरोबर होता.”
57 पेत्र नकार देत म्हणाला, “बाई, मी त्या मनुष्याला ओळखत नाही.”
58 थोड्या वेळाने दुसऱ्या एकाने त्याच्याकडे पाहून म्हटले, “तू पण
त्यांच्यापैकी एक आहेस.” “महाराज, मी तो नाही,” पेत्र नाकारून
म्हणाला. 59 सुमारे तासाभराने आणखी एकाने खात्रीपूर्वक विधान केले
व पेत्राला म्हटले, “हा मनुष्य त्यांच्याबरोबर होता. कारण तो गालील
प्रांताचा आहे!” 60 हे ऐकून पेत्र त्यांना म्हणू लागला, “अरे माणसा, तू
काय बोलतोस हे मला समजत नाही.” तेवढ्यात कोंबडा आरवला. 61
प्रभू येशूंनी पेत्राकडे वळून पाहिले तेव्हा त्याच क्षणाला पेत्राला येशूंचे
शब्द आठवले, “पेत्रा, आज कोंबडा आरवण्यापूर्वी तू मला तीन वेळा
नाकारशील.” 62 पेत्र दूर निघून गेला आणि मोठ्या दुःखाने रडला. 63
मग पहारेकऱ्यांनी त्यांना बुक्क्या मारल्या व त्यांची थट्टा करावयास
सुरुवात केली. 64 त्यांनी त्यांचे डोळे बांधले आणि म्हटले, “अंतर्ज्ञानाने
सांग, तुला कोणी चापट मारली?” 65 आणि त्यांनी त्यांची वाटेल
तशी निंदा केली व अपमान केला. 66 प्रातःकाळ झाल्यावर, लोकांचे
वडीलजन, नियमशास्त्राचे शिक्षक आणि दोघेही मुख्य याजक एकत्रित
भेटले आणि येशूंना त्यांच्यासमोर आणण्यात आले. 67 ते म्हणाले,
“जर तू ख्रिस्त आहेस तर तसे आम्हाला सांग.” पण येशू म्हणाले,
“जर मी तुम्हाला सांगितले, तर तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवणार नाही,
68 आणि जर मी तुम्हाला विचारले, तर तुम्ही उत्तर देणार नाही. 69
परंतु येथून पुढे मानवपुत्राला सर्वसमर्थ परमेश्वराच्या उजवीकडे बसलेले
पाहाल.” 70 त्या सर्वांनी विचारले, “तू परमेश्वराचा पुत्र आहेस काय?”
येशूंनी उत्तर दिले, “तुम्ही म्हणता मी आहे.” 71 तेव्हा ते म्हणाले,
“आता आपल्याला आणखी साक्षीदारांची काय गरज आहे?” ते आपण
स्वत: त्याच्याच तोंडून ऐकले आहे.

**23** नंतर ती सर्व मंडळी उठली व त्यांनी येशूंना पिलाताकडे नेले.
2 त्यांनी त्यांच्यावर दोषारोप केला व ते म्हणू लागले, “आम्हाला
आढळून आले की हा मनुष्य आमच्या राष्ट्राचा घातपात करू पाहत आहे.
कैसराला कर देण्यास विरोध करतो आणि असा दावा करतो की मी
ख्रिस्त, राजा आहे.” 3 तेव्हा पिलाताने येशूंना विचारले, “तू यहूद्यांचा
राजा आहेस काय?” येशूंनी उत्तर दिले, “तुम्ही म्हणता ते बरोबर आहे.”
4 तेव्हा पिलात मुख्य याजकांकडे आणि जमावाकडे वळून म्हणाला, “या
माणसामध्ये मला कोणताही दोष दिसत नाही.” 5 तेव्हा ते अधिकच
आग्रह करून म्हणाले, “पण हा मनुष्य सर्व यहूदीया प्रांतातील लोकांस
त्याच्या शिकवणीद्वारे भडकावित आहे आणि गालीलापासून सुरुवात
करून तो येथे आला आहे.” 6 हे ऐकल्यावर पिलाताने विचारले, “तो
गालीली आहे काय?” 7 तो गालीली असल्याचे समजल्यावर, पिलाताने
येशूंना हेरोद राजाकडे घेऊन जाण्यास सांगितले, कारण गालील प्रांत

हेरोदाच्या अधिकारकक्षेत होता आणि स्वत: हेरोद त्यावेळी यरुशलेमात
होता. 8 येशूंना प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाल्यामुळे हेरोद आनंदित
झाला. कारण येशूंविषयी त्याने पुष्कळ ऐकले होते आणि त्याने केलेला
एखादा चमत्कार डोळ्यांनी पाहण्याची त्याची फार इच्छा होती. 9 त्याने
येशूंना अनेक प्रश्न विचारले, परंतु येशूंनी त्याच्या एकाही प्रश्नाचे उत्तर
दिले नाही. 10 इकडे मुख्य याजक आणि नियमशास्त्र शिक्षक उभे
राहून आवेशाने येशूंवर आरोप करीत राहिले. 11 त्यावेळी हेरोद आणि
त्याचे शिपाई येशूंचा उपहास आणि चेष्टा करू लागले. त्यांना झगझगीत
कपडे घालून त्यांनी पिलाताकडे परत पाठविले. 12 त्या दिवशी हेरोद
आणि पिलात मित्र झाले. त्याआधी ते एकमेकांचे शत्रू होते. 13 नंतर
पिलाताने प्रमुख याजक, अधिकारी आणि लोक यांना एकत्र बोलावून
म्हटले, 14 “तुम्ही या मनुष्याला, तो लोकांना बंड करावयास चिथावीतो
म्हणून माझ्याकडे आणले. मी त्याची तुमच्यासमोर कसून चौकशी केली
आणि तो निर्दोष आहे, असे मला आढळून आले. 15 हेरोदाचा निर्णय
देखील असाच आहे, म्हणूनच त्याने याला आमच्याकडे परत पाठविले
आहे. मरणदंडाची शिक्षा व्हावी असे या मनुष्याने काहीही केलेले नाही.
16 म्हणून मी याला फटके मारतो आणि नंतर त्याला सोडून देतो.”
17 कारण या सणात त्यांच्यासाठी त्याला एका गुन्हेगाराला सोडावे
लागत असे. 18 परंतु गर्दीतील सर्व लोक ओरडून म्हणाले, “याला जिवे
मारा आणि आमच्यासाठी बरब्बाला सोडा.” 19 बरब्बाला त्यावेळी
शहरामध्ये उठाव करणे व खून करणे यासाठी तुरुंगात ठेवले होते. 20
येशूंना सोडून देण्याची पिलाताची इच्छा होती, म्हणून तो त्यांच्याशी
वाद घालू लागला 21 पण लोक ओरडतच राहिले, “त्याला क्रूसावर
खिळा! त्याला क्रूसावर खिळा!” 22 तरीही आणखी एकदा तिसऱ्या
खेपेस पिलाताने खुलासा विचारला, “या मनुष्याने कोणता गुन्हा केला
आहे? त्याला क्रूसखांबावर खिळावे असा कोणताही दोष त्याच्यामध्ये
मला आढळला नाही, मी त्याला फटके मारून सोडून देतो.” 23 परंतु
येशूंना क्रूसावर खिळण्याची मागणी करीत, ते ओरडू लागले, शेवटी
त्यांचे ओरडणे सफल झाले, 24 आणि पिलाताने त्यांची मागणी मान्य
करण्याचे ठरविले. 25 तसेच त्यांच्या मागणीप्रमाणे, बंडाळी आणि
खून करण्याच्या आरोपावरून तुरुंगात असलेला बरब्बाला सोडून दिले
आणि येशूंना क्रूसावर खिळावे म्हणून त्यांच्या स्वाधीन केले. 26 ते
येशूंना घेऊन जात असताना, कुरेने गावचा रहिवासी शिमोन नावाचा
एक मनुष्य रानातून परत येत होता. त्याला त्यांनी धरले व येशूंचा
क्रूसखांब त्याच्यावर ठेवला व त्याला तो येशूंच्या मागोमाग वाहून
नेण्यास भाग पाडले. 27 येशूंच्या मागे लोकांचा प्रचंड समुदाय चालला
होता. त्यांच्यामध्ये अनेक शोक करणाऱ्या स्त्रियाही होत्या. 28 तेव्हा
येशू त्या स्त्रियांकडे वळून त्यांना म्हणाले, “यरुशलेमच्या कन्यांनो,
माझ्यासाठी रडू नका, तर स्वत:साठी आणि आपल्या मुलाबाळांसाठी
रडा. 29 कारण असे दिवस येत आहेत की, त्या दिवसात तुम्ही म्हणाल,
‘लेकरे न झालेल्या स्त्रिया, न प्रसवलेली उदरे व न पाजलेली स्तने धन्य
आहेत.’” 30 त्यावेळी, “‘ते पर्वतांना म्हणतील, “आमच्यावर येऊन
पडा!” आणि टेकड्यांना म्हणतील, आम्हाला “झाकून टाका!”’ 31
कारण जर लोक हिरव्या वृक्षाची अशी गत करतात, तर सुकलेल्या
वृक्षाचे काय होईल?” 32 येशूंबरोबर आणखी दोन माणसे, दोघेही
अपराधी होते, त्यांनाही जिवे मारण्याकरिता नेण्यात आले. 33 जेव्हा
ते कवटी म्हटलेल्या जागी आले, तिथे त्यांनी त्याला अपराध्यांबरोबर
क्रूसावर खिळले, एक त्यांच्या उजवीकडे आणि दुसरा त्यांच्या डावीकडे
होता. 34 तेव्हा येशू म्हणाले, “हे पित्या, यांना क्षमा कर, कारण ते काय
करीत आहेत, ते त्यांना समजत नाही.” आणि येशूंची वस्त्रे सैनिकांनी
चिठ्ठ्या टाकून वाटून घेतली. 35 लोक उभे राहून पाहत होते आणि
शासक त्यांची थट्टा करीत होते. ते म्हणत होते, “त्याने दुसऱ्यांचे तारण
केले, तो परमेश्वराचा निवडलेला म्हणजे ख्रिस्त असेल तर त्याने स्वत:चा
बचाव करावा.” 36 सैनिकांनीही त्यांना शिरक्यात भिजविलेला आंब
पिण्यास दिला आणि त्यांचा उपहास केला. 37 ते त्याला म्हणाले,
“जर तू यहूद्यांचा राजा असशील तर स्वत:ला वाचव.” 38 त्यांच्या
डोक्याच्या वर एक लेखपत्रक लावण्यात आले. त्यावर लिहिले होते:
हा यहूद्यांचा राजा आहे. 39 गुन्हेगारांपैकी एकजण त्यांची निंदा करून
म्हणाला, “तू ख्रिस्त आहेस ना? तर मग स्वत:ला आणि आम्हालाही
वाचव.” 40 पण दुसऱ्या गुन्हेगाराने पहिल्याला दटावून म्हटले, “तुला
परमेश्वराचे भय वाटत नाही काय, तू सुद्धा तीच शिक्षा भोगीत आहेस?
41 आपल्या दुष्ट कृत्यांमुळे आपणास झालेली मरणाची शिक्षा अगदी
यथायोग्य आहे. पण याने तर काहीही चूक केली नाही.” 42 मग तो
येशूंना म्हणाला, “अहो येशू, आपण आपल्या राज्यात याल, तेव्हा माझी
आठवण ठेवा.” 43 येशूंनी त्याला उत्तर दिले, “मी तुला निश्चित सांगतो
की आज तू मजबरोबर सुखलोकात असशील.” 44 आता दुपारची
वेळ झाली होती, आणि संपूर्ण देशावर दुपारच्या तीन वाजेपर्यंत अंधार
पडला. 45 सूर्यप्रकाश देण्याचे थांबला. मंदिराच्या पवित्रस्थानातील
पडदा वरपासून खालपर्यंत दोन भागात फाटला. 46 तेव्हा येशूंनी पुन्हा
एकदा मोठी आरोळी मारून म्हटले, “हे पित्या, मी माझा आत्मा तुमच्या
स्वाधीन करतो.” हे शब्द बोलल्यानंतर त्यांनी शेवटचा श्वास घेतला. 47
काय घडले हे पाहून रोमी शताधिपतीने परमेश्वराचे गौरव करून म्हटले,
“खरोखर हा मनुष्य नीतिमान होता.” 48 क्रूसावर खिळण्याचा प्रसंग
पाहण्याकरिता आलेल्या जमावाने घडलेल्या घटना पाहिल्या, तेव्हा ते
शोकाकुल होऊन छाती बडवित घरी परतले. 49 परंतु जे सर्व येशूंना
ओळखत होते, त्यामध्ये गालीलाहून त्यांच्यामागे आलेल्या अनेक स्त्रिया
काही अंतरावर थांबल्या आणि या गोष्टी पाहत होत्या. 50 यहूदीयातील
अरिमथिया शहराचा योसेफ नावाचा एक मनुष्य होता, तो न्यायसभेचा
सदस्य असून चांगला व नीतिमान होता. 51 त्याने त्यांच्या या निर्णयाला
आणि कारवाईला संमती दिली नव्हती. तो यहूदीयातील अरिमथिया
नगरातून आला असून, तो स्वत: परमेश्वराच्या राज्याची वाट पाहत
होता. 52 पिलाताकडे जाऊन त्याने येशूंचे शरीर मिळण्यासाठी विनंती
केली. 53 त्याने येशूंचे शरीर क्रूसावरून खाली घेतले आणि ते तागाच्या
वस्त्रात गुंडाळून खडकात खोदलेल्या एका कबरेत ठेवले, ज्यामध्ये

आतापर्यंत कोणालाही ठेवले नव्हते. 54 हे सर्व संस्कार शब्बाथाची
तयारी करण्याच्या दिवशी करण्यात आले. 55 येशूंबरोबर गालीलाहून
आलेल्या स्त्रियांनी मागोमाग येऊन ती कबर पाहिली आणि येशूंचे शरीर
कबरेत कसे ठेवले हे पाहिले. 56 नंतर त्या घरी गेल्या आणि त्यांनी
मसाले आणि सुगंधी द्रव्ये तयार केली. परंतु यहूदी नियमशास्त्राच्या
आज्ञेप्रमाणे त्यांनी शब्बाथाच्या दिवशी विसावा घेतला.

**24** आठवड्याच्या पहिल्या दिवशी, भल्या पहाटेस, त्या स्त्रियांनी
त्यांनी तयार केलेले मसाले घेतले आणि त्या कबरेकडे गेल्या;
2 तिथे त्यांनी पाहिले की तो दगड कबरेपासून दूर सरकवलेला आहे,
3 परंतु जेव्हा त्यांनी आत प्रवेश केला तेव्हा त्यांना प्रभू येशूंचे शरीर
सापडले नाही. 4 याबद्दल ते आश्चर्य करीत असतानाच, अकस्मात
त्यांच्या बाजूला विजेसारखी चकाकणारी वस्त्रे घातलेले दोन पुरुष उभे
राहिले. 5 त्यामुळे त्या स्त्रिया भयभीत झाल्या व खाली वाकून त्यांनी
आपली तोंडे भूमीकडे केली. पण ते पुरुष त्यांना म्हणाले, "जे जिवंत
आहेत त्यांना तुम्ही मृतांमध्ये का शोधता? 6 ते येथे नाही, ते पुन्हा उठले
आहेत! गालीलात असताना त्यांनी तुम्हाला काय सांगितले होते याची
आठवण करा. 7 'मानवपुत्र दुष्ट लोकांच्या हाती विश्वासघाताने धरून
दिला जाईल, त्यांना क्रूसावर खिळून मारण्यात येईल आणि ते तिसऱ्या
दिवशी पुन्हा उठतील.'" 8 तेव्हा त्यांना त्यांचे शब्द आठवले. 9 मग
कबरेपासून परत येऊन त्यांनी येशूंच्या अकरा शिष्यांना आणि इतर
सर्वांना हे वर्तमान सांगितले. 10 ज्या स्त्रिया कबरेकडे गेल्या होत्या,
त्यात मरीया मग्दालिया, योहान्ना, याकोबाची आई मरीया आणि इतर
ज्या त्यांच्याबरोबर होत्या त्यांनी हे प्रेषितांना सांगितले. 11 परंतु त्यांनी
त्या स्त्रियांवर विश्वास ठेवला नाही कारण त्यांना त्यांचे शब्द मूर्खपणाचे
वाटले. 12 पेत्र कबरेजवळ धावत गेला व त्याने आत डोकावून पाहिले,
तेव्हा त्याला केवळ तागाच्या पट्ट्या पडलेल्या दिसल्या, तेव्हा काय घडले
असावे याविषयी तो आश्चर्य करीत परत गेला. 13 त्याच दिवशी म्हणजे
आठवड्याच्या पहिल्या दिवशी, येशूंचे दोन अनुयायी यरुशलेमपासून
अंदाजे सात मैल असलेल्या अम्माऊस नावाच्या गावी चालले होते. 14
घडलेल्या त्या सर्व गोष्टींविषयी ते एकमेकांबरोबर बोलत होते. 15 ते
एकमेकांशी बोलत व चर्चा करीत असताना प्रत्यक्ष येशू तिथे आले आणि
त्यांच्याबरोबर चालू लागले. 16 परंतु ते त्यांना ओळखणार नाहीत असे
करण्यात आले होते. 17 येशूंनी त्यांना विचारले, "चालताना, तुम्ही काय
चर्चा करीत आहात?" हा प्रश्न ऐकून ते शांत उभे राहिले, त्यांचे चेहरे
दु:खी झाले. 18 त्यांच्यापैकी क्लयपा नावाचा एकजण म्हणाला, "गेल्या
काही दिवसात यरुशलेममध्ये घडलेल्या त्या घटनांची माहिती नसलेले
असे तुम्ही एकटेच आहात काय?" 19 "कशा घटना?" येशूंनी विचारले.
ते म्हणाले, "नासरेथ या गावातून आलेल्या येशूंविषयी, जो परमेश्वराच्या
आणि सर्व लोकांच्या दृष्टीने उक्ती व कृती यामध्ये सामर्थ्यशाली असा
संदेष्टा होता. 20 महायाजकांनी आणि आमच्या अधिकाऱ्यांनी त्यांना
मृत्युदंडाची शिक्षा दिली, त्यांनी त्यांना क्रूसावर खिळून मारले. 21
परंतु आम्हाला आशा होती की तोच इस्राएलास मुक्ती देणारा होता. या
सर्वगोष्टी घडून आज तीन दिवस झाले आहेत. 22 पण आमच्यातील
काही स्त्रियांनी आम्हाला आश्चर्याचा मोठाच धक्का दिला आहे. त्या
अगदी आज पहाटे कबरेकडे गेल्या. 23 पण त्यांना त्यांचे शरीर सापडले
नाही. तेव्हा त्यांनी येऊन सांगितले की त्यांना देवदूतांचे दर्शन झाले व ते
म्हणाले की येशू जिवंत आहेत. 24 तेव्हा आमच्यातील काही लोक
कबरेकडे गेले आणि त्या स्त्रियांनी जसे सांगितले होते तसेच त्यांना
दिसले. परंतु येशूंचे शरीर त्यांना दिसले नाही." 25 तेव्हा येशू त्यांना
म्हणाले, "तुम्ही मूर्ख आहात आणि संदेष्ट्यांनी जे लिहिले आहे त्यावर
विश्वास ठेवण्यास मतिमंद आहात. 26 आपल्या गौरवात जाण्यापूर्वी या
गोष्टी ख्रिस्ताने सहन करणे गरजेचे आहे असे नाही काय?" 27 नंतर
त्यांनी संपूर्ण धर्मशास्त्रातील मोशे व सर्व संदेष्ट्यांच्या लिखाणामधून
स्वत:विषयी काय सांगितले आहे, हे त्यांना स्पष्ट केले. 28 जेव्हा ते त्या
गावाजवळ आले जिथे ते जात होते, तेव्हा येशूंनी पुढे जाणे चालू ठेवले,
जसे की ते पुढे जात होते असे दर्शविले. 29 परंतु त्यांनी त्यांना आग्रह
करून म्हटले, "आमच्या येथे राहा, कारण संध्याकाळ होत चालली
आहे." तेव्हा येशू त्यांच्या घरी गेले. 30 ते भोजनास बसले असताना,
येशूंनी भाकर घेतली, आभार मानले, ती मोडली आणि ती त्यांना दिली.
31 तेव्हा त्यांचे डोळे उघडले आणि त्यांनी त्यांना ओळखले. त्याच
क्षणाला येशू त्यांच्यापासून अंतर्धान पावले. 32 ते एकमेकास म्हणू
लागले, "ते रस्त्याने आपल्यासोबत बोलत असताना आणि आपल्याला
शास्त्रलेख समजावून सांगत असताना आपली अंत:करणे प्रज्वलित
झाली नाहीत काय?" 33 तेव्हा त्याच घटकेस ते उठून यरुशलेमास
माघारी गेले, तिथे येशूंचे अकरा शिष्य आणि इतर अनुयायी एकत्र
जमले आहेत, असे त्यांनी पाहिले. 34 जमलेले लोक म्हणत होते, "प्रभू
खरोखर उठले आहे व त्यांनी शिमोनाला दर्शन दिले आहे." 35 तेव्हा त्या
दोघांनी सांगितले की, ते रस्त्याने असताना काय घडले होते आणि
येशूंनी भाकर मोडली तेव्हा त्यांनी त्यांना कसे ओळखले. 36 ते हे
सर्व सांगत असतानाच, प्रत्यक्ष येशू स्वत: अकस्मात त्यांच्यामध्ये उभे
राहिले आणि म्हणाले, "तुम्हाला शांती असो." 37 आपण एखादा
दुष्टात्मा पाहत आहोत असे वाटून, ते सर्व विलक्षण भयभीत झाले. 38
येशूंनी त्यांना विचारले, "तुम्ही का घाबरला आणि तुमच्या मनात संशय
का आला? 39 माझे हात व माझे पाय पाहा. मी तोच आहे. भुतांना मांस
व हाडे नसतात, पण मला ती आहेत हे तुम्ही पाहत आहात." 40 हे
बोलल्यावर येशूंनी आपले हात व पाय त्यांना दाखविले. 41 त्यावेळी
त्यांची हृदये आनंदाने भरली, पण त्याबरोबरच त्यांच्या मनात संशयही
दाटला होता. तेव्हा येशूंनी त्यांना विचारले, "तुमच्याजवळ येथे खावयास
काही आहे काय?" 42 तेव्हा त्यांनी त्यांना भाजलेल्या माशाचा एक
तुकडा दिला. 43 त्यांनी तो घेऊन त्यांच्यादेखत खाल्ला. 44 मग येशू
त्यांना म्हणाले, "मोशेचे नियमशास्त्र, संदेष्टे आणि स्तोत्रसंहितेमध्ये
जे काही माझ्याविषयी लिहिले आहे ते सर्व खरे झालेच पाहिजे, हे मी
तुम्हाला तुमच्याबरोबर असताना सांगितले होते." 45 मग शास्त्रलेख
त्यांना समजावा म्हणून त्यांनी त्यांची मने उघडली. 46 त्यांनी पुढे

म्हटले, “ख्रिस्ताने दुःख सहन करावे, मरावे आणि तिसऱ्या दिवशी
मरणातून पुन्हा उठावे या गोष्टी फार पूर्वी लिहून ठेवल्या होत्या. 47
आणि यरुशलेमापासून आरंभ करून सर्व राष्ट्रांमध्ये त्यांच्या नावाने
पापांच्या क्षमेसाठी पश्चात्तापाची घोषणा करण्यात यावी. 48 तुम्ही या
सर्व गोष्टींचे साक्षी आहात. 49 माझ्या पित्याने अभिवचन दिले ते मी
तुम्हाकडे पाठवेन. तर तुम्हाला वरून सामर्थ्य मिळेपर्यंत या शहरातच
राहा.” 50 यानंतर येशूंनी त्यांना बेथानी गावापर्यंत नेले आणि आपले
हात वर करून आशीर्वाद दिला. 51 येशू त्यांना आशीर्वाद देत असताना
त्यांना सोडून स्वर्गात वर घेतले गेले. 52 तेव्हा त्यांनी त्यांना नमन केले
आणि मोठ्या आनंदाने ते यरुशलेमास परतले 53 आणि ते मंदिरामध्ये
नियमितपणे परमेश्वराची स्तुती करीत राहिले.

# योहान

**1** प्रारंभी शब्द होता आणि शब्द परमेश्वरा समवेत होता आणि शब्द
परमेश्वर होता. 2 तोच प्रारंभीपासून परमेश्वराबरोबर होता. 3 शब्दाद्वारे
सर्वगोष्टी निर्माण झाल्या आणि जे काही निर्माण झाले ते त्यांच्याशिवाय
निर्माण झाले नाही. 4 त्यांच्यामध्ये जीवन होते आणि तेच जीवन संपूर्ण
मनुष्यजातीला प्रकाश देत होते. 5 तो प्रकाश अंधारात उजळत होता
आणि अंधाराने त्या प्रकाशाला ओळखले नाही. 6 परमेश्वराने योहान
नावाच्या मनुष्याला पाठविले. 7 तो त्या प्रकाशाविषयी प्रमाण पटावे
व साक्ष द्यावी म्हणून आला, यासाठी की त्यांच्याद्वारे सर्वांनी विश्वास
ठेवावा. 8 तो स्वतः प्रकाश नव्हता; तो केवळ त्या प्रकाशाविषयी साक्ष
द्यावी म्हणून आला होता. 9 जो खरा प्रकाश प्रत्येकाला प्रकाश देतो तो
जगात येणार होता. 10 तो जगात होता आणि जगाची निर्मिती त्यांच्याद्वारे
झाली, तरी जगाने त्यांना ओळखले नाही. 11 ते स्वतःच्या लोकांकडे
आले, परंतु त्यांनी त्यांचा स्वीकार केला नाही. 12 परंतु ज्या सर्वांनी
त्यांना स्वीकारले, त्यांच्या नावावर विश्वास ठेवला, त्यांना परमेश्वराची
मुले होण्याचा अधिकार दिला— 13 ज्या लेकरांचा जन्म ना वंशाने, ना
मानवी इच्छेने किंवा पतीच्या इच्छेने, तर परमेश्वरापासून झाला. 14
शब्दाने मानवी शरीर धारण केले व आमच्यामध्ये त्यांनी वास्तव्य केले.
आम्ही त्यांचे गौरव पाहिले, ते गौरव एकमेव पुत्राचे, जो पित्यापासून
आला व अनुग्रह व सत्याने परिपूर्ण होता त्यांचे होते. 15 योहानाने
त्यांच्याबद्दल साक्ष दिली. तो ओरडून म्हणाला, "ज्यांच्याविषयी मी
म्हणालो होतो, 'जो माझ्यानंतर येणार आहे तो माझ्यापेक्षा थोर आहे,
कारण तो माझ्यापूर्वी होता.'" 16 त्यांच्या पूर्णतेतून आम्हा सर्वांना
कृपेवर कृपा भरून मिळाली आहे. 17 कारण मोशेद्वारे नियमशास्त्र
देण्यात आले होते; परंतु येशू ख्रिस्ताद्वारे कृपा व सत्य देण्यात आले
आहे. 18 परमेश्वराला कोणी कधीही पाहिलेले नाही, परंतु त्यांचा
एकुलता एक पुत्र, जे स्वतः परमेश्वर आहेत आणि पित्याच्या निकट
सहवासात राहतात, त्या पित्याने त्यांना प्रकट केले आहे. 19 जेव्हा
यहूदी पुढाऱ्यांनी यरुशलेम येथून याजक आणि लेवी यांना योहानाकडे
विचारपूस करावयास पाठविले की तो कोण आहे, त्यावेळी योहानाने
दिलेली ही साक्ष होय. 20 तो कबूल करण्यास कचरला नाही, त्याने
मोकळेपणाने सांगितले, तो म्हणाला, "मी ख्रिस्त नाही." 21 त्यावर
त्यांनी परत विचारले, "मग तुम्ही कोण आहात? तुम्ही एलीयाह आहात
काय?" त्याने उत्तर दिले, "नाही." "मग आपण संदेष्टा आहात काय?"
त्याने उत्तर दिले, "नाही." 22 शेवटी ते म्हणाले, "तर मग आपण आहात
तरी कोण? आम्हाला सांगा, म्हणजे ज्यांनी आम्हाला हे विचारण्यास
पाठविले आहे त्यांना उत्तर देता येईल." 23 यशायाह संदेष्ट्याच्या
शब्दात योहानाने उत्तर दिले, मी अरण्यात घोषणा करणाऱ्या एकाची
वाणी आहे, जी म्हणते, "'प्रभूचा मार्ग सरळ करा.'" 24 आता ज्या
परूश्यांनी त्यांना पाठविले होते, 25 त्यांनी प्रश्न विचारला, "तुम्ही
ख्रिस्त नाही, एलीयाह नाही व संदेष्टाही नाही तर तुम्ही बाप्तिस्मा का
करता?" 26 तेव्हा योहान उत्तरला, "मी पाण्याने बाप्तिस्मा करतो,
परंतु तुम्हामध्ये एकजण असा आहे की, ज्याला तुम्ही ओळखत नाही.
27 तो हाच आहे जो माझ्यानंतर येत आहे आणि त्याच्या वहाणांचे
बंद सोडण्यासाठी एक दास होण्याची देखील माझी पात्रता नाही."
28 हे सर्व यार्देन नदीच्या पलीकडे बेथानी येथे घडले, जिथे योहान
बाप्तिस्मा देत होता. 29 दुसऱ्या दिवशी येशूंना आपणाकडे येत असताना
योहानाने पाहिले आणि तो म्हणाला, "हा पाहा, जगाचे पाप वाहून
नेणारा परमेश्वराचा कोकरा! 30 ते हेच आहेत, ज्यांच्या संदर्भात मी
म्हणत होतो, 'हा मनुष्य जो माझ्यानंतर येणार आहे, तो माझ्यापेक्षा थोर
आहे कारण तो माझ्यापूर्वी होता.' 31 मला स्वतः त्यांची ओळख नव्हती,
पण मी याच कारणासाठी पाण्याने बाप्तिस्मा करत आलो की त्यांनी
इस्राएली लोकांस प्रकट व्हावे." 32 मग योहानाने अशी साक्ष दिली:
"स्वर्गातून पवित्र आत्मा कबुतरासारखा खाली आला व त्यांच्यावर
स्थिरावला. 33 मी स्वतः त्यांना ओळखत नव्हतो, परंतु ज्यांनी मला
पाण्याने बाप्तिस्मा करण्यासाठी पाठविले त्यांनी मला सांगितले होते
की, 'ज्या मनुष्यावर आत्मा उतरतांना आणि स्थिरावताना तुम्ही पाहाल,
तोच पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा देईल.' 34 हे घडताना मी स्वतः पाहिले
आहे आणि साक्ष देतो की हे परमेश्वराचे पुत्र आहेत." 35 दुसऱ्या दिवशी
योहान आपल्या दोन शिष्यांसह उभा असताना, 36 येशूंना जाताना
पाहून योहानाने म्हटले, "हा पाहा, परमेश्वराचा कोकरा!" 37 त्या दोन
शिष्यांनी त्याला हे बोलताना ऐकले, तेव्हा ते येशूंना अनुसरले. 38 येशूंनी
मागे वळून ते आपल्याला अनुसरत आहेत हे पाहून विचारले, "तुम्हाला
काय पाहिजे?" त्यांनी उत्तर दिले, "रब्बी" म्हणजे "गुरुजी, आपण
कुठे राहता?" 39 येशूंनी म्हटले, "या आणि पाहा." त्यांनी जाऊन
त्यांचे निवासस्थान पाहिले आणि तो संपूर्ण दिवस त्यांनी त्यांच्याबरोबर
घालविला. त्यावेळी दुपारचे चार वाजले होते. 40 योहानाचे बोलणे ऐकून
ज्यांनी येशूंना अनुसरले होते, त्या दोन शिष्यांमधील एक आंद्रिया,
शिमोन पेत्राचा भाऊ होता. 41 आंद्रियाने पहिली गोष्ट ही केली की त्याने
त्याचा भाऊ शिमोन याला शोधले आणि त्याला सांगितले, "आम्हाला
मसिहा म्हणजे ख्रिस्त सापडला आहे." 42 मग तो त्याला येशूंकडे घेऊन
आला. येशूंनी त्याच्याकडे पाहून म्हटले, "तू योहानाचा पुत्र शिमोन
आहेस, तुला केफा, म्हणजे खडक असे म्हणतील." भाषांतर केल्यानंतर
पेत्र. 43 दुसऱ्या दिवशी येशूंनी गालील प्रांतात जाण्याचे ठरविले. त्यांना
फिलिप्प सापडल्यावर ते त्याला म्हणाले, "माझ्यामागे ये." 44 आंद्रिया
आणि पेत्र यांच्याप्रमाणेच फिलिप्प बेथसैदा नगरचा रहिवासी होता.
45 मग फिलिप्पाला नाथानाएल सापडल्यानंतर तो त्याला म्हणाला,
"ज्यांच्याबद्दल मोशेने नियमशास्त्रात लिहून ठेवले आणि ज्यांच्याबद्दल
संदेष्ट्यांनीसुद्धा कथन केले ते, येशू नासरेथकर, योसेफाचे पुत्र आम्हाला
सापडले आहेत." 46 त्यावर नाथानाएलाने विचारले, "नासरेथ! तिथून
काही चांगले निघू शकेल काय?" यावर फिलिप्पाने त्याला म्हटले,
"तू ये आणि पाहा." 47 आपल्याकडे नाथानाएल येताना पाहून, येशू
म्हणाले, "हा खरा इस्राएली असून याच्यामध्ये फसवणूक आढळत

नाही.” 48 तेव्हा नाथानाएलाने विचारले, “तुम्ही मला कसे ओळखता?”
येशूंनी त्याला उत्तर दिले, “फिलिप्पाने तुला बोलविण्यापूर्वी मी तुला
अंजिराच्या झाडाखाली उभे असताना पाहिले होते.” 49 नाथानाएलाने
जाहीर केले, “गुरुजी, आपण परमेश्वराचे पुत्र; आपण इस्राएलचे राजे
आहात.” 50 त्यावर येशू म्हणाले, “मी तुला अंजिराच्या झाडाखाली
पाहिले असे सांगितले म्हणून तू विश्वास ठेवतोस. परंतु यापेक्षा अधिक
मोठ्या गोष्टी तू पाहशील.” 51 ते पुढे असेही म्हणाले, “मी तुम्हाला
निश्चित सांगतो, की तुम्ही स्वर्ग उघडलेला आणि परमेश्वराचे स्वर्गदूत वर
चढताना व मानवपुत्रावर उतरतांना पाहाल.”

**2** तिसऱ्या दिवशी गालीलातील काना येथे एक लग्न होते. येशूंची आई
तिथे होती, 2 येशू व त्यांच्या शिष्यांना देखील त्या लग्नाचे आमंत्रण
होते. 3 ज्यावेळी द्राक्षारस संपला, तेव्हा येशूंची आई त्यांना म्हणाली,
“त्यांच्याजवळचा द्राक्षारस संपला आहे.” 4 येशू म्हणाले, “बाई, तू
मला यामध्ये भाग घ्यावयास का लावते? माझी घटका अजूनही आलेली
नाही.” 5 त्यांच्या आईने नोकरांस सांगितले, “हा जे काही तुम्हाला
सांगेल ते करा.” 6 त्या ठिकाणी जवळच पाण्याचे सहा दगडी रांजण
होते, ते यहूदीयांच्या शुद्धीकरणासाठी वापरले जात असत आणि त्या
प्रत्येकात सुमारे शंभर लीटर पाणी मावत असे. 7 येशू त्या नोकरांना
म्हणाले, “रांजण पाण्याने भरा” त्याप्रमाणे त्यांनी ते पुरेपूर भरले. 8
नंतर येशू त्यांना म्हणाले, “आता यातील काही काढून भोजन प्रमुखाकडे
न्या.” त्यांनी तसे केले, 9 त्या भोजन प्रमुखाने द्राक्षारसात परिवर्तित
झालेल्या पाण्याची चव पाहिली. तो द्राक्षारस कुठून आणला हे त्याला
माहीत नव्हते, पण ज्या नोकरांनी पाणी काढले होते त्यांना माहीत
होते. म्हणून त्याने वराला बाजूला बोलावून म्हटले, 10 “प्रत्येकजण
उत्तम द्राक्षारस प्रथम वाढतो आणि पाहुणे पिऊन तृप्त झाले की, मग
हलक्या प्रतीचा वाढतो; तुम्ही तर उत्तम द्राक्षारस आतापर्यंत ठेवला
आहे.” 11 येशूंनी गालीलातील काना येथे केलेले हे पहिले चिन्ह होते व
त्याद्वारे आपले गौरव प्रकट केले आणि शिष्यांनी त्यांच्यावर विश्वास
ठेवला. 12 यानंतर येशू आपली आई, भाऊ आणि शिष्य यांच्याबरोबर
काही दिवस खाली कफर्णहूम येथे राहण्यास गेले. 13 त्यानंतर यहूद्यांचा
वल्हांडण सण जवळ आला असताना येशू वर यरुशलेमास गेले. 14
तिथे त्यांनी मंदिराच्या अंगणात गुरे, मेंढरे व कबुतरे विकणारे आणि
पैसे बदलून देणारे लोक यांना पाहिले, 15 तेव्हा त्यांनी दोऱ्यांचा एक
चाबूक तयार केला आणि त्या सर्वांना मेंढरे आणि गुरे यांच्यासहित
मंदिराच्या परिसरातून बाहेर घालविले आणि नाणी बदलून देणाऱ्यांचे
मेज पालथे करून त्यांची नाणी उधळून टाकली. 16 मग जे कबुतरे विक्रेते
होते त्यांना ते म्हणाले, “यांना येथून काढा! माझ्या पित्याच्या घराची
बाजारपेठ करू नका!” 17 तेव्हा शिष्यांना हा शास्त्रलेख आठवला:
“तुझ्या मंदिराविषयीच्या ईर्षेने मला ग्रासून टाकले आहे.” 18 यहूदी
पुढाऱ्यांनी त्यांना म्हटले, “हे सर्व करण्याचा अधिकार आपणाला दिला
आहे हे सिद्ध करण्यासाठी आपण कोणते चिन्ह आम्हास दाखवाल?”
19 येशू म्हणाले, “हे मंदिर तुम्ही नष्ट करा आणि मी ते तीन दिवसात
पुन्हा बांधेन.” 20 त्यांनी उत्तर दिले, “हे मंदिर बांधण्यासाठी शेहेचाळीस
वर्षे लागली आणि आपण तीन दिवसात हे बांधू शकता का?” 21
परंतु मंदिर म्हणजे स्वतःच्या शरीरा संदर्भात ते बोलत होते. 22 पुढे ते
मरणातून उठल्यानंतर, त्यांच्या शिष्यांना या शब्दाचे स्मरण झाले. नंतर
त्यांनी शास्त्रलेख व येशूंनी उच्चारलेली वचने यावर विश्वास ठेवला. 23
वल्हांडणाच्या उत्सवात येशू यरुशलेमात असताना, अनेक लोकांनी
त्यांच्याद्वारे घडत असलेली चिन्हे पाहिली व त्यांच्या नावावर विश्वास
ठेवला. 24 परंतु येशूंनी स्वतःस त्यांच्या अधीन केले नाही, कारण ते सर्व
लोकांस ओळखून होते. 25 त्यांना मनुष्याविषयी कोणाच्याही साक्षीची
गरज नव्हती, कारण प्रत्येक व्यक्तीमध्ये काय आहे हे त्यांना माहीत
होते.

**3** आता निकदेम नावाचा एक परूशी, जो यहूदी प्रतिनिधीमंडळाचा
सभासद होता, 2 तो रात्री येशूंकडे आला व म्हणाला, “गुरुजी,
आपण शिक्षक आहात व परमेश्वराकडून आलेले आहात, हे आम्हास
माहीत आहे. कारण ही जी चिन्हे आपण करत आहात, ती परमेश्वर
बरोबर असल्याशिवाय करता येणार नाही.” 3 त्यावर येशूंनी उत्तर
दिले, “मी तुला निश्चित सांगतो, नवीन जन्म झाल्याशिवाय कोणालाही
परमेश्वराचे राज्य पाहता येणार नाही.” 4 तेव्हा निकदेमाने विचारले,
“जे वृद्ध आहेत त्यांचा नव्याने जन्म कसा होऊ शकेल? त्यांना दुसऱ्या
वेळी आपल्या मातेच्या उदरात जाऊन जन्म घेता येणे शक्य नाही!” 5
येशूंनी उत्तर दिले, “मी तुला निश्चित सांगतो, पाण्याने आणि पवित्र
आत्म्याने जन्म झाल्याशिवाय कोणीही परमेश्वराच्या राज्यात प्रवेश
करू शकणार नाही. 6 शरीर शरीरालाच आणि आत्मा आत्म्याला जन्म
देतो. 7 ‘तुझा नवीन जन्म झाला पाहिजे,’ या माझ्या विधानाचे आश्चर्य
मानण्याचे कारण नाही. 8 वारा पाहिजे तिकडे वाहतो आणि त्याचा
आवाज तुम्ही ऐकता, परंतु तो कुठून आला व कुठे जाईल हे तुम्ही
सांगू शकत नाही. तसेच जो प्रत्येकजण आत्म्यापासून जन्मतो त्यांच्या
बाबतीत असेच आहे.” 9 तेव्हा निकदेमाने विचारले, “पण हे कसे
होईल?” 10 “येशूंनी म्हटले, तुम्ही इस्राएलचे शिक्षक असूनही तुम्हाला
या गोष्टी समजत नाही काय? 11 मी तुम्हाला निश्चित सांगतो की जे
आम्हास समजले आहे ते आम्ही बोलतो आणि आम्ही जे काही पाहिले
आहे, त्याविषयी साक्ष देतो आणि तरीही तुम्ही लोक आमची साक्ष मान्य
करीत नाही. 12 मी पृथ्वीवरील गोष्टी तुम्हाला सांगितल्या तरी तुम्ही
विश्वास ठेवीत नाही; तर मग स्वर्गीय गोष्टी तुम्हाला सांगितल्यास कसा
विश्वास ठेवाल? 13 स्वर्गातून आलेल्या मानवपुत्राशिवाय इतर कोणीही
स्वर्गात गेला नाही. 14 जसा मोशेने जंगलात साप उंच केला, त्याचप्रमाणे
मानवपुत्रालाही उंच केले जाईल, 15 जो कोणी त्याजवर विश्वास ठेवेल,
त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त होईल.” (aiōnios g166) 16 कारण
परमेश्वराने जगावर एवढी प्रीती केली की त्यांनी आपला एकुलता एक
पुत्र दिला, यासाठी की, जो कोणी त्यांच्यावर विश्वास ठेवतो, त्याचा
नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे. (aiōnios g166)
17 परमेश्वराने आपल्या पुत्राला या जगामध्ये, जगाला दोष लावण्यासाठी

नव्हे तर, त्यांच्याद्वारे जगाचे तारण व्हावे म्हणून पाठविले आहे. 18
जो त्यांच्यावर विश्वास ठेवतो तो दोषरहित ठरेल, परंतु जो विश्वास
ठेवीत नाही तो दोषी ठरविण्यात आला आहे, कारण त्याने परमेश्वराच्या
एकुलत्या एका पुत्राच्या नावावर विश्वास ठेवण्याचे नाकारले. 19 निर्णय
हाच आहे: प्रकाश या जगात आला आहे, परंतु लोकांनी प्रकाशाऐवजी
अंधकाराची अधिक आवड धरली; कारण त्यांची कर्मे दुष्ट होती. 20
दुष्कृत्ये करणारा प्रत्येकजण प्रकाशाचा द्वेष करतो आणि प्रकाशाकडे
येत नाही, कारण आपली दुष्कृत्ये प्रकट होतील अशी त्याला भीती
वाटते. 21 परंतु जो सत्याने जीवन जगतो तो प्रकाशाकडे येतो, यासाठी
की जे काही त्यांनी केले ते परमेश्वराच्या दृष्टीने योग्य आहे, हे स्पष्ट दिसून
यावे. 22 त्यानंतर, येशू आणि त्यांचे शिष्य यहूदीया प्रांतात आले आणि
तिथे थोडा वेळ त्यांच्याबरोबर घालविला आणि बाप्तिस्मे केले. 23
आता योहान शालिमाजवळ असलेले एनोन येथे बाप्तिस्मा करीत होता,
कारण तिथे विपुल प्रमाणात पाणी असून, लोक बाप्तिस्मा घेण्यासाठी
येत असत. 24 त्या वेळेपर्यंत योहान तुरुंगात टाकला गेला नव्हता. 25
कोणाएका यहूदी मनुष्याने योहानाच्या शिष्यांबरोबर शुद्धीकरणाच्या
विधीबद्दल वादविवाद केला. 26 तेव्हा शिष्य योहानाकडे आले आणि
म्हणाले, “गुरुजी, यार्देन नदीच्या पलीकडे जो मनुष्य आपल्याबरोबर
होता व ज्यांच्याबद्दल आपण साक्ष दिली, ते बाप्तिस्मा करीत आहेत
आणि पाहा, प्रत्येकजण त्यांच्याकडे जात आहे.” 27 त्यावर योहानाने
उत्तर दिले, “मनुष्याला जे काही स्वर्गातून दिले जाईल तेच प्राप्त होईल.
28 ‘मी ख्रिस्त नव्हे, परंतु त्यांच्यापुढे मला पाठविण्यात आले आहे,’ असे
मी म्हटले होते याचे साक्षी तुम्हीच आहात. 29 वधू वराची असते. वराचा
मित्र जवळ थांबून त्याचे भाषण ऐकतो, वराचा आवाज ऐकून त्याचा
आनंद पूर्ण होतो, तो आनंद माझा आहे आणि आता तो परिपूर्ण झाला
आहे. 30 ते अधिक थोर होवो आणि मी लहान व्हावे.” 31 जो स्वर्गातून
आलेला आहे तो इतर सर्वांपेक्षा थोर आहे. जो जगापासून आहे तो
जगाचा आहे; व जगातील विषयांच्या बाबतीत बोलतो. जो स्वर्गातून
येतो तो सर्वांहून थोर आहे. 32 त्यांनी जे पाहिले व ऐकले त्याविषयी
ते साक्ष देतात, परंतु त्यांची साक्ष कोणीच मान्य करत नाही. 33 जे
कोणी त्यांची साक्ष स्वीकारतात, त्यांनी असे प्रमाणित केले की परमेश्वर
सत्य आहे. 34 ज्या कोणाला परमेश्वराने पाठविले, ते परमेश्वराची वचने
बोलतात, कारण परमेश्वर विपुलतेचा आत्मा देतात. 35 पिता पुत्रावर
प्रीती करतात आणि त्याने प्रत्येक गोष्ट त्यांच्या हाती सोपविली आहे. 36
जो कोणी पुत्रावर विश्वास ठेवतो, त्याला सार्वकालिक जीवन आहे; परंतु
जो कोणी पुत्राला नाकारतो, तो जीवन पाहणार नाही, पण परमेश्वराचा
क्रोध त्याच्यावर राहील. (aiōnios g166)

**4** येशू योहानापेक्षा अधिक शिष्य करून त्यांचा बाप्तिस्मा करीत
आहेत असे परूश्यांच्या कानावर गेले आहे असे येशूंना समजले—
2 वास्तविक पाहता येशू बाप्तिस्मा देत नव्हते, परंतु त्यांचे शिष्यच
बाप्तिस्मा देत असत. 3 तेव्हा यहूदीया प्रांत सोडून ते पुन्हा गालील
प्रांतामध्ये गेले. 4 त्यासाठी त्यांना शोमरोन प्रांतामधून जावे लागले.
5 मग ते शोमरोनातील सूखार नावाच्या नगरास आले; ते याकोबाने
आपला पुत्र योसेफास दिलेल्या शेताजवळ होते. 6 तिथे याकोबाची
विहीर होती. येशू, प्रवासाने थकलेले याकोबाच्या विहिरीजवळ बसले. ती
भर दुपारची वेळ होती. 7 तेव्हा एक शोमरोनी स्त्री पाणी काढण्यासाठी
आली, येशूंनी तिला म्हटले, “तू मला पाणी प्यावयास देशील का?”
8 त्यांचे शिष्य अन्न विकत घेण्यासाठी गावात गेलेले होते. 9 तेव्हा
ती शोमरोनी स्त्री त्यांना म्हणाली, “आपण यहूदी आहात व मी एक
शोमरोनी स्त्री आहे. तुम्ही मजजवळ पाणी कसे मागू शकता?” (कारण
यहूदी लोक शोमरोनी लोकांशी संबंध ठेवीत नसत.) 10 येशू तिला
म्हणाले, “परमेश्वराचे वरदान आणि मला प्यावयाला पाणी दे असे
म्हणणारा कोण, हे जर तुला कळले असते तर तू त्यांच्याजवळ मागितले
असते आणि त्यांनी तुला जिवंत पाणी दिले असते.” 11 “महाराज,”
ती स्त्री म्हणाली, “परंतु आपल्याजवळ पाणी काढण्यासाठी पोहरा
नाही आणि विहीर तर खूप खोल आहे. हे जिवंत पाणी आपणाकडे
कुठून येणार? 12 आमचा पिता याकोबाने आम्हाला ही विहीर दिली
होती व ते स्वतः, त्यांची गुरे आणि त्याचे पुत्रही हे पाणी पीत असत,
त्यांच्यापेक्षा आपण थोर आहात काय?” 13 येशूंनी तिला उत्तर दिले,
“जो कोणी हे पाणी पिईल त्याला पुन्हा तहान लागेल, 14 परंतु जे
पाणी मी देतो ते पाणी जो कोणी पिईल त्याला कधीही तहान लागणार
नाही. खरोखर, जे पाणी मी त्यांना देईन ते त्यांच्यामध्ये सार्वकालिक
जीवनासाठी जिवंत पाण्याचा झरा असे होईल.” (aiōn g165, aiōnios
g166) 15 ती स्त्री म्हणाली, “महाराज, मला हे पाणी द्या, म्हणजे मला
तहान लागणार नाही आणि सतत पाणी काढण्यासाठी येथे येण्याची
गरजही पडणार नाही.” 16 येशूंनी तिला सांगितले, “जा आणि तुझ्या
पतीला इकडे बोलावून आण.” 17 परंतु ती स्त्री म्हणाली, “मला पती
नाही.” त्यावर येशू म्हणाले, “मला पती नाही हे जे तू म्हणतेस ते अगदी
खरे आहे. 18 कारण वस्तुस्थिती अशी आहे की तुला पाच पती होते
आणि जो पुरुष सध्या तुझ्याबरोबर आहे, तो तुझा पती नाही. तू जे
काही सांगितले, ते सर्व सत्य आहे.” 19 “महाराज,” ती स्त्री उद्गारली,
“आपण खरोखर संदेष्टे आहात असे मला दिसते. 20 आमच्या पूर्वजांनी
या डोंगरावर परमेश्वराची उपासना केली, परंतु तुम्ही यहूदी, उपासनेचे
स्थान यरुशलेममध्येच आहे असा आग्रह धरता.” 21 येशू तिला म्हणाले,
“बाई, माझ्यावर विश्वास ठेव, अशी वेळ येईल की त्यावेळी तुम्ही
पित्याची उपासना या डोंगरावर किंवा यरुशलेमात करणार नाही. 22
तुम्ही शोमरोनी तुम्हाला माहीत नाही, अशाची उपासना करता; पण जो
आम्हाला माहीत आहे आम्ही त्याची उपासना करतो. कारण उद्धार
यहूदी लोकांपासून आहे. 23 अशी वेळ येत आहे आणि आली आहे
की खरे उपासक पित्याची उपासना आत्म्याने व खरेपणाने करतील.
पिता अशाच प्रकारच्या उपासकांना शोधीत आहे. 24 परमेश्वर आत्मा
आहे आणि त्यांच्या भक्तांनी त्यांची उपासना आत्म्याने व खरेपणानेच
करावयास पाहिजेत.” 25 ती स्त्री म्हणाली, “मला माहीत आहे की,
ख्रिस्त म्हणतात तो मसिहा येणार आहे आणि तो आला म्हणजे

सर्व गोष्टींचे स्पष्टीकरण करून सांगेल.” 26 यावर येशूंनी जाहीरपणे
सांगितले, “मी, तुजबरोबर बोलत आहे तोच मी आहे.” 27 त्यांचे शिष्य
परतले आणि ते एका बाईशी बोलत आहेत हे पाहून त्यांना आश्चर्य
वाटले. परंतु, “तुम्हाला काय हवे आहे?” किंवा “तिच्याबरोबर कसला
संवाद करीत होते?” असे त्यांना त्यांच्यापैकी एकानेही विचारले नाही.
28 मग, तिने आपली पाण्याची घागर तिथेच सोडली आणि नगरात
जाऊन लोकांना म्हणाली, 29 “चला, या मनुष्याला पाहा, मी केलेली
प्रत्येक गोष्ट त्याने मला सांगितली. तोच ख्रिस्त असू शकेल का?” 30
तेव्हा ते नगरातून बाहेर आले व त्यांच्याकडे वाटचाल करू लागले. 31
“गुरुजी, आपण काही खावे,” म्हणून शिष्य त्यांना आग्रह करू लागले.
32 पण ते त्यांना म्हणाले, “माझ्याजवळ असे अन्न आहे ज्याबद्दल
तुम्हाला काहीच ठाऊक नाही.” 33 त्यावर शिष्य एकमेकांना विचारू
लागले, “यांना कोणी अन्न आणून दिले का?” 34 येशूंनी म्हटले,
“ज्याने मला पाठविले त्यांच्या इच्छेप्रमाणे करणे व त्यांचे कार्य पूर्ण
करणे हेच माझे अन्न. 35 ‘चार महिन्यांचा अवधी कापणी करण्यासाठी
आहे असे तुमचे म्हणणे आहे ना?’ तर मी तुम्हाला सांगतो, आपली
नजर वर करून शेते पाहा! ती कापणीसाठी तयार आहेत. 36 आता
कापणाऱ्याला मजुरी मिळत आहे व तो सार्वकालिक जीवनासाठी पीक
साठवून ठेवत आहे; यासाठी की, पेरणाऱ्याने व कापणाऱ्यानेही एकत्रित
मिळून आनंद करावा. (aiōnios g166) 37 ‘एक पेरतो व दुसरा कापणी
करतो,’ अशी जी म्हण आहे ती खरी आहे. 38 जिथे तुम्ही पेरणी
केली नाही, तिथे कापणी करण्यासाठी मी तुम्हाला पाठविले; इतरांनी
पेरणी करण्याचे कष्ट केले होते आणि त्यांच्या श्रमाचे प्रतिफळ तुम्हाला
मिळाले आहे.” 39 “मी केलेली प्रत्येक गोष्ट त्याने मला सांगितली,” या
तिच्या साक्षीवरून शोमरोन नगरातील अनेकांनी त्यांच्यावर विश्वास
ठेवला. 40 म्हणून शोमरोनी लोक येशूंकडे आल्यावर त्यांनी येशूंना
नगरात राहण्याची विनंती केली. तेव्हा ते तिथे दोन दिवस राहिले. 41
याकाळात त्यांच्या वचनामुळे आणखी पुष्कळ लोक विश्वासू झाले.
42 मग ते त्या बाईला म्हणाले, “तू सांगितले म्हणून नव्हे, तर आम्ही
प्रत्यक्ष त्यांचे बोलणे ऐकून त्यांच्यावर विश्वास ठेवत आहोत आणि
आम्हाला माहीत आहे की हा मनुष्य खरोखर जगाचा तारणारा आहे.”
43 दोन दिवसानंतर ते गालील प्रांतात गेले. 44 कारण येशूंनी स्वतः
स्पष्टपणे सांगितले होते की, संदेष्ट्याला स्वतःच्या देशात मान मिळत
नाही. 45 ते गालीलात आले, तेव्हा गालिलकरांनी त्यांचे स्वागत केले.
कारण वल्हांडण सणाच्या वेळी, ते तिथे उपस्थित होते व यरुशलेममध्ये
जे काही येशूंनी केले ते त्यांनी पाहिले होते. 46 गालीलातील काना गावी
त्यांनी पुन्हा भेट दिली, येथेच त्यांनी पाण्याचा द्राक्षारस केला होता. ते
तिथे असताना, कफर्णहूममध्ये एका शासकीय अधिकाऱ्याचा मुलगा
आजारी होता. 47 येशू यहूदीयातून गालीलात आले आहेत, हे ऐकून
तो त्यांच्याकडे गेला व आपण येऊन माझ्या मुलाला बरे करावे, अशी
त्यांना आग्रहाने विनंती केली, कारण तो मुलगा मृत्युशय्येवर होता. 48
तेव्हा येशू म्हणाले, “मी अद्भुते व चिन्हे केल्याशिवाय तुम्ही लोक मजवर
विश्वास ठेवणार नाही.” 49 तो शासकीय अधिकारी म्हणाला, “प्रभूजी,
माझे मूल मरण्यापूर्वी येण्याची कृपा करा.” 50 येशू त्याला म्हणाले,
“जा, तुझा मुलगा जगेल, तो मरणार नाही.” त्या मनुष्याने येशूंच्या
वचनावर विश्वास ठेवला आणि निघाला. 51 तो मार्गावर असतानाच,
त्याचे काही दास त्याला भेटले आणि आपला मुलगा जिवंत आहे अशी
बातमी त्यांनी त्याला दिली. 52 मुलाला कोणत्या वेळेपासून बरे वाटू
लागले, अशी त्याने त्यांच्याजवळ चौकशी केली असता त्यांनी उत्तर
दिले, “काल दुपारी एक वाजण्याच्या सुमारास त्याचा ताप नाहीसा
झाला.” 53 तेव्हा त्या पित्याला उमगले की त्याच घटकेस येशूंनी,
“तुझा मुलगा जगेल तो मरणार नाही.” हे शब्द उच्चारले होते. मग तो व
त्याच्या संपूर्ण कुटुंबाने येशूंवर विश्वास ठेवला. 54 येशूंनी यहूदीयातून
गालीलात आल्यानंतर हे दुसरे चिन्ह केले होते.

5 काही काळानंतर, येशू यहूद्यांच्या सणांपैकी एकास यरुशलेम येथे
गेले. 2 आता यरुशलेम शहरात मेंढरे दरवाजाजवळ एक तळे आहे;
त्याला अरामी भाषेत बेथेस्दा म्हणतात आणि या तळ्याभोवती छप्पर
असलेल्या खांबांच्या पाच पडव्या होत्या. 3 येथे लंगडे, आंधळे, लुळे
असे अनेक अपंग लोक पडून असत. 4 कारण प्रभूचा दूत वेळोवेळी
येऊन, ते पाणी हालवीत असे. पाणी हालविताच कोणत्याही रोगाने
ग्रस्त असलेली व्यक्ती तळ्यात प्रथम उतरल्यास बरी होत असे. 5
तिथे अडतीस वर्षे अपंग असलेला एक मनुष्य होता. 6 येशूंनी त्याला
तिथे पडलेले पाहिले आणि तो तसाच स्थितीत बराच काळ पडून
आहे, असे जाणून त्याला विचारले, “तुला बरे होण्याची इच्छा आहे
काय?” 7 “प्रभूजी,” तो अपंग म्हणाला, “पाणी हालविल्यानंतर
तळ्यात उतरण्यास मला मदत करेल असा कोणी नाही. मी प्रयत्न
करून आत उतरण्याआधी दुसराच आत उतरलेला असतो.” 8 तेव्हा येशू
त्याला म्हणाले, “ऊठ आणि आपले अंथरूण उचल आणि चालू लाग.”
9 त्याच क्षणी तो मनुष्य बरा झाला आणि आपले अंथरूण उचलून चालू
लागला. ज्या दिवशी हे घडले तो शब्बाथ दिवस होता. 10 आणि यहूदी
पुढारी त्या बऱ्या झालेल्या मनुष्याला म्हणाले, “शब्बाथ दिवशी अंथरूण
उचलणे नियमशास्त्राच्या विरुद्ध आहे.” 11 परंतु त्याने त्यास उत्तर दिले,
“ज्याने मला बरे केले, तो म्हणाला, ‘तुझे अंथरूण उचलून चालू लाग.’”
12 त्यांनी त्याला विचारले, “तुझे अंथरूण उचलून चालू लाग, असे
सांगणारा व्यक्ती कोण आहे?” 13 जो मनुष्य बरा झाला होता त्याला
आपल्याला कोणी बरे केले, याची कल्पना नव्हती, कारण येशू गर्दीत
दिसेनासे झाले होते. 14 नंतर येशूंना तो मनुष्य मंदिरात आढळला आणि
येशूंनी त्याला सांगितले, “पाहा, तू आता बरा झाला आहेस. येथून पुढे
पाप करू नकोस, नाही तर तुझे पूर्वीपेक्षा अधिक वाईट होईल.” 15
मग त्या मनुष्याने यहूदी पुढाऱ्यांकडे जाऊन ज्याने मला बरे केले तो
येशू आहे असे सांगितले. 16 येशू शब्बाथ दिवशी अशा गोष्टी करीत
असल्यामुळे यहूदी पुढाऱ्यांनी त्यांचा छळ करण्यास सुरुवात केली.
17 येशूंनी त्यांच्या आरोपाला उत्तर दिले व म्हणाले, “माझा पिता या
दिवसापर्यंत सतत कार्य करीत आहे आणि मी देखील कार्य करीत

आहे.” 18 या कारणासाठी तर यहूदी पुढारी त्यांना जिवे मारण्यास
अधिकच आतुर झाले; कारण त्यांनी शब्बाथ मोडला होता, एवढेच नव्हे,
तर त्यांनी परमेश्वराला आपला पिता म्हणून स्वतःला परमेश्वरासमान
केले होते. 19 येशूंनी त्यांना असे उत्तर दिले: “मी तुम्हाला निश्चित
सांगतो, पुत्राला स्वतः होऊन काही करता येत नाही; तो पित्याला जे
काही करताना पाहतो, तेच तो करतो, कारण जे काही पिता करतो,
तेच पुत्रही करतो. 20 पिता पुत्रावर प्रीती करतो आणि तो जे करतो ते
सर्व पुत्राला विदित करतो. होय आणि तो याहूनही मोठी कृत्ये त्याला
दाखवेल व त्यामुळे तुम्ही चकित व्हाल. 21 कारण जसा पिता मेलेल्यास
उठवून जीवन देतो, तसा पुत्रही त्याच्या मर्जीप्रमाणे ज्यांना पाहिजे
त्यांना जीवन देतो. 22 याशिवाय, पिता कोणाचाही न्याय करीत नाही,
तर सर्व न्याय करण्याचे काम त्याने पुत्राकडे सोपविले आहे, 23 यासाठी
की जसा पित्याचा तसा सर्वांनी पुत्राचाही सन्मान करावा, जो पुत्राचा
सन्मान करीत नाही तो, ज्याने पुत्राला पाठविले त्या पित्याचाही सन्मान
करीत नाही. 24 “मी तुम्हाला निश्चित सांगतो, जो कोणी माझे वचन
ऐकतो आणि ज्यांनी मला पाठविले त्यांच्यावर विश्वास ठेवतो, त्याला
सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे आणि त्याचा न्याय होणार नाही,
तर त्याने मरणातून पार होऊन जीवनात प्रवेश केला आहे. (aiōnios
g166) 25 मी निश्चित सांगतो, अशी वेळ येत आहे आणि आलेलीच
आहे की त्यावेळी मेलेले लोक परमेश्वराच्या पुत्राची वाणी ऐकतील
आणि जे ऐकतील, ते जिवंत राहतील. 26 कारण ज्याप्रमाणे पित्यामध्ये
जीवन आहे, त्याचप्रमाणे पुत्रामध्येही जीवन असावे अशी त्यांनी योजना
केली आहे. 27 आणि तो मानवपुत्र आहे म्हणून न्यायनिवाडा करण्याचा
अधिकारही त्यांना दिला आहे. 28 “याविषयी आश्चर्य करू नका, कारण
अशी वेळ येत आहे हे की, जे सर्व कबरेमध्ये आहेत ते त्यांची वाणी
ऐकतील, 29 आणि बाहेर येतील. ज्यांनी चांगली कर्मे केली आहेत ते
सार्वकालिक जीवनासाठी उठतील, व ज्यांनी दुष्कर्मे केली आहेत ते दंड
भोगण्यासाठी उठतील. 30 मी स्वतःहून काही करू शकत नाही; मी
ऐकतो त्याप्रमाणे न्याय करतो आणि माझा निर्णय योग्य आहे, कारण
मी स्वतःस खुश करू इच्छित नाही, तर ज्यांनी मला पाठविले त्यांना
खुश करू पाहतो. 31 “जर मी स्वतःविषयी साक्ष दिली, तर माझी साक्ष
खरी ठरणार नाही. 32 परंतु दुसरा एक आहे जो माझ्या बाजूने साक्ष
देतो आणि त्याने जी साक्ष माझ्याबद्दल दिली, ती खरी आहे. 33 “तुम्ही
लोकांना योहानाकडे पाठविले आणि त्याने सत्याविषयी साक्ष दिली 34
मी मनुष्याची साक्ष स्वीकारतो असे नाही; मी हे यासाठी सांगत आहे की
त्याद्वारे तुमचे तारण व्हावे. 35 योहान एक ज्वलंत दिवा होता आणि
तुम्ही त्याच्या प्रकाशाचा आनंद घेण्याचे मान्य केले. 36 “माझी जी
साक्ष आहे ती योहानाच्या साक्षीपेक्षा वजनदार आहे. कारण जी कामे
पूर्ण करण्याचे मला पित्याने सोपविले आहे, तीच कार्ये मी करीत आहे व
ती साक्ष देतात की पित्यांनीच मला पाठविले आहे. 37 ज्या पित्याने
मला पाठविले त्यांनी स्वतःच माझ्याबद्दल साक्ष दिली आहे. तुम्ही त्यांची
वाणी कधीही ऐकली नाही आणि त्यांची आकृती पाहिली नाही, 38
त्यांचे वचन तुम्हामध्ये राहत नाही, कारण ज्याला त्यांनी पाठविले
त्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवला नाही. 39 तुम्ही मेहनतीने शास्त्रलेख
शोधून पाहता, कारण त्यांच्यामध्ये सार्वकालिक जीवन आहे, असे
तुम्हाला वाटते. तेच शास्त्रलेख माझ्याबद्दल साक्ष देतात; (aiōnios g166)
40 तरी जीवनप्राप्ती साठी तुम्ही माझ्याकडे येत नाही. 41 “मी मनुष्याचे
गौरव स्वीकारीत नाही, 42 परंतु मी तुम्हाला ओळखतो व मला चांगले
माहीत आहे की तुमच्या हृदयात परमेश्वराची प्रीती नाही. 43 कारण मी
पित्याच्या नावाने आलो, पण तुम्ही माझा स्वीकार केला नाही; परंतु जर
स्वतःच्याच नावाने दुसरा कोणी आला, तर तुम्ही त्याला स्वीकाराल. 44
जे तुम्ही एकमेकांकडून प्रशंसा स्वीकारता परंतु जो एकच परमेश्वर,
त्यांच्याकडून प्रशंसा मिळविण्याचा प्रयत्न करत नाही, त्या तुम्हाला
विश्वास तरी कसा ठेवता येईल? 45 “परंतु मी पित्यासमोर तुम्हाला
दोषी ठरवेन असा विचार करू नका. कारण ज्याच्यावर तुम्ही आशा
ठेवली आहे तो मोशेच तुम्हाला दोषी ठरवेल. 46 तुम्ही मोशेवर विश्वास
ठेवला, तर माझ्यावरही ठेवला असता, कारण त्याने माझ्याविषयी
लिहिले आहे. 47 परंतु ज्याअर्थी तुम्ही त्याच्या लिखाणावर विश्वास
ठेवीत नाही, त्याअर्थी मी जे सांगतो त्यावर विश्वास कसा ठेवाल?”

6 काही वेळानंतर, येशू गालील समुद्रापलीकडे गेले. या समुद्राला
(तिबिर्यास सरोवर) असेही म्हणत 2 लोकांचा मोठा समुदाय
त्यांच्यामागे चालला होता, कारण त्यांनी आजाऱ्यांना अद्भुत चिन्हे करून
बरे केलेले पाहिले होते. 3 यानंतर येशू डोंगरावर त्यांच्या शिष्यांसह
जाऊन बसले. 4 यहूद्यांचा वल्हांडण सण आता जवळ आला होता. 5
जेव्हा येशूंनी वर पाहिले व त्यांना एक मोठा जनसमुदाय आपल्याकडे येत
असलेला दिसला. ते फिलिप्पाला म्हणाले, “या लोकांना खाण्यासाठी
आपणास भाकरी कुठे विकत मिळतील?” 6 ते केवळ त्याची परीक्षा
पाहत होते, कारण आपण काय करणार आहोत हे त्यांनी मनात आधी
ठरविले होते. 7 फिलिप्पाने उत्तर दिले, “प्रत्येकाला एक घास तरी
खाण्याएवढे अन्न विकत आणण्यासाठी अर्ध्या वर्षाच्या मजुरीपेक्षा
अधिक तरी लागेल!” 8 मग शिमोन पेत्र जो येशूंचा शिष्य होता, त्याचा
भाऊ आंद्रिया म्हणाला, 9 “येथे एक मुलगा आहे त्याच्याजवळ जवाच्या
पाच लहान भाकरी आणि दोन लहान मासे आहेत, परंतु त्या इतक्या
लोकांना कशा काय पुरतील?” 10 येशूंनी म्हटले, “लोकांना खाली
गटागटाने बसावयास सांगा.” त्या ठिकाणी भरपूर गवत होते व ते खाली
बसले. तिथे पुरुषांचीच संख्या अंदाजे पाच हजार होती. 11 मग येशूंनी
त्या भाकरी घेतल्या, आभार मानले व जे बसले होते ते खाऊन तृप्त
होईपर्यंत वाटल्या. त्यानंतर मासळ्यांचेही त्यांनी तसेच केले. 12 सर्वांनी
भरपूर जेवण केल्यावर, ते शिष्यांना म्हणाले, “आता उरलेले तुकडे
गोळा करा. काहीही वाया जाऊ देऊ नका.” 13 मग त्यांनी उरलेले तुकडे
गोळा केले आणि जवाच्या पाच भाकरींपैकी जेवून उरलेल्या तुकड्यांनी
बारा टोपल्या भरल्या. 14 येशूंनी हे चिन्ह केल्याचे पाहून लोक म्हणू
लागले, “खरोखर, या जगात जो येणार होता तो संदेष्टा हाच आहे.” 15
लोक आपल्याला जबरदस्तीने राजा करण्याच्या उद्देशाने आले आहेत हे

येशूंना माहीत होते, तेव्हा ते पुन्हा एकटेच डोंगरावर निघून गेले. 16
संध्याकाळ झाल्यावर, त्यांचे शिष्य खाली सरोवराकडे गेले, 17 ते
होडीत बसून सरोवरा पलीकडे कफर्णहूमास जाण्यास निघाले. रात्र
झाली तरी येशू यद्यपि त्यांच्याकडे परतले नव्हते. 18 परंतु वादळी वारा
सुटला व लाटा खवळून वाहू लागल्या. 19 ते तीन किंवा चार मैल अंतर
वल्हवून गेले असतील, तोच त्यांना येशू होडीकडे पाण्यावरून चालत
येताना दिसले, तेव्हा ते फार घाबरले. 20 परंतु ते त्यांना म्हणाले, “मीच
आहे; भिऊ नका.” 21 ते येशूंना होडीत घेण्यास तयार झाले आणि
लागलीच ती होडी जिथे त्यांना जायचे होते त्या किनाऱ्यास पोहोचली.
22 मग दुसऱ्या दिवशी सकाळी सरोवराच्या पलीकडच्या किनाऱ्यावर
लोकांचा समुदाय थांबला होता, तिथे केवळ एक होडी होती आणि येशू
शिष्यांसहित त्यामध्ये गेले नव्हते, तरी शिष्य होडीत बसून निघून गेले
होते. 23 काही होड्या तिबिर्याहून ज्या ठिकाणी आभार मानून प्रभूने
त्यांना भाकर खाऊ घातली होती त्या ठिकाणी आल्या. 24 समुदायाच्या
लक्षात आले की येशू आणि त्यांचे शिष्य तिथे नाहीत, हे पाहून ते
नावेमध्ये बसून येशूंच्या शोधार्थ कफर्णहूमास निघाले. 25 ते त्यांना
सरोवराच्या पलीकडे भेटल्यावर, त्यांना म्हणाले, “गुरुजी, आपण येथे
कधी आला?” 26 येशूंनी त्यांना उत्तर दिले, “मी तुम्हाला निश्चित सांगतो,
मी जी चिन्हे केली, त्यामुळे नाही तर तुम्ही भाकरी खाल्या व तृप्त
झाला म्हणूनच माझा शोध करीत आहात. 27 नाशवंत अन्नासाठी कष्ट
करू नका, तर जे अन्न सार्वकालिक जीवनासाठी टिकते व जे मानवपुत्र
तुम्हाला देतो, ते मिळविण्यासाठी झटा, कारण परमेश्वरपित्याने आपल्या
मान्यतेचा शिक्का त्यांच्यावर दिला आहे.” (aiōnios g166) 28 त्यावर
त्यांनी विचारले, “असे कोणते काम करावे की ज्याची अपेक्षा परमेश्वर
आम्हाकडून करतात?” 29 येशू म्हणाले, “परमेश्वराचे कार्य हेच आहे:
ज्यांना त्यांनी पाठविले त्यांच्यावर तुम्ही विश्वास ठेवावा.” 30 त्यावर ते
म्हणाले, “आम्ही पाहून विश्वास ठेवावा असे आपणास वाटत असेल, तर
आपण आम्हाला आणखी कोणती चिन्हे द्याल? आपण काय कराल?
31 आमच्या पूर्वजांनी अरण्यात मान्ना खाल्ला व असे लिहिले आहे:
‘त्यांनी त्यांना खाण्यासाठी स्वर्गातून भाकर दिली.’” 32 येशू त्यांना
म्हणाले, “मी तुम्हाला निश्चित सांगतो, ज्यांनी तुम्हाला स्वर्गातून येणारी
भाकर दिली तो मोशे नव्हता, परंतु माझा पिता जो स्वर्गातील खरी
भाकर तुम्हाला देत आहे. 33 ही परमेश्वराची भाकर आहे, जी स्वर्गातून
उतरली आहे आणि जगाला जीवन देते.” 34 ते म्हणाले, “प्रभूजी, हीच
भाकर आपण आम्हाला नेहमी द्या.” 35 त्यावर येशू जाहीरपणे म्हणाले,
“मीच जीवनाची भाकर आहे. जो मजकडे येतो त्याला पुन्हा कधीही
भूक लागणार नाही आणि जो मजवर विश्वास ठेवतो त्याला कधीही
तहान लागणार नाही. 36 परंतु मी तुम्हाला सांगितल्याप्रमाणे, तुम्ही
मला प्रत्यक्ष पाहता तरी माझ्यावर विश्वास ठेवत नाही. 37 जे सर्वजण
पिता मला देतात, ते माझ्याकडे येतील आणि जे माझ्याकडे येतील
त्यांना मी कधीच घालवून देणार नाही. 38 कारण माझ्या इच्छेप्रमाणे
नव्हे तर ज्यांनी मला पाठविले आहे, त्यांची इच्छा पूर्ण करण्यासाठी मी
स्वर्गातून उतरलो आहे. 39 आणि ज्यांनी मला पाठविले त्यांची इच्छा
हीच आहे की त्यांनी जे मला दिलेले आहेत, त्यातील एकालाही मी
हरवू नये, तर त्यांना शेवटच्या दिवशी मरणातून उठवावे. 40 कारण
माझ्या पित्याची इच्छा ही आहे की जे प्रत्येकजण पुत्राकडे पाहतात
व त्याजवर विश्वास ठेवतात, त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे
आणि मी शेवटच्या दिवशी त्यांना उठवेन.” (aiōnios g166) 41 मी,
“स्वर्गातून उतरलेली भाकर आहे,” या त्यांच्या विधानामुळे यहूदी पुढारी
त्यांच्याविरुद्ध कुरकुर करू लागले. 42 ते म्हणाले, “हा योसेफाचा पुत्र
येशू आहे ना, ज्याच्या आईवडिलांना आपण चांगले ओळखतो नाही
का? ‘आपण स्वर्गातून आलो आहोत.’ हे कसे म्हणतो?” 43 हे ऐकून
येशू त्यांना म्हणाले, “आपसात कुरकुर करू नका, 44 ज्यांनी मला
पाठविले त्या पित्याने आकर्षून घेतल्यावाचून कोणीही मजकडे येऊ
शकत नाही आणि मी त्यांना शेवटच्या दिवशी उठवेन. 45 संदेष्ट्यांच्या
ग्रंथात असा शास्त्रलेख आहे: ‘त्या सर्वांना परमेश्वर शिकवतील.’ जो
कोणी पित्याचे ऐकून त्यांच्यापासून शिकला आहे तो मजकडे येतो.
46 जो परमेश्वरापासून आहे त्याच्याशिवाय पित्याला कोणीही पाहिले
नाही. 47 मी तुम्हाला निश्चित सांगतो की, जो विश्वास ठेवतो त्याला
सार्वकालिक जीवन मिळालेच आहे. (aiōnios g166) 48 मीच जीवनाची
भाकर आहे. 49 तुमच्या पूर्वजांनी रानात मान्ना खाल्ला, तरी ते मरण
पावले. 50 परंतु ही भाकर जी स्वर्गातून उतरलेली आहे, ती जे कोणी
खातील ते मरणार नाही. 51 मी ती स्वर्गातून उतरलेली जिवंत भाकर
आहे. जे कोणीही भाकर खातील, ते सदासर्वकाळ जगतील. ही भाकर
माझे शरीर आहे, जी जगाच्या जीवनासाठी मी देणार आहे.” (aiōn g165)
52 यास्तव यहूदी पुढारी आपसात तीव्र वाद करू लागले, “हा मनुष्य
त्याचा देह आम्हास कसा खावयास देऊ शकेल?” 53 येशू म्हणाले,
“मी तुम्हाला निश्चित सांगतो, जोपर्यंत तुम्ही मानवपुत्राचा देह खात
नाही व त्याचे रक्त पीत नाही, तोपर्यंत तुम्हामध्ये जीवन नाही. 54 जो
कोणी माझा देह खातो आणि माझे रक्त पितो, त्याला सार्वकालिक
जीवन मिळते आणि मी त्यांना शेवटच्या दिवशी उठवेन. (aiōnios g166)
55 कारण माझा देह हे खरे अन्न आहे आणि माझे रक्त हे खरे पेय
आहे. 56 जे माझा देह खातात व माझे रक्त पितात, ते माझ्यामध्ये
राहतात आणि मी त्यांच्यामध्ये राहतो. 57 मला पाठविणाऱ्या जिवंत
पित्यामुळे मी जगतो. तसेच ज्यांचे पोषण माझ्यावर होते तो प्रत्येकजण
माझ्यामुळे जगेल. 58 मी स्वर्गातून उतरलेली भाकर आहे. तुमच्या
पूर्वजांनी मान्ना खाल्ला आणि मरण पावले, परंतु ज्या कोणाचे पोषण
या भाकरीवर होते ते सदासर्वकाळ जगतील.” (aiōn g165) 59 येशूंनी
हे शिक्षण कफर्णहूमातील सभागृहामध्ये दिले. 60 हे ऐकून, त्यांच्या
शिष्यांपैकी पुष्कळजण म्हणाले, “ही शिकवण अवघड आहे. हे कोण
स्वीकारू शकेल?” 61 त्यांचे शिष्य कुरकुर करीत आहेत, हे ओळखून
येशू त्यांना म्हणाले, “यामुळे तुम्ही दुखविले गेले आहात का? 62 तर
मग मानवपुत्राला, जिथे ते पूर्वी होते तिथे वर चढून जाताना पाहाल! 63
फक्त आत्माच सार्वकालिक जीवन देतो; देहाचे काही महत्त्व नाही. मी

जी वचने तुम्हाला सांगितली आहेत, ती आत्मा व जीवन यांनी पूर्ण
आहेत. 64 तरी, तुमच्यापैकी काहीजण माझ्यावर विश्वास ठेवत नाहीत.”
आपणावर कोण विश्वास ठेवतो व कोण आपला विश्वासघात करणार हे
येशूंना सुरुवातीपासून माहीत होते. 65 पुढे येशू म्हणाले, “यासाठीच मी
तुम्हाला सांगितले होते की, पित्याने शक्य केल्याशिवाय कोणालाही
माझ्याकडे येता येत नाही.” 66 हे ऐकून त्यांचे अनेक शिष्य मागे फिरले
व त्यांना अनुसरले नाहीत. 67 येशू आपल्या बारा शिष्यांना म्हणाले,
“तुम्ही सुद्धा सोडून जाणार नाही ना?” 68 त्यावर शिमोन पेत्राने उत्तर
दिले, “प्रभूजी, आम्ही कोणाकडे जावे? सार्वकालिक जीवनाची वचने
आपणाजवळच आहेत. (aiōnios g166) 69 आम्ही विश्वास ठेवला आहे
आणि तुम्ही परमेश्वराचे पवित्र पुरुष आहात हे ओळखले आहे.” 70
येशूंनी त्यांना उत्तर दिले, “मी तुम्हा बाराजणांस निवडून घेतले नव्हते
काय? तरी तुम्हातील एकजण सैतान आहे!” 71 हे शिमोन इस्कर्योत
याचा पुत्र यहूदाह याच्यासंबंधात ते बोलले, कारण तो बारा शिष्यांपैकी
एक असून त्यांचा विश्वासघात करणार होता.

**7** यानंतर, येशू गालीलाच्या अवतीभोवती फिरले. त्यांना यहूदीया
प्रांतातून जाण्याची इच्छा नव्हती, कारण तेथील यहूदी पुढारी त्यांना
जिवे मारण्यासाठी मार्ग शोधत होते. 2 परंतु जेव्हा यहूदीयांच्या मंडपाचा
सण जवळ आला, 3 येशूंचे भाऊ त्यांना म्हणाले, “तुम्ही गालीलातून
निघून यहूदीयात जा, म्हणजे तेथील तुमच्या शिष्यांना जे कार्य तुम्ही
करता ते पाहावयास मिळेल. 4 ज्याला प्रसिद्धी पाहिजे असा कोणी
गुप्तपणे काही करीत नाही. तुम्ही या गोष्टी करीत आहात, तर जगाला
प्रकट व्हा.” 5 कारण त्यांच्या भावांचा देखील त्यांच्यावर विश्वास
नव्हता. 6 यावर येशूंनी त्यांना म्हटले, “माझी वेळ अद्यापि आलेली
नाही; तुम्हाला कोणतीही वेळ योग्यच आहे. 7 जग तुमचा द्वेष करू
शकत नाही, परंतु माझा द्वेष करते, कारण जगाची कर्मे दुष्ट आहेत
अशी मी त्यांच्याविषयी साक्ष देतो. 8 तुम्ही सणास जा. मी या सणास
वर जात नाही कारण माझी वेळ अजून आली नाही.” 9 त्यांना असे
सांगितल्यावर, ते गालीलातच राहिले. 10 तथापि, असे असूनही, येशूंचे
भाऊ सणासाठी गेल्यानंतर, येशूही, उघडपणे नव्हे, तर गुप्तपणे तिथे
गेले. 11 आता सणात यहूदी पुढारी येशूंवर नजर ठेवून विचारपूस करीत
होते, “की ते कुठे आहेत?” 12 समुदायामध्ये त्यांच्याबद्दल सर्वत्र चर्चा
होत होती. काही म्हणत होते, “तो खरोखर चांगला मनुष्य आहे.” तर
इतर म्हणत होते, “नाही, तो लोकांची फसवणूक करतो.” 13 परंतु
यहूदी पुढाऱ्यांच्या भीतीमुळे लोकांसमोर त्यांच्याविषयी बोलण्यास
कोणीच धजत नव्हते. 14 मग अर्धा सण पार पडल्यानंतर येशू मंदिराच्या
अंगणात गेले आणि शिकवू लागले. 15 जे यहूदी तिथे होते ते चकित
झाले आणि विचारू लागले, “हा मनुष्य शिकला नसून हे ज्ञान त्याला
कसे प्राप्त झाले?” 16 येशू त्यांना म्हणाले, “माझी शिकवण माझी
स्वतःची नसून ज्यांनी मला पाठविले त्यांची आहे. 17 जर कोणी
परमेश्वराच्या इच्छेप्रमाणे करण्याचा निर्धार करेल तर त्याला खात्रीने
समजेल की माझी शिकवण परमेश्वरापासून आहे की मी स्वतःच्या मनाचे
बोलत आहे. 18 जो कोणी स्वतःचे विचार मांडतो तो स्वतःचे गौरव
करतो, परंतु जो ज्याने त्याला पाठविले त्याला गौरव मिळावे म्हणून
बोलतो, तो मनुष्य खरा आहे; व त्याच्यात खोटेपण नाही. 19 मोशेने
तुम्हाला नियमशास्त्र दिले आहे ना? तरी तुम्हापैकी एकही नियमशास्त्र
पाळीत नाही. तुम्ही मला ठार मारण्याचा प्रयत्न का करता?” 20
त्यावर लोकसमुदायाने उत्तर दिले, “तू भूतग्रस्त आहेस. तुला जिवे
मारण्याचा प्रयत्न कोण करीत आहे?” 21 येशू त्यांना म्हणाले, “मी एक
चमत्कार केला आणि तुम्हा सर्वांना आश्चर्य वाटले. 22 मोशेने तुम्हाला
सुंतेचा नियम दिला तरी, ही प्रथा मोशेद्वारे आली नसून, पूर्वजांपासून
आलेली आहे, त्यानुसार तुम्ही मुलाची सुंता शब्बाथ दिवशी करता.
23 मोशेच्या नियमांचा भंग होऊ नये म्हणून मुलाची सुंता जर शब्बाथ
दिवशी करता, मी शब्बाथ दिवशी एका मनुष्याला पूर्ण स्वास्थ्य दिले तर
माझ्यावर का रागावता? 24 तोंड बघून न्याय करू नका, तर यथायोग्य
न्याय करा.” 25 यरुशलेममध्ये राहणारे काही लोक एकमेकास विचारू
लागले, “ज्याला जिवे मारण्याचा प्रयत्न करीत आहेत तो हाच मनुष्य
नाही काय? 26 हा तर येथे जाहीरपणे बोलत आहे आणि ते एक शब्दही
बोलत नाहीत. तर मग हाच ख्रिस्त आहे अशी आपल्या पुढाऱ्यांना खात्री
पटली आहे का? 27 परंतु हा मनुष्य कुठून आला आहे हे आपणास
माहीत आहे; जेव्हा ख्रिस्त येईल, तेव्हा तो कुठून येईल हे कोणालाही
कळणार नाही.” 28 हे ऐकून मंदिराच्या आवारात, शिकवीत असताना,
येशू मोठ्याने म्हणाले, “होय, मी कोण, कुठला हे सर्व तुम्हाला ठाऊक
आहे. तरी मी माझ्या स्वतःच्या अधिकाराने येथे आलो नाही, परंतु ज्याने
मला पाठविले तो खरा आहे; त्यांना तुम्ही ओळखीत नाही, 29 पण मी
त्यांना ओळखतो, कारण मी त्यांच्यापासून आहे आणि त्यांनीच मला
पाठविले आहे.” 30 त्यांनी येशूंना पकडण्याचा प्रयत्न केला, परंतु कोणी
त्यांच्यावर हात टाकू शकले नाही, कारण त्यांची वेळ अद्यापि आली
नव्हती. 31 तरी, लोकसमुदायामधील अनेकांनी त्यांच्यावर विश्वास
ठेवला. ते म्हणाले, “जेव्हा ख्रिस्त मसिहा येईल, तेव्हा तो या मनुष्यापेक्षा
अधिक चिन्हे करेल काय?” 32 जेव्हा परूश्यांनी लोकांची त्यांच्याबद्दल
चाललेली कुजबुज ऐकली. तेव्हा त्यांनी आणि महायाजकांनी येशूंना
अटक करण्यासाठी मंदिराचे शिपाई पाठविले. 33 येशू त्यांना म्हणाले,
“मी तुमच्याजवळ आणखी थोडा वेळ राहणार आहे, मग ज्याने मला
पाठविले, त्यांच्याकडे परत जाईन. 34 तुम्ही माझा शोध कराल, परंतु मी
तुम्हाला सापडणार नाही आणि मी जिथे असेन, तिथे तुम्हाला येता
येणार नाही.” 35 यहूदी पुढारी एकमेकास विचारू लागले, “या मनुष्याचा
कुठे जाण्याचा विचार आहे की तो आपणास सापडणार नाही? कदाचित
हा आपले लोक जे ग्रीक लोकांमध्ये पांगलेले आहेत, त्या लोकांना
शिक्षण देण्यासाठी जात असेल काय? 36 ‘तुम्ही माझा शोध कराल,
परंतु मी तुम्हाला सापडणार नाही आणि मी जिथे असेन, तिथे तुम्हाला
येता येणार नाही,’ असे तो बोलला याचा अर्थ तरी काय असावा?” 37
मग सणाच्या शेवटच्या म्हणजे सर्वात महत्त्वाच्या दिवशी, येशू मोठ्याने
म्हणाले, “जे कोणी तहानलेले असतील, त्यांनी माझ्याकडे यावे आणि

प्यावे. 38 शास्त्रलेखात सांगितल्याप्रमाणे, जे कोणी माझ्यावर विश्वास
ठेवतात, त्यांच्यामधून जिवंत पाण्याच्या नद्या वाहतील." 39 त्यांच्या
म्हणण्याचा अर्थ, ज्यांनी विश्वास ठेवला त्या प्रत्येकाला पवित्र आत्मा
दिला जाणार होता. परंतु त्यावेळेपर्यंत तो आत्मा दिला गेला नव्हता,
कारण येशूंचे गौरव अद्याप झाले नव्हते. 40 त्यांचे हे शब्द ऐकल्यावर,
त्यांच्यातील काहीजण म्हणाले, "खरोखर हा मनुष्य संदेष्टा आहे." 41
इतर काही म्हणाले, "हेच ख्रिस्त आहेत." पण इतर काहीजण म्हणाले,
"ख्रिस्त गालीलातून येऊ शकेल काय? 42 शास्त्रलेख असे सांगत
नाही का, दावीदाच्या कुळात, बेथलेहेममध्ये, जिथे दावीद राहिला तिथून
ख्रिस्त येईल?" 43 अशा रीतीने लोकसमुदायात येशूंमुळे फूट पडली.
44 काहींना त्यांना पकडावेसे वाटले, परंतु कोणीही त्यांच्यावर हात
टाकला नाही. 45 शेवटी मंदिराचे शिपाई महायाजक व परूशी यांच्याकडे
परत आले. त्यांनी विचारले, "तुम्ही त्याला आत का आणले नाही?"
46 शिपाई उत्तर देत म्हणाले, "या मनुष्यासारखे आतापर्यंत कोणीही
बोलले नाही." 47 त्यावर उलट उत्तर देत परूशी म्हणाले, "तुम्हालाही
त्याने फसविले आहे काय?" 48 अधिकाऱ्यांपैकी किंवा परूश्यांपैकी
कोणीतरी त्याच्यावर विश्वास ठेवला आहे काय? 49 नाही! परंतु हा
समुदाय ज्यांना नियमशास्त्राविषयी माहिती नाही—तो शापित आहे.
50 निकदेम, हा त्यांच्यापैकी एक असून, जो पूर्वी येशूंकडे गेला होता,
म्हणाला, 51 "एखाद्याचे प्रथम न ऐकता व जे कार्य तो करत आहे ते
समजून न घेता नियमशास्त्र त्याला दोषी ठरविते काय?" 52 त्यावर
त्यांनी उत्तर दिले, "तुम्हीदेखील गालीलकर आहात काय? शोधून पाहा
म्हणजे तुम्हाला समजेल की गालीलातून कोणताही संदेष्टा येत नाही."
53 नंतर ते सर्वजण घरी गेले.

**8** नंतर येशू जैतुनाच्या डोंगराकडे परतले. 2 अगदी पहाटेच येशू
पुन्हा मंदिराच्या अंगणात आले, त्यांच्याभोवती सर्व लोक जमले
आणि ते बसून त्यांना शिकवू लागले. 3 नियमशास्त्र शिक्षक व परूशी
यांनी व्यभिचार करीत असताना धरलेल्या एका स्त्रीला त्यांच्याकडे
आणले. त्यांनी तिला समुदायाच्या पुढे उभे केले 4 आणि ते येशूंना
म्हणाले, "गुरुजी, या स्त्रीला व्यभिचाराचे कृत्य करीत असतानाच
धरले आहे. 5 मोशेच्या नियमशास्त्रामध्ये आम्हास आज्ञा दिली आहे
की अशा स्त्रियांना दगडमार करावा. परंतु आपण काय म्हणता?" 6
ते या प्रश्नाचा उपयोग त्यांना सापळ्यात पकडावे व दोष ठेवण्यास
आधार मिळावा म्हणून करत होते. परंतु येशू खाली वाकून बोटाने
जमिनीवर लिहू लागले. 7 ते त्यांना प्रश्न विचारत राहिले, तेव्हा येशू
सरळ उभे राहून त्यांना म्हणाले, "तुम्हामध्ये जो पापविरहित आहे
त्यानेच तिच्यावर प्रथम दगड टाकावा." 8 मग ते पुन्हा खाली वाकून
जमिनीवर लिहू लागले. 9 ज्यांनी हे ऐकले, ते सर्वजण प्रथम वयस्कर व
नंतर एका पाठोपाठ एक असे सर्वजण निघून गेले आणि शेवटी येशू
एकटेच त्या स्त्रीसोबत राहिले, ती स्त्री अद्याप तिथेच उभी होती. 10
मग येशू सरळ उभे राहून तिला म्हणाले, "बाई, ते कुठे आहेत? तुला
कोणीही दोषी ठरविले नाही काय?" 11 ती म्हणाली "कोणी नाही,
प्रभू!" येशू जाहीरपणे म्हणाले, "तर मग मीही तुला दोषी ठरवीत नाही.
जा आणि तुझे पापमय जीवन सोडून दे." 12 येशू पुन्हा लोकांशी बोलले
आणि म्हणाले, "मी जगाचा प्रकाश आहे. जो कोणी माझ्यामागे येतो तो
कधीही अंधारात चालणार नाही, परंतु त्याच्याजवळ जीवनाचा प्रकाश
राहील." 13 यावर परूशी त्यांना आव्हान देत म्हणाले, "येथे आपण,
आपल्या स्वतःविषयी साक्ष देता; म्हणून तुमची साक्ष सबळ वाटत
नाही." 14 येशूंनी त्यांना उत्तर दिले, "मी स्वतःविषयी साक्ष देत असलो,
तरी माझी साक्ष सबळ आहे, कारण मी कुठून आलो आणि कुठे जाणार
आहे, हे मला माहीत आहे. परंतु मी कुठून येतो व मी कुठे जातो याची
तुम्हाला काही कल्पना नाही. 15 तुम्ही मानवी मापदंडाने न्याय करता;
परंतु मी कोणाचाही न्याय करीत नाही. 16 मी न्याय केलाच, तर माझे
निर्णय खरे आहेत, कारण मी एकटाच नाही, तर ज्या पित्याने मला
पाठविले तेही माझ्याबरोबर असतात. 17 तुमच्या नियमशास्त्रात लिहिले
आहे की दोन साक्षीदारांची साक्ष खरी मानावी. 18 मी स्वतःविषयी साक्ष
देतो आणि ज्या पित्याने मला पाठविले ते माझे दुसरे साक्षीदार आहेत."
19 तेव्हा त्यांनी विचारले, "तुझा पिता कुठे आहे?" त्यावर येशूंनी उत्तर
दिले, "मी व माझा पिता कोण आहे हे तुम्हाला माहीत नाही, तुम्ही
मला ओळखले असते, तर माझ्या पित्यालाही ओळखले असते." 20
मंदिराच्या अंगणाच्या जवळ जिथे दानार्पण टाकीत असत तिथे शिकवीत
असताना ते ही वचने बोलले, तरीसुद्धा त्यांना कोणीही धरले नाही,
कारण त्यांची वेळ तेव्हापर्यंत आली नव्हती. 21 मग पुन्हा येशू त्यांना
म्हणाले, "मी जाणार आहे आणि तुम्ही माझा शोध कराल व तुमच्या
पापात मराल. मी जिथे जाणार तिथे तुम्हाला येता येणार नाही." 22
यामुळे यहूदी म्हणू लागले, "'मी जिथे जातो, तिथे तुम्हाला येता येणार
नाही,' म्हणजे तो आत्महत्या करेल की काय?" 23 परंतु ते पुढे म्हणाले,
"तुम्ही खालचे आहात; मी तर वरून आहे. तुम्ही या जगाचे आहात;
तसा मी या जगाचा नाही. 24 मी तुम्हाला म्हणालो होतो की तुम्ही
तुमच्या पापात मराल; मी तो आहे, असा विश्वास तुम्ही न धरल्यास
तुम्ही खरोखर तुमच्या पापात मराल." 25 त्यांनी विचारले, "तर मग
आपण कोण आहात?" येशूंनी उत्तर दिले, "मी प्रारंभापासून तुम्हाला
सांगत आलो आहे, 26 मला तुमचा न्याय करण्याबाबत बरेच काही
बोलायचे आहे. परंतु ज्यांनी मला पाठविले, ते विश्वसनीय आहेत आणि
जे मी त्यांच्यापासून ऐकले आहे, तेच जगाला सांगतो." 27 परंतु ते
त्यांच्याशी पित्यासंबंधी बोलत होते, हे त्यांना अद्यापि उमगले नव्हते. 28
म्हणून येशू म्हणाले, "जेव्हा तुम्ही मानवपुत्राला उंच कराल, तेव्हाच मी
तो आहे आणि मी स्वतःहून काही करत नाही तर पित्याने मला ज्यागोष्टी
शिकविल्या, त्याच बोलतो हे तुम्हाला समजेल. 29 ज्याने मला पाठविले;
ते माझ्याबरोबर आहेत, त्यांनी मला एकटे सोडले नाही, कारण त्यांना
जे आवडते ते मी नेहमी करत असतो." 30 हे ऐकल्यावर अनेकांनी
त्यांच्यावर विश्वास ठेवला. 31 ज्या यहूदी पुढाऱ्यांनी त्यांच्यावर विश्वास
ठेवला होता, त्यांना येशू म्हणाले, "जर तुम्ही माझी शिकवण घट्ट धरून
ठेवाल, तर तुम्ही माझे खरे शिष्य व्हाल. 32 मग तुम्हाला सत्य समजेल

आणि सत्य तुम्हाला स्वतंत्र करेल.” 33 त्यांनी उत्तर दिले, “आम्ही
अब्राहामाचे वंशज आहोत व कधीही कोणाच्या दास्यात नव्हतो. तर
आम्हाला स्वतंत्र करण्यात येईल, असे तुम्ही कसे म्हणता?” 34 त्यावर
येशूंनी उत्तर दिले, “मी तुम्हाला खरोखर सांगतो की, जो प्रत्येकजण
पाप करतो तो पापाचा दास आहे. 35 आता दासाला कुटुंबात कायम
राहता येत नाही, परंतु पुत्र तिथे सदासर्वदा राहतो. (aiōn g165) 36 म्हणून
पुत्राने तुम्हाला स्वतंत्र केले, तरच तुम्ही खरोखर स्वतंत्र व्हाल. 37 मला
माहीत आहे की तुम्ही अब्राहामाचे वंशज आहात आणि असे असतानाही
तुम्ही मला जिवे मारण्याचा मार्ग शोधत आहात, कारण माझ्या वचनांना
तुमच्यामध्ये स्थान नाही. 38 मी पित्याच्या समक्षतेत असताना जे
पाहिले, तेच मी तुम्हाला सांगत आहे. तुम्ही मात्र तुमच्या पित्यापासून
जे काही ऐकले त्याप्रमाणे करता.” 39 त्यांनी उत्तर दिले, “अब्राहाम
आमचा पिता आहे.” येशू म्हणाला, “जर तुम्ही अब्राहामाची लेकरे
असता तर तुम्ही अब्राहामाची कृत्ये केली असती. 40 परंतु त्याऐवजी
परमेश्वराकडून ऐकलेले सत्य मी तुम्हाला सांगितले, म्हणून तुम्ही मला
जिवे मारण्याचा प्रयत्न करीत आहात, अब्राहामाने असे कृत्य कधीही
केले नव्हते. 41 तुम्ही तुमच्या स्वतःच्या पित्याची कामे करीत आहात.”
तेव्हा ते विरोध करीत म्हणाले, “आम्ही बेवारस संतती नाही, आमचा
खरा पिता प्रत्यक्ष परमेश्वरच आहे.” 42 येशूंनी त्यांना म्हटले, “परमेश्वर
तुमचा पिता असता, तर तुम्ही मजवर प्रीती केली असती, कारण मी
परमेश्वरापासून आलो आहे. मी स्वतः होऊन आलो नाही; परमेश्वराने
मला पाठविले आहे. 43 मी म्हणतो ते तुम्हाला समजत नाही कारण ते
तुम्ही ऐकू इच्छित नाहीत. 44 तुम्ही तुमचा पिता सैतानापासून आहात
आणि तुमच्या पित्याची इच्छा पूर्ण करावयास पाहता. तो आरंभापासून
घात करणारा व सत्याला धरून न राहणारा आहे, कारण त्याच्यामध्ये
सत्य नाही. तो जेव्हा लबाड बोलतो तेव्हा तो त्याची जन्मभाषा बोलतो,
कारण तो लबाड आहे व लबाडांचा पिता आहे. 45 पण मी सत्य सांगतो
तर तुम्ही मजवर विश्वास ठेवीत नाही! 46 मी पापी आहे हे तुमच्यापैकी
कोणी सिद्ध करू शकेल का? जर मी सत्य सांगतो, तर मजवर विश्वास
का ठेवीत नाही? 47 जो कोणी परमेश्वरापासून आहे तो परमेश्वराचे शब्द
ऐकतो. तुम्ही त्यांचे ऐकत नाही, याचे कारण हेच की तुम्ही परमेश्वराचे
नाही.” 48 यहूदी पुढाऱ्यांनी त्यांना उत्तर दिले, “आम्ही खरे सांगत
नव्हतो का की तुम्ही शोमरोनी आहात व तुम्हाला भूत लागलेले आहे?”
49 येशू म्हणाला, “मला भूत लागलेले नाही, कारण मी माझ्या पित्याचा
सन्मान करतो आणि तुम्ही माझा अपमान करता. 50 मी स्वतःचे गौरव
करू इच्छित नाही; पण एकजण ते इच्छितो आणि तो न्यायाधीश आहे.
51 मी तुम्हाला निश्चित सांगतो, जे कोणी माझे वचन पाळतात त्यांना
मरणाचा अनुभव कधीही येणार नाही.” (aiōn g165) 52 यावर त्यांनी
उद्गार काढले, “आता आमची खात्री झाली की, तुला भूत लागले आहे!
प्रत्यक्ष अब्राहाम व संदेष्टेही मरण पावले आणि तरी तू म्हणतो की तुझी
वचने पाळणाऱ्यांना मृत्यूचा अनुभव कधीही येणार नाही. (aiōn g165)
53 आमचा पिता अब्राहाम त्यापेक्षा तू थोर आहेस काय? तो मरण
पावला आणि संदेष्टेही. तू कोण आहेस असे तुला वाटते?” 54 तेव्हा
येशूंनी त्यांना सांगितले, “मी स्वतः आपले गौरव केले, तर ते व्यर्थ
आहे. परंतु माझा गौरव करणारे माझे पिता आहेत आणि त्यानांच तुम्ही
आपला परमेश्वर मानता. 55 तुम्ही त्यांना ओळखत नाही, मी त्यांना
ओळखतो आणि मी त्यांना ओळखत नाही असे म्हटले असते, तर मी
तुमच्यासारखाच लबाड ठरलो असतो; परंतु मी त्यांना ओळखतो व
त्यांचे वचन पाळतो. 56 तुमचा पिता अब्राहाम माझा दिवस पाहण्याच्या
विचाराने उत्सुक झाला होता; व तो पाहून त्याला आनंद झाला.” 57
तेव्हा यहूदी पुढारी त्याला म्हणाले, “तुझे वय पन्नास वर्षाचे देखील नाही
आणि तू अब्राहामाला पाहिले!” 58 येशूंनी उत्तर दिले, “मी तुम्हाला
निश्चित सांगतो की अब्राहाम जन्मला नव्हता, त्यापूर्वी मी आहे!” 59 हे
ऐकल्याबरोबर त्यांनी येशूंना मारण्यासाठी दगड उचलले, परंतु येशू
त्यांच्यापासून लपून मंदिराच्या आवारातून निघून गेले.

**9** येशू जात असताना, त्यांनी एका जन्मांध मनुष्यास पाहिले, 2 तेव्हा
त्यांच्या शिष्यांनी त्यांना विचारले, “गुरुजी, कोणी पाप केले, या
मनुष्याने की त्याच्या आईवडिलांनी, ज्यामुळे हा आंधळा जन्मला?” 3
येशूंनी उत्तर दिले, “त्याने किंवा त्याच्या आईवडिलांनी पाप केले नाही,
परंतु हे यासाठी झाले की परमेश्वराची कृत्ये त्याच्यामध्ये प्रकट व्हावी.
4 जोपर्यंत दिवस आहे, तोपर्यंत ज्याने मला पाठविले त्यांची कार्ये
आपल्याला केली पाहिजेत. रात्र येत आहे, तेव्हा कोणी काही करू शकत
नाही. 5 मी या जगात आहे, तेव्हापर्यंत मी या जगाचा प्रकाश आहे.” 6
असे बोलून, ते जमिनीवर थुंकले व थुंकीने चिखल करून त्याचा लेप
त्यांनी त्या माणसाच्या डोळ्यांवर लावला. 7 “जा, ते त्याला म्हणाले,
शिलोआम तळ्यात डोळे धू.” (शिलोआम म्हणजे पाठविलेला.) तेव्हा
तो मनुष्य गेला व त्याने डोळे धुतले आणि डोळस होऊन घरी गेला. 8
त्याचे शेजारी आणि इतर लोक त्याला एक भिकारी म्हणून ओळखत
होते, ते एकमेकांना विचारू लागले “बसून भीक मागणारा तो हाच
मनुष्य नाही काय?” 9 काहीजण म्हणाले, “होय, हाच तो.” पण
इतर म्हणाले, “नाही, तो फक्त त्याच्यासारखा दिसतो.” तो भिकारी
आग्रहपूर्वक म्हणाला, “मी तोच मनुष्य आहे!” 10 “मग तुझे डोळे
कसे उघडले?” त्यांनी त्याला विचारले. 11 तेव्हा त्याने सांगितले, “येशू
नावाच्या एका मनुष्याने चिखल केला आणि माझ्या डोळ्यांवर लावला.
मग मला शिलोआमाच्या तळ्यावर जाऊन चिखल धुण्यास सांगितले.
त्याप्रमाणे मी जाऊन धुतले व मला दृष्टी प्राप्त झाली.” 12 त्यांनी
विचारले, “तो मनुष्य कुठे आहे?” तो म्हणाला, “मला माहीत नाही.”
13 तेव्हा त्यांनी जो मनुष्य आंधळा होता त्याला परूश्यांकडे आणले,
14 आता येशूंनी चिखल तयार करून त्या माणसाचे डोळे उघडले तो
शब्बाथवार होता. 15 यास्तव परूश्यांनीही त्याला दृष्टी कशी आली हे
विचारले. तेव्हा तो मनुष्य उत्तरला, “त्यांनी माझ्या डोळ्यांवर चिखल
लावला आणि मी तो धुऊन टाकला आणि आता मी पाहू शकतो.” 16
त्यांच्यापैकी काही परूशी म्हणाले, “हा मनुष्य परमेश्वरापासून आलेला
नाही, कारण तो शब्बाथ पाळत नाही.” परंतु इतरांनी विचारले, “पण

पातकी मनुष्याला अशी चिन्हे करता येतील का?” यावरून त्यांच्यामध्ये
फूट पडली. 17 शेवटी परूशी पुन्हा आंधळ्या मनुष्याकडे वळले व
त्याला म्हणाले, “त्याने तुझे डोळे उघडले तर त्यांच्याविषयी तुला
काय म्हणावयाचे आहे?” यावर तो मनुष्य उत्तरला, “तो परमेश्वराचा
संदेष्टा आहे.” 18 यहूदी पुढाऱ्यांनी दृष्टी प्राप्त झालेल्या त्या माणसाच्या
आईवडिलांस बोलावून आणेपर्यंत, तो आंधळा होता आणि आता त्याला
दिसते, यावर त्यांनी विश्वास ठेवला नाही. 19 त्यांना विचारले, “हा
तुमचा मुलगा आहे काय? तुम्ही म्हणता तो हाच आहे का जो आंधळा
जन्मला होता? तर मग त्याला आता दृष्टी कशी आली?” 20 तेव्हा
त्याच्या आईवडिलांनी उत्तर दिले, “हा आमचा मुलगा आहे व तो आंधळा
जन्मला होता हे आम्हास ठाऊक आहे. 21 तरी त्याला आता कसे
दिसते किंवा त्याला कोणी दृष्टी दिली, हे आम्हास माहीत नाही. तो
प्रौढ आहे. त्यालाच विचारा.” 22 त्याचे आईवडील यहूदी पुढाऱ्यांच्या
भीतीमुळे असे म्हणाले, कारण त्यांनी आधी ठरविले होते की जे कोणी,
येशू हा ख्रिस्त आहे, असे कबूल करतील, त्यांना सभागृहामधून बाहेर
टाकण्यात यावे. 23 यामुळे त्याच्या आईवडिलांनी म्हटले, “तो प्रौढ
आहे; त्याला विचारा.” 24 तेव्हा जो मनुष्य पूर्वी आंधळा होता, त्याला
त्यांनी पुन्हा दुसऱ्यांदा बोलावून सांगितले, “सत्य सांगून परमेश्वराचे
गौरव कर, हा मनुष्य पापी आहे, हे आम्हाला माहीत आहे.” 25 त्यावर
तो म्हणाला, “तो पापी आहे की नाही, हे मला ठाऊक नाही. परंतु मला
एक गोष्ट माहीत आहे. मी पूर्वी आंधळा होतो आणि आता मला दिसते!”
26 त्यांनी त्याला विचारले, “त्याने तुला काय केले? त्याने तुझे डोळे
कसे उघडले?” 27 तेव्हा त्याने उत्तर दिले, “मी या आधीच तुम्हाला
सांगितले; पण तुम्ही ऐकले नाही. ते पुन्हा का ऐकता? त्यांचे शिष्य
व्हावे अशी तुमची इच्छा आहे काय?” 28 त्यावर त्यांनी त्याची निंदा
केली व ते म्हणाले, “तूच त्याचा शिष्य आहेस! आम्ही तर मोशेचे शिष्य
आहोत! 29 आम्हाला माहीत आहे की परमेश्वर मोशेशी बोलले, परंतु
याच्याबद्दल म्हणशील, तर तो कुठला आहे हे आम्हास ठाऊक देखील
नाही.” 30 तेव्हा त्याने उत्तर दिले, “हे केवढे आश्चर्य आहे! त्याने माझे
डोळे उघडले आणि तो मात्र कुठून आला याबद्दल तुम्हाला काहीही
माहिती नाही! 31 आपल्याला ठाऊक आहे की परमेश्वर पापी लोकांचे
ऐकत नाही. तर जे कोणी परमेश्वर भक्त असून त्यांच्या इच्छेप्रमाणे
वर्ततो त्यांचेच ते ऐकतात. 32 कोणी जन्मांधांचे डोळे उघडले, असे
कधीच ऐकण्यात आले नाही. (aiōn g165) 33 ही व्यक्ती परमेश्वरापासून
नसती, तर हे करू शकली नसती.” 34 तेव्हा यहूदी पुढारी म्हणाले, “तू
जन्मापासून पापात बुडलेला आहेस आणि आम्हाला शिकवितोस?”
आणि त्यांनी त्याला बाहेर घालविले. 35 त्यांनी त्याला बाहेर घालविले,
हे येशूंनी ऐकले आणि तो त्यांना भेटल्यावर, येशूंनी त्याला विचारले,
“तुझा मानवपुत्रावर विश्वास आहे का?” 36 तो म्हणाला, “प्रभू, ते
कोण हे मला सांगा म्हणजे मी त्यांच्यावर विश्वास ठेवेन.” 37 येशू
म्हणाले, “आता तू त्याला पाहिले आहेस आणि खरेतर तो तुझ्याशी
बोलत आहे.” 38 “होय प्रभूजी,” तो म्हणाला, “मी विश्वास धरतो!”
आणि त्याने त्यांची उपासना केली. 39 मग येशू म्हणाले, “मी न्याय
करण्यासाठी या जगात आलो आहे, यासाठी की आंधळयांना दिसावे
आणि जे पाहतात त्यांनी आंधळे व्हावे.” 40 जे परूशी तिथे होते त्यांनी
जे बोलले ते ऐकले आणि विचारले, “आम्ही आंधळे आहोत काय?”
41 येशू म्हणाले, “तुम्ही आंधळे असता, तर तुम्ही पापी नसता; परंतु
तुम्हाला दिसते असे तुम्ही म्हणता, म्हणून तुमचा दोष तसाच राहतो.”

**10** “परूश्यांनो मी तुम्हाला निश्चित सांगतो की, जो कोणी मेंढवाड्यात
दारातून आत प्रवेश करत नाही आणि दुसरीकडून चढून जातो, तो
चोर व लुटारू असला पाहिजे. 2 जो दाराने आत जातो तो मेंढरांचा
मेंढपाळ आहे. 3 दारावरचा पहारेकरी त्याच्यासाठी दार उघडतो आणि
मेंढरे त्यांची वाणी ओळखतात. तो आपल्या मेंढरांना त्यांच्या नावाने
हाक मारतो व त्यांना बाहेर घेऊन जातो. 4 आपली सर्व मेंढरे बाहेर
काढल्यावर, तो त्यांच्यापुढे चालतो व मेंढरे त्याला अनुसरतात, कारण
ती त्याची वाणी ओळखतात. 5 ती परक्याच्या मागे कधीच जाणार
नाहीत; उलट ती त्याच्यापासून दूर पळून जातील, कारण ती त्या
परक्याची वाणी ओळखीत नाहीत.” 6 येशू हे अलंकारिकरित्या बोलले,
परंतु परूश्यांना ते समजले नाही. 7 यास्तव येशू त्यांना पुन्हा म्हणाले,
“मी तुम्हाला निश्चित सांगतो की, मी मेंढरांचे दार आहे. 8 जे सर्व
माझ्यापूर्वी आले होते ते सर्व चोर व लुटारू होते, मेंढरांनी त्यांचे ऐकले
नाही. 9 मीच दार आहे; जो कोणी माझ्याद्वारे प्रवेश करतो त्याचे तारण
होईल. ते आत येतील व बाहेर जातील आणि त्यांना कुरणे आढळतील.
10 चोर केवळ चोरी, घात आणि नाश करण्यास येतो; मी त्यांना जीवन
मिळावे व ते विपुलपणे मिळावे म्हणून आलो आहे. 11 “मीच उत्तम
मेंढपाळ आहे. उत्तम मेंढपाळ आपल्या मेंढरांकरिता आपला जीव
देतो. 12 परंतु भाडेकरू, जो मेंढपाळ नाही, तो लांडगा येताना पाहतो
व मेंढरे तशीच सोडून पळून जातो, मग तो लांडगा त्या कळपावर
हल्ला करतो आणि त्यांची पांगापांग होते. 13 तो मनुष्य पळून जातो
कारण तो भाडेकरू असतो आणि त्याला मेंढरांची काहीच काळजी
नसते. 14 “मी उत्तम मेंढपाळ आहे; मला माझी मेंढरे माहीत आहेत व
माझ्या मेंढरांना मी माहीत आहे 15 तसेच माझे पिता मला ओळखतात
आणि मी पित्याला ओळखतो आणि मी माझ्या मेंढरांसाठी माझा जीव
देतो. 16 माझी आणखी काही मेंढरे आहेत, पण ती या मेंढवाड्यातील
नाहीत. त्यांनासुद्धा मी माझ्या मेंढवाड्यात आणलेच पाहिजे. ते सुद्धा
माझी वाणी ऐकतील आणि मग एक कळप आणि एक मेंढपाळ असे
होईल. 17 पिता मजवर प्रीती करतात, याचे कारण हे आहे की, मी
आपला जीव देतो, तो केवळ परत घेण्याकरिता देतो; 18 तो कोणी
मजपासून घेत नाही, तर मी स्वतः होऊनच तो अर्पण करतो. मला तो
देण्याचा अधिकार आहे व तो परत घेण्याचाही अधिकार आहे. ही आज्ञा
मला माझ्या पित्यापासून प्राप्त झाली आहे.” 19 यहूद्यांनी या गोष्टी
ऐकल्या तेव्हा त्यांच्यात पुन्हा मतभेद उत्पन्न झाले. 20 त्यांच्यापैकी
काहीजण म्हणाले, “तो एकतर भूतग्रस्त अथवा वेडा तरी असावा. अशा
माणसाचे तुम्ही का ऐकता?” 21 तर इतर म्हणाले, “ही वचने ज्याला

भूत लागलेले आहे त्या माणसाची नाहीत. भुताला आंधळयांचे डोळे
उघडता येतील काय?” 22 ते थंडीचे दिवस होते आणि यरुशलेमात
मंदिराच्या समर्पणाचा सण होता. 23 आणि येशू मंदिराच्या परिसरामध्ये
असलेल्या शलोमोनच्या अंगणामध्ये फिरत होते. 24 यहूदी पुढाऱ्यांनी
त्यांच्याभोवती गराडा घालून विचारले, “तू आम्हाला अजून किती वेळ
संशयात ठेवणार आहेस? तू जर ख्रिस्त असशील, तर तसे आम्हाला
स्पष्टपणे सांगून टाक.” 25 येशूंनी उत्तर दिले, “मी तुम्हाला सांगितले
पण तुम्ही विश्वास ठेवीत नाही. माझ्या पित्याच्या नावाने मी जे कार्य
करतो ते माझ्याविषयी साक्ष देतात, 26 परंतु तुम्ही मजवर विश्वास
ठेवीत नाही, कारण तुम्ही माझी मेंढरे नाहीत. 27 माझी मेंढरे माझी
वाणी ऐकतात; मी त्यांना ओळखतो आणि ती माझ्यामागे येतात. 28 मी
त्यांना सार्वकालिक जीवन देतो आणि त्यांचा कधीही नाश होणार नाही;
कोणीही त्यांना माझ्या हातातून हिरावून घेणार नाही. **(aiōn g165, aiōnios
g166)** 29 ज्या माझ्या पित्याने ती मला दिली आहेत तो सर्वश्रेष्ठ आहे;
कोणीही त्यांना माझ्या पित्याच्या हातातून हिसकून घेऊ शकत नाही.
30 मी आणि माझे पिता एक आहोत.” 31 तेव्हा यहूदी विरोधकांनी
त्यांना दगडमार करण्यासाठी पुन्हा दगड उचलले, 32 परंतु येशू त्यांना
म्हणाले, “मी पित्याद्वारे अनेक चांगली कामे केली आहेत. माझ्या
कोणत्या कामामुळे तुम्ही मला दगडमार करीत आहात?” 33 ते म्हणाले,
“कोणत्याही चांगल्या कृत्यासाठी आम्ही तुला दगडमार करीत नाही, तर
दुर्भाषण केल्याबद्दल. तू एक सामान्य मानव असूनही, स्वतःला परमेश्वर
म्हणवितोस म्हणून आम्ही तुला दगडमार करीत आहोत.” 34 त्यावर
येशूंनी उत्तर दिले, “तुम्ही ‘दैवते’ आहात असे मी म्हणालो, हे तुमच्या
नियमात लिहिले नाही काय? 35 ज्यास परमेश्वराचे वचन प्राप्त झाले
त्यास त्याने ‘दैवते’ म्हटले तर शास्त्रलेखाचा भंग होत नाही 36 तर
ज्याला पित्याने स्वतः वेगळे करून जगात पाठविले, तो जर म्हणतो की,
‘मी परमेश्वराचा पुत्र आहे,’ तर त्या विधानाला तुम्ही दुर्भाषण, असे कसे
म्हणता? 37 मी आपल्या पित्याची कृत्ये करीत नसल्यास, माझ्यावर
विश्वास ठेऊ नका; 38 तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवीत नाही, तर मी करत
असलेल्या कृत्यांवर तरी विश्वास ठेवा. म्हणजे तुमची खात्री होईल की
पिता मजमध्ये आहे व मी पित्यामध्ये आहे.” 39 त्यांना अटक करण्याचा
त्यांनी पुन्हा प्रयत्न केला, पण ते त्यांच्या हातातून निसटून गेले. 40 मग
येशू यार्देन नदीच्या पलीकडे जिथे योहान आरंभीच्या दिवसात बाप्तिस्मा
करीत असे, त्या ठिकाणी जाऊन राहिले. 41 आणि त्यांच्याकडे अनेक
लोक आले. ते आपसात म्हणू लागले, “योहानाने काही चिन्ह केले
नाही, तरी येशूंबद्दल त्याने जे काही सांगितले ते सर्व खरे ठरले आहे.”
42 तेव्हा त्या ठिकाणी अनेक लोकांनी येशूंवर विश्वास ठेवला.

**11** आता लाजर नावाचा एक मनुष्य आजारी होता. तो मरीया व तिची
बहीण मार्थाच्या बेथानी गावाचा होता. 2 ही मरीया, जिचा भाऊ
लाजर आजारी होता, तीच ही मरीया जिने प्रभूच्या मस्तकावर बहुमोल
सुगंधी तेल ओतले आणि त्यांचे चरण आपल्या केसांनी पुसले होते. 3
तेव्हा या बहिणींनी येशूंना निरोप पाठविला, “प्रभू, ज्यावर तुमची प्रीती
आहे तो आजारी आहे.” 4 येशूंनी हा निरोप ऐकला, तेव्हा ते म्हणाले,
“या आजाराचा शेवट मृत्यूत होणार नाही. तर परमेश्वराच्या गौरवासाठी
होईल आणि त्याद्वारे परमेश्वराच्या पुत्राचेही गौरव होईल.” 5 मार्था
आणि तिची बहीण मरीया व लाजर यांच्यावर येशूंची प्रीती होती, 6 तरी
लाजर आजारी आहे हे ऐकूनही येशू ज्या ठिकाणी राहत होते, तिथेच
अधिक दोन दिवस राहिले. 7 यानंतर ते आपल्या शिष्यांना म्हणाले,
“चला आपण परत यहूदीयात जाऊ.” 8 परंतु शिष्य म्हणाले, “गुरुजी,
थोड्याच दिवसांपूर्वी यहूदी आपल्याला धोंडमार करण्याचा प्रयत्न करीत
होते आणि तरी आपण पुन्हा तिथे जाता काय?” 9 येशूंनी त्यांना उत्तर
दिले, “दिवसात बारा तास प्रकाश असतो की नाही? जर कोणी दिवसा
चालतो तर अडखळत नाही, कारण या पृथ्वीवरील प्रकाशामुळे त्याला
दिसते. 10 जेव्हा एखादी व्यक्ती रात्री चालते तेव्हा ती अडखळते, कारण
तिच्याजवळ प्रकाश नसतो.” 11 असे म्हटल्यानंतर, मग येशू त्यांना
सांगू लागले, “आपला मित्र लाजर झोपी गेला आहे, परंतु मी जाऊन
त्याला झोपेतून जागे करतो.” 12 त्यांचे शिष्य म्हणाले, “प्रभूजी तो
झोपला असेल, तर बरा होईल.” 13 येशू तर लाजराच्या मरणाविषयी
बोलत होते, परंतु शिष्यांना वाटले की ते नैसर्गिक झोपेविषयीच बोलत
आहेत. 14 मग येशूंनी त्यांना स्पष्टपणे सांगितले, “लाजर मरण पावला
आहे, 15 तुमच्यासाठी मी तिथे नव्हतो म्हणून मला आनंद होत आहे,
यासाठी की तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवावा. चला, आपण त्याच्याकडे
जाऊ.” 16 परंतु दिदुम म्हटलेला थोमा इतर शिष्यांना म्हणाला, “चला,
आपणही त्यांच्याबरोबर मरू.” 17 ते तिथे पोहोचल्यावर, येशूंना समजले
की, लाजराला कबरेत ठेऊन चार दिवस झाले होते. 18 बेथानी हे गाव
यरुशलेमपासून दोन मैलापेक्षा कमी अंतरावर होते. 19 आणि अनेक
यहूदी लोक मार्था व मरीया यांच्या भावाचा मृत्यू झाल्यामुळे त्यांचे
सांत्वन करण्यासाठी आले होते. 20 येशू येत आहेत हे ऐकताच, मार्था
त्यांना भेटावयास सामोरी गेली, पण मरीया मात्र घरातच राहिली. 21
“प्रभूजी,” मार्था येशूंना म्हणाली, “आपण येथे असता, तर माझा
भाऊ मेला नसता. 22 परंतु तरी आता जे काही आपण परमेश्वराजवळ
मागाल, ते आपणास ते देतील हे मला ठाऊक आहे.” 23 त्यावर येशूंनी
तिला सांगितले, “तुझा भाऊ पुन्हा उठेल.” 24 मार्था म्हणाली, “होय,
अंतिम दिवशी, पुनरुत्थानाच्या दिवशी तो जिवंत होईल.” 25 येशू तिला
म्हणाले, “पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो कोणी मजवर विश्वास
ठेवतो, तो मरण पावला असला, तरी पुन्हा जगेल; 26 जो कोणी मजवर
विश्वास ठेवून जगतो तो कधीही मरणार नाही. यावर तुझा विश्वास आहे
काय?” **(aiōn g165)** 27 “होय, प्रभूजी,” ती म्हणाली, “या जगात
येणारा, तो ख्रिस्त (मसिहा), परमेश्वराचे पुत्र आपण आहात यावर माझा
विश्वास आहे.” 28 ती असे बोलल्यानंतर परत गेली व आपली बहीण
मरीयेला बाजूला बोलावून म्हणाली, “गुरुजी आले आहेत आणि ते तुला
विचारत आहेत.” 29 मरीयेने हे ऐकले तेव्हा ती त्वरेने उठून त्यांच्याकडे
गेली. 30 येशूंनी अद्याप गावात प्रवेश केलेला नव्हता, जिथे मार्था त्यांना
भेटली त्याच ठिकाणी ते होते. 31 जे यहूदी लोक मरीयेच्याजवळ

घरात होते व तिचे सांत्वन करीत होते, त्यांनी तिला चटकन उठून बाहेर
जाताना पाहिले, तेव्हा ती शोक करण्यासाठी कबरेकडेच जात आहे
असे त्यांना वाटले आणि म्हणून तेही तिच्या पाठीमागे गेले. 32 येशू
जिथे होते तिथे मरीया पोहोचल्यावर त्यांना पाहून ती त्यांच्या पाया
पडली व त्यांना म्हणाली, “प्रभूजी, आपण येथे असता, तर माझा भाऊ
मरण पावला नसता.” 33 येशूंनी तिला असे रडताना आणि जे यहूदी
तिच्याबरोबर होते त्यांना शोक करताना पाहिले, तेव्हा ते आत्म्यामध्ये
व्याकूळ व अस्वस्थ झाले. 34 येशूंनी विचारले, “तुम्ही त्याला कुठे ठेवले
आहे?” ते त्याला म्हणाले, “प्रभूजी, या आणि पाहा.” 35 येशू रडले.
36 नंतर यहूदी म्हणाले, “पाहा, त्यांचे त्याच्यावर किती प्रेम होते!” 37
परंतु काहीजण म्हणाले, “ज्याने आंधळया मनुष्याचे डोळे उघडले, ते
या मनुष्याला मरणापासून वाचवू शकले नाहीत का?” 38 येशू पुन्हा
व्याकूळ होऊन कबरेजवळ आले. ती एक गुहा होती आणि तिच्या
प्रवेशद्वारावर धोंड लोटलेली होती. 39 येशू म्हणाले, “धोंड बाजूला
काढा.” मृत माणसाची बहीण मार्था म्हणाली, “परंतु प्रभूजी, आता
त्याला दुर्गंधी सुटली असेल, कारण त्याला तिथे ठेऊन चार दिवस झाले
आहेत.” 40 तेव्हा येशू म्हणाले, “मी तुला सांगितले नव्हते काय, की जर
तू विश्वास ठेवशील तर परमेश्वराचे गौरव पाहशील?” 41 यास्तव त्यांनी
ती धोंड बाजूला केली. मग येशूंनी दृष्टी वर करून म्हटले, “हे पित्या,
तुम्ही माझे ऐकले म्हणून मी तुमचे आभार मानतो. 42 मला माहीत आहे
की तुम्ही नेहमीच माझे ऐकता, परंतु सर्व लोक जे येथे उभे आहेत,
त्यांच्या हिताकरिता मी हे बोललो, यासाठी की तुम्ही मला पाठविले
आहे यावर त्यांनी विश्वास ठेवावा.” 43 हे बोलल्यावर, येशू मोठ्याने
हाक मारून म्हणाले, “लाजरा, बाहेर ये!” 44 लाजर बाहेर आला, त्याचे
हातपाय पट्ट्यांनी बांधलेले होते व तोंडाभोवती कापड गुंडाळलेले होते.
येशूंनी लोकांस म्हटले, “त्याची प्रेतवस्त्रे काढा आणि त्याला जाऊ द्या.”
45 यामुळे मरीयेला भेटावयास आलेल्या अनेक यहूद्यांनी येशूंनी जे केले
ते पाहिले व त्याजवर विश्वास ठेवला. 46 परंतु काहीजण परूश्यांकडे गेले
आणि येशूंनी काय केले ते त्यांना सांगितले. 47 मग मुख्य याजकांनी व
परूश्यांनी न्यायसभा बोलावली. ते विचारू लागले, “आपण काय साध्य
केले आहे? या ठिकाणी हा मनुष्य अनेक चिन्हे करीत आहे. 48 जर
आपण त्याला असेच करत राहू दिले, तर प्रत्येकजण त्याच्यावर विश्वास
ठेवेल आणि रोमी येतील व आपले मंदिर व आपले राष्ट्र दोन्ही ताब्यात
घेतील.” 49 त्यांच्यापैकी कयफा नावाचा मनुष्य त्या वर्षी महायाजक
होता, तो म्हणाला, “तुम्हाला काहीच माहीत नाही! 50 तुम्ही हे देखील
लक्षात आणत नाही की, संपूर्ण राष्ट्राचा नाश होणे यापेक्षा लोकांसाठी
एका मनुष्याने मरावे हे तुमच्या हिताचे आहे.” 51 हे तो आपल्या मनाचे
बोलला नाही, त्या वर्षाचा महायाजक म्हणून त्याने भविष्य केले की,
येशू यहूदी राष्ट्राकरिता मरणार आहेत, 52 हे केवळ इस्राएली राष्ट्रासाठीच
नव्हे, तर परमेश्वराच्या सर्व पांगलेल्या मुलांना एकत्र आणावे आणि
एक करावे यास्तव. 53 मग त्या दिवसापासून त्यांनी त्याला जिवे
मारण्याचा कट केला. 54 यामुळे येशू यहूदीया प्रांताच्या लोकांमध्ये
उघडपणे फिरले नाहीत. तर त्याऐवजी ते अरण्याच्या जवळ असलेल्या
एफ्राईम नावाच्या एका गावी आपल्या शिष्यांसह जाऊन राहिले. 55
जेव्हा यहूद्यांचा वल्हांडण सण जवळ आला, तेव्हा सण सुरू होण्यापूर्वी
शुद्धीकरणाचा विधी पार पाडावा म्हणून देशातील अनेक लोक वर
यरुशलेममध्ये आले होते 56 येशूंना ते शोधत होते, मंदिराच्या अंगणात
उभे राहून ते एकमेकांना विचारीत होते, “तुम्हाला काय वाटते? तो
वल्हांडण सणाला येणारच नाही काय?” 57 इकडे मुख्य याजकांनी
आणि परूश्यांनी उघडपणे आज्ञा केली की, येशू कोणाला आढळल्यास
त्याने ताबडतोब सूचना द्यावी म्हणजे ते त्यांना अटक करतील.

**12** वल्हांडण सण सुरू होण्याच्या सहा दिवसापूर्वी, ज्याला येशूंनी
मेलेल्यातून उठविले होते तो लाजर जिथे राहत होता त्या बेथानी
गावी येशू आले. 2 तिथे त्यांनी येशूंच्या सन्मानार्थ संध्याकाळचे भोजन
दिले. मार्था जेवण वाढत होती, त्यावेळी लाजर मेजाभोवती येशूंबरोबर
भोजनास बसलेल्यांपैकी एक होता. 3 मरीयेने अर्धा शेर, शुद्ध जटामांसीचे
मोलवान सुगंधी तेल; येशूंच्या पायावर ओतले आणि तिने त्यांचे पाय
आपल्या केसांनी पुसले आणि त्या सुगंधी तेलाच्या वासाने घर भरून
गेले. 4 परंतु येशूंच्या शिष्यांपैकी एकजण, यहूदाह इस्कर्योत जो येशूंचा
विश्वासघात करणार होता, त्याने विरोध केला, 5 “वास्तविक ते तेल
विकून येणारे पैसे गोरगरिबांना देता आले नसते का? त्या तेलाचे मोल
एका वर्षाच्या मजुरीएवढे होते.” 6 त्याला गरिबांची काळजी होती म्हणून
तो असे म्हणाला नाही, तर तो चोर होता; व पैशाच्या पिशवीचा मालक
असून, जे काही त्यात टाकले जाई त्यातून स्वतःसाठी काढून घेत असे.
7 त्यावर येशू म्हणाले, “तिला असू दे, माझ्या उत्तरक्रियेसाठी सुगंधी तेल
तिने बचत करून ठेवले होते. 8 गरीब लोक तर नेहमीच तुमच्याबरोबर
राहतील, परंतु मी तुमच्याबरोबर नेहमीच असणार नाही.” 9 तितक्यात
येशू तिथे आले आहेत हे कळल्यावर यहूदी लोकांचा समुदाय तिथे आला,
तेव्हा केवळ त्यानांच नव्हे तर ज्याला येशूंनी मरणातून उठविले त्या
लाजराला पाहण्यासाठी त्यांनी गर्दी केली. 10 हे पाहून मुख्य याजकांनी
लाजराला देखील जिवे मारण्याची योजना केली. 11 यासाठी की अनेक
यहूदी लोक लाजरामुळे येशूंवर विश्वास ठेवू लागले होते. 12 दुसऱ्या
दिवशी येशू यरुशलेमला येत आहेत ही बातमी वल्हांडण सणासाठी
आलेल्या मोठ्या समुदायाने ऐकली. 13 त्यांनी खजुरीच्या झाडांच्या
झावळया घेतल्या व त्यांच्या भेटीस गेले आणि गजर करीत म्हणाले,
“होसान्ना!” “प्रभूच्या नावाने येणारा धन्यवादित असो!” “इस्राएलचा
राजा धन्यवादित असो!” 14 येशूंना एक गाढवीचे शिंगरू सापडले व
ते त्यावर बसले, शास्त्रलेखात असे लिहिले आहे: 15 “सीयोनकन्ये
भिऊ नको; पाहा, तुझा राजा येत आहे गाढवीच्या शिंगरावर बसून येत
आहे.” 16 हे प्रथम त्यांच्या शिष्यांना समजले नाही; परंतु येशूंचे गौरव
झाल्यानंतर त्यांना समजून आले की, ज्यागोष्टी येशूंबद्दल लिहिल्या
गेल्या होत्या त्याच गोष्टी त्यांच्यासाठी करण्यात आल्या होत्या. 17
येशूंनी लाजराला कबरेमधून बाहेर बोलाविले व मरणातून उठविले,
त्यावेळेस जो लोकसमुदाय तिथे होता त्यांनी वचनाचा प्रचार करणे सुरू

ठेवले. 18 ज्यांनी त्या चिन्हाबद्दल ऐकले होते, असे अनेक लोक येशूंना
भेटण्यासाठी गेले. 19 यास्तव परूशी एकमेकांना म्हणू लागले, “आपण
काहीच साध्य केले नाही. पाहा, सारे जग कसे त्याच्यामागे जात आहे!”
20 सणाच्या उपासनेला हजर राहण्यासाठी जे ग्रीक लोक आले होते, 21
ते गालीलातील बेथसैदा येथील रहिवासी फिलिप्पाकडे विनंती घेऊन
आले, “महाराज, आम्हाला येशूंना भेटण्याची इच्छा आहे.” 22 तेव्हा
फिलिप्पाने त्याबद्दल आंद्रियाला सांगितले; मग त्या दोघांनी येशूंना
सांगितले. 23 येशू त्यांना म्हणाले, “मानवपुत्राचे गौरव होण्याची वेळ
आली आहे. 24 मी तुम्हाला निश्चित सांगतो, गव्हाचा दाणा जमिनीत
पडून मेला नाही, तर तो एकच दाणा राहतो. परंतु तो मेला तर बहुत पीक
देतो. 25 जो कोणी आपल्या जिवावर प्रीती करतो, तो आपल्या जीवास
मुकेल आणि जो या जगात आपल्या जिवाचा द्वेष करेल, तो त्याला
अनंतकाळाच्या जीवनासाठी राखेल. (aiōnios g166) 26 जर कोणी माझी
सेवा करेल तर त्यांनी मला अनुसरावेच; म्हणजे जिथे मी आहे, तिथे
माझा सेवक असेल. जे कोणी माझी सेवा करेल त्यांचा सन्मान माझा
पिता करतील. 27 “आता माझा जीव अस्वस्थ झाला आहे, मी काय
म्हणू? ‘हे पित्या, या घटकेपासून मला वाचव?’ नाही, केवळ याच
कारणासाठी मी या घटकेस आलो आहे. 28 हे पित्या, आपल्या नावाचे
गौरव करा!” नंतर स्वर्गातून वाणी आली, “मी ते गौरविले आहे आणि
पुन: गौरवेन.” 29 जो लोकसमुदाय तिथे उभा असून ऐकत होता तो
म्हणाला, ही गर्जना झाली; इतर म्हणाले, त्याच्याबरोबर देवदूत बोलला.
30 तेव्हा येशू म्हणाले, “ती वाणी माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी
होती. 31 आता या जगाचा न्यायनिवाडा होण्याची वेळ आहे आणि
जगाच्या अधिपतीला बाहेर टाकण्यात येईल. 32 आणि मला, पृथ्वीवर
उंच केले जाईल, तेव्हा मी सर्व लोकांना माझ्याकडे ओढेन.” 33 आपण
कोणत्या प्रकारे मरणार आहोत हे सुचविण्यासाठी येशू असे बोलले. 34
जमावाने म्हटले, “नियमशास्त्रामधून आम्ही ऐकले आहे की ‘ख्रिस्त
सर्वदा राहील, तर मानवपुत्राला उंच केले पाहिजेत’ असे तुम्ही कसे
म्हणता? हा ‘मानवपुत्र’ कोण आहे?” (aiōn g165) 35 तेव्हा येशूंनी
त्यांना उत्तर दिले, “आणखी थोडा वेळ प्रकाश तुमच्याबरोबर राहील.
तुम्हावर अंधकाराने मात करण्यापूर्वी प्रकाश आहे तोपर्यंत चालत राहा,
कारण जो कोणी अंधारात चालतो त्याला आपण कुठे जातो हे कळत
नाही. 36 तुम्ही प्रकाशाची मुले व्हावी म्हणून जोपर्यंत तुम्हाबरोबर
प्रकाश आहे, तोपर्यंत प्रकाशावर विश्वास ठेवा.” येशू या गोष्टी बोलले
व तिथून निघून त्यांच्यापासून गुप्त राहिले. 37 येशूंनी अनेक चिन्हे
त्यांच्यासमोर केली असतानाही, ते त्यांच्यावर विश्वास ठेवण्यास तयार
नव्हते. 38 नेमके हेच भविष्य यशायाह संदेष्ट्याने वर्तविले होते, ते पूर्ण
झाले: “प्रभू, आमच्या वार्तेवर कोणी विश्वास ठेवला आणि प्रभूचा भुज
कोणाला प्रकट झाला आहे?” 39 परंतु या कारणाने ते विश्वास ठेवू
शकत नव्हते, कारण, यशायाहने इतरत्र असेही म्हटले आहे: 40 “म्हणून
परमेश्वराने त्यांचे डोळे आंधळे केले आहेत आणि त्यांची हृदये कठोर
केली होती, म्हणजे त्यांना डोळ्यांनी दिसू नये, किंवा अंत:करणाने
समजू नये, किंवा ते वळू नये—जेणे करून मी त्यांना बरे करेन.”
41 यशायाहने येशूंचे गौरव पाहिले म्हणून तो त्यांच्याविषयी बोलला.
42 त्याच वेळेला पुष्कळांनी आणि पुढाऱ्यांपैकी अनेकांनी त्यांच्यावर
विश्वास ठेवला. परंतु परूश्यांमुळे ते आपला विश्वास व्यक्त करीत नव्हते.
आपण सभागृहातून बहिष्कृत केले जाऊ असे त्यांना भय वाटत होते;
43 कारण परमेश्वराकडून मिळणाऱ्या स्तुतीपेक्षा त्यांना मानवाकडून
मिळणारी स्तुती अधिक प्रिय होती. 44 नंतर येशू मोठ्याने म्हणाले, “जे
कोणी मजवर विश्वास ठेवतात ते फक्त मजवरच विश्वास ठेवतात असे
नाही, तर ज्यांनी मला पाठविले त्यांच्यावर ठेवतात; 45 जे मला पाहतात
ते वास्तविक ज्यांनी मला पाठविले त्यांनाच पाहतात. 46 मी या जगात
प्रकाश म्हणून आलो आहे, यासाठी की जे मजवर विश्वास ठेवतात
त्यांनी अंधारात राहू नये. 47 “जर कोणी माझी वचने ऐकून ती पाळीत
नाही, तर मी त्या व्यक्तीचा न्याय करीत नाही. कारण मी या जगाचा
न्याय करण्यासाठी आलो नसून, जगाचे तारण करण्यासाठी आलो
आहे. 48 जे मला नाकारतात व माझ्या वचनांचा स्वीकार करीत नाही;
त्यांचा न्याय करणारे एकच आहे; जी वचने मी बोललो होतो तीच त्यांचा
न्याय करतील. 49 कारण मी माझे स्वत:चे बोलत नाही, ज्या पित्याने
मला पाठविले, त्यांनी मी काय सांगावे व काय बोलावे याची मला
आज्ञा दिली आहे. 50 त्यांच्या आज्ञा सार्वकालिक जीवनाकडे नेणाऱ्या
आहेत. यास्तव जे काही मी बोलतो, ते पित्याने मला सांगितल्याप्रमाणे
बोलतो.” (aiōnios g166)

13 वल्हांडण सण सुरू होण्यास थोडा अवधी होता. येशूंना माहीत
होते की हे जग सोडून पित्याकडे जाण्याची त्यांची वेळ जवळ
आली आहे. जगात जे त्यांचे लोक होते, त्यांच्यावर त्यांनी प्रीती केली
व शेवटपर्यंत प्रीती केली. 2 संध्याकाळचे भोजन चालू असताना,
येशूंचा विश्वासघात करावा असा विचार सैतानाने शिमोनाचा पुत्र यहूदाह
इस्कर्योतच्या मनात घातला होता. 3 येशूंना माहीत होते की, पित्याने
सर्वगोष्टी त्यांच्या सत्तेखाली ठेवल्या आहेत आणि ते परमेश्वरापासून
आले आहेत व त्यांच्याकडे परत जाणार आहेत; 4 म्हणून येशू
भोजनावरून उठले आणि आपली बाहेरील वस्त्रे काढून ठेवली आणि
रुमाल कमरेस बांधला. 5 त्यानंतर त्यांनी मोठ्या गंगाळात पाणी
ओतले आणि ते आपल्या शिष्यांचे पाय धुऊ लागले आणि आपल्या
कमरेभोवती असलेल्या रुमालाने पुसू लागले. 6 ते शिमोन पेत्राकडे
आले, तो त्यांना म्हणाला, “प्रभू, तुम्ही माझे पाय धुणार आहात काय?”
7 येशूंनी उत्तर दिले, “मी काय करीत आहे, हे तुला आता कळणार नाही,
पण नंतर कळेल.” 8 पेत्र म्हणाला, “नाही, मी तुम्हाला माझे पाय
कधीही धुऊ देणार नाही.” येशू म्हणाले, “मी तुला धुतले नाही, तर
तुला माझ्याबरोबर वाटा नाही.” (aiōn g165) 9 शिमोन पेत्राने म्हटले,
“प्रभू, केवळ माझे पायच नव्हे तर हात व डोके देखील धुवा!” 10 यावर
येशू म्हणाले, “ज्यांची आंघोळ झाली आहे त्याला फक्त पाय धुण्याची
गरज असते, कारण त्यांचे पूर्ण शरीर स्वच्छ असते. आता तू शुद्ध झाला
आहेस, परंतु तुम्ही सर्वच शुद्ध नाहीत.” 11 आपला विश्वासघात करणारा

कोण आहे ते येशूंना माहीत होते आणि म्हणूनच ते म्हणाले, तुम्ही सर्वच
शुद्ध नाही. 12 त्यांचे पाय धुतल्यावर त्यांनी कपडे पुन्हा अंगावर घातले
आणि आपल्या जागी परत आले व आपल्या शिष्यांना विचारले, “मी
तुमच्यासाठी काय केले हे तुम्हाला समजले का? 13 तुम्ही मला ‘गुरुजी’
आणि ‘प्रभूजी’ असे संबोधता आणि ते खरे आहे, यासाठी की तो मी
आहे. 14 आता ज्याअर्थी मी तुमचा प्रभू व गुरू असूनही तुमचे पाय
धुतले, तसेच तुम्ही सुद्धा एकमेकांचे पाय धुतले पाहिजेत. 15 जसे मी
तुम्हासाठी केले तसे तुम्हीही करावे म्हणून मी तुम्हाला नमुना घालून
दिला आहे. 16 मी खरोखर तुम्हाला सांगतो, दास आपल्या धन्यापेक्षा
थोर नाही, संदेशवाहक ज्याने त्याला पाठविले त्यापेक्षा मोठा नाही. 17
आता तुम्हाला या गोष्टी समजल्या आहेत, तुम्ही त्याप्रमाणे कराल तर
तुम्ही आशीर्वादित व्हाल. 18 “मी तुम्हा सर्वांबद्दल बोलत नाही; मी
ज्यांची निवड केली आहे ते मला माहीत आहेत. परंतु यासाठी की,
‘ज्याने माझ्याबरोबर भाकर खाल्ली तो माझ्यावर उलटला आहे.’ हा
शास्त्रलेखाचा भाग पूर्ण होण्यासाठी असे झाले आहे. 19 “मी तुम्हाला
हे आताच, घडून येण्यापूर्वी सांगत आहे, ते यासाठी की जेव्हा तसे घडून
येईल, तेव्हा तुम्ही विश्वास ठेवावा की मी तो आहे. 20 मी तुम्हाला निश्चित
सांगतो की, जे कोणी ज्याला मी पाठविले त्याला स्वीकारतात, ते मला
स्वीकारतात आणि जे कोणी मला स्वीकारतात ते ज्याने मला पाठविले
त्याला स्वीकारतात.” 21 असे बोलल्यानंतर, येशू आपल्या आत्म्यामध्ये
व्याकूळ होऊन उत्तरले, “मी तुम्हाला निश्चित सांगतो, तुम्हातील एकजण
मला विश्वासघाताने धरून देईल.” 22 त्यांचे शिष्य एकमेकांकडे रोखून
पाहू लागले, येशू नेमके कोणाबद्दल बोलत आहेत हे त्यांना समजेना. 23
त्यांच्यापैकी ज्या शिष्यावर येशूंची प्रीती होती तो शिष्य, येशूंच्या उराशी
टेकलेला होता. 24 “कोणाविषयी सांगत आहे हे विचारून आम्हास
सांग,” असे शिमोन पेत्राने त्या शिष्याला खुणावून विचारले. 25 तो
येशूंच्या उराशी टेकलेला असता, म्हणाला, “प्रभूजी, तो कोण आहे?”
26 येशू उत्तरले, “ज्या एकाला मी हा भाकरीचा तुकडा ताटात बुडवून
देईल तोच तो आहे.” मग ताटात भाकरीचा तुकडा बुडविल्यानंतर त्यांनी
तो शिमोनाचा पुत्र यहूदाह इस्कर्योतला दिला. 27 यहूदाहने ती भाकर
घेतल्याबरोबर सैतान त्याजमध्ये शिरला. येशूंनी त्याला म्हटले, “जे तू
करणार आहेस, ते आता त्वरेने कर.” 28 येशू कशाला तसे म्हणाले
हे भोजनास बसलेल्यातील कोणालाही समजले नाही. 29 काहींना
वाटले की यहूदाहच्या हाती पैशाचा कारभार असल्यामुळे सणासाठी
काही विकत घ्यावे किंवा गरिबांना काही द्यावे म्हणून येशूने सांगितले
असेल. 30 मग तो भाकरीचा तुकडा घेतल्याबरोबर, यहूदाह बाहेर
निघून गेला. तेव्हा रात्र होती. 31 तो निघून गेल्याबरोबर, येशू म्हणाले,
“आता मानवपुत्राचे गौरव झाले आहे आणि परमेश्वराचे त्यामध्ये गौरव
झाले आहे; 32 जर परमेश्वराचे गौरव त्यांच्यामध्ये झाले तर परमेश्वर
आपल्यामध्ये पुत्राचे गौरव करतील आणि लवकरच गौरव करतील. 33
“माझ्या मुलांनो, मी अजून थोडा वेळ तुम्हाबरोबर आहे. मग तुम्ही माझा
शोध कराल आणि जसे मी यहूदी पुढाऱ्यांना सांगितले, तसेच आता
तुम्हालाही सांगतो: मी जिथे जाणार, तिथे तुम्हाला येता येणार नाही.
34 “मी तुम्हाला एक नवीन आज्ञा देत आहे: तुम्ही एकमेकांवर प्रीती
करा. जशी मी तुम्हावर प्रीती केली, तशी तुम्हीही एकमेकांवर प्रीती
केलीच पाहिजे. 35 तुमची एकमेकांवर प्रीती असली म्हणजे त्यावरून
सर्वजण ओळखतील की तुम्ही माझे शिष्य आहात.” 36 शिमोन पेत्राने
त्यांना विचारले, “प्रभूजी, आपण कुठे जाणार आहात?” येशूंनी उत्तर
दिले, “मी जिथे जातो, तिथे आता तुला माझ्यामागे येता येणार नाही,
परंतु नंतर तू माझ्यामागे येशील.” 37 त्यावर पेत्र म्हणाला, “प्रभू, मला
आताच तुम्हाला का अनुसरता येणार नाही? मी आपल्यासाठी माझा
प्राण देईन.” 38 येशूंनी उत्तर दिले, “माझ्यासाठी तू खरोखर आपला
जीव देशील काय? मी तुला निश्चित सांगतो, कोंबडा आरवण्यापूर्वी, तू
मला तीन वेळा नाकारशील!

**14** “तुमची हृदये अस्वस्थ होऊ देऊ नका. तुम्ही परमेश्वरावर विश्वास
ठेवा; आणि माझ्यावरसुद्धा विश्वास ठेवा. 2 माझ्या पित्याच्या
घरात राहण्याच्या अनेक खोल्या आहेत आणि तसे नसते तर, मी
तुमच्यासाठी जागा तयार करण्यासाठी जात आहे असे तुम्हाला सांगितले
असते का? 3 आणि जर मी गेलो व तुमच्यासाठी जागा तयार केली की,
मी पुन्हा येईन व तुम्हाला बरोबर घेऊन जाईन, म्हणजे जिथे मी आहे
तिथे तुम्हीही असावे. 4 मी ज्या ठिकाणी जाणार आहे, तिथे जाण्याचा
मार्ग तुम्हाला ठाऊक आहे.” 5 थोमा त्यांना म्हणाला, “प्रभूजी, आपण
कुठे जात आहात हे आम्हास माहीत नाही, तर मार्ग आम्हास कसा
माहीत असणार?” 6 येशूंनी उत्तर दिले, “मार्ग आणि सत्य आणि
जीवन मीच आहे. माझ्याद्वारे आल्याशिवाय पित्याकडे कोणीही येऊ
शकत नाही. 7 जर तुम्ही मला खरोखर ओळखले असते, तर माझ्या
पित्यालाही ओळखले असते. आता यापुढे तुम्ही त्यांना ओळखता व
त्यांना पाहिलेही आहे.” 8 फिलिप्प म्हणाला, “प्रभूजी, आम्हाला पिता
दाखवा म्हणजे पुरे आहे.” 9 येशूंनी उत्तर दिले: “फिलिप्पा, मी इतका
काळ तुम्हाजवळ असूनही तू मला ओळखत नाही काय? ज्याने मला
पाहिले आहे, त्याने पित्यालाही पाहिले आहे. तर मग, ‘पिता दाखवा
असे तू कसे म्हणतोस’? 10 मी पित्यामध्ये आहे व पिता मजमध्ये आहे,
यावर तुझा विश्वास नाही काय? जी वचने मी तुला सांगतो, ते मी माझ्या
स्वतःच्या अधिकाराने सांगत नाही. खरेतर, माझ्यामध्ये वसणारा पिताच
हे कार्य करीत आहे. 11 फक्त विश्वास ठेवा की मी पित्यामध्ये आहे
आणि पिता मजमध्ये आहे; अथवा प्रत्यक्ष कार्याच्या पुराव्यावर तरी
विश्वास ठेवा. 12 मी तुम्हाला निश्चित सांगतो, मी जी कृत्ये करतो ती
मजवर विश्वास ठेवणाराही करेल, किंबहुना त्यापेक्षाही मोठी करेल,
कारण मी पित्याकडे जात आहे. 13 आणि तुम्ही जे काही माझ्या नावाने
मागाल ते मी करेन, यासाठी की पुत्रामध्ये पित्याचे गौरव व्हावे. 14
तुम्ही माझ्या नावाने मजजवळ जे काहीही मागाल, ते मी तुम्हासाठी
करेन. 15 “जर तुमची मजवर प्रीती असेल, तर माझ्या आज्ञा पाळा. 16
आणि मी पित्याजवळ मागेन, ते तुम्हाला मदत करण्यासाठी दुसरा
कैवारी देतील, जो तुम्हाबरोबर सर्वकाळ राहील— **(aiōn g165)** 17

सत्याचा आत्मा. त्याला जग स्वीकारणार नाही, कारण जग त्याला
पाहत नाही व ओळखत नाही. परंतु तुम्ही त्याला ओळखता, कारण तो
तुम्हाबरोबर राहतो आणि तुम्हामध्ये राहील. 18 मी तुम्हाला अनाथ
सोडणार नाही; मी तुमच्याकडे येईन. 19 आता थोड्याच वेळात, जग
मला आणखी पाहणार नाही, परंतु तुम्ही मला पाहाल. मी जिवंत आहे,
म्हणून तुम्हीही जिवंत राहाल. 20 त्या दिवशी तुम्हाला समजेल की
मी पित्यामध्ये आहे व तुम्ही मजमध्ये आहात व मी तुम्हामध्ये आहे.
21 ज्याच्याजवळ माझ्या आज्ञा आहेत व जो त्या पाळतो तोच मजवर
प्रीती करतो. जो मजवर प्रीती करतो त्यावर माझे पिताही प्रीती करतील
आणि मी देखील त्याजवर प्रीती करेन व स्वतः त्यांना प्रकट होईन.” 22
नंतर यहूदाह (यहूदाह इस्कर्योत नव्हे) म्हणाला, “पण प्रभूजी, आपण
फक्त आम्हाला प्रकट होणार पण जगाला का प्रकट होणार नाही?”
23 येशूंनी उत्तर दिले, “कारण जो कोणी मजवर प्रीती करतो तो माझे
शिक्षण आचरणात आणेल. माझे पितादेखील त्यांच्यावर प्रीती करतील
आणि आम्ही त्यांच्याकडे येऊ व त्यांच्याबरोबर वस्ती करू. 24 जो
कोणी माझ्यावर प्रीती करीत नाही, तो माझे शिक्षण पाळीत नाही.
माझी जी वचने तुम्ही ऐकत आहात ती माझी स्वतःची नाहीत; तर ज्याने
मला पाठविले त्या पित्याची आहेत. 25 “मी तुमच्याबरोबर असताना,
हे सर्व तुम्हाला सांगितले आहे. 26 परंतु तो कैवारी, पवित्र आत्मा,
ज्याला पिता माझ्या नावाने पाठवतील, तो तुम्हाला सर्वकाही शिकवेल
आणि मी सांगितलेल्या सर्व गोष्टींची आठवण करून देईल. 27 शांती मी
तुम्हासाठी ठेऊन जातो; माझी शांती मी तुम्हाला देतो. ज्याप्रमाणे जग
देते त्याप्रमाणे मी तुम्हाला देत नाही. तुमची मने अस्वस्थ होऊ देऊ नका
व भिऊ नका. 28 “मी तुम्हाला सांगितले ते तुम्ही ऐकले आहे की, ‘मी
जात आहे, परंतु मी तुम्हाकडे परत येईन.’ जर तुमची मजवर प्रीती
असती, तर मी पित्याकडे जातो म्हणून तुम्हाला आनंद वाटला असता,
कारण माझे पिता मजपेक्षा थोर आहेत. 29 आता हे घडून येण्यापूर्वीच
मी तुम्हाला सांगितले आहे, यासाठी की ते घडून आले म्हणजे, तुम्ही
विश्वास ठेवावा. 30 आता मी तुम्हाला यापेक्षा अधिक सांगणार नाही,
कारण या जगाचा अधिपती येत आहे. त्याचा मजवर काहीही अधिकार
नाही, 31 परंतु तो यासाठी आला की जगाने ओळखावे की मी पित्यावर
प्रीती करतो आणि पित्याने जशी मला आज्ञा दिली तसेच मी तंतोतंत
करतो. “आता उठा; आपण येथून जाऊ.”

**15** “मी खरी द्राक्षवेल आहे आणि माझे पिता माळी आहेत. 2
माझ्यातील प्रत्येक फांदी जी फळ देत नाही ती ते छाटून टाकतात
आणि फळ न देणाऱ्या प्रत्येक फांदीला अधिक फळ यावे म्हणून ते
तिची छाटणी करतात. 3 जे वचन मी तुम्हाला सांगितले आहे त्यामुळे
तुम्ही आधी शुद्ध झालाच आहात. 4 म्हणून मजमध्ये राहा व मी
तुम्हामध्ये राहीन. कोणतीही फांदी स्वतःहून फळ देऊ शकत नाही;
तिला वेलीमध्येच राहणे भाग आहे. तसेच माझ्यामध्ये राहिल्यावाचून
तुम्हालाही फळ देता येणे शक्य नाही. 5 “मी द्राक्षवेल आहे; तुम्ही फांद्या
आहात. जर तुम्ही मजमध्ये राहाल व मी तुम्हामध्ये, तर तुम्ही मुबलक
फळ द्याल; कारण माझ्यापासून वेगळे राहून तुम्हालाही काही करता
येणार नाही. 6 जर तुम्ही माझ्यामध्ये राहत नाही, तर त्या फांदीसारखे
आहात जी फेकून देतात व ती वाळते; अशा सर्व फांद्या गोळा करून
अग्नीत टाकून जाळतात. 7 परंतु तुम्ही माझ्यामध्ये राहिलात आणि
माझी वचने तुम्हामध्ये राहिली, तर जी काही तुमची इच्छा असेल ते
मागा आणि ते तुम्हासाठी करण्यात येईल. 8 तुम्ही मुबलक फळ देता
तेव्हा हे दाखविता की तुम्ही माझे शिष्य आहात, हे माझ्या पित्याच्या
गौरवासाठी आहे. 9 “जशी पित्याने मजवर प्रीती केली, तशीच मीही
तुमच्यावर प्रीती केली आहे. आता तुम्ही माझ्या प्रीतीत राहा. 10 जसा
मी माझ्या पित्याच्या आज्ञा पाळून त्यांच्या प्रीतीत राहतो, जर तुम्ही
माझ्या आज्ञा पाळाल, तर माझ्या प्रीतीत राहाल. 11 मी तुम्हाला हे सर्व
सांगितले आहे कारण माझा आनंद तुम्हामध्ये असावा आणि तुमचा
आनंद पूर्ण व्हावा. 12 माझी आज्ञा ही आहे: मी तुम्हावर प्रीती केली,
तशी तुम्हीही एकमेकांवर प्रीती करावी. 13 आपल्या मित्रासाठी स्वतःचे
प्राण अर्पण करावे, यापेक्षा कोणतीही प्रीती मोठी नाही. 14 तुम्ही
माझ्या आज्ञा पाळल्या, तर तुम्ही माझे मित्र आहात. 15 मी यापुढे
तुम्हाला दास म्हणणार नाही, कारण धन्याचे व्यवहार दासाला माहीत
नसतात; त्याऐवजी, मी तुम्हाला मित्र म्हटले आहे, कारण जे काही मी
आपल्या पित्यापासून शिकून घेतले आहे, ते सर्व मी तुम्हाला कळविले
आहे. 16 तुम्ही मला निवडले नाही, पण मी तुम्हाला निवडले व तुमची
नेमणूक केली. ती यासाठी की तुम्ही जाऊन फळ द्यावे व तुमचे फळ
टिकावे—म्हणजे तुम्ही जे काही माझ्या नावाने पित्याजवळ मागाल
ते त्यांनी तुम्हाला द्यावे. 17 ही माझी आज्ञा आहे: तुम्ही एकमेकांवर
प्रीती करावी. 18 “जर जगाने तुमचा द्वेष केला, तर हे लक्षात ठेवा की
त्यांनी प्रथम माझाही द्वेष केला आहे. 19 जर तुम्ही जगाचे असता, तर
स्वतःवर करावी अशी त्यांनी तुमच्यावर प्रीती केली असती. परंतु तुम्ही
जगाचे नाही, या जगातून मी तुमची निवड केली आहे. त्या कारणाने जग
तुमचा द्वेष करते. 20 मी तुम्हाला जे सांगितले याची आठवण ठेवा:
‘दास आपल्या धन्यापेक्षा थोर नाही.’ जर त्यांनी माझा छळ केला, तर ते
तुमचाही छळ करतील. त्यांनी माझी वचने पाळली, तर ते तुमची ही
पाळतील! 21 माझ्या नावामुळे ते तुमच्याशी असे वागतील, कारण
ज्यांनी मला पाठविले त्यांना ते ओळखीत नाहीत. 22 मी आलो नसतो व
त्यांच्याशी बोललो नसतो, तर त्यांच्यावर पापाचा दोष नसता; परंतु
आता त्यांना त्यांच्या पापासाठी काहीही सबब सांगता येणार नाही.
23 जो कोणी माझा द्वेष करतो, तो माझ्या पित्याचाही द्वेष करतो.
24 जे कोणीही केले नाही, ते कार्य मी त्यांच्यामध्ये केले नसते, तर
ते दोषी समजले गेले नसते. परंतु वस्तुस्थिती ही आहे की, त्यांनी
आम्हा दोघांचा, म्हणजे माझा व माझ्या पित्याचा द्वेष केला आहे.
25 ‘विनाकारण त्यांनी माझा द्वेष केला,’ असे त्यांच्या नियमात जे
म्हटले आहे, ते पूर्ण झाले आहे. 26 “जेव्हा कैवारी येईल, ज्याला मी
पित्यापासून तुम्हाकडे पाठवेन, तो सत्याचा आत्मा जो पित्याकडून

येतो—तो माझ्याविषयी साक्ष देईल. 27 परंतु तुम्हीदेखील साक्ष दिलीच
पाहिजे, कारण आरंभापासून तुम्ही मजबरोबर राहिला आहात.

16 “तुम्ही बहकविले जाऊ नये म्हणून मी तुम्हाला हे सर्व सांगितले
आहे. 2 कारण ते तुम्हाला सभागृहामधून काढून टाकतील आणि
खरोखर, अशी वेळ येत आहे की, जे कोणी तुम्हाला जिवे मारतील
त्यांना आपण परमेश्वराला सेवेचा यज्ञ अर्पण करीत आहोत असे वाटेल.
3 ते अशा गोष्टी करतील कारण त्यांनी कधीही पित्याला किंवा मला
ओळखले नाही. 4 मी तुम्हाला हे सांगत आहे, ते यासाठी की जेव्हा
ते घडेल, तेव्हा तुम्हाला आठवेल की मी आधी तुम्हाला त्यासंबंधी
इशारा दिला होता. मी या गोष्टी यापूर्वी तुम्हाला सांगितल्या नाहीत,
कारण मी प्रत्यक्ष तुम्हाबरोबर होतो, 5 परंतु आता ज्यांनी मला पाठविले
त्यांच्याकडे मी परत जात आहे. तरी तुम्हापैकी कोणीही, ‘आपण
कुठे जाता?’ असे विचारीत नाही 6 खरे सांगावयाचे तर, मी या गोष्टी
सांगितल्या आहेत म्हणून तुमची हृदये दुःखाने भरून गेलेली आहेत. 7
परंतु खरी गोष्ट सांगतो की, माझे जाणे हे तुमच्या हितासाठीच आहे. मी
जर गेलो नाही, तर कैवारी तुमच्याकडे येणार नाही; पण मी जर गेलो तर
मी त्याला तुमच्याकडे पाठवेन. 8 जेव्हा तो येईल, तेव्हा पापाविषयी,
नीतिमत्त्वाविषयी व न्यायनिवाड्या विषयी जग कशी चूक करत आहे हे
तो सिद्ध करेल. 9 पापाविषयी, कारण जगातले लोक मजवर विश्वास
ठेवीत नाहीत; 10 नीतिमत्त्वाविषयी, कारण मी पित्याकडे जात आहे
आणि तुम्ही मला यापुढे पाहणार नाही; 11 न्यायनिवाड्या विषयी,
कारण या जगाच्या अधिपतीला दोषी ठरविण्यात आले आहे. 12 “मला
तुम्हाला बरेच काही सांगावयाचे आहे, पण आता ते तुमच्याने ग्रहण
होणार नाही. 13 परंतु जेव्हा तो सत्याचा आत्मा येईल, तेव्हा तो तुम्हाला
मार्गदर्शन करून पूर्ण सत्यात नेईल, कारण तो आपल्या स्वतःचे काहीही
सांगणार नाही; तर त्याने जे काही ऐकले आहे, तेच तुम्हाला सांगेल. तो
तुम्हाला जे काही घडणार आहे ते सांगेल. 14 कारण तो माझ्यापासून
आहे, म्हणून माझे गौरव करेल आणि माझ्यापासून जे त्याला मिळेल
ते तो तुम्हाला प्रकट करेल. 15 पित्याचे जे सर्व आहे ते माझे आहे.
यासाठी मी म्हणालो की आत्मा जे माझ्याकडून स्वीकारेल ते तो
तुम्हाला प्रकट करेल.” 16 येशू वारंवार म्हणत होते, “थोड्या वेळाने मी
तुम्हाला दिसणार नाही, परंतु त्यानंतर थोड्या वेळाने तुम्ही मला पुन्हा
पाहाल.” 17 यावरून, त्यांचे काही शिष्य एकमेकास विचारू लागले,
“मी पित्याकडे जातो म्हणून थोड्या वेळाने तुम्ही मला पाहणार नाही
आणि पुन्हा थोड्या वेळाने तुम्ही मला पाहाल याचा अर्थ काय?” 18
तेव्हा ते विचारू लागले, “थोड्या वेळाने, असे जे येशू म्हणत आहेत, हे
आम्हास समजत नाही.” 19 त्यांना याविषयी काही विचारायचे आहे हे
ओळखून येशूंनी त्यांना म्हटले, “मी तुम्हाला जे सांगितले होते, त्याबद्दल
तुम्ही एकमेकांना विचारत आहात काय की ‘थोड्या वेळाने तुम्ही मला
पाहणार नाही आणि पुन्हा थोड्या वेळाने तुम्ही मला पाहाल.’ 20 मी
तुम्हाला निश्चित सांगतो की, जग आनंद करेल पण तुम्ही रडाल व शोक
कराल. तुम्ही दुःख कराल परंतु तुमच्या दुःखाचे रूपांतर आनंदात होईल.
21 जी स्त्री बाळाला जन्म देते तिला वेदना होतात कारण तिची वेळ
आलेली असते; परंतु जेव्हा तिचे बाळ जन्मास येते तेव्हा ती तिच्या
बाळाला या जगात जन्मलेले पाहून आनंद करते व सर्व यातना विसरून
जाते. 22 त्याच प्रकारे आता दुःख करण्याची तुमची वेळ आहे, परंतु
मी तुम्हाला पुन्हा भेटेन तेव्हा तुमचे हृदय आनंदी होईल आणि तुमचा
आनंद तुमच्यापासून कोणीही हिरावून घेणार नाही. 23 त्या दिवशी तुम्ही
माझ्याजवळ काही मागणार नाही. मी तुम्हाला खरोखर सांगतो की,
तुम्ही जे काही माझ्या नावाने पित्याजवळ मागाल ते तो तुम्हाला देईल.
24 आतापर्यंत तुम्ही माझ्या नावाने काही मागितले नाही. माझ्या नावाने
मागा म्हणजे मिळेल आणि तुमचा आनंद पूर्ण होईल. 25 “जरी मी
अलंकारिक रीतीने बोलत आहे, तरी अशी वेळ येईल की मी तुम्हाबरोबर
अशा भाषेमध्ये आणखी बोलणार नाही, तर पित्याविषयी तुम्हाला
स्पष्टरीतीने सांगेन. 26 त्या दिवसात तुम्ही माझ्या नावाने मागाल. मी
असे म्हणत नाही की मी तुमच्यावतीने पित्याजवळ मागेन. 27 नाही,
पिता स्वतःही तुमच्यावर प्रीती करतात, कारण तुम्ही मजवर प्रीती
केली व मी परमेश्वरापासून आलो आहे असा विश्वास ठेवला. 28 मी
पित्यापासून आलो आणि या जगात प्रवेश केला आणि मी हे जग सोडून
पित्याकडे परत जात आहे.” 29 तेव्हा येशूंचे शिष्य म्हणाले, “पाहा,
आता तुम्ही स्पष्ट बोलत आहात, अलंकारिक भाषेत काही सांगत नाही.
30 आता आम्हास कळले की, तुम्हाला सर्वगोष्टी ठाऊक आहेत, म्हणून
कोणासही आपणास प्रश्न विचारण्याची गरज नाही. यावरून आपण
परमेश्वरापासून आला आहात असा आम्ही विश्वास ठेवतो.” 31 येशूंनी
उत्तर दिले, “आता तुम्ही विश्वास ठेवता काय? 32 अशी वेळ येत आहे
आणि आलीच आहे की तुमची पांगापांग होईल व तुम्ही प्रत्येकजण
आपआपल्या घरी परत जाल. तुम्ही मला एकटे सोडाल, तरीसुद्धा मी
एकटा नसेन, कारण माझे पिता मजबरोबर आहेत. 33 “मी या सर्वगोष्टी
तुम्हाला सांगितल्या, ते यासाठी की माझ्यामध्ये तुम्हाला शांती मिळावी.
या जगात तुम्हाला त्रास सहन करावा लागेल. परंतु धीर धरा! कारण मी
जगावर विजय मिळविला आहे.”

17 हे म्हटल्यावर, येशूंनी वर आकाशाकडे दृष्टी लावून प्रार्थना केली:
“हे पित्या, वेळ आली आहे, आपल्या पुत्राचे गौरव करा, यासाठी
की पुत्राने आपले गौरव करावे; 2 आपण त्याला सर्व लोकांवर अधिकार
दिला आहे, ते यास्तव की ज्यांना तुम्ही त्याच्याकडे सोपविले आहे,
त्या सर्वांना त्याने सार्वकालिक जीवन द्यावे. **(aiōnios g166)** 3 आता
सार्वकालिक जीवन हेच आहे: जे तुम्ही एकच सत्य परमेश्वर आहात त्या
तुम्हाला व ज्यांना तुम्ही पाठविले, त्या येशू ख्रिस्ताला त्यांनी ओळखावे.
**(aiōnios g166)** 4 तुम्ही दिलेले कार्य समाप्त करून मी तुम्हाला पृथ्वीवर
गौरव प्राप्त करून दिले आहे. 5 तर आता, हे पित्या, जग स्थापन
होण्यापूर्वी जे माझे गौरव तुमच्या समक्षतेत होते त्याच्यायोगे माझे गौरव
करा. 6 “तुम्ही मला या जगातील जे लोक दिले, त्यांच्यासमोर मी
तुम्हाला प्रगट केले आहे. ते तुमचे होते; तुम्ही ते सर्वजण मला दिले
आणि त्यांनी तुमचे वचन पाळले आहे. 7 आता त्यांना कळले आहे

की, जे काही तुम्ही मला दिले आहे ते तुमच्यापासून आहे. 8 कारण
तुम्ही मला दिलेली वचने मी त्यांना दिली आणि त्यांनी ती स्वीकारली
आहेत. त्यांना खात्रीपूर्वक समजले की मी तुमच्यापासून आलो आणि
तुम्ही मला पाठविले आहे. 9 मी त्यांच्यासाठी प्रार्थना करीत आहे. मी
जगासाठी प्रार्थना करीत नाही, परंतु जे तुम्ही मला दिले आहेत आणि ते
आपले आहेत त्यांच्यासाठी करतो. 10 जे सर्व माझे आहेत ते तुमचेच
आहेत आणि जे सर्व तुमचे आहेत ते माझे आहेत आणि त्यांच्याद्वारे मला
गौरव मिळाले आहे. 11 आता मी या जगात राहणार नाही, मी तुमच्याकडे
येत आहे, परंतु ते या जगात अजूनही आहेत. पवित्र पित्या, जे नाव तुम्ही
मला दिले आहे, त्या नावाच्या सामर्थ्याने त्यांना सुरक्षित ठेवा, यासाठी
की जसे आपण एक आहोत तसे त्यांनी एक व्हावे. 12 जोपर्यंत मी
त्यांच्याबरोबर होतो, तोपर्यंत जे नाव तुम्ही मला दिले, त्याद्वारे मी त्यांना
राखले व सुरक्षित ठेवले आणि जो नाशाचा पुत्र आहे त्याच्याशिवाय
एकाचाही नाश झाला नाही, यासाठी की शास्त्रलेख पूर्ण व्हावा. 13
"आता मी तुमच्याकडे येत आहे, परंतु मी या जगात असतानाच हे
सांगत आहे, यासाठी की माझा आनंद त्यांच्यामध्ये परिपूर्ण व्हावा. 14
मी त्यांना तुमचे वचन सांगितले आहे आणि जगाने त्यांचा द्वेष केला,
कारण जसा मी जगाचा नाही तसे तेही या जगाचे नाहीत. 15 तुम्ही
त्यांना जगातून काढून घ्यावे यासाठी मी प्रार्थना करीत नाही, परंतु त्यांचे
दुष्टापासून रक्षण करावे. 16 जसा मी या जगाचा नाही तसे तेही या
जगाचे नाहीत." 17 सत्याने त्यांना पवित्र करा; तुमचे वचन सत्य आहे.
18 जसे तुम्ही मला जगात पाठविले, तसे मीही त्यांना जगात पाठविले
आहे. 19 त्यांनी देखील खरोखर पवित्र व्हावे म्हणून मी त्यांच्यासाठी
स्वतःला पवित्र करतो. 20 "माझी प्रार्थना केवळ त्यांच्यासाठीच नाही.
जे त्यांच्या संदेशाद्वारे मजवर विश्वास ठेवतील मी त्यांच्यासाठी देखील
प्रार्थना करतो. 21 हे पित्या, तुम्ही मजमध्ये व मी तुम्हामध्ये आहे, तसेच
त्या सर्वांनी एक व्हावे, म्हणजे तुम्ही मला पाठविले असा जग विश्वास
ठेवेल. 22 तुम्ही जे गौरव मला दिले ते मी त्यांना दिले, यासाठी की जसे
आपण एक आहोत तसे त्यांनीही एक व्हावे, 23 मी त्यांच्यामध्ये व तुम्ही
माझ्यामध्ये यासाठी आहोत की त्यांनी एक होऊन पूर्ण व्हावे आणि
त्यावरून जगाने समजून घ्यावे की, तुम्ही मला पाठविले आहे आणि
जशी तुम्ही मजवर प्रीती केली तशी त्यांच्यावरही प्रीती केली आहे.
24 "हे पित्या, जगाची उत्पत्ती होण्यापूर्वी तुम्ही मजवर प्रीती करून
मला गौरव दिले. आता त्यांना माझे गौरव पाहता यावे म्हणून तुम्ही जे
लोक मला दिले, त्यांनी जिथे मी आहे, तिथे माझ्याजवळ असावे अशी
माझी इच्छा आहे. 25 "हे नीतिमान पित्या, जग तुम्हाला ओळखत
नाही, परंतु मी तुम्हाला ओळखतो आणि तुम्ही मला पाठविले हे त्यांना
समजले आहे. 26 मी तुमच्या नाव त्यांच्यासमोर प्रकट केले आहे, मी
तुम्हाला प्रकट करीतच राहीन, जेणे करून जी तुमची प्रीती मजवर आहे
ती त्यांच्यामध्ये असावी आणि मी त्यांच्यामध्ये असावे."

**18** त्यांची प्रार्थना आटोपल्यावर, येशू आपल्या शिष्यांसह किद्रोन
ओहोळाच्या पलीकडे गेले. दुसऱ्या बाजूला एक बाग होती, ते व
त्यांचे शिष्य तिथे गेले. 2 आता यहूदा, ज्याने त्यांचा विश्वासघात केला,
त्याला ही जागा माहीत होती, कारण येशू आपल्या शिष्यांना बऱ्याच
वेळा तिथे भेटत होते. 3 तेव्हा सैनिकांची एक तुकडी, महायाजक
आणि परूश्यांकडील अधिकाऱ्यांना वाट दाखवित यहूदाह त्यांना बागेत
घेऊन आला. त्यांच्याजवळ मशाली, कंदिले व हत्यारे होती. 4 येशू, जे
सर्व आपल्यासोबत घडणार होते ते पूर्णपणे जाणून होते, त्यांनी बाहेर
जाऊन त्यांना विचारले, "तुम्हाला कोण हवे आहे?" 5 त्यावर त्यांनी
उत्तर दिले, "नासरेथकर येशू." तेव्हा येशू म्हणाले, "तो मी आहे,"
आणि विश्वासघात करणारा यहूदाही त्यांच्याबरोबर तिथे उभा होता.
6 जेव्हा येशूने म्हटले, "मी तो आहे," तेव्हा ते मागे सरकून भूमीवर
पडले. 7 त्यांना पुन्हा विचारले, "तुम्हाला कोण हवे आहे?" त्यांनी
म्हटले, "नासरेथकर येशू." 8 येशू म्हणाले, "तो मी आहे असे मी
तुम्हाला सांगितले आहेच, आणि जर तुम्ही मला शोधत आहात, तर या
माणसांना जाऊ द्यावे. 9 जे तुम्ही मला दिले आहेत त्यातून मी एकही
हरविला नाही," हे शब्द त्यांनी सांगितले होते ते पूर्ण व्हावे म्हणून असे
झाले. 10 तेव्हा शिमोन पेत्राजवळ तरवार होती, ती तरवार उपसून त्याने
महायाजकाच्या दासावर वार केला व त्याचा उजवा कान कापून टाकला.
त्या दासाचे नाव मल्ख होते. 11 येशूंनी पेत्रास आज्ञा केली, "तुझी
तलवार म्यानात घाल! पित्याने मला दिलेल्या प्याल्यातून मी पिऊ नये
काय?" 12 मग यहूदी अधिकाऱ्यांनी, सैनिकांनी व त्यांच्या सेनापतींनी
येशूंना अटक केली. त्यांना बंदी बनविले. 13 प्रथम त्यांनी येशूंना त्या
वर्षाचा महायाजक कयफाचा सासरा हन्नाकडे नेले. 14 याच कयफाने
यहूदी पुढाऱ्यांसोबत अशी मसलत केली होती की, लोकांसाठी एका
मनुष्याने मरावे हे हिताचे आहे. 15 शिमोन पेत्र आणि आणखी एक
शिष्य येशूंच्या मागे आले. कारण हा शिष्य महायाजकाच्या ओळखीचा
असल्यामुळे, त्याने येशूंबरोबर महायाजकाच्या अंगणात प्रवेश केला.
16 परंतु पेत्राला बाहेर दाराजवळ थांबावे लागले. तो दुसरा शिष्य,
ज्याला मुख्य याजकाची ओळख होती, तो परत आला व दारावर राखण
ठेवणाऱ्या दासीशी बोलला व त्यांनी पेत्राला आत आणले. 17 मग त्या
दासीने पेत्राला विचारले, "तू खात्रीने या माणसाच्या शिष्यांपैकी एक
नाहीस ना?" त्याने उत्तर दिले, "मी नाही." 18 थंडी पडल्यामुळे शिपाई
व वाड्यातील दास ऊब मिळावी म्हणून शेकोटी पेटवून त्याच्याभोवती
शेकत उभे राहिले. पेत्रसुद्धा त्यांच्याबरोबर शेकत उभा राहिला. 19
दरम्यान, महायाजकाने येशूंना त्यांच्या शिष्यांविषयी आणि त्यांचे
शिक्षण त्याविषयी प्रश्न विचारले. 20 येशूने त्याला उत्तर दिले, "मी
जगापुढे उघडपणे बोलतो, कारण मी सभागृहांमध्ये व मंदिरात जिथे
सर्व यहूदी एकत्रित येतात तिथे नियमितपणे शिक्षण दिले आहे. मी
गुप्तपणे काहीही बोललो नाही. 21 मला का विचारता? ज्यांनी माझे
ऐकले त्यांना विचारा. मी काय बोललो ते त्यांना माहीतच असेल."
22 येशूने असे म्हटल्यावर, जवळ असणाऱ्या अधिकाऱ्यांपैकी एकाने
येशूंच्या तोंडावर चापट मारली व "अशा रीतीने तू महायाजकाला उत्तर
देतो काय?" त्याने दरडावून मागणी केली. 23 येशूने उत्तर दिले,

“मी जर काही चुकीचे बोललो असेल तर तसे सिद्ध करा. परंतु मी
सत्य बोललो असेन, तर तुम्ही मला का मारले?” 24 मग हन्नाने
येशूंना बांधलेल्या अवस्थेतच महायाजक कयफा याजकडे पाठविले.
25 दरम्यान, इकडे शिमोन पेत्र अजूनही शेकोटीजवळ शेकत उभा
असताना त्यांनी त्याला विचारले, “तू खरोखर त्यांच्या शिष्यांपैकीच
एक नाहीस का आहेस ना?” पेत्र नाकारून म्हणाला, “मी तो नाही.”
26 परंतु ज्याचा कान पेत्राने कापून टाकला होता, त्याचा एक नातलग,
महायाजकाच्या दासांपैकी एक होता. त्याने पेत्राला विचारले, “मी तुला
येशूंबरोबर बागेत पाहिले नाही का?” 27 पेत्राने पुन्हा नकार दिला
आणि तेवढ्यात कोंबडा आरवला. 28 मग यहूदी पुढाऱ्यांनी येशूंना
कयफाकडून रोमी राज्यपालाच्या राजवाड्यात नेले. तोपर्यंत पहाट
झाली होती आणि आपण नियमशास्त्रानुसार अशुद्ध होऊ नये आणि
आपल्याला वल्हांडणाचे भोजन करता यावे म्हणून ते स्वतः राजवाड्यात
गेले नाहीत. 29 तेव्हा पिलात त्यांच्याकडे बाहेर आला आणि त्याने त्यांना
विचारले, “या मनुष्याविरुद्ध तुमचे काय आरोप आहेत?” 30 पिलाताला
उलट निरोप देत ते म्हणाले, “तो गुन्हेगार नसता तर आम्ही त्याला
तुमच्या स्वाधीन केलेच नसते!” 31 पिलात त्यांना म्हणाला, “त्याला
घेऊन जा आणि तुमच्या नियमशास्त्राप्रमाणे त्याचा न्याय करा.” ते
विरोध करून म्हणाले, “मृत्युदंड देण्याचा अधिकार आम्हाला नाही.” 32
आपण कोणत्या प्रकारे मरणार असे जे येशूंनी सांगितले होते ते पूर्ण
व्हावे म्हणून हे झाले. 33 मग पिलात राजवाड्यामध्ये परतला आणि
त्याने येशूंना आपल्यापुढे बोलावून विचारले, “तू यहूद्यांचा राजा आहेस
काय?” 34 “ही तुमची स्वतःची कल्पना आहे की, इतरजण माझ्याबद्दल
तुमच्याजवळ असे बोलले?” येशूंनी विचारले. 35 तेव्हा प्रत्युत्तर करीत
पिलात म्हणाला, “मी यहूदी आहे काय? तुझ्याच लोकांनी आणि मुख्य
याजकांनीच तुला माझ्या स्वाधीन केले नाही का? तू काय केले?” 36
मग येशूंनी उत्तर दिले, “माझे राज्य या जगाचे नाही. जर असते तर,
यहूदी पुढाऱ्यांनी मला अटक करू नये म्हणून माझ्या सेवकांनी लढाई
केली असती. परंतु आता माझे राज्य दुसऱ्या ठिकाणचे आहे.” 37
यावरून पिलात त्याला म्हणाला, “मग तू राजा आहेस!” येशूंनी उत्तर
दिले, “तुम्ही म्हणता मी राजा आहे. खरेतर सत्याची साक्ष देण्यासाठीच
माझा जन्म झाला व मी या जगात आलो. जे सत्याच्या बाजूचे आहेत, ते
माझे ऐकतात.” 38 पिलाताने उलट विचारले, “सत्य काय आहे?” मग
तो पुन्हा यहूदी जिथे जमले होते तिथे बाहेर गेला व त्यांना म्हणाला,
“त्याच्यावर आरोप करण्यासाठी मला कसलाही आधार सापडत नाही.
39 परंतु वल्हांडण सणाच्या निमित्ताने मी तुमच्यासाठी एका कैद्याला
सोडावे अशी तुमची रीत आहे. तर मी या ‘यहूद्यांच्या राजाला’ सोडावे
अशी तुमची इच्छा आहे का?” 40 ते ओरडले, “नाही, त्याला नको!
आम्हाला बरब्बा हवा आहे!” बरब्बाने तर बंडात भाग घेतला होता.

**19** मग पिलाताने येशूंना फटके मारविले. 2 सैनिकांनी एक काट्यांचा
मुकुट गुंफून त्यांच्या मस्तकांवर घातला. त्यांच्या अंगावर जांभळा
झगा घातला. 3 ते त्यांच्याकडे वारंवार जाऊन म्हणाले, “यहूद्यांचा राजा,
तुझा जयजयकार असो!” आणि त्यांनी त्याच्या तोंडावर चापटा मारल्या.
4 मग पिलात पुन्हा एकदा बाहेर आला आणि तिथे जमलेल्या यहूद्यांना
म्हणाला, “पाहा, मी आता त्याला तुमच्यापुढे बाहेर आणत आहे, परंतु
लक्षात ठेवा की मला त्याच्या ठायी कोणताही अपराध सापडला नाही.”
5 येशू काट्यांचा मुकुट व जांभळा झगा घातलेले असे बाहेर आले, तेव्हा
पिलात यहूद्यांना म्हणाला, “हा तो मनुष्य!” 6 येशूंना पाहताच मुख्य
याजक व त्यांचे अधिकारी ओरडू लागले, “क्रूसावर खिळा! क्रूसावर
खिळा!” परंतु पिलाताने उत्तर दिले, “तुम्हीच त्याला घेऊन जा आणि
त्याला क्रूसावर खिळा. कारण माझ्या दृष्टीने पाहिले तर, त्याच्यावर दोष
ठेवण्यासाठी मला कोणताही आधार सापडत नाही.” 7 तेव्हा यहूदी
अधिकाऱ्यांनी आग्रहपूर्वक म्हटले, “आमचे नियमशास्त्र आहे, त्यानुसार
त्याने मरण पावलेच पाहिजे, कारण त्याने स्वतःला परमेश्वराचा पुत्र
म्हटले आहे.” 8 हे ऐकल्यावर पिलात, अधिकच घाबरला. 9 आणि तो
राजवाड्यामध्ये परत गेला. “तू कुठून आला आहेस?” त्याने येशूंना
विचारले, परंतु येशूंनी त्याला उत्तर दिले नाही. 10 पिलाताने म्हटले, “तू
माझ्याशी बोलण्यास नकार देतोस काय? तुला सोडण्याचा अथवा तुला
क्रूसावर खिळण्याचा अधिकार मला आहे, हे तुला कळत नाही का?”
11 तेव्हा येशू उत्तरले, “जर तुम्हाला वरून अधिकार दिला गेला नसता तर
तो माझ्यावर चालला नसता. यास्तव ज्यांनी मला तुमच्या स्वाधीन केले
त्यांचा पापदोष अधिक मोठा आहे.” 12 तेव्हापासून, पिलात येशूंना
मुक्त करण्याचा प्रयत्न करू लागला, परंतु यहूदी पुढारी ओरडत राहिले,
“तुम्ही या मनुष्याला सोडले, तर तुम्ही कैसराचे मित्र नाही; कारण
जो कोणी स्वतःला राजा म्हणवितो तो कैसराचा विरोधी आहे.” 13 हे
ऐकल्यावर, पिलाताने येशूंना बाहेर आणले आणि फरसबंदी नावाची
जागा, जिला अरामी भाषेत गब्बाथा म्हणतात, तिथे तो न्यायासनावर
बसला 14 तो वल्हांडणाच्या तयारीचा दिवस असून; ती दुपारची वेळ
होती. “हा पाहा तुमचा राजा,” पिलात यहूदीयांना म्हणाला. 15 पण
लोकांनी अधिकच मोठ्याने गर्जना केली, “त्याला येथून न्या! त्याला
येथून न्या! त्याला क्रूसावर खिळा!” तेव्हा पिलाताने विचारले, “तुमच्या
राजाला मी क्रूसावर खिळावे काय?” त्यावर मुख्य याजक म्हणाले,
“कैसराशिवाय आम्हाला दुसरा राजा नाही.” 16 शेवटी पिलाताने येशूंना
क्रूसावर खिळण्याकरिता त्यांच्या स्वाधीन केले. सैनिकांनी त्यांना
आपल्या ताब्यात घेतले. 17 मग आपला स्वतःचा क्रूस वाहवून, ते
कवटी म्हटलेल्या जागी आले, ज्याला अरामी भाषेमध्ये गोलगोथा
म्हणतात. 18 तिथे त्यांना आणि त्यांच्याबरोबर इतर दोघांना—त्यांच्या
दोन्ही बाजूला एकएक व येशूंना त्यांच्यामध्ये असे क्रूसावर खिळले. 19
पिलाताने त्यांच्या क्रूसावर एक लेखपत्रक लावले, ते असे होते: यहूद्यांचा
राजा, नासरेथकर येशू. 20 अनेक यहूद्यांनी हे पत्रक वाचले, कारण
येशूंना ज्या ठिकाणी क्रूसावर खिळले होते ते ठिकाण शहराच्या जवळ
होते आणि क्रूसावरील लेख हा हिब्रू, लॅटिन व ग्रीक भाषांमध्ये लिहिलेला
होता. 21 मुख्य याजक पिलाताला म्हणाले, “यहूद्यांचा राजा असे लिहू
नका” तर “मी यहूद्यांचा राजा आहे, असे या मनुष्याने म्हटले होते तसे

लिहा.” 22 तेव्हा पिलाताने उत्तर दिले, “मी जे लिहिले, ते लिहिले.” 23
सैनिकांनी येशूंना क्रूसावर खिळल्यानंतर, त्यांनी त्यांची वस्त्रे घेतली
आणि एकाएका सैनिकाला एक असे त्याचे चार विभागामध्ये वाटप
केले, फक्त अंतर्वस्त्रे ठेवली. हा अंगरखा शिवलेला नसून वरपासून
खालपर्यंत संपूर्ण विणलेला होता. 24 ते एकमेकांना म्हणाले, “त्याचा
अंगरखा आपण फाडू नये, आपणापैकी तो कोणाला मिळावा, हे
पाहण्यासाठी आपण चिठ्ठ्या टाकू या.” यामुळे पुढील शास्त्रलेख पूर्ण
झाला: “त्यांनी माझी वस्त्रे आपसात वाटून घेतली, आणि माझ्या
वस्त्रासाठी चिठ्ठ्या टाकल्या.” म्हणूनच त्या सैनिकांनी याप्रमाणे केले.
25 क्रूसाच्या जवळ येशूंची आई व तिची बहीण, क्लोपाची पत्नी मरीया
आणि मरीया मग्दालिया उभ्या होत्या. 26 मग येशूंनी आपल्या आईला
व ज्या शिष्यावर त्यांची प्रीती होती त्याला जवळ उभे राहिलेले पाहून
आईला म्हटले, “बाई, पाहा, हा तुझा पुत्र!” 27 आणि त्यांनी त्या
शिष्याला म्हटले, “पाहा, ही तुझी आई!” त्या वेळेपासून त्या शिष्याने
तिला आपल्या घरी ठेवून घेतले. 28 यानंतर सर्वगोष्टी पूर्ण झाल्या आहेत
हे जाणून शास्त्रलेख पूर्ण व्हावा म्हणून येशूंनी म्हटले, “मला तहान
लागली आहे.” 29 तिथे शिरक्यात भिजविलेला एक स्पंज एजोबाच्या
काठीवर ठेवून व काठी उंच करून त्यांनी येशूंच्या ओठांना लावला. 30
तो चाखल्यावर, येशू म्हणाले, “पूर्ण झाले आहे,” आणि त्यांनी मस्तक
लववून प्राण सोडला. 31 आता क्रूसावर खिळलेल्यांची शरीरे दुसऱ्या
दिवसापर्यंत लटकत राहू नयेत, अशी यहूदी पुढाऱ्यांची इच्छा होती.
कारण हा तयारीचा दिवस होता आणि दुसरा दिवस हा एक विशेष
शब्बाथ होता. म्हणून त्यांचे पाय मोडण्याचा हुकूम द्यावा, अशी विनंती
त्यांनी पिलाताला केली, मग त्यांची शरीरे उतरवून घेता येतील. 32
त्याप्रमाणे सैनिकांनी येशूंबरोबर क्रूसावर टांगलेल्या पहिल्याचे पाय
मोडले मग दुसऱ्याचे ही मोडले. 33 परंतु जेव्हा ते येशूंजवळ आले, तेव्हा
ते आधीच मरण पावल्याचे त्यांना दिसून आले, म्हणून त्यांनी येशूंचे पाय
मोडले नाहीत. 34 तरीपण, सैनिकांपैकी एकाने त्यांच्या कुशीत भाला
भोसकला, तेव्हा रक्त व पाण्याचा ओघ बाहेर पडला. 35 ज्या मनुष्याने
हे पाहिले त्याने साक्ष दिली आणि त्याची साक्ष खरी आहे. त्याला
माहीत आहे की तो सत्य बोलत आहे आणि तो साक्ष देतो यासाठी की,
तुम्हीही विश्वास ठेवावा. 36 सैनिकांनी जे केले त्यामुळे पुढील शास्त्रलेख
पूर्ण झाले: “त्याच्या हाडांपैकी एकही हाड मोडले जाणार नाही,” 37
आणि आणखी एक शास्त्रलेख असा आहे, “ज्याला त्यांनी भोसकले ते
त्याच्याकडे पाहतील.” 38 त्यानंतर अरिमथियाकर योसेफाने येशूंचे
शरीर पिलाताकडे मागितले. आता योसेफ येशूंचा एक गुप्त अनुयायी
असून यहूदी पुढाऱ्यांना भीत होता. पिलाताच्या परवानगीने, तो आला
आणि येशूंचे शरीर घेऊन गेला. 39 जो येशूंकडे रात्री आलेला होता, तो
निकदेमही त्याच्याबरोबर होता व त्याने आपल्याबरोबर गंधरस व अगरू
यांचे सुमारे चौतीस कि. ग्रॅ. मिश्रण आणले होते. 40 येशूंचे शरीर घेऊन
त्या दोघांनी ते सुगंधी द्रव्यासह तागाच्या वस्त्राने गुंडाळले. हे यहूद्यांच्या
उत्तरक्रियेच्या रीतीप्रमाणे होते. 41 ज्या ठिकाणी येशूंना क्रूसावर खिळले
होते त्या ठिकाणी एक बाग होती आणि त्या बागेत एक नवीन कबर
होती, त्यामध्ये आतापर्यंत कोणालाही ठेवले नव्हते. 42 शब्बाथ सुरू
होण्यापूर्वी सर्वकाही उरकण्याची घाई होती व ही कबर जवळच होती,
म्हणून त्यांनी येशूंचे शरीर त्याच कबरेत ठेवले.

**20** आठवड्याच्या पहिल्या दिवशी अगदी पहाटेस, अंधार असताना,
मरीया मग्दालिया कबरेकडे गेली आणि प्रवेशद्वारावरून मोठी
धोंड बाजूला लोटलेली आहे, असे तिने पाहिले. 2 तेव्हा धावतच ती
शिमोन पेत्र व दुसरा शिष्य, ज्यावर येशूंची प्रीती होती, त्यांना येऊन
म्हणाली, “त्यांनी प्रभूला कबरेतून काढून नेले आहे आणि त्यांना कुठे
ठेवले आहे ते आम्हाला माहीत नाही!” 3 मग पेत्र आणि दुसरा शिष्य
कबरेकडे निघाले. 4 दोघेही धावत होते, परंतु तो दुसरा शिष्य पेत्रापुढे
धावत गेला आणि कबरेजवळ प्रथम पोहोचला. 5 त्याने डोकावून आत
पाहिले, तेव्हा तिथे त्याने तागाच्या पट्ट्या पडलेल्या पाहिल्या, परंतु तो
आत गेला नाही. 6 एवढ्यात शिमोन पेत्र त्याच्यामागून आला आणि
सरळ कबरेच्या आत गेला. त्याने तागाची वस्त्रे पडलेली पाहिली, 7
त्याप्रमाणे जे कापड येशूंच्या डोक्याला गुंडाळून बांधले होते, ते कापड
अजूनही त्याच ठिकाणी तागाच्या वस्त्रापासून वेगळे पडलेले होते असे
त्याने पाहिले. 8 शेवटी दुसरा शिष्य, जो प्रथम कबरेजवळ पोहोचला
होता, तोही आत गेला. त्याने पाहिले आणि विश्वास ठेवला. 9 कारण
त्यांनी मेलेल्यातून पुन्हा उठावे हा शास्त्रलेख तोपर्यंत त्यांना समजला
नव्हता. 10 नंतर शिष्य एकत्र जिथे राहत होते तिथे ते परत गेले. 11
परंतु मरीया बाहेर कबरेजवळ रडत उभी राहिली. ती रडत असताना,
तिने ओणवून कबरेच्या आत डोकावून पाहिले. 12 आणि तिला, जिथे
येशूंचे शरीर ठेवले होते तिथे, एक उशाशी व दुसरा पायथ्याशी शुभ्र झगा
परिधान केलेले दोन देवदूत दिसले. 13 त्यांनी तिला विचारले, “बाई,
तू का रडत आहेस?” तिने उत्तर दिले, “कारण त्यांनी माझ्या प्रभूला
काढून नेले आहे,” आणि “त्यांनी त्यांचे शरीर कुठे ठेवले आहे, हे मला
माहीत नाही.” 14 असे असताना, तिने मागे वळून पाहिले, तेव्हा येशू
तिथे उभे होते, पण ते येशू आहेत हे तिने ओळखले नाही. 15 येशूंनी
तिला विचारले, “बाई, तू का रडत आहेस? तू कोणाचा शोध करत
आहेस?” तो माळी असावा, असे समजून ती म्हणाली, “महाराज,
तुम्ही त्यांना नेले असेल, तर तुम्ही कुठे ठेवले ते मला सांगा, म्हणजे मी
त्यांना घेऊन जाईन.” 16 येशू तिला म्हणाले, “मरीये.” त्यांच्याकडे
वळून ती अरामी भाषेत म्हणाली “रब्बूनी!” म्हणजे “गुरुजी.” 17
येशू म्हणाले, “मला स्पर्श करू नको, कारण मी अद्याप पित्याकडे
वर गेलो नाही. पण तू जा आणि माझ्या भावांना सांग, की ‘मी वर
माझ्या पित्याकडे आणि तुमच्या पित्याकडे, माझ्या परमेश्वराकडे आणि
तुमच्या परमेश्वराकडे जात आहे.’” 18 मरीया मग्दालिया, शिष्यांकडे
बातमी घेऊन आली: “मी प्रभूला पाहिले आहे!” ज्यागोष्टी येशूंनी तिला
सांगितल्या होत्या त्या तिने शिष्यांना सांगितल्या. 19 आठवड्याच्या
पहिल्या संध्याकाळी, शिष्य एकत्र जमले असता, यहूदी पुढाऱ्यांच्या
भीतीने सर्व दारे आतून बंद केलेली असताना, येशू येऊन त्यांच्यामध्ये

उभे राहिले आणि म्हणाले, “तुम्हाला शांती असो!” 20 असे बोलल्यावर,
त्यांनी आपले हात व आपली कूस त्यांना दाखविली. तेव्हा प्रभूला पाहून
शिष्यांना अतिशय आनंद झाला. 21 पुन्हा येशू म्हणाले, “तुम्हाला शांती
असो! जसे पित्याने मला पाठविले तसे मीही तुम्हाला पाठवितो.” 22
आणि येशूंनी त्यांच्यावर श्वास फुंकला व म्हटले, “पवित्र आत्म्याचा
स्वीकार करा. 23 तुम्ही कोणाच्या पापांची क्षमा केली, तर त्यांची क्षमा
होईल; पण जर तुम्ही क्षमा केली नाही, तर त्यांची क्षमा होणार नाही.”
24 येशू आले त्यावेळी बारा पैकी एकजण दिदुम म्हणजे जुळा या नावाने
ओळखला जाणारा थोमा तिथे शिष्यांबरोबर नव्हता. 25 इतर शिष्य
त्याला सांगू लागले, “आम्ही प्रभूला पाहिले!” परंतु तो त्यांना म्हणाला,
“त्यांच्या हातात खिळयांचे व्रण पाहिल्यावाचून व जिथे खिळे ठोकले
होते तिथे माझे बोट घातल्यावाचून आणि माझा हात त्यांच्या कुशीत
घातल्यावाचून मी विश्वास ठेवणार नाही.” 26 एक आठवड्यानंतर शिष्य
पुन्हा घरी असताना थोमा त्यांच्याबरोबर होता. जरी दारे बंद होती तरी
येशू त्यांच्यामध्ये उभे राहून म्हणाले, “तुम्हाला शांती असो!” 27 नंतर
त्यांनी थोमाला म्हटले, “तुझे बोट येथे ठेव; माझे हात पाहा. तुझा हात
लांब कर आणि माझ्या कुशीत घाल. विश्वासहीन न राहता विश्वास
धरणारा हो.” 28 थोमाने म्हटले, “माझे प्रभू व माझे परमेश्वर!” 29 मग
येशूंनी त्याला म्हटले, “कारण तू मला पाहिले आहेस, म्हणून तू विश्वास
ठेवतोस; परंतु न पाहता विश्वास ठेवणारे धन्य होत.” 30 येशूंनी अनेक
चिन्हे आपल्या शिष्यांदेखत केली, ती या पुस्तकात कथन केलेली
नाहीत. 31 परंतु हे यासाठी नोंदले आहेत की तुम्ही विश्वास ठेवावा की
येशू ख्रिस्त हे परमेश्वराचे पुत्र आहेत व त्यांच्या नावावर विश्वास ठेवून
तुम्हाला सार्वकालिक जीवन लाभावे.

**21** त्यानंतर येशू पुन्हा तिबिऱ्यास सरोवराजवळ शिष्यांस प्रगट झाले,
ते असे घडले: 2 शिमोन पेत्र, दिदुम म्हणून ओळखला जाणारा
थोमा, गालीलातील काना येथील नाथानाएल, जब्दीचे पुत्र आणि दुसरे
दोन शिष्य एकत्रित होते. 3 शिमोन पेत्र त्यांना म्हणाला, “मी मासे
धरावयास बाहेर जात आहे,” तेव्हा ते पेत्राला म्हणाले, “आम्ही पण
तुझ्याबरोबर येतो.” तेव्हा ते बाहेर निघून होडीत बसले, परंतु त्या रात्री ते
काहीही धरू शकले नाही. 4 पहाटेच्या वेळी, येशू सरोवराच्या काठावर
उभे होते, परंतु ते येशू आहेत हे शिष्यांना समजले नाही. 5 येशूंनी हाक
मारून विचारले, “मित्रांनो, तुमच्याजवळ काही मासे आहेत काय?”
“नाही,” त्यांनी उत्तर दिले. 6 मग त्यांनी म्हटले, “होडीच्या उजव्या
बाजूस जाळे टाका, म्हणजे तुम्हाला काही सापडतील.” जेव्हा त्यांनी
तसे केले, तेव्हा इतक्या मोठ्या संख्येने मासे मिळाले की त्यांना जाळे
ओढणे अशक्य झाले. 7 मग ज्या शिष्यावर येशूंची प्रीती होती तो
पेत्राला म्हणाला, “ते प्रभू आहेत!” शिमोन पेत्राने, “ते प्रभू आहेत,” हे
ऐकताच आपला अंगरखा कंबरेभोवती गुंडाळला, कारण त्याने तो काढून
ठेवला होता आणि पाण्यात उडी मारली. 8 दुसरे शिष्य माशांचे जाळे
ओढीत होडीतून आले, कारण ते काठापासून दूर नव्हते, तर सुमारे नव्वद
मीटर अंतरावर होते. 9 मग काठावर उतरल्यावर, त्यांनी कोळशाचा
विस्तव पाहिला, त्यावर मासळी व काही भाकरी ठेवल्या होत्या. 10 येशू
त्यांना म्हणाले, “तुम्ही आता धरलेल्या मासळीतून काही आणा.” 11
शिमोन पेत्राने परत मचव्यावर चढून जाळे काठावर ओढून आणले. त्याने
मोजल्याप्रमाणे त्यात एकशे त्रेपन्न मोठे मासे होते आणि इतके असूनही
ते जाळे फाटले नव्हते. 12 येशू त्यांना म्हणाले, “या आणि न्याहरी
करा.” आपण कोण आहात? असे विचारण्याचे त्यांच्या शिष्यांपैकी
एकालाही धैर्य झाले नाही, परंतु ते प्रभू आहे हे त्यांना माहीत होते. 13
मग येशू आले, त्यांनी भाकर घेऊन त्यांना दिली व मासळीचेही त्यांनी
तसेच केले. 14 मेलेल्यातून उठल्यावर शिष्यांना प्रगट होण्याची येशूंची
ही तिसरी वेळ होती. 15 जेवल्यानंतर येशू शिमोन पेत्राला म्हणाले,
“योहानाच्या पुत्रा शिमोना, या सर्वांपेक्षा तू मजवर अधिक प्रीती करतोस
काय?” तेव्हा पेत्राने उत्तर दिले, “होय, प्रभू, आपणाला माहीत आहे, की
माझे तुमच्यावर प्रेम आहे.” येशूंनी त्याला म्हटले, “तर माझ्या कोकरांना
चार.” 16 येशूंनी पुन्हा विचारले, “योहानाच्या पुत्रा शिमोना, तू मजवर
प्रीती करतोस काय?” पेत्र म्हणाला, “होय, प्रभू मी आपणावर प्रेम
करतो, हे आपल्याला ठाऊक आहे.” येशू त्याला म्हणाले, “माझ्या
मेंढरांना पाळ.” 17 तिसऱ्या वेळेला त्यांनी त्याला विचारले, “योहानाच्या
पुत्रा शिमोना, तू माझ्यावर प्रेम करतोस काय?” “तू माझ्यावर प्रेम
करतोस काय?” असे तिसऱ्या वेळेस येशूंनी विचारल्यामुळे, पेत्र दुःखी
झाला. तो म्हणाला “प्रभूजी, आपल्याला सर्वकाही माहीत आहे की मी
आपणावर प्रेम करतो.” येशू म्हणाले, “माझ्या मेंढरांस चार. 18 मी
तुला निश्चित सांगतो, तू तरुण होतास, तेव्हा पोशाख चढवून तुला हवे
तिथे जात होतास; परंतु तू जेव्हा वृद्ध होशील, तेव्हा तू आपले हात
पसरशील आणि मग दुसरे तुला पोशाख घालतील आणि तुला जिथे
जावयास नको तिथे नेतील.” 19 परमेश्वराचे गौरव करण्यासाठी पेत्र
कोणत्या प्रकारच्या मरणाने मरेल, हे त्याला कळावे, म्हणून येशू असे
बोलले. मग येशूंनी त्याला म्हटले, “माझ्यामागे ये!” 20 मग पेत्र वळला
आणि ज्या शिष्यावर येशूंची प्रीती होती तो त्यांच्यामागे येत होता असे
त्याने पाहिले. भोजनाच्या वेळी येशूंच्या उराशी असता मागे वळून,
“प्रभूजी, आपला घात कोण करणार आहे?” असे ज्याने विचारले
होते तो हा शिष्य होता. 21 पेत्राने त्याला पाहिल्यावर येशूंना विचारले,
“प्रभूजी, याचे काय?” 22 त्यावर येशूंनी उत्तर दिले, “मी पुन्हा येईपर्यंत
त्याने जगावे, अशी माझी इच्छा असली तर त्याचे तुला काय? तुला
माझ्यामागे आलेच पाहिजे.” 23 या कारणाने, तो शिष्य मरणार नाही
अशी अफवा विश्वासणाऱ्यांमध्ये पसरली. परंतु तो मरणार नाही, असे ते
म्हणाले नव्हते; येशू ख्रिस्त एवढेच म्हणाले होते, “मी येईपर्यंत त्याने
जगावे अशी माझी इच्छा असली, तर त्याचे तुला काय?” 24 तो हा
शिष्य ज्याने या सर्व गोष्टींविषयी साक्ष दिली आणि त्या लिहून ठेवल्या.
त्याची साक्ष खरी आहे हे आम्हास माहीत आहे. 25 येशूंनी दुसरीही बहुत
कृत्ये केलीत. मला वाटते, जर सर्व घटना लिहून काढल्या, तर इतकी
पुस्तके होतील की ती या संपूर्ण जगात मावणार नाहीत.

# प्रेषित

1 थियफिल महोदय, मी माझ्या पहिल्या ग्रंथात, येशूंनी जे कार्य
करण्यास आणि शिक्षण देण्यास सुरुवात केली त्या दिवसापासून, 2
त्यांच्या निवडलेल्या प्रेषितांना पवित्र आत्म्याद्वारे आज्ञा केल्यानंतर येशू
वर स्वर्गात घेतले गेले, त्या दिवसापर्यंत घडलेल्या गोष्टी लिहिल्या आहेत.
3 त्यांचे क्लेश संपल्यानंतर, त्यांनी आपण जिवंत आहोत हे पुष्कळ
खात्रीलायक पुराव्यांनी सिद्ध केले. चाळीस दिवसांच्या काळात ते स्वत:
त्यांना प्रकट झाले आणि परमेश्वराच्या राज्यासंबंधी बोलले. 4 अशाच
एका प्रसंगी, ते त्यांच्याबरोबर भोजन करीत असताना, त्यांनी आज्ञा
केली: “यरुशलेम सोडून जाऊ नका, तर माझ्या पित्याने अभिवचन
दिलेल्या ज्या देणगीबद्दल तुम्ही मला बोलताना ऐकले होते, त्याची वाट
पाहा. 5 कारण योहान पाण्याने बाप्तिस्मा करीत होता, परंतु थोड्या
दिवसातच तुमचा बाप्तिस्मा पवित्र आत्म्याने केला जाईल.” 6 मग ते
त्यांच्याभोवती गोळा झाले आणि त्यांनी विचारले, “हे प्रभू, यावेळी
आपण इस्राएलच्या राज्याची पुनर्स्थापना करणार आहात काय?”
7 ते त्यांना म्हणाले, “पित्याने वेळ व तारीख आपल्या अधिकाराने
निश्चित केली आहे आणि त्याबद्दल तुम्हाला जाणून घेण्याची गरज
नाही. 8 परंतु जेव्हा पवित्र आत्मा तुम्हावर येईल तुम्हाला सामर्थ्य
प्राप्त होईल आणि तुम्ही यरुशलेममध्ये आणि सर्व यहूदीयात आणि
शोमरोनात आणि पृथ्वीच्या अंतापर्यंत माझे साक्षीदार व्हाल.” 9
असे म्हटल्यानंतर ते त्यांच्या नजरेसमोर वर घेतले गेले आणि ढगांनी
त्यांना त्यांच्या दृष्टिआड केले. 10 येशू जसे वर घेतले जात होते तसे
त्यांचे शिष्य आकाशाकडे निरखून लावून पाहत होते, एकाएकी पांढरी
वस्त्रे घातलेले दोन पुरुष त्यांच्याजवळ उभे राहिले. 11 ते म्हणाले,
“अहो गालीलातील मनुष्यांनो, तुम्ही येथे आकाशाकडे पाहत का उभे
राहिलात? हेच येशू, ज्यांना तुमच्यापासून वर स्वर्गात घेतले गेले,
जसे तुम्ही त्यांना स्वर्गात जाताना पाहत आहात तसेच परत येणार
आहेत.” 12 नंतर प्रेषित सुमारे शब्बाथ दिवसाच्या वाटचालीवर अंतरावर
असलेल्या जैतुनाच्या डोंगरावर होते तिथून ते यरुशलेमला परत आले.
13 तिथे पोहोचल्यावर, ते राहत होते त्या माडीवरील खोलीत गेले. तिथे
जे शिष्य उपस्थित होते ते हे: पेत्र, योहान, याकोब आणि आंद्रिया;
फिलिप्प आणि थोमा; बर्थलमय आणि मत्तय; अल्फीचा पुत्र याकोब,
शिमोन कनानी आणि याकोबाचा पुत्र यहूदाह. 14 हे सर्वजण व येशूंची
आई मरीया, त्यांचे भाऊ, इतर स्त्रिया एकत्र येऊन सतत प्रार्थनेत वेळ
घालवित असत. 15 त्या दिवसांमध्ये पेत्र विश्वासणाऱ्या लोकांमध्ये
उभा राहिला (ते एकूण एकशेवीस लोक होते) आणि त्याने भाषण
दिले. 16 तो म्हणाला, “बंधू भगिनींनो, येशूंना अटक करून देण्यासाठी
मार्गदर्शन करणारा यहूदाहच्या संदर्भात फार पूर्वी दावीद राजाद्वारे पवित्र
आत्म्याने भाकीत केलेला शास्त्रलेख पूर्ण होणे आवश्यक होते. 17 तो
आपल्यापैकीच एक होता आणि त्याने आपल्या सेवाकार्यामध्ये भाग
घेतला होता.” 18 यहूदाहने त्याला मिळालेल्या दुष्टाईच्या पैशाने शेत
विकत घेतले; तिथे तो डोक्यावर पडला, त्याचे पोट फुटून सर्व आतडी
बाहेर पडली. 19 ही वार्ता यरुशलेमात राहणाऱ्या सर्वांना समजली,
तेव्हापासून त्या शेताला त्यांच्या भाषेत हकलदमा, म्हणजे रक्ताचे शेत
असे नाव पडले. 20 “यासाठी,” पेत्र म्हणाला, “स्तोत्रांच्या पुस्तकात
लिहिले आहे: “‘त्याचे ठिकाण ओसाड पडो; व त्यात कोणीही वस्ती न
करो,’ आणि, “‘त्याचा अधिकार घेण्यासाठी इतर येवोत.’ 21 यास्तव हे
आवश्यक आहे की अशा व्यक्तींपैकी एकाची निवड आपण करावी
की, जो प्रभू येशू आपल्यामध्ये राहत होते त्या वेळेपासून आतापर्यंत
सर्व वेळ आपल्याबरोबर राहात आलेला आहे, 22 प्रारंभीपासून म्हणजे
योहानाकडून येशूंचा बाप्तिस्मा झाला, त्या दिवसापासून येशूंना स्वर्गात
घेतले जाईपर्यंत, कारण यांच्यामधून एकाने आपल्याबरोबर येशूंच्या
पुनरुत्थानाचे साक्षीदार असणे आवश्यक आहे.” 23 तेव्हा त्यांनी यूस्त
म्हटलेला योसेफ, ज्याला बारसब्बास देखील म्हणत असत आणि
मत्थिया अशा दोन माणसांची नावे सुचविली. 24 नंतर त्यांनी प्रार्थना
केली, “हे प्रभू, तुम्ही प्रत्येकाचे अंत:करण जाणता. या दोघांपैकी तुम्ही
कोणाला निवडले आहे हे आम्हाला दाखवा, 25 ही प्रेषितीय सेवा,
नियोजित स्थानी गेलेल्या यहूदाहने सोडली.” 26 नंतर त्यांनी चिठ्ठ्या
टाकल्या आणि मत्थियाची चिठ्ठी निघाली; व इतर अकरा प्रेषितांबरोबर
त्याची निवड झाली.

2 जेव्हा पेंटेकॉस्टचा दिवस आला, त्यावेळी ते सर्व एका ठिकाणी
जमले होते. 2 एकाएकी स्वर्गातून प्रचंड सोसाट्याच्या वाऱ्यासारखा
आवाज आला आणि ज्या घरात ते बसले होते ते सर्व घर त्याने भरले.
3 त्यावेळी अग्नीच्या जिभांसारख्या दिसणाऱ्या जिभा वेगवेगळया
होऊन प्रत्येकावर एकएक अशा स्थिरावताना त्यांना दिसल्या. 4
तिथे उपस्थितीत असलेले सगळे जण पवित्र आत्म्याने भरले आणि
आत्म्याने हे करण्यास त्यांना समर्थ केल्यामुळे ते वेगवेगळया भाषेत
बोलू लागले. 5 त्यावेळेस आकाशाखालील प्रत्येक देशामधून आलेले
भक्तिमान यहूदी यरुशलेममध्ये राहत होते. 6 जेव्हा त्यांनी तो मोठा
आवाज ऐकला, तेव्हा त्या ठिकाणी लोकांची मोठी गर्दी जमली आणि
ते गोंधळून गेले, कारण प्रत्येकाने स्वत:ची मातृभाषा बोलली जात
असलेली ऐकले. 7 विस्मित होऊन त्यांनी विचारले: “हे सर्व बोलत
आहेत ते गालीलकर आहेत ना? 8 तरीसुद्धा ते आमच्या मातृभाषांमध्ये
बोलताना आम्ही ऐकत आहोत हे कसे? 9 आम्ही येथे पार्थी, मेदिया
आणि एलामी लोक आहोत; मेसोपोटामिया रहिवासी, यहूदीया आणि
कप्पदुकिया, पंत आणि आशिया, 10 फ्रुगिया आणि पंफुल्या, इजिप्त
व कुरणेच्या जवळचा लिबिया; रोमहून आलेले पाहुणे 11 यहूदी व
धर्मांतर झालेले यहूदी; क्रेतीय व अरब लोक हे देखील आमच्यात
आहेत. तरी देखील परमेश्वराच्या अद्भुत कृत्यांबद्दल आमच्या भाषेमध्ये
बोलताना ऐकत आहोत!” 12 ते चकित झाले व गोंधळून एकमेकांना
विचारू लागले, “याचा अर्थ काय असेल?” 13 पण काहीजण थट्टा
करीत म्हणाले, “हे द्राक्षारसाचे अति सेवन करून मस्त झाले आहे.”
14 त्यावेळी पेत्र अकरा प्रेषितांसह उभा राहून, त्या जमावाला उद्देशून

मोठ्याने म्हणाला: “यरुशलेममधील यहूदी बंधूंनो आणि रहिवाशांनो,
तुम्हाला या गोष्टी स्पष्ट समजणे आवश्यक आहे; म्हणून माझे बोलणे
लक्षपूर्वक ऐका. 15 तुम्ही समजता त्याप्रमाणे ही माणसे द्राक्षारसाने
मस्त झालेली नाहीत. आता तर सकाळचे फक्त नऊ वाजले आहेत! 16
तर पाहा याविषयी संदेष्टा योएलने असे भविष्य केले होते: 17 “‘परमेश्वर
म्हणतात, शेवटच्या दिवसात, मी माझा आत्मा सर्व लोकांवर ओतेन.
तुमचे पुत्र व तुमच्या कन्या भविष्यवाणी करतील, व तुमचे वृद्ध स्वप्ने
पाहतील, तुमचे तरुण दृष्टान्त पाहतील. 18 माझ्या दासांवर म्हणजेच,
स्त्री आणि पुरुष दोघांवरही, त्या दिवसांत मी माझा आत्मा ओतेन.
आणि ते भविष्यवाणी करतील. 19 वर आकाशात व खाली पृथ्वीवर,
रक्त व अग्नी व धुरांचे स्तंभ अशी विलक्षण चिन्हे मी दाखवेन. 20 प्रभूचा
महान व गौरवी दिवस येण्यापूर्वी सूर्य अंधकारमय व चंद्र रक्तमय होईल.
21 आणि जो कोणी प्रभूच्या नावाने त्यांचा धावा करेल तोच वाचेल.’ 22
“अहो इस्राएली लोकहो! आता हे लक्ष देऊन ऐका: तुम्हाला चांगलेच
माहीत आहे की, परमेश्वराने नासरेथकर येशूंना अधिकृत मान्यता देऊन
त्यांच्याद्वारे तुमच्यामध्ये चमत्कार, अद्भुत गोष्टी व चिन्हे केली. 23
परमेश्वराच्या पूर्वनियोजित योजनेप्रमाणे व त्यांच्या पूर्वज्ञानानुसार या
मनुष्यास तुमच्या हातात सोपवून दिले आणि तुम्ही दुष्ट लोकांच्या
मदतीने, त्यांना क्रूसावर खिळे ठोकून जिवे मारले. 24 परंतु परमेश्वराने
त्यांची मृत्यूच्या वेदनांपासून सुटका केली व त्यांना मरणातून पुन्हा
उठविले, कारण मृत्यूला येशूंवर अधिकार चालविणे अशक्य होते. 25
दावीद राजा त्यांच्यासंबंधी म्हणतो: “‘मी माझ्या प्रभूला नित्य दृष्टीसमोर
ठेवले आहे. कारण ते माझ्या उजवीकडे आहेत, मी डळमळणार नाही.
26 यास्तव माझे अंतःकरण उल्हासित आहे आणि माझी जीभ स्तुतिगान
करीत आहे; माझे शरीर देखील आशेत विसावा घेईल, 27 कारण तुम्ही
मला अधोलोकात राहू देणार नाही, किंवा तुमच्या पवित्रजनाला कुजणे
पाहू देणार नाही. (Hadēs g86) 28 तुम्ही मला जीवनाचे मार्ग कळविले
आहेत; तुमच्या समक्षतेत तुम्ही मला हर्षाने भराल.’ 29 “प्रिय यहूदी
बंधूंनो, मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगू शकतो की, आपला पूर्वज दावीद
मरण पावला आणि त्याला पुरले व त्याची कबर आज देखील येथे आहे.
30 परंतु तो संदेष्टा होता व त्याला माहीत होते की परमेश्वराने त्याला
शपथ वाहून असे अभिवचन दिले होते, त्याच्या वंशजांपैकी एकाला ते
त्याच्या सिंहासनावर बसवतील. 31 पुढे होणाऱ्या गोष्टी पाहता, तो
ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाबद्दल बोलला, की त्यांना अधोलोकात राहू दिले
नाही किंवा त्यांच्या देहाला कुजणे पाहू दिले नाही. (Hadēs g86) 32
त्याच येशूंना परमेश्वराने मरणातून उठवून जिवंत केले आणि त्याचे
आम्ही सर्वजण साक्षीदार आहोत. 33 आता ते परमेश्वराच्या उजवीकडे
उच्च पदावर आहेत, अभिवचन दिल्याप्रमाणे त्यांनी तो पवित्र आत्मा
पित्याकडून घेऊन आम्हावर ओतला आहे, त्याचाच हा परिणाम जे तुम्ही
आता पाहात आणि ऐकत आहात. 34 कारण दावीद आकाशात चढून
गेला नाही, तरी तो म्हणाला, “‘प्रभू माझ्या प्रभूला म्हणाले: 35 “मी
तुझ्या शत्रूंना तुझ्या पायाखाली ठेवीपर्यंत माझ्या उजव्या हाताला बसून
राहा.”’ 36 “यास्तव इस्राएलातील सर्वजणांनी खात्री करून घ्यावी: ज्या
येशूंना तुम्ही क्रूसावर दिले होते, त्यांना परमेश्वराने प्रभू आणि ख्रिस्त
केले आहे.” 37 हे त्याचे बोलणे लोकांच्या अंतःकरणाला भेदले आणि
ते पेत्राला व इतर प्रेषितांना म्हणाले, “बंधुजनहो, आता आम्ही काय
करावे?” 38 पेत्राने उत्तर दिले, “पश्चात्ताप करा आणि तुमच्या पापांच्या
क्षमेसाठी येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्यावा आणि तुम्हाला पवित्र
आत्म्याचे दान प्राप्त होईल. 39 हे वचन तुमच्यासाठी आणि तुमच्या
मुलाबाळांसाठी आणि सर्वांसाठी जे फार दूर आहेत आणि ज्यांना प्रभू
आमचे परमेश्वर बोलावतील त्यांच्यासाठी आहे.” 40 आणखी त्याने
पुष्कळ शब्दांनी त्यांना इशारा दिला आणि विनवणी करून म्हटले, “या
भ्रष्ट पिढीपासून तुम्ही स्वतःला वाचवा.” 41 ज्यांनी हा त्यांचा संदेश
ग्रहण केला त्यांचा बाप्तिस्मा झाला आणि त्या दिवशी सुमारे तीन हजार
लोकांची त्यांच्या संख्येत भर पडली. 42 प्रेषितांद्वारे दिले जात असलेले
शिक्षण आणि सहभागिता, भाकर मोडणे आणि प्रार्थना यासाठी ते
स्वतः समर्पित झाले. 43 प्रेषितांद्वारे झालेली अनेक अद्भुते व चिन्हे पाहून
सर्वांच्या मनामध्ये भीतियुक्त आदर निर्माण झाला होता. 44 तेव्हा सर्व
विश्वासणारे एकत्र होते आणि त्यांच्याजवळ असलेले सर्वकाही समाईक
होते. 45 जे कोणी गरजवंत होते, त्यांना देण्यासाठी त्यांनी त्यांच्या
जमिनी आणि मालमत्ता विकल्या. 46 दररोज मंदिराच्या अंगणात ते
एकत्र जमत होते आणि त्यांच्या घरांमध्ये भाकर मोडीत असत आणि
मोठ्या आनंदाने व कृतज्ञ मनाने एकत्र खात होते, 47 परमेश्वराची स्तुती
करीत होते आणि सर्व लोकांकडून त्यांना चांगली वागणूक मिळाल्याचा
आनंद ते करीत होते आणि प्रभूने त्यांच्या संख्येत प्रत्येक दिवशी तारण
पावलेल्यांची भर घातली.

3 एके दिवशी दुपारी तीन वाजता, प्रार्थनेची वेळ असल्यामुळे पेत्र
आणि योहान मंदिरात जात होते. 2 त्यावेळी जन्मापासून लंगडा
असलेल्या एका मनुष्याला सुंदर नावे मंदिराच्या दरवाजाजवळ आणले
जात होते, जिथे त्याला दररोज मंदिराच्या अंगणात जात असणाऱ्यांकडे
भीक मागण्यासाठी ठेवले जात होते. 3 जेव्हा त्याने पेत्र आणि योहानला
तिथे प्रवेश करताना पाहिले, त्याने त्यांच्याकडे भीक मागितली. 4
तेव्हा पेत्राने व योहानाने त्याच्याकडे निरखून पाहिले आणि पेत्र त्याला
म्हणाला, “आमच्याकडे पाहा!” 5 त्यांच्याकडून काही मिळेल या
अपेक्षेने त्या मनुष्याने त्यांच्याकडे पाहिले. 6 परंतु पेत्र त्याला म्हणाला,
“माझ्याजवळ चांदी किंवा सोने नाही, परंतु जे आहे ते तुला देतो.
नासरेथकर येशू ख्रिस्ताच्या नावाने चालू लाग.” 7 मग त्याने त्या
मनुष्याचा उजवा हात धरून त्याला उभे राहण्यास मदत केली आणि
त्याच क्षणी त्याच्या पायात व घोट्यात बळ प्राप्त झाले. 8 तो उडी
मारून पायावर उभा राहिला व चालू लागला. मग चालत, उड्या मारीत
आणि परमेश्वराची स्तुती करीत तो त्यांच्याबरोबर मंदिराच्या अंगणात
गेला. 9 सर्व लोकांनी त्याला चालताना आणि परमेश्वराची स्तुती
करताना पाहिले, 10 आणि जो मंदिराच्या सुंदर नावे दरवाजाजवळ
भीक मागण्यासाठी बसत असे, तो हाच आहे अशी त्यांची ओळख

पटली. त्याच्या बाबतीत जे काही घडले होते, त्यामुळे ते आश्चर्यचकित
झाले. 11 मग तो पेत्र व योहान यांना बिलगून राहिला असता, सर्व लोक
फार आश्चर्यचकित होऊन शलोमोनाच्या देवडीकडे धावत आले. 12 हे
पाहून पेत्र त्या जमावाला म्हणाला: “अहो इस्राएली लोकांनो, याबद्दल
आश्चर्य वाटण्याचे काही कारण आहे का? आमच्याच शक्तीने किंवा
सुभक्तीने या मनुष्याला चालावयास लावले आहे, अशा अर्थाने तुम्ही
आम्हाकडे का पाहत आहात? 13 अब्राहाम, इसहाक आणि याकोबाचे
परमेश्वर, जे आपल्या पूर्वजांचे परमेश्वर आहेत, त्यांनी त्यांचा सेवक
येशूंना गौरविले आहे. त्याच येशूंना मारून टाकले जावे यासाठी तुम्ही
त्यांना धरून दिले आणि पिलातासमोर तुम्ही त्यांना नाकारले. जरी
पिलाताने त्यांना सोडून देण्याचा निश्चय केला होता, 14 तरी तुम्ही
पवित्र व नीतिमानाशी संबंध ठेवण्यास नकार दिला व त्याऐवजी एका
खुनी माणसाच्या मुक्ततेची मागणी केली. 15 तुम्ही प्रत्यक्ष जीवनाच्या
निर्माणकर्त्यालाच जिवे मारले, परंतु परमेश्वराने त्यांना मरणातून पुन्हा
उठविले, याचे आम्ही साक्षी आहोत. 16 येशूंच्या नावावरील विश्वासामुळे
हा मनुष्य ज्याला आपण पाहता व ओळखता तो आता बलवान झाला
आहे. येशूंच्या नावावरील विश्वासाद्वारे तो पूर्ण बरा झालेला आहे, हे तुम्ही
सर्वजण पाहतच आहात. 17 “आता, इस्राएली बंधूंनो, मला माहीत
आहे की तुम्ही जे केले, ते अज्ञानाने केले आणि तुमच्या पुढाऱ्यांनीही
तेच केले. 18 परंतु ख्रिस्ताने दुःख सहन करावे म्हणून परमेश्वराने सर्व
संदेष्ट्यांच्या मुखाद्वारे जे भाकीत केले होते, ते पूर्ण केले. 19 यास्तव
पश्चात्ताप करा आणि परमेश्वराकडे वळा, म्हणजे तुमची पापे पुसून
टाकली जावी व दिवसेंदिवस प्रभूकडून तुम्हाला नवीन शक्ती प्राप्त
व्हावी, 20 आणि त्यांनी तुमच्यासाठी ख्रिस्त म्हणून ज्यांची नेमणूक
झाली आहे, त्या येशूंना पाठवावे. 21 तरी ज्याविषयी फार पूर्वीपासून
परमेश्वराने आपल्या पवित्र संदेष्ट्यांच्याद्वारे सांगितले होते की सर्व
गोष्टींची पुनर्स्थापना होईपर्यंत, त्यांना स्वर्गामध्ये राहणे अगत्याचे आहे.
(aiōn g165) 22 कारण मोशे म्हणाला, ‘प्रभू तुमचे परमेश्वर, तुमच्या
लोकांतून तुमच्यासाठी माझ्यासारखा एक संदेष्टा उभा करतील; तो
सांगेल ते सर्वकाही तुम्ही ऐका. 23 जो कोणी संदेष्ट्याचे ऐकणार नाही,
त्याचा त्यांच्या लोकांतून समूळ नाश करण्यात येईल.’ 24 “खरोखरच,
शमुवेल संदेष्ट्याने आणि त्याच्यानंतर आलेल्या प्रत्येक संदेष्ट्याने
आजच्या या दिवसाबद्दल भविष्य सांगितलेले आहे. 25 तुम्ही संदेष्ट्यांचे
वारसदार आहात आणि परमेश्वराने तुमच्या पूर्वजांशी केलेल्या कराराचे
भागीदार आहात. ते अब्राहामाला म्हणाले, ‘तुझ्या संततीद्वारे पृथ्वीवरील
सर्व लोक आशीर्वादित होतील.’ 26 परमेश्वराने आपल्या सेवकाला
उठविले, तेव्हा प्रथम तुमच्याकडे पाठविले, यासाठी की तुम्हा प्रत्येकाने
तुमच्या दुष्ट मार्गापासून मागे वळून आशीर्वादित व्हावे.”

**4** पेत्र व योहान लोकांशी बोलत असताना याजकगण, मंदिराच्या
रक्षकांचा प्रमुख आणि काही सदूकी लोक त्यांच्याकडे आले. 2 ते
अत्यंत अस्वस्थ झाले, कारण प्रेषित शिक्षण देत होते व येशूंच्याद्वारे
मृतांचे पुनरुत्थान होईल असे लोकांना जाहीरपणे सांगत होते. 3 त्यांनी
पेत्र व योहानाला अटक केली आणि संध्याकाळ झाल्यामुळे त्यांना
दुसऱ्या दिवशीही कैदेतच ठेवले. 4 त्यांच्यातील अनेकांनी संदेश ऐकला
आणि विश्वास ठेवला; म्हणून विश्वास ठेवणाऱ्या पुरुषांची संख्या सुमारे
पाच हजारापर्यंत गेली. 5 नंतर दुसऱ्या दिवशी असे झाले की शासक,
वडीलजन आणि नियमशास्त्र शिक्षक यरुशलेममध्ये एकत्रित भेटले. 6
महायाजक हन्ना तिथे होता, तसेच कयफा, योहान, आलेक्सांद्र आणि
महायाजकांच्या कुटुंबातील इतर सर्वजण तिथे हजर होते. 7 त्यांनी पेत्र
व योहान यांना आपल्यासमोर बोलाविले व त्यांना प्रश्न विचारण्यास
सुरुवात केली: “तुम्ही कोणत्या अधिकाराने किंवा कोणाच्या नावाने
हे केले आहे?” 8 नंतर पेत्र पवित्र आत्म्याने परिपूर्ण होऊन त्यांना
म्हणाला: “अधिकारी आणि वडीलजनांनो! 9 या लंगड्या मनुष्याच्या
बाबतीत दयाळूपणाचे जे कृत्य करण्यात आले व तो कसा बरा झाला
याची जर आपण चौकशी करीत असाल, 10 तर मला तुम्हाला आणि सर्व
इस्राएली लोकांना सांगू द्या की, ज्या येशूंना तुम्ही क्रूसावर चढवून ठार
मारले, परंतु परमेश्वराने त्यांना मरणातून पुन: उठविले, त्याच नासरेथकर
येशू ख्रिस्ताच्या नावाने, हा मनुष्य येथे पूर्ण बरा होऊन तुमच्यासमोर उभा
आहे.” 11 धर्मशास्त्रात याच येशूंबद्दल असे लिहिले आहे, “‘जो दगड
बांधणाऱ्यांनी नाकारला, तोच इमारतीचा कोनशिला झाला आहे.’ 12
तारण दुसऱ्या कोणामध्येही सापडणार नाही, कारण ज्या नावाने आपले
तारण होईल, असे दुसरे कोणतेही नाव आकाशाखाली मानवजातीमध्ये
दिलेले नाही.” 13 त्यांनी पेत्र व योहान यांचे धैर्य पाहिले तेव्हा त्याचे
त्यांना नवल वाटले आणि त्यांना कळून आले की ती अशिक्षित व
सर्वसामान्य माणसे असून ते येशूंच्या सहवासात राहत होते. 14
आणि त्या बरे झालेल्या मनुष्याला त्यांच्याजवळ उभे असलेले पाहून,
त्यांच्याने काही बोलवेना. 15 त्यावेळी त्यांनी त्यांना न्यायसभेच्या
बाहेर जाण्यास सांगितले आणि एकत्र चर्चा केली. 16 “आपण या
मनुष्यांचे काय करावे?” ते म्हणाले, “यरुशलेमकरांना माहीत आहे की
त्यांनी हा असाधारण चमत्कार करून दाखविला आहे आणि आम्ही हे
नाकारू शकत नाही. 17 तरी या गोष्टी लोकांमध्ये अधिक पसरू नये
म्हणून आपण त्यांना अशी धमकी द्यावी की यापुढे त्यांनी या नावाने
कोणाबरोबर काहीही बोलू नये.” 18 तेव्हा त्यांनी त्यांना परत आत
बोलाविले आणि येशूंच्या नावाने पुन्हा बोलू नये किंवा शिक्षण देऊ नये,
अशी ताकीद दिली. 19 परंतु पेत्र व योहानाने उत्तर दिले, “परमेश्वराच्या
दृष्टीने काय योग्य आहे: तुमचे ऐकावे की त्यांचे? याचा न्याय तुम्हीच
करा! 20 ज्यागोष्टी आम्ही पाहिल्या आणि ऐकल्या आहेत, त्याबद्दल
सांगण्याचे आम्ही थांबविणार नाही.” 21 अशी धमकी दिल्यानंतर,
त्यांनी त्यांना जाऊ दिले. त्यांना कशी शिक्षा करावी, याचा निर्णय ते
घेऊ शकले नाही, कारण घडलेल्या गोष्टीमुळे सर्व लोक परमेश्वराचे
गौरव करीत होते, 22 जो मनुष्य आश्चर्यकारक रीतीने बरा झाला होता,
त्याचे वय चाळीस वर्षांहून अधिक होते. 23 पेत्र व योहानाची सुटका
झाल्याबरोबर, ते दुसऱ्या शिष्यांकडे गेले आणि मुख्य याजकगण आणि
वडीलजन जे काही म्हणाले, ते सर्व त्यांना सांगितले. 24 त्यांचे हे विवरण

ऐकून सर्व विश्वासणाऱ्यांनी मोठ्या स्वराने मिळून परमेश्वराकडे प्रार्थना
केली: “सार्वभौम प्रभू, तुम्ही आकाश, पृथ्वी, सागर व त्यातील सर्वकाही
निर्माण केले आहे. 25 पवित्र आत्म्याद्वारे तुम्ही, तुमचा सेवक आणि
आमचा पिता दावीदाच्या मुखातून बोलला आहात: “‘राष्ट्रे कट का रचत
आहेत आणि लोक व्यर्थच कुटिल योजना का करीत आहेत? 26 प्रभू
आणि त्यांच्या अभिषिक्ताविरुद्ध पृथ्वीवरील राजे आणि अधिकारी एकत्र
येऊन उठाव करीत आहेत.’ 27 खरोखर हेरोद राजा आणि राज्यपाल
पंतय पिलात आणि सर्व गैरयहूदी आणि त्याचप्रमाणे या शहरात राहणारे
इस्राएली लोक तुमचे पवित्र सेवक येशू, ज्यांचा तुम्ही अभिषेक केला
आहे, त्यांच्याविरुद्ध कट कारस्थान करण्यास एकत्र आले. 28 तुमच्या
शक्तीने आणि इच्छेने जे घडावे असे तुम्ही योजले होते तेच त्यांनी केले.
29 तर आता, हे प्रभू, त्यांच्या धमक्यांकडे लक्ष द्या आणि मोठ्या धैर्याने
तुमचे वचन सांगण्यासाठी तुमच्या सेवकांना सामर्थ्य द्या. 30 तुमचे
पवित्र सेवक येशूंच्या नावामध्ये आजार बरे होण्यासाठी चिन्हे आणि
आश्चर्यकारक गोष्टी करून दाखविण्यासाठी तुम्ही आपला हात लांब
करा.” 31 या प्रार्थनेनंतर ज्या ठिकाणी ते जमले होते, ती हादरली आणि
ते सर्वजण पवित्र आत्म्याने परिपूर्ण होऊन धैर्याने परमेश्वराचे वचन सांगू
लागले. 32 त्यावेळी सर्व विश्वासणारे एक हृदयाचे आणि एकमनाचे
होते. त्यांच्यापैकी कोणीही त्यांची संपत्ती स्वत:ची आहे असे हक्काने
सांगत नव्हते, परंतु त्यांच्याकडे असलेले सर्वकाही त्यांनी समाईक
मानले होते. 33 प्रभू येशूंच्या पुनरुत्थानाविषयी प्रेषित मोठ्या शक्तीने
सतत साक्ष देत राहिले आणि त्या सर्वांवर परमेश्वराची विपुल कृपा
शक्तीने कार्य करीत होती. 34 त्यांच्यामध्ये गरजवंत असा कोणीही
राहिला नव्हता. कारण घर व जमिनीचे जे मालक होते, ते त्यांची घरे व
जमिनी विकून आलेले पैसे 35 प्रेषितांच्या चरणी आणून ठेवीत होते
आणि जे कोणी गरजवंत होते, त्यांना वाटून देत. 36 योसेफ लेवी असून
सायप्रसवासी होता ज्याला प्रेषितांनी बर्णबा म्हणजे, “उत्तेजनाचा पुत्र”
असे नाव दिले होते, 37 त्याने त्याच्या मालकीची शेतजमीन विकून
मिळालेली रक्कम प्रेषितांच्या चरणी आणून ठेवली.

**5** आता हनन्याह नावाचा मनुष्य आणि त्याची पत्नी सप्पीरा या दोघांनी
मिळून आपल्या संपत्तीचा एक भाग विकला. 2 मिळालेल्या पैशातून
काही पैसे त्याने त्याच्या पत्नीच्या पूर्ण संमतीने स्वत:साठी ठेवले व
बाकीचे पैसे आणून प्रेषितांच्या चरणी ठेवले. 3 परंतु पेत्र म्हणाला,
“हनन्याह, सैतानाने तुझे हृदय एवढे कसे भरले की तू पवित्र आत्म्याशी
लबाडी केलीस व मालमत्ता विकून आलेल्या पैशातून काही पैसे तुझ्या
स्वत:साठी ठेवून घेतलेस? 4 संपत्ती विकण्यापूर्वी ती तुझ्या मालकीची
नव्हती का आणि ती विकल्यानंतर, त्या पैशाचा वापर कसा करावा हे
देखील तुझ्या अधिकारात नव्हते का? तर मग असे करण्याचे तुझ्या
मनात कसे आले? तू केवळ मनुष्याबरोबर नाही तर परमेश्वराबरोबर
लबाडी केली आहेस.” 5 हे शब्द ऐकताच हनन्याह खाली कोसळला
आणि मरण पावला. घडलेल्या गोष्टी ऐकून सर्वजण भयभीत झाले. 6
नंतर काही तरुण पुरुष पुढे आले आणि त्यांनी त्याचा मृतदेह गुंडाळला
व बाहेर नेऊन पुरून टाकला. 7 सुमारे तीन तासानंतर त्याची पत्नी
आत आली, काय घडले होते याची तिला कल्पना नव्हती. 8 पेत्राने
तिला विचारले, मला सांग “तुला व हनन्याला जमिनीची इतकीच किंमत
मिळाली काय?” तिने उत्तर दिले, “होय, तितकीच किंमत.” 9 मग पेत्र
तिला म्हणाला, “प्रभूच्या आत्म्याची परीक्षा पाहण्यासाठी तुम्ही कट का
केला? ऐक, ज्या पुरुषांनी तुझ्या पतीला नुकतेच पुरले आहे त्यांचे
पाय दारातच आहेत आणि ते तुलादेखील उचलून बाहेर नेतील.” 10
त्याच क्षणी ती त्याच्या पायावर कोसळली आणि मरण पावली आणि
ते तरुण आत आले व तिचा मृत्यू झाल्याचे पाहून तिला बाहेर नेऊन
तिच्या नवऱ्याजवळ पुरले. 11 सर्व मंडळी आणि ज्या सर्वांनी हे ऐकले
ते सारे भयभीत झाले. 12 प्रेषित लोकांमध्ये अनेक चिन्हे व अद्भुत
कृत्ये करीत होते आणि सर्व विश्वासणारे एकत्रितपणे शलोमोनाच्या
देवडीत जमत असत, 13 त्यांच्याबद्दल लोकांच्या मनात अत्यंत सन्मान
होता, परंतु त्यांच्यात सामील होण्याचे धैर्य कोणाला झाले नाही. 14
तरी देखील अधिकाधिक पुरुषांनी व स्त्रियांनी प्रभूवर विश्वास ठेवला
आणि त्यांच्या संख्येत वाढ झाली. 15 याचा परिणाम असा झाला
की, पेत्र जवळून जात असताना निदान त्याची छाया तरी त्यांच्यातील
काही जणांवर पडावी म्हणून आजारी लोकांना बाहेर रस्त्यावर आणून
खाटांवर आणि अंथरुणावर ठेवीत असत. 16 यरुशलेमच्या आसपासच्या
गावातून लोकसमुदाय येताना त्यांच्याबरोबर आजारी व अशुद्ध आत्म्यांनी
पीडलेल्यांना आणत होते आणि ते सर्वजण बरे होऊन जात. 17 नंतर
महायाजक आणि त्यांचे सहकारी जे सर्व सदूकी पंथाचे सभासद होते,
ते मत्सराने भरून गेले. 18 त्यांनी प्रेषितांना अटक करून सार्वजनिक
तुरुंगात डांबले. 19 परंतु रात्रीच्या समयी प्रभूच्या देवदूताने तुरुंगाचे
दरवाजे उघडून त्यांना बाहेर काढले. 20 तो म्हणाला, “मंदिराच्या
आवारात जा आणि या नवजीवनाबद्दल लोकांना सांगा.” 21 ते पहाटेच
मंदिराच्या आवारात गेले आणि त्यांना सांगितल्याप्रमाणे लगेच त्यांनी
शिक्षण देण्यास सुरुवात केली. जेव्हा महायाजक व त्यांचे सहकारी
आले, तेव्हा त्यांनी न्यायसभा व यहूदी वडीलमंडळीला एकत्र बोलाविले
आणि प्रेषितांना तुरुंगातून चौकशीसाठी घेऊन यावे अशी आज्ञा केली.
22 तुरुंगामध्ये गेल्यानंतर, अधिकाऱ्यांना तिथे प्रेषित आढळले नाहीत
म्हणून ते परतले आणि त्यांना सांगितले की, 23 “तुरुंगाचे दरवाजे
व्यवस्थित बंद केलेले होते आणि पहारेकरी दाराबाहेर उभे होते. परंतु
आम्ही दरवाजे उघडले, तेव्हा आम्हाला कोणीही आढळले नाही.” 24
मंदिराच्या सुरक्षा अधिकाऱ्याने व मुख्य याजकांनी हे ऐकले, तेव्हा
पुढे काय घडेल याबद्दल ते घोटाळयात पडले. 25 इतक्यात कोणीतरी
येऊन सांगितले, “पाहा! ज्यांना तुम्ही तुरुंगात ठेवले होते ती माणसे
मंदिराच्या आवारात उभे राहून लोकांना शिक्षण देत आहेत.” 26 तेव्हा
सुरक्षा अधिकारी आपल्याबरोबर काही शिपाई घेऊन गेला आणि
त्याने प्रेषितांना जुलूम न करता आणले, कारण लोक आपल्याला
धोंडमार करतील, अशी त्यांना भीती वाटत होती. 27 प्रेषितांना घेऊन
आल्यानंतर, महायाजकाने त्यांना प्रश्न विचारावे म्हणून न्यायसभेपुढे

आणून उभे केले. 28 ते म्हणाले, “या नावाने शिकवू नका, असे आम्ही
तुम्हाला कडक शब्दात सांगितले होते तरी पाहा, तुम्ही तुमच्या शिक्षणाने
सारे यरुशलेम भरून टाकले आहे आणि या मनुष्याच्या रक्ताचा दोष
आम्हावर लावण्याचा निश्चय केला आहे.” 29 परंतु पेत्र व इतर प्रेषितांनी
उत्तर दिले, “आम्ही मनुष्यापेक्षा परमेश्वराची आज्ञा पाळलीच पाहिजे. 30
तुम्ही येशूंना क्रूसावर टांगून मारल्यानंतर आमच्या पूर्वजांच्या परमेश्वराने
येशूंना मरणातून पुन्हा जिवंत केले. 31 आता परमेश्वराने त्यांना उच्च
केले व राजपुत्र आणि तारणारा म्हणून स्वत:च्या उजवीकडे बसविले
आहे, ते यासाठी की इस्राएली लोकांना पश्चात्ताप व पापक्षमेचा लाभ
व्हावा. 32 या गोष्टींचे आम्ही साक्षी आहोत आणि पवित्र आत्मा,
ज्याला परमेश्वराने जे त्यांची आज्ञा पाळतात त्यांना दिला आहे तोही
साक्षी आहे.” 33 हे ऐकल्यावर ते अतिशय संतापले व त्यांना मारून
टाकण्याचे त्यांनी ठरविले. 34 परंतु गमालियेल नावाचा एक परूशी,
जो शास्त्राध्यापक व सर्व लोकांमध्ये सन्मान्य मानलेला, न्यायसभेपुढे
उभा राहिला आणि त्याने या माणसांना थोडा वेळ बाहेर न्यावे, अशी
आज्ञा केली. 35 मग तो न्यायसभेला उद्देशून म्हणाला, “अहो इस्राएली
लोकहो, या मनुष्यांच्या बाबतीत काही करण्याच्या तुमच्या उद्देशाचा
काळजीपूर्वक विचार करा. 36 काही काळापूर्वी थुदास नावाचा मनुष्य
पुढे येऊन मी कोणीतरी आहे असे म्हणू लागला, त्याला सुमारे चारशे
अनुयायी मिळाले. त्याचा वध करण्यात येऊन सर्व अनुयायांची पांगापांग
झाली व सर्वकाही नष्ट झाले. 37 त्याच्यानंतर शिरगणतीच्या वेळी,
गालीलकर यहूदाह पुढे आला आणि त्याने एका टोळीस बंडास प्रवृत्त
केले. परंतु तो सुद्धा मारला गेला आणि त्याच्या अनुयायांचीही पांगापांग
झाली. 38 म्हणून मी तुम्हाला या सद्य परिस्थितीत असा सल्ला देत आहे
की या माणसांना सोडून द्या. त्यांना जाऊ द्या, कारण हा बेत किंवा कार्य
मनुष्यांचे असेल, तर ते नष्ट होईल. 39 परंतु जर हे परमेश्वराचे असेल, तर
तुम्ही या माणसांना थांबविण्यास समर्थ होणार नाही आणि तुम्ही केवळ
परमेश्वराविरुद्ध लढत आहात, असे तुम्हाला आढळून येईल.” 40 त्याच्या
भाषणामुळे त्यांचे मन वळाले; त्यांनी प्रेषितांना आत बोलावून फटके
मारविले आणि येशूंच्या नावाने पुन्हा कधीही बोलू नका, अशी ताकीद
देऊन त्यांना सोडून दिले. 41 प्रेषित तर न्यायसभेतून आनंद करीत
बाहेर पडले. कारण येशूंच्या नावाकरिता अप्रतिष्ठा सहन करण्यासाठी ते
पात्र ठरविले गेले होते. 42 आणि प्रत्येक दिवशी मंदिराच्या आवारात व
घरोघरी जाऊन “येशू हेच ख्रिस्त आहेत” याबद्दलचे शिक्षण देण्याचे व
शुभवार्तेची घोषणा करण्याचे त्यांनी थांबविले नाही.

**6** त्या दिवसांमध्ये शिष्यांची संख्या वाढत असताना, त्यांच्यापैकी
काही ग्रीक भाषिक यहूदी लोकांनी इब्री भाषिक यहूदी लोकांविरुद्ध
तक्रार केली की दररोजच्या भोजनाचे वाटप होत असताना त्यांच्या
विधवांकडे दुर्लक्ष होत आहे. 2 तेव्हा बारा प्रेषितांनी सर्व शिष्यांना
एकत्रित बोलावून सांगितले, “आम्हास हे योग्य वाटत नाही की आम्ही
परमेश्वराच्या वचनाच्या सेवेकडे दुर्लक्ष करून अन्न वाटपाची सेवा करावी.
3 तर बंधूंनो आणि भगिनींनो, तुमच्यामधून जे आत्म्याने परिपूर्ण आणि
सुज्ञ आहेत अशा सात माणसांची निवड करा म्हणजे आम्ही त्यांच्यावर
ही जबाबदारी सोपवून देऊ. 4 आणि मग प्रार्थनेकडे व वचनाची सेवा
करण्याकडे आम्हाला आमचे लक्ष लावता येईल.” 5 गटातील सर्वांस हा
प्रस्ताव योग्य वाटला. त्यांनी स्तेफनाची निवड केली, जो विश्वासाने
आणि पवित्र आत्म्याने परिपूर्ण होता; फिलिप्प, प्रखर, नीकानुर, तीमोन,
पर्मिना व नीकलाव हा अंत्युखियाचा असून यहूदी मतानुसार त्याचे
परिवर्तन झालेले होते 6 या पुरुषांना प्रेषितांपुढे सादर करण्यात आले.
त्यांनी त्यांच्यासाठी प्रार्थना करून त्यांच्यावर आपले हात ठेवले. 7 मग
परमेश्वराच्या वचनाचा प्रसार झाला. यरुशलेममध्ये शिष्यांची संख्या
मोठ्या वेगाने वाढली आणि अनेक याजकांनी देखील मोठ्या संख्येने
विश्वासाचे आज्ञापालन केले. 8 आता स्तेफन परमेश्वराच्या कृपेने आणि
सामर्थ्याने परिपूर्ण असा मनुष्य होता आणि त्याने लोकांमध्ये मोठी
आश्चर्यकृत्ये व चिन्हे केली होती. 9 परंतु लिबेर्तिन (असे ज्यास म्हणत
होते त्या) सभागृहातील काही सभासद, कुरेनेकर, आलेक्सांद्रेयकर
आणि किलिकिया व आशिया प्रदेशातील यहूदी लोक स्तेफनाबरोबर
वादविवाद करू लागले. 10 परंतु स्तेफन जे आत्म्याच्या ज्ञानाद्वारे बोलला
त्याला विरोध करण्यास ते समर्थ ठरले नाहीत. 11 मग त्यांनी गुप्तपणे
काही माणसांना फूस लावली व बोलण्यास भाग पाडले, “स्तेफनाला
मोशे आणि परमेश्वर यांची निंदा करताना आम्ही ऐकले आहे.” 12 अशा
रीतीने त्यांनी लोकांना व तसेच वडिलांना आणि नियमशास्त्र शिक्षकांना
चिथविले. त्यांनी स्तेफनाला जबरदस्तीने धरले व न्यायसभेपुढे आणले.
13 त्यांनी खोट्या साक्षीदारांना प्रस्तुत केले व त्यांनी अशी साक्ष दिली,
“तो सतत पवित्र ठिकाणाविरुद्ध व नियमांविरुद्ध बोलतो. 14 ते आणखी
म्हणाले, आम्ही याला असे म्हणताना ऐकले आहे की नासरेथकर
येशू हे ठिकाण उद्ध्वस्त करतील आणि मोशेने आपल्याला लावून
दिलेले नियमशास्त्र बदलून टाकतील.” 15 आणि न्यायसभेत बसलेले
सर्वजण त्याच्याकडे एकाग्रतेने पाहत असताना त्यांना स्तेफनाचा चेहरा
देवदूताच्या चेहऱ्यासारखा दिसला.

**7** तेव्हा महायाजकाने स्तेफनाला विचारले, “हे आरोप खरे आहेत
काय?” 2 स्तेफनाने त्यावर असे उत्तर दिले: “बंधुजनहो व वडिलांनो,
माझे ऐका! आपला पिता अब्राहाम हारानात जाऊन राहण्यापूर्वी
मेसोपोटामिया देशात असताना गौरवशाली परमेश्वर त्याला प्रकट झाले.
3 परमेश्वर त्याला म्हणाले, ‘तू आपला देश व आपले लोक सोड आणि
मी दाखवेन त्या देशात जा.’ 4 “तेव्हा त्याने खाल्डियनांचा देश सोडला
आणि तो हारान येथे राहिला. त्याच्या पित्याच्या मृत्यूनंतर, परमेश्वराने
त्याला तुम्ही सध्या राहत आहात त्या भूमीत पाठविले. 5 परमेश्वराने
त्याला येथेही वतन दिले नाही, पाऊल पडेल एवढी जमीनदेखील दिली
नाही. परंतु त्यावेळी अब्राहामाला मूलबाळ नव्हते, तरी परमेश्वराने
त्याला असे अभिवचन दिले की, हा देश त्याला आणि त्याच्या नंतरच्या
संततीला वतन म्हणून दिला जाईल. 6 परमेश्वर त्याच्याशी अशा रीतीने
बोलले: ‘तुझे वंशज, जो देश त्यांचा स्वत:चा नाही अशा देशात परके
गुलाम म्हणून राहतील व त्यांना चारशे वर्षे बंदिस्त करून अन्यायाने

वागविले जाईल. 7 परंतु ज्या राष्ट्रात त्यांनी गुलाम म्हणून सेवा केली
त्याला मी शिक्षा करेन,' असे परमेश्वराने म्हटले, 'आणि शेवटी त्या
देशातून ते बाहेर येतील आणि या ठिकाणी माझी उपासना करतील.'
8 नंतर परमेश्वराने अब्राहामाला, सुंतेचा करार दिला आणि अब्राहाम
इसहाकाचा पिता झाला आणि तो आठ दिवसांचा असतानाच त्याची
सुंता झाली. पुढे इसहाक हा याकोबाचा पिता झाला आणि याकोब हा
बारा पूर्वजांचा पिता झाला. 9 "कारण पूर्वज योसेफाचा मत्सर करीत
होते, म्हणून त्यांनी त्याला इजिप्तमध्ये गुलाम म्हणून विकले. परंतु
परमेश्वर त्याच्याबरोबर होते, 10 आणि त्यांनी योसेफाला त्याच्या सर्व
संकटातून सोडविले. परमेश्वराने योसेफाला ज्ञान दिले आणि इजिप्तचा
राजा फारोहची त्याच्यावर कृपादृष्टी होईल असे केले. म्हणून फारोहने
त्याची इजिप्तवर शासक आणि त्याच्या राजवाड्यातील सर्व कार्यभार
पाहण्यासाठी नेमणूक केली. 11 "तेव्हा इजिप्त आणि कनान देशामध्ये
दुष्काळ पडला आणि सर्वठिकाणी हाहाकार माजला, तेव्हा आपल्या
पूर्वजांना अन्न मिळेना. 12 जेव्हा याकोबाने ऐकले की इजिप्त देशामध्ये
धान्य आहे, तेव्हा त्याने आपल्या पूर्वजांना प्रथम भेटीसाठी त्या देशात
पाठविले. 13 त्यांच्या दुसऱ्या भेटीच्या वेळी योसेफाने आपण कोण
आहोत याची ओळख आपल्या भावांना करून दिली व योसेफाच्या
घराण्याविषयी फारोह राजाला सर्वकाही कळले. 14 यानंतर, योसेफाने
त्याचा पिता याकोबाला आणि त्याच्या सर्व कुटुंबीयांनी बोलावून
घेतले. ते सर्वजण मिळून पंचाहत्तर लोक होते. 15 नंतर याकोब खाली
इजिप्तमध्ये आला आणि तिथेच तो आणि आपले पूर्वज मरण पावले. 16
त्यांचे मृतदेह शेखेमात आणण्यात आले व अब्राहामाने हमोराच्या पुत्रांना
पैसे देऊन विकत घेतलेल्या कबरेत पुरण्यात आले. 17 "अब्राहामाला
दिलेले परमेश्वराचे वचन पूर्ण करण्याचा काळ जवळ आला, त्यावेळेस
इजिप्तमध्ये आपल्या लोकांची संख्या खूपच झपाट्याने वाढलेली होती.
18 नंतर 'एक नवीन राजा इजिप्तच्या गादीवर आला. त्याच्या दृष्टीने
योसेफ कोणीही नव्हता.' 19 हा राजा आपल्या लोकांशी दगाबाजीने व
निष्ठुरपणाने वागला व त्याने त्यांची नवजात बालके जगू नयेत, म्हणून
त्यांना बाहेर फेकण्यास भाग पाडले. 20 "याच सुमारास मोशेचा जन्म
झाला आणि तो असाधारण बालक होता. तीन महिने त्याच्या घरातील
लोकांनी त्याची काळजी घेतली, 21 त्याला बाहेर ठेवले असताना,
फारोहच्या कन्येने त्याला घेतले आणि स्वतःचा पुत्र म्हणून त्याचे
पालनपोषण करून त्याला वाढवले. 22 मोशेला इजिप्तमधील सर्व
विद्यांचे शिक्षण मिळाले व तो एक प्रभावी वक्ता आणि कृतीतही प्रभावी
झाला. 23 "जेव्हा मोशे चाळीस वर्षांचा झाला, त्यावेळी त्याने आपल्या
इस्राएली बांधवांना भेटण्याचे मनात ठरविले. 24 तिथे त्याने पाहिले
की, एका इस्राएली मनुष्यास इजिप्तचा मनुष्य अन्यायाने वागवित
आहे, म्हणून मोशेने त्याचे रक्षण करण्यास त्या इजिप्तच्या माणसाची
हत्या करून त्याचा सूड घेतला. 25 मोशेला वाटले की त्याच्या बांधवांस
समजेल की परमेश्वर त्यांची सुटका करण्यासाठी त्याचा उपयोग करून
घेत आहे, परंतु ते त्यांना समजले नाही. 26 दुसऱ्या दिवशी मोशेला
दोन इस्राएली माणसे एकमेकांशी भांडताना दिसले. त्यांचा समेट
करीत तो त्यांना म्हणाला, 'गृहस्थांनो, तुम्ही भाऊबंद आहात; तुम्ही
एकमेकांबरोबर का भांडत आहात?' 27 "परंतु जो मनुष्य दुसऱ्यावर
अन्याय करीत होता, त्याने मोशेला बाजूला होण्यास सांगितले. 'तुला
आमच्यावर अधिकारी व न्यायाधीश कोणी नेमले? 28 काल जसे तू
इजिप्त देशाच्या मनुष्याला मारून टाकलेस, तसे मलाही ठार करणार
आहेस काय?' 29 जेव्हा मोशेने हे ऐकले तेव्हा तो मिद्यानी लोकांच्या
देशात पळून गेला व तिथे तो परकीय म्हणून राहिला आणि तिथे त्याला
दोन पुत्र झाले. 30 "चाळीस वर्षे झाल्यानंतर सीनाय पर्वताजवळ
असलेल्या जंगलामध्ये एक दूत मोशेला जळत्या ज्वालाच्या झुडूपामधून
प्रकट झाला. 31 मोशेने ते दृश्य पाहिले, तेव्हा त्याने आश्चर्य केले. ते
नीट पाहण्याकरिता तो जवळ गेला, तेव्हा त्याने प्रभूची वाणी बोलताना
ऐकली: 32 'मी तुझ्या पूर्वजांचा म्हणजे अब्राहाम, इसहाक आणि
याकोबाचा परमेश्वर आहे.' हे ऐकताच मोशे भीतीने कापू लागला आणि
त्याला तिथे पाहण्याचे धैर्य झाले नाही. 33 "मग प्रभूने त्याला म्हटले,
'तुझी पायतणे काढ, कारण ज्या भूमीवर तू उभा आहेस ती पवित्र भूमी
आहे. 34 इजिप्तमध्ये असलेल्या माझ्या लोकांचे अत्याचार मी खरोखरच
पाहिले आहेत. त्यांचे कळवळणे मी ऐकले आहे आणि त्यांना त्यांच्या
त्रासातून सोडविण्यासाठी मी खाली आलो आहे. आता ये, मी तुला परत
इजिप्तकडे पाठवितो.' 35 "त्याच मोशेला, 'तुला आमच्यावर अधिकारी
व न्यायाधीश असे कोणी नेमले?' असे विचारून पूर्वी झिडकारीले होते,
त्याला परमेश्वराने स्वतः शासक व मुक्त करणारा म्हणून झुडूपात प्रकट
झालेल्या दूताच्या द्वारे त्यांच्याकडे परत पाठविले. 36 आणि अनेक
अद्भुत कृत्ये व चिन्हे करून त्याने त्यांना इजिप्त देशामधून, तांबड्या
समुद्रातून आणि चाळीस वर्षे रानातून बाहेर काढले. 37 "तोच मोशे
ज्याने इस्राएल लोकांना सांगितले होते, 'परमेश्वर, तुमच्या लोकांतून
तुमच्यासाठी माझ्यासारखा एक संदेष्टा उभा करतील.' 38 तो अरण्यात
लोकसमुदायाबरोबर होता आणि सीनाय पर्वतावर परमेश्वराचा दूत
जो त्याच्याशी आणि आपल्या पूर्वजांशी बोलला आणि आपल्याला
देण्याकरिता जिवंत वचने त्याला मिळाली. 39 "परंतु आपले पूर्वज
त्याचे ऐकावयास तयार नव्हते. याव्यतिरिक्त, त्यांनी त्यास स्वीकारले
नाही, कारण इजिप्तकडे परत जाण्याची इच्छा त्यांच्या मनात उत्पन्न
झाली. 40 त्यांनी अहरोनाला सांगितले, 'आमच्यापुढे जातील अशी
दैवते आमच्यासाठी बनव—ज्याने आम्हाला इजिप्तच्या बाहेर आणले,
त्या मोशेचे काय झाले हे आम्हाला माहीत नाही!' 41 त्याचवेळेस
त्यांनी वासराच्या प्रतिरूपाची मूर्ती तयार केली. त्यांनी तिच्यासाठी
बलिदान व अर्पणे आणली, स्वतःच्या हातांनी तयार केलेल्या कृती
समोर ते मौज करू लागले. 42 म्हणून परमेश्वराने त्यांच्याकडे पाठ
फिरवून त्यांना आकाशातील सूर्य, चंद्र व ताऱ्यांची पूजा करू दिली.
संदेष्ट्याच्या पुस्तकामध्ये लिहिल्याप्रमाणे: "'अहो इस्राएली लोकहो,
रानात असताना चाळीस वर्षे तुम्ही मला अर्पणे व यज्ञे आणली काय?
43 तुम्ही मोलेख दैवताचा मंडप आणि शक्कुथ व ताऱ्यांचे दैवत रेफान,

उपासना करण्यासाठी या मूर्ती तुम्ही घडविल्या. म्हणून मी तुम्हाला
बाबेलच्या पलीकडे बंदिवासात पाठवेन.’ 44 “आपले पूर्वज रानातून
जाताना त्यांच्याबरोबर कराराच्या साक्षीचा निवासमंडप होता. परमेश्वराने
मोशेला दिलेल्या निर्देशानुसार व नमुन्याप्रमाणे त्याची रचना करण्यात
आली होती. 45 जेव्हा परमेश्वराने इतर राष्ट्रांना त्यांच्या समोरून हाकलून
दिले तेव्हा त्यांनी त्यांची जमीन ताब्यात घेतली आणि आपल्या पूर्वजांनी
यहोशुआच्या नेतृत्वाखाली जो निवासमंडप त्यांच्याबरोबर आणला तो
त्या जमिनीवर दावीद राजाच्या काळापर्यंत तिथेच राहिला. 46 दावीदाने
परमेश्वराची कृपादृष्टी अनुभवली आणि त्याने याकोबाच्या परमेश्वरासाठी
निवासस्थान बांधता येईल का अशी विचारपूस केली. 47 परंतु तो
शलोमोन होता ज्याने परमेश्वरासाठी भवन बांधले. 48 “तथापि, सर्वोच्च
परमेश्वर मानवी हातांनी बांधलेल्या घरांमध्ये राहत नाहीत. ज्याप्रमाणे
संदेष्टा असे म्हणतो: 49 “‘स्वर्ग माझे सिंहासन आहे, आणि पृथ्वी माझे
पादासन आहे. तर तुम्ही माझ्यासाठी कशाप्रकारचे घर बांधणार? असे
प्रभू म्हणतात. माझे विश्रांतिस्थान कुठे असणार? 50 माझ्या हाताने हे
सर्व घडवले नाही काय?’ 51 “अहो ताठ मानेच्या लोकांनो! तुमची
अंत:करणे व कानांची सुंता अजूनही झालेली नाही. तुम्ही अगदी तुमच्या
पूर्वजांसारखे आहात: तुम्ही नेहमी पवित्र आत्म्याला विरोध करता! 52
तुमच्या पूर्वजांनी ज्याचा छळ केला नाही, असा एक तरी संदेष्टा आहे
का? जो नीतिमान आहे व त्यांच्या आगमनाचे भविष्य वर्तविणाऱ्यांना
देखील तुम्ही जिवे मारले आणि आता तुम्ही त्यांचा विश्वासघात करून
त्यांनाच जिवे मारले 53 आणि देवदूतांद्वारे मिळालेल्या परमेश्वराच्या
नियमांचाही तुम्ही जाणूनबुजून भंग केला.” 54 सभागृहातील यहूदी
पुढाऱ्यांनी हे ऐकले तेव्हा ते भयंकर संतापले आणि त्याच्यावर दात
खाऊ लागले. 55 परंतु स्तेफन, पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाला व त्याने
वर स्वर्गाकडे पाहून परमेश्वराचे गौरव बघितले आणि येशू परमेश्वराच्या
उजवीकडे उभे आहेत असे त्याला दिसले. 56 तो म्हणाला, “पाहा, मी
स्वर्ग उघडलेला आणि मानवपुत्र परमेश्वराच्या उजवीकडे उभे असलेले
मला दिसत आहे.” 57 मग त्यांनी त्यांचे हात त्यांच्या कानांवर ठेऊन
मोठ्याने आरोळया मारल्या आणि त्याच्या अंगावर तुटून पडले, 58
त्यांनी स्तेफनाला शहराबाहेर ओढीत नेले आणि त्याला धोंडमार करू
लागले. त्याचवेळी, इकडे साक्षीदारांनी काढून ठेवलेले त्यांचे अंगरखे
शौल म्हटलेल्या एका तरुण माणसाच्या पायाजवळ ठेवले होते. 59 ते
स्तेफनाला दगडमार करीत असताना, स्तेफनाने प्रार्थना केली, “प्रभू
येशू, माझ्या आत्म्याचा स्वीकार करा.” 60 आणि मग गुडघ्यावर टेकून
मोठ्याने ओरडून म्हणाला, “हे प्रभू, हे पाप त्यांच्या हिशेबी धरू नका.”
असे बोलल्यानंतर तो मरण पावला.

**8** स्तेफनाच्या वधाला शौलाने मान्यता दिली. त्या दिवसापासून
यरुशलेम येथील मंडळीचा मोठा छळ सुरू झाला आणि प्रेषितांशिवाय
सर्व विश्वासणारे यहूदीया व शोमरोन या प्रांतात पांगले. 2 भक्तिमान
लोकांनी स्तेफनाला पुरले आणि त्याच्यासाठी मोठा शोक केला 3
परंतु शौलाने मंडळीचा नाश करण्यास सुरुवात केली. तो घरोघरी
जाऊन, स्त्री व पुरुष दोघांनाही खेचून तुरुंगात घालीत असे. 4 आता
जे पांगलेले होते त्यांनी जिथे कुठे ते गेले तिथे शुभवार्तेच्या वचनाचा
प्रसार केला. 5 फिलिप्प खाली शोमरोनातील एका शहरात गेला आणि
त्याने ख्रिस्ताबद्दल घोषणा केली. 6 ज्यावेळी समुदायाने फिलिप्पाचे
ऐकले व त्याने केलेली चिन्हे पाहिली, सर्वांनी त्याच्या म्हणण्याकडे
बारकाईने लक्ष दिले. 7 अनेक अशुद्ध आत्मे किंकाळी मारून निघून जात
आणि अनेक पक्षघाती व पांगळे लोक बरे होत असत. 8 त्या शहरात
मोठा आनंद झाला होता. 9 आता काही काळापर्यंत शिमोन नावाचा
एक मनुष्य जादूटोणा करीत होता आणि त्याने शोमरोन शहरातील
लोकांना चकित करून सोडले होते व तो आपण कोणी फार मोठे
आहोत अशी फुशारकी मारीत असे. 10 म्हणून सर्व उच्च व नीच लोक
त्याच्याकडे लक्ष देत होते व जिला “परमेश्वराची महाशक्ती म्हणतात तो
खरोखर हाच मनुष्य असला पाहिजे,” असे उद्गार काढीत होते. 11 ते
त्याच्यामागे जात होते कारण बराच काळापासून जादूटोणा करून त्याने
त्यांना थक्क केले होते. 12 परंतु जेव्हा लोकांनी परमेश्वराच्या राज्याची
शुभवार्ता व येशू ख्रिस्ताचे नाव याबद्दलचा संदेश फिलिप्पाकडून ऐकला
आणि त्यावर विश्वास ठेवला, तेव्हा पुरुषांना व स्त्रियांना दोघांनाही
बाप्तिस्मा देण्यात आला. 13 शिमोनाने देखील विश्वास ठेवला आणि
त्याचा बाप्तिस्मा झाला. आता फिलिप्प जिथे जात असे तिथे तो
त्याच्यामागे जाऊ लागला आणि चमत्कार व चिन्हे पाहून तो आश्चर्य करू
लागला. 14 यरुशलेममधील प्रेषितांनी जेव्हा शोमरोनातील लोकांनी
परमेश्वराचे वचन स्वीकारल्याचे ऐकले, तेव्हा त्यांनी पेत्र व योहानाला
शोमरोनात पाठविले. 15 ते तिथे पोहोचले तेव्हा त्यांनी तेथील नवीन
विश्वासणाऱ्यांना पवित्र आत्मा मिळावा म्हणून प्रार्थना केली, 16 कारण
तोपर्यंत त्यांच्यापैकी कोणावरही पवित्र आत्मा आलेला नव्हता; केवळ
प्रभू येशूंच्या नावात त्यांचा बाप्तिस्मा झाला होता. 17 मग पेत्र व
योहानाने आपले हात त्यांच्यावर ठेवले आणि त्यांना पवित्र आत्मा प्राप्त
झाला. 18 शिमोनाने पाहिले की प्रेषितांनी हात ठेवले म्हणजे पवित्र
आत्म्याचे दान मिळते, तेव्हा त्याने प्रेषितांना पैसे देऊ केले 19 आणि
म्हणाला, “मला देखील हे सामर्थ्य मिळू द्या म्हणजे ज्या कोणावर मी
आपले हात ठेवेन तेव्हा त्यांना पवित्र आत्मा लाभेल.” 20 पेत्राने उत्तर
दिले: “तुझ्या पैशांचा तुझ्याबरोबर नाश होवो, कारण परमेश्वराचे दान
पैशाने विकत घेता येईल असा तू विचार केला! 21 या सेवेत तुला भाग
किंवा सहभाग नाही, कारण तुझे हृदय परमेश्वराच्या दृष्टीने बरोबर नाही.
22 तू तुझ्या या दुष्टतेबद्दल पश्चात्ताप कर आणि प्रभूकडे प्रार्थना कर,
या आशेने की, कदाचित ते तुझ्या हृदयातील विचारांबद्दल तुला क्षमा
करतील; 23 कारण तू कडूपणाने भरलेला आणि पापाचा दास आहेस
असे मला दिसते.” 24 तेव्हा शिमोन म्हणाला, “तुम्ही सांगितलेल्या या
गोष्टी मजवर येऊ नयेत, यासाठी प्रभूला विनवणी करा.” 25 आणखी
प्रभूचे वचन गाजवून व येशूंबद्दल साक्ष देऊन पेत्र व योहान यरुशलेमला
परतले. परत जाताना रस्त्याने शोमरोनातील अनेक खेड्यांमध्ये थांबून
त्यांनी तेथील लोकांना शुभवार्ता सांगितली. 26 आता प्रभूच्या दूताने

फिलिप्पाला म्हटले, “ऊठ दक्षिणेकडील रस्त्यावर जा, तो वाळवंटातून
जाणारा रस्ता यरुशलेमपासून गाझाकडे जातो.” 27 तेव्हा तो निघाला
आणि जात असताना रस्त्यावर त्याला इथिओपिया देशाचा एक षंढ
भेटला, हा षंढ इथिओपियाची राणी कांदकेचा महत्त्वाचा अधिकारी
व खजिनदार होता. हा मनुष्य यरुशलेमला आराधना करण्यासाठी
आला होता, 28 आणि आता घरी परत जात असताना तो त्याच्या
रथामध्ये बसून यशायाह संदेष्ट्याचा ग्रंथ वाचीत होता. 29 तेव्हा पवित्र
आत्मा फिलिप्पाला म्हणाला, “तू रथ गाठ आणि त्याच्या जवळच
चालत राहा.” 30 मग फिलिप्प धावत रथापर्यंत गेला आणि तो
खोजा यशायाह संदेष्ट्याचा ग्रंथ वाचीत होता. ते ऐकून त्याने त्याला
विचारले, “आपण जे वाचत आहात ते आपणास समजते काय?” 31
तो म्हणाला, “कोणीतरी स्पष्टीकरण करून सांगितल्याशिवाय हे मला
कसे समजेल?” म्हणून त्याने फिलिप्पाला विनंती केली की, त्याने
रथात चढून त्याच्याजवळ बसावे. 32 शास्त्रलेखातील जो उतारा तो
षंढ वाचीत होता तो असा होता: “वधावयाला नेणाऱ्या कोकराप्रमाणे
त्याला नेण्यात आले, आणि लोकर कातरणाऱ्यांसमोर मेंढरू जसे
स्तब्ध राहते, तसेच त्याने आपले मुख उघडले नाही. 33 त्याच्या लीन
अवस्थेत तो न्यायापासून वंचित राहिला. त्याच्या वंशजांबद्दल कोण बोलू
शकेल? कारण त्याचे जीवन पृथ्वीवरून काढून घेण्यात आले होते.”
34 षंढाने फिलिप्पाला विचारले, “संदेष्टा कोणाविषयी बोलत आहे,
स्वत:विषयी किंवा दुसऱ्या कोणाविषयी?” 35 तेव्हा फिलिप्पाने त्याच
शास्त्रलेखापासून सुरुवात करून त्याला येशूंची शुभवार्ता सांगितली. 36
तसेच पुढे प्रवास करीत असताना रस्त्याच्या बाजूला असलेल्या एका
जलाशयाजवळ ते आले आणि त्याचवेळेस षंढ म्हणाला, “पाहा, येथे
पाणी आहे. माझा बाप्तिस्मा होण्यासाठी काही अडचण आहे काय?”
37 फिलिप्पाने उत्तर दिले, “आपण पूर्ण अंत:करणाने विश्वास धरीत
असाल, तर आपला बाप्तिस्मा होऊ शकतो.” आणि षंढाने उत्तर दिले,
“येशू ख्रिस्त हे परमेश्वराचे पुत्र आहेत असा मी विश्वास ठेवतो.” 38
मग त्याने रथ थांबविण्यास सांगितले आणि फिलिप्प व षंढ दोघेही
खाली पाण्यात उतरले आणि फिलिप्पाने त्याला बाप्तिस्मा दिला. 39 ते
पाण्यातून वर आले, तेव्हा प्रभूच्या आत्म्याने एकाएकी फिलिप्पाला
उचलून नेले आणि त्या षंढाला तो पुन्हा कधीही दिसला नाही. तो आनंद
करीत त्याच्या मार्गाने पुढे निघून गेला. 40 फिलिप्प, अजोत या शहरात
दिसून आला आणि पुढे प्रवास करीत कैसरीया येथे पोहोचेपर्यंत त्याला
वाटेत लागलेल्या सर्व गावांमध्ये त्याने शुभवार्ता सांगितली.

**9** इकडे शौल अजूनही प्रत्येक श्वासागणीक प्रभूच्या शिष्यांचा घात
करण्याच्या धमक्या देत होता. तो महायाजकाकडे गेला 2 आणि
दिमिष्क येथील सभागृहासाठी अशी पत्रे मागितली की, हा मार्ग
अनुसरणारे कोणीही पुरुष किंवा स्त्रिया जर त्याला दिसून आले तर
त्यांना बंदिवान करून यरुशलेमेत न्यावे. 3 तो प्रवास करीत दिमिष्क
जवळ पोहोचत असताना अकस्मात आकाशातून त्याच्याभोवती प्रकाश
चकाकताना त्याने पाहिला. 4 तो जमिनीवर पडला आणि त्याच्याशी
बोलणारी एक वाणी त्याने ऐकली, ती म्हणाली, “शौला, शौला, तू
माझा छळ का करीत आहेस?” 5 शौलाने विचारले, “प्रभूजी, आपण
कोण आहात?” “ज्याचा तू छळ करीत आहेस, तो मी येशू आहे, 6
तर आता उठून उभा राहा आणि शहरामध्ये जा आणि जे काही तुला
करणे अगत्याचे आहे ते तुला सांगण्यात येईल.” 7 शौलाच्या बरोबर
प्रवास करणारे नि:शब्द होऊन उभे राहिले; त्यांनी आवाज ऐकला
खरा, परंतु त्यांनी कोणाला पाहिले नाही 8 मग शौल जमिनीवरून
उठला, त्याने डोळे उघडले पण त्याला काहीच दिसत नव्हते. मग त्यांनी
त्याला हाताला धरून दिमिष्क या ठिकाणी नेले. 9 तिथे तो तीन दिवस
आंधळा होता आणि त्याने अन्न व पाणी सेवन केले नाही. 10 आता
दिमिष्क येथे हनन्याह नावाचा येशूंचा एक शिष्य होता. दृष्टान्तामध्ये
प्रभूने त्याला हाक मारली, “हनन्याह!” हनन्याह उत्तर देत म्हणाला,
“आज्ञा प्रभूजी.” 11 प्रभू त्याला म्हणाले, “तू सरळ नावाच्या रस्त्यावर
यहूदाहच्या घरी जा. तिथे तार्सस येथील शौल नावाच्या मनुष्याचा शोध
कर, तो या घटकेला माझी प्रार्थना करीत आहे. 12 त्याने दृष्टान्तात
पहिले आहे की, हनन्याह नावाचा कोणी एक मनुष्य येईल आणि
त्याची दृष्टी परत येण्यासाठी तो त्याचे हात त्याच्यावर ठेवील.” 13
हनन्याह म्हणाला, “प्रभूजी! यरुशलेममधील तुझ्या पवित्र लोकांना या
मनुष्याने किती नुकसान पोहोचविले आहे, याचा वृतांत मी अनेकांकडून
ऐकला आहे. 14 आणि तुमच्या नावाचा धावा करणाऱ्या सर्वांना अटक
करण्याचा अधिकार त्याला महायाजकाकडून मिळाला आहे.” 15 परंतु
प्रभू हनन्याला म्हणाले, “जा! कारण गैरयहूदी व त्यांचे राजे आणि
त्याचप्रमाणे इस्राएली लोक यांच्याकडे माझे नाव जाहीर करण्यासाठी
तो माझे निवडलेले पात्र आहे. 16 माझ्या नावासाठी किती त्रास सहन
करावा लागेल, हे मी त्याला दाखवेन.” 17 नंतर हनन्याह त्या घरी
गेला आणि त्याने घरात प्रवेश केला. त्याचे हात शौलावर ठेवीत त्याने
म्हटले, “बंधू शौल, तू वाटेने येत असताना ज्या प्रभू येशूंनी तुला दर्शन
दिले, त्यांनी मला यासाठी पाठविले आहे की, तुला आपली दृष्टी परत
यावी व तू पवित्र आत्म्याने परिपूर्ण व्हावेस.” 18 त्याच क्षणी, त्याच्या
डोळ्यावरून खपल्यांसारखे काहीतरी पडले आणि शौलाला पुन्हा दिसू
लागले. तो उठला आणि त्याचा बाप्तिस्मा झाला, 19 त्याने थोडेसे अन्न
घेतल्यानंतर, त्याला पुन्हा शक्ती प्राप्त झाली. शौलाने दिमिष्कमध्ये
अनेक दिवस शिष्यांच्या बरोबर घालविले. 20 ताबडतोब तो सभागृहात
गेला आणि येशू हे परमेश्वराचे पुत्र आहेत असा उपदेश करू लागला. 21
ज्यांनी त्याची शुभवार्ता ऐकली, ते सर्वजण आश्चर्याने थक्क झाले आणि
विचारू लागले, “यरुशलेममध्ये येशूंच्या नावाने धावा करणाऱ्यांची
धूळधाण करणारा मनुष्य तो हाच नव्हे काय आणि तो येथे त्यांना कैद
करून महायाजकांकडे नेण्यासाठी आलेला होता, हे खरे आहे ना?” 22
तरी शौल अधिक सामर्थ्यवान होत गेला आणि येशू हेच ख्रिस्त आहेत
असे सिद्ध करून दिमिष्कमध्ये राहणाऱ्या यहूद्यांस त्याने निरुत्तर केले.
23 यानंतर पुष्कळ दिवस झाल्यावर, यहूद्यांनी त्याला जिवे मारण्याचा
कट केला, 24 परंतु शौलाला त्यांची योजना समजली. त्याला मारून

टाकण्यासाठी रात्रंदिवस ते शहराच्या द्वारावर नजर ठेऊन होते. 25
परंतु त्याच्या अनुयायांनी त्याला रात्रीच नेऊन टोपलीत बसविले आणि
शहराच्या भिंतीतील झरोक्यातून खाली उतरविले. 26 तो यरुशलेममध्ये
आल्यावर, येशूंच्या शिष्यांबरोबर सामील होण्याचा त्याने प्रयत्न केला,
परंतु त्या सर्वांना त्याचे भय वाटत होते, कारण तो खरोखर शिष्य आहे,
या गोष्टीवर त्यांचा विश्वास नव्हता. 27 परंतु बर्णबाने त्याला प्रेषितांपुढे
आणले आणि कशाप्रकारे दिमिष्क रस्त्यावर शौलाला प्रभूचे दर्शन
झाले आणि प्रभूने त्याला काय सांगितले आणि दिमिष्क येथे त्याने
निर्भयपणाने येशूंच्या नावामध्ये शुभवार्ता कशी सांगितली, हे सर्व त्यांना
कथन केले. 28 शौल त्यांच्याबरोबर तिथे राहिला व यरुशलेममध्ये
मोकळेपणाने फिरू लागला, प्रभूच्या नावामध्ये धैर्याने बोलू लागला. 29
तो ग्रीक यहूद्यांशी बोलत असे व वादविवाद करीत असे, परंतु त्यांनी
त्याचा घात करण्याचा प्रयत्न केला. 30 जेव्हा इतर विश्वासणाऱ्यांनी
यासंबंधी ऐकले, तेव्हा त्यांनी त्याला कैसरीयास नेले आणि नंतर
तिथून तार्सस येथे त्याची रवानगी केली. 31 नंतर यहूदीया, गालील
आणि शोमरोन या प्रांतातील सर्व मंडळयांना शांतता लाभली आणि
ते विश्वासात दृढ झाले. प्रभूचे भय धरून राहिल्यामुळे आणि पवित्र
आत्म्याच्या प्रोत्साहनामुळे त्यांच्या संख्येत वाढ झाली. 32 पेत्र त्या
देशात प्रवास करीत असताना, प्रभूच्या लोकांना भेटण्यासाठी तो लोद
गावात आला. 33 तिथे त्याला एनियास नावाचा एक मनुष्य भेटला, तो
पक्षघाती असून आठ वर्षे बिछान्याला खिळून होता. 34 पेत्र त्याला
म्हणाला, "एनियास, येशू ख्रिस्ताने तुला बरे केले आहे. ऊठ आणि
आपले अंथरूण गुंडाळ." तेव्हा एनियास तत्काळ उठला. 35 लोद व
शारोन या शहरात राहणाऱ्या सर्व लोकांनी एनियासला पाहिले आणि ते
प्रभूकडे वळले. 36 आता योप्पामध्ये टबीथा या नावाची शिष्या राहत
होती, ग्रीक भाषेमध्ये तिचे नाव दुर्कस असे होते; ती सदैव गरिबांची
मदत व चांगली कृत्ये करीत असे. 37 याच सुमारास ती आजारी पडून
मरण पावली आणि तिचा देह धुऊन स्वच्छ केला आणि माडीवरील
खोलीत ठेवला होता. 38 लोद योप्पाच्या जवळ होते; जेव्हा शिष्यांनी
ऐकले की पेत्र लोद गावी आला आहे, तेव्हा त्यांनी त्याच्याकडे दोन
माणसे पाठवून, "ताबडतोब या" अशी त्याला विनवणी केली. 39 पेत्र
त्यांच्याबरोबर गेला. तो आल्यावर त्याला माडीवरील खोलीत नेण्यात
आले. सर्व विधवा तिच्याभोवती उभ्या राहून शोक करीत होत्या आणि
दुर्कस जिवंत असताना तिने त्यांच्यासाठी तयार केलेले अंगरखे आणि
इतर वस्त्रे त्यांनी पेत्राला दाखविली. 40 पेत्राने सर्वांना खोली बाहेर
जाण्यास सांगितले; मग त्याने गुडघे टेकून प्रार्थना केली. मग मृत
स्त्रीकडे वळून तो म्हणाला, "टबीथा, ऊठ." तिने आपले डोळे उघडले
आणि पेत्राला पाहून ती उठून बसली. 41 त्याने आपला हात पुढे करून
तिला पायांवर उभे राहण्यास मदत केली. नंतर त्याने विश्वासणाऱ्यांना,
विशेषकरून विधवांना आत बोलाविले आणि त्यांच्यापुढे तिला जिवंत
सादर केले. 42 ही घटना योप्पामध्ये समजली आणि अनेकांनी प्रभूवर
विश्वास ठेवला. 43 पेत्र योप्पा येथे शिमोन नावाच्या चांभाराच्या घरी
बरेच दिवस राहिला.

10 कैसरीया येथे कर्नेल्य नावाचा एक मनुष्य, जो इटलीच्या
पलटणीचा शताधिपती होता. 2 तो व त्याचे सारे कुटुंब धार्मिक व
परमेश्वराला भिऊन वागणारे होते; तो उदारहस्ते गरजवंतांना दानधर्म
करीत असे आणि परमेश्वराची नियमितपणे प्रार्थना करीत असे. 3 एके
दिवशी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास त्याला एक दृष्टान्त झाला.
त्याने स्पष्टपणे असे पाहिले की, परमेश्वराचा एक दूत त्याच्याकडे आला
आणि त्याला म्हणाला, "कर्नेल्या!" 4 कर्नेल्याने त्याच्याकडे टक
लावून पाहिले व भयभीत झाला. त्याने विचारले, "काय प्रभूजी?"
देवदूत उत्तरला, "तुझ्या प्रार्थना आणि गरिबांसाठी केलेल्या दानधर्माची
परमेश्वराला आठवण आहे. 5 आता योप्पा येथे माणसे पाठवून, शिमोन
ज्याला पेत्र म्हणतात त्याला बोलावून घे. 6 ज्याचे घर समुद्राकाठी
आहे, त्या शिमोन चांभाराच्या घरी पाहुणा आहे." 7 जो देवदूत
त्याच्याबरोबर बोलला तो गेल्यानंतर, कर्नेल्याने आपल्या दोन नोकरांना
आणि धर्मनिष्ठ शिपायास, जो त्याच्या वैयक्तिक सेवकांपैकी एक होता
त्याला बोलाविले. 8 घडलेली सर्व हकिकत त्याने त्यांना सांगितली
आणि त्यांना योप्पाकडे पाठवून दिले. 9 दुसऱ्या दिवशी दुपारच्या
सुमारास ते प्रवास करीत शहराजवळ येत होते आणि इकडे पेत्र प्रार्थना
करण्यासाठी घराच्या धाब्यावर गेला. 10 त्याला भूक लागली आणि
काहीतरी खावे अशी त्याला इच्छा झाली, जेवण तयार होत असताना
त्याचे देहभान सुटले. 11 त्याने पाहिले आकाश उघडलेले आहे आणि
मोठ्या चादरी सारखे काहीतरी चारही कोपरे धरून खाली जमिनीकडे
सोडले जात आहे. 12 तिच्यात पृथ्वीवरील सर्वप्रकारचे चतुष्पाद प्राणी,
त्याचप्रमाणे सरपटणारे जीवजंतू व आकाशातील पाखरे होती. 13
मग एक वाणी त्याला म्हणाली, "पेत्रा ऊठ, व मारून खा." 14
"खात्रीने नाही, प्रभू!" पेत्राने उत्तर दिले, "मी अस्वच्छ व अशुद्ध असे
कधीही खाल्ले नाही." 15 दुसऱ्या वेळेस त्याला वाणी ऐकू आली,
"परमेश्वराने जे शुद्ध केले आहे, ते अशुद्ध म्हणू नकोस." 16 असे तीन
वेळा झाले, मग लागलीच ती चादर पुन्हा स्वर्गात वर घेतली गेली. 17
त्या दृष्टान्ताचा काय अर्थ असावा याविषयी पेत्र विचारात पडला असता,
कर्नेल्याने पाठविलेल्या माणसांना शिमोनाचे घर सापडले आणि ती
बाहेर दरवाजाजवळ येऊन उभी राहिली. 18 त्यांनी हाक मारून अशी
विचारणा केली, "शिमोन, ज्याला पेत्र असेही म्हणतात, येथेच राहत
आहेत काय?" 19 इकडे पेत्र त्या दृष्टान्ताविषयी विचार करीत असताना,
आत्मा त्याला म्हणाला, "शिमोना, तीन माणसे तुला शोधत आहेत. 20
म्हणून ऊठ आणि खाली जा. त्यांच्याबरोबर जाण्यास संकोच करू
नको, कारण मीच त्यांना पाठविले आहे." 21 पेत्र खाली गेला आणि
त्या माणसांना म्हणाला, "मी तोच आहे ज्याचा तुम्ही शोध घेत आहात.
तुम्ही कशासाठी आला आहात?" 22 त्या माणसांनी उत्तर दिले, "आम्ही
कर्नेल्य शताधिपतीकडून आलो आहोत. ते नीतिमान आणि परमेश्वराला
भिऊन वागणारे मनुष्य आहेत, सर्व यहूदी लोकांकडून सन्मानित झालेले

आहेत. एका पवित्र दूताने त्यांना सांगितले की तुम्ही पेत्राला तुमच्या
घरी बोलवावे म्हणजे तुमच्याकडील संदेश त्यांना ऐकता येईल” 23
तेव्हा पेत्राने त्या माणसांना पाहुणे म्हणून घरात बोलाविले. दुसऱ्या
दिवशी पेत्र त्यांच्याबरोबर निघाला, योप्पातील काही विश्वासणारे बंधूही
त्याच्याबरोबर गेले. 24 दुसऱ्या दिवशी ते कैसरीयास पोहोचले. कर्नेल्य
त्यांची वाटच पाहत होता, त्याने आपले नातेवाईक व जवळचे मित्र यांना
एकत्रित बोलाविले होते. 25 पेत्राने घरात प्रवेश करताच, कर्नेल्याने
त्याची भेट घेतली आणि आदराने त्याच्या पाया पडला. 26 परंतु पेत्राने
त्याला उभे केले व म्हणाला, “उभे राहा, मी स्वत: तुमच्यासारखाच
एक मनुष्य आहे.” 27 त्याच्याशी बोलत असताना, पेत्र आत गेला
आणि तिथे त्याला पुष्कळ लोक एकत्र जमलेले आढळले. 28 तेव्हा
पेत्र त्यांना म्हणाला: “माझ्यासारख्या यहूदी व्यक्तीने गैरयहूदीयाला
भेटणे व त्यांच्याशी संबंध ठेवणे हे यहूदी नियमशास्त्राच्या विरुद्ध आहे
हे तुम्हाला माहीतच आहे. परंतु परमेश्वराने मला दाखवून दिले आहे
की, मी कोणालाही अपवित्र किंवा अशुद्ध लेखू नये. 29 म्हणूनच मला
बोलाविणे आल्याबरोबर, काहीही हरकत न घेता मी लगेच आलो. आता
तुम्ही मला कशासाठी बोलाविले ते सांगा?” 30 कर्नेल्याने उत्तर दिले:
“तीन दिवसांपूर्वी माझ्या घरी याच वेळेस दुपारी तीन वाजण्याच्या
सुमारास, मी प्रार्थना करीत होतो. तेव्हा तेजस्वी झगा घातलेला एक
पुरुष एकाएकी माझ्यासमोर उभा राहिला. 31 आणि मला म्हणाला,
‘कर्नेल्या, परमेश्वराने तुझी प्रार्थना ऐकली आहे. तू गरिबांना केलेल्या
दानधर्माची त्यांनी आठवण केली आहे. 32 आता योप्पा येथे शिमोन
ज्याला पेत्र म्हणतात त्याला बोलावून घे. ज्याचे घर समुद्राकाठी आहे
त्या शिमोन चांभाराच्या घरी तो पाहुणा आहे.’ 33 म्हणून मी ताबडतोब
तुम्हाला बोलावून घेतले आहे, तुम्ही आला हे बरे झाले. आपण सर्व येथे
परमेश्वराच्या समक्षतेत आहोत आणि प्रभूने जे सर्वकाही सांगण्याची
आज्ञा देऊन तुम्हाला पाठविले आहे ते सांगा.” 34 मग पेत्र बोलू लागला:
“मला अगदी स्पष्टपणे कळून आले आहे की परमेश्वर पक्षपात करीत
नाहीत, 35 परंतु प्रत्येक राष्ट्रांमध्ये जे त्यांचे भय धरतात व योग्य तेच
करतात त्या सर्वांना ते स्वीकारतात. 36 तुम्हाला माहीत आहे की,
परमेश्वराने इस्राएलच्या लोकांसाठी येशू ख्रिस्ताद्वारे जे सर्वांचे प्रभू
आहेत, शांतीच्या शुभवार्तेची घोषणा करीत त्यांचा संदेश पाठविला. 37
योहानाने बाप्तिस्म्याबद्दल संदेश दिल्यानंतर गालीलापासून सुरुवात
होऊन संपूर्ण यहूदीयामध्ये काय घडून आले हे तुम्हाला चांगले माहीत
आहे, 38 कशाप्रकारे परमेश्वराने नासरेथकर येशूंना पवित्र आत्म्याचा
व सामर्थ्याचा अभिषेक केला आणि ते सत्कर्मे करीत व सैतानाच्या
सत्तेखाली असलेल्या सर्वांस बरे करीत फिरत होते, कारण परमेश्वर
त्यांच्याबरोबर होते. 39 “त्या यहूदीयांच्या देशामध्ये व यरुशलेममध्ये
त्यांनी ज्या सर्वगोष्टी केल्या त्यांचे आम्ही साक्षी आहोत. त्यांनी त्यांना
क्रूसावर खिळून मारले, 40 परंतु परमेश्वराने तीन दिवसानंतर त्यांना
मरणातून पुन्हा जिवंत केले व लोकांसमोर प्रकट केले. 41 जरी ते
सर्व लोकांसमोर प्रकट झाले नाहीत, परंतु जे ज्यांना परमेश्वराने पूर्वीच
निवडून ठेवले होते त्या साक्षीदारांसमक्ष म्हणजे आम्हाला, मरणातून
उठल्यानंतर ते प्रकट झाले व त्यांनी आमच्याबरोबर खाणेपिणे केले. 42
त्यांनी आम्हाला अशी आज्ञा केली आहे की, लोकांस उपदेश करा व
साक्ष द्या, परमेश्वराने नेमलेले जिवंतांचे व मेलेल्यांचे न्यायाधीश हेच
आहेत. 43 सर्व संदेष्ट्यांनी येशूंबद्दल अशी साक्ष दिली आहे की जो
प्रत्येकजण त्यांच्यावर विश्वास ठेवतो त्याला त्यांच्या नावाने पापक्षमा
मिळते.” 44 पेत्र हे वचन बोलत असतानाच, सर्व संदेश ऐकणाऱ्यांवर
पवित्र आत्मा उतरला. 45 पेत्राबरोबर आलेले विश्वासणारे, ज्यांची
सुंता झाली होती ते आश्चर्यचकित झाले, कारण त्यांनी पाहिले की
गैरयहूदी लोकांवरसुद्धा पवित्र आत्मा ओतून दिला आहे. 46 कारण
त्यांनी त्यांना अन्य भाषांमधून बोलताना आणि परमेश्वराची स्तुती
करताना ऐकले. मग पेत्र म्हणाला, 47 “त्यांचा पाण्याने बाप्तिस्मा
करण्यास निश्चितच कोणीही हरकत घेणार नाही, कारण पवित्र आत्मा
जसा आपल्याला मिळाला, तसा त्यांनाही मिळालेला आहे.” 48 मग
त्याने आज्ञा केली की येशू ख्रिस्ताच्या नावात त्यांचा बाप्तिस्मा करावा.
मग पेत्राने त्यांच्याबरोबर काही दिवस राहावे म्हणून त्यांनी त्याला
विनंती केली.

**11** गैरयहूदी लोकांनीही परमेश्वराचे वचन ग्रहण केले हे प्रेषितांच्या
आणि यहूदीया प्रांतातील विश्वासणाऱ्यांच्या कानी गेले. 2 मग
पेत्र वर यरुशलेमला गेला, त्यावेळी सुंता झालेल्या विश्वासणाऱ्यांनी
त्याच्यावर टीका केली 3 ते म्हणाले, “तू असुंती लोकांच्या घरी गेलास
आणि त्यांच्याबरोबर भोजन केले.” 4 त्यावर पेत्राने सुरुवातीपासून,
सर्वगोष्टी सविस्तर सांगितल्या: 5 तो म्हणाला, “मी योप्पा शहरात
प्रार्थना करीत असताना, माझे देहभान सुटले तेव्हा मी दृष्टान्त पाहिला.
त्यामध्ये मोठ्या चादरी सारखे काहीतरी चारही कोपरे धरून आकाशातून
खाली सोडले जात आहे आणि मी जिथे होतो तिथे ते खाली आले. 6 मी
त्यामध्ये डोकावून पाहिले मला पृथ्वीवरील चतुष्पाद प्राणी, श्वापदे,
सरपटणारे जीवजंतू व आकाशातील पाखरे दिसली. 7 तेव्हा एक
वाणी माझ्याशी बोलताना मी ऐकली, ‘पेत्रा, ऊठ व मारून खा.’ 8
“मी उत्तर दिले, ‘प्रभू खात्रीने नाही! कारण अस्वच्छ व अशुद्ध असे
कधीही माझ्या तोंडात गेलेले नाही.’ 9 “स्वर्गातून दुसऱ्या वेळेस
वाणी ऐकू आली, ‘परमेश्वराने जे शुद्ध केले आहे, ते अशुद्ध असे म्हणू
नकोस.’ 10 असे तीन वेळा झाले आणि ते सर्व परत स्वर्गाकडे घेतले
गेले. 11 “नेमक्या याच वेळी कैसरीयाहून मजकडे पाठविलेली तीन
माणसे मी राहत होतो त्या घराच्या समोर येऊन उभी राहिली. 12
तेव्हा आत्मा मला म्हणाला त्यांच्याबरोबर जाण्यास संकोच करू नको.
मजबरोबर सहा बंधूही सोबतीला होते आणि आम्ही त्या मनुष्याच्या
घरी प्रवेश केला. 13 त्याने आम्हाला सांगितले की परमेश्वराचा दूत
त्याच्या घरात प्रकट झाला आणि म्हणाला, ‘योप्पा येथे शिमोन ज्याला
पेत्र म्हणतात त्याला बोलावून घे. 14 तो तुला संदेश सांगेल त्याद्वारे
तुझे आणि तुझ्या सर्व घराण्याचे तारण होईल.’ 15 “मी बोलण्यास
सुरुवात केली, तेव्हाच पवित्र आत्मा त्यांच्यावर उतरला, जसा तो

सुरुवातीला आपल्यावर उतरला होता. 16 तेव्हा मला आठवण झाली
की, प्रभू येशूंनी काय सांगितले होते: ‘योहानाने पाण्याने बाप्तिस्मा
केला, परंतु तुमचा बाप्तिस्मा पवित्र आत्म्याने होईल.’ 17 म्हणून जर
परमेश्वराने तेच दान त्यांना दिले, जे आपण प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास
ठेवला तेव्हा आपल्याला मिळाले, तर परमेश्वराला विरोध करणारा मी
कोण?” 18 त्यांनी हे ऐकले, तेव्हा त्यांच्याकडे आणखी काही प्रश्न
राहिले नाहीत आणि ते परमेश्वराची स्तुती करू लागले व म्हणाले, “तर
आता परमेश्वराने गैरयहूदीयांनाही पश्चात्ताप करण्याची संधी दिली आहे
ज्यामुळे त्यांना जीवन प्राप्त होईल.” 19 स्तेफनाचा वध झाल्यानंतर
छळामुळे जे इतरत्र पांगले होते ते प्रवास करीत फेनिके, सायप्रस व
अंत्युखिया येथे गेले व त्यांनी केवळ यहूदीयांनाच वचन सांगितले. 20
तरी, सायप्रस व कुरेने, येथून अंत्युखिया येथे गेलेल्या काही लोकांनी
प्रभू येशूंविषयीची शुभवार्ता ग्रीक लोकांनाही सांगितली. 21 तेव्हा प्रभूचे
सामर्थ्य त्यांच्यावर होते, म्हणून लोकांनी मोठ्या संख्येने विश्वास ठेवला
आणि ते प्रभूकडे वळले. 22 यरुशलेम येथे असलेल्या मंडळीने जेव्हा ही
बातमी ऐकली, तेव्हा त्यांनी बर्णबाला अंत्युखियास पाठविले. 23 जेव्हा
तो तिथे आला आणि परमेश्वराच्या कृपेमुळे जे काही झाले होते ते पाहून
तो आनंदित झाला आणि त्या सर्वांनी पूर्ण मनाने प्रभूबरोबर एकनिष्ठ
राहावे असे त्याने त्या सर्वांना उत्तेजन दिले. 24 बर्णबा एक चांगला
मनुष्य होता, तो पवित्र आत्म्याने भरलेला आणि विश्वासात परिपूर्ण
असा होता आणि फार मोठ्या संख्येने लोकांना प्रभूकडे आणले. 25
त्यानंतर शौलाचा शोध घेण्यासाठी बर्णबा पुढे तार्ससला गेला, 26
जेव्हा तो त्याला भेटला, त्याने त्याला अंत्युखिया येथे आणले. बर्णबा व
शौल दोघेही वर्षभर मंडळयांमध्ये अनेक लोकांना भेटून शिक्षण देत
राहिले. अंत्युखिया मध्येच शिष्यांना ख्रिस्ती हे नाव प्रथम मिळाले. 27
याकाळात काही संदेष्टे यरुशलेमकडून खाली अंत्युखियास आले. 28
त्यांच्यामधील अगब नावाचा एकजण उभा राहिला आणि आत्म्याच्या
साहाय्याने त्याने असे भविष्य सांगितले की, सर्व रोमी साम्राज्यात
मोठा दुष्काळ पडणार आहे. (क्लौडियसच्या कारकिर्दीत हे झाले.)
29 तेव्हा शिष्यांनी असे ठरविले की, प्रत्येकांनी त्यांच्या ऐपतीप्रमाणे
यहूदीयामध्ये राहणाऱ्या बंधू भगिनींना मदत करावी. 30 त्याप्रमाणे
त्यांनी केले, त्यांच्या देणग्या तेथील वडीलमंडळींना पाठविण्यासाठी
त्यांनी शौल व बर्णबाच्या स्वाधीन केल्या.

**12** त्याच सुमारास हेरोद राजाने मंडळीतील काही लोकांना छळावे
म्हणून बंदिस्त केले. 2 त्याने योहानाचा भाऊ याकोबाचा
तलवारीने वध करविला. 3 या कृत्याने यहूदी प्रसन्न झाल्याचे पाहून,
हेरोद पेत्रालासुद्धा अटक करण्यास पुढे आला. हे बेखमीर भाकरीच्या
सणाच्या वेळेस घडले. 4 पेत्राला अटक करून तुरुंगात टाकले आणि
त्याच्यावर चार शिपायांच्या चार दलांचा पहारा बसविला. वल्हांडण
सण झाल्यावर त्याला बाहेर आणून समुदायापुढे चौकशी करावी असा
हेरोदाचा हेतू होता. 5 पेत्राला तुरुंगात ठेवण्यात आले होते, परंतु
मंडळी त्याच्यासाठी परमेश्वराकडे एकाग्रतेने प्रार्थना करत होती. 6
हेरोद त्याला चौकशीसाठी बाहेर आणणार होता त्या आधीच्या रात्री,
पेत्र दोन बेड्या घातलेला, दोन शिपायांच्यामध्ये झोपला होता आणि
पहारेकरी प्रवेशद्वारापुढे रक्षण करीत उभे होते. 7 तेव्हा अकस्मात
तुरुंगाच्या कोठडीत प्रकाश पडला आणि पाहा, प्रभूचा दूत पेत्राजवळ
प्रकट झाला. त्या दूताने पेत्रावर हात ठेऊन त्याला जागे केले व म्हटले,
“लवकर, ऊठ!” तेव्हा पेत्राच्या हातातील बेड्या गळून पडल्या. 8 मग
देवदूताने त्याला सांगितले, “कपडे घाल आणि पायात जोडे घाल.”
तेव्हा पेत्राने त्याप्रमाणे केले. मग देवदूताने त्याला आज्ञा केली, “आता
तुझा अंगरखा लपेट आणि माझ्यामागे ये.” 9 पेत्र तुरुंगातून निघून
त्याच्यामागे चालू लागला, परंतु देवदूत जे करीत होता ते सर्व खरोखर
घडत होते याची त्याला कल्पना नव्हती; तो एक दृष्टान्त पाहत आहे असे
त्याला वाटले. 10 त्यांनी पहिल्या व दुसऱ्या पहारेकऱ्यांना ओलांडले
आणि ते शहरात जाण्याच्या लोखंडी द्वारापर्यंत पोहोचले. त्यावेळी तो
दरवाजा त्यांच्यासाठी आपोआपच उघडला गेला आणि त्यातून ते बाहेर
पडले. जेव्हा पुढे एका रस्त्याइतके अंतर चालून गेल्यानंतर अचानक
देवदूत पेत्राला सोडून निघून गेला. 11 पेत्र भानावर येऊन म्हणाला,
“आता मला निश्चित कळून आले की प्रभूने त्यांचा देवदूत पाठवून
हेरोदाच्या तावडीतून व यहूदी लोक ज्या गोष्टींची अपेक्षा करीत होते
त्यापासून मला सोडविले आहे.” 12 हे त्याला स्पष्टपणे समजल्यानंतर,
योहान ज्याला मार्क असेही म्हणतात त्याची आई मरीयाच्या घरी गेला.
तिथे अनेक लोक एकत्र जमून प्रार्थना करीत होते. 13 त्याने अंगणाचा
दरवाजा ठोठावला आणि रुदा नावाची एक दासी दार उघडण्यासाठी
आली. 14 तिने पेत्राचा आवाज ओळखला, तेव्हा तिला एवढा आनंद
झाला की दरवाजा न उघडता ती पुन्हा आत धावत गेली आणि, “पेत्र
दारात आहे!” असे तिने सांगितले. 15 ते तिला म्हणाले, “तुझे मन
ठिकाण्यावर नाही,” परंतु ती आग्रहाने सांगू लागली, तेव्हा ते म्हणाले,
“तो त्याचा देवदूत असावा.” 16 परंतु पेत्र ठोठावीत राहिला आणि जेव्हा
त्यांनी दरवाजा उघडला व त्याला पाहिले, तेव्हा त्यांना आश्चर्य वाटले.
17 पेत्राने त्यांना आपल्या हाताने खुणावून शांत केले आणि प्रभूने त्याला
तुरुंगातून कसे बाहेर काढले, हे त्यांना सविस्तर सांगितले. मग तो त्यांना
म्हणाला, “याकोब आणि बंधू भगिनींना याबद्दल सांगा,” मग तो दुसऱ्या
स्थळी निघून गेला. 18 पहाट झाल्यावर, पेत्राचे काय झाले असावे या
विचाराने सैनिकांमध्ये एकच गडबड उडाली. 19 हेरोदाने त्याचा पूर्ण
शोध करूनही तो सापडला नाही, तेव्हा त्याने त्या सोळा पहारेकऱ्यांची
उलट तपासणी करून त्यांना मरणदंडाच्या शिक्षेचा आदेश दिला. यानंतर
हेरोद यहूदीयातून कैसरीयात गेला व तिथे राहिला. 20 तो सोर व सीदोन
येथील लोकांबरोबर भांडण करीत होता; ते आता एकत्र झाले आणि
त्यांनी त्याच्याबरोबर विशेष भेट ठरविली. राजाचा विश्वासू वैयक्तिक
सेवक ब्लस्तचा पाठिंबा मिळविल्यानंतर त्यांनी शांततेची मागणी केली,
कारण ही शहरे त्यांच्या अन्नधान्याच्या पुरवठ्यासाठी हेरोद राजाच्या
देशावर अवलंबून होती. 21 नेमलेल्या दिवशी हेरोद, आपली राजवस्त्रे
परिधान करून राजासनावर बसला आणि त्यांच्यापुढे जाहीर भाषण

करू लागला. 22 ते ओरडले, “ही मनुष्याची नव्हे परंतु परमेश्वराची
वाणी आहे.” 23 हेरोदाने परमेश्वराला गौरव दिले नाही, म्हणून प्रभूच्या
दूताने हेरोदावर तत्काळ प्रहार करून त्याला खाली पाडले आणि त्याला
किड्यांनी खाऊन टाकले व तो मरण पावला. 24 परंतु परमेश्वराचे वचन
पसरत राहिले आणि वाढत गेले. 25 जेव्हा बर्णबा आणि शौल यांनी
यरुशलेममधील त्यांचे सेवाकार्य पूर्ण केले, तेव्हा योहान ज्याला मार्क
असेही म्हणत त्याला त्यांच्याबरोबर घेऊन ते परत आले.

**13** आता अंत्युखिया येथील मंडळीत संदेष्टे व शिक्षक होते: बर्णबा,
शिमोन, ज्याला निगेर देखील म्हणत, कुरेनेचा लूक्य, मनायेन
ज्याचे संगोपन मांडलिक हेरोद राजाकडून झाले होते आणि शौल. 2 हे
सर्वजण प्रभूची आराधना आणि उपास करीत असताना, पवित्र आत्मा
त्यांना म्हणाला, “बर्णबा व शौल यांना ज्या कामासाठी मी पाचारण
केले आहे त्यासाठी त्यांना वेगळे करा.” 3 तेव्हा उपास आणि प्रार्थना
केल्यावर त्यांनी आपले हात त्यांच्यावर ठेवले व त्यांना निरोप दिला.
4 पवित्र आत्म्याने त्या दोघांना त्यांच्या मार्गावर पाठविले, ते खाली
सलुकीयाला गेले आणि तारवात बसून सायप्रस बेटावर उतरले. 5
सलमीस या शहरात आल्यानंतर, ते यहूदी लोकांच्या सभागृहांमध्ये गेले
व त्यांनी परमेश्वराचे वचन जाहीर केले. योहान त्यांच्याबरोबर मदतनीस
म्हणून गेला होता. 6 त्या संपूर्ण बेटावर प्रवास करीत ते पाफोस येथे
जाऊन पोहोचले. तिथे त्यांना यहूदी बार-येशू नावाचा जादूगार व खोटा
संदेष्टे भेटला. 7 सेर्गियोस पौलुस नावाच्या राज्यपालाचा तो एक सेवक
होता. सेर्गियोस पौलुस हा बुद्धिमान व ज्ञानी मनुष्य होता. या राज्यपालाने
बर्णबा व शौलना बोलाविले, कारण परमेश्वराचे वचन ऐकण्याची त्याची
इच्छा होती. 8 परंतु अलीम जादूगार (असा त्याच्या नावाचा अर्थ आहे)
त्याने त्यांना विरोध केला आणि विश्वास ठेवण्यापासून राज्यपालाला
दूर ठेवण्यासाठी प्रयत्न केला. 9 मग पवित्र आत्म्याने भरलेला शौल,
ज्याला पौल देखील म्हणत असत, त्याने अलीमाकडे रोखून पाहात
म्हटले, 10 “तू सैतानाचा पुत्र आहेस आणि सर्व चांगुलपणाचा वैरी
आहेस! तू सर्वप्रकारच्या कपटाने व चातुर्याने भरलेला आहेस. प्रभूच्या
चांगल्या मार्गाला भ्रष्ट करण्याचे तू कधीच सोडणार नाहीस काय? 11 तर
पाहा, आताच प्रभूचा हात तुझ्याविरुद्ध उठला आहे. तू आंधळा होशील
आणि काही वेळ तुला सूर्याचा प्रकाश सुद्धा दिसणार नाही.” तत्काळ
धुके व अंधकार यांनी तो ग्रासल्यासारखा झाला आणि आपल्याला
हाती धरून न्यावे, म्हणून तो इकडे तिकडे कोणाचा तरी चाचपडत
शोध करू लागला. 12 राज्यपालाने जे घडले ते पाहिले, तेव्हा त्याने
विश्वास ठेवला आणि प्रभूच्या शिक्षणाविषयी तो आश्चर्यचकित झाला.
13 आता पौल आणि त्याचे सहकारी यांनी पाफोस शहर सोडले व ते
तारवात बसून पंफुल्यातील पेर्गा येथे आले, या ठिकाणी योहानाने
त्यांचा निरोप घेतला व तो यरुशलेमला परतला. 14 ते पेर्गापासून पुढे
पिसिदिया प्रांतातील अंत्युखियास गेले. शब्बाथ दिवशी ते सभागृहात
गेले आणि तिथे खाली जाऊन बसले. 15 नेहमीप्रमाणे नियमशास्त्र व
संदेष्ट्यांच्या ग्रंथातून वाचल्यानंतर, सभागृहातील पुढाऱ्यांनी त्यांना
म्हटले: “बंधूंनो, आपल्याजवळ लोकांसाठी काही उत्तेजनपर वचन
असेल तर कृपा करून आम्हास सांगा.” 16 पौल उठून उभा राहिला
व त्याने हाताने खुणावले आणि म्हणाला: “अहो इस्राएली लोकहो
आणि परमेश्वराची उपासना करणारे गैरयहूदी, माझे ऐका! 17 या
इस्राएली राष्ट्राच्या परमेश्वराने आपल्या पूर्वजांना निवडून घेतले आणि
इजिप्तमध्ये राहत असताना त्यांना फलद्रूप केले. परमेश्वराने आपल्या
महान बलाने त्यांना त्या देशातून व गुलामगिरीतून बाहेर आणले; 18
रानात अंदाजे चाळीस वर्षे त्यांनी त्यांचे गैरवर्तन सहन केले; 19 त्यांनी
कनानातील सात राष्ट्रांना उलथवून टाकले व त्यांची भूमी वतन म्हणून
त्यांच्या लोकांना दिली. 20 हे सर्व घडून येण्यास सुमारे चारशे पन्नास
वर्षे लागली. “त्यानंतर, परमेश्वराने त्यांना शमुवेल संदेष्टा येईपर्यंत
न्यायाधीश नेमून दिले. 21 यानंतर लोकांनी राजा मागितला आणि
परमेश्वराने त्यांना बन्यामीन वंशातील कीशाचा पुत्र शौलाला राजा
म्हणून दिले, त्याने चाळीस वर्षे राज्य केले. 22 शौलाला दूर केल्यानंतर,
दावीदाला त्यांचा राजा म्हणून नेमले. या दावीदाबद्दल परमेश्वराने साक्ष
दिली: ‘माझ्या मनासारखा मनुष्य इशायाचा पुत्र दावीद मला मिळाला
आहे; माझ्या इच्छेप्रमाणे असणाऱ्या प्रत्येक गोष्टी तो करेल.’ 23
“परमेश्वराने वचन दिल्याप्रमाणे, याच मनुष्याच्या वंशामधून येशूंना
इस्राएली लोकांसाठी त्यांचा तारणारा म्हणून आणले आहे. 24 येशू
येण्यापूर्वी, योहानाने सर्व इस्राएली लोकांना पश्चात्तापाच्या बाप्तिस्म्याचा
उपदेश केला. 25 योहानाचे कार्य संपत आलेले असताना, योहानाने
विचारले: ‘मी कोण आहे असे तुम्हाला वाटते? तुम्ही ज्याची वाट पाहता
तो मी नाही. परंतु जो माझ्यामागून येत आहे, त्याच्या पादत्राणाचे बंद
सोडण्याइतकी सुद्धा माझी योग्यता नाही.’ 26 “अब्राहामाची संतान,
माझ्या प्रिय भावांनो आणि परमेश्वराचे भय धरणाऱ्या गैरयहूदीयांनो,
तारणाचा संदेश आपल्या सर्वांसाठी दिलेला आहे. 27 यरुशलेममधील
लोकांनी व त्यांच्या शासकांनी येशूंना ओळखले नाही, त्यांना दोषी
ठरवून संदेष्ट्यांच्या त्या शब्दांची पूर्तता केली, ज्या शब्दांचे वाचन
प्रत्येक शब्बाथ दिवशी त्यांच्यामध्ये केले जात होते. 28 त्यांना जिवे
मारण्यासाठी एकही योग्य पुरावा त्यांना सापडला नाही, तरी त्यांना
मृत्युदंडाची शिक्षा द्यावी अशी मागणी त्यांनी पिलाताकडे केली. 29
त्यांच्याबद्दलची सर्व भविष्ये पूर्ण झाल्यानंतर त्यांनी त्यांना क्रूसावरून
खाली उतरविले व कबरेत ठेवले. 30 परंतु परमेश्वराने त्यांना मृतांतून
उठविले, 31 जे गालीलाहून प्रवास करीत यरुशलेमला त्यांच्याबरोबर
आले होते, त्यांना पुष्कळ दिवस ते प्रकट झाले. तेच आता आपल्या
लोकांस त्यांचे साक्षीदार आहेत. 32 “यासाठी, आम्ही तुम्हाला शुभवार्ता
सांगतो की: 33 परमेश्वराने ते वचन त्यांनी येशूंना मरणातून उठवून
आमच्यासाठी म्हणजे त्यांच्या संतानासाठी पूर्ण केले आहे. त्याप्रमाणे
दुसऱ्या स्तोत्रसंहितेमध्ये असे लिहिले आहे: “‘तू माझा पुत्र आहे आज
मी तुझा पिता झालो आहे.’ 34 त्यांना कुजण्याचा अनुभव कधीही
येऊ नये म्हणून परमेश्वराने त्यांना मरणातून जिवंत केले. परमेश्वर असे
म्हणाले, “‘दावीद राजाला पवित्र व निश्चित आशीर्वाद देण्याचे वचन

मी दिले होते.’ 35 म्हणून दुसऱ्या एका ठिकाणीही असे लिहिले आहे,
“‘तू तुझ्या पवित्रजनाला कुजणे पाहू देणार नाहीस.’ 36 “दावीदाने
परमेश्वराच्या उद्देशाप्रमाणे आपल्या पिढीची सेवा केल्यानंतर तो मरण
पावला; त्याला त्याच्या पूर्वजांबरोबर पुरले आणि त्याचे शरीर कुजले.
37 परंतु ज्याला परमेश्वराने मृतातून उठविले आणि त्याचे शरीर कुजले
नाही. 38 “यासाठी माझ्या मित्रांनो, माझी अशी इच्छा आहे की तुम्ही
हे समजून घ्यावे की, येशूंच्याद्वारे पापक्षमेची घोषणा ही तुमच्यासाठी
केली आहे. 39 जो प्रत्येकजण विश्वास ठेवतो, तो त्यांच्याद्वारे सर्व
पापांपासून मुक्त होतो, मोशेच्या नियमशास्त्राच्या आधारे ही गोष्ट पटवून
देणे तुम्हाला शक्य झाले नव्हते. 40 यास्तव सावध राहा, संदेष्ट्यांनी जे
सांगितले ते तुमच्याबाबतीत होऊ नये: 41 “‘निंदा करणाऱ्यांनो, पाहा,
विस्मित होऊन नष्ट व्हा, कारण आता मी तुमच्या काळात जे कार्य
करणार आहे, त्याबद्दल तुम्हाला कोणी सांगितले तरी त्याच्यावर तुमचा
विश्वास बसणार नाही.’” 42 पौल व बर्णबा सभागृह सोडून जात होते
त्यावेळी पुढील शब्बाथ दिवशी या गोष्टींबद्दल त्यांनी अधिक माहिती
द्यावी, अशी लोकांनी त्यांना विनंती केली. 43 मग सभा संपल्यावर
अनेक यहूदी आणि यहूद्यांच्या संस्कृतीप्रमाणे धर्मांतर करून आलेले
भक्त पौल व बर्णबा यांच्यामागे गेले व त्यांच्याबरोबर बोलणे केले.
त्यांनी परमेश्वराच्या कृपेमध्ये सतत वाढत राहावे असे पौल आणि
बर्णबाने त्यांना उत्तेजन दिले. 44 पुढील शब्बाथाच्या दिवशी शहरातील
जवळपास सर्वच लोक प्रभूचे वचन ऐकण्यासाठी एकत्रित झाले. 45
परंतु यहूद्यांनी समुदाय पाहिला, तेव्हा त्यांना हेवा वाटला आणि पौल जे
बोलत होता त्याला विरोध करून त्यांनी त्याची निंदानालस्ती केली. 46
मग पौल आणि बर्णबा हे निर्भयपणे बोलले: “हे परमेश्वराचे वचन प्रथम
तुम्हाला देण्याचे अगत्य होते. ज्याअर्थी तुम्ही ते नाकारले आहे आणि
सार्वकालिक जीवनाकरिता तुम्ही स्वत: योग्य नाहीत असे दाखविले
आहे, त्याअर्थी आम्ही गैरयहूदीयांकडे वळतो. (aiōnios g166) 47 यासाठी
प्रभूने आम्हाला ही आज्ञा दिली आहे: “‘पृथ्वीच्या दिगंतापर्यंत तुमच्याद्वारे
मिळणारे तारण लाभावे, म्हणून मी तुला गैरयहूदीयांसाठी त्यांचा प्रकाश
केले आहे.’” 48 गैरयहूदीयांनी जेव्हा हे ऐकले, तेव्हा ते आनंदित
झाले आणि त्यांनी प्रभूच्या वचनाचा सन्मान केला व आणि ज्यांना
सार्वकालिक जीवनासाठी नियुक्त करण्यात आले होते त्या सर्वांनी
विश्वास ठेवला. (aiōnios g166) 49 प्रभूचे वचन सर्व प्रांतात पसरले. 50
परंतु यहूदी पुढाऱ्यांनी शहरातील उच्च वर्गातील धार्मिक स्त्रियांना व
प्रमुख व्यक्तींना चिथविले. त्यांनी पौल व बर्णबा यांचा छळ करून त्यांना
त्यांच्या प्रांतातून हाकलून दिले. 51 तेव्हा त्यांनी इशारा म्हणून त्या
शहराची धूळ तिथेच झटकून टाकली आणि ते इकुन्यास गेले. 52 आणि
शिष्य आनंदाने आणि पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले.

**14** इकुन्या येथे पौल व बर्णबा नेहमीप्रमाणे यहूदी सभागृहामध्ये
गेले. तिथे ते इतक्या प्रभावीपणाने बोलले की, यहूदी व गैरयहूदी
लोकांनी मोठ्या संख्येने विश्वास ठेवला. 2 परंतु ज्या यहूद्यांनी विश्वास
ठेवण्याचे नाकारले त्यांनी इतर गैरयहूद्यांना चिथावणी देऊन बंधुवर्गाविरुद्ध
त्यांची मने विषाने भरली. 3 तरी देखील पौल व बर्णबाने तिथे बराच
काळ घालविला, ते धैर्याने प्रभूसाठी बोलत राहिले, त्यांनी कृपेचा
संदेश चिन्हे व अद्भुते यांच्याद्वारे सिद्ध केला. 4 मग त्या शहरातील
लोकांमध्ये दोन गट झाले; काही यहूदीयांच्या तर काही प्रेषितांच्या
बाजूने झाले. 5 त्यांना अन्यायाने धोंडमार करण्यासाठी गैरयहूदी, यहूदी,
व त्यांचे पुढारी मिळून कट करीत होते. 6 हे त्यांना समजल्यावर ते
लुकाओनियानच्या प्रांतातील लुस्त्र, दर्बे व सभोवतालच्या देशामध्ये
पळून गेले, 7 आणि तिथे शुभवार्तेचा प्रचार करीत राहिले. 8 त्यांना
लुस्त्र मध्ये पांगळा मनुष्य बसलेला आढळला. तो जन्मापासूनच पांगळा
असून कधीही चालू शकला नव्हता. 9 पौल बोलत असताना तो ऐकत
होता. पौलाने त्याच्याकडे सरळ निरखून पाहिले आणि बरा होण्यासाठी
लागणारा विश्वास त्याच्याकडे आहे असे त्याला दिसले. 10 तेव्हा त्याने
मोठ्याने म्हटले, “तुझ्या पायांवर उठून उभा राहा!” त्याच क्षणाला त्या
मनुष्याने उडी मारली आणि तो चालू लागला. 11 पौलाने केलेले कृत्य
पाहून जमाव लुकवनी भाषेत मोठ्याने ओरडून म्हणाला, “परमेश्वर
आमच्यामध्ये मनुष्य रूपाने उतरून आले आहेत!” 12 बर्णबाला त्याने
झूस या नावाने व पौल हा मुख्य वक्ता असल्यामुळे त्याला हेर्मेस असे
म्हटले. 13 शहराच्या बाहेर असलेल्या झूस मंदिरातील पुजाऱ्याने, बैल
आणि फुलांच्या माळा घेतल्या व शहराच्या वेशीजवळ आले, कारण
त्याला आणि जनसमुदायाला, त्यांना यज्ञार्पणे करावयाची होती. 14 परंतु
ज्यावेळी प्रेषित बर्णबा व पौल यांनी हे ऐकले, तेव्हा त्यांनी स्वत:ची वस्त्रे
फाडली व धावत लोकांमध्ये शिरून ते ओरडून म्हणाले: 15 “मित्रांनो,
तुम्ही हे कशासाठी करीत आहात? आम्हीसुद्धा तुमच्यासारखीच माणसे
आहोत. आम्ही तुमच्यासाठी जी शुभवार्ता आणली आहे ती तुम्हाला
सांगतो, यासाठी की तुम्ही या निरर्थक गोष्टी सोडून देऊन, ज्याने
आकाश, पृथ्वी, सागर व त्यातील सर्वकाही निर्माण केले त्या जिवंत
परमेश्वराकडे वळावे. 16 मागील काळात, त्यांनी सर्व राष्ट्रांना त्यांच्या
मर्जीप्रमाणे वागू दिले; 17 तरी त्यांनी स्वत:च्या अस्तित्वाची साक्ष दिली:
त्यांच्याच दयेने तुमच्यासाठी आकाशातून पाऊस पाडतात, ऋतूमध्ये
पीक देतात; ते तुम्हाला भरपूर अन्न पुरवितात आणि तुमचे हृदय
आनंदाने भरून टाकतात.” 18 परंतु इतके बोलल्यानंतरही, लोकांना
यज्ञ करण्यापासून आवरणे त्यांना अत्यंत कठीण गेले. 19 तेव्हा काही
यहूदी अंत्युखिया आणि इकुन्या येथून आले आणि त्यांनी समुदायाला
त्यांच्या बाजूने करवून घेतले. त्यांनी पौलाला धोंडमार केला आणि तो
मरण पावला आहे असे समजून त्याला शहराबाहेर फरफटत ओढून
नेले. 20 परंतु शिष्य त्याच्या अवतीभोवती उभे राहिले, तेव्हा तो उठला
आणि पुन्हा त्या शहरात गेला. दुसऱ्या दिवशी तो आणि बर्णबा दर्बेकडे
निघून गेले. 21 त्यांनी त्या शहरात शुभवार्तेचा प्रचार करून मोठ्या
संख्येने शिष्य बनविले. नंतर ते लुस्त्र, इकुन्या व अंत्युखिया या शहरात
परत आले. 22 त्यांनी शिष्यांना बळकटी येण्यासाठी आणि विश्वासात
एकनिष्ठतेने टिकून राहण्यासाठी उत्तेजन दिले, कारण “परमेश्वराच्या
राज्यात प्रवेश करण्यासाठी आपल्याला अनेक संकटातून गेले पाहिजे,”

असे ते म्हणाले. 23 पौल आणि बर्णबाने प्रत्येक मंडळीमध्ये वडिलांची
नेमणूक केली आणि उपास व प्रार्थना करून ज्या प्रभूवर त्यांनी विश्वास
ठेवला होता, त्या प्रभूला त्यांचे समर्पण केले. 24 नंतर पिसिदियामधून
जात असताना ते पंफुल्यात आले, 25 आणि पेर्गा येथे वचनाचा प्रचार
केल्यानंतर ते खाली अत्तलिया येथे गेले. 26 अत्तलियाहून ते तारवात
बसून अंत्युखियास आले, आता जे कार्य त्यांनी पूर्ण केले होते त्यासाठी
याच ठिकाणी त्यांना परमेश्वराच्या कृपेवर सोपविण्यात आले होते. 27
तिथे पोहोचल्यावर त्यांनी मंडळीला एकत्र बोलाविले आणि परमेश्वराने
जे सर्वकाही त्यांच्याद्वारे केले व गैरयहूदीयांसाठी देखील विश्वासाचे दार
कसे उघडले, याचा अहवाल सादर केला. 28 आणि तिथे ते शिष्यांबरोबर
पुष्कळ दिवस राहिले.

**15** यहूदीया येथून काही माणसे अंत्युखियास आली व
विश्वासणाऱ्यांना शिकवू लागली: "मोशेने शिकविलेल्या
नियमशास्त्राप्रमाणे जोपर्यंत तुमची सुंता होत नाही, तोपर्यंत तुमचे
तारण होणे शक्य नाही." 2 पौल आणि बर्णबाचा त्यांच्याबरोबर प्रखर
मतभेद व वादविवाद झाला. शेवटी पौल आणि बर्णबाबरोबर इतर काही
विश्वासणाऱ्यांची नेमणूक करण्यात आली व या प्रश्नांसंबंधी यरुशलेम
येथे प्रेषित व वडीलजनांना भेटावे म्हणून त्यांना पाठविण्यात आले. 3
नंतर मंडळीने त्यांना निरोप देऊन पाठविले आणि जसे ते फेनिके आणि
शोमरोनामधून प्रवास करीत गेले, गैरयहूदीयांचे कसे परिवर्तन झाले हे
त्यांनी तेथील लोकांना सांगितले. या बातमीने सर्व विश्वासणाऱ्यांना
अतिशय आनंदित केले. 4 जेव्हा ते यरुशलेममध्ये आले, तेथील मंडळी,
प्रेषित व वडीलजनांनी त्यांचे स्वागत केले आणि परमेश्वराने जे सर्वकाही
त्यांच्या सेवेद्वारे केले होते, याची सविस्तर माहिती पौल व बर्णबाने
त्यांना दिली. 5 परूशी लोकांच्या पंथातील काही विश्वासू सभासद उठून
उभे राहिले व म्हणाले, "गैरयहूदी लोकांची सुंता झालीच पाहिजे व
मोशेच्या नियमशास्त्राचे पालन करणे त्यांना आवश्यक आहे." 6 प्रेषित
आणि पुढारी या प्रश्नावर विचारविनिमय करण्यासाठी एकत्रित भेटले.
7 बरीच चर्चा झाल्यानंतर, पेत्र उभा राहिला व त्यांना उद्देशून म्हणाला:
"बंधूंनो, हे आपणा सर्वांस माहीत आहे की गैरयहूदीयांनी विश्वास
ठेवावा व माझ्याद्वारे शुभवार्तेचा संदेश त्यांना कळावा यासाठी फार
काळापूर्वी परमेश्वराने माझी निवड केली होती. 8 परमेश्वर अंतःकरणे
ओळखतो, त्यांनी आपल्याप्रमाणेच गैरयहूदी लोकांनाही पवित्र आत्मा
देऊन त्यांचाही स्वीकार केला आहे, असे स्पष्ट दाखविले आहे. 9
त्याने त्यांच्यामध्ये आणि आपल्यामध्ये कसलाही भेदभाव केलेला
नाही, कारण त्याने त्यांची मने विश्वासाद्वारे शुद्ध केली आहेत. 10 तेव्हा
आता, जे जू आपल्याला व आपल्या पूर्वजांना वाहवयास अशक्य
होते, ते गैरयहूद्यांना वाहवयास लावून तुम्ही जणू परमेश्वराची परीक्षा
पाहता काय? 11 नाही! आमचा विश्वास आहे की प्रभू येशूंच्या कृपेद्वारे
आपल्याप्रमाणे त्यांनाही तारण मिळाले आहे." 12 तेव्हा बर्णबा व
पौल यांच्याद्वारे गैरयहूदी लोकांमध्ये परमेश्वराने जी चिन्हे व अद्भुते
केली यांचे वर्णन ऐकत असताना सर्व सभा स्तब्ध राहिली. 13 मग
त्यांचे बोलणे आटोपल्यावर याकोब म्हणाला, "बंधूंनो, माझे ऐका.
14 परमेश्वराने प्रथम मध्यस्थी करून गैरयहूदी लोकांमधून आपल्या
नावासाठी लोक निवडून घेतले हे शिमोनाने वर्णन करून आपल्याला
सांगितले आहे. 15 संदेष्ट्यांचे शब्द याच्याशी सहमत आहे, असे लिहिले
आहे: 16 "'यानंतर मी पुन्हा येईन आणि दावीदाचे पतन झालेले मंडप
पुनर्स्थापित करेन, तिच्या अवशेषांची पुनर्बांधणी करेन, आणि तिची
पुनर्स्थापना करेन. 17 म्हणजे उरलेली मानवजात प्रभूचा शोध करेल,
माझे नाव धारण करणारे सर्व गैरयहूदी देखील, ही कार्ये करतात ते प्रभू
असे म्हणतात,' 18 प्रारंभीच्या काळापासून या गोष्टी प्रकट करणारे
परमेश्वर असे म्हणतात. (aiōn g165) 19 "माझा न्याय असा आहे की,
जे गैरयहूदी परमेश्वराकडे वळत आहेत, त्यांच्यासाठी कठीण होईल
असे आपण करू नये. 20 फक्त त्यांना एवढेच लिहून कळवावे की,
त्यांनी मूर्तींना अर्पिलेले अन्न खाण्यापासून आणि वेश्यागमन यापासून
आणि गळा दाबून मारलेल्या प्राण्यांचे मांस खाण्यापासून आणि रक्ताचे
सेवन करण्यापासून स्वतःला दूर ठेवावे. 21 कारण प्राचीन काळापासून
मोशेच्या नियमशास्त्राचा प्रत्येक शहरामध्ये प्रचार केला जाऊ लागला
आणि प्रत्येक शब्बाथ दिवशी सभागृहामध्ये त्याचे वाचन होऊ लागले."
22 मग प्रेषित आणि वडीलजन व सर्व मंडळीने ठरविले की त्यांची
काही निवडलेली माणसे अंत्युखियास पौल व बर्णबा यांच्याबरोबर
पाठवावीत. त्यांनी यहूदाह ज्याला बारसब्बास असेही म्हणत असत व
सीला यांना निवडले. हे दोघे विश्वासणाऱ्यामधील पुढारी होते. 23 त्यांनी
आपल्याबरोबर नेलेल्या पत्राचा मजकूर असा होता: प्रेषित, वडीलजन
आणि बंधुवर्ग यांच्याकडून, अंत्युखिया, सिरिया व किलिकिया येथील
गैरयहूदी विश्वासणाऱ्यांना: सलाम. 24 आमच्यामधून काहीजण आमच्या
परवानगीशिवाय तिथे येऊन तुम्हाला गोंधळात पाडत आहेत आणि
त्यांच्या बोलण्याने तुमची मने विचलित करीत आहेत असे आमच्या
ऐकण्यात आले आहे. 25 तेव्हा आम्ही सर्वांनी ठरविले की आमचे प्रिय
बंधू बर्णबा व पौल यांच्याबरोबर काही जणांना निवडून तुमच्याकडे
पाठवावे. 26 या लोकांनी आपला प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावासाठी
आपले जीव धोक्यात घातले होते. 27 यास्तव यहूदाह व सीला यांना
पाठविले असून ते स्वतः आम्ही लिहिलेल्या या गोष्टी तुम्हाला तोंडी
सांगतील. 28 पवित्र आत्म्याला आणि आम्हाला हेच योग्य वाटले की,
ज्या आवश्यक गोष्टींशिवाय तुमच्यावर ओझे टाकले जाऊ नये त्या
अशा आहेत: 29 मूर्तींना अर्पिलेले अन्न खाण्यापासून, रक्ताचे सेवन
करण्यापासून, गळा दाबून मारलेल्या प्राण्यांचे मांस खाण्यापासून आणि
वेश्यागमन यापासून तुम्ही स्वतःला दूर ठेवावे. या गोष्टी टाळण्याकडे
तुम्ही लक्ष द्याल तर ते तुमच्या हिताचे होईल. निरोप द्यावा. 30 ती माणसे
तिथून खाली अंत्युखियात आली आणि तिथे पोहोचल्यावर त्यांनी सर्व
मंडळीला एकत्र जमवून ते पत्र त्यांच्याकडे सोपविले. 31 लोकांनी ते
वाचले आणि त्यातील उत्तेजनपर संदेशाने ते आनंदित झाले. 32 मग
यहूदाह आणि सीला, जे स्वतः संदेष्टे होते, त्यांनी विश्वासणाऱ्यांना
पुष्कळ गोष्टी बोलण्याद्वारे उत्तेजित करून स्थिरावले. 33 तिथे काही

काळ राहिल्यानंतर, तेथील विश्वासणाऱ्यांनी त्यांना शांतीचा आशीर्वाद
देऊन, ज्यांनी त्यांना पाठविले होते त्यांच्याकडे परत पाठविले. 34 परंतु
सीला तिथेच राहिला. 35 पौल व बर्णबा अंत्युखियामध्ये राहिले, तिथे
ते व त्यांच्याबरोबर अनेकांनी शिक्षण दिले आणि प्रभूच्या वचनाची
घोषणा केली. 36 काही काळानंतर पौलाने बर्णबाला म्हटले, “आपण
परत जावे व ज्या ज्या सर्व शहरांत जिथे आपण प्रभूच्या वचनाचा
प्रचार केला होता, तेथील विश्वासणाऱ्यांची भेट घेऊन त्यांची विचारपूस
करावी.” 37 बर्णबाला हवे होते की योहान, ज्याला मार्क असेही म्हणत,
त्यालाही आपल्याबरोबर न्यावे. 38 परंतु पौलाला त्याला बरोबर नेणे
सुज्ञपणाचे वाटले नाही, कारण मार्क त्यांना पंफुल्यामध्ये सोडून गेला
होता आणि या कार्यात पुढे जाण्यासाठी त्याने साथ दिली नव्हती. 39
याबाबत त्यांचा मतभेद एवढा तीव्र झाला की त्यांनी एकमेकांची सोबत
सोडली. बर्णबाने आपल्याबरोबर मार्कला घेतले आणि जहाजात बसून
ते सायप्रसला गेले, 40 परंतु पौलाने सीलाची निवड केली व त्यासह
तो निघाला. विश्वासणाऱ्यांनी त्यांना शाबासकी देऊन प्रभूच्या कृपेवर
सोपविले. 41 तो सिरिया व किलिकियामधून मंडळयांना बळकट करीत
गेला.

**16** पौल दर्बे आणि नंतर लुस्त्र येथे आला, तिथे तीमथ्य नावाचा एक
शिष्य राहत होता, त्याची आई यहूदी असून विश्वासणारी होती,
परंतु त्याचे वडील ग्रीक होते. 2 लुस्त्र व इकुन्या येथील विश्वासणारे
त्याच्याबद्दल चांगली साक्ष देत होते. 3 त्याला आपल्याबरोबर फेरीत
सामील करावयाचे असल्यामुळे पौलाने निघण्यापूर्वी तीमथ्याची सुंता
करविली, कारण त्या भागातील सर्व यहूदीयांना त्याचे वडील ग्रीक
असल्याचे माहीत होते. 4 गावागावातून प्रवास करीत असताना, त्यांनी
यरुशलेममधील प्रेषित व वडीलजन यांनी जे निर्णय ठरविले होते त्याचे
पालन लोकांनी करावे, असे सांगितले. 5 म्हणून मंडळ्या विश्वासात
स्थिर झाल्या व त्यांच्या संख्येत दररोज वाढ होत गेली. 6 त्यानंतर
पौल आणि त्याचे सहकारी यांनी फ्रुगिया आणि गलातीया प्रांतातून
सगळीकडे प्रवास केला, कारण आशिया प्रांतात जाऊन परमेश्वराच्या
वचनाचा प्रचार करू नये असे पवित्र आत्म्याकडून त्यांना सांगण्यात
आले होते. 7 मुसियाच्या सरहद्दीवर आल्यानंतर, ते बिथुनिया प्रांतामध्ये
प्रवेश करावयास निघाले, तेव्हा येशूंच्या आत्म्याने त्यांना तशी परवानगी
दिली नाही. 8 म्हणून ते मुसिया प्रांतातून खाली त्रोवास येथे गेले. 9
रात्रीच्या वेळी पौलाने दृष्टान्तात असे पाहिले की मासेदोनियातील मनुष्य
उभा राहून गयावया होऊन विनंती करीत आहे, “मासेदोनियात या व
आम्हास मदत करा.” 10 पौलाने हा दृष्टान्त पाहिल्यानंतर आपल्याला
परमेश्वराने यांच्यामध्ये शुभवार्ता प्रचार करावयास बोलाविले आहे,
असे समजून लगेच आम्ही मासेदोनियास जाण्याची तयारी केली. 11
आम्ही त्रोवास येथून जहाजात चढलो व सरळ समथ्राकेस पोहोचलो व
दुसऱ्या दिवशी नियापुलीस येथे गेलो. 12 तिथून आम्ही प्रवास करून
फिलिप्पै, जे रोमी वसाहतीत असून मासेदोनियाच्या शहरामधील एक
महत्त्वाचे नगर होते तिथे गेलो. तिथे आम्ही बरेच दिवस राहिलो. 13
मग शब्बाथ दिवशी आम्ही शहराच्या द्वारातून बाहेर नदीकाठी गेलो,
तिथे प्रार्थनेसाठी ठिकाण असेल अशी आमची अपेक्षा होती. आम्ही
तिथे बसलो आणि ज्या स्त्रिया तिथे जमल्या होत्या, त्यांच्याबरोबर
बोलण्यास सुरुवात केली. 14 त्या ऐकणाऱ्या स्त्रियांमध्ये थुवतीरा
शहराची लुदिया नावाची कोणी एक स्त्री होती. ती जांभळया वस्त्रांचा
व्यवसाय करीत असे, ती परमेश्वराची उपासना करणारी होती. पौलाच्या
संदेशाचा स्वीकार करण्यासाठी प्रभूने तिचे हृदय उघडले. 15 मग तिचा
आणि तिच्या कुटुंबातील सदस्यांचा बाप्तिस्मा झाला व तिने आम्हाला
तिच्या घरी बोलाविले. ती म्हणाली, “मी प्रभूवर विश्वास ठेवणारी आहे,
असे जर तुम्ही मान्य करीत असाल तर, या आणि माझ्या घरी राहा.”
तिच्या आग्रहामुळे आम्हाला ते मान्य करावे लागले. 16 एकदा आम्ही
प्रार्थना स्थळाकडे जात असताना, आम्हाला एक गुलाम मुलगी भेटली
जिच्यामध्ये अशुद्ध आत्मा असून त्याच्या साहाय्याने ती भविष्य सांगत
असे. भविष्यकथन करून ती आपल्या धन्यांना खूप पैसा मिळवून देत
असे. 17 ती पौलाच्या आणि आमच्यामागे येऊन मोठ्याने म्हणाली, “हे
लोक परात्पर परमेश्वराचे सेवक आहेत आणि तारण कसे मिळेल याचा
मार्ग हे तुम्हाला सांगत आहेत.” 18 असे ती पुष्कळ दिवस करत होती.
शेवटी पौल अत्यंत त्रस्त झाला आणि तिच्याकडे वळून तिच्यातील
आत्म्याला म्हणाला, “मी येशू ख्रिस्ताच्या नावाने तुला आज्ञा करतो की
तिच्यातून बाहेर नीघ!” आणि त्या क्षणी तो आत्मा तिच्यातून निघून
गेला. 19 आपल्याला जे धन मिळत होते ते आता मिळणार नाही असे
पाहून तिच्या धन्यांनी, पौल व सीलाला पकडून अधिकाऱ्यांना तोंड
देण्याकरिता बाजारपेठेत ओढत नेले. 20 त्यांनी त्यांना न्यायाधीशापुढे
आणले व ते म्हणाले, “ही यहूदी माणसे आमच्या शहरात गोंधळ
माजवीत आहेत 21 आम्ही रोमी लोकांनी जे नियम स्वीकारणे व
आचरणे योग्य नाहीत, अशा नियमांची ते वकिली करत आहेत.” 22
मग पौल व सीलावर हल्ला करण्यात लोकसमूह सामील झाला, तेव्हा
न्यायाधीशांनी त्यांचे कपडे काढून त्यांना फटके मारण्याचा हुकूम दिला.
23 त्यांना निष्ठुरपणे पुष्कळ फटके मारल्यानंतर तुरुंगात टाकण्यात
आले आणि तुरुंगाच्या पहारेकऱ्याला त्यांच्यावर बंदोबस्ताने पहारा
ठेवण्याचा हुकूम देण्यात आला. 24 असा हुकूम मिळाल्यावर त्यांना
आतील कोठडीत ठेऊन त्यांचे पाय लाकडी खोड्यांत अडकविण्यात
आले. 25 मध्यरात्रीच्या सुमारास पौल व सीला प्रार्थना करीत असताना
आणि परमेश्वराचे गीत गात असताना इतर कैदी ते ऐकत होते. 26
अचानक तीव्र भूकंपाने तुरुंगाचा पाया डळमळला. एकाएकी तुरुंगाचे
सर्व दरवाजे उघडले गेले आणि सर्व कैद्यांचे साखळदंड मोकळे झाले. 27
तुरुंगाचा नायक झोपेतून जागा झाला आणि तुरुंगाचे सर्व दरवाजे सताड
उघडे पाहून, सर्व कैदी पळून गेलेले असावेत असे समजून तो तलवार
उपसून स्वत:ला ठार करणार होता. 28 परंतु पौल ओरडून म्हणाला, “तू
स्वत:ला इजा करू नकोस! आम्ही सर्व येथेच आहोत!” 29 तुरुंगाच्या
नायकाने दिवे मागविले व तो धावत आला आणि पौल आणि सीला
यांच्यापुढे थरथर कापत पालथा पडला. 30 त्याने त्यांना बाहेर आणले

आणि विचारले, “महाराज, माझे तारण व्हावे, म्हणून मी काय करावे?”
31 त्यांनी सांगितले, “प्रभू येशूंवर विश्वास ठेव, म्हणजे तुझे व तुझ्या
घराण्याचे तारण होईल.” 32 तेव्हा त्यांनी त्याला व त्याच्या घराण्यातील
सर्वांना प्रभूचे वचन सांगितले. 33 मग रात्रीच्या त्याच घटकेस तुरुंगाच्या
नायकाने त्यांच्या जखमा धुतल्या आणि लगेच त्याने व त्याच्या सर्व
कुटुंबाने बाप्तिस्मा घेतला. 34 त्या नायकाने त्यांना आपल्या घरी
आणले व त्यांच्यापुढे भोजन वाढले; तो व त्याच्या कुटुंबातील सर्व लोक
परमेश्वरावरील विश्वासात आल्यामुळे अत्यंत आनंदित झाले होते. 35
पहाट झाल्यानंतर, न्यायाधीशांनी त्यांच्या अधिकाऱ्यांना त्या तुरुंगाच्या
नायकाकडे पाठवून त्यांना हुकूम दिला: “त्या माणसांना सोडून द्या.”
36 तेव्हा तुरुंगाच्या नायकाने पौलाला सांगितले, “न्यायाधीशांनी हुकूम
दिला आहे की, पौल व सीला यांना जाऊ द्यावे, आता तुम्ही जाऊ
शकता. शांतीने जा.” 37 परंतु पौल अधिकाऱ्यांना म्हणाला: “त्यांनी
आमची चौकशी न करता आम्हाला जाहीरपणे फटके मारले आणि
आम्ही रोमी नागरिक असतानाही आम्हास तुरुंगात डांबले. आता आम्ही
गुपचूप निघून जावे, अशी त्यांची इच्छा आहे काय? त्यांनी स्वतः येऊन
आम्हास मुक्त करावे.” 38 अधिकाऱ्यांनी जाऊन हे शब्द न्यायाधीशांना
कळविले, पौल व सीला हे रोमी नागरिक आहेत, हे त्यांना समजले तेव्हा
ते घाबरले. 39 आणि त्यांना शांत करण्यासाठी ते स्वतः तुरुंगात आले
आणि तुरुंगाच्या बाहेर आणून, ते शहर सोडून जावे अशी त्यांना विनंती
केली. 40 तुरुंगातून बाहेर आल्यानंतर पौल व सीला हे लुदियेच्या घरी
गेले आणि बंधू भगिनींना भेटून त्यांना उत्तेजित केले. नंतर ते तिथून
निघाले.

**17** जेव्हा पौल व त्याचे सहकारी प्रवास करीत अंफिपुली व
अपल्लोनिया या शहरांमधून जात होते तेव्हा ते थेस्सलनीका येथे
आले, ज्या ठिकाणी यहूद्यांचे सभागृह होते. 2 आपल्या रीतीप्रमाणे,
पौल सभागृहामध्ये गेला आणि लागोपाठ तीन शब्बाथ दिवस त्याने
धर्मशास्त्रावरून त्यांच्याशी संवाद केला, 3 त्याने त्यांना स्पष्टीकरण
करून पटवून दिले की, ख्रिस्ताने दुःख सोसावे व मेलेल्यामधून पुन्हा
उठावे याचे अगत्य आहे. तो त्यांना म्हणाला, “या येशूंची मी तुम्हाला
घोषणा करीत आहे, तेच ख्रिस्त आहेत.” 4 ऐकणाऱ्यांपैकी काही
यहूदीयांची खात्री झाली आणि ती माणसे पौल व सीला यांना येऊन
मिळाली. यामध्ये परमेश्वराचे भय धरणाऱ्या ग्रीक लोकांची संख्या
मोठी होती आणि त्यात काही प्रमुख स्त्रियाही समाविष्ट होत्या. 5
परंतु इतर यहूदीयांना मत्सर वाटला; म्हणून त्यांनी रस्त्यावरील काही
गुंड लोकांना घेऊन शहरात त्यांना दंगल करण्यास चिथावणी दिली.
पौल व सीला यांना बाहेर काढून लोकांकडे आणण्यासाठी ते त्यांना
शोधीत यासोनाच्या घराकडे धावले. 6 पण ते तिथे नाहीत, असे पाहून
त्यांनी यासोन व इतर काही विश्वासणाऱ्यांना ओढून काढले व त्यांना
शहर न्यायाधीशांपुढे नेऊन आरडाओरड करून म्हणाले, “या माणसांनी
सर्व जगात उलथापालथ केली आहे आणि आता ते येथेही आलेले
आहेत; 7 आणि यासोनाने त्यांचे आपल्या घरामध्ये स्वागत केले
आहे. हे सर्व कैसराच्या हुकुमाविरुद्ध वागतात आणि म्हणतात की
येशू म्हणून कोणी एक दुसरा राजा आहे.” 8 शहरातील अधिकारी
व लोकसमुदाय यांनी हे ऐकले, तेव्हा त्यांची धांदल उडाली. 9 मग
यासोन व इतरांकडून जामीन घेतल्यानंतरच त्यांना जाऊ दिले. 10 रात्र
झाल्याबरोबर विश्वासणाऱ्यांनी पौल व सीला यांना बिरुयास पाठविले.
तिथे पोहोचल्यावर ते यहूदी सभागृहामध्ये गेले. 11 आता बिरुया येथील
यहूदी थेस्सलनीकातील लोकांपेक्षा थोर चरित्राचे होते, त्यांनी संदेश
मोठ्या उत्सुकतेने ऐकला पौलाची विधाने खरी आहेत की नाहीत,
हे ते प्रतिदिवशी वचनांची तपासणी करून पाहात असत. 12 याचा
परिणाम असा झाला की अनेकांनी विश्वास ठेवला, यामध्ये बऱ्याच
संख्येने प्रमुख ग्रीक स्त्रिया व अनेक ग्रीक पुरुष देखील होते. 13
थेस्सलनीकातील यहूद्यांनी पौल बिरुया येथे परमेश्वराच्या वचनाचा प्रचार
करीत आहे असे ऐकले, तेव्हा काहीजण तिथे गेले आणि त्यांनी तिथेही
समुदायामध्ये चळवळ व खळबळ उडवून दिली. 14 विश्वासणाऱ्यांनी
पौलाला ताबडतोब समुद्रकिनारी पाठविले, परंतु सीला व तीमथ्य हे
बिरुया येथे राहिले. 15 पौलाबरोबर जे गेले होते त्यांनी त्याला अॅथेन्सला
पोहोचविले आणि सीला व तीमथ्य यांनी त्वरा करून त्याला येऊन
मिळावे अशी आज्ञा त्यांना केली. 16 त्यावेळी पौल अॅथेन्समध्ये त्यांची
वाट पाहत असताना, ते शहर मूर्तींनी भरलेले पाहून तो आत्म्यामध्ये
फार दुःखी झाला. 17 म्हणून तो सभागृहामध्ये यहूदी आणि परमेश्वराचे
भय धरणारे गैरयहूदी या दोघांबरोबर चर्चा करण्यासाठी जाऊ लागला
आणि दररोज सार्वजनिक चौकात जे येत होते त्या सर्वांशी वादविवाद
करू लागला. 18 तेव्हा एपिकूरपंथी व स्तोयिकपंथी यांच्यातील काही
तत्वज्ञानी लोक त्याच्याशी वाद घालू लागले. त्यांच्यापैकी काहीजण
म्हणाले, “हा बडबड्या काय सांगण्याचा प्रयत्न करीत आहे?” इतर
म्हणाले, “हा परक्या परमेश्वराचा प्रचारक दिसतो.” ते असे बोलत,
कारण पौल येशू व पुनरुत्थान या विषयीच्या शुभवार्तेचा प्रचार करीत
होता. 19 नंतर त्यांनी त्याला धरून अरीयपगावर चर्चेसाठी बैठकीत
आणले व ते त्याला म्हणाले, “तू हे जे नवीन शिक्षण देत आहेस,
ते काय आहे, हे आम्हाला समजेल का? 20 कारण तू आम्हाला
अपरिचित असलेल्या गोष्टी ऐकवीत आहेस व त्यांचा अर्थ काय हे
समजावे अशी आमची इच्छा आहे.” 21 सर्व अॅथेन्सचे नागरिक व तिथे
राहणारे परदेशी लोक, इतर काहीही न करता नव्या गोष्टी सांगणे किंवा
ऐकणे यामध्ये आपला वेळ घालवित असत. 22 पौल अरीयपगाच्या
बैठकीमध्ये मध्यभागी उभा राहून म्हणाला: “अॅथेन्सच्या नागरिकांनो!
आपण सर्व दृष्टीने अतिशय धार्मिक वृत्तीचे आहात, ही गोष्ट माझ्या
लक्षात आलेली आहे. 23 कारण मी बाहेर फिरत असताना, तुमच्या
पूजेच्या वस्तूंकडे मी काळजीपूर्वक पाहिले, मला एक वेदीसुद्धा दिसून
आली जिच्यावर असा शिलालेख होता: अज्ञात परमेश्वराला. म्हणजे ज्या
परमेश्वराला तुम्ही ओळखत नाही त्याची तुम्ही उपासना करता आणि
आता त्यांच्याविषयीच मी तुम्हाला सांगत आहे. 24 “ज्या परमेश्वराने
जग व त्यातील सर्वकाही निर्माण केले ते आकाशाचे व पृथ्वीचे प्रभू

आहेत, म्हणून ते हातांनी बांधलेल्या मंदिरात राहत नाहीत; 25 मानवी
हात त्यांच्या गरजा भागवू शकत नाहीत, कारण त्यांना कशाचीही गरज
नाही. ते प्रत्येकाला जीव आणि श्वास व लागणारे सर्वकाही पुरवितात.
26 त्यांनी एका मनुष्यापासून सर्व राष्ट्रे उत्पन्न केली, त्यांनी सर्व पृथ्वीवर
निवास करावा असे केले आणि इतिहासामध्ये त्यांचे नेमलेले समय
व त्यांच्या निवासांच्या निश्चित सीमा त्यांनी आधी नेमल्या होत्या. 27
परमेश्वराने हे यासाठी केले की, लोक त्यांचा शोध करतील आणि
कसेही करून त्यांना प्राप्त करून घेतील, वास्तविक ते आपल्यातील
कोणापासूनही फार दूर नाहीत. 28 'कारण त्यांच्यामध्ये आपण जगतो,
वागतो आणि आपले अस्तित्व आहे.' प्रत्यक्ष तुमच्या कवींपैकी काहींनी
म्हटल्याप्रमाणे, 'आपण त्यांची संतती आहोत.' 29 "यास्तव जर आपण
परमेश्वराची संतती आहोत, तर मग आपण असा विचार कधीही करू नये
की परमेश्वर म्हणजे मानवाच्या कलाकृतीने व कौशल्याने, सोने किंवा
चांदी या धातूपासून अथवा दगडापासून तयार केलेल्या प्रतिमेसारखा
आहे. 30 पूर्वी परमेश्वराने अशा अज्ञानाकडे दुर्लक्ष केले, परंतु आता सर्व
ठिकाणच्या लोकांनी पश्चात्ताप करावा अशी आज्ञा ते करीत आहे. 31
कारण त्यांनी असा एक दिवस ठरविला आहे, त्या दिवशी ते त्यांनी
नियुक्त केलेल्या मनुष्याच्या द्वारे या जगाचा न्याय नीतीने करतील.
त्यांना त्यांनी मरणातून जिवंत करून या गोष्टींबाबत प्रत्येकाला खात्री
करून दिली आहे." 32 मरण पावलेल्यांच्या पुनरुत्थानाबद्दल पौल
बोलला, तेव्हा ऐकणाऱ्यांपैकी काहींनी टोमणे मारले, परंतु इतर म्हणाले,
"आम्हाला याविषयी पुढे कधी तरी ऐकावयास आवडेल." 33 त्यामुळे,
पौल त्यांना सोडून निघून गेला. 34 काही लोक पौलाचे अनुयायी झाले
व त्यांनी विश्वास ठेवला. त्यात दिओनुस्य नावाचा अरीयपगाचा एक
सभासद, दामारी नावाची एक स्त्री व इतर काहीजण होते.

**18** यानंतर, पौलाने ॲथेन्स सोडले व तो करिंथ येथे गेला. 2 तिथे
त्याला पोनतस गावाचा अक्विला नावाचा एक यहूदी भेटला, तो
त्याची पत्नी प्रिस्किल्लाला घेऊन इटली देशातून काही दिवसांपूर्वीच तिथे
आलेला होता. कारण रोममधून सर्व यहूदी लोकांनी निघून जावे, अशी
क्लौडियस सीझरने आज्ञा केली होती. पौल त्यांच्या भेटीला गेला, 3
जसे ते तंबू तयार करणारे होते तसेच तो देखील होता, मग त्यांच्याबरोबर
राहून त्याने काम केले. 4 प्रत्येक शब्बाथ दिवशी सभागृहात यहूदी आणि
ग्रीक यांची खात्री करून देण्यासाठी तो प्रयत्न करीत असे. 5 जेव्हा
मासेदोनियाहून सीला व तीमथ्य आले, तेव्हा येशू हेच ख्रिस्त आहेत असा
प्रचार आणि साक्ष केवळ यहूदीयांनाच सांगण्यासाठी पौलाने स्वत:चे
समर्पण केले होते. 6 परंतु जेव्हा ते पौलाला विरोध करून शिवीगाळ
करू लागले, तेव्हा पौलाने याच्या निषेधार्थ त्याचे वस्त्र झटकून टाकले
आणि म्हणाला, "तुमच्या विनाशासाठी तुम्हीच जबाबदार आहात! मी
निर्दोष आहे. येथून पुढे मी गैरयहूदीयांकडे जाईन." 7 नंतर पौल सभागृह
सोडून तीतुस यूस्त नावाच्या माणसाच्या घरी गेला. तो परमेश्वराचा
उपासक होता आणि सभागृहा शेजारीच राहत असे. 8 त्या सभागृहाचा
प्रमुख क्रिस्प आणि त्याच्या कुटुंबातील सर्व लोकांनी प्रभूवर विश्वास
ठेवला आणि करिंथमधील अनेकांनी पौलाचे ऐकून विश्वास ठेवला आणि
त्यांचा बाप्तिस्मा झाला. 9 एके रात्री प्रभू पौलाशी दृष्टान्तात बोलला:
"भिऊ नकोस; बोलत राहा, गप्प राहू नकोस. 10 मी तुझ्याबरोबर आहे
आणि कोणीही तुझ्यावर हल्ला वा तुला इजा करणार नाही, कारण या
शहरात माझे अनेक लोक आहेत." 11 तेव्हा पौल त्यांना करिंथ येथे दीड
वर्ष परमेश्वराचे वचन शिकवीत राहिला. 12 गल्लियो अखया प्रांताचा
राज्यपाल झाला, तेव्हा पौलाला तिथून घालवून द्यावे म्हणून करिंथ
येथील यहूद्यांनी एकजूट होऊन त्याच्यावर हल्ला केला आणि त्याला
न्यायालयात आणले. 13 त्यांनी पौलावर असा आरोप केला, "हा मनुष्य,
आमच्या नियमशास्त्राविरुद्ध परमेश्वराची उपासना करण्यासाठी लोकांची
मने वळवित आहे." 14 पौल आता बोलणार होता इतक्यातच, गल्लियो
त्यांना म्हणाला, "जर तुम्ही यहूदी गंभीर गुन्हा किंवा दुराचाराची तक्रार
करीत असाल, तर तुमचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी काहीतरी कारण
असते. 15 परंतु ज्याअर्थी हा वाद निव्वळ शब्दांचा आणि नावांचा आणि
तुमच्या नियमशास्त्राबद्दलचा आहे, त्याअर्थी तुम्हीच हे प्रकरण मिटवा.
अशा प्रकारच्या वादांचा न्यायनिवाडा करण्याचे मी साफ नाकारतो."
16 असे म्हणून त्याने त्यांना न्यायालयासमोरून घालवून दिले. 17
त्यानंतर जमावाने सोस्थनेस या सभागृहाच्या पुढाऱ्यास पकडले आणि
न्यायालयासमोरच त्याला मार दिला; परंतु गल्लियोने तिकडे अजिबात
लक्ष दिले नाही. 18 पौल करिंथ येथे काही काळ राहिला. नंतर त्याने
तेथील विश्वासणाऱ्या बंधू व भगिनींचा निरोप घेतला आणि प्रिस्किल्ला
व अक्विलाला बरोबर घेऊन तो सीरियाला जाण्यासाठी जलप्रवासास
निघाला. परंतु या प्रवासाला निघण्याआधी, किंख्रिया या ठिकाणी पौलाने
आपल्या डोक्याचे मुंडण करून घेतले, कारण त्याने नवस केलेला
होता. 19 इफिसमध्ये पोहोचल्यावर, पौलाने प्रिस्किल्ला व अक्विलाला
तिथेच सोडले. तो स्वत: तेथील सभागृहामध्ये गेला आणि त्याने तेथील
यहूदी लोकांबरोबर युक्तिवाद गेला. 20 जेव्हा त्यांनी पौलाला विनंती
केली की, त्याने त्यांच्याबरोबर अधिक वेळ घालवावा, परंतु पौलाने ते
नाकारले. 21 परंतु निघताना मात्र त्याने त्यांना वचन दिले, "परमेश्वराची
इच्छा असेल, तर मी पुन्हा येईन." मग इफिस सोडून जलमार्गाने तो
निघाला. 22 जेव्हा तो कैसरीया येथे पोहोचला, तेव्हा तिथून तो वर
यरुशलेमकडे आला आणि तेथील मंडळीला अभिवादन करून तो
अंत्युखियास गेला. 23 अंत्युखियामध्ये थोडा काळ घालविल्यानंतर,
तिथून पौल बाहेर पडला आणि गलातीया व फ्रुगिया या प्रांतामधून
ठिकठिकाणी प्रवास करीत तेथील सर्व शिष्यांना त्याने प्रोत्साहित केले.
24 त्याचवेळी आलेक्सांद्रियाचा रहिवासी, अपुल्लोस नावाचा यहूदी
इफिस येथे आला होता. तो एक विद्वान मनुष्य होता आणि त्याला
शास्त्रलेखाचे सखोल ज्ञान होते. 25 प्रभूच्या मार्गाचे शिक्षण त्याला
देण्यात आलेले होते आणि तो आवेशाने बोलत होता, जरी त्याला फक्त
योहानाच्या बाप्तिस्म्याबद्दल माहिती होती, तरी येशूंबद्दल अचूक शिक्षण
देत होता. 26 तो धैर्याने सभागृहामध्ये बोलू लागला. जेव्हा प्रिस्किल्ला
आणि अक्विला यांनी त्याचा संदेश ऐकला, तेव्हा त्यांनी त्याला त्यांच्या

घरी आमंत्रित केले आणि परमेश्वराचा मार्ग त्याला अधिक स्पष्टपणे समजावून सांगितला. 27 जेव्हा अपुल्लोसला अखया येथे जायचे होते, तेव्हा बंधू व भगिनींनी त्याला उत्तेजन दिले व अखया येथील शिष्यांनी त्याचे स्वागत करावे असे विनंती पत्र त्याच्या हाती देऊन त्याचा निरोप घेतला. जेव्हा तो तिथे आला, तेव्हा कृपेद्वारे ज्यांनी विश्वास ठेवला होता त्यांना त्याची फार मोठी मदत झाली. 28 कारण सार्वजनिक वाद करून त्याने अतिशय सशक्तपणे यहूदीयांच्या सर्व वादांचे खंडन केले आणि शास्त्राच्या आधाराने त्यांच्या निदर्शनास आणून दिले की, येशू हेच ख्रिस्त आहेत.

**19** अपुल्लोस करिंथ येथे असताना, पौल अंतर्भागातून प्रवास करीत इफिस येथे आला. तिथे त्याला काही शिष्य आढळले. 2 त्याने त्यांना विचारले, “तुम्ही विश्वास ठेवला त्यावेळी, तुम्हाला पवित्र आत्मा मिळाला काय?” त्यांनी उत्तर दिले, “नाही, पवित्र आत्मा काय आहे हे आम्ही ऐकले देखील नाही.” 3 तेव्हा पौलाने त्यांना विचारले, “तर मग तुम्ही कोणता बाप्तिस्मा घेतला?” “योहानाचा बाप्तिस्मा,” ते उत्तरले. 4 मग पौल म्हणाला, “योहानाचा बाप्तिस्मा हा पश्चात्तापाचा बाप्तिस्मा होता. त्याने लोकांना जो त्याच्यामागून येणार होता त्या येशूंवर विश्वास ठेवण्यास सांगितले.” 5 हे ऐकल्यानंतर, त्यांचा प्रभू येशूंच्या नावात बाप्तिस्मा करण्यात आला. 6 मग पौलाने आपले हात त्यांच्यावर ठेवले, त्यावेळी पवित्र आत्मा त्यांच्यावर आला आणि ते अन्य भाषेत बोलू लागले आणि भविष्यवाणी करू लागले. 7 ते सर्व बारा पुरुष होते. 8 मग पौलाने सभागृहामध्ये प्रवेश केला आणि अतिशय धैर्याने परमेश्वराच्या राज्याविषयी संवाद करीत व प्रमाण पटवीत तीन महिने चर्चा करीत राहिला. 9 परंतु काहीजण हटवादी झाले; त्यांनी विश्वास ठेवण्याचे नाकारले आणि जाहीरपणे द्वेषाच्या भावनेने त्या मार्गाविषयी विषयी बोलू लागले. तेव्हा पौल त्यांच्यामधून निघून गेला व शिष्यांना आपल्याबरोबर घेऊन त्याने तुरन्नाच्या व्याख्यानगृहात रोज संवाद केला. 10 असे दोन वर्षे ते सातत्याने करीत राहिले. त्यामुळे आशिया प्रांतात राहणाऱ्या सर्व यहूदी व गैरयहूदी लोकांनी प्रभूचे वचन ऐकले. 11 परमेश्वराने पौलाद्वारे असाधारण अशी आश्चर्यकृत्ये केली, 12 त्यामुळे असे झाले की, ज्या रुमालांना आणि अंगावरील वस्त्रांना पौलाचा फक्त स्पर्श झाला होता, ते रुमाल व वस्त्र आजाऱ्यांकडे नेले आणि त्यांचे आजार बरे झाले आणि दुरात्मे त्यांना सोडून गेले. 13 काही यहूदी प्रभू येशूंचे नाव घेऊन फिरत होते आणि ज्यांना दुरात्म्यांनी पछाडलेले होते त्यांना मुक्त करण्याचा प्रयत्न करीत होते. ते असे म्हणत होते, “ज्या येशूंच्या नावाची पौल घोषणा करीत आहे, त्या नावाने मी तुला आज्ञा करतो की याच्यामधून बाहेर नीघ.” 14 स्कवा, हा यहूदी मुख्य याजक असून त्याचे सात पुत्र हे काम करीत होते. 15 एके दिवशी त्या दुरात्म्याने त्यांना म्हटले, “येशू मला माहीत आहे आणि पौलही मला माहीत आहे, परंतु तुम्ही कोण आहात?” 16 मग ज्या मनुष्यास दुरात्मा लागला होता त्याने त्यांच्यावर उडी मारली आणि त्याच्या शक्तीने त्या सर्वांना शरण आणले. त्यांना अशी मारपीट केली की ते उघडेनागडे व घायाळ होऊन त्या घरातून पळून गेले. 17 या घटनेची वार्ता लागलीच सर्व इफिसमध्ये राहणारे यहूदी व ग्रीक यांना कळली, तेव्हा त्या सर्वांमध्ये भीती निर्माण झाली आणि प्रभू येशूंचे नाव अत्यंत आदरणीय मानले गेले. 18 ज्या अनेकांनी विश्वास ठेवला होता ते आता पुढे आले आणि जे काही त्यांनी केले होते त्याची जाहीर कबुली दिली. 19 अनेक लोक जे जादूटोणा करीत होते, त्यांनी त्यांची पुस्तके एकत्रित आणली आणि ती सर्व लोकांसमोर जाळून टाकली. त्यांनी त्या पुस्तकांची किंमत मोजली, तेव्हा ती पन्नास हजार चांदीची नाणी एवढी झाली. 20 या रीतीने प्रभूचे वचन वाढत जाऊन प्रबळ झाले. 21 हे सर्व झाल्यानंतर, मासेदोनिया व अखया या प्रांतातून यरुशलेमला जावे, असे पौलाने आपल्या मनात ठरविले व म्हटले, “तिथे गेल्यानंतर, मी रोम या ठिकाणीही भेट दिली पाहिजे.” 22 त्याने आपले दोन मदतनीस, तीमथ्य व एरास्तला मासेदोनियास पुढे पाठविले आणि तो आणखी काही काळ आशिया प्रांतात राहिला. 23 त्याच सुमारास, या मार्गाविषयी फार मोठी खळबळ उडाली. 24 देमेत्रिय नावाच्या चांदीच्या कारागिराने अर्तमीस देवीचे चांदीचे देव्हारे तयार करून तेथील कारागिरांना पुष्कळ उद्योग मिळवून दिला होता. 25 एकदा त्याने या सारखाच व्यवसाय करणाऱ्या कारागिरांनादेखील एकत्र बोलाविले आणि तो त्यांना म्हणाला: “माझ्या मित्रांनो, या धंद्यात आपल्याला चांगला फायदा होत आहे, हे आपल्याला माहीतच आहे. 26 तुम्ही पाहता व ऐकता की इफिसातच केवळ नव्हे तर बहुतेक सर्व आशिया देशातील बहुसंख्य लोकांची या पौलाने खात्री पटवली आहे व त्यांना चुकीची कल्पना करून दिली आहे. तो म्हणतो की मानवी हातांनी तयार केलेली दैवते मुळीच परमेश्वर नाहीत. 27 आता यामध्ये धोका हा आहे की, आपल्या धंद्याचे चांगले नाव नाहीसे होईल, इतकेच नव्हे तर महादेवी अर्तमीसच्या मंदिराची सुद्धा अपकीर्ती होईल आणि ही देवता, जिची उपासना सर्व आशियामध्ये व जगामध्ये केली जाते, तिचे दैवी वैभव लुटून नेले जाईल.” 28 त्यांनी हे ऐकले, तेव्हा ते क्रोधाविष्ट झाले व मोठमोठ्याने ओरडू लागले: “इफिसकरांची अर्तमीस थोर आहे!” 29 लवकरच संपूर्ण शहरात एकच गोंधळ माजला. पौलाचे प्रवासातील सोबती, मासेदोनियाकर गायस व अरिस्तार्ख, यांना लोकांनी अटक केली आणि त्यांना नाटकगृहाकडे ओढून नेले. 30 समुदायापुढे स्वतः जावे, असे पौलाच्या मनात होते, परंतु शिष्य त्याला तसे करू देईनात. 31 त्या प्रांतातील काही अधिकारी, पौलाचे मित्र, यांनी देखील त्याला निरोप पाठविला व नाटकगृहात प्रवेश करू नये अशी त्याला विनंती केली. 32 सभेत गोंधळ माजलेला होता: कोणी काही, तर इतर दुसरेच काहीतरी म्हणत होते. खरे म्हणजे, बहुतेकांना आपण येथे कशासाठी आलो आहोत हे देखील माहीत नव्हते. 33 काही यहूद्यांनी आलेक्सांद्राला पुढे ढकलले, मग आलेक्सांद्राने लोकांपुढे बचावाचे भाषण करण्यासाठी, शांत व्हावे म्हणून हाताने खुणावले. 34 परंतु तो यहूदी आहे हे समजल्यावर, सुमारे दोन तास, “इफिसकरांची अर्तमीस थोर!” अशी आरोळी ते एका सुरात मारीत राहिले. 35 सरतेशेवटी नगर लेखनिकाने जमावाला शांत करून म्हटले: “इफिसच्या नागरिकांनो,

स्वर्गातून खाली पडलेल्या त्या थोर अर्तमीसच्या मूर्तीचे व मंदिराचे
संरक्षक इफिस शहर आहे, हे सर्व जगाला माहीत नाही का? 36 तरी,
या गोष्टी निर्विवाद आहेत, म्हणून तुम्ही शांत राहा व उतावळेपणाने
भलतेच काही करू नका. 37 तुम्ही या माणसांना येथे आणले आहे,
त्यांनी मंदिरे लुटली नाहीत व आपल्या देवीची निंदाही केली नाही. 38
जर देमेत्रिय आणि त्याच्या बरोबरच्या कारागिरांना कोणाविरुद्ध काही
तक्रार असेल तर न्यायालये उघडी आहेत आणि न्यायाधीशही आहेत. ते
आरोप करू शकतात. 39 जर यापेक्षा इतर गोष्टी असतील तर, त्या
न्यायसभेमध्ये मिटविता येतील. 40 वास्तविक, आजच्या घटनांमुळे
आपल्यावर दंगल केल्याचा आरोप येण्याचा धोका आहे, तेव्हा याचे
विशिष्ट कारण आपल्याला देता येणार नाही, कारण या दंगलीस तसे
काही कारण नव्हते.” 41 असे बोलून त्याने सभा बरखास्त केली.

**20** जेव्हा गडबड शांत झाली, तेव्हा पौलाने शिष्यांना बोलाविले आणि
त्यांना उत्तेजन दिल्यानंतर, त्यांचा निरोप घेऊन तो मासेदोनियाला
जाण्यास निघाला. 2 त्या भागातून प्रवास करून त्याने लोकांना अनेक
उत्तेजनपर शब्द सांगितले आणि शेवटी तो ग्रीसमध्ये आला, 3 तिथे तो
तीन महिने राहिला. पुढे सीरियाला जलमार्गाने जाण्याची तो तयारी
करीत असताना, यहूदी कट कारस्थान करीत आहेत, हे त्याच्या नजरेस
आले, तेव्हा मासेदोनियामधून जाण्याचे त्याने ठरविले. 4 त्याच्याबरोबर
बिरुया मध्ये राहणारा पुर्राचा पुत्र सोपत्र, थेस्सलनीका येथील अरिस्तार्ख
व सकूंद, दर्बे येथील गायस व तीमथ्य देखील, तसेच आशिया प्रांतातील
तुखिक व त्रोफिम होते. 5 ते पुढे जाऊन त्रोवास येथे आमची वाट पाहत
होते. 6 परंतु आम्ही बेखमीर भाकरीच्या सणानंतर फिलिप्पैहून तारवात
बसून पाच दिवसानंतर त्रोवास येथे एकत्रित जमलो. तिथे आम्ही सात
दिवसांचा मुक्काम केला. 7 आठवड्याच्या पहिल्या दिवशी आम्ही
भाकर मोडण्याकरिता एकत्रित आलो. पौल लोकांबरोबर बोलला आणि
दुसऱ्या दिवशी तो जाणार होता, म्हणून मध्यरात्र होईपर्यंत बोलतच
राहिला. 8 वरच्या मजल्यावरील ज्या खोलीत आम्ही जमलो होतो, तिथे
पुष्कळ दिव्यांचा प्रकाश होता. 9 तेव्हा पौल बोलत राहिल्यामुळे युतुख
नावाचा कोणी एक तरुण खिडकीत बसला असता, त्याला गुंगी येऊन
गाढ झोप लागली. तो गाढ झोपेत असताना, तिसऱ्या मजल्यावरून
खाली जमिनीवर पडला आणि त्यास उचलले तेव्हा तो मरण पावला
आहे असे दिसून आले. 10 तेव्हा पौल खाली गेला आणि त्या तरुणावर
पाखर घालून आपल्या हाताने कवटाळले व म्हणाला, “भयभीत होऊ
नका, तो जिवंत आहे!” 11 मग तो पुन्हा वरच्या मजल्यावर गेला आणि
त्याने भाकर मोडून खाल्ली. पहाट होईपर्यंत बोलत राहिल्यावर तो रवाना
झाला. 12 लोक त्या तरुणाला जिवंत घरी घेऊन आले म्हणून त्यांना
अतिशय समाधान वाटले. 13 पौल अस्सोस नगराकडे पायी जाणार
होता म्हणून त्याने असे ठरविले की, आम्ही तारवात बसून अस्सोसला
पुढे जावे आणि तिथे पोहोचल्यावर त्याला तारवात घ्यावे. 14 त्याप्रमाणे
तो अस्सोस या ठिकाणी आम्हाला भेटला, तेव्हा त्याला तारवात घेऊन
आम्ही पुढे मतुलेनास गेलो. 15 दुसऱ्या दिवशी तारवात बसून आम्ही
खियोस बंदर पार केले. त्यानंतरच्या पुढील दिवशी सामोस बंदर पार
केले, मग दुसऱ्या दिवशी मिलेतास आलो. 16 आशिया प्रांतामध्ये फार
दिवस राहावे लागू नये म्हणून इफिस शहराच्या पुढे जाण्याचे पौलाने
ठरविले होते, कारण शक्य झाल्यास पेन्टेकॉस्टच्या दिवसांच्या वेळी
यरुशलेममध्ये पोहोचावे, या दृष्टीने तो घाई करीत होता. 17 मिलेताहून
पौलाने इफिस येथील मंडळीच्या वडीलजनांना निरोप पाठविला. 18 ते
आल्यानंतर त्याने त्यांना म्हटले, “मी आशियात आल्यानंतर पहिल्या
दिवसापासून पूर्णवेळ तुम्हाबरोबर नेहमी कसा होतो व कसा राहिलो,
याची तुम्हाला जाणीव आहे. 19 म्हणजे फार नम्रतेने, आसवे गाळीत
आणि माझ्या यहूदीयांच्या कटांमुळे मजवर आलेली अतिशय कठीण
परीक्षा व संकटे सोशीत मी प्रभूची सेवा कशी केली, हे तुम्हाला माहीत
आहे. 20 जे तुमच्यासाठी हितकारक आहे, त्याचा प्रचार करण्यास उशीर
अथवा कुरकुर केली नाही, परंतु लोकांमध्ये उघडपणे आणि घरोघरी
जाऊन शिक्षण दिले. 21 त्यांनी पश्चात्ताप करून परमेश्वराकडे वळणे
आवश्यक आहे आणि आपल्या प्रभू येशूंवर विश्वास ठेवावा याविषयी
यहूदी व गैरयहूदी लोकांमध्ये मी घोषणा करीत आलो आहे. 22 “आणि
आता, जसे आत्म्याद्वारे मला यरुशलेमकडे जाण्यास भाग पाडले जात
आहे. तिथे माझ्याबाबतीत काय होणार आहे याची मला जाणीव नाही.
23 मला माहीत आहे की प्रत्येक शहरामध्ये तुरुंगवास व यातना यांना
मला तोंड द्यावे लागणार आहे, असा इशारा पवित्र आत्मा मला देत
आहे. 24 तरीपण, माझे जीवन माझ्याकरिता मोलाचे नाही; माझे एकच
ध्येय आहे की धाव संपविणे व जे कार्य प्रभू येशूंनी मला दिले आहे ते
पूर्ण करणे म्हणजे परमेश्वराने जी कृपा केली आहे, त्याची शुभवार्ता
इतरांना सांगणे हे होय. 25 “आणि आता मला माहीत झाले आहे की
ज्या तुम्हामध्ये मी परमेश्वराच्या राज्याचा प्रचार करीत फिरत होतो,
त्या तुम्ही मला पुन्हा पाहणार नाही. 26 यास्तव, मी आज तुम्हाला
जाहीर करतो की तुमच्यापैकी कोणाच्याही रक्ताबाबत मी निर्दोष आहे.
27 कारण परमेश्वराचे संपूर्ण मनोरथ सांगण्यास मी कधीही मागेपुढे
पाहिले नाही. 28 तुम्ही स्वतःवर आणि सर्व कळपावर लक्ष ठेवा, कारण
पवित्र आत्म्याने तुम्हाला देखरेख करण्यासाठी नेमले आहे. परमेश्वराने
स्वतःच्या रक्ताने ज्या मंडळीला विकत घेतले आहे, त्या परमेश्वराच्या
मंडळीचे तुम्ही मेंढपाळ व्हा. 29 मला हे माहीत आहे की मी गेल्यानंतर,
क्रूर लांडगे येतील व तुम्हामध्ये शिरतील आणि ते कळपालाही सोडणार
नाहीत. 30 प्रत्यक्ष तुमच्या गटामधून काही माणसे उठतील व त्यांना
अनुयायी मिळावेत व त्यांचे शिष्य व्हावेत म्हणून सत्य विपरीत करतील.
31 म्हणून आता तुम्ही सावध राहा! मी तुमच्याबरोबर तीन वर्षे रात्रंदिवस
आसवे गाळून तुम्हा प्रत्येकाला सावध राहण्याविषयी सूचना देण्याचे
केव्हाही थांबविले नाही, याची आठवण ठेवा. 32 “आणि आता मी
तुम्हाला परमेश्वरावर व त्यांच्या कृपेच्या वचनांवर सोपवितो, ते वचन
तुमची वृद्धी करण्यास आणि पवित्र केलेल्या सर्वांमध्ये वतन द्यावयास
समर्थ आहे. 33 मी कोणाच्याही सोन्याचा, रुप्याचा किंवा वस्त्रांचा लोभ
धरला नाही. 34 तुम्हा स्वतःस माहीत आहे की माझ्या या हातांनी माझ्या

गरजा आणि माझ्याबरोबर असणाऱ्यांच्याही गरजा भागविण्यासाठी कष्ट
केले आहेत. 35 मी केलेल्या सर्व गोष्टीत मी तुम्हाला निदर्शनास आणून
दिले आहे की, अशाप्रकारे श्रम करून आपण अशक्तांना साहाय्य करावे
व प्रभू येशू जे शब्द स्वतः बोलले होते ते स्मरणात ठेवा: 'घेण्यापेक्षा
देणे यात अधिक धन्यता आहे.'" 36 पौलाचे बोलणे संपल्यावर त्याने
सर्वांबरोबर गुडघे टेकले आणि प्रार्थना केली. 37 तेव्हा त्या सर्वांनी फार
मोठा आकांत केला व त्यांनी पौलाच्या गळ्यात मिठी मारून त्याची
चुंबने घेतली. 38 तुम्ही माझे तोंड पुन्हा पाहणार नाही हे जे वाक्य त्याने
म्हटले होते, याचे त्या सर्वात जास्त दुःख झाले होते. मग त्यांनी त्याला
तारवापर्यंत पोहोचविले.

**21** शेवटी आम्ही अतिदुःखाने रडून त्यांचा निरोप घेतल्यावर,
जहाजातून प्रवास करीत सरळ कोस येथे गेलो. दुसऱ्या दिवशी
आम्ही रुदा येथे गेलो आणि तिथून पातराला गेलो. 2 तिथे आम्हाला
फेनिके प्रांताकडे जाणारे जहाज दिसल्यावर, आम्ही त्या जहाजात
बसून पुढे प्रवासाला निघालो. 3 जाताना आम्हाला सायप्रस बेट दिसले
आणि त्याच्या दक्षिणेकडे जाऊन आम्ही पुढे सीरियातील सोर बंदरात
उतरलो, कारण तिथे जहाजातील सामान खाली करावयाचे होते. 4 तिथे
आम्ही शिष्यांना शोधून काढले, मग तिथे त्यांच्याबरोबर आम्ही सात
दिवस राहिलो. त्यांनी आत्म्याद्वारे पौलाला यरुशलेमकडे न जाण्याचा
आग्रह केला. 5 परंतु जेव्हा आम्हाला जाण्याची वेळ आली, तेव्हा तेथील
सर्वजण पत्नी आणि लेकरांसोबत आमच्याबरोबर चालत शहराच्या
सीमेपर्यंत आले आणि तिथे समुद्रकिनाऱ्यावर आम्ही गुडघे टेकून प्रार्थना
केली. 6 एकमेकांचा निरोप घेतल्यानंतर आम्ही जहाजात चढलो आणि
ते घरी परत गेले. 7 सोरापासूनचा जलप्रवास आम्ही चालू ठेवला व
त्यानंतर आम्ही प्टोलेमाईस येथे उतरलो. तेथील बंधू, भगिनींची आम्ही
भेट घेतली आणि एक दिवस त्यांच्याबरोबर राहिलो. 8 दुसऱ्या दिवशी
आम्ही निघालो व कैसरीया येथे पोहोचलो आणि सुवार्तिक फिलिप्पाच्या
घरी राहिलो, तो सात जणांपैकी एक होता. 9 त्याला चार अविवाहित
कन्या होत्या, त्या भविष्यवाणी करीत असत. 10 आम्ही अनेक दिवस
तिथे राहिल्यानंतर, एक अगब नावाचा संदेष्टा यहूदीया येथून तिथे आला.
11 आम्हाकडे येऊन त्याने पौलाचा कमरबंद घेतला व स्वतःचे हातपाय
बांधून तो म्हणाला, "पवित्र आत्मा म्हणतो, 'हा कमरबंद ज्या मनुष्याचा
आहे त्याला यरुशलेममधील यहूदी पुढारी असेच बांधून गैरयहूदीयांच्या
हाती देतील.'" 12 हे ऐकल्यानंतर आम्ही आणि लोकांनी पौलाला
यरुशलेमला न जाण्याची विनंती केली. 13 पौल म्हणाला, "तुम्ही रडून
माझे हृदय का तोडता? यरुशलेममध्ये केवळ तुरुंगात पडण्याचीच
माझी तयारी नाही, तर प्रभू येशूंच्या नावासाठी मरण्यास देखील मी
तयार आहे." 14 त्याचे मन वळत नाही हे पाहून आम्ही म्हणालो,
"प्रभूच्या इच्छेप्रमाणे होवो." 15 यानंतर आम्ही यरुशलेमकडे जाण्यास
निघालो. 16 कैसरीयातील काही शिष्य आमच्याबरोबर आले आणि
त्यांनी आम्हाला जिथे राहणार होतो त्या म्नासोनच्या घरी आणले.
हा मनुष्य सायप्रसचा असून प्रारंभीच्या शिष्यांपैकी एक होता. 17
आम्ही यरुशलेममध्ये आल्यावर विश्वासणाऱ्यांनी आमचे प्रेमाने स्वागत
केले. 18 दुसऱ्या दिवशी पौल व आम्ही याकोबास भेटण्यास गेलो.
तिथे सर्व वडीलजनही उपस्थिती होते. 19 क्षेमकुशल विचारल्यानंतर
पौलाने आपल्या सेवेद्वारे परमेश्वराने गैरयहूद्यांमध्ये जे कार्य केले होते
त्याचा सविस्तर अहवाल दिला. 20 त्यांनी हे ऐकले व परमेश्वराची
स्तुती केली. नंतर ते पौलाला म्हणाले: "हे पाहा बंधू, हजारो यहूद्यांनी
विश्वास ठेवला आहे आणि ते सर्वजण नियमशास्त्राच्या बाबतीत उत्साही
आहेत. 21 तुझ्याविषयी त्यांना असे कळविण्यात आले आहे की, तू
गैरयहूदी लोकांमध्ये राहणाऱ्या सर्व यहूदीयांस मोशेपासून फिरा आणि
आपल्या मुलांची सुंता करू नका किंवा आपल्या रूढी व प्रथांप्रमाणे
राहू नका असे शिकवितोस. 22 तर आम्ही आता काय करावे? कारण
तू येथे आला आहेस हे ते खात्रीने ऐकतील, 23 तेव्हा आम्ही सांगतो
ते कर. नवस केलेले असे आमच्यात चौघेजण आहेत. 24 तर तू या
माणसांना घेऊन शुद्धीकरणाचा विधी पूर्ण कर आणि त्यांच्या मुंडणाचा
खर्च कर, म्हणजे ते त्यांच्या डोक्यांचे मुंडण करू शकतील व प्रत्येकाला
समजेल की तू स्वतःसुद्धा नियमशास्त्र पाळतोस आणि तुझ्याबद्दलच्या
अहवालात जे सांगितलेले आहे, त्यात काही तथ्य नाही. 25 गैरयहूदी
विश्वासणाऱ्यांबद्दल म्हणशील तर आम्ही आमचा निर्णय त्यांना लिहून
कळविला आहे की त्यांनी मूर्तींना अर्पिलेले अन्न खाण्यापासून, रक्त
सेवन करण्यापासून, गळा दाबून मारलेल्या प्राण्यांचे मांस खाण्यापासून
आणि वेश्यागमन यापासून स्वतःला दूर ठेवावे." 26 दुसऱ्या दिवशी
पौलाने त्या माणसांना घेऊन त्यांच्याबरोबर स्वतःस शुद्ध करून घेतले.
जेव्हा त्यांच्या शुद्धीकरणाच्या विधीचे दिवस समाप्त होतील आणि
त्यांच्यातील प्रत्येकासाठी अर्पण करावे लागेल, त्या तारखेची सूचना
देण्यासाठी तो मंदिरात गेला. 27 ते सात दिवस अंदाजे संपत आलेले
असताना, आशियातून आलेल्या काही यहूद्यांनी पौलाला मंदिरात
पाहिले. तेव्हा त्यांनी सर्व जमावाला चिथविले व त्याला पकडले, 28 ते
मोठ्याने ओरडत म्हणाले, "अहो इस्राएल लोकहो, आमची मदत करा!
हा मनुष्य प्रत्येकाला प्रत्येक ठिकाणी आपल्या लोकांविरुद्ध, आपल्या
नियमांविरुद्ध व या स्थळाबद्दल शिकवण देतो आणि याशिवाय या
मनुष्याने गैरयहूदी लोकांना येथे आणून हे पवित्र मंदिर भ्रष्ट केले आहे."
29 या आधी त्यांनी पौलाला इफिस येथील त्रोफिमबरोबर शहरात पाहिले
होते आणि पौलाने त्याला मंदिरात आणले असावे असा त्यांचा समज
झाला होता. 30 तेव्हा सर्व शहर खळबळून गेले आणि सर्व बाजूंनी
लोक धावत आले. पौलाला जबरदस्तीने पकडून मंदिरातून ओढून
काढण्यात आले आणि तत्काळ दरवाजे बंद करण्यात आले. 31 ते
त्याला ठार करण्याच्या विचारात होते, एवढ्यात रोमी लष्करी ठाण्याच्या
सेनापतीकडे बातमी गेली की सर्व यरुशलेममध्ये गोंधळ माजला
आहे. 32 तेव्हा तो त्वरित आपल्या सैनिकांना व अधिकाऱ्यांना घेऊन
धावत समुदायाकडे गेला. मारणाऱ्यांनी सेनापतीला व फौजेला येताना
पाहिल्याबरोबर पौलाला फटके मारण्याचे थांबविले. 33 सेनापतीने
येऊन त्याला अटक केली आणि दोन साखळ्यांनी त्याला बांधण्यात

यावे अशी आज्ञा केली. नंतर त्याने तो कोण होता आणि त्याने काय केले
होते याची चौकशी केली. 34 तेव्हा समुदायातील काही लोक एक आणि
इतर दुसरे काहीतरी म्हणत होते. या गलबल्यामुळे सेनापतीला खरे ते
काही कळेना, म्हणून त्याने पौलाला बराकीत नेण्याचा हुकूम दिला. 35
पौल पायऱ्यांपर्यंत पोहोचला, त्यावेळी लोकांची हिंसा एवढी वाढली की
होती की सैनिकांना त्याला उचलून न्यावे लागले. 36 त्याच्यामागे चालत
येणारा लोकसमुदाय सारखा ओरडत होता, "याची विल्हेवाट लावा!"
37 पौलाला सैनिक आता बराकीत नेणार, एवढ्यात तो सेनापतीला
म्हणाला, "मी आपल्याबरोबर काही बोलू शकतो काय?" त्याने त्याला
विचारले. "तुला ग्रीक भाषा येते काय? 38 ज्या इजिप्तच्या मनुष्याने
थोड्या दिवसांपूर्वी बंड उठवून चार हजार दहशतवाद्यांस रानात नेले
होते, तो तूच आहेस नाही का?" 39 पौलाने उत्तर दिले, "मी यहूदी
आहे व किलिकियातील तार्सस शहराचा नागरिक असून, माझे शहर
सर्वसामान्य नाही. कृपा करून या लोकांबरोबर मला बोलू द्यावे." 40
सेनापतीची परवानगी मिळाल्यावर, पौल पायऱ्यांवर उभा राहिला आणि
लोकांनी शांत राहवे, असे त्याने हाताने खुणावले. ते सर्व शांत झाल्यावर,
तो इब्री भाषेत म्हणाला:

**22** "बंधूंनो व वडीलजनांनो, माझ्या बचावाचे भाषण ऐकून घ्या."
2 तो इब्री भाषेत बोलत आहे, हे ऐकून स्तब्धता अधिकच वाढली.
तेव्हा पौल बोलू लागला: 3 "मी एक यहूदी आहे आणि माझा जन्म
किलिकियामधील तार्सस शहरात झाला, परंतु मी या शहरात वाढलो.
माझे शिक्षण गमालियेलच्या मार्गदर्शनात झाले व आपल्या पूर्वजांच्या
नियमशास्त्राचे सविस्तर प्रशिक्षण मला मिळाले. जसे तुम्ही आज
परमेश्वराविषयी आवेशी आहात तसाच मीही होतो. 4 ज्यांनी या मार्गाचे
अनुसरण केले होते, त्यांना मरण येईपर्यंत मी त्यांचा छळ केला. स्त्री व
पुरुष या दोघांनाही बांधून तुरुंगात टाकीत होतो. 5 महायाजक व येथे
असलेले सर्व सभासद, ते स्वतः याबाबतीत साक्ष देऊ शकतात की, मी
त्यांच्याकडून दिमिष्क येथील सभेच्या सदस्यांना दाखविण्यासाठी तशी
पत्रेसुद्धा मिळविली होती आणि या लोकांना बंदिवान करून यरुशलेम
येथे आणून त्यांना शिक्षा केली जावी यासाठी तिथे गेलो. 6 "दुपारच्या
समयी मी दिमिष्कच्या जवळ आलो असताना, अकस्मात आकाशातून
माझ्याभोवती प्रकाश चकाकताना पाहिला. 7 मी जमिनीवर पडलो,
तेव्हा इब्री भाषेत बोलणारी वाणी मी ऐकली, 'शौला! शौला! तू माझा
छळ का करीत आहेस?' 8 "'प्रभूजी, आपण कोण आहात?' मी
विचारले. "प्रभूने मला उत्तर दिले, 'ज्याचा तू छळ करीत आहेस, तोच
मी नासरेथकर येशू आहे,' 9 माझ्या सहकाऱ्यांनी प्रकाश पाहिला, परंतु
जे माझ्याशी बोलत होते त्यांची वाणी त्यांनी ओळखली नाही. 10 "मी
विचारले, 'प्रभू मी काय करावे?' "प्रभू म्हणाले, 'आता उठून उभा राहा
आणि दिमिष्कमध्ये जा, जे काही तुला करावयाचे आहे, ते तुला तिथे
सांगण्यात येईल.' 11 त्या प्रखर प्रकाशामुळे मी आंधळा झालो होतो,
म्हणून माझ्या सोबत्यांनी मला हाताला धरून दिमिष्कला नेले. 12
"हनन्याह नावाचा मनुष्य मला भेटावयास आला. तो नियमशास्त्राचे
अचूक पालन करणारा होता व सर्व यहूदी लोकांचे त्याच्याबद्दल फारच
चांगले मत होते. 13 तो माझ्याजवळ उभा राहून म्हणाला, 'बंधू शौल,
तुला दृष्टी प्राप्त होवो!' आणि त्याच क्षणाला मी त्याला पाहू शकलो. 14
"नंतर त्याने मला असे सांगितले: 'आपल्या पूर्वजांच्या परमेश्वराने तुझी
निवड यासाठी केली आहे की, तू त्यांची इच्छा जाणून घ्यावीस आणि
जे नीतिमान आहेत त्यांना पाहावेस व त्यांच्या तोंडचे शब्द ऐकावेस.
15 तू जे पाहिले व ऐकले आहेस त्याविषयी तू सर्व मनुष्यांना साक्षी
होशील. 16 आणि आता विलंब कशासाठी? जा आणि बाप्तिस्मा घे
आणि त्यांच्या नावाने धावा करून आपल्या पापांपासून शुद्ध हो.' 17
"यरुशलेमला परतल्यानंतर मी मंदिरात प्रार्थना करीत होतो, तेव्हा मला
तंद्री लागली, 18 आणि मी पाहिले की प्रभू माझ्याबरोबर बोलत आहेत.
ते मला म्हणाले, 'ताबडतोब यरुशलेम सोडून जा, कारण येथील लोक
माझ्याबद्दल जी साक्ष तू देशील ती ते स्वीकारणार नाहीत.' 19 "मी
उत्तर दिले, 'प्रभू, या लोकांना माहीत आहे की, मी एका सभागृहातून
दुसऱ्या सभागृहात जाऊन विश्वासणाऱ्यांना मार देऊन तुरुंगात टाकीत
होतो. 20 आणि तुझा रक्तसाक्षी स्तेफनाचे रक्त सांडत होते, तेव्हा मी
त्याला मान्यता देत उभा होतो आणि जे धोंडमार करीत होते त्यांचे
काढून ठेवलेले अंगरखे मी राखीत होतो.' 21 "नंतर प्रभू मला म्हणाले,
'जा; कारण मी तुला फार दूर गैरयहूदीयांकडे पाठविणार आहे.'" 22 या
वाक्यापर्यंत समुदायांनी पौलाचे ऐकले. नंतर त्यांनी त्यांचा आवाज
वाढवला आणि ओरडून म्हणाले, "हा मनुष्य जमिनीला भार असा आहे!
हा जगण्यास योग्य नाही!" 23 ते ओरडत होते, आपले अंगरखे वर
हवेत फेकीत होते व धूळ आकाशात उधळीत होते, 24 तेव्हा सेनापतीने
पौलाला आत बराकीत आणण्याची आज्ञा केली. लोक त्याच्यावर इतके
का ओरडत आहेत, हे समजावे म्हणून त्याने फटके मारून त्याची चौकशी
करण्यास सांगितले. 25 जेव्हा ते पौलाला फटके मारण्यासाठी बांधत
होते त्यावेळेस पौल तिथे उभा असलेल्या शताधिपतीला म्हणाला, "ज्या
मनुष्यावर दोषारोप अजून सिद्ध झालेला नाही, अशा रोमी नागरिकाला
फटके मारणे हे कायद्याने योग्य आहे का?" 26 ते ऐकल्याबरोबर तो
अधिकारी शताधिपती सेनापतीकडे गेला व म्हणाला, "आपण काय
करत आहात? हा मनुष्य तर रोमी नागरिक आहे." 27 तेव्हा तो सेनापती
पौलाकडे गेला आणि त्याने त्याला विचारले, "मला सांग, तू रोमी
नागरिक आहेस काय?" त्याने उत्तर दिले. "होय, मी आहे." 28 त्यावर
तो सेनापती बोलला, "मला नागरिकत्व मिळण्यासाठी खूप पैसे खर्च
करावे लागले." "परंतु मी जन्मतःच रोमी नागरिक आहे," पौलाने
उत्तर दिले. 29 यामुळे जे त्याला प्रश्न विचारून त्याची चौकशी करणार
होते ते तत्काळ निघून गेले. सेनापतीला जेव्हा समजले की, पौल
एक रोमी नागरिक आहे आणि त्याचा आरोप सिद्ध होण्यापूर्वी त्याला
साखळदंडानी बांधले गेले होते, तो फार घाबरून गेला. 30 सेनापतीला
हे शोधून काढायचे होते की, खरोखर कोणत्या कारणाने यहूदी लोक
पौलाला आरोपी ठरवीत आहेत. म्हणून त्याने दुसऱ्या दिवशी पौलाला

मुक्त केले आणि मुख्य याजक व सर्व न्यायसभेचे सभासद यांना एकत्र होण्याचा हुकूम केला. त्यांनी पौलाला न्यायसभेपुढे आणून उभे केले.

**23** मग न्यायसभेकडे निरखून पाहत पौल म्हणाला, “माझ्या बंधूंनो, मी आजपर्यंत माझे परमेश्वरा संबंधीचे कर्तव्य पूर्ण सदसद्विवेकबुद्धीने करीत आलो आहे.” 2 यावेळी महायाजक हनन्याहने पौलाच्याजवळ असलेल्या लोकांना त्याच्या तोंडावर चापट मारण्याचा हुकूम केला. 3 तेव्हा पौल त्याला म्हणाला, “हे चुन्याचा लेप लावलेल्या भिंती, परमेश्वर तुझ्यावर वार करतील! तू येथे नियमशास्त्राप्रमाणे माझा न्याय करतो, परंतु तू स्वत: नियमशास्त्राचा भंग करून माझ्यावर वार करण्याची आज्ञा देतोस काय!” 4 पौलाच्या शेजारी जे उभे होते ते त्याला म्हणाले, “तू परमेश्वराच्या महायाजकाचा अपमान करण्याचे धैर्य कसे केले!” 5 पौलाने उत्तर केले, “बंधूंनो, तो महायाजक आहे, हे मला माहीत नव्हते; असे लिहिले आहे: ‘तुमच्या लोकांच्या पुढाऱ्यांपैकी कोणाला कधीही वाईट बोलू नकोस.’” 6 नंतर पौलाला, समजले की तिथे उपस्थित असलेल्या लोकांमध्ये काही सदूकी आहेत आणि इतर परूशी आहेत, तेव्हा पौल न्यायसभेच्या समोर म्हणाला, “बंधूंनो, माझे पूर्वज परूशी होते, त्यांच्याप्रमाणे मी परूशी आहे आणि माझी आशा व मृतांचे पुनरुत्थान यामुळे माझी चौकशी होत आहे.” 7 तो हे बोलला तेव्हा परूशी व सदूकी यांच्यात कलह होऊन सभेत फूट पडली. 8 कारण सदूकी लोक म्हणत की पुनरुत्थान नाही, देवदूत नाहीत आणि आत्मेही नाहीत, परंतु परूश्यांचा या सर्वांवर विश्वास होता. 9 तेव्हा मोठा गोंधळ सुरू झाला, काही नियमशास्त्राचे शिक्षक जे परूशी होते ते उठून उभे राहिले आणि जोरजोराने वादविवाद करू लागले. “आम्हाला या मनुष्यात काही अयोग्य असे आढळत नाही, ते म्हणाले, जर त्याच्याशी कदाचित एखादा आत्मा किंवा देवदूत बोलला असेल तर कसे समजावे?” 10 वादाने उग्र स्वरूप धारण केले, सरतेशेवटी सेनापतीला भीती वाटली की ते पौलाचे फाडून तुकडे करतील. तेव्हा त्याने त्याच्या सैनिकांना हुकूम दिला की, त्यांनी खाली जाऊन त्याला त्यांच्यापासून जबरदस्तीने दूर करावे आणि पुन्हा बराकीत घेऊन यावे. 11 त्याच रात्री प्रभू पौलाजवळ उभा राहिले आणि त्याला म्हणाले, “धैर्य धर! येथे यरुशलेममध्ये तू माझ्याविषयी लोकांना जशी साक्ष दिलीस, तशीच साक्ष तुला रोममध्येही द्यावीच लागणार आहे.” 12 मग दुसऱ्या दिवशी सकाळी काही यहूद्यांनी कट करून शपथ घेतली की पौलाचा वध करेपर्यंत ते अन्न व पाणी सेवन करणार नाहीत. 13 चाळीस किंवा त्याहून अधिक यहूदी या कटकारस्थानामध्ये सामील झाले. 14 नंतर ते महायाजक व वडीलजनांकडे गेले आणि म्हणाले, “पौलाचा वध करेपर्यंत आम्ही अन्न सेवन करणार नाही, अशी कडक शपथ आम्ही घेतली आहे. 15 तर आता, त्याच्याविषयी आणखी काही विचारपूस बारकाईने करावयाची आहे, या निमित्ताने त्याला आपणाकडे आणावे असे तुम्ही व न्यायसभेने सेनापतीला सुचवावे. तो येथे येण्यापूर्वी त्याला ठार करण्याच्या तयारीत आम्ही आहोत.” 16 परंतु पौलाच्या बहिणीच्या मुलाला त्यांचा हा कट समजला, तेव्हा बराकीत जाऊन त्याने पौलाला तसे कळविले. 17 तेव्हा पौलाने शताधिपतींपैकी एकाला बोलाविले व त्याला म्हणाला, “या तरुणाला सेनापतीकडे ने; या तरुणाला काहीतरी सांगावयाचे आहे.” 18 म्हणून त्याला सेनापतीकडे नेले. शताधिपती म्हणाला, “बंदिवान पौलाने, या मुलाला आपणास काही महत्त्वाचे सांगावयाचे आहे म्हणून आपणाकडे आणावे, अशी विनंती केली.” 19 तेव्हा सेनापतीने त्या तरुण मुलाचा हात धरून त्यास बाजूला नेऊन विचारले, “तुला मला काय सांगावयाचे आहे?” 20 तो म्हणाला: “पौलाकडून आणखी अधिक माहिती हवी आहे असे निमित्त सांगून उद्या आपण त्याला न्यायसभेपुढे आणावे, अशी विनंती काही यहूदी आपल्याला करणार आहेत. 21 परंतु आपण त्याकडे कृपया लक्ष देऊ नका, कारण चाळिसांहून अधिक जण त्याला ठार करण्यासाठी वाटेवर टपून बसलेली आहेत. त्याचा वध करेपर्यंत अन्न आणि पाणी सेवन करावयाचे नाही असा त्यांनी निर्णय घेतला आहे व आपण त्यांची विनंती मान्य कराल, ही त्यांची आशा आहे.” 22 तेव्हा सेनापतीने, “तू मला हे सांगितले आहेस हे कोणालाही कळू देऊ नकोस.” असा इशारा देऊन त्या तरुणाला पाठवून दिले. 23 त्यानंतर त्याने आपल्या दोन शताधिपतींना बोलाविले व त्यांना हुकूम दिला, “आज रात्री नऊ वाजता कैसरीयास जाण्यासाठी दोनशे सैनिक, सत्तर घोडेस्वार आणि दोनशे भालेकरी तयार ठेव. 24 पौलाला प्रवासासाठी घोडे द्या व त्याला राज्यपाल फेलिक्स यांच्याकडे बंदोबस्ताने सुरक्षित न्या.” 25 मग त्याने असे पत्र लिहिले: 26 महाराज, राज्यपाल फेलिक्स यास: क्लौडियस लुसियाचा: सलाम. 27 या मनुष्याला यहूदी लोकांनी पकडले होते व ते त्याला ठार मारणार होते, तेव्हा तो रोमी नागरिक आहे हे समजल्यानंतर त्याला सोडविण्यासाठी मी सैनिक पाठविले. 28 त्यांनी काय दोषारोप केला आहे हे समजून घ्यावयाचे होते म्हणून मी त्याला न्यायसभेपुढे आणले. 29 मला लवकरच समजून आले की त्यांच्यातील वाद हा नियमांविषयी होता आणि त्याबद्दल त्याला तुरुंगवास अथवा मरणाची शिक्षा देता येणार नाही. 30 परंतु या माणसाविरुद्ध कट रचण्यात येऊन तो अंमलात येण्याची शक्यता आहे असे मला समजले, तेव्हा त्याला ताबडतोब आपणाकडे पाठविले. त्याच्यावर आरोप करणाऱ्यांनी ते तुमच्यासमोर मांडावेत असा मी त्यांना हुकूम केला. 31 म्हणून सैनिकांनी, हुकुमाप्रमाणे पौलाला घेऊन त्याच रात्री अंतिपत्रिसापर्यंत पोहोचविले. 32 दुसऱ्या दिवशी त्याच्याबरोबर पुढे जाण्यास घोडदळाला त्याच्याबरोबर ठेऊन ते आपल्या बराकीत परतले. 33 ते घोडदळ कैसरीयास पोहोचले, तेव्हा त्यांनी ते पत्र राज्यपालांपुढे सादर केले आणि पौलाला त्याच्या स्वाधीन केले. 34 राज्यपालांनी पत्र वाचले आणि तो कोणत्या प्रांताचा आहे, असे विचारले. तो किलिकियाचा आहे, असे त्यास समजल्यावर, 35 राज्यपालांनी पौलाला सांगितले, “तुझ्यावर आरोप करणारे येथे आले की मी तुझे हे प्रकरण ऐकून घेईन.” नंतर राज्यपालांनी पौलाला हेरोदाच्या राजवाड्यातील पहाऱ्यात ठेवण्याचा हुकूम दिला.

**24** पाच दिवसानंतर महायाजक हनन्याह काही वडीलजनांसह
तिर्तुल्लस नावाच्या वकीलास बरोबर घेऊन कैसरीयाला गेले
आणि त्यांनी पौलाविरुद्ध केलेले त्यांचे आरोप राज्यपालापुढे सादर केले.
2 पौलाला आत बोलाविण्यात आले, तेव्हा तिर्तुल्लसाने त्याचे आरोपपत्र
फेलिक्ससमोर सादर केले: “आपल्या कारकिर्दीत आम्हास: दीर्घकाल
शांती लाभलेली आहे आणि तुमच्या दूरदृष्टीमुळे आमच्या देशात समाज
सुधारणा झाल्या आहेत. 3 यामुळे आम्ही सर्वठिकाणी आणि प्रत्येक
प्रकारे कृतज्ञतेने व मनापासून स्वागत करतो आणि श्रेष्ठ फेलिक्स आम्ही
तुमचे अत्यंत आभारी आहोत. 4 आपणास कंटाळा येणार नाही अशा
रीतीने, मी माझे म्हणणे आपणापुढे मांडणार आहे, तेव्हा कृपा करून
आपण माझे भाषण ऐकून घ्यावे, अशी आपणास विनंती आहे. 5 “हा
मनुष्य त्रासदायक असल्याचे आम्हास आढळून आले आहे तो अवघ्या
जगातील सर्व यहूदीयांना बंड करण्यास चिथावीत असतो. नासरेथकर
पंथाचा हा पुढारी आहे 6 हा मंदिर अपवित्र करण्याचा प्रयत्न करीत होता;
म्हणून आम्ही त्याला अटक केली. आम्ही आमच्या नियमानुसार त्याचा
न्याय करणार होतो 7 परंतु यरुशलेम येथील पलटणीचे सेनापती लुसिया
आले आणि त्यांनी जबरदस्ती करून त्याला आमच्या हातातून काढून
घेतले 8 व आज्ञा केली की त्याच्यावर आरोप करणाऱ्यांनी तुमच्यासमोर
यावे. आता या माणसाची आपण स्वतः चौकशी करून या आरोपात
तथ्य आहे की नाही, हे समजून घ्यावे.” 9 त्याचे बोलणे संपताच सर्व
यहूद्यांनी एकसुरात अनुमोदन दिले की सांगण्यात आलेली प्रत्येक
गोष्ट सत्य आहे. 10 राज्यपालाने त्याला बोलण्यास खुणावले, पौलाने
उत्तर दिले: “महाराज, आपण अनेक वर्षे या देशात न्यायाधीश म्हणून
आहात; त्यामुळेच मी आनंदाने माझे बचावाचे भाषण आपणापुढे करीत
आहे. 11 मंदिरामध्ये उपासना करण्यासाठी मी यरुशलेममध्ये आलो
याला बारा दिवसांहून अधिक कालावधी लोटला नाही, हे आपण सहज
पडताळून पाहू शकाल. 12 आणि मंदिरात, सभागृहामध्ये किंवा शहरात
कोणाबरोबर वादविवाद करताना किंवा लोकात अशांती माजविताना
मजवर आरोप करणाऱ्यांना मी आढळलो नाही. 13 त्यांनी जे आरोप
मजवर केले आहेत ते तुम्हाला सिद्ध करून दाखवू शकत नाहीत. 14 तरी
एक गोष्ट कबूल करतो की मी आपल्या पूर्वजांच्या परमेश्वराची उपासना
करतो व त्या मार्गाचा अनुयायी आहे ज्याला हे लोक पंथ असे म्हणतात.
त्याबरोबरच जे नियमशास्त्राला धरून आहे त्या प्रत्येक गोष्टीवर व
संदेष्ट्यांच्या लिखाणात जे लिहिले आहे, त्या प्रत्येक वचनावर माझा
विश्वास आहे, 15 परमेश्वरामध्ये या लोकांची जी आशा आहे तीच
माझीसुद्धा आहे, ती ही की नीतिमान व अनीतिमान या दोघांचेही
पुनरुत्थान होईल. 16 यामुळेच मी परमेश्वरासमोर आणि मनुष्यासमोर
माझी विवेकबुद्धी सतत स्वच्छ ठेवण्यासाठी खूप कष्ट घेतो. 17 “अनेक
वर्षे बाहेर राहिल्यानंतर, मी गरीब लोकांना साहाय्य करण्यासाठी देणग्या
व अर्पण वाहण्यासाठी यरुशलेमला परतलो. 18 यांनी मला मंदिराच्या
अंगणात शुद्धीकरणाचा विधी पूर्ण करताना पाहिले. तिथे माझ्याभोवती
जमाव नव्हता आणि मी कोणत्याही गोंधळात सहभागी झालो नव्हतो.
19 परंतु आशिया प्रांतातील काही यहूदीयांची माझ्याविरुद्ध काही तक्रार
असेल तर त्यांनी येथे हजर राहणे आवश्यक होते. 20 येथे प्रत्यक्ष
उपस्थित असलेल्या या लोकांना विचारा की त्यांच्या न्यायसभेपुढे मी
उभा होतो तेव्हा त्यांना मजमध्ये कोणता अपराध आढळून आला, 21 ही
केवळ एक गोष्ट सोडून मी त्यांच्यासमोर उच्च आवाजाने ओरडलो:
‘मृतांचे पुनरुत्थान यामुळे मी आज आपणापुढे चौकशीसाठी उभा
आहे.’” 22 फेलिक्सला या मार्गाबद्दल चांगली माहिती होती, त्याने
सुनावणी तात्पुरती थांबविली. “जेव्हा सेनापती लुसिया येईल, तेव्हा
आपण या प्रकरणाचा निकाल लावू,” असे त्याने म्हटले. 23 त्याने
शताधिपतीला हुकूम केला की, पौलावर पहारा ठेवावे परंतु त्याला
थोडीफार स्वतंत्रता दिली जावी आणि त्याच्या मित्रांना त्याची सेवा
करण्याची अधिकृत परवानगी द्यावी. 24 मग काही दिवसानंतर आपली
यहूदी पत्नी द्रुसिल्लासह फेलिक्स आला. पौलाला बोलविल्यानंतर तो
येशू ख्रिस्तावरील विश्वासासंबंधी जे बोलला ते त्यांनी ऐकले. 25 तो
जेव्हा नीतिमत्व, इंद्रियदमन आणि भावी न्याय या गोष्टीसंबंधाने बोलत
होता, तेव्हा फेलिक्स भयभीत झाला आणि म्हणाला, “आतासाठी हे
पुरे आहे! तू जाऊ शकतोस. मला पुढे अधिक सवड लाभली, तर मी
तुला पुन्हा बोलावेन.” 26 त्याचवेळेस त्याने अशीही आशा बाळगली
होती की पौल त्याला लाच देईल आणि म्हणून तो त्याला वारंवार
बोलावून घेत होता व त्याच्याबरोबर बोलणे करीत होता. 27 दोन वर्षे
निघून गेल्यानंतर, पुढे पुर्क्य फेस्त हा राज्यपाल म्हणून फेलिक्सच्या
जागेवर आला. परंतु फेलिक्सला यहूदीयावर कृपादृष्टी दाखवायची होती
म्हणून तो पौलाला कैदेतच ठेऊन निघून गेला.

**25** तीन दिवसानंतर प्रांतात आल्यानंतर, फेस्त कैसरीयाहून यरुशलेम
येथे वर गेला, 2 तेव्हा प्रमुख याजकांनी आणि यहूदी पुढाऱ्यांनी
त्याच्यासमोर पौलाविरुद्ध दोषपत्रे सादर केली. 3 त्यांनी फेस्ताला
विनंती केली की, पौलाची बदली यरुशलेमकडे करावी आणि आम्हावर
कृपादृष्टी दाखवावी, कारण पौलाला घेऊन जाताना वाटेत अचानक
त्याच्यावर हल्ला करून त्याला ठार मारण्याची योजना ते करीत होते.
4 परंतु फेस्ताने त्यांना उत्तर दिले, “पौल कैसरीया येथे कैदेत आहे
व मी लवकरच स्वतः तिथे जाणार आहे. 5 तुमच्या काही पुढाऱ्यांनी
माझ्याबरोबर यावे आणि या मनुष्याने काही गुन्हा केला असेल तर
त्यांनी त्याच्याविरुद्ध तसे आरोप तिथे सादर करावेत.” 6 त्यानंतर आठ
किंवा दहा दिवस त्यांच्याबरोबर घालविल्यानंतर, फेस्त कैसरीयास
खाली गेला. दुसऱ्याच दिवशी न्यायालय भरवून पौलाला आपल्यासमोर
आणावे असा त्याने हुकूम दिला. 7 पौल आत आल्यावर, यरुशलेमहून
आलेले यहूदी लोक त्याच्याभोवती उभे राहिले. त्यांनी त्याच्याविरुद्ध
अनेक गंभीर असे आरोप लावले, परंतु ते आरोप ते सिद्ध करू शकले
नाहीत. 8 पौलाने त्याच्या बचावासाठी उत्तर दिले, “मी यहूदी लोकांच्या
नियमशास्त्राविरुद्ध, मंदिराविरुद्ध किंवा कैसराविरुद्ध चुकीचे असे काहीही
केलेले नाही.” 9 तेव्हा यहूदी लोकांना प्रसन्न करण्यास आतुर असलेल्या
फेस्ताने पौलाला विचारले, “यरुशलेमला जाऊन तिथे माझ्यापुढे तुझी

चौकशी व्हावी, यासाठी तू तयार आहेस काय?” 10 परंतु पौलाने त्याला उत्तर दिले: “मी कैसराच्या न्यायालयापुढे उभा आहे म्हणून इथेच माझा न्याय होईल. तुम्हाला चांगले ठाऊक आहे की, मी यहूदीयांच्या विरुद्ध काहीही उपद्रव केले नाही. 11 जर मी मृत्यूस पात्र असे काही केले असेल, तर मी मरण्यास नकार देत नाही परंतु यहूदी माझ्यावर जे आरोप करतात, ते जर खरे नाहीत, तर कोणालाही मला यांच्या स्वाधीन करण्याचा अधिकार नाही. मी कैसराजवळ न्याय मागतो!” 12 त्यावर फेस्ताने आपल्या सल्लागारांची मसलत घेऊन जाहीर केले, “ठीक आहे. तू कैसराजवळ न्यायाची याचना केली आहेस, तर तू कैसरापुढेच जाशील!” 13 पुढे थोड्याच दिवसांनी राजा अग्रिप्पा आणि बर्णीका कैसरीयास फेस्तास आदर देण्यासाठी आले. 14 ते तिथे अनेक दिवस वास्तव्य करीत असल्यामुळे, फेस्ताला राजाबरोबर पौलाच्या प्रकरणाची चर्चा करण्यास वेळ मिळाला. तो म्हणाला: “फेलिक्साने ज्याला कैदेत तसेच ठेवले होते असा एक मनुष्य येथे आहे. 15 मी यरुशलेम येथे गेलो होतो, तेव्हा तेथील प्रमुख याजकांनी व इतर यहूदी पुढाऱ्यांनी त्याच्यावर दोषारोप करून त्याला शिक्षा द्यावी अशी मला विनंती केली. 16 “मी त्यांना सांगितले की, रोमी प्रथेनुसार आरोपी व वादी समोरासमोर येणे व आरोपीला स्वतः आरोपाचे खंडन करण्याची संधी मिळाल्याशिवाय कोणालाही दंड देणे योग्य नाही. 17 ते ज्यावेळी येथे चौकशीसाठी आले, त्यावेळी मी दुसऱ्याच दिवशी न्यायासनावर बसून तो वाद सुनावणीसाठी उशीर न करता घेतला व त्याला न्यायालयात आणण्याचा हुकूम केला. 18 परंतु त्याच्याविरुद्ध केलेले आरोप माझ्या कल्पनेप्रमाणे मुळीच नव्हते. 19 ते आरोप त्यांच्या धर्मासंबंधी आणि मरण पावलेल्या कोणा येशूंसंबंधी होते. पौल खात्रीने सांगतो की तो जिवंत आहे. 20 अशा प्रकारच्या प्रकरणात कसा काय निर्णय द्यावा याविषयी मी गोंधळात पडलो. तेव्हा मी पौलाला या आरोपांची चौकशी यरुशलेममध्ये व्हावी यास त्याची मान्यता आहे का, असे विचारले. 21 परंतु पौलाने कैसराकडे न्याय मागितला, तेव्हा मी त्याला बादशहाकडे नेण्याची व्यवस्था होईपर्यंत तुरुंगात ठेवण्याचा हुकूम दिला.” 22 त्यावर अग्रिप्पा फेस्तास म्हणाला, “मला स्वतः या माणसाचे म्हणणे ऐकायला आवडेल.” फेस्ताने उत्तर दिले. “तर उद्याच त्याचे भाषण ऐकावयास मिळेल.” 23 तेव्हा दुसऱ्या दिवशी, अग्रिप्पा व बर्णीका ही न्यायालयात मोठ्या रुबाबाने लष्करी अधिकाऱ्यांच्या समवेत व शहरातील प्रमुख पुरुषांसह आले. फेस्ताच्या आदेशानुसार पौलाला न्यायालयात आणण्यात आले. 24 मग फेस्त म्हणाले: “अग्रिप्पा महाराज आणि सर्व उपस्थिती लोकहो, या मनुष्याला पाहा! याच्याविरुद्ध सर्व यहूदी समाजाने यरुशलेम व कैसरीया, यांनी माझ्याकडे विनंती केली आहे आणि अशी ओरड करीत आहेत की त्याने अधिक काळ जिवंत राहू नये. 25 माझ्या मते त्याने मृत्युदंडास योग्य असे काहीही केलेले नाही, परंतु त्याने बादशहाजवळ न्याय मागितला म्हणून त्याला रोम या ठिकाणी पाठविण्याचे मी ठरविले आहे. 26 परंतु मी महाराजांना निश्चित काय लिहून कळवावे हे मला समजत नाही आणि म्हणूनच मी त्याला तुम्हासर्वांपुढे व विशेषकरून अग्रिप्पा राजांपुढे चौकशी साठी आणले आहे, यासाठी की मला जे योग्य ते लिहिता येईल. 27 कारण एखाद्या कैद्यावर असलेल्या कोणत्याही आरोपाचे स्पष्ट वर्णन केल्याशिवाय त्याला रोमला पाठविणे योग्य होणार नाही.”

**26** अग्रिप्पा राजा पौलास म्हणाला, “तुला स्वतःविषयी बोलण्यास परवानगी देण्यात आली आहे.” तेव्हा पौलाने आपल्या हाताने खूण करून बचावाचे भाषण करण्यास सुरुवात केली: 2 तो म्हणाला “महाराज अग्रिप्पा, यहूदी लोक माझ्याविरुद्ध जे आरोप करीत आहेत, त्या सर्व आरोपांना मला माझे प्रत्युत्तर आपणापुढे सादर करता येत आहे याबद्दल मी स्वतःस धन्य समजतो, 3 कारण मला माहीत आहे की आपण यहूदी लोकांच्या रूढी व मतभेद यांचे तज्ञ आहात. आता कृपया माझे म्हणणे शांतचित्ताने ऐकून घ्या. 4 “मी लहानपणापासून स्वतःच्या देशात आणि यरुशलेममध्ये माझ्या आयुष्याच्या सुरुवातीपासून आतापर्यंत कसे जगलो हे सर्व यहूदीयांस चांगले माहीत आहे. 5 ते मला बऱ्याच काळापासून ओळखतात आणि त्यांना मान्य असेल तर माझ्याबद्दल साक्षही देऊ शकतील, की आपल्या धर्माच्या पंथाबाबतीत मी नेहमीच कट्टर परूशी म्हणून जीवन जगलो. 6 परमेश्वराने आपल्या पूर्वजांना दिलेल्या अभिवचनांवर माझी आशा आहे म्हणून माझी आज चौकशी होत आहे व मी येथे उभा आहे. 7 आमचे बारा वंश अभिवचन पूर्ण होण्याची आशा बाळगत परमेश्वराची सेवा मनःपूर्वक रात्रंदिवस करीत आहेत. तरी महाराज अग्रिप्पा, त्याच आशेमुळे मजवर यहूद्यांनी आरोप ठेवला आहे. 8 परंतु मृतांचे पुनरुत्थान हे तुम्हापैकी कोणालाही अविश्वसनीय का वाटावे? 9 “मला वाटत होते की नासरेथकर येशूंच्या नावाविरुद्ध जितके काही शक्य होईल तितके करावे. 10 आणि त्याप्रकारे मी यरुशलेममध्ये केले होते. तिथे प्रभूच्या अनेक लोकांना महायाजकाच्या अधिकाराने तुरुंगात डांबले आणि त्यांचा वध करण्याकरिता मी संमती देत असे. 11 अनेकदा मी एका सभागृहातून दुसऱ्या सभागृहात जात असे व त्यांना शिक्षा करून, बळजबरीने ईश्वरनिंदा करावयास भाग पाडीत असे. त्यांचा छळ करण्यास मी इतका झपाटलेला होतो की परकीय शहरात देखील मी त्यांचा पाठलाग करीत असे. 12 “मी अशाच एका प्रवासात असताना दिमिष्कमधून महायाजकांचे अधिकारपत्र व नियुक्तपत्र बरोबर घेऊन जात होतो. 13 महाराज अग्रिप्पा, मी वाटेने जात असताना दुपारच्या सुमारास, सूर्यप्रकाशाहून अधिक तेजस्वी प्रकाश माझ्या आणि माझ्या सोबत्यांच्या भोवती आकाशातून तळपताना मी पाहिला. 14 आम्ही सर्वजण जमिनीवर पडलो, तेव्हा अरामी भाषेत बोलणारी वाणी मी ऐकली. ‘शौला, शौला, तू माझा छळ का करीत आहेस? पराणीवर लाथ मारणे तुला हानिकारक आहे.’ 15 “मी विचारले, ‘प्रभूजी, आपण कोण आहात?’ “प्रभूने त्याला उत्तर दिले, ‘ज्याचा तू छळ करीत आहेस, तो मी येशू आहे, 16 आता उठून आपल्या पायांवर उभा राहा. मी तुला यासाठी दर्शन दिले आहे की जे तू माझ्याविषयी पाहिले व जे प्रकट होणार आहे त्याविषयी तुला सेवक व साक्षी नेमावे. 17 मी तुझे लोक व गैरयहूदी लोक यांच्यापासून तुझी सुटका करेन. मी तुला त्यांच्याकडे पाठवित आहे 18 यासाठी की त्यांचे डोळे उघडावेत आणि त्यांनी अंधकारातून

प्रकाशाकडे, सैतानाच्या अधिकाराऐवजी परमेश्वराच्या सत्याकडे यावे, म्हणजे त्यांना पापक्षमा मिळेल आणि माझ्यावरील विश्वासामुळे जे पवित्र केलेले आहेत त्यांच्याबरोबर त्यांना वतन मिळावे.’ 19 “अशा रीतीने, महाराज अग्रिप्पा, मी त्या स्वर्गीय दृष्टान्ताचा अव्हेर केला नाही आणि सांगितल्याप्रमाणे केले. 20 तर मी प्रथम दिमिष्क, यरुशलेम आणि यहूदीया प्रांतातील लोकांना व गैरयहूदी लोकांना असा प्रचार केला की त्या सर्वांनी पश्चात्ताप करून परमेश्वराकडे वळावे व पश्चात्तापास योग्य अशी फळे द्यावी. 21 या कारणामुळे काही यहूद्यांनी मला मंदिराच्या अंगणात धरले आणि जिवे मारण्याचा प्रयत्न केला. 22 परंतु परमेश्वराने आजपर्यंत मला साहाय्य केले; म्हणूनच प्रत्येक लहानथोरास या गोष्टींची साक्ष सांगण्यास मी येथे उभा आहे व ज्यागोष्टी घडतील असे संदेष्टे व मोशे यांनी सांगितले होते, त्यापलीकडे मी दुसरे काहीही सांगितले नाही. 23 त्यांनी सांगितले होते की ख्रिस्त दुःख सहन करतील आणि यहूदी व गैरयहूदी अशा दोघांनाही प्रकाशाचा संदेश मिळावा म्हणून तेच प्रथम मरणातून पुन्हा उठतील.” 24 हे ऐकताच फेस्त मध्येच म्हणाला, “पौला, तुझे मन ठिकाण्यावर नाही. तुझ्या दीर्घकाळाच्या अभ्यासाने तुझे मन भ्रमिष्ट झाले आहे.” 25 परंतु पौलाने उत्तर केले, “अत्यंत थोर फेस्त महाराज, मी वेडा नाही, मी सत्य व वैचारिकदृष्ट्या योग्य तेच सांगत आहे. 26 महाराजांना या गोष्टी माहीत आहेत आणि या गोष्टी मोकळेपणाने मी तुमच्याबरोबर बोलू शकतो. कारण माझी खात्री आहे की या सर्व घटना आपल्या परिचयाच्या आहेत, कारण या गोष्टी कुठे जगाच्या कानाकोपऱ्यात घडलेल्या नाहीत. 27 अग्रिप्पा महाराज, संदेष्ट्यांवर आपला विश्वास आहे ना? आपण विश्वास ठेवता हे मला माहीत आहे.” 28 अग्रिप्पा मध्येच पौलास म्हणाला, “एवढ्या थोड्या वेळात माझे मन वळवून मला ख्रिस्ती करता येईल असे तुला वाटते का?” 29 पौलाने उत्तर दिले, “पुष्कळ अथवा थोड्या वेळात—परंतु मी परमेश्वराजवळ अशी प्रार्थना करतो की आज माझे बोलणे जे सर्वजण ऐकत आहेत व आपण सुद्धा या बेड्यांशिवाय माझ्यासारखे व्हावे.” 30 तेव्हा राजा, राज्यपाल, बर्णीका व इतर सर्वजण जाण्यासाठी उभे राहिले. 31 आणि त्या दालनातून निघून गेल्यावर, त्यांचे एकमेकाशी असे एकमत झाले, “या मनुष्याला मरणदंडाची अथवा तुरुंगवासाची शिक्षा द्यावी, असे त्याने काहीही केलेले नाही.” 32 अग्रिप्पा फेस्तास म्हणाला, “त्याने कैसराजवळ न्याय मागितला नसता, तर त्याची सुटका करता आली असती.”

**27** आम्ही इटलीस तारवातून जावे असे ठरले, तेव्हा पौल आणि इतर काही बंदिवानांना बादशाही रक्षकांच्या फलटणीतील यूल्य नावाच्या शताधिपतीच्या ताब्यात देण्यात आले. 2 तेव्हा आशियाच्या प्रांतातील किनाऱ्यावरील अनेक बंदरावर थांबत जाणाऱ्या व अद्रमुत्तीय शहरापासून निघालेल्या जहाजात बसून आम्ही समुद्राकडे निघालो, तेव्हा मासेदोनियातील थेस्सलनीका येथील रहिवासी अरिस्तार्ख नावाचा एक मनुष्य आमच्याबरोबर होता. 3 दुसऱ्या दिवशी आम्ही सीदोन बंदरात पोहोचलो; तेव्हा यूल्याने प्रेमाने पौलाला किनाऱ्यावर उतरून मित्रांकडे जाण्याची परवानगी दिली म्हणजे त्याच्या मित्रांद्वारे त्याच्या गरजा भागविल्या जातील. 4 तिथून आम्ही पुन्हा समुद्र प्रवासास निघाल्यावर तोंडासमोर वारा येत असल्यामुळे सायप्रसच्या उत्तरेला असलेले बेट आणि मुख्य भूमी यांच्यामधून गेलो. 5 आम्ही समुद्राची यात्रा करून किलिकिया व पंफुल्या या प्रांतांच्या किनाऱ्याने जाऊन लुक्यातील मूर्या येथे जाऊन पोहोचलो. 6 तिथे शताधिपतीला इटलीस जाणारे आलेक्सांद्रियाचे तारू सापडले तेव्हा त्याने आम्हाला त्या तारवात बसविले. 7 मग पुष्कळ दिवस आम्हाला मंद गतीने प्रवास करावा लागला आणि शेवटी आम्ही कनीदस बंदराजवळ आलो. वारा अद्याप तोंडासमोर येत असल्यामुळे क्रेताला वळसा घालून सलमोने शहराकडे जावे लागले. 8 पुढे वादळी वाऱ्यातून मोठ्या प्रयासाने हळूहळू मार्ग काढीत दक्षिणेकडील किनाऱ्याने आम्ही सुंदर बंदर जे लसया शहराच्या जवळ होते तिथे आलो. 9 बराच वेळ व्यर्थ गेलेला होता आणि समुद्रावरून जाणे धोक्याचे झाले होते आणि आता प्रायश्चित्ताचा दिवस होऊन गेला होता. तेव्हा पौलाने अधिकाऱ्यांना इशारा दिला, 10 तो म्हणाला, “माणसांनो, आपला हा जलप्रवास भीषण आहे कदाचित आपले तारू फुटेल, मालाची हानी होईल आणि आपले जीवसुद्धा धोक्यात येतील.” 11 परंतु शताधिपतीने, पौलाच्या सूचनेपेक्षा तांडेल व तारवाचा कप्तान यांचा सल्ला स्वीकारला. 12 कारण हे बंदर खुले असून हिवाळा घालविण्यासाठी सुरक्षित नव्हते, म्हणून बहुतेकांनी सल्ला दिला की, प्रवास पुढे चालू ठेवावा आणि जमल्यास फेनिके बंदरात जाऊन तिथे हिवाळा घालवावा. ते बंदर क्रेता या ठिकाणी होते, दक्षिण-पश्चिम आणि उत्तर-पश्चिम अशा दोन्ही दिशांकडे या बंदराचे तोंड होते. 13 जेव्हा दक्षिणी वारा मंद गतीने वाहू लागला, तेव्हा त्यांना वाटले की आता योग्य संधी आहे; म्हणून त्यांनी नांगर उचलला आणि क्रेताच्या काठाकाठाने ते प्रवास करू लागले. 14 ते फारसे दूर गेलेही नव्हते तोच, युरकुलोन नावाचा ईशान्येकडील तुफानी वारा बेटावरून अतिशय झपाट्याने वाहू लागला. 15 या वादळामध्ये तारू सापडले आणि वारा नेईल तिकडे तारू वाहत जाऊ लागले. आम्हीही तारू वाऱ्याबरोबर वाहू दिले. 16 आम्ही कौदा नावाच्या एका लहान बेटाजवळून जात असताना, मोठ्या प्रयासाने जीवनरक्षक होडी तारवाला बांधू शकलो, 17 मग ती होडीवर घेतल्यानंतर, तारवाचा खालील भाग मजबूत करण्यासाठी दोरांनी आवळून बांधले. कारण त्यांना असे भय वाटू लागले की तारू सुर्तीच्या किनाऱ्यावर जाऊन वाळूत रुतून बसेल. म्हणून त्यांनी जहाजाचे शीड उतरविले आणि जहाजाला वाहवत जाऊ दिले. 18 दुसऱ्या दिवशी समुद्र अधिकच खवळला. तेव्हा तारू हलके करण्यासाठी खलाशी तारवातील माल समुद्रात टाकू लागले. 19 तिसऱ्या दिवशी त्यांनी तारवाची अवजारे आपल्या हाताने टाकून दिली. 20 त्या तुफानी वादळाचा भयंकर जोर होता आणि अनेक दिवस सूर्याचे व ताऱ्यांचे दर्शनही आम्हास घडले नाही. शेवटी आता आमचा जीव वाचेल अशी सर्व आशा आम्ही सोडून दिली. 21 अनेक दिवस कोणी काहीही खाल्ले नव्हते, मग शेवटी पौल उभा राहून त्यांना म्हणाला: “माणसांनो, तुम्ही माझा सल्ला ऐकून

क्रेता बंदर सोडले नसते, तर हे नुकसान व हानी टळू शकली असती.
22 तरी मी तुम्हाला विनंती करतो आता धैर्य सोडण्याची गरज नाही,
आपल्यापैकी कोणाचाही नाश होणार नाही; फक्त जहाजाचेच नुकसान
होईल. 23 जो माझा परमेश्वर आहे आणि ज्याची मी सेवा करतो, त्याचा
एक देवदूत काल रात्री माझ्याजवळ उभा राहिला 24 आणि म्हणाला,
‘पौला, भिऊ नकोस, कारण तू नक्कीच कैसरापुढे चौकशीसाठी उभा
राहणार आहेस; एवढेच नव्हे, तर परमेश्वराने त्यांच्या कृपेने तुझ्याबरोबर
प्रवास करणाऱ्या सर्वांचे जीव तुझ्या हाती दिले आहेत.’ 25 यासाठी
माणसांनो, धीर धरा, कारण माझा परमेश्वरावर विश्वास आहे आणि
त्यांनी म्हटल्याप्रमाणे अगदी तसेच घडणार. 26 परंतु आपले जहाज
एका बेटावर आदळून फुटणार आहे.” 27 चौदाव्या रात्रीस अद्रिया
सागराच्या लाटांनी हैराण होऊन हेलकावे खात असताना, मध्यरात्रीच्या
सुमारास खलाश्यांना वाटले की आपण एका जमिनीजवळ येत आहोत.
28 त्यांनी तळ पाहण्यासाठी पाण्यात बुडीद टाकले, तिथे पाणी अंदाजे
37 मीटर खोल असल्याचे समजले; पुढे जाऊन पुन्हा बुडीद टाकले,
तेव्हा पाण्याची खोली 27 मीटर भरली. 29 आपले तारू खडकावर
आपटेल असे भय वाटल्यामुळे, त्यांनी तारवाच्या मागच्या बाजूने चार
नांगर टाकले आणि दिवस उजाडण्याची प्रार्थना करू लागले. 30
काही खलाश्यांनी होडी सोडून पळून जाण्याचा बेत केला. नाळीवरून
म्हणजे जहाजाच्या पुढच्या बाजूने नांगर टाकीत आहोत, असा बहाणा
करून त्यांनी होडी खाली सोडली. 31 परंतु पौल सैनिकांना आणि
शताधिपतीला म्हणाला, “हे लोक जर तारवात राहिले नाहीत, तर
तुमचे पण रक्षण होणार नाही व तुम्ही जिवंत राहणार नाही.” 32 तेव्हा
सैनिकांनी होडीचे दोर कापून ती जाईल तिकडे वाहू दिली. 33 पहाट
होण्यापूर्वी पौलाने प्रत्येकाला अन्न खाण्यासाठी विनंती केली. तो
म्हणाला, “आज चौदा दिवसापासून, अनिश्चित अशा मनःस्थितीत तुम्ही
उपाशी राहिला आहात, काहीही खाल्ले नाही. 34 आता मी विनंती करतो
की थोडेतरी खा म्हणजे तुमचा बचाव होईल कारण तुम्हातील कोणाच्या
डोक्याच्या एकाही केसाचा नाश होणार नाही.” 35 हे म्हटल्यानंतर, मग
त्याने भाकर घेऊन सर्वांसमक्ष परमेश्वराचे आभार मानले व ती मोडून
खाल्ली. 36 ते सर्व उत्तेजित झाले व त्यांनी खाण्यास सुरुवात केली.
37 जहाजात आम्ही सर्वजण मिळून दोनशे शहात्तर लोक होतो. 38
त्यांनी जेवढे पाहिजे तेवढे खाल्ल्यानंतर, खलाश्यांनी जहाजातील धान्य
समुद्रात टाकले व जहाज आणखी हलके केले. 39 दिवस उजाडला, तरी
त्यांना किनारा ओळखता आला नाही, परंतु एक खाडी व तिचा सपाट
किनारा, त्यांच्या दृष्टीस पडला व मचव्याने किनाऱ्यावर जाण्याचा त्यांनी
निश्चय केला व जलयान तिथेच ठेवले. 40 सरतेशेवटी जेव्हा तसा प्रयत्न
करण्याचे त्यांनी ठरविले, तेव्हा त्यांनी नांगर कापून टाकून, ते समुद्रात
राहू दिले सुकाणूची बंधने ढिली केली आणि पुढचे शीड वाऱ्यावर सोडून
किनाऱ्याची वाट धरली. 41 परंतु जहाज पुढे जाऊन वाळूत रुतून
बसले. नाळ घट्ट रुतली आणि वरामाचे म्हणजे जहाजाच्या मागील
भागाचे आदळणाऱ्या लाटांनी तुकडे तुकडे झाले. 42 तेव्हा कैदी पोहत
जाऊन पळून जाऊ नयेत म्हणून सर्व कैद्यांना ठार मारावे, अशी योजना
सैनिकांनी केली. 43 परंतु पौलाला वाचवावे अशी या शताधिपतीची
इच्छा होती आणि म्हणून त्याने ती योजना मान्य केली नाही. मग त्याने
हुकूम दिला की ज्यांना पोहता येत असेल, त्यांनी पहिल्याने उडी टाकून
काठास जावे. 44 त्याप्रमाणे बाकीच्यांनी कोणी फळयांवर तर कोणी
तारवाच्या तुकड्यावर बसून जावे. याप्रमाणे प्रत्येकजण किनाऱ्यावर
सुरक्षितपणे पोहोचला.

**28** किनाऱ्यावर सुरक्षित पोहोचल्यावर, आम्हाला समजले की त्या
बेटाचे नाव मलता असे होते. 2 त्या बेटावरील लोकांनी आम्हाला
असाधारण दया दाखविली. त्यांनी आमच्यासाठी शेकोटी पेटवून आमचे
स्वागत केले कारण पाऊस असून थंडी पडली होती. 3 तेव्हा पौलाने
काटक्या आणून शेकोटीवर ठेवल्या, इतक्यात उष्णता झाल्यामुळे एक
विषारी साप बाहेर निघाला व पौलाच्या हाताला विळखा घालून राहिला.
4 त्या बेटावरील लोकांनी त्या सर्पाला त्याच्या हाताला झोंबलेले पाहिले,
तेव्हा ते एकमेकास म्हणाले, “हा मनुष्य खात्रीने खुनी असला पाहिजे;
तो जरी समुद्रातून वाचला, तरी न्याय देवी त्याला जगू देणार नाही.” 5
परंतु पौलाने तो साप झटकून अग्नीत टाकला आणि त्याला काहीच
इजा झाली नाही. 6 आता पौल सुजेल किंवा तत्काळ मरून पडेल अशी
लोकांची अपेक्षा होती; परंतु पुष्कळ वेळ वाट पाहिल्यानंतर, काही
विशेष झाले नाही हे दिसल्यावर, त्यांनी आपले मन बदलले आणि तो
परमेश्वर असावा असे म्हणाले. 7 जवळच त्या बेटाच्या पुबल्य नावाच्या
मुख्याधिकाऱ्याची मालमत्ता होती. त्याने त्याच्या घरी आमचे स्वागत केले
आणि तीन दिवस आदरातिथ्य केले. 8 त्याचे वडील बिछान्यावर तापाने
व जुलाबाने आजारी होते. पौल त्याला पाहावयास गेला आणि प्रार्थना
केल्यानंतर त्याचे हात त्याच्यावर ठेऊन त्याला बरे केले. 9 हे घडून
आल्यावर, बेटावरील इतर आजारी माणसे त्याच्याकडे आली आणि
बरी होऊन गेली. 10 अनेक प्रकारे त्यांनी आमचा सन्मान केला आणि
जेव्हा आम्ही समुद्रप्रवासाला निघण्यास तयार झालो, त्यांनी आम्हाला
लागणाऱ्या सर्व आवश्यक गोष्टींचा पुरवठा केला. 11 तीन महिन्यानंतर
आलेक्सांद्रियाचे जहाज हिवाळयासाठी थांबले होते त्याने आम्ही प्रवास
सुरू केला. त्यावर त्याची निशाणी क्यास्टर व पोलक या जुळया दैवतांची
मूर्ती बसवलेली होती. 12 सुराकूस येथे आम्ही तीन दिवस राहिलो.
13 तिथून आम्ही निघालो आणि रेगियमला पोहोचलो. दुसऱ्या दिवशी
दक्षिणेकडील वारा वाहू लागल्यावर, तिथून आम्ही निघालो व एका
दिवसाच्या प्रवासानंतर पुत्युलास जाऊन पोहोचलो. 14 तिथे आम्हाला
काही विश्वासणारे आढळले आणि त्यांनी आम्हाला त्यांच्याबरोबर एक
आठवडाभर राहण्याची विनंती केली. मग आम्ही रोमला आलो. 15
तेथील बंधुजनांनी आम्ही येणार असे ऐकले आणि ते प्रवास करून
अप्पियाची पेठ व तीन उतार शाळा या ठिकाणी आम्हाला येऊन
भेटले. त्यांना पाहून पौलाने परमेश्वराचे आभार मानले आणि त्याला
प्रोत्साहन प्राप्त झाले. 16 पुढे आम्ही रोममध्ये आल्यानंतर, पौलाला
एकटे राहण्याची परवानगी देण्यात आली, मात्र पहारा करणारा एक

सैनिक त्याच्याबरोबर असे. 17 तीन दिवसानंतर पौलाने स्थानिक यहूदी
पुढाऱ्यांना एकत्र बोलाविले. ते आल्यावर तो म्हणाला: "माझ्या बंधूंनो,
मी आपल्या लोकांविरुद्ध किंवा आपल्या पूर्वजांच्या रूढींचे उल्लंघन
केलेले नाही, तरी यरुशलेममध्ये मला बंदिवान करून रोमी सरकारच्या
हवाली केले. 18 रोमी लोकांनी माझी चौकशी केली आणि मला सोडून
देण्याची त्यांची इच्छा होती, कारण मरणदंडास पात्र असा गुन्हा मी
केलेला नव्हता. 19 परंतु यहूद्यांनी माझ्या सुटकेला विरोध केल्यामुळे,
कैसराजवळ न्याय मागण्याशिवाय मला दुसरा पर्यायच राहिला नाही.
मला खरोखरच माझ्या लोकांविरुद्ध आरोप करावयाचे नव्हते 20 या
कारणामुळे मी तुम्हाला आज येथे येण्याची विनंती केली की आपली
प्रत्यक्ष भेट घ्यावी व आपल्याबरोबर बोलावे. कारण मी इस्राएलाच्या
आशेमुळे या साखळीने बांधलेला आहे." 21 तेव्हा त्यांनी उत्तर दिले,
"तुमच्यासंबंधात आम्हाला यहूदीयातून पत्रेही आली नाहीत आणि
तिथून आलेल्या आमच्या बांधवांकडून काही अहवाल कळविण्यात
आला नाही 22 परंतु आम्हाला तुमचे विचार ऐकायला हवे आहेत, कारण
या पंथाच्या विरुद्ध सर्वत्र लोक बोलत आहेत." 23 तेव्हा पौलाला
भेटण्यासाठी त्यांनी एक दिवस ठरविला आणि फार मोठ्या संख्येने तो
राहत होता त्या ठिकाणी आले. तो सकाळपासून संध्याकाळपर्यंत,
धर्मशास्त्रातून म्हणजे मोशेचे नियमशास्त्र व संदेष्ट्यांचे ग्रंथ यामधून
परमेश्वराच्या राज्याविषयी आणि येशूंविषयी शिक्षण देऊन प्रमाण
पटवीत राहिला. 24 ऐकणाऱ्यांपैकी काहींनी खात्रीपूर्वक विश्वास ठेवला,
परंतु काहींनी ठेवला नाही. 25 त्यांचे एकमेकात एकमत होत नव्हते
व पौलाचे शेवटचे निवेदन ऐकल्यावर ते उठून जाऊ लागले: पवित्र
आत्म्याद्वारे यशायाह संदेष्ट्याने तुमच्या पूर्वजांना सत्य सांगितले ते
असे: 26 "'ते नेहमी पाहत राहिले, तरी त्यांना दिसत नाही, ते नेहमी
कानांनी ऐकत असले, तरी त्यांना ऐकू येत नाही व ते ग्रहण करत
नाहीत. 27 या लोकांचे अंतःकरण असंवेदनशील करा; त्यांचे कान मंद
आणि त्यांचे डोळे बंद करा. नाहीतर ते त्यांच्या डोळ्यांनी पाहतील,
त्यांच्या कानांनी ऐकतील, अंतःकरणापासून समजतील, आणि ते मागे
वळतील आणि बरे होतील.' 28 "म्हणून तुम्हाला हे माहीत व्हावे की
परमेश्वरापासून लाभणारे तारण गैरयहूदीयांसाठी देखील आहे व ते
त्याचा स्वीकार करतील!" 29 हे त्याने म्हटल्यानंतर, यहूदी तीव्रपणे
त्यांच्यातच वादविवाद करून निघून गेले. 30 पौल पुढे दोन वर्षापर्यंत
भाड्याच्या घरात राहिला आणि तिथेच त्याला भेटण्यास येणाऱ्यांचे
तो स्वागत करीत असे. 31 त्याने मोठ्या धैर्याने आणि कोणत्याही
अडथळयाशिवाय परमेश्वराच्या राज्याची घोषणा केली आणि प्रभू येशू
ख्रिस्ताविषयीचे शिक्षण दिले!

# रोमकरांस

**1** मी पौल, ख्रिस्त येशूंचा दास, प्रेषित होण्यास पाचारलेला आणि
परमेश्वराच्या शुभवार्तेसाठी वेगळा केलेला 2 ज्या शुभवार्तेविषयी
पवित्रशास्त्रलेखात त्यांनी आपल्या संदेष्ट्यांद्वारे आधी अभिवचन
दिले होते. 3 त्यांच्या पुत्राविषयी, जे शारीरिक दृष्टीने दावीदाचे वंशज
होते, 4 ते आपले प्रभू येशू ख्रिस्त, जे पवित्रतेच्या आत्म्याद्वारे व
मृतांच्या पुनरुत्थानाच्या सामर्थ्याने परमेश्वराचे पुत्र ठरविले गेले. 5
त्यांच्याद्वारे आम्हाला कृपा व प्रेषितपण मिळाले आहे; ते यासाठी की
सर्व गैरयहूदीयांनी त्यांच्या नावाकरिता विश्वासाने आज्ञापालन करणारे
व्हावे. 6 तुम्ही सुद्धा त्या गैरयहूदीयांमधून येशू ख्रिस्ताचे होण्यासाठी
बोलाविलेले आहात. 7 रोम मधील सर्वजण, ज्यांच्यावर परमेश्वर प्रीती
करतात आणि ज्यांना त्यांचे पवित्र लोक होण्यासाठी पाचारण केले
आहे: 8 प्रथम, तुमचा विश्वास जगजाहीर होत आहे, म्हणून मी तुम्हा
प्रत्येकासाठी येशू ख्रिस्ताद्वारे माझ्या परमेश्वराचे आभार मानतो. 9 ज्या
परमेश्वराची सेवा मी माझ्या आत्म्याने व त्याच्या पुत्राच्या शुभवार्तेचा
संदेश गाजवून करतो, ते माझे साक्षी आहेत की, मी नेहमीच तुमची
आठवण करीत असतो. 10 माझ्या प्रार्थनेमध्ये मी सर्वदा प्रार्थना करतो
की शेवटी का होईना परमेश्वराची इच्छा असेल तर तुमच्याकडे येण्याचा
माझा मार्ग मोकळा व्हावा. 11 तुम्ही बळकट व्हावे म्हणून तुम्हाला
आध्यात्मिक देणगी प्रदान करावी यासाठी भेटण्यास मी उत्कंठित
झालो आहे— 12 तर एकमेकांच्या विश्वासाकडून मला व तुम्हालाही
उत्तेजन मिळावे. 13 बंधूंनो व भगिनींनो, इतर गैरयहूदीयांमध्ये मला
जशी पीकप्राप्ती झाली, तशी तुम्हामध्येही व्हावी म्हणून मी तुमच्याकडे
येण्याचा अनेकदा निश्चय केला, पण आतापर्यंत मला प्रतिबंध करण्यात
आला, हे तुम्हाला कळावे अशी माझी इच्छा आहे. 14 कारण ग्रीक व
बर्बर, तसेच शहाणे व मूर्ख या दोघांचाही मी ऋणी आहे. 15 यामुळे
तुम्ही जे रोममध्ये आहात त्या तुम्हालाही शुभवार्ता सांगण्यास मी
एवढा उत्सुक झालो आहे. 16 शुभवार्तेची मला लाज वाटत नाही,
कारण त्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाचे, प्रथम यहूदीयांचे नंतर
गैरयहूदीयांचे तारण करण्यास ती परमेश्वराचे सामर्थ्य आहे. 17 या
शुभवार्तेमध्ये परमेश्वराचे नीतिमत्व प्रकट होते व हे नीतिमत्व विश्वासाने
प्रथमपासून शेवटपर्यंत विश्वासाद्वारे साध्य होते, कारण असे लिहिले
आहे, “नीतिमान विश्वासाने जगेल.” 18 जे अनीतीने सत्य दाबून ठेवतात
त्या सर्व अधार्मिक आणि दुष्कर्म करणाऱ्या लोकांवर परमेश्वराचा क्रोध
स्वर्गातून प्रकट होतो, 19 परमेश्वराविषयी जे कळले पाहिजे ते त्यांना
प्रकट झाले आहे; स्वतः परमेश्वरानेच त्यांना ते प्रकट केले आहे. 20
कारण जगाच्या उत्पत्तीपासून, परमेश्वराचे अदृश्य गुण व त्यांचे दैवी
अस्तित्व व सनातन सामर्थ्याचे ज्ञान, त्यांच्या निर्मीतीद्वारे झालेले आहे,
म्हणून त्यांना कोणतीही सबब राहिली नाही. (aïdios g126) 21 परमेश्वराचे
ज्ञान त्यांना निश्चित होते, पण त्यांनी परमेश्वर म्हणून त्यांचे गौरव केले
नाही अथवा त्यांचे आभारही मानले नाहीत. याउलट त्यांचे विचार पोकळ
झाले आणि त्यांची मूर्ख मने अंधाराने व्याप्त झाली. 22 ते स्वतःला
शहाणे समजत असताना मूर्ख बनले 23 आणि मग त्यांनी अविनाशी
परमेश्वराच्या गौरवाची अदलाबदल करून, स्वतःसाठी नश्वर मानव, पक्षी,
पशू, सरपटणारे प्राणी यांच्या मूर्ती बनविल्या. 24 याकरिता परमेश्वरानेही
त्यांना हृदयाच्या पापी वासना व सर्वप्रकारच्या लैंगिक अशुद्धतेच्या
अधीन होऊ दिले आणि त्यांनी आपल्या शरीराची आपसात मानहानी
केली. 25 परमेश्वराविषयीच्या सत्याची अदलाबदल त्यांनी खोटेपणाशी
केली आणि उत्पन्नकर्त्या ऐवजी उत्पन्न केलेल्या वस्तूंची उपासना
व सेवा केली. तो उत्पन्नकर्ता युगानुयुग धन्यवादित आहेत. आमेन.
(aiōn g165) 26 या कारणासाठी, परमेश्वराने त्यांना निर्लज्ज वासनांच्या
स्वाधीन केले. त्यामुळे त्यांच्या स्त्रियांनी देखील नैसर्गिक लैंगिक
संबंधापेक्षा अनैसर्गिक संबंध ठेवले. 27 तसेच पुरुषही स्त्रियांबरोबर
नैसर्गिक संबंध सोडून एकमेकांविषयीच्या अभिलाषेने कामातुर होऊन,
त्यांनी एकमेकांशी लज्जास्पद कर्मे केली, याचा परिणाम असा झाला
की त्यांना त्यांच्या अपराधांची योग्य शिक्षा मिळाली. 28 यानंतरही,
परमेश्वराचे ज्ञान राखून ठेवावे हे त्यांना उचित वाटले नाही, म्हणून
परमेश्वरानेही त्यांची मने दुष्टतेच्या स्वाधीन केली, यासाठी की जे करू
नये ते त्यांनी करावे. 29 सर्वप्रकारचा दुष्टपणा व वाईटपणा, लोभ आणि
दुष्टता यांनी ते भरले. ते द्वेष, खुनशीपणा, कलह, खोटेपणा, कटुता
आणि कुटाळकी यांनी ते भरून गेले. 30 ते निंदक, परमेश्वराचा द्वेष
करणारे, उद्धट, गर्विष्ठ आणि बढाईखोर, नव्या वाईट मार्गाचा विचार
करणारे, आणि आईवडिलांची आज्ञा न मानणारे झाले; 31 ते निर्बुद्धि,
विश्वासघातकी, प्रीतिशून्य आणि दयाहीन असे झाले. 32 अशा गोष्टी
करणाऱ्यांना मरण रास्त आहे, हा परमेश्वराच्या नीतिमत्वाचा आदेश
ठाऊक असूनही, ते या गोष्टी करीतच राहिले, इतकेच नव्हे तर, जे
करतात त्यांनाही मान्यता दिली.

**2** जे तुम्ही दुसऱ्यांना दोष लावता, एखाद्या विषयाला धरून दुसऱ्यांचा
न्याय करता, त्यावेळी तुम्ही स्वतः दोषी ठरता; कारण तुम्ही जे न्याय
करणारे आहात, ते स्वतःच त्या गोष्टी करता. यामुळे, तुम्हाला कोणतीच
सबब सांगता येणार नाही. 2 आपल्याला माहीत आहे की, अशा गोष्टी
करणाऱ्यांविरूद्ध परमेश्वराचा न्याय सत्यावर आधारलेला आहे. 3 तुम्ही
सर्वसाधारण मनुष्य असून न्याय करता, पण तीच कृत्ये स्वतः करता
तर, तुम्ही परमेश्वराच्या न्यायातून सुटाल असे तुम्हाला वाटते का? 4
त्यांचा विपुल दयाळूपणा, धीर आणि सहनशीलता यांचा अवमान करून
परमेश्वराची दया तुला पश्चात्तापाकडे नेणारी आहे हे तुला समजत नाही
का? 5 तुमच्या हट्टीपणामुळे आणि पश्चात्ताप विरोधी अंतःकरणामुळे,
तुम्ही आपल्यासाठी परमेश्वराच्या क्रोधाचा दिवस व नीतीचा न्याय प्रकट
होईल तोपर्यंत क्रोध साठवून ठेवीत आहात. 6 परमेश्वर “प्रत्येकाला
ज्याच्या त्याच्या कृत्याप्रमाणे योग्य ते प्रतिफळ देतील.” 7 जे धीराने
चांगले कार्य करीत राहून गौरव, सन्मान व अविनाशीतेसाठी खटपट
करतात, त्यांना ते सार्वकालिक जीवन देतील. (aiōnios g166) 8 पण जे
स्वार्थी आणि सत्याचा नकार करणारे आणि दुष्ट मार्गांनी चालतात,

त्यांच्यावर कोप व क्रोध राहील. 9 वाईट करणाऱ्या प्रत्येक मनुष्यावर;
प्रथम यहूदीयावर आणि मग गैरयहूदीयांवर क्लेश आणि संकटे येतील.
10 परंतु सर्व चांगले काम करणाऱ्यांना; प्रथम यहूदी, नंतर गैरयहूदीयांना
परमेश्वराकडून गौरव, सन्मान व शांती ही लाभतील. 11 कारण परमेश्वर
पक्षपात करीत नाहीत. 12 नियमशास्त्राशिवाय ज्या सर्वांनी पाप केले
त्यांचा नाश नियमशास्त्राशिवाय होईल, आणि ज्यांनी नियमशास्त्राधीन
असून पाप केले असेल त्यांचा न्याय नियमशास्त्रानुसार केला जाईल. 13
नियमशास्त्र केवळ ऐकणारे परमेश्वराच्या दृष्टीने नीतिमान ठरत नाहीत,
परंतु जे नियमशास्त्र पाळणारे आहेत, त्यांना नीतिमान म्हणून घोषित
केले जाईल. 14 निश्चितच, जेव्हा गैरयहूदी लोकांजवळ नियमशास्त्र
नव्हते, तरी जे नियमशास्त्रात आहे ते नैसर्गिकरित्या पाळीत होते,
त्यांच्याजवळ नियम नव्हते तरी ते स्वतः नियम असे झाले. 15 ते
प्रदर्शित करतात की नियम त्यांच्या अंतःकरणात लिहिलेले आहे; त्यांची
विवेकबुद्धीच त्यांना साक्ष देते आणि त्यांचेच विचार त्यांना दोषी किंवा
निर्दोष ठरवितात. 16 हे त्या दिवशी घडेल जेव्हा माझ्या शुभवार्तेनुसार
परमेश्वर येशू ख्रिस्ताद्वारे प्रत्येकाच्या गुप्त रहस्यांचा न्याय करतील. 17
आता, जर तुम्ही स्वतःला यहूदी समजता व नियमशास्त्रावर अवलंबून
राहता आणि परमेश्वरामध्ये प्रौढी मिरवता; 18 तुम्हाला परमेश्वराच्या
नियमांचे शिक्षण मिळाले आहे, म्हणून तुम्ही त्यांची इच्छा ओळखता
आणि श्रेष्ठ ते पसंत करता; 19 तुम्हाला खात्री आहे की, तुम्ही एखाद्या
आंधळयाला मार्गदर्शक व्हाल व अंधारात इतरांना प्रकाश असे व्हाल. 20
नियमांचे दृश्य स्वरूप ज्ञान व सत्य यामध्ये आहे, आणि म्हणून आपण
मूर्खांचे मार्गदर्शक, लहान मुलांचे शिक्षक आहोत असे तुम्हाला वाटते.
21 जे तुम्ही, इतरांना शिकविणारे, ते तुम्ही स्वतःला का शिकवीत नाही?
चोरी करू नका म्हणून संदेश सांगणारे, तुम्ही चोरी का करता? 22 जे
तुम्ही लोकांनी व्यभिचार करू नये, असे म्हणता ते तुम्ही व्यभिचार करता
का? जे तुम्ही मूर्तीचा विटाळ मानणारे, तुम्ही मंदिर का लुटता? 23 जे
तुम्ही नियमशास्त्राचा गर्व असणारे, ते तुम्ही नियम मोडून परमेश्वराचा
अपमान का करता? 24 मग नियमशास्त्र म्हणते: "तुमच्यामुळेच
गैरयहूदी लोकांमध्ये परमेश्वराच्या नावाची निंदा होत आहे." 25 नियम
पाळत असाल तर सुंतेला काही मोल आहे; पण तुम्ही नियम पाळीत
नसाल, तर सुंता न झाल्यासारखे आहात. 26 जर ज्यांची सुंता झाली
नाही ते नियमशास्त्राचे पालन करतात, तर त्यांची सुंता न होणे, हे सुंता
झाल्यासारखे होणार नाही काय? 27 ज्यांच्या शरीराची सुंता झालेली
नसून नियम पाळतात ते तुम्हाला दोषी ठरवतील, कारण तुमच्याजवळ
लेखी नियम आहेत आणि सुंता झालेली असतानाही तुम्ही नियम तोडता.
28 कारण केवळ बाह्य स्वरूपाने कोणी यहूदी होत नाही, सुंता ही केवळ
शारीरिक आणि बाह्य नाही. 29 तोच खरा यहूदी, जो मनाने यहूदी आहे
आणि सुंता ही अंतःकरणाची सुंता आहे व ती आत्म्याद्वारे आहे, लेखी
व्यवस्थेप्रमाणे नाही. अशा व्यक्तीची प्रशंसा इतर लोकांकडून नव्हे, तर
परमेश्वरापासून होईल.

**3** तर यहूदी असून फायदा काय, किंवा सुंतेला काही मोल आहे का?
2 सर्व बाबतीत आहे! सर्वात प्रथम यहूदीयांना परमेश्वराने आपले
वचन सोपवून दिले होते. 3 जर काहीजण अविश्वासू होते तर मग काय?
त्यांचा अविश्वासूपणा हा परमेश्वराच्या विश्वासूपणाला रद्द करेल का? 4
नक्कीच नाही! प्रत्येक मनुष्य लबाड असला तरी परमेश्वर खरेच आहेत.
यासंबंधी असे लिहिले आहे: "म्हणून तुम्ही यथायोग्य न्याय दिला आहे
आणि जेव्हा तुम्ही न्याय देता तेव्हा ते दोषमुक्त असतात." 5 परंतु जर
आमच्या अनीतीमुळे परमेश्वराचे नीतिमत्व अधिक स्पष्ट होत असेल
तर आम्ही काय म्हणावे? परमेश्वर आपल्यावर क्रोध आणतात तर ते
अन्यायी आहेत काय? (मी तर हे मानवी रीतीने बोलतो.) 6 पण असे
कदापि नाही! कारण मग परमेश्वर जगाचा न्याय कसा करतील? 7
कोणी असा वाद करेल, "जर माझ्या खोटेपणाने परमेश्वराच्या खरेपणाचे
संवर्धन होते व त्यांचे अधिक गौरव होते, तर मी पापी आहे असा दोष
का लावण्यात येत आहे?" 8 किंवा, "चला आपण वाईट करू म्हणजे
यामधून काही चांगले निष्पन्न होईल" आम्ही असेच म्हणालो, असा
काहीजण आमच्यावर आरोप लावतात. त्यांची दंडाज्ञा तर योग्यच
आहे! 9 तर मग काय? यात आम्हाला काही फायदा आहे का? मुळीच
नाही! कारण आम्ही आधी यहूदी आणि गैरयहूदी सर्वजण पापाच्या
सत्तेखाली आहेत असा आरोप केला आहे. 10 असे लिहिले आहे:
"कोणीही नीतिमान नाही, एकही नाही; 11 समंजस असा कोणी नाही;
परमेश्वराला शोधणारा कोणी नाही. 12 प्रत्येकजण भटकून गेले आहेत;
सर्वजण निरुपयोगी झाले आहेत. सत्कर्म करणारा कोणीच नाही,
एकही नाही." 13 "त्यांची मुखे उघड्या थडग्यासारखी आहेत" त्यांच्या
जिभेने ते खोटे बोलतात. "नागाचे विष त्यांच्या ओठांवर असते." 14
"त्यांची मुखे तर शापाने व कडूपणाने भरलेली आहेत." 15 "रक्तपात
करावयाला त्यांचे पाय धाव घेतात, 16 दुःख व विध्वंस यांनी त्यांचे
मार्ग ओळखले जातात, 17 आणि शांतीचा मार्ग त्यांना माहीत नाही."
18 "त्यांच्या दृष्टीत परमेश्वराचे मुळीच भय नसते." 19 आपल्याला
माहीत आहे की, जे काही नियमशास्त्र सांगते ते नियमाच्या अधीन
असणाऱ्यांना सांगते, यासाठी की प्रत्येक तोंड बंद होईल व सर्व जगाला
परमेश्वरासमोर हिशोब द्यावा लागेल. 20 नियमशास्त्राप्रमाणे कृती
करणारी कोणीही व्यक्ती परमेश्वरासमोर नीतिमान म्हणून घोषित केली
जाणार नाही; आपल्या पापांची जाणीव आपणाला नियमशास्त्रामुळे
होते. 21 पण आता नियमशास्त्राव्यतिरीक्त परमेश्वराचे नीतिमत्त्व प्रकट
झाले आहे, याविषयीची साक्ष नियमशास्त्र आणि संदेष्ट्यांनी दिली
आहे. 22 परमेश्वराचे नीतिमत्व येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्यांना
दिले आहे, त्यात यहूदी व गैरयहूदी असा भेद केलेला नाही, 23 कारण
सर्वांनी पाप केले आहे, आणि परमेश्वराच्या गौरवाला अंतरले आहेत, 24
आता परमेश्वराच्या कृपेने, ख्रिस्त येशूंच्याद्वारे खंडणी भरून आपल्याला
मुक्त केले आणि विनामूल्य नीतिमान म्हणून जाहीर केले आहे. 25
ख्रिस्ताच्या सांडलेल्या रक्ताने विश्वासाद्वारे प्रायश्चिताचा यज्ञ व्हावा म्हणून
परमेश्वराने त्यांना प्रस्तुत केले. यासाठी की मागे केलेल्या आपल्या

पापांसाठी त्यांच्या सहनशीलतेमुळे दंड मिळू नये, तर त्यांचे नीतिमत्व
प्रगट व्हावे. 26 आता सध्याच्या काळात देखील ते आपले नीतिमत्व
प्रकट करीत आहेत, यासाठी की त्यांनी स्वत:वर आणि येशूंवर विश्वास
ठेवणाऱ्यांना नीतिमान म्हणून घोषित करावे. 27 तर मग आमचा
गर्व कशासाठी? तो वगळण्यात आला आहे. कोणत्या नियमानुसार?
नियमाला कर्माची जोड हवी का? नाही, नियमाला विश्वासाची गरज
आहे. 28 आमची मान्यता ही आहे की मनुष्य विश्वासाद्वारे नीतिमान
ठरतो, नियमशास्त्रातील कर्मामुळे नाही. 29 किंवा परमेश्वर केवळ
यहूदीयांचाच परमेश्वर आहे का? तो गैरयहूदीयांचा परमेश्वर नाही का? तो
गैरयहूदीयांचा सुद्धा आहेच, 30 परमेश्वर एकच आहे, मग सुंता झालेले
वा सुंता न झालेले, विश्वासाच्याद्वारे सर्वजण निरपराधी ठरतात. 31
आता आपण नियमशास्त्राला विश्वासाने निरुपयोगी करतो का? मुळीच
नाही! उलट आपण नियमशास्त्र प्रस्थापित करतो.

**4** आपण याबाबतीत काय म्हणावे, शारीरिक दृष्टीने आपला पूर्वज
अब्राहामाला काय अनुभवयास मिळाले? 2 अब्राहाम जर कृत्यांमुळे
नीतिमान ठरला असता तर त्याला बढाई मिरविण्यास काही कारण
असते; परंतु परमेश्वरासमोर नाही. 3 शास्त्रलेख काय म्हणतो?
“अब्राहामाने परमेश्वरावर विश्वास ठेवला, आणि ते त्याला नीतिमत्व असे
गणण्यात आले.” 4 आता जो परिश्रम करतो त्याची मजुरी त्याचे दान
नसून त्याचा अधिकार आहे. 5 जो व्यक्ती परिश्रम करीत नाही, परंतु जो
अधर्मी लोकांना नीतिमान ठरविणाऱ्या त्या परमेश्वरावर विश्वास ठेवतो,
तो व्यक्ती विश्वासाने नीतिमान ठरतो. 6 दावीद राजा पण तेच सांगतो
की कर्माविाचून परमेश्वर त्यांना नीतिमान म्हणून जाहीर करतो, त्यांच्या
धन्यतेचा आनंद काय वर्णावा: 7 “धन्य ते लोक, ज्यांच्या अपराधांची
क्षमा झालेली आहे, ज्यांच्या पापांवर पांघरूण घातले आहे. 8 धन्य ती
व्यक्ती, ज्याच्या हिशोबी प्रभू कधीही पापाचा दोष लावणार नाही.” 9 हा
आशीर्वाद केवळ सुंता झालेल्यांसाठी आहे की सुंता न झालेल्यांसाठी
सुद्धा आहे? आपण म्हणतो की अब्राहामाचा विश्वास त्याला नीतिमत्व
असे गणण्यात आला. 10 कोणत्या परिस्थितीत त्याला मान्यता देण्यात
आली? सुंता होण्यापूर्वी किंवा नंतर? नंतर नाही, पण आधी! 11
सुंता झालेली नसताना त्याच्या विश्वासामुळे नीतिमत्व प्राप्त होते याचा
शिक्का म्हणून सुंता ही खूण होती. जे विश्वास ठेवतात पण ज्यांची सुंता
झाली नाही, त्या सर्वांचा अब्राहाम हा पिता झाल्यामुळे त्यांना नीतिमत्व
प्राप्त व्हावे, 12 आणि तो सुंता झालेल्याचाही पिता आहे, पण ज्यांची
केवळ सुंताच झाली नाही तर जो विश्वास आपला पिता अब्राहामामध्ये
सुंता होण्यापूर्वी होता त्या विश्वासावर पाऊल ठेऊन चालतात त्यांचाही
पिता आहे. 13 अब्राहामाला व त्याच्या वंशजांना जे अभिवचन दिले
होते की तो या पृथ्वीचा वारस होईल, ते नियमशास्त्राद्वारे नव्हे, तर
विश्वासाने जे नीतिमत्व प्राप्त होते त्याद्वारे देण्यात आले होते 14 कारण
जे नियमावर अवलंबून आहेत ते जर वारसदार आहेत, तर विश्वासास
काहीच किंमत नाही आणि अभिवचने निरर्थक आहेत. 15 कारण
नियमामुळे क्रोध भडकतो आणि जिथे नियम नाही तिथे उल्लंघनही
नाही. 16 यास्तव, अभिवचन विश्वासाच्याद्वारे कृपा म्हणून अब्राहामाच्या
सर्व वंशजाला मिळते. जे केवळ नियमांच्या अधीन आहेत त्यांनाच नव्हे,
तर ज्यांचा विश्वास अब्राहामाच्या विश्वासासारखा आहे त्या सर्वांना,
कारण अब्राहाम आपल्या सर्वांचा पिता आहे. 17 असे लिहिले आहे:
“मी तुला अनेक राष्ट्रांचा पिता केले.” परमेश्वराच्या दृष्टीने अब्राहाम
आमचा पिता आहे, ज्यावर त्याने विश्वास ठेवला, जो परमेश्वर मेलेल्यांना
जीवन देतो आणि ज्यागोष्टी नाही त्या गोष्टी अस्तित्वात याव्या अशी
आज्ञा देतो. 18 आशा धरण्यास काही आधार नसताना, अब्राहामाने
आशेने विश्वास ठेवला व तो अनेक राष्ट्रांचा पिता झाला, आणि “तुझी
संततीही होईल.” असे त्याला सांगण्यात आले होते त्याचप्रमाणे झाले.
19 त्याचे शरीर जणू काही मृत अवस्थेत असताना—तो अंदाजे शंभर
वर्षाचा होता—व साराहचे गर्भाशय मृत झालेले असताना, त्याने आपला
विश्वास डळमळू दिला नाही 20 परमेश्वराच्या अभिवचनाबद्दल अब्राहाम
कधीही अविश्वासाने डळमळला नाही, परंतु विश्वासामध्ये दृढ झाला
आणि त्याने परमेश्वराला गौरव दिले. 21 अभिवचन दिल्याप्रमाणे परमेश्वर
करावयास समर्थ आहे ही त्याची पूर्ण खात्री होती. 22 त्यामुळेच, “ते
त्याला नीतिमत्व असे गणण्यात आले.” 23 हे शब्द “तो नीतिमान
ठरविला गेला” केवळ त्यांच्यासाठीच लिहिले गेले नव्हते, 24 परंतु
आपल्यासाठीही आहे, ज्यांनी प्रभू येशूंना मरणातून उठविले त्यावर
विश्वास ठेवला तर परमेश्वर आपल्यालाही नीतिमान ठरवेल. 25 त्यांना
आपल्या पापांसाठी मरणाच्या स्वाधीन करण्यात आले आणि आपल्या
नीतिमत्वासाठी पुन्हा उठविले गेले.

**5** ज्याअर्थी, विश्वासाद्वारे आपल्याला नीतिमान ठरविण्यात आले आहे,
त्याअर्थी आपल्याला प्रभू येशू ख्रिस्ताद्वारे परमेश्वराबरोबर शांती आहे,
2 ख्रिस्ताद्वारे विश्वासामुळेच त्यांनी आपल्याला या कृपेत प्रवेश दिला
आहे. येथे आपण स्थिर आहोत व आपण परमेश्वराच्या आशेच्या गौरवाची
प्रौढी मिरवितो. 3 इतकेच केवळ नव्हे तर क्लेशातही आनंद करतो,
कारण आपणास माहीत आहे की दु:ख हे धीर उत्पन्न करते. 4 धीरामुळे,
चारित्र्य; आणि चारित्र्यामुळे, आशा. 5 आशेमुळे आपण लज्जित होणार
नाही, कारण आपणाला दिलेल्या पवित्र आत्म्याद्वारे परमेश्वराची प्रीती
आपल्या अंत:करणात ओतली गेली आहे. 6 आपण अगदी दुर्बल होतो
तेव्हा ख्रिस्त योग्य वेळी, अधर्मी लोकांसाठी मरण पावले. 7 नीतिमान
मनुष्यासाठी क्वचितच कोणी मरेल; चांगल्या मनुष्यासाठी मरावयास
कोणीतरी धजेल. 8 परंतु परमेश्वर आम्हावरील स्वत:च्या प्रीतीचे प्रमाण
असे देतात की, आम्ही पापी असताना, ख्रिस्त आम्हासाठी मरण पावले.
9 त्यांच्या रक्ताने आपल्याला नीतिमान ठरविले, तर किती विशेषकरून
परमेश्वराच्या सर्व भावी क्रोधापासून त्यांच्याद्वारे आपला उद्धार होईल!
10 आपण परमेश्वराचे शत्रू असताना, त्यांच्या पुत्राच्या मरणाद्वारे आपला
समेट झाला, त्याअर्थी समेट झाल्यानंतर, कितीतरी अधिक त्यांच्या
जीवनाद्वारे तारले जाऊ! 11 एवढेच नव्हे, तर परमेश्वरामध्ये आम्ही
प्रभू येशू ख्रिस्ताद्वारे अभिमान बाळगतो, त्यांच्याद्वारे आमचा आता
समेट झाला आहे. 12 एका मनुष्याच्या द्वारे पाप जगात शिरले आणि

पापाद्वारे मरण जगात आले; सर्व लोकांमध्ये मरण पसरले, कारण
सर्वांनी पाप केले आहे. 13 नियमशास्त्र देण्यापूर्वी पाप जगात होतेच;
पण नियमशास्त्र अस्तित्वात नसल्यामुळे, कोणालाही पापाबद्दल दोषी
ठरविता येत नव्हते. 14 आदामापासून मोशेपर्यंत मृत्यूचे राज्य होते,
कारण आदामासारखा आज्ञेचा भंग त्यांनी स्वत: कधीही केलेला नव्हता.
आदाम, जो येणार होता त्याचे प्रतिरूप होता. 15 तरी देणगी ही
आज्ञाभंगासारखी नाही. कारण या एका मनुष्याने, म्हणजे आदामाने,
आपल्या पापांमुळे अनेक मानवांवर मृत्यू आणला. परंतु परमेश्वराची
कृपा व देणगी एका मनुष्याद्वारे म्हणजे येशू ख्रिस्ताच्या कृपेद्वारे अनेकांना
प्राप्त झाली. 16 परमेश्वराचे वरदान एका मनुष्याने केलेल्या पापाच्या
परिणामासारखे नाही आणि एकाच्या पापामुळे न्याय दंड मिळाला,
परंतु वरदान अनेक अपराधानंतर आले आणि आपल्याला नीतिमान
गणण्यात आले. 17 कारण जर एका मनुष्याच्या अपराधामुळे, त्याच
मनुष्याच्या द्वारे मरणाने राज्य केले, तर ज्यांना कृपेची व नीतिमत्वाची
विपुल दाने मिळाली आहेत, ते येशू ख्रिस्त जे एक मानव आहेत,
त्यांच्याद्वारे जीवनात किती विशेषकरून राज्य करतील! 18 यास्तव एका
अपराधामुळे सर्व मनुष्यजाती दंडास पात्र झाली, तसेच न्यायीपणाच्या
एका कृत्यामुळे सर्व मनुष्यजात जीवनासाठी नीतिमान ठरविली जाते.
19 कारण जसे एक मनुष्याच्या आज्ञाभंगामुळे अनेक लोक पापी ठरविले
गेले, तसेच एका मनुष्याच्या आज्ञापालनामुळे अनेक लोक नीतिमान
ठरविले जातील. 20 पापाची जाणीव वाढावी म्हणून नियमशास्त्राचा
प्रवेश झाला, कारण जिथे पाप वाढले, तिथे कृपा अति विपुल झाली,
21 यासाठी की ज्याप्रमाणे पापाने मरणाद्वारे राज्य केले, त्याचप्रमाणे
कृपेने नीतिमत्वाद्वारे राज्य करावे आणि येशू ख्रिस्त आपल्या प्रभूद्वारे
सार्वकालिक जीवन मिळावे. (aiōnios g166)

**6** तर मग आपण काय म्हणावे? आपल्याला अधिक कृपा मिळावी
म्हणून आपण पाप करीतच राहावे काय? 2 नक्कीच नाही! जे
आपण पापाला मरण पावलो आहोत, ते आपण त्यात कसे जगू
शकतो? 3 ज्या आपण सर्वांनी ख्रिस्त येशूंमध्ये बाप्तिस्मा घेतला,
त्यांच्या मृत्यूमध्येही बाप्तिस्मा घेतला हे तुम्हाला माहीत नाही का?
4 यास्तव बाप्तिस्म्याद्वारे मरणाने आपण ख्रिस्ताबरोबर पुरले गेलो
यासाठी की, ज्याप्रमाणे ख्रिस्त पित्याच्या गौरवी शक्तीने मरणातून
उठविले गेले, त्याचप्रमाणे आपणही पूर्णत: नवीन जीवन जगावे. 5
जर आपण त्यांच्या मरणामध्ये त्यांच्याशी अशा रीतीने संयुक्त झालो,
तर त्यांच्या पुनरुत्थानामध्येही त्यांच्याशी खात्रीने संयुक्त होऊ. 6
आपल्याला माहीत आहे की आपला जुना स्वभाव त्यांच्याबरोबरच
खिळला गेला व पापाच्या अधिकारात असलेले आपले शरीर निर्बल
झाले म्हणून यापुढे आपण पापाचे गुलाम असू नये. 7 कारण जो कोणी
मरण पावला आहे, तो पापापासून मुक्त झाला आहे. 8 आता जर आपण
ख्रिस्ताबरोबर मेलो, तर त्यांच्याबरोबर जिवंतही होऊ असा आपला
विश्वास आहे. 9 कारण आपल्याला ठाऊक आहे की, ख्रिस्त मरणातून
उठविले गेले ते पुन्हा मरू शकत नाहीत; यापुढे त्यांच्यावर मरणाची
सत्ता चालणार नाही. 10 त्यांचे हे मरण पापासाठी एकदाच होते; पण
आता जे जीवन ते जगतात, ते परमेश्वराकरिता जगतात. 11 याप्रमाणे,
आपण पापाला मरण पावलेले आणि ख्रिस्त येशूंद्वारे परमेश्वरासाठी
जिवंत झालेले असे माना. 12 तुम्ही वाईट वासनांच्या स्वाधीन होऊ
नये म्हणून तुमच्या मर्त्य शरीरावर पापाची सत्ता गाजवू देऊ नका. 13
तुमच्या शरीराचा कोणताही अवयव पाप करण्यासाठी दुष्टपणाचे साधन
म्हणून सादर करू नका, परंतु त्याऐवजी मरणातून जिवंत झाल्यासारखे
परमेश्वराला सादर करा; आणि आपला प्रत्येक अवयव नीतिमत्वाची
साधने होण्याकरिता त्याला सादर करा. 14 तुम्ही नियमशास्त्राधीन नाही
तर कृपेच्या अधीन आहात, म्हणून येथून पुढे पाप तुम्हावर स्वामित्व
चालविणार नाही. 15 तर मग काय? आपण नियमशास्त्राच्या अधीन
नसून कृपेच्या अधीन आहोत, म्हणून आपण पाप करावे काय? नक्कीच
नाही! 16 ज्याची आज्ञा पाळण्यासाठी तुम्ही स्वत:ला वाहवून घेता,
त्याची आज्ञा पाळण्याने तुम्ही त्याचे गुलाम बनता; पापाची गुलामी तर
मरण किंवा परमेश्वराचे आज्ञापालन तर नीतिमत्व हे तुम्हाला माहीत
नाही काय? 17 परमेश्वराचे आभारी आहोत, कारण पूर्वी तुम्ही पापाचे
गुलाम होता, परंतु आता तुम्हाला जी शिकवण दिली आहे तिचे तुम्ही
अंत:करणापासून आज्ञापालन केले आणि तुम्ही समर्पित आहात. 18
तुम्ही पापापासून मुक्त होऊन आता नीतिमत्वाचे दास झाला आहात.
19 तुमच्या मानवी रीतीप्रमाणे रोजच्या जीवनातील उदाहरण घेऊन
मी बोलतो. तुम्ही आपले अवयव अशुद्धपणाला व सतत वाढणाऱ्या
दुष्टपणाला दास म्हणून समर्पित केले होते, तसे आता स्वत:स जे
नीतिमत्व पावित्र्याकडे नेते त्यास दास म्हणून समर्पित करा. 20 जेव्हा
तुम्ही पापाचे दास होता, तेव्हा नीतिमत्वाच्या बंधनातून मुक्त होता. 21
ज्यासाठी तुम्हाला आता लाज वाटते त्या गोष्टींपासून त्यावेळी तुम्हाला
काय लाभ मिळाला? त्या गोष्टींचा परिणाम तर मरण आहे. 22 पण
आता तुम्ही पापाच्या सत्तेपासून मुक्त झाला असून परमेश्वराचे दास
झाला आहात, आणि जो लाभ तुम्हाला मिळाला आहे तो पावित्र्याकडे
नेतो व त्याचा परिणाम सार्वकालिक जीवन आहे. (aiōnios g166) 23
कारण पापाचे वेतन मरण आहे, पण परमेश्वराचे कृपादान आपल्या प्रभू
येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे. (aiōnios g166)

**7** बंधूंनो आणि भगिनींनो, ज्यांना नियमशास्त्र माहीत आहे,
त्यांच्याबरोबर मी बोलतो, एखादी व्यक्ती जोपर्यंत जिवंत आहे
तोपर्यंत नियमशास्त्राचे प्रभुत्व तिच्यावर राहते हे तुम्हाला समजत नाही
काय? 2 उदाहरणार्थ, लग्न झालेली स्त्री तिचा पती जिवंत असेपर्यंत
त्याला बांधलेली असते, परंतु जर तिचा पती मरण पावला, तर ती ज्या
नियमाद्वारे त्याला बांधलेली असते त्यापासून मुक्त होते. 3 पती जिवंत
असताना, तिने दुसऱ्या पुरुषाशी संबंध ठेवले तर तिला व्यभिचारिणी
म्हणतात; पण पती मरण पावल्यावर ती त्या नियमापासून मुक्त होते;
नंतर तिने दुसऱ्या पुरुषाशी विवाह केला, तर ती व्यभिचारिणी होत
नाही. 4 त्याप्रमाणे बंधू व भगिनींनो, तुम्ही सुद्धा ख्रिस्ताच्या शरीराद्वारे
नियमशास्त्राला मृत झाले आहात, म्हणून तुम्ही दुसऱ्याचे, जो मरणातून

उठविला गेला त्याचे व्हावे यासाठी की तुम्ही परमेश्वरासाठी फळ द्यावे.
5 आपण पापी स्वभावाच्या नियंत्रणात होतो, व ज्या कृत्यांचे फळ मरण
आहे, ती करावयास आपल्या वासना नियमानुसार आपल्यामध्ये कार्य
करीत होत्या. 6 परंतु आता ज्याने आपल्याला बांधून ठेवले होते, त्याला
आपण मेलेले आहोत, म्हणून नियमशास्त्रातील जुन्या लेखाप्रमाणे नव्हे,
तर एका नव्या आत्म्याच्या मार्गाने सेवा करू या. 7 तर मग आपण
काय म्हणावे? नियम पापमय आहे का? नक्कीच नाही! नियमाशिवाय
पाप काय आहे हे मला समजले नसते. “तू लोभ करू नको,” असे
नियमशास्त्र मला म्हणाले नसते, तर लोभ काय आहे हे मला कधीच
समजले नसते. 8 परंतु पापाने नियमांचा फायदा घेऊन संधी साधून
माझ्यामध्ये सर्वप्रकारचा लोभ उत्पन्न केला; कारण नियमांशिवाय पाप
मृत आहे. 9 अशी वेळ होती जेव्हा मी नियमशास्त्राशिवाय जिवंत होतो;
परंतु आज्ञा आल्यावर, पाप जीवित झाले आणि मी मरण पावलो. 10
वास्तविक ज्या आज्ञांनी जीवन द्यावयास पाहिजे होते, त्याच आज्ञांनी
मरण आले हे मला आढळून आले. 11 पापाने आज्ञांच्या योगे गैरफायदा
घेऊन मला फसविले, आणि आज्ञांच्या द्वारे मला ठार मारले. 12
वास्तविक नियमशास्त्र पवित्र आहे, आणि आज्ञा पवित्र, न्याययुक्त
आणि उत्तम आहेत. 13 परंतु जे उत्तम ते माझ्या मरणास कारणीभूत
झाले काय? असे नक्कीच नाही. पाप ते पाप दिसावे, आणि चांगल्याद्वारे
पापाने माझ्यामध्ये मृत्यू उत्पन्न केला, यासाठी की आज्ञेद्वारे पाप हे
पराकोटीचे पाप दिसून यावे. 14 नियमशास्त्र आध्यात्मिक आहे; हे
आपल्याला माहीत आहे. पण मी तर पापाला गुलाम म्हणून विकलेला
दैहिक प्राणी आहे. 15 मी काय करतो हे मला समजत नाही. कारण जे
मला करावेसे वाटते, ते मी करत नाही, जे करण्याचा मला तिटकारा
येतो, तेच मी करीत असतो. 16 जर मी जे करू नये ते करतो, तर
नियमशास्त्र चांगले आहे, हे मी मान्य करतो. 17 कारण या गोष्टी
करणारा मी स्वतः नाही, तर माझ्यामध्ये वसत असलेले पाप करते.
18 माझ्या देहस्वभावा मध्ये काहीच चांगले वसत नाही. वास्तविक
जे चांगले ते करण्याची मला इच्छा असते पण मला ते करता येत
नाही. 19 चांगले करावे असे मला वाटते, पण मी ते करीत नाही, परंतु
वाईट जे मला करावेसे वाटत नाही ते मी करीत राहतो. 20 आता जे
मला करावयास नको असते, तेच मी करतो, ते मी नाही तर जे पाप
माझ्यामध्ये वसते ते करते. 21 योग्य ते करावे, असे मला वाटते, पण
वाईट माझ्या अगदी जवळच असते, हा नियम कार्यरत आहे असे मला
आढळते. 22 परमेश्वराच्या नियमामुळे माझ्या अंतःकरणात मी आनंद
करतो. 23 पण माझ्यामध्ये आणखी एक नियम आढळतो, आणि तो
माझ्या मनातील नियमाशी युद्ध करतो आणि मला कैद करतो व मला
पापाच्या नियमाच्या स्वाधीन करतो. 24 मी किती कष्टी मनुष्य! या
मृत्यूच्या शरीरापासून मला कोण सोडवेल? 25 परमेश्वराचा धन्यवाद
असो! जे येशू ख्रिस्त आपला प्रभू यांच्याद्वारे मला मुक्त करतात. मी
स्वतः माझ्या मनामध्ये परमेश्वराच्या नियमाचा गुलाम, परंतु माझ्या
पापी स्वभावात मी पापाच्या नियमाचा दास आहे.

**8** यास्तव, जे आता ख्रिस्त येशूंमध्ये आहेत त्यांना दंडाज्ञा नाही. 2
कारण ख्रिस्त येशूंच्याद्वारे आत्म्याच्या नियमाने जे तुम्हाला जीवन
देतात, त्यांनी तुम्हाला पापाचे नियम व मरण यातून मुक्त केले आहे. 3
कारण आपल्या पापी स्वभावामुळे आपल्याला वाचविण्यास नियम
असमर्थ होते, तेव्हा परमेश्वराने स्वतःच्या पुत्राला पापमय मनुष्यासारखे
व पापबली म्हणून पाठविले व मानवी स्वभावात जे पाप राज्य करीत
होते त्याला दोषी ठरविले. 4 यासाठी की जे देहाने नव्हे तर पवित्र
आत्म्याप्रमाणे जीवन जगतात, त्यांच्यामध्ये नियमांसाठी आवश्यक
असणारे नीतिमत्व पूर्ण व्हावे. 5 जे आपल्या शारीरिक स्वभावाला
अनुसरून जीवन जगतात, त्यांची मने दैहिक गोष्टींकडे असतात, परंतु जे
पवित्र आत्म्याला अनुसरून जीवन जगतात त्यांची मने आत्म्याच्या
इच्छेप्रमाणे करण्याकडे असतात. 6 मन दैहिक असणे म्हणजे मरण
आहे; पवित्र आत्म्याने नियंत्रित मनाला जीवन व शांती लाभते, 7
कारण दैहिक मन परमेश्वरविरोधी आहे; ते परमेश्वराच्या नियमाच्या
अधीन होत नाही आणि कधीही होणार नाही. 8 जे देहाच्या सत्तेखाली
आहेत ते परमेश्वराला संतुष्ट करू शकणार नाहीत. 9 तुम्ही देहाच्या
सत्तेखाली नाही, परंतु जर परमेश्वराचा आत्मा तुमच्यामध्ये राहतो तर
तुम्ही आत्म्याच्या सत्तेखाली आहात, जर कोणामध्ये ख्रिस्ताचा आत्मा
वास करीत नाही, तर तो ख्रिस्ताचा नाही. 10 जर ख्रिस्त तुम्हामध्ये
आहे, आणि पापामुळे तुमचे शरीर मरण पावले; पण नीतिमत्वामुळे
तुमचा आत्मा जिवंत राहील. 11 आणि ज्यांनी येशूंना मेलेल्यातून
उठविले, त्यांचा आत्मा जर तुम्हामध्ये वास करीत असेल, तर ज्यांनी
ख्रिस्ताला मरणातून उठविले ते तुमच्यामध्ये राहत असणाऱ्या त्याच
पवित्र आत्म्याद्वारे तुमची मर्त्य शरीरे जिवंत करतील. 12 यास्तव,
बंधूंनो आणि भगिनींनो, आपण ऋणी आहोत, परंतु देहस्वभावाप्रमाणे
जगण्यास देहाचे ऋणी नाही. 13 कारण तुम्ही देहस्वभावाप्रमाणे वागत
राहिला, तर मराल. पण पवित्र आत्म्याच्या शक्तीने दैहिक कुकर्मे नष्ट
केलीत, तर जगाल. 14 कारण ज्यांना परमेश्वराचा आत्मा चालवितो, ती
परमेश्वराची लेकरे आहेत, 15 पुन्हा भीती बाळगावी असा दास्यतेचा
आत्मा तुम्हाला मिळालेला नाही; याउलट असा आत्मा मिळाला आहे की
ज्यामुळे तुम्ही दत्तकपुत्र झाला आहात आणि, “अब्बा, बापा” अशी हाक
मारू शकता. 16 कारण पवित्र आत्मा स्वतः आपल्या आत्म्याबरोबर
साक्ष देतो की आपण परमेश्वराची मुले आहोत. 17 ज्याअर्थी आपण मुले
आहोत, त्याअर्थी आपण परमेश्वराचे वारस, ख्रिस्ताबरोबर सहवारस
आहोत, जर आम्ही खरोखर त्यांच्या दुःखात सहभागी होतो, तर त्यांच्या
गौरवात सुद्धा सहभागी होऊ. 18 तर आपल्याला पुढे जे गौरव प्रकट
होणार आहे, त्याच्या तुलनेने वर्तमान काळातील दुःखे काहीच नाहीत.
19 कारण परमेश्वर आपल्या लेकरांना प्रकट करेल, त्या दिवसाची अखिल
सृष्टी वाट पाहत आहे. 20 कारण सृष्टी स्वतःच्या निवडीनुसार निराशेच्या
स्वाधीन नाही, तर त्यांनी तिला या आशेच्या स्वाधीन ठेवले ते, 21
यासाठी की स्वतः सृष्टी विनाशाच्या दास्यत्वातून मोकळी होईल आणि
परमेश्वराच्या मुलांना मिळणाऱ्या स्वतंत्रेत व गौरवात सहभागी होईल.

22 कारण आपल्याला ठाऊक आहे की संपूर्ण सृष्टी प्रसूती वेदनांच्या
क्लेशांप्रमाणे आतापर्यंत कण्हत आहे. 23 ज्या आपणाला आत्म्याचे
प्रथमफळ मिळाले आहे, ते आपणही कण्हत आहोत, आपण देखील
त्या परमेश्वराची दत्तक मुले म्हणून आपल्या शरीराचा उद्धार होईल
त्या दिवसाची आतुरतेने वाट पाहत आहोत, 24 आणि या आशेमध्येच
आपण तारण पावलो आहोत. जी आशा दृश्य आहे ती आशाच नव्हे.
जे काही आहे त्याची आशा कोण धरेल? 25 पण जे अद्यापि प्राप्त
झाले नाही त्याबद्दल आशा ठेवतो, तर आपण धीराने वाट पाहतो.
26 त्याच प्रकारे, पवित्र आत्माही आपल्या अशक्तपणात आपणास
साहाय्य करतो. कारण प्रार्थना कशासाठी करावी हे आपल्याला समजत
नाही, पण पवित्र आत्मा आपल्यासाठी शब्दाविना कण्हण्याने मध्यस्थी
करतो. 27 आणि जो आपली अंतःकरणे शोधतो तो आत्म्याचे मन
जाणतो, कारण आत्मा परमेश्वराच्या इच्छेनुसार परमेश्वराच्या लोकांसाठी
मध्यस्थी करतो. 28 आणि आपल्याला माहीत आहे की, परमेश्वरावर
प्रीती करणारे आणि जे त्याच्या संकल्पनेप्रमाणे बोलावलेले आहेत,
त्यांच्या कल्याणार्थ सर्वगोष्टी सहकारी ठरतात. 29 ज्यांच्याविषयी
परमेश्वराला पूर्वज्ञान होते व त्यांनी आपल्या पुत्राच्या प्रतिमेप्रमाणे व्हावे,
यासाठी त्यांना पूर्वनियोजित केले होते की त्यांनी अनेक बंधू आणि
भगिनीमध्ये ज्येष्ठ असे व्हावे. 30 आणि त्यांनी ज्यांना पूर्वनियोजित
केले, त्यांना बोलाविले; व ज्यांना बोलाविले, त्यांना नीतिमान ठरविले व
ज्यांना नीतिमान ठरविले, त्यांचे त्यांनी गौरव ही केले. 31 अशा गोष्टींना
प्रतिसाद म्हणून काय म्हणावे? जर परमेश्वर आपल्या पक्षाचे आहेत तर
आमच्याविरुद्ध कोण असू शकेल? 32 ज्यांनी स्वतःच्या पुत्रास राखून न
ठेवता आपणा सर्वांकरिता त्यांना दिले, तर ते आपल्याला त्यांच्यासोबत
सर्वकाही उदारतेने देणार नाहीत काय? 33 परमेश्वराने ज्यांना निवडले
आहे त्यांच्यावर आरोप करण्यास कोण धजेल? नीतिमान ठरविणारे
ते परमेश्वरच आहेत. 34 तर असा कोण आहे जो आपल्याला दंडाज्ञा
देईल? कोणी नाही. ख्रिस्त येशू जे मरण पावले, इतकेच नव्हे तर
जिवंत असे उठविले गेले आणि तेच आता परमेश्वराच्या उजवीकडे बसून
आमच्यासाठी मध्यस्थी करीत आहेत. 35 मग ख्रिस्ताच्या प्रीतीपासून
आपल्याला कोण विभक्त करू शकेल? संकट किंवा आपत्ती किंवा छळ
किंवा दुष्काळ किंवा नग्नता, धोका किंवा तरवार काय? 36 कारण असे
लिहिले आहे: “तुमच्याकरिता आम्ही दिवसभर मृत्यूचा सामना करीत
असतो, वधाची प्रतीक्षा करणाऱ्या मेंढरांसारखे आम्हाला गणण्यात
आले आहे.” 37 नाही, या सर्व गोष्टीत ज्यांनी आमच्यावर प्रीती केली,
त्यांच्याद्वारे आम्ही अत्यंत विजयी आहोत. 38 कारण माझी खात्री आहे
की ना मरण ना जीवन, ना देवदूत ना भुते, ना वर्तमान ना भविष्यकाळ,
ना कोणती शक्ती, 39 अथवा उंची, खोली आणि सृष्टीमधील कोणतीही
गोष्ट आपल्या प्रभू येशू ख्रिस्तामधील परमेश्वराच्या प्रीतीपासून आपणास
विभक्त करू शकणार नाही.

**9** मी ख्रिस्तामध्ये सत्य बोलतो, असत्य नाही, पवित्र आत्मा माझ्या
विवेकबुद्धीला पुष्टी देतो. 2 माझे अंतःकरण मोठ्या दुःखाने व अविरत
पीडेने भरून गेले आहे. 3 मी माझ्या बंधूंसाठी जे शारीरिक रीतीने माझे
स्वजातीय आहेत, त्यांच्यासाठी शापित होऊन ख्रिस्तापासून वेगळे होऊ
शकलो असतो तर बरे झाले असते. 4 हे इस्राएली लोक आहेत. त्यांनाच
दत्तकपण, दैवी गौरव, करार, नियम, मंदिराची सेवा आणि अभिवचनेही
दिली आहेत. 5 पूर्वज हे त्यांचेच आहेत, त्यांच्याद्वारे ख्रिस्ताची, जे
सर्वोच्च परमेश्वर आहेत, शारीरिक वंशावळी समजते. त्यांची सर्वकाळ
स्तुती असो! आमेन. (aiōn g165) 6 तर असे नाही की परमेश्वराचे वचन
अयशस्वी ठरले. इस्राएल वंशातून आलेला प्रत्येकजण इस्राएली असेल
असे नाही. 7 कारण त्याचे वंशज आहेत म्हणून ते सर्व अब्राहामाची मुले
आहेत असे नाही. याउलट, “इसहाकाद्वारेच तुझी संतती वाढेल.” 8
याचा अर्थ असा की शारीरिक रीतीने जन्मलेली मुले ही परमेश्वराची मुले
नाहीत, जी अभिवचनानुसार जन्मलेली लेकरे, तीच अब्राहामाची मुले
गणली जातील. 9 कारण अशा रीतीने वचन दिले होते: “मी निश्चित
वेळेत परत येईल, आणि साराहला एक पुत्र होईल.” 10 एवढेच नव्हे,
परंतु रिबेकाहच्या लेकरांचीही एकाच वेळी आपला पिता इसहाकाद्वारे
गर्भधारणा झाली होती. 11 जुळया मुलांचा जन्म होण्याआधी, किंवा
चांगले वाईट करण्याआधी; परमेश्वराचा उद्देश निवडीसंबंधाने कायम
राहावा. 12 कृत्याने नव्हे तर पाचारण देणाऱ्याने असे रिबेकाहला
सांगितले होते, “मोठा लहान्याची सेवा करेल.” 13 जसे शास्त्रलेखात
लिहिले आहे: “मी याकोबावर प्रीती केली, परंतु मी एसावाचा द्वेष
केला.” 14 तर मग आपण काय म्हणावे? परमेश्वर अन्यायी आहे का?
नक्कीच नाही. 15 कारण ते मोशेला म्हणाले: “ज्याच्यावर मला कृपा
करावयाची, त्याच्यावर मी कृपा करेन आणि ज्याच्यावर मला दया
करावयाची, त्याच्यावर मी दया करेन.” 16 हे मानवी इच्छेने किंवा
प्रयत्नांनी नव्हे, तर परमेश्वराच्या दयेवर अवलंबून आहे. 17 शास्त्रलेख
फारोहला सांगते: “मी तुला याच एका उद्देशाने राखून ठेवले की, माझे
सामर्थ्य तुझ्यामध्ये प्रकट व्हावे आणि माझे नाव अखिल पृथ्वीवर जाहीर
व्हावे.” 18 यास्तव ज्यांच्यावर दया करावी असे परमेश्वराला वाटते,
त्यांच्यावर ते दया करतात व ज्याला कठोर करावे त्यांना ते कठोर
करतात. 19 तुमच्यापैकी काही मला म्हणतील: “परमेश्वर आम्हाला
दोष का लावतात? त्यांच्या इच्छेला विरोध कोण करणार?” 20 मानव
असून, परमेश्वराला उलट उत्तर देणारे तुम्ही कोण? “घडलेल्या वस्तूने
ती घडविणाऱ्याला, ‘तू मला असे का घडविलेस असे म्हणावे काय?’”
21 कुंभाराला एकाच मातीच्या गोळयातून एक पात्र विशेष उद्देशासाठी
व काही सामान्य वापरासाठी घडविण्याचा अधिकार नाही काय? 22
परंतु आपला क्रोध दाखववा आणि आपले सामर्थ्य प्रकट करावे असे
परमेश्वराने ठरविले तर, नाशासाठी सिद्ध झालेल्या क्रोधाच्या पात्रांचे फार
सहनशीलतेने सहन करतील काय? 23 त्यांनी हे अशासाठी केले की
पूर्वीच तयार केलेल्या दयेच्या पात्राला त्यांच्या वैभवाची धनसंपत्ती प्रकट
करावी. 24 आम्हाला पण त्यांनी बोलाविले, केवळ यहूदीयातूनच नाही
तर गैरयहूदीयातूनही नाही का? 25 होशेयाने म्हटल्याप्रमाणे: “जे माझे
लोक नाहीत त्यांना मी ‘माझे लोक’ म्हणेन; आणि जी मला प्रिय नाही

तिला मी ‘माझी प्रिया’ असे म्हणेन,” 26 आणि, “ज्या ठिकाणी म्हटले
होते, तुम्ही माझे लोक नाहीत, तिथे त्यांना जिवंत परमेश्वराची लेकरे
असे म्हणतील.” 27 यशायाह इस्राएलाविषयी उच्च वाणीने म्हणतो:
“इस्राएलाची संख्या समुद्राच्या वाळूच्या कणासारखी असली, तरी
अवशिष्ट मात्र तारले जातील. 28 कारण प्रभू त्यांचा दंड पृथ्वीवर वेगाने
आणि निर्णयात्मक रीतीने अंमलात आणतील,” 29 यशायाहने आधी
म्हटल्याप्रमाणे: “सेनाधीश प्रभूने जर आमचे वंशज वाचविले नसते,
तर आम्ही सदोमासारखे झालो असतो आणि गमोरासारखी आमची
गत झाली असती.” 30 तर मग आपण काय म्हणावे? गैरयहूदी लोक
खऱ्या अर्थाने नीतिमत्वाचा शोध करीत नव्हते, तरी त्यांना विश्वासाद्वारे
नीतिमत्व प्राप्त झाले. 31 पण नियमशास्त्राद्वारे नीतिमत्व मिळण्यासाठी
प्रयत्न करणारे इस्राएल लोक मात्र ते प्राप्त करू शकले नाहीत. 32 का
नाही? कारण विश्वासाने नव्हे तर कर्माने मिळेल म्हणून ते त्याच्यामागे
लागले. ते अडखळविणाऱ्या धोंड्याला अडखळले. 33 असे लिहिले
आहे: “पाहा, सीयोनात मी लोकांना ठेच लागण्याचा एक दगड व
अडखळण्याचा एक खडक ठेवतो ज्यामुळे ते पडतील, पण त्यांच्यावर
विश्वास ठेवणारा कधीही लज्जित होणार नाही.”

**10** बंधूंनो व भगिनींनो, माझी मनापासून इच्छा व परमेश्वराजवळ
प्रार्थना आहे की इस्राएल लोकांचे तारण व्हावे. 2 ते परमेश्वराप्रती
आवेशी आहेत, हे मला ठाऊक आहे, परंतु तो आवेश ज्ञानावर आधारित
नाही, याबद्दल मी साक्ष देतो. 3 परमेश्वराच्या नीतिमत्वाविषयी त्यांना
माहीत नाही. ते परमेश्वराच्या नीतिमत्वाच्या अधीन न होता, त्यांनी
स्वतःचे नीतिमत्व स्थापित करण्याचे प्रयत्न केले. 4 कारण ख्रिस्त
नियमशास्त्रांची परिपूर्ती आहे, यासाठी की विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला
नीतिमत्व प्राप्त व्हावे. 5 नियमशास्त्रावर आधारित नीतिमत्वासंबंधी
मोशेने अशा रीतीने लिहिले: “जो कोणी या गोष्टी करेल तो त्यामुळे जिवंत
राहील.” 6 पण विश्वासाने मिळणारे नीतिमत्व सांगते: “असे आपल्या
मनात म्हणू नका की, ‘स्वर्गात कोण चढेल?’” (म्हणजे, ख्रिस्ताला
खाली आणण्यासाठी) 7 “किंवा ‘खाली पाताळात कोण उतरेल?’”
(म्हणजे, ख्रिस्ताला मेलेल्यांमधून वर आणण्यासाठी) (Abyssos g12) 8
याचा अर्थ काय आहे? “हे वचन तुमच्याजवळ आहे; ते तुमच्या मुखात
व हृदयात आहे,” हा विश्वासाचा संदेश आम्ही गाजवितो: 9 “येशू प्रभू
आहे,” असे तुम्ही मुखाने जाहीर कराल व परमेश्वराने त्यांना मेलेल्यातून
उठविले असा तुमच्या अंतःकरणात विश्वास धराल, तर तुमचे तारण
होईल. 10 कारण तुमच्या अंतःकरणात विश्वास ठेवल्यानेच तुम्ही
नीतिमान ठरता; आणि आपल्या मुखाने इतरांना आपल्या विश्वासाबद्दल
सांगितले की तारण होते. 11 शास्त्रलेख म्हणते, “जो कोणी प्रभू येशूंवर
विश्वास ठेवितो तो कधीही लज्जित होणार नाही.” 12 यहूदी व गैरयहूदी
यामध्ये फरक नाही; त्या सर्वांचा एकच प्रभू आहे आणि जे त्यांचा
धावा करतात त्या सर्वांना ते विपुल आशीर्वाद देतात, 13 परंतु, “जो
कोणी प्रभूच्या नावाने त्यांचा धावा करेल तोच वाचेल.” 14 ज्याच्यावर
त्यांनी विश्वास ठेवला नाही, तर ते त्याचा धावा कसा करतील? आणि
ज्याच्याविषयी त्यांनी कधी ऐकलेच नाही, तर त्याच्यावर विश्वास
कसा ठेवतील? आणि कोणी त्यांना संदेश सांगितलाच नाही, तर ते
कसे ऐकतील? 15 आणि कोणाला पाठविल्यावाचून ते संदेश कसा
सांगतील? कारण असे लिखित आहे: “शुभवार्ता आणणाऱ्याचे पाय
किती मनोरम आहेत!” 16 परंतु शुभवार्ता सर्वच इस्राएल लोकांनी
स्वीकारली नाही. यशायाह म्हणतो, “प्रभू, आमच्या वार्तेवर कोणी
विश्वास ठेवला आहे?” 17 तरीपण, संदेश ऐकल्यानेच विश्वास प्राप्त
होतो, आणि ख्रिस्ताचा संदेश, वचन ऐकल्यामुळे प्राप्त होतो. 18
परंतु मी विचारतो: त्यांनी ऐकले नाही का? होय, ऐकले: “पृथ्वीच्या
दिगंतापर्यंत त्यांची वाणी गेली आहे, कारण जगाच्या शेवटपर्यंत त्यांचा
शब्द गेला आहे.” 19 मी पुन्हा विचारतो: हे इस्राएली लोकांना कळलेच
नाही का? प्रथम मोशे म्हणतो, “जे राष्ट्र नाही त्यांच्याद्वारे मी तुम्हाला
ईर्षेस आणेन; ज्या राष्ट्राला समज नाही त्याद्वारे मी तुम्हाला क्रोधास
आणेन.” 20 यशायाह धिटाईने म्हणाला, “ज्यांनी माझा शोध केला
नव्हता, त्यांना मी सापडलो आहे; ज्यांनी माझ्याविषयी विचारपूस केली
नव्हती, त्यांना मी स्वतःस प्रकट केले.” 21 इस्राएलाबद्दल तो म्हणतो,
“आज्ञा न पाळणाऱ्या आणि हट्टी लोकांसाठी मी आपले हात दिवसभर
पुढे केले आहेत.”

**11** मग मी विचारतो: परमेश्वराने आपल्या लोकांचा त्याग केला आहे
काय? मुळीच नाही! मी स्वतः एक इस्राएली, अब्राहामाच्या
कुळातील व बन्यामीनाच्या वंशातील आहे. 2 ज्यांच्याविषयी
पूर्वज्ञान होते अशा आपल्या लोकांचा परमेश्वराने त्याग केला नाही.
वचनामध्ये एका भागात एलीयाहबद्दल म्हटले, ते तुम्हाला माहीत नाही
का—इस्राएलविरुद्ध परमेश्वराजवळ त्याने कशी विनंती केली: 3 “प्रभू,
त्यांनी तुमच्या संदेष्ट्यांना मारून टाकले आहे, आणि तुमच्या वेद्या
फोडल्या आहेत; मी एकटाच उरलो आहे, आणि आता ते मला सुद्धा
मारण्याचा प्रयत्न करीत आहेत.” 4 यावर परमेश्वराचे त्याला काय उत्तर
होते? “मी माझ्याकरिता सात हजार लोक राखून ठेवले आहेत आणि
ज्यांनी बआलच्या पुढे गुडघे टेकले नाहीत.” 5 वर्तमान काळीही असेच
आहे. काही अवशिष्ट जण कृपेने निवडलेले आहेत, 6 आणि जर हे कृपेने
आहे, तर कर्मावर आधारित होऊ शकत नाही. तसे असते, तर कृपा ही
यापुढे कृपा राहणार नाही. 7 मग काय? इस्राएली लोकांनी जे झटून
शोधले ते त्यांना मिळालेले नाही. जे निवडलेले होते त्यांना मिळाले,
पण इतरजण कठीण झाले, 8 जसे लिहिले आहे: “परमेश्वराने त्यांना
धुंदीचा आत्मा दिला आहे, त्यांचे डोळे पाहू शकत नाहीत व कान ऐकू
शकत नाहीत, आणि असे आज या दिवसापर्यंत चालले आहे.” 9 दावीद
राजा म्हणाला: “त्यांचा मेज सापळा व पाश, त्यांना अडखळविण्याचा
धोंडा आणि प्रतिफळ असा होवो. 10 त्यांचे डोळे अंधकारमय होवोत,
म्हणजे त्यांना दिसणार नाही, आणि त्यांची कंबर कायमची खाली
वाकवून ठेवा.” 11 मी पुन्हा विचारतो: ते असे अडखळले की परत उभे
राहू शकणार नाहीत का? नक्कीच नाही! त्यांच्या पापांमुळे, गैरयहूदी
लोकांना तारण प्राप्त होईल, म्हणजे इस्राएल ईर्षेला पेटतील. 12

त्यांच्या पापांचा परिणाम म्हणून जग आत्मिकरित्या धनवान झाले आणि त्यांचे नुकसान म्हणजे गैरयहूदीयांचे आत्मिक धन झाले, तर मग त्यांचे भरून येणे कितीतरी आत्मिक आशीर्वादाने धनयुक्त होईल! 13 मी जे तुम्ही गैरयहूदी आहात, त्यांच्यासोबत बोलतो. मी जितका गैरयहूदीयांसाठी प्रेषित आहे, तेवढाच मी माझ्या सेवेचा अभिमान बाळगतो. 14 या आशेने की कसेही करून मी माझ्या लोकांमध्ये हेवा निर्माण करून त्यांच्यापैकी काही जणांचे तारण साधावे. 15 त्यांच्या नकारामुळे जगाचा समेट झाला तर त्यांची स्वीकृती मरणातून जीवन होणार नाही का? 16 आणि आता पिठाच्या गोळ्यापैकी काही भाग प्रथमफळ म्हणून पवित्र आहे तर, सर्वच पिठाचा गोळाही पवित्र ठरेल; जर मुळे पवित्र असली, तर फांद्याही असणार. 17 जर काही फांद्या मोडून टाकण्यात आल्या आणि तुम्ही, जे रानटी जैतून, त्यांच्यामध्ये कलमरूपे लावले तर तुम्ही जैतून वृक्षाच्या मुळातून होणाऱ्या पौष्टिकतेचे वाटेकरी झाला आहात. 18 परंतु इतर फांद्यापेक्षा स्वतःला विशेष समजू नका. हे लक्षात ठेवा: तुम्ही मुळाला आधार देत नाही, परंतु मूळ तुम्हाला आधार देते. 19 तुम्ही म्हणत असाल, “या फांद्या तोडल्या म्हणजे मला कलम लावण्यात येईल.” 20 ठीक आहे. त्या फांद्या अविश्वासामुळे तोडण्यात आल्या, आणि तुम्ही केवळ विश्वासामुळे उभे आहात. तेव्हा अहंकारी होऊ नका पण भयभीत व्हा. 21 कारण जर परमेश्वराने स्वाभाविक फांद्या राखल्या नाहीत, तर तो तुम्हालाही राखणार नाही. 22 परमेश्वराचा दयाळूपणा आणि कठोरपणा लक्षात घ्या: जे पडले त्यांच्याशी कठोरपणा, पण तुमच्यासाठी दयाळूपणा. पण तुम्ही त्यांच्या दयाळूपणात राहिले पाहिजे; नाही तर तुम्हालाही छाटून टाकण्यात येईल. 23 आणि जर ते अविश्वासात राहणार नाहीत, तर तेही कलम म्हणून लावले जातील, कारण परमेश्वर त्यांचे कलम पुन्हा लावण्यास समर्थ आहेत. 24 या सर्वानंतर, जर तुम्हाला मूळच्या रानटी जैतुनाच्या झाडातून कापून टाकले, त्या तुम्हाला सृष्टिक्रम सोडून चांगल्या जैतूनात कलम लावले, तर या ज्या त्याच्या मूळच्याच फांद्या त्या आपल्या जैतूनात किती विशेषकरून कलम म्हणून लावल्या जातील! 25 प्रिय बंधूंनो व भगिनींनो, या रहस्याविषयी तुम्ही अजाण नसावे अशी माझी इच्छा आहे, यासाठी की तुम्ही बढाई मारू नये: गैरयहूदी लोकांची ठरलेली संख्या पूर्ण विश्वासात येईपर्यंत इस्राएली लोक काही प्रमाणात कठोर झाले आहेत, 26 आणि याप्रकारे सर्व इस्राएलचे तारण होईल. याविषयी लिहिले आहे: “सीयोनातून तारणारा येईल; व तो याकोबाला सर्व अभक्तीपासून वळवेल. 27 मी त्यांची पापे हरण करेन. आणि त्यांच्याशी केलेला हा माझा करार आहे.” 28 शुभवार्तेच्या दृष्टिकोनातून पाहता, ते तुमचे शत्रू आहेत; निवडीच्या दृष्टिकोनातून पाहता पूर्वजांसाठी ते अजूनही परमेश्वराला प्रिय असेच आहेत. 29 कारण परमेश्वराचे पाचारण व कृपादाने अपरिवर्तनीय असतात. 30 एकेकाळी तुम्ही परमेश्वराची आज्ञा पाळणारे नव्हता, आता यहूदीयांच्या अवज्ञेचा परिणाम म्हणून तुम्हाला दया मिळाली आहे, 31 आता परमेश्वराची जी दया तुमच्यावर झाली त्याचा परिणाम म्हणून, जे आज्ञा उल्लंघन करणारे झाले, त्यांना आता दया प्राप्त होईल. 32 कारण सर्वांवर दया करावी म्हणून परमेश्वराने त्या सर्वांना आज्ञा मोडणाऱ्यांसोबत बांधले आहे. (eleēsē g1653) 33 अहाहा, परमेश्वराचे गहन ज्ञान आणि बुद्धीची संपत्ती किती अगम्य आहे! त्यांचे न्याय गहन आहेत, त्यांचे मार्ग किती दुर्गम आहेत! 34 “कारण प्रभूचे मन कोण जाणू शकेल? किंवा त्यांचा सल्लागार कोण आहे?” 35 “परमेश्वराला कोणी कधी काही दिले की परमेश्वराने त्यांची परतफेड करावी?” 36 कारण त्यांच्यापासून आणि त्यांच्याद्वारे आणि त्यांच्यासाठी सर्वगोष्टी आहेत. त्यांना सदासर्वकाळ गौरव असो! आमेन. (aiōn g165)

**12** यास्तव, बंधू आणि भगिनींनो, मी परमेश्वराच्या दयेमुळे तुम्हाला विनवितो की तुम्ही आपल्या शरीरांचा जिवंत, पवित्र व परमेश्वराला संतोष होईल असा यज्ञ करावा; हीच तुमची खरी आणि योग्य उपासना ठरेल. 2 या जगाशी समरूप होऊ नका; तर आपल्या मनाच्या नवीनीकरणाने स्वतःचे रूपांतर होऊ द्या, यासाठी की परमेश्वराची जी उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा, ती काय आहे, हे तुम्ही समजून घ्यावे. (aiōn g165) 3 मला दिलेल्या कृपेने मी तुम्हातील प्रत्येकाला सांगतो: स्वतःला वाजवीपेक्षा अधिक समजू नका, तर आपणास परमेश्वराने प्रत्येकाला वाटून दिलेल्या विश्वासाच्या परिमाणाप्रमाणे मर्यादेने स्वतःला माना. 4 आपल्या प्रत्येकाला एक शरीर असून अनेक अवयव आहेत, आणि हे सर्व अवयव एकच कार्य करीत नाहीत. 5 आपण ख्रिस्तामध्ये अनेक असलो, तरी एक शरीर आहोत व आपण सर्व एकमेकांचे अवयव आहोत. 6 आपल्या सर्वांना जी कृपा दिली आहे, त्यानुसार आपल्याला वेगवेगळी दाने दिली आहेत. जर तुम्हाला परमेश्वराचे संदेश सांगण्याचे कृपादान असेल, तर तो संदेश आपल्या विश्वासानुसार सांगा. 7 जर सेवा करण्याचे, तर सेवा करा. जर शिकविण्याचे, तर शिकवा. 8 जर उत्तेजनाचे, तर उत्तेजन द्या; जर देण्याचे असेल, तर औदार्याने द्या; जर व्यवस्थापनाचे असेल, तर आस्थेने करा; जर करुणा करण्याचे, तर उल्हासाने करा. 9 प्रीती निष्कपट असावी. जे वाईट त्याचा द्वेष करा. जे चांगले आहे त्याला चिटकून राहा. 10 एकमेकांवर बंधुभावाने प्रीती करा आणि आपल्यापेक्षा इतरांचा आदर करा. 11 आस्थेमध्ये कमी पडू नका, तर आपला आध्यात्मिक आवेश कायम राखा व प्रभूची सेवा करा. 12 आशेमध्ये हर्षित, संकटात सहनशील आणि प्रार्थनेमध्ये विश्वासू असा. 13 जे गरजवंत असे प्रभूचे लोक आहेत, त्यांना द्या. आदरातिथ्य करा. 14 जे तुमचा छळ करतात; त्यांना शाप देऊ नका; उलट आशीर्वाद द्या. 15 आनंद करणाऱ्यांबरोबर आनंद करा; रडणाऱ्यांबरोबर रडा. 16 एकमेकांशी ऐक्याने राहा. गर्विष्ठ होऊ नका. तर अगदी सामान्य लोकांच्या सहवासात आनंद माना, अहंकार बाळगू नका. 17 वाईटाने वाईटाची फेड करू नका. सर्वांच्या दृष्टीने जे योग्य आहे ते करा. 18 साधेल तर, तुम्हाकडून होईल तितके प्रत्येकाशी शांतीने राहा. 19 माझ्या प्रिय मित्रांनो, सूड उगवू नका. तर परमेश्वराच्या क्रोधाला वाट द्या, असे लिहिले आहे: “सूड घेणे मजकडे आहे; मी परतफेड करेन,” असे प्रभू म्हणतात. 20 त्याउलट: “तुमचा शत्रू भुकेला असेल, तर

त्याला खावयास द्या; तो तान्हेला असेल, तर त्याला प्यावयास द्या. असे
केल्याने तुम्ही त्याच्या डोक्यावर निखाऱ्यांची रास कराल.” 21 वाईटाने
जिंकले जाऊ नका, तर चांगल्याने वाईटाला जिंका.

**13** प्रत्येकाने प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या अधीन असावे, कारण
परमेश्वराने जो नेमून दिला नाही, असा अधिकारच नाही. जे
अधिकारी आहेत, ते स्वतः परमेश्वराने नेमलेले आहेत. 2 यास्तव, जो
अधिकारी व्यवस्थेविरुद्ध बंड करतो, तो परमेश्वराने स्थापित केलेल्या
व्यवस्थेविरुद्ध बंड करीत असतो आणि जे असे करतात, ते स्वतःवर दंड
ओढवून घेतील. 3 जे योग्य गोष्टी करतात, त्यांना राज्यकर्त्यांची भीती
वाटत नाही, परंतु जे अयोग्य करतात त्यांनाच त्याची भीती वाटते. जे
अधिकारी आहेत त्यांच्या भयापासून मुक्त असावे, अशी तुमची इच्छा
आहे काय? तर मग योग्य तेच करा, म्हणजे तो तुमची प्रशंसा करेल. 4
कारण तुमचे हित करण्यासाठी तो परमेश्वराचा नेमलेला सेवक आहे.
परंतु तुम्ही अयोग्य केले, तर त्याची भीती बाळगा, कारण तो तलवार
व्यर्थ धारण करीत नाही. अयोग्य करणाऱ्याला शासन करण्यासाठी
तो परमेश्वराचा सेवक, न्यायनीतीचा कारभारी आहे. 5 यास्तव केवळ
संभवनीय दंडाकरिताच नव्हे, तर सदसद्विवेकबुद्धीमुळे अधिकाऱ्यांच्या
अधीन राहणे आवश्यक आहे. 6 याकारणास्तव तुम्ही करही देता;
कारण अधिकारी परमेश्वराचे सेवक आहेत आणि त्यांना पूर्णवेळ सेवा
करणे आवश्यक आहे. 7 प्रत्येकाला त्याचे जे काही देणे असेल, ते द्या:
जर कर द्यायचे तिथे कर द्या, महसूल असेल तर महसूल द्या. आणि जिथे
सन्मान तिथे सन्मान, जिथे आदर तिथे आदर द्या. 8 इतरांवर प्रीती
करण्याशिवाय कोणाचे ऋणी राहू नका, कारण जो कोणी दुसऱ्यांवर
प्रीती करतो त्याने नियमशास्त्र पूर्ण केले आहे. 9 या आज्ञा आहेत, “तू
व्यभिचार करू नको,” “तू खून करू नको,” “तू चोरी करू नको,” “तू
लोभ धरू नको,” आणि इतर दुसऱ्या कोणत्याही आज्ञा असतील तरी,
“जशी तुम्ही स्वतःवर तशी तुमच्या शेजाऱ्यावर प्रीती करा,” या एका
आज्ञेत सर्व आज्ञा समाविष्ट आहेत. 10 प्रीती शेजाऱ्याचे काही वाईट
करीत नाही, म्हणूनच ती नियमशास्त्राची परिपूर्ती करते. 11 आणखी हे
करा, सध्याचा समय ओळखून घ्या: झोपेतून उठण्याची वेळ आली आहे.
कारण आपण विश्वास ठेवला तेव्हापेक्षा तारण आता आपल्या अधिक
जवळ आले आहे. 12 रात्र संपत आली आहे; दिवस लवकरच येऊन
ठेपेल, म्हणून अंधाराची कृत्ये सोडून द्या आणि प्रकाशाचे शस्त्रधारण
करा. 13 दिवस आहे तोपर्यंत आपली वागणूक सभ्य असू द्या. दंगलीत,
मद्याच्या धुंदीत, लैंगिक अनैतिकतेत, कामासक्तीत, कलहात व मत्सरात
आपला वेळ व्यर्थ दवडू नका. 14 यापेक्षा, प्रभू येशू ख्रिस्तांना परिधान
करा व देहाच्या वासनांचा उपभोग घेण्याचा विचार करू नका.

**14** विश्वासाने दुर्बल असलेल्यांचा स्वीकार करा, तरी वादविवादाच्या
गोष्टींमुळे भांडणे करू नका. 2 कोणा एकाचा विश्वास असा आहे
की त्याला कोणतेही खाणे निषिद्ध नाही, परंतु ज्याचा विश्वास दुर्बल तो
शाकभाजीच खातो. 3 जो कोणी सर्वकाही खातो त्याने न खाणाऱ्याला
तुच्छ ठरवू नये, आणि जो कोणी सर्वकाही खात नाही त्याने खाणाऱ्याचा
न्याय करू नये; कारण परमेश्वराने त्याचा स्वीकार केला आहे. 4
दुसऱ्याच्या चाकराचा न्याय करण्याचा अधिकार तुला कोणी दिला?
चाकराचे स्थिर राहणे किंवा पतन यासाठी त्याचा धनी जबाबदार आहे
आणि त्यांना स्थिर करण्यात येईल, कारण प्रभू त्यांना स्थिर करण्यास
समर्थ आहे. 5 कोणी मनुष्य एखादा दिवस दुसऱ्या दिवसापेक्षा अधिक
महत्त्वाचे मानतो; आणखी कोणी सर्व दिवस सारखेच मानतो. तर
प्रत्येकाने आपल्या मनाने पूर्ण खात्री करून घ्यावी. 6 जो कोणी एखादा
दिवस विशेष पाळतो तो प्रभूसाठी पाळतो, आणि जो मांस खातो
तो प्रभूसाठी खातो; कारण तो परमेश्वराचे आभार मानतो; जो वर्ज्य
करतो तो प्रभूकरिता करतो आणि तोही परमेश्वराचे आभार मानतो.
7 कारण आपल्यातील कोणी स्वतःकरिता जगत नाही आणि कोणी
स्वतःकरिता मरत नाही. 8 आपण जगतो ते प्रभूकरिता जगतो; आणि
आपण मरतो ते प्रभूकरिता मरतो; म्हणून आपण जगलो किंवा मेलो,
तरी प्रभूचे आहोत. 9 ख्रिस्त याचसाठी मृत्यू पावले व पुन्हा जिवंत झाले
की त्यांनी मेलेल्यांचा व जिवंतांचाही प्रभू असावे. 10 तर तू आपल्या
बंधूला व भगिनीला दोषी का ठरवितोस? किंवा तू आपल्या बंधूला
तुच्छ का मानतोस? आपणा सर्वांस परमेश्वराच्या न्यायासनासमोर उभे
राहवयाचे आहे. 11 कारण असे लिहिले आहे: “‘प्रभू म्हणतात, मी
जिवंत आहे म्हणून,’ ‘प्रत्येक गुडघा माझ्यापुढे टेकला जाईल; आणि
प्रत्येक जीभ परमेश्वराचा स्वीकार करेल.’” 12 तर मग आपल्यातील
प्रत्येकजण स्वतःचा हिशोब परमेश्वराला देईल. 13 यास्तव आपण
यापुढे एकमेकांना दोषी ठरवू नये; तर असा निश्चय करावा की कोणी
आपल्या बंधू किंवा भगिनीपुढे काही विघ्न किंवा अडखळण ठेवू नये.
14 मला ठाऊक आहे आणि प्रभू येशूंमध्ये माझी खात्री आहे, की
कोणताही पदार्थ मूळचा अशुद्ध नाही; तरी अमुक पदार्थ अशुद्ध आहे,
असे समजणाऱ्यासाठीच तो अशुद्ध आहे. 15 तुझ्या बंधूला किंवा
भगिनीला अन्नामुळे क्लेश झाले तर तू प्रीतीने वागेनासा झाला आहेस.
ज्यासाठी ख्रिस्त मरण पावले त्यांचा नाश तुझ्या खाण्यामुळे करू नको.
16 तुमच्या दृष्टीने जे चांगले ते तुम्हाला माहीत आहे, त्याबद्दल वाईट
बोलण्याचा प्रसंग आणू नका. 17 परमेश्वराचे राज्य खाणे व पिणे यात
नाही, तर नीतिमत्व, शांती व पवित्र आत्म्याद्वारे मिळणारा आनंद यात
आहे. 18 कारण जो अशाप्रकारे ख्रिस्ताची सेवा करतो तो परमेश्वराला
संतोष देणारा व मनुष्यांनी पारखलेला आहे. 19 तर मग जेणेकरून
शांती व परस्परांची वृद्धी होईल अशा गोष्टींच्या मागे आपण लागावे. 20
अन्नामुळे परमेश्वराच्या कामाचा नाश करू नका. सर्व अन्न शुद्धच आहे;
परंतु जो व्यक्ती काहीही खाण्यामुळे इतरांना अडखळवितो त्याला ते
वाईट आहे. 21 मांस न खाणे, द्राक्षारस न पिणे किंवा जे योग्य नाही असे
काहीही करू नका की जेणेकरून तुझे बंधू व भगिनी पापात पडतील. 22
तुझ्याठायी जो विश्वास आहे तो तू परमेश्वरासमक्ष आपणाजवळ ठेव.
आपणाला जे काही पसंत आहे त्याविषयी ज्याला स्वतःचा न्यायनिवाडा
करावा लागत नाही तो धन्य, 23 पण संशय धरून जो कोणी व्यक्ती मग

तो पुरुष व स्त्री, खातो तो दोषी ठरतो, कारण त्याचे खाणे विश्वासाने
नाही; आणि जे काही विश्वासाने नाही ते पाप आहे.

**15** आपण जे बळकट आहोत, ते आम्ही अशक्तांना भार वाहण्यास
मदत केली पाहिजे, केवळ आपण स्वत:लाच संतुष्ट करू नये. 2
आपण प्रत्येकजण आपल्या शेजाऱ्यांचे हित व उन्नती करून त्यांना
संतुष्ट करण्याकडे लक्ष देऊ या. 3 कारण ख्रिस्तानेसुद्धा स्वत:ला संतुष्ट
केले नाही, परंतु असे लिहिले आहे: “तुझा अपमान करणाऱ्याने केलेला
अपमान माझ्यावर आला आहे.” 4 कारण जे काही पूर्वी लिहिण्यात
आले, ते सर्व आपल्याला शिक्षण मिळावे म्हणून लिहिले गेले, यासाठी
की धीर धरून शास्त्रलेखापासून मिळणाऱ्या प्रोत्साहनाद्वारे आपण
आपल्या आशेला दृढ धरून राहवे. 5 धीर व प्रोत्साहन देणारा परमेश्वर
तुम्हाला एकमेकांबरोबर एकचित्ताने राहण्यास साहाय्य करो. प्रत्येकाने
एकमेकांशी ख्रिस्त येशूंच्या ठायी असलेल्या वृत्तीने व विचाराने वागावे,
6 आणि मग आपल्याला एकमनाने व एकसुराने, परमेश्वराचे म्हणजे
आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या पित्याचे गौरव करता येईल. 7 ख्रिस्ताने
जसा तुमचा स्वीकार केला, तसा तुम्हीही एकमेकांचा परमेश्वराच्या
स्तुतीसाठी स्वीकार करा. 8 कारण मी तुम्हाला सांगतो की, ख्रिस्त
परमेश्वराचे सत्य प्रस्थापित करण्याकरिता यहूदीयांचे सेवक झाले आहे,
यासाठी की परमेश्वराने आपल्या पूर्वजांना दिलेली अभिवचने पूर्ण
करावी, 9 म्हणजे गैरयहूदी लोकांनी परमेश्वराच्या दयेमुळे त्यांचे गौरव
करावे. असे लिहिले आहे: “यास्तव गैरयहूदी लोकांमध्ये मी तुमचे
स्तवन करेन; व तुमच्या नावाचे गुणगान गाईन.” 10 आणखी असे
म्हटले आहे, “अहो, गैरयहूदीयांनो, तुम्हीही त्यांच्या लोकांसह आनंद
करा.” 11 आणखी पुन्हा, “सर्व गैरयहूदी लोकांनो प्रभूची स्तुती करा;
प्रत्येक राष्ट्र त्यांचे गौरव करो.” 12 आणि यशायाह संदेष्टा म्हणतो,
“इशायाचे मूळ उगवेल, व ते राष्ट्रांचा शासक होण्यास उभे राहतील;
गैरयहूदीयांच्या आशा त्यांच्यामध्येच आहेत.” 13 तुम्ही त्यांच्यावर
विश्वास ठेवल्यामुळे आशेचे परमेश्वर तुम्हाला सर्व आनंदाने आणि
शांतीने भरो, यासाठी की तुमच्यामध्ये असणाऱ्या पवित्र आत्म्याच्या
सामर्थ्यात विपुल आशेमध्ये तुम्ही वाढत जावे. 14 माझ्या बंधू आणि
भगिनींनो, तुम्ही स्वत: चांगुलपणाने पूर्ण भरलेले व ज्ञानाने परिपूर्ण
आणि एकमेकांना शिकवण्यास पात्र आहात याची मला नक्कीच खात्री
आहे. 15 त्यांची तुम्हाला पुन्हा आठवण करून द्यावी म्हणून मी काही
गोष्टींबद्दल धीटपणे लिहिले आहे, कारण परमेश्वराने मला कृपा दिली
आहे 16 की गैरयहूदीयांसाठी मी ख्रिस्त येशूंचा सेवक व्हावे. त्यांनी मला
परमेश्वराची शुभवार्ता जाहीर करण्यासाठी याजकपण सोपविले आहे,
यासाठी की गैरयहूदीयांना पवित्र आत्म्याने वेगळे केलेले व परमेश्वराला
ग्रहणीय यज्ञ म्हणून अर्पण करावे. 17 यास्तव मी परमेश्वराची सेवा
ख्रिस्त येशूंद्वारे केली त्याबद्दल मी अभिमान बाळगतो. 18 गैरयहूदीयांनी
परमेश्वराचे आज्ञापालन करावे म्हणून ख्रिस्ताने माझ्या शब्द व कृतीने
जे काही पूर्ण केले त्या व्यतिरिक्त मी इतर गोष्टीबद्दल बोलण्यास
धजणार नाही. 19 चिन्हे आणि झालेली अद्भुते पवित्र आत्म्याच्या
शक्तीने झाली. अशा रीतीने मी यरुशलेमपासून तो इल्लूरिकमापर्यंत
सर्वत्र ख्रिस्ताच्या शुभवार्तेची घोषणा पूर्णपणे केली आहे. 20 जिथे
ख्रिस्ताबद्दल अजून कळले नाही त्या ठिकाणी जाऊन शुभवार्तेचा प्रचार
करावा हेच माझे ध्येय होते, यासाठी की मी इतरांनी बांधलेल्या पायावर
रचू नये. 21 यशायाह म्हणतो: “त्यासंबंधी ज्यांना पूर्वी कधी कोणीही
सांगितले नाही, ते पाहतील व ज्यांनी ऐकले नाही, त्यांना समजेल.”
22 यामुळे तुम्हाकडे येण्यास मला अनेकदा अडखळण आले. 23
पण आता या प्रांतामध्ये मला काही काम करावयाचे राहिले नाही,
आणि इतक्या वर्षांच्या प्रतीक्षेनंतर तुमच्याकडे येण्यास मी तयार झालो
आहे. 24 कारण स्पेन देशाची सफर करण्याचा माझा मानस आहे.
तिकडे जाताना आशा आहे की मी काही काळ तुमच्या सहवासात
आनंदाने घालविल्यावर, तुम्ही मला पुन्हा वाटेस लावावे. 25 आता मी
यरुशलेमकडे परमेश्वराच्या लोकांची सेवा करण्यासाठी जात आहे. 26
कारण पाहा, मासेदोनिया व अखया येथील लोकांनी यरुशलेममधील
प्रभूच्या लोकांना साहाय्य व्हावे म्हणून वर्गणी गोळा केली आहे. 27
हे त्यांनी अतिशय आनंदाने केले. आपण ऋणी आहोत असे त्यांना
वाटते. गैरयहूदीयांना यहूदीयांद्वारे आध्यात्मिक आशीर्वाद प्राप्त झाले
आहेत, या अद्भुत आध्यात्मिक दानाची अंशत: फेड म्हणून हे भौतिक
दान द्यावे, असे त्यांनी ठरविले. 28 ही वर्गणी पोहोचवून त्यांचे हे काम
पार पाडल्यानंतर आणि दान त्यांना मिळाल्याची खात्री झाल्यानंतर मी
स्पेनकडे जाताना तुम्हाला येऊन भेटेन; 29 आणि जेव्हा मी तुमच्याकडे
येईन तेव्हा ख्रिस्ताच्या भरपूर आशीर्वादाने भरलेला असा येईन हे मला
माहीत आहे. 30 बंधूंनो व भगिनींनो, आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताद्वारे
आणि आत्म्याच्या प्रीतीद्वारे, मी तुम्हाला विनंती करतो की, माझ्या
संघर्षात सहभाग म्हणून परमेश्वराजवळ माझ्यासाठी प्रार्थना करावी.
31 यहूदीयामधील जे विश्वासणारे नाहीत त्यांच्यापासून माझे रक्षण
व्हावे आणि मी नेत असलेली वर्गणी यरुशलेम येथील प्रभूच्या लोकांनी
स्वीकारावी म्हणून प्रार्थना करा. 32 मी परमेश्वराच्या इच्छेने आनंदाने
तुम्हाकडे येऊ शकेन आणि तुमच्या सहवासात ताजातवाना होऊ शकेन.
33 आता शांतीचे परमेश्वर तुम्हा सर्वांबरोबर असो. आमेन.

**16** किंख्रिया मंडळीतील आपली बहीण फीबी जी सेविका आहे, तिची
शिफारस करतो. 2 मी तुम्हाला सांगतो की प्रभूच्या लोकांना
शोभेल असे तिला प्रभूमध्ये स्वीकारा आणि जी काही मदत तिला
तुमच्यापासून पाहिजे ती द्या, कारण तिने अनेक लोकांचे व माझेही
साहाय्य केले आहे. 3 प्रिस्किल्ला व अक्विला ख्रिस्त येशूंमधील माझे
सहकारी, यांना सदिच्छा कळवा. 4 त्यांनी माझ्याकरिता त्यांचा जीवही
धोक्यात घातला; आणि केवळ मीच नाही, तर गैरयहूदीयांच्या सर्व
मंडळ्याही त्यांचे ऋणी आहेत. 5 त्यांच्या घरात जमणाऱ्या मंडळीला
माझ्या सदिच्छा कळवा. माझा प्रिय मित्र अपैनत यालाही सदिच्छा,
आशियामध्ये त्यानेच प्रथम ख्रिस्ताचा स्वीकार केला. 6 जिने तुम्हासाठी
खूप परिश्रम केले त्या मरीयेलाही सदिच्छा सांगा. 7 माझे यहूदी बंधू
अंद्रोनीक व युनिया, जे माझ्याबरोबर तुरुंगात होते त्यांना पण सदिच्छा

द्या. प्रेषितांमध्ये त्यांचे स्थान अवर्णनीय आहे व माझ्यापूर्वी ते ख्रिस्तात
होते. 8 प्रभूमध्ये प्रिय मित्र आंप्लियात याला माझ्या सदिच्छा कळवा.
9 तसेच ख्रिस्तामध्ये आमचा सहकारी उर्बान व माझा प्रिय मित्र स्ताखु
यांना सदिच्छा कळवा. 10 अपिल्लेस जो ख्रिस्ताशी एकनिष्ठ असून
परीक्षेस उतरलेला आहे त्याला सदिच्छा कळवा. तसेच अरिस्थबूलच्या
घरातील सर्वांना माझ्या सदिच्छा कळवा. 11 माझा नातेवाईक हेरोदियोन
याला सदिच्छा द्या. नार्सिसाच्या घरातील जे प्रभूमध्ये आहेत त्यांना
सदिच्छा कळवा. 12 त्रेफैना आणि त्रेफोसा, या स्त्रियांनी प्रभूमध्ये
खूप श्रम केले, त्यांना सदिच्छा कळवा. प्रिय मैत्रीण पर्सिस, हिला
सदिच्छा कळवा. तिने प्रभूमध्ये अतिशय कष्ट घेतले. 13 प्रभूने निवडून
घेतलेला रूफस आणि त्याची आई, जी माझीही आई आहे, त्यांना
सदिच्छा कळवा. 14 असुंक्रित, फ्लगोन, हर्मेस, पत्रोबास, हेर्मेस यांना
व त्यांच्याबरोबर असणाऱ्या सर्व बंधू व भगिनींना सदिच्छा कळवा.
15 फिललग, युलिया, नीरिय व त्याची बहीण, ओलुंपास, व त्यांच्या
बरोबरच्या सर्व पवित्र जणांना सदिच्छा कळवा. 16 एकमेकांना पवित्र
चुंबनाने अभिवादन करा. ख्रिस्ताच्या सर्व मंडळ्या तुम्हाला सदिच्छा
कळवितात. 17 आता बंधूंनो व भगिनींनो, मी तुम्हाला आग्रहाने विनंती
करतो की, जे शिक्षण तुम्हाला मिळाले आहे त्याविरुद्ध जे फूटी व
अडथळे आणणारे आहेत, त्यांच्यावर लक्ष ठेवा; आणि त्यांच्यापासून दूर
राहा. 18 कारण असे लोक आपल्या प्रभू ख्रिस्ताची सेवा करीत नाही,
तर स्वतःच्या पोटाची करतात. आपल्या गोड व लाघवी भाषणाने, ते
भोळ्यांच्या अंतःकरणास भुरळ पाडतात. 19 तुमच्या आज्ञापालनाबद्दल
प्रत्येकाने ऐकले आहे, म्हणून मी तुमच्यासाठी आनंद करतो; तरी तुम्ही
जे उत्तम त्यासंबंधाने सुज्ञ आणि जे वाईट त्याविषयी अज्ञानी असावे,
अशी माझी इच्छा आहे. 20 शांतीचा परमेश्वर लवकरच सैतानाला
तुमच्या पायाखाली चिरडून टाकील. आपल्या प्रभू येशूंची कृपा तुम्हावर
असो. 21 माझा सहकारी तीमथ्य, तसेच माझे नातेवाईक लूक्य,
यासोन आणि सोसिपतेर, हे तुम्हाला आपल्या सदिच्छा कळवीत
आहेत. 22 हे पत्र लिहिणारा, मी तर्तिय, प्रभूमध्ये तुम्हाला सदिच्छा देत
आहे. 23 गायस, जो माझे आणि इथे त्याच्या घरी जमणाऱ्या मंडळीचे
आदरातिथ्य करतो, तो तुम्हाला त्याच्या सदिच्छा कळवितो. या शहराचा
खजिनदार एरास्त, तसेच आपला विश्वासू बंधू क्किर्त यांच्याही तुम्हाला
सदिच्छा. 24 आपला प्रभू येशू ख्रिस्त यांची कृपा तुम्हा सर्वांवर असो.
आमेन. 25 माझ्या शुभवार्तेनुसार तो आता तुम्हाला स्थिर करेल व
ज्या येशू ख्रिस्ताचा संदेश मी घोषित केला त्यानुसार जे रहस्य अनंत
काळापूर्वी गुपित होते ते आता प्रकट झाले आहे. (aiōnios g166) 26 पण
आता संदेष्ट्यांनी लिहिलेल्या शास्त्राद्वारे प्रकट आणि जाहीर झालेली
सार्वकालिक परमेश्वराची आज्ञा यांना अनुसरून सर्व गैरयहूदी लोकांनी
विश्वासाने आज्ञापालन करावे. (aiōnios g166) 27 आता केवळ एकच
ज्ञानी परमेश्वर, त्यांना येशू ख्रिस्त यांच्याद्वारे सदासर्वकाळ गौरव असो.
आमेन. (aiōn g165)

# 1 करिंथकरांस

1 परमेश्वराच्या इच्छेने ख्रिस्त येशूंचा प्रेषित होण्यासाठी बोलविलेला पौल आणि बंधू सोस्थनेस यांच्याकडून, 2 करिंथ येथील परमेश्वराच्या मंडळीस, जे ख्रिस्त येशूंमध्ये पवित्र केलेले व पवित्र होण्यासाठी बोलाविलेले, तसेच ख्रिस्त येशू आपले व त्यांचे प्रभू यांचे नाव घेऊन प्रत्येक ठिकाणी धावा करतात त्या सर्वांस: 3 परमेश्वर आपले पिता व प्रभू येशू ख्रिस्त यांच्याकडून तुम्हास कृपा आणि शांती असो. 4 ख्रिस्त येशूंमध्ये जी कृपा तुम्हाला दिली, त्याबद्दल मी सतत तुमच्यासाठी माझ्या परमेश्वराचे आभार मानतो. 5 त्यांच्यामध्ये तुम्ही सर्वप्रकारे संपन्न झाला आहात—सर्वप्रकारच्या भाषणात व सर्व ज्ञानात समृद्ध झाला आहात. 6 ख्रिस्ताविषयीची जी आमची साक्ष आहे त्याची परमेश्वर तुमच्यामध्ये पुष्टी करीत आहे. 7 यास्तव तुम्ही आपले प्रभू येशू ख्रिस्त यांच्या प्रकट होण्याची आतुरतेने वाट पाहत असताना आध्यात्मिक दानाची तुम्हाला काहीच उणीव पडलेली नाही. 8 प्रभू येशू ख्रिस्ताच्या दिवशी तुम्ही निर्दोष असे असावे म्हणून तेच तुम्हाला शेवटपर्यंत स्थिर करतील. 9 परमेश्वर ज्यांनी त्यांचा पुत्र आणि आपला प्रभू येशू ख्रिस्त यांच्या सहभागितेत तुम्हाला बोलाविले ते विश्वसनीय आहेत. 10 माझ्या प्रिय बंधूंनो व भगिनींनो, प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावास्तव मी तुम्हाला विनंती करतो की, तुम्ही जे काही बोलता त्यामध्ये एकमत असावे, म्हणजे तुमच्यामध्ये फूट पडू नये, मनाने आणि विचाराने तुम्ही सर्व एकतेमध्ये परिपूर्ण असावे. 11 कारण बंधूंनो व भगिनींनो, तुम्हामध्ये भांडणे आहेत, असे मला ख्लोवेच्या घरातील काही लोकांनी सांगितले आहे. 12 माझ्या म्हणण्याचा अर्थ हा: तुमच्यातील एकजण म्हणतो, “मी पौलाचा अनुयायी आहे,” तर कोणी “मी अपुल्लोसाचा” आणखी कोणी “मी केफाचा अनुयायी आहे,” आणखी कोणी “मी ख्रिस्ताचा अनुयायी आहे.” 13 ख्रिस्त विभागले गेले आहेत का? तुमच्यासाठी पौलाला क्रूसावर दिले होते का? तुमचा बाप्तिस्मा पौलाच्या नावात झाला होता का? 14 तुमच्यातील क्रिस्प आणि गायस यांच्याशिवाय मी इतर कोणाचाही बाप्तिस्मा केला नाही, म्हणून मी परमेश्वराचे आभार मानतो. 15 त्यामुळे तुम्हापैकी कोणालाही, तुमचा बाप्तिस्मा माझ्या नावात झाला असे म्हणता येणार नाही. 16 होय! मी स्तेफनाच्या कुटुंबीयांचाही बाप्तिस्मा केला, पण त्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणाचाही बाप्तिस्मा केल्याचे मला आठवत नाही. 17 कारण ख्रिस्ताने मला बाप्तिस्मा करण्याकरिता नव्हे, तर शुभवार्तेचा प्रचार करण्याकरिता पाठविले आहे—वाक्पटुतेने व ज्ञानाने नव्हे, यामुळे असे न होवो की ख्रिस्ताच्या क्रूसाचे सामर्थ्य रिक्त व्हावे. 18 क्रूसाचा संदेश नाश पावत असलेल्यांना मूर्खपणाचा वाटतो, तरी तारणाची प्राप्ती होत आहे अशा आपल्यासाठी तो परमेश्वराचे सामर्थ्य असा आहे. 19 कारण असे लिहिले आहे: “ज्ञानी लोकांचे ज्ञान मी नष्ट करेन. बुद्धिमानाची बुद्धी मी निष्फळ करेन.” 20 मग ज्ञानी लोक कुठे आहेत? नियमशास्त्र शिक्षक कुठे आहेत? या युगाचे तत्वज्ञानी कुठे आहेत? जे मूर्ख आहेत त्यांना परमेश्वराने जगाचे ज्ञान असे केले नाही का? (aiōn g165) 21 कारण परमेश्वराच्या ज्ञानामध्ये असतानाही जगाला त्याच्या ज्ञानाद्वारे परमेश्वराला ओळखता आले नाही, जो प्रचार मुर्खपणाद्वारे केला होता त्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांचे परमेश्वराने आनंदाने तारण केले. 22 यहूदी लोक चिन्हाची मागणी करतात; आणि ग्रीक लोक ज्ञान शोधतात. 23 पण आम्ही क्रूसावर खिळलेल्या ख्रिस्ताला गाजवितो: जो यहूदीयांना अडखळण आणि गैरयहूदीयांना मूर्खपणा असा आहे, 24 परंतु परमेश्वराने ज्यांना बोलाविले आहे, त्या यहूदी आणि ग्रीक, या दोघांनाही ख्रिस्त हे परमेश्वराचे सामर्थ्य आणि ज्ञान आहे. 25 परमेश्वराची मूर्खता मानवी शहाणपणापेक्षा अधिक सुज्ञपणाची आहे, आणि परमेश्वराचा अशक्तपणा मनुष्याच्या सामर्थ्यापेक्षा बलवान आहे. 26 प्रिय बंधूंनो आणि भगिनींनो, ज्यावेळी तुम्हाला पाचारण करण्यात आले त्यावेळी तुम्ही कोण होता याचा विचार करा. तुम्ही अनेकजण तर मनुष्यांच्या दृष्टीने शहाणे; किंवा प्रभावी किंवा कुलीन कुळात जन्मलेले नव्हता. 27 तरी जगाच्या दृष्टीने जे सुज्ञ आहेत अशांना लाजविण्याकरिता परमेश्वराने मूर्खपणाच्या गोष्टी निवडल्या; आणि सशक्तांना लाजविण्याकरिता त्यांनी जगातील दुर्बल गोष्टी निवडल्या. 28 परमेश्वराने जगातील धिक्कारलेले, अकुलीन यांना निवडले, जेणे करून त्यांना शून्यवत करावे. 29 आणि म्हणूनच परमेश्वरासमोर कोणत्याही मनुष्याने बढाई मारू नये. 30 कारण त्यामुळेच तुम्ही ख्रिस्त येशूंमध्ये आहात, ते परमेश्वरापासून आपले ज्ञान व नीतिमत्व, पवित्रता आणि खंडणी असे झाले आहेत. 31 यास्तव शास्त्रलेखात लिहिले आहे: “जो प्रौढी मिरवतो त्याने प्रभूमध्ये प्रौढी मिरवावी.”

2 बंधूंनो आणि भगिनींनो, माझ्याबाबतीत तसेच झाले, जेव्हा मी तुम्हाकडे आलो, तेव्हा परमेश्वराची साक्ष तुम्हाला सांगण्यासाठी मानवी ज्ञान आणि वक्तृत्व घेऊन आलो नाही. 2 कारण मी असा निश्चय केला होता की तुम्हामध्ये असताना फक्त क्रूसावर खिळलेला येशू ख्रिस्त याव्यतिरिक्त कोणत्याही गोष्टी जाणून घेऊ नये. 3 मी तुमच्याकडे अशक्त, अतिशय भीतभीत व कापत आलो. 4 माझे संदेश व उपदेश ज्ञान किंवा शहाणपणाच्या शब्दाचे नव्हते, तरी पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याचे प्रमाण देणारे होते. 5 यासाठी की तुमचा विश्वास मानवी ज्ञानांवर आधारलेला असू नये, तर परमेश्वराच्या सामर्थ्यावर असावा. 6 तरी देखील, आम्ही परिपक्व झालेल्यांना ज्ञानाचा संदेश सांगतो, परंतु हे ज्ञान या युगाचे नव्हे किंवा या युगाचे शासक, ज्यांचे अध:पतन होणार आहे त्यांचेही नव्हे. (aiōn g165) 7 आम्ही परमेश्वराचे ज्ञान आणि रहस्य जे गुप्त होते, ते जाहीर करतो आणि ते रहस्य परमेश्वराने युगानुयुगा पूर्वी आपल्या गौरवासाठी सिद्ध केले आहे. (aiōn g165) 8 तरी या युगाच्या अधिकाऱ्यांना ही योजना समजलीच नाही, त्यांना ती समजली असती, तर त्यांनी गौरवाच्या प्रभूला क्रूसावर कधीच खिळले नसते. (aiōn g165) 9 तरी शास्त्रलेखानुसार: “जे डोळ्यांनी पाहिले नाही, जे कोणत्याही कानावर पडले नाही, माणसाच्या मनात आले नाही,”— त्या सर्वगोष्टी परमेश्वरावर प्रीती करणाऱ्यांसाठी त्यांनी सिद्ध

केल्या आहेत— 10 परमेश्वराने आपल्याला त्यांच्या आत्म्याद्वारे या
गोष्टी प्रकट केल्या आहेत. कारण परमेश्वराचा आत्मा हा सर्व गोष्टींचा,
परमेश्वराच्या अत्यंत गहन गोष्टींचा देखील शोध घेतो. 11 एखाद्या व्यक्तीचे
विचार त्या व्यक्तीच्या आत्म्याशिवाय इतर कोणाला समजतात का?
त्याचप्रमाणे परमेश्वराचे विचार परमेश्वराच्या आत्म्याशिवाय कोणालाही
माहीत नाहीत. 12 आपल्याला जगाचा आत्मा मिळाला नाही, परंतु जो
आत्मा परमेश्वरापासून आहे तो मिळाला आहे, यासाठी की परमेश्वराने
आपल्याला जे विनामूल्य दिले आहे, ते आपण समजून घ्यावे. 13 आम्ही
असे बोलतो हे मानवी ज्ञानाने शिकविलेले शब्द नव्हे, तर आत्म्याने
शिकविलेले शब्द म्हणजे आत्मिक गोष्टींचे स्पष्टीकरण करण्याकरिता
आम्ही आत्म्याने शिकविलेले शब्द वापरतो. 14 परंतु जो मनुष्य आत्मिक
नाही, तो परमेश्वराच्या आत्म्यापासून आलेल्या गोष्टी स्वीकारीत नाही,
कारण त्याला त्या मूर्खपणाच्या वाटतात, त्याला त्या समजणार नाहीत,
कारण त्या गोष्टी परमेश्वराच्या आत्म्यानेच पारखल्या जाऊ शकतात. 15
आत्मिक असलेल्या मनुष्याला प्रत्येक गोष्ट पारखता येते, परंतु तो
स्वत: मात्र कोणत्याही मानवी न्यायाखाली नसतो. 16 कारण, “प्रभूचे
मन कोण जाणू शकेल? त्यांचा सल्लागार कोण आहे?” आपल्याकडे
तर ख्रिस्ताचे मन आहे.

**3** प्रिय बंधूंनो आणि भगिनींनो, आत्म्याद्वारे जीवन जगत असलेल्या
लोकांबरोबर बोलावे तसे मी तुमच्याबरोबर बोलू शकलो नाही, कारण
तुम्ही ख्रिस्तामध्ये लहान बालक असून अजूनही दैहिक आहात. 2 मी
तुम्हाला दूध दिले, जड अन्न दिले नाही, कारण तुम्ही त्यासाठी तयार
नव्हता आणि निश्चित त्यासाठी तुम्ही अजूनही तयार नाही. 3 तुम्ही
अजूनही दैहिक आहात. तुम्हामध्ये भांडणे आणि मत्सर आहेत, तुम्ही
दैहिक आहात की नाही? तुम्ही केवळ सामान्य मानवासारखे वागता की
नाही? 4 तुमच्यातील एकजण म्हणतो, “मी पौलाचा अनुयायी आहे”
आणि दुसरा “मी अपुल्लोसाचा अनुयायी आहे,” यावरून तुम्ही सामान्य
मनुष्य आहात नाही काय? 5 तर मग काय, अपुल्लोस तरी कोण आहे?
मी पौल कोण आहे? आम्ही तर केवळ परमेश्वराचे सेवक, त्यांच्याद्वारे
तुम्ही विश्वास ठेवला—प्रभूने प्रत्येकाला कामगिरी सोपवून दिली होती.
6 मी बी पेरले, अपुल्लोसाने पाणी घातले, परंतु परमेश्वराने वाढविले. 7
पेरणारा किंवा पाणी घालणारा कोणी काही नाही, तर फक्त परमेश्वरच जे
त्याची वाढ करतात. 8 जो पेरतो व जो पाणी घालतो त्यांचा हेतू एकच
आहे आणि त्या दोघांनाही त्यांच्या श्रमाचे प्रतिफळ मिळेल. 9 आम्ही
परमेश्वराच्या सेवेतील सहकारी आहोत. तुम्ही परमेश्वराचे शेत आहात,
परमेश्वराची इमारत आहात. 10 परमेश्वराने जी कृपा मला दिली आहे,
त्यानुसार मी कुशल बांधकाम करणाऱ्यासारखा पाया घातला आणि
आणखी कोणी त्यावर बांधकाम करीत आहे. परंतु प्रत्येकाने बांधकाम
काळजीपूर्वक केले पाहिजे. 11 जो पाया आधी घातलेला आहे, जे
स्वत: येशू ख्रिस्त आहे, त्या व्यतिरिक्त दुसरा पाया कोणालाही घालता
येणार नाही. 12 जर या पायांवर कोणी सोने, चांदी, रत्ने व माणके
आणि कोणी केवळ लाकूड, गवत व पेंढ्या वापरून बांधकाम करेल. 13
तर त्या प्रत्येकाचे काम जसे आहे तसे दिसेल, कारण तो दिवस ते
प्रकाशात आणेल. अग्नीद्वारे ते प्रकट होईल, प्रत्येकाचे काम कसे आहे
हे अग्नीने पारखले जाईल. 14 बांधलेले टिकून राहिले, तर बांधकाम
करणाऱ्याला त्याचे प्रतिफळ मिळेल. 15 परंतु जर ते जळून गेले, तर
बांधकाम करणाऱ्याला हानी सोसावी लागेल; परंतु तो स्वत: वाचेल,
परंतु जणू काय अग्नी ज्वालांमधून बाहेर ओढून काढल्यासारखाच
वाचेल. 16 तुम्ही स्वत: परमेश्वराचे मंदिर आहात आणि परमेश्वराचा
आत्मा तुम्हामध्ये वस्ती करतो हे तुम्हाला माहीत नाही का? 17 जर
कोणी परमेश्वराच्या मंदिराचा नाश करतो, तर परमेश्वरसुद्धा त्या व्यक्तीचा
नाश करतील. कारण परमेश्वराचे मंदिर पवित्र आहे आणि तुम्ही मिळून
ते मंदिर आहात. 18 तुम्ही स्वत:ची फसवणूक करून घेऊ नका. जर
तुमच्यापैकी कोणी या युगाच्या रीतीप्रमाणे स्वत:ला ज्ञानी समजत
असेल, तर ज्ञानी होण्यासाठी त्याला “मूर्ख” व्हावे लागेल, (aiōn g165)
19 कारण या जगाचे ज्ञान परमेश्वराच्या दृष्टीने मूर्खपणा आहे. असे
लिहिले आहे: “ते ज्ञानी लोकांना त्यांच्याच धूर्तपणात पकडतात,” 20
आणि पुन्हा, “ज्ञानी लोकांचे विचार निरर्थक असतात हे प्रभू जाणतात.”
21 तेव्हा मानवी नेत्यांची बढाई मारू नका! कारण सर्वकाही तुमचे आहे.
22 मग तो पौल, अपुल्लोस किंवा केफा किंवा जग, जीवन आणि मरण
किंवा सांप्रत काळ किंवा भविष्यकाळ हे सर्व तुमचे आहेत. 23 पण
तुम्ही ख्रिस्ताचे आहात आणि ख्रिस्त परमेश्वराचे आहेत.

**4** ख्रिस्ताचे सेवक आणि परमेश्वराने जे गुप्त रहस्य प्रकट केले आहे
त्याचे कारभारी असे आम्हाला समजावे. 2 आता ज्यांना कारभार
सोपवून दिला आहे, त्यांनी स्वत:ला विश्वासू असे प्रमाणित करावे. 3
तुम्ही माझा न्याय केला किंवा कोणत्याही मानवी न्यायालयाने केला;
तर मी त्याची जास्त काळजी करत नाही, निश्चित, मी स्वत:चाही न्याय
करीत नाही. 4 कारण माझा विवेक शुद्ध असला, तरी मी निर्दोष ठरत
नाही. प्रभू माझा न्याय करेल. 5 यास्तव निवडलेल्या समयापूर्वी व
प्रभूच्या आगमनापूर्वी कशाचाही न्याय करू नका. त्यावेळी ते अंधकारात
लपलेले सत्य प्रकाशात आणतील व आपल्या अंत:करणातील उद्देश
उघड करेल आणि मग त्यावेळी प्रत्येकाला परमेश्वराकडून प्रशंसा
मिळेल. 6 आता, बंधूंनो व भगिनींनो, या गोष्टी मी तुमच्या हिताकरिता
स्वत:ला व अपुल्लोसला लागू केल्या आहेत यासाठी की, “जे लिहिलेले
वचन आहे त्यापलीकडे जाऊ नका.” या म्हणीचा अर्थ तुम्ही आम्हाकडून
शिकावा. आमच्यापैकी एकाचा अनुयायी म्हणून फुगून जाऊन दुसऱ्याला
कमी लेखू नये. 7 तुम्हाला इतरांपासून वेगळे कोणी केले? तुमच्याजवळ
असे काय आहे की जे तुम्हाला मिळालेले नाही? ज्याअर्थी तुम्हाला सर्व
मिळाले आहे, तर तुम्हाला मिळाले नाही अशी बढाई का मारता? 8
इतक्यातच तुम्हाला जे हवे ते मिळाले आहे, इतक्यात धनवान झाला
आहात, आम्हाला सोडून राज्य करीत आहात; तुम्ही राजे बनला असताच
तर ठीक झाले असते, कारण आम्हीही तुम्हाबरोबर राजे झालो असतो.
9 मला असे वाटते की परमेश्वराने आम्हा प्रेषितांना विजय यात्रेमध्ये,
सर्वात शेवटच्या ठिकाणी मृत्युदंड नेमलेल्यांसारखे ठेवले आहे. आम्ही

सर्व सृष्टी, मानव आणि देवदूतांपुढे एक मौज म्हणून झालो आहे. 10
आम्ही ख्रिस्तासाठी मूर्ख आहोत, ख्रिस्तामध्ये तुम्ही सर्व सुज्ञ आहात!
आम्ही अशक्त आहोत, पण तुम्ही सशक्त आहात! आम्ही अप्रतिष्ठित
आहोत, तुम्ही तर प्रतिष्ठित आहात! 11 या घटकेपर्यंत आम्ही भुकेले व
तहानलेले, घाणेरडी वस्त्रे घातलेले व अतिशय कठोर वागणूक मिळालेले
व बेघर असे आहोत. 12 आम्ही आमच्या हाताने काबाडकष्ट करतो,
जेव्हा आम्हाला शाप देतात, तेव्हा आम्ही आशीर्वाद देतो; आमचा छळ
केला जातो, तेव्हा आम्ही सहन करतो; 13 आमची निंदा होत असता,
आम्ही ममतेने उत्तर देतो. तरीही या क्षणापर्यंत आम्ही जगाचा गाळ व
केरकचरा असे झालो आहोत. 14 तुम्हाला लाजवावे म्हणून नव्हे तर
तुम्हाला सावध करावे या उद्देशाने मी तुम्हाला या गोष्टी, माझी प्रिय
मुले या नात्याने लिहित आहे. 15 ख्रिस्तामध्ये तुम्हाला हजारो शिक्षक
असले, पण पुष्कळ वडील नाहीत. कारण ख्रिस्त येशूंमध्ये शुभवार्तेद्वारे
मी तुमचा पिता झालो आहे. 16 म्हणून मी तुम्हाला विनंती करतो की,
तुम्ही माझे अनुकरण करणारे व्हा. 17 या कारणाकरिता मी तीमथ्याला
तुम्हाकडे पाठवित आहे. तो प्रभूमध्ये माझा प्रिय व विश्वासू पुत्र आहे. तो
प्रत्येक ठिकाणी मंडळयांमध्ये जाऊन मी जे शिक्षण देत असे, त्याप्रमाणे
ख्रिस्त येशूंमध्ये माझ्या शिकवणीची तुम्हाला आठवण करून देईल.
18 मी तुमच्याकडे येणार नाही असे समजून तुमच्यातील काहीजण
अहंकारी झाले आहेत. 19 परंतु प्रभूची इच्छा असली तर मी तुम्हाकडे
लवकरच येईन आणि त्यावेळी गर्विष्ठांच्या बोलण्याकडेच नाही, तर
त्यांच्या सामर्थ्याकडे देखील पाहीन. 20 परमेश्वराचे राज्य बोलण्यात
नव्हे परंतु सामर्थ्यात आहे. 21 तुम्हाला काय आवडेल, मी तुम्हाकडे
शिस्तीची काठी घेऊन, की प्रेम भावाने आणि सौम्य आत्म्याने यावे?

**5** मला असा अहवाल मिळाला आहे की तुमच्यामध्ये लैंगिक अनैतिकता
आहे, की जी गैरयहूदीही खपवून घेणार नाहीत; कोणाएका मनुष्याने
आपल्या वडिलांच्या पत्नीशी अनैतिक संबंध ठेवले आहेत. 2 आणि
तुम्ही अभिमान बाळगता! याउलट दु:खाने ज्या मनुष्याने असे केले,
त्याला सहभागितेतून घालवून द्यावयाचे नव्हते का? 3 मी शरीराने
अनुपस्थित असलो तरी आत्म्याने उपस्थित आहे आणि उपस्थित
असल्यासारखा मी प्रभू येशूंच्या नावाने जो हे कृत्य करीत आहे त्याचा
न्याय करून चुकलो आहे. 4 आपल्या प्रभू येशूंच्या शक्तीने युक्त असा
माझा आत्मा व तुम्ही एकत्र मिळून 5 या मनुष्याला देहस्वभावाच्या
नाशाकरिता सैतानाच्या स्वाधीन करावे, यासाठी की त्याचा आत्मा
प्रभूच्या दिवशी तारला जावा. 6 तुम्ही गर्व करणे उचित नाही. थोडे
खमीर सर्व पिठाच्या गोळ्याला फुगविते, हे तुम्हाला माहीत नाही
का? 7 या जुन्या खमिराला काढून टाका, म्हणजे तुम्ही एक नवीन
अखमीर गोळा तयार व्हाल, जे वास्तविक तुम्हीच आहात. कारण ख्रिस्त
आपल्यासाठी वल्हांडणाचा कोकरा म्हणून अर्पिले गेले. 8 आपण सण
साजरा करू या, जुन्या भाकरीच्या खमिराने, द्वेष आणि दुष्टपणाने नव्हे
तर त्याऐवजी प्रामाणिकपणाने व सत्याने अखमीर भाकरीने साजरा
करू या. 9 तुम्हाला लिहिलेल्या पत्रात तुम्ही जारकर्मी लोकांमध्ये
मिसळू नये असे मी म्हटले होते. 10 जे अनीतिमान, लोभिष्ट, फसविणारे
आणि मूर्तिपूजक अशा या जगाच्या लोकांविषयी मी बोलत नव्हतो,
अन्यथा तुम्हाला हे जग सोडून जावे लागेल. 11 मी तुम्हाला लिहित आहे
की आपण बंधू किंवा भगिनी आहोत असा दावा करीत असतानाही जे
जारकर्म किंवा लोभी, निंदक, मूर्तिपूजक, मद्य प्राशन करणारे आहेत
अशांमध्ये मिसळू नका. अशा लोकांबरोबर भोजनास देखील बसू नका.
12 मंडळीच्या बाहेर जे आहेत त्यांचा न्याय मी का करावा? परंतु जे आत
आहेत त्यांचा न्याय करू नये का? 13 बाहेरच्या लोकांचा न्याय करणारे
परमेश्वर आहेत. "या दुष्ट मनुष्याला तुमच्यामधून काढून टाका."

**6** जर तुमचा कोणाविरुद्ध वाद असल्यास, तो प्रभूच्या लोकांकडे न
नेता, एखाद्या अनीतिमान न्यायाधीशाकडे नेण्याचे धैर्य कसे करता?
2 आपण प्रभूचे लोक जगाचा न्याय करणार आहोत, हे तुम्हाला माहीत
नाही काय? असे असताना, तुम्ही या क्षुल्लक गोष्टींचा आपसात न्याय
करण्यास समर्थ नाही का? 3 आपण स्वत: देवदूतांचा न्यायनिवाडा
करणार आहोत हे तुम्हाला माहीत नाही का? तर त्याच्या तुलनेत या
जगाच्या गोष्टी काहीच नाहीत. 4 जर अशा गोष्टींसंबंधी तुमच्यात वाद
आहेत, तर तुमच्या मंडळीशी ज्यांचा काहीही संबंध नाही, अशांना
तुम्ही न्याय करावयास कसे लावता? 5 तुम्हाला लाज वाटावी म्हणून
मी हे सांगत आहे. विश्वासणाऱ्यांमधील वादांचा न्याय करू शकेल
असा तुमच्यामध्ये कोणीच शहाणा मनुष्य नाही का? 6 उलट एक
विश्वासणारा मनुष्य त्याच्या बंधुवर फिर्याद करतो आणि ती ही विश्वास
न ठेवणाऱ्यांपुढे! 7 तुम्हामध्ये खटले आहेत याचा अर्थ हाच की तुमचा
पूर्णपणे पराजय झालेला आहे. त्याऐवजी तुम्ही अन्याय का सहन
करत नाही? स्वत:ची फसवणूक का करून घेत नाही? 8 उलट,
तुम्ही स्वत:च बंधू व भगिनींची फसवणूक करून त्यांच्यावर अन्याय
करता! 9 अशा वाईट गोष्टी करणाऱ्यांना परमेश्वराच्या राज्याचे वतन
मिळणार नाही, हे तुम्हाला ठाऊक नाही काय? स्वत:ची फसवणूक
करून घेऊ नका. व्यभिचारी, मूर्तिपूजक, जारकर्मी आणि पुमैथुनी, 10
चोर, लोभी, मद्यपी, चहाडखोर आणि दरोडेखोर यांनाही परमेश्वराच्या
राज्यात वाटा मिळणार नाही. 11 तुमच्यापैकी काहीजण अशा प्रकारचे
होते, पण आता तुम्हाला धुऊन स्वच्छ करून पवित्र केलेले आहे. प्रभू
येशू ख्रिस्ताच्या नावाने आणि परमेश्वराच्या पवित्र आत्म्याने तुम्हाला
नीतिमान केले आहे. 12 तुम्ही म्हणाल, "मला काहीही करण्याची मुभा
आहे," पण सर्वच गोष्टी हिताच्या नसतात. "मला काहीही करण्याची
मुभा असली" तरी कोणत्याही गोष्टींची सत्ता मजवर चालणार नाही.
13 तुम्ही म्हणता, "अन्न पोटासाठी आणि पोट अन्नासाठी आहे, पण
परमेश्वर या दोघांचाही नाश करतील." शरीर लैंगिक अशुद्धतेसाठी
नाही तर प्रभूसाठी आहे आणि प्रभू शरीरासाठी आहे. 14 ज्याप्रमाणे
प्रभूला परमेश्वराने आपल्या शक्तीने मरणातून उठविले, त्याप्रमाणेच तो
आपल्यालाही उठवेल. 15 तुमची शरीरे ख्रिस्ताचे अवयव आहेत, हे
तुम्हाला ठाऊक नाही काय? तेव्हा मी ख्रिस्ताच्या शरीराचा अवयव
घेऊन तो वेश्येशी एक करावा काय? कधीच नाही! 16 जर कोणी

वेश्येबरोबर जोडला जातो, तेव्हा ती त्याच्या शरीराचा भाग होते, हे तुम्हाला ठाऊक नाही काय? कारण शास्त्रलेख सांगतो, “ती दोघे एकदेह होतील.” 17 परंतु जो कोणी प्रभूशी जडला आहे तो आत्म्याने त्यांच्याशी एक झाला आहे. 18 व्यभिचाराच्या पापापासून दूर पळा, कारण दुसरे कोणतेही पाप मनुष्य करतो ते शरीराबाहेर करतो, परंतु जो कोणी व्यभिचार करतो, तेव्हा तो स्वतःच्याच शरीराविरुद्ध पाप करतो. 19 तुमचे शरीर परमेश्वराने तुम्हाला दिलेल्या पवित्र आत्म्याचे मंदिर आहे आणि ते तुमच्यामध्ये राहतात, हे तुम्हाला माहीत नाही काय? तुम्ही स्वतःचे नाही; 20 कारण तुम्हाला किंमत देऊन विकत घेतले आहे, म्हणून तुमच्या शरीराने परमेश्वराचे गौरव करा.

**7** आता ज्या गोष्टींविषयी तुम्ही मला लिहिले होते: “मनुष्याने स्त्रीशी लैंगिक संबंध न ठेवलेले बरे.” 2 तरी जारकर्म वाढले आहे म्हणून प्रत्येक पुरुषाने आपल्या पत्नीशी संबंध ठेवावे आणि प्रत्येक स्त्रीने स्वतःच्या पतीशी. 3 विवाहित स्त्री म्हणून असलेले सर्व हक्क पुरुषाने आपल्या पत्नीला द्यावेत, आणि पत्नीनेही आपल्या पतीसाठी तसेच करावे. 4 पत्नीच्या शरीरावर तिचा स्वतःचा अधिकार नाही तर, पतीचा असतो. त्याचप्रमाणे पतीला स्वतःच्या शरीरावर अधिकार नसतो तर तो त्याच्या पत्नीला असतो. 5 एकमेकांची वंचना करू नका, पण प्रार्थनेला वेळ मिळावा म्हणून एकमेकांच्या संमतीने काही काळ अलिप्त राहा. पण तुम्ही पुन्हा एकत्र यावे म्हणजे आत्मसंयमनाच्या अभावी सैतान तुम्हाला मोहात पाडणार नाही. 6 मी हे आज्ञारूपाने म्हणत नाही परंतु अनुमती म्हणून सांगतो. 7 माझी इच्छा अशी आहे की, जसा मी आहे तसे तुम्ही सर्वांनी असावे. परंतु प्रत्येकाला परमेश्वराकडून देणगी मिळालेली आहे; एकास एक देणगी तर दुसऱ्यास दुसरी देणगी. 8 म्हणून जे अविवाहित आहेत आणि ज्या विधवा आहेत, त्यांना मी सांगतो तुम्हीही जसा मी आहे तसे राहावे. 9 पण तुम्हाला संयम राखता येत नसेल, तर विवाह केलेला बरा. वासनेने जळण्यापेक्षा विवाह करणे उत्तम. 10 आता जे विवाहित आहेत, त्यांच्यासाठी मी एक आज्ञा देतो (मी नाही, पण प्रभू देतात) पत्नीने पतीपासून विभक्त होऊ नये. 11 पण पत्नी विभक्त झाली असेल, तर तिने दुसरा विवाह करू नये किंवा आपल्या पतीशी समेट करावा. पतीनेही आपल्या पत्नीला घटस्फोट देऊ नये. 12 इतरांना मी हे सांगतो (प्रभू नव्हे, पण मी): एखाद्या भावाची पत्नी विश्वास ठेवणारी नसेल आणि ती त्याच्या जवळच राहण्यास तयार असेल, तर त्याने तिला घटस्फोट देऊ नये. 13 त्याचप्रमाणे एखाद्या स्त्रीचा पती अविश्वासी असेल आणि तिच्याबरोबर राहण्यास तयार असेल, तर तिनेही त्याला घटस्फोट देऊ नये. 14 कारण अविश्वासी पती, विश्वासणाऱ्या पत्नीद्वारे पवित्र होऊ शकेल आणि अविश्वासी पत्नी, विश्वासणाऱ्या पतीद्वारे पवित्र होऊ शकेल. नाही तर तुमची लेकरे अशुद्ध असती, परंतु ती आता पवित्र आहेत. 15 परंतु जर अविश्वासी व्यक्ती वेगळी होऊ इच्छित असेल तर तसे होऊ द्या. अशा परिस्थितीत भाऊ किंवा बहीण बांधलेले नाही; कारण परमेश्वराने आपल्याला पाचारण केले आहे ते यासाठी की आपण शांतीने राहावे. 16 अहो पत्नींनो, तुमच्या पतींचे तारण तुमच्याद्वारे होईल किंवा नाही हे कसे समजावे? किंवा पतींनो तुमच्या पत्नीचे तारण तुमच्याद्वारे होईल किंवा नाही हे कसे समजावे? 17 प्रत्येकाने विश्वासू व्यक्तीसारखे प्रभूने तुम्हाला ज्या स्थितीत ठेवले आहे व परमेश्वराने जसे पाचारण केले आहे तसे राहावे. सर्व मंडळयांसाठी माझा हाच नियम आहे. 18 सुंता झालेल्या एखाद्या व्यक्तीस पाचारण झाले आहे काय? तर तुम्ही असुंती होऊ नये. तसेच सुंता न होण्यापूर्वी एखाद्या व्यक्तीस पाचारण झाले आहे का? तर त्याने सुंता करून घेऊ नये. 19 सुंतेचे काही महत्त्व नाही व असुंतेचेही नाही. परंतु परमेश्वराच्या आज्ञा पाळणे हेच महत्त्वाचे आहे. 20 एखाद्या व्यक्तीला परमेश्वराने पाचारण केले, त्यावेळी ज्या स्थितीत ते होते तसेच त्यांनी राहवे. 21 तुम्ही गुलाम असताना पाचारण झाले काय? त्यामुळे तुम्ही चिंता करू नका. पण तुम्हाला स्वतंत्र होणे शक्य असेल तर अवश्य व्हा. 22 जर कोणी गुलाम असताना, प्रभूने तुम्हाला विश्वासात पाचारण केले, तर तुम्ही प्रभूमध्ये स्वतंत्र केलेली व्यक्ती आहात. त्याचप्रमाणे, जो स्वतंत्र असून पाचारलेला आहे तो ख्रिस्ताचा गुलाम आहे. 23 तुम्हाला किंमत भरून विकत घेण्यात आले आहे; म्हणून तुम्ही माणसांचे गुलाम होऊ नका. 24 माझ्या बंधूंनो व भगिनींनो, प्रत्येक व्यक्तीला परमेश्वराने पाचारण केले होते तेव्हा ज्या स्थितीत ते होते त्याच स्थितीत त्यांनी परमेश्वराला जोडलेले असावे. 25 आता कुमारिकांबद्दल: मला प्रभूकडून आज्ञा मिळालेली नाही, तरीपण प्रभूच्या कृपेनुसार मी जो विश्वसनीय आहे तो मी माझा न्याय देतो. 26 वर्तमान काळातील संकटामुळे, पुरुषांनी ज्या स्थितीत आहेत, त्या स्थितीत राहावे हे त्यांच्यासाठी योग्य होईल असे मला वाटते. 27 तुमचा विवाह झाला आहे का? तर मुक्त होण्यास पाहू नका. तुम्ही अविवाहित आहात का? तर पत्नी शोधण्याच्या मागे लागू नका. 28 परंतु जर तुम्ही विवाह केला, तरी तुम्ही काही पाप केले नाही आणि एखाद्या कुमारिकेने विवाह केला, तर तिनेही पाप केले नाही. जे विवाह करतात, त्यांना जीवनामध्ये अनेक समस्यांना तोंड द्यावे लागेल; आणि तुमची त्यापासून सुटका व्हावी अशी माझी इच्छा आहे. 29 बंधू व भगिनींनो, वेळ थोडा आहे. यापुढे ज्यांना पत्नी आहे त्यांनी आपल्याला पत्नी नाही अशाप्रकारे राहावे. 30 जे विलाप करतात त्यांनी जणू काही तो केला नाही असे समजावे; जे आनंदित आहेत ते जणू काही आनंदी नाहीत असे समजावे; जे विकत घेतात, त्यांनी स्वतःचे काही नसल्यासारखे समजावे. 31 जे ऐहिक गोष्टींचा उपभोग घेतात, त्यांनी त्यातच गर्क होऊन जाऊ नये, कारण सध्याचे जग लयाला जात आहे. 32 तुम्ही चिंता विरहित असावे, अशी माझी इच्छा आहे. एखादा अविवाहित पुरुष प्रभूचे कार्य—प्रभूला कसे संतोषविता येईल, यासंबंधी काळजी करतो. 33 तरी विवाहित पुरुष जगातील गोष्टींचा आणि आपल्या पत्नीला आनंदी कसे ठेवता येईल, याचा विचार करतो. 34 त्याच्या आवडीनिवडी विभागल्या जातात. अविवाहित स्त्री वा कुमारिकेचे प्रभूला शरीराने व आत्म्याने संतुष्ट करण्याचे ध्येय असते, परंतु विवाहित स्त्री जगाच्या गोष्टींविषयी व आपल्या पतीला कसे संतोषवावे याकडे लक्ष देते. 35 हे मी तुमच्या

भल्यासाठी सांगत आहे, तुम्हावर निर्बंध घालण्यासाठी नव्हे, यासाठी
की तुम्ही योग्यप्रकारे जीवन जगावे आणि तुमचे मन विचलित न होता
प्रभूला पूर्णपणे समर्पित व्हावे. 36 जर मागणी झालेल्या कुमारिकेशी
एखादा मनुष्य आदरपूर्वक वागत नाही असे त्याला वाटले, आणि
त्याच्या भावना अतितीव्र आहेत तर त्याने जे योग्य आहे ते करावे. त्यांनी
लग्न करावे, केल्यास तो पाप करत नाही. 37 परंतु एखाद्या माणसाचे
मन स्थिर आहे व जो दडपणाखाली नाही व ज्याचा आपल्या शरीरावर
ताबा आहे, त्याने कुमारिकेशी विवाह न करण्याचे ठरविले असेल, तर तो
मनुष्य योग्य करतो. 38 म्हणून मग जो पुरुष कुमारिकेशी विवाह करतो,
तो चांगले करतो. परंतु जो विवाह करीत नाही तो अधिक चांगले करतो.
39 पती जिवंत असेल तोपर्यंत पत्नी आपल्या पतीला बांधलेली आहे.
पती मरण पावला, तर ती पाहिजे त्याच्याशी लग्न करण्यास मोकळी
आहे, पण तो प्रभूमध्ये विश्वासू असावा. 40 पण माझ्या मते ती जशी
आहे तशी राहिली तर ती अधिक सुखी होईल—आणि मला असे वाटते
की माझ्यातही परमेश्वराचा आत्मा वास करतो.

**8** मूर्तींना अर्पण केलेले अन्न: आपल्याला माहीत आहे “आपल्या
सर्वांना ज्ञान आहे.” ज्ञान फुगविते, परंतु प्रीती वृद्धी करते. 2 ज्यांना
वाटत असेल की आपण ज्ञानी आहोत, तर जे त्यांना समजावयास पाहिजे
ते त्यांना अजूनही समजले नाही. 3 परंतु जो परमेश्वरावर प्रीती करतो,
त्याला परमेश्वर ओळखतात. 4 तर आता, मूर्तींना अर्पण केलेले अन्न
यासंबंधी आपल्याला माहीत आहे, “या जगातील मूर्तीमध्ये परमेश्वराचे
अस्तित्व नाही” आणि “एका परमेश्वराशिवाय दुसरा परमेश्वर नाही.” 5
कारण स्वर्गात आणि पृथ्वीवरही जरी तथाकथित परमेश्वर आणि अनेक
“देवता” आणि अनेक “प्रभू” आहेत, 6 तरी आपल्याला एकच परमेश्वर,
पिता ज्यांच्याद्वारे सर्वकाही निर्माण झाले आणि त्यांच्यासाठी आम्ही
जगतो; आणि एकच प्रभू, येशू ख्रिस्त ज्यांच्याद्वारे सर्वकाही निर्माण
झाले आणि ज्यांच्याद्वारे आपण जगतो. 7 तरी हे ज्ञान सर्वांच्या ठायी
असते असे नाही; कित्येक लोकांवर मूर्तीचा प्रभाव अजूनही असल्यामुळे
जेव्हा ते मूर्तीला अर्पिलेले अन्न सेवन करतात, तेव्हा ते परमेश्वराला
अर्पिलेले आहे असे समजून खातात, त्यांचा विवेक दुर्बल असल्यामुळे
विटाळतो. 8 परंतु अन्न आपल्याला परमेश्वराच्या जवळ नेत नाही;
जर आपण खात नाही तर आपली हानी होत नाही आणि जर खातो
तर काही अधिक चांगले होत नाही. 9 तरी तुमच्या या अधिकाराचा
उपयोग करीत असताना जे दुर्बल आहेत त्यांना अडखळण होऊ नये
म्हणून सावधगिरी बाळगा. 10 कारण एखाद्या दुबळ्या विवेकबुद्धीच्या
मनुष्याने तुमच्यासारख्या ज्ञानी व्यक्तीला मूर्तीच्या मंदिरामध्ये अन्न
खातांना पाहिले तर ते मूर्तीला वाहिलेले खाण्याचे त्याला धैर्य प्राप्त
होणार नाही का? 11 म्हणून आपले अशक्त बंधू व भगिनी ज्यांच्यासाठी
ख्रिस्त मरण पावले, अशांचा तुमच्या ज्ञानामुळे नाश होऊ नये. 12
जेव्हा तुम्ही अशाप्रकारे त्यांच्याविरुद्ध पाप करता व त्यांच्या दुबळ्या
विवेकबुद्धीला इजा पोहोचविल्याने तुम्ही ख्रिस्ताविरुद्ध पाप करता. 13
यामुळे जे मी खातो त्यामुळे माझ्या बंधू व भगिनींना पापाचे कारण
होत असेल, तर मी मांस कधीच खाणार नाही, म्हणजे मी त्यांच्या
अध:पतनास कारणीभूत होणार नाही. (aiōn g165)

**9** मी स्वतंत्र नाही का? मी प्रेषित नाही का? मी आपल्या प्रभू येशूंना
पाहिले नाही का? प्रभूमध्ये तुम्ही माझ्या श्रमाचे फळ नाही का? 2
कदाचित मी दुसऱ्यांसाठी प्रेषित नसेल, पण तुमच्यासाठी नक्कीच आहे!
कारण माझ्या प्रेषितपणाचा तुम्ही प्रभूमध्ये शिक्का आहात. 3 माझा
न्याय करणाऱ्यांना हे माझे बचावाचे उत्तर आहे. 4 आम्हाला खाण्याचा
पिण्याचा अधिकार नाही काय? 5 इतर प्रेषित, प्रभूचे बंधू आणि केफा
यांच्याप्रमाणे विश्वासू पत्नी करून तिला बरोबर नेण्याचा हक्क नाही
काय? 6 फक्त मला आणि बर्णबाला स्वत:च्या उपजीविकेसाठी काम न
करण्याचा अधिकार नाही काय? 7 स्वत:च्या खर्चाने कोणता सैनिक
सेवा करतो? द्राक्षमळा लावतो, पण द्राक्ष खात नाही असा कोणी आहे
का? मेंढराचा कळप पाळून दूध पिणार नाही असा कोणी आहे का? 8
मी हे मानवी अधिकाराने म्हणतो काय? पण कायदाही तेच सांगतो की
नाही? 9 कारण मोशेने नियमशास्त्रात लिहिले आहे: “बैल धान्याची
मळणी करीत असताना त्याच्या तोंडाला मुसके बांधू नको.” आता
परमेश्वराला बैलाची काळजी आहे एवढाच त्याचा अर्थ आहे काय? 10 हे
खात्रीने त्यांनी आपल्यासाठी म्हटले नाही का? होय, हे आमच्यासाठी
लिहिण्यात आले आहे, कारण जो कोणी नांगरतो आणि मळणी करतो,
त्यांनी हंगामाच्या पिकात वाटा मिळेल या आशेने करावी. 11 जर
आम्ही तुमच्यामध्ये आध्यात्मिक गोष्टीचे बीज पेरले आणि त्याबद्दल
केवळ भौतिक गोष्टींच्या हंगामाची अपेक्षा केली, तर त्यात काय मोठे
झाले? 12 जर इतरांना तुमच्याकडून या गोष्टी मिळण्याचा हक्क आहे,
तर आम्हालाही तुमच्याकडून मिळण्याचा अधिक हक्क नाही काय?
परंतु आम्ही त्या अधिकाराचा उपयोग केला नाही. याउलट, ख्रिस्ताच्या
शुभवार्तेमध्ये अडखळण येऊ नये म्हणून आम्ही कोणत्याही गोष्टी सहन
करण्यास तयार आहोत. 13 जे मंदिरात सेवा करणारे आहेत त्यांना
मंदिरातून अन्न मिळते आणि वेदीवर सेवा करणारे, वेदीवर अर्पण
केलेल्या अर्पणाचा वाटा घेतात हे तुम्हाला माहीत नाही काय? 14
याचप्रमाणे, प्रभूने आज्ञा दिली आहे की जे शुभवार्तेचा प्रचार करतात
त्यांचे पोषण शुभवार्तेद्वारे झाले पाहिजे. 15 परंतु मी यापैकी एकाही
अधिकाराचा उपयोग केला नाही किंवा हे तुम्ही माझ्यासाठी करावे या
उद्देशानेही मी तुम्हाला लिहित नाही. माझा स्वाभिमान कोणी हिरावून
घेण्यापेक्षा मी मरण पत्करेन. 16 कारण जर मी शुभवार्तेचा प्रचार करतो,
तर मला प्रौढी मिरविण्याची गरज नाही, प्रचार करणे हे आवश्यक आहे,
जर मी शुभवार्तेचा प्रचार करीत नाही तर माझा धिक्कार असो. 17 मी
प्रचार केला, तर मला त्याचे प्रतिफळ मिळेल; आणि स्वत:हून केला नाही
तरी ती पार पाडण्याची जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली आहे.
18 माझा मोबदला काय आहे? तो हा की: शुभवार्तेचा प्रचार करताना
तो मोफत करावा आणि शुभवार्तेचा प्रचारक म्हणून आपला अधिकार
पूर्णपणे गाजवू नये. 19 मी स्वतंत्र आहे, कोणाच्याही अधीन नाही
आणि तरीही जितक्यांना शक्य आहे तितक्यांना जिंकता यावे म्हणून मी

स्वत:ला सर्वांचा दास करून घेतले आहे. 20 यहूदीयांना जिंकण्यासाठी
मी यहूदीयांसारखा झालो. नियमशास्त्राधीन असणाऱ्यांसाठी मीही
नियमशास्त्राधीन झालो. वास्तविक मी नियमशास्त्राधीन नाही. 21 ज्यांना
नियमशास्त्र नाही, त्यांना जिंकून घेता यावे म्हणून मीही त्यांच्यासाठी
नियमशास्त्र नसल्यासारखा झालो. परमेश्वराच्या नियमांपासून मी
बंधमुक्त नाही परंतु ख्रिस्ताच्या नियमांनी बांधला गेलो आहे. 22 जे अशक्त
आहेत त्यांना जिंकण्यासाठी मी अशक्त झालो. मी सर्व लोकांसाठी
सर्वकाही झालो आहे, यासाठी की मी कसेही करून काहींचे तारण
साधावे 23 मी हे सर्व शुभवार्तेसाठी करतो यासाठी की मिळणाऱ्या
आशीर्वादात मलाही वाटेकरी होता यावे. 24 शर्यतीत प्रत्येकजण धावतो,
परंतु फक्त एकाच व्यक्तीला बक्षीस मिळते हे तुम्हाला माहीत नाही
का? अशा रीतीने धावा की ते बक्षीस तुम्हाला मिळेल. 25 जो कोणी
क्रीडास्पर्धेत भाग घेतो, त्या प्रत्येकाला कडक रीतीने प्रशिक्षण घ्यावे
लागते. ते विनाशी मुकुट मिळविण्यासाठी करतात, परंतु आपण तर
अविनाशी मुकुट मिळविण्यासाठी तसे करतो. 26 म्हणून मी ध्येय
नसलेल्या कोणा मनुष्यासारखा धावत नाही; मी केवळ मुष्टियुद्ध करीत
नाही, म्हणजे हवेत मुष्टिप्रहार करत नाही. 27 मी एखाद्या क्रीडापटूप्रमाणे
माझ्या शरीरावर ताबा मिळवितो व परिश्रम करून त्याला दास करून
ठेवतो, जेणेकरून इतरांना उपदेश केल्यानंतर मी स्वत:च बक्षिसास
अपात्र ठरणार नाही.

**10** बंधू व भगिनींनो, आपल्या पूर्वजांनी मेघाखाली कूच केली. ते
सर्वजण समुद्रातूनही पार गेले, याबद्दल आपण अज्ञानी असू नये.
2 मेघात आणि समुद्रात त्यांचा व मोशेमध्ये बाप्तिस्मा झाला. 3 त्या
सर्वांनी एकच आध्यात्मिक अन्न खाल्ले. ते सर्वजण तेच आध्यात्मिक
पाणी प्याले. त्यांच्याबरोबर चाललेल्या आत्मिक खडकातून ते पाणी
प्याले आणि हा खडक तर ख्रिस्त होते. 5 हे सर्व असूनही, परमेश्वर त्या
बहुतेकांविषयी संतुष्ट नव्हते; त्यामुळे त्यांची शरीरे अरण्यात विखुरली
गेली. 6 आता ज्यागोष्टी घडल्या, त्या आपल्याला उदाहरणादाखल
आणि आपण त्यांच्याप्रकारे आपली हृदये वाईट गोष्टींवर केंद्रित करू
नयेत म्हणून घडल्या. 7 त्यांच्यातील काही मूर्तिपूजक होते, तसे तुम्ही
होऊ नका. असे लिहिले आहे: “लोकांनी बसून खाणेपिणे केले व
उठून चैनबाजीची मजा घेऊ लागले.” 8 त्याचप्रमाणे त्यांच्यातील काही
लोकांनी लैंगिक अनीतीला वाव दिला, तसे आपण करू नये आणि एका
दिवसात तेवीस हजार लोक मरण पावले. 9 आपण ख्रिस्ताची परीक्षा
पाहू नये, जशी त्यांच्यातील काहीजणांनी पाहिली आणि ते सर्पदंशाद्वारे
मरण पावले. 10 आणि कुरकुर करू नका, जशी त्यांच्यापैकी काहींनी
केली आणि ते नाश करणाऱ्या दूताच्या हातून मरण पावले. 11 आता
या गोष्टी त्यांच्यासाठी उदाहरणादाखल झाल्या आणि ज्या आपणावर
युगाचा शेवट येऊन ठेपला आहे, त्या आपल्याला इशारा म्हणून लिहून
ठेवण्यात आल्या आहेत. (aiōn g165) 12 म्हणून जर तुम्हाला वाटत
असेल की तुम्ही स्थिर उभे आहात, तर आपण पडू नये म्हणून खबरदारी
घ्या. 13 मनुष्यमात्रावर येणाऱ्या सर्वसाधारण परीक्षेपेक्षा वेगळी परीक्षा
तुम्हावर आलेली नाही आणि परमेश्वर विश्वासू आहेत; ते तुमच्या
सहनशक्तीपलीकडे तुमची परीक्षा होऊ देणार नाहीत. तुम्ही ते सहन
करण्यास समर्थ व्हावे म्हणून परीक्षा आली असताना त्यातून बाहेर
पडण्याचा मार्गही सिद्ध करतील. 14 यास्तव, माझ्या प्रिय मित्रांनो,
मूर्तिपूजेपासून दूर पळा. 15 मी बुद्धिमान लोकांबरोबर बोलतो; मी जे
तुम्हाला सांगत आहे त्याची पारख तुम्हीच करा. 16 उपकारस्तुतीचा
प्याला ज्याबद्दल आपण उपकारस्तुती करतो ती ख्रिस्ताच्या रक्तामध्ये
सहभागिता नाही का? जी भाकर आपण मोडतो ती ख्रिस्ताच्या शरीराशी
सहभागिता नाही का? 17 कारण भाकर एक आहे, आम्ही पुष्कळजण
असलो तरी एक शरीर आहोत, आपण सर्वजण एकाच भाकरीचे
सहभागी आहोत. 18 इस्राएली लोकांचा विचार करा: वेदीवर अर्पण
केलेले यज्ञबली जे खातात, ते वेदीशी सहभागी होतात की नाही? 19
मूर्तींना अर्पिलेल्या अन्नास काही महत्त्व आहे किंवा मूर्तीला काही महत्त्व
आहे असा माझ्या म्हणण्याचा अर्थ आहे काय? 20 नाही! गैरयहूदी
लोक परमेश्वराला यज्ञ अर्पण करीत नसून भुतांना अर्पण करतात आणि
भुतांशी तुम्ही सहभागी व्हावे अशी माझी इच्छा नाही. 21 तुम्ही प्रभूचा
प्याला आणि भुतांचा प्याला यातून एकाच वेळी पिऊ शकणार नाही.
तसेच प्रभूचा मेज आणि भुतांचा मेज या दोन्हीमध्ये तुम्हाला एकाच
वेळी सहभागी होता येत नाही. 22 प्रभूला ईर्षेस पेटवावे असा प्रयत्न
आपण करतो काय? आपण त्यांच्यापेक्षा शक्तिमान आहोत काय?
23 “मला प्रत्येक गोष्ट करण्याची मुभा आहे,” असे तुम्ही म्हणता
तरी प्रत्येक गोष्ट हितकारक असतेच असे नाही, “मला प्रत्येक गोष्ट
करण्याची मुभा असली,” तरी सर्वगोष्टी वृद्धी करीत नाहीत. 24 कोणी
स्वत:चे हित पाहू नये, तर दुसऱ्याचेही पाहावे. 25 बाजारात विकत
मिळणारे मांस विवेकभावाकरिता प्रश्न न विचारता खा. 26 कारण,
“पृथ्वी व तिच्यातील सर्वकाही प्रभूचे आहे.” 27 एखाद्या गैरविश्वासू
व्यक्तीने तुम्हाला भोजनाचे आमंत्रण दिले आणि तुमची जाण्याची इच्छा
असली तर तुमच्यापुढे जे वाढले असेल, ते सदसद्विवेकबुद्धीने प्रश्न
न विचारता खावे. 28 पण समजा, “हे यज्ञात वाहिलेले आहे” असे
तुम्हाला कोणी सांगितले, तर ज्याने ही सूचना दिली त्याच्यासाठी
व सदसद्विवेकबुद्धीसाठी तुम्ही ते खाऊ नये. 29 अशा प्रसंगी तुम्ही
त्या माणसाची सदसद्विवेकबुद्धीने लक्षात घ्यावी, तुमची नव्हे. माझ्या
स्वातंत्र्याचा न्याय दुसऱ्यांच्या विवेकभावाला अनुसरून का व्हावा?
30 किंवा जर मी त्या भोजनामध्ये परमेश्वराचे आभार मानून सहभागी
झालो, तर ज्यासाठी मी धन्यवाद दिला त्याबद्दल मला दोष का देण्यात
यावा? 31 तुम्ही जे खाता किंवा पिता किंवा जे काही करता ते सर्व
परमेश्वराच्या गौरवासाठीच करावे. 32 यहूदी असोत की गैरयहूदी असोत
किंवा परमेश्वराची मंडळी असो, कोणालाही तुमच्यामुळे अडखळण
होऊ नये. 33 मी सर्वप्रकारे सर्वांना संतुष्ट करण्याचा प्रयत्न करतो. मी
स्वत:चे भले पाहत नाही परंतु अनेकांचे भले पाहतो यासाठी की त्यांचे
तारण व्हावे.

11 मी ख्रिस्ताच्या उदाहरणाचे अनुसरण करतो, तसे तुम्हीही माझे
अनुसरण करा. 2 सर्व गोष्टीत तुम्ही माझी आठवण करता म्हणून
मी तुमची प्रशंसा करतो व ज्या रूढी मी तुम्हाला सोपवून दिल्या, त्या
तुम्ही घट्ट धरून ठेवल्या आहेत. 3 परंतु एक गोष्ट तुम्हाला समजावी
अशी माझी इच्छा आहे, प्रत्येक पुरुषाचे मस्तक ख्रिस्त आहे आणि
प्रत्येक स्त्रीचे मस्तक तिचा पती आहे, ख्रिस्ताचा मस्तक परमेश्वर
आहे. 4 जो प्रत्येक पुरुष प्रार्थना करताना किंवा संदेश सांगताना
आपल्या डोक्यावर आच्छादन ठेवतो, तो त्याच्या मस्तकाचा अनादर
करतो. 5 तसेच जी स्त्री डोक्यावर आच्छादन न घेता प्रार्थना करते
किंवा संदेश सांगते, ती आपल्या पतीचा अनादर करते. तसे करणे
म्हणजे जणू काय तिने आपल्या डोक्याचे मुंडण केल्यासारखे आहे. 6
एखाद्या स्त्रीला डोक्यावर आच्छादन घेण्याची इच्छा नसेल, तर तिने
केस कापावे किंवा मुंडण करावे आणि केस कापणे किंवा मुंडण करणे
हे तिला लाजिरवाणे वाटत असेल, तर तिने डोक्यावर आच्छादन घ्यावे.
7 पुरुषाने आपले मस्तक झाकणे योग्य नाही, कारण तो परमेश्वराचे
प्रतिरूप व गौरव आहे; परंतु स्त्री पुरुषाचे गौरव आहे. 8 कारण पुरुष
स्त्रीपासून झाला नाही, परंतु स्त्री पुरुषापासून झाली. 9 पुरुष स्त्रीसाठी
निर्माण करण्यात आला नव्हता, परंतु स्त्री पुरुषासाठी निर्माण करण्यात
आली. 10 या कारणासाठी स्त्रीने आपल्या अधिकाराचे चिन्ह म्हणून
देवदूतांकरिता स्वतःचे मस्तक आच्छादावे. 11 प्रभूमध्ये स्त्री पुरुषापासून
स्वतंत्र नाही आणि पुरुषही स्त्रीपासून स्वतंत्र नाही. 12 कारण जशी
स्त्री पुरुषापासून, त्याचप्रमाणे सर्व पुरुष स्त्रीपासूनच जन्मले, परंतु
सर्वकाही परमेश्वरापासून आहे. 13 त्यासंबंधी तुम्हीच निर्णय घ्या: स्त्रीने
आपले मस्तक आच्छादून न घेता परमेश्वराची प्रार्थना करणे योग्य
आहे काय? 14 निसर्ग आपणास शिकवितो की लांब केस असणे
हे पुरुषास लज्जास्पद आहे, 15 परंतु जर स्त्रीचे लांब केस आहेत
तर ते तिचे गौरव आहे, कारण आच्छादन म्हणूनच तिला लांब केस
दिलेले आहेत. 16 याबाबतीत कोणी वाद घालत असेल, तर आम्हामध्ये
आणि परमेश्वराच्या सर्व मंडळयांमध्ये इतर रीत प्रचलित नाही. 17
आता खालील गोष्टीबद्दल मला तुमची प्रशंसा करता येत नाही, कारण
तुमचे सभेमध्ये एकत्र येणे तुमचे हित करण्यापेक्षा अधिक नुकसानच
करते. 18 पहिली गोष्ट अशी की मंडळी म्हणून तुम्ही एकत्र येत असला
तरी, तुमच्यात फूट आहे, असे मी ऐकतो आणि त्यावर काही अंशी
माझा विश्वास आहे. 19 तुम्हामध्ये मतभेद असणे गरजेचे आहे, म्हणजे
परमेश्वराने मान्यता दिलेले कोण आहेत, हे आपोआप उघड होईल. 20
तुम्ही एकत्र येता, तेव्हा ते केवळ प्रभुभोजन खाण्यासाठी नव्हे, 21 जेव्हा
तुम्ही भोजन करता, तेव्हा तुमच्यातील काहीजण इतरांचा विचार न
करता स्वतःचे भोजन करतात. याचा परिणाम, एकजण उपाशी राहतो व
दुसरा द्राक्षारसाने ओतप्रोत भरतो. 22 खाणेपिणे करण्यासाठी तुम्हाला
स्वतःची घरे नाहीत काय? किंवा तुम्ही परमेश्वराच्या मंडळीचा अनादर
करून ज्यांच्याजवळ काहीच नाही, त्यांना लाजविता काय? मी तुम्हाला
काय म्हणावे? मी तुमची प्रशंसा करावी काय? याबाबतीत अजिबात
नाही. 23 जे मला प्रभूपासून प्राप्त झाले ते मी तुम्हाला सोपवून दिले
आहे: ज्या रात्री प्रभू येशूंचा विश्वासघात करण्यात आला, त्या रात्री
त्यांनी भाकर घेतली, 24 आणि आभार मानून ती मोडली आणि ते
म्हणाले, "हे माझे शरीर तुमच्याकरिता दिले जात आहे; माझ्या स्मरणार्थ
हे करा." 25 त्याचप्रमाणे भोजन झाल्यावर, प्याला घेतला व म्हणाले,
"हा प्याला माझ्या रक्ताने केलेला नवा करार आहे; ज्या ज्यावेळी तुम्ही
हा प्याल, त्यावेळी हे माझ्या स्मरणार्थ करा." 26 कारण ज्यावेळी
तुम्ही ही भाकर खाता आणि हा प्याला पिता, तेव्हा प्रत्येक वेळी त्यांचे
पुनरागमन होईपर्यंत प्रभूच्या मृत्यूची घोषणा करता. 27 आणि म्हणून,
जो कोणी अयोग्य प्रकारे ही भाकर खातो किंवा प्रभूचा प्याला पितो, तो
प्रभूचे शरीर आणि रक्त याविरुद्ध पाप करतो. 28 याच कारणासाठी
ही भाकर खाण्यापूर्वी आणि हा प्याला पिण्यापूर्वी प्रत्येकाने आपले
आत्मपरीक्षण करावे. 29 जो ख्रिस्ताचे मंडळीरूपी शरीर न ओळखता
अयोग्य प्रकारे ही भाकर खातो आणि हा प्याला पितो, तो स्वतःवर न्याय
ओढवून घेतो. 30 म्हणूनच तुमच्यामध्ये अनेकजण दुर्बल व आजारी
आहेत, एवढेच नव्हे तर काहीजण मृत्यू पावले आहेत. 31 परंतु जर
तुम्ही स्वतःला पडताळून पाहिले असते, तर तुमचा असा न्याय झाला
नसता. 32 जरी आपला न्याय प्रभूने अशा रीतीने केला, तरी तुम्हाला
शिस्त लागावी, यासाठी की शेवटी जगाबरोबर आपणही दोषी ठरविले
जाऊ नये. 33 म्हणूनच, प्रिय बंधूंनो व भगिनींनो, तुम्ही भोजनासाठी
एकत्र येता, तेव्हा सर्वजण एकमेकांसाठी थांबून एकत्रित भोजन करा.
34 तुमच्यापैकी कोणी भुकेला असला तर त्याने घरीच काहीतरी खाऊन
यावे, यासाठी की जेव्हा तुम्ही एकत्रित जेवता त्यावेळी दंडपात्र होऊ
नये. इतर बाबींसंबंधी मी तिकडे आल्यावर पुढील मार्गदर्शन करेन.

12 आता, बंधूंनो आणि भगिनींनो, आत्मिक दानांसंदर्भात तुम्ही
अज्ञानी असावे अशी माझी इच्छा नाही. 2 तुम्हाला आठवतच
असेल की तुम्ही गैरयहूदी होता, तेव्हा तुम्ही कोणत्या प्रकारे का होईना
मुक्या मूर्तींच्या प्रभावाखाली भटकले गेला होता. 3 याच कारणासाठी
तुम्हाला हे समजावे की परमेश्वराच्या पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने बोलणारा
कोणीही "येशू शापित असो" असे म्हणणार नाही आणि कोणी मनुष्य
पवित्र आत्म्याशिवाय, "येशू प्रभू आहे" असेही म्हणणार नाही. 4
निरनिराळ्या प्रकारची दाने आहेत, परंतु ती दाने वाटून देणारा पवित्र
आत्मा एकच आहे. 5 सेवा करण्याचे निरनिराळे प्रकार आहेत, पण
प्रभू एकच आहे. 6 कार्य निरनिराळ्या प्रकारचे आहेत, परंतु त्या सर्व
गोष्टींमध्ये आणि प्रत्येकामध्ये कार्य करणारे परमेश्वर एकच आहेत. 7
आता प्रत्येकाला आत्म्याचे प्रकटीकरण सार्वजनिक कल्याणासाठी
होते. 8 एकाला आत्म्याद्वारे ज्ञानाचा संदेश, तर तोच दुसऱ्याला बुद्धीचा
संदेश एकाच आत्म्याद्वारे देतो. 9 त्याच आत्म्याद्वारे एकाला विश्वास, तर
त्या एका आत्म्याद्वारे दुसऱ्याला रोग बरे करण्याची दाने मिळतात. 10
तोच आत्मा काही जणांना चमत्कार करण्याचे सामर्थ्य देतो, तर इतर
काही जणांना संकल्प सांगण्याचे, तर कित्येकांना आत्मे ओळखण्याचे
सामर्थ्य देतो. आणखी काहींना तो अन्य भाषा बोलण्याचे ज्ञान देतो;

आणि त्याचप्रमाणे इतरांना अन्य भाषेचे स्पष्टीकरण करण्याची क्षमता
देतो. 11 ही सर्व कार्ये एक आणि एकच आत्मा करतो आणि आपल्या
निर्धारानुसार प्रत्येकाला वाटून देतो. 12 जसे शरीर एक असून, अनेक
अवयव आहेत, तरी हे सर्व अवयव मिळून एकच शरीर होते, तसेच
ख्रिस्ताविषयीही आहे. 13 काही यहूदी किंवा गैरयहूदी, काही गुलाम
किंवा स्वतंत्र, आपण सर्व एकाच आत्म्याद्वारे एक शरीर होण्यासाठी
बाप्तिस्मा पावलेलो आहोत आणि आपल्या प्रत्येकाला एक आत्मा
प्यावयास दिला आहे. 14 आता शरीर एकच अवयव नाही, तर ते अनेक
अवयवांनी मिळून बनलेले आहे. 15 समजा पाय म्हणाला, “मी हात
नाही म्हणून शरीराचा अवयव नाही,” तरी त्याच्या त्या म्हणण्यामुळे तो
शरीराचा भाग होत नाही असे नाही. 16 तसेच कानाने म्हटले, “मी डोळा
नाही म्हणून मी शरीराचा भाग नाही,” तर त्याच्या त्या म्हणण्यामुळे
तो शरीराचा भाग होत नाही असे नाही. 17 सर्व शरीर केवळ डोळा
असते, तर ऐकावयास कसे आले असते? किंवा जर संपूर्ण शरीर
केवळ कानच असते, तर वास कसा घेता आला असता? 18 परंतु
परमेश्वराने आपल्या योजनेप्रमाणे सर्व अवयवांना एकाच शरीरामध्ये
त्याला पाहिजे तशी रचना केली आहे. 19 ते केवळ एकच भाग असते,
तर शरीर कुठे असते? 20 तर मग अनेक अवयव आहेत, परंतु शरीर
मात्र एकच आहे. 21 डोळा हातास म्हणू शकत नाही, “मला तुझी गरज
नाही.” तसेच मस्तकही पायांना म्हणू शकत नाही, “मला तुमची गरज
नाही.” 22 उलट शरीराचे अशक्त म्हणून समजले जाणारे अवयवही
अत्यावश्यक आहेत. 23 आपल्याला वाटते की शरीरामध्ये काही भाग
कमी मानाचे आहेत तरी त्यांना आपण विशेष सन्मानाने वागवितो आणि
तुच्छ गणले गेलेल्या अवयवांना सुरूप करण्याकडे विशेष लक्ष दिले
जाते. 24 सुरूप दिसणाऱ्या अवयवांची अशी काळजी घेण्याची गरज
नसते. म्हणून परमेश्वराने आपल्या शरीराचे निरनिराळे भाग अशा रीतीने
जोडले आहेत की जे भाग एरवी कमी महत्त्वाचे वाटतात, त्यांचा मोठा
सन्मान केला जावा. 25 ते अशासाठी की शरीरामध्ये फूट नसावी, तर
सर्व अवयवांनी एकमेकांची सारखीच काळजी घ्यावी. 26 जर एका
अवयवाला दु:ख झाले, तर त्याच्याबरोबर सर्व अवयवांना दु:ख होते
आणि एका अवयवाचा सन्मान झाला, तर सर्व अवयव आनंदित होतात.
27 आता आपण ख्रिस्ताचे शरीर आहोत आणि आपण प्रत्येकजण
त्याचे भाग आहोत, 28 आणि परमेश्वराने सर्वात प्रथम मंडळीत प्रेषित,
दुसरे संदेष्टे, तिसरे शिक्षक, मग चमत्कार करणारे, तसेच रोग बरे
करण्याचे दान प्राप्त झालेले, इतरांना मदत करणारे, मार्गदर्शन करणारे,
आणि शेवटी वेगवेगळी भाषा बोलणारे. 29 सर्व प्रेषित आहे काय? सर्व
संदेष्टे आहेत काय? सर्व शिक्षक आहेत काय? प्रत्येकाला चमत्कार
करण्याचे दान मिळाले आहे काय? 30 सर्वांना रोग बरे करण्याची
दाने मिळाली आहेत काय? सर्वजणांना अन्य भाषेत बोलतात काय?
सर्वजण स्पष्टीकरण करतात काय? 31 तेव्हा अधिक उच्चदानांची इच्छा
बाळगणे चांगले. आणि आता मी तुम्हाला सर्वोत्कृष्ट मार्ग दाखवितो.

**13** जर मी मनुष्यांच्या आणि देवदूतांच्या भाषेमध्ये बोलत असलो,
पण माझ्याठायी प्रीती नसली, तर मी वाजणारी थाळी किंवा
झणझणणाऱ्या झांजेसारखा आहे. 2 मला परमेश्वराचे संकल्पनिवेदन
करण्याचे दान असले, सर्वप्रकारच्या रहस्यांचे गहन अर्थ आकलन होत
असले आणि सर्व ज्ञान असले आणि जरी डोंगर हालविण्याइतका
मजजवळ विश्वास असला, पण माझ्याठायी प्रीती नसली, तर मी
काहीच नाही. 3 माझ्याजवळ जी संपत्ती आहे ती सर्व मी गरिबांना
दिली आणि माझे शरीर कष्ट सहन करण्यासाठी अर्पण केले, परंतु
माझ्याठायी प्रीती नसली, तर मला काही लाभ नाही. 4 प्रीती सहनशील
आहे, प्रीती दयाळू आहे. ती कधीही हेवा किंवा मत्सर करीत नाही,
कधीही अभिमान बाळगत नाही, गर्व करीत नाही. 5 ती कधीही इतरांचा
अपमान करीत नाही, स्वार्थ पाहत नाही किंवा सहज चिडत नाही. ती
अयोग्य गोष्टींची कधीही नोंद ठेवीत नाही. 6 प्रीती वाईट गोष्टींमध्ये
आनंद मानत नाही परंतु सत्यामध्ये आनंद मानते. 7 प्रीती नेहमी संरक्षण
करते, सर्वदा विश्वास ठेवते, सर्वदा आशा धरते आणि सर्वदा धीर
धरते. 8 भविष्यनिवेदन करण्याचे दान समाप्त होईल, वेगवेगळी भाषा
बोलण्याचे दान स्तब्ध होईल आणि बुद्धीचे ज्ञान नाहीसे होईल; परंतु
प्रीती अखंडपणे टिकून राहील. 9 कारण आपल्याला थोडेच कळते,
आपल्याला संकल्पाचेही ज्ञान थोडे आहे. 10 परंतु पूर्णत्वाचे आगमन
झाल्यावर, जे अपूर्ण आहे ते नाहीसे होईल. 11 मी बालक होतो, तेव्हा
माझे बोलणे, विचार करणे, विवाद करणे बालकासारखे होते. परंतु
जेव्हा मी प्रौढ झालो, तेव्हा लेकरांसारखे वागणे मी सोडून दिले आहे.
12 कारण आपण आता केवळ आरशात प्रतिबिंब पाहत आहोत; नंतर
आपण समोरासमोर पाहणार आहोत. मला आता केवळ अंशत: कळते;
नंतर मला सर्वकाही स्पष्ट असे दिसेल, जशी माझी संपूर्ण ओळख झाली
आहे. 13 विश्वास, आशा, प्रीती या तीन गोष्टी टिकून राहतात; परंतु
त्यामध्ये प्रीती सर्वश्रेष्ठ आहे.

**14** प्रीतीचा मार्ग अनुसरा, तरीपण आत्म्याच्या देणग्यांची इच्छा
बाळगत राहा, विशेषत: संदेश सांगण्याचे. 2 कारण जेव्हा तुम्ही
अन्य भाषा बोलता तेव्हा माणसाशी नव्हे तर परमेश्वराशी बोलता. निश्चित,
तुम्ही आत्म्याद्वारे गूढ बोलत असाल तर तुमचे बोलणे कोणालाही
समजणार नाही. 3 परंतु जो कोणी संदेश देतो तो लोकांची आत्मिक
वृद्धी, प्रोत्साहन, आणि समाधान व्हावे म्हणून बोलतो. 4 जो अन्य
भाषेत बोलतो तो स्वत:चीच उन्नती करतो. परंतु जो संदेश देतो, तो
मंडळीची प्रगती करण्यास मदत करतो. 5 तुम्ही सर्वांनी अन्य भाषेत
बोलावे अशी माझी इच्छा आहे, परंतु त्याऐवजी तुम्ही संदेश देणारे व्हावे.
कारण अन्य भाषा बोलणाऱ्यांनी अर्थ नाही सांगितला तर मंडळीची
उन्नती कशी होईल, पण त्यापेक्षा संदेश देणारे अधिक श्रेष्ठ आहेत. 6
बंधू व भगिनींनो, समजा मी तुमच्याकडे आलो आणि अन्य भाषेत बोलू
लागलो, तर तुम्हाला माझा काय फायदा, याउलट मी तुमच्यासाठी काही
प्रकटीकरण, किंवा ज्ञान किंवा संदेश दिला किंवा वचनाचा बोध आणला
तर चांगले होणार नाही का? 7 बासरी किंवा वीणा यांसारख्या निर्जीव

वस्तू ध्वनी उत्पन्न करतात, परंतु प्रत्येक वाद्याच्या स्वरात भिन्नता
असल्याशिवाय कोणते वाद्य वाजत आहे हे कसे समजणार? 8 जर
कर्णे स्पष्ट स्वर काढणार नाही, तर युद्धावर जाण्यासाठी तयारी कोण
करेल? 9 तुमच्याबाबतीत असेच आहे. त्याचप्रमाणे सहज समजेल अशा
भाषेत बोलल्याशिवाय, तुम्ही काय म्हणता हे इतरांना कसे समजेल?
तुम्ही फक्त वाऱ्याबरोबर बोलत आहात असे होईल. 10 नि:संशय
जगामध्ये निरनिराळ्या भाषा आहेत, परंतु एकही अर्थाविना नाही. 11
जर मला एखाद्याच्या बोलण्याचा अर्थ समजून घेण्याची क्षमता नाही,
तर माझ्याशी बोलणारा मनुष्य मला विदेशी वाटेल आणि मीही त्याला
विदेशी वाटेन. 12 तुमच्याबाबतीत असेच आहे. ज्याअर्थी तुम्ही आत्मिक
दानांसाठी उत्सुक आहात, तर मग मंडळीची वृद्धी व्हावी यासाठी ती दाने
विपुल प्रमाणात मिळावी म्हणून नेहमी प्रयत्न करा. 13 या कारणासाठी
एखादा अन्य भाषेत बोलतो, तर त्याने आपण काय बोललो याचा
अर्थ सांगता यावा म्हणून प्रार्थना करावी. 14 कारण मी अन्य भाषेत
प्रार्थना करतो, तर माझा आत्मा प्रार्थना करतो, पण माझे मन निष्फळ
आहे. 15 मी काय करावे? मी आत्म्याने प्रार्थना करेन, परंतु माझ्या
बुद्धीनेही प्रार्थना करेन, मी आत्म्याने गीते गाईन व त्याचबरोबर बुद्धीनेही
गीते गाईन. 16 जेव्हा तुम्ही फक्त आत्म्याने परमेश्वराची उपकारस्तुती
कराल, तर जो चौकशी करणारा किंवा अविश्वासू व्यक्ती, ज्याला तुम्ही
काय बोलता हे समजत नाही तो तुमच्या स्तुतीला “आमेन” कसा
म्हणू शकेल? 17 तुम्ही पुरेशी स्तुती करता, परंतु याद्वारे कोणाचीच
उन्नती होणार नाही. 18 मी तुम्हा सर्वांपेक्षा अधिक अन्य भाषेत बोलू
शकतो, याबद्दल मी परमेश्वराचे आभार मानतो. 19 परंतु मंडळीत अन्य
भाषेतून दहा हजार शब्द बोलण्यापेक्षा, इतरांना बोध होईल असे पाच
शब्द बोलणे मी अधिक पसंत करेन. 20 प्रिय बंधूंनो व भगिनींनो, तुम्ही
लेकरांसारखे विचार करण्याचे सोडून द्या. वाईटाच्या बाबतीत तुम्ही
बालकांसारखे, परंतु विचारांच्या बाबतीत प्रौढ व्हा. 21 नियमशास्त्रात
आपल्याला सांगितले आहे: “अन्य भाषा बोलणारे परक्यांच्या ओठांद्वारे
मी या लोकांशी बोलेल, परंतु तरीही हे लोक माझे ऐकणार नाहीत. असे
प्रभू म्हणतात.” 22 अन्य भाषा बोलता येणे ही विश्वास ठेवणाऱ्यांसाठी
चिन्ह नसून, विश्वास न ठेवणाऱ्यांसाठी चिन्ह आहे. परंतु संदेश देणे,
हे विश्वास ठेवणाऱ्यांसाठी आहे, विश्वास न ठेवणाऱ्यांसाठी नाही. 23
तरीपण चौकशी करणारा किंवा अविश्वासू मनुष्य तुमच्या मंडळीत
आला आणि त्याने तुम्हा सर्वांना अन्य भाषेतून बोलताना ऐकले,
तर तुम्ही सर्वजण वेडे आहात असेच त्याला वाटेल. 24 परंतु तुम्ही
सर्वजण संदेश देत असताना एखादा चौकशी करणारा किंवा अविश्वासू
मनुष्य आत आला तर त्याला पापी असल्याची खात्री पटेल आणि
सर्व त्याचा निवाडा करतील. 25 त्याच्या अंत:करणातील गुप्त गोष्टी
उघड होतील; आणि, “तुम्हामध्ये निश्चितच परमेश्वर आहे!” असे जाहीर
करून तो पालथा पडेल व परमेश्वराची उपासना करेल. 26 मग बंधूंनो व
भगिनींनो, आपण काय म्हणावे? जेव्हा तुम्ही एकत्र येता, त्यावेळी
तुमच्यापैकी प्रत्येकाजवळ असलेले गीत किंवा बोधपर शब्द, किंवा
प्रकटीकरण, किंवा अन्य भाषा, किंवा अर्थ सांगण्याची प्रत्येकाची
तयारी असावी. या सर्वगोष्टी अशा रीतीने व्हाव्या की ज्याद्वारे मंडळीची
उन्नती होईल. 27 कोणी अन्य भाषेत बोलतो, तर दोन किंवा जास्तीत
जास्त तीन क्रमानुसार, एकजण एकावेळी बोलेल आणि दुसरा अर्थ
सांगेल. 28 पण अर्थ सांगणारा उपस्थित नसला, तर अन्य भाषा
बोलणाऱ्यांनी मंडळीत शांत राहवे. त्याने स्वत:शी व परमेश्वराशी बोलावे.
29 संदेश देणाऱ्यांपैकी दोघांनी किंवा तिघांनीच बोलावे आणि इतरांनी
संदेशाची काळजीपूर्वक पारख करावी. 30 बसलेल्यांपैकी एखाद्याला
काही प्रकटीकरण झाले, तर पहिल्या संदेश देणाऱ्यांनी शांत व्हावे.
31 ते एकामागून एक संदेश देतील म्हणजे प्रत्येकाला बोध मिळून
त्यांना उत्तेजन मिळेल. 32 संदेश देणाऱ्याचे आत्मे संदेश देणाऱ्यांच्या
नियंत्रणात असतात. 33 कारण परमेश्वर हे अव्यवस्था व गोंधळ यांचे
परमेश्वर नसून शांततेचे आहेत—हे प्रभूच्या सर्व मंडळयांमध्ये दिसले
पाहिजे. 34 स्त्रियांनी मंडळीमध्ये शांत राहवे. स्त्रियांना बोलण्याची
परवानगी नाही. नियमशास्त्रात सांगितल्याप्रमाणे त्यांनी अधीन राहवे.
35 त्यांना काही गोष्टींची चौकशी करावयाची असल्यास, त्यांनी आपल्या
पतीला घरी विचारावे. कारण एखाद्या स्त्रीने मंडळीला प्रवचन देणे ही
लज्जास्पद बाब आहे. 36 परमेश्वराच्या वचनाचा प्रारंभ तुम्हापासूनच
झाला काय? आणि हे वचन फक्त तुम्हा लोकांपर्यंतच पोहोचले काय?
37 आपल्याला पवित्र आत्म्याकडून संदेश देण्याचे किंवा दुसरे दान
मिळाले आहे, असे वाटणाऱ्यांनी हे ओळखावे, की मी जे लिहित आहे ती
प्रभूची आज्ञा आहे. 38 जर कोणी याकडे दुर्लक्ष करेल, तर त्यांच्याकडेही
दुर्लक्ष केल्या जाईल. 39 यास्तव, माझ्या बंधूंनो व भगिनींनो, संदेश
देण्याची उत्कट इच्छा धरा आणि अन्य भाषेतून जे बोलतात त्यांना मना
करू नका. 40 तरीपण प्रत्येक गोष्ट सुव्यवस्थित आणि योग्यरीतिने
केली जावी.

**15** आता माझ्या बंधूंनो व भगिनींनो, ज्या शुभवार्तेचा मी तुम्हाला
प्रचार केला होता, त्याची तुम्हाला आठवण करून द्यावीशी वाटते,
तिचा तुम्ही स्वीकार केला आणि तिच्यामध्ये तुम्ही खंबीरपणे उभे
आहात. 2 या शुभवार्तेद्वारे तुमचे तारण झाले, ज्या वचनांचा मी तुम्हाला
प्रचार केला त्यावर जर तुम्ही दृढविश्वास ठेवला नाही, तर तुमचा विश्वास
व्यर्थ आहे. 3 प्रथम महत्त्वाचे म्हणजे जे मी स्वीकारले तेच तुम्हाला
सांगत आलो आहे आणि ते म्हणजे वचनांनुसार: ख्रिस्त आमच्या
पापांसाठी मरण पावले. 4 त्यांना पुरण्यात आले आणि तीन दिवसानंतर
त्यांना शास्त्रलेखात सांगितल्याप्रमाणे कबरेतून पुन्हा उठविण्यात आले,
5 आणि केफाला त्यांचे पहिल्यांदा दर्शन घडले, आणि नंतर बारा
शिष्यांना. 6 त्यानंतर पाचशेपेक्षा अधिक बंधू व भगिनींना एकाच
वेळी त्यांचे दर्शन घडले, त्यातील बहुतेक आजही जिवंत असले, तरी
काहीजण मरण पावले आहेत. 7 याकोबाला आणि नंतर सर्व प्रेषितांना
त्यांचे दर्शन झाले. 8 सर्वात शेवटी, एखाद्या अवेळी जन्मलेल्यासारखे
मला त्यांचे दर्शन झाले. 9 कारण सर्व प्रेषितांपेक्षा मी सर्वात कनिष्ठ
आहे आणि प्रेषित म्हणून घेण्याच्या किंचितही लायकीचा नाही, कारण

मी परमेश्वराच्या मंडळीचा छळ केला. 10 आता मी जो काही आहे, तो
परमेश्वराच्या कृपेमुळेच आहे; आणि त्यांची माझ्यावरील कृपा व्यर्थ
गेली नाही. कारण इतर सर्वांपेक्षा मी अधिक कष्ट केले; परंतु मी नाही
तर परमेश्वराची कृपा माझ्यावर असल्यामुळे हे झाले. 11 प्रचार मी किंवा
त्यांनी केला, परंतु संदेश तोच आहे आणि त्यावर तुम्ही विश्वास ठेवला.
12 परंतु जर ख्रिस्त मरणातून पुन्हा उठविले गेले असा आम्ही प्रचार
करतो, तर मग मेलेल्यांचे पुनरुत्थान होणार नाही, असे तुमच्यापैकी
काहीजण का म्हणतात? 13 जर मेलेल्यांचे पुनरुत्थान होत नाही, तर
ख्रिस्तही अजून उठविले गेले नाही. 14 आणि ख्रिस्त अजून उठविले गेले
नाही, तर आमचा प्रचार आणि तुमचा विश्वासही व्यर्थ आहे. 15 यापेक्षा
अधिक, म्हणजे आम्ही परमेश्वराविषयी खोटी साक्ष देणारे आढळलो,
कारण परमेश्वराने ख्रिस्ताला मृतांतून उठविले अशी साक्ष आम्ही देतो.
मृत झालेले पुन्हा उठविले जाणार नाहीत, तर त्यांनी त्याला मृतांतून
उठविलेच नाही. 16 जर मेलेले जिवंत होत नाही, तर मग ख्रिस्तही अजून
जिवंत झालेले नाही; 17 आणि ख्रिस्त मरणातून जिवंत झाले नाही, तर
तुमचा विश्वास व्यर्थ आहे. तुम्ही अजूनही तुमच्या पापातच आहात. 18
आणि तर जे ख्रिस्तामध्ये मरण पावले आहेत, त्यांचाही नाश झाला आहे.
19 जर ख्रिस्तामध्ये आपली आशा फक्त या पृथ्वीवरील जीवनासाठी
असेल, तर सर्व मनुष्यांमध्ये आपली स्थिती अधिक दयनीय ठरेल. 20
परंतु निश्चित ख्रिस्त मेलेल्यातून उठविले गेले आहेत; जे निद्रा पावलेले
आहेत त्यातील ते प्रथमफळ आहे. 21 कारण जसा एका मनुष्याद्वारे
मृत्यू आला, तसाच या एका मनुष्याद्वारे मेलेल्यांचे पुनरुत्थानही आले
आहे. 22 कारण आदामामध्ये सर्व मरण पावतात, तसेच ख्रिस्तामुळे
सर्व जिवंत करण्यात येतील 23 प्रत्येकजण आपआपल्या क्रमाप्रमाणे
उठेल: प्रथमफळ ख्रिस्त; नंतर जेव्हा ते येतील तेव्हा जे त्यांचे आहेत
ते उठतील. 24 नंतर शेवट होईल, त्यांनी सर्व सत्ता, अधिकार आणि
सामर्थ्य नष्ट केल्यावर ख्रिस्त आपले राज्य परमेश्वर पित्याला सोपवून
देतील. 25 कारण त्यांचे सर्व शत्रू पायाखाली ठेवीपर्यंत त्यांना राज्य
करणे भाग आहे. 26 शेवटचा शत्रू जो मृत्यू, त्याचाही नाश केला जाईल.
27 कारण त्यांनी “सर्वगोष्टी त्यांच्या पायाखाली ठेवल्या आहेत.” आता
जेव्हा असे म्हटले आहे की, “सर्वकाही” त्यांच्या अधिकाराखाली ठेवले
आहे, यावरून स्पष्ट होते की ज्यांनी “सर्वकाही” ख्रिस्ताच्या अधीन केले
आहे आणि त्या सर्वकाहीमध्ये परमेश्वराचा समावेश नाही. 28 हे सर्व
त्यांनी केल्यानंतर, पुत्र स्वत: त्यांच्या अधीन होईल ज्या परमेश्वराने
सर्वकाही त्यांच्या स्वाधीन केले आहे, यासाठी की परमेश्वराने सर्वात
सर्वकाही व्हावे. 29 जर पुनरुत्थान नाही, तर काहीजणांनी मृतांच्यावतीने
बाप्तिस्मा घेतला आहे त्यांनी काय करावे? जर मृत झालेले पुन्हा
कधीच जिवंत होणार नसतील तर लोकांनी त्यांच्याबद्दल बाप्तिस्मा
घेण्याची काय गरज आहे? 30 आणि प्रत्येक वेळेस आम्ही तरी आमचे
प्राण धोक्यात का घालावे? 31 निश्चित, मी दररोज मृत्यूला तोंड देतो.
मला ख्रिस्त येशू आपला प्रभू यामध्ये तुम्हा सर्वांचा अभिमान वाटतो.
32 जर पृथ्वीवरील आशेने इफिस येथील हिंस्र पशूंशी मनुष्यांसारखे
लढण्यात आले तर मला काय लाभ झाला? जर मेलेले पुन्हा जिवंत
होणार नाही तर, “चला, आपण खाऊ आणि पिऊ, कारण उद्या आपण
मरणार आहोत.” 33 तुम्ही फसविले जाऊ नका: “वाईटाची संगती
चांगल्या चरित्रांना बिघडवते.” 34 तुम्ही शुद्धीवर यावयास हवे आणि
पाप करणे सोडून द्या; पण परमेश्वरासंबंधात काहीजण अज्ञानी आहेत
मी हे तुम्हाला लाज वाटावी म्हणून बोलतो. 35 आता कोणी विचारेल,
“मरण पावलेले कसे जिवंत होतील? आणि त्यांची शरीरे कोणत्या
प्रकारची असतील?” 36 किती मूर्खपणा! जे तुम्ही पेरता, ते जर मेले
नाही तर त्यातून जीवन येत नाही. 37 तुम्ही बी पेरता, तेव्हा तुम्ही त्याचे
शरीर पेरीत नाही, तर फक्त बी पेरता, कदाचित ते गव्हाचे किंवा दुसऱ्या
कशाचे तरी असते. 38 मग परमेश्वर त्यांच्या इच्छेप्रमाणे त्याला शरीर
देतो आणि प्रत्येक प्रकारच्या बीजाला ते त्याचे स्वत:चेच शरीर देतात.
39 सर्व देह एकसारखे नसतात: मानवाचा देह एकप्रकारचा, पशूंचा
दुसऱ्या प्रकारचा, पक्षांचा एक आणि मत्स्याचा एक. 40 त्याचप्रमाणे
स्वर्गीय शरीरे आणि दैहिक शरीरेही आहेत. परंतु स्वर्गीय शरीराचे सौंदर्य
एका प्रकारचे आणि भौतिक शरीराचे सौंदर्य दुसऱ्या प्रकारचे आहे.
41 सूर्याला एका विशिष्ट प्रकारचे तेज असते, चंद्राला दुसऱ्या प्रकारचे
आणि ताऱ्यांना वेगळ्या प्रकारचे तेज आहे. शिवाय सर्व ताऱ्यांचेही तेज
वेगवेगळे असते. 42 अशाप्रकारे ज्यांचे मरणातून पुनरुत्थान झाले त्यांचे
होईल. नाशवंत असे शरीर पेरले जाते, अविनाशी असे उठविले जाते. 43
अपमानात पेरले जाते पण गौरवात उठविले जाते आणि अशक्तपणात
पेरले जाते पण शक्तीत उठविले जाते. 44 नैसर्गिक शरीर पेरले जाते,
आत्मिक शरीर उठविले जाते. जर नैसर्गिक शरीर आहे तर आत्मिक
शरीरही आहे. 45 असे लिहिले आहे: “पहिला मानव आदाम जिवंत
प्राणी झाला.” शेवटचा आदाम जीवन देणारा आत्मा आहे. 46 प्रथम
आत्मिक आले नाही तर शारीरिक, त्यानंतर आत्मिक आहे. 47 पहिला
मानव भूमीच्या धुळीतून आला; दुसरा मानव स्वर्गापासून होता. 48
जसा मानव मातीचा होता, बाकीचेही त्याच्यासारखे मातीचे आहेत
आणि जो स्वर्गातील मनुष्य जसा आहे, तसेच जे स्वर्गातील तेही आहेत.
49 आणि आता ज्याप्रमाणे आपण शारीरिक मनुष्याचे प्रतिरूप धारण
केले आहे, तसेच आपण स्वर्गीय मनुष्याचे प्रतिरूप धारण करू. 50
माझ्या बंधू व भगिनींनो मी तुम्हाला जाहीर करतो की रक्त व मांस यांना
परमेश्वराच्या राज्याचे वतन मिळू शकत नाही, त्याचप्रमाणे नाशवंताला
अविनाशी वतन मिळू शकत नाही. 51 ऐका, मी तुम्हाला एक रहस्य
सांगतो: आपण सर्वच मरणार नाही, तर आपण सर्व बदलून जाऊ. 52 हे
सर्व क्षणार्धात, डोळयाची उघडझाप होते न होते तोच, शेवटचे रणशिंग
वाजल्याबरोबर घडून येईल. कारण तुतारीचा नाद होईल आणि मरण
पावलेले अविनाशीपणात उठविले जातील, आणि आपण बदलले जाऊ.
53 कारण नाशवंताने अविनाशीपणाला धारण केले पाहिजे आणि जे
मर्त्य त्याने अमरत्व परिधान केलेच पाहिजे. 54 जेव्हा जे नाशवंत आहे ते
अविनाशीपण परिधान करेल, आणि जे मर्त्य आहे ते अमरत्व, तेव्हा हे
शास्त्रलेखातील वचन सत्य होईल: “विजयाने मृत्यूला गिळून टाकले

आहे.” 55 “अरे मरणा, तुझा विजय कुठे? अरे मरणा, तुझी नांगी
कुठे?” (Hadēs g86) 56 कारण मरणाची नांगी पाप आहे आणि पापाचे
बळ नियमशास्त्र आहे. 57 परंतु आपण परमेश्वराचे आभार मानू, कारण
तेच आपल्याला आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताद्वारे विजय देतात. 58 यास्तव,
माझ्या प्रिय बंधू व भगिनींनो, खंबीर व्हा आणि कशानेही विचलित होऊ
नका. आपल्या स्वतःला पूर्णपणे प्रभूच्या कार्यात वाहून घ्या, कारण
तुम्हाला माहीत आहे की प्रभूमध्ये तुमचे श्रम कधीही व्यर्थ होणार नाही.

**16** आता प्रभूच्या लोकांना आर्थिक मदत करण्याबद्दल: गलातीया
येथील मंडळयांना मी जे करावयास सांगितले ते तुम्हीही करा. 2
प्रत्येक आठवड्याच्या पहिल्या दिवशी, तुम्हातील प्रत्येकाने मिळालेल्या
उत्पन्नातून काही रक्कम बाजूला काढून, साठवून ठेवावी, म्हणजे मी
तिथे आल्यानंतर वर्गण्या गोळा कराव्या लागणार नाहीत. 3 मग, मी
तिकडे आल्यावर, तुम्ही स्वतः निवडलेले लोक व ओळख करून देणारी
माझी पत्रे आणि तुमची प्रेमाची देणगी घेऊन मी त्यांना यरुशलेमला
पाठवेन. 4 मीही जाणे उचित होईल असे वाटले, तर आम्ही सोबतीने
प्रवास करू. 5 मासेदोनियामधून गेल्यानंतर, मी तुम्हाकडे येईन कारण
मीही मासेदोनियामधून जाण्याचा विचार करत आहे. 6 तेव्हा मी
तुमच्याबरोबर बहुतेककरून अधिक काळ, कदाचित हिवाळादेखील
घालवेन. मग मी जिथे कुठे जाईन, तिथे माझी रवानगी करण्यात मला
तुम्ही मदत करू शकता. 7 यावेळी तुम्हाला धावती भेट द्यावी आणि पुढे
जावे अशी माझी इच्छा नाही; तर प्रभूची इच्छा असेल तर तुमच्याकडे
येऊन काही काळ तुमच्याबरोबर राहावे अशी माझी इच्छा आहे. 8
पण पन्नासाव्या दिवसाच्या सणापर्यंत मी येथेच म्हणजे इफिसमध्ये
राहणार आहे. 9 कारण माझ्यासाठी चांगले व प्रभावी सेवेचे द्वार उघडले
गेले आहे. परंतु तिथे मला विरोध करणारे देखील पुष्कळच आहेत. 10
तीमथ्य तुमच्याकडे आला, तर तुमच्याबरोबर असताना त्याला भिण्याची
गरज नाही असे त्याला कळू द्या, माझ्यासारखाच तोही प्रभूचे सेवाकार्य
करीत आहे. 11 कोणीही त्याला कमी लेखू नये, शांती प्राप्त झालेला
असा त्याला माझ्याकडे परत पाठवा. जे आणखी बंधू इकडे येणार
आहेत, त्यांच्याबरोबरच त्यालाही भेटण्यास मी उत्सुक आहे. 12 आता
बंधू अपुल्लोसासंबंधी: त्याने बंधुजनांबरोबर तुमच्याकडे येण्याची मी
त्याला खूप विनंती केली. परंतु आताच तुम्हाकडे यावे अशी त्याची
मुळीच इच्छा नव्हती, परंतु संधी मिळेल तेव्हा तो येईल. 13 जागृत
राहा; विश्वासात स्थिर राहा; धैर्याने वागा व खंबीर असा. 14 तुम्ही
जे काही करता ते प्रीतीने करा. 15 तुम्हाला माहीत आहे की स्तेफन
आणि त्याचे कुटुंब हे अखया प्रातांमधील पहिले विश्वासू आहेत आणि
प्रभूच्या लोकांसाठी सेवाकार्य करण्यासाठी त्यांनी स्वतःला समर्पित
केले आहे. बंधू व भगिनींनो मी तुम्हालाही विनंती करतो, 16 की जे
कोणी साहाय्य आणि श्रम करतात अशा लोकांच्या स्वाधीन राहा. 17
स्तेफन, फर्तूनात व अखायिक यांच्या येण्याने मला फार आनंद झाला.
त्यांच्यामुळे तुमच्यावतीने जे काही कमी होते त्यांची त्यांनी भरपाई
केली. 18 त्यांनी मला व तुमच्या आत्म्याला खूपच उल्लासित केले आहे.
अशा लोकांना मान्यतेची आवश्यकता आहे. 19 आशिया प्रांतातील
मंडळया तुम्हाला शुभेच्छा पाठवितात. अक्विला व प्रिस्किल्ला, व
त्यांच्या घरात जमणारी मंडळी तुम्हाला प्रभूमध्ये शुभेच्छा सांगतात. 20
तसेच सर्व बंधू व भगिनी तुम्हाला शुभेच्छा देतात. एकमेकांचे पवित्र
चुंबनाने अभिवादन करा. 21 आता या पत्रातील शुभेच्छा मी पौल,
स्वतःच्या हातांनी लिहित आहे. 22 जो कोणी प्रभूवर प्रीती करीत नाही,
तो शापित असो. हे प्रभू या! 23 प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा तुम्हावर असो.
24 तुम्हा सर्वांना ख्रिस्त येशूंमध्ये माझी प्रीती असो. आमेन.

# 2 करिंथकरांस

1 परमेश्वराच्या इच्छेने, ख्रिस्त येशूंचा प्रेषित झालेला पौल आणि
आपला बंधू तीमथ्य याजकडून, 2 परमेश्वर आपला पिता व प्रभू
येशू ख्रिस्त यांच्याकडून तुम्हास कृपा आणि शांती असो. 3 आपल्या
प्रभू येशू ख्रिस्ताचे पिता आणि आपला परमेश्वर, करुणेचा पिता आणि
सर्व सांत्वन करणारे परमेश्वर यांची स्तुती असो. 4 ते आपल्या सर्व
दुःखांमध्ये आपले सांत्वन करतात, यासाठी की जे सांत्वन आम्हाला
परमेश्वराकडून मिळाले आहे, त्या सांत्वनाने जे कोणत्याही दुःखात
आहेत त्यांचे सांत्वन करावे. 5 ज्याप्रकारे आम्ही ख्रिस्ताच्या अगणित
दुःखांमध्ये सहभागी आहोत, त्याच प्रकारे आमचे सांत्वनही ख्रिस्ताद्वारे
विपुल होते. 6 जर आम्ही दुःखी आहोत तर ते तुमच्या सांत्वनासाठी
व तारणासाठी; जर आम्हाला सांत्वन लाभले आहे, तर ते तुमच्या
सांत्वनासाठी, यासाठी की जी दुःखे आम्ही सोसतो व जी तुम्हीही
सोसत आहात, त्यामुळे तुम्हामध्ये धीर व सहनशीलता उत्पन्न व्हावी 7
आणि तुमच्याबद्दलची आमची आशा स्थिर आहे व जसे तुम्ही आमच्या
दुःखामध्ये तसेच आमच्या सांत्वनातही सहभागी झाला आहात. 8
प्रिय बंधूंनो व भगिनींनो, आशिया प्रांतात ज्या दुःखाच्या अनुभवातून
आम्हास जावे लागले, त्याबद्दल तुम्ही अज्ञानी असावे अशी आमची
इच्छा नाही. आमच्या सहनशक्तीपलीकडे आम्ही ओझ्याखाली अगदी
दबून गेलो की; आम्ही जीवनाची आशा सोडून दिली होती. 9 खरोखर
आम्हाला मृत्यूची दंडाज्ञा ठरलेली आहे असे वाटले, हे यासाठी झाले की
आम्ही केवळ स्वतःवर अवलंबून न राहता, जे मृतांना उठवितात त्या
परमेश्वरावरच अवलंबून राहावे. 10 त्यांनी आम्हाला मरणाच्या धोक्यातून
सोडविले आणि ते पुन्हा आम्हाला असेच सोडवतील. आम्ही त्यांच्यावर
आशा ठेवली आहे की ते आम्हाला असेच पुढेही सोडवित राहतील.
11 परंतु तुम्हीही आमच्यासाठी प्रार्थना करून आम्हाला मदत करावी.
कारण जो कृपेचा अनुग्रह सर्वांच्या प्रार्थनेचे उत्तर म्हणून आम्हास
मिळाला आहे, त्याबद्दल आमच्यावतीने अनेकजण परमेश्वराची स्तुती
करतील. 12 हे आम्हाला गर्वाचे कारण आहे: आमच्या सर्व व्यवहारात
आमच्या विवेकबुद्धीची साक्ष ही आहे की या जगात आणि तुमच्या
संबंधात, आम्ही पवित्र आणि ईश्वरी प्रामाणिकपणाने भरलेले होतो. हे
ऐहिक ज्ञानावर नव्हे तर परमेश्वराच्या कृपेवर अवलंबून राहिल्यामुळे
आम्ही करू शकलो. 13 तुम्हाला जे समजत नाही किंवा वाचता येत
नाही असे आम्ही काहीच लिहित नाही. आमची आशा आहे की, 14
जरी तुम्ही थोडेफार आम्हाला ओळखता आणि पुढे तुम्हाला पूर्णपणे
कळून येईल की प्रभू येशूंच्या दिवशी जसा तुम्हाला आमचा अभिमान
आहे, तसाच आम्ही पण तुमच्याविषयी अभिमान बाळगू. 15 या
गोष्टीचा मला भरवसा होता की मी प्रथम तुमची भेट घ्यावी यासाठी
की तुम्हाला दोनदा लाभ व्हावा. 16 मी मासेदोनियास जाताना, वाटेत
थांबून तुम्हाला भेटावे आणि तसेच मासेदोनियाहून परत येतांना भेटावे
आणि तुम्ही मला पुढे यहूदीयाकडे वाटेस लावले असते. 17 मी हे
बेत चंचलवृतीने केले काय? मी ऐहिक रीतीने माझ्या योजना करतो
काय किंवा “होय, होय” आणि “नाही, नाही” असे म्हणतो का? 18
ज्याप्रकारे परमेश्वर खात्रीने विश्वासू आहे, तेवढ्याच खात्रीने आमचा
संदेश “होय” आणि “नाही” असा नाही. 19 तीमथ्य, सीला व मी,
तुम्हाला परमेश्वराचे पुत्र येशू ख्रिस्त यांच्याबद्दल संदेश सांगत आलो तो
“नाही” आणि “होय” असा नाही, परंतु त्यांच्यामध्ये नेहमीच “होय”
आहे. 20 परमेश्वराने कितीही अभिवचने दिलेली असोत, ख्रिस्तामध्ये ती
“होय” आहेत. परमेश्वराच्या नावाचे गौरव करीत आम्ही त्यांच्याद्वारे
“आमेन” म्हणतो. 21 आता हेच परमेश्वर जे तुम्हाला व आम्हाला असे
आपणा दोघांना ख्रिस्तामध्ये स्थिर करतात. त्यांनी आमचा अभिषेक
केला आहे, 22 त्यांच्या मालकीहक्काचा शिक्का आमच्यावर मारला
आहे आणि आमच्या अंतःकरणात पवित्र आत्मा ठेव म्हणून ठेवला
आहे, जे येणार आहे त्याची हमी देत आहे. 23 परमेश्वराला मी माझा
साक्षीदार म्हणून हाक मारतो—आणि माझे जीवन पणाला लावले
आहे—तुमची गय करावी म्हणून मी करिंथास परतलो नाही. 24 तुमच्या
विश्वासावर अधिकार दाखववा म्हणून नव्हे, कारण विश्वासामुळेच तुम्ही
स्थिर आहात, परंतु आम्ही तुमच्याबरोबर सहकर्मी होऊन आनंदासाठी
परिश्रम करतो.

2 मी स्वतःशी निश्चय करून म्हणालो की तुम्हाला आणखी एक दुःखद
भेट देणार नाही. 2 कारण मी तुम्हाला दुःखी केले, तर मग ज्यांना
मजकडून दुःख झाले आहे त्या तुमच्याशिवाय मला कोण आनंदित
करेल? 3 मी लिहिल्याप्रमाणे केले, मी आल्यावर ज्यांच्यापासून मला
आनंद मिळावा, त्यांच्याकडून मला दुःख होणार नाही. मला तुम्हा
सर्वांवर भरवसा होता की तुम्ही सर्वजण माझ्या आनंदात सहभागी
व्हाल. 4 तुम्हाला दुःखी करावे म्हणून नव्हे तर माझ्या प्रीतीची खोली
तुम्हाला कळावी, म्हणून हे पत्र मी तुम्हाला क्लेश आणि हृदयाच्या
यातना आणि अनेक आसवे गाळून लिहिले आहे. 5 जर कोणी दुःख
दिले, तर त्याने केवळ मलाच अधिक दुःख दिले असे नाही तर काही
अंशी तुम्हा सर्वांना दुःख दिले आहे—त्यापेक्षा अधिक कडक शब्दात
बोलू इच्छित नाही. 6 तुम्ही साऱ्यांनी बहुमताने त्याला शिक्षा दिली
ती पुरेशी आहे. 7 याउलट, त्याला आता क्षमा करण्याची व त्याचे
सांत्वन करण्याची वेळ आहे, नाही तर तो अतिशय दुःखामध्ये बुडून
जाण्याची शक्यता आहे. 8 आता मी तुम्हाला विनंती करतो, तुम्ही
त्याच्यावर प्रीती करता याची त्याला खात्री द्या. 9 हे पत्र लिहिण्याचे
दुसरे कारण आहे की तुम्ही परीक्षेत स्थिर आहात व प्रत्येक गोष्टीत
आज्ञा पाळता हे अजमावून पाहावे. 10 तुम्ही एखाद्याला क्षमा करता,
त्याला मीही क्षमा करतो. ज्याची मी क्षमा केली आहे आणि जर क्षमा
करण्याचे बाकी आहे तर ती ख्रिस्ताच्या समक्ष तुमच्या हितासाठी केली
आहे. 11 यासाठी की सैतानाचे आपल्यावर वर्चस्व होऊ नये; कारण
त्याचे डाव आपल्याला कळत नाहीत असे नाही. 12 मी त्रोवास शहरात
ख्रिस्ताच्या शुभवार्तेचा प्रचार करण्यास आल्यावर, प्रभूंनी माझ्यासाठी
द्वार उघडल्याचे मला आढळून आले. 13 परंतु माझा बंधू तीत, तिथे

मला भेटला नाही, त्यामुळे माझ्या मनाला शांती नव्हती. म्हणून मी
तेथील लोकांचा निरोप घेतला व तडक मासेदोनियाकडे गेलो. 14 परंतु
परमेश्वराची स्तुती असो! कारण ते आम्हाला ख्रिस्ताच्या विजयोत्सवात
आमचे नेतृत्व करण्यास आमच्यापुढे चालतात व आम्ही त्यांचे दास
असून त्यांच्यामागे चालतो आणि प्रभूंच्या ज्ञानाविषयीचा सुगंध सर्वत्र
पसरविण्यासाठी ते आमचा उपयोग करून घेतात. 15 ज्यांचे तारण होत
आहे व ज्यांचा नाश होत आहे त्या सर्वांसाठी आम्ही परमेश्वरासाठी
ख्रिस्ताचा सुगंध असे आहोत 16 एकाला आम्ही असा सुगंध आहोत
की ज्यामुळे मरण येते व दुसऱ्याला असा सुगंध आहोत की ज्यामुळे
जीवन मिळेल. आणि अशा कामासाठी कोण योग्य आहे? 17 आम्ही
अशा अनेक लोकांसारखे नाही की जे परमेश्वराचे वचन सांगून लाभ
मिळवितात. उलट ख्रिस्तामध्ये आम्ही परमेश्वरासमोर प्रामाणिकपणाने
आणि परमेश्वराने पाठविलेल्या माणसाप्रमाणे बोलत असतो.

**3** आम्ही पुन्हा स्वतःची प्रशंसा करण्यास प्रारंभ केला आहे काय?
आणि इतर काही लोकांसारखे शिफारसपत्र तुम्हासाठी व तुम्हापासून
घेण्याची गरज आहे का? 2 आमच्या हृदयांवर लिहिलेले, सर्वांना माहीत
असलेले व वाचले जाणारे असे तुम्ही स्वतः आमचे पत्र आहात. 3 तुम्ही
ख्रिस्ताकडून आलेले पत्र आहात, आमच्या सेवेचा परिणाम, जे शाईने
लिहिलेले नाही परंतु जिवंत परमेश्वराच्या आत्म्याने, दगडी पाटीवर
नसून, मानवी हृदयाच्या पाटीवर कोरलेले आहे हे दाखवा. 4 असा
आमचा भरवसा ख्रिस्ताद्वारे परमेश्वरावर आहे. 5 आम्ही आमच्यामध्ये
कार्यक्षम आहोत असे नाही किंवा आम्ही काही दावा करू शकतो असे
आम्हाला वाटत नाही; कारण आमची कार्यक्षमता परमेश्वरापासून आहे.
6 नव्या कराराची सेवा करणारे म्हणून त्यांनी आम्हाला योग्य केले आहे.
हा करार लेखी नव्हे तर आत्म्यापासून आहे; लेख मृत करतो, परंतु
पवित्र आत्मा जीवन देतो. 7 आता जे अक्षर दगडावर कोरलेले असून
ज्याचा परिणाम मरण होता, ती सेवा एवढी गौरवी होती, की जरी कमी
होणाऱ्या तेजामुळे इस्राएली लोकांना मोशेच्या चेहऱ्याकडे स्थिर पाहत
राहणे अशक्य झाले होते, पण हळूहळू ते तेज कमी होत गेले. 8 पवित्र
आत्म्याची सेवा त्याहूनही खूपच अधिक वैभवशाली नव्हे काय? 9
दंडाज्ञा करणारी सेवा जर एवढी तेजस्वी होती, तर नीतिमत्वाची सेवा
त्याहून कितीतरी अधिक तेजस्वी असेल! 10 खरे म्हणजे जे तेजस्वी होते
ते तेज नसून त्याची तुलना करता, पहिल्या तेजाचे मोल काहीच नाही.
11 आणि जर लोप पावत चाललेले तेजोमय होते, तर जे अनंतकालिक
आहे त्याचे तेज निश्चितच अधिक आहे. 12 आम्हाला अशी आशा आहे
म्हणून आम्हाला मोठे धैर्यही आहे. 13 आम्ही मोशेसारखे नाही, ज्याने
लोप पावत चाललेले वैभव इस्राएली लोकांनी पाहू नये म्हणून आपल्या
मुखावर आच्छादन घातले. 14 परंतु त्यांची मने आता मंद झाली व जुना
करार वाचला जात असताना आजही तेच आच्छादन आहे. ते फक्त
ख्रिस्तामध्येच दूर केले जाईल. 15 आज या दिवसापर्यंत जेव्हा मोशेचा
ग्रंथ वाचला जातो, तेव्हा त्यांच्या हृदयावर आच्छादन राहते. 16 परंतु
जेव्हा कोणी प्रभूकडे वळतो, त्यावेळी हे आच्छादन काढले जाते. 17
प्रभू आत्मा आहे आणि जिथे प्रभूचा आत्मा तिथे स्वातंत्र्य आहे. 18
आपण जे सर्व, मुखावर आच्छादन नसलेले; ते आपण प्रभूचे वैभव
प्रतिबिंबित करणारे आहोत. ते आपण वाढत जाणाऱ्या तेजासह त्यांच्या
प्रतिमेप्रमाणे बदलत जात आहोत. हे सर्व प्रभूपासून आहे जे आत्मा
आहेत.

**4** यास्तव, परमेश्वराच्या दयेने आम्हाला ही सेवा प्राप्त झाली आहे,
म्हणून आम्ही धैर्य सोडीत नाही. 2 आम्ही सर्व गुप्त व लज्जास्पद
गोष्टींचा त्याग केला आहे; आम्ही खोटेपणा करीत नाही आणि परमेश्वराचे
वचन विकृत करीत नाही. याउलट, सरळपणाने सत्य प्रकट करून
परमेश्वरासमोर प्रत्येक मनुष्याच्या सदसद्विवेकबुद्धीने आपणास पटवितो.
3 जरी आमची शुभवार्ता आच्छादिलेली असली, तर ती ज्यांचा नाश
होणार आहे, त्यांच्यापासूनच आच्छादिलेली आहे. 4 या जगाच्या
अधिपतीने विश्वासणाऱ्यांची मने आंधळी केली आहेत, म्हणून शुभवार्तेचा
प्रकाश जो ख्रिस्ताचे गौरव आणि परमेश्वराची प्रतिमा प्रकट करतो, ते
पाहू शकत नाहीत. (aiōn g165) 5 आम्ही स्वतःविषयी प्रचार करीत नाही,
तर ख्रिस्त येशू हेच प्रभू आणि आम्ही येशूंसाठी तुमचे दास आहोत. 6
कारण, “अंधकारातून प्रकाश हो,” असे जे परमेश्वर बोलले, त्यांनी येशू
ख्रिस्ताच्या मुखावरील ज्ञानाच्या तेजाचा प्रकाश आमच्या अंतःकरणात
दिला आहे. 7 तरी आम्हासाठी हा मोलवान ठेवा एका मातीच्या पात्रात
ठेवलेला आहे हे दाखविण्यासाठी की, जे अपार सामर्थ्य आमचे स्वतःचे
नसून परमेश्वराकडून आहे, हे प्रत्येकाला दिसावे. 8 आम्ही चहूकडून
अतिशय दबून गेलो आहोत, परंतु चिरडले गेलो नाही; घोटाळ्यात
पडलो, परंतु हताश होत नाही. 9 छळ झाला पण त्याग करण्यात
आला नाही; आम्हाला खाली पाडण्यात आले, परंतु नाश झाला नाही.
10 आम्ही नेहमीच येशूंच्या मरणाला आमच्या शरीरात घेऊन वावरतो
यासाठी की येशूंचे जीवनसुद्धा आमच्या शरीरांमध्ये प्रकट व्हावे. 11
म्हणून आम्ही, जे जिवंत आहोत ते येशूंप्रीत्यर्थ मरणासाठी सोपवून
दिलेले आहोत, यासाठी की आमच्या मर्त्य देहांमध्ये सुद्धा त्यांचे जीवन
प्रकट व्हावे. 12 आमच्यामध्ये मृत्यू कार्य करतो, परंतु तुम्हामध्ये जीवन
कार्य करते. 13 असे लिहिले आहे: “मी विश्वास ठेवला आहे म्हणून
मी बोललो,” त्याप्रमाणे आमच्याजवळ सारखाच विश्वासाचा आत्मा
आहे, म्हणून आम्ही विश्वास ठेवतो आणि बोलतो. 14 आम्हाला हे
माहीत आहे की, ज्यांनी प्रभू येशूंना मेलेल्यांमधून जिवंत केले, तेच
आम्हालाही येशूंबरोबर पुन्हा जिवंत करतील आणि तुमच्याबरोबरच
आम्हाला स्वतःपुढे सादर करतील. 15 हे सर्व तुमच्या भल्यासाठी आहे,
जितके अधिक लोक त्यांच्या कृपेने त्यांच्याजवळ येतील, तितके त्यांच्या
अपार दयेबद्दल त्यांचे आभार मानतील आणि परमेश्वराचे अधिक गौरव
होईल. 16 यास्तव, आम्ही कधीही निराश होत नाही. आमची बाह्य शरीरे
अशक्त होत असली, तरी आम्ही अंतर्यामी दिवसेंदिवस नवीन होत
आहोत. 17 आमची संकटे अति हलकी व क्षणिक आहेत तरी त्यामुळे
सदासर्वकाळचे गौरव प्राप्त होणार आहे की ज्याची तुलना आम्ही करू
शकत नाही. (aiōnios g166) 18 म्हणून ज्यागोष्टी दृश्य आहेत त्यावर

आम्ही आपले लक्ष केंद्रित करत नाही, परंतु जे अदृश्य आहे त्यावर
करतो, कारण जे दृश्य आहे ते तात्पुरते आहे, परंतु जे अदृश्य आहे ते
सार्वकालिक आहे. (aiōnios g166)

5 आम्हास ठाऊक आहे की ज्या ऐहिक तंबू—आमचे शरीर—मध्ये
आम्ही राहतो त्याचा जर नाश झाला, तर परमेश्वराने आमच्यासाठी
इमारत, सार्वकालिक स्वर्गीय घर जे मानवी हाताने बांधलेले नाही असे
तयार केले आहे. (aiōnios g166) 2 या गृहामध्ये असताना स्वर्गीय गृहाचे
पांघरूण घालण्याची इच्छा धरून आपण एवढे कण्हत आहोत. 3
कारण आम्ही वस्त्रे धारण केली तर नग्न असे सापडणार नाही. 4 या
तंबूमध्ये आम्ही आहोत तोपर्यंत आम्ही कण्हतो व थकलेले आहोत, वस्त्रे
परिधान करू नये असे आम्हास वाटत नाही, परंतु स्वर्गीय निवासस्थान
धारण करावे, यासाठी की जे मर्त्य ते जीवनाने गिळंकृत करावे. 5
ज्याने आम्हाला या उद्देशासाठीच सिद्ध केले आहे तो परमेश्वर आहे
आणि अमानत म्हणून आम्हाला पवित्र आत्मा विसार म्हणून दिला
आहे. 6 यास्तव आता खात्रीपूर्वक आपण जाणून घ्यावे की जोपर्यंत
आपण शारीरिक घरामध्ये आहोत, तोपर्यंत आपण प्रभूपासून दूर
असतो. 7 आम्ही विश्वासाने जगतो, प्रत्यक्ष पाहण्याने नव्हे. 8 आमचा
भरवसा आहे आणि हे आम्हास बरे वाटते की या शरीरापासून वेगळे
होऊन प्रभूसह आपण आनंदाने वास करावा. 9 तेव्हा, आम्ही येथे
या शरीरामध्ये असू अथवा या शरीरापासून दूर असू, आम्ही करतो
त्या सर्व गोष्टींत प्रभूंना संतोष देणे, हेच आमचे ध्येय आहे. 10 कारण
आपल्या सर्वांनाच ख्रिस्ताच्या न्यायासनासमोर उभे राहावे लागणार
आहे. या शरीरामध्ये असताना प्रत्येकाने ज्या चांगल्या अथवा वाईट
गोष्टी केल्या असतील, त्यांचे आपल्यापैकी प्रत्येकाला योग्य ते प्रतिफळ
मिळेल. 11 प्रभूची भीती बाळगणे हे काय आहे हे आपणास माहीत
आहे, त्यामुळेच इतरांना वळवून घेण्याचा आम्ही प्रयत्न करतो! आम्ही
कोण आहोत हे परमेश्वरापुढे स्पष्ट आहे आणि मी आशा धरतो की,
तुमच्या विवेकबुद्धीनेही तुम्ही हे निश्चित जाणता. 12 पुन्हा स्वतःचीच
प्रशंसा करण्याचा आम्ही प्रयत्न करत नाही. तर तुम्हाला आमच्यासाठी
अभिमान बाळगण्याची संधी देत आहोत, यासाठी की जे हृदयातील
गोष्टींचा नव्हे तर बाह्य गोष्टींचा अभिमान बाळगतात त्यांना तुम्हाला उत्तर
देता यावे. 13 जर “आम्ही वेडे असलो,” जसे काही लोक म्हणतात तर ते
परमेश्वरासाठी आहोत. जर आम्ही भानावर असलो, तर ते तुमच्यासाठी
आहोत. 14 ख्रिस्ताची प्रीती आम्हाला गळ घालते कारण आम्हास खात्री
आहे की, ज्याअर्थी एक आपल्या सर्वांसाठी मरण पावला तर आपण
सर्वजण मेलो आहोत. 15 ते सर्वांसाठी मरण पावले, म्हणून आता जे
जिवंत आहेत त्यांनी यापुढे स्वतःसाठी जगू नये, तर जे त्यांच्यासाठी
मरण पावले आणि पुन्हा उठले, त्यांच्यासाठी जगावे. 16 येथून पुढे
ऐहिक दृष्टीने आम्ही कोणाकडे पाहत नाही. आम्ही ख्रिस्ताकडे त्यादृष्टीने
पाहत होतो पण आता तसे पाहत नाही. 17 जर कोणी ख्रिस्तामध्ये आहे,
तर तो नवी सृष्टी झाला आहे; जुने संपले आहे व सर्व नवीन झाले आहे.
18 हे सर्व परमेश्वरापासून आहे, ज्यांनी आमचा त्यांच्याशी ख्रिस्ताद्वारे
समेट केला आणि समेटाची सेवा आम्हाला दिली आहे. 19 परमेश्वर
ख्रिस्ताद्वारे जगाशी समेट घडवून आणत होते आणि लोकांची पातके
त्यांच्याविरुद्ध मोजत नव्हते. हाच समेटाचा संदेश त्यांनी आम्हाकडे
सोपवून दिला आहे. 20 आम्ही ख्रिस्ताचे राजदूत आहोत, जणू काही
परमेश्वर आमच्याद्वारे तुम्हाला विनंती करीत आहे. आम्ही ख्रिस्ताच्या
वतीने तुम्हाला विनवितो की, परमेश्वराबरोबर तुमचा समेट होऊ द्या. 21
ज्यांच्या ठायी पाप नव्हते, त्यांना आपल्यासाठी पाप असे केले, म्हणजे
त्यांच्याशी आपण संयुक्त होऊन, परमेश्वराचे नीतिमत्व व्हावे.

6 परमेश्वराचे सहकारी या नात्याने आम्ही तुम्हाला विनवितो की
परमेश्वराची कृपा व्यर्थ होऊ देऊ नका. 2 कारण ते म्हणतात,
“माझ्या कृपेच्या समयी तुमची विनवणी माझ्या कानी आली. तारणाच्या
दिवशी, मी तुम्हाला साहाय्य केले.” मी तुम्हाला सांगतो, आताच
परमेश्वराच्या कृपेचा समय आहे आणि आजच तारणाचा दिवस आहे. 3
आम्ही कोणाच्याही मार्गात अडखळण होत नाही, जेणेकरून आम्ही
करीत असलेली सेवा दोषी ठरविली जाऊ नये. 4 आम्ही परमेश्वराचे
सेवक या नात्याने सर्वप्रकारे आमची योग्यता पटवून देण्याचा प्रयत्न
करतो: मोठ्या धैर्याने, दुःख, ओझे व संकटे आम्ही सहन करतो. 5
आम्हाला मारहाण, तुरुंग, दंगल, कष्ट, जागरणे आणि उपवास; 6
शुद्धतेने, बुद्धीने, धीराने आणि दयेने; पवित्र आत्म्याने आणि खऱ्या
प्रीतीने भरलेले; 7 सत्याचे भाषण, आणि परमेश्वराचे सामर्थ्य; उजव्या
आणि डाव्या हातात नीतिमत्वाची शस्त्रे धारण करून करीत असतो. 8
गौरव आणि अपमान, वाईट अहवाल आणि चांगला अहवाल; प्रामाणिक
परंतु लबाड समजण्यात आलेले; 9 प्रसिद्ध तरी अप्रसिद्ध, मृत्यूच्या
समीप परंतु जिवंत; घायाळ केलेले परंतु मृत्यूपासून राखलेले 10 व्यथित
परंतु सतत आनंदित; गरीब परंतु इतरांना धनवान बनविणारे; मालकीचे
काहीही नाही आणि तरी सर्वकाही असल्यासारखे असे आहोत. 11
करिंथकरांनो आम्ही तुमच्यापासून काहीच न लपविता आमचे हृदय
तुमच्यासमोर मोकळे केले आहे. 12 आमची प्रीती तोकडी नाही पण
तुमची प्रीतीच संकुचित आहे. 13 तुम्ही माझी स्वतःची मुले आहात
असे समजून मी बोलत आहे. तुमची अंतःकरणेसुद्धा संपूर्णपणे उघडी
करा. 14 विश्वासहीन लोकांबरोबर संबंध जोडून सहभागी होऊ नका;
कारण नीतिमत्व व दुष्टता यामध्ये साम्य आहे काय? किंवा प्रकाश
व अंधकार यामध्ये काही भागीदारी आहे काय? 15 तसेच ख्रिस्त व
सैतान यांच्यामध्ये मेळ कसा असेल? विश्वासणारा मनुष्य व विश्वासहीन
मनुष्य यांच्यामध्ये साम्य आहे का? 16 आणि परमेश्वराचे मंदिर व
मूर्ती, यांच्यामध्ये कसा मेळ बसणार? कारण आम्ही परमेश्वराचे मंदिर,
जिवंत परमेश्वराचे घर आहोत आणि परमेश्वराने म्हटले आहे: “मी
त्यांच्यामध्ये राहीन आणि त्यांच्यामध्ये चालेन; मी त्यांचा परमेश्वर होईन
आणि ते माझे लोक होतील.” 17 यास्तव, “त्यांच्यामधून निघा आणि
त्यांच्यापासून स्वतःला वेगळे करा; प्रभूने म्हटले आहे त्यांच्या अशुद्ध
वस्तूला स्पर्श करू नका, म्हणजे मी तुमचे स्वागत करेन.” 18 आणि

“मी तुमचा पिता होईन आणि तुम्ही माझे पुत्र व माझ्या कन्या व्हाल असे सर्वसमर्थ प्रभू म्हणतात.”

**7** यास्तव, आपल्याला अशी अभिवचने मिळाली आहेत, म्हणून प्रिय मित्रांनो देहाला व आत्म्याला अशुद्ध करणाऱ्या सर्व गोष्टींपासून आपण स्वत:ला शुद्ध करू या आणि परमेश्वराविषयी आदरयुक्त भय बाळगून आपल्या पवित्रतेला सिद्ध करू या. 2 तुमच्या हृदयात आमच्यासाठी जागा करा. आम्ही कोणाविरुद्ध अन्याय केला नाही. आम्ही कोणालाही मार्गभ्रष्ट केले नाही किंवा कोणाचा गैरफायदा घेतला नाही. 3 तुम्हाला दंडाज्ञा व्हावी म्हणून मी हे सांगत नाही, कारण मी पूर्वीच सांगितले आहे की तुम्हाला आमच्या हृदयात स्थान आहे आणि आम्ही जगू किंवा मरू तेव्हा तुमच्याबरोबर असू. 4 मी अगदी मोकळेपणाने तुमच्याबरोबर बोलतो; मला तुमचा अतिशय अभिमान आहे. मी खूप उत्तेजित झालो आहे; आमच्या या सर्व दु:खात माझ्या आनंदाला कोणतीच सीमा उरली नाही. 5 मासेदोनियात आल्यावरही आम्हाला शारीरिक रूपात विसावा मिळाला नाही. आम्ही चहूकडून संकटात होतो; बाहेर कलह व आत भय होते. 6 मग निराश झालेल्यांना सांत्वन देणाऱ्या परमेश्वराने तीताच्या येण्याने आमचे सांत्वन केले. 7 त्याच्या केवळ येण्याने नव्हे परंतु तुम्ही त्याचे जे सांत्वन केले त्यामुळेही, माझ्यासंबंधाने तुमची उत्सुकता, तुमचे अति दु:ख, तुमची माझ्यावरील आस्था या सर्वगोष्टी त्याने मला सांगितल्या, तेव्हा माझा आनंद पूर्वीपेक्षाही ओसंडून वाहू लागला. 8 जरी माझ्या पत्रामुळे मी तुम्हाला दु:ख दिले याचे मला मुळीच वाईट वाटत नाही. याबद्दल निश्चितच मला दु:ख झाले खरे, पण माझ्या पत्राने तुम्हाला थोडाच काळ दु:खी केले हे मी समजतो. 9 तुम्हाला दु:खी केले म्हणून नव्हे, तर त्या दु:खाने तुम्ही पश्चात्तापाकडे वळलात म्हणून मला आनंद वाटतो. तुमचे दु:खी होणे हे परमेश्वराच्या इच्छेनुसार झाले आणि यामुळे आमच्यामुळे तुमची कोणतीही हानी झाली नाही. 10 कारण दैवी दु:खाने पश्चात्ताप व त्याचा परिणाम तारण, परंतु ऐहिक दु:खाने मरण येते. 11 या दैवी दु:खाने तुमच्यामध्ये काय उत्पन्न केले आहे ते पाहा: किती उत्सुकता, तुम्हाला स्वत: स्पष्ट करण्याची उत्कंठा, किती संताप, किती भय, किती तळमळ, किती आस्था, किती न्याय मिळावा अशी इच्छा आणि या प्रत्येक गोष्टीत तुम्ही स्वत:स निर्दोष असे सिद्ध केले आहे. 12 मी तुम्हाला पत्र लिहिले ते, ज्याने चूक केली त्याच्यासाठी नव्हे आणि ज्याच्याविरुद्ध चूक केली त्यांच्यासाठी सुद्धा नव्हे, तर परमेश्वराच्या दृष्टीने तुम्ही किती समर्पित आहात हे स्पष्ट करण्यासाठी लिहिले. 13 या सर्व गोष्टींद्वारे तुम्ही आम्हाला प्रोत्साहन दिले. परंतु याहून अधिक आनंद आम्हाला मिळाला तो तीताच्या आनंदाने! कारण तुम्ही त्याच्या आत्म्याला ताजेतवाने केले. 14 मला तुमच्याबद्दल केवढा अभिमान आहे, हे मी त्याला सांगितले होते आणि तुम्ही मला मुळीच निराश केले नाही. जे काही आम्ही तुम्हाला सांगितले ते सर्व खरे होते, तसेच मी तीतापुढे काढलेले तुमच्याबद्दलचे अभिमानाचे शब्दही खरे ठरले आहेत! 15 ज्या रीतीने भयाने व थरथर कापत तुम्ही सर्वांनी आज्ञांकितपणा दाखवून त्याचा स्वीकार केला, या सर्वगोष्टी आठवून, तुमच्याविषयीची त्याची प्रीती अधिक वाढली आहे. 16 तुमच्यावर पूर्ण भरवसा ठेवू शकतो याचा मला आनंद आहे.

**8** आता, बंधू भगिनींनो, मासेदोनियातील मंडळयांवर परमेश्वराने जी कृपा केली, ते तुम्हाला समजावे अशी माझी इच्छा आहे. 2 अनेक भीषण परीक्षेमध्ये, त्यांचा ओसंडणारा आनंद आणि कमालीच्या दैनावस्थेत त्यांची उदारता प्रत्यक्षात आली. 3 त्यांनी आपल्याला जे शक्य होते तेवढेच दिले असे नाही, तर आपल्या शक्तीपलीकडे दिले; आणि स्वत:हून दिले अशी मी साक्ष देतो. 4 प्रभूच्या लोकांना साहाय्य करण्याच्या सेवेत त्यांना अनुमती दिली जावी आणि त्यांना सहभागी होता यावे म्हणून त्यांनी आम्हाला फार विनवणी केली. 5 आमच्या अपेक्षेपेक्षा त्यांनी अधिक दिले, त्यांनी प्रथम स्वत: प्रभूला आणि परमेश्वराच्या इच्छेने आम्हालाही दिले. 6 म्हणून आम्ही तीताला आग्रह केला की जशी प्रथम त्याने सुरुवात केली होती तर आताही कृपेच्या या कार्यातील वाटाही पूर्ण करण्यास तुम्हाला उत्तेजित करावे. 7 तुम्ही प्रत्येक बाबतीत अग्रेसर आहात. तुमच्या विश्वासात, भाषणात, ज्ञानात, परिपूर्ण उत्साहात व आम्हाबद्दल प्रीतीत ज्याची प्रेरणा आम्ही तुम्हामध्ये निर्माण केली आहे—आता कृपेच्या देण्याविषयीही तुम्ही सुद्धा अग्रेसर असावे अशी माझी इच्छा आहे. 8 याबाबतीत मी तुम्हाला आज्ञा करीत नाही; तर इतरांच्या उत्सुकतेशी तुमच्या प्रीतीच्या खरेपणाची परीक्षा करावयाची आहे. 9 आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा तुम्हाला माहीत आहे, जरी ते इतके धनवान होते तरी तुमच्यासाठी दरिद्री झाले, यासाठी की त्यांच्या दारिद्र्याने तुम्ही धनवान व्हावे. 10 या गोष्टीसंबंधाने जे तुमच्यासाठी योग्य आहे ते मी तुम्हाला सांगतो: मागील वर्षी तुम्हीच असे होता की ज्यांनी प्रथम देण्यास आरंभ केला. इतकेच केवळ नव्हे, परंतु तशी इच्छाही बाळगण्यामध्ये तुम्ही पुढे होता. 11 मग एवढ्या इच्छेच्या उत्साहाने आरंभ केलेले हे कार्य ते समाप्त होईपर्यंत तुमच्याजवळ जे असेल ते देऊन पूर्ण करा. 12 जर देण्याची तुमची खरोखर इच्छा असेल, तर जे तुमच्याकडे आहे, त्या आधारावर तुमचे दान स्वीकारले जाईल, जे तुमच्याजवळ नाही त्याप्रमाणे नाही. 13 आमची अशी इच्छा नाही की तुम्ही अधिक दबून जावे म्हणजे इतरांचा भार हलका व्हावा परंतु समानता असावी असे आम्हाला वाटते. 14 या वेळेला सध्या तुमच्या विपुलतेतून ज्याकाही त्यांच्या गरजा आहेत त्या भागविल्या जातील, पुढे त्यांच्या विपुलतेतून ज्या तुमच्या गरजा आहेत त्या भागविल्या जातील. आमचे ध्येय समानता असावी असे आहे. 15 याबाबतीत शास्त्रलेख काय म्हणतो: “ज्याने खूप गोळा केले, त्याला अधिक झाले नाही, आणि ज्याने थोडे गोळा केले त्याला थोडे झाले नाही.” 16 जशी मला तुमच्याविषयी कळकळ आहे तशीच तीताच्या हृदयात परमेश्वराने उत्पन्न केली आहे, म्हणून मी परमेश्वराचे आभार मानतो. 17 त्याने आमची विनंती आनंदाने मान्य केली इतकेच केवळ नव्हे तर तो फारच उत्साहाने व स्वत:च्या इच्छेने आपणास भेटावयास येत आहे. 18 शुभवार्तेच्या सेवेसाठी ज्याची प्रशंसा सर्व मंडळयातून होत आहे अशा

एका बंधूला त्याच्याबरोबर पाठवित आहे. 19 खरे म्हणजे, आम्ही कृपेचे
दान घेऊन येत असताना आमच्याबरोबर प्रवास करण्यासाठी या बंधुची
मंडळयांमधून निवड झाली होती. यामुळे केवळ प्रभूचे गौरव होईल व
साहाय्य करण्याविषयीची आमची मदत करण्याची आस्था सर्वांना दिसून
येईल. 20 कारण ही उदारतेने साहाय्यता म्हणून दिलेली देणगी आम्ही
कशी हाताळतो याबाबतीत कोणालाही टीका करण्याचा प्रसंग मिळू नये,
म्हणून आम्ही प्रयत्नात आहोत. 21 फक्त प्रभूंच्या दृष्टिकोनातून नव्हे तर
मानवाच्या दृष्टिकोनातूनही जे योग्य आहे ते करण्याकरिता आम्ही श्रम
घेतो. 22 मी तुमच्याकडे आणखी एका बंधूला पाठवित आहे. तो पुष्कळ
प्रकारे आस्थेवाईक असल्याचे आम्हाला अनुभवाने माहीत आहे, कारण
त्याचा तुमच्यावर अधिक भरवसा आहे. 23 तीत तुमच्यामध्ये माझा
भागीदार व सहायक आहे आणि त्याच्याबरोबर जे बंधू आहेत, ते येथील
मंडळयांचे प्रतिनिधी आणि ख्रिस्ताचे गौरव आहेत. 24 कृपा करून ती
प्रीती या बंधुंवरही करा आणि तुम्ही ते सर्व त्यांच्यासाठी कराल असे मी
अभिमानाने व जाहीरपणे म्हटले आहे. ते सर्व मंडळयांनी पाहावे.

**9** प्रभूंच्या लोकांना मदत करण्याच्या या सेवेबाबत मी तुम्हाला लिहावे
याची गरज नाही. 2 कारण अशी मदत करण्याविषयीची तुमची
उत्सुकता मला चांगली माहीत आहे; आणि तुमची अखया येथून
गेल्या वर्षापूर्वीच अशी देणगी पाठविण्याची तयारी होती, असे मी
मासेदोनियांना मोठ्या अभिमानाने सांगितले आहे. खरे म्हणजे तुमचा हा
उत्साह पाहूनच येथील अनेकांना मदत करावी अशी प्रेरणा झाली. 3 या
गोष्टीबाबतीत तुमच्याबद्दलचा माझा अभिमान व्यर्थ ठरू नये म्हणून मी
या भावांना पाठवित आहे, यासाठी की मी तुम्हाला सांगितल्याप्रमाणे
तुम्ही तयार असावे. 4 मासेदोनियातील काही लोक माझ्याबरोबर आले
आणि मी त्यांना सांगितल्याप्रमाणे तुमची काहीच तयारी नाही असे
आढळले, तर आम्हास तुमच्याबद्दल जो भरवसा होता त्याबद्दल काही
म्हणता येणार नाही व ते लाजिरवाणे ठरेल. 5 म्हणून मला असे वाटले,
हे आवश्यक आहे की, बंधूंना अशी विनंती करावी की त्यांनी प्रथम
तुमची भेट घ्यावी आणि तुम्ही दिलेल्या आश्वासनानुसार उदारतेने देत
असलेल्या देणगीची व्यवस्था पूर्ण करावी. तेव्हा ती एक मुक्तहस्ताने
दिलेली भेट अशी असेल, असंतुष्टतेने देणाऱ्यासारखी ती नसेल. 6 परंतु
हे लक्षात ठेवा जो कोणी राखून पेरतो, तर तो राखूनच कापणी करेल.
जो उदारपणे बी पेरतो, तो उदारपणे कापणी करेल. 7 आपण किती
द्यावे हे ज्याने त्याने स्वत: मनात ठरविल्याप्रमाणे द्यावे, हे भाग पाडते
म्हणून किंवा बळजबरीने नव्हे, कारण संतोषाने देणारा परमेश्वराला
आवडतो. 8 परमेश्वर तुम्हाला विपुल आशीर्वाद देण्यास समर्थ आहे.
ते तुम्हाला सर्ववेळी व सर्व गोष्टीत एवढे देतील की जे काही तुम्हाला
गरजेचे आहे ते मिळेल व चांगल्या कामासाठी भरपूर शिल्लक राहील.
9 हे शास्त्रलेखात सांगितल्याप्रमाणे आहे: “गरजवंतांना ते उदारहस्ते
दानधर्म करतात; त्यांची नीतिमत्ता चिरकाळ टिकते.” (aiōn g165) 10
कारण तो पेरणाऱ्यांसाठी बी पुरवितो आणि खाण्यासाठी भाकर पुरवितो
तोच तुम्हालाही पेरण्यासाठी बियांचा भांडार वाढवेल व पुरवठा करेल
आणि तुमच्या नीतिमत्वाच्या हंगामाची वाढ करेल. 11 होय, तुम्ही
सर्व दृष्टीने संपन्न व्हावे यासाठी की प्रत्येक प्रसंगी तुम्ही उदारपणे
द्यावे व आमच्याद्वारे तुमच्या उदारतेबद्दल परमेश्वराचे आभारप्रदर्शन
व्हावे. 12 म्हणजे तुमच्या या सेवेमुळे केवळ प्रभूंच्या लोकांच्या गरजा
पूर्ण करण्यास साहाय्य होते असे नाही तर परमेश्वराप्रती उपकारस्तुती
ओसंडून वाहू लागते. 13 तुम्ही करीत असलेले सेवाकार्य यामुळे तुम्ही
सिद्ध करून दाखविले आहे की, तुम्ही ख्रिस्ताच्या शुभवार्तेला कबूल
करून आज्ञाधारक राहिला, तसेच तुम्ही त्यांच्या व सर्वांच्याप्रती उदारता
दाखविली म्हणून इतरजण परमेश्वराची स्तुती करतील, 14 आणि
परमेश्वराची अद्भुत कृपा तुमच्यावर प्रकट झाली म्हणून त्यांची मने
तुम्हाकडे लागली आहेत व ते तुमच्यासाठी उत्कंठेने प्रार्थना करतात. 15
परमेश्वराच्या अवर्णनीय देणगीबद्दल त्यांची स्तुती असो.

**10** ख्रिस्ताच्या सौम्यतेने व नम्रपणाने मी तुम्हाला विनंती करतो
की तुमच्यापैकी काहीजण म्हणतात की मी पौल, तुमच्यासमोर
असताना “भित्रा” व तुमच्यापासून दूर असलो म्हणजे “धीटपणे”
वागतो. 2 मी तुम्हाला विनंती करतो की मी तिथे आलो की ज्याकाही
लोकांना वाटते की आमची जीवनशैली ऐहिक आहे, त्यांच्याविरुद्ध कठोर
होण्याची गरज भासणार नाही, अशी माझी आशा आहे. 3 आम्ही या
जगामध्ये राहतो तरीपण ऐहिक लोक जसे युद्ध करतात तसे आम्ही
करीत नाही. 4 जी शस्त्रे युद्धासाठी आम्ही वापरतो ती दैहिक नाहीत
याउलट त्यात किल्ले उद्‌ध्वस्त करण्याचे दैवी सामर्थ्य आहे. 5 आम्ही
वाद व परमेश्वराच्या ज्ञानाविरुद्ध उंच उभारलेले सर्वकाही पाडून टाकतो
आणि प्रत्येक विचाराला बंदिस्त करून ख्रिस्ताच्या आज्ञेखाली स्वाधीन
करतो. 6 तुमचे आज्ञापालन पूर्ण झाल्यावर, जे आज्ञा न पाळणारे
आहेत आम्ही त्यांना दंड करण्यास तयार आहोत. 7 तुम्ही बाहेरील
रूप पाहून न्याय करता. जर कोणाला असा भरवसा असेल की ते
ख्रिस्ताचे आहेत, तर त्यांनी याबद्दल पुन्हा विचार करावा की जसे
आम्ही ख्रिस्ताचे आहोत तसे तेही आहेत. 8 हा अधिकार प्रभूने तुम्हाला
खाली पाडून टाकण्यासाठी नव्हे, तर तुम्हाला विकसित करण्यासाठी
आम्हाला दिला आहे, आणि जरी मी त्याविषयी थोडाफार अभिमान
दाखविला, तरी मला त्याची लाज वाटणार नाही. 9 तुम्हाला असा
भास होऊ नये की घाबरून सोडण्याच्या उद्देशाने मी पत्रे लिहित आहे.
10 काहीजण म्हणतात, “त्याची पत्रे वजनदार व प्रभावी आहेत परंतु
व्यक्ती म्हणून त्याचा प्रभाव पडत नाही आणि त्याच्या भाषणात काही
तथ्य नाही.” 11 अशा लोकांना हे समजावे की आम्ही अनुपस्थितीत
असताना आमच्या पत्राद्वारे जे काही आम्ही आहोत, तेच उपस्थित
असताना आमच्या कृतीद्वारे आहोत. 12 जे स्वत:ची प्रशंसा करतात,
त्यांच्याशी तुलना करण्याचे धैर्य आम्ही करीत नाही. ते स्वत:चे आपसात
मोजमाप करतात व आपसातच तुलना करतात, ते शहाणे नाहीत. 13
आम्ही मर्यादेच्या बाहेर प्रौढी मिरविणार नाही, तर जी सेवा परमेश्वराने
आम्हास नेमून दिली आहे व जी मर्यादा परमेश्वराने आम्हास लावून
दिली आहे, त्या मर्यादेतच आम्ही प्रौढी मिरवू आणि त्यात तुमचाही

समावेश आहे. 14 ख्रिस्ताविषयीची शुभवार्ता तुमच्याकडे पोहोचविणारे
आम्हीच पहिले होतो. म्हणून अधिक प्रौढी मिरवून मर्यादेचे उल्लंघन
करीत नाही, जर आम्ही तुमच्यापर्यंत येऊ शकलो नसतो तर आम्ही
मर्यादेचे उल्लंघन करीत आहोत हे बोलणे ठीक असते. 15 जे कार्य
दुसऱ्यांनी केले आहे त्याबद्दल आम्ही मर्यादा सोडून अभिमान बाळगत
नाही. तुमचा विश्वास जसजसा वाढत जाईल तसेच आमच्या कार्याचे
क्षेत्र तुम्हामध्ये खूप वाढावे, अशी आमची आशा आहे. 16 त्यानंतर
तुमच्यापलीकडे, दूरवर असलेल्या प्रांतात आम्हाला शुभवार्ता गाजविता
येईल आणि इतर लोकांच्या क्षेत्रात जे काम आधी केले आहे त्याबद्दल
अभिमान बाळगण्याचे आम्हास कारण उरणार नाही. 17 “जो प्रौढी
मिरवतो त्याने प्रभूमध्ये प्रौढी मिरवावी.” 18 कोणी स्वतःची प्रशंसा
करतो तर त्यास मान्यता मिळेल असे नाही, परंतु ज्याची प्रशंसा प्रभू
करतात त्यास मान्यता मिळेल.

**11** माझी आशा आहे की तुम्ही माझा थोडा मूर्खपणा सहन करून
घ्याल. हो, कृपा करून सहन करून घ्या. 2 तुम्हासाठी माझी जी
आस्था आहे ती दैवी आस्था आहे. मी तुम्हाला एक पती, ख्रिस्त त्यांचे
वचन दिले होते, म्हणजे मी तुम्हाला एक शुद्ध कुमारी म्हणून त्यांना सादर
करावे. 3 परंतु हव्वा जशी सापाकडून धूर्ततेने फसविली गेली, तसेच
तुमची मने कशाने का होईना ख्रिस्तावरील तुमच्या शुद्ध व प्रामणिक
भक्तीपासून भटकून जातील, अशी मला भीती वाटते. 4 जर कोणी
तुम्हाकडे येऊन आम्ही प्रचार करतो त्या येशूंऐवजी दुसऱ्या येशूंचा प्रचार
करतो किंवा तुम्ही जो आत्मा स्वीकारला होता त्याऐवजी दुसरा आत्मा
स्वीकारला, किंवा जी शुभवार्ता तुम्ही स्वीकारली त्या शुभवार्तेहून भिन्न
अशी शुभवार्ता तुम्ही स्वीकारली, तर तुम्ही हे सहजपणे स्वीकारता व
सहन करून घेता. 5 जे “उच्च संदेष्टे” आहेत त्यांच्यापेक्षा मी कमी
प्रतीचा आहे असे मी समजत नाही. 6 मी अशिक्षित वक्ता असेन, परंतु
मला ज्ञान आहे आणि ते आम्ही अनेक प्रकारे पटवून दिले आहे. 7
परमेश्वराच्या शुभवार्तेचा संदेश तुम्हाला फुकट सांगितला व यात मी
स्वतःला हीन केले व तुम्हाला उच्च केले तर यात मी पाप केले काय? 8
इतर मंडळ्यांचे वेतन घेऊन मी जणू काय त्यांनाच लुबाडले यासाठी की
मला तुमची सेवा करता यावी. 9 आणि मी जेव्हा तुमच्याजवळ होतो
आणि मला गरज पडली, मी कोणालाही ओझे झालो नाही, कारण
मासेदोनियातून जे बंधू आले त्यांनी माझ्या गरजांची परिपूर्ती केली व
माझे ओझे कोणत्याही प्रकारे तुम्हावर पडणार नाही आणि मी असेच
पुढेही करेन. 10 जोपर्यंत ख्रिस्ताचे सत्य मजमध्ये आहे, तोपर्यंत अखया
प्रांतातील कोणीही मी करीत असलेल्या अभिमानास प्रतिबंध करू
शकणार नाही 11 का? कारण मी तुमच्यावर प्रीती करीत नाही? मी
प्रीती करतो हे परमेश्वराला माहीत आहे! 12 मी जे करतो ते करीत
राहीन, यासाठी की जे आम्ही त्यांच्या समान आहोत असे मानतात व
त्याबाबत प्रौढी मिरविण्याची संधी शोधतात त्यांना ती मिळू नये. 13
कारण असे लोक खोटे प्रेषित, फसविणारे कामकरी, ख्रिस्ताचे प्रेषित
आहोत असा समज करून फसविणारे आहेत. 14 यात आश्चर्य वाटत
नाही! कारण स्वतः सैतानही प्रकाशाचा दूत असे रूप धारण करतो. 15
मग त्याचे सेवकही नीतिमान असल्याचे ढोंग करतात यात काही नवल
नाही. त्यांच्या कृत्यांप्रमाणे त्यांचा शेवट होईल. 16 पुन्हा मी तुम्हाला
सांगतो: मला मूर्ख समजू नका; आणि तसे तुम्ही मला समजत असाल
तर जसा मूर्खाचा तसा माझा स्वीकार करा, यासाठी की मला थोडा
गर्व करण्याचा प्रसंग मिळेल. 17 जसे प्रभू बोलतात तसा मी बोलत
नाही, परंतु माझ्या स्वविश्वासाच्या प्रौढीमध्ये मूर्खपणाने बोलतो. 18
देहाला अनुसरून अनेक लोक प्रौढी मिरवितात, मग मी सुद्धा प्रौढी
मिरवीन. 19 तुम्ही फार शहाणे आहात म्हणून तुम्ही मूर्खांचे आनंदाने
सहन करून घेता. 20 खरे पाहता, जे तुम्हाला गुलाम बनवितात किंवा
तुमचे हिरावून घेतात किंवा गैरफायदा घेतात, स्वतःस उच्च करतात
किंवा तुमच्या तोंडात चापट मारतात, तरी तुम्ही या गोष्टी सहन करून
घेता. 21 मला सांगावयास लाज वाटते की याबाबतीत आम्ही दुर्बल
आहोत! जर कशाबद्दल कोणी गर्व करण्याचे धैर्य करीत असेल तर मला
देखील गर्व करण्याचे धैर्य होईल. हे मी पुन्हा मूर्खासारखा बोलत आहे.
22 ते इब्री आहेत का? तर मी पण आहे. ते इस्राएली आहेत का? मग मी
देखील आहे. ते अब्राहामाचे संतान आहेत ना? मग, मी देखील आहे. 23
ते ख्रिस्ताचे सेवक आहेत ना? मी अधिक आहे. असे मी वेड्यासारखे
बोलतो! अधिक श्रम केले आहे, वारंवार तुरुंगात पडलो आहे, तीव्र
फटके खाल्ले आणि अनेक वेळा मृत्यूला तोंड दिले. 24 यहूद्यांनी पाच
वेळेला एक कमी चाळीस फटक्यांची मला शिक्षा दिली. 25 तीन वेळा
मला छड्यांनी मारण्यात आले. एकदा मला धोंडमार झाला. तीन वेळा
माझे तारू फुटले, एक रात्र आणि एक दिवस मी समुद्रात घालविला. 26
मी सतत प्रवास केले आहेत आणि नद्यांची संकटे, लुटारूंची संकटे,
यहूदी लोकांची संकटे, गैरयहूदी लोकांची संकटे, शहरातील संकटे,
गावातील संकटे, समुद्रातील संकटे, खोट्या विश्वासणाऱ्यांपासून संकटे.
27 मी श्रम व कष्ट केले आणि अनेकदा झोपेशिवाय राहिलो आहे.
अनेक वेळा मी उपाशी व तान्हेला होतो; पुष्कळदा भोजनाशिवाय
राहिलो आहे; मी थंडीने कुडकुडलो व नग्न होतो. 28 मग याव्यतिरिक्त,
दररोज सर्व मंडळ्यांच्या चिंतेचे ओझे माझ्यावर आहे. 29 जर कोणी
अशक्त आहे, तर मला अशक्तपणा जाणवत नाही का? कोणी पापात
अडखळविला गेला, तर त्याचे मला दुःख होणार नाही काय? 30 जर
मला अभिमान मिरवायचा असेल, तर ज्या गोष्टींमध्ये माझा दुबळेपणा
दिसून येतो त्यांचा मी अभिमान मिरवीन. 31 परमेश्वर आपल्या प्रभू येशू
ख्रिस्ताचे पिता, ज्यांची युगानुयुग स्तुती असो, त्यांना ठाऊक आहे की
मी लबाडी करीत नाही. (aiōn g165) 32 उदाहरणार्थ, दिमिष्क शहरात
अरीतास राजाच्या राज्यपालाने मला पकडण्यासाठी वेशींमध्ये पहारे
बसविले होते; 33 परंतु मला एका टोपलीत बसविले ती टोपली शहराच्या
भिंतीच्या एका झरोक्यातून खाली सोडण्यात आली आणि अशा रीतीने
मी तिथून निसटलो.

**12** मी प्रौढी मिरवित जाणारच. यामुळे काही निष्पन्न होणार नाही,
तरी प्रभूपासून मला जे दृष्टान्त आणि प्रकटीकरणे झाली;

त्याबद्दल मी तुम्हाला आता सांगत जातो. 2 मला एक मनुष्य ख्रिस्तामध्ये
माहीत आहे, त्याला चौदा वर्षांपूर्वी तिसऱ्या स्वर्गात वर उचलून नेण्यात
आले होते. तो शरीराने किंवा शरीराविरहित मला ते माहीत नाही;
परमेश्वराला माहीत आहे. 3 आणि मला माहीत आहे की हा मनुष्य
शरीराने किंवा शरीराविरहित हे मला माहीत नाही, परमेश्वराला माहीत
आहे, 4 स्वर्गामध्ये घेतला गेला, आणि ज्या गोष्टींचे वर्णन करून सांगता
येणार नाही अशा गोष्टी ऐकल्या. त्या गोष्टी दुसऱ्यांना सांगण्याची
परवानगी नाही. 5 मी अशा मनुष्याबद्दल प्रौढी मिरवीन, मी स्वत:बद्दल
तर नाही, परंतु फक्त माझ्या दुबळेपणाची प्रौढी मिरवीन. 6 मी प्रौढी
मिरवावी असे ठरविले तर तसे केल्याने मी मूर्ख ठरणार नाही, कारण मी
सत्य बोलत आहे, परंतु मी तसे करणार नाही. कारण मी करतो व
बोलतो त्यापेक्षा कोणीही मला जास्त मानू नये, अशी माझी इच्छा आहे.
7 मला झालेल्या श्रेष्ठ प्रकटीकरणांमुळे मी फुगून जाऊ नये व बढाया
मारू नये म्हणून मला शारीरिक काटा देण्यात आला आणि सैतानाचा
दूत त्रास देण्याकरिता ठेवण्यात आला. 8 मी प्रभूला तीन वेळा हे
माझ्यापासून काढून घ्यावे म्हणून विनंती केली. 9 त्यांनी म्हटले, “माझी
कृपा तुला पूर्ण आहे. कारण माझे सामर्थ्य अशक्तपणात पूर्णत्वास येते.”
कारण माझ्या अशक्तपणाबद्दल मी प्रौढी मिरवीन, म्हणजे ख्रिस्ताचे
सामर्थ्य माझ्यावर राहील. 10 ख्रिस्तासाठी दुर्बलता, अपमान व कष्ट,
छळ व अडचणी, याविषयी मी अगदी संतुष्ट आहे; कारण जेव्हा मी
अशक्त आहे, तेव्हाच मी सबळ असतो. 11 अशा रीतीने प्रौढी मिरवायला
लावून, मी स्वत:ला मूर्ख बनविले आहे आणि तुम्ही मला तसे वागायला
भाग पाडले आहे. खरेतर तुम्ही माझी प्रशंसा करावयास पाहिजे होती,
जरी मी तुच्छ असलो तरी त्या “उच्च प्रेषितांच्या” तुलनेत मी कमी
नाही. 12 मी तुमच्याबरोबर राहत असताना मी निश्चित प्रेषित आहे,
याचा पुरावा धीराने तुमच्यामध्ये अनेक चमत्कार, चिन्हे आणि महत्कृत्ये
केली यामधून दिसून येते. 13 मी माझे ओझे तुमच्यावर टाकले नाही
तर इतर मंडळयांच्या तुलनेत कोणत्या गोष्टीत तुम्ही कमी भरला? या
चुकीबद्दल तुम्ही मला कृपा करून क्षमा करा! 14 आता मी तिसऱ्यांदा
तुमच्या भेटीला येण्याची तयारी करत आहे; आणि मी तुम्हावर ओझे
होणार नाही, कारण मला तुमची संपत्ती नको परंतु तुम्ही हवे आहात.
तसे पाहिले तर, मुलांनी आपल्या आईवडिलांसाठी संचय करण्याची
गरज नाही तर उलट आईवडिलांनीच आपल्या मुलांसाठी करावे. 15 मी
तुम्हासाठी जे काही आहे ते आनंदाने सर्व खर्च करण्यासाठी तयार आहे
आणि मला स्वत:सही खर्च करण्यास तयार आहे. जर मी तुमच्यावर
अधिक प्रीती करतो, तर तुम्ही माझ्यावर कमी प्रीती करता का? 16
काही असो, मी तुमच्यावर ओझे झालो नाही. तरीही, मी धूर्त आहे आणि
मी आपल्याला फसविले असे तुम्हाला वाटते का? 17 ज्या लोकांना मी
तुमच्याकडे पाठविले त्यांच्याद्वारे मी तुमचा गैरफायदा घेतला का? 18
तीताला मी विनंती करून तुमच्या भेटीला पाठविले आणि त्याच्याबरोबर
आमच्या भावाला पाठविले, तीताने तुमचा गैरफायदा घेतला का? कारण
आम्ही एकाच आत्म्याच्या सारख्याच पावलांवर पाऊल टाकून चाललो
नाही का? 19 आम्ही स्वत:च्या बचावासाठी हे करतो असे तुम्हाला
वाटते का? आम्ही परमेश्वराच्या दृष्टीने जे ख्रिस्तामध्ये आहेत त्यांच्याशी
बोलत आहोत. प्रिय मित्रांनो, जे काही आम्ही करतो ते तुमच्या वृद्धीसाठी
आहे. 20 कारण मला अशी भीती वाटते की जेव्हा मी येईन, तेव्हा तुम्ही
मला जसे पाहिजे तसे आढळणार नाही, आणि जसा तुम्हाला पाहिजे
तसा मी तुम्हाला आढळणार नाही. मला भीती वाटते की तुम्हामध्ये
भांडणे, द्वेष, राग, स्वार्थी आकांक्षा, निंदा, चहाड्या, आढ्यता आणि
अव्यवस्था यांनी भरलेले असे आढळाल. 21 होय, मला वाटते की
मी पुन्हा आलो की माझा परमेश्वर मला तुमच्यापुढे नम्र करेल आणि
ज्या अनेकांनी पूर्वी पाप केलेले आहे आणि आपल्या हातून घडलेल्या
अशुद्धता, लैंगिक पाप व कामातुरपणा, या गोष्टींबद्दल पश्चात्ताप केला
नाही त्याबद्दल मला दु:ख करावे लागेल.

**13** तुमच्या भेटीला येण्याची ही माझी तिसरी वेळ राहील. “प्रत्येक
गोष्ट दोन किंवा तीन साक्षीदारांच्या संमतीने प्रकरण स्थापित
केले पाहिजे.” 2 मी तुमच्याबरोबर दुसऱ्या खेपेला तिथे असताना
आधी इशारा दिलाच आहे. आणि आता मी अनुपस्थित असतानाही
सांगतो: मी परत आलो तर ज्यांनी पूर्वी पाप केले होते त्या सर्वांची
गय करणार नाही 3 ख्रिस्त माझ्याद्वारे बोलतात या पुराव्याची तुम्ही
मागणी करीत आहात. ते तुम्हाविषयी अशक्त नाही, तर ते तुमच्याशी
योग्य रीतीने वागण्यासाठी अशक्त नाही तर सामर्थी असे आहेत. 4
त्यांना अशक्तपणात क्रूसावर खिळले गेले, तरी परमेश्वराच्या शक्तीने
ते जिवंत आहेत. त्यासारखेच आम्ही त्यांच्यामध्ये अशक्त आहोत,
तरी परमेश्वराच्या शक्तीने तुमच्याशी योग्य रीतीने वागण्यासाठी जिवंत
आहोत. 5 तुम्हीच स्वत:चे परीक्षण करा. तुम्ही निश्चित विश्वासात आहात
की नाही; तुमची परीक्षा करून पाहा. ख्रिस्त येशू तुम्हामध्ये आहे हे
तुम्हाला कळत नाही तर कदाचित तुम्ही परीक्षेत उतरला नाहीत? 6
या कसोटीत आम्ही अयशस्वी झालो नाही हे तुम्हाला आढळून येईल,
असा विश्वास धरतो. 7 आम्ही परमेश्वराला प्रार्थना करतो की तुम्ही
जे अयोग्य आहे ते करू नये केवळ आम्ही परीक्षेत उतरलो आहोत
म्हणून नव्हे आणि जरी आम्ही उतरलो नाही असे दिसले तरी तुम्ही
योग्य जे आहे ते करावे. 8 आपण सत्याविरूद्ध काही करू शकत नाही,
परंतु सत्यासाठीच करू शकतो. 9 तुम्ही सबळ आहात पण आम्ही
अशक्त आहोत यात आम्हाला आनंद आहे. आमची प्रार्थना हीच आहे
की तुम्हाला पूर्णत्व प्राप्त व्हावे. 10 मी या गोष्टी माझ्या अनुपस्थित
लिहितो ते या आशेने की, तिथे आल्यावर जो अधिकार प्रभूने मला
दिला त्याचा कठीण रीतीने वापर करून तुम्हाला पाडण्यासाठी नव्हे
तर तुमची वृद्धी करण्यासाठी करू. 11 शेवटी, बंधू आणि भगिनींनो,
आनंद करा! मी सांगितले त्याकडे लक्ष पुरवा. परिपूर्ण होण्यासाठी
झटा, एकचित्त व्हा, उत्तेजन द्या व शांतीने राहा आणि प्रीतीचा व शांतीचा
परमेश्वर तुम्हाबरोबर असो. 12 एकमेकांना पवित्र चुंबनाने अभिवादन
करा. 13 या ठिकाणी असणारे परमेश्वराचे सर्व लोक तुम्हाला शुभेच्छा

पाठवित आहेत.
14 आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा, परमेश्वराची
प्रीती व पवित्र आत्म्याची सहभागिता तुम्हाबरोबर असो.

# गलातीकरांस

1 प्रेषित पौल, ज्याला मनुष्यांनी नाही किंवा एका मनुष्याने पाठवले
नाही, परंतु येशू ख्रिस्त आणि परमेश्वर पिता ज्यांनी येशूंना मरणातून
उठविले त्यांच्याद्वारे पाठवण्यात आलेला, त्या माझ्याकडून 2 आणि
माझ्याबरोबर येथे असलेले सर्व बंधू आणि भगिनी यांच्याकडून, 3
परमेश्वर आपला पिता व प्रभू येशू ख्रिस्त यांच्याकडून तुम्हास कृपा
आणि शांती असो. 4 ज्यांनी आपला परमेश्वर आणि पिता यांच्या इच्छेला
अनुसरून आमच्या पापांसाठी स्वत:ला दिले यासाठी की सध्याच्या दुष्ट
जगापासून आम्हाला वाचवावे. (aiōn g165) 5 त्यांना सदासर्वकाळ गौरव
असो. आमेन. (aiōn g165) 6 मला आश्चर्य वाटते की, ज्यांनी तुम्हाला
ख्रिस्ताच्या कृपेत जगण्यासाठी बोलाविले, त्यांना सोडून तुम्ही इतक्या
लवकर वेगळ्या शुभवार्तेकडे वळत आहात, 7 जी खरोखर शुभवार्ता
नाहीच. काही लोक उघडपणे तुम्हाला गोंधळात टाकीत आहेत आणि
ख्रिस्ताच्या शुभवार्तेत बदल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. 8 परंतु
ज्या शुभवार्तेचा प्रचार आम्ही तुम्हाला केला, त्या व्यतिरिक्त जर आम्ही
किंवा स्वर्गातून एखादा देवदूतसुद्धा प्रचार करीत असेल तर त्यांच्यावर
परमेश्वराचा शाप येवो! 9 जसे आम्ही पूर्वी सांगितलेले आहे, म्हणून मी
आता पुन्हा सांगतो: जर कोणी तुम्हाला तुम्ही स्वीकारलेल्या शुभवार्ते
व्यतिरिक्त दुसरा प्रचार करीत आहेत, तर त्यांच्यावर परमेश्वराचा शाप
असो! 10 आता मी माणसांची पसंती मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे
का, किंवा परमेश्वराची? किंवा मी लोकांना प्रसन्न करण्याचा प्रयत्न
करीत आहे का? जर मी अजूनही लोकांना प्रसन्न करीत असतो तर
मी ख्रिस्ताचा सेवक नसेन. 11 बंधूंनो आणि भगिनींनो, माझी अशी
इच्छा आहे की तुम्ही हे समजून घ्यावे की, ज्या शुभवार्तेचा प्रचार मी
केला ती मनुष्याकडून आलेली नाही. 12 कोणत्याही व्यक्तीकडून मी ते
स्वीकारलेले नाही किंवा मला ते शिकविण्यात आलेले नाही; तर मला ही
शुभवार्ता येशू ख्रिस्ताकडून प्रकटीकरणाद्वारे मिळाली आहे. 13 कारण
तुम्ही ऐकलेच आहे की, यहूदी धर्मात असताना माझे पूर्वीचे जीवन कसे
होते, कशाप्रकारे उग्र रूप धारण करून मी परमेश्वराच्या मंडळीचा छळ
केला आणि त्या मंडळीचा नाश करण्याचा प्रयत्न केला. 14 माझ्या
लोकांमध्ये माझ्या वयाच्या पुष्कळांपेक्षा मी यहूदी धर्मसंप्रदायात अधिक
पुढे जात होतो आणि माझ्या पूर्वजांच्या परंपरेविषयी अत्यंत आवेशी
होतो. 15 परंतु जेव्हा परमेश्वराने मला माझ्या मातेच्या उदरात असतानाच
निवडले आणि त्यांच्या कृपेने मला बोलाविले, त्यांना हे योग्य वाटले
की 16 त्यांच्या पुत्राला माझ्यामध्ये प्रकट करावे; यासाठी की गैरयहूदी
लोकांमध्ये मी येशूंच्या शुभवार्तेची घोषणा करावी. अशी माझी त्वरित
प्रतिक्रिया होती की कोणत्याही मनुष्याचा सल्ला घेऊ नये. 17 माझ्या
आधी जे प्रेषित होते त्यांना भेटण्यासाठी मी यरुशलेमपर्यंत गेलो नाही,
परंतु मी अरबस्थानात गेलो. नंतर मी दिमिष्कास परत आलो. 18 नंतर
तीन वर्षांनंतर केफाची ओळख करून घेण्यासाठी मी यरुशलेमला गेलो
आणि पंधरा दिवस मी त्याच्याबरोबर राहिलो. 19 प्रभूचा भाऊ याकोब
याच्याशिवाय दुसऱ्या प्रेषितांना मी भेटलो नाही. 20 मी परमेश्वरासमोर
तुम्हाला खात्री देतो की, मी जे तुम्हाला लिहित आहे त्यामध्ये काही
खोटे नाही. 21 नंतर मी सिरिया आणि किलिकिया येथे गेलो. 22
ख्रिस्तामध्ये असलेल्या यहूदीया येथील मंडळयांना त्यावेळेस माझी
वैयक्तिक ओळख नव्हती. 23 त्यांनी फक्त एवढेच ऐकले होते, “ज्या
मनुष्याने पूर्वी आमचा छळ केला तो आता त्या विश्वासाचा प्रचार करीत
आहे ज्याचा नाश करण्याचा त्याने प्रयत्न केला होता.” 24 माझ्यामुळे
त्यांनी परमेश्वराचे गौरव केले.

2 नंतर चौदा वर्षांनंतर मी पुन्हा यरुशलेम येथे गेलो, यावेळेस बर्णबास
माझ्याबरोबर होता. मी तीतालाही आमच्याबरोबर घेतले. 2 मला
प्राप्त झालेल्या प्रकटीकरणाचा प्रतिसाद म्हणून मी तिथे गेलो आणि
तेथील प्रतिष्ठित पुढाऱ्यांची एकांतात भेट घेऊन त्यांना ती शुभवार्ता
सांगितली, ज्या शुभवार्तेचा प्रचार मी गैरयहूदीयांमध्ये करीत आहे. मला
खात्री करून घ्यायची होती की, मी व्यर्थ धावत नव्हतो आणि माझी
धडपड मी काही व्यर्थपणे करीत आलेलो नव्हतो. 3 माझ्याबरोबर
असलेला तीतस ग्रीक होता, तरी त्याची सुंता झाली पाहिजे असा
आग्रह त्यांनी धरला नाही. 4 हा प्रश्न खोट्या विश्वासणाऱ्यांमुळेच
उद्भवला कारण ख्रिस्त येशूंमध्ये आम्हाला जे स्वातंत्र्य आहे, त्याचा
शोध घेण्यासाठी आणि आम्हाला गुलाम बनविण्यासाठी काही खोटे
विश्वासणारे आमच्यामध्ये घुसले होते. 5 आम्ही एक क्षणभर देखील
त्यांना वश झालो नाही, यासाठी की शुभवार्तेचे सत्य तुमच्याजवळ
कायम असावे. 6 ज्यांना अतिश्रेष्ठ म्हणून मानले जात होते ते काहीही
करीत होते तरी मला काही फरक पडला नाही; परमेश्वर पक्षपात
करीत नाही. त्यांनी माझ्या संदेशात काहीही भर घातली नाही. 7
याउलट, त्यांनी ओळखले की सुंता न झालेल्या लोकांमध्ये शुभवार्तेचा
प्रचार करण्याचे कार्य मला सोपविण्यात आले आहे, ज्याप्रकारे पेत्राला
सुंता झालेल्या लोकांमध्ये कार्य करण्याचे सोपविण्यात आले होते. 8
कारण जे परमेश्वर सुंता झालेल्यांसाठी प्रेषित पेत्रामध्ये करीत होते,
तेच परमेश्वर गैरयहूदीयांसाठी मी जो प्रेषित आहे त्या माझ्यामध्ये
सुद्धा करीत होते. 9 जेव्हा याकोब, केफा आणि योहान असे जे श्रेष्ठ
आधारस्तंभ यांना समजले की मला कृपा प्राप्त झाली आहे, तेव्हा त्यांनी
माझ्याशी व बर्णबाशी सहभागितेच्या उजव्या हातांनी हस्तांदोलन केले.
त्यांनी हे मान्य केले की आम्ही गैरयहूदीयांकडे जावे आणि त्यांनी सुंता
झालेल्यांकडे जावे. 10 त्या सर्वांनी एकच अशी विनंती केली होती की
गरिबांना साहाय्य करण्याची आम्ही सतत आठवण ठेवावी आणि तीच
गोष्ट करण्यासाठी मी नेहमीच उत्सुक होतो. 11 जेव्हा केफा अंत्युखिया
येथे आला, तेव्हा मी त्याच्या तोंडावर त्याला विरोध केला, कारण तो
दोषी होता. 12 याकोबाकडून काही लोक येण्यापूर्वी तो प्रथम गैरयहूदी
लोकांबरोबर भोजन करीत असे. परंतु जेव्हा ते आले, तेव्हा त्याने मागे
सरकण्यास सुरुवात केली आणि तो स्वत:ला गैरयहूदीयांपासून वेगळे
करू लागला, कारण सुंता झालेल्या गटातील लोकांचे त्याला भय वाटत
होते. 13 बाकीचे यहूदी त्याच्या ढोंगात त्याला सामील झाले, म्हणून

त्यांच्या ढोंगीपणामुळे बर्णबासचीसुद्धा चुकीची कल्पना झाली. 14
जेव्हा मी पाहिले की, शुभवार्तेत जे सत्य आहे त्याप्रमाणे ते चालत
नाहीत, तेव्हा सर्वांसमक्ष मी केफाला म्हणालो, “तू यहूदी आहेस तरी
तू गैरयहूदीयांसारखे जगत आहेस आणि यहूदीयांसारखे नाही. तर
मग हे कसे आहे की, गैरयहूदी लोकांना यहूदी प्रथा पाळण्यासाठी तू
भाग पाडतोस? 15 “जे आम्ही जन्माने यहूदी आहोत आणि गैरयहूदी
लोकांसारखे पापी नाही. 16 हे जाणून घ्या, नियमशास्त्राच्या कार्याद्वारे
मनुष्य नीतिमान ठरत नाही, परंतु येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवल्यानेच
आपण नीतिमान ठरतो. म्हणून आम्हीसुद्धा ख्रिस्त येशूंवर विश्वास
ठेवला आहे, यासाठी की आम्हीसुद्धा ख्रिस्तामधील विश्वासाने नीतिमान
ठरावे आणि नियमशास्त्र पाळल्याने नव्हे. कारण नियमशास्त्राचे पालन
केल्याने कोणी नीतिमान ठरत नाही. 17 “ख्रिस्तामध्ये नीतिमान ठरावे
असा प्रयत्न करीत असताना आपण यहूदीसुद्धा पापी लोकांमध्ये
आहोत, त्याचा अर्थ हा नाही की ख्रिस्त आपल्याला पाप करण्यास
उत्तेजन देतात? नक्कीच नाही. 18 जे मी उद्‌ध्वस्त केले ते जर मी
पुन्हा बांधतो, तर मी खरोखरच नियमशास्त्र मोडणारा असा ठरतो. 19
“नियमांद्वारे मी नियमाला मरण पावलो यासाठी की मी परमेश्वरासाठी
जगावे. 20 मी ख्रिस्ताबरोबर क्रूसावर खिळलेला आहे आणि मी जगतो
असे नाही, तर ख्रिस्त माझ्यामध्ये जगतात. मी आता जे जीवन शरीरात
जगतो ते मी परमेश्वराच्या पुत्रावर विश्वास ठेवून जगतो, ज्यांनी माझ्यावर
प्रीती केली आणि स्वतःला माझ्यासाठी दिले. 21 मी परमेश्वराच्या
कृपेला वगळत नाही, कारण नियमशास्त्राचे पालन केल्याने नीतिमत्व
प्राप्त होत असते, तर ख्रिस्ताचे मरण व्यर्थ झाले असते.”

**3** अहो मूर्ख गलातीकरांनो! तुम्हाला कोणी मोहात पाडले आहे?
तुमच्या डोळयांसमोरच येशू ख्रिस्त यांना क्रूसावर खिळण्यात आले
असे स्पष्ट चित्रित केले होते. 2 तुमच्याकडून फक्त एकच गोष्ट समजून
घेणे मला आवडेल: नियमशास्त्राप्रमाणे कार्य केल्याने तुम्हाला पवित्र
आत्मा मिळाला किंवा जे काही तुम्ही ऐकले त्यावर विश्वास ठेवल्याने?
3 तुम्ही इतके मूर्ख आहात काय? जे आत्म्याद्वारे सुरू केले ते तुम्ही
आता दैहिकरितीने पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहात काय? 4 इतके
अपार दुःख तुम्ही व्यर्थच अनुभवले आहे काय, जर ते खरोखरच व्यर्थ
होते? 5 तर मी पुन्हा विचारतो, परमेश्वर त्यांचा आत्मा तुम्हाला देतात
आणि चमत्काराचे कार्य तुम्हामध्ये नियमशास्त्राच्या कार्याद्वारे करतात
किंवा तुम्ही जे ऐकले आहे त्यावर विश्वास ठेवण्याद्वारे? 6 त्याचप्रमाणे
अब्राहामानेसुद्धा, “परमेश्वरावर विश्वास ठेवला आणि ते त्याला नीतिमत्व
असे गणण्यात आले.” 7 ज्यांनी विश्वास ठेवला तीच अब्राहामाची मुले
आहेत, हे तुम्हाला स्पष्ट समजू द्या. 8 पवित्र शास्त्राने आधी सांगितले
होते की परमेश्वर विश्वासाने गैरयहूदीयांना नीतिमान ठरवतील आणि
त्यांनी अब्राहामास आधी शुभवार्तेची घोषणा केली: “तुझ्याद्वारे सर्व
राष्ट्रे आशीर्वादित होतील.” 9 म्हणून जे विश्वास ठेवतात त्यांना विश्वासू
अब्राहामासोबत आशीर्वाद प्राप्त होतील. 10 जे नियमशास्त्रावर विसंबून
आहेत ते सर्वजण शापाच्या बंधनाखाली आहेत. कारण पवित्रशास्त्र
स्पष्ट म्हणते: “जो कोणी नियमशास्त्राच्या पुस्तकात जे सर्वकाही
लिहिले आहे त्याप्रमाणे करीत नाही तो शापित आहे.” 11 यास्तव, हे
अगदी स्पष्ट आहे की नियमशास्त्रावर अवलंबून राहणारे परमेश्वरापुढे
नीतिमान ठरणार नाहीत, कारण “नीतिमान विश्वासाने जगेल.” 12
नियम विश्वासावर आधारित नाही; याव्यतिरिक्त नियमशास्त्र म्हणते,
“जो कोणी या गोष्टी करेल तो त्यामुळे जिवंत राहील.” 13 ख्रिस्ताने
आम्हासाठी शाप होऊन, नियमशास्त्राच्या शापापासून आम्हाला खंडणी
देऊन सोडविले, कारण असे लिहिले आहे, “जो कोणी खांबावर टांगला
आहे, तो शापित आहे.” 14 हे सर्व यासाठी की अब्राहामाला दिलेला
आशीर्वाद ख्रिस्त येशूंच्याद्वारे गैरयहूदीयांनाही प्राप्त व्हावा, म्हणजे
विश्वासाद्वारे अभिवचन दिल्याप्रमाणे आपल्याला आत्म्याचे दान प्राप्त
व्हावे. 15 प्रिय बंधू व भगिनींनो, रोजच्या जीवनातील उदाहरण देतो.
मानवी करार जो प्रस्थापित केलेला आहे त्यात कोणी वेगळे करू शकत
नाही किंवा त्यामध्ये भर घालू शकत नाही त्याप्रमाणे हे आहे. 16
ही अभिवचने अब्राहाम व त्याच्या संतानाला दिली होती. शास्त्रलेख
“आणि संतानांना” असे अनेक लोकांविषयी म्हणत नाही, तर “आणि
तुझ्या संतानाला,” म्हणजे एका व्यक्तीविषयी म्हणतात, आणि ते
ख्रिस्त आहे. 17 मला म्हणावयाचे ते हे: चारशेतीस वर्षानंतर देण्यात
आलेले नियमशास्त्र, परमेश्वराने आधी कायम केलेल्या कराराला वेगळे
करू शकत नाही व दिलेले वचन रद्द करू शकत नाही. 18 कारण जर
वारसा नियमशास्त्रावर अवलंबून आहे, तर ते अभिवचनांवर अवलंबून
नाही. परंतु परमेश्वराने अब्राहामाला आपल्या कृपेने, अभिवचनाद्वारे
वारसाहक्क दिला. 19 तर मग नियमशास्त्र कशासाठी देण्यात आले?
ज्या संतानाला त्यांचे अभिवचन दिलेले होते, त्यांचे आगमन होईपर्यंत
उल्लंघन काय आहे हे समजण्यासाठी हे लावून दिले होते. आपले
नियम देवदूतांद्वारे मध्यस्थाला सोपवून दिले. 20 मध्यस्थ म्हणजे
एकापेक्षा अधिक पक्षाचा असतो; पण परमेश्वर एक आहे. 21 तर मग
नियमशास्त्र आणि परमेश्वराची अभिवचने परस्परविरोधी आहेत काय?
मुळीच नाही! नियमशास्त्र दिल्याने जीवन मिळत असले, तर नीतिमत्व
नियमापासून आले असते. 22 पूर्ण जग पापाच्या नियंत्रणात आहे असे
शास्त्रलेखाने स्पष्ट केले. येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्यांठी जे
अभिवचन मिळणार होते, ते त्यांच्यावर विश्वास ठेवतात त्यांना दिले
जावे. 23 हा विश्वास येण्यापूर्वी, आपण नियमशास्त्राच्या पहाऱ्यात
होतो आणि आपण पहाऱ्यात राहू जोपर्यंत तो विश्वास प्रकट होत नाही.
24 विश्वासाद्वारे आपल्याला नीतिमान ठरविण्यासाठी ख्रिस्त येईपर्यंत
नियमशास्त्र आपले संरक्षक होते. 25 पण आता विश्वास आल्यामुळे
आपण संरक्षकाच्या अधीन नाही. 26 कारण आता आपण ख्रिस्त
येशूंवरील विश्वासाच्याद्वारे परमेश्वराची लेकरे आहोत. 27 ज्या आपण
सर्वांनी ख्रिस्तामध्ये बाप्तिस्मा घेतला आहे, त्या आपण ख्रिस्ताला
परिधान केले आहे. 28 आता कोणी यहूदी किंवा गैरयहूदी, गुलाम किंवा
स्वतंत्र, स्त्री किंवा पुरुष नाहीत, तर आपण सर्व ख्रिस्त येशूंमध्ये एक

आहोत, 29 जर आपण ख्रिस्ताचे आहोत तर अब्राहामाचे खरे संतान व
परमेश्वराने दिलेल्या अभिवचनांचे वारस आहोत.

**4** आता मी असे म्हणतो की वारस जोपर्यंत बाळ आहे, तोपर्यंत
तो सर्व मालमत्तेचा धनी असूनही, दासापेक्षा वेगळा नाही. 2
पित्याने ठरविलेल्या वेळेपर्यंत, त्याला त्याचे पालक व कारभारी
सांगतील तसे वागावे लागते. 3 जेव्हा आम्ही बालक होतो, तेव्हा आम्ही
जगाच्या आत्मिक तत्वांच्या दबावाखाली होतो. 4 परंतु काळाची पूर्णता
झाल्यावर परमेश्वराने आपल्या पुत्राला पाठविले; ते स्त्रीपासून जन्मलेले,
नियमांच्या अधीन असे जन्मले होते. 5 जे आपण नियमांच्या अधीन
होतो, त्या आपल्याला खंडणी देऊन सोडवावे आणि पुत्र म्हणून दत्तक
घ्यावे. 6 कारण तुम्ही त्यांचे पुत्र आहात, म्हणूनच परमेश्वराने त्यांचा
आत्मा आमच्या हृदयात पाठविला आहे, त्याद्वारेच आपण, “अब्बा,
पिता अशी त्यांना हाक मारतो.” 7 आता आपण दास नसून परमेश्वराची
लेकरे झालो आहोत, जर लेकरे आहोत, तर परमेश्वराने आपल्याला
त्यांचे वारसही केले आहे. 8 तुम्हाला परमेश्वराची ओळख होण्यापूर्वी,
तुम्ही सुद्धा, जे वास्तविक परमेश्वर नाहीत, त्यांचे दास होता. 9 पण आता
ज्याअर्थी तुम्हाला परमेश्वराची ओळख झाली आहे, किंवा परमेश्वराद्वारे
ओळखले गेला आहात, त्याअर्थी परत त्या दुबळ्या, दयनीय तत्वाच्या
प्रभावाखाली का येता? पुन्हा त्याचे दास होण्याची आशा का धरता? 10
तुम्ही विशेष दिवस, महिने, ऋतू आणि वर्ष हे पाळता! 11 तुम्हासाठी
केलेले माझे सारे कष्ट वाया गेले असावेत अशी मला भीती वाटते. 12
प्रिय बंधू व भगिनींनो, माझ्यासारखे व्हा, कारण मी तुमच्यासारखा
झालो आहे. तुम्ही माझे काही नुकसान केले नाही. 13 वास्तविक माझ्या
शारीरिक आजारात मी तुम्हाला प्रथम शुभवार्तेचा प्रचार केला होता.
14 माझ्या शारीरिक आजाराने जणू तुमची परीक्षा झाली, तरी तुम्ही
माझा धिक्कार व अवमान केला नाही. उलट तुम्ही माझे स्वागत केले,
जणू काही मी परमेश्वराचा दूत, किंवा स्वतः ख्रिस्त येशूच होतो. 15
तुमची माझ्याविषयीची आशीर्वादाची वृत्ती आता कुठे आहे? मी साक्ष
देतो, की शक्य झाले असते तर तुम्ही स्वतःचे डोळेदेखील काढून मला
दिले असते. 16 आता सत्य बोलून मी तुमचा शत्रू झालो काय? 17 ते
लोक तुम्हाला आपल्या पक्षात घेण्यास उत्सुक आहेत, पण ते तुमच्या
भल्यासाठी नाही. परंतु तुम्ही त्यांचे शिष्य व्हावे, म्हणून ते तुम्हाला
आम्हापासून वेगळे करू पाहतात. 18 आस्था असणे आणि उद्देश चांगला
असणे गरजेचे आहे, केवळ मी तुमच्याबरोबर आहे तेव्हाच नव्हे तर
नेहमीच असे असणे आवश्यक आहे. 19 माझ्या प्रिय मुलांनो, ख्रिस्ताचे
स्वरूप तुम्हामध्ये निर्माण होईपर्यंत मला प्रसूती वेदना होत राहतील. 20
आताच मी तिथे तुमच्याबरोबर असतो व माझा सूर बदलू शकलो असतो,
तर बरे झाले असते, कारण मी तुमच्या संदर्भात गोंधळात आहे. 21 मला
सांगा, तुम्ही जे नियमांच्या अधीन राहू इच्छिता, त्या तुम्हाला नियम काय
म्हणतात याची जाणीव नाही का? 22 असे लिहिले आहे की अब्राहामाला
दोन पुत्र होते एक दासीपासून झालेला, तर दुसरा स्वतंत्र स्त्रीपासून
झालेला. 23 त्या दासीपासून झालेला पुत्र दैहिकरितीने जन्मला, परंतु
स्वतंत्र स्त्रीपासून झालेला पुत्र दैवी अभिवचनाचा परिणाम म्हणून
जन्मला. 24 अलंकारिक रूपात या गोष्टी घेतल्या आहेत पाहा: या स्त्रिया
दोन करार आहेत. त्यापैकी एक करार आहे सीनाय पर्वतावर केलेला
करार ज्यामुळे दास्यत्वाच्या संतानाचा जन्म होतो: ही हागार आहे. 25
आता हागार ही अरबस्थानातील सीनाय पर्वत असा आहे आणि आता
अस्तित्वात असलेल्या यरुशलेम शहराचे प्रतीक आहे, कारण ती तिच्या
संतानाबरोबर दास्यात आहे. 26 परंतु यरुशलेम जी वर आहे ती स्वतंत्र
आहे आणि ती आपली मातृनगरी आहे. 27 जसे यशायाहने लिहिले
आहे: “हे वांझ स्त्रिये, तू जी कधीही प्रसवली नाही; उचंबळून गीत गा,
मोठ्याने जयघोष कर, कारण विवाहित स्त्रीपेक्षा, तू, जिला प्रसूती वेदना
झाल्या नाही, त्या परित्यक्ता स्त्रीला अधिक लेकरे आहेत,” 28 आता
बंधू व भगिनींनो, आपण इसहाकासारखे अभिवचनाची मुले आहोत. 29
त्यावेळेस दैहिकरित्या जन्मलेल्या पुत्राने आत्म्याच्या शक्तीने जन्मलेल्या
पुत्राचा छळ केला तसेच आताही होत आहे. 30 पण शास्त्रलेखात काय
लिहिले आहे? “दासी व तिचा पुत्र यांना घालवून द्या, कारण दासीचा
पुत्र स्वतंत्र स्त्रीच्या पुत्राबरोबर कधीही वारस होणार नाही.” 31 प्रिय
बंधू व भगिनींनो, आपण दासीपुत्र नाही, तर आपण स्वतंत्र स्त्रीची मुले
आहोत.

**5** ख्रिस्ताने स्वातंत्र्यासाठी आपल्याला मुक्त केले आहे, म्हणून त्यामध्ये
स्थिर राहा व पुन्हा दास्यत्वाच्या जोखडाखाली सापडू नका. 2 माझे
ऐकून घ्या! मी पौल तुम्हाला सांगतो की जर तुम्ही स्वतः सुंता करून
घेत असाल, तर ख्रिस्ताचा तुम्हाला काहीही उपयोग होणार नाही. 3
मी पुन्हा प्रत्येक मनुष्यास जाहीर करतो की जो कोणी आपली सुंता
करून घेईल, तो पूर्ण नियमशास्त्र आचरण्यास बांधलेला आहे. 4 तुम्ही
नीतिमान ठरावे म्हणून नियमांचे पालन करता ते तुम्ही ख्रिस्तापासून
वेगळे झाले आहात; आणि परमेश्वराच्या कृपेला अंतरले आहात. 5
आम्ही पवित्र आत्म्याद्वारे नीतिमत्व प्राप्त करावे या विश्वासाने आशा
धरून वाट पाहत आहोत. 6 ख्रिस्त येशूंमध्ये सुंता होणे किंवा न होणे
याला काही महत्त्व नाही; फक्त एकच गोष्ट महत्त्वाची आहे ती म्हणजे
विश्वास प्रीतीद्वारे प्रकट व्हावा. 7 तुम्ही चांगली धाव धावत होता तर
तुम्हाला सत्याचे पालन करण्यास कोणी अडखळण केले? 8 हे मन
वळविण्याचे काम ज्यांनी तुम्हाला पाचारण केले आहे त्याच्याकडून होत
नाही. 9 “थोडे खमीर सर्व पिठाच्या गोळ्याला फुगविते.” 10 मला
प्रभूमध्ये विश्वास आहे, की तुम्ही अन्य विचारांचा स्वीकार करणार नाही.
तुम्हाला गोंधळात टाकणारा मग तो कोणीही का असेना, त्याला दंड
भोगावा लागेल. 11 बंधू व भगिनींनो, मी जर अजूनही सुंतेचा प्रचार
करतो तर माझा छळ अजूनही का होतो? तर मग क्रूसाच्या अडथळ्याचे
निर्मूलन झाले असते. 12 जे तुम्हाला हैराण करणारे आहेत, त्यांनी
स्वतःला पूर्णरीतीने नपुंसक करून घ्यावे एवढीच माझी इच्छा आहे. 13
बंधू व भगिनींनो, तुम्हाला स्वतंत्र होण्यासाठी बोलाविले आहे. पण
तुमचे स्वातंत्र्य देहवासना पूर्ण करण्यासाठी वापरू नका, तर प्रीतीने
व नम्रपणाने एकमेकांची सेवा करा. 14 कारण सर्व नियमशास्त्र या

एका आज्ञेत सामावलेले आहे: “जशी तुम्ही स्वत:वर तशी तुमच्या
शेजाऱ्यावर प्रीती करा.” 15 तुम्ही एकमेकांना टोचता व खाऊन टाकता
तर एकमेकांचा नाश परस्परांच्या हातून होऊ नये म्हणून सांभाळा. 16
मी तुम्हाला सांगतो, आत्म्याच्या प्रेरणेने चला, मग तुम्ही देहवासना
पूर्ण करणारच नाही. 17 दैहिक इच्छा आत्म्याविरुद्ध आहे व आत्मा
देहाविरुद्ध आहे. ते आपसात विरोधी आहेत, यासाठी की ज्यागोष्टी
तुम्ही केल्या पाहिजे त्या तुम्ही करू नये. 18 जर तुम्ही आत्म्याच्या
प्रेरणेने चालता तर तुम्ही नियमशास्त्राधीन नाही. 19 देहस्वभावाची
कृत्ये उघड आहेत: लैंगिक अनैतिकता, अशुद्धता आणि दुर्व्यसनीपणा,
20 मूर्तिपूजा आणि जादूटोणा, द्वेष, मतभेद, मत्सर, क्रोध, स्वार्थी
इच्छा, कलह, तट, 21 हेवा, दारुबाजी, गोंधळ आणि अशा प्रकारच्या
गोष्टी ज्याबद्दल मी तुम्हाला पूर्वी सावध केले होते की जे कोणी असे
जीवन जगतात त्यांना परमेश्वराच्या राज्याचे वतन मिळणार नाही. 22
परंतु आत्म्याचे फळ प्रीती, आनंद, शांती, सहनशीलता, दयाळूपणा,
चांगुलपणा, विश्वासूपणा, 23 सौम्यता व आत्मसंयमन; अशांविरुद्ध
नियमशास्त्र नाही. 24 जे ख्रिस्त येशूंचे आहेत, त्यांनी आपल्या दैहिक
वासनांना व इच्छांना क्रूसावर खिळले आहे. 25 जर आपण आत्म्याच्या
सामर्थ्याने जगतो, तर आत्म्याच्या प्रेरणेने चालावे. 26 तर आता आपण
गर्विष्ठ होऊ नये व एकमेकांना चीड आणू नये.

**6** प्रिय बंधू व भगिनींनो, जर कोणी पापात सापडला, तर तुम्ही जे
आत्मिक आहात त्या तुम्ही त्याला सौम्य रीतीने सुधारावे. तुम्ही
स्वत:स सांभाळा, कदाचित तुम्हीही मोहात पडाल. 2 एकमेकांची
ओझी वाहा, आणि अशा रीतीने ख्रिस्ताचा नियम पूर्ण कराल. 3 आपण
कोणी नसताना कोणी आहोत असा विचार करणारा स्वत:चीच फसगत
करतो. 4 प्रत्येकाने आपल्या कृतींची परीक्षा करावी, कारण मगच
त्याला स्वत:बद्दल आढ्यता बाळगता येईल आणि स्वत:ची इतरांबरोबर
तुलना करण्याची गरज वाटणार नाही. 5 आपल्यातील प्रत्येकाने
आपापला भार वाहिला पाहिजे. 6 ज्यांना परमेश्वराच्या वचनातून शिक्षण
मिळाले आहे, त्यांनी शिक्षण देणाऱ्याला सर्व चांगल्या गोष्टींचा वाटा
द्यावा. 7 फसविले जाऊ नका; परमेश्वराचा उपहास करू शकत नाही.
कारण मनुष्य जे पेरतो तेच कापतो! 8 जो देहाकरीता पेरतो, त्याला
देहापासून नाशाचे पीक मिळेल, परंतु जो कोणी पवित्र आत्म्याला संतुष्ट
करण्यासाठी पेरतो त्याला पवित्र आत्म्यापासून सार्वकालिक जीवनाचे
पीक मिळेल. (aiōnios g166) 9 योग्य ते करण्याचा आपल्याला कंटाळा
येऊ नये, कारण आपण थकलो नाही तर योग्य वेळी पिकांची कापणी
करू. 10 म्हणून शक्य होईल आणि जशी आपणास संधी मिळेल तसे
आपण सर्वांचे भले करावे, विशेषकरून विश्वासणाऱ्यांच्या कुटुंबाचे
चांगले करावे. 11 मी स्वत:च्याच हाताने मोठ्या अक्षरांनी तुम्हाला
लिहित आहे! 12 जे दैहिकरितीने लोकांवर छाप पाडावयास पाहतात ते
तुम्ही सुंता करून घ्यावी यासाठी दबाव टाकतात. ते एकाच कारणामुळे
की ख्रिस्ताच्या क्रूसामुळे होणारा छळ त्यांना टाळता यावा. 13 ज्यांची
सुंता झाली ते सुद्धा नियम पाळीत नाहीत; तरी देखील तुमची सुंता
व्हावी ही त्यांची इच्छा आहे, म्हणजे त्यांना तुमच्या दैहिक सुंतेची प्रौढी
मिरविता येईल. 14 आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या वधस्तंभाशिवाय इतर
कशाचीही प्रौढी मिरवावी असे माझ्याकडून न होवो त्याद्वारे मी जगाला
व जग मला क्रूसावर खिळलेले आहे. 15 सुंता होणे किंवा न होणे याला
काही महत्त्व नाही; नवी उत्पत्ती हेच महत्त्वाचे आहे. 16 जे हा नियम
पाळतील त्या सर्वांवर व परमेश्वराच्या इस्राएलावर शांती व दया असो.
17 येथून पुढे मला कोणी त्रास देऊ नये, कारण माझ्या शरीरावर मी
येशूंची चिन्हे वागवितो. 18 बंधू भगिनींनो, आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताची
कृपा तुमच्या आत्म्याबरोबर असो, आमेन.

# इफिसकरांस

1 परमेश्वराच्या इच्छेने झालेला ख्रिस्त येशूंचा प्रेषित पौल याजकडून,
2 परमेश्वर आपला पिता व प्रभू येशू ख्रिस्त यांच्याकडून तुम्हास
कृपा आणि शांती असो. 3 परमेश्वर आणि आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचे
पिता यांची स्तुती असो, ज्यांनी आपल्याला स्वर्गामधील सर्व आत्मिक
आशीर्वादाने ख्रिस्तामध्ये आशीर्वादित केले आहे. 4 आम्ही त्यांच्या दृष्टीने
पवित्र आणि निष्कलंक असावे म्हणून त्यांनी जगाच्या स्थापनेपूर्वी
आपल्याला ख्रिस्तामध्ये प्रीतीमुळेच निवडले. 5 त्यांच्या आनंदास आणि
इच्छेस अनुसरून येशू ख्रिस्ताद्वारे आपण दत्तकपुत्र व्हावे, ही त्यांची पूर्व
योजना होती; 6 त्यांच्या प्रिय पुत्राद्वारे आपल्याला मुक्तपणे दिलेल्या
गौरवयुक्त कृपेची स्तुती व्हावी. 7 त्यांच्यामध्ये परमेश्वराच्या विपुल
कृपेद्वारे व त्यांच्या रक्ताद्वारे खंडणी म्हणून आपल्याला पापांची क्षमा
देऊन 8 आपल्यावर कृपेची वृष्टी केली आहे. सर्व ज्ञान व बुद्धीने, 9 त्यांनी
ख्रिस्तामध्ये त्यांच्या इच्छेचे रहस्य त्यांच्या उद्देशानुसार आपल्याला
कळविले आहे. 10 ही योजना काळाच्या पूर्णतेची होती, यासाठी की
स्वर्गातील आणि पृथ्वीवरील सर्वगोष्टी ख्रिस्तामध्ये एकत्र व्हाव्या. 11
कारण ज्यांच्या इच्छेनुसार व उद्देशानुसार जे सर्वकाही चालवितात,
त्यांच्या पूर्व योजनेनुसार आपण त्यांच्यामध्ये निवडलेले होतो. 12 यात
उद्देश असा होता की, आपण ज्यांनी ख्रिस्तावर प्रथम आशा ठेवली
होती, त्यांनी त्यांच्या गौरवाच्या स्तुतीचे साधन व्हावे. 13 जेव्हा तुम्ही
सत्याचा संदेश ऐकला, आणि तारणाच्या शुभवार्तेवर विश्वास ठेवला,
तेव्हा तुमचा ख्रिस्तामध्ये समावेश झाला व तुम्हावरही वचनदत्त पवित्र
आत्म्याचा शिक्का मारला गेला, 14 आणि हा आत्मा परमेश्वराच्या
लोकांसाठी खंडणी व आपल्याला वतनाचा विसार म्हणून त्यांच्या
गौरवाच्या स्तुतीसाठी दिला आहे. 15 या कारणासाठी, प्रभू येशूंवरील
तुमच्या विश्वासाबद्दल आणि परमेश्वराच्या सर्व लोकांवर असलेली तुमची
प्रीती याबद्दल आम्ही ऐकले, तेव्हापासून 16 माझ्या प्रार्थनेत तुमची
आठवण ठेवून तुम्हासाठी आभार मानण्याचे मी थांबविले नाही. 17
माझे हे मागणे आहे, की तुम्ही त्यांना अधिक चांगल्या रीतीने ओळखावे
म्हणून परमेश्वर, जे आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचे गौरवशाली पिता,
यांनी तुम्हाला ज्ञान व प्रकटीकरणाचा आत्मा द्यावा. 18 मी प्रार्थना
करतो की तुमच्या अंत:करणाचे डोळे प्रकाशित केले जावेत, आणि
पवित्र जनांमध्ये असलेल्या गौरवशाली वतनाच्या संपत्तीच्या आशेसाठी
तुम्हाला पाचारण करण्यात आले आहे, हे तुम्ही ओळखून घ्यावे. 19 जे
विश्वास ठेवतात, त्यांना अमर्याद सामर्थ्य आहे. हे तेच महापराक्रमी
सामर्थ्य आहे 20 ज्याच्यायोगे त्यांनी ख्रिस्ताला मरणातून उठविले आणि
स्वर्गात परमेश्वराच्या उजवीकडे बसविले, 21 जे स्थान सर्व शासन
आणि अधिकार, सामर्थ्य आणि प्रभुत्व व सध्याच्या युगात व येणाऱ्या
युगातील कोणत्याही नावांपेक्षाही सर्वोच्च आहे, (aiōn g165) 22 आणि
परमेश्वराने सर्वकाही त्यांच्या पायाखाली ठेवले आणि मंडळीसाठी
प्रत्येक गोष्टींमध्ये मस्तक म्हणून नियुक्त केले. 23 मंडळी जे त्यांचे
शरीर, तिला त्यांच्या परिपूर्णतेने सर्वकाही सर्वप्रकारे पुरवितात.

2 तुम्ही स्वत:च्या पातकांमध्ये व अपराधांमध्ये मृत झालेले होता. 2
त्यामध्ये तुम्ही जगाच्या रीतीप्रमाणे वागत होता व आकाशमंडळातील
शासक आत्मा जो प्रत्यक्ष या क्षणीही आज्ञा न पाळणाऱ्यांमध्ये कार्य
करीत आहे, त्याच्यामागे चालणारे होता. (aiōn g165) 3 एकेकाळी
आपणही त्यामध्ये जगत होतो. आपल्यामधील दैहिक वासना आणि
विचार यांचे अनुसरण करणाऱ्यांप्रमाणेच नैसर्गिकरित्या परमेश्वराच्या
क्रोधास पात्र होतो. 4 परंतु परमेश्वर हे दयेचे सागर आहेत व आपल्यावरील
त्यांच्या अपरंपार प्रीतीमुळे, 5 आपण आपल्या अपराधांमध्ये मृत झालो
असताना त्यांनी ख्रिस्तामध्ये आपणास जिवंत केले व कृपेनेच तुमचे
तारण झाले आहे. 6 आणि परमेश्वराने आपल्याला ख्रिस्त येशूंमध्ये
उठवून स्वर्गीय राज्यात त्यांच्याबरोबर बसविले आहे. 7 यासाठी की
ख्रिस्त येशूंमध्ये त्यांची आपल्यावरील दया व येणाऱ्या युगांमध्ये त्यांची
कृपा किती अतुलनीय आहे हे आपणास दाखववे. (aiōn g165) 8
कृपेनेच विश्वासाद्वारे तुमचे तारण झाले आहे आणि हे तुमच्याकडून
झाले नाही तर ते परमेश्वराचे दान आहे, 9 कृत्याद्वारे नव्हे; त्यामुळे
कोणी गर्व करू शकत नाही. 10 कारण परमेश्वराने पूर्वीच आमच्यासाठी
नेमून ठेवलेली चांगली कृत्ये करण्याकरिता आम्ही ख्रिस्त येशूंमध्ये
घडविलेली परमेश्वराची हस्तकृती आहोत. 11 यास्तव, आठवण ठेवा
की जे आपण पूर्वी जन्माने गैरयहूदी व सुंता झालेल्याकडून असुंती
समजले जात होतो, ती सुंता शरीरात मनुष्यांच्या हाताने केली जात
असे. 12 लक्षात असू द्या, त्या दिवसांमध्ये तुम्ही ख्रिस्तापासून अलिप्त,
इस्राएलाच्या नागरिकत्वापासून वेगळे केलेले, कराराच्या वचनाला
परके, आणि जगात परमेश्वरावाचून व आशेवाचून जगत होता. 13 जे
तुम्ही एकेकाळी खूप दूर होता, त्या तुम्हाला आता ख्रिस्त येशूंमध्ये,
त्यांच्या रक्ताद्वारे निकट आणले आहे. 14 कारण ते स्वत:च आपली
शांती आहेत, त्यांनी दोन गटास एक केले आणि त्यांना विभक्त करणारी
शत्रुत्वाची भिंत पाडली. त्यांनी आपल्या देहाने नियमशास्त्राला त्यांच्या
आज्ञापालन व विधीसहित दूर केले. यात त्यांचा उद्देश हा होता की या
दोघांमधून स्वत:साठी एक नवा मनुष्य उत्पन्न करून शांती प्रस्थापित
करावी. 16 कारण त्यांनी क्रूसाद्वारे वैरभाव नाहीसा करून व दोघांना
एक शरीर करून परमेश्वराशी समेट घडवून आणला. 17 तुम्ही जे
त्यांच्यापासून फार दूर होते आणि जे जवळ होते, अशा दोघांसाठी ते
आले व त्यांनी शांतीचा प्रचार केला. 18 कारण त्यांच्याद्वारे आम्हा
दोघांनाही एकाच आत्म्याद्वारे पित्याजवळ येण्याचे स्वातंत्र्य आहे. 19
या कारणाने तुम्ही आता परदेशी आणि परके नाही, तर परमेश्वराच्या
लोकांबरोबर सहनागरिक आणि त्यांच्या कुटुंबाचे सदस्य झाला आहात.
20 तुम्ही प्रेषित आणि संदेष्टे यांच्या भक्कम पायावर बांधलेले आहात,
ज्याची मुख्य कोनशिला ख्रिस्त येशू आहेत. 21 त्यांच्यामध्ये पूर्ण इमारत
एकत्र जोडली जात असताना वाढत जाऊन प्रभूचे पवित्र मंदिर होत

आहे. 22 त्याचप्रमाणे तुम्हीही पवित्र आत्म्याद्वारे एकत्र बांधले गेले
असताना परमेश्वराचे वसतिस्थान झाला आहात.

**3** याकारणास्तव, मी पौल, तुम्हा गैरयहूदीयांसाठी ख्रिस्त येशूंचा
बंदिवान आहे. 2 तुम्हाकरिता परमेश्वराच्या कृपेची व्यवस्था जी
मला देण्यात आली आहे याबाबत तुम्ही ऐकले आहे. 3 अर्थात् हे
रहस्य मला प्रकटीकरणाद्वारे समजले, याबद्दल मी यापूर्वी थोडक्यात
लिहिले आहे. 4 ते वाचल्यानंतर, ख्रिस्ताचे जे रहस्य आहे, त्याबद्दल
मला झालेले ज्ञान तुम्हाला समजेल. 5 हे रहस्य इतर पिढींच्या लोकांना
प्रकट केले गेले नव्हते, पण आता त्यांनी आपल्या पवित्र प्रेषित व
संदेष्टे यांना परमेश्वराच्या आत्म्याद्वारे प्रकट केले आहे. 6 हे रहस्य
असे आहे: शुभवार्तेद्वारे गैरयहूदीही इस्राएली लोकांबरोबर सहवारस,
एका शरीराचे अवयव, आणि ख्रिस्त येशूंमध्ये अभिवचनाचे सहभागी
असे आहेत. 7 परमेश्वराच्या कृपेच्या वरदानाने व सामर्थ्याच्या कृतीने
मी या शुभवार्तेचा सेवक झालो आहे. 8 मी जो प्रभूच्या लोकांमध्ये
लहानात लहान, त्या मला गैरयहूदीयांना ख्रिस्ताच्या अगाध समृद्धीच्या
शुभवार्तेचा प्रचार करण्याची कृपा देण्यात आली. 9 ज्यांनी सर्वकाही
निर्माण केले त्या परमेश्वरामध्ये युगानुयुगांपासून गुप्त ठेवलेले ते रहस्य
प्रकट करण्याची व्यवस्था केली. (aiōn g165) 10 यासाठी की आता
मंडळीद्वारे, आकाशमंडळातील शासक आणि अधिकाऱ्यांना परमेश्वराचे
विविध ज्ञान कळावे हाच त्यांचा उद्देश होता, 11 हा त्यांच्या युगानुयुगाचा
उद्देश ख्रिस्त येशू आपला प्रभू यामध्ये पूर्ण व्हावा. (aiōn g165) 12
येशूंमध्ये आणि त्यांच्यावरील विश्वासाद्वारे आम्ही पूर्ण स्वातंत्र्याने आणि
आत्मविश्वासाने परमेश्वराजवळ जाऊ शकतो. 13 म्हणून तुमच्यासाठी जे
दुःख मला सहन करावे लागत आहे यामुळे तुम्ही मुळीच निराश होऊ
नका, कारण ते तुमचे गौरव आहे. 14 या कारणासाठी मी पित्यासमोर
गुडघे टेकतो, 15 स्वर्गातील व पृथ्वीवरील प्रत्येक कुटुंबाला त्यांच्याद्वारे
नाव देण्यात आले आहे. 16 मी प्रार्थना करतो की आपल्या गौरवशाली
संपत्तीनुरूप आपल्या पवित्र आत्म्याचे सामर्थ्य देऊन त्यांनी तुम्हाला
अंतर्यामी शक्तिसंपन्न करावे. 17 ज्यामुळे ख्रिस्त विश्वासाद्वारे तुमच्या
हृदयात राहतील व तुम्ही प्रीतीमध्ये खोल मुळावलेले व स्थिर व्हावे अशी
मी प्रार्थना करतो, 18 आणि तुम्हाला प्रभूच्या सर्व पवित्र लोकांबरोबर
ख्रिस्ताच्या प्रेमाची लांबी, रुंदी, खोली व उंची किती आहे हे समजून
घेण्यास समर्थ होता यावे, 19 आणि ही प्रीती जी ज्ञानापलीकडे आहे, ती
तुम्हाला समजावी, यासाठी की तुम्ही स्वतः परमेश्वराच्या सर्व पूर्णतेइतके
परिपूर्ण व्हावे. 20 आता जे आपल्या सामर्थ्यानुसार आमच्यामध्ये कार्य
करीत आहेत आणि आमच्या मागण्या किंवा कल्पना यांच्या पलीकडे
अधिक विपुलतेने करण्यास समर्थ आहेत, 21 त्यांना मंडळीमध्ये आणि
ख्रिस्त येशूंमध्ये सर्व पिढ्यान् पिढ्या सदासर्वकाळ गौरव असो. आमेन.
(aiōn g165)

**4** प्रभूसाठी बंदिवान म्हणून, मी तुम्हाला आग्रहाची विनंती करतो,
की तुम्हाला झालेल्या पाचारणास शोभेल असे जीवन जगावे. 2 पूर्ण
नम्रतेने आणि सौम्यतेने; सहनशीलतेने, प्रीतीने एकमेकांचे सहन करा.
3 शांतीच्या बंधनात व पवित्र आत्म्याद्वारे ऐक्य टिकविण्यास झटावे.
4 जसे एक शरीर व एक आत्मा, तसेच आपल्याला एकाच गौरवी
आशेसाठी पाचारण करण्यात आले होते. 5 एक प्रभू, एक विश्वास, एक
बाप्तिस्मा; 6 एकच परमेश्वर असून ते सर्वांचे पिता आहेत. तेच सर्वांवर,
सर्वांमधून आणि सर्वांमध्ये आहेत. 7 तरी आपल्यापैकी प्रत्येकाला,
ख्रिस्ताने नेमल्याप्रमाणे कृपा देण्यात आली आहे. 8 यामुळे असे म्हटले
आहे: "जेव्हा त्यांनी उच्चस्थानी आरोहण केले, त्यांनी अनेक बंदिवान
नेले आणि त्यांच्या लोकांना दाने दिली." 9 "त्यांचे आरोहण झाले"
याचा अर्थ काय? की ते खाली पृथ्वीच्या अधोभागात उतरले होते.
10 जे अधोभागात उतरले त्यांनी पूर्ण सृष्टी भरून जाण्याच्या उद्देशाने
स्वर्गाच्या उच्च स्थानापर्यंत सन्मानाने आरोहण केले. 11 म्हणून ख्रिस्ताने
स्वतः मंडळीला काही प्रेषित, संदेष्टे, सुवार्तिक, पाळक आणि शिक्षक
म्हणून दिले, 12 हे यासाठी की त्यांच्या लोकांना सेवेच्या कार्यात सिद्ध
करून ख्रिस्ताचे शरीर सुसज्ज व्हावे. 13 जोपर्यंत आपण सर्व विश्वास
आणि परमेश्वराच्या पुत्राच्या ज्ञानामध्ये एकता, परिपक्वता व ख्रिस्ताची
परिपूर्णता यापर्यंत पोहोचत नाही, तोपर्यंत हे दिले आहे. 14 आता
यापुढे आपण बाळांसारखे असू नये, आणि तऱ्हेतऱ्हेच्या शिक्षणरूपी
वाऱ्याने, मनुष्यांच्या धूर्तपणाने व कपटाने फसविले जाऊन लाटांनी
इकडे तिकडे वाहणारे व हेलकावे खाणारे होऊ नये. 15 त्याऐवजी
प्रीतीमध्ये सत्य बोलत असताना, आपण प्रत्येक गोष्टींमध्ये ख्रिस्त
ज्यांचे मस्तक आहेत, त्यांचे परिपक्व शरीर होण्यासाठी वाढत जावे.
16 त्यांच्यापासून संपूर्ण शरीर प्रत्येक सांध्याशी एकत्र जोडून धरले
जाते, प्रत्येक अवयव आपले कार्य करतो व प्रीतीमध्ये शरीराची वाढ व
बांधणी होते. 17 प्रभूच्या वतीने मी तुम्हाला आग्रहाने सांगतो की तुम्ही
येथून पुढे ज्यांचे विचार भ्रष्ट झाले आहेत अशा गैरयहूदीयांसारखे जगू
नका. 18 कारण त्यांचे विचार व बुद्धी अंधकारमय झाली असून, ते
त्यांच्या हृदयाच्या कठीणपणामुळे अज्ञानी झाले आहेत व परमेश्वराच्या
जीवनापासून दूर गेले आहेत. 19 सर्वसाधारण अकलेचा त्यांना गंध
राहिला नाही, त्यांनी स्वतःला कामुकता व सर्व अशुद्धतेच्या स्वाधीन
केले असून ते लोभाने भरलेले आहेत. 20 पण अशाप्रकारे जीवनाचा
मार्ग तुम्ही शिकला नाही तर, 21 जेव्हा तुम्ही ख्रिस्ताबद्दल ऐकले
आणि येशूंमध्ये जे सत्य आहे त्याबद्दल तुम्ही शिकला आहात; 22
फसवणुकीच्या इच्छेने भ्रष्ट होत आलेला जुना मनुष्य काढून टाकणे, हे
तुम्ही शिकला आहात; 23 तुमची मनोवृत्ती नवी केली जावी; 24 आणि
खरे नीतिमत्व व पवित्रता यामध्ये परमेश्वरासारखा उत्पन्न केलेला नवा
स्वभाव तुम्ही परिधान करावा. 25 यास्तव तुम्ही प्रत्येकजण एकमेकांशी
लबाडी करण्याचे सोडून, आपल्या शेजाऱ्यांशी सत्य बोला, कारण
आपण सर्व एकाच शरीराचे अवयव आहोत. 26 "तुम्ही रागावले असला
तरी पाप करू नका." तुम्ही रागात असताना सूर्य मावळू देऊ नका. 27
आणि सैतानाला पाय ठेवण्यास जागा देऊ नका. 28 चोरी करणाऱ्यांनी
चोरी न करता आपल्या हातांनी चांगले व उपयोगी असे काम करावे,

म्हणजे गरजवंत लोकांना देण्याकरिता त्यांच्याजवळ काहीतरी असेल.
29 आपल्या मुखाद्वारे अपायकारक शब्द बाहेर पडू देऊ नका. परंतु
प्रसंगाला अनुसरून ऐकणाऱ्यांसाठी उपयुक्त व त्यांच्या वृद्धीसाठी
कारणीभूत होईल असे बोला. 30 परमेश्वराच्या पवित्र आत्म्याला दु:खी
करू नका, कारण त्याच्याद्वारे तुम्ही खंडणीच्या दिवसासाठी शिक्का
मारलेले आहात. 31 सर्वप्रकारचा कडूपणा, संताप आणि राग, भांडणे
आणि निंदानालस्ती याबरोबरच सर्वप्रकारचा द्वेषभाव सोडून द्या. 32
एकमेकांना दयाळू व कनवाळूपणे वागवा; जशी परमेश्वराने तुम्हाला
ख्रिस्तामध्ये क्षमा केली, तशी तुम्ही एकमेकांना क्षमा करा.

**5** परमेश्वराची प्रिय लेकरे या नात्याने तुम्ही परमेश्वराचा कित्ता गिरवावा.
2 ज्याप्रमाणे ख्रिस्ताने आपल्यावर प्रीती केली आणि स्वत:ला
आपल्यासाठी सुगंधी अर्पण व यज्ञ म्हणून परमेश्वराला दिले त्याप्रमाणे
तुम्हीही प्रीतीच्या मार्गाने चला. 3 तुमच्यामध्ये लैंगिक पापे, कोणत्याही
प्रकारची अशुद्धता किंवा लोभ यांची अप्रत्यक्ष सूचना देखील असू नये,
कारण या गोष्टी परमेश्वराच्या पवित्र लोकांसाठी अयोग्य आहेत. 4
आणि अश्लीलता, मूर्खपणाचे बोलणे, असभ्य विनोद यांचे तुम्हामध्ये
स्थान नसावे, ते उचित नाहीत, त्याऐवजी उपकारस्तुती व्हावी. 5 तुम्ही
या गोष्टीविषयी खात्री बाळगा: व्यभिचारी, अशुद्ध किंवा लोभी असा
व्यक्ती मूर्तिपूजक आहे, त्यास ख्रिस्ताच्या आणि परमेश्वराच्या राज्याचे
वतन मिळणार नाही. 6 पोकळ शब्दांनी कोणी तुम्हाला फसवू नये,
या गोष्टींमुळे आज्ञाभंग करणाऱ्यांवर परमेश्वराचा क्रोध भडकतो. 7
यास्तव तुम्ही त्यांचे भागीदार सुद्धा होऊ नका. 8 कारण पूर्वी तुम्ही
अंधकार होता, परंतु आता तुम्ही प्रभूमध्ये प्रकाश आहात. प्रकाशाच्या
लेकरांसारखे जगा. 9 (प्रकाशाचे फळ सर्वप्रकारचे चांगुलपण, नीतिमत्व
व सत्यता यामध्ये आहे.) 10 प्रभू कशाने प्रसन्न होतात याचा शोध घ्या.
11 अंधकाराच्या निष्फळ कर्मांशी तुम्हाला काहीच करावयाचे नाही,
त्याऐवजी ते उघडकीस आणा. 12 अवज्ञा करणारे जे गुप्तपणे करतात,
त्यांचा उल्लेख करणे देखील लज्जास्पद होईल. 13 परंतु प्रकाशाद्वारे
सर्वकाही उघड होते, ते दृष्टीस पडते आणि जे सर्वकाही प्रकाशित
केलेले आहे ते प्रकाश असे होते. 14 त्यामुळेच असे म्हटले आहे:
“अरे निद्रास्ता, जागा हो, मेलेल्यामधून ऊठ म्हणजे ख्रिस्त तुझ्यावर
प्रकाशतील.” 15 म्हणून तुम्ही अज्ञानी नव्हे तर ज्ञानी लोकांसारखे
वागण्याची काळजी घ्या. 16 दिवस कठीण आहेत, म्हणून प्रत्येक
संधीचा उपयोग करून घ्या. 17 मुर्खासारखे वागू नका, तर प्रभूची इच्छा
काय आहे ते समजून घ्या. 18 मद्यपान करून धुंद होऊ नका, ज्यामुळे
अनीती वाढते. त्याऐवजी आत्म्याने परिपूर्ण व्हा. 19 आत्म्याने प्रेरित
स्तोत्रे, गाणी आणि आत्मिक गीते गाऊन एकमेकांशी बोला. भजने
गाऊन व संगीताद्वारे तुमच्या मनापासून प्रभूची स्तुती करा. 20 आपले
प्रभू येशू ख्रिस्त यांच्या नावाने आपले परमेश्वर आणि पिता यांचे प्रत्येक
गोष्टीसाठी नेहमी उपकार माना. 21 ख्रिस्ताबद्दल असलेल्या आदरामुळे
एकमेकांच्या अधीन राहा. 22 पत्नींनो, जसे प्रभूच्या, तसेच तुम्ही
तुमच्या पतीच्या अधीन असा. 23 कारण ज्याप्रमाणे पती हा पत्नीचे
मस्तक आहे, तर ख्रिस्त हा त्यांचे शरीर म्हणजे, मंडळीचे मस्तक, तिचा
तो उद्धारकर्ता आहे. 24 आता मंडळी जशी ख्रिस्ताच्या अधीन राहते,
तसेच पत्नींनी सुद्धा प्रत्येक बाबतीत त्यांच्या पतीच्या अधीन राहवे.
25 पतींनो, तुम्हीही आपल्या पत्नीवर प्रीती केली पाहिजे, ज्याप्रमाणे
ख्रिस्ताने मंडळीवर प्रीती करून स्वत:स तिच्यासाठी अर्पण केले, 26
जेणेकरून मंडळीला वचनरुपी पाण्याने धुवून शुद्ध करून तिला पवित्र
करावे; 27 आणि त्याने ती मंडळी गौरवी, डाग किंवा सुरकुती किंवा
दोषरहित अशी आपणाला सादर करावी, ती पवित्र आणि निष्कलंक
असावी. 28 याचप्रमाणे पतींनीही त्यांच्या पत्नीवर, त्या आपलेच शरीर
आहेत, असे समजून प्रीती करावी. जो त्याच्या पत्नीवर प्रीती करतो, तो
स्वत:वर प्रीती करतो. 29 कोणी कधीही स्वत:च्याच शरीराचा द्वेष केला
नाही, परंतु ज्याप्रमाणे ख्रिस्त मंडळीचे संगोपन करून काळजी घेतात
त्याप्रमाणे करतो. 30 कारण आपण त्यांच्या शरीराचे अवयव आहोत.
31 “या कारणासाठी पुरुष आपल्या आईवडिलांना सोडून आपल्या
पत्नीशी जडून राहील आणि ती दोघे एकदेह होतील.” 32 हे गूढ रहस्य
आहे, परंतु मी ख्रिस्ताबद्दल आणि मंडळीबद्दल बोलत आहे. 33 म्हणून
तुम्ही प्रत्येकाने जशी आपणावर तशीच आपल्या पत्नीवर प्रीती करावी
आणि पत्नीनेही आपल्या पतीचा सन्मान करावा.

**6** लेकरांनो, प्रभूमध्ये तुम्ही आपल्या आईवडिलांची आज्ञा पाळा,
कारण हे योग्य आहे. 2 “तुमच्या आई आणि वडिलांचा मान राखा”
अभिवचन असलेली ही पहिली आज्ञा आहे. 3 “यासाठी की तुमचे
कल्याण व्हावे आणि तुम्हाला पृथ्वीवर दीर्घायुष्याचा लाभ घेता यावा.”
4 पित्यांनो, तुम्ही आपल्या मुलांना प्रकोपित करू नका; याउलट प्रभूच्या
शिक्षणात व बोधवचनात त्यांना वाढवा. 5 दासांनो, जसे आपण ख्रिस्ताचे
आज्ञापालन करतो, तसेच खऱ्या मनाने आपल्या ऐहिक धन्याचा मान
राखा व भय धरा व त्यांच्या आज्ञा पाळा 6 केवळ त्यांची नजर तुमच्यावर
असतानाच त्यांची कृपादृष्टी व्हावी म्हणून त्यांचे आज्ञापालन करू नका,
तर मनापासून परमेश्वराची इच्छा पूर्ण करणारे ख्रिस्ताचे दास असे व्हा.
7 ही सेवा लोकांची म्हणून नाही परंतु पूर्ण मनाने आपण जशी प्रभूची
करतो अशी समजून करा. 8 तुम्ही दास किंवा स्वतंत्र असला, तरी
प्रत्येक चांगल्या गोष्टीचे वेतन प्रभू तुम्हा प्रत्येकाला देईल, हे लक्षात
ठेवा. 9 आणि धन्यांनो, तुमच्या दासांशी तसेच वागा. त्यांना धमक्या
देऊ नका. कारण तुम्हाला ठाऊक आहे की तुमचा व त्यांचा दोघांचाही
एकच धनी जे स्वर्गात असून त्यांच्याजवळ पक्षपात नाही. 10 सर्वात
शेवटी प्रभूच्या बळामध्ये आणि त्यांच्या पराक्रमी सामर्थ्याने सज्ज व्हा.
11 परमेश्वराची सर्व शस्त्रास्त्रे धारण करा, म्हणजे तुम्हाला सैतानाच्या
योजनेविरुद्ध उभे राहता येईल. 12 कारण आपले युद्ध मांस आणि
रक्त यांच्याविरुद्ध नाही, तर सत्ताधारी, अधिपतींविरुद्ध, अंधकाराच्या
शक्तीविरुद्ध, आणि आकाशमंडळातील दुष्ट आत्मे यांच्याविरुद्ध आहे.
(aiōn g165) 13 यास्तव वाईट दिवसांमध्ये तुम्हाला खंबीरपणे उभे राहता
यावे आणि सर्वकाही केल्यानंतर टिकाव धरता यावा म्हणून परमेश्वराची
शस्त्रसामुग्री धारण करा. 14 म्हणून सत्यरूपी कमरबंदाने आपली कंबर

बांधा, नीतिमत्वाचे ऊरस्त्राण घेऊन स्थिर उभे राहा. 15 परमेश्वराच्या
शांतीची शुभवार्ता गाजविण्याची तत्परता ही पादत्राणे घालून तयार
राहा. 16 या सर्व व्यतिरिक्त विश्वासरूपी ढाल घ्या, जिच्याद्वारे तुम्ही
त्या दुष्टाचे अग्निबाण विझवू शकाल. 17 तारणाचे शिरस्त्राण, आणि
आत्म्याची तरवार म्हणजे परमेश्वराचे वचन हे देखील घ्या. 18 सर्वदा
प्रार्थना करा. पवित्र आत्म्यामध्ये प्रत्येक प्रसंगी, सर्वप्रकारच्या प्रार्थनेने
आणि विनवणीने, प्रभूच्या लोकांसाठी जागृत राहून अगत्याने प्रार्थना
करीत राहा. 19 माझ्यासाठी सुद्धा प्रार्थना करा, की जेव्हाही मी बोलेन
तेव्हा मला शब्द सुचावेत, व मी निर्भयपणे शुभवार्तेचे रहस्य स्पष्ट करून
सांगावे. 20 त्यासाठीच मी साखळदंड धारण केलेला राजदूत आहे.
प्रार्थना करा की निर्भयतेने सांगावयास हवे तसे मी ते जाहीर करावे.
21 येथे मी कसा आहे व काय करीत आहे, यासंबंधीची सर्व हकिकत
माझा प्रिय बंधू आणि प्रभूच्या कार्यातील प्रामाणिक सहकारी तुखिक
तुम्हाला सांगेल. 22 आमची खुशाली तुम्हाला समजावी व त्याने तुम्हाला
प्रोत्साहित करावे म्हणून मी त्याला तुमच्याकडे पाठवित आहे. 23 बंधू व
भगिनींना शांती असो आणि परमेश्वर जो पिता आणि प्रभू येशू ख्रिस्त
यांच्याकडून तुम्हाला विश्वासाबरोबर प्रीती प्राप्त होवो! 24 आपल्या प्रभू
येशू ख्रिस्तावर शाश्वत प्रीती करणाऱ्या तुम्हा सर्वांवर कृपा असो.

# फिलिप्पैकरांस

1 ख्रिस्त येशूंचे दास पौल व तीमथ्य, 2 परमेश्वर आपला पिता व प्रभू
येशू ख्रिस्त यांच्याकडून तुम्हास कृपा आणि शांती असो. 3 जेव्हा
मला तुमची आठवण होते त्या प्रत्येक वेळी मी माझ्या परमेश्वराचे आभार
मानतो. 4 आणि आनंदाने माझ्या सर्व प्रार्थनांमध्ये तुमच्या सर्वांसाठी
सतत प्रार्थना करतो 5 कारण पहिल्या दिवसापासून तर आजपर्यंत
शुभवार्तेच्या प्रसारात तुम्ही भागीदार झाला आहात. 6 माझी खात्री
आहे की ज्या परमेश्वराने तुम्हामध्ये चांगले कार्य सुरू केले आहे, त्यास
ते ख्रिस्त येशूंच्या दिवसापर्यंत सिद्धीस नेतील. 7 तुम्हा सर्वांविषयी
असा विचार करणे मला योग्य आहे, कारण माझ्या हृदयात तुम्हाला
स्थान आहे. मी तुरुंगात होतो अथवा शुभवार्तेची पुष्टी करीत व प्रमाण
देत होतो, त्या प्रत्येक वेळी तुम्ही सर्वजण माझ्याबरोबर परमेश्वराच्या
कृपेमध्ये सहभागी झाला होता. 8 ख्रिस्त येशूंच्या ममतेने मी तुम्हासाठी
किती उत्कंठित आहे, याविषयी परमेश्वर साक्षी आहे. 9 आणि ही
माझी प्रार्थना आहे: तुमची प्रीती ही ज्ञानाने व विवेकाच्या खोलीने
अधिकाधिक वाढावी. 10 कारण जे उत्तम आहे ते तुम्हाला ओळखता
यावे व ख्रिस्ताच्या दिवसासाठी तुम्ही शुद्ध व निर्दोष असावे, 11 येशू
ख्रिस्ताद्वारे प्राप्त होणाऱ्या नीतिमत्वाच्या फळांनी भरले जावे व त्याद्वारे
परमेश्वराची स्तुती आणि गौरव व्हावे. 12 आता प्रिय बंधू भगिनींनो, जे
माझ्याबाबतीत घडले त्यामुळे प्रत्यक्ष शुभवार्तेच्या कार्यात वाढ झाली
आहे हे तुम्हाला समजावे अशी माझी इच्छा आहे. 13 याचा परिणाम
असा झाला की, राजवाड्यामध्ये असलेले पहारेकरी आणि प्रत्येकास
हे स्पष्टपणे माहीत झाले आहे की मी ख्रिस्तासाठी बंधनात आहे. 14
आणि माझ्या या बंधनामुळे, येथील बहुतेक बंधू व भगिनींना प्रभूमध्ये
धैर्य प्राप्त झाले आहे आणि ते पहिल्यापेक्षा धैर्याने अधिक निर्भयपणे
शुभवार्ता जाहीर करत आहेत. 15 हे सत्य आहे की, काहीजण हेव्याने
आणि वैरभावाने ख्रिस्ताचा प्रचार करतात, परंतु अन्य काही चांगल्या
उद्देशाने करतात. 16 दुसरे जे आहेत ते प्रीतीमुळे करतात, कारण
शुभवार्तेचे समर्थन करण्यासाठी मी येथे आहे, हे त्यांना ठाऊक आहे. 17
पण पूर्वीचे जे आहेत ते काहीजण ख्रिस्ताचा प्रचार स्वार्थी महत्त्वाकांक्षेने
व अप्रामाणिकपणे करतात, यामुळे येथे मी बंधनात असताना ते माझ्या
दुःखात भर घालतात. 18 परंतु यापासून काय होते? त्यांचे हेतू खरे
असो किंवा खोटे असो, एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्वप्रकारे ख्रिस्ताचा
प्रचार होत आहे आणि त्यातच मी आनंद करणार. होय, त्यातच मी
आनंद करीत राहीन. 19 कारण जे काही मला झाले त्यातून, तुमच्या
प्रार्थनेद्वारे आणि येशू ख्रिस्ताच्या पवित्र आत्म्याच्या पुरवठ्याने माझी
सुटका होईल हे मला माहीत आहे. 20 याची मला खात्री व अपेक्षा आहे
की मी यामुळे लज्जित होऊ नये, तर मला पुरेसे धैर्य प्राप्त व्हावे यासाठी
की जगण्याने किंवा मरणाने, आता आणि सर्वदा, ख्रिस्त माझ्या शरीरात
उंच केला जावा. 21 कारण मला, जगणे हे ख्रिस्त आणि मरणे हे लाभ
आहे! 22 जर मला हे दैहिक जीवन जगायचे आहे, तर ते माझ्यासाठी
श्रमाचे फळ ठरेल. मी काय निवडू? हे मला कळत नाही! 23 मी दोन्ही
गोष्टीसंबंधाने पेचात आहे: कारण येथून जाऊन ख्रिस्तासोबत असावे,
अशी माझी तीव्र इच्छा आहे. तिथे असणे अधिक उत्तम आहे! 24 परंतु
मी शरीरात असणे हे तुमच्यासाठी अधिक आवश्यक आहे. 25 मला
माहीत आहे की, तुमची प्रगती आणि विश्वासातील तुमच्या आनंदासाठी
मी येथे तुम्हाजवळ राहीन. 26 मी तुम्हाला भेटण्यासाठी पुन्हा परत
आलो म्हणजे ख्रिस्त येशूंमधील तुमचा माझ्यासंबंधीचा अभिमान भरून
वाहू लागेल. 27 पण काहीही झाले, तरी ख्रिस्ताच्या शुभवार्तेला साजेल
असे तुमचे आचरण ठेवा, म्हणजे मी तुम्हाला पुन्हा येऊन भेटलो अथवा
माझ्या अनुपस्थितीत मला तुमच्याबद्दल असे ऐकावयास यावे की तुम्ही
एका आत्म्यात स्थिर आहात व विश्वासाच्या शुभवार्तेमध्ये एकत्र झटत
आहात, 28 पण तुमचे जे विरोधी आहेत त्यांना न घाबरता तुम्ही उभे
आहात. कारण त्यांचा नाश हे त्यांना चिन्ह आहे, परंतु तुमचा उद्धार
होईल व तोही परमेश्वराद्वारे होईल. 29 केवळ ख्रिस्तावर विश्वास ठेवावा,
एवढेच नव्हे, तर त्यांच्यासाठी दुःखही सहन करावे हे दान तुम्हाला
देण्यात आले आहे. 30 पूर्वी मी कसे दुःख सहन केले, हे तुम्ही पाहिलेच
आहे व जे मी आता सहन करीत आहे तेही तुम्ही आता ऐकत आहात, व
तेच दुःख तुम्हीही आता सहन करीत आहात.

2 यास्तव ख्रिस्ताच्या ठायी ऐक्यता असल्यामुळे काही उत्तेजन,
त्यांच्या प्रीतीचे काही सांत्वन, आत्म्याची काही सहभागिता, जर
काही करुणा व कळवळा आहे, 2 तर तुम्ही एकमेकांशी सहमत
होणारे, सारखीच प्रीती करणारे आणि एका आत्म्याचे व एकमनाचे
होऊन माझा आनंद परिपूर्ण करा. 3 स्वार्थी महत्त्वाकांक्षा, किंवा बढाई
मारण्याच्या हेतूंनी तुम्ही काहीही करू नये, तर प्रत्येकाने नम्रतेने इतरांना
आपल्यापेक्षा अधिक श्रेष्ठ मानावे. 4 तुम्ही केवळ स्वतःचेच हित नव्हे, तर
इतरांचेही हित पाहावे. 5 ख्रिस्त येशूंमध्ये जी मनोवृत्ती होती, तीच वृत्ती
तुम्ही एकमेकांच्या संबंधात बाळगा: 6 ते खुद्द परमेश्वराच्या स्वरुपाचे
असूनही त्यांनी स्वतःस परमेश्वरासमान केले नाही व परमेश्वरासम
असण्याचा लाभ त्यांनी घेतला नाही; 7 उलट, त्यांनी स्वतःला रिक्त केले
आणि दासाचे स्वरूप घेऊन, मनुष्यांच्या प्रतिरूपाचे झाले. 8 मानवी रूप
धारण करून त्यांनी स्वतःस लीन केले, येथपर्यंत की आज्ञापालन करून
ते मरावयास, आणि तेही क्रूसावरील मरण पत्करण्यास तयार झाले. 9
म्हणून परमेश्वराने त्यांना अत्युच्च स्थानी ठेवले आणि सर्व नावांपेक्षा जे
श्रेष्ठ नाव ते त्यांना दिले; 10 यासाठी की येशूंच्या नावाने प्रत्येक गुडघा
टेकला जावा, स्वर्गात, पृथ्वीवर आणि पृथ्वीच्या खाली, 11 परमेश्वर
पित्याच्या गौरवासाठी प्रत्येक जीभ कबूल करेल की येशू ख्रिस्त हेच
प्रभू आहेत. 12 यास्तव, प्रिय मित्रांनो, मी तिथे तुम्हाबरोबर असताना
आणि याहीपेक्षा माझ्या अनुपस्थितीत तुम्ही नेहमीच आज्ञापालन केले
आहे, म्हणून तुमच्या तारणाचे कार्य भयात व कापत साधून घ्या.
13 कारण परमेश्वर आहेत, की ज्यांनी आपल्या उत्तम योजनेसाठी
तुमच्यामध्ये इच्छा करणे व कृती करणे साधले आहे. 14 जे काही
कराल ते सर्व कुरकुर व वादविवाद न करता करा, 15 म्हणजे, “तुम्ही

या दुष्ट आणि कुटिल आणि हेकेखोर पिढीत दोषरहित व शुद्ध राहून
परमेश्वराची लेकरे” म्हणून त्यांच्यामध्ये आकाशातील ताऱ्यांप्रमाणे
चमकाल. 16 तुम्ही जीवनाचे वचन मजबूत धरून ठेवले आहे म्हणून
ख्रिस्ताच्या दिवशी माझी धाव व श्रम व्यर्थ झाले नाही याचा मला
अभिमान बाळगता येईल. 17 तुमच्या विश्वासाची सेवा आणि यज्ञ
यावर मी स्वतः पेयार्पण म्हणून अर्पण केला जात आहे तरी मीही
तुमच्याबरोबर आनंद करेन. 18 त्याचप्रमाणे तुम्हीही उल्हासित व्हावे
आणि माझ्याबरोबर आनंद करावा. 19 मला प्रभू येशूंमध्ये आशा आहे
की, मी लवकरच तीमथ्याला तुमच्याकडे पाठवेन; म्हणजे तुमची बातमी
ऐकून मीही उल्हासित होईन. 20 तुमचा खरा हितचिंतक तीमथ्यासारखा
दुसरा कोणी नाही. 21 इतर प्रत्येकजण स्वतःच्या फायद्याच्या गोष्टी
पाहतात, येशू ख्रिस्ताच्या नाही. 22 शुभवार्तेच्या कार्यात तीमथ्याने मला
जसा पुत्र आपल्या पित्यास करतो, तसे साहाय्य करून स्वतःस सिद्ध
केले हे तुम्हाला माहीत आहे. 23 माझ्या सर्वगोष्टी व्यवस्थित होताच,
त्याला तुमच्याकडे लवकर पाठविता येईल अशी मला आशा आहे; 24
आणि मीही स्वतः लवकर येईन, असा प्रभूवर माझा भरवसा आहे.
25 मध्यंतरी मला वाटले की मी एपफ्रदीत हा माझा भाऊ, सहकारी,
सहसैनिक आणि तुमचा संदेशवाहक याला तुमच्याकडे परत पाठवावे.
माझ्या गरजेच्यावेळी मला साहाय्य करण्यासाठी तुम्ही त्याला पाठविले
होते. 26 कारण त्याच्या आजाराची वार्ता तुम्ही ऐकली म्हणून तुम्हा
सर्वांना भेटावयास तो उत्सुक व चिंताक्रांत झालेला आहे; 27 आणि
खरोखरच तो आजारी पडला, अंदाजे मरणोन्मुख झाला होता, पण
परमेश्वराने त्याच्यावर आणि माझ्यावरही दया करून मला दुःखावर
दुःख होण्यापासून वाचविले. 28 म्हणूनच त्याला तुमच्याकडे परत
पाठविण्यास मी अधिकच उत्सुक आहे. कारण त्याला पाहून तुम्हाला
आनंद वाटेल आणि माझी चिंताही कमी होईल. 29 प्रभूमध्ये मोठ्या
आनंदाने त्याचे स्वागत करून त्याच्यासारख्यांचा सत्कार करा. 30
कारण ख्रिस्ताच्या सेवेसाठी त्याने आपला जीव धोक्यात घातला व
त्याला अंदाजे मरण आलेच होते, माझ्यासाठी तुम्हाला ज्यागोष्टी करता
आल्या नाहीत त्या त्याने केल्या.

**3** बंधू व भगिनींनो, प्रभूमध्ये आनंद करा. त्याच गोष्टी तुम्हाला पुन्हा
लिहिण्याचा मला त्रास होत नाही आणि हे तुमच्या संरक्षणासाठी
आहे. 2 त्या कुत्र्यांपासून, दुष्ट कृत्ये करणारे, देहाची विच्छिन्नता
करणाऱ्यांपासून सावध राहावे. 3 कारण वास्तविक सुंता झालेले
आपणच आहोत आणि जे आपणही आत्म्याद्वारे परमेश्वराची सेवा करतो
व ख्रिस्त येशूंमध्ये अभिमान बाळगतो आणि देहावर भरवसा ठेवत
नाही. 4 तरी देखील मला देहावर भरवसा ठेवण्यास कारणे आहेत. जर
काहींना वाटते की त्यांना देहावर भरवसा ठेवण्यास कारणे आहेत, तर
मला अधिक आहेत. 5 मी आठव्या दिवशी सुंता झालेला, इस्राएली
लोकातील, बन्यामीन वंशातील, इब्र्यांचा इब्री; नियमशास्त्रानुसार परूशी
असा होतो; 6 आणि आवेशाविषयी म्हणाल तर मंडळीचा छळ करणारा;
नियमशास्त्रातील नीतिमत्वाविषयी दोषरहित होतो. 7 परंतु जो काही
मला लाभ होतो, तो सर्व मी ख्रिस्तासाठी हानी समजलो आहे. 8
यापेक्षाही अधिक, ख्रिस्त येशू माझे प्रभू, यांच्या सर्वश्रेष्ठ ज्ञानासाठी
मी सर्वकाही हानी असे समजतो व त्यासाठी मी सर्वगोष्टी गमावल्या
आहेत व मी त्या कचऱ्यासमान लेखतो यासाठी की ख्रिस्त मला प्राप्त
व्हावे. 9 आणि मी त्यांच्यामध्ये सापडावे आणि नियमांद्वारे प्राप्त होणारे
नीतिमत्व नव्हे, परंतु ख्रिस्तामधील विश्वासाने प्राप्त होणारे नीतिमत्व
परमेश्वरावरील विश्वासाने प्राप्त होते. 10 मी ख्रिस्ताला आणि त्यांच्या
पुनरुत्थानाचे सामर्थ्य, व त्यांच्या दुःखसहनाची सहभागिता जाणून
त्यांच्या मृत्यूशी अनुरूप व्हावे. 11 आणि कसेही करून मी मृतांमधून
पुनरुत्थान प्राप्त करून घ्यावे. 12 मी सर्वकाही मिळविले किंवा माझ्या
ध्येयाप्रत पोहोचलो आहे असे नाही, परंतु ते आपलेसे करण्यासाठी व
घट्ट धरून ठेवण्यासाठी मी नेटाने पुढे जात आहे. कारण मला ख्रिस्त
येशूंनी पकडून ठेवले आहे. 13 बंधू व भगिनींनो, मी अजूनही ते प्राप्त
केलेले नाही, परंतु मी एक गोष्ट करतो: मागील गोष्टींकडे दुर्लक्ष करून
पुढील गोष्टींकडे नेटाने लक्ष लावतो. 14 ख्रिस्त येशूंमध्ये परमेश्वराच्या
स्वर्गीय पाचारणासंबंधीचे पारितोषिक जिंकण्यासाठी मी त्या लक्ष्याकडे
धावत आहे. 15 आपण जे सर्व परिपक्व आहोत त्यांनीही हाच भाव
ठेवावा. जर एखाद्या गोष्टीसंबंधाने तुमचे विचार वेगळे असतील तर
परमेश्वर ती गोष्ट तुम्हाला स्पष्ट करतील. 16 जसे येथवर आपण
पोहोचलो आहोत त्याप्रमाणे चालत राहावे. 17 प्रिय बंधू व भगिनींनो,
माझे अनुकरण करणारे व्हा, जसा आम्ही तुम्हाला कित्ता घालून दिला
त्याप्रमाणे जे चालतात त्यांच्याकडे लक्ष द्या. 18 कारण मी हे पूर्वी
तुम्हाला सांगितले आणि आताही रडत सांगतो की अनेक लोक असे
जगतात जसे ते ख्रिस्ताच्या क्रूसखांबाचे शत्रू आहेत. 19 त्यांचा शेवट तर
विनाश आहे, कारण पोट हेच त्यांचे दैवत आहे; निर्लज्जपणा त्यांचे
गौरव आहे आणि त्यांचे मन भौतिक गोष्टींकडे लागलेले आहे. 20 परंतु
आपले नागरिकत्व तर स्वर्गीय आहे आणि तिथून आपला तारणारा प्रभू
येशू ख्रिस्त यांच्या परतण्याची आपण आतुरतेने वाट पाहत आहोत. 21
जे त्या सामर्थ्याद्वारे सर्वकाही त्यांच्या नियंत्रणात ठेवण्यास समर्थ आहे,
ते आपली अशक्त शरीरे घेऊन व त्यांचे रूपांतर करून ती स्वतःच्या
शरीरासारखी गौरवशाली शरीरे करतील.

**4** यास्तव, बंधू व भगिनींनो, जो मी तुम्हावर प्रीती करतो व तुम्हाला
भेटावयास उत्कंठित आहे व जे तुम्ही माझा आनंद, मुकुट आहात,
प्रभूमध्ये अशाप्रकारे स्थिर राहा. 2 मी युवदीयेला विनंती करतो व
सुंतुखेस विनंती करतो की प्रभूमध्ये एकमनाचे व्हा. 3 होय, माझ्या
जिवलग मित्रा, मी तुलाही विनवितो की या भगिनींना साहाय्य कर;
कारण शुभवार्तेसाठी माझ्या बरोबरीने, तसेच क्लेमेंत आणि ज्यांची
नावे जीवनाच्या पुस्तकात आहेत, अशा माझ्या इतर सहकाऱ्यांबरोबर
देखील त्यांनी श्रम केले आहेत. 4 प्रभूमध्ये सर्वदा आनंद करा. मी
पुन्हा सांगतो आनंद करा. 5 तुमची सौम्यता प्रत्येकाला दिसून येऊ द्या.
प्रभू समीप आहेत. 6 कशाविषयीही चिंताक्रांत होऊ नका, तर सर्व
परिस्थितीत, प्रार्थना व विनवणी करीत, उपकारस्तुतीसह आपल्या

मागण्या परमेश्वराला कळवा. 7 आणि परमेश्वराची शांती, जी आपल्या
सर्व बुद्धीच्या पलीकडे आहे, ती तुमचे विचार आणि तुमची मने ख्रिस्त
येशूंमध्ये राखील. 8 शेवटी, बंधू आणि भगिनींनो, जे काही सत्य, जे
काही आदरणीय व जे काही न्याय्य, जे काही शुद्ध, जे काही सुंदर,
जे काही प्रशंसनीय, श्रवणीय आणि स्तुतिपात्र आहे त्याचा विचार
करा. 9 माझ्यापासून तुम्ही जे सर्वकाही शिकला किंवा स्वीकारले किंवा
ऐकले, किंवा मजमध्ये पाहिले त्यानुसार आचरण करा आणि शांती
देणारे परमेश्वर तुम्हाबरोबर राहतील. 10 मी प्रभूमध्ये स्तुती करतो की
शेवटी तुम्हाला माझ्याविषयीची पुन्हा काळजी उत्पन्न झाली. तुम्ही
खरोखर काळजी करीत होता हे मला माहीत आहे, पण ते तुम्हाला प्रकट
करण्याची संधी मिळाली नाही. 11 मला गरज आहे म्हणून मी हे बोलतो
असे नाही, कारण कोणत्याही परिस्थितीत समाधानी राहण्यास मी
शिकलो आहे. 12 मला गरजेमध्ये राहणे, विपुलतेमध्ये राहणे हे माहीत
आहे. कोणत्याही परिस्थितीत व प्रत्येक परिस्थितीत भरल्यापोटी अथवा
भुकेला, संपन्नतेत किंवा विपन्नतेत, समाधानी कसे राहावे हे मला
माहीत आहे. 13 जे मला शक्ती देतात त्यांच्याद्वारे सर्वकाही करण्यास मी
समर्थ आहे. 14 तरीही तुम्ही माझ्या दुःखात सहभागी झाला हे योग्य
केले. 15 फिलिप्पैकरांनो, तुम्हाला हे माहीत आहे की, शुभवार्तेच्या
प्रारंभीच्या दिवसात मी मासेदोनियामधून गेलो, तेव्हा देण्याघेण्यामध्ये
केवळ तुमच्याशिवाय कोणत्याच मंडळीने माझ्याशी भागीदारी केली
नाही. 16 मी थेस्सलनीका येथे गरजेत असताना, तुम्ही मला एकदाच
नव्हे तर दोनदा मदत पाठविली. 17 मला तुमची देणगी पाहिजे असे
नाही, तर तुमच्या हिशेबी मोबदला वाढावा किंवा तुम्हाला लाभ व्हावा
अशी मी अपेक्षा करतो. 18 मजजवळ सर्वकाही आहे आणि ते भरपूर
प्रमाणात आहे! एपफ्रदीत आला, तेव्हा त्याच्याबरोबर पाठविलेल्या
देणग्यांमुळे मी अगदी भरून गेलो आहे. त्या देणग्या म्हणजे परमेश्वराला
मान्य, संतोष देणारा सुगंधी यज्ञच आहेत. 19 त्यामुळे परमेश्वर स्वतः
ख्रिस्त येशूंमध्ये तुमच्या सर्व गरजा आपल्या गौरवी संपत्तीतून पुरवतील.
20 खरोखर, आता परमेश्वर जे आपला पिता त्यांना सदासर्वकाळ गौरव
असो. आमेन. **(aiōn g165)** 21 तेथील सर्व पवित्र लोकांना ख्रिस्त
येशूंमध्ये माझी विचारणा सांगा. माझ्याबरोबर असलेले बंधू व भगिनी
देखील तुम्हाला आपल्या शुभेच्छा पाठवितात. 22 आणि येथील सर्व
परमेश्वराचे लोक, विशेषकरून जे कैसराच्या कुटुंबातील आहेत, तुम्हा
सर्वांना आपल्या शुभेच्छा पाठवितात. 23 आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताची
कृपा तुमच्या आत्म्यासोबत असो. आमेन.

# कलस्सैकरांस

1 परमेश्वराच्या इच्छेने ख्रिस्त येशूंचा प्रेषित झालेला पौल व बंधू तीमथ्य
यांच्याकडून, 2 कलस्सै शहरातील पवित्र लोक व ख्रिस्तामधील
विश्वासू बंधू व भगिनीस, 3 आम्ही तुम्हासाठी प्रार्थना करतो त्यावेळी
परमेश्वराचे, आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या पित्याचे सतत आभार मानतो,
4 कारण ख्रिस्त येशूंमध्ये असलेला तुमचा विश्वास, आणि परमेश्वराच्या
सर्व लोकांवर असलेली तुमची प्रीती याबद्दल आम्ही ऐकले आहे. 5
विश्वास व प्रीती यामुळे निर्माण होणारी आशा जी स्वर्गात तुम्हासाठी
राखून ठेवली आहे व ज्याबद्दल तुम्ही शुभवार्तेच्या सत्याचा संदेश
आधी ऐकला आहे, 6 ज्या दिवसापासून तुम्ही ती शुभवार्ता ऐकली
व परमेश्वराची कृपा तुम्हाला त्याद्वारे समजून आली व तुमच्यामध्येही
ती वाढत आहे, त्याचप्रमाणे ती आता जगभर वृद्धिंगत होऊन फळ
देत आहे. 7 आमचा अतिप्रिय सहकारी एपफ्रास याच्याकडून तुम्ही
शिकला, तो आमच्यावतीने ख्रिस्ताचा विश्वासू सेवक आहे. 8 पवित्र
आत्म्यामध्ये तुमची प्रीती याबद्दलही त्यानेच आम्हाला सांगितले. 9
म्हणूनच आम्ही ज्या दिवशी तुमच्याविषयी ऐकले, तुमच्यासाठी प्रार्थना
करण्याचे थांबविले नाही. आम्ही परमेश्वराजवळ सतत मागतो की
त्यांनी तुम्हाला आत्म्याद्वारे दिले जाणारे सर्व ज्ञान व समज यांच्याद्वारे
त्यांच्या इच्छेच्या ज्ञानाने भरावे; 10 त्यामुळे प्रभूला आवडेल असे
योग्य जीवन तुम्ही जगावे व प्रत्येक बाबतीत त्यांना प्रसन्न करावे.
चांगल्या कृत्यांद्वारे फळ देणारे, परमेश्वराच्या ज्ञानात वाढणारे, 11 धीर
व सहनशक्ती ही अधिक रीतीने तुम्हाला प्राप्त व्हावी म्हणून त्यांच्या
गौरवाच्या पराक्रमानुसार तुम्ही सर्वप्रकारच्या सामर्थ्याने समर्थ व्हावे
आणि आनंदाने 12 त्या पित्याचे आभार मानणारे व्हा, ज्यांनी प्रकाशाच्या
राज्यामध्ये असलेल्या पवित्र लोकांच्या वतनामध्ये सहभागी होण्यासाठी
तुम्हाला पात्र ठरविले आहे. 13 कारण अंधकाराच्या सत्तेतून सोडवून
त्यांनी आपल्याला त्यांच्या प्रिय पुत्राच्या राज्यात आणले आहे, 14
त्यांच्यामध्ये आपणास खंडणी, अर्थात् पापांची क्षमा मिळाली आहे.
15 त्यांचा पुत्र हे अदृश्य परमेश्वराची प्रतिमा आहेत, सर्व सृष्टीत प्रथम
जन्मलेले आहेत. 16 त्यांच्यामध्ये सर्वगोष्टी निर्माण झाल्या: स्वर्गातील
गोष्टी आणि पृथ्वीवरील, दृश्य आणि अदृश्य, मग ती सिंहासने किंवा
अधिपत्य किंवा शासक किंवा अधिकारी असोत, प्रत्येक गोष्ट त्यांच्याद्वारे
व त्यांच्यासाठी निर्माण करण्यात आली आहे. 17 ते सर्व गोष्टींच्या
पूर्वी आहेत आणि त्यांच्यामध्ये सर्वगोष्टी स्थिर राहतात, 18 आणि ते
शरीराचे म्हणजे मंडळीचे मस्तक आहेत, तेच प्रारंभ आहेत; आणि तेच
मेलेल्यामधून प्रथम जन्मलेले आहेत, यासाठी की ते प्रत्येक गोष्टींमध्ये
त्यांनी सर्वश्रेष्ठ असावे. 19 कारण परमेश्वराची प्रसन्नता यामध्येच
होती की, त्यांची सर्व परिपूर्णता येशूंच्या ठायी वसावी, 20 आणि
त्यांच्या क्रूसावरील सांडलेल्या रक्ताद्वारे शांती प्रस्थापित करून स्वर्गात
व पृथ्वीवरील सर्व गोष्टींचा त्यांच्याद्वारे समेट व्हावा. 21 एकेकाळी तुम्ही
परमेश्वराला परके होता आणि वाईट कृत्यामुळे मनाने त्यांचे शत्रू झाला
होता. 22 परंतु आता त्यांनी ख्रिस्ताच्या भौतिक शरीराच्या मरणाद्वारे,
तुमचा त्यांच्याशी समेट केला आहे, यासाठी की तुम्हाला त्यांच्या दृष्टीने
पवित्र आणि निष्कलंक दोषरहित सादर करावे; 23 जर तुम्ही तुमच्या
विश्वासात दृढ व त्या शुभवार्तेमधील आशेपासून तुम्ही ढळला नाही तर
स्थिर राहाल. जी शुभवार्ता तुम्ही ऐकली होती आणि जिची घोषणा
जाहीरपणे आकाशाखाली प्रत्येक व्यक्तीला करण्यात आली होती,
मी पौल, त्या शुभवार्तेचा सेवक झालो आहे. 24 आता तुमच्यासाठी
दुःख सहन करण्यात मला आनंद आहे; कारण ख्रिस्ताने, त्यांचे शरीर
म्हणजे मंडळी हिच्याकरिता सोसलेल्या दुःखातले जे अद्यापि अपूर्ण
राहिलेले आहे, ते मी माझ्या शरीरामध्ये भरून काढत आहे. 25 तुम्हाला
परमेश्वराचे वचन पूर्णतेने कळावे व ते सादर करता यावे म्हणून मी तिचा
सेवक झालो असून माझी नेमणूक करण्यात आली आहे. 26 त्यांनी जे
रहस्य युगानुयुग व पिढ्यान् पिढ्या गुप्त ठेवले होते, परंतु आता ते
प्रभूच्या लोकांना प्रकट केले आहे. (aiōn g165) 27 त्यांना परमेश्वराने
यासाठी निवडले की, त्यांच्या गौरवाच्या संपत्तीचे रहस्य, म्हणजे तुमच्या
गौरवाची आशा, जे ख्रिस्त तुम्हामध्ये आहेत, त्यांना गैरयहूद्यांमध्ये प्रकट
करावे. 28 ते हेच आहे ज्याची आम्ही घोषणा करतो व बोध करून ज्ञानाने
प्रत्येकास शिकवितो, यासाठी की प्रत्येकाला ख्रिस्तामध्ये परिपक्व असे
सादर करावे. 29 त्यांचे जे सामर्थ्य मजमध्ये अतिशय प्रबळरीत्या कार्य
करते, त्यानुसार मी झटून परिश्रम करीत आहे.

2 तुमच्यासाठी आणि लावदिकीया रहिवाशांसाठी, आणि ज्या सर्वांशी
माझी वैयक्तिक भेट झाली नाही अशांसाठी, मी किती झटून श्रम
करीत आहे हे तुम्हाला समजावे. 2 माझा उद्देश हाच आहे की त्यांच्या
अंतःकरणास उत्तेजन मिळून ते प्रेमाने बांधले जावे, आणि त्यांना
विपुलतेने पूर्ण ज्ञान प्राप्त व्हावे, यासाठी की परमेश्वराची गुप्त योजना
ख्रिस्त हे त्यांना समजावे, 3 आणि त्यांच्यामधेच सर्व बुद्धीची व ज्ञानाची
भांडारे गुप्त ठेवलेली आहेत. 4 हे मी तुम्हाला यासाठी सांगत आहे की
प्रलोभन देणाऱ्या भाषणाने कोणी तुम्हाला फसवू नये. 5 कारण जरी
मी शरीराने दूर असलो, तरी आत्म्याने तुम्हाजवळ हजर आहे. तुम्ही
शिस्तबद्ध आहात व ख्रिस्तावर तुमचा दृढविश्वास आहे, यात मी आनंद
मानतो. 6 तर जसे, तुम्ही ख्रिस्त येशूंना प्रभू म्हणून स्वीकारले तसेच
त्यांच्यामध्ये आपले जीवन जगत राहा. 7 त्यांच्यामध्ये मुळावलेले,
बांधलेले, तुम्हाला शिकविलेल्या विश्वासात मजबूत असलेले आणि
उपकारस्तुतीने भरून वाहणारे असा. 8 हे लक्षात असू द्या की पोकळ
व फसवे तत्वज्ञान जे ख्रिस्तावर नव्हे तर मानवी परंपरा आणि ऐहिक
तत्वांवर आधारित आहे, याद्वारे कोणी तुम्हाला बंधनात पाडू नये म्हणून
जपा. 9 कारण ख्रिस्ताच्या ठायी दैवत्वाची सर्व परिपूर्णता शरीररूपाने
राहते; 10 आणि ख्रिस्तामध्ये तुम्ही परिपूर्ण केलेले आहात. ते सर्व
सामर्थ्य आणि अधिकार यांचे मस्तक आहेत. 11 त्यांच्यामध्ये तुमची
सुंता झाली आहे, मानवी हाताने केलेली नव्हे तर, ख्रिस्ताद्वारे तुमची
जी सुंता झाली आहे त्याद्वारे तुमचा दैहिक पापी मूळस्वभाव काढून
टाकण्यात आला आहे. 12 कारण तुम्ही बाप्तिस्म्यामध्ये त्यांच्यासह

पुरला गेलात व ज्यांना त्यांनी मरणातून उठविले यांच्याबरोबर तुम्हीही
परमेश्वराच्या कृतीवरील विश्वासाद्वारे उठविण्यात आले आहात. 13 जेव्हा
तुम्ही स्वतःच्या पातकांमध्ये व शारीरिक असुंतेमध्ये मृत होता, त्यावेळी
परमेश्वराने ख्रिस्तामध्ये तुम्हाला जिवंत केले आणि आपल्या सर्व
पातकांची क्षमा केली. 14 आपल्याविरुद्ध असलेले व आपल्याला आरोपी
ठरविणारे विधिलेख, त्यांनी आम्हापासून दूर करून क्रूसावर खिळयांनी
ठोकून कायमचे रद्द केले, 15 आणि सत्तांना आणि अधिकारांना हाणून
पाडले व त्यांचे उघड प्रदर्शन करून क्रूसाद्वारे त्यांच्यावर विजय संपादन
केला. 16 तेव्हा खाणेपिणे, किंवा धार्मिक सण, किंवा नवा चंद्रोत्सव
किंवा शब्बाथ, याविषयी कोणालाही तुमचा न्याय करू देऊ नका. 17 हे
सर्व केवळ येणाऱ्या गोष्टींची छाया असे आहेत, पण खरी वास्तविकता
ख्रिस्तामध्ये सापडते. 18 जो कोणी व्यर्थ नम्रतेचा देखावा करण्यात
संतोष पावतो आणि देवदूतांची उपासना करतो, त्यांनी तुम्हाला अपात्र
ठरवू नये. असा मनुष्य पाहिलेल्या गोष्टींचे विस्तारपूर्वक वर्णन करतो
आणि दैहिक विचारांनी, आत्मिक नसलेल्या हृदयाने उगीचच फुगून
जातो. 19 त्या लोकांचा त्यांच्या मस्तकाशी संबंध तुटला आहे, ज्या
मस्तकाला संपूर्ण शरीर बळकटपणे एकत्रित जोडले जाते, सांधे व बंधने
त्यांच्यापासून पुरवठा पावते व त्याची परमेश्वरामध्ये वाढ होते. 20 तुम्ही
ख्रिस्ताबरोबर जगाच्या प्राथमिक तत्वज्ञानास मरण पावलेले आहात, तरी
देखील तुम्ही जणू काय जगाशी जोडलेले आहात व त्याच्या नियमांच्या
अधीन आहात. 21 “हात लावू नको! चव घेऊ नको! स्पर्श करू नको!”
22 हे नियम मानवी शिकवण व आज्ञा यावर आधारित आहेत, ते वारंवार
उपयोगात आणल्यामुळे नष्ट होणे स्वाभाविक आहे. 23 खरोखर या
नियमांना ज्ञानाचा देखावा आहे, स्वनियमाने नेमलेली उपासना, खोटी
नम्रता आणि देहाला कठोर कष्ट देणे या गोष्टी आहेत. परंतु दैहिक वासना
नियंत्रणात ठेवण्यासाठी या नियमांचा काडी इतकाही उपयोग होत
नाही.

**3** यास्तव, ख्रिस्ताबरोबर तुम्ही उठविले गेला आहात, तर जिथे
ख्रिस्त परमेश्वराच्या उजवीकडे बसले आहे, तेथील वरील गोष्टींकडे
आपली मने लावा. 2 तुम्ही आपली अंतःकरणे स्वर्गीय गोष्टींकडे लावा,
पृथ्वीवरील गोष्टींकडे लावू नका. 3 कारण तुम्ही मृत असून, आता तुमचे
जीवन ख्रिस्ताबरोबर परमेश्वरामध्ये गुप्त ठेवलेले आहे. 4 ख्रिस्त जे
आपले जीवन आहेत, ते प्रकट होतील, तेव्हा तुम्हीही त्यांच्याबरोबर
गौरवात प्रकट व्हाल. 5 म्हणून आपल्यातील ऐहिक स्वभाव कायमचा
ठार करा: जसे लैंगिक अनैतिकता, अशुद्धता, कामवासना, दुष्ट इच्छा
आणि लोभ जी मूर्तिपूजा आहे. 6 यामुळे परमेश्वराचा क्रोध येणार आहे.
7 पूर्वी तुम्हीही याप्रकारे चालत होता व असेच जीवन जगत होता. 8
परंतु आता तुम्ही संताप आणि राग, दुष्टभाव, निंदा, मुखातून शिवीगाळी
करणे हे सर्व आपल्यापासून दूर करा. 9 एकमेकांशी लबाडी करू
नका, कारण तुमचा जुना मनुष्य त्याच्या कृतींसह तुम्ही काढून टाकला
आहे. 10 तुम्ही आता नवा मनुष्य धारण केला आहे, जो आपल्या
उत्पन्न करणाऱ्याच्या प्रतिमेमध्ये, ज्ञानामध्ये नवा होत आहे. 11 यामध्ये
गैरयहूदी किंवा यहूदी, सुंती किंवा असुंती, बर्बर व स्कुथी, गुलाम किंवा
स्वतंत्र असा फरक नाही, परंतु ख्रिस्तच सर्व आणि सर्वात आहेत. 12
यास्तव, परमेश्वराचे निवडलेले लोक, पवित्र आणि अतिप्रिय या नात्याने
करुणा, दया, लीनता, सौम्यता आणि सहनशीलता ही परिधान करा. 13
एकमेकांचे सहन करा, जर कोणाची एखाद्याविरुद्ध काही तक्रार असेल
तर जशी प्रभूने तुम्हाला क्षमा केली तशी तुम्हीही एकमेकांना क्षमा करा.
14 आणि या सर्व सद्गुणांपेक्षा प्रीती धारण करा कारण त्यामुळे तुम्ही
सर्वजण प्रीतीमध्ये एकत्र बांधले जाल. 15 ख्रिस्ताची शांती, तुमच्या
अंतःकरणात राज्य करो; कारण एकाच शरीराचे अवयव म्हणून तुम्हीही
या शांतीसाठी बोलावलेले आहात. तुम्ही कृतज्ञ राहा. 16 स्तोत्रे, गाणी
आणि आत्मिक गीते, यांच्याद्वारे कृतज्ञ अंतःकरणातून परमेश्वराला
गाणी गाऊन एकमेकांना पूर्ण सज्ञानाने शिकविताना आणि बोध देताना
ख्रिस्ताचा संदेश तुम्हामध्ये विपुलतेने राहो. 17 आणि जी काही कृती
तुम्ही कराल व जे बोलाल, ते सर्व आपला प्रभू येशू ख्रिस्त यांच्या नावाने
आणि त्यांच्याद्वारे परमेश्वर जो पिता त्यांची उपकारस्तुती करा. 18
पत्नींनो, जसे प्रभूला योग्य तसे तुम्ही तुमच्या पतीच्या अधीन असा. 19
पतींनो, तुम्हीही आपल्या पत्नीवर प्रीती करा, व तिच्याशी कठोरतेने वागू
नका. 20 लेकरांनो, तुम्ही सर्व गोष्टीत आपल्या आईवडिलांची आज्ञा
पाळा, कारण त्यामुळे प्रभूला संतोष होतो. 21 वडिलांनो, तुम्ही आपल्या
मुलांना प्रकोपित करू नका, नाही तर त्यांचे धैर्य खचेल. 22 दासांनो,
तुम्ही पृथ्वीवरील आपल्या धन्यांचे प्रत्येक गोष्टीत आज्ञापालन करा,
केवळ त्यांची नजर तुमच्यावर असतानाच त्यांची कृपादृष्टी व्हावी म्हणून
नाही, तर सत्य मनाने प्रभूचे भय बाळगून करा. 23 जे काही तुम्ही
करता, ते पूर्ण मनाने करा, मनुष्यांसाठी नव्हे, तर प्रभूसाठी म्हणून करा.
24 हे तुम्हाला माहीत आहे की, प्रभूपासून तुम्हाला वारसा हे प्रतिफळ
म्हणून मिळेल. तुम्ही प्रभू ख्रिस्ताची सेवा करीत आहात. 25 अन्याय
करणाऱ्यास त्याच्या अन्यायाचे प्रतिफळ मिळेल, पक्षपात होणार नाही.

**4** धन्यांनो, तुम्ही तुमच्या दासांना जे उचित व योग्य ते द्या; कारण
तुम्हाला माहीत आहे की तुम्हालासुद्धा स्वर्गात स्वामी आहे. 2
जागृत राहून आणि उपकारस्तुतीसह प्रार्थनेत तत्पर राहा. 3 ख्रिस्ताच्या
रहस्याची घोषणा आम्हाला करता यावी याकरिता परमेश्वराने आमच्या
संदेशासाठी दार उघडावे म्हणूनही प्रार्थना करा. त्याचकरिता मी या
बंधनात आहे. 4 ती जशी स्पष्टपणे सांगितली पाहिजे, तशी मला सांगता
यावी, म्हणून प्रार्थना करा. 5 बाहेरील लोकांबरोबर सुज्ञतेने वागा; आणि
प्रत्येक संधीचा उपयोग करून घ्या. 6 तुमचे संभाषण सर्वदा कृपेने
भरलेले, मिठाने रुचकर केल्यासारखे असावे, म्हणजे प्रत्येकाला कसे
उत्तर द्यावे हे तुम्हाला कळेल. 7 तुखिक माझे सर्व वर्तमान तुम्हाला
सांगेल. तो माझा प्रिय बंधू आणि प्रभूच्या कार्यातील प्रामाणिक सहकारी
आहे. 8 मी त्याला याच हेतूने पाठवित आहे की त्याद्वारे तुम्हाला आमची
खुशाली तुम्हाला समजावी व त्याने तुमच्या हृदयास प्रोत्साहित करावे.
9 विश्वासू व अतिप्रिय बंधू अनेसिम, तुम्हामधील एक, यालाही मी
तुम्हाकडे पाठवित आहे. तो व तुखिक तुम्हाला येथील सर्व अद्यावत

बातम्या देतील. 10 माझ्याबरोबर येथे बंदिवान असलेला अरिस्तार्ख, तसेच बर्णबाचा नातेवाईक मार्कही तुम्हाला आपली शुभेच्छा पाठवितात. मी पूर्वी सूचना दिल्याप्रमाणे मार्क कधी तुमच्याकडे आला, तर त्याचे मनापासून स्वागत करा. 11 येशू म्हटलेला यूस्त देखील आपली शुभेच्छा पाठवित आहे. परमेश्वराच्या राज्यासाठी हेच तेवढे यहूदी येथे माझे सहकारी आहेत आणि ते माझ्या सांत्वनाचे कारण झाले आहेत. 12 जो तुमच्यातील एक आणि ख्रिस्त येशूंचा दास, एपफ्रास, तुम्हाला शुभेच्छा पाठवितो. तो तुमच्यासाठी नेहमी झटून प्रार्थना करून परमेश्वराजवळ मागतो, की परमेश्वराच्या इच्छेमध्ये तुम्ही परिपक्व व पूर्ण खात्री झालेले असे स्थिर उभे राहावे. 13 मी साक्ष देतो की, त्याने तुमच्यासाठी आणि लावदिकीया व हिरापोलिस येथील लोकांसाठी फार श्रम केले आहेत. 14 प्रिय वैद्य लूक आणि देमास आपली शुभेच्छा पाठवित आहेत. 15 लावदिकीया येथील विश्वासणाऱ्या बंधुजनांस, नुंफा व तिच्या घरात जमणाऱ्या मंडळीला माझ्या शुभेच्छा सांगा. 16 तुमच्यासाठी हे पत्र वाचून झाल्यानंतर ते लावदिकीया मंडळीकडेसुद्धा वाचण्यास देणे आणि त्याबदल्यात लावदिकीयाकडून आलेले पत्र वाचावे. 17 अर्खिप्पाला सांगा, “प्रभूमध्ये तुला जी सेवा दिलेली आहे ती पूर्ण करण्याकडे लक्ष देणे.” 18 मी पौल, माझ्या स्वतःच्या हातांनी या शुभेच्छा लिहित आहे. माझ्या बंधनाची आठवण ठेवा. परमेश्वराची कृपा तुम्हाबरोबर असो.

# 1 थेस्सलनीकाकरांस

1 आपले परमेश्वर पिता व प्रभू येशू ख्रिस्तामध्ये असलेल्या थेस्सलनीका
येथील मंडळीस, 2 आमच्या प्रार्थनांमध्ये तुम्हाला निरंतर स्मरण
करीत, तुमच्या सर्वांबद्दल सतत परमेश्वराचे आभार मानतो. 3 आपले
पिता परमेश्वरापुढे तुमचे विश्वासाचे कार्य व प्रीतीने केलेले श्रम आणि
आपल्या प्रभू येशू ख्रिस्तावरील आशेचा धीर यांची आम्ही निरंतर
आठवण करतो. 4 परमेश्वराचे प्रीतीस पात्र माझे प्रिय बंधू आणि
भगिनींनो, आम्हाला माहीत आहे की परमेश्वराने तुम्हाला निवडले आहे.
5 कारण आमची शुभवार्ता तुमच्याकडे केवळ शब्दाने नव्हे, परंतु शक्तीने,
पवित्र आत्म्याने आणि पूर्ण खात्रीने आली. तुमच्याकरिता तुम्हामध्ये
तुमच्याबरोबर राहत असताना आम्ही कसे राहिलो हे तुम्हाला माहीतच
आहे. 6 पवित्र आत्म्याने जो आनंद तुम्हाला दिला आहे, त्याद्वारे तुम्ही
अतिशय क्लेशांमध्ये असतानाही संदेशाचा स्वीकार केला आणि आमचे
व प्रभूचे अनुकरण करणारे झाले; 7 आणि म्हणूनच मासेदोनिया व
अखया येथील सर्व विश्वासणाऱ्यांसाठी तुम्ही आदर्श झाले. 8 प्रभूचा
संदेश तुम्हाद्वारे केवळ मासेदोनिया व अखया येथेच घोषित करण्यात
आला असे नाही, तर परमेश्वरावरील तुमचा विश्वास सर्वत्र जाहीर
झाला आहे. त्यामुळे तुमच्याबद्दल काही सांगण्याची आम्हाला गरजच
राहिली नाही. 9 कारण ते स्वतः अहवाल देतील की आमचे स्वागत
तुम्ही कशाप्रकारे केले आणि जे जिवंत व खरे परमेश्वर आहेत, त्यांची
सेवा करण्यासाठी तुम्ही मूर्तीपासून कसे दूर झाला आहात. 10 आणि
परमेश्वराचा पुत्र येशू ज्यांना त्यांनी मृतांतून पुनरुत्थित केले, जे येणाऱ्या
क्रोधापासून, आपल्याला सोडवितात त्यांची स्वर्गातून येण्याची तुम्ही
वाट पाहात आहात.

2 प्रिय बंधू आणि भगिनींनो, आम्ही तुमची भेट घेण्यासाठी येणे काही
व्यर्थ ठरले नव्हते हे तुम्हाला माहीतच आहे. 2 पूर्वी फिलिप्पैमध्ये
आम्हाला दुःख व अपमानकारक वागणूक सहन करावी लागली हे
तुम्हाला ठाऊक आहे, परंतु आमच्या परमेश्वराच्या साहाय्याने भयंकर
विरोध असतानाही आम्ही परमेश्वराची शुभवार्ता सांगण्याचे धैर्य केले.
3 जो बोध आम्ही करतो तो अयोग्य किंवा अशुद्ध हेतूने नव्हे किंवा
आम्ही तुमची फसवणूक करावी या उद्देशानेही नव्हे. 4 उलट, आम्ही
परमेश्वराला मान्य असलेले व जी शुभवार्ता आमच्यावर सोपवून दिली
आहे ज्यापुढे बोलतो. आम्ही लोकांना खुश करण्याचा प्रयत्न करीत
नाही, तर परमेश्वराला करतो जे हृदये पारखणारे आहेत. 5 तुम्हाला
माहीत आहे की आम्ही कोणाची खुशामत कधीही केली नाही किंवा
लोभ लपवण्यासाठी ढोंग केले नाही, परमेश्वर साक्षी आहेत. 6 आम्ही
लोकांकडून म्हणजे, तुमच्याकडून किंवा दुसऱ्या कोणाकडूनही स्तुतीची
कधीच अपेक्षा केली नाही. 7 वास्तविक ख्रिस्ताचे प्रेषित म्हणून आमचा
अधिकार निश्चितपणे मिळविता आला असता. जशी आई आपल्या
लेकरांचे कोमलतेने पालनपोषण करते, त्याचप्रमाणे आम्हीही तुमच्याशी
कोमलतेने व्यवहार केला. 8 तसेच आम्ही तुमची काळजी घेतली. आम्ही
तुमच्यावर एवढी प्रीती केली की आम्ही आनंदाने केवळ परमेश्वराची
शुभवार्ताच नव्हे तर आमचे स्वतःचे जीवनही देण्यास तयार होतो. 9 बंधू
आणि भगिनींनो, आम्ही केलेले कष्ट आणि परिश्रम हे तुम्हाला आठवत
असतील; परमेश्वराच्या शुभवार्तेचा प्रचार तुम्हाला करीत असताना
आमचे ओझे कोणावर पडू नये म्हणून आम्ही रात्रंदिवस श्रम केले. 10
तुमच्यातील प्रत्येकाशी आमचे वागणे पवित्र, नीतीने व निर्दोष होते,
याला तुम्ही विश्वासणारे स्वतः आणि परमेश्वर साक्षी आहेत. 11 पिता
स्वतःच्या मुलांशी वागतो त्याचप्रमाणे आम्ही तुमच्या प्रत्येकाशी वागलो,
हे तुम्हाला माहीत आहे, 12 तुम्हाला उत्तेजन, सांत्वन आणि विनंती करून
सांगतो की ज्या परमेश्वराने तुम्हाला त्यांच्या गौरवी राज्यात बोलाविले
आहे, त्यांना शोभेल असे जीवन जगा. 13 परमेश्वराचे आम्ही निरंतर
आभार मानतो, कारण जेव्हा तुम्ही आमच्याकडून परमेश्वराचे वचन
ऐकले, तेव्हा तुम्ही ते मानवाचे म्हणून नाही, परंतु परमेश्वराचे सत्यवचन
म्हणून स्वीकारले, जे वास्तविकतेचे आहे आणि तेच तुमच्यामध्ये कार्य
करीत आहे. 14 कारण बंधू आणि भगिनींनो, यहूदीयामध्ये तुम्ही ख्रिस्त
येशूंमध्ये असलेल्या परमेश्वराच्या मंडळयांचे अनुकरण करणारे झालात
म्हणून स्वतःच्या बांधवांकडून तुम्हाला दुःख सहन करावे लागले, त्याच
गोष्टी यहूदी लोकांकडूनही या मंडळयांना सहन कराव्या लागल्या. 15
त्यांनी प्रभू येशूंना आणि संदेष्ट्यांना ठार मारले; आणि आम्हालाही
हाकलून लावले. त्यांनी परमेश्वराला नाखुश केले आणि सर्वांचे विरोधी
झाले, 16 आम्ही त्यांच्याशी संवाद करू नये, जेणे करून गैरयहूदीयांचे
तारण होईल, म्हणून ते आम्हाला रोखून ठेवण्याचा प्रयत्न करीत होते
आणि अशा रीतीने त्यांच्या पापांचे माप भरत आले आहे. परंतु आता
शेवटी परमेश्वराचा क्रोध त्यांच्यावर आला आहे. 17 बंधू आणि भगिनींनो,
आम्ही थोड्या वेळासाठी तुम्हापासून शरीराने दूर असलो, पण विचाराने
नव्हे, आमच्या प्रबळ इच्छेने तुम्हाला भेटण्याचा प्रत्येक प्रकारे प्रयत्न
केला. 18 आम्ही तुमच्याकडे येण्याचा, मी स्वतः पौलाने वारंवार प्रयत्न
केला. परंतु सैतानाने आम्हाला अडविले. 19 आमची आशा, आमचा
आनंद, आपल्या प्रभू येशूंच्या पुनरागमनासमयी त्यांच्या सान्निध्यात जो
आमचा आशेचा मुकुट तो काय? ते तुम्हीच आहात ना? 20 कारण
तुम्हीच आमचे गौरव आणि आनंद आहात.

3 जेव्हा आमच्यात त्राण उरले नाही असे वाटले तेव्हा, ॲथेन्स इथे
थांबून राहणे उत्तम वाटले. 2 ख्रिस्ताच्या शुभवार्तेचा प्रसार कार्य
करणारा आमचा बंधू आणि परमेश्वराच्या सेवेतील सहकर्मी असलेला
तीमथ्य, त्याने तुम्हाला विश्वासात बळकट व प्रोत्साहित करावे म्हणून
आम्ही त्याला पाठविले आहे. 3 यासाठी तुमच्यामधील कोणीही या
परीक्षांमुळे अस्थिर होऊ नये, कारण यासाठीच आपण नेमलेले आहोत
हे तुम्हाला चांगले ठाऊक आहे. 4 वास्तविक, आम्ही तुमच्याकडे
असतानाच, आम्ही तुम्हाला नेहमीच सांगत आलो की आपला छळ
होईल आणि त्याप्रमाणे घडून आले, हे देखील तुम्हाला चांगले माहीत
आहे. 5 कारण, जेव्हा हे माझ्या सहनशक्तीच्या पलीकडे झाले, तेव्हा
तुमच्या विश्वासाविषयी विचारपूस करण्यास मी त्याला तुमच्याकडे

पाठविले. कदाचित कोणत्याही मार्गाने का होईना परीक्षकाने तुम्हाला
परीक्षेत पाडले असेल आणि आमचे सर्व श्रम व्यर्थ गेले असतील
अशी भीती मला वाटली. 6 तीमथ्य तुमच्याकडून नुकताच आम्हाकडे
परतला असून त्याने तुमचा विश्वास आणि प्रीती याबद्दल चांगली बातमी
दिली आहे आणि आमच्याबद्दल तुम्हाला गोड आठवणी आहेत व
तुम्हाला भेटण्यासाठी आम्ही जसे उत्कंठित आहोत, तसेच आम्हाला
भेटण्यासाठी तुम्हीही उत्कंठित आहात. 7 त्यामुळे, बंधू आणि भगिनींनो,
आमच्या सर्व दु:खात व छळात तुमच्या विश्वासाद्वारे तुमच्याकडून
आम्हाला उत्तेजन मिळाले आहे. 8 तुम्ही प्रभूमध्ये स्थिर उभे आहात
म्हणून आम्ही खऱ्या अर्थाने जगतो. 9 परमेश्वराच्या समक्षतेत जो सर्व
आनंद आम्हाला तुमच्यामुळे झाला आहे त्याबद्दल आम्ही तुमच्याबद्दल
परमेश्वराचे पुरेसे आभार कसे मानावयाचे? 10 आम्ही तुमच्यासाठी रात्र
आणि दिवस फार आग्रहाने प्रार्थना करतो की आम्ही तुम्हाला लवकरच
भेटावे आणि तुमच्या विश्वासामध्ये जे काही उणे असेल ते पूर्ण करावे.
11 आता स्वत: आमचे परमेश्वर पिता आणि आपले प्रभू येशू ख्रिस्त
यांनी आमचा तुम्हाकडे येण्याचा मार्ग सिद्ध करावा. 12 प्रभू असे करो
की जशी आम्ही तुमच्यावर करतो तशी तुमची प्रीती वाढावी आणि
एकमेकांसाठी ओसंडून वाहावी. 13 आपले प्रभू येशू आपल्या सर्व पवित्र
जणांसह येतील, त्यावेळी आपल्या परमेश्वर पित्याच्या समक्षतेत तुम्ही
दोषरहित आणि पवित्र असावे, म्हणून ते तुमची मने बळकट करोत.

4 प्रिय बंधू आणि भगिनींनो, इतर गोष्टीसंबंधाने आम्ही तुम्हाला
आज्ञा केली होती की परमेश्वराला प्रसन्न करण्यासाठी कसे जीवन
जगावे आणि ते तुम्ही जगतच आहात आणि आता आम्ही तुम्हाला
सांगतो व प्रभू येशूंमध्ये विनंती करतो की तुम्ही अधिकाधिक वाढ
करावी. 2 आता प्रभू येशूंच्या अधिकाराने आम्ही तुम्हाला कोणते निर्देश
दिले होते हे तुम्हास माहीत आहेत. 3 परमेश्वराची ही इच्छा आहे की
तुम्ही पवित्र असावे आणि लैंगिक अनैतिकता यापासून स्वत:ला दूर
ठेवावे. 4 आपले शरीर पवित्र आणि सन्माननीय आहे हे लक्षात ठेऊन
तुम्हातील प्रत्येकाने स्वत:च्या शरीरावर ताबा ठेवण्यास शिकावे. 5 जे
परमेश्वराला ओळखत नाहीत अशा गैरयहूदीयांप्रमाणे कामवासनेच्या
लालसेने नव्हे; 6 आणि या गोष्टीसंबंधात कोणीही आपल्या बंधू किंवा
भगिनींचे अयोग्य करून गैरफायदा घेऊ नये. याबद्दल आम्ही तुम्हाला
आधी सांगून ठेवले होते व इशारा दिला होता की असे पाप करणाऱ्यांना
प्रभू शिक्षा देतील. 7 कारण परमेश्वराने आपल्याला अपवित्रतेसाठी
नव्हे, तर पवित्र जीवन जगण्यासाठी पाचारण केले आहे. 8 यास्तव,
जो कोणी या निर्देशाचा तिरस्कार करतो, तो मनुष्यांचा नव्हे परंतु
ज्या परमेश्वराने आपल्याला पवित्र आत्मा दिला आहे त्या परमेश्वराचा
तिरस्कार करतात. 9 एकमेकांवर प्रीती करण्याविषयी तुम्हाला काही
लिहिण्याची गरज नाही, कारण एकमेकांवर प्रीती करावी हे स्वत:च
तुम्ही परमेश्वरापासून शिकला आहात. 10 आणि वास्तविक, मासेदोनिया
प्रांतातील परमेश्वराच्या सर्व कुटुंबावर तुम्ही प्रीती करीत आहात. तरी
बंधू आणि भगिनींनो आम्ही विनंती करतो, ती अधिकाधिक करावी.
11 शांतीने जीवन जगणे, आपल्या व्यवसायात मग्न असणे आणि
स्वत:च्या हाताने काम करणे हे तुमचे ध्येय असू द्या, 12 म्हणजे तुमचे
दैनंदिन जीवन बाहेरील लोकांच्या सन्मानास पात्र ठरेल आणि तुम्हाला
कोणावरही अवलंबून राहण्याची गरज पडणार नाही. 13 बंधू आणि
भगिनींनो, जे मरणामध्ये झोपी गेले आहेत, त्यांच्याविषयी तुम्ही अजाण
नसावे, अशी आमची इच्छा आहे, यासाठी की ज्यांना आशा नाही अशा
इतर मनुष्यासारखा आपण खेद करू नये. 14 कारण येशू मरण पावले
आणि पुन्हा जिवंत झाले, असा आपला विश्वास आहे, त्याअर्थी येशूंमध्ये
झोपी गेले आहेत त्यांना परमेश्वर माघारी आणतील यावर आपण विश्वास
ठेवतो. 15 स्वत: प्रभू येशूंच्या वचनाप्रमाणे मी तुम्हाला सांगतो की
आपण जे जिवंत आहोत आणि प्रभूच्या आगमनासमयी जिवंत असू, ते
प्रभूला भेटण्यासाठी, जे आपल्यापूर्वी मरण पावले आहेत, त्यांच्या
आधी, वर घेतले जाणार नाही. 16 कारण प्रभू स्वत:च आज्ञा करणाऱ्या
मोठ्या ध्वनीने, प्रधान दूताच्या वाणीने आणि परमेश्वराच्या तुतारीच्या
आवाजाने स्वर्गातून खाली उतरतील. मग ख्रिस्तामध्ये जे मरण पावले
आहेत, ते प्रथम उठतील. 17 त्यानंतर, जे आपण अजून जिवंत आहोत
आणि मागे राहिलेले आहोत, असे सर्वजण मेघारूढ होऊन प्रभूला
भेटण्यासाठी अंतराळात घेतले जाऊ आणि प्रभूजवळ सदासर्वकाळ
राहू. 18 या वचनांद्वारे परस्परांना प्रोत्साहन द्या.

5 आता, बंधू आणि भगिनींनो, वेळ आणि घटका याविषयी तुम्हाला
लिहिण्याची गरज नाही, 2 कारण तुम्हाला हे पक्के ठाऊक आहे
की जसा चोर रात्री येतो तसा प्रभूचा दिवस येईल. 3 “शांतता आणि
सुरक्षितता,” असे लोक म्हणत असतानाच, ज्याप्रमाणे गर्भवती स्त्रीला
प्रसूती वेदना होतात, त्याचप्रमाणे त्यांच्यावर अचानक नाश ओढवेल
आणि त्यातून ते सुटणार नाहीत. 4 परंतु बंधू आणि भगिनींनो, तुम्ही
अंधारात असू नये जेणे करून हा दिवस तुम्हाला अचानक येणाऱ्या
चोरासारखा चकित करेल. 5 परंतु बंधू आणि भगिनींनो, तुम्ही सर्व
प्रकाशाची व दिवसाची मुले आहात. आम्ही रात्रीचे किंवा अंधकाराचे
नाही. 6 आपण झोपी गेलेल्या सारखे असू नये, परंतु जागृत आणि
शुद्धीवर असलेले असावे. 7 झोप घेणारे, रात्री झोपतात, मद्य पिणारे,
रात्री मद्य पितात. 8 परंतु जे आपण दिवसाचे आहोत, ते आपण
संयमी असावे, विश्वास आणि प्रीतीचे चिलखत धारण करावे आणि
तारणाची आशा हे शिरस्त्राण धारण करावे. 9 क्रोध सहन करावा म्हणून
परमेश्वराने आपली निवड केली नाही, तर प्रभू येशू ख्रिस्ताद्वारे आपले
तारण व्हावे म्हणून केली आहे. 10 ते आपल्यासाठी मरण पावले,
यासाठी की आपण जागे असलो किंवा झोपेत असलो तरी त्याच्याबरोबर
जिवंत राहावे. 11 म्हणून तुम्ही आता जे करीत आहात त्याचप्रमाणे
एकमेकांना प्रोत्साहन द्या आणि एकमेकांची वृद्धी करण्यासाठी झटा.
12 बंधू आणि भगिनींनो, तुम्हाला सांगतो की जे तुम्हामध्ये परिश्रम
करतात, जे प्रभूमध्ये तुमची काळजी घेतात आणि तुम्हाला बोध करतात
त्यांचा मान राखा. 13 त्यांच्या कार्यामुळे त्यांना प्रीतीने सर्वोच्च मान द्या,
एकमेकांबरोबर शांतीने राहा. 14 बंधू आणि भगिनींनो, आम्ही तुम्हाला

विनंती करतो की जे आळशी आणि लुडबुड करणारे आहेत त्यांना
ताकीद द्या, जे निराश आहेत त्यांना उत्तेजन द्या, अशक्तांना आधार
द्या, प्रत्येकाशी सहनशीलतेने वागा. 15 कोणी वाईटाची फेड वाईटाने
करणार नाही याची काळजी घ्या, परंतु प्रत्येकाचे आणि सर्वांचे सर्वदा
चांगले करण्यासाठी झटा. 16 सर्वदा आनंदित राहा, 17 निरंतर प्रार्थना
करा, 18 सर्व परिस्थितीत उपकारस्मरण करा, कारण ख्रिस्त येशूंमध्ये
तुमच्यासाठी परमेश्वराची इच्छा हीच आहे. 19 पवित्र आत्म्याला विझवू
नका. 20 संदेशाला तुच्छ मानू नका. 21 परंतु त्या सर्वांची परीक्षा करा;
जे चांगले आहे ते धरून ठेवा, 22 सर्वप्रकारच्या वाईटाचा निषेध करा.
23 परमेश्वर स्वत: जे शांतीचे परमेश्वर आहेत, ते तुम्हाला परिपूर्णतेने
पवित्र करोत. आपले प्रभू येशू ख्रिस्त येईपर्यंत तुमचा पूर्ण आत्मा, जीव
आणि शरीर निर्दोष राखली जावोत. 24 ज्यांनी तुम्हाला पाचारण केले
आहे ते विश्वासू आहेत आणि ते करतीलच. 25 बंधू आणि भगिनींनो,
आमच्यासाठी प्रार्थना करा. 26 परमेश्वराच्या सर्व लोकांचे पवित्र चुंबनाने
अभिवादन करा. 27 हे पत्र सर्व बंधू आणि भगिनींना वाचून दाखवावे,
अशी मी तुम्हाला प्रभूसमोर आज्ञा करतो. 28 आपल्या प्रभू येशू
ख्रिस्ताची कृपा तुम्हावर असो.

# 2 थेस्सलनीकाकरांस

**1** परमेश्वर आपले पिता व प्रभू येशू ख्रिस्तामध्ये असलेल्या थेस्सलनीका
येथील मंडळीस, 2 परमेश्वर आपले पिता व प्रभू येशू ख्रिस्त
यांच्याकडून तुम्हास कृपा आणि शांती असो. 3 बंधू आणि भगिनींनो,
आम्ही सतत तुमच्यासाठी परमेश्वराचे आभार मानतो आणि तसे करणे
योग्य आहे, कारण तुमचा विश्वास अधिकाधिक वाढत आहे आणि
तुम्हा सर्वांचे जे एकमेकांवरील प्रेम आहे ते देखील वाढत आहे. 4
यास्तव, तुम्ही सर्व छळांमध्ये आणि परीक्षांमध्ये जो धीर दाखविला
आणि त्यामध्ये तुम्ही जी चिकाटी आणि विश्वास दाखविला त्याबद्दल
आम्ही परमेश्वराच्या मंडळयांमध्ये अभिमानाने सांगतो. 5 परमेश्वराचा
न्याय योग्य आहे, याचे हे सर्व प्रमाण आहे आणि याचा परिणाम म्हणजे
ज्या परमेश्वराच्या राज्यासाठी तुम्ही दु:ख सोसत आहात त्यासाठी तुम्ही
पात्र ठरावे. 6 परमेश्वर न्यायी आहेत: जे तुम्हाला त्रास देतात त्यांची
परतफेड ते त्रासांनी करतील. 7 प्रभू येशू अग्निज्वालेमधून, आपल्या
महाप्रतापी दूतांसह स्वर्गातून प्रकट होतील आणि त्रास सहन करणाऱ्या
तुम्हाला व आम्हालाही विश्रांती देतील. 8 जे परमेश्वराला ओळखत
नाहीत आणि आपल्या प्रभू येशूंची शुभवार्तेचे पालन करीत नाहीत,
त्यांना ते शिक्षा देतील. 9 सर्वकाळचा नाश ही त्यांची शिक्षा असेल
आणि ते प्रभूच्या समक्षतेतून व परमेश्वराच्या गौरव व सामर्थ्यातून
कायमचे विभक्त होतील. (aiōnios g166) 10 त्यांच्या आगमनाच्या दिवशी
ते आपल्या पवित्र लोकांमध्ये गौरविले जातील आणि ज्यांनी त्यांच्यावर
विश्वास ठेवला त्या सर्वांना हर्षचकित करण्यासाठी येतील. यामध्ये
तुमचा सहभाग आहे कारण आमची जी साक्ष तुम्हाला दिली त्यावर
तुम्ही विश्वास ठेवला. 11 हे लक्षात ठेऊन, आपल्या परमेश्वराने तुम्हाला
त्यांच्या पाचरणासाठी योग्य करावे आणि सर्व चांगुलपणाची प्रत्येक
इच्छा आणि विश्वासाच्या प्रत्येक कृत्याच्या सामर्थ्याने पूर्ण करावे, अशी
आम्ही तुमच्यासाठी सतत प्रार्थना करतो. 12 प्रभू येशूंच्या नावाचे गौरव
तुमच्यामध्ये आणि तुमचे त्यांच्यामध्ये आपल्या परमेश्वराच्या आणि प्रभू
येशू ख्रिस्ताच्या कृपेने व्हावे ही आमची प्रार्थना आहे.

**2** आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचे पुन्हा येणे व आपले त्यांच्याजवळ
एकवटणे यासंबंधी बंधूंनो आणि भगिनींनो मी तुम्हाला सांगतो, 2
आमच्याद्वारे दिलेल्या तथाकथित शिक्षणाद्वारे तुम्ही सहज अस्थिर किंवा
गोंधळून जाऊ नका. प्रभूचा दिवस येऊन ठेपला आहे, असे ठामपणे
आपल्या संदेशाद्वारे किंवा बोलण्याद्वारे किंवा पत्राद्वारे सांगणाऱ्यांना
घाबरून जाऊ नका. 3 कोणी तुमची कोणत्याही प्रकारे फसवणूक करू
नये, जोपर्यंत विश्वासाचे पतन होणार नाही आणि नियम नसलेला पुरुष
म्हणजे नाशाचा पुरुष प्रकट होणार नाही तोपर्यंत तो दिवस येणार
नाही. 4 तो तथाकथित देव किंवा भजनीय वस्तूंचा विरोध करेल व या
सर्वांहून स्वत:ला उंच करेल, तो परमेश्वराच्या मंदिरात बसेल व मीच
परमेश्वर आहे, असे जाहीर करेल. 5 मी तुमच्याबरोबर तिथे असताना,
हे सांगितल्याचे तुम्हाला आठवत नाही का? 6 आणि आता त्याने
योग्य वेळेस प्रकट व्हावे म्हणून त्याला कोणत्या गोष्टीचे अडखळण
आहे हे तुम्हाला माहीत आहे. 7 कारण अधर्माचे गुप्त सामर्थ्य आधी
कार्यान्वित आहे, ते आधीच सुरू झालेले आहे. परंतु जो प्रतिबंध करीत
आहे, तो मार्गातून दूर होईपर्यंत ते तसेच सुरू राहणार आहे. 8 मग हा
अधर्मी पुरुष प्रकट होईल, पण प्रभू येशू त्याला मुख श्वासाने मारून
टाकतील आणि आपल्या आगमनाच्या प्रतापाने त्याचा नाश करतील. 9
सैतान कशाप्रकारे कार्य करतो त्यानुसार अनीतिमानाचे येणे असेल. तो
विलक्षण सामर्थ्याच्याद्वारे खोटी चिन्हे आणि अद्भुते करून दाखवेल, 10
आणि ज्यांचा नाश होत आहे त्यांना त्यांच्या सर्व मार्गात दुष्टतेने फसवेल.
त्यांचा नाश होत आहे कारण त्यांनी आपल्या तारणासाठी सत्यावर
प्रीती करण्यास नकार दिला. 11 या कारणामुळे परमेश्वर त्यांच्यावर
तीव्र भ्रांती पाठवतील यासाठी की ते लबाडीवर विश्वास ठेवतील, 12
आणि ज्या सर्वांनी सत्यावर विश्वास ठेवला नाही आणि दुष्टपणात आनंद
मानला, त्या सर्वांना दोषी ठरविण्यात येईल. 13 परंतु प्रभूला प्रिय
असलेल्या बंधू आणि भगिनींनो, आम्ही तुमच्यासाठी परमेश्वराची सतत
उपकारस्तुती केली पाहिजे, कारण परमेश्वराने तुम्हाला आत्म्याद्वारे
होणाऱ्या पवित्रीकरणाच्या कार्यात व सत्यावरील विश्वासात प्रथमफळ
म्हणून तारणासाठी निवडले आहे. 14 आमच्या शुभवार्तेद्वारे त्यांनी
तुम्हाला यासाठी पाचारण केले की आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या
गौरवात तुम्ही सहभागी व्हावे. 15 बंधू आणि भगिनींनो, स्थिर राहा
आणि जे शिक्षण आम्ही तुम्हाला शब्दाद्वारे किंवा पत्राद्वारे सोपवून दिले
त्याला घट्ट धरून ठेवा. 16 ज्यांनी कृपेद्वारे आपल्यावर प्रीती केली आणि
युगानुयुगाचे प्रोत्साहन व चांगली आशा आपल्याला दिली, ते परमेश्वर
आपले पिता व स्वत: आपले प्रभू येशू ख्रिस्त, (aiōnios g166) 17 तुमच्या
अंत:करणास प्रोत्साहित करोत आणि प्रत्येक चांगल्या कृतीत आणि
बोलण्यात तुम्हाला समर्थ करोत.

**3** आता इतर गोष्टीसंबंधाने, बंधू आणि भगिनींनो, आमच्यासाठी
प्रार्थना करा यासाठी की जसा तुमच्यामध्ये झाला तसा प्रभूचा संदेश
वेगाने पसरावा व त्यास सन्मान मिळावा. 2 दुष्ट व वाईट माणसांकडून
आमची सुटका व्हावी म्हणूनही प्रार्थना करा, कारण प्रत्येकजण प्रभूवर
विश्वास करणारा असतोच असे नाही. 3 परंतु प्रभू विश्वासू आहेत, ते
तुम्हाला सामर्थ्यवान करतील आणि दुष्टापासून तुमचे रक्षण करतील,
4 आणि आम्हाला प्रभूमध्ये भरवसा आहे की आम्ही आज्ञापिलेल्या
गोष्टी तुम्ही करता आणि करीतच राहाल. 5 प्रभू तुमची अंत:करणे
परमेश्वराच्या प्रीतिकडे आणि ख्रिस्ताच्या सहनशीलतेकडे लावो. 6 प्रिय
बंधू आणि भगिनींनो, आम्ही प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाने आज्ञा करतो
की, जो प्रत्येक विश्वासणारा बंधू आळशी आणि फूट पाडणारा आणि
आमच्याद्वारे जे शिक्षण मिळाले त्याप्रमाणे जीवन न जगणारा असल्यास
त्यापासून दूर राहा. 7 कारण तुम्हाला आमचे अनुकरण कसे करावयाचे
हे चांगले माहीत आहे. आम्ही तुम्हामध्ये राहत असताना आळशी नव्हतो.
8 आम्ही कोणाचेही अन्न विकत घेतल्याशिवाय खाल्ले नाही; याउलट,
तुमच्यातील कोणावरही ओझे होऊ नये म्हणून आम्ही रात्रंदिवस परिश्रम

आणि कष्ट केले. 9 याचा अर्थ तुमच्यापासून मदत मिळण्याचा अधिकार
आम्हाला नाही असे नाही, परंतु आम्ही हे यासाठी केले की तुम्ही आमचे
अनुकरण करावे म्हणून तुम्हाला आदर्श झालो. 10 आम्ही तुम्हाजवळ
होतो, तेव्हाही तुम्हाला हाच नियम दिला होता: “जो कोणी काम करू
इच्छित नाही, त्याने खाऊ नये.” 11 तुमच्यापैकी काहींची जीवनशैली
आळशी आहे आणि काही लोक व्यत्यय आणणारे व इतरांच्या कामात
लुडबुड करतात असे आम्ही ऐकतो. 12 अशा लोकांना आम्ही प्रभू येशू
ख्रिस्ताच्या नावाने विनंती नव्हे, आज्ञा करतो की त्यांनी शांत व्हावे
आणि आपल्या अन्नासाठी श्रम करावे. 13 बंधू आणि भगिनींनो, तुम्ही
सत्कृत्य करीत असताना खचून जाऊ नका. 14 जो कोणी या पत्रात
लिहिल्याप्रमाणे आमच्या बोधाचे पालन करणार नाही त्याची विशेष
दखल घ्या व त्याला लाज वाटावी म्हणून त्याच्यापासून दूर राहा. 15
त्याला शत्रूप्रमाणे लेखू नका, तर तुम्ही विश्वासणाऱ्या बंधूला द्याल
त्याप्रमाणे त्याला ताकीद द्या. 16 आता सर्व शांतीचे प्रभू स्वतः सर्ववेळी
आणि सर्वप्रकारे आपली शांती तुम्हाला देवो. प्रभू तुम्हा सर्वांबरोबर
असो. 17 आता मी पौल, माझ्या स्वतःच्या हातांनी या शुभेच्छा लिहित
आहे, माझ्या सर्व पत्रात हे चिन्ह आहे आणि मी अशाप्रकारे लिहित
असतो. 18 आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा तुम्हा सर्वांवर असो.

# 1 तीमथ्य

1 परमेश्वर आपले तारणकर्ता व ख्रिस्त येशू आपली आशा, यांच्या
आज्ञेने ख्रिस्त येशूंचे प्रेषित म्हणून नेमलेला पौल याजकडून, 2
विश्वासातील माझा खरोखरचा पुत्र तीमथ्य यास, 3 मासेदोनियास
जाताना मी तुला सांगितल्याप्रमाणे, विनंती करतो इफिस येथेच राहा
आणि चुकीचे शिक्षण देणाऱ्यांना प्रतिबंध करण्याचा प्रयत्न कर आणि
ज्यांच्याकडून विश्वासातील परमेश्वरासंबंधी रचना न होता, वाद मात्र
तयार होतात, अशा गोष्टींवर आणि अखंडित वंशावळयांवर चित्त त्यांनी
ठेवू नये. 5 आज्ञेचा उद्देश हा आहे की, शुद्ध अंतःकरणातून, चांगल्या
विवेकभावातून आणि निष्कपट विश्वासातून येणारी प्रीती तुम्हामध्ये
असावी. 6 या गोष्टी सोडून अनेकजण निरर्थक बोलण्याकडे वळले
आहेत. 7 ते नियमशास्त्राचे शिक्षक होण्यास अभिलाषी आहेत, परंतु
ज्या गोष्टींबद्दल ते मोठ्या आत्मविश्वासाने बोलतात आणि सांगतात
त्या गोष्टी त्यांनाच समजत नाहीत. 8 आपल्याला ठाऊक आहे की
नियमशास्त्र चांगले आहे—जर त्याचा योग्य रीतीने उपयोग करण्यात
आला तर. 9 नीतिमानांसाठी नियमशास्त्र तयार करण्यात आलेले
नाही; तर आज्ञा मोडणारे, विद्रोही, भक्तिहीन व पापी, अपवित्र आणि
अधर्मी, आईवडीलांवर हल्ला करणारे, आणि खून करणारे 10 जारकर्मी,
समलैंगिक, दासांचा व्यापार करणारे, लबाड, खोटी शपथ वाहणारे
यांच्यासाठी—आणि इतर जे काही शुद्ध शिक्षणाविरुद्ध आहे. 11 जे
धन्यवादित परमेश्वराच्या गौरवाशी संबंधित शुभवार्तेला सुसंगत आहे,
ते माझ्याकडे सोपविण्यात आले आहे. 12 मी आपल्या प्रभू ख्रिस्त
येशूंचा आभारी आहे, ज्यांनी मला सामर्थ्य दिले आणि त्यांनी मला
विश्वासयोग्य मानून त्यांच्या सेवेसाठी निवडले. 13 मी पूर्वी परमेश्वराची
निंदा करणारा, छळ करणारा आणि जुलमी होतो, तरी देखील मजवर
दया झाली, यासाठी की जे काही मी करीत होतो ते अज्ञानामुळे आणि
अविश्वासामुळे केले. 14 ख्रिस्त येशू आपले प्रभू यांची कृपा माझ्यावर
विश्वास आणि प्रीतीद्वारे विपुलतेने ओतण्यात आली आहे. 15 ही गोष्ट
विश्वसनीय आणि पूर्णपणे स्वीकारावयास योग्य आहे, की ख्रिस्त येशू
पाप्यांना तारावयास जगात आले आणि त्या पातक्यांमध्ये सर्वात
मोठा मीच आहे. 16 परंतु माझ्यावर दया झाली की, ख्रिस्त येशूंनी
माझा उदाहरणादाखल उपयोग करावा आणि माझ्यासारख्या मोठ्या
पातक्यांबाबतही परमेश्वराने किती सहनशीलता दाखविली, म्हणजे
इतरांनाही विश्वासाने सार्वकालिक जीवन मिळू शकते. **(aiōnios g166)**
17 जे सर्वकाळचे राजा, अविनाशी व अदृश्य असे एकच परमेश्वर यांना
सदासर्वकाळ सन्मान आणि गौरव असो. आमेन. **(aiōn g165)** 18 माझ्या
मुला, तीमथ्या, माझी तुला ही आज्ञा आहे: संदेष्ट्यांच्याद्वारे तुझ्याविषयी
पूर्वीच सांगितल्याप्रमाणे, तू त्यांच्याद्वारे उत्तम युद्ध करावे. 19 आणि
विश्वास व चांगल्या विवेकशीलतेस घट्ट बिलगून राहा, ज्यांनी त्याचा
नकार केला त्यांचे विश्वासरूपी तारू फुटले. 20 हुमनाय व आलेक्सांद्र हे
त्यांच्यामध्ये आहेत; त्यांनी ईश्वराची निंदा करू नये हे शिकावे, म्हणून मी
त्यांना सैतानाच्या स्वाधीन केले आहे.

2 तर सर्वात प्रथम मी विनंती करतो की, सर्व मनुष्यांसाठी विनंत्या,
प्रार्थना, रदबदल्या आणि उपकारस्तुती करावी. 2 अशाच प्रकारे
राजांसाठी आणि अधिकाऱ्यांसाठी करावी, यासाठी की आपण पूर्ण
सुभक्तीने व गंभीरपणाने शांतीचे व स्वस्थपणाचे आयुष्यक्रमण करावे.
3 असे करणे चांगले आहे आणि यामुळे परमेश्वर आपल्या तारणाऱ्याला
संतोष होतो. 4 कारण सर्वांचे तारण व्हावे आणि त्यांना सत्याचे ज्ञान
समजावे अशी त्यांची इच्छा आहे: 5 कारण एकच परमेश्वर आहे आणि
परमेश्वर व मनुष्य यामध्ये मनुष्य ख्रिस्त येशू हेच एकमेव मध्यस्थ आहे.
6 त्यांनी सर्वांसाठी स्वतःला खंडणी म्हणून दिले ही साक्ष नेमलेल्या
काळी देणे होय. 7 आणि या उद्देशाने त्यांनी मला या साक्षीसाठी घोषणा
करणारा आणि प्रेषित म्हणून नियुक्त केले—मी खरे बोलतो, खोटे
बोलत नाही—आणि गैरयहूदीयांचा विश्वासू आणि खरा शिक्षक म्हणून
नेमलेला आहे. 8 म्हणून सर्वठिकाणी पुरुषांनी राग आणि वादविवाद
सोडून पवित्र हात वर करून प्रार्थना करावी, अशी माझी इच्छा आहे.
9 स्त्रियांनीही वागणुकीत शांत, समजूतदार, आदरणीय आणि वस्त्रे
प्रावरणांत संयमी असावे. वेशभूषा, सोने किंवा मोती किंवा मोलवान
पोशाख यामध्ये नव्हे, 10 तर जे परमेश्वराची भक्ती करणाऱ्यांना शोभेल,
अशा आचरणामुळे त्यांच्याकडे लक्ष वेधले जावे. 11 स्त्रियांनी शांतपणे
व नम्रतेने शिकावे. 12 स्त्रियांनी पुरुषांना शिकवावे किंवा त्यांच्यावर
अधिकार गाजवावा, याला मी परवानगी देत नाही; परंतु त्यांनी शांत
राहावे. 13 कारण आदाम प्रथम घडविला गेला आणि नंतर हव्वा. 14
आणि सैतानाने आदामाला फसविले नाही; फसविली गेली ती स्त्री
आणि ती पापी ठरली. 15 म्हणून मुलांना जन्म देताना तिचे तारण होईल,
ती नेमस्तपणाने विश्वास, प्रीती आणि पवित्रपण यामध्ये राहिल्याने हे
होईल.

3 हे वचन विश्वासयोग्य आहे की जर कोणी अध्यक्ष होण्याची इच्छा
धरतो, तर तो उत्तम कामाची इच्छा बाळगतो. 2 तर अध्यक्ष निर्दोष,
एका पत्नीचा पती असावा, सौम्य, सावधान, आदरणीय, अतिथिप्रिय
आणि शिकविण्यात निपुण असावा. 3 तो मद्यपी अथवा भांडखोर नसावा,
तर तो सौम्य व दयाळू असावा, तो पैशावर प्रीती करणारा नसावा. 4 तो
आपल्या घरावर उत्तम अधिकार चालविणारा, त्याने आपल्या लेकरांना
आज्ञाधारक ठेवावे आणि हे सर्व आदरयुक्तरितीने करावे. 5 (ज्याला
आपल्या कुटुंबाची व्यवस्था चांगली ठेवता येत नाही, तर तो परमेश्वराच्या
मंडळीचा सांभाळ कसा करेल?) 6 अध्यक्ष नव्याने ख्रिस्ती झालेला
नसावा, नाही तर तो गर्वाने फुगून जाऊन सैतानाच्या दंडाचा भागीदार
होईल. 7 तसेच मंडळीच्या बाहेरील लोकांचेही त्याच्याविषयी चांगले मत
असावे, जेणेकरून त्याची निंदा होऊ नये आणि सैतानाच्या फासात तो
पडू नये. 8 मंडळीतील सेवकही आदरयोग्य व निष्कपट असावेत. ते
मद्यपान करणारे नसावे व अप्रामाणिकपणे पैसा मिळविणारे नसावे. 9

ते विश्वासाचे गुप्त सत्य शुद्ध विवेकबुद्धीने राखणारे असावेत. 10 आणि
त्यांची प्रथम चाचणी करणे आवश्यक आहे; नंतर निर्दोष ठरल्यास
त्यांनी सेवक म्हणून काम करावे. 11 त्याचप्रमाणे, त्यांच्या पत्नीदेखील
आदरणीय असाव्यात. त्या निंदानालस्ती करणाऱ्या असू नयेत, तर त्या
नेमस्त व सर्व गोष्टींविषयी विश्वासू असाव्यात. 12 सेवक एका पत्नीचा
पती असावा आणि तो आपल्या मुलांची व कुटुंबाची व्यवस्था उत्तम
प्रकारे घेणारा असावा. 13 ज्यांनी सेवकपणाची सेवा चांगली केली,
त्यांना मान मिळतो आणि ख्रिस्त येशूंवरील त्यांची विश्वासात दृढता
वाढते. 14 तुझ्याकडे लवकरच येण्याची आशा असूनही, या सर्वगोष्टी
मी आताच तुला लिहित आहे, 15 जर माझे येणे थोडेसे लांबले, तर
परमेश्वराचे घर म्हणजे जिवंत परमेश्वराची मंडळी जी सत्याचा खांब व
आधारस्तंभ आहे, त्या परमेश्वराच्या घरात कसे वागले पाहिजे, हे तुला
समजावे. 16 सुभक्तीचे रहस्य निर्विवाद गंभीर आहे: परमेश्वर मानव
शरीरात प्रकट झाले, आत्म्यात नीतिमान ठरले; देवदूतांच्या पाहण्यात
आले, राष्ट्रांमध्ये गाजविले गेले, जगात त्यांच्यावर विश्वास ठेवण्यात
आला आणि गौरवात पुन्हा वर घेतले गेले.

4 पवित्र आत्मा स्पष्ट सांगतो की शेवटच्या काळात कित्येक लोक
विश्वासापासून दूर जातील आणि धूर्त व दुरात्म्याच्या शिक्षणावर
मन लावतील. 2 ज्या लबाड बोलणाऱ्या माणसाची सदसद्विवेकबुद्धी
तापलेल्या लोखंडाने डागलेली आहे. 3 हे लोक विवाह करण्यास
मनाई करतील, जे अन्न विश्वासणाऱ्यांनी आणि सत्य जाणणाऱ्यांनी
उपकारस्तुती करून स्वीकार करावे म्हणून परमेश्वराने निर्माण केले
आहे ते वर्ज्य करावे, असे ते म्हणतील. 4 परमेश्वराने उत्पन्न केलेली
प्रत्येक वस्तू चांगली आहे आणि उपकारस्तुती करून घेतले तर काहीही
वर्ज्य नाही. 5 कारण परमेश्वराचे वचन आणि मध्यस्थी प्रार्थना यांनी ती
समर्पित होते. 6 जर तू या गोष्टी बंधू भगिनींना समजावून सांगितल्या,
तर विश्वासाच्या वचनांनी आणि ज्या चांगल्या शिक्षणाला तू अनुसरले
आहेस तसे पोषण होत असलेला ख्रिस्त येशूंचा चांगला सेवक होशील.
7 मूर्ख कल्पना, खुळ्या लोककथा यापासून दूर राहा आणि आपल्या
आत्मिक उन्नतीसाठी प्रशिक्षण घे. 8 शारीरिक व्यायाम योग्य आहे,
परंतु आध्यात्मिक व्यायाम अधिक महत्त्वाचा आहे, कारण हे सद्य
जीवनाचे आणि भावी जीवनाचे अभिवचन देते. 9 ही गोष्ट विश्वसनीय व
पूर्णपणे स्वीकारावयास योग्य आहे. 10 याचकरिता आम्ही श्रम व कसून
प्रयत्न करतो, म्हणून आमची आशा जो सर्व मानवांचा आणि विशेषत:
त्यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्यांचा तारणारा आहे, त्या जिवंत परमेश्वरावर
आहे. 11 या गोष्टी आज्ञारूपाने सांग व शिकव. 12 कोणालाही तुझे
तरुणपण तुच्छ लेखू देऊ नकोस. तर तू विश्वासणाऱ्यांसाठी बोलण्यात,
वर्तणुकीत, प्रीतीत, विश्वासात, शुद्धपणात कित्ता हो. 13 मी तिथे
येईपर्यंत सार्वजनिक शास्त्रवाचन करण्यात, बोध करण्यात, शिक्षण
देण्यात तत्पर राहा. 14 मंडळीच्या वडिलांनी तुझ्यावर हात ठेवले असता,
संदेशाद्वारे जी आध्यात्मिक कृपादाने तुला दिली, त्याची उपेक्षा करू
नको. 15 तुझी प्रगती सर्वांच्या लक्षात येईल म्हणून या गोष्टींचे चिंतन
कर, यामध्ये तत्पर राहा. 16 तू आपले जीवन आणि शिक्षण यावर नीट
लक्ष ठेव. या गोष्टींमध्ये टिकून राहा, कारण असे केल्याने तू स्वत:चे व
तुझे ऐकणाऱ्यांचेही तारण करशील.

5 वडील मनुष्यास कठोरपणे बोलू नको, तर तो जणू काही आपला
पिताच आहे, असे मानून आदराने त्यांना बोध कर. जसे भावांशी
बोलावे तसे तरुणांशी बोल. 2 वयस्कर स्त्रियांना मातेसमान वागणूक दे
आणि तरूणींविषयी केवळ शुद्ध भावना बाळगून त्यांना बहिणींसमान
वागणूक दे. 3 ज्या गरजवंत विधवा आहेत, त्यांचा सन्मान कर. 4
परंतु विधवेला मुले अथवा नातवंडे असतील, तर त्यांनी प्रथम आपल्या
कुटुंबीयांशी सुभक्तीने वागून व आपल्या पितरांचे उपकार फेडण्यास
शिकावे, यामुळे परमेश्वराला अतिशय संतोष होतो. 5 जी वास्तविक
विधवा आहे व एकटी पडलेली आहे, तिने परमेश्वरावर आपली आशा
ठेवली आहे आणि ती मदतीसाठी रात्रंदिवस विनंत्या व प्रार्थना करीत
असते. 6 परंतु जी विधवा विलासी आहे, ती जिवंत असून मेलेली आहे.
7 त्यांनी निर्दोष असावे म्हणून या गोष्टी निक्षून सांग. 8 परंतु जर कोणी
आपल्या स्वकीयांचे आणि विशेषकरून आपल्या घरच्यांची तरतूद करीत
नाही, तर त्याने विश्वास नाकारला आहे आणि तो अविश्वासणाऱ्यापेक्षा
वाईट आहे. 9 जी विधवा साठ वर्षांपेक्षा अधिक आहे, तिच्या पतीबरोबर
विश्वासू राहिलेली आहे, 10 जिच्या चांगल्या कामाबद्दल ती प्रसिद्ध
आहे, म्हणजे जिने आपल्या मुलाबाळांचे चांगले संगोपन केले असेल,
जिने आतिथी सत्कार केलेला असेल, जिने प्रभूच्या लोकांचे पाय
धुतले असतील, संकटात पडलेल्या लोकांना मदत केली असेल आणि
सर्वप्रकारच्या चांगल्या कामासाठी समर्पित केले असेल, तिचे नाव
विधवांच्या यादीत लिहावे. 11 परंतु तरुण विधवांचे नाव अशा यादीत
नोंदवू नये, कारण जेव्हा त्यांची विषयवासना ख्रिस्तावरील त्यांच्या
निष्ठेपेक्षा प्रबळ होते, तेव्हा त्या विवाह करू पाहतात, 12 आणि म्हणून
आपली पहिली प्रतिज्ञा मोडल्याबद्दल त्या आपल्यावर दंड ओढवून
घेतात. 13 शिवाय, त्या आळशी बनण्यात व घरोघर फिरून गप्पागोष्टी
करण्यात आणि इतर लोकांच्या कामकाजात लुडबुड करण्यात आपला
वेळ घालविण्याची शक्यता आहे. 14 म्हणून माझी इच्छा आहे की
तरुण विधवांनी विवाह करावा, मुलांना जन्म द्यावा व कुटुंब चालवावे;
विरोध करणाऱ्याला निंदा करण्याचे कोणतेही निमित्त सापडू नये. 15
कारण असे करून काही विधवा यापूर्वीच मागे फिरून सैतानाच्या मागे
गेल्या आहेत. 16 जर कोणी विश्वासणारी स्त्री विधवांची काळजी घेत
आहे, तर तिने त्यांची मदत करीत राहावे आणि मंडळीवर त्यांचे ओझे
टाकू नये म्हणजे ज्या विधवा खरोखर गरजवंत आहेत, त्यांना मंडळी
मदत करू शकेल. 17 जे वडीलजन आपला अधिकार चांगल्या प्रकारे
चालवितात, विशेषकरून जे उपदेश व शिक्षण याविषयी परिश्रम घेतात,
त्यांना दुप्पट सन्मानास योग्य गणले जावे. 18 कारण पवित्रशास्त्र
म्हणते, “बैल धान्याची मळणी करीत असताना, त्याला मुसके बांधू
नको” आणि “कामकरी आपल्या वेतनास पात्र आहे!” 19 दोन किंवा
तीन साक्षीदारांनी आरोप ठेवल्याशिवाय वडिलांविरुद्धच्या तक्रारीकडे

लक्ष देऊ नये. 20 जे वडील पाप करीत असतात त्यांचा सर्वांच्यासमक्ष
निषेध कर म्हणजे इतरांना त्याचे भय राहील. 21 परमेश्वर, प्रभू येशू
ख्रिस्त आणि निवडलेले देवदूत यांच्यासमोर मी तुला निक्षून सांगतो
की, या सूचना कोणताही भेदभाव न करता पाळ. पक्षपाताने काहीही
करण्यात येऊ नये. 22 अध्यक्ष निवडण्यात कधीही घाई करू नको.
इतरांच्या पापात सहभागी होऊ नको आणि तू स्वतःस शुद्ध राख. 23
यापुढे पाणीच पीत राहू नकोस, तर कधीकधी तू थोडासा द्राक्षारस
घेत जा, कारण पोटाच्या विकाराने तू वारंवार आजारी असतोस. 24
अनेक माणसांची पापे आधीच उघड होतात आणि न्यायनिवाड्यासाठी
त्यांच्यापुढे जातात आणि कित्येकांची पापे त्यांच्यामागून जातात. 25
अशाच प्रकारे काही चांगली कार्ये आधी उघड होतात आणि जी इतर
प्रकारची आहेत, ती कायमची गुप्त राहू शकत नाहीत.

**6** जे दास म्हणून जुवाखाली आहेत त्यांनी आपआपल्या धन्यास सर्व
सन्मानास योग्य मानावे, यासाठी की परमेश्वराच्या नावाची आणि
शिकवणीची निंदा होऊ नये. 2 त्यांचा धनी विश्वासणारा असल्यास
त्यांना ते बंधूसारखे आहेत, त्यांनी त्यांचा अवमान करू नये, उलट जास्त
आदराने सेवा करावी, कारण जे तुमच्या सेवेचा लाभ घेणारे आहेत ते
विश्वासणारे व प्रिय आहेत. या गोष्टी त्यांना शिकवून पालन करण्यास
सांग. 3 जर कोणी, इतर कोणतेही मत शिकवितो आणि आपल्या प्रभू
येशू ख्रिस्ताचा योग्य बोध आणि सुभक्तीचे शिक्षण मान्य करीत नाही, 4
तर तो अहंकारी आहे व त्याला काहीच समजत नाही. त्याला शब्दयुद्ध
व वादविवाद यांची विकृत आवड आहे. यांच्यापासूनच हेवा, कलह,
कोणाची बदनामी होईल असे बोलणे, दुष्ट संशय, 5 आणि ज्यांच्यापासून
सत्य हिरावून घेतले आहे आणि ज्यांना भक्ती द्रव्यलोभाचे एक साधन
वाटते, अशा भ्रष्ट मनाच्या माणसांमध्ये सतत भांडणे होतात. 6 परंतु
संतोषासहित असणारी सुभक्ती ही मोठीच मिळकत आहे. 7 कारण
आपण जगात काही आणले नाही आणि आपण जाताना बरोबर काहीही
घेऊन जाणार नाही. 8 म्हणून आपल्याजवळ पुरेसे अन्नवस्त्र असले की
त्यामध्ये आपण तृप्त असावे. 9 जे श्रीमंत होण्याची इच्छा धरतात,
ते परीक्षेत आणि पाशात व अति मूर्खपणाच्या आणि अपायकारक
अभिलाषांच्या आहारी जातात, जी त्यांना अधोगतीला नेऊन त्यांचा
संपूर्ण नाश करतात. 10 कारण पैशाचा लोभ सर्वप्रकारच्या दुष्टाईचे एक
मूळ होय. पैशाच्या आसक्तीने कित्येक विश्वासापासून बहकले आहेत
आणि त्यांनी स्वतःस अनेक दुःखांनी भेदून घेतले आहे. 11 परंतु हे
परमेश्वराच्या माणसा, तू या सर्व गोष्टींपासून पळ आणि नीतिमत्व,
सुभक्ती, विश्वास, प्रीती, सहनशीलता आणि लीनता यांच्या पाठीस
लाग. 12 विश्वासाचे सुयुद्ध लढ. परमेश्वराने तुला केलेले पाचारण
आणि सार्वकालिक जीवन धरून ठेव, ज्याचा अनेक साक्षीदारांसमक्ष
तू अंगीकार केला आहे. (aiōnios g166) 13 सर्वांना जीवन देणाऱ्या
परमेश्वरासमक्ष आणि पंतय पिलातासमोर निर्भयपणाने साक्ष देणाऱ्या
ख्रिस्त येशूंसमक्ष मी तुला आज्ञा करतो 14 आपले प्रभू येशू ख्रिस्त
परत येईपर्यंत या आज्ञा दोषरहित आणि निर्दोष ठेव. 15 परमेश्वर जे
योग्य समयी त्याला पूर्ण करतील, परमेश्वर जे धन्यवादित व एकच
सर्वसमर्थ, राजांचा राजा आणि प्रभूंचा प्रभू, ज्या एकालाच अमरत्व
आहे, जे अगम्य प्रकाशात राहतात, ज्यांना कोणीही पाहिले नाही, आणि
कोणीही पाहू शकत नाही; त्यांना सदासर्वकाळ गौरव आणि चिरकाल
सामर्थ्य असो. आमेन. (aiōnios g166) 17 जगातील श्रीमंतांना निक्षून
सांग की त्यांनी गर्विष्ठ आणि उद्धट होऊ नये; त्या धनावर विसंबून राहू
नये. तर परमेश्वर जे आपल्या उपभोगासाठी सर्वकाही विपुल देतात,
त्याचा अभिमान बाळगा व त्यांच्यावर भरवसा ठेवा. (aiōn g165) 18
त्यांना चांगले ते करण्यासाठी, सत्कर्माविषयी धनवान व गरजवंतांना
औदार्याने देणे व परोपकारी असण्याविषयी आज्ञा द्या. 19 अशाप्रकारे,
ही संपत्ती त्यांच्या भावी युगाच्या पायाभरणीसाठी खर्च केली जाईल,
जेणेकरून जे जीवन जगू शकतील ते वास्तव आहे. 20 हे तीमथ्या, जी
ठेव तुला सोपविली आहे तिचे रक्षण कर आणि अधर्माच्या रिकाम्या
वटवटीपासून आणि ज्ञानाच्या फुशारक्या मारणाऱ्याबरोबर मूर्खपणाचे
वाद वर्ज्य कर. 21 कित्येक ती स्वीकारून विश्वासापासून ढळले आहेत.
परमेश्वराची कृपा तुझ्याबरोबर असो.

# 2 तीमथ्य

1 ख्रिस्त येशूंमधील जीवनाच्या अभिवचनानुसार, परमेश्वराच्या इच्छेने
ख्रिस्ताचा प्रेषित पौल याच्याकडून, 2 माझा प्रिय पुत्र तीमथ्य यास:
3 मी निरंतर प्रार्थनेत तुझी आठवण करताना, ज्या माझ्या पूर्वजांच्या
परमेश्वराची मी शुद्ध मनाने सेवा करतो, त्यांचे आभार मानतो. 4
त्यावेळचे तुझे अश्रू मला आठवतात. तुला पुन्हा भेटण्यास मी किती
उत्कंठित झालो आहे, जेणे करून माझा आनंद पूर्ण होईल. 5 तुझी आई
युनीके आणि तुझी आजी लोईस यांचा प्रभूवर जितका दृढविश्वास आहे
आणि माझी खात्री आहे की तोच विश्वास तुझ्यामध्येही आहे. 6 म्हणूनच
तुझ्यावर मी हात ठेवल्याने, परमेश्वराची जी देणगी तुला मिळाली, त्या
देणगीला तू नव्याने प्रज्वलित केले पाहिजे. याची मी तुला आठवण देत
आहे. 7 कारण परमेश्वराने आम्हाला भित्रेपणाचा आत्मा नाही, तर
सामर्थ्य, प्रीती आणि आत्मसंयमनाचा आत्मा दिला आहे. 8 म्हणून
आपल्या प्रभूविषयी साक्ष देण्यास आणि जो मी त्यांचा बंदिवान, त्या
माझ्याविषयी तू लाज वाटून घेऊ नकोस, तर शुभवार्तेसाठी परमेश्वराच्या
सामर्थ्याने तू माझ्याबरोबर दुःखाचा वाटा घे. 9 त्यांनीच आपले तारण
केले आणि पवित्र जीवनासाठी आपल्याला पाचारण केले हे त्यांनी
आपण काही केले म्हणून नव्हे, तर स्वतःच्या हेतूसाठी व कृपेमुळे
केले. ही कृपा आपल्याला ख्रिस्त येशूंमध्ये युगाच्या पूर्वी दिलेली होती.
**(aiōnios g166)** 10 तर आता आपला तारणारा ख्रिस्त येशूंच्या देखाव्याने
प्रकट झाली आहे, ज्यांनी एकीकडे मृत्यूचा नाश केला आणि दुसरीकडे
ईश्वरीय शुभवार्तेद्वारे जीवन आणि अमरत्व प्रकाशित केले. 11 मला
त्या शुभवार्तेची घोषणा करणारा, प्रेषित आणि शिक्षक म्हणून निवडले
आहे. 12 याच कारणामुळे मी येथे तुरुंगात दुःख सोशीत आहे. पण मला
त्याची मुळीच लाज वाटत नाही, कारण ज्यांच्यावर माझा विश्वास आहे,
त्यांना मी चांगला ओळखतो आणि माझी खात्री आहे की मी त्यांच्याकडे
सोपविलेली माझी ठेव त्यांच्या त्या दिवसापर्यंत राखून ठेवण्यास ते
समर्थ आहे. 13 जो चांगल्या शिक्षणाचा नमुना तू माझ्याकडून ऐकला,
तो ख्रिस्त येशूंमधील विश्वास आणि प्रीती याबरोबर दृढ धरून राहा. 14
आमच्या ठायी वस्ती करीत असलेल्या पवित्र आत्म्याकडून मिळालेली
चांगली ठेव सांभाळ. 15 आशियातील सर्व विश्वासणारे माझ्यापासून दूर
गेले आहे, हे तुला माहीतच आहे. त्यामध्ये फुगलस आणि हर्मगनेस हे
देखील आहेत. 16 अनेसिफर आणि त्याचे सर्व कुटुंबीय यांच्यावर प्रभू
दया करो, कारण त्याने अनेक वेळा मला उत्तेजन दिले आणि त्याला
माझ्या तुरुंगवासाची कधीच लाज वाटली नाही. 17 जेव्हा तो रोममध्ये
आला, तेव्हा त्याने सर्वत्र माझा कसून शोध केला आणि शेवटी मला
शोधून काढले. 18 त्या दिवशी प्रभूपासून त्याला दया मिळेल असे प्रभू
करो! इफिसमध्ये त्याने मला किती प्रकारे मदत केली, हे तुला चांगले
माहीत आहे.

2 माझ्या मुला, ख्रिस्त येशूंच्या ठायी जी कृपा आहे, तिच्यात सबळ हो.
2 ज्यागोष्टी तू पुष्कळ साक्षीदारांच्या समोर माझ्याकडून ऐकल्या,
त्या विश्वासू माणसांच्या स्वाधीन कर. जे इतरांनाही शिकविण्यास
समर्थ आहेत. 3 येशू ख्रिस्ताचा एक चांगला सैनिक या नात्याने
माझ्यासोबत तू आपल्या दुःखाचा वाटा उचल, 4 कोणताही सैनिक
स्वतःला संसाराच्या व्यवहारात गुंतवून घेत नाही. यासाठी की ज्याने
त्याला सैन्यात घेतले त्याला संतुष्ट करावे. 5 एखाद्याने मल्लयुद्धात भाग
घेतला परंतु नियमानुसार कामगिरी न केल्यास त्याला विजय पदक
मिळणार नाही. 6 परिश्रम करणाऱ्या शेतकऱ्याने पिकाचा पहिला वाटा
घेणे योग्य आहे. 7 जे मी तुला सांगत आहे त्यावर मनन कर आणि
हे समजण्यास प्रभू तुला साहाय्य करो. 8 येशू ख्रिस्त, जे दावीदाचे
वंशज, मृतांतून उठविले गेले याची आठवण ठेव, हीच माझी शुभवार्ता.
9 या ईश्वरीय शुभवार्तेकरिता मी एखाद्या गुन्हेगाराप्रमाणे साखळीने
बांधलेला असून मला दुःख भोगावे लागत आहे, तरी परमेश्वराचे वचन
साखळीने जखडलेले नाही. 10 परमेश्वराच्या निवडलेल्या लोकांना
माझ्या दुःखसहनाकडून ख्रिस्त येशूंमध्ये तारण आणि सार्वकालिक
गौरव मिळणार असेल, तर मी ती दुःखे आनंदाने सोशीन. **(aiōnios
g166)** 11 ही बाब विश्वासयोग्य आहे की त्यांच्याबरोबर आपण मेलो तर
त्यांच्याबरोबर जिवंतही राहू. 12 जर आपण धीराने दुःख सहन करतो
तर त्यांच्याबरोबर राज्यही करू, जर आपण त्यांना नाकारतो तर तेही
आपल्याला नाकारतील. 13 जर आपण अविश्वासी झालो, तरी ते विश्वासू
राहतात, कारण त्यांना स्वतःला नाकारता येत नाही. 14 परमेश्वराच्या
लोकांना या गोष्टींची आठवण करून देत राहा. परमेश्वरासमोर त्यांना
इशारा दे की त्यांनी शाब्दिक वाद करू नये. याचा कोणालाही फायदा
होत नाही, परंतु यामुळे ऐकणाऱ्यांचा नाश होतो. 15 तू सत्यवचन नीट
सांगणारा, लाज वाटण्यास कोणतेही कारण नसलेला, परमेश्वराच्या
पसंतीस उतरलेला कामकरी, असा तू स्वतःस परमेश्वराला सादर
करण्याचा प्रयत्न कर. 16 भक्तिहीन वादविवाद टाळा, कारण जे
त्यात गुंततात ते अधिकाधिक भक्तिहीन होतील. 17 आणि याप्रकारचे
शिक्षण कुजलेल्या जखमेसारखे पसरेल. हुमनाय व फिलेत, ती दोघे
अशा प्रकारची माणसे आहेत. 18 त्यांनी सत्याचा मार्ग सोडला आणि
मेलेल्यांचे पुनरुत्थान आधीच झाले आहे, अशी घोषणा करीत अनेकांचा
विश्वास नष्ट केला आहे. 19 परंतु परमेश्वराने घातलेला पाया स्थिर आहे,
त्यास शिक्का हा आहे: "जे प्रभूचे आहेत, त्यांना ते ओळखतात,"
आणि "प्रभूचे नाव घेणाऱ्यांनी अधर्मापासून दूर राहावे." 20 मोठ्या
घरात सोन्याचांदीची, तशीच काही लाकडाची व मातीची बनविलेली पात्रे
असतात. काही विशेष उद्देशासाठी व काही सामान्य वापरासाठी आहेत.
21 म्हणूनच, जो स्वतःला त्यापासून दूर राहून शुद्ध करतो, तो सन्मानास
नेमलेले, पवित्र, स्वामीसाठी उपयुक्त आणि प्रत्येक चांगल्या कार्यासाठी
तयार केलेले पात्र मानला जाईल. 22 तारुण्यातील वासनांपासून दूर
पळ आणि जे प्रभूला शुद्ध अंतःकरणाने हाक मारतात त्यांच्यासोबत
नीतिमत्व, विश्वास, प्रीती, शांती यांच्यामागे लाग. 23 परंतु मूर्खपणाच्या
आणि अज्ञानाच्या वादात गुंतला जाऊ नकोस, कारण त्याद्वारे भांडणे
होतात हे तुला ठाऊक आहे. 24 प्रभूचे सेवक भांडखोर नसावेत, तर जे

अयोग्य गोष्टी करतात, त्यांचे ते सौम्य, सहनशील असे शिक्षक असावेत.
25 विरोध करणाऱ्यांना नम्रतेने शिकविण्याचा प्रयत्न कर, कदाचित
परमेश्वर त्यांना सत्याच्या ज्ञानाच्या प्राप्तीसाठी पश्चात्ताप देईल. 26
सैतानाने त्यांना त्याच्या इच्छेप्रमाणे करण्यासाठी कैद करून ठेवले
आहे. ते शुद्धीवर येतील आणि सैतानाच्या सापळयातून सुटतील.

**3** हे लक्षात ठेव, शेवटच्या दिवसांमध्ये कठीण संकटाचे काळ येतील.
2 लोक स्वार्थी, धनलोभी, गर्विष्ठ, बढाईखोर, परमेश्वराचा उपहास
करणारे, मातापित्यांची अवज्ञा करणारे, दयाहीन, अपवित्र, 3 ममताहीन,
क्षमा न करणारे, चहाड्या करणारे, आत्मसंयमन न करणारे, क्रूर,
चांगल्याचा द्वेष करणारे, 4 विश्वासघातकी, बेपर्वा, अहंकारी, परमेश्वरावर
प्रीती करण्याऐवजी सुखोपभोगावर प्रीती करणारे होतील. 5 ते भक्तीचा
देखावा करतील, परंतु त्याच्या सामर्थ्याला नाकारतील, अशा सर्व
लोकांपासून दूर राहा. 6 ते अशा प्रकारचे लोक आहेत की ते घरांमध्ये
शिरतात व पापांनी दबलेल्या, सर्वप्रकारच्या दुष्ट वासनांनी वेढलेल्या
व सतत शिकत असूनही ज्यांना सत्य कधीही उमगले नाही, अशा
स्त्रियांना वश करतील. 8 यान्नेस आणि यांब्रेस यांनी जसा मोशेला
विरोध केला, तसेच हे शिक्षक सत्याचा विरोध करतात. ते भ्रष्ट बुद्धीचे
आणि विश्वासाविषयी नाकारलेले असे लोक आहेत. 9 परंतु हे फार
काळ चालणार नाही. कारण जसा त्यांचा मूर्खपणा उघड झाला होता,
तसेच यांचाही मूर्खपणा प्रत्येकाला कळून येईल. 10 परंतु माझी
शिकवण, वागणूक, संकल्प, विश्वास, सहनशीलता, प्रीती, धीर 11
आणि अंत्युखिया, इकुन्या व लुस्त्र या शहरात आलेली संकटे आणि
माझा झालेला छळ हे तुला पूर्ण माहीत आहे. परंतु या सर्वांतून प्रभूनेच
मला सोडविले. 12 खरे पाहिले तर ख्रिस्त येशूंमध्ये जे सुभक्तीने जीवन
जगण्याचा निश्चय करतात, त्या सर्वांचा छळ होईल. 13 परंतु दुष्ट आणि
भोंदू लोक हे दुसऱ्यांना फसवून आणि स्वतः फसून अधिक वाईटाकडे
जातील. 14 परंतु तुझ्यासाठी, तू ज्यागोष्टी शिकलास, ज्याविषयी तुझी
खात्री झाली आहे, त्या धरून राहा; कारण त्या तू कोणापासून शिकलास
तुला माहीत आहे. 15 लहानपणापासूनच पवित्रशास्त्र तुला माहीत आहे.
हेच पवित्रशास्त्र ख्रिस्त येशूंमधील विश्वासाच्याद्वारे परमेश्वराचे तारण
स्वीकारण्यासाठी तुला सुज्ञ करते. 16 संपूर्ण पवित्रशास्त्र परमेश्वराच्या
प्रेरणेने रचलेले आहे आणि शिक्षण, निषेध, सुधारणा, नीतिमत्वाचे
शिक्षण याकरिता उपयोगी आहे. 17 यासाठी की, परमेश्वराचा सेवक
पूर्णपणे प्रत्येक चांगल्या कामासाठी सज्ज व्हावा.

**4** परमेश्वरासमक्ष आणि जे आपले राज्य स्थापन करण्यासाठी येतील,
तेव्हा जिवंतांचा व मेलेल्यांचा न्याय करतील, त्या ख्रिस्त येशूंसमक्ष
मी तुला आदेश देतो की: 2 तू वचनाची घोषणा करीत राहा. वेळी
अवेळी त्यामध्ये तत्पर राहा. सर्व सहनशीलतेने व शिक्षणाने दोष
दाखव, निषेध कर आणि बोध कर. 3 कारण अशी वेळ येईल जेव्हा
लोक शुद्ध शिक्षण स्वीकारणार नाहीत. त्याऐवजी, स्वतःच्या इच्छा
पूर्ण करण्यासाठी त्यांच्याभोवती असंख्य शिक्षक एकत्रित करतील जे
त्यांच्या कानाची खाज जिरविणारे उपदेश देतील. 4 ते सत्यापासून
आपले कान फिरवतील आणि काल्पनिक कथांकडे वळतील. 5 परंतु
या सर्व विषयांमध्ये सावध राहा; दु:ख सहन कर; ईश्वरीय शुभवार्तेच्या
प्रचारकाचे काम कर आणि आपली सेवा पूर्ण कर. 6 कारण मी आता
पेयार्पणासारखा ओतला जात असून, माझी जाण्याची वेळ आली आहे.
7 मी चांगले युद्ध लढलो आहे, धाव संपवली आहे, विश्वास राखला आहे.
8 पुढे आता माझ्यासाठी जो नीतिमत्वाचा मुकुट ठेवला आहे, प्रभू,
आपले नीतिमान न्यायाधीश, त्या दिवशी मला देतील, आणि केवळ
मलाच नाही, तर जे त्यांच्या परत येण्याची आवडीने वाट पाहत आहेत,
त्या सर्वांना मिळेल. 9 शक्य तितक्या लवकर माझ्याकडे येण्याचा
प्रयत्न कर, 10 कारण देमासाने जगावर प्रीती केल्याने, मला सोडून तो
थेस्सलनीकास गेला आहे. क्रिसेन्स गलातीयास व तीत दालमतियास
गेले आहेत. (aiōn g165) 11 केवळ लूकच माझ्याबरोबर आहे. येताना
मार्काला घेऊन ये, कारण माझ्या सेवेत तो उपयोगी आहे. 12 मीच
तुखिकास इफिसास पाठविले 13 माझा अंगरखा जो त्रोवासात बंधू
कार्पूसजवळ राहिला आहे, तो तू येतांना घेऊन ये, सोबत माझी पुस्तके
व विशेषकरून चर्मपत्रेही आण. 14 आलेक्सांद्र तांबटाने माझे फार
वाईट केले. प्रभू त्याला त्याच्या कामाचे योग्य फळ देतील, 15 परंतु तू
पण त्याच्यापासून सावध राहा; कारण आम्ही जे बोललो, त्या सर्व
बोलण्यास त्याने जोरदार विरोध केला. 16 माझ्या पहिल्या सुनावणीच्या
वेळी कोणीही माझ्याबरोबर नव्हते, प्रत्येकाने माझा त्याग केला; याचा
दोष त्यांच्यावर येऊ नये. 17 परंतु प्रभू माझ्याजवळ उभे राहिले आणि
धैर्याने माझ्या संपूर्ण संदेशाची घोषणा व्हावी व ती सर्व गैरयहूदीयांनी
ऐकावी म्हणून त्यांनी मला संधी दिली. सिंहापुढे टाकले जाण्यापासून
मला सोडविले. 18 प्रभू सर्व वाईटापासून मला सोडवतील आणि मला
त्यांच्या स्वर्गीय राज्यात सुरक्षित आणतील. परमेश्वराला सदासर्वकाळ
गौरव असो. आमेन. (aiōn g165) 19 प्रिस्किल्ला, अक्विला आणि
अनेसिफराच्या कुटुंबीयांनी माझा सलाम सांग. 20 एरास्त करिंथमध्येच
राहिला आणि त्रोफिम आजारी झाला. त्याला मिलेता येथेच ठेऊन मी
आलो. 21 हिवाळयापूर्वी इकडे येण्याचा प्रयत्न कर. युबूल, पुदेस, लीन,
क्लौदिया आणि इतर सर्वजण तुला शुभेच्छा पाठवितात. 22 प्रभू येशू
ख्रिस्त तुझ्या आत्म्याबरोबर असो. तुम्हा सर्वांवर कृपा असो.

# तीता

**1** परमेश्वराने निवडलेल्या लोकांच्या विश्वासाच्या वृद्धीसाठी आणि
त्यांना भक्तीच्या मार्गावर नेणाऱ्या सत्याच्या ज्ञानासाठी नेमलेला
परमेश्वराचा दास व येशू ख्रिस्ताचा प्रेषित पौल याच्याकडून, 2 परमेश्वर
जे कधीही खोटे बोलत नाहीत, त्यांनी सार्वकालिक जीवनाच्या आशेचे
अभिवचन सुरवातीच्या काळाच्या आधीपासून दिले (aiōnios g166)
3 आणि आता त्यांच्या नियोजित वेळेनुसार प्रचाराद्वारे ते प्रकाशात
आणले, जे आपल्या तारणाऱ्या परमेश्वराच्या आज्ञेने मला सोपविण्यात
आले. 4 आमच्यासारखाच विश्वासात असलेला माझा खरा पुत्र तीत
याला: 5 मी तुला क्रेता बेटावर सोडले, जेणे करून तू तेथील उर्वरित
कार्याची संपूर्ण व्यवस्था करावी आणि माझ्या आज्ञेनुसार प्रत्येक
नगरात मंडळीचे वडील नेमावे. 6 जो निर्दोष आणि एकाच स्त्रीचा पती
असावा; त्याची मुले विश्वासणारी असून त्यांच्यावर दुराचाराचा व ती
अवज्ञा करणारी असल्याचा आरोप नसावा. 7 अध्यक्ष हे परमेश्वराच्या
घराचे कारभारी आहेत म्हणून त्यांचे जीवन निर्दोष असावे. तर स्वच्छंदी
अथवा लवकर रागास येणारे, मद्यपी अथवा भांडखोर, किंवा अनीतीने
धन मिळविणारे नसावेत. 8 ते पाहुणचार करण्याची आवड असणारे,
चांगल्या गोष्टींवर प्रेम करणारे, इंद्रियदमन करणारे, सरळ, पवित्र
आणि शिस्तबद्ध असावे. 9 त्याने शिकविल्याप्रमाणे विश्वासू संदेश
दृढपणे धरून ठेवले पाहिजे, जेणेकरून ते चांगल्या शिकवणीने इतरांना
प्रोत्साहन देणारे आणि जे विरोध करतात त्यांचे खंडन करणारे असावे.
10 कारण अनावर, व्यर्थ बोलणारे आणि फसविणारे पुष्कळ लोक
आहेत, त्यांच्यात विशेषकरून सुंता झालेल्या गटाचे आहेत. 11 त्यांचे
तोंड बंद केले पाहिजे; कारण अप्रामाणिक लाभासाठी जे शिकवू नये ते
शिकवून ते संपूर्ण घराण्यांची उलथापालथ करीत आहेत. 12 त्यांच्याच
कोणाएका संदेष्ट्याने सांगितले आहे, “क्रेतीय लोक लबाड, दुष्ट पशू,
आळशी खादाड आहेत.” 13 हा संदेश अगदी खरा आहे. यास्तव त्यांना
कडकपणे ताकीद दे, जेणेकरून ते विश्वासात दृढ होतील, 14 यहूदी
काल्पनिक कथाकडे आणि सत्याकडे पाठ फिरविलेल्या लोकांच्या
आज्ञाकडे दुर्लक्ष करतील. 15 शुद्ध लोकांसाठी सर्वगोष्टी शुद्ध आहेत, तर
भ्रष्ट आणि विश्वास नसलेल्या लोकांसाठी काहीही शुद्ध नाही. कारण
त्यांचे मन आणि विवेकभाव हे दोन्ही अशुद्ध आहेत. 16 ते परमेश्वराला
ओळखतात असा दावा करतात, परंतु त्यांच्या कृत्याने ते चुकीचे सिद्ध
होते. ते घृणास्पद, आज्ञा न पाळणारे आणि कोणत्याही चांगल्या
कार्यासाठी अयोग्य आहेत.

**2** शुद्ध शिक्षणास जे धरून आहे तेच तू शिकव. 2 वयस्क पुरुषांनी
नेमस्त, आदरास पात्र, आत्मसंयमी व विश्वास, प्रीती आणि
सहनशीलता यामध्ये खंबीर असावे, असे शिक्षण तू त्यांना दे. 3
त्याचप्रमाणे वयस्क स्त्रिया आदरयुक्त असाव्या; त्या इतरांच्या चहाड्या
करीत फिरणाऱ्या किंवा मद्यपानासक्त नसाव्या; त्या सुशिक्षण देणाऱ्या
असाव्या; 4 म्हणजे त्या तरुण स्त्रियांस त्यांच्या पतींवर आणि
मुलांवर प्रीती करण्यास, 5 आत्मसंयमी, शुद्धाचरणी, घरकामात मग्न,
मायाळू व आपल्या पतींच्या अधीन राहण्यास शिकविता येईल, म्हणजे
परमेश्वराच्या वचनाची निंदा होणार नाही. 6 तसेच, तरुणांनी आत्मसंयमी
व्हावे, म्हणून त्यांना प्रोत्साहित कर. 7 जे चांगले ते करून, तू त्यांना
प्रत्येक गोष्टींत कित्ता घालून दे. तुझ्या शिकविण्यात प्रामाणिकपणा,
गांभीर्य दाखव. 8 दोष लावता येणार नाही अशा सद्भाषणाने युक्त
तुझी शिकवण असावी; यासाठी की जे तुला विरोध करतील, त्यांना
आपल्याविषयी वाईट बोलण्यास जागाच नसल्यामुळे लाज वाटावी. 9
दासांना असा बोध कर की त्यांनी त्यांच्या धन्याच्या अधीन असावे,
त्यांना संतुष्ट करण्याचा प्रयत्न करावा, त्यांना उलट उत्तर देऊ नये; 10
आणि त्यांनी चोरी करू नये, तर त्यांच्यावर भरवसा ठेवण्यास ते लायक
आहेत असे दाखवावे. यासाठी की या सर्व गोष्टींत त्यांनी आपल्या
तारणाऱ्या परमेश्वराबद्दलच्या शिक्षणास शोभा आणावी. 11 कारण
आता सर्वांना तारण देणारी परमेश्वराची कृपा प्रकट झाली आहे. 12 ती
कृपा आपल्याला असे शिकविते की, आम्ही अभक्ती व ऐहिक वासनांना
“नाही” म्हणून, आताच्या युगात आत्मसंयमाने, नीतीने व सुभक्तीने
जगावे; (aiōn g165) 13 आणि धन्य आशेची, म्हणजे येशू ख्रिस्त आपले
महान परमेश्वर आणि तारणाऱ्यांचे गौरव प्रकट होण्याची वाट पाहावी.
14 त्यांनीच स्वतःचे बलिदान देऊन आपल्याला प्रत्येक अधर्मापासून
मुक्त केले, त्यांनी स्वतःसाठी शुद्ध करून त्यांच्या चांगल्या कार्यासाठी
आपल्याला उत्साही प्रजा बनविले. 15 अधिकाराने या सर्व विषयांचे
शिक्षण देऊन लोकांना बोध आणि प्रोत्साहित कर. यात कोणीही तुला
तुच्छ मानू नये.

**3** आपल्या लोकांना आठवण करून दे की, सत्ता व अधिकारी यांच्या
अधीन राहून आज्ञापालन करावे आणि चांगल्या कार्याकरिता नेहमी
सिद्ध असावे, 2 त्यांनी कोणाची निंदा करू नये व भांडण करू नये, तर
सर्वांशी सौम्यतेने आणि आदराने वागावे. 3 पूर्वी आपण देखील मूर्ख व
अवज्ञा करणारे; सर्वप्रकारे बहकलेले आणि विलासवृत्ती आणि दुष्ट
वासनांचे गुलाम होतो. क्रोध व हेवा यांनी आपली जीविते भरून गेली
हाती आणि एकमेकांचा द्वेष करणारे होतो. 4 जेव्हा आपल्या तारणाऱ्या
परमेश्वराची दया आणि प्रीती प्रकट होण्याची वेळ आली, 5 तेव्हा त्यांनी
आपले तारण केले, कारण हे आपण केलेल्या नीतिच्या कृत्यामुळे झाले
नाही, तर ते त्यांच्या दयेने झाले आणि आपल्याला नवीन जन्माचे स्नान
व पवित्र आत्म्याने केलेले नवीनीकरण दिले आहे. 6 त्यांनी आपले
तारणकर्ता येशू ख्रिस्ताद्वारे आपल्यावर विपुलतेने पवित्र आत्मा ओतला
आहे, 7 म्हणून त्यांच्या कृपेमुळे आपणास नीतिमान ठरविण्यात यावे
आणि त्यांनी दिलेल्या सार्वकालिक जीवनाच्या आशेनुसार आपण
वारस व्हावे. (aiōnios g166) 8 मी तुला सांगितलेल्या या सर्वगोष्टी
सत्य आहेत आणि या गोष्टींवर विशेष भर देऊन तू त्या सांगाव्या अशी
माझी इच्छा आहे, यासाठी की ज्यांनी परमेश्वरावर विश्वास ठेवला आहे,
त्यांनी सत्कार्य करण्याविषयी काळजी घ्यावी. या गोष्टी उत्कृष्ट असून
प्रत्येकाला लाभदायक आहेत. 9 परंतु नियमशास्त्राबद्दल मूर्खवाद,

वंशावळया व वादविवाद आणि भांडणे टाळा, कारण हे निरर्थक आणि निरुपयोगी आहे. 10 तुमच्यामध्ये कोणी तट पाडत असेल, तर त्याला पहिला व दुसरा इशारा दिला जावा, नंतर त्याच्याशी संबंध ठेवू नये. 11 असा मनुष्य बिघडलेला आहे आणि त्याने स्वतःला दोषी ठरविले असून तो पाप करतो, याची तू खात्री बाळग. 12 अर्तमाला किंवा तुखिकाला मी तुझ्याकडे पाठविल्यानंतर शक्य तितक्या लवकर तू मला निकोपोलीस येथे येऊन भेट, कारण मी हिवाळयात तिथेच राहण्याचा निश्चय केला आहे. 13 जेनस जो विधि-विशेषज्ञ व अपुल्लोस यांच्या प्रवासासाठी तुमच्याकडून शक्य होईल ती सर्व मदत करा आणि त्यांना लागणाऱ्या गरजेच्या सर्व गोष्टी त्यांच्याकडे आहेत याची काळजी घ्या. 14 कारण गरजवंतांना मदत करण्यास आपल्या लोकांनी शिकले पाहिजे, म्हणजे ते आपल्या दररोजच्या गरजा भागवू शकतील व निष्फळ जीवन जगणार नाही. 15 माझ्याबरोबर असलेला प्रत्येकजण तुला अभिवादन पाठवितो. जे विश्वासात आमच्यावर प्रेम करतात त्यांना सलाम सांगा. तुम्हा सर्वांवर कृपा असो.

# फिलेमोन

1 ख्रिस्त येशूंचा बंदिवान पौल आणि आपला बंधू तीमथ्य, 2 आमची
बहीण अप्फिया आणि आमचा सहसैनिक अर्खिप—आणि जी
मंडळी तुमच्या घरात एकत्र भेटतात त्यांना: 3 परमेश्वर आपले पिता
व प्रभू येशू ख्रिस्त यांच्याकडून तुम्हास कृपा आणि शांती असो.
4 मी माझ्या प्रार्थनांमध्ये तुझी आठवण करून माझ्या परमेश्वराचे
सतत आभार मानतो, 5 कारण त्यांच्या सर्व पवित्र लोकांवरील तुझी
प्रीती आणि प्रभू येशूंवरील तुझा विश्वास याविषयी मी ऐकले आहे.
6 तुला ख्रिस्तात प्राप्त होणाऱ्या सर्व चांगल्या गोष्टींचे सखोल ज्ञान
होण्यासाठी तुझी आमच्याबरोबर विश्वासामध्ये असलेली भागीदारी
कार्यरत व्हावी अशी मी प्रार्थना करतो. 7 तुझ्या प्रीतीने मला फार
आनंद व प्रोत्साहन प्राप्त झाले आहे, कारण बंधू, तू प्रभूच्या लोकांची
अंत:करणे ताजीतवानी केली आहेस. 8 यास्तव, जे योग्य आहे ते तू
करावे म्हणून तुला आज्ञा देण्याचे जरी मला ख्रिस्ताद्वारे धैर्य आहे, 9 तरी
मी पौल—वयस्क मनुष्य आणि आता ख्रिस्त येशूंचा बंदिवान, तुला
प्रीतीस्तव विनंती करण्याचे पसंत करतो. 10 माझी विनंती माझा पुत्र
अनेसिम जो मी बंधनात असताना माझा आत्मिक पुत्र झाला त्याच्या
संदर्भात आहे. 11 तो यापूर्वी तुला उपयोगी नव्हता, परंतु आता तो
आपल्या दोघांनाही, तुला व मला उपयोगी आहे. 12 तो माझा प्राण
आहे—त्याला मी तुझ्याकडे—परत पाठवित आहे. 13 शुभवार्तेमुळे
मी या बंधनात असताना माझी मदत करण्यासाठी त्याने तुझी जागा
घेतली असती आणि त्याला येथेच ठेवणे मला आवडले असते. 14 परंतु
तुझ्या संमतीशिवाय काहीही करणे मला योग्य वाटले नाही, यासाठी की
जे काही औदार्य तू करशील ते बळजबरीने केल्यासारखे नसावे परंतु
स्वेच्छेने केलेले असावे. 15 कदाचित या कारणासाठी तो थोडा काळ
तुझ्यापासून वेगळा झाला असेल, जेणेकरून तू त्याला सर्वकाळासाठी
प्राप्त करून घ्यावे. **(aiōnios g166)** 16 परंतु येथून पुढे दास नव्हे, तर
दासापेक्षा योग्य असा प्रिय बंधू व्हावे. तो मला अतिशय प्रिय आहे,
परंतु व्यक्तिगत रीतीने आणि प्रभूमध्ये बंधू या दोन्हीही नात्याने तो तुला
अधिक प्रिय आहे. 17 यास्तव जर तू मला भागीदार समजत असशील,
तर जसे तू माझे स्वागत केले असते, तसेच त्याचे कर. 18 जर त्याने
काही अयोग्य कृत्य केले असेल अथवा तो तुझा कर्जदार असेल तर ते
मूल्य माझ्या हिशोबी मांड. 19 हे, मी पौल, माझ्या स्वत:च्या हातांनी
लिहित आहे. मी त्याची परतफेड करेन—वास्तविक तू स्वत: माझा
ऋणी आहेस, परंतु मी त्याचा उल्लेख करणार नाही. 20 बंधू, माझी
इच्छा आहे की प्रभूमध्ये मला तुझ्याकडून काही लाभ व्हावा; माझ्या
हृदयाला ख्रिस्तामध्ये ताजेतवाने कर. 21 तू आज्ञापालन करशील याची
खात्री बाळगून मी तुला हे लिहिले आहे आणि जे मी तुला सांगत आहे
त्यापेक्षा तू कितीतरी अधिक करशील हे मला माहीत आहे. 22 आणखी
एक गोष्ट: माझ्यासाठी पाहुण्यांची खोली तयार ठेव, कारण तुझ्या
प्रार्थनेचे उत्तर म्हणून माझ्या येण्याने तुझी भरपाई होईल अशी मी आशा
करतो. 23 ख्रिस्त येशूंमध्ये माझा सहबंदीवान एपफ्रास तुला शुभेच्छा
पाठवितो. 24 आणि मार्क, अरिस्तार्ख, देमास व लूक हे माझे सहकारी
देखील तुला शुभेच्छा पाठवितात. 25 आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा
तुमच्या आत्म्यासह असो.

# इब्री

**1** भूतकाळात परमेश्वर वेळोवेळी आणि निरनिराळ्या प्रकारे
संदेष्ट्यांद्वारे आपल्या पूर्वजांशी बोलले. 2 पण आता या शेवटच्या
दिवसांमध्ये, ते त्यांच्या पुत्राद्वारे आपल्याशी बोलले आहेत व त्यांना
सर्व गोष्टींचे वारस केले आहे आणि त्यांच्या द्वारेच जग निर्माण केले
आहे. (aiōn g165) 3 पुत्र परमेश्वराच्या गौरवाचे प्रतिबिंब आणि त्याच्या
व्यक्तिमत्वाचे हुबेहूब प्रतिरूप आहेत. ते आपल्या वचनाच्या महान शक्तीने
सर्व गोष्टींना सुस्थिर ठेवतात. पापांची शुद्धी केल्यानंतर, ते स्वर्गामध्ये
वैभवाच्या उजवीकडे बसले आहेत. 4 अशा रीतीने ते देवदूतांपेक्षा
अतिश्रेष्ठ झाले आणि जे नाव त्यांना बहाल केले ते देवदूतांच्या नावांहून
अतिश्रेष्ठ आहे. 5 कारण परमेश्वराने असे कोणत्या देवदूताला कधी
म्हटले, “तू माझा पुत्र आहेस; आज मी तुझा पिता झालो आहे”?
आणि पुन्हा एकदा, “मी त्याचा पिता होईन, आणि तो माझा पुत्र
होणार”? 6 आणि त्याच्या ज्येष्ठ पुत्राला पृथ्वीवर आणतो आणि
म्हणतो, “परमेश्वराचे सर्व दूत त्याची उपासना करोत.” 7 परमेश्वर ते
आपल्या दूतांविषयी बोलताना म्हणतात, “तो वायूला आपले दूत, व
अग्निज्वालांना आपले सेवक करतात.” 8 पण आपल्या पुत्राविषयी
ते म्हणतात, “हे परमेश्वरा, तुमचे सिंहासन सदासर्वकाळ टिकेल;
न्याय्यतेचा राजदंड त्यांच्या राज्याचे राजदंड राहील. (aiōn g165) 9
नीतिमत्व तुम्हाला प्रिय असून दुष्टाईचा तुम्ही द्वेष केला आहे. म्हणूनच
परमेश्वराने, तुझ्या परमेश्वराने, हर्षाच्या तेलाने तुझा अभिषेक करून
तुझ्या सोबत्यांपेक्षा तुला अधिक उंच ठिकाणी स्थिर केले आहे.” 10 ते
असेही म्हणाले, “हे प्रभू, प्रारंभी पृथ्वीचा पाया तुम्हीच घातला, आणि
आपल्या हातांनी तुम्ही गगनमंडळे निर्माण केलीत. 11 ती नष्ट होतील,
परंतु तुम्ही निरंतर राहाल; ती सर्व जुन्या वस्त्राप्रमाणे जीर्ण होतील. 12
तुम्ही ती वस्त्राप्रमाणे गुंडाळणार; आणि वस्त्राप्रमाणे ते बदलतील.
परंतु तुम्ही निरंतर समान राहणार, आणि तुमची वर्षे कधीही संपुष्टात
येणार नाहीत.” 13 आणि परमेश्वराने आपल्या कोणत्या दूतांविषयी असे
म्हटले, “मी तुझ्या शत्रूंना तुझ्या पायाखाली ठेवीपर्यंत तू माझ्या उजव्या
हाताला बसून राहा”? 14 कारण ज्यांना तारण मिळणार आहे, त्यांची
सेवा करण्यासाठी सर्व देवदूत म्हणजे सेवा करणारे म्हणून पाठविलेले
आत्मे नाहीत काय?

**2** आपण ऐकलेल्या गोष्टींकडे फार काळजीपूर्वक लक्ष दिले पाहिजे,
यासाठी की आपण त्यामुळे बहकून जाऊ नये. 2 कारण ज्याअर्थी
देवदूतांद्वारे सांगितलेला संदेश स्थिर होता आणि प्रत्येक आज्ञेचे उल्लंघन
व आज्ञाभंग करणाऱ्यांना योग्य शिक्षा मिळाली. 3 ज्या तारणाची प्रभूने
प्रथम घोषणा केली आणि ऐकणाऱ्यांनी आम्हाला पुष्टी दिली, त्या महान
तारणाची आपण उपेक्षा केली, तर आपण कसे निभावू? 4 परमेश्वराने
चिन्हे, अद्भुते व नाना प्रकारचे चमत्कार करून साक्ष दिली आणि पवित्र
आत्म्याद्वारे त्यांच्या इच्छेनुसार विशिष्ट दाने वाटून दिली आहेत. 5
ज्या येणाऱ्या जगाबद्दल आपण बोलत आहोत, ते जग देवदूतांच्या
हाती सोपवून दिलेले नाही. 6 परंतु एका ठिकाणी एकाने अशी साक्ष
दिली आहे: “मनुष्य तो काय की तुम्ही त्याची आठवण ठेवावी, आणि
मानवपुत्र कोण की त्याची काळजी करावी? 7 तुम्ही त्याला देवदूतांपेक्षा
किंचित कमी असे घडविले आहे. गौरव आणि सन्मान यांचा मुकुट तुम्ही
त्याच्या डोक्यावर ठेवला आहे, 8 आणि सर्वकाही त्यांच्या पायाखाली
ठेवले आहे.” सर्वगोष्टी त्यांच्या पायाखाली ठेवल्या असताना, परमेश्वराने
कोणतीच अशी गोष्ट ठेवली नाही की जी त्यांच्या स्वाधीन केली नाही.
तरी सध्या हे सर्व स्वाधीन केल्याचे आपण अद्यापि पाहिले नाही. 9 पण
फक्त काही काळ देवदूतांहून किंचित कमी असे केले होते, या येशूंना
आता गौरवाने व सन्मानाने मुकुटमंडित केले आहे असे आपण पाहतो,
कारण त्यांनी मरण सोसले, यासाठी की परमेश्वराच्या कृपेद्वारे त्यांनी
प्रत्येकासाठी मरणाचा अनुभव घ्यावा. 10 हे योग्य होते की परमेश्वर,
ज्यांच्यासाठी आणि ज्यांच्याद्वारे सर्वकाही निर्माण झाले, त्यांनी पुष्कळ
पुत्रांना व कन्यांना गौरवात आणावे, यासाठी की त्यांच्या तारणाच्या
उत्पादकाच्या दुःख सहनाद्वारे त्यांना परिपूर्ण करावे. 11 जो लोकांना
पवित्र करतो आणि जे पवित्र झाले आहेत, ते दोन्ही एकाच कुटुंबातील
आहेत. यामुळेच आपल्याला बंधू आणि भगिनी असे म्हणावयाला येशू
लाजत नाही. 12 ते म्हणतात, “मी तुमचे नाव माझ्या बंधुभगिनींसमोर
जाहीर करेन; मी मंडळीमध्ये तुमचे स्तवन गाईन.” 13 आणि पुन्हा,
“मी त्याच्यावर माझा भरवसा ठेवेन.” आणि आणखी ते म्हणाले,
“पाहा, मी आणि परमेश्वराने मला दिलेली लेकरेही येथे आहेत.” 14
आणि ज्याअर्थी लेकरे रक्तमांसाची आहेत, त्याअर्थी तेही रक्तमांसाचे
भागीदार झाले; यासाठी की त्यांच्या मरणाद्वारे सैतानाकडे जे मृत्यूचे
सामर्थ्य होते, ते त्याचे सामर्थ्य मोडून काढावे. 15 मृत्यूच्या भयामुळे
सर्व आयुष्यभर दास्यत्वाच्या गुलामगिरीत राहणाऱ्यांची त्यांना सुटका
करता येईल. 16 हे निश्चित आहे की ते देवदूतांच्या नव्हे तर अब्राहामाच्या
संततीची मदत करतात. 17 या कारणासाठी त्यांना आपल्यासारखे
म्हणजे बंधूसारखे होणे व पूर्ण मानव होणे अगत्याचे होते, कारण
त्यामुळेच त्यांना परमेश्वरासमोर आपला कृपाळू व विश्वासू याजक होता
आले आणि मनुष्याच्या पापांबद्दल प्रायश्चित करता आले. 18 कारण
त्यांनी स्वतःची परीक्षा होत असताना दुःख भोगले, त्याअर्थी आपलीही
परीक्षा होत असताना आपल्याला साहाय्य करावयास ते समर्थ आहेत.

**3** यास्तव, पवित्र बंधू आणि भगिनींनो, तुम्ही जे स्वर्गीय पाचारणाचे
भागीदार आहात, ते तुम्ही आपले विचार येशूंवर केंद्रित करा, त्यांना
आम्ही आमचा प्रेषित आणि महायाजक म्हणून कबूल करतो. 2 कारण
जसा मोशे परमेश्वराच्या सर्व घराण्यात विश्वासू होता, तसेच येशूही
ज्यांनी त्यांना नेमले त्यांच्याशी विश्वासू होते. 3 कारण ज्याप्रमाणे
एखाद्या घर बांधणाऱ्याला, घराला लाभणाऱ्या मानापेक्षा अधिक मान
प्राप्त होतो, त्याचप्रमाणे येशू हे मोशेच्या सन्मानापेक्षा अधिक सन्मानास
पात्र ठरले आहेत. 4 कारण प्रत्येक घर कोणीतरी बांधलेले असते,
परंतु सर्वकाही बांधणारे परमेश्वर आहे. 5 जे काही पुढे भविष्यात
परमेश्वराद्वारे बोलले जाणार होते, त्याची साक्ष देण्याकरिता “मोशे हा

परमेश्वराच्या सर्व घराण्यातील एक विश्वासू सेवक होता.” 6 परंतु
विश्वासू पुत्र म्हणून परमेश्वराच्या घरावर ख्रिस्ताची नेमणूक झाली होती.
जर आपण खरोखर आपला विश्वास आणि गौरवाची आशा शेवटपर्यंत
टिकवून ठेवली तर आपण त्यांचे घर आहोत. 7 ज्याप्रकारे पवित्र आत्मा
म्हणतो: “आज, जर तुम्ही त्यांची वाणी ऐकाल, 8 तर तुमची अंत:करणे
कठीण करू नका, जशी रानात परीक्षा होत असताना तुम्ही बंडखोरी
केली होती. 9 जरी त्यांनी माझी कृत्ये चाळीस वर्षे पाहिली होती तरी
तुमच्या पूर्वजांनी माझी परीक्षा घेऊन मला कसोटीस लावले. 10 आणि
म्हणून त्या पिढीवर मी फार संतापलो; मी म्हणालो, ‘त्यांची हृदये
माझ्यापासून नेहमीच दूर जात आहेत, आणि त्यांना माझे मार्ग कळलेच
नाही. 11 मी रागाने शपथ घेतली की, ते माझ्या विसाव्यात कधीही
प्रवेश करणार नाहीत.’” 12 बंधू आणि भगिनींनो, आपले हृदय पापमय
आणि अविश्वासू होऊन आपल्यापैकी कोणीही जिवंत परमेश्वराला
सोडून जाणार नाही म्हणून जपा. 13 अद्यापि “आज” म्हटलेला जो
काळ आहे तोपर्यंत, दररोज एकमेकांना उत्तेजन द्या, म्हणजे पापाच्या
कपटामुळे तुमचे मन कठीण होणार नाही. 14 जर आपण आपला
आरंभीचा भरवसा शेवटपर्यंत दृढ धरला तर ख्रिस्तामध्ये आपल्याला
सहभाग आहे. 15 ज्याप्रमाणे आताच म्हटले आहे: “आज, जर तुम्ही
त्यांची वाणी ऐकाल, तर जशी तुम्ही बंडखोरीमध्ये केली, तशी आपली
अंत:करणे कठीण करू नका.” 16 ज्यांनी वाणी ऐकली आणि नंतर बंड
केले ते लोक कोण होते? मोशेने ज्यांना इजिप्तमधून बाहेर काढले, तेच
हे लोक होते नाही का? 17 आणि चाळीस वर्षे ते कोणावर रागावले
होते? तेच लोक होते ना ज्यांनी पाप केले आणि परिणामी त्यांचे शरीरे
रानात विनाश पावली? 18 ते त्यांच्या विसाव्यात केव्हाही येणार नाहीत
असे परमेश्वराने शपथ वाहून म्हटले, ते ज्यांनी त्याच्या आज्ञा पाळल्या
नाहीत, त्यांना नाही तर कोणाला बोलत होते? 19 आणि त्यांच्या
अविश्वासूपणामुळे ते प्रवेश करू शकले नाहीत.

**4** यास्तव, ज्याअर्थी त्यांच्या विसाव्यात प्रवेश करण्याचे अभिवचन
अद्यापि कायम आहे, त्याअर्थी तुमच्यातील कोणीही उणा पडू
नये म्हणून काळजी घ्या. 2 कारण ही शुभवार्ता जशी त्यांना तशी
आपल्यालाही सांगितली होती; पण जो संदेश त्यांनी ऐकला त्यामुळे
त्यांचे काहीही भले झाले नाही, कारण ज्यांनी आज्ञापालन केले त्यांच्या
विश्वासात ते सहभागी झाले नाहीत. 3 ज्यांनी विश्वास ठेवला त्यांनाच
विसाव्यात जाता येते, जसे परमेश्वराने म्हटले, “मी रागाने शपथ घेतली
की, ते माझ्या विसाव्यात कधीही प्रवेश करणार नाहीत.” जरी जगाच्या
स्थापनेपासून परमेश्वर त्यांना स्वीकारावयास सिद्ध आहेत व त्यांची वाट
पाहत आहेत. 4 कारण सातव्या दिवसाबद्दल असे कुठेतरी लिहिले आहे,
“परमेश्वराने सातव्या दिवशी त्यांच्या सर्व कामापासून विश्रांती घेतली.”
5 अजून वरील भागात परमेश्वर म्हणतात, “ते माझ्या विसाव्यात कधीही
प्रवेश करणार नाहीत.” 6 तरी, ते अभिवचन कायम असून काहीजण
त्या विसाव्यात जातात, पण पहिल्यांदा ज्यांना शुभवार्ता ऐकण्याची
संधी मिळाली तरी त्यांनी आज्ञा मोडल्यामुळे ते प्रवेश करू शकले नाहीत.
7 परंतु विसाव्यात प्रवेश करण्यासाठी परमेश्वराने दुसरी वेळ नेमली
आहे आणि त्याला “आज” असे म्हटले. हे ते फार पूर्वी दावीदाच्या
मुखाद्वारे बोलले होते, आधीच नमूद केलेल्या शब्दांत ते म्हणाले,
“आज तुम्ही त्यांची वाणी ऐकाल तर किती बरे, आपली अंत:करणे
कठीण करू नका.” 8 जर यहोशुआने त्यांना विसावा दिला असता,
तर परमेश्वराने यानंतर दुसऱ्या दिवसाविषयी बोलले नसते. 9 तेव्हा
परमेश्वराच्या लोकांसाठी शब्बाथाचा विसावा राहिला आहे. 10 जो कोणी
परमेश्वराच्या विसाव्यात प्रवेश करतो, त्याने जसा परमेश्वराने त्यांच्या
कृत्यांपासून विसावा घेतला तसा आपल्या कृत्यांपासून सुद्धा विसावा
घेतला आहे. 11 यास्तव, त्या विसाव्यात प्रवेश करण्यासाठी आपण
हरप्रकारे प्रयत्न करू या. यासाठी की त्यांच्या अवज्ञेच्या उदाहरणामुळे
कोणाचाही नाश होऊ नये. 12 कारण परमेश्वराचे वचन जिवंत व
सक्रिय आहे. ते कोणत्याही दुधारी तलवारीहून अधिक तीक्ष्ण असून
जीव आणि आत्मा, सांधे आणि मज्जा यांना खोलवर भेदून जाणारे व
अंत:करणातील विचार आणि वृत्ती यांचा न्याय करणारे आहे. 13 संपूर्ण
सृष्टीतील काहीही परमेश्वराच्या दृष्टीपासून लपलेले नाही. ज्यांना आपण
हिशोब देणे आवश्यक आहे, त्यांच्या डोळ्यांपुढे सर्वकाही अनावृत व
उघडे आहे. 14 यास्तव, स्वर्गमंडलातून पार गेलेले परमेश्वराचे पुत्र येशू
महान महायाजक आपणास आहेत, म्हणून आम्ही विश्वासाचा पत्कर
केलेला आहे तो दृढ धरून ठेऊ या. 15 ते असे महायाजक नाहीत जे
आपल्या दुर्बलतेविषयी सहानुभूती दर्शविण्यास असमर्थ आहे, परंतु
असे आहेत जे सर्वप्रकारे आमच्यासारखेच पारखलेले होते तरी निष्पाप
राहिले. 16 तेव्हा आपल्यावर दया व्हावी आणि गरजेच्यावेळी साहाय्य
मिळण्यासाठी आपल्याला कृपा प्राप्त व्हावी, म्हणून आपण धैर्याने
प्रत्यक्ष परमेश्वराच्या कृपेच्या सिंहासनाजवळ जाऊ या.

**5** प्रत्येक महायाजक परमेश्वर विषयक गोष्टींबाबत लोकांचे प्रतिनिधित्व
करण्यासाठी व पापांसाठी देणग्या आणि यज्ञे अर्पण करण्यासाठी
निवडला जातो. 2 तो स्वत: निर्बलतेच्या अधीन असल्यामुळे अज्ञानी व
भटकलेल्या लोकांबरोबर सौम्यतेने वागू शकतो. 3 या कारणासाठीच
त्याला स्वत:च्या पापांसाठी आणि लोकांच्या पापांसाठी यज्ञ करावा
लागत असे. 4 आणि कोणीही हा सन्मान स्वत:हून घेऊ शकत नाही,
ज्यांना परमेश्वराने अहरोनासारखे पाचारण केले आहे त्यांनाच तो प्राप्त
होतो. 5 त्याच प्रकारे ख्रिस्तानेही स्वत:ला महायाजक होण्यासाठी
गौरविले नाही. परंतु परमेश्वर त्याला म्हणाले, “तू माझा पुत्र आहे;
आज मी तुझा पिता झालो आहे.” 6 आणखी दुसऱ्या ठिकाणी ते असे
म्हणाले, “मलकीसदेकाच्या संप्रदायाप्रमाणे तू सदासर्वकाळचा याजक
आहे.” (aiōn g165) 7 येशू त्या दिवसात पृथ्वीवर देहामध्ये असताना,
स्वत:ला मृत्यूपासून वाचविण्यास जे समर्थ आहेत, त्यांच्याजवळ
त्यांनी अश्रू गाळीत आणि आत्म्यात मोठ्या आक्रोशाने विनवणी करीत
प्रार्थना केली आणि त्यांची प्रार्थना त्याच्या आदरयुक्त अधीनतेमुळे
ऐकण्यात आली. 8 ते पुत्र होते, तरी त्यांनी सोसलेल्या दु:ख सहनाद्वारे
ते आज्ञापालन शिकले. 9 आणि परिपूर्ण केल्यामुळे, त्यांच्या आज्ञा

मानणाऱ्या सर्वांचे अनंतकाळचे तारणकर्ता झाले, (aiōnios g166) 10 आणि परमेश्वराद्वारे मलकीसदेकाच्या संप्रदायाप्रमाणे महायाजक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. 11 याबाबतीत आम्हाला खूप सांगावेसे वाटते, परंतु हे तुम्हाला स्पष्ट करून सांगणे कठीण आहे, कारण तुम्ही समजून घेण्याचा प्रयत्न करीत नाही. 12 वास्तविक आतापर्यंत तुम्ही शिक्षक व्हायला पाहिजे होते, पण त्याऐवजी कोणीतरी तुम्हालाच परमेश्वराच्या वचनांची मूलतत्वे परत शिकविण्याची गरज आहे. तुम्हाला दूध हवे, जड अन्न नव्हे! 13 आणि जो कोणी दुधावर जगतो तो अजून तान्हेबाळ आहे आणि तान्हेबाळ असल्यामुळे नीतिमत्वाच्या शिक्षणाविषयी अपरिचित आहे. 14 परंतु जड अन्नाचे सेवन परिपक्वांसाठी असते, जे सतत योग्य व अयोग्य यामधील फरक समजण्याचा सराव करून स्वतःला प्रशिक्षित करतात.

**6** यास्तव आपण ख्रिस्ताविषयीच्या प्राथमिक शिक्षणाच्या पलीकडे जाऊन व्यर्थ प्रथांबद्धल पश्चात्ताप आणि परमेश्वरावरील विश्वास यात परिपक्व होऊ या. 2 शुद्धतेच्या प्रथांबाबत, बाप्तिस्म्यांविषयी, डोक्यावर हात ठेवणे, मृतांचे पुनरुत्थान आणि सार्वकालिक न्याय अशा विषयांचा पाया पुन्हा घालू नका. (aiōnios g166) 3 आणि परमेश्वर परवानगी देतील, तर आपण तसे करू. 4 ज्यांना एकदा प्रकाश मिळाला होता, ज्यांनी स्वर्गीय दानांची रुची घेतली, जे पवित्र आत्म्याचे सहभागी झाले, 5 ज्यांनी परमेश्वराच्या उत्तम वचनांची रुची घेतली आणि येणाऱ्या जगाच्या महान सामर्थ्याचा अनुभव घेतला, (aiōn g165) 6 जर त्यांचे पतन झाले तर त्यांना परत पश्चात्तापाकडे आणणे अशक्य आहे. ते परमेश्वराच्या पुत्राला पुन्हा एकदा क्रूसावर खिळतात आणि त्यांची सार्वजनिक नामुष्की करतात, यात त्यांचे नुकसान आहे. 7 जी भूमी तिच्यावर वारंवार पडलेल्या पावसाचे सेवन करते आणि ज्यांनी लागवड केली आहे त्यांना ती उपयोगी पीक देते, तिला परमेश्वराचा आशीर्वाद मिळतो. 8 परंतु जी भूमी काटे आणि कुसळे उपजविते, ती कुचकामी व शापित होण्याच्या बेतात आहे; तिचा अंत जळण्याने होईल. 9 जरी आम्ही असे बोलत असलो तरी, प्रिय मित्रांनो, तुमच्याविषयी आम्हाला यापेक्षा चांगल्या व तारणाबरोबर येणाऱ्या गोष्टींची खात्री आहे. 10 कारण परमेश्वर अन्यायी नाहीत. तुमची कृत्ये आणि त्यांच्या नावावर जी प्रीती तुम्ही त्यांच्या लोकांची मदत करून आणि अजूनही मदत करून दाखविता ती ते विसरणार नाहीत. 11 आमची इच्छा आहे की तुमच्यातील प्रत्येकाने शेवटपर्यंत असाच उत्साह दाखवावा, म्हणजे जी आशा तुम्ही बाळगता ती पूर्ण होईल. 12 तुम्ही आळशी व्हावे अशी आमची इच्छा नाही, परंतु अशांचे अनुकरण करा की जे विश्वासाद्वारे आणि धीराच्या योगे प्रतिज्ञेचे वारस आहेत. 13 जेव्हा परमेश्वराने अब्राहामाला त्यांचे वचन दिले, तेव्हा त्यांना शपथ वाहण्यास स्वतःपेक्षा मोठा कोणी नसल्यामुळे ते स्वतःचीच शपथ वाहून, 14 म्हणाले, “मी तुला निश्चितच आशीर्वादित करेन आणि तुला अनेक वंशज देईन.” 15 मग अब्राहामाने धीराने वाट पाहिल्यानंतर त्याला अभिवचनाप्रमाणे प्राप्त झाले. 16 लोक आपल्यापेक्षा श्रेष्ठ असलेल्यांची शपथ वाहतात आणि जे काही म्हटले आहे शपथ त्याचे समर्थन करते आणि सर्व वादांचा शेवट करते. 17 कारण परमेश्वराने आपला कधीही न बदलणारा संकल्प त्यांच्या वारसांना स्पष्टपणे कळावा म्हणून स्वतःच्या शपथेने तो कायम केला. 18 परमेश्वराने हे यासाठी केले की ज्या दोन न बदलणाऱ्या गोष्टी ज्याविषयी खोटे बोलणे परमेश्वराला अशक्य आहे व आम्ही स्वतःपुढे ठेवण्यात आलेली आशा प्राप्त करण्याकरिता धावलो, त्या आम्हास मोठे उत्तेजन मिळावे. 19 आम्हाला ही आशा जिवासाठी नांगर असून स्थिर व अढळ आहे. ती पडद्याच्या मागे आतील मंदिरात प्रवेश करणारी आहे. 20 जिथे येशूंनी आपला अग्रदूत मलकीसदेकाच्या संप्रदायाप्रमाणे, सदासर्वकाळचा महायाजक म्हणून आपल्यावतीने प्रवेश केला आहे. (aiōn g165)

**7** हा मलकीसदेक शालेमचा राजा असून परात्पर परमेश्वराचा याजकही होता. अनेक राजांचा पराभव करून अब्राहाम परत येत असताना, मलकीसदेक त्याला भेटला व त्याला आशीर्वाद दिला. 2 तेव्हा अब्राहामाने सर्वांचा दहावा भाग त्याला दिला. प्रथम मलकीसदेकाच्या नावाचा अर्थ, “नीतिमत्वाचा राजा” असा आहे; आणि, “शालेमचा राजा” म्हणजे “शांतीचा राजा” असा आहे. 3 त्याची आई किंवा वडील, वंशावळी, जीवनाचा उगम अथवा त्याच्या आयुष्याचा शेवट याविषयी काही माहिती नाही, तरी परमेश्वराच्या पुत्रासमान तो युगानुयुग याजक राहतो. 4 तर तो केवढा थोर आहे याचा विचार करा: कुलपिता अब्राहामाने लुटीचा दहावा हिस्सा त्याला दिला. 5 लेवीच्या गोत्रातील, ज्यांना याजकपण प्राप्त होत असते त्यांना लोकांपासून, म्हणजे जे अब्राहामाच्या वंशजाचे आहेत अशा इस्राएली बांधवांपासून, नियमशास्त्राप्रमाणे दहावा भाग गोळा करता येतो. 6 परंतु हा मनुष्य लेवी वंशातील नव्हता, त्याने अब्राहामापासून दशांश गोळा केला आणि ज्याला वचने मिळाली होती त्याला त्याने आशीर्वाद दिला. 7 हे निर्विवाद सत्य आहे की मोठ्यांकडून कनिष्ठाला आशीर्वाद मिळतो. 8 या एका संदर्भात, याजक जे मर्त्य मानव आहेत, त्यांच्याद्वारे दशांश गोळा केल्या जातो, परंतु दुसऱ्या संदर्भात, तो जिवंत आहे असे त्याच्याविषयी जाहीर केले आहे. 9 दशांश गोळा करणाऱ्या लेवीनेही अब्राहामाद्वारे दशांश दिला असेही एखाद्याला म्हणता येईल. 10 कारण जेव्हा मलकीसदेक अब्राहामाला भेटला, तेव्हा लेवी पूर्वजाच्या शरीरात होता. 11 जर लेवी याजकपणाच्या संबंधात लोकांना खरोखर नियमशास्त्र प्राप्त झाले होते व त्यामुळे पूर्णता प्राप्त झाली असती, याजकपण स्थिर करता आले असते तर दुसऱ्या याजकाची गरज का होती, की जो मलकीसदेकाच्या संप्रदायाप्रमाणे आणि अहरोनाच्या संप्रदायाप्रमाणे नसावा? 12 जेव्हा याजकपण बदलले, तेव्हा नियमात सुद्धा बदल होणे आवश्यक आहे. 13 कारण ज्याच्याबद्दल या गोष्टी सांगितल्या होत्या तो एका असामान्य, वेगळ्या वंशातील होता; त्या वंशातल्या कोणीही वेदीवर सेवा केली नव्हती. 14 हे स्पष्ट आहे की आपले प्रभू यहूदाहच्या वंशातून आले आणि याजकांबद्दल त्या वंशाविषयी मोशे काही म्हणाला नाही. 15 आणि जे काही आम्ही म्हटले ते अधिक स्पष्ट आहे की मलकीसदेकासारखा

दुसरा याजक प्रकट होईल. 16 ते पूर्वजांच्या नियमानुसार नव्हे, तर
ज्या जीवनाचा अंत होऊ शकत नाही अशा जीवनापासून वाहणाऱ्या
सामर्थ्याच्या आधारावर याजक झाले; 17 हे असे जाहीर करते:
“मलकीसदेकाच्या संप्रदायाप्रमाणे तू सदासर्वकाळचा याजक आहेस.”
(aiōn g165) 18 पूर्वीचा नियम बाजूला ठेवण्यात आला, कारण तो
कमकुवत व निरुपयोगी होता. 19 (कारण नियमशास्त्राने काहीही
परिपूर्ण केले नाही), आणि अधिक चांगल्या आशेची ओळख झाली
आहे, ज्याद्वारे आपण परमेश्वराजवळ जातो. 20 आणि हे शपथेवाचून
झाले नाही! दुसरे शपथ न घेता याजक झाले. 21 परंतु तो शपथ घेऊन
याजक झाला, जेव्हा परमेश्वर त्याला म्हणाले, “प्रभूने शपथ घेतली आहे
आणि ते त्यांचे मन कदापि बदलणार नाहीत: ‘तू सदासर्वकाळचा याजक
आहेस.’” (aiōn g165) 22 कारण या शपथेमुळे, येशू अधिक चांगल्या
कराराची हमी घेणारे झाले आहेत. 23 आता असे पुष्कळ याजक होऊन
गेले, जे मृत झाल्यामुळे त्यांची सेवा सातत्याने करू शकले नाहीत. 24
पण येशू सदासर्वकाळ जिवंत आहेत; त्यांचे याजकपण युगानुयुगचे
आहे. (aiōn g165) 25 यास्तव त्यांच्याद्वारे परमेश्वराकडे येणाऱ्या सर्वांचे
पूर्णपणे तारण करण्यास ते समर्थ आहेत, कारण त्यांच्यासाठी मध्यस्थी
करण्यास ते सदासर्वदा जिवंत आहेत. 26 असे महायाजक खरोखर
आपल्या गरजा भागविण्यास समर्थ आहेत—ते पवित्र, निर्दोष, शुद्ध,
आणि पापी माणसांपासून वेगळे केलेले, स्वर्गाहून अधिक उंच केलेले
आहेत. 27 त्यांना त्या महायाजकांप्रमाणे प्रथम स्वतःच्या पापांसाठी,
मग लोकांच्या पापांसाठी दिवसेंदिवस यज्ञ करण्याची गरज नाही; कारण
त्यांनी त्यांच्या पापासाठी एकदाच यज्ञ करून स्वतःला अर्पण केले.
28 नियमशास्त्र दुर्बलतेने भरलेल्या माणसांना महायाजक नेमते; पण
नियमशास्त्रानंतर आलेली शपथ ती जो युगानुयुग परिपूर्ण आहे त्या
पुत्राला नेमते. (aiōn g165)

**8** आमच्या म्हणण्याचा मुख्य मुद्दा हाच आहे: आम्हाला असे एक
महायाजक आहेत, जे स्वर्गामध्ये वैभवाच्या सिंहासनाच्या उजवीकडे
बसले आहे. 2 प्रभूने उभारलेला खरा मंडप जो केवळ मानवाद्वारे
बांधलेला नाही, त्या मंदिरात ते सेवा करीत आहेत. 3 आणि ज्याअर्थी
प्रत्येक महायाजक दाने व यज्ञार्पण करण्यासाठी नेमलेला असतो,
म्हणून यांच्या जवळही अर्पण करण्यास काहीतरी असणे आवश्यक
आहे. 4 जर ते पृथ्वीवर असते, तर ते याजक झाले नसते, कारण येथे
नियमशास्त्रानुसार दाने अर्पण करणारे याजक आधी नेमलेले असतात.
5 जे स्वर्गात आहे, त्याचे प्रतिरूप आणि छाया आहे त्या मंदिरात ते
सेवा करतात. यामुळेच मोशे निवासमंडप उभारण्याची तयारी करीत
असताना, “पर्वतावर दाखविलेल्या निवासमंडपाच्या नमुन्याप्रमाणेच
ते सर्व काळजीपूर्वकपणे ठेवावे असे त्याला सांगितले होते.” 6 परंतु
येशूंना मिळालेले सेवाकार्य त्यांच्यापेक्षा जेवढे श्रेष्ठ आहे तेवढेच ते जुन्या
करारापेक्षा श्रेष्ठ आहे, कारण अधिक चांगल्या अभिवचनांवर आधारित
असलेल्या नवीन कराराचे ते मध्यस्थ आहेत. 7 जर पहिला करार निर्दोष
असता तर त्याच्या जागी दुसरा करार स्थापण्याची काहीच आवश्यकता
भासली नसती. 8 परंतु परमेश्वराला लोकांतील दोष दिसले आणि ते
म्हणाले: “प्रभू जाहीर करून म्हणत आहेत, असे दिवस येतील जेव्हा,
इस्राएलच्या लोकांशी व यहूदीयाच्या लोकांशी मी एक नवीन करार
करेन. 9 मी त्यांच्या पूर्वजांचा हात धरून त्यांना इजिप्त देशातून बाहेर
आणले, तेव्हा मी त्यांच्याशी केलेल्या कराराप्रमाणे हा करार नसेल.
ते माझ्या कराराशी विश्वासू राहिले नाही, आणि मी त्यांच्यापासून दूर
गेलो, असे प्रभू म्हणतात. 10 परंतु मी इस्राएलाच्या लोकांबरोबर करार
स्थापित करेन तो असा प्रभू जाहीर करतात, त्या वेळेनंतर मी माझे
नियम त्यांच्या मनात ठेवेन, आणि ते त्यांच्या हृदयावर लिहेन मी त्यांचा
परमेश्वर होईन, आणि ते माझे लोक होतील. 11 कोणीही आपल्या
शेजाऱ्याला बोध करणार नाही, किंवा ‘प्रभूला ओळखा’ असे कोणी
कोणाला बोलणार नाही, कारण लहानापासून ते थोरापर्यंत सर्वजण
मला ओळखतील, 12 मी त्यांच्या दुष्कृत्यांची क्षमा करेन व यापुढे
त्यांची पापे स्मरणार नाही.” 13 त्यांनी या करारास “नवा” असे म्हणून
जुना करार कालबाह्य ठरविला आहे; आणि जो कालबाह्य व जुना आहे
तो लवकर नाहीसा होईल.

**9** पहिल्या करारात उपासनेविषयी आणि पृथ्वीवरील मंदिराविषयी
नियम होते. 2 एक मंडप तयार केला होता. त्याच्या पहिल्या खोलीत
सोन्याचा दीपवृक्ष, एक मेज व त्या मेजावर समर्पित भाकरी होत्या; या
भागाला पवित्रस्थान म्हणत. 3 दुसऱ्या पडद्याच्या मागे एक खोली होती;
तिला परमपवित्रस्थान म्हणत असत. 4 त्यात सोन्याची धूपवेदी सोन्याने
आच्छादलेला कराराचा कोश होता. या कोशात मान्ना असलेले एक
सुवर्णपात्र, अंकुर फुटलेली अहरोनाची काठी व कराराच्या दगडी पाट्या
होत्या. 5 आणि दयासनावर छाया करणारे गौरवी करूबीम होते; पण
एवढा तपशील पुरे. 6 या गोष्टींची अशी व्यवस्था लावल्यानंतर, आपले
सेवाकार्य करण्यासाठी याजक नियमितपणे या बाहेरील खोलीत प्रवेश
करीत, 7 पण आतील खोलीत फक्त महायाजकच प्रवेश करीत असे
आणि तेही वर्षातून एकदाच. तो स्वतःसाठी आणि लोकांनी अजाणतेने
केलेल्या पापांसाठी रक्त अर्पण करत असतो आणि रक्ताशिवाय तो
इथे कधीही प्रवेश करीत नाही. 8 या सर्व गोष्टींवरून पवित्र आत्मा
आपल्याला हे निदर्शनास आणून देतात की जोपर्यंत जुना मंडप आणि
त्यातील कार्यक्रम चालू होते तोपर्यंत परमपवित्रस्थानात जाण्याचा
मार्ग मोकळा नव्हता. 9 हे वर्तमान काळासाठी उदाहरण आहे, तिथे
अर्पण केलेली दाने व अर्पणे उपासकाची विवेकबुद्धी शुद्ध करीत नाही.
10 हे विधी केवळ अन्न व पाणी तसेच निरनिराळया प्रकारच्या शुद्ध
करण्याच्या विधी याबाबत आहेत—बाह्य नियम नवा काळ येईपर्यंत
लावून दिले आहेत. 11 परंतु जेव्हा चांगल्या गोष्टी ज्या आता येथे
आहेत त्यांचा महायाजक म्हणून ख्रिस्त आले होते, जो मानवी हाताने
केलेला नाही व जो या सृष्टीचा भाग नाही, अशा अधिक महान व
अधिक परिपूर्ण मंडपाद्वारे आत गेले. 12 त्यांनी परमपवित्रस्थानात
शेळयांच्या आणि वासरांच्या रक्ताद्वारे प्रवेश केला नाही; परंतु स्वतःच्या
रक्ताद्वारे एकदाच प्रवेश केला आणि अनंतकाळची मुक्ती मिळविली.

(aiōnios g166) 13 जर शेळयांचे आणि बैलांचे रक्त किंवा कालवडींची
राख विधिपूर्वक अशुद्ध असलेल्यांवर शिंपडल्यास ते बाह्यतः शुद्ध
केले जाते. 14 तर, सनातन आत्म्याद्वारे ज्याने परमेश्वराला स्वतःस
निष्कलंक असे अर्पण केले, त्या ख्रिस्ताचे रक्त मृत्यूस कारणीभूत
असणारी कामे केल्याच्या टोचणीपासून आपल्या विवेकबुद्धीला शुद्ध
करून परमेश्वराची सेवा करण्यास किती अधिक प्रवृत्त करेल! (aiōnios
g166) 15 याकारणास्तव ख्रिस्त हे नव्या कराराचे मध्यस्थ आहेत,
ज्यांना पाचारण झाले आहे, त्यांनी जुन्या करारानुसार जी पापे केली,
त्यांच्या शिक्षेपासून मुक्ती मिळावी म्हणून ख्रिस्ताने स्वतःच्या मृत्यूद्वारे
खंडणी भरून त्यांना सोडवावे व त्यांना सार्वकालिक जीवनाच्या वारसाचे
अभिवचन मिळावे. (aiōnios g166) 16 कारण मृत्युपत्र असले की ज्याने
ते तयार केले आहे त्याचा मृत्यू झाला आहे हे सिद्ध होणे आवश्यक आहे.
17 मृत्युपत्र एखाद्याच्या मृत्यूनंतर अंमलात येते. ज्याने ते मृत्युपत्र केले
आहे तो जिवंत असेपर्यंत ते अंमलात येत नाही. 18 या कारणासाठीच
पहिला करार रक्ताशिवाय अंमलात आला नाही. 19 जेव्हा मोशेने सर्व
लोकांना नियम जाहीर केले, तेव्हा त्याने पाण्याबरोबर वासरांचे रक्त
घेतले आणि किरमिजी लोकर व एजोबाच्या फांद्या त्यात बुडवून ग्रंथावर
आणि सर्व लोकांवर ते शिंपडले. 20 मग तो म्हणाला, “हे कराराचे
रक्त आहे, तो पाळावा म्हणून परमेश्वराने तुम्हाला आज्ञा दिली आहे.”
21 आणि त्याच प्रकारे त्याने दोन्ही मंडप व विधींसाठी जी उपकरणे
वापरली जात, त्यावरही रक्तसिंचन केले. 22 खरे म्हणजे, नियमाप्रमाणे
अंदाजे प्रत्येक वस्तू रक्तसिंचन करूनच शुद्ध करण्यात येई; आणि रक्त
सांडल्याशिवाय पापांची क्षमा होत नाही. 23 मग हे आवश्यक होते की,
स्वर्गीय गोष्टींचे प्रतिरूप या बलिदानांने शुद्ध करणे अगत्याचे होते, परंतु
स्वर्गीय गोष्टी याहून चांगल्या बलिदानांने शुद्ध करणे अगत्याचे अगत्य
होते. 24 ख्रिस्ताने मानवी हाताने बांधलेल्या पवित्र मंदिरात प्रवेश केला
नाही कारण ते खऱ्या मंदिराची केवळ नक्कल होती; आपल्यावतीने
परमेश्वराच्या समक्षतेत उपस्थित राहण्यासाठी त्यांनी प्रत्यक्ष स्वर्गात
प्रवेश केला आहे. 25 आणि जसा महायाजक प्रतिवर्षी जे त्याचे स्वतःचे
नाही असे रक्त घेऊन परमपवित्रस्थानात जातो, तसे त्यांना स्वर्गात
जाऊन वारंवार स्वतःचे रक्त अर्पण करावयाचे नव्हते. 26 तसे करणे
आवश्यक असते, तर त्यांना जगाच्या स्थापनेपासून अनेकदा दुःख सहन
करावे लागले असते. पण आता ते एकदाच युगाच्या समाप्तीस स्वयज्ञ
करून प्रकट झाले आणि त्यांनी पापाची सत्ता नष्ट केली. (aiōn g165) 27
जसे माणसांना एकदाच मरणे व त्यानंतर न्यायाला तोंड देणे हे नेमून
ठेवले आहे, 28 तसेच अनेकांचे पाप वाहून नेण्यासाठी बली म्हणून
ख्रिस्त एकदाच मरण पावले आणि ते दुसऱ्या वेळेस प्रकट होणार, ते
पाप वाहण्यासाठी नाही, तर जे त्यांची धीराने वाट पाहतात, त्यांचे तारण
आणण्यासाठी येतील.

**10** नियमशास्त्र ज्या येणाऱ्या चांगल्या गोष्टी आहेत त्यांची छाया
आहे—त्याचे खरे स्वरूप नाही. या कारणासाठी ते प्रतिवर्षी नित्य
अर्पण केल्या जाणाऱ्या त्याच यज्ञांनी उपासनेसाठी येणाऱ्यांना परिपूर्ण
करण्यास केव्हाही समर्थ ठरत नाही. 2 तसे झाले असते, तर एकच
अर्पण पुरेसे नव्हते काय? उपासक कायमचे शुद्ध झाले असते तर त्यांची
दोषाची भावना नाहीशी झाली असती. 3 पण त्यांनी त्यांच्या पापांची
प्रतिवर्षी त्यांना आठवण करून दिली. 4 कारण बैलांचे व शेळयांचे
रक्त पापे दूर करण्यास असमर्थ आहे. 5 यास्तव, जेव्हा ख्रिस्त जगात
आले तेव्हा ते म्हणाले, “यज्ञ किंवा अर्पणे यांची इच्छा तुम्हाला नाही,
परंतु तुम्ही माझ्यासाठी एक शरीर तयार केले; 6 होमार्पण व पापार्पण
यांनी तुम्हाला संतोष झाला नाही. 7 मग मी म्हणालो, ‘मी येथे आहे;
शास्त्रलेखात माझ्याविषयी लिहिले आहे, हे माझ्या परमेश्वरा तुमची
इच्छा पूर्ण करण्यास मी आलो आहे.’” 8 ते प्रथम म्हणाले, “बली
आणि दाने, होमार्पणे आणि पापार्पणाची तुम्हाला इच्छा नाही व त्यात
तुम्हाला संतोष नाही;” जरी ते नियमानुसार अर्पण करत होते. 9 नंतर
ते म्हणाले, “हा मी येथे आहे, तुमच्या इच्छेप्रमाणे करण्यासाठी मी
आलो आहे.” दुसरी व्यवस्था स्थापन करून त्यांनी पहिली व्यवस्था
रद्द केली. 10 आणि त्या इच्छेद्वारे आपण येशू ख्रिस्ताच्या एकदाच
झालेल्या देह बलिदानाद्वारे पवित्र केलेले आहोत. 11 प्रत्येक याजक
प्रतिदिवशी धार्मिक कामे करत आणि जे यज्ञ पापे दूर करावयाला
कदापि समर्थ नाहीत तेच यज्ञ वारंवार करत उभा असतो. 12 परंतु या
याजकाने पापांसाठी सार्वकालिक असे एकच बली अर्पण करून ते
परमेश्वराच्या उजव्या हाताशी बसले आहेत. 13 आणि त्या वेळेपासून
त्यांचे शत्रू त्यांचे पायासन होईपर्यंत वाट पाहत आहेत. 14 कारण एकाच
यज्ञामुळे ज्यांना ते पवित्र करीत आहे, त्या सर्वांना त्यांनी परिपूर्ण केले
आहे. 15 याबाबत पवित्र आत्मा आपल्याला साक्ष देतो, प्रथम त्यांनी
म्हटले: 16 “मी त्यांच्याबरोबर करार करेन तो असा, प्रभू म्हणतात त्या
वेळेनंतर, मी माझे नियम त्यांच्या मनात ठेवेन आणि ते मी त्यांच्या
हृदयावर लिहेन.” 17 मग पुढे ते म्हणतात, “त्यांची पापे व नियमबाह्य
कृत्ये यापुढे मी स्मरणार नाही.” 18 आणि जिथे क्षमा झालेली आहे,
तिथे पापांसाठी आणखी यज्ञ करण्याची मुळीच गरज नाही. 19
म्हणून प्रिय बंधू आणि भगिनींनो, आता येशूंच्या रक्ताद्वारे आपल्याला
परमपवित्रस्थानी आत्मविश्वासाने जाता येते. 20 आपल्यासाठी हा
नवा व जीवनदायी मार्ग पडद्याद्वारे म्हणजे त्यांच्या शरीराद्वारे उघडला
आहे. 21 आणि आपल्यासाठी परमेश्वराच्या घरावर एक महान याजक
आहेत, 22 म्हणून आपली हृदये शुद्ध करण्यासाठी शिंपडले, दोषी
विवेकापासून मुक्त झालेले व शुद्ध पाण्याने शरीर धुतलेले असे आपण
खऱ्या अंतःकरणाने व विश्वासाच्या पूर्ण खात्रीने परमेश्वराजवळ येऊ.
23 आपण न डगमगता आपल्या आशेचा भरवसा दृढ धरू; कारण
ज्यांनी वचन दिले ते विश्वसनीय आहेत. 24 आणि प्रीती व चांगली
कृत्ये करण्यास उत्तेजन येईल असे एकमेकांना प्रेरित करू या. 25
आपण कित्येकांच्या सवयीप्रमाणे आपले एकत्रित मिळणे न सोडता
एकमेकांना उत्तेजन द्यावे आणि तो दिवस जवळ येत असल्याचे तुम्हाला
दिसते म्हणून तसे एकत्रित मिळून एकमेकांना अधिक उत्तेजन द्यावे. 26
सत्याचे ज्ञान झाल्यानंतर जर आपण जाणूनबुजून पाप करतो, तर त्या

पापांसाठी दुसरे कोणतेही अर्पण राहिले नाही, 27 पण राहिले ते भयावह
न्यायाची प्रतीक्षा आणि परमेश्वराच्या शत्रूंना भस्मसात करून टाकणारी
मोठी आगच. 28 मोशेने दिलेले नियमशास्त्र एखाद्याने नाकारले तर
त्याच्यावर दया न होता त्याला दोघांच्या किंवा तिघांच्या साक्षीवरून
मरणदंड होतो. 29 तर ज्याने परमेश्वराच्या पुत्राला पायाखाली तुडविले,
शुद्ध करणारे साक्षीचे रक्त अपवित्र मानले, जेणेकरून ते स्वत: पवित्र
झाले होते आणि कृपाशील पवित्र आत्म्याचा अपमान केला तो किती
अधिक कठोर शिक्षा होण्यास पात्र ठरेल म्हणून तुम्हाला वाटते? 30
कारण “सूड घेणे मजकडे आहे; मी परतफेड करेन,” आणि आणखी,
“प्रभू त्यांच्या लोकांचा न्याय करतील,” असे जे म्हणाले, ते आपल्याला
माहीत आहे. 31 जिवंत परमेश्वराच्या हातात सापडणे फार भयंकर
आहे. 32 जेव्हा तुम्हाला प्रथम प्रकाश मिळाला तेव्हा तुम्हाला भयंकर
दु:खसहनाने भरलेला संघर्ष करावा लागला याची आठवण करा. 33
कित्येकदा सार्वजनिक रीतीने तुमचा अपमान व छळ झाला; तर कधी
अशाच गोष्टी सहन करणाऱ्यांबरोबर तुम्ही जोडीने उभे राहिला. 34
बंदिवानांबरोबर तुम्ही दु:ख सोसले आणि अधिक चांगली व टिकाऊ
मालमत्ता आपल्याजवळ आहे हे समजून तुम्ही स्वत:च्या मालमत्तेची
जप्ती आनंदाने स्वीकारली. 35 तुमचा विश्वास सोडू नका, त्याचे मोठे
प्रतिफळ तुम्हाला मिळणार आहे. 36 तुम्ही परमेश्वराची इच्छा पूर्ण
केल्यानंतर जे वचन त्यांनी तुम्हाला दिले आहे ते तुम्हास मिळेल यासाठी
धीराचे अगत्य आहे. 37 कारण, “अगदी थोड्या वेळात, जो येणार आहे
तो येईल आणि उशीर करणार नाही.” 38 आणि, “माझा नीतिमान
विश्वासाने जगेल. आणि माघार घेणाऱ्यामध्ये मला संतोष वाटणार
नाही.” 39 माघार घेणाऱ्यातील आणि नाश होणाऱ्यातील आपण नाही,
परंतु ज्यांच्याजवळ विश्वास असून ज्यांना तारणप्राप्ती झाली आहे
त्यांच्यात आपण सामील आहोत.

**11** विश्वास हा अपेक्षित गोष्टींविषयीचा भरवसा आणि न दिसणाऱ्या
गोष्टींबद्दलची खात्री आहे. 2 पुरातन काळातील परमेश्वराचे भक्त
त्यांच्या विश्वासाबद्दल नावाजलेले होते. 3 विश्वासाद्वारे आपल्याला
कळते की सर्व जग परमेश्वराच्या शब्दाने निर्माण झाले; म्हणजे जे दिसते
ते दृश्य गोष्टींपासून निर्माण झालेले नाही. (aiōn g165) 4 विश्वासाद्वारे
हाबेलाने काईनापेक्षा उत्तम अर्पण परमेश्वराकडे आणले. परमेश्वराने
त्याची प्रशंसा करून त्याला नीतिमान गणले, आणि हाबेल जरी मरण
पावला आहे, तरी विश्वासाद्वारे तो आजही बोलतो. 5 विश्वासाद्वारे
हनोख जिवंत असताना परमेश्वराने त्याला स्वर्गात नेले, त्याला मृत्यूचा
अनुभव आला नाही: “तो एकाएकी दिसेनासा झाला, कारण परमेश्वराने
त्याला नेले.” हे घडण्यापूर्वी परमेश्वर म्हणाले होते की ते हनोखाच्या
बाबतीत अतिशय संतुष्ट होते. 6 विश्वासाशिवाय परमेश्वराला संतुष्ट
करणे अशक्य आहे, ज्या कोणाला परमेश्वराकडे यावयाचे असेल,
त्याने परमेश्वर आहे असा विश्वास धरला पाहिजे व त्यांचा मनापासून
शोध घेणाऱ्यांना ते प्रतिफळ देतात. 7 विश्वासाद्वारे नोआहने कोणी
कधीही पाहिले नाही अशा गोष्टीबद्दल परमेश्वराने दिलेला इशारा ऐकला
आणि आपल्या कुटुंबाच्या रक्षणासाठी आदरयुक्त भीतीने तारू बांधले.
नोआहने विश्वासामुळेच जगाचा धिक्कार केला आणि त्याला नीतिमत्वाचे
वतन प्राप्त झाले. 8 जेव्हा परमेश्वराने त्याला वारसाचे अभिवचन
दिलेल्या देशात जाण्यास सांगितले, तेव्हा अब्राहामाने आपण कुठे
जात आहोत हे माहीत नसतानाही विश्वासाने आज्ञापालन केले. 9
तो विश्वासाने त्या वचनदत्त देशात पोहोचला, तरीही तिथे एखाद्या
परदेशी उपऱ्यासारखा तंबूतच राहिला. तसेच इसहाक व याकोब,
ज्यांना परमेश्वराने हेच वारसाचे अभिवचन दिले होते, तेही पुढे तसेच
तंबूत राहिले. 10 विश्वासाद्वारे अब्राहाम परमेश्वराने योजलेल्या व पाया
बांधून घडविलेल्या शहराची आशेने वाट पाहत होता. 11 विश्वासाद्वारे
सारा देखील वृद्धापकाळात माता होऊ शकली. परमेश्वर आपल्या
अभिवचनाप्रमाणे करतीलच हे तिला माहीत होते. 12 आणि याप्रमाणे
वृद्धापकाळामुळे मूल होण्याची शक्यता नसलेल्या अब्राहामापासून
आकाशातील तारे व समुद्र किनाऱ्यावरील वाळू इतकी अगणित संख्या
असलेल्या वंशजांचा जन्म झाला. 13 ही सर्व विश्वासाने जगणारी माणसे,
परमेश्वराने त्यांना देऊ केलेली सर्व वचनफळे मिळण्यापूर्वीच मरण
पावले; परंतु त्यांनी ती वचनफळे दुरून पाहिली व त्याचे स्वागत केले. ही
पृथ्वी आपले खरे घर नाही; येथे आपण केवळ परके व प्रवासी आहोत,
असे त्यांनी मानले होते. 14 त्यांच्या या बोलण्यावरून ते आपल्या खऱ्या
देशाची वाट पाहत होते असे ते दाखवितात. 15 त्यांची इच्छा असती
तर त्यांनी मागे सोडलेल्या देशात ते परत जाऊ शकले असते, 16
पण ते त्यापेक्षाही उत्तम अशा स्वर्गीय देशाची आशा धरून होते आणि
म्हणून मी त्यांचा परमेश्वर आहे, असे म्हणण्याची परमेश्वराला लाज
वाटत नाही, कारण त्यांनी त्यांच्यासाठी एक शहर सिद्ध केलेले आहे. 17
परमेश्वर अब्राहामाची परीक्षा घेत असताना त्याने इसहाकाचे अर्पण केले
आणि ज्याला वारसाचे वचन प्राप्त झाले होते तो अब्राहाम यज्ञवेदीवर
आपल्या एकुलत्या एक पुत्राचा वध करण्यासाठी सिद्ध झाला; 18 जरी
परमेश्वराने अभिवचन दिले होते: “इसहाकाद्वारेच तुझी संतती वाढेल.”
19 अब्राहामाने तर्क केला की इसहाक मरण पावला तरी परमेश्वर त्याला
पुन्हा जिवंत करतील; आणि तसे म्हणावे तर त्याला इसहाक मरणातून
पुन्हा जिवंत मिळाला. 20 विश्वासाद्वारे इसहाकाने याकोब व एसाव
या आपल्या दोन पुत्रांना त्यांच्या भावी काळासाठी आशीर्वाद दिला.
21 याकोबानेही, तो वृद्ध झालेला व मृत्युशय्येवर असतानाही उठून व
आपल्या काठीच्या टोकावर टेकून त्याने उपासना केली व विश्वासाने
प्रार्थना करून योसेफाच्या दोन्ही मुलांना आशीर्वाद दिला. 22 जेव्हा
योसेफाचा शेवट जवळ आला, तेव्हा तोही विश्वासाद्वारे बोलला की
परमेश्वर इस्राएली लोकांची इजिप्तमधून सुटका करतील; त्याने त्याच्या
अस्थी संस्काराबद्दल सूचना दिली! 23 विश्वासाद्वारे मोशेच्या जन्मानंतर
त्याच्या आईवडिलांनीही त्याला तीन महिने लपवून ठेवले, कारण आपला
पुत्र असामान्य आहे, हे पाहिल्यावर त्यांना राजाज्ञेचे भय वाटले नाही. 24
मोशे मोठा झाल्यावर त्यानेही विश्वासाद्वारे फारोह राजाचा नातू म्हणवून
घेण्यास नाकारले, 25 व पापाची क्षणभंगुर सुखे उपभोगण्याऐवजी

परमेश्वराच्या लोकांबरोबर त्यांना मिळत असलेल्या वाईट वागणुकीच्या
दुःखात सहभागी होण्याचे विश्वासाने निवडले. 26 इजिप्त देशामधील
सर्व भांडाराचा मालक होण्यापेक्षा, ख्रिस्तासाठी दुःख सहन करणे
अधिक चांगले, असे त्याने मानले, कारण परमेश्वराकडून मिळणाऱ्या
महान प्रतिफळाची तो वाट पाहत होता. 27 विश्वासाद्वारे त्याने इजिप्त
देश सोडला व राजाच्या क्रोधाला तो घाबरला नाही. मोशेने धीर धरला,
कारण त्याने जे अदृश्य आहेत त्या परमेश्वराला पाहिले. 28 म्हणूनच
परमेश्वराने सांगितल्याप्रमाणे त्यांनी वल्हांडण सण विश्वासाद्वारे साजरा
केला आणि कोकराचे रक्त लावले, यासाठी की मृत्युदूताने इस्राएली
लोकांच्या ज्येष्ठ मुलांना स्पर्श न करता निघून जावे. 29 विश्वासाद्वारे
इस्राएली लोक तांबड्या समुद्रातून कोरड्या जमिनीवरून चालत गेले.
त्यांचा पाठलाग करणाऱ्या इजिप्तच्या लोकांनी तसेच करण्याचा प्रयत्न
केला, तेव्हा ते सर्व बुडून मेले. 30 परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे इस्राएली
लोकांनी विश्वासाने यरीहो शहराच्या तटबंदीभोवती सात दिवस चालत
फेऱ्या घातल्यावर, ती तटबंदी खाली कोसळली. 31 विश्वासाद्वारे
राहाब वेश्येने इस्राएली हेरांचा स्नेहभावाने पाहुणचार केला व त्यामुळे
परमेश्वराची आज्ञा न पाळणाऱ्या लोकांबरोबर तिचा अंत झाला नाही. 32
तर मग, मी आणखी किती उदाहरणे सांगावी? गिदोन, बाराक, शमशोन,
इफ्ताह, दावीद, शमुवेल आणि सर्व संदेष्ट्यांच्या विश्वासाबद्दलच्या कथा
सांगण्यासाठी मला वेळ नाही. 33 विश्वासाद्वारे या सर्व लोकांनी राज्ये
जिंकली, न्यायीपणाने सत्ता गाजवली व वचनफळ प्राप्त केले; सिंहाची
तोंडे बंद केली; 34 आणि अग्निज्वालांच्या प्रकोपाला थंड केले; काहींचा
तलवारीच्या धारेपासून बचाव झाला; काहीजण जे अशक्त होते, ते
सबळ झाले; इतरांना लढाईमध्ये मोठे बळ प्राप्त झाले; त्यांनी परकीय
सैन्ये परतवून व पळवून लावली. 35 काही स्त्रियांना विश्वासाद्वारे त्यांचे
मेलेले प्रियजन परत जिवंत मिळाले. पण दुसऱ्या काहींना विश्वासामुळे
मरेपर्यंत छळ सोसावा लागला, तरीही सुटका करून घेण्यापेक्षा पुढे
याहून चांगल्या जीवनात आपले पुनरुत्थान होईल, असा त्यांचा विश्वास
होता. 36 काहींची हेटाळणी झाली आणि त्यांना चाबकांचे फटके मारले
गेले, तर इतरांना बेड्या ठोकून तुरुंगात टाकण्यात आले. 37 काहींचा
दगडमाराने मृत्यू झाला, तर काहींचे करवतीने दोन तुकडे करण्यात
आले; काहींना तलवारीने ठार करण्यात आले, काहीजण मेंढरांची व
बकऱ्याची कातडी पांघरूण वाळवंटात व पर्वतांवर भटकत असत. ते
निराधार, पीडित व वाईट वागणूक मिळालेले होते. 38 हे जग त्यांच्या
योग्यतेचे नव्हते. ते वाळवंटात व पर्वतांवर भटकत असत व गुहेत आणि
बिळात राहत असत. 39 या माणसांनी विश्वासाद्वारे परमेश्वराची मान्यता
मिळविली, तरीपण त्यांच्यापैकी कोणालाही परमेश्वराच्या वचनांची फळे
मिळाली नाहीत; 40 कारण परमेश्वराने आपल्यासाठी ज्या अधिक
चांगल्या गोष्टी सिद्ध केल्या आहेत त्यामध्ये त्यांनीही वाटेकरी व्हावे,
अशी परमेश्वराची योजना होती.

**12** यास्तव, आपण इतक्या साक्षीदारांच्या मेघाने वेढलेले आहोत,
तेव्हा अडखळण करणारी प्रत्येक गोष्ट व सहज गुंतविणारे पाप
बाजूला टाकून, आपल्याला नेमून दिलेल्या धावेवर धीराने धावावे.
2 आपण आपल्या विश्वासाचा अग्रेसर व पूर्तता करणाऱ्या येशूंवर
आपले नेत्र स्थिर करावे; कारण त्यांना त्याजपुढे जो आनंद दिसत
होता, त्याकरिता त्यांनी लज्जा तुच्छ मानून वधस्तंभ सहन केला
आणि ते परमेश्वराच्या सिंहासनाच्या उजवीकडे बसले आहे. 3 ज्यांनी
आपणाविरुद्ध पाप करणाऱ्यांनी केलेला इतका विरोध सहन केला,
त्याच्याविषयी विचार करा म्हणजे तुम्ही थकून न जाता तुमच्या मनांचा
धीर सुटणार नाही. 4 पापाविरुद्ध तुमच्या संघर्षात, तुम्ही रक्त सांडेपर्यंत
पापाशी झगडला नाही. 5 आणि तुम्हाला उद्देशून पिता आपल्या पुत्रास
बोलतो ते परमेश्वराचे उत्तेजनाचे शब्द विसरलात काय? ते म्हणाले,
"माझ्या पुत्रा, प्रभूच्या शिस्तीकडे दुर्लक्ष करू नकोस, त्याने तुझा निषेध
केल्यास खचू नकोस, 6 कारण प्रभू ज्यांच्यावर प्रीती करतात त्यालाच
ते शिस्त लावतात, आणि ज्या प्रत्येकाला पुत्र म्हणून ते स्वीकार करतात
त्याला फटकेही मारतात." 7 तुम्ही धीराने शिस्त सहन करत आहात;
परमेश्वर तुम्हाला पुत्राप्रमाणे वागवितात आणि लेकरांना शिस्त लावत
नाही असा कोण पिता आहे? 8 जर तुम्हाला शिस्त लावली नाही
तर—सर्वांनाच शिस्तीला सामोरे जावे लागते—तुम्ही अनौरस आहात,
तुम्ही या कुटुंबातील खरे पुत्र किंवा कन्या नाहीत. 9 आपल्या सर्वांना
शिस्त लावणारे मानवी पिता होते आणि त्यासाठी आपण त्यांचा मान
राखतो, तर मग आपण आत्म्यांच्या पित्याच्या कितीतरी अधिक स्वाधीन
होऊन जगावे! 10 त्यांनी थोडे दिवस त्यांना योग्य वाटली तशी शिस्त
लावली; परंतु परमेश्वर आपल्या हितासाठी शिस्त लावतात, म्हणजे
आपण त्यांच्या पवित्रतेचे वाटेकरी व्हावे. 11 कोणतीही शिस्त तत्काली
आनंदाची वाटत नाही, परंतु दुःखाची वाटते; तरी ज्यांना तिच्याकडून
प्रशिक्षण मिळाले आहे, त्यांना ती पुढे नीतिमत्वाचे शांतिकारक फळ
देते. 12 यास्तव, आपले गळणारे हात व निर्बल गुडघे सशक्त करा. 13
"आणि तुमच्या पावलांसाठी मार्ग सरळ करा," म्हणजे लंगडे पडून
अपंग होणार नाही, उलट बरे होतील. 14 सर्वांबरोबर शांततेने राहण्याचा
व पवित्र होण्याचा झटून प्रयत्न करा; पवित्रतेशिवाय कोणीही प्रभूला
पाहू शकत नाही. 15 परमेश्वराच्या कृपेला कोणी उणे पडू नये, व ज्यामुळे
पुष्कळजण अशुद्ध व त्रास देणारे होतील असे कोणतेही कडूपणाचे
मूळ अंकुरित होऊ नये, या विषयी दक्ष राहा. 16 कोणी जारकर्मी होऊ
नये किंवा ज्याने एका जेवणासाठी आपल्या ज्येष्ठत्वाच्या वतनाचा
हक्क विकला, त्या एसावासारखे अनीतिमान होऊ नये, म्हणून लक्ष
द्या. 17 तुम्हाला माहीत आहे की, त्यानंतर तो हा ज्येष्ठत्वाचा आशीर्वाद
मिळविण्याची इच्छा करत असतानाही त्याचा नकार झाला; त्याने जरी
अश्रू ढाळून आशीर्वाद मिळविण्याचा प्रयत्न केला, तरी जे काही त्याने
केले होते ते त्याला बदलता आले नाही. 18 पेटलेला अग्नी, काळोख
व वादळांनी वेढलेल्यास स्पर्श करू शकाल अशा पर्वताजवळ तुम्ही
आला नाही. 19 तिथे रणशिंगाचा इतका भयावह नाद झाला व भयप्रद
संदेश देणारी एक वाणी ऐकू आली की लोकांनी परमेश्वराला त्यांचे
बोलणे थांबविण्याची याचना केली. 20 "एखाद्या पशूने त्या पर्वताला

स्पर्श केला, तर त्याला मरेपर्यंत धोंडमार करावी,” ही परमेश्वराची आज्ञा
त्यांच्या सहनशक्ती पलीकडे होती. 21 स्वतः मोशे देखील ते दृश्य
पाहून इतका घाबरला की तो म्हणाला, “मी भीतीने थरथर कापत
आहे.” 22 परंतु तुम्ही सीयोन पर्वतावर, जिवंत परमेश्वराच्या शहरात,
स्वर्गीय यरुशलेमात आणि असंख्य देवदूतांच्या आनंदी संमेलनात आला
आहात. 23 मंडळीतील प्रथम जन्मलेले, ज्यांची नावे स्वर्गात नोंदलेली
आहेत त्या मंडळीत तुम्ही आला आहात. सर्वांचा न्याय करणाऱ्या
परमेश्वराजवळ, परिपूर्ण केलेल्या नीतिमानांच्या आत्म्याजवळ तुम्ही
आला आहात. 24 तुम्ही येशूंजवळ, जे नव्या कराराचे मध्यस्थ आहेत
आणि हाबेलाच्या रक्तापेक्षा उत्तम वचन बोलणाऱ्या, त्या शिंपडलेल्या
रक्ताजवळ आला आहात. 25 तुमच्याशी जे बोलत आहेत, त्यांच्या
आज्ञा तुम्ही कटाक्षाने पाळा. कारण जगातील संदेश देणाऱ्याची आज्ञा
न पाळल्यामुळे इस्राएली लोकांची शिक्षेपासून सुटका झाली नाही,
मग स्वर्गातून ताकीद देणाऱ्याचे आपण ऐकले नाही, तर आपण किती
मोठ्या संकटात सापडू? 26 ते बोलले तेव्हा त्यांच्या आवाजाने पृथ्वी
हलली, पण आता ते वचन देतात, “केवळ पृथ्वीच नव्हे तर आकाशही
पुन्हा हालविणार.” 27 “पुन: एकदा” चा अर्थ असाच दिसतो की
अस्थिर—निर्माण केलेल्या—वस्तू ते काढून टाकतील व नाश होणार
नाही अशाच अढळ गोष्टी टिकतील. 28 आपल्याला असे अविचल
राज्य प्राप्त होणार आहे, तेव्हा कृतज्ञ अंतःकरणांनी आणि आदरयुक्त
भय बाळगून आपण परमेश्वराची उपासना करू या. 29 कारण आपले
“परमेश्वर भस्म करणारे अग्नी आहेत.”

**13** बंधुप्रीतिमध्ये जडून राहा. 2 अपरिचितांचे आदरातिथ्य करण्यास
विसरू नका, कारण असे करताना काहींनी नकळत देवदूतांचा
पाहुणचार केला आहे. 3 तुरुंगात असलेल्यांची सतत आठवण ठेवा,
जणू काही आपण स्वतः तुरुंगात आहोत असे समजून त्यांच्याबरोबर
दुःख सहन करा. छळ होणाऱ्यांसह तुमचाही छळ होत आहे असे समजून
त्यांच्या दुःखात वाटेकरी व्हा. 4 विवाह सर्वांना सन्मान्य असावा आणि
वैवाहिक अंथरूण पवित्र राखावे, कारण व्यभिचार करणारे अथवा
जारकर्म करणाऱ्यांचा न्याय परमेश्वर स्वतः करेल. 5 द्रव्यलोभापासून दूर
राहा; जवळ असेल तेवढ्यात तुम्ही समाधानी असावे. कारण परमेश्वराने
म्हटले आहे, “मी तुला कधीच सोडणार नाही व तुला कधीच टाकणार
नाही.” 6 म्हणूनच आत्मविश्वासाने आपल्याला म्हणता येते: “प्रभू माझे
सहायक आहेत; मला कशाचेही भय वाटणार नाही. नश्वर मानव मला
काय करणार?” 7 तुम्हाला परमेश्वराचे वचन शिकविणाऱ्या तुमच्या
वडीलजनांची आठवण ठेवा. त्यांच्या जीवनचरित्राचा परिणाम बघून
त्यांच्या विश्वासाचे अनुकरण करा. 8 येशू ख्रिस्त काल, आज आणि
युगानुयुग सारखेच आहेत. (aiōn g165) 9 म्हणून कोणत्याही प्रकारच्या
अनोळखी शिक्षणाच्या आहारी जाऊ नका. जे खाऊन खाणाऱ्याचा
जीवनाला काहीच फायदा होत नाही असे विधिविषयक विशिष्ट पदार्थ
खाण्याने नव्हे, तर तुमचे अंतःकरण कृपेने बळकट करणे चांगले आहे.
10 आपली एक वेदी आहे, तेथील काही खाण्याचा, मंडपात जे सेवा
करतात त्यांना अधिकार नाही. 11 वधलेल्या पशूंचे रक्त पापार्पण म्हणून
महायाजक नियमानुसार परमपवित्रस्थानात नेत असत व नंतर त्या
पशूंची शरीरे छावणीबाहेर जाळून टाकीत. 12 लोकांना त्याच्या रक्ताने
पवित्र करण्यासाठीच येशूंनी शहराच्या वेशीबाहेर जाऊन दुःख सहन
केले. 13 तेव्हा आपणही त्याच्याकडे, त्याने सहन केलेला अपमान
घेऊन छावणीच्या बाहेर जाऊ या. 14 आपण तर स्वर्गातील भावी
नगराची वाट पाहत आहोत, कारण आपल्याला या जगात स्थायी
नगर नाही. 15 तेव्हा आपण येशूंच्या साहाय्याने परमेश्वराला आपल्या
स्तुतीचा यज्ञ—त्यांच्या नावाचे गौरव करणारे आपले मुखफल सतत
अर्पण करू या. 16 चांगले कार्य करण्यात आणि आपल्याजवळ जे
आहे त्यात गरजवंतांना भागीदार करण्यास विसरू नका, कारण असे
यज्ञ परमेश्वराला फार संतोष देतात. 17 आपल्या पुढाऱ्यांवर भरवसा
ठेवा व त्यांच्या अधीन राहा, कारण ते तुमच्यावर नजर ठेवतात आणि
तुमच्याविषयी त्यांना प्रभूला हिशोब द्यावा लागतो. अशाने त्यांचे काम
आनंदाचे होईल व त्यांना ते ओझे वाटणार नाही, ज्याचा तुम्हाला काहीही
लाभ नाही. 18 आमच्यासाठी प्रार्थना करा. कारण आमची खात्री आहे
की आमची विवेकबुद्धी स्वच्छ आहे व सर्व बाबतीत सन्मानाने जगण्याची
आमची इच्छा आहे. 19 तुमच्याकडे मी लवकर परत यावे म्हणून मला
तुमच्या प्रार्थनेची विशेष गरज आहे. 20 आता ज्या शांतीच्या परमेश्वराने,
सार्वकालिक कराराच्या रक्ताने, आपले प्रभू येशू, जे मेंढरांचे महान
मेंढपाळ आहेत, (aiōnios g166) 21 यांना मेलेल्यातून माघारी आणले, ते
परमेश्वर त्यांच्या दृष्टीने जे योग्य ते आपल्यामध्ये येशू ख्रिस्ताद्वारे करोत
व प्रत्येक कामात त्यांना संतोषविण्यास तुम्हाला सिद्ध करो. त्यांना
सदासर्वकाळ गौरव असो. आमेन. (aiōn g165) 22 बंधू व भगिनींनो, माझे
उपदेशाचे शब्द कृपा करून ऐकून घ्या, खरेतर हे पत्र मी थोडक्यातच
लिहिले आहे. 23 बंधू तीमथ्य हा आता तुरुंगातून सुटला आहे, हे तुम्हाला
माहीत असावे, अशी माझी इच्छा आहे; तो इकडे लवकर आला, तर
त्याला बरोबर घेऊन मी तुमच्या भेटीस येईन. 24 मंडळीतील तुमच्या
सर्व वडीलजनांस व तेथील इतर पवित्र जणांना माझ्या शुभेच्छा सांगा.
माझ्याबरोबर येथे इटलीमध्ये असलेले विश्वासणारे बांधव तुम्हाला
शुभेच्छा सांगतात. 25 तुम्हा सर्वांवर परमेश्वराची कृपा असो.

# याकोब

1 परमेश्वराचा आणि प्रभू येशू ख्रिस्ताचा दास याकोब याजकडून,
2 माझ्या बंधूंनो आणि भगिनींनो, जेव्हा तुम्ही अनेक प्रकारच्या
परीक्षांना तोंड देता तेव्हा त्यात अत्यानंद माना. 3 कारण तुम्हाला
ठाऊक आहे की तुमच्या विश्वासाची जी परीक्षा होते त्यामुळे धीर उत्पन्न
होतो. 4 धीराला कार्य पूर्ण करू द्या यासाठी की तुम्ही परिपक्व आणि
पूर्ण व्हावे व तुम्हाला कशाचीही कमतरता भासू नये. 5 जर तुम्हापैकी
कोणी ज्ञानाने उणा असेल, तर तुम्ही परमेश्वराला मागा आणि ते तुम्हास
दिले जाईल, कारण ते कोणाचेही दोष न काढता सर्वांस उदारतेने देतात.
6 परंतु जेव्हा तुम्ही मागता, तेव्हा संशय न बाळगता विश्वासाने मागावे,
कारण जो संशय धरतो तो वाऱ्याने लोटलेल्या व हेलकावे खाणाऱ्या
समुद्राच्या लाटेसारखा आहे. 7 अशा व्यक्तीने आपल्याला प्रभूपासून
काही मिळेल अशी आशा अजिबात धरू नये. 8 असा मनुष्य दुहेरी
मनाचा असून ज्या सर्वगोष्टी तो करतो त्यात अस्थिर असतो. 9 दीन
परिस्थितीतील विश्वासू जणांनी आपल्या उच्च पदाबद्दल अभिमान
बाळगावा. 10 परंतु जे श्रीमंत आहेत त्यांनी आपल्या दीन अवस्थेबद्दल
अभिमान बाळगावा; कारण ते रान फुलांसारखे नाहीसे होतील. 11 जसा
सूर्य प्रखर उष्णतेने उगवतो आणि रोप कोमेजून टाकतो; त्याचे फूल
गळून पडते आणि त्याच्या सुदंरतेचा नाश होतो. त्याचप्रमाणे श्रीमंत
ही आपला उद्योग करीत असतानाच कोमेजून जाईल. 12 जो कोणी
व्यक्ती परीक्षेत धीर धरतो तो धन्य आहे, कारण परीक्षेत उतरल्यावर,
प्रभूने आपल्यावर प्रीती करणाऱ्यांना जो जीवनी मुकुट देण्याचे वचन
दिले आहे, तो त्याला मिळेल. 13 मोह आल्यानंतर, “परमेश्वर मला
मोहात टाकत आहे” असे कोणीही म्हणू नये. कारण परमेश्वराला वाईट
गोष्टींचा मोह होत नाही आणि ते स्वत: कोणाला मोहात पाडत नाहीत;
14 परंतु प्रत्येक मनुष्य स्वत:च्याच दुष्ट वासनेने ओढला व भुलविला
जाऊन मोहात पडतो. 15 मग इच्छेने गर्भधारण केल्यानंतर, ती वासना
पापाला जन्म देते; आणि पापाची पूर्ण वाढ झाली म्हणजे पाप मरणास
जन्म देते. 16 म्हणून माझ्या प्रिय बंधू आणि भगिनींनो फसू नका. 17
प्रत्येक उत्तम व परिपूर्ण दान वरून आहे, ते स्वर्गातील प्रकाशाचे पिता जे
छायेसारखे बदलत नाहीत, त्यांच्यापासून येते. 18 त्यांनी आपल्याला
सत्य वचनाद्वारे जन्म देण्यासाठी निवडले आहे, यासाठी की त्यांनी जे
सर्वकाही उत्पन्न केले त्यामधील आपण प्रथमफळ व्हावे. 19 माझ्या
प्रिय बंधू आणि भगिनींनो, हे लक्षात घ्या, प्रत्येकजण ऐकावयास शीघ्र,
बोलावयास सावकाश व रागास मंद असावा. 20 कारण मनुष्याच्या
संतापाने परमेश्वर ज्या नीतिमत्वाची अपेक्षा करतो ते साध्य होत नाही.
21 यास्तव, सर्व अनैतिक घाण व दुष्टतेचा त्याग करा व जे वचन
तुम्हामध्ये पेरलेले आहे त्याचा नम्रतेने स्वीकार करा, ते वचन तुम्हाला
तारावयास समर्थ आहे. 22 वचन केवळ ऐकून स्वत:ची फसवणूक करू
नका. वचन सांगते त्याप्रमाणे आचरण करा. 23 कारण जो कोणी वचन
ऐकतो, पण त्याप्रमाणे आचरण करत नाही, तो आरशात आपले मुख
पाहणाऱ्यासारखा आहे. 24 तो स्वत:कडे पाहिल्यावर निघून जातो आणि
आपण कसे दिसत होतो हे ताबडतोब विसरतो. 25 परंतु जो कोणी
स्वतंत्रतेच्या परिपूर्ण नियमांकडे लक्ष देतो आणि त्यामध्ये स्थिर राहतो,
तो ऐकून विसरणारा न होता त्याप्रमाणे कृती करणारा होतो आणि तो जे
काही करतो त्या गोष्टीत त्याला आशीर्वाद मिळतो. 26 जे स्वत:ला भक्त
समजतात परंतु आपल्या जिभेवर ताबा ठेवीत नाहीत, ते स्वत:लाच
फसवितात व त्यांची भक्ती व्यर्थ आहे. 27 परमेश्वर पित्याच्या दृष्टीने
शुद्ध व निर्दोष भक्ती हीच आहे की अनाथ व विधवांची त्यांच्या दु:खात
काळजी घेणे आणि जगाच्या मलिनतेपासून स्वत:ला अलिप्त राखणे.

2 प्रिय बंधू आणि भगिनींनो, गौरवशाली प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास
ठेवणारे आपण पक्षपात करू नये. 2 एखादा मनुष्य तुमच्या
सभांमध्ये सोन्याची अंगठी घातलेला आणि उंची कपडे परिधान केलेला
आला, व एक गरीब मनुष्य जुने आणि मळीन कपडे घातलेला आला. 3
तर तुम्ही ज्याने उंची कपडे परिधान केले आहेत त्याच्याकडे विशेष लक्ष
देता आणि म्हणता, “ही जागा तुमच्यासाठी चांगली आहे,” परंतु त्या
गरीब मनुष्याला म्हणता, “तिथे उभा राहा” किंवा “माझ्या पायाजवळ
जमिनीवर बस,” 4 तुम्ही आपसात भेदभाव केला की नाही आणि दुष्ट
विचारांनी न्याय करणारे झाले की नाही? 5 माझ्या प्रिय बंधू आणि
भगिनींनो ऐका, परमेश्वराने जगाच्या दृष्टीने जे दरिद्री आहेत त्यांना
विश्वासामध्ये धनवान होण्यास आणि जे त्याच्यावर प्रीती करतात त्यांना
वचनानुसार राज्याचे वारस होण्यास निवडले नाही का? 6 परंतु तुम्ही
गरिबांचा अपमान केला आहे. धनवान लोकच तुमचे शोषण करतात
की नाही? तेच लोक तुम्हाला न्यायालयात खेचतात की नाही? 7 ज्या
उत्कृष्ट नावावरून तुमची ओळख होते, त्या नावाची निंदा करणारे तेच
नाहीत का? 8 “जशी तुम्ही स्वत:वर तशी तुमच्या शेजाऱ्यावर प्रीती
करा,” हा शास्त्र वचनात आढळणारा राजमान्यनियम तुम्ही पाळता तर
चांगले करता. 9 पण तुम्ही पक्षपात करता, तर पाप करता आणि नियम
मोडणारे म्हणून नियमानुसार दोषी ठरता. 10 जो कोणी सर्व नियम
पाळतो, परंतु एका बाबीविषयी अडखळतो तो सर्व नियम मोडणाऱ्या
एवढाच दोषी आहे. 11 ज्यांनी म्हटले, “तू व्यभिचार करू नको,” तोच
हे सुद्धा म्हणतो, “तू खून करू नको.” जर तू व्यभिचार करीत नाही
परंतु खून करतो, तर तू नियम मोडणारा होतो. 12 स्वतंत्रता देणाऱ्या
नियमाद्वारे तुमचा न्याय होणार आहे म्हणून बोला व कृती करा, 13
कारण जे कोणी दयावान नाहीत त्यांचा न्याय दयेवाचून होईल. दया
न्यायावर विजय मिळविते. 14 माझ्या बंधू आणि भगिनींनो, जर कोणी
असा दावा करतो की त्याच्याजवळ विश्वास आहे, परंतु क्रिया नाही
तर त्यापासून काय लाभ? अशा विश्वासाने त्यांचे तारण होऊ शकेल
का? 15 समजा तुमच्या बंधू किंवा भगिनीला वस्त्र आणि रोजच्या
अन्नाची उणीव आहे. 16 जर तुमच्यापैकी एकजण त्यांना म्हणतो,
“शांतीने जा; ऊब घ्या व खाऊन तृप्त व्हा,” परंतु त्यांच्या शारीरिक
गरजासंबंधी काही करीत नाही, तर काय उपयोग? 17 त्याचप्रमाणे,
विश्वासाला जर कृतीची जोड नसली तर तो निर्जीव आहे. 18 पण कोणी

म्हणेल, “तुझ्याजवळ विश्वास आहे; आणि माझ्याकडे क्रिया आहे.”
तुझा विश्वास क्रियांवाचून मला दाखव आणि मी माझा विश्वास माझ्या
कृत्यांद्वारे सिद्ध करतो. 19 परमेश्वर एकच आहे असा तुमचा विश्वास
आहे. तर उत्तम! दुरात्मे देखील विश्वास धरतात आणि भीतीने थरथर
कापतात. 20 अरे मूर्ख माणसा, कृती शिवाय विश्वास व्यर्थ आहे याचा
तुला पुरावा पाहिजे का? 21 आपला पिता अब्राहामाने त्याचा पुत्र
इसहाकाला वेदीवर अर्पण केले आणि त्या कृत्यामुळे त्याला नीतिमान
ठरविण्यात आले नाही का? 22 तुम्हीच पाहा, त्याचा विश्वास आणि
कृती एकत्रित कार्य करत होते आणि त्याने जे काही केले त्याद्वारे त्याचा
विश्वास पूर्ण झाला. 23 आणि जे शास्त्रलेखात सांगितले ते पूर्ण झाले,
“अब्राहामाने परमेश्वरावर विश्वास ठेवला आणि ते त्याला नीतिमत्व असे
गणण्यात आले,” आणि त्याला परमेश्वराचा मित्र म्हणण्यात आले. 24
तर मग तुम्ही पाहा मनुष्य केवळ विश्वासाने नव्हे तर कृतीने नीतिमान
ठरतो. 25 त्याचप्रमाणे, राहाब वेश्याने हेरांना राहण्यासाठी जागा दिली
आणि त्यांना दुसऱ्या मार्गाने पाठवून दिले, यात ती तिच्या कृत्यामुळे
नीतिमान ठरली नाही का? 26 जसे शरीर आत्म्यावाचून निर्जीव आहे,
तसा विश्वासही क्रियांवाचून निर्जीव आहे.

**3** माझ्या विश्वासू बंधूंनो, तुम्हातील पुष्कळांनी शिक्षक होऊ नये,
कारण तुम्हाला माहीत आहे की जे आपण शिक्षक आहोत त्या
आपला न्याय अधिक कठोरपणे होईल. 2 आपण सर्वजण अनेक प्रकारे
अडखळतो. जर कोणी बोलण्यात कधीही चुकत नाही, तर तो परिपूर्ण
आहे व आपले सर्व शरीर ताब्यात ठेवण्यास समर्थ आहे. 3 घोड्यांनी
आज्ञा पाळावी म्हणून आम्ही त्याच्या तोंडात लगाम घालतो व त्याद्वारे
संपूर्ण प्राण्याचे शरीर वळवू शकतो. 4 किंवा तारवांचे उदाहरण घ्या,
ही तारवे खूप मोठी असतात व प्रबळ वाऱ्यांनी ती लोटली जातात,
तरी चालकाची इच्छा असते तिकडे ती अगदी लहानशा सुकाणाने
वळविता येतात. 5 त्याचप्रमाणे, जीभ ही शरीराचा लहान अवयव
आहे, परंतु ती मोठ्या गोष्टींची फुशारकी मारते. विचार करा, मोठ्या
जंगलाला पेटविण्यासाठी आगीची एक लहान ठिणगी पुरेशी आहे. 6
जीभ सुद्धा आग आहे, आपल्या शरीराच्या अवयवांमध्ये ती दुष्टतेचे
जग आहे. ती संपूर्ण शरीराला भ्रष्ट करते, एखाद्याच्या जीवनाला आग
लावते आणि स्वतः नरकाच्या अग्नीने पेटलेली आहे. **(Geenna g1067)** 7
सर्वप्रकारचे प्राणी, पक्षी आणि सरपटणारे प्राणी आणि समुद्रातील
प्राणी वश झाले आहेत आणि त्यांना मनुष्यप्राण्याने वश केले आहे. 8
परंतु कोणताही मनुष्यप्राणी जिभेला वश करू शकत नाही. ती चंचल
दुष्ट, प्राणघातक विषाने पूर्णपणे भरलेली आहे. 9 या जिभेने आपल्या
प्रभू आणि पित्याची आपण स्तुती करतो, आणि याच जिभेने ज्याला
परमेश्वराच्या प्रतिमेप्रमाणे बनविले आहे अशा मनुष्यप्राण्याला शाप
देतो. 10 याप्रकारे स्तुती आणि शाप एकाच मुखातून निघतात. प्रिय बंधू
आणि भगिनींनो, असे असू नये. 11 एकाच झऱ्यातून दोन्ही प्रकारचे
ताजे पाणी आणि खारट पाणी वाहू शकते काय? 12 माझ्या बंधूंनो व
भगिनींनो, अंजिराचे झाड जैतुनाची फळे आणि द्राक्षवेल अंजीर उत्पन्न
करू शकेल काय? नाही, तसेच खाऱ्या पाण्याचा झरा ताजे पाणी देणार
नाही. 13 तुम्हामध्ये ज्ञानी आणि समंजस कोण आहे? त्याने ज्ञानाच्या
लीनतेने आपल्या चांगल्या वर्तणुकीद्वारे आपले ज्ञान दाखवावे. 14 परंतु
तुम्ही कटुता, मत्सर आणि स्वार्थी इच्छा आपल्या अंतःकरणात बाळगत
असाल, तर पोकळ बढाई मारू नका किंवा सत्य नाकारू नका. 15 अशा
प्रकारचे ज्ञान हे स्वर्गातून उतरत नाही, परंतु ते पृथ्वीवरील अनीतिमान व
सैतानाकडून आहे. 16 कारण जिथे मत्सर अथवा स्वार्थी हेतू असेल,
तिथे अव्यवस्था व सर्व दुराचारी व्यवहार असतो. 17 परंतु स्वर्गातून
येणारे ज्ञान हे सर्वप्रथम शुद्ध, नंतर शांतिप्रिय, विचारशील, विनयी,
दयामयी व चांगली फळे यांनी भरलेले, अपक्षपाती आणि प्रामाणिक
असते. 18 शांती करणारे शांतीचे बीज पेरतात आणि ते नीतिमत्वाचे
पीक काढतात.

**4** तुम्हामध्ये लढाया आणि भांडणे कशामुळे उत्पन्न होतात? ज्या
इच्छा तुम्हामध्ये लढाई करतात त्यातून नाही काय? 2 तुम्ही इच्छा
करता परंतु तुम्हाला प्राप्त होत नाही, यामुळे तुम्ही वध करता. तुम्ही
लोभ धरता, परंतु जे पाहिजे ते तुम्हाला प्राप्त होत नाही, यामुळे तुम्ही
भांडता आणि लढता. तुमच्याकडे नाही कारण तुम्ही परमेश्वराकडे मागत
नाही. 3 जेव्हा तुम्ही मागता, तरी तुम्हाला ते मिळत नाही, कारण तुम्ही
अयोग्य हेतूने, विलासाच्या गोष्टींवर खर्च करावा म्हणून मागता. 4
व्यभिचारी लोकांनो, जगाशी मैत्री परमेश्वराबरोबर वैर आहे हे तुम्हाला
समजत नाही काय? यास्तव, जो कोणी जगाचा मित्र होण्याचे पसंत
करतो तो परमेश्वराचा शत्रू झाला आहे. 5 त्याने जो आत्मा आपल्या
ठायी ठेवला आहे तो सौम्य ईर्षेने आपल्यावर नजर ठेवतो, हे शास्त्राचे
म्हणणे व्यर्थ आहे असे तुम्हास वाटते का? 6 परंतु ते आपल्याला अधिक
कृपा देतात, यामुळे शास्त्रवचन सांगते, “परमेश्वर गर्विष्ठांचा विरोध
करतात परंतु नम्रजनावर कृपा करतात.” 7 तुम्ही स्वतः परमेश्वराच्या
अधीन व्हा. सैतानाचा विरोध करा, म्हणजे तो तुम्हापासून पळून जाईल;
8 तुम्ही परमेश्वराजवळ या म्हणजे ते तुम्हाजवळ येतील. अहो पाप्यांनो,
आपले हात धुवा आणि दुहेरी मनाचे जे आहेत त्यांनी आपली अंतःकरणे
शुद्ध करावीत. 9 तुम्ही रडा, शोक आणि आकांत करा. तुमचे हसणे
शोकात आणि तुमचा आनंद खिन्नतेमध्ये बदलू द्या. 10 प्रभूसमोर तुम्ही
स्वतःला नम्र करा आणि ते तुम्हाला उंच करतील. 11 प्रिय बंधूंनो आणि
भगिनींनो, एकमेकांची चहाडी करू नका. जो कोणी आपल्या बंधू किंवा
भगिनी विरुद्ध बोलतो अथवा त्यांचा न्याय करतो, तो नियमाविरुद्ध
बोलतो व न्याय करतो, जेव्हा तुम्ही नियमांविरुद्ध न्याय करता आणि ते
पाळीत नाही, तर न्याय करणारे व्हाल. 12 नियमशास्त्र देणारे आणि
न्यायाधीश एकच आहेत, तेच उद्धार आणि नाश करू शकतात. परंतु
आपल्या शेजाऱ्याचा न्याय करणारा तू कोण? 13 आता ऐका, तुम्ही
म्हणता, “आम्ही आज किंवा उद्या या किंवा त्या शहरात जाऊ, तिथे
वर्षभर राहू, उद्योग सुरू करू आणि पैसे कमवू.” 14 तुम्हाला उद्या काय
आणि कसे होणार हे माहीत नाही. तुमचे जीवन ते काय आहे? तुम्ही
त्या धुक्यासारखे आहात, जे थोड्या वेळासाठी दिसते आणि नाहीसे

होते. 15 याऐवजी, तुम्ही असे म्हणावयास हवे, “जर प्रभूची इच्छा
असेल, तर आम्ही जगू व हे किंवा ते करू.” 16 जसे आता तुम्ही घमेंड
करता आणि अभिमान बाळगता. अशा सर्व प्रकारची बढाई वाईट आहे.
17 जर कोणाला चांगले करणे कळत असूनही, ते करत नाही, तर ते
त्यांना पाप गणले जाते.

5 श्रीमंत लोकांनो, ऐका, जी आपत्ती तुमच्यावर येणार आहे त्यामुळे
रडा आणि विलाप करा. 2 तुमची संपत्ती सडली आहे व तुमच्या
वस्त्रांना गंज लागला आहे. 3 तुमचे सोने आणि चांदी याला गंज
चढला आहे. त्यांचे गंजणे तुम्हाविरुद्ध साक्ष देईल आणि अग्नीप्रमाणे
तुमचे मांस खाऊन टाकेल. शेवटच्या दिवसासाठी तुम्ही धनाचा साठा
करून ठेवला आहे. 4 पाहा! ज्या कामकऱ्यांनी तुमची शेते कापली,
त्यांचे वेतन तुम्ही दिले नाही ते तुमच्याविरुद्ध आक्रोश करीत आहेत.
कापणी करणाऱ्यांचा आक्रोश सेनाधीश प्रभूच्या कानावर गेला आहे. 5
पृथ्वीवर तुम्ही विलासात आणि भोगासक्तीत राहिला. तुम्ही स्वतःला
वधासाठी धष्टपुष्ट केले आहे. 6 जो तुमचा विरोध करत नव्हता, त्या
निष्पाप मनुष्याला तुम्ही दोषी ठरवून त्याचा वध केला. 7 प्रिय बंधूंनो
आणि भगिनींनो, प्रभूचे आगमन होईपर्यंत धीर धरा. पाहा शेतकरी
कसा जमिनीतून निघणाऱ्या मोलवान पिकांची वाट पाहतो. शरद आणि
वसंतामध्ये येणाऱ्या पावसाची धीराने वाट पाहतो. 8 तसेच तुम्ही
पण, धीर धरा आणि खंबीरपणे उभे राहा, कारण प्रभूचे येणे जवळ
आले आहे. 9 बंधूंनो आणि भगिनींनो, तुमचा न्याय होऊ नये म्हणून
एकमेकांविरुद्ध कुरकुर करू नका. न्यायाधीश दारात उभा आहे. 10
बंधूंनो आणि भगिनींनो, संदेष्टे प्रभूच्या नावाने बोलत असताना त्यांनी
सहन केलेले दुःख आणि धीर याचे उदाहरण लक्षात घ्या. 11 तुम्हाला
माहीत आहे, ज्यांनी धीर धरला त्यांना आपण आशीर्वादित म्हणतो.
तुम्ही इय्योबाच्या धीराविषयी ऐकले आणि शेवटी प्रभूने त्याला कसे
आशीर्वादित केले हे तुम्ही पाहिले. प्रभू करुणा आणि दया यांनी भरलेले
आहेत. 12 या सर्वांपेक्षा, माझ्या बंधू आणि भगिनींनो, ना स्वर्गाची, ना
पृथ्वीची किंवा दुसऱ्या कोणत्याच गोष्टींची शपथ वाहू नका. जे काही
तुम्हाला म्हणावयाचे ते साधे “होय” किंवा “नाही” असावे. नाही तर
तुम्ही दोषी ठरविले जाल. 13 तुम्हापैकी कोणी त्रासात आहे काय?
त्यांनी प्रार्थना करावी. कोणी आनंदी आहे काय? त्यांनी स्तुतिस्तोत्रे
गावीत. 14 तुम्हामध्ये कोणी आजारी आहे काय? त्याने मंडळीच्या
वडिलांना बोलवावे आणि त्यांनी प्रभूच्या नावाने त्याला तैलाभ्यंग करावा
आणि प्रार्थना करावी. 15 विश्वासाने केलेली प्रार्थना त्या रोग्याला बरे
करेल; प्रभू त्याला उठवेल. जर त्यांनी पाप केले असेल, तर त्यांची
क्षमा होईल. 16 यास्तव एकमेकांजवळ आपली पापे कबूल करा व
एकमेकांसाठी प्रार्थना करा, म्हणजे तुम्ही निरोगी व्हाल. नीतिमान
माणसाची प्रार्थना प्रबळ व परिणामकारक असते. 17 एलीयाह अगदी
आपल्यासारख्या स्वभावाचा मनुष्य होता. त्याने पाऊस पडू नये अशी
कळकळीने प्रार्थना केली आणि साडेतीन वर्षे भूमीवर पाऊस पडला
नाही. 18 मग त्याने पुन्हा प्रार्थना केली, तेव्हा आकाशातून पाऊस पडला
आणि पृथ्वीने आपला उपज दिला. 19 प्रिय बंधूंनो आणि भगिनींनो,
जर तुम्हातील कोणी एक सत्यापासून बहकला असेल आणि अशा
व्यक्तीला कोणी परत आणेल तर मग 20 हे लक्षात ठेवा, जो कोणी
अशा पापी व्यक्तीला त्याच्या अयोग्य मार्गापासून फिरवितो, तो त्याला
मरणापासून वाचवेल आणि त्याच्या अनेक पापांवर पांघरूण घालेल.

# 1 पेत्र

1 पेत्र, येशू ख्रिस्ताच्या प्रेषिताकडून, 2 जे परमेश्वर पित्याच्या
पूर्वज्ञानानुसार निवडलेले, आत्म्याच्या पवित्रीकरणाच्या कार्याद्वारे,
येशू ख्रिस्ताचे आज्ञापालन करणारे, त्यांच्या रक्ताने सिंचन झालेले: 3
परमेश्वर आणि आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचे पिता यांची स्तुती असो!
त्यांनी आपल्या महान दयेने आणि येशू ख्रिस्ताच्या मृत्यूमधून झालेल्या
पुनरुत्थानाद्वारे जिवंत आशेमध्ये आपल्याला नवीन जन्म दिला आहे. 4
हे वतन अविनाशी असून कधीही नाश होत नाही किंवा कुजत नाही;
आणि हे वतन तुमच्यासाठी स्वर्गात राखून ठेवले आहे. 5 जे तारण
शेवटच्या काळी प्रकट होण्यास सिद्ध आहे, ते तुम्हाला पूर्णपणे प्राप्त
व्हावे याकरिता विश्वासाद्वारे परमेश्वराच्या शक्तीने तुम्ही सुरक्षित ठेवलेले
आहात. 6 त्याविषयी तुम्ही खूप उल्लास करता, तरी आता थोडा वेळ
वेगवेगळया प्रकारच्या परीक्षांमुळे दुःख सोसणे तुम्हाला भाग पडत
आहे. 7 ही तुमच्या विश्वासाची सिद्ध निष्ठा सोन्यापेक्षा कितीतरी अधिक
मौल्यवान आहे, जे अग्नीने शुद्ध केलेले असूनही नाश पावते. जेव्हा येशू
ख्रिस्त प्रकट होतील तेव्हा त्या विश्वासाची स्तुती, गौरव आणि सन्मान
होऊ शकेल. 8 त्यांना पाहिले नसतानाही, तुम्ही त्यांच्यावर प्रीती करता;
ते दिसत नसतानाही, तुम्ही त्यांच्यावर विश्वास ठेवता आणि अवर्णनीय
गौरवी आनंदाने उल्हासता, 9 कारण त्यांच्यावर विश्वास ठेवल्यामुळे
पुढे मिळणारे तुमच्या आत्म्याचे तारण हे तुमचे प्रतिफळ आहे. 10
तुमच्याकडे जी येणार होती, त्या कृपेबद्दल ज्या संदेष्ट्यांनी तुम्हाला
सांगितले, त्यांनी या तारणासंबंधी लक्षपूर्वक शोध घेतला आणि मोठ्या
काळजीने, 11 त्यांच्यामध्ये असणाऱ्या ख्रिस्ताच्या आत्म्याद्वारे त्यांनी
ख्रिस्ताचे दुःखसहन आणि त्यानंतर येणाऱ्या गौरवी गोष्टीबद्दल भविष्य
केले, तेव्हा त्यांनी ती वेळ आणि परिस्थिती शोधण्याचा प्रयत्न केला.
12 ते त्यांना यासाठी प्रकट केले होते की, ते स्वतःची सेवा नव्हे तर
तुमची करीत होते. ते ज्या गोष्टींविषयी बोलले होते, त्या गोष्टी तुम्हाला
स्वर्गातून पाठविलेल्या पवित्र आत्म्याद्वारे, ज्यांनी शुभवार्तेची घोषणा
केली त्यांच्याद्वारे तुम्हाला आता सांगितल्या आहेत. स्वर्गदूतांना सुद्धा या
गोष्टी जाणून घेण्याची इच्छा होती. 13 म्हणून येशू ख्रिस्त प्रकट होतील
तेव्हा तुम्हाला दिल्या जाणाऱ्या कृपेवर सावध अंतःकरणाने आणि
संपूर्ण विचारशीलतेने तुमची आशा ठेवा. 14 आज्ञांकित मुलांसारखे व्हा
आणि अज्ञानपणातील वाईट इच्छेला अनुसरून जसे तुम्ही पूर्वी जगत
होता तसे आता जगू नका. 15 परंतु ज्यांनी तुम्हाला पाचारण केले ते
जसे पवित्र आहेत, तसेच तुम्हीही जे काही करता त्यांच्यामध्ये पवित्र
असा. 16 कारण शास्त्रलेखात असे लिहिले आहे, “तुम्ही पवित्र असावे,
कारण मी पवित्र आहे.” 17 तुम्ही ज्यांना पिता म्हणून हाक मारता, ते
प्रत्येक व्यक्तीच्या कामाचा निःपक्षपातीपणाने न्याय करतात, म्हणून
या जगात तुमचे जीवन परदेशीयांसारखे आदरयुक्त भीतीने व्यतीत
करा. 18 तुम्हाला माहीत आहे की, तुमच्या पूर्वजांपासून परंपरेने चालत
आलेल्या निरर्थक वागणुकीपासून चांदी किंवा सोने अशा नाशवंत
वस्तूंनी तुमची सुटका केली नाही, 19 परंतु निष्कलंक आणि निर्दोष
कोकरा, जे ख्रिस्त त्यांच्या मौल्यवान रक्ताने झाली. 20 या जगाची
निर्मिती होण्यापूर्वीच त्यांची निवड झाली होती, परंतु या शेवटच्या
काळात ते तुमच्यासाठी प्रकट झाले. 21 त्यांच्याद्वारे तुम्ही परमेश्वरावर
विश्वास ठेवता, ज्यांना परमेश्वराने मरणातून उठविले आणि त्यांचे गौरव
केले, म्हणून तुमचा विश्वास आणि तुमची आशा परमेश्वरामध्ये आहे. 22
आता सत्याचे आज्ञापालन करून तुम्ही स्वतःला शुद्ध केले आहे यासाठी
की, तुमची एकमेकांवर खरी प्रीती असावी आणि एकमेकांवर खोल
अंतःकरणापासून प्रीती करावी. 23 कारण नाशवंत बीजापासून नव्हे, तर
अविनाशी बीजापासून, जिवंत आणि सर्वकाळ टिकणाऱ्या परमेश्वराच्या
वचनाद्वारे तुमचा नवीन जन्म झाला आहे. (aiōn g165) 24 कारण, “सर्व
लोक गवतासारखे आहेत, आणि त्यांचे सौंदर्य वनातील फुलांसारखे
आहे. गवत सुकते आणि फूल कोमेजते. 25 परंतु प्रभूचे वचन सर्वकाळ
टिकते.” आणि हेच ते वचन आहे ज्याचा प्रचार तुम्हाला करण्यात आला
होता. (aiōn g165)

2 यास्तव, सर्व वैरभाव आणि सर्व खोटेपणा, ढोंग, मत्सर आणि
प्रत्येक प्रकारच्या दुर्भाषणाचा त्याग करा. 2 नवीन जन्मलेल्या
बालकांसारखे शुद्ध, आध्यात्मिक दुधाची इच्छा धरा म्हणजे तुम्ही तुमच्या
तारणाच्या अनुभवामध्ये वाढत जाल. 3 कारण प्रभू चांगले आहेत याचा
तुम्ही आता अनुभव घेतला आहे. 4 जो जिवंत दगड बांधणाऱ्यांनी
नाकारला, परंतु परमेश्वराने निवडलेला आणि त्यांना मोलवान असलेल्या
ख्रिस्ताकडे तुम्ही आला आहात. 5 तुम्ही सुद्धा, जिवंत दगडांसारखे
आत्मिक मंदिर म्हणून बांधले जात आहात, यासाठी की येशू ख्रिस्ताद्वारे
परमेश्वराने स्वीकारण्यास योग्य असे आत्मिक यज्ञ अर्पिण्यासाठी तुम्ही
पवित्र याजकगण व्हावे. 6 कारण शास्त्रलेखात असे लिहिले आहे:
“पाहा, सीयोनात मी एक दगड ठेवितो निवडलेला आणि मौल्यवान
कोनशिला, त्यांच्यावर विश्वास ठेवणारा कधीही लज्जित होणार नाही.”
7 आता जे तुम्ही विश्वास ठेवता, त्या तुम्हासाठी हा दगड अति मोलवान
आहे. परंतु जे विश्वास ठेवीत नाहीत, “जो दगड बांधणाऱ्यांनी नाकारला,
तोच इमारतीचा कोनशिला झाला आहे.” 8 आणि, “लोकांना ठेच
लागण्याचा एक दगड व अडखळण्याचा एक खडक ठेवतो.” ते
अडखळतात, कारण ते परमेश्वराच्या वचनाप्रमाणे चालत नाहीत, ज्या
शिक्षेसाठी ते पूर्वीच नेमलेले सुद्धा होते. 9 परंतु तुम्ही निवडलेले लोक,
राजकीय याजकगण, पवित्र राष्ट्र, परमेश्वराचे विशेष धन आहात, यासाठी
की ज्यांनी तुम्हाला अंधारातून काढून त्यांच्या अद्भुत प्रकाशात आणले
त्यांच्या स्तुतीची घोषणा करावी. 10 पूर्वी तुम्ही ते लोक नव्हता परंतु
आता तुम्ही परमेश्वराचे लोक आहात; पूर्वी तुम्हाला दया प्राप्त झाली
नव्हती, परंतु आता तुम्हाला दया प्राप्त झाली आहे. 11 प्रिय मित्रांनो, जे
तुम्ही या जगात परदेशीय व बंदिवासात आहात त्या तुम्हाला मी विनंती
करतो की, ज्या पापी वासना तुमच्या आत्म्याविरुद्ध लढतात त्यापासून
दूर राहा. 12 अनीतिमान लोकांमध्ये अशा प्रकारचे चांगले जीवन जगा,
की अयोग्य कृत्ये करण्याचा ते तुमच्यावर आरोप करीत असतील, तरी

ते तुमची चांगली कामे पाहतील आणि परमेश्वराच्या येण्याच्या दिवशी
ते त्यांचे गौरव करतील. 13 तुम्ही प्रभूकरिता मनुष्यांमध्ये स्थापित
केलेल्या प्रत्येक अधिकाऱ्याच्या अधीन असा: मग तो सर्वोच्च अधिकारी
म्हणून राजासुद्धा असेल 14 अथवा राज्यपाल असेल, कारण जे अयोग्य
गोष्टी करतात त्यांना शिक्षा करण्यासाठी आणि जे योग्य गोष्टी करतात,
त्यांची प्रशंसा करण्यासाठी ते परमेश्वराकडून पाठविलेले आहेत. 15
कारण परमेश्वराची अशी इच्छा आहे की चांगली कार्ये करून तुम्ही
मूर्ख लोकांची अज्ञानी बोलणी बंद करावीत. 16 तुम्ही मुक्त आहात,
परंतु तुमचे स्वातंत्र्य वाईट कृत्यांवर पांघरूण घालण्यासाठी वापरू
नका, तर परमेश्वराच्या दासासारखे जगा. 17 प्रत्येकाला योग्य आदर
दाखवा. विश्वासणाऱ्यांच्या कुटुंबावर प्रीती करा. परमेश्वराचे भय बाळगा
व राजाचा मान राखा. 18 दासांनो, आदराने परमेश्वराचे भय बाळगून
तुम्ही स्वतःला तुमच्या धन्याच्या अधीन करा, फक्त जे चांगले आणि
कृपाळू आहेत अशांच्याच नाही, तर जे कठोर आहेत अशा धन्यांच्यासुद्धा
अधीन राहा. 19 कारण त्याला परमेश्वराची जाणीव असल्यामुळे जर
कोणी मनुष्य अन्यायी दुःखाच्या वेदना सहन करतो, तर ते प्रशंसनीय
आहे. 20 परंतु चूक केल्याबद्दल मिळालेली शिक्षा तुम्ही सहन केली तर
त्यात काय मोठेपणा आहे? परंतु जर चांगले केल्याबद्दल तुम्ही दुःख
भोगले आणि ते सहन केले तर हे परमेश्वराच्या दृष्टीने प्रशंसनीय आहे.
21 यासाठीच तुम्हाला पाचारण करण्यात आलेले आहे, कारण ख्रिस्ताने
तुमच्यासाठी दुःख सहन करून तुमच्यासमोर एक आदर्श ठेवला आहे,
यासाठी की तुम्ही त्यांचे अनुकरण करावे. 22 “त्यांनी कधीही पाप
केले नाही; आणि त्यांच्या मुखात कोणतेही कपट आढळले नाही.”
23 जेव्हा त्यांनी त्यांचा अपमान केला, तरी त्यांनी कधी उलट उत्तर
दिले नाही, जेव्हा दुःख भोगले त्यांनी धमकाविले नाही. त्यापेक्षा त्यांनी
जो न्यायीपणाने न्याय करतो त्यांच्याकडे स्वतःला सोपवून दिले. 24
त्यांच्या शरीरामध्ये त्या क्रूसावर, “त्यांनी स्वतः आमची पापे वाहिली”
यासाठी की, आपण पापी स्वभाव सोडून नीतिमत्वासाठी जीवन जगावे;
“त्यांना झालेल्या जखमांच्याद्वारे तुम्ही बरे झाले आहात.” 25 कारण
“मेंढरांप्रमाणे तुम्ही परमेश्वरापासून बहकून दूर गेला होता,” परंतु आता
तुम्ही तुमच्या मेंढपाळाकडे आणि तुमच्या आत्म्याच्या रक्षकाकडे परत
आला आहात.

**3** पत्नींनो याचप्रकारे तुम्ही तुमच्या पतीच्या आज्ञेत राहा, म्हणजे
त्यांच्यापैकी कोणी जर परमेश्वराच्या वचनावर विश्वास ठेवीत नाहीत,
तर ते वचनाशिवाय त्यांच्या पत्नींच्या वर्तणुकीद्वारे जिंकले जाऊ
शकतात; 2 कारण ते तुमच्या जीवनातील शुद्धता आणि आदर पाहतात.
3 जसे की केशरचना आणि सोन्याचे दागदागिने घालणे किंवा आकर्षक
वस्त्रे घालणे या बाह्य गोष्टींवर तुमचे सौंदर्य केवळ अवलंबून नसावे, 4 तर
याउलट ते तुमच्या अंतःकरणाच्या, न झिजणाऱ्या पण सौंदर्यपूर्ण शांत
आणि सौम्य आत्म्याचे असावे, जे परमेश्वराच्या दृष्टीने अति मोलवान
आहे. 5 कारण पूर्वीच्या काळातील पवित्र स्त्रिया ज्यांची परमेश्वरावर
आशा होती, त्या अशाच प्रकारे स्वतःला सजवित असत. त्यांनी स्वतःला
त्यांच्या पतीच्या अधीन केले होते, 6 ज्याप्रमाणे सारा अब्राहामाच्या
आज्ञेत राहिली आणि त्याला तिचा प्रभू असे म्हणाली. जर तुम्ही भीती
न बाळगता जे चांगले ते करीत आहात, तर तुम्ही तिच्या मुली आहात. 7
पतींनो, त्याच प्रकारे तुम्ही आपल्या पत्नीबरोबर राहत असताना त्या
नाजूक आहेत म्हणून सुज्ञतेने राहा, तुमच्याबरोबर त्यादेखील कृपेच्या
जीवनाच्या देणग्यांच्या वतनदार आहेत, म्हणून त्यांना मान द्या म्हणजे
तुमच्या प्रार्थनेत व्यत्यय येणार नाही. 8 सारांश, तुम्ही सर्व एकचित्ताने
एकमेकांवर खऱ्या प्रीतीने व सहानुभूतीने बंधुप्रीती करणारे, दयाळू
व नम्र असे व्हा. 9 वाईटाची फेड वाईटाने किंवा अपमानाची फेड
अपमानाने करू नका. याउलट, वाईटाची फेड आशीर्वाद देऊन करा,
कारण आशीर्वाद हे वतन मिळविण्यासाठी तुम्हाला पाचारण करण्यात
आले आहे. 10 कारण, “जो जीवनावर प्रीती करतो आणि चांगले
दिवस पाहण्याची अपेक्षा करतो, तर त्यांनी आपली जीभ वाईटापासून
आणि आपले ओठ कपट बोलण्यापासून राखावे. 11 त्यांनी वाईटाचा
त्याग करावा आणि चांगले ते करावे; त्यांनी शांतीचा यत्न करावा व
तिच्यामागे लागावे. 12 कारण प्रभूचे नेत्र नीतिमानांवर आहेत, आणि
त्यांचे कान नीतिमानांच्या प्रार्थनेकडे लागलेले असतात. परंतु प्रभूचे
मुख जे वाईट करतात त्यांच्याविरुद्ध आहे.” 13 चांगले करण्याची
आस्था असेल, तर सहसा कोणी तुम्हाला अपाय करणार नाही. 14 जर
तुम्ही चांगले केल्याबद्दल सहन करता, तर तुम्ही आशीर्वादित आहात.
“त्यांच्या अफवांना भिऊ नका आणि घाबरू नका.” 15 ख्रिस्ताला प्रभू
म्हणून आपल्या अंतःकरणात आदरणीय माना. तुमच्यामध्ये जी आशा
आहे व ती का आहे, याविषयी विचारपूस करणाऱ्या प्रत्येकाला उत्तर
देण्यास नेहमी सिद्ध असा आणि ते सौम्यतेने व आदरपूर्वक करा. 16
आदरयुक्त, शुद्ध विवेकबुद्धीला अनुसरून राहा, म्हणजे ख्रिस्तामधील
तुमच्या चांगल्या वागणुकीविरुद्ध जे लोक द्वेषभावाने बोलतात, त्यांना
निंदानालस्तीची लाज वाटेल. 17 तुम्ही दुःख सोसावे अशी परमेश्वराची
इच्छा असेल, तर वाईट करून दुःख भोगण्यापेक्षा, चांगले करून दुःख
सोसणे, अधिक चांगले आहे! 18 नीतिमान असताना अनीतिमान
लोकांना, तुम्हाला परमेश्वराकडे न्यावे म्हणून ख्रिस्तानेसुद्धा पापांसाठी
एकदाच दुःख सोसले, शारीरिक दृष्टीने त्यांचा मृत्यू झाला होता, परंतु
आत्म्यामध्ये त्यांना जिवंत केले होते. 19 जिवंत झाल्यानंतर येशू गेले
आणि बंदीशाळेतील आत्म्यांना संदेश दिला 20 ज्यांनी परमेश्वराच्या
आज्ञेचे पालन केले नव्हते; पूर्वी नोआहच्या काळामध्ये जहाज बांधले
जात असताना परमेश्वराने धीराने त्यांची वाट पाहिली. त्यामध्ये असलेले
फक्त थोडे लोक, सर्व मिळून आठजण पाण्यामधून वाचले होते. 21
ते पाणी आपल्यासाठी बाप्तिस्म्याचे चित्र आहे, ते शरीराची घाण
काढून नाही तर परमेश्वराकडे सदसद्विवेकबुद्धीची प्रतिज्ञा केल्याने आता
तुम्हालासुद्धा वाचविते. ते तुम्हाला येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाद्वारे
वाचविते. 22 ते येशू आता स्वर्गात गेले आहेत आणि परमेश्वराच्या
उजवीकडे असून सर्व स्वर्गदूत, अधिकार आणि सत्ता त्यांच्या अधीन
आहेत.

**4** म्हणून, ज्याअर्थी ख्रिस्ताने त्यांच्या शरीरामध्ये दु:ख सहन केले,
त्याअर्थी तुम्ही सुद्धा तीच मनोवृत्ती धारण केली पाहिजे, कारण
जो कोणी शरीरामध्ये दु:ख सहन करतो तो पापाचा त्याग करतो. 2
याचा परिणाम असा होतो की, त्यांचे उरलेले ऐहिक जीवन ते मानवाच्या
वाईट इच्छेप्रमाणे नव्हे तर परमेश्वराच्या इच्छेप्रमाणे जगतात. 3 कारण
गैरयहूदी लोकांप्रमाणे व्यभिचार, कामातुरपणा, मद्यासक्ती, रंगेलपणा,
बदफैली आणि घृणित मूर्तिपूजा करण्यात तुम्ही बराच वेळ घालविला.
4 त्यांना आश्चर्य वाटते की तुम्ही आता त्यांच्या बेपर्वा, वाईट जीवनात
सामील होत नाही आणि ते तुमची निंदा करतात. 5 पण एवढे लक्षात
ठेवा की, त्यांना त्यांचा हिशोब त्या परमेश्वराला द्यावा लागेल जे जिवंतांचा
आणि मेलेल्यांचा न्याय करण्यास सिद्ध आहेत. 6 याच कारणासाठी
शुभवार्तेचा प्रचार जे आता मृत झाले आहेत त्यांना करण्यात आला होता,
यासाठी की देहामध्ये त्यांचा न्यायनिवाडा मनुष्याच्या प्रमाणानुसार
व्हावा परंतु आत्म्यामध्ये त्यांनी परमेश्वराच्या इच्छेप्रमाणे जिवंत राहवे.
7 सर्व गोष्टींचा अंतकाळ जवळ आला आहे म्हणून सावध आणि
विचारशील असा, म्हणजे तुम्हाला प्रार्थना करता येईल. 8 सर्वात
महत्त्वाचे म्हणजे एकमेकांवर निष्ठेने प्रीती करा, कारण प्रीती पुष्कळ
पापांची रास झाकून टाकते. 9 कुरकुर न करता एकमेकांचे आदरातिथ्य
करा. 10 परमेश्वराच्या कृपेच्या वेगवेगळ्या रूपामध्ये परमेश्वराचे एकनिष्ठ
कारभारी म्हणून तुमच्यातील प्रत्येकाने एकमेकांना मदत करण्यासाठी
तुम्हाला जे काही विशेष कर्तृत्वदान मिळाले आहे त्याचा उपयोग करा.
11 जर कोणी संदेश देतो तर त्याने असा संदेश द्यावा की, तो परमेश्वराचेच
शब्द बोलत आहे. जर कोणी सेवा करतात, तर परमेश्वर जशी शक्ती
पुरवितात त्याप्रमाणे करावी, म्हणजे सर्व गोष्टीमध्ये येशू ख्रिस्ताद्वारे
परमेश्वराचे गौरव होईल. त्यांना गौरव आणि सामर्थ्य सदासर्वकाळ
असो. आमेन! (aiōn g165) 12 प्रिय मित्रांनो, तुमची परीक्षा घेण्यासाठी
तुमच्यावर आलेल्या अग्नीसारख्या वाईट अनुभवांबद्दल आश्चर्यचकित
होऊ नका, जसे की तुमच्यासाठी काहीतरी विचित्रच घडत आहे. 13 परंतु
ख्रिस्ताच्या दु:खात जेवढे तुम्हाला सहभागी होता येईल तेवढे होऊन
आनंद करा, म्हणजे ज्यावेळी त्यांचे गौरव प्रकट होईल त्यावेळी तुम्ही
अतिआनंदीत व्हाल. 14 जर ख्रिस्ताच्या नावामुळे तुमचा अपमान झाला
असेल तर तुम्ही धन्य, कारण गौरवाचा आत्मा म्हणजेच परमेश्वराचा
आत्मा तुम्हावर येऊन स्थिरावला आहे. 15 जर तुम्ही दु:ख भोगता तर
खुनी किंवा चोर, किंवा कोणताही गुन्हेगार किंवा लुडबुड्या म्हणून
सुद्धा दु:ख भोगू नये. 16 तरीपण ख्रिस्ती या नात्याने तुम्ही दु:ख सहन
केले तर लाज मानू नका, तर परमेश्वराची स्तुती करा की तुम्ही ते नाव
धारण केले आहे. 17 कारण ही वेळ न्यायनिवाडा करण्याची आहे
आणि त्याची सुरुवात परमेश्वराच्या घराण्यातील लोकांपासून होत आहे;
आणि जर त्याची सुरुवात आपल्यापासून झाली तर, जे परमेश्वराच्या
शुभवार्तेप्रमाणे चालत नाहीत त्यांचे काय होईल? 18 आणि, “जर
नीतिमान लोकांचे तारण कष्टाने होते, तर अनीतिमान व पापी लोकांचे
काय होईल?” 19 म्हणून जे परमेश्वराच्या इच्छेप्रमाणे दु:ख सहन
करतात त्यांनी स्वत:ला त्यांच्या विश्वासू निर्माणकर्त्याकडे सोपवून द्यावे
आणि नेहमी चांगली कामे करीत राहवे.

**5** तुमच्यामध्ये जे वडील आहेत त्यांना मी एक सहवडील आणि
ख्रिस्ताच्या दु:खांचा साक्षी, तो मी सुद्धा पुढे प्रकट होणाऱ्या गौरवाचा
वाटेकरी असेन, हा बोध करतो: 2 तुमच्या देखरेखीखाली असलेल्या
परमेश्वराच्या कळपाचे पालनपोषण करा, त्यांच्यावर लक्ष ठेवा, तुम्हाला
हे काम करावेच लागते अशा दृष्टीने नाही तर तुम्ही स्वखुशीने हे काम
करा, ही परमेश्वराची तुमच्याकडून अपेक्षा आहे; अप्रामाणिक लाभ
मिळविण्यासाठी नाही परंतु सेवा करण्यास उत्सुक असा; 3 जो कळप
तुमच्या हाती सोपविला आहे त्यांच्यावर प्रभुत्व दाखवू नका, परंतु
लोकांसमोर उदाहरण म्हणून राहा. 4 जेव्हा मुख्य मेंढपाळ येतील,
तेव्हा गौरवाचा मुकुट तुम्हाला मिळेल, तो कधीच झिजणार नाही. 5
त्याच प्रकारे तुम्ही जे तरुण आहात, तुमच्या वडीलधाऱ्यांच्या अधीन
राहा. तुम्ही सर्वजण एकमेकांबरोबर नम्रता परिधान करून राहा, कारण,
“परमेश्वर गर्विष्ठांचा विरोध करतात परंतु नम्रजनावर कृपा करतात.” 6
परमेश्वराच्या पराक्रमी हाताखाली स्वत:ला नम्र करा, म्हणजे ते तुम्हाला
योग्य वेळी उंच करतील. 7 तुमच्या सर्व चिंता त्याच्यावर टाका, कारण
ते तुमची काळजी घेतात. 8 सावध असा, दक्ष राहा! तुमचा शत्रू सैतान
हा गर्जणाऱ्या सिंहासारखा कोणाचा नाश करावा म्हणून शोधीत फिरतो.
9 विश्वासामध्ये दृढ उभे राहून त्याचा विरोध करा, कारण तुम्हाला
माहीत आहे की, जगभरातील विश्वासणाऱ्या लोकांच्या कुटुंबांना अशाच
प्रकारची दु:खे भोगावी लागत आहेत. 10 तुम्ही थोडा वेळ दु:ख सहन
केल्यावर, सर्व कृपेचे परमेश्वर ज्यांनी तुम्हाला त्यांच्या सार्वकालिक
गौरवामध्ये येण्यासाठी ख्रिस्तामध्ये आमंत्रित केले आहे, ते स्वत: तुमची
पुनर्स्थापना करतील आणि तुम्हाला सशक्त, दृढ आणि स्थिर करतील.
(aiōnios g166) 11 त्यांना सदासर्वकाळ अधिकार असो. आमेन. (aiōn
g165) 12 ज्याला मी एकनिष्ठ भाऊ मानतो, त्या सीलासच्या मदतीने मी
तुम्हाला थोडक्यात लिहिले आहे, तुम्हाला उत्तेजित करतो आणि अशी
साक्ष देतो की, हीच परमेश्वराची खरी कृपा आहे. यामध्येच स्थिर राहा.
13 जी बाबेलमध्ये आहे ती, तुमच्याबरोबर एकत्र निवडलेली, तुम्हाला
तिच्या शुभेच्छा पाठविते आणि माझा पुत्र मार्क तुम्हाला शुभेच्छा
पाठवितो. 14 एकमेकांना प्रीतीच्या चुंबनाने अभिवादन करा. तुम्ही जे
ख्रिस्तामध्ये आहात त्या तुम्हा सर्वांना शांती असो.

# 2 पेत्र

**1** येशू ख्रिस्ताचा सेवक आणि प्रेषित शिमोन पेत्र, याजकडून, 2
परमेश्वर आणि आपले येशू प्रभू यांच्या ज्ञानाद्वारे कृपा व शांती
तुम्हाला अधिकाधिक प्राप्त होवो. 3 त्यांच्या दैवी सामर्थ्याने तुम्हाला
त्यांच्या स्वतःच्या वैभवात व चांगुलपणात सहभागी होण्यास पाचारण
केले, त्यांच्या ज्ञानाद्वारे जीवनास व सुभक्तीस आवश्यक असलेल्या
सर्वगोष्टी आपल्याला दिल्या आहेत. 4 याद्वारे त्यांनी आपल्याला त्यांची
अतिमहान आणि मोलवान अभिवचने दिली आहेत, यासाठी की त्याद्वारे
त्यांच्या दैवीस्वभावात आपण सहभागी व्हावे व जगाच्या भ्रष्टतेतून
निर्माण होणाऱ्या वाईट वासनेपासून आपली सुटका व्हावी. 5 कारण याच
कारणासाठी, तुमच्या विश्वासामध्ये चांगुलपणाची भर घालण्याचा प्रयत्न
करा; चांगुलपणात ज्ञानाची; 6 ज्ञानात आत्मसंयमाची; आत्मसंयमात
धीराची; धीरात सुभक्तीची; 7 सुभक्तीत बंधुप्रेमाची; बंधुप्रेमात प्रीतीची.
8 कारण जर हे गुण तुमच्यामध्ये वाढत असले तर ते आपल्या प्रभू येशू
ख्रिस्ताच्या ज्ञानात तुम्हाला निष्क्रिय व निष्फळ होण्यापासून राखतील.
9 ज्याच्याजवळ हे गुण नाहीत तो दूरदृष्टी नसलेला आणि आंधळा
आहे, त्याला आपल्या पूर्वीच्या पापापासून शुद्ध झाल्याचा विसर पडला
आहे. 10 यास्तव, माझ्या बंधू आणि भगिनींनो तुमचे पाचारण आणि
निवड दृढ करण्यासाठी होईल तितके प्रयत्न करा. असे केल्यास तुम्ही
कधीही अडखळणार नाही किंवा तुमचे पतन होणार नाही, 11 तर
आपले प्रभू आणि तारणारे येशू ख्रिस्त यांच्या शाश्वत राज्यात तुमचे
भव्य स्वागत होईल. (aiōnios g166) 12 जरी तुम्हाला या गोष्टी माहीत
आहेत आणि तुमच्याकडे असलेल्या सत्यात तुम्ही निश्चितपणे स्थिर
झालेले आहात, तरी या गोष्टींची मी तुम्हाला नेहमीच आठवण करून
देईन. 13 मला असे वाटते की, जोपर्यंत मी या शारीरिक तंबूमध्ये राहत
आहे, तोपर्यंत तुमची स्मरणशक्ती ताजीतवानी करणे हे योग्य आहे; 14
कारण मला माहीत आहे की मी लवकरच हा शारीरिक मंडप सोडणार
आहे, जसे आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताने मला स्पष्ट करून दिले आहे.
15 माझे निर्गमन झाल्यावर या गोष्टी तुम्हाला सतत लक्षात राहतील
यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करेन. 16 चातुर्याने कल्पिलेल्या कथास
अनुसरून आम्ही आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचे सामर्थ्य आणि आगमन
यासंबंधाने कळविले होते असे नाही, परंतु आम्ही त्यांच्या वैभवाचे साक्षी
आहोत. 17 त्यांना परमेश्वरपित्याकडून सन्मान आणि गौरव मिळाले,
तेव्हा सर्वोच्च गौरवी परमेश्वराकडून अशी वाणी झाली, “हा माझा
परमप्रिय पुत्र आहे आणि त्याच्याविषयी मी संतुष्ट आहे.” 18 आम्ही
त्यांच्याबरोबर पवित्र डोंगरावर असताना आकाशातून झालेली वाणी
आम्ही स्वतः ऐकली आहे. 19 आमच्याकडे संदेष्ट्यांचा निश्चित संदेश
आहे, तो अंधारात प्रकाशणाऱ्या दिव्याप्रमाणे आहे. तुमच्या अंतःकरणात
दिवस उजाडेपर्यंत व पहाटेचा तारा उगवेपर्यंत तुम्ही त्याच्याकडे लक्ष
द्याल तर बरे होईल. 20 सर्वात महत्त्वाचे, प्रथम हे ध्यानात ठेवा की,
धर्मशास्त्रातील कोणत्याही संदेशाचा उलगडा संदेष्ट्यांच्या स्वतःच्या
कल्पनेने करता येत नाही. 21 कारण भविष्यकथन मनुष्यांच्या इच्छेने
कधी झालेले नाही, तर संदेष्ट्यांनी, जरी ते मनुष्य होते तरी पवित्र
आत्म्याने प्रेरित होऊन परमेश्वराकडून आलेला संदेश सांगितला आहे.

**2** परंतु लोकांमध्ये सुद्धा खोटे संदेष्टे होते, तसेच तुमच्यामध्ये खोटे
शिक्षक असतील, ते गुप्त रीतीने विध्वंसक पाखंडी मते प्रचारात
आणतील, ज्याने त्यांना विकत घेतले अशा सार्वभौम प्रभूला नाकारतात
आणि स्वतःवर आकस्मिक नाश ओढवून घेतील. 2 पुष्कळजण त्यांच्या
अनैतिक कृत्यांचे अनुकरण करतील व सत्याच्या मार्गाची त्यामुळे निंदा
होईल. 3 हे शिक्षक त्यांच्या लोभापायी बनावट गोष्टी सांगून तुमच्याकडून
पैसे मिळवतील. त्यांच्यासाठी नेमलेला दंड दीर्घकाळापासून त्यांच्यावर
लटकत आहे आणि त्यांचा नाश डुलक्या घेत नाही. 4 कारण जर
परमेश्वराने पाप करणाऱ्या देवदूतांना राखले नाही, परंतु नरकात पाठविले,
निबिड काळोखाच्या बंधनात न्यायासाठी अटकेत ठेवले. (Tartaroō
g5020) 5 त्यांनी प्राचीन जगाचीही गय केली नाही, तर अभक्तांच्या
जगावर जलप्रलय आणला आणि नीतिमत्त्वाचा संदेश देणारा नोआहचे
सात जणांसह रक्षण केले. 6 पुढे येणाऱ्या अनीतिमानास उदाहरण
देण्यासाठी सदोम व गमोरा ही नगरे भस्म करून त्यांची राख केली व
त्यांनी त्यांना विध्वंसाची शिक्षा केली. 7 त्यांनी अनीतिमान लोकांच्या
कामातुर वर्तनास दुःखी झालेल्या नीतिमान लोटाची सुटका केली, 8
(कारण तो नीतिमान मनुष्य त्यांच्यामध्ये दिवसेंदिवस राहून त्यांची
अधर्मी कृत्ये पाहून व ऐकून त्याचा नीतिमान जीव तीव्र दुःखी झाला
होता.) 9 नीतिमान लोकांना परीक्षेतून कसे सोडवावे व अनीतिमान
लोकांना शिक्षा भोगीत न्यायाच्या दिवसासाठी कसे राखून ठेवावे हे
प्रभूला कळते. 10 विशेषकरून अशा लोकांसाठी हे खरे आहे जे देहाच्या
भ्रष्ट अभिलाषांच्या मागे लागतात आणि अधिकारास तुच्छ मानतात.
धाडसी आणि उद्धट असून ते स्वर्गीय प्राण्यांची निंदा करण्यास घाबरत
नाहीत; 11 स्वर्गातील देवदूत अधिक समर्थ आणि बलवान आहेत
तरीसुद्धा प्रभूकडून अशा प्राण्यांचा न्याय होत असताना ते त्यांची निंदा
करीत नाहीत. 12 परंतु हे लोक जे काही त्यांना समजत नाही त्या
गोष्टींविषयी निंदा करीत असतात. ते उपजत निर्बुद्ध प्राणी पकडले जाऊन
त्यांचा नाश व्हावा एवढ्यासाठी जन्मलेल्या पशूंसारखे स्वतःचा सुद्धा
नाश करून घेतील. 13 त्यांनी केलेल्या हानीचे प्रतिफळ त्यांच्या पदरी
पडेल. दिवसाच्या प्रकाशात चैनबाजी करण्यात ते आनंद मानतात, ते
डाग व कलंक आहेत. तुमच्याबरोबर मेजवान्या करताना ते फसवेगिरीने
वागतात व त्यात त्यांना मौज वाटते. 14 त्यांच्या नजरेत व्यभिचार
भरला असून पाप केल्यावाचून त्यांना राहवत नाही. ते अस्थिर मनाच्या
लोकांना मोह घालतात. त्यांची हृदये लोभात निर्ढावलेली असतात;
ते शापग्रस्त लोक आहेत! 15 ते सरळ मार्ग सोडून बहकले आहेत
आणि दुष्टपणाचे वेतन प्रिय मानणारा बौराचा पुत्र बलामच्या मार्गाने गेले
आहेत. 16 परंतु त्याच्या अयोग्य कृत्याबद्दल गाढवाद्वारे त्याचा निषेध
करण्यात आला. मुक्या गाढवाने मनुष्यवाणीने बोलून संदेष्ट्याच्या
वेडेपणाला आळा घातला. 17 हे लोक कोरड्या झऱ्यांसारखे, वादळाने

उडविलेल्या ढगांसारखे आहेत. त्यांच्यासाठी काळाकुट्ट अंधार राखलेला
आहे. 18 कारण जेव्हा चुकीने वागणाऱ्या लोकांमधून कोणी बाहेर पडले
असतील, त्यांना हे लोक मूर्खपणाच्या, मोठ्या फुगीर गोष्टी बोलून
आणि देहाच्या वासनांद्वारे कामातुरपणाने भुरळ घालतात. 19 हे त्यांना
स्वतंत्रतेचे वचन देतात जेव्हा ते स्वतःच दुष्टतेचे दास आहेत, कारण
“लोक ज्याच्या अधिकारात आहेत, ते त्याचे दास आहेत.” 20 प्रभू व
तारणारा येशू ख्रिस्तांच्या ज्ञानाद्वारे जगाच्या भ्रष्टतेतून बाहेर पडल्यावर
जर पुन्हा तिच्यात गुंतून तिच्या कह्यात गेले तर त्यांची शेवटची अवस्था
पहिल्यापेक्षा वाईट होते. 21 नीतिमत्त्वाचा मार्ग समजून आल्यानंतर
आपणास दिलेल्या पवित्र आज्ञेकडे पाठ फिरवणे यापेक्षा तो मार्ग त्यांना
माहीत झालाच नसता, तर ते त्यांच्यासाठी बरे झाले असते. 22 अशा
लोकांसाठी या म्हणी खऱ्या आहेत: “कुत्रा त्याच्या ओकारीकडे परत
जातो,” आणि “धुतलेली डुकरीण तिच्या चिखलात लोळण्यास परत
जाते,” अशा म्हणींप्रमाणे त्यांची गत झालेली असते.

**3** प्रिय मित्रांनो, आता माझे हे तुम्हाला दुसरे पत्र आहे. या दोन्ही
पत्राद्वारे मी तुम्हाला आठवण देऊन तुमच्या विचारांना हितकारक
होतील अशा गोष्टींना चालना देत आहे. 2 माझी इच्छा आहे की,
पवित्र संदेष्ट्यांनी पूर्वी सांगितलेल्या वचनांची आणि आमचे प्रभू आणि
तारणाऱ्याने तुमच्या प्रेषितांद्वारे दिलेल्या आज्ञेची तुम्ही आठवण ठेवावी.
3 सर्वात प्रथम तुम्ही हे समजून घ्या की, शेवटच्या दिवसात थट्टा
करणारे येतील, थट्टा करतील आणि स्वतःच्या वाईट वासनांच्या मागे
लागतील. 4 ते म्हणतील, “त्यांच्या येण्याचे दिलेले ‘येत आहे’ हे वचन
आता कुठे आहे? आमचे पूर्वज मरण पावले, तरी सर्वकाही उत्पत्तीच्या
प्रारंभापासून होते तसेच चालू आहे.” 5 परंतु ते बुद्धिपुरस्सर हे विसरतात
की, फार पूर्वी परमेश्वराच्या शब्दाने आकाशमंडळ अस्तित्वात आले
आणि पृथ्वी पाण्यातून व पाण्याद्वारे घडविली गेली. 6 याच पाण्यामुळे
त्यावेळेच्या जगाचा महाप्रलयाने नाश झाला होता. 7 आता अस्तित्वात
असलेले आकाश व पृथ्वी ही त्याच परमेश्वराच्या शब्दाने अग्नीत
नष्ट करण्यासाठी राखलेली आहेत, अनीतिमान लोकांच्या न्यायाच्या
दिवसासाठी आणि नाशासाठी ती राखून ठेवलेली आहेत. 8 प्रिय
मित्रांनो, एक गोष्ट तुम्ही विसरू नका: प्रभूसाठी एक दिवस हजार
वर्षांसारखा आहे आणि हजार वर्षे एका दिवसासारखी आहेत. 9 कित्येक
लोक ज्याला संथपणा म्हणतात, तसे प्रभू आपल्या वचनाविषयी करीत
नाहीत, तर ते तुमच्याबरोबर सहनशीलतेने वागतात. कोणाचाही नाश
व्हावा, अशी त्यांची इच्छा नाही, तर प्रत्येकाने पश्चात्ताप करावा अशी
त्यांची इच्छा आहे. 10 परंतु चोर येतो तसा प्रभूचा दिवस येईल. त्या
दिवशी आकाश मोठ्याने गर्जना करीत नाहीसे होईल, मूलतत्त्वे तप्त
होऊन लयास जातील आणि पृथ्वी व तिच्यावरील सर्वगोष्टी उघड्या
पडतील. 11 ज्याअर्थी सर्वकाही अशा रीतीने नष्ट होणार आहे, त्याअर्थी
तुम्ही कशाप्रकारचे लोक असणे आवश्यक आहे? तुम्ही पवित्र आणि
सुभक्तीत जीवन जगले पाहिजे. 12 तो परमेश्वराचा दिवस लवकर यावा
म्हणून तुम्ही त्याकडे लक्ष देत आहात, त्या दिवशी आकाश अग्नीत
जळून विलयास जाईल आणि त्यातील मूलतत्वे उष्णतेने वितळतील.
13 परंतु परमेश्वराच्या वचनाप्रमाणे ज्यामध्ये नीतिमत्त्व वास करते, असे
नवे आकाश व नव्या पृथ्वीची आपण वाट पाहत आहोत. 14 तर मग प्रिय
मित्रांनो, या गोष्टीची वाट पाहत असता तुम्ही त्यांच्या दृष्टीने निष्कलंक
व निर्दोष असे त्यांच्याबरोबर शांतीत असलेले त्यांना आढळून यावे
म्हणून प्रत्येक प्रकारे प्रयत्न करा. 15 आपल्या प्रभूची सहनशीलता ही
तारणाचीच संधी आहे असे समजा. आपला प्रिय बंधू पौलाला देण्यात
आलेल्या ज्ञानाप्रमाणे त्यानेही तुम्हाला असेच लिहिले आहे, हे तारणच
आहे असे समजा. 16 या विषयाचे वर्णन करून तो त्याच्या सर्व पत्रात
त्याच प्रकारे लिहितो. त्याच्या पत्रातील काही गोष्टी समजावयास कठीण
अशा आहेत. अज्ञानी व अस्थिर माणसे इतर धर्मशास्त्रलेखांचा जसा
विपरीत अर्थ करतात तसा या पत्राचाही करतात. अशाने ते स्वतःच्या
नाशाला कारणीभूत होतात. 17 प्रिय मित्रांनो, तुम्हाला आधी इशारा
देऊन ठेवला आहे, म्हणून तुम्ही अनीतिमान लोकांच्या चुकीच्या प्रवाहात
सापडून आपल्या सुरक्षित स्थितीतून ढळू नये यासाठी जपून राहा. 18
परंतु आपले प्रभू आणि तारणारे येशू ख्रिस्त यांच्या कृपेत आणि ज्ञानात
वाढत राहा. त्यांना गौरव आता आणि सदासर्वकाळ असो! आमेन. **(aiōn
g165)**

# 1 योहान

**1** जे प्रारंभीपासून होते, जे आम्ही ऐकले आहे, जे आमच्या डोळ्यांनी
आम्ही पाहिले आहे, ज्याच्याकडे आम्ही लक्षपूर्वक पाहिले आहे
आणि आमच्या हातांनी स्पर्श केला आहे; जीवनाच्या वचनासंबंधी आम्ही
ही घोषणा करीत आहोत. 2 जे जीवन प्रकट झाले ते आम्ही पाहिले आहे
आणि त्याचीच साक्ष देतो आणि तुमच्यासाठी सार्वकालिक जीवनाची
घोषणा करतो; जे पित्याजवळ होते आणि आमच्यासाठी ते प्रकट झाले
आहे. (aiōnios g166) 3 आम्ही जे पाहिले व ऐकले आहे तेच तुम्हाला
सांगत आहोत, यासाठी की तुम्ही सुद्धा आमच्याबरोबर सहभागी व्हावे.
आमची सहभागिता पित्याबरोबर आणि त्यांचा पुत्र येशू ख्रिस्ताबरोबर
आहे. 4 आम्ही हे लिहित आहोत यासाठी की, आमचा आनंद परिपूर्ण
असावा. 5 हा संदेश आम्ही त्यांच्याकडून ऐकला आहे आणि तो तुम्हाला
घोषित करतो, परमेश्वर प्रकाश आहेत; त्यांच्यामध्ये अजिबात अंधार
नाही. 6 जर आम्ही असे म्हणतो की, आमची त्यांच्याबरोबर सहभागिता
आहे आणि तरीसुद्धा अंधारात राहतो तर आम्ही खोटे बोलतो आणि
खरेपणाने जगत नाही. 7 परंतु जसे ते प्रकाशात आहेत, तसे आम्ही
प्रकाशामध्ये चाललो, तर आमची एकमेकांबरोबर सहभागिता आहे
आणि त्यांचा पुत्र येशू यांचे रक्त सर्व पापापासून आम्हाला शुद्ध करते.
8 जर आम्ही पापविरहित आहोत, असे आपण म्हणतो, तर आम्ही
स्वतःला फसवितो आणि आमच्यामध्ये सत्य नाही. 9 जर आपण
आपली पापे त्यांच्याजवळ कबूल करतो, तर ते विश्वसनीय व न्यायी
आहेत, म्हणून आपल्या पापांची क्षमा करतील आणि सर्व अनीतीपासून
आपल्याला शुद्ध करतील. 10 जर आपण म्हणतो की, आपण पाप
केले नाही, तर आपण परमेश्वराला लबाड ठरवितो आणि त्यांचे वचन
आपल्यामध्ये नाही.

**2** माझ्या प्रिय मुलांनो, मी तुम्हासाठी हे लिहित आहे यासाठी की
तुम्ही पाप करू नये, परंतु जर कोणी पाप करतो, तर आपल्यासाठी
एक कैवारी येशू ख्रिस्त, जे नीतिमान आहेत आणि ते पित्याजवळ
आहेत. 2 तेच आपल्या पापांसाठी प्रायश्चिताचा यज्ञ आहेत आणि
केवळ आपल्यासाठीच नाही तर सर्व जगाच्या पापांसाठीसुद्धा आहेत. 3
आपल्याला हे माहीत आहे की, जर आपण परमेश्वराच्या आज्ञा पाळतो
तर आपल्याला त्यांची ओळख झाली आहे. 4 जो कोणी असे म्हणतो,
“मी त्यांना ओळखतो,” परंतु त्यांच्या आज्ञांचे पालन करीत नाही तर तो
लबाड आहे आणि सत्य त्या व्यक्तीमध्ये नाही. 5 परंतु जर कोणी त्यांचे
वचन पाळतो, तर परमेश्वरासाठी त्याची प्रीती खरोखर त्यांच्यामध्ये पूर्ण
झाली आहे. यावरून आपणास समजते की आपण त्यांच्यामध्ये आहोत.
6 जो कोणी असा दावा करतो की तो त्यांच्यामध्ये राहतो, त्याने जसे
येशू राहिले तसे राहिले पाहिजे. 7 प्रिय बंधूंनो, मी काही तुम्हाला नवीन
आज्ञा लिहून देत आहे असे नाही, तर ही जुनीच आहे, जी सुरुवातीपासून
दिलेली आहे. ही जुनी आज्ञा जो एक संदेश आहे तो तुम्ही ऐकलेला आहे,
8 तरी मी तुम्हास एक नवी आज्ञा लिहित आहे; तिचे सत्य त्याच्यामध्ये
आणि तुमच्यामध्ये दिसून येत आहे, कारण अंधकार नाहीसा होत आहे
व खरा प्रकाश आताच प्रज्वलित झाला आहे. 9 जर कोणी प्रकाशामध्ये
आहे असा दावा करतो, परंतु आपल्या बंधू किंवा भगिनीचा द्वेष करतो
तर तो अजूनही अंधकारातच आहे. 10 जो कोणी आपल्या बंधू आणि
भगिनीवर प्रीती करतो तो प्रकाशात राहतो आणि त्याच्यामध्ये असे
काहीच नाही की ज्यामुळे ते अडखळतील. 11 परंतु जर कोणी आपल्या
बंधू व भगिनीचा द्वेष करतो, तो अंधकारात राहतो आणि अंधारात
चालतो. ते कुठे जातात हे त्यांना कळत नाही, कारण अंधाराने त्यांना
आंधळे केले आहे. 12 माझ्या प्रिय मुलांनो, मी तुम्हाला लिहित आहे,
कारण येशूंच्या नावामुळे तुमच्या पातकांची क्षमा झाली आहे. 13
पित्यांनो मी तुम्हाला लिहित आहे, कारण जे आरंभापासून आहेत त्यांना
तुम्ही ओळखता. तरुणांनो, मी तुम्हाला लिहित आहे, कारण तुम्ही त्या
दुष्टावर विजय मिळविला आहे. 14 प्रिय मुलांनो मी तुम्हाला लिहितो,
कारण तुम्ही पित्याला ओळखता. वडिलांनो मी तुम्हाला लिहितो, कारण
तुम्ही त्यांना ओळखता जे सुरुवातीपासून आहेत. तरुणांनो मी तुम्हाला
लिहितो, कारण तुम्ही सशक्त आहात आणि परमेश्वराचे वचन तुम्हामध्ये
राहते, आणि तुम्ही त्या दुष्टावर विजय मिळविला आहे. 15 जगावर
किंवा जगातील गोष्टींवर प्रीती करू नका. जर कोणी जगावर प्रीती
करतात तर त्यांच्यामध्ये पित्यासाठी प्रीती वसत नाही. 16 कारण
जगात जे सर्व आहे ते म्हणजे, देहाची वासना, डोळ्याची वासना व
जीवनाचा गर्व या सर्वगोष्टी पित्यापासून नाहीत तर जगापासून आहेत.
17 जग आणि त्याच्या सर्व वासना नाहीशा होतील, परंतु जी व्यक्ती
परमेश्वराच्या इच्छेप्रमाणे करते, ती सदासर्वकाळ जगते. (aiōn g165)
18 प्रिय मुलांनो, ही शेवटची घटका आहे; आणि तुम्ही ऐकल्याप्रमाणे
ख्रिस्तविरोधक येत आहे आणि आतासुद्धा अनेक ख्रिस्तविरोधक आलेले
आहेत. यावरूनच आपणास समजते की ही शेवटची घटका आहे. 19 ते
आपल्यामधूनच बाहेर पडले आहेत, परंतु ते खरोखर आपले नव्हतेच.
कारण ते जर आपल्यातील असते तर ते आपल्याबरोबर राहिले असते;
परंतु ते गेल्याने हे सिद्ध झाले की त्यांच्यापैकी कोणीही आपल्यातील
नव्हता. 20 परंतु जे पवित्र ख्रिस्त येशू आहेत, त्यांच्याकडून तुमचा
अभिषेक झाला आहे आणि तुम्हा सर्वांना सत्य माहीत आहे. 21
तुम्हाला सत्य माहीत नाही म्हणून मी तुम्हास लिहितो असे नाही, परंतु
ते तुम्हाला माहीत आहे आणि सत्याचा उगम असत्यापासून होत नाही.
22 लबाड कोण आहे? जो कोणी येशू हे ख्रिस्त आहे हे नाकारतो तो.
असा मनुष्य ख्रिस्तविरोधक आहे, पिता आणि पुत्र यांना तो नाकारतो.
23 जो पुत्राला स्वीकारीत नाही त्याच्याजवळ पिता नाही; जो कोणी
पुत्राला स्वीकारतो त्याच्याजवळ पितासुद्धा आहे. 24 तुम्ही तर हे लक्षात
ठेवा की, तुम्ही जे काही सुरुवातीपासून ऐकले आहे ते तुम्हामध्ये राहते.
ते जर तुम्हामध्ये राहते, तर तुम्ही सुद्धा पुत्र आणि पित्यामध्ये स्थिर
राहाल. 25 त्यांनी आपल्याला सार्वकालिक जीवन देण्याचे अभिवचन
दिले आहे. (aiōnios g166) 26 तुम्हाला भ्रमात पाडून बहकविण्याचा
जे प्रयत्न करीत आहेत त्यांच्याबद्दल मी तुम्हास लिहित आहे. 27

प्रभूपासून जो अभिषेक तुम्हाला मिळाला आहे तो तुम्हावर राहतो;
आणि तुम्हाला कोणी शिकविण्याची गरज नाही. त्यांचा अभिषेक
तुम्हाला सर्व गोष्टींविषयी शिकवेल. त्यांचा अभिषेक खोटा नाही तर
सत्य आहे, जसे त्यांनी तुम्हाला शिकविले आहे तसे त्यांच्यामध्ये राहा.
28 आता प्रिय मुलांनो, सतत त्यांच्यामध्ये राहा, म्हणजे ते प्रकट होतील
त्यावेळी आपण आत्मविश्वासपूर्वक असावे आणि त्यांच्या येण्याच्या
दिवशी त्यांच्यासमोर आपणास लज्जित व्हावे लागणार नाही. 29 जर
तुम्हाला माहीत आहे की ते नीतिमान आहेत, तर तुम्हाला हे माहीत आहे
की, प्रत्येकजण जे काही चांगले करतात तो त्यांच्यापासून जन्मला
आहे.

**3** पित्याने आपण परमेश्वराची लेकरे म्हणून संबोधले जावे म्हणून
पित्याने आपणावर किती मोठा अगाध प्रीतीचा वर्षाव केला आहे!
आणि आपण तसे आहोतच! जग आपल्याला ओळखत नाही कारण
जगाने त्यांना ओळखले नाही. 2 प्रिय मित्रांनो, आपण आता परमेश्वराची
लेकरे आहोत आणि आपण पुढे काय होऊ हे अजून आपल्याला ठाऊक
झालेले नाही. परंतु जेव्हा ख्रिस्त प्रकट होतील तेव्हा जसे ख्रिस्त आहेत
तसे आपण होणार, कारण जसे ते आहेत तसेच आपण त्यांना पाहू. 3
ज्यांना त्यांच्यामध्ये अशी आशा आहे ते स्वत:ला शुद्ध करतात, जसे ते
शुद्ध आहेत. 4 जे प्रत्येकजण पाप करतात ते नियम मोडतात; खरेतर
नियमांचे पालन न करणे हेच पाप आहे. 5 परंतु तुम्हाला हे माहीत आहे
की, आपली पापे दूर करावी म्हणून ख्रिस्त प्रकट झाले. त्यांच्यामध्ये
कोणतेही पाप नाही. 6 जे कोणी त्यांच्यामध्ये राहतात ते पाप करीत
राहत नाही. जे कोणी पाप करीत राहतात, त्यांनी ख्रिस्ताला पाहिलेले
नाही किंवा त्यांना ओळखले नाही. 7 अहो प्रिय मुलांनो, तुम्हाला कोणी
बहकवू नये. जसे ख्रिस्त नीतिमान आहेत, तसेच जे कोणी योग्य ते
करतात ते नीतिमान आहेत. 8 जो कोणी पापमय गोष्टी करतो ते
सैतानापासून आहे, कारण सैतान प्रारंभापासूनच पाप करीत आला
आहे. परंतु सैतानाची कृत्ये नष्ट करावी म्हणून परमेश्वराचे पुत्र प्रकट
झाले. 9 ज्यांचा जन्म परमेश्वरापासून झाला आहे, ते पाप करीत राहत
नाही, कारण त्यांच्याठायी परमेश्वराचे बीज राहते; म्हणून पाप करीत
राहणे त्याला अशक्यच असते, कारण त्यांचा जन्म परमेश्वरापासून
झाला आहे. 10 यावरून आपल्याला परमेश्वराची मुले कोणती आणि
सैतानाची मुले कोणती, हे ओळखता येते. जे कोणी जे योग्य आहे ते
करीत नाहीत, ती परमेश्वराची लेकरे नाहीत किंवा जे कोणी आपल्या
भावावर आणि बहिणीवर प्रीती करीत नाही ते सुद्धा परमेश्वरापासून
नाहीत. 11 कारण आपण एकमेकांवर प्रीती करावी हाच संदेश तुम्ही
सुरुवातीपासून ऐकला आहे. 12 आपण काईनासारखे होऊ नये, कारण
तो सैतानाचा होता व त्याने आपल्या भावाचा वध केला. त्याने त्याचा वध
का केला? कारण काईनाची कृत्ये वाईट होत्या आणि त्याच्या भावाची
कृत्ये नीतियुक्त होती. 13 म्हणून प्रिय बंधूंनो आणि भगिनींनो जगाने
तुमचा द्वेष केला, तर आश्चर्य करू नका. 14 आपल्याला माहीत आहे की
आपण मरणातून जीवनात पार गेलो आहोत कारण आपण एकमेकांवर
प्रीती करतो. जे कोणी प्रीती करीत नाही ते मरणामध्येच राहतात. 15 जे
कोणी भावाचा आणि बहिणीचा द्वेष करतात ते खुनी आहेत आणि
तुम्हाला माहीत आहे की, कोणत्याही खुनी व्यक्तीमध्ये सार्वकालिक
जीवन राहत नाही. (aiōnios g166) 16 प्रीती काय आहे हे यावरून
आपल्याला समजते की, येशू ख्रिस्ताने त्यांचे जीवन आपल्यासाठी
दिले आणि म्हणून आपणही आपल्या भावांसाठी आणि बहिणींसाठी
आपले जीवन दिले पाहिजे. 17 जर कोणाजवळ ऐहिक संपत्ती असेल
आणि तो पाहतो की त्याचा भाऊ किंवा बहीण गरजेत आहे परंतु
त्याला त्यांची दया येत नाही, तर अशा व्यक्तीमध्ये परमेश्वराची प्रीती
कशी असू शकेल? 18 प्रिय लेकरांनो, आपण शब्दांनी किंवा कोरड्या
बोलण्याने प्रीती करू नये, परंतु कृतीने आणि सत्याने प्रीती करावी. 19
यावरून आपल्याला माहीत होते की, आपण सत्याच्या पक्षाचे आहोत
आणि त्याच्या समक्षतेत आपली हृदये विसावतात. 20 जर आपली
अंत:करणे आपल्याला दोषी ठरवीत असतील तर हे लक्षात ठेवा की,
परमेश्वर आपल्या अंत:करणापेक्षा महान आहेत आणि ते सर्वकाही
जाणतात. 21 प्रिय मित्रांनो, जर आपली अंत:करणे आपल्याला दोषी
ठरवीत नसतील तर परमेश्वरासमोर येण्यास आपल्याला धैर्य आहे 22
आणि आपण जे काही मागतो ते त्यांच्याकडून मिळते, कारण आपण
त्यांच्या आज्ञा पाळतो आणि त्याला आवडणाऱ्या गोष्टी करतो. 23 ही
त्यांची आज्ञा आहे: त्यांचा पुत्र येशू ख्रिस्ताच्या नावावर विश्वास ठेवणे
आणि त्यांनी आज्ञा दिल्याप्रमाणे एकमेकांवर प्रीती करावी. 24 जे
कोणी परमेश्वराच्या आज्ञा पाळतात ते परमेश्वरामध्ये राहतात आणि
परमेश्वर त्यांच्यामध्ये राहतात. आणि अशा रीतीने आपल्याला समजते
की परमेश्वर आपल्यामध्ये राहतात: परमेश्वराने जो आत्मा आपणास
दिला आहे त्याद्वारे हे आपणास समजून येते.

**4** प्रिय मित्रांनो, प्रत्येक आत्म्यावर विश्वास ठेवू नका, परंतु ते आत्मे
परमेश्वराकडून आलेले आहेत का याची परीक्षा करा, कारण पुष्कळ
खोटे संदेष्टे जगामध्ये निघालेले आहेत. 2 याप्रकारे तुम्ही परमेश्वराचा
आत्मा ओळखू शकता: जो प्रत्येक आत्मा, येशू ख्रिस्त देह धारण
करून आले होते हे स्वीकारतो, तो परमेश्वरापासून आहे. 3 परंतु
प्रत्येक आत्मा जो येशूंचा अंगीकार करीत नाही तो परमेश्वरापासून
नाही. हा तर ख्रिस्तविरोधकाचा आत्मा आहे, ज्याच्या येण्याबद्दल
तुम्ही ऐकले आहे आणि तो आधीच जगामध्ये आलेला आहे. 4 प्रिय
लेकरांनो, तुम्ही परमेश्वराचे आहात आणि जे ख्रिस्ताचे विरोधक आहेत,
त्यांच्याशी झगडून तुम्ही विजय मिळविला आहे, कारण जगात जो
आहे, त्याच्यापेक्षा जे तुम्हामध्ये आहेत, ते श्रेष्ठ आहेत. 5 हे लोक
या जगाचे आहेत आणि म्हणून साहजिकच या जगाच्या गोष्टींबद्दल
त्यांना आस्था वाटते आणि जगही त्यांच्याकडे लक्ष देते. 6 आम्ही
परमेश्वरापासून आहोत आणि जे परमेश्वराला ओळखतात ते आमचे
ऐकतात; परंतु जे कोणी परमेश्वरापासून नाहीत ते आमचे ऐकत नाहीत.
याद्वारेच आम्ही सत्याचा आत्मा कोणता आणि फसवणुकीचा आत्मा
कोणता हे ओळखतो. 7 प्रिय मित्रांनो, आपण एकमेकांवर प्रीती करू

या, कारण प्रीती परमेश्वरापासून आहे. जे कोणी प्रीती करतात ते
परमेश्वरापासून जन्मले आहेत आणि ते परमेश्वराला ओळखतात. 8 परंतु
जे प्रीती करीत नाहीत, ते परमेश्वराला ओळखत नाहीत, कारण परमेश्वर
प्रीती आहेत. 9 परमेश्वराने आपल्यावरील प्रीती अशी प्रकट केली:
त्यांनी त्यांच्या एकुलत्या एका पुत्राला या जगात पाठविले यासाठी की,
आपल्याला त्यांच्याद्वारे जीवन लाभावे. 10 प्रीती हीच आहे: आपण
परमेश्वरावर प्रीती केली असे नाही तर त्यांनी आपणावर प्रीती केली
आणि आपल्या पापांसाठी त्यांच्या पुत्राला प्रायश्चिताचा बळी म्हणून
पाठविले. 11 प्रिय मित्रांनो, ज्याअर्थी परमेश्वराने आपल्यावर एवढी
प्रीती केली, त्याअर्थी आपणही एकमेकांवर प्रीती केली पाहिजे. 12
परमेश्वराला कोणीही कधीही पाहिले नाही; परंतु जर आपण एकमेकांवर
प्रीती केली तर, परमेश्वर आपल्यामध्ये राहतात आणि त्यांची प्रीती
आपल्यामध्ये पूर्ण झाली आहे. 13 ते आपल्यामध्ये राहतात व आपण
त्यांच्यामध्ये राहतो, याचा पुरावा हा आहेः त्यांनी स्वतःचा पवित्र आत्मा
आपल्याला दिला आहे. 14 आम्ही पाहिले आहे आणि अशी साक्ष देतो
की, पित्याने त्यांच्या पुत्राला जगाचा तारणारा म्हणून पाठविले आहे.
15 येशू हे परमेश्वराचे पुत्र आहेत असे जर कोणी अंगीकृत करतात
तर, त्यांच्यामध्ये परमेश्वर राहतात आणि ते परमेश्वरामध्ये राहतात.
16 परमेश्वराची प्रीती आपल्यावर आहे, ती आपण ओळखतो आणि
तिच्यावर अवलंबून राहतो. परमेश्वर प्रीती आहेत. जे प्रीतीत राहतात
ते परमेश्वरामध्ये राहतात आणि परमेश्वर त्यांच्यामध्ये राहतात. 17
अशा रीतीने प्रीती आपल्यामध्ये पूर्ण होते, यासाठी की न्यायाच्या
दिवशी आपल्याला असा आत्मविश्वास प्राप्त व्हावा: या जगात आपण
येशू सारखे आहोत. 18 प्रीतीमध्ये भय नसते. पूर्ण प्रीती भीतीला
घालवून देते, कारण भीतीमध्ये शासन असते. जो भीती बाळगतो तो
प्रीतीमध्ये पूर्ण झालेला नसतो. 19 आम्ही त्यांच्यावर प्रीती करतो,
कारण त्यांनी प्रथम आम्हावर प्रीती केली. 20 जे कोणी परमेश्वरावर
प्रीती करण्याचा दावा करतात, तरी आपल्या भावाचा किंवा बहिणीचा
द्वेष करतात तर ते लबाड आहेत. कारण जर कोणी आपल्या भावाला
आणि बहिणीला पाहत असूनही त्यांच्यावर प्रीती करीत नाही, तर ते
परमेश्वरावर प्रीती करू शकत नाहीत, ज्यांना त्यांनी पाहिलेले नाही. 21
परमेश्वराने आपल्याला आज्ञा दिली आहे: जे कोणी परमेश्वरावर प्रीती
करतात त्यांनी आपल्या भावावर आणि बहिणीवर सुद्धा प्रीती करावी.

**5** येशू हे ख्रिस्त आहेत, असा विश्वास ठेवणारा प्रत्येकजण
परमेश्वरापासून जन्मला आहे आणि प्रत्येकजण जे पित्यावर प्रीती
करतात ते त्यांच्या लेकरावरही प्रीती करतात. 2 आपण परमेश्वराच्या
मुलांवर प्रीती करतो हे यावरून आपणास समजतेः परमेश्वरावर प्रीती
करावी व त्यांच्या आज्ञांचे पालन करावे. 3 परमेश्वराच्या आज्ञा पाळणे
म्हणजे त्यांच्यावर प्रीती करणे होय आणि त्यांच्या आज्ञा जाचक नाहीत
4 कारण प्रत्येकजण जे परमेश्वरापासून जन्मले आहेत त्यांनी या जगावर
मात केली आहे. आमच्या विश्वासाच्याद्वारे आम्ही या जगावर मात
करून विजय मिळविला आहे. 5 जगावर मात करणारे असे ते कोण
आहेत? फक्त तेच आहेत जे येशू हेच परमेश्वराचे पुत्र आहेत असा
विश्वास धरतात. 6 पाणी आणि रक्त यांच्याद्वारे जे आले तेच येशू
ख्रिस्त आहेत. ते केवळ पाण्याच्याद्वारे आले नाहीत, परंतु पाण्याच्या
आणि रक्ताच्याद्वारे आले. जो साक्ष देतो तो परमेश्वराचा आत्मा आहे,
कारण आत्मा सत्य आहे. 7 याबद्दल तिघे जण साक्ष देतात: 8 आत्मा,
पाणी आणि रक्त या तिघांमध्ये एकमत आहे. 9 आपण मनुष्यांची
साक्ष स्वीकारतो, परंतु परमेश्वराची साक्ष सर्वात महान आहे, कारण
ती परमेश्वराने दिलेली साक्ष आहे जी त्यांनी त्यांच्या पुत्राबद्दल दिली
आहे. 10 जे कोणी परमेश्वराच्या पुत्रावर विश्वास ठेवतात ते ही साक्ष
स्वीकारतात. जे कोणी यावर विश्वास ठेवीत नाहीत, परमेश्वराने त्यांना
लबाड ठरविले आहे, कारण परमेश्वराने त्यांच्या पुत्राविषयी दिलेल्या
साक्षीवर त्यांनी विश्वास ठेवला नाही; 11 हीच ती साक्ष आहे: परमेश्वराने
आपल्याला सार्वकालिक जीवन दिले आहे आणि हे जीवन त्यांच्या
पुत्रामध्ये आहे. (aiōnios g166) 12 ज्या कोणामध्ये परमेश्वराचा पुत्र
वसतो, त्याच्यामध्ये जीवन आहे; ज्याच्यामध्ये परमेश्वराचा पुत्र वसत
नाही, त्याच्यामध्ये जीवन नाही. 13 मी तुम्हाला हे लिहित आहे यासाठी
की, तुम्ही जे परमेश्वराच्या पुत्राच्या नावावर विश्वास ठेवता त्या तुम्हाला
हे माहीत असावे की, सार्वकालिक जीवन तुम्हाला मिळालेले आहे.
(aiōnios g166) 14 आपल्याला परमेश्वराच्या समक्षतेत येण्यासाठी
आत्मविश्वास आहे, कारण आपण त्यांच्या इच्छेनुसार काही मागितले तर
ते आमचे ऐकतात. 15 जे आपण मागतो ते ऐकतात आणि आपल्याला
माहीत आहे की जे आपण त्यांना मागितले आहे ते आपणास मिळाले
आहे. 16 ज्याचा शेवट मरणात नाही, असे पाप कोणा भावाच्या किंवा
बहिणीच्या हातून घडताना तुम्हाला आढळले, तर परमेश्वराने त्यांना
क्षमा करावी म्हणून तुम्ही प्रार्थना करावी आणि परमेश्वर त्यांना जीवन
देईल. मी त्यांच्या बाबतीत सांगतो, ज्यांचे पाप त्यांना मरणाकडे नेत
नाही. असे एक पाप आहे जे मरणाकडे घेऊन जाते. त्याबद्दल तुम्ही
प्रार्थना करावी असे मी म्हणत नाही. 17 प्रत्येक चुकीचे कृत्य पाप आहे
आणि असेही पाप आहे की ज्याचा परिणाम मरण नाही. 18 आपल्याला
माहीत आहे की, जे कोणी परमेश्वरापासून जन्मले आहेत ते पाप करीत
राहत नाहीत; जे परमेश्वरापासून जन्मले आहेत त्यांना परमेश्वर सुरक्षित
ठेवतात आणि तो दुष्ट त्यांना अपाय करू शकत नाही. 19 आपल्याला हे
माहीत आहे की, आपण परमेश्वराची लेकरे आहोत आणि संपूर्ण जग त्या
सैतानाच्या नियंत्रणाखाली आहे. 20 आपल्याला हे सुद्धा माहीत आहे
की, परमेश्वराचे पुत्र ख्रिस्त आले आहेत आणि आपण खऱ्या परमेश्वराला
ओळखावे यासाठी त्यांनी आपल्याला बुद्धी दिली आहे. त्यांचे पुत्र येशू
ख्रिस्तामध्ये असल्याने, जे खरे आहेत त्यांच्यामध्ये आपण आहोत. तेच
एकमेव खरे परमेश्वर आहेत आणि तेच सार्वकालिक जीवन आहेत.
(aiōnios g166) 21 प्रिय लेकरांनो, तुम्ही स्वतःस मूर्तीपासून दूर ठेवा.

# 2 योहान

1 मंडळीचा वडील याजकडून, 2 कारण जे सत्य आमच्यामध्ये राहते
आणि तेच आमच्याबरोबर कायम राहील. (aiōn g165) 3 परमेश्वर
जे पिता आणि येशू ख्रिस्त जे पित्याचा पुत्र यांच्याकडून सत्य आणि
प्रीती यामध्ये कृपा, दया आणि शांती तुम्हाबरोबर राहील. 4 पित्याने
आपल्याला आज्ञा केल्याप्रमाणे तुझी काही मुले सत्यात चालतात हे
ऐकून मला अतिशय आनंद झाला. 5 आता, हे प्रिय स्त्रिये, मी तुला नवी
आज्ञा लिहित नाही परंतु तीच जी प्रारंभापासून देण्यात आली आहे. मी
तुम्हास सांगतो की, तुम्ही एकमेकांवर प्रीती करावी. 6 प्रीती हीच आहे
की, आपण त्यांच्या आज्ञेचे पालन करीत जीवन जगतो. जसे तुम्ही
सुरुवातीपासूनच ऐकले आहे, त्यांची आज्ञा आहे की तुम्ही प्रीतिपूर्ण
जीवन जगावे. 7 मी तुम्हाला सांगतो की, फसवणूक करणारे असे
पुष्कळजण जगामध्ये निघालेले आहेत, येशू ख्रिस्त देह धारण करून या
जगात आले, याचा ते अंगीकार करीत नाहीत. अशा प्रकारची कोणीही
व्यक्ती फसवणूक करणारी आणि ख्रिस्तविरोधक आहे. 8 आम्ही जे
परिश्रम केले आहेत ते तुम्ही हरवू नये यासाठी जपा, परंतु तुम्हाला
त्याचा संपूर्ण मोबदला मिळावा. 9 जे कोणी सर्वांच्या पुढे जात राहतात
आणि ख्रिस्ताच्या शिक्षणात राहत नाहीत त्यांच्याकडे परमेश्वर नाही; जो
कोणी या शिक्षणात राहतो त्यांच्याकडे पिता आणि पुत्र दोघेही आहेत.
10 जर कोणी तुमच्याकडे येतो आणि तुम्हाला असे शिक्षण देत नाही,
तर त्यांना तुमच्या घरात घेऊ नका किंवा त्यांचे स्वागतही करू नका. 11
तुम्ही जर त्यांचे स्वागत केले, तर तुम्ही त्यांच्या दुष्कर्मामध्ये भागीदार
व्हाल. 12 तुम्हाला लिहिण्यासाठी माझ्याकडे पुष्कळ काही आहे,
परंतु ते कागद आणि शाईने लिहून कळवावे अशी माझी इच्छा नाही.
त्याऐवजी तुमची भेट घ्यावी आणि समोरासमोर तुमच्याबरोबर बोलावे
अशी आशा करतो म्हणजे आपला आनंद परिपूर्ण होईल. 13 जिला
परमेश्वराने निवडले आहे, त्या तुझ्या बहिणीची मुले त्यांच्या शुभेच्छा
पाठवितात.

# 3 योहान

1 मंडळीचा वडील याजकडून, 2 प्रिय मित्रा, मी प्रार्थना करतो की,
तुला चांगले आरोग्य लाभो आणि तुझ्याबरोबर सर्वकाही चांगले होत
जावो, जशी तुझ्या आत्म्याचीसुद्धा उन्नती होत आहे. 3 जेव्हा काही
विश्वासणाऱ्यांनी येऊन सत्यासाठी असलेल्या तुमच्या विश्वासूपणाबद्दल
साक्ष दिली आणि सांगितले की तुम्ही सातत्याने विश्वासात कशाप्रकारे
जगत आहात, तेव्हा मला मोठा आनंद झाला. 4 माझी मुले सत्याने
चालतात, हे ऐकल्याने मला जेवढा आनंद होतो, तेवढा आनंद दुसऱ्या
कशानेही होत नाही. 5 प्रिय मित्रा, जे तुला अनोळखी आहेत, त्या काही
भावांसाठी आणि बहिणींसाठी तू जे करीत आहेस त्यामध्ये तू विश्वासू
आहेस. 6 त्यांनी मंडळीला तू दाखविलेल्या प्रीतीविषयी साक्ष दिली
आहे. कृपा करून त्यांना अशाप्रकारे निरोप देऊन पाठव की ज्यामुळे
परमेश्वराचे गौरव व्हावे. 7 ते गैरयहूदी लोकांकडून कोणतीही मदत न
घेता सेवेसाठी बाहेर निघाले हे परमेश्वराच्या नावाच्या गौरवासाठीच होते.
8 आपण अशा लोकांचे आदरातिथ्य केले पाहिजे, म्हणजे सत्यासाठी
आपण एकत्र कार्य करू शकू. 9 मी मंडळीला एक पत्र लिहिले, परंतु
दियत्रेफस, जो स्वतःस श्रेष्ठ करण्याची आवडत धरतो, तो आमचे स्वागत
करणार नाही. 10 म्हणून जेव्हा मी येईन, तेव्हा तो आमच्याविषयी
द्वेषभावनेने निरर्थक बातम्या पसरवित आहे याकडे लक्ष वेधीन. एवढेच
नव्हे तर तो इतर विश्वासणाऱ्यांचेही स्वागत करीत नाही. पण जे कोणी
करू इच्छितात त्यांना तो मनाई करतो आणि मंडळीतून घालवून देतो. 11
प्रिय मित्रा, जे वाईट आहे त्याचे अनुकरण करू नको तर चांगल्याचे कर.
जो कोणी चांगले करतो तो परमेश्वरापासून आहे. जो कोणी जे काही
वाईट आहे ते करतो त्याने परमेश्वराला पाहिलेले नाही. 12 देमेत्रियाबद्दल
प्रत्येकजण चांगले बोलतात आणि स्वतः सत्यसुद्धा त्याच्याविषयी
साक्ष देते. आम्हीसुद्धा त्याच्याविषयी चांगलेच बोलतो आणि तुम्हाला
माहीतच आहे की, आमची साक्ष खरी आहे. 13 तुम्हाला लिहिण्यासाठी
माझ्याकडे पुष्कळ काही आहे, परंतु ते लेखणी आणि शाईने लिहून
कळवावे अशी माझी इच्छा नाही. 14 तुमची भेट लवकरच होईल,
अशी मला आशा आहे आणि तेव्हा आपण समोरासमोर बोलू. तुम्हाला
शांती लाभो. येथील मित्र तुम्हाला शुभेच्छा पाठवितात. कृपया तेथील
मित्रांपैकी प्रत्येकाला त्यांच्या नावाने शुभेच्छा दे.

# यहूदा

1 येशू ख्रिस्ताचा सेवक आणि याकोबाचा बंधू यहूदाह याजकडून,
2 दया, शांती आणि प्रीती तुम्हाला अधिकाधिक प्राप्त होवो. 3
प्रिय बंधूंनो, आपणा सर्वास मिळालेल्या सामाईक तारणाबद्दल मी
तुम्हाला लिहिण्यास उत्सुक होतो, परंतु मला तुम्हाला लिहिण्याचे आणि
विनंती करण्याचे अगत्य वाटले की जो विश्वास परमेश्वराच्या पवित्र
लोकांना एकदाचाच सोपवून दिला होता, तो राखण्याविषयी तुम्ही
झटावे. 4 ज्यांच्यासाठी दंडाज्ञा फार पूर्वीच लिहून ठेवलेली होती असे
काही लोक गुप्तपणे तुमच्यामध्ये आत शिरले आहेत. हे अनीतिमान
लोक, परमेश्वराची कृपा विकृत करून तिला अनैतिकतेचे स्वरूप देतात
आणि येशू ख्रिस्त आपल्या एकाच सार्वभौम प्रभूला नाकारतात. 5 जरी
हे सर्व तुम्हाला आधी माहीत आहे, तरी तुम्हाला आठवण करून देतो की
प्रभूने त्यांच्या लोकांना इजिप्तमधून सोडविले, परंतु नंतर त्यांच्यावर
विश्वास न ठेवणाऱ्यांचा त्यांनी नाश केला. 6 आणि ज्या दूतांनी आपल्या
अधिकारांचे पद न राखता आपले योग्य स्थान सोडले त्यांना त्यांनी
अंधकारात, अनंतकाळच्या बंधनात मोठ्या न्यायाच्या दिवसासाठी
राखून ठेवले आहे. (aïdios g126) 7 त्याच प्रकारे सदोम आणि गमोरा
आणि शेजारच्या गावांनी स्वतःच्या देहाला लैंगिक व्यभिचार आणि
भ्रष्टतेमध्ये वाहवून घेतले. त्यांना अनंतकाळाच्या अग्नीची शिक्षा सहन
करावी म्हणून उदाहरणादाखल पुढे ठेवले आहे. (aiōnios g166) 8 अगदी
त्याच प्रकारे, हे अनीतिमान लोक आपल्या स्वप्नाच्या जोरावर, स्वतःचे
शरीर विटाळवितात, अधिकार नाकारतात आणि स्वर्गीय प्राणिमात्रांची
निंदा करतात. 9 परंतु प्रमुख देवदूत मिखाएल, जेव्हा मोशेच्या शरीरावरून
सैतानाशी वादविवाद करीत असताना स्वतः त्याचा निंदासहित न्याय
करण्याचे धैर्य त्याने केले नाही परंतु एवढेच म्हणाला, “प्रभू तुला
धमकावो!” 10 तरी हे लोक जे काही त्यांना समजत नाही त्याची निंदा
करतात आणि ज्यागोष्टी त्यांना उपजत स्वभावाने समजतात—जसे
अविवेकी प्राणी करतात—त्यायोगे ते नाश करून घेतील. 11 त्यांना
धिक्कार असो! त्यांनी काईनाचा मार्ग स्वीकारला आणि लाभासाठी
बलामाच्या अयोग्य मार्गात त्वरेने पदार्पण केले; कोरहाच्या बंडात
त्यांनी स्वतःचा नाश करून घेतला. 12 हे लोक प्रीती भोजनात डाग,
लपलेले खडक असून तुमच्याबरोबर जेवतात—केवळ स्वतःचे पोट
भरणारे मेंढपाळ. ते निर्जल मेघासारखे वाऱ्याने उडून जाणारे; शरद
ऋतूत फळ न देणारे, दोनदा मेलेले आणि उपटलेल्या झाडांसारखे
आहेत. 13 ते समुद्राच्या लज्जास्पद फेस आणणाऱ्या बेबंद लाटेसारखे;
भटकलेल्या ताऱ्यांसारखे, ज्यांच्यासाठी सर्वकाळचा काळाकुट्ट अंधार
राखून ठेवलेला आहे. (aiōn g165) 14 आदामानंतर सातव्या पिढीचा
मनुष्य हनोखाने त्यांच्याबद्दल भविष्यवाणी केली: “पाहा, प्रभू आपल्या
हजारो आणि हजारो पवित्र जणांसह येत आहेत 15 सर्वांचा न्याय
करण्यासाठी आणि जे सर्व अनीतिमान कृत्ये त्यांनी अनीतीमध्ये केली
आणि अनीतिमान पाप्यांनी त्यांच्याविरुद्ध जे सर्व विद्रोही शब्द बोलले
त्या सर्वांना तो दोषी ठरवेल.” 16 हे लोक कुरकुर करणारे आणि
दोष शोधणारे आहेत; वाईट वासनांच्या मागे लागणारे, स्वतःची बढाई
मारणारे आणि स्वतःच्या लाभासाठी इतरांची खुशामत करणारे आहेत.
17 परंतु, प्रिय मित्रांनो, आपल्या प्रभू येशू ख्रिस्तांच्या प्रेषितांनी तुम्हाला
जे पूर्वी सांगितले, त्याची आठवण ठेवा. 18 त्यांनी तुम्हाला सांगितले,
“शेवटच्या दिवसात निंदा करणारे स्वतःच्या अनीतिमान वासनांच्या मागे
लागतील.” 19 हे लोक तुमच्यामध्ये फूट पाडणारे, उपजत स्वभावाने
वागणारे आणि पवित्र आत्मा नसलेले आहेत. 20 परंतु तुम्ही, प्रिय
मित्रांनो, स्वतःला परमपवित्र विश्वासाच्या पायावर बांधा आणि पवित्र
आत्म्याद्वारे प्रार्थना करा. 21 आपला प्रभू येशू ख्रिस्त तुम्हाला त्यांच्या
कृपेने ज्या अनंतकाळच्या जीवनात नेणार आहेत त्याची वाट पाहत
असताना आपणास परमेश्वराच्या प्रीतीमध्ये राखा. (aiōnios g166) 22
जे संशय धरतात त्यांच्यावर दया करा; 23 काहींना अग्नीतून ओढून
काढा आणि वाचवा; आणि इतरांना भीतिमिश्रीत दया दाखवून कलंकित
देहामुळे डागाळलेल्या वस्त्रांचाही द्वेष करा. 24 आता जे तुम्हाला
अडखळण्यापासून राखण्यास आणि त्यांच्या गौरवी समक्षतेत दोषरहित
आणि अति आनंदात प्रस्तुत करण्यास समर्थ आहेत— 25 जे आपले
तारणारे एकच परमेश्वर आहेत त्यांना येशू ख्रिस्त आपले प्रभू यांच्याद्वारे
गौरव, वैभव, राज्य आणि अधिकार, युगारंभापूर्वी पासून आता आणि
सदासर्वकाळ असो आमेन. (aiōn g165)

# प्रकटीकरण

1 ज्यागोष्टी लवकरच निश्चितच घडून येणार आहेत, त्या आपल्या
सेवकांना दाखविण्यासाठी परमेश्वराने हे प्रकटीकरण येशू ख्रिस्ताला
दिले. त्यांनी आपल्या दूताला पाठवून आपला सेवक योहानाला ते
कळविले. 2 योहानाने जे सर्व पाहिले त्याविषयी साक्ष दिली—ती
म्हणजे, परमेश्वराचे वचन आणि येशू ख्रिस्ताची साक्ष. 3 जो कोणी या
भविष्यकथनाचे मोठ्याने वाचन करतो तो धन्य, जे लोक ते ऐकतात
आणि यात लिहिल्याप्रमाणे पालन करतात ते धन्य, कारण वेळ जवळ
आली आहे. 4 योहानाकडून, 5 आणि जे विश्वसनीय साक्षीदार,
मृतातील प्रथमफळ आणि पृथ्वीवरील राजांचे शासक आहेत त्या येशू
ख्रिस्तापासून तुम्हास कृपा आणि शांती लाभो. त्यांना, जे आमच्यावर
प्रीती करतात आणि ज्यांच्या रक्ताद्वारे आमची पापांपासून सुटका
झाली आहे 6 आणि ज्या येशूंनी परमेश्वराची व त्यांच्या पित्याची सेवा
करण्यासाठी आमची त्यांचे राज्य व याजक म्हणून निवड केली आहे,
त्यांना सदासर्वकाळ गौरव व सामर्थ्य असो! आमेन. (aiōn g165) 7
“पाहा, ते मेघारूढ होऊन येत आहेत,” आणि “प्रत्येक नेत्र त्यांना
पाहील, स्वत: त्याला भोसकणारेही त्यांच्याकडे पाहतील” आणि तेव्हा
पृथ्वीवरील सर्व लोक “त्यांच्यामुळे शोक करतील.” 8 प्रभू परमेश्वर
म्हणतात, “मीच अल्फा व ओमेगा, जे होते आणि जे येणार आहेत, ते
सर्वसमर्थ परमेश्वर आहेत.” 9 मी योहान, तुमचा बंधू, येशूंच्या दुःखात,
राज्यात व धीरात तुमचा सहभागी असलेला, परमेश्वराच्या वचनामुळे
आणि येशूंच्या साक्षीमुळे पत्मोस नावाच्या बेटावर शिक्षा भोगीत
होतो. 10 प्रभूच्या दिवशी मी आत्म्यात संचारलो आणि मी माझ्यामागे
रणशिंगाच्या आवाजासारखा मोठा आवाज ऐकला. 11 तो म्हणाला:
“तुला जे दिसते, ते एका ग्रंथपटावर लिहून काढ आणि ते इफिस,
स्मुर्णा, पर्गमम, थुवतीरा, सार्दीस, फिलदेल्फिया व लावदिकीया या सात
मंडळयांना पाठव.” 12 माझ्याशी कोण बोलत आहे हे पाहण्यासाठी
मी मागे वळलो, आणि जेव्हा मी मागे वळलो तेव्हा तिथे सोन्याच्या
सात समया असल्याचे मला दिसले. 13 त्या समयांच्या मध्यभागी
मानवपुत्रासारखा दिसणारा कोणी एक उभा होता. त्यांनी पायघोळ
वस्त्र घातले होते व छातीवर सोन्याचा पट्टा बांधला होता. 14 त्यांच्या
डोक्यावरील केस पांढऱ्या लोकरीसमान, बर्फासारखे शुभ्र होते आणि
त्यांचे डोळे अग्नीच्या ज्वालेसारखे भेदक होते. 15 त्यांचे पाय जणू
काही भट्टीतून शुद्ध केलेल्या चकचकीत सोनपितळयासारखे होते आणि
त्यांची वाणी गर्जना करणाऱ्या धबधब्यासारखी होती. 16 त्यांनी त्यांच्या
उजव्या हातात सात तारे धरले होते आणि त्यांच्या तोंडातून तीक्ष्ण
दुधारी तलवार निघाली. त्यांचा चेहरा मध्यान्ह्याच्या सूर्यप्रकाशा इतका
तेजस्वी होता. 17 त्यांना पाहताक्षणीच मी त्यांच्या पायाशी मृतवत
होऊन पडलो. पण त्यांनी आपला उजवा हात माझ्यावर ठेऊन म्हटले,
“भिऊ नको! मी पहिला व शेवटचा, जिवंत असलेला तो मीच आहे;
मी मृत होतो आणि पाहा, आता मी सदासर्वकाळ जिवंत आहे! आणि
मृत्यूच्या व अधोलोकाच्या किल्ल्या माझ्याजवळ आहेत. (aiōn g165,
Hadēs g86) 19 “तर तू जे पाहिले, जे आता आहे आणि यानंतर घडणार
आहे, ते सर्व लिहून ठेव. 20 तू माझ्या उजव्या हातात पाहिलेल्या सात
ताऱ्यांचे व सोन्याच्या सात समयांचे रहस्य हे आहे: हे सात तारे म्हणजे
सात मंडळयांचे देवदूत आणि सोन्याच्या सात समया म्हणजे सात
मंडळया आहेत.”

2 “इफिस येथील मंडळीच्या देवदूताला लिही: जे आपल्या उजव्या
हातात सात तारे धरतात व जे सोन्याच्या सात समयांमध्ये चालतात,
ते असे म्हणतात. 2 तुमची कृत्ये, तुमचे परिश्रम आणि तुमचा धीर
मला ठाऊक आहे. दुष्ट लोक तुम्हाला सहन होत नाहीत हे मला
ठाऊक आहे. प्रेषित नसताना स्वतःला प्रेषित म्हणविणाऱ्यांची परीक्षा
करून ते कसे लबाड आहेत, हे तुम्ही शोधून काढले आहे. 3 माझ्या
नावासाठी, तुम्ही खचून न जाता धीराने दुःख सोसले आहे. 4 परंतु,
माझ्याजवळ तुमच्याविरुद्ध हे आहे: तुमची जी पहिली प्रीती होती
ती तुम्ही सोडली आहे. 5 तुम्ही कसे पतन पावलात याची आठवण
करा! पश्चात्ताप करा आणि जी कृत्ये तुम्ही पूर्वी करीत होता ती करा.
जर तुम्ही पश्चात्ताप करणार नाही, तर मी तुमच्याकडे येईन आणि
तुमची समई तिच्या स्थानापासून दूर करेन. 6 पण एक गोष्ट तुमच्यात
अनुकूल आहे: माझ्याप्रमाणेच तुम्हीदेखील निकलाइतांच्या कृत्त्यांचा
द्वेष करता. 7 ज्याला ऐकावयास कान आहेत तो, आत्मा मंडळयास
काय म्हणतो ते ऐको. जो विजय मिळवितो, त्याला मी परमेश्वराच्या
स्वर्गलोकात असलेल्या जीवनाच्या वृक्षाचे फळ खाण्याचा अधिकार
देईन. 8 “स्मुर्णा येथील मंडळीच्या देवदूताला लिही: जे पहिले व
शेवटचे, जे मरण पावले होते व जिवंत झाले, ते असे म्हणतात. 9
मला तुमचे दुःख आणि दारिद्र्य ठाऊक आहे, तरीपण तुम्ही धनवान
आहात! आणि जे म्हणतात आम्ही यहूदी आहोत, पण ते नाहीत तर
सैतानाचे सभास्थान आहेत, अशा लोकांनी केलेली निंदा मी जाणतो.
10 तुम्हाला जे काही सोसावे लागणार आहे त्याची भीती बाळगू नका.
तुमची परीक्षा व्हावी म्हणून सैतान तुमच्यापैकी कित्येकांना तुरुंगात
टाकणार आहे आणि दहा दिवस तुम्हाला छळ सहन करावा लागेल. परंतु
तुम्ही मरेपर्यंत विश्वासू राहा आणि मी तुम्हाला विजयाचे मुकुट म्हणून
जीवन देईन. 11 ज्याला ऐकावयास कान आहेत तो आत्मा मंडळयास
काय म्हणतो ते ऐको, जो विजय मिळवितो त्याला दुसऱ्या मरणाची
बाधा होणारच नाही. 12 “पर्गमम येथील मंडळीच्या देवदूताला लिही:
ज्यांच्याजवळ तीक्ष्ण आणि दुधारी तलवार आहे, ते असे म्हणतात: 13
तुम्ही कुठे राहता हे मला ठाऊक आहे, जिथे सैतानाचे आसन आहे तिथे.
तुम्ही माझे नाव दृढ धरून राहिला आहात. माझा विश्वासू साक्षीदार
अंतिपा जो तुमच्या शहरामध्ये जिथे सैतान राहतो, तिथे ठार मारला
गेला, त्या दिवसातही तुम्ही माझ्यावरील विश्वास नाकारला नाही. 14
परंतु, माझ्याजवळ तुमच्याविरुद्ध काही गोष्टी आहेत: त्या या की,
बलामाच्या शिक्षणाप्रमाणे चालणारे काही लोक तुमच्यामध्ये आहेत.
त्यांनी बालाकाच्या शिक्षणानुसार इस्राएली लोकांपुढे असे अडखळण

केले की, जेणे करून त्यांनी मूर्तीला दाखविलेला नैवेद्य खावा व लैंगिक
अनीती करावी. 15 याचप्रमाणे, निकलाइतांच्या शिक्षणाप्रमाणे चालणारे
लोक तुमच्यातही आहेत. 16 यास्तव पश्चात्ताप कर! नाही तर, मी
तुमच्याकडे लवकरच येऊन माझ्या तोंडातून निघणाऱ्या तलवारीने
त्यांच्याविरुद्ध लढेन. 17 ज्याला ऐकावयास कान आहेत तो, आत्मा
मंडळयास काय म्हणतो ते ऐको, जो विजय मिळवितो त्याला गुप्त
राखलेल्या मान्न्यातून मी देईन आणि ज्यावर नवे नाव लिहिलेले असेल
तो पांढरा खडाही मी त्या व्यक्तीला देईन, जे तो खडा घेणाऱ्याशिवाय
कोणालाही माहीत नसेल. 18 “थुवतीरा येथील मंडळीच्या देवदूताला
लिही: ज्याचे नेत्र आगीच्या ज्वालेसारखे भेदक आहेत व ज्याचे पाय
चकाकत्या कास्यासारखा आहेत, ते परमेश्वराचे पुत्र असे म्हणतात: 19
तुमची सर्व कृत्ये मला ठाऊक आहेत आणि तुमची प्रेमळ वागणूक व
विश्वास, तुमची सेवा व धीर ही सर्व मी जाणतो. आणि दिवसेंदिवस या
सर्व गुणांमध्ये तुमची होत असलेली प्रगती देखील मला दिसते. 20 परंतु,
माझ्याजवळ तुमच्याविरुद्ध हे आहे: ईजबेल नावाची जी स्त्री स्वतःला
संदेष्टी म्हणविते आणि लैंगिक अनीती करण्यास व मूर्तीला दाखविलेला
नैवेद्य खाण्यास माझ्या सेवकांना तिच्या शिकवणीने भुलविते, तिचे
तुम्ही सहन करता. 21 मी तिला वेळ दिला, पण आपल्या जारकर्माबद्दल
पश्चात्ताप करण्याचे तिने नाकारले. 22 पाहा, मी तिला क्लेशमय
अंथरुणावर खिळवून टाकीन आणि तिच्याबरोबर व्यभिचार करणाऱ्या
लोकांनी तिचा मार्ग सोडून पश्चात्ताप न केल्यास तीव्र क्लेश देईन. 23 मी
तिच्या लेकरांना ठार मारीन, म्हणजे सर्व मंडळयांना कळून येईल की,
मी मने व अंतःकरणांची पारख करणारा आहे. तुमच्यापैकी प्रत्येकाला
मी ज्याच्या त्याच्या कृत्यांप्रमाणे फळ देईन. 24 थुवतीरा येथील बाकीचे
जे तुम्ही तिच्या शिकवणीप्रमाणे चालत नाहीत व सैतानाच्या गहन गोष्टी
शिकला नाहीत, मी तुम्हाला सांगतो, की मी तुमच्यावर अधिक ओझे
लादणार नाही, फक्त मी येईपर्यंत तुमच्याजवळ जे आहे ते दृढ धरून
राहा. 26 जे विजय मिळवितात व शेवटपर्यंत माझ्या इच्छेप्रमाणे करीत
राहतात, त्यांना मी राष्ट्रांवर अधिकार देईन. 27 आणि ते त्यांच्यावर लोह-
राजदंडाने अधिकार गाजवून मातीच्या पात्राप्रमाणे त्यांच्या ठिकऱ्या
करतील; — 28 ज्याप्रमाणे मला माझ्या पित्याकडून अधिकार मिळाला
आहे, त्याप्रमाणे मी त्यांना पहाटेचा तारा देखील देईन. 29 ज्याला
ऐकावयास कान आहेत तो, आत्मा मंडळयास काय म्हणतो ते ऐको.

**3** “सार्दीस येथील मंडळीच्या देवदूताला लिही: ज्यांच्याजवळ
परमेश्वराचे सात आत्मे व सात तारे आहेत, ते असे म्हणतात: तुमची
कृत्ये मला ठाऊक आहेत, तुम्ही जिवंत आहात असे तुमच्याविषयी मत
आहे, पण तुम्ही मेलेले आहात. 2 जागृत व्हा! जे उरलेले आहेत व
मरणाच्या पंथास लागले आहे त्यांना बळकट करा, कारण तुमची कृत्ये
माझ्या परमेश्वराच्या दृष्टीने मला परिपूर्ण अशी आढळली नाहीत. 3 जे
तुम्ही प्रथम ऐकले व स्वीकारले, त्याची आठवण करा आणि त्यावर
दृढविश्वास ठेऊन पश्चात्ताप करा. कारण तुम्ही जागृत झाला नाही, तर
जसा चोर येतो तसा मी येईन आणि मी कोणत्या घटकेस तुमच्याकडे
येईन हे तुम्हाला मुळीच समजणार नाही. 4 मात्र ज्यांनी आपली वस्त्रे
विटाळली नाहीत, असे थोडे लोक सार्दीस येथे तुमच्यामध्ये आहेत. ते
शुभ्र वस्त्रे परिधान करून माझ्याबरोबर फिरतील कारण ते त्यास पात्र
आहेत. 5 जो विजय मिळवितो तो त्यांच्यासारखा शुभ्र वस्त्रे परिधान
करेल. मी त्या व्यक्तीचे नाव जीवनाच्या पुस्तकातून कधीच खोडणार
नाही. तर माझ्या पित्यासमोर व त्यांच्या देवदूतांसमोर मी त्याच्या
नावाचा जाहीरपणे स्वीकार करेन. 6 ज्याला ऐकावयास कान आहेत
तो, आत्मा मंडळयास काय म्हणतो ते ऐको. 7 “फिलदेल्फिया येथील
मंडळीच्या देवदूताला लिही: जे पवित्र व सत्य आहे, ज्यांच्याजवळ
दावीदाची किल्ली आहे, ते जे उघडतात, ते कोणालाही बंद करता येत
नाही आणि ते जे बंद करतात, ते कोणाला उघडता येत नाही, ते असे
म्हणतात. 8 तुमची कृत्ये मला ठाऊक आहेत. पाहा, मी तुझ्यापुढे दार
उघडून ठेवले आहे, ते कोणी बंद करू शकत नाही. मला माहीत आहे
की तुमची शक्ती कमी आहे, तरी तुम्ही माझे वचन पाळले व माझे
नाव नाकारले नाही. 9 जे सैतानाच्या सभास्थानातील असून स्वतःला
यहूदी म्हणतात पण तसे नाहीत, ते खोटे बोलतात. त्यांना मी तुमच्या
स्वाधीन करेन. पाहा, ते तुमच्या पाया पडतील व मी तुमच्यावर प्रीती
केली आहे हे ते स्वीकारतील. 10 धीर धरण्याविषयीच्या माझ्या आज्ञा
तुम्ही पाळल्या आहेत, म्हणून पृथ्वीवर राहणाऱ्या लोकांची परीक्षा
होण्याचा जो प्रसंग सर्व जगावर येणार आहे, त्यापासूनही मी तुम्हाला
राखीन. 11 मी लवकर येत आहे. तुमचा मुकुट कोणी घेऊ नये म्हणून जे
तुमच्याजवळ आहे, ते दृढ धरून ठेवा. 12 जो विजय मिळवितो त्याला
मी माझ्या परमेश्वराच्या मंदिरातील स्तंभ करेन. ते तिथून कधीही बाहेर
जाणार नाहीत. माझ्या परमेश्वराचे नाव, स्वर्गातून माझ्या परमेश्वरापासून
उतरणारे नवे यरुशलेम, म्हणजे माझ्या परमेश्वराची नगरी, हिचे नाव
आणि माझे नवे नाव मी त्याच्यावर लिहेन. 13 ज्याला ऐकावयास कान
आहेत तो, आत्मा मंडळयास काय म्हणतो ऐको. 14 “लावदिकीया
येथील मंडळीच्या देवदूताला लिही: जे आमेन आहेत, विश्वासू व खरे
साक्षी आणि परमेश्वराच्या सृष्टीचे शासक आहेत, ते असे म्हणतात.
15 तुमची कृत्ये मला ठाऊक आहेत. तुम्ही थंड नाही व उष्ण नाही.
तुम्ही थंड किंवा उष्ण असता तर बरे झाले असते! 16 पण तुम्ही कोमट
आहात, म्हणजे उष्ण नाही आणि थंडही नाही; म्हणून मी तुम्हाला
माझ्या मुखातून बाहेर ओकून टाकीन. 17 तुम्ही म्हणता, ‘मी श्रीमंत
आहे; हवे ते धन मिळविले आहे; मला कशाचीही उणीव नाही’ पण तुम्ही
कष्टी, दीन, दरिद्री, आंधळे व नग्न आहात, हे तुम्हाला समजत नाही. 18
म्हणून तुम्हाला माझा असा सल्ला आहे की श्रीमंत होण्यासाठी तुम्ही
माझ्याकडून अग्नीत शुद्ध केलेले सोने विकत घ्यावे. तुमची लज्जास्पद
नग्नता झाकण्यात यावी म्हणून तुम्ही माझ्याकडून स्वच्छ, शुद्ध, शुभ्र
वस्त्रे विकत घ्यावी. तुम्हाला दृष्टीलाभ व्हावा म्हणून तुम्ही माझ्याकडून
अंजन विकत घ्यावे. 19 ज्यांच्यावर मी प्रीती करतो, त्यांना मी दटावतो व
शिक्षा देऊन शिस्त लावतो. म्हणून आस्थावान होऊन पश्चात्ताप करावा.
20 पाहा! मी दाराशी उभा राहून, दार ठोठावीत आहे. जो कोणी माझी

वाणी ऐकून दार उघडेल, तर मी आत येईन; मी त्याच्याबरोबर भोजन
करेन आणि तो माझ्याबरोबर भोजन करेल. 21 जो विजय मिळवितो
त्याला मी माझ्या राजासनावर बसण्याचा अधिकार देईन, जसा मी
विजय मिळवून माझ्या पित्याबरोबर त्यांच्या राजासनावर बसलो. 22
ज्याला ऐकावयास कान आहेत तो, आत्मा मंडळयास काय म्हणतो
ऐको.”

**4** यानंतर मी पाहिले, आणि माझ्यापुढे स्वर्गात एक दार उघडलेले
मला दिसले आणि जी वाणी मी प्रथम ऐकली होती व जी रणशिंग
ध्वनीसारखी होती, ती म्हणाली, “इकडे वर ये, म्हणजे ज्यागोष्टी
यानंतर घडणार आहेत त्या मी तुला दाखवेन” 2 मी लगेच आत्म्यात
संचारलो, आणि माझ्यापुढे स्वर्गात एक राजासन ठेवलेले होते व
त्यावर एकजण बसला होता. 3 आणि जो तिथे बसला होता तो
हिऱ्यासारखा व माणकाच्या रत्नासारखा दिसत होता; त्या राजासनाच्या
सभोवताली एक पाचूसारखे दिसणारे मेघधनुष्य होते; 4 राजासनाभोवती
चोवीस सिंहासने होती आणि त्यावर शुभ्र वस्त्रे परिधान केलेले व
डोक्यावर सोन्याचे मुकुट घातलेले चोवीस वडीलजन बसलेले होते. 5
राजासनापासून विजा चमकत होत्या. आणि मेघगर्जनांचा आवाज ऐकू
येत होता. राजासनासमोर परमेश्वराच्या सात आत्म्यांचे प्रतीक असलेले
सात दीप तेवत होते. 6 त्याचप्रमाणे राजासनापुढे स्फटिकासारखे
स्वच्छ आणि काचेच्या समुद्रासारखे दिसणारे असे काहीतरी होते.
राजासनाच्या मध्यभागी व राजासनाच्या भोवताली चार जिवंत प्राणी
होते; त्यांना पुढे आणि मागे अंगभर डोळे होते. 7 या प्राण्यांपैकी पहिला
प्राणी सिंहासारखा, दुसरा बैलासारखा, तिसरा जो होता त्याचा चेहरा
मनुष्याच्या मुखासारखा व चौथा प्राणी उडत्या गरुडासारखा होता. 8 त्या
चारही सजीव प्राण्यांना प्रत्येकाला सहा पंख होते. त्यांच्या पंखांभोवती
आतून बाहेरून सर्वत्र डोळे होते. ते अहोरात्र अखंडपणे बोलत होते:
9 जे राजासनावर बसलेले आहेत आणि जे युगानुयुग जिवंत आहेत,
त्यांचा त्या सजीव प्राण्यांनी ज्या ज्यावेळी गौरव केला, त्यांना बहुमान
दिला आणि त्यांची उपकारस्तुती केली, (aiōn g165) 10 त्या त्यावेळी
त्या चोवीस वडीलजनांनी त्या सर्वकाळ जिवंत असलेल्या परमेश्वरापुढे
दंडवत घातले, त्यांची उपासना केली आणि आपले मुकुट राजासनापुढे
ठेऊन म्हटले: (aiōn g165) 11 “हे आमच्या प्रभू आणि परमेश्वरा, गौरव,
आदर, सामर्थ्य स्वीकारण्यास तुम्ही पात्र आहात; कारण तुम्ही सर्व
निर्माण केले. तुमच्याच इच्छेने सर्वकाही अस्तित्वात आले.”

**5** जे राजासनावर बसले होते, त्यांच्या उजव्या हातात पाठपोट
लिहिलेली ग्रंथपटाची गुंडाळी मी पाहिली. ती गुंडाळी सात शिक्के
मारून बंद केली होती. 2 एक बलवान देवदूत मोठ्याने घोषणा करीत
होता: “हे शिक्के फोडून, या ग्रंथपटाची गुंडाळी उघडावयास पात्र
असा कोणी आहे का?” 3 पण स्वर्गात, पृथ्वीवर किंवा पृथ्वीच्या
खाली, कोणीही ती गुंडाळी उघडण्यास किंवा त्यात लिहिलेले पाहण्यास
समर्थ नव्हता. 4 तेव्हा मी फार रडलो. कारण ती गुंडाळी उघडावयास
किंवा त्यात पाहावयास योग्य असा कोणीही सापडला नाही. 5 पण
त्या चोवीस वडिलांपैकी एकजण मला म्हणाला, “रडू नकोस! कारण
पाहा, यहूदाह वंशाचा सिंह, दावीदाचा मूळ विजयी झाला आहे. सातही
शिक्के फोडून ती गुंडाळी उघडण्यास तो समर्थ आहे.” 6 मग मी
पाहिले, ते राजासन, ते चोवीस वडीलजन व ते चार सजीव प्राणी यांच्या
मध्यभागी वध झाल्यासारखा कोकरा उभा असलेला मला दिसला.
कोकऱ्याला सात शिंगे, सात डोळे, असून, ते जगाच्या प्रत्येक भागात
पाठविलेले परमेश्वराचे सात आत्मे आहेत. 7 कोकरा पुढे आला, आणि
जे राजासनावर बसले होते, त्यांच्या उजव्या हातातून त्याने ती गुंडाळी
घेतली. 8 कोकऱ्याने ती गुंडाळी घेतली, तेव्हा त्या चार सजीव प्राणी व
चोवीस वडीलजनांनी कोकऱ्याच्या पुढे दंडवत केले. त्या प्रत्येकाजवळ
एकएक वीणा आणि धूपद्रव्याने भरलेले सोन्याचे धूपपात्र होते. यातील
धूप म्हणजे पवित्रजनांच्या प्रार्थना आहेत. 9 ते नवे गीत गाऊ लागले.
गीताचे शब्द असे: “ती गुंडाळी घ्यावयास व त्याचे शिक्के फोडून तो
उघडण्यास तुम्ही पात्र आहात, कारण तुमचा वध करण्यात आला
होता आणि तुम्ही आपल्या रक्ताने परमेश्वरासाठी प्रत्येक वंश, भाषा,
लोक व राष्ट्रे विकत घेतले आहे, 10 तुम्ही त्या सर्वांना एक राज्य
आणि आमच्या परमेश्वराची सेवा करण्यासाठी याजक केले आहे; ते
पृथ्वीवर राज्य करतील.” 11 तेव्हा मी पाहिले हजारो आणि लाखो नव्हे
तर अगणित देवदूतांचे गीत ऐकू आले. ते राजासन, सजीव प्राणी व
वडीलजनांच्या सभोवती उभे होते. 12 ते मोठ्याने म्हणत होत: “ज्यांचा
वध करण्यात आला होता, तो कोकरा सामर्थ्य, संपत्ती, सुज्ञता, बल,
सन्मान, गौरव आणि उपकारस्तुती स्वीकारण्यास पात्र आहे!” 13
मग स्वर्गातील, पृथ्वीवरील, पृथ्वीच्या खालील व समुद्रातील प्राण्यांना
गाताना मी ऐकले. ते गात होते: “जे राजासनावर बसले आहेत, त्यांना व
कोकऱ्याला उपकारस्तुती, सन्मान, गौरव आणि सामर्थ्य (aiōn g165)
14 तेव्हा ते चार सजीव प्राणी म्हणाले, “आमेन,” आणि त्या चोवीस
वडीलजनांनी साष्टांग नमस्कार घालून आराधना केली.

**6** कोकऱ्याने त्या सात शिक्यातील पहिला शिक्का फोडून उघडताना
मी पाहिले. तेव्हा त्या चार सजीव प्राण्यांतील एकाने, गर्जनेसारख्या
आवाजात म्हटले, “ये!” 2 मी पहिले तो माझ्यासमोर एक पांढरा घोडा
आहे असे मला दिसले! घोडेस्वाराजवळ एक धनुष्य होते. त्याच्या
डोक्यावर एक मुकुट ठेवण्यात आला. मग विजेता म्हणून जिंकण्याच्या
उद्देशाने तो स्वार निघून गेला. 3 नंतर कोकऱ्याने दुसरा शिक्का फोडला,
तेव्हा दुसऱ्या सजीव प्राण्याने, “ये” अशी हाक मारली, ती मी ऐकली.
4 यावेळी एक अग्निवर्ण घोडा बाहेर पडला. पृथ्वीवरील शांतता नष्ट
करण्याचा अधिकार त्याला देण्यात आला होता. लोक एकमेकांचा
वध करू लागले. त्या स्वाराला एक मोठी तलवार देण्यात आली. 5
मग कोकऱ्याने तिसरा शिक्का फोडला, तेव्हा तिसरा सजीव प्राणी,
“ये” म्हणताना मी ऐकले. मग मी एक काळा घोडा पाहिला! त्याच्या
स्वाराच्या हातात एक तराजू होते. 6 मग त्या चार सजीव प्राण्यांमधून
निघालेली एक वाणी मी ऐकली. ती म्हणाली, “एका दिवसाच्या मजुरीत

एक कि. ग्रॅ. गहू आणि तीन कि. ग्रॅ. जव! आणि तेल आणि द्राक्षारस
यांची नासाडी करू नका.” 7 जेव्हा कोकऱ्याने चौथा शिक्का फोडला,
तेव्हा मी ऐकले, चौथा सजीव प्राणी म्हणाला, “ये!” 8 मग मी एक
फिकट रंगाचा घोडा पाहिला! त्याच्या स्वाराचे नाव मृत्यू होते आणि
अधोलोक त्याच्यामागून आला. पृथ्वीवरील एक चतुर्थांश लोकांना युद्ध,
दुष्काळ, पीडा आणि हिंस्र पशूद्वारे ठार मारण्याचा त्यांना अधिकार
देण्यात आला होता. **(Hadēs g86)** 9 त्यानंतर त्याने पाचवा शिक्का
फोडला, तेव्हा मी एक वेदी पाहिली. त्या वेदीखाली परमेश्वराचे वचन
सांगितल्यामुळे आणि विश्वासूपणे साक्ष दिल्यामुळे जिवे मारले गेलेल्या
सर्व लोकांचे आत्मे होते. 10 त्यांनी प्रभूला मोठ्याने हाक मारली,
“हे सर्वसत्ताधारी पवित्र आणि सत्य प्रभू, पृथ्वीवरील लोकांचा न्याय
करण्यास आणि आमच्या रक्ताबद्दल सूड घेण्यास तुम्ही किती काळ
लावणार?” 11 तेव्हा त्यातील प्रत्येकाला एकएक पांढरा झगा देण्यात
आला. त्यांना सांगण्यात आले की त्यांचे सहकर्मी बंधू, हुतात्म्यांची
संख्या पूर्ण होईपर्यंत, आणखी थोडा काळ थांबा. 12 मी पाहत असताना
त्याने सहावा शिक्का फोडला, तेव्हा एक प्रचंड भूमिकंप झाला. सूर्य
शेळयाच्या केसांपासून तयार केलेल्या गोणपाटासारखा काळा झाला;
चंद्र रक्तासारखा लाल झाला. 13 अंजिराच्या वृक्षांवरील कच्ची फळे
एखाद्या प्रचंड वादळाने गळून पडतात, तसे आभाळातील तारे भूमीवर
गळून पडतांना मला दिसले. 14 एखाद्या गुंडाळीप्रमाणे अंतराळ गुंडाळले
गेले आणि प्रत्येक पर्वत व बेट हादरून आपल्या जागेवरून ढळले.
15 तेव्हा पृथ्वीवरील राजे, राजपुत्र, सैन्याचे उच्चाधिकारी, श्रीमंत
तसेच बलवान लोक, सर्व लहान थोर माणसे, गुलाम आणि स्वतंत्र
लोक, सर्वजण डोंगराच्या गुहांमध्ये व खडकांमध्ये दडून बसले. 16
ते डोंगरटेकड्यांना उद्देशून ओरडून विनवू लागले, “आम्हावर पडून जे
राजासनावर बसले आहेत, त्यांच्या नजरेपासून आणि कोकऱ्याच्या
क्रोधापासून आम्हाला लपवा! 17 कारण त्यांच्या क्रोधाचा महान दिवस
आला आहे, त्यात कोणाचा निभाव लागेल?”

**7** त्यानंतर पृथ्वीच्या चारही कोपऱ्यांवर चार देवदूत उभे राहिलेले
मी पाहिले. पृथ्वीवरील भूमी, समुद्र किंवा कोणताही वृक्ष, यावर
वाहू नये म्हणून ते त्या चारही वाऱ्यांना थोपवून धरीत होते. 2 मग
दुसरा देवदूत पूर्वेच्या दिशेने हातात जिवंत परमेश्वराचा शिक्का घेऊन
येताना मी पाहिला. पृथ्वीला व समुद्राला इजा करण्याचे काम ज्या चार
देवदूतांवर सोपविले होते, त्या चार देवदूतांना तो ओरडून म्हणाला,
3 “आम्ही परमेश्वराच्या सेवकांच्या कपाळावर परमेश्वराचा शिक्का
मारीपर्यंत पृथ्वी, समुद्र किंवा वृक्ष यांना काहीही इजा करू नका.” 4
ज्या लोकांवर हा शिक्का मारण्यात आला त्यांची संख्या मी ऐकली: ते
इस्राएलच्या सर्व बारा वंशांमधून 1,44,000 लोक होते. 5 यहूदाह
वंशातून 12,000; रऊबेन वंशातून 12,000; गाद वंशातून 12,000;
6 आशेर वंशातून 12,000; नफताली वंशातून 12,000; मनश्शेह
वंशातून 12,000; 7 शिमोन वंशातून 12,000; लेवी वंशातून
12,000; इस्साखार वंशातून 12,000; 8 जबुलून वंशातून 12,000;
योसेफ वंशातून 12,000; बन्यामीन वंशातून 12,000. 9 यानंतर मी
पाहिले आणि सर्व राष्ट्रे, वंश, लोक व भाषा यातील इतके लोक होते की
त्यांचे मोजमाप करणे अशक्य होते. ते सर्व शुभ्र वस्त्रे घालून, हातात
खजुरीच्या झावळया घेऊन, राजासनासमोर आणि कोकरासमोर उभे
होते. 10 ते प्रचंड आवाजात घोषणा करीत होते: “राजासनावर बसलेल्या
आमच्या परमेश्वरापासून आणि कोकऱ्यापासून तारणप्राप्ती होत आहे.”
11 तेव्हा सर्व देवदूत राजासन व वडीलजन आणि चार सजीव प्राणी
यांच्याभोवती उभे होते आणि राजासनासमोर दंडवत घालून उपासना
करीत असताना 12 ते म्हणाले: “आमेन! आमच्या परमेश्वराला धन्यवाद,
गौरव, सुज्ञता, उपकारस्तुती, मान, सामर्थ्य आणि पराक्रम सदासर्वकाळ
असो. आमेन!” **(aiōn g165)** 13 मग या चोवीस वडीलजनांपैकी एकाने
मला विचारले, “हे शुभ्र पोशाख घातलेले कोण आहेत व ते कुठून आले
आहेत?” 14 मी म्हटले, “महाराज, ते तुम्हाला माहीत आहे.” तेव्हा ते
म्हणाले, “जे महान संकटातून निभावून येतात, ते हे आहेत. त्यांनी
आपले झगे कोकऱ्याच्या रक्ताने धुऊन शुभ्र केले आहेत. 15 म्हणूनच,
“आज ते येथे परमेश्वराच्या राजासनासमोर, त्यांच्या मंदिरात, त्यांची
अहोरात्र सेवा करीत आहेत. जे राजासनावर बसलेले आहेत, ते त्यांच्या
सानिध्यात त्यांना आश्रय देतील. 16 त्यांना पुन्हा कधी भूक, किंवा
तहान लागणार नाही; त्यांना सूर्याचा ताप, किंवा दाहक उष्णता बाधणार
नाही. 17 कारण राजासनापुढे मध्यभागी असलेला कोकरा त्यांचा
मेंढपाळ होईल, ‘ते त्यांना जीवनाच्या पाण्याच्या झऱ्याजवळ नेईल,’
‘आणि परमेश्वर त्यांच्या डोळयांतील सर्व अश्रू पुसून टाकतील.’”

**8** त्यांनी जेव्हा सातवा शिक्का उघडला, तेव्हा स्वर्गामध्ये अंदाजे
अर्धातास सर्वत्र संपूर्ण शांतता पसरली. 2 नंतर मी पाहिले जे सात
देवदूत परमेश्वरासमोर उभे राहिले, त्यांना सात कर्णे देण्यात आले.
3 नंतर दुसरा एक देवदूत, सोन्याची एक धूपदाणी घेऊन आला व
वेदीजवळ उभा राहिला. त्याला राजासनासमोरील सोन्याच्या वेदीवर
अर्पण करण्यासाठी परमेश्वराच्या निवडलेल्या लोकांच्या प्रार्थना मिश्रित
बराच धूप देण्यात आला होता. 4 त्या देवदूताच्या हातातून प्रार्थना
मिश्रित धूपाचा सुगंध परमेश्वरासमोर वर चढला. 5 तेव्हा त्या देवदूताने
वेदीवरील अग्नी धूपदाणीत भरून घेतला आणि त्याने खाली पृथ्वीवर
टाकला. त्याबरोबर मोठा गडगडाट व गर्जना झाल्या, विजा चमकल्या
आणि प्रचंड भूमिकंप झाला. 6 नंतर ज्या सात देवदूतांजवळ सात कर्णे
होते, त्यांनी आपआपले कर्णे वाजविण्याची तयारी केली. 7 पहिल्या
देवदूताने आपला कर्णा वाजविला, तेव्हा पृथ्वीवर रक्तमिश्रित गारा व
अग्नीचा वर्षाव झाला. पृथ्वीच्या एकतृतीयांश भागाला आग लागली
आणि त्यामुळे एकतृतीयांश वृक्ष व सर्व हिरवे गवत जळून गेले. 8 नंतर
दुसऱ्या देवदूताने आपला कर्णा वाजविला. तेव्हा एका मोठ्या जळत्या
पर्वतासारखे काहीतरी समुद्रात टाकण्यात आले. त्यामुळे समुद्राचा
तिसरा हिस्सा रक्तमय झाला. समुद्रातील एकतृतीयांश जिवंत प्राणी
मरण पावले आणि एकतृतीयांश जहाजे नष्ट झाली. 10 मग तिसऱ्या
देवदूताने आपला कर्णा वाजविला. तेव्हा आकाशातून एक मोठा जळता

तारा पृथ्वीवरील एकतृतीयांश नद्या व झरे यावर पडला. 11 त्या ताऱ्याचे
नाव कडूदवणा असे आहे. त्यामुळे पृथ्वीवरील एकतृतीयांश पाणी
कडू विषारी बनले व अनेक लोक मरण पावले. 12 चौथ्या देवदूताने
आपला कर्णा वाजविला, तेव्हा सूर्याचा तिसरा हिस्सा, चंद्र व तारे
यांचाही तिसरा हिस्सा काळा झाला. त्यामुळे दिवसाचा एकतृतीयांश
भाग प्रकाशाविना आणि रात्रीचा एकतृतीयांश भाग अंधार झाला. 13
मी हे पाहत असतानाच, आकाशातून एक गरुड पक्षी उडतांना मला
दिसला. तो मोठ्याने म्हणत होता, “धिक्कार! धिक्कार! पृथ्वीवरील
लोकांना धिक्कार! कारण लवकरच उरलेले तीन देवदूत आपआपले
कर्णे वाजवितील.”

**9** मग पाचव्या देवदूताने आपला कर्णा वाजविला, तेव्हा जो तारा
आकाशातून पृथ्वीवर पडला होता आणि ज्या ताऱ्याला अथांग
कूपाची किल्ली देण्यात आली होती, त्याला मी पाहिले. **(Abyssos g12)**
2 तेव्हा त्याने अथांग कूप उघडले आणि प्रचंड भट्टीच्या धुरासारखा
धूर त्यातून वर आला. त्या अगाध कूपाच्या धुरामुळे सूर्य व आकाश
अंधकारमय झाले. **(Abyssos g12)** 3 मग त्या धुरातून टोळ निघून
पृथ्वीवर उतरले. त्यांना पृथ्वीवर असणाऱ्या विंचवाप्रमाणे सामर्थ्य
देण्यात आले होते. 4 पृथ्वीवरील गवत, वनस्पती किंवा झाडेझुडूपे,
यांना उपद्रव न करता ज्या लोकांच्या कपाळावर परमेश्वराचा शिक्का
नाही, त्यांच्यावर हल्ला करण्यास सांगण्यात आले होते. 5 त्यांना
ठार मारण्याचा अधिकार त्यांच्याकडे नव्हता, तर फक्त पाच महिने
पीडा देण्याचे काम सोपविले होते. विंचू मनुष्याला नांगी मारतो, तेव्हा
त्याला होणाऱ्या पीडेसारखी ती होती. 6 त्या दिवसात लोक मरणाची
वाट पाहतील पण त्यांना मृत्यू येणार नाही; मृत्यू यावा म्हणून ते
उत्कंठित होतील, मृत्यू त्याच्यापासून दूर पळेल. 7 पृथ्वीवर आलेले
टोळ युद्धासाठी सज्ज केलेल्या घोड्यांसारखे दिसत होते. त्यांचे चेहरे
मनुष्यांसारखे असून त्यांच्या डोक्यांवर सोन्याचा मुकुटांसारखे दिसणारे
काहीतरी होते. 8 त्यांचे केस स्त्रियांच्या केसांसारखे होते आणि त्यांचे
दात सिंहाच्या दातांसारखे होते. 9 त्यांनी लोखंडी ऊरस्त्राणासारखी
ऊरस्त्राणे घातली होती. त्यांच्या पंखांचा ध्वनी युद्धात त्वेषाने हल्ला
करणारे अनेक घोडे व धावत्या रथांच्या ध्वनीसारखा होता. 10 त्यांना
विंचवाच्या नांग्यांसारख्या दंश करणाऱ्या शेपट्या होत्या. पाच महिने
लोकांचा छळ करण्याची शक्ती या शेपट्यांत होती. 11 अथांग कूपाचा
सत्ताधारी देवदूत त्यांचा राजा होता. त्याचे नाव हिब्रू भाषेत अबद्दोन,
हेल्लेणी भाषेत अपल्लूओन (जो सर्वनाशक) असे आहे. **(Abyssos g12)**
12 एक अनर्थ आता संपला आहे; पण आणखी दोन अनर्थ येणार आहेत.
13 नंतर सहाव्या देवदूताने आपला कर्णा वाजविला, तेव्हा परमेश्वराच्या
राजासनासमोरील सोन्याच्या वेदीच्या चारही शिंगातून निघालेली एक
वाणी मी ऐकली. 14 ज्या सहाव्या देवदूताजवळ रणशिंग होते त्याला ती
म्हणाली, “यूफ्रेटीस नदीवर बांधून ठेवलेल्या चारही देवदूतांना मोकळे
कर.” 15 आणि एकतृतीयांश मनुष्यजात ठार मारण्याकरिता नेमलेली
घटका, दिवस, महिना व वर्ष यासाठी तयार केलेले हे चार देवदूत मोकळे
करण्यात आले. 16 घोडदळाची संख्या वीस कोटी होती. मी त्यांची
संख्या ऐकली. 17 त्या दृष्टान्तात घोडे व स्वार मला दिसले ते असे: त्यांना
अग्नीसारखी लाल, गडद निळया रंगाची व गंधकासारखी पिवळया
रंगांची ऊरस्त्राणे होती. त्या घोड्यांची डोकी सिंहांच्या डोक्यांसारखी
होती आणि त्यांच्या तोंडामधून अग्नी, धूर व गंधक हे सर्व निघत होते,
18 आणि त्या पीडामुळे एकतृतीयांश मानवजात मारली गेली. 19
त्या घोड्यांची शक्ती त्यांच्या तोंडात व शेपटांत आहे. त्यांच्या शेपट्या
सापांसारख्या असून त्यांनाही डोकी आहेत आणि त्यांच्या साहाय्याने
ते जखमा करतात. 20 त्या पीडांमुळे जे ठार मारले गेले नाहीत अशा
बाकीच्या माणसांनी स्वतःच्या हातांनी घडविलेल्या गोष्टींबद्दल पश्चात्ताप
केला नाही. म्हणजे, भुतांची व ज्यांना पाहता, ऐकता व चालता येत
नाही अशा सोन्याच्या, रुप्याच्या, कास्याच्या, दगडाच्या व लाकडाच्या
मूर्तींची पूजा करणे त्यांनी सोडले नाही. 21 तसेच, त्यांनी केलेले खून,
चेटके, जारकर्म, त्यांच्या चोऱ्या या पापांबद्दल पश्चात्ताप केला नाही.

**10** मग मी आणखी एक पराक्रमी देवदूत, स्वर्गातून उतरतांना
पाहिला. त्याने मेघांचे वेष्टण घातले होते. त्याच्या मस्तकाच्या
वरती मेघधनुष्य होते; त्याचा चेहरा सूर्यासारखा तेजस्वी होता आणि
त्याचे पाय अग्नी स्तंभासारखे होते. 2 त्याच्या हातात उघडलेली एक
छोटी गुंडाळी होती. त्याने आपला उजवा पाय समुद्रावर व डावा पाय
जमिनीवर ठेवला. 3 मग त्याने सिंहगर्जनेसारखी एक मोठी गर्जना
केली, तेव्हा सात मेघगर्जनांनी प्रत्युत्तर दिले. 4 त्या सात मेघगर्जनांनी
उच्चारलेले शब्द मी लिहून ठेवणार होतो; तेवढ्यात स्वर्गातून एक वाणी
मला म्हणाली, “थांब, लिहू नकोस. त्यांचे शब्द मोहरबंद कर, आताच ते
प्रकट करावयाचे नाहीत.” 5 मग समुद्र व जमीन यावर उभे राहिलेल्या
त्या बलवान देवदूताने आपला उजवा हात स्वर्गाकडे उंचाविला. 6 आणि
जे युगानुयुग जिवंत आहे, ज्यांनी आकाश व त्यातील सर्वकाही, पृथ्वी
व तिच्यातील सर्वकाही, समुद्र व त्यातील सर्व जलचर निर्माण केले,
त्यांची शपथ वाहून म्हटले, “आता अधिक विलंब लागणार नाही! **(aiōn
g165)** 7 पण सातवा देवदूत आपले रणशिंग वाजविण्याच्या बेतात
असेल त्या दिवसात, आपले सेवक व संदेष्टे यांना कळविल्याप्रमाणे
युगानुयुग गुप्त ठेवलेली परमेश्वराची रहस्यमय योजना साध्य होईल.” 8
मग स्वर्गातील ती वाणी माझ्याशी पुन्हा बोलली, “जा आणि समुद्र व
जमीन यावर उभ्या असलेल्या त्या बलवान देवदूताकडून ती उघडलेली
गुंडाळी घे.” 9 त्याप्रमाणे त्याच्याकडे जाऊन मी त्याला ती छोटी गुंडाळी
मागितली. तो मला म्हणाला, “ही घे आणि खाऊन टाक. ‘ती तुझ्या
तोंडात मधासारखी गोड लागेल,’ पण ती गिळल्यावर ती तुझे पोट
आंबट करेल.” 10 तेव्हा मी देवदूताच्या हातातून छोटी गुंडाळी घेतली
आणि खाऊन टाकली. त्याने सांगितल्याप्रमाणे माझ्या तोंडाला ती
मधाप्रमाणे गोड लागली, पण ती गिळल्यावर माझे पोट आंबट झाले.
11 तेव्हा मला सांगण्यात आले, “अनेक लोक, राष्ट्रे, भाषा बोलणारे व
राजे यांना तू पुन्हा भविष्यवाणी केली पाहिजे.”

**11** मग मला एक मापनपट्टी देण्यात आली आणि मला सांगण्यात
आले, “जा परमेश्वराच्या मंदिराचे आणि वेदीचे मोजमाप
उपासकांसहित घे. 2 पण पवित्र मंदिरा बाहेरच्या अंगणाचे माप घेऊ
नको, कारण ते गैरयहूदीयांना देण्यात आले आहे. गैरयहूदी राष्ट्रे यरुशलेम
शहरास बेचाळीस महिने पायाखाली तुडवतील. 3 आणि मी माझ्या दोन
साक्षीदारांना गोणपाट नेसून 1,260 दिवस भविष्य सांगण्यासाठी
निवडणार आहे.” 4 “ते दोन साक्षीदार पृथ्वीच्या प्रभूसमोर उभे असलेले
दोन जैतून वृक्ष” व दोन समया आहेत. 5 आणि त्यांना कोणी अपाय
करण्याचा प्रयत्न केल्यास, त्यांच्या तोंडातून अग्नी निघतो आणि
त्यांच्या शत्रूंना गिळून घेतो आणि जर कोणी मनुष्य त्यांना अपाय करू
इच्छील तर तो अशाप्रकारे मारला जाणे आवश्यक आहे. 6 त्यांच्या
भविष्यवाणी करण्याच्या काळात पाऊस पडू नये म्हणून आकाश बंद
करण्याचा त्यांना अधिकार देण्यात आला आहे; तसेच पृथ्वीवरील नद्यांचे
व समुद्रांचे पाणी रक्तमय करण्याचा व त्यांना वाटेल तेव्हा आणि वाटेल
तितक्या वेळा, लोकांत पीडा उत्पन्न करण्याचाही अधिकार देण्यात
आला आहे. 7 त्यांची साक्ष संपल्यानंतर, अथांग कूपातून येणारा पशू
त्यांच्याविरुद्ध लढाई करेल आणि त्यांचा पाडाव करून त्यांना ठार
करेल. (Abyssos g12) 8 ज्या मोठ्या शहराला लाक्षणिक अर्थाने सदोम
आणि इजिप्त असे म्हटले आहे आणि ज्या शहरात त्यांच्या प्रभूला
क्रूसावर खिळण्यात आले होते, त्या शहरातील रस्त्यांवर त्यांची प्रेते
पडून राहतील. 9 सर्व लोक, वंश, भाषा आणि राष्ट्रे त्यांची प्रेते साडेतीन
दिवस टक लावून पाहतील आणि त्यांना पुरण्यास नकार देतील. 10
उलट, आपला इतका छळ करणाऱ्या या दोन संदेष्ट्यांच्या मृत्यूबद्दल
सर्व जगभर लोक जागोजागी आनंदोत्सव करतील, एकमेकांना भेटी
देतील. 11 पुढे साडेतीन दिवसानंतर परमेश्वरापासून येणारा जीवनदायी
श्वास त्यांच्यामध्ये संचारला, तेव्हा ते आपल्या पायांवर उभे राहिले
आणि ज्यांनी त्यांना पाहिले त्यांचा थरकाप उडाला. 12 मग स्वर्गातून
एक मोठी वाणी त्यांच्याबरोबर बोलताना त्यांनी ऐकली. ती म्हणाली,
“इकडे वर या!” तेव्हा ते आपल्या शत्रूंच्या देखत मेघारूढ होऊन
स्वर्गात वर गेले. 13 त्याच घटकेस एक प्रचंड भूमिकंप झाला आणि
शहराचा एक दशांश भाग जमीनदोस्त होऊन, सात हजार लोक मरण
पावले. तेव्हा भूमिकंपातून वाचलेल्या प्रत्येकाने भयभीत होऊन स्वर्गीय
परमेश्वराचे गौरव केले. 14 दुसरा अनर्थ संपला; पण पाठोपाठ तिसरा
अनर्थ लवकर येत आहे. 15 कारण त्याचवेळी सातव्या देवदूताने आपला
रणशिंग वाजविला, त्याबरोबर स्वर्गातून अनेक प्रचंड ध्वनी झाले, त्या
वाण्या म्हणत होत्या: “जगाचे राज्य आमच्या प्रभूचे आणि त्यांच्या
ख्रिस्ताचे झाले आहे, ते युगानुयुग राज्य करतील.” (aiōn g165) 16 तेव्हा
परमेश्वरासमोर, आपल्या आसनांवर बसलेल्या चोवीस वडीलजनांनी
परमेश्वरापुढे दंडवत करून त्यांची उपासना केली. 17 ते म्हणाले: “हे
सर्वसमर्थ प्रभू परमेश्वरा, आम्ही तुम्हाला धन्यवाद देतो. जे आहेत
आणि जे होते, कारण तुम्ही आपले महान सामर्थ्य प्रकट करून तुमच्या
शासनाची सुरुवात केली आहे. 18 राष्ट्रे तुमच्यावर क्रोधाविष्ट झाली
होती; पण आता तुमचा क्रोध प्रगट झाला आहे. आता मृतांचा न्याय
करण्याची वेळ आली आहे, तुमचे सेवक संदेष्टे, तुमचे पवित्रजन आणि
तुमच्या नावाचा आदर करणारे सर्व लहान व थोर— अशा सर्वांना
पारितोषिके देण्याची, व पृथ्वीचा नाश करणाऱ्यांचा नाश करण्याची वेळ
आली आहे.” 19 तेव्हा स्वर्गात परमेश्वराचे मंदिर उघडण्यात आले आणि
मंदिरात असलेला परमेश्वराच्या करारांचा कोश दिसू लागला. विजा
चमकू लागल्या, मेघगर्जना आणि गडगडाट होऊ लागला. भूमिकंप
झाला आणि गारांचे मोठे वादळ झाले.

**12** मग स्वर्गामध्ये एक अलौकिक चिन्ह मला दिसले. सूर्य परिधान
केलेली एक स्त्री मी पाहिली. तिच्या पायाखाली चंद्र होता.
तिच्या डोक्यावर बारा ताऱ्यांचा मुकुट होता. 2 ती गर्भवती होती आणि
प्रसूतीची वाट पाहत प्रसूती वेदनांनी ओरडत होती. 3 तोच स्वर्गामध्ये
दुसरे चिन्ह दिसले: एकाएकी सात डोकी आणि दहा शिंगे असलेला एक
प्रचंड अग्निवर्ण अजगर दृश्यमान झाला. त्याच्या डोक्यांवर सात मुकुट
होते. 4 त्याने आपल्या शेपटाने एकतृतीयांश तारे ओढून घेतले आणि
त्यांना पृथ्वीवर खाली लोटून दिले. मग तो अजगर, त्या स्त्रीचे मूल
जन्मल्या बरोबर ते खाऊन टाकावे, या उद्देशाने तिच्यासमोर जाऊन उभा
राहिला. 5 त्या स्त्रीने एका अशा मुलाला जन्म दिला, “की जो सर्व
राष्ट्रांवर लोह-राजदंडाने राज्य करणार होता.” त्या मुलाला परमेश्वरापुढे
व राजासनापुढे उचलून नेण्यात आले. 6 ती स्त्री अरण्यात पळून गेली.
तिथे तिचे 1,260 दिवस पोषण करण्याकरिता परमेश्वराने तिच्यासाठी
एक जागा तयार करून ठेवली होती. 7 मग स्वर्गात युद्ध सुरू झाले.
मिखाएल व त्याचे दूत अजगराविरूद्ध लढले आणि त्यांच्याबरोबर अजगर
व त्याच्या दूतांनी युद्ध केले. 8 पुरेसे सामर्थ्य नसल्यामुळे युद्धात त्यांचा
पराजय झाला आणि ते स्वर्गातील त्यांचे स्थान हरवून बसले. 9 तो
प्रचंड अजगर, म्हणजे दियाबल किंवा सैतान म्हटलेला, सर्व जगाला
फसविणारा प्राचीन सर्प, याला त्याच्या सर्व दूतांसह पृथ्वीवर लोटून
देण्यात आले. 10 तेव्हा स्वर्गातून आलेली एक उच्च स्वरातील वाणी
मी ऐकली. ती म्हणाली, “परमेश्वराचे तारण, सामर्थ्य व त्यांचे राज्य
आणि त्यांच्या ख्रिस्ताचा अधिकार यांचा उदय झाला आहे; कारण
आमच्या बंधुजनावर आरोप ठेवणाऱ्याला स्वर्गातून पृथ्वीवर ढकलून
दिले आहे. तो रात्रंदिवस आमच्या परमेश्वरासमोर त्यांच्यावर दोषारोप
करीत असे! 11 पण आमच्या बंधुजनांनी कोकराच्या रक्ताने आणि
आपल्या साक्षीच्या वचनाने त्याचा पाडाव केला. स्वत:च्या जिवावर प्रेम
न करता त्यांनी मरण सोसले. 12 म्हणून अहो स्वर्गांनो व स्वर्गातील
नागरिकांनो, उल्लास करा! पण पृथ्वी व समुद्रा तुम्हाला हाय, हाय!
कारण आता आपल्यासाठी अगदीच थोडका काळ बाकी आहे, हे
ओळखून सैतान अतिशय क्रोधाविष्ट होऊन तुमच्याकडे आला आहे.”
13 आपल्याला पृथ्वीवर लोटून दिले आहे हे अजगराच्या लक्षात आले,
तेव्हा जिने पुरुष संतानाला जन्म दिला होता, त्या स्त्रीचा त्याने पाठलाग
केला. 14 पण तिच्यासाठी अरण्यात तयार केलेल्या जागी तिने उडून
जावे म्हणून तिला मोठ्या गरुडाच्या पंखांसारखे दोन पंख देण्यात आले.

तिथे तिचे साडेतीन वर्षे पोषण व त्या अजगरापासून रक्षण व्हावयाचे होते. 15 तेव्हा त्या स्त्रीचा नायनाट करण्यासाठी त्या सर्पाच्या तोंडातून नदीच्या पाण्यासारखा एक महापूर बाहेर आला व तिच्या रोखाने जोरात वाहत गेला. 16 पण तेवढ्यात पृथ्वीने आपले तोंड उघडले आणि तो महापूर गिळून घेऊन अजगरापासून त्या स्त्रीचा बचाव केला. 17 तेव्हा संतापलेला अजगर त्या स्त्रीच्या इतर मुलांना, म्हणजे जी सर्व मुले परमेश्वराच्या आज्ञा पाळीत आणि आपण येशूंचे आहोत अशी साक्ष देत असत, त्यांच्यावर हल्ला करण्यास सिद्ध झाला.

**13** तो अजगर वाट पाहत समुद्रकिनाऱ्यावर उभा राहिला. मग मी माझ्या दृष्टान्तात एक विचित्र पशू समुद्रातून वर चढून येताना पाहिला. त्याला सात डोकी व दहा शिंगे होती. या शिंगावर दहा मुकुट होते. त्या पशूच्या प्रत्येक डोक्यावर परमेश्वर निंदक नावे लिहिलेली होती. 2 हा पशू दिसावयास चित्त्यासारखा होता, पण त्याचे पाय अस्वलासारखे व तोंड सिंहासारखे होते. अजगराने त्याला स्वतःचे सामर्थ्य, आसन व मोठा अधिकार दिला. 3 त्याच्या एका डोक्यावर प्राणघातक जखम झाल्यासारखे मला दिसले. पण ती प्राणघातक जखम बरी झाली. या चमत्काराने सारे जग आश्चर्यचकित झाले आणि त्या पशूला अनुसरले. 4 त्या अजगराने दुष्ट पशूला अधिकार दिले म्हणून लोक अजगराची आणि त्या दुष्ट पशूचीही उपासना करू लागले. त्यांनी उद्गार काढले, “याच्यासारखा महान कोणी आहे काय? याच्याशी युद्ध करण्यास कोणी समर्थ आहे काय?” 5 त्या पशूला गर्विष्ठ उद्गार काढणारे, दुर्भाषणे करणारे तोंड देण्यात आले होते. तसेच बेचाळीस महिने आपला अधिकार गाजविण्याचे त्याला स्वातंत्र्य देण्यात आले होते. 6 तो पशू परमेश्वराचे नाव, मंदिर व स्वर्गात निवास करणाऱ्या सर्वांची निंदा करीत राहिला. 7 अजगराने त्याला परमेश्वराच्या पवित्र लोकांविरुद्ध लढून त्यांच्यावर विजय मिळविण्याचे सामर्थ्य दिले. आणि प्रत्येक वंश, लोक, भाषा व राष्ट्रे यावर सत्ता गाजविण्याचा त्याला अधिकार दिला. 8 पृथ्वीवरील ते सर्व लोक ज्यांची नावे जगाच्या उत्पत्तीपासून वधलेल्या कोकराच्या जीवनाच्या पुस्तकात लिहिलेली नाहीत ते त्या पशूची उपासना करतील. 9 ज्याला ऐकावयास कान आहे, त्या प्रत्येकाने ऐकावे: 10 “जर कोणाला तुरुंगवास घडणार असेल, तर ते तुरुंगवासात जातील. जर एखाद्याला तलवारीने ठार मारणे आहे, तर तलवारीने ते मारले जातील.” परमेश्वराच्या लोकांनी धीराने सहन करण्याची व आपला दृढविश्वास ठेवण्याची आवश्यकता आहे. 11 मग मी दुसरा एक पशू पाहिला. तो पृथ्वीतून वर येत होता. त्याला कोकऱ्याच्या शिंगांसारखी दोन शिंगे होती, पण त्याचा आवाज अजगरासारखा होता. 12 प्राणघातक जखम बरी झालेल्या त्या पहिल्या पशूच्या प्रतिनिधी सारखा सर्व अधिकार त्याने चालविला व सर्व जगास त्या पहिल्या पशूला नमन करविले. 13 त्याने महान चमत्कार केले, सर्वांच्या डोळयांदेखत आकाशातून पृथ्वीवर अग्निज्वाला आणल्या. 14 कारण पहिल्या पशूच्या प्रतिनिधी प्रमाणे या पशूने अद्भुत चिन्हे करून पृथ्वीवरील रहिवाशांना फसविले. तलवारीने प्राणांतिक जखम होऊनही पुन्हा जिवंत झालेल्या त्या पहिल्या पशूची मोठी मूर्ती उभारावी, असा त्याने जगातील लोकांना हुकूम केला. 15 या पहिल्या पशूच्या मूर्तीमध्ये प्राण घालून तिला बोलण्याची शक्ती देण्याचीही दुसऱ्या पशूला परवानगी देण्यात आली होती. मग खुद्द त्या मूर्तीनेच हुकूम सोडला: “जो कोणी त्या पशूच्या मूर्तीला नमन करण्याचे नाकारील, त्याला ठार मारले जाईल.” 16 त्याने असेही फर्मान काढले की लहान थोर, श्रीमंत व गरीब, स्वतंत्र व दास या सर्वांनी आपल्या उजव्या हातावर किंवा कपाळावर एक खूण गोंदून घ्यावी. 17 त्या पहिल्या पशूची खूण किंवा त्याच्या नावाचा सांकेतिक आकडा त्यांच्यावर असल्याशिवाय कोणालाही विकत घेता येणार नाही किंवा विकता येणार नाही. 18 हे समजण्यासाठी सुज्ञतेची आवश्यकता आहे. कोणाजवळ अंतर्ज्ञान असेल, तर त्याने त्या पशूच्या संख्येचा हिशोब करावा, कारण ती एका मनुष्याच्या नावाची सांकेतिक संख्या आहे. ती संख्या 666 अशी आहे.

**14** नंतर सीयोन पर्वतावर एक कोकरा उभा असलेला मी पाहिला. ज्यांच्या कपाळावर त्यांचे व त्यांच्या पित्याचे नाव लिहिले होते, असे 1,44,000 लोक त्याच्याबरोबर होते. 2 मग मी स्वर्गातून तो मोठ्या धबधब्याच्या गर्जनेसारखा आणि मेघांच्या मोठ्या गडगडाटासारखा एक ध्वनी ऐकला. तो अनेक वीणावादक आपआपल्या वीणा वाजवित असल्यासारखा होता. 3 लोकांचा हा अतिभव्य गायकवृंद परमेश्वराचे राजासन, चार सजीव प्राणी व चोवीस वडीलजन यांच्यासमोर एक नवे गीत गात होता. पृथ्वीवरून खंडणी भरून सोडविलेल्या या 1,44,000 लोकांशिवाय दुसऱ्या कोणालाही हे गाणे शिकता येत नव्हते. 4 कारण त्यांनी स्वतःला शुद्ध राखलेले आहे आणि स्त्रीसंगाने ते मलीन झालेले नाहीत. जिथे कुठे कोकरा जातो, तिथे ते त्याच्यामागे जातात. त्यांना माणसातून विकत घेण्यात आले होते आणि परमेश्वराला व कोकऱ्याला प्रथमफळ म्हणून अर्पण केले होते. 5 असत्य भाषण कधीही त्यांच्या मुखातून निघाले नाही; ते निष्कलंक आहेत. 6 नंतर मी अंतराळाच्या मध्यभागी दुसरा एक देवदूत उडतांना पाहिला. पृथ्वीवर राहणाऱ्या सर्वांना, म्हणजे प्रत्येक राष्ट्र, वंश, भाषा व लोकांना सांगण्यासाठी तो सर्वकालची शुभवार्ता घेऊन चालला होता. (aiōnios g166) 7 तो मोठ्या आवाजात म्हणाला, “परमेश्वराचे भय धरा व त्यांना गौरव द्या! कारण त्यांनी न्यायनिवाडा करावा अशी वेळ आता आली आहे. ज्यांनी आकाश, पृथ्वी, समुद्र आणि पाण्याचे झरे निर्माण केले, त्यांची उपासना करा.” 8 तेव्हा त्याच्या पाठोपाठ दुसरा एक देवदूत आला. तो म्हणत होता, “‘पडले! महान बाबिलोन शहर पडले!’ ज्या शहराने सर्व राष्ट्रांना आपल्या व्यभिचाराचे वेड लावणारे द्राक्षमद्य पाजले, ते पडले.” 9 मग त्यांच्यामागून एक तिसरा देवदूत मोठ्याने घोषणा करीत आला: “समुद्रातील पहिल्या पशूला व त्याच्या मूर्तीला जो कोणी नमन करेल आणि त्याचे चिन्ह आपल्या कपाळावर किंवा हातावर गोंदून घेईल, 10 त्या प्रत्येकाला परमेश्वराच्या क्रोधाचा द्राक्षमद्याचा प्याला, त्याची तीव्रता कमी न करता प्यावा लागेल. पवित्र देवदूत व कोकरा यांच्यासमक्ष या सर्वांचा जळत्या गंधकाने छळ करण्यात येईल. 11 त्यांच्या छळाचा धूर

युगानुयुग वर चढत राहील आणि त्यातून त्यांची रात्री किंवा दिवसा कधीच सुटका होत नाही. कारण त्यांनी त्या पहिल्या पशूला व त्याच्या मूर्तीला नमन केले, आणि त्याच्या नावाची सांकेतिक खूण गोंदून घेतली. (aiōn g165) 12 कारण येशूंवर विश्वास ठेवणारे व अखेरपर्यंत परमेश्वराच्या आज्ञा पाळणाऱ्या पवित्र लोकांना यामुळे धीराने प्रत्येक छळ सहन करण्याची आता आवश्यकता आहे." 13 मग मला आकाशातून एक वाणी ऐकू आली. ती मला म्हणाली "हे लिही: आतापासून प्रभूमध्ये मृत झालेले ते धन्य." आत्मा म्हणतो, "होय, कारण आता सर्व श्रमापासून त्यांना विश्रांती मिळेल. त्यांची सत्कृत्ये त्यांच्या मागोमाग जातील." 14 मग मी पाहिले तो मला एक पांढरा मेघ दिसला, त्या मेघावर मनुष्याच्या पुत्रासारखे कोणी एक बसले होते. त्यांच्या मस्तकावर सोन्याचा मुकुट व हातात धारदार विळा होता. 15 मग मंदिरातून एक देवदूत बाहेर आला व मेघावर बसलेल्यास उच्चस्वराने हाक मारून म्हणाला, "तुमचा विळा घ्या आणि कापणीस प्रारंभ करा, कारण पृथ्वीचे पीक तयार झाले आहे व कापणी करण्याची वेळ आली आहे." 16 तेव्हा मेघावर बसलेल्याने आपला विळा पृथ्वीवर चालविला आणि पृथ्वीची कापणी झाली. 17 यानंतर स्वर्गातील मंदिरातून आणखी एक देवदूत निघाला आणि त्याच्याजवळही एक धारदार विळा होता. 18 दुसरा एक देवदूत ज्याला अग्नीवर अधिकार होता तो वेदीतून बाहेर आला आणि विळा घेतलेल्या देवदूताला मोठ्याने म्हणाला, "पृथ्वीवरील द्राक्षवेलींना लागलेले द्राक्षांचे घोस, विळा चालवून कापून घे. कारण ते पिकले आहेत." 19 तेव्हा त्या देवदूताने पृथ्वीवर आपला विळा चालविला आणि द्राक्षे गोळा करून, रस काढण्यासाठी ती परमेश्वराच्या क्रोधाच्या मोठ्या द्राक्षकुंडात टाकली. 20 ते द्राक्षकुंड शहराबाहेर तुडविण्यात आले, तेव्हा त्यातून रक्ताचा पाट वाहिला. हा पाट घोड्यांच्या लगामा एवढा उंच आणि तीनशे किलोमीटर लांब होता.

**15** आणि मी स्वर्गात आणखी एक महान व आश्चर्यकारक चिन्ह पाहिले: अखेरच्या सात पीडा घेतलेले सात देवदूत. त्या पीडानंतर परमेश्वराचा क्रोध समाप्त झाला. 2 मग माझ्यासमोर अग्निमिश्रित काचेच्या समुद्रासारखे काहीतरी मी पाहिले. पहिला पशू, त्याची मूर्ती, त्याची खूण व त्याच्या नावाची संख्या, या सर्वांवर विजय संपादन केलेले सर्वजण, काचेच्या समुद्राच्या किनारीवर उभे होते. सर्वांच्या हातात परमेश्वराने दिलेल्या वीणा होत्या. 3 ते परमेश्वराचा सेवक मोशेचे आणि कोकऱ्याचे गीत गात होते: "हे सर्वसमर्थ प्रभू परमेश्वरा! तुमची कृत्ये थोर आणि अलौकिक आहेत! हे राष्ट्रांच्या राजा, तुमचे मार्ग नीतीचे आणि सत्याचे आहेत! 4 हे प्रभू, असा कोण आहे जो तुमचे भय धरणार नाही, आणि तुमच्या नावाचे गौरव करणार नाही? कारण तुम्हीच पवित्र आहात! सर्व राष्ट्रे येऊन तुमची आराधना करतील, कारण तुमची न्याय्य कृत्ये प्रकट झाली आहेत." 5 मग मी पाहिले, तो स्वर्गातील मंदिराचे साक्षीचे परमपवित्रस्थान उघडलेले मला दिसले. 6 ज्यांना पृथ्वीवर सात पीडा ओतण्याचे काम नेमून देण्यात आले होते, ते सात देवदूत त्या मंदिरातून बाहेर आले. त्यांनी डागविरहीत आणि तेजस्वी तागाची वस्त्रे परिधान केली होती; त्यांच्या छातीवर सोन्याचे पट्टे बांधले होते. 7 त्या चार सजीव प्राण्यांतील एकाने, त्या सात देवदूतांना युगानुयुग जिवंत असणाऱ्या परमेश्वराच्या क्रोधाने भरलेल्या सात सोन्याच्या वाट्या दिल्या. (aiōn g165) 8 त्यांचे गौरव व सामर्थ्य यातून निघालेल्या धुराने मंदिर भरून गेले. सात देवदूतांचे सात पीडा ओतण्याचे काम संपेपर्यंत कोणालाही मंदिरात जाता आले नाही.

**16** नंतर मी मंदिरातून निघालेली एक मोठी वाणी सात देवदूतांना म्हणतांना ऐकली, "जा, परमेश्वराच्या क्रोधाच्या सात वाट्या पृथ्वीवर ओता." 2 त्याप्रमाणे, पहिला देवदूत मंदिरातून निघाला. त्याने आपली वाटी पृथ्वीवर ओतली, तेव्हा ज्या लोकांवर पशूची खूण होती व ज्यांनी त्याच्या मूर्तीला नमन केले होते, अशा प्रत्येकाला चिघळलेले आणि क्लेशदायक फोड आले. 3 दुसऱ्या देवदूताने आपले वाटी समुद्रावर ओतली, तेव्हा समुद्राचे पाणी मेलेल्या माणसाच्या रक्तासारखे रक्तमय झाले आणि त्यातील सर्व जिवंत प्राणी मरण पावले. 4 तिसऱ्या देवदूताने त्याची वाटी नद्यांवर आणि झऱ्यावर ओतली आणि ते पाणी रक्तमय झाले. 5 मग मी जलांच्या देवदूताला जाहीर करताना ऐकले: "जे तुम्ही आहात, जे तुम्ही होता, ते तुम्ही हे पवित्र प्रभू, हा न्यायनिवाडा करण्यास तुम्ही न्यायी आहात. 6 कारण त्यांनी तुमच्या पवित्र जणांचे आणि संदेष्ट्यांचे रक्त सांडले, आणि आता तुम्ही त्यांना रक्त प्यावयास लावले आहे, त्याला ते पात्र आहेत." 7 नंतर वेदीला असे म्हणताना मी ऐकले: "खरोखर, हे सर्वसमर्थ प्रभू परमेश्वरा, तुमचे न्याय न्यायी व सत्य आहेत." 8 मग चौथ्या देवदूताने आपली वाटी सूर्यावर ओतली आणि सर्व माणसांना सूर्याच्या अग्नीने भाजून काढण्याची परवानगी देण्यात आली. 9 माणसे तीव्र उष्णतेने करपून गेली, तेव्हा या पीडांवर ज्यांचे नियंत्रण आहे त्या परमेश्वराच्या नावाला शाप दिला, परंतु त्यांनी पश्चात्ताप केला नाही आणि परमेश्वराचे गौरव केले नाही. 10 मग पाचव्या देवदूताने आपली वाटी समुद्रातील पशूच्या आसनावर ओतली. तेव्हा त्याचे संपूर्ण राज्य अंधकारमय झाले आणि त्याच्या प्रजाजनांनी असह्य वेदनांमुळे आपल्या जिभा चावल्या. 11 आपल्या वेदना आणि फोड याबद्दल त्यांनी स्वर्गातील परमेश्वराला शाप दिले. पण आपल्या दुष्कृत्यांबद्दल पश्चात्ताप करण्याचे त्यांनी नाकारले. 12 सहाव्या देवदूताने आपली वाटी यूफ्रेटीस महानदीवर ओतली, तेव्हा पूर्वेकडून येणाऱ्या राजांचा मार्ग सिद्ध व्हावा म्हणून तिचे पाणी आटून गेले. 13 नंतर बेडकासारखे दिसणारे तीन अशुद्ध आत्मे अजगराच्या तोंडातून, पशूच्या तोंडातून व खोट्या संदेष्ट्यांच्या तोंडामधून निघताना मी पाहिले. 14 चमत्कार करणारे हे दुरात्मे जगातील सर्व राजांकडे जाऊन सर्वसमर्थ परमेश्वराच्या दिवशी युद्धासाठी त्यांना एकत्र करतात. 15 "पाहा! जसा चोर येतो तसा मी येईन! जे आपली वस्त्रे घालून तयार होऊन माझी वाट पाहत आहेत, ते धन्य! त्यांना नग्नावस्थेत आणि लज्जास्पद स्थितीत चालावे लागणार नाही." 16 मग त्या तिघांनी जगातील सर्व राजांना, हिब्रू भाषेत हर्मगिदोन म्हटलेल्या ठिकाणी एकत्र केले. 17 मग सातव्या देवदूताने आपली वाटी अंतराळात ओतली;

तेव्हा मंदिरात असलेल्या राजासनावरून एक मोठी वाणी निघाली. ती
म्हणाली, “पूर्ण झाले आहे!” 18 मग मेघगर्जना, व आकाश दणाणून
सोडणारा गडगडाट झाला. विजा चमकल्या आणि मानवी इतिहासात
कधी झाला नव्हता इतका मोठा व तीव्र स्वरुपाचा भूमिकंप झाला. 19
त्या मोठ्या शहराचे तीन भाग झाले. राष्ट्रांची नगरे उद्ध्वस्त झाली.
महान बाबिलोन नगरीचे परमेश्वराला स्मरण झाले व त्यांनी तिला त्यांचा
क्रोधरूपी द्राक्षारसाचा प्याला प्यावयास लावला. 20 प्रत्येक बेट नाहीसे
झाले; पर्वत सपाट झाले. 21 प्रत्येकी सुमारे पन्नास कि. ग्रॅ. वजनाच्या
प्रचंड गारा आकाशातून माणसांवर पडल्या. गारांच्या पीडांमुळे लोकांनी
परमेश्वराला शाप दिले, कारण त्या गारांची पीडा फार भयानक होती.

**17** पीडांची वाटी ओतणाऱ्या त्या सात देवदूतांपैकी एक देवदूत
माझ्याकडे आला व मला म्हणाला, “माझ्याबरोबर ये, म्हणजे मी
तुला अनेक जलप्रवाहांवर बसलेल्या त्या मोठ्या वेश्येचा न्याय कसा
होणार आहे ते दाखवेन. 2 पृथ्वीवरील राजांनी तिच्याशी व्यभिचार केला
आणि पृथ्वीवरील लोक त्यांच्या जारकर्माचे मद्य पिऊन झिंगले.” 3
नंतर मी आत्म्याने संचरित असताना देवदूताने मला रानात नेले. तिथे
किरमिजी रंगाचे श्वापद व त्यावर परमेश्वर निंदात्मक नावे असून त्याला
सात डोकी व दहा शिंगे होती व एक स्त्री त्यावर बसलेली मला दिसली.
4 त्या स्त्रीने जांभळी व किरमिजी वस्त्रे घातली होती आणि सोने,
मौल्यवान रत्ने व मोती यांनी ती शृंगारलेली होती. तिच्या हातात अमंगळ
पदार्थांनी आणि तिच्या जारकर्मांच्या अशुद्धतेने भरलेला सोन्याचा प्याला
होता. 5 तिच्या कपाळावर लिहिलेले नाव एक गूढ अर्थाचे होते: महान
बाबिलोन, पृथ्वीवरील वेश्यांची व अमंगळ गोष्टींची माता. 6 मी बघितले
की येशूंसाठी हुतात्मे झालेल्या पवित्र लोकांचे रक्त पिऊन ती झिंगली
होती. अचंबित होऊन मी तिच्याकडे पाहत राहिलो. 7 तेव्हा देवदूत
मला म्हणाले: “तू एवढा आश्चर्यचकित का झालास? ती स्त्री कोण
आहे आणि ज्या सात डोक्यांच्या आणि दहा शिंगांच्या पशूवर ती स्वार
झाली आहे, तो पशू कोण आहे, याचे रहस्य मी तुला सांगतो. 8 तो
पशू जो तुम्ही पाहिला होता, जो होता, पण आता नाही. तरी लवकरच
तो अथांग कूपातून वर येईल आणि सार्वकालिक विनाशाकडे जाईल.
पृथ्वीवरील लोकांपैकी ज्यांची नावे जगाच्या उत्पत्तीपासून जीवनाच्या
पुस्तकात लिहिलेली नाहीत, ते सर्व लोक पशूला पाहून थक्क होतील.
जो पूर्वी होता, आता नाही, पण पुन्हा परत येणार. (Abyssos g12) 9
“हे समजण्यासाठी ज्ञानाची आवश्यकता आहे. ती सात डोकी म्हणजे
सात टेकड्या आहेत त्यावर ती स्त्री बसते. 10 त्याचप्रमाणे ती सात
डोकी, सात राजांची प्रतिके आहेत. त्यापैकी पाच राजे आधी पतन
पावले आहेत. सध्या सहावा राजा राज्य करीत आहे आणि सातवा
अजून यावयाचा आहे; पण त्याची कारकीर्द अल्पकाळच टिकेल. 11 जो
पशू आधी होता, पण आता नाही, तो आठवा राजा असून, सातापैकी
एक आहे, नंतर त्याचाही नाश होईल. 12 “त्या पशूची दहा शिंगे म्हणजे
दहा राजे असून, ते अजून सत्तेवर आलेले नाहीत. त्यांनीही या पशूबरोबर
राज्य करावे, म्हणून त्यांना एका तासापुरती सत्ता देण्यात येईल. 13 त्या
सर्वांचा एकच उद्देश आहे, ते पशूला आपले सामर्थ्य व अधिकार बहाल
करतील. 14 ते सर्वजण मिळून कोकऱ्या विरुद्ध युद्ध पुकारतील. परंतु
कोकरा त्यांच्यावर विजय मिळवेल, कारण तो प्रभूंचा प्रभू आणि राजांचा
राजा आहे आणि त्यांनी पाचारण केलेले, निवडलेले आणि विश्वासू
अनुयायी त्यांच्याबरोबर असतील.” 15 तेव्हा देवदूत मला म्हणाला,
“ती वेश्या ज्यांच्यावर बसली आहे, ते जलप्रवाह म्हणजे प्रत्येक लोक,
समुदाय, राष्ट्र व भाषा आहेत. 16 तो पशू व जी दहा शिंगे तू पाहिली, ते
वेश्येचा द्वेष करतात; ते तिच्यावर हल्ला करतील आणि तिला नग्न
करून तिचे मांस खातील व तिला अग्नीने जाळून टाकतील. 17 कारण
परमेश्वर आपला उद्देश पूर्ण करण्यासाठी त्यांच्या मनात एक योजना
घालेल. आपले सर्व अधिकार परमेश्वराचे वचन पूर्ण होईपर्यंत त्या शेंदरी
पशूला देण्याचे ते एकमताने आपसात ठरवतील. 18 तुझ्या दृष्टान्तात तू
पाहिलेली स्त्री, पृथ्वीच्या राजांवर सत्ता गाजवणाऱ्या महानगरीचे दर्शक
आहे.”

**18** त्यानंतर स्वर्गातून दुसरा एक देवदूत खाली उतरतांना मी पाहिला.
त्याला मोठा अधिकार देण्यात आला होता. त्याच्या प्रखर तेजाने
पृथ्वी उजळून निघाली. 2 तो देवदूत मोठ्याने ओरडून म्हणाला:
“‘पडले! महान बाबिलोन शहर पडले!’ ती भुतांची वस्ती व सर्वप्रकारच्या
अशुद्ध आत्म्यांचा आश्रय, व सर्वप्रकारच्या गलिच्छ, ओंगळ पक्ष्यांचा
आश्रय अशी झाली आहे! 3 तिच्या व्यभिचाराचे वेड लावणारे द्राक्षमद्य
सर्व राष्ट्रांनी प्राशन केले आहे. पृथ्वीवरील राजांनी तिच्याशी जारकर्म
केले आहे, आणि जगातील व्यापारी तिच्या भोग विलासी धनामुळे
श्रीमंत झाले आहेत.” 4 मग मी स्वर्गातून निघालेली दुसरी एक वाणी
ऐकली, ती म्हणाली: “‘माझ्या लोकांनो, तिच्यापासून दूर व्हा,’ तिच्या
पापात वाटेकरी होऊ नका, नाही तर, तिच्याबरोबर तुम्हालाही पीडा
भोगावी लागेल. 5 कारण तिच्या पापांची रास स्वर्गापर्यंत उंच गेली
आहे, आणि परमेश्वराने तिच्या गुन्ह्याची आठवण केली आहे. 6 तिने
जसे तुम्हाला केले, तसेच तिला करा; तिने केलेल्या दुष्कृत्यांबद्दल
तिला दुप्पट शिक्षा करा. तिच्या प्याल्यात तिच्याच प्याल्यातून दुप्पट
ओता.” 7 तिने आपले सगळे आयुष्य विलासात आणि ऐषआरामात
घालविले आहे, आता त्याच मानाने तिला यातना आणि दुःख द्या. ती
आपल्या अंतःकरणात बढाया मारून म्हणते, “मी महाराणी होऊन
माझ्या सिंहासनावर बसलेली आहे. मी काही विधवा नाही. मला कधीच
दुःखाचा अनुभव येणार नाही.” 8 म्हणूनच तिला मरण, शोक व दुष्काळ
या सर्वांच्या पीडा एकाच दिवशी भोगाव्या लागतील. अग्नीने तिला
जाळून टाकण्यात येईल. सर्वसमर्थ प्रभू परमेश्वर तिचा न्यायनिवाडा
करणार आहेत. 9 “पृथ्वीवरील ज्या राजांनी, तिच्याबरोबर व्यभिचार
केला व तिच्या विलासामध्ये सामील झाले होते. ते तिच्या पीडेच्या
भयामुळे दूर उभे राहून तिच्या जळण्याचा धूर पाहतील, 10 तेव्हा ते
तिच्याकरिता ऊर बडवून शोक करतील. ते म्हणतील: “‘हाय हाय!
महान बाबिलोन नगरी, ती सामर्थ्यशाली नगरी! एका क्षणात तिच्यावर
न्यायाची कुऱ्हाड कोसळली आहे!’ 11 “पृथ्वीवरील व्यापारी तिच्यासाठी

रडून शोक करतील, कारण आता त्यांचा माल विकत घेण्यास कोणीच
उरले नाही: 12 सोने, चांदी, हिरे, रत्ने, तलम कापड, जांभळे आणि
किरमिजी रेशमी कापड, सर्वप्रकारचे चंदनी व सुगंधी लाकूड, हस्तदंती
माल, मोलवान लाकडाचे कोरीव नक्षीकाम, कास्य, लोखंड, संगमरवरी
दगड, 13 तसेच दालचिनी व मसाले, उटणी, धूप, अत्तर, ऊद, द्राक्षारस,
जैतुनाचे तेल, उत्तम सपीठ व गहू, गुरे, मेंढरे, घोडे, रथ, गुलाम म्हणून
विकण्यात येणारे लोक. 14 “ते म्हणतील, ‘ज्या फळांची तुझ्या जीवाला
वासना होती ती तुझ्यापासून घेतली गेली आहेत, सर्व विलास आणि
वैभवी गोष्टी तुझ्यापुढून गेली आहेत; त्याचा तुला कधीच पुनर्लाभ
होणार नाही.’ 15 जे व्यापारी तिला हे पदार्थ विकून श्रीमंत झाले,
ते आता तिची पीडा बघून भयभीत होतील. दूर उभे राहून रडत व
शोक करतील. 16 ते आक्रोश करून म्हणतील: “‘हाय! हाय! ही
इतकी सुंदर महानगरी! जांभळ्या, किरमिजी तलम वस्त्रांनी सजलेल्या,
सोन्यामोत्यांच्या अलंकारांनी नटलेल्या स्त्रीसारखी ही सुंदर महानगरी!
17 एका क्षणात तिची सर्व संपत्ती नष्ट झाली!’ “प्रत्येक जहाजाचे कप्तान
आणि खलाशी व समुद्रापासून उत्पन्न मिळविणारे सर्वजण दूर अंतरावर
उभे राहतील, 18 धुराच्या उसळणाऱ्या लोटांकडे पाहत शोकाकुल होऊन
ते रडत म्हणतील, ‘या महान नगरीसारखी दुसरी नगरी सर्व जगात
शोधून तरी सापडेल काय?’ 19 मोठ्या दु:खाने आपल्या डोक्यात धूळ
टाकून ते रडत व आक्रोश करीत म्हणतील: “‘हाय, हाय! किती महान
नगरी होती ही! ज्या सर्वांकडे जहाजे होती ते तिच्यामुळेच श्रीमंत झाले,
आणि आता ती एका तासात उद्ध्वस्त झाली!’ 20 “पण हे स्वर्गा! तिचा
शेवट झाला म्हणून तू आनंद कर! आणि तुम्ही, परमेश्वराच्या मुलांनो,
संदेष्ट्यांनो, प्रेषितांनो, तुम्हीही आनंद करा! कारण तिने तुमच्यावर
लादलेल्या न्यायाविरुद्ध परमेश्वराने तुमच्या बाजूने न्यायनिवाडा केला
आहे.” 21 मग एका बलवान देवदूताने, जात्याच्या तळीच्या आकाराचा
एक मोठा दगड उचलून समुद्रात टाकला व तो ओरडून म्हणाला: “ते
महान नगर बाबिलोन अशाच हिंसक रीतीने खाली फेकले जाईल व ते
कायमचे नाहीसे होईल.” 22 त्या नगरीत आता कर्णे, वीणा, बासरी,
यांचा सूरही कधी ऐकू येणार नाही. तिथे कसल्याच प्रकारचे उद्योगधंदे
पुन्हा आढळणार नाहीत. तिथे गिरणीचा आवाज पुन्हा ऐकू येणार नाही.
23 दिव्यांचा प्रकाश यापुढे तुझ्यावर उजळणार नाही आणि वधूवरांची
वाणी पुन्हा ऐकू येणार नाही. तुझे व्यापारी पृथ्वीवरील थोर लोक होते.
सर्व राष्ट्रे तुझ्या चेटकाने ठकविली गेली होती. 24 पृथ्वीवर सांडलेले सर्व
संदेष्टे आणि पवित्रजन, यांचे रक्त तिच्यामध्ये आढळले.

**19** यानंतर मी ऐकले, स्वर्गात जणू काही एक मोठा जनसमुदाय
गर्जना करून म्हणत आहे: “हाल्लेलूयाह! तारण, गौरव व
सामर्थ्य ही आमच्या परमेश्वराची आहेत! 2 कारण त्यांचे निर्णय सत्य
व न्याय्य आहेत. ज्या मोठ्या वेश्येने आपल्या जारकर्माने पृथ्वी भ्रष्ट
केली होती, तिला त्यांनी दंड केला आहे आणि आपल्या सेवकांच्या
रक्ताबद्दल तिचा सूड उगवला आहे.” 3 आणि पुन्हा त्यांनी घोषणा
केली: “हाल्लेलूयाह” तिचा धूर सदासर्वकाळ वर जात आहे. **(aiōn g165)**
4 तेव्हा ते चोवीस वडीलजन व चार सजीव प्राणी यांनी राजासनावर
बसलेल्या परमेश्वरासमोर दंडवत घालून त्यांना नमन करीत म्हटले,
“आमेन! हाल्लेलूयाह!” 5 तेव्हा राजासनातून एक वाणी निघाली.
ती म्हणाली, “परमेश्वराचे भय बाळगणाऱ्या त्यांच्या सर्व लहान थोर
सेवकहो, आपल्या परमेश्वराचे स्तवन करा.” 6 नंतर मी एका विराट
लोक समुदायाची, पाण्याच्या उसळत्या प्रवाहासारखी गर्जना किंवा
विजांच्या प्रचंड गडगडाटासारखी एक वाणी मी ऐकली. ती म्हणाली,
“हाल्लेलूयाह, कारण आमचे प्रभू, सर्वसमर्थ परमेश्वर, राज्य करतात!
7 चला, आपण आनंदोत्सव करू, उल्लास करू व त्यांचे गौरव करू,
कारण कोकऱ्याच्या विवाहाची वेळ झाली आहे. त्यांच्या वधूने स्वत:ला
सजविले आहे. 8 तिला तेजस्वी व शुद्ध असे तागाचे तलम वस्त्र
परिधान करावयास दिले आहे,” ते तागाचे तलम वस्त्र म्हणजे पवित्र
लोकांची नीतिकृत्ये आहेत. 9 तेव्हा तो देवदूत मला म्हणाला, असे लिही
“कोकराच्या विवाहाच्या मेजवानीस आमंत्रित केलेले ते धन्य!” तो मला
असेही म्हणाला, “ही परमेश्वराची सत्यवचने आहेत.” 10 तेव्हा त्याला
नमन करावे म्हणून मी त्याच्या पायांवर पडलो. पण त्याने मला म्हटले,
“असे करू नको! कारण मी तुझ्यासारखा आणि येशूंवरील आपल्या
विश्वासाची साक्ष देणाऱ्या तुझ्या बांधवांसारखाच परमेश्वराचा एक सेवक
आहे, परमेश्वरालाच नमन कर! कारण येशूंची साक्ष देणे हाच संदेशाचा
आत्मा आहे.” 11 तेव्हा मी स्वर्ग उघडलेला पाहिला आणि माझ्यासमोर
एक पांढरा घोडा व त्यावर जो बसला होता त्याचे नाव “विश्वासू आणि
खरा” आहे. तो नीतीने न्याय आणि युद्ध करतो. 12 त्याचे डोळे अग्नीच्या
ज्वालेसारखे होते व त्याच्या डोक्यावर अनेक मुकुट होते. त्याच्यावर एक
नाव लिहिलेले होते ते त्याच्यावाचून कोणाला कळत नाही. 13 त्याने
रक्तात बुचकळलेली वस्त्रे पांघरलेली होती. “परमेश्वराचा शब्द” हे त्याचे
नाव होते. 14 स्वर्गातील सैन्य उत्तम, तलम, पांढरी स्वच्छ वस्त्रे परिधान
करून आणि पांढऱ्या घोड्यांवर स्वार होऊन त्यांच्यामागून चालत होते.
15 “त्यांनी राष्ट्रांवर वार करावा म्हणून त्याच्या तोंडातून तीक्ष्ण तलवार
निघाली.” ते त्यावर लोह-राजदंडाने अधिकार गाजवील आणि सर्वसमर्थ
परमेश्वराच्या तीव्र क्रोधरूपी द्राक्षारसाचे कुंड ते तुडवतील. 16 त्यांच्या
वस्त्रावर व मांडीवर हे नाव लिहिलेले होते: राजांचा राजा आणि प्रभूंचा
प्रभू. 17 नंतर मी एका देवदूताला सूर्यामध्ये उभा राहिलेला पाहिले. तो
अंतराळातील मध्यभागी उडणाऱ्या सर्व पक्ष्यांना उच्च वाणीने म्हणाला,
“या, परमेश्वराच्या महान मेजवानीसाठी एकत्र व्हा! 18 या आणि
राजांचे, कप्तानांचे व मोठमोठ्या सेनाधिकाऱ्यांचे मांस खा! घोड्यांचे व
त्यावरील स्वारांचे, सर्व लहान, थोर, स्वतंत्र, दास यांचे मांस खावयास
या.” 19 तेव्हा तो पशू, पृथ्वीवरील राजे व त्यांची सैन्ये, जो घोड्यावर
बसला होता त्याच्याविरुद्ध आणि त्याच्या सैन्याविरुद्ध युद्ध करण्यासाठी
एकत्र होत असलेले मी पाहिले. 20 त्या पशूला आणि त्याच्याबरोबर त्या
खोट्या भविष्यवाद्याला कैद करण्यात आले. हा खोटा संदेष्टे, पशूच्या
वतीने आपल्या चमत्कारांनी ज्यांनी त्या पशूची खूण धारण केली होती
आणि जे त्याच्या मूर्तीची उपासना करीत असत, त्यांना फसविले होते.


त्या दोघांनाही गंधकाने सतत जळत राहणाऱ्या अग्नीच्या सरोवरात
जिवंत टाकण्यात आले. **(Limnē Pyr g3041 g4442)** 21 जो घोड्यावर
बसलेला स्वार होता त्याच्या मुखातून बाहेर येणाऱ्या तलवारीने बाकी
राहिलेले मारले गेले आणि सगळ्या पक्षांनी आधाशीपणे त्यांचे मांस
खाल्ले.

**20** मग मी एक देवदूत स्वर्गातून खाली उतरतांना पाहिला.
त्याच्याजवळ अथांग कूपाची किल्ली होती. त्याच्या हातात एक
मोठा साखळदंड होता. **(Abyssos g12)** 2 त्याने त्या अजगराला, त्या
पुरातन सापाला, जो पिशाच्च किंवा सैतान आहे त्याला धरले आणि
एक हजार वर्षांसाठी साखळदंडाने जखडून टाकले, 3 आणि अथांग
कूपात टाकले. हा हजार वर्षांचा काळ पूर्ण होईपर्यंत अजगराने इतःपर
कोणत्याही राष्ट्राला फसवू नये म्हणून त्याने अथांग कूप बंद केले
आणि त्याला कुलूप लावून शिक्कामोर्तब केले. त्यानंतर त्याला थोड्या
काळासाठी मोकळे सोडण्यात येईल. **(Abyssos g12)** 4 नंतर ज्यांना
न्याय करण्याचे अधिकार देण्यात आले होते त्यांना मी राजासनावर
बसलेले पाहिले. आणि येशूंच्या साक्षीमुळे व परमेश्वराच्या वचनामुळे
ज्यांचा शिरच्छेद करण्यात आला त्यांचे आत्मे पहिले आणि त्यांनी
त्या पशूला किंवा त्याच्या मूर्तीला नमन केले नव्हते किंवा आपल्या
कपाळावर व हातावर त्याची खूणही घेतली नव्हती. ते पुन्हा जिवंत
झाले होते व त्यांनी ख्रिस्तासह एक हजार वर्षे राज्य केले. 5 हे पाहिले
पुनरुत्थान होय. इतर मृत लोक हजार वर्षे संपेपर्यंत पुन्हा जिवंत झाले
नाहीत 6 पहिल्या पुनरुत्थानात जे वाटेकरी होतात, ते धन्य आणि
पवित्र आहेत, कारण दुसऱ्या मरणाची त्यांच्यावर सत्ता राहणार नाही. ते
परमेश्वराचे व ख्रिस्ताचे याजक होऊन ख्रिस्ताबरोबर एक हजार वर्षे
राज्य करतील. 7 हा हजार वर्षांचा काळ संपल्यावर सैतानाला तुरुंगातून
सोडण्यात येईल, 8 आणि तो पृथ्वीच्या चार कोपऱ्यातील गोग व
मागोग राष्ट्रांस ठकविण्यास व त्यांना लढाईसाठी एकत्र करण्यास बाहेर
जाईल. त्यांची संख्या समुद्र किनाऱ्यावरील वाळूच्या कणांइतकी आहे.
9 त्यांनी पृथ्वीवर सर्वत्र फिरून पवित्र जणांची छावणी व परमेश्वराला
प्रिय असलेले नगर वेढले, परंतु स्वर्गातून अग्नी उतरला आणि त्याने
त्यांना भस्म केले. 10 मग त्यांचा विश्वासघात करणाऱ्या सैतानाला ज्या
सरोवरात तो पशू आणि खोट्या संदेष्ट्यांना आधी टाकले आहे, त्या
अग्नीच्या व जळत्या गंधकाच्या सरोवरात पुन्हा टाकण्यात येईल. तिथे
त्यांना रात्रंदिवस, युगानुयुग यातना भोगाव्या लागतील. **(aiōn g165,**
**Limnē Pyr g3041 g4442)** 11 मग एक भव्य शुभ्र राजासन व त्यावर
बसलेला एकजण माझ्या दृष्टीस पडला. तेव्हा पृथ्वी व आकाशांनी
त्यांच्या समोरून पळ काढला आणि त्यांना कुठेही जागा मिळाली नाही.
12 मग मृत झालेले लहान थोर परमेश्वराच्या आसनासमोर उभे असलेले
मी पाहिले आणि पुस्तके उघडण्यात आली. आणखी एक पुस्तक
उघडण्यात आले जे जीवनाचे पुस्तक होते. पुस्तकात लिहिल्यानुसार
प्रत्येकाच्या कृत्यांप्रमाणे त्यांचा न्याय करण्यात आला. 13 जे लोक
समुद्रात मरण पावले होते, त्यांना समुद्रांनी परत दिले. पृथ्वी व अधोलोक
यांनीही आपल्यातील मृतांना बाहेर सोडले. त्या प्रत्येकाच्या कृत्यांप्रमाणे
त्यांचा न्याय करण्यात आला. **(Hadēs g86)** 14 मरण व अधोलोक
ही अग्नीच्या सरोवरात टाकण्यात आली. अग्नीचे सरोवर म्हणजेच
दुसरे मरण होय. **(Hadēs g86, Limnē Pyr g3041 g4442)** 15 जीवनाच्या
पुस्तकात ज्या कोणाचे नाव लिहिलेले सापडले नाही, त्याला अग्नीच्या
सरोवरात टाकण्यात आले. **(Limnē Pyr g3041 g4442)**

**21** नंतर मी, "एक नवी पृथ्वी व एक नवे आकाश" पाहिले, कारण
पहिले आकाश व पहिल्या पृथ्वीचे अस्तित्व राहिले नसून त्यात
समुद्र अस्तित्वात नव्हते. 2 तेव्हा मी नवे यरुशलेम म्हणजे पवित्र नगरी,
स्वर्गातून परमेश्वरापासून उतरतांना पाहिली, ती वरासाठी शृंगारलेल्या
वधूप्रमाणे सजविलेली होती. 3 राजासनावरून मला एक मोठी वाणी ऐकू
आली. ती म्हणाली, "पाहा! परमेश्वराचे वसतिस्थान आता मनुष्यांबरोबर
आहे; ते स्वतः त्यांच्याबरोबर राहतील; ते त्यांचे लोक होतील; आणि ते
त्यांचे परमेश्वर होतील. 4 'ते त्यांच्या डोळ्यांतील प्रत्येक अश्रू पुसून
टाकतील आणि आता मृत्यू,' दुःख, रडणे व वेदना अस्तित्वात राहणार
नाहीत. या सर्व जुन्या गोष्टी कायमच्या नाहीशा झाल्या आहेत." 5
जे राजासनावर बसले होते ते म्हणाले, "मी सर्वकाही नवीन करीत
आहे!" मग ते म्हणाले, "हे लिहून घे; कारण ही वचने विश्वसनीय आणि
सत्य आहेत." 6 ते मला म्हणाले, "सर्वकाही पूर्ण झाले आहे! मीच
अल्फा व ओमेगा, प्रारंभ आणि शेवट आहे. तान्हेल्या सर्व लोकांना
मी जीवनाच्या झऱ्याचे पाणी मोफत देईन. 7 जो विजय मिळवितो
त्याला या सर्व गोष्टींचा वारसा मिळेल. मी त्यांचा परमेश्वर होईन आणि
ते माझी संतती होतील. 8 परंतु भेकड, विश्वासहीन, अशुद्ध, खून
करणारे, जारकर्मी, चेटकी, मूर्तिपूजक व सर्व लबाड—अशा माणसांच्या
वाट्यास अग्नीचे व गंधकाचे सरोवर येईल. हेच ते दुसरे मरण होय."
**(Limnē Pyr g3041 g4442)** 9 मग शेवटच्या सात पीडांनी भरलेल्या
वाट्या ओतणाऱ्या सात देवदूतांपैकी एक देवदूत माझ्याकडे येऊन मला
म्हणाला, "चल, माझ्याबरोबर ये, म्हणजे मी तुला वधू—कोकऱ्याची
पत्नी दाखवितो." 10 तेव्हा मी आत्म्याने संचारित झालो आणि मला
एका उंच व विशाल अशा पर्वतशिखरावर नेण्यात आले. तिथून मी ती
पवित्र नगरी म्हणजे यरुशलेम, स्वर्गातून परमेश्वरापासून उतरतांना
पाहिली. 11 ती परमेश्वराच्या गौरवाने भरली होती, एखाद्या रत्नाप्रमाणे
चमकत होती; यास्फे खड्यासारखी स्फटीकशुभ्र होती. 12 तिचे तट
रुंद व उंच होते. तिला बारा मोठमोठ्या वेशी असून त्यावर बारा देवदूत
पहारा करीत होते. त्या वेशींवर इस्राएलच्या बारा वंशांची नावे लिहिलेली
होती. 13 उत्तरेकडे तीन, दक्षिणेकडे तीन, पूर्वेकडे तीन व पश्चिमेकडे
तीन वेशी होत्या. 14 नगरीच्या तटबंदीला बारा पाये होते. या पायांवर
कोकऱ्याच्या बारा प्रेषितांची नावे लिहिलेली होती. 15 नगरी, वेशी व
तटबंदी यांचे मोजमाप घेण्यासाठी देवदूताच्या हातामध्ये सोन्याची एक
मोजकाठी होती. 16 ती नगरी चौरस होती. म्हणजे तिची लांबी जितकी
होती तितकीच तिची रुंदी होती, देवदूताने नगरीचे माप काठीने घेतले. ते
लांबीला 2,200 किलोमीटर भरले. तिची रुंदी व उंची समान होती. 17

मग त्याने भिंतीची जाडी मोजली. ती या टोकापासून त्या टोकापर्यंत 65
मीटर होती. देवदूताने मानवी परिमाणांत ही तटबंदी मोजली. 18 नगरीचा
तट यास्फे रत्नाचा होता आणि ती शुद्ध काचेसारख्या पारदर्शक सोन्याची
होती. 19 तिच्या तटाच्या पायाचे बारा थर होते. ते रत्नजडित शीलांनी
बांधलेले होते. पहिला थर यास्फे रत्नाचा, दुसरा नीलमण्याचा, तिसरा
स्फटिकचा, चौथा पाचूचा, 20 पाचवा गोमेद रत्नाचा, सहावा सार्दि,
सातवा लसणा, आठवा वैडूर्य मण्याचा, नववा पुष्कराजाचा, दहावा सोन
लसणीचा, अकरावा याकींथ रत्नाचा व बारावा पद्मराग रत्नाचा होता.
21 बारा वेशी बारा मोत्यांच्या होत्या. प्रत्येक वेस एकाच मोत्याची होती.
शहराचा विशाल राजमार्ग काचेसारखा पारदर्शक शुद्ध सोन्याचा होता.
22 नगरीत कुठे मंदिर दृष्टीस पडत नव्हते, कारण सर्वसमर्थ प्रभू परमेश्वर
आणि कोकरा हेच तिथे मंदिर होते. 23 नगरीला प्रकाश देण्यासाठी
सूर्यचंद्राची गरज नाही, कारण परमेश्वराचे गौरव तिला प्रकाश देते आणि
कोकरा तिचा दिवा आहे. 24 राष्ट्रे त्यांच्या प्रकाशाने चालतील आणि
पृथ्वीवरील राजे त्यांचे वैभव तिथे आणतील. 25 तिच्या वेशी दिवसा बंद
होत नाहीत; तिथे रात्र नाहीच. 26 सर्व राष्ट्रांचे वैभव आणि प्रतिष्ठा,
नगरीमध्ये आणण्यात येईल. 27 मात्र त्या नगरीत कोणतीही अपवित्र
गोष्ट, लज्जास्पद किंवा असत्य आचरण करणाऱ्यांचा प्रवेश होणार
नाही. परंतु ज्यांची नावे कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात लिहिलेली
आहेत, असे लोकच या नगरीत प्रवेश करतील.

**22** मग देवदूताने मला जीवनाच्या पाण्याची नदी दाखविली. तिचे
पाणी स्फटिकासारखे नितळ होते. परमेश्वर आणि कोकरा यांच्या
राजासनांतून ती निघाली होती. 2 राजमार्गाच्या मध्यावरून ती वाहत
होती. नदीच्या दोन्ही बाजूंना जीवनदायी वृक्ष उभे होते, त्यांना वर्षातून
बारा वेळा बहर येई. प्रत्येक महिन्याला त्यांना नवी फळे येत. त्यांची
पाने राष्ट्रांना निरोगी करण्यासाठी औषध म्हणून वापरली जात. 3
तिथे कोणतेही शाप असणार नाही, कारण परमेश्वराचे व कोकऱ्याचे
सिंहासन त्या शहरात असेल आणि त्यांचे सेवक त्यांची सेवा करतील.
4 ते त्यांचे मुख पाहतील व त्यांचे नाव त्यांच्या कपाळावर लिहिलेले
असेल. 5 तिथे रात्र असणार नाही, दिव्यांची किंवा सूर्यप्रकाशाची
तिथे गरज पडणार नाही, कारण प्रत्यक्ष प्रभू परमेश्वरच त्यांचा प्रकाश
होतील आणि ते युगानुयुग राज्य करतील. (aiōn g165) 6 नंतर तो
देवदूत मला म्हणाला, “ही वचने सत्य व विश्वसनीय आहेत आणि
संदेष्ट्यांना अंत:स्फूर्ती देणाऱ्या प्रभू परमेश्वरांनी ज्यागोष्टी लवकर
घडून आल्या पाहिजेत, त्या त्यांच्या सेवकांना कळविण्यासाठी त्यांच्या
दूताला पाठविले आहे.” 7 “पाहा, मी लवकर येतो! जो कोणी या
पुस्तकात लिहिलेली भविष्यवचनाचे पालन करतो तो धन्य.” 8 मी,
योहानाने या सर्वगोष्टी ऐकल्या व पाहिल्या आणि ज्या देवदूताने मला
त्या दाखविल्या, त्याला नमन करण्यासाठी मी त्याच्या पायांवर उपडा
पडलो. 9 परंतु तो मला म्हणाला, “असे करू नकोस. संदेष्टे व या
पुस्तकातील वचने पाळणारे लोक यांच्या सोबतीचा मी सेवकबंधू आहे.
तू परमेश्वराची आराधना कर.” 10 नंतर त्याने मला सांगितले, “या
पुस्तकातील भविष्यकथनाचे शब्द शिक्का मारून बंद करू नकोस,
कारण वेळ जवळ आली आहे. 11 अनाचारी अधिक अनाचार करोत,
दुष्ट अधिक दुष्ट बनोत, न्यायी लोक अधिक नीतिमान होवोत व जे पवित्र
आहेत, ते पवित्रतेत अधिकाधिक दृढ होवोत.” 12 “पाहा, मी लवकर
येत आहे! माझे प्रतिफळ मी बरोबर घेऊन येत आहे. प्रत्येक व्यक्तीला
त्यांच्या कर्मानुसार देईन. 13 मीच अल्फा व ओमेगा, प्रारंभ आणि शेवट,
आदि व अंत आहे. 14 “आपल्याला जीवनाच्या झाडावर अधिकार
मिळावा व वेशीतून नगरीत प्रवेश मिळावा म्हणून जे आपली वस्त्रे धुतात
ते धन्य. 15 नगराच्या बाहेर कुत्रे व जादूटोणा करणारे, जारकर्मी, खुनी,
मूर्तिपूजक, ज्यांना लबाडी प्रिय आहे असे लबाडी करणारे सर्वजण
राहतील. 16 “तू हे सर्व मंडळयांना सांगावे म्हणून मी येशूने, माझा
दूत तुझ्याकडे साक्षीदार म्हणून पाठविला आहे. मी दावीदाचे मूळ व
त्याचा वंश आहे. मी पहाटेचा तेजस्वी तारा आहे.” 17 आत्मा व वधू
म्हणतात “ये!” हा शब्द ऐकणारा प्रत्येकजण म्हणो, “ये!” कोणाही
तान्हेल्याने यावे आणि कोणतेही मोल न देता जीवनाचे पाणी हवे तेवढे
प्यावे. 18 या पुस्तकातील संदेश ऐकणाऱ्या प्रत्येकाला मी सावध
करतो: या ग्रंथपटात जे लिहिले आहे त्यात कोणी भर घातली, तर
परमेश्वर त्याच्यावर या पुस्तकात लिहिलेल्या पीडा आणेल. 19 तसेच
जो कोणी या भविष्यकथनच्या पुस्तकात वर्णन केलेल्या वचनांतून
काही काढून टाकील, परमेश्वर त्याचा वाटा या पुस्तकात वर्णिलेल्या
जीवनाच्या झाडातून व पवित्र नगरीतून काढून टाकील. 20 ज्यांनी या
गोष्टी सांगितल्या आहेत, ते जाहीरपणे म्हणतात, “होय, मी लवकर येत
आहे!” आमेन! हे प्रभू येशू, या! 21 आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा
परमेश्वराच्या लोकांवर असो. आमेन.




तेव्हा मी नवे यरुशलेम म्हणजे पवित्र नगरी, स्वर्गातून परमेश्वरापासून उतरतांना पाहिली, ती वरासाठी शृंगारलेल्या वधूप्रमाणे सजविलेली होती. राजासनावरून मला एक मोठी वाणी ऐकू आली. ती म्हणाली, “पाहा! परमेश्वराचे वसतिस्थान आता मनुष्यांबरोबर आहे; ते स्वतः त्यांच्याबरोबर राहतील; ते त्यांचे लोक होतील; आणि ते त्यांचे परमेश्वर होतील.”
प्रकटीकरण 21:2-3

# वाचकांसाठी मार्गदर्शक

मराठी at AionianBible.org/Readers-Guide

The Aionian Bible republishes public domain and Creative Common Bible texts that are 100% free to copy and print. The original translation is unaltered and notes are added to help your study. The notes show the location of eleven special Greek and Hebrew Aionian Glossary words to help us better understand God's love for individuals and for all mankind, and the nature of afterlife destinies.

Who has the authority to interpret the Bible and examine the underlying Hebrew and Greek words? That is a good question! We read in 1 John 2:27, *"As for you, the anointing which you received from him remains in you, and you do not need for anyone to teach you. But as his anointing teaches you concerning all things, and is true, and is no lie, and even as it taught you, you remain in him."* Every Christian is qualified to interpret the Bible! Now that does not mean we will all agree. Each of us is still growing in our understanding of the truth. However, it does mean that there is no infallible human or tradition to answer all our questions. Instead the Holy Spirit helps each of us to know the truth and grow closer to God and each other.

The Bible is a library with 66 books in the Protestant Canon. The best way to learn God's word is to read entire books. Read the book of Genesis. Read the book of John. Read the entire Bible library. Topical studies and cross-referencing can be good. However, the safest way to understand context and meaning is to read whole Bible books. Chapter and verse numbers were added for convenience in the 16th century, but unfortunately they can cause the Bible to seem like an encyclopedia. The Aionian Bible is formatted with simple verse numbering, minimal notes, and no cross-referencing in order to encourage the reading of Bible books.

Bible reading must also begin with prayer. Any Christian is qualified to interpret the Bible with God's help. However, this freedom is also a responsibility because without the Holy Spirit we cannot interpret accurately. We read in 1 Corinthians 2:13-14, *"And we speak of these things, not with words taught by human wisdom, but with those taught by the Spirit, comparing spiritual things with spiritual things. Now the natural person does not receive the things of the Spirit of God, for they are foolishness to him, and he cannot understand them, because they are spiritually discerned."* So we cannot understand in our natural self, but we can with God's help through prayer.

The Holy Spirit is the best writer and he uses literary devices such as introductions, conclusions, paragraphs, and metaphors. He also writes various genres including historical narrative, prose, and poetry. So Bible study must spiritually discern and understand literature. Pray, read, observe, interpret, and apply. Finally, *"Do your best to present yourself approved by God, a worker who does not need to be ashamed, properly handling the word of truth."* 2 Timothy 2:15. *"God has granted to us his precious and exceedingly great promises; that through these you may become partakers of the divine nature, having escaped from the corruption that is in the world by lust. Yes, and for this very cause adding on your part all diligence, in your faith supply moral excellence; and in moral excellence, knowledge; and in knowledge, self-control; and in self-control patience; and in patience godliness; and in godliness brotherly affection; and in brotherly affection, love. For if these things are yours and abound, they make you to be not idle nor unfruitful to the knowledge of our Lord Jesus Christ,"* 2 Peter 1:4-8.

# शब्दकोष

मराठी at AionianBible.org/Glossary

The Aionian Bible un-translates and instead transliterates eleven special words to help us better understand the extent of God's love for individuals and all mankind, and the nature of afterlife destinies. The original translation is unaltered and a note is added to 64 Old Testament and 200 New Testament verses. Compare the meanings below to the Strong's Concordance and Glossary definitions.

***Abyssos*** g12
*Greek:* proper noun, place
*Usage:* 9 times in 3 books, 6 chapters, and 9 verses
*Meaning:*
Temporary prison for special fallen angels such as Apollyon, the Beast, and Satan.

***aïdios*** g126
*Greek:* adjective
*Usage:* 2 times in Romans 1:20 and Jude 6
*Meaning:*
Lasting, enduring forever, eternal.

***aiōn*** g165
*Greek:* noun
*Usage:* 127 times in 22 books, 75 chapters, and 102 verses
*Meaning:*
A lifetime or time period with a beginning and end, an era, an age, the completion of which is beyond human perception, but known only to God the creator of the aiōns, Hebrews 1:2. Never meaning simple endless or infinite chronological time in Greek usage. Read Dr. Heleen Keizer and Ramelli and Konstan for proofs.

***aiōnios*** g166
*Greek:* adjective
*Usage:* 71 times in 19 books, 44 chapters, and 69 verses
*Meaning:*
From start to finish, pertaining to the age, lifetime, entirety, complete, or even consummate. Never meaning simple endless or infinite chronological time in Koine Greek usage. Read Dr. Heleen Keizer and Ramelli and Konstan for proofs.

***eleēsē*** g1653
*Greek:* verb, aorist tense, active voice, subjunctive mood, 3rd person singular
*Usage:* 1 time in this conjugation, Romans 11:32
*Meaning:*
To have pity on, to show mercy. Typically, the subjunctive mood indicates possiblity, not certainty. However, a subjunctive in a purpose clause is a resulting action as certain as the causal action. The subjunctive in a purpose clause functions as an indicative, not an optative. Thus, the grand conclusion of grace theology in Romans 11:32 must be clarified. God's mercy on all is not a possibility, but a certainty. See ntgreek.org.

***Geenna*** g1067
*Greek:* proper noun, place
*Usage:* 12 times in 4 books, 7 chapters, and 12 verses
*Meaning:*
Valley of Hinnom, Jerusalem's trash dump, a place of ruin, destruction, and judgment in this life, or the next, though not eternal to Jesus' audience.

***Hadēs*** g86
*Greek:* proper noun, place
*Usage:* 11 times in 5 books, 9 chapters, and 11 verses
*Meaning:*
Synonomous with Sheol, though in New Testament usage Hades is the temporal place of punishment for deceased unbelieving mankind, distinct from Paradise for deceased believers.

***Limnē Pyr*** g3041 g4442
*Greek:* proper noun, place
*Usage:* Phrase 5 times in the New Testament
*Meaning:*
Lake of Fire, final punishment for those not named in the Book of Life, prepared for the Devil and his angels, Matthew 25:41.

***Sheol*** h7585
*Hebrew:* proper noun, place
*Usage:* 66 times in 17 books, 50 chapters, and 64 verses
*Meaning:*
The grave or temporal afterlife world of both the righteous and unrighteous, believing and unbelieving, until the general resurrection.

***Tartaroō*** g5020
*Greek:* proper noun, place
*Usage:* 1 time in 2 Peter 2:4
*Meaning:*
Temporary prison for particular fallen angels awaiting final judgment.

# शब्दकोष +

AionianBible.org/Bibles/Marathi---Marathi-Indian-Bible/Noted

Glossary references are below. Strong's Hebrew and Greek number notes are added to 64 Old Testament and 200 New Testament verses. Questioned verse translations do not contain Aionian Glossary words and may wrongly imply *eternal* or *Hell*. * The note placement is skipped or adjusted for verses with non-standard numbering.

## Abyssos

लूक 8:31
रोमकरांस 10:7
प्रकटीकरण 9:1
प्रकटीकरण 9:2
प्रकटीकरण 9:11
प्रकटीकरण 11:7
प्रकटीकरण 17:8
प्रकटीकरण 20:1
प्रकटीकरण 20:3

## aïdios

रोमकरांस 1:20
यहूदा 1:6

## aiōn

मत्तय 12:32
मत्तय 13:22
मत्तय 13:39
मत्तय 13:40
मत्तय 13:49
मत्तय 21:19
मत्तय 24:3
मत्तय 28:20
मार्क 3:29
मार्क 4:19
मार्क 10:30
मार्क 11:14
लूक 1:33
लूक 1:55
लूक 1:70
लूक 16:8
लूक 18:30
लूक 20:34
लूक 20:35
योहान 4:14
योहान 6:51
योहान 6:58
योहान 8:35
योहान 8:51
योहान 8:52
योहान 9:32
योहान 10:28
योहान 11:26
योहान 12:34
योहान 13:8
योहान 14:16
प्रेषित 3:21
प्रेषित 15:18
रोमकरांस 1:25
रोमकरांस 9:5
रोमकरांस 11:36
रोमकरांस 12:2
रोमकरांस 16:27
1 करिंथकरांस 1:20
1 करिंथकरांस 2:6
1 करिंथकरांस 2:7
1 करिंथकरांस 2:8
1 करिंथकरांस 3:18
1 करिंथकरांस 8:13
1 करिंथकरांस 10:11
2 करिंथकरांस 4:4
2 करिंथकरांस 9:9
2 करिंथकरांस 11:31
गलातीकरांस 1:4
गलातीकरांस 1:5
इफिसकरांस 1:21
इफिसकरांस 2:2
इफिसकरांस 2:7
इफिसकरांस 3:9
इफिसकरांस 3:11
इफिसकरांस 3:21
इफिसकरांस 6:12
फिलिप्पैकरांस 4:20
कलस्सैकरांस 1:26
1 तीमथ्य 1:17
1 तीमथ्य 6:17
2 तीमथ्य 4:10
2 तीमथ्य 4:18
तीता 2:12
इब्री 1:2
इब्री 1:8
इब्री 5:6
इब्री 6:5
इब्री 6:20
इब्री 7:17
इब्री 7:21
इब्री 7:24
इब्री 7:28
इब्री 9:26
इब्री 11:3
इब्री 13:8
इब्री 13:21
1 पेत्र 1:23
1 पेत्र 1:25
1 पेत्र 4:11
1 पेत्र 5:11
2 पेत्र 3:18
1 योहान 2:17
2 योहान 1:2
यहूदा 1:13
यहूदा 1:25
प्रकटीकरण 1:6
प्रकटीकरण 1:18
प्रकटीकरण 4:9
प्रकटीकरण 4:10
प्रकटीकरण 5:13
प्रकटीकरण 7:12
प्रकटीकरण 10:6
प्रकटीकरण 11:15
प्रकटीकरण 14:11
प्रकटीकरण 15:7
प्रकटीकरण 19:3
प्रकटीकरण 20:10
प्रकटीकरण 22:5

## aiōnios

मत्तय 18:8
मत्तय 19:16
मत्तय 19:29
मत्तय 25:41
मत्तय 25:46
मार्क 3:29
मार्क 10:17
मार्क 10:30
लूक 10:25
लूक 16:9
लूक 18:18
लूक 18:30
योहान 3:15
योहान 3:16
योहान 3:36
योहान 4:14
योहान 4:36
योहान 5:24
योहान 5:39
योहान 6:27
योहान 6:40
योहान 6:47
योहान 6:54
योहान 6:68

योहान 10:28
योहान 12:25
योहान 12:50
योहान 17:2
योहान 17:3
प्रेषित 13:46
प्रेषित 13:48
रोमकरांस 2:7
रोमकरांस 5:21
रोमकरांस 6:22
रोमकरांस 6:23
रोमकरांस 16:25
रोमकरांस 16:26
2 करिंथकरांस 4:17
2 करिंथकरांस 4:18
2 करिंथकरांस 5:1
गलातीकरांस 6:8
2 थेस्सलनीकाकरांस 1:9
2 थेस्सलनीकाकरांस 2:16
1 तीमथ्य 1:16
1 तीमथ्य 6:12
1 तीमथ्य 6:16
2 तीमथ्य 1:9
2 तीमथ्य 2:10
तीता 1:2
तीता 3:7
फिलेमोन 1:15
इब्री 5:9
इब्री 6:2
इब्री 9:12
इब्री 9:14
इब्री 9:15
इब्री 13:20
1 पेत्र 5:10
2 पेत्र 1:11
1 योहान 1:2
1 योहान 2:25
1 योहान 3:15
1 योहान 5:11
1 योहान 5:13
1 योहान 5:20
यहूदा 1:7
यहूदा 1:21
प्रकटीकरण 14:6

## *eleēsē*

रोमकरांस 11:32

## *Geenna*

मत्तय 5:22
मत्तय 5:29
मत्तय 5:30
मत्तय 10:28
मत्तय 18:9
मत्तय 23:15
मत्तय 23:33
मार्क 9:43
मार्क 9:45
मार्क 9:47
लूक 12:5
याकोब 3:6

## *Hadēs*

मत्तय 11:23
मत्तय 16:18
लूक 10:15
लूक 16:23
प्रेषित 2:27
प्रेषित 2:31
1 करिंथकरांस 15:55
प्रकटीकरण 1:18
प्रकटीकरण 6:8
प्रकटीकरण 20:13
प्रकटीकरण 20:14

## *Limnē Pyr*

प्रकटीकरण 19:20
प्रकटीकरण 20:10
प्रकटीकरण 20:14
प्रकटीकरण 20:15
प्रकटीकरण 21:8

## *Sheol*


उत्पत्ती 37:35
उत्पत्ती 42:38
उत्पत्ती 44:29
उत्पत्ती 44:31
गणना 16:30
गणना 16:33
अनुवाद 32:22
1 शमुवेल 2:6
2 शमुवेल 22:6
1 राजे 2:6
1 राजे 2:9
इय्योब 7:9
इय्योब 11:8
इय्योब 14:13
इय्योब 17:13
इय्योब 17:16
इय्योब 21:13
इय्योब 24:19
इय्योब 26:6
स्तोत्रसंहिता 6:5
स्तोत्रसंहिता 9:17
स्तोत्रसंहिता 16:10
स्तोत्रसंहिता 18:5
स्तोत्रसंहिता 30:3
स्तोत्रसंहिता 31:17
स्तोत्रसंहिता 49:14
स्तोत्रसंहिता 49:15
स्तोत्रसंहिता 55:15
स्तोत्रसंहिता 86:13
स्तोत्रसंहिता 88:3
स्तोत्रसंहिता 89:48
स्तोत्रसंहिता 116:3
स्तोत्रसंहिता 139:8
स्तोत्रसंहिता 141:7
नीतिसूत्रे 1:12
नीतिसूत्रे 5:5
नीतिसूत्रे 7:27
नीतिसूत्रे 9:18
नीतिसूत्रे 15:11
नीतिसूत्रे 15:24
नीतिसूत्रे 23:14
नीतिसूत्रे 27:20
नीतिसूत्रे 30:16
उपदेशक 9:10
गीतरत्न 8:6
यशायाह 5:14
यशायाह 7:11
यशायाह 14:9
यशायाह 14:11
यशायाह 14:15
यशायाह 28:15
यशायाह 28:18
यशायाह 38:10
यशायाह 38:18
यशायाह 57:9
यहेज्केल 31:15
यहेज्केल 31:16
यहेज्केल 31:17
यहेज्केल 32:21
यहेज्केल 32:27
होशेय 13:14
आमोस 9:2
योनाह 2:2
हबक्कूक 2:5

## *Tartaroō*


2 पेत्र 2:4

## *Questioned*


None yet noted




जेव्हा परमेश्वराने त्याला वारसाचे अभिवचन दिलेल्या देशात जाण्यास सांगितले, तेव्हा अब्राहामाने आपण कुठे जात आहोत हे माहीत नसतानाही विश्वासाने आज्ञापालन केले. - इब्री 11:8




शेवटी फारोहने जेव्हा लोकांस जाऊ दिले, तेव्हा परमेश्वराने त्यांना पलिष्ट्यांच्या देशातून जवळचा मार्ग असूनही तिथून चालविले नाही. कारण परमेश्वर म्हणाले,
“जर युद्धाला सामोरे जावे लागले तर त्यांचे मन बदलेल व ते पुन्हा इजिप्तकडे जातील.” - निर्गम 13:17




मी मानवपुत्र, सेवा करवून घ्यावयास नाही, तर सेवा करावयास आणि पुष्कळांच्या उद्धारासाठी आपला जीव खंडणी म्हणून द्यावयास आलो आहे. - मार्क 10:45




मी पौल, ख्रिस्त येशूंचा दास, प्रेषित होण्यास पाचारलेला आणि परमेश्वराच्या शुभवार्तेसाठी वेगळा केलेला - रोमकरांस 1:1

## Creation 4004 B.C.

| | |
|---|---|
| Adam and Eve created | 4004 |
| Tubal-cain forges metal | 3300 |
| Enoch walks with God | 3017 |
| Methuselah dies at age 969 | 2349 |
| God floods the Earth | 2349 |
| Tower of Babel thwarted | 2247 |
| Abraham sojourns to Canaan | 1922 |
| Jacob moves to Egypt | 1706 |
| Moses leads Exodus from Egypt | 1491 |
| Gideon judges Israel | 1245 |
| Ruth embraces the God of Israel | 1168 |
| David installed as King | 1055 |
| King Solomon builds the Temple | 1018 |
| Elijah defeats Baal's prophets | 896 |
| Jonah preaches to Nineveh | 800 |
| Assyrians conquer Israelites | 721 |
| King Josiah reforms Judah | 630 |
| Babylonians capture Judah | 605 |
| Persians conquer Babylonians | 539 |
| Cyrus frees Jews, rebuilds Temple | 537 |
| Nehemiah rebuilds the wall | 454 |
| Malachi prophecies the Messiah | 416 |
| Greeks conquer Persians | 331 |
| Seleucids conquer Greeks | 312 |
| Hebrew Bible translated to Greek | 250 |
| Maccabees defeat Seleucids | 165 |
| Romans subject Judea | 63 |
| Herod the Great rules Judea | 37 |

(The Annals of the World, James Uusher)

## Jesus Christ born 4 B.C.

## New Heavens and Earth

| | |
|---|---|
| | Christ returns for his people |
| 1956 | Jim Elliot martyrd in Ecuador |
| 1830 | John Williams reaches Polynesia |
| 1731 | Zinzendorf leads Moravian mission |
| 1614 | Japanese kill 40,000 Christians |
| 1572 | Jesuits reach Mexico |
| 1517 | Martin Luther leads Reformation |
| 1455 | Gutenberg prints first Bible |
| 1323 | Franciscans reach Sumatra |
| 1276 | Ramon Llull trains missionaries |
| 1100 | Crusades tarnish the church |
| 1054 | The Great Schism |
| 997 | Adalbert marytyrd in Prussia |
| 864 | Bulgarian Prince Boris converts |
| 716 | Boniface reaches Germany |
| 635 | Alopen reaches China |
| 569 | Longinus reaches Alodia / Sudan |
| 432 | Saint Patrick reaches Ireland |
| 397 | Carthage ratifies Bible Canon |
| 341 | Ulfilas reaches Goth / Romania |
| 325 | Niceae proclaims God is Trinity |
| 250 | Denis reaches Paris, France |
| 197 | Tertullian writes Christian literature |
| 70 | Titus destroys the Jewish Temple |
| 61 | Paul imprisoned in Rome, Italy |
| 52 | Thomas reaches Malabar, India |
| 39 | Peter reaches Gentile Cornelius |
| 33 | Holy Spirit empowers the Church |

(Wikipedia, Timeline of Christian missions)

## Resurrected 33 A.D.

<table>
<tr><th colspan="3" rowspan="3">Where?<br>Who?</th><th colspan="8">When?</th></tr>
<tr><th colspan="2">Innocence</th><th colspan="4">Fallen</th><th colspan="2">Glory</th></tr>
<tr><th>Eternity Past</th><th>4000 BC Creation</th><th>Fall to Sin No Law</th><th>1500 BC Moses' Law</th><th>Advent of Christ 0-33 AD</th><th>Church Age Kingdom Age</th><th>Great White Throne</th><th>New Heaven and Earth</th></tr>
<tr><td rowspan="11">Who?</td><td rowspan="3">God</td><td>Father</td><td rowspan="3">God's Perfect Fellowship<br><br>John 10:30</td><td rowspan="7">God's Perfect Fellowship with Adam in the Garden of Eden<br><br>No Fall<br>No Death<br><br>Gen 1:31</td><td colspan="4">Living in Unapproachable Light, 1 Timothy 6:16</td><td rowspan="7">God's Perfectly Restored Fellowship with All Mankind in the Holy City<br><br>No Hades<br>No Dead<br><br>Rev 20:3</td><td rowspan="7">All Restored<br><br>Acts 3:21</td></tr>
<tr><td>Son</td><td colspan="2">Pre-Incarnate, John 8:58</td><td>Incarnate, John 1:14</td><td>Paradise, Luke 23:43</td></tr>
<tr><td>Holy Spirit</td><td colspan="2">Everywhere, Psalm 139:7</td><td colspan="2">Indwelling Believers, John 14:17</td></tr>
<tr><td rowspan="3">Mankind</td><td>Living Mankind</td><td rowspan="8">No Creation<br><br>No people<br><br>Gen 1:1</td><td colspan="4">Serving the Savior or Satan on Earth, Ephesians 2:1-5</td></tr>
<tr><td>Deceased Believing Mankind</td><td colspan="4">Blessed in Paradise, Luke 16:22</td></tr>
<tr><td>Deceased Unbelieving Mankind</td><td colspan="4">Punished in Hades until the final judgment, Luke 16:23 and Rev 20:13</td></tr>
<tr><td rowspan="6">Angels</td><td>Holy Angels</td><td colspan="4">Serving Mankind at God's Command, Hebrews 1:14</td></tr>
<tr><td>Imprisoned Angels</td><td rowspan="5">No Fall<br><br>No Unholy Angels<br><br>Gen 1:31</td><td colspan="4">Imprisoned in Tartarus, 2 Peter 2:4 and Jude 6</td><td rowspan="5">Lake of Fire Prepared for the Devil and his Angels<br><br>Mat 25:41<br>Rev 20:10</td><td rowspan="5">Fallen Angels Forgiven?<br><br>Col 1:20<br>Yes?<br><br>Heb 2:16<br>No?</td></tr>
<tr><td>Fugitive Angels</td><td colspan="3" rowspan="4">Rebelling Against Christ<br><br>Accusing Mankind<br><br>1 Peter 5:8 and Revelation 12:10</td><td>Thalaasa, Rev 20:13</td></tr>
<tr><td>First Beast Demon</td><td rowspan="2">Lake of Fire<br>Revelation 19:20</td></tr>
<tr><td>False Prophet Demon</td></tr>
<tr><td>Satan</td><td>Abyss<br>Revelation 20:2</td></tr>
</table>

# नशीब

मराठी at AionianBible.org/Destiny

The Aionian Bible shows the location of eleven special Greek and Hebrew Aionian Glossary words to help us better understand God's love for individuals and for all mankind, and the nature of after-life destinies. The underlying Hebrew and Greek words typically translated as *Hell* show us that there are not just two after-life destinies, Heaven or Hell. Instead, there are a number of different locations, each with different purposes, different durations, and different inhabitants. Locations include 1) Old Testament *Sheol* and New Testament *Hadēs*, 2) *Geenna*, 3) *Tartaroō*, 4) *Abyssos*, 5) *Limnē Pyr*, 6) *Paradise*, 7) *The New Heaven*, and 8) *The New Earth*. So there is reason to review our conclusions about the destinies of redeemed mankind and fallen angels.

The key observation is that fallen angels will be present at the final judgment, 2 Peter 2:4 and Jude 6. Traditionally, we understand the separation of the Sheep and the Goats at the final judgment to divide believing from unbelieving mankind, Matthew 25:31-46 and Revelation 20:11-15. However, the presence of fallen angels alternatively suggests that Jesus is separating redeemed mankind from the fallen angels. We do know that Jesus is the helper of mankind and not the helper of the Devil, Hebrews 2. We also know that Jesus has atoned for the sins of all mankind, both believer and unbeliever alike, 1 John 2:1-2. Deceased believers are rewarded in Paradise, Luke 23:43, while unbelievers are punished in Hades as the story of Lazarus makes plain, Luke 16:19-31. Yet less commonly known, the punishment of this selfish man and all unbelievers is before the final judgment, is temporal, and is punctuated when Hades is evacuated, Revelation 20:13. So is there hope beyond Hades for unbelieving mankind? Jesus promised, *"the gates of Hades will not prevail,"* Matthew 16:18. Paul asks, *"Hades where is your victory?"* 1 Corinthians 15:55. John wrote, *"Hades gives up,"* Revelation 20:13.

Jesus comforts us saying, *"Do not be afraid,"* because he holds the keys to *unlock* death and Hades, Revelation 1:18. Yet too often our *Good News* sounds like a warning to *"be afraid"* because Jesus holds the keys to *lock* Hades! Wow, we have it backwards! Hades will be evacuated! And to guarrantee hope, once emptied, Hades is thrown into the Lake of Fire, never needed again, Revelation 20:14.

Finally, we read that anyone whose name is not written in the Book of Life is thrown into the Lake of Fire, the second death, with no exit ever mentioned or promised, Revelation 21:1-8. So are those evacuated from Hades then, *"out of the frying pan, into the fire?"* Certainly, the Lake of Fire is the destiny of the Goats. But, do not be afraid. Instead, read the Bible's explicit mention of the purpose of the Lake of Fire and the identity of the Goats, *"Then he will say also to those on the left hand, 'Depart from me, you cursed, into the consummate fire which is prepared for... the devil and his angels,'"* Matthew 25:41. Bad news for the Devil. Good news for all mankind!

Faith is not a pen to write your own name in the Book of Life. Instead, faith is the glasses to see that the love of Christ for all mankind has already written our names in Heaven. *"If the first fruit is holy, so is the lump,"* Romans 11:16. Though unbelievers will suffer regrettable punishment in Hades, redeemed mankind will never enter the Lake of Fire, prepared for the devil and his angels. And as God promised, all mankind will worship Christ together forever, Philippians 2:9-11.




यास्तव सर्व राष्ट्रांमध्ये जाऊन शिष्य बनवा आणि त्यांना पित्याच्या, पुत्राच्या आणि पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या; - मत्तय 28:19